This PDF you are browsing now is a digitized copy of rare books and manuscripts from the Jnanayogi Dr. Shrikant Jichkar Knowledge Resource Center Library located in Kavikulaguru Kalidas Sanskrit University Ramtek, Maharashtra.

KKSU University (1997- Present) in Ramtek, Maharashtra is an institution dedicated to the advanced learning of Sanskrit.
The University Collection is offered freely to the Community of Scholars with the intent to promote Sanskrit Learning.

Website
https://kksu.co.in/

Digitization was executed by NMM

https://www.namami.gov.in/

Sincerely,

Prof. Shrinivasa Varkhedi
Hon'ble Vice-Chancellor

Dr. Deepak Kapade
Librarian

Digital Uploaded by eGangotri Digital Preservation Trust, New Delhi
https://egangotri.wordpress.com/

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय ग्रंथालय

हस्तलिखित संग्रह

दाखल क्र. M 2056 विषय पुराण

नांव श्रीमद्भागवत् महापुराण (मुद्रित)

लेखक / लिपीकार —

त 1020 काळ — पूर्ण / अपूर्ण

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अथ श्रीमद्वाल्मीकि[illegible]:

सटीकः सार्थं प्रारभ्यते

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पूर्वी श्रीवेदव्यासांनीं पुष्कळ पुराणें व शास्त्रें रचिलीं; परंतु त्या योगानें त्यांचें मन स्वस्थ होईना व त्यात्याठिकाणीं त्यांस संतोष वाटेना, ह्मणून नारदऋषीच्या उपदेशानें, श्रीमद्भगवंताचे गुण मुख्यत्वेंकरून वारंवार ज्यांत वर्णिले आहेत अशा भागवत शास्त्रास आरंभ करण्याची इच्छा करणारे श्रीवेदव्यास मुनि, विघ्ननिवृत्ति वगैरे होण्याकरितां ह्याच ग्रंथांत प्रतिपाद्य जी परमात्मा देवता तिचें अनुस्मरणरूप मंगलाचरण करितात- मी, शिष्यांसहवर्तमान त्या परमेश्वराचें ध्यान करितों. त्याचें स्वरूप आणि तटस्थ अशा दोन लक्षणांनीं उपलक्षण करितात, त्यांत स्वरूपलक्षण असें कीं,– ज्या परमेश्वराचें स्वरूप, भूत, भविष्य व वर्तमान या तिन्हीं काळीं सत्य (जन्ममरणादिविकाररहित केवळ ब्रह्मरूप) आहे. याचें कारण, ज्या ब्रह्माचेठिकाणीं, मायेचे तीन गुण जे– तम रज आणि सत्त्व यांपासून अनुक्रमें झालेलीं आकाशादि पंचमहाभूतें, श्रोत्रादिक इंद्रियें व त्यांच्या देवता यांची सृष्टि ही, वस्तुतः खोटी असतांहि, ज्याच्या सत्यतेनें खरी आहे असें भासते. यास दृष्टांत– तेज, उदक आणि मृत्तिका यांचा एकमेकांचेठिकाणीं एकमेकांचा झालेला भास जसा आश्रयभूत पदार्थांच्या खरेपणामुळें खरासा वाटतो, ह्मणजे ते-

---

अथ नानापुराणशास्त्रप्रबंधैश्चित्तप्रसत्तिमलभमानस्तत्रतत्रापरितुष्यन्नारदोपदेशतः श्रीमद्भगवद्गुणानुवर्णनप्रधानं भागवतशास्त्रं प्रारिप्सुर्वेदव्यासस्तत्प्रत्यूहनिवृत्त्यादिसिद्धये तत्प्रतिपाद्यपरदेवतानुस्मरणलक्षणं मंगलमाचरति । जन्माद्यस्येति । परं परमेश्वरं धीमहि । ध्यायतेर्लिङि छांदसं ध्यायेमेत्यर्थः । बहुवचनं शिष्याभिप्रायम् । तमेव स्वरूपतटस्थलक्षणाभ्यामुपलक्षयति । तत्र स्वरूपलक्षणं सत्यमिति । सत्यत्वे हेतुः । यत्र यस्मिन्ब्रह्मणि त्रयाणां मायागुणानां तमोरजःसत्त्वानां सर्गो भूतेंद्रियदेवतारूपोऽमृषा सत्यः यत्सत्यतया मिथ्यासर्गोऽपि सत्यवत्प्रतीयते तं परं सत्यमित्यर्थः । अत्र दृष्टान्तः । तेजोवारिमृदां यथा विनिमय इति । विनिमयो व्यत्ययोऽन्यस्मिन्नन्यावभासः । स यथाधिष्ठानसत्तया सद्वत्प्रतीयत इत्यर्थः । तत्र तेजसि वारिबुद्धिर्मरीचितोये प्रसिद्धा । मृदि काचादौ वारिबुद्धिर्वारिणि च काचादिबुद्धिरित्यादि यथायथमूह्यम् । यद्वा । तस्यैव

जन्माद्यस्य यतोऽन्वयादितरतश्चार्थेष्वभिज्ञः स्वराट् तेने ब्रह्म हृदा य आदिकवये मुह्यंति यत्सूरयः ॥

परमार्थसत्यत्वप्रतिपादनाय तदितरस्य मिथ्यात्वमुक्तम् । यत्र मृषैवायं त्रिसर्गो न वस्तुतः सन्निति । यत्रेत्यनेन प्रतीतमुपाधिसंबंधं वारयति । स्वेनैव धाम्ना महसा निरस्तं कुहकं कपटं मायालक्षणं यस्मिंस्तम् । तटस्थलक्षणमाह । जन्मादीति । अस्य विश्वस्य जन्मस्थितिभंगा यतो भवंति तं धीमहीति । तत्र हेतुः । अन्वयादितरतश्च । अर्थेष्वाकाशादिकार्येषु परमेश्वरस्य सद्रूपेणान्वयादकार्येभ्यश्च खपुष्पादिभ्यस्तद्व्यतिरेकात् । यद्वा अन्वयशब्देनानुवृत्तिरितरशब्देन व्यावृत्तिः । अनुवृत्तत्वात्सद्रूपं ब्रह्म कारणं मृत्सुवर्णादिवत् । व्यावृत्तत्वाद्विश्वं कार्यं घटकुंडलादिवदित्यर्थः । यद्वा । सावयवत्वादन्वयव्यतिरेकाभ्यां यदस्य जन्मादि तद्यतो भवतीति संबंधः । तथा च श्रुतिः । यतो वा इमानि भूतानि जायंते । येन जातानि जीवंति । यत्प्रयंत्यभिसंविशंतीत्याद्या । स्मृतिश्च । यतः सर्वाणि भूतानि भवंत्यादियुगागमे ॥ यस्मिंश्च प्रलयं यांति पुनरेव युगक्षये

जाचेठिकाणीं पाणी भासणें, हें मृगजळाचेठिकाणीं प्रसिद्ध आहे, तेथें वास्तविक पाहूं गेलें असतां, सूर्याचे किरण खरे, पाणी खरें नव्हे, असें असतांहि 'पाणीच खरें' असा भास होतो, ह्यास कारण सूर्यकिरणांची सत्यता होय, तसेंच पाण्यावर कांचेचा भास होतो व कांचेच्या तुकड्यावर पाण्याचा अथवा अग्नीचा भास होतो; हे सर्व भासणारे पदार्थ, खरे नसतांहि त्यांच्या आश्रयभूत पदार्थांच्या ह्मणजे सूर्यकिरण पाणी आणि कांच यांच्या खरेपणामुळें खरेसे भासतात; तसाच भूतें, इंद्रियें आणि देवता यांचा सर्ग, वस्तुतः खरा नसतांहि परमेश्वराच्या सत्यत्वामुळें आपणास खरासा भासतो. किंवा ' यत्र त्रिसर्गो मृषा ' येथें ब्रह्मवस्तूचेंच वास्तविक सत्यत्व सांगण्याकरितां ॥ १
त्याहून इतर पदार्थांचें मिथ्यात्व सांगितलें आहे. तें असें कीं,– ज्या ब्रह्मवस्तूचेठिकाणीं हा त्रिगुणात्मक सर्ग खोटाच आहे, खरा मुळींच नाहीं. एतावता परमा-

३

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ श्रीगणेशाय नमः ॥ ॥ सरस्वतीगणेशांतें वंदूं ज्यांच्या कृपावशें ॥ बुद्धिजाड्य झडे आणि विघ्ननाश घडे सदा ॥ १ ॥ गुरूच्या पादुका वंदूं ज्या शिरीं धरितांच कीं ॥ हृदयीं बोध उपजे संसारभयनाशक ॥ २ ॥ रमाकांतउमाकांतां वंदूं त्यां एकरूप जे ॥ परस्परस्तुतीनें कीं तुष्टती सर्वसिद्धिद ॥ ३ ॥ यथाशक्ति जसे पक्षी फिरती अंबरीं तसें ॥ विष्णूचें यश वर्णावें मानवांनीं असें असे ॥ ४ ॥ श्रीमद्भागवताचा जे संस्कृतार्थ न जाणते ॥ त्यांसाठीं हा प्राकृतार्थ लिहितों मी यथामति ॥ ५ ॥ ॥

प्रथमारंभीं टीकाकार श्रीधरस्वामींनीं इष्टहेतुसिद्ध्यर्थ मंगलाचरण केलें आहे, तें असें- ज्याच्या चरणकमलांतील चिद्रूप मकरंद, परमहंसांनीं सेवन केला आहे व भक्तजनांचें अंतःकरण हें ज्याचें निवासस्थान आहे, त्या श्रीरामचंद्रास मी नमस्कार करितों ॥ १ ॥ ज्याच्या मुखामध्यें सरस्वती आहे, ज्याच्या वक्षःस्थळाचेठिकाणीं (हेमरेखारूपानें) लक्ष्मी आहे व ज्याच्या हृदयांत स्वयंप्रकाश ज्ञान आहे, त्या नृसिंहाची मी उपासना करितों ॥ १ ॥ विश्वाचा सर्ग व विसर्ग इत्यादि नऊ लक्षणांनीं लक्षित व विश्वाला आश्रयभूत जें श्रीकृष्णनामक परमस्वरूप त्यास आम्हीं नमस्कार करितों ॥ २ ॥ परस्परांच्या आत्मत्वामुळें परस्परांची स्तुति ज्यांस प्रिय आहे असे

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ ॐ नमः परमहंसास्वादितचरणकमलचिन्मकरंदाय भक्तजनमानसनिवासाय श्रीरामचंद्राय ॥ वागीशा यस्य वदने लक्ष्मीर्यस्य च वक्षसि ॥ यस्यास्ते हृदये संवित्तं नृसिंहमहं भजे ॥ १ ॥ विश्वसर्गविसर्गादिनवलक्षणलक्षितम् ॥ श्रीकृष्णाख्यं परं धाम जगद्धाम नमाम तत् ॥ २ ॥ माधवोमाधवावीशौ सर्वसिद्धिविधायिनौ ॥ वंदे परस्परात्मानौ परस्परनुतिप्रियौ ॥ ३ ॥ संप्रदायानुरोधेन पौर्वापर्यानुसारतः ॥ श्रीभागवतभावार्थदीपिकेयं प्रतन्यते ॥ ४ ॥ क्वाहं मंदमतिः क्वेदं मंथनं क्षीरवारिधेः ॥ किं तत्र परमाणुर्वै यत्र मज्जति मंदरः ॥ ५ ॥ मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरिम् ॥ यत्कृपा तमहं वंदे परमानंद-माधवम् ॥ ६ ॥ श्रीमद्भागवताभिधः सुरतरुस्तारांकुरः सज्जनिः स्कंधैर्द्वादशभिस्ततः प्रविलसद्भक्त्यालवालोदयः ॥ द्वात्रिंशत्त्रिशतं च यस्य विलसच्छाखाः सहस्राण्यलं पर्णान्यष्टदशेष्टदोऽतिसुलभो वर्वर्ति सर्वोपरि ॥ ७ ॥

जे सर्वसिद्धि देणारे श्रीपति व उमापति ह्यांस मी नमस्कार करितों ॥ ३ ॥ ब्रह्मदेवादिपरंपरेनें प्राप्त झालेल्या संप्रदायाच्या अनुरोधानें व ग्रंथांतील मागच्या व पुढच्या संगतीस अनुसरून श्रीमद्भागवतांतील भावार्थ दाखविणारी ही दीपिका मी करितों ॥ ४ ॥ परंतु मी मंदमति कोणीकडे व हें क्षीरसागराचें मंथन कोणीकडे ! अहो ! जेथें मंदरपर्वतहि बुडून जातो तेथें परमाणूचा पाड काय? ॥ ५ ॥ ज्याची कृपा मुक्याला बोलवित्ये व पांगळ्याकडून पर्वताचें उल्लंघन करवित्ये, त्या परमानंदरूप माधवाला मी वंदन करितों ॥ ६ ॥ अहो ! परमेश्वराच्या कृपेची गोष्ट तर असूंदे ! परंतु, त्याचे गुणानुवाद प्रतिपादन करणाऱ्या ह्या भागवत ग्रंथाच्या फक्त श्रवणादिकांच्या योगानेंसुद्धां चतुर्विध पुरुषार्थांची सिद्धि होते; कारण, ओंकारापासून ज्याचा अंकुर आहे, सत्यस्वरूपी परमेश्वरापासून ज्याची उत्पत्ति आहे, द्वादश स्कंधांनीं जो विस्तृत झाला आहे, उत्कट भक्तिरूप अळ्यामध्यें जो उगवला आहे, ज्याला अतिशय शोभणाऱ्या तीनशें बत्तीस शाखा (अध्याय) आहेत, ज्याला अठरा हजार पानें (श्लोक) आहेत व जो प्राप्त होण्यास अतिशय सुलभ असून इष्ट वस्तु देणारा आहे, ह्मणून हा श्रीमद्भागवतनामक कल्पवृक्ष सर्व पुराणांपेक्षां श्रेष्ठ आहे ॥ ७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मक ब्रह्मविद्यारूप आहे असें दर्शित झालें ॥ १ ॥ असें मंगलाचरण करून या श्रीमद्भागवताचेठिकाणीं श्रोत्यांची प्रवृत्ति होण्यासाठीं, कर्मकांड (यज्ञयागादिक कर्मांचें प्रतिपादन करणारा अनुष्ठानप्रकार), उपासनाकांड (कर्मांगभूत उपासना), आणि ज्ञानकांड (अध्यात्मशास्त्र) या तिहींचें प्रतिपादन करणाऱ्या सर्व शास्त्रांपेक्षां या भागवताचें श्रेष्ठत्व दाखवितात–श्रीनारायणानें प्रथम संक्षेपानें केलेल्या व पुढें व्यासानें विस्तार केलेल्या या सुंदर भागवताचेठायीं, दुसऱ्याचा उत्कर्ष सहन न करणें या मत्सरानें रहित व भूतदयाळू अशा साधूंचा, मोक्षप्राप्तीसुद्धां कोणत्याहि प्रकारचें फळ मिळण्याच्या कामनेनें रहित असा केवळ ईश्वराराधनरूप उत्तम धर्म सांगितला आहे. येणेंकरून कर्मकांडप्रतिपादक शास्त्रांपेक्षां भागवताचें श्रेष्ठत्व सांगितलें. आतां ज्ञानकांडप्रतिपादक शास्त्रांपेक्षांहि याचें श्रेष्ठत्व सांगतात–

पौर्णमास्यां स याति परमं पदम् ॥ अष्टादश सहस्राणि पुराणं तत्प्रकीर्तितम् । पुराणांतरे च । ग्रंथोऽष्टादशसाहस्रो द्वादशस्कंधसंमितः । हयग्रीवब्रह्मविद्या यत्र वृत्रवधस्तथा ॥ गायत्र्या च समारंभस्तद्वै भागवतं विदुः । पद्मपुराणेऽबरीषं प्रति गौतमोक्तिः । अंबरीष शुकप्रोक्तं नित्यं भागवतं शृणु । पठस्व स्वमुखेनापि यदीच्छसि भवक्षयमिति । अत एव भागवतं नामान्यदित्यपि न शंकनीयम् ॥ १ ॥ इदानीं श्रोतृप्रवर्तनाय श्रीभागवतस्य कांडत्रयविषयेभ्यः सर्वशास्त्रेभ्यः श्रैष्ठ्यं दर्शयति । धर्म इति । अत्र श्रीमति सुंदरे भागवते परमो धर्मो निरूप्यते । परमत्वे हेतुः । प्रकर्षेणोज्झितं कैतवं फलाभिसंधिलक्षणं कपटं यस्मिन्सः । प्रशब्देन मोक्षाभिसंधिरपि निरस्तः । केवलमीश्वराराधनलक्षणो धर्मो निरूप्यत इति । अधिकारितोऽपि धर्मस्य परमत्वमाह । निर्मत्सराणां परोत्कर्षासहनं मत्सरस्तद्रहितानाम् । सतां भूतानुकंपिनाम् । एवं कर्मकांडविषयेभ्यः

धर्मः प्रोज्झितकैतवोऽत्र परमो निर्मत्सराणां सतां वेद्यं वास्तवमत्र वस्तु शिवदं तापत्रयोन्मूलनम् ॥
श्रीमद्भागवते महामुनिकृते किंवा परैरीश्वरः सद्यो हृद्यवरुद्ध्यतेऽत्र कृतिभिः शुश्रूषुभिस्तत्क्षणात् ॥ २ ॥

शास्त्रेभ्यः श्रैष्ठ्यमुक्तं ज्ञानकाण्डविषयेभ्योऽपि श्रैष्ठ्यमाह । वेद्यमिति । वास्तवं परमार्थभूतं वस्तु वेद्यं नतु वैशेषिकाणामिव द्रव्यगुणादिरूपम् । यद्वा वास्तवशब्देन वस्तुनोंऽशो जीवो वस्तुनः शक्तिर्माया वस्तुनः कार्यं जगच्च तत्सर्वं वस्त्वेव न ततः पृथगिति वेद्यम् । अयत्नेनैव ज्ञातुं शक्यमित्यर्थः । ततः किमत आह । शिवदं परमसुखदम् । किंच । आध्यात्मिकादितापत्रयोन्मूलनं च । अनेन ज्ञानकांडविषयेभ्यः श्रैष्ठ्यं दर्शितम् । कर्तृतोऽपि श्रैष्ठ्यमाह । महामुनिः श्रीनारायणस्तेन प्रथमं संक्षेपतः कृते । देवताकांडविषयगतं श्रैष्ठ्यमाह । किंवेति । परैः शास्त्रैस्तदुक्तसाधनैर्वेश्वरो हृदि किंवा सद्य एवावरुद्ध्यते स्थिरीक्रियते । वाशब्दः कटाक्षे । किंतु विलंबेन कथंचिदेव । अत्र तु शुश्रूषुभिः श्रोतुमिच्छद्भिरेव तत्क्षणादेवावरुद्ध्यते । इदमेव तर्हि किमिति सर्वे न शृण्वंति तत्राह । कृतिभिरिति । श्रवणेच्छा तु पुण्यैर्विना नोत्पद्यत इत्यर्थः । तस्मादत्र

येथें परमसुख देणारें व आध्यात्मिक, आधिभौतिक आणि आधिदैविक ह्या त्रिविध तापांचा नाश करणारें परमार्थभूत वस्तु, सहज समजलें जातें. अथवा– वस्तु शब्दानें वस्तूचा (ब्रह्माचा) अंश जीव, वस्तूची शक्ति माया आणि वस्तूचें कार्य जग, हें सर्व वस्तूच आहे, त्याहून निराळें नाहीं; असें यत्नावांचून जाणण्यास शक्य आहे. एतावता ज्ञानकांडविषयक शास्त्रांपेक्षां भागवताचें श्रेष्ठत्व दाखविलें. आतां देवताकांड (उपासनाकांड) विषयक शास्त्रांपेक्षांहि भागवताचें श्रेष्ठत्व सांगतात– इतर शास्त्रांनीं, किंवा इतर शास्त्रांत सांगितलेल्या साधनांनीं परमेश्वर तत्काळ हृदयांत स्थिर केला जातो काय? तर नाहीं, फार आयासानें व पुष्कळ वेळानें. येथें तर ऐकण्याची इच्छा करणाऱ्या पुरुषांनींच ईश्वर आपल्या हृदयामध्यें तत्काल स्थिर केला जातो. तर सर्व लोक हेंच कां ऐकत नाहींत? अशी शंका आली असतां सांगतात– ते पुरुष पुण्यवान् असले पाहिजेत. पुण्यावांचून ऐकण्याची इच्छाच होत नाहीं. तस्मात् या भागवतामध्यें तिन्ही कांडांतील अ-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्मा सत्य आहे हें सिद्ध झालें. परमेश्वराचेठिकाणीं मायावगैरे उपाधि असताल? तर नाहींत— स्वतःच्याच तेजानें निरंतर मायारूपी कपट ज्या परमेश्वराचेठिकाणीं निरास पावलें आहे, अशा त्या परमेश्वराचें मी ध्यान करितों. आतां तटस्थ लक्षण असें कीं,— या जगाची उत्पत्ति स्थिति व लय हे ज्या परमेश्वरापासून होतात त्या परमेश्वराचा आकाशादि कार्यांचेठिकाणीं अन्वय (सद्रूपानें स्थिति) असल्यामुळें तीं आहेत असें भासतें. आणि मुळींच नसलेल्या आकाशपुष्पादिकांपासून त्याचा व्यतिरेक (सद्रूपानें नसणें) असल्यामुळें, त्याचेठिकाणीं जग हें वस्तुतः खरें नसून कल्पित आहे, असें सिद्ध होतें. अथवा—अन्वयशब्दानें अनुवृत्ति (व्याप्ति असणें) आणि इतरशब्दानें व्यावृत्ति (व्याप्तीचा अभाव) हीं घ्यावींत. अन्वय असल्यामुळें सद्रूप ब्रह्म हें जगाचें कारण आहे आणि व्यावृत्ति असल्यामुळें जग हें ब्रह्माचें कार्य असून ब्रह्माचेठिकाणीं कल्पित आहे. यास दृष्टांत— सोनें हें कारण व दागिना हें कार्य. सोन्यांचा दागिन्यांत अन्वय आहे, ह्मणजे सोन्यापासून दागिना झाला असल्यामुळें दागिन्याला सोनें ह्मटलें तरी चालेल, पण दागिन्याचा सोन्यांत व्यतिरेक आहे, ह्मणजे दागिना मोडला तर त्याचा दागिनेपणा मात्र नाहींसा होतो, सोनेपणा नाहींसा

इत्याद्या। तर्हि किं प्रधानं जगत्कारणत्वाद्ध्येयमभिप्रेतं नेत्याह । अभिज्ञो यस्तम्। स ईक्षत लोकान्नु सृजा इति स इमाँल्लोकानसृजतेति श्रुतेः। ईक्षतेर्नाशब्दमिति न्यायाच्च। तर्हि किं जीवो ध्येयः स्यान्नेत्याह। स्वराट् स्वेनैव राजते यस्तं स्वतःसिद्धज्ञानमित्यर्थः। तर्हि किं ब्रह्मा ध्येयः। हिरण्यगर्भः समवर्तताग्रे भूतस्य जातः पतिरेक आसीदिति श्रुतेः। नेत्याह। तेन इति। आदिकवये ब्रह्मणेऽपि ब्रह्म वेदं यस्तेने प्रकाशितवान्। यो ब्रह्माणं विदधाति पूर्वं यो वै वेदांश्च प्रहिणोति तस्मै। तꣳह देवमात्मबुद्धिप्रकाशं मुमुक्षुर्वै शरणमहं प्रपद्य इति श्रुतेः। ननु ब्रह्मणोऽन्यतो वेदाध्ययनमप्रसिद्धम्। सत्यम्। तत्तु हृदा मनसैव तेने विस्तृतवान्। अनेन बुद्धिवृत्तिप्रवर्तकत्वेन गायत्र्यर्थो दर्शितः।

तेजोवारिमृदां यथा विनिमयो यत्र त्रिसर्गोऽमृषा धाम्ना स्वेन सदा निरस्तकुहकं सत्यं परं धीमहि ॥ १ ॥

वक्ष्यति हि। प्रचोदिता येन पुरा सरस्वती वितन्वताजस्य सतीं स्मृतिं हृदि। स्वलक्षणा प्रादुरभूत्किलास्यतः स मे ऋषीणामृषभः प्रसीदतामिति। ननु ब्रह्मा स्वयमेव सुप्तप्रतिबुद्धन्यायेन वेदमुपलभताम्। नेत्याह। यद्यस्मिन्ब्रह्मणि सूरयोऽपि मुह्यंतीति। तस्माद्ब्रह्मणोऽपि पराधीनज्ञानत्वात्स्वतःसिद्धज्ञानः परमेश्वर एव जगत्कारणम्। अत एव सत्योऽसतः सत्ताप्रदत्वाच्च परमार्थसत्यः सर्वज्ञत्वेन च निरस्तकुहकस्तं धीमहीति। गायत्र्या प्रारंभेण च गायत्र्याख्यब्रह्मविद्यारूपमेतत्पुराणमिति दर्शितम्। यथोक्तं मत्स्यपुराणे पुराणदानप्रस्तावे। यत्राधिकृत्य गायत्रीं वर्ण्यते धर्मविस्तरः। वृत्रासुरवधोपेतं तद्भागवतमिष्यते॥ लिखित्वा तच्च यो दद्याद्धेमसिंहसमन्वितम्। प्रौष्ठपद्यां

होत नाहीं, ह्मणून दागिना हा सोन्यामध्यें कल्पित आहे असें सिद्ध होतें. किंवा— या जगाला सावयवत्व आहे ह्मणून अन्वयव्यतिरेकेंकरून याचे उत्पत्तिस्थितिसंहार ज्या व्यापक परमेश्वरापासून होतात त्याचें आह्मीं ध्यान करितों. तर मग मायादेखील या जगाला कारण आहे ह्मणून तीही ध्यान करण्यास योग्य आहे कीं काय ? तर नव्हे; जो जाणता (ज्ञानी) आहे, मायेसारखा जड नाहीं. तर मग जीवच ध्येय असेल ! कारण, तोही जाणता आहे. तर तसेंहि नव्हे. आह्मीं ज्याचें ध्यान करितों तो स्वतःसिद्धज्ञानस्वरूपी आहे, व जीव हा अविद्यावृत आहे. तर मग ब्रह्मदेव असेल ? तर तसेंहि नव्हे. ज्यानें ब्रह्मदेवालासुद्धां मनानेंच वेद प्रकाशित केले आहेत. अशा प्रकारच्या ईश्वराच्या बुद्धिप्रवर्तकत्वेंकरून गायत्रीचा अर्थ प्रदर्शित झाला. तर मग निजून उठलेल्या पुरुषाला जसें पूर्वदिवशीं केलेल्या अध्ययनाचें स्वतःच ज्ञान होतें तसें ब्रह्मदेवाला पूर्वसृष्टींतील वेदाचें ज्ञान झालें असेल ? असें जर ह्मणावें तर तसेंही नाहीं ज्या वेदाच्या प्रकाशनाविषयीं इंद्रादिकहि मोह पावतात. तस्मात् ब्रह्मदेवाचेंहि ज्ञान पराधीनच आहे; ह्मणून स्वतःसिद्धज्ञानवान् असा परमेश्वरच जगाचें कारण आहे. यास्तव जो ईश्वर, सत्य असून मिथ्याभूत जगाला सत्ता देणारा परमार्थ सत्य आणि सर्वज्ञत्वामुळें मायाकपटरहित आहे त्या ईश्वराचें आह्मीं ध्यान करितों. एतावता गायत्र्यर्थानें आरंभिलेलें हें पुराण गायत्रीना-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

र्थांचें प्रतिपादन असल्यामुळें हेंच सर्व शास्त्रांपेक्षां श्रेष्ठ आहे, यास्तव याचेंच नित्य श्रवण करावें ॥ २ ॥ आतां भागवत, सर्व शास्त्रांपेक्षां श्रेष्ठ आहे म्हणून याचें केवळ श्रवणच करावें असें नाहीं, तर हें सर्व शास्त्रांचें फलरूप आहे म्हणून याचें परमादरानें सेवन करावें असें सांगतात-- हे रसविशेषभावनाचतुर रसज्ञ हो, चतुर्विध पुरुषार्थांचें साधन अशा वेदरूपी कल्पवृक्षाचें हें भागवतनामक फळ होय. हें पूर्वीं वैकुंठलोकीं होतें, तें नारदानें तेथून आणून मला दिलें आणि तें मी शुकमुनीच्या मुखामध्यें ठेविलें. तें त्या शुकमुनीच्या मुखापासून शिष्यप्रशिष्यादिरूप पल्लवांच्या परंपरेनें हळूहळू अखंडच भूमीवर उतरलें. म्हणजे उंच प्रदेशांतून खालीं पडल्यामुळें फुटलें नाहीं. म्हणूनच परमानंदरूप रसानें संयुक्त आहे. लोकांमध्यें तर शुकाच्या (राघूच्या) मुखानें स्पर्श केलेलें पेरूंदि फळ अमृताप्रमाणें गोड होतें असें प्रसिद्ध

इदानीं तु न केवलं सर्वशास्त्रेभ्यः श्रेष्ठत्वादस्य श्रवणं विधीयतेऽपितु सर्वशास्त्रफलरूपमिदमतः परमादरेण सेव्यमित्याह । निगमेति । निगमो वेदः स एव कल्पतरुः सर्वपुरुषार्थोपायत्वात्तस्य फलं भागवतं नाम तत्तु वैकुंठगतं नारदेनानीय मह्यं दत्तम् । मया च शुकस्य मुखे निहितम् । तच्च तन्मुखाद्भुवि गलितं शिष्यप्रशिष्यादिरूपपल्लवपरंपरया शनैरखंडमेवावतीर्णम् । नतूच्चनिपातेन स्फुटितमित्यर्थः । एतच्च भविष्यदपि भूतवन्निर्दिष्टम् । अनागताख्यानेनैवास्य शास्त्रस्य प्रवृत्तेः । अत एवामृतरूपेण द्रवेण संयुतम् । लोके हि शुकमुखस्पृष्टं फलममृतमिव स्वादु भवतीति प्रसिद्धम् । अत्र शुको मुनिः । अमृतं परमानंदः । स एव द्रवो रसः । रसो वै सः । रसꣳ ह्येवायं लब्ध्वानन्दी भवतीति श्रुतेः । अतो हे रसिका हे रसज्ञास्तत्रापि भावुका हे रसविशेषभावनाचतुराः । अहो भुवि गलितमित्यलभ्यलाभोक्तिः । इदं भागवतं नाम फलं मुहुः पिबत । ननु त्वगष्ट्यादिकं विहाय फलाद्रसः पीयते कथं फलमेव

कांडत्रयार्थस्यापि यथावत्प्रतिपादनादिदमेव सर्वशास्त्रेभ्यः श्रेष्ठमतो नित्यमेतदेव श्रोतव्यमिति भावः ॥ २ ॥

निगमकल्पतरोर्गलितं फलं शुकमुखादमृतद्रवसंयुतम् ॥ पिबत भागवतं रसमालयं मुहुरहो रसिका भुवि भावुकाः ॥ ३ ॥ नैमिशेऽनिमिषक्षेत्रे ऋषयः शौनकादयः ॥ सत्रं स्वर्गायलोकाय सहस्रसममासत ॥ ४ ॥

पातव्यं तत्राह । रसं रसरूपम् । अतस्त्वगष्ट्यादेर्हेयांशस्याभावात्फलमेव कृत्स्नं पिबत । अत्र च रसतादात्म्याविवक्षया रसवत्त्वस्य विवक्षितत्वाद्गुणवचनेऽपि रसशब्दे मतुपः प्राप्त्यभावात्तेन विनैव रसं फलमिति सामानाधिकरण्यम् । तत्र फलमित्युक्ते पानासंभवो हेयांशप्रसक्तिश्च भवेदिति तन्निवृत्त्यर्थं रसमित्युक्तम् । रसमित्युक्तेऽपि गलितस्य रसस्य पातुमशक्यत्वात्फलमितिद्रष्टव्यम् । नच भागवतामृतपानं मोक्षेऽपि त्याज्यमित्याह । आलयं लयो मोक्षः अभिविधावाकारः लयमभिव्याप्य । नहीदं स्वर्गादिसुखवन्मुक्तैरुपेक्ष्यते किंतु सेव्यत एव । वक्ष्यति हि । आत्मारामाश्च मुनयो निर्ग्रंथा अप्युरुक्रमे । कुर्वंत्यहैतुकीं भक्तिमित्थंभूतगुणो हरिरिति ॥ ३ ॥ तदेवमनेन श्लोकत्रयेण विशिष्टेष्टदेवतानुस्मरणपूर्वकं प्रारिप्सितस्य शास्त्रस्य विषयप्रयोजनादिवैशिष्ट्येन सुखसेव्यत्वेन च श्रोतॄनभिमुखीकृत्य शास्त्रमारभते । नैमिश इति । ब्रह्मणा विसृष्टस्य मनोमयस्य चक्रस्य नेमिः शीर्यते कुंठीभवति यत्र तन्नेमिशं नेमिशमेव नैमिशम् । तथा च वायवीये । एतन्मनोमयं चक्रं मया सृष्टं विसृज्यते । यत्रास्य शीर्यते नेमिः स देशस्त-

आहे. यास्तव हें भागवतनामक फळ, तुह्मीं वारंवार जीवन्मुक्ति झाली असतांहि प्राशन करा. येथें अशी शंका होईल कीं, फळाची साल, आठींवगैरे टाकून फळांतील रस प्राशन केला जातो । फळच कसें प्राशन करावें ? तर सांगतात-- हें केवळ रसरूप आहे. साल, आठींवगैरे टाकण्यासारखा भाग यांत कांहींच नसल्यामुळें सर्व फळच प्राशन करा असें सांगितलें. आणि जीवन्मुक्त पुरुषांनींहि, स्वर्गादिसुखाप्रमाणें याची उपेक्षा केली जात नाहीं, तर याचें सेवनच केलें जातें ॥ ३ ॥ याप्रमाणें तीन श्लोकांनीं मंगलाचरण, ग्रंथ करण्याचा उद्देश, त्यांतील विषय आणि भागवताच्या श्रवणाविषयीं लोकांस उपदेश, यांचें प्रतिपादन करून ग्रंथास आरंभ करितात.-- श्रीविष्णूचें क्षेत्र जें नैमिषारण्य त्यामध्यें शौनकादिक ऋषि, आपणास श्रीहरीच्या स्वरूपाची प्राप्ती व्हावी म्हणून सहस्रसंवत्सरात्मक

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अनुष्ठान कालाच्या सत्रास आरंभ करून राहिले होते ॥ ४ ॥ एके दिवशीं प्रातःकालीं सायंप्रातर्होम करून सत्राच्या उद्देशानें एकत्र बसलेल्या त्या शौनकादि ऋषींनीं सत्कारपूर्वक आसनावर बसलेल्या सूताला आदरानें असें विचारिलें कीं, ॥ ५ ॥ ऋषि ह्मणाले–हे निष्पापा सूता, तूं खरोखर ज्या महाभारतादि इतिहासांसहवर्तमान पुराणांचें आणि धर्मशास्त्राचें अध्ययन केलें आहेस व व्याख्यानसुद्धां केलें आहेस ॥ ६ ॥ आणि विद्वच्छ्रेष्ठ भगवान् व्यास, जीं शास्त्रें व पुराणें जाणतो व तसेच भगवंताचीं सगुणनिर्गुण

पसः शुभः ॥ इत्युक्त्वा सूर्यसंकाशं चक्रं सृष्ट्वा मनोमयम् । प्रणिपत्य महादेवं विससर्ज पितामहः॥ तेऽपि हृष्टतमा विप्राः प्रणम्य जगतां प्रभुम् । प्रययुस्तस्य चक्रस्य यत्र नेमिर्व्यशीर्यत ॥ तद्वनं तेन विख्यातं नैमिशं मुनिपूजितमिति । नैमिष इति पाठे वराहपुराणोक्तं द्रष्टव्यम् । तथाहि गौरमुखमृषिंप्रति भगवद्वाक्यम् । एवं कृत्वा ततो देवो मुनिं गौरमुखं तदा । उवाच निमिषेणेदं निहतं दानवं बलम् । अरण्येऽस्मिंस्ततस्त्वेतन्नैमिषारण्यसंज्ञितम् । भविष्यति यथार्थं वै ब्राह्मणानां विशेषकमिति । अनिमिषः श्रीविष्णुरलुप्तदृष्टित्वात्तस्य क्षेत्रे । तथाचात्रैव शौनकादिवचनं क्षेत्रेऽस्मिन्वैष्णवे वयमिति । स्वः स्वर्गे गीयत इति स्वर्गायो हरिः स एव लोको भक्तानां निवासस्थानं तस्मै तत्प्राप्तय इत्यर्थः । सहस्रं समाः संवत्सरा अनुष्ठानकालो यस्य तत्सत्रं सत्रसंज्ञकं कर्मोद्दिश्यासत उपविविशुः । यद्वा । आसताकुर्वतेत्यर्थः । आलभेत निर्वपति उपयंतीत्यादिवत्प्र-

त एकदा तु मुनयः प्रातर्हुतहुताग्नयः ॥ सत्कृतं सूतमासीनं पप्रच्छुरिदमादरात् ॥ ५ ॥ ऋषय ऊचुः ॥ त्वया खलु पुराणानि सेतिहासानि चानघ ॥ आख्यातान्यप्यधीतानि धर्मशास्त्राणि यान्युत ॥ ६ ॥ यानि वेद विदां श्रेष्ठो भगवान्बादरायणः ॥ अन्ये च मुनयः सूत परावरविदो विदुः ॥ ७ ॥ वेत्थ त्वं सौम्य तत्सर्वं तत्त्वतस्तदनुग्रहात् ॥ ब्रूयुः स्निग्धस्य शिष्यस्य गुरवो गुह्यमप्युत ॥ ८ ॥ तत्र तत्रांजसायुष्मन्भवता यद्विनिश्चितम् ॥ पुंसामेकांततः श्रेयस्तन्नः शंसितुमर्हसि ॥ ९ ॥ प्रायेणाल्पायुषः सभ्य कलावस्मिन्युगे जनाः ॥ मंदाः सुमंदमतयो मंदभाग्या ह्युपद्रुताः ॥ १० ॥

त्ययोच्चारणमात्रार्थत्वेनास्तेर्धात्वर्थस्याविवक्षितत्वात् ॥ ४ ॥ प्रातःकाले हुता एव हुता अग्नयो यैस्ते । अनेन नित्यनैमित्तिकहोमसाकल्यं दर्शितम् । इदं वक्ष्यमाणमादरात्पप्रच्छुः ॥ ५ ॥ विविदिषितानर्थान्प्रष्टुं सूतस्य सर्वशास्त्रज्ञानातिशयमाहुः । त्वयेति त्रिभिः श्लोकैः । इतिहासो महाभारतादिस्तत्सहितानि । न केवलमधीतान्यपित्वाख्यातान्यपि व्याख्यातानि च । उत अपि । यानि धर्मशास्त्राणि तान्यपि ॥ ६ ॥ किंच यानीत्यादि । विदां विदुषां मध्ये श्रेष्ठो व्यासो यानि वेद । परावरे सगुणनिर्गुणे ब्रह्मणी विदंतीति तथा ॥ ७ ॥ वेत्थ जानासि । सौम्य हे साधो तेषामनुग्रहात् । तत्त्वतो ज्ञाने हेतुमाह । ब्रूयुरिति । स्निग्धस्य प्रेमवतः । उत एव । गुह्यं रहस्यमपि ब्रूयुरेव ॥ ८ ॥ अंजसा ग्रंथार्जवेन । एकांततः श्रेयोऽव्यभिचारि श्रेयःसाधनम् ॥ ९ ॥ अन्येऽपि बहुना कालेन बहुशास्त्रश्रवणादिभिर्विनिश्चिन्वंतु नेत्याहुः । प्रायेणेति । हे सभ्य

स्वरूपें जाणणारे अन्यहि ऋषि, जीं शास्त्रें जाणतात ॥ ७ ॥ तीं सर्व अभिप्रायांसुद्धां त्या ऋषींच्या व व्यासाच्या अनुग्रहानें तूं जाणत आहेस. कारण, प्रेमळ शिष्याला गुरु, जें कांहीं गुह्य असेल तेंसुद्धां सांगतात ॥ ८ ॥ हे आयुष्मन् सूता, त्या त्या धर्मशास्त्रादि ग्रंथांमध्यें मनुष्यांचें परमकल्याणकारक जें साधन तुला निश्चयानें समजलें असेल तें आह्मांस सांगण्यास तूं योग्य आहेस ॥ ९ ॥ हे साधो, या कलियुगामध्यें लोक प्रायः अल्पायुषी, आळशी, अतिशय मंदबुद्धि,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मंदभाग्य आणि रोगांनीं पीडित झालेले आहेत ॥ १० ॥ आणि वर्णाश्रमविभागेंकरून श्रवण करण्याचीं शास्त्रें व कर्मे तर पुष्कळ असून तीं अनेक प्रकारच्या कर्तव्यतांनीं परिपूर्ण आहेत. यास्तव हे साधो सूता, येथें जें सारभूत असेल तें आपल्या बुद्धीनें काढून श्रद्धावान् अशा आह्मांस सांग; जें ऐकिल्यानें आमचें अंतःकरण शांत होईल ॥ ११ ॥ दुसरा प्रश्न– हे सूता, तुझें कल्याण असो. भक्तांचा पालक जो भगवान् तो वसुदेवाच्या देवकीनामक स्त्रीचेठायीं जें कार्य करावयाच्या इच्छेनें प्रकट झाला, तें तूं जाणत आहेस ॥ १२ ॥ यास्तव हे सूता, तें ऐकण्याची इच्छा करणाऱ्या आह्मांस सांगण्याविषयीं तूं योग्य आहेस. ज्या परमेश्वराचा अवतार प्राणि-

---

साधो अस्मिन्युगे कलावल्पायुषो जनास्तत्रापि मंदा अलसास्तत्रापि सुमंदमतयस्तत्रापि मंदभाग्या विघ्नाकुलास्तत्राप्युपद्रुता रोगादिभिः ॥ १० ॥ न च बहुशास्त्रश्रवणेऽपि तावतैव फलसिद्धिरित्याहुः । भूरीणीति । भूरीणि कर्माण्यनुष्ठेयानि येषु तानि । समुद्धृत्य यथावदुद्धृत्य येनोद्धृतवचनेनात्मा बुद्धिः संप्रसीदति सम्यगुपशाम्यति ॥ ११ ॥ प्रश्नान्तरं सूत जानासीति पंचभिः । भद्रं त इत्यौत्सुक्येनाशीर्वादः । भगवान्निरतिशयैश्वर्यादिगुणः । सात्वतां सच्छब्देन सत्त्वमूर्तिर्भगवान्स उपास्यतया विद्यते येषामिति सत्वंतो भक्ताः । स्वार्थेऽण् राक्षसवायसादिवत् । तस्य चाश्रवणमार्षम् । तदेवं सात्वंत इति भवति । तेषां पतिः पालकः । यस्यार्थविशेषस्य चिकीर्षया वसुदेवस्य भार्यायां

भूरीणि भूरिकर्माणि श्रोतव्यानि विभागशः ॥ अतः साधोऽत्र यत्सारं समुद्धृत्य मनीषया ॥ ब्रूहि नः श्रद्दधानानां येनात्मा संप्रसीदति ॥ ११ ॥ सूत जानासि भद्रं ते भगवान्सात्वतां पतिः ॥ देवक्यां वसुदेवस्य जातो यस्य चिकीर्षया ॥ १२ ॥ तन्नः शुश्रूषमाणानामर्हस्यंगानुवर्णितुम् ॥ यस्यावतारो भूतानां क्षेमाय च भवाय च ॥१३॥ आपन्नः संसृतिं घोरां यन्नाम विवशो गृणन् ॥ ततः सद्यो विमुच्येत यद्बिभेति स्वयं भयम् ॥ १४ ॥ यत्पादसंश्रयाः सूत मुनयः प्रशमायनाः ॥ सद्यः पुनंत्युपस्पृष्टाः स्वर्धुन्यापोऽनुसेवया ॥ १५ ॥ को वा भगवतस्तस्य पुण्यश्लोकेड्यकर्मणः ॥ शुद्धिकामो न शृणुयाद्यशः कलिमलापहम् ॥ १६ ॥

देवक्यां जातः ॥ १२ ॥ अंग हे सूत तन्नोऽनुवर्णयितुमर्हसि । सामान्यतस्तावद्यस्यावतारो भूतानां क्षेमाय पालनाय भवाय समृद्धये ॥ १३ ॥ तत्प्रभावमनुवर्णयंतस्तद्यशःश्रवणौत्सुक्यमाविष्कुर्वंति । आपन्न इति त्रिभिः । संसृतिमापन्नः प्राप्तः विवशोऽपि गृणन् । ततः संसृतेः । अत्र हेतुः । यद्यतो नाम्नो भयमपि स्वयमेव बिभेति ॥ १४ ॥ किंच यस्य पादः संश्रयो येषामत एव प्रशमोऽयनं वर्त्माश्रयो वा येषां ते मुनय उपस्पृष्टाः सन्निधिमात्रेण सेविताः सद्यः पुनंति । स्वर्धुनी गंगा तस्या आपस्तु तत्पादान्निःसृता नतु तत्रैव तिष्ठंत्यतस्तत्संबंधेनैव पुनंत्योऽप्यनुसेवया पुनंति नतु सद्य इति मुनीनामुत्कर्षोक्तिः ॥ १५ ॥ पुण्यश्लोकैरीड्यानि स्तव्यानि कर्माणि यस्य तस्य यशः

मात्रांच्या पालनाकरितां आणि समृद्धीकरितां असतो ॥ १३ ॥ भयंकर संसारांत पडलेल्या पुरुषानें अगदीं परस्वाधीन अवस्थेमध्येंहि ज्याचें नांव उच्चारिलें असतां तत्काळ तो त्या संसारापासून विमुक्त होतो. कारण, ज्या नामापासून भीतिदेखील स्वतः भय पावत्ये ॥ १४ ॥ हे सूता, ज्या परमेश्वराच्या चरणाचा आश्रय करणारे शांतचित्त ऋषि, आपला आश्रय करणाऱ्या लोकांस तत्काळ पवित्र करितात. गंगेचें उदक पवित्र करणारें खरें परंतु तें फार दिवस सेवन केलें असतां पवित्र करितें; ॥१५॥ पुण्यश्लोकपुरुषांनींहि स्तुति करण्यास योग्य ज्याचीं कृत्यें आहेत; अशा त्या भगवंताचें, कलिसंबंधी पापाचा नाश करणारें यश, अंतःकरणशुद्धि व्हावी अशी इच्छा करणारा कोण बरें श्रवण करणार नाहीं ? तर सर्वहि करतील ॥ १६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तिसरा प्रश्न—लीलामात्रानें ब्रह्मादि कलावतार धारण करणारा जो भगवान् त्याचीं नारदादि ऋषींनीं गाइलेलीं उदार कृत्यें, श्रद्धावान् अशा आह्मांस सांगावीं ॥ १७ ॥ चवथा प्रश्न—हे बुद्धिमन् सूता, आपल्या मायेच्या योगानें यथेच्छ क्रीडा करणारा जो ईश्वर हरि त्याच्या शुभकारक मत्स्यादि अवतारकथा, आह्मांस सांग ॥ १८ ॥ आह्मीं तर उत्तमकीर्ति अशा भगवंताचे जे पराक्रम त्यांच्या श्रवणाविषयीं तृप्ति पावत नाहीं. कारण, जें भगवच्चरित्र, श्रवण करणाऱ्या रसिक भक्तांस पदपदाचेठायीं अति-

---

कलिमलापहं संसारदुःखोपशमनम् ॥ १६ ॥ प्रश्नांतरं । तस्येति । उदाराणि महांति विश्वसृष्ट्यादीनि । सूरिभिर्नारदादिभिः । कलाः ब्रह्मरुद्रादिमूर्तीः ॥ १७ ॥ अथेति प्रश्नांतरे । अवतारकथाः स्थित्यर्थमेव तत्तदवसरे ये मत्स्याद्यवतारास्तदीयाः कथाः । स्वैरं लीलाः कुर्वतः । श्रीकृष्णावतारप्रयोजनप्रश्नेनैव तच्चरितप्रश्नोऽपि जात एवेति ज्ञातव्यम् ॥ १८ ॥ अत्यौत्सुक्येन पुनरपि तच्चरितान्येव श्रोतुमिच्छन्तस्तत्रात्मनस्तृप्त्यभावमावेदयंति । वयं त्विति । योगयागादिषु तृप्ताः स्मः । उद्गच्छति तमो यस्मात्स उत्तमस्तथाभूतः श्लोको यशो यस्य तस्य विक्रमे तु विशेषेण न तृप्यामोऽलमिति न मन्यामहे । तत्र हेतुः । यद्विक्रमं शृण्वताम् । यद्वा । अन्ये तृप्यंतु नाम वयं तु नेति

तस्य कर्माण्युदाराणि परिगीतानि सूरिभिः ॥ ब्रूहि नः श्रद्दधानानां लीलया दधतः कलाः ॥ १७ ॥ अथाख्याहि हरेर्धीमन्नवतारकथाः शुभाः ॥ लीला विदधतः स्वैरमीश्वरस्यात्ममायया ॥ १८ ॥ वयं तु न वितृप्याम उत्तमश्लोकविक्रमे ॥ यच्छृण्वतां रसज्ञानां स्वादु स्वादु पदे पदे ॥ १९ ॥ कृतवान्किल वीर्याणि सह रामेण केशवः ॥ अतिमर्त्यानि भगवान्गूढः कपटमानुषः ॥ २० ॥ कलिमागतमाज्ञाय क्षेत्रेऽस्मिन्वैष्णवे वयम् ॥ आसीना दीर्घसत्रेण कथायां सक्षणा हरेः ॥ २१ ॥ त्वं नः संदर्शितो धात्रा दुस्तरं निस्तितीर्षताम् ॥ कलिं सत्त्वहरं पुंसां कर्णधार इवार्णवम् ॥ २२ ॥ ॥ ॥

तुशब्दस्यान्वयः । अयमर्थः । त्रेधा ह्यलंबुद्धिर्भवति । उदरादिभरणेन वा रसाज्ञानेन वा स्वादुविशेषाभावाद्वा । तत्र शृण्वतामित्यनेन श्रोत्रस्याकाशत्वादभरणमित्युक्तम् । रसज्ञानामित्यनेन चाज्ञानतः पशुवत्तृप्तिर्निराकृता । इक्षुभक्षणवद्रसांतराभावेन तृप्तिं निराकरोति । पदे पदे प्रतिक्षणं स्वादुतोऽपि स्वादु ॥ १९ ॥ अतः श्रीकृष्णचरितानि कथयेत्याशयेनाहुः । कृतवानिति । अतिमर्त्यानि मर्त्याननतिक्रांतानि गोवर्धनोद्धरणादीनि । मनुष्येष्वसंभावितानीत्यर्थः ॥ २० ॥ ननु याजनाध्यापनादिव्यग्राणां कुत एतच्छ्रवणावकाशः स्यादत आहुः । कलिमिति । कलिमागतं ज्ञात्वा तद्भिया विष्णुपदं गन्तुकामा दीर्घसत्रेण निमित्तेनात्र वैष्णवे क्षेत्र आसीनाः । हरः कथायां सक्षणा लब्धावसराः ॥ २१ ॥ अस्मिंश्च समये त्वद्दर्शनमीश्वरेणैव संपादितमित्यभिनंदंति । त्वमिति । कलिं संसारं निस्तर्तुमिच्छताम् । अर्णवं तितीर्षतां कर्णधारो नाविक इव ॥ २२ ॥

शयच गोड लागतें ॥ १९ ॥ पांचवा प्रश्न—स्वतः गूढ असून मायारूप कपटाचा आश्रय करून मनुष्यावतार धारण करणारा जो श्रीकृष्ण भगवान् त्यानें बलरामासहवर्तमान मनुष्यांचे हातून न होणारे जे पराक्रम केले असतील ते आह्मांस सांग ॥ २० ॥ आह्मीं कलियुग प्राप्त झालें असें जाणून या विष्णुक्षेत्ररूपी नैमिषारण्यामध्यें सहस्रसंवत्सरात्मक सत्राच्या उद्देशानें बसलों आहों. यास्तव हरीच्या कथाश्रवणाविषयीं आह्मांस अवकाश आहे ॥ २१ ॥ समुद्र तरण्याची इच्छा करणाऱ्या पुरुषांस जसा अकस्मात् नावाडी भेटावा, तसा पुरुषांचें सत्त्व हरण करणारा जो हा दुस्तर कलिरूप संसार त्यास तरण्याची इच्छा करणाऱ्या आह्मांस

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ब्रह्मदेवानेंच तुझी गांठ पाडून दिली आहे ॥ २२ ॥ सहावा प्रश्न—धर्माचें कवचासारखें रक्षण करणारा, ब्राह्मणाचा कैवारी, आणि योगेश्वर असा श्रीकृष्ण भगवान् आतां निजधामास गेला असतां, आपल्या रक्षणासाठीं धर्म कोणास बरें शरण गेला? तें सांग ॥ २३ ॥ असा श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील प्रथमस्कंधामध्यें नैमिषारण्याच्या आख्यानाविषयीं हा प्रथम अध्याय समाप्त झाला ॥ १ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ याप्रमाणें प्रथम अध्यायांत शौनकादिक ऋषींनीं सूताला जे सहा प्रश्न केले त्यांपैकीं च्यार प्रश्नाचें उत्तर या द्वितीयाध्यायामध्यें सूतांनीं दिलें आहे ॥ १ ॥ व्यास ह्मणाला– याप्रमाणें उत्तम प्रश्न केल्यामुळें अतिसंतुष्ट झालेला रोमहर्षणाचा पुत्र जो

पुनः प्रश्नांतरं । ब्रूहीति । धर्मस्य वर्मणि कवचवद्रक्षके स्वां काष्ठां मर्यादां स्वस्वरूपमित्यर्थः । अस्य चोत्तरं । कृष्णे स्वधामोपगते धर्मज्ञानादिभिः सहेत्ययं श्लोकः ॥ २३ ॥ इति श्रीमद्भागवते प्रथमस्कंधे भावार्थदीपिकायां टीकायां प्रथमोऽध्यायः ॥१॥ तदेवं प्रथमेऽध्याये षट् प्रश्ना मुनिभिः कृताः॥ द्वितीये तूत्तरं सूतश्चतुर्णामाह तेष्वथ ॥१॥ विप्राणामित्येवंभूतैः सम्यक्प्रश्नैः सम्यग्घृष्टो रोमहर्षणस्य पुत्र उग्रश्रवास्तेषां वचः प्रतिपूज्य सत्कृत्य प्रवक्तुमुपचक्रमे उपक्रांतवान् ॥ १ ॥ प्रवचनस्योपक्रमो नाम गुरुदेवतानमस्कार इति तमाह । यमिति त्रिभिः । तत्र स्वगुरोः शुकस्यैश्वर्यं तच्चरितेनैव द्योतयन्नाह । यमिति । यं प्रव्रजंतं संन्यस्य गच्छंतम् । अनुपेतं मामुपनयस्वेत्युपनयनार्थमाचार्यमनुपसन्नम् । यद्वा ।

ब्रूहि योगेश्वरे कृष्णे ब्रह्मण्ये धर्मवर्मणि ॥ स्वां काष्ठामधुनोपेते धर्मः कं शरणं गतः ॥ २३ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे प्रथमस्कंधे नैमिषेयोपाख्याने प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥ ॥ व्यास उवाच ॥ इति संप्रश्नसंहृष्टो विप्राणां रौमहर्षणिः ॥ प्रतिपूज्य वचस्तेषां प्रवक्तुमुपचक्रमे ॥ १ ॥ सूत उवाच ॥ यं प्रव्रजंतमनुपेतमपेतकृत्यं द्वैपायनो विरहकातर आजुहाव ॥ पुत्रेति तन्मयतया तरवोऽभिनेदुस्तं सर्वभूतहृदयं मुनिमानतोऽस्मि ॥ २ ॥ यः स्वानुभावमखिलश्रुतिसारमेकमध्यात्मदीपमतितितीर्षतां तमोऽधम् ॥ संसारिणां करुणयाह पुराणगुह्यं तं व्याससूनुमुपयामि गुरुं मुनीनाम् ॥ ३ ॥ ॥ ॥

केनाप्यनुपेतमननुगतमेकाकिनमित्यर्थः । तत्र हेतुः अपेतकृत्यं कृत्यशून्यं कर्ममार्गेऽप्रवर्तमानं नैष्ठिकत्वात् । द्वैपायनो व्यासो विरहात्कातरो भीतः सन्पुत्रा३इति प्लुतेनाजुहावाहूतवान् । दूरादाह्वाने प्लुते सत्यपि संधिरार्षः । तदा तन्मयतया शुकरूपतया तरवोऽभिनेदुः प्रत्युत्तरमुक्तवंतः । पितुः स्नेहानुबंधपरिहाराय यो वृक्षरूपेणोत्तरं दत्तवानित्यर्थः । तं मुनिमानतोऽस्मि । तन्मयत्वोपपादनाय विशेषणम् । सर्वभूतानां हृन्मनः अयते योगबलेन प्रविशतीति सर्वभूतहृदयस्तम् ॥ २ ॥ तत्कृपालुतां दर्शयन्नाह । य इति । अंधं गाढं तमः संसाराख्यमतितर्तुमिच्छताम् । पुराणानां मध्ये गुह्यं गोप्यम् । तत्र हेतुत्वेन चत्वारि विशेषणानि । स्वो निजोऽसाधारणोऽनुभावः प्रभावो यस्य तत्स्वानुभावम् । अखिलश्रुतीनां सारम् । एकमद्वितीयमनुपममित्यर्थः । आत्मानं कार्यकारणसंघातमधिकृत्य वर्तमानमात्मतत्त्वमध्यात्मं तस्य दीपं साक्षात्प्रकाशकम् । उपया

उग्रश्रवानामक सूत त्यांनें त्या शौनकादि ऋषींच्या वचनाची प्रशंसा करून उत्तर सांगण्यास आरंभ केला॥१॥ आरंभ करणें ह्मणजे गुरुदेवतानमस्कार होय, तो सूतानें असा केला कीं,–ज्या शुकाचीं कोणतींच कर्में करावयाचीं शेष राहिलीं नव्हतीं ह्मणून सर्वसंगांचा परित्याग करून तो आश्रमांतून निघून एकटाच वनांत जाऊं लागला तेव्हां त्यास पुत्रविरहानें व्याकुळ झालेल्या व्यासानें, हे पुत्रा३ अशी प्लुतस्वरानें हाक मारिली. तेव्हां त्याचें सर्वात्मत्व असल्यामुळें वृक्षांनींच "ओ" असें प्रत्युत्तर दिलें, ह्मणजे व्यासांनीं मोहांत पडूं नये या हेतूनें शुकानेंच आपलें सर्वात्मत्व दाखविण्याकरितां वृक्षांकडून उत्तर देवविलें. असा सर्व प्राणिमात्रांच्या हृदयामध्यें योगसामर्थ्यानें प्रवेश करणारा जो शुकदेव त्याला मी नमस्कार करितों ॥ २ ॥ संसाररूप अंधकारास तरून जाण्याची इच्छा करणाऱ्या संसारी लोकांच्या करुणेनें; आत्मस्वरूपाचा असाधारण महिमा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ज्यांत वर्णिलेला आहे, सर्वश्रुतींचें सार, ज्याची बरोबरी करणारें दुसरें कोणतेंहि पुराण नाहीं; आत्मस्वरूपाला दिव्यासारखें प्रत्यक्ष दाखविणारें व सर्वपुराणामध्यें गुह्य असें हें भागवत पुराण ज्यानें सांगितलें त्या सर्व ऋषींचा गुरु अशा श्रीशुकाला मी शरण जातों ॥ ३ ॥ नारायण, सर्वपुरुषांमध्यें श्रेष्ठ असा नर, सरस्वती देवी, आणि व्यास यांस नमस्कार करून ग्रंथास आरंभ करावा. म्हणून सूतांनीं स्वतः त्यांस नमस्कार करून लोकांनींहि तसेंच करावें असा उपदेश केला आहे ॥ ४ ॥ हे ऋषिहो, तुम्हीं सर्वलोकांचें कल्याण करणारा असा हा फार चांगला मला प्रश्न केला आहे कीं, ज्याकृष्णकथेच्या श्रवणानें अंतःकरण प्रसन्न होतें त्या कृष्णकथेचाच तुम्ही हा प्रश्न केला आहे

मि शरणं व्रजामि ॥ ३ ॥ जयत्यनेन संसारमिति जयो ग्रंथस्तमुदीरयेदिति स्वयं तथोदीरयन्नन्यान्पौराणिकानुपशिक्षयति ॥ ४ ॥ तेषां वचः प्रतिपूज्येति यदुक्तं तत्प्रतिपूजनं करोति । हे मुनयः साधु यथा भवति तथाहं पृष्टः। यतो लोकानां मंगलमेतत् । यद्यतः कृष्णविषयः संप्रश्नः कृतः । सर्वशास्त्रार्थसारोद्धारप्रश्नस्यापि कृष्णे पर्यवसानादेवमुक्तम् ॥ ५ ॥ तत्र यत्प्रथमं पृष्टं सर्वशास्त्रसारमैकांतिकं श्रेयो ब्रूहीति तत्रोत्तरं । स वै पुंसामिति । अयमर्थः । धर्मो द्विविधः प्रवृत्तिलक्षणो निवृत्तिलक्षणश्च । तत्र यः स्वर्गाद्यर्थः प्रवृत्तिलक्षणः सोऽपरः । यतस्तु धर्माच्छ्रवणादरादिलक्षणा भक्तिर्भवति स परो धर्मः स एवैकांतिकं श्रेय इति । कथंभूता । अहैतुकी हेतुः फलानुसंधानं तद्रहिता

नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ॥ देवीं सरस्वतीं व्यासं ततो जयमुदीरयेत् ॥ ४ ॥ मुनयः साधु पृष्टोऽहं भवद्भिर्लोकमंगलम् ॥ यत्कृतः कृष्णसंप्रश्नो येनात्मा सुप्रसीदति ॥ ५ ॥ स वै पुंसां परो धर्मो यतो भक्तिरधोक्षजे ॥ अहैतुक्यप्रतिहता ययात्मा संप्रसीदति ॥ ६ ॥ वासुदेवे भगवति भक्तियोगः प्रयोजितः ॥ जनयत्याशु वैराग्यं ज्ञानं यत्तदहैतुकम् ॥ ७ ॥ धर्मः स्वनुष्ठितः पुंसां विष्वक्सेनकथासु यः ॥ नोत्पादयेद्यदि रतिं श्रम एव हि केवलम् ॥ ८ ॥ धर्मस्य ह्यापवर्ग्यस्य नार्थोऽर्थायोपकल्पते ॥ नार्थस्य धर्मैकांतस्य कामो लाभाय हि स्मृतः ॥ ९ ॥

अप्रतिहता विघ्नैरनभिभूता ॥ ६ ॥ ननु तमेतं वेदानुवचनेन ब्राह्मणा विविदिषंति यज्ञेन दानेन तपसानाशकेनेत्यादिश्रुतिभ्यो धर्मस्य ज्ञानांगत्वं प्रसिद्धं तत्कुतो भक्तिहेतुत्वमुच्यते सत्यम् । तत्तु भक्तिद्वारेणेत्याह । वासुदेव इति । अहैतुकं शुष्कतर्काद्यगोचरमौपनिषदमित्यर्थः ॥ ७ ॥ व्यतिरेकमाह । धर्म इति । यो धर्म इति प्रसिद्धः स यदि विष्वक्सेनस्य कथासु रतिं नोत्पादयेत्तर्हि स्वनुष्ठितोऽपि सन्नयं श्रमो ज्ञेयः । ननु मोक्षार्थस्यापि धर्मस्य श्रमत्वमस्त्येवात आह । केवलं विफलः श्रम इत्यर्थः । नन्वस्ति तत्रापि स्वर्गादिफलमित्याशंक्यैवकारेण निराकरोति । क्षयिष्णुत्वान्न तत्फलमित्यर्थः । नन्वक्षय्यं ह वै चातुर्मास्ययाजिनः सुकृतं भवतीत्यादिश्रुतेर्न तत्फलस्य क्षयिष्णुत्वमित्याशंक्य हिशब्देन साधयति । तद्यथेह कर्मचितो लोकः क्षीयत एवमेवामुत्र पुण्यचितो लोकः क्षीयत इति तर्कानुगृहीतया श्रुत्या क्षयिष्णुत्वप्रतिपादनात् ॥ ८ ॥ तदेवं हरिभक्ति-

---

॥ ९ ॥ ज्या धर्माच्या योगानें अधोक्षजभगवंताचेठायीं फलप्राप्तीची इच्छा नसणारी व जिच्या योगानें आत्मा सुप्रसन्न होतो अशी दृढ भक्ति प्राप्त होते तोच पुरुषांना मोक्षप्राप्ति करून देणारा सर्वधर्मांमध्यें श्रेष्ठ धर्म होय ॥ ६ ॥ वासुदेवभगवंताचेठायीं अर्पण केलेला भक्तियोग, तत्काळ वैराग्य व फलेच्छारहित ज्ञान उत्पन्न करितो ॥ ७ ॥ उत्तमप्रकारें आचरण केलेला धर्म, पुरुषास जर भगवत्कथेच्याठायीं प्रीति उत्पन्न करीत नाहीं तर तो केवळ श्रमरूप आहे असें समजावें ॥ ८ ॥ कारण मोक्षप्राप्तिसंबंधीं धर्माचें फळ अर्थ (द्रव्यप्राप्ति) हें म्हणणें योग्य नाहीं. तसेंच केवळ धर्मप्राप्तीचें साधन असा जो अर्थ त्या- ॥ ९ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

चें फळ कामप्राप्ति (विषयभोग) हें लाभकारक ह्मटलें नाहीं ॥ ९ ॥ कामाचें (विषयभोगाचें) फळ, इंद्रियें संतुष्ट राखणें हें नव्हे. तर जेवढ्यानें देह जीवंत राहील
तेवढेंच आहे. आणि वांचण्याचें फळ, सकाम कर्मांनीं द्रव्य मिळविणें हें नव्हे. तर तत्त्व जाणण्याची इच्छा हेंच होय ॥ १० ॥ तत्त्व ह्मणजे काय? तर
जें अद्वय ज्ञान त्यालाच तत्त्ववेत्ते पुरुष तत्त्व असें ह्मणतात, त्यालाच उपनिषदांचा अर्थ जाणणारे ब्रह्म ह्मणतात, हिरण्यगर्भाची उपासना करणारे परमात्मा ह्मण-

---

द्वारा तदितरवैराग्यात्मज्ञानपर्यंतः परो धर्म इत्युक्तम् । अन्ये तु मन्यंते । धर्मस्यार्थः फलं तस्य च कामः फलं तस्य चेंद्रियप्रीतिस्तत्प्रीतेश्च पुनरपि धर्मार्थादिपरंपरेति ।
यथाहुः । धर्मादर्थश्च कामश्च स किमर्थं न सेव्यत इत्यादि तन्निराकरोति । धर्मस्येति द्वाभ्याम् । आपवर्ग्यस्योक्तन्यायेनापवर्गपर्यंतस्य धर्मस्यार्थाय फलत्वायार्थो नोपक-
ल्पते योग्यो न भवति तथार्थस्याप्येवंभूतधर्माव्यभिचारिणः कामो लाभाय फलत्वाय नहि स्मृतो मुनिभिः ॥ ९ ॥ कामस्य च विषयभोगस्येंद्रियप्रीतिर्लाभः फलं न
भवति । किंतु यावता जीवेत तावानेव कामस्य लाभः । जीवनपर्याप्त एव कामः सेव्य इत्यर्थः । जीवस्य जीवनस्य च पुनः कर्मानुष्ठानद्वारा कर्मभिर्य इह प्रसिद्धः सोऽर्थो न भवति
किंतु तत्त्वजिज्ञासैवेति ॥ १० ॥ ननु च तत्त्वजिज्ञासा नाम धर्मजिज्ञासैव । धर्म एव हि तत्त्वमिति केचित्तत्राह । तत्त्वविदस्तु तदेव तत्त्वं वदंति । किं तत् । यज्ज्ञा-

कामस्य नेंद्रियप्रीतिर्लाभो जीवेत यावता ॥ जीवस्य तत्त्वजिज्ञासा नार्थो यश्चेह कर्मभिः ॥ १० ॥ वदंति तत्तत्त्वविदस्तत्त्वं यज्ज्ञा-
नमद्वयम् ॥ ब्रह्मेति परमात्मेति भगवानिति शब्द्यते ॥ ११ ॥ तच्छ्रद्दधाना मुनयो ज्ञानवैराग्ययुक्तया ॥ पश्यंत्यात्मनि चात्मानं
भक्त्या श्रुतगृहीतया ॥ १२ ॥ अतः पुंभिर्द्विजश्रेष्ठा वर्णाश्रमविभागशः ॥ स्वनुष्ठितस्य धर्मस्य संसिद्धिर्हरितोषणम् ॥ १३ ॥
तस्मादेकेन मनसा भगवान् सात्वतां पतिः ॥ श्रोतव्यः कीर्तितव्यश्च ध्येयः पूज्यश्च नित्यदा ॥ १४ ॥ यदनुध्यासिना युक्ताः कर्म-
ग्रंथिनिबंधनम् ॥ छिंदंतिकोविदास्तस्य को न कुर्यात्कथारतिम् ॥ १५ ॥

नं नाम । अद्वयमिति क्षणिकविज्ञानपक्षं व्यावर्तयति । ननु तत्त्वविदोऽपि विगीतवचना एव । मैवम् । तस्यैव तत्त्वस्य नामांतरैरभिधानादित्याह । औपनिषदैर्ब्रह्मेति हैर-
ण्यगर्भैः परमात्मेति सात्वतैर्भगवानित्यभिधीयते ॥ ११ ॥ तच्च तत्त्वं सपरिकरया भक्त्यैव प्राप्यत इत्याह । तच्चेत्यन्वयः । ज्ञानवैराग्ययुक्तयेत्यत्र ज्ञानं परोक्षम् । तच्च
तत्त्वमात्मनि क्षेत्रज्ञे पश्यंति । किं तत् । आत्मानं परमात्मानम् । श्रुतेन वेदांतादिश्रवणेन गृहीतया प्राप्तयेति भक्तेर्दार्ढ्यमुक्तम् ॥ १२ ॥ धर्मस्य फलं भक्तिर्नार्थकामादिक-
मितीममर्थमुपपाद्योपसंहरति । अत इति । हे द्विजश्रेष्ठाः हरितोषणं हरेराराधनम् । संसिद्धिः फलम् ॥ १३ ॥ यस्माच्च भक्तिहीनो धर्मः केवलं श्रम एव तस्माद्भक्तिप्रधान
एव धर्मोऽनुष्ठेय इत्याह । तस्मादिति । एकेनैकाग्रेण मनसा ॥ १४ ॥ भक्तिरहितो धर्मः केवलं श्रम एवेति प्रपंचितम् । इदानीं तु भक्तेर्मुक्तिफलत्वं प्रपंचयति । यदिति ।

तात, व भक्ति करणारे पुरुष भगवान् ह्मणतात ॥ ११ ॥ त्या आत्मरूप तत्त्वास श्रद्धावान् मुनि, ज्ञानवैराग्यांनीं युक्त अशा वेदांतश्रवणादिकेंकरून संपादन केलेल्या भक्तीनें
स्वात्म्याचेठिकाणींच पाहतात ॥ १२ ॥ यास्तव हे शौनकादि द्विजश्रेष्ठहो, ब्राह्मणादि वर्ण आणि ब्रह्मचर्यादि आश्रम यांच्या विभागाप्रमाणें उत्तम आचरण केलेल्या धर्मा-
चें मुख्य फळ, हरीचा संतोष हेंच होय ॥ १३ ॥ यास्तव एकाग्र अंतःकरणानें भक्तपालक अशा भगवंताचीं श्रवण, कीर्तन, ध्यान आणि पूजन हीं नित्य करावीं ॥ १४ ॥
आतां भक्तीच मुक्ती देणारी आहे असें सांगतात– ज्याच्या ध्यानरूप खड्गेंकरून युक्त असे विवेकी पुरुष, अहंकाररूप ग्रंथीला उत्पन्न करणाऱ्या कर्मास तोडून टाकितात.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याच्या कथेचेठायीं प्रीति, कोणता पुरुष करणार नाहीं; तर सर्वहि करितील॥१५॥ आतां हरिकथेचेठायीं प्रीति उत्पन्न होण्यास उपाय सांगतात—हे विप्रहो, पुण्यकारक तीर्थांच्या सेवनानें निष्पाप झालेल्या पुरुषाला महत्सेवा घडते व तिच्या योगानें त्याला धर्मविषयीं श्रद्धा उत्पन्न होते, नंतर श्रवणाची इच्छा,तदनंतर भगवत्कथाश्रवण करणाऱ्या त्या पुरुषास वासुदेवाच्या कथेचेठायीं रुचि उत्पन्न होत्ये॥१६॥नंतर ज्याचें श्रवण आणि कीर्तन हीं पुण्यरूप आहेत असा सत्पुरुषांचा हितकारी भगवान् श्रीकृष्ण, आपल्या कथेचें श्रवण करणाऱ्या पुरुषांच्या हृदयामध्यें राहून त्यांच्या कामादि वासनेंचा, नाश करितो॥१७॥ नंतर, निरंतर भगवद्भक्तांच्या अथवा भागवतशास्त्राच्या सेवेनें अंतःकरणांतील वासनारूप सर्व

यस्यानुध्या अनुध्यानं सैवासिः खड्गस्तेन युक्ता विवेकिनो ग्रंथिमहंकारं निबध्नाति यत्कर्म तच्छिदंति तस्य कथायां रतिं को न कुर्यात् ॥ १५ ॥ ननु सत्यमेव कर्मनिर्मूलनी हरिकथारतिस्तथापि तस्यां रुचिर्नोत्पद्यते किं कुर्मस्तत्राह । शुश्रूषोरिति । पुण्यतीर्थनिषेवणान्निष्पापस्य महत्सेवा स्यात्तया च तद्धर्मश्रद्धा ततः श्रवणेच्छा ततो रुचिः स्यादित्यर्थः ॥ १६ ॥ ततश्च । शृण्वतामिति । पुण्ये श्रवणकीर्तने यस्य सः । सतां सुहृद्धितकारी । हृदि यान्यभद्राणि कामादिवासनास्तानि । अंतस्थो हृदयस्थः

शुश्रूषोः श्रद्दधानस्य वासुदेवकथारुचिः ॥ स्यान्महत्सेवया विप्राः पुण्यतीर्थनिषेवणात् ॥ १६ ॥ शृण्वतां स्वकथां कृष्णः पुण्यश्रवणकीर्तनः ॥ हृद्यंतस्थो ह्यभद्राणि विधुनोति सुहृत्सताम् ॥ १७ ॥ नष्टप्रायेष्वभद्रेषु नित्यं भागवतसेवया ॥ भगवत्युत्तमश्लोके भक्तिर्भवति नैष्ठिकी ॥ १८ ॥ तदा रजस्तमोभावाः कामलोभादयश्च ये ॥ चेत एतैरनाविद्धं स्थितं सत्त्वे प्रसीदति ॥ १९ ॥ एवं प्रसन्नमनसो भगवद्भक्तियोगतः ॥ भगवत्तत्त्वविज्ञानं मुक्तसंगस्य जायते ॥ २० ॥ भिद्यते हृदयग्रंथिश्छिद्यंते सर्वसंशयाः ॥ क्षीयंते चास्य कर्माणि दृष्ट एवात्मनीश्वरे ॥ २१ ॥ अतो वै कवयो नित्यं भक्तिं परमया मुदा ॥ वासुदेवे भगवति कुर्वंत्यात्मप्रसादनीम् ॥२२॥

सन् ॥ १७ ॥ ततश्च । नष्टप्रायेष्विति । सर्वाभद्रनाशस्य ज्ञानोत्तरकालत्वात्प्रायग्रहणम् । भागवतानां भागवतशास्त्रस्य वा सेवया । नैष्ठिकी निश्चला विक्षेपकाभावात् । ॥ १८ ॥ रजश्च तमश्च ये च तत्प्रभवा भावाः कामादयः एतैरनाविद्धमनभिभूतम् । प्रसीदत्युपशाम्यति ॥ १९ ॥ भगवद्भक्तियोगतः प्रसन्नमनसोऽत एव मुक्तसंगस्य ॥ २० ॥ ज्ञानफलमाह । भिद्यत इति । हृदयमेव ग्रंथिश्चिज्जडग्रथनरूपोऽहंकारः । अत एव सर्वे संशया असंभावनादिरूपाः । कर्माण्यनारब्धफलानि । आत्मनि स्वरूपभूते ईश्वरे दृष्टे साक्षात्कृते सति । एवकारेण ज्ञानानंतरमेवेति दर्शयति ॥ २१ ॥ तत्र च सदाचारं दर्शयन्नुपसंहरति । अत इति । आत्मनः प्रसादनीं मनःशोधनीं वासुदेवे भक्तिं कुर्वंतीति

पापें नष्ट झालीं असतां पुण्यकीर्ति अशा भगवंताचेठायीं अचल भक्ति उत्पन्न होत्ये॥१८॥ तेव्हां रजोगुण व तमोगुण व त्यांपासून उत्पन्न होणारे जे कामलोभादिक विकार ह्यांनीं कांहींच क्षोभ न पावणारें चित्त, सत्वगुणाचेठायीं स्थिर राहून शांत होतें॥१९॥याप्रमाणें भगवद्भक्तीच्या योगानें शांतचित्त झाल्यामुळें सर्वठिकाणीं आसक्ति सुटलेला जो पुरुष त्याला भगवंताच्या तत्त्वाचें अपरोक्ष ज्ञान होतें ॥ २० ॥ ज्ञानाचें फळ सांगतात– स्वरूपभूत ईश्वराचा साक्षात्कार झाला असतां त्या पुरुषाची अहंकाररूपी हृदयग्रंथि नाश पावत्ये, असंभावनादि सर्व संशय नाहींसे होतात आणि संचितादि सर्व कर्में क्षय पावतात ॥ २१ ॥ ह्मणून बुद्धिमान् पुरुष, नेहमी मोठ्या हर्षानें वासुदेव जो भगवान्

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याचेठायीं मनास प्रसन्न करणारी भक्ति करितात ॥२२॥ आतां ब्रह्मदेवादिक तिघेही एकरूपच असून त्यांमध्यें वासुदेवाचें श्रेष्ठत्व सांगतात—सत्त्व, रज, आणि तम हे तीन प्रकृतीचे गुण आहेत, त्यांनीं युक्त जो एक परम पुरुष भगवान् तो, येथें या जगाचें पालन, उत्पत्ति आणि संहार करण्यासाठीं विष्णु, ब्रह्मदेव आणि शंकर अशा संज्ञा धारण करितो, पण त्यांमध्यें सत्त्वगुणात्मक विष्णूपासून पुरुषांना शुभ फलें प्राप्त होतात ॥२३॥ जसा स्वतः प्रकाशशून्य काष्ठापेक्षां त्यांतून उत्पन्न झालेला धूम किंचित् कर्मप्रवर्तक असल्यामुळें श्रेष्ठ आहे आणि त्या धूमापासून उत्पन्न झालेला तीनवेदरूपी अग्नि वेदोक्त कर्मानुष्ठानास साक्षात् साधन असल्यामुळें त्या धूमाहून जसा श्रेष्ठ आहे, त्याप्रमाणें अज्ञानरूपी तमोगुणापेक्षां किंचित् ज्ञानरूपी रजोगुण श्रेष्ठ आहे आणि त्याहून साक्षात् ब्रह्मज्ञानसंपादक सत्त्वगुण श्रेष्ठ आहे, ह्मणजे शंकर तमोगुणोपाधिक, ब्रह्मा रजोगुणोपाधिक आणि विष्णु स-

---

भजनीयविशेषो दर्शितः ॥ २२ ॥ तदेवोपपादयितुं ब्रह्मादीनां त्रयाणामेकात्मकत्वेऽपि वासुदेवस्याधिक्यमाह । सत्त्वमिति । इह यद्यप्येक एव परः पुमानस्य विश्वस्य स्थित्यादये स्थितिसृष्टिप्रलयार्थं हरिविरिंचिहरेति संज्ञाः केवलं भिन्ना धत्ते । हरिविरिंचिहरा इति वक्तव्ये संधिरार्षः । तत्र तेषां मध्ये श्रेयांसि शुभफलानि सत्त्वतनोर्वासुदेवादेव स्युः ॥ २३ ॥ उपाधिवैशिष्ट्येन फलवैशिष्ट्यं सदृष्टांतमाह । पार्थिवात्स्वतःप्रवृत्तिप्रकाशरहिताद्दारुणः काष्ठात्सकाशाद्धूमः प्रवृत्तिस्वभावस्त्रयीमयो वेदोक्तकर्मप्रचुरः ईषत्कर्मप्रत्यासत्तेः। तस्मादप्यग्निस्त्रयीमयः साक्षात्कर्मसाधनत्वात् । एवं तमसः सकाशाद्रजो ब्रह्मदर्शनं ब्रह्मप्रकाशकम् । तुशब्देन लयात्मकात्तमसः सकाशाद्रजसः

सत्त्वं रजस्तम इति प्रकृतेर्गुणास्तैर्युक्तः परः पुरुष एक इहास्य धत्ते ॥ स्थित्यादये हरिविरिंचिहरेति संज्ञाः श्रेयांसि तत्र खलु सत्त्वतनोर्नृणां स्युः ॥ २३ ॥ पार्थिवाद्दारुणो धूमस्तस्मादग्निस्त्रयीमयः ॥ तमसस्तु रजस्तस्मात्सत्त्वं यद्ब्रह्मदर्शनम् ॥ २४ ॥ भेजिरे मुनयोऽथाग्रे भगवंतमधोक्षजम् ॥ सत्त्वं विशुद्धं क्षेमाय कल्पंते येऽनु तानिह ॥ २५ ॥ मुमुक्षवो घोररूपान् हित्वा भूतपतीनथ ॥ नारायणकलाः शांता भजंति ह्यनसूयवः ॥ २६ ॥ रजस्तमःप्रकृतयः समशीला भजंति वै ॥ पितृभूतप्रजेशादीन् श्रियैश्वर्यप्रजेप्सवः ॥ २७ ॥

सोपाधिकज्ञानहेतुत्वेन किंचिद्ब्रह्मदर्शनप्रत्यासत्तिमात्रमुक्तं नतु सर्वथा तत्प्रकाशकत्वं विक्षेपकत्वात् । यत्सत्त्वं तत्साक्षाद्ब्रह्मदर्शनम् । अतस्तद्गुणोपाधीनां ब्रह्मादीनामपि यथोत्तरं वैशिष्ट्यमिति भावः ॥ २४ ॥ वासुदेवभक्तौ पूर्वाचारं प्रमाणयति । भेजिर इति । अथातो हेतोरग्रे पुरा विशुद्धं सत्त्वं सत्त्वमूर्तिं भगवंतमधोक्षजम् । अतो येताननुवर्तंते त इह संसारे क्षेमाय कल्पंते ॥ २५ ॥ नन्वन्यानपि केचिद्भजंतो दृश्यंते सत्यम् । मुमुक्षवस्त्वन्यान्न भजंति किंतु सकामा एवेत्याह । मुमुक्षव इति द्वाभ्याम् । भूतपतीनिति पितृप्रजेशादीनामुपलक्षणम् । अनसूयवो देवतांतरानिंदकाः संतः ॥ २६ ॥ रजस्तमसी प्रकृतिः स्वभावो येषां ते । अत एव पितृभूतादिभिः समं शीलं येषाम् । श्रिया सहै-

---

त्त्वगुणोपाधिक असल्यामुळें ते उत्तरोत्तर श्रेष्ठ आहेत असें जाणावें ॥ २४ ॥ पूर्वी ऋषींनीं विशुद्धसत्त्वमूर्ति अधोक्षज भगवंताचें सेवन केलें आहे ह्मणून आतांहि त्या ऋषींप्रमाणें जे लोक परमेश्वराचें सेवन करितील त्यांचें कल्याण होईल ॥ २५ ॥ कोणी सकाम पुरुष दुसऱ्या देवतेंचें आराधन करणारे दिसतात परंतु जे मुमुक्षु पुरुष आहेत ते कोणाचीहि निंदा न करितां, भूतपति, पितर, पिशाच इत्यादिकांचा त्याग करून शांत अशा नारायणाच्या कलावतारांचें आराधन करितात ॥२६॥ तथापि ज्यांचे स्वभाव पित्रादिकांसारखेच रजोगुणतमोगुणात्मक आहेत असे कितीएक सकाम उपासक, संपत्ति, ऐश्वर्य आणि संतति यांच्या प्राप्तीची इच्छा धरून पितर भूत आणि प्रजापति यांचें आराधन करितात आणि कदाचित् त्यांपासून त्यांच्या कामनाहि पूर्ण होतात, तथापि सर्वोत्कृष्ट मोक्षफळ देणारा वासुदेवच आहे ह्मणून त्याचें सर्व मुमुक्षूंनीं आ-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राधन करावें ॥२७॥ आतां सर्व शास्त्रें वासुदेवपरच आहेत असें सांगतात- वेद मुख्यत्वेंकरून वासुदेवाचेंच वर्णन करितात ह्मणून वासुदेवपर आहेत, पंचमहायज्ञादि यज्ञ, वासुदेवाच्या प्राप्तीसाठींच आहेत, सर्व योगशास्त्रें वासुदेवाचेठिकाणींच पर्यवसान पावणारीं आहेत, स्नानसंध्यादि सर्व क्रिया वासुदेवप्रीत्यर्थच आहेत, वेदादि ज्ञानशास्त्रें वासुदेवप्रतिपादक, आहेत, अपरोक्षज्ञानशास्त्रहि वासुदेवानुभवपरच आहे, दानव्रतादिविषयक धर्मशास्त्रहि वासुदेवपरच आहे, स्वर्गादिप्राप्तिरूप गतिहि वासुदेवापासूनच उत्पन्न झालेली आहे॥२८॥ ॥२९॥ कारण त्याच ह्या षड्गुणैश्वर्यसंपन्न भगवंतानें स्वतः निर्गुण व व्यापक असतां सत्त्वरजतमात्मक व कार्यकारणात्मक आपल्या मायेनें प्रथम हें जग उत्पन्न केलें आहे॥३०॥आ-

श्वर्यं प्रजाश्चेप्संतीति तथा ते ॥ २७ ॥ मोक्षप्रदत्वाद्वासुदेवो भजनीय इत्युक्तम् । सर्वशास्त्रतात्पर्यगोचरत्वादपीत्याह द्वाभ्याम् । वासुदेव एव परस्तात्पर्यगोचरो येषां ते । ननु वेदा मखपरा दृश्यंते इत्याशंक्य तेऽपि तदाराधनार्थत्वात्तत्परा एवेत्युक्तम् । योगा योगशास्त्राणि । तेषामप्यासनप्राणायामादिक्रियापरत्वमाशंक्य तासामपि तत्प्राप्त्युपायत्वात्तत्परत्वमुक्तम् ॥२८॥ ज्ञानं ज्ञानशास्त्रम् । ननु च तज्ज्ञानपरमेवेत्याशंक्य ज्ञानस्यापि तत्परत्वमुक्तम् । तपोऽत्र ज्ञानम् । धर्मो धर्मशास्त्रं दानव्रतादिविषयम् । ननु तत्स्वर्गपरमित्याशंक्य गम्यत इति गतिः स्वर्गादिफलं साऽपि तदानंदांशरूपत्वात्तत्परैवेत्युक्तम् । यद्वा । वेदा इत्यनेनैव तन्मूलत्वात्सर्वाण्यपि वासुदेवपराणीत्युक्तम् । तत्र ननु तेषां मखयोगक्रियादिनानार्थपरत्वान्न तदेकपरत्वमित्याशंक्य मखादीनामपितत्परत्वमित्युक्तमिति द्रष्टव्यम् ॥ २९ ॥ ननु जगत्सर्गतत्प्रवेशनियमनादिविलासयुक्ते वस्तुनि सर्वशा-

वासुदेवपरा वेदा वासुदेवपरा मखाः ॥ वासुदेवपरा योगा वासुदेवपराः क्रियाः ॥ २८ ॥ वासुदेवपरं ज्ञानं वासुदेवपरं तपः ॥
वासुदेवपरो धर्मो वासुदेवपरा गतिः ॥ २९ ॥ स एवेदं ससर्जाग्रे भगवानात्ममायया ॥ सदसद्रूपया चासौ गुणमय्याऽगुणो
विभुः ॥ ३० ॥ तया विलसितेष्वेषु गुणेषु गुणवानिव ॥ अंतः प्रविष्ट आभाति विज्ञानेन विजृंभितः ॥ ३१ ॥ यथा ह्यवहितो
वह्निर्दारुष्वेकः स्वयोनिषु ॥ नानेव भाति विश्वात्मा भूतेषु च तथा पुमान् ॥ ३२ ॥ असौ गुणमयैर्भावैर्भूतसूक्ष्मेंद्रियात्मभिः ॥
स्वनिर्मितेषु निर्विष्टो भुंक्ते भूतेषु तद्गुणान् ॥ ३३ ॥

स्त्रसमन्वयो दृश्यते । कथं वासुदेवपरत्वं सर्वस्य तत्राह । स एवेति चतुर्भिः । एतैरेव श्लोकैस्तस्य कर्माण्युदाराणि ब्रूहीति प्रश्नस्योत्तरमुक्तम् । सदसद्रूपया कार्यकारणात्मिकया अगुणश्चेत्यन्वयः । स्वतो निर्गुणोऽपि सन्नित्यर्थः ॥ ३० ॥ भगवतो जगत्कारणत्वमुक्तं प्रवेशनियमनलक्षणां लीलामाह । तयेति । विलसितेषूद्भूतेषु गुणेष्वाकाशादिष्वंतः प्रविष्टः सन्गुणवानिव मदधीना एते गुणा इत्यभिमानवानिव नतु वस्तुतस्तथा । यतो विज्ञानेन चिच्छक्त्या विजृंभितोऽत्यूर्जितः ॥ ३१ ॥ बहुरूपत्वलीलामाह । यथेति । स्वयोनिषु स्वाभिव्यंजकेषु । अवहितो निहितः । विश्वात्मा पुमान्परमेश्वरः । भूतेषु प्राणिषु । अंतर्यामिणोऽपि प्रतियोनिनानात्वेन नानात्वमिवोच्यते । क्षेत्रज्ञरूपेण वा ॥ ३२ ॥ भोगरूपां लीलामाह । असाविति । असौ हरिर्भूतसूक्ष्माणि चेंद्रियाणि चात्मा मनश्च तैः स्वयं निर्मितेषु भूतेषु चतुर्विधेष्विति भोगे स्वातंत्र्यं द्योत्यते ।

तां ईश्वराची प्रवेशादि लीला सांगतात- आणि त्या मायेनें उत्पन्न झालेल्या या आकाशादि पदार्थांचेठायीं प्रविष्ट होऊन, तो भगवान् स्वतः असंग व स्वप्रकाशचैतन्यरूपी असतांहि, हे सर्व पदार्थ माझ्या स्वधीन आहेत अशा अभिमानानें युक्त असल्यासारखा भासतो ॥ ३१ ॥ जसा अग्नि, स्वतः सर्वत्र एकरूपच असून त्याला प्रकट करणाऱ्या काष्ठांचेठिकाणीं तो प्रविष्ट झाला ह्मणजे, त्या काष्ठांप्रमाणेंच लांब, वर्तुळ इत्यादि नानाप्रकारचा भासतो, तसा जगदात्मा परमेश्वर, भूतांचेठायीं प्रविष्ट झाला असतां नानाप्रकारचा भासतो ॥ ३२ ॥ हाच भगवान्, भूतसूक्ष्में (शब्दादिक पंच विषय) इंद्रियें आणि मन या त्रिगुणात्मक कार्यांनीं स्वतः उत्पन्न केलेल्या जरायुजादि चारप्रकारच्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

देहांचेठायीं प्रविष्ट होऊन त्या त्या इंद्रियांनीं त्या त्या विषयांचा उपभोग करितो ॥३३॥ आणि लोकांस उत्पन्न करणारा, हाच भगवान् देवांमध्यें इंद्रब्रह्मादिक, तिर्यग्जातींमध्यें मत्स्यकूर्मादिक आणि मनुष्यांमध्यें रामकृष्णादिक अवतार घेऊन सत्त्वगुणाच्या योगानें लोकांचें रक्षण करितो ॥३४॥ ॥ असा श्रीम० म०प्र०हा द्वु०अ० समाप्त झाला॥२॥ प्रथमाध्यायामध्यें अवतारकथा सांगण्याविषयीं शौनकादिक ऋषींनीं सूताला प्रश्न केला होता त्याचें उत्तर, या तृतीय अध्यायांत सूतानें पुरुषादिक अवतार व त्यांचीं निरनिराळीं चरित्रें सांगून दिलें आहे ॥ १ ॥ सूत ह्मणाला—हे ऋषिहो, भगवंतानें सृष्टीचे आरंभीं सर्व चराचर विश्व उत्पन्न करण्याच्या इच्छेनें, पुरुषावतार धारण केला. तें स्व-

---

अप्सराश्चासौ उर्वशी च ताम् ॥ ६ ॥ यज्ञं यज्ञोपाधिं विष्णुम् । कोशो वसुसंचयः वसुकाम इत्यत्र धनमात्रमिति भेदः । दांपत्यमन्योन्यप्रीतिस्तदेवार्थो यस्य सः ॥ ७ ॥ धर्मार्थो धर्मकामः । उत्तमश्लोकोपाधिं विष्णुम् । तंतुं तन्वन्संतानवृद्धिमन्विच्छन् । रक्षा बाधानिवृत्तिस्तत्कामः पुण्यजनान् यक्षान् । ओजो बलं तत्कामो मरुद्गणान् देवान् ॥८॥ राज्यं राजत्वं तत्कामो मनून् । देवान्मन्वंतरपालान् । राज्ञः कर्म राज्यं तत्कामो विश्वान्देवानिति विशेषः । अभिचरन् शत्रुमरणमिच्छन्निर्ऋतिं राक्षसम् । कामकामः भोगेच्छुः ।

रूपाभिकामो गंधर्वान्स्त्रीकामोऽप्सरउर्वशीम् ॥ आधिपत्यकामः सर्वेषां यजेत परमेष्ठिनम् ॥ ६ ॥ यज्ञं यजेद्यशस्कामः कोशकामः प्रचेतसम् ॥ विद्याकामस्तु गिरिशं दांपत्यार्थ उमां सतीम् ॥ ७ ॥ धर्मार्थ उत्तमश्लोकं तंतुं तन्वन्पितॄन्यजेत् ॥ रक्षाकामः पुण्यजनानोजस्कामो मरुद्गणान् ॥ ८ ॥ राज्यकामो मनून्देवान्निर्ऋतिं त्वभिचरन्यजेत् ॥ कामकामो यजेत्सोममकामः पुरुषं परम् ॥ ९ ॥ अकामः सर्वकामो वा मोक्षकाम उदारधीः ॥ तीव्रेण भक्तियोगेन यजेत पुरुषं परम् ॥ १० ॥ एतावानेव यजतामिह निःश्रेयसोदयः ॥ भगवत्यचलो भावो यद्भागवतसंगतः ॥ ११ ॥ ज्ञानं यदाप्रतिनिवृत्तगुणोर्मिचक्रमात्मप्रसाद उत यत्र गुणेष्वसंगः ॥ कैवल्यसंमतपथस्त्वथ भक्तियोगः को निर्वृतो हरिकथासु रतिं न कुर्यात् ॥ १२ ॥

अकामो वैराग्यकामः पुरुषं परं प्रकृतिव्यतिरेकोपाधिमीश्वरम् ॥ ९ ॥ अकाम एकांतभक्तः उक्तानुक्तसर्वकामो वा । पुरुषं पूर्णं निरुपाधिम् ॥ १० ॥ पूर्वोक्तनानादेवतायजनस्यापि संयोगपृथक्त्वेन भक्तियोगफलत्वमाह । एतावानिति । इंद्रादीनपि यजतामिह तत्तद्यजनेन भागवतानां संगतो भगवत्यचलो भावो भक्तिर्भवतीति यदेतावानेव निःश्रेयसस्य परमपुरुषार्थस्योदयो लाभः । अन्यत्तु सर्वं तुच्छमित्यर्थः ॥११॥ भागवतसंगत इत्यनेन सूचितां हरिकथारतिं स्तौति । ज्ञानमिति । यत् यासु कथासु ज्ञानं भवति । कीदृशम् । आ-

---

पुरुषानें यक्षांचें पूजन करावें. बलप्राप्तीची इच्छा असल्यास त्यानें मरुद्गणनामक देवांची पूजा करावी ॥ ८ ॥ राज्यपद इच्छिणारानें मन्वंतरांतील पालक मनुरूपी देवांची पूजा करावी. शत्रुमरण इच्छिणारानें निर्ऋतिनामक लोकपालाची उपासना करावी. अनेक भोगांची इच्छा करणारानें चंद्राची पूजा करावी. वैराग्य होण्याची इच्छा करणारानें मायातीत परमेश्वराची उपासना करावी ॥ ९ ॥ कोणत्याच फलप्राप्तीची इच्छा न करणारा अथवा सर्व प्रकारच्या सुखांची इच्छा करणारा किंवा उदार बुद्धिमान् असल्यामुळें केवळ मोक्षाचीच इच्छा करणारा या सर्वांनीं अनन्यभक्तियोगानें पूर्ण परब्रह्मरूपी परमेश्वराचें आराधन करावें ॥ १० ॥ इंद्रादि देवांचें आराधन करणाऱ्या पुरुषांस भगवद्भक्तांच्या संगतिद्वारा भगवत्स्वरूपीं अचल भक्ति प्राप्त होणें इतकेंच या लोकीं परमपुरुषार्थाचें मुख्य फल आहे, याहून इतर सर्व फलें तुच्छ आहेत ॥ ११ ॥ हे राजा, ज्या हरिकथांच्या श्रवणानें, त्रिगुणापासून उत्पन्न होणाऱ्या कामक्रोधादि सर्व लहरी नाश करणारें ज्ञान उत्पन्न होतें, विषयांचेठिकाणीं विरक्ति

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

उत्पन्न होते, चित्त प्रसन्न होतें आणि मोक्षप्राप्तीविषयीं संमत असलेला मार्ग जो भक्तियोग तो प्राप्त होतो; यास्तव श्रवणानंदानें तृप्त झालेला कोण पुरुष त्या हरिकथेचे-ठिकाणीं प्रीति करणार नाहीं? तर सर्वही करितीलच ॥ १२ ॥ शौनक ह्मणाला–हे सूता, असें श्रीशुकाचार्याचें भाषण श्रवण करून भरतकुलांतील श्रेष्ठ अशा राजा परीक्षितीनें पुढें परब्रह्मनिष्ठ व वेदादिसकलशास्त्रप्रवीण अशा श्रीशुकाचार्यास दुसरें काय विचारिलें? ॥ १३ ॥ हे ज्ञानसंपन्ना सूता, तें श्रवण करण्याची इच्छा करणाऱ्या आह्मांस तूं सांगण्याला योग्य आहेस. कारण, आमची खात्री आहे कीं, साधूंच्या सभेमध्यें ज्या कथा होतात त्यांचें पर्यवसान भगवत्कथांकडे असावयाचेंच ॥ १४ ॥ त्यांत तो प्रसिद्ध पांडवनंदन महारथी परीक्षिति राजा मोठा भगवद्भक्त होता, जो लहानपणीं बालक्रीडासाधनांनीं खेळ खेळत असतांसुद्धां, कृष्णपूजादिरूप खेळाचेंच ग्रहण करीत असे.

सर्वतः प्रतिनिवृत्तमुपरतं गुणोर्मीणां रागादीनां चक्रं समूहो यस्मात्तत् । उत अनंतरं तद्धेतुरात्मप्रसादश्च यत्र यासु मनःप्रसादहेतुर्गुणेषु विषयेष्वसंगो वैराग्यं च । उभयत्रेति पाठे इहामुत्र च गुणेष्वसंगः कैवल्यमित्येव संमतः पंथा यो भक्तियोगः निर्वृतः श्रवणसुखेन अन्यत्रानिर्वृत इति वा। तासु हरिकथासु को रतिं न कुर्यात् ॥ १२ ॥ अभिव्याहृतमुक्तम् । ऋषिं परब्रह्मदर्शिनम् । कविं शब्दब्रह्मनिष्णातम् ॥ १३ ॥ श्रवणेच्छायां हेतुः । हरिकथा एव उदर्के उत्तरफलं यासु ताः कथाः । सतां भागवतानां सदसि सभायां

शौनक उवाच ॥ ॥ इत्यभिव्याहृतं राजा निशम्य भरतर्षभः ॥ किमन्यत्पृष्टवान्भूयो वैयासकिमृषिं कविम् ॥ १३ ॥ एतच्छुश्रूषतां विद्वन्सूत नोऽर्हसि भाषितुम् ॥ कथा हरिकथोदर्काः सतां स्युः सदसि ध्रुवम् ॥ १४ ॥ स वै भागवतो राजा पांडवेयो महारथः ॥ बालक्रीडनकैः क्रीडन्कृष्णक्रीडां य आददे ॥ १५ ॥ वैयासकिश्च भगवान्वासुदेवपरायणः ॥ उरुगायगुणोदाराः सतां स्युर्हि समागमे ॥ १६ ॥ आयुर्हरति वै पुंसामुद्यन्नस्तं च यन्नसौ ॥ तस्यर्ते यत्क्षणो नीत उत्तमश्लोकवार्तया ॥ १७ ॥ तरवः किन्न जीवंति भस्त्राः किन्न श्वसंत्युत ॥ न खादंति न मेहंति किं ग्रामपशवोऽपरे ॥ १८ ॥ श्वविड्वराहोष्ट्रखरैः संस्तुतः पुरुषः पशुः ॥ न यत्कर्णपथोपेतो जातु नाम गदाग्रजः ॥ १९ ॥

स्युः ॥ १४ ॥ एतत्प्रपंचयति । स वा इति द्वाभ्याम् । कृष्णपूजादिरूपां क्रीडां यः स्वीकृतवान् ॥ १५ ॥ उरुगायस्य गुणैरुदारा महत्यः कथाः स्युः ॥ १६ ॥ किंच । वृथैव क्षीयमाणमायुर्हरिकथया सफलं कुर्वित्याशयेनाह त्रिभिः । आयुरिति । असौ सूर्य उद्यन्नुद्गच्छन् अस्तमदर्शनं च यन् गच्छन् यत् येन क्षणो नीतस्तस्य आयुर्ऋते वर्जयित्वा वृथैव हरति ॥१७॥ ननु जीवनमेव तेषामायुषः फलमस्ति तत्राह। तरव इति । ननु तेषां श्वासो नास्ति तर्हि भस्त्राश्चर्मकोशाः। ननु तासामाहारादिकं नास्ति तत्राह। न खादंति नाश्नंति न मेहंति रेतःसेकं मैथुनं न कुर्वंति किम् । उत अपि नराकारं पशुं मत्वाह । अपरे इति ॥ १८ ॥ तदेवाह श्वादिभिः संस्तुतः सदृशो निरूपितः यस्य कर्णपथं कदा-

---

॥ १५ ॥ आणि तो भगवान् शुकाचार्येही केवळ ईश्वरभजनीं तत्पर होता. तेव्हां श्रीशुकाचार्य वक्ता, व परीक्षिति राजर्षि श्रोता असल्यामुळें तेथें जमलेल्या साधूंच्या समागमांत वेदादिकांनीं बहुतप्रकारें वर्णन केलेल्या भगवंताच्या गुणांनीं श्रेष्ठ अशा कथाच वर्णनांत अवश्य आल्या असतील ॥ १६ ॥ हे सूता, नित्यशः उदय व अस्त पावणारा हा सूर्य, पुरुषांच्या आयुष्याचा नाश करितो खरा परंतु तो, ज्या पुरुषानें आपल्या आयुष्याच्या दहापळांइतका तरी काळ पुण्यकीर्ति भगवंताच्या वार्तेनें घालविला असेल, त्या पुरुषाच्या आयुष्यावांचून ह्मणजे त्याचेंमात्र आयुष्य व्यर्थ जात नाहीं॥ १७॥ वांचणें श्वासोच्छ्वास करणें, खाणें व मैथुन करणें, हेंच आयुष्याचें फळ ह्मणावें तर, वृक्ष वांचत नाहीं काय? लोहाराचे भाते श्वासोच्छ्वास करीत नाहीं काय? व दुसरे वृषभादिक ग्राम्यपशु भक्षण व मैथुन करीत नाहींत काय?॥१८॥ तस्मात् गदाग्रज ॥ ९ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भगवान् ज्याच्या श्रवणमार्गांत कधींहि आला नाहीं तो नराकृति पशु, श्वान, विष्ठाभक्षक सूकर, उंट व गर्दभ यांच्यापेक्षांहि निंद्य आहे. ह्मणजे श्वानादिकांतसुद्धां मैथुनादिकालांचा नियम असतो व ते पशु, लोकांच्या कांहींतरी उपयोगीं पडतात पण याच्यामध्यें तसाहि प्रकार कांहींच नाहीं ॥ १९ ॥ हे सूता, उरुक्रम "भगवंताच्या लीलेचें श्रवण न करणारीं जीं मनुष्याचीं कर्णछिद्रें तीं केवळ बिळेंच होत. आणि जी दुष्ट जिव्हा, भगवंताच्या कथांचें गायन करीत नाहीं ती बेडकाच्या जिव्हेसारखी व्यर्थ बडबड करणारी होय ॥ २० ॥ उंची पागोटें व किरीट घातलेलेंहि मस्तक, जर मुक्तिदायक परमेश्वरास नमस्कार करीत नाहीं, तर तें केवळ भारच होय. देदीप्यमान सुवर्णाच्या कंकणांनीं भूषित असलेलेंहि हस्त, जर हरीची पूजा करीत नाहींत तर ते प्रेताच्या हस्तांसारखे अमंगळ जाणावे ॥ २१ ॥ तसेच मनुष्यांचे जे नेत्र, विष्णुमूर्तींचें

चिदपि नागतः सः अवज्ञास्पदत्वाच्छ्वभिः कश्मलविषयासक्तत्वाद्विड्वराहैर्ग्रामसूकरैः कंटकवद्दुःखदविषयासक्तत्वादुष्ट्रैर्भारवाहित्वात् खरैस्तुल्य इत्यर्थः ॥ १९ ॥ तस्यांगानि च निष्फलानीत्याह । बिले इति पंचभिः। बतेति खेदे । न शृण्वतोऽशृण्वतो नरस्य ये कर्णपुटे ते बिले वृथा रंध्रे न चेदुपगायति तस्य जिह्वा असती दुष्टा दर्दुरो भेकस्तदीया जिह्वेव ॥ २० ॥ पट्टवस्त्रोष्णीषेण किरीटेन च जुष्टमपि शिरो यदि न नमेत्तर्हि केवलं भार एव। शवो मृतकस्तत्करतुल्यो लसती कांचनकंकणे ययोस्तौ अप्यर्थे वाशब्दः

बिले बतोरुक्रमविक्रमान्ये न शृण्वतः कर्णपुटे नरस्य ॥ जिह्वाऽसती दार्दुरिकेव सूत न चोपगायत्युरुगायगाथाः ॥ २० ॥ भारः परं पट्टकिरीटजुष्टमप्युत्तमांगं न नमेन्मुकुंदम् ॥ शावौ करौ नो कुरुतः सपर्यां हरेर्लसत्कांचनकंकणौ वा ॥ २१ ॥ बर्हायिते ते नयने नराणां लिंगानि विष्णोर्न निरीक्षतो ये ॥ पादौ नृणां तौ द्रुमजन्मभाजौ क्षेत्राणि नानुव्रजतो हरेर्यौ ॥ २२ ॥ जीवञ्छवो भागवतांघ्रिरेणुं न जातु मर्त्योऽभिलभेत यस्तु ॥ श्रीविष्णुपद्या मनुजस्तुलस्याः श्वसञ्छवो यस्तु न वेद गंधम् ॥ २३ ॥ तदश्मसारं हृदयं बतेदं यद्गृह्यमाणैर्हरिनामधेयैः ॥ न विक्रियेताथ यदा विकारो नेत्रे जलं गात्ररुहेषु हर्षः ॥ २४ ॥ अथाभिधेह्यंग मनोऽनुकूलं प्रभाषसे भागवतप्रधानः ॥ यदाह वैयासकिरात्मविद्याविशारदो नृपतिं साधु पृष्टः ॥ २५ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे द्वितीयस्कंधे तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥

॥ २१ ॥ ये नयने विष्णोर्मूर्तीर्न निरीक्षेते ते बर्हायिते मयूरपिच्छनेत्रतुल्ये । द्रुमवज्जन्म भजत इति तथा वृक्षमूलतुल्यावित्यर्थः ॥ २२ ॥ नाभिलभेत अभितो न स्पृशेन्न धारयेत् । श्रीविष्णुपद्याः श्रीविष्णुपदलग्नायाः । न वेदेति अवघ्राय नाभिनंदेदित्यर्थः ॥२३॥ अश्मवत्सारो बलं काठिन्यं यस्य । विक्रियालक्षणमाह । अथेति । गात्ररुहेषु रोमसु हर्ष उद्गमः ॥ २४ ॥ तस्मादभक्तस्य सर्वमेतद्व्यर्थम् । मनसोऽनुकूलं प्रियं च ब्रूषे । अथ अतः साधु पृष्टः सन् वैयासकिर्नृपतिं प्रति यदाह तदभिधेहीति ॥२५॥ इति द्वितीय-

---

दर्शन घेत नाहींत ते मोराच्या पिसाऱ्यावरील नेत्राकृतींसारखें व्यर्थ जाणावे. आणि मनुष्याचे जे पाय, परमेश्वराच्या क्षेत्रांचेठिकाणीं यात्रेस जात नाहींत ते केवळ वृक्षाच्या मुळ्यांसारखे जन्मास मात्र आले आहेत असें समजावें ॥ २२ ॥ जो मानव भगवद्भक्तांचें चरणरज कधींहि आपल्या मस्तकादिकांवर धारण करीत नाहीं, तो जीवंत असून प्रेतासारखाच होय. तसाच जो मनुष्य श्रीविष्णुचरणीं समर्पण केलेल्या तुलसीचा गंध (वास) ग्रहण करीत नाहीं, तो मनुष्य श्वासोच्छ्वास करीत असतांहि शवासारखा जाणावा ॥ २३ ॥ स्वतः किंवा दुसऱ्यांनीं उच्चारण केलेल्या हरीच्या नांवांनीं जें हृदय, नेत्रांत आनंदाश्रु येणें, अंगावर रोमांच उभे राहणें, इत्यादि लक्षणांनीं प्रेमानें सद्गदित होत नाहीं. तें हृदय, लोखंडासारखें कठोर होय ॥ २४ ॥ यास्तव हे सूता, तूं आमच्या मनाला जें अनुकूळ तेंच उत्तम भाषण करीत आहेस, तर

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

परीक्षिति राजानें उत्तम प्रश्न केला असतां, आत्मविद्येमध्यें निष्णात असून भगवद्भक्तांत श्रेष्ठ अशा शुकाचार्यांनें त्यास जें तत्त्व कथन केलें असेल तें आह्मांस सांग ॥ २५ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील द्वितीयस्कंधामध्यें तिसरा अध्याय समाप्त झाला ॥ ३ ॥ ॥ ॥ परीक्षिति राजानें हरीच्या सृष्ट्यादि चरित्रांविषयीं प्रश्न केला असतां, श्रीशुकाचार्यांनें त्याचें उत्तर, पूर्वीं झालेल्या ब्रह्मनारदसंवादानें सांगण्यास आरंभ केला ही कथा, चतुर्थ अध्यायांत सांगितली आहे ॥ १ ॥ सूत ह्मणाला-ऋषिहो, याप्रमाणें आत्मतत्त्वाचा निश्चय करून देणारें शुकाचार्यांचें भाषण ऐकून परीक्षिति राजानें, आपली बुद्धि श्रीकृष्णाचेठिकाणीं श्रवणादि सेवा करण्याविषयीं दृढ-निश्चययुक्त केली ॥ १ ॥ आणि देह, भार्या, पुत्र, राजवाडा, हत्ती, घोडेवगैरे पशु, द्रव्य, बंधु आणि निष्कंटक सार्वभौम राज्य यांचेठिकाणीं निरंतर वाढलेली जी

स्कंधे टीकायां तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥ ॥ ॥ तुर्ये परीक्षिता पृष्टं सृष्ट्यादि हरिचेष्टितम् ॥ शुकेन ब्रह्मतत्पुत्रसंवादेनोपवर्ण्यते ॥ १ ॥ राज्ञः प्रश्नं कथयितुं तस्य प्राक्तनीं स्थितिमाह चतुर्भिः । वैयासकेः शुकस्य इति एवंभूतमात्मनस्तत्त्वस्य निश्चयो यस्मात्तद्वच उपधार्याकलय्य सतीं कृष्ण एव सेव्यो नान्य इत्येवंभूताम् ॥ १ ॥ आत्मा देहः । पशवो गजादयः ॥२॥ इममेवार्थं हरिलीलालक्षणम् ॥३॥ संस्थां मृत्युम् । त्रैवर्गिकं धर्मार्थकामप्रधानम् । संन्यस्य त्यक्त्वा । आत्मभावं परप्रेम्णा भगवदात्मत्वं गतः प्राप्तः सन्प-

॥ सूत उवाच ॥ वैयासकेरिति वचस्तत्त्वनिश्चयमात्मनः ॥ उपधार्य मतिं कृष्ण औत्तरेयः सतीं व्यधात् ॥ १ ॥ आत्मजायासुतागार-पशुद्रविणबंधुषु ॥ राज्ये चाविकले नित्यं विरूढां ममतां जहौ ॥ २ ॥ पप्रच्छ चेममेवार्थं यन्मां पृच्छथ सत्तमाः ॥ कृष्णानुभाव-श्रवणे श्रद्दधानो महामनाः ॥ ३ ॥ संस्थां विज्ञाय संन्यस्य कर्म त्रैवर्गिकं च यत् ॥ वासुदेवे भगवति आत्मभावं दृढं गतः ॥ ४ ॥ राजोवाच ॥ समीचीनं वचो ब्रह्मन्सर्वज्ञस्य तवानघ ॥ तमो विशीर्यते मह्यं हरेः कथयतः कथाम् ॥ ५ ॥ भूय एव विवित्सामि भगवानात्ममायया ॥ यथेदं सृजते विश्वं दुर्विभाव्यमधीश्वरैः ॥ ६ ॥ यथा गोपायति विभुर्यथा संयच्छते पुनः ॥ यां यां शक्तिमुपा-श्रित्य पुरुशक्तिः परः पुमान् ॥ आत्मानं क्रीडयन्क्रीडन्करोति विकरोति च ॥ ७ ॥

प्रच्छ ॥ ४ ॥ मह्यं मम तमोऽज्ञानं विशीर्यते नश्यति । तव कथयतः सतः अतः समीचीनम् ॥ ५ ॥ पुनश्च वेदितुमिच्छामि । इदं दुर्विभाव्यमवितर्क्यं विश्वं यथा सृजति ॥६॥ गोपायति पालयति । संयच्छते संहरते । पुरुशक्तिर्बहुशक्तिमान् । क्रीडन् यथा करोति आत्मानं ब्रह्मादिरूपिणं क्रीडयन् विकरोति विविधं करोति ॥ ७ ॥

अंतःकरणांत ममता होती तिचा त्यानें त्याग केला ॥ २ ॥ आणि हे ऋषिश्रेष्ठहो, श्रीकृष्णाच्या पराक्रमश्रवणाविषयीं उत्कटभक्तिमान् व उदारचित्त अशा त्या परिक्षिति राजानें, आपला मृत्युकाळ जवळ आला असें जाणून धर्म अर्थ व काम एतत्संबंधी जें नित्यनैमित्तिककर्म त्याचा संन्यास केला आणि भगवान् वासुदेवाचेठिकाणीं प्रेमानें ऐक्यभाव पावोन, तुह्मी जो मला 'ईश्वराच्या लीला सांगा' असा प्रश्न केलात तोच प्रश्न त्यानें शुकाचार्यास, विचारिला ॥ ३ ॥ ४ ॥ राजा ह्मणाला-हे पुण्यमूर्ते ब्रह्मनिष्ठ शुकाचार्य, आपण सर्वज्ञ आहां. यास्तव आपलें भाषण अतिउत्कृष्ट आहे. कारण, आपण हरीची कथा वर्णन करूं लागलां ह्मणजे माझें अज्ञान नाहींसें होतें ॥ ५ ॥ तो व्यापक भगवान्, ब्रह्मादिकांसारख्या समर्थांचाहि तर्क चालण्यास अशक्य असें हें संपूर्ण चराचर विश्व, आपल्या मायेनें कसें उत्पन्न करितो, याचें रक्षण कसें करितो, व पुनः याचा संहार कोणत्या रीतीनें करितो, तें मी पुनःहि जाणण्याची इच्छा करितों ॥ ६ ॥ बहुशक्तिमान् तो परमपुरुष, ज्या ज्या शक्तीचा आश्रय करून क्रीडा करण्यासाठीं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आपणासच ब्रह्मदेवादि स्वरूपानें उत्पन्न करितो व तत्स्वरूपी आत्म्यास रमविण्यासाठीं अनेक प्रकारचे दुसरे रामकृष्णादिक अवतार धारण करितो ॥ ७ ॥ हे ब्रह्मनिष्ठ शुकाचार्य, आश्चर्यकारक कर्में करणाऱ्या षड्गुणैश्वर्यसंपन्न हरीचें चरित्र, मोठमोठ्या विद्वज्जनांनींहि खरोखर तर्क करण्यास अशक्यच आहे असें मला भासतें ॥ ८ ॥ ईश्वर स्वतः एकच असून सृष्ट्यादि बहुत कर्में करण्याकरितां, पुरुषरूपानें एकदम मायेच्या सत्त्वादि अनेक गुणांचा स्वीकार करितो किंवा ब्रह्मादिक अवतारांनीं अनुक्रमेंकरून गुणांचा स्वीकार करितो, याविषयीं मला संदेह आहे, यास्तव आपण हा विषय मला कृपा करून यथास्थितपणें कथन करावा. कारण, आपण योगैश्वर्यसंपन्न असून खरोखर वेदब्रह्माच्या ज्ञानाविषयीं विचारानें निष्णात आहां व परमात्मस्वरूपाविषयीं अनुभवानें निष्णात आहां ॥ ९ ॥ १० ॥ सूत ह्मणाला– ऋषिहो, याप्रमाणें परीक्षिति राजानें

॥ ८॥एकः पुरुषरूपेण युगपत् जन्मभिर्ब्रह्माद्यवतारैः क्रमशो वा यथा प्रकृतेर्गुणान् गृह्णाति ॥९॥ विचिकित्सितं संदिग्धम्। शाब्दे ब्रह्मणि विचारेण निष्णातः परस्मिन्ननुभवेन॥१०॥ उपामंत्रितः प्रार्थितः । प्रचक्रमे देवतागुरुनमस्कारादिरूपमुपक्रमं कृतवानित्यर्थः ॥ ११ ॥ तदेवाह त्रयोदशभिः। परस्मै सर्वोत्तमाय। तत्र हेतुः भूयसेऽपरिमितमहिम्ने। तद्दर्शयति।

नूनं भगवतो ब्रह्मन्हरेरद्भुतकर्मणः ॥ दुर्विभाव्यमिवाभाति कविभिश्चापि चेष्टितम् ॥ ८ ॥ यथा गुणांस्तु प्रकृतेर्युगपत्क्रमशोऽपि वा ॥ बिभर्ति भूरिशस्त्वेकः कुर्वन् कर्माणि जन्मभिः ॥ ९ ॥ विचिकित्सितमेतन्मे ब्रवीतु भगवान् यथा ॥ शाब्दे ब्रह्मणि निष्णातः परस्मिंश्च भवान् खलु ॥ १० ॥ सूत उवाच ॥ ॥ इत्युपामंत्रितो राज्ञा गुणानुकथने हरेः ॥ हृषीकेशमनुस्मृत्य प्रतिवक्तुं प्रचक्रमे ॥ ११ ॥ श्रीशुक उवाच ॥ नमः परस्मै पुरुषाय भूयसे सदुद्भवस्थाननिरोधलीलया ॥ गृहीतशक्तित्रितयाय देहिनामंतर्भवायानुपलक्ष्यवर्त्मने ॥ १२ ॥ भूयो नमः सद्वृजिनच्छिदेऽसतामसंभवायाऽखिलसत्त्वमूर्तये ॥ पुंसां पुनः पारमहंस्य आश्रमे व्यवस्थितानामनुमृग्यदाशुषे ॥ १३ ॥

सतः प्रपंचस्य उद्भवादिषु निमित्तभूता या लीला तया गृहीतं ब्रह्मादिरूपेण रजआदिशक्तित्रितयं येन तस्मै । अंतर्भवायांतर्यामिणे अतएव सर्वांतरत्वादनुपलक्ष्यं वर्त्म यस्य ॥ १२ ॥ विचित्रफलदातृत्वमनुस्मरन् प्रणमति। भूयः पुनश्च नमः सतां धर्मवर्तिनां वृजिनच्छिदे दुःखहंत्रे असतामधर्मशीलानामसंभवायानुद्भवहेतवे । अखिलसत्त्वमूर्तये तत्तद्देवतादिरूपेण तत्तत्फलदायेत्यर्थः। समग्रसत्त्वमूर्तये इति वा । पुनरपि पूर्वोक्तभयवैलक्ष्यण्यमाह। पारमहंस्ये प्रत्यङ्निष्ठारूपे आश्रमे व्यवस्थितानां पुंसामनुमृग्यमतन्निरसनेन पुनः

हरीच्या गुणानुवर्णनाविषयीं प्रार्थना केलेल्या शुकाचार्यांनें, इंद्रियनियामक हृषीकेशाचें स्मरण करून प्रश्नाचें उत्तर सांगण्यास आरंभ केला ॥ ११ ॥ भागवतकथनाच्या निर्विघ्न समाप्तीसाठीं देवता व गुरु यांस नमस्कार करीत होत्साता श्रीशुकाचार्य ह्मणाला– कीं, चराचर जगाचे उत्पत्ति, स्थिति व संहार करण्याच्या लीलेनें रज सत्त्व आणि तम या तीन गुणांचीं ब्रह्मा, विष्णु आणि शंकर हीं रूपें धारण करणारा, सर्व देह्यांच्या हृदयांत अंतर्यामिरूपानें असूनहि ज्याचा मार्ग कोणालाहि ओळखूं येत नाहीं आणि ज्याचा महिमा अपरिमित आहे अशा परम पुरुषरूपी ईश्वरास मी नमस्कार करितों ॥ १२ ॥ जो भगवान्, साधूंच्या दुःखाचा नाश करणारा, दुष्टांची उत्पत्तीच होऊं न देणारा, सर्व देवतांच्या भक्तांस त्या त्या देवतारूपानें इष्ट फळ देणारा आणि परमहंस आश्रमाचेठिकाणीं राहणाऱ्या पुरुषांस आत्मस्वरूप देणारा आहे, त्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भगवंतास पुनः माझा नमस्कार असो ॥ १३ ॥ हे परमेश्वरा, तुला माझा वारंवार नमस्कार असो. तूं भक्तांचा पालक आहेस; भक्तिहीन जनास तुझी ज्ञानदिशाहि अत्यंत दूर आहे, ह्मणजे त्यांस तुझें ज्ञान मुळींच होत नाहीं. तुझ्या ऐश्वर्याच्या तोडीचें ऐश्वर्य अथवा तुझ्याहून अधिक ऐश्वर्य दुसरें कोणाचेंच नाहीं. ह्मणून निरुपम ऐश्वर्यरूप तेजानें स्वस्वरूपभूत ब्रह्माचेठिकाणीं रममाण होणाऱ्या तुला माझा नमस्कार असो ॥ १४ ॥ ज्या परमेश्वराचें नामसंकीर्तन, स्मरण, दर्शन, वंदन, श्रवण किंवा पूजन केलें असतां, तें मनुष्याच्या पापाचा तत्काल नाश करितें व ज्याची कीर्ति अत्यंत मंगलकारक आहे त्याला माझे अनेक नमस्कार असोत ॥ १५ ॥ आत्मानात्मविवेक-

---

पुनर्मृग्यं यदात्मतत्त्वं तस्य दाशुषे दात्रे ॥ १३ ॥ सात्वतां भक्तानामृषभाय पालकाय। कुयोगिनां भक्तिहीनानां विदूरा काष्ठा दिगपि यस्य दुर्ज्ञेयायेत्यर्थः। तदेवं वैषम्यप्रतीतावपि निर्दोषत्वायाचिंत्यमैश्वर्यमाह। निरस्तं साम्यमतिशयश्च यस्य यदपेक्षयान्यस्य साम्यमतिशयश्च नास्ति तेन राधसा ऐश्वर्येण स्वधामनि स्वस्वरूपे ब्रह्मणि रममाणाय ॥ १४ ॥ सर्वसाधनेभ्यो भक्तेः श्रैष्ठ्यमनुस्मरन् प्रणमति। यत्कीर्तनमिति द्वाभ्याम्। अर्हणं पूजनम्। सुभद्रं मंगलं श्रवो यशो यस्य तस्मै ॥१५॥ विचक्षणा विवेकिनो यस्य चरणयोरुपसादनादुपसत्तेर्भजनात्। अंतरात्मनो मनसः उभयत्रेह च परत्र च संगं व्युदस्य निरस्य गतक्लमाः प्रयासरहिताः ॥ १६ ॥ भक्तिशून्यानां सर्वसाधनवैफल्यं दर्शयन्न-

---

नमो नमस्तेऽस्त्वृषभाय सात्वतां विदूरकाष्ठाय मुहुः कुयोगिनाम् ॥ निरस्तसाम्यातिशयेन राधसा स्वधामनि ब्रह्मणि रंस्यते नमः ॥ १४ ॥ यत्कीर्तनं यत्स्मरणं यदीक्षणं यद्वंदनं यच्छ्रवणं यदर्हणम् ॥ लोकस्य सद्यो विधुनोति कल्मषं तस्मै सुभद्रश्रवसे नमो नमः ॥ १५ ॥ विचक्षणा यच्चरणोपसादनात् संगं व्युदस्योभयतोंऽतरात्मनः ॥ विंदंति हि ब्रह्मगतिं गतक्लमास्तस्मै सुभद्रश्रवसे नमो नमः ॥ १६ ॥ तपस्विनो दानपरा यशस्विनो मनस्विनो मंत्रविदः सुमंगलाः ॥ क्षेमं न विंदंति विना यदर्पणं तस्मै सुभद्रश्रवसे नमो नमः ॥ १७ ॥ किरातहूणांध्रपुलिंदपुल्कसा आभीरकंका यवनाः खसादयः ॥ येऽन्ये च पापा यदुपाश्रयाश्रयाः शुद्ध्यंति तस्मै प्रभविष्णवे नमः ॥ १८ ॥ स एष आत्मात्मवतामधीश्वरस्त्रयीमयो धर्ममयस्तपोमयः ॥ गतव्यलीकैरजशंकरादिभिर्वितर्क्यलिंगो भगवान् प्रसीदताम् ॥ १९ ॥

मति। तपस्विन इति। मनस्विनो योगिनः। सुमंगलाः सदाचाराः। यस्मिंस्तप आचर्पणं विना सुभद्रश्रवस इत्यस्यावृत्तिर्यशःश्रवणादेः प्राधान्यज्ञापनाय ॥१७॥ भक्तेःपरमशुद्धिहेतुत्वं दर्शयन्नाह। किरातादयो ये पापजातयः अन्ये च ये कर्मतः पापरूपास्ते यदुपाश्रया भागवतास्तदाश्रयाः संतः शुद्ध्यंति। असंभावनाशंकां परिहरति। प्रभविष्णवे प्रभवनशीलायेति ॥ १८ ॥ सर्वोपास्यत्वमनुस्मरन्प्रार्थयते। स एष आत्मवतां धीराणामात्मा आत्मत्वेनोपास्य इत्यर्थः। त्रयीमयत्वादिविशेषणैस्तत्तन्मार्गेणोपास्यत्वं विवक्षितम्। गतव्य-

---

ज्ञानसंपन्न असे सत्पुरुष, ज्याच्या चरणसेवेनें आपल्या मनाची या मृत्युलोकांतील व स्वर्गलोकांतील आसक्ति (फलेच्छा) सर्वथा दूर करून श्रमरहित होत्साते मोक्षपदाला पावतात त्या पुण्यकीर्ति भगवंतास माझा वारंवार नमस्कार असो ॥ १६ ॥ तीव्र तप करणारे, दानशील, यशस्वी, योगी, मंत्रवेत्ते व सदाचारसंपन्न हे सर्वहि आपापलीं तपादिककर्में ज्याला अर्पण केल्यावांचून मोक्षसुख पावत नाहींत त्या अतिपवित्रकीर्ति परमात्म्यास माझे वारंवार नमस्कार असोत ॥ १७ ॥ भिल्ल, वायव्यप्रांताकडील ताम्रमुख लोक, तैलंगणांतील आंध्र जातीचे लोक, पुलिंद व पुल्कस हे चांडाळजातींतील लोक, आभीर, कंक, यवन व खस इत्यादि यवनजातींतील लोक आणि जे दुसरेहि पापजातींतील लोक तेदेखील ज्याच्या भक्तांच्या आश्रयानें शुद्ध होतात त्या महाप्रभावशाली ईश्वराला माझा नमस्कार असो ॥ १८ ॥ आत्मज्ञानी पुरुषांनीं ॥ ११ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आत्मत्वेंकरून जाणलेला, ऋग्वेद यजुर्वेद व सामवेद यांनीं आराधना केलेला, यज्ञादि करणारास धर्मरूपी, तपश्चर्या करणारांस तपोरूपी आणि निष्कपटभक्तियुक्त अशा ब्रह्मदेव
व शंकर इत्यादिकांनींहि ज्याचें स्वरूप आश्चर्येंकरून पहाण्यास योग्य आहे असा तो भगवान् आह्मांस प्रसन्न होवो ॥ १९ ॥ लक्ष्मीचा पति, यज्ञांचा पति, देवादिक सर्व
प्रजांचा पति, सर्वांच्या बुद्धींचा साक्षी, सत्य लोकादिक लोकांचा व पृथ्वीचा रक्षक, अंधक वृष्णि व सात्वत या यादवांतील कुलांचा अधिपति व आपत्कालीं रक्षण कर-
णारा आणि भक्तांचा रक्षक जो भगवान् तो मला प्रसन्न होवो ॥ २० ॥ ज्या परमेश्वराच्या चरणांच्या ध्यानरूपी समाधीच्या योगेंकरून शुद्ध झालेल्या बुद्धीनें विवेकी पुरुष,
परमात्म्याचें यथार्थ तत्त्व जाणतात आणि यथामति त्याचें माहात्म्य वर्णन करितात तो मुक्तिदाता भगवान् मला प्रसन्न होवो ॥ २१ ॥ कल्पाच्या आरंभीं ब्रह्मदेवाच्या

लीकैर्निष्कपटैर्भक्तैर्वितर्क्यमत्याश्चर्येण वीक्षणीयं लिंगं मूर्तिर्यस्य सः प्रसीदतु ॥ १९ ॥ सर्वपालकत्वमनुस्मरन्नाह । श्रिय इति । गतिश्च सर्वापत्सु रक्षकः ॥ २० ॥ ज्ञानप्रदत्वम-
नुस्मरन्नाह । यदंघ्रीति द्वाभ्याम् । यस्यांघ्र्योरनुध्यानमेव समाधिस्तेन धौतया शोधितया । यथारुचं रुच्यनुसारेण सगुणनिर्गुणादिभेदैः यद्वा रुक् प्रतिभा यथामतीत्यर्थः ॥२१॥
किंच । पुरा कल्पादावजस्य हृदि सतीं सृष्टिविषयां स्मृतिं वितन्वता येन प्रचोदिता सती सरस्वती तस्य मुखतः किल प्रादुर्भूता । स्वानि लक्षणानि शिक्षाद्युक्तानि यस्याः सा ।

श्रियः पतिर्यज्ञपतिः प्रजापतिर्धियां पतिर्लोकपतिर्धरापतिः ॥ पतिर्गतिश्चांधकवृष्णिसात्वतां प्रसीदतां मे भगवान्सतां पतिः ॥ २० ॥
यदंघ्र्यनुध्यानसमाधिधौतया धियाऽनुपश्यंति हि तत्त्वमात्मनः ॥ वदंति चैतत्कवयो यथारुचं स मे मुकुंदो भगवान्प्रसीदताम्
॥ २१ ॥ प्रचोदिता येन पुरा सरस्वती वितन्वताऽजस्य सतीं स्मृतिं हृदि ॥ स्वलक्षणा प्रादुरभूत्किलाऽस्यतः स मे ऋषीणामृषभः
प्रसीदताम् ॥ २२ ॥ भूतैर्महद्भिर्य इमाः पुरो विभुर्निर्माय शेते यदमूषु पूरुषः ॥ भुंक्ते गुणान्षोडश षोडशात्मकः सोऽलंकृषीष्ट भग-
वान्वचांसि मे ॥ २३ ॥ नमस्तस्मै भगवते व्यासायामिततेजसे ॥ पपुर्ज्ञानमयं सौम्या यन्मुखांबुरुहासवम् ॥ २४ ॥

ऋषीणां ज्ञानप्रदानामृषभः श्रेष्ठः ॥ २२ ॥ इदानीं स्ववाचं श्रोतृजनाह्लादिनीं शृंगारकरुणादिशोभां प्रार्थयते । भूतैरिति । स मे वचांसि अलंकृषीष्टालंकरोतु । अन्यस्य वचसाम-
न्येनालंकारासंभवमाशंक्य तस्यांतर्यामितामाविष्करोति । यो महद्भिर्भूतैरिमाः पुरः शरीराणि सृष्ट्वाऽमूषु पूर्ष्वंतर्यामितया शेते वसति । अत्र पुरुषसमाख्यां प्रमाणयति । यद्यस्मा-
त्पूरुष इति । अतएव य एकादशेंद्रियपंचभूतरूपान्षोडश गुणान्कला भुंक्ते प्रकाशयति पालयतीति वा । तदा त्वात्मनेपदमार्षम् । अत्र हेतुः । यतः षोडशानामात्मा चेतयिता
स्वार्थे कः । न त्वत्र जीवत्वमुच्यते प्रार्थनाविरोधात् ॥ २३ ॥ श्रीव्यासं नमस्कारोति । नम इति । सौम्या भक्ताः । यस्य मुखांबुरुहे आसवो मकरंदस्तम् ॥ २४ ॥

हृदयांत सृष्टिविषयक स्मृतीचा विस्तार करणाऱ्या ज्या परमात्म्यानें, सरस्वतीची प्रेरणा केली असतां, तीच वेदरूपिणी सरस्वती, आपल्या शिक्षाव्याकरणादिक लक्षणां-
सहवर्तमान त्या ब्रह्मदेवाच्या मुखांतून प्रगट झाली, असा ज्ञानदात्यांमध्यें श्रेष्ठ जो भगवान् तो मला प्रसन्न होवो ॥ २२ ॥ जो व्यापक परम पुरुष, पंचमहाभूतांच्या योगानें ह्या
निरनिराळ्या शरीररूपी नगऱ्या निर्माण करून ह्यांमध्यें नियामकत्वेंकरून वास करितो आणि पंच ज्ञानेंद्रियें, पंच कर्मेंद्रियें, पंच प्राण व मन ह्या सोळा तत्त्वांचा प्रेरक होऊन
शब्दस्पर्शादिक सोळा विषयांचा उपभोग घेतो, तो भगवान् माझ्या वाक्यांस, खरेपणानें व श्रोत्यांना गोडी लागून आनंद होईल अशा रीतीनें शृंगारकरुणादिक रसांनीं
अलंकृत करो ॥ २३ ॥ आतां शुकाचार्य वेदव्यासनामक आपल्या गुरूस नमस्कार करितात– भक्तजनांनीं ज्या व्यासाच्या मुखकमलांतील ब्रह्मसूत्रें व पुराणें इत्यादिक

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अप्रतिम ज्ञानमय रसाचें प्राशन केलें आहे. त्या अपरिमित तेजस्वी भगवान् व्यासाला माझा नमस्कार असो ॥ २४ ॥ हे राजन्, जो तूं मला प्रश्न केलास हाच पूर्वी नारदानें ब्रह्मदेवाला केला असतां, ज्याच्या हृदयांत वेद जाग्रत आहेत अशा त्या स्वयंभू ब्रह्मदेवानें, आपणास साक्षात् हरीनें जें सांगितलें होतें ते भागवत पुराण, त्या नारदास सांगितलें ॥ २५ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील द्वितीयस्कंधामध्यें चवथा अध्याय समाप्त झाला ॥ ४ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ५ ॥ नारदानें ब्रह्मदेवाला प्रश्न केला असतां, ब्रह्मदेवानें त्यास काल व कर्म इत्यादि शक्तींनीं केलेली विराट्सृष्टिरूप हरीची लीला वर्णन केली, ही कथा, या पांचव्या अध्यायांत आहे ॥ १ ॥ नारद ह्मणाला– हे देवदेवा, तूं सर्व भूतांची उत्पत्ति करणारा असून सर्वांचा मूळपुरुष आहेस. तुला माझा नमस्कार असो. तें ज्ञानाचें साधन मला सांग कीं, ज्याच्या योगानें

इदानीं प्रश्नोत्तरतया ब्रह्मनारदसंवादं प्रस्तौति । एतदिति । उत्पत्तिसमय एव वेदा गर्भे यस्य । साक्षाद्धरिर्यदाह ॥ २५ ॥ इति द्वितीयस्कंधे टीकायां चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥ पंचमे नारदेनाथ पृष्टः स्रष्टचादिवक्त्यजः ॥ हरेर्लीलां विराट्सृष्टिं कालकर्मादिशक्तिभिः ॥ १ ॥ नारदाय विपृच्छते वेदगर्भोऽभ्यधादित्युक्तं तत्र नारदप्रश्नमाह । देवदेवेति । हे भूतभावन अतएव सर्वेषां पूर्वज अनादे । ज्ञायतेऽनेनेति ज्ञानं तत्साधनं यत्तद्विजानीहि विशेषेण ज्ञापयेत्यर्थः । कथंभूतंआत्मतत्त्वं नितरां दृश्यते येन तत् ॥ १ ॥ उपलक्षणभू-

एतद्देवात्मभू राजन् नारदाय विपृच्छते ॥ वेदगर्भोऽभ्यधात्साक्षाद्यदाह हरिरात्मनः ॥ २५ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे द्वितीयस्कंधे चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥ ॥ नारद उवाच ॥ देवदेव नमस्तेऽस्तु भूतभावन पूर्वज ॥ तद्विजानीहि यज्ज्ञानमात्मतत्त्वनिदर्शनम् ॥ १ ॥ यद्रूपं यदधिष्ठानं यतः सृष्टमिदं प्रभो ॥ यत्संस्थं यत्परं यच्च तत्तत्त्वं वद तत्त्वतः ॥ २ ॥ सर्वं ह्येतद्भवान्वेद भूतभव्यभवत्प्रभुः ॥ करामलकवद्विश्वं विज्ञानावसितं तव ॥ ३ ॥ यद्विज्ञानो यदाधारो यत्परस्त्वं यदात्मकः ॥ एकः सृजसि भूतानि भूतैरेवात्ममायया ॥ ४ ॥

तं विश्वमेवात्मज्ञानसाधनमतस्तद्विशेषं पृच्छति । यद्रूपं येन रूप्यते प्रकाश्यते यदधिष्ठानं यदाश्रयम् । यतो येन सृष्टं यत्संस्थं यस्मिन् लीयते यत्परं यदधीनं यच्चेति यदात्मकं स्वतः सत्कारणतो वेत्यर्थः । तस्य तत्त्वं याथार्थ्यं तत्त्वतो वद ॥ २ ॥ न जानामीति न च वक्तव्यमित्याह । सर्वमिति । भूतं जातं भव्यं जनिष्यमाणं भवत् जायमानं तेषां प्रभुर्यतोऽतो विशिष्टेन ज्ञानेनावसितं निश्चितम् ॥ ३ ॥ आस्तामिदं आदौ तावत्त्वामेव कथयेत्याह । यतो यस्य विज्ञानम् । कस्तव विज्ञानद इत्यर्थः । यदाधारः कस्तवाश्रयः यत्परो यदधीनः यदात्मको यत्स्वरूपः । मम तु त्वमेव स्वतंत्रः परमेश्वर इति बुद्धिः तव तपश्चरणेन तु परशंकया पृच्छामीत्याह । सार्धैश्चतुर्भिः । एकोऽसहायः ॥ ४ ॥

मला आत्म्याच्या खऱ्या स्वरूपाचा पूर्णरीतीनें बोध होईल ॥ १ ॥ हे प्रभो, हें जग ज्याच्या योगानें प्रकाशित होतें, जो या जगाचा आश्रय आहे, ज्यापासून हें उत्पन्न होतें, ज्याचे स्वरूपीं लय पावतें, ज्याच्या स्वाधीन राहतें व ज्याच्या स्वरूपानें आहे त्याचें वास्तविक स्वरूप कोणतें तें मला सांग ॥ २ ॥ हें सर्व तुला माहीत आहे. कारण, तूं पूर्वीं झालेल्या, पुढें होणाऱ्या व सध्या चालू असणाऱ्या जगाचा प्रभु असल्यामुळें, जसा आंवळा हातांत घेतला असतां, त्याचें सर्व स्वरूप पूर्णपणें कळून येतें त्याप्रमाणें ह्या जगाचें स्वरूप तुला, तुझ्या विशिष्ट ज्ञानानें पूर्ण अवगत आहे ॥ ३ ॥ हे ब्रह्मदेवा, प्रथम मला हें सांग कीं, एकटाच तूं आपल्या संकल्पमात्रें करून पंचमहाभूतें उत्पन्न करून, त्यांच्यायोगानें देवमनुष्यादिकांस उत्पन्न करितोस, तर तुला हें सृष्टि उत्पन्न करण्याचें ज्ञान कोणी दिलें? तुला आधार कोणाचा आहे?

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तुझा धनी कोण आहे? व तुझें खरें स्वरूप कोणतें आहे? ॥ ४ ॥ जसा कोळी, आपल्याच तंतुरूप शक्तीचा आश्रय करून भिंतीवर जाळें पसरतो तसा तूं स्वतःच सर्व शक्ति स्वीकारण्याविषयीं कुंठित न होतां श्रमरहित असून आपलेठिकाणींच त्या भूतांचें रक्षण करितोस ॥ ५ ॥ ह्मणून हे विभो, या जगांत उत्तम, मध्यम, किंवा अधम, अशीं देव मनुष्य इत्यादिक जीं नांवें, दोन पायांच्या चयार पायांच्या इत्यादि ज्या आकृति, आणि पांढरा काळा इत्यादिक जे गुण यांनीं, समजण्यासारखे स्थूल सूक्ष्म सर्व पदार्थ तुझ्याखेरीज दुसऱ्यापासून झाले आहेत असें मला वाटत नाहीं. तर तुझ्यापासूनच हें सर्व झालें आहे असें मी जाणतों ॥६॥ परंतु त्या तूं, एकाग्र अंतःकरणानें जें घोर तप केलेंस तेणेंकरून तूं मला खेद उत्पन्न करितोस, आणि दुसरा कोणी तरी ईश्वर असावा अशी आशंका माझ्या मनांत आणितोस ॥ ७ ॥ यास्तव हे सर्वेश्वरा

आत्मनि भावयसे पालयसि स्वयमेव पराभवमप्राप्यन्नक्लमः श्रमरहितः यथोर्णनाभिरात्मन एव शक्तिमवष्टभ्य सृजति तद्वत् ॥ ५ ॥ तस्मादहं त्वस्मिन्विश्वस्मिन्परमुत्तममपरम-धर्मं समं मध्यमं च तत्रापि नाम मनुष्यादि रूपं द्विपदत्वादि गुणः शुक्लत्वादि तैर्भाव्यं साध्यं तत्रापि सदसत्स्थूलं सूक्ष्मं च किंचिदप्यन्यतो न वेद किंतु त्वत्त एव सर्वं भव-तीति मन्ये ॥ ६ ॥ स तथाविधोऽपि भवांस्तपोऽचरदिति यत्तेन नोऽस्मान्खेदयसे मोहयसि । यतः पराशंकां ईश्वरांतराशंकां प्रयच्छसि ॥ ७ ॥ तथैवाहं त्वयानुशासितः शि-

आत्मन्भावयसे तानि न पराभावयन्स्वयम् ॥ आत्मशक्तिमवष्टभ्य ऊर्णनाभिरिवाक्लमः ॥ ५ ॥ नाहं वेद परं ह्यस्मिन् नापरं न समं विभो ॥ नामरूपगुणैर्भाव्यं सदसत्किंचिदन्यतः ॥ ६ ॥ स भवानचरद्घोरं यत्तपः सुसमाहितः ॥ तेन खेदयसे नस्त्वं परा-शंकां प्रयच्छसि ॥ ७ ॥ एतन्मे पृच्छतः सर्वं सर्वज्ञ सकलेश्वर ॥ विजानीहि यथैवेदमहं बुद्ध्येऽनुशासितः ॥ ८ ॥ ब्रह्मोवाच ॥ सम्यक्कारुणिकस्येदं वत्स ते विचिकित्सितम् ॥ यदहं चोदितो धर्मे भगवद्वीर्यदर्शने ॥ ९ ॥ नानृतं तव तच्चापि यथा मां प्रब्रवीषि भोः॥ अविज्ञाय परं मत्त एतावत्त्वं यतो हि मे ॥ १० ॥ येन स्वरोचिषा विश्वं रोचितं रोचयाम्यहम् ॥ यथाऽर्कोऽग्निर्यथा सोमो यथर्क्षग्रहतारकाः ॥ ११ ॥

क्षितः सन् बुद्ध्ये बुद्ध्येयं तथा विजानीहि विशेषेण ज्ञापय ॥ ८ ॥ प्रश्नमभिनंदति । वत्स हे पुत्र तवेदं विचिकित्सितं संदेहः तत्पूर्वकः प्रश्नोऽयं सम्यगित्यर्थः । यतः कारुणिकस्य तवायं प्रश्नः । अत्र हेतुः । यद्यतो भगवद्वीर्यप्रकाशने धर्मे प्रवर्तितोऽस्मि अतस्त्वं जिज्ञासुरपि मयि कृपामेव कृतवानित्यर्थः ॥९॥ ननु त्वमेव भगवानित्युक्तम् । त्वया एकः सृजसि भूतानीत्यादिना सत्यम् । यथा मामीश्वरत्वेन प्रभाषसे तदपि तव भाषणं नात्यंतमनृतं यतः कारणादेतावत्प्रभावस्य भाव एतावत्त्वं मेऽस्ति किंतु मत्तः-परमीश्वरमविज्ञाय ब्रूषे अतः सादृश्यात्तवेयं भ्रांतिर्न तु बुद्धिपूर्वमनृतमित्यर्थः । यत ईश्वरान्ममैतावत्त्वं तमविज्ञायेति वान्वयः ॥१०॥ तर्हि कोऽसावीश्वरः इत्यपेक्षायां भक्त्या-

---

सर्वज्ञा, हें पूर्वोक्त सर्व विचारणाऱ्या मला, तूं असा उपदेश कर कीं, ज्याच्या योगानें मी हें सर्व यथास्तिथपणें समजेन ॥ ८ ॥ ब्रह्मदेव ह्मणाला– हे वत्सा, नारदा, तूं लोकांवर दया करणारा आहेस ह्मणून तुझें हें संदेहपूर्वक विचारणें चांगलें आहे. कारण, हे सौम्यमूर्ते नारदा तूं प्रश्नाच्या योगानें भगवंताच्या गुणानुवर्णनाकडे माझी प्रवृत्ति केलीस. यास्तव मला असें वाटतें कीं, तूं तत्त्वज्ञानेच्छु असूनहि माझ्यावर कृपाच केलीस ॥ ९ ॥ हे नारदा, जें तूं मला ह्मणालास कीं, ‘तूंच भगवान् आहेस’ तें तुझें भाषण खोटें आहे असें नाहीं. कारण, तूं ह्मणतोस तसें माझें ऐश्वर्य आहे, परंतु माझ्यापेक्षां श्रेष्ठ जो ईश्वर त्यास तूं न जाणतां भ्रांतीनें मलाच जगदीश्वर ह्मणतोस. नाहींतर तुझे असे उद्गार निघाले नसते ॥ १० ॥ तर जसे या जगांत– सूर्य, अग्नि, चंद्र, नक्षत्रें, ग्रह तारावगैरे तेजस्वी गोल भगवंताच्याच प्रकाशानें लोकांस प्रकाशित

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करितात तसा मीहि, ज्या स्वयंप्रकाश ईश्वरानें प्रकाशित केलेल्या जगाचें, सृष्टीनें स्पष्टीकरण करितों ॥ ११ ॥ हे नारदा, तुझ्यासारखे लोक ज्या परमेश्वराच्या अजिंक्य मायेच्या योगानें मोहित होऊन मलाच जगद्गुरु (सृष्टिकर्ता परमेश्वर) असें ह्मणतात. त्या षड्गुणैश्वर्यसंपन्न वासुदेवाला आह्मी नमस्कार करितों ॥ १२ ॥ माझें कपट हा भगवान् जणतो असें जाणून ज्या परमेश्वराच्या नजरेसमोर उभें राहवयास देखील लज्जित होणाऱ्या ह्या मायेनें मोहित झालेले मंदबुद्धि पुरुष, 'हें सर्व माझें व मी सर्व कर्ता' अशी बडबड करितात ॥ १३ ॥ हे नारदा, पंच महाभूतें, जन्मास निमित्त असें प्राण्याचें पूर्वसंचित कर्म, त्याचा क्षोभक काल, त्याच्या परिणामाचा हेतु स्वभाव

नमस्कुर्वन्नेव तं कथयति त्रिभिः । येन स्वप्रकाशेन रोचितं प्रकाशितमेव प्रकाशयामि सृष्ट्याभिव्यक्तं करोमि । यथार्कादयश्चैतन्यप्रकाश्यमेव प्रकाशयंति । तथाच श्रुतिः । न तत्र सूर्यो भाति न चंद्रतारकं नेमा विद्युतो भांति कुतोऽयमग्निः ॥ तमेव भांतमनुभाति सर्वं तस्य भासा सर्वमिदं विभातीति ॥ ११ ॥ तस्मै नमो धीमहि यस्य मायया विमोहिताः संतो युष्मदादयो मां जगद्गुरुं जगत्कारणं वदंति तस्मै ॥ १२ ॥ यन्मायपेति मायासंबंधोक्तेस्तस्य दुर्जयत्वोक्तेश्च तस्यापि किमस्ति संसारो नैवेत्याह । मत्कपटमसौ जानातीति यस्य दृष्टिपथे स्थातुं विलज्जमानयैव तस्मिन्स्वकार्यमकुर्वत्याऽमुया मायया विमोहिता अस्मदादयो दुर्धियोऽविद्यावृतज्ञाना एव केवलं विकत्थंते श्लाघंते अनेन यद्रूपमित्यस्य

तस्मै नमो भगवते वासुदेवाय धीमहि ॥ यन्मायया दुर्जयया मां ब्रुवंति जगद्गुरुम् ॥ १२ ॥ विलज्जमानया यस्य स्थातुमीक्षापथेऽमुया ॥ विमोहिता विकत्थंते ममाहमिति दुर्धियः ॥ १३ ॥ द्रव्यं कर्म च कालश्च स्वभावो जीव एव च ॥ वासुदेवात्परो ब्रह्मन्न चान्योऽर्थोऽस्ति तत्त्वतः ॥ १४ ॥ नारायणपरा वेदा देवा नारायणांगजाः ॥ नारायणपरा लोका नारायणपरा मखाः ॥ १५ ॥ नारायणपरो योगो नारायणपरं तपः ॥ नारायणपरं ज्ञानं नारायणपरा गतिः ॥ १६ ॥ तस्यापि द्रष्टुरीशस्य कूटस्थस्याखिलात्मनः ॥ सृज्यं सृजामि सृष्टोऽहमीक्षयैवाभिचोदितः ॥ १७ ॥ सत्त्वं रजस्तम इति निर्गुणस्य गुणास्त्रयः ॥ स्थितिसर्गनिरोधेषु गृहीता मायया विभोः ॥ १८ ॥

प्रश्नस्योत्तरमुक्तं भवति ॥ १३ ॥ तदेवं स्वस्मादन्यं परमेश्वरं निरूप्येदानीं यदधिष्ठानमित्यादि नवप्रश्नानां स एवाधिष्ठानादिकं सर्वमित्युत्तरं वक्तुं तद्व्यतिरेकेणान्यस्यासत्त्वमाह। द्रव्यमिति । द्रव्यं महाभूतान्युपादानरूपाणि कर्म जन्मनिमित्तं कालस्तत्क्षोभकः स्वभावस्तत्परिणामहेतुः जीवो भोक्ता वासुदेवात्परोऽन्योऽर्थो नास्ति कारणाव्यतिरेकात्कार्यस्य ॥१४॥ तत्प्रपंचयति द्वाभ्याम् । नारायणः परः कारणं येषां ते । अनेनैव शास्त्रयोनित्वप्रतिपादनेनेश्वरे प्रमाणं सर्वज्ञत्वादिकं चोक्तम् । देवाश्च तदंगाज्जाता अतो न तद्व्यतिरिक्ताः लोकाः स्वर्गादयस्तदानंदांशाः मखास्तत्साधनभूताः ॥ १५ ॥ योगः प्राणायामादिः तपस्तत्साध्यं चित्तैकाग्र्यं ज्ञानं तत्साध्यं गतिस्तत्फलम् । अनेनैव सर्वं तदधीनमित्युक्तम् ॥ १६ ॥ तर्हि त्वं किं करोषीत्यपेक्षायामाह । तस्य सृज्यमपि तेन सृष्टोऽहं सृजामि । ईक्षया कटाक्षेण तत्र हेतवो द्रष्टुरित्यादयः ॥ १७ ॥ ननु कुतोऽयं जीवेश्वरविभागो

आणि भोक्ता जीव हे सर्वही अर्थ, खरोखर पाहिले असतां वासुदेवाहून निराळे नाहींत ॥ १४ ॥ वास्तव सर्व वेद नारायणपर आहेत, देवही नारायणापासूनच उत्पन्न झालेले आहेत. स्वर्गादि लोक, अग्निष्टोमादिक यज्ञ, अष्टांगयोग, स्वधर्माचरणरूप तप, अपरोक्ष ज्ञान आणि मोक्षरूप गति हीं सर्व नारायणपरच आहेत ॥ १५ ॥ १६ ॥ सर्वसाक्षी, सर्वांचें मूळकारण, निर्विकारी आणि सर्वात्मा अश त्या ईश्वराच्या कटाक्षानें प्रेरित होत्साता, व त्यानेंच उत्पन्न केलेला मी, त्यानेंच निर्माण करावयाचें हें जग निर्माण करितों ॥ १७ ॥ त्याच सर्वव्यापक निर्गुण परमेश्वरानें, जगाचे स्थिति, उत्पत्ति व संहार करण्याकरितां मायेनें सत्त्व, रज आणि तम असे तीन गुण स्वीकार लेले ॥ १३ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आहेत ॥ १८ ॥ ते गुण, पंचमहाभूतें, देवता व इंद्रियें यांस आश्रयभूत होऊन, त्या देहेंद्रियादिकांचेठिकाणीं 'मी व माझें' इत्यादिक अभिमान धारण करणारा वस्तुतः भगवंताचा अंश असल्यामुळें सर्वदा मुक्त परंतु मायेचा स्वीकार करणारा असा जो जीव त्याला बद्ध करितात ॥ १९ ॥ हे नारदा, आवरण करणाऱ्या सत्त्व, रज व तम या तीन गुणांनीं ज्याचें स्वरूप जीवांस समजलें जात नाहीं असा, तोच हा अधोक्षज भगवान्, सर्वांचा व माझा नियंता ईश्वर आहे ॥ २० ॥ त्या मायानियंत्या परमेश्वरानें आपण बहुरूप होण्याची इच्छा केली, तेव्हां त्यानें, आपल्या मायेनें आपल्या स्वरूपीं सहज प्राप्त झालेल्या, काल, जीवांचें अदृष्ट, कर्म आणि स्वभाव यांचा स्वीकार केला

यतस्त्वं प्रेर्यः स च प्रेरकः स्यादित्यपेक्षायां जीवेश्वरविभागहेतुमाह त्रिभिः । सत्त्वमिति । निर्गुणस्यापीश्वरस्यैते त्रयो गुणा बध्नंतीत्युत्तरेणान्वयः । कथंभूताः । तेनैव स्वातं-त्र्येण स्थित्याद्यर्थं मायया गृहीताः ॥१८॥ वस्तुतः सर्वदा मुक्तमपि मायिनं मायाविषयं पुरुषं जीवं बध्नंति । क । कार्यमधिभूतं कारणमध्यात्मं कर्ताधिदैवतं तेषां भावस्तत्त्वं तस्मिन् । द्रव्यं महाभूतानि ज्ञानशब्देन देवताः क्रिया इंद्रियाणि तदाश्रयास्तेषां कारणभूतास्तत्तदभिमानेन बध्नंति ॥१९॥ अतः स एष वक्ष्यमाण एभिर्गुणैर्लिंगैर्जीवानामावरकै-रुपाधिभिः सुष्ठुलक्षिता गतिस्तत्त्वं यस्य सः स्वैर्भक्तैरेव लक्षिता गतिस्तत्त्वं यस्येति वा ॥ २० ॥ तस्य सृष्टिप्रकारमाह । कालमिति । कर्म जीवादृष्टम् । विबुभूषुर्विविधं भवितुमि-

कार्यकारणकर्तृत्वे द्रव्यज्ञानक्रियाश्रयाः ॥ बध्नंति नित्यदा मुक्तं मायिनं पुरुषं गुणाः ॥१९॥ स एष भगवाँल्लिंगैस्त्रिभिरेभिरधोक्षजः ॥
स्वलक्षितगतिर्ब्रह्मन्सर्वेषां मम चेश्वरः ॥ २० ॥ कालं कर्म स्वभावं च मायेशो मायया स्वया ॥ आत्मन्यदृच्छया प्राप्तं विबुभू-
षुरुपाददे ॥२१॥ कालाद्गुणव्यतिकरः परिणामः स्वभावतः ॥ कर्मणो जन्म महतः पुरुषाधिष्ठितादभूत् ॥२२॥ महतस्तु विकुर्वाणाद्रजःस-
त्वोपबृंहितात् ॥ तमःप्रधानस्त्वभवद्द्रव्यज्ञानक्रियात्मकः ॥ २३ ॥ सोऽहंकार इति प्रोक्तो विकुर्वन्समभूत्त्रिधा ॥ वैकारिकस्तै-
जसश्च तामसश्चेति यद्भिदा ॥ द्रव्यशक्तिः क्रियाशक्तिर्ज्ञानशक्तिरिति प्रभो ॥ २४ ॥

च्छन् ॥ २१ ॥ गुणानां व्यतिकरः क्षोभः साम्यत्यागः स्वभावतः परिणामो रूपांतरापत्तिः पुरुष ईश्वरस्तेनाधिष्ठितत्वं त्रयाणां विशेषणम् । महतो महत्तत्त्वस्य ॥ २२ ॥ महत्तत्त्वाद्विकुर्वाणाद्विक्रियमाणात् तस्य च क्रियाज्ञानशक्तित्वात्त्रिगुणत्वेऽपि रजःसत्त्वाभ्यामुपबृंहितत्वं अहंकारस्य त्वावरकत्वात्तमःप्रधानत्वम् । अतएवाहंकारकार्येषु ताम-समाकाशादिकं बहु राजसं सात्विकं चाल्पं एवं तदुपाधिकेषु जीवेष्वपि तथैव तामसाधिक्यम् ॥ २३ ॥ स च विकुर्वन्रूपांतरं गच्छन् । त्रैविध्यमेवाह । वैकारिकः सात्विक-स्तैजसो राजसः यद्भिदा यस्य भेदः द्रव्यशक्तिरित्यादीनि प्रातिलोम्येन त्रयाणां लक्षणानि द्रव्ये महाभूतान्ये शक्तिर्यस्य क्रियास्विंद्रियेषु शक्तिर्यस्य ज्ञानेषु देवेषु शक्तिर्यस्य ।

॥ २१ ॥ तेव्हां ईश्वरानें स्वीकारलेल्या कालापासून सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांमध्यें कमजास्तपणा होऊन, ईश्वरानें स्वीकारलेल्या स्वभावापासून त्या गुणाचें रूपांतर झालें आणि कर्मापासून महत्तत्त्व उत्पन्न झालें ॥ २२ ॥ नंतर रजोगुण व सत्त्वगुण यांनीं संवर्धित असें महत्तत्त्व विकार पावूं लागलें असतां, त्यापासून ज्यामध्यें तमोगुण अधिक आहे असा द्रव्य (पंचमहाभूतें) ज्ञान (मन व देवता) क्रिया (इंद्रियें) यांनीं युक्त असा एक विकार उत्पन्न झाला ॥ २३ ॥ त्याला अहंकार असें ह्मणतात. हे समर्था नारदा, तो अहंकार रूपांतर पावूं लागला तेव्हां त्याचे सात्विक, राजस आणि तामस असे तीन भेद झाले, ते द्रव्यशक्ति (पंचमहाभूतें उत्पन्न कर-णारा) क्रियाशक्ति (इंद्रियें उत्पन्न करणारा) आणि ज्ञानशक्ति (अंतःकरण व देवता उत्पन्न करणारा) असे मानिले आहेत ॥ २४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुढें विकार पावणाऱ्या तामस अहंकारापासून आकाश झालें. त्याचें सूक्ष्मरूप व मुख्य गुण शब्द आहे, ज्याच्यापासून द्रष्टा (पाहणारा) आणि दृश्य (दिसणारी वस्तु) या समजता त. जसें भिंतीच्या आड उभें राहून एकादा मनुष्य 'हा हत्ती हा हत्ती' असें ओरडला तर त्या 'हा हत्ती' या शब्दावरून आपल्याला द्रष्टा आणि दृश्य समजून येतात कीं, भिंती आड कोणी मनुष्य असून तो हत्तीला पहात आहे ॥ २५ ॥ नंतर विकार पावणाऱ्या त्या आकाशापासून स्पर्शगुणानें युक्त असा वायु उत्पन्न झाला. तो आकाशाच्या अनुवृत्तीमुळें शब्दवान्ही होय. त्या वायूपासून देहाचें धारण होऊन इंद्रियें, मन व शरीर यांचेठिकाणीं टवटवी प्राप्त होते ॥ २६ ॥ नंतर काल कर्म व स्वभाव याहींकरून विकार पावणाऱ्या वायूपासून रूपगुणानें युक्त असें तेज उत्पन्न झालें तें वायु व आकाश यांच्या गुणांच्या अनुवृत्तीनें स्पर्श व शब्द यांनींही युक्त आहे ॥ २७ ॥ नंतर विकार

हेप्रभो बोद्धुं शक्त ॥ २४ ॥ भूतादेरिति तामसस्य विशेषणम् । ननु तामसात्प्रथमं शब्दो भवतीति प्रसिद्धम् । सत्यं स तु तस्य नभसो मात्रा सूक्ष्मं रूपं गुणश्चासाधारणो व्यावर्तको धर्मः शब्दद्वारा नभ उत्पद्यत इत्यर्थः । एवमेव स्पर्शादिष्वपि द्रष्टव्यं शब्दस्य लक्षणं लिंगमिति कुड्याद्यंतरितेन केनचिदुच्चैर्गजो गज इत्युक्ते यो गजद्रष्टा यश्च तेन दृश्यो गजस्तयोर्लिंगं बोधकम् । लिंगविशेषणत्वाच्चच्छब्दस्य षंढत्वम् ॥ २५ ॥ परस्य नभसः कारणत्वेनान्वयाच्छब्दवांश्च वायुस्तस्यैव लक्षणं प्राणो देहधारणम् । ओजःस-

तामसादपि भूतादेर्विकुर्वाणादभून्नभः ॥ तस्य मात्रा गुणः शब्दो लिंगं यद्द्रष्टृदृश्ययोः ॥ २५ ॥ नभसोऽथ विकुर्वाणादभूत् स्पर्शगुणोऽनिलः ॥ परान्वयाच्छब्दवांश्च प्राण ओजः सहो बलम् ॥ २६ ॥ वायोरपि विकुर्वाणात् कालकर्मस्वभावतः ॥ उदपद्यत तेजो वै रूपवत् स्पर्शशब्दवत् ॥ २७ ॥ तेजसस्तु विकुर्वाणादासीदंभो रसात्मकम् ॥ रूपवत्स्पर्शवच्चांभो घोषवच्च परान्वयात् ॥ २८ ॥ विशेषस्तु विकुर्वाणादंभसो गंधवानभूत् ॥ परान्वयाद्रसस्पर्शशब्दरूपगुणान्वितः ॥ २९ ॥ वैकारिकान्मनो जज्ञे देवा वैकारिका दश ॥ दिग्वातार्कप्रचेतोश्विवह्नींद्रोपेंद्रमित्रकाः ॥ ३० ॥

होबलानींद्रियमनःशरीराणां पाटवानि तेषां हेतुरित्यर्थः ॥ २६ ॥ उदपद्यत उत्पन्नं स्वतो रूपवत्तेजो वायुनभसोः कारणभूतयोरन्वयात्स्पर्शशब्दवच्च । एवमंभसः पृथिव्याश्च परान्वयाधिक्याद्गुणाधिक्यम् ॥ २७ ॥ घोषः शब्दः ॥ २८ ॥ विशेषः पृथ्वी पृथिव्याश्च परान्वयाधिक्याद्गुणाधिक्यम् ॥ २९ ॥ मनःशब्देनैव तदधिष्ठाता चंद्रोऽपि द्रष्टव्यः । अन्ये च दश देवा वैकारिकाः सात्विकाहंकारकार्याः तानाह । दिशश्च वातश्च अर्कश्च प्रचेताश्च अश्विनौ च एते पंच श्रोत्रत्वक्चक्षुजिह्वाघ्राणानामधिष्ठातारः । वह्निश्च इंद्रश्च

पावणाऱ्या तेजापासून रसगुणात्मक जल उत्पन्न झालें तें जल, तेज, वायु व आकाश यांच्या प्रवेशानें युक्त असल्यामुळें रूपयुक्त, स्पर्शयुक्त व शब्दयुक्त झालें ॥ २८ ॥ नंतर विकार पावणाऱ्या उदकापासून गंधगुणानें युक्त अशी पृथिवी झाली, तींत कारणभूत आकाशादिकांचा प्रवेश होऊन शब्द, स्पर्श, रूप, रस हे गुण प्राप्त झाले ॥ २९ ॥ सात्विक अहंकारापासून मन झालें व त्याचा अधिष्ठाता चंद्र उत्पन्न झाला आणि त्याच सात्विक अहंकारापासून दिशा, वायु, सूर्य, वरुण, अश्विनीकुमार अग्नि, इंद्र, विष्णु, मित्र व प्रजापति या दहा देवता उत्पन्न झाल्या. त्यांत पहिल्या पांच देवता—श्रोत्र, त्वचा, चक्षु, जिव्हा आणि घ्राण या पांच ज्ञानेंद्रियांच्या अधिष्ठात्या आहेत व दुसऱ्या पांच देवता— वाक्, पाणी, पाद, पायु आणि उपस्थ या पांच कर्मेंद्रियांच्या अधिष्ठात्या आहेत ॥ ३० ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राजसाहंकार विकार पावूं लागला असतां त्यापासूनं दहा इंद्रियें उत्पन्न झालीं. तीं—श्रोत्र, त्वचा, घ्राण, दृष्टि, आणि जिव्हा, हीं पांच ज्ञानेंद्रियें आणि वाक्, पाणी, पाद पायु व उपस्थ हीं पांच कर्मेंद्रियें होत. ज्ञानशक्तीनें युक्त बुद्धि व क्रियाशक्तीनें युक्त प्राण हीं दोनहि राजस अहंकाराचीं कार्यें होत ॥ ३१ ॥ याप्रमाणें कारणसृष्टि सांगून, आतां कार्यसृष्टि सांगतात—हे ब्रह्मवित्तमा नारदा, पंच महाभूतें, इंद्रियें, मन व सत्त्वादिक तीन गुण हे पदार्थ जेव्हां परस्परांशीं मिळून राहिलेले नव्हते तेव्हां ते सुखादि भोग भोगण्याचें साधन जें शरीर त्यास निर्माण करण्याविषयीं समर्थ झाले नाहींत ॥ ३२ ॥ नंतर ज्या कालीं भगवंताच्या शक्तीनें त्यांस प्रेरणा केली तेव्हां ते पंचमहाभूतादि पदार्थ एकमेकांशीं मिळून त्यांनीं प्रधानगुणात्मक (कार्यकारणात्मक) अंश ग्रहण करून समष्टि (समुदाय) व व्यष्टि (अवयव) असें दोन प्रकारचें पिंडब्रह्मां-

---

उपेंद्रश्च मित्रश्च कश्च प्रजापतिः एते पंच वाक्पाणिपादपायूपस्थानामधिष्ठातारः ॥ ३० ॥ यतो ज्ञानशक्तिर्बुद्धिः क्रियाशक्तिः प्राणश्च तैजसाहंकारकार्यौ अतो ज्ञानक्रियाविशेषरूपाणींद्रियाण्यपि तैजसादभवन्नित्यर्थः । तान्याह । श्रोत्रमिति । दोः पाणिः मेढ्रमुपस्थः । क्रमस्त्वत्र न विवक्षितः ॥ ३१ ॥ एवं कारणसृष्टिमुक्त्वा कार्यसृष्टिमाह । यदा एते असंगता अमीलिता आसन् अतएव यदा आयतनस्य शरीरस्य निर्माणे न शेकुः ॥ ३२ ॥ तदा सदसत्त्वं प्रधानगुणभावमुपादाय स्वीकृत्य उभयं समष्टिव्यष्ट्यात्मकं

तैजसात्तु विकुर्वाणादिंद्रियाणि दशाभवन् ॥ ज्ञानशक्तिः क्रियाशक्तिर्बुद्धिः प्राणस्तु तैजसौ ॥ श्रोत्रं त्वग्घ्राणदृग्जिह्वावाग्दोर्मेढ्रांघ्रिपायवः ॥ ३१ ॥ यदैतेऽसंगता भावा भूतेंद्रियमनोगुणाः ॥ यदायतननिर्माणे न शेकुर्ब्रह्मवित्तम ॥ ३२ ॥ तदा संहत्य चान्योऽन्यं भगवच्छक्तिचोदिताः ॥ सदसत्त्वमुपादाय चोभयं ससृजुर्ह्यदः ॥ ३३ ॥ वर्षपूगसहस्रांते तदंडमुदकेशयम् ॥ कालकर्मस्वभावस्थो जीवोऽजीवमजीवयत् ॥ ३४ ॥ स एव पुरुषस्तस्मादंडं निर्भिद्य निर्गतः ॥ सहस्रोर्वंघ्रिबाह्वक्षः सहस्राननशीर्षवान् ॥ ३५ ॥ यस्येहावयवैर्लोकान्कल्पयंति मनीषिणः ॥ कव्यादिभिरधः सप्त सप्तोर्ध्वं जघनादिभिः ॥ ३६ ॥ पुरुषस्य मुखं ब्रह्म क्षत्रमेतस्य बाहवः ॥ ऊर्वोर्वैश्यो भगवतः पद्भ्यां शूद्रोऽभ्यजायत ॥ ३७ ॥ भूर्लोकः कल्पितः पद्भ्यां भुवर्लोकोऽस्य नाभितः ॥ हृदा स्वर्लोक उरसा महर्लोको महात्मनः ॥ ३८ ॥

शरीरम् ॥ ३३ ॥ कालकर्मस्वभावानधिष्ठाय स्थितो जीवयतीति जीवः परमात्मा ऽजीवमचेतनं जीवयच्चेतयति स्म ॥ ३४ ॥ निर्भिद्य पृथक्कृत्य स्थित इत्यर्थः ॥ ३५ ॥ तदवयवैर्लोकरचनामाह । यस्येति । कटिरित्यूरुमूलयोः पश्चाद्भागः जघनं पुरोभागः अधः सप्तलोकानतलादीन् । उर्ध्वं भूरादीन्सप्त ॥ ३६ ॥ वर्णानां तत उत्पत्तिं दर्शयति । पुरुषस्येति । ब्रह्म ब्राह्मणो मुखमिति कार्यकारणयोरभेदविवक्षयोक्तं बाहव इति च क्षत्रं क्षत्रियः ॥ ३७ ॥ इदानीमुपासनार्थं लोककल्पनाभेदान्दर्शयन्सप्तलोकपक्षमाह द्वाभ्याम् ।

डात्मक हें शरीर उत्पन्न केलें ॥ ३३ ॥ तें शरीर, हजारो वर्षेंपर्यंत उदकांत निर्जीव राहिलें असतां, पुढें कालकर्मस्वभावांस अनुसरणाऱ्या परमात्म्यानें (त्यांत प्रवेश करून) त्या निर्जीव शरीरास सजीव केलें ॥ ३४ ॥ नंतर ज्याला अनंत मांड्या, पाय, बाहु व नेत्र आहेत व ज्याला अनंत मुखें व मस्तकें आहेत असा तोच परमात्मा त्या ब्रह्मांडाचा भेद करून त्यांतून पुरुषरूपानें बाहेर पडला ॥ ३५ ॥ विद्वान् पुरुष, ज्या परमेश्वराच्या अवयवांनीं ब्रह्मांडांतील चवदा लोकांची कल्पना करितात, त्यांत कमरेखालच्या सात अवयवांनीं अतलादिक सात लोकांची व कमरेवरच्या 'कटीचा पूर्व भाग इत्यादिक' सात अवयवांनीं भूर्लोकादिक सात लोकांची कल्पना करितात ॥ ३६ ॥ त्या विराट्पुरुषाचें मुख ब्राह्मण होय. त्याचे बाहू क्षत्रिय होत. त्या भगवंताच्या मांड्यांपासून वैश्य उत्पन्न झाले व पायांपासून शूद्र उत्पन्न झाले ॥ ३७ ॥ या विराड्रूपी ईश्वराच्या पायांपासून

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कमरेपर्यंतच्या भागानें सप्तपाताळांची व भूलोकाची कल्पना केली आहे. बेंबीपासून भुवर्लोक कल्पिला आहे, हृदयानें स्वर्गलोक, व वक्षःस्थलानें महर्लोक कल्पिला आहे ॥ ३८ ॥ त्याच्या कंठाचेठिकाणीं जनलोकाची कल्पना केली आहे. त्याच्या दोन स्तनांपासून किंवा दोन ओष्ठांपासून तपोलोकाची कल्पना केली आहे. त्याच्या मस्तकांनीं सत्यलोकाची कल्पना केली आहे. वैकुंठलोक हा, उत्पन्न केलेल्या लोकांपैकीं नव्हे, तर तो निराळाच अनादि आहे ॥ ३९ ॥ त्या पुरुषाच्या कमरेपासून अतलाची मांड्यांपासून वितलाची, गुडघ्यांपासून पवित्र अशा सुतलाची, पायांच्या पोटर्‍यांपासून तलातलाची, पायांच्या घोट्यांपासून महातलाची, पावलांच्या पुढच्या भागांपासून रसातलाची व पावलांच्या तळव्यांपासून पाताळाची कल्पना केली आहे. याप्रमाणें तो पुरुष चतुर्दशलोकरूपी आहे ॥ ४० ॥ ४१ ॥ आतां कोठें तीनच लोकांच्या

भूर्लोकः पातालमारभ्य पद्भ्यां कटिपर्यंताभ्याम् ॥ ३८ ॥ स्तनद्वयादित्युपासनार्थत्वादूर्ध्वाधोभाववैपरीत्यं न दोषः । यद्वा । स्तनच्छब्दं कुर्वच्चदोष्ठद्वयं तस्मादित्यर्थः । ब्रह्मलोको वैकुंठाख्यः । सनातनो नित्यः नतु सृज्यप्रपंचांतर्वर्तीत्यर्थः ॥ ३९ ॥ इदानीं चतुर्दशलोकपक्षं दर्शयति । तत्र जघनादिभिर्भूरादयः पूर्वोक्ता एव सप्त । कट्यादिभिरधः सप्त लोकानाह । तत्कट्यामिति द्वाभ्याम् । शुद्धं हरिभक्तनिवासत्वात् ॥ ४० ॥ ४१ ॥ त्रिलोकपक्षमाह । भूर्लोकः पातालादिसहितः ॥ ४२ ॥ ॥ इति द्वितीयस्कंधे टीकायां

ग्रीवायां जनलोकश्च तपोलोकः स्तनद्वयात् ॥ मूर्धभिः सत्यलोकस्तु ब्रह्मलोकः सनातनः ॥ ३९ ॥ तत्कट्यां चातलं क्लृप्तमूरुभ्यां वितलं विभोः ॥ जानुभ्यां सुतलं शुद्धं जंघाभ्यां तु तलातलम् ॥ ४० ॥ महातलं तु गुल्फाभ्यां प्रपदाभ्यां रसातलम् ॥ पातालं पादतलत इति लोकमयः पुमान् ॥ ४१ ॥ भूर्लोकः कल्पितः पद्भ्यां भुवर्लोकोऽस्य नाभितः ॥ स्वर्लोकः कल्पितो मूर्ध्ना इति वा लोककल्पना ॥ ४२ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे द्वितीयस्कंधे पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥ ब्रह्मोवाच ॥ वाचां वह्नेर्मुखं क्षेत्रं छंदसां सप्त धातवः ॥ हव्यकव्यामृतान्नानां जिह्वा सर्वरसस्य च ॥ १ ॥

पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥ ॥ षष्ठे विराड्विभूतिश्च मोक्षाध्यात्मादिभेदतः ॥ दृढीकृतं च पूर्वोक्तं सर्वं पुरुषसूक्ततः ॥ १ ॥ इदानीं वैराजस्य विभूतिः सप्रपंचमनुवर्ण्यते । वाचामस्मदादिवागिंद्रियाणां तदधिष्ठातुर्वह्नेश्च तस्य मुखं क्षेत्रमुत्पत्तिस्थानम् । छंदसां गायत्र्यादीनां सप्तानां तस्य सप्त धातवस्त्वगादयः क्षेत्रम् । हव्यं देवानामन्नं कव्यं पितॄणां अमृतं तदुभयशेषो मनुष्याणां तेषामन्नानां सर्वरसस्य मधुरादेः षड्विधस्य चकारादस्मदादिरसनेंद्रियस्य तदधिष्ठातुर्वरुणस्य चैतस्य जिह्वा क्षेत्रमुत्पत्तिस्थानम् । एवं सर्वत्रानुक्रमुन्नेयम् ॥ १ ॥

कल्पनेचा पक्ष सांगितला आहे तो असा—त्या पुरुषाच्या पायांपासून भूलोकाची कल्पना केली आहे, नाभीपासून भुवर्लोकाची कल्पना केली आहे आणि मस्तकानें स्वर्लोकाची कल्पना केली आहे; अशीहि लोककल्पना आहे. तेथें भूर्लोकादिकांमध्यें पाताळादिकांचा अंतर्भाव समजावा ॥ ४२ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील द्वितीयस्कंधामध्यें हा पांचवा अध्याय समाप्त झाला ॥ ५ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या सहाव्या अध्यायाचेठिकाणीं आध्यात्मिक आधिभौतिक आणि आधिदैविक या भेदांनीं विराट्पुरुषाच्या विभूति सांगितल्या आहेत आणि पूर्वी सांगितलेल्या सर्व विषयांचें पुरुषसूक्तानें दृढीकरण केलें आहे ॥ १ ॥ ब्रह्मदेव ह्मणाला—हे नारदा, विराट्पुरुषाचें मुख हें, सर्व प्राणिमात्रांच्या वाणी व त्यांची अधिष्ठात्री देवता अग्नि, यांचें उत्पत्तिस्थान आहे. त्याच्या त्वचादि सप्तधातु ह्या गायत्र्यादि सप्तछंदांचें उत्पत्तिस्थान आहेत. त्याची जिव्हा, ही हव्य (देवांचें अन्न) कव्य (पितरांचें अन्न) अमृत (यज्ञशेष मनुष्यांचें अन्न) मधुरादिक सर्व रस, सर्व प्राण्याचीं रसनेंद्रियें व

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्यांचा अधिपति वरुण, यांचें उत्पत्तिस्थान होय ॥ १ ॥ त्याच्या नाकपुड्या, सर्वांचे प्राण व त्यांचा अधिपति वायु यांचें परम उत्पत्तिस्थान होत. त्याचें घ्राणेंद्रिय,
अश्विनीकुमार, औषधि आणि सामान्य व विशेष सुगंध यांचें उत्पत्तिस्थान होय ॥ २ ॥ त्याचें चक्षुइंद्रिय, रूप आणि प्रकाश यांचें उत्पत्तिस्थान आहे. त्याचे नेत्रगो-
लक (बुबुळ), स्वर्ग आणि सूर्य यांचें उत्पत्तिस्थान आहेत. त्याचे कर्ण (कानाच्या पाळी), दिशा व तीर्थें यांचें उत्पत्तिस्थान आहेत. त्याचें श्रोत्रेंद्रिय, आकाश व शब्द
यांचें उत्पत्तिस्थान आहे ॥ ३ ॥ त्याचें शरीर, सुवर्णादि पदार्थ, व शोभा यांचें उत्पत्तिस्थान आहे. त्याची त्वचा, स्पर्श, वायु व सर्व प्रकारचे यज्ञ यांचें उत्पत्तिस्थान
आहे ॥ ४ ॥ त्या विराट्पुरुषाच्या अंगावरील रोम, सर्व वृक्षांचें किंवा ज्या वृक्षांच्या योगानें यज्ञाची उत्तमप्रकारें सिद्धता होत्ये त्यांचें उत्पत्तिस्थान आहेत. या विराट्-

सर्वासूनामस्मदादिप्राणानां तस्य नासे नासारंध्रे परमायने उत्तमक्षेत्रे । मोदप्रमोदयोश्च सामान्यविशेषगंधयोर्घ्राणो घ्राणेंद्रियं परमायनम् ॥ २ ॥ रूपाणां तेजसां
रूपप्रकाशानां चक्षुरिंद्रियम् । अक्षिणी नेत्रगोलके सर्वत्र षष्ठ्यंतानां प्रथमांतं क्षेत्रं द्रष्टव्यम् । कर्णौ श्रोत्राधिष्ठाने श्रोत्रमिंद्रियं तस्य गात्रं शरीरं वस्तूनां ये सारांशास्तेषां
भाजनं स्थानम् ॥ ३ ॥ अस्य त्वक् स्पर्शस्य वायोश्चेत्यर्थः । सर्वस्य मेधस्य यज्ञस्य उद्भिज्जजातीनां सर्ववृक्षाणाम् । यैर्वृक्षैर्यज्ञः सम्यक् साधितस्तेषामेव वा ॥ ४ ॥ केशा

सर्वासूनां च वायोश्च तन्नासे परमायने ॥ अश्विनोरोषधीनां च घ्राणो मोदप्रमोदयोः ॥ २ ॥ रूपाणां तेजसां चक्षुर्दिवः सूर्यस्य चा-
क्षिणी ॥ कर्णौ दिशां च तीर्थानां श्रोत्रमाकाशशब्दयोः ॥ तद्गात्रं वस्तुसाराणां सौभगस्य च भाजनम् ॥ ३ ॥ त्वगस्य स्पर्शवायो-
श्च सर्वमेधस्य चैव हि ॥ रोमाण्युद्भिज्जजातीनां यैर्वा यज्ञस्तु संभृतः ॥ ४ ॥ केशश्मश्रुनखान्यस्य शिलालोहाभ्रविद्युताम् ॥ बाहवो
लोकपालानां प्रायशः क्षेमकर्मणाम् ॥ ५ ॥ विक्रमो भूर्भुवः स्वश्च क्षेमस्य शरणस्य च ॥ सर्वकामवरस्यापि हरेश्चरण आस्पदम्
॥ ६ ॥ अपां वीर्यस्य सर्गस्य पर्जन्यस्य प्रजापतेः ॥ पुंसः शिश्न उपस्थस्तु प्रजात्यानंदनिर्वृतेः ॥ ७ ॥ पायुर्यमस्य मित्रस्य परि-
मोक्षस्य नारद ॥ हिंसाया निर्ऋतेर्मृत्योर्निरयस्य गुदः स्मृतः ॥ ८ ॥

मेघानां क्षेत्रं पूर्वं तथोक्तेः श्मश्रूणि विद्युतां पादकरनखानि शिलालोहानामिति सादृश्याद्भ्रम् । क्षेमकर्मणां पालनकर्तॄणाम् ॥ ५ ॥ विक्रमः पादन्यासो भूरादिलोकानामास्पदमा-
श्रयः भूरादिशब्दानामव्ययत्वात्षष्ठ्या लुक् । क्षेमो लब्धरक्षणं शरणं भयाद्रक्षणम् । सर्वेषां कामानां वरस्य वरणस्यापि हरेरंघ्रिरास्पदम् ॥६॥ वीर्यस्य शुक्रस्य शिश्नोऽधिष्ठानं
उपस्थस्त्विंद्रियं प्रजात्यानंदः संतानार्थः संभोगस्तेन या निर्वृतिस्तापहानिस्तस्याः ॥ ७ ॥ परिमोक्षस्य मलत्यागस्य पायुरिंद्रियम् । गुदस्थानं निर्ऋतेरलक्ष्म्याः ॥ ८ ॥

पुरुषाचे मस्तकावरील केश, मिशा व नखें हीं, मेघ विद्युल्लता, पाषाण व लोखंड यांचीं उत्पत्तिस्थानें आहेत ॥ ५ ॥ त्याचे बाहु, इंद्रादिलोकपालांचें व बहुधा रक्षण
करणाऱ्या राजादिकांचें उत्पत्तिस्थान आहेत. त्याचें पाय ठेवणें, भूलोक, अंतरिक्षलोक, स्वर्गलोक, प्राप्त झालेल्या पदार्थांचें रक्षण व भयापासून संरक्षण यांचें उत्पत्ति-
स्थान आहे. विराट्रूपी हरीचे पाय, सर्व मनोरथ पूर्ण होण्याच्या वरप्रदानाचें स्थान आहेत ॥ ६ ॥ त्या पुरुषाचें शिश्न, उदकें, रेत पर्जन्य, उत्पत्तिक्रम आणि प्रजापति
देवता यांचें उत्पत्तिस्थान होय. त्या पुरुषाचें उपस्थेंद्रिय संततीकरितां केलेल्या स्त्रीसंभोगापासून जो सुखानुभव होतो त्याचें उत्पत्तिस्थान आहे ॥ ७ ॥ हे नारदा,
पुरुषाचें गुदेंद्रिय, यम, मित्र, आणि मलत्याग यांचें उत्पतिस्थान होय. त्याचें गुदस्थान हिंसा, दारिद्र्य, मृत्यु आणि नरक यांचें उत्पत्तिस्थान आहे ॥ ८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुरुषाचा पृष्ठभाग पराभव, अधर्म, आणि अज्ञान यांचें उत्पत्तिस्थान होय. त्याच्या नाडी, शोणभद्रादिक नद व भागीरथ्यादिक नद्या यांचें उत्पत्तिस्थान व त्याच्या अस्थींचा समुदाय, पर्वतांचें उत्पत्तिस्थान आहे ॥ ९ ॥ त्याचें उदर, माया, अन्नादिकांचे रस, समुद्र व सर्वभूतांचा प्रलय यांचें उत्पत्तिस्थान आहे. त्याचें हृदय, सर्वांच्या मनाचें उत्पत्तिस्थान आहे ॥ १० ॥ हे नारदा, त्या विराट्पुरुषाचें चित्त, धर्म, मी, तूं सनकादिक ऋषि, शंकर, अपरोक्ष आत्मसाक्षात्कार आणि शुद्ध अंतःकरण यांचें उत्पत्तिस्थान होय ॥ ११ ॥ मी, तूं, शंकर, व तुझे वडीलबंधु हे सनकादिक ऋषि, देव, दैत्य, मनुष्य, हत्ति, पक्षी, मृग, सर्प, गंधर्व, अप्सरा, यक्ष, राक्षस, भूतगण, अजगर,

---

आपल्या हस्तावर, सात दिवसपर्यंत सहज लीलेनें अळंब्यासारखा गोवर्धन पर्वत धारण करील ॥ ३२ ॥ पुढें चंद्राच्या किरणांनीं शुभ्रवर्ण अशा शरदृतूंतील रात्रींमध्यें वृंदावनांत क्रीडा करणारा व नृत्यक्रीडेविषयीं उद्युक्त झालेला तो श्रीकृष्ण, मंजुळपदांनीं व दीर्घ आलापांनीं युक्त जें गायन त्याच्या योगानें कामोद्दीपन होऊन विवश झालेल्या गोपींनां बलात्कारानें हरण करणाऱ्या शंखचूडाचा शिरच्छेद करील ॥ ३३ ॥ आणि जे–प्रलंबासुर, धेनुकासुर, बकासुर, केशी, वृषभासुर, चाणूरवगैरे मल्ल, कुवलयापीडनांवाचा हत्ती, कंस, कालयवन, भौमासुर, पौंड्रकादिक, तसेच शाल्व, द्विविद वानर, बल्वल, दंतवक्र, नग्नजित् राजाचे सात वृषभ, शंबरासुर विदूरथ, व रुक्मिवगैरे उत्पन्न होतील ॥ ३४ ॥ तसेच जे– कांबोज, मत्स्य, कुरु, कैकय, सृंजय इत्यादि रणशूर राजे हस्तांत धनुष्यें धारण करून युद्धामध्यें प्राप्त होतील त्यांस, ॥ २३ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

बलराम, भीम, अर्जुन इत्यादिक कपटनांवें धारण करणाऱ्या त्या श्रीकृष्णानेंच मारिलें असतां, ते सर्वेहि त्याच्या वैकुंठलोकास जातील ॥ ३५ ॥ कालाच्या योगानें मंदबुद्धि व अल्पायुषी झालेल्या पुरुषांस, आपण केलेले वेद दुर्बोध आहेत असें जाणून, सत्यवतीच्याठिकाणीं व्यासरूपानें प्रगट झालेला तोच भगवान्, वेदरूपवृक्षाचे शाखाभेदानें विभाग करील ॥ ३६ ॥ वेदमार्गामध्यें अत्यंत निष्ठेनें राहणारे परंतु मयासुरानें निर्माण केलेल्या अदृश्य वेगयुक्त तीन नगऱ्यांत वसून त्या नगऱ्यांच्या योगानें लोकांचा घात करणारे अशा देवद्वेष्ट्या दैत्यांच्या बुद्धींला मोह व लोभ उत्पन्न करणारा पाखंडी बुद्धवेष धारण करून तो भगवान्, त्यांस पुष्कळ पाखंडमार्ग सांगेल

तेन दमिताः कालांतरे यास्यंतीति भावः । एतच्च सर्वमपि कर्म दिव्यमिव तच्चान्यथा न भाव्यमिति पूर्वेणैव संबंधः ॥३५॥ व्यासावतारमाह । अनुयुगं मीलिता संकुचिता धीर्येषाम् । स्तोकमल्पमायुर्येषां ते स्वनिगमः स्वकृतो वेदराशिः बताहो दूरे पारं यस्येति दुर्गम इत्यवमृश्य सत्यवत्यामाविर्भूतः सन् स एव हरिः विटपशः शाखाभेदेन ॥३६॥ बुद्धावतारमाह । देवद्विषां निगमवर्त्मनि वेदमार्गे निष्ठितानां नितरां स्थितानाम् । तद्बलेन च पूर्भिः पुरीभिः अदृश्यतूर्भिरलक्ष्यवेगाभिः मतेर्विमोहो योग्यतात्यागो यस्मात् मतेः प्रलोभश्चायुक्तस्वीकारो यस्मात्तं पाखंडवेषं विधाय तेनौपधर्म्यं पाखंडधर्मं स्वार्थे ष्यञ् बहु । भाष्यत इत्यर्थः ॥ ३७ ॥ कल्क्यवतारमाह । यर्हि यदा सतामप्यालयेषु गृहेषु हरेः कथा

कालेन मीलितधियामवमृश्य नृणां स्तोकायुषां स्वनिगमो बत दूरपारः ॥ आविर्हितस्त्वनुयुगं स हि सत्यवत्यां वेदद्रुमं विटपशो विभजिष्यति स्म ॥ ३६ ॥ देवद्विषां निगमवर्त्मनि निष्ठितानां पूर्भिर्मयेन विहिताभिरदृश्यतूर्भिः ॥ लोकान् घ्नतां मतिविमोहमतिप्रलोभं वेषं विधाय बहु भाष्यत औपधर्म्यम् ॥ ३७ ॥ यर्ह्यालयेष्वपि सतां न हरेः कथाः स्युः पाखंडिनो द्विजजना वृषला नृदेवाः ॥ स्वाहा स्वधा वषडिति स्म गिरो न यत्र शास्ता भविष्यति कलेर्भगवान्युगांते ॥ ३८ ॥ सर्गे तपोऽहमृषयो नव ये प्रजेशाः स्थाने च धर्ममखमन्वमरावनीशाः ॥ अंते त्वधर्महरमन्युवशासुराद्या मायाविभूतय इमाः पुरुशक्तिभाजः ॥ ३९ ॥ विष्णोर्नु वीर्यगणनां कतमोऽर्हतीह यः पार्थिवान्यपि कविर्विममे रजांसि ॥ चस्कंभ यः स्वरंहसाऽस्खलता त्रिपृष्ठं यस्मात्त्रिसाम्यसदनादुरु कंपयानम् ॥ ४० ॥

न स्युस्त्रैवर्णिकाः पाखंडिनाः स्युः शूद्राश्च राजानः स्युस्तदा कल्किरूपेण कलेः शास्ता भविष्यति । अत्र च ब्रह्मनारदसंवादात्प्राग्भाविनो वराहादयः मन्वंतरावतारास्तु भूता भाविनश्च धन्वंतरिपरशुरामौ तदा वर्तेते श्रीरामादयस्तु भाविनः । तत्र तु क्वचिद्भूतादिनिर्देशश्छांदस इति द्रष्टव्यम् ॥ ३८ ॥ सृष्ट्यादिकार्यभेदेन मायागुणावतारविभूतीराह । इदं सर्ग इति । स्थाने स्थितौ मखो विष्णुः धर्मश्च मखश्च मनवश्चामराश्चावनीशाश्च अंते संहारे हरो रुद्रः मन्युवशाः सर्पाः बहुशक्तिधारिणो भगवत इमा विभूतयः ॥ ३९ ॥ यो मया संक्षेपेणोक्तं विस्तरेण वक्तुं न कोऽपि समर्थ इत्याह । पृथिव्याः परमाणूनपि यो विममे गणितवांस्तादृशोऽपि को नु विष्णोर्वीर्यगणनां कर्तुमर्हति । कथंभूतस्य । यो

॥ ३७ ॥ ज्या वेळीं साधूंच्यादेखील घरीं हरीच्या कथेचें श्रवण कीर्तन होत नाहींसें होईल, ब्राह्मण क्षत्रिय व वैश्य हे तीनही वर्ण पाखंडी होतील, शूद्रलोक राजे होतील, आणि जेव्हां स्वाहाकार स्वधाकार व वषट्कार हे शब्द ऐकूंसुद्धां येत नाहींसे होतील, तेव्हां कलियुगाच्या शेवटीं कलीचें शासन करणारा तो भगवान् कल्किरूपानें अवतार धारण करील ॥ ३८ ॥ हे नारदा, या जगाच्या सृष्टिकार्याविषयीं जे–तप, मी (ब्रह्मा) मरीच्यादिक नऊ ऋषि, व दक्षादिक प्रजापति योजिलेले आहेत, पालनाविषयीं जे–धर्म, विष्णु, स्वायंभुवादिक चवदा मनु, इंद्रादिदेव व पृथु इत्यादिक सार्वभौम राजे योजिलेले आहेत आणि संहाराविषयीं जे–अधर्म, शंकर, सर्प व असुरादिक योजिलेले आहेत; ह्या सर्वेहि अनंतशक्ति धारण करणाऱ्या त्या भगवंताच्याच मायेनें रचिलेल्या विभूति होत ॥ ३९ ॥ हे नारदा, जो बुद्धिमान् पुरुष, पृथिवीच्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

परमाणूचीहि गणती करूं शकतो तसाहि कोण बरें पुरुष, विष्णूच्या पराक्रमाची गणना करण्यास समर्थ होईल? कोणीच होणार नाहीं. कारण, ज्या विष्णूनें, वामनावतारीं आपल्याच अस्खलित चरणवेगानें, ब्रह्मांडाच्या बाहेर असणाऱ्या त्रिगुणात्मक मायेच्या आवरणांसुद्धां, अतिशय कांपूं लागणाऱ्या सत्यलोकाचें धारण केलें आहे. ॥ ४० ॥ हे नारदा, मी (ब्रह्मदेव) व हे तुझे वडील बंधु मरीच्यादिक ऋषिहि, त्या परमेश्वराच्या मायेच्या बलाचा अंत जाणत नाहींत. मग जे दुसरे सामान्य लोक आहेत ते कसे जाणतील! कारण, ज्याला सहस्र मुखें आहेत असा आदिदेव शेषहि, या विष्णूच्या गुणाचें हजार मुखांनीं निरंतर गायन करित असून तो अजूनहि त्या गुणांचा

विष्णुस्त्रिपृष्ठं सत्यलोकं चस्कंभ धृतवान् किमिति चस्कंभ यस्मात्रैविक्रमेऽस्खलता प्रतिघातशून्येन स्वरंहसा स्वपादवेगेन त्रिसाम्यरूपं सदनमधिष्ठानं प्रधानं तस्मादारभ्योरु अधिकं कंपयानं कंपमानम् । कंपेन यानं यस्येति वा । अतः कारणाचस्कंभ आत्रिपृष्ठमिति वा छेदः । सत्यलोकमभिव्याप्य यः सर्वं धृतवानित्यर्थः । तथा च मंत्रः । विष्णोर्नुकमिति । अस्यार्थः । विष्णोर्नु वीर्याणि कं प्रवोचं कः प्रवोचदित्यर्थः । यः पार्थिवानि रजांस्यपि विममे सोऽपि यो विष्णुस्त्रेधा विचक्रमाणस्त्रिविक्रमं कुर्वन्नुत्तरं लोकमस्कभायदवष्टब्धवान् । कथंभूतं सधस्थं सहस्य सधादेशः तिष्ठंतीति स्थाः तत्रस्थैर्देवैः सहवर्तमानमित्यर्थः ॥ ४० ॥ एतत्प्रपंचयति । नांतमिति । पुरुषस्य यन्माया-

नांतं विदाम्यहममी मुनयोऽग्रजास्ते मायाबलस्य पुरुषस्य कुतोऽपरे ये ॥ गायन्गुणान्दशशतानन आदिदेवः शेषोऽधुनाऽपि समवस्यति नास्य पारम् ॥ ४१ ॥ येषां स एव भगवान्दययेदनंतः सर्वात्मनाऽश्रितपदो यदि निर्व्यलीकम् ॥ ते दुस्तरामतितरंति च देवमायां नैषां ममाहमिति धीः श्वसृगालभक्ष्ये ॥ ४२ ॥ वेदाहमंग परमस्य हि योगमायां यूयं भवश्च भगवानथ दैत्यवर्यः ॥ पत्नी मनोः स च मनुश्च तदात्मजाश्च प्राचीनबर्हिं ऋभुरंग उत ध्रुवश्च ॥ ४३ ॥ इक्ष्वाकुरैलमुचुकुंदविदेहगाधिरघ्वंबरीषसगरा गयनाहुषाद्याः ॥ मांधात्रलर्कशतधन्वनुरंतिदेवदेवव्रतो बलिरमूर्तरयो दिलीपः ॥ ४४ ॥

बलं तस्यांतं न विदामि न वेद्मि दशशतान्याननानि यस्य स शेषोऽप्यस्य गुणान् गायन् पारं न समवस्यति न प्राप्नोति ॥ ४१ ॥ यदि न केऽपि विदंति तर्हि कथं मुच्येरन् तत्कृपयैवेत्याह । येषामिति । दययेद्दयां कुर्यात् । ते च यदि निष्कपटमाश्रितचरणा भवंति ते दुस्तरां देवमायामतितरंति चकारान्मायावैभवं विदंति च । अथेति वा पाठः । प्रत्यक्षमेव तेषां मायातरणमित्याह । नैषामिति । श्वसृगालानां भक्ष्ये देहे ॥ ४२ ॥ अंतर्ज्ञानाभावेऽपि मायेयमिति ज्ञानं तत्कृपया बहूनामस्तीत्याह । वेदाहमिति त्रिभिः । यूयमिति । सनकादीनंतर्भाव्य बहुत्वम् । दैत्यवर्यः प्रह्रादः मनुः स्वायंभुवः तस्य पत्नी शतरूपा च तदात्मजाः पुत्रौ कन्याश्च प्राचीनबर्हिषो विसर्गलोपश्छांदसः ॥ ॥ ४३ ॥ शतधनुः अनुश्च संधिरार्षः । रंतिदेवा इति वा पाठः सुगमः । ऐकपद्ये एतैः सहितो देवव्रत इत्यर्थः ॥ ४४ ॥

अंत पावत नाहीं ॥४१॥ वास्तव तोच भगवान् अनंत, ज्या जीवांवर 'हे माझें तत्त्व जाणोत, व माझी माया तरोत अशी' दया करील व ते जर निष्कपटभावानें सर्वप्रकारें हरीच्या चरणाचा आश्रय करितील तर ते दुस्तर अशाहि देवमायेला तरून जातील व तिचें वैभवहि जाणतील आणि त्यानांच श्वान कोल्हे इत्यादिकांच्या भक्ष्यरूप देहावर, हें माझें आणि हा मी अशी बुद्धि राहणार नाहीं ॥ ४२ ॥ हे नारदा, मी त्या परमात्म्याची योगमाया जाणतों आणि सनकादिकांसह तुह्मीहि जाणतां. भगवान् शंकर, दैत्यश्रेष्ठ प्रल्हाद, स्वायंभुव मनूची स्त्री शतरूपा, व तो स्वायंभुव मनु, व त्याचे पुत्र प्रियव्रतादिक, प्राचीन बर्हि राजा, ऋभु आणि ध्रुव हे जाणतात ॥ ४३ ॥ इक्ष्वाकु, पुरूरवा,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मुचुकुंद, जनक गाधि, रघु, अंबरीष, सगर, गय व ययाति इत्यादिक राजे, मांधाता, अलर्क, शतधन्वा, अनु, रंतिदेव, भीष्माचार्य, बलि, अमूर्तरय, दिलीप ॥ ४४ ॥ सौभरि, उत्तंक, शिबि, देवल, पिप्पलाद, सारस्वत ऋषि, उद्धव, पराशर, भूरिषेण, तसेच इतर जे बिभीषण, हनुमान्, श्रीशुकाचार्य, पांडव, आर्ष्टिषेण गंधर्व, विदुर आणि श्रुतदेवप्रभृति ते सर्वेहि भगवंताची माया जाणतात ॥ ४५ ॥ स्त्रिया, शूद्र, ताम्रमुख, भिल्ल, इत्यादि पापजातींचे लोक, तसेच पशुपक्ष्यादिक जीवहि जर भगवद्भक्ति करणारे असले तर तेही देवाच्या मायेला जाणतात व तरतात; मग भगवंताच्या स्वरूपीं ज्यांचें मन गढून गेलें आहे ते जाणतात व तरतात हें काय बोलावें ॥ ४६ ॥ ज्याला

उपेंद्रदत्तः शुकः। विभीषणादयो वर्या मुख्या येषां ते ॥ ४५ ॥ किंबहुना सत्संगेन सर्वेऽपि विदंतीत्याह। ते वा इति। अद्भुताः क्रमाः पादन्यासा यस्य हरेस्तत्परायणास्तद्भक्तास्ते षां शीले शिक्षा येषां ते। तथा यदि भवंति तर्हि तेऽपि विदंतीत्यर्थः। श्रुते भगवतो रूपे धारणा मनोनियमनं येषां ते विदंतीति किमु वक्तव्यम् ॥ ४६ ॥ किं तद्भगवतः स्वरूपं यस्मिन्मनोधारणां विधाय मायां तरंतीत्यपेक्षायामाह। शश्वदिति द्वाभ्याम्। यद्ब्रह्मेति विदुर्मुनयस्तद्वै भगवतः पदं स्वरूपं किं तद्ब्रह्म तदाह। अजस्रं नित्यं च तत्सुखं च विशोकं चेति। अजस्रसुखत्वे हेतुः। शश्वत्सदा प्रशांतमतो नित्यसुखरूपम्। विशोकत्वे हेतुः अभयं तत्कुतः यतः समं भेदशून्यमतोऽभयम्। द्वितीयाद्वै भयं भवतीति श्रुतेः। तत्कुतः यतः सदसतः प्रतिबोधमात्रं ज्ञानैकरसम्। ननु ज्ञानस्यापि नीलपीताद्याकारेण चक्षुरादिकरणभेदेन च भेदो दृश्यते नशुद्धं निर्मलम्। ननु दर्शितो विषयकरणोपरागरूपो मल इत्यत आह।

सौभर्युतंकशिबिदेवलपिप्पलादसारस्वतोद्धवपराशरभूरिषेणाः ॥ येऽन्ये विभीषणहनूमदुपेंद्रदत्तपार्थार्ष्टिषेणविदुरश्रुतदेववर्याः ॥ ४५ ॥ ते वै विदंत्यतितरंति च देवमायां स्त्रीशूद्रहूणशबरा अपि पापजीवाः ॥ यद्यद्भुतक्रमपरायणशीलशिक्षास्तिर्यग्जना अपि किमु श्रुतधारणा ये ॥ ४६ ॥ शश्वत्प्रशांतमभयं प्रतिबोधमात्रं शुद्धं समं सदसतः परमात्मतत्त्वम् ॥ शब्दो न यत्र पुरुकारकवान् क्रियार्थो माया परैत्यभिमुखे च विलज्जमाना ॥ ४७ ॥ तद्वै पदं भगवतः परमस्य पुंसो ब्रह्मेति यद्विदुरजस्रसुखं विशोकम् ॥ सध्र्यङ्नियम्य यतयो यमकर्तहेतिं जह्युः स्वराडिव निपानखनित्रमिंद्रः ॥ ४८ ॥

परं विषयकरणसंगशून्यं वृत्तेरेव तदुपरागो न ज्ञानस्येति भावः। ननु तथापि ज्ञात्रा सह भेदः स्यात् न आत्मतत्त्वमात्मनो ज्ञातुः स्वरूपमेव तन्न ततो भिन्नम्। ननु तं त्वौपनिषदं पुरुषं पृच्छामीति शब्दबोध्यत्वप्रतीतेः कुतो बोधरूपत्वं तत्राह। शब्दो न यत्रेति। आरोपितनिवृत्तावेव शब्दस्य व्यापारो न तद्बोध इत्यर्थः। ननु च भवतु नाम निरस्तभेदज्ञानरूपत्वाद्विशोकत्वं सुखस्य तु नानाकारकसाध्यक्रियाफलत्वात्कथमजस्रसुखत्वं तस्येत्यत आह। यत्र बहुकारकसाध्यः क्रियार्थं उत्पाद्याप्यविकार्यसंस्कार्यरूपं चतुर्विधं क्रियाफलं च नास्ति इंद्रियैर्ज्ञानांशाभिव्यक्तिरिव क्रियाभिरानंदांशाभिव्यक्तिमात्रं क्रियते नोत्पत्त्यादिकमिति भावः। ननूत्पत्त्याद्यभावेऽपि मायामलापाकरणेन विकार्यत्वमेव स्याद्व्रीहीणामिव तुषापाकरणेनेत्याशंक्याह। माया अभिमुखे स्थातुं विलज्जमानेव यस्मात् परैति दूरतोऽपसरति ॥ ४७ ॥ तस्मादेवंभूते भगवति नियमितमनसां कृतार्थानां न किमपि कृत्यमस्तीत्याह। सध्र्यंचतीति सध्र्यक् सहचरं मनो यंप्रति नियम्य यस्मिन् स्थिरीकृत्य यतयो यत्नशीलाः कर्तौ भेदस्तन्निरासोऽकर्तस्तत्र हेतिं साधनं जह्युस्त्यजेयुः अनुपयो-

मननशील ऋषि, 'ब्रह्म' असें ह्मणतात तेंच त्या परमपुरुष भगवंताचें स्वरूप होय. तें नित्य सुखरूप, शोकरहित, निरंतर शांत, निर्भय, भेदशून्य, ज्ञानैकरस, व विषयांच्या व इंद्रियांच्या संयोगानें रहित असें आत्मरूप आहे. ज्याचा साक्षात् बोध करण्यास वेदहि समर्थ होत नाहींत, जेथें बहुसाधनांनीं घडणाऱ्या कर्मांच्या फळाचा संबंध नाहीं, आणि ज्याच्या समोर उभी राहण्यास लज्जा पावणारी माया, दुरूनच मागें सरते ॥ ४७ ॥ जसा आपणच पर्जन्यरूपानें शोभणारा इंद्र, विहीर खणण्याच्या कुदळवगैरे साधनांचा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याग करितो त्याप्रमाणें यत्नशील परमहंस ऋषि, ज्याचेठिकाणीं आपलें मन एकाग्रतेनें स्थिर करून ब्रह्मसाक्षात्कार झाल्यावर, मोक्षप्राप्तीसाठीं पूर्वी स्वीकारलेल्या सर्व साधनांचा त्याग करितात ॥ ४८ ॥ आणि ज्याच्यापासून ब्राह्मणादिकांच्या शमदमादि साधनांनीं केलेल्या शुभकर्मांची सिद्धि होते, तोच भगवान् जीवांच्या सर्व पुण्यकर्मांचा प्रेरक व फलदाता आहे. याचें कारण, देह उत्पन्न होण्यास कारणभूत जीं पंचमहाभूतें त्यांचा परस्पर वियोग झाल्यामुळें देहाचा नाश झाला तथापि, तेथें राहणारा वस्तुतः जन्मरहित तो भोक्ता पुरुष जीव, ह्या देहाबरोबर 'जसें आकाश नाश पावत नाहीं त्याप्रमाणें' नाश पावत नाहीं ॥ ४९ ॥ बा नारदा, तो हा विश्वपालक भगवान्

गात्तन्नाद्रियंत इत्यर्थः । उपयोगाभावेन साधनानादरे दृष्टांतः । निपीयतेऽस्मिन्निति निपानं कूपस्तस्य खनित्रं खननसाधनं यथा स्वराट् स्वयमेव पर्जन्यरूपेण विराजमान इंद्रो नादत्ते तद्वदिति । यद्वा । स्वेनैव राजत इति स्वराट् दरिद्रः स यथा इंद्रः समृद्धः सन् कर्मकारदशायां गृहीतं निपानखनित्रं जहाति तद्वदित्यर्थः ॥ ४८ ॥ एवं तावदजस्रसुखं विशोकं ब्रह्मैव भगवतः स्वरूपं तत्प्राप्तानां च न प्राप्यं कृत्यं वा किंचिदस्तीत्युक्तमिदानीं ततः प्राक् स एव सर्वफलदाता सर्वकर्मप्रवर्तकश्चेत्याह । स एव श्रेयसां फलानां विभुर्दाताऽपि तत्र हेतुः भावानां ब्राह्मणादीनां स्वभावैः शमदमादिभिर्विशेषणैर्विहितस्यास्य सतः शुभस्य कर्मणो यतः प्रवर्तकात्प्रसिद्धिः । यद्वा । भावानां महदादीनां स्वभावेन परिणामेन विहितस्य सतः कार्यस्य प्रसिद्धिः स एव स्वर्गादीनां दातेर्थः । ननु कर्मकर्तुर्मृतस्य कथं स्वर्गादिफलं स्यात्तत्राह । स्वारंभकधातूनां भूतानां विगमे

स श्रेयसामपि विभुर्भगवान्यतोऽस्य भावस्वभावविहितस्य सतः प्रसिद्धिः ॥ देहे स्वधातुविगमेऽनु विशीर्यमाणे व्योमेव तत्र पुरुषो न
विशीर्यतेऽजः ॥ ४९ ॥ सोऽयं तेऽभिहितस्तात भगवान्विश्वभावनः ॥ समासेन हरेर्नान्यदन्यस्मात्सदसच्च यत् ॥ ५० ॥ इदं भाग-
वतं नाम यन्मे भगवतोदितम् ॥ संग्रहोऽयं विभूतिनां त्वमेतद्विपुलीकुरु ॥ ५१ ॥ यथा हरौ भगवति नृणां भक्तिर्भविष्यति ॥
सर्वात्मन्यखिलाधारे इति संकल्प्य वर्णय ॥ ५२ ॥ मायां वर्णयतोऽमुष्य ईश्वरस्यानुमोदतः ॥ शृण्वतः श्रद्धया नित्यं मायया-
त्मा न मुह्यति ॥ ५३ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे द्वितीयस्कंधे ब्रह्मनारदसंवादे सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥ ॥ ॥

वियोगे सत्यन्वनु विशीर्यमाणेऽपि देहे तत्रस्थं व्योमेव यस्तेन सह न विशीर्यते यतोऽजस्तेन सह न जातस्तस्य पुरुषस्य श्रेयसां प्रभुरित्यर्थः ॥ ४९ ॥ अध्यायत्रयस्यार्थमुपसंहरति । सोऽयं ते समासेन संक्षेपेणाभिहितः । तमेवाह । सदसत्कार्यं कारणं च हरेरन्यन्न भवति । ननु हरेस्तदव्यतिरेके तद्गतविकारप्रसंगः स्यात् न अन्यस्मात्कारणभूतो हरिः कार्याद्व्यतिरिक्त इत्यर्थः ॥ ५० ॥ अयं च विभूतीनां संग्रह उदितः ॥ ५१ ॥ यथा वर्णितेन नृणां भक्तिर्भविष्यतीत्येवं संकल्प्य संचिंत्य तथा हरिलीलाप्राधान्येन श्रीभागवतं वर्णय न तु भक्तिरसविघातेन केवलं तत्त्वमित्यर्थः ॥ ५२ ॥ ननु लीला मायाश्रया किं तद्वर्णनेनेत्यत आह । मायामिति ॥ ५३ ॥ इति द्वितीयस्कंधे टीकायां

हरि, मी तुला संक्षेपानें सांगितला आहे. कारण, प्रकृत्यादिक तत्त्वें व त्यांपासून उत्पन्न झालेले जे सर्व लोक, हे त्या हरीहून निराळे नाहींत तर त्याचेंच स्वरूप आहेत. तो मात्र त्या मायिक पदार्थांहून निराळा आहे ॥ ५० ॥ हे नारदा, भगवंतानें मला जें भागवत सांगितलें तें हेंच होय. भगवंताच्या विभूतींचा हा संक्षेप आहे, यास्तव तूं हें पुराण, लोकांमध्यें विस्तारानें वर्णन करून प्रसिद्ध कर ॥ ५१ ॥ सर्वात्मा व मोक्षादि सर्व पुरुषार्थांचा आश्रय अशा हरीचेठिकाणीं, जशी लोकांना भक्ति प्राप्त होईल तसा विचार करून हरिलीलेच्या मुख्यत्वानें याचें वर्णन कर ॥ ५२ ॥ या ईश्वराच्या मायेचें वर्णन करणारा, त्या वर्णनास अनुमोदन देणारा व तें वर्णन दृढ विश्वासानें नित्य श्रवण करणारा अशा पुरुषांची बुद्धि मायेच्या योगानें कधींहि मोह पावत नाहीं ॥ ५३ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील द्वितीयस्कंधामध्यें ब्रह्मनारदसंवाद-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कथनरूप हा सातवा अध्याय समाप्त झाला ॥ ७ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ७ ॥ परीक्षितिराजानें, जीव आणि ईश्वर यांच्या देहसंबंधाविषयीं कांहीं संशय असल्यामुळें श्रीशुकाचार्यांस प्रश्न केला आणि त्या प्रसंगानें आपणास जाणावयाचे जे दुसरेहि पुष्कळ पुराणसंबंधी विषय होते तेही विचारिले, हा विषय या आठव्या अध्यायांत सांगितला आहे ॥ १ ॥ राजा ह्मणाला—हे वेदवेत्त्यांमध्यें श्रेष्ठ शुकाचार्यं, मायागुणरहित परमेश्वराच्या गुणवर्णनाविषयीं आज्ञा दिलेल्या ज्ञानसंपन्न नारदानें तें भागवत कोणाकोणाला कसकसें सांगितलें? तें तत्त्व जाणावें अशी माझी इच्छा आहे. कारण, अद्भुत पराक्रमशाली हरीच्या कथा, सर्व लोकांस मंगलकारक आहेत ॥ १ ॥ २ ॥ हे महाभाग्यशालिन् शुकाचार्य, त्या कथा मला सांगाव्या, ह्मणजे मी त्या कथा ऐकून सर्वात्मरूपी श्रीकृष्णाचेठिकाणीं सर्वसंगरहित असें आपलें मन स्थापन करून या शरीराचा त्याग

सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥ ॥ ७ ॥ अष्टमे देहसंबंधमाक्षिपन्नीशजीवयोः ॥ बहून्परीक्षिदाप्रच्छत्पुराणार्थान्बुभुत्सितान् ॥ १ ॥ त्वमेतद्विपुलीकुर्वित्युक्तं तदेव विपुलीकरणं पृच्छति । ब्रह्मणेति त्रिभिः । अगुणस्य गुणातीतस्यापि । देववद्दर्शनं यस्य सः ॥ १ ॥ २ ॥ निःसंगं मनः श्रीकृष्णे निवेश्येति स्वप्रयत्नो दर्शितः ॥ ३ ॥ सोऽपि श्रद्धया शृण्वतो नावश्यक इत्याह । शृण्वत इति । स्वप्रयत्नं विनापि भगवान् स्वयमेव हृदि विशति ॥ ४ ॥ भावसरोरुहं हृदयकमलं प्रविष्टश्च तद्गतं सर्वं मलं धुनोति । सलिलस्येति

॥ राजोवाच ॥ ब्रह्मणा चोदितो ब्रह्मन् गुणाख्यानेऽगुणस्य च ॥ यस्मै यस्मै यथा प्राह नारदो देवदर्शनः ॥ १ ॥ एतद्वेदितुमिच्छामि तत्त्वं वेदविदांवर ॥ हरेरद्भुतवीर्यस्य कथा लोकसुमंगलाः ॥ २ ॥ कथयस्व महाभाग यथाऽहमखिलात्मनि ॥ कृष्णे निवेश्य निःसंगं मनस्त्यक्ष्ये कलेवरम् ॥ ३ ॥ शृण्वतः श्रद्धया नित्यं गृणतश्च स्वचेष्टितम् ॥ कालेन नातिदीर्घेण भगवान्विशते हृदि ॥ ४ ॥ प्रविष्टः कर्णरंध्रेण स्वानां भावसरोरुहम् ॥ धुनोति शमलं कृष्णः सलिलस्य यथा शरत् ॥ ५ ॥ धौतात्मा पुरुषः कृष्णपादमूलं न मुंचति ॥ मुक्तसर्वपरिक्लेशः पांथः स्वशरणं यथा ॥ ६ ॥ यदधातुमतो ब्रह्मन्देहारंभोऽस्य धातुभिः ॥ यदृच्छया हेतुना वा भवंतो जानते यथा ॥ ७ ॥

द्रव्यांतरव्यामिश्रणादिना कुंभस्थे जले शोधिते तदेव केवलं शुद्ध्यति नतु नदीतडागादिगतम् । स च मलः कुंभस्यांतस्तिष्ठत्येव नतु सर्वथा विलीयते अतएव किंचिच्चलनेन पुनः क्षुभ्यति च एवं तपोदानादिप्रायश्चित्तं न सर्वथा सर्वेषां सर्वं पापं धुनोति किंतु सावशेषम् । तच्च कस्यचिदेव किंचिदेव हृदि प्रविष्टमात्रस्तु श्रीकृष्णः सर्वेषां सर्वं पापं निःशेषं हरतीत्यनेन दृष्टांतेनोक्तं सलिलस्य मलं यथा शरदिति ॥ ५ ॥ ततश्च कृतार्थो भवतीत्याह । धौतात्मा निष्पापः । मुक्ताः सर्वे रागद्वेषादयः परिक्लेशा येन । पांथः प्रवासादागतः स्वशरणं गृहं यथा न मुंचति तद्वत् ॥ ६ ॥ तदेवं श्रवणौत्सुक्यमाविष्कृत्य संदिग्धानर्थान् पृच्छति । अधातुमतः धातवो महाभूतानि तत्संबंधशून्यस्यास्य लौकिकस्यात्मनो

करीन ॥ ३ ॥ आपलें चरित्र प्रीतीनें श्रवण किंवा कीर्तन करणाऱ्या पुरुषाच्या हृदयामध्यें थोडक्याच कालानें भगवान् प्रवेश करितो ॥ ४ ॥ आणि आपल्या भक्तांच्या हृदयकमलामध्यें कर्णछिद्रमार्गानें प्रविष्ट झालेला तो भगवान्, 'जसा शरदृतु, पाण्याचा गढूळपणा नाहींसा करून टाकितो त्याप्रमाणें,' त्या भक्तांच्या हृदयकमलांतील कामक्रोधादिरूप सर्व पापांचा नाश करून टाकितो ॥ ५ ॥ नंतर रागद्वेषादिक सर्व क्लेश ज्यानें सोडिले आहेत असा शुद्धचित्त झालेला तो पुरुष, 'जसा प्रवास करणारा पुरुष, धन मिळविण्याचेवगैरे सर्व क्लेश सोडून आपल्या घरीं आला असतां तो आपलें घर पुनः सोडीत नाहीं त्याप्रमाणें' श्रीकृष्णाच्या चरणकमलाचा त्याग करीत नाहीं. ॥ ६ ॥ असें श्रवणाविषयीं आपलें उत्सुकत्व प्रगट करून आतां परिक्षितिराजा प्रश्न करितो कीं,—हे ब्राह्मणश्रेष्ठा, पंचमहाभूतांच्या संबंधानें रहित अशाहि जीवाला,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पंचमहाभूतांनीं जो देह उत्पन्न होतो तो काय ईश्वरेच्छेनेंच होतो किंवा कर्मवगैरे त्याला कांहीं कारण आहे, हें आपण यथार्थ जाणत आहां यास्तव मला सांगावें ॥ ७ ॥ ज्या ईश्वराच्या नाभिकमलापासून सर्व लोकरचनारूप कमळ उत्पन्न झालें तो ईश्वरहि, जसा हा जीव आपल्या परिमितसंख्येच्या निरनिराळ्या अवयवांनीं युक्त आहे त्याप्रमाणेंच सर्व लोकरचनारूप अवयवांनीं युक्त असलेला आपण सांगितला, तेव्हां जीवापेक्षां ईश्वराचें विशेष माहात्म्य काय आहे ? ॥ ८ ॥ विशेष तर असलाच पाहिजे कारण, ज्याच्या नाभिकमलापासून उत्पन्न झालेला ब्रह्मदेवहि ज्याच्या अनुग्रहानें सर्वभूतें उत्पन्न करितो व जो त्या सर्वभूतांचा नियंता आहे, त्या ब्रह्मदेवानेंहि त्याच्या

जीवस्य धातुभिर्देहारंभ इति यदेतत् किं यदृच्छया निर्निमित्तं हेतुना वा कर्मादिना भवंतो यथावज्जानते अतः कथयंत्विति शेषः ॥ ७ ॥ यश्चासावीश्वरः सोऽप्येतत्तुल्यदेहवान् प्रोक्तः अतस्तस्य को विशेष इत्याशयेन पृच्छति । आसीदिति सार्धेन । लोकानां संस्थानं रचना तदेव लक्षणं स्वरूपं यस्य । तत्रैलोक्यात्मकं पद्मं यस्योदरादासीत् । असावीश्वर इयत्तायुक्तैः स्वपरिमितैरवयवैरयं लौकिकः पुरुषो यावान् यत्संख्याकावयवयुक्तस्तावान् प्रोक्तः संस्थावानवयववानिव च प्रोक्तः अतः को विशेषस्तस्येति ॥ ८ ॥ अवश्यं च विशेषो वाच्य इत्याह । अजो ब्रह्मा भूतानां व्यष्ट्युपाधीनामात्मा नियंता समष्ट्युपाधित्वात् येन च अनुगृह्णता तस्य रूपं ददृशे दृष्टवान् । एतच्च । तस्यापि द्रष्टुरीशस्य कूटस्थस्याखिलात्मनः ॥ सृज्यं सृजामि सृष्टोऽहमीक्षयैवाभिचोदित इत्यादिनोक्तमनूद्यते । अग्रे तु स्पष्टं भविष्यति ॥ ९ ॥ प्रश्नांतरमाह । स चापीति यत्र शेते

आसीद्यदुदरात्पद्मं लोकसंस्थानलक्षणम् ॥ यावानयं वै पुरुष इयत्तावयवैः पृथक् ॥ तावानसाविति प्रोक्तः संस्थावयववानिव
॥ ८ ॥ अजः सृजति भूतानि भूतात्मा यदनुग्रहात् ॥ ददृशे येन तद्रूपं नाभिपद्मसमुद्भवः ॥ ९ ॥ स चापि यत्र पुरुषो विश्वस्थि-
त्युद्भवाप्ययः ॥ मुक्त्वाऽऽत्ममायां मायेशः शेते सर्वगुहाशयः ॥ १० ॥ पुरुषावयवैर्लोकाः सपालाः पूर्वकल्पिताः ॥ लोकैरमुष्याव-
यवाः सपालैरिति शुश्रुम ॥ ११ ॥ यावान्कल्पो विकल्पो वा यथा कालोऽनुमीयते ॥ भूतभव्यभवच्छब्द आयुर्मानं च यत्सतः
॥ १२ ॥ कालस्यानुगतिर्या तु लक्ष्यतेऽण्वी बृहत्यपि ॥ यावत्यः कर्मगतयो यादृशीर्द्विजसत्तम ॥ १३ ॥

येन रूपेणावतिष्ठते । विश्वस्य स्थित्यादयो यस्मात् एवमादिप्रश्नानां तत्त्वतोऽर्हस्युदाहर्तुमिति सर्वांते क्रियया संबंधः ॥ १० ॥ प्रश्नांतरमाह । पुरुषस्यावयवैः पूर्वं कल्पिता यस्येहावयवैर्लोकान्कल्पयंतीत्यादौ लोकैश्चामुष्यावयवा इति पातालमेतस्य हि पादमूलमित्यादौ च त्वन्मुखाच्छ्रुतवंतो वयम् ॥ ११ ॥ एवं संदेहविपर्ययाभ्यां पृष्टम् इदानीमज्ञातान्बहूनर्थान्पृच्छति । यावानित्यादिना । कल्पो महान् विकल्पोऽवांतरः भूतादिः शब्दो यस्मात् यस्य वाचक इति वा । सतः स्थूलदेहाभिमानिनो मनुष्यपितृदेवादेरायुषः प्रमाणम् ॥ १२ ॥ अनुमानप्रकारः पृष्टः विशेषं पृच्छति । कालस्येति । अनुगतिः प्रवृत्तिः कर्मगतयः कर्मप्राप्याणि स्थानानि । यादृशीः यादृश्यः ॥ १३ ॥

अनुग्रहानेंच त्याचें स्वरूप अवलोकन केलें ॥ ९ ॥ असा तो सर्वजगाचें पालन, उत्पत्ति व नाश करणारा, सर्वांतर्यामी मायानियंता पुरुष, आपल्या मायेला सोडून कोणत्या स्वरूपीं राहतो? ॥ १० ॥ तसेंच इंद्रादि लोकपालांसहित पातालादि सर्व लोक पुरुषाच्या चरणादिक अवयवांनीं पूर्वींपासून रचलेले आहेत असें आपल्यापासून मी ऐकिलें आणि पुन्हा सर्व लोक व लोकपाल यांच्या योगानें या पुरुषाचे अवयव कल्पिले आहेत असें ऐकिलें. तेव्हां दोन्ही कारणें व दोन्हीं कार्यें, अशा परस्पर विरुद्ध गोष्टी संभवतात कशा? ॥ ११ ॥ महाकल्प व त्यांतील अवांतर कल्प हे कसे आहेत? भूत, भविष्य व वर्तमान या तीन प्रकारच्या कालांचें अनुमान (ज्ञान) कसें होतें, आणि स्थूलदेहधारी जे मनुष्य पितर इत्यादिक त्यांच्या आयुष्याचें प्रमाण काय आहे? ॥ १२ ॥ हे ब्राह्मणश्रेष्ठा, कालाची जी स्थूल किंवा सूक्ष्म गति आहे ती कशी जाणली

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जाते. कर्मांच्या योगानें प्राप्त होणारीं स्थानें किती व कशा प्रकारचीं आहेत? ॥ १३ ॥ सत्त्वरजादि गुणांचा देव मनुष्यादिरूप परिणाम आपणास प्राप्त व्हावा अशी इच्छा करणाऱ्या जीवांमध्यें कोणता अधिकारी कोणत्या पुण्यपापरूप कर्मांच्या समुदायाचें कोणत्या रीतीनें आचरण केलें असतां, देवादिस्वरूपांस पावतो? ॥ १४ ॥ पृथ्वी, पाताल, दशदिशा, आकाश, स्वर्ग, नवग्रह, नक्षत्रें, पर्वत, नद्या, समुद्र आणि द्वीपें यांची उत्पत्ति कशी आहे? व यांचेठिकाणीं राहणाऱ्या प्राण्यांची उत्पत्ति कशी आहे? ॥ १५ ॥ ब्रह्मांडाच्या आंतील व बाहेरील रचनेचें प्रमाण, साधूंचें चरित्र, ब्राह्मणादिक वर्ण व ब्रह्मचर्यादिक आश्रम यांच्या स्वभावांचा निश्चय, हीं कशीं आहेत? ॥ १६ ॥ तसेंच हरीचें अतिआश्चर्यकारक जें अवतारचरित्र, कृतादिक युगें, त्या युगांतील कालमान व प्रत्येक युगांतील धर्म, कसे आहेत? तें सांगावें ॥ १७ ॥ मनुष्य-

---

गुणानां सत्त्वादीनां परिणामं देवादिरूपमिच्छतां गुणिनां जीवानां मध्ये यस्मिन् परिणामे कर्मणां पुण्यपापानां समावायः समुदायः केन कर्मसमुदायेन कथं कृतेन कोऽधिकारी देवादिभावं प्राप्नोतीत्यर्थः ॥ १४ ॥ भूपातालादीनां संभवः। एतान्योकांसि येषां प्राणिनां तेषां च संभवः। यथेति सर्वत्रानुषंगः ॥ १५ ॥ वर्णानामाश्रमाणां च विनिश्चयस्तत्तत्स्वभावैर्निर्धारः ॥ १६ ॥ युगेयुगे प्रतियुगं यो धर्मो यच्च हरेरवतारानुचरितम् ॥ १७ ॥ सविशेषो वर्णाश्रमनिबंधनः श्रेणीनां तत्तद्व्यवसायोपजीविनां व्यवहारनियमलक्षणो धर्मः राजर्षीणां

यस्मिन्कर्मसमावायो यथा येनोपगृह्यते ॥ गुणानां गुणिनां चैव परिणाममभीप्सताम् ॥ १४ ॥ भूपातालककुब्व्योमग्रहनक्षत्रभू-
भृताम् ॥ सरित्समुद्रद्वीपानां संभवश्चैतदोकसाम् ॥ १५ ॥ प्रमाणमण्डकोशस्य बाह्याभ्यन्तरभेदतः ॥ महतां चानुचरितं वर्णाश्रम-
विनिश्चयः ॥ १६ ॥ अवतारानुचरितं यदाश्चर्यतमं हरेः ॥ युगानि युगमानं च धर्मो यश्च युगेयुगे ॥ १७ ॥ नृणां साधारणो
धर्मः सविशेषश्च यादृशः ॥ श्रेणीनां राजर्षीणां च धर्मः कृच्छ्रेषु जीवताम् ॥ १८ ॥ तत्त्वानां परिसंख्यानं लक्षणं हेतुलक्षणम् ॥
पुरुषाराधनविधिर्योगस्याध्यात्मिकस्य च ॥ १९ ॥ योगेश्वरैश्वर्यगतिर्लिंगभंगस्तु योगिनाम् ॥ वेदोपवेदधर्माणामितिहासपुराणयोः
॥ २० ॥ संप्लवः सर्वभूतानां विक्रमः प्रतिसंक्रमः ॥ इष्टापूर्तस्य काम्यानां त्रिवर्गस्य च यो विधिः ॥ २१ ॥

प्रजापालनाधिकारिणां कृच्छ्रेषु आपत्सु जीवतां सर्वेषाम् ॥ १८ ॥ सर्वेषां तत्त्वानां प्रकृत्यादीनां परिसंख्यानं संख्यालक्षणं स्वरूपं हेतुतो लक्षणं तत्तत्कार्यहेतुत्वेन च लक्षणमित्यर्थः। पुरुषाराधनस्य विधिर्देवपूजाप्रकारः अष्टांगयोगस्य च विधिः ॥ १९ ॥ योगेश्वराणामैश्वर्येणाणिमादिनार्चिरादिगतिः। लिंगशरीरस्य भंगः प्रलयः। वेदा ऋग्वेदादयः उपवेदा आयुर्वेदादयः धर्मा धर्मशास्त्राणि तेषा इतिहासपुराणयोश्च गतिः स्वरूपम् ॥ २० ॥ संप्लवोऽवांतरप्रलयः यद्वा सम्यक् प्लुवनमुद्भवः। विक्रमः स्थितिः प्रतिसंक्रमो महा-

---

मात्रांचा साधारण धर्म कसा आहे? व ब्राह्मणादिक वर्ण, व ब्रह्मचर्यादिक आश्रम यांचा भिन्नभिन्न विशेष धर्म कसा आहे? निरनिराळ्या व्यापाराच्या योगानें उपजीविका करणाऱ्या लोकांचा नियमित व्यवहाररूप धर्म कसा आहे? पृथु इत्यादि जे राजर्षि झाले त्यांचा प्रजापालनरूप धर्म कसा आहे? आणि संकटांमध्यें उपजीविका चालविणाऱ्या लोकांचा धर्म कसा? तें सांगावें ॥ १८ ॥ प्रकृतिवगैरे तत्त्वांची संख्या किती आहे? त्यांचें स्वरूप कोणतें? व त्या त्या कार्याच्या उपयोगित्वेंकरून त्यांची स्वरूपस्थिति कशी आहे? देवपूजेचा विधि कसा? व अष्टांगयोगसाधनाचा प्रकार कसा आहे? हें सांगावें ॥ १९ ॥ योगेश्वरांची, अणिमादिसिद्धींच्या योगानें अर्चिरादि मार्गेंकरून गति कशी आहे? योग्यांच्या लिंगशरीराचा नाश कसा होतो? ऋग्वेदादिक मुख्य वेद, आयुर्वेदादिक (वैद्यकादिक) उपवेद, धर्मशास्त्रें, इतिहास व पुराणें यांचें स्वरूप कसें आहे? ॥ २० ॥ सर्व प्राणिमात्रांचा ब्रह्मदेवाच्या प्रतिदिवशीं होणारा प्रलय, जगाची स्थिति, ब्रह्मदेवाच्या शंभर वर्षांनंतर होणारा महाप्रलय, इष्ट (वैदिककर्में) पूर्त

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

(विहिरी तलाव देवालयेंवगैरे बांधणें) अग्निहोत्रादिक काम्यकर्मांचें विधान व धर्म अर्थ व काम यांचें परस्पर विरोध न येतां आचरण करणें, हीं सर्व कशीं आहेत? ॥ २१ ॥ आणि प्रलयकालीं देहरूप उपाधींचा नाश झाल्यावर पुनः त्यांची सृष्टि, पाखंडमार्गांची उत्पत्ति आणि जीवाचे बंधमोक्ष व त्याचें बंधमोक्षांहून निराळ्या स्वरूपानें राहणें, हीं कशीं आहेत? ॥ २२ ॥ वैराग्यादिगुणसंपन्न भगवान्, आपल्या मायेनें सृष्टीच्या वेळीं क्रीडा कशी करितो? व प्रलयकालीं त्या मायेचा त्याग करून तो व्यापक परमात्मा, साक्षी असल्याप्रमाणें उदासीन कसा राहतो? ॥ २३ ॥ हे ऐश्वर्यसंपन्न महामुने, आपल्याला शरण येऊन प्रश्न करणाऱ्या मला या विचारलेल्या प्रश्नाचीं उत्तरें व न विचारिलें असतांहि सांगण्यास योग्य असेल तें, अनुक्रमानें यथास्थित सांगण्याविषयीं आपण योग्य आहां ॥ २४ ॥ प्रत्यक्ष ईश्वरापासून उत्पन्न होऊन सत्य-

---

प्रलयः इष्टं वैदिकं कर्म पूर्तं स्मार्तम् । वापीकूपतडागादि देवतायतनानि च ॥ अन्नप्रदानमारामः पूर्तमित्यभिधीयते । इति ॥ तत्र च काम्यानामग्निहोत्रादीनां विधिः त्रिवर्गस्य धर्मार्थकामस्य विधिरविरोधप्रकारः ॥ २१ ॥ अनुशायिनां लीनोपाधीनां जीवानाम् । आत्मनो जीवस्य व्यवस्थानं बंधमोक्षातिरिक्तस्वरूपेणावस्थानम् ॥ २२ ॥ उदास्ते प्रलये

यश्चानुशायिनां सर्गः पाखंडस्य च संभवः ॥ आत्मनो बंधमोक्षौ च व्यवस्थानं स्वरूपतः ॥ २२ ॥ यथाऽऽत्मतंत्रो भगवान्विक्रीडत्यात्ममायया ॥ विसृज्य वा यथा मायामुदास्ते साक्षिवद्विभुः ॥ २३ ॥ सर्वमेतच्च भगवन्पृच्छते मेऽनुपूर्वशः ॥ तत्त्वतोऽर्हस्युदाहर्तुं प्रपन्नाय महामुने ॥ २४ ॥ अत्र प्रमाणं हि भवान्परमेष्ठी यथाऽऽत्मभूः ॥ परे चेहानुतिष्ठंति पूर्वेषां पूर्वजैः कृतम् ॥ २५ ॥ न मेऽसवः परायंति ब्रह्मन्ननशनादमी ॥ पिबतोऽच्युतपीयूषमन्यत्र कुपिताद्द्विजात् ॥ २६ ॥ सूत उवाच ॥ स उपामंत्रितो राज्ञा कथायामिति सत्पतेः ॥ ब्रह्मरातो भृशं प्रीतो विष्णुरातेन संसदि ॥ २७ ॥ प्राह भागवतं नाम पुराणं ब्रह्मसंमितम् ॥ ब्रह्मणे भगवत्प्रोक्तं ब्रह्मकल्प उपागते ॥ २८ ॥

॥ २३ ॥ चशब्दादपृष्टमपि ॥ २४ प्रमाणं सम्यक् ज्ञाता यतस्तव ब्रह्मनारदव्यासक्रमेण संप्रदायोऽस्तीति सामान्यन्यायेनाह । परे चेति । यद्वा त्वदन्ये प्रायशो गतानुगतिका एव न तत्त्वविद इत्याह । परे चेति ॥ २५ ॥ ननु तवानशनद्विजकोपाभ्यां व्याकुलस्य कुतः श्रवणं तत्राह । नेति । न परायंति नापगच्छंति न व्याकुलीभवंतीत्यर्थः । अच्युतकीर्तिपीयूषम् ॥ २६ ॥ उपामंत्रितः पृष्टः संश्चासौ पतिश्च तस्य ॥ २७ ॥ ब्रह्मकल्पे सृष्ट्युपक्रमकल्पे भागवताख्यानेनैव प्रश्नानामुत्तरं दातुमुपक्रांतवानित्यर्थः ॥ २८ ॥

लोकीं राहणाऱ्या ब्रह्मदेवास जशी याविषयींची पूर्ण माहिती आहे तशीच आपणासहि आहे. कारण, आपला ब्रह्मनारदव्यासक्रमानें संप्रदाय आहे. इतर जे कोणी येथें आहेत ते गतानुगतिक असल्यामुळें आपल्या पूर्वजांनीं व त्यांच्या पूर्वजांनीं केलेलें मात्र आचरण करितात त्यांस तत्त्वज्ञान नसतें ॥ २५ ॥ हे ब्रह्मनिष्ठा, आपल्यापासून निघालेलें अच्युताचें कथामृत प्राशन करीत असल्यामुळें माझे हे प्राण, क्रुद्ध झालेल्या ब्राह्मणाच्या शापानें नियमित केलेल्या प्राणोत्क्रमणकालापूर्वीं या अनशनव्रतानेंहि व्याकुळ होत नाहींत ॥ २६ ॥ सूत ह्मणाला—ऋषि हो, परीक्षितिराजानें सभेमध्यें भक्तरक्षक परमेश्वराच्या कथेविषयीं याप्रमाणें प्रश्न केले असतां, शुकाचार्याला अत्यंत संतोष झाला आणि तो सृष्टीच्या आरंभीं ब्रह्मदेवाला भगवंतानें सांगितलेलें वेदतुल्य जें भागवतनामक पुराण तें सांगण्यास प्रवृत्त झाला ॥ २७ ॥ २८ ॥

॥ २७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आणि पांडवांच्या वंशजांमध्यें श्रेष्ठ अशा त्या परीक्षितिराजानें जें जें विचारिलें होतें तें सर्व भागवतकथनप्रसंगाच्या क्रमानें सांगावयास श्रीशुकाचार्यांनें आरंभ केला ॥ २९ ॥
यप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील द्वितीयस्कंधामध्यें प्रश्नविधिनामक हा आठवा अध्याय समाप्त झाला ॥ ८ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ पूर्वीं श्रीनारायणानें जें
भागवत ब्रह्मदेवाला सांगितलें होतें तें श्रीशुकानें राजाच्या प्रश्नाचीं उत्तरें सांगत असतां त्याला पुनः सांगितलें, हा विषय, या नवव्या अध्यायामध्यें सांगितला आहे ॥१॥
श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजन्, जसा निद्राकालीं अनेक स्वप्नें पाहणाऱ्या पुरुषाला त्या स्वप्नांत पाहिलेल्या पदार्थांपैकीं एकाचा पदार्थाचादेखील जागृतिसमयीं वास्तविक

पांडूनामृषभः श्रेष्ठः आनुपूर्व्येणेति प्रस्तावक्रमोऽत्र विवक्षितो न प्रश्नक्रमः ॥ २९ ॥ इति द्वितीयस्कंधे टीकायामष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥ ॥ राजप्रश्नोत्तरं वक्ष्यन्ब्रह्मणे हरिणोदितम् ॥
कथयामास नवमे शुको भागवतं पुनः ॥ १ ॥ तत्र यत्तावदुक्तं यदधातुमत इत्यनेन जीवस्य कथं देहसंबंध इति तत्रोत्तरमाह । आत्ममायेति । आत्मनो हरेर्मायामंतरेण अनुभ-
वरूपस्यात्मनोऽर्थेन दृश्येन देहादिना संबंधोऽजसा तत्त्वतो न घटेत । अत्र हेतुः परस्येति । स्वप्नद्रष्टुर्यथा स्वप्नदेहसंबंधो न घटते तद्वत् ॥ १ ॥ संसारोऽपि माययैवेत्याह ।
बहुरूपो बाल्युवादिरूपो देवनरादिरूपश्चाभाति । गुणेषु देहादिषु ॥ २ ॥ अतएव भक्तियोगेन तन्निरासे सति मोक्षोऽपि घटत इत्याह । यर्हीति । वावशब्द एवार्थे । स्व एव

यद्यत्परीक्षिदृषभः पांडूनामनुपृच्छति ॥ आनुपूर्व्येण तत्सर्वमाख्यातुमुपचक्रमे ॥ २९ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे द्वितीयस्कंधे
प्रश्नविधिर्नामाष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ आत्ममायामृते राजन्परस्यानुभवात्मनः ॥ न घटेतार्थसंबंधः स्वप्नद्रष्टुरिवां-
जसा ॥ १ ॥ बहुरूप इवाभाति मायया बहुरूपया ॥ रममाणो गुणेष्वस्या ममाहमिति मन्यते ॥ २ ॥ यर्हि वाव महिम्नि स्वे
परस्मिन्कालमाययोः ॥ रमेत गतसंमोहस्त्यक्त्वोदास्ते तदोभयम् ॥ ३ ॥ आत्मतत्त्वविशुद्ध्यर्थं यदाह भगवानृतम् ॥ ब्रह्मणे दर्श-
यन् रूपमव्यलीकव्रतादृतः ॥ ४ ॥

महिम्नि यदा रमेत तदेवाह । कालमाययोः पुरुषप्रकृत्योः परस्मिन् तदोभयमहं ममेति च त्यक्त्वा उदास्ते पूर्णरूपेणावतिष्ठते तदुक्तम् । यया संमोहितो जीव आत्मानं त्रिगु-
णात्मकम् ॥ परोऽपि मनुतेऽनर्थं तत्कृतं चाभिपद्यते ॥ अनर्थोपशमं साक्षाद्भक्तियोगमधोक्षजे ॥ लोकस्याजानतो विद्वांश्चक्रे सात्वतसंहिताम् इति ॥ ३ ॥ यच्चोक्तम् । परमे-
श्वरस्यापि देहसंबधाविशेषात्कथं तद्भक्त्या मोक्षः स्यादित्यासीद्यदुदरात्पद्ममित्यादिना तत्राह । आत्मनो जीवस्य तत्त्वविशुद्ध्यर्थं तत्त्वज्ञानार्थं तद्भवत्येव। किं तत् यत्तप आ-
दिना भजनं भगवान् ब्रह्मणे आह। किं कुर्वन् । ऋतं सत्यं चिद्घनं रूपं दर्शयन्। दर्शने हेतुः। अव्यलीकेन व्रतेन तपसा आदृतः सेवितः सन्। अयं भावः। जीवस्याविद्यया मिथ्या-

संबंध घडत नसतो तसा ज्ञानस्वरूपी आत्म्याला (जीवाला) यथार्थरीतीनें विचार केला असतां हरीच्या मायेवांचून इतर कोणत्याहि कारणानें ह्या जड देहादिकांशीं संबंध,
घडत नाहीं ॥ १ ॥ तर बहुत स्वरूपें धारण करणाऱ्या मायेच्यायोगानें हा जीव, बाल, तरुण इत्यादि बहुत अवस्थानीं किंवा देव, मनुष्य इत्यादिक बहुत प्रकारांनीं युक्त
असल्यासारखा भासतो आणि या मायेच्या गुणांपासून झालेल्या देहेंद्रियादिक विषयांचेठिकाणीं आसक्त होऊन क्रीडा करूं लागला ह्मणजे, देहच मी आहें व विषय माझे
आहेत असें मानतो ॥ २ ॥ आणि जेव्हां हा जीव मायासंबंधी मोहानें रहित होऊन प्रकृतिपुरुषांहून निराळ्या आपल्या स्वरूपीं रममाण होतो तेव्हां अहंतेचा व ममतेचा
त्याग करून पूर्णानंदस्वरूपानें राहतो ॥ ३ ॥ पूर्वीं ब्रह्मदेवानें निष्कपट तपानें भगवंताचें आराधन केलें असतां, भगवंतानें त्या ब्रह्मदेवाला आपलें सत्यज्ञानपूर्ण स्वरूप

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दाखवून जो मार्ग सांगितला तोच सर्वजीवानां आत्मतत्त्वाची (मोक्षाची) प्राप्ति होण्यास साधन आहे ॥ ४ ॥ भगवद्भजनानेंच तत्त्वज्ञान होतें हें सविस्तर सांगण्यासाठीं इतिहास सांगतात कीं,– आदिदेव व जगतांचा परम गुरु असा जो ब्रह्मदेव, तो आपल्या उत्पत्तिस्थानभूत कमलावर बसून, सृष्टि कशी करावी, याविषयीं विचार करूं लागला परंतु जिच्या योगानें प्रपंचाचा निर्माणप्रकार सिद्ध होईल अशी सृष्टीविषयीं उपयुक्त बुद्धि त्याला प्राप्त होईना ॥ ५ ॥ तेव्हां तो विचार करीत असतां, त्यानें एकदां प्रलयकालीन उदकामध्यें उत्पन्न झालेला एक शब्द ऐकिला. तो, कपासून मपर्यंत जीं २५ अक्षरें त्यांस स्पर्श ह्मणतात. त्यांपैकीं सोळावें (त) व एकविसावें

रूपदेहसंबंधः । ईश्वरस्य तु योगमायया चिद्घनलीलाविग्रहाविर्भाव इति महान् विशेषः अतस्तद्भजनान्मोक्षोपपत्तिरिति ॥ ४ ॥ भगवद्भजनादेव तत्त्वज्ञानमित्येतत्प्रपंचयिष्यन् ब्रह्मणोऽपि तत्त्वज्ञानं तत्प्रसादादेवेति दर्शयितुमितिहासमाह । स इत्यादिना । परो गुरुभक्तिरहस्योपदेष्टा स्वधिष्ण्यं पद्ममास्थाय अधिष्ठाय तस्याधिष्ठानान्वेषणाय पूर्वं जले निमग्नः परावृत्त्य स्वधिष्ण्ये स्थित्वेत्यर्थः । ऐक्षत तत्कथं स्रष्टव्यमित्यालोचितवान् तां दृशं प्रज्ञाम् । अत्र सृष्टिविषये संमतामव्यभिचारिणीम् । विधिः प्रकारः ॥ ५ ॥ सृष्टिं चिंतयन्कदाचिद् द्व्यक्षरं वचोंऽभसि उपाशृणोत् उपसमीपे श्रुतवान् । ते अक्षरे दर्शयति । कादयो मावसानाः स्पर्शास्तेषु यत्षोडशं तकारो यच्चैकविंशं पकारः। वचसो निर्दे-

स आदिदेवो जगतां परो गुरुः स्वधिष्ण्यमास्थाय सिसृक्षयैक्षत ॥ तां नाध्यगच्छद्दृशमत्रसंमतां प्रपंचनिर्माणविधिर्यया भवेत् ॥ ५ ॥ स चिंतयन्द्व्यक्षरमेकदाम्भस्युपाशृणोद्द्विर्गदितं वचो विभुः ॥ स्पर्शेषु यत्षोडशमेकविंशं निष्किंचनानां नृप यद्धनं विदुः ॥ ६ ॥ निशम्य तद्वक्तृदिदृक्षया दिशो विलोक्य तत्रान्यदपश्यमानः ॥ स्वधिष्ण्यमास्थाय विमृश्य तद्धितं तपस्युपादिष्ट इवादधे मनः ॥ ७ ॥ दिव्यं सहस्राब्दममोघदर्शनो जितानिलात्मा विजितोभयेंद्रियः ॥ अतप्यत स्माखिललोकतापनं तपस्तपीयांस्तपतां समाहितः ॥ तस्मै स्वलोकं भगवान्सभाजितः संदर्शयामास परं न यत्परम् ॥ ८ ॥

शार्थं तदर्थमाह । हे नृप निष्किंचनानां त्यक्तधनानां धनं यद्विदुः येन तपोधना इति प्रसिद्धाः। तच्च द्विर्गदितं तपतपेति लोण्मध्यमपुरुषैकवचनम् । तस्य वीप्सां सादरविधिरूपामशृणोदित्यर्थः ॥ ६ ॥ एवं निशम्य तस्य वचसो वक्तुर्दिदृक्षया ततः प्रचलितः सन् दिशो विलोक्य पुनः स्वधिष्ण्यमास्थाय केनचित्प्रत्यक्षं नियुक्त इव तच्चात्मनो हितं विमृश्य तपसि मनो धृतवानित्यर्थः ॥ ७ ॥ ततश्च स ब्रह्माऽखिलानां लोकानां तापनं प्रकाशकं तपोऽतप्यत स्म कृतवान् । तपतपेत्येतस्य वचसोऽर्थे अमोघं दर्शनं यस्य। जितोऽनिल आत्मा मनश्च येन। विजितान्युभयेंद्रियाणि ज्ञानकर्मात्मकानि येन । तपतां तपश्चरतां मध्ये तपीयानतिशयेन तपस्वी । तस्मै ब्रह्मणे स्वलोकं वैकुंठाख्यं

(प) या दोन अक्षरांचा दोनवेळां उच्चार झालेला (तप तप) असा शब्द होता. हे राजा, ज्या तपाला निर्धन पुरुषाचें धन असें ह्मणतात ॥ ६ ॥ तें तपतप (तप कर तपकर) असें वाक्य ऐकून ब्रह्मदेवानें त्या वाक्याचा वक्ता कोण आहे हें पाहण्यासाठीं सर्व दिशांकडे अवलोकन केलें, परंतु त्याला तेथें दुसरें कोणीच दिसले नाहीं. शेवटीं तो आपल्या आसनावरच बसला आणि तप केलें असतां त्यांतच आपलें हित आहे असा विचार करून, एकाद्यानें उपदेश केल्यासारखा त्यानें तप करण्याचा निश्चय केला ॥ ७ ॥ नंतर पूर्वीं ऐकिलेल्या (तपतप) या वाक्याच्या अर्थाविषयीं अमोघ (सफल) ज्ञानसंपन्न असून तपस्विजनांमध्यें महातपस्वी अशा त्या ब्रह्मदेवानें, आपल्या देहांतील वायु, मन, पंचज्ञानेंद्रियें व पंचकर्मेंद्रियें यांस स्वाधीन करून व एकाग्रचित्त होऊन देवांचीं हजार वर्षेंपर्यंत सर्वलोकांस प्रकाश करणारें असें दिव्य तप ॥ २८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

केलें. नंतर तपानें आराधन केलेल्या भगवंतानें त्याला आपला श्रेष्ठ वैकुंठलोक दाखविला. तो असा कीं–ज्यापेक्षां दुसरा कोणताहि लोक श्रेष्ठ नाहीं ॥ ८ ॥ जेथें क्लेश,
अज्ञान व भय हीं मुळींच नाहींत, आणि महापुण्यवंत सत्पुरुष व देव हे ज्याची स्तुति करितात, जेथें रजोगुण, तमोगुण किंवा या दोहोंनीं मिश्रित सत्त्वगुण राहत नाहीं,
शुद्ध सत्त्वगुण मात्र राहतो, जेथें काळाचा पराक्रम (नाश) नाहीं ॥ ९ ॥ जेथें मायादेखील नाहीं तेथें दुसरे रागलोभादिक विकार नाहींत हें काय सांगावें ! जेथें
देवदैत्यांनीं पूज्य असे जयविजयादिक पार्षद राहतात. ते असे कीं, श्यामवर्ण असून स्वच्छ, कमळाच्या पत्राप्रमाणें असलेल्या नेत्रांनीं युक्त, पीतांबरधारी, सुंदरकां-
तियुक्त, अतिसुकुमार, ॥ १० ॥ सर्वहि चतुर्भुज, ज्यांच्या आंगावर अतितेजःपुंज उत्तम उत्तम रत्नजडित पदकें व अलंकार आहेत असे, अतितेजस्वी व पोंवळीं

परं श्रेष्ठम् । न यत्परं यतः परमुत्कृष्टमन्यन्नास्ति ॥ ८ ॥ तमेव लोकमनुवर्णयति पंचभिः । व्यपेताः संक्लेशादयो यस्मात् । स्वदृष्टवद्भिः सत्पुण्यवद्भिः यद्वा स्वस्य दृष्टं दर्शनमस्ति
येषाम् । आत्मविद्भिरित्यर्थः । तयोस्ताभ्यां मिश्रं सत्त्वं च न प्रवर्तते । किंतु शुद्धमेव सत्त्वम् । कालविक्रमो नाशः ॥ ९ ॥ अपरे रागलोभादयो न संतीति किमु वक्तव्यम् ।
अनुव्रताः पार्षदाः । श्यामाश्च ते अवदाता उज्ज्वलाश्च पद्मनेत्राः पीतांबराः सुरुचोऽतिकमनीयाः सुपेशसोऽतिसुकुमाराः ॥ १० ॥ उन्मिषंत इव प्रभावंतो मणिप्रवेका

व्यपेतसंक्लेशविमोहसाध्वसं स्वदृष्टवद्भिर्विबुधैरभिष्टुतम् ॥ प्रवर्तते यत्र रजस्तमस्तयोः सत्त्वं च मिश्रं न च कालविक्रमः ॥ ९ ॥ न यत्र माया
किमुतापरे हरेरनुव्रता यत्र सुरासुरार्चिताः ॥ श्यामावदाताः शतपत्रलोचनाः पिशंगवस्त्राः सुरुचः सुपेशसः ॥ १० ॥ सर्वे चतु-
र्बाहव उन्मिषन्मणिप्रवेकनिष्काभरणाः सुवर्चसः ॥ प्रवालवैदूर्यमृणालवर्चसः परिस्फुरत्कुंडलमौलिमालिनः ॥ ११ ॥ भ्राजिष्णुभिर्यः
परितो विराजते लसद्विमानावलिभिर्महात्मनाम् ॥ विद्योतमानः प्रमदोत्तमाद्युभिः सविद्युदभ्रावलिभिर्यथा नभः ॥ १२ ॥ श्रीर्यत्र
रूपिण्युरुगायपादयोः करोति मानं बहुधा विभूतिभिः ॥ प्रेंखं श्रिता या कुसुमाकरानुगैर्विगीयमाना प्रियकर्म गायती ॥ १३ ॥ ददर्श
तत्राऽखिलसात्वतां पतिं श्रियः पतिं यज्ञपतिं जगत्पतिम् ॥ सुनंदनंदप्रबलार्हणादिभिः स्वपार्षदमुख्यैः परिसेवितं विभुम् ॥ १४ ॥

सुवर्चसोऽतितेजस्विनः । प्रवालादिवद्वर्चो वर्णो येषां ते । परितः स्फुरंति कुंडलानि मौलयो मा-
ण्युत्तमा येषु तानि निष्कानि पदकान्याभरणानि च येषां ते । सुवर्चसोऽतितेजस्विनः । प्रवालादिवद्वर्चो वर्णो येषां ते । परितः स्फुरंति कुंडलानि मौलयो मा-
मण्युत्तमा येषु तानि निष्कानि पदकान्याभरणानि च येषां ते । भ्राजिष्णुभिर्देदीप्यमानाभिः । प्रमदोत्तमानां दिवः कांतयस्ताभिर्विद्योतमानः सह
लाश्च संति येषां ते ॥ ११ ॥ पार्षदाननुवर्ण्य पुनरपि लोकमनुवर्णयति । भ्राजिष्णुभिर्देदीप्यमानाभिः । प्रमदोत्तमानां दिवः कांतयस्ताभिर्विद्योतमानः सह
विद्युद्भिर्वर्तमानाः सविद्युतस्ताभिरभ्रावलिभिः तत्र विद्युत इव स्त्रियः अभ्रपंक्तय इव विमानानि नभ इव लोकः ॥ १२ ॥ श्रीः संपत् । रूपिणी मूर्तिमती । मानं पूजाम् ।
विभूतिभिर्नानाविभवैः प्रेंखमांदोलं संश्रिता कुसुमाकरो वसंतस्तस्यानुगा भ्रमरास्तैर्विविधं गीयमाना स्वयं तु प्रियस्य हरेः कर्म गायंतीव भवति ॥ १३ ॥ य एवंभूतो

वैदूर्य (लसण्या) व कमलकंद यांच्यासारख्या वर्णाचे असून आसमंताद्भागीं स्फुरण पावणाऱ्या कुंडलें किरीट व माला यांनीं सुशोभित असे राहतात ॥ ११ ॥ पुनः त्या
वैकुंठलोकाचें वर्णन करितात.– जसें आकाश विद्युल्लतांसहित मेघपंक्तींनीं शोभतें तसा जो वैकुंठलोक, उत्तमस्त्रियांच्या कांतींनीं प्रकाशमान असून मोठमोठ्या भक्तांच्या
तेजस्वी झळकणाऱ्या विमानांच्या ओळींनीं फारच शोभत आहे ॥ १२ ॥ जेथें, वसंतऋतूचे सेवकच अशा भ्रमरांनीं गायन केलेली मूर्तिमंत लक्ष्मी, वेदांनीं वर्णन केलेल्या
श्रीविष्णूच्या चरणाची नानाप्रकारच्या ऐश्वर्यांनीं पूजा करीत असते. व झोंपाळ्यावर बसून त्या आपल्या प्रियपतीच्या अनेक लीला गायन करित्ये ॥ १३ ॥ त्या वैकुंठ-
लोकाचेठिकाणीं ब्रह्मदेवानें सर्वभक्तांचा पति, लक्ष्मीचा पति, यज्ञाचा पति, जगाचा पति, आणि सुनंद, नंद, प्रबल व अर्हण इत्यादि आपल्या मुख्य पार्षदांनीं आसमंतात्

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सेवन केलेला अशा नारायणास अवलोकन केलें ॥ १४ ॥ तो समर्थ ईश्वर, भक्तांवर प्रसाद करण्याविषयीं उद्युक्त, आपलें स्वरूप पाहणाऱ्या भक्तांस कृपादृष्टीनें हर्ष उत्पन्न करणारा, प्रसन्नहास्य व आरक्तनेत्र यांसहित असलेल्या मुखानें युक्त, किरीट धारण करणारा, कुंडलें धारण करणारा, पीतांबरधारी, चतुर्भुज, वक्षःस्थलाचेठिकाणीं राहणाऱ्या लक्ष्मीनें चिन्हित, अतिश्रेष्ठ सिंहासनावर बसलेला, प्रकृति, पुरुष, महत्तत्व व अहंकार ह्या च्यार, पंचज्ञानेंद्रियें, पंचकर्मेंद्रियें, मन व पंचमहाभूतें ह्या सोळा आणि शब्दादिक पांच विषय ह्या पांच अशा २५ तत्त्वरूप शक्तींनीं सभोंवार वेष्टित, दुसऱ्यांचेठिकाणीं स्थिर नसणाऱ्या स्वाभाविक पूर्ण ऐश्वर्यांनीं युक्त, व आपल्याच स्वरूपीं रममाण असा होता ॥ १५ ॥ १६ ॥ त्याच्या दर्शनाच्यायोगानें ज्याचें अंतःकरण आनंदांत गढून गेलें आहे, अंगावर रोमांच उभे राहिले आहेत, अतिशय प्रेम उत्पन्न झाल्यामुळें नेत्र

लोकस्तत्र तस्मिन् ॥ १४ ॥ भृत्यानां प्रसादेऽभिमुखं दृगेव आसव इव द्रष्टॄणां हर्षकरी यस्य तं प्रसन्नहासमरुणलोचनं चाननं यस्य वक्षसि स्थितया च श्रिया लक्षितं अलंकृतमित्यर्थः ॥ १५ ॥ अध्यर्हणीयं वरिष्ठं सिंहासनम् । चतस्रः प्रकृतिपुरुषमहदहंकाररूपाः षोडश एकादशेंद्रियपंचमहाभूताख्याः पंचतन्मात्ररूपा याः शक्तयस्ताभिर्वृतम् । स्वैर्भगैः स्वाभाविकैरैश्वर्यादिभिः इतरत्र योगिष्वध्रुवैरागंतुकैः साधारणैरित्यर्थः । एवं सत्यपि स्व एव धामन्स्वस्वरूप एव रममाणं अतएवेश्वरम् ॥ १६ ॥

भृत्यप्रसादाभिमुखं दृगासवं प्रसन्नहासारुणलोचनाननम् ॥ किरीटिनं कुंडलिनं चतुर्भुजं पीतांबरं वक्षसि लक्षितं श्रिया ॥ १५ ॥
अध्यर्हणीयासनमास्थितं परं वृतं चतुःषोडशपंचशक्तिभिः ॥ युक्तं भगैः स्वैरितरत्र चाध्रुवैः स्व एव धामन् रममाणमीश्वरम् ॥ १६ ॥
तद्दर्शनाह्लादपरिप्लुतांतरो हृष्यत्तनुः प्रेमभराश्रुलोचनः ॥ ननाम पादांबुजमस्य विश्वसृग्यत्पारमहंस्येन पथाऽधिगम्यते ॥ १७ ॥ तं
प्रीयमाणं समुपस्थितं तदा प्रजाविसर्गे निजशासनार्हणम् ॥ बभाष ईषत्स्मितशोचिषा गिरा प्रियः प्रियं प्रीतमनाः करे स्पृशन्
॥ १८ ॥ श्रीभगवानुवाच ॥ त्वयाऽहं तोषितः सम्यग्वेदगर्भ सिसृक्षया ॥ चिरं भृतेन तपसा दुस्तोषः कूटयोगिनाम् ॥ १९ ॥ वरं
वरय भद्रं ते वरेशं माऽभिवांछितम् ॥ ब्रह्मन् श्रेयःपरिश्रामः पुंसो मद्दर्शनावधिः ॥ २० ॥

तस्य दर्शनेन य आह्लादस्तेन परिप्लुतं व्याप्तमांतरमंतःकरणं यस्य । हृष्यंती रोमांचिता तनुर्यस्य । प्रेमभरेणाश्रूणि लोचनेषु यस्य । विश्वसृक् ब्रह्मा । पारमहंस्येन पथा ज्ञानमार्गेण ॥ १७ ॥ तं ब्रह्माणं भगवान् बभाषे । प्रजाविसर्गे कार्ये । निजशासनार्हणं स्वनियोगार्हम् । प्रजाविसर्गे समुपस्थितमिति वान्वयः । ईषत्स्मितेन शोचिर्दीप्तिः शोभा यस्यास्तया गिरा ॥ १८ ॥ सिसृक्षया हेतुना चिरं संभृतेन तपसाहं सम्यक् तोषितः । दुस्तोषस्तोषयितुमशक्यः ॥ १९ ॥ मा इति माम् । श्रेयसां फलानां परिश्रामः परि-

---

आनंदाश्रूंनीं भरून गेले आहेत, अशा सृष्टिकर्त्या ब्रह्मदेवानें, त्या ईश्वराच्या चरणकमलास नमस्कार केला. जें चरणकमल केवळ ज्ञानमार्गानेंच प्राप्त होतें ॥ १७ ॥ तेव्हां आपल्या दर्शनानें संतोष पावणारा, आपल्या सन्मुख उभा राहिलेला, प्रजा उत्पन्न करण्याच्या कामीं आपली आज्ञा मान्य करण्यास योग्य अशा त्या प्रिय ब्रह्मदेवाला प्रसन्न झालेल्या प्रिय भगवंतानें हस्ताचेठिकाणीं स्पर्श करून किंचित् मंदहास्यानें शोभणाऱ्या वाणीनें भाषण केलें ॥ १८ ॥ श्रीभगवान् ह्मणाला— हे ब्रह्मदेवा, तुझ्या अंतःकरणांत सर्व वेद आहेत त्यामुळें सकाम भक्तांस संतुष्ट न होणाऱ्याहि मला तूं, सृष्टि करण्याच्या इच्छेनें फार वेळ आचरण केलेल्या तपानें, उत्तम रीतीनें संतुष्ट केलें आहेस ॥ १९ ॥ हे ब्रह्मदेवा, वर देण्यास समर्थ अशा मजपासून तूं इच्छित वर मागून घे. तुझें कल्याण असो. आतां तप पुरे. कारण, पुरुषाला फलप्राप्तीबद्दल साधनांचा परिश्रम

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

माझें दर्शन होईपर्यंतच करावा लागतो ॥ २० ॥ तुला माझ्या वैकुंठलोकाचें जें दर्शन झालें हा माझ्या इच्छेचाच प्रभाव आहे. कारण, एकांतामध्यें मी उच्चारिलेलें 'तप तप' असें वाक्य ऐकून तूं उत्तम तप केलें आहेस ॥२१॥ जेव्हां तूं सृष्टिकार्याविषयीं अत्यंत मोहित झालास तेव्हां मीच तुला 'तप तप' या वाक्याचा उपदेश केला होता. हे निष्पापा ब्रह्मदेवा, तप हें माझें हृदय असून मी तपाचा साक्षात् आत्मा (मुख्यस्वरूप) आहें ॥२२॥ हें संपूर्ण चराचर विश्व मी, तपानेंच उत्पन्न करितों आणि तपानेंच त्याचा संहार करितों व तपानेंच त्याचें पालनहि करितों. एतावता तप हेंच माझें वीर्य (शक्ति), इतरांनीं आचरण करण्यास फारच कठीण असें आहे ॥२३॥ ब्रह्मदेव म्हणाला—हे भगवन्, तूं सर्व प्राणिमात्रांचा

श्रमः साधनप्रयासः मम दर्शनमवधिर्यस्य स तथा अतोऽधिकं तु पुनः फलं नास्तीत्यर्थः ॥ २० ॥ एतच्च मत्कृपयैव त्वया प्राप्तमित्याह । मनीषितमिच्छा तुभ्यमिदं दातव्यमिति या ममेच्छा तस्यानुभावोऽयम्। कोऽसौ तमाह। मम लोकस्यावलोकनं यत्। न चेदं मयैव तपोबलेन प्राप्तमिति स्वातंत्र्यं मन्यस्व तत्प्रवृत्तेरपि मत्कृतत्वादित्याह । रहसि तपतपेति यद्वच उपश्रुत्य परमं तपश्चकर्थ कृतवानसि ॥ २१ ॥ तदपि त्वांप्रति मयैवादिष्टमुपदिष्टम्। कदा तत्र तदा सृष्ट्यारंभे त्वयि कर्मणि कार्येऽर्थे विमोहिते सति । किंच तपो नाम ममैव शक्तिरित्याह । तपो मे हृदयमंतरंगा शक्तिः आत्मा स्वरूपम् । यस्य ज्ञानमयं तप इति श्रुतेः ॥ २२ ॥ ग्रसामि संहरामि बिभर्मि पालयामि वीर्यं शक्तिः

मनीषितानुभावोऽयं मम लोकावलोकनम् ॥ यदुपश्रुत्य रहसि चकर्थ परमं तपः ॥ २१ ॥ प्रत्यादिष्टं मया तत्र त्वयि कर्मविमोहिते ॥ तपो मे हृदयं साक्षादात्माऽहं तपसोऽनघ ॥ २२ ॥ सृजामि तपसैवेदं ग्रसामि तपसा पुनः ॥ बिभर्मि तपसा विश्वं वीर्यं मे दुश्चरं तपः ॥ २३ ॥ ब्रह्मोवाच ॥ ॥ भगवन् सर्वभूतानामध्यक्षोऽवस्थितो गुहाम् ॥ वेद ह्यप्रतिरुद्धेन प्रज्ञानेन चिकीर्षितम् ॥ २४ ॥ तथापि नाथमानस्य नाथ नाथय नाथितम् ॥ परावरे यथा रूपे जानीयां ते त्वरूपिणः ॥ २५ ॥ यथाऽऽत्ममायायोगेन नानाशक्त्युपबृंहितम् ॥ विलुंपन् विसृजन् गृह्णन् बिभ्रदात्मानमात्मना ॥ २६ ॥ क्रीडस्यमोघसंकल्प ऊर्णनाभिर्यथोर्णुते ॥ तथा तद्विषयां धेहि मनीषां मयि माधव ॥ २७ ॥ भगवच्छिक्षितमहं करवाणि ह्यतंद्रितः ॥ नेहमानः प्रजासर्गं बध्येयं यदनुग्रहात् ॥ २८ ॥

॥ २३ ॥ अध्यक्षोऽधिष्ठाता गुहां गुहायां बुद्धाववस्थितः सन्यद्यपि वेद तथापीत्युत्तरेणान्वयः ॥ २४ ॥ नाथमानस्य याचमानस्य उपतप्यमानस्येति वा । हेनाथ नाथय आशंसय प्रयच्छ नाथितं याचितम् । नाथृनाधृयाच्ञोपतापैश्वर्याशीःषु । नाथितमेवाह । परं सूक्ष्ममवरं स्थूलं च ते रूपं यथा जानीयाम् ॥ २५ ॥ यथा च त्वं क्रीडसि तद्विषयां मनीषां मयि धेहीत्युत्तरेणान्वयः । नानाशक्त्युपबृंहितं विश्वं विलुंपन् संहरन् विविधं सृजन् बिभ्रत्पालयन् आत्मना स्वयमेवात्मानं ब्रह्मादिरूपं गृह्णन्ननुगृण्हन् क्रीडसि ॥ २६ ॥ ऊर्णुते तंतुभिरात्मानमाच्छादयति ॥ २७ ॥ तत्किं सृष्टेरुद्विग्न एव तत्त्वज्ञानं प्रार्थयसे नेत्याह । भगवता त्वया शिक्षितमनुशिष्टमतंद्रितोऽनलसः सन्

आश्रय असून त्यांच्या बुद्धींच्याठिकाणीं राहतोस. तेव्हां आपल्या अकुंठित पूर्ण ज्ञानानें तूं, माझ्या मनांतील कर्तव्य जाणतच आहेस, तथापि हे प्रभो, रूपरहित अशा तुझीं स्थूलसूक्ष्म (लहानमोठीं) रूपें जशीं मी जाणेन तसें, याचना करणाऱ्या माझें मागणें तूं मला द्यावें ॥ २४ ॥ २५ ॥ हे माधवा, जसा कोळी, आपणच पुष्कळ तंतु उत्पन्न करून त्यांनीं आपणासच आच्छादन करून घेतो व शेवटीं ते तंतु आपणच भक्षण करितो तसा आपल्या मायेच्या योगानें अनेक शक्तींनीं वृद्धिंगत झालेलें जग, संहार करीत, उत्पन्न करीत व पालन करीत होत्साता, सत्यसंकल्प तूं आपणच आपल्या योगानें ब्रह्मदेवादिक रूपें घेऊन जशा रीतीनें क्रीडा करीत आहेस तशा प्रकारचें ज्ञान होण्याची बुद्धि माझेठिकाणीं स्थापन कर ॥ २६ ॥ २७ ॥ मी आळस न धरितां तूं सांगशील तसें सृष्टीचें काम करीन. परंतु प्रजांची सृष्टि करणाऱ्याहि मला,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अहंकारादिकेंकरून बंध प्राप्त होऊं नये अशाविषयीं तुझा अनुग्रह पाहिजे ॥ २८ ॥ हे समर्था, तूं लौकिक मित्राप्रमाणें हस्तस्पर्शादिकेंकरून व ममत्वेंकरून मला आपल्या सख्यासारखा मानिला आहेस, यास्तव मी प्रजासृष्टिरूप तुझ्या सेवेच्याठिकाणीं राहून या चराचर लोकांस उत्तममध्यमादि भेदेंकरून अनायासानें जोंपर्यंत उत्पन्न करीन, तोंपर्यंत तुझ्यापासून प्राप्त झालेल्या सन्मानामुळें 'मीहि स्वतंत्र आहें असा' मला मोठा अभिमान प्राप्त होऊं नये ॥ २९ ॥ श्रीभगवान् ह्मणाला– हे ब्रह्मदेवा, वेदादिग्रंथांत सांगितलेलें जें माझें अनुभवसहित व भक्तियुक्त अतिगुह्य ज्ञान आहे, तें व त्याचीं साधनें मी तुला सांगतों ग्रहण कर ॥ ३० ॥ माझ्या स्वरूपाची इयत्ता व सत्ता जशी आहे,

---

करिष्यामि । तर्हि किमनेन तत्त्वज्ञानेन तत्राह । यस्मादेवंभूतात्त्वदनुग्रहात्प्रजासर्गमीहमानः कुर्वन्नप्यहंकारादिभिर्बद्धो न भवेयमिति ॥ २८ ॥ अवश्यं च मदो भविता स तु कंचित्कालं माभूदिति प्रार्थयते । यावदिति । भो ईश ते त्वया लौकिकस्य सख्युः सखेवाहं कृतः करस्पर्शनादिना ममत्वेन संमानितः सन् प्रजासर्गरूपे तव परिकर्मणि सेवायां स्थितोऽविक्लवोऽव्याकुल एव । यावज्जनं विभजाम्युत्तममध्यमादिभेदेन सृजामि तावत्त्वत्संमाननादहमप्यजः स्वतंत्र इति मानिनो मे समुन्नद्ध उत्कटो मदो माभूत् । यद्वा । मदो मा समुन्नद्ध मासमुन्नह्यताम् । उद्रिक्तो न भवेदित्यर्थः ॥ २९ ॥ ज्ञानं शास्त्रोत्थम् । विज्ञानमनुभवः । रहस्यं भक्तिः । सुगोप्यमपि वक्ष्यामीत्यादिनिर्देशात् तस्यांगं साधनम् ॥ ३० ॥ ननु

यावत्सखासख्युरिवेश ते कृतः प्रजाविसर्गे विभजामि भो जनम् ॥ अविक्लवस्ते परिकर्मणि स्थितो मा मे समुन्नद्धमदोऽजमानिनः ॥ २९ ॥ श्रीभगवानुवाच ॥ ज्ञानं परमगुह्यं मे यद्विज्ञानसमन्वितम् ॥ सरहस्यं तदंगं च गृहाण गदितं मया ॥ ३० ॥ यावानहं यथाभावो यद्रूपगुणकर्मकः ॥ तथैव तत्त्वविज्ञानमस्तु ते मदनुग्रहात् ॥ ३१ ॥ अहमेवासमेवाग्रे नान्यद्यत्सदसत्परम् ॥ पश्चादहं यदेतच्च योऽवशिष्येत सोऽस्म्यहम् ॥ ३२ ॥ ऋतेऽर्थं यत्प्रतीयेत न प्रतीयेत चात्मनि ॥ तद्विद्यादात्मनो मायां यथाऽऽभासो यथा तमः ॥ ३३ ॥

त्वद्दर्शनेऽप्यसमर्थोऽहं कथं ज्ञानाधिकारी स्यां तत्राह । यावानिति । यावान् स्वरूपतः यथाभावो यादृक्सत्तावान् । यानि रूपाणि गुणाः कर्माणि च यस्य ॥ ३१ ॥ एतदेव सम्यगुपदिशन् यावानित्यस्यार्थं स्फुटयति । अहमेवाग्रे सृष्टेः पूर्वमासम् । स्थितो नान्यत्किंचित् । यत् सत्स्थूलमसत्सूक्ष्मं परं तयोः कारणं प्रधानम् । तस्याप्यंतर्मुखतया तदा मय्येव लीनत्वात् अहं च तदा आसमेव केवलं न चान्यदकरवम् । पश्चात्सृष्टेरनंतरमप्यहमेवास्मि यदेतद्विश्वं तदप्यहमस्मि । प्रलये योऽवशिष्येत सोऽप्यहमेव । अनेन चानाद्यनं-तत्वादद्वितीयत्वाच्च परिपूर्णोऽहमित्युक्तं भवति ॥३२॥ याथात्म्यमायायोगेनेत्यनेन मायाया अपि पृष्टत्वाद्वक्ष्यमाणोपयोगित्वाच्च मायां निरूपयति । ऋतेऽर्थं विनापि वास्तवमर्थम् । यद्यतः किमप्यनिरुक्तमात्मन्यधिष्ठाने प्रतीयेत । सदपि च न प्रतीयेत तदात्मनो मम मायां विद्यात् । यथा आभासो द्विचंद्रादिरित्यर्थं विना प्रतीतौ दृष्टांतः । यथा तम इति ।

व माझें स्वरूप, गुण व कर्में हीं जशीं आहेत तसेंच तत्त्वज्ञान तुला माझ्या अनुग्रहानें प्राप्त होवो ॥ ३१ ॥ सृष्टीच्या पूर्वीं मीच होतों. स्थूल, सूक्ष्म किंवा या दोहोंना कारण जी प्रकृति हें सर्व माझ्याहून भिन्न कांहींच नव्हतें. सृष्टीच्या नंतरहि मीच आहें. जें हें जगत् तेंहि मीच आहें आणि प्रलयाचेठिकाणीं जो अवशिष्ट राहतो तोहि मीच आहें ॥ ३२ ॥ जसा आकाशांत एकच चंद्र असतां, एकाद्या मनुष्याला पित्तादिविकारामुळें दोन चंद्र आहेत असा खोटाच आभास होतो, तसें आत्म्याचेठिकाणीं वस्तुतः खरें नसतां जें देहादि वस्तु प्रतीतीला येतें, किंवा जसा राहु, ग्रहमंडळामध्यें असतांहि दिसत नाहीं, तसें जें आत्मवस्तु खरें असतांहि प्रतीतीला येत नाहीं, ती आत्म्याची माया

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आहे असें जाणावें ॥ ३३ ॥ जशीं पंचमहाभूतें लहानथोर प्राणिमात्रांच्या देहांमध्यें प्रविष्ट झालीं आहेत. कारण, तीं तेथें प्राप्त होतात परंतु वास्तविकरीत्या तीं तेथें प्रविष्ट
झालीं नाहींत. तर तीं प्राण्याच्या उत्पत्तीच्या पूर्वींच कारणरूपानें तेथें आहेत तसा त्या प्राण्यांच्या देहांमध्यें मी सबाह्याभ्यंतरीं स्वातंत्र्यानें व्याप्त असल्यामुळें प्रविष्ट असूनहि
तत्संबंधी गुणदोषांनीं लिप्त होत नाहीं; अशी माझी अद्भुत स्थिति आहे ॥ ३४ ॥ जशी माती घड्याचें कारण असल्यामुळें ती घड्यामध्यें असत्ये हा अन्वय, पण मातीहि
कारणरूपानें कार्यरूप घड्याहून निराळी आहे हा व्यतिरेक. तसें आत्मा सर्वांस कारण असल्यामुळें त्याचा सर्व कार्यांत अन्वय (व्यापून राहणें) आहे, पण कारणरूपानें
त्याचा कार्याहून व्यतिरेक (निराळेपणा) आहे. अशा अन्वयव्यतिरेकांनीं जें सर्वठिकाणीं सर्वकाळ असतें तेंच आत्मस्वरूप होय. हे ब्रह्मदेवा, आत्म्याचें तत्त्व जाणण्याची

सतोऽप्रतीतौ तमो राहुर्यथा ग्रहमंडले स्थितोऽपि न दृश्यते तथा ॥३३॥ यथा भाव इत्येतत्स्पष्टयति । यथा महाभूतानि भौतिकेष्वनु सृष्टेरनंतरं प्रविष्टानि तेषूपलभ्यमानत्वात्।
अप्रविष्टानि च प्रागेव कारणतया तेषु विद्यमानत्वात् । तथा तेषु भूतभौतिकेषु अहं न च तेष्वहम् । एवंभूता मम सत्तेत्यर्थः ॥ ३४ ॥ साधनमाह । आत्मनस्तत्त्वजिज्ञासुना
एतावत्त्वमेव जिज्ञास्यं विचार्यम् । तदेवाह । अन्वयः कार्येषु कारणत्वेनानुवृत्तिः कारणावस्थायां च तेभ्यो व्यतिरेकः तथा जाग्रदाद्यवस्थासु तत्तत्साक्षितयान्वयः व्यतिरेकश्च
समाध्यादौ एवमन्वयव्यतिरेकाभ्यां यत्स्यात् सर्वत्र सर्वदा च तदेवात्मेति ॥ ३५ ॥ यत्प्रार्थितं नेहमानः प्रजासर्गमिति तत्प्रसादीकरोति । एतन्मतं सम्यगनुतिष्ठ समाधिना

यथा महांति भूतानि भूतेषूच्चावचेष्वनु ॥ प्रविष्टान्यप्रविष्टानि तथा तेषु न तेष्वहम् ॥ ३४ ॥ एतावदेव जिज्ञास्यं तत्त्वजिज्ञासुना-
तस्मिन्महाभागवतो द्वैपायनसुहृत्सखः ॥ लोकाननुचरन्सिद्ध आससाद यदृच्छया ॥ ९ ॥ तस्यानुरक्तस्य मुनेर्मुकुंदः प्रमोदभावानतकंधरस्य ॥ आशृण्वतो मामनुरागहाससमीक्षया विश्रमयन्नुवाच ॥ १० ॥ श्रीभगवानुवाच ॥ वेदाहमंतर्मनसीप्सितं ते ददामि यत्तद्दुरवापमन्यैः ॥ सत्रे पुरा विश्वसृजां वसूनां मत्सिद्धिकामेन वसो त्वयेष्टः ॥ ११ ॥ स एष साधो चरमो भवानामासादितस्ते मदनुग्रहो यत् ॥ यन्मां नृलोकान्रह उत्सृजंतं दिष्ट्या ददृश्वान् विशदानुवृत्त्या ॥ १२ ॥ पुरा मया प्रोक्तमजाय नाभ्ये पाद्मे निषण्णाय ममादिसर्गे ॥ ज्ञानं परं मन्महिमावभासं यत्सूरयो भागवतं वदंति ॥ १३ ॥ इत्यादृतोक्तः परमस्य पुंसः प्रतिक्षणानुग्रहभाजनोऽहम् ॥ स्नेहोत्थरोमा स्खलिताक्षरस्तं मुंचञ्छुचः प्रांजलिराबभाषे ॥ १४ ॥

पम् ॥ ११ ॥ तस्य भाग्यमभिनंदति । स एष भावो जन्म ते भवानां मध्ये चरमः यद्यस्मिन् मदनुग्रह आसादितो लब्धः यत्पुनर्मां रह एकांते विशदानुवृत्त्या एकांतभक्त्या ददृश्वान्दृष्टवानसि एतद्दिष्ट्या भद्रं जातमित्यर्थः । नृलोकान् नृशब्देन जीवास्तेषां लोकानुत्सृजंतं वैकुंठं गच्छंतमित्यर्थः ॥ १२ ॥ ददामीति यदुक्तं तदेव निर्दिशति । पुरा पूर्वस्मिन्पाद्मे कल्पे आदिसर्गे सर्गोपक्रमे मम महिमा लीलाऽवभास्यते येन तत् ॥ १३ ॥ इत्येवमादृतश्चासावुक्तश्चाहं प्रतीक्षणं कृपाऽवलोक एवानुग्रहस्तस्य भाजनः पात्रभूतः

घेण्यास अशक्य असें जें माझ्या प्राप्तीचें साधन (ज्ञान) तें मी तुला देतों ॥ ११ ॥ हे साधो, ह्या जीवलोकांचा त्याग करून वैकुंठास जाणाऱ्या माझें एकांतभक्तीच्या योगानें तूं जें एकांतीं दर्शन घेतलेंस हें फार चांगलें झालें. ज्या जन्मांत तूं माझा अनुग्रह संपादन केलास तें हें तुझें जन्म सर्व जन्मांमध्यें शेवटचेंच होय. या नंतर तूं मुक्त होशील ॥ १२ ॥ पूर्वीं गेलेल्या पाद्मकल्पामध्यें सृष्टीच्या आरंभीं माझ्या नाभीपासून उत्पन्न होऊन कमळावर बसलेल्या ब्रह्मदेवाला जें मीं सांगितलें होतें, ज्याला विवेकी पुरुष, भागवत असें म्हणत व ज्याच्या योगानें माझी लीला कळून येते, त्या ज्ञानाचा मी तुला उपदेश करितों ॥ १३ ॥ याप्रमाणें त्या परमपुरुष भगवंतानें आदरपूर्वक भाषण केलें असतां त्याच्या कृपादृष्टिरूप अनुग्रहास पात्र झालेला मी, हर्षानें ज्याच्या आंगावर रोमांच उभे राहिले आहेत, सद्गदित कंठ झाला आहे, व नेत्रांतून

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रेमाश्रु चालले आहेत असा होत्साता, हात जोडून त्या श्रीकृष्णाला ह्मणालों कीं, ॥ १४ ॥ हे प्रभो, तुझ्या चरणकमलाचें सेवन करणाऱ्या लोकांस या लोकीं, धर्म अर्थ काम व मोक्ष या चारहि पुरुषार्थांमध्यें कोणता वरें दुर्लभ आहे ? कोणताच नाहीं. तथापि, हे सर्वव्यापका देवा, मी त्या पुरुषार्थांची इच्छा करीत नाहीं. कारण, मी केवळ तुझ्या चरणाच्या सेवेविषयींच उत्सुक आहें ॥ १५ ॥ हे प्रभो, निरिच्छ अशा तुझीं कर्मे, जन्मरहित अशा तुझें जन्म, कालस्वरूपी तुझें शत्रूच्या भयानें पलायन करणें व द्वारकारूप किल्ल्याचा आश्रय करणें आणि स्वस्वरूपीं रममाण असणाऱ्या तुझें पुष्कळ स्त्रियांसहवर्तमान गृहस्थाश्रम करणें, यांविषयीं ज्ञानसंपन्न लोकांचीहि

पाठांतरे प्रतिक्षणमनुग्रहस्य पात्रमिति शुचोऽश्रूणि मुंचन्नाबभाषे उक्तवानस्मि ॥ १४ ॥ नहि स्वाज्ञाननिवृत्तिमात्रकामोऽहं किंतु त्वन्निषेवणोत्सुकस्त्वयि चाघटमानाचरणं दृष्ट्वा मे मोहो भवत्यतस्त्वं तत्त्वज्ञानं देहीति प्रार्थयितुमाह । को न्विति । चतुर्षु धर्मादिषु । तथापि हेभूमन् भवत्पदांभोजनिषेवणोत्सुकोऽहं तान्न प्रवृणोमि ॥ १५ ॥ अघटमानाचरणं दर्शयति । कर्माण्यनीहस्य निःस्पृहस्य निष्क्रियस्य वा । अभवस्याजन्मनो भवो जन्म कालात्मनस्तवारिभयाद्दुर्गाश्रयः पलायनं च स्वात्मनि रतिर्यस्य तस्य बह्वीभिः स्त्रीभिर्गृहस्थाश्रम इति यदिहास्मिन् संसारे विदुषामपि धीः संशयेन खिद्यति ॥ १६ ॥ किंच । मंत्रेषु च प्रस्तुतेषु सत्सु मामाहूय वै अहो पृच्छेरपृच्छः । अकुंठितः कालादिनाऽखंडः

कोन्वीश ते पादसरोजभाजां सुदुर्लभोऽर्थेषु चतुर्ष्वपीह ॥ तथापि नाहं प्रवृणोमि भूमन् भवत्पदांभोजनिषेवणोत्सुकः ॥ १५ ॥ कर्माण्यनीहस्य भवोऽभवस्य ते दुर्गाश्रयोऽथारिभयात्पलायनम् ॥ कालात्मनो यत्प्रमदायुताश्रयः स्वात्मन्रतेः खिद्यति धीर्विदामिह ॥ १६ ॥ मंत्रेषु मां वा उपहूय यत्त्वमकुंठिताखंडसदात्मबोधः ॥ पृच्छेः प्रभो मुग्ध इवाप्रमत्तस्तन्नो मनो मोहयतीव देव ॥ १७ ॥ ज्ञानं परं स्वात्मरहःप्रकाशं प्रोवाच कस्मै भगवान् समग्रम् ॥ अपि क्षमं नो ग्रहणाय भर्तर्वदांजसा यद्वृजिनं तरेम ॥१८॥ इत्यावेदितहार्दाय मह्यं स भगवान् परः ॥ आदिदेशारविंदाक्ष आत्मनः परमां स्थितिम् ॥१९॥ स एवमाराधितपादतीर्थादधीततत्त्वात्मविबोधमार्गः ॥ प्रणम्य पादौ परिवृत्य देवमिहागतोऽहं विरहातुरात्मा ॥ २० ॥

संततः सदात्मा संशयादिरहितो बोधो विद्याशक्तिर्यस्य । मुग्धवदज्ञवत् । अप्रमत्तोऽवहितः सन् ॥ १७ ॥ स्वात्मनस्तव रहो रहस्यं तत्त्वं तस्य प्रकाशकम् । कस्मै ब्रह्मणे सर्व नामत्वमार्षम् । नोऽस्माकं ग्रहणायापि क्षमं यदि योग्यं तर्हि वद भर्त्तः स्वामिन् यद्यतो वृजिनं संसारदुःखमनायासेन तरिष्यामः ॥ १८ ॥ आवेदितो हार्दो हृदिस्थितोऽभिप्रायो येन तस्मै ॥१९॥ आराधितपादो भगवान् स एव तीर्थं गुरुस्तस्मादधीतोऽधिगतस्तत्त्वात्मविबोधस्य परमार्थात्मज्ञानस्य मार्गो येन सोऽहं देवं परिवृत्य प्रदक्षिणीकृत्य ॥२०॥

बुद्धि खिन्न (आश्चर्ययुक्त) होत्ये ॥ १६ ॥ हे प्रभो, देवा, अकुंठित आणि अखंड अशा आत्मज्ञानानें संपन्न असा तूं मसलतींच्या वेळीं मला बोलावून आणून एखाद्या अज्ञानी पुरुषाप्रमाणें लक्षपूर्वक जें मला विचारीत होतास तें तुझें भाषण आठवलें ह्मणजे, माझ्या मनाला केवळ मोह उत्पन्न करितें ॥ १७ ॥ हे स्वामिन्, आत्मस्वरूपाच्या रहस्याचा बोध करून देणारें जें उत्तम ज्ञान तूं ब्रह्मदेवाला समग्र सांगितलें आहेस, तें मला समजण्यासारखें असेल तर कृपा करून सांग. ह्मणजे त्याच्या योगानें मी दुःखरूपी संसार सहज तरून जाईन ॥ १८ ॥ अशा रीतीनें मी आपल्या मनांतील अभिप्राय श्रीकृष्णास कळविला असतां, त्या कमलनयन भगवान् परमेश्वरानें, मला आपल्या स्वरूपाच्या परमस्थितिरूप ज्ञानाचा उपदेश केला ॥ १९ ॥ याप्रमाणें आराधन केलेल्या गुरुरूपी श्रीकृष्णापासून परमार्थरूपी आत्मज्ञानाचा मार्ग प्राप्त करून घेतल्यावर,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मी त्या देवाला प्रदक्षिणा करून व त्याच्या चरणांस नमस्कार करून, त्याच्या विरहानें व्याकुलचित्त होत्साता येथें आलों आहें ॥ २० ॥ तो मी, श्रीकृष्णाच्या दर्शनानें आनंदयुक्त व वियोगानें दुःखयुक्त होत्साता आतां त्या प्रभूला प्रिय, अशा बदरिकाश्रमास गमन करितों ॥ २१ ॥ ज्या स्थलाचेठिकाणीं, देव नारायण व भगवान् नर हे लोकांवर अनुग्रह करणारे दोघे ऋषी, लोकांस उपद्रव न होण्यासारखें दुर्घट तप कल्पसमाप्तीपर्यंत करीत आहेत ॥ २२ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, याप्रमाणें विदुरानें आपल्या आप्तजनाची वधरूप अप्रियवार्ता, उद्धवापासून ऐकून त्या ज्ञानसंपन्न विदुरानें, प्राप्त झालेल्या शोकाचें विवेकेंकरून परिमार्जन केलें ॥ २३ ॥ आणि हे कौरवकुलांतील श्रेष्ठ राजा, त्या विदुरानें श्रीकृष्णाच्या परिवारमंडळींमध्यें मुख्य असून बदरिकाश्रमास जाणाऱ्या त्या महाभगवद्भक्त उद्धवास विश्वासानें हें पुढील भाषण

तस्य दर्शनेनाह्लादो वियोगेनार्तिश्च ताभ्यां युतो बदर्याश्रमस्थानं गमिष्यामि ॥ २१ ॥ मृदु परोपद्रवशून्यं तीव्रं दुश्चरं दीर्घमाकल्पांतं तेपाते तपश्चरत इत्यर्थः । लोकभावनौ लोकानुग्रहकारकौ ॥ २२ ॥ ज्ञानेन विवेकेन ॥ २३ ॥ कृष्णपरिग्रहे परिवारे मुख्यं विश्रंभाद्विश्वासात् । कौरवर्षभ हेपरीक्षिते ॥ २४ ॥ यद्यस्माद्विष्णोर्भृत्याः स्वभृ-

सोऽहं तद्दर्शनाह्लादवियोगार्तियुतः प्रभो ॥ गमिष्ये दयितं तस्य बदर्याश्रममंडलम् ॥ २१ ॥ यत्र नारायणो देवो नरश्च भगवानृषिः ॥ मृदु तीव्रं तपो दीर्घं तेपाते लोकभावनौ ॥ २२ ॥ श्रीशुक उवाच ॥ इत्युद्धवादुपाकर्ण्य सुहृदां दुःसहं वधम् ॥ ज्ञानेनाशमयत्क्षत्ता शोकमुत्पतितं बुधः ॥ २३ ॥ स तं महाभागवतं व्रजंतं कौरवर्षभ ॥ विश्रंभादभ्यधत्तेदं मुख्यं कृष्णपरिग्रहे ॥ २४ ॥ विदुर उवाच ॥ ज्ञानं परं स्वात्मरहःप्रकाशं यदाह योगेश्वर ईश्वरस्ते ॥ वक्तुं भवान्नोऽर्हति यद्धि विष्णोर्भृत्याः स्वभृत्यार्थकृतश्चरंति ॥ २५ ॥ उद्धव उवाच ॥ ननु ते तत्त्वसंराध्य ऋषिः कौषारवोंऽति मे ॥ साक्षाद्भगवताऽऽदिष्टो मर्त्यलोकं जिहासता ॥ २६ ॥ श्रीशुक उवाच ॥ इति सह विदुरेण विश्वमूर्तेर्गुणकथया सुधया प्लावितोरुतापः ॥ क्षणमिव पुलिने यमस्वसुस्तां समुषित औपगविर्निशां ततोऽगात् ॥ २७ ॥

त्यप्रयोजनसाधकाः संतश्चरंति नहि कृतार्थानामन्यत्कृत्यमस्तीत्यर्थः ॥ २५ ॥ तत्त्वाय संराध्य इति । अयं भावः । भगवतैव स्मरणमात्रेण तवापि तत्त्वमुपदिष्टप्रायम् । अथ केवलमसंभावनादिनिवृत्तये ज्ञानी कश्चिदाराध्यः स च तवाराध्यो मैत्रेयो नत्वहं मर्मांतिक एव त्वदुपदेशे तस्यादिष्टत्वादिति ॥ २६ ॥ प्लावितोऽपनीत उरुस्तापो यस्य सः ।

केलें कीं ॥ २४ ॥ विदुर ह्मणाला—हे उद्धवा, योगेश्वर श्रीकृष्णानें, आत्मस्वरूपाच्या रहस्याचा बोध करून देणारें जें ज्ञान तुला सांगितलें, आहे तें तूं मला सांगण्यास योग्य आहेस. कारण, विष्णूचे सेवक, आपल्या सेवकांच्या कार्याकरितांच पृथिवीवर संचार करीत असतात ॥ २५ ॥ उद्धव ह्मणाला—श्रीकृष्णानें तुझें स्मरण केलें होतें एवढ्यावरून साक्षात् भगवंतानेंच तुला तत्त्वोपदेश केल्यासारखा आहे. परंतु असंभावना, विपरीतभावना व संशय यांच्या निवृत्तीकरितां कोणीतरी ज्ञानी गुरु तुला केला पाहिजे यास्तव कुषीरवाचा पुत्र जो मैत्रेय ऋषि त्याचेंच तूं तत्त्वज्ञानासाठीं सेवन कर. कारण, भगवान् जेव्हां मृत्युलोक सोडून जाऊं लागला तेव्हां त्या साक्षात् भगवंतानें, तुला उपदेश करण्याबद्दल त्या मैत्रेयऋषीला माझ्या समक्ष आज्ञा केली आहे ॥ २६ ॥ शुकाचार्य ह्मणाला— हे राजा, याप्रमाणें विदुरासहवर्तमान झालेल्या विश्वमूर्ति कृष्णाच्या गुणकथारूप अमृतानें आध्यात्मिकादि त्रिविधतापांचें उपशमन करून यमुनेच्या वाळवंटामध्यें ती रात्र एका क्षणासारखी घालवून नंतर, सकाळीं उद्धव तेथून ॥ ११

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

बदरिकाश्रमास निघून गेला ॥ २७ ॥ राजा ह्मणाला—यादवांतील सेनाधिपतींच्या समुदायाचें पालन करणारे जे वृष्णि व भोज, ते सुद्धां ब्राह्मणांच्या शापानें मरण पावले असतां, तो एक उद्धवच कसा अवशेष राहिला ? कारण, सर्व यादवांत मुख्य, त्रैलोक्याधिपति जो हरि त्यानेंहि आपल्या देहाचा त्याग केला ॥ २८ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला— हे राजा, ब्राह्मणाचा शाप हें केवळ ज्याचें मिष आहे अशा कालाच्या योगानें, वृद्धिंगत झालेल्या आपल्या कुळाचा संहार करून आपल्या देहाचाहि त्याग करण्याची इच्छा करणाऱ्या सफलइच्छावान् श्रीकृष्णानें असा विचार केला कीं, ॥ २९ ॥ आतां मी ह्या लोकाला सोडून वैकुंठलोकीं गेलों असतां, माझ्या आश्रयानें राहणारें जें साक्षात् ज्ञान त्याला पुढें परंपरेनें चालविण्यास, आत्मवेत्त्यामध्यें श्रेष्ठ असा हा उद्धवच योग्य आहे ॥ ३० ॥ हा श्रेष्ठ उद्धव, एक अणुमात्र सुद्धां माझ्यापेक्षां

यमस्वसुर्यमुनायाः पुलिने तीरे तां निशां क्षणमिव समुषितः । औपगविरुद्धवः ॥ २७ ॥ ब्रह्मशापेन निधनं प्राप्तेषु यचस्मात्त्रयाणां ब्रह्मादीनामीशो हरिरप्याकृतिं मनुष्याकारं त्यक्तवान् ॥ २८ ॥ ब्रह्मशापोऽपदेशो मिषं यस्य तेन कालेन स्वशक्तिरूपेणामोघं वांछितं यस्य न ह्यत्र शापः प्रभुः किंतु भगवदिच्छैवेत्यर्थः ॥ २९ ॥ मय्युपरते सति

राजोवाच ॥ निधनमुपगतेषु वृष्णिभोजेष्वधिरथयूथपयूथपेषु मुख्यः ॥ स तु कथमवशिष्ट उद्धवो यद्धरिरपि तत्यज आकृतिं त्र्यधीशः ॥ २८ ॥ श्रीशुक उवाच ॥ ब्रह्मशापापदेशेन कालेनामोघवांछितः ॥ संहृत्य स्वकुलं नूनं त्यक्ष्यन्देहमचिंतयत् ॥ २९ ॥ अस्माल्लोकादुपरते मयि ज्ञानं मदाश्रयम् ॥ अर्हत्युद्धव एवाद्धा संप्रत्यात्मवतां वरः ॥ ३० ॥ नोद्धवोऽण्वपि मन्न्यूनो यद्गुणैर्नार्दितः प्रभुः ॥ अतो मद्वयुनं लोकं ग्राहयन्निह तिष्ठतु ॥ ३१ ॥ एवं त्रिलोकगुरुणा संदिष्टः शब्दयोनिना ॥ बदर्याश्रममासाद्य हरिमीजे समाधिना ॥ ३२ ॥ विदुरोऽप्युद्धवाच्छ्रुत्वा कृष्णस्य परमात्मनः ॥ क्रीडयोपात्तदेहस्य कर्माणि श्लाघितानि च ॥ ३३ ॥ देहन्यासं च तस्यैवं धीराणां धैर्यवर्धनम् ॥ अन्येषां दुष्करतरं पशूनां विक्लवात्मनाम् ॥ ३४ ॥ आत्मानं च कुरुश्रेष्ठ कृष्णेन मनसेक्षितम् ॥ ध्यायन् गते भागवते रुरोद प्रेमविह्वलः ॥ ३५ ॥

ज्ञानमर्हति ज्ञानयोग्यो भवति ॥ ३० ॥ मत्तः सकाशादीषदपि न्यूनो न भवति यचस्माद्गुणैर्विषयैर्न क्षोभितः मद्वयुनं मद्विषयं ज्ञानं लोकस्योपदिशन्निह तिष्ठतु ॥ ३१ ॥ एवमनेनाभिप्रायेण शब्दयोनिना वेदकर्त्रा ईजे पूजयामास ॥ ३२ ॥ ३३ ॥ अन्येषां पशूनां पशुतुल्यानां विक्लवात्मनामधीरचित्तानाम् ॥ ३४ ॥ मनसेक्षितं चिंतितम् ॥ ३५ ॥

कमी नाहीं. कारण, विषयांपासून याला कोणतेहि विकार होत नाहींत. यास्तव माझ्याविषयींच्या ज्ञानाचा लोकांस उपदेश करीत होत्साता, तो येथें (पृथ्वीवर) राहूंदे ॥ ३१ ॥ असा विचार करून, वेदांचें उत्पत्तिस्थान व त्रैलोक्याचा गुरु अशा श्रीकृष्णानें आज्ञा केलेला तो उद्धव, बदरिकाश्रमास जाऊन समाधीच्या योगानें श्रीहरीची पूजा करिता झाला ॥ ३२ ॥ इकडे विदुरहि, लीलेनें देहधारण करणाऱ्या श्रीकृष्ण परमात्म्याचीं स्तुत्य कर्में उद्धवापासून श्रवण करून, आणि धैर्यवान् पुरुषांच्या धैर्याची वृद्धि करणारें व इतर पशुतुल्य अधीर पुरुषांस सर्वथा करण्यास अशक्य असें त्या श्रीकृष्णाचें देहत्यागरूप कर्म ऐकून ॥ ३३ ॥ ३४ ॥ व हे राजा, श्रीकृष्णानें मनःपूर्वक आपलें स्मरण केलें होतें असें श्रवण करून, तो भगवद्भक्त उद्धव तेथून निघून गेला असतां, या सर्व गोष्टींचें व श्रीकृष्णाचें चिंतन करीत होत्साता, तो विदुर, प्रेमानें व्याकुळ

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होऊन रुदन करूं लागला ॥ ३५ ॥ नंतर भरतकुलश्रेष्ठ, ज्ञानसंपन्न तो विदुर, पुढें कांहीं दिवसांनीं यमुनेच्या तीरापासून, जेथें मैत्रयऋषि होता त्या भागीरथीच्या तीराचेठिकाणीं प्राप्त झाला ॥ ३६ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील तृतीयस्कंधामध्यें विदुरोद्धवसंवादरूप हा चवथा अध्याय समाप्त झाला ॥ ४ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ नंतर विदुरानें मैत्रेयऋषीला प्रश्न केला असतां, त्यानें विदुरास भगवंताची लीला वर्णिली आहे आणि महत्तत्त्वादिकांची उत्पत्ति व त्या तत्त्वांनीं केलेली हरीची स्तुति या पांचव्या अध्यायांत सांगितली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, कुरूंमध्यें श्रेष्ठ असा तो विदुर, गंगाद्वाराचेठिकाणीं ह्मणजे हरिद्वाराचेठिकाणीं बसलेल्या महाज्ञानी मैत्रेयऋषीच्या जवळ जाऊन त्याच्या सुशीलत्वादिक व दयालुत्वादिक गुणांनीं संतुष्ट व भगवंताच्या सप्रेमभक्तीनें शुद्ध-

---

कालिंद्याः सकाशात् सिद्ध एव विदुरः कतिपयैर्दिनैः स्वःसरितं गंगां प्रापद्यत प्राप्तः ॥ ३६ ॥ इति तृतीये टीकायां चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥ ॥ पंचमे भगवल्लीलां क्षत्रा पृष्टो महामुनिः ॥ प्रोवाच महदादीनां सर्गं तैश्च हरेः स्तुतिम् ॥ १ ॥ उक्तश्चतुर्भिरध्यायैः क्षत्तुर्मैत्रेयसंगमः ॥ संवादस्तु तयोः स्कंधद्वयेनाथ निगद्यते ॥ २ ॥ द्युनद्या गंगाया द्वारि हरिद्वारे आसीनं न तु कर्मव्यग्रम्। तत्र हेतुः। अगाधोऽपरिच्छिन्नो बोधो यस्येति मैत्रेयस्य सौशील्यमार्जवादिगुणाश्च करुणादयस्तैरभितृप्तः। पाठांतरे क्षत्तुः सौशील्यादिभिरभितृप्तं

कालिंद्याः कतिभिः सिद्ध अहोभिर्भरतर्षभः ॥ प्रापद्यत स्वःसरितं यत्र मित्रासुतो मुनिः ॥ ३६ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे तृतीयस्कंधे चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥ श्रीशुक उवाच ॥ द्वारि द्युनद्या ऋषभः कुरूणां मैत्रेयमासीनमगाधबोधम् ॥ क्षत्तोपसृत्याच्युतभावशुद्धः पप्रच्छ सौशील्यगुणाभितृप्तः ॥ १ ॥ विदुर उवाच ॥ सुखाय कर्माणि करोति लोको न तैः सुखं वाऽन्यदुपारमं वा ॥ विंदेत भूयस्तत एव दुःखं यदत्र युक्तं भगवान्वदेन्नः ॥ २ ॥ जनस्य कृष्णाद्विमुखस्य दैवादधर्मशीलस्य सुदुःखितस्य ॥ अनुग्रहायेह चरंति नूनं भूतानि भव्यानि जनार्दनस्य ॥ ३ ॥ तत्साधुवर्यादिश वर्त्म शं नः संराधितो भगवान् येन पुंसाम् ॥ हृदि स्थितो यच्छति भक्तिपूते ज्ञानं सतत्त्वाधिगमं पुराणम् ॥ ४ ॥

संतुष्टं मैत्रेयम् ॥ १ ॥ प्रश्नानेवाह। सुखायेति पंचदशभिः। तैः कर्मभिः सुखं वान्यस्य दुःखस्योपशमं वेत्यर्थः। अथवाऽन्यद्वा न विंदेत किं तदित्यपेक्षायां तस्यैव निर्देशः उपारमं वेति ततस्तैः कर्मभिर्भूयः पुनः पुनर्दुःखमेव विंदेत अत्रैवंविधे संसारे नोऽस्माकं यद्युक्तं कर्तुं योग्यं तत्सर्वज्ञो भगवान्वदेन्निरूपयतु ॥ २ ॥ दैवात्प्राचीनकर्मणो निमित्तभूतात्कृष्णाद्विमुखस्यातोऽधर्मशीलस्यातः सुदुःखितस्य जनस्यानुग्रहाय भव्यानि मंगलानि भूतानि चरंति भवंतः परोपकारस्वभावा एवेत्यर्थः ॥ ३ ॥ तत्तस्मात् हे साधुवर्य शं सुखरूपं

चित्त होत्साता, त्याला प्रश्न करूं लागला ॥ १ ॥ विदुर ह्मणाला– हे मैत्रेयऋषे, सर्व लोक सुखाकरितां कर्मे करितात त्यांपासून त्यांस सुखाची प्राप्ति किंवा दुःखाची निवृत्ति होत नाहीं परंतु उलट त्या कर्मांपासून दुःखच प्राप्त होतें. यास्तव या दुःखमय संसारांत आह्मांस करण्याविषयीं योग्य असें कर्म कोणतें ? तें कथन करावें. कारण, आपण सर्वज्ञ आहां ॥ २ ॥ मला तर असें वाटतें कीं, दैवयोगानें श्रीकृष्णापासून विमुख झालेल्या, अधर्मशील व दुःखित अशा दीनजनावर अनुग्रह करण्यासाठींच आपल्यासारखे विष्णूचे मंगलकारक भक्त, या भूमीवर संचार करित असतात ॥ ३ ॥ तस्मात् हे साधुश्रेष्ठा, ज्या मार्गाच्या योगानें आराधन केलेला भगवान्, पुरुषांच्या भक्तीनें पवित्र झालेल्या हृदयाचेठिकाणीं प्रगट होऊन आत्म्याचा प्रत्यक्ष अनुभव करून देणारें पुरातन ज्ञान देतो तो सुखरूप मार्ग आह्मांस कथन कर ॥ ४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्रिगुणात्मक मायेचा नियंता स्वतंत्र भगवान्, रामकृष्णादिक अवतार घेऊन जीं कर्मे करितो, व स्वतः निःस्पृह असून हें सर्व विश्व त्यानें जसें उत्पन्न केलें आहे, व त्याचें रक्षण करून त्याची जीविका जशी चालवितो ॥५॥ आणि पुनः तोच भगवान्, हें सर्व जग प्रलयकालीं आपल्या हृदयाकाशांत लीन करून सृष्टिसंबंधी सर्व व्यापारांपासून निवृत्त होत्साता आपल्या योगमायेच्याठिकाणीं ज्या रीतीनें शयन करतो व पुनः सृष्टिकालीं योगैश्वर्यसंपन्न देवादिकांचा ईश्वर तो एकच असतां या जगांत प्रविष्ट होऊन ब्रह्मदेव विष्णु इत्यादि अनेकरूपांनीं जसा बनला आहे ॥ ६ ॥ आणि तो भगवान्, ब्राह्मणादिक तीन वर्ण, गाई व देव यांच्या कल्याणासाठीं मत्स्यादिक अवता-

---

वर्त्म न आदिश कथय येन वर्त्मना संराधितो हृदि स्थितः सन् तत्त्वाधिगम आत्मापारोक्ष्यं तत्सहितं पुराणमनादिवेदप्रमाणकम् ॥ ४ ॥ करोति कर्माणीत्यादीनां वर्णयेति पंचमश्लोके क्रियासंबंधः । यथा येन प्रकारेण पुरुषरूपेण कृतावतारः संत्र्यधीशः त्रिगुणमायानियंता अतः स्वतंत्र एव यानि कर्माणि करोति । कर्माण्येव विशेषतः पृच्छति । यथेत्यादिना । निरीहो निष्क्रियो निःस्पृहो वा संस्थाप्य सुस्थितं कृत्वा । वृत्तिं जीविकाम् ॥ ५ ॥ स्वे स्वीये खे हृदयाकाशे निवेश्य स्थापयित्वा । निवृत्ता वृत्तयो यस्य । गुहायां योगमायायाम् । बहुधा ब्रह्मादिरूपेण ॥ ६ ॥ मत्स्याद्यवतारभेदैः क्रीडन्यानि कर्माणि विधत्ते यथा पुनर्विशेषं प्रष्टुमौत्सुक्यमाविष्करोति । मन इति । सुश्लोकाः पुण्यकीर्तयस्तेषां

करोति कर्माणि कृतावतारो यान्यात्मतंत्रो भगवांस्त्र्यधीशः ॥ यथा ससर्जाग्र इदं निरीहः संस्थाप्य वृत्तिं जगतो विधत्ते ॥ ५ ॥ यथा पुनः स्वे ख इदं निवेश्य शेते गुहायां स निवृत्तवृत्तिः ॥ योगेश्वराधीश्वर एक एतदनुप्रविष्टो बहुधा यथासीत् ॥ ६ ॥ क्रीडन् विधत्ते द्विजगोसुराणां क्षेमाय कर्माण्यवतारभेदैः ॥ मनो न तृप्यत्यपि शृण्वतां नः सुश्लोकमौलेश्चरितामृतानि ॥ ७ ॥ यैस्तत्त्वभेदैरधिलोकनाथो लोकानलोकान् सह लोकपालान् ॥ अचीक्लृपद्यत्र हि सर्वसत्त्वनिकायभेदोऽधिकृतः प्रतीतः ॥ ८ ॥ येन प्रजानामुत आत्मकर्मरूपाभिधानां च भिदां व्यधत्त ॥ नारायणो विश्वसृगात्मयोनिरेतच्च नो वर्णय विप्रवर्य ॥ ९ ॥ परावरेषां भगवन् व्रतानि श्रुतानि मे व्यासमुखादभीक्ष्णम् ॥ अतृप्नुम क्षुल्लसुखावहानां तेषामृते कृष्णकथामृतौघात् ॥ १० ॥

मौलिरिवाधिक्येनोपरि विराजमानस्तस्येत्यर्थः ॥ ७ ॥ अधिलोकनाथो लोकनाथाधिपतिः अलोकाँल्लोकालोकपर्वताद्बहिर्भागान् अचीक्लृपत्कल्पयामास । यत्र येषु सर्वाणि यानि सत्त्वानि तेषां निकायास्तेषां भेदः अधिकृतस्तत्तत्कर्माधिकारी आश्रित इति वा ॥ ८ ॥ उतापि च येन प्रकारेण जीवानामात्मा स्वभावस्तत्कृतं कर्म तत्कृतं रूपं तत्कृता अभिधास्तासां भेदं कृतवान् । विश्वसृष्टा स्वयमात्मयोनिः स्वतःसिद्धः ॥ ९ ॥ ननु महाभारते त्वया सर्वं श्रुतमेव किं पुनः प्रश्नैस्तत्राह । परे त्रैवर्णिका अवरे शूद्रादयस्तेषां व्रतानि धर्माः मे मया अभीक्ष्णं पुनःपुनः तेषां श्रवणेनातृप्नुम तृप्ताः स्म तेषां तुच्छसुखावहत्वात् । यस्तु तत्र कृष्णकथामृतौघः सूचितस्तस्मादृते तत्र स्वलंबुद्धिर्नास्तीत्यर्थः ॥१०॥

रांनीं क्रीडा करित होत्साता जशीं कर्में करितो, तीं तूं मला कथन कर. कारण, पुण्यश्लोकचूडामणि अशा हरीचीं अमृततुल्य चरित्रें वारंवार श्रवण करण्यानेंहि आमचें मन तृप्त होत नाहीं ॥ ७ ॥ यास्तव त्या लोकपालाधिपति ईश्वरानें, ज्यामध्यें सर्व प्राणिमात्रांच्या समुदायाचा निरनिराळा रचलेला भेद दिसून येतो त्या, इंद्रादि लोकपालांसहित लोकांस व लोकालोकपर्वताच्या बाहेरच्या भागांस, ज्या महत्तत्त्वादिक परस्पर भिन्नतत्त्वांच्या समुदायांनीं निर्माण केलें आहे ॥ ८ ॥ आणि हे ब्राह्मणश्रेष्ठा, त्या जगत्स्रष्ट्या स्वतःसिद्ध नारायणानें, ज्या प्रकारानें जीवांचे स्वभाव, कर्में रूपें आणि नांवें ह्यांचा भेद उत्पन्न केला आहे, हें सर्वही वर्णन कर ॥ ९ ॥ हे भगवन् ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य हे उंच वर्ण व शूद्रादिक नीचवर्ण या सर्वांचे धर्म मी व्यासाच्या मुखापासून वारंवार श्रवण केले, परंतु श्रीकृष्णकथारूप अमृताच्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रवाहाखेरीज त्या स्वल्प सुख देणाऱ्या सर्व धर्मांच्या श्रवणाविषयीं आमची तृप्ति झाली आहे, परंतु श्रीकृष्णकथामृतौघाविषयीं मात्र आमची तृप्ति झाली नाहीं. ॥ १० ॥
कारण, जो भगवान्, आपलें चरित्र श्रवण करणाऱ्या पुरुषाच्या मनांत कर्णेंद्रियद्वारा प्रविष्ट होऊन, संसारांत घालणाऱ्या गृहादिसंबंधी प्रीतीचा छेद करून टाकितो,
त्या तीर्थपाद भगवंताच्या, तुमच्यासारख्यांच्या समाजामध्यें नारदादिकांनीं स्तवन केलेल्या कथामृतौघाविषयीं कोण खरें पुरुष, तृप्ति पावणार आहे? ॥ ११ ॥ हे
मैत्रेया, तुझा सखा जो वेदव्यास मुनि त्यानेंहि मोक्षधर्मांच्या शेवटीं भगवंताच्या गुणांचें वर्णन करण्याच्या इच्छेनेंच भारत इतिहास सांगितला आहे. त्यामध्येंहि मनुष्यांची

तत्र हेतुः । क इति । तीर्थपदः कृष्णस्य अभिधानात्कथामृतौघात् सत्रेषु समाजेषु सूरिभिर्नारदादिभिः ॥ ११ ॥ महाभारतस्याप्यत्रैव तात्पर्यमित्याह । मुनिः श्रीकृष्णो
वेदव्यासो भगवद्गुणान् मोक्षधर्मांते नारायणीयाख्याने वक्तुमिच्छुः सन्नर्थकामादिवर्णनं तु हरिकथायां मतिप्रवेशार्थमेवेत्याह । यस्मिन्निति । नृणां मतिर्ग्राम्यसुखानुवादैर्द्वारभू-
तैर्नु निश्चितं हरेः कथायां गृहीता नीता । तदुक्तमितिहाससमुच्चये। कामिनो वर्णयन् कामं लोभं लुब्धस्य वर्णयन् ॥ नरः किं फलमाप्नोति कूपेऽधमिव पातयन् ॥ लोकचित्ताव-
तारार्थं वर्णयित्वाऽत्र तेन तौ ॥ इतिहासैः पवित्रार्थैः पुनरत्रैव निंदितौ ॥ अन्यथा घोरसंसारबंधहेतू जनस्य तौ ॥ वर्णयेत्स कथं विद्वान्महाकारुणिको मुनिः इति ॥ १२ ॥

कस्तृप्नुयात्तीर्थपदोऽभिधानात्सत्रेषु वः सूरिभिरिड्यमानात् ॥ यः कर्णनाडीं पुरुषस्य यातो भवप्रदां गेहरतिं छिनत्ति ॥ ११ ॥
मुनिर्विवक्षुर्भगवद्गुणानां सखाऽपि ते भारतमाह कृष्णः ॥ यस्मिन्नृणां ग्राम्यसुखानुवादैर्मतिर्गृहीता नु हरेः कथायाम् ॥ १२ ॥ सा
श्रद्दधानस्य विवर्धमाना विरक्तिमन्यत्र करोति पुंसः ॥ हरेः पदानुस्मृतिनिर्वृतस्य समस्तदुःखात्ययमाशु धत्ते ॥ १३ ॥ तान् शोच्यशो-
च्यानविदोऽनुशोचे हरेः कथायां विमुखानघेन ॥ क्षिणोति देवोऽनिमिषस्तु येषामायुर्वृथा वादगतिस्मृतीनाम् ॥ १४ ॥ तदस्य
कौषारव शर्मदातुर्हरेः कथामेव कथासु सारम् ॥ उद्धृत्य पुष्पेभ्य इवार्तबंधो शिवाय नः कीर्तय तीर्थकीर्तेः ॥ १५ ॥

श्रीहरिकथायां मतिप्रवेशस्य फलमाह । सा कथा मतिर्वा । अन्यत्र ग्राम्यसुखे । ततः किमत आह । हरेरिति ॥ १३ ॥ एवंभूतायां कथायां ये न रमंते तान् शोचति । शोच्या ये
तेषामपि शोच्यांश्च तत्राविदो भारततात्पर्यानभिज्ञान् शोच्यान् ये तु ज्ञात्वापि हरेः कथायां विमुखास्तांस्तेषामपि शोच्यानिति योज्यम् । अनिमिषः कालो येषामायुः क्षिपति ।
अत्रैव हेतुः । वृथैव वादगतिस्मृतयो वाग्देहमनोव्यापारा येषाम् ॥ १४ ॥ तत्स्माद्धे कौषारवास्य विश्वस्य शिवाय कथासु सारभूतां हरेः कथामेवोद्धृत्य नः कीर्तय । यथा

बुद्धि, विषयसुखाच्या वर्णनद्वारानें हरीच्या कथेकडेच लाविली आहे ॥ १२ ॥ ती बुद्धि, हरिकथेवर श्रद्धा ठेवणाऱ्या पुरुषाची श्रवणादिकांच्या योगानें उत्तरोत्तर वृद्धिंगत
झाली असतां, अन्य विषयांचेठिकाणीं वैराग्य उत्पन्न करित्ये. आणि हरिचरणांच्या वारंवार स्मरणानें तृप्त झालेल्या त्या पुरुषाच्या सर्व दुःखांचा सत्वर नाश करित्ये.
॥ १३ ॥ असें असतां, पूर्वसंचितपापानें हरीच्या कथेविषयीं विमुख झालेल्या, भारततात्पर्य न जाणणाऱ्या व शोचनीयांपेक्षांहि अतिशोच्य अशा त्या अज्ञपुरुषांचा मी
वारंवार शोक करितों. कारण, ज्या हरिकथाविमुख लोकांचीं कायिक, वाचिक व मानसिक सर्व कर्में व्यर्थ होत असल्यामुळें त्यांचें आयुष्य निरंतर जागृत असणारा
कालरूपी देव हरण करितो ॥ १४ ॥ तस्मात् हे दीनबंधो मैत्रेया, सुखदात्या पवित्रकीर्ति हरीच्या कथेंमध्यें जी सारभूत कथा असेल ती, भ्रमर जसा पुष्पांतून ॥ १३

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मध निराळा काढतो त्याप्रमाणें इतर कथांतून निराळी काढून या जगाच्या कल्याणाकरितां आम्हांस सांग ॥ १५ ॥ ज्या ईश्वरानें, जगाच्या उत्पत्तिस्थितिनाशांकरितां प्रथम त्रिगुणात्मक शक्तीचा स्वीकार केला आहे, त्याच ईश्वरानें मनुष्यामध्यें श्रीकृष्णावतार धारण करून जीं अमानुष कर्में केलीं आहेत तीं मला वर्णन कर ॥ १६ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, याप्रमाणें लोककल्याणासाठीं विदुरानें योगैश्वर्यसंपन्न त्या मैत्रेय ऋषीला प्रश्न केला असतां मैत्रेयानें त्या विदुराचा पुष्कळ प्रकारें गौरव करून उत्तर देण्यास आरंभ केला ॥ १७ ॥ मैत्रेय ह्मणाला–हे साधो विदुरा, लोकांवर उत्तम प्रकारें अनुग्रह करणाऱ्या व अधोक्षज भगवंताचेठिकाणीं मन जडलेल्या आपलीहि कीर्ति प्रसंगानें लोकांमध्यें वाढविणाऱ्या तूं हा फार उत्तम प्रश्न केला आहेस ॥ १८ ॥ हे विदुरा, व्यासनंदन अशा तुझेठिकाणीं हें आश्चर्य नाहीं, कारण, सर्वांच्या

पुष्पेभ्यो मधु मधुप उद्धरति तद्वदुद्धृत्य ॥ १५ ॥ विशेषतः श्रीकृष्णकथा कथनीयेत्याशयेनाह । स इति । यो विश्वसर्गाद्यर्थं पूर्वं गृहीतशक्तिः स एव पुरुषेषु कृतावतारः सन् पुरुषानतिक्रम्य वर्तमानानि यानि कर्माणि चकार तानि विस्तराद्वद ॥ १६ ॥ पुंसां निःश्रेयसमेवार्थः प्रयोजनं तेन हेतुना पृष्टः ॥ १७ ॥ बहुमानमेवाह । साध्विति पंचभिः । अधोक्षज एवात्मा मनो यस्य तस्यात्मनः स्वस्य कीर्तिं च प्रसंगाद्वितन्वता ॥ १८ ॥ हरिर्यद्गृहीत एतच्चित्रं न भवति कुतः बादरायणवीर्यजे ॥ १९ ॥ ननु तर्हि कथं

स विश्वजन्मस्थितिसंयमार्थे कृतावतारः प्रगृहीतशक्तिः ॥ चकार कर्माण्यतिपूरुषाणि यानीश्वरः कीर्तय तानि मह्यम् ॥ १६ ॥
श्रीशुक उवाच ॥ स एवं भगवान्पृष्टः क्षत्त्रा कौषारविर्मुनिः ॥ पुंसां निःश्रेयसार्थेन तमाह बहुमानयन् ॥ १७ ॥ मैत्रेय उवाच ॥
साधु पृष्टं त्वया साधो लोकान्साध्वनुगृह्णता ॥ कीर्तिं वितन्वता लोके आत्मनोऽधोक्षजात्मनः ॥ १८ ॥ नैतच्चित्रं त्वयि क्षत्तर्बादराय-
णवीर्यजे ॥ गृहीतोऽनन्यभावेन यत्त्वया हरिरीश्वरः ॥ १९ ॥ मांडव्यशापाद्भगवान्प्रजासंयमनो यमः ॥ भ्रातुः क्षेत्रे भुजिष्यायां
जातः सत्यवतीसुतात् ॥ २० ॥ भवान्भगवतो नित्यं संमतः सानुगस्य च ॥ यस्य ज्ञानोपदेशाय मादिशद्भगवान्व्रजन् ॥ २१ ॥
अथ ते भगवल्लीला योगमायोपबृंहिताः ॥ विश्वस्थित्युद्भवांतार्था वर्णयाम्यनुपूर्वशः ॥ २२ ॥ भगवानेक आसेदमग्र आत्मात्मनां
विभुः ॥ आत्मेच्छानुगतावात्मानानामत्युपलक्षणः ॥ २३ ॥

शूद्रत्वं कथं च लोकानुग्राहकत्वं तत्राह । मांडव्यशापादिति । भ्रातुर्विचित्रवीर्यस्य क्षेत्रे क्षेत्रत्वेन स्वीकृतायां भुजिष्यायां दास्यां यम एव त्वं जातोऽसि ॥ २० ॥ किंच । भवानिति । कुतः यस्य तव ज्ञानोपदेशाय मामादिष्टवान् । चकारात्स्वयमपि स्मृत्यैवोपदिष्टवानिति ॥ २१ ॥ विश्वस्थित्यादयोऽर्था विषया यासां ताः ॥ २२ ॥ तत्र सृष्टिलीलां वर्णयितुं ततः पूर्वावस्थामाह । इदं विश्वमग्रे सृष्टेः पूर्वं परमात्मा भगवानेक एवास आसीत् आत्मनां जीवानामात्मा स्वरूपं विभुः स्वामी च नान्यद्दृष्टृदृश्यात्मकं किंचिदासीत् । कार-

---

दुःखांचा परिहार करणारा जो ईश्वर तो तूं एकाग्र भक्तीनें आपल्या अंतःकरणांत ग्रहण केला आहेस ॥ १९ ॥ हे विदुरा, पुण्यपापांच्या तारतम्यानें प्रजांचें नियमन करणारा तूं भगवान् यम असून, मांडव्यऋषीच्या शापामुळें व्यासापासून त्याच्या विचित्रवीर्यनामक बंधूच्या दासीचेठिकाणीं उत्पन्न झाला आहेस ॥ २० ॥ हे विदुरा, तूं षड्गुणैश्वर्यसंपन्न श्रीकृष्णाला व त्याच्या परिवारमंडळीलाहि निरंतर प्रिय होतास. कारण, ज्या तुला तत्त्वज्ञानाचा उपदेश करण्याकरितां वैकुंठाचेठिकाणीं गमन करणाऱ्या त्या श्रीकृष्ण भगवंतानें मला सांगून ठेविलें आहे ॥ २१ ॥ यास्तव हे विदुरा तुला, विश्वाची स्थिति, उत्पत्ति व लय यांनीं युक्त असून योगमायेनें वृद्धिंगत झालेल्या भगवंताच्या लीला मी अनुक्रमानें वर्णन करितों ॥ २२ ॥ हें जग, सृष्टीच्या पूर्वीं, द्रष्टा व दृश्य इत्यादि बुद्धींनीं समजण्यांत न येणारा, सर्व जीवांचे मूळस्वरूप

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

व नियंता, परमात्मा, भगवान्, त्याला ‘ आपण एकट्यानेंच रहावें ’ अशी इच्छा असल्यामुळें एकटाच होता दुसरें कांहीं नव्हतें ॥ २३ ॥ त्यावेळीं एकट्यानेंच प्रकाशमान
असणाऱ्या त्या द्रष्ट्या आत्म्यानें दुसरें कांहींच दृश्य पाहिलें नाहीं. तेव्हां त्याच्या मायादिक शक्ति जरी लीन झालेल्या होत्या तरी त्याची ज्ञानशक्ति जागृत होती
म्हणून त्यानें आपणास नसल्यासारखें मानिलें ॥ २४ ॥ हे महाभाग्यवंता विदुरा, त्या विश्वव्यापक परमेश्वरानें जिच्या योगानें हें चराचर जग निर्माण केलें तीच त्या
द्रष्ट्या परमेश्वराची कार्यकारणरूप मायानामक शक्ति होय ॥ २५ ॥ नंतर कालशक्तीच्या योगानें गुणक्षोभ झालेल्या त्या मायेच्याठिकाणीं, ज्ञानशक्तियुक्त त्या अधोक्षज

णात्मना सत्त्वेऽपि पृथक्प्रतीत्यभावादित्याह । अनानामत्युपलक्षणो नानाद्रष्टृदृश्यादिमतिभिर्नोपलक्ष्यत इति तथा। यद्वा। अकारप्रश्लेषं विनैवायमर्थः यः सृष्टौ नानामतिभिरुपल-
क्ष्यते स तदा एक एवासीदिति । कुतः । आत्मेच्छा माया तस्या अनुगतौ लये सति। यद्वा। आत्मन एकाकित्वेनावस्थानेच्छायामनुवृत्तायामित्यर्थः ॥२३॥ तत्र प्रथमं मायोद्भव-
प्रकारमाह द्वाभ्याम्। स वै एष द्रष्टा सन् दृश्यं नापश्यत् । यतः स एकराडेक एव तदा प्रकाशते आत्मानमसंतमिव मेने दृश्याभावे द्रष्टृत्वाभावात् । तदाह। सुप्ता मायाद्याः
शक्तयो यस्य सः न त्वसंतमेव मेने यतोऽसुप्ता दृक् चिच्छक्तिर्यस्येति ॥ २४ ॥ सा वै द्रष्टृदृश्यानुसंधानरूपा सदसदात्मिका कार्यकारणरूपा । यद्वा । सद्दृश्यमसददृश्यमात्म-
स्वरूपं च तयोरात्मा यस्याः तदुभयानुसंधानरूपत्वात् ॥ २५ ॥ कालवृत्त्या कालशक्त्या गुणमय्यां क्षुभितगुणायां अधोक्षजः परमात्मा आत्मांशभूतेन पुरुषेण प्रकृत्यधि-

स वा एष तदा द्रष्टा नापश्यद्दृश्यमेकराट् ॥ मेनेऽसंतमिवात्मानं सुप्तशक्तिरसुप्तदृक् ॥ २४ ॥ सा वा एतस्य संद्रष्टुः शक्तिः सदसदा-
त्मिका ॥ माया नाम महाभाग ययेदं निर्ममे विभुः ॥ २५ ॥ कालवृत्त्या तु मायायां गुणमय्यामधोक्षजः ॥ पुरुषेणात्मभूतेन
वीर्यमाधत्त वीर्यवान् ॥ २६ ॥ ततोऽभवन्महत्तत्त्वमव्यक्तात्कालचोदितात् ॥ विज्ञानात्मात्मदेहस्थं विश्वं व्यंजंस्तमोनुदः ॥ २७ ॥
सोऽप्यंशगुणकालात्मा भगवद्दृष्टिगोचरः ॥ आत्मानं व्यकरोदात्मा विश्वस्यास्य सिसृक्षया ॥ २८ ॥ महत्तत्त्वाद्विकुर्वाणादहंतत्त्वं
व्यजायत ॥ कार्यकारणकर्त्रात्मा भूतेंद्रियमनोमयः ॥ २९ ॥

ष्ठातृरूपेण वीर्यं चिदाभासमाधत्त वीर्यवान् चिच्छक्तियुक्तः ॥ २६ ॥ कालप्रेरितादव्यक्तान्मायातः तत्त्वपदं परित्यज्य महतो लक्षणमतः पुंल्लिंगनिर्देशो विज्ञानात्मेति
सत्त्वप्रधानत्वात् स्वदेहस्थं विश्वमुच्छूनबीजगतमंकुरादिरूपं वृक्षमिव व्यंजन् व्यंजयन् प्रकाशयन् यतोऽसौ तमोनुदतीति तमोनुदः । तदुक्तं सात्वततंत्रे । विष्णोस्तु त्रीणि रूपाणि
पुरुषाख्यान्यथो विदुः ॥ प्रथमं महतः स्रष्टृ द्वितीयं त्वंडसंस्थितम् ॥ तृतीयं सर्वभूतस्थं तानि ज्ञात्वा विमुच्यत इति ॥ २७ ॥ अहंकारोत्पत्तिमाह सार्धाभ्याम् । सोऽपीति ।
अंशश्चिदाभासो निमित्तं गुणा उपादानं कालः क्षोभकस्तदात्मा तदधीनः भगवान् सर्वाध्यक्षस्तद्दृष्टिगोचरः सन् स्वयमात्मानं व्यकरोद्रूपांतरमनयत् ॥ २८ ॥ अहंकारस्य
लक्षणमाह । कार्यमधिभूतं कारणमध्यात्मं कर्तृ अधिदैवं तेषामात्मा आश्रयः । अत्र हेतुः । भूतेंद्रियमनोमयस्तद्विकारवान् मन इति देवानामप्युपलक्षणम् ॥ २९ ॥

परमात्म्यानें आपल्या अंशभूत पुरुषाकडून चिदाभासरूप वीर्य स्थापन केलें ॥ २६ ॥ नंतर कालानें प्रेरित अशा मायेपासून महत्तत्व उत्पन्न झालें तें स्वतः अनुभव
ज्ञानस्वरूपि असून आपल्या शरीरांत असणाऱ्या जगतास प्रगट करणारें व अज्ञानाचा नाश करणारें होतें ॥ २७ ॥ त्या महत्तत्त्वावर सर्वाध्यक्ष भगवंताचा दृष्टिपात
होतांच तें चिदाभास (निमित्तकारण) तीन गुण (उपादानकारण) व काल (रूपांतराचें कारण) यांच्या स्वाधीन होऊन त्यानें या जगाची सृष्टि करण्याच्या इच्छेनें
आपणच आपल्या स्वरूपाचें रूपांतर केलें ॥ २८ ॥ तेव्हां रूपांतरास पावणाऱ्या त्या महत्तत्त्वापासून अहंकारतत्त्व उत्पन्न झालें. तो अहंकार, अधिभूत, अध्यात्म आणि

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अधिदैव असा तीन प्रकारचा होऊन आकाशादि पंचमहाभूतें, दहा इंद्रियें, दहा देवता व मन यांस आश्रय झाला ॥ २९ ॥ त्याचा प्रकार असा कीं,–तो अहंकार, सात्विक,
राजस आणि तामस असा तीन प्रकारचा असून त्यांपैकीं, विकार पावणाऱ्या सात्विक अहंकारापासून मन उत्पन्न झालें आणि ज्यांच्यापासून शब्दस्पर्शादिक विषयांचा
अनुभव येतो त्या देवताहि त्या सात्विक अहंकारापासून उत्पन्न झाल्या ॥ ३० ॥ पंचज्ञानेंद्रियें व पंचकर्मेंद्रियें हीं राजसाहंकारापासून उत्पन्न झालीं. तामस अहंकारा-
पासून आकाशाचें सूक्ष्मरूप जो शब्द, तो उत्पन्न झाला. त्या शब्दापासून त्याचाच (शब्दाचा) बोध करून देणारें आकाश उत्पन्न झालें ॥ ३१ ॥ पुढें काल, माया व
चैतन्यांश यांच्या योगानें भगवंतानें अवलोकन केलेल्या आकाशानें, आपल्यापासून उत्पन्न झालेल्या स्पर्शाचें रूपांतर करून त्यापासून वायु उत्पन्न केला ॥ ३२ ॥ तो

एतदेव विभागतः प्रपंचयति। वैकारिक इत्यादिना। वैकारिकः सात्विकस्तैजसो राजसः देवाश्च वैकारिकाः सात्विकाहंकारकार्यभूता इत्यर्थः। यतो येभ्य इंद्रियाधिष्ठातृभ्यो देवेभ्यो
हेतुभूतेभ्योऽर्थाभिव्यंजनं शब्दादिप्रकाशो भवति ॥ ३० ॥ तैजसान्येवेत्यन्वयः। ज्ञानेंद्रियाणां ज्ञानमयानां सात्विकत्वशंका माभूदित्येवकारः। तामसो भूतसूक्ष्मस्य शब्दस्यादिः
कारणम्। यतः शब्दात् खमाकाशो भवति आत्मनो लिंगं स्वगुणशब्दरूपेण प्रकाशकं हृदयाकाशतया वा। यद्वा लिंगं शरीरम्। आकाशशरीरं ब्रह्म इति श्रुतेः ॥ ३१ ॥

वैकारिकस्तैजसश्च तामसश्चेत्यहं त्रिधा ॥ अहंतत्त्वाद्विकुर्वाणान्मनो वैकारिकादभूत् ॥ वैकारिकाश्च ये देवा अर्थाभिव्यंजनं यतः
॥ ३० ॥ तैजसानींद्रियाण्येव ज्ञानकर्ममयानि च ॥ तामसो भूतसूक्ष्मादिर्यतः खं लिंगमात्मनः ॥ ३१ ॥ कालमायांशयोगेन भ-
गवद्वीक्षितं नभः ॥ नभसोऽनुसृतं स्पर्शं विकुर्वन्निर्ममेऽनिलम् ॥ ३२ ॥ अनिलोऽपि विकुर्वाणो नभसोऽरुबलान्वितः ॥ ससर्ज
रूपतन्मात्रं ज्योतिर्लोकस्य लोचनम् ॥ ३३ ॥ अनिलेनान्वितं ज्योतिर्विकुर्वत्परवीक्षितम् ॥ आधत्तांभो रसमयं कालमायांशयोगतः
॥ ३४ ॥ ज्योतिषांभोऽनुसंसृष्टं विकुर्वद्ब्रह्मवीक्षितम् ॥ महीं गंधगुणामाधात्कालमायांशयोगतः ॥ ३५ ॥ भूतानां नभआदीनां
यद्यद्भव्यावरावरम् ॥ तेषां परानुसंसर्गाद्यथासंख्यं गुणान्विदुः ॥ ३६ ॥

॥ ३२ ॥ नभसा सहितः स्वयं चोरुबलान्वितः ततो
नभसः स्वस्मादनुसृतमुद्भूतं स्पर्शं विकुर्वद्रूपांतरं नयदनिलं वायुम्। एवं सर्वत्र तन्मात्रद्वारा भूतोत्पत्तिरिति ज्ञातव्यम् ॥ ३२ ॥ नभसा सहितः स्वयं चोरुबलान्वितः ततो
ज्योतिस्तेजः लोचनं प्रकाशकम् ॥ ३३ ॥ ३४ ॥ ३५ ॥ हे भव्य विदुर पाठांतरे भाव्यं कार्यं यद्यदवरमवरं कार्यं तेषां कार्याणां परैः कारणैरनुसंसर्गाद्यन्वयाद्यथासंख्यं
यथाक्रममुत्तरोत्तरमधिकान् गुणान् विदुः। तथाहि। नभसः शब्द एव गुणोऽन्यान्वयाभावात् वायोस्तु स्पर्शः आकाशान्वयाच्छब्दश्च एवं तेजसस्तौ च रूपं च अंभसस्तानि

वायुहि आकाशानें युक्त व स्वतः पुष्कळ शक्तिमान् होता. तो विकार पावूं लागला, तेव्हां त्यानें आपल्यापासून तेजाचें सूक्ष्मभूतरूप व त्यापासून लोकांच्या दृष्टीला
प्रकाश देणारें तेज हें उत्पन्न केलें ॥ ३३ ॥ नंतर वायूनें युक्त, व ईश्वरानें अवलोकन केलेलें तें तेज, काल, माया व चिदाभास यांच्या योगानें रूपांतर पावूं लागलें तेव्हां
त्यानें रसगुणानें युक्त असें उदक उत्पन्न केलें ॥ ३४ ॥ नंतर ब्रह्मानें अवलोकन केलेलें, काल, माया व चैतन्यांश यांच्या योगानें विकार पावणारें व तेजानें युक्त अशा
त्या उदकानें, गंधरूप सूक्ष्मगुणानें युक्त अशी पृथिवी उत्पन्न केली ॥ ३५ ॥ हे विदुरा, आकाश वायु इत्यादिक भूतांमध्यें जें जें भूत पाठीमागून उत्पन्न झालें त्यात्या-
मध्यें पूर्वीं उत्पन्न झालेल्या भूतांचा संबंध असल्यामुळें आकाशाचा एक, वायूचे दोन, तेजाचे तीन अशा क्रमानें अधिक अधिक गुण आहेत असें ह्मणतात ॥ ३६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

काल, माया व ईश्वरांश यांपासून अनुक्रमानें प्राप्त झालेल्या परिणाम, रूपांतर व ज्ञानकला या लक्षणांनीं युक्त असे हे विष्णूचे अंशरूप महत्तत्त्वादिकांचे अभिमानी देव, भिन्न भिन्न असल्यामुळें ब्रह्मांडरचनारूप आपलें कार्य करण्याविषयीं असमर्थ होत्साते, हात जोडून त्या व्यापक परमेश्वराची स्तुति करूं लागले ॥ ३७ ॥ देव ह्मणाले—हे देवा, शरणागतांचा ताप दूर करण्याविषयीं केवळ छत्ररूप अशा तुझ्या चरणकमलास आह्मीं नमस्कार करितों. ज्या चरणकमलाचा आश्रय करणारे, संन्यासी लोक, मोठ्याही संसाररूपी दुःखास दूर झुगारून देतात ॥ ३८ ॥ हे सृष्टिकर्त्या षड्गुणैश्वर्यसंपन्ना ईश्वरा, ज्याअर्थीं या संसारामध्यें तापत्रयानें पीडित झालेले सर्व जीव, (तुझ्या

रसश्च मह्याः सर्वे ॥ ३६ ॥ देवामहदाद्यभिमानिनः विष्णोः कला अंशाः काललिंगं विकृतिः मायालिंगं विक्षेपः अंशलिंगं चेतना तानि विद्यंते येषु अतः समत्वेन नानात्वात्परस्परासंबंधात्स्वक्रियायां ब्रह्मांडरचनायामनीशा अशक्ताः संतो विभुं परमेश्वरं प्रोचुः ॥ ३७ ॥ मिथः स्पर्धिष्णवो देवा न मिलंतः परस्परम् ॥ विश्वकर्मण्यनीशाना निर्विण्णा हरिमीडिरे ॥ नमामेति । प्रपन्नानां तापोपशमे आतपत्रं छत्रम् । तत्र हेतुः । यस्य पादारविंदस्य मूलं तलं केत आश्रयो येषां ते संसारदुःखं बहिर्दूरत उत्क्षिपंति परित्यजंति । पांथाः स्वगृहं प्राप्य मार्गश्रममिव ॥ ३८ ॥ श्रमं विनिवेदयंत आहुः । हे धातः पितः यद्यस्माद्भवे संसारे आत्मन्नात्मनि संबोधनं वा शर्म सुखं ऋते यदिति पाठे यत्पादभजनं

एते देवाः कला विष्णोः कालमायांशलिंगिनः ॥ नानात्वात्स्वक्रियाऽनीशाः प्रोचुः प्रांजलयो विभुम् ॥ ३७ ॥ देवा ऊचुः ॥ नमाम ते देव पदारविंदं प्रपन्नतापोपशमातपत्रम् ॥ यन्मूलकेता यतयोंऽजसोरु संसारदुःखं बहिरुत्क्षिपंति ॥ ३८ ॥ धातर्यदस्मिन्भव ईश जीवास्तापत्रयेणोपहता न शर्म ॥ आत्मँल्लभंते भगवंस्तवांघ्रिच्छायां सविद्यामत आश्रयेम ॥ ३९ ॥ मार्गंति यत्ते मुखपद्मनीडैश्छंदःसुपर्णैर्ऋषयो विविक्ते ॥ यस्याघमर्षोदसरिद्वरायाः पदं पदं तीर्थपदः प्रपन्नाः ॥ ४० ॥ यच्छ्रद्धया श्रुतवत्या च भक्त्या संमृज्यमाने हृदयेऽवधाय ॥ ज्ञानेन वैराग्यबलेन धीरा व्रजेम तत्तेंऽघ्रिसरोजपीठम् ॥ ४१ ॥

विना शर्म न लभंते । ननु ज्ञानादज्ञानकृतस्तापो निवर्तते किं मदंघ्रिच्छायाश्रयणेन तत्राहुः । सविद्यां तदाश्रयणमेव विद्याप्रापकमित्यर्थः ॥ ३९ ॥ अज्ञातस्याश्रयणायोगात्त ज्ज्ञानसाधनमाहुः । मार्गंत्यन्वेषयंति । यत्तत्तीर्थपदस्तव पदं वयं प्रपन्नाः । कैर्मार्गंति । छंदःसुपर्णैर्वेदपक्षिभिः तवैव मुखपद्मं नीडं येषां यथा पक्षिणो नीडादुद्गतास्ततस्ततः परिभ्रम्य पुनस्तत्रैव विशंति तथा वेदा अपि त्वत्त उद्गतास्त्वय्येव पर्यवस्यंति अतो वेदानाश्रित्य त्वत्पदं मृगयंत इति । विविक्ते असंगे मनसि किंचाघमर्षमघनाशकमुदमुदकं यासां सरितां तासु वराया गंगायाः पदमुद्गमस्थानम् । अतो गंगामनुसेवमाना अपि तदुद्गमस्थानं त्वत्पदं प्राप्नुवंतीत्यर्थः ॥ ४० ॥ ननु विषयाकृष्टचित्तानां कुतस्तदन्वेषणं तत्राहुः । यच्छ्रद्धयेति । यद्धृदयेऽवधाय ध्यात्वा वैराग्यं बलं यस्य तेन ज्ञानेन धीरा भवंति । सरागे चित्ते ध्यानमेव कुतस्तत्राहुः । श्रद्धया श्रवणपूर्विकया भक्त्या च संमृज्य-

---

चरणसेवेवांचून) आत्मस्वरूपाचे ठिकाणीं असणाऱ्याहि सुखास पावत नाहींत, त्याअर्थीं आह्मी ज्ञानपरिपूर्ण अशा तुझ्या पादच्छायेचा आश्रय करितों ॥ ३९ ॥ हे भगवन्, ज्या तुझ्या पदाचा, मोठमोठे ऋषि, विषयसंगरहित अशा आपल्या शुद्ध अंतःकरणामध्यें 'तुझ्या मुखकमलरूप घरट्यापासून उत्पन्न झालेल्या वेदरूप पक्ष्यांच्या आश्रयानें' शोध करितात व जें तुझें पद, 'आपल्या उदकाच्या योगानें पातकांचा नाश करणाऱ्या ज्या नद्या त्यामध्यें श्रेष्ठ अशा' गंगेचें उगम स्थान आहे त्या पवित्रचरण अशा तुझ्या पदाला आह्मी शरण आलों आहों ॥ ४० ॥ श्रद्धेनें व श्रवणपूर्वक सप्रेमभक्तीनें शुद्ध झालेल्या हृदयामध्यें ज्या तुझ्या चरणकमलाचें ध्यान करून प्राप्त झालेल्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वैराग्ययुक्त ज्ञानानें, कीतीएक पुरुष, ज्ञानसंपन्न होतात त्या तुझ्या चरणकमलाच्या आसनास आह्मी शरण जातों ॥ ४१ ॥ हे प्रभो, जगाच्या उत्पत्तिस्थितिनाशांकरितां अवतार धारण करणाऱ्या तुझें जें चरणकमल स्मरण केलें असतां, भक्तजनास मोक्षसुख देतें त्या तुझ्या चरण कमलाला सर्व आह्मीं शरण आलों आहों ॥ ४२ ॥ हे भगवन्, देहरूप नगरीमध्यें वास करणाऱ्याहि तुझें जें चरणकमल इंद्रियांदिसहित, अति तुच्छरूप देहाचेठिकाणीं व त्याला उपयुक्त जीं गृहादिक त्यांचेठिकाणीं 'मी आणि माझें' असा दुराग्रह धारण करणाऱ्या जीवांना अत्यंत दूर (प्राप्त होण्यास दुर्लभ) आहे त्या तुझ्या चरणकमलाची आह्मी सेवा करितों ॥ ४३ ॥ हे वेदवर्णिता परमेश्वरा,

---

माने संशोध्यमाने ॥ ४१ ॥ भक्तानुग्रहं स्मरंत आहुः । विश्वस्येति ॥ ४२ ॥ अंतर्यामितया नित्यं सन्निहितेऽनर्थकं व्रजनमित्याशंक्याहुः । यदिति । सानुबंधे सोपकरणे असति तुच्छे पुर्यां स्वदेहे एव वसतोऽपि यत्सुदूरं दुष्प्रापम् ॥ ४३ ॥ ननु यदि हृदिस्थस्यापि पदाब्जं केषांचित्सुदूरं तर्ह्यन्येषामपि तथैव स्यादविशेषादित्याशंक्याहुः । तानिति । असद्वृत्तिभिर्बहिर्मुखैरक्षिभिरिंद्रियैः पराहृतं दूरमपहृतमंतःस्थं मनो येषां ते । अथो अतएव ते नूनं तान्न पश्यंति । वै प्रसिद्धम् । कुतः पुनस्तेषां तत्संगः स्यात् । कान् । ते तव पदन्यासो गमनं तस्य विलासो विभ्रमस्तस्य लक्ष्मीः शोभा तस्या ये । त्वल्लीलाकथादिभिः शोभमानांस्त्वद्भक्तानित्यर्थः । पथ इति लक्ष्यानिति च पाठे त्वत्पदन्यासविलासो लक्ष्यो येषां तान् पथस्त्वन्मार्गभूतान् सतो मार्गान् वा श्रवणादीन्न पश्यंतीत्यर्थः । यद्वा । ये एवंभूता भागवतास्ते तानुन्मत्तान्नूनं नैव पश्यंतीत्यन्वयः । सत्संगाभावेन हरिकथाश्रवणाभावाद्धृदिस्थितमपि तेषां सुदूरमिति भावः ॥ ४४ ॥ एतदेव स्फुटयंति । पानेनेति द्वाभ्याम् । वैराग्यं सारो बलं यस्य बोधस्य तं लब्ध्वान्वीयुः प्राप्नुयुः । अकुंठधिष्ण्यं वैकुंठलोकम् ॥ ४५ ॥ आत्मनि समाधिर्मनःस्थैर्यं स एव योग उपायस्तस्य बलेन ज्ञानयोगतः श्रमेण मोक्षः सत्संगतस्त्वत्कथाश्रवणादिना त्वनायासेनैव अहंमताविष्टानां तु न कथंचिदिति भावः ॥ ४६ ॥ तदेवं स्तुत्वा प्रार्थयंते चतुर्भिः । तत्तस्मात् हे आद्य ते त्वदीया वयं यस्माल्लोकानां सिसृक्षया त्वयाऽनुसृष्टाः क्रमेणोत्पादिताः ।

विश्वस्य जन्मस्थितिसंयमार्थे कृतावतारस्य पदांबुजं ते ॥ व्रजेम सर्वे शरणं यदीश स्मृतं प्रयच्छत्यभयं स्वपुंसाम् ॥ ४२ ॥ यत्सानुबंधेऽसति देहगेहे ममाहमित्यूढदुराग्रहाणाम् ॥ पुंसां सुदूरं वसतोऽपि पुर्यां भजेम तत्ते भगवन्पदाब्जम् ॥ ४३ ॥ तान्वा असद्वृत्तिभिरक्षिभिर्ये पराहृतांतर्मनसः परेश ॥ अथो न पश्यंत्युरुगाय नूनं ये ते पदन्यासविलासलक्ष्म्याः ॥ ४४ ॥ पानेन ते देव कथासुधायाः प्रवृद्धभक्त्या विशदाशया ये ॥ वैराग्यसारं प्रतिलभ्य बोधं यथांऽजसाऽन्वीयुरकुंठधिष्ण्यम् ॥ ४५ ॥ तथाऽपरे चात्मसमाधियोगबलेन जित्वा प्रकृतिं बलिष्ठाम् ॥ त्वामेव धीराः पुरुषं विशंति तेषां श्रमः स्यान्न तु सेवया ते ॥ ४६ ॥ तत्ते वयं लोकसिसृक्षयाऽऽद्य त्वयाऽनुसृष्टास्त्रिभिरात्मभिः स्म ॥ सर्वे वियुक्ताः स्वविहारतंत्रं न शक्नुमस्तत्प्रतिहर्तवे ते ॥ ४७ ॥

विषयाभिमुख इंद्रियांनीं ज्यांचें मन विषयांकडे आकर्षण केलें जातें, ते विषयी पुरुष, तुझ्या लीलाकथा वर्णन करणाऱ्या सत्पुरुषांस मुळींच पहात नाहींत. मग त्यांना तुझ्या कथेचें श्रवण व तुझ्या चरणकमलाचें दर्शन कोठून होणार ? व्हावयाचेंच नाहीं ॥४४॥ हे देवा, जे पुरुष, तुझ्या कथामृताच्या प्राशनानें वृद्धिंगत झालेल्या भक्तीनें शुद्धचित्त होतात ते वैराग्यानें बलिष्ठ असें उत्तम प्रकारचें ज्ञान पावोन अनायासानें तुझ्या वैकुंठलोकास पावतात ॥ ४५ ॥ तसेंच दुसरेहि ज्ञानी पुरुष, आत्मस्वरूपाचेठिकाणीं मनाची स्थिरता करून त्या उपायाच्या सामर्थ्यानें बलवत्तर अशा मायेला जिंकून पुरुषरूपी तुझ्या स्वरूपामध्येंच प्रवेश करितात परंतु त्यांना मोक्षप्राप्तीविषयीं योगाभ्या सरूप श्रम होतो आणि तुझ्या भक्तिमार्गरूप सेवेच्या योगानें श्रम न होतां अनायासानेंच मुक्ति प्राप्तहोते ॥ ४६ ॥ हे आद्य परमेश्वरा, तूं लोकांची सृष्टि करण्यासाठीं तीन

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

गुणांच्या स्वभावांनीं ज्या आह्मांस उत्पन्न केलें आहेस ते सर्व आह्मी परस्पर निरनिराळे असल्यामुळें ज्याकरितां तूं आह्मांस उत्पन्न केलेंस तें तुझें खेळण्याचें साधन ब्रह्मांड उत्पन्न करून तुला समर्पण करण्यास आह्मीं समर्थ होत नाहीं ॥ ४७ ॥ यास्तव हे अजा, आह्मी ब्रह्मांड उत्पन्न करून योग्यकाळीं तुला सर्व भोग जोंपर्यंत समर्पण करूं व आमच्या योग्यतेनुसार आह्मीहि अन्न भक्षण करूं, तसेच ते हे सर्व जीव ज्या ब्रह्मांडांत राहून तुला व आह्मांला सर्व भोग अर्पण करून निर्विघ्नपणें अन्न भक्षण करितील अशी तूं आतां योजना कर ॥ ४८ ॥ तूं कार्यसहित आह्मां देवांचा उत्पन्न करणारा निर्विकारी पुराणपुरुष आहेस. ह्मणूनच हे देवा, तूं वस्तुतः जन्मरहित असूनहि

त्रिभिरात्मभिः सत्त्वादिस्वभावैरतएव विरुद्धस्वभावत्त्वाद्वियुक्ताः संतो यदर्थं सृष्टास्तत्स्वविहारतंत्रं त्वत्क्रीडोपकरणं ब्रह्मांडं ते तुभ्यं प्रतिहर्तवे प्रतिहर्तुं समर्पयितुं न शक्नुमोऽतस्त्वं नः स्वचक्षुः परिदेहीति त्रयाणां श्लोकानां चतुर्थेनान्वयः ॥ ४७ ॥ असामर्थ्यमेव प्रपंचयितुं कार्यस्यातिवैचित्र्यमाहुः । भो अज काले तत्तदवसरे बलिं भोगं यावत्साकल्येन ते तुभ्यं हराम समर्पयाम यथा येन प्रकारेणान्नमदाम भक्षयामेत्यनेनान्नमात्रं चास्माकमैश्वर्येण तु भोगस्तवैवेत्युक्तम् । उभयेषां तव चास्माकं च यत्र स्थित्वा इमे जीवा अनूहा अप्रत्यूहा निर्विघ्नाः यद्वा अनूहा अवितर्का निःसंशया इत्यर्थः । तथा च श्रुतिः । ता एनमब्रुवन्नायतनं नः प्रजानीहि यस्मिन् प्रतिष्ठिता अन्नमदाम इति ॥ ४८ ॥ अवश्यं च त्वयाऽस्माकमेषां च कार्योपाधीनां जीवानां वृत्तिः परिकल्पनीया जनकत्वादित्याहुः । नोऽस्माकं सान्वयानां सकार्याणां यद्वा अन्वेतीत्यन्वयः । कारणं तत्सहितानां त्वमेवाद्यः कारणम् । अत्र हेतवः । कूटस्थोऽविक्रियः पुरुषोऽधिष्ठाता पुराणः पुरातनः । एतदुपपादयंति । त्वमिति । हे देव अज एव त्वं गुणानां सत्त्वादीनां कर्मणां जन्मादीनां च योनौ कारणभूतायां शक्त्यां मायायां प्रथमं रेत आदधे निहितवानसीत्यर्थः । कीदृशम् । कविं सर्वज्ञं महत्तत्त्वरूपम् ॥ ४९ ॥ तथा हे आत्मन् देव सत्प्रमुखा महदादयो वयं यदर्थं बभूविम तत् किं ते कार्यं करवाम । सृष्टिमिति चेत्तत्राहुः । तर्हि नोऽस्माकं त्वं स्वचक्षुः स्वीयं ज्ञानं शक्त्या सह परिदेहि प्रयच्छ । यस्मात्त्वत्त एवानुग्रहो येषां ते यदनुग्रहास्तेषामस्माकं क्रियार्थे इयानेव एतावाननुग्रहो येषामित्येकं वा पदम् । त्वदीयज्ञानक्रियाशक्तिभ्यामेव वयं सृष्टौ क्षमा नान्यथेत्यर्थः ॥ ५० ॥ इति तृतीये टीकायां पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥ ॥ षष्ठे तैरीश्वराविष्टैः सृष्टिमाह विराट्तनोः ॥ अधिदैवादिभेदं च तत्रैव भगवत्कृतम् ॥ १ ॥ स्वशक्तीनां महदादीनामसमेत्यामिलित्वा

यावद्बलिं तेऽज हराम काले यथा वयं चान्नमदाम यत्र ॥ यथोभयेषां त इमे हि लोका बलिं हरंतोऽन्नमदंत्यनूहाः ॥ ४८ ॥
त्वं नः सुराणामसि सान्वयानां कूटस्थ आद्यः पुरुषः पुराणः ॥ त्वं देवशक्त्यां गुणकर्मयोनौ रेतस्त्वजायां कविमादधेऽजः ॥ ४९ ॥
ततो वयं सत्प्रमुखा यदर्थे बभूविमात्मन्करवाम किं ते ॥ त्वं नः स्वचक्षुः परिदेहि शक्त्या देव क्रियार्थे यदनुग्रहाणाम् ॥ ५० ॥
॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे तृतीयस्कंधे पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥ ॥ ऋषिरुवाच ॥ इति तासां स्वशक्तीनां सतीनामसमेत्य सः ॥
प्रसुप्तलोकतंत्राणां निशाम्य गतिमीश्वरः ॥ १ ॥

सत्त्वादिक गुण व कर्में यांचें उत्पत्तिस्थान व जन्मरहित अशा आपल्या शक्तिरूप मायेचेठिकाणीं महत्तत्त्वरूप गर्भाचें स्थापन केलें आहेस ॥ ४९ ॥ यास्तव हे सर्वात्मस्वरूपा देवा, महत्तत्त्वादिक आह्मी सर्व देव, ज्या कार्यासाठीं उत्पन्न झालों तें तुझें कोणतें कार्य करावें ? त्या कार्याविषयीं तूंच आमच्यावर अनुग्रह करणारा आहेस ह्मणून आह्मांला आपली क्रियाशक्तिसहित ज्ञानदृष्टि चावीस ॥ ५० ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील तृतीयस्कंधामध्यें पांचवा अध्याय समाप्त झाला ॥ ५ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ छ ॥ नंतर षड्गुणैश्वर्यसंपन्न ईश्वरानें त्या सर्व तत्त्वांमध्यें प्रवेश करून, त्यांजकडून विराट्देह उत्पन्न करविला व त्यांत अधिदैव, अध्यात्म अणि आधिभूत यांची भिन्नभिन्न योजना केली हा विषय या सहाव्या अध्यायांत सांगितलेला आहे ॥ १ ॥ मैत्रेय ह्मणाला—हे विदुरा, याप्रमाणें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्या ईश्वरानें एकमेकांमध्यें मिश्र न होतां निरनिराळ्या राहिलेल्या व विश्वरचना करण्यास असमर्थ अशा त्या आपल्या शक्तींची स्थिति अवलोकन करून ॥ १ ॥ अद्भुत पराक्रमयुक्त अशा त्या भगवंतानें त्यावेळीं कालनामक शक्तीचा स्वीकार करून तेवीस तत्त्वांच्या समुदायामध्यें अंतर्यामित्वेंकरून एकदम प्रवेश केला ॥ २ ॥ आणि अनुप्रवेश करणाऱ्या त्या भगवंतानें, पूर्वीं लीन असलेल्या क्रियाशक्तीला प्रगट करून त्या चेष्टारूप क्रियाशक्तीनें एकमेकांस सुटून असलेल्या त्या तत्त्वांच्या समुदायाला एकेठिकाणीं जुळविलें ॥ ३ ॥ तेव्हां परमेश्वरानें प्रेरित असल्यामुळें ज्यांची क्रियाशक्ति जाग्रत झाली आहे अशा त्या तेवीस तत्त्वांच्या समुदायानें, आपापल्या अंशेंकरून

सतीनां स्थितानाम् । प्रसुप्तं लोकतंत्रं विश्वरचना यासाम् । यद्वा । प्रसुप्तजीवोपकरणानां गतिं स्थितिं दृष्ट्वा अविशदित्युत्तरेणान्वयः ॥ १ ॥ कालेन संज्ञा उद्बोधो यस्याः कालयति क्षोभयति स्वकार्याणीति वा कालसंज्ञा प्रकृतिस्तां शक्तिं प्रकृत्या सह प्रवेशात्त्रयोविंशतितत्त्वानामित्युक्तं अंतर्यामितया प्राविशत् ॥ २ ॥ चेष्टारूपेण क्रियाशक्त्या कर्म तेषां क्रियां जीवानामदृष्टं वा ॥ ३ ॥ प्रबुद्धं कर्म क्रियाशक्तिर्यस्य स त्रयोविंशतेर्गणः दैवेनेश्वरेण प्रेरितः । मात्राभिरंशैः अधिपूरुषं विराट्देहम् ॥ ४ ॥ जननमेवाह । परेणेश्वरेण । विश्वसृजां तत्त्वानां गणः मात्रया चुक्षोभ परिणतो न सर्वात्मना । यस्मिँल्लोकाः स्थिताः ॥ ५ ॥ स पुरुषोऽधिपुरुष इत्युक्तः आंडकोशे ब्रह्मांडमध्ये

कालसंज्ञां तदा देवीं बिभ्रच्छक्तिमुरुक्रमः ॥ त्रयोविंशतितत्त्वानां गणं युगपदाविशत् ॥ २ ॥ सोऽनुप्रविष्टो भगवांश्चेष्टारूपेण तं गणम् ॥ भिन्नं संयोजयामास सुप्तं कर्म प्रबोधयन् ॥ ३ ॥ प्रबुद्धकर्मा दैवेन त्रयोविंशतिको गणः ॥ प्रेरितोऽजनयत्स्वाभिर्मात्राभिरधिपूरुषम् ॥ ४ ॥ परेण विशता स्वस्मिन्मात्रया विश्वसृग्गणः ॥ चुक्षोभान्योऽन्यमासाद्य यस्मिँल्लोकाश्चराचराः ॥ ५ ॥ हिरण्मयः स पुरुषः सहस्रपरिवत्सरान् ॥ आंडकोश उवासाप्सु सर्वसत्वोपबृंहितः ॥ ६ ॥ स वै विश्वसृजां गर्भो देवकर्मात्मशक्तिमान् ॥ विबभाजात्मनात्मानमेकधा दशधा त्रिधा ॥ ७ ॥ एष ह्यशेषसत्त्वानामात्मांशः परमात्मनः ॥ आद्योऽवतारो यत्रासौ भूतग्रामो विभाव्यते ॥ ८ ॥

सर्वैः सत्त्वैरनुशायिभिर्जीवैः सहितः ॥ ६ ॥ गर्भः कार्यरूपो विराट् देवशक्तिर्ज्ञानशक्तिस्तयैकधा हृदयावच्छिन्नचैतन्यरूपेण कर्मशक्तिः क्रियाशक्तिस्तया दशधा प्राणरूपेण प्राणादयः पंच । नागः कूर्मश्च कृकलो देवदत्तो धनंजयः । इत्येते पंचैवं वृत्तिभेदेन दशविधः प्राणः आत्मशक्तिर्भोक्तृशक्तिस्तयाऽध्यात्मादिभेदेन त्रिधाऽऽत्मानं विभक्तं कृतवान् ॥ ७ ॥ एवं विभागसामर्थ्याय तस्योत्कर्षमाह । एष हीति । अशेषसत्वानां प्राणिनामात्मा व्यष्टीनां तदंशत्वात् अंशो जीवः अवतारत्वोक्तिस्तस्मिन्नारायणाविर्भावाभिप्रा-

---

विराट्देह उत्पन्न केला ॥ ४ ॥ तो उत्पत्तीचा प्रकार असा कीं, विश्वसृष्टि करणाऱ्या तत्त्वांचा गणच, आपलेठिकाणीं प्रविष्ट झालेल्या परमेश्वराच्या योगानें परस्परांशीं संयुक्त होऊन आपल्या कांहीं अंशानें, ज्याचेठिकाणीं चराचर लोक राहिले आहेत अशा पुरुषरूपानें परिणाम पावला ॥ ५ ॥ तो सुवर्णमय विराट्पुरुष, सर्व जीवांसहवर्तमान ब्रह्मांडाच्या मध्यभागीं उदकामध्यें देवमानानें हजार वर्षेंपर्यंत राहिला होता ॥ ६ ॥ तो विराट्पुरुष, विश्व उत्पन्न करणाऱ्या तत्त्वांचा गर्भरूप असून ज्ञानशक्ति, क्रियाशक्ति आणि भोक्तृशक्ति यांनीं युक्त होता. त्यानें आपणच आपले, ज्ञानशक्तीच्या योगानें एक (हृदय), क्रियाशक्तीच्या योगानें दहा (प्राण), आणि भोक्तृशक्तीच्या योगानें तीन (अध्यात्म, अधिदैव आणि अधिभूत), असे विभाग करून घेतले ॥ ७ ॥ कारण, हा विराड्रूपी पुरुष, सर्वजीवांचा आत्मा असून परमात्म्याचा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नारायणनामक आद्य अवतार होय. ज्याच्या स्वरूपाचेठिकाणीं हा चराचर प्राण्यांचा समुदाय सुरक्षितपणें वास करीत आहे ॥ ८ ॥ पूर्वीं सांगितलेले विभाग असे कीं, तो विराट्पुरुष, दहा इंद्रियांसहित मन १ सर्व इंद्रियांच्या देवता २ व सर्व इंद्रियांचे शब्दादि विषय ३ या भेदांनीं तीन प्रकारचा, प्राण १ आपान २ व्यान ३ उदान ४ समान ५ नाग ६ कूर्म ७ कृकल ८ देवदत्त ९ आणि धनंजय १० या भेदांनीं दहा प्रकारचा आणि हृदयरूपानें एक प्रकारचा आहे ॥ ९ ॥ तो अधोक्षज प्रभु, विश्वोत्पादक देवांच्या प्रार्थनेचें स्मरण करून, त्यांची अनेक प्रकारें वृत्ति चालविण्यासाठीं आपल्या ज्ञानशक्तीनें विराट्पुरुषाचें पुढें असें करीन हें मनांत आणूं लागला ॥ १० ॥ नंतर चिंतन केलेल्या त्या विराट्देहाला देवांस उपयुक्त अशीं कितीएक स्थानें उत्पन्न झालीं, तीं मी तुला सांगतों. श्रवण कर ॥ ११ ॥ त्या विराट्देहाला प्रथम

येण ॥ ८ ॥ पूर्वश्लोकार्थं विवृणोति । साध्यात्मः अध्यात्मानींद्रियाणि तत्सहितः विराडिति सर्वत्र ॥ ९ ॥ अध्यात्मादिभेदं प्रपंचयितुमाह । स्मरन्निति । विज्ञापितं यावद्धलिं तेऽज हरामेत्यादि स्वेन तेजसा चिच्छक्त्या अतपदेवं करिष्यामीत्यालोचितवान् । यस्य ज्ञानमयं तप इति श्रुतेः । विवृत्तये विविधवृत्तिलाभाय ॥ १० ॥ मे मत्तः शृणु ॥ ११ ॥ आयतनान्येवाह । तस्याग्निरित्यादिचतुर्दशभिः । आस्यं निर्भिन्नं पृथक् जातं पदं स्वस्थानं स्वांशेन स्वशक्त्या वाचा सहाविशत् असौ जीवः वक्तव्यं प्रतिपद्यते शब्दमुच्चा

साध्यात्मः साधिदैवश्च साधिभूत इति त्रिधा ॥ विराट् प्राणो दशविध एकधा हृदयेन च ॥ ९ ॥ स्मरन्विश्वसृजामीशो विज्ञापित-
मधोक्षजः ॥ विराजमतपत्स्वेन तेजसैषां विवृत्तये ॥ १० ॥ अथ तस्याभितप्तस्य कति चायतनानि ह ॥ निरभिद्यंत देवानां तानि
मे गदतः शृणु ॥ ११ ॥ तस्याग्निरास्यं निर्भिन्नं लोकपालोऽविशत्पदम् ॥ वाचा स्वांशेन वक्तव्यं ययाऽसौ प्रतिपद्यते ॥ १२ ॥
निर्भिन्नं तालु वरुणो लोकपालोऽविशद्धरेः ॥ जिह्वयांशेन च रसं ययासौ प्रतिपद्यते ॥ १३ ॥ निर्भिन्ने अश्विनौ नासे विष्णोरावि-
शतां पदम् ॥ घ्राणेनांशेन गंधस्य प्रतिपत्तिर्यतो भवेत् ॥ १४ ॥ निर्भिन्ने अक्षिणी त्वष्टा लोकपालोऽविशद्विभोः ॥ चक्षुषांऽशेन
रूपाणां प्रतिपत्तिर्यतो भवेत् ॥ १५ ॥ निर्भिन्नान्यस्य चर्माणि लोकपालोऽनिलोऽविशत् ॥ प्राणेनांशेन संस्पर्शं येनासौ प्रतिपद्यते
॥ १६ ॥ कर्णावस्य विनिर्भिन्नौ धिष्ण्यं स्वं विविशुर्दिशः ॥ श्रोत्रेणांशेन शब्दस्य सिद्धिं येन प्रपद्यते ॥ १७ ॥

रयतीत्यर्थः । सर्वत्र यन्निर्भिन्नं तदधिष्ठानं अग्न्यादि प्रथमांतमधिदैवम् । वागादींद्रियं तृतीयांतमध्यात्मम् । प्रतिपत्तव्यमधिभूतम् ॥ १२ ॥ हरेः विराजः ॥ १३ ॥ १४ ॥ त्वष्टा आदित्यः ॥ १५ ॥ प्राणेनेति । प्राणवद्देहव्यापिना त्वगिंद्रियेणेत्यर्थः ॥ १६ ॥ शब्दस्य सिद्धिं ज्ञानम् ॥ १७ ॥

मुख हें स्थान उत्पन्न झालें. तेथें आग्नेयीदिशेचा अधिपति अग्नि, वाणीरूप आपल्या शक्तीसहवर्तमान प्रविष्ट झाला. ज्या वाणीरूप शक्तीच्या योगानें हा पुरुष, शब्दांचें उच्चारण करितो ॥ १२ ॥ त्या विराट्पुरुषाला तालुस्थान उत्पन्न झालें, तेथें लोकपाल वरुण, जिव्हेंद्रियरूप आपल्या शक्तीसहवर्तमान प्रविष्ट झाला. ज्या जिव्हेनें हा जीव रसाचें ग्रहण करितो ॥ १३ ॥ त्या विष्णूला दोन नासिकाछिद्रें उत्पन्न झालीं. त्या स्थानीं अश्विनीकुमारनामक दोन देव आपल्या घ्राणेंद्रियरूप शक्तीसहवर्तमान प्रविष्ट झाले. ज्या घ्राणेंद्रियापासून जीवाला गंधविषयाचा अनुभव प्राप्त होतो ॥ १४ ॥ त्या व्यापक विराट्पुरुषाला नेत्रें उत्पन्न झालीं तेथें लोकरक्षक सूर्य आपल्या चक्षुरिंद्रियासह प्रविष्ट झाला; ज्याच्या योगानें जीवास रूपाचें ज्ञान होतें ॥ १५ ॥ त्या विराट्पुरुषास चर्में उत्पन्न झालीं, तेथें लोकपाल वायु, आपल्या त्वचारूप इंद्रियशक्तीसह प्रविष्ट झाला. ज्या त्वगिंद्रियानें या जीवास शीतोष्णादिक स्पर्शांचें ज्ञान होतें ॥ १६ ॥ त्या विराट्पुरुषास कर्ण उत्पन्न झाले, त्या आपल्या स्थानीं सर्व दिशा,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रोत्रेंद्रियरूप शक्तीसह प्रविष्ट झाल्या. ज्या श्रोत्रेंद्रियानें जीवाला शब्दाचें ज्ञान होतें ॥ १७ ॥ त्या पुरुषाला त्वचा उत्पन्न झाली, त्या स्थानीं सर्व ओषधि रोमरूप शक्तीसह प्रविष्ट झाल्या. ज्या रोमरंध्रांच्या योगानें जीवाला कंडूरूप आनंदाची प्राप्ति होत्ये ॥ १८ ॥ त्याला शिश्न उत्पन्न झालें. त्या आपल्या स्थानाचेठिकाणीं प्रजापति, वीर्यशक्तीसह प्रविष्ट झाला. ज्या वीर्यरूप शक्तीच्या योगानें हा जीव, संभोगरूप आनंद पावतो ॥ १९ ॥ त्या पुरुषाला गुदद्वार उत्पन्न झालें. तेथें लोकांचें रक्षण करणारा मित्र देव, पायुनामक इंद्रियशक्तीसह प्रविष्ट झाला. ज्या इंद्रियाच्या योगानें हा जीव, अन्नादिसंबंधी मलाचा त्याग करितो ॥ २० ॥ त्या पुरुषाला हस्त उत्पन्न झाले तेथें स्वर्गलोकाचा पालक इंद्र, क्रयविक्रयरूप शक्तीसह प्रविष्ट झाला. जेणेंकरून हा पुरुष, आपली उपजीविका पावतो ॥ २१ ॥ त्या पुरुषाला पाय उत्पन्न झाले,

---

त्वचं चर्म ओषधीरोषधयः त्वगिंद्रियस्यैव स्थानभेदेन विषयद्वयं कंडूः स्पर्शश्च । तत्र चायं नामभेदो देवताभेदश्चेति द्वितीयस्कंध एव व्याख्यातम् ॥ १८ ॥ कः प्रजापतिः ॥ १९ ॥ २० ॥ स्वःपतिः स्वर्गस्य पतिः । वार्तया क्रयविक्रयादिशक्त्या । वृत्तिं जीविकाम् ॥ २१ ॥ २२ ॥ २३ ॥ विक्रियां संकल्पादिरूपाम् ॥२४॥ आत्मानमहंकारम् ।

मान सांगितलें आहे त्यांत सहा पळें तांब्याचें एक पात्र एक प्रस्थ (शेर) पाणी राहण्याजोगें करून त्यास, मध्यभागीं चार मासे सोन्याच्या चार आंगळें लांब केलेल्या तारेनें
(ह्मणजे ती तार आंतून जाण्याजोगें) छिद्र पाडावें. त्या छिद्रानें प्रस्थपरिमित पाणी आंत भरलें ह्मणजे तें पात्र बुडतें, त्याला घटिका असें ह्मणतात ॥ ९ ॥ हे विदुरा,
चार चार प्रहर ह्मणजे मनुष्यांचे एक दिवस व एक रात्र असें अहोरात्र होतें पंधरा अहोरात्रें ह्मणजे एक पक्ष होय. तो पक्ष, शुक्ल आणि कृष्ण असा दोनप्रकारचा आहे
॥ १० ॥ ते दोन्हीं पक्ष मिळून एक मास (महिना) होय. तें पितरांचें एक अहोरात्र जाणावें. दोन महिने ह्मणजे एक ऋतु. सहा महिने ह्मणजे एक अयन. तीं अयनें
दक्षिणायन आणि उत्तरायण अशीं दोन आहेत. तीं दोन अयनें मिळून देवांचें एक अहोत्र असें ह्मणतात. बारा महिने ह्मणजे एक संवत्सर होय. शंभर संवत्सर ह्मणजे मनु-
ष्यांच्या आयुष्याची परम मर्यादा असें सांगितलें आहे ॥ ११ ॥ १२ ॥ परमाणूपासून आरंभ करून संवत्सरापर्यंत होणाऱ्या कालानें, ग्रह नक्षत्रें आणि तारा यांच्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

चक्रावर फिरत असणारा कालरूपी भगवान् सूर्य, या भुवनकोशाला प्रदक्षिणा करितो ॥ १३ ॥ हे विदुरा, त्याच वर्षांच्या काळाला, सूर्य, बृहस्पति, सवन, चंद्र व नक्षत्रें यांच्या गतींच्या भेदानें, संवत्सर, परिवत्सर, इडावत्सर, अनुवत्सर आणि वत्सर अशीं पांच नांवें वर्णन करितात ॥ १४ ॥ जो सूर्य, पंचमहाभूतांपैकीं एक तेजोमय मंडलरूपी असून आपल्या कालनामक शक्तीच्या योगानें बीजादिकांमध्यें असणारे अंकुरादिक उत्पन्न होण्याच्या शक्तीला अनेकप्रकारें पक्क करून यज्ञादिद्वारा सकाम पुरुषांना सत्त्वादिगुणमय स्वर्गादिफलांचा विस्तार करीत करीत पुरुषाच्या मोहनिवृत्तीकरितां आकाशामध्यें धांवत असतो त्या पांचप्रकारच्या संवत्सरांची प्रेरणा कर-

---

न्यादीनि तारा अन्यानि नक्षत्राणि तदुपलक्षितं यत्कालचक्रं तत्र स्थितोऽनिमिषः कालात्मा विभुरीश्वरः सूर्यो जगद्द्वादशराश्यात्मकं भुवनकोशं पर्येति पर्यटति ॥ १३ ॥ संवत्सरादिभेदश्च सौरबार्हस्पत्यसावनचांद्रनाक्षत्रमासभेदेन द्रष्टव्यः । केचित्पुनरेवमाहुः । यदा शुक्लपक्षप्रतिपदि संक्रांतिर्भवति तदा सौरचांद्रमासयोर्युगपदुपक्रमो भवति स संवत्सरः ततः सौरमानेन वर्षे षट् दिनानि वर्धंते चांद्रमानेन वर्षे षट् दिनानि ह्रसंतीति द्वादशदिनव्यवधानादुभयोरग्रपश्चाद्भावो भवति । एवं व्यवधानतारतम्येन पंच वर्षाणि गच्छंति तन्मध्ये द्वौ मलमासौ भवतः पुनः षष्ठः संवत्सरो भवतीति ॥ १४ ॥ एवंभूतः कालात्मा नित्यमप्रमत्तैः पूजनीय इत्याह । य इति । सृज्यं कार्यमंकुरादि तद्विषयां

संवत्सरः परिवत्सर इडावत्सर एव च ॥ अनुवत्सरो वत्सरश्च विदुरैवं प्रभाष्यते ॥ १४ ॥ यः सृज्यशक्तिमुरुधोच्छ्वसयन्स्वशक्त्या पुंसोऽभ्रमाय दिवि धावति भूतभेदः ॥ कालाख्यया गुणमयं क्रतुभिर्वितन्वंस्तस्मै बलिं हरत वत्सरपंचकाय ॥ १५ ॥ विदुर उवाच ॥ पितृदेवमनुष्याणामायुः परमिदं स्मृतम् ॥ परेषां गतिमाचक्ष्व ये स्युः कल्पाद्बहिर्विदः ॥ १६ ॥ भगवान्वेद कालस्य गतिं भगवतो ननु ॥ विश्वं विचक्षते धीरा योगराद्धेन चक्षुषा ॥ १७ ॥ मैत्रेय उवाच ॥ कृतं त्रेता द्वापरं च कलिश्चेति चतुर्युगम् ॥ दिव्यैर्द्वादशभिर्वर्षैः सावधानं निरूपितम् ॥ १८ ॥ चत्वारि त्रीणि द्वे चैकं कृतादिषु यथाक्रमम् ॥ संख्यातानि सहस्राणि द्विगुणानि शतानि च ॥ १९ ॥

बीजादीनां शक्तिं कालरूपया स्वशक्त्या बहुधोच्छ्वसयन् कार्याभिमुखीं कुर्वन् दिव्यंतरिक्षे धावति । कोऽसौ । भूतभेदो महाभूतविशेषस्तेजोमंडलरूपी सूर्यः । किमर्थं धावति । पुंसः पुरुषस्याभ्रमाय भ्रमो मोहस्तन्निवृत्तये आयुरादिव्ययेन विषयासक्तिं निवर्तयन्नित्यर्थः । सकामानां तु गुणमयं स्वर्गादिफलं क्रतुभिर्विस्तारयन् तस्मै संवत्सरपंचकप्रवर्तकाय पूजां कुरुत ॥ १५ ॥ इदं स्वस्वमानेन वर्षशतं गणितमायुर्मानं प्रत्यहं कल्प्यते सृज्यत इति कल्पस्त्रैलोक्यं तस्माद्बाह्यतः । विदो ज्ञानिनः ॥ १६ ॥ योगराद्धेन योगसिद्धेन ॥ १७ ॥ द्वादशभिर्वर्षसहस्रैरित्युत्तरश्लोकसामर्थ्याज्ज्ञातव्यम् । अवधीयत इत्यवधानं संध्या चांशश्च तत्सहितम् ॥ १८ ॥ कृतयुगे चत्वारि सहस्राणि संध्यासंध्यांशयोश्चत्वारि

णाऱ्या सूर्यनारायणाला तुह्मी पूजा समर्पण करा ॥ १५ ॥ विदुर ह्मणाला– हे मैत्रेया, पितर, देव, आणि मनुष्यें यांच्या आयुष्याची परम मर्यादा, त्यांच्या त्यांच्या मानानें शंभर वर्षें आहे असें आपण सांगितलें. आतां जे ज्ञानसंपन्न भृग्वादिक ऋषि, त्रैलोक्याच्या बाहेर आहेत त्या महात्म्यांच्या आयुष्याचें प्रमाण मला सांगावें ॥ १६ ॥ आपण योगैश्वर्यसंपन्न आहां, ह्मणून आपल्याला कालरूपी भगवंताची गति माहीत आहेच. कारण, आपल्यासारखे ज्ञानी पुरुष, योगाभ्यासानें सिद्ध झालेल्या ज्ञानदृष्टीनें सर्व जगास पाहतात ॥ १७ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, युगाच्या आरंभीं असणारी संध्या आणि शेवटीं असणारा अंश यांसहवर्तमान कृत, त्रेता, द्वापर आणि कलि हीं चार युगें (चौकडी) देवांच्या बाराहजार वर्षांनीं पूर्ण होतात. असें सांगितलें आहे ॥ १८ ॥ त्या कृतादिक चार युगांचें प्रमाण अनुक्रमानें देवांच्या मानानें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

चार, तीन, दोन आणि एक अशीं सहस्रें आणि सहस्रांच्या दुप्पट शतें अशीं वर्षें सांगितलीं आहेत ह्मणजे ४८०० वर्षांचें कृतयुग, ३६०० वर्षांचें त्रेतायुग, २४०० वर्षांचें द्वापरयुग व १२०० वर्षांचें कलियुग अशीं आहेत ॥ १९ ॥ शतसंख्यांनीं परिमित असलेल्या संध्या व अंश यांच्या मध्यें जो काल चार हजारवगैरे वर्षें, असतो त्यालाच युगवेत्ते पुरुष, युग असें ह्मणतात. त्या प्रत्येक युगामध्यें निरनिराळा धर्म सांगितला आहे ॥ २० ॥ कृतयुगामध्यें चतुष्पाद ह्मणजे संपूर्ण धर्म मनुष्यांमध्यें राहत असतो, आणि तोच धर्म, त्रेतादिक दुसऱ्या युगांमध्यें एकेक पादानें वृद्धिंगत होणाऱ्या अधर्माच्या योगानें कमी कमी होत जातो ॥ २१ ॥ बा विदुरा, त्रैलोक्याच्या बाहेर असणारे जे ब्रह्मलोकापर्यंत लोक, तेथें राहणाऱ्या पुरुषांचा, देवांच्या मानानें हजार युगें झालीं ह्मणजे एक दिवस होतो. व त्यांची तेवढीच रात्र असते. ज्या

चत्वारीत्यष्टौ शतानि च एवं त्रेतादिष्वपि योज्यम् ॥ १९ ॥ युगस्यादौ संध्या अंतेऽशः तयोः । उक्तानि शतानि संख्या ययोस्तयोरंतरेण मध्ये युगम् । तस्य विशेषमाह यत्रेति । गवालंभादिधर्मविशेषो यत्र विधीयत इत्यर्थः । साधारणधर्मस्तु संध्यांशयोरप्यस्त्येव ॥ २० ॥ चतुष्पात्संपूर्णस्त्रेतादिषु पादेन पादेन व्येति ह्रसति पादेन पादेन वर्धमानेनाधर्मेण हेतुना । एतच्च स्वरूपकथनमात्रं वैराग्यार्थं न तु धर्मसंकोचनार्थम् ॥ २१ ॥ त्रिलोक्या बहिर्महर्लोकप्रभृति ब्रह्मलोकमभिव्याप्य चतुर्युगसहस्रमेकं दिनम् । यद्यस्यां विश्वसृक् ब्रह्मा निमीलति स्वपिति ॥ २२ ॥ तत्र दिनस्थितिमाह निशाऽवसान इत्यादिसार्धैश्चतुर्भिः ।

संध्यांऽशयोरंतरेण यः कालः शतसंख्ययोः ॥ तमेवाहुर्युगं तज्ज्ञा यत्र धर्मो विधीयते ॥ २० ॥ धर्मश्चतुष्पान्मनुजान्कृते समनुवर्तते ॥
स एवान्येष्वधर्मेण व्येति पादेन वर्धता ॥ २१ ॥ त्रिलोक्या युगसाहस्रं बहिराब्रह्मणो दिनम् ॥ तावत्येव निशा तात यन्निमीलति
विश्वसृक् ॥ २२ ॥ निशावसान आरब्धो लोककल्पोऽनुवर्तते ॥ यावद्दिनं भगवतो मनून् भुंजंश्चतुर्दश ॥ २३ ॥ स्वं स्वं कालं
मनुर्भुंक्ते साधिकां ह्येकसप्ततिम् ॥ मन्वंतरेषु मनवस्तद्वंश्या ऋषयः सुराः ॥ भवंति चैव युगपत्सुरेशाश्चानु ये च तान् ॥ २४ ॥
एष दैनंदिनः सर्गो ब्राह्मस्त्रैलोक्यवर्तनः ॥ तिर्यङ्नृपितृदेवानां संभवो यत्र कर्मभिः ॥ २५ ॥ मन्वंतरेषु भगवान्बिभ्रत्सत्त्वं स्वमूर्तिभिः ॥
मन्वादिभिरिदं विश्वमवत्युदितपौरुषः ॥ २६ ॥ तमोमात्रामुपादाय प्रतिसंरुद्धविक्रमः ॥ कालेनानुगताशेष आस्ते तूष्णीं दिनात्यये ॥ २७ ॥

चतुर्दश मनून् भुंजन् पालयन् व्याप्नुवन्नित्यर्थः ॥ २३ ॥ किंचिदधिकां युगानामेकसप्ततिम् । मनुवंश्याः पृथ्वीपालकाः क्रमेण भवंति सप्तर्षिप्रभृतयस्तु युगपत्समकालमेव भवंति । सुरेशा इंद्राः ताननु वर्तंते ये गंधर्वादयस्तेऽपि ॥ २४ ॥ त्रैलोक्यं वर्तयतीति तथा ॥ २५ ॥ स्वमूर्तिभिर्मन्वंतरावतारैर्मन्वादिभिर्द्वारभूतैराविष्कृतपुरुषकारः सन्विश्वं रक्षति ॥ २६ ॥ रात्रिगतां स्थितिमाह पंचभिः । तमसो मात्रां लेशम् । प्रतिसंरुद्धः प्रत्याहृतो विक्रमो येन । अनुगतमनुप्रविष्टमशेषं यस्मिन् ॥ २७ ॥ तदेव स्पष्टयति ।

रात्रीमध्यें ब्रह्मदेव शयन करितो ॥ २२ ॥ ती रात्र संपल्यावर पुनः आरंभिलेला लोकांचा सृष्टिक्रम, ब्रह्मदेवाचा दिवस संपेपर्यंत चालतो. तोंपर्यंत चवदा मनु होतात ॥ २३ ॥ प्रत्येक मनु, आपापल्या अधिकाराचा काल दिव्यमानानें चार युगांच्या एकाहात्तर आवृत्ति, कांहीं अधिक ह्मणजे ७१ ३/७ भोगतो. प्रत्येक मन्वंतराचेठिकाणीं, मनु, त्याच्या वंशांतील राजे, सप्तर्षि, देव, इंद्र व त्या इंद्रांचे अनुयायी जे गंधर्वादिक ते एकदम अधिकारी होतात ॥ २४ ॥ हा त्रैलोक्याला वागविणारा व ब्रह्मदेवाच्या प्रत्येक दिवसांत होणारा सृष्टीचा क्रम होय. ज्यामध्यें कर्मांच्या योगेंकरून पशु पक्षी, मनुष्य, पितर व देव यांची उत्पत्ति होत्ये ॥ २५ ॥ सर्व मन्वंतरांमध्यें भगवान्, सत्त्वगुणाचा स्वीकार करून आपल्या अंशरूपी मन्वादिकांच्या स्वरूपानें पराक्रम प्रगट करीत होत्साता या जगाचें रक्षण करितो ॥ २६ ॥ आणि तमोगुणाच्या अंशाचा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

स्वीकार करून आपला सृष्टिकरण्याचा व्यापार बंद करणारा आणि कालाच्या योगानें ज्याच्याठिकाणीं त्रैलोक्याचा अनुप्रवेश झाला आहे असा तो ब्रह्मदेव, दिवसाच्या शेवटीं (सायंकालीं) स्वस्थपणें शयन करितो ॥ २७ ॥ ह्मणजे जेथें चंद्र नाहीं, व सूर्य नाहीं अशी ब्रह्मदेवाची रात्र सुरू होतांच तत्काळ, भूः भुवः आणि स्वः हे तीन-हि लोक अंतर्धान पावतात ॥ २८ ॥ ते असे कीं, त्या वेळीं शेषाच्या मुखांतील अग्निरूप भगवंताच्या शक्तीनें त्रैलोक्याचा दाह होऊं लागला असतां, त्या अग्नीच्या योगानें पीडित झालेले भृग्वादिक ऋषि, आपला महर्लोक सोडून जनलोकीं जातात ॥ २९ ॥ इतक्यांत कल्पांतरूप कालाच्या योगानें वृद्धिंगत झालेले समुद्र, अतिशय क्षोभ पावलेल्या प्रचंड वायूंनीं ज्यांच्या लाटा कंपित झाल्या आहेत असे होऊन तत्काळ त्रैलोक्याला बुडवून टाकितात ॥ ३० ॥ त्या पाण्यामध्यें तो शेषशायी हरि,

---

तमेवेति । अन्वपिधीयंत इति कर्मकर्तरि प्रयोगः । तिरोहिता भवंतीत्यर्थः । कथम् । निर्मुक्तो रहितः शशी भास्करश्च यथा भवति तथा ॥ २८ ॥ भगवच्छक्तिरूपो यः संकर्षणमुखाग्निस्तेनोष्मणार्दिताः संतो जनलोकं यांति ॥ २९ ॥ कल्पांतेनैधिताः सिंधवः समुद्राः । उत्कट आटोपः क्षोभो येषां ते च ते चंडवातैरीरितोर्मयश्च ॥ ३० ॥ जनलोक

तमेवान्वपिधीयंते लोका भूरादयस्त्रयः ॥ निशायामनुवृत्तायां निर्मुक्तशशिभास्करम् ॥ २८ ॥ त्रिलोक्यां दह्यमानायां शक्त्या संकर्षणाग्निना ॥ यांत्यूष्मणा महर्लोकाज्जनं भृग्वादयोऽर्दिताः ॥ २९ ॥ तावत्रिभुवनं सद्यः कल्पांतैधितसिंधवः ॥ प्लावयंत्युत्कटाटोपचंडवातेरितोर्मयः ॥ ३० ॥ अंतः स तस्मिन्सलिल आस्तेऽनंतासनो हरिः ॥ योगनिद्रानिमीलाक्षः स्तूयमानो जनालयैः ॥ ३१ ॥ एवंविधैरहोरात्रैः कालगत्योपलक्षितैः ॥ अपक्षितमिवाऽस्यापि परमायुर्वयःशतम् ॥ ३२ ॥ यदर्धमायुषस्तस्य परार्धमभिधीयते ॥ पूर्वः परार्धोऽपक्रांतो ह्यपरोऽद्य प्रवर्तते ॥ ३३ ॥ पूर्वस्यादौ परार्धस्य ब्राह्मो नाम महानभूत् ॥ कल्पो यत्राऽभवद्ब्रह्मा शब्दब्रह्मेति यं विदुः ॥ ३४ ॥ तस्यैव चांते कल्पोऽभूद्यं पाद्ममभिचक्षते ॥ यद्धरेर्नाभिसरस आसील्लोकसरोरुहम् ॥ ३५ ॥ अयं तु कथितः कल्पो द्वितीयस्यापि भारत ॥ वाराह इति विख्यातो यत्रासीत्सूकरो हरिः ॥ ३६ ॥

आलयो येषां महर्लोकगतानामन्येषां च तैः ॥ ३१ वैराग्यार्थमाह । एवंविधैरहोरात्रैर्वर्षशतं सर्वेषां प्राणिनामायुषः परमधिकमस्य ब्रह्मणो यदायुस्तदप्यपक्षितमिव क्षीणमिवेति लोकोक्तिः गतप्रायमित्यर्थः ॥ ३२ ॥ तदेवाह । यदिति ॥ ३३ ॥ पूर्वस्य परार्धस्यादाविति त्रिभिर्वस्तुकथनमात्रम् ॥ ३४ ॥ पाद्मत्वे हेतुः । यदिति ॥ ३५ ॥ अयं तु द्वितीय-

---

जनलोकनिवासी ऋषींनीं स्तूयमान होत्साता योगनिद्रेनें डोळे मिटून राहत असतो ॥ ३१ ॥ या प्रकारच्या कालगतीनें उपलक्षित झालेल्या अहोरात्रांनीं, सर्व प्राणिमात्रांच्या आयुष्यापेक्षां अधिक असें या ब्रह्मदेवाचें शंभर वर्षें असलेलें आयुष्यहि संपत आल्यासारखेंच झालें आहे ॥ ३२ ॥ कारण, त्या ब्रह्मदेवाच्या आयुष्याचा जो अर्धा भाग (पंनास वर्षें) त्याला परार्ध असें ह्मणतात. ते परार्ध दोन आहेत. त्यांपैकीं पहिला परार्ध संपून गेला. सध्यां दुसरा परार्ध चालू आहे ॥ ३३ ॥ पहिल्या परार्धाच्या आरंभीं ब्राह्मनामक एक मोठा कल्प (ब्रह्मदेवाचा दिवस) होऊन गेला. त्यामध्यें, ज्याला शब्दब्रह्म असें ह्मणतात तो ब्रह्मदेव उत्पन्न झाला ॥ ३४ ॥ त्याच पहिल्या परार्धाच्या शेवटीं, ज्याला, पाद्म असें ह्मणतात तो कल्प झाला होता. त्या कल्पामध्यें हरीच्या नाभिरूप सरोवरापासून त्रिभुवनात्मक कमल उत्पन्न झालें ॥ ३५ ॥ हे विदुरा, वाराह या नांवानें प्रसिद्ध असलेला हा कल्प तर, दुसऱ्या परार्धाच्या आरंभीं झाला असें सांगितलें आहे. या कल्पामध्यें विष्णूनें वराह

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अवतार धारण केला होता ॥ ३६ ॥ हा द्विपरार्धनामक काल, मायारूप उपाधीनें रहित अशा अनादि अनंत जगदात्म्याच्या केवळ एका निमेषासारखा मानिला आहे ॥ ३७ ॥ ज्याचा आद्य अंश परमाणु आहे व शेवटचा अंश दोन परार्धें आहेत असा हा काल, देह, गृह इत्यादिकांचे अभिमान बाळगणाऱ्या पुरुषांचामात्र नाश करण्याविषयीं समर्थ आहे. हा सर्वव्यापक परमेश्वराचें नियमन करण्याविषयीं मुळींच समर्थ होत नाहीं ॥ ३८ ॥ हे विदुरा, प्रकृति, महत्तत्व, अहंकार व शब्दस्पर्शादिक पांच सूक्ष्मभूतें यांनीं उत्पन्न झालेला, अकरा इंद्रियें व पंचमहाभूतें अशा सोळा विकारांनीं युक्त आणि आंत पन्नास कोटि योजनें विस्तृत असून बाहेरून एकापेक्षां एक दसपट अधिक अशा पृथिव्यादिक सात आवरणांनीं परिवेष्टित असा हा ब्रह्मांडकोश, ज्यामध्यें प्रविष्ट झाला असतां परमाणूसारखा दिसतो इतकेंच नव्हे तर अशा दुसऱ्या

स्यादौ कथितः ॥ ३६ ॥ तदेवं कालेन निमित्तेन सृज्यानामायुःपरिमाणमुक्त्वा कालपरिच्छेदरहितं तत्त्वमाह । कालोऽयमिति पंचभिः । उपचर्यते केवलं नत्वनेनापि क्रमेणायुर्गणनं तस्येत्याह । अव्याकृतस्य कार्योपाधिशून्यस्यातएवानंतस्यानादेश्च जगदात्मनो जगत्कारणस्य ॥ ३७ ॥ तत्परिच्छेदे कालस्यासामर्थ्यादित्याह । कालोऽयमीश्वरः समर्थोऽपि भूम्नः परिपूर्णस्येशितुं नैव प्रभुः समर्थः । यतो धाममानिनां देहगेहाभिमानिनामेवेश्वरः ॥ ३८ ॥ भूम्न इत्युक्तं तत्प्रपंचयन्नाह । विकारैः षोडशभिर्युक्तैरष्टप्रकृ-

कालोऽयं द्विपरार्धाख्यो निमेष उपचर्यते ॥ अव्याकृतस्यानंतस्य अनादेर्जगदात्मनः ॥ ३७ ॥ कालोऽयं परमाण्वादिर्द्विपरार्धांत
ईश्वरः ॥ नैवेशितुं प्रभुर्भूम्न ईश्वरो धाममानिनाम् ॥ ३८ ॥ विकारैः सहितो युक्तैर्विशेषादिभिरावृतः ॥ आंडकोशो बहिरयं पंचाशत्कोटि-
विस्तृतः ॥ ३९ ॥ दशोत्तराधिकैर्यत्र प्रविष्टः परमाणुवत् ॥ लक्ष्यतेंऽतर्गताश्चान्ये कोटिशो ह्यंडराशयः ॥ ४० ॥ तदाहुरक्षरं ब्रह्म
सर्वकारणकारणम् ॥ विष्णोर्धाम परं साक्षात्पुरुषस्य महात्मनः ॥ ४१ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे तृतीयस्कंधे एकादशो-
ऽध्यायः॥ ११ ॥ ॥ मैत्रेय उवाच ॥ इति ते वर्णितः क्षत्तः कालाख्यः परमात्मनः ॥ महिमा वेदगर्भोऽथ यथाऽस्राक्षीन्निबोध मे ॥ १ ॥
ससर्जाग्रेंऽधतामिस्रमथ तामिस्रमादिकृत् ॥ महामोहं च मोहं च तमश्चाज्ञानवृत्तयः ॥ २ ॥

तिसंयुक्तैः सहितस्तदारब्ध इत्यर्थः । अयमांडकोशो यत्र प्रविष्टः परमाणुवल्लक्ष्यत इत्युत्तरेणान्वयः । कीदृशः । अंतः पंचाशत्कोटियोजनविस्तृतो बहिश्च विशेषादिभिः पृथिव्यादिभिः सप्तभिरावृतः ॥ ३९ ॥ कीदृशैः आंडकोशप्रमाणाद्दशगुणमुत्तरोत्तरोऽधिको येषु तैः न केवलमयमेक एवापित्वन्येऽपि लक्ष्यंते ॥ ४० ॥ सर्वेषां कारणानां कारणं धाम स्वरूपम् ॥ ४१ ॥ इति तृतीये टीकायामेकादशोऽध्यायः ॥ ११ ॥ ॥ द्वादशे तु कुमारादि मनःसर्गासमेधनात् ॥ कायद्वैधेन यौनस्तु मनुसर्गोऽनुवर्ण्यते ॥ १ ॥ १ ॥ अग्र इति ब्रह्मा स्वस्रष्टौ प्रथममविद्यावृत्तीः ससर्ज तत्र तमोनाम स्वरूपाप्रकाशः मोहो देहाद्यहंबुद्धिः महामोहो भोगेच्छा तामिस्रं तत्प्रतिघाते क्रोधः अंधतामिस्रं तन्नाशेऽहमेव

कोट्यावधि ब्रह्मांडांच्या राशींच्याराशी ज्यामध्यें आहेत ॥ ३९ ॥ ४० ॥ आणि जें प्रधानादि सर्व कारणांचेंहि कारण आहे, त्यालाच साक्षात् महात्म्या सर्वव्यापी विष्णूचें अक्षरब्रह्मरूपी परमस्वरूप असें ह्मणतात ॥ ४१ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील तृतीयस्कंधांमध्यें हा अकरावा अध्याय समाप्त झाला ॥ ११ ॥ ॥ आतां ह्या बाराव्या अध्यायांत, ब्रह्मदेवानें मनापासून सनत्कुमारादिकांस उत्पन्न केलें, परंतु त्यांपासून पुढें सृष्टीची वृद्धि होईना ह्मणून, त्यानें आपल्या देहाच्या वामदक्षिणभागांपासून उभयतां स्त्रीपुरुषें उत्पन्न केलीं असतां, त्यांच्या संयोगानें झालेला सृष्टीचा प्रकार वर्णन केला आहे ॥ १ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, याप्रमाणें मी तुला परमात्म्याचा कालनामक महिमा सांगितला. आतां ब्रह्मदेवानें प्रजा ज्या रीतीनें उत्पन्न केल्या तें तूं माझ्यापासून श्रवण कर ॥ १ ॥ सृष्टीचा उपक्रम करणाऱ्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ब्रह्मदेवानें, प्रथम, तम (स्वतांच्या स्वरूपाचें अज्ञान), मोह (देह, इंद्रियें ह्यांवरच मी, अशी बुद्धि) महामोह (भोगांची इच्छा) तामिस्र (भोगांच्या इच्छेचा भंग
झाला असतां क्रोध) आणि अंधतामिस्र (भोगांचा सर्वथा भंग झाला असतां 'स्वतांच मरण पावलों' असें मानणें) या प्रकारच्या पांच अज्ञानवृत्ति उत्पन्न केल्या
॥ २ ॥ परंतु ही पापरूपी सृष्टि पाहून त्याच्या मनाला समाधान वाटलें नाहीं ह्मणून, नंतर त्या ब्रह्मदेवानें भगवंताच्या ध्यानानें पवित्र झालेल्या आपल्या मनाच्या
योगानें दुसरे सनक, सनंद, सनातन आणि सनत्कुमार असे चार, कर्मरहित नैष्ठिक ब्रह्मचारी (आमरणांत ब्रह्मचर्य व्रत धारण करणारे) मुनि उत्पन्न केले ॥ ३ ॥
॥ ४ ॥ आणि ब्रह्मदेवानें त्या पुत्रांस, 'हे पुत्रहो तुह्मी प्रजा उत्पन्न करा' असें सांगितलें. परंतु मोक्षधर्माचें आचरण करण्याविषयीं तत्पर असून वासुदेवपरायण अशा

मृतोऽस्मीति बुद्धिः । तदेवोक्तं वैष्णवे । तमोऽविवेको मोहः स्यादंतःकरणविभ्रमः ॥ महामोहस्तु विज्ञेयो ग्राम्यभोगसुखैषणा ॥ मरणं ह्यंधतामिस्रं तामिस्रः क्रोध उच्यते ॥
अविद्या पंचपर्वैषा प्रादुर्भूता महात्मन इति ॥ पातंजलेऽप्येत एवोक्ताः । अविद्यास्मितारागद्वेषाभिनिवेशाः पंच क्लेशाः इति । श्रीविष्णुस्वामिप्रोक्ता वा अज्ञानविपर्यासभेदः

दृष्ट्वा पापीयसीं सृष्टिं नात्मानं बह्वमन्यत ॥ भगवद्ध्यानपूतेन मनसान्यांस्ततोऽसृजत् ॥ ३ ॥ सनकं च सनंदं च सनातनमथा-
त्मभूः ॥ सनत्कुमारं च मुनीन्निष्क्रियानूर्ध्वरेतसः ॥ ४ ॥ तान्बभाषे स्वभूः पुत्रान्प्रजाः सृजत पुत्रकाः ॥ तन्नैच्छन्मोक्षधर्माणो वा-
सुदेवपरायणाः ॥ ५ ॥ सोऽवध्यातः सुतैरेवं प्रत्याख्यातानुशासनैः ॥ क्रोधं दुर्विषहं जातं नियंतुमुपचक्रमे ॥ ६ ॥ धिया निगृ-
ह्यमाणोऽपि भ्रुवोर्मध्यात्प्रजापतेः ॥ सद्योऽजायत तन्मन्युः कुमारो नीललोहितः ॥ ७ ॥ स वै रुरोद देवानां पूर्वजो भगवान्भवः ॥
नामानि कुरु मे धातः स्थानानि च जगद्गुरो ॥ ८ ॥ इति तस्य वचः पाद्मो भगवान्परिपालयन् ॥ अभ्यधाद्भद्रया वाचा मारो-
दीस्तत्करोमि ते ॥ ९ ॥ यदरोदीः सुरश्रेष्ठ सोद्वेग इव बालकः ॥ ततस्त्वामभिधास्यंति नाम्ना रुद्र इति प्रजाः ॥ १० ॥

भयशोकाः । तदुक्तम् । स्वाद्दगुत्थविपर्यासेत्यादि ॥ २ ॥ न बह्वमन्यत नाभ्यनंदत् ॥ ३ ॥ यद्यपि प्रतिकल्पं सनकादिसृष्टिर्नास्ति तथापि ब्राह्मसर्गत्वादिहोच्यते । वस्तुतस्तु
मुख्यसर्गादय एव प्रतिकल्पं भवंति सनकादयस्तु ब्राह्मकल्पसृष्टा एवानुवर्तंते ॥ ४ ॥ स्वभूर्ब्रह्मा ॥ ५ ॥ अवध्यातोऽवज्ञातः । प्रत्याख्यातमनंगीकृतमनुशासनं यैः ॥ ६ ॥
स चासौ मन्युश्च तन्मन्युः ॥ ७ ॥ ८ ॥ ९ ॥ बालक इव ॥ १० ॥

त्या पुत्रांनीं तें ब्रह्मदेवाचें सांगणें ऐकण्याची इच्छाच केली नाहीं ॥ ५ ॥ याप्रमाणें आज्ञेचा अंगीकार न करणाऱ्या पुत्रांनीं अवज्ञा केलेला तो ब्रह्मदेव, अवज्ञेमुळें प्राप्त
झालेल्या दुःसह क्रोधाला आवरून धरण्याविषयीं प्रयत्न करूं लागला ॥ ६ ॥ परंतु बुद्धीनें आटोपून धरिलेलाहि तो क्रोध, ब्रह्मदेवाच्या भृकुटींच्या मध्यभागापासून
तत्काल, काळा आणि तांबडा वर्ण धारण करणाऱ्या पुत्राच्या रूपानें उत्पन्न झाला ॥ ७ ॥ देवांच्याहि पूर्वीं उत्पन्न झालेला तो पुत्ररूपी भगवान् रुद्र, रोदन करूं
लागला आणि 'तूं कां रुदन करितोस, असें ब्रह्मदेवानें त्याला विचारिलें असतां ह्मणाला कीं, हे बाबा जगद्गुरो, तूं मला नांवें ठेव आणि मला राहण्यास स्थानें करून दे
॥ ८ ॥ असें त्याचें वचन ऐकून तें पुरें करण्याकरितां, त्या षड्गुणैश्वर्यसंपन्न ब्रह्मदेवानें मधुरवाणीनें असें भाषण केलें कीं, हे वत्सा, तूं रडूं नकोस. तुझ्या ह्मणण्या-
प्रमाणें मी करितों ॥ ९ ॥ हे सुरश्रेष्ठा, ज्याअर्थीं तूं खिन्न असलेल्या मुलाप्रमाणें रोदन केलेंस त्याअर्थीं तुला सर्व प्रजा रुद्र या नांवानें हाक मारतील ॥ १० ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हृदय, इंद्रियें, प्राण, आकाश, वायु, अग्नि, जल, पृथिवी, सूर्य, चंद्र आणि तपश्चर्या हीं तुला रहावयाचीं स्थानें, तूं विचारावयाच्या पूर्वींच मी तयार करून ठेविलीं आहेत ॥ ११ ॥ तशींच मन्यु, मनु, महिनस, महान्, शिव, ऋतुध्वज, उग्ररेता, भव, काल, वामदेव आणि धृतव्रत हीं तुझीं अकरा नांवें होत ॥ १२॥ हे रुद्रा, धी, वृत्ति, उशाना, उमा, नियुत्सर्पि, इला, अंबिका, इरावती, सुधा, दीक्षा आणि रुद्राणी ह्या अकरा तुझ्या स्त्रिया होत ॥ १३ ॥ हे रुद्रा, हीं नांवें आणि स्थानें ग्रहण कर. कारण, तूं प्रजांचा अधिपति आहेस. याकरितां तूं आतां स्त्रियांसहवर्तमान या नांवांनीं व स्थानांनीं युक्त होऊन पुष्कळ प्रजा उत्पन्न कर ॥ १४ ॥ याप्रमाणें ब्रह्मदेवानें आज्ञा केलेल्या त्या भगवान् नीललोहित रुद्रानें, आपलें बळ, काळा व तांबडा वर्ण आणि तापट व उग्र स्वभाव यांच्या योगानें आपल्यासारख्या पुष्कळ प्रजा उत्पन्न केल्या

अग्रे पूर्वमेव मे मया कृतानि ॥ ११ ॥ १२॥ १३॥ सयोषणः सस्त्रीकः। एभिः स्थानैर्नामभिश्च युक्तः प्रजाः सृज ॥ १४॥ सत्वं बलम्। आकृतिर्नीललोहितता स्वभावस्तीव्रता तेन

हृदिंद्रियाण्यसुर्व्योम वायुरग्निर्जलं मही ॥ सूर्यश्चंद्रस्तपश्चैव स्थानान्यग्रे कृतानि मे ॥ ११ ॥ मन्युर्मनुर्महिनसो महाञ्छिवः ऋतुध्वजः ॥ उग्ररेता भवः कालो वामदेवो धृतव्रतः ॥ १२ ॥ धीर्वृत्तिरुशनोमा च नियुत्सर्पिरिलांबिका ॥ इरावती सुधा दीक्षा रुद्राण्यो रुद्र ते स्त्रियः ॥ १३ ॥ गृहाणैतानि नामानि स्थानानि च सयोषणः ॥ एभिः सृज प्रजा बह्वीः प्रजानामसि यत्पतिः ॥ १४ ॥ इत्यादिष्टः स गुरुणा भगवान्नीललोहितः ॥ सत्वाकृतिस्वभावेन ससर्जात्मसमाः प्रजाः ॥ १५ ॥ रुद्राणां रुद्रसृष्टानां समंताद्ग्रसतां जगत् ॥ निशम्यासंख्यशो यूथान्प्रजापतिरशंकत ॥ १६ ॥ अलं प्रजाभिः सृष्टाभिरीदृशीभिः सुरोत्तम ॥ मया सह दहंतीभिर्दिशश्चक्षुर्भिरुल्बणैः ॥ १७ ॥ तप आतिष्ठ भद्रं ते सर्वभूतसुखावहम् ॥ तपसैव यथापूर्वं स्रष्टा विश्वमिदं भवान् ॥ १८ ॥ तपसैव परं ज्योतिर्भगवंतमधोक्षजम् ॥ सर्वभूतगुहावासमंजसा विंदते पुमान् ॥ १९ ॥ मैत्रेय उवाच ॥ एवमात्मभुवादिष्टः परिक्रम्य गिरां पतिम् ॥ बाढमित्यमुमामंत्र्य विवेश तपसे वनम् ॥२०॥ अथाभिध्यायतः सर्गं दश पुत्राः प्रजज्ञिरे ॥ भगवच्छक्तियुक्तस्य लोकसंतानहेतवः ॥ २१ ॥

॥ १५ ॥ रुद्राणां यूथानि दृष्ट्वाऽशंकत तत्राशंकां प्राप्तः ॥ १६ ॥ १७ ॥ स्रष्टा स्रक्ष्यति ॥ १८ ॥ १९ ॥ २० ॥ २१ ॥

॥ १५ ॥ नंतर, त्या रुद्रानें, रुद्रांचे बरेच समुदाय उत्पन्न केले. ते चोहोंकडून जगाला ग्रासूं लागले असें पाहून, ब्रह्मदेव मनांत शंकित झाला आणि ह्मणाला कीं, ॥ १६ ॥ हे सुरश्रेष्ठा, आपल्या भयंकर नेत्रांनीं माझ्यासहवर्तमान दशदिशा जाळूं इच्छिणाऱ्या अशा प्रजा तूं उत्पन्न केल्यास तेवढ्या पुरेत ॥ १७ ॥ हे रुद्रा, आतां तूं सर्व प्राणिमात्रांना सुखकारक असें तप आचरण कर. तुझें कल्याण होवो. तूं तपाच्याच योगानें पूर्वींप्रमाणें हें जग पुनः उत्पन्न करशील ॥ १८ ॥ कारण हा पुरुष, तपाच्या योगेंकरूनच सर्व प्राणिमात्रांच्या हृदयामध्यें वास करणाऱ्या परमतेजोरूपी अधोक्षज भगवंताला अनायासानें पावतो ॥ १९ ॥ ॥ ३५ ॥
मैत्रय ह्मणाला—हे विदुरा, ब्रह्मदेवानें अशी आज्ञा केली असतां त्या रुद्रानें, ठीक आहे असें ह्मणून, वेदवाणीचा पति अशा त्या ब्रह्मदेवाला प्रदक्षिणा करून व त्याचा निरोप घेऊन त्यानें, तप करण्यासाठीं वनामध्यें प्रवेश केला ॥ २० ॥ इकडे सृष्टिसंबंधी विचार करणाऱ्या व भगवंताच्या शक्तीनें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

युक्त अशा त्या ब्रह्मदेवाला लोकांची संतति वाढण्यास कारणीभूत असे दहा पुत्र उत्पन्न झाले ॥ २१ ॥ ते–मरीचि, अत्रि, अंगिरा, पुलस्त्य, पुलह, क्रतु, भृगु, वसिष्ठ, दक्ष आणि त्यांतील दहावा नारद होय ॥ २२ ॥ त्यांमध्यें ब्रह्मदेवाच्या मांडीपासून नारद झाला, आंगठ्यापासून दक्ष झाला, प्राणापासून वसिष्ठ झाला, त्वचेपासून भृगु झाला, हस्तापासून क्रतु झाला ॥ २३ नाभीपासून पुलह झाला, दोन्हीं कर्णांपासून पुलस्त्य ऋषि झाला, मुखापासून अंगिरा झाला, नेत्रांपासून अत्रि झाला आणि मनापासून मरीचि झाला ॥ २४ ॥ पुनः ब्रह्मदेव सृष्टि उत्पन्न करण्याचा विचार करूं लागला तेव्हां, त्याच्या दक्षिण स्तनापासून धर्म उत्पन्न झाला आणि त्या धर्मापासून स्वतः नारायण उत्पन्न झाला. तसाच ब्रह्मदेवाच्या पृष्ठभागापासून अधर्म उत्पन्न झाला आणि त्यापासून लोकांना भय उत्पन्न करणारा मृत्यु उत्पन्न झाला ॥ २५ ॥ पुढें ब्रह्मदेवाच्या हृदयापासून काम, भृकुटीपासून क्रोध, अधरोष्ठापासून लोभ, मुखापासून वाणी, शिश्नापासून सप्त समुद्र, आणि गुदस्थानापासून पापप्रवर्तक राक्षस हे उत्पन्न झाले ॥ २६ ॥

॥ २२ ॥ २३ ॥ २४ ॥ २५ ॥ अधरदच्छदादधरोष्ठात् ॥ २६ ॥ २७ ॥ देहांतरेण कृतं सर्गं वक्तुं तद्देहत्यागे कारणमाह । वाचमित्यादिना ॥ २८ ॥ २९ ॥

उत्संगान्नारदो जज्ञे दक्षोऽंगुष्ठात्स्वयंभुवः ॥ प्राणाद्वसिष्ठः संजातो भृगुस्त्वचि करात्क्रतुः ॥ २३ ॥ पुलहो नाभितो जज्ञे पुलस्त्यः कर्णयोर्ऋषिः ॥ अंगिरा मुखतोऽक्ष्णोऽत्रिर्मरीचिर्मनसोऽभवत् ॥ २४ ॥ धर्मः स्तनाद्दक्षिणतो यत्र नारायणः स्वयम् ॥ अधर्मः पृष्ठतो यस्मान्मृत्युर्लोकभयंकरः ॥ २५ ॥ हृदि कामो भ्रुवः क्रोधो लोभश्चाधरदच्छदात् ॥ आस्याद्वाक् सिंधवो मेढ्रान्निर्ऋतिः पायोरघाश्रयः ॥ २६ ॥ छायायाः कर्दमो जज्ञे देवहूत्याः पतिः प्रभुः ॥ मनसो देहतश्चेदं जज्ञे विश्वकृतो जगत् ॥ २७ ॥ वाचं दुहितरं तन्वीं स्वयंभूर्हरतीं मनः ॥ अकामां चकमे क्षत्तः सकाम इति नः श्रुतम् ॥ २८ ॥ तमधर्मे कृतमतिं विलोक्य पितरं सुताः ॥ मरीचिमुख्या मुनयो विश्रंभात्प्रत्यबोधयन् ॥ २९ ॥ नैतत्पूर्वैः कृतं त्वद्ये न करिष्यंति चापरे ॥ यत्त्वं दुहितरं गच्छेरनिगृह्यांगजं प्रभुः ॥ ३० ॥ तेजीयसामपि ह्येतन्न सुश्लोक्यं जगद्गुरो ॥ यद्वृत्तमनुतिष्ठन्वै लोकः क्षेमाय कल्पते ॥ ३१ ॥

मरीचिरत्र्यंगिरसौ पुलस्त्यः पुलहः क्रतुः ॥ भृगुर्वसिष्ठो दक्षश्च दशमस्तत्र नारदः ॥ २२ ॥

तत्त्वतो ये पूर्वे ब्रह्मादयोऽन्ये वा तैरेतन्न कृतं अपरे त्वत्तोऽर्वाचीनास्तेऽपि न करिष्यंति । अंगजं कामम् ॥ ३० ॥ तेजीयसामतितेजस्विनामपि सुश्लोक्यं सत्कीर्तिदं न ।

आणि छायेपासून देवहूतीचा पति जो समर्थ कर्दम ऋषि तो उत्पन्न झाला. याप्रमाणें ब्रह्मदेवाच्या मनापासून व देहापासून हें सर्व जग उत्पन्न झालें ॥ २७ ॥ आतां ब्रह्मदेवानें दुसरा देह धारण करून केलेली सृष्टि सांगण्याकरितां त्याला त्या देहाचा त्याग करण्याचें कारण सांगतात–हे विदुरा, ब्रह्मदेवास वाणीनामें एक कन्या होती, ती आपल्या परम सौंदर्यानें पित्याचें मन हरण करण्यासारखी अति कोमलांगी होती. ती सकामचित्त नसतां ब्रह्मदेव, कामबुद्धीनें तिची इच्छा करूं लागला असें आम्ही ऐकिलें आहे ॥ २८ ॥ तेव्हां अधर्माचेठिकाणीं बुद्धि धारण करणाऱ्या त्या आपल्या पित्यास अवलोकन करून त्याचेच पुत्र जे मरीचिआदिक पूर्वीं सांगितलेले ऋषि त्यांनीं त्याला, नम्रपणानें निषेधरूप बोध केला ॥ २९ ॥ तो असा कीं,–हे ताता, जो धर्ममर्यादेचें रक्षण करणारा तूं, आपल्या शरीरापासून उत्पन्न झालेल्या कामास आवरून न धरितां, आपल्या कन्येशीं गमन करण्याची इच्छा करीत आहेस हें काय! तुझ्या पूर्वीं होऊन गेलेल्या ब्रह्मादिकांनीं हें कृत्य केलेलें नाहीं व तुझ्या नंतर होणारेहि दुसरे कोणी करणार नाहींत ॥ ३० ॥ हे जगद्गुरो, हें कृत्य, तुमच्यासारख्या तेजस्वी पुरुषांनाहि कीर्तिकारक होणार नाहीं. कारण, तेजस्वी पुरुषांचें वर्तन

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पाहून तसें आचरण करणारा हा लोक, कल्याणाकारणें योग्य होतो ॥ ३१ ॥ ज्या परमेश्वरानें आपल्या स्वरूपीं असलेलें हें जग, स्वतःच्या तेजानें प्रकट केलें त्या भगवंताला नमस्कार असो. तोच भगवान्, ह्या ब्रह्मदेवाला अधर्मापासून निवृत्त करून धर्माचें रक्षण करण्यास योग्य आहे ॥ ३२ ॥ याप्रमाणें आपल्या समोर भाषण करणाऱ्या आपल्या मरीच्यादि ऋषिरूप पुत्रांस अवलोकन करून तो प्रजापतींचा पति ब्रह्मदेव, कुकर्माकडे आपली प्रवृत्ति झाली ह्मणून लज्जित होऊन त्याचवेळीं त्यानें आपल्या देहाचा त्याग केला. ब्रह्मदेवानें टाकलेल्या त्या निंदास्पद शरीराचा दिशांनीं स्वीकार केला. त्या शरीराला लोकांमध्यें धुकें असें ह्मणतात ॥ ३३ ॥ एकेसमयीं सृष्टिकर्ता ब्रह्मदेव, मी जसे पूर्वीच्या कल्पामध्यें लोक उत्पन्न केले होते तसे संगतवार लोक आतां मला कसे करितां येतील असा विचार करीत असतां, त्याच्या च्यारहि मुखांतून वेद उत्पन्न झाले ॥ ३४ ॥

भवति । येषां तेजीयसां वृत्तम् ॥ ३१ ॥ ३२ ॥ तन्वं तनुम् ॥ ३३ ॥ कथं स्रक्ष्यामीत्यभिध्यायतः स्रष्टुर्ब्रह्मणश्चतुःसंख्यायुक्तान्मुखात् समवेतान्सुसंगतान् । यथा पुरा प्राक्कल्पे ॥ ३४ ॥ चातुर्होत्रं होत्रादीनां चतुर्णां कर्म कर्मतंत्रं यज्ञविस्तारः उपवेदैर्न्यायैश्च सह आश्रमास्तद्वृत्तयश्चासन् ॥ ३५ ॥ मुखतो मुखेभ्यः ॥ ३६ ॥ चातुर्होत्रसृष्टिक्रम-

तस्मै नमो भगवते य इदं स्वेन रोचिषा ॥ आत्मस्थं व्यंजयामास स धर्मं पातुमर्हति ॥ ३२ ॥ स इत्थं गृणतः पुत्रान् पुरो दृष्ट्वा प्रजापतीन् ॥ प्रजापतिपतिस्तन्वं तत्याज व्रीडितस्तदा ॥ तां दिशो जगृहुर्घोरां नीहारं यद्विदुस्तमः ॥ ३३ ॥ कदाचिद्ध्यायतः स्रष्टुर्वेदा आसंश्चतुर्मुखात् ॥ कथं स्रक्ष्याम्यहं लोकान्समवेतान्यथा पुरा ॥ ३४ ॥ चातुर्होत्रं कर्मतंत्रमुपवेदनयैः सह ॥ धर्मस्य पादाश्चत्वारस्तथैवाश्रमवृत्तयः ॥ ३५ ॥ विदुर उवाच ॥ स वै विश्वसृजामीशो वेदादीन्मुखतोऽसृजत् ॥ यद्यद्येनासृजद्देवस्तन्मे ब्रूहि तपोधन ॥ ३६ ॥ ॥ मैत्रेय उवाच ॥ ऋग्यजुःसामाथर्वाख्यान्वेदान्पूर्वादिभिर्मुखैः ॥ शस्त्रमिज्यां स्तुतिस्तोमं प्रायश्चित्तं व्यधात्क्रमात् ॥ ३७ ॥ आयुर्वेदं धनुर्वेदं गांधर्वं वेदमात्मनः ॥ स्थापत्यं चासृजद्वेदं क्रमात्पूर्वादिभिर्मुखैः ॥ ३८ ॥ इतिहासपुराणानि पंचमं वेदमीश्वरः ॥ सर्वेभ्य एव वक्त्रेभ्यः ससृजे सर्वदर्शनः ॥ ३९ ॥

माह । शस्त्रमप्रगीतमंत्रस्तोत्रं होतुः कर्म इज्यामध्वर्योः कर्म स्तुतिः स्तोमं स्तुतिः संगीतं स्तोमं तदर्थमृक्समुदायं त्रिवृत्स्तोमो भवतीत्यादिविहितमुद्गातृप्रयोज्यम् । प्रायश्चित्तं ब्राह्मम् ॥ ३७ ॥ उपवेदक्रममाह । आयुर्वेदमिति । आत्मनो मुखैः स्थापत्यं विश्वकर्मशास्त्रम् ॥ ३८ ॥ ३९ ॥

तसेच उपवेद व न्याय यांच्यासहवर्तमान, होता, अध्वर्यु, उद्गाता व ब्रह्मा या चार ऋत्विजांचीं कर्में, यज्ञयागादि अनुष्ठानें, धर्माचे चार पाद, व ब्रह्मचर्यादिक आश्रम व त्यांचा वर्तनक्रम हे सर्व त्याच्याच मुखांपासून उत्पन्न झाले ॥ ३५ ॥ विदुर ह्मणाला—हे तपोधना मैत्रेय ऋषे, विश्वस्रष्टयांचा अधिपति अशा त्या ब्रह्मदेवानें आपल्या मुखांपासून वेदादिक उत्पन्न केले परंतु त्यानें आपल्या ज्या ज्या मुखापासून जें जें उत्पन्न केलें असेल तें मला सांग ॥ ३६ ॥ मैत्रेय ह्मणाला—हे विदुरा, त्या ब्रह्मदेवानें, आपल्या पूर्वादिक चार मुखांपासून ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद हे अनुक्रमानें उत्पन्न केले आणि त्याच क्रमानें, शस्त्र (होत्याचें कर्म) इज्या (अध्वर्यूचें कर्म) स्तुतिस्तोम (उद्गात्याचें कर्म) आणि प्रायश्चित्त (ब्रह्म्याचें कर्म) हीं चार उत्पन्न केलीं ॥ ३७ ॥ तसेच—आयुर्वेद (वैद्यशास्त्र), धनुर्वेद (शस्त्रविद्या), गांधर्ववेद (गायनविद्या) व स्थापत्यवेद (कलाकौशल्यज्ञान) हे चार उपवेद त्यानें आपल्या पूर्वादि मुखांपासून अनुक्रमानें उत्पन्न केले ॥ ३८ ॥ तशींच त्या सर्वदर्शी ब्रह्मदेवानें ॥ ३६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आपल्या सर्वांही मुखांपासून पंचमवेदरूपी इतिहास पुराणें उत्पन्न केलीं ॥ ३९ ॥ त्यानें आपल्या पूर्वमुखापासून षोडशी आणि उक्थ हे दोन याग उत्पन्न केले. दक्षिण मुखापासून चयन व अग्निष्टोम, पश्चिममुखापासून आप्तोर्याम व अतिरात्र, आणि उत्तरमुखापासून गोसव आणि वाजपेय असे दोन दोन याग उत्पन्न केले ॥ ४० ॥ तसेच–शौच दया तप आणि सत्य हे धर्माचे चार चरण आणि वृत्तींसहवर्तमान ब्रह्मचर्यादिक चार आश्रम हे त्यानें आपल्या पूर्वादिक चार मुखांपासून अनुक्रमानें उत्पन्न केले ॥ ४१ ॥ आतां ब्रह्मचर्यादिक आश्रमांचेठिकाणीं पुढचापुढचा श्रेष्ठ असे प्रत्येकाचे चार चार प्रकार सांगतात–त्यांमध्यें ब्रह्मचारी आश्रमामध्यें सावित्र (उपनयन झाल्यापासून गायत्रीच्या अध्ययनासाठीं तीन दिवसपर्यंत धारण करावयाचें) प्रजापत्य (एक वर्षपर्यंत धारण करावयाचें), ब्राह्म (वेदाध्ययन संपेपर्यंत धारण करावयाचें) आणि बृहत् (मरणकालापर्यंत धारण करावयाचें), असें चारप्रकारचें ब्रह्मचर्य व्रत आहे. गृहस्थाश्रमामध्यें वार्ता (अनिषिद्ध कृषिकर्मादिक वृत्तीनें उपजीवन करणें), संचय (यजमानाकडून यज्ञादि कर्मे करवून जें

कर्मतंत्रक्रममाह । षोडश्युक्थाविति । पुरीषी चयनम् । अग्निष्टुदग्निष्टोमः ॥ ४० ॥ विद्येति शौचम् । क्षेत्रज्ञस्येश्वरज्ञानाद्विशुद्धिः परमा मता इति स्मृतेः । दानमिति दया । भूताभयप्रदानस्य कलां नार्हंति षोडशीं इति वचनात् । एवंच तपः शौचं दया सत्यमिति पादाः कृते कृताः इति प्रथमस्कंधोक्तेरविरोधः ॥ ४१ ॥ ब्रह्मचर्याद्याश्रमेष्वेकैकस्य चातुर्विध्यमाह । सावित्रं ब्रह्मचर्यमुपनयनादारभ्य गायत्रीमधीयानस्य त्रिरात्रं प्राजापत्यं व्रतान्याचरतः संवत्सरं ब्राह्मं वेदग्रहणांतं बृहन्नैष्ठिकं वार्ता अनिषिद्धकृष्यादिवृत्तिः संचयो याजनादिवृत्तिः शालीनं अयाचितवृत्तिः शिलोंछः पतितकणिशकणवृत्तिः एकवचनमार्षम् । इत्येता गृहे वृत्तयः इति । यद्वा शिलोंछ इति

षोडश्युक्थौ पूर्ववक्त्रात्पुरीष्यग्निष्टुतावथ ॥ आप्तोर्यामातिरात्रौ च वाजपेयं सगोसवम् ॥ ४० ॥ विद्या दानं तपः सत्यं धर्मस्येति पदानि च ॥ आश्रमांश्च यथासंख्यमसृजत्सह वृत्तिभिः ॥ ४१ ॥ सावित्रं प्राजापत्यं च ब्राह्मं चाथ बृहत्तथा ॥ वार्तासंचयशालीन-शिलोंछ इति वै गृहे ॥ ४२ ॥ वैखानसा वालखिल्यौदुंबराः फेनपा वने ॥ न्यासे कुटीचकः पूर्वं बह्वोदो हंसनिष्क्रियौ ॥ ४३ ॥ आन्वीक्षिकी त्रयी वार्ता दंडनीतिस्तथैव च ॥ एवं व्याहृतयश्चासन्प्रणवो ह्यस्य दह्रतः ॥ ४४ ॥

द्वंद्वैक्ये सप्तमी एवं वृत्तिभेदे सति गृहे स्थिता भवंतीत्यर्थः ॥ ४२ ॥ वने स्थिताश्चत्वारः तत्र वैखानसा अकृष्टपच्यवृत्तयः वालखिल्या नवेऽन्ने लब्धे पूर्वसंचितान्नत्यागिनः । औदुंबराः प्रातरुत्थाय यां दिशं प्रथमं पश्यंति तत आहृतैः फलादिभिर्जीवंतः फेनपाः स्वयं पतितैः फलादिभिर्जीवंतः कुटीचकः स्वाश्रमकर्मप्रधानः बह्वोदः कर्मोपसर्जनीकृत्य ज्ञानप्रधानः हंसो ज्ञानाभ्यासनिष्ठः निष्क्रियः प्राप्ततत्त्वः एते च सर्वे यथोत्तरं श्रेष्ठाः ॥ ४३ ॥ न्यायादीनां पूर्वादिक्रमेणोत्पत्तिमाह । आन्वीक्षिकीति आन्वीक्षिक्याद्या मोक्षधर्मकामार्थविद्याः भूर्भुवःस्वरिति व्यस्तास्तिस्रः समस्ता चतुर्थी । यथाहाश्वलायनः । एवं व्याहृतयः प्रोक्ता व्यस्ताः समस्ताः इति । यद्वा मह इति चतुर्थी । तथाच

द्रव्य मिळेल त्यावर जीवन करणें), शालीन (न मागतां मिळेल त्यावर निर्वाह करणें), आणि शिलोंछ (शेतांत पडलेले धान्याचे कण आणून त्यांवर उपजीवन करणें) असे चार वृत्तिभेद आहेत ॥ ४२ ॥ वानप्रस्थ आश्रमामध्यें वैखानस (खणल्यानांगरल्यावांचून उत्पन्न झालेल्या पदार्थांवर निर्वाह करणें), वालखिल्य (नवें अन्न मिळालें कीं, पूर्वींचें संग्रहीं असलेलें टाकून देणें), औदुंबर (सकाळीं उठल्याबरोबर ज्या दिशेला दृष्टि जाईल तिकडून फळेंवगैरे आणून निर्वाह करणें) आणि फेनप (आपोआप गळलेलीं फळेंवगैरे खाणें) असे चार प्रकार आहेत. आणि संन्यास आश्रमामध्यें, कुटीचक (आपल्या आश्रमाला सांगितलेलीं कर्में मुख्यत्वें आचरण करणारा), बह्वोद (जीं कर्में केलीं नसतां प्रत्यवाय लागतो तेवढींमात्र करून ज्ञानाभ्यास करणारा), हंस (कर्म मुळींच न करितां केवळ ज्ञानाभ्यास करणारा) आणि निष्क्रिय (ज्याला ज्ञान झालें तो) असे चार प्रकार आहेत. हे सर्व प्रकार उत्तरोत्तर श्रेष्ठ होत ॥ ४३ ॥ आन्वीक्षिकी (मोक्षप्राप्ति करून देणारी आत्मविद्या), त्रयी (स्वर्गादि फल देणारी कर्मविद्या), वार्ता

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

(निर्वाहाचें साधन शेतकी व्यापार वगैरे), आणि दंडनीति (द्रव्याची प्राप्ति करून देणारी राजनीति) ह्या चार वार्ता व भूः, भुवः, स्वः आणि भूर्भुवःस्वः ह्या चार व्याहृति, ब्रह्मदेवाच्या पूर्वादि मुखांपासून अनुक्रमें उत्पन्न झाल्या आणि प्रणव त्याच्या हृदयाकाशापासून झाला ॥ ४४ ॥ त्या समर्थ ब्रह्मदेवाच्या लोमांपासून उष्णिक् छंद, त्वचेपासून गायत्री, मांसापासून त्रिष्टुप्, स्नायूंपासून अनुष्टुप्, अस्थींपासून जगती हे छंद उत्पन्न झाले ॥ ४५ ॥ मज्जेपासून पंक्तिछंद उत्पन्न झाला, प्राणापासून बृहतीछंद उत्पन्न झाला. त्याच्या जीवापासून– क–पासून म–पर्यंत २५ वर्ण उत्पन्न झाले. त्याच्या देहापासून स्वर उत्पन्न झाले ॥ ४६ ॥ त्याच्या इंद्रियांपासून श, ष, स, ह, हे चार वर्ण उत्पन्न झाले असें ह्मणतात, त्याच्या बलापासून य, र, ल, व, हे चार वर्ण उत्पन्न झाले. आणि क्रीडेपासून, निषाद, ऋषभ, गांधार, षड्ज, मध्यम

श्रुतिः । भूर्भुवः सुवरिति वा एतास्तिस्रो व्याहृतयस्तासामुह स्मैतां चतुर्थीमाह । वाचमस्य प्रवेदयते मह इति इति । दहृतः हृदयाकाशात् ॥ ४४ ॥ स्नुतः स्नायुतः । अनुष्टुप् स्नावानि इति श्रुतेः ॥ ४५ ॥ महाकल्पे ब्रह्मा शब्दरूपोऽभवदित्युक्तं तदेव दर्शयन् वर्णानामुत्पत्तिमाह । स्पर्श इति सार्धेन । स्पर्शः कादिवर्गपंचकं स्वरोऽकारादिः ॥ ४६ ॥ ऊष्माणं शषसहचतुष्कम् । अंतस्था यरलवाः । सप्त स्वराः षड्जादयः । विहारेण क्रीडया ॥ ४७ ॥ अतएव शब्दतनु-

तस्योष्णिगासील्लोमभ्यो गायत्री च त्वचो विभोः ॥ त्रिष्टुम्मांसात्स्नुतोऽनुष्टुब्जगत्यस्थ्नः प्रजापतेः ॥ ४५ ॥ मज्जायाः पंक्तिरुत्पन्ना बृहती प्राणतोऽभवत् ॥ स्पर्शस्तस्याभवज्जीवः स्वरो देह उदाहृतः ॥ ४६ ॥ ऊष्माणमिंद्रियाण्याहुरंतस्था बलमात्मनः ॥ स्वराः सप्त विहारेण भवंति स्म प्रजापतेः ॥ ४७ ॥ शब्दब्रह्मात्मनस्तात व्यक्ताव्यक्तात्मनः परः ॥ ब्रह्मावभाति विततो नानाशक्त्युपबृंहितः ॥ ४८ ॥ ततोऽपरामुपादाय स सर्गाय मनो दधे ॥ ऋषीणां भूरिवीर्याणामपि सर्गमविस्तृतम् ॥ ४९ ॥ ज्ञात्वा तद्धृदये भूयश्चिंतयामास कौरव ॥ अहो अद्भुतमेतन्मे व्यापृतस्यापि नित्यदा ॥ ५० ॥ न ह्येधंते प्रजा नूनं दैवमत्र विघातकम् ॥ एवं युक्तकृतस्तस्य दैवं चावेक्षतस्तदा ॥ ५१ ॥ कस्य रूपमभूद्द्वेधा यत्कायमभिचक्षते ॥ ताभ्यां रूपविभागाभ्यां मिथुनं समपद्यत ॥ ५२ ॥

त्वाद्ब्रह्मणः परमेश्वरो नित्यं प्रकाशत इत्याह । व्यक्ता वैखरी अव्यक्तः प्रणवः तदात्मनस्तस्य ब्रह्मणः परः परमेश्वरः अवभाति । कीदृशः । ब्रह्म परिपूर्णः तत्राव्यक्तात्मनो ब्रह्मरूपो विततोऽवभाति व्यक्तात्मनो नानाशक्त्युपबृंहित इंद्रादिरूपोऽवभाति ॥ ४८ ॥ या पूर्वं विसृष्टा सती नीहारं तमोऽभवत् ततोऽपरामनिषिद्धकामासक्तां तनुम् । शब्दब्रह्मतनुस्तु सदाऽस्त्येव । तन्वंतरग्रहणे कारणमाह । ऋषीणामित्यादिना ॥ ४९ ॥ ५० ॥ युक्तकृतः यथोचितं कुर्वतः ॥ ५१ ॥ अतएव कस्य ब्रह्मण इदं द्विधा-

---

धैवत आणि पंचम हे सात स्वर उत्पन्न झाले ॥ ४७ ॥ ~~हे विदुरा, व्यक्त आणि अव्यक्त अशीं ज्याचीं दोन स्वरूपें आहेत त्या शब्दब्रह्मरूपी ब्रह्मदेवाला, ऐश्वर्यादिक अनेक शक्तींनीं युक्त असलेला परमेश्वर, सगुण व निर्गुण स्वरूपांनीं निरंतर प्रत्यक्ष भासतो~~ ॥ ४८ ॥ हे कुरुकुलोत्पन्ना विदुरा, नंतर त्या ब्रह्मदेवानें दुसऱ्या तनूचा स्वीकार करून सृष्टि करण्याचा विचार मनांत आणिला. ~~ह्मणजे सृष्टि करण्याविषयीं समर्थ अशाहि मरीच्यादिक ऋषींचा सर्ग विस्तृत झाला नाहीं असें जाणून~~ तो ब्रह्मदेव सृष्टीची वृद्धि होण्याविषयीं पुनः हृदयामध्यें चिंतन करूं लागला कीं, ॥ ४९ ॥ अहो काय सांगावें! मी सर्वदा प्रजावृद्धीच्या कामांत गढून गेलों असतांहि प्रजा वृद्धिंगत होत नाहींत हें आश्चर्य आहे! ह्यामध्यें दैवच बिघाड करीत आहे ॥ ५० ॥ अशा प्रकारें ब्रह्मदेव, यथायोग्य काम करीत असतां व ~~दैवावर विश्वास ठेवीत असतां~~, त्या ब्रह्मदेवाच्या शरीराचे त्यावेळीं एकाएकीं दोन विभाग झाले. ~~त्याला अद्यापि लोक, ब्रह्मदेवाचें शरीर दुभागलें ह्या आश्चर्यामुळें 'हें काय' असें ह्मणतात~~ ॥ ५१ ॥ त्या स्वरूपाच्या दोन ॥ ३७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भागांपासून एक मिथुन (जोडपें) उत्पन्न झालें ॥ ५२ ॥ त्यामध्यें जो पुरुष होता तो स्वायंभुवनामक सार्वभौम मनु झाला आणि जी स्त्री होती ती त्या महात्म्या
मनूची शतरूपानामक पट्टराणी झाली ॥ ५३ ॥ तेव्हांपासून मैथुनधर्माच्या योगानें प्रजा वृद्धिंगत होत चालल्या. हे साधुश्रेष्ठ विदुरा, त्या स्वायंभुव मनूला शतरूपेच्या-
ठिकाणीं, प्रियव्रत आणि उत्तानपाद हे दोन पुत्र आणि आकूति, देवहूति व प्रसूति ह्या तीन कन्या मिळून पांच मुलें झालीं ॥ ५४ ॥ ५५ ॥ नंतर त्यानें आपली आकूति-
नामक पहिली मुलगी, रुचिनामक ऋषीला दिली. मधली देवहूति कर्दमऋषीला दिली व तिसरी प्रसूति दक्षाला दिली. ह्या तीन मुलींच्या संततीनें हें जग भरून गेलें आहे
॥ ५६ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील तृतीयस्कंधामध्यें हा बारावा अध्याय समाप्त झाला ॥ १२ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ ७ ॥ त्या स्वायंभुव
मनूला सृष्टि करण्याची इच्छा झाली असतां, अकस्मात् प्रलयोदकामध्यें बुडालेल्या पृथिवीचा उद्धार करण्याविषयीं श्रीविष्णूनें वराहावतार घेऊन हिरण्याक्ष दैत्याचा वध

भूतमित्याश्चर्यात्कायमप्याप्यभिचक्षते ॥ ५२ ॥ या स्त्री साऽस्य महिष्यासीत् ॥ ५३ ॥ एधांबभूविरे वृद्धिं प्राप्ताः । तदेवाह । स चापीति ॥ ५४ ॥ ५५ ॥ यतः यासां संततिभिः
॥ ५६ ॥ इति तृतीये टीकायां द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥ ॥ त्रयोदशे सिसृक्षायां मनोराकस्मिकाद्भुताम् ॥ धरामुद्धर्तुमुद्भूतात्क्रोडाद्दैत्यानुसूदनम् ॥१॥१॥ स्वयंभुवः पुत्रस्तद्दे-

यस्तु तत्र पुमान्सोऽभून्मनुः स्वायंभुवः स्वराट् ॥ स्त्री याऽऽसीच्छतरूपाख्या महिष्यस्य महात्मनः ॥ ५३ ॥ तदा मिथुनधर्मेण प्रजा
ह्येधांबभूविरे ॥ स चापि शतरूपायां पंचापत्यान्यजीजनत् ॥ ५४ ॥ प्रियव्रतोत्तानपादौ तिस्रः कन्याश्च भारत ॥ आकूतिर्देवहूति-
श्च प्रसूतिरिति सत्तम ॥ ५५ ॥ आकूतिं रुचये प्रादात्कर्दमाय तु मध्यमाम् ॥ दक्षायादात्प्रसूतिं च यत आपूरितं जगत् ॥ ५६ ॥
॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे तृतीयस्कंधे द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ निशम्य वाचं वदतो मुनेः पुण्यतमां
नृप ॥ भूयः प्रपच्छ कौरव्यो वासुदेवकथादृतः ॥ १ ॥ विदुर उवाच ॥ स वै स्वायंभुवः सम्राट् प्रियः पुत्रः स्वयंभुवः ॥ प्रति-
लभ्य प्रियां पत्नीं किं चकार ततो मुने ॥ २ ॥ चरितं तस्य राजर्षेरादिराजस्य सत्तम ॥ ब्रूहि मे श्रद्दधानाय विष्वक्सेनाश्रयो
ह्यसौ ॥ ३ ॥ श्रुतस्य पुंसां सुचिरश्रमस्य नन्वंजसा सूरिभिरीडितोऽर्थः ॥ तत्तद्गुणानुश्रवणं मुकुंदपादारविंदं हृदयेषु येषाम् ॥ ४ ॥
॥ श्रीशुक उवाच ॥ इति ब्रुवाणं विदुरं विनीतं सहस्रशीर्ष्णश्चरणोपधानम् ॥ प्रहृष्टरोमा भगवत्कथायां प्रणीयमानो मुनिरभ्यचष्ट ॥ ५ ॥

हांशत्वात् सः ॥ २ ॥ विष्वक्सेनो हरिरेवाश्रयो यस्य सः ॥ ३ ॥ अतस्तस्य चरितं श्रोतव्यमित्याह । सुचिरं श्रमो यस्मिंस्तस्य पुंसां श्रुतस्यांजसा मुख्यत्वेनायमेवार्थ ईडितः
स्तुतः। ननु मुकुंदपादारविंदं येषां हृदयेष्वस्ति तेषां भागवतानां गुणानुश्रवणम् ॥ ४ ॥ सहस्रशीर्षा श्रीकृष्णस्तस्य चरणावुपधीयेते यस्मिन् । श्रीकृष्णः प्रीत्या यस्योत्संगे

केला ही कथा या तेराव्या अध्यायांत वर्णिली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला- हे राजन्, याप्रमाणें भाषण करणाऱ्या मैत्रेय ऋषीची पुण्यकारक वाणी श्रवण
करून, वासुदेवाच्या कथेच्याठिकाणीं आदरयुक्त अशा त्या विदुरानें पुनः प्रश्न केला ॥ १ ॥ विदुर ह्मणाला- हे मैत्रय ऋषे, ब्रह्मदेवाचा प्रिय पुत्र जो सार्वभौम
स्वायंभुव मनु त्यानें, प्रियपत्नी प्राप्त झाल्यानंतर काय केलें ? ॥ २ ॥ हे साधुश्रेष्ठा, त्या आदिराज राजर्षीचें चरित्र श्रद्धेनें श्रवण करणाऱ्या मला सांगावें. कारण, तो
हरीच्याच आश्रयानें वर्तत होता ॥ ३ ॥ ज्या भगवद्भक्तांच्या अंतःकरणामध्यें मोक्ष देणाऱ्या ईश्वराचें चरणकमल नेहमीं प्रकट असतें त्या भक्तांचे गुणानुवाद ऐकणें हेंच
पुरुषांनीं फार दिवस श्रम करून संपादन केलेल्या शास्त्राध्ययनाचें मुख्य फळ होय, असें विद्वज्जनांनीं वर्णन केलें आहे ॥ ४ ॥ शुकाचार्य ह्मणाला- हे राजन्, ज्याच्या
मांडीवर प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्ण आपले पाय पसरून बसत असे, त्या अतिनम्र विदुरानें याप्रमाणें प्रश्न करून भगवत्कथेच्याठिकाणीं प्रवृत्ति केलेला मैत्रेय ऋषि, अतिहर्षानें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रोमांचित तनु होऊन भाषण करूं लागला ॥ ५ ॥ मैत्रेय ह्मणाला–हे विदुरा, जेव्हां आपल्या भार्येसहवर्तमान स्वायंभुव मनु उत्पन्न झाला तेव्हां त्यानें हात जोडून व नम्र होऊन ब्रह्मदेवाजवळ भाषण केलें कीं, ॥ ६ ॥ हे भगवन्, तूंच एक, ह्या सर्व प्राणिमात्रांचा उत्पन्न करणारा व पोषण करणारा पिता आहेस तथापि आह्मां प्रजांकडून तुझी शुश्रूषा, कोणतें काम केलें असतां होईल ? ॥ ७ ॥ आणि आमच्याकडून होण्यासारख्या कर्मांमध्यें जें केलें असतां आमची या लोकीं सर्वत्र कीर्ति होऊन परलोकींहि आह्मांस उत्तम गति प्राप्त होईल, तें करण्याविषयीं मला आज्ञा कर. हे स्तुतियोग्या, तुला नमस्कार असो ॥ ८ ॥ ब्रह्मदेव ह्मणाला–बा मनो, 'मला आज्ञा कर' असा निष्कपट अंतःकरणानें ज्याअर्थीं तूं आपणा स्वतांला माझ्या स्वाधीन केलें आहेस त्याअर्थीं तुला मी प्रसन्न झालों आहें. हे भूपते, तुह्मां उभयतांचें कल्याण असो ॥ ९ ॥

चरणौ प्रसारयतीत्यर्थः । तमभ्यचष्ट अभ्यभाषत । मुनिर्मैत्रेयः प्रणीयमानस्तेन प्रवर्त्यमानः ॥ ५ ॥ वेदगर्भं ब्रह्माणम् ॥ ६ ॥ त्वमेवैकः पिता सर्वेषां यतो जन्मकृत् वृत्तिदः पोषकश्च त्वमेव अतस्तव यद्यप्यन्यापेक्षा नास्त्यथाप्यस्माकं ते शुश्रूषा केन कर्मणा भवेत्तद्विधेहीत्युत्तरेणान्वयः ॥ ७ ॥ हे ईड्य आत्मशक्तिष्वस्मच्छक्तिष्वस्मच्छक्येषु कर्मसु मध्ये केन कर्मणा भवेत्तद्विधेहीदं कर्तव्यमिति कथय । यत्कृत्वा यस्मिन् कृते सति । विष्वक् सर्वतः । अमुत्र परलोके ॥ ८ ॥ वां युवाभ्यां स्वस्ति भद्रं स्ताद्भूयात् । यद्यतो

॥ मैत्रेय उवाच ॥ यदा स्वभार्यया साकं जातः स्वायंभुवो मनुः ॥ प्रांजलिः प्रणतश्चेदं वेदगर्भमभाषत ॥ ६ ॥ त्वमेकः सर्वभूतानां जन्मकृद्वृत्तिदः पिता ॥ अथापि नः प्रजानां ते शुश्रूषा केन वा भवेत् ॥ ७ ॥ तद्विधेहि नमस्तुभ्यं कर्मस्वीड्यात्मशक्तिषु ॥ यत्कृत्वेह यशो विष्वगमुत्र च भवेद्गतिः ॥ ८ ॥ ब्रह्मोवाच ॥ प्रीतस्तुभ्यमहं तात स्वस्ति स्ताद्वां क्षितीश्वर ॥ यन्निर्व्यलीकेन हृदा शाधि मेत्यात्मनाऽर्पितम् ॥ ९ ॥ एतावत्याऽऽत्मजैर्वीर कार्या ह्यपचितिर्गुरौ ॥ शक्त्याऽप्रमत्तैर्गृह्येत सादरं गतमत्सरैः ॥ १० ॥ स त्वमस्यामपत्यानि सदृशान्यात्मनो गुणैः ॥ उत्पाद्य शास धर्मेण गां यज्ञैः पुरुषं यज ॥ ११ ॥ परं शुश्रूषणं मह्यं स्यात्प्रजारक्षया नृप ॥ भगवांस्ते प्रजाभर्तुर्हृषीकेशोऽनु तुष्यति ॥ १२ ॥ येषां न तुष्टो भगवान्यज्ञलिंगो जनार्दनः ॥ तेषां श्रमो ह्यपार्थाय यदात्मा नादृतः स्वयम् ॥ १३ ॥ मनुरुवाच ॥ आदेशेऽहं भगवतो वर्तेयामीवसूदन ॥ स्थानं त्विहानुजानीहि प्रजानां मम च प्रभो ॥ १४ ॥

मा मां शाध्यनुशिक्षयेति आत्मना स्वयमेवार्पितं निवेदितमतः प्रीतोऽस्मि ॥ ९ ॥ अपचितिः पूजा गृह्येत आज्ञेति शेषः । सनकादयो न कुर्वंति वयं किमिति करिष्याम इत्येवंभूतो गतो मत्सरो येभ्यः ॥ १० ॥ गां शास शाधि पालयेत्यर्थः । पुरुषं हरिम् ॥ ११ ॥ प्रजापालकस्य ते तुष्टो भविष्यति ॥ १२ ॥ यज्ञलिंगो यज्ञमूर्तिः । अपगतोऽर्थो यस्मात् केवलं श्रमायैवेत्यर्थः । यद्यस्मादात्मैव स्वयं नादृतः तस्मिन्नतुष्टे स्वार्थस्यैवासिद्धेः सर्वात्मत्वाच्च तस्य ॥ १३ ॥ वर्तेय वर्तिष्ये । अमीवसूदन पापनाशन । अनुजा-

---

हे वीरा, पुत्रांनीं नम्रतायुक्त व मत्सररहित होऊन आपल्या शक्तीप्रमाणें पित्याची आज्ञा आदरेंकरून स्वीकारावी इतकीच त्यांनीं पित्याची पूजा करावयाची आहे ॥ १० ॥ यास्तव आतां तूं, आपल्या स्वतःच्या गुणांला योग्य अशीं अपत्यें या शतरूपेच्याठिकाणीं उत्पन्न करून पृथिवीचें धर्मानें पालन कर आणि यज्ञांच्या योगेंकरून यज्ञपुरुषाचें आराधन कर ॥ ११ ॥ हे राजन्, प्रजांच्या रक्षणाच्या योगानें माझी अत्युत्तम सेवा होईल आणि प्रजांचें पालन करणाऱ्या तुझ्यावर हृषीकेश भगवान्हि संतुष्ट होईल ॥ १२ ॥ यज्ञरूपी जनार्दन भगवान्, ज्यांच्यावर संतुष्ट झाला नाहीं त्यांचा सर्वप्रकारचा श्रम व्यर्थ आहे. कारण, त्यांनीं आपल्या आत्म्याचाच अनादर केला आहे ॥ १३ ॥ मनु ह्मणाला–हे पापनाशका प्रभो, आपल्या भगवंताच्या आज्ञेप्रमाणें मी वर्तन करीन, परंतु येथें सर्वप्रजांना आणि मला राहावयास स्थान आपण दाखवून द्यावें ॥ १४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हे देवा, सर्व प्राण्यांचें निवासस्थान अशी जी पृथ्वी ती, अगाधजलामध्यें निमग्न होऊन गेली आहे. त्या भूदेवीच्या उद्धाराविषयीं प्रयत्न करावा ॥ १५ ॥ मैत्रेय
ह्मणाला– हे विदुरा, मनूनें सांगितल्याप्रमाणें जलामध्यें निमग्न झालेली पृथ्वी अवलोकन करून ब्रह्मदेवानें 'आतां मी हिला वर कशी काढूं' अशाविषयीं बुद्धीनें पुष्कळ-
वेळ विचार केला. तो असा कीं–॥ १६ ॥ मी सृष्टि उत्पन्न करीत असतां अकालींच उत्पन्न झालेल्या उदकांनीं पृथ्वी बुडून रसातलांत गेली! आतां येथें ईश्वरानें सृष्टी-
विषयीं योजलेल्या आह्मीतरी काय करावें!! आतां ज्या ईश्वराच्या हृदयापासून मी उत्पन्न झालों त्यानेंच ह्या गोष्टीबद्दल योग्य उपायाची योजना करावी ॥ १७ ॥
हे विदुरा, अशा रीतीनें ब्रह्मदेव विचार करीत असतां, एकाएकीं त्याच्या नाकपुडींतून एक आंगठ्याएवढें वराहाचें (डुकराचें) पिलूं बाहेर पडलें! ॥ १८ ॥ ~~हे भरत-~~

नीह्यत्र स्थातव्यमित्यनुज्ञां देहि ॥ १४ ॥ महीति चेदत आह । यदोकः स्थानं सा मही । हे देव । अस्या देव्याः ॥ १५ ॥ पूर्वं पाने कृतेऽपि पुनरकांड एवोद्भूतानामपां
मध्ये सन्नामवसन्नां निमग्नाम् । समुन्नेष्ये उद्धरिष्यामि ॥ १६ ॥ चिंतामेवाह । सृजतः सतः । वार्भिरद्भिः । रसां रसातलम् । ईश्वरेण सर्गे नियुक्तैः । मेऽनुष्ठेयं स एव विद-

यदोकः सर्वसत्त्वानां मही मग्ना महांभसि ॥ अस्या उद्धरणे यत्नो देव देव्या विधीयताम् ॥ १५ ॥ मैत्रेय उवाच ॥ परमेष्ठी त्वपां
मध्ये तथा सन्नामवेक्ष्य गाम् ॥ कथमेनां समुन्नेष्य इति दध्यौ धिया चिरम् ॥ १६ ॥ सृजतो मे क्षितिर्वार्भिः प्लाव्यमाना रसां गता ॥
अथात्र किमनुष्ठेयमस्माभिः सर्गयोजितैः ॥ १७ ॥ यस्याहं हृदयादासं स ईशो विदधातु मे ॥ इत्यभिध्यायतो नासाविवरात्सहसा-
ऽनघ ॥ वराहतोको निरगादंगुष्ठपरिमाणकः ॥ १८ ॥ तस्याभिपश्यतः खस्थः क्षणेन किल भारत ॥ गजमात्रः प्रववृधे तदद्भुतमभू-
न्महत् ॥ १९ ॥ मरीचिप्रमुखैर्विप्रैः कुमारैर्मनुना सह ॥ दृष्ट्वा तत्सौकरं रूपं तर्कयामास चित्रधा ॥ २० ॥ किमेतत्सौकरव्याजं
सत्त्वं दिव्यमवस्थितम् ॥ अहो बताश्चर्यमिदं नासाया मे विनिःसृतम् ॥ २१ ॥ दृष्टोऽङ्गुष्ठशिरोमात्रः क्षणाद्गंडशिलासमः ॥ अपि-
स्विद्भगवानेष यज्ञो मे खेदयन्मनः ॥ २२ ॥ इति मीमांसतस्तस्य ब्रह्मणः सह सूनुभिः ॥ भगवान्यज्ञपुरुषो जगर्जागेंद्रसन्निभः
॥ २३ ॥ ब्रह्माणं हर्षयामास हरिस्तांश्च द्विजोत्तमान् ॥ स्वगर्जितेन ककुभः प्रतिस्वनयता विभुः ॥ २४ ॥

धातु संपादयतु ॥ १७ ॥ वराहतोकः सूक्ष्मो वराहः ॥ १८ ॥ खस्थ आकाशे स्थितः सन् ॥ १९ ॥ चित्रधा अनेकधा ॥ २० ॥ २१ ॥ पूर्वमंगुष्ठाग्रप्रमाणो दृष्टः । गंडशिला
स्थूलपाषाणस्तत्समः । यज्ञो विष्णुः । निजरूपतिरोधानेन मे मनः खेदयन् ॥ २२ ॥ इति मीमांसमानस्य सतः । जगर्जागर्जत् । गिरींद्रतुल्यः ॥ २३ ॥ गर्जनप्रयोजनमाह ।

~~कुलोद्वहा विदुरा,~~ तो ब्रह्मदेव पहात असतांनाच, आकाशामध्यें असलेलें तें वराहाचें पिलूं एका क्षणांत खरोखर हत्तीएवढें मोठें झालें! तें सर्वांना मोठेंच आश्चर्य वाटलें!!
॥ १९ ॥ तेव्हां मरीचिप्रभृति ब्राह्मण, सनकादिक ऋषि आणि स्वायंभुव मनु यांसहवर्तमान ब्रह्मदेवानें तें वराहस्वरूप पाहून त्याविषयीं अनेक प्रकारचे तर्क केले ॥ २० ॥ डुकरा-
च्या मिषानें आपल्यापुढें असलेला हा दिव्य प्राणीतरी कोण आहे! काय हो माझ्या नाकांतूनच हा प्राणी बाहेर पडला, केव्हडें हें आश्चर्य ॥ २१ ॥ हा प्रथमतः आंगठ्या-
च्या अग्राएवढा दिसत होता, तोच एका क्षणांत प्रचंड शिळेएवढा झाला! कांहो! हा साक्षात् यज्ञरूपी भगवानच आपलें खरें स्वरूप गुप्त करून माझ्या मनाला मोहांत तर
पाडीत नसेलना! ॥ २२ ॥ तो ब्रह्मदेव, आपल्या पुत्रांसह असे तर्क करीत आहे, इतक्यांत त्या यज्ञपुरुषरूपी भगवंतानें तें आपलें शरीर मोठ्या पर्वताएवढें करून गर्जना
केली, ॥ २३ ॥ आपल्या गर्जनेच्या योगानें दशदिशा नादित करणाऱ्या त्या सर्वव्यापक श्रीहरीनें ब्रह्मदेवाला आणि त्या श्रेष्ठ ब्राह्मणांना हर्ष उत्पन्न केला ॥ २४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तेव्हां जनलोक, तपोलोक व सत्यलोक ह्यांमध्यें वास करणाऱ्या त्या ऋषींनीं, ~~आपल्या खेदाचा नाश करणारी~~ त्या मायिक वराहाची गर्जना ऐकून ऋग्वेद, यजुर्वेद, आणि सामवेद, ह्यांतील पवित्र मंत्रांच्या योगानें त्याची स्तुती केली ॥ २५ ॥ यज्ञरूपी वराहानें, आपल्या गुणानुवादानें परिपूर्ण अशी त्या भक्तांनीं केलेली वेदरूप स्तुति ऐकून त्यांच्या उत्कर्षाकरितां पुनः गर्जना करून एखाद्या मोठ्या हत्तीप्रमाणें लीला करीत करीत उदकामध्यें प्रवेश केला ॥ २६ ॥ ज्यानें आपलें पुच्छ वर उचलून धरिलें आहे, जो मानेवरचे लांब लांब केंस कांपवीत आहे, जो आकाशांत फिरत आहे, ज्याची आकृति कठोर आहे, ज्याच्या कातडीवरील केंस रांठ आहेत. खुरांच्या योगानें ज्यानें मेघ

ब्रह्माणमिति ॥ २४ ॥ घर्घरितं तज्जात्यनुकरणध्वनिम् । अनिश्चयेन यः स्वखेदस्तस्य क्षयिष्णु क्षपयिष्णु नाशकम् । ते इति पुनरुक्तिः प्रसिद्धिख्यापनार्था । त्रिभिः पवित्रैऋग्यजुःसाममंत्रैरगृणन्नस्तुवन् ॥ २५ ॥ वेदैर्वितन्यते स्तूयते मूर्तिर्यस्य सः अतएवात्मनो गुणाननुवदति तथा तत्तेषां ब्रह्म उच्चारितं वेदमवधार्य ज्ञात्वा ॥ २६ ॥ कथंभूतः सन्नाविवेशेत्यपेक्षायामाह । द्वाभ्याम् । उच्चैः क्षिप्तो वालः पुच्छं येन । खचर आकाशचारी । कठोरः कठिनः । सटाः स्कंधवालान् । खराणि तीक्ष्णानि रोमाणि यस्याः सा त्वग्यस्य । खुरैराहतान्यभ्राणि येन । सितदंष्ट्रोऽतिशुक्लदंष्ट्रः ईक्षा निरीक्षणमेव ज्योतिरालोको यस्य । तदा प्रकाशांतराभावात् बभासेऽशोभत । महीध्रः पृथिव्या उद्धर्ता

निशम्य ते घर्घरितं स्वखेदशयिष्णु मायामयसूकरस्य ॥ जनस्तपःसत्यनिवासिनस्ते त्रिभिः पवित्रैर्मुनयोऽगृणन्स्म ॥ २५ ॥ तेषां सतां वेदवितानमूर्तिर्ब्रह्माऽवधार्यात्मगुणानुवादम् ॥ विनद्य भूयो विबुधोदयाय गजेंद्रलीलो जलमाविवेश ॥ २६ ॥ उत्क्षिप्तवालः खचरः कठोरः सटा विधुन्वन्खररोमशत्वक् ॥ खुराहताभ्रः सितदंष्ट्र ईक्षाज्योतिर्बभासे भगवान्महीध्रः ॥ २७ ॥ घ्राणेन पृथ्व्याः पदवीं विजिघ्रन् क्रोडापदेशः स्वयमध्वरांगः ॥ करालदंष्ट्रोऽप्यकरालदृग्भ्यामुद्वीक्ष्य विप्रान्गृणतोऽविशत्कम् ॥ २८ ॥ स वज्रकूटांगनिपातवेगविशीर्णकुक्षिः स्तनयन्नुदन्वान् ॥ उत्सृष्टदीर्घोर्मिभुजैरिवार्तश्चुक्रोश यज्ञेश्वर पाहि मेति ॥ २९ ॥ खुरैः क्षुरप्रैर्दरयंस्तदाऽऽप उत्पारपारं त्रिपरू रसायाम् ॥ ददर्श गां तत्र सुषुप्सुरग्रे यां जीवधानीं स्वयमभ्यधत्त ॥ ३० ॥

॥ २७ ॥ क्रोडापदेशो वराहच्छद्मा अतः स्वयमध्वरांगोऽपि पशुरिव घ्राणेन विजिघ्रन् गृणतः स्तोतॄन्विप्रानुद्वीक्ष्योर्ध्वं वीक्ष्य कं जलमाविशत् ॥ २८ ॥ तदानींतनसमुद्रध्वनिमुत्प्रेक्षते । स उदन्वान्समुद्र आर्त इव स्तनयन् शब्दं कुर्वन्भो यज्ञेश्वर मा मां पाहि मामवेत्येवं चुक्रोश । आर्तसादृश्यमाह । उत्सृष्टाः प्रसारिता दीर्घा ऊर्मय एव भुजास्तैर्विशिष्टः । आर्तत्वे हेतुः । वज्रकूटो वज्रमयः पर्वतस्तद्वदंगं यद्भगवतस्तस्य निपातवेगेन विशीर्णा कुक्षिर्यस्य ॥ २९ ॥ तदा रसायां रसातले गां पृथ्वीं ददर्श । कः त्रिपरुस्त्रीणि परूंषि सवनात्मकानि पर्वाणि यस्य । यज्ञमूर्तिरित्यर्थः । किं कुर्वन् । क्षुरप्रा आयताग्राः शरास्तत्सदृशैः खुरैरपो दरयन् । कथम् । उत्पारपारं उत्पाराणां पारशू-

---

अस्ताव्यस्त केले आहेत, ज्याच्या दाढा शुभ्रवर्ण आहेत, ज्याच्या दृष्टीचा प्रकाश जिकडेतिकडे पडला आहे, असा पृथ्वीचा उद्धार करणारा तो भगवान् शोभूं लागला ॥ २७ ॥ स्वतः यज्ञमूर्ति असूनहि लीलेकरितां वराहरूपाचें अनुकरण करणारा तो भगवान्, भयंकर दाढांनीं युक्त असतांनाहि आपल्या सौम्यदृष्टीनें त्या स्तुति करणाऱ्या ऋषींकडे अवलोकन करून आपल्या घ्राणेंद्रियानें पृथ्वीचा सुगावा लागावा ह्मणून हुंगीत हुंगीत जलामध्यें प्रविष्ट झाला ॥ २८ ॥ तेव्हां वज्रमयपर्वतासारखें जें भगवच्छरीर त्याच्या पडण्याच्या वेगानें ज्याचा अंतर्भाग खवळून गेला आहे असा तो मेघासारखी गर्जना करणारा समुद्र, घाबरल्यासारखा होऊन पसरलेल्या लांब लांब तरंगरूपी आपल्या बाहूंनीं भगवंतास शरण गेला आणि ‘हे यज्ञपालका माझें रक्षण कर’ अशी त्यानें मोठी आरोळी मारिली ॥ २९ ॥ ~~त्यावेळीं प्रातःसवन, माध्यान्हसवन~~

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अशा त्या यज्ञमूर्ति वराहानें, बाणासारख्या अणकुचीदार आपल्या खुरांनीं त्या अपार उदकांचें विदारण
आणि तृतीयसवन हीं तीन सवनें ज्याच्या पायांचे सांधे आहेत
करून पाताळामध्यें ती पृथ्वी अवलोकन केली. जी पृथ्वी सर्व जीवांना आधारभूत असून पूर्वी, प्रलयकालच्या उदकांत शयन करण्यास उद्युक्त झालेल्या त्या भगवंतानें
आपणच आपल्या उदरांत धारण केली होती ॥ ३० ॥ नंतर उदकामध्यें निमग्न झालेल्या त्या पृथ्वीला आपल्या दाढेच्या योगानें उचलून रसातलांतून वर येत असतां,
तो भगवान् फारच शोभूं लागला. तेव्हां त्या उदकांमध्यें हातांत गदा घेऊन आंगावर धांवून येणारा व पृथ्वीला वर आणण्याविषयीं प्रतिबंध करणारा अशा असह्य
पराक्रमी हिरण्याक्ष दैत्याला, 'सुदर्शन चक्रानें मी असतां तूं पराभव काय ह्मणून सहन करितोस असें सांगून ज्याला तीव्र क्रोध आणिला आहे अशा' त्या भगवंतानें, सिंह

न्यानामप्यपां पारमवसानं यथाभवति तथा विदारयन् । कथंभूतः । अग्रे प्रलयसमये तत्र तास्वप्सु सुषुप्सुः शिशयिषुः सन् जीवा धीयंते यस्यां सर्वजीवाधारभूतां यां स्वय
मभ्यधत्ताभिमुख्येन दधार । जठरे धृतवानित्यर्थः । अनेन तदुद्धरणेऽनायासं द्योतयति ॥ ३० ॥ रसायाः सकाशादुत्थितः संरुरुचे सम्यगशोभत । तत्राप्यंभसि गदामु-
द्यम्यागच्छंतं रुंधानं प्रतिघ्नंतं असह्यः सहनानर्हो विक्रमो यस्य तं दैत्यम् । सुनाभं चक्रं तद्वत्संदीपितस्तीव्रो मन्युर्यस्य । यद्वा । मयि विद्यमाने किमिति परिभवं सहस इति
सुनाभेन संदीपितस्तीव्रमन्युः स भगवान् सिंहो गजमिव लीलया जघानेन्युत्तरेणान्वयः ॥ ३१ ॥ गजेंद्रो जगतीं क्रीडया विदारयन् गैरिकया यथा अरुणगंडतुंडो भवति

तत्रापि दैत्यं गदयापतंतं सुनाभसंदीपिततीव्रमन्युः ॥ ३१ ॥ जघान रुंधा-
स्वदंष्ट्रयोद्धृत्य महीं निमग्नां स उत्थितः संरुरुचे रसायाः ॥
नमसह्यविक्रमं स लीलयेभं मृगराडिवांभसि ॥ तद्रक्तपंकांकितगंडतुंडो यथा गजेंद्रो जगतीं विभिंदन् ॥ ३२ ॥ तमालनीलं सितदं-
तकोट्या क्ष्मामुत्क्षिपंतं गजलीलयांग ॥ प्रज्ञाय बद्धांजलयोऽनुवाकैर्विरिंचिमुख्या उपतस्थुरीशम् ॥ ३३ ॥ ॥ ऋषय ऊचुः ॥
जितं जितं तेऽजित यज्ञभावन त्रयीं तनूं स्वां परिधुन्वते नमः ॥ यद्रोमगर्तेषु निलिल्युरध्वरास्तस्मै नमः कारणसूकराय ते ॥ ३४ ॥
रूपं तवैतन्ननु दुष्कृतात्मनां दुर्दर्शनं देव यदध्वरात्मकम् ॥ छंदांसि यस्य त्वचि बर्हि रोमस्वाज्यं दृशि त्वंघ्रिषु चातुर्होत्रम् ॥ ३५ ॥

तथा । तस्य रक्तमेव पंकस्तेनांकितौ गंडौ तुंडं च यस्य सः ॥ ३२ ॥ प्रज्ञायालक्ष्य । अनुवाको वैदिकं सूक्तं तत्सदृशैर्वाक्यैस्तुष्टुवुः ॥ ३३ ॥ भो अजित ते त्वया जितं
जितमिति संभ्रमे वीप्सा । यज्ञैर्भाव्यते आक्रियत इति तथा । त्रयीं वेदमयीम् । निलिल्युर्लीनप्रायाः । कारणं पृथिव्युद्धरणं तेन सूकराय ॥ ३४ ॥ यज्ञात्मतां प्रपंचयंतः
स्तुवंति । रूपमित्यादिचतुर्भिः । छंदांसि गायत्र्यादीनि । यज्ञांगभूतच्छंदआद्यनुवादेन भगवदवयवता विधीयते बर्हिःशब्दे दीर्घाभाव आर्षः । दृशि चक्षुषि चातुर्होत्रं होत्रादि-

---

तेव्हां जसें एकादा हत्ती मातीच्या टेकडीशीं टक्कर करून निघाला ह्मणजे त्याचें गंडस्थळ तांबडी माती
जसा हत्तीला मारून टाकतो त्याप्रमाणें सहज मारून टाकिलें. ॥ ३१ ॥ ३२ ॥ हे विदुरा, हत्तीसारख्या लीलेनें आपल्या पांढऱ्या
लागून लाल झालेलें असतें तशीं त्या भगवंताचीं गंडस्थळ व मुख हीं हिरण्याक्षाच्या रक्तपंकानें लाल झालीं होतीं
दंतांच्या अग्रावर पृथ्वी उचलून धारण करणारा आणि तमालवृक्षासारखा श्यामवर्ण अशा त्या वराहरूपी ईश्वराला पाहून, ब्रह्मदेवप्रभृति ऋषि, हात जोडून वैदिकसू-
क्तांनीं त्याची स्तुति करूं लागले ॥ ३३ ॥ ऋषि ह्मणाले—हे अपराजिता, तुझा सर्वदा जयजयकार असो, हे यज्ञाधिपते, आपली वेदत्रयात्मक मूर्ति वारंवार कंपित करणाऱ्या
तुला नमस्कार असो. ज्या तुझ्या रोमच्छिद्रांमध्यें सर्व यज्ञ लीन झाल्यासारखे आहेत, त्या पृथ्वीचा उद्धार करण्याकरितां वराहरूप धारण करणाऱ्या तुला नमस्कार
असो ॥ ३४ ॥ हे देवा, जें तुझें हें यज्ञात्मक स्वरूप आहे तें, खरोखर पापीपुरुषांच्या दृष्टीस पडण्यास अशक्य आहे, कारण ज्या तुझ्या त्वचेच्याठिकाणीं गायत्री,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

उष्णिक्वगैरे छंद राहतात, केंसांचेठिकाणीं दर्भ आहेत, दृष्टीच्याठिकाणीं घृत आहे, व चार चरणांचेठिकाणीं, होता अध्वर्यु इत्यादिक चार ऋत्विजांचीं चार कर्में आहेत ॥ ३५ ॥ हे ईश्वरा, तुझ्या मुखाच्या अग्रभागाचेठिकाणीं जुहू (हंसमुखासारखें) पात्र आहे, दोन नाकपुड्यांचेठिकाणीं स्रुवा (पळीसारखें पात्र) आहे, उदराचेठिकाणीं इडा (हातभर लांब चौकोनी चपटें) पात्र आहे, कर्णछिद्राचेठिकाणीं चमस (आठ आंगळें चौकोनी) पात्रें आहेत. मुखाचेठिकाणीं प्राशित्र (गाईच्या कानासारखें) पात्र आहे, कंठछिद्राच्या ठिकाणीं ग्रह (बारा सोम पात्रें) आहेत. हे भगवन्, तुझें जें चर्वण (रवंथ) तेंच अग्निहोत्र होय ॥ ३६ ॥ हे यज्ञवराहा, दीक्षा (यज्ञामध्यें दीक्षा घेण्यासाठीं जी इष्टि करितात ती) वारंवार घेतलेला तुझा अवतार होय. उपसद (या नांवच्या तीन इष्टि) हीच तुझी मान होय. प्रायणीय व उदय-

कर्मचतुष्टयम् ॥ ३५ ॥ स्रुक् जुहूस्तुंडे मुखाग्रे । स्रुवो नासिकयोः । इडा भक्षणपात्री । चमसा ग्रहाश्च सोमपात्राणि । प्राशित्रं ब्रह्मभागपात्रम् । ग्रस्यतेऽनेनेति ग्रसनं मुखांतर्वर्ति छिद्रम् । चर्वणं भक्षणम् ॥ ३६ ॥ दीक्षा दक्षिणीयेष्टिः । अनुजन्म वारंवारमभिव्यक्तिः । उपसदस्तिस्र इष्टयः । शिरोधरं ग्रीवा प्रायणीया दीक्षाऽनंतरेष्टिः । उदयनीय समाप्तीष्टिः ते एव दंष्ट्रे यस्य प्रवर्ग्यो महावीरः प्रत्युपसदं पूर्वं क्रियते । सभ्यो होमरहितोऽग्निः । आवसथ्यमौपासनाग्निः तयोर्द्वंद्वैक्यम् । तत्तव क्रतुरूपस्य शीर्षं शिरः चितय इष्टकाचयनानि पंचासवः प्राणाः ॥ ३७ ॥ प्रातःसवनादीन्यवस्थितिरासनं बाल्याद्यवस्था वा । अग्निष्टोमोऽत्यग्निष्टोम उक्थः षोडशी वाजपेयोऽतिरात्र आप्तोर्याम इति सप्तसंस्था

स्रुक् तुंड आसीत्स्रुव ईश नासयोरिडोदरे चमसाः कर्णरंध्रे ॥ प्राशित्रमास्ये ग्रसने ग्रहास्तु ते यच्चर्वणं ते भगवन्नग्निहोत्रम् ॥ ३६ ॥
दीक्षाऽनुजन्मोपसदः शिरोधरं त्वं प्रायणीयोदयनीयदंष्ट्रः ॥ जिह्वा प्रवर्ग्यस्तव शीर्षकं क्रतोः सभ्यावसथ्यं चितयोऽसवो हि ते
॥ ३७ ॥ सोमस्तु रेतः सवनान्यवस्थितिः संस्थाविभेदास्तव देव धातवः ॥ सत्राणि सर्वाणि शरीरसंधिस्त्वं सर्वयज्ञक्रतुरिष्टिबंधनः
॥ ३८ ॥ नमो नमस्तेऽखिलमंत्रदेवताद्रव्याय सर्वक्रतवे क्रियात्मने ॥ वैराग्यभक्त्यात्मजयाऽनुभावितज्ञानाय विद्यागुरवे नमो नमः
॥ ३९ ॥ दंष्ट्राग्रकोट्या भगवंस्त्वया धृता विराजते भूधर भूः सभूधरा ॥ यथा वनान्निःसरतो दता धृता मतंगजेंद्रस्य सपत्रपद्मिनी ॥ ४० ॥

विभेदास्त्वङ्मांसादिसप्तधातवः । सत्राणि द्वादशाहादीनि बहुयागसंघातरूपाणि । असोमाः यज्ञाः ससोमाः क्रतवस्तद्रूपस्त्वम् । इष्टिर्यजनमनुष्ठानं तदेव बंधनं यस्य सः ॥३८॥ पूर्वोक्तमेव सपरिकरं कीर्तयंतः प्रणमंति । नमो नम इति । अखिलमंत्रादिरूपाय क्रियात्मने सामान्यव्यापाररूपाय । किंच । वैराग्ययुक्तकर्मसाध्या सत्त्वशुद्धिस्ततो भक्तिस्तत आत्मजयश्चित्तस्थैर्यं तेनानुभावितं साक्षात्कृतं यज्ज्ञानं तस्मै । एवंभूतज्ञानप्रदाय गुरवे च ॥ ३९ ॥ हे भूधर । सभूधरा सपर्वता । वनादुदकान्निर्गच्छतो गजेंद्रस्य । दता दंतेन ॥४०॥

नीय (ह्या नांवच्या दोन इष्टि) ह्या तुझ्या दाढा होत. प्रवर्ग्य (माहावीर) ही तुझी जिव्हा होय. सभ्यावसथ्य (सभ्यः होमरहित अग्नि, आवसथ्य होम करावयाचा अग्नि) हें यज्ञमूर्ति अशा तुझें मस्तक होय. चिति (विटेचें चयन) हे तुझे प्राण होत ॥ ३७ ॥ हे देवा, सोमरस ह्या तुझें रेत होय, प्रातःसवनादिक तीन सवनें ह्या तुझ्या बाल्यादिक तीन अवस्था होत, अग्निष्टोमादिक सप्तसंस्था ह्या तुझ्या सप्त धातु होत, द्वादशाहादिक सर्व सत्रें, हे तुझ्या शरीराचे सांधे होत. एतावता तूं, सर्वयज्ञक्रतुरूप (ज्यांत पशुवध नसतो तो यज्ञ व ज्यांत पशुवध असतो क्रतु) असून त्यांतील इष्टि ह्या तुझ्या शरीरांतील सांध्यांचीं बंधनें होत ॥ ३८ ॥ सर्व मंत्र, देवता, आणि घृतादि द्रव्यें एतद्रूपी, सर्व यज्ञरूपी आणि कर्मरूपी अशा तुला वारंवार नमस्कार असो. वैराग्य, भक्ति आणि मनाची स्थिरता यांच्या प्रयोगेंकरून प्राप्त होणारें जें ज्ञान तत्स्वरूपी व ज्ञान देणारा गुरुरूपी अशा तुला पुनः पुनः नमस्कार असो ॥ ३९ ॥ हे भूमिधारक भगवन्, ज्याप्रमाणें पाण्यांतून बाहेर पडणाऱ्या मदोन्मत्त गजाच्या ॥ ४० ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दांतानें धारण केलेली कमलिनी पत्रांसहवर्तमान शोभते तशी तूं आपल्या दाढेच्या अग्रभागावर धारण केलेली ही भूमि, पर्वतांसहित अत्यंत शोभत आहे ॥ ४० ॥ अथवा दांतानें धारण केलेली कमलिनी पत्रांसहवर्तमान शोभते तशी तूं आपल्या दाढेच्या अग्रभागावर धारण केलेली ही भूमि, आपल्यावर मेघाचें धारण करणाऱ्या मोठ्या शिखराच्या योगानें जशी एकाद्या कुलपर्वताला शोभा प्राप्त होत्ये तसेंच तुझें हें वेदत्रयीरूपि वराहशरीर, दांतांवर धारण केलेल्या भूमंडळाच्या योगानें शोभत आहे ॥ ४१ ॥ हे देवा, स्थावर व जंगम अशा दोन्ही प्रकारच्या विश्वाची राहण्याची व्यवस्था लागण्याकरितां, आपल्या पत्नीरूपी ह्या जगन्मातेला (पृथ्वीला) उत्तमप्रकारें स्थापन कर. कारण, तूं सर्व जगतांचा पिता आहेस. जसे याज्ञिक पुरुष, मंत्रानें अरणींमध्यें अग्नि स्थापन करितात तसें तूं भूमीच्याठिकाणीं आपलें तेज (लोकांना पाठीवर धारण करण्याची शक्ति) ठेविलें आहेस. ह्मणून या पृथ्वीवर राहणारे आह्मी, तुज पित्यासहवर्तमान या मातेला नम-

---

त्वया धृता भूर्विराजत इत्युक्तमिदानीं भूमंडलेन त्वद्रूपं विराजत इत्याहुः । त्रयीति । अथेत्यर्थांतरे । ते इदं रूपं दंतेन धृतं यद्भूमंडलं तेन चकास्ति शोभते । शृंगेणोढो धृतो यो घनस्तेन भूयसाऽतिमहता । विभ्रमो विलासः ॥ ४१ ॥ लोकाय वासस्थानार्थम् । ते पत्नीं जगतां मातरम् । यतस्त्वं पिताऽसि एवं सति तत्र स्थिताः संतस्त्वया पित्रा सहास्यै मात्रे नमसा विधेम नमनं करिष्यामः । नमस्कारेण परिचरेमेति वा । स्वतेजो धारणशक्तिं याज्ञिका मंत्रतोऽग्निमरणाविवाधाः निहितवानसि ॥ ४२ ॥

त्रयीमयं रूपमिदं च सौकरं भूमंडलेनाथ दता धृतेन ते ॥ चकास्ति शृंगोढघनेन भूयसा कुलाचलेंद्रस्य यथैव विभ्रमः ॥ ४१ ॥
संस्थापयैनां जगतां सतस्थुषां लोकाय पत्नीमसि मातरं पिता ॥ विधेम चास्यै नमसा सह त्वया यस्यां स्वतेजोऽग्निमिवारणावधाः ॥ ४२ ॥ कः श्रद्दधीतान्यतमस्तव प्रभो रसां गताया भुव उद्विबर्हणम् ॥ न विस्मयोऽसौ त्वयि विश्वविस्मये यो माययेदं ससृजेऽतिविस्मयम् ॥ ४३ ॥ विधुन्वता वेदमयं निजं वपुर्जनस्तपःसत्यनिवासिनो वयम् ॥ सटाशिखोद्धूतशिवांबुबिंदुभिर्विमृज्यमाना भृशमीश पाविताः ॥ ४४ ॥ स वै बत भ्रष्टमतिस्तवैष ते यः कर्मणां पारमपारकर्मणः ॥ यद्योगमायागुणयोगमोहितं विश्वं समस्तं भगवन्विधेहि शम् ॥ ४५ ॥

इदं च त्वयाऽतिदुष्करं कृतमित्याहुः । क इति । हे प्रभो तव त्वया कृतं भुव उद्विबर्हणमुद्धरणं त्वदन्यः कः श्रद्दधीत स्पृहयेत् । अध्यवस्येदित्यर्थः । त्वयि पुनरसौ विस्मयो न भवति यतो विश्वे सर्वे विस्मया यस्मिन् । कुतः । यो भवान् अतिविस्मयमत्यद्भुतमिदं विश्वं क्रियाविशेषणं वा । ससृजे सृष्टवान् ॥ ४३ ॥ विस्मयं दर्शयंतः प्रार्थयंते । विधुन्वतेति द्वाभ्याम् । सटानां शिखाभिरग्रैरुद्धूता उच्छलिता ये शिवा अंबुबिंदवस्तैः सिच्यमाना वयं पवित्रीकृताः ॥ ४४ ॥ तव कर्मणां पारं य एष तेऽवलोकयति ज्ञातुमिच्छतीत्यर्थः । यस्य तव योगमायया यो गुणैः सह योगस्तेन मोहितम् । अतो विश्वस्य शं मंगलं विधेहि । यथा त्वामचिंत्यानंतशक्तिं ज्ञात्वा भजेत्तथाऽनु-

---

स्कार करितों ॥ ४२ ॥ हे प्रभो, पाताळांत गेलेल्या भूमीचें जें तूं उद्धरण केलेंस हें कर्म तुझ्याहून दुसरा कोण पुरुष करण्याविषयीं मनांततरी आणील? कोणीहि आणणार नाहीं. तथापि सर्व आश्चर्यांचें आगर अशा तुझ्याठिकाणीं हा पृथ्वीचा उद्धार आश्चर्यकारक नाहीं. कारण, ज्या तूं आपल्या मायेनें अतिशय आश्चर्यकारक हें जग निर्माण केलें आहेस ॥ ४३ ॥ हे ईश्वरा, आपलें हें वेदमय शरीर कंपित करणाऱ्या तूं, आपल्या आंगावरील लांब लांब केंसांच्या अग्रांनीं उडविलेल्या पवित्र उदकांच्या बिंदूनीं, जन, तप आणि सत्य या लोकांचेठिकाणीं वास करणाऱ्या आह्मांवर अभिषेक करून आह्मांस अत्यंत पवित्र केलें आहेस ॥ ४४ ॥ हे देवा, ज्या तुझ्या कर्माचा अंत नाहीं अशा तुझ्या कर्माचा अंत जाणण्याची जो इच्छा करितो त्याच्या बुद्धीला भ्रंश झाला असें समजलें पाहिजे; हे भगवन्, हें सर्व विश्व, तुझ्याच योगमा-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

येनें प्राप्त झालेल्या विषयांच्या संबंधानें मोहित झालें आहे· यास्तव अचिंत्य व अनंतशक्ति अशा तुला जाणून हें जशी तुझी भक्ती करील तसा तूं याच्यावर अनुग्रह कर ॥ ४५ ॥ मैत्रेय ह्मणाला–हे विदुरा, याप्रमाणें त्या ब्रह्मवेत्त्या ऋषींनीं स्तुति केली असतां, त्या जगद्रक्षक भगवंतानें आपल्या खुरांच्या योगानें खळबळलेल्या त्या पाण्यावर पृथ्वीची स्थापना केली ॥ ४६ ॥ नंतर प्रजांचा पालक व दुःखहरण करणारा अशा त्या विष्वक्सेन भगवंतानें, पाताळांतून लीलेनें वर काढलेल्या पृथ्वीचें उदकामध्यें पूर्वी सांगितल्याप्रमाणें स्थापन करून निजधामास गमन केलें ॥ ४६ ॥ हे विदुरा, ज्याचीं मायिक चरित्रें वर्णन करण्यासारखीं आहेत व ज्याचेठिकाणीं लाविलेली बुद्धि, सर्व दुःखांचा नाश करिते त्या हरीची अतिमंगलकारक सुंदर ही कथा, जो पुरुष भक्तीनें श्रवण करितो किंवा दुसऱ्याकडून श्रवण करवितो त्याच्या

गृहाणेत्यर्थः ॥ ४५ ॥ उपस्थीयमानः स्तूयमानः । स्वखुराक्रांत इति जलेऽपि धारणशक्त्याधानं दर्शयति । अविता रक्षकः ॥ ४६ ॥ ४७ ॥ कथनीयानि मायीनि मायावंति चरित्राणि यस्य । श्रवयेत श्रावयेत ऱ्हस्वत्वमार्षम् । उशतीं कमनीयाम् । हृदि प्रसीदति स्वमनसि संतुष्यतीत्यर्थः ॥ ४८ ॥ आशिषो यद्यपि सुलभास्तथापि न प्रार्थनीया इत्याह । ताभिराशीर्भिरलम् । लवात्मभिस्तुच्छाभिः । न च तदा भजनस्य वैफल्यं शंकनीयमित्याह । भगवद्भजनव्यतिरेकेण फलांतरदृष्टिं विना भजतां स्वपदप्राप्तिं

॥ मैत्रेय उवाच ॥ ॥ इत्युपस्थीयमानस्तैर्मुनिभिर्ब्रह्मवादिभिः ॥ सलिले स्वखुराक्रांत उपाधत्ताविताऽवनिम् ॥ ४६ ॥ स इत्थं भगवानुर्वीं विष्वक्सेनः प्रजापतिः ॥ रसाया लीलयोन्नीतामप्सु न्यस्य ययौ हरिः ॥ ४७ ॥ य एवमेतां हरिमेधसो हरेः कथां सुभद्रां कथनीयमायिनः ॥ शृण्वीत भक्त्या श्रवयेत वोशतीं जनार्दनोऽस्याशु हृदि प्रसीदति ॥ ४८ ॥ तस्मिन्प्रसन्ने सकलाशिषां प्रभौ किं दुर्लभं ताभिरलं लवात्मभिः ॥ अनन्यदृष्ट्या भजतां गुहाशयः स्वयं विधत्ते स्वगतिं परः पराम् ॥ ४९ ॥ को नाम लोके पुरुषार्थसारवित्पुराकथानां भगवत्कथासुधाम् ॥ आपीय कर्णांजलिभिर्भवापहामहो विरज्येत विना नरेतरम् ॥ ५० ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे तृतीयस्कंधे वराहप्रादुर्भावे त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ निशम्य कौषारविणोपवर्णितां हरेः कथां कारणसूकरात्मनः ॥ पुनः स पप्रच्छ तमुद्यतांजलिर्न चातितृप्तो विदुरो धृतव्रतः ॥ १ ॥

स्वयमेव विधत्ते । गुहाशयत्वादहैतुकीं भक्तिं जानन् ॥ ४९ ॥ अतः को नाम पुराकथानां पूर्ववृत्तानां मध्ये । कथंचिदापीय विरज्येत विरमेत् । नरेतरं पशुं विना ॥ ५० ॥ इति श्रीमद्भागवते तृतीयस्कंधे टीकायां त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥ ॥ चतुर्दशे निदानं तु तद्वधे वक्तुमुच्यते ॥ संध्यायां कश्यपाद्गर्भसंभवः कामतो दितेः ॥ १ ॥ १ ॥

हृदयामध्यें जनार्दन भगवान् सत्वर प्रसन्न होतो ॥ ४७ ॥ हे विदुरा, सर्व आशीर्वादांचा स्वामी तो प्रसन्न झाला असतां दुर्लभ काय आहे? कांहींच नाहीं· तथापि त्याच्याजवळ विषयभोग मागूं नयेत· कारण–ते फार थोडावेळ टिकणारे असतात· आणि अंतर्यामाचेठिकाणीं राहणारा तो परमात्मा, अनन्यभावानें आपली भक्ति करणाऱ्या पुरुषांना आपली उत्तम गति स्वतःच देतो ॥ ४८ ॥ यास्तव अहो! या लोकामध्यें पुरुषार्थाचें तत्त्व जाणणारा कोण बरें पुरुष, संसारनाशक पुरातन कथेंतील भगवत्कथामृताचें आपल्या कर्णरूप अंजलींनीं प्राशन करून कंटाळेल ! पशूंशिवाय दुसरा कोणीहि कंटाळणार नाहीं ॥ ४९ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील तृतीयस्कंधामध्यें वराहप्रादुर्भावकथनरूप हा तेरावा अध्याय समाप्त झाला ॥ १३ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ७ ॥ आतां हिरण्याक्ष दैत्याच्या वधाचें मूळकारण सांगण्यासाठीं, कामामोहित झालेल्या दितीच्या उदरीं कश्यपापासून प्रदोषकाळीं गर्भ राहिला, ही कथा या चवदाव्या अध्यायांत वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ शुकाचार्य ह्मणाला–हे राजन्, ॥ ४८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भगवत्कथाश्रवणाचें व्रत धारण करणारा तो विदुर, मैत्रेयानें वर्णन केलेली, पृथ्वीच्या उद्धारासाठीं वराहावतार धारण करणाऱ्या श्रीहरीची कथा ऐकून पूर्णरीतीनें समाधान न झाल्यामुळें मैत्रेय ऋषीला पुनः हात जोडून प्रश्न करूं लागला ॥ १ ॥ विदुर ह्मणाला—हे मुनिश्रेष्ठा, त्याच यज्ञमूर्ति हरीनें आदिदैत्य हिरण्याक्षाचा वध केला असें आह्मी ऐकिलें ॥ २ ॥ परंतु हे ब्रह्मन्, आपल्या दाढेच्या अग्रानें सहज पृथ्वीचा उद्धार करणाऱ्या त्या भगवंताचें आणि हिरण्याक्ष दैत्यराजाचें युद्ध कोणत्या कारणानें झालें? ॥ ३ ॥ मैत्रेय ह्मणाला—हे वीरा विदुरा, तूं फार चांगलें विचारिलेंस. कारण, तूं मनुष्यांच्या मृत्युरूप पाशाला तोडून टाकणारी हरीची अवतारकथा विचारिली आहेस ॥ ४ ॥ नारदमुनींनीं गायन केलेल्या ज्या कथेच्या योगानें उत्तानपाद राजाचा पुत्र ध्रुव बालक, मृत्यूच्या मस्तकावर आपला पाय देऊन विमानांत

मृत्योः पाशं विशातयति मोचयतीति तेनैव येन भूमिरुद्धृता । अनुशुश्रुम त्वन्मुखात् ॥ २ ॥ मृधो युद्धम् ॥ ३ ॥ साधुत्वे हेतुः । यद्यस्मात्त्वं हरेरवतारकथां पृच्छसीति । मृत्योः पाशं विशातयति मोचयतीति तथा ॥ ४ ॥ तदेव दर्शयति । यया कथया । उत्तानपदः पुत्रो ध्रुवः । मुनिना नारदेन । अर्भक एव यदा ध्रुवाय सुनंदादिभिर्विमानमानीतं तदाऽस्य देहत्यागोऽपेक्षितः स्यादिति मत्वा मृत्यावासन्नेऽपि देहं न तत्याज किंतु सोपान इव तस्य मूर्ध्नि पदं दत्त्वा विमानमारुह्य विष्णुपदमारूढः । वक्ष्यति हि । परीत्याभ्यर्च्य धिष्ण्याग्र्यं कृतस्व-

विदुर उवाच ॥ तेनैव तु मुनिश्रेष्ठ हरिणा यज्ञमूर्तिना ॥ आदिदैत्यो हिरण्याक्षो हत इत्यनुशुश्रुम ॥ २ ॥ तस्य चोद्धरतः क्षोणीं स्वदंष्ट्राग्रेण लीलया ॥ दैत्यराजस्य च ब्रह्मन् कस्माद्धेतोरभून्मृधः ॥ ३ ॥ मैत्रेय उवाच ॥ साधु वीर त्वया पृष्टमवतारकथां हरेः ॥ यत्त्वं पृच्छसि मर्त्यानां मृत्युपाशविशातनीम् ॥ ४ ॥ ययोत्तानपदः पुत्रो मुनिना गीतयाऽर्भकः ॥ मृत्योः कृत्वैव मूर्ध्न्यंघ्रिमारुरोह हरेः पदम् ॥ ५ ॥ अथात्रापीतिहासोऽयं श्रुतो मे वर्णितः पुरा ॥ ब्रह्मणा देवदेवेन देवानामनुपृच्छताम् ॥ ६ ॥ दितिर्दाक्षायणी क्षत्तर्मारीचं कश्यपं पतिम् ॥ अपत्यकामा चकमे संध्यायां हृच्छयार्दिता ॥ ७ ॥ इष्ट्वाऽग्निजिह्वं पयसा पुरुषं यजुषां पतिम् ॥ निम्लोचत्यर्क आसीनमग्न्यगारे समाहितम् ॥ ८ ॥ दितिरुवाच ॥ एष मां त्वत्कृते विद्वन्काम आत्तशरासनः ॥ दुनोति दीनां विक्रम्य रंभामिव मतंगजः ॥ ९ ॥

इति ॥ ५ ॥ तयोः संग्रामे हेतुं वक्तुमितिहासं प्रस्तौति । अथेति । अनुपृच्छतां देवानां ब्रह्मणा वर्णित इतिहासो मया श्रुतः ॥ ६ ॥ देवप्रश्नप्रस्तावाय प्रथमं हिरण्याक्षहिरण्यकशिपूत्पत्तिप्रसंगमाह । दितिरित्यादिना यावदध्यायपरिसमाप्ति । मरीचेः पुत्रं कश्यपम् । हृच्छयः कामस्तेनार्दिता अतः संध्यायामेव कामितवती ॥ ७ ॥ तदप्यग्निहोत्रशालायां तत्रापि समाहितम् । अग्निर्जिह्वा यस्य । यजुषां यज्ञानां पतिं पुरुषं श्रीविष्णुम् ॥ ८ ॥ कृपणां बहुभाषिणी-
स्त्ययनो द्विजैः ॥ इयेष तदधिष्ठातुं बिभ्रद्रूपं हिरण्मयम् ।

बसून अचलस्थानावर आरूढ झाला ॥ ५ ॥ आतां तूं प्रश्न केलास याविषयींच पूर्वीं सर्व देवांनीं ब्रह्मदेवाला प्रश्न केला असतां, देवांचाहि देव अशा त्या ब्रह्मदेवानें, देवांस सांगितलेला हा इतिहास मी ऐकिला आहे ॥ ६ ॥ तो असा— हे विदुरा, दक्षाची कन्या दिति ती मरीचिनामक प्रजापतीच्या कश्यपनामक पुत्राला दिली होती ती एकेवेळीं आपल्या सवतीचीं मुलें पाहून आपणासही मुलें असावीं अशी इच्छा धरून कामातुर होत्साती, सूर्यास्त झालें असतां प्रदोषकाळीं, ज्याची जिव्हा अग्नि आहे अशा यज्ञपतिरूपी श्रीविष्णूचें, दुधाच्या योगानें हवन करून होमशाळेंत समाधिस्थ बसलेल्या आपल्या पतीची इच्छा करूं लागली ॥ ७ ॥ ८ ॥ दिति ह्मणाली— हे सर्वज्ञा, ज्याप्रमाणें मदोन्मत्त गज, केळीला पीडा उत्पन्न करितो त्याप्रमाणें, हातांत धनुष्य धारण करणारा हा मदन, आपलें शौर्य प्रकट करून, तुझ्याकरितां मला पीडा उत्पन्न करित आहे ॥ ९ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

यास्तव, मुलें असणाऱ्या सवतींच्या सुखसमृद्धींनीं संताप पावणाऱ्या माझ्यावर आपण अनुग्रह करावा. आपलें कल्याण असो ॥ १० ॥ आपल्यासारखा पति, ज्यांच्या-ठिकाणीं पुत्ररूपानें उत्पन्न होतो, अशा रीतीनें नवऱ्याकडून ज्यांनां पुष्कळ मान मिळतो, त्या स्त्रियांची कीर्ति सर्व लोकांमध्यें पसरत्ये ॥ ११ ॥ पूर्वीं आमचा पिता भगवान् दक्ष, आह्मां मुलींवर फार प्रेम करीत होत्साता 'हे मुलीनो, तुह्मी कोणत्या पतीला वरणार' असें आह्मां सर्वमुलींना निरनिराळें विचारूं लागला ॥ १२ ॥ तेव्हां वंशवृद्धीची इच्छा करणाऱ्या त्या आमच्या पित्यानें, आह्मां सर्व मुलींचा अभिप्राय जाणून त्यांपैकीं तुमच्या स्वभावाला अनुसरणाऱ्या आह्मां तेरा जणींना तुह्मांला अर्पण केलें ॥ १३ ॥ यास्तव हे कमलनयना प्रियकरा, माझी इच्छा परिपूर्ण कर. कारण, हे सर्वश्रेष्ठा, तुझ्यासारिख्या थोरपुरुषाचेठिकाणीं माझ्यासारख्या दीनजनाची याचना

मिति वक्ष्यति तत्र एषमामिति द्वाभ्यां कार्पण्यं भर्तरीति चतुर्भिश्च बहुभाषणं वर्ण्यते । दुनोति पीडयति । विक्रम्य शौर्यमाविर्भाव्य । रंभां कदलीम् ॥ ९ ॥ आयुंक्ष्वां सर्वतो युनक्तु सम्यक्करोतु ॥ १० ॥ भर्तरि प्राप्तबहुमानानां स्त्रीणां यशो लोकानाविशते व्याप्नोति । प्रजया पुत्ररूपेण । तज्जाया जाया भवति यदस्यां जायते पुनः इति श्रुतेः ।

तद्भवान्दह्यमानायां सपत्नीनां समृद्धिभिः ॥ प्रजावतीनां भद्रं ते मय्यायुंक्ष्वामनुग्रहम् ॥ १० ॥ भर्तर्याप्तोरुमानानां लोकानाविशते यशः ॥ पतिर्भवद्विधो यासां प्रजया ननु जायते ॥ ११ ॥ पुरा पिता नो भगवान्दक्षो दुहितृवत्सलः ॥ कं वृणीत वरं वत्सा इत्यपृच्छत नः पृथक् ॥ १२ ॥ स विदित्वाऽऽत्मजानां नो भावं संतानभावनः ॥ त्रयोदशाददात्तासां यास्ते शीलमनुव्रताः ॥ १३ ॥ अथ मे कुरु कल्याण कामं कंजविलोचन ॥ आर्तोपसर्पणं भूमन्नमोघं हि महीयसि ॥ १४ ॥ इति तां वीर मारीचः कृपणां बहुभाषिणीम् ॥ प्रत्याहानुनयन्वाचा प्रवृद्धानंगकश्मलाम् ॥ १५ ॥ एष तेऽहं विधास्यामि प्रियं भीरु यदिच्छसि ॥ तस्याः कामं न कः कुर्यात्सिद्धिस्त्रैवर्गिकी यतः ॥ १६ ॥ सर्वाश्रमानुपादाय स्वाश्रमेण कलत्रवान् ॥ व्यसनार्णवमत्येति जलयानैर्यथाऽर्णवम् ॥ १७ ॥ यामाहुरात्मनो ह्यर्धं श्रेयस्कामस्य मानिनि ॥ यस्यां स्वधुरमध्यस्य पुमांश्चरति विज्वरः ॥ १८ ॥

॥ ११ ॥ नोऽस्माकं पिता नोऽस्मान्पृथगपृच्छत् । अयं भावः । त्रयोदशानामप्यस्माकं त्वयि भावसाम्ये वैषम्याचरणं तवानुचितमिति ॥ १२ ॥ १३ ॥ मोघं न भवति हि । महीयसि त्वादृशे महत्तमे ॥ १४ ॥ प्रवृद्धानंगेन कश्मलं मोहो यस्यास्ताम् ॥ १५ ॥ संध्याकालवंचनाय भार्याप्रशंसा । एष इति पंचभिः । यतो यस्याः सकाशात् ॥ १६ ॥ सर्वाश्रमानुपादायेति तानप्यन्नादिदानेन कृच्छ्रतस्तारयन्स्वयं तरतीत्यर्थः ॥ १७ ॥ आत्मनो देहस्यार्धं कर्मसु द्वयोः सहाधिकारात् । यच्छब्दानां तां त्वामिति तृतीयश्लो-

---

कधींहि निष्फल व्हावयाची नाहीं ॥ १४ ॥ हे विदुरा, याप्रमाणें अतिवृद्धिंगत झालेल्या कामानें मोह पावलेली, दीन व बहुभाषण करणारी अशा त्या आपल्या भार्येचें संध्याकाळ टाळण्यासाठीं वाणीनें सांत्वन करीत होत्साता तो कश्यप ऋषि ह्मणाला कीं,– ॥ १५ ॥ हे भित्र्ये स्त्रिये, हा मी, तुझ्या मनांत ज्याची इच्छा असेल तें तुझें प्रिय करितों. कारण, जिच्यायोगानें पुरुषाला धर्म, अर्थ आणि काम या तिन्ही पुरुषार्थांची सिद्धि होत्ये, त्या पत्नीची इच्छा कोण बरें पुरुष, पुरविणार नाहीं ? सर्वेही पुरवितीलच ॥ १६ ॥ जसा नावाडी नौकेच्या योगानें दुसऱ्या लोकांसहवर्तमान स्वतःहि समुद्रास तरून जातो त्याप्रमाणें सपत्नीक पुरुष, आपल्या गृहस्थाश्रमाच्या योगानें, इतर आश्रमी लोकांस घेऊन (त्यांस अन्नवस्त्रादिक देऊन) स्वतःहि दुःखरूप समुद्रास तरून जातो ॥ १७ ॥ हे मानवति स्त्रिये, जिला त्रिविध पुरुषार्थ इच्छि- ॥ ४२ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

णाऱ्या पुरुषाचें अर्धांग असें ह्मटलें आहे, जिच्यावर आपल्या सर्व कर्मांचा भार टाकून हा पुरुष, निश्चितपणें आपले व्यवहार चालवीत असतो ॥ १८ ॥ जसा किल्ल्याचा
आश्रय करणारा पुरुष, चोरांना सहज जिंकितो त्याप्रमाणें आह्मी ज्या तुझा आश्रय करून, इतर आश्रमांनीं जिंकण्यास अशक्य अशा इंद्रियरूपी शत्रूंना सहज जिंकून
टाकूं ॥ १९ ॥ हे गृहस्वामिणि, आह्मी व आमच्यासारखे दुसरे जे गुणग्राही लोक आहेत ते, अनेक उपकार करणाऱ्या तुझ्यासारख्या आपल्या भार्येचे उपकार फेडण्या-
विषयीं आपल्या सर्वहि आयुष्याच्या योगानें सुद्धां समर्थ होणार नाहींत ॥ २० ॥ तथापि अपत्यप्राप्तीसाठीं हा तुझा मनोरथ पूर्ण करितों परंतु लोकांनीं माझी निंदा न
करावी याकरितां दोन घटिकापर्यंत धीर धर ॥ २१ ॥ ही राक्षसवगैरे भयंकर प्राण्यांची फिरण्याची वेळा असून दिसण्यांत व स्वभावानेंहि भयंकर आहे. कारण,

---

केन संबंधः । स्वधुरं दृष्टादृष्टकर्मभारम् । विज्वरो निश्चिंतः ॥ १८ ॥ हेलाभिर्लीलाभिः जयेमेति सभार्यस्येंद्रियाणि प्रायेणेतस्ततो न सर्पंतीति भावः ॥ १९ ॥ तामनेकोपका-
रकर्त्रीं त्वां कात्स्न्येंनानुकर्तुं प्रत्युपकारैस्त्वत्सदृशा भवितुं न प्रभवो न समर्थाः । ये चान्ये गुणगृध्नवो गुणप्रियास्तेऽपि न समर्थाः । संपूर्णेनाप्यायुषा । वाशब्दाज्जन्मांतरै-
रपि न प्रभव इत्युक्तम् ॥ २० ॥ यद्यपि त्वदनुकरणमशक्यम् । प्रजात्यै पुत्रोत्पत्त्यै । नातिवोचंति न निंदंति । प्रतिपालय प्रतीक्षस्व ॥ २१ ॥ स्वनिंदामगणयंतीं भीषयन्

यामाश्रित्येंद्रियारातीन्दुर्जयानितराश्रमैः ॥ वयं जयेम हेलाभिर्दस्यून्दुर्गपतिर्यथा ॥ १९ ॥ न वयं प्रभवस्तां त्वामनुकर्तुं गृहेश्वरि ॥
अप्यायुषा वा कात्स्न्येंन ये चान्ये गुणगृध्नवः ॥ २० ॥ अथापि काममेतं ते प्रजात्यै करवाण्यलम् ॥ यथा मां नातिवोचंति सुहू-
र्तं प्रतिपालय ॥ २१ ॥ एषा घोरतमा वेला घोराणां घोरदर्शना ॥ चरंति यस्यां भूतानि भूतेशानुचराणि ह ॥ २२ ॥ एतस्यां
साध्वि संध्यायां भगवान्भूतभावनः ॥ परीतो भूतपर्षद्भिर्वृषेणाटति भूतराट् ॥ २३ ॥ श्मशानचक्रानिलधूलिधूम्रविकीर्णविद्योत-
जटाकलापः ॥ भस्मावगुंठामलरुक्मदेहो देवस्त्रिभिः पश्यति देवरस्ते ॥ २४ ॥ न यस्य लोके स्वजनः परो वा नात्यादृतो नोत
कश्चिद्विगर्ह्यः ॥ वयं व्रतैर्यच्चरणापविद्धामाशास्महेऽजां बत भुक्तभोगाम् ॥ २५ ॥

श्रीरुद्रमनुवर्णयति । एषेति सप्तभिः । घोराणामेषा वेला स्वयं च घोरदर्शना ॥ २२ ॥ भूतपर्षद्भिर्भूतगणैः ॥ २३ ॥ तर्हि तत्संमुखत्वमात्रं वर्जनीयमिति चेत्तत्राह । श्मशाने
यश्चक्रानिलो वातमंडली तस्मिन् या धूलिस्तया धूम्रो विकीर्णो विक्षिप्तो विद्योतो द्युतिमान् जटाकलापो यस्य । भस्मनाऽवगुंठः प्रावृतोऽमलो रुक्मवद्देहो यस्य । स देव-
स्त्रिभिः सोमार्काग्निनेत्रैः पश्यतीत्यस्योत्तरश्लोकत्रयेऽप्यनुषंगः । एकस्य जामातरः परस्परं भ्रातरो व्यवह्रियंते अतो मम भ्राता असौ तव देवर इति लज्जार्थमुक्तम् ॥ २४ ॥
ननु तथापि महत्त्वेनादरणीयस्य स्वजनस्य च तव स सर्वं क्षमेतैव तत्राह । यस्य स्वजनादिर्नास्ति समत्वात् । ईश्वरस्य ऐश्वर्यमेवाह । येन चरणेनापविद्धां निर्माल्यवद्दूरत-

---

यावेळीं शंकराचीं अनुचरभूतें, जिकडेतिकडे संचार करीत असतात ॥ २२ ॥ हे पतिव्रते, या संध्याकाळच्या वेळीं, प्राणिमात्रांचें परिपालन करणारा भूतपति भगवान्
शंकर, आपल्या बरोबर भूतप्रमथादिक गण घेऊन नंदीवर बसून फिरत असतो ॥ २३ ॥ श्मशानांतील वावटळीनें उडालेल्या धूळीनें धूम्रवर्ण असून विसकटलेला व
दैदीप्यमान असा ज्याचा जटाभार आहे आणि भस्माचा लेप दिलेला, निर्मळ व सुवर्णासारखा ज्याचा देह आहे असा तुझा दीर जो देव (शंकर), तो, चंद्र, सूर्य, व अग्नि ह्या
आपल्या तीन नेत्रांनीं जगांतील सर्व प्रकार पहात असतो ॥ २४ ॥ या जगामध्यें ज्याला कोणी स्वकीय अथवा परकीय नाहीं, तसाच ज्याला कोणी अतिमान्य किंवा
निंद्य नाहीं. तथापि ज्यानें उपभोग घेऊन निर्माल्याप्रमाणें आपल्या चरणानें दूर झुगारून दिलेल्या मायिक संपत्तीची आह्मी व्रतादिकांच्या योगेंकरून आशा करीत

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आहों! काय हें आश्चर्य ! ॥ २५ ॥ आपल्या वरील मायेचें आवरण नाहींसें करण्याची इच्छा करणारे बुद्धिमान् पुरुष, ज्याच्या निर्दोष चरित्राचें वर्णन करितात, ज्याची बरोबरी किंवा अधिकपणा दुसऱ्या कोणासहि करितां येणार नाहीं आणि साधूंची गतिरूप असाहि त्या शंकरानें पिशाचवृत्तीचें आचरण स्वीकारिलें आहे ॥ २६ ॥ ज्यांनीं वस्त्रें, पुष्पें, अलंकार व केशरादिकांच्या उट्या इत्यादिकांच्या योगेंकरून, श्वानांनीं भक्षण करण्यास योग्य असें आपलें शरीर आत्मत्वेंकरून उपलालन केलें आहे, तेंच हतभाग्य अज्ञानी लोक, आत्मस्वरूपीं रममाण असणाऱ्या ज्या शंकराच्या लोकशिक्षारूप आचरणाचा उपहास करितात ॥ २७ ॥ ब्रह्मादिक देवही, ज्यानें केलेल्या धर्ममर्यादांचें पालन करितात, हें सर्व जग ज्यानें उत्पन्न केलें आहे, आणि सृष्टि उत्पन्न करणारी माया ही ज्याच्या आज्ञेमध्यें वागणारी आहे. त्या शंकरानें स्वतः पिशा-

स्त्यक्तां तेन भुक्तभोगामजां मायां तन्मयीं विभूतिं महाप्रसाद इत्याशास्महे । व्रतैस्तमाराध्य ॥ २५ ॥ अनिषिद्धसुखत्यागादसौ पिशाच इत्युपहासो न कार्य इत्याह द्वाभ्याम् । यस्यानवद्यं विषयासक्तिशून्यमाचरितम् । बिभित्सवो भेत्तुमिच्छवः ॥ २६ ॥ समीहितमभिप्रेतं लोकशिक्षारूपं अविदुषोऽविद्वांसः । यद्वा । न विद्वानन्यो यस्मादिति तस्य सर्वज्ञस्येत्यर्थः । दुर्भगानेवाह । यैरिति । श्वभोजनं शुनां भोज्यं शरीरं स्वात्मतयाऽयमेवात्मेति बुद्ध्या ॥ २७ ॥ अहो अतर्क्यं तस्याचरणमित्याह । ब्रह्मादयो येन कृतान्सेतूंन्स्व

यस्यानवद्याचरितं मनीषिणो गृणंत्यविद्यापटलं बिभित्सवः ॥ निरस्तसाम्यातिशयोऽपि यत्स्वयं पिशाचचर्यामचरद्गतिः सताम्
॥ २६ ॥ हसंति यस्याचरितं हि दुर्भगाः स्वात्मन्रतस्याविदुषः समीहितम् ॥ यैर्वस्त्रमाल्याभरणानुलेपनैः श्वभोजनं स्वात्मतयो-
पलालितम् ॥ २७ ॥ ब्रह्मादयो यत्कृतसेतुपाला यत्कारणं विश्वमिदं च माया ॥ आज्ञाकरी तस्य पिशाचचर्या अहो विभूम्नश्चरितं
विडंबनम् ॥ २८ ॥ ॥ मैत्रेय उवाच ॥ सैवं संविदिते भर्त्रा मन्मथोन्मथितेंद्रिया ॥ जग्राह वासो ब्रह्मर्षेर्वृषलीव गतत्रपा ॥ २९ ॥
स विदित्वाऽथ भार्यायास्तं निर्बंधं विकर्मणि ॥ नत्वा दिष्टाय रहसि तयाऽथोपविवेश ह ॥ ३० ॥ अथोपस्पृश्य सलिलं प्राणानायम्य
वाग्यतः ॥ ध्यायन् जजाप विरजं ब्रह्म ज्योतिः सनातनम् ॥ ३१ ॥ दितिस्तु व्रीडिता तेन कर्मावद्येन भारत ॥ उपसंगम्य विप्रर्षिम-
धोमुख्यभ्यभाषत ॥ ३२ ॥ दितिरुवाच ॥ मा मे गर्भमिमं ब्रह्मन्भूतानामृषभोऽवधीत् ॥ रुद्रः पतिर्हि भूतानां यस्याकरवमंहसम् ॥ ३३ ॥

स्वाधिकारान्पालयंति यः कारणं यस्य येन कृतमिदं विश्वम् । माया च यस्याज्ञाकरी । विभूम्नः परमेश्वरस्य विडंबनमतर्क्यमित्यर्थः ॥ २८ ॥ भर्त्रा निरूपकेणैवं संविदिते ज्ञापितेऽपि सति वृषलीव वेश्येव ॥ २९ ॥ विकर्मणि निषिद्धे कर्मणि दिष्टाय दैवरूपायेश्वराय । उपविवेशेति मैथुनं लक्ष्यते ॥ ३० ॥ उपस्पृश्य स्नात्वा भर्गशब्दवाच्यं विरजं ज्योतिर्ध्यायन्सनातनं ब्रह्म गायत्रीं प्रणवं वा जजाप ॥ ३१ ॥ कर्मावद्येन कर्मदोषेण ॥ ३२ ॥ मावधीन्माहंस्त्वित्यर्थः । वधशंकाबीजमाह । रुद्र इति । अंहसमंहोऽपराधम-

चवृत्ति धारण केली आहे! तस्मात् जगद्व्यापक भगवंताचें चरित्र अतर्क्य आहे यांत संशय नाहीं ॥ २८ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, कश्यपानें याप्रमाणें सांगितलें असतांहि मदनानें व्याकुळ झालेली ती दिति, वेश्येप्रमाणें निर्लज्ज होऊन, तिनें ब्रह्मर्षीचें वस्त्र ग्रहण केलें ॥ २९ ॥ नंतर त्या कश्यपानें, निषिद्ध कर्म करण्याविषयीं आपल्या भार्येचा तो आग्रह जाणून, निरुपाय झाल्यामुळें दैवरूपी ईश्वराला नमस्कार करून नंतर एकांतीं तिच्याशीं गमन केलें ॥ ३० ॥ नंतर त्या मुनीनें स्नान करून प्राणायाम केल्यावर मौनव्रताचें धारण केलें आणि भर्गशब्दानें वाच्य अशा निर्मळ तेजाचें (सूर्याचें) ध्यान करीत सनातन ब्रह्मरूप गायत्रीमंत्राचा जप केला ॥ ३१ ॥ हे विदुरा, इकडे दिति तर त्या निंद्य कर्मानें लज्जित होऊन कश्यप ऋषीच्या जवळ जाऊन नम्रमुखी होऊन भाषण करूं लागली ॥ ३२ ॥ दिति ह्मणाली– हे ब्रह्मन्, मी ज्याचा अपराध

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

केला आहे त्या भूतपति भगवान् रुद्रानें माझ्या ह्या गर्भाचा नाश करूं नये ॥ ३३ ॥ जो अपराध्यांचेठिकाणीं अतिभयंकर, सकाम कर्मे करणाऱ्यांस त्यांचें फल देणारा, निष्काम कर्मे करणाऱ्यांस मुक्ति देणारा, वस्तुतः दंडाचा त्याग करणारा, परंतु दुष्टांचेठिकाणीं दंड धारण करणारा व त्यांचा नाश करण्याविषयीं क्रोधरूप धारण करणारा अशा त्या सर्वदुःखनाशक महादेवाला नमस्कार असो ॥ ३४ ॥ तो पूर्णदयाळु, सतीचा पति, माझा मेहुणा भगवान् देव, अगदीं निर्दय अशा व्याधानेंसुद्धां दया करण्यास योग्य अशा आह्मां स्त्रियांवर प्रसन्न होवो ॥ ३५ ॥ मैत्रेय ह्मणाला—हे विदुरा, थरथर कांपणाऱ्या व आपल्या संततीचें इहपरलोकीं कल्याण व्हावें अशी इच्छा करणाऱ्या त्या आपल्या स्त्रीला अवलोकन करून, संध्याकाळचें विहित कर्मानुष्ठान आटोपल्यावर तो कश्यप ऋषि, त्या स्त्रीला ह्मणाला कीं, ॥ ३६ ॥ कश्यप ह्मणाला—

करवं कृतवत्यस्मि ॥ ३३ ॥ रुत् दुःखं तद्द्रावयतीति रुद्रस्तस्मै उग्रायानतिलंघ्याय मीढुषे सकामेषु फलसेचनकर्त्रे निष्कामेषु शिवाय वस्तुतो न्यस्तदंडाय दुष्टेषु धृतदंडाय संहारे मन्यवे ॥ ३४ ॥ भामो भगिनीभर्ता उरुरनुग्रहो यस्य व्याधस्य निर्दयस्यापि सतीपतिरित्यनेन स्त्रीणां स्वभावं स्वयमपि वेत्तीति सूचयति ॥ ३५ ॥ स्वसर्गस्य स्वसंतानस्याशिषं शुभं लोक्यां लोकद्वयार्हां संध्यायां यो नियमः स निवृत्तो यस्य ॥ ३६ ॥ ते आत्मनश्चित्तस्याप्रायत्यादशुचित्वात् मौहूर्तिकात्संध्यारूपात् उत अपि मम निदे-

नमो रुद्राय महते देवायोग्राय मीढुषे ॥ शिवाय न्यस्तदंडाय धृतदंडाय मन्यवे ॥ ३४ ॥ स नः प्रसीदतां भामो भगवानुर्वनुग्रहः ॥ व्याधस्याप्यनुकंप्यानां स्त्रीणां देवः सतीपतिः ॥ ३५ ॥ मैत्रेय उवाच ॥ स्वसर्गस्याशिषं लोक्यामाशासानां प्रवेपतीम् ॥ निवृत्तसंध्यानियमो भार्यामाह प्रजापतिः ॥ ३६ ॥ ॥ कश्यप उवाच ॥ अप्रायत्यादात्मनस्ते दोषान्मौहूर्तिकादुत ॥ मन्निदेशातिचारेण देवानां चातिहेलनात् ॥ ३७ ॥ भविष्यतस्तवाभद्रावभद्रे जाठराधमौ ॥ लोकान्सपालांस्त्रींश्चंडि मुहुराक्रंदयिष्यतः ॥ ३८ ॥ प्राणिनां हन्यमानानां दीनानामकृतागसाम् ॥ स्त्रीणां निगृह्यमाणानां कोपितेषु महात्मसु ॥ ३९ ॥ तदा विश्वेश्वरः क्रुद्धो भगवाँल्लोकभावनः ॥ हनिष्यत्यवतीर्यासौ यथाऽद्रीन् शतपर्वधृक् ॥ ४० ॥ दितिरुवाच ॥ वधं भगवता साक्षात्सुनाभोदारबाहुना ॥ आशासे पुत्रयोर्मह्यं माक्रुद्धाद्ब्राह्मणाद्विभो ॥ ४१ ॥ न ब्रह्मदंडदग्धस्य न भूतभयदस्य च ॥ नारकाश्चानुगृह्णंति यां यां योनिमसौ गतः ॥ ४२ ॥

शस्याज्ञाया अतिचारेणातिक्रमेण देवानां रुद्रानुचराणाम् ॥ ३७ ॥ एतैश्चतुर्भिर्हेतुभिर्जाठराधमौ पुत्रापसदौ हेचंडि कोपने ॥ ३८ ॥ हन्यमानानां सताम् ॥ ३९ ॥ शतपर्वधृक् वज्रधर इंद्रः ॥ ४० ॥ सुनाभेनोदारो बाहुर्यस्य । मह्यं मम । कोपितेष्वित्युक्तत्वाच्छंकितचित्ता सती प्रार्थयते ब्राह्मणान्माभूदिति ॥ ४१ ॥ नारका अपि तथा यां यां

हे क्रोधिष्टे अभद्रे स्त्रिये, तुझ्या अंतःकरणाच्या अशुद्धतेमुळें, संध्याकाळची वेळ अमंगळ असल्यामुळें, माझ्या आज्ञेचा तूं भंग केल्यामुळें व रुद्रानुचर देवांचा तूं अपमान केल्यामुळें तुला अकल्याणकारक असे दोन अधम पुत्र होतील आणि ते लोकपालांसहवर्तमान तिन्ही लोकांस वारंवार दुःख देतील ॥ ३७ ॥ ३८ ॥ त्यांच्यापासून निरपराधी दीन प्राण्यांचा वध होऊं लागला असतां, स्त्रियांवर बलात्कार होऊं लागला असतां आणि त्यांनीं अपराध केल्यामुळें भगवद्भक्त क्रोधाविष्ट झाले असतां—॥ ३९ ॥ त्यावेळीं लोकांचें रक्षण करणारा हा विश्वेश्वर भगवान् क्रुद्ध होत्साता, अवतार धारण करून, ज्सा वज्रधारण करणारा इंद्र पर्वताचा छेद करितो त्याप्रमाणें तुझ्या मुलांचा वध करील ॥ ४० ॥ दिति ह्मणाली—हे प्रभो, सुदर्शनचक्राच्या योगानें ज्याचा बाहु उदार (मुक्ति देणारा) आहे, त्या साक्षात् विष्णूकडूनतरी माझ्या पुत्रांचा वध व्हावा अशी मी इच्छा करित्यें, परंतु एकाद्या रागावलेल्या ब्राह्मणाकडून (शापद्वारा) माझ्या पुत्रांचा वध न होवो ॥ ४१ ॥ कारण, ब्राह्मणाच्या शापानें जळून मेलेला

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

व प्राणिमात्रांना भय उत्पन्न करणारा या दोघांवर नरकांतीलहि प्राणी दया करीत नाहींत व तो प्राणी, ज्या ज्या दुसऱ्या कोणत्याहि योनींत जाईल त्या त्या ठिकाणचे प्राणी त्याच्यावर दया करीत नाहींत ॥ ४२ ॥ कश्यप ह्मणाला–हे प्रिये, आपण केलेल्या अपराधांबद्दल झालेलें दुःख आणि पश्चात्ताप यांच्यामुळें, तत्काल योग्य अयोग्य गोष्टींचा विचार केल्यामुळें, भगवान् विष्णूच्याठिकाणीं मोठा मान ठेविल्यामुळें आणि शंकर व मी या दोघांविषयींहि पूज्यबुद्धि ठेविल्यामुळें ॥ ४३ ॥ तुझ्या पुत्राच्या चार पुत्रांमध्यें साधूंना मान्य असा एक पुत्र, होईल. त्याची पवित्र कीर्ति भगवंताच्या कीर्तीच्या बरोबरीनें लोक गातील ॥ ४४ ॥ हीनवर्ण झालेल्या सोन्याला जसें दाहादिक उपायांनीं शुद्ध करून घेतात त्याप्रमाणें साधु, ज्या तुझ्या नांतवाचा (प्रऱ्हादाचा) स्वभाव प्राप्त करून घेण्याविषयीं, निर्वैरत्व, समचित्तत्व इत्यादिक उपायांनीं

योनिमसौ गतो भवति तत्रस्थाश्च नानुगृह्णंति कृपां न कुर्वंति ॥ ४२ ॥ कृतो योऽपराधस्तेन शोकस्ततोऽनुतापस्तेन प्रत्यवमर्शनाद्युक्तायुक्तविचारात् भगवति हरौ भवे श्री-रुद्रे एतैः पंचभिः कारणैः ॥ ४३ ॥ पुत्रस्य हिरण्यकशिपोः पुत्राणां मध्ये एकः सतां मतो भविष्यति । तमेव वर्णयति गास्यंतीति सार्धैः पंचभिः । समं सह सदृशं वा ॥४४॥ हीनवर्णं हेम यथा योगैर्दाहादिभिरुपायैः शोध्यते तथा यस्य शीलं स्वभावमनुवर्तितुमनुगंतुं प्राप्तुं निर्वैरादिभिर्योगैरात्मानं भावयिष्यंति शोधयिष्यंति ॥ ४५ ॥ विश्वप्रसादे

॥ कश्यप उवाच ॥ कृतशोकानुतापेन सद्यः प्रत्यवमर्शनात् ॥ भगवत्युरुमानाच्च भवे मय्यपि चादरात् ॥ ४३ ॥ पुत्रस्यैव तु पु-त्राणां भवितैकः सतां मतः ॥ गास्यंति यद्यशः शुद्धं भगवद्यशसा समम् ॥ ४४ ॥ योगैर्हेमेव दुर्वर्णं भावयिष्यंति साधवः ॥ निर्वै-रादिभिरात्मानं यच्छीलमनुवर्तितुम् ॥ ॥ ४५ ॥ यत्प्रसादादिदं विश्वं प्रसीदति यदात्मकम् ॥ स स्वदृग्भगवान्यस्य तोष्यतेऽनन्य-या दृशा ॥ ४६ ॥ स वै महाभागवतो महात्मा महानुभावो महतां महिष्ठः ॥ प्रवृद्धभक्त्या ह्यनुभाविताशये निवेश्य वैकुंठमिमं विहास्यति ॥ ४७ ॥ अलंपटः शीलधरो गुणाकरो हृष्टः परर्द्ध्या व्यथितो दुःखितेषु ॥ अभूतशत्रुर्जगतः शोकहर्ता नैदाघिकं तापमिवोडु-राजः ॥ ४८ ॥ अंतर्बहिश्चामलमब्जनेत्रं स्वपूरुषेच्छाऽनुगृहीतरूपम् ॥ पौत्रस्तव श्रीललनाललामं द्रष्टा स्फुरत्कुंडलमंडिताननम् ॥४९॥

हेतुर्यदात्मकं स्वदृगात्मसाक्षी यस्यानन्यया भगवानेव सत्य इत्येवंभूतया दृशा तोष्यते तोषं प्राप्स्यते ॥ ४६ ॥ तत्र हेतुः । सवा इति महात्माऽपरिच्छिन्नदृष्टिः महानुभावो महाप्रभावः महतामपि मध्ये महिष्ठोऽतिशयेन महान् प्रवृद्धय। भक्त्यानुभाविते शोधिते चित्ते वैकुंठं हरिं निवेश्य देहाद्यभिमानं त्यक्ष्यति ॥ ४७ ॥ महाभागवतत्वमाह । अलं-पट इति । शीलधरः सुस्वभावः गुणानां धैर्यादीनामाकरो जन्मभूमिः परेषां समृद्ध्या हृष्टः परेषु दुःखितेषु सत्सु न भूतो जातः शत्रुर्यस्य निदाघे भवं तापं चंद्रो यथा हर-त्येवं जगतः शोकहर्ता भविष्यति ॥ ४८ ॥ अपरिच्छिन्नदृष्टित्वमाह । अंतर्रिति। स्वपुरुषाणामिच्छया पुनः पुनर्गृहीतानि रूपाणि येन । श्रीरेव ललना सुंदरी तस्या ललामं

आपल्या अंतःकरणाला शुद्ध करून घेतील ॥ ४५ ॥ हें भगवत्स्वरूपि जग, ज्याच्या प्रसादानें आनंद पावतें तो सर्वसाक्षी भगवान् ज्याच्या (प्रऱ्हादाचा) 'भगवानच सत्य आहे अशा' अनन्यदृष्टीनें संतोष पावेल ॥ ४६ ॥ महाभगवद्भक्त, उदारचित्त, महाप्रतापी व थोरांमध्येंहि थोर असा तो प्रऱ्हाद, अतिशय वृद्धिंगत झालेल्या भक्तीनें शुद्ध केलेल्या अंतःकरणांत श्रीविष्णूची स्थापना करून देहा दिकांवर असलेला अभिमान सोडून देईल ॥ ४७ ॥ विषयांचेठिकाणीं लंपट नसणारा, सुस्वभावानें युक्त, गुणांचा निधि, दुसऱ्याचें ऐश्वर्य पाहून संतोष मानणारा, दुसरे दुःखित झाले असतां दुःख मानणारा, आणि शत्रुबुद्धिरहित असा तो प्रऱ्हाद, जसा चंद्र, ग्रीष्मऋतुसंबंधी तापाचा नाश करितो त्याप्रमाणें जगाच्या शोकाचा नाश करणारा होईल ॥ ४८ ॥ हे प्रिये, या जगाच्या आंत बाहेर व्यापून असणारा, निर्दोष, भक्तांच्या इच्छेप्रमाणें रूप ॥ ४४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

धारण करणारा, लक्ष्मीरूप स्त्रीचें परमभूषण आणि देदीप्यमान कुंडलांच्या योगानें ज्याचें मुख शोभायुक्त झालें आहे अशा कमलनयन भगवंताला, तुझा नातु प्रल्हाद, प्रत्यक्ष अवलोकन करील ॥ ४९ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, आपला नातु भगवद्भक्त होणार असें ऐकून दितीला अतिशय आनंद झाला आणि आपल्या पुत्रांचा वध भगवंताच्याच हातून होणार असें जाणून, त्यांस सद्गति होईल अशा अभिप्रायानें तिच्या मनाला समाधान वाटलें ॥ ५० ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील तृतीयस्कंधामध्यें दितिकश्यपसंवादरूप हा चवदावा अध्याय समाप्त झाला ॥ १४ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ ७ ॥ नंतर निस्तेज झालेल्या देवांनीं, आपल्या तेजोहानीचें कारण ब्रह्मदेवाला विचारिलें असतां, त्यानें वैकुंठवासी जयविजयनामक विष्णुदूतांना ब्राह्मणाचा शापवगैरे झाल्याचें कारण त्यांस कथन केलें, ही कथा या

मंडनम् । द्रष्टा द्रक्ष्यति ॥ ४९ ॥ महामनाः सोत्साहचित्ता हरिणा सह युद्धेन मरणे पुत्रयोः कीर्तिः सद्गतिश्च भवेदिति ॥ ५० ॥ इति तृतीयस्कंधे टीकायां चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥ ॥ हतप्रभैः सुरैः पृष्टः प्राह पंचदशे विधिः ॥ तद्बीजविप्रशापादि वैकुंठे विष्णुभृत्ययोः ॥ १ ॥ तदेवं देवानां ब्रह्मणश्च संवादप्रस्तावमुक्त्वेदानीं तं संवादं वक्तुमाह । प्राजापत्यं काश्यपं तेजो वीर्यं परेषां तेजो हंतीति तथा आर्षः । स्वपुत्राभ्यां करिष्यते यत्सुराणामर्दनं पीडनं तस्माच्छंकमाना ॥१॥ तेन गर्भतेजसा हतालोके निरस्तसूर्यादिप्र-

मैत्रेय उवाच ॥ श्रुत्वा भागवतं पौत्रममोदत दितिर्भृशम् ॥ पुत्रयोश्च वधं कृष्णाद्विदित्वाऽऽसीन्महामनाः ॥ ५० ॥ इति श्रीमद्भागवते तृतीयस्कंधे दितिकश्यपसंवादे चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥ मैत्रेय उवाच ॥ प्राजापत्यं तु तत्तेजः परतेजोहनं दितिः ॥ दधार वर्षाणि शतं शंकमाना सुरार्दनात् ॥१॥ लोके तेन हतालोके लोकपाला हतौजसः ॥ न्यवेदयन्विश्वसृजे ध्वांतव्यतिकरं दिशाम् ॥२॥ देवा ऊचुः ॥ तम एतद्विभो वेत्थ संविग्ना यद्वयं भृशम् ॥ न ह्यव्यक्तं भगवतः कालेनास्पृष्टवर्त्मनः ॥ ३ ॥ देवदेव जगद्धातर्लोकनाथ शिखामणे ॥ परेषामपरेषां त्वं भूतानामसि भाववित् ॥ ४ ॥ नमो विज्ञानवीर्याय माययेदमुपेयुषे ॥ गृहीतगुणभेदाय नमस्तेऽव्यक्तयोनये ॥ ५ ॥

काशे हतौजसो हतप्रभावाः ध्वांतेन व्यतिकरं संकरम् ॥ २ ॥ वेत्थ जानासि किं विचारयसि यद्यतो वयं संविग्ना भीताः अव्यक्तमज्ञातम् । न स्पृष्टं वर्त्म ज्ञानप्रचारो यस्य ॥ ३ ॥ ब्रह्माणं परमेश्वरत्वेन स्तुवंतः प्रार्थयंते । देवदेवेति सप्तभिः । लोकनाथानां शिखामणे भावविदभिप्रायज्ञोऽसि । केनाभिप्रायेण । दितेर्गर्भो वर्धत इति जानासीत्यर्थः ॥ ४ ॥ विज्ञानं वीर्यं बलं यस्य । इदं ब्रह्मदेहमुपेयुषे प्राप्तवते गृहीतो गुणभेदो रजोगुणो येन । व्यक्तस्य प्रपंचस्य योनये कारणाय न व्यक्ता केनापि प्रमाणेन विज्ञाता योनिर्यस्येति वा ॥ ५ ॥

पंधराव्या अध्यायांत वर्णिलेली आहे ॥ १ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, आपल्या पुत्रांकडून देवांना पीडा प्राप्त होईल अशी शंका धारण करणाऱ्या त्या दितीनें, इतरांच्या तेजाचा नाश करणारें तें कश्यपऋषींचें वीर्य शंभर वर्षेंपर्यंत आपल्या उदरांत धारण केलें ॥ १ ॥ त्या तेजाच्या योगानें लोकांतील चंद्रसूर्यादिकांचा सुद्धां प्रकाश नाहींसा झाला असतां, हतवीर्य झालेल्या इंद्रादिक लोकपालांनीं, अंधकारानें झालेला दिशांचा संकर (पूर्वपश्चिमादिक दिशा ओळखूं येत नाहीं अशी स्थिति) ब्रह्मदेवास कळविला ॥ २ ॥ देव ह्मणाले– हे विधात्या ज्या तुझ्या ज्ञानमार्गाला कालानें स्पर्श केला जात नाहीं, त्या तुज भगवंताला माहित नाहीं अशी कोणतीहि गोष्ट नाहीं. ह्मणून आह्मी ज्यापासून अत्यंत भिऊन गेलों आहों असा हा अंधकार कोठून प्राप्त झाला तें तूं जाणतच आहेस ॥ ३ ॥ हे देवदेवा, हे जगत्पालका, हे लोकनाथमुकुटमणे, तूं सर्वहि उच्चनीच प्राणिमात्रांचा अभिप्राय जाणणारा आहेस ॥ ४ ॥ हे देवा, अनेक प्रकारच्या ज्ञानरूप बलानें युक्त अशा तुला नमस्कार असो. मायेच्या योगानें रजोगुणाचा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

स्वीकार करणारा आणि या ब्रह्मदेवस्वरूपाला धारण करणारा, परंतु सर्व प्रपंचाचें कारण अशा तुला नमस्कार असो ॥ ५ ॥ आपल्याठिकाणीं सर्व भुवनें ओंऊन ठेवणारा, कार्यकारणस्वरूपी असूनहि वस्तुतः त्यांहून निराळा व सर्व जीवांचा उत्पादक अशा तुझें अनन्य भक्तीनें जे चिंतन करितात त्या–प्राण, इंद्रियें व मन यांस जिंकणाऱ्या, परिपक्व झालेल्या योगसाधनानें युक्त व तुझा प्रसाद मिळविणाऱ्या पुरुषांना कोठेंहि पराभव प्राप्त होत नाहीं ॥ ६ ॥ ७ ॥ सर्व प्रजा, ज्या तुझ्या वेदलक्षणवाणीरूप दांवणीनें बांधल्या गेल्या असून, नांकामध्यें वेसण घातलेले वृषभ जसे धन्याचें ओझें पोंचवितात त्याप्रमाणें आपल्या अधिकारानुरूप कर्मे करून तीं तुह्मांस व आह्मांस अर्पण करितात, त्या जगन्नियंत्या तुला नमस्कार असो ॥ ८ ॥ हे परमेश्वरा, त्या तूं, सांप्रतकालीं अंधकारानें रात्रदिवस समजत नसल्यामुळें ज्या आमचीं कर्मे बंद पडलीं-

सकामतया प्रतिक्षणं दुःखमनुभवंतो निष्कामभक्तान् स्तुवंत आहुर्द्वाभ्याम् । ये त्वा त्वामनन्येन निष्कामेन भावेन भक्त्या ध्यायंति आत्मनो जीवान्भावयतीति तथा । स्वस्मिन्प्रोतानि ग्रथितानि भुवनानि येन । चेतनाचेतनप्रपंचकारणमित्यर्थः । तत्र हेतुः । सदसदात्मकं कार्यकारणरूपं वस्तुतस्ताभ्यां परम् ॥ ६ ॥ जितः श्वास इंद्रियाण्यात्मा मनश्च यैः अतः सुपक्वयोगाः अतएव प्राप्तो युष्मत्प्रसादो यैस्तेषाम् ॥ ७ ॥ अन्ये तु नित्यं कर्मक्लेशिन इत्याहुः । यस्येति । तंत्या दामन्या आयत्ता अधीनाः । मुख्याय नि-

ये त्वाऽनन्येन भावेन भावयंत्यात्मभावनम् ॥ आत्मनि प्रोतभुवनं परं सदसदात्मकम् ॥ ६ ॥ तेषां सुपक्वयोगानां जितश्वासेंद्रिया-
त्मनाम् ॥ लब्धयुष्मत्प्रसादानां न कुतश्चित्पराभवः ॥ ७ ॥ यस्य वाचा प्रजाः सर्वा गावस्तंत्येव यंत्रिताः ॥ हरंति बलिमायत्ता-
स्तस्मै मुख्याय ते नमः ॥ ८ ॥ स त्वं विधत्स्व शं भूमंस्तमसा लुप्तकर्मणाम् ॥ अदभ्रदयया दृष्ट्या आपन्नानर्हसीक्षितुम् ॥ ९ ॥
एष देव दितेर्गर्भ ओजः काश्यपमर्पितम् ॥ दिशस्तिमिरयन्सर्वा वर्धतेऽग्निरिवैधसि ॥ १० ॥ ॥ मैत्रेय उवाच ॥ स प्रहस्य महा-
बाहो भगवान् शब्दगोचरः ॥ प्रत्याचष्टात्मभूर्देवान् प्रीणन् रुचिरया गिरा ॥ ११ ॥ ॥ ब्रह्मोवाच ॥ मानसा मे सुता
युष्मत्पूर्वजाः सनकादयः ॥ चेरुर्विहायसा लोकाँल्लोकेषु विगतस्पृहाः ॥ १२ ॥ त एकदा भगवतो वैकुंठस्यामलात्मनः ॥ ययुर्वै-
कुंठनिलयं सर्वलोकनमस्कृतम् ॥ १३ ॥

यंत्रे प्राणरूपायेति वा । तथा च श्रुतिः । तस्य वाक्तंतिर्नामानि दामनि इत्यादिः ॥ ८ ॥ तमसा अहोरात्रविभागाभावेन लुप्तानि कर्माणि येषाम् । आपन्नानापद्गतानस्मान् ॥ ९ ॥ आपत्कारणमाहुः । एष गर्भः तस्य विशेषणम् । अर्पितं निक्षिप्तं काश्यपमोजो वीर्यं दिशस्तिमिरयंस्तमो व्याप्ताः कुर्वन् ॥ १० ॥ दितेः कुचेष्टितं ज्ञात्वा प्रहस्य देवानां ये शब्दा विज्ञप्तिवाक्यानि तेषां गोचरो विषयभूतः प्रत्यभाषत ॥ ११ ॥ युष्मत्सकाशात्पूर्वं जाताः ॥ १२ ॥ वैकुंठाख्यं लोकं ययुः ॥ १३ ॥

आहेत त्या आमचें कल्याण करावें. आतां शरण आलेल्या आह्मांकडे आपल्या पूर्ण कृपायुक्त दृष्टीनें अवलोकन करण्यास तूं योग्य आहेस ॥ ९ ॥ हे देवा, जसा ओल्या काष्ठामध्यें ठेवलेला अग्नि, धूर उत्पन्न करीत पेटूं लागतो त्याप्रमाणें कश्यपऋषीनें दितीच्या उदरीं स्थापन केलेलें हें गर्भरूप तेज, सर्व दिशा अंधकारानें व्याप्त करीत वाढूं लागलें आहे ॥ १० ॥ मैत्रेय ह्मणाला– हे महाबाहो विदुरा, देवांची प्रार्थना ऐकून घेणारा तो भगवान् ब्रह्मदेव, दितीचें कुचेष्टित मनांत आल्यामुळें हास्य करून, देवांना संतोष उत्पन्न करीत होत्साता मधुरवाणीनें भाषण करूं लागला ॥ ११ ॥ ब्रह्मदेव ह्मणाला–हे देवहो, तुमच्या पूर्वीं उत्पन्न झालेले माझे मानसिक पुत्र जे सनत्कुमार, सनक, सनंदन आणि सनातन ते निरिच्छपणें आपल्या सत्यलोकांतून निघून इतर सर्व लोकांचेठिकाणीं आकाशमार्गानें फिरत असत ॥ १२ ॥ ते एकेवेळीं फिरतां फिरतां,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

निर्मलचित्त व षड्गुणैश्वर्यसंपन्न अशा विष्णूच्या सर्व लोकांनीं वंद्य अशा वैकुंठलोकास निघून गेले ॥ १३ ॥ ज्यांनीं पूर्वी निष्काम धर्माच्या योगानें हरीचें आराधन केलें आहे ते सर्वहि पुरुष, विष्णूसारखी मूर्ति धारण करून त्या वैकुंठलोकाचेठिकाणीं वास करितात ॥ १४ ॥ ज्या वैकुंठलोकाचेठिकाणीं, वेदांतांनींच जाणला जाणारा पुराणपुरुष धर्मरूपी भगवान् विष्णु, शुद्धसत्त्वगुणमय मूर्ति धारण करून आह्मां भक्तांना सुख देण्याकरितां राहत असतो ॥ १५ ॥ जेथें मूर्तिमंत मोक्षच कीं काय असें सर्व ऋतूंमध्यें पुष्पादि संपत्तीनें युक्त अशा मनोरथपूरक वृक्षांनीं शोभणारें नैःश्रेयसनामक वन (बाग) आहे ॥ १६ ॥ ज्या वनामध्यें—स्त्रियांसहवर्तमान विमानांतून संचार करणारे विष्णुभक्त, पाण्यामध्यें ज्यांचा मकरंद (सुवास) पसरला आहे अशा प्रफुल्लित झालेल्या वसंत ऋतूंतील मोगऱ्यांच्या वायूनें आणलेल्या सुगंधानें

तं वर्णयति । वसंती त्यादिद्वादशभिः । वैकुंठस्य हरेरिव मूर्तिर्येषां ते । निमित्तं फलं न निमित्तं प्रवर्तकं यस्मिन् । निष्कामेन धर्मेणेत्यर्थः । आराधयन्नाराधितवंतः ॥ १४ ॥ यत्रेति । शब्दगोचरो वेदांतैकवेद्यः विरजं सत्त्वमूर्तिं विष्टभ्य धृत्वा वृषो धर्ममूर्तिः स्वानां स्वान् ॥ १५ ॥ तत्रत्यं वनं विशिनष्टि । यत्रेति चतुर्भिः । सर्वेष्वप्यृतुषु श्रीः पुष्पादिसंपत्तेषां तैः ॥१६॥ चरितानि चरित्राणि भर्तुः प्रभोः अनुविकसंत्यो मधु मकरंदस्तद्युक्ता माधव्यो वासंत्यो लताः यद्वा अनुविकसन्मधवः प्रसरन्मकरंदा साधव्यो मधुकालीनाः सुमनसस्तासां

वसंति यत्र पुरुषाः सर्वे वैकुंठमूर्तयः ॥ येऽनिमित्तनिमित्तेन धर्मेणाराधयन् हरिम् ॥ १४ ॥ यत्र चाद्यः पुमानास्ते भगवान् शब्दगोचरः ॥ सत्त्वं विष्टभ्य विरजं स्वानां नो मृडयन् वृषः ॥ १५ ॥ यत्र नैःश्रेयसं नाम वनं कामदुघैर्द्रुमैः ॥ सर्वर्तुश्रीभिर्विभ्राजत्कैवल्यमिव मूर्तिमत् ॥ १६ ॥ वैमानिकाः सललनाश्चरितानि यत्र गायंति लोकशमलक्षपणानि भर्तुः ॥ अंतर्जलेऽनुविकसन्मधुमाधवीनां गंधेन खंडितधियोऽप्यनिलं क्षिपंतः ॥ १७ ॥ पारावतान्यभृतसारसचक्रवाकदात्यूहहंसशुकतित्तिरिबर्हिणां यः ॥ कोलाहलो विरमतेऽचिरमात्रमुच्चैर्भृंगाधिपे हरिकथामिव गायमाने ॥ १८ ॥ मंदारकुंदकुरवोत्पलचंपकार्णपुन्नागनागबकुलांबुजपारिजाताः ॥ गंधेऽर्चिते तुलसीकाभरणेन तस्या यस्मिंस्तपः सुमनसो बहु मानयंति ॥ १९ ॥

गंधेन खंडिता विघ्निता धीर्येषां तेऽपि तद्गंधप्रापकमनिलं क्षिपंतस्तिरस्कुर्वंतो गायंति । अनेन भगवत्पार्षदानां निरतिशयविषयसुखेऽपि भगवद्भजनानंदासक्तिर्दर्शिता ॥ १७ ॥ अन्यभृताः कोकिलाः दात्यूहश्चातकः अचिरमात्रं क्षणमात्रं विरमति अनेन तत्रत्यपक्षिणामपि हरिकथाश्रवणादिपरमानंदो दर्शितः ॥ १८ ॥ मंदारपारिजातौ सुरतरुविशेषौ कुरवस्तिलकवृक्षः उत्पलं रात्रिविकासि अंबुजं दिनविकासि नागो नागकेसरः एताः सुमनसः पुष्पजातयः सुगंधा अपि तुलसिकाभरणेन श्रीहरिणा तुलस्या गंधेऽर्चिते सति

ज्यांच्या बुद्धींना विघ्न होत आहे असेहि ते विष्णुभक्त, त्या सुगंध आणणाऱ्या वायूचा तिरस्कार करीत होत्साते, सर्व लोकांच्या पापांचा नाश करणारीं प्रभूचीं चरित्रें गायन करित असतात ॥ १७ ॥ ज्या वनामध्यें एखादा श्रेष्ठ भ्रमर, उच्चस्वरानें हरिकथेसारखें गायन करूं लागला असतां, पारवे, कोकिल, सारसपक्षी, चक्रवाक, चातक, हंस, शुक (राघू), तित्तिरपक्षी आणि मयूर यांचा जो स्वाभाविक कलकलाट शब्द, तोहि क्षणमात्र बंद होतो. येणेंकरून तेथील पक्ष्यांनाहि हरिकथाश्रवणाचा आनंद असतो असें दर्शित झालें ॥ १८ ॥ ज्या वनामध्यें, तुळशींच्या हारानें भूषित अशा श्रीहरीनें, त्या तुळशीच्या सुगंधाची प्रशंसा केली असतां, त्याच बागेंत राहणारे— मंदार, कुंद, तिलक, कमोद, चंपक, अर्ण, पुन्नाग, नागकेसर, बकुळ, कमळ आणि पारिजात हे पुष्पजातींचे वृक्ष सुगंधयुक्त असूनहि आपणां सर्वांपेक्षां भगवंताला तुळसी

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आवडत्ये ह्मणून तिची तपश्चर्या थोर असें मानितात. याच्या योगानें तेथें राहणारे गुणग्राहीच आहेत; मत्सरयुक्त नाहींत असें सूचित झालें ॥ १९ ॥ पुनः वैकुंठाचें वर्णन करितात–जें वैकुंठ स्थान, हरिचरणाचेठिकाणीं केवळ नम्र असणाऱ्या निष्काम भक्तांना मात्र प्राप्त होणाऱ्या, वैदूर्यमणि, पाच व सुवर्ण यांनीं निर्माण केलेल्या विमानांनीं व्याप्त आहे. ज्या विमानांत असणाऱ्या कृष्णचिंतकांच्या मनामध्यें, 'ज्यांचे कटिभाग विशाल असून मुखांवर हास्याच्या योगानें फार शोभा आली आहे अशा' उत्तम स्त्रिया देखील, आपल्या हावभावांनीं काम उत्पन्न करूं शकत नाहींत ॥ २० ॥ ज्या लक्ष्मीनें आपल्यावर अनुग्रह करावा एतदर्थ ब्रह्मादिकांचा यत्न चालला आहे, ती

यस्मिन्वने तस्यास्तपो बहु मानयंति । अनेन तत्रत्या गुणग्राहिण एव न मत्सरिण इत्युक्तम् । एवंभूतं वनं यत्र तद्वैकुंठं ययुरिति पूर्वेणान्वयः ॥ १९ ॥ पुनर्वैकुंठमेव विशिनष्टि । यत्संकुलं व्याप्तं भवति कैः हरिपदयोरानतिः प्रणामस्तावन्मात्रेण दृष्टैर्भक्तानां विमानैर्न कर्मादिप्राप्यैर्वैदूर्यमारकतैर्हैममयैश्च विमानैः बृहंति कटितटानि यासाम् । स्मितशोभीनि मुखानि यासां ता अपि कृष्णे आत्मा येषां रजः काममुत्स्मयाद्यैः परिहासादिभिर्न आदधुर्न जनयामासुः ॥ २० ॥ श्रीर्लक्ष्मीः रूपिणी मनोहरमूर्तिधारिणी सती श्रीहरेः सद्मनि संमार्जनं कुर्वतीव यस्मिन् लोके संलक्ष्यते चरणारविंदं क्वणयती नूपुरेण शब्दयंती मुक्तो दोषश्चांचल्यं यया यद्वा मुक्तेन दोषा प्रसारितेन बाहुना । कीदृशे सद्मनि । स्फटिकमयानि कुड्यानि यस्मिन् मध्ये मध्ये च शोभार्थमुपेतं संयुक्तं हेम यस्मिन् यस्या अनुग्रहणे श्रीरनुग्रहं करोत्वित्येतदर्थमन्येषां ब्रह्मादीनां यत्नः सा । अयं

तत्संकुलं हरिपदानतिमात्रदृष्टैर्वैदूर्यमारकतहेममयैर्विमानैः ॥ येषां बृहत्कटितटाः स्मितशोभिमुख्यः कृष्णात्मनां न रज आदधुरुत्स्मयाद्यैः ॥ २० ॥ श्रीरूपिणी क्वणयती चरणारविंदं लीलांबुजेन हरिसद्मनि मुक्तदोषा ॥ संलक्ष्यते स्फटिककुड्य उपेतहेम्नि संमार्जतीव यदनुग्रहणेऽन्ययत्नः ॥ २१ ॥ वापीषु विद्रुमतटास्वमलामृताप्सु प्रेष्यान्विता निजवने तुलसीभिरीशम् ॥ अभ्यर्चती स्वलकमुन्नसमीक्ष्य वक्त्रमुच्छेषितं भगवतेत्यऽमतांग यच्छ्रीः ॥ २२ ॥ यन्न व्रजंत्यघभिदो रचनानुवादाच्छृण्वंति येऽन्यविषयाः कुकथा मतिघ्नीः ॥ यास्तु श्रुता हतभगैर्नृभिरात्तसारास्तांस्तान्क्षिपंत्यशरणेषु तमस्सु हंत ॥ २३ ॥

भावः । यद्यपि तत्र रजो नास्त्येव तथाऽपि स्वर्णपट्टिकाऽवच्छिन्नभित्तिभागेषु बहुधा प्रतिबिंबिता सती लीलांऽबुजं भ्रामयंती विनयभक्तिभ्यां तथा लक्ष्यत इति ॥ २१ ॥ अंग हेदेवाः । यद्यस्मिँल्लोके श्रीरेवं अमत अमंस्त मेने किंकुर्वती विद्रुममयानि तटानि यासां अमला अमृततुल्या आपो यासां तासु वापीषु निजवने लक्ष्मीवने परिचारिकाभिरन्विता तुलसीभिः श्रीविष्णुं पूजयंती तदोदके प्रतिबिंबितं शोभनालकयुक्तमुत्कृष्टनासिकायुक्तं च स्ववक्त्रं वीक्ष्य भगवता उच्छेषितं चुंबितमित्यमन्यत अनेन लक्ष्म्या अपि सौभाग्यसुखं भगवदनुग्रहेणैवेति द्योतितम् ॥ २२ ॥ पुनः कथंभूतं तत् । यद्वैकुंठं न व्रजंति के ये कुकथाः शृण्वंति कास्ताः अघं भिनत्तीत्यघभित्तस्य हरेः रचना

मूर्तिमती लक्ष्मीसुद्धां, ज्या वैकुंठामध्यें, स्फटिकांच्या भिंतींनीं युक्त असून मधून मधून शोभा आणण्याकरितां ज्याला सुवर्णांच्या पट्या लावलेल्या आहेत अशा श्रीहरीच्या गृहामध्यें, आपला चंचल स्वभाव टाकून नूपुरांच्या योगानें आपलें चरणकमळ शब्दयुक्त करीत करीत हस्तामध्यें क्रीडेसाठीं धारण केलेल्या कमलानें संमार्जनच करीत आहे कीं काय अशी पाहण्यांत येत्ये ॥ २१ ॥ हे देवहो, ज्या वैकुंठामध्यें, दासींना बरोबर घेऊन आपल्या 'लक्ष्मीवन' नांवाच्या उपवनामध्यें तुळशींच्या योगानें हरीची पूजा करणाऱ्या लक्ष्मीनें, पोवळ्यांनीं सभोंवार बांधविलेल्या स्वच्छ उदकाच्या वापींमध्यें, सुंदर केशांनीं व सरळ नासिकेनें युक्त असलेलें आपलें मुख, अवलोकन करून तें भगवंतानें चुंबन केलेलें असल्यामुळें फार शोभत आहे, असें मानिलें ॥ २२ ॥ पापनाशक हरीच्या सृष्ट्यादि लीलांच्या वर्णनावांचून इतर (अर्थ कामपर) ॥ ४६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विषयांनीं युक्त असल्यामुळें बुद्धीला मोह करणाऱ्या अशा निंद्य कथेचें जे पुरुष श्रवण करितात, ते ज्या वैकुंठलोकाचेठिकाणीं जात नाहींत. ज्या निंद्य कथा, पुण्याचा नाश करणाऱ्या असून दुर्दैवी लोकांनीं श्रवण केल्या असतां त्या त्या लोकांना आश्रयरहित अशा घोर नरकामध्यें पाडतात. केवढें दुःख हें! ॥ २३ ॥ हे देव हो, ज्या मनुष्यजन्माचेठिकाणीं धर्मज्ञानासहवर्तमान तत्त्वज्ञान प्राप्त होतें त्या आमच्या (ब्रह्मदेवा) सारख्यांनीं सुद्धां देवाजवळ प्रार्थना करण्यास योग्य अशा मनुष्यजन्माला प्राप्त झालेले जे लोक, भगवंताचें आराधन करीत नाहींत ते खरोखर सर्वत्र पसरलेल्या भगवंताच्या मायेनें अत्यंत मोहित झाले आहेत असें समजावें ॥ २४ ॥ आणि भगवंताच्या श्रवणकीर्तनादि भक्तीनें देहादिकांचेठिकाणीं अभिमानरहित व हरीच्या उत्तम यशाच्या परस्पर वर्णनामध्यें प्रेमानें ज्यांचा कंठ दाटून येत आहे व नेत्रांतून आनं-

---

सृष्ट्यादिलीला तस्या अनुवादादन्यविषया अर्थकामादिवार्ता मतिभ्रंशिकाः तेषामव्रजने हेतुः । यास्तु हतभाग्यैर्नरैः श्रुताः सत्यस्तांस्तान् श्रोतॄनशरणेषु निराश्रयेषु तमःसु नरकेषु क्षिपंति । हंत खेदे कथंभूताः आत्तः सारः श्रोतॄणां पुण्यं याभिस्ताः ॥ २३ ॥ प्रसंगात्तान् शोचंति नोऽस्माभिर्ब्रह्मादिभिरप्यभ्यर्थितां नृगतिं मनुष्यजातिं प्रपन्नाः प्राप्ताः संतोऽपि हरेराराधनं न कुर्वंति कीदृशीं नृगतिम् । यत्र यस्यां धर्मसहितं तत्त्वज्ञानं भवति । तदुभयसाधकत्वात्तस्याः तेऽमुष्य भगवतो विस्तृतया मायया ननु संमोहिताः । बतेति खेदे । यदिवैवं संबंधः । केवलं त एव न व्रजंति किंतु ये भगवदाराधनं न कुर्वंति तेऽपि तेषां मायामोहितत्वादिति ॥ २४ ॥ पुनः कथंभूतम् । यच्च नः उपरि

ये ऽभ्यर्थितामपि च नो नृगतिं प्रपन्ना ज्ञानं च तत्त्वविषयं सहधर्म यत्र ॥ नाराधनं भगवतो वितरंत्यमुष्य संमोहिता विततया बत मायया ते ॥ २४ ॥ यच्च व्रजंत्यनिमिषामृषभानुवृत्त्या दूरेयमा ह्युपरि नः स्पृहणीयशीलाः ॥ भर्तुर्मिथः सुयशसः कथनानुरागवैक्लव्यबाष्पकलया पुलकीकृतांगाः ॥ २५ ॥ तद्विश्वगुर्वधिकृतं भुवनैकवंद्यं दिव्यं विचित्रविबुधाग्र्यविमानशोचिः ॥ आपुः परां मुदमपूर्वमुपेत्य योगमायाबलेन मुनयस्तदथो विकुंठम् ॥ २६ ॥ तस्मिन्नतीत्य मुनयः षडसज्जमानाः कक्षाः समानवयसावथ सप्तमायाम् ॥ देवावचक्षत गृहीतगदौ परार्ध्यकेयूरकुंडलकिरीटविटंकवेषौ ॥ २७ ॥

स्थितं व्रजंति । के अनिमिषां देवानामृषभः श्रेष्ठो हरिस्तस्यानुवृत्त्या दूरे यमो येषाम् । यद्वा । दूरीकृतयमनियमाः पाठांतरे दूरीकृताहंकारा इत्यर्थः । स्पृहणीयं करुणादि शीलं येषाम् । किंच भर्तुर्हरेर्यत्सुयशस्तस्य मिथःकथने योऽनुरागस्तेन वैक्लव्यं वैवश्यं तेन बाष्पकला तया सह पुलकीकृतमंगं येषाम् । यद्वा नः उपरीति व्रजतां विशेषणम् । निरहंकारत्वादस्मत्तोऽपि येऽधिकास्ते यद्व्रजंतीत्यर्थः ॥ २५ ॥ तत्तदा तदपूर्वं विकुंठं अथो अनंतरमुपेत्य मुनयः परामुत्कृष्टां मुदमापुः अपूर्वत्वे हेतवः विश्वगुरुणा हरिणाऽधिकृतमधिष्ठितम् । भुवनानामेकमेव वंद्यम् । दिव्यमलौकिकम् । विचित्राणि विबुधाग्र्याणां विमानानि तेषां शोचिर्दीप्तिर्यस्मिन् । योगमायाबलेनेति अष्टांगयोगप्रभावेणोपेत्य परमेश्वरे तु योगमायेति चिच्छक्तिविलास इति द्रष्टव्यम् ॥ २६ ॥ तस्मिन्वैकुंठे षट् कक्षाः प्राकारद्वाराणि असज्जमानाः भगवद्दर्शनोत्कंठया तत्तदद्भुतदर्शने आसक्तिमकुर्वाणाः

दाश्रु गळत आहेत. व अंगावर रोमांच उभे राहिले आहेत, आणि ज्यांचा दयालुत्वादिक स्वभाव आमच्या सारख्यांनीं सुद्धां इच्छा करण्यास योग्य आहे असे भक्तजन, आमच्या स्थानापेक्षां वर असणाऱ्या ज्या वैकुंठामध्यें गमन करितात ॥ २५ ॥ विश्वगुरु भगवंताचें राहण्याचें स्थान, सर्व भुवनामध्यें मुख्य असून वंद्य, आणि मोठमोठ्या देवांच्या विमानांनीं प्रकाशित झालेलें, अशा त्या अपूर्व दिव्य वैकुंठस्थानास योगसाधनाच्या सामर्थ्यानें पावल्या नंतर ते सनकादिक ऋषि, परम आनंद पावले ॥ २६ ॥ नंतर त्या ऋषींनीं, त्या वैकुंठलोकाचेठिकाणीं भगवद्दर्शनाच्या उत्कंठेमुळें मार्गांतील चमत्कार पाहण्याविषयीं कोठेंहि आसक्त न होतां, सहा चौक्या ओलांडून पुढें सातव्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

झालेले ते यक्ष राक्षस, त्या ब्रह्मदेवालाच भक्षण करण्याविषयीं त्याच्याकडे धांवले. आणि परस्पर असें बोलूं लागले कीं, ज्याअर्थीं ह्याच्यामुळें आह्मीं क्षुधेनें व तृषेनें पीडित आलों आहों, त्याअर्थीं हा आपला पिता आहे अशा कृपायुक्त बुद्धीनें याचें रक्षण करूं नका, तर याचें भक्षणच करा ॥ २० ॥ हें ऐकून भयभीत झालेला ब्रह्मदेव, त्यांस ह्मणाला कीं, हे यक्ष राक्षसहो, तुह्मी माझे पुत्र झालां आहांत, तस्मात् माझें भक्षण करूं नका तर रक्षणच करा. असे ते यक्ष राक्षस उग्रस्वभावयुक्त झाले. त्यांत जे पूर्वी ब्रह्मदेवास भक्षण करा असें ह्मणाले होते ते यक्ष झाले आणि जे रक्षण करूं नका असें ह्मणाले होते ते राक्षस झाले ॥ २१ ॥ पुढें ब्रह्मदेवानें प्रकाशरूपी स्वरूप धारण करून आपल्या कांतिच्या योगानें, मुख्यत्वेंकरून ज्या ज्या सात्विक देवता आहेत त्यांस उत्पन्न केलें आणि त्या शरीराचा त्याग केला. तेव्हां क्रीडा करणाऱ्या त्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सात्विक देवतांनीं ब्रह्मदेवानें टाकलेल्या त्या दिवसरूपी कांतीचा स्वीकार केला ॥ २२ ॥ पुढें ब्रह्मदेवानें आपल्या कमरेच्या पुढच्या भागापासून अत्यंत स्त्रीलंपट अशा दैत्यांस उत्पन्न केलें. ते विषयासक्त असल्यामुळें कामातुर होऊन ब्रह्मदेवाशींच मैथुन करण्यास प्रवृत्त झाले ॥ २३ ॥ नंतर हास्य करणारा तो भगवान् ब्रह्मदेव, आपल्या मागें लागलेल्या त्या निर्लज्ज असुरांस पाहून क्रुद्ध झाला आणि त्यांपासून भिऊन वेगानें पलायन करूं लागला ॥ २४ ॥ आणि धांवत धांवत तो ब्रह्मदेव, शरणागतांचें दुःख निवारण करणाऱ्या व भक्तांवर अनुग्रह करण्याकरितां त्यांच्या इच्छेनुरूप आपलें स्वरूप दाखविणाऱ्या हरीला शरण जाऊन ह्मणाला कीं—॥ २५ ॥ हे प्रभो परमात्मन्, तूं माझें रक्षण कर. तुझ्या आज्ञेनें मीं ज्या प्रजा उत्पन्न केल्या त्याच ह्या पापिष्ठ होऊन बलात्कारानें मैथुन करण्याविषयीं माझ्या मागें लागल्या आहेत ॥ २६ ॥

तेन विसृष्टां त्यक्तां प्रभामहः दिवसरूपां सतीं देवयंतः क्रीडयंतोऽहार्षुर्जगृहुः ॥ २२ ॥ अदेवानिति छेदः । स जघनादसुरानसृजत इति श्रुतेः । अतिलोलुपान्स्त्रीलंपटान् अभिपेदिरे प्राप्ताः ॥ २३ ॥ परापतदपलायत ॥ २४ ॥ भक्तेच्छानुरूपमात्मानं दर्शयतीति तथा तमुपव्रज्य ॥ २५ ॥ पाहीति द्वाभ्यां प्रार्थितवान् यभितुं मैथुनेन धर्षयितुम् ॥ २६ ॥ लोकानां जनानाम् । तवानासन्नावनाश्रितौ पादौ यैस्तेषाम् ॥ २७ ॥ विविक्तमसंदिग्धमध्यात्मदर्शनं परचित्तज्ञानं यस्य हरेः घोरां कामकश्मलां स्वतनुं विमुं-

देवोऽदेवान्जघनतः सृजतिस्मातिलोलुपान् ॥ तएनं लोलुपतया मैथुनायाभिपेदिरे ॥ २३ ॥ ततो हसन्स भगवानसुरैर्निरपत्रपैः ॥ अन्वीयमानस्तरसा क्रुद्धो भीतः परापतत् ॥ २४ ॥ स उपव्रज्य वरदं प्रपन्नार्तिहरं हरिम् ॥ अनुग्रहाय भक्तानामनुरूपात्मदर्शनम् ॥ २५ ॥ पाहि मां परमात्मंस्ते प्रेषणेनासृजं प्रजाः ॥ ता इमा यभितुं पापा उपाक्रामंति मां प्रभो ॥ २६ ॥ त्वमेकः किल लोकानां क्लिष्टानां क्लेशनाशनः ॥ त्वमेकः क्लेशदस्तेषामनासन्नपदां तव ॥ २७ ॥ सोऽवधार्यास्य कार्पण्यं विविक्ताध्यात्मदर्शनः ॥ विमुंचात्मतनुं घोरामित्युक्तो विमुमोच ह ॥ २८ ॥ तां क्वणच्चरणांभोजां मदविह्वललोचनाम् ॥ कांचीकलापविलसद्दुकूलच्छन्नरोधसम् ॥ २९ ॥

चेति उक्तवानिति शेषः । इत्युक्तश्च ब्रह्मा तां तनुं विमुमोच सर्वत्र तनुत्यागो नाम तत्तन्मनोभावत्यागो विवक्षितः ग्रहणं च तत्तद्भावापत्तिरिति द्रष्टव्यम् ॥ २८ ॥ साऽहोरात्रयोः संधिरभवत् इति श्रुतेः । सा तेन विसृष्टा तनुः सायंतनी संध्या बभूव । सा च कामोद्रेकवेला असुराश्च राजसत्वात्स्त्रीलंपटा अतस्तां संध्यामेव स्त्रियं कल्पयित्वा ते संमोहं प्राप्ता इत्याह । तामिति त्रिभिः । नूपुराभ्यां क्वणती चरणांभोजे यस्याः मदेन विह्वले लोचने यस्याः कांचीकलापेन विलसद्दुकूलं तेन छन्नं रोधः कटितटं यस्यास्ताम्॥२९॥

हे देवा, दुःखी लोकांचें खरोखर दुःख निरसन करणारा एक तूंच आहेस व जे तुझ्या चरणाचा आश्रय करीत नाहींत त्या पुरुषांना दुःख देणाराहि एक तूंच आहेस ॥ २७ ॥ याप्रमाणें ब्रह्मदेवानें प्रार्थना केली असतां, दुसऱ्याच्या मनांतील अभिप्राय जाणणाऱ्या त्या भगवंतानें त्याची ती दीनावस्था जाणून, हे ब्रह्मदेवा, तूं कामदूषित झालेली ही आपली तनू सोडून दे, असें सांगितलें असतां, ब्रह्मदेवानें त्या आपल्या मूर्तीचा त्याग केला, ह्मणजे ती मनोवासना सोडून दिली ॥ २८ ॥ हे विदुरा, ब्रह्मदेवानें टाकलेली ती तनु संध्याकाळची अभिमानी देवता झाली. कामवासना प्रदीप्त होण्याची हीच वेळ होय. दैत्यांना ती वेळ स्त्रीप्रमाणें भासली. ~~ती अशी कीं, जिचीं चरणकमलें पैंजणांच्या योगानें शब्द करित आहेत, जिचे डोळे तारुण्यमदानें लाल झाले आहेत, पैठणी नेसली असल्यामुळें जिचा कटिप्रदेश आच्छादित झालेला असून~~

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्यावर घातलेल्या कमरपट्ट्याची कांति त्या पैठणीवर पडली आहे, परस्पर संघर्षण होत असल्यामुळें जिच्या उन्नत स्तनांमध्यें अंतर मुळींच राहिलेलें नाहीं, जिची नासिका चांफेकळीप्रमाणें सुरेख आहे, जिचे दांत कुंदाच्या कळ्यांप्रमाणें सुंदर आहेत, जिचें स्नेहयुक्त हास्य व शृंगारलीलासूचक अवलोकन जिकडेतिकडे प्रवृत्त होत आहे जिच्या मस्तकावर काळ्याभोर केंसांचा बुचडा आहे, जी लज्जेनें आपलें शरीर पदरानें झांकून घेत आहे, अशा त्या स्त्रीरूपिणी संध्येला पाहून, सर्व असुर अगदीं मोहित झाले ॥ २९ ॥ ३० ॥ ३१ ॥ आणि परस्परांमध्यें बोलूं लागले कीं, अहो कायतरी हिचें हें सौंदर्य! अहो काय हें हिचें धैर्य! अहाहा काय हें हिचें तारुण्य आहे!! कामविकार उत्पन्न झालेल्या आमच्यामध्यें ही कामविकाररहित असल्यासारखी फिरत आहे! ॥ ३२ ॥ याप्रमाणें कुत्सितबुद्धि ते असुर, बहुत प्रकारें तर्क करीत करीत

अन्योन्य माश्लेषयोपमर्देन हेतुनोत्तुंगौ निरंतरौ पयोधरौ यस्याः सुद्विजां सुदतीम् । स्निग्धो हासो लीलाऽवलोकनं च यस्याः ॥ ३० ॥ गूहंतीं वस्त्रांचलेनावृण्वानाम् । नीलानामलकानां वरूथः स्तोमो विद्यते यस्याः हेधर्म विदुर तां स्त्रियमुपलभ्य मत्वा ॥ ३१ ॥ संमूढानां विभावनाक्रममाह । अहो इति ॥ ३२ ॥ अभिसंभाव्य सत्कृत्य विश्रंभात्प्रणयात् कुबुद्धयस्ते तां पप्रच्छुः ॥ ३३ ॥ काऽसीति त्रिभिः । काऽसि जात्या कस्य वा कन्या हेभामिनि कोपने रूपमेव द्रविणमनर्घ्यं वस्तु तदेव पण्यं क्रयार्हं

अन्योन्याश्लेषयोत्तुंगनिरंतरपयोधराम् ॥ सुनासां सुद्विजां स्निग्धहासलीलावलोकनाम् ॥ ३० ॥ गूहंतीं व्रीडयात्मानं नीलालकवरूथिनीम् ॥ उपलभ्यासुरा धर्म सर्वे संमुमुहुः स्त्रियम् ॥ ३१ ॥ अहो रूपमहोधैर्यमहो अस्या नवं वयः ॥ मध्ये कामयमानानामकामेव विसर्पति ॥ ३२ ॥ वितर्कयंतो बहुधा तां संध्यां प्रमदाकृतिम् ॥ अभिसंभाव्य विश्रंभात्पर्यपृच्छन्कुमेधसः ॥ ३३ ॥ काऽसि कस्यासि रंभोरु को वाऽर्थस्तेऽत्र भामिनि ॥ रूपद्रविणपण्येन दुर्भगान्नो विबाधसे ॥ ३४ ॥ या वा काचित्त्वमबले दिष्ट्या संदर्शनं तव ॥ उत्सुनोषीक्षमाणानां कंदुकक्रीडया मनः ॥ ३५ ॥ नैकत्र ते जयति शालिनि पादपद्मं घ्नंत्या मुहुः करतलेन पतत्पतंगम् ॥ मध्यं विषीदति बृहत्स्तनभारभीतं शांतेव दृष्टिरमला सुशिखासमूहः ॥ ३६ ॥

तेन तदसमर्पणेन नो विबाधसे ॥ ३४ ॥ किं जातिकुलादिप्रश्नेन या वा काचिद्भव दिष्ट्येदं तावद्भद्रं जातं यत्तव दर्शनं किंतु केवलं नो मन उत्सुनोषि विमथ्नासि ॥ ३५ ॥ पततपतंगमुच्चलंतं कंदुकम् । क्षुभितचित्तानां वाक्यं नैकत्रेति । हेशालिनि श्लाघ्ये एकत्र न जयति न स्थिरीभवति यद्वा नैकत्रानेकगतिविलासेषु जयति सर्वोत्कर्षेण वर्तते । पततपतंगमुच्चलंतं कंदुकम् । क्षुभितचित्तानां वाक्यं नैकत्रेति । हेशालिनि श्लाघ्ये एकत्र न जयति न स्थिरीभवति यद्वा नैकत्रानेकगतिविलासेषु जयति सर्वोत्कर्षेण वर्तते । शोभनान्केशानवकीर्यमाणान्स- बृहतोः स्तनयोर्भाराद्भीतं तव कृशं मध्यं विषीदति श्राम्यति शांता मंथरेव प्रसरति सुशिखासमूहः शोभनः केशकलापस्ते पाठांतरे सुशिखाः

संध्येचा सत्कार करून, मोठ्या प्रेमानें तिला विचारूं लागले कीं, ॥ ३३ ॥ हे रंभोरु (जिच्या मांड्या केळीच्या खांबांसारख्या विलासिनी स्त्रीसारख्या भासणाऱ्या त्या संध्येचा सत्कार करून, मोठ्या प्रेमानें तिला विचारूं लागले कीं, ॥ ३३ ॥ हे रंभोरु (जिच्या मांड्या केळीच्या खांबांसारख्या आहेत अशा हे स्त्रिये) तूं जातीनें कोण आहेस? कोणाची कन्या आहेस? हे विलासिनि, येथें तुझें काम काय आहे? तुझें स्वरूप अमोल्य वस्तु असून तें विक्रय करण्यास योग्य आहे, तें भाग्यहीन अशा आम्हांला तूं अर्पण करीत नाहींस, त्याच्या योगानें आमच्या मनाला तूं फार दुःख देत आहेस ॥ ३४ ॥ हे स्त्रिये, तुझी जाति कोणतीहि असो. आम्हांला तुझें दर्शन झालें ही मोठी आनंदाची गोष्ट होय. परंतु हे सुभगे, तूं चेंडूफळीच्या खेळानें पाहणाऱ्या आमच्या मनाला क्षोभ उत्पन्न करीत आहेस ॥ ३५ ॥ हे शोभने, वरवर उसळणाऱ्या चेंडूला वारंवार आपल्या करतलानें ताडण करीत असणाऱ्या तुझें चरणकमल एकेठिकाणीं स्थिर राहत नाहीं. मोठ्या स्तनांच्या भारानें दडपून गेलेली तुझी कृश कटी, चेंडू खेळतांना फारच श्रम पावत आहे. तुझी निर्मळ दृष्टि, आळसानें युक्त असल्यासारखी जिकडेतिकडे संचार करीत आहे. तुझ्या केंसाचा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कुचद्वा फारच मनोहर दिसत आहे ॥ ३६ ॥ याप्रमाणें मूढबुद्धि अशा त्या असुरांनीं, स्त्रीप्रमाणें भासणाऱ्या व लोभ उत्पन्न करणाऱ्या त्या सायंकाळच्या संध्येला, ही स्त्रीच आहे असें मानून तिचा स्वीकार केला ॥ ३७ ॥ पुढें ब्रह्मदेवानें कांहीं शृंगारिक गूढ अभिप्रायानें हास्य करून त्यापासून आपणच आपला वास घेणारी ह्मणजे आपल्याच स्वरूपसौंदर्यानें गर्विष्ठ अशी एक तेजःपुंज मूर्ति धारण करून तिच्या योगानें गंधर्व व अप्सरा यांचे पुष्कळ गण उत्पन्न केले ॥ ३८ ॥ आणि त्या सौंदर्ययुक्त प्रिय मूर्तीचा त्याग केला. ती चंद्रिकारूपानें (चांदण्याच्या रूपानें) परिणाम पावली. विश्वावसु इत्यादिक गंधर्वांनीं त्या मूर्तीचा स्वीकार केला ॥ ३९ ॥ पुढें भगवान् ब्रह्मदेवानें, आपल्या तंद्रेनें (आळसानें) भूतें व पिशाचें उत्पन्न केलीं आणि मोकळे केंस सुटलेल्या व दिगंबर (नग्न) अशा त्या भूतपिशाचांस अवलोकन करून त्यानें आपले डोळे

मूह बधानेति अत्र चास्तंगच्छन्सूर्य एव पतत्पतंगः मेघविच्छेदो मध्यविषादः तारकारूपा दृष्टिः तम एव केशा इत्याद्यूह्यम् ॥ ३६ ॥ प्रमदेवाचरंतीं स्त्रियं मत्वा जगृहुः ॥ ३७ ॥ प्रहस्यात्मानमात्मना जिघ्रंत्या कांत्या सौंदर्येण प्रहसनमात्मावघ्राणं च सौंदर्यानुभावचातुर्यविकारः ॥ ३८ ॥ ज्योत्स्नां चंद्रिकारूपाम् । त एव गंधर्वादिगणाः विश्वावसुः पुरोगमो मुख्यो येषु

इति सायंतनीं संध्यामसुराः प्रमदायतीम् ॥ प्रलोभयंतीं जगृहुर्मत्वा मूढधियः स्त्रियम् ॥ ३७ ॥ प्रहस्य भावगंभीरं जिघ्रंत्यात्मानमात्मना ॥ कांत्या ससर्ज भगवान् गंधर्वाप्सरसां गणान् ॥ ३८ ॥ विससर्ज तनुं तां वै ज्योत्स्नां कांतिमतीं प्रियाम् ॥ त एव चाददुः प्रीत्या विश्वावसुपुरोगमाः ॥ ३९ ॥ सृष्ट्वा भूतपिशाचांश्च भगवानात्मतंद्रिणा ॥ दिग्वाससो मुक्तकेशान्वीक्ष्य चामीलयद्दृशौ ॥ ४० ॥ जगृहुस्तद्विसृष्टां तां जृंभणाख्यां तनुं प्रभोः ॥ निद्रामिंद्रियविक्लेदो यया भूतेषु दृश्यते ॥ येनोच्छिष्टान्धर्षयंति तमुन्मादं प्रचक्षते ॥ ४१ ॥ ऊर्जस्वंतं मन्यमान आत्मानं भगवानजः ॥ साध्यान्गणान् पितृगणान्परोक्षेणासृजत्प्रभुः ॥ ४२ ॥ त आत्मसर्गं तं कायं पितरः प्रतिपेदिरे ॥ साध्येभ्यश्च पितृभ्यश्च कवयो यद्वितन्वते ॥ ४३ ॥

॥ ३९ ॥ आत्मनस्तंद्रिणा आलस्येन तांश्च मुक्तकेशान्वीक्ष्य नेत्रे निमीलितवान् ॥ ४० ॥ इंद्रियाणां विक्लेदः स्रावो यया तां निद्रां प्रचक्षते येनेंद्रियविक्लेदेन हेतुनोच्छिष्टांश्च सतो धर्षयंति भ्रांतान्कुर्वंति तं भूतादिगणमुन्मादं प्रचक्षते तंद्रा जृंभिका निद्रोन्मादहेतुत्वेन भूतादीनां तनूनां च चातुर्विध्यमुक्तम् ॥ ४१ ॥ ऊर्जस्वंतं बलवंतम् । परोक्षेणादृश्यरूपेण ॥ ४२ ॥ आत्मनः सर्गो यस्मात्तम् । यद्येन कायेन संप्रदानत्वनिमित्तेन कवयः कर्मकोविदाः साध्येभ्यः पितृभ्यश्च स्वपितृरूपेभ्यः वितन्वते श्राद्धादिना हव्यं

मिटले ॥ ४० ॥ हे विदुरा, नंतर त्या ब्रह्मदेवानें टाकलेली ती जांभईनामक मूर्ति त्याच भूतपिशाचांनीं स्वीकारिली. जिच्या योगानें प्राणिमात्रांचेठिकाणीं इंद्रियांचा विक्लेद (शिथिलपणा) दृष्टोत्पत्तीस येतो, तिला निद्रा असें ह्मणतात आणि ज्या शिथिलपणामुळें मलमूत्रादिकांनीं संयुक्त झालेल्या अपवित्र प्राण्यांस जे भ्रांतियुक्त करितात त्या भूतादिगणांस उन्माद असें ह्मणतात. मिळून आळस, जांभई, निद्रा आणि उन्माद हे चार या निद्राशरीराचे भेद आहेत. तसेच त्या भेदांपासून भूतयोनींत झालेले भूतें, पिशाचें, उन्माद वगैरे प्रकार पुष्कळ आहेत ॥ ४१ ॥ नंतर एकेवेळीं आपणास बलवान् असें मानणाऱ्या भगवान् प्रभु ब्रह्मदेवानें, आपल्या अदृश्यरूपानें साध्यगण व पितृगण उत्पन्न केले ॥ ४२ ॥ त्या साध्यांनीं व पितृगणांनीं ज्यापासून आपली उत्पत्ति झाली त्या ब्रह्मदेवानें टाकलेल्या देहाचा स्वीकार केला. ज्या देहाला पोंच-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ण्याच्या उद्देशानें कर्ममार्गी लोक, आपल्या पितररूपी साध्यांना व पितरांना श्राद्धादिकें करून हव्यकव्यरूप अन्नें अर्पण करितात ॥ ४३ ॥ नंतर ब्रह्मदेवानें आपल्या दिसत असतां अकस्मात् गुप्त होण्याच्या शक्तीनें, सिद्ध आणि विद्याधर यांस उत्पन्न केलें व त्यांना तो आपला अंतर्धाननामक अद्भुत देह अर्पण केला ॥ ४४ ॥ तदनंतर तो प्रभु ब्रह्मदेव, एकेवेळीं आपलें प्रतिबिंब पाहात असतां, आपणच आपणास सुंदर आहें असें मानूं लागला व त्यानें त्या आपल्या प्रतिबिंबाच्या योगानें किंनर व किंपुरुष उत्पन्न केले ॥ ४५ ॥ नंतर ब्रह्मदेवानें जें आपलें प्रतिबिंब शरीर सोडून दिलें होतें, तें त्या किंनरादिकांनीं स्वीकारिलें, यामुळें ते दोन्ही गण एकत्र मिळून आपल्या बिंबभूत ब्रह्मदेवानें केलेल्या पराक्रमांचें वर्णन करून पहांटेच्या वेळेस त्याचें गायन करित असतात ॥ ४६ ॥ नंतर जेव्हां सृष्टी वृद्धिंगत होइना, तेव्हां तीची

कव्यं च ददति ॥ ४३ ॥ तिरोधानेन दृश्यत्वे सत्यप्यंतर्धानशक्त्या ॥ ४४ ॥ प्रत्यात्म्येन प्रतिबिंबेन आत्माभासं प्रतिबिंबमात्मनाऽऽत्मनो मानः प्रतिबिंबदर्शिनः सुंदरस्य शिरःकंपादिचेष्टा अतएव तत्स्रष्टानां मिथः संमाननेन नित्यं मिथुनीभावः ॥ ४५ ॥ तत्प्रतिबिंबरूपम् । कर्मभिस्तत्पराक्रमानुवर्णनैः ॥ ४६ ॥ भोग आभोगो विस्तारः

सिद्धान्विद्याधरांश्चैव तिरोधानेन सोऽसृजत् ॥ तेभ्योऽददात्तमात्मानमंतर्धानाख्यमद्भुतम् ॥ ४४ ॥ स किन्नरान्किंपुरुषान्प्रत्यात्म्येनासृजत्प्रभुः ॥ मानयन्नात्मनाऽऽत्मानमात्माभासं विलोकयन् ॥ ४५ ॥ ते तु तज्जगृहू रूपं त्यक्तं यत्परमेष्ठिना ॥ मिथुनीभूय गायंतस्तमेवोषसि कर्मभिः ॥ ४६ ॥ देहेन वै भोगवता शयानो बहुचिंतया ॥ सर्गेऽनुपचिते क्रोधादुत्ससर्ज ह तद्वपुः ॥ ४७ ॥ येऽहीयंतामुतः केशा अहयस्तेऽग जज्ञिरे ॥ सर्पाः प्रसर्पतः क्रूरा नागा भोगोरुकंधराः ॥ ४८ ॥ स आत्मानं मन्यमानः कृतकृत्यमिवात्मभूः ॥ तदा मनून्ससर्जांते मनसा लोकभावनान् ॥ ४९ ॥ तेभ्यः सोऽत्यसृजत्स्वीयं पुरं पुरुषमात्मवान् ॥ तान् दृष्ट्वा ये पुरा सृष्टाः प्रशशंसुः प्रजापतिम् ॥ ५० ॥

पादादिप्रसरणं तद्वता देहेन अनुपचिते वृद्धिमप्राप्ते तत् भोगक्रोधादियुक्तम् ॥ ४७ ॥ अमुतोऽमुष्मादेहाचे केशा अहीयंत प्रच्युतास्तेऽहयो जाताः प्रसर्पतः पादाद्याकुंचनैः प्रचलतोऽमुष्मात्सर्पाः अतएव अगा न भवंतीति नागाः अतिवेगवंत इत्यर्थः । भोगवतो जातत्वाद्भोगेन फणेनोरुर्विस्तीर्णा कंधरा येषाम् । सर्वे चैते तत्क्रोधयोगात्क्रूराः तेषामवांतरजातिभेदः सर्पसिद्धांते प्रसिद्धः ॥ ४८ ॥ यदा मन्यमानोऽभूत्तदा मनून्ससर्ज ॥ ४९ ॥ तेभ्यः स्वीयं पुरुषं पुरुषाकारं पुरं देहमत्यसृजद्ददौ तान्मनून् ॥ ५० ॥

वृद्धि कशी होईल या मोठ्या चिंतेनें आपला विस्तीर्ण देह अस्ताव्यस्त पसरून निजलेल्या ब्रह्मदेवानें, आपला मनोरथ पूर्ण झाला नाहीं ह्मणून रागावलेलें व लांबलचक पसरलेलें तें आपलें शरीर टाकून दिलें ॥ ४७ ॥ हे विदुरा, त्या ब्रह्मदेवाच्या शरीरापासून जे केश गळाले होते त्यांपासून अहि (सर्पांतील एक जात) झाले आणि हातपाय पसरून चळवळ करणाऱ्या त्याच शरीरापासून सर्प व नाग झाले, ते फारच चपळ व क्रोधयुक्त असून त्यांचे देह मानेचेठिकाणीं फणारूपानें विस्तीर्ण असतात ॥ ४८ ॥ याप्रमाणें सृष्टि करून शेवटीं तो ब्रह्मदेव स्वतःलाच मी कृतकृत्य आहें असें मानूं लागला तेव्हां त्यानें आपल्या मनाच्या योगानें लोकांचें रक्षण करणारे चवदा मनु उत्पन्न केले ॥ ४९ ॥ त्या जितेंद्रिय ब्रह्मदेवानें आपलें तें पुरुषाकार शरीर त्या मनूंला अर्पण केलें. तेव्हां त्या मनूंस अवलोकन करून पूर्वीं उत्पन्न केलेले जे देवगंधर्वा-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दिक होते त्यांनीं ब्रह्मदेवाची मोठी प्रशंसा केली कीं, ॥ ५० ॥ हे जगदुत्पादका देवा, तूं मनूला उत्पन्न केलेंस ही फार चांगली गोष्ट झाली· कारण, ज्या मनुसृष्टीमध्यें अग्निहोत्रादि सर्व क्रिया चालत असल्यामुळें आह्मी सर्वेही तुह्मांसहवर्तमान अन्न भक्षण करूं ॥ ५१ ॥ नंतर तपश्चर्या, उपासना, आसनादिक योग आणि वैराग्यैश्वर्यादियुक्त समाधि यांनीं युक्त असलेल्या ब्रह्मदेवानें इंद्रियें वश करून घेतलीं आणि आपणास मान्य अशा ऋषिरूपी प्रजा उत्पन्न केल्या ॥ ५२ ॥ आणि त्यानें, समाधि, योग, अणिमादि सिद्धि, तप, ज्ञान, आणि वैराग्य यांनीं युक्त अशा त्या आपल्या शरीराचा एकेक अंश त्या एकक ऋषीला अर्पण केला ॥५३॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणां-तील तृतीयस्कंधामध्यें हा विसावा अध्याय समाप्त झाला ॥ २० ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां या एकविसाव्या अध्यायामध्यें, कर्दम प्रजापतीच्या तप व उपासना

ते त्वया यत्कृतं तत्सुकृतम् । सुकृतत्वमाहुः । यस्मिन्मनुसर्गे क्रिया अग्निहोत्राद्याः । अतोऽस्मिन्सर्वे वयं साकं सहान्नं हविर्भागाद्यदाम भक्षयाम हेब्रह्मन् ॥ ५१ ॥ कायसृष्टि-मुक्त्वा ऋषीणां सृष्टिमाह । तपसेति विद्या उपासना योगोऽत्रासनादिः सुसमाधिर्वैराग्यैश्वर्यादियुक्तः समाधिः तेन च युक्तः हृषीकेशः स्ववशेंद्रियः सन् ऋषिर्ब्रह्मा ऋषीन्प्रजा

अहो एतज्जगत्स्रष्टः सुकृतं बत ते कृतम् ॥ प्रतिष्ठिताः क्रिया यस्मिन्साकमन्नमदामहे ॥ ५१ ॥ तपसा विद्यया युक्तो योगेन सुसमा-धिना ॥ ऋषीनृषिर्हृषीकेशः ससर्जाभिमताः प्रजाः ॥ ५२ ॥ तेभ्यश्चैकैकशः स्वस्य देहस्यांशमदादजः ॥ यत्तत्समाधियोगर्धितपोवि-द्याविरक्तिमत् ॥ ५३ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे तृतीयस्कंधे विंशतितमोऽध्यायः ॥ २० ॥ ॥ विदुर उवाच ॥ स्वायंभुवस्य च मनोर्वंशः परमसंमतः ॥ कथ्यतां भगवन्यत्र मैथुनेनैधिरे प्रजाः ॥ १ ॥ प्रियव्रतोत्तानपादौ सुतौ स्वायंभुवस्य वै ॥ यथाधर्मं जुगुपतुः सप्तद्वीपवतीं महीम् ॥ २ ॥ तस्य वै दुहिता ब्रह्मन् देवहूतीति विश्रुता ॥ पत्नी प्रजापतेरुक्ता कर्दमस्य त्वयाऽनघ ॥ ३ ॥ तस्यां स वै महायोगी युक्तायां योगलक्षणैः ॥ ससर्ज कतिधा वीर्यं तन्मे शुश्रूषवे वद ॥ ४ ॥

ससर्ज ॥ ५२ ॥ किंतद्देहं यस्यांशमदादित्यत आह । यदिति । समाधिश्च योगश्च ऋद्धिश्च ऐश्वर्यं तपश्च विद्या च विरक्तिश्च विद्यंते यस्मिंस्तत् ॥ ५३ ॥ इति तृतीयस्कंधे टीका-यां विंशोऽध्यायः ॥ २० ॥ ॥ एकविंशे तपोविद्यातोषितेन तु विष्णुना ॥ कर्दमस्य मनोः पुत्र्या विवाहघटनोच्यते ॥ १ ॥ एधिरे एधांचक्रिरे ॥ १ ॥ धर्मं महीं च यथा जुगुपतुः ररक्षतुस्तन्मे वदेति तृतीयेनान्वयः ॥ २ ॥ तस्य मनोः ॥ ३ ॥ योगलक्षणैर्यमादिभिर्युक्तायाम् । कतिधा वीर्यं ससर्ज कतिपुत्रानुत्पादयामासेत्यर्थः ॥ ४ ॥

यांनीं प्रसन्न झालेल्या विष्णूनें, स्वायंभुव मनूच्या देवहूतिनामक कन्येबरोबर, त्या कर्दम प्रजापतीची विवाहघटना केली असा कथाभाग वर्णन केला आहे ॥ १ ॥ विदुर ह्मणाला—हे मैत्रेय ऋषे, ज्याच्यामध्यें मैथुनाच्या योगानें प्रजा वृद्धिंगत झाल्या आहेत, तो जगामध्यें परम मान्य असा स्वायंभुव मनूचा वंश मला वर्णन कर ॥ १ ॥ आणि त्या स्वायंभुव मनूच्या प्रियव्रत आणि उत्तानपाद ह्या नांवांच्या दोन्हीं पुत्रांनीं सप्तद्वीपवती पृथिवीचें पालन कसें केलें तेंहि मला वर्णन करावें ॥ २ ॥ हे निष्पापा ब्राह्मण-श्रेष्ठा, तूं देवहूतिनामें प्रख्यात जी त्या स्वायंभुवमनूची कन्या व कर्दम प्रजापतीची स्त्री ह्मणून सांगितली त्या यमनियमादिक योगलक्षणांनीं युक्त अशा आपल्या भार्येचेठिकाणीं त्या महायोगी कर्दम ऋषीनें किती मुलें उत्पन्न केलीं? तें ऐकण्याची इच्छा करणाऱ्या मला सांग ॥ ३ ॥ ४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हे मैत्रेय ऋषे, ब्रह्मदेवाचा पुत्र जो रुचि ऋषि, व दक्षप्रजापति त्यांनीं, मनूच्या कन्या आकूति व प्रसूति यांस वरून त्यांपासून जी सृष्टि उत्पन्न केली असेल तीहि मला कथन कर ॥ ५ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, प्रजा उत्पन्न कर् अशी ब्रह्मदेवानें भगवान् कर्दमाला आज्ञा केली असतां, त्यानें दाहा हजार वर्षेंपर्यंत सरस्वती नदीच्या तीरीं तपश्चर्या केली ॥ ६ ॥ नंतर चित्ताच्या एकाग्रतेनें युक्त असा तो कर्दम प्रजापति, पूजनाच्या योगेंकरून भक्तानां वर देणाऱ्या श्रीहरीची सेवा करूं लागला ॥ ७ ॥ हे विदुरा, त्या वेळीं कृतयुग चाललें होतें त्यामध्यें दाहा हजार वर्षें तपश्चर्या झाली असतां, प्रसन्न झालेल्या कमलनयन भगवंतानें वेदांनींच जाणण्यास योग्य असें ब्रह्ममय स्वरूप धारण करून त्या कर्दमाला दर्शन दिलें ॥ ८ ॥ तेव्हां त्या कर्दमानें, सूर्यासारखा निर्मळ असून ज्याच्या कंठामध्यें सूर्यविकासी पांढऱ्या कमळांची व चंद्रविकासी कमोदांची माळा आहे,

---

मानवीं मनोः कन्यामाकूतिं च प्रसूतिं च भार्यां लब्ध्वा यथा भूतानि ससर्ज तच्च वदेति चकारस्यार्थः ॥ ५ ॥ सहस्राणां समा दश दशसहस्राणि संवत्सरानित्यर्थः ॥ ६ ॥ ततस्तस्मिंस्तपसि क्रियायोगेन पूजाप्रकारेण संप्रपेदे सिषेवे प्रपन्नेभ्यो भक्तेभ्यो वरदातारम् ॥ ७ ॥ शब्दैकवेद्यं यद्ब्रह्म तन्मयं वपुर्दधत्तं प्रत्यात्मानं दर्शयामास ॥ ८ ॥ पद्मोत्पले दिनरात्रिविकासे सितानां पद्मानामुत्पलानां च स्रक् यस्य तम् । स्निग्धा स कर्दमस्तं खेऽवस्थितं दृष्ट्वा मूर्ध्ना क्षितावपतत् । गीर्भिश्चाभ्यगृणादिति चतुर्णामन्वयः ।

रुचिर्यो भगवान्ब्रह्मन्दक्षो वा ब्रह्मणः सुतः ॥ यथा ससर्ज भूतानि लब्ध्वा भार्यां च मानवीम् ॥ ५ ॥ मैत्रेय उवाच ॥ प्रजाः सृजेति भगवान्कर्दमो ब्रह्मणोदितः ॥ सरस्वत्यां तपस्तेपे सहस्राणां समा दश ॥ ६ ॥ ततः समाधियुक्तेन क्रियायोगेन कर्दमः ॥ संप्रपेदे हरिं भक्त्या प्रपन्नवरदाशुषम् ॥ ७ ॥ तावत्प्रसन्नो भगवान्पुष्कराक्षः कृते युगे ॥ दर्शयामास तं क्षत्तः शाब्दं ब्रह्म दधद्वपुः ॥ ८ ॥ स तं विरजमर्काभं सितपद्मोत्पलस्रजम् ॥ स्निग्धनीलालकव्रातवक्त्राब्जं विरजोंऽबरम् ॥ ९ ॥ किरीटिनं कुंडलिनं शंखचक्र-गदाधरम् ॥ श्वेतोत्पलक्रीडनकं मनःस्पर्शस्मितेक्षणम् ॥ १० ॥ विन्यस्तचरणांभोजमंसदेशे गरुत्मतः ॥ दृष्ट्वा खेवस्थितं वक्षःश्रियं कौस्तुभकंधरम् ॥ ११ ॥ जातहर्षोऽपतन्मूर्ध्ना क्षितौ लब्धमनोरथः ॥ गीर्भिस्त्वभ्यगृणात्प्रीतिस्वभावात्मा कृतांजलिः ॥ १२ ॥ ऋषिरुवाच ॥ जुष्टं बताद्याखिलसत्त्वराशेः सांसिध्यमक्ष्णोस्तव दर्शनान्नः ॥ यद्दर्शनं जन्मभिरीड्य सद्भिराशासते योगिनो रूढयोगाः ॥ १३ ॥

मा ... वक्षसि श्रीर्यस्य कौस्तुभः नीलाश्च येऽलकास्तेषां व्रातो वक्त्राब्जे यस्य ॥ ९ ॥ श्वेतोत्पलं क्रीडनकं यस्य मनःस्पर्शं मनस्यानंदजनकं स्मितमीक्षणं च यस्य तम् ॥ १० ॥ वक्षसि श्रीर्यस्य कौस्तुभः कंधरायां यस्य ॥ ११ ॥ प्रीतिरेव स्वभावः स्वतःसिद्धो धर्मो यस्य तथाविध आत्मा मनो यस्य ॥ १२ ॥ त्वामृते परमानंदं धिगन्यवरकामुकम् ॥ अथापि कृपणं मानु-

---

ज्याच्या मुखकमलावर स्नेहयुक्त व काळ्याभोर केंसांच्या कुरळ्या आल्या आहेत, ज्यानें भरजरीचा पीतांबर नेसला आहे, ॥ ९ ॥ ज्यानें मस्तकावर किरीट, कर्णामध्यें कुंडलें आणि हस्तांचेठायीं शंख चक्र आणि गदा हीं धारण केलीं आहेत, ज्यानें चवथ्या हातांत खेळण्याकरितां एक पांढरें कमळ धारण केलें आहे, ज्याचें हास्यपूर्वक अवलोकन मनाला आनंद उत्पन्न करणारें आहे, ॥ १० ॥ ज्याच्या वक्षःस्थलाचेठिकाणीं लक्ष्मी व कंठाचेठिकाणीं कौस्तुभ रत्न आहे, अशा गरुडाच्या स्कंधावर आपलीं चरणकमलें ठेऊन आकाशामध्यें प्राप्त झालेल्या भगवंताला अवलोकन करून ॥ ११ ॥ कर्दम ऋषीला आपला मनोरथ पूर्ण झाला असें वाटून हर्ष झाला आणि त्यानें प्रेमयुक्त चित्तानें भगवंताला भूमीवर साष्टांग नमस्कार घातला व हात जोडून पुढें सांगितल्याप्रमाणें त्या परमेश्वराची स्तुति केली ॥ १२ ॥ कर्दम ह्मणाला– हे स्तुतियोग्या परमेश्वरा, ही मोठी आनंदाची गोष्ट आहे कीं, आह्मी आज सर्व सत्त्वराशिरूप तुझ्या दर्शनानें आपल्या नेत्रांचें साफल्य करून घेतलें आहे. कारण, पवित्र कुलांत अनेक जन्में घेऊन

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

योगसिद्ध झालेले योगी, ज्या तुझ्या दर्शनाची इच्छा करितात परंतु तें त्यांस प्राप्त होत नाहीं ॥ १३ ॥ हे ईश्वरा, तुझ्या मायेनें ज्यांची बुद्धि नष्ट झाली आहे तेच लोक विषयांच्या लेशाकरितां, संसारसमुद्र तरून जाण्यास केवळ नौकाच अशा तुझ्या चरणकमलाची सेवा करितात. तूं तर त्यांना ते विषयभोगहि देतोस कीं, जे नरकवासी जीवांनाहि प्राप्त होतात ॥ १४ ॥ हे ईश्वरा, याप्रमाणें सकाम पुरुषांची निंदा करणारा जो मी तोसुद्धां, त्या पुरुषांप्रमाणेंच असून आपल्यासारख्या स्वभावाच्या आणि धर्म, अर्थ व काम यांची प्राप्ति करून देणाऱ्या स्त्रीला वरण्याच्या इच्छेनें कल्पवृक्षाप्रमाणें सर्व मनोरथ पूर्ण करणाऱ्या तुझ्या चरणाजवळ प्राप्त झालों आहें ॥ १५ ॥ हे धर्ममूर्ते, परमेश्वरा, तुज

गृहाण वरदानतः ॥ १ ॥ बतेति हर्षे । हेईड्य नोऽस्माभिः समग्रसत्त्वनिधेस्तव दर्शनादद्याक्ष्णोः सांसिध्यं साफल्यं जुष्टं सेवितम् । त्वद्दर्शनमेव महाफलमित्युपपादयति । यस्य तव दर्शनं सद्भिरुत्तरोत्तरमापादितप्रकर्षैर्जन्मभी रूढो विरूढो योगो यैस्तेऽपि ॥ १३ ॥ सकामभक्तान्विगर्हयन्नाह । य इति । हेईश ये निरयेऽपि स्युस्तेषां कामानां लवाय ये त्वन्मायया नष्टबुद्धयस्त एवोपासते त्वं तु तेषां तान्कामानपि रासि ददासि ॥ १४ ॥ यः सकामान्निंदामि सोऽहमपि तादृश एवेत्याह । तथेति । गृहमेधो गृहाश्रमस्तत्र धेनुं त्रिवर्गदोग्ध्रीं भार्यां परिवोढुकामः परिणेतुमिच्छन्कामदुघांघ्रिपस्य कल्पद्रुमस्य तव मूलमंघ्रिमुपेयिवानुपगतोऽस्मि । ननु कामाद्यर्थमन्यत्किमप्युपास्यतां न यतोऽशेषस्य पुरुषार्थस्य मूलमेतदेव ॥ १५ ॥ ननु तर्हि मुक्त्यर्थमेव किं न भजसि अनधिकारादित्याह । हेअधीश यस्त्वं प्रजापतिस्तस्य तव वचसा तंत्याऽयं कामहतो लोकः

ये मायया ते हतमेधसस्त्वत्पादारविंदं भवसिंधुपोतम् ॥ उपासते कामलवाय तेषां रासीश कामान्निरयेऽपि ये स्युः ॥ १४ ॥ तथा स चाहं परिवोढुकामः समानशीलां गृहमेधधेनुम् ॥ उपेयिवान्मूलमशेषमूलं दुराशयः कामदुघांघ्रिपस्य ॥ १५ ॥ प्रजापतेस्ते वचसाऽधीश तंत्या लोकः किलायं कामहतो नु बद्धः ॥ अहं च लोकानुगतो वहामि बलिं च शुक्लानिमिषाय तुभ्यम् ॥ १६ ॥ लोकांश्च लोकानुगतान्पशूंश्च हित्वा श्रितास्ते चरणातपत्रम् ॥ परस्परं त्वद्गुणवादसीधुपीयूषनिर्यापितदेहधर्माः ॥ १७ ॥ न तेऽजराक्षभ्रमिरायुरेषां त्रयोदशारं त्रिशतं षष्टिपर्व ॥ षण्नेम्यनंतच्छदि यत्त्रिणाभि करालस्रोतो जगदाच्छिद्य धावत् ॥ १८ ॥

पशुवद्बद्धः हे शुक्ल शुद्धधर्ममूर्तेऽहं च किल लोकानुगतोऽतस्तुभ्यं बलिं वहामि कर्ममयीं त्वदाज्ञामनुवर्ते अनिमिषाय कालात्मने तदर्थं भार्यां चेच्छामीति चकारस्यार्थः । न केवलं लोकानुगतो बलिं वहामि किंतु ऋणत्रयापाकरणार्थमिति किलेत्युक्तम् ॥ १६ ॥ अनिमिषायेत्यनेन कालात्मकात्त्वत्तो भीतः कर्म करोमीत्युक्तमेतत्तु भयं त्वद्भक्तानां नास्तीत्याह । द्वाभ्यां लोकान्कामाभिभूतांस्तानुसृतान्पशूंश्च विवेके सत्यपि पुनः कर्मजडान्मादृशान्हित्वाऽनादृत्य ये तव चरणरूपमातपत्रं श्रिताः । तानेवाह । त्वद्गुणानां वादः कथा तदेव सीधु मदिरा संसारविस्मारकत्वात् । पीयूषं रुचिकरत्वात् । तेन निर्यापिता विलापिता देहधर्माः क्षुत्पिपासादयो यैः । एषामित्युत्तरेणान्वयः ॥ १७ ॥ तव यत्त्रिणाभि कालचक्रं तज्जगदाच्छिद्याकृष्य धावदपि एषां त्वद्भक्तानामायुराच्छिद्य धावन्न भवति । कथंभूतम् । अजरं ब्रह्म तस्मिन्नक्षरूपे भ्रमिर्भ्रमणम् । भ्रमदिति

प्रजानाथाच्या वेदवाणीरूप दावणीनें जसे हे सकाम लोक बद्ध झाले आहेत त्याप्रमाणेंच मीहि त्या लोकांना अनुसरून देव, ऋषि व पितर यांच्या ऋणांपासून मुक्त होण्यासाठीं कालरूपी तुला बलि अर्पण करित आहें, ह्मणजे कर्ममय तुझ्या आज्ञेच्या पालनाकरितां भार्येची इच्छा करीत आहें ॥ १६ ॥ हे देवा, तुझे भक्त तर, विषयासक्त लोकांना व त्यांस अनुसरणाऱ्या माझ्यासारख्या कर्मजडांना न जुमानितां तापत्रयनाशक तुझ्या चरणरूप छत्राचा आश्रय करून, ते परस्परांमध्यें संसारविस्मृतिकारक तुझ्या कथामृताच्या श्रवणकीर्तनादिरूप प्राशनानें, क्षुधा तृषावगैरे देहधर्मांचें निवारण करितात ॥ १७ ॥ ह्याकरितांच ब्रह्मरूप आसाभोंवती फिरणारें, अधिक महिन्या-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सुद्धां तेरा महिने हे ज्याचे आरे आहेत, तीनशें साठ अहोरात्रें हीं ज्याचीं पेरें आहेत, सहा ऋतु हे ज्याच्या धांवा आहेत, कालाचे क्षण लववगैरे जे अवयव ते ज्याचे कर्वतासारखे दांते आहेत, तीन चातुर्मास्यें हे ज्याचे मध्यभागीं आधारभूत वेढे आहेत, असें चराचर जगाचें आयुष्य आकर्षण करून धांवणारें, तीव्र वेगयुक्त असें हें तुझें संवत्सरात्मक, कालचक्र, ह्या तुझ्या भक्तांचेंमात्र आयुष्य कमी करूं शकत नाहीं ॥ १८ ॥ हे भगवंता, तूं स्वतः एकच असून जग उत्पन्न करण्याच्या इच्छेनें आपल्या ठिकाणीं धारण केलेल्या दुसऱ्या योगमायेच्या योगानें प्रगट झालेल्या आपल्या शक्तींनीं, भिंतीवर जाळें पसरणाऱ्या कोळ्याप्रमाणें हें जग उत्पन्न करितोस, याचें पालन करितोस आणि शेवटीं याचा संहारही करितोस ॥ १९ ॥ हे ईश्वरा, तूं आह्मां भक्तांना जें शब्दादिक विषयसुख देतोस हें मायिक असल्यामुळें जरी भक्तांस द्यावें असें तुला

वक्तव्येऽतिभ्रमणशीलत्वादुपचारेण भ्रमिरित्यभेदनिर्देशः । अधिकमासेन सह त्रयोदशमासा अरा यस्य त्रिशतं षष्टिश्चाहोरात्राः पर्वाणि यस्य । शतशब्दे विभक्तेरलुगार्षः । षड्-ऋतवो नेमयो यस्य अनंताः क्षणलवादयश्छदाः पत्राणि पत्राकारा धाराः संति यस्य त्रीणि चातुर्मास्यानि नाभय आधारभूतानि वलयानि यस्य करालस्रोतस्तीव्रवेगम् । एतैर्विशेषणैरेव संवत्सरात्मकं चक्रमुक्तमिति द्रष्टव्यम् ॥ १८ ॥ ननु निरुपाधिमुदासीनं मां किं याचस तथाऽपि मायया विश्वस्रष्ट्यादिकर्तृत्वात्त्वमेव याच्य इत्याह । स्वय-मेक एव सन्नप्यात्मन्यधिकृतया योगमायया हेतुभूतया याः स्वीकृताः शक्तयः सत्त्वाद्यास्ताभिः । अदो विश्वम् । स्वव्यतिरिक्तसाधनानपेक्षत्वे दृष्टांतः । यथेति ॥ १९ ॥

एकः स्वयं सन्जगतः सिसृक्षया द्वितीययात्मन्नधियोगमायया ॥ सृजस्यदः पासि पुनर्ग्रसिष्यसे यथोर्णनाभिर्भगवन्स्वशक्तिभिः ॥ १९॥ नैतद्बताधीश पदं तवेप्सितं यन्माययानस्तनुषे भूतसूक्ष्मम् ॥ अनुग्रहायास्त्वपि यर्हि मायया लसत्तुलस्या तनुवा विल-क्षितः ॥ २० ॥ तं त्वाऽनुभूत्योपरतक्रियार्थं स्वमाययावर्तितलोकतंत्रम् ॥ नमाम्यभीक्ष्णं नमनीयपादसरोजमल्पीयसि कामवर्षम् ॥२१॥ ऋषिरुवाच ॥ इत्यव्यलीकं प्रणुतोऽब्जनाभस्तमाबभाषे वचसामृतेन॥सुपर्णपक्षोपरि रोचमानः प्रेमस्मितोद्वीक्षणविभ्रमद्भ्रूः॥२२॥

यद्यपि मायिकत्वाद्भक्तेभ्यो विषयसुखं दातुं नेच्छसि तथाऽप्यस्मदभिप्रायानुसारेण तत्संपादयेत्याह । नैतदिति । हेअधीश नोऽस्माकं भजतां भूतसूक्ष्मरूपं पदं शब्दादिवि-षयसुखं मायया तनुषे विस्तारयसीति यदेतत्तव यद्यपीप्सितं न भवति तथाऽप्यस्मदनुग्रहायास्तु ऋणत्रयापाकरणानंतरमेवापवर्गाय भवत्वित्यर्थः । यर्हि यतो मायया परिच्छिन्न इव लसंत्या तुलस्या युक्तस्त्वं विलक्षितोऽसि एवंभूतस्य तव दर्शनं यतो भुक्तिमुक्तिप्रदमित्यर्थः ॥ २० ॥ तं त्वा त्वां भुक्तिमुक्तिप्रदं नमामि । मुक्तिदत्वे हेतुः । अनुभूत्या ज्ञानेनोपरतः क्रियार्थः कर्मफलभोगो यस्मिन् । भोगदत्वे हेतुः । स्वमायया आवर्तितं लोकतंत्रं विश्वोपकरणं येन अतः सकामैर्निष्कामैश्च नमनीयं पादसरोजं यस्य तम् । तत्राल्पीयसि सकामे पुंसि भजने वा कामान्वर्षतीति तथा तम् ॥ २१ ॥ अमृतेन सुखकरेण प्रेमस्मिताभ्यामीक्षणेन विभ्रमंती भ्रूर्यस्य ॥ २२ ॥

खरोखर वाटत नाहीं, तथापि तें तुझ्या कृपेनें आमच्या अनुग्रहासाठीं आह्मांस प्राप्त होवो. ह्मणजे आह्मी, देव, ऋषि व पितर यांच्या ऋणापासून मुक्त झाल्यावर तें आह्मांस मुक्ति देणारें होवो. कारण, मायेच्या योगानें तूं तुळशीच्या माळेनें सुशोभित अशा आपल्या सगुण मूर्तीनें आमच्या दृष्टीस पडला आहेस, यास्तव आह्मांस भोग आणि मोक्ष हे दोन्हीहि प्राप्त होवोत ॥ २० ॥ हे देवा, जो तूं आपल्या मायेच्या योगानें ह्या जगाची राहटी चालण्यासाठीं अनेक साधनें उत्पन्न करितोस ह्मणजे सर्व प्राण्यांना विषयभोग देतोस आणि ज्ञानाच्या योगानें प्राण्यांचीं सर्व कर्मफलें नाहींशीं करून त्यांस मुक्ति देतोस, ह्मणूनच सकाम व निष्काम जनांनीं ज्या तुझीं चरणकमलें वंद्य आहेत व स्वल्प आराधन केलें असतांहि जो तूं भक्तांचे मनोरथ पूर्ण करितोस त्या तुज भगवंताला मी वारंवार नमस्कार करितों ॥ २१ ॥ मैत्रेय ह्मणाला–हे विदुरा,

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

याप्रमाणें निष्कपटपणें स्तुति केलेला, गरुडाच्या पंखांवर बसून शोभणारा व सप्रेम मंदहास्यपूर्वक अवलोकनानें ज्याची भ्रुकुटी भ्रमण पावत आहे असा तो कमलनाभ भगवान्, अमृततुल्य भाषणाच्या योगानें त्या कर्दम ऋषीला ह्मणाला कीं, ॥ २२ ॥ श्रीभगवान् ह्मणाला– हे कर्दम ऋषे, तूं ज्याकरितां उत्तम प्रकारच्या आपल्या नियमांनीं माझें पूजन केलेंस, तें तुझें हृद्गत जाणून मीं पूर्वींच त्या कार्याची उत्तम योजना करून ठेविली आहे ॥ २३ ॥ हे प्रजाध्यक्षा कर्दमा सामान्य लोकांनींहि केलेलें माझें पूजन कधींहि निष्फळ व्हावयाचें नाहीं, मग माझ्याठिकाणीं ज्यांनीं आपलें चित्त एकाग्र केलें आहे अशा तुझ्यासारख्या महात्म्यांनीं केलेलें माझें पूजन निष्फळ कोठून होणार! मुळींच व्हावयाचें नाहीं ॥ २४ ॥ आतां मी काय योजना करून ठेविली आहे तें सांगतों ऐक– ज्यावें सदाचरण सर्वठिकाणीं प्रसिद्ध आहे असा, ब्रह्मदेवाचा पुत्र स्वायंभुव मनु ह्मणून एक सार्वभौम राजा आहे, जो ब्रह्मावर्त देशामध्यें राहून सप्तसमुद्रांकित पृथ्वीचें पालन करित असतो ॥ २५ ॥ हे ब्राह्मणा, धर्मशास्त्रांत प्रवीण

चैत्यं हार्दं भावम् । मे मया समयोजि संघटितम् । यदर्थमेवाहं समर्चितस्तत् ॥ २३ ॥ मयि संग्रभितः संगृहीत एकाग्रीकृत आत्मा चित्तं यैस्तेषां यन्मदर्हणम् । त्वादृशेष्वतितरां सर्वथा मृषा निष्फलं न स्यात् ॥ २४ ॥ विख्यातं मंगलमभ्युदयः सदाचारादिलक्षणं यस्य ॥ २५ ॥ हेविप्र महिष्या सह ॥ २६ ॥ २७ ॥ यत्र यस्यां भार्यायाम् । समाहितमभिसं-

श्रीभगवानुवाच ॥ विदित्वा तव चैत्यं मे पुरैव समयोजि तत् ॥ यदर्थमात्मनियमैस्त्वयैवाहं समर्चितः ॥ २३ ॥ न वै जातु मृषैव स्यात्प्रजाध्यक्ष मदर्हणम् ॥ भवद्विधेष्वतितरां मयि संगृभितात्मनाम् ॥ २४ ॥ प्रजापतिसुतः सम्राण्मनुर्विख्यातमंगलः ॥ ब्रह्मा- वर्तं योऽधिवसन्शास्ति सप्तार्णवां महीम् ॥ २५ ॥ स चेह विप्र राजर्षिर्महिष्या शतरूपया ॥ आयास्यति दिदृक्षुस्त्वां परश्वो धर्म- कोविदः ॥ २६ ॥ आत्मजामसितापांगीं वयःशीलगुणान्विताम् ॥ मृगयंतीं पतिं दास्यत्यनुरूपाय ते प्रभो ॥ २७ ॥ समाहि- तं ते हृदयं यत्रेमान्परिवत्सरान् ॥ सा त्वां ब्रह्मन्नृपवधूः काममाशु भजिष्यति ॥ २८ ॥ यात आत्मभृतं वीर्यं नवधा प्रसविष्यति ॥ वीर्ये त्वदीये ऋषय आधास्यंत्यंजसाऽऽत्मनः ॥ २९ ॥ त्वं च सम्यगनुष्ठाय निदेशं म उशत्तमः ॥ मयि तीर्थीकृताशेषक्रियार्थो मां प्रपत्स्यसे ॥ ३० ॥ कृत्वा दयां च जीवेषु दत्त्वा चाभयमात्मवान् ॥ मय्यात्मानं सहजगद्द्रक्ष्यस्यात्मनि चापि माम् ॥ ३१ ॥

धानेन स्थितम् । नृपवधू राजकन्या ॥ २८ ॥ ते वीर्यमात्मनि भृतं धृतं या प्रसविष्यति सा भजिष्यति वीर्ये वीर्यप्रसूतासु कन्यासु अंजसा आत्मनः पुत्रानाधास्यंति ॥ २९ ॥ निदेशमाज्ञाम् । उशत्तमः शुद्धसत्त्वः तीर्थं पात्रं तेन दानं लक्ष्यते । मयि समर्पितसर्वकर्मफल इत्यर्थः ॥ ३० ॥ गार्हस्थ्येन दयां कृत्वा संन्यासेनाभयं दत्त्वा मय्यात्मानं

असा तो राजर्षि तुला पाहण्याकरितां आपल्या शतरूपानामक राणीसहवर्तमान परवांचे दिवशीं येथें येईल ॥ २६ ॥ आणि हे ब्राह्मणश्रेष्ठा, योग्य पति मिळावा अशी इच्छा करणारी, जिचे नेत्रकटाक्ष श्यामवर्ण आहेत व जी वय, सुस्वभाव आणि गुण यांनीं युक्त आहे अशा आपल्या कन्येला तो मनु, वयादिकांनीं योग्य अशा तुला अर्पण करील ॥ २७ ॥ हे ब्राह्मणा, ती राजकन्या विवाह झाल्यावर पुढें येणाऱ्या दाहा हजार वर्षेंपर्यंत यथेच्छपणें तुझी सेवा करील त्या योगानें तुझें अंतःकरण त्या पत्नीचेठिकाणीं निरंतर समाधान वृत्तीनें जडून राहील ॥ २८ ॥ पुढें ती देवहूति, तुझें वीर्य आपल्या उदरीं धारण करून प्रसूत झाली असतां, तिला नऊ कन्या होतील, त्या तुझ्या नऊ कन्यांचेठिकाणीं मरीच्यादिक ऋषि, अनायासानें पुत्र उत्पन्न करितील ॥ २९ ॥ तूंहि माझ्या वेदलक्षण आज्ञेप्रमाणें उत्तम अनुष्ठान करून शुद्धांतःकरण होशील आणि माझेठिकाणीं सर्व कर्मफलांचें अर्पण करून मला शरण येशील ॥ ३० ॥ प्रथम गृहस्थाश्रमामध्यें तूं जीवांवर दया करून ह्मणजे त्यांना अन्न आच्छादन वगैरे

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

देऊन व पुढें संन्यासधर्माच्या योगानें त्या सर्वांना अभय देऊन ज्ञानसंपन्न असा तूं, जगासहवर्तमान आपणाला माझेठिकाणीं व मलाहि आपलेठिकाणीं ऐक्यरूपानें पाहशील ॥ ३१ ॥ हे महामुने, मीहि आपल्या अंशरूपानें तुझ्या वीर्यानें युक्त होऊन तुझ्या देवहूतिनामक भार्येचेठिकाणीं अवतार धारण करीन आणि सांख्यशास्त्ररूप तत्त्वसंहितेचें तिला कथन करीन ॥ ३२ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, याप्रमाणें त्या कर्दम ऋषीला सांगून नंतर, इंद्रियांचा प्रत्याहार केला असतां प्रगट होणाऱ्या त्या भगवंतानें, सरस्वतीनदीनें परिवेष्टित अशा त्या बिंदुसरोवरापासून आपल्या लोकीं गमन केलें ॥ ३३ ॥ तें असें कीं, तप व मंत्रजप इत्यादिक साधनांनीं सिद्ध झालेल्या योगेश्वरांनीं ज्याचा वैकुंठमार्ग सर्वोत्कर्षानें वर्णिला आहे अशा त्या परमात्म्यानें, तो कर्दम ऋषि पाहात असतां, आपल्या वाहनरूप गरुडाच्या बृहद्रथंतरनामक पक्षांनीं

जगच्च सहैकीभूतं द्रक्ष्यसि ॥ ३१ ॥ त्वद्वीर्येण सह देवहूत्यामवतीर्येति शेषः ॥ ३२ ॥ प्रत्यग्भूतेष्वक्षेषु जायते आविर्भवतीति प्रत्यगक्षजः सरस्वत्या नद्या परिश्रितात्परिवेष्टितात् ॥ ३३ ॥ अशेषैस्तपोमंत्रादिसिद्धेश्वरैरभिष्टुतः सिद्धमार्गो वैकुंठमार्गो यस्य। यद्वा। अशेषसिद्धेश्वराभिष्टुतश्चासौ सिद्धैर्मृग्यत इति सिद्धमार्गश्च स ययौ पत्ररथेंद्रो गरुडस्तस्य पक्षैरुदीर्णमभिव्यक्तं सामाकर्णयन्। बृहद्रथंतरे पक्षाविति श्रुतेः। उच्चारितं स्तोमं च सामाधारभूतानामृचां समुदायं शृण्वन्। स्तोम आत्मा इति श्रुतेः। समासपाठे उच्चारितः स्तोमः स्तोत्रीयसमुदायो यस्य साम्न इति ॥ ३४ ॥ तं कालं परश्व इत्युक्तं प्रतीक्षमाणः ॥ ३५ ॥ शातकौंभाः सौवर्णाः परिकरा यस्मिंस्तं रथमास्थाय दुहितरं चारोप्य वरान्वेषणार्थं पर्यटन् ॥ ३६ ॥ हे सुधन्वन्विदुर यदहः ॥ ३७ ॥ तत्प्रवेशमात्रेण परमानंदं प्राप्त इति दर्शयितुमाश्रमं वर्णयति। यस्मिन्नित्यादिभिः सप्तभिः श्लोकैः।

सहाहं स्वांशकलया त्वद्वीर्येण महामुने ॥ तव क्षेत्रे देवहूत्यां प्रणेष्ये तत्त्वसंहिताम् ॥ ३२ ॥ मैत्रेय उवाच ॥ एवं तमनुभाष्याथ भगवान्प्रत्यगक्षजः ॥ जगाम बिंदुसरसः सरस्वत्या परिश्रितात् ॥ ३३ ॥ निरीक्षतस्तस्य ययावशेषसिद्धेश्वराभिष्टुतसिद्धमार्गः ॥ आकर्णयन्पत्ररथेंद्रपक्षैरुच्चारितं स्तोममुदीर्णसाम ॥ ३४ ॥ अथ संप्रस्थिते शुक्ले कर्दमो भगवानृषिः ॥ आस्ते स्म बिंदुसरसि तं कालं प्रतिपालयन् ॥ ३५ ॥ मनुः स्यंदनमास्थाय शातकौंभपरिच्छदम् ॥ आरोप्य स्वां दुहितरं सभार्यः पर्यटन्महीम् ॥ ३६ ॥ तस्मिन्सुधन्वन्नहनि भगवान्यत्समादिशत् ॥ उपायादाश्रमपदं मुनेः शांतव्रतस्य तत् ॥ ३७ ॥ यस्मिन्भगवतो नेत्रान्न्यपतन्नश्रुबिंदवः ॥ कृपया संपरीतस्य प्रपन्नेऽर्पितया भृशम् ॥ ३८ ॥

उच्चारिल्यामुळें स्पष्ट ऐकूं येणाऱ्या सामगायनाचें व त्याला आश्रयभूत ऋचांच्या समुदायाचें श्रवण करीत करीत गमन केलें ॥ ३४ ॥ याप्रमाणें तो शुद्धस्वरूप परमात्मा तेथून गेल्यावर तो योगैश्वर्यसंपन्न कर्दम ऋषि, ‘परवांचे दिवशीं स्वायंभुव मनु येथें येईल अशा’ भगवंतानें सांगितलेल्या कालाची मार्गप्रतीक्षा करीत त्या बिंदुसरोवराच्या तीरीं आपल्या आश्रमांत राहिला ॥ ३५ ॥ हे उत्तम धनुष्य धारण करणाऱ्या विदुरा, इकडे स्वायंभुव मनुही आपल्या पत्नीसह सुवर्णालंकारांनीं भूषित अशा रथांत बसून व आपल्या कन्येलाहि रथावर बसवून घेऊन, पृथ्वीवर पर्यटण करीत भगवंतानें जो दिवस सांगितला होता त्या दिवशीं, शांतस्वभावानें युक्त अशा त्या कर्दम ऋषीच्या आश्रमस्थळीं येऊन पोंचला ॥ ३६ ॥ ३७ ॥ जेथें शरण आलेल्या कर्दमावर केलेल्या कृपेनें व्याप्त झालेल्या भगवंताच्या नेत्रांतून प्रेमाश्रुबिंदु तेथील सरोवरांत पडले होते ह्मणून त्या आश्रमाला व सरोवराला बिंदुसरोवर असें नांव प्राप्त झालें. तें पुण्यकारक सरोवर सरस्वती नदीनें आसमंताद्भागीं वेष्टित होतें आणि आरोग्यकारक

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अमृतासारख्या गोड उदकानें युक्त असल्यामुळें महान् महान् ऋषींच्या समुदायानें सेवन केलेलें होतें ॥ ३८ ॥ ३९ ॥ तसेंच ज्यांच्यामध्यें मधुर शब्द करणारे मंगलकारक पशुपक्षी राहात होते असें तें आश्रमस्थान पवित्र वृक्षांच्या व वल्लींच्या समुदायांनीं युक्त होतें आणि सर्व ऋतूंमध्यें येणाऱ्या फलांनीं व पुष्पांनीं परिपूर्ण असून आपोआप उगवलेल्या दाट वृक्षांच्या ओळींच्या शोभेनें युक्त होतें ॥ ४० ॥ तसेंच मत्त झालेल्या पक्षिगणांनीं नादित, फुलांतील मध पिऊन गुंग झालेल्या भ्रमरांच्या गुंजारवानें युक्त, मत्त झालेल्या मयूररूपी नटांच्या नृत्यसंभ्रमानें सुशोभित, व मत्त झालेले कोकिलपक्षी जेथें परस्परांना हाका मारीत आहेत, असें होतें ॥ ४१ ॥ कदंब, चंपक, अशोक, करंज, बकुळ, असण, कुंद, मंदार, कुडे व आंब्याचे लहान लहान रोपे यांनीं तें भूषित होतें ॥ ४२ ॥ पाणकावळे, पाण्यावर तरणारे क्रौंचबकादिक पक्षी, हंस,

प्रपन्ने कर्दमे ॥ ३८ ॥ शिवमारोग्यममृतवत्स्वादु जलं यस्मिन् ॥ ३९ ॥ कूजंतः पुण्या मृगा द्विजाश्च येषु तैः पुण्यद्रुमलतानां जालैः समूहैर्युक्तम् ॥ ४० ॥ घुष्टं नादितम् । मत्तभ्रमराणां विभ्रमो विनोदो यस्मिन् । मत्ता बर्हिण एव नटास्तेषामाटोपो नृत्यसंभ्रमो यस्मिन् । आह्वयंतो मिथो मत्ताः कोकिला यस्मिन् ॥ ४१ ॥ कदंबादिभिर्वृक्षैरलं-

तद्वै बिंदुसरो नाम सरस्वत्या परिप्लुतम् ॥ पुण्यं शिवामृतजलं महर्षिगणसेवितम् ॥३९॥ पुण्यद्रुमलताजालैः कूजत्पुण्यमृगद्विजैः ॥ सर्वर्तुफलपुष्पाढ्यं वनराजिश्रियान्वितम् ॥ ४० ॥ मत्तद्विजगणैर्घुष्टं मत्तभ्रमरविभ्रमम् ॥ मत्तबर्हिनटाटोपमाह्वयन्मत्तकोकिलम् ॥ ४१ ॥ कदंबचंपकाशोककरंजबकुलासनैः ॥ कुंदमंदारकुटजैश्चूतपोतैरलंकृतम् ॥ ४२ ॥ कारंडवैः प्लवैर्हंसैः कुररैर्जलकुक्कुटैः ॥ सारसैश्चक्रवाकैश्च चकोरैर्वल्गु कूजितम् ॥ ४३ ॥ तथैव हरिणैः क्रोडैः श्वाविद्गवयकुञ्जरैः ॥ गोपुच्छैर्हरिभिर्मर्कैर्नकुलैर्नाभिभिर्वृतम् ॥ ४४ ॥ प्रविश्य तत्तीर्थवरमादिराजः सहात्मजः ॥ ददर्श मुनिमासीनं तस्मिन्हुतहुताशनम् ॥ ४५ ॥ विद्योतमानं वपुषा तपस्युग्रयुजा चिरम् ॥ नातिक्षामं भगवतः स्निग्धापांगावलोकनात् ॥ तद्व्याहृतामृतकला पीयूषश्रवणेन च ॥ ४६ ॥ प्रांशुं पद्मपलाशाक्षं जटिलं चीरवाससम् ॥ उपसंसृत्य मलिनं यथाऽर्हणमसंस्कृतम् ॥ ४७ ॥

कृतम् ॥ ४२ ॥ कारंडवादिभिः पक्षिभिर्वल्गु यथा तथा कूजितम् ॥ ४३ ॥ हरिणादिभिर्वृतम् । तत्र क्रोडः सूकरः श्वाविच्छल्लकः मर्को मर्कटः तद्विशेषा गोपुच्छाः हरिर्वानरः सिंहो वा नाभिः कस्तूरीमृगः ॥ ४४ ॥ हुतो हुताशनो ब्रह्मचारियोग्यो येन ॥ ४५ ॥ उग्रा युक् योगो यस्य तेन वपुषा विद्योतमानं तस्य भगवता व्याहृतं भाषणमेवामृतकला अमृतमयस्य चंद्रस्य कला तन्मयं पीयूषं तस्य श्रवणेन च नातिक्षामं तपसा कृशं संतमप्यकृशम् ॥ ४६ ॥ प्रांशुमुन्नतं उपसंसृत्य समीपं गत्वा मलिनं ददर्शेति पूर्वेव

ढिवे, पाणकोंबडे, सारस, चक्रवाक व चकोर या पक्ष्यांच्या मधुर शब्दांनीं तें नादयुक्त होतें ॥ ४३ ॥ तसेंच हरिण, वराह, साळई, गवे, हत्ती, गोपुच्छ, सिंह, मर्कट[1], मुंगुस, व कस्तूरीमृग यांनीं तें स्थान व्याप्त होतें ॥ ४४ ॥ अशा त्या पवित्र आश्रमांत आदिराजा तो स्वायंभुव मनु, आपल्या कन्येसहवर्तमान प्रवेश करून त्यानें, तेथें ब्रह्मचाऱ्यास योग्य अशा अग्नींत होम करून बसलेल्या कर्दम ऋषीला अवलोकन केलें ॥ ४५ ॥ तो मुनि, बहुत कालपर्यंत तपाच्याठिकाणीं तीव्र संयोग झालेल्या आपल्या शरीरानें प्रकाशमान होता आणि जरी तो वस्तुतः तपश्चर्येनें कृश झाला होता तथापि भगवंताच्या प्रेमयुक्त कटाक्षावलोकनेंकरून व त्याला भगवंतानें सांगितलेलें जें भाषण तेंच अमृतरूपी चंद्रकलेंतील अमृत त्याच्या श्रवणद्वारा प्राशनानें तो फारसा कृश दिसत नव्हता ॥ ४६ ॥ आणि उंच, जटा धारण करणारा, वल्कलें परिधान

१ सर्व शरिर कृष्णवर्ण असून तांबडया मुखानें व गाईसारख्या पुच्छानें युक्त असलेले एकप्रकारचे वानर.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करणारा, व ज्याचीं नेत्रें कमलपत्रासारखीं आहेत असा होता. त्याजवळ जाऊन स्वायंभुव मनु पाहातो, तों जसें एकादें महामोल तेजःपुंज रत्न वरचेवर पुसलें नसतां मळकट दिसतें तसा तो त्याच्या दृष्टीस पडला ॥ ४७ ॥ नंतर कर्दमानें आपल्या पर्णकुटिकेंत आलेल्या व आपल्या पुढें नम्र असलेल्या त्या राजाला आशीर्वाद देऊन योग्य पूजेनें त्याचा सत्कार केला ॥ ४८ ॥ नंतर भगवंतानें सांगितलेली गोष्ट ध्यानांत ठेवणारा तो मुनि, पूजेचा स्वीकार करून नम्रतेनें अग्रभागीं बसलेल्या स्वायंभुव मनूला, आपल्या मधुर वाणीनें संतुष्ट करीत करीत ह्मणाला कीं– ॥ ४९ ॥ हे राजा, तुझें पृथ्वीपर्यटन निश्चयेंकरून सत्पुरुषांच्या संरक्षणाकरितां आणि दुष्टांच्या वधाकरितां आहे. कारण, जो तूं प्रत्यक्ष विष्णूची पालनशक्तिच आहेस ॥ ५० ॥ जो तूं, जगाच्या पालनाकरितां सूर्य, चंद्र, अग्नि, इंद्र, वायु, यमधर्म व वरुण यांची स्वरूपें आपले-

---

क्रिया अर्ह्यतेऽनेनेत्यर्हणं महारत्नं तदसंस्कृतमनिर्णिक्तं यथा मलिनं दृश्यते तद्वत् ॥ ४७ ॥ उटजं पर्णशालां प्राप्तं पुरः पादसमीपे प्रणतमाशीर्भिरभिनंद्य सपर्यया पूजया प्रत्यगृह्णात्सत्कृतवान् ॥ ४८ ॥ ४९ ॥ ते चंक्रमणं पर्यटनम् । हि यस्मात् ॥ ५० ॥ मनुस्थं विष्णुं प्रणमति य इति । स्थाने तत्तत्कार्यावसरे । शुक्लाय विष्णवे ॥ ५१ ॥

अथोटजमुपायातं नृदेवं प्रणतं पुरः ॥ सपर्यया पर्यगृह्णात्प्रतिनंद्यानुरूपया ॥ ४८ ॥ गृहीतार्हणमासीनं संयतं प्रीणयन्मुनिः ॥ स्मरन्भगवदादेशमित्याह श्लक्ष्णया गिरा ॥ ४९ ॥ नूनं चंक्रमणं देव सतां संरक्षणाय ते ॥ वधाय चासतां यस्त्वं हरेः शक्तिर्हि पालनी ॥ ५० ॥ योऽर्केंद्वग्नींद्रवायूनां यमधर्मप्रचेतसाम् ॥ रूपाणि स्थान आधत्से तस्मै शुक्लाय ते नमः ॥ ५१ ॥ न यदा रथमास्थाय जैत्रं मणिगणार्पितम् ॥ विस्फूर्जच्चंडकोदंडो रथेन त्रासयन्नघान् ॥ ५२ ॥ स्वसैन्यचरणक्षुण्णं वेपयन्मंडलं भुवः ॥ विकर्षन्बृहतीं सेनां पर्यटस्यंशुमानिव ॥ ५३ ॥ तदैव सेतवः सर्वे वर्णाश्रमनिबंधनाः ॥ भगवद्रचिता राजन्भिद्येरन्बत दस्युभिः ॥ ५४ ॥ अधर्मश्च समेधेत लोलुपैर्व्यंकुशैर्नृभिः ॥ शयाने त्वयि लोकोऽयं दस्युग्रस्तो विनंक्ष्यति ॥ ५५ ॥

नयदेति पंचानामयमर्थः । यद्यपि धर्मरक्षार्थं सर्वतः पर्यटतस्तव प्रसंगादप्यागमनं भवति तथापि विशेषकार्यं चेदस्ति तत्कथ्यतामिति । जैत्रं जयप्रदं मणिगणा अर्पिता यस्मिंस्तं रथमारुह्य त्वं यदा भुवो मंडलं न पर्यटसि तदा सेतवो भिद्येरन्निति त्रयाणामन्वयः । विस्फूर्जन्नादं कुर्वच्चंडं कोदंडं धनुर्यस्य ॥ ५२ ॥ स्वसैन्यस्य चरणैः क्षुण्णं संघट्टितम् ॥ ५३ ॥ वर्णाश्रमाणां निबंधनं यैः । बत अहो ॥ ५४ ॥ निरंकुशैर्नृभिर्निमित्तभूतैः शयाने निश्चिंते ॥ ५५ ॥

ठिकाणीं धारण करितोस त्या विष्णुरूपी तुला माझा नमस्कार असो ॥ ५१ ॥ हे राजा, टणत्कार शब्द करणारें, भयंकर धनुष्य धारण करणारा तूं, आपल्या विजयी रत्नखचित रथामध्यें आरूढ होऊन त्या रथाच्या घडघडाट शब्दानें शत्रूंना त्रास उत्पन्न करीत व आपल्या सैन्याच्या चरणांनीं तुडविलेलें भूमंडळ कंपित करीत करीत मोठी सेना बरोबर घेऊन जर सूर्यासारखें पर्यटन केलें नाहींस ॥ ५२ ॥ ५३ ॥ तर हे राजा, वर्णांच्या व आश्रमांच्या व्यवस्थेविषयीं भगवंतानें बांधून दिलेल्या सगळ्या धर्ममर्यादा चोरांनीं मोडून टाकिल्या जातील मग केवढा अनर्थ होईल बरें? ॥ ५४ ॥ आणि जर तूं धर्मरक्षणाविषयीं उदासीन झालास तर स्वेच्छाचारी व द्रव्यलोभी अशा लोकांच्या योगानें अधर्म फार वाढेल आणि दुष्ट लोकांनीं पीडित झालेलें हें जग नाश पावेल ह्मणून तसें न होण्याकरितां तूं पर्यटण करित आहेस ॥ ५५ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तथापि हे वीरा, ज्याकरितां तूं विशेषेंकरून येथेंच आला आहेस तें कारण मी तुला विचारितों आणि त्याचा आह्मी अगदीं निष्कपट मनानें स्वीकार करूं ॥ ५६ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील तृतीयस्कंधामध्यें हा एकविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २१ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ श्रीविष्णूनें कर्दम ऋषीला जसें सांगितलें होतें त्याप्रमाणें स्वायंभुव मनूनें आपली देवहूतिनामक कन्या त्या कर्दम मुनीला अर्पण केली अशी कथा या बाविसाव्या अध्यायांत वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ मैत्रेय ह्मणाला—हे विदुरा, याप्रमाणें कर्दमानें ज्याच्या सर्व गुणांचा व कर्मांचा उत्कर्ष स्पष्टरीतीनें वर्णन केला आहे असा तो सार्वभौम मनु, आपल्या कीर्तीचें वर्णन ऐकून लज्जित झाल्यासारखा होऊन, आपलें बोलणें संपवून स्वस्थ बसलेल्या त्या कर्दम ऋषीला ह्मणाला कीं, ॥ १ ॥ मनु ह्मणाला—हे ऋषे, वेदमय ब्रह्मदेवानें आपल्या वेदरूपी शरीराचें रक्षण

निर्व्यलीकेन सहर्षेण प्रतिपद्यामहे स्वीकुर्महे ॥ ५६ ॥ इति श्रीमद्भागवते तृतीयस्कंधे टीकायामेकविंशतितमोऽध्यायः ॥ २१ ॥ ॥ द्वाविंशे कर्दमायादाचथादिष्टं हि विष्णुना ॥ मनुर्दुहितरं देवहूतिमित्युपवर्ण्यते ॥ १ ॥ एवमाविष्कृतोऽभिष्टुतोऽशेषाणां गुणानां कर्मणां चोदय उत्कर्षो यस्य स सम्राण्मनुः सव्रीड इव स्वकी-

अथापि पृच्छे त्वां वीर यदर्थं त्वमिहागतः ॥ तद्वयं निर्व्यलीकेन प्रतिपद्यामहे हृदा ॥ ५६ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे तृतीयस्कंधे एकविंशतितमोऽध्यायः ॥ २१ ॥ ॥ मैत्रेय उवाच ॥ एवमाविष्कृताशेषगुणकर्मोदयो मुनिम् ॥ सव्रीड इव तं सम्राडुपारतमुवाच ह ॥ १ ॥ मनुरुवाच ॥ ब्रह्माऽसृजत्स्वमुखतो युष्मानात्मपरीप्सया ॥ छंदोमयस्तपोविद्यायोगयुक्तानलंपटान् ॥ २ ॥ तत्त्राणायासृजच्चास्मान् दोःसहस्रात्सहस्रपात् ॥ हृदयं तस्य हि ब्रह्म क्षत्रमंगं प्रचक्षते ॥ ३ ॥ अतो ह्यन्योन्यमात्मानं ब्रह्म क्षत्रं च रक्षतः ॥ रक्षति स्माव्ययो देवः स यः सदसदात्मकः ॥ ४ ॥ तव संदर्शनादेव छिन्ना मे सर्वसंशयाः ॥ यत्स्वयं भगवान्प्रीत्या धर्ममाह रिरक्षिषोः ॥ ५ ॥

र्तिश्रवणात् । प्रत्याख्यानशंकया वा तं मुनिमुवाच उपारतं निवृत्तिनिरतम् ॥ १ ॥ मदीया कन्या त्वया परिणेयेति विज्ञापयिष्यन्युष्मदस्मत्संबंधस्तावदीश्वरेण पूर्वमेव घटित इत्याह । ब्रह्मेति सार्धाभ्याम् । आत्मनः परीप्सया पर्याप्तुमिच्छया छंदोमयस्यात्मनः पर्याप्तिः पालनं वेदप्रवर्तनं तस्येच्छया युष्मान्ब्राह्मणान् ॥ २ ॥ तत्त्राणाय ब्राह्मणपालनाय ब्रह्म ब्राह्मणजातिः क्षत्रं क्षत्रियजातिः ॥३॥ एवं स देव एव रक्षतिस्म । कोऽसौ । यः सदसदात्मकः सर्वात्मकः तथाऽप्यव्ययो निर्विकारः ॥ ४ ॥ तं विज्ञापयितुमेव

होण्यासाठीं आपल्या मुखापासून तप, ज्ञान व अष्टांग योग ह्यांनीं युक्त असून विषयांचेठिकाणीं लंपट नसणाऱ्या तुह्मां ब्राह्मणांस उत्पन्न केलें आहे ॥ २ ॥ आणि त्या ब्राह्मणाच्या रक्षणाकरितां अनंत चरणांनीं युक्त असलेल्या त्याच ब्रह्मदेवानें आपल्या अनंत हस्तांपासून आह्मां क्षत्रियांस उत्पन्न केलें आहे, ह्मणूनच ब्राह्मणकुल हें त्याचें हृदय आणि क्षत्रियकुल हें त्याचें शरीर असें ह्मणतात ॥ ३ ॥ याप्रमाणें एकाच शरीराशीं संबंध असल्यामुळें आपआपलें व परस्परांचें रक्षण करणाऱ्या त्या ब्राह्मणांना व क्षत्रियांना तोच देव रक्षण करितो. तो कोणता? तर, जो सर्व जगद्रूपी असून निर्विकार आहे ॥ ४ ॥ हे ऋषे, ज्याअर्थीं प्रजेचें रक्षण करण्याची इच्छा करणाऱ्या माझें कर्तव्य कर्म तुह्मीं आपण होऊन मोठ्या प्रीतीनें सांगितलेंत त्याअर्थीं आपल्या दर्शनेंकरूनच माझे सर्व संशय दूर झाले ॥ ५ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

फार काय सांगावें ! ज्यांनीं आपलें मन स्वाधीन करून घेतलें नाहीं त्या लोकांच्या दृष्टी पडण्याससुद्धां अशक्य असा तुमचें दर्शन मला झालें हें मोठें भाग्य होय ! आणि आपल्या मंगलकारक चरणरजाचा स्पर्श माझ्या मस्तकाला झाला हीहि मोठी आनंदाची गोष्ट आहे ॥ ६ ॥ अहाहा ! माझ्या भाग्योदयानेंच तुम्ही मला राजधर्म सांगून माझ्यावर मोठा अनुग्रह केलात व मीहि सुदैवानेंच आपल्या उघड्या कर्णरंध्रांनीं आपलीं मनोहर भाषणें सेवन केलीं ॥ ७ ॥ तस्मात् हे ऋषे, कन्येच्या प्रेमामुळें, 'हिला योग्य पति कसा मिळेल' या काळजीनें खिन्नचित्त झालेल्या मज दीनाचें सांगणें आपण कृपा करून ऐकून घ्यावें ॥ ८ ॥ प्रियव्रत व उत्तानपाद यांची बहीण ही माझी देवहूतिनामक कन्या, वय, स्वभाव आणि गुण इत्यादिकांनीं योग्य असा पति इच्छित आहे ॥ ९ ॥ तुमचा स्वभाव, विद्या, रूप, वय आणि गुण हे जेव्हां हिनें नारदमुनीपासून ऐकिले तेव्हांपासून ही तुम्हांस

तद्दर्शनादिकमभिनंदति । तवेति त्रिभिः ॥ ५ ॥ अकृतात्मनामवशीकृतचित्तानाम् ॥ ६ ॥ अनुग्रहोऽनुशासनादिरूप एव । उशतीरुशत्यः ॥ ७ ॥ विज्ञापयति । स भवानिति सप्तभिः । दुहितुः स्नेहेन परिक्लिष्ट आत्मा यस्य श्रावितं विज्ञापनम् ॥ ८ ॥ प्रियव्रतोत्तानपदोः स्वसेति पुत्रिकाकरणशंका निरस्ता मम सुतेति क्षत्रकन्या तव

दिष्ट्या मे भगवान्दृष्टो दुर्दर्शो योऽकृतात्मनाम् ॥ दिष्ट्या पादरजः स्पृष्टं शीर्ष्णा मे भवतः शिवम् ॥ ६ ॥ दिष्ट्या त्वया-ऽनुशिष्टोऽहं कृतश्चानुग्रहो महान् ॥ अपावृतैः कर्णरंध्रैर्जुष्टा दिष्ट्योशतीर्गिरः ॥ ७ ॥ स भवान्दुहितृस्नेहपरिक्लिष्टात्मनो मम ॥ श्रोतुमर्हसि दीनस्य श्रावितं कृपया मुने ॥ ८ ॥ प्रियव्रतोत्तानपदोः स्वसेयं दुहिता मम ॥ अन्विच्छति पतिं युक्तं वयः-शीलगुणादिभिः ॥ ९ ॥ यदा तु भवतः शीलश्रुतरूपवयोगुणान् ॥ अशृणोन्नारदादेषा त्वय्यासीत्कृतनिश्चया ॥ १० ॥ तत्प्रतीच्छ द्विजाग्र्येमां श्रद्धयोपहृतां मया ॥ सर्वात्मनाऽनुरूपां ते गृहमेधिषु कर्मसु ॥ ११ ॥ उद्यतस्य हि कामस्य प्रतिवादो न शस्यते ॥ अपि निर्मुक्तसंगस्य कामरक्तस्य किं पुनः ॥ १२ ॥ य उद्यतमनादृत्य कीनाशमभियाचते ॥ क्षीयते तद्यशः स्फीतं मानश्चावज्ञया हतः ॥ १३ ॥ अहं त्वाऽशृणवं विद्वन्विवाहार्थं समुद्यतम् ॥ अतस्त्वमुपकुर्वाणः प्रत्तां प्रतिगृहाण मे ॥ १४ ॥ ऋषिरुवाच ॥ बाढ-मुद्वोढुकामोऽहमप्रत्ता च तवात्मजा ॥ आवयोरनुरूपोऽसावाद्यो वैवाहिको विधिः ॥ १५ ॥

योग्येति दर्शितम् ॥ ९ ॥ एषा देवहूतिः ॥ १० ॥ प्रतीच्छ स्वीकुरु ॥ ११ ॥ उद्यतस्य स्वतः प्राप्तस्य विषयस्य प्रतिवादः प्रत्याख्यानम् ॥ १२ ॥ कीनाशं कृपणम् । अवज्ञया परापमानेन ॥ १३ ॥ यस्य सावधि ब्रह्मचर्यं स उपकुर्वाणः मे प्रत्तां मया दत्ताम् ॥ १४ ॥ अप्रत्ता चेति मय्येव कृतनिश्चयत्वात्कस्मैचित्प्रतिश्रुता च न भवती-

---

वरण्याविषयीं निश्चय करून राहिली आहे ॥ १० ॥ तस्मात् हे द्विजश्रेष्ठ, भक्तिपुरःसर मी अर्पण केलेली ही कन्या, तुम्ही स्वीकारावी. कारण, गृहस्थाश्रमसंबंधी कर्मांविषयीं तुम्हांस सर्वप्रकारांनीं ही योग्य आहे ॥ ११ ॥ ह्या गोष्टीला आपण नाहीं म्हणूं नये. कारण, सर्वसंग परित्याग केलेल्या पुरुषालाहि स्वतः प्राप्त झालेल्या विषयाचा अव्हेर करणें उचित नाहीं, मग विषयासक्त पुरुषाला उचित कोठून होईल ? ॥ १२ ॥ जो पुरुष, आपणाजवळ न मागतां प्राप्त झालेल्या वस्तूचा अनादर करून पुढें त्या वस्तूची एकाद्या कृपण मनुष्याजवळ याचना करितो, त्याचें यश जरी सर्वठिकाणीं पसरलेलें असलें तरी तें नाश पावतें आणि दुसऱ्या लोकांपासून अवज्ञा होऊन त्याचा मान-भंगही होतो ॥ १३ ॥ हे ज्ञानसंपन्ना ऋषे, 'तुम्ही विवाहाकरितां उद्युक्त आहां' असें मी ऐकिलें आहे. यास्तव सावधि (गृहस्थाश्रमापर्यंत) ब्रह्मचर्य व्रत धारण करणाऱ्या तुम्हीं, मी अर्पण केलेल्या ह्या कन्येचा स्वीकार करावा ॥ १४ ॥ कर्दम ऋषि म्हणाला— हे राजा, ठीक आहे. मी खरोखरच विवाह करण्याची इच्छा करीत आहें आणि ही

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तुझी कन्याहि दुसऱ्या कोणाला देण्याचें तूं वचन दिलेलें नाहीं. तस्मात् आह्मां उभयतांला अनुरूप असा हा पहिलाच विवाहविधि आहे ॥ १५ ॥ आणि हे राजा, वेदामध्यें सांगितलेल्या विधीमध्यें प्रसिद्ध असलेला ह्या तुझ्या कन्येचा जो माझ्यासहवर्तमान विवाह करण्याचा मनोरथ तो परिपूर्ण होवो. कारण, आपल्या अंगकांतीनेंच भूषणादिसंबंधी शोभेचा तिरस्कार करणाऱ्या तुझ्या कन्येचा, कोण बरें अंगीकार करणार नाहीं? ॥ १६ ॥ पूर्वी एके वेळीं तोरड्या घातलेल्या असल्यामुळें रुणझुण् शब्द करणाऱ्या पायांच्या योगानें जिला शोभा आली होती व जिचे नेत्र चेंडूकडे लागलेले असल्यामुळें चंचल झाले होते अशा राजवाड्याच्या गच्चीवर खेळणाऱ्या ज्या तुझ्या कन्येला अवलोकन करून, अत्यंत मोहानें व्याकुळचित्त झालेला विश्वावसुनामक गंधर्व, आपल्या विमानांतून खालीं पडला होता; अशी, स्त्रियांमध्यें अतिसुंदर, लक्ष्मीची चरणसेवा

त्यर्थः । आद्यः प्रथमः ततःपूर्वं विवाहाभावात् । मुख्य इति वा ॥ १५ ॥ भूयाद्भवेत् प्रतीतः गृभ्णामि ते सौभगत्वाय हस्तं मया पत्या इत्यादिमंत्रप्रसिद्धः । स्वयांगकांत्यैव श्रियं भूषणादिशोभाम् ॥ १६ ॥ यां विलोक्य न्यपतत् संमोहेन विमूढं व्याकुलं चेतो यस्य क्वणद्भ्यामंघ्रिभ्यां शोभा यस्याः ॥ १७ ॥ तां ललनानां ललामं भूषणभूतां असेवितौ श्रियश्चरणौ यैस्तैरदृष्टां द्रष्टुमप्ययोग्यां उच्चपदः उत्तानपादस्य अभियातां स्वयं प्राप्ताम् ॥ १८ ॥ भजिष्ये स्वीकरिष्ये यावदपत्योत्पत्तिस्तावद्गार्हस्थ्यं ततः परं

कामः स भूयान्नरदेव तस्याः पुत्र्याः समाम्नायविधौ प्रतीतः ॥ क एव ते तनयां नाद्रियेत स्वयैव कांत्या क्षिपतीमिव श्रियम् ॥ १६ ॥ यां हर्म्यपृष्ठे क्वणदंघ्रिशोभां विक्रीडतीं कंदुकविह्वलाक्षीम् ॥ विश्वावसुर्न्यपतत्स्वाद्विमानाद्विलोक्य संमोहविमूढचेताः ॥ १७ ॥ तां प्रार्थयंतीं ललनाललाममसेवितश्रीचरणैरदृष्टाम् ॥ वत्सां मनोरुच्चपदः स्वसारं को नानुमन्येत बुधोऽभियाताम् ॥ १८ ॥ अतो भजिष्ये समयेन साध्वीं यावत्तेजो बिभृयादात्मनो मे ॥ अतो धर्मान्पारमहंस्यमुख्यान्शुक्लप्रोक्तान्बहु मन्येऽविहिंस्रान् ॥ १९ ॥ यतोऽभवद्विश्वमिदं विचित्रं संस्थास्यते यत्र च वाऽवतिष्ठते ॥ प्रजापतीनां पतिरेष मह्यं परं प्रमाणं भगवाननंतः ॥ २० ॥ मैत्रेय उवाच ॥ स उग्रधन्वन्नियदेवाबभाष आसीच्च तूष्णीमरविंदनाभम् ॥ धियोपगृह्णन्स्मितशोभितेन मुखेन चेतो लुलुभे देवहूत्याः ॥ २१ ॥

संन्यास इति भाषाबंधः समयः । तमेवाह । यावदात्मनो मम तेजो गर्भं बिभृयात् । यद्वा ममात्मनो देहाच्च्युतं तेजो वीर्यं बिभृयादिति । अतःपरं पारमहंस्यं ज्ञानं तस्मिन्मुख्यान् शुक्लेन विष्णुना साक्षात्प्रकर्षेणोक्तानविहिंस्रान्हिंसारहितान् शमादीन्बहुयथाभवत्येवमनुष्ठेयान्मन्ये ॥ १९ ॥ ननु तव पितुः प्रजापतेराज्ञा सृष्टावेव न संन्यासे तत्राह । यत इति । संस्थास्यते च लयं यास्यति । वावेति एवार्थे । ऋणत्रयापाकरणानंतरं संन्यास एव मादृशानां भगवतोक्त इत्यर्थः ॥ २० ॥ हे उग्रधन्वन्विदुर लुलुभे मुनेर्मुखेन

न करणाऱ्या पुरुषांनीं पहाण्याससुद्धां अशक्य, मनूची (तुझी) कन्या आणि उत्तानपाद राजाची बहीण अशी स्त्री आपल्या घरीं येऊन पति होण्याकरितां जर आपली प्रार्थना करीत आहे तर कोण बरें ज्ञाता पुरुष तिचा अंगीकार करणार नाहीं? सर्वही करतीलच ॥ १७ ॥ १८ ॥ यास्तव कांहीं नियमित कालपर्यंत ह्मणजे माझ्या देहापासून गलित झालेलें वीर्य ही धारण करी तोंपर्यंत मी या साध्वीचा स्वीकार करीन. त्यानंतर संन्यास ग्रहण करून भगवंतानें सांगितलेले ज्ञानसंपादनाविषयीं मुख्य आणि हिंसारहित असे जे शमदमादिक धर्म त्यांचाच बहुआदरानें स्वीकार करावा असें माझ्या मनांत आहे ॥ १९ ॥ कारण, ज्यापासून अनेक चमत्कारांनीं परिपूर्ण हें जग उत्पन्न झालें, ज्याच्यामध्यें ह्याचा लय होईल आणि प्रस्तुत हें ज्याच्याठिकाणीं आहे तो हा प्रजापतींचा अधिपति अनंत भगवानच मला केवळ मान्य आहे, ह्मणजे ऋणत्रयापासून मुक्त झाल्यावर संन्यास घेण्याविषयीं त्या भगवंताचीच मला आज्ञा आहे ॥ २० ॥ मैत्रेय ह्मणाला– हे उग्र धनुष्य धारण करणाऱ्या विदुरा, तो कर्दम ऋषि, ॥ ६९ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

इतकेंच भाषण करून आपल्या बुद्धीनें पद्मनाभ भगवंताचें ध्यान करीत स्वस्थ बसला. त्या वेळीं त्याच्या मंदहास्यानें सुशोभित झालेल्या मुखाकडे पाहून देवहूतीचें चित्त त्याला वरण्याविषयीं लुब्ध झालें ॥ २१ ॥ कर्दमाचें भाषण ऐकिल्यावर तो मनुहि, आपल्या राणीचा व कन्येचा निश्चय स्पष्टपणें जाणून, हर्षयुक्त झाला आणि त्यानें अनेकगुणसमूहांनीं युक्त अशा त्या कर्दमाला शीलादिगुणसंपन्न अशी आपली कन्या अर्पण केली ॥ २२ ॥ त्या वेळीं शतरूपानामक महाराणीनें मोठ्या प्रेमानें त्या उभयतां दंपतींला, मोठमोठ्या मूल्यवान् देणग्या, भूषणें, वस्त्रें आणि गृहसंबंधी पुष्कळ भांडीकुंडीं अर्पण केलीं ॥ २३ ॥ याप्रमाणें तो सार्वभौम मनु आपली कन्या यथायोग्य वराला देऊन निश्चिंत झाला, आणि तेथून निघून जातेवेळीं त्यानें आपल्या कन्येस बाहूंनीं आलिंगन करून तिचा विरह सहन न करीत होत्साता उत्कंठेनें सद्गदित-

---

प्रलोभ्यतेस्म यद्वा मुखेन प्रलोभितवान् ॥ २१ ॥ स मनुः अन्वनंतरं महिष्याश्च व्यवसितं निश्चयं ज्ञात्वा ॥ २२ ॥ पारिबर्हान्विवाहकाले प्रदेयान् भूषाः भूषणानि वासांसि परिच्छदान्गृहोपकरणानि च ॥ २३ ॥ प्रत्तां दत्ताम्। सद्दक्षाय सद्दशाय गता व्यथा चिंता यस्य औत्कंठ्येनोन्मथितः क्षुभित आशयो यस्य ॥ २४ ॥ तस्या विरहं सोढुं हेअंब हेवत्से

सोऽनुज्ञात्वा व्यवसितं महिष्या दुहितुः स्फुटम् ॥ तस्मै गुणगणाढ्याय ददौ तुल्यां प्रहर्षितः ॥ २२ ॥ शतरूपा महाराज्ञी पारिबर्हान्महाधनान् ॥ दंपत्योः पर्यदात्प्रीत्या भूषावासः परिच्छदान् ॥ २३ ॥ प्रत्तां दुहितरं सम्राट् सदृक्षाय गतव्यथः ॥ उपगुह्य च बाहुभ्यामौत्कंठ्योन्मथिताशयः ॥ २४ ॥ अशक्नुवंस्तद्विरहं मुंचन्बाष्पकलां मुहुः ॥ आसिंचदंब वत्सेति नेत्रोदैर्दुहितुः शिखाः ॥ २५ ॥ आमंत्र्य तं मुनिवरमनुज्ञातः सहानुगः ॥ प्रतस्थे रथमारुह्य सभार्यः स्वपुरं नृपः ॥ २६ ॥ उभयोर्ऋषिकुल्यायाः सरस्वत्याः सुरोधसोः ॥ ऋषीणामुपशांतानां पश्यन्नाश्रमसंपदः ॥ २७ ॥ तमायांतमभिप्रेत्य ब्रह्मावर्तात्प्रजाः पतिम् ॥ गीतसंस्तुतिवादित्रैः प्रत्युदीयुः प्रहर्षिताः ॥ २८ ॥ बर्हिष्मती नाम पुरी सर्वसंपत्समन्विता ॥ न्यपतन्यत्र रोमाणि यज्ञस्यांगं विधुन्वतः ॥ २९ ॥

इति ब्रुवन् । संधिरार्षः । शिखाः केशानासिंचत् ॥ २५ ॥ २६ ॥ ऋषिकुलहितायाः उभयोः सुरोधसोः शोभनतटयोः ॥ २७ ॥ अभिप्रेत्य ज्ञात्वा ब्रह्मावर्तादेशात्प्रजाः पतिं प्रत्युज्जग्मुः ॥ २८ ॥ कोऽसौ ब्रह्मावर्त इत्यपेक्षायामाह । यत्र बर्हिष्मती नाम पुरीति । साऽपि कुत्र । यत्र यज्ञस्य यज्ञवराहस्य रोमाणि न्यपतन्निति यत्रेति सर्वत्र संबध्यते ॥२९॥

चित्त झाला आणि वारंवार नेत्रांतून दुःखाश्रु ढाळीत व हे बाई, हे तान्हे, असें कन्येशीं भाषण करीत करीत त्यानें आपल्या नेत्राश्रूंनीं तिचे सगळे केंस भिजवून टाकिले ॥ २४ ॥ २५ ॥ नंतर त्या ऋषिश्रेष्ठ कर्दमाला विचारून, त्यानें आज्ञा दिली असतां, तो राजा, स्त्रीसहवर्तमान रथारूढ झाला व सेवकांसहित आपल्या नगरास जाण्याकरितां निघाला ॥ २६ ॥ तेव्हां ऋषिकुलाला योग्य अशा सरस्वतीनदीच्या दोन्ही सुंदर तीरांवर असलेल्या अतिशांत ऋषींच्या आश्रमसंपत्ति अवलोकन करीत करीत तो मार्गानें चालला ॥ २७ ॥ इकडे ब्रह्मावर्त देशांतील सर्व प्रजा, आपला पालक राजा, स्वदेशास येत आहे असें जाणून अत्यंत हर्षयुक्त झाल्या आणि त्याचे गुण गाऊन स्तुति करीत व वाद्यें वाजवीत होत्सात्या ब्रह्मावर्त देशांतून त्याला सामोऱ्या गेल्या ॥ २८ ॥ ह्या देशामध्यें सर्व प्रकारच्या संपत्तींनीं परिपूर्ण अशी बर्हिष्मती-नांवाची एक राजधानी होती, जिच्यामध्यें पूर्वीं यज्ञवराह अवतार धारण करणाऱ्या भगवंतानें आपलें शरीर थरथर कांपविलें तेव्हां त्यापासून भूमीवर केंस पडले होते ॥२९॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुढें तेच केंस, नित्य हिरव्या रंगाचे कुश व काश (दर्भांतील एक जात) या रूपानें भूमीपासून उगवले. ज्या कुशकाशांच्या योगानें ऋषींनीं यज्ञविध्वंसक राक्षसादिकांचा पराभव करून विष्णूच्या प्रीत्यर्थ यज्ञानुष्ठान केलें ॥ ३० ॥ वराहरूपी भगवंतापासून भूमिरूप स्थान मिळाल्यावर ऐश्वर्यसंपन्न मनूनेंहि ज्या नगरीमध्यें कुश व काश या जातींचे बर्हि (दर्भ) पसरून यज्ञरूपी विष्णूचें यजन केलें होतें, ह्मणून ती बर्हिष्मतीनामक नगरी झाली. येणेंकरून स्वर्गापेक्षां भूमि श्रेष्ठ असून तींतहि हें ब्रह्मावर्त स्थान श्रेष्ठ असें सिद्ध होतें ॥ ३१ ॥ असो, तो मनु, ज्या बर्हिष्मतीनांवाच्या नगरीमध्यें पूर्वीं वास करीत होता तिच्यामध्यें पुन्हा तापत्रयाचा नाश करणाऱ्या आपल्या पुरातन मंदिरांत प्रविष्ट होऊन, त्यानें आपली पत्नी व मुलें यांसहवर्तमान धर्मादिकांना विरोध न येतां विषयांचा उपयोग घेतला ॥ ३२ ॥ पहांटेच्या वेळीं

बर्हिष्मतीनामनिरुक्तिं ब्रुवन्प्रसंगाद्देशस्य श्रैष्ठ्यमाह । द्वाभ्याम् । कुशाः काशाश्चासन् शश्वन्नित्यं हरितं वर्चो वर्णो येषाम् । यज्ञघ्नान् राक्षसादीन् पराभवं नीत्वा यज्ञं विष्णुम् ॥ ३० ॥ यज्ञपुरुषं विष्णुं यत इति यत्रायजत् भुवं स्थानं लब्धेति तृन्प्रत्ययांतम् । लब्धवान्सन्नित्यर्थः । यतो लब्धवांस्तं यज्ञपुरुषमिति वा एतेन स्वर्गादपि भूमिः श्रेष्ठा तत्रापि तत्स्थानं श्रेष्ठमित्युक्तं भवति ॥ ३१ ॥ प्रस्तुतमाह । यां बर्हिष्मतीं नाम पुरीं समावसत् पूर्वं यस्यामुषितस्तस्यां निर्विश्य भवनं प्रविष्टः सन्भोगान्बुभुजे

कुशाः काशास्त एवासन्शश्वद्धरितवर्चसः ॥ ऋषयो यैः पराभाव्य यज्ञघ्नान्यज्ञमीजिरे ॥ ३० ॥ कुशकाशमयं बर्हिरास्तीर्य भगवान्मनुः ॥ अयजद्यज्ञपुरुषं लब्धा स्थानं यतो भुवम् ॥ ३१ ॥ बर्हिष्मतीं नाम विभुर्यां निर्विश्य समावसत् ॥ तस्यां प्रविष्टो भवनं तापत्रयविनाशनम् ॥ सभार्यः सप्रजः कामान्बुभुजेऽन्याविरोधतः ॥ ३२ ॥ संगीयमानसत्कीर्तिः सस्त्रीभिः सुरगायकैः ॥ प्रत्यूषेष्वनुबद्धेन हृदा शृण्वन्हरेः कथाः ॥ ३३ ॥ निष्णातं योगमायासु मुनिं स्वायंभुवं मनुम् ॥ यदा भ्रंशयितुं भोगा न शेकुर्भगवत्परम् ॥ ३४ ॥ अयातयामास्तस्यासन्यामाः स्वांतरयापनाः ॥ शृण्वतो ध्यायतो विष्णोः कुर्वतो ब्रुवतः कथाः ॥ ३५ ॥ स एवं स्वांतरं निन्ये युगानामेकसप्ततिम् ॥ वासुदेवप्रसंगेन परिभूतगतित्रयः ॥ ३६ ॥

इत्यन्वयः ॥ ३२ ॥ अन्येषां धर्मादीनामविरोधेन प्रत्यूषेषु उषःसु संगीयमाना सत्कीर्तिर्यस्य तथापि स्वयं हरेरेव कथाः शृण्वन्भोगान्बुभुजे ॥ ३३ ॥ योगमायासु ऐच्छिकभोगरचनासु यद्यतः आभ्रंशयितुं आ ईषदपि भ्रंशयितुमभिभवितुम् ॥ ३४ ॥ अतो यातो यामो यस्य पक्वस्यान्नस्य तद्गतसारं भवत्यतोऽन्यदपि गतसारं यातयाममुच्यते । अयातयामा अगतसारा आसन् । स्वांतरं तदयिं मन्वंतरं यापयंति गमयंति ते यामाः कालावयवाः कुर्वतः स्ववाक्यैरुपनिबध्नतः ॥ ३५ ॥ परिभूतं गतित्रयं जाग्रदादि सात्विकादि

आपल्या स्त्रियांसह देवगायक गंधर्व, तेथें येऊन ज्याच्या सत्कीर्तीचें उत्तम गायन करीत असत. तथापि तो राजा, आपल्या कीर्तीच्या श्रवणाविषयीं आसक्त न होतां, स्वतः प्रेमभरित अंतःकरणानें हरीच्याच कथा श्रवण करीत असे ॥ ३३ ॥ तो स्वायंभुव मनु, पाहिजेत ते भोग निर्माण करण्यास समर्थ, मननशील व भगवत्परायण होता ह्मणून त्याला सर्वहि विषयभोग धर्ममार्गापासून किंचित्सुद्धां भ्रष्ट करण्याविषयीं समर्थ झाले नाहींत ॥ ३४ ॥ विष्णूचें ध्यान करणारा, विष्णूच्या कथा रचणारा, त्यांचें वर्णन करणारा व श्रवण करणारा अशा त्या मनूचे मन्वंतरसंबंधी काळाचे सर्वही प्रहरादिक अवयव, कधींहि निष्फळ झाले नाहींत ॥ ३५ ॥ याप्रमाणें वासुदेवाच्या कथाप्रसंगेंकरून त्या मनूनें, जाग्रत्, स्वप्न आणि सुषुप्ति या तिन्हीं अवस्थांना जिंकून, कृत त्रेत, द्वापर आणि कलि हीं चार युगें एकाहात्तर वेळ जातात इतका आपल्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मन्वंतराचा काळ सुखानें घालविला ॥ ३६ ॥ हे व्यासपुत्रा विदुरा, श्रीहरीचा आश्रय करून राहणाऱ्या पुरुषाला, शरीरापासून होणारे रोगादिक, मनापासून होणारे चिंता इत्यादिक, अंतरिक्षापासून होणारे विद्युत्पातादिक मनुष्यांपासून होणारे पराभवादिक आणि पंचमहाभूतांपासून होणारे अतिवृष्ट्यादिक क्लेश कसे बरें पीडा करितील? करणारच नाहींत ॥ ३७ ॥ ज्यों मनु, सर्व प्राणिमात्रांचा हितकर्ता असल्यामुळें एके वेळीं सर्व ऋषींनीं त्यास प्रश्न केला असतां, त्यानें (मनुस्मृतिरूपानें) मनुष्यांचे साधारण धर्म व ब्राह्मणादिक वर्णांचे व ब्रह्मचर्यादिक आश्रमांचे शुभकारक नानाप्रकारचे विशेष धर्म स्पष्ट रीतीनें सांगितले आहेत ॥ ३८ ॥ हे विदुरा, वर्णन करण्यास योग्य अशा त्या आदिराज स्वायंभुव मनूचें हें अद्भुत चरित्र, तुला मी वर्णन केलें आहे· आतां त्याची कन्या जी देवहूति तिचें आख्यान सांगतों ऐक ॥ ३९ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील तृतीयस्कंधामध्यें हा बाविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २२ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ ७ ॥ ॥ आतां तेविसाव्या अध्यायांत

वा येन ॥ ३६ ॥ दिव्यास्त्वांतरिक्षाः मानुषाः शत्रुप्रभवाः भौतिकाः शीतोष्णादिप्रभवाः । वैयासे हेविदुर ॥ ३७ ॥ तस्य ज्ञानातिशयमाह । य इति । नृणां साधारणधर्मान्

शारीरा मानसा दिव्या वैयासे ये च मानुषाः ॥ भौतिकाश्च कथं क्लेशा बाधंते हरिसंश्रयम् ॥ ३७ ॥ यः पृष्टो मुनिभिः प्राह धर्मान्नानाविधान्शुभान् ॥ नृणां वर्णाश्रमाणां च सर्वभूतहितः सदा ॥ ३८ ॥ एतत्त आदिराजस्य मनोश्चरितमद्भुतम् ॥ वर्णितं वर्णनीयस्य तदपत्योदयं शृणु ॥ ३९ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे तृतीयस्कंधे द्वाविंशतितमोऽध्यायः ॥ २२ ॥ ॥ मैत्रेय उवाच ॥ पितृभ्यां प्रस्थिते साध्वी पतिमिंगितकोविदा ॥ नित्यं पर्यचरत्प्रीत्या भवानीव भवं प्रभुम् ॥ १ ॥ विश्रंभेणात्मशौचेन गौरवेण दमेन च ॥ शुश्रूषया सौहृदेन वाचा मधुरया च भोः ॥ २ ॥ विसृज्य कामं दंभं च द्वेषं लोभमघं मदम् ॥ अप्रमत्तोद्यता नित्यं तेजीयांसमतोषयत् ॥ ३ ॥ स वै देवर्षिवर्यस्तां मानवीं समनुव्रताम् ॥ दैवाद्गरीयसः पत्युराशासानां महाशिषः ॥ ४ ॥

॥ ३८ ॥ तस्य यदपत्यं देवहूतिस्तस्योदयं प्रभावम् ॥ ३९ ॥ इति तृतीये टीकायां द्वाविंशोऽध्यायः ॥ २२ ॥ ॥ त्रयोविंशे ततो योगनिर्मिते सर्वसंपदि ॥ विमाने कामगे चित्रा तयो रतिरुदीर्यते ॥ १ ॥ प्रस्थिते गमने कृते सति ॥ १ ॥ २ ॥ दंभं कपटम् । अघं निषिद्धाचरणम् । तेजीयांसमतितेजस्विनम् ॥ ३ ॥ दैवाद्गरीयसो दैवादपि

कर्दम ऋषीनें आपल्या तपाच्या व योगाच्या सामर्थ्यानें निर्माण केलेल्या, सर्व संपत्तींनीं युक्त व स्वेच्छाचारी अशा विमानामध्यें, त्या उभयतांची विचित्र क्रीडा वर्णन केली आहे ॥ १ ॥ मैत्रेय ह्मणाला— हे विदुरा, इकडे देवहूतीच्या आईबापांनीं आश्रमांतून गमन केलें असतां, पतीचा अभिप्राय जाणणारी, साध्वी ती देवहूति, ज्याप्रमाणें पार्वती शंकरप्रभूची सेवा नेहमी करित्ये त्याप्रमाणें आपल्या पतीची प्रीतीनें सेवा करूं लागली ॥ १ ॥ हे विदुरा, सावध राहून पति सांगेल त्याप्रमाणें वागणाऱ्या त्या देवहूतीनें, विषयभोगांची इच्छा, कपट, द्वेष, लोभ, निषिद्धाचरण व उन्मत्तपणा या दुर्गुणांचा त्याग करून, शारीरिक व मानसिक शुद्धता, विचारांचा प्रौढपणा, इंद्रियांचा निग्रह, सेवाधर्म, प्रेम व मधुर भाषण यांच्या योगानें त्या महातेजस्वी पतीला संतुष्ट केलें ॥ २ ॥ नंतर तो देवर्षिश्रेष्ठ कर्दम ऋषि, दैवीं असलेली गोष्टही अन्यथा करण्यास समर्थ अशा आपणापासून पुष्कळ विषयभोग मिळावे अशी इच्छा करणारी, आपली सेवा करणारी, पातिव्रत्यरूप व्रताचरणानें कृश झालेली, व त्यांतहि फारच काळ गेल्यामुळें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अति कृश झालेली अशा त्या देवहूतीला अवलोकन करून, कृपेनें व्याकुळ होत्साता प्रेमानें सद्गदित झालेल्या वाणीनें तिला ह्मणाला कीं, ॥ ४ ॥ ५ ॥ कर्दम ह्मणाला– हे मनुकन्ये, माझा मान राखणाऱ्या तुझ्या ह्या उत्तम सेवेनें व अतिशय भक्तीनें आज मी संतुष्ट झालों आहें; कारण, प्राणिमात्रांस अत्यंत प्रिय असून अनेक प्रकारांनीं रक्षण करण्यास योग्य जो हा स्वदेह तो तूं मजकरितां झिजविण्यास मागेंपुढें पाहिलें नाहींस ! ॥ ६ ॥ यास्तव पूर्वीं स्वधर्मामध्यें तत्पर असणाऱ्या माझ्या ज्या तप, समाधि, उपासना आणि अंतःकरण एकाग्र करून भगवत्स्वरूपीं लावणें· यांच्या योगेंकरून प्राप्त करून घेतलेले जे भयरहित व शोकरहित दिव्य भोग आहेत तेच तूं माझ्या सेवेनें

गुरुतरात् । दैवमप्यन्यथाकर्तुं समर्थादित्यर्थः ॥ ४ ॥ व्रतचर्यया कर्शितां तत्रापि भूयसा कालेनातिक्षामामित्यर्थः ॥ ५ ॥ सुहृत्प्रियः मदर्थे क्षपयितुं नावेक्षितो न गणितः समुचितः श्लाघ्योऽपि मत्सेवासक्तयोपेक्षित इत्यर्थः ॥ ६ ॥ तपश्च समाधिश्च विद्या च उपासना तासु य आत्मयोगश्चित्तैकाग्र्यं तेन विजिताः प्राप्ता भगवत्प्रसादा दिव्यभोगास्तानेव तेऽवरुद्धांस्त्वयापि वशीकृतान्प्रपश्य ते दिव्यां दृष्टिं वितरामि यया दृष्ट्या द्रक्ष्यसि ॥ ७ ॥ अन्ये पुनर्भोगाः किं नकिमपि अतितुच्छा इत्यर्थः । तत्र हेतुः । भगवत उरुक्रमस्य या भ्रूस्तस्या उद्विजृंभो वक्रीभावस्तेन विभ्रंशिता अर्थरचना मनोरथा येषु निजधर्मेण पातिव्रत्येन दुह्यंत इति तथा तान् दुरधिगान्दुष्प्रापान् नृपा

कालेन भूयसा क्षामां कर्शितां व्रतचर्यया ॥ प्रेमगद्गदया वाचा पीडितः कृपयाऽब्रवीत् ॥ ५॥ कर्दम उवाच ॥ तुष्टोऽहमद्य तव मा-
नवि मानदायाः शुश्रूषया परमया परया च भक्त्या ॥ यो देहिनामयमतीव सुहृत्स्वदेहो नावेक्षितः समुचितः क्षपितुं मदर्थे ॥ ६ ॥
ये मे स्वधर्मनिरतस्य तपःसमाधिविद्यात्मयोगविजिता भगवत्प्रसादाः ॥ तानेव ते मदनुसेवनयाऽवरुद्धान्दृष्टिं प्रपश्य वितराम्यभ-
यानशोकान् ॥ ७ ॥ अन्ये पुनर्भगवतो भ्रुव उद्विजृंभविभ्रंशितार्थरचनाः किमुरुक्रमस्य ॥ सिद्धाऽसि भुंक्ष्व विभवान्निजधर्मदोहान्
दिव्यान्नरैर्दुरधिगान्नृपविक्रियाभिः ॥ ८ ॥ एवं ब्रुवाणमबलाऽखिलयोगमायाविद्याविचक्षणमवेक्ष्य गताधिरासीत् ॥ संप्रश्रयप्रणयविह्व-
लया गिरेषद्व्रीडावलोकविलसद्धसिताननाऽऽह ॥ ९ ॥ देवहूतिरुवाच ॥ राद्धं बत द्विजवृषैतदमोघयोगमायाधिपे त्वयि विभो तद-
वैमि भर्तः ॥ यस्तेऽभ्यधायि समयः सकृदंगसंगो भूयाद्गरीयसि गुणः प्रसवः सतीनाम् ॥ १० ॥

वयमिति या विक्रियास्तत्तद्भोगविकृतयस्ताभिः ॥ ८ ॥ अखिला योगमायाश्च विद्याश्च तत्तदुपासनास्तासु विचक्षणं निपुणमेवंब्रुवाणं पतिमवेक्ष्य गताधिर्निश्चिंता जाता संप्रश्रयो विनयः प्रणयः प्रेम ताभ्यां विह्वला गद्गदा तया गिरा ईषद्व्रीडासहितो योऽवलोकस्तेन विलसद्विकसितं हसितं जातहासं चाननं यस्याः सा आह जगाद ॥ ९ ॥ बतेति हर्षे । द्विजवृष द्विजश्रेष्ठ हेभर्तस्त्वय्येतत्सर्वं राद्धं सिद्धमेव तदहमवैमि जानामि किंतु यस्ते त्वया समयोऽभिहितः स तावद्भूयात् स कृदिति गर्भसंभवमात्रपर्यंत इत्यर्थः । यस्मा-

मिळविले आहेस, ते तुला दिव्य दृष्टि देऊन मी दाखवितों पाहा ॥ ७ ॥ दुसरे जे मनुष्यांचे भोग आहेत, ते उरुक्रम भगवंताच्या भ्रुकुटीच्या वक्रीभावानेंच ज्यांतील मनोरथ नष्ट होऊन जातात असे तुच्छ आहेत· आणि तूं तर माझ्या सेवेनें कृतार्थ झाली आहेस· यास्तव राज्यसंपत्ति खर्च केल्या तरी मनुष्यांस प्राप्त न होणारे असून केवळ पातिव्रत्य धर्मानेंच तुला प्राप्त झालेले अशा दिव्य भोगांचा तूं आतां उपभोग घे ॥ ८ ॥ हे विदुरा, याप्रमाणें भाषण करणाऱ्या व हरीच्या सर्व योगमाया व सर्व प्रकारच्या उपासना जाणण्याविषयीं निपुण अशा त्या आपल्या कर्दम पतीला अवलोकन करून, ती देवहूति निश्चिंत झाली आणि जिचें मुख, किंचित् लज्जायुक्त अवलोकनानें विकसित व हास्ययुक्त झालें आहे अशी ती, नम्रता व प्रेम यांच्या योगानें सद्गदित झालेल्या वाणीनें ह्मणाली कीं, ॥ ९ ॥ देवहूति ह्मणाली– हे ब्राह्मणश्रेष्ठा पते, सफल योगमायांचा ॥ ७१ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अधिपति अशा आपल्याठिकाणीं दिव्य भोग उत्पन्न करणें हें सर्व सिद्धच आहे व तें मी समजून आहें, व त्यामुळें मला आनंद वाटत आहे. परंतु हे विभो, जें आपण विवाहाच्या वेळीं गर्भधारण होईपर्यंत तुझा अंगसंग होईल ह्मणून मला वचन दिलें होतें, तें आतां परिपूर्ण होवो. कारण पतिव्रता स्त्रियांना आपल्या पूज्य पतीपासून अपत्यप्राप्ति होणें हा एक मोठा लाभच आहे ॥ १० ॥ हे स्वामिन्, त्या अंगसंगाविषयीं जें कांहीं साधन करणें असेल तें, कामशास्त्रानुसारें संपादन करावें ह्मणजे ज्या अभ्यंगस्नान, भोजन, पान इत्यादिक साधनेंकरून आपणच क्षोभविलेल्या कामानें पीडित झालेल्या माझा हा देह, आपल्या सहवर्तमान रममाण होण्याच्या उत्कट इच्छेनें तपश्चर्यादिकेंकरून कृश व दीन झाला आहे, तो भोग भोगण्याविषयीं समर्थ होईल. आणि तसें होण्याविषयीं योग्य असें एक घर निर्माण करण्याचा विचार करावा ॥ ११ ॥ मैत्रेय

द्ररीयसि श्रेष्ठे भर्तरि हेतुभूते स्त्रीणां प्रसवो गुणो महान् लाभः । समासपाठे गरीयसि पत्यौ सति सतीनां यतो गुणप्रसवो गुणविस्तारो भवति । अतः पुत्रोत्पत्त्या मम गुणविस्तारे जाते पश्चात्त्वदुक्तं सर्वं भवत्विति भावः ॥ १० ॥ अंगसंगार्थं च प्रथममितिकर्तव्यतां संपादयेत्याह । हे ईश तत्रांगसंगे इतिकृत्यं साधनं यथोपदेशं कामशास्त्रानुसारेणोपशिक्ष संजानीहि उपकल्पयेत्यर्थः । येन साधनेनाभ्यंगभोजनपानादिनाऽतीव रंतुमिच्छया कर्शितो दीनश्च ममैष आत्मा देहः सिध्येत रतिसमर्थो भवेत् । कथंभूतायाः ।

तत्रेतिकृत्यमुपशिक्ष यथोपदेशं येनैष मे कर्शितोऽतिरिरंसयात्मा ॥ सिध्येत ते कृतमनोभवधर्षिताया दीनस्तदीश भवनं सदृशं विचक्ष्व ॥ ११ ॥मैत्रेय उवाच ॥ प्रियायाः प्रियमन्विच्छन्कर्दमो योगमास्थितः ॥ विमानं कामगं क्षत्तस्तर्ह्येवाविरचीकरत् ॥ १२ ॥ सर्वकामदुघं दिव्यं सर्वरत्नसमन्वितम् ॥ सर्वर्द्ध्युपचयोदर्कं मणिस्तंभैरुपस्कृतम् ॥ १३ ॥ दिव्योपकरणोपेतं सर्वकालसुखावहम् ॥ पट्टिकाभिः पताकाभिर्विचित्राभिरलंकृतम् ॥ १४ ॥ स्रग्भिर्विचित्रमाल्याभिर्मंजुसिंजत्षडंघ्रिभिः ॥ दुकूलक्षौमकौशेयैर्नानावस्त्रैर्विराजितम् ॥ १५ ॥

ते त्वयैव कृतः क्षोभितो यो मनोभवस्तेन धर्षितायाः । तत्ततोऽनुरूपं भवनं विचक्ष्व वितर्कय विचारयेति यावत् ॥ ११ ॥ तर्हि तत्क्षणमेव आविरचीकरदाविर्भावयांबभूव ॥ १२ ॥ तदेव विशिनष्टि । सर्वकामदुघमिति नवभिः । सर्वैश्च रत्नादिभिः समन्वितम् । सर्वर्द्धीनां सर्वसंपदां य उपचयस्तस्योदर्कं उत्तरोत्तराभिवृद्धिर्यस्मिन् उपस्कृतं शोभितम् ॥ १३ ॥ उपकरणं परिकरः पट्टिका अल्पविस्तारपट्टवस्त्रविशेषाः पताका विस्तृतास्ताभिः ॥ १४ ॥ विचित्राणि माल्यानि पुष्पाणि यासु मंजु यथा भवत्येवं

ह्मणाला– हे विदुरा, याप्रमाणें देवहूतीनें सांगितलें असतां, त्या आपल्या प्रियेचें प्रिय करण्याच्या इच्छेनें कर्दम ऋषीनें योगसाधनाचा स्वीकार करून, त्याच्या योगानें तत्क्षणींच यथेच्छ गमन करणारें एक विमान उत्पन्न केलें ॥ १२॥ तें दिव्य विमान, सर्व कामना परिपूर्ण करणारें, सर्व प्रकारच्या रत्नांनीं युक्त व सर्व प्रकारच्या संपत्तींच्या उत्कर्षाची अभिवृद्धि ज्याचेठिकाणीं आहे असें असून रत्नांच्या स्तंभांनीं सुशोभित होतें ॥ १३ ॥ तें दिव्य पर्यंकादिक साहित्यांनीं युक्त, सर्वकालीं सुखकारक, आणि चित्रविचित्र लहानमोठ्या पडद्यांनीं व पताकांनीं सुशोभित होतें ॥ १४ ॥ तसेंच ज्यावर बसलेले भ्रमर मंजुळ गुंजारव करीत होते अशा अनेक रंगांच्या फुलांच्या माळांनीं युक्त व पैठण्या, पीतांबरवगैरे रेशमी वस्त्रांनीं व कापसाच्या व लोंकरीच्यावगैरे उंची उंची वस्त्रांनीं सुशोभित होतें ॥ १५ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

एकावर एक अशा प्रकारें रचलेल्या मजल्यांमध्यें शय्या, पलंग, पंखे, खुर्च्या आसनेंवगैरे निरनिराळीं ठेवलेलीं असल्यामुळें तें अति रमणीय दिसत होतें ॥ १६ ॥ तसेंच तें जागोजाग ठेवलेल्या तऱ्हेतऱ्हेच्या तसबिरी चित्रें इत्यादिकांनीं सुशोभित होतें व पाचेच्या फरसबंदीनें व पोंवळ्यांच्या वेदींनीं (बसावयाच्या जाग्यांनीं) बांधलेलें होतें ॥ १७ ॥ तसेंच प्रत्येक द्वारामध्यें असलेल्या पोंवळ्यांच्या उंबऱ्यानें शोभित असून त्याच्या दारांच्या फळ्या हिरेजडित होत्या, त्याचीं शिखरें इंद्रनीळ मण्याचीं असून त्यांवर सुवर्णाचे कलश ठेविलेले होतें ॥ १८ ॥ तसेंच हिऱ्यांच्या भिंतींमध्यें जडलेल्या उत्तम उत्तम पद्मराग मण्यांच्या योगानें तें विमान नेत्रयुक्त असल्यासारखें दिसत होतें व महामोल चित्रविचित्र रंगाच्या छतांनीं व सुवर्णमय तोरणांनीं युक्त होतें ॥ १९ ॥ त्या विमानावर ठिकठिकाणीं कृतीनें केलेल्या हंसांस व पारव्यांस, हे आपले स्वजातीयच बसले

सिंजंतः कूजंतः षडंघ्रयो यासु ताभिः स्रग्भिः ॥ १५ ॥ उपर्युपरि विरचितगृहेषु कशिपुभिः शय्याभिः कांतं कमनीयम् । पर्यंकादिभिश्च कांतम् ॥ १६ ॥ १७ ॥ द्वास्सु द्वारेषु विद्रुमनिर्मिता देहली उदुंबरस्तया भातं शोभितम् । वज्रखचितकपाटयुक्तम् । इंद्रनीलमयेषु शिखरेषु प्रासादाग्रभागेषु ॥ १८ ॥ चक्षुष्मंत इव ये पद्मरागाग्र्यास्तैः ।

उपर्युपरि विन्यस्तनिलयेषु पृथक् पृथक् ॥ क्षिप्तैः कशिपुभिः कांतं पर्यंकव्यजनासनैः ॥ १६ ॥ तत्र तत्र विनिक्षिप्तनानाशिल्पोपशोभितम् ॥ महामरकतस्थल्या जुष्टं विद्रुमवेदिभिः ॥ १७ ॥ द्वास्सु विद्रुमदेहल्या भातं वज्रकपाटवत् ॥ शिखरेष्विंद्रनीलेषु हेमकुंभैरधिश्रितम् ॥ १८ ॥ चक्षुष्मत्पद्मरागाग्र्यैर्वज्रभित्तिषु निर्मितैः ॥ जुष्टं विचित्रवैतानैर्महार्हैर्हेमतोरणैः ॥ १९ ॥ हंसपारावतव्रातैस्तत्र तत्र निकूजितम् ॥ कृत्रिमान्मन्यमानैः स्वानधिरुह्याधिरुह्य च ॥ २० ॥ विहारस्थानविश्रामसंवेशप्रांगणाजिरैः ॥ यथोपजोषं रचितैर्विस्मापनमिवात्मनः ॥ २१ ॥ ईदृग् गृहं तत्पश्यंतीं नातिप्रीतेन चेतसा ॥ सर्वभूताशयाभिज्ञः प्रावोचत्कर्दमः स्वयम् ॥ २२ ॥ निमज्ज्यास्मिन् ह्रदे भीरु विमानमिदमारुह ॥ इदं शुक्लकृतं तीर्थमाशिषा यापकं नृणाम् ॥ २३ ॥

यद्वा । चक्षुष्मदिव कैः पद्मरागाग्र्यैः विचित्रैर्वैतानैर्वितानसमूहैः ॥ १९ ॥ कृत्रिमानपि हंसादीन्स्वान्सजातीयान्मन्यमानैस्तत्रतत्राधिरुह्याधिरुह्य निकूजितम् ॥ २० ॥ विहारस्थानं क्रीडाप्रदेशः विश्रामः शयनगृहम् । संवेश उपभोगस्थानम् । प्रांगणं गृहाद्बहिः अजिरं प्राकाराद्बहिः यथोपजोषं यथासुखमात्मनः स्वस्य मायाविनोऽपि विस्मयजनकमिव ॥ २१ ॥ नातिप्रीतेन मलिनदेहत्वात्परिचारिकाभावाच्च ॥ २२ ॥ अस्मिन् ह्रदे बिंदुसरसि आरुह्याधिरोह शुक्लेन विष्णुना कृतमानंदबिंदुनिपातनेन यापकं

आहेत असें मानून, त्या हंसांचे व पारव्यांचे समुदाय त्यांच्याजवळ वारंवार येऊन बसून शब्द करीत असत ॥ २० ॥ आणि तें विमान, जसें आपणास सुख होईल त्याप्रमाणें रचलेल्या–क्रीडेची जागा, शयनाचें स्थळ, पोषाख करण्याचें स्थान, घराच्या समोर चौक व तटाच्या बाहेर मैदान; यांनीं, स्वतः मायावी (विमान उत्पन्न करणाऱ्या) अशा त्या कर्दमालाहि विस्मय उत्पन्न करण्यासारखें होतें ॥ २१ ॥ हे विदुरा, अशा प्रकारचें तें घर पाहूनहि, त्याठिकाणीं दासीवगैरे नसल्यामुळें व आपलें शरीर मलिन झालेलें असल्यामुळें अतिसंतुष्ट न झालेल्या अंतःकरणानें युक्त अशा त्या देवहूतीला, सर्व प्राण्यांच्या अंतःकरणांतील अभिप्राय जाणणारा तो कर्दम ऋषि, स्वतःच ह्मणाला कीं,–॥ २२ ॥ हे भीरु (भित्र्ये) तूं खिन्न कां झाली आहेस? या बिंदुसरोवरामध्यें स्नान करून नंतर या विमानामध्यें आरोहण कर. हें शुक्लरूपी विष्णूनें निर्मि-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लेलें बिंदुसरोवरनामक तीर्थ, मनुष्यांचे सर्व मनोरथ पूर्ण करणारें आहे (ह्यांत स्नान केलेंस कीं तुला जें जें पाहिजे असेल तें तें मिळेल) ॥ २३ ॥ हे विदुरा, असें तें पतीचें भाषण आदरानें ऐकून मलिन वस्त्र व जटा झालेले केंस धारण करणारी तसेंच डाग पडलेल्या स्तनांनीं युक्त असें चिखलानें भरलेलें शरीर धारण करणारी ती कमलाक्षी देवहूती, निर्मळ जलाचें केवळ आश्रयस्थान अशा सरस्वती नदीच्या मध्यभागीं असलेल्या त्या बिंदुसरोवरामध्यें प्रविष्ट झाली ॥ २४ ॥ २५ ॥ तिनें त्या सरोवरामध्यें बुडी मारतांच तेथें आपल्या घरांत बसलेल्या एक हजार कन्या पाहिल्या. त्या सर्वहि वयानें तरुण असून त्यांच्या शरीराला कमलासारखा सुगंध येत होता ॥ २६ ॥ त्या स्त्रियांनीं त्या देवहूतीला पाहतांच अकस्मात् उठून हात जोडून भाषण केलें कीं—आह्मी तुझ्या दासी आहों. तुझें काय काम करावें तें आह्मांस

प्रापकम् ॥ २३ ॥ समादायाहृत्य सरजं मलिनम् । वेणीभूताञ्जटिलान् ॥ २४ ॥ शबलौ विवर्णौ स्तनौ यस्मिंस्तत् । सरस्वत्याः शिवानि जलान्याशेरते यस्मिन् । शिवा जलाशया जलचरा यस्मिन्निति वा ॥ २५ ॥ सा तत्र निमग्ना सती विस्मयं ददर्श । तमाह । सांऽतःसरसीति दशभिः । उत्पलगंधयः कमलगंधीः ॥ २६ ॥ तुभ्यं तव कर्मकरीः परिचारिका वयमस्मानाज्ञापयेति स्त्रियः प्रोचुः ॥ २७ ॥ ततश्च स्नानेन स्नानयोग्यतैलादिना ॥ २८ ॥ परार्घ्यान्युत्कृष्टानि वरीयांसि तत्प्रियाणि द्युमंति

सा तद्भर्तुः समादाय वचः कुवलयेक्षणा ॥ सरजं बिभ्रती वासो वेणीभूतांश्च मूर्धजान् ॥ २४ ॥ अंगं च मलपंकेन संछन्नं शबलस्तनम् ॥ आविवेश सरस्वत्याः सरः शिवजलाशयम् ॥ २५ ॥ सांऽतःसरसि वेश्मस्थाः शतानि दश कन्यकाः ॥ सर्वाः किशोरवयसो ददर्शोत्पलगंधयः ॥ २६ ॥ तां दृष्ट्वा सहसोत्थाय प्रोचुः प्रांजलयः स्त्रियः ॥ वयं कर्मकरीस्तुभ्यं शाधि नः करवाम किम् ॥ २७ ॥ स्नानेन तां महार्हेण स्नापयित्वा मनस्विनीम् ॥ दुकूले निर्मले नूत्ने ददुरस्यै च मानद ॥ २८ ॥ भूषणानि परार्ध्यानि वरीयांसि द्युमंति च ॥ अन्नं सर्वगुणोपेतं पानं चैवामृतासवम् ॥ २९ ॥ अथादर्शे स्वमात्मानं स्रग्विणं विरजांबरम् ॥ विरजं कृतस्वस्त्ययनं कन्याभिर्बहुमानितम् ॥ ३० ॥ स्नातं कृतशिरःस्नानं सर्वाभरणभूषितम् ॥ निष्कग्रीवं वलयिनं कूजत्कांचननूपुरम् ॥ ३१ ॥ श्रोण्योरध्यस्तया कांच्या कांचन्या बहुरत्नया ॥ हारेण च महार्हेण रुचकेन च भूषितम् ॥ ३२ ॥

दीप्तिमंति च । पानं पेयम् । अमृतं स्वादु आसवं मादकम् ॥ २९ ॥ आदर्शे स्वमात्मानं ददर्शेति शेषः । आत्मानं विशिनष्टि चतुर्भिः । कृतं स्वस्त्ययनं मंगलं यस्य पुंस्त्वमात्मशब्दसामानाधिकरण्यात् ॥ ३० ॥ विरजमित्यस्य प्रपंचः स्नातमुद्वर्त्य क्षालितम् । कृतं शिरःस्नानमभ्यंगो येन भूषितत्वमेवाह । निष्कं पदकं ग्रीवायां यस्य ॥ ३१ ॥ बहूनि रत्नानि

सांग ॥ २७ ॥ हे विदुरा, नंतर त्या दासींनींच त्या आपल्या धनिनीचा अभिप्राय जाणून, उंच उंच तेलें व उटणींवगैरे त्या उत्साहयुक्त देवहूतीच्या अंगास लावून तिला स्नान घातलें आणि परिधान करण्यासाठीं तिला नवीं स्वच्छ दोन वस्त्रें दिलीं ॥ २८ ॥ तसेच त्यांनीं देवहूतीला तिच्या मनास आवडणारे, अतिशय उत्कृष्ट तेजस्वी अलंकार, षड्रसयुक्त अन्नें व मधुर आणि मादक अशीं पानकें (सरबतें) दिलीं ॥ २९ ॥ नंतर देवहूतीनें आपला देह आरशामध्यें प्रतिबिंबरूपानें अवलोकन केला, तो मस्तकावरून अभ्यंगस्नान केलेला, निर्मळ, स्वच्छ वस्त्रें परिधान केलेला, गळ्यामध्यें फुलांच्या व पुतळ्यांच्यावगैरे माळा धारण केलेला, हातांमध्यें सोन्याच्या बांगड्या गोट तोडे आणि पायांमध्यें खुळखुळ वाजणारे सोन्याचे नूपुर घातलेला ॥ ३० ॥ ३१ ॥ कमरेच्याठिकाणीं सोन्याच्या रत्नखचित कमरपट्ट्यानें युक्त, कंठाचेठिकाणीं बहुत मोलाचा रत्नहार व पदक (तन्मणि) यांनीं भूषित, व इतरहि मौक्तिकादिक सर्व भूषणांनीं अलंकृत, सुंदर दंतपंक्तीनें, सुरेख भ्रुकुटींनीं, काळ्याभोर केसांनीं व कमळाच्या कळ्यांशीं स्पर्धा

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करण्याच्या, मनोहर सप्रेमकटाक्षयुक्त नेत्रांनीं मुखाला शोभा आलेला, स्त्रियांनीं हळदकुंकूं देणें, ओटी भरणें इत्यादि मंगलकारक उपचार केलेला आणि दासींनीं अनेक प्रकारचे तांबूलदानादि सत्कार केलेला असा होता ॥ ३२ ॥ ३३ ॥ हे विदुरा, अशाप्रकारचा आपला देह, आरशांतील प्रतिबिंबांत अवलोकन करून, ऋषी- मध्यें श्रेष्ठ अशा आपल्या प्रियपतीचें जेव्हां त्या देवहूतीनें स्मरण केलें, त्याचवेळीं ज्या ठिकाणीं तो कर्दम प्रजापति होता त्याच ठिकाणीं स्त्रियांसहवर्तमान ती आपो- आप येऊन पोंचली ॥ ३४ ॥ त्या वेळीं हजारो स्त्रियांनीं परिवेष्टित अशी आपण पतीच्या समोर आहें असें पाहून आणि तें आपल्या पतीचें योगसामर्थ्य आहे असें जाणून तिला मोठें आश्चर्य वाटलें ॥ ३५ ॥ हे कामरूपी शत्रूला जिंकणाऱ्या विदुरा, जिनें मळ घालविणारें स्नान केलें आहे, जी अपूर्व रीतीनें शोभत आहे, विवाहाच्या पूर्वीं

यस्यां तया रुचकेन मंगलद्रव्येण कुंकुमादिना । तदुक्तं विश्वप्रकाशे । रुचकं मंगलद्रव्ये ग्रीवाभरणदंतयोः इति ॥ ३२ ॥ सुदता सुभ्रुवा चक्षुषेति च जातावेक- वचनानि एतैर्लसच्छोभमानं मुखं यस्य कथंभूतेन चक्षुषा श्लक्ष्णो मनोहरः स्निग्धोऽपांगो नेत्रप्रांतो यस्य पद्मकोशेन स्पर्धत इति पद्मकोशस्पृत्तेन ॥ ३३ ॥ दृष्ट्वा च यदा पतिं सस्मार तदा यत्रासौ तत्रैव स्वयमप्यास्ते ॥ ३४ ॥ आत्मानं निशाम्य दृष्ट्वा तां च तस्य योगगतिं योगप्रभावं दृष्ट्वा संशयं किमिदमिति विस्मयम् ॥ ३५ ॥ स मुनि-

सुदता सुभ्रुवा श्लक्ष्णस्निग्धापांगेन चक्षुषा ॥ पद्मकोशस्पृधा नीलैरलकैश्च लसन्मुखम् ॥ ३३ ॥ यदा सस्मार ऋषभमृषीणां दयि- तं पतिम् ॥ तत्र चास्ते सह स्त्रीभिर्यत्रास्ते स प्रजापतिः ॥ ३४ ॥ भर्तुः पुरस्तादात्मानं स्त्रीसहस्रवृतं तदा ॥ निशाम्य तद्योगगतिं संशयं प्रत्यपद्यत ॥ ३५ ॥ स तां कृतमलस्नानां विभ्राजंतीमपूर्ववत् ॥ आत्मनो बिभ्रतीं रूपं संवीतरुचिरस्तनीम् ॥ ३६ ॥ विद्याधरी- सहस्रेण सेव्यमानां सुवाससम् ॥ जातभावो विमानं तदारोहयदमित्रहन् ॥ ३७ ॥ तस्मिन्नलुप्तमहिमा प्रिययाऽनुरक्तो विद्याधरीभि- रुपचीर्णवपुर्विमाने ॥ बभ्राज उत्कचकुमुद्गणवानपीच्यस्ताराभिरावृत इवोडुपतिर्नभःस्थः ॥ ३८ ॥ तेनाष्टलोकपविहारकुलाचलें- द्रद्रोणीष्वनंगसखमारुतसौभगासु ॥ सिद्धैर्नुतो द्युधुनिपातशिवस्वनासु रेमे चिरं धनदवल्ललनावरूथी ॥ ३९ ॥

विवाहात्प्राग्यदात्मनो रूपं तदेव पुनर्बिभ्रतीम् । संवीतौ प्रावृतौ रुचिरौ स्तनौ यस्याः पाठांतरे तु रूपविशेषणम् ॥ ३६ ॥ शोभने वाससी यस्याः । जातो भावः प्रेम यस्य । हे अमित्रहन् जितकाम ॥ ३७ ॥ तस्मिन्विमाने मुनिर्बभ्राजे । न लुप्तो महिमा स्वातंत्र्यं यस्य उपचीर्णं शुश्रूषितं वपुर्यस्य विकसितकुमुद्गणवानपीच्योऽतिसुंदरः पूर्णचंद्र इव मुनिर्नभ इव विमानं तारा इव ताः स्त्रियः कुमुदानीव तासां नेत्राणीति ज्ञेयम् ॥ ३८ ॥ तेन विमानेन अष्टलोकपालानां विहारो यस्मिन्कुलाचलेंद्रे मेरौ तस्य द्रोणीषु

असलेलें आपलें स्वरूप जिनें पुनः धारण केलें आहे, जिनें उत्तम वस्त्रें परिधान केलीं आहेत, जिचे मनोहर स्तन कंचुकीनें परिवेष्टित झालेले आहेत, आणि विद्याधरांच्या सहस्र स्त्रिया जिची शुश्रूषा करीत आहेत अशा त्या आपल्या भार्येला (देवहूतीला), प्रेमभाव उत्पन्न झालेल्या त्या कर्दम ऋषींनें त्या विमानांत बसविलें ॥ ३६ ॥ ३७ ॥ आणि जो आपल्या प्रियेशीं अनुरक्त आहे, तथापि ज्याचें स्वातंत्र्य मुळींच नष्ट झालें नाहीं, आणि विद्याधरींनीं ज्याच्या शरीराची शुश्रूषा चालविली आहे असा तो कर्दम मुनि, त्या विमानामध्यें आपल्या प्रियेसहवर्तमान बसला. तेव्हां जसा आकाशामध्यें उगवलेला अतिसुंदर पूर्णचंद्र, प्रफुल्लित झालेल्या कमळिणींच्या समुदायानें युक्त व नक्षत्रांनीं परिवेष्टित झाला असतां शोभतो त्याप्रमाणें शोभूं लागला ॥ ३८ ॥ नंतर सिद्ध ज्याची स्तुति करीत आहेत व स्त्रियांच्या समुदायानें युक्त अशा त्या कर्दम ऋषींनें, त्या विमानाच्या योगेंकरून इंद्रादिक आठहि लोकपालांचीं विहार करण्याचीं स्थलें ज्याच्यावर आहेत अशा मेरुपर्वताच्या सुंदर दऱ्यांचेठिकाणीं कुबेराप्रमाणें फार दिवस ॥ ७३

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

क्रीडा केली. त्या दऱ्या, मदनाचा उत्तेजक मित्र जो मंद वायु त्याच्या वाहण्याच्या योगानें मनोहर व ज्यांमध्यें स्वर्गांवरून पृथिवीवर पडणाऱ्या गंगानदीच्या धबधब्यांचा मंगलकारक शब्द घुमत असे अशा होत्या ॥ ३९ ॥ नंतर संतुष्टचित्त अशा त्या कर्दमानें आपल्या सुंदर भार्येसहवर्तमान, वैश्रंभक, सुरसन, नंदन, पुष्पभद्रक, मानस, आणि चैत्ररथ्य ह्या देवांच्या बागेंमध्यें यथेच्छ क्रीडा केली ॥ ४० ॥ त्या वेळीं विस्तीर्ण अतितेजस्वी व बसणाराच्या इच्छेस येईल तिकडे जाणाऱ्या त्या विमानांत बसून वायूप्रमाणें त्रैलोक्यांत संचार करणाऱ्या त्या कर्दम ऋषीनें, नेहमी विमानांत बसून फिरणाऱ्या देवांनादेखील मागें सारिलें ॥ ४१ ॥ हे विदुरा, ज्या पुरुषांनीं भगवंताच्या संसारदुःखनाशक अशा चरणाचा आश्रय केला आहे त्या धीरपुरुषांना दुर्मिळ असें काय आहे? कांहींच नाहीं ॥ ४२ ॥ असो, महायोगी असा तो

दरीषु अनंगस्य सखा यो मारुतः शीतसुगंधमंदानिलस्तेन सौभगं सौंदर्यं यासु सिद्धैर्नुतः स्तुतः सन् द्युधुनिर्गंगा तस्याः पातेन शिवः स्वनो यासु तासु रेमे । ललनावरूथी स्त्रीरत्नसमूहवान् ॥ ३९ ॥ वैश्रंभकादिषु देवोद्यानेषु मानसे च सरसि रतः प्रीतः सन् ॥ ४० ॥ अत्यशेतातिक्रम्य स्थितः ॥ ४१ ॥ उद्दामचेतसां धीराणाम् । व्यसनं संसारस्तस्यात्ययो यस्मात् ॥ ४२ ॥ प्रेक्षयित्वा दर्शयित्वा गोलं मंडलम् । स्वसंस्थया द्वीपवर्षादिरचनया यावांस्तावंतम् । बहून्याश्चर्याणि यस्मिंस्तम् ॥ ४३ ॥ नवधा

वैश्रंभके सुरसने नंदने पुष्पभद्रके ॥ मानसे चैत्ररथ्ये च स रेमे रामया रतः ॥ ४० ॥ भ्राजिष्णुना विमानेन कामगेन महीयसा ॥ वैमानिकानत्यशेत चरन् लोकान्यथाऽनिलः ॥ ४१ ॥ किं दुरापादनं तेषां पुंसामुद्दामचेतसाम् ॥ यैराश्रितस्तीर्थपदश्चरणो व्यसनात्ययः ॥ ४२ ॥ प्रेक्षयित्वा भुवो गोलं पत्न्यै यावान्स्वसंस्थया ॥ बह्वाश्चर्यं महायोगी स्वाश्रमाय न्यवर्तत ॥ ४३ ॥ विभज्य नवधाऽऽत्मानं मानवीं सुरतोत्सुकाम् ॥ रामां निरमयन्रेमे वर्षपूगान्मुहूर्तवत् ॥ ४४ ॥ तस्मिन्विमान उत्कृष्टां शय्यां रतिकरीं श्रिता ॥ न चाबुध्यत तं कालं पत्याऽपीच्येन संगता ॥ ४५ ॥ एवं योगानुभावेन दंपत्यो रममाणयोः ॥ शतं व्यतीयुः शरदः कामलालसयोर्मनाक् ॥ ४६ ॥ तस्यामाधत्त रेतस्तां भावयन्नात्मनात्मवित् ॥ नोधा विधाय रूपं स्वं सर्वसंकल्पविद्विभुः ॥ ४७ ॥

विभज्य नवप्रभेदमात्मानं कृत्वा ॥ ४४ ॥ ४५ ॥ शरदः संवत्सराः मनागीषदिव व्यतीयुः ॥ ४६ ॥ आत्मना स्वदेहार्धरूपेणातिप्रीत्या भावयन् तथा सति सदपत्यं भवेदिति नोधा नवधा सर्वसंकल्पविदिति तस्या बह्वपत्यसंकल्पं जानन्नित्यर्थः । विभुस्तथाकर्तुं समर्थश्च आत्मविदिति च तस्यामनासक्तत्वात्स्त्रियो जाता इति भावः । पुमान्पुंसोऽधिके

कर्दम ऋषि, द्वीपें खंडें इत्यादिक अनेक रचनांच्या योगानें बहुत आश्चर्यकारक असें हें जितकें ह्मणून भूमंडळ आहे तितकें सर्व आपल्या पत्नीला दाखवून, नंतर आपल्या आश्रमीं येण्यासाठीं माघारा फिरला ॥ ४३ ॥ नंतर त्या कर्दमानें, आपलीं नऊ स्वरूपें धारण करून रतिक्रीडेविषयीं उत्सुक अशा त्या सुंदर मनुकन्येला रमवीत रमवीत दोन घटिकांप्रमाणें कितीएक वर्षांचे समुदायपर्यंत क्रीडा केली ॥ ४४ ॥ तेव्हां त्या निमानामध्यें रतिक्रीडेची उत्सुकता वाढविणाऱ्या उत्कृष्ट शय्येचा आश्रय करून आपल्या अतिसुंदर पतीशीं संगत असलेल्या त्या देवहूतीनें बहुत वर्षें गेलेला तो काळ, मुळींच जाणला नाहीं ॥ ४५ ॥ याप्रमाणें विषय भोगण्याविषयीं उत्सुक व योगसामर्थ्यानें पाहिजे ते पदार्थ उत्पन्न करून रममाण होणाऱ्या त्या उभयतां स्त्रीपुरुषांचीं शंभर वर्षें अगदीं थोड्या कालासारखीं निघून गेलीं ॥ ४६ ॥ नंतर आपल्याला पुष्कळ मुलें व्हावींत अशा देवहूतीच्या मनोरथाला जाणणारा व तसें करण्याविषयीं समर्थ अशा त्या आत्मवेत्त्या कर्दम ऋषीनें, त्या देवहूतीला आपलें अर्धें शरीरच आहे असे मानून, आपल्या स्वरूपाचे नऊ विभाग करून

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तिच्याठिकाणीं रेत स्थापन केलें ॥ ४७ ॥ नंतर त्याच दिवशीं ती देवहूति प्रसूत होऊन तिला नऊ कन्या झाल्या. त्या संपूर्ण अवयवांनीं सुंदर होत्या व त्यांच्या अंगाला तांबड्या कमळाप्रमाणें सुगंध येत होता ॥ ४८ ॥ तेव्हां लागलाच सर्व संग परित्याग करून आपला पति वनांत जात आहे असें अवलोकन करून, सुंदरी पतिव्रता ती देवहूति, व्याकुळ व खिन्न झालेल्या अंतःकरणानें नखरूप मण्याच्या कांतीनें युक्त असलेल्या आपल्या पायानें भूमीचें लेखन करीत होत्साती खालीं मान घालून नेत्रांतून गळूं लागणाऱ्या अश्रुपातांचा निरोध करून बाहेरून हांसतच आहे असें दाखवीत ती हळूहळू पतीशीं मधुर भाषण करूं लागली ॥ ४९ ॥ ५० ॥ देवहूति ह्मणाली–हे प्रभो, आपण मला जें वचन दिलें होतें तें सर्व पूर्ण केलें तथापि आतां शरण आलेल्या मला अभय देण्याविषयीं आपण समर्थ आहां ॥ ५१ ॥ हे ब्रह्मनिष्ठ ऋषे, ह्या आपल्या कन्यांनीं आपआपणाला योग्य असे पति

शुक्रे स्त्रीभवत्यधिके स्त्रिया इति स्मृतेः ॥ ४७ ॥ अतोऽनंतरमेव सद्य एकस्मिन्नेवाहनि चारूणि सर्वाण्यंगानि यासाम् ॥ ४८ ॥ प्रव्रजिष्यंतमालक्ष्य वितर्क्य स्मयमाना बहिरंतस्तु विक्लवेन व्याकुलेन विदूयता संतप्यमानेन हृदा उवाचेत्युत्तरेणान्वयः ॥ ४९ ॥ नखा एव मणयस्तैः श्रीः शोभा यस्य तेन पदा भुवं लिखंतीति दुरंतचिंतालक्ष-

अतः सा सुषुवे सद्यो देवहूतिः स्त्रियः प्रजाः ॥ सर्वास्ताश्चारुसर्वांग्यो लोहितोत्पलगंधयः ॥ ४८ ॥ पतिं सा प्रव्रजिष्यंतं तदा लक्ष्योशती सती ॥ स्मयमाना विक्लवेन हृदयेन विदूयता ॥ ४९ ॥ लिखंत्यधोमुखी भूमिं पदा नखमणिश्रिया ॥ उवाच ललितां वाचं निरुध्याश्रुकलां शनैः ॥ ५० ॥ देवहूतिरुवाच ॥ सर्वं तद्भगवान्मह्यमुपोवाह प्रतिश्रुतम् ॥ अथापि मे प्रपन्नाया अभयं दातुमर्हसि ॥ ५१ ॥ ब्रह्मन्दुहितृभिस्तुभ्यं विमृग्याः पतयः समाः ॥ कश्चित्स्यान्मे विशोकाय त्वयि प्रव्रजिते वनम् ॥ ५२ ॥ एतावताऽलं कालेन व्यतिक्रांतेन मे प्रभो ॥ इंद्रियार्थप्रसंगेन परित्यक्तपरात्मनः ॥ ५३ ॥ इंद्रियार्थेषु सज्जंत्या प्रसंगस्त्वयि मे कृतः ॥ अजानंत्या परं भावं तथाऽप्यस्त्वभयाय मे ॥ ५४ ॥

णम् ॥ ५० ॥ उपोवाह संपादितवान् । अभयमिति भाविनो दैन्यात्संसाराच्च यद्भयं तन्निवर्तयेत्यर्थः ॥ ५१ ॥ तत्र दैन्यं निवेदयति । तुभ्यं तव दुहितृभिः स्वयमेवात्मनः समा योग्याः पतयो विमृग्या इति दैन्यं प्राप्तम् । संसारभयमुररीकृत्याह । कश्चिदिति । विशोकाय ज्ञानोपदेशाय स्त्रीभिर्ऋणानपाकरणात्कंचित्कालं त्वदवस्थानेन ब्रह्मवित्पुत्रः कश्चित्किं स्यादित्यर्थः ॥ ५२ ॥ विषयान् भुंक्ष्व किं ब्रह्मविचयेति चेत्तत्राह । एतावताऽलं पूर्यताम् । परित्यक्तः पर आत्मा यया तस्या मम ॥ ५३ ॥ स्वकृतमनुशोचंत्याह ।

स्वतःच पाहिले पाहिजेत, हें एक मला मोठेंच संकट प्राप्त झालें आहे. बरें तें असो, कसें तरी होईल, परंतु आपण संन्यास घेऊन वनामध्यें गेलां असतां, माझा शोक घालविण्याकरितां एकादा ब्रह्मनिष्ठ पुत्र पाहिजे होता. मुली झाल्या एवढ्यानें आपलें तरी पितृऋण फिटलें आहे असें नाहीं, यास्तव आपण आणखी कांहीं दिवस घरीं राहिलां असतां, मला एकादा ब्रह्मवेत्ता पुत्र झाला तर सर्वच यथास्थित होईल ॥ ५२ ॥ 'तूं भक्ष्यभोज्यादि विषयांचा उपभोग कर तुला ब्रह्मज्ञानाचें काय प्रयोजन आहे' असें आपण ह्मणाल तर, हे प्रभो, परमात्मस्वरूपाचा त्याग करणाऱ्या माझ्या, विषयप्रसंगानेंच निघून गेलेल्या इतक्या काळानें आतां पुरे झालें. पुढील काळ तरी ईश्वरभजनांत जावा अशी मी इच्छा करित्यें ॥ ५३ ॥ आपण ब्रह्मज्ञानी आहां हें न जाणणाऱ्या मी, आजपर्यंत केवळ इंद्रियें संतुष्ट करण्यामध्येंच सक्त होऊन अज्ञानानें आपले

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ठिकाणीं प्रसंग केला तरी आतां तो, आपल्या कृपेनें मला पुत्रलाभ होऊन संसारदुःख दूर करण्याविषयीं समर्थ होवो ॥ ५४ ॥ अज्ञानानें कां होईना, विषयासक्त पुरुषांशीं केलेली जी संगति तीमात्र संसाराला कारण होत्ये आणि तीच संगति आपल्यासारख्या सत्पुरुषांशीं केली असतां, मोक्ष देण्याविषयीं समर्थ होत्ये ॥ ५५ ॥ ह्या सृष्टीमध्यें ज्या प्राण्याचें कर्म, धर्माच्या उपयोगीं पडत नाहीं, वैराग्य होण्याला साधन होत नाहीं, आणि वैराग्यद्वारा हरीच्या सेवेविषयींहि पर्यवसान पावत नाहीं, तो प्राणी जीवंत असून मेल्यासारखा होय ॥ ५६ ॥ हे प्रभो, मुक्ति देण्यालाहि समर्थ अशा आपला समागम घडला असतांहि मला आजपर्यंत ज्याअर्थीं बंधांतून मुक्त होण्याची इच्छा झाली नाहीं, त्याअर्थीं भगवंताच्या मायेनें मला पक्कें फसविलें आहे, यांत संशय नाहीं ॥ ५७ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील तृतीयस्कंधामध्यें कापिलेय आख्यानसं-

---

इंद्रियार्थेष्विति चतुर्भिः । मे मया परं भावं त्वं ब्रह्मविदिति ॥ ५४ ॥ प्रसंगः कथमभयायास्तु तत्राह । संग इति । अधियाऽज्ञानेन ॥ ५५ ॥ स्वभावतः प्रवृत्तं यस्य कर्म धर्मार्थं न कल्पते धर्माभिमुखं न भवेत् । तत्रापि निष्कामधर्मद्वारा विरागाय न कल्पते । तद्वारा च तीर्थपदस्य हरेः सेवार्थं न पर्यवस्येदित्यर्थः ॥ ५६ ॥ न मुमुक्षेय मोक्तु-

संगो यः संसृतेर्हेतुरसत्सु विहितो धिया ॥ स एव साधुषु कृतो निःसंगत्वाय कल्पते ॥ ५५ ॥ नेह यत्कर्म धर्माय न विरागाय कल्पते ॥ न तीर्थपदसेवायै जीवन्नपि मृतो हि सः ॥ ५६ ॥ साऽहं भगवतो नूनं वंचिता मायया दृढम् ॥ यत्त्वां विमुक्तिदं प्राप्य न मुमुक्षेय बंधनात् ॥ ५७ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे तृतीयस्कंधे कापिलेयोपाख्याने त्रयोविंशतितमोऽध्यायः ॥ २३ ॥ ॥ मैत्रेय उवाच ॥ ॥ निर्वेदवादिनीमेवं मनोर्दुहितरं मुनिः ॥ दयालुः शालिनीमाह शुक्लाभिव्याहृतं स्मरन् ॥ १ ॥ ऋषिरुवाच ॥ मा खिदो राजपुत्रीत्थमात्मानं प्रत्यनिंदिते ॥ भगवांस्तेऽक्षरो गर्भमदूरात्संप्रपत्स्यते ॥ २ ॥ धृतव्रतासि भद्रं ते दमेन नियमेन च ॥ तपोद्रविणदानैश्च श्रद्धया चेश्वरं भज ॥ ३ ॥

मिच्छां न कृतवत्यस्मि ॥ ५७ ॥ इति श्रीमद्भागवते म० तृतीयस्कंधे टीकायां कपिलोपाख्याने त्रयोविंशतितमोऽध्यायः ॥ २३ ॥ ॥ चतुर्विंशे ततो जन्म कपिलस्याह तत्पितुः ॥ प्रव्रज्यां तमनुज्ञाप्य ऋणत्रयविमोक्षतः ॥ १ ॥ शालिनीं श्लाघ्याम्। शुक्लेनाभिव्याहृतं सहाहं स्वांशकलयेत्यादि ॥ १ ॥ इत्थं मा खिदः खेदं माकार्षीः । आत्मानं प्रत्यहं भाग्यहीनेति अदूराच्छीघ्रम् ॥ २ ॥ दमेनेंद्रियसंयमेन नियमेन स्वधर्मेण तपांसि द्रविणदानानि च तैः ॥ ३ ॥

बंधीं हा तेविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २३ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ ७ ॥ ॥ ह्या चोविसाव्या अध्यायांत, कपिल महामुनीचा अवतार, ब्रह्मदेवानें केलेली त्याची स्तुति, मरीच्यादिक ऋषींचे विवाह आणि ऋणत्रयापासून मुक्त झालेल्या कर्दम प्रजापतीचें कपिलमहामुनीच्या आज्ञेनें संन्यासग्रहणपूर्वक महाप्रस्थान, हे विषय वर्णन केले आहेत ॥ १ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, याप्रमाणें वैराग्यानें भाषण करणाऱ्या विनयसंपन्न त्या मनुकन्येला (देवहूतीला) तो दयाळू कर्दममुनि शुक्लरूपी विष्णूनें पूर्वीं सांगितलेल्या भाषणाचें स्मरण करून ह्मणाला कीं–॥ १ ॥ ऋषि ह्मणाला– हे स्तुत्यगुणयुक्ते राजकन्ये, तूं स्वतांबद्दल अशा रीतीनें खेद करूं नकोस; कारण, तिन्हीं काळीं अविनाशस्वरूपी असा षड्गुणैश्वर्यसंपन्न ईश्वर तुझ्या उदरीं लवकरच अवतार धारण करील ॥ २ ॥ हे प्रिये, तूं आजपर्यंत पुष्कळ निरनिराळीं व्रतें आचरण केलीं आहेस, ह्मणून तुझें कल्याण होईल. आतां पुढेंही इंद्रियनिग्रह नानाप्रकारचे नियम, तपश्चर्या व द्रव्यदानें यांच्या योगेंकरून तूं भक्तिपुरःसर ईश्वराची सेवा कर॥ ३ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तूं आराधन केलेला तो शुक्लरूपी भगवान् विष्णु जगामध्यें माझें यश वाढविण्यासाठीं तुझ्या उदरीं अवतार घेईल व तुला ब्रह्मज्ञानाचा उपदेश करून तुझ्या हृदयांतील अहंकाररूपी ग्रंथीचा छेद करील ॥ ४ ॥ मैत्रेय ह्मणाला–हे विदुरा, देवहूतीहि कर्दम प्रजापतीच्या आज्ञेवर आदरपूर्वक पूर्ण विश्वास ठेऊन, निर्विकार असून जगाला सन्मार्गाचा उपदेश करणारा गुरुरूपी जो पुराण पुरुष त्याची आराधना करूं लागली ॥ ५ ॥ पुढें बराच काल निघून गेला असतां, काष्ठामध्यें जसा अग्नि प्रकट होतो त्याप्रमाणें भगवान् मधुसूदन, कर्दम मुनीच्या वीर्याचा आश्रय करून त्या देवहूतीचेठिकाणीं अवतीर्ण झाला ॥ ६ ॥ त्या वेळीं स्वर्गामध्यें देवांनीं वाद्यें वाजविलीं. अतिशय दाट असे प्राप्त झालेले मेघ गर्जना करूं लागले. गंधर्व आनंदानें त्या ईश्वराची गायनामध्यें स्तुति करूं लागले. अप्सरा नृत्य करूं लागल्या ॥ ७ ॥ देवांनीं

हृदयग्रंथिं चिज्जडात्मकमहंकारलक्षणं बंधं छेत्ता छेत्स्यति औदर्यः पुत्रः सन् ब्रह्म भावयत्युपदिशतीति तथा ॥ ४ ॥ श्रद्धाय विश्वस्य ॥ ५ ॥ बहुतिथे बहुतरे कालेऽतिक्रांते सति । कार्दमं कर्दमसंबंधि ॥ ६ ॥ घनाघना इत्येकं पदम्। वर्षंतो मेघाः गायंति स्म नृत्यंति स्म ॥ ७ ॥ अपवर्जिता मुक्ताः ॥ ८ ॥ परिश्रितं परिवेष्टितम् ॥ ९ ॥ आगत्य

स त्वयाऽऽराधितः शुक्लो वितन्वन्मामकं यशः ॥ छेत्ता ते हृदयग्रंथिमौदर्यो ब्रह्मभावनः ॥ ४ ॥ मैत्रेय उवाच ॥ देवहूत्यपि संदेशं गौरवेण प्रजापतेः ॥ सम्यक् श्रद्धाय पुरुषं कूटस्थमभजद्गुरुम् ॥ ५ ॥ तस्यां बहुतिथे काले भगवान्मधुसूदनः ॥ कार्दमं वीर्यमापन्नो जज्ञेऽग्निरिव दारुणि ॥ ६ ॥ अवादयंस्तदा व्योम्नि वादित्राणि घनाघनाः ॥ गायंति तं स्म गंधर्वा नृत्यंत्यप्सरसो मुदा ॥ ७॥ पेतुः सुमनसो दिव्याः खेचरैरपवर्जिताः ॥ प्रसेदुश्च दिशः सर्वा अंभांसि च मनांसि च ॥ ८ ॥ तत्कर्दमाश्रमपदं सरस्वत्या परिश्रितम् ॥ स्वयंभूः साकमृषिभिर्मरीच्यादिभिरभ्ययात् ॥ ९ ॥ भगवंतं परं ब्रह्म सत्त्वेनांशेन शत्रुहन् ॥ तत्त्वसंख्यानविज्ञप्त्यै जातं विद्वानजः स्वराट् ॥ १० ॥ सभाजयन्विशुद्धेन चेतसा तच्चिकीर्षितम् ॥ प्रहृष्यमाणैरसुभिः कर्दमं चेदमभ्यधात् ॥ ११ ॥ ब्रह्मोवाच ॥ त्वया मेऽपचितिस्तात कल्पिता निर्व्यलीकतः ॥ यन्मे संजगृहे वाक्यं भवान्मानद मानयन् ॥ १२ ॥

किं कृतवांस्तदाह । भगवंतमिति द्वाभ्याम् । तत्त्वानां संख्यानं यस्मिंस्तस्य सांख्यस्य विज्ञप्त्यै विशेषेण ज्ञापनाय भगवंतं जातं विद्वानजो ब्रह्मा स्वराट् स्वतःसिद्धज्ञानस्तस्य चिकीर्षितं सभाजयन्पूजयन्प्रहृष्यमाणैरसुभिरिंद्रियैरुपलक्षितः कर्दमं चेदमभ्यधादिति द्वयोरन्वयः । चकाराद्देवहूतिं च ॥ १० ॥ ११ ॥ तत्र त्वयेति पंचभिः । कर्दमं प्रत्याह । अपचितिः पूजा कृता यद्यस्मात् निर्व्यलीकतो निष्कपटं सम्यग्गृहीतवान् ॥ १२ ॥

उधळलेलीं दिव्य पुष्पें पृथ्वीवर पडूं लागलीं. सर्व दिशा, उदकें आणि सर्वांचीं अंतःकरणें प्रसन्न झालीं ॥ ८ ॥ त्या वेळीं मरीच्यादिक ऋषींसहवर्तमान ब्रह्मदेव, सरस्वतीनदीनें परिवेष्टित अशा त्या कर्दम ऋषीच्या आश्रमस्थानीं प्राप्त झाला ॥ ९ ॥ हे शत्रुनाशका विदुरा, तत्त्वांचें निरूपण ज्यामध्यें आहे असें सांख्यशास्त्र विशेषेंकरून लोकांस सांगण्याकरितां, सत्त्वगुणरूप अंशानें परब्रह्मरूप तो भगवान् अवतीर्ण झाला आहे असें जाणणारा स्वतःसिद्धज्ञानवान् तो ब्रह्मदेव, आपल्या विशुद्ध अंतःकरणानें कर्दमानें योजलेल्या गोष्टींचें अभिनंदन करीत करीत आनंदाश्रु, रोमांच इत्यादि लक्षणांच्या योगेंकरून हर्षयुक्त झालेल्या इंद्रियांनीं उपलक्षित होत्साता, कर्दम ऋषि व देवहूति या उभयतांस ह्मणाला कीं–॥ १० ॥ ११ ॥ ब्रह्मदेव ह्मणाला–बा कर्दमा, तूं दुसऱ्यांचें गौरव करणारा आहेस. ज्याअर्थीं तूं मला मान देऊन माझ्या आज्ञेचें ग्रहण

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

केलेंस त्याअर्थीं तूं माझी निष्कपटपणें पूजाच केलीस असें मी मानितों ॥१२॥ हे कर्दमा, पुत्रांनीं पित्याच्याठिकाणीं त्याच्या आज्ञेचा 'ठीक आहे असा' बहुमानानें स्वीकार करणें इतकीच सेवा करावयाची आहे॥ १३ ॥ हे साधो वत्सा, ह्या तुझ्या, सिंहाप्रमाणें कृशकटीनें युक्त सुंदर स्वरूपाच्या कन्या, आपल्या वंशांच्या योगानें या सृष्टीची अनेकप्रकारें वृद्धि करतील ॥ १४ ॥ यास्तव आतां तूं ह्या आपल्या कन्या, इच्छेनुरूप आणि स्वभावानुरूप मरीचिप्रभृति श्रेष्ठ ऋषींना दे आणि आपली कीर्ति भूमीवर विस्तृत कर ॥ १५ ॥ हे मुने, हा तुझा पुत्र प्राणिमात्रांचे सर्व मनोरथ पूर्ण करणारा, असून कपिल नांवाचा देह धारण करणारा हा पुराणपुरुष विष्णु अवतीर्ण झाला आहे, असें मी जाणतों ॥ १६ हे मनुकन्ये देवहूति, तुझ्या उदरीं प्रविष्ट झालेला, सुवर्णासारखे केंस, कमळासारखे डोळे व कमलचिन्हांनीं चिन्हित अशीं चरणकमलें धारण करणारा, हा कैटभारी

अनुमन्येतेति यदेतावत्येव ॥ १३ ॥ अनेकधा प्रभावैर्वंशैर्बृंहयिष्यंति वर्धयिष्यंति ॥ १४ ॥ ऋषिमुख्येभ्यो मरीच्यादिभ्यः ॥ १५ ॥ पुत्रस्तु साक्षादीश्वर इत्याह । वेदाहमिति । शेवधिं निधिं सर्वाभीष्टदम् ॥ १६ ॥ देवहूतिं प्रत्याह । त्रिभिः । ज्ञानं शास्त्रोक्तं विज्ञानमपरोक्षं च ते एव योग उपायस्तेन कर्मणां जटा मूलानि वासना उद्धरन्नुत्पाटयिष्यन्

एतावत्येव शुश्रूषा कार्या पितरि पुत्रकैः ॥ बाढमित्यनुमन्येत गौरवेण गुरोर्वचः ॥ १३ ॥ इमा दुहितरः सभ्य तव वत्स सुमध्यमाः ॥ सर्गमेतं प्रभावैः स्वैर्बृंहयिष्यंत्यनेकधा ॥ १४ ॥ अतस्त्वमृषिमुख्येभ्यो यथाशीलं यथारुचि ॥ आत्मजाः परिदेह्यद्य विस्तृणीहि यशो भुवि ॥ १५ ॥ वेदाहमाद्यं पुरुषमवतीर्णं स्वमायया ॥ भूतानां शेवधिं देहं बिभ्राणं कपिलं मुने ॥ १६ ॥ ज्ञानविज्ञानयोगेन कर्मणामुद्धरन् जटाः ॥ हिरण्यकेशः पद्माक्षः पद्ममुद्रापदांबुजः ॥ १७ ॥ एष मानवि ते गर्भं प्रविष्टः कैटभार्दनः ॥ अविद्यासंशयग्रंथिं छित्त्वा गां विचरिष्यति ॥ १८ ॥ अयं सिद्धगणाधीशः सांख्याचार्यैः सुसंमतः ॥ लोके कपिल इत्याख्यां गंता ते कीर्तिवर्धनः ॥ १९ ॥ मैत्रेय उवाच ॥ तावाश्वास्य जगत्स्रष्टा कुमारैः सह नारदः ॥ हंसो हंसेन यानेन त्रिधाम परमं ययौ ॥ २० ॥ गते शतधृतौ क्षत्तः कर्दमस्तेन चोदितः ॥ यथोदितं स्वदुहितॄः प्रादाद्विश्वसृजां ततः ॥ २१ ॥

पद्ममुद्रायुक्तं पदांबुजं यस्य ॥ १७ ॥ हे मानवि अविद्या स्वरूपाज्ञानं संशया मिथ्याज्ञानानि तन्मयं तव हृदयग्रंथिम् ॥ १८ ॥ सुसंमतः सुपूजितः सन् गंता प्राप्स्यति ॥ १९ ॥ कुमारैः सहेति शेषः । सहनारदो नारदसहितश्च मरीच्यादीन्विवाहार्थमवस्थाप्य नैष्ठिकैरेतैः पंचभिः सहितो हंसो ब्रह्मा ययौ । त्रिधाम तृतीयं धाम स्वर्गस्तस्य परां काष्ठां सत्यलोकम् ॥ २० ॥ शतधृतौ ब्रह्मणि ॥ २१ ॥

भगवान्, शास्त्रोक्तज्ञान व अपरोक्षज्ञान या दोन्हींच्या उपदेशेंकरून, कर्मांच्या वासना उपटून टाकित होत्साता, तुझ्या अंतःकरणांतील अज्ञानरूप संशयांची गांठ तोडून टाकून पृथिवीवर पर्यटण करील ॥ १७ ॥ १८ ॥ हा सर्व सिद्धगणांचा अधिपति, सांख्यशास्त्राच्या उपदेष्ट्या पंडितांनीं सुपूजित होऊन, तुझी कीर्ति वाढविणारा होईल व लोकांमध्यें कपिल या नांवानें प्रसिद्ध होईल ॥ १९ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, जगाची उत्पत्ति करणाऱ्या ब्रह्मदेवानें, कर्दमाचें व देवहूतीचें अशा रीतीनें आश्वासन करून, आपल्या बरोबर आलेल्या ऋषींपैकीं मरीचि अत्रि इत्यादिक ऋषींना विवाहासाठीं तेथेंच ठेऊन, नारद व सनकादिक चार अशा पांच पुत्रांसहवर्तमान हंसावर बसून सत्यलोकीं निघून गेला ॥ २० ॥ हे विदुरा, ब्रह्मदेव गेल्यावर त्यानें आज्ञा केल्याप्रमाणें कर्दम ऋषीनें, आपल्या कन्या, मरीचिप्रभृति प्रजापतींना अर्पण केल्या ॥ २१ ॥

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कला नांवाची आपली कन्या, मरीचि ऋषीला दिली. तशीच अनसूया अत्रीला, श्रद्धा अंगिरसाला आणि हविर्भू पुलस्त्याला अर्पण केली ॥ २२ ॥ स्वभावादि गुणांनीं योग्य अशी गतिनामक कन्या पुलहाला, क्रिया नांवाची साध्वी कन्या क्रतूला, ख्याति भृगूला आणि अरुंधती वसिष्ठाला अर्पण केली ॥ २३ ॥ जिच्या योगानें यज्ञ परिपूर्ण होतो ती शांति नांवाची कन्या अथर्व ऋषीला दिली; याप्रमाणें विवाह केलेल्या त्या सपत्नीक महर्षींना कर्दम ऋषीनें प्रियवस्तु देऊन संतुष्ट केलें ॥ २४ ॥ हे विदुरा, नंतर स्त्रियांचा स्वीकार करणारे ते ऋषि, आनंदानें त्या कर्दम ऋषीचा निरोप घेऊन पत्न्यांसहवर्तमान आपापल्या आश्रमस्थलीं निघून गेले ॥ २५ ॥ इकडे त्या

॥२२ ॥ युक्तां योग्याम् । अयच्छददात् ॥ २३ ॥ वितन्यते समृद्धः क्रियते शांत्यधिष्ठात्रीं देवतामित्यर्थः । समलालयत्संतोषितवान् ॥ २४ ॥ निमंत्र्य पृष्ट्वा नंदिं हर्षं प्राप्ताः संतः ॥ २५ ॥ सच मुनिः त्रियुगं विष्णुम् । विविक्ते रहसि ॥ २६ ॥ पापच्यमानानां भृशं दह्यमानानाम् । निरये संसारे स्वीयैरमंगलैः पापैः ॥ २७ ॥ कुतः सर्वा देवताः

मरीचये कलां प्रादादनसूयामथात्रये ॥ श्रद्धामंगिरसेऽयच्छत्पुलस्त्याय हविर्भुवम् ॥ २२ ॥ पुलहाय गतिं युक्तां क्रतवे च क्रियां सतीम् ॥ ख्यातिं च भृगवेऽयच्छद्वसिष्ठायाप्यरुंधतीम् ॥ २३ ॥ अथर्वणेऽददाच्छांतिं यया यज्ञो वितन्यते ॥ विप्रर्षभान्कृतोद्वाहान्सदारान्समलालयत् ॥ २४ ॥ ततस्त ऋषयः क्षत्तः कृतदारा निमंत्र्य तम् ॥ प्रातिष्ठन्नंदिमापन्नाः स्वं स्वमाश्रममंडलम् ॥ २५ ॥ स चावतीर्णं त्रियुगमाज्ञाय विबुधर्षभम् ॥ विविक्त उपसंगम्य प्रणम्य समभाषत ॥ २६ ॥ अहो पापच्यमानानां निरये स्वैरमंगलैः ॥ कालेन भूयसा नूनं प्रसीदंतीह देवताः ॥ २७ ॥ बहुजन्मविपक्केन सम्यग्योगसमाधिना ॥ द्रष्टुं यतंते यतयः शून्यागारेषु यत्पदम् ॥ २८ ॥ स एव भगवानद्य हेलनं न गणय्य नः ॥ गृहेषु जातो ग्राम्याणां यः स्वानां पक्षपोषणः ॥ २९ ॥ स्वीयं वाक्यमृतं कर्तुमवतीर्णोऽसि मे गृहे ॥ चिकीर्षुर्भगवान् ज्ञानं भक्तानां मानवर्धनः ॥ ३० ॥

प्रसन्ना इति ज्ञातमलभ्यलाभादित्याह । द्वाभ्याम् । बहुषु जन्मसु विपक्केन सुसिद्धेन सम्यग्योगो भक्तियोगस्तस्मिन्समाधिरैकाग्र्यं तेन शून्यागारेषु विविक्तस्थानेषु यस्य तव पदम् ॥ २८ ॥ हेलनमवज्ञां लाघवं न गणय्यागणयित्वा उचितमेव तवैतदित्याह । यस्त्वं स्वानां भक्तानां पक्षं पुष्णासीति तथा सः ॥ २९ ॥ एतत्प्रपंचयति । द्वाभ्याम् । स्वयमेवावतीर्णोऽसि स्ववाक्यं तव पुत्रो भविष्यामीति यत्तत्सत्यं कर्तुं ज्ञानं ज्ञानसाधनं सांख्यं च चिकीर्षुः सन् ॥ ३० ॥

कर्दमानें, देवांमध्यें श्रेष्ठ अशा षड्गुणैश्वर्यसंपन्न विष्णूनें आपल्या घरीं अवतार घेतला आहे असें जाणून, एकांतीं त्याच्याजवळ जाऊन नमस्कार करून भाषण केलें कीं,– ॥ २६ ॥ अहो! या सृष्टीमध्यें आपल्या पापकर्मांच्या योगानें संसारामध्यें अनेक प्रकारचे ताप पावणाऱ्या प्राण्यांना, पुष्कळ कालाच्या योगानेंतरी देवता प्रसन्न होतात यांत संशय नाहीं ॥ २७ ॥ पुष्कळ जन्माचेठिकाणीं सिद्ध झालेल्या उत्तम योगसमाधीच्या योगानें संन्यासी लोकसुद्धां एकांतस्थलीं ज्या तुझ्या चरणाचें दर्शन घेण्याचा प्रयत्न करितात ॥ २८ ॥ असा आपल्या भक्तांचा कैवारी भगवान् तूं, आह्मी तुझी कितीहि अवज्ञा केली असतां तिकडे लक्ष न देतां, विषयासक्त अशा आमच्या घरीं आज उत्पन्न झाला आहेस ॥ २९ ॥ तोतरी भक्तांचा सन्मान वाढवावा आणि सांख्यशास्त्राचा प्रसार करावा ह्मणून, प्रत्यक्ष भगवान् तूं, 'मी तुझ्या घरीं जन्म घेईन' असें ॥ ७६॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आपलें भाषण सत्य करण्यासाठीं माझ्या घरीं अवतीर्ण झाला आहेस ॥ ३० ॥ हे भगवन्, वस्तुतः तूं निराकार आहेस तथापि तुझ्या भक्तांना जीं जीं चतुर्भुजादिक तुझीं स्वरूपें आवडतात तीं तींच तुलाही आवडतात ह्मणजे तींच तूं धारण करितोस ॥ ३१ ॥ तस्मात् तत्त्व जाणण्याच्या इच्छेनें विवेकी पुरुषांनीं प्रत्यक्ष सर्वदा प्रणाम करण्यास योग्य असें ज्याचें पादपीठ आहे अशा व ऐश्वर्य, वैराग्य, कीर्ति, ज्ञान, वीर्य आणि संपत्ति ह्या षड्गुणैश्वर्यांनीं परिपूर्ण अशा तुला मी शरण आलों आहें ॥ ३२ ॥ हे भगवन्, सर्वशक्ति ज्याच्या स्वाधीन आहेत ह्मणजे प्रकृति, पुरुष, महत्तत्त्व, काल, अहंकार लोक व लोकपाल हीं ज्याचीं स्वरूपें आहेत आणि चिच्छक्तीच्या योगानें

यानि तवालौकिकानि चतुर्भुजादिरूपाणि तान्येव तेऽभिरूपाणि योग्यानि यानि च स्वजनानां रोचंते मनुष्यसरूपाणि तान्यपि ते रोचंत इत्यर्थः । अरूपिणः प्राकृतरूपरहितस्य ॥ ३१ ॥ अभिवादार्हं पादपीठं यस्य ऐश्वर्यादिभिः पूर्तं पूर्णम् ॥ ३२ ॥ ऐश्वर्यादिकं विवृण्वन्नाह । परं परमेश्वरम् । तत्र हेतुः । स्वच्छंदाः स्वाधीनाः शक्तयो यस्य ता एवाह । प्रधानं प्रकृतिरूपं पुरुषं तदधिष्ठातारं महांतं महत्तत्त्वरूपं कालं तेषां क्षोभकं त्रिवृतमहंकाररूपं लोकात्मकं तत्पालात्मकं च तदेवं मायया प्रधानादिरूपतामुक्त्वा चिच्छक्त्या निष्प्रपंचतामाह । आत्मानुभूत्या चिच्छक्त्याऽनुगतः स्वस्मिन् लीनः प्रपंचो यस्य तम् । कविं सर्वज्ञम् । प्रधानाद्याविर्भावलयसाक्षिणमित्यर्थः ॥ ३३ ॥

तान्येव तेऽभिरूपाणि रूपाणि भगवंस्तव ॥ यानि यानि च रोचंते स्वजनानामरूपिणः ॥ ३१ ॥ त्वां सूरिभिस्तत्त्वबुभुत्सयाऽद्धा सदाऽभिवादार्हणपादपीठम् ॥ ऐश्वर्यवैराग्ययशोऽवबोधवीर्यश्रियां पूर्तमहं प्रपद्ये ॥ ३२ ॥ परं प्रधानं पुरुषं महांतं कालं कविं त्रिवृतं लोकपालम् ॥ आत्मानुभूत्यानुगतप्रपंचं स्वच्छंदशक्तिं कपिलं प्रपद्ये ॥ ३३ ॥ आस्माभिपृच्छेऽद्य पतिं प्रजानां त्वयावतीर्णर्ण उताप्तकामः ॥ परिव्रजत्पदवीमास्थितोऽहं चरिष्ये त्वां हृदि युंजन्विशोकः ॥ ३४ ॥ श्रीभगवानुवाच ॥ मया प्रोक्तं हि लोकस्य प्रमाणं सत्यलौकिके ॥ अथाजनि मया तुभ्यं यदवोचमृतं मुने ॥ ३५ ॥

संन्यासानुज्ञां प्रार्थयते । आस्माभिपृच्छे यत्किंचिदभिपृच्छामीत्यर्थः । त्वया पुत्ररूपेणावतीर्णानि निवृत्तानि ऋणानि दैवादिरूपाणि यस्य स आप्तकामश्चाहं परिव्रजतां संन्यासिनां पदवीं मार्गमाश्रितः संस्त्वां युंजन् स्मरन्विचरिष्यामि ॥ ३४ ॥ अहं तावज्ज्ञानोपदेशायैव त्वद्गृहेऽवतीर्णः अतस्तव गृहे वसतोऽपि मुक्तिः सुलभैव । यद्यवश्यं गंतव्यमेवेत्याग्रहस्तथापि मामेवानुस्मरन् गच्छेत्याशयेनाह । मयेति षड्भिः । सत्यलौकिके वैदिके लौकिके च कृत्ये स्वोक्तस्य प्रामाण्यमभिदर्शयति । यद्यस्मात्तुभ्यं तव

ज्याच्यामध्यें सर्व प्रपंच लीन झाला आहे त्या कपिलनामक तुज परमेश्वराला मी शरण आलों आहें ॥ ३३ ॥ हे देवा, तुझ्या योगानें मी देव, ऋषि व पितर यांच्या ऋणांपासून मुक्त झालों आहें आणि माझे संसारसंबंधी सर्व मनोरथही परिपूर्ण झाले आहेत; ह्याकरितां मी आतां संन्यासमार्गाचा आश्रय करून अंतःकरणामध्यें तुझें ध्यान करून शोकरहित होत्साता यथेच्छ संचार करीन. तस्मात् आतां संन्यास ग्रहण करण्याकरितां सर्व प्रजांचा पालक अशा तुझी मी आज्ञा मागतों ॥ ३४ ॥ श्रीभगवान् ह्मणाला— हे कर्दमा, मी तुझ्या घरीं जो अवतार धारण केला आहे, तो ज्ञानाच्या उपदेशासाठींच आहे, ह्मणून तुला घरींदेखील मुक्ति दुर्लभ नाहीं. आतां जर तुला संन्यास घेऊन जाणें हेंच अवश्य वाटत असेल तर जा, पण माझ्याकडे लक्ष असूं दे. कारण, वैदिकवाक्यांमध्यें किंवा लौकिकभाषणांत माझें बोलणें सर्व लोकांला प्रमाण आहे ह्मणून तुला

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दिलेलें वचन खरें करण्याकरितां मी हा अवतार घेतला आहे ॥३५॥ या लोकीं झालेला हा माझा अवतार लिंगदेहापासून मुक्त होण्याची इच्छा करणाऱ्या मुमुक्षूंना आत्मज्ञान करून देण्याकरितां संमत असलेल्या प्रकृतिपुरुषादि तत्त्वांच्या निरूपणाविषयीं आहे ॥ ३६ ॥ हा सूक्ष्म आत्मज्ञानाचा मार्ग जरी पूर्वसिद्धच आहे तथापि पुष्कळ काळ गेल्यामुळें तो अगदीं नष्ट झाला आहे झणून त्याची पुन्हा प्रवृत्ति करण्याकरितां हा देह मी धारण केला आहे असें तूं समज ॥ ३७ ॥ हे ऋषे, मी तुला अनुज्ञा दिली आहे यास्तव तूं आतां यथेच्छ गमन कर आणि मृत्यूला जिंकणें फार कठीण आहे परंतु तूं माझेठिकाणीं अर्पण केलेल्या सर्व कर्मांच्या योगानें त्याला जिंकून मोक्षप्राप्तीकरितां माझी (परमात्म्याची) उपासना कर ॥ ३८ ॥ सर्व प्राणिमात्रांच्या अंतःकरणामध्यें राहणारा स्वयंप्रकाश परमात्मा जो मी त्याला, आपल्या देहस्थित आत्म्याचेठिकाणींच मनानें पाहून, तूं शोकापासून मुक्त

पुत्रो भविष्यामीत्यवोचम् । अथ अतएव तद्दत्तं सत्यं यथा भवति तथा मयाऽजनि जन्म स्वीकृतम् ॥ ३५ ॥ दुराशयाल्लिंगान्मुमुक्षूणां मुनीनामात्मदर्शने संमताय तत्त्वानां प्रसंख्यानाय विद्धीत्युत्तरस्यानुषंगः ॥ ३६ ॥ नन्वयमात्मज्ञानमार्गः पूर्वसिद्ध एव नेदानीमपूर्ववत्प्रवर्तनीयस्तत्राह । एष इति । अव्यक्तः सूक्ष्मः ॥ ३७ ॥ कामं यथेच्छम् ।

एतन्मे जन्म लोकेऽस्मिन्मुमुक्षूणां दुराशयात् ॥ प्रसंख्यानाय तत्त्वानां संमतायात्मदर्शने ॥ ३६ ॥ एष आत्मपथोऽव्यक्तो नष्टः कालेन भूयसा ॥ तं प्रवर्तयितुं देहमिमं विद्धि मया भृतम् ॥३७॥ गच्छ कामं मयाऽऽपृष्टो मयि संन्यस्तकर्मणा ॥ जित्वा सुदुर्जयं मृत्युममृतत्वाय मां भज ॥ ३८ ॥ मामात्मानं स्वयंज्योतिः सर्वभूतगुहाशयम् ॥ आत्मन्येवात्मना वीक्ष्य विशोकोऽभयमृच्छसि ॥ ३९ ॥ मात्रे आध्यात्मिकीं विद्यां शमनीं सर्वकर्मणाम् ॥ वितरिष्ये यया चासौ भयं चातितरिष्यति ॥ ४० ॥ मैत्रेय उवाच ॥ एवं समुदितस्तेन कपिलेन प्रजापतिः ॥ दक्षिणीकृत्य तं प्रीतो वनमेव जगाम ह ॥ ४१ ॥ व्रतं स आस्थितो मौनमात्मैकशरणो मुनिः ॥ निःसंगो व्यचरत्क्षोणीमनग्निरनिकेतनः ॥ ४२ ॥ मनो ब्रह्मणि युंजानो यत्तत्सदसतः परम् ॥ गुणावभासे विगुण एकभक्त्याऽनुभाविते ॥ ४३ ॥

आपृष्टोऽनुज्ञातः यद्वा यथा त्वं गंतुं मां पृष्टवांस्तथाऽत्रावस्थातुं मयाऽपि त्वमापृष्ट इत्यर्थः । मयि संन्यस्तेन समर्पितेन कर्मणा । अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययाऽमृतमश्नुत इति श्रुतेः ॥ ३८ ॥ ततश्च मां परमं परमात्मानमात्मनि स्वस्मिन्नात्मना मनसा अन्वीक्षमाणोऽभयं मोक्षं प्राप्स्यसि ॥ ३९ ॥ मात्रे देवहूत्यै शमनीमुन्मूलनीम् । भयमतिशयेन तरिष्यति परमानंदं प्राप्स्यतीति चकारार्थः ॥ ४० ॥ समुदितः सम्यगुक्तः सन् तं प्रदक्षिणीकृत्य ॥ ४१ ॥ मुनीनामिदं मौनं व्रतमहिंसालक्षणम् ॥ ४२ ॥ सदसतः परं यत्तस्मिन्

होशील आणि मोक्षसुखाला पावशील ॥ ३९ ॥ मी देवहूतिमातेला, संचित व क्रियमाण अशा सर्व कर्मांच्या वासना मनांतून उपटून टाकणारी अध्यात्मविद्या सांगेन. जिच्या योगानें ती देवहूति संसारभयाला तरून जाईल आणि परमानंदाला पावेल ॥ ४० ॥ मैत्रेय ह्मणाला— हे विदुरा, याप्रमाणें त्या कपिल मुनीनें कर्दम प्रजापतीला उत्तमप्रकारें सांगितलें असतां, आनंद पावलेला तो कर्दम ऋषि, त्या कपिलाला प्रदक्षिणा करून वनामध्येंच निघून गेला ॥ ४१ ॥ नंतर ज्याचा रक्षक आत्माच आहे असा तो गृहरहित, अग्निरहित व सर्वसंगपरित्याग केलेला कर्दम मुनि, मननशील ऋषींना योग्य अशा अहिंसालक्षण व्रताचा आश्रय करून, पृथिवीवर यथेष्ट संचार करूं लागला ॥ ४२ ॥ तो मुनि, कार्य आणि कारण यांहून पलीकडचें, तिन्ही गुणांचा प्रकाश करणारें आणि एकनिष्ठ भक्तीच्या योगानें अपरोक्षत्वें करून जाणलेंजाणारें जें निर्गुण ॥ ७॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ब्रह्म त्याचेठिकाणीं आपलें मन लावून ॥ ४३ ॥ देहाचेठायीं अभिमानरहित व स्त्रीपुत्रादिकांचेठायीं ममतारहित, सुखदुःखादि द्वंद्वरहित, वैरभावरहित, सर्वत्र समदृष्टि ठेवणारा, स्वतःचें स्वरूप जाणणारा, तसाच ज्याच्या लाटा शांत झाल्या आहेत अशा सागराप्रमाणें शांत व विषयांवरून परावृत्त करून परमात्म्याकडे लाविलेल्या शांत बुद्धीनें युक्त व धैर्यवान् असा होऊन, ॥ ४४ ॥ तो आपल्या उत्कट भक्तियोगाच्या योगेंकरून सर्वज्ञ व अंतर्यामी जो भगवान् वासुदेव त्याचेठिकाणीं आपलें अंतःकरण स्थिर करून अज्ञानबंधापासून मुक्त होत्साता, ॥ ४५ ॥ सर्व प्राणिमात्रांचेठिकाणीं व्यापून असणाऱ्या व्यापक भगवंताला आणि त्या भगवंताचेठिकाणीं असणाऱ्या सर्व भूतांना अभेदबुद्धीनें पाहूं लागला ॥ ४६ ॥ तेव्हां इच्छा व द्वेष या मनोधर्मांनीं रहित, सर्वठिकाणीं समबुद्धि आणि भगवद्भक्तियुक्त अशा त्या कर्दम ऋषीला,

---

ब्रह्मणि गुणावभासके निर्गुणे एकभक्त्याऽव्यभिचारिण्या भक्त्याऽनुभाविते ऽपरोक्षीकृते ॥ ४३ ॥ अतो देहादिष्वहंकारादिरहितः अतएव निर्द्वंद्वः शीतोष्णाद्यनाकुलः समदृग्भेदाग्राहकः किंतु स्वदृक् स्वमेव पश्यन् प्रत्यक् प्रवणा शांता विक्षेपरहिता धीर्यस्य ॥ ४४ ॥ तदेवंविधकल्पितोपाधिनिवृत्तिमुक्त्वा परमेश्वरपदप्राप्तिमाह । वासुदेव इति त्रिभिः । प्रतीचो जीवस्यात्मनि लब्ध आत्मा चित्तं येन यतो मुक्तं बंधनमज्ञानं यस्य ॥ ४५ ॥ लब्धात्मतामेवाह । आत्मानमिति ॥ ४६ ॥ तदेवं तेन

निरहंकृतिर्निर्ममश्च निर्द्वंद्वः समदृक् स्वदृक् ॥ प्रत्यक् प्रशांतधीर्धीरः प्रशांतोर्मिरिवोदधिः ॥ ४४ ॥ वासुदेवे भगवति सर्वज्ञे प्रत्यगात्मनि ॥ परेण भक्तिभावेन लब्धात्मा मुक्तबंधनः ॥ ४५ ॥ आत्मानं सर्वभूतेषु भगवंतमवस्थितम् ॥ अपश्यत्सर्वभूतानि भगवत्यपि चात्मनि ॥ ४६ ॥ इच्छाद्वेषविहीनेन सर्वत्र समचेतसा ॥ भगवद्भक्तियुक्तेन प्राप्ता भागवती गतिः ॥ ४७ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे तृतीयस्कंधे कापिलेये चतुर्विंशतितमोऽध्यायः ॥ २४ ॥ ॥ शौनक उवाच ॥ कपिलस्तत्त्वसंख्याता भगवानात्ममायया ॥ जातः स्वयमजः साक्षादात्मप्रज्ञप्तये नृणाम् ॥ १ ॥

भागवती गतिः प्राप्ता । पाठांतरे स एव तां गतिं प्राप्त इति ॥ ४७ ॥ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे तृतीयस्कंधे टीकायां चतुर्विंशोऽध्यायः ॥ २४ ॥ ॥ पंचविंशे जनन्या तु पृष्टो बंधविमोचनम् ॥ आदावाह परं भक्तिलक्षणं कपिलः सुतः ॥ १ ॥ कपिलेनार्पिता मात्रे गूढभावनियंत्रिता ॥ योगमाणिक्यमंजूषा स्फुटमुद्घाट्यतेऽधुना ॥ २ ॥ उक्तानुवादपूर्वकं कापिलं योगं पृच्छति । कपिल इति त्रिभिः । तत्त्वानां संख्याता गणकः सांख्यप्रवर्तक इत्यर्थः । अतएव स्वयं जातः आत्मप्रज्ञप्तये आत्मतत्त्वज्ञापनाय ॥ १ ॥

भगवद्भक्तांस प्राप्त होणारी अशी भागवतीगति प्राप्त झाली ॥ ४७ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील तृतीयस्कंधामध्यें कपिलाच्या आख्यानाविषयीं हा चोविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २४ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ ७ ॥ ॥ आतां या पंचविसाव्या अध्यायामध्यें, देवहूतिमातेनें आपल्या कपिलनामक पुत्राला प्रश्न केला असतां, त्यानें प्रथम, संसारबंधापासून मुक्त करणारें उत्तमप्रकारचें भक्तियोगाचें लक्षण तिला सांगितलें ही कथा वर्णन केली आहे ॥ १ ॥ कपिल महामुनीनें आपल्या देवहूतिमातेला जी योगरूप माणकांची पेटी अर्पण केली आहे, ती त्या कपिलाच्या गूढ अभिप्रायरूप झांकणानें झांकलेली असल्यामुळें ती आतां मी स्पष्टरीतीनें उघडून दाखवितों ॥ २ ॥ शौनक ऋषि ह्मणाला– हे सूता, प्रकृतिपुरुषादि तत्त्वांच्या संख्येचा प्रवर्तक जो साक्षात् भगवान् कपिल, तो स्वतः जन्मरहित असूनहि मनुष्यांना आत्म-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तत्त्वाचें ज्ञान करून देण्याकरितां उत्पन्न झाला ॥ १ ॥ सर्व पुरुषांमध्यें श्रेष्ठ आणि सर्व योग्यांमध्यें वरिष्ठ असा ह्या कपिल महामुनीच्या कीर्तीचें श्रवण करण्याविषयीं परमेश्वराचीं पुष्कळ चरित्रें श्रवण करणाऱ्याहि माझ्या इंद्रियांची पूर्णपणें तृप्ति होत नाहीं ॥ २ ॥ यास्तव आपल्या भक्तांच्या इच्छेप्रमाणें देह धारण करणारा भगवान्, जीं जीं कर्में करितो तीं सर्व कर्में वर्णन करण्यास योग्य आहेत, ह्मणून श्रद्धापूर्वक श्रवण करणाऱ्या मला तीं तूं वर्णन कर ॥ ३ ॥ सूत ह्मणाला– हे शौनक मुने, तूं जसा मला प्रश्न केलास याप्रमाणेंच विदुरानें आत्मविचारविषयीं प्रेरणा केलेला भगवान् व्यासस्खा मैत्रेय ऋषि, संतुष्ट होऊन विदुराच्या प्रश्नाप्रमाणें त्याला असें ह्मणाला कीं, ॥ ४ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, भगवान् कपिल महामुनि, पिता कर्दम ऋषि अरण्यांत निघून गेल्यानंतर मातेचें प्रिय करण्याच्या इच्छेनें कांहीं दिवस त्या बिंदुसरोवराच्या तीरींच राहिला होता

पुंसां मध्ये वर्ष्मणो वृद्धस्योत्तमस्येत्यर्थः । सर्वयोगिनां मध्ये वरिम्णः वरस्य भावो वरिमा भवितृप्रधानोऽयं निर्देशः । वरिष्ठस्येत्यर्थः । यद्वा वरीयस्त्वादित्यर्थः । विश्रुतौ कीर्तौ असव इंद्रियाणि भूर्यलं न तृप्यंति श्रुतेन श्रवणेन दीव्यति द्योतत इति तथा तस्य यद्वा । भूरि बहुशः श्रुतो देवो येन तस्यापि मेऽसव इति संबंधः ॥ २ ॥ स्वानां पुंसां छंदेनेच्छया आत्मा देहो यस्य सः यद्यत्कर्म विधत्ते तानि कर्माणि कीर्तनार्हाण्यनुकीर्तय ॥ ३ ॥ यथा त्वं मां प्रचोदयस्येवं प्रचोदितः सन् तथा तत्प्रश्नानुसारेण

नह्यस्य वर्ष्मणः पुंसां वरिम्णः सर्वयोगिनाम् ॥ विश्रुतौ श्रुतदेवस्य भूरि तृप्यंति मेऽसवः ॥ २ ॥ यद्यद्विधत्ते भगवान् स्वच्छं-
दात्माऽऽत्ममायया ॥ तानि मे श्रद्दधानस्य कीर्तन्यान्यनुकीर्तय ॥ ३ ॥ सूत उवाच ॥ द्वैपायनसखस्त्वेवं मैत्रेयो भगवांस्तथा ॥
प्राहेदं विदुरं प्रीत आन्वीक्षिक्यां प्रचोदितः ॥ ४ ॥ मैत्रेय उवाच ॥ पितरि प्रस्थितेऽरण्यं मातुः प्रियचिकीर्षया ॥ तस्मिन्बिंदुसरे-
ऽवात्सीद्भगवान् कपिलः किल ॥ ५ ॥ तमासीनमकर्माणं तत्त्वमार्गाग्रदर्शनम् ॥ स्वसुतं देवहूत्याह धातुः संस्मरती वचः ॥ ६ ॥
देवहूतिरुवाच ॥ निर्विण्णा नितरां भूमन्नसदिंद्रियतर्षणात् ॥ येन संभाव्यमानेन प्रपन्नांऽधं तमः प्रभो ॥ ७ ॥ तस्य त्वं तमसोंऽध-
स्य दुष्पारस्याद्य पारगम् ॥ सच्चक्षुर्जन्मनामंते लब्धं मे त्वदनुग्रहात् ॥ ८ ॥ य आद्यो भगवान्पुंसामीश्वरो वै भवान् किल ॥ लोकस्य
तमसांऽधस्य चक्षुः सूर्य इवोदितः ॥ ९ ॥ अथ मे देवसंमोहमपाक्रष्टुं त्वमर्हसि ॥ योऽवग्रहोऽहंममेतीत्येतस्मिन्योजितस्त्वया ॥ १० ॥

आन्वीक्षिक्यामात्मविद्यायाम् ॥ ४ ॥ बिंदुसरे बिंदुसरसि ॥ ५ ॥ तत्त्वमार्गस्याग्रं पारं दर्शयतीति तथा तम् । एष मानवि ते गर्भं प्रविष्टः कैटभार्दन इत्यादिधातुर्वचः ॥ ६ ॥ असतामिंद्रियाणां तर्षणाद्विषयाभिलाषान्निर्विण्णा श्रांताऽस्मि येन संभाव्यमानेन पूर्यमाणेन ॥ ७ ॥ पारं गमयतीति पारगं त्वमेव श्रेष्ठं चक्षुर्मे मया लब्धम् । त्वदनुग्रहाज्जन्मनामंते भाव्ये सति ॥ ८ ॥ तत्प्रपंचयति । स भगवान् भवांश्चक्षूरूप उदितः सूर्यो यथा ॥ ९ ॥ अपाक्रष्टुमपनेतुम् । कोऽसौ संमोहस्तमाह । एतस्मिन्देहादौ त्वयैव

॥ ५ ॥ एके दिवशीं ब्रह्मदेवाचें भाषण स्मरण करणारी देवहूति, आसनावर बसलेल्या, वस्तुतः कर्मरहित परंतु मुमुक्षूंना तत्त्वमार्गाचा सिद्धांत दाखविणाऱ्या त्या आपल्या पुत्राला ह्मणाली कीं, ॥ ६ ॥ देवहूति ह्मणाली– हे जगद्व्यापका प्रभो, मी ह्या दुर्निवार इंद्रियांच्या तृप्तीसाठीं विषयांच्या अभिलाषानें अगदीं कंटाळून गेल्यें आहें. आणि विषय देऊन त्या इंद्रियांची पूर्तता करितां करितां गाढ अंधकारांत (संसारांत) पडल्यें आहें ॥ ७ ॥ त्या संसाररूपी दुष्पार अंधकारांतून पार पाडणारा दिव्यचक्षुरूपी तूं, 'तुझ्या अनुग्रहानेंच आतां माझ्या जन्मांचा शेवट होण्याची वेळ आली असतां' मला प्राप्त झाला आहेस ॥ ८ ॥ जो षड्गुणैश्वर्यसंपन्न पुराण पुरुष ईश्वर, जीवांचा नियंता आहे व जो अज्ञानरूप तमानें अंध झालेल्या लोकांला उदय पावलेल्या सूर्याप्रमाणें ज्ञानचक्षु देणारा आहे, तोच तूं कपिल आहेस यांत संशय नाहीं ॥ ९ ॥ हे देवा, आतां ॥ ७॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तूं हा माझा महामोह दूर करून टाकावास. कारण, ह्या देहादिकांचेठिकाणीं हा मी आणि हें माझें इत्यादि दुराग्रह आणि त्यापासून झालेले प्रीतिवगैरे सर्व प्रकार तूंच उत्पन्न केले आहेस ॥ १० ॥ त्या तुला मी, प्रकृतिपुरुषांचें ज्ञान व्हावें ह्मणून शरण आल्यें आहें. तूं शरण जाण्यास योग्य व आपल्या भक्तांच्या संसाररूप वृक्षाचा छेद करणारी केवळ कुऱ्हाडच असून सद्धर्मवेत्त्यांमध्यें वरिष्ठ आहेस. अशा तुला मी नमस्कार करित्यें ॥ ११ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, याप्रमाणें पुरुषांना मोक्षाविषयीं प्रीति उत्पन्न करणारें आपल्या आईचें निर्दोष इच्छित ऐकिल्याबरोबर, मंदहास्याच्या योगानें ज्याच्या मुखाला शोभा आली आहे, व आत्मज्ञानसंपन्न पुरुषांचा अधिपति अशा त्या कपिलमहामुनीनें मनापासून त्याचें अभिनंदन करून भाषण करण्यास आरंभ केला ॥ १२ ॥ श्रीभगवान् ह्मणाला– हे माते, मनुष्यांना मोक्षप्राप्तीचा उपाय ह्मटला

योजितो योऽहंममेत्यवग्रह आग्रहः द्वितीय इतिशब्दस्तत्कार्यरागादिग्रहणार्थः ॥ १० ॥ प्रकृतेः पुरुषस्य च जिज्ञासया त्वामहं शरणं गता सती नमामीत्यन्वयः। कुठारं छेत्तारम् ॥ ११ ॥ अपवर्गवर्धनं मोक्षे रतिजनकम्। ईषत्स्मितेन शोभितमाननं यस्य ॥ १२ ॥ आध्यात्मिक आत्मनिष्ठः यत्र यस्मिन् ॥ १३ ॥ १४ ॥ तत्र सर्वांगनैपुण्यं चित्तसंय-

तं त्वा गताऽहं शरणं शरण्यं स्वभृत्यसंसारतरोः कुठारम् ॥ जिज्ञासयाऽहं प्रकृतेः पूरुषस्य नमामि सद्धर्मविदां वरिष्ठम् ॥ ११ ॥ मैत्रेय उवाच ॥ इति स्वमातुर्निरवद्यमीप्सितं निशम्य पुंसामपवर्गवर्धनम् ॥ धियाऽभिनंद्यात्मवतां सतां गतिर्बभाष ईषत्स्मितशोभिताननः ॥ १२ ॥ श्रीभगवानुवाच ॥ योग आध्यात्मिकः पुंसां मतो निःश्रेयसाय मे ॥ अत्यंतोपरतिर्यत्र दुःखस्य च सुखस्य च ॥ १३ ॥ तमिमं ते प्रवक्ष्यामि यमवोचं पुराऽनघ॥ ऋषीणां श्रोतुकामानां योगं सर्वांगनैपुणम् ॥ १४॥ चेतः खल्वस्य बंधाय मुक्तये चात्मनो मतम् ॥ गुणेषु सक्तं बंधाय रतं वा पुंसि मुक्तये ॥ १५ ॥ अहंममाभिमानोत्थैः कामलोभादिभिर्मलैः ॥ वीतं यदा मनः शुद्धमदुःखमसुखं समम् ॥ १६ ॥ तदा पुरुष आत्मानं केवलं प्रकृतेः परम् ॥ निरंतरं स्वयंज्योतिरणिमानमखंडितम् ॥ १७ ॥

माधीनमिति दर्शयन्नाह। चेत इति। अस्यात्मनो जीवस्य गुणेषु विषयेषु पुंसि परमेश्वरे वाशब्दस्तुशब्दार्थे ॥ १५ ॥ यथा च चित्तसंयमे पुरुषार्थसिद्धिस्तद्दर्शयति। अहमिति त्रिभिः। मलैर्वीतं विरहितं यदा शुद्धं मनो भवति। मनःशुद्धेर्ज्ञापकमाह। अदुःखमिति ॥ १६ ॥ निरंतरं निर्भेदम्। अणिमानं सूक्ष्मम्। अखंडितमपरिच्छिन्नम्॥ १७॥

ह्मणजे आत्म्याचेठिकाणीं पर्यवसान पावणारा योगच असें माझें मत आहे. कारण, जो योग प्राप्त झाला असतां, संसारसंबंधी दुःखाची व विषयसुखाची अत्यंत निवृत्ति होत्ये ॥ १३ ॥ हे पवित्रे माते, जो योगमार्ग पूर्वीं श्रवण करण्याची इच्छा करणाऱ्या ऋषींनां मी सांगितला होता, तोच हा सर्व अंगांनीं परिपूर्ण असा योगमार्ग आतां मी तुला सांगतों ॥ १४ ॥ हे माते, ह्या आत्म्याच्या बंधाला किंवा मुक्तीला कारण, चित्तच आहे ह्याशिवाय दुसरें कांहीं नाहीं. तें चित्त शब्दादि विषयांचेठिकाणीं आसक्त झालें ह्मणजे बंधाला कारण होतें आणि तेंच ईश्वराचेठिकाणीं रत झालें ह्मणजे मुक्तीला कारण होतें ॥ १५ ॥ जेव्हां तें मन, देहाचेठिकाणीं 'हा मी' असा अहंकार आणि पुत्रादिकांचेठिकाणीं 'हीं माझीं' असें ममत्व ह्या दोनप्रकारच्या अभिमानापासून उत्पन्न झालेल्या काम, लोभ इत्यादिक मलांनीं (विकारांनीं) रहित होऊन शुद्ध होतें, ह्मणजे त्याला सुख किंवा दुःख हीं दोन्ही प्राप्त न होतां समता पावतें ॥ १६ ॥ तेव्हां ज्ञान, वैराग्य आणि भक्ति यांनीं युक्त झालेल्या त्या मनाच्या योगेंकरून

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हा पुरुष, आपणास प्रकृतीहून पलीकडचा, केवळ भेदरहित, स्वयंप्रकाश, अतिसूक्ष्म, अखंडित आणि उदासीन आहें असें पहातो आणि प्रकृती क्षीणशक्ति झाली आहे असें पाहातो ॥ १७ ॥ १८ ॥ योगाभ्यास करणाऱ्या पुरुषांना ब्रह्मप्राप्ति होण्यास सर्वात्मरूप भगवंताचेठिकाणीं केलेल्या निष्काम भक्तीसारखा दुसरा सुखकारक मार्ग नाहीं ॥ १९ ॥ या सर्वांनाहि सत्संग मूळकारण आहे असें सांगतात.-दुष्ट लोकांचा समागम हाच जीवात्म्याला बंधन करणारा दृढपाश आहे असें विद्वान लोक ह्मणतात आणि तोच समागम स्थानें सत्पुरुषांचेठिकाणीं केला तर तें मोक्षाचें उघडें द्वार आहे असें समजावें ॥ २० ॥ सत्पुरुष कोणते? असें ह्मणशील तर, जे सहनशील, दयाळू, शत्रुरहित, सर्व प्राणिमात्रांचे मित्र, गंभीर स्वभावाचे, शास्त्रानुसार वर्तन करणारे व सुशील हेंच ज्यांचें भूषण आहे ते सत्पुष होत ॥ २१ ॥ आणि जे माझेठिकाणीं अनन्यभावानें दृढभक्ति करितात, माझ्या-

हतौजसं क्षीणबलाम् ॥ १८ ॥ मनःशुद्धौ च भक्तिरेवांतरंगसाधनमित्याह । नेति ॥ १९ ॥ अस्य सर्वस्यापि सत्संगो मूलमित्याह । प्रसंगमिति । अपावृतं निरावरणम् ॥ २० ॥ साधूनां लक्षणमाह । तितिक्षव इति चतुर्भिः । साधवः शास्त्रानुवर्तिनः साधु सुशीलं तदेव भूषणं येषाम् ॥ २१ ॥ २२ ॥ एतानुक्तलक्षणान्भक्तान् तापा

ज्ञानवैराग्ययुक्तेन भक्तियुक्तेन चात्मना ॥ परिपश्यत्युदासीनं प्रकृतिं च हतौजसम् ॥ १८ ॥ न युज्यमानया भक्त्या भगवत्यखिलात्मनि ॥ सदृशोऽस्ति शिवः पंथा योगिनां ब्रह्मसिद्धये ॥ १९ ॥ प्रसंगमजरं पाशमात्मनः कवयो विदुः ॥ स एव साधुषु कृतो मोक्षद्वारमपावृतम् ॥ २० ॥ तितिक्षवः कारुणिकाः सुहृदः सर्वदेहिनाम् ॥ अजातशत्रवः शांताः साधवः साधुभूषणाः ॥ २१ ॥ मय्यनन्येन भावेन भक्तिं कुर्वंति ये दृढाम् ॥ मत्कृते त्यक्तकर्माणस्त्यक्तस्वजनबांधवाः ॥ २२ ॥ मदाश्रयाः कथा मृष्टाः शृण्वंति कथयंति च ॥ तपंति विविधास्तापा नैतान्मद्गतचेतसः ॥ २३ ॥ त एते साधवः साध्वि सर्वसंगविवर्जिताः ॥ संगस्तेष्वथ ते प्रार्थ्यः संगदोषहरा हि ते ॥ २४ ॥ सतां प्रसंगान्मम वीर्यसंविदो भवंति हृत्कर्णरसायनाः कथाः ॥ तज्जोषणादाश्वपवर्गवर्त्मनि श्रद्धारतिर्भक्तिरनुक्रमिष्यति ॥ २५ ॥ भक्त्या पुमान् जातविराग ऐंद्रियाद्दृष्टश्रुतान्मद्रचनानुचिंतया ॥ चित्तस्य यत्तो ग्रहणे योगयुक्तो यतिष्यते ऋजुभिर्योगमार्गैः ॥ २६ ॥

आध्यात्मिकादयो न तपंति न व्यथयंति कुतः मद्गतं चेतो येषां तान् ॥ २३ ॥ ये तापैर्नाभिभूयंते ते साधव इत्यर्थः ॥ २४ ॥ सत्संगस्य भक्त्यंगतामुपपादयति । सतामिति । वीर्यस्य सम्यग्विद्वेदनं यासु ता वीर्यसंविदः हृत्कर्णयो रसायनाः सुखदाः तासां जोषणात्सेवनादपवर्गोऽविद्यानिवृत्तिर्वर्त्म यस्मिंस्तस्मिन्हरौ प्रथमं श्रद्धा ततो रतिस्ततो भक्तिरनुक्रमिष्यति क्रमेण भविष्यतीत्यर्थः ॥ २५ ॥ ततः किमत आह । भक्त्येति । मम रचना या सृष्ट्यादिलीला तस्या अनुचिंतया या भक्तिस्तया ऐंद्रियात्सुखाज्जात-

करितां व्यावहारिक सर्व कर्मांचा स्वजनांचा व बांधवांचा त्याग करितात, माझ्यासंबंधी शुद्ध कथेंचें श्रवण करितात अथवा वर्णन करितात, त्या माझेचठिकाणीं आसक्तचित्त असलेल्या भक्तांना संसारसंबंधी अनेक प्रकारचे ताप, दुःख उत्पन्न करित नाहींत ॥ २२ ॥ २३ ॥ हे साध्वि माते, सर्व संगपरित्याग करून राहिलेले पूर्वी सांगितलेल्या लक्षणाचे जे साधु आहेत; त्यांचाच समागम तुला संपादन केला पाहिजे. कारण, तेच सत्पुरुष दुष्ट पुरुषांच्या अथवा विषयांच्या संगतीपासून उत्पन्न झालेल्या जन्ममरणादि दोषांचा नाश करणारे आहेत ॥ २४ ॥ साधूंच्या समागमानेंच माझ्या पराक्रमाचें यथार्थ ज्ञान करून देणाऱ्या तशाच अंतःकरणाला व कर्णांना सुख देणाऱ्या कथेंचें श्रवण घडतें. ॥ ५ त्यांच्या सेवनानें मोक्षमार्गरूप हरीचेठिकाणीं प्रथम श्रद्धा, नंतर प्रीति आणि नंतर भक्ति ह्या अनुक्रमानें प्राप्त होतात ॥ २५ ॥ नंतर मी केलेल्या सृष्टिवगैरे लीलांच्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वारंवार चिंतनानें माझेठिकाणीं उत्पन्न झालेल्या भक्तीच्या योगानें, ह्या लोकीं दिसणाऱ्या व स्वर्गादि लोकांचेठिकाणीं ऐकण्यांत येणाऱ्या विषयसुखांपासून मनुष्याला वैराग्य उत्पन्न होतें आणि तो मनुष्य, आत्मसाधनाच्या तयारीला लागून योगाभ्यास करित होत्साता, भक्तिप्रधान अशा योगमार्गांनीं अंतःकरण स्वाधीन करण्याचा प्रयत्न करितो ॥ २६ ॥ तो पुरुष, मायेच्या गुणांपासून झालेल्या शब्दादि विषयांच्या सेवनाचा त्याग करून वैराग्यानें वृद्धिंगत झालेल्या ज्ञानानें, अष्टांगयोगानें आणि माझेठिकाणीं अर्पण केलेल्या भक्तीच्या योगानें, या देहामध्येंच सर्वांच्या अंतर्यामीं राहणाऱ्या माझी प्राप्ति करून घेतो ॥ २७ ॥ देवहूति ह्मणाली– हे कपिला, जिच्या योगानें मोक्षात्मक तुझ्या स्वरूपाला मी तत्काल सर्वात्मत्वेंकरून पावेन, ती तुझ्याठिकाणीं योग्य अशी भक्ति कोणती आहे? त्यांतहि मला (स्त्रियेला) योग्य अशी कोणत्या प्रकारची

विरागः सन् दृष्टश्रुतादैहिकामुष्मिकात् ततो यत्त उद्युक्तः संश्चित्तस्य ग्रहणे यतिष्यते ऋजुभिर्भक्तिप्रधानत्वादनायासैः ॥ २६ ॥ तदेवं प्रकृतेर्गुणानामसेवया ज्ञानादिभिश्चायं जीव इहैव देहे मामेवावरुंधे प्राप्नोति ॥ २७ ॥ काचिदिति । कास्विदित्यर्थः । उचिता योग्या तत्रापि मम स्त्रियाः कीदृशी गोचरा योग्या । निर्वाणं मोक्षात्मकं तव पदं स्वरूपमन्वाश्नवै अनंतरमेव सर्वात्मना प्राप्स्यामि । अंजसा त्विति पाठे अहं त्विति संबंधः ॥ २८ ॥ भगवद्बाणो यो भगवंतं लक्षीकरोतीत्यर्थः । यतो यस्माद्योगात् ॥ २९ ॥

असेवयाऽयं प्रकृतेर्गुणानां ज्ञानेन वैराग्यविजृंभितेन ॥ योगेन मय्यर्पितया च भक्त्या मां प्रत्यगात्मानमिहावरुंधे ॥ २७ ॥ देवहूतिरुवाच ॥ काचित्त्वय्युचिता भक्तिः कीदृशी मम गोचरा ॥ यया पदं ते निर्वाणमंजसाऽन्वश्नवा अहम् ॥ २८ ॥ यो योगो भगवद्बाणो निर्वाणात्मंस्त्वयोदितः ॥ कीदृशः कति चांगानि यतस्तत्त्वावबोधनम् ॥ २९ ॥ तदेतन्मे विजानीहि यथाऽहं मंदधीर्हरे ॥ सुखं बुद्ध्येय दुर्बोधं योषा भवदनुग्रहात् ॥ ३० ॥ मैत्रेय उवाच ॥ विदित्वाऽर्थं कपिलो मातुरित्थं जातस्नेहो यत्र तन्वाऽभिजातः ॥ तत्त्वाम्नायं यत्प्रवदंति सांख्यं प्रोवाच वै भक्तिवितानयोगम् ॥ ३१ ॥ श्रीभगवानुवाच ॥ देवानां गुणलिंगानामानुश्रविककर्मणाम् ॥ सत्व एवैकमनसो वृत्तिः स्वाभाविकी तु या ॥ ३२ ॥

विजानीहि विशेषेण ज्ञापय सुखमनायासेन ॥ ३० ॥ इत्थं मातुरर्थं प्रयोजनं विदित्वा । जातस्नेहत्वे हेतुः । यत्र यस्यां तन्वा देहेनाविर्भूतः तत्त्वान्याम्नायंतेऽनुक्रम्यंते यस्मिन् । किं तत् । यत्सांख्यं प्रवदंति तत्प्रोवाच भक्तिवितानं च योगं च ॥ ३१ ॥ काचित्त्वय्युचिता भक्तिरिति पृष्टामुत्तमां भक्तिं लक्षयति गुणा विषया लिंग्यंते ज्ञायंते यैस्तेषां देवानां द्योतनात्मकानामिंद्रियाणां तदधिष्ठातॄणां वा सत्त्वे सत्त्वमूर्तौ हरावेव या वृत्तिः सा भक्तिः सिद्धेर्मुक्तेरपि गरीयसीत्युत्तरेणान्वयः। कथंभूता। अनिमित्ता निष्कामा स्वाभाविक्यप्रयत्नसिद्धा। तेषामेवंविधवृत्तौ हेतुमाह । गुरोरुच्चारणमनुश्रूयत इत्यनुश्रवो वेदस्तद्विहितमानुश्रविकं तदेव कर्म येषाम् । अतएवैकमेकरूपमविकृतं मनो

आहे? ॥ २८ ॥ हे मोक्षस्वरूपा, तूं भगवंताची प्राप्ती करून देणारा जो योग सांगितलास कीं, ज्याच्या योगानें तत्त्वज्ञान होतें तो कसा करावयाचा? व त्याचीं अंगें किती आहेत? ॥ २९ ॥ हे भक्तसंकटनाशका देवा, मंदबुद्धि अशी स्त्री मी, समजण्यास फार कठीण अशा त्या योगमार्गाला, तुझ्या अनुग्रहानें जशी अनायासानें समजेन, तसें मला समजून सांग ॥ ३० ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, कपिल मुनि, जिच्या उदरीं स्वतः शरीर धारण करून उत्पन्न झाला, त्या मातेचा असा अभिप्राय जाणून, दयायुक्त होऊन त्यानें मातेला, ज्याच्यामध्यें प्रकृति आदिकरून तत्त्वांचें निरूपण आहे व ज्याला लोकांमध्यें सांख्यशास्त्र असें ह्मणतात त्याचें, भक्तीच्या विस्ताराचें व योगाचें उत्तमप्रकारें कथन केलें ॥ ३१ ॥ श्रीभगवान् ह्मणाला– हे माते, शुद्धचित्त असलेल्या पुरुषाचीं विषयांचें ज्ञान संपादन करून देणारीं व वेदोक्त कर्मं करणारीं जीं इंद्रियें,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्यांची सत्त्वमूर्ति श्रीहरीच्या ठिकाणींच यत्नावांचून सिद्ध झालेली जी निष्काम वृत्ति तीच भगवद्भक्ति होय. ती अणिमादि सिद्धीपेक्षां अधिकयोग्यतेची आहे. ती भक्ति जसा जठराग्नि प्राण्यानें भक्षण केलेलें अन्न सहज पचन करून नाहींसें करून टाकितो त्याप्रमाणें लिंगदेहाचा नाश करून टाकित्ये. त्यावेंच नांव मोक्ष होय ॥ ३२ ॥ ३३ ॥ आतां मुक्तीपेक्षां भक्ति श्रेष्ठ कशी तें सांगतों— हे माते, कितीएक भक्त माझ्याकरितांच सर्व व्यापार करणारे असून माझ्या चरणसेवेंत निमग्न होत्साते, माझ्याशीं सायुज्य मुक्ति प्राप्त होण्याचीसुद्धां इच्छा करीत नाहींत, तर ते भगवद्भक्त, एकेठिकाणीं मिळून प्रेमपूर्वक माझ्या लीलांचें परस्पर वर्णन मात्र करितात ॥ ३४ ॥ हे आई, आणि तेच

यस्य पुंसः शुद्धसत्त्वस्येत्यर्थः ॥ ३२ ॥ मुक्तिश्च प्रासंगिकी भवत्येवेत्याह । या भक्तिः कोशं लिंगशरीरं जरयति क्षपयति । स्वप्रयत्नं विनैव सिद्धौ दृष्टांतः । निगीर्णं भुक्तमन्नमनलो जाठरो यथा जरयतीति ॥ ३३ ॥ भक्तेर्गरिष्ठत्वमेवोपपादयति । नैकात्मतामिति पंचभिः । एकात्मतां सायुज्यमोक्षं मदर्थमीहा क्रिया येषाम् । प्रसज्ज्यासक्तिं कृत्वा पौरुषाणि वीर्याणि ॥ ३४ ॥ प्रसन्नानि वक्त्राण्यरुणानि लोचनानि च येषु तैर्मद्रूपैः साकं सह नित्यं परमेश्वरानुभवसुखं भक्तावधिकमिति भावः ॥ ३५ ॥ आत्मानं-दस्त्ववश्यं भावीत्याह । तैरिति । दर्शनीया मनोहरा अवयवा मुखनेत्रादयो येषु तैः हृत आत्मा चित्तं येषाम् । हृता आकृष्टाः प्राणाश्चेंद्रियाणि येषां तान्भजतोऽनिच्छत

अनिमित्ता भागवती भक्तिः सिद्धेर्गरीयसी ॥ जरयत्याशु या कोशं निगीर्णमनलो यथा ॥ ३३ ॥ नैकात्मतां मे स्पृहयंति केचिन्म-त्पादसेवाऽभिरता मदीहाः ॥ येऽन्योन्यतो भागवताः प्रसज्य सभाजयंते मम पौरुषाणि ॥ ३४ ॥ पश्यंति ते मे रुचिराण्यंब संतः प्रसन्नवक्त्रारुणलोचनानि ॥ रूपाणि दिव्यानि वरप्रदानि साकं वाचं स्पृहणीयां वदंति ॥ ३५ ॥ तैर्दर्शनीयावयवैरुदारविलासहासे-क्षितवामसूक्तैः ॥ हृतात्मनो हृतप्राणांश्च भक्तिरनिच्छतो मे गतिमण्वीं प्रयुंक्ते ॥ ३६ ॥ अथो विभूतिं मम मायाविनस्तामैश्वर्यमष्टांग-मनुप्रवृत्तम् ॥ श्रियं भागवतींवा ऽस्पृहयंति भद्रां परस्य मे तेऽश्नुवते तु लोके ॥ ३७ ॥

इच्छाहीनानप्यण्वीं गतिं मुक्तिं प्रयुंक्ते प्रापयति । कैः साधनैर्हृतात्मनः उदारैर्विलासादिभिः तत्र विलासो लीला वामं मनोहरं सूक्तं मधुरभाषणम् ॥ ३६ ॥ विभूत्यादिकं च तत्राधिकमित्याह । अथो अविद्यानिवृत्त्यनंतरं विभूतिं सत्यलोकादिगतां भोगसंपत्तिमणिमाद्यष्टांगमैश्वर्यमनुप्रवृत्तं भक्तिमनु स्वतएव प्राप्तमपि भागवतीं च श्रियं वैकुंठस्थां संपत्तिमस्पृहयंति । ते यद्यपि न स्पृहयंतीत्यर्थः । तथापि लोके वैकुंठे अश्नुवते तु प्राप्नुवंत्येव ॥ ३७ ॥

भगवद्भक्त, प्रसन्नमुख व आरक्तनेत्र यांनीं युक्त अशीं इच्छित वर देणारीं माझीं सुंदर दिव्य रूपें अवलोकन करितात व त्यांच्याबरोबर श्रवण करण्यास योग्य अशीं प्रेमळ भाषणें करितात ॥ ३५ ॥ तेव्हां मनोहर असे मुखनेत्रादिक अवयव, उदार लीला, मंदहास्ययुक्त अवलोकन आणि मधुर भाषण ह्यांनीं युक्त अशा त्या माझ्या रूपांनीं, ज्यांचीं मनें व इंद्रियें जणुं आपणाकडे ओढून घेतलीं आहेत असे ते माझे भक्त, मोक्षाची इच्छा करीत नसतांहि ती भक्तिच त्यांना मोक्षाची प्राप्ति करून देत्ये ॥ ३६ ॥ अज्ञाननिवृत्ति झाल्यानंतर ते भगवद्भक्त मायेचा नियंता अशा माझ्या सत्यलोकादिकांचेठिकाणीं असलेल्या भोगसंपत्तींची, किंवा भक्तीच्या मागून आपोआप प्राप्त झालेल्या अणिमा महिमा इत्यादिक आठ प्रकारच्या ऐश्वर्यांची अथवा वैकुंठावेठिकाणीं असलेल्या सुखकारक संपत्तींची जरी इच्छा करीत नाहींत तथापि माझ्या वैकुंठ-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लोकाचेठिकाणीं त्यांना त्या संपत्ति प्राप्त होतातच ॥ ३७ ॥ वैकुंठ हाही एक लोक असल्यामुळें स्वर्गादिकांप्रमाणें तेथेंहि भोक्त्यांचा व भोगांचा नाश होत असेल अशी शंका घेशील तर हे शांतरूपे माते, ज्यांचा प्रिय, आत्मा, पुत्र, सखा, गुरु, सुहृद आणि इष्ट दैवत, हीं सर्व मीच आहें त्या मत्परायण भक्तांचा कोणत्याहि प्रकारें नाश होत नाहीं कारण, माझें कालचक्र, त्यांचा ग्रास करीत नाहीं ॥ ३८ ॥ हे माते, इहलोक तसाच परलोक व त्या दोन्हीं लोकांमध्यें गमन करणारा देह व त्या देहाच्या संबंधानें येथें असणारीं जीं ऐश्वर्यें, पशु व गृहें त्यांचा व इतरहि सर्व विषयांचा त्याग करून अनन्यभक्तीच्या योगानें सर्वसाक्षी अशा माझें जे भजन करितात, त्यांना मी

नन्वेवं तर्हि लोकत्वाविशेषात्स्वर्गादिवद्भोक्तृभोग्यानां कदाचिद्विनाशः स्यात्तत्राह। हेशांतरूपे यद्वा शांतं शुद्धसत्त्वं तद्रूपे वैकुंठे मत्पराः कदाचिदपि न नंक्ष्यंति भोग्यहीना न भवंति। अनिमिषो मे हेतिर्मदीयं कालचक्रं च नो लेढि तान्न ग्रसति। तत्रहेतुर्येषामिति। सुत इव स्नेहविषयः सखेव विश्वासास्पदम्। गुरुरिवोपदेष्टा सुहृदिव हितकारी इष्टं दैवमिव पूज्यः एवं सर्वभावेन मां ये भजंति तान्मदीयं कालचक्रं न ग्रसतीत्यर्थः ॥ ३८ ॥ एवंभूतां तु मुक्तिमेकांतभक्तेभ्यो ददामीत्याह। इममिति द्वाभ्याम्। उभयायिनं लोकद्वयगामिनमात्मानं सोपाधिकमात्मानमनु ये पुत्रकलत्रादयो ये च पश्वादयः। रायः धनानि ॥ ३९ ॥ अन्यांश्च परिग्रहान् मृत्योः संसारादतिपारयेऽतितारयामि ॥ ४० ॥ अभक्तानां

न कर्हिचिन्मत्पराः शांतरूपे नंक्ष्यंति नो मे निमिषो लेढि हेतिः ॥ येषामहं प्रिय आत्मा सुतश्च सखा गुरुः सुहृदो दैवमिष्टम्
॥ ३८ ॥ इमं लोकं तथैवामुमात्मानमुभयायिनम् ॥ आत्मानमनु ये चेह ये रायः पशवो गृहाः ॥ ३९ ॥ विसृज्य सर्वानन्यांश्च
मामेवं विश्वतोमुखम् ॥ भजंत्यनन्यया भक्त्या तान्मृत्योरतिपारये ॥ ४० ॥ नान्यत्र मद्भगवतः प्रधानपुरुषेश्वरात् ॥ आत्मनः
सर्वभूतानां भयं तीव्रं निवर्तते ॥ ४१ ॥ मद्भयाद्वाति वातोऽयं सूर्यस्तपति मद्भयात् ॥ वर्षतींद्रो दहत्यग्निर्मृत्युश्चरति मद्भयात्
॥ ४२ ॥ ज्ञानवैराग्ययुक्तेन भक्तियोगेन योगिनः ॥ क्षेमाय पादमूलं मे प्रविशंत्यकुतोभयम् ॥ ४३ ॥ एतावानेव लोकेऽस्मिन्पुंसां
निःश्रेयसोदयः ॥ तीव्रेण भक्तियोगेन मनो मय्यर्पितं स्थिरम् ॥ ४४ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे तृतीयस्कंधे कापिलेयोपा-
ख्याने पंचविंशतितमोऽध्यायः ॥ २५ ॥

तु कथंचिदपि न मोक्ष इत्याह। नेति। मद्भगवतोऽन्यत्र भगवतो मत्तो विना सर्वभूतानामात्मनः भगवदादिविशेषणत्रयेण सामर्थ्यं निरपेक्षत्वं हितकारित्वं चोक्तम् ॥ ४१ ॥ ऐश्वर्यं स्फुटयति। मद्भयादिति। श्रुतिश्च भीषाऽस्माद्वातः पवते। भीषोदेति सूर्यः। भीषास्मादग्निश्चेंद्रश्च। मृत्युर्धावति पंचम इति ॥ ४२ ॥ मद्भजनादेव मोक्ष इत्यत्र सदाचारं प्रमाणयति। ज्ञानेति ॥ ४३ ॥ उपसंहरति। एतावानिति। मय्यर्पितं सन्मनः स्थिरं भवतीति यदेतावानेव ॥ ४४ ॥ इति श्री० तृती० टीकायां पं० ॥ २५ ॥

मृत्युरूप संसारापासून पार पाडितों ॥ ३९ ॥ ४० ॥ हे माते, प्रकृतिपुरुषांचा नियंता, सर्व भूतांचा आत्मा आणि षड्गुणैश्वर्यसंपन्न असा जो मी परमात्मा त्यावांचून दुसरेठिकाणीं हें तीव्र संसारभय निवृत्त होत नाहीं ॥ ४१ ॥ हा वारा, माझ्या भीतीनेंच वाहत असतो, सूर्य माझ्या भयानेंच प्रकाश पाडतो, इंद्र माझ्या भीतीनेंच वृष्टि करितो, अग्नि दहन करितो आणि मृत्युहि माझ्याच भीतीनें संचार करितो ॥ ४२ ॥ यास्तव, योगी पुरुष आपलें कल्याण करून घेण्याकरितां ज्ञान आणि वैराग्य यांनीं युक्त असलेल्या भक्तियोगानें निर्भय अशा माझ्या चरणास शरण येतात ॥ ४३ ॥ या लोकामध्यें तीव्र भक्तियोगानें माझेठिकाणीं अर्पण केलेलें मन स्थिर होतें, असें जें होणें इतकाच पुरुषांच्या मोक्षप्राप्तीचा उदय होय ॥ ४४ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील तृतीयस्कंधामध्यें हा पंचविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २५ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां या सविस्ताच्या अध्यायामध्यें पुरुष आणि प्रकृति यांचें निरनिराळें ज्ञान होण्यासाठीं सांख्यशास्त्राच्या क्रमानें सर्व तत्त्वांची उत्पत्ति, लक्षणभेदेंकरून वर्णन केली आहे ॥ १ ॥ श्रीभगवान् ह्मणाला—हे माते, इतका वेळ मी तुला भक्तियोग सांगितला, आतां तुला तत्त्वांचीं वेगवेगळीं लक्षणें सांगतों. तीं लक्षणें जाणिलीं असतां, पुरुष मायेच्या गुणांपासून मुक्त होतो ॥ १ ॥ हे माते, अहंकाररूप हृदयग्रंथींचा भेद करणारें जें आत्मदर्शनरूप ज्ञान, तें पुरुषाच्या मोक्षप्राप्तीस कारण आहे असें ह्मणतात. तें ज्ञान तत्त्वांच्या लक्षणांच्या ज्ञानानें होतें; ह्मणून तत्त्वांचीं लक्षणें सांगण्याच्या क्रमानें तें ज्ञानच मी तुला वर्णन करितों ॥ २ ॥ प्रथमतः

षड्विंशे पुंप्रकृत्योस्तु विवेकायोपवर्ण्यते ॥ सांख्येन सर्वभावानां जन्म लक्षणभेदतः ॥ १ ॥ धात्रा पुत्राय यत्प्रोक्तं क्षत्रे मित्रासुतेन यत् ॥ मात्रे सांख्यं तदध्यात्मं प्राधान्येनाह तत्त्ववित् ॥ २ ॥ तत्त्वाम्नायं यत्प्रवदंति सांख्यमित्यत्र सांख्यं भक्तिर्योगश्चेति त्रयमुपक्षिप्तम् । तत्र भक्तिमुक्त्वेदानीं सांख्यमाह । अथेति ॥ १ ॥ ननु मुक्तिरात्मज्ञानादेव नतु तत्त्वलक्षणज्ञानात् । तमेव विदित्वाऽतिमृत्युमेति इति श्रुतेरत आह । ज्ञानमिति । आत्मदर्शनरूपं ज्ञानमतएव हृदयग्रंथिभेदनमहंकारनिवर्तकं निःश्रेयसप्रयोजनाय यदाहुस्तत्ते वर्णयामि । तत्त्वलक्षणज्ञानादेव विविक्तात्मज्ञानं भवतीति भावः ॥ २ ॥ तत्र पुरुषं लक्षयति । अनादिरिति । आत्मैव पुरुषः कोऽसावात्मा प्रत्यक्प्रतिलोमं धाम स्फूर्तिर्यस्य । क्षणिकपक्षं व्यावर्तयति । अनादिरिति । संसारित्वपक्षं व्यावर्तयति । प्रकृतेः परः अन्योऽसंगः । ज्ञानादिगुणत्वं वारयति निर्गुणः मीमांसकाद्य-

श्रीभगवानुवाच ॥ अथ ते संप्रवक्ष्यामि तत्त्वानां लक्षणं पृथक् ॥ यद्विदित्वा विमुच्येत पुरुषः प्राकृतैर्गुणैः ॥ १ ॥ ज्ञानं निःश्रेय-सार्थाय पुरुषस्यात्मदर्शनम् ॥ यदाहुर्वर्णये तत्ते हृदयग्रंथिभेदनम् ॥ २ ॥ अनादिरात्मा पुरुषो निर्गुणः प्रकृतेः परः ॥ प्रत्यग्धा-मा स्वयंज्योतिर्विश्वं येन समन्वितम् ॥ ३ ॥ स एष प्रकृतिं सूक्ष्मां दैवीं गुणमयीं विभुः ॥ यदृच्छयैवोपगतामभ्यपद्यत लीलया ॥ ४ ॥ गुणैर्विचित्राः सृजतीं सरूपाः प्रकृतिं प्रजाः ॥ विलोक्य मुमुहे सद्यः स इह ज्ञानगूहया ॥ ५ ॥

भिमतज्ञानविषयत्वं वारयति । स्वयंज्योतिः अनेनैव प्राभाकराभिमतं ज्ञानाधारत्वेन स्फुरणमपि निरस्तम् । स्वयंज्योतिष्ट्वे हेतुः । विश्वं येन समन्वितं प्रकाशत इति शेषः । एतैरेव हेतुभिः पुरुषस्य प्रकृतेः परत्वमपि सिद्धम् ॥ ३ ॥ अत्रावरणविक्षेपशक्तिभेदेन प्रकृतिर्द्विविधा तत्रावरणशक्त्या सैव जीवोपाधिरविद्या विक्षेपशक्त्या सैव माया पारमेश्वरी । पुरुषश्च जीवेश्वररूपेण द्विविधः तत्र यः प्रकृत्यविवेकेन संसरति स जीवः यस्तु प्रकृतिं वशीकृत्य विश्वसृष्ट्यादि करोति स ईश्वरः । तत्र प्रकृत्यविवेकेन जीवस्य संसारप्रकारमाह । स एष इति पंचभिः । सूक्ष्मामव्यक्तां दैवीं देवस्य विष्णोः शक्तिं लीलयोपगतां यदृच्छयैवाभ्यपद्यतेत्यन्वयः ॥ ४ ॥ तस्या लीलामाह । गुणैरिति । ज्ञानं गूहयत्यावृणोतीति ज्ञानगूहा तया । तथाच श्रुतिः । अजामेकां लोहितशुक्लकृष्णां बह्वीं प्रजां जनयंतीं सरूपाम् ॥ अजो ह्येको जुषमाणोऽनुशेते जहात्येनां भुक्तभोगामजो-

---

पुरुषांचें लक्षण सांगतों—हे माते, ज्याच्या योगानें व्याप्त झालेलें हें विश्व प्रकाश पावतें तो आत्माच पुरुष होय. तो स्वयंप्रकाश, अंतर्ज्ञानरूपी, प्रकृतीहून पर, निर्गुण आणि अनादि आहे ॥ ३ ॥ आवरण आणि विक्षेप अशा दोनप्रकारच्या शक्तिभेदानें प्रकृतीचे अविद्या आणि माया असे दोन भेद झाले आहेत, त्यांत अविद्या ही ज्ञानाचें आच्छादन करणारी जीवाची उपाधि होय, आणि माया ही ब्रह्मांडाचा पसारा करणारी ईश्वराची उपाधि होय. पुरुषाचेही जीव आणि ईश्वर असे दोन भेद आहेत. त्यांत जीव हा, प्रकृतीच्या अज्ञानानें संसार पावतो, ईश्वर हा, प्रकृतीला स्वाधीन ठेऊन जगाचे उत्पत्तिस्थितिसंहार करितो. आतां प्रकृतीच्या अज्ञानानें जीवाला संसार कसा होतो तें पांच श्लोकांनीं सांगतात—त्याच व्यापक (जीवरूपी) पुरुषानें, विष्णूची त्रिगुणात्मक शक्ति जी प्रकृति ती लीलेनें जवळ आली असतां तिचा सहजगत्या अंगीकार केला ॥ ४ ॥ सत्त्व,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रज आणि तम ह्या तीन गुणांच्या योगानें आपल्यासारख्या त्रिगुणात्मक अनेक प्रकारच्या प्रजा उत्पन्न करणाऱ्या त्या प्रकृतीला पाहून तो जीव, ज्ञानाचें आवरण करणाऱ्या तिच्या योगानें तत्काल मोहित झाला, ह्मणजे आपल्या मूळच्या स्वरूपास विसरला ॥ ५ ॥ अशा रीतीनें पुरुष, प्रकृतीच्या अध्यासेंकरून, प्रकृतीच्या गुणांनीं कर्मे केलीं असतां, तीं मीच केलीं असें त्या कर्मांचें कर्तृत्व आपल्याठिकाणीं मानितो ॥ ६ ॥ तें मानणेंच, अकर्ता, साक्षी, ईश्वर व सुखस्वरूपी अशा ह्या पुरुषाला (जीवाला) जन्मरणरूप संसारबंधाचें कारण होतें व त्या कर्मबंधानें केलेलें परतंत्रत्वहि प्राप्त होतें ॥ ७ ॥ पुरुषाला, शरीर इंद्रियें आणि देवता ह्यांचे धर्म प्राप्त होण्याला कारण प्रकृति होय आणि सुखांच्या किंवा दुःखांच्या भोक्तृत्वाचें कारण, प्रकृतीहून वेगळा असणारा पुरुष होय. ह्मणजे कूटस्थाला स्वतः विकार नसल्यामुळें प्रकृतीचा परिणामभूत

ऽन्यः इति । मुमुहे आत्मानं विस्मृतवान् ॥ ५ ॥ पराभिध्यानं प्रकृत्यध्यासस्तेन प्रकृतेर्गुणैः कर्मसु क्रियमाणेषु कर्तृत्वमात्मनि मन्यते ॥ ६ ॥ तदिति कर्तृत्वमननमेव अस्य पुरुषस्य साक्षिमात्रत्वादकर्तुरेव सतः कर्मभिर्बंधः ईशस्यापरतंत्रस्यैव कर्मबंधकृतं भोगे पारतंत्र्यं निर्वृतात्मनः सुखात्मकस्यैव संसृतिर्जन्ममृत्युप्रवाहः प्रकृत्यविवेककृतमेतत्सर्वं भवतीत्यर्थः ॥ ७ ॥ ननु चैतन्यसामानाधिकरण्येनैव कर्तृत्वादिप्रतीतेः स्वस्यैव तदंगीक्रियतां नेत्याह । कार्यं शरीरं कारणमिंद्रियं कर्ता देवतावर्गः तद्भावापत्तौ पुरुषस्य प्रकृतिं कारणं विदुः । कूटस्थस्य स्वतो विकाराभावात्प्रकृतिपरिणामभूतदेहाद्यहंकारकृतमेव कर्तृत्वादिकमित्यर्थः । भोक्तृत्वे तु पुरुषं कारणं विदुरित्यस्यायं भावः । यद्यप्यहंकार-

एवं पराभिध्यानेन कर्तृत्वं प्रकृतेः पुमान् ॥ कर्मसु क्रियमाणेषु गुणैरात्मनि मन्यते ॥ ६ ॥ तदस्य संसृतिर्बंधः पारतंत्र्यं च तत्कृतम् ॥ भवत्यकर्तुरीशस्य साक्षिणो निर्वृतात्मनः ॥ ७ ॥ कार्यकारणकर्तृत्वे कारणं प्रकृतिं विदुः ॥ भोक्तृत्वे सुखदुःखानां पुरुषं प्रकृतेः परम् ॥ ८ ॥ देवहूतिरुवाच ॥ प्रकृतेः पुरुषस्यापि लक्षणं पुरुषोत्तम ॥ ब्रूहि कारणयोरस्य सदसच्च यदात्मकम् ॥ ९ ॥ श्रीभगवानुवाच ॥ यत्तत्त्रिगुणमव्यक्तं नित्यं सदसदात्मकम् ॥ प्रधानं प्रकृतिं प्राहुरविशेषं विशेषवत् ॥ १० ॥ पंचभिः पंचभिर्ब्रह्म चतुर्भिर्दशभिस्तथा ॥ एतच्चतुर्विंशतिकं गणं प्राधानिकं विदुः ॥ ११ ॥

गतमेव कर्तृत्वादिकं भोक्तृत्वं च तथाऽपि विकारस्य जडावसानत्वादुपाधिप्राधान्यं भोगस्य चिदवसानत्वादुपहितप्राधान्यमिति ॥ ८ ॥ तदेवं संसारिणं पुरुषं तद्धेतुं प्रकृतिं च ज्ञात्वेदानीं जगत्कारणमीश्वरं तत्प्रकृतिं च पृच्छति । प्रकृतेरिति । अस्य विश्वस्य सदसच्च स्थूलं सूक्ष्मं च कार्यं यदात्मकं तयोः प्रकृतिपुरुषयोः ॥ ९ ॥ तत्र प्रकृतिं लक्षयति । यत्प्रधानं तदेव प्रकृतिं प्राहुः । किं तत्प्रधानं स्वतोऽविशेषम् । विशेषवद्विशेषाणामाश्रयः तर्हि किं ब्रह्म न । त्रिगुणम् । किं महत्तत्त्वादि न अव्यक्तमकार्यम् । किं कालादि न सदसदात्मकं कार्यकारणरूपम् । किं जीवः प्रकृतिः न नित्यम् ॥ १० ॥ अन्येषां तत्त्वानां लक्षणं वक्तुं तानि गणयति । पंचभिरित्यादि । संख्याभेदेनैतच्चतु-

जो देहादिकांचेठिकाणीं असलेला अहंकार त्याचेठिकाणींच जरी कर्तृत्वादिक सर्व धर्म अनुभवास येतात तथापि त्या अहंकाराला जडत्व असल्यामुळें भोग हा धर्म चैतन्यरूपी पुरुषाच्याठिकाणींच पर्यवसान पावतो ॥८॥ देवहूति ह्मणाली–हे पुरुषश्रेष्ठा, स्थूल आणि सूक्ष्म कार्यें हीं ज्यांचें स्वरूप आहेत, त्या प्रकृतिपुरुषरूपी ह्या जगाच्या कारणभूत दोन्हीं तत्त्वांचें मला लक्षण सांग ॥ ९ ॥ श्रीभगवान् ह्मणाला–ज्यामध्यें कोणतेहि विशेष धर्म नाहींत पण जें विशेष धर्मांचा आधार आहे, ह्मणजे जसे आकाशामध्यें घटपटादि कोणतेहि पदार्थ नाहींत पण तें सर्व पदार्थांचा आधार आहे, तसें जें त्रिगुणात्मक, इंद्रियांना अगोचर, कार्यकारणात्मक आणि नित्य असें तत्त्व आहे, त्यालाच प्रधान किंवा प्रकृति असें ह्मणतात ॥ १० ॥ पांच, पांच, चार आणि दहा मिळून या चोवीस तत्त्वांच्या समुदायाला प्रधानकार्यरूपी ब्रह्म असें ह्मणतात ॥ ११ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तीं चोवीस तत्त्वें अशीं–पृथ्वी, उदक, तेज, वायु व आकाश हीं पांच महाभूतें होत व त्यांचीं गंध, रस, रूप, स्पर्श आणि शब्द हीं पांच सूक्ष्मरूपें मला मान्य आहेत ॥१२॥ इंद्रियें दहा आहेत. कर्ण, त्वचा, दृष्टि, जिव्हा, नासिका, वाणी, हात, पाय, शिश्न आणि दहावें गुद म्हटलें आहे ॥१३॥ अंतःकरणाचा–मन, बुद्धि, अहंकार आणि चित्त असा चार प्रकारचा भेद आहे, तो त्याच्या संकल्प, निश्चय, अभिमान आणि चिंता अशा निरनिराळ्या बोधक वृत्तींनीं समजण्यांत येतो ॥ १४ ॥ इतकाच हा चोवीस प्रकारचा सगुणब्रह्माचा संख्याविशेष तत्त्वज्ञानी पुरुषांनीं सांगितला आहे. आतां जो काल आहे तें पंचविसावें तत्त्व असें कोणी म्हणतात, तो काल प्रकृतीचाच अवस्थाविशेष आहे ॥ १५ ॥ कित्येक लोक तर पुरुषाच्या पराक्रमालाच काल असें म्हणतात. तो काल संहार करणारा व सृष्टि करणारा असा दोनप्रकारचा आहे. ज्यापासून प्रकृति-

---

विंशतिकं एतानि चतुर्विंशतिर्यस्मिन् गणे तं गणं प्राधानिकं प्रधानकार्यात्मकं ब्रह्म विदुः ॥ ११ ॥ एतद्विवृणोति । महाभूतानीति त्रिभिः । तावंति पंचैव ॥१२॥१३॥ अंतरात्मकमंतःकरणम् । लक्षणरूपया व्यवच्छेदिकया ॥ १४ ॥ यावान्मया प्रोक्त एतावानेव संख्यातो गणितस्तत्त्वज्ञैः । काले तु मतद्वयमाह । यः कालः स पंचविंशकः अल्पार्थे कप्रत्ययः । प्रकृतेरेवावस्थाविशेष इत्यर्थः ॥ १५ ॥ एके तु पौरुषं पुरुषस्येश्वरस्य प्रभावं विक्रमं कालमाहुः । तमेव कालं द्वेधा लक्षयति । यतो भयं भवति । कस्य प्रकृतिमीयुषः

महाभूतानि पंचैव भूरापोऽग्निर्मरुन्नभः ॥ तन्मात्राणि च तावंति गंधादीनि मतानि मे ॥ १२ ॥ इंद्रियाणि दश श्रोत्रं त्वग्दृग्रसननासिकाः ॥ वाक्करौ चरणौ मेढ्रं पायुर्दशम उच्यते ॥ १३ ॥ मनो बुद्धिरहंकारश्चित्तमित्यंतरात्मकम् ॥ चतुर्धा लक्ष्यते भेदो वृत्त्या लक्षणरूपया ॥ १४ ॥ एतावानेव संख्यातो ब्रह्मणः सगुणस्य ह ॥ सन्निवेशो मया प्रोक्तो यः कालः पंचविंशकः ॥ १५ ॥ प्रभावं पौरुषं प्राहुः कालमेके यतो भयम् ॥ अहंकारविमूढस्य कर्तुः प्रकृतिमीयुषः ॥ १६ ॥ प्रकृतेर्गुणसाम्यस्य निर्विशेषस्य मानवि ॥ चेष्टा यतः स भगवान्काल इत्युपलक्षितः ॥ १७ ॥ अंतः पुरुषरूपेण कालरूपेण यो बहिः ॥ समन्वेत्येष सत्त्वानां भगवानात्ममायया ॥ १८ ॥ दैवात्क्षुभितधर्मिण्यां स्वस्यां योनौ परः पुमान् ॥ आधत्त वीर्यं साऽसूत महत्तत्त्वं हिरण्मयम् ॥ १९ ॥

प्राप्तस्य अतएव देहेऽहंकारेण विमूढस्य कर्तुर्जीवस्य अनेन संहारकत्वेन लक्षितः ॥ १६ ॥ सृष्टिहेतुत्वेन लक्षयति । प्रकृतेरिति ॥ १७ ॥ कोऽसौ भगवांस्तमाह । अंतरिति अंतः सर्वप्राणिनां यः पुरुषरूपेण नियंतृत्वेन समन्वेति सम्यक् तद्विकाररहित एवानुस्यूतो वर्तते बहिश्च कालरूपेण । एष भगवान् । यद्वा यः पुरुष इति प्रसिद्धः कालः स पंचविंशः एके तु पुरुषस्य प्रभावं कालमाहुः । प्रभावस्यैव लक्षणम् । यत इति । पुरुषस्यैव कालत्वे हेतुः प्रकृतेरिति । उभयथा विवक्षायां हेतुः अंतरिति शेषं समानम् । तदेवं प्रकृतेश्चतुर्विंशति भेदाः जीवेश्वरयोश्चैक्यविवक्षातः पंचविंशतिस्तत्त्वानि भवंति । तयोर्भेदविवक्षया च षड्विंशतिर्भवंति ॥ १८ ॥ इदानीं तत्त्वानामुत्पत्तिपूर्वकं लक्षणा-

---

रूप उपाधीचा स्वीकार करणाऱ्या व देहावरच 'मी' असा अभिमान ठेवून मूढ होऊन राहणाऱ्या कर्त्या जीवाला भय प्राप्त होतें, तो काल संहार करणारा होय ॥ १६ ॥ आणि हे मनुकन्ये, ज्यापासून नामरूपादि विभागरहित अशी तीन गुणांची समतारूप जी प्रकृति तिच्या चलनवलनादिक चेष्टा होतात तो भगवान् काल, सृष्टि करणारा होय ॥ १७ ॥ याप्रमाणें तो हा भगवान्, आपल्या मायेच्या योगानें सर्व प्राण्यांच्या आंत अंतर्यामिरूपानें व बाहेरून कालरूपानें व्यापून राहिला आहे. एतावता जीव आणि ईश्वर एकच असें म्हटलें तर त्यापक्षीं प्रकृतीचे चोवीस भेद व एक पुरुष मिळून तत्त्वें पंचवीस होतात व जीव आणि ईश्वर हीं वेगवेगळीं तत्त्वें मानिलीं तर तीं दोन व प्रकृतीचीं चोवीस मिळून सव्वीस तत्त्वें होतात ॥ १८ ॥ आतां तत्त्वांची उत्पत्ति व लक्षणें सांगतात– जीवांच्या अदृष्टाचें फळ मिळण्याची वेळ आली तेव्हां, जिच्या ॥ १९ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

गुणामध्यें क्षोभ उत्पन्न झाला व जी स्वतःचें प्रकट होण्याचें स्थान अशा प्रकृतीच्याठिकाणीं सर्व नियंत्या पुरुषानें, आपलें चैतन्यशक्तिरूप वीर्य स्थापन केलें, तेव्हां तिच्यापासून तेजस्वी असें एक महत्तत्त्व उत्पन्न झालें ॥ १९ ॥ हें महत्तत्त्व, जशाचा तसाच राहणारा जगाचा पहिला अंकुर होय. यानें आपल्याठिकाणीं सूक्ष्मरूपानें भरून असलेलें विश्व प्रकट करण्यासाठीं आपल्या तेजाच्या योगानें, आपल्याच स्वरूपाचें आच्छादन करणाऱ्या (ज्यानें पूर्वी प्रळयाच्या वेळीं महत्तत्त्वाचा प्रकृतींत लय केला होता त्या) प्रलयकालच्या तीव्र अंधकाराला गिळून टाकिलें ॥ २० ॥ हे माते, प्रसंगानें प्राप्त झालेली चतुर्व्यूहोपासनाही तुला सांगतों—जें सर्व वेदांमध्यें प्रसिद्ध, निर्मल सत्त्वगुणात्मक व रागद्वेषादिरहित असें भगवत्प्राप्तीचें स्थान ह्मटलें आहे व ज्याला वासुदेवनामक चित्त असेंहि ह्मणतात तें महत्तत्त्वच होय. त्याला अधिभूतरूपानें महत्तत्त्व

न्याह । दैवादित्यादिना एतान्यसंहत्येत्यतः प्राक्तनेन ग्रंथेन । तत्र चित्तस्योत्पत्तिपूर्वकं लक्षणमाह । चतुर्भिः । दैवाज्जीवादृष्टात्क्षुभिता धर्मा गुणा यस्याः योनावभिव्यक्तिस्थाने प्रकृतौ वीर्यं चिच्छक्तिम् । सा प्रकृतिर्महत्तत्त्वमसूत । महतः स्वरूपमाह । हिरण्मयं प्रकाशबहुलम् ॥ १९ ॥ विश्वमहंकारादिप्रपंचम् । आत्मगतं स्वस्मिन्सूक्ष्मरूपेण स्थितं व्यंजन्प्रकटयन्महांस्तीव्रं प्रलयकालीनं तमोऽपिबत् । कूटस्थो लयविक्षेपशून्यः कथंभूतं तमः आत्मानं प्रस्वापयति प्रच्छादयतीति तथा यत्पूर्वं प्रलयसमये महांतं प्रकृतौ विलापयामासेत्यर्थः ॥ २० ॥ प्रसंगाच्चतुर्व्यूहोपासनामाह । यत्तदिति । सर्वागमप्रसिद्धत्वमाह । स्वच्छं विशदम् । शांतं रागादिरहितम् । भगवतः पदमुपलब्धिस्थानम् ।

विश्वमात्मगतं व्यंजन्कूटस्थो जगदंकुरः ॥ स्वतेजसाऽपिबत्तीव्रमात्मप्रस्वापनं तमः ॥ २० ॥ यत्तत्सत्त्वगुणं स्वच्छं शांतं भगवतः पदम् ॥ यदाहुर्वासुदेवाख्यं चित्तं तन्महदात्मकम् ॥ २१ ॥ स्वच्छत्वमविकारित्वं शांतत्वमिति चेतसः ॥ वृत्तिभिर्लक्षणं प्रोक्तं यथाऽपां प्रकृतिः परा ॥ २२ ॥ महत्तत्त्वाद्विकुर्वाणाद्भगवद्वीर्यसंभवात् ॥ क्रियाशक्तिरहंकारस्त्रिविधः समपद्यत ॥ २३ ॥ वैकारिकस्तैजसश्च तामसश्च यतो भवः ॥ मनसश्चेंद्रियाणां च भूतानां महतामपि ॥ २४ ॥

अतएव वासुदेवाख्यं यदाहुः । अयमर्थः । अधिभूतरूपेण तस्यैव महानिति संज्ञा अध्यात्मरूपेण चित्तमिति उपास्यरूपेण वासुदेव इति अधिष्ठाता तु तस्य क्षेत्रज्ञः एवमहंकारे संकर्षण उपास्यः रुद्रोऽधिष्ठाता मनस्यनिरुद्ध उपास्यः चंद्रोऽधिष्ठाता बुद्धौ प्रद्युम्न उपास्यः ब्रह्माऽधिष्ठातेति ज्ञातव्यम् ॥ २१ ॥ स्वच्छत्वं भगवद्बिंबग्राहित्वम् । अविकारित्वं लयविक्षेपराहित्यम् । अपां प्रकृतिः फेनतरंगादिरहिताऽवस्था परा भूसंसर्गात्प्राक्तनी सा यथा मधुरा स्वच्छा शांता च तद्वदित्यर्थः ॥ २२ ॥ अहंकारस्योत्पत्तिपूर्वकं लक्षणमाह । महत्तत्त्वादिति चतुर्भिः । क्रियासु शक्तिर्यस्य स क्रियाशक्तिः ॥ २३ ॥ त्रैविध्यमाह । वैकारिक इति तस्य कार्यमाह । यतो यस्मान्मनआदीनां भव

अशी संज्ञा आहे, अध्यात्मरूपानें चित्त ही संज्ञा आहे, उपास्यरूपानें वासुदेव ही संज्ञा आहे आणि त्याचा अधिष्ठाता क्षेत्रज्ञ होय. हा चतुर्व्यूहोपासनेंतील पहिला व्यूह जाणावा ॥ २१ ॥ जसें उदकाचें खरें लक्षण, पृथिवीचा संपर्क होण्यापूर्वी व त्यावर फेंस लाटावगैरे उत्पन्न होण्यापूर्वी स्वच्छ, शांत व मधुर असतें. नंतर भूमी वायुवगैरेंच्या संबंधानें फेंसवगैरे विकारयुक्त होतें. त्याप्रमाणें चित्ताचें लक्षण, वृत्ती उत्पन्न होण्यापूर्वी स्वच्छ (भगवंताचें बिंब ग्रहण करण्यास योग्य) निर्विकारि (लय किंवा चांचल्य यांनीं रहित व शांत (गंभीर) असें असून वृत्ती उत्पन्न झाल्यावर कामक्रोधादि विकारयुक्त होतें असें सांगितलें आहे ॥ २२ ॥ भगवंताच्या चिच्छक्तीपासून उत्पन्न झालेलें जें महत्तत्त्व तें कालगतीनें विकार पावूं लागलें, तेव्हां त्यापासून सर्व कर्मांमध्यें ज्याची शक्ति आहे असा तीनप्रकारचा अहंकार उत्पन्न झाला ॥ २३ ॥ तो—सात्विक, राजस आणि तामस असा होय. त्या तीन प्रकारच्या अहंकारापासून अनुक्रमानें मन, इंद्रियें आणि पंचमहाभूतें यांची उत्पत्ति झाली ॥ २४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्या अहंकारालाच प्रत्यक्ष सहस्रमुखी अनंत, भूतेंद्रियदेवतारूप आणि संकर्षणनामक पुरुष असें ह्मणतात. चतुर्व्यूहोपासनेमध्यें हा दुसरा व्यूह जाणावा. ह्यांत ह्याला अधिभूतरूपानें भूतें, इंद्रियें व मन यांचा समुदाय ही संज्ञा, अध्यात्मरूपानें अहंकार ही संज्ञा, उपास्यरूपानें संकर्षण ही संज्ञा व याचा अधिष्ठाता रुद्र होय ॥ २५ ॥ देवतारूपानें कर्तृत्व, इंद्रियरूपानें करणत्व व भूतांच्या रूपानें कार्यत्व हीं अथवा सत्त्व, रज व तम या गुणांच्या संबंधानें शांतत्व, भयंकरत्व व अतिमूढत्व हीं त्या अहंकाराचीं लक्षणें होत ॥ २६ ॥ पुढें विकार पावणाऱ्या सात्विक अहंकारापासून मनरूपी तत्त्व उत्पन्न झालें. ज्याच्या संकल्पविकल्पांपासून अनेक प्रकारच्या कामनांची उत्पत्ति होत्ये ॥ २७ ॥ ह्या मनालाच अनिरुद्धनांवाचा देव व इंद्रियांचा अधिपति असें ह्मणतात. हें शरदृतूंतील निळ्या कमळासारखें श्यामवर्ण असून योगिजनांनीं हळू हळू वश करण्यास योग्य आहे. चतुर्व्यूहोपास-

उत्पत्तिः ॥ २४ ॥ तस्मिन्नुपास्यव्यूहमाह । सहस्रशिरसमिति ॥ २५ ॥ लक्षणमाह । कर्तृत्वमिति । कर्तृत्वं देवतादिरूपेण करणत्वमिंद्रियरूपेण कार्यत्वं भूतरूपेण शांतत्वादिकं तु तत्तत्कारणगुणत्रयरूपेण ॥ २६ ॥ मनस उत्पत्तिपूर्वकं लक्षणमाह । वैकारिकादिति द्वाभ्याम् । संकल्पश्चिंतनम् । विकल्पो विशेषचिंतनम् । यस्य मनसः संकल्पविकल्पाभ्यां कामसंभवो वर्तत इति कामरूपा वृत्तिर्लक्षणत्वेनोक्ता नतु प्रद्युम्नव्यूहोत्पत्तिः तस्य संकल्पादिकार्यत्वाभावात् उपास्यव्यूहस्य चानिरुद्धस्योक्तेः ॥ २७ ॥ शारदं शरत्कालीनमिंदीवरं नीलोत्पलं तदिव श्यामम् । यच्छनैः संराध्यं वशीकर्तुं योग्यम् । दुर्ग्रहत्वात् ॥ २८ ॥ बुद्धेरुत्पत्तिपूर्वकं लक्षणमाह । तैजसादिति द्वाभ्याम् ।

सहस्रशिरसं साक्षाद्यमनंतं प्रचक्षते ॥ संकर्षणाख्यं पुरुषं भूतेंद्रियमनोमयम् ॥ २५ ॥ कर्तृत्वं करणत्वं च कार्यत्वं चेति लक्षणम् ॥ शांतघोरविमूढत्वमिति वा स्यादहंकृतेः ॥ २६ ॥ वैकारिकाद्विकुर्वाणान्मनस्तत्त्वमजायत ॥ यत्संकल्पविकल्पाभ्यां वर्तते कामसंभवः ॥ २७ ॥ यद्विदुर्ह्यनिरुद्धाख्यं हृषीकाणामधीश्वरम् ॥ शारदेंदीवरश्यामं संराध्यं योगिभिः शनैः ॥ २८ ॥ तैजसात्तु विकुर्वाणाद्बुद्धितत्त्वमभूत्सति ॥ द्रव्यस्फुरणविज्ञानमिंद्रियाणामनुग्रहः ॥ २९ ॥ संशयोऽथ विपर्यासो निश्चयः स्मृतिरेव च ॥ स्वाप इत्युच्यते बुद्धेर्लक्षणं वृत्तितः पृथक् ॥ ३० ॥ तैजसानींद्रियाण्येव क्रियाज्ञानविभागशः ॥ प्राणस्य हि क्रियाशक्तिर्बुद्धेर्विज्ञानशक्तिता ॥ ३१ ॥

हे सति द्रव्यस्फुरणरूपं विज्ञानमिति चित्तव्यावृत्त्यर्थमुक्तम् । इंद्रियाणामनुग्रह इति सविकल्पज्ञाने हृषीकाणामधीश्वरमिति यदुक्तं तत्तु निर्विकल्पज्ञाने ॥ २९ ॥ द्रव्यस्फुरणस्यैव प्रपंचः संशयादिः विपर्यासो मिथ्याज्ञानम् । निश्चयः प्रमाणज्ञानम् । स्वापो निद्रा प्रमाणविपर्ययविकल्पनिद्रास्मृतयः इति पातंजलोक्तेः ॥ ३० ॥ इंद्रियाणामुत्पत्तिमाह । तैजसानि तैजसाहंकाराज्जातानि ज्ञानेंद्रियाणां वैकारिकत्वशंकानिवृत्त्यर्थमेवकारः । द्विविधान्यपींद्रियाणि तैजसान्येवेत्यन्वयः । तत्र हेतुः प्राणस्येति । हियस्मात्प्राणस्य क्रियाशक्तिर्बुद्धेश्च विज्ञानशक्तिताऽतः प्राणस्य तैजसत्वात्तत्क्रियाशक्तिमतामिंद्रियाणां तैजसत्वं तथा बुद्धेस्तैजसत्वात्तदीयज्ञानशक्तिमतामपींद्रियाणां तैजसत्वमित्यर्थः ॥ ३१ ॥

नेमध्यें हा तिसरा व्यूह जाणावा. तेथें ह्याला अधिभूत रूपानें व आध्यात्मरूपानें मन ही संज्ञा, उपास्यदेवतारूपानें अनिरुद्ध ही संज्ञा व याचा अधिष्ठाता चंद्र होय ॥ २८ ॥ हे पतिव्रते, विकार पावणाऱ्या राजसाहंकारापासून बुद्धिरूपी तत्त्व उत्पन्न झालें. ह्या तत्त्वाचीं वृत्तींच्या भेदानें निरनिराळीं लक्षणें आहेत तीं—पदार्थाचें स्वरूप समजण्याचें विशिष्ट ज्ञान, इंद्रियांवर विषय मिळवून देण्याचा अनुग्रह करणें, संशय, विपरीत ज्ञान, निश्चय, स्मरण आणि निद्रा हीं होत. चतुर्व्यूहोपासनेमध्यें हा चवथा व्यूह जाणावा. त्यांत त्याला अधिभूत व अध्यात्मरूपानें बुद्धि ही संज्ञा, उपास्यरूपानें प्रद्युम्न ही संज्ञा व याचा अधिष्ठाता ब्रह्मा होय ॥ २९ ॥ ३० ॥ आतां इंद्रियांची उत्पत्ति सांगतात. पांच कर्मेंद्रिये व पांच ज्ञानेंद्रियें हीं राजसाहंकारापासूनच उत्पन्न झालीं. कारण, कर्म ही शक्ति प्राणाची आहे व तो प्राण राजसाहंकाराचें कार्य आहे, ह्मणून कर्म करणारीं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

इंद्रियें (कर्मेंद्रियें) राजसाहंकाराचें कार्य होत. तशीच ज्ञान ही शक्ति बुद्धीची आहे व ती बुद्धि राजसाहंकाराचें कार्य असल्यामुळें ज्ञानेंद्रियेंहि राजसाहंकाराचेंच कार्य होत ॥ ३१ ॥ आतां सूक्ष्म विषयांसहित पंचमहाभूतांची उत्पत्ति व लक्षणें सांगतात–भगवंताच्या शक्तीनें प्रेरित झालेला तामसाहंकार, विकार पावूं लागला असतां, त्यापासून शब्द हें सूक्ष्मभूत उत्पन्न झालें, त्या शब्दापासून आकाश हें महाभूत झालें. त्या शब्दविषयाचें ग्रहण करणारें श्रोत्रेंद्रिय होय ॥ ३२ ॥ अर्थाचा आश्रय असणें, पाहण्याला बोधक चिन्ह होणें व आकाशाच्या सूक्ष्मरूपानें असणें हें शब्दाचें लक्षण असें विद्वान् लोक समजतात ॥ ३३ ॥ तसेंच प्राणिमात्रांना जागा देणें, आंत व बाहेर

तन्मात्रोत्पत्तिपूर्वकमाकाशादिमहाभूतोत्पत्तिं तल्लक्षणं चाह । तामसादिति पंचदशभिः । श्रोत्रं तु शब्दगमित्यादिभिर्विषयोत्पत्त्यनंतरं तत्संबंधमात्रं कथ्यते नतूत्पत्तिः प्रागेवोत्पन्नत्वात् शब्दं गच्छति प्राप्नोतीति शब्दगम् ॥ ३२ ॥ शब्दस्य लक्षणमाह । अर्थाश्रयत्वमर्थवाचकत्वम् । द्रष्टुर्लिंगत्वं कुड्यांतरितस्य वक्तुर्ज्ञापकत्वम् । तदुक्तम् । लिंगं यद्द्रष्टृदृश्ययोः इति । नभसस्तन्मात्रत्वं सूक्ष्मत्वं शब्दस्य लक्षणमित्यन्वयः ॥ ३३ ॥ नभसो लक्षणमाह । भूतानामिति । छिद्रदातृत्वमवकाशदातृत्वम् । बहिरंतर्व्यवहारास्पदत्वम् । आत्मा मनः प्राणादीनां धिष्ण्यत्वमाश्रयत्वं नाड्यादिच्छिद्ररूपेण वृत्तिः कार्यमेव लक्षणं वृत्तिलक्षणम् । एवमुत्तरत्राप्येकेन श्लोकेन तन्मात्रमहा-

तामसाच्च विकुर्वाणाद्भगवद्वीर्यचोदितात् ॥ शब्दमात्रमभूत्तस्मान्नभः श्रोत्रं तु शब्दगम् ॥ ३२ ॥ अर्थाश्रयत्वं शब्दस्य द्रष्टुर्लिंगत्वमेव च ॥ तन्मात्रत्वं च नभसो लक्षणं कवयो विदुः ॥ ३३ ॥ भूतानां छिद्रदातृत्वं बहिरंतरमेव च ॥ प्राणेंद्रियात्मधिष्ण्यत्वं नभसो वृत्तिलक्षणम् ॥ ३४ ॥ नभसः शब्दतन्मात्रात्कालगत्या विकुर्वतः ॥ स्पर्शोऽभवत्ततो वायुस्त्वक्स्पर्शस्य च संग्रहः ॥ ३५ ॥ मृदुत्वं कठिनत्वं च शैत्यमुष्णत्वमेव च ॥ एतत्स्पर्शस्य स्पर्शत्वं तन्मात्रत्वं नभस्वतः ॥ ३६ ॥ चालनं व्यूहनं प्राप्तिर्नेतृत्वं द्रव्यशब्दयोः ॥ सर्वेंद्रियाणामात्मत्वं वायोः कर्माभिलक्षणम् ॥ ३७ ॥ वायोश्च स्पर्शतन्मात्राद्रूपं दैवेरितादभूत् ॥ समुत्थितं ततस्तेजश्चक्षू रूपोपलंभनम् ॥ ३८ ॥

भूतयोरुत्पत्तिः द्वितीयेन तन्मात्रलक्षणम् । तृतीयेन महाभूतलक्षणमित्यनुसंधेयम् ॥ ३४ ॥ का सा त्वक् स्पर्शस्य संग्रहः सम्यग्ग्रहणं यया पुंस्त्वं नियतलिंगत्वात् । यद्वा स्पर्शस्य संग्रहस्ततो भवतीति शेषः । शब्दतन्मात्रादित्यादि तन्मात्राणामुत्तरोत्तरान्वयार्थमुक्तम् ॥ ३५ ॥ स्पर्शलक्षणमाह । मृदुत्वमिति । स्पर्शत्वं स्वरूपलक्षणमित्यर्थः । नभस्वतो वायोस्तन्मात्रत्वं च ॥ ३६ ॥ चालनं वृक्षशाखादेः व्यूहनं मेलनं तृणादेः प्राप्तिः संयोगो द्रव्यस्य गंधवतो घ्राणं प्रति तथा शैत्यादिमतः स्पर्शनं प्रति शब्दस्य श्रोत्रं प्रति नेतृत्वम् । सर्वेंद्रियाणामात्मात्वमुपोद्बलकत्वम् । कर्मणा कार्येणाभिलक्षणम् । भावे ल्युट् । कर्मैवाभिलक्षणमिति विग्रहे तु करणे ॥ ३७ ॥ ३८ ॥

व्यवहार करण्यास स्थान असणें, व शिरा इत्यादिकांच्या छिद्ररूपानें प्राण, इंद्रियें आणि मन ह्यांना आश्रय असणें हें आकाशाचें कार्यरूप लक्षण होय ॥ ३४ ॥ पुढें कालगतीनें तें शब्दगुणयुक्त आकाश विकार पावूं लागलें असतां, त्यापासून स्पर्शरूप सूक्ष्मगुण उत्पन्न होऊन त्यापासून वायु झाला. स्पर्शाचें ग्रहण करणारें त्वगिंद्रिय होय ॥ ३५ ॥ मऊपणा, कठिणपणा, शीतत्व, उष्णता, आणि वायूचें सूक्ष्मरूप असणें हीं स्पर्शाचीं लक्षणें होत ॥ ३६ ॥ वृक्षांच्या फांद्यावगैरे हालविणें, गवतवगैरे एकत्र जमविणें, सर्वत्र गति असणें, सुगंधादि पदार्थ नाकाशीं नेणें, शीतउष्णादि पदार्थांचा त्वचेशीं संयोग करणें व सर्व इंद्रियांना त्यांचें कार्य करण्यास शक्ति देणें हें वायूचें कार्यरूप लक्षण होय ॥ ३७ ॥ दैवानें प्रेरित अशा स्पर्शगुणयुक्त वायूपासून रूप हें सूक्ष्मभूत उत्पन्न झालें. त्यापासून तेज झालें. रूपाचें ग्रहण करणारें चक्षु इंद्रिय होय ॥३८॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हे पतिव्रते, पदार्थमात्राला आकार प्राप्त करून देणें, पदार्थांच्या आधारानें प्रतीतीस येणें, पदार्थांच्या रचनेप्रमाणें रचना असणें आणि तेजाचा विशेष गुण होऊन राहणें हीं रूपाचीं लक्षणें होत ॥ ३९ ॥ प्रकाश करणें, पचन करणें, थंडी नाहींशी करणें, क्षुधा व तृषा उत्पन्न करून त्यांच्या निवृत्तीकरितां खाणें व पिणें आणि पदार्थांस वाळविणें हीं तेजाचीं कार्यलक्षणें होत ॥ ४० ॥ नंतर रूप हें ज्याचा गुण आहे तें तेज, दैवानें प्रेरित होऊन विकार पावूं लागलें असतां, त्यापासून रस हा सूक्ष्मगुण उत्पन्न झाला आणि त्यापासून उदक उत्पन्न झालें. रसाला ग्रहण करणारें जिव्हा इंद्रिय होय ॥ ४१ ॥ रस हा मूळचा एक मधुर असून तो संसर्गिद्रव्यांच्या

द्रव्याकृतित्वं द्रव्यस्याकारसमर्पकत्वम् । गुणता द्रव्योपसर्जनतया प्रतीतिः शब्दस्य तु स्वातंत्र्येणैव प्रतीतिः अप्रत्यक्षद्रव्यस्य स्पर्शादेरपि स्वातंत्र्येणैव प्रतीतिः रूपस्य तु नैवमिति तस्यायं विशेष उक्तः व्यक्तिसंस्थात्वं द्रव्यस्य या संस्था सन्निवेशः सैव संस्था यस्य तत्परिणामतया प्रतीतिरित्यर्थः । तेजसस्तेजस्त्वमसाधारणत्वम् ॥ ३९ ॥ द्योतनं प्रकाशनम् । पचनं तंडुलादेः क्षुत्तृडशना पिपासा च तद्वारेण पानमदनं च ॥ ४० ॥ जिह्वा रसनेंद्रियम् । रसो गृह्यतेऽनयेति रसग्रहः । यद्वा रसग्रहस्ततो भवतीति शेषः ॥ ४१ ॥ कषायादिषु लवणोऽपि द्रष्टव्यः । भौतिकानां संसर्गिद्रव्याणाम् । य एको मधुर एव सन्नेवमनेकधा भिद्यते स रस इत्यर्थः ॥ ४२ ॥ क्लेदनमार्द्रीकरणम् । पिंडनं

द्रव्याकृतित्वं गुणता व्यक्तिसंस्थात्वमेव च ॥ तेजस्त्वं तेजसः साध्वि रूपमात्रस्य वृत्तयः ॥ ३९ ॥ द्योतनं पचनं पानमदनं हिममर्दनम् ॥ तेजसो वृत्तयस्त्वेताः शोषणं क्षुत्तृडेव च ॥ ४० ॥ रूपमात्राद्विकुर्वाणात्तेजसो दैवचोदितात् ॥ रसमात्रमभूत्तस्मादंभो जिह्वा रसग्रहः ॥ ४१ ॥ कषायो मधुरस्तिक्तः कट्वम्ल इति नैकधा ॥ भौतिकानां विकारेण रस एको विभिद्यते ॥ ४२ ॥ क्लेदनं पिंडनं तृप्तिः प्राणनाप्यायनोंदनम् ॥ तापापनोदो भूयस्त्वमंभसो वृत्तयस्त्विमाः ॥ ४३ ॥ रसमात्राद्विकुर्वाणादंभसो दैवचोदितात् ॥ गंधमात्रमभूत्तस्मात्पृथ्वी घ्राणस्तु गंधगः ॥ ४४ ॥ करंभपूतिसौरभ्यशांतोग्राम्लादिभिः पृथक् ॥ द्रव्यावयववैषम्याद्गंध एको विभिद्यते ॥ ४५ ॥ भावनं ब्रह्मणः स्थानं धारणं सद्विशेषणम् ॥ सर्वसत्त्वगुणोद्भेदः पृथिवीवृत्तिलक्षणम् ॥ ४६ ॥

मृदादेः पिंडीकरणम् । तृप्तिस्तृप्तिदातृत्वम् । प्राणनं जीवनम् । आपोमयः प्राण इति स्मृतेः । आप्यायनं तृड्वैक्लव्यनिवर्तनम् । उंदनं मृदूकरणम् । ओंदनमिति पाठेऽपि स एवार्थः । भूयस्त्वं कूपादावुद्धृतस्यापि पुनःपुनरुद्भवः ॥ ४३ ॥ गंधगो गंधं प्राप्नोति ॥ ४४ ॥ करंभो मिश्रगंधः यथा व्यंजनादीनां हिंग्वादिसंस्कारेण पूतिर्दुर्गंधः सौरभ्यं कर्पूरादेः शांतः शतपत्रादेः उग्रो लशुनादेः अम्लस्तिंतिण्यादेः संसर्गिणां द्रव्यावयवानां वैषम्याच्च एवं विभिद्यते स गंध इत्यर्थः ॥ ४५ ॥ ब्रह्मणो भावनं प्रतिमादिरूपेण

योगानें, खारट, तिखट, कडवट व आंबट इत्यादिक अनेकप्रकारचे भेद पावतो ॥ ४२ ॥ भिजविणें, मृत्तिकादिकांचे पिंड करणें, तृप्ति देणें, जीवन देणें, तृषा भागविणें, पदार्थाला मृदुता आणणें, ताप घालविणें व कूपादिकांपासून बाहेर काढलें असतांहि पुनः उत्पन्न होणें, हीं उदकाची कार्यभूत लक्षणें होत ॥ ४३ ॥ नंतर ज्याचा रस हा गुण आहे तें उदक, दैवानें प्रेरित होऊन विकार पावूं लागलें असतां, त्यापासून गंध हा सूक्ष्मगुण उत्पन्न झाला व त्या गंधापासून पृथिवी उत्पन्न झाली. गंधाचें ग्रहण करणारें घ्राणेंद्रिय होय ॥ ४४ ॥ तो गंध, वस्तुतः एकच असून संसर्गिद्रव्यांच्या मिश्रणानें, मिश्रगंध, सुगंध, दुर्गंध, शांत, उग्र आणि आंबट इत्यादिक निरनिराळे भेद पावतो ॥ ४५ ॥ प्रतिमादिरूपानें ब्रह्मवस्तूला साकारता आणणें, दुसऱ्या आश्रयाची अपेक्षा न धरितां असणें, जलादिकांचें धारण करणें, आकाशादिकांचा निरनिराळे-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

चेठिकाणीं पाहत असे तेंसुद्धां आतां अविद्येनें कल्पिलेल्या अहंकाराचेठिकाणींच आहे असें पाहतो ॥ ३६ ॥ त्याच्या जीवन्मुक्तीचा प्रकार दोन श्लोकांनीं सांगतात.— शेवटींच्या शरीराचेठिकाणीं असणारा तो सिद्धयोगी, 'जसा मद्याच्या मदानें अंध झालेला एखादा मनुष्य, आपल्या कमरेच्याठिकाणीं गुंडाळलेलें वस्त्र आहे किंवा पडून गेलें तें पाहत नाहीं त्याप्रमाणें' ज्या देहापासून आत्मस्वरूपाची प्राप्ति झाली तो देह, प्रारब्धकर्मवशेंकरून आसनावरून उठला किंवा उठून तेथेंच उभा राहिला अथवा तेथून दुसऱ्याठिकाणीं गेला किंवा पुनरपि जाग्यावर आला या गोष्टींचेंसुद्धां अनुसंधान ठेवीत नाहीं, मग सुखदुःखाचें अनुसंधान कोठून ठेवणार! ठेवितच नाहीं ॥ ३७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तर त्याच्या देहाच्या प्रवृत्तिनिवृत्ती व वांचणें कसें घडतें? असें म्हणशील तर हे, माते प्रारब्धकर्मांच्या योगानें चालणारा तो देह, जोंपर्यंत त्याच्या उत्पत्तीचें कारण कर्म असतें तोंपर्यंत इंद्रियांसह जीवंत राहतोच. परंतु ज्याला समाधीपर्यंत योग साध्य झाला आहे व ज्यानें आत्मवस्तु जाणिलें आहे तो सिद्धयोगी, पुत्र स्त्री इत्यादि प्रपंचासहित त्या देहाला, स्वप्नांत भासलेल्या देहाप्रमाणें मानून त्याचा पुनः अभिमानानें स्वीकार करीत नाहीं ॥ ३८ ॥ आतां साहा श्लोकांनीं ज्ञानाचा प्रकार सांगतात. — जसा अतिशय प्रीतीमुळें आत्मत्वेंकरून मानलेल्या पुत्राहून किंवा द्रव्याहून जाणणारा पुरुष निराळा आहे, असें सर्वांच्या अनुभवास येतें त्याप्रमाणें देह, इंद्रियें इत्यादिकांहून त्यांचा द्रष्टा पुरुष निराळा आहे असें समजावें ॥ ३९ ॥ जसा हा अग्निच आहे असें मानलेल्या जळत असलेल्या काष्ठाहून किंवा अग्नीपासून उत्पन्न

वा मदिरामदेनांधो यथा न पश्यति ॥ ३७ ॥ ननु तर्हि देहस्य कथं प्रवृत्तिनिवृत्ती जीवनं वा तत्राह । देहोऽपीति । दैवं पूर्वसंस्कारस्तद्वशो गच्छन्यावत्स्वारंभकं कर्मास्ति तावत्प्रतिसमीक्षते जीवत्येव सासुः सेंद्रियः । ननु तर्हि तस्मिन्पुनः संगः स्यात्तत्राह । तं देहं स्वाप्नदेहादितुल्यं सप्रपंचं पुत्रादिसहितं पुनर्न भजतेऽहंममेति नाभिमन्यते अधिरूढः प्राप्तः समाधिपर्यंतो योगो येन अतएव प्रतिबुद्धं वस्त्वात्मतत्त्वं येन सः ॥ ३८ ॥ प्रतिबोधप्रकारमाह । षड्भिः यथेति । अतिस्नेहवशादात्मत्वेनाभिमतादपि पुत्रादेः मर्त्यः पित्रादिः पुरुषो देहादेर्द्रष्टा ॥ ३९ ॥ पृथगवस्थानाभावेऽपि भेदं सदृष्टांतमाह । यथोल्मुकादिदानीं ज्वलतः काष्ठात् स्वसंभवादग्नेः संभूतात् आत्मत्वेनाग्नेः

देहोऽपि दैववशगः खलु कर्म यावत्स्वारंभकं प्रतिसमीक्षत एव सासुः ॥ तं सप्रपंचमधिरूढसमाधियोगः स्वाप्नं पुनर्न भजते प्रतिबुद्धवस्तुः ॥ ३८ ॥ यथा पुत्राच्च वित्ताच्च पृथङ्मर्त्यः प्रतीयते ॥ अप्यात्मत्वेनाभिमताद्देहादेः पुरुषस्तथा ॥ ३९ ॥ यथोल्मुकाद्विस्फुलिंगाद्धूमाद्वाऽपि स्वसंभवात् ॥ अप्यात्मत्वेनाभिमतात्तदग्निः पृथगुल्मुकात् ॥ ४० ॥ भूतेंद्रियांतःकरणात्प्रधानाज्जीवसंज्ञितात् ॥ आत्मा तथा पृथग्द्रष्टा भगवान् ब्रह्मसंज्ञितः ॥ ४१ ॥ सर्वभूतेषु चात्मानं सर्वभूतानि चात्मनि ॥ ईक्षेतानन्यभावेन भूतेष्विव तदात्मताम् ॥ ४२ ॥ स्वयोनिषु यथाज्योतिरेकं नाना प्रतीयते ॥ योनीनां गुणवैषम्यात्तथात्मा प्रकृतौ स्थितः ॥ ४३ ॥

स्वरूपत्वेनाभिमतादपि अत्यंताविवेकिनो हि धूमेऽप्यग्न्यभिमानोऽस्ति उल्मुकात्पूर्वसिद्धादपि तद्दाहकः प्रकाशकश्चाग्निः पृथगेव ॥ ४० ॥ भूतादेर्द्रष्टा तेभ्यः पृथक् तस्मादपि जीवसंज्ञिताद्ब्रह्मसंज्ञितः पृथक् तथा प्रधानादपि तत्प्रवर्तको भगवान्पृथगित्यर्थः ॥ ४१ ॥ उपाधितो विवेकमुक्त्वा तस्यैक्यमाह । सर्वभूतेष्विति । भूतेषु चतुर्विधेषु तदात्मतां महाभूतात्मताम् ॥ ४२ ॥ धर्मभेदस्याप्यौपाधिकतां सदृष्टांतमाह । स्वयोनिषु काष्ठेषु ज्योतिरग्निः गुणवैषम्याद्दीर्घह्रस्वादिभेदात् प्रकृतौ देहे ॥ ४३ ॥

झालेल्या धूमाहून अथवा ठिणगीहून विझविलेल्या काष्ठाहून त्यांचा दाहक व प्रकाशक अग्नि निराळा असतो त्याप्रमाणें ॥ ४० ॥ भूतें, इंद्रियें व अंतःकरण यांचा द्रष्टा, जीवात्मा, त्या भूतादिकांहून निराळा आहे व त्या जीवात्म्याहूनही त्याचा द्रष्टा ब्रह्मसंज्ञक निराळा आहे तसाच प्रकृतीहूनही तिचा प्रवर्तक भगवान् निराळा आहे ॥ ४१ ॥ यास्तव 'जशीं उद्भिज्ज, जरायुज, अंडज, आणि स्वेदज अशा चार प्रकारच्या प्राण्याचेठिकाणीं सर्वलोक, पंचमहाभूतांना अभेदत्वेंकरून पाहतात' त्याप्रमाणें स्थावर जंगमात्मक सर्व प्राणिमात्रांचेठिकाणीं उपादान कारणत्वेंकरून असणाऱ्या आत्म्याला व आत्म्याचेठिकाणीं कार्यत्वेंकरून असणाऱ्या सर्व प्राणिमात्रांना अभेदरूपत्वानें पाहावीं ॥ ४२ ॥ जसा एकच अग्नि, आपलें प्रकट होण्याचें स्थान अशीं जीं काष्ठें त्याचेठिकाणीं त्यांच्या ऱ्हस्वदीर्घत्वादिक निरनिराळ्या स्थितीमुळें ऱ्हस्वदीर्घादिरूप नानाप्रकारचा भासतो त्याप्रमाणें देवादि शरीरांचेठिकाणीं असणारा आत्मा त्यांच्या त्यांच्या स्वभावामुळें तसा तसा भासतो परंतु वस्तुतः तो एकच आहे ॥ ४३ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तस्मात् हे देवहूति माते, भगवद्भक्तानें, देहादिरूपानें परिणाम पावलेल्या आपल्या मोह करणाऱ्या ह्या देवाच्या अचिंत्य शक्तिरूप प्रकृतीचें विचारानें निवर्तन करून आपल्या स्वरूपस्थितीनें रहावें ॥ ४४ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील तृतीयस्कंधामध्यें ध्यानादियोग निरूपणनामक हा अठ्ठाविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २८ ॥ आतां या एकुणतिसाव्या अध्यायामध्यें मुमुक्षुजनाला सात्विकादिक अनेक प्रकारचा भक्तियोग सांगून संसाराचेठिकाणीं वैराग्य होण्यासाठीं काळाचें बळ व भयंकर संसार यांचें स्वरूप वर्णिलें आहे॥ १ ॥ देवहूति ह्मणाली– हे प्रभो कपिला, ह्या महत्तत्त्वादिकांचें खरें स्वरूप ज्याच्या योगानें समजतें तें प्रकृतीचें पुरुषाचें व महत्तत्त्वादिकांचें निरनिराळें लक्षण, जसें सांख्यशास्त्रांमध्यें सांगितलेलें आहे तसें तूं मला सांगितलें आहेस. आतां तें लक्षण, ज्या भक्तियोगानें स्पष्ट रीतीनें समजतें त्या भक्तियोगाचा

स्वां स्वांशस्य जीवस्य बंधहेतुं दैवीं देवस्य विष्णोः शक्तिं पराभाव्य तत्प्रसादेनैव जित्वा स्वरूपेण ब्रह्मत्वेनावतिष्ठते॥ ४४ ॥ इति श्रीमद्भागवते तृतीये टीकायामष्टाविंशतितमोऽध्यायः ॥ २८ ॥ ॥ एकोनत्रिंशके भक्तियोगस्तु बहुधोच्यते ॥ कालस्य च बलं घोरा संसृतिश्च विरक्तये ॥ १ ॥ उक्तानुवादपूर्वकं भक्तिमार्गभेदान्पृच्छति द्वाभ्याम् । लक्षणं महदादीनां यथा सांख्येषु तथा कथितम् । येन लक्षणेन तत्पारमार्थिकं परस्परविभक्तमित्यर्थः । यो भक्तियोगो मूलं प्रयोजनं यस्य तद्यन्मूलं तत्कथितम् । तस्य

तस्मादिमां स्वां प्रकृतिं देवीं सदसदात्मिकाम् ॥ दुर्विभाव्यां पराभाव्य स्वरूपेणावतिष्ठते ॥ ४४ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे तृतीयस्कंधे कापिलेये साधनानुष्ठानं नामाष्टाविंशतितमोऽध्यायः ॥ २८ ॥ ॥ देवहूतिरुवाच ॥ लक्षणं महदादीनां प्रकृतेः पुरुषस्य च ॥ स्वरूपं लक्ष्यतेऽमीषां येन तत्पारमार्थिकम् ॥ १ ॥ यथा सांख्येषु कथितं यन्मूलं तत्प्रचक्षते ॥ भक्तियोगस्य मे मार्गं ब्रूहि विस्तरशः प्रभो ॥ २ ॥ विरागो येन पुरुषो भगवन्सर्वतो भवेत् ॥ आचक्ष्व जीवलोकस्य विविधा मम संसृतीः ॥ ३ ॥ कालस्येश्वररूपस्य परेषां च परस्य ते ॥ स्वरूपं बत कुर्वंति यद्धेतोः कुशलं जनाः ॥ ४ ॥ लोकस्य मिथ्याभिमतेरचक्षुषश्चिरं प्रसुप्तस्य तमस्यनाश्रये ॥ श्रांतस्य कर्मस्वनुविद्धया धिया त्वमाविरासीः किल योगभास्करः ॥ ५ ॥ मैत्रेय उवाच ॥ इति मातुर्वचः श्लक्ष्णं प्रतिनंद्य महामुनिः ॥ आबभाषे कुरुश्रेष्ठ प्रीतस्तां करुणार्दितः ॥ ६ ॥

भक्तियोगस्य मार्गं प्रकारं विस्तरतो मे ब्रूहि ॥ १ ॥ २ ॥ येन संसृतीनामाख्यानेन विगतरागो भवेत् ॥ ३ ॥ ईश्वररूपस्य महाप्रभावस्य ते त्वदात्मकस्य यद्धेतोर्यद्भयात्कुशलं पुण्यं कुर्वंति ॥ ४ ॥ अचक्षुषोऽज्ञस्य अतो मिथ्याभूते देहादावभिमतिरहंकारो यस्य अतः कर्मस्वनुविद्धया आसक्तया धिया श्रांतस्य अतएवानाश्रयेऽपारे तमसि संसारे चिरं प्रसुप्तस्य लोकस्य प्रबोधाय त्वं योगप्रकाशको भास्करः किलाविर्भूतोऽसि ॥ ५ ॥ श्लक्ष्णं सुंदरम् ॥ ६ ॥

मार्ग मला विस्तरानें वर्णन कर॥ १ ॥ २॥ तसेंच हे भगवन्, ज्यांच्या समजण्यानें मुमुक्षुजनाला सर्वठिकाणीं वैराग्य उत्पन्न होईल त्या जीवलोकाच्या अनेक प्रकारच्या जन्ममरणरूप संसृति मला वर्णन कर ॥ ३ ॥ आणि ज्याच्या भयानें लोक पुण्यकर्म करितात व ब्रह्मादिकांचा नियामक असा जो महापराक्रमी त्वद्रूपी काळ त्याचेंहि स्वरूप मला कथन कर ॥ ४ ॥ कारण, हा सर्व लोक तर अज्ञानी असून मिथ्याभूत देहादिकांच्याठिकाणीं अहंकार धारण करणारा असल्यामुळें कर्मांच्याठिकाणीं आसक्त झालेल्या बुद्धीनें तीं तीं कर्में करितां करितां थकून जाऊन संसाररूपी अपार अंधकारामध्यें गाढ निजून राहिला आहे, आणि तूं तर याला जाग्रत करण्याकरितां साक्षात् योगमार्ग प्रकाशक सूर्यच प्रकट झाला आहेस ह्मणून तुला मी प्रश्न करित्यें ॥ ५ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे कुरुश्रेष्ठ विदुरा, याप्रमाणें देवहूतीनें प्रश्न केला असतां, संतुष्ट व जीवांविषयीं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करुणायुक्त झालेल्या त्या कपिलमहामुनींनें आईच्या सुंदर भाषणाचा सत्कार करून तिला ह्मणाला कीं, ॥ ६ ॥ श्रीभगवान् ह्मणाला– हे देवहूति, भक्तियोग, अनेक प्रकारच्या विशेषांनीं भेद पावला आहे. कारण, मनुष्यांचा अभिप्रायच, अनेक फलसंकल्पाच्या भेदानें पुष्कळ प्रकारचे भेद पावतो ॥ ७ ॥ ते भेद असे कीं, जो एखादा क्रोधी मनुष्य, आपला आणि परमात्म्याचा भेद पहात असून, एखाद्याची हिंसा, दंभ आणि मत्सर हीं मनामध्यें ठेऊन माझी भक्ति करितो तो तामस (कनिष्ठप्रतीचा) भक्त होय. ह्या तामस भक्तामध्येंहि तीन भेद आहेत– हिंसेकरितां भक्ति करणारा अत्यंत अधम, दांभिक भक्ति करणारा मध्यम आणि मत्सर बुद्धीनें भक्ति करणारा उत्तम होय ॥ ८ ॥ आतां जो भेददर्शी पुरुष, स्रक्चंदनवनितादिक विषय, सत्कीर्ति आणि धनादिक ऐश्वर्यें ह्यांची इच्छा धरून मूर्ति इत्यादिकांचेठिकाणीं माझी पूजा करितो तो राजस (मध्यमप्रतीचा) भक्त होय. ह्या राजस भक्तांचेहि तीन भेद आहेत. विषयसुखासाठीं भक्ति करणारा अधम, कीर्तीसाठीं भक्ति करणारा मध्यम आणि ऐश्वर्यप्राप्तीसाठीं भक्ति करणारा उत्तम

मार्गैः प्रकारविशेषैः तानेवाह । स्वभावभूता ये गुणास्तेषां मार्गेण वृत्तिभेदेन भावोऽभिप्रायः फलसंकल्पभेदाद्भक्तिभेद इत्यर्थः ॥७॥ अभिसंधाय संकल्प्य संरंभी क्रोधी भिन्नदृक् भेददर्शी यो भावं भक्तिं कुर्यात्स त्रिविधोऽपि तामसः ॥ ८ ॥ पृथग्भावो भेददर्शी ॥ ९ ॥ कर्मनिर्हारं पापक्षयम् । परस्मिन्परमेश्वरे तदर्पणं कर्मार्पणम् । भगवत्प्रीतिमुद्दिश्येत्यर्थः । यष्टव्यमिति विधिसिद्धिमुद्दिश्येत्यर्थः । भेददर्शित्वमर्चादावर्चनं च त्रिष्वपि समानम् । तदेवं तामसादिभक्तिषु त्रयस्त्रयो भेदाः तासु यथोत्तरं श्रैष्ठ्यम् । एवं च श्रवणकीर्तनादयो नवापि प्रत्येकं नव

श्रीभगवानुवाच ॥ भक्तियोगो बहुविधो मार्गैर्भामिनि भाव्यते ॥ स्वभावगुणमार्गेण पुंसां भावो विभिद्यते ॥ ७ ॥ अभिसंधाय यो हिंसां दंभं मात्सर्यमेव वा ॥ संरंभी भिन्नदृग् भावं मयि कुर्यात्स तामसः ॥ ८ ॥ विषयानभिसंधाय यश ऐश्वर्यमेव वा ॥ अर्चादावर्चयेद्यो मां पृथग्भावः स राजसः ॥ ९ ॥ कर्मनिर्हारमुद्दिश्य परस्मिन्वा तदर्पणम् ॥ यजेद्यष्टव्यमिति वा पृथग्भावः स सात्विकः ॥ १० ॥ मद्गुणश्रुतिमात्रेण मयि सर्वगुहाशये ॥ मनोगतिरविच्छिन्ना यथा गंगांऽभसोंऽबुधौ ॥ ११ ॥ लक्षणं भक्तियोगस्य निर्गुणस्य ह्युदाहृतम् ॥ अहैतुक्यव्यवहिता या भक्तिः पुरुषोत्तमे ॥ १२ ॥

नव भेदाः । तदेवं सगुणा भक्तिरेकाशीतिभेदा भवति ॥ १० ॥ निर्गुणा तु भक्तिरेकविधैव तामाह । मद्गुणश्रुतिमात्रेणेति द्वाभ्याम् । मद्गुणश्रुतिमात्रेण मयि पुरुषोत्तमे मनोगतिरिति या भक्तिः सा निर्गुणस्य भक्तियोगस्य लक्षणमित्यन्वयः । अविच्छिन्ना संतता ॥ ११ ॥ लक्षणं स्वरूपम् । अहैतुकी फलानुसंधानशून्या अव्यवहिता भेददर्शनरहिता च ॥१२॥

होय ॥ ९ ॥ आणि जो भेददर्शी पुरुष, पापक्षयाचा उद्देश धरून किंवा तें कर्म ईश्वरार्पण व्हावें ह्मणजे त्यापासून ईश्वराची प्रीति व्हावी असा उद्देश धरून अथवा 'पूजा करावी' अशी वेदाची आज्ञा आहे ती पूर्ण होण्याचा उद्देश धरून माझी पूजा करितो तो सात्विक (उत्तम प्रतीचा) भक्त होय. यांतही तीन भेद आहेत– पापक्षयासाठीं भक्ति करणारा कनिष्ठ, ईश्वरप्रीतीसाठीं भजणारा मध्यम आणि विधि पूर्ण करण्यासाठीं भक्ति करणारा उत्तम होय. याप्रमाणें सात्विक, राजस व तामस अशा तीन प्रकारच्या भक्तींचे प्रत्येकीचे तीन तीन असे नऊ भेद झाले; ह्या नऊ भक्तींचेहि आणखी श्रवण, कीर्तन, स्मरण, चरणसेवा, अर्चन, वंदन, दास्य, सख्य आणि आत्मनिवेदन हे नऊ नऊ भेद आहेत. मिळून सगुण भक्तीचे प्रकार ८१ झाले ॥ १० ॥ निर्गुण भक्ति तर एकाच प्रकारची आहे. जशी गंगेच्या पाण्याची गति समुद्राकडे असते त्याप्रमाणें सर्वांचा अंतर्यामी पुरुषोत्तम जो मी त्याचेठिकाणीं, माझ्या भक्तवात्सल्यादिक गुणांच्या श्रवणमात्रेंकरून कोणत्याहि फलाची इच्छा किंवा भेदबुद्धि न ठेवितां मनाची

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अविच्छिन्न गति होणें, अशी जी भक्ति, तें निर्गुणभक्तियोगाचें लक्षण सांगितलें आहे ॥ ११ ॥ १२ ॥ अशी निर्गुण भक्ति करणाऱ्या पुरुषांना, सालोक्य (माझ्याबरोबर एका लोकीं राहणें) सार्ष्टि (माझ्यासारखीं ऐश्वर्यें भोगणें) सामीप्य (माझ्याजवळ राहणें) सारूप्य (माझ्या सारखें रूप असणें) आणि एकत्व (सायुज्यमुक्ति ह्मणजे माझ्यारूपीं ऐक्य पावणें) ह्या चार प्रकारच्या मुक्ति मी दिल्या तरी देखील ते भक्त, माझ्या सेवनाखेरीज दुसरें कांहींच ग्रहण करीत नाहींत. मग त्यांना त्यांच्या प्राप्तीच्या इच्छेविषयीं शंका कशाला पाहिजे? ॥ १३ ॥ यास्तव तो सांगितलेला भक्तियोगच आत्यंतिक (कधींहि न ढळणारा) ह्मटला आहे. ज्याच्या योगानें मनुष्य, सत्वरजतमात्मक संसाराचें उल्लंघन करून मत्स्वरूपी होण्याविषयीं योग्य होतो ॥ १४ ॥ अशी भक्ति उत्पन्न होण्याचीं साधनें—निरिच्छपणें श्रद्धापूर्वक उत्तमरीतीनें स्वधर्माचरण करणें, निष्काम बुद्धीनें फारशी हिंसा न करितां पंचरात्रादिक आगमामध्यें सांगितल्याप्रमाणें माझी पूजा करणें ॥ १५ ॥ माझ्या मूर्तीचें दर्शन, आलिंगनादि

भक्तानां निष्कामतां कैमुत्यन्यायेनाह । सालोक्यं मया सहैकस्मिंल्लोके वासम् । सार्ष्टिं समानैश्वर्यम् । सामीप्यं निकटवर्तित्वम् । सारूप्यं समानरूपताम् । एकत्वं सायुज्यम् । उत अपि दीयमानमपि न गृह्णंति कुतस्तत्कामनेत्यर्थः ॥ १३ ॥ किमिति तर्हि भजंते भक्तेरेव परमफलत्वादित्याह । स एवेति । ननु त्रैगुण्यं हित्वा ब्रह्मप्राप्तिः परमफलं प्रसिद्धम् । सत्यं तत्तु भक्तावानुषंगिकमित्याह । येन भक्तियोगेन मद्भावाय ब्रह्मत्वाय ॥ १४ ॥ एवंभूताया भक्तेः साधनान्याह । पंचभिः । निषेवितेन सम्यगनु-

सालोक्यसार्ष्टिसामीप्यसारूप्यैकत्वमप्युत ॥ दीयमानं न गृह्णंति विना मत्सेवनं जनाः ॥ १३ ॥ स एष भक्तियोगाख्य आत्यंतिक उदाहृतः ॥ येनातिव्रज्य त्रिगुणं मद्भावायोपपद्यते ॥ १४ ॥ निषेवितेनानिमित्तेन स्वधर्मेण महीयसा ॥ क्रियायोगेन शस्तेन नातिहिंस्रेण नित्यशः ॥ १५ ॥ मद्धिष्ण्यदर्शनस्पर्शपूजास्तुत्यभिवंदनैः ॥ भूतेषु मद्भावनया सत्त्वेनासंगमेन च ॥ १६ ॥ महतां बहुमानेन दीनानामनुकंपया ॥ मैत्र्या चैवात्मतुल्येषु यमेन नियमेन च ॥ १७ ॥ आध्यात्मिकानुश्रवणान्नामसंकीर्तनाच्च मे ॥ आर्जवेनार्यसंगेन निरहंक्रियया तथा ॥ १८ ॥ मद्धर्मणो गुणैरेतैः परिसंशुद्ध आशयः ॥ पुरुषस्यांजसाऽभ्येति श्रुतमात्रगुणं हि माम् ॥ १९ ॥ यथा वातरथो घ्राणमावृंक्ते गंध आशयात् ॥ एवं योगरतं चेत आत्मानमविकारि यत् ॥ २० ॥

ष्ठितेन अनिमित्तेन स्वधर्मेण नित्यनैमित्तिकेन महीयसा श्रद्धादियुक्तेन क्रियायोगेन पंचरात्राद्युक्तपूजाप्रकारेण शस्तेन निष्कामेन ॥ १५ ॥ मद्धिष्ण्यं मत्प्रतिमादि तस्य दर्शनादिभिः सत्त्वेन धैर्येण असंगमेन वैराग्येण ॥ १६ ॥ १७ ॥ आर्जवेनाकौटिल्येन ॥ १८ ॥ मद्धर्मणो भगवद्धर्मानुष्ठातुः पुरुषस्याशयश्चित्तम् ॥ १९ ॥ प्रयत्नं विनैव प्राप्तौ

निमित्तानें स्पर्श, पूजा, स्तुति व वंदन हीं करीत जाणें प्राणिमात्रांचेठिकाणीं हीं परमेश्वराचीं स्वरूपेंच आहेत अशी भावना करणें, मनांमध्यें धैर्य व विषयांचेठिकाणीं वैराग्य धारण करणें ॥ १६ ॥ सत्पुरुषांचा पुष्कळ आदर करणें अनाथांवर दया करणें, गुणांनीं आपल्यासारख्या लोकांशीं मैत्री ठेवणें अहिंसादिक यम व जपपाठादिक नियम धारण करणें ॥ १७ ॥ आत्मस्वरूपाचें प्रतिपादन करणाऱ्या शास्त्राचें वारंवार श्रवण करणें, माझें नामसंकीर्तन करणें, मनाचा सरळपणा ठेवणें सत्पुरुषांचा समागम धरणें, देहादिकांचेठिकाणीं अभिमान सोडून देणें ॥ १८ ॥ याप्रकारच्या गुणांनीं भागवतधर्माचें आचरण करणाऱ्या पुरुषाचें अंतःकरण अत्यंत शुद्ध होतें आणि तें माझ्या गुणांचें श्रवण होतांच माझ्याठिकाणीं अनायासानें आसक्त होतें ॥ १९ ॥ ~~जसा वायूच्या योगानें वाहून येणारा सुगंध, आपल्या स्थानावरून (पुष्पादिक ठिकाणावरून)~~

१ यज्ञामध्यें आवश्यक सांगितलेल्या पशुहिंसेखेरीज दुसरी हिंसा निषिद्ध आहे ह्मणून मूळांत 'नातिहिंस्रेण' असें पद ठेविलें आहे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

घ्राणेंद्रियाला आपल्या स्वाधीन करून घेतो त्याप्रमाणें भक्तियोगांत निमग्न झालेलें व सुखदुःखादिकांचेठिकाणीं समता पावलेलें जें चित्त तें परमात्म्याला वश करून घेतें ॥ २० ॥ मी सर्व भूतांचा आत्मा असल्यामुळें सर्व प्राणिमात्रांचेठिकाणीं निरंतर राहिलों आहें त्या माझी अवज्ञा करून ह्मणजे सर्व भूतांचे ठिकाणीं मला न पाहतां जो मरणाऱ्या देहाचेठिकाणीं आत्मदृष्टि ठेऊन केवळ मूर्तींच्याठिकाणीं मात्र माझी पूजा करितो तो त्या पूजेचें केवळ अनुकरण (सोंग) करितो ॥ २१ ॥ हेंच स्पष्ट सांगतात.– सर्व भूतांचेठिकाणीं आत्मरूपत्वेंकरून असणाऱ्या माझा ह्मणजे ईश्वराचा अवमान करून जो मूर्खपणानें मूर्तींची मात्र पूजा करितो तो केवळ भस्मामध्येंच होम करितो; ह्मणजे भस्मामध्यें होम करणें हें जसें निष्फळ आहे त्याप्रमाणें त्याची सेवा निष्फळ होत्ये ॥ २२ ॥ देहादिकांचेठिकाणीं अभिमान धारण करणारा, भेददर्शी, सर्व भूतांचेठिकाणीं वैरभाव धारण करणारा आणि सर्व प्राण्यांच्या देहांमध्यें असलेल्या माझ्याशीं द्वेष करणारा जो पुरुष त्याचें मन कधींहि शांति पावत नाहीं ॥ २३ ॥

दृष्टांतः । वातो रथः प्रापको यस्य गंधस्य आशयात्स्थानात् । आवृंक्ते आत्मसात्करोति अविकारि समं यच्चेतः ॥ २० ॥ चित्तशुद्धिश्च सर्वभूतात्मदृष्ट्यैव भवतीति वक्तुं केवलप्रतिमादिनिष्ठां निंदन्नाह । अहमिति सप्तभिः । अर्चैव विडंबनमनुकरणम् । अर्चायां पूजाविडंबनमिति वा अवज्ञोपेक्षाद्वेषनिंदाः क्रमेण चतुर्भिर्निषिध्यंते ॥ २१ ॥ हित्वा उपेक्ष्य ॥ २२ ॥ २३ ॥ द्रव्यैरुत्पन्नया क्रियया भूतग्रामावमानिनस्तन्निंदकस्य ॥ २४ ॥ तर्हि किमर्चादावर्चनमनर्थकमेव नेत्याह । अर्चादाविति । सर्वभूतेष्ववस्थितं मां

अहं सर्वेषु भूतेषु भूतात्माऽवस्थितः सदा ॥ तमवज्ञाय मां मर्त्यः कुरुतेऽर्चाविडंबनम् ॥ २१ ॥ यो मां सर्वेषु भूतेषु संतमात्मानमीश्वरम् ॥ हित्वाऽर्चां भजते मौढ्याद्भस्मन्येव जुहोति सः ॥ २२ ॥ द्विषतः परकाये मां मानिनोऽभिन्नदर्शिनः ॥ भूतेषु बद्धवैरस्य न मनः शांतिमृच्छति ॥ २३ ॥ अहमुच्चावचैर्द्रव्यैः क्रिययोत्पन्नयाऽनघे ॥ नैव तुष्येऽर्चितोऽर्चायां भूतग्रामावमानिनः ॥ २४ ॥ अर्चादावर्चयेत्तावदीश्वरं मां स्वकर्मकृत् ॥ यावन्न वेद स्वहृदि सर्वभूतेष्ववस्थितम् ॥ २५ ॥ आत्मनश्च परस्यापि यः करोत्यंतरोदरम् ॥ तस्य भिन्नदृशो मृत्युर्विदधे भयमुल्बणम् ॥ २६ ॥ अथ मां सर्वभूतेषु भूतात्मानं कृतालयम् ॥ अर्हयेद्दानमानाभ्यां मैत्र्याऽभिन्नेन चक्षुषा ॥ २७॥ जीवाः श्रेष्ठा ह्यजीवानां ततः प्राणभृतः शुभे ॥ ततः सचित्ताः प्रवरास्ततश्चेंद्रियवृत्तयः ॥ २८॥

स्वहृदि यावन्न वेद स्वकर्मकृत्कर्माविरोधेन यथावकाशम् । अनेन कर्मनिष्ठाया अपि स एवावधिरित्युक्तं भवति ॥ २५ ॥ अंतरा अंतरं भेदम् । उत् अपि अरमल्पम् । अल्पमपि भेदं यः पश्यतीत्यर्थः । यद्वा अंतरा मध्ये उदरं शरीरम् । मृत्युरहं तस्य भयं विदधे करोमि ॥ २६ ॥ अथ अतः सर्वभूतेषु कृतावासम् । तत्र हेतुः । भूतानामात्मानमंतर्यामिणम् । अभिन्नेन चक्षुषा समदर्शनेन ॥ २७ ॥ तत्रापि यथोत्तरं मानाद्यतिशयः कर्तव्य इति वक्तुं तारतम्यमाह । जीवा इति सार्द्धैः षड्भिः । अजीवानामचेतनेभ्यः ततस्ते-

---

हे निष्पापे देवहूति, लहानमोठ्या उपचारांनीं संपादन केलेल्या पूजासामुग्रीनें प्रतिमेच्याठिकाणीं पूजा केलेलाहि मी, प्राणिमात्रांची अवहेलना करणाऱ्या पुरुषावर कधींहि संतुष्ट होत नाहीं ॥ २४ ॥ यास्तव हे माते, सर्व भूतांचेठिकाणीं असणाऱ्या मला जोंपर्यंत आपल्या हृदयामध्यें पुरुष जाणत नाहीं तोंपर्यंतच त्यानें स्वतःचीं नित्यनैमित्तिक कर्में करून मिळेल तितक्या अवकाशांत मूर्तींच्यावगैरे ठिकाणीं माझें ह्मणजे परमेश्वराचें पूजन करीत जावें ॥ २५ ॥ जो मनुष्य, स्वतांमध्यें, परमेश्वरामध्यें व सर्व प्राणिमात्रांमध्यें स्वल्प कां होईना अंतर मानितो त्या भेददृष्टि मनुष्याला मीच मृत्युरूपी होऊन अतिदुःसह असें संसारभय उत्पन्न करितों ॥ २६ ॥ यास्तव सर्व भूतांमध्यें वास करणारा सर्व भूतांचा अंतर्यामी जो मी त्या माझें 'आपल्याहून श्रेष्ठ आहेत त्यांचेठिकाणीं बहुमान, बरोबरीचे आहेत त्यांचेठिकाणीं मैत्री, कमी आहेत त्यांचेठिकाणीं प्रियवस्तूंचें दान आणि सर्वत्र समदृष्टि' ह्यांच्या योगानें पूजन करावें ॥ २७ ॥ हे मंगलरूपे देवहूति, मृत्तिका पाषाण इत्यादिक अचेतनांपेक्षां वृक्षादिक सचेतनप्राणी श्रेष्ठ

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होत, त्यांपेक्षांहि श्वासोच्छ्वास करणारे जंगमप्राणी श्रेष्ठ होत. त्यांच्यापेक्षांहि ज्ञान असणारे (सूर्यकमळ इत्यादिक) श्रेष्ठ जाणावे. त्यांच्यापेक्षांहि ज्यानां इंद्रियवृत्ति (रूपरसादिकांचीं ज्ञानें) आहेत ते श्रेष्ठ होत ॥ २८ ॥ त्यांमध्येंहि स्पर्श जाणणाऱ्या जीवांपेक्षां रसजाणणारे (मत्स्यवगैरे) श्रेष्ठ होत. त्यांच्यापेक्षांहि गंध जाणणारे (भ्रमरवगैरे) श्रेष्ठ आहेत. त्यांच्याहून शब्द जाणणारे (सर्प इत्यादिक) श्रेष्ठ होत ॥ २९ ॥ त्यांमध्येंहि रूपांचा भेद जाणणारे (कावळेवगैरे) श्रेष्ठ होत. त्यांच्यापेक्षां ज्यांच्या मुखांत खालीं व वर दोहोंकडे दांत असतात ते (मर्कटवगैरे) श्रेष्ठ होत. तसेच पादहीन प्राण्यापेक्षां पुष्कळ पायांचे (गोमीवगैरे) प्राणी श्रेष्ठ होत. त्यांच्यापेक्षां चार पायांचे (पश्वादिक) श्रेष्ठ होत. त्यांच्यापेक्षां दोन पायांचे (मनुष्यादिक) श्रेष्ठ होत ॥ ३० ॥ त्यांमध्यें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र हे चार वर्ण श्रेष्ठ होत. त्यांमध्येंहि ब्राह्मण उत्तम होय. ब्राह्मणामध्येंहि वेदवेत्ता श्रेष्ठ आहे. त्याच्यापेक्षांही अर्थवेत्ता श्रेष्ठ होय ॥ ३१ ॥ अर्थवेत्त्यापेक्षां दुसऱ्याचे संशय घालविणारा

ष्वपि प्राणभृतः प्राणवृत्तिमंतः सचित्ता ज्ञानवंतः इंद्रियाणां वृत्तयो येषु इंद्रियवृत्तयो वृक्षाणामपि सूक्ष्माः संत्येव । तथाहि महाभारते मोक्षधर्मेषु स्मर्यते । तस्मात्पश्यंति पादपाः तस्माज्जिघ्रंति पादपाः इत्यादि प्रसिद्धा तु स्पर्शनेंद्रियवृत्तिरेव ॥ २८ ॥ अतस्तेभ्यः स्पर्शवेदिभ्यो रसवेदिनो मत्स्यादयः श्रेष्ठाः गंधविदो भ्रमरादयः शब्दविदः सर्पादयः

तत्रापि स्पर्शवेदिभ्यः प्रवरा रसवेदिनः ॥ तेभ्यो गंधविदः श्रेष्ठास्ततः शब्दविदो वराः ॥ २९ ॥ रूपभेदविदस्तत्र ततश्चोभयतोदतः ॥ तेषां बहुपदाः श्रेष्ठाश्चतुष्पादस्ततो द्विपात् ॥ ३० ॥ ततो वर्णाश्च चत्वारस्तेषां ब्राह्मण उत्तमः ॥ ब्राह्मणेष्वपि वेदज्ञो ह्यर्थज्ञोऽभ्यधिकस्ततः ॥ ३१ ॥ अर्थज्ञात्संशयच्छेत्ता ततः श्रेयान्स्वकर्मकृत् ॥ मुक्तसंगस्ततो भूयानदोग्धा धर्ममात्मनः ॥ ३२ ॥ तस्मान्मय्यर्पिताशेषक्रियार्थात्मा निरंतरः ॥ मय्यर्पितात्मनः पुंसो मयि संन्यस्तकर्मणः ॥ न पश्यामि परं भूतमकर्तुः समदर्शिनात् ॥ ३३ ॥ मनसैतानि भूतानि प्रणमेद्बहु मानयन् ॥ ईश्वरो जीवकलया प्रविष्टो भगवानिति ॥ ३४ ॥ भक्तियोगश्च योगश्च मया मानव्युदीरितः ॥ ययोरेकतरेणैव पुरुषः पुरुषं व्रजेत् ॥ ३५ ॥

॥ २९ ॥ रूपभेदविदः काकादयः उभयतो दंता येषाम् । अपादेभ्यो बहुपादास्तेभ्यश्चतुष्पादा इत्यर्थः । ततो द्विपान्मनुष्यः ॥ ३० ॥ ततस्तेषु वर्णाः ॥ ३१ ॥ संशयच्छेत्ता मीमांसकः । ततोऽपि केवलात्स्वकर्मकृत् मुक्तसंगस्य लक्षणमात्मनो धर्ममदोग्धा निष्काम इत्यर्थः ॥ ३२ ॥ अर्पिता अशेषाः क्रिया अर्थास्तत्फलान्यात्मा देहश्च येन अत एव निरंतरोऽव्यवहितः अकर्तुः कर्तृत्वाभिमानशून्यात् ॥ ३३ ॥ जीवानां कलया परिकलनेन अंतर्यामितया प्रविष्ट इति दृष्ट्वेत्यर्थः ॥ ३४ ॥ उक्तं भक्तियोगं पूर्वोक्तेनाष्टां-

---

(मीमांसक) श्रेष्ठ आहे. त्याच्यापेक्षांहि स्वतांचीं (वर्णाश्रमविहित) कर्में करणारा श्रेष्ठ होय. त्याच्याहूनहि सर्व संगपरित्याग करून राहिलेला व निष्काम कर्म करणारा श्रेष्ठ होय ॥ ३२ ॥ त्याहूनहि ज्यानें स्वतःचीं सर्व कर्में, त्या कर्मांचीं फलें व शरीर हीं सर्वच मला अर्पण केलीं आहेत त्यामुळें माझी प्राप्ती होण्यास ज्याला कांहींच अडकाठी राहिली नाहीं तो श्रेष्ठ होय. आपला देह मला अर्पण करणारा, माझेठिकाणीं कर्मांचें फळ अर्पण करणारा, कर्तृत्वाभिमानानें रहित, व समदृष्टि ठेवणारा अशा पुरुषाहून दुसरा उत्कृष्ट प्राणी मला कोणीच दिसत नाहीं ॥ ३३ ॥ तस्मात् भगवान् ईश्वरच जीवरूपानें सर्व प्राण्यांचेठिकाणीं प्रविष्ट झाला आहे अशा बुद्धीनें ह्या सर्वप्राणिमात्रांचा बहुमान करून त्यांना वंदन करीत जावें ॥ ३४ ॥ हे मनुकन्ये, मी तुला भक्तियोग आणि अष्टांगयोग हे दोन्हीहि सांगितले आहेत; ज्या दोहोंपैकीं एकाचेंहि

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आचरण केलेंअसतां पुरुषाला परमेश्वररूपाची प्राप्ति होईल ॥ ३५ ॥ आतां जीवाला संसार होण्याचें कारण व कालाचें स्वरूप तुला सांगतों.— हे साध्वि, भगवान् ब्रह्मपरमात्म्याचें जें हें प्रकृतिपुरुषात्मक व त्या दोन्हींहून निराळें स्वरूप आहे त्यालाच दैव असें ह्मणतात; याच्या प्रेरणेनें जीवांना कर्मांच्या नानाप्रकारच्या गति प्राप्त होतात ॥ ३६ ॥ हेंच स्वरूप, पदार्थमात्रांच्या निराळेपणाला कारण झालें ह्मणजे त्याला काल असें ह्मणतात. ज्या कालापासून महत्तत्त्व आदिकरून तत्त्वांना व त्यांच्या अभिमानानें भेददृष्टि मानणाऱ्या जीवांना भय प्राप्त होतें ॥ ३७ ॥ जो काल, सर्व जगाचा आश्रय असल्यामुळें सर्व प्राणिमात्रांच्या अंतरीं प्रवेश करून पंचमहाभूतांच्या योगानें सर्व भूतांचा संहार करितो तोच हा काल, जगाला वश ठेवणाऱ्या ब्रह्मादिकांनाहि प्रभु (त्यांस आपल्या स्वाधीन राखणारा) आहे व यज्ञादि कर्मांचें फळ देणारा

गयोगेन सहोपसंहरति । भक्तियोगश्चेति । हेमानवि पुरुषं परमेश्वरम् ॥ ३५ ॥ यदन्यत्पृष्टं जीवस्य संसृतीः कालस्य स्वरूपं चाचक्ष्वेति तदाह । एतदिति सार्धेन । एतत्सर्वनियंतृ यद्भगवतो रूपम् । कीदृशम् । प्रधानपुरुषात्मकं परं तद्व्यतिरिक्तं च एतदेव दैवमित्यभिधीयते कीदृशं कर्मणो विचेष्टितं नानासंसृतिलक्षणं यस्मात्तत् दैवप्रेरितकर्मकृताः संसृतयो विचित्रा इत्यर्थः ॥ ३६ ॥ एतदेव भगवतो रूपं काल इति चाभिधीयते । कीदृशम् । रूपभेदस्य वस्तूनामन्यथात्वस्यास्पदमाश्रयः कारणम् । उक्तं हि ।

एतद्भगवतो रूपं ब्रह्मणः परमात्मनः ॥ परं प्रधानं पुरुषं दैवं कर्म विचेष्टितम् ॥ ३६ ॥ रूपभेदास्पदं दिव्यं काल इत्यभिधीयते ॥ भूतानां महदादीनां यतो भिन्नदृशां भयम् ॥ ३७ ॥ योंऽतः प्रविश्य भूतानि भूतैरत्त्यखिलाश्रयः ॥ स विष्ण्वाख्योऽधियज्ञोऽसौ कालः कलयतां प्रभुः ॥ ३८ ॥ न चास्य कश्चिद्दयितो न द्वेष्यो न च बांधवः ॥ आविशत्यप्रमत्तोऽसौ प्रमत्तं जनमंतकृत् ॥ ३९ ॥ यद्भयाद्वाति वातोऽयं सूर्यस्तपति यद्भयात् ॥ यद्भयाद्वर्षते देवो भगणो भाति यद्भयात् ॥ ४० ॥ यद्वनस्पतयो भीता लताश्चौषधिभिः सह ॥ स्वे स्वे कालेऽभिगृह्णंति पुष्पाणि च फलानि च ॥ ४१ ॥ स्रवंति सरितो भीता नोत्सर्पत्युदधिर्यतः ॥ अग्निरिंधे सगिरिभिर्भूर्न मज्जति यद्भयात् ॥ ४२ ॥ नभो ददाति श्वसतां पदं यन्नियमाददः ॥ लोकं स्वदेहं तनुते महान्सप्तभिरावृतम् ॥ ४३ ॥

कालाद्गुणव्यतिकर इति वक्ष्यते च गुणव्यतिकरः काल इति दिव्यमद्भुतप्रभावम् । तदेवाह । भूतानामिति यावत्समाप्ति । महदादीनां तत्तदभिमानिनां जीवानाम् ॥ ३७ ॥ भयहेतुत्वमाह । य इति भूतैरेव भूतान्यत्ति संहरति अधियज्ञो यज्ञफलदाता कलयतां वशीकुर्वताम् ॥ ३८ ॥ ३९ ॥ ४० ॥ यच्चस्माद्भीताः ॥ ४१ ॥ यतो भीताः सरितः स्रवंति इंधे दीप्यते सह गिरिभिर्भूः ॥ ४२ ॥ अदो नभो यन्नियमाद्यस्याज्ञया महान्महत्तत्त्वमंकुरात्मकं स्वदेहं लोकत्वेन तनुते विस्तारयति ॥ ४३ ॥

विष्णुनामक आहे ॥ ३८ ॥ या कालाला कोणी आवडता नाहीं, कोणी शत्रु नाहीं व कोणी बांधवहि नाहीं; हा स्वतः सावध असून बेसावध असलेल्या लोकांमध्यें प्रवेश करितो आणि त्यांचा संहार करितो ॥ ३९ ॥ ज्यांच्या भयानें जगाचा निर्वाह चालविणारा वायूहि सर्वठिकाणीं संचार करीत असतो. ज्याच्या भयानें सूर्य त्या त्या कालीं योग्य ताप उत्पन्न करितो, ज्याच्या भयानें इंद्र वृष्टि करितो. ज्याच्या भयानें नक्षत्रांचा समुदाय प्रकाश पावतो ॥ ४० ॥ ज्याच्यापासून भ्यालेल्या वनस्पति व लता ह्या ओषधींसहवर्तमान आपापल्या वसंतादिक कालाचेठिकाणीं पुष्पें आणि फळें प्रकट करितात ॥ ४१ ॥ ज्याच्यापासून भ्यालेल्या नद्या, वाहातात व ज्यापासून भ्यालेला समुद्रहि आपली मर्यादा उल्लंघन करीत नाहीं. ज्याच्या भयामुळें अग्नि प्रदीप्त होतो. ज्याच्याभयानें पर्वतांसहवर्तमान भूमि बुडून जात नाहीं ॥ ४२ ॥ ज्याच्या आज्ञेवरून

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हें आकाश, प्राण्यांना राहण्यासाठीं जागा देतें· ज्याच्या आज्ञेवरून महत्तत्त्व, जगाचा मूळ अंकूर अशा आपल्या देहापासून पृथिव्यादिक सात आवरणांनीं वेष्टित अशा लोकाला ब्रह्मांडरूपानें विस्तृत करितें ॥ ४३ ॥ ज्यांच्या स्वाधीन हें चराचर जग आहे ते सत्व, रज, तम ह्या तीन गुणांचे नियंते ब्रह्मविष्णुरुद्रनामक देवहि ज्याच्या भयानें या विश्वाच्या उत्पत्तिस्थिति संहाराचेठिकाणीं प्रत्येक कल्पामध्यें प्रवृत्त होतात ॥ ४४ ॥ तो काल वस्तुतः अनादि अनंत व अविनाशी असून पिता इत्यादिकांच्या रूपानें पुत्रादिकांस उत्पन्न करीत होत्साता जगाला उत्पन्न करणारा आहे आणि मृत्यूच्या योगानें अंतकालासुद्धां मारीत होत्साता सर्वांचा अंत करणारा आहे ॥ ४५ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील तृतीयस्कंधामध्यें हा एकुणतिसावा अध्याय समाप्त झाला ॥ २९ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ७ ॥ ॥ आतां या तिसाव्या अध्यायामध्यें देहपत्नी इत्यादिकांचेठिकाणीं आसक्तचित्त झालेल्या कामीपुरुषांची पापाच्या योगेंकरून तमोगुणात्मक अधोगति वर्णन केली आहे ॥ १ ॥ श्रीभगवान्

गुणाभिमानिनो गुणनियंतारो देवा ब्रह्मादयोऽस्य विश्वस्य सर्गादिषु प्रवर्तंते । अनुयुगं वारंवारमित्यर्थः ॥ ४४ ॥ जनेन पित्रादिना जनं पुत्रादिं जनयन्नादिकृत् मृत्युनांऽतकमपि मारयन्नंतकरः स्वयं त्वनादिरनंतोऽव्ययश्च ॥ ४५ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे तृतीयस्कंधे टीकायामेकोनत्रिंशत्तमोऽध्यायः ॥ २९ ॥ ॥ त्रिंशे तु कायकांतादिलालनाकुल-

गुणाभिमानिनो देवाः सर्गादिष्वस्य यद्भयात् ॥ वर्ततेऽनुयुगं येषां वश एतच्चराचरम् ॥ ४४ ॥ सोऽनंतोंऽतकरः कालोऽनादिरादिकृदव्ययः ॥ जनं जनेन जनयन्मारयन्मृत्युनांतकम् ॥ ४५ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे तृतीयस्कंधे एकोनत्रिंशत्तमोऽध्यायः ॥ २९ ॥ ॥ कपिल उवाच ॥ तस्यैतस्य जनो नूनं नायं वेदोरुविक्रमम् ॥ काल्यमानोऽपि बलिनो वायोरिव घनावलिः ॥ १ ॥ यं यमर्थमुपादत्ते दुःखेन सुखहेतवे ॥ तं तं धुनोति भगवान्पुमान् शोचति यत्कृते ॥ २ ॥ यदध्रुवस्य देहस्य सानुबंधस्य दुर्मतिः ॥ ध्रुवाणि मन्यते मोहाद्गृहक्षेत्रवसूनि च ॥ ३ जंतुर्वै भव एतस्मिन्यां यां योनिमनुव्रजेत् ॥ तस्यां तस्यां स लभते निर्वृतिं न विरज्यते ॥ ४ ॥

चेतसाम् ॥ कामिनां तामसी पापादधोगतिरुदीर्यंते ॥१॥ कालप्रभाववर्णनपूर्वकं वैराग्याय विचित्रकर्मकृतां संसृतिमध्यायत्रयेण प्रपंचयति । तस्यैतस्य बलिनः कालस्य बलिनेति वा पाठः । काल्यमानो विचाल्यमानोऽपि वायोर्विक्रमं यथा मेघपंक्तिर्न वेद ॥ १ ॥ विक्रममेवाह । यं यमर्थं दुःखेन प्रयासेनोपादत्ते आपादयति तं तमर्थं भगवान्कालो धुनोति विनाशयति । यत्कृते यन्निमित्तम् ॥ २ ॥ शोके हेतुः । यद्यस्मात्सानुबंधस्य कलत्रादिसहितस्य देहस्य संबंधीनि गृहादीनि वसु द्रव्यम् । अनुक्तसमुच्चयार्थश्चकारः ॥ ३ ॥ दुर्मतित्वं

कपिल ह्मणाला— हे माते, जशी मेघांची पंक्ति वायूच्या योगानें इकडेतिकडे धांवत असत्ये तथापि ती, वायूच्या पराक्रमास जाणत नाहीं त्याप्रमाणें पूर्वीं सांगितलेल्या बलवत्तर कालाच्या योगानें निरनिराळ्या अनेक अवस्था पावणाराहि हा लोक, त्या कालाच्या महान् पराक्रमास खरोखर जाणत नाहीं ॥ १ ॥ हा पुरुष, जी जी वस्तु आपल्याला सुख होण्याकरितां मोठ्या प्रयत्नानें संपादन करितो तिचा तिचा हा सर्व समर्थ काल नाश करितो असें झालें ह्मणजे हा पुरुष, त्या वस्तूकरितां शोक करीत बसतो ॥ २ ॥ शोकाचें कारण, तो दुर्बद्धि पुरुष, पुत्रकलत्रादिसहित नश्वर असलेल्या आपल्या देहाच्या संबंधानें प्राप्त झालेल्या घर, शेत व द्रव्य यांस अज्ञानानें 'शाश्वत आहेत' असें मानितो ह्मणून त्यांचा नाश झालाअसतां त्यास शोक प्राप्त होतो ॥ ३ ॥ या संसारामध्यें प्राणी ज्या ज्या देवमनुष्यादिक योनीमध्यें जन्मास जाईल त्या त्या योनीमध्यें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तो सुख पावतो ह्मणून विरक्त होत नाहीं ॥ ४ ॥ पहा– नरकामध्यें असणाराहि जीव, तेथील विष्ठेच्या आहारादिकांचें त्याला सुख वाटत असल्यामुळें भगवंताच्या मायेनें मोहित होत्साता त्या आपल्या कीटकादिक देहाचाहि त्याग करण्याची मुळींच इच्छा करीत नाहीं ॥ ५ ॥ तर मनुष्य, स्वतांचा देह, बायको, मुलें, घर, पशु, द्रव्य, बंधु यांच्याविषयीं आपल्या मनांत मनोराज्यें (उत्तरोत्तर सुख वाढण्याचे विचार) करीत होत्साता आपल्याला धन्य असें मानीत असतो ॥ ६ ॥ नंतर ह्या स्त्रीपुत्रादिकांचें पोषण कसें करावें अशा चिंतेनें त्याचें सर्वांग जळत असतें तेव्हां तो दुरात्मा मूढ एका पाठीमागून एक अशीं निरंतर पापें करितो ॥ ७ ॥ व्यभिचारिणी स्त्रियांनीं एकांतस्थलीं पसरलेल्या संभोगादिरूप मायाजाळानें व मधुर मधुर भाषणें करणाऱ्या मुलांच्या शब्दांनीं ज्याचें अंतःकरण व इंद्रियें आकृष्ट झालीं आहेत असा तो गृहस्थाश्रमी पुरुष, दुःखांनीं भरलेल्या व कपटधर्मांनीं युक्त अशा आपल्या घरामध्यें आळस न करितां दुःखाचें निवारण करीत असूनहि 'हें सुखच आहे' असें मानितो परंतु खरें

दर्शयन्दुःखं प्रपंचयति । जंतुरिति चतुर्दशभिः ॥ ४ ॥ नारक्यां नरकाहारादिभिर्जातायाम् ॥ ५ ॥ निरूढमूलं प्रसृतमनोरथं हृदयं यस्य बहुमन्यते कृतार्थोऽहमिति श्लाघते ॥ ६ ॥ उद्वहनाधिना पोषणचिंतया ॥ ७ ॥ दुराशयत्वमाह । आक्षिप्त आत्मा इंद्रियाणि च यस्य । कया । असतीनां पुंश्चलीनामपि रहसि

नरकस्थोऽपि देहं वै न पुमांस्त्यक्तुमिच्छति ॥ नारक्यां निर्वृतौ सत्या देवमायाविमोहितः ॥ ५ ॥ आत्मजायासुतागारपशुद्रविणबंधुषु ॥ निरूढमूलहृदय आत्मानं बहु मन्यते ॥ ६ ॥ संदह्यमानसर्वांग एषामुद्वहनाधिना ॥ करोत्यविरतं मूढो दुरितानि दुराशयः ॥ ७ ॥ आक्षिप्तात्मेंद्रियः स्त्रीणामसतीनां च मायया ॥ रहोरचितयाऽऽलापैः शिशूनां कलभाषिणाम् ॥ ८ ॥ गृहेषु कूटधर्मेषु दुःखतंत्रेष्वतंद्रितः ॥ कुर्वन्दुःखप्रतीकारं सुखवन्मन्यते गृही ॥ ९ ॥ अर्थैरापादितैर्गुर्व्या हिंसयेतस्ततश्च तान् ॥ पुष्णाति येषां पोषेण शेषभुग्यात्यधः स्वयम् ॥ १० ॥ वार्तायां लुप्यमानायामारब्धायां पुनः पुनः ॥ लोभाभिभूतो निःसत्त्वः परार्थे कुरुते स्पृहाम् ॥ ११ ॥ कुटुंबभरणाकल्पो मंदभाग्यो वृथोद्यमः ॥ श्रिया विहीनः कृपणो ध्यायन् श्वसिति मूढधीः ॥ १२ ॥

रचितया संभोगादिरूपया मधुरभाषिणां शिशूनामालापैश्च सुखवन्मन्यत इत्युत्तरेणान्वयः ॥ ८ ॥ कूटाः वित्तशाठ्यादिबहुला धर्मा येषु दुःखप्रधानेषु ॥ ९ ॥ येषां पोषणेनाधो याति तान्पुष्णाति शेषभुगिति भोगोऽपि तस्य दुर्लभ इत्यर्थः ॥ १० ॥ वार्तायां जीविकायाम् । निःसत्त्वोऽशक्तः परार्थे परस्वे ॥ ११ ॥ अकल्पोऽसमर्थः ॥ १२ ॥

सुख पावत नाहीं ॥ ८ ॥ ९ ॥ शास्त्रमर्यादेचें उल्लंघन करून मोठ्या हिंसेच्या योगानें जिकडून तिकडून मिळविलेल्या धनादिकेंकरून त्या स्त्रीपुत्रादिकांचें पोषण करितो व त्या सर्वांचें भोजनादिक झाल्यावर अवशेष राहिलेलें अन्नादिक आपण भक्षण करितो याप्रमाणें त्यांच्या पोषणानें आपण अधोगतीला जातो ॥ १० ॥ उपजीविकेसाठीं तो जे जे व्यापार आरंभितो ते आरंभिलेले व्यापार वारंवार बुडून त्यांमध्यें तोटा होऊं लागला असतां, स्वतः द्रव्य मिळविण्याविषयीं अशक्त व लोभानें विवेकशून्य होत्साता तो दुसऱ्याचें द्रव्य अपहार करण्याची इच्छा करितो ॥ ११ ॥ आणि त्या दैवहीन व संपत्तिरहित पुरुषाचें द्रव्य मिळविण्याचे सर्व प्रयत्न निष्फल होऊं लागले असतां कुटुंबाच्या पोषणाविषयीं असमर्थ असल्यामुळें दीन झालेला तो मूढबुद्धि पुरुष, 'काय करावें, कसा माझा उत्कर्ष होईल' अशी चिंता करीत मोठ्यांनीं श्वासोच्छ्वास

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

टाकितो ॥ १२ ॥ अशा रीतीनें त्याच्या हातून आपलें पोषण होईनासें झालें ह्मणजे जसे दुष्ट शेतकरी ह्मातार्‍या बैलाचा आदर करीत नाहींत त्याप्रमाणें त्याचे स्त्रीपुत्रादिक जसे पूर्वीं आपल्या पोषणाच्यावेळीं त्याचा आदर राखीत असत त्याप्रमाणें वृद्धदशेमध्यें राखीत नाहींत व त्याला अन्नाच्छादनादिकहि देत नाहींत ॥ १३ ॥ असा अनादर होऊं लागला तरी त्याला वैराग्य होत नाहीं, जरेनें त्याचें स्वरूप विरूप होतें, भक्षण केलेलें अन्न पचन होत नाहीं, ह्मणून अल्पाहारी, अल्पव्यापार, रोगग्रस्त व शेवटीं मरणोन्मुख झाला तरी, त्यानें पूर्वीं पोषण केलेल्या स्त्रीपुत्रादिकांनीं पोषित होत्साता त्यांनीं अवमानपूर्वक दिलेलें अन्नादिक भक्षण करून घराचें रक्षण करणार्‍या कुत्र्याप्रमाणें घरांत राहतो ॥ १४ ॥ १५ ॥ पुढें कफाच्या योगानें त्याच्या वायूच्या मार्गभूत नाड्या रुद्ध होतात, खोकला व श्वास उत्पन्न होऊन त्याला फार आयास होतात, आणि प्राणोत्क्रमणाच्यावेळीं उर्ध्वगति झालेल्या वायूनें त्याच्या डोळ्यांच्या बाहुल्या बाहेर पडून तो घशामध्यें घुरघुर शब्द करूं लागतो ॥ १६ ॥ निजलेला व

पूर्वं यथाऽऽद्रियंते तथाऽऽदरं न कुर्वंति कीनाशाः कृपणाः कृषीवलाः गोजरं वृद्धं बलीवर्दम् ॥ १३ ॥ भ्रियमाणः पुष्यमाणः ॥ १४ ॥ अवमत्याऽवज्ञयोपन्यस्तं समीपे प्रक्षिप्तम् । गृहपालः श्वा आहरन् भुंजानः आमयावी रोगी ॥ १५ ॥ उत्तारो बहिर्निर्गतनेत्रः कफेन संरुद्धा नाड्यो मार्गभूता यस्य कासश्वासाभ्यां कृत आयासो

एवं स्वभरणाकल्पं तत्कलत्रादयस्तथा ॥ नाद्रियंते यथा पूर्वं कीनाशा इव गोजरम् ॥ १३ ॥ तत्राप्यजातनिर्वेदो भ्रियमाणः स्वयंभृतैः ॥ जरयोपात्तवैरूप्यो मरणाभिमुखो गृहे ॥ १४ ॥ आस्तेऽवमत्योपन्यस्तं गृहपाल इवाहरन् ॥ आमयाव्यप्रदीप्ताग्निरल्पाहारोऽल्पचेष्टितः ॥ १५ ॥ वायुनोत्क्रमतोत्तारः कफसंरुद्धनाडिकः ॥ कासश्वासकृतायासः कंठे घुरघुरायते ॥ १६ ॥ शयानः परिशोचद्भिः परिवीतः स्वबंधुभिः ॥ वाच्यमानोऽपि न ब्रूते कालपाशवशं गतः ॥ १७ ॥ एवं कुटुंबभरणे व्यापृतात्माऽजितेंद्रियः ॥ म्रियते रुदतां स्वानामुरुवेदनयाऽस्तधीः ॥ १८ ॥ यमदूतौ तदा प्राप्तौ भीमौ सरभसेक्षणौ ॥ स दृष्ट्वा त्रस्तहृदयः शकृन्मूत्रं विमुंचति ॥ १९ ॥ यातनादेह आवृत्य पाशैर्बध्वा गले बलात् ॥ नयतो दीर्घमध्वानं दंड्यं राजभटा यथा ॥ २० ॥ तयोर्निर्भिन्नहृदयस्तर्जनैर्जातवेपथुः ॥ पथि श्वभिर्भक्ष्यमाण आर्तोऽघं स्वमनुस्मरन् ॥ २१ ॥

यस्य घुरघुर इति शब्दं करोति ॥ १६ ॥ परिवीतः परिवेष्टितः वाच्यमानो बंधो तातेत्याहूयमानः ॥ १७ ॥ अस्तधीर्नष्टमतिः ॥ १८ ॥ मृतस्य पुण्यपापाभ्यां द्वे गती तत्र पापगतिमाह । यमदूतावित्यादि यावत्समाप्ति । सरभसं सक्रोधमीक्षणं ययोस्तौ दृष्ट्वा ॥ १९ ॥ आवृत्य निरुद्ध्य ॥ २० ॥ तयोस्तर्जनैर्निर्भिन्नं हृदयं यस्य आर्तः संश्वल-

कालपाशाच्या (मृत्यूच्या) स्वाधीन झालेला तो जवळ बसून शोक करणार्‍या त्याच्या बंधूंनीं वेष्टित होत्साता, त्यांनीं 'बाबा, दादा' इत्यादिक हाका मारून बोलविला तरी बोलत नाहीं ॥ १७ ॥ याप्रमाणें ज्यानें इंद्रियांचा जय न करितां केवळ कुटुंबाच्या पोषणाविषयीं आपलें शरीर लाविलें तो शेवटीं प्राप्त होणार्‍या मोठ्या वेदनेनें नष्टबुद्धि होऊन त्याचे बांधव रोदन करीतअसतां मरण पावतो ॥ १८ ॥ तेव्हां तो आपणास नेण्याविषयीं प्राप्त झालेल्या व क्रोधावेशानें डोळे वटारलेल्या भयंकर यमदूतांना पाहून फारच भयभीत होतो आणि मलमूत्रोत्सर्ग करितो ॥ १९ ॥ जसे राजाचे दूत अपराधी मनुष्याला बांधून नेतात त्याप्रमाणें दोघे यमदूत त्या प्राण्याला यातना भोगण्यास योग्य अशा देहामध्यें रोधून कंठाचेठिकाणीं पाशांनीं बंधन करून बलात्कारानें पुष्कळ लांब रस्त्यावरून ओढीत नेतात ॥ २० ॥ त्या दूतांच्या 'तोडा मारा' इत्यादिक भाषणांनीं हृदय फाटून गेलेला, थरथरां कापणारा व मार्गामध्यें कुत्रे ज्याला फाडफाडून खातात असा तो पीडित झाला ह्मणजे आपल्या पापाचें स्मरण करीत

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होत्साता– ॥ २१ ॥ क्षुधेनें व तृषेनें व्याप्त, सूर्यांचा ताप वणवा आणि वायु यांच्या उष्णतेनें ज्यावरील वाळू तापून गेली आहे व जेथें विश्रांतीचें स्थान किंवा पाणी मुळींच नाहीं अशा मार्गामध्यें अतिशय ताप पावणारा, म्हणून चालण्यास असमर्थ असूनहि पाठीवर चाबुकानें ताडित होत्साता मोठ्या संकटानें चालतो ॥ २२ ॥ चालतांना थकून गेल्यामुळें वाटेमध्यें जेथें तेथें पडतो, मूर्छा पावतो, परंतु पुनः उठतो. याप्रमाणें अंधकारानें युक्त व अतिशय दुःखप्रद अशा मार्गानें त्या प्राण्याला दूत यमलोकीं घेऊन जातात ॥ २३ ॥ यमाची नगरी पृथिवीपासून ९९००० योजनें लांब आहे इतक्या मार्गावरून यमदूतांनीं प्राण्याला तीन मुहूर्तांमध्यें (फारच पापी असला तर) दोनच मुहूर्तांमध्यें, नेलें असतां त्याला अतिशय यातना प्राप्त होतात ॥ २४ ॥ पुढें तेथील यातना त्याच्या आंगाभोंवतीं जळकीं काष्ठें वगैरे बांधून त्याच्या अवयवांचें जाळणें, त्याच्या शरीराचें मांस त्याच्याकडूनच तोडवून किंवा दुसऱ्या कडून तोडवून तें त्याचें त्याच्याचकडून भक्षण करविणें ॥ २५ ॥ यमाच्या घरीं असलेल्या कुत्र्यांकडून व

तीति द्वितीयेनान्वयः ॥ २१ ॥ क्षुत्तृड्भ्यां परीतो व्याप्तः तप्ता वालुका यस्मिन् निर्गत आश्रमो विश्रामस्थानमुदकं च यस्मिन् ॥ २२ ॥ यमसादनं नीतो भवति ॥ २३ ॥ तत्रैव विशेषमाह । अध्वनः संबंधिनां योजनानां नवतिं नव च सहस्राणि पापाधिक्ये द्वाभ्यां वा नीतः सन् ॥ २४ ॥ यातनाः संक्षेपतो दर्शयति चतुर्भिः । आदीपनं

क्षुत्तृट्परीतोऽर्कदवानलानिलैः संतप्यमानः पथि तप्तवालुके ॥ कृच्छ्रेण पृष्ठे कशया च ताडितश्चलत्यशक्तोऽपि निराश्रमोदके ॥ २२ ॥ तत्र तत्र पतन् श्रांतो मूर्छितः पुनरुत्थितः ॥ यथा पापीयसा नीतस्तमसा यमसादनम् ॥ २३ ॥ योजनानां सहस्राणि नवतिं नव चाध्वनः ॥ त्रिभिर्मुहूर्तैर्द्वाभ्यां वा नीतः प्राप्नोति यातनाः ॥ २४ ॥ आदीपनं स्वगात्राणां वेष्टयित्वोल्मुकादिभिः ॥ आत्ममांसादनं क्वापि स्वकृत्तं परतोऽपि वा ॥ २५ ॥ जीवतश्चांत्राभ्युद्धारः श्वगृध्रैर्यमसादने ॥ सर्पवृश्चिकदंशाद्यैर्दशद्भिश्चात्मवैशसम् ॥ २६ ॥ कृंतनं चावयवशो गजादिभ्यो भिदापनम् ॥ पातनं गिरिशृंगेभ्यो रोधनं चांबुगर्तयोः ॥ २७ ॥ यास्तामिस्रांधतामिस्रा रौरवाद्याश्च यातनाः ॥ भुंक्ते नरो वा नारी वा मिथः संगेन निर्मिताः ॥ २८ ॥ अत्रैव नरकः स्वर्ग इति मातः प्रचक्षते ॥ या यातना वै नारक्यस्ता इहाप्युपलक्षिताः ॥ २९ ॥ एवं कुटुंबं बिभ्राण उदरंभर एव वा ॥ विसृज्येहोभयं प्रेत्य भुंक्ते तत्फलमीदृशम् ॥ ३० ॥

प्रज्वलनं प्राप्नोति स्वेन कृत्तमन्येन वा कृत्तं छिन्नं यत्स्वस्य मांसं तस्य भक्षणमित्यर्थः ॥ २५ ॥ आत्मनो वैशसं पीडाम् ॥ २६ ॥ भिदापनं भेदप्रापणम् ॥ २७ ॥ २८ ॥ न चैतदसंभावितमत्रापि दृश्यमानत्वादित्याह । अत्रैवेति ॥ २९ ॥ उभयं कुटुंबं स्वं देहं च ॥ ३० ॥

गिधाडांकडून तो प्राणी जिवंत असतां त्याचीं आंतडीं बाहेर काढणें, सर्प, विंचू, डांस इत्यादिक दंश करणाऱ्या प्राण्याकडून त्याच्या शरीरास पीडा करणें ॥ २६ ॥ शस्त्रांनीं त्याचे अवयव तोडून काढणें, हत्तीवगैरे पशूंकडून त्याचे अवयव तुडवून वेगवेगळे करणें, पर्वतांच्या शिखरांवरून त्याला खालीं लोटणें, पाण्यामध्यें किंवा चिखलाच्या खाड्यामध्यें त्याला बुडवून ठेवणें– ॥ २७ ॥ इत्यादिक यातना व इतरहि तामिस्र, अंधतामिस्र, रौरवनरकादिक यातना-तो पुरुष असो किंवा स्त्री असो त्यांनीं परस्परांच्या आसक्तीनें पाप करून संपादन केलेल्या यातना त्यांस भोगाव्या लागतात ॥ २८ ॥ हे माते, नरक किंवा स्वर्ग हे दोनहि या लोकींच आहेत असें विचारशील पुरुष म्हणतात. कारण, नरकसंबंधी ज्या यातना आहेत त्या या लोकामध्येंहि कीटकादिकांचेठिकाणीं प्रत्यक्ष दिसून येतात ॥ २९ ॥ याप्रमाणें कुटुंबाचें पोषण करणारा किंवा आपलेंच पोट भरणारा पुरुष, त्या कुटुंबाला किंवा देहाला या लोकींच सोडून देऊन परलोकाचेठिकाणीं स्वतःच्या पापकर्मांचें पूर्वीं सांगितल्याप्रमाणें फळ भोगितो ॥ ३० ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्राणिमात्राशीं द्रोह करून ज्यांचें पोषण केलें त्या आपल्या शरीराला व कुटुंबाला येथेंच टाकून देऊन केलेलें पापमात्र भोगण्याकरितां बरोबर घेऊन एकटाच स्वतः नरकामध्यें जाऊन पडतो ॥ ३१ ॥ जसें 'प्राणी आपलें कुटुंब व शरीर येथेंच टाकून जातो तसें पापहि येथेंच टाकून कां जात नाहीं' असें ह्मणशील तर हे माते, त्या कुटुंबपोषणाच्या पापाचें फळ परमेश्वरानें त्याच्याजवळ पोंचविलेलें असतें तें नरकामध्यें त्यालाच भोगावें लागतें. प्राणी ईश्वराधीन असल्यामुळें या लोकींच पापाचा त्याग करून जाण्यास तो समर्थ होत नाहीं. अंतकालीं ईश्वराला शरण जाऊन याणें आपल्या पातकाची निवृत्ति करून घ्यावी असें ह्मणावें तर त्यावेळीं चोरांनीं द्रव्य लुटून नेलेला पुरुष जसा द्रव्याच्या काळजींत सुस्कारे टाकीत असतो त्याला कांहींच योग्यायोग्य विचार सुचत नाहींत त्याप्रमाणें अंतकाळीं याची स्थिति झालेली असते ॥ ३२ ॥ केवळ अधर्माच्या योगेंकरून कुटुंबपोषणाविषयीं उत्सुक असणारा जीव, नरकांतील शेवटचें स्थान अशा अंधतामिस्र नरकामध्यें जातो ॥ ३३ ॥ याप्रमाणें यमलोकींचे

पापार्जितं धनं भुंजते बहवः कर्तैव नरकं यातीत्याह एक इति । भूतद्रोहेण यद्भृतं तत्स्थूलं स्वकलेवरमिहैव हित्वा । कुशलादितरत् पापं तदेव पाथेयं भोग्यं यस्य ॥ ३१ ॥ ननु पापमपि विहाय गच्छतु तत्राह । दैवेनेति । तस्य कुटुंबपोषणस्य शमलं पापं दैवेनेश्वरेण प्रापितं भुंक्ते ॥ ३२ ॥ ननु कुटुंबपोषणं विहितमेव तत्राह । केवलेनेति । तमसो नरकस्य चरमं पदं स्थानम् ॥ ३३ ॥ पुनर्मनुष्यशरीरप्राप्तिप्रकारमाह । नरलोकस्य मनुष्यदेहस्य प्राप्तेरधस्तादर्वाग्यावत्यो यातनाः आदिशब्देन श्वसूकरादियोनयश्च यास्ताः सर्वाः क्रमेण संप्राप्य भोगेन

एकः प्रपद्यते ध्वांतं हित्वेदं स्वकलेवरम् ॥ कुशलेतरपाथेयो भूतद्रोहेण यद्भृतम् ॥ ३१ ॥ दैवेनासादितं तस्य शमलं निरये पुमा- न् ॥ भुंक्ते कुटुंबपोषस्य हृतवित्त इवातुरः ॥ ३२ ॥ केवलेन ह्यधर्मेण कुटुंबभरणोत्सुकः ॥ याति जीवोंऽधतामिस्रं चरमं तमसः पदम् ॥ ३३ ॥ अधस्तान्नरलोकस्य यावतीर्यातनादयः ॥ क्रमशः समनुक्रम्य पुनरत्राव्रजेच्छुचिः ॥ ३४ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे तृतीयस्कंधे कापिलेयोपाख्याने कर्मविपाको नाम त्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३० ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ कर्मणा दैवने- त्रेण जंतुर्देहोपपत्तये ॥ स्त्रियाः प्रविष्ट उदरं पुंसो रेतःकणाश्रयः ॥ १ ॥ कललं त्वेकरात्रेण पंचरात्रेण बुद्बुदम् ॥ दशाहेन तु क- र्कंधूः पेश्यंडं वा ततः परम् ॥ २ ॥

क्षीणपापः शुचिः सन्नत्र पुनर्नरत्वं प्राप्नोतीत्यर्थः ॥ ३४ ॥ इति श्रीम० तृती० टीकायां त्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३० ॥ ॥ एकत्रिंशे विमिश्रैस्तु पुण्यपापैरिहांतरा ॥ मनुष्ययो- निसंप्राप्तिर्वर्ण्यते राजसी गतिः ॥ १ ॥ पुनरत्राव्रजेदित्युक्तं तदेव विशेषतो दर्शयति । कर्मणा पूर्वकृतेन दैवमीश्वरस्तदेव नेत्रं नेतृ प्रवर्तकं यस्य प्रविष्टो भवति ॥ १ ॥ कललं शु-

नरक भोगून झाल्यावर मनुष्यदेह प्राप्त होण्याच्या पूर्वींच्या जितक्या यातना व श्वानसूकरादिक योनी भोगावयाच्या आहेत त्या सर्व अनुक्रमानें भोगून पापाचा क्षय झाल्यावर शुद्ध होऊन पुनः या लोकाचेठिकाणीं मनुष्यजन्मास येतो ॥ ३४ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील तृतीयस्कंधामध्यें कर्मविपाकनिरूपणरूप हा तिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३० ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां एकतिसाव्या अध्यायामध्यें मिश्र असलेल्या पुण्यपापांच्या योगानें जीवाची या लोकाचेठिकाणीं मनुष्यजन्मप्राप्तिरूप रजोगुणाची गति वर्णन केली आहे ॥ १ ॥ याप्रमाणें प्राण्यांच्या नरकसंबंधी क्लेशांचें निरूपण करून आतां गर्भवाससंबंधी व जन्मादिसंबंधी क्लेशांचें निरूपण करण्याविषयीं श्रीभगवान् ह्मणाला– हे माते, हा प्राणी देहप्राप्तीकरितां, ज्याचा प्रवर्तक ईश्वर आहे अशा पूर्वार्जित कर्माच्या योगेंकरून एकाद्या पुरुषाच्या शरीरामध्यें धान्यकणाचा आश्रय करून प्रवेश करितो आणि त्याच्या रेतःकणाचा आश्रय करून स्त्रीच्या उदरामध्यें प्रविष्ट होतो ॥ १ ॥ तें स्त्रीच्या उदरामध्यें प्रविष्ट झालेलें जीवानें आश्रय केलेलें रेत, एका रात्रीनें स्त्रीच्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रक्तानें मिश्रित होतें. पांच रात्रीनीं बुडबुड्यासारखें वाटोळें होतें. दाहा दिवसांनीं बोरीच्या फळासारखें कांहीं कठीण होतें. त्यानंतर मांसाच्या पिंडासारखें होतें आणि तें रेत, तिर्यक् योनींमध्यें असलें तर अंड्यासारखें होतें ॥ २॥ एका महिन्यानें त्याला मस्तक उत्पन्न होतें, दोन महिन्यांनीं हातपाय वगैरे अवयवांचा विभाग होतो. तीन महिन्यानीं नखें, रोम, अस्थि व त्वचा हीं उत्पन्न होतात व पुरुषप्रदर्शक लिंगाची उत्पत्ति व स्त्रीप्रदर्शक योनिच्छिद्राची उत्पत्ति होत्ये ॥ ३ ॥ चार महिन्यानीं मांसादिक सप्त धातु उत्पन्न होतात. पांच महिन्यांनीं क्षुधा व तृषा ह्या उत्पन्न होतात. सहा महिन्यांनीं चर्मानें वेष्टित होऊन तो प्राणी उजव्या कुशीमध्यें फिरूं लागतो ॥ ४ ॥ आईनें भक्षण केलेल्या अन्नपानादिकांच्या योगानें ज्याचे सप्तधातु वृद्धिंगत होत आहेत असा तो जीव, कीटादिकांचें उत्पत्तिस्थान अशा विष्ठामूत्रादिकांच्या खाड्यामध्यें निजून राहतो

क्रशोणितमिश्रितं भवति बुद्बुदं वर्तुलाकारम् । कर्कंधूर्बदरीफलं तदाकारं कठिनम् । पेशी मांसपिंडाकारम् । अंडं वा योन्यंतरे ॥ २ ॥ बाह्वंघ्र्यादीनामंगानां विग्रहो विभागः लिंगं च छिद्राणि च तेषामुद्भवः ॥ ३ ॥ जरायुणा गर्भवेष्टनेन वीतः प्रावृतः ॥ ४ ॥ मातुर्जग्धेन भक्षितेनान्नेन पानाद्यैश्चैधमाना धातवो यस्य जंतूनां संभवो यस्मिंस्तन्नसंमते गर्ते शेते । तथाच मार्कंडेयपुराणे । नाडी चाप्यायनी नाम नाभ्यां तस्य निबद्ध्यते ॥ स्त्रीणां तथांत्रसुषिरे सा निबद्धोपजायते ॥ क्रमंते भुक्तपीतानि

मासेन तु शिरो द्वाभ्यां बाह्वंघ्र्याद्यंगविग्रहः ॥ नखलोमास्थिचर्माणि लिंगच्छिद्रोद्भवस्त्रिभिः ॥ ३ ॥ चतुर्भिर्धातवः सप्त पंचभिः क्षुत्तृडुद्भवः ॥ षड्भिर्जरायुणा वीतः कुक्षौ भ्राम्यति दक्षिणे ॥ ४ ॥ मातुर्जग्धान्नपानाद्यैरेधद्धातुरसंमते ॥ शेते विण्मूत्रयोर्गर्ते स जंतुर्जंतुसंभवे ॥ ५ ॥ कृमिभिः क्षतसर्वांगः सौकुमार्यात्प्रतिक्षणम् ॥ मूर्छामाप्नोत्युरुक्लेशस्तत्रत्यैः क्षुधितैर्मुहुः ॥ ६ ॥ कटुतीक्ष्णोष्णलवणरूक्षाम्लादिभिरुल्बणैः ॥ मातृभुक्तैरुपस्पृष्टः सर्वांगोत्थितवेदनः ॥ ७ ॥ उल्बेन संवृतस्तस्मिन्नंत्रैश्च बहिरावृतः ॥ आस्ते कृत्वा शिरः कुक्षौ भुग्नपृष्ठशिरोधरः ॥ ८ ॥ अकल्पः स्वांगचेष्टायां शकुंत इव पंजरे ॥ तत्र लब्धस्मृतिर्दैवात्कर्म जन्मशतोद्भवम् ॥ स्मरन् दीर्घमनुच्छ्वासं शर्म किंनाम विंदते ॥ ९ ॥ आरभ्य सप्तमान्मासाल्लब्धबोधोऽपि वेपितः ॥ नैकत्रास्ते सूतिवातैर्विष्ठाभूरिव सोदरः ॥ १० ॥

स्त्रीणां गर्भोदरे तथा ॥ तैराप्यायितदेहोऽसौ जंतुर्वृद्धिमुपैति वै इति ॥ ५ ॥ तत्रत्यैः कृमिभिः खादद्भिः सौकुमार्यात्कोमलत्वेन क्षतानि सर्वांगानि यस्य ॥ ६ ॥ उल्बणैर्दुःसहैः सर्वेष्वंगेषूत्थिता वेदना यस्य आस्त इत्युत्तरेणान्वयः ॥ ७ ॥ उल्बेन जरायुणा भुग्नं कुटिलीभूतं पृष्ठं शिरोधरा ग्रीवा च यस्य ॥ ८ ॥ दैवात्पूर्वकर्मवशात् लब्धा स्मृतिर्येन सः दीर्घं दुरंतमनुच्छ्वासं यथा भवति तथा तत्र स्थितः सन् ॥ ९ ॥ सूतिहेतुभिर्वातैर्वेपितः सोदरः समानोदरजन्मा विष्ठाभूः कृमिरिवेति ॥ १० ॥

॥ ५ ॥ त्याठिकाणीं असणारे क्षुधाक्रांत कीटक ह्याच्या सर्व अंगाला चावूं लागलेअसतां हा सुकुमार असल्यामुळें ह्याला अतिशय क्लेश प्राप्त होतात व हा क्षणोक्षणीं मूर्छा पावतो ॥ ६ ॥ कडू, तिखट, उष्ण, खारट, रूक्ष, आंबट इत्यादिक मातेनें भक्षण केलेल्या दुःसह पदार्थांचा याला स्पर्श होऊं लागला असतां ह्याच्या सर्वांगाचेठिकाणीं वेदना उत्पन्न होऊं लागतात ॥ ७ ॥ त्याठिकाणीं गर्भाशयानें वेष्टित व बाहेरून मातेच्या आंतड्यांनीं वेष्टित असून कुंडलाकार वांकड्या झालेल्या पृष्ठभागानें व मानेनें युक्त होत्साता मातेच्या कुशीमध्यें मस्तक करून राहतो ॥ ८ ॥ त्या गर्भवासाचेठिकाणीं पूर्वकर्मवशेंकरून त्याला स्मृति प्राप्त होत्ये आणि शेंकडों जन्मांमध्यें केलेल्या कर्मांचें स्मरण करून मोठ्यांनीं श्वासोच्छ्वास टाकीत असणारा तो जीव, कांहींतरी सुख पावतो काय? नाहींच पावत ॥ ९ ॥ सातव्या महिन्याच्या आरंभापासून त्याला ॥ ९८॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जरी शेंकडों जन्मांमध्यें घडलेल्या कर्मांचें ज्ञान होतें तरी प्रसूतिवायूनें तो इकडेतिकडे चलित होत्साता त्याच उदरामध्यें विष्ठेपासून उत्पन्न झालेल्या किड्यां- (जंतां-) प्रमाणें एकेठिकाणीं स्थिर राहत नाहीं ॥ १० ॥ त्यावेळीं सप्तधातुरूप बंधनांनीं युक्त असलेला तो देहात्मदर्शी जीव, गर्भवासादिरूप संसारदुःखापासून भय पावत होत्साता पश्चात्ताप पावून, ज्यानें उदरामध्यें प्रवेश करविला त्या भगवंताची हात जोडून व्याकुळ झालेल्या वाणीनें स्तुति करितो ॥ ११ ॥ जीव ह्मणतो– हे भगवन् ज्या तूं विषयासक्त अशा मला योग्य अशी ही गर्भवासरूप गति दाखविली आहेस त्या,शरणागत आलेल्या जगाचें रक्षण करण्यासाठीं आपल्याच इच्छेनें नानाप्रकारचे अवतार धारण करणाऱ्या तुझ्या भूमीवर संचार करणाऱ्या निर्भय चरणकमलास, संसारतापानें संतप्त झालेला मी, शरण जात आहें ॥ १२ ॥ जो ह्या मातेच्या उदराचेठिकाणीं

नाथमानो याचमान उपतप्यमान इति वा ऋषिर्देहात्मदर्शी भीतः पुनर्गर्भवासात् सप्त वध्रयो बंधनभूता धातवो यस्य सः विक्लवया व्याकुलया ॥ ११ ॥ उपसन्नं जगद्रक्षितुं स्वेच्छया गृहीतनानामूर्त्तेर्भगवतश्चरणारविंदमकुतोभयं सोऽहं शरणं व्रजामि । भुवि चलदिति श्रीकृष्णावताराभिप्रायेण असतो मेऽनुरूपा योग्या येनेदृशी गर्भवासलक्षणा गतिर्दर्शिता तस्य ॥ १२ ॥ ननु कोऽसौ यं शरणं व्रजसि को वा तव तस्य च विशेषो येन सेव्यसेवकत्वमित्यपेक्षायामाह । अत्र मातुर्देहे भूतेंद्रियाशयमयीं देहाकारपरिणतां माया-

नाथमान ऋषिर्भीतः सप्तवध्रिः कृतांजलिः ॥ स्तुवीत तं विक्लवया वाचा येनोदरेऽर्पितः ॥ ११ ॥ जंतुरुवाच ॥ तस्योपसन्नमवितुं जगदिच्छयाऽऽत्तनानातनोर्भुवि चलच्चरणारविंदम् ॥ सोहं व्रजामि शरणं ह्यकुतोभयं मे येनेदृशी गतिरदर्श्यसतोऽनुरूपा ॥ १२ ॥ यस्त्वत्र बद्ध इव कर्मभिरावृतात्मा भूतेंद्रियाशयमयीमवलंब्य मायाम् ॥ आस्तेऽविशुद्धमविकारमखंडबोधमातप्यमानहृदयेऽवसितं नमामि ॥ १३ ॥ यः पंचभूतरचिते रहितः शरीरे छन्नोऽयथेंद्रियगुणार्थचिदात्मकोऽहम् ॥ तेनाविकुंठमहिमानमृषिं तमेनं वंदे परं प्रकृतिपूरुषयोः पुमांसम् ॥ १४ ॥

मवलंब्याश्रित्य कर्मभिरावृतस्वरूप इव बद्ध इव च य आस्ते सोऽहम् । यस्त्वत्रैवास्ते तं नमामि । कथंभूतमित्यपेक्षायां तुशब्दोक्तं विशेषं दर्शयति । आतप्यमाने हृदये ऽवसितं प्रतीतमेवमप्यविकारम् । कुतः विशुद्धं निरुपाधिं तत्कुतः अखंडो बोधो यस्य तम् ॥ १३ ॥ ननु त्वमपि वस्तुतः शुद्ध एव । असंगो ह्ययं पुरुषः इत्यादि[illegible]तः । तत्कथं युवयोरयं विशेषस्तत्राह । यः पंचभिर्भूतै रचिते शरीरे अयथा मिथ्यैव छन्नो न वस्तुतः यतस्तेन शरीरेण रहितोऽसंगोऽतोऽयथैवेंद्रियगुणार्थचिदात्मकः इंद्रियाणि च गुणाश्च अर्थाश्च चिदाभासश्च तदात्मकः सोऽहं तं वंदे । कथंभूतम् । तेन शरीरेणाविकुंठो महिमा यस्य तं अवगुंठेति पाठेऽवसन्नं गुंठनमावरणं यस्य स महिमा यस्येत्यर्थः ।

पंचमहाभूतें इंद्रियें आणि अंतःकरण यांच्या आकारानें परिणाम पावलेल्या देहरूपी मायेचा आश्रय करून पुण्यपापरूप कर्मांनीं ज्याचें स्वरूप आच्छादित झालें आहे ह्मणूनच बद्ध झाल्यासारखा राहतो तोच मी, सर्वप्रकारें संताप पावलेल्या माझ्या हृदयामध्येंच प्रतीतीला येणारा, पुण्यपापादि संबंधरहित व निर्विकारी अशा अखंडज्ञानरूपी भगवंताला नमस्कार करितों ॥ १३ ॥ जो मी, पंचमहाभूतांनीं रचिलेल्या शरीराचेठिकाणीं मिथ्याच आच्छादित झालों आहें ह्मणजे इंद्रियें, सत्वादिक गुण, शब्दादिक विषय आणि चिदाभास यांचेठिकाणीं अभिमान धारण करणारा झालों आहें; परंतु वस्तुतः मी तसा आच्छादित नाहीं. कारण, त्या शरीरानें रहित (असंग) आहें. तो मी

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्या शरीरानें ज्याचा स्वरूपानंद कधींहि लोप पावत नाहीं असा प्रकृतिपुरुषांचा नियंता जो सर्वज्ञ पुरुष त्याला वंदन करितों ॥ १४ ॥ कारण, ज्याच्या मायेनें मोहित झालेला, ज्यामध्यें अनेक प्रकारचीं सत्वादिक गुणांपासून उत्पन्न झालेलीं कर्में हींच मोठीं बंधनें आहेत अशा संसार संबंधीं प्रवृत्तिमार्गाचेठिकाणीं त्यांपासून झालेले क्लेश भोगीत फिरणारा व स्वरूपानंदाला विसरलेला हा जीव, त्या भगवंताच्या अनुग्रहावांचून दुसऱ्या कोणत्या उपायानें पुनः हा आपल्या स्वरूपानंदाचें सेवन करील! कोणत्याच उपायानें करणार नाहीं. यास्तव त्यालाच शरण जाणें योग्य आहे ॥ १५ ॥ मला सध्या जें हें त्रिकालज्ञान झालें आहे तें त्याच्यावांचून दुसऱ्या कोणी दिलें! कोणींच नाहीं; तर त्याणेंच दिलें आहे. कारण, त्या देवानेंच स्थावरजंगमात्मक प्राण्याचेठिकाणीं आपला अंतर्यामिरूप अंश ठेविला आहे. ह्मणूनच जीवाला बंधनभूत अशा कर्ममार्गाला

तत्र हेतुः । प्रकृतिपुरुषयोः परं नियंतारम् । कुतः ऋषिं सर्वज्ञं विद्याशक्तिमित्यर्थः । विद्याऽविद्याकृतो विशेष इति भावः ॥ १४ ॥ ननु ज्ञानेनायं बंधो निवर्तिष्यते किं परमेश्वरवंदनेन तत्राह । यस्य मायया नष्टस्मृतिः सन्संसारसंबंधिनि पथि तदभिश्रमेण तत्कृतेन क्लेशेन चरन्नयं जीवो महतस्तस्यैवेश्वरस्यानुग्रहं विना पुनः कया युक्त्या लोकं निजस्वरूपं प्रवृणीत संभजेत अभिश्रमहेतुत्वेन पंथानं विशिनष्टि । उरूणि गुणनिमित्तानि कर्माणि नितरां बंधनानि यस्मिन् ईश्वरस्य प्रसादं विना ज्ञानाभावात्स एव सेव्य इत्यर्थः ॥ १५ ॥ ईश्वर एव ज्ञानद इत्युपपादयन्नाह । यदेतत्त्रिकालविषयं ज्ञानं तत्तं विना कतमो मय्यदधान्न कोऽपि किंतु स देव ईश्वर एव । नन्वन्यः प्रकृष्टो

यन्माययोरुगुणकर्मनिबंधनेऽस्मिन्सांसारिके पथि चरंस्तदभिश्रमेण ॥ नष्टस्मृतिः पुनरयं प्रवृणीत लोकं युक्त्या कया महदनुग्रहमंतरेण ॥ १५ ॥ ज्ञानं यदेतददधात्कतमः स देवस्त्रैकालिकं स्थिरचरेष्वनुवर्तितांशः ॥ तं जीवकर्मपदवीमनुवर्तमानास्तापत्रयोपशमनाय वयं भजेम ॥ १६ ॥ देह्यन्यदेहविवरे जठराग्निनाऽसृग्विण्मूत्रकूपपतितो भृशतप्तदेहः ॥ इच्छन्नितो विवसितुं गणयन्स्वमासान् निर्वास्यते कृपणधीर्भगवन्कदा नु ॥ १७ ॥ येनेदृशीं गतिमसौ दशमास्य ईश संग्राहितः पुरुदयेन भवादृशेन ॥ स्वेनैव तुष्यतु कृतेन स दीननाथः कोनाम तत्प्रतिविनांऽजलिमस्य कुर्यात् ॥ १८ ॥

जीवो दधातु नेत्याह । जीवरूपां कर्मपदवीमनुवर्त्तमाना वयमिति तद्व्यतिरेकेण न कोपि समर्थ इत्यर्थः । अन्यस्यात्रासंभवमुक्त्वा तस्य संभवमाह । स्थिरेषु चरेषु चांतर्यामिरूपोऽनुवर्तितोंऽशो येन तं भजेम ॥ १६ ॥ स्वदुःखं विज्ञापयन्नाह । देहीति । अन्यदेहविवरे मातुरुदरकुहरे योऽसृग्विण्मूत्रकूपस्तस्मिन्पतितस्तत्र जठराग्निना भृशं तप्तो देहो यस्यातएव कृपणधीरितो विवराद्विवसितुं निर्गंतुमिच्छन्स्वमासान्गणयन्नसौ कदा नु अहो बहिर्निर्वास्यते ॥ १७ ॥ तत्कृतमुपकारं स्मरन्नाह । येनेदृशीं गतिं ज्ञानम् ।

अनुसरणारे आह्मी, आपल्या आध्यात्मिकादिक तापत्रयाच्या निवृत्तिसाठीं त्याचें सेवन करितों. हे भगवन् हा देहधारी जीव, दुसऱ्या देहाच्या विवरामध्यें (आईच्या उदरामध्यें) असलेल्या रक्त, विष्ठा आणि मूत्र यांच्या कूपांत पडून राहिला आहे, जठराग्नीच्या योगानें याचा देह अतिसंतप्त होऊन गेला आहे, हा येथून बाहेर पडण्याची इच्छा करीत असून आपले महिने मोजीत राहिला आहे. आणि ह्याचें अंतःकरणही अगदीं दीन होऊन गेलें आहे. तस्मात् ह्याला आपण येथून केव्हां बरें बाहेर काढणार ? ॥ १७ ॥ हे ईश्वरा, अतिशय दयालु व निरुपम अशा ज्या तूं, ह्या दहा महिन्याच्या अनधिकारी मजजीवाला, अशा प्रकारचें ज्ञान दिलें आहेस, तो दीननाथ परमेश्वर तूं स्वतः केलेल्या उपकारानें स्वतःच संतुष्ट हो. कारण, केवळ नमस्कार करण्यावांचून कोण बरें पुरुष, या तूं केलेल्या उपकाराचा प्रत्युपकार करण्याविषयीं समर्थ होईल? कोणीच होणार नाहीं ॥ १८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हे प्रभो, हो संसारांतील पश्वादिक जीवलोक आपल्या देहामध्यें, त्या देहापासून उत्पन्न झालेलीं सुखदुःखेंच केवळ पहातो; दुसरें कांहींच पहात नाहीं. आणि मी तर ज्यानें दिलेल्या विवेकज्ञानानें शमदमादि साधनानीं संपन्न असलेल्या शरीरानें युक्त होऊन शरीराच्या बाहेर व आंत 'अपरोक्षत्वानें अनुभवास येणाऱ्या अहंकारास्पद भोक्त्या प्रमाणें' भासमान झालेल्या त्या अनादि पूर्ण भगवंताला अवलोकन करितों ॥ १९ ॥ यास्तव हे प्रभो, ह्या गर्भवासामध्यें जरी मी पराकाष्ठेच्या दुःखानें राहत आहें तरी गर्भांतून बाहेर, अंधकारानें भरलेल्या कूपाप्रमाणें विवेकाला आच्छादून टाकणाऱ्या संसारामध्यें पडण्याची इच्छा करीत नाहीं. कारण, ज्या संसारांत पडलेल्या प्राण्याला, हे देवा

भवादृशेनेति निरुपमेनेत्यर्थः । स्वकृतेनैव स्वयं तुष्यतु अंजलिमात्रं विना तत्कृतोपकारे प्रत्युपकारं कः कुर्यादित्यर्थः ॥ १८ ॥ ईदृशीं गति मित्यनेन जात्यंतरविलक्षणं ज्ञानं प्रापितवानित्युक्तं तदेव वैलक्षण्यमाह । पश्यतीति । अयमपरः पश्वादिः सप्तवध्रिर्जीवः स्वदेहे शारीरके शरीरभवे सुखदुःखे केवलं ननु पश्यति अहं पुनर्यत्सृष्ट्या धिषणया यद्दत्तेन विवेकज्ञानेन दमशरीरी दम इत्युपलक्षणं शमदमादियुक्तशरीरवानासमभवं तमेव च पुराणमनादिं पुरुषं पूर्णं बहिश्च हृदि च पश्ये पश्यामीत्यन्वयः । कथं अपरोक्षतया प्रतीतं चैत्यमिव अहंकारास्पदं भोक्तारमिवेत्यर्थः ॥ १९ ॥ विवकज्ञानकृतं संसारोद्वेगमनुवदन्मोक्षमार्गमेवाध्यवस्यति । सोऽहमिति द्वाभ्याम् । हेविभो

पश्यत्ययं धिषणया ननु सप्तवध्रिः शारीरके दमशरीर्यपरः स्वदेहे ॥ यत्सृष्टया स तमहं पुरुषं पुराणं पश्ये बहिर्हृदि च चैत्यमिव प्रतीतम् ॥ १९ ॥ सोऽहं वसन्नपि विभो बहुदुःखवासं गर्भान्न निर्जिगमिषे बहिरंधकूपे ॥ यत्रोपयातमुपसर्पति देवमाया मिथ्या-मतिर्यदनुसंसृतिचक्रमेतत् ॥ २० ॥ तस्मादहं विगतविक्लव उद्धरिष्य आत्मानमाशु तमसः सुहृदात्मनैव ॥ भूयो यथा व्यसनमे-तदनेकरंध्रं मा मे भविष्यदुपसादितविष्णुपादः ॥ २१ ॥ कपिल उवाच ॥ एवं कृतमतिर्गर्भे दशमास्यः स्तुवन्नृषिः ॥ सद्यः क्षिप-त्यवाचीनं प्रसूत्यै सूतिमारुतः ॥ २२ ॥

बहुदुःखवासं यथा भवति तथा गर्भे वसन्नपि सोऽहं गर्भाद्बहिर्न निर्गंतुमिच्छामि । तत्र हेतुः । अंधकूपप्राये यत्र बहिरुपयातं गतं प्राणिनं देवस्य तव मायोपसर्पति व्याप्नोति । यदनु यां मायामनु मिथ्यामतिर्देहेऽहंबुद्धिः संसृतिचक्रं च कलत्रपुत्रादिसंबंधाद्युपसर्पति ॥ २० ॥ तस्मादत्रैव स्थितोऽपि विगतविक्लवोऽव्याकुलः सन्सुहृदा आत्मना सार-थिरूपया बुद्ध्यैवात्मानं तमसः संसाराद्दुद्धरिष्यामि अनेकरंध्रं नानागर्भवासरूपमेतद्व्यसनं दुःखं यथा मे मा भविष्यन्न भविष्यति तथा काऽत्र तव साधनसामग्री तत्राह । उपसादितौ हृदयं प्रापितौ विष्णोः पादौ येन मया सः ॥ २१ ॥ दश मासाः परिच्छेदका यस्येति प्रसूतिपूर्वक्षणोपलक्षणम् । ऋषिर्जीवः सद्यस्तत्क्षणमेव अवाचीनमवाङ्-

---

तुझी माया व्यापून टाकिते. मग देहपुत्रादिकांचेठिकाणीं 'मी आणि माझें' असा अभिमान उत्पन्न होतो. नंतर जन्ममरणादि परंपरायुक्त हें संसारचक्र मागें लागतें ॥ २० ॥ यास्तव जसें पुनः अनेक गर्भवासादिरूप हें दुःख मला प्राप्त होणार नाहीं तसें येथेंच राहून, येथें बहुत दुःख असलें तरी धैर्य धरून व्याकुळ न होतां आपल्या स्वाधीन असलेल्या बुद्धीच्या योगेंकरून हृदयामध्यें विष्णूचे चरण धारण करून मी लौकरच आपला संसारदुःखापासून उद्धार करून घेईन ॥ २१ ॥ कपिल ह्मणाला– हे माते, दहा महिन्याचा तो जीव, गर्भवासामध्येंच अशा प्रकारें भगवंताची स्तुति करून मुक्त होण्याविषयीं जों आपल्या बुद्धीचा निश्चय करितो तों तत्काळ प्रसूतिकाळाचा वायु

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्या अधोमुख जीवाला बाहेर निघण्याविषयीं प्रेरणा करितो ॥ २२ ॥ त्या वायुनें एकाएकीं त्याला त्याच्या स्थानापासून लोटून दिलें ह्मणजे तो मस्तक खालीं करून फार व्याकुळ, मूर्छित व नष्टस्मृति होऊन मोठ्या कष्टानें बाहेर पडतो ॥ २३ ॥ भूमीवर मातेच्या रक्तामध्यें व मूत्रामध्यें पडलेला तो जीव, विष्ठेपासून उत्पन्न झालेल्या जंताप्रमाणें लोळूं लागतो. आणि गर्भवासांतील ज्ञान नष्ट झालें असतां विपरीत गतीला (देहादिकांच्या अभिमानाला) पावून तो प्राणी अतिशय रडूं लागतो ॥ २४ ॥ त्या बालकाचा अभिप्राय न जाणणाऱ्या लोकानें पोषण केलेला ह्मणजे तो क्षुधेनें रुदन करीत असतां त्याच्या पोटांत दुखत आहे, अशी कल्पना करून कडू औषध पाजणें व पोटांत दुखण्यानें रडत असतां स्तनपान करविणें इत्यादिक त्याला नको ते पदार्थ सेवन करविलेला तो बालक, दुःखाचें कारण सांगण्याविषयीं असमर्थ असतो ॥ २५ ॥ फार काय सांगावें, ढेंकूण व पिसा इत्यादिकांनीं दुःखप्रद झालेल्या अमंगल पर्यंकावर निजविलेला तो जीव, आपलें आंग खाजविण्यास, हालचाल करण्यास व उठण्याबसण्यास

मुखम् । सूतिहेतुर्मारुतः क्षिपति तुदति ॥ २२ ॥ अवसृष्टोऽधःक्षिप्तः सन् ॥ २३ ॥ रोरूयति रोरूयते ॥ २४ ॥ परस्य च्छंदमभिप्रायमविदुषा अनभिप्रेतं स्तन्यार्थं रोदने उदरव्यथां प्रकल्प्य निंबरसपानमुदरव्यथया रोदने स्तनपानमित्यादि ॥ २५ ॥ आसनोत्थानचेष्टने चानीशः सन् रोरूयतीत्यनुषंगः ॥ २६ ॥ आमा कोमला त्वग्यस्य

तेनावसृष्टः सहसा कृत्वाऽवाक्शिर आतुरः ॥ विनिष्क्रामति कृच्छ्रेण निरुच्छ्वासो हतस्मृतिः ॥ २३ ॥ पतितो भुव्यसृङ्मूत्रे विष्ठाभूरिव चेष्टते ॥ रोरूयति गते ज्ञाने विपरीतां गतिं गतः ॥ २४ ॥ परच्छंदं न विदुषा पुष्यमाणो जनेन सः ॥ अनभिप्रेतमापन्नः प्रत्याख्यातुमनीश्वरः ॥ २५ ॥ शायितोऽशुचि पर्यंके जंतुः स्वेदजदूषिते ॥ नेशः कंडूयनेंऽगानामासनोत्थानचेष्टने ॥ २६ ॥ तुदंत्यामत्वचं दंशा मशका मत्कुणादयः ॥ रुदंतं विगतज्ञानं कृमयः कृमिकं यथा ॥ २७ ॥ इत्येवं शैशवं भुक्त्वा दुःखं पौगंडमेव च ॥ अलब्धाभीप्सितोऽज्ञानादिद्धमन्युः शुचाऽर्पितः ॥ २८ ॥ सह देहेन मानेन वर्द्धमानेन मन्युना ॥ करोति विग्रहं कामी कामिष्वंताय चात्मनः ॥ २९ ॥ भूतैः पंचभिरारब्धे देहे देह्यबुधोऽसकृत् ॥ अहंममेत्यसद्ग्राहः करोति कुमतिर्मतिम् ॥ ३० ॥

तम् । विगतं गर्भे जातं ज्ञानं यस्य ॥ २७ ॥ शैशवं पंचवर्षाणि ततः पौगंडं यौवनादर्वाक् तत्र चाध्ययनादिदुःखम् । यौवने दुःखमाह । सार्धैस्त्रिभिः । अलब्धाभीप्सितत्वेन शुचार्पितो व्याप्तः अज्ञानादिद्धो दीप्तो मन्युर्यस्य सः ॥ २८ ॥ देहेन सहैव वर्धमानेनाभिमानेन मन्युना च विग्रहं विरोधकं करोति । आत्मनोंऽताय नाशाय ॥ २९ ॥ अज्ञानं प्रपंचयति

असमर्थ असून रडत असतो ॥ २६ ॥ जसे मोठ्या कीटकाला लहान कीटक व्यथा करितात त्याप्रमाणें कोमलत्वचेनें युक्त असलेल्या व गर्भवासांतील ज्ञान गेलें ह्मणून रडत असलेल्या त्या बालकाला, डांस माशा ढेकूण वगैरे प्राणी पीडा देतात ॥ २७ ॥ याप्रमाणें तो प्राणी बाल्यावस्थेंतील दुःख भोगून पुढें तारुण्यापूर्वींच्या पौगंड अवस्थेंतील अध्ययन करण्याचा वगैरे त्रास भोगितो नंतर तारुण्यावस्था प्राप्त झाली असतां कामवासनायुक्त झालेला हा पुरुष, पाहिजे ती वस्तु मिळाली नाहीं ह्मणजे अज्ञानानें क्रोधयुक्त होऊन शोकानें व्याप्त होतो व देहाबरोबर वाढलेल्या अभिमानानें व क्रोधानें युक्त होऊन आपलाच नाश करून घेण्याकरितां दुसऱ्या कामिजनांशीं वैरभाव करूं लागतो ॥ २८ ॥ २९ ॥ आकाशादि पंचमहाभूतांनीं उत्पन्न झालेल्या देहाचेठिकाणीं, अज्ञानी, दुराग्रही व कुत्सितबुद्धि असा हा प्राणी, ‘मी आणि माझा,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अशी बुद्धि वारंवार धारण करितो ॥ ३० ॥ या प्राण्याला, अज्ञान व कर्म ह्यांच्या योगानें उत्पन्न झालेला जो हा देह, जन्म, जरा, व्याधि, मरण इत्यादिक, दुःखच देत
असतो; त्या देहाकरितांच हा प्राणी वारंवार कर्म करितो व त्या कर्मानें बद्ध होऊन श्वानसूकरादि योनींमध्यें जन्ममरणरूप संसार पावतो ॥ ३१ ॥ कदाचित् सन्मार्गानें
वागत असणाराहि हा प्राणी जर, शिश्न व उदर यांच्या तृप्ती करितांच अनेक व्यवसाय करणाऱ्या अधम लोकांचा सहवास करून त्यांच्या मार्गांत रमूं लागला तर 'पूर्वी
यातनादेहांत घालून त्याला यमदूत नेतात' इत्यादिक सांगितल्याप्रमाणें नरकामध्यें प्रवेश करितो ॥ ३२ ॥ कारण, दुर्जनाच्या संगतीनें, सत्य, शुद्धता, दया, मौन,
बुद्धि, संपत्ति, लज्जा, कीर्ति, सहनशीलता, इंद्रियनिग्रह, मनोनिग्रह आणि उत्कर्ष हे गुण अगदीं नाश पावतात ॥ ३३ ॥ ह्मणून विषयासक्त, मूढ, कामक्रोधादिकांनीं
विक्षिप्तचित्त, शोचनीय आणि खेळांतील हरिणाप्रमाणें स्त्रियांच्या अधीन असणारे जे असत्पुरुष त्यांची संगति कधींहि करूं नये ॥ ३४ ॥ स्त्रियांच्या संगतीनें अथवा त्यांचा

भूतैरारब्धे देहे असदाग्रहोऽहंममेति मतिं करोति ॥ ३० ॥ तदर्थं देहार्थम् । यद्येन कर्मणा बद्धः यो देहः अनुयाति पुनःपुनरायात्यनुवर्तते इति वा । कुतः
अविद्याकर्मभ्यां बद्धयत इति तथा ॥ ३१ ॥ यद्यसद्भिरास्थितोऽधिष्ठितः संस्तेषां पथि रमते पथि सन्मार्गे आस्थितोऽपि यद्यसद्भिः सह रमत इति वा तर्हि यातनादेह
आवृत्येत्यादिपूर्वोक्तप्रकारेण तमो नरकं प्रविशति ॥ ३२ ॥ असत्संगं निंदति । सत्यमिति त्रिभिः । बुद्धिः परमपुरुषार्थविषया श्रीर्धनधान्यलक्षणा ह्रीर्लज्जा यशः कीर्तिः

तदर्थं कुरुते कर्म यद्बद्धो याति संसृतिम् ॥ योऽनुयाति ददन्क्लेशमविद्याकर्मबंधनः ॥ ३१ ॥ यद्यसद्भिः पथि पुनः शिश्नोदरकृतो-
द्यमैः ॥ आस्थितो रमते जंतुस्तमो विशति पूर्ववत् ॥ ३२ ॥ सत्यं शौचं दया मौनं बुद्धिः श्रीर्ह्रीर्यशः क्षमा ॥ शमो दमो भग-
श्चेति यत्संगाद्याति संक्षयम् ॥ ३३ ॥ तेष्वशांतेषु मूढेषु खंडितात्मस्वसाधुषु ॥ संगं न कुर्याच्छोच्येषु योषित्क्रीडामृगेषु च
॥ ३४ ॥ न तथाऽस्य भवेन्मोहो बंधश्चान्यप्रसंगतः ॥ योषित्संगाद्यथा पुंसो यथा तत्संगिसंगतः ॥ ३५ ॥ प्रजापतिः स्वां दुहितरं
दृष्ट्वा तद्रूपधर्षितः ॥ रोहिद्भूतां सोऽन्वधावदृक्षरूपी हतत्रपः ॥ ३६ ॥ तत्सृष्टसृष्टसृष्टेषु कोन्वखंडितधीः पुमान् ॥ ऋषिं नारा-
यणमृते योषिन्मय्येह मायया ॥ ३७ ॥

क्षमा सहिष्णुत्वं शमो बाह्येंद्रियनिग्रहः दमो मनोनिग्रहः भग उन्नतिः यत्संगाद्येषामसतां संगात् ॥ ३३ ॥ खंडितात्मसु देहात्मबुद्धिषु योषितां क्रीडामृगवदधीनेषु ॥ ३४ ॥
यथा च योषित्संगिनां संगतो बंधस्तथाऽन्यप्रसंगतो न भवेत् ॥ ३५ ॥ योषित्संगस्यानर्थहेतुतां प्रपंचयति । प्रजापतिरिति सप्तभिः । रोहिद्भूतां मृगीरूपां सतीमृक्षरूपी-
मृगाकारः सन् हतत्रपो निर्लज्जः ॥ ३६ ॥ तेन ब्रह्मणा सृष्टा मरीच्यादयस्तैः सृष्टाः कश्यपादयस्तैरपि सृष्टा देवमनुष्यादयस्तेषु को नु पुमानखंडितधीर ना कृष्टमनाः ॥ ३७ ॥

समागम करणाऱ्या विषयलंपट पुरुषांच्या संगतीनें जसा या पुरुषाला मोह किंवा बंध प्राप्त होतो त्याप्रमाणें दुसऱ्या कोणाच्याहि संगतीनें प्राप्त होत नाहीं ॥ ३५ ॥ सृष्टि-
कर्ता ब्रह्मदेव, आपल्या सरस्वतीनामक कन्येला पाहून तिच्या स्वरूपसौंदर्यानें मोहित झाला. तेव्हां त्याचा तो दुष्ट अभिप्राय जाणून त्या कन्येनें हरिणीचें स्वरूप धारण
करून पलायन करूं लागली तें पाहून तो ब्रह्मदेवहि हरिणाचें स्वरूप धारण करून मरीच्यादिक ऋषि पहात असतां निर्लज्जपणें तिच्या मागून धांवूं लागला ॥ ३६ ॥
अहाहा! प्रत्यक्ष ब्रह्मदेवाची अशी अवस्था! मग त्यानें उत्पन्न केलेले मरीचिप्रभृति ऋषि, त्यानीं उत्पन्न केलेले कश्यपादिक ऋषि आणि त्यांनीं उत्पन्न केलेले जे देव
मनुष्यादिक प्राणी त्यांमध्यें एका नरनारायण ऋषीवांचून ह्या जगतांमध्यें स्त्रीरूपी मायेनें मोहितबुद्धि न झालेला कोण बरें पुरुष आहे? कोणींच नाहीं ॥ ३७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हे माते ह्या स्त्रीरूपी माझ्या मायेचें बळ कसें आहे तें पहा! जी केवळ आपल्या कटाक्ष फेंकण्याच्या योगेंकरून दिग्विजय करणाऱ्याहि वीरांना पादाक्रांत करून टाकित्ये ॥ ३८ ॥ यास्तव ज्याला माझ्या सेवेनें आत्मरूपाचा लाभ झाला आहे परंतु योगाचें परमफल प्राप्त करून घेण्याची ज्याची इच्छा आहे त्या पुरुषानें स्त्रियांची संगति कधींहि करूं नये. कारण, 'या मुमुक्षुपुरुषाला स्त्रिया ह्या केवळ नरकाचें द्वार आहे' असें ह्मणतात ॥ ३९ ॥ जी देवानें निर्माण केलेली स्त्रीरूपी माया, शुश्रूषावगैरे करण्याच्या मिषानें आपल्याजवळ हळूहळू येंत्ये ती तृणानें आच्छादित झालेल्या कूपाप्रमाणें आपला मृत्यु (अनर्थ करणारी) आहे असें मुमुक्षुपुरुषानें समजावें ॥ ४० ॥ मुमुक्षुस्त्रीनेंहि, पूर्वजन्मीं आपला जीव, पुरुषरूपी असून स्त्रीचेठिकाणीं आसक्त झाल्यामुळें अंतकाळीं स्त्रीच्या ध्यानेंकरून जसा स्त्रीत्व पावला आहे त्याप्रमाणें या जन्मींही पुरुषाच्या ध्यानानें पुढें पुरुषत्व पावेल व असें वारंवार होऊं लागलेंअसतां संसाराची निवृत्ति कधींच होणार नाहीं. असें मनांत जाणून जी स्त्री, पुरुषाप्रमाणें वागणाऱ्या ज्या माझ्या मायेला मोहानें द्रव्य, मुलें व

दिशां जयिनः शूरानपि ॥ ३८ ॥ प्रतिलब्ध आत्मरूपो लाभो येन अस्य मुमुक्षोर्याः प्रमदा निरयद्वारं वदंति योगिनः ॥ ३९ ॥ शनैः शुश्रूषादिमिषेणोपयाति या योषिद्रूपा माया तां मृत्युं प्रतिकूलामीक्षेत ॥ ४० ॥ मुमुक्षुं स्त्रियं प्रत्येतदेवाह । या मन्यते इति द्वाभ्याम्। ऋषभायतीं पुरुषवदाचरंतीं या मम मायां वित्तादिप्रदं पतिं मन्यते तदा तां पुरुषरूपां मायां मृत्युं विंद्यादित्युत्तरेणान्वयः। यतः पूर्वजन्मनि स्वयं पुमान्स्त्रीसंगतोंऽतकाले स्त्रीध्यानेन स्त्रीत्वं प्राप्तो जीवः ॥ ४१ ॥ तां पत्यादिरूपं मृत्युं विजा-

बलं मे पश्य मायायाः स्त्रीमय्या जयिनो दिशाम् ॥ या करोति पदाक्रांतान् भ्रूविजृंभेण केवलम् ॥ ३८ ॥ संगं न कुर्यात्प्रमदासु जातु योगस्य पारंपरमारुरुक्षुः ॥ मत्सेवया प्रतिलब्धात्मलाभो वदंति या निरयद्वारमस्य ॥ ३९ ॥ योपयाति शनैर्माया योषिद्देवविनिर्मिता ॥ तामीक्षेतात्मनो मृत्युं तृणैः कूपमिवावृतम् ॥ ४० ॥ या मन्यते पतिं मोहान्मन्मायामृषभायतीम् ॥ स्त्रीत्वं स्त्रीसंगतः प्राप्तो वित्तापत्यगृहप्रदम् ॥ ४१ ॥ तामात्मनो विजानीयात्पत्यपत्यगृहात्मकम् ॥ दैवोपसादितं मृत्युं मृगयोर्गायनं यथा ॥ ४२ ॥ देहेन जीवभूतेन लोकाल्लोकमनुव्रजन् ॥ भुंजान एव कर्माणि करोत्यविरतं पुमान् ॥ ४३ ॥

नीयात्। मृगयोर्लुब्धकस्य गायनमनुकूलत्वेन प्रतीयमानमपि यथा मृगस्य मृत्युः ॥ ४२ ॥ तदेवं जीवस्य संसृतिः प्रपंचिता तत्र च तस्य कर्मवशेन लोकाल्लोकांतरगमनं जन्ममरणं चोक्तम्। तत्रैवं शंक्यते। ननु व्यापकस्य कथं लोकाल्लोकांतरगमनम्। नित्यस्य च कथं जन्ममरणे भोगेन कर्मक्षये च सति जन्म मरणं च नेष्यते तत्कुतः पुनरपि तस्य कर्मसंभव इति तत्र लोकांतरगमनं कर्म च संभवतीत्याह। देहेनेति। जीवस्योपाधितया भूतेन जातेन लिंगदेहेन लोकांतरमनुव्रजन् अविरतं कर्माणि

घर इत्यादि देणारा पति आहे असें मानित असत्ये तिनें, त्या पति, अपत्यें घर इत्यादि रूपानें भासणाऱ्या माझ्या मायेला, 'जसें व्याधाचें गायन मृगाच्या नाशास कारण होतें त्याप्रमाणें' आपल्या प्रारब्धानें समीपभागीं आणलेला हा आपला मृत्यूच आहे असें समजावें ॥ ४१ ॥ ४२ ॥ याप्रमाणें जीवाचा संसार सांगितला, व त्यामध्यें त्याला कर्मवशेंकरून या लोकांतून परलोकांत जाणें व जन्ममरणें सांगितलीं. येथें व्यापक जीवाला परलोकीं जाणें कसें घडेल? व तो जर नित्य आहे तर त्याला जन्ममरणें कशीं प्राप्त होतील? तीं जर प्राप्त झालीं नाहींत तर त्याच्या हातून कर्मे कसें घडणार? अशी शंका आली असतां सांगतात कीं, हे माते, जीवाचा उपाधिभूत जो लिंगदेह त्याच्या योगेंकरून पुरुष, एका लोकांतून दुसऱ्यालोकीं जाऊन प्रारब्ध कर्मांचें फळ भोगितहोत्साता निरंतर दुसरा देह प्राप्त होण्यास कारण अशीं कर्मेंच करित असतो ॥ ४३ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जीवाचा उपाधि जो लिंगदेह तो ह्या आत्म्याला मुक्तिप्राप्त होईपर्यंत अनुसरणारा असतो तो एक सूक्ष्मदेह आणि भूतें, इंद्रियें आणि मन यांचा विकार जो हा स्थूलदेह तो असे हे दोन्ही देह आपापलें कार्य करण्यास अयोग्य झाले ह्मणजे तेंच ह्या जीवात्म्याचें मरण होय, आणि ते दोन्ही देह पुनः प्रकट झाले ह्मणजे तेंच याचें जन्म होय ॥ ४४ ॥ याचें स्पष्टीकरण करितात– पृथिव्यादिक द्रव्यांचें (घटपटादि पदार्थांचें) साक्षात्कार होण्याचें स्थान अशा या स्थूलदेहाला शब्दादिक विषयांचें ग्रहण करण्याविषयीं वृद्धत्वादिकांमुळें जेव्हां अयोग्यता येत्ये तेव्हां त्यांतील सूक्ष्म देहाला सुद्धां आपलें काम करण्यास अयोग्यता येत्ये व स्थूलशरीर नाश पावतें तेव्हां तें त्याचें मरण होय आणि तेंच स्थूलशरीर सूक्ष्मशरीरासह पुनः उत्पन्न होतें व ' हाच मी आहें ' अशा अभिमानानें विषयांचें ग्रहण करण्यास समर्थ होतें तेव्हां तेंच त्याचें जन्म होय ॥ ४५ ॥ यास दृष्टांत– जसें, काचबिंदु, कामीण इत्यादि विकारांनीं बिघडलेल्या नेत्रगोलकांना रूपग्रहणाविषयीं अयोग्यता येतांच त्या गोलकामध्यें राहणाऱ्या चक्षु

करोतीति कर्मणामसमाप्तिरुक्ता ॥ ४३ ॥ जन्ममरणसंभवमाह । जीवो जीवोपाधिर्लिंगदेहोऽस्यात्मनोऽनुगोऽनुवर्ती भूतेंद्रियमनोमयः स्थूलभूतादिविकारो देहो भोगायतनं तयोर्निरोधः कार्यायोग्यता तदस्य जीवस्य मरणमुच्यते । आविर्भावस्तु संभवो जन्मोच्यते ॥ ४४ ॥ एतदेव दृष्टांतेन स्पष्टयति । द्रव्योपलब्धिस्थानस्य नेत्रगोलकादेर्द्रव्येक्षायां रूपादिदर्शने काचकामलादिदोषेण यदाऽयोग्यता भवति तदैव चक्षुष इंद्रियस्याप्ययोग्यता अनयोः स्थानचक्षुषोर्यदाऽयोग्यता तदैव द्रष्टुर्जीवस्य द्रष्टृत्वायोग्यता

जीवो ह्यस्यानुगो देहो भूतेंद्रियमनोमयः ॥ तन्निरोधोऽस्य मरणमाविर्भावस्तु संभवः ॥ ४४ ॥ द्रव्योपलब्धिस्थानस्य द्रव्येक्षाऽयोग्यता यदा ॥ तत्पंचत्वमहंमानादुत्पत्तिर्द्रव्यदर्शनम् ॥ ४५ ॥ यथाऽक्ष्णोर्द्रव्यावयवदर्शनायोग्यता यदा ॥ तदैव चक्षुषो द्रष्टुर्द्रष्टृत्वायोग्यताऽनयोः ॥ ४६ ॥ तस्मान्न कार्यः संत्रासो न कार्पण्यं न संभ्रमः ॥ बुद्ध्वा जीवगतिं धीरो मुक्तसंगश्चरेदिह ॥ ४७ ॥ सम्यग्दर्शनया बुद्ध्या योगवैराग्ययुक्तया ॥ मायाविरचिते लोके चरेन्न्यस्य कलेवरम् ॥ ४८ ॥

एवं स्थूलदेहवैकल्ये लिंगस्य वैकल्यं तदेव जीवस्य मरणं न स्वत इत्यर्थः । क्वचिदेकः श्लोकोऽधिकः पठ्यते । तत्रायमर्थः । द्रव्योपलब्धिस्थानस्य स्थूलशरीरस्य द्रव्येक्षायां यदाऽयोग्यता तत्पंचत्वं मरणम् । अहंमानादिदमेवाहमित्यभिमानेन द्रव्यस्य स्थूलशरीरस्य दर्शनमुत्पत्तिः अक्ष्णोर्गोलकयोर्द्रव्यावयवस्य रूपादेर्दर्शनेऽयोग्यता शेषं समानम् ॥ ४५ ॥ ४६ ॥ यस्मान्न वस्तुतो जीवस्य जन्ममरणादि तस्मान्मरणात्संत्रासो न कार्यो जीवने च न कार्पण्यं दैन्यं कार्यम् । संभ्रमश्च जीवनप्रयत्ने ॥ ४७ ॥ ननु सर्वथा मुक्तसंगत्वे कथं जीवितमत आह । सम्यक् पश्यति विचारयतीति सम्यग्दर्शना तया बुद्ध्या मायाविरचिते लोके कलेवरं न्यस्य निक्षिप्य तस्मिन्नासक्तिंत्यक्त्वा

इंद्रियालाही अयोग्यता येत्ये आणि दोघांच्याहि अयोग्यतेमुळें जीवालाहि द्रष्टृत्वाविषयीं अयोग्यता प्राप्त होत्ये. याप्रमाणें स्थूलदेहाला अयोग्यता प्राप्त झाली ह्मणजे लिंगदेहालाहि ती प्राप्त होत्ये दोहोंच्याहि अयोग्यत्वामुळें जीवालाहि अयोग्यत्व येऊन मरणव्यवहार घडतो तसाच पुन्हा दोहोंनाहि योग्यत्व उत्पन्न झालें ह्मणजे जीवाला योग्यत्व येऊन जन्मव्यवहार घडतो; वस्तुतः ते दोन्हीही खरे नाहींत ॥ ४६ ॥ तस्मात् मुमुक्षुपुरुषानें, मरणाबद्दल भीति बाळगूं नये; व सुख दुःखादिकांला प्रारब्धाधीनत्व आहे ह्मणून वाचण्याविषयीं दैन्यही दाखवूं नये. तसाच उपजीविकेकरितां प्रयत्नही करूं नये. तर अच्छेद्य व अदाह्य इत्यादि प्रकारची जीवाची गति जाणून धैर्यवान् व देहादिकांचेठिकाणीं आसक्तिरहित होऊन या संसारामध्यें संचार करावा ॥ ४७ ॥ ह्मणजे मायेनें रचिलेल्या ह्या लोकाचेठिकाणीं योगसाधन व वैराग्य

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

यानीं युक्त अशा सुविचाररूप बुद्धीनें आपल्या देहाविषयींची आसक्ति सोडून वागत असावें ॥ ४८ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील तृतीयस्कंधामध्यें जीवगति कथनरूप हा एकतिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३१ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या बत्तिसाव्या अध्यायामध्यें, तत्त्वज्ञानरहित अशा सकामपुरुषाची सात्विक धर्मांच्या योगेंकरून स्वर्गादिलोकांचेठिकाणीं गति सांगून त्याची तेथून पुनरावृत्ति सांगितली आहे ॥ १ ॥ कपिल ह्मणाला– हे देवहूति, आतां जो गृहामध्येंच राहणारा पुरुष, आपल्या गृहस्थाश्रम धर्माचें आचरण करून धर्म, द्रव्यसंपादन व विषयभोग यांची प्राप्ति करून घेतो तो, ‘ जसा गाई चारून दूध काढणारा पुरुष, पुनः पुनः दुधाच्या आशेनें त्या गाईंना चारितो त्याप्रमाणें ’ आचरण केलेल्या त्या आपल्या धर्मांवेंच पुनः पुनः आचरण करितो ॥ १ ॥ परंतु तो काममोहित झालेला पुरुष, ईश्वराराधनरूप भगवद्धर्मापासून निवृत्त होऊन श्रद्धेनें युक्तहोत्साता, यज्ञांच्या योगेंकरून देवांचें व श्राद्धांच्या योगेंकरून पितरांचें आराधन करितो ॥ २ ॥

विचरेदित्यर्थः ॥ ४८ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे तृतीयस्कंधे टीकायां एकत्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३१ ॥ ॥ द्वात्रिंशे सात्विकैर्धर्मैरूर्ध्वं गतिरुदीर्यते ॥ तत्त्वज्ञानविहीनस्य ततश्च पुनरागतिः ॥ १ ॥ तदेवं पापकर्मणो गतिरुक्ता इदानीं काम्यकर्मणो गतिमाह । अथेति चतुर्भिः । यो गृह एवावसन्स्वान्धर्मान्दोग्धि दोह्यमाह । काममर्थं च तान्दुग्धान्धर्मान्भूयः पिपर्ति पूरयत्यनुतिष्ठति ॥ १ ॥ सोऽपि भगवदाराधनरूपाद्धर्मात्पराङ्मुखः सन्प्राकृतानपि देवान्पितॄंश्च यजते ॥ २ ॥ ततः किं तत्राह । तेषां श्रद्धयाऽऽक्रां-

॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे तृतीयस्कंधे कापिलेये जीवगतिर्नामैकत्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३१ ॥ ॥ कपिल उवाच ॥ अथ यो गृहमेधीयान्धर्मानेवावसन् गृहे ॥ काममर्थं च धर्मान् स्वान् दोग्धि भूयः पिपर्ति तान् ॥ १ ॥ स चापि भगवद्धर्मात्काममूढः पराङ्मुखः ॥ यजते क्रतुभिर्देवान् पितॄंश्च श्रद्धयान्वितः ॥ २ ॥ तच्छ्रद्धयाक्रांतमतिः पितृदेवव्रतः पुमान् ॥ गत्वा चांद्रमसं लोकं सोमपाः पुनरेष्यति ॥ ३ ॥ यदा चाहींद्रशय्यायां शेतेऽनंतासनो हरिः ॥ तदा लोका लयं यांति त एते गृहमेधिनाम् ॥ ४ ॥ ये स्वधर्मान्न दुह्यंति धीराः कामार्थहेतवे ॥ निःसंगा न्यस्तकर्माणः प्रशांताः शुद्धचेतसः ॥ ५ ॥ निवृत्तिधर्मनिरता निर्ममा निरहंकृताः ॥ स्वधर्माख्येन सत्त्वेन परिशुद्धेन चेतसा ॥ ६ ॥ सूर्यद्वारेण ते यांति पुरुषं विश्वतोमुखम् ॥ परावरेशं प्रकृतिमस्योत्पत्त्यंतभावनम् ॥ ७ ॥

ता व्याप्ता मतिर्यस्य पित्रर्थं देवार्थं च व्रतं नियमो यस्य सोमपाः तत्र सोमं पीत्वेत्यर्थः ॥ ३ ॥ लोके तिष्ठत्यपि पुण्यक्षयात्पातमुक्त्वा लोकानामपि लयमाह । यदा चाहरहः प्रलये ॥ ४ ॥ भगवद्धर्मनिष्ठानां तत्प्राप्तिमेव गतिमाह त्रिभिः । ये तु कामार्थप्रयोजनाय स्वधर्मान्न दुह्यंति न दुहंति निःसंगा अनासक्ताः न्यस्तानीश्वरे समर्पितानि कर्माणि यैः ॥ ५ ॥ ६ ॥ विश्वतोमुखं परिपूर्णं पुरुषं यांति । तथाच श्रुतिः । सूर्यद्वारेण ते विरजाः प्रयांति यत्रामृतः पुरुषो ह्यव्ययात्मेति प्रकृतिमुपादानकारणम् । उत्पत्त्यंतभावनं

तो त्या देवपितरांचेठिकाणीं ‘हेच आपले मनोरथ पूर्ण करितील’ अशा विश्वासानें व्याप्त बुद्धि होऊन त्यांच्या आराधनाचेंच व्रत स्वीकारितो त्या कर्मांच्या योगानें मेल्यावर तो चंद्रलोकास जाऊन तेथें अमृत प्राशन करून पुण्य संपलें ह्मणजे पुनः ह्या मृत्युलोकीं माघारा येतो ॥ ३ ॥ हे माते, ब्रह्मदेवाच्या दिवसाच्या शेवटीं जेव्हां अनंतासन हरि शेषशय्येवर निजतो तेव्हां हे गृहस्थाश्रम्यांस प्राप्त होणारे लोक नाश पावतात ॥ ४ ॥ आणि जे विवेकी पुरुष अर्थ आणि काम यांच्या करितां स्वधर्माचें आचरण न करितां केवळ ईश्वरार्पण बुद्धीनें स्वधर्माचरण करितात ते पुरुष, विषयासक्तिरहित, ईश्वरार्पण कर्में करणारे, शांत, शुद्धचित्त, मोक्षधर्मांचेठिकाणीं तत्पर, देहादिकांचेठिकाणीं अहंकाररहित पुत्रादिकांचेठिकाणीं ममतारहित होत्साते, आपल्या धर्माचरणानें व शुद्ध झालेल्या अंतःकरणाच्या योगानें सूर्यद्वारा (अर्चिरादिमार्गेंकरून) स्थावर

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जंगमाचा नियंता, या जगाचें उपादान कारण व निमित्त कारण अशा परिपूर्ण पुरुषाच्या स्वरूपाला जाऊन मिळतात ॥ ५ ॥ ६ ॥ ७ ॥ हे माते, जे लोक, परमेश्वर-
दृष्टीनें हिरण्यगर्भाची उपासना करणारे असतात ते दोन परार्धांनंतर जो ब्रह्मदेवाचा लय सांगितला आहे तो प्राप्त होईपर्यंत ब्रह्मदेवाच्या सत्यलोकाचेठिकाणीं
राहतात ॥ ८ ॥ हे माते, देवादिकांहून श्रेष्ठ असा त्रिगुणात्मक ब्रह्मदेव, दोन परार्धरूपकालपर्यंत आपल्या अधिकाराचा अनुभव घेऊन नंतर, पृथिवी, उदक, तेज,
वायु, आकाश, मन, इंद्रियें, शब्दादिक विषय आणि अहंकार इत्यादिकांनीं युक्त अशा ब्रह्मांडाचा संहार करण्याच्या इच्छेनें जेव्हां परमेश्वराच्या स्वरूपांत जाऊन

निमित्तकारणम् ॥ ७ ॥ परमेश्वरदृष्ट्या हिरण्यगर्भोपासकानामपि क्रमेण तत्प्राप्तिमाह । द्विपरार्धावसान इति त्रिभिः । परस्य हिरण्यगर्भस्य परचिंतकाः परमेश्वरदृष्ट्या
हिरण्यगर्भोपासकाः ॥ ८ ॥ क्ष्मादीनि पंचमहाभूतानि मनश्चेंद्रियाणि चार्थाश्च शब्दादयो भूतादिश्चाहंकार एवमादिभिः परिवृतं युक्तं ब्रह्मांडंप्रति संहर्तुमिच्छुः सन् अव्याकृतमी-
श्वरम् । पराख्यं द्विपरार्धलक्षणं कालम् ॥ ९ ॥ परेत्य दूरं गत्वा भगवंतं हिरण्यगर्भमनुप्रविष्टा ये योगिनोऽमृतं परमानंदरूपं प्रधानमुत्कृष्टं ब्रह्म तेनैव सहोपयांति न तु
पूर्वम् । यतस्तदाऽगताभिमानाः । तथाच स्मृतिः । ब्रह्मणा सह ते सर्वे संप्राप्ते प्रतिसंचरे ॥ परस्यांते कृतात्मानः प्रविशंति परं पदम् इति ॥ १० ॥ भगवदुपासकास्तु साक्षा-

द्विपरार्धावसाने यः प्रलयो ब्रह्मणस्तु ते ॥ तावदध्यासते लोकं परस्य परचिंतकाः ॥ ८ ॥ क्ष्मांभोनलानिलवियन्मनइंद्रियार्थ-
भूतादिभिः परिवृतं प्रतिसंजिहीर्षुः ॥ अव्याकृतं विशति यर्हि गुणत्रयात्मा कालं पराख्यमनुभूय परः स्वयंभूः ॥ ९ ॥ एवं परेत्य
भगवंतमनुप्रविष्टा ये योगिनो जितमरुन्मनसो विरागाः ॥ तेनैव साकममृतं पुरुषं पुराणं ब्रह्म प्रधानमुपयांत्यगताभिमानाः ॥ १० ॥
अथ तं सर्वभूतानां हृत्पद्मेषु कृतालयम् ॥ श्रुतानुभावं शरणं व्रज भावेन भामिनि ॥ ११ ॥ आद्यः स्थिरचराणां यो वेदगर्भः
सहर्षिभिः ॥ योगेश्वरैः कुमाराद्यैः सिद्धैर्योगप्रवर्तकैः ॥ १२ ॥ भेददृष्ट्याभिमानेन निःसंगेनापि कर्मणा ॥ कर्तृत्वात्सगुणं
ब्रह्म पुरुषं पुरुषर्षभम् ॥ १३ ॥

देव तं प्राप्नुवंति न क्रमेणातस्त्वं साक्षात्तमेव भजेत्याह । अथ तस्मात् । भावेन प्रेम्णा ॥ ११ ॥ एवं तावद्भगवद्भक्तानां निरंतरमेव तत्प्राप्तिर्भगवद्भेदेन हिरण्यगर्भोपासकानां तु
क्रमेणेत्युक्तम् । भेदेनोपासने तु ब्रह्मादयोऽप्यावर्तंते किमुतान्य इत्याह । आद्य इति चतुर्भिः । यो वेदगर्भः सोऽपि गुणव्यतिकरे जाते यथापूर्वं ब्रह्मपदाधिकृतः सन्प्रजायते
इति तृतीयेनान्वयः । न केवलं स एवैकः किंतु ऋषिभिर्मरीच्यादिभिर्योगेश्वरादिभिश्च सह ॥ १२ ॥ जन्मनि हेतुद्वयम् । भेददृष्ट्याऽभिमानेन कर्तृत्वादिति च । यथापूर्वत्वे

मिळतो,–॥ ९ ॥ तेव्हांच पूर्वीं सांगितल्याप्रमाणें सत्यलोकास जाऊन भगवान् हिरण्यगर्भाचें ध्यान करित बसलेले, जे प्राणवायु व मन ह्यांचा जय केलेले विरक्त योगी
ते त्या ब्रह्मदेवासहवर्तमानच उत्कृष्ट अशा परमानंद ब्रह्मरूपी पुराणपुरुषाला जाऊन मिळतात; त्याच्या पूर्वीं मिळत नाहींत. कारण, पूर्वीं ते निरभिमानी नसतात ॥ १० ॥
तस्मात् हे माते, सर्व भूतांच्या हृदयकमलांचेठिकाणीं ज्यानें वास केला आहे ज्याचे पराक्रम तूं मजपासून श्रवण केले आहेस त्या भगवंताला तूं प्रेमानें शरण जा
॥ ११ ॥ आतां भेदबुद्धीनें उपासना केली असतां पुनरावृत्ति होत्ये असें सांगतात.– स्थावरजंगमात्मक प्राण्याचा स्रष्टा जो ब्रह्मदेव तो निष्काम कर्मानें युक्त असतांहि,
कर्तृत्वामुळें उत्पन्न झालेला अभिमान व भेददृष्टि ह्यांच्या योगानें, मरीच्यादिक ऋषि, सनत्कुमारादिक योगेश्वर व दुसरेहि योगप्रवर्तक सिद्ध यां सहवर्तमान, सर्वांतर्या-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मी, गुणांचा नियंता अशा ब्रह्मरूप पुरुषश्रेष्ठाशीं ऐक्य पावोनही पुन्हा सृष्टीच्या आरंभीं ईश्वररूपी कालाच्या योगानें सत्त्वादिक गुणांचा परस्पर मिश्रभाव झाला असतां पूर्वींप्रमाणें उत्पन्न होतो ॥ १२ ॥ १३ ॥ १४ ॥ तसेच ते मरीच्यादिक ऋषीहि स्वधर्माचरणापासून उत्पन्न झालेल्या ब्रह्मलोकांतील ऐश्वर्यांचा उपभोग घेऊन सृष्टीच्या आरंभीं गुणांमध्यें न्यूनाधिक्यभाव झाला असतां, पुन्हा उत्पन्न होऊन आपापल्या अधिकारांवर येतात ॥ १५ ॥ आतां सकामकर्म करणारांची निंदा करितात.–जे पुरुष तर या लोकीं सकामकर्मांचेठिकाणीं असक्तचित्त व श्रद्धायुक्त होत्साते काम्य व नित्य अशीं वेदानें सांगितलेलीं सर्व कर्में करितात ॥ १६ ॥ व जे रजोगुणानें विक्षिप्तचित्त झालेले, इंद्रियांचा निग्रह न केलेले, व गृहकृत्यांत अंतःकरण अत्यंत गुंतून गेलेले पुरुष, प्रतिदिवशीं पितरांचें आराधन करितात ॥ १७ ॥ ते पुरुष, धर्म, अर्थ आणि काम या तीन पुरुषार्थांविषयींच तत्पर असल्यामुळें, ज्याचे मोठमोठे पराक्रम कथन करण्यास योग्य आहेत अशा मधुसूदन भगवंताच्या कथेविषयीं विन्मुख होतात ॥ १८ ॥

हेतुः । निःसंगेन निष्कामेन कर्मणेति ॥ १३ ॥ किं कृत्वाऽत्र प्रजायते प्रथमं पारमेष्ठ्यमैश्वर्यं निषेव्य पश्चात्प्रलये सगुणं गुणाधिष्ठातारं प्रथमावताररूपं पुरुषं संसृत्य प्राप्य तेऽपि ऋषिप्रमुखाः स्वकर्मनिर्मितमैश्वर्यं निषेव्य पुरुषं च संसृत्य यथापूर्वं स्वस्वाधिकारेण पुनरायांतीत्यन्वयः ॥ १४ ॥ १५ ॥ यदा ब्रह्मोपासकानामपि भेददर्शनाभिमानाभ्यामेवमावृत्तिस्तदा काम्यकर्मिणां किं वक्तव्यमिति तन्निंदन्नाह । षड्भिः । ये त्विह कर्मस्वासक्तमनसः संतोऽप्रतिषिद्धानि काम्यानि नित्यानि च कर्माणि कृत्स्नानि

स संसृत्य पुनः काले कालेनेश्वरमूर्तिना ॥ जाते गुणव्यतिकरे यथापूर्वं प्रजायते ॥ १४ ॥ ऐश्वर्यं पारमेष्ठ्यं च तेऽपि धर्मविनिर्मितम् ॥ निषेव्य पुनरायांति गुणव्यतिकरे सति ॥ १५ ॥ ये त्विहासक्तमनसः कर्मसु श्रद्धयान्विताः ॥ कुर्वंत्यप्रतिषिद्धानि नित्यान्यपि च कृत्स्नशः ॥ १६ ॥ रजसा कुंठमनसः कामात्मानोऽजितेंद्रियाः ॥ पितॄन्यजंत्यनुदिनं गृहेष्वभिरताशयाः ॥ १७ ॥ त्रैवर्गिकास्ते पुरुषा विमुखा हरिमेधसः ॥ कथायां कथनीयोरुविक्रमस्य मधुद्विषः ॥ १८ ॥ नूनं दैवेन विहता ये चाच्युतकथासुधाम् ॥ हित्वा शृण्वंत्यसद्गाथाः पुरीषमिव विड्भुजः ॥ १९ ॥ दक्षिणेन पथाऽर्यम्णः पितृलोकं व्रजंति ते ॥ प्रजामनु प्रजायंते श्मशानांतक्रियाकृतः ॥ २० ॥ ततस्ते क्षीणसुकृताः पुनर्लोकमिमं सति ॥ पतंति विवशा दैवैः सद्यो विभ्रंशितोदयाः ॥ २१ ॥

कुर्वंति तेऽर्यम्णो दक्षिणेन पथा धूममार्गेण पितृलोकं व्रजंतीति पंचमेनान्वयः । मध्ये तन्निंदा ॥ १६ ॥ १७ ॥ हरति संसारं मेधा यस्य कथनीया उरवो विक्रमा यस्य तस्य मधुद्विषः कथायां विमुखाः संतो ये त्रैवर्गिकाः ये चाच्युतस्य कथासुधां हित्वाऽसतां गाथाः शृण्वंति ते नूनं दैवेन विहता इत्यन्वयः ॥ १८ ॥ १९ ॥ पितृलोकात्पुनः प्रजामनु स्वपुत्रादिषु प्रजायंते गर्भाधानादारभ्य श्मशानांताः क्रियाः कृतवंतः यथोक्तकारिण इत्यर्थः ॥ २० ॥ कथं प्रजायंते तदाह । ततस्ते पुनरिमं लोकंप्रति पतंति।

जसे घरडुकर चांगले चांगले पदार्थ मिळाले तरी त्यांचा त्याग करून विष्ठेचेंच भक्षण करितात त्याप्रमाणें जे भगवत्कथामृताचा त्याग करून दुसऱ्या अभद्र गोष्टी श्रवण करितात ते पुरुष खरोखर आपल्या प्रारब्धानें हत झालेले (दुर्दैवी) असें समजावें ॥ १९ ॥ गर्भाधान संस्कारापासून श्मशानापर्यंत (और्ध्वदेहिक कृत्यापर्यंत) सर्व संस्कार करणारे ते लोक, धूम नांवाच्या दक्षिणमार्गानें अर्यमा नांवाचा जो पितरांचा राजा त्याच्या पितृलोकास जातात व तेथून पुन्हा आपल्या पुत्रादिकांच्या वंशांत जन्मास येतात ॥ २० ॥ ते असे कीं– हे पतिव्रते देवहूति, भोगांच्या योगानें त्यांचें पुण्य क्षीण होतें आणि नंतर देवांनीं त्यांचें भोगसाधन नाहींसें करून टाकिलें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्मणजे ते अगदीं विवश होऊन या लोकांत येऊन पडतात ॥ २१ ॥ यास्तव हे माते, तूं, ज्याचें चरणकमल सेवन करण्यास योग्य आहे त्या परमेश्वराचें, त्याच्या गुणांचा आश्रय करून राहणाऱ्या भक्तीनें अनन्यभावेंकरून सेवन कर ॥ २२ ॥ कारण, वासुदेव भगवंताचेठिकाणीं भक्तियोग केला असतां तो, ब्रह्मसाक्षात्कार करून देणारें ज्ञान, आणि संसाराचेठिकाणीं वैराग्य शीघ्र उत्पन्न करितो ॥ २३ ॥ तेंच स्पष्ट सांगतात– हे माते, जेव्हां ह्या भक्ताचें चित्त, भगवद्गुणाच्या प्रीतीनें त्या भगवंताचेठिकाणीं निश्चळ होऊन, इंद्रियवृत्तीच्या योगेंकरून शब्दस्पर्शादिक सारख्या (एक स्वरूपी) विषयांवर 'हें मला प्रिय आहे आणि हें अप्रिय आहे' अशा प्रकारचें वैषम्य धारण करीत नाहीं–॥ २४ ॥ तेव्हांच तो भक्त, शुद्ध झालेल्या अंतःकरणाच्या योगानें, त्याज्य अथवा ग्राह्य इत्यादिक विभागानें

विभ्रंशित उदयो भोगसाधनं येषाम् ॥ २१ ॥ परमेष्ठिनं परमेश्वरम् । सर्वभावेनातिप्रीत्या तस्य गुणानाश्रयते या भक्तिस्तया ॥ २२ ॥ भजने च ज्ञानवैराग्ये स्वत एव भवत इत्याह । वासुदेव इति ॥ २३ ॥ तदेवोपपादयति यदाऽस्य भक्तस्य चित्तं भगवद्गुणानुरागेण तस्मिन्नेव निश्चलं सदिंद्रियवृत्तिभिर्वैषम्यमर्थेषु न विगृह्णाति ॥ २४ ॥ तदैवात्मनात्मानं स्वप्रकाशमीक्षते । कथंभूतम् । समं च तद्दर्शनं च तत्कुतः निःसंगम् । संगाद्धि वैषम्यं भवति । निःसंगत्वे हेतुः । हेयोपादेयरहितम् । तत्कुतः । पदं व्यवसितमरूढम् । परमानंदोऽहमिति निश्चयं प्राप्तमित्यर्थः ॥ २५ ॥ समेष्वर्थेष्वित्युक्तं तदेव साम्यं दर्शयति । ज्ञानमात्रमेव परब्रह्मादिशब्दैः प्रसिद्धम् । दृश्यादिभिर्द्दश्य-

तस्मात्त्वं सर्वभावेन भजस्व परमेष्ठिनम् ॥ तद्गुणाश्रयया भक्त्या भजनीयपदांबुजम् ॥ २२ ॥ वासुदेवे भगवति भक्तियोगः प्रयोजितः ॥ जनयत्याशु वैराग्यं ज्ञानं यद्ब्रह्मदर्शनम् ॥ २३ ॥ यदाऽस्य चित्तमर्थेषु समेष्विंद्रियवृत्तिभिः ॥ न विगृह्णाति वैषम्यं प्रियमप्रियमित्युत ॥ २४ ॥ स तदैवात्मनात्मानं निःसंगं समदर्शनम् ॥ हेयोपादेयरहितमारूढं पदमीक्षते ॥ २५ ॥ ज्ञानमात्रं परं ब्रह्म परमात्मेश्वरः पुमान् ॥ दृश्यादिभिः पृथग्भावैर्भगवानेक ईयते ॥ २६ ॥ एतावानेव योगेन समग्रेणेह योगिनः ॥ युज्यतेऽभिमतो ह्यर्थो यदसंगस्तु कृत्स्नशः ॥ २७ ॥ ज्ञानमेकं पराचीनैरिंद्रियैर्ब्रह्म निर्गुणम् ॥ अवभात्यर्थरूपेण भ्रांत्या शब्दादिधर्मिणा ॥ ॥ २८ ॥ यथा महानहंरूपस्त्रिवृत्पंचविधः स्वराट् ॥ एकादशविधस्तस्य वपुरंडं जगद्यतः ॥ २९ ॥

द्रष्टृकरणरूपेण पृथक् प्रतीयते । ज्ञानमात्रत्वेन समेष्वित्यर्थः ॥ २६ ॥ ननु ज्ञानमात्रमात्मनः स्वरूपत्वान्नित्यप्राप्तमेवेति किमनेकसाध्येन योगेन प्राप्यते तदाह । एतावानिति युज्यते प्राप्यते प्रपंचसंगव्युदास एव योगफलमित्यर्थः ॥ २७ ॥ ननु कथं प्रत्यक्षादिप्रतीतः प्रपंचो व्युदसितुं शक्यते प्रतीतेर्भ्रांतित्वादित्याह । ज्ञानमिति । पराचीनैः पराङ्मुखैः शब्दादिधर्मो यस्य तेनार्थरूपेण ज्ञानरूपं निर्गुणं ब्रह्मैवावभाति नत्वर्थः पृथगस्तीत्यर्थः ॥ २८ ॥ अर्थरूपत्वमेवोदाहृत्य दर्शयति । यथेति । अहंरूपोऽहंकारः स च

रहित, सम, प्रकाशरूप आणि प्रकृतीच्या अध्यासानें रहित अशा स्वरूपभूत आत्म्याला मीच परमानंदरूपी आहें असें अवलोकन करितो ॥ २५ ॥ हे माते, ज्ञानस्वरूपी एकच पदार्थ, द्रष्टा, दृश्य इत्यादि निरनिराळ्या स्वरूपांनीं प्रतीतीस येतो व निरनिराळ्या शास्त्रांमध्यें निरनिराळ्या शब्दांनीं वर्णन केला जातो. त्यांत उपनिषदांमध्यें परब्रह्म, योगशास्त्रांमध्यें परमात्मा, ईश्वर, सांख्यशास्त्रांमध्यें पुरुष आणि भक्तिशास्त्रामध्यें भगवान् असा प्रसिद्ध आहे ॥ २६ ॥ हे माते, योगिजनाला; कर्मयोग, भक्तियोग, ज्ञानयोग व अष्टांगयोग या सर्वांच्या योगेंकरून सर्व विषयांचेठिकाणीं जें वैराग्य होणें इतकेंच शास्त्रसंमत अभीष्ट फळ संपादन करावयाचें आहे ॥ २७ ॥ हे माते, ज्ञानरूपी असें एक निर्गुण ब्रह्मच, बहिर्मुख झालेल्या इंद्रियांच्या योगानें शब्दादि धर्मांनीं युक्त असलेल्या आकाशादि अर्थरूपानें (देव मनुष्यादि रूपानें) केवळ भ्रमाच्या योगानें भासतें त्याचेठिकाणीं भेददृष्टिपूर्वक 'मी आणि माझें' अशा प्रकारें आसक्ति धारण करणें हें बंधन होय. त्याच्या निवृत्तीसाठीं मुमुक्षूनें यत्न केलाच पाहिजे ॥ २८ ॥ जसें महत्तत्त्व,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अहंकाररूपानें सत्त्वरजतमोगुणात्मक तीन प्रकारचें, महाभूतरूपानें पांच प्रकारचें व इंद्रियरूपानें अकरा प्रकारचें भासतें व ज्या अहंकारादिकांपासून स्वप्रकाश जीव आणि त्या जीवाचें शरीर ब्रह्मांड व जग हीं भासतात त्याप्रमाणें ज्ञानही शब्दादि विषयांच्या रूपानें नानाप्रकारचें भासतें ॥ २९ ॥ परंतु निरंतर श्रद्धा, भक्ति योगाभ्यास आणि वैराग्य यांच्या योगेंकरून ज्याचें अंतःकरण एकाग्र झालें आहे व जो सर्वठिकाणीं आसक्तिरहित झाला आहे तोच हें सर्व ब्रह्मरूप आहे असें पहातो ॥ ३० ॥ हे पूज्यरूपे देवहूति, ज्याच्या योगानें प्रकृति व पुरुष यांचें खरें स्वरूप जाणतां येतें व ज्याच्या योगानें ब्रह्मसाक्षात्कार होतो तें हें ज्ञान मी तुला सांगितलें आहे ॥ ३१ ॥ हे साध्वि, निर्गुणवस्तुविषयक ज्ञानयोग आणि माझ्याठिकाणीं निष्ठा असलेला निष्काम भक्तियोग या दोहोंचेंहि भगवत्प्राप्तिलक्षण एकच फळ आहे ॥ ३२ ॥

त्रिवृत् त्रिगुणात्मकः पुनश्च भूतरूपेण पंचविधः । इंद्रियरूपेणैकादशविधश्च स्वराड् जीवरूपः तस्य जीवस्य वपुरंडं जगच्च यतो येभ्यो महदादिभ्यः तथाऽवभाति ॥ २९ ॥ ननु तर्हि जनः किमित्येवं न प्रत्येति तत्राह । एतद्ब्रह्म ॥ ३० ॥ उक्तमेवार्थं सुखप्रतिपत्त्यर्थं संक्षेपेणानुवदति । इतीति । हेगुर्वि पूज्ये ॥ ३१ ॥ अनेन च ज्ञानयोगेन भगवानेव प्राप्यो यथा भक्तियोगेनेत्याह । नैर्गुण्यो ज्ञानयोगश्च मन्निष्ठो भक्तिलक्षणश्च यो योगस्तयोर्द्वयोरप्येक एवार्थः प्रयोजनम् । कोऽसौ । भगवच्छब्दोपलक्षणं ज्ञापको यस्य तदुक्तं गीतासु । ते प्राप्नुवंति मामेव सर्वभूतहिते रताः इति ॥ ३२ ॥ ननु ज्ञानयोगस्यात्मलाभः फलं शास्त्रेणावगम्यते भक्तियोगस्य तु भजनीयेश्वरप्राप्तिः कुतस्तयोरेकार्थ-

एतद्वै श्रद्धया भक्त्या योगाभ्यासेन नित्यशः ॥ समाहितात्मा निःसंगो विरक्त्या परिपश्यति ॥ ३० ॥ इत्येतत्कथितं गुर्वि ज्ञानं तद्ब्रह्मदर्शनम् ॥ येनानुबध्यते तत्त्वं प्रकृतेः पुरुषस्य च ॥ ३१ ॥ ज्ञानयोगश्च मन्निष्ठो नैर्गुण्यो भक्तिलक्षणः ॥ द्वयोरप्येक एवार्थो भगवच्छब्दलक्षणः ॥ ३२ ॥ यथेंद्रियैः पृथग्द्वारैरर्थो बहुगुणाश्रयः ॥ एको नानेयते तद्वद्भगवाञ्छास्त्रवर्त्मभिः ॥ ३३ ॥ क्रियया क्रतुभिर्दानैस्तपःस्वाध्यायमर्शनैः ॥ आत्मेंद्रियजयेनापि संन्यासेन च कर्मणाम् ॥ ३४ ॥ योगेन विविधांगेन भक्तियोगेन चैव हि ॥ धर्मेणोभयचिह्नेन यः प्रवृत्तिनिवृत्तिमान् ॥ ३५ ॥ आत्मतत्त्वावबोधेन वैराग्येण दृढेन च ॥ ईयते भगवानेभिः सगुणो निर्गुणः स्वदृक् ॥ ३६ ॥ प्रावोचं भक्तियोगस्य स्वरूपं ते चतुर्विधम् ॥ कालस्य चाव्यक्तगतेर्योऽतर्धावति जंतुषु ॥ ३७ ॥

त्वमित्याशंक्य दृष्टांतेनोपपादयति । यथा बहूनां रूपरसादीनां गुणानामाश्रयो गुडक्षीरादिरेक एवार्थो मार्गभेदप्रवृत्तैरिंद्रियैर्नाना प्रतीयते चक्षुषा शुक्ल इति रसनेन मधुर इति स्पर्शनेन शीत इत्यादि तथा भगवानेक एव तत्तद्रूपेणावगम्यते ॥ ३३ ॥ शास्त्रमार्गानेव प्रपंचयति । क्रिययेति त्रिभिः । क्रियया पूर्तरूपया क्रतुभिर्यागैः मर्शनं मीमांसा आत्मेंद्रियजयो निषिद्धवर्जनम् ॥ ३४ ॥ उभयचिह्नेन सकामनिष्कामलक्षणेन । तमेवाह य इति । सकामधर्मप्राप्यं स्वर्गाद्यपि भगवत एव सगुणं स्वरूपमिति भावः ॥ ३५ ॥ एभिर्वर्त्मभिः स्वदृक् स्वप्रकाशः ॥ ३६ ॥ तदेवं ज्ञानयोगमुपसंहृत्य तस्य च भक्तियोगेन समानार्थत्वमुक्त्वा भक्तियोगाद्युपसंहरति । प्रावोचमिति द्वाभ्याम् । चतुर्विधं

जसा रूपरसादिक बहुत गुणांचा आश्रय असणारा साखर वगैरे एकच पदार्थ निरनिराळे विषय ग्रहण करणाऱ्या इंद्रियांनीं नानाप्रकारचा म्हणजे चक्षुरिंद्रियानें पांढरा, रसनेंद्रियानें गोड, घ्राणेंद्रियानें सुगंधयुक्त, स्पर्शनेंद्रियानें थंड इत्यादि प्रकारें जाणला जातो त्याप्रमाणें एकच भगवान् शास्त्रमार्गांनीं नानाप्रकारचा जाणला जातो ॥ ३३ ॥ म्हणजे विहीर खणणें, तळें बांधणें इत्यादि कर्में, यज्ञयागादिक अनुष्ठानें, अनेक प्रकारचीं दानें, तप, वेदाध्ययन, वेदवाक्यांचा विचार, मन व इंद्रियें यांचा जय, ईश्वराचेच ठिकाणीं कर्मांचें समर्पण, अष्टांगयोग, नऊ प्रकारचा भक्तियोग, प्रवृत्तिनिवृत्तिरूप म्हणजे सकाम व निष्काम असा दोन्हीं प्रकारचा धर्म, आत्मतत्त्वाचें ज्ञान आणि दृढ वैराग्य ह्या मार्गांनीं स्वप्रकाश भगवंताचीच सगुणरूपेंकरून व निर्गुणरूपेंकरून प्राप्ति होतये ॥ ३४ ॥ ३५ ॥ ३६ ॥ हे माते, सात्विक, राजस, तामस आणि निर्गुण अशा चार

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रकारच्या भक्तियोगाचें स्वरूप आणि प्राणिमात्रांचेठिकाणीं जो जन्मादि विकार होण्यास कारणीभूत होतो व ज्याची गति कोणास समजत नाहीं अशा कालाचें स्वरूपही मी तुला सांगितलें आहे ॥ ३७ ॥ हे माते, ज्या कर्मामध्यें प्रवेश करणारा जीव, आपल्या मूळच्या स्वरूपाला जाणत नाहीं त्या, अज्ञानानें केलेल्या कर्मांनीं जीवाला प्राप्त होणाऱ्या नानाप्रकारच्या संसृतिही मी तुला सांगितल्या आहेत ॥ ३८ ॥ हे देवहूति, मी सांगितलेलें हें तत्त्वज्ञान, खळ (दुसऱ्यास फसविणारा) उद्धट, गर्विष्ठ, नास्तिक व दांभिक या पुरुषांना कधींहि सांगूं नये ॥ ३९ ॥ तसेंच, विषयासक्त, गृह स्त्री पुत्र धन इत्यादिकांचेठिकाणीं आसक्त, माझी भक्ति न करणारा आणि माझ्या भक्तांचा द्वेष करणारा यांनाहि सांगूं नये ॥ ४० ॥ गुरूवर व मजवर विश्वास ठेवणारा, माझी भक्ति करणारा, नम्र, तत्त्वज्ञान्यावर दोषदृष्टि न ठेवणारा, प्राणिमात्रांवर दया करणारा, गुरुजनाची व माझी सेवा करण्यास तत्पर, बाह्यविषयाविषयीं विरक्ति उत्पन्न झालेला, शांतचित्त, मत्सररहित, अंतरीं व बाहेर शुद्धता राखणारा आणि ज्याला

त्रिगुणनिर्गुणभेदेन अंतर्धावति उत्पत्तिनिधनादि करोति ॥ ३७ ॥ अंग हेमातः ॥ ३८ ॥ उपदेशेऽनधिकारिणो दर्शयति । नैतदिति द्वाभ्याम् । खलाय परोद्वेजकाय भिन्नाय दुराचाराय धर्मध्वजाय दांभिकाय ॥ ३९ ॥ ४० ॥ अधिकारिण आह । श्रद्दधानायेति द्वाभ्याम् ॥ ४१ ॥ ४२ ॥ एतच्छ्रवणकीर्तनपरस्यापि मत्पदप्राप्तिरेव फल-

जीवस्य संसृतीर्बह्वीरविद्याकर्मनिर्मिताः ॥ यास्वंग प्रविशन्नात्मा न वेद गतिमात्मनः ॥ ३८ ॥ नैतत्खलायोपदिशेन्नाविनीताय क-
र्हिचित् ॥ न स्तब्धाय न भिन्नाय नैव धर्मध्वजाय च ॥ ३९ ॥ न लोलुपायोपदिशेन्न गृहारूढचेतसे ॥ नाभक्ताय च मे जातु न
मद्भक्तद्विषामपि ॥ ४० ॥ श्रद्दधानाय भक्ताय विनीतायानसूयवे ॥ भूतेषु कृतमैत्राय शुश्रूषाभिरताय च ॥ ४१ ॥ बहिर्जातवि-
रागाय शांतचित्ताय दीयताम् ॥ निर्मत्सराय शुचये यस्याहं प्रेयसां प्रियः ॥ ४२ ॥ य इदं शृणुयादंब श्रद्धया पुरुषः सकृत् ॥
यो वाऽभिधत्ते मच्चितः स ह्येति पदवीं च मे ॥ ४३ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे तृतीयस्कंधे कापिलेये द्वात्रिंशोऽध्यायः ॥ ३२ ॥
॥ मैत्रेय उवाच ॥ एवं निशम्य कपिलस्य वचो जनित्री सा कर्दमस्य दयिता किल देवहूतिः ॥ विस्रस्तमोहपटला तमभिप्रणम्य
तुष्टाव तत्त्वविषयांकितसिद्धिभूमिम् ॥ १ ॥

मित्याह । य इति । अप्यर्थे चकारः । सोऽपि मत्पदवीमेति हि निश्चितम् ॥ ४३ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे तृतीयस्कंधे टीकायां द्वात्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३२ ॥ ॥ त्रयस्त्रिंशे तु तस्यैव कपिलस्योपदेशतः ॥ ज्ञानभावेन तन्मातुर्जीवन्मुक्तिरुदीर्यते ॥ १ ॥ विस्रस्तं मोहरूपं पटलमावरणं यस्याः सा तत्त्वान्येव विषयस्तेनांकिता सिद्धिः

सर्व वस्तूंपेक्षां मीच अतिशय प्रिय आहें त्या पुरुषाला, ह्या तत्त्वज्ञानाचा उपदेश करावा ॥ ४१ ॥ ४२ ॥ हे आई, माझेठिकाणीं चित्त ठेवणारा जो पुरुष, श्रद्धेनें ह्या आख्यानाचें एकवार श्रवण करील किंवा पठण करील त्याला निःसंशय माझ्या पदाची प्राप्ति होईल ॥ ४३ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील तृतीयस्कंधा-मध्यें हा बत्तिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३२ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ६ ॥ ॥ आतां तेतिसाव्या अध्यायामध्यें त्या कपिलानें केलेल्या उपदेशाप्रमाणें ज्ञान, भक्ति आणि वैराग्य यांनीं युक्त झालेल्या देवहूतीची जीवन्मुक्ति वर्णन केली आहे ॥ १ ॥ मैत्रेय ह्मणाला हे विदुरा, ह्याप्रमाणें कर्दमप्रजापतीची प्रियपत्नी व कपिलाची माता जी देवहूति तिनें कपिलाचें भाषण श्रवण करून जिचें मोहरूप आवरण नाहींसें झालें आहे अशी होत्साती तत्त्वरूप विषयानें युक्त व सांख्यशास्त्रज्ञानाचा प्रवर्तक

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अशा त्या कपिलाला नमस्कार करून त्याची स्तुति करूं लागली ॥ १ ॥ देवहूति ह्मणाली– हे कपिला, ज्या तुझ्या नाभिकमलापासून उत्पन्न झालेल्या प्रत्यक्ष ब्रह्मदेवानेंहि उदकामध्यें शयन करणारें असून पंचमहाभूतें, इंद्रियें, शब्दादिक विषय व मन ह्यांनीं व्याप्त, सत्त्वादि गुणांच्या प्रवाहानें युक्त आणि सर्व प्रपंचाचें बीज अशा तुझ्या स्वरूपाचें केवळ ध्यानच केलें, ह्मणजे तें स्वरूप त्याच्या कांहीं लौकर दृष्टीस पडलें नाहीं ॥ २ ॥ तो सत्यसंकल्प, क्रियारहित, सर्व जीवांचा नियंता, अतर्क्य अशा अनंत शक्तींनीं युक्त आणि गुणांच्या प्रवाहानें आपल्या शक्तींचे अनेक विभाग करणारा तूंच विश्वाचे उत्पत्तिस्थितिसंहार करितोस ॥ ३ ॥ हे नाथा, त्याप्रमाणेंच प्रलयकालीं ज्या तुझ्या उदरामध्यें हें सर्व जग प्रविष्ट झालें होतें आणि जो तूं मायेनें बालकाचें रूप धारण करून आपल्या पायांचा आंगठा चोखीत चोखीत एकटाच वडाच्या

सांख्यज्ञानं तस्य भूमिं क्षेत्रं प्रवर्तकम् ॥ १ ॥ अथेति वाक्यांतरे । अजोऽपि तव वपुः केवलं दध्यौ न तु दृष्टवान् स च स्वयं साक्षाद्यस्य तव जठराब्जाज्जातः स भवानेव विश्वस्य सर्गादि विधत्ते न तु तव सर्गादिकर्ता कश्चिदस्ति स एवंभूतस्त्वं मे मया कथं जठरेण धृत इति त्रयाणामन्वयः । कथंभूतं वपुः सत् व्यक्तम् । तत्र हेतुः । अंतःसलिले शयानम् । कीदृशम् । भूतानींद्रियाणि च अर्थाश्च शब्दादय आत्मा च मन एतन्मयमेतैर्व्याप्तमित्यर्थः । कुतः गुणानां प्रवाहो यस्मिंस्तत्कुतः अशेषस्य कार्यकारणस्य बीजं कारणम् ॥ २ ॥ कथंभूतो भगवान्सर्गादि विधत्ते गुणप्रवाहरूपेण विभक्तं वीर्यं शक्तिर्येन सः शक्तिद्वारेण विधत्ते न साक्षादित्यर्थः । यतोऽनीहो निष्क्रियः । तर्हि कथं

देवहूतिरुवाच ॥ अथाप्यजोंऽतःसलिले शयानं भूतेंद्रियार्थात्ममयं वपुस्ते ॥ गुणप्रवाहं सदशेषबीजं दध्यौ स्वयं यज्जठराब्जजातः
॥ २ ॥ स एव विश्वस्य भवान्विधत्ते गुणप्रवाहेण विभक्तवीर्यः ॥ सर्गाद्यनीहोऽवितथाभिसंधिरात्मेश्वरोऽतर्क्यसहस्रशक्तिः ॥ ३ ॥
स त्वं भृतो मे जठरेण नाथ कथं नु यस्योदर एतदासीत् ॥ विश्वं युगांते वटपत्र एकः शेते स्म मायाशिशुरंघ्रिपानः ॥ ४ ॥ त्वं देह-
तंत्रः प्रशमाय पाप्मनां निदेशभाजां च विभो विभूतये ॥ यथावतारास्तव सूकरादयस्तथाऽयमप्यात्मपथोपलब्धये ॥ ५ ॥ यन्ना-
मधेयश्रवणानुकीर्तनाद्यत्प्रह्वणाद्यत्स्मरणादपि क्वचित् ॥ श्वादोऽपि सद्यः सवनाय कल्पते कुतः पुनस्ते भगवन्नु दर्शनात् ॥ ६ ॥

शक्तिद्वारेणापि सर्गादि विधत्ते तत्राह । अवितथाभिसंधिः सत्यसंकल्पः । किमर्थं विधत्ते । आत्मनां जीवानामीश्वरः जीवानां भोगार्थमित्यर्थः । ननु कथं विचित्रान्भोगानेक एव विदध्यात्तत्राह । अतर्क्याः सहस्रमपरिमिताः शक्तयो यस्य ॥ ३ ॥ किंच प्रलये यस्योदरे एतद्विश्वमासीत्स त्वं मया जठरेण कथं धृतः । ननु शिशौ मयि किमेतदुच्यते तत्राह । वटपत्र इति । अंघ्रिं पादांगुष्ठं पिबतीत्यंघ्रिपानः इदमपि शिशुत्वं तद्वदेव मायेति भावः ॥ ४ ॥ अथवा न त्वं मयाऽपत्यांतरमिव जठरे भृतः किंतु वराहाद्यवतारवदि-च्छयैवाविर्भूतोऽसीत्याह । त्वं देहतंत्रो देहपरिकरः स्वीकृतमूर्तिरसि । पाप्मनां दुष्टानाम् । निदेशभाजामाज्ञानुवर्तिनां विभूतये समृद्धये आत्मपथोपलब्धये ज्ञानमार्गप्रदर्शनाय ॥ ५ ॥ अतस्त्वद्दर्शनादहं कृतार्थाऽस्मीति कैमुत्यन्यायेनाह । यन्नामधेयस्य श्रवणमनुकीर्तनं च तस्मात् क्वचित्कदाचिदपि श्वानमत्तीति श्वादः श्वपचः सोऽपि सवनाय

पानावर शयन करीत होतास त्या तुझें मी उदरामध्यें कसें बरें धारण केलें? तेव्हां तुझीच ही लीला अतर्क्य आहे ॥ ४ ॥ हे समर्था, तूं दुष्टांच्या नाशाकरितां व तुझ्या आज्ञेप्रमाणें वागणाऱ्या सज्जनांच्या समृद्धीकरितां देहाचा स्वीकार करितोस. यास्तव जसे तुझे वराहादिक अवतार पूर्वीं होऊन गेले तसाच हाही तुझा अवतार भक्तांना ज्ञानमार्ग दाखविण्या करितां झाला आहे ॥ ५ ॥ ह्मणून तुझ्या दर्शनेंकरूनच मी कृतार्थ झाल्यें आहें. कारण, एखाद्यावेळींहि ज्या तुझ्या नांवाच्या श्रवणानें अथवा कीर्तनानें किंवा तुला नमस्कार केल्यानें अथवा तुझें स्मरण केल्यानें प्रत्यक्ष चांडाळ असला तरी तो सोमयाग करणाऱ्या पुरुषाप्रमाणें आदर करण्यास योग्य होतो. असें जर आहे तर हे भगवन्, तुझ्या दर्शनेंकरून मनुष्य

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कृतार्थ होईल हें काय सांगावें ! ॥ ६ ॥ अहाहा ! ! हे परमेश्वरा, ज्याच्या जिव्हाग्रीं तुझें नांव राहतें तो चांडाळ असला तरी त्याच कारणामुळें 'तुझ्याहून विमुख असलेल्या यज्ञानुष्ठान करणाऱ्या ब्राह्मणापेक्षांही' तो श्रेष्ठ होय. अधिक तर काय सांगावें ! जे तुझें नामसंकीर्तन करितात त्याच श्रेष्ठ पुरुषांनीं तप केलें, त्यांनींच होम केले, त्यांनींच सर्व तीर्थांमध्यें स्नान केलें व त्यांनीं वेदांचें अध्ययन व अध्यापनादिक केलीं असें समजावें. कारण, तुझ्या नामसंकीर्तनामध्यें सर्व पुण्यकर्मांचा अंतर्भाव आहे ॥ ७ ॥ यास्तव विषयांपासून अंतर्मुख केलेल्या मनामध्यें ज्याचें चिंतन करितां येतें, ज्यानें आपल्या स्वरूपाच्या प्रकाशानें सत्त्वरजतमोरूप गुणांच्या प्रवाहाचा (संसाराचा) निरास करून टाकिला आहे, ज्याच्या गर्भामध्यें वेद आहेत, ज्याला वेदांतशास्त्रामध्यें परब्रह्म असें ह्मणतात, सांख्यशास्त्रामध्यें पुरुष ह्मणतात, पुराणामध्यें विष्णु ह्मणतात त्या तुज कपिलाला मी वंदन करित्यें ॥ ८ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, ह्याप्रमाणें कपिलनामक परमपुरुष भगवंताची देवहूतीनें स्तुति केली असतां, मातेविषयीं प्रीतियुक्त अशा त्या

सोमयागाय कल्पते योग्यो भवति । अनेन पूज्यत्वं लक्ष्यते ॥ ६ ॥ तदुपपादयति । अहो बतेत्याश्चर्ये यस्य जिह्वाग्रे तव नाम वर्तते स श्वपचोऽप्यतोऽस्मादेव हेतोर्गरीयान् । यद्यस्माद्वर्तते अत इति वा । कुत इत्यत आह । त एव तपस्तेपुः कृतवंतः जुहुवुर्होमं कृतवंतः सस्नुस्तीर्थेषु स्नाताः आर्यास्त एव सदाचाराः ब्रह्म वेदमनूचुरधीतवंतः । त्वन्ना-

अहो बत श्वपचोऽतो गरीयान्यज्जिह्वाग्रे वर्तते नाम तुभ्यम् ॥ तेपुस्तपस्ते जुहुवुः सस्नुरार्या ब्रह्मानूचुर्नाम गृणंति ये ते ॥ ७ ॥ तं त्वामहं ब्रह्म परं पुमांसं प्रत्यक्स्रोतस्यात्मनि संविभाव्यम् ॥ स्वतेजसा ध्वस्तगुणप्रवाहं वंदे विष्णुं कपिलं वेदगर्भम् ॥ ८ ॥ मैत्रेय उवाच ॥ ईडितो भगवानेवं कपिलाख्यः परः पुमान् ॥ वाचा विक्लवयेत्याह मातरं मातृवत्सलः ॥ ९ ॥ कपिल उवाच ॥ मार्गेणानेन मातस्ते सुसेव्येनोदितेन मे ॥ आस्थितेन परां काष्ठामचिरादवरोत्स्यसि ॥ १० ॥ श्रद्धस्वैतन्मतं मह्यं जुष्टं यद्ब्रह्मवादिभिः ॥ येन मामभवं याया मृत्युमृच्छंत्यतद्विदः ॥ ११ ॥ मैत्रेय उवाच ॥ इति प्रदर्श्य भगवान्सतीं तामात्मनो गतिम् ॥ स्वमात्रा ब्रह्मवादिन्या कपिलोऽनुमतो ययौ ॥ १२ ॥ सा चापि तनयोक्तेन योगादेशेन योगयुक् ॥ तस्मिन्नाश्रम आपीडे सरस्वत्याः समाहिता ॥ १३ ॥

मकीर्तने तपआद्यंतर्भूतमतस्ते पुण्यतमा इत्यर्थः । यद्वा जन्मांतरे तैस्तपोहोमादि सर्वं कृतमिति त्वन्नामकीर्तनमहाभाग्योदयादवगम्यत इत्यर्थः ॥ ७ ॥ प्रत्यक्स्रोतसि प्रत्याहृते आत्मनि मनसि संविभाव्यं संचिंत्यम् । वेदा गर्भे यस्य सः ॥ ८ ॥ अविक्लवया गंभीरया वाचा ॥ ९ ॥ ते तव सुसेव्येन सुखसेव्येन मे मयोदितेन आस्थितेनानुष्ठितेन परां काष्ठां जीवन्मुक्तिमवरोत्स्यसि प्राप्स्यसि ॥ १० ॥ यायाः यास्यसि अतद्विदो मन्मतमविद्वांसः ॥ ११ ॥ अनुमतोऽनुज्ञातः ॥ १२ ॥ सरस्वत्या आपीडे पुष्पमुकुटतुल्ये ।

कपिलानें स्नेहानें सद्गदित झालेल्या वाणीच्या योगानें आईला असें ह्मटलें कीं, ॥ ९ ॥ हे माते, तुला सेवन करण्यास अति सुलभ अशा मी सांगितलेल्या ह्या मार्गानें तूं चाललीस तर फारच लवकर उत्तम फलरूप जीवन्मुक्तीला पावशील ॥ १० ॥ हे माते, ब्रह्मवेत्त्या पुरुषांनीं प्रीतीनें स्वीकार केलेल्या ह्या माझ्या मतावर तूं विश्वास ठेव. याच्याच सेवनेंकरून तूं, संसारांतून सुटून जन्ममरणरहित अशा माझ्या स्वरूपास पावशील. हें मत न जाणणारे पुरुष, मृत्युरूप संसारांत पडतात ह्मणजे त्यांतून त्यांची सुटका कधींच होत नाहीं ॥ ११ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, याप्रमाणें तो भगवान् कपिलमहामुनि ब्रह्मवेत्त्यांनीं सेवन केलेली व सुखसाध्य अशी आत्मगति आईला दाखवून ब्रह्मतत्त्व जाणणाऱ्या त्या देवहूति मातेनें जाण्यास आज्ञा दिली असतां, ईशान्य दिशेकडे निघून गेला ॥ १२ ॥ नंतर ती देवहूतीहि पुत्रानें उपदेश केलेल्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

योगमार्गाच्या योगेंकरून आपलें चित्त एकाग्र करून सरस्वतीनदीला मुकुटाप्रमाणें अलंकारभूत अशा त्या बिंदुसरोवरनामक आपल्या आश्रमामध्यें समाधि लावून स्वस्थ राहिली ॥ १३ ॥ तोच प्रकार सविस्तर सांगतात— त्रिकालस्नानाच्या योगेंकरून पिंगटवर्ण झालेले जटायुक्त कुरळकेश व तीव्रतपाच्या योगानें कृश झालेला व वल्कलें परिधान करणारा आपला देह धारण करणाऱ्या त्या देवहूतीनें, कर्दमप्रजापतीच्या तपोबलानें व योगसामर्थ्यानें वृद्धिंगत झालेल्या, निरुपम व देवांनींसुद्धां प्रार्थना करण्यास योग्य अशा त्या आपल्या गृहसंबंधी सौख्याचा अभिमान सोडून दिला ॥ १४ ॥ १५ ॥ ज्या घरामध्यें हस्तिदंती पलंग असून त्यांवर दुधाच्या फेसासारख्या पांढऱ्या स्वच्छ शय्या, सुवर्णाचीं भांडींवगैरे सर्व साहित्यें आणि अतिमृदु सरपोस घातलेलीं सुवर्णाचीं आसनें (कोचें) होतीं ॥ १६ ॥ जेथें उंची पाचेच्या शिलांनीं व स्वच्छ स्फटिकांनीं बांधलेल्या भिंतींमध्यें रचिलेल्या सुंदर स्त्रियांच्या हातांत दिलेले पद्मरागादि रत्नाचे दीप शोभत होते ॥ १७ ॥ त्या घराजवळ एक उपवन होतें तें मंदार, पारिजात इत्यादिक

सरस्वत्येति पाठे मुकुटेनेव संवेष्टिते बिंदुसरसि समाहिता बभूव ॥ १३ ॥ कथंभूता सती समाहिता तदाह । अभीक्ष्णं त्रिषवणमवगाहः स्नानं तेन कपिशान्पिशंगान्स्वत एव कुटिलानलकान्केशांस्तथाऽऽत्मानं देहं चीरधारिणं कृशं च बिभ्रती सती ॥१४॥ प्रजापतेः कर्दमस्य तपोयोगाभ्यां विजृंभितमतिशयितं स्वगार्हस्थ्यं हित्वा पुत्रभूतेश्वर विरहा-

अभीक्ष्णावगाहकपिशान् जटिलान्कुटिलालकान् ॥ आत्मानं चोग्रतपसा बिभ्रती चीरिणं कृशम् ॥ १४ ॥ प्रजापतेः कर्दमस्य तपोयोगविजृंभितम् ॥ स्वगार्हस्थ्यमनौपम्यं प्रार्थ्यं वैमानिकैरपि ॥ १५ ॥ पयःफेननिभाः शय्या दांता रुक्मपरिच्छदाः ॥ आसनानि च हैमानि सुस्पर्शास्तरणानि च ॥ १६ ॥ स्वच्छस्फटिककुड्येषु महामारकतेषु च ॥ रत्नप्रदीपा आभांति ललनारत्नसंयुताः ॥ १७ ॥ गृहोद्यानं कुसुमितै रम्यं बह्वमरद्रुमैः ॥ कूजद्विहंगमिथुनं गायन्मत्तमधुव्रतम् ॥ १८ ॥ यत्र प्रविष्टमात्मानं विबुधानुचरा जगुः ॥ वाप्यामुत्पलगंधिन्यां कर्दमेनोपलालितम् ॥ १९ ॥ हित्वा तदीप्सिततममप्याखंडलयोषिताम् ॥ किंचिच्चकार वदनं पुत्रविश्लेषणातुरा ॥ २० ॥ वनं प्रव्रजिते पत्यावपत्यविरहातुरा ॥ ज्ञाततत्त्वाऽप्यभून्नष्टे वत्से गौरिव वत्सला ॥ २१ ॥

तुरा सती वदनं किंचिदनिर्वाच्यं शोकव्याकुलं चकारेति षष्ठेनान्वयः ॥ १५ ॥ यत्र गार्हस्थ्ये क्षीरफेननिभा मृदुशुभ्राः शय्या आस्तरणान्याभांति दंतघटिता मंचकाश्च स्वर्णमयाः परिकराः आसनानि पीठादीनि सुस्पर्शान्यास्तरणानि येषु ॥ १६ ॥ १७ ॥ बहुभिरमरद्रुमै रम्यम् ॥ १८ ॥ यत्रोद्याने प्रविष्टमात्मानं देवहूतिम् ॥ १९ ॥ आखंडल इंद्रस्तस्य या योषितस्तासामपीप्सिततमं प्राप्तमिष्टतमं तद्धित्वा तत्राभिमानं त्यक्त्वा ॥ २० ॥ सुहृद्वियोगस्य दुःसहतामाह । वनमिति । नष्टे वत्से वत्सला गौरिवाभूत् ॥ २१ ॥

अनेक प्रकारच्या प्रफुल्लित झालेल्या सुरतरूंच्या योगेंकरून मनोहर होतें जेथें पक्ष्यांचीं जोडपीं मधुर शब्द करीत असत, जेथें पुष्पांचा मकरंद पिऊन मत्त झालेले भ्रमर गायन करीत असत ॥ १८ ॥ जेथें कमलांनीं सुवासित झालेल्या पुष्करिणीमध्यें प्रविष्ट झालेल्या, व कर्दम ऋषीनें क्रीडेच्यावेळीं अंगीकार केलेल्या आपलें (देवहूतीचें) किंनर गंधर्वादिक गायन करीत असत ॥ १९ ॥ आणि ज्याविषयीं इंद्राच्या स्त्रियांना देखील 'हें आपणास प्राप्त होईल काय? अशी' इच्छा होत असे. त्या उपवनाचासुद्धां अभिमान टाकून, पुत्राच्या विरहानें खिन्न झालेल्या त्या देवहूतीनें आपलें मुख किंचित् उदासीन केलें ॥ २० ॥ प्रियपति (कर्दम) संन्यास घेऊन अरण्यांत निघून गेला असतां, पुत्राच्या विरहानें व्याकुळ झालेली ती देवहूति, आत्मतत्त्व जाणणारी होती तरी जशी प्रेमळ गाई वत्स नष्ट झाला असतां विव्हळ होते त्याप्रमाणें विव्हळ झाली ॥ २१ ॥ ॥१०६॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हे वत्सा विदुरा, ती देवहूती अपत्यरूप कपिल हरि देवाचें ध्यान करून थोडक्याच कालानें, पूर्वीं सांगितलेल्या सर्व समृद्धियुक्त घराविषयीं निःस्पृह झाली ॥ २२ ॥ नंतर, कपिलनामक पुत्रानें ध्यान करण्यास योग्य जें भगवंताचें प्रसन्नमुखयुक्त स्वरूप सांगितलें होतें त्या सर्व अवयवयुक्त स्वरूपाचें किंवा त्या स्वरूपाच्या एकेक अवयवाचें शुद्ध अंतःकरणानें ध्यान करून त्या देवहूतीनें, भक्तीच्या अखंड प्रवाहरूप योगानें कडकडीत वैराग्यानें व यथायोग्य पूजादिक कर्मांच्या अनुष्ठानापासून झालेल्या ब्रह्मसाक्षात्काररूप ज्ञानानें, स्वरूप प्रकाशानेंच ज्याचा मायागुणांनीं रचिलेला देहेंद्रियादि भेद नाहींसा झाला आहे अशा आत्म्याला सर्व व्यापक रूपानें जाणून- ॥ २३ ॥ २४ ॥ २५ ॥ जीवांचा आश्रयभूत अशा ब्रह्मरूप भगवंताचेठिकाणीं आपली बुद्धि लाविली· त्यावेळीं तिचा जीवभाव सुटला असल्यामुळें सर्व क्लेश नाहींसे होऊन

विरहकृतध्यानफलमाह । निःस्पृहा निर्वासना । वत्स विदुर ॥ २२ ॥ ततः स्वसुतः कपिलो यदाह तद्भगवतो रूपं ध्यायती तदाऽऽत्मानं च विश्वतोमुखं सर्वगतं ध्यायती ब्रह्मण्यवस्थितमतिर्बभूवेति पूर्वस्यैवानुषंगः । केन ध्यायती विशुद्धेनात्मना मनसा ॥ २३ ॥ विशुद्धौ कारणान्याह । भक्तिप्रवाहरूपेण योगेन वैराग्येण च युक्तानुष्ठानेन जातं यज्ज्ञानं तेन च । युक्तानुष्ठानं च गीतासूक्तम् । युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु ॥ युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा इति । ब्रह्महेतुना ब्रह्मत्वापाद-

तमेव ध्यायती देवमपत्यं कपिलं हरिम् ॥ बभूवाचिरतो वत्स निस्पृहा तादृशे गृहे ॥ २२ ॥ ध्यायती भगवद्रूपं यदाह ध्यानगो-
चरम् ॥ सुतः प्रसन्नवदनं समस्तव्यस्तचिंतया ॥ २३ ॥ भक्तिप्रवाहयोगेन वैराग्येण बलीयसा ॥ युक्तानुष्ठानजातेन ज्ञानेन ब्रह्म-
हेतुना ॥ २४ ॥ विशुद्धेन तदाऽऽत्मानमात्मना विश्वतोमुखम् ॥ स्वानुभूत्या तिरोभूतमायागुणविशेषणम् ॥ २५ ॥ ब्रह्मण्यव-
स्थितमतिर्भगवत्यात्मसंश्रये ॥ निवृत्तजीवापत्तित्वात्क्षीणक्लेशाप्तनिर्वृतिः ॥ २६ ॥ नित्यारूढसमाधित्वात्परावृत्तगुणभ्रमा ॥ न स-
स्मार तदाऽऽत्मानं स्वप्ने दृष्टमिवोत्थितः ॥ २७ ॥ तद्देहः परतः पोषोऽप्यकृशश्चाध्यसंभवात् ॥ बभौ मलैरवच्छन्नः सधूम इव
पावकः ॥ २८ ॥ स्वांगं तपोयोगमयं मुक्तकेशं गतांबरम् ॥ दैवगुप्तं न बुबुधे वासुदेवप्रविष्टधीः ॥ २९ ॥

केन ॥ २४ ॥ विश्वतोमुखत्वे हेतुः । स्वानुभूत्यास्वरूपप्रकाशेन तिरोभूतम् । मायागुणैर्विशेषणं परिच्छेदो यस्य ॥ २५ ॥ कथंभूते ब्रह्मणि आत्मनां जीवानां संश्रये भगवति तस्या जीवन्मुक्तिमाह । सार्धैस्त्रिभिः । तदा च निवृत्ता जीवापत्तिर्जीवभावो यस्यास्तस्या भावस्तत्त्वं तस्मात् विगतक्लेशा प्राप्तनिर्वृतिश्च सत्यात्मानं देहं न सस्मारेत्युत्तरेणान्वयः ॥ २६ ॥ ननु तथापि गुणानां विद्यमानत्वात्कथमस्मरणं तत्राह । नित्यारूढो लब्धप्रतिष्ठः समाधिर्यस्यास्तस्याभावस्तत्त्वं तस्मात् । परावृत्तः शांतो गुणनिमित्तो भ्रमो यस्याः सा ॥२७॥ परतः पराभिरेव कर्दमसृष्टविद्याधरीभिः पोषः पोषणं यस्य आधिर्मनोग्लानिस्तदसंभवादकृशः मलैरवच्छन्नोऽपि बभौ ॥२८॥ दैवगुप्तमारब्धकर्म-

---

तिला परमानंद प्राप्त झाला होता, व तिची सर्वदा समाधि लागून गेली असल्यामुळें तिचा अहंममतारूपी भ्रम निवृत्त झाला होता, म्हणून त्यावेळीं जसें जागृत झालेल्या पुरुषाला स्वप्नांत पाहिलेल्या देहाचें स्मरण राहत नाहीं त्याप्रमाणें तिला तिच्या देहाचें स्मरणसुद्धां राहिलें नाहीं ॥ २६ ॥ २७ ॥ तेव्हां तिच्या देहाचें कर्दमानें निर्माण केलेल्या विद्याधरींकडून पोषण होत असून तो मनोदुःख (काळजी) नसल्यामुळें कृशही झाला नव्हता तथापि अभ्यंग वगैरे नसल्यामुळें मलांच्या थरांनीं आच्छादित होऊन धुरानें युक्त असलेला अग्नि जसा शोभतो त्याप्रमाणें शोभत असे ॥ २८ ॥ फार काय सांगावें ! जिची बुद्धी वासुदेवाचेठिकाणीं प्रविष्ट झाली आहे अशा त्या देवहूतीनें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तपोयोगमय, केंस सुटलेलें, वस्त्र गळून पडलेलें व प्रारब्धानें रक्षण केलेलें तें आपलें शरीरसुद्धां जाणिलें नाहीं॥ २९ ॥ हे विदुरा, ह्याप्रमाणें कपिलानें सांगितलेल्या मार्गानें ती देवहूती, लवकरच सर्वश्रेष्ठ, अंतर्यामी, नित्यमुक्त आणि ब्रह्मरूपी अशा भगवंताशीं ऐक्य पावली ॥ ३० ॥ हे वीरा विदुरा, ज्याठिकाणीं त्या देवहूतीला योगसिद्धि (मुक्ति) प्राप्त झाली तें 'सिद्धपद' या नांवानें त्रैलोक्यांत प्रख्यात असें अतिशय पुण्यकारक क्षेत्र झालें ॥ ३१ ॥ हे शांतस्वभावा विदुरा, योगमार्गाच्या प्रयोगानें ज्याचे देहसंबंधी धातुमल नाहींसे झाले आहेत असें त्या देवहूतीचें तें शरीरच नद्यांमध्यें श्रेष्ठ, सिद्धांनीं सेवित व सिद्धि देणारी अशी एक नदी झालें; ह्मणजे नदीरूपानें परिणाम पावलें॥ ३२ ॥ तो महायोगी भगवान् कपिलहि मातेची आज्ञा घेऊन पित्याच्या आश्रमांतून ईशान्य दिशेस निघून गेला ॥ ३३ ॥ आणि तेथें सिद्ध, चारण, गंधर्व, मुनि व अप्सरांच्या समुदायांनीं स्तूयमान होत्साता, समुद्रानेंहि त्याची स्तुति करून त्यास आपल्यामध्यें राहावयास स्थान दिलें ॥ ३४ ॥ तेथें सांख्याचार्यांनीं स्तुत असा तो

पालितम् ॥ २९ ॥ निर्वाणं नित्यमुक्तम् ॥ ३० ॥ हे वीर विदुर । उपेयुषी प्राप्ता ॥ ३१ ॥ हे सौम्य तस्यास्तन्मर्त्यं शरीरं सरिद्भूत् । कथंभूतम् । योगेन विधूता विलीना मार्त्या दैहिका धातुमला यस्य ॥ ३२ ॥ कपिलोऽपि ययावित्युक्तं तदेव प्रपंचयति । कपिलोऽपीति त्रिभिः । समनुज्ञाप्यानुज्ञां संप्रार्थ्य ॥ ३३ ॥ दत्तमर्हणमर्घ्यं

एवं सा कपिलोक्तेन मार्गेणाचिरतः परम् ॥ आत्मानं ब्रह्म निर्वाणं भगवंतमवाप ह ॥ ३० ॥ तद्वीरासीत्पुण्यतमं क्षेत्रं त्रैलोक्यविश्रुतम् ॥ नाम्ना सिद्धपदं यत्र सा संसिद्धिमुपेयुषी ॥ ३१ ॥ तस्यास्तद्योगविधुतमार्त्यं मर्त्यमभूत्सरित् ॥ स्रोतसां प्रवरा सौम्य सिद्धिदा सिद्धसेविता ॥ ३२ ॥ कपिलोऽपि महायोगी भगवान्पितुराश्रमात् ॥ मातरं समनुज्ञाप्य प्रागुदीचीं दिशं ययौ ॥ ३३ ॥ सिद्धचारणगंधर्वैर्मुनिभिश्चाप्सरोगणैः ॥ स्तूयमानः समुद्रेण दत्तार्हणनिकेतनः ॥ ३४ ॥ आस्ते योगं समास्थाय सांख्याचार्यैरभिष्टुतः ॥ त्रयाणामपि लोकानामुपशांत्यै समाहितः ॥ ३५ ॥ एतन्निगदितं तात यत्पृष्टोऽहं तवानघ ॥ कपिलस्य च संवादो देवहूत्याश्च पावनः ॥ ३६ ॥ य इदमनुशृणोति योऽभिधत्ते कपिलमुनेर्मतमात्मयोगगुह्यम् ॥ भगवति कृतधीः सुपर्णकेतावुपलभते भगवत्पदारविंदम् ॥३७॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे तृतीयस्कंधे कापिलेयोपाख्याने त्रयस्त्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३३ ॥ ॥ श्रीरस्तु ॥

निकेतनं च यस्मै ॥ ३४ ॥ उपशांत्यर्थं समाहित आस्ते ॥ ३५ ॥ प्रकरणार्थमुपसंहरति, । एतदिति । तव त्वया ॥ ३६ ॥ एतच्छ्रवणकीर्तनफलमाह । य इति । सुपर्णकेतौ गरुडध्वजे उपलभते प्राप्नोति ॥ ३७ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे तृतीयस्कंधे टीकायां भावार्थदीपिकायां श्रीधरस्वामिविरचितायां त्रयस्त्रिंशोऽध्यायः ॥ ३३ ॥ ॥ ॥ ॥ समाप्तोऽयं तृतीयः स्कंधः ॥ ॥ ॥ ॥ ॥

कपिलमुनि, तिन्ही लोकांतील सर्व प्राण्यांना योगप्रवृत्तीनें मोक्षप्राप्त होण्यासाठीं एकाग्रचित्तानें समाधि लावून अद्यापि राहिला आहे ॥ ३५ ॥ बा निष्पापा विदुरा, जें मनुवंशादिक तूं मला विचारलें होतेंस तें हें तुला मी कथन केलें आहे. आणि त्या प्रसंगानें कपिलाचा व देवहूतीचा पापनाशक संवादही सांगितला आहे ॥ ३६ ॥ जो पुरुष, आत्मयोगरूप (भगवद्ध्यानरूप) सर्व शास्त्रांचें रहस्य असें हें कपिलमहामुनींचें मत प्रतिदिवशीं श्रवण करितो अथवा दुसऱ्यास सांगतो त्याला गरुडध्वज भगवंताचेठिकाणीं भक्तियोगाची प्राप्ति होऊन भगवंताच्या चरणकमलाची प्राप्ति होत्ये ॥ ३७ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील तृतीयस्कंधामध्यें कापिलेय आख्यानरूप हा तेतिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३३ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ ७ ॥ ॥ तृतीयस्कंध समाप्त ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

इति श्रीमद्भागवते तृतीयस्कंधः
सटीकः सार्थश्च समाप्तः

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ अथ श्रीमद्भागवते चतुर्थस्कंधः प्रारभ्यते ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ श्रीगणेशाय नमः ॥ ॥ आतां चतुर्थस्कंधामध्यें एकतीस अध्यायांनीं ईश्वराधीन असलेल्या ब्रह्मदेव मनु इत्यादिकांनीं केलेली चराचरभूतांची सृष्टि वर्णन केली आहे ॥१॥ त्यांत पहिल्या अध्यायामध्यें, स्वायंभुवमनूच्या कन्यैंचे निरनिराळे वंश सांगितले आहेत. ज्या वंशांमध्यें हरीनें यज्ञादिक अवतार धारण करून अनेक प्रकारचे पराक्रम केले आहेत ॥ २ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, स्वायंभुवमनूला शतरूपा स्त्रीचेठिकाणीं आकूति, देवहूति आणि प्रसूति ह्या नांवांनीं प्रसिद्ध अशा तीन कन्या व प्रियव्रत आणि उत्तानपाद ह्या नांवांचे दोन पुत्र झाले ॥ १ ॥ त्यांमध्यें आकूति नामक जी कन्या ती जरी बंधूंनीं युक्त होती तरी ती, आपल्याला पुष्कळ मुलें असावीं अशी इच्छा धारण करणाऱ्या मनूनें, शतरूपास्त्रीचें अनुमोदन घेऊन पुत्रिकाधर्माच्या आश्रयानें, ह्मणजे 'हिला जो मुलगा होईल तो मला द्यावा' असा जांवयाशीं ठराव करून रुचि ऋषीला दिली ॥ २ ॥ नंतर ब्रह्मतेजानें युक्त अशा त्या भगवान् प्रजापति रुचिऋषीला उत्तम प्रकारच्या ईश्वरध्यानाच्या योगानें त्या स्त्रीचेठिकाणीं एक पुत्र आणि एक कन्या अशीं दोन मुलें झालीं ॥ ३ ॥ त्यांपैकीं

॥ श्रीगणेशाय नमः ॥ ॥ नमः श्रीपरमहंसास्वादितचरणकमलचिन्मकरंदाय भक्तजनमानसनिवासाय श्रीरामचंद्राय ॥ ॥ अथैकत्रिंशताध्यायैर्विसर्गस्तुर्ये इर्यते ॥ विसर्गस्त्वीश्वराधीनैर्ब्रह्ममन्वादिभिः कृतः ॥ १ ॥ तत्र तु प्रथमेऽध्याये मनुकन्यान्वयाः पृथक् ॥ वर्ण्यंते यत्र यज्ञादिमूर्तिभिः प्रभवो हरेः ॥ २ ॥ मनुकन्यान्वयं विस्तरेण वक्तुमाह । मनोस्त्विति । चकाराद्द्वौ पुत्रौ च ॥ १ ॥ तुशब्दादन्यतोऽपि पुत्रलाभः सूचितस्तद्दर्शयितुमाह । पुत्रिकाधर्ममाश्रित्येति । अभ्रातृकां प्रदास्यामि तुभ्यं कन्याम-

॥ श्रीगणेशाय नमः ॥ ॥ मैत्रेय उवाच ॥ मनोस्तु शतरूपायां तिस्रः कन्याश्च जज्ञिरे ॥ आकूतिर्देवहूतिश्च प्रसूतिरिति विश्रुताः ॥ १ ॥ आकूतिं रुचये प्रादादपि भ्रातृमतीं नृपः ॥ पुत्रिकाधर्ममाश्रित्य शतरूपानुमोदितः ॥ २ ॥ प्रजापतिः स भगवान् रुचिस्तस्यामजीजनत् ॥ मिथुनं ब्रह्मवर्चस्वी परमेण समाधिना ॥ ३ ॥ यस्तयोः पुरुषः साक्षाद्विष्णुर्यज्ञस्वरूपधृक् ॥ या स्त्री सा दक्षिणा भूतेरंशभूताऽनपायिनी ॥ ४ ॥ आनिन्ये स्वगृहं पुत्र्याः पुत्रं विततरोचिषम् ॥ स्वायंभुवो मुदा युक्तो रुचिर्जग्राह दक्षिणाम् ॥ ५ ॥ तां कामयानां भगवानुवाह यजुषां पतिः ॥ तुष्टायां तोषमापन्नोऽजनयद्द्वादशात्मजान् ॥ ६ ॥ तोषः प्रतोषः संतोषो भद्रः शांतिरिडस्पतिः ॥ इध्मः कविर्विभुः स्वह्नः सुदेवो रोचनो द्विषट् ॥ ७ ॥ तुषिता नाम ते देवा आसन्स्वायंभुवांतरे ॥ मरीचिमिश्रा ऋषयो यज्ञः सुरगणेश्वरः ॥ ८ ॥

लंकृताम् ॥ अस्यां यो जायते पुत्रः स मे पुत्रो भवेदिति । भाषाबंधेन कन्यादानं पुत्रिकाधर्मः । स चाभ्रातृकायां कन्यायां पुत्रार्थिन एव प्रसिद्धस्तथापि पुत्रबाहुल्यकामस्तथाकृतवानित्याह । भ्रातृमतीमपीति ॥ २ ॥ मिथुनं पुरुषं स्त्रियं च । समाधिना ईश्वरध्यानेन ॥ ३ ॥ भूतेर्लक्ष्म्या अंशभूता अतस्तयोर्विवाहो न विरुद्ध इति भावः ॥ ४ ॥ पुत्र्या आकूतेः पुत्रं यज्ञम् ॥ ५ ॥ यजुषां यज्ञानां मंत्राणां वा पतिर्विष्णुः ॥ ६ ॥ द्विषट् द्वादश ॥ ७ ॥ प्रसंगात्स्वायंभुवमन्वंतरगतं षट्कमाह । तुषिता इति द्वाभ्याम् । मन्वं-

---

जो पुरुष होता तो यज्ञस्वरूप धारण करणारा साक्षात् विष्णु होय आणि जी स्त्री होती तिचें नांव दक्षिणा. ती, लक्ष्मीचा अंशावतार कीं जिला विष्णूचा वियोग कधींच होत नाहीं अशी होती ॥ ४ ॥ नंतर चोहोंकडे ज्याचा प्रकाश पडत आहे असा आपल्या कन्येचा तो पुत्र (यज्ञ) स्वायंभुवमनूनें मोठ्या आनंदानें आपल्या घरीं आणिला आणि ती दक्षिणानामक कन्या रुचिऋषीनें घेतली ह्मणजे तो तिचें उत्तम प्रकारें संगोपन करीत असे ॥ ५ ॥ नंतर ती कन्या उपवर होऊन पतीची इच्छा करूं लागली तेव्हां यज्ञाधिपति भगवान् विष्णूनें (यज्ञानेंच) तिला वरिलें. तेव्हां ती संतुष्ट झाली व तो यज्ञही संतोष पावला. नंतर तिचेठिकाणीं त्या यज्ञाला बारा पुत्र झाले ॥ ६ ॥ त्यांचीं नांवें–तोष प्रतोष, संतोष, भद्र, शांति, इडस्पति, इध्म, कवि, विभु, स्वन्ह, सुदेव आणि रोचन हे बारा होत ॥ ७ ॥ आतां प्रसंगानें स्वायंभुव मन्वंतरांतील सहा प्रकार सांगतात–हे विदुरा,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

स्वायंभुव मन्वंतरामध्यें तेच तोषप्रतोषादिक बारा पुत्र, तुषित या नांवानें प्रसिद्ध असे देव झाले, मरीचिप्रभृति सप्तर्षि झाले, यज्ञ हा हरीचा अवतार झाला व देवांचा अधिपति इंद्रहि तोच झाला ॥ ८ ॥ प्रियव्रत व उत्तानपाद हे महातेजस्वी मनूचे पुत्र झाले, आणि त्यांचे पुत्र नांतू व मुलींचे पुत्र ह्यांच्या वंशजांपासून त्या मन्वंतराचें परिपालन झालें ॥ ९ ॥ बा विदुरा, मनूनें आपली दुसरी कन्या देवहूति कर्दमऋषीला दिली, तत्संबंधी चरित्र मीच सांगितलें असतां तूं बहुत करून श्रवण केलें आहेस ॥ १० ॥ त्या महासमर्थ मनूनें, आपली तिसरी प्रसूतिनामक कन्या, दक्षनामक ब्रह्मपुत्राला अर्पण केली· ज्या दक्षापासून वाढलेली मोठी संतति त्रैलोक्यामध्यें पसरली आहे ॥ ११ ॥ हे विदुरा, आतां मरीचिप्रभृति नऊ ब्रह्मर्षींच्या पत्न्या ज्या नऊ कर्दमाच्या कन्या मी तुला पूर्वी सांगितल्या आहेत त्यांचा पुत्रपौत्रादि विस्तार मी तुला सांगतों तूं श्रवण कर ॥ १२ ॥ कर्दमऋषीची कन्या व मरीचि ऋषीची स्त्री जी कला तिला, कश्यप आणि पूर्णिमा असे दोन पुत्र झाले· ज्या दोघांच्या वंशानें हें जगत् भरून गेलें आहे ॥ १३ ॥ हे

तरं मनुर्देवा मनुपुत्राः सुरेश्वरः ॥ ऋषयोंऽशावतारश्च हरेः षड्विधमुच्यते । इति वक्ष्यति ॥ तत्र स्वायंभुवो मनुः । तुषिता देवाः । मरीचिप्रमुखाः सप्तर्षयः । यज्ञो हरेरवतारः स एव सुरगणेश्वर इंद्रः ॥ ८ ॥ प्रियव्रतोत्तानपादौ मनुपुत्रौ पृथ्वीपालकौ तदेवं यज्ञस्य द्वैरूप्येण षड्विधत्वम् । तयोः पुत्रपौत्रनप्तॄणां वंशैरनुवृत्तं व्याप्तं पालितं तन्मन्वंतरम्

प्रियव्रतोत्तानपादौ मनुपुत्रौ महौजसौ ॥ तत्पुत्रपौत्रनप्तॄणामनुवृत्तं तदंतरम् ॥ ९ ॥ देवहूतिमदात्तात कर्दमायात्मजां मनुः ॥ तत्सं-
बंधि श्रुतप्रायं भवता गदतो मम ॥ १० ॥ दक्षाय ब्रह्मपुत्राय प्रसूतिं भगवान्मनुः ॥ प्रायच्छद्यत्कृतः सर्गस्त्रिलोक्यां वि-
ततो महान् ॥ ११ ॥ याः कर्दमसुताः प्रोक्ता नव ब्रह्मर्षिपत्नयः ॥ तासां प्रसूतिप्रसवं प्रोच्यमानं निबोध मे ॥ १२ ॥ पत्नी
मरीचेस्तु कला सुषुवे कर्दमात्मजा ॥ कश्यपं पूर्णिमानं च ययोरापूरितं जगत् ॥ १३ ॥ पूर्णिमाऽसूत विरजं विश्वगं च परं-
तप ॥ देवकुल्यां हरेः पादशौचाद्याऽभूत्सरिद्दिवः ॥ १४ ॥ अत्रेः पत्न्यनसूया त्रीन् जज्ञे सुयशसः सुतान् ॥ दत्तं दुर्वाससं सोम-
मात्मेशब्रह्मसंभवान् ॥ १५ ॥ विदुर उवाच ॥ अत्रेर्गृहे सुरश्रेष्ठाः स्थित्युत्पत्त्यंतहेतवः ॥ किंचिच्चिकीर्षवो जाता एतदाख्याहि मे
गुरो ॥ १६ ॥ मैत्रेय उवाच ॥ ब्रह्मणा नोदितः सृष्टावत्रिर्ब्रह्मविदांवरः ॥ सह पत्न्या ययावृक्षं कुलाद्रिं तपसिस्थितः ॥ १७ ॥

॥ ९ ॥ श्रुतप्रायं बाहुल्येन श्रुतम् । तत्कन्यावंशानामश्रुतत्वात्प्रायग्रहणम् ॥ १० ॥ ११ ॥ प्रसूतिप्रसवं पुत्रपौत्रादिभिर्विस्तारम् ॥ १२ ॥ ययोर्वंशेनापूरितम् ॥ १३ ॥ कश्यपस्य वंशं षष्ठे वक्ष्यति । द्वितीयस्य वंशमाह । पूर्णिमेति । देवकुल्यां नाम कन्यां च । हरेः पादक्षालनाज्जन्मांतरे या दिवः सरिद्गंगाऽभूत् ॥ १४ ॥ आत्मेशब्रह्म-संभवान्विष्णुरुद्रब्रह्मणामंशैः संभूतान् ॥ १५ ॥ किंचित्किंस्वित् । किं कर्तुमिच्छव इत्यर्थः ॥ १६ ॥ ऋक्षं नाम कुलाद्रिम् । तपसिस्थितः सन् ॥ १७ ॥

शत्रुतापना विदुरा, पूर्णिमाला, विश्वग आणि विरज हे दोन पुत्र आणि देवकुल्या नांवाची एक कन्या अशीं तीन मुलें झालीं· ज्या देवकुल्येनें हरीच्या चरणाचें क्षालन केलें ह्मणून ती जन्मांतरीं स्वर्गीची नदी (गंगा) झाली ॥ १४ ॥ अत्रिऋषीची पत्नी जी अनसूया तिला विष्णु, रुद्र व ब्रह्मदेव यांच्या अंशांपासून अवतीर्ण झालेले दत्त, दुर्वासा आणि चंद्र ह्या नांवांचे उत्तम यशस्वी तीन पुत्र झाले ॥ १५ ॥ विदुर ह्मणाला– हे गुरो मैत्रयऋषे, विश्वाची उत्पत्ति, स्थिति व लय ह्यांस कारणभूत असे देवश्रेष्ठ जे ब्रह्मविष्णुमहेश्वर, ते कोणतें कार्य करण्यासाठीं अत्रिऋषीच्या घरीं अवतीर्ण झाले हें मला सांग ॥ १६ ॥ मैत्रेय ह्मणाला– ब्रह्मवेत्त्यांमध्यें श्रेष्ठ अशा अत्रिऋषीला ब्रह्मदेवानें सृष्टि करण्याची आज्ञा केली असतां तो तपश्चर्या करण्याच्या निश्चयानें आपल्या अनसूयानामक पत्नीसहवर्तमान ऋक्षनामक कुलपर्वतावर निघून गेला ॥ १७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आणि तेथें निर्विंध्यानामक नदीच्या वाहणाऱ्या उदकानें चोहोंबाजूंनीं नादित झालेल्या व पुष्पगुच्छांनीं युक्त अशा पळसांच्या व अशोक वृक्षांच्या वनामध्यें ॥ १८ ॥ तो अत्रिऋषी, प्राणायामाच्या योगानें आपल्या मनाचा निग्रह करून, 'जो कोण जगदीश्वर आहे त्याला मी शरण जातों तो मला आपल्यासारखी संतति देवो' असें चिंतन करून शीतउष्ण, सुखदुःख इत्यादिकांचें सहन करित होत्साता केवळ वायूचें भक्षण करून शंभर वर्षेंपर्यंत एका पायावर उभा राहिला ॥ १९ ॥ २० ॥ तेव्हां प्राणायामरूप काष्ठांनीं प्रदीप्त होऊन अत्रिऋषीच्या मस्तकांतून बाहेर निघालेल्या अग्नीच्या योगानें त्रैलोक्याला ताप होऊं लागला असें पाहून, अप्सरा, ऋषि, गंधर्व, सिद्ध, विद्याधर आणि सर्प हे ज्यांच्या कीर्तीचें गायन करीत आहेत असे ब्रह्माविष्णुमहेश्वर हे तीनहि देव त्या अत्रिऋषीच्या आश्रमास प्राप्त झाले ॥ २१ ॥ २२ ॥ तेव्हां एकाएकीं

तस्मिन्कुलाद्रौ। प्रसूनानां स्तबका येषु पलाशाशोकेषु तेषां कानने । निर्विंध्या नाम नदी तस्याः स्रवद्भिर्वार्भिरुद्घुष्टे नादिते॥ १८॥ १९ ॥ २०॥ प्राणायाम एव एधः संदीपको यस्य तेन मुनेर्मूर्ध्नो निर्गतेनाग्निना तप्यमानं समीक्ष्य तदाश्रमपदं ययुरित्युत्तरेणान्वयः ॥ २१ ॥ अप्सरःप्रमुखैर्वितायमानं विस्तार्यमाणं यशो येषां ते ॥ २२ ॥ तेषां प्रादुर्भावः प्राकट्यं तस्य संयोगः सन्निधिस्तेन विद्योतितं मनो यस्य । उत्तिष्ठन्नुत्कर्षेण तिष्ठन् ॥ २३ ॥ अर्हणं पुष्पादिकमंजलौ यस्य । उपतस्थे पूजयामास । वृषाद्यारूढान् ।

तस्मिन्प्रसूनस्तबकपलाशाशोककानने ॥ वार्भिः स्रवद्भिरुद्घुष्टे निर्विंध्यायाः समंततः ॥ १८ ॥ प्राणायामेन संयम्य मनो वर्षशतं मुनिः ॥ अतिष्ठदेकपादेन निर्द्वंद्वोऽनिलभोजनः ॥ १९ ॥ शरणं तं प्रपद्येऽहं य एव जगदीश्वरः ॥ प्रजामात्मसमां मह्यं प्रयच्छत्विति चिंतयन् ॥ २० ॥ तप्यमानं त्रिभुवनं प्राणायामैधसाग्निना ॥ निर्गतेन मुनेर्मूर्ध्नः समीक्ष्य प्रभवस्त्रयः ॥ २१ ॥ अप्सरोमुनिगंधर्वसिद्धविद्याधरोरगैः ॥ वितायमानयशसस्तदाश्रमपदं ययुः ॥ २२ ॥ तत्प्रादुर्भावसंयोगविद्योतितमना मुनिः ॥ उत्तिष्ठन्नेकपादेन ददर्श विबुधर्षभान् ॥ २३ ॥ प्रणम्य दंडवद्भूमावुपतस्थेऽर्हणांजलिः ॥ वृषहंससुपर्णस्थान्स्वैः स्वैश्चिह्नैश्च चिह्नितान् ॥ २४ ॥ कृपावलोकेन हसद्वदनेनोपलंभितान् ॥ तद्रोचिषा प्रतिहते निमील्य पुनरक्षिणी ॥ २५ ॥ चेतस्तत्प्रवणं युंजन्नस्तावीत्संहतांजलिः ॥ श्लक्ष्णया सूक्तया वाचा सर्वलोकगरीयसः ॥ २६ ॥ अत्रिरुवाच ॥ विश्वोद्भवस्थितिलयेषु विभज्यमानैर्मायागुणैरनुयुगं विगृहीतदेहाः ॥ ते ब्रह्मविष्णुगिरिशाः प्रणतोऽस्म्यहं वस्तेभ्यः क एव भवतां म इहोपहूतः ॥ २७ ॥

स्वैः स्वैश्चिह्नैस्त्रिशूलकमंडलुचक्रादिभिः ॥ २४ ॥ कृपयाऽवलोको यस्मिन् हसच्च तद्वदनं च तेनोपलंभितान्प्रसन्नत्वेन ज्ञापितान् । तेषां रोचिषा दीप्त्या ॥ २५ ॥ श्लक्ष्णया मधुरया । सूक्तया गंभीरार्थया ॥ २६ ॥ अनुयुगं कल्पेकल्पे विभज्य गृहीतो देहो यैस्ते प्रसिद्धा ब्रह्मविष्णुगिरिशा यूयम् । वो युष्मान्प्रणतोऽस्मि । तेभ्यः सकाशादेक

संनिधभागीं झालेल्या त्यांच्या प्रकटपणाच्या योगानें ज्याचें मन प्रकाशयुक्त झालें आहे व जो एका पायांवर उभा राहिला आहे अशा त्या अत्रिऋषीनें त्या देवश्रेष्ठांस अवलोकन केलें ॥ २३ ॥ आणि वृषभ हंस आणि गरुड या वाहनांवर बसलेल्या, त्रिशूळ कमंडलु चक्र इत्यादिक आपापल्या चिन्हांनीं चिन्हित व कृपादृष्टियुक्त व हास्ययुक्त मुखानें आपली प्रसन्नता सुचविणाऱ्या त्या तिन्हीं देवांस पाहतांच भूमीवर त्यानें दंडासारखा नमस्कार करून हातांत पूजासाहित्य घेऊन त्यांची पूजा केली; नंतर तो ऋषि, त्या देवांच्या कांतीनें दिपून गेलेलीं आपलीं नेत्रें मिटून—॥ २४ ॥ २५ ॥ आपलें अंतःकरण त्यांच्याकडे लावीत होत्साता हात जोडून सर्व लोकांमध्यें श्रेष्ठ अशा त्या देवांची गंभीर अर्थानें भरलेल्या मधुरवाणीनें स्तुति करूं लागला ॥ २६ ॥ अत्रिऋषि म्हणाला— हे देवहो, जगाची उत्पत्ति स्थिति व संहार हीं कार्यें होण्याविषयीं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

एकाच मायेचे गुण वेगवेगळे झाले आहेत त्या गुणांच्या योगानें प्रतिकल्पांत वेगवेगळ्या मूर्ति धारण करणारे जे ब्रह्माविष्णुमहेश्वर तेच तुम्ही आहां. मी तुम्हांला नमस्कार करीत आहें. मी येथें एकाचीच स्तुति केली होती तो तुम्हांपैकीं कोण आहे तें कृपा करून मला सांगा ॥ २७ ॥ मी याठिकाणीं आपणाला पुत्रप्राप्ति व्हावी ह्मणून अनेक प्रकारच्या उपचारांनीं एकाच भगवंताचें चित्तामध्यें ध्यान केलें असून सर्व देहधारी प्राण्यांच्या मनालाहि अगोचर असणारे तुह्मी तिघेजण याठिकाणीं कसे वरें प्राप्त झालां आहां ? हें आपण मजवर प्रसन्न होऊन कथन करा; कारण, याबद्दल मला मोठा विस्मय वाटत आहे ॥ २८ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे समर्था विदुरा, त्या तिन्ही श्रेष्ठ देवांनीं असें त्या ऋषीचें भाषण ऐकून हास्य केलें आणि मधुरवाणीनें त्या ऋषीप्रत असें भाषण केलें कीं, ॥ २९ ॥ देव ह्मणाले– हे अत्रिऋषे, तूं जसा संकल्प केला आहेस त्याप्रमाणेंच झालें आहे त्यांत कांहीं अन्यथा झालें नाहीं. कारण तूं सत्यसंकल्प आहेस. तूं ज्या एका जगदीश्वरनामक तत्त्वाचें ध्यान केलेस तेच आह्मी तिघेजण आहों;

एव मे मयोपहूतः । शरणं तं प्रपद्ये इत्येकस्यैव निर्दिष्टत्वात् । स च युष्मासु क इति युष्माभिरेव कथ्यतामित्यर्थः ॥ २७ ॥ अस्य प्रपंचः एक इति । विविधैः प्रधानैरुपचारैः । विबुधप्रधान इति वा पाठः । प्रजननाय पुत्रोत्पत्त्यै चित्तीकृतश्चित्तेनैक्यं नीतः । मनसोऽपि दूरा अगोचराः संतः कथं नु त्रयोप्यत्रागताः ॥ २८ ॥ २९ ॥ ते त्वया यथा कृतः

एको मयेह भगवान्विविधप्रधानैश्चित्तीकृतः प्रजननाय कथं नु यूयम् ॥ अत्रागतास्तनुभृतां मनसोऽपि दूरा ब्रूत प्रसीदत महानिह विस्मयो मे ॥ २८ ॥ मैत्रेय उवाच ॥ इति तस्य वचः श्रुत्वा त्रयस्ते विबुधर्षभाः ॥ प्रत्याहुः श्लक्ष्णया वाचा प्रहस्य तमृषिं प्रभो ॥ २९ ॥ देवा ऊचुः ॥ यथा कृतस्ते संकल्पो भाव्यं तेनैव नान्यथा ॥ सत्संकल्पस्य ते ब्रह्मन्यद्वै ध्यायति ते वयम् ॥ ३० ॥ अथास्मदंशभूतास्ते आत्मजा लोकविश्रुताः ॥ भवितारोऽङ्ग भद्रं ते विस्रप्स्यंति च ते यशः ॥ ३१ ॥ एवं कामवरं दत्त्वा प्रतिजग्मुः सुरेश्वराः ॥ सभाजितास्तयोः सम्यग्दंपत्योर्मिषतोस्ततः ॥ ३२ ॥ सोमोऽभूद्ब्रह्मणोंऽशेन दत्तो विष्णोस्तु योगवित् ॥ दुर्वासाः शंकरस्यांशो निबोधांगिरसः प्रजाः ॥ ३३ ॥ श्रद्धा त्वंगिरसः पत्नी चतस्रोऽसूत कन्यकाः ॥ सिनीवाली कुहू राका चतुर्थ्यनुमतिस्तथा ॥ ३४ ॥ तत्पुत्रावपरावास्तां ख्यातौ स्वारोचिषेंऽतरे ॥ उतथ्यो भगवान्साक्षाद्ब्रह्मिष्ठश्च बृहस्पतिः ॥ ३५ ॥

संकल्पस्तेन तथैव भाव्यं नान्यथा । यतः सत्संकल्पस्य ते संकल्पः । तर्हि कथमेकस्मिन् ध्यायमाने त्रयः प्रतीतास्थ तत्राहुः । यदेकं जगदीश्वराख्यं तत्त्वं भवान् ध्यायति त एते वयं त्रयोऽपि तदेवैकं तत्त्वं नास्माकं भेदोऽस्तीत्यर्थः ॥ ३० ॥ विस्रप्स्यंति विस्तारयिष्यंति । अंतर्भूतणिजर्थस्य सृप्लृगतावित्यस्य रूपम् ॥ ३१ ॥ ताभ्यां सम्यक् सभाजिताः पूजिताः संतः ततः स्थानात्प्रतिजग्मुः ॥ ३२ ॥ अंगिरसो ब्रह्मणस्तृतीयपुत्रस्य । निबोध बुद्ध्यस्व ॥ ३३ ॥ ताः कन्या निर्दिशति । सिनीवालीति ॥ ३४ ॥ ३५ ॥

आह्मां तिघांत भेद मुळींच नाहीं ॥ ३० ॥ यास्तव हे मुने तुझें कल्याण असो. तुला आमच्या अंशांपासून झालेले जगद्विख्यात तीन पुत्र होतील व ते तुझी कीर्ति सर्वत्र पसरतील ॥ ३१ ॥ हे विदुरा, याप्रमाणें त्या देवश्रेष्ठांनीं अत्रिऋषीला इच्छित वर दिला असतां त्या उभयतां स्त्रीपुरुषांनीं त्यांची उत्तम रीतीनें पूजा केली नंतर ते ब्रह्माविष्णुमहेश्वर, तीं उभयतां पहात असतां आपापल्या स्थानीं निघून गेले ॥ ३२ ॥ पुढें अत्रिऋषीला, ब्रह्मदेवाच्या अंशापासून चंद्र, विष्णूच्या अंशापासून योगशास्त्रांत निष्णात असा दत्त आणि शंकराच्या अंशापासून दुर्वासऋषी असे तीन पुत्र झाले. आतां ब्रह्मदेवाचा तिसरा पुत्र जो अंगिराऋषी त्याची संतति सांगतों ऐक ॥ ३३ ॥ अंगिराऋषीची पत्नी जी श्रद्धा तिला सिनीवाली, कुहू, राका आणि चवथी अनुमति अशा चार कन्या झाल्या ॥ ३४ ॥ तसेच त्या अंगिराऋषीचे दुसरे दोन

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुत्र, स्वारोचिष मन्वंतरांत प्रख्यात होते. एक उतथ्य आणि दुसरा महासमर्थ ब्रह्मज्ञानसंपन्न साक्षात् बृहस्पति होय ॥ ३५ ॥ ब्रह्मदेवाचा चवथा पुत्र जो पुलस्त्य ऋषी त्याला त्याची पत्नी जी हविर्भू तिच्या उदरीं अगस्त्य आणि महातपस्वी विश्रवा असे दोन पुत्र झाले, त्यांपैकीं अगस्त्य हा दुसऱ्या जन्मीं जठराग्नि झाला ॥ ३६ ॥ विश्रव्याला इडविडानामक पत्नीच्या उदरीं जो पुत्र झाला तोच यक्षांचा राजा देव कुबेर होय. त्या विश्रव्यालाच केशिनीनामक दुसऱ्या पत्नीचेठिकाणीं रावण, कुंभकर्ण आणि बिभीषण या नांवांचे तीन पुत्र झाले ॥ ३७ ॥ हे महाबुद्धिमंता विदुरा, ब्रह्मदेवाचा पांचवा पुत्र जो पुलहऋषी त्याची भार्या महासाध्वी जी गति तिला कर्मश्रेष्ठ, वरीयान् आणि सहिष्णु असे तीन पुत्र झाले ॥ ३८ ॥ ब्रह्मदेवाचा सहावा पुत्र जो क्रतुऋषी त्याची पत्नी जी क्रिया तिला ब्रह्मतेजानें उज्ज्वल दिसणारे असे वालखिल्य नांवांचे साठ हजार पुत्र झाले ॥ ३९ ॥ हे शत्रुतापना विदुरा, ब्रह्मदेवाचा सातवा पुत्र जो वसिष्ठ त्याला ऊर्जा-(अरुंधती) नामक पत्नीच्या उदरीं आचरणानें व मनानें

पुलस्त्यो हविर्भुवि पत्न्यामित्यन्वयः । सोऽगस्त्यः । दह्राग्निः जठराग्निः । विश्रवाश्च पुलस्त्यस्य सुत इति शेषः ॥ ३६ ॥ तस्य विश्रवस इडविडायां जातः सुतः कुबेरः । अन्यस्यां भार्यायां केशिन्यां रावणादयस्त्रयः सुताः ॥ ३७ ॥ ३८ ॥ ज्वलतः प्रकाशमानान् ॥ ३९ ॥ चित्रकेतुप्रमुखा जज्ञिरे तेच सप्तर्षयो जाताः ॥ ४० ॥

पुलस्त्योऽजनयत्पत्न्यामगस्त्यं च हविर्भुवि ॥ सोऽन्यजन्मनि दह्राग्निर्विश्रवाश्च महातपाः ॥ ३६ ॥ तस्य यक्षपतिर्देवः कुबेरस्त्विडविडासुतः ॥ रावणः कुंभकर्णश्च तथाऽन्यस्यां विभीषणः ॥ ३७ ॥ पुलहस्य गतिर्भार्या त्रीनसूत सती सुतान् ॥ कर्मश्रेष्ठं वरीयांसं सहिष्णुं च महामते ॥ ३८ ॥ क्रतोरपि क्रिया भार्या वालखिल्यानसूयत ॥ ऋषीन् षष्टिसहस्राणि ज्वलतो ब्रह्मतेजसा ॥ ३९ ॥ ऊर्जायां जज्ञिरे पुत्रा वसिष्ठस्य परंतप ॥ चित्रकेतुप्रधानास्ते सप्त ब्रह्मर्षयो ऽमलाः ॥ ४० ॥ चित्रकेतुः सुरोचिश्च विरजा मित्र एव च ॥ उल्बणो वसुभृद्यानो द्युमान् शक्त्यादयोऽपरे ॥ ४१ ॥ चित्तिस्त्वथर्वणः पत्नी लेभे पुत्रं धृतव्रतम् ॥ दध्यञ्चमश्वशिरसं भृगोर्वंशं निबोध मे ॥ ४२ ॥ भृगुः ख्यात्यां महाभागः पत्न्यां पुत्रानजीजनत् ॥ धातारं च विधातारं श्रियं च भगवत्पराम् ॥ ४३ ॥ आयतिं नियतिं चैव सुते मेरुस्तयोरदात् ॥ ताभ्यां तयोरभवतां मृकंडः प्राण एव च ॥ ४४ ॥

तानेवाह । चित्रकेतुरिति । वसुभृद्यानो नामैकः । शक्त्यादयो ऽपरे ऽन्यस्याः पुत्राः ॥ ४१ ॥ ४२ ॥ ख्यात्यां पत्न्याम् । पुत्रान्पुत्रौ पुत्रीं च । तानेवाह धातारमिति ॥ ४३ ॥ तयोर्धातृविधात्रोः ॥ ४४ ॥

शुद्ध असे चित्रकेतुप्रभृति सात पुत्र झाले तेच पुढें सात ब्रह्मर्षि (सप्तर्षि) झाले ॥ ४० ॥ त्यांचीं नांवें चित्रकेतु, सुरोचि, विरजा, मित्र, उल्बण वसुभृद्यान आणि द्युमान् हीं होत. तसेच वसिष्ठाला दुसऱ्या पत्नीच्याठिकाणीं शक्ति आदिक दुसरे पुत्र झाले ॥ ४१ ॥ ब्रह्मदेवाचा आठवा पुत्र जो अथर्वा त्याची पत्नी जी चित्ति तिला नेमनिष्ठ असा दधीच नांवाचा एक पुत्र झाला त्याला अश्विनीकुमारांनीं कारणपरत्वें घोड्याचें मस्तक लाविलें होतें ह्मणून त्याचें अश्वशिरा असेंहि नांव पडलें होतें. आतां ब्रह्मदेवाचा नववा पुत्र जो भृगु त्याचा वंश सांगतों ऐक ॥ ४२ ॥ महाभाग्यशाली भृगुऋषीला ख्यातिनामक पत्नीच्या उदरीं धाता आणि विधाता ह्या नांवांचे दोन पुत्र व भगवंताचेठिकाणीं तत्पर अशी श्री नांवाची एक कन्या इतकीं अपत्यें झालीं ॥ ४३ ॥ त्या भृगूच्या दोन पुत्रांना मेरुऋषीनें आपल्या आयति आणि नियति ह्या नांवांच्या दोन कन्या दिल्या. त्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दोघींना दोघां ऋषींपासून मृकंड आणि प्राण असे दोन पुत्र झाले ॥ ४४ ॥ मृकंडाचा पुत्र मार्कंडेय होय. प्राणाला वेदशिरा ह्या नांवाचा मुनि पुत्र झाला. भृगुऋषीला आणखी एक कवि नांवाचा पुत्र होता. ज्या कवीला ज्ञानसंपन्न असा उशना (शुक्र) पुत्र झाला ॥ ४५ ॥ हे विदुरा, त्या ह्या सर्व मुनींनीं आपापल्या पुत्रपौत्रादि संततीच्या योगानें त्रैलोक्य भरून टाकिलें. विदुरा, हा कर्दमऋषीच्या मुलींच्या वंशाचा विस्तार मी तुला सांगितला ॥ ४६ ॥ हा वंशविस्तार श्रद्धापूर्वक श्रवण करणाऱ्या पुरुषाचें पातक तत्काल दूर करितो. असो. ब्रह्मदेवाच्या दक्षनामक पुत्रानें स्वायंभुवमनूच्या प्रसूतिनामक तिसऱ्या कन्येशीं विवाह केला ॥ ४७ ॥ त्या समर्थ दक्षाला तिचेठिकाणीं सोळा सुंदर कन्या झाल्या. त्यांपैकीं तेरा कन्या त्यानें धर्माला दिल्या तशीच एक अग्नीला दिली ॥ ४८ ॥ सर्व पितरांना मिळून एक दिली व जन्ममरणरूप संसाराची निवृत्ति करणाऱ्या शंकराला एक दिली. हे विदुरा, श्रद्धा, मैत्री, दया, शांति, तुष्टि, पुष्टि, क्रिया, उन्नति, बुद्धि, मेधा, तितिक्षा, ऱ्ही आणि मूर्ति ह्या तेरा

कविश्च भार्गवो भृगोः पुत्रः यस्य कवेः सुत उशना ॥ ४५ ॥ ४६ ॥ अजात्मजो ब्रह्मपुत्रः नतु प्राचेतसः ॥ ४७ ॥ ४८ ॥ युक्तेभ्यः संयतेभ्यो मि-

मार्कंडेयो मृकंडस्य प्राणाद्वेदशिरा मुनिः ॥ कविश्च भार्गवो यस्य भगवानुशना सुतः ॥ ४५ ॥ त एते मुनयः क्षत्तर्लोकान्सर्गैर-भावयन् ॥ एष कर्दमदौहित्रसंतानः कथितस्तव ॥ ४६ ॥ शृण्वतः श्रद्दधानस्य सद्यः पापहरः परः ॥ प्रसूतिं मानवीं दक्ष उपयेमे ह्यजात्मजः ॥ ४७ ॥ तस्यां ससर्ज दुहितॄः षोडशामललोचनाः ॥ त्रयोदशादाद्धर्माय तथैकामग्नये विभुः ॥ ४८ ॥ पितृभ्य एकां युक्तेभ्यो भवायैकां भवच्छिदे ॥ श्रद्धा मैत्री दया शांतिस्तुष्टिः पुष्टिः क्रियोन्नतिः ॥ ४९ ॥ बुद्धिर्मेधा तितिक्षा ह्रीर्मूर्तिर्धर्मस्य पत्न्यः ॥ श्रद्धाऽसूत शुभं मैत्री प्रसादमभयं दया ॥ ५० ॥ शांतिः सुखं मुदं तुष्टिः स्मयं पुष्टिरसूयत ॥ योगं क्रियोन्नतिर्दर्पमर्थं बुद्धिरसूयत ॥ ५१ ॥ मेधा स्मृतिं तितिक्षा तु क्षेमं ऱ्हीः प्रश्रयं सुतम् ॥ मूर्तिः सर्वगुणोत्पत्तिर्नरनारायणावृषी ॥ ५२ ॥ ययोर्जन्मन्यदो विश्वमभ्यनंदत्सुनिर्वृतम् ॥ मनांसि ककुभो वाताः प्रसेदुः सरितोऽद्रयः ॥ ५३ ॥ दिव्यवाद्यंत तूर्याणि पेतुः कुसुमवृष्टयः ॥ मुनयस्तुष्टुवुस्तुष्टा जगुर्गंधर्वकिन्नराः ॥ ५४ ॥ नृत्यंति स्म स्त्रियो देव्य आसीत्परममंगलम् ॥ देवा ब्रह्मादयः सर्वे उपतस्थुरभिष्टवैः ॥ ५५ ॥

लितेभ्यो वा ॥ ४९ ॥ ५० ॥ ५१ ॥ सर्वेषां गुणानामुत्पत्तिर्यस्यां सा ॥ ५२ ॥ ५३ ॥ ५४ ॥ उपतस्थुर्भेजुः ॥ ५५ ॥

धर्माच्या स्त्रिया होत ॥ ४९ ॥ त्यांपैकीं श्रद्धेला शुभ, मैत्रीला प्रसाद, दयेला अभय, शांतीला सुख, तुष्टीला आनंद, पुष्टीला गर्व, क्रियेला योग, उन्नतीला अहंकार, बुद्धीला अर्थ, मेधेला स्मृति, तितिक्षेला क्षेम, व ऱ्हीला विनय असे बाराजणींना बारा पुत्र झाले आणि सर्व गुणांचें उत्पत्तिस्थान अशा मूर्तीला नरनारायण नांवांचे दोन ऋषि पुत्र झाले ॥ ५० ॥ ५१ ॥ ५२ ॥ त्यांच्या जन्मकाळीं हें विश्व उत्साहांत निमग्न होऊन अत्यंत आनंद पावलें होतें. लोकांचीं मनें व दिशा प्रसन्न झाल्या. वारे शांत वाहूं लागले. नद्यांचीं उदकें स्वच्छ झालीं. पर्वतांनींहि आपलीं अंतस्थ रत्नें वगैरे प्रकट करून प्रसन्नता दाखविली ॥ ५३ ॥ स्वर्गांत वाद्यें वाजूं लागलीं. तेथून भूमीवर पुष्पवृष्टि होऊं लागल्या. मुनि संतुष्ट होऊन त्या नरनारायणाची स्तुति करूं लागले. गंधर्व आणि किन्नर भगवंताचें यश गाऊं लागले ॥ ५४ ॥ देवांगना नृत्य करूं लागल्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असा चोहोंकडे परममंगल झाला असतां, ब्रह्मदेव आदिकरून सर्व देव अभिनव स्तोत्रांनीं त्या नरनारायणाची स्तुति करूं लागले ॥ ५५ ॥ देव ह्मणाले– आकाशांतील ढगांमध्यें मनुष्य जसजशी घोडा हत्ती वगैरेंची कल्पना करितो तसतसे ते पदार्थ त्याला भासूं लागतात त्याप्रमाणें ज्या परमेश्वरानें आपल्या मायेनें आत्मस्वरूपाचे ठिकाणीं हें जग निर्माण केलें आहे व त्या आत्म्याचा प्रकाश होण्यासाठीं धर्माच्या घरीं त्या ऋषिस्वरूपानें आज हा अवतार प्रकट केला आहे, त्या अंतर्यामी पुरुषाला आह्मी नमस्कार करितों ॥ ५६ ॥ ज्याच्या तत्त्वाचें केवळ शास्त्रानेंच अनुमान करितां येतें, प्रत्यक्ष जाणतां येत नाहीं त्या या भगवंतानें, लक्ष्मीचें स्थान जें निर्मल कमळ त्याला सुद्धां स्वसौंदर्यानें मागें टाकणाऱ्या आपल्या पूर्ण कृपादृष्टियुक्त नेत्रकमलानें, जगन्मर्यादेच्या रक्षणासाठीं सत्त्वगुणानें उत्पन्न केलेल्या आह्मां देवगणांकडे अवलोकन करावें ॥ ५७ ॥

निजया मायया यस्मिन्नात्मनि खे गगने रूपभेदं गंधर्वनगरमिवेदं विश्वं विरचितम् । तस्यात्मनः प्रतिचक्षणाय प्रकाशनायात्मानं योऽद्य प्रादुश्चकार प्रकटितवांस्तस्मै पुरुषाय नमः । केन रूपेण प्रादुश्चकार । ऋषेर्मूर्तिराकारो यस्मिंस्तेन रूपेण ॥ ५६ ॥ सोऽयं नोऽस्मान्सुरगणाननल्पकरुणायुक्तेन विलोकनेन विशिष्टनेत्रेण दृश्यात्पश्यतु । कथंभूतेन । यच्छ्रीनिकेतममलमरविंदं तत्क्षिपता निरस्कुर्वता । कथंभूतः । अनुमेयं शास्त्रतो विचार्यं नत्वस्माकमपरोक्षं तत्त्वं यस्य । कथंभूतानस्मान् । स्थितेर्जगन्मर्यादाया व्यतिकरोऽन्यथात्वं

देवा ऊचुः ॥ यो मायया विरचितं निजयाऽऽत्मनीदं खे रूपभेदमिव तत्प्रतिचक्षणाय ॥ एतेन धर्मसदने ऋषिमूर्तिनाऽद्य प्रादुश्चकार पुरुषाय नमः परस्मै ॥ ५६ ॥ सोऽयं स्थितिव्यतिकरोपशमाय सृष्टान्सत्त्वेन नः सुरगणाननुमेयतत्त्वः ॥ दृश्याददभ्रकरुणेन विलोकनेन यच्छ्रीनिकेतममलं क्षिपताऽरविंदम् ॥ ५७ ॥ एवं सुरगणैस्तात भगवंतावभिष्टुतौ ॥ लब्धावलोकैर्ययतुरर्चितौ गंधमादनम् ॥ ५८ ॥ ताविमौ वै भगवतो हरेरंशाविहागतौ ॥ भारव्ययाय च भुवः कृष्णौ यदुकुरूद्वहौ ॥ ५९ ॥ स्वाहाऽभिमानिनश्चाग्नेरात्मजांस्त्रीनजीजनत् ॥ पावकं पवमानं च शुचिं च हुतभोजनम् ॥ ६० ॥ तेभ्योऽग्नयः समभवंश्चत्वारिंशच्च पंच च ॥ त एवैकोनपंचाशत्साकं पितृपितामहैः ॥ ६१ ॥ वैतानिके कर्मणि यन्नामभिर्ब्रह्मवादिभिः ॥ आग्नेय्य इष्टयो यज्ञे निरूप्यंतेऽग्नयस्तु ते ॥ ६२ ॥

तस्योपशमाय सत्त्वेन गुणेन सृष्टान् ॥ ५७ ॥ लब्धोऽवलोको यैः सुरगणैस्तैरभिष्टुतावर्चितौ संतौ ययतुः ॥ ५८ ॥ भुवो भारस्य व्ययाय नाशाय । चकार एकवाक्यत्वार्थः तौ च सांप्रतमिहागतावित्यर्थः । तदुक्तं तंत्रे । अर्जुने तु नरावेशः कृष्णो नारायणः स्वयं इति । यदूद्वहः श्रीकृष्णः कुरूद्वहोऽर्जुनः उभावपि कृष्णनामानौ ॥ ५९ ॥ अग्न्यभिमानिनो देवान् । स्वाहा नाम तस्य भार्या । हुतभोजनमिति त्रयाणां विशेषणम् ॥ ६० ॥ पितरस्त्रयः पितामह एकस्तैः साकं सह ॥ ६१ ॥ वैतानिके वैदिके कर्मणि यज्ञे

बा विदुरा, याप्रमाणें देवगणांनीं त्या भगवंताची (नरनारायणाची) स्तुति केली असतां त्यांनीं देवांकडे कृपादृष्टीनें अवलोकन केलें. नंतर देवांनीं पूजित असे ते नरनारायण तपश्चर्या करण्याकरितां गंधमादन पर्वतावर निघून गेले ॥ ५८ ॥ तेच हे भगवान् हरींचे अंश नरनारायण, पृथिवीचा भार दूर करण्यासाठीं यादवांच्या व कौरवांच्या कुळांत अवतार घेऊन दोघेहि कृष्णनामक असे कृष्णार्जुन येथें प्राप्त झाले आहेत ॥ ५९ ॥ आतां अग्नीची संतति सांगतों– अग्नीची पत्नी जी स्वाहा तिला, पावक, पवमान आणि शुचि हे तीन पुत्र झाले, हे तिघेजण अग्नीच्या अभिमानी देवता असून होमद्रव्याचें भक्षण करितात ॥ ६० ॥ त्यांपासून पंचेचाळीस प्रकारचे अग्नि उत्पन्न झाले आहेत. तेच अग्नि, तीन पितर व एक पितामह मिळून एकुणपन्नास होत ॥ ६१ ॥ वेदवेत्ते पुरुष, यज्ञकर्मामध्यें ज्या एकुणपन्नास अग्नींच्या नांवांनीं प्रसिद्ध अशा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अग्निदेवतादिक इष्टि करितात ते हे अग्नि होत, हे अग्नि लौकिक नव्हत ॥ ६२ ॥ अग्निष्वात्त (या लोकीं केवळ स्मार्त कर्म करून पितृत्व पावलेले), बर्हिषद (या लोकीं अग्निहोमादि यज्ञ करून पितृत्व पावलेले), सोमप (यज्ञांत सोमपान करणारे), आज्यप (यज्ञांत घृत प्राशन करणारे), साग्निक (ज्यांना श्राद्धकालीं अग्नौकरण आहे ते) आणि निरग्निक (ज्यांना अग्नौकरण नाहीं ते) ह्या सर्व पितरांची पत्नी दक्षाची कन्या स्वधा होय ॥ ६३ ॥ त्या स्वधेला पितरांपासून वयुना आणि धारिणी अशा दोन कन्या झाल्या. त्या दोघीजणीहि ब्रह्मज्ञानाचा उपदेश करणाऱ्या असून शास्त्रीय आणि अनुभविक अशा दोन्ही प्रकारच्या ज्ञानांत पारंगत होत्या. ह्मणूनच त्यांना पुढें संतति झाली नाहीं ॥ ६४ ॥ दक्षाची कन्या व शंकराची स्त्री जी सती ती गुणांनीं व स्वभावानें आपणास योग्य अशा शंकर देवाच्या सेवेमध्यें सर्वकाल तत्पर असतांहि तिला पुत्र झाला नाहीं ॥ ६५ ॥ तिनें, निरपराधी अशा शंकराशीं आपला पितादक्ष प्रतिकूल झाला असें पाहून, त्याच्या रागानें कौमारावस्थेमध्येंच योगधारणेच्या योगेंकरून आपणच

येषां नामभिरग्निदेवताका इष्टयो निरूप्यंते क्रियंते त एतेऽग्नयो न लौकिकाः । अतो बहूनां न वैयर्थ्यमिति भावः ॥ ६२ ॥ सौम्याः सोमपाः येषामग्नौकरणमस्ति ते साग्नयः तद्रहितास्त्वनग्नयः ॥ ६३ ॥ तयोस्तु संततिर्नाभवज्जीवन्मुक्तत्वादित्याह । उभे त इति ॥ ६४ ॥ गुणशीलत आत्मनः सदृशं देवमनुव्रताऽपि सती पुत्रं न लेभे ॥ ६५ ॥ तत्र हेतुः । स्वे पितरि दक्षे ऽप्रतिरूपे ऽसदृशे प्रतिकूले सतीत्यर्थः । आत्मना स्वयमेवात्मानं देहमजहात्त्यक्तवती । योगसंयुता योगमाश्रित्येति ॥ ६६ ॥ इति

अग्निष्वात्ता बर्हिषदः सौम्याः पितर आज्यपाः ॥ साग्नयोऽनग्नयस्तेषां पत्नी दाक्षायणी स्वधा ॥ ६३ ॥ तेभ्यो दधार कन्ये द्वे
वयुनां धारिणीं स्वधा ॥ उभे ते ब्रह्मवादिन्यौ ज्ञानविज्ञानपारगे ॥ ६४ ॥ भवस्य पत्नी तु सती भवं देवमनुव्रता ॥ आत्मनः
सदृशं पुत्रं न लेभे गुणशीलतः ॥ ६५ ॥ पितर्यप्रतिरूपे स्वे भवायानागसे रुषा ॥ अप्रौढैवात्मनात्मानमजहाद्योगसंयुता ॥ ६६ ॥
॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे चतुर्थस्कंधे विदुरमैत्रेयसंवादे प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥ ॥ विदुर उवाच ॥ भवे शीलवतां श्रेष्ठे
दक्षो दुहितृवत्सलः ॥ विद्वेषमकरोत्कस्मादनादृत्यात्मजां सतीम् ॥ १ ॥ कस्तं चराचरगुरुं निर्वैरं शांतविग्रहम् ॥ आत्मारामं कथं
द्वेष्टि जगतो दैवतं महत् ॥ २ ॥ एतदाख्याहि मे ब्रह्मन् जामातुः श्वशुरस्य च ॥ विद्वेषस्तु यतः प्राणांस्तत्यजे दुस्त्यजान्सती ॥ ३ ॥

तुचर्थे टीकायां प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥ ॥ द्वितीये प्रथमाध्यायोपक्षिप्तभवदक्षयोः ॥ विद्वेषे वर्ण्यते हेतुर्विश्वसृड्यज्ञसंभवः ॥ १ ॥ सतीं सतीनाम्नीम् ॥ १ ॥ न चासौ कस्यचिद्द्वेषार्ह इत्याह । क इति । चराचरगुरुं जगतो दैवतं च तं को द्वेष्टि । निर्वैरत्वे हेतुः । भावे क्तः । शांतं शांतिरेव विग्रहो यस्य । कुतः । आत्मन्येवारामोरतिर्यस्य तम् । यद्वा । कः प्रजापतिर्दक्षः कथं द्वेष्टि । एवंभूते तस्मिन्द्वेषो ऽयुक्तो ऽशक्यश्चेत्यर्थः ॥ २ ॥ यतो हेतोर्विद्वेषः यतो विद्वेषात्प्राणांस्तत्याज एतदाख्याहि ॥ ३ ॥

आपल्या देहाचा त्याग केला ॥ ६६ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील चतुर्थस्कंधांत विदुरमैत्रेयसंवादामध्यें हा पहिला अध्याय समाप्त झाला ॥ १ ॥ प्रथमाध्यायाचे अंतीं संक्षेपानें सांगितलेला जो शिवाचा व दक्षाचा परस्पर द्वेष त्याविषयीं कारण असा विश्वस्रष्ट्यांच्या यज्ञाचा संभव या दुसऱ्या अध्यायांत सांगितला आहे ॥ १ ॥ विदुर ह्मणाला– हे ऋषे, कन्येवर प्रीति करणाऱ्या दक्षानें आपल्या सतीनामक कन्येचा अनादर करून सुशील पुरुषांमध्यें अग्रगण्य अशा शंकराशीं कशाकरितां अत्यंत द्वेष केला? ॥ १ ॥ शंकराचें माहात्म्य किती वर्णावें! जो स्थावरजंगमात्मक विश्वाचा गुरु वैरभावरहित, केवळ शांतिरूपी, आत्मस्वरूपींच रममाण असणारा आणि जगाचें परमपूज्य दैवत अशा त्या शंकराशीं दक्षानें द्वेष तरी कसा केला? ॥ २ ॥ तस्मात् हे ब्रह्मनिष्ठ मैत्रेयऋषे, ज्यामुळें सतीनें, त्याग करण्यास

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अशक्य अशा आपल्या प्राणाचाहि त्याग केला. अशा प्रकारचा जांवयाचा आणि सासऱ्याचा द्वेष पडण्यास कारण काय झालें ? हें मला सांग ॥ ३ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, पूर्वीं मरीच्यादिक विश्वस्रष्ट्या ऋषींच्या सत्रामध्यें आपल्या सेवकांसहवर्तमान सर्व महर्षि, देवगण, मुनि व अग्नि हे एकत्र जमले होते ॥ ४ ॥ त्या महासभेमध्यें प्रविष्ट झालेला, सूर्यासारखा प्रकाशमान, व आपल्या तेजाच्या योगानें त्या मोठ्या सभेंतील अंधकार नाहींसा करणारा अशा दक्षाला अवलोकन करून त्याच्या कांतीनें चकित झालेले ते सर्व ऋषि, अग्नि व सभासद, ब्रह्मदेव व शंकर या दोघांशिवाय एकदम आपापल्या आसनांवरून उठून उभे राहिले ॥ ५ ॥ ६ ॥ याप्रमाणें सभासदांनीं उत्तमप्रकारें सत्कार केलेला तो भगवान् दक्ष, लोकांचा गुरु जो ब्रह्मदेव त्याला नमस्कार करून, त्याची आज्ञा घेऊन, आपल्या आसनावर बसला ॥ ७ ॥ नंतर पूर्वीं बस-

---

तदेवाख्यातुमितिहासं प्रस्तौति । पुरेति । समेता आसन् ॥ ४ ॥ प्रविष्टं दक्षमिति शेषः । महत्सदो महतीं सभाम् ॥ ५ ॥ स्वधिष्ण्येभ्यः स्वीयासनेभ्यः ॥ ६ ॥ ७ ॥ प्राक् स्वोपवेशनात्पूर्वमेव निषण्णमुपविष्टं मृडं शिवम् । तदनादृतस्तेनाभ्युत्थानादिभिरकृतादरः नामृष्यन्नासहत । वामं वक्रं यथा भवति तथाऽभिवीक्ष्य ॥ ८ ॥ मे वचनं श्रूयताम् ।

॥ मैत्रेय उवाच ॥ पुरा विश्वसृजां सत्रे समेताः परमर्षयः ॥ तथाऽमरगणाः सर्वे सानुगा मुनयोऽग्नयः ॥ ४ ॥ तत्र प्रविष्टमृषयो
दृष्ट्वाऽर्कमिव रोचिषा ॥ भ्राजमानं वितिमिरं कुर्वंतं तन्महत्सदः ॥ ५ ॥ उदतिष्ठन्सदस्यास्ते स्वधिष्ण्येभ्यः सहाग्नयः ॥ ऋते विरिंचं
शर्वं च तद्भासाऽऽक्षिप्तचेतसः ॥ ६ ॥ सदसस्पतिभिर्दक्षो भगवान्साधु सत्कृतः ॥ अजं लोकगुरुं नत्वा निषसाद तदाज्ञया ॥ ७ ॥
प्राङ्निषण्णं मृडं दृष्ट्वा नामृष्यत्तदनादृतः ॥ उवाच वामं चक्षुर्भ्यामभिवीक्ष्य दहन्निव ॥ ८ ॥ श्रूयतां ब्रह्मर्षयो मे सहदेवाः सहा-
ग्नयः ॥ साधूनां ब्रुवतो वृत्तं नाज्ञानान्न च मत्सरात् ॥ ९ ॥ अयं तु लोकपालानां यशोघ्नो निरपत्रपः ॥ सद्भिराचरितः पंथा येन
स्तब्धेन दूषितः ॥ १० ॥ एष मे शिष्यतां प्राप्तो यन्मे दुहितुरग्रहीत् ॥ पाणिं विप्राग्निमुखतः सावित्र्या इव साधुवत् ॥ ११ ॥

अज्ञानान्मत्सराच्च न ब्रुवतः ॥ ९ ॥ स्तब्धेनोचितक्रियाशून्येन । ध्वस्तेनेति पाठे भ्रष्टेन ॥ १० ॥ तदेवाह । एष इति । यद्यस्माद्विप्राग्निसमक्षं सावित्रीतुल्याया मे दुहितुः

लेल्या शिवाला अवलोकन करून, त्यानें उठून आपला सत्कार केला नाहीं हें पहातांच तो प्रकार त्या दक्षाला सहन झाला नाहीं. तेव्हां त्यानें आपल्या वक्र दृष्टीनें शंकराकडे पाहून त्याला जाळीतेंच आहे कीं काय असा क्रुद्ध होऊन सभासदांस ह्मणाला कीं,–॥ ८ ॥ अहो ब्रह्मर्षि, देव, अग्नि आदिकरून सर्व सभासद हो, अज्ञानानें अथवा मत्सरानें भाषण न करितां साधूंच्या वर्तणुकीच्या संबंधानें मी कांहीं भाषण करीत आहें, यास्तव तें माझें भाषण तुह्मी श्रवण करा ॥ ९ ॥ हा तर निर्लज्ज (शंकर) इंद्रादि लोकपालांच्या यशाचा नाश करणारा आहे. कारण, गर्वानें फुगलेल्या अशा ज्यानें, आज माझा अपमान करून, साधूंनीं आचरण केलेला मार्ग दूषित केला आहे ॥ १० ॥ ज्या अर्थीं ह्यानें संभावित पुरुषाप्रमाणें, सावित्रीसारख्या योग्यतेच्या माझ्या कन्येचें, ब्राह्मणांच्या व अग्नीच्या समक्ष पाणिग्रहण केलें, त्या अर्थीं ह्याला माझें शिष्यत्व

---

१ शोभन दृष्टिनें. २ आपल्या क्रोधानें आपणासच जाळीत होत्साता. ३ येथें शंकराच्या निंदेकरितां दक्षानें योजिलेल्याहि वाणीनें वास्तविकपणें त्याची स्तुतीच केली आहे. ४ अद्वैत रसामध्यें निमग्न असल्यामुळें लोकलज्जेनें रहित. ५ आपल्या पराक्रमानें इंद्रादिकांच्या यशाचा तिरस्कार करणारा. ६ ब्रह्मस्वरूपी अशा ज्यानें. ७ स्वतः अचळ असल्यामुळें उत्थापनादि मार्ग स्वीकारिला नाहीं. ८ अशिष्यत्व (वंदनीयत्व)

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्राप्त झालें आहे ॥ ११ ॥ ज्याचे डोळे मर्कटासारखे आहेत अशा ह्यानें, जिचे नेत्र लहान हरणाच्या नेत्रांसारखे सुंदर आहेत अशा माझ्या कन्येचें पाणिग्रहण करून, उत्थापन देणें व नमस्कार करणें यांस योग्य अशा माझा नुसत्या शब्दानेंदेखील सत्कार केला नाहीं हें यास योग्य नाहीं, ॥ १२ ॥ अहो काय करावें! क्रियाभ्रष्ट, अपवित्र, अभिमानी व मर्यादा सोडून वागणारा अशा ह्याला, माझ्या मनांत कन्या द्यावयाची नव्हती तथापि जशी एखाद्या शूद्राला वेदवाणी द्यावी त्याप्रमाणें मी आपली सुंदर कन्या ह्याला दिली आहे ॥ १३ ॥ भयंकर अशा स्मशानभूमीचेठिकाणीं भूतगण व प्रेतें यांनीं परिवेष्टित असा हा, केंस मोकळे सोडून नागव्यानें एकाद्या उन्मत्त

पाणिमग्रहीत् ॥ ११ ॥ मृगशावस्य हरिणबालस्याक्षिणीवाक्षिणी यस्याः । प्रत्युत्थानाभिवादार्हे मय्युचितं सन्मानं वाचाऽपि नाकरोत् ॥ १२ ॥ अनर्हाय कन्या दत्तेत्यनुतप्यमान आह । लुप्तक्रियायेति सार्धैश्चतुर्भिः । उशतीं वेदलक्षणां गिरम् ॥ १३ ॥ प्रेतावासेषु श्मशानेषु । व्युप्ता विकीर्णाः केशा यस्य ॥ १४ ॥ चिताभस्मना कृतं स्नानं येन । प्रेतानां स्रजो माल्यानि यस्य स प्रेतस्रक् । नृणामस्थीनि भूषणानि यस्य । शिव इत्यपदेशो नाममात्रं यस्य । तमोमात्रात्मकः केवलतमोरूप आत्मा स्वभावो येषाम् ॥ १५ ॥ उन्मादा भूतविशेषास्तेषां नाथाय । दुर्हृदे दुष्टचित्ताय । बतेति खेदे ॥ वास्तवस्त्वयमर्थः । लुप्ताः क्रिया यस्मिन् परब्रह्मरूपत्वात् । अतएव नास्ति शुचिर्यस्मात् ।

गृहीत्वा मृगशावाक्ष्याः पाणिं मर्कटलोचनः ॥ प्रत्युत्थानाभिवादार्हे वाचाऽप्यकृत नोचितम् ॥ १२ ॥ लुप्तक्रियायाशुचये मानिने भिन्नसेतवे ॥ अनिच्छन्नप्यदां बालां शूद्रायेवोशतीं गिरम् ॥ १३ ॥ प्रेतावासेषु घोरेषु प्रेतैर्भूतगणैर्वृतः ॥ अटत्युन्मत्तवन्नग्नो व्युप्तकेशो हसन् रुदन् ॥ १४ ॥ चिताभस्मकृतस्नानः प्रेतस्रङ्न्रस्थिभूषणः ॥ शिवापदेशो ह्यशिवो मत्तो मत्तजनप्रियः ॥ पतिः प्रमथभूतानां तमोमात्रात्मकात्मनाम् ॥ १५ ॥ तस्मा उन्मादनाथाय नष्टशौचाय दुर्हृदे ॥ दत्ता बत मया साध्वी चोदिते परमेष्ठिना ॥ १६ ॥

अमानिने अभिन्नसेतवे इति च छेदः । तस्य परमेश्वरस्य मदीया मानुषी कन्या कथं योग्या स्यादिति लज्जादिना दातुमनिच्छन्नपि तत्संबंधलोभेन दत्तवान् । शूद्रायेत्यनर्हत्वमात्रे दृष्टांतो न हीनत्वे पूर्वापरस्ववचनविरोधापत्तेः । एतदुक्तं भवति । यथा कश्चिच्छूद्राय वेदमर्थलोभेन ददाति तद्वदिति । प्रेतावासेष्वित्यादि सर्वं विडंबनमात्रमिति स्वयमेवाह । उन्मत्तवदिति । अन्यथोन्मत्त इत्येवावक्ष्यत् । अशिवो नास्ति शिवो यस्मात् । अमत्तोऽमत्तजनप्रिय इति च छेदः । पतिः प्रमथभूतानामिति भक्तवात्सल्यमाह । तामसानपि दोषमपनीय पातीति । नष्टानामपि शौचं शुद्धिर्यस्मात् । दुष्टेष्वप्येते मयाऽनुकंप्या इति हृन्मनो यस्य स दुर्हृत्तस्मै । बतेति हर्षे । ब्रह्मणो वाक्याच्च

पुरुषाप्रमाणें हंसत व रडत फिरतो ॥ १४ ॥ हा चिताभस्मानें स्नान केलेला असतो, प्रेतांच्या माळा गळ्यांत धारण करितो, मनुष्यांचीं हाडें हींच ज्याचीं भूषणें आहेत, याचें नांव मात्र शिव आहे परंतु हा केवळ अशिव (अमंगळ) आहे. हा स्वतः मत्त असून याला उन्मत्त जनच प्रिय आहेत. हा केवळ तमोगुणरूप स्वभावाच्या प्रमथभूतगणांचा पति आहे ॥ १५ ॥ असें असतां सर्व लोकाधिपति ब्रह्मदेवानें मला आज्ञा केल्यामुळें मी आपली साध्वी कन्या, त्या शुचिर्भूतपणानें रहित व दुष्टचित्त अशा भूतपतीला दिली बरें!

---

१ विषयासक्त पुरुषांचा उद्धार कसा होईल हें पाहणारा. २ सर्वक्रियारहित. ३ अत्यंत पवित्र. ४ निरभिमानी. ५ मर्यादांचें उल्लंघन न करणारा. ६ त्याच्या संबंधलोभानें दिली. ७ जशी वेदवाणी एखादा पुरुष, द्रव्यलोभानें शूद्राला देतो त्याप्रमाणें दिली. ८ उन्मत्त पुरुषाप्रमाणें, असें मूळांतच ह्मटलें आहे, प्रत्यक्ष उन्मत्त असें ह्मटलें नाहीं. त्यावरून, वेड्यासारखी वागणूक करून दाखवितो मात्र परंतु वस्तुतः तसा नाहीं हें सिद्ध आहे. ९ ज्याहून दुसरा कल्याणकर्ता कोणीच नाहीं असा. १० मत्त नव्हे असा. ११ सुस्वभावाचे लोक ज्याला प्रिय आहेत असा. १२ पतित झालेल्या लोकांनांहि ज्यापासून पवित्रता प्राप्त होत्ये. १३ दुष्टांबद्दल देखील 'ह्यांच्यावर आपण दया करावी, असें' ज्याच्या मनांत येतें. १४ हा आनंदाचा उद्गार आहे ह्मणजे ब्रह्मदेवाच्या सांगीवरून मी परमेश्वराला कन्या दिली हें फार चांगलें झालें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ही फार वाईट गोष्ट झाली ॥ १६ ॥ मैत्रेय ह्मणाला–हे विदुरा, याप्रमाणें कोणत्याहि प्रकारें प्रतिकूल नसून केवळ स्वस्थ बसणाऱ्या शंकराची त्या दक्षानें निंदा केली आणि क्रुद्ध झालेला तो दक्ष, उदकाचें आचमन करून, त्या शंकरास शाप देण्यास प्रवृत्त झाला ॥ १७ ॥ तो ह्मणाला–हा शंकर, सर्व देवगणांमध्यें अधम आहे ह्मणून ह्याला देवयज्ञामध्यें इंद्र, विष्णु इत्यादि देवांसहवर्तमान हैविर्भाग प्राप्त होऊं नये ॥ १८ ॥ मैत्रेय ह्मणाला–हे विदुरा, त्या वेळीं सभेंतील मुख्य सभासदांनीं दक्षाचा पुष्कळप्रकारें निषेध केला असतांहि त्यानें शंकराला शाप देऊन, तो अतिक्रुद्ध होत्साता; त्या सभामंडपांतून निघून आपल्या घरीं गेला ॥ १९ ॥ इकडे शिवसेवकांमध्यें श्रेष्ठ अशा नंदिकेश्वरानें तो शाप ऐकतांक्षणींच क्रोधाच्या आवेशानें त्याचे डोळे लाल झाले आणि त्यानें दक्षाला व त्यानें केलेल्या शिवाच्या निंदेला ज्यांनीं

ज्ञाभयादिकं परित्यज्य दत्तेत्यर्थः ॥ १६ ॥ अप्रतीपमप्रतिकूलं यथा भवत्येवमवस्थितमपि विनिंद्य ॥ १७ ॥ देवानां यजनसमये देवैः सह भागं न लभतां किंतु तेभ्यः पूर्वमेव लभतां अग्रभोजित्वात् । यद्वा । तेषु भुक्तवत्सु लभतां सर्वपोषकत्वात् । तत्र हेतुः । देवगणोऽधमो यस्मात्सः ॥ १८ ॥ स दक्षस्तस्मात्स्थानाद्विनिष्क्रम्य जगाम । हे कौरव्य ॥ १९ ॥ गिरिशस्यानुगानामग्रणीर्मुख्यः । रोष एव कषायस्तेन दूषितः आरक्तनेत्र इत्यर्थः । तस्य गिरिशस्यावाच्यतां वचनानर्हतां निंद्यतामित्यर्थः । तेभ्योऽपि

मैत्रेय उवाच ॥ विनिंद्यैवं स गिरिशमप्रतीपमवस्थितम् ॥ दक्षोऽथाप उपस्पृश्य क्रुद्धः शप्तुं प्रचक्रमे ॥ १७ ॥ अयं तु देवयजन इंद्रोपेंद्रादिभिर्भवः ॥ सह भागं न लभतां देवैर्देवगणाधमः ॥ १८॥ निषिध्यमानः स सदस्यमुख्यैर्दक्षो गिरित्राय विसृज्य शापम् ॥ तस्माद्विनिष्क्रम्य विवृद्धमन्युर्जगाम कौरव्य निजं निकेतनम् ॥ १९ ॥ विज्ञाय शापं गिरिशानुगाग्रणीर्नंदीश्वरो रोषकषायदूषितः ॥ दक्षाय शापं विससर्ज दारुणं ये चान्वमोदंस्तदवाच्यतां द्विजाः ॥ २० ॥ य एतन्मर्त्यमुद्दिश्य भगवत्यप्रतिद्रुहि ॥ द्रुह्यत्यज्ञः पृथग्दृष्टिस्तत्त्वतो विमुखो भवेत् ॥ २१ ॥ गृहेषु कूटधर्मेषु सक्तो ग्राम्यसुखेच्छया ॥ कर्मतंत्रं वितनुते वेदवादविपन्नधीः ॥ २२ ॥ बुद्ध्या पराभिध्यायिन्या विस्मृतात्मगतिः पशुः ॥ स्त्रीकामः सोऽस्त्वतितरां दक्षो बस्तमुखोऽचिरात् ॥ २३ ॥

शापं विससर्ज ॥ २० ॥ दक्षं शपति । सार्धैस्त्रिभिः । एतन्मर्त्यं दक्षशरीरमुद्दिश्य श्रेष्ठं मत्वा । अप्रतिद्रुहि प्रतिद्रोहमकुर्वति । पृथग्दृष्टिर्भेददर्शी । तत्त्वतः परमार्थात् ॥ २१ ॥ परो देहादिस्तमेवात्मत्वेनाभितो ध्यातुं शीलं यस्यास्तया बुद्ध्या विस्मृताऽऽत्मनो गतिस्तत्त्वं येन अतः पशुतुल्यः । अतितरां स्त्रीकामोऽस्त्विति द्वितीयः शापः । बस्तस्य अज्ञत्वमेवाह । गृहेष्विति । कर्मतंत्रं कर्मपरिकरम् । वेदे ये वादा अर्थवादा अक्षय्यं ह वै चातुर्मास्ययाजिनः सुकृतं भवतीत्यादयस्तैर्विपन्ना विनष्टा धीर्यस्य ॥ २२ ॥

अनुमोदन दिलें होतें त्या ब्राह्मणांना, असा भयंकर शाप दिला कीं,– ॥ २० ॥ जो मूर्ख दक्ष, आपलें हें नश्वर शरीरच श्रेष्ठ आहे असें मानून, भगवान्, शंकर कोणाशींहि द्रोह करीत नसतां त्याचा द्रोह करितो त्याची भेददृष्टीच कायम राहील, ह्मणजे त्याला तत्त्वज्ञान होणार नाहीं. (हा एक शाप) ॥ २१ ॥ जो हा दक्ष, कपटयुक्त आचारांनीं युक्त अशा गृहस्थाश्रमामध्यें तुच्छ विषयसुखाच्या इच्छेनें गुंतून राहून, वेदांतील 'चातुर्मास्ययज्ञ करणारास अक्षय पुण्य प्राप्त होतें' अशीं जीं कर्मांची प्रशंसा करणारीं वाक्यें त्यांच्या योगानें याची विचारबुद्धि नष्ट झाल्यामुळें हा कर्मांच्या पसाऱ्याचेंच आचरण करीत आहे ॥ २२ ॥ व ह्याच्या बुद्धीला 'देहच आत्मा' असें मान

---

१ देवांचा समुदाय ज्यापेक्षां कमी योग्यतेचा आहे असा. २ देवांच्या पूर्वींच त्याला भाग मिळावा. कारण, तो अग्रभोजी आहे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ण्याचा अभ्यास नित्य असल्यामुळें हा आत्म्याचें स्वरूप विसरून पशुतुल्य झाला आहे, ह्मणून हा अत्यंत स्त्रीलंपट होईल, (हा दुसरा शाप) आणि या दक्षाला लवकरच बोकडाचें मुख प्राप्त होईल (हा तिसरा शाप) ॥ २३ ॥ याला हाच शाप योग्य आहे. कारण, कर्मकांडरूप अज्ञानाचेठिकाणींच याची तत्त्वज्ञानबुद्धि आहे ह्मणून हा मूर्ख आहे. या सभेमध्यें शंकराचा अपमान करणाऱ्या याला, जे ब्राह्मण अनुसरले आहेत तेही जन्ममरणरूप संसार पावोत (हा ब्राह्मणांना पहिला शाप) ॥ २४ ॥ कर्ममार्गाची स्तुति करणारीं जीं वाक्यें त्याच पुष्पांनीं प्रफुल्लित झालेल्या वेदवाणीरूप वल्लीच्या, मनाला क्षोभ करणाऱ्या कर्मफलरूप पुष्कळ मधुगंधानें ज्यांचें चित्त मोहित झालें आहे ह्मणूनच जे शिवाचा द्वेष करितात ते ब्राह्मण, तसेच कर्मं करण्यामध्यें आसक्त होवोत, ह्मणजे त्यांस मोक्ष न मिळो (हा दुसरा शाप) ॥ २५ ॥ हे ब्राह्मण, भक्ष्य-अभक्ष्यांच्या विचारानें शून्य होऊन, देहादिकांच्या पोषणासाठीं विद्या, तप आणि व्रतें धारण करणारे, द्रव्य, शरीर आणि इंद्रियें यांमध्येंच अत्यंत सुख मानून रमणारे आणि

मुखमेव मुखं यस्येति तृतीयः शापः ॥ २३ ॥ अयं च शापोऽस्यानुरूप एवेत्याह । विद्याबुद्धिः इयमेव तत्त्वविद्येति बुद्धिर्यस्य । अतोऽसौ जड एव । द्विजान् शपति । संसरंत्विति सार्धद्वाभ्याम् । शर्वमवमन्यत इति तथा तममुं दक्षं ये चानुवर्तंते ते संसरंतु जन्ममरणाद्यनुभवंत्वित्येकः शापः ॥ २४ ॥ श्रुतायाः वेदरूपायाः पुष्पिण्याः पुष्पाणीवार्थवादा मनःक्षोभकत्वात् । अर्थवादबहुलाया इत्यर्थः । मधुगंधतुल्येन प्ररोचनेन मन्था मनःक्षोभकेनोन्मथित आत्मा मनो येषां ते संमुह्यंतु कर्मस्वासक्ता भवंत्विति

विद्याबुद्धिरविद्यायां कर्ममय्यामसौ जडः ॥ संसरंत्विह ये चामुमनुशर्वावमानिनम् ॥ २४ ॥ गिरः श्रुतायाः पुष्पिण्या मधुगंधेन भूरिणा ॥ मथ्ना चोन्मथितात्मानः संमुह्यंतु हरद्विषः ॥ २५ ॥ सर्वभक्षा द्विजा वृत्त्यै धृतविद्यातपोव्रताः ॥ वित्तदेहेंद्रियारामा याचका विचरंत्विह ॥ २६ ॥ तस्यैवं ददतः शापं श्रुत्वा द्विजकुलाय वै ॥ भृगुः प्रत्यसृजच्छापं ब्रह्मदंडं दुरत्ययम् ॥ २७ ॥ भवव्रतधरा ये च ये च तान्समनुव्रताः ॥ पाखंडिनस्ते भवंतु सच्छास्त्रपरिपंथिनः ॥ २८ ॥ नष्टशौचा मूढधियो जटाभस्मास्थिधारिणः ॥ विशंतु शिवदीक्षायां यत्र दैवं सुरासवम् ॥ २९ ॥ ब्रह्म च ब्राह्मणांश्चैव यद्यूयं परिनिंदथ ॥ सेतुं विधारणं पुंसामतः पाखंडमाश्रिताः ॥ ३० ॥

द्वितीयः शापः ॥ २५ ॥ सर्वभक्षा भक्ष्याभक्ष्यविचारशून्याः । वृत्त्यै देहादिपोषणाय धृतानि विद्यातपोव्रतानि यैः । वित्तादिष्वेवारामो रतिर्येषां ते । याचकाः संतो विचरंत्विति च शापचतुष्टयम् ॥ २६ ॥ प्रत्यसृजत्प्रत्यदात् । शापरूपं ब्रह्मदंडम् ॥ २७ ॥ सच्छास्त्रस्य परिपंथिनः प्रतिकूलाः ॥ २८ ॥ सुरा गौडी पैष्टी माध्वी च । आसवस्तालादिसंभवं मद्यम् । द्वंद्वैक्यात्षंढत्वम् । तद्यत्र दैवं पूज्यं देवतावदादरणीयमिति वा ॥ २९ ॥ ब्रह्म वेदम् । कथंभूतम् । सेतुं मर्यादारूपम् । तदेवाह । पुंसां वर्णाश्रमा-

---

याचना करणारे असे होऊन या पृथिवीवर संचार करोत (हे चार शाप) ॥ २६ ॥ मैत्रेय ह्मणाला— हे विदुरा, याप्रमाणें ब्राह्मणाच्या कुळाला शाप देणाऱ्या त्या नंदिकेश्वराचें भाषण ऐकून, भृगुऋषींनें शिवभक्तांना उलट दुस्तर ब्रह्मदंडरूप शाप दिले ॥ २७ ॥ ते असे कीं,— शिवाचीं व्रतें धारण करणारे किंवा त्यांचे अनुयायी जे ह्मणून कोणी असतील ते सर्व सच्छास्त्राचे शत्रु पाखंडी होवोत ॥ २८ ॥ ज्या शिवदीक्षेमध्यें गुळापासून, पिठापासून व मधापासून झालेली सुरा व तालादि वृक्षांपासून झालेलें मद्य हीं देवतांप्रमाणें पूज्य मानिलीं आहेत, त्या शिवदीक्षेमध्यें शुचिर्भूतपणानें रहित, अज्ञानी व शरीरावर जटा भस्म आणि हाडें धारण करणारे ते लोक, प्रवेश करोत ॥ २९ ॥ अरे! ज्या अर्थीं तुह्मी वर्ण, आश्रम आणि आचार यांनीं युक्त असलेल्या पुरुषांचे धर्म धारण करणाऱ्या वेदाची व त्याला अनुसरून राहणाऱ्या ब्राह्मणाची निंदा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करीत आहां त्या अर्थी तुह्मी पाखंडमतावाच आश्रय केला आहे ॥ ३० ॥ अहो काय सांगावें ! ज्याचें मूळकारण विष्णु आहे, व पूर्वींच्या ऋषींनींहि ज्या मार्गाचा आश्रय केला आहे, असा हा सनातन वैदिक मार्गच सर्व लोकांचा कल्याणकारक असून ॥३१॥ त्या अत्यंत शुद्ध व सज्जनांचा सनातन मार्ग अशा वेदाची निंदा केल्यामुळें तुह्मी आतां ज्या ठिकाणीं भूताधिपतीच मुख्य दैवत आहे अशा वेदविरुद्ध पाखंडमार्गामध्यें संचार करा ॥ ३२ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, याप्रमाणें तो भृगु ऋषि शाप देत असतां, अनुचर मंडळीसहवर्तमान तो भगवान् शंकर, या एकमेकांच्या शापानें एकमेकांचा नाश होत आहे असें मनांत आल्यामुळें किंचित् खिन्न झाल्यासारखा होऊन, त्या सभेंतून निघून गेला ॥ ३३ ॥ हे महाधनुर्धारी विदुरा, सृष्टि करणाऱ्या त्या प्रजापतींनींही जेथें सर्वांमध्यें श्रेष्ठ असा श्रीहरि पूज्य आहे असें तें आपलें सहस्रसंवत्सरात्मक सत्र पूर्ण करून, ज्या ठिकाणीं गंगेचा यमुनेशीं संगम झाला आहे त्या प्रयाग क्षेत्राचेठायीं अवभृथ स्नान केलें व ते सर्व ऋषि मनानें व शरीरानें निर्मळ होत्साते त्या स्थानापासून आपापल्या स्थानीं

चारवतां विधारणं धारकम् ॥ ३० ॥ सेतुत्वं प्रपंचयति द्वाभ्याम् । एष वेदलक्षण एव शिवः पंथाः । यं पूर्वे ऋषयोऽनुसंतस्थुराश्रितवंतः । यच्चस्मिन् जनार्दनः प्रमाणं मूलम् ॥ ३१ ॥ भूतराड् भूतानां तामसानां रतिः ॥ ३२ ॥ अन्योन्यशापेनोभयोर्नाशाद्विमना इवेति । तथापि भगवदनुग्रहीतानां नाशो न स्यादिति भावः ॥ ३३ ॥

एष एव हि लोकानां शिवः पंथाः सनातनः ॥ यं पूर्वे चानुसंतस्थुर्यत्प्रमाणं जनार्दनः ॥ ३१ ॥ तद्ब्रह्म परमं शुद्धं सतां वर्त्म सनातनम् ॥ विगर्ह्य यात पाषंडं दैवं वो यत्र भूतराट् ॥ ३२ ॥ मैत्रेय उवाच ॥ तस्यैवं वदतः शापं भृगोः स भगवान्भवः ॥ निश्चक्राम ततः किंचिद्विमना इव सानुगः ॥ ३३ ॥ तेऽपि विश्वसृजः सत्रं सहस्रपरिवत्सरान् ॥ संविधाय महेष्वास यत्रेज्य ऋषभो हरिः ॥ ३४ ॥ आप्लुत्यावभृथं यत्र गंगा यमुनयाऽन्विता ॥ विरजेनात्मना सर्वे स्वं स्वं धाम ययुस्ततः ॥ ३५ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे चतुर्थस्कंधे दक्षशापो नाम द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥ ॥ मैत्रेय उवाच ॥ सदा विद्विषतोरेवं कालो वै ध्रियमाणयोः ॥ जामातुः श्वशुरस्यापि सुमहानतिचक्रमे ॥ १ ॥ यदाऽभिषिक्तो दक्षस्तु ब्रह्मणा परमेष्ठिना ॥ प्रजापतीनां सर्वेषामाधिपत्ये स्मयोऽभवत् ॥ २ ॥

ऋषभः सर्वश्रेष्ठो हरिर्यत्र इज्यः पूज्यस्तत्सत्रं सम्यग्विधाय । हे महेष्वास विदुर ॥ ३४ ॥ यत्र प्रयागेऽन्विता तत्रावभृथस्नानं कृत्वा ततः स्थानाद्ययुः ॥ ३५ ॥ इति चतुर्थे टीकायां द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥ ॥ तृतीये तु सती तातयज्ञोत्सवदिदृक्षया ॥ गमिष्यंती महेशेन वारिता नीतिहेतुभिः ॥ १ ॥ ध्रियमाणयोरवतिष्ठमानयोः । ध्रुङ्अवस्थान इत्यस्मात् ॥ १ ॥ यद्यपि रुद्रविहीनो यज्ञो नास्त्येव तथापि दक्षस्य रुद्रपरित्यागो द्वेषाद्गर्वाच्च । तत्र द्वेषे हेतुरुक्तः । गर्वे हेतुमाह । यदा तु प्रजापतीना-

---

निघून गेले ॥ ३४ ॥ ३५ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील चतुर्थस्कंधामध्यें हा दुसरा अध्याय समाप्त झाला ॥ २ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ ७ ॥

आतां या तिसऱ्या अध्यायामध्यें दक्षाची कन्या जी सती ती पित्याचे घरीं यज्ञाचा महोत्साह पाहण्याच्या इच्छेनें जात असतां, तिचें शंकरानें अनेकप्रकारच्या नीतिवाक्यांनीं निवारण केलें, अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ मैत्रेय ह्मणाला–हे विदुरा, अशा पूर्वोक्त कारणानें निरंतर द्वेषभाव बाळगून राहणाऱ्या त्या सासऱ्याचा (दक्षाचा) व जांवयाचा (शंकराचा) पुष्कळ काळ निघून गेला ॥ १ ॥ ज्यांत शंकराचा भाग नाहीं असा यज्ञच नाहीं परंतु दक्षानें द्वेषानें व गर्वानें शंकराचा त्याग केला होता. त्यांत द्वेषाचें कारण मी तुला पूर्वाध्यायांत सांगितलें. आतां गर्वाचें कारण सांगतों ऐक. जेव्हां लोकाधिपति ब्रह्मदेवानें दक्षाला सर्व प्रजापतींच्या आधिपत्या-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विषयीं अभिषेक केला, त्या वेळीं त्या दक्षाला गर्व झाला. त्यामुळें त्यानें शंकरादि ब्रह्मनिष्ठांचा तिरस्कार करून ह्मणजे त्यांना यज्ञास न बोलावितां किंवा हविर्भाग न देतां, शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें प्रथम वाजपेय यज्ञ करून, नंतर बृहस्पतिसव नांवाचा उत्तम यज्ञ करण्यास आरंभ केला ॥ ३ ॥ त्या यज्ञामध्यें दक्षानें सर्व ब्रह्मर्षि, देवर्षि, पितर व देवता ह्यांचा, दक्षिणावगैरे देऊन चांगला सत्कार केला व त्यांच्या पत्न्यांचीहि वस्त्रभूषणादिकांच्या दानेंकरून पतींसहवर्तमान पूजा केली. येणेंकरून एकदा पूजा केलेल्याहि देवादिकांची पत्नीपूजनाचे वेळीं पुन्हा पूजा केली असें सिद्ध होतें ॥ ४ ॥ तेव्हां त्या यज्ञसंबंधीं कांहीं गोष्टी आकाशामध्यें देव परस्पर बोलत चालले असतां, दक्षकन्या देवी सतीनें 'आपल्या पित्याच्या घरीं यज्ञाचा मोठा समारंभ चालला आहे' असें ऐकिलें ॥ ५ ॥ आणि सर्व दिशांकडून गंधर्ववगैरे उपदेवश्रेष्ठांच्या चंचलनेत्रांनीं

होम करणाऱ्या त्या भृगु ऋषीच्या श्मश्रु उपटिल्या. जो भृगु ऋषि, विश्वस्रष्ट्यांच्या सभेमध्यें आपल्या मिशांवर ताव देऊन शंकराला हंसला होता ॥ १९ ॥ पुढें त्याच वीरभद्रानें, भगदेवाला क्रोधानें भूमीवर पाडून त्याचे डोळे उकरून काढिले; कारण, पूर्वीं सभेमध्यें असलेल्या ज्या भगदेवानें, दक्षप्रजापति शंकराची निंदा करीत असतां, त्याला डोळ्यांनीं विशेष सूचना केली होती ॥ २० ॥ आणि त्या वीरभद्रानें, जसे बलरामानें कलिंगराजाचे दांत पाडिले होते त्याप्रमाणें पूषादेवाचे दांत पाडिले, ज्यानें जगद्गुरु शंकराला दक्षप्रजापतीनें शाप दिला तेव्हां आपले दांत दाखवून हास्य केलें होतें ॥ २१ ॥ पुढें तो त्रिनेत्र वीरभद्र, दक्षाच्या छातीवर बसून तीक्ष्ण धारेच्या खड्गानें त्याचें मस्तक तोडूं लागला असतांहि त्यावेळीं तें शिर धडापासून तोडून काढण्याला तो समर्थ जाहला नाहीं ॥ २२ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

यामकारें त्या पशुपती वीरभद्रानें अनेक शस्त्रास्त्रांच्या योगेंकरून त्याचें मस्तक तोडण्याविषयीं यत्न केला, परंतु त्याच्या कंठाची त्वचा मुळींच तुटेना तेव्हां परम आश्चर्य
पावोन त्यानें बराच वेळ विचार केला ॥ २३ ॥ नंतर त्या पशुपति वीरभद्रानें, गळा दाबणेंवगैरे उपायांनींच यज्ञांत पशूला मारतात, असें पाहून त्या उपायानें यजमान-
पशुरूप दक्षाच्या धडापासून त्याचें शिर वेगळें केलें ॥ २४ ॥ त्यावेळीं त्या वीरभद्राच्या कर्माची प्रशंसा करणाऱ्या त्या भूत, प्रेत व पिशाच ह्यांमध्यें 'फार उत्तम झालें,
फार उत्तम झालें' असा शब्द प्रवृत्त झाला व इतर ब्राह्मणादिकांचा त्याच्या उलट 'फार वाईट झालें' असा शब्द प्रवृत्त झाला ॥ २५ ॥ त्याकालीं अत्यंत
क्रोधयुक्त अशा त्या वीरभद्रानें, त्या मस्तकाचें त्याच यज्ञांतील दक्षिणाग्नीमध्यें हवन केलें आणि त्याच अग्नीनें त्या यज्ञमंडपाला जाळून पुनः कैलासपर्वतावर
गमन केलें ॥ २६ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील चतुर्थस्कंधामध्यें दक्षयज्ञविध्वंससंबंधी हा पांचवा अध्याय समाप्त झाला ॥ ५ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

इत्युपरिव्यक्तीभविष्यति त्र्यंबको वीरभद्रः ॥ २२ ॥ अस्त्रान्वितैर्मंत्रसहितैः अनिर्भिन्नत्वग्यस्य तथाभूतं दृष्ट्वेति शेषः ॥ २३ ॥ स पशूनां पतिर्मखे संज्ञपनं
योगं कंठनिष्पीडनादिरूपं मारणोपायं दृष्ट्वा तेनोपायेनाहरत् ॥ २४ ॥ अन्येषां ब्राह्मणादीनां तद्विपर्ययोऽसाधुवादः अभूदिति शेषः ॥ २५ ॥ गुह्यकालयं कैलासम्

शस्त्रैरस्त्रान्वितैरेवमनिर्भिन्नत्वचं हरः ॥ विस्मयं परमापन्नो दध्यौ पशुपतिश्चिरम् ॥ २३ ॥ दृष्ट्वा संज्ञपनं योगं पशूनां स पतिर्मखे ॥
यजमानपशोः कस्य कायात्तेनाहरच्छिरः ॥ २४ ॥ साधुवादस्तदा तेषां कर्म तत्तस्य शंसताम् ॥ भूतप्रेतपिशाचानामन्येषां तद्वि-
पर्ययः ॥ २५ ॥ जुहावैतच्छिरस्तस्मिन्दक्षिणाग्नावमर्षितः ॥ तद्देवयजनं दग्ध्वा प्रातिष्ठद्गुह्यकालयम् ॥ २६ ॥ इति श्रीमद्भागवते
महापुराणे चतुर्थस्कंधे दक्षयज्ञविध्वंसो नाम पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥ ॥ मैत्रेय उवाच ॥ अथ देवगणाः सर्वे रुद्रानीकैः पराजिताः ॥
शूलपट्टिशनिस्त्रिंशगदापरिघमुद्गरैः ॥ १ ॥ संछिन्नभिन्नसर्वांगाः सर्त्विक्सभ्या भयाकुलाः ॥ स्वयंभुवे नमस्कृत्य कार्त्स्न्येनैतन्न्यवेद-
यन् ॥ २ ॥ उपलभ्य पुरैवैतद्भगवानब्जसंभवः ॥ नारायणश्च विश्वात्मा न कस्याध्वरमीयतुः ॥ ३ ॥ तदाकर्ण्य विभुः प्राह तेजीयसि
कृतागसि ॥ क्षेमाय तत्र सा भूयान्न प्रायेण बुभूषताम् ॥ ४ ॥

॥ २६ ॥ इति चतुर्थे टीकायां पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥ ॥ षष्ठे तु देवसंघेन सह गत्वा भवं विधिः ॥ सांत्वयामास दक्षादिजीवितार्थमादरात् ॥ १ ॥ अथ देवगणाः स्वयं-
भुवे न्यवेदयन्निति द्वितीयेनान्वयः ॥ १ ॥ शूलादिभिः संछिन्नानि त्रुटितानि भिन्नानि विदीर्णान्यंगानि येषाम् । सह ऋत्विग्भिः सभ्यैश्च वर्तमानाः ॥ २ ॥ कस्य दक्षस्य
यज्ञे ब्रह्मा विष्णुश्च नेयतुर्न जग्मतुः यत्रारुद्रको यज्ञस्तत्र नारायणविरिंचावपि नागतौ ॥ ३ ॥ विभुर्ब्रह्मा तेजीयस्यति तेजस्विनि पुरुषे कृतागसि सत्यपि स्वयं तत्र कृतागसां

नंतर देवगणासहवर्तमान ब्रह्मदेव, शंकराकडे गेला आणि त्यानें दक्षादिकांच्या जीवनादिकांविषयीं मोठ्या आदरानें शंकराचें सांत्वन केलें, ही कथा ह्या सहाव्या अध्याया-
मध्यें वर्णन केली आहे ॥ १ ॥ मैत्रेय ह्मणाला—हे विदुरा, याप्रकारें रुद्रगणांनीं शूळ, पट्टिश, खड्ग, गदा, परिघ, मुद्गर व इतर आयुधें यांच्या योगानें पराजित केलेले
व ज्यांचीं अंगें शूळादिकांच्या योगानें तुटूनफुटून गेलीं आहेत असे भयभीत झालेले ऋत्विज, सदस्य व सर्व देवांचे गण, ब्रह्मदेवाजवळ जाऊन त्याला नमस्कार करून
त्यांनीं हें इत्थंभूत सर्व वर्तमान त्याला निवेदन केलें ॥ १ ॥ २ ॥ त्या कमलोद्भव सर्वज्ञ ब्रह्मदेवाला व सर्वव्यापी नारायणाला हें भविष्य पूर्वींच समजलें होतें, ह्मणून ते
दोघेहि दक्षप्रजापतीच्या यज्ञास गेले नव्हते ॥ ३ ॥ असो. तो वृत्तांत ऐकून घेऊन ब्रह्मदेवानें देवांस सांगितलें कीं, देवहो, लोकांमध्यें असा एक साधारण नियम आहे कीं,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अधिक शक्तीच्या अति तेजस्वी पुरुषानें अपराध केला असतांहि अल्पशक्तीच्या पुरुषांनीं आपल्या पराक्रमानें त्याचा सूड उगविण्याची इच्छा केली तर ती, बहुतकरून त्यांचें कल्याण करणारी होत नाहीं ॥ ४ ॥ येथें तर ज्या तुह्मीं, यज्ञामध्यें भाग ग्रहण करणाऱ्या शंकराचा भाग बंद करून त्याचा अपराध केला आहे, त्या तुमचें कल्याण होणार कसें! तथापि तो शीघ्रप्रसन्न होणारा आहे ह्मणून तुह्मी निर्मल अंतःकरणानें त्याचें चरणकमल घट्ट धरून त्याला प्रसन्न करून घ्या ॥ ५ ॥ देवहो, जो शंकर क्रुद्ध झाला असतां, त्रैलोक्य आणि त्यांतील सर्वही लोकपाल नाहींसे होतील. तो आदींच दक्षाच्या मर्मभेदक दुर्भाषणांनीं हृदयामध्यें विद्ध झाला आहे, त्यांतहि त्याला प्रियपत्नीचा वियोग झाला आहे. तस्मात् आतां तुह्मी शीघ्र तेथें जाऊन त्या देवापाशीं क्षमा मागा आणि आपली 'यज्ञाचें पुनःसंधान व्हावें' अशी इच्छा प्रदर्शित करा ॥ ६ ॥ आह्मी तेथें जाण्यास भितों तूंच कांहींतरी उपाय कर असें ह्मणूं नका. कारण, ज्या स्वतंत्र शंकराच्या सत्यस्वरूपाला किंवा बळ आणि पराक्रम यांच्या इयत्तेला मी जाणत नाहीं, हा

बुभूषतामपराधं कर्तुमिच्छतां सा तथा बुभूषा तेषां क्षेमाय न भूयात् । प्रायेणेति लोकोक्तिः न भवेदेवेत्यर्थः ॥ ४ ॥ अथापि प्रसादयध्वं क्षमापयत ये भवंतो बर्हिषो यज्ञस्य भागभाजं परादुर्दूरादेव खंडितवंतः प्रगृहीतांघ्रिपद्मं पादौ प्रगृह्येत्यर्थः ॥ ५ ॥ अध्वरस्य जीवितं पुनःसंधानं प्रार्थयमानाः संतः यस्मिन्कुपिते सति सपालो लोको न भवेन्न-

अथापि यूयं कृतकिल्बिषा भवं ये बर्हिषो भागभाजं परादुः ॥ प्रसादयध्वं परिशुद्धचेतसा क्षिप्रप्रसादं प्रगृहीतांघ्रिपद्मम् ॥ ५ ॥
आशासाना जीवितमध्वरस्य लोकः सपालः कुपिते न यस्मिन् ॥ तमाशु देवं प्रियया विहीनं क्षमापयध्वं हृदि विद्धं दुरुक्तैः ॥ ६ ॥
नाहं न यज्ञो न च यूयमन्ये ये देहभाजो मुनयश्च तत्त्वम् ॥ विदुः प्रमाणं बलवीर्ययोर्वा यस्यात्मतंत्रस्य क उपायं विधित्सेत् ॥
॥ ७ ॥ स इत्थमादिश्य सुरानजस्तैः समन्वितः पितृभिः सप्रजेशैः ॥ ययौ स्वधिष्ण्यान्निलयं पुरद्विषः कैलासमद्रिप्रवरं प्रियं प्रभोः
॥ ८ ॥ जन्मौषधितपोमंत्रयोगसिद्धैर्नरेतरैः ॥ जुष्टं किन्नरगंधर्वैरप्सरोभिर्वृतं सदा ॥ ९ ॥ नानामणिमयैः शृंगैर्नानाधातुवि-
चित्रितैः ॥ नानाद्रुमलतागुल्मैर्नानामृगगणावृतैः ॥ १० ॥ नानाऽमलप्रस्रवणैर्नानाकंदरसानुभिः ॥ रमणं विहरंतीनां रमणैः
सिद्धयोषिताम् ॥ ११ ॥

श्येदित्यर्थः ॥ ६ ॥ वयं तु तत्र गंतुं बिभीमस्त्वमेव कंचिदुपायं विधत्स्वेति वेदत आह । नेति । यज्ञस्तदानींतन इंद्रः यस्य तत्त्वं बलवीर्ययोः प्रमाणमियत्तां च न विदुः वीर्यं पराक्रमः पापमिति पाठेऽपराधम् ॥ ७ ॥ ८ ॥ कैलासं वर्णयति । जन्मौषधीत्यादि चतुर्दशभिः । नरेतरैर्देवैर्जुष्टम् ॥ ९ ॥ शृंगै रमणं रतिप्रदमित्युत्तरेणान्वयः । कथंभूतैः । नानाधातुभिर्विचित्रितैः नाना द्रुमलता गुल्माश्च येषु ॥ १० ॥ नाना अमलानि प्रस्रवणानि येषु नानाकंदराः सानवश्च येषु । रमणैः सह क्रीडंतीनाम् ॥ ११ ॥

यज्ञनामक इंद्र, तुह्मीं देव, तसेच दुसरे जे सर्व प्राणी व ऋषि आहेत, तेही जाणत नाहींत. अशा पुरुषाच्या सांत्वनाचा उपाय कोण करूं शकेल? ॥ ७ ॥ तो ब्रह्मदेव देवांना असें सांगून, त्यांना आणि प्रजापतींसह पितरांना बरोबर घेऊन, आपल्या सत्यलोकापासून शंकरप्रभूचें प्रियस्थान अशा पर्वतांमध्यें श्रेष्ठ कैलासपर्वतावर निघून गेला ॥ ८ ॥ तो पर्वत-जन्मतः ओषधि, तप, मंत्र आणि योग, यांच्या योगानें सिद्ध झालेल्या देवांनीं सेवन केलेला होता, तसाच निरंतर किन्नर गंधर्व आणि अप्सरा यांनीं व्याप्त होता ॥ ९ ॥ आणि अनेक प्रकारच्या रत्नमय शिखरांनीं नानाप्रकारच्या पिवडी, गेरू, खडू, इत्यादिक धातूंनीं, चित्रविचित्र अशा स्थलांनीं, नानाप्रकारच्या हरिणादिक पशूंच्या समुदायांनीं व अनेक जातींच्या वृक्ष वल्ली व झुडपें यांनीं युक्त होता ॥ १० ॥ तसाच स्वच्छ उदकाचे पुष्कळ झरे, अनेक गुहा व सुंदर शिखरें यांनीं युक्त ॥१९॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असल्यामुळें तो पर्वत, पतींसहवर्तमान क्रीडा करणाऱ्या सिद्धांच्या स्त्रियांना रमणीय वाटत असे ॥ ११ ॥ मोरांच्या 'टाहो' शब्दांनीं नादयुक्त, पुष्पांतील मध पिऊन मदांध झालेल्या भ्रमरांच्या गायनस्वरांनीं युक्त असून कोकिळांच्या उच्चस्वरांनीं व इतर पक्ष्यांच्या शब्दांनीं व्याप्त होता ॥ १२ ॥ उंच उंच शाखारूप हस्तांनीं युक्त असलेल्या कल्पवृक्षांच्या योगानें तो पर्वत, पक्ष्यांना हाकाच मारीत आहे कीं, काय! तसाच मोठमोठ्या हत्तींच्या योगानें चालतच आहे कीं काय ! व झऱ्यांच्या शब्दांनीं बोलतच आहे कीं काय! असा भासत असे ॥ १३ ॥ मंदार, पारिजात, सुरू, तमाल, सागवान्, ताड, कांचन, असाणा व अर्जुन या वृक्षांनीं सुशोभित होता ॥ १४ तसाच आम्र, कदंब, काळ्यावर्णाचे अशोक, नागचाफे, उंडल, सोनचाफे, पाटला, अशोक, बकुळ, कुंद, तांबडी कोरांटी, सोन्यासारख्या वर्णाचीं शंभर पाकळ्यांचीं

मयूराणां केकाभिः स्वनैर्नादितम् । मदांधैरलिभिर्विमूर्छितं मूर्छना रागगतिविशेषस्तद्व्याप्तं कृतम् । रक्तकंठानां कोकिलानां प्लावितैः प्लुतत्वं नीतैः स्वरैः अन्येषां च पतत्रिणां कूजितैः ॥१२॥ उद्धस्तैरुन्नतशाखैर्द्रुमैर्द्विजान्पक्षिण आह्वयंतमिव । लोके हि हस्तमुत्क्षिप्योच्चैः स्वरेणाह्वानमर्थिनां कुर्वंति अद्रिश्चोत्क्षिप्तहस्ताकारैर्द्रुमैः स्तत्रत्यपक्षिस्वनैश्च तथा लक्ष्यत इत्यर्थः । व्रजद्भिर्मातंगैर्व्रजंतमिव निर्झरध्वनिभिर्गृणंतं भाषमाणमिव ॥ १३ ॥ १४ ॥ चूताम्रयोर्नीपकदंबयोरवांतरजातिभेदः वेणुकीचकयोश्च नीरंध्रसरंध्रत्वेन भेदः ॥१५॥ स्वर्णार्णैः

मयूरकेकाभिरुतं मदांधालिविमूर्छितम् ॥ प्लाविते रक्तकंठानां कूजितैश्च पतत्रिणाम् ॥ १२ ॥ आह्वयंतमिवोद्धस्तैर्द्विजान्कामदुघै-र्द्रुमैः ॥ व्रजंतमिव मातंगैर्गृणंतमिव निर्झरैः ॥ १३ ॥ मंदारैः पारिजातैश्च सरलैश्चोपशोभितम् ॥ तमालैः शालतालैश्च कोविदारास-नार्जुनैः ॥ १४ ॥ चूतैः कदंबैर्नीपैश्च नागपुन्नागचंपकैः ॥ पाटलाशोकबकुलैः कुंदैः कुरबकैरपि ॥ १५ ॥ स्वर्णार्णशतपत्रैश्च वररे-णुकजातिभिः ॥ कुब्जकैर्मल्लिकाभिश्च माधवीभिश्च मंडितम् ॥ १६ ॥ पनसोदुंबराश्वत्थप्लक्षन्यग्रोधहिंगुभिः ॥ भूर्जैरोषधिभिः पूगै राजपूगैश्च जंबुभिः ॥ १७ ॥ खर्जूराम्रातकाम्राद्यैः प्रियालमधुकेंगुदैः ॥ द्रुमजातिभिरन्यैश्च राजितं वेणुकीचकैः ॥ १८ ॥ कुमुदो-त्पलकह्लारशतपत्रवनार्धिभिः ॥ नलिनीषु कलं कूजत्खगवृंदोपशोभितम् ॥ १९ ॥ मृगैः शाखामृगैः क्रोडैर्मृगेंद्रैर्ऋक्षशल्यकैः ॥ गवयैः शरभैर्व्याघ्रै रुरुभिर्महिषादिभिः ॥ २० ॥ कर्णांत्रैकपदाश्वास्यैर्निर्जुष्टं वृकनाभिभिः ॥ कदलीषंडसंरुद्धनलिनीपुलिनश्रियम् ॥ २१ ॥

स्वर्णवर्णैः शतपत्रैर्मंडितम् । रेणुकजातिभिरित्यत्र रेणुका एला जातिर्मालती ॥ १६ ॥ १७ ॥ द्रुमजातिभिरित्यत्र जातिरवांतरभेदसामान्यम् ॥ १८ ॥ कुमुदादिसमृद्धिभिर्हेतु-भिर्नलिनीषु सरःसु कलं मधुरं यथा भवत्येवं कूजंति यानि पक्षिवृंदानि तैरुपशोभितम् ॥ १९ ॥ मृगादिभिर्निर्जुष्टं निषेवितम् । पूर्वं मृगगणाः शृंगविशेषणत्वेनोक्ता इदानीं स्वातंत्र्येणेत्यपौनरुक्त्यम् ॥ २० ॥ नाभिभिः कस्तूरीमृगैः कदलीषंडैः संरुद्धान्यावृतानि नलिनीनां पुलिनानि तैः श्रीः शोभा यस्मिन् ॥ २१ ॥

कमळें, उत्तम उत्तम वेळदोड्यांचीं झाडें, जाई, कुडे, मोगऱ्या, कस्तूरमोगऱ्या यांनीं सुशोभित होता ॥ १५ ॥ १६ ॥ व फणस, उंबर, अश्वत्थ, पिंपरी, वड, हिंग, लिंब, भूर्जे, ओषधि पोफळी, मोठ्या सुपारीच्या पोंफळी, जांभळी, खजूर, आंबाडा, आपोसवगैरे उंची आंबे, प्रियाल, मोहा, हिंगणमिठेवगैरे वृक्षजातींनीं तसाच भरीव वेळवांनीं व पोकळ वेळवांनींहि तो पर्वत शोभत होता ॥ १७ ॥ १८ ॥ त्यावर अनेक सरोवरें असून त्यांत कुमुद, उत्पल, कल्हार, शतपत्र यांचे समूह प्रफुल्लित झाले होते व तो मधुर शब्द करणाऱ्या पक्ष्यांच्या थव्यांच्या थव्यांनीं अधिकच सुशोभित दिसत असे ॥ १९ ॥ हरिण, वानर, वराह, सिंह, रीस, साळी, गवे, शरभ, वाघ, काळवीट व वनमहिष वगैरे रानटी पशूंनीं ॥ २० ॥ तसाच कर्णांत्र एकपद, अश्वास्य, लांडगे व कस्तूरीमृग यांनीं युक्त होता आणि तेथील सरोवरांच्या बाजूस असलेल्या वाळवंटामध्यें

१ फळें येऊन पिकलीं ह्मणजे मरणारीं झाडें केळी, साळीवगैरे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लावलेल्या केळीच्या वनांनीं सुशोभित होता ॥ २१ ॥ सतीदेवीच्या स्नानानें अधिकच पुण्यकारक उदक झालेल्या नंदानामक नदीनें तो कैलास आसमंतद्भागीं परिवेष्टित होता. अशा प्रकारच्या त्या पर्वताला अवलोकन करून ते सर्वहि देव विस्मित झाले ॥ २२ ॥ नंतर देवांनीं त्या कैलास पर्वतावर अलकानांवाची नगरी व सौगंधिक-नांवाचें वन हीं अवलोकन केलीं. त्या वनामध्यें सौगंधिक नांवांचीं उत्तम सुवासयुक्त कमळें उत्पन्न होतात म्हणून त्या वनाचें सौगंधिक असें नांव पडलें आहे ॥ २३ ॥ आणि त्या अलकानगरीच्या बाहेरच्या बाजूंनीं नंदा आणि अलकनंदा या दोन नद्या, असून त्या श्रीहरींच्या चरणकमलावरील रजःकणांच्या संबंधानें अत्यंत पवित्र आहेत ॥ २४ ॥ हे विदुरा, ज्या नद्यांच्या उदकामध्यें अनेक प्रकारचे विहार केल्यावर श्रम पावलेल्या देवांच्या स्त्रिया, स्वर्गांवरून खालीं उतरून आपल्या प्रियपतींबरोबर

नंदया गंगया पर्यस्तं परिवेष्टितम् । सत्या भवान्याः स्नानेन पुण्यतरमतिसुगंधमुदकं यस्याम् ॥ २२ ॥ तत्र गिरौ वनं च ददृशुः । यत्र वने तन्नाम सौगंधिकं पंकजं भवति जातावेकवचनम् ॥ २३ ॥ पुरीं वर्णयति । नंदा चेति चतुर्भिः । सरितौ पुरः पुराद्बाह्यतो भवतः । तीर्थपादस्य हरेः पादांभोजरजसा ॥ २४॥ ययोर्विगाह्य प्रविश्य क्रीडंति ॥२५॥ ययोरंभो विगततृषोऽपि

पर्यस्तं नंदया सत्याः स्नानपुण्यतरोदया ॥ विलोक्य भूतेशगिरिं विबुधा विस्मयं ययुः ॥ २२ ॥ ददृशुस्तत्र ते रम्यामलकां नाम वै पुरीम् ॥ वनं सौगंधिकं चापि यत्र तन्नामपंकजम् ॥२३॥ नंदा चालकनंदा च सरितौ बाह्यतः पुरः ॥ तीर्थपादपदांभोजरजसाऽतीव पावने ॥ २४ ॥ ययोः सुरस्त्रियः क्षत्तरवरुह्य स्वधिष्ण्यतः ॥ क्रीडंति पुंसः सिंचंत्यो विगाह्य रतिकर्शिताः ॥ २५ ॥ ययोस्तत्स्नानविभ्रष्टनवकुंकुमपिंजरम् ॥ वितृषोऽपि पिबंत्यंभः पाययंतो गजा गजीः ॥ २६ ॥ तारहेममहारत्नविमानशतसंकुलाम् ॥ जुष्टां पुण्यजनस्त्रीभिर्यथा खं सतडिद्घनम् ॥ २७ ॥ हित्वा यक्षेश्वरपुरीं वनं सौगंधिकं च तत् ॥ द्रुमैः कामदुघैर्हृद्यं चित्रमाल्यफलच्छदैः ॥ २८ ॥ रक्तकंठखगानीकस्वरमंडितषट्पदम् ॥ कलहंसकुलप्रेष्ठं खरदंडजलाशयम् ॥ २९ ॥

गजाः पिबंति । तत्र हेतुः । तासां सुरस्त्रीणां स्नानेन विभ्रष्टं गलितं यन्नवं कुंकुमं तेन पिंजरं पीतवर्णम् । गजीः करिणीः ॥ २६ ॥ तारं रूप्यम् । तारादिमयविमानानां शतैः संकुलाम् । तडिद्भिः स्त्रीणां घनैर्विमानानां खेन पुर्याः सादृश्यम् ॥ २७ ॥ यक्षेश्वरपुरीं हित्वाऽतिक्रम्य तद्वनं च दृष्ट्वा ते देवा आराद्दूराद्वटं ददृशुरिति चतुर्थेनान्वयः । कथंभूतं वनम् । चित्राणि माल्यानि फलानि छदाश्च पत्राणि येषु तैर्द्रुमैर्हृद्यं सुखकरम् ॥ २८ ॥ रक्तकंठखगानामनीकस्य स्वरैर्मंडिताः षट्पदाः षट्पदस्वरा यस्मिन् । कलहं-

---

स्नान करून तें उदक, पुरुषांच्या आंगांवर सेचन करीत जलक्रीडा करितात ॥ २५ ॥ व त्या स्त्रियांच्या शरीरांना लावलेल्या व स्नानाच्या वेळीं धुवून गेलेल्या नूतन केशराच्या योगानें पिंवळें झालेलें ज्या नद्यांचें उदक, तहान लागली नसलेलेहि हत्ती, हत्तिणींना पाजीत होत्साते स्वतःहि पितात ॥ २६ ॥ त्या नद्यांनीं परिवेष्टित अशी ती अलका नगरी, रुप्याच्या सोन्याच्या व महामोल रत्नांच्या शेंकडो विमानांनीं व्याप्त असून यक्षांच्या अनेक स्त्रियांनीं सेवन केलेली होती. ती–विद्युल्लतांसहित पांढऱ्या ॥ १६ ॥
पिंवळ्या, तांबड्या व काळ्या मेघांनीं जसें आकाश शोभायमान दिसतें तशी दिसत होती ॥२७॥ अशा त्या कुबेराच्या नगरीला टाकून देव पुढें गेले. तों तें सौगंधिक नांवाचें वन त्यांच्या दृष्टीस पडलें तें–चित्रविचित्र फुलें, फळें व पानें ज्यांच्यावर आहेत अशा आश्रितांचे मनोरथ पूर्ण करणाऱ्या वृक्षांनीं मनोरम होतें॥२८॥ ज्या वनांतील भ्रमरांच्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

गुंजारवांना कोकिलपक्ष्यांच्या समुदायांच्या शब्दांनीं विशेष मनोहरता येत असे, जें राजहंसांच्या कुळाला अत्यंत प्रिय असे, जेथें कमलांनीं युक्त अशीं सरोवरें
असत, गंडस्थळांची कंडू शमन होण्याकरितां वनगजांनीं फारच घर्षण केलेल्या हरिचंदन वृक्षांवरून येणाऱ्या वायूच्या स्पर्शानें जें यक्षस्त्रियांच्या मनाला
क्रीडा करण्याविषयीं वारंवार अधिक क्षोभ उत्पन्न करीत असे ॥ २९ ॥ ३० ॥ जेथें जागोजाग कमळपंक्तींनीं भरलेल्या व वैडूर्यरत्नांच्या पायऱ्या बांधलेल्या तळ्या
होत्या व जेथें किंपुरुषनामक एक प्रकारचे देव, क्रीडा करण्यासाठीं प्राप्त झाले होते. त्या सौगंधिक वनाला पाहून ते देव, पुढें गेले. तों तेथून जवळच एक वटवृक्ष त्यांच्या
दृष्टीस पडला ॥ ३१ ॥ तो शंभर योजनें उंच असून त्याच्या पाऊणपाऊणशें योजनें लांब वाढलेल्या शाखांचा विस्तार सभोंवार पसरला होता. व त्यानें सभोंवती निश्चल
छाया पाडली होती. त्यावर पक्ष्यांचें एकही घरटें नसल्यामुळें त्याचे खालीं राहणारास पक्ष्यांच्या किलबिलाटाचा त्रास मुळींच होत नसे. तेथें कोणत्याही प्रकारचा ताप (त्रास)

सानां कुलस्य प्रेष्ठम्। खरदंडानि पद्मानि तैर्युक्ता जलाशया यस्मिन् ॥ २९ ॥ वनकुंजरैः संघृष्टा ये हरिचंदनद्रुमास्तत्संबंधिना वायुना पुण्यजनस्त्रीणां मनः अधि अधिकमुन्म-
थयन् ॥ ३० ॥ यत्र चोत्पलमालिन्यो वाप्यस्तत्किंपुरुषैः प्राप्तं वनं दृष्ट्वा पाठांतरे किंपुरुषैः प्राप्ता वापीश्च दृष्ट्वेत्यर्थः ॥ ३१ ॥ योजनशतमुत्सेध उच्छ्रायो यस्य पादोनैः

वैदूर्यकृतसोपाना वाप्य उत्पलमालिनीः ॥ प्राप्तं
वनकुंजरसंघृष्टहरिचंदनवायुना ॥ अधिपुण्यजनस्त्रीणां मुहुरुन्मथयन्मनः ॥ ३० ॥ वैदूर्यकृतसोपाना वाप्य उत्पलमालिनीः ॥ प्राप्तं
किंपुरुषैर्दृष्ट्वा त आराद्ददृशुर्वटम् ॥ ३१ ॥ स योजनशतोत्सेधः पादोनविटपायतः ॥ पर्यक्कृताचलच्छायो निर्नीडस्तापवर्जितः ॥ ३२ ॥
तस्मिन्महायोगमये मुमुक्षुशरणे सुराः ॥ ददृशुः शिवमासीनं त्यक्तामर्षमिवांतकम् ॥ ३३ ॥ सनंदनाद्यैर्महासिद्धैः शांतैः संशांत-
विग्रहम् ॥ उपास्यमानं सख्या च भर्त्रा गुह्यकरक्षसाम् ॥ ३४ ॥ विद्यातपोयोगपथमास्थितं तमधीश्वरम् ॥ चरंतं विश्वसुहृदं वा-
त्सल्याल्लोकमंगलम् ॥ ३५ ॥ लिंगं च तापसाभीष्टं भस्मदंडजटाजिनम् ॥ अंगेन संध्याभ्ररुचा चंद्रलेखां च बिभ्रतम् ॥ ३६ ॥

सर्वतः पंचसप्ततियोजनप्रमाणैर्विटपैः शाखाभिरायतो विस्तृतः पर्यक् सर्वतः कृता अचला छाया येन निर्गतं नीडं यस्मात् ॥ ३२ ॥ मुमुक्षूणां शरणे आश्रये त्यक्तामर्षो-
ऽतकस्तत्तुल्यम् ॥ ३३ ॥ तं विशिनष्टि । सनंदनाद्यैरिति पंचभिः । सख्या कुबेरेणोपास्यमानम् ॥ ३४ ॥ विद्या उपासना तपश्चित्तैकाग्र्यं योगः समाधिस्तेषां पंथानं प्रवर्तन-
द्वारा लोकस्य मंगलं हितं तपोवात्सल्यात्स्नेहादाचरंतम् ॥ ३५ ॥ संध्याभ्ररुचा रक्तवर्णेनांगेन भस्मादिलिंगं चंद्रलेखां च बिभ्रतम् ॥ ३६ ॥

मुळींच नसे ॥३२॥ हे विदुरा, त्या महायोगमय व मुमुक्षुजनास आश्रय करण्यास योग्य अशा वटवृक्षाखालीं बसलेला, 'क्रोधाचा त्याग करून साक्षात् काळच बसला आहे कीं
काय' अशा त्या श्रीशंकराला देवांनीं अवलोकन केलें ॥ ३३ ॥ तो शंकर—अत्यंत शांतमूर्ति असल्यामुळें, शांतीनें युक्त असे सनंदनादिक महासिद्ध व यक्षराक्षसांचा पालक जो
(शंकराचा) सखा कुबेर हे सर्व, त्याच्याजवळ बसून त्याची उपासना करीत होते ॥ ३४ ॥ आपणच सर्व जगाचा हितकर्ता व पालक असल्यामुळें प्राणिमात्रांच्या प्रेमानें
जो, आपलें आचरण पाहून लोकांनीं तसें वागावें अशा उदारबुद्धीनें उपासना, चित्ताची एकाग्रता आणि समाधि यांचा मार्ग आचरण करून लोकांस दाखवीत होता
॥ ३५ ॥ ज्यानें संध्याकाळच्या अभ्राप्रमाणें आरक्तवर्ण अशा आपल्या शरीरानें तपस्व्याला योग्य अशीं भस्म, दंड, जटा आणि कृष्णाजिन हीं चिन्हें व मस्तकावर

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

चंद्रकला धारण केली होती ॥ ३६ ॥ तो दर्भांच्या आसनावर बसून कितीएक सत्पुरुष श्रवण करीत असतां, प्रश्न करणाऱ्या नारदाला सनातन ब्रह्मज्ञानाचा उपदेश करीत होता ॥ ३७ ॥ तो उजव्या मांडीवर डावें चरणकमळ व डाव्या गुडघ्यावर डावा बाहु ठेऊन वीरासन घालून उजव्या मनगटांत रुद्राक्षांची माळा धारण करून तर्कमुद्रेनें बसला होता ॥ ३८ ॥ डावी मांडी दृढ बसावी ह्मणून तिच्याखालीं योगपट्ट दृढ धारण करणारा, ब्रह्मानंदाचेठिकाणीं चित्ताची एकाग्रवृत्ती लावून स्वस्थ बसणारा, व विचारशीलांमध्यें मुख्य विचारशील अशा त्या शंकराला, लोकपालांसह ऋषींनीं हात जोडून नमस्कार केला ॥ ३९ ॥ देवदैत्यांचे अधिपति ज्याच्या चरणां ल

व्रतिनामासनं वृसी तस्यां ब्रह्म प्रवोचंतम् ॥ ३७ ॥ सव्यं पादपद्मं दक्षिणे ऊरौ कृत्वा विन्यस्य जातुनि च सव्ये बाहुं कृत्वा दक्षिणबाहुप्रकोष्ठे मणिबंधस्थाने अक्षमालां च कृत्वा दक्षिणहस्तकृतया तर्कमुद्रयोपलक्षितमासीनमित्यर्थः। तदुक्तं योगशास्त्रे। एकपादमथैकस्मिन्विन्यसेदूरुसंस्थितम्॥ इतरस्मिंस्तथा बाहुं वीरासनमिदं स्मृतम्॥ तर्कमुद्रा चोक्ता। तर्जन्यंगुष्ठयोरग्रे मिथः संयोज्य चांगुलीः ॥ प्रसार्य बंधनं प्राहुस्तर्कमुद्रेति मांत्रिका इति॥३८॥ ब्रह्मनिर्वाणं ब्रह्मानंदस्तत्र समाधिरैकाग्र्यं तमाश्रितम्। योगकक्षां योगपट्टं च वामजानु-

उपविष्टं दर्भमय्यां बृस्यां ब्रह्म सनातनम् ॥ नारदाय प्रवोचंतं पृच्छते शृण्वतां सताम् ॥ ३७ ॥ कृत्वोरौ दक्षिणे सव्यं पादपद्मं च जानुनि ॥ बाहुं प्रकोष्ठेऽक्षमालामासीनं तर्कमुद्रया ॥ ३८ ॥ तं ब्रह्मनिर्वाणसमाधिमाश्रितं व्युपाश्रितं गिरिशं योगकक्षाम् ॥ सलोकपाला मुनयो मनूनामाद्यं मनुं प्रांजलयः प्रणेमुः ॥ ३९ ॥ स तूपलभ्यागतमात्मयोनिं सुरासुरेशैरभिवंदितांघ्रिः ॥ उत्थाय चक्रे शिरसाऽभिवंदनमर्हत्तमः कस्य यथैव विष्णुः ॥ ४० ॥ तथाऽपरे सिद्धगणा महर्षिभिर्ये वै समंतादनु नीललोहितम् ॥ नमस्कृतः प्राह शशांकशेखरं कृतप्रणामं प्रहसन्निवात्मभूः ॥ ४१ ॥ ब्रह्मोवाच ॥ जाने त्वामीशं विश्वस्य जगतो योनिबीजयोः ॥ शक्तेः शिवस्य च परं यत्तद्ब्रह्म निरंतरम् ॥ ४२ ॥

दृढीकरणार्थं विशेषेणोपाश्रितवंतम्। मननशीला मनवस्तेषामाद्यं मुख्यम् ॥ ३९ ॥ अर्हत्तमो विष्णुर्वामनमूर्तिर्यथा कस्य कश्यपस्य ॥ ४० ॥ महर्षिभिः सहिता ये नीललोहितमनुवर्तंते तेऽपि तस्मै वंदनं चक्रुः एवं सर्वैर्नमस्कृतः प्राह। कृतः प्रणामो देवैर्यस्मै तम् ॥ ४१ ॥ यद्यपि त्वं नीचवन्मां नमस्करोषि तथापि तवैश्वर्यमहं वेद्मीत्याह। जान इति। त्वां विश्वस्येशं जाने। तत्र हेतुः। जगतो योनिर्या शक्तिः प्रकृतिर्बीजं च शिवः पुरुषस्तयोः कारणम्। तथापि निरंतरं निर्भेदं यद्ब्रह्म निर्विकारं तदेव

अभिवंदन करितात असा तो शंकर सर्वांस पूज्य असतांहि त्यानें ब्रह्मदेव आपल्या समीप प्राप्त झाला असें पाहून 'जसा कश्यपऋषि आलेला पाहून वामनावतार धारण करणाऱ्या विष्णूनें उठून त्याला वंदन केलें त्याप्रमाणें' आसनावरून उठून शंकरानें ब्रह्मदेवाला मस्तकानें अभिवंदन केलें ॥ ४० ॥ तसेच शंकराच्या आसमंताद्भागीं त्याला अनुसरून वागणारे जे दुसरे ऋषि व सिद्धगण होते त्यांनींहि ब्रह्मदेवाला वंदन केलें. याप्रमाणें शंकरानें व त्याच्या पार्षदांनीं वंदन केलेला तो ब्रह्मदेव, हांसत हांसत त्या चंद्रशेखराला ह्मणाला कीं–॥ ४१ ॥ ब्रह्मदेव ह्मणाला– हे शंकरा, तूं जरी लोकसंग्रहाकरितां आपला कमीपणा दर्शवून मला पित्याप्रमाणें नमस्कार केलास तथापि तूं सृष्टीचा नियामक, जगाचें उत्पत्तिस्थान जी प्रकृति व बीज जो पुरुष त्या दोघांचेंहि मूळ कारण, जें निर्विकार ब्रह्म तेंच आहेस असें मी जाणतों ॥ ४२ ॥

१ आपलें एक पाऊल दुसऱ्या मांडीवर चढवून बसवावें व ज्या मांडीवर पाउल नाहीं तिच्यावर बाहु ठेवावा या आसनाला योगशास्त्रामध्यें 'वीरासन' असें ह्मटलें आहे. २ आंगठा व तर्जनी यांचीं अग्रें एकमेकांस लावून चिमटी करावी व बाकीचीं तिन्ही बोटें पसरलेलींच ठेवावीं या बंधनास मांत्रिक लोक 'तर्कमुद्रा' असें ह्मणतात.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हे षड्गुणैश्वर्यसंपन्ना ईश्वरा, ज्याप्रमाणें कोळी स्वतः तंतू उत्पन्न करितो, त्यांचेठिकाणीं क्रीडा करितो व फिरून त्यांचा आपल्याचठिकाणीं उपसंहार करितो त्याप्रमाणें, तूंहि स्वस्वरूप अशा प्रकृतिपुरुषांचेठिकाणीं क्रीडा करीत होत्साता, हें जग उत्पन्न करितोस, पालन करितोस आणि संहारही करितोस ॥ ४३ ॥ तूंच धर्म व अर्थ यांस उत्पन्न करणाऱ्या वेदत्रयाच्या रक्षणासाठीं दक्षाच्या निमित्तानें यज्ञ उत्पन्न केला आहेस. नेमधर्मांचें पालन करणारे ब्राह्मण ज्या धर्ममर्यादांचें भक्तिपुरःसर पालन करितात त्या धर्ममर्यादाहि लोकांमध्यें तूंच बांधून ठेविल्या आहेस ॥ ४४ ॥ हे मंगलदायका प्रभो, तूंच उत्तम कर्मै करणाऱ्या पुरुषांना स्वर्गलोक किंवा मोक्ष मिळवून देतोस व निंद्य कर्मै करणारांना भयंकर नरक देतोस, असें असतां, एकाद्या पुरुषाला विपरीत फळ मिळतें ह्याचें कारण काय? ह्मणजे दक्षानें चांगलें कर्म केलें असतां त्याचा नाश कां झाला ? ॥ ४५ ॥ रोषानें

त्वमिति जाने ॥ ४२ ॥ ननु विरुद्धमेतत्तत्राह । त्वमेव सरूपयोरविभक्तयोः शिवशक्त्योः क्रीडन्विश्वसृष्ट्यादि करोषि । ऊर्णनाभिरिव स्वरूपयोरिति पाठे स्वांशयोः अतो न विरोधः ॥ ४३ ॥ धर्ममर्थं च दोग्धि या त्रयी तस्या अभिपत्तये रक्षणायाध्वरं सृष्टवानसि । यद्वा हेधर्मार्थदुघ धर्माद्यभिपत्तये तत्प्राप्तये दक्षेण सूत्रेण निमित्तेन सेतवो वर्णाश्रं मर्यादाश्च अवसिता निबद्धा निर्णीता इति वा श्रद्दधते श्रद्धयाऽनुतिष्ठंति ॥ ४४ ॥ सर्वकर्मफलदाताऽपि त्वमेवेत्याह । हेमंगल मंगलानां शुभानां कर्मणां कर्तुः स्वः स्वर्गं

त्वमेव भगवन्नेतच्छिवशक्त्योः सरूपयोः ॥ विश्वं सृजसि पास्यत्सि क्रीडन्नूर्णपटो यथा ॥ ४३ ॥ त्वमेव धर्मार्थदुघाभिपत्तये दक्षेण सूत्रेण ससर्जिथाध्वरम् ॥ त्वयैव लोकेऽवसिताश्च सेतवो यान्ब्राह्मणाः श्रद्दधते धृतव्रताः ॥ ४४ ॥ त्वं कर्मणां मंगल मंगलानां कर्तुः स्म लोके तनुषे स्वः परं वा ॥ अमंगलानां च तमिस्रमुल्बणं विपर्ययः केन तदेव कस्यचित् ॥ ४५ ॥ न वै सतां त्वच्चरणार्पितात्मनां भूतेषु सर्वेष्वभिपश्यतां तव ॥ भूतानि चात्मन्यपृथग्दिदृक्षतां प्रायेण रोषोऽभिभवेद्यथा पशुम् ॥ ४६ ॥ पृथग्धियः कर्मदृशो दुराशयाः परोदयेनार्पितहृद्रुजोऽनिशम् ॥ परान्दुरुक्तैर्वितुदंत्यरुंतुदास्तान्मावधीद्दैववधान्भवद्विधः ॥ ४७ ॥ यस्मिन्यदा पुष्करनाभमायया दुरंतया स्पृष्टधियः पृथग्दृशः ॥ कुर्वंति तत्र ह्यनुकंपया कृपां न साधवो दैवबलात्कृते क्रमम् ॥ ४८ ॥

परं मोक्षं वा तनुषे अमंगलानामशुभानां कर्मणां कर्तुश्च तमिस्रं नरकं तनुषे । तत्र केन हेतुना तदेव तस्मिन्नेव कस्यचिद्विपर्ययो भवति ॥ ४५ ॥ त्वत्कोपोऽत्र हेतुरित्यसंभावितमिति कैमुत्यन्यायेनाह । न वै सतां सतः रोषोऽभिभवेत् । तव त्वां द्वितीयार्थे षष्ठ्यौ । पशुमज्ञं यथाऽभिभवति तद्वत् ॥ ४६ ॥ अतो ये पृथग्धियो भेददृशोऽतः कर्मण्येव दृष्टिर्येषाम् । दुष्ट आशयो येषां परेषामुदयेन संपदा अर्पिता हृदि रुग्येषां अरुंतुदा मर्मभेत्तारः दैवेनैव वधो येषां तान्भवद्विधो निरुपमः साधुर्मावधीन्न हन्यात् ॥ ४७ ॥ प्रत्युत साधूनां

झाला असें ह्मणावें तर तें संभवत नाहीं; कारण, रोष हा, जसा पशुतुल्य अज्ञजनांला घेरून टाकितो त्याप्रमाणें ज्यांनीं आपलें अंतःकरण तुझ्या चरणीं अर्पण केलें आहे, ज्यांनीं सर्व प्राणिमात्रांचेठिकाणीं तूं आहेस अशी दृष्टि ठेविली आहे आणि जे आत्मस्वरूपीं सर्व प्राणिमात्रांना अभेदभावानें पाहत आहेत त्या सत्पुरुषांनासुद्धां बहुतकरून आपल्या स्वाधीन करून घेत नाहीं, मग तो रोष तुला कोठून प्राप्त होणार, व्हावयाचाच नाहीं ॥ ४६ ॥ आतां भेददर्शी असल्यामुळें कर्माकडेच ज्यांची दृष्टि आहे, ज्यांचें अंतःकरण दुष्ट आहे, ज्यांच्या मनाला दुसऱ्यांच्या उदयानें निरंतर पीडा होत असते व जे मर्मभेदक असल्यामुळें आपल्या दुर्भाषणांच्या योगानें इतरांस पीडा देत असतात त्यांचा दैवानेंच वध होत असतो, यास्तव त्यांच्या नाशास आपल्यासारख्या महासमर्थ साधूनें प्रवृत्त होऊं नये ॥ ४७ ॥ शिवाय साधूंच्या आचाराकडे लक्ष देऊन तूं ह्यांच्यावर अनुग्रहच करावा हें मला योग्य दिसतें कारण, कमलनाभ भगवंताच्या अ.ाध मायेनें मोहितबुद्धि झालेले पुरुष, ज्या देशीं व ज्या काळीं 'हा मी व हा दुसरा असा' भेद

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मानून, साधूंचा अपराध करितात त्या देशीं व त्याकालीं सत्पुरुष, आपल्या दयालु स्वभावानें 'माझें दैवच असें आहे, येथें त्यांचा अपराध काय आहे' असा विचार करून शेवटीं त्यांच्यावर कृपाच करितात, त्यांच्या नाशास प्रवृत्त होत नाहींत ॥ ४८ ॥ हे प्रभो, परम पुरुषाच्या अगाध मायेनें तुझ्या बुद्धीला स्पर्शही झाला नसल्यामुळें तूं सर्वज्ञ आहेस, यास्तव त्या मायेनें ज्यांच्या बुद्धीला मोह पाडला आहे ह्मणूनच ज्यांचें मन कर्मे करण्यांत आसक्त झालें आहे, त्यांच्यावर अनुग्रह करण्यास तूं योग्य आहेस ॥ ४९ ॥ तस्मात् हे शंकरा, ज्या यज्ञामध्यें कुबुद्धि याज्ञिकांनीं, ज्यानें यज्ञ सफल केला जातो अशा यज्ञांत विभाग असणाऱ्याहि, तुला भाग दिला नाहीं ह्मणून तूं

वृत्तमालोक्यानुग्रहमेव कर्तुमर्हसीत्याह । द्वाभ्याम् । यस्मिन्देशे यदा काले स्पृष्टधियो मोहितचित्ताः पृथग्दृशो भवंति तत्रापराधे साधवो ह्यनुकंपयाऽऽनंतरमेव परदुःखासहिष्णुतया चित्तप्रकंपेन कृपां कुर्वंति नतु क्रमं पराक्रमम् । कुतः । दैवबलात्कृतेऽर्थे ममैव दैवमेवंभूतं कोऽत्रापराधस्तेषामिति मत्वा तद्धननं न कुर्वंत इत्यर्थः ॥ ४८ ॥ भवांस्त्वस्पृष्टमतिरतएव समस्तदृक् सर्वज्ञः तया मायया हत आत्मा येषां तेष्वतएव कर्मानुगतचित्तेष्विहापराधेऽनुग्रहं कर्तुमर्हसि ॥ ४९ ॥ एवं सामान्येनोक्त्वा प्रस्तुतमाह । कुर्विति त्रिभिः । त्वया हतस्यातएवासमाप्तस्य प्रजापतेरध्वरस्य । हेमनो यत्राध्वरे कुयाज्ञिका भागिनोऽपि तव भागं न ददुः । भागार्हस्त्वमाह ।

भवांस्तु पुंसः परमस्य मायया दुरंतयाऽस्पृष्टमतिः समस्तदृक् ॥ तया हतात्मस्वनुकर्मचेतःस्वनुग्रहं कर्तुमिहार्हसि प्रभो ॥ ४९ ॥ कुर्वध्वरस्योद्धरणं हतस्य भो स्त्वयाऽसमाप्तस्य मनो प्रजापते ॥ न यत्र भागं तव भागिनो ददुः कुयज्विनो येन मखो निनीयते ॥ ५० ॥ जीवताद्यजमानोऽयं प्रपद्येताक्षिणी भगः ॥ भृगोः श्मश्रूणि रोहंतु पूष्णो दंताश्च पूर्ववत् ॥ ५१ ॥ देवानां भग्नगात्राणा-मृत्विजां चायुधाश्मभिः ॥ भवताऽनुगृहीतानामाशु मन्योऽस्त्वनातुरम् ॥ ५२ ॥ एष ते रुद्रभागोऽस्तु यदुच्छिष्टोऽध्वरस्य वै ॥ यज्ञ-स्ते रुद्र भागेन कल्पतामद्य यज्ञहन् ॥ ५३ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे चतुर्थस्कंधे रुद्रसांत्वनं नाम षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥ ॥

मैत्रेय उवाच ॥ इत्यजेनानुनीतेन भवेन परितुष्यता ॥ अभ्यधायि महाबाहो प्रहस्य श्रूयतामिति ॥ १ ॥

येन त्वया मखो निनीयते फलं प्राप्यते ॥ ५० ॥ ५१ ॥ हेमन्यो अनातुरमारोग्यमस्तु ॥ ५२ ॥ भागश्च तवास्त्वित्याह । एष इति । हेरुद्र यावदित्यर्थे यदित्यव्ययम् । यज्ञे क्रते यावानुच्छिष्टोऽवशिष्टोऽर्थस्तावानेष तव भागोऽस्तु । हेरुद्र ते भागेनाद्य यज्ञः कल्पतां संपद्यताम् ॥ ५३ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे चतुर्थे टीकायां षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥ ॥ सप्तमे विष्णुरुद्भूतः स्तुतो दक्षभवादिभिः ॥ यज्ञं प्रवर्तयामास दक्षेणेति निरूप्यते ॥ १ ॥ अजेन योऽनुनीतः प्रार्थितो भवस्तेनाभिहितम् । हेमहाबाहो विदुर ॥ १ ॥

विध्वंस केल्यामुळें समाप्त न झालेल्या त्या दक्षप्रजापतीच्या यज्ञाचें आतां तूं पुनःसंधान कर ॥ ५० ॥ हा यजमान (दक्ष) जीवंत व्हावा, भगदेवाला पुनः डोळे प्राप्त व्हावेत, भृगूच्या मिशा वाढाव्यात आणि पूषा ऋत्विजाला दांतही पूर्वींप्रमाणें यावेत ॥ ५१ ॥ हे शिवा, शस्त्रें व पाषाण यांच्या योगानें ज्यांचीं गात्रें भग्न झालीं आहेत त्या देवांना व ऋत्विजांना तुझ्या अनुग्रहाच्या योगेंकरून सत्वर आरोग्य प्राप्त होवो ॥ ५२ ॥ हे रुद्रा, यज्ञ झाल्यावर अवशिष्ट ह्मणून जितके पदार्थ राहतील तितका हा सर्व खरोखर तुझा भाग असो. हे यज्ञविध्वंसका रुद्रा, तुझ्या भागानें आज या यज्ञाला पूर्णता प्राप्त होवो ॥ ५३ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील चतुर्थ स्कंधामध्यें हा सहावा अध्याय समाप्त झाला ॥ ६ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां या सातव्या अध्यायामध्यें, विष्णु प्रगट झाला असतां त्याची दक्ष, शिव इत्यादि देवांनीं स्तुति केल्यावर त्यानें पुनः दक्षाकडून यज्ञ प्रवृत्त केला अशी कथा वर्णन केलेली आहे ॥१॥ मैत्रेय ह्मणाला—हे महाबाहो विदुरा, याप्रमाणें ब्रह्मदेवानें विनंति केली असतां, संतोष ॥ १८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पावणाऱ्या शंकरानें हास्य करून ब्रह्मदेवाला 'ऐका' असें ह्मणून बोलण्यास आरंभ केला ॥ १ ॥ श्रीमहादेव ह्मणाला– हे प्रजापते ब्रह्मदेवा, देवाच्या मायेनें मोहित झालेल्या अज्ञानी लोकांचा अपराध मी उच्चारित नाहीं किंवा मनांतही आणीत नाहीं, परंतु धर्ममर्यादेच्या रक्षणाकरितां त्या अपराधाबद्दल मी त्यांना दंड केला आहे ॥ २ ॥ आतां यज्ञाचें पुनःसंधान व्हावें असें तुमचें ह्मणणें असेल तर, ज्याचें मस्तक पूर्वीं जळून गेलें आहे त्या दक्षप्रजापतीला बोकडाचें मस्तक लावलें असतां लागेल. भगदेव यज्ञांतील आपला भाग मित्रनामक देवाच्या दृष्टीनें पाहील ॥ ३ ॥ पूषा देवानें तर चावावयाचें द्रव्य असेल तें यजमानाच्या दांतांनीं चावून खावें व पीठ भक्षण करावें. ज्या देवांनीं मला यज्ञांतील अवशिष्ट हविर्भाग दिला आहे त्यांचे सर्व अवयव पूर्वींप्रमाणें जसेच्यातसे होतील ॥ ४ ॥ अध्वर्यु आणि दुसरे ऋत्विज ह्यांपैकीं ज्यांचे बाहु तुटले असतील त्यांच्या

अघमपराधम् ॥ २ ॥ स्वापराधमपह्नुत्यानुगृह्णाति । दग्धं शीर्षं यस्य तस्य प्रजापतेरजस्य मुखं यस्मिंस्तत्तथाभूतं शिरोऽस्तु बर्हिषः संबंधिनं भागम् । मित्रनाम्नो देवस्य ॥ ३ ॥ प्रकर्षेण कृतानि लग्नान्यंगानि येषां ते भवंतु । उच्छेषणं यज्ञावशिष्टम् ॥ ४ ॥ येषां त्वंगानि नष्टानि ते त्वश्विनोर्बाहुभ्यां कृतबाहवः पूष्णो हस्ताभ्यां कृतहस्ताश्च

श्रीमहादेव उवाच ॥ नाघं प्रजेश बालानां वर्णये नानुचिंतये ॥ देवमायाभिभूतानां दंडस्तत्र धृतो मया ॥ २ ॥ प्रजापतेर्दग्ध-
शीर्ष्णो भवत्वजमुखं शिरः ॥ मित्रस्य चक्षुषेक्षेत भागं स्वं बर्हिषो भगः ॥ ३ ॥ पूषा तु यजमानस्य दद्भिर्जक्षतु पिष्टभुक् ॥ देवाः
प्रकृतसर्वांगा ये म उच्छेषणं ददुः ॥ ४ ॥ बाहुभ्यामश्विनोः पूष्णो हस्ताभ्यां कृतबाहवः ॥ भवंत्वध्वर्यवश्चान्ये बस्तश्मश्रुर्भृगुर्भ-
वेत् ॥ ५ ॥ मैत्रेय उवाच ॥ तदा सर्वाणि भूतानि श्रुत्वा मीढुष्टमोदितम् ॥ परितुष्टात्मभिस्तात साधुसाध्वित्यथाऽब्रुवन् ॥ ६ ॥
ततो मीढ्वांसमामंत्र्य शुनासीराः सहर्षिभिः ॥ भूयस्तद्देवयजनं समीढ्वद्वेधसो ययुः ॥ ७ ॥ विधाय कार्त्स्न्येन च तद्यदाह भगवा-
न्भवः ॥ संदधुः कस्य कायेन सवनीयपशोः शिरः ॥ ८ ॥ संधीयमाने शिरसि दक्षो रुद्राभिवीक्षितः ॥ सद्यः सुप्त इवोत्तस्थौ ददृशे
चाग्रतो मृडम् ॥ ९ ॥ तदा वृषध्वजद्वेषकलिलात्मा प्रजापतिः ॥ शिवावलोकादभवच्छरद्ध्रद इवामलः ॥ १० ॥

भवंतु । अध्वर्यवः अन्ये च ऋत्विजः बस्तस्य श्मश्रूण्येव श्मश्रूणि यस्य ॥ ५ ॥ मीढुष्टमः शिवस्तेनोक्तम् । परितुष्टैश्चित्तैः ॥ ६ ॥ मीढ्वांसं शिवं त्वयागत्य सर्वं कार्यमित्यामंत्र्य संप्रार्थ्य शुनासीरा देवाः सह मीढुषा वेधसा च वर्तमानाः समीढ्वद्वेधसः ॥ ७ ॥ कार्त्स्न्येन वक्रहस्तबाह्वादिसाधारण्यं विधाय ॥ ८ ॥ ९ ॥ पूर्वं वृषध्वजद्वेषेण

बाहूंचीं कार्यें आश्विनीकुमारांच्या बाहूंनीं होतील व ज्यांचे हात तुटले असतील त्यांच्या हातांचीं कार्यें पूषा देवाच्या हातांनीं होतील. भृगूला बोकडाच्या मिशा प्राप्त होतील ॥ ५ ॥ मैत्रेय ह्मणाला– बा विदुरा, त्या वेळीं सर्व लोकांनीं शिवाचें भाषण श्रवण करून, संतुष्ट अशा अंतःकरणांनीं 'फार उत्तम, फार उत्तम' असें भाषण केलें ॥ ६ ॥ आणि तदनंतर ऋषींसहवर्तमान देवांनीं 'आपण येऊन कार्यतें करावें' अशी शिवाची प्रार्थना करून, शंकर व ब्रह्मदेव यांसहवर्तमान पुनः ते त्या यज्ञमंडपांत गेले ॥ ७ ॥ आणि त्यांनीं भगवान् शंकरानें जें सांगितलें होतें त्याप्रमाणें सर्व करून, दक्षाच्या धडाला यज्ञपशूचें मस्तक जोडिलें ॥ ८ ॥ तेव्हां मस्तक जोडिल्यावर रुद्रानें कृपादृष्टीनें पाहिलेला तो दक्ष, तत्काल, जसा एखादा निजलेला मनुष्य जागा होऊन उठतो त्याप्रमाणें उठून उभा राहिला, तों पुढें शंकर त्याच्या दृष्टीस पडला ॥ ९ ॥ कर्मजडत्वांत डोहाचें पाणी

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ग्रढूळ झालेलें असतें तें शरदृतु प्राप्त झाला ह्मणजे जसें स्वच्छ होतें त्याप्रमाणें पूर्वीं शंकराचा द्वेष केल्यामुळें ज्या दक्षाचें अंतःकरण पापयुक्त होतें तोच दक्ष तेव्हां शिवाचें दर्शन होतांच निर्दोष झाला ॥ १० ॥ आणि शंकराची स्तुति करण्याचें त्यानें मनांत आणिलें परंतु मरण पावलेल्या कन्येचें स्मरण झाल्यामुळें प्रेमानें व उत्कंठेनें त्याचा कंठ सद्गदित झाल्यामुळें तो दक्ष, स्तुति करण्यास समर्थ झाला नाहीं ॥ ११ ॥ तेव्हां प्रेमानें विव्हळ झालेल्या त्या महाबुद्धिमान् दक्षप्रजापतीनें मोठ्या प्रयासानें आपलें अंतःकरण स्थिर करून, निष्कपटभावानें शंकराची स्तुति केली ॥ १२ ॥ दक्ष ह्मणाला–हे भगवन् शंकरा, मी पूर्वीं तुझी जरी पुष्कळ निंदा केली होती, तथापि तूं माझी उपेक्षा न करितां मला शिक्षा केलीस हा तूं माझ्यावर मोठाच अनुग्रह केला आहेस. तूं व श्रीविष्णु या उभयतांच्या हातून अधम ब्राह्मणाविषयींसुद्धां उपेक्षा होत नाहीं मग जे लोक धर्माप्रमाणें आपलें वर्तन ठेवितात त्यांचेठिकाणीं उपेक्षा कोठून होणार? होणारच नाहीं ॥ १३ ॥ हे परमसमर्था शंकरा, वेदाचें व आपल्या खऱ्या स्वरूपाचें संप्रदाय

कलिलः कलुषीकृत आत्मा यस्य सः तदा शरत्कालीनो ह्रद इवामलोऽभवत् ॥ १० ॥ ११ ॥ १२ ॥ यदपि यद्यपि प्रलब्धः पराभूतो मया भवांस्तथापि त्वया दंडो भृतः शिक्षा कृता ननूपेक्षितोऽस्मि युक्तमेवैतदित्याह । ब्रह्मबंधुषु च ब्राह्मणाभासेष्वपि तुभ्यं तव हरेश्चेति वां युवयोरवज्ञोपेक्षा नास्ति ॥ १३ ॥ तत्र हेतुमाह । विद्येति । ब्रह्मा

भवस्तवाय कृतधीर्नाशक्रोदनुरागतः ॥ औत्कंठ्याद्बाष्पकलया संपरेतां सुतां स्मरन् ॥ ११ ॥ कृच्छ्रात्संस्तभ्य च मनः प्रेमविव्हलितः सुधीः ॥ शशंस निर्व्यलीकेन भावेनेशं प्रजापतिः ॥ १२ ॥ दक्ष उवाच ॥ भूयाननुग्रह अहो भवता कृतो मे दंडस्त्वया मयि भृतो[illegible]पि प्रलब्धः ॥ न ब्रह्मबंधुषु च वां भगवन्नवज्ञा तुभ्यं हरेश्च कुत एव धृतव्रतेषु ॥ १३ ॥ विद्यातपोव्रतधरान्मुखतः स्म विप्रान् ब्रह्मात्मतत्त्वमवितुं प्रथमं त्वमस्राक् ॥ तद्ब्राह्मणान्परम सर्वविपत्सु पासि पालः पशूनिव विभो प्रगृहीतदंडः ॥ १४ ॥ योऽसौ मयाऽविदिततत्त्वदृशा सभायां क्षिप्तो दुरुक्तिविशिखैरगणय्य तन्माम् ॥ अर्वाक्पतंतमर्हत्तम निंदयाऽपाद्दृष्ट्याऽऽर्द्रया स भगवान्स्वकृतेन तुष्येत् ॥ १५ ॥ मैत्रेय उवाच ॥ क्षमाप्यैवं स मीढ्वांसं ब्रह्मणा चानुमंत्रितः ॥ कर्म संतानयामास सोपाध्यायर्त्विगग्निभिः ॥ १६ ॥

भूत्वा त्वमस्राक्स्राक्षीः । किमर्थम् । आत्मत्त्वमवितुं यद्वा ब्रह्म वेदमात्मतत्त्वं चावितुं संप्रदायप्रवर्तनेन ज्ञापयितुमित्यर्थः । तत्तस्मात् हेपरम उत्कृष्ट ॥ १४ ॥ अत्र च प्रत्युपकारो नास्तीत्याह । योऽसाविति । अविदिततत्त्वदृशा अप्राप्ततत्त्वज्ञानेन तदगणय्य विस्मृत्य अर्हत्तमनिंदयाऽर्वागधः पतंतं मामपाद्रक्षितवान् । स्वकृतेनैव परानुग्रहेणैव तुष्येत् । न मया तत्प्रतिकर्तुं शक्यमित्यर्थः ॥ १५ ॥ अनुमंत्रितोऽनुज्ञातः उपाध्यायसहितैर्ऋत्विगादिभिः अनुवर्तयामास ॥ १६ ॥

प्रवृत्तीनें लोकांस ज्ञान होण्यासाठीं तूं पूर्वीं आपल्या मुखापासून विद्या तपश्चर्या आणि व्रतें यांचें पालन करणारे ब्राह्मण उत्पन्न केले आहेस, ह्मणून जसा पशुपाल हातांत दंड घेऊन पशूंचें रक्षण करितो त्याप्रमाणें तूं दुष्टांना दंड करून ब्राह्मणांचें सर्व संकटांमध्यें रक्षण करितोस ॥ १४ ॥ हे भगवंता तत्त्वज्ञान मुळींच नसलेल्या मी, भरसभेमध्यें अपशब्दबाणांनीं वेधून टाकिलेला जो हा भगवान् तूं, त्यानें तें माझें दुर्भाषण जमेस न धरितां, पूज्य पुरुषाची निंदा केल्यामुळें नरकामध्यें पडत असणाऱ्या माझें दयार्द्रदृष्टीनें संरक्षणच केलेंस, त्या तूं आपण केलेल्या उपकारांनींच आपला संतोष मानून घेतला पाहिजे. कारण, तुझे प्रत्युपकार करण्यास मी सर्वथा समर्थ नाहीं ॥ १५ ॥ ॥ १९ ॥
मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, त्या दक्षप्रजापतीनें शंकराजवळ आपल्या अपराधांची अशी क्षमा मागितल्यावर, ब्रह्मदेवानें अनुमोदन दिलें असतां, त्यानें उपाध्याय, ऋत्विज

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आणि अग्नि यांच्या साह्यानें तें यज्ञकर्म पुढें चालविलें ॥ १६ ॥ तेव्हां त्या श्रेष्ठ ब्राह्मणांनीं प्रमथादि वीरांच्या संपर्कानें झालेल्या दोषाची निवृत्ति होण्याकरितां व यज्ञकर्म पुढें चालण्याकरितां विष्णूला अर्पण करावयाचा त्रिकपाल पुरोडाश (तीन खापऱ्यांवर भाजलेला शिरा) सिद्ध केला ॥ १७ ॥ हे विदुरा, पुरोडाशाची आहुति हातांत घेतलेल्या अध्वर्यूसहवर्तमान यजमानानें (दक्षानें) विशुद्धबुद्धीनें विष्णूचें ध्यान केलें असतां, श्रीविष्णु, ध्यान केल्याप्रमाणेंच तेथें प्रकट झाला ॥ १८ ॥ त्या वेळीं दाही दिशांना उज्ज्वल करणाऱ्या आपल्या कांतीनें त्या सभासदांचें तेज फिकें पाडणारा तो भगवान्, बृहत् आणि रथंतर या नांवांचीं दोन सामें ज्याचे पक्ष आहेत त्या गरुडानें तेथें आणून पोंचविला ॥ १९ ॥ तो–श्यामवर्ण, असून त्याच्या कमरेला सुवर्णाचा कमरपट्टा होता, तो सूर्यासारख्या तेजस्वी मुकुटानें युक्त होता, त्याचें कुंडलांनीं युक्त असलेलें मुखकमल नीलकेशरूप भ्रमरांनीं भूषित होतें, शंख, पद्म, चक्र, बाण, धनुष्य, गदा, तलवार व ढाल हीं आठ आयुधें धारण करणारे व कडीं तोडेवगैरे

वीराणां प्रमथादीनां संसर्गकृतदोषस्य शुद्धये निवृत्त्यर्थम् ॥ १७ ॥ उपात्तहविषाऽध्वर्युणा सहविशुद्धया बुद्ध्या दध्यौ । हेविशांपते विदुर ॥ १८ ॥ स्वया प्रभया तेषां तेजो मुष्णंस्तिरस्कुर्वन् उपानीतः समीपं मापितः स्तोत्रे बृहद्रथंतरे वाजौ पक्षौ तद्वता । बृहद्रथंतरे पक्षाविति श्रुतेः ॥१९ ॥ तमेवानुवर्णयति । श्याम इति द्वाभ्याम् । हिरण्यवद्रशना यस्येति वस्त्रं लक्ष्यते अर्कतुल्येन किरीटेन जुष्टः नीलालका एव भ्रमरास्तैर्मंडितं कुंडलयुक्तमास्यं यस्य कंब्वादिभिरायुधैर्भृत्यरक्षार्थं व्यग्रैर्हिरण्मयैर्भुजैः पुष्पितः कर्णिकार इव शोभमानः भुजानां हिरण्मयत्वं केयूरकंकणमुद्रिकाद्यलंकारैः ॥ २० ॥ वक्षस्यधिश्रिता वधूर्लक्ष्मीर्यस्य सः उदारो हासो ऽवलोकश्च तयोः कलया लेशेन पार्श्वे उभयतो भ्रमती व्यजनचामरे एव राजहंसौ यस्मिन्सः रज्यमानः शोभातिशयं नीयमानः ॥ २१ ॥ ब्रह्मेंद्रत्र्यक्षा नायका मुख्या येषां ते ॥ २२ ॥ हतरुचस्तिरस्कृतप्रभाः सन्नजिह्वा गद्गदवाचः ससाध्वसास्व-

वैष्णवं यज्ञसंतत्यै त्रिकपालं द्विजोत्तमाः ॥ पुरोडाशं निरवपन्वीरसंसर्गशुद्धये ॥ १७॥ अध्वर्युणाऽऽत्तहविषा यजमानो विशांपते ॥ धिया विशुद्धया दध्यौ तथा प्रादुरभूद्धरिः ॥ १८ ॥ तदा स्वप्रभया तेषां द्योतयंत्या दिशो दश ॥ मुष्णंस्तेज उपानीतस्तार्क्ष्येण स्तोत्रवाजिना ॥ १९ ॥ श्यामो हिरण्यरशनोऽर्ककिरीटजुष्टो नीलालकभ्रमरमंडितकुंडलास्यः ॥ कंब्वब्जचक्रशरचापगदासिचर्मव्यग्रैर्हिरण्मयभुजैरिव कर्णिकारः ॥ २० ॥ वक्षस्यधिश्रितवधूर्वनमाल्युदारहासावलोककलया रमयंश्च विश्वम् ॥ पार्श्वभ्रमद्व्यजनचामरराजहंसः श्वेतातपत्रशशिनोपरि रज्यमानः ॥ २१ ॥ तमुपागतमालक्ष्य सर्वे सुरगणादयः ॥ प्रणेमुः सहसोत्थाय ब्रह्मेंद्रत्र्यक्षनायकाः ॥ २२ ॥ तत्तेजसा हतरुचः सन्नजिह्वाः ससाध्वसाः ॥ मूर्ध्ना धृतांजलिपुटा उपतस्थुरधोक्षजम् ॥ २३ ॥

सुवर्णालंकारांनीं युक्त अशा आठ हस्तांनीं प्रफुल्लित झालेल्या कर्णिकारवृक्षा (पांगारा) प्रमाणें तो शोभत होता ॥ २० ॥ त्याच्या वक्षःस्थलाच्या आश्रयानें लक्ष्मी राहिली होती, त्यानें वनपुष्पांची माळा धारण केली होती, उत्कृष्ट सुंदर हास्याच्या योगानें आणि कटाक्षपातांच्या योगानें तो सर्व विश्वाला रमवीत होतो, पंखा आणि चवरी हीं दोन्ही ज्याच्या दोहों बाजूंस, राजहंस पक्ष्यांप्रमाणें फिरत होतीं, श्वेतछत्ररूप चंद्रानें त्याच्या मस्तकावरील भागाला शोभा आणिली होती ॥ २१ ॥ या प्रकारच्या प्राप्त झालेल्या त्या भगवंताला अवलोकन करून ब्रह्मदेव, इंद्र आणि शिव हे ज्यांमध्यें मुख्य आहेत अशा सर्व देवगणादिकांनीं एकदम उठून त्याला नमस्कार केला ॥ २२ ॥ तेव्हां त्याच्या तेजानें निस्तेज झालेले, त्याच्या महिम्यानें भीति उत्पन्न झालेले व प्रेमानें सद्गदितकंठ झालेले अशा त्या देवांनीं, मस्तकीं हात जोडून त्या अधोक्षज भगवंताची

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

स्तुति केली ॥ २३ ॥ ब्रह्मदेव आदिकरून सर्व देवांच्या अंतःकरणवृत्ति जरी त्या परमेश्वराच्या महात्म्याच्या फारच अलिकडे होत्या म्हणजे ईश्वराच्या महात्म्यापर्यंत पोंचल्या नव्हत्या तथापि सर्वांवर अनुग्रह करण्याकरितां प्रकट झालेल्या त्या विष्णूची ते यथामति स्तुति करूं लागले ॥ २४ ॥ त्या वेळीं एकाग्रचित्त व हात जोडलेल्या अशा त्या दक्षप्रजापतीनें पूजा साहित्यानें भरलेलें पात्र घेऊन, जग उत्पन्न करणाऱ्या ब्रह्मादिकांचा श्रेष्ठ गुरु व सुनंदनंदप्रभृति पार्षदगणांनीं परिवेष्टित अशा त्या यज्ञपति भगवंताची पूजा करून, आनंदानें स्तुति करीत करीत तो त्याला शरण गेला ॥ २५ ॥ दक्ष म्हणाला– हे परमेश्वरा, स्वस्वरूपाचेठिकाणीं राहणारा आणि ज्यापासून

न्महिम्ना क्षुभितचित्ताः उपतस्थुस्तुष्टुवुः ॥ २३ ॥ यस्य महिमानं प्रति तु अर्वागेव वृत्तिर्येषां तेऽपि यथामति गृणंति स्मास्तुवन् । कृतः प्रकटीकृतोऽनुग्रहार्थं विग्रहो येन तम् । यद्वा तेषामर्वाग्वृत्तित्वे हेतुः । ते तु यस्य महि महिमा विभूतिमात्ररूपा इत्यर्थः ॥ २४ ॥ तत्र तावद्दक्षस्तुतिप्रकारमाह । दक्ष इति गृहीतमर्हणसादनोत्तमं येन तम् । उत्तमे पात्रे आसाद्यार्हणेषु समर्पितेषु प्रीत्या सार्हणपात्रं स्वयमेव येन गृहीतमित्यर्थः । यद्वा कथं प्रपेदे गृहीतमर्हणसादनोत्तमं यथा भवति तद्गृहीत्वा प्रपेद इत्यर्थः । गृहीत्वेति पाठस्तु सुगमः गृणन्स्तुवन्प्रपेदे शरणं जगाम । दक्ष ऋत्विक् सदस्येशभृगुब्रह्मेंद्रयोषितः ॥ ऋषयश्च तथा सिद्धा यजमानी च लोकपाः ॥ योगिब्रह्माग्निदेवाश्च स्तुवंति जगदीश्वरम् ॥ तथा गंधर्वविद्याधब्राह्मणाश्च पृथङ्मतैः ॥ २५ ॥ ननु साक्षात्परमेश्वर एव रुद्रस्तस्य ब्रह्मपुत्रत्वेन जीवत्वमनुकारमात्रं हंत किमिति त्वया भेददृष्ट्याऽसाववज्ञात इति मां

अप्यर्वाग्वृत्तयो यस्य महि त्वात्मभुवादयः ॥ यथामति गृणंति स्म कृतानुग्रहविग्रहम् ॥ २४ ॥ दक्षो गृहीतार्हणसादनोत्तमं यज्ञेश्वरं विश्वसृजां परं गुरुम् ॥ सुनंदनंदाद्यनुगैर्वृतं मुदा गृणन्प्रपेदे प्रयतः कृतांजलिः ॥ २५ ॥ दक्ष उवाच ॥ शुद्धं स्वधाम्न्युपरताखिलबुद्ध्यवस्थं चिन्मात्रमेकमभयं प्रतिषिध्य मायाम् ॥ तिष्ठंस्तयैव पुरुषत्वमुपेत्य तस्यामास्ते भवानपरिशुद्ध इवात्मतंत्रः ॥ २६ ॥ ऋत्विज ऊचुः ॥ तत्त्वं न ते वयमनंजन रुद्रशापात्कर्मण्यवग्रहधियो भगवन्विदामः ॥ धर्मोपलक्षणमिदं त्रिवृदध्वराख्यं ज्ञातं यदर्थमधिदैवमदो व्यवस्थाः ॥ २७ ॥

भगवानाक्षेप्स्यतीत्याशंक्याप्रच्युतस्वरूपस्य जीवधर्मनाट्यं तवैव संगच्छते नान्यस्येत्याह । शुद्धमिति । स्वधाम्नि स्वस्वरूपे तिष्ठन्भवान् शुद्धं चिन्मात्रं चैतन्यघनः शुद्धत्वे हेतुः । उपरता नित्यनिवृत्ताऽखिला बुद्ध्यवस्था यस्मात् । अतः एकं भेदशून्यं अतएवाभयम् । द्वितीयाद्वै भयं भवतीति श्रुतेः । जीवस्यापि वस्तुत एवंभूतत्वात्तद्वैलक्षण्यार्थमुक्तम् । मायां प्रतिषिध्याभिभूय स्वतंत्र एव संस्तया मायया पुरुषत्वं मनुष्यनाट्यमुपेत्य तस्यां मायायां तिष्ठन्नपरिशुद्ध इव रागादिमानिवास्ते रामकृष्णाद्यवतारे तथा प्रतीयते भवानित्यर्थः । अन्ये त्वविद्योपाधयो मायाऽभिभूताः संसरंति अतस्त्वमेवेश्वरो न रुद्रादय इति भावः । अतएवेमां दृष्टिं भगवान्वारयिष्यति । अहं ब्रह्मा च शर्वश्च जगतः कारणं परमित्यादिना ॥ २६ ॥ ऋत्विजोऽपि स्वस्यापराधं परिहरंतः स्तुवंति । भो अनंजन उपाधिमलशून्य यद्यपि त्वमेव रुद्रादिदेवतारूपस्तथाऽपि नंदीश्वरशापात्

बुद्धीच्या जाग्रदादिक अवस्था सर्वदा निवृत्त झाल्या आहेत असा अद्वितीय शुद्धचैतन्यरूपी तूं, मायेचा तिरस्कार करून स्वतंत्रपणें राहत असतांहि त्याच मायेच्या योगानें मनुष्यनाट्य स्वीकारून तिचेठिकाणीं राहत होत्साता, रामकृष्णादिक अवतारांमध्यें राग, लोभ, क्रोध इत्यादिकांनीं युक्त असल्यासारखा भासत आहेस ॥ २६ ॥ ऋत्विज म्हणाले– हे निरंजन भगवंता, आम्हीं रुद्राचा अंशभूत जो नंदिकेश्वर त्याच्या शापानें कर्मांचेचठिकाणीं आग्रहबुद्धि धारण करीत होत्साते, तुझें खरें स्वरूप जाणत नाहीं, तर ज्या यज्ञाच्या सिद्धीकरितां, अमुक कर्मामध्यें अमुकच देवता, दुसरी नाहीं, अशा प्रकारच्या व्यवस्थेनें तूं राहिला आहेस. तें धर्माला प्रवृत्त करणारें, ऋग्वेद, यजुर्वेद

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आणि सामवेद यांच्यामध्यें प्रतिपादन केलेलें हें यज्ञनामक तुझें स्वरूपच आह्मी जाणलें आहे ॥ २७ ॥ सदस्य ह्मणाले– हे आश्रयदात्या देवा, ज्याच्यामध्यें विश्रांतीचें स्थान मुळींच नाहीं, जेथें अनेक क्लेशरूप बिकट स्थलें आहेत, जेथें मृत्युरूपी उग्र सर्प टपून बसला आहे, ज्यांत विषयरूप मृगजळ, सुखदुःख, लाभअलाभ, जयअपजय-वगैरे द्वंद्वरूपी खाडे, दुष्टपुरुषरूपी पशूंचें भय व शोकरूपी वणवा आहे, अशा या संसारमार्गाचेठिकाणीं असलेला, अहंकारास्पद देह आणि ममतास्पद गृह यांच्या भारानें युक्त आणि कामानें पीडित झालेला हा अज्ञानी जीवांचा समुदाय, तुझ्या चरणरूपी विश्रांतिस्थानाला कधीं बरें पावेल? ॥ २८ ॥ रुद्र ह्मणाला– हे वरप्रदा, या लोकीं

कर्मण्येव दुराग्रहधियः संतस्तव तत्त्वं न विद्मः किंतु धर्मस्यापूर्वस्योपलक्षणभूतं त्रिवृत् त्रयीप्रतिपाद्यमध्वराख्यं तव रूपमस्माभिर्ज्ञातम् । कीदृशम् । यदर्थं यस्य सिद्धये ऽधिदैवं देवताऽधिकारेणादो व्यवस्थाः अमूर्व्यवस्थाः अत्रेयमेवदेवता नान्येत्येवंभूता नियमा इत्यर्थः । यद्वा व्यवस्था इत्याख्यातम् । अडागमाद्यभाव आर्षः । यदर्थमद इदमिंद्राद्यधिदैवं रूपं विशेषेणास्थितवानसीत्यर्थः ॥ २७ ॥ सदस्यास्तु निरीश्वरेऽपि दक्षाध्वरे धनलोभेन स्वप्रवृत्तिमनुचिंत्यानुतप्ता विरक्तिमाशासानाः स्तुवंति । हेशरणद आश्रयप्रद उत्पत्त्यध्वनि संसारमार्गे वर्तमानोऽज्ञानां सार्थः समूहस्ते पादौकस्त्वत्पादरूपं निवासं कदा यास्यति । कथंभूते संसारमार्गे अशरणे विश्रामस्थानशून्ये उरुक्लेशा एव दुर्गमस्थानानि यस्मिन् अंतक एवोग्रो व्यालस्तेनान्विष्टे लक्षीकृते विषयरूपा मृगतृण्मृगतृष्णिका यस्मिन् आत्माहंकारास्पदं शरीरं ममत्वास्पदं गेहं च स एवोरुर्भारो

सदस्या ऊचुः ॥ उत्पत्त्यध्वन्यशरण उरुक्लेशदुर्गेऽतकोग्रव्यालान्विष्टे विषयमृगतृष्यात्मगेहोरुभारः ॥ द्वंद्वश्वभ्रे खलमृगभये शोक-दावेऽज्ञसार्थः पादौकस्ते शरणद कदा याति कामोपसृष्टः ॥ २८ ॥ रुद्र उवाच ॥ तव वरद वरांघ्रावाशिषेहाखिलार्थे ह्यपि मुनि-भिरसक्तैरादरेणार्हणीये ॥ यदि रचितधियं माविद्यलोकोऽपविद्धं जपति न गणये तत्त्वत्परानुग्रहेण ॥ २९ ॥ भृगुरुवाच ॥ यन्मा-यया गहनयाऽपहृतात्मबोधा ब्रह्मादयस्तनुभृतस्तमसि स्वपंतः ॥ नात्मन् श्रितं तव विदंत्यधुनाऽपि तत्त्वं सोऽयं प्रसीदतु भवा-न्प्रणतात्मबंधुः ॥ ३० ॥ ब्रह्मोवाच ॥ नैतत्स्वरूपं भवतोऽसौ पदार्थभेदग्रहैः पुरुषो यावदीक्षेत् ॥ ज्ञानस्य चार्थस्य गुणस्य चाश्रयो मायामयाद्व्यतिरिक्तो यतस्त्वम् ॥ ३१ ॥

यस्य सः । द्वंद्वानि सुखदुःखादीन्येव श्वभ्राणि गर्ता यस्मिन् खला एव मृगा व्याघ्रादयस्तेभ्यो भयं यस्मिन् शोक एव दावाग्निर्यस्मिन् । कामेनोपसृष्टः पीडितः ॥ २८ ॥ श्रीरुद्रस्तु पूर्वं मम निंदा दुःसहाऽऽसीदिदानीं तु तां न गणयामीत्याह । तवेति । आशिषा कामेनासक्तैर्निष्कामै रचितधियमभिनिवेशितचित्तं मा मामविद्यो विद्याहीनो लोको यद्यपविद्धं जपत्याचारभ्रष्टं जल्पति तज्जल्पनमहं न गणये । तत्र हेतुः । तव यः परोऽनुग्रहस्तेन त्वत्पराणां वा योऽनुग्रहस्तेन ॥ २९ ॥ भृगुस्तु स्वभावतस्तत्त्वज्ञा-नहीना जीवा अतोऽज्ञानकृतं मम दुश्चेष्टितं क्षमस्वेत्याह । यन्माययेति । आत्मन्नात्मनि श्रितमनुगतं तव तत्त्वं न विदंति । प्रणतानामात्मा बंधुश्च ॥ ३० ॥ ब्रह्मादयो न

सर्व पुरुषार्थांच्या प्राप्तीचें साधन, व निष्काम मुनींनींहि आदरानें पूजा करण्यास योग्य अशा तुझ्या पूज्य चरणाचेठिकाणीं बुद्धीची स्थापना करणाऱ्या मला अज्ञानी लोक, जरी आचारभ्रष्ट असें ह्मणत आहेत तथापि तुझ्या परम अनुग्रहाच्या योगानें मी त्या बोलण्याची गणनाच करीत नाहीं ॥ २९ ॥ भृगु ह्मणाला– हे देवा, ज्या तुझ्या अगाध मायेनें, ज्यांच्या आत्मज्ञानाचा अपहार केला आहे ते ब्रह्मादिक जीव, अज्ञानरूप अंधकारामध्यें शयन करीत असून स्वस्वरूपीं स्थित असलेल्या तुझ्या खऱ्या स्वरू-पाला अजूनहि जाणत नाहींत, तो शरण आलेल्या भक्तांचा आत्मा व हितकर्ता तूं मजवर प्रसन्न हो ॥ ३० ॥ ब्रह्मदेव ह्मणाला– हे प्रभो, ज्या अर्थीं ज्ञानाला, शब्दादिक

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विषयांना आणि श्रोत्रादिक इंद्रियांना आश्रयभूत असलेला तूं, या मायिक प्रपंचाहून निराळा आहेस. त्या अर्थी हा जीव, निरनिराळे पदार्थ ग्रहण करणाऱ्या इंद्रियांच्या योगानें जितकें ह्मणून अवलोकन करील तितकें सर्व तुझें वास्तविक स्वरूप नव्हे ॥ ३१ ॥ इंद्र ह्मणाला– हे अच्युता, दैत्याचा नाश करणाऱ्या व आयुधें उचलून धारण करणाऱ्या अशा आठ बाहुदंडांनीं युक्त असें हें जगाचें पालन करणारें तुझें स्वरूप मात्र, प्रपंचासारखें मायिक ह्मणतां येत नाहीं; तर हें सत्यच आहे. कारण, हें आमच्या मनाला व दृष्टींना जसा आनंद करणारें आहे तसा प्रपंच नाहीं ॥ ३२ ॥ ऋत्विजांच्या स्त्रिया ह्मणाल्या– हे यज्ञमूर्ते, तुझ्या यजनाकरितां ब्रह्मदेवानें पूर्वी उत्पन्न केलेला हा यज्ञ, आज शंकरानें दक्षाच्या रागानें विध्वस्त करून टाकिला आहे, यास्तव स्मशानभूमीप्रमाणें उत्साहरहित झालेल्या त्या ह्या आमच्या यज्ञाला तूं आपल्या

विदंतीति भृगुणोक्ते तदसहमानो ब्रह्मा तत्त्वज्ञानमाविष्कुर्वन्निवाह । नैतदिति । पदार्थभेदग्राहकैरिंद्रियैः गुणस्येंद्रियस्य यद्वा ज्ञानार्थयोः कारणस्य सत्त्वादेः अतएवासतो मायामयाद्व्यतिरिक्तो भवान् ॥ ३१ ॥ इंद्रस्त्विंद्रियविषयः सर्वोऽपि मिथ्येति ब्रह्मणोक्तमसहमान आह । इदं तव वपुरप्युपपन्नमेव न तु प्रपंचवदनिर्वचनीयतयाऽनुपपन्नम् । सुराणां विद्विषः क्षपयंतीति तथा तैर्भुजदंडैरुपलक्षितम् ॥ ३२ ॥ ऋत्विजां पत्न्यः स्तुवंति । यज्ञोऽयं तव यजनाय त्वां यष्टुं केन ब्रह्मणा पूर्वं सृष्टः । हे यज्ञात्मंस्तं नो यज्ञं नलिनकांत्या दृशा नेत्रेण पुनीहि पवित्रं कुरु । कथंभूतं यज्ञम् । शवाः शेरते यस्मिन्निति शवशयनं श्मशानं तद्वदाभा प्रतीतिर्यस्य स चासौ शांतमेधश्चोपरतोत्सवः मेधश-

इंद्र उवाच ॥ इदमप्यच्युत विश्वभावनं वपुरानंदकरं मनोदृशाम् ॥ सुरविद्विट्क्षपणैरुदायुधैर्भुजदंडैरुपपन्नमष्टभिः ॥ ३२ ॥ पत्न्य ऊचुः ॥ यज्ञोऽयं तव यजनाय केन सृष्टो विध्वस्तः पशुपतिनाऽद्य दक्षकोपात् ॥ तं नस्त्वं शवशयनाभ शांतमेधं यज्ञात्मन्नलिनरुचा दृशा पुनीहि ॥ ३३ ॥ ऋषय ऊचुः ॥ अनन्वितं ते भगवन्विचेष्टितं यदात्मना चरसि हि कर्म नाज्यसे ॥ विभूतये यत उपसेदुरीश्वरीं न मन्यते स्वयमनुवर्ततीं भवान् ॥ ३४ ॥ सिद्धा ऊचुः ॥ अयं त्वत्कथामृष्टपीयूषनद्यां मनोवारणः क्लेशदावाग्निदग्धः ॥ तृषार्तोऽवगाढो न सस्मार दावं न निष्क्रामति ब्रह्मसंपन्नवन्नः ॥ ३५ ॥

ब्देन पशुहिंसाद्युत्सवो लक्ष्यते शवमुदकं तत्र शेते इति तथा पद्मं तन्नाभेति संबोधनं वा ॥ ३३ ॥ ऋषयस्तु कर्माण्यनुतिष्ठंतस्तत्पुण्येन तत्फलेन च युज्यंते भगवति तु तदभावमालक्ष्य विस्मिताः स्तुवंति । अनन्वितमघटमानं यद्यस्मादात्मना स्वयं कर्माचरस्यनुतिष्ठसि नत्वज्यसे लिप्यसे यतश्चान्ये विभूतये संपदे ईश्वरीं लक्ष्मीमुपसेदुर्भेजुः । यद्वा यत इति सार्वविभक्तिकस्तसिः यामित्यर्थः । भवांस्तु स्वयमेवानुवर्तमानां तां न मन्यते नाद्रियते ॥ ३४ ॥ सिद्धास्तु तत्कथासुखमभिनंदंतः स्तुवंति । अयं नो मनोगजस्त्वत्कथैव मृष्टं शुद्धं पीयूषं तन्मयी या नदी तस्यामवगाढः प्रविष्टो दावाग्नितुल्यं संसारतापं न संस्मरति स्म न च ततो निर्गच्छति ब्रह्मसंपन्नवद्ब्रह्मैक्यं प्राप्त इव ॥ ३५ ॥

कमलासारख्या सुंदर दृष्टीनें पवित्र कर ॥ ३३ ॥ ऋषि ह्मणाले– हे भगवन्, तुझें आचरण अगदीं विलक्षण आहे, कारण, तूं स्वतां कर्मे आचरण करितोस परंतु त्यांच्या योगानें लिप्त होत नाहींस. दुसरे लोक, आपल्याला ऐश्वर्य मिळावें ह्मणून जिची उपासना करितात ती लक्ष्मी, स्वतः तुझी निरंतर सेवा करीत असतांहि तूं तिचा मुळींच आदर करीत नाहींस ह्मणजे तिच्याठिकाणीं आसक्त होत नाहींस ॥ ३४ ॥ सिद्ध ह्मणाले– हे देवा, आमचा मनोरूपी हत्ती, क्लेशरूपी वणव्यानें पोळून गेल्यामुळें तृषेनें व्याकुळ होत्साता, सध्या तुझ्या कथारूपी शुद्ध अमृताच्या नदीमध्यें प्रविष्ट होऊन बुडी मारून बसला आहे. तेथें ब्रह्मानंदांत निमग्न असलेल्या पुरुषाप्रमाणें त्याला संसार- ॥ २१ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रूप वणव्याचें स्मरणसुद्धां होत नाहीं आणि त्या नदींतून तो बाहेरही पडत नाहीं ॥ ३५ ॥ यजमानाची पत्नी ह्मणाली– हे ईश्वरा, तूं येथें आलास ही फार चांगली गोष्ट झाली. तूं आह्मांस प्रसन्न हो. तुला नमस्कार करित्यें. हे लक्ष्मीपते, मनोहर अशा लक्ष्मीसहवर्तमान तूं आमचें रक्षण कर. हे यज्ञाधिपते, जसा मस्तक तुटून केवळ धडमात्र अवशेष राहिलेला पुरुष, हस्तपादादिक अवयवांनीं शोभत नाहीं त्याप्रमाणें यज्ञही तुझ्यावांचून, प्रयाज, अनुयाज इत्यादिक नांवांच्या अंगांनीं शोभत नाहीं ॥ ३६ ॥ लोकपाल ह्मणाले– हे सर्वव्यापका ज्याच्या योगानें सर्व दृश्य पदार्थ दिसले जातात असा अंतर्यामी द्रष्टा, जो तूं तो, मिथ्याभूत विषयांना प्रकाशित करणाऱ्या आमच्या इंद्रियांनीं पाहिला गेला आहेस काय? नाहींच. जो तूं, पांच भूतांनीं युक्त असलेल्या साहाव्या जीवासारखा आह्मांस भासतोस हें तुझें खरें स्वरूप नव्हे तर ही तुझी माया होय.

यजमानी दक्षपत्नी स्तौति । ते स्वागतं भद्रमागमनं जातम् । हेअधीश यथा शिरसा हीनः कबंधमात्रः पुरुषोंऽगैः करचरणाद्यवयवैः शोभमानैरपि न शोभते । तथा त्वां विना केवलं प्रयाजाद्यंगैर्मखो न शोभतेऽतो नः श्रिया सह त्रायस्व त्वद्भक्तान्कुर्वित्यर्थः ॥ ३६ ॥ लोकपालास्त्वीश्वरत्वाभिमानारूढा भगवतस्तत्त्वमपश्यंत ऊचुः । दृष्टः किं न दृष्ट इत्यर्थः । कुतः असद्भहैः पुंस्त्वमाविष्टलिंगत्वात् । असत्प्रकाशरूपाभिर्दृग्भिरिंद्रियैः । अयं भावः । शुद्धचित्तानां त्वं शुद्धसत्त्वमूर्तिर्भासि अस्माकं तु बहिर्मुखेंद्रियाणां पंचभूतोपलक्षितो जीवविशेष इवावभासि अतस्त्वमस्मदिंद्रियगोचरो न भवसि धिगस्मज्जीवितमिति ॥ ३७ ॥ योगेश्वरास्तदभेदेन भजतामनुग्रहभाक्त्वं मन्यमानाः स्वामिभृत्य-

यजमान्युवाच ॥ स्वागतं ते प्रसीदेश तुभ्यं नमः श्रीनिवास श्रिया कांतया त्राहि नः ॥ त्वामृतेऽधीश नांगैर्मखः शोभते शीर्षहीनः कबंधो यथा पूरुषः ॥ ३६ ॥ लोकपाला ऊचुः ॥ दृष्टः किं नो दृग्भिरसद्ग्रहैस्त्वं प्रत्यग्द्रष्टा दृश्यते येन दृश्यम् ॥ माया ह्येषा भवदीया हि भूमन्यस्त्वं षष्ठः पंचभिर्भासि भूतैः ॥ ३७ ॥ योगेश्वरा ऊचुः ॥ प्रेयान्न तेऽन्योऽस्त्यमुतस्त्वयि प्रभो विश्वात्मनीक्षेन्न पृथग्य आत्मनः ॥ अथापि भक्त्येश तयोपधावतामनन्यवृत्त्याऽनुगृहाण वत्सल ॥ ३८ ॥ जगदुद्भवस्थितिलयेषु दैवतो बहुभिद्यमानगुणयात्ममायया ॥ रचितात्मभेदमतये स्वसंस्थया विनिवर्तितभ्रमगुणात्मने नमः ॥ ३९ ॥

भावेन भजतामप्यनुग्रहं प्रार्थयमानाः स्तुवंति द्वाभ्याम् । प्रेयानिति । विश्वात्मनि परब्रह्मणि त्वयि य आत्मनः पृथक्त्वं नेक्षेत अमुतोऽमुष्मादन्यस्ते प्रेष्ठो नास्ति । आत्मनो जीवान्पृथक् नेक्षेतेति वा । हेवत्सल भक्तजनप्रिय अनन्यवृत्त्याऽव्यभिचारिण्या भक्त्या भजतोऽनुगृहाणेत्यर्थः ॥ ३८ ॥ अव्यभिचारिणी भक्तिः कथं स्याद्गजनीयानां बहुत्वादित्याशंक्याहुः । जगत उद्भवादिषु निमित्तेषु दैवतो जीवादृष्टाद्बहुधा भिद्यमाना गुणा यस्यास्तया स्वमाययाऽऽत्मनि स्वरूपे रचिता ब्रह्मादिभेदमतिर्येन तस्मै स्वसंस्थया

ह्मणजे शुद्धचित्त पुरुषांना तूं शुद्धसत्वरूपानें भासतोस. आह्मीं तर बहिर्मुख इंद्रियांचे आहों ह्मणून आह्मांला तूं जीवासारखा भासतोस. तर तुला खऱ्या रीतीनें न जाणणाऱ्या आमच्या आयुष्याला धिकार असो ॥ ३७ ॥ योगेश्वर ह्मणाले– हे प्रभो, परब्रह्मरूप अशा तुझेठिकाणीं जो मनुष्य, स्वतांला किंवा सर्व जीवांना वेगळेपणानें मानीत नाहीं ह्मणजे सर्वभूतीं ईश्वर अशी बुद्धि ठेवितो त्याहून दुसरा अधिक प्रिय तुला कोणीच नाहीं, हें खरें आहे; तथापि हे भक्तवत्सला ईश्वरा, एकनिष्ठभक्तीनें तुझी सेवा करणाऱ्या आह्मांवर तूं अनुग्रह कर ॥ ३८ ॥ जगाची उत्पत्ति, स्थिति व नाश होण्यासाठीं जीवांच्या अदृष्टामुळें जिचे गुण बहुत प्रकारें भेद पावतात त्या आपल्या मायेच्या योगानें ज्या तूं, आपल्या स्वरूपाचेठिकाणीं ब्रह्मदेव आदिकरून भिन्नभिन्न रूपें निर्माण केलीं आहेस आणि आपल्या केवळ स्वरूपस्थितीनें आत्म्याचेठिकाणीं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भासणारे गुण व त्यांच्यामुळें दिसणारीं भिन्न भिन्न रूपें हीं सर्व दूर केलीं आहेस त्या तुला नमस्कार असो ॥ ३९ ॥ वेदब्रह्म ह्मणालें– मी व दुसरे ब्रह्मादिकही ज्याच्या स्वरूपाला जाणत नाहींत त्या वस्तुतः निर्गुण असून शुद्धसत्वात्मक मूर्ति धारण करून धर्मादिकांचें फल देणाऱ्या तुज भगवंताला नमस्कार असो ॥ ४० ॥ अग्नि ह्मणाला– ज्याच्या तेजानें मी प्रज्वलित होऊन उत्तम यज्ञामध्यें घृतानें सेवन केलेलें होमद्रव्य देवांकडे नेऊन ज्यावें त्यास पोंचवितों. त्या–'आश्रावय' 'अस्तु श्रौषट्' 'यज' 'ये यजामहे' आणि 'वषट्' ह्या पांच मंत्रांनीं ज्यावें उत्तम पूजन होतें व अग्निहोत्र, दर्शपूर्णमास, चातुर्मास्यें, पशु व सोम ह्या पांच रूपांनीं युक्त अशा यज्ञरूपी तुज

केवलस्वरूपावस्थानेन च विनिवर्तितो भेदभ्रमो गुणाश्च तद्धेतव आत्मनि येन तस्मै ॥ ३९ ॥ शब्दब्रह्म स्तौति । नमस्त इति श्रितं स्वीकृतं सत्त्वं येनातो धर्मादिफलप्रसवित्रे । ननु सत्त्वगुणत्वं चैकस्य कथमित्याशंक्याह । यस्य काष्ठां तत्त्वं नाहं वेद्मि अपरे ब्रह्मादयश्च न विदुस्तस्मै ॥ ४० ॥ अग्निस्तु यज्ञमूर्तिं प्रणमति । यस्य तेजसा सुष्ठु समिद्धं प्रदीप्तं तेजो यस्य सोऽहं प्रशस्तेऽध्वरे हविर्वहामि तं यज्ञियं यज्ञाय हितं पालकम् । यज्ञं यज्ञमूर्तिम् । पंचविधत्वमैतरेयके उक्तम् । स एष यज्ञः पंचविधोऽग्निहोत्रं दर्शपूर्णमासौ चातुर्मास्यानि पशुः सोम इति । पंचभिर्यजुर्भिर्यज्ञमंत्रैः स्विष्टं सुपूजितम् । तथाच श्रुतिः । आश्रावयेति चतुरक्षरमस्तु श्रौषडिति चतुरक्षरं यजेति

ब्रह्मोवाच ॥ नमस्ते श्रितसत्त्वाय धर्मादीनां च सूतये ॥ निर्गुणाय च यत्काष्ठां नाहं वेदापरेऽपि च ॥ ४० ॥ अग्निरुवाच ॥ यत्तेजसाऽहं सुसमिद्धतेजा हव्यं वहे स्वध्वर आज्यसिक्तम् ॥ तं यज्ञियं पंचविधं च पंचभिः स्विष्टं यजुर्भिः प्रणतोऽस्मि यज्ञम् ॥ ४१ ॥ देवा ऊचुः ॥ पुरा कल्पापाये स्वकृतमुदरीकृत्य विकृतं त्वमेवाद्यस्तस्मिन्सलिल उरगेंद्राधिशयने ॥ पुमान् शेषे सिद्धैर्हृदि विमृशिताध्यात्मपदविः स एवाद्याक्ष्णोर्यः पथि चरसि भृत्यानवसि नः ॥ ४२ ॥ गंधर्वा ऊचुः ॥ अंशांशास्ते देवमरीच्यादय एते ब्रह्मेंद्राद्या देवगणा रुद्रपुरोगाः ॥ क्रीडाभांडं विश्वमिदं यस्य विभूमंस्तस्मै नित्यं नाथ नमस्ते करवाम ॥ ४३ ॥

द्व्यक्षरं ये यजामह इति पंचाक्षरं द्व्यक्षरो वषट्कारः । स्मृतिश्च । चतुर्भिश्च चतुर्भिश्च द्वाभ्यां पंचभिरेव च ॥ हूयते च पुनर्द्वाभ्यां स मे विष्णुः प्रसीदत्विति ॥ ४१ ॥ देवास्तु सत्यं वयमपि देवास्तथापि जगदाद्यंतयोस्त्वमेव नान्यः कश्चिदित्याहुः । पुरेति । कल्पापाये प्रलये विकृतं कार्यजातमुदरीकृत्य संहृत्य त्वमेवाद्यः पुमानुरगेंद्र एवाधिकं शयनं शय्या तस्मिन् शेषे शयनं करोषि । सिद्धैर्जनलोकादिवासिभिर्विमृशिता विचिंतिताऽध्यात्मपदवी ज्ञानमार्गो यस्य स एव त्वं य इदानीमक्ष्णोः पथि चरसि प्रत्यक्षोऽसि अवसि रक्षसि ॥ ४२ ॥ गंधर्वाप्सरसस्तु वयं भिया केवलं सर्वानपि परमेश्वरत्वेनोपश्लोकयामस्त्वमेव तु परमेश्वरोऽन्ये तु त्वदंशा एवेत्याहुः । अंशांशा इति ।

यज्ञपालकाला मी नमस्कार करितों ॥ ४१ ॥ देव ह्मणाले– हे देवा, ज्या तूं पूर्वीं गेलेल्या कल्पाच्या शेवटीं आपण उत्पन्न केलेलें हें कार्यात्मक जग आपल्या उदरीं आटोपून ठेऊन त्या प्रलयकालच्या उदकामध्यें शेषरूपी शय्येवर शयन केलें होतेंस व त्या वेळीं जनलोकादिकांचेठिकाणीं राहणाऱ्या सिद्धांनीं ज्याच्या ज्ञानमार्गाचें आपल्या हृदयामध्यें चिंतन केलें होतें तोच पुराणपुरुष तूं आज आमच्या दृष्टिमार्गाचेठिकाणीं प्राप्त झाला आहेस व तोच तूं आह्मां सेवकांचें रक्षण करीत आहेस ॥ ४२ ॥ गंधर्व ह्मणाले– हे जगद्व्यापका, सर्वेश्वरा, देवा, हे मरीचिवगैरे ऋषि व ब्रह्मा, इंद्र इत्यादिक रुद्रप्रभृति देवगण, तुझ्या अंशाचेहि अंशावतार होत. आणि हें सर्व जग ज्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तुझ्या क्रीडेच्या साहित्यांनीं भरलेलें भांडें आहे त्या तुला आह्मी नित्य नमस्कार करितों ॥ ४३ ॥ विद्याधर ह्मणाले– आह्मांला तर असें वाटतें कीं, तुझ्या भजनद्वारा चतुर्विध पुरुषार्थांचें साधन असें हें शरीर प्राप्त झालें असतांहि विषयासक्त असलेला हा लोक, तुझ्या मायेनें मोह पावतो आणि या शरीरादिकांचेठिकाणीं 'हा मी, आणि हें माझें' असा अभिमान धारण करून विनयानें वागणें इत्यादि धर्ममार्ग सोडून देणाऱ्या याच्याच पुत्रादिकांनीं याचा अनेकवेळां धिक्कार केला तरीदेखील तुच्छ विषयांचेठिकाणीं आसक्त होत्साता आपल्या मोहाच्या मुळींच त्याग करीत नाहीं. परंतु हे देवा, तुझें कथामृत सेवन करणारा पुरुष मात्र आपल्या मोहाचा सर्वथा त्याग करितो ॥ ४४ ॥ ब्राह्मण ह्मणाले– हे भगवन्, तूंच यज्ञ, तूंच होमद्रव्यें, तूंच अग्नि, तूंच स्वतः मंत्र, समिधा, दर्भ व यज्ञपात्रें आहेस. तसाच सदस्य, ऋत्विज यजमानी, यजमान, देवता,

---

हेविभूमन्महत्तम क्रीडाभांडं क्रीडोपकरणं विश्वं ब्रह्मांडं यस्य तस्मै ते नमनं कुर्मः ॥ ४३ ॥ विद्याधरास्तु केवलं विद्याभिः संपदः प्राप्यंते अहंकारादिव्यामोहनिवृत्तिस्तु त्वत्कथाश्रवणं विना नास्तीत्याहुः । अर्थं पुरुषार्थसाधनं कलेवरमभिपद्य प्राप्य त्वन्माययाऽस्मिन्ममेत्यहमिति चाभिमानं कृत्वेममात्ममोहं युष्मत्कथामृतनिषेवक उदुच्चैर्व्युदस्येत्परित्यजेन्नान्यः । ननु स्वैः पुत्रादिभिरधिक्षिप्तो दुःखितः सन्परित्यजेदेव नेत्याहुः । क्षिप्तोऽपि दुर्मतिः असत्सु विषयेष्वेव लालसा तृष्णा यस्य सः ॥ ४४ ॥ ब्राह्मणाः

विद्याधरा ऊचुः ॥ त्वन्माययाऽर्थमभिपद्य कलेवरेऽस्मिन्कृत्वा ममाहमिति दुर्मतिरुत्पथैः स्वैः ॥ क्षिप्तोऽप्यसद्विषयलालस आत्ममोहं युष्मत्कथाऽमृतनिषेवक उद्व्युदस्येत् ॥ ४४ ॥ ब्राह्मणा ऊचुः ॥ त्वं क्रतुस्त्वं हविस्त्वं हुताशः स्वयं त्वं हि मंत्रः समिद्दर्भपात्राणि च ॥ त्वं सदस्यर्त्विजो दंपती देवता अग्निहोत्रं स्वधा सोम आज्यं पशुः ॥ ४५ ॥ त्वं पुरा गां रसाया महासूकरो दंष्ट्रया पद्मिनीं वारणेंद्रो यथा ॥ स्तूयमानो नदँल्लीलया योगिभिर्व्युज्जहर्थ त्रयीगात्रयज्ञक्रतुः ॥ ४६ ॥ स प्रसीद त्वमस्माकमाकांक्षतां दर्शनं ते परिभ्रष्टसत्कर्मणाम् ॥ कीर्त्यमाने नृभिर्नाम्नि यज्ञेश ते यज्ञविघ्नाः क्षयं यांति तस्मै नमः ॥ ४७ ॥ मैत्रेय उवाच ॥ इति दक्षः कविर्यज्ञं भद्र रुद्रावमर्शितम् ॥ कीर्त्यमाने हृषीकेशे संनिन्ये यज्ञभावने ॥ ४८ ॥

स्तुवंति । त्वमिति त्रिभिः । सदस्याश्च ऋत्विजश्च ॥ ४५ ॥ गां पृथ्वीं रसाया रसातलाद्दंष्ट्रया व्युज्जहर्थ विशेषेणोद्धृतवानसि योगिभिः स्तूयमानः हेत्रयीगात्र वेदमूर्ते यज्ञो यागः सयूपस्तद्विशेषः क्रतुस्तद्रूपी यज्ञसंकल्परूप इति वा यज्ञः क्रतुः कर्म यस्येति वा ॥ ४६ ॥ स त्वमस्माकं त्वद्दर्शनमाकांक्षतां प्रसीद अस्मद्यज्ञमप्युद्धरेत्यर्थः । नचाशक्यं तवैतत् । यतस्तव नाम्नि कीर्त्यमान एव यज्ञविघ्नाः क्षयं यांति एवं प्रभावो यस्तस्मै नमः ॥ ४७ ॥ इत्यनेन प्रकारेण सर्वैः कीर्त्यमाने हेभद्र विदुर संनिन्ये

अग्निहोत्र, स्वधा, सोमरस, तूप व पशु हीं सर्व तूंच आहेस ॥ ४५ ॥ हे वेदत्रयमूर्ते, तूं पूर्वीं यज्ञक्रतुरूपी[१] वराहावतार धारण करून योगिजन तुझी स्तुति करीत असतां, ज्याप्रमाणें गजेंद्र कमळिणीला शुंडेनें धरून वर उचलितो त्याप्रमाणें गर्जना करीत करीत तूं आपल्या दंष्ट्रेच्या योगानें रसातळापासून पृथ्वीला सहज वर काढिलीस ॥ ४६ ॥ हे यज्ञसंरक्षका, आमचें सत्कर्म नष्ट झाल्यामुळें आह्मी तुझ्या दर्शनाची इच्छा धरून राहिलों आहों, याकरितां तूं आमच्यावर प्रसन्न हो; आणि या यज्ञाचा उद्धार कर. हें तुला अशक्य नाहीं. कारण, मनुष्यांनीं ज्या तुझ्या नांवाचा केवळ उच्चार केला असतांहि यज्ञांतील सर्व विघ्नें नाश पावतात अशा तुला आह्मीं नमस्कार करितों ॥ ४७ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे मंगलरूपा विदुरा, याप्रमाणें सर्वांनीं त्या यज्ञसंरक्षक इंद्रियनियंत्या भगवंताची स्तुति केली असतां, ज्ञानसंपन्न अशा दक्षानें, वीरभद्रानें दूषित

---

१ ज्यामध्यें पशुबंधनाचा स्तंभ असतो त्या कर्माला 'यज्ञ' असें ह्मणतात व त्यांतीलच एका भेदास क्रतु असें ह्मणतात.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

केल्यामुळें अपूर्ण राहिलेलें तें यज्ञकर्म पूर्ण करण्यास आरंभ केला ॥ ४८ ॥ हे निष्पापा विदुरा, त्या वेळीं भगवान् सर्वांतर्यामी असल्यामुळें सर्व देवभागांचा भोक्ता व निजानंदानें तृप्त असतांहि आपल्या त्रिकपाल पुरोडाशात्मक भागानें संतुष्ट झाल्यासारखें दाखवीत होत्साता, दक्षाला हाक मारून ह्मणाला कीं—॥ ४९ ॥ श्रीभगवान् ह्मणाला—हे दक्षा, जगताचें परमकारण, सर्वांचा आत्मा, महासमर्थ, सर्वसाक्षी, स्वयंप्रकाश व उपाधिरहित जो मी त्या माझींच ब्रह्मदेव आणि शंकर हीं रूपें आहेत ॥ ५० ॥ हे ब्राह्मणा दक्षा, तोच मी आपल्या त्रिगुणात्मक मायेचा आश्रय करून जगाची उत्पत्ति, पालन व संहार करीत होत्साता, त्या त्या कर्माला योग्य अशीं निरनिराळीं रूपें घेऊन ब्रह्मा, विष्णु आणि शंकर अशीं नांवें धारण करितों ॥ ५१ ॥ त्या सर्वांतर्यामी केवळ अद्वितीय ब्रह्मरूप माझेठिकाणीं, ब्रह्मदेव, शंकर आणि सर्वप्राणिमात्र यांस भेदबुद्धीनें जो पाहतो तो पुरुष अज्ञ होय

प्रवर्तयामास ॥ ४८ ॥ सर्वात्मतया सर्वभागभोक्ताऽपि भगवान्निजानंदतृप्तोऽपि स्वेन भागेन त्रिकपालपुरोडाशेन प्रीयमाण इव दक्षमाभाष्य संबोध्य बभाषे ॥ ४९ ॥ योऽहं जगतः कारणं आत्मा चेश्वरश्च उपद्रष्टा साक्षी च स्वयंप्रकाशश्च निरुपाधिश्च स एव ब्रह्मा शर्वश्चेत्यन्वयः ॥ ५० ॥ कुत इत्यत आह । अहमेवात्ममायामधिष्ठाय जगत्सृष्ट्यादि कुर्वन्स च स च सन्सर्वशक्तिः क्रियोचितां संज्ञां धारयामि ॥ ५१ ॥ तस्मिन्केवलेऽद्वितीये समानासमानजातीयभेदरहिते ब्रह्मणि मयि ब्रह्मरुद्रौ भूतानि च भेदेनाज्ञः

भगवान् स्वेन भागेन सर्वात्मा सर्वभागभुक् ॥ दक्षं बभाष आभाष्य प्रीयमाण इवानघ ॥ ४९ ॥ श्रीभगवानुवाच ॥ अहं ब्रह्मा च शर्वश्च जगतः कारणं परम् ॥ आत्मेश्वर उपद्रष्टा स्वयंदृगविशेषणः ॥ ५० ॥ आत्ममायां समाविश्य सोऽहं गुणमयीं द्विज ॥ सृजन् रक्षन् हरन् विश्वं दध्रे संज्ञां क्रियोचिताम् ॥ ५१ ॥ तस्मिन् ब्रह्मण्यद्वितीये केवले परमात्मनि ॥ ब्रह्मरुद्रौ च भूतानि भेदेनाज्ञोऽनुपश्यति ॥ ५२ ॥ यथा पुमान्न स्वांगेषु शिरःपाण्यादिषु क्वचित् ॥ पारक्यबुद्धिं कुरुते एवं भूतेषु मत्परः ॥ ५३ ॥ त्रयाणामेकभावानां यो न पश्यति वै भिदाम् ॥ सर्वभूतात्मनां ब्रह्मन् स शांतिमधिगच्छति ॥ ५४ ॥ मैत्रेय उवाच ॥ एवं भगवतादिष्टः प्रजापतिपतिर्हरिम् ॥ अर्चित्वा क्रतुना स्वेन देवानुभयतोऽयजत् ॥ ५५ ॥ रुद्रं च स्वेन भागेन ह्युपाधावत्समाहितः ॥ कर्मणोदवसानेन सोमपानितरानपि ॥ उदवस्य सहर्त्विग्भिः सस्नाववभृथं ततः ॥ ५६ ॥

पश्यतीत्यर्थः ॥ ५२ ॥ विद्वांस्तु भेदं न पश्यतीति सदृष्टांतमाह । यथेति ॥ ५३ ॥ तस्मादेवमैक्यं पश्यन्कृतार्थो भवतीत्याह । त्रयाणामेको भावः स्वरूपं येषाम् ॥ ५४ ॥ स्वेन क्रतुना त्रिकपालेष्ट्या उभयतोंऽगैः प्रधानेन च ॥ ५५ ॥ स्वेन भागेन यज्ञावशिष्टेन उदवस्यते समाप्यतेऽनेनेत्युदवसानं तेन कर्मणा सोमपानितरानप्युपाधावदित्यनु-

---

॥ ५२ ॥ जसा कोणीहि मनुष्य, आपल्या मस्तक हात इत्यादिक अवयवांचेठिकाणीं परकीयबुद्धि कधींहि धारण करीत नाहीं त्याप्रमाणें माझेठिकाणीं तत्पर असलेला विद्वान् पुरुष, सर्व प्राणिमात्रांचेठिकाणीं परकीयभाव धारण करीत नाहीं ॥ ५३ ॥ तस्मात् हे ब्राह्मणा, वस्तुतः एकस्वरूप असलेले व सर्व भूतात्मे जे ब्रह्मविष्णुमहेश्वर ह्या तिघांमध्यें जो भेद पहात नाहीं ह्मणजे तिन्ही एकरूपच आहेत असें समजतो तो शांति (मोक्ष) पावतो ॥ ५४ ॥ मैत्रेय ह्मणाला—हे विदुरा, याप्रमाणें भगवंतानें उपदेश केला असतां प्रजापतींचा अधिपति तो दक्ष, त्रिकपाल पुरोडाशाच्या भागानें विष्णूचें पूजन करून अंग आणि प्रधान या दोन्हीं प्रकारांनीं त्यानें सर्व देवांचें पूजन केलें ॥ ५५ ॥ नंतर शुद्धांतःकरणपूर्वक त्या दक्षानें, यज्ञावशिष्ट भागानें श्रीरुद्राला संतुष्ट करून व यज्ञांतील शेवटच्या उदवसाननामक कर्माच्या योगानें इतरहि सोमपान कर-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

णाऱ्या देवांचें पूजन करून, ऋत्विजांसहवर्तमान अवभृथ स्नान केलें ॥ ५६ ॥ नंतर स्वतांच्या सामर्थ्यानेंच ज्याला सिद्धि प्राप्त झाली आहे अशाहि त्या दक्षाला देवांनीं 'तुझी बुद्धि धर्माच्या ठिकाणीं स्थिर असो' असा आशीर्वाद देऊन स्वर्गाचेठिकाणीं गमन केलें ॥ ५७ ॥ याप्रमाणें दक्षाची कन्या जी सती तिनें, आपलें पूर्व शरीर टाकून ती हिमालयपर्वताच्या मेनकानामक पत्नीच्या उदरीं जन्मास आली, असें आमच्या ऐकण्यांत आहे ॥ ५८ ॥ ज्याप्रमाणें प्रलयकालीं निद्रिस्त झालेली जगत्कर्त्री शक्ति, नूतनसृष्टीच्या आरंभीं ईश्वराजवळ पुनः प्राप्त होत्ये त्याप्रमाणें ती अंबिका देवी, (पूर्वजन्मींची सती) अनन्यभावानें शरण जाणाऱ्या लोकांना प्राप्त होणाऱ्या त्याच आपल्या प्रियपति शंकराला पुनः वरून राहिली आहे ॥ ५९ ॥ हे विदुरा, दक्षयज्ञाचा विध्वंस करणाऱ्या भगवान् शंकराचें हें चरित्र, मी बृहस्पतीचा शिष्य जो महाभगवद्भक्त उद्धव त्यापासून पूर्वीं श्रवण केलें आहे ॥ ६० ॥ हे विदुरा, जो मनुष्य, हें अत्यंत पवित्र, यशाची वृद्धि करणारें, आयुष्याची वृद्धि करणारें, पापसमुदायाचा नाश

षंगः । ततश्चोदवस्य कर्म समाप्यावभृथरूपं यथा भवति तथा स्नातवान् ॥ ५६ ॥ स्वेनैवानुभावेनाप्तराधसे प्राप्तसिद्धये तस्मा अपि ॥ ५७ ॥ ५८ ॥ आवृंक्ते भजते स्म । अनन्यभावानामेकैव गतिर्यस्तम् । प्रलयकाले सुप्ता शक्तिरीश्वरमिव ॥ ५९ ॥ बृहस्पतेः शिष्यान्मया श्रुतम् ॥ ६० ॥ परं पवित्रं य आकर्ण्य तथाऽनुकीर्तयेत्स आत्मनः

तस्मा अप्यनुभावेन स्वेनैवावाप्तराधसे ॥ धर्म एव मतिं दत्वा त्रिदशास्ते दिवं ययुः ॥ ५७ ॥ एवं दाक्षायणी हित्वा सती पूर्वक-
लेवरम् ॥ जज्ञे हिमवतः क्षेत्रे मेनायामिति शुश्रुम ॥ ५८ ॥ तमेव दयितं भूय आवृंक्ते पतिमंबिका ॥ अनन्यभावैकगतिं शक्तिः
सुप्तेव पूरुषम् ॥ ५९ ॥ एतद्भगवतः शंभोः कर्म दक्षाध्वरद्रुहः ॥ श्रुतं भागवताच्छिष्यादुद्धवान्मे बृहस्पतेः ॥ ६० ॥ इदं पवित्रं
परमीशचेष्टितं यशस्यमायुष्यमघौघमर्षणम् ॥ यो नित्यदाकर्ण्य नरोऽनुकीर्तयेद्धुनोत्यघं कौरव भक्तिभावतः ॥ ६१ ॥ इति श्रीम-
द्भागवते महापुराणे चतुर्थस्कंधे दक्षयज्ञसंधानं नाम सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥ ॥ मैत्रेय उवाच ॥ सनकाद्या नारदश्च ऋभुर्हंसोऽरुणि-
र्यतिः ॥ नैते गृहान् ब्रह्मसुता ह्यावसन्नूर्ध्वरेतसः ॥ १ ॥

परस्याप्यघं संसारव्यसनं सर्वदा धुनोति ॥ ६१ ॥ इति चतुर्थे टीकायां सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥ ॥ दक्षकन्यान्वये प्राप्ता दक्षयज्ञकथोदिता ॥ मनुपुत्रान्वये प्राप्ता ध्रुवचर्याऽथ पंचभिः ॥ १ ॥ अष्टमे गुरुदारोक्तिरोषमत्सरतः पुरात् ॥ निर्गतेन ध्रुवेणाह तपसा तोषणं हरेः ॥ २ ॥ एवं तावन्मनुकन्याऽन्वयोक्त्यैव मरीच्यादीनां ब्रह्मपुत्राणां वंशा

करणारें ईश्वराचें चरित्र, नित्य भक्तिभावानें श्रवण किंवा वर्णन करितो तो स्वतांच्या व दुसऱ्याच्याहि संसारदुःखाचें निरसन करितो ॥ ६१ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील चतुर्थस्कंधामध्यें दक्षयज्ञसंधाननामक हा सातवा अध्याय समाप्त झाला ॥ ७ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ ७ ॥ ॥ पूर्वोक्त दक्षकन्येच्या वंशांत प्रसंगानें प्राप्त झालेली दक्षाच्या यज्ञाची कथा सातव्या अध्यायांत कथन करून, आतां आठव्या अध्यायापासून पांच अध्यायांनीं मनुपुत्र उत्तानपाद राजाच्या वंशांत प्राप्त झालेल्या ध्रुवाच्या चरित्राचें वर्णन करितात ॥ १ ॥ त्यांत या आठव्या अध्यायामध्यें सापत्नमातेच्या वाक्यांनीं क्रुद्ध होऊन नगराबाहेर गेलेल्या ध्रुवानें, तपश्चर्येच्या योगानें श्रीहरीला प्रसन्न करून घेतलें अशी कथा सांगितली आहे ॥ २ ॥ मैत्रेय ह्मणाला— हे विदुरा, सनक, सनंदन, सनातन व सनत्कुमार व तसेच नारद, ऋभु, हंस. अरुणि आणि यति ह्या नैष्ठिक ब्रह्मचर्यव्रत धारण करणाऱ्या ब्रह्मपुत्रांनीं गृहस्थाश्रमाचा स्वीकार केला नाहीं. ह्मणून त्यांचा वंश झाला नाहीं ॥ १ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हे शत्रुनाशका, विदुरा अधर्म ह्या नांवाचा एक ब्रह्मदेवाचा पुत्र होता त्याची पत्नी मृषा (असत्य) तिला दंभ (दुसऱ्यास फसविणें) आणि माया (कपटी वागणूक) अशीं दोन मुलें झालीं. तीं अधर्माचीं मुलें ह्मणून त्यांनीं धर्ममार्ग सोडून परस्परांशींच स्त्रीपुरुषसंबंध केला. अधर्माच्या पुढील वंशांतही असेच बहीणभावंडांचे धर्मविरुद्ध विवाह झाले आहेत. इकडे निर्ऋतीला संतति नव्हती ह्मणून त्यानें तें जोडपेंच दत्तक घेतलें ॥ २ ॥ हे महामते विदुरा, त्यांना (दंभाला आणि मायेला) लोभ आणि निकृति (फसवणूक) हें जोडपें झालें. त्यांना क्रोध आणि हिंसा हीं मुलें झालीं. त्या दोघांनाहि कलि (कलह) आणि त्याची बहीण दुरुक्ति (अपशब्द) हीं मुलें झालीं ॥ ३ ॥ हे साधुश्रेष्ठा, कलीनें त्या दुरुक्तीच्या ठिकाणीं भयनांवाचा पुत्र आणि मृत्युनांवाची कन्या हें उग्र उत्पन्न केलें. त्यांना पुढें यातना आणि नरक हें जोडपें उत्पन्न झालें ॥ ४ ॥ हे पवित्रा विदुरा, मी तुला हा अधर्माचा वंश संक्षिप्तपणें सांगितला आहे. मनुष्यानें हें पुण्यकारक आख्यान तीनवेळां ऐकिलें असतां, तो आपल्या मनाचा मळ (पापवासना) नाहींसा

वर्णितास्तत्रावशिष्टं किंचिदाह । सनकाद्या इति । नावसन्नाश्रिताः उर्ध्वरेतसो नैष्ठिकाः अतस्तेषां वंशो नास्ति ॥ १ ॥ अधर्मोऽपि ब्रह्मपुत्रस्तस्य वंशमाह । मृषेति चतुर्भिः । दंभः परप्रतारणं माया तदुचिता चेष्टा तयोः सोदरयोरपि दांपत्यमधर्मांशतया एवमुपर्यपि । अप्रजोऽपुत्रः ॥ २ ॥ निकृतिः शठता यत् याभ्यां कलिश्च तस्य स्वसा दुरुक्तिः

मृषाऽधर्मस्य भार्यासीद्दंभं मायां च शत्रुहन् ॥ असूत मिथुनं तत्तु निर्ऋतिर्जगृहेऽप्रजः ॥ २ ॥ तयोः समभवल्लोभो निकृतिश्च महामते ॥ ताभ्यां क्रोधश्च हिंसा च यद्दुरुक्तिः स्वसा कलिः ॥ ३ ॥ दुरुक्तौ कलिराधत्त भयं मृत्युं च सत्तम ॥ तयोश्च मिथुनं जज्ञे यातना निरयस्तथा ॥ ४ ॥ संग्रहेण मयाख्यातः प्रतिसर्गस्तवानघ ॥ त्रिः श्रुत्वैतत्पुमान्पुण्यं विधुनोत्यात्मनो मलम् ॥ ५ ॥ अथातः कीर्तये वंशं पुण्यकीर्तेः कुरूद्वह ॥ स्वायंभुवस्यापि मनोर्हरेरंशांशजन्मनः ॥ ६ ॥ प्रियव्रतोत्तानपादौ शतरूपापतेः सुतौ ॥ वासुदेवस्य कलया रक्षायां जगतः स्थितौ ॥ ७ ॥ जाये उत्तानपादस्य सुनीतिः सुरुचिस्तयोः ॥ सुरुचिः प्रेयसी पत्युर्नेतरा यत्सुतो ध्रुवः ॥ ८ ॥ एकदा सुरुचेः पुत्रमंकमारोप्य लालयन् ॥ उत्तमं नारुरुक्षंतं ध्रुवं राजाऽभ्यनंदत ॥ ९ ॥ तथा चिकीर्षमाणं तं सपत्न्यास्तनयं ध्रुवम् ॥ सुरुचिः शृण्वतो राज्ञः सेर्ष्यमाहातिगर्विता ॥ १० ॥

श्चेत्यर्थः ॥ ३ ॥ यातना तीव्रवेदना ॥ ४ ॥ प्रतिसर्गोऽनुसर्ग इव यद्वा प्रतिसर्गः प्रलयः । अधर्मस्य प्रलयहेतुत्वात्प्रतिसर्गत्वम् । एतदंतमधर्मवंशम् । पुण्यमिति वर्जनद्वारा पुण्यहेतुत्वात् ॥ ५ ॥ मनोः पुत्रवंशम् । हरेरंशो ब्रह्मा तस्यांशाद्देहार्धाज्जन्म यस्य ॥ ६ ॥ जगतो रक्षायां स्थितौ ॥ ७ ॥ सुनीतिः सुरुचिश्च जाये तयोर्मध्ये इतरा सुनीतिः ॥ ८ ॥ तयोः प्रियाप्रियत्वे प्रपंचयन्ध्रुवचरित्रमाह पंचभिरध्यायैः । सुरुचेः पुत्रमुत्तमसंज्ञं लालयन् ॥ ९ ॥ तथा अंकारोहणं चिकीर्षमाणम् ॥ १० ॥

करून टाकितो ॥ ५ ॥ हे कुरुकुलभूषणा, आतां पुढें श्रीहरीचा अंशभूत जो ब्रह्मदेव त्याच्या देहार्धापासून झालेल्या पवित्रकीर्ति स्वायंभुव मनूचाहि वंश मी तुला सांगतों ॥ ६ ॥ स्वायंभुवमनूला शतरूपानामक स्त्रीच्या उदरीं प्रियव्रत आणि उत्तानपाद या नांवांचे दोन पुत्र झाले, ते वासुदेवाच्या अंशानें झालेले असल्यामुळें जगाच्या रक्षणाविषयीं तत्पर असत ॥ ७ ॥ त्यांपैकीं उत्तानपादराजाला सुरुचि आणि सुनीति अशा दोन स्त्रिया होत्या. त्यांमध्यें सुरुचि ही राजाला जशी फार आवडती होती तशी जिचा पुत्र ध्रुव ती सुनीति आवडती नव्हती ॥ ८ ॥ एकेवेळीं, राजा सुरुचीच्या उत्तमनामक पुत्राला मांडीवर घेऊन खेळवीत असतां, ध्रुवाच्या मनांत पित्याच्या अंकावर बसावें असें आलें व तो बसूं लागला तेव्हां (सुरुचीच्या भीतीनें) राजानें त्याला बसण्याविषयीं अनुमोदन दिलें नाहीं ॥ ९ ॥ तेव्हां राजाच्या प्रीतीमुळें अत्यंत गर्विष्ठ

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अशी ती सुरुचि राजाच्या मांडीवर बसण्याची इच्छा करणाऱ्या सवतीच्या ध्रुवपुत्रास ईर्ष्येनें असें ह्मणाली कीं,- ॥ १० ॥ हे वत्सा, तूं राजपुत्र आहेस खरा तथापि तुला मी उदरीं
धारण केलें नाहीं, ह्मणून तूं राजाच्या आसनावर बसण्यास योग्य नाहींस ॥ ११ ॥ अरे ज्या तुला दुर्लभ वस्तूच्या प्राप्तीविषयीं इच्छा झाली आहे तो तूं खरोखर अज्ञान बाळ
आहेस, ह्मणून 'आपण अन्यस्त्रीच्या गर्भामध्यें वाढलों आहें' ही गोष्ट अजून तुझ्या ध्यानांत आली नाहीं ॥ १२ ॥ आतां तुला जर राजाच्या आसनाची इच्छा असेल तर तूं तपाच्या
योगानें ईश्वराचें आराधन करून त्याच्याच अनुग्रहानें आपणाला माझ्या उदरीं जन्म प्राप्त होण्याचा यत्न कर ॥ १३ ॥ मैत्रेय ह्मणाला– हेविदुरा, याप्रमाणें सापत्नमातेच्या
अत्यंत कठोर वाग्बाणांनीं हृदयाचेठिकाणीं विद्ध झालेला तो ध्रुव, दंडानें ताडण केलेल्या सर्पाप्रमाणें क्रोधानें फुस्कारे टाकीत टाकीत, प्रत्यक्ष पहात असणाऱ्या परंतु सापत्न-
मातेच्या प्रेमानें ज्याची वाचा कुंठित झाली आहे अशा आपल्या पित्याचा त्याग करून, रोदन करीत करीत आपल्या मातेच्या जवळ निघून गेला ॥ १४ ॥ तेव्हां त्या सुनीतीनें

गर्वोक्तिमेवाह त्रिभिः । नेति । नृपतेर्धिष्ण्यमासनं नृपात्मजोऽपि भवान्नारोढुमर्हति ॥११॥ १२॥ पुरुषमीश्वरम् ॥ १३ ॥ मिषंतं पश्यंतम् । सन्नवाचं कुंठितवाचम् ॥१४॥ उदुह्यारोप्य ।
अंतःपुरजनमुखाच्छ्रुत्वा ॥ १५ ॥ शोक एव दावाग्निस्तेन दावाग्निगता लतेव स्थिता सा बाला विलापं चकार ॥ १६ ॥ वृजिनस्य दुःखस्य अमंगलमपराधं परेषु मामंस्थाः ।

न वत्स नृपतेर्धिष्ण्यं भवानारोढुमर्हति ॥ न गृहीतो मया यत्त्वं कुक्षावपि नृपात्मजः ॥ ११ ॥ बालोऽसि बत नात्मानमन्यस्त्री-
गर्भसंभृतम् ॥ नूनं वेद भवान्यस्य दुर्लभेऽर्थे मनोरथः ॥ १२ ॥ तपसाराध्य पुरुषं तस्यैवानुग्रहेण मे ॥ गर्भे त्वं साधयात्मानं
यदीच्छसि नृपासनम् ॥ १३ ॥ मैत्रेय उवाच ॥ मातुः सपत्न्याः सुदुरुक्तिविद्धः श्वसन्रुषा दंडहतो यथाऽहिः ॥ हित्वा मिषंतं पितरं
सन्नवाचं जगाम मातुः प्ररुदन्सकाशम् ॥ १४ ॥ तं निश्वसंतं स्फुरिताधरोष्ठं सुनीतिरुत्संग उदुह्य बालम् ॥ निशम्य तत्पौरमुखा-
न्नितांतं सा विव्यथे यद्गदितं सपत्न्याः ॥ १५ ॥ सोत्सृज्य धैर्यं विललाप शोकदावाग्निना दावलतेव बाला ॥ वाक्यं सपत्न्याः
स्मरती सरोजश्रिया दृशा बाष्पकलामुवाह ॥ १६ ॥ दीर्घं श्वसंती वृजिनस्य पारमपश्यती बालकमाह बाला ॥ माऽमंगलं तात
परेष्वमंस्था भुंक्ते जनो यत्परदुःखदस्तत् ॥ १७ ॥ सत्यं सुरुच्याभिहितं भवान्मे यद्दुर्भगाया उदरे गृहीतः ॥ स्तन्येन वृद्धश्च
विलज्जते यां भार्येति वा वोढुमिडस्पतिर्माम् ॥ १८ ॥

यद्यतः परेभ्यो दुःखं ददाति यः स स्वदत्तमेव दुःखं भुंक्ते ॥ १७ ॥ दुर्भगया मया उदरे गृहीतस्तस्या एव स्तन्येन वृद्धश्च दुर्भगत्वमेवाह । यां मामिडस्पतिर्भूपतिर्भार्येति

ज्याचे अधरोष्ठ स्फुरण पावत आहेत व जो लांब लांब उसासे टाकीत आहे अशा त्या ध्रुव बालकाला मांडीवर घेऊन, नागरिक जनांच्या मुखांतून जें सवतीनें भाषण केलें होतें
त्याचें श्रवण केलें, तेव्हां ती अत्यंत दुःखित झाली ॥ १५ ॥ आणि आपल्या सवतीच्या भाषणाचें स्मरण करीत होतसाती ती सुनीति, अरण्यामध्यें वणव्यांत सांपडलेली वेल
जशी होरपळून जाते त्याप्रमाणें शोकरूपी दावाग्नीनें अंतःकरणामध्यें करपून जाऊन, आपल्या कमळासारख्या सुंदर दृष्टीनें दुःखाश्रु ढाळूं लागली आणि एकाएकीं धैर्य
सोडून दुःखोद्गारपूर्वक रोदन करूं लागली ॥ १६ ॥ तेव्हां दुःखाचा अंत केव्हां होईल हें न पाहणारी व दीर्घ श्वासोच्छ्वास टाकणारी ती सुनीति, ध्रुवबालकास ह्मणाली
कीं,– बा वत्सा, दुसऱ्यांनीं वक्र भाषण केलें हा त्यांनीं आपला अपराध केला असें तूं मनांत आणूं नकोस. कारण, जो मनुष्य दुसऱ्याला दुःख देतो त्याला तें दुःख स्वतः-
लाच भोगावें लागतें ॥ १७ ॥ बाळा, सुरुचीनें जें भाषण केलें तें अगदीं खरें आहे. कारण, ज्या मला तुसतें 'भार्या' अथवा 'दासी' असें ह्मणून वागविण्याचीदेखील

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

महाराजांना लज्जा वाटत्ये, त्या मी हतभागिणीनें तुला आपल्या उदरीं धारण केला असून तूं माझ्याच स्तनपानानें वाढला आहेस ॥ १८ ॥ यास्तव बा वत्सा, 'माझ्या उत्तम नामक पुत्राप्रमाणें तुला राजासनावर बसण्याची जर इच्छा असेल तर अधोक्षजाच्या चरणकमलाचें निष्कपटपणें आराधन कर असें' जें तुला सापत्नमातेनें सांगितलें आहे त्याप्रमाणेंच तूं तिच्यावर मत्सरबुद्धि न ठेवितां तें श्रीहरीचें आराधन कर ॥ १९ ॥ हे बालका, जगाच्या पालनाकरितां ज्यानें सत्त्वगुणात्मक स्वरूप स्वीकारिलें आहे त्या भगवंताच्या चरणकमलाची सेवा करून ब्रह्मदेवालाही, 'ज्यांनीं आपलें मन आणि प्राण स्वाधीन करून घेतले आहेत त्या योगिजनांनींहि वंद्य असें' सर्वोत्कृष्ट स्थान प्राप्त झालें आहे ॥ २० ॥ त्याप्रमाणेंच तुझा आजा जो भगवान् स्वायंभुव मनु त्यानें, ईश्वर सर्वांतर्यामी आहे, अशा बुद्धीनें बहुदक्षिणायुक्त यज्ञांच्या योगें-करून ज्या भगवंताचें आराधन करून, इतर साधनांनीं दुर्मिळ असें या भूलोकचें व स्वर्गलोकचें सुख प्राप्त करून घेऊन, मरण पावल्यावर मोक्षसुखही संपादन केलें ॥ २१ ॥

वोढुं स्वीकर्तुं विलज्जते वाशब्दाद्दासीत्यपि ॥ १८ ॥ पितृभार्यात्वेन मात्रा समा मातुः सपत्नी तयापि यदुक्तं तपसाराध्य पुरुषमित्यादि तदातिष्ठ कुरु । अध्यासनं यदीच्छसि ॥ १९ ॥ परिचर्यं निषेव्य विश्वस्य विभावनाय पालनायात्ता स्वीकृता गुणाभिपत्तिः सत्त्वगुणाधिष्ठानं येन तस्य जित आत्मा मनः श्वसनः प्राणश्च यैस्तैरभिवंद्यम् ॥ २० ॥

आतिष्ठ तत्तात विमत्सरस्त्वमुक्तं समात्राऽपि यदव्यलीकम् ॥ आराधयाधोक्षजपादपद्मं यदीच्छसेऽध्यासनमुत्तमो यथा ॥ १९ ॥ यस्यांघ्रिपद्मं परिचर्य विश्वविभावनायात्तगुणाभिपत्तेः ॥ अजोऽध्यतिष्ठत्खलु पारमेष्ठ्यं पदं जितात्मश्वसनाभिवंद्यम् ॥ २० ॥ तथा मनुर्वो भगवान्पितामहो यमेकमत्या पुरुदक्षिणैर्मखैः ॥ इष्ट्वाऽभिपेदे दुरवापमन्यतो भौमं सुखं दिव्यमथापवर्ग्यम् ॥ २१ ॥ तमेव वत्साश्रय भृत्यवत्सलं मुमुक्षुभिर्मृग्यपदाब्जपद्धतिम् ॥ अनन्यभावे निजधर्मभाविते मनस्यवस्थाप्य भजस्व पूरुषम् ॥ २२ ॥ नान्यं ततः पद्मपलाशलोचनाद्दुःखच्छिदं ते मृगयामि कंचन ॥ यो मृग्यते हस्तगृहीतपद्मया श्रियेतरैरंग विमृग्यमाणया ॥ २३ ॥ मैत्रेय उवाच ॥ एवं संजल्पितं मातुराकर्ण्यार्थागमं वचः ॥ संनियम्यात्मनात्मानं निश्चक्राम पितुः पुरात् ॥ २४ ॥ नारदस्तदुपाकर्ण्य ज्ञात्वा तस्य चिकीर्षितम् ॥ स्पृष्ट्वा मूर्धन्यघघ्नेन पाणिना प्राह विस्मितः ॥ २५ ॥

एकमत्या सर्वांतर्यामिदृष्ट्या ॥ २१ ॥ मृग्या पदाब्जयोः पद्धतिर्मार्गो यस्य तमेवाश्रय शरणं व्रज ततो भजस्व नान्यस्मिन्भावो यस्य तस्मिन् । निजधर्मैर्भाविते शोधिते ॥ २२ ॥ तमेवेत्यनेन सूचितं सर्वोत्तमत्वं प्रपंचयति । नान्यमिति । हस्तेन गृहीतं दीपवत्पद्मं यया इतरैर्ब्रह्मादिभिः ॥ २३ ॥ संजल्पितं विलापम् । ततोऽर्थस्यागमो यस्मात्तथाभूतं वच आकर्ण्य ॥ २४ ॥ २५ ॥

ह्याकरितां हे वत्सा, तूंहि, मोक्ष मिळविण्याची इच्छा करणारे पुरुष ज्याच्या चरणकमलाच्या मार्गाचा शोध करीत असतात, त्या भक्तवत्सल प्रभूलाच शरण जा आणि स्वधर्माचरणानें शुद्ध केलेल्या व अनन्यभक्तीनें युक्त अशा आपल्या मनाचेठिकाणीं त्या पुरुषोत्तमाचें स्थापन करून सेवा कर ॥ २२ ॥ हे बाळा, इतर ब्रह्मादिलोक जिचा शोध करीत असतात ती प्रत्यक्ष लक्ष्मीच दिव्याप्रमाणें हातांत कमळ घेऊन ज्याचा शोध करीत असत्ये त्या कमलनयन भगवंतावांचून दुसरा कोणीहि तुझ्या दुःखाचा नाश करणारा मला दिसत नाहीं ॥ २३ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, ध्रुवानें अशा प्रकारचें आईचें विलापरूप परंतु आपली इष्टसिद्धि करून देणारें भाषण श्रवण करून, आपल्याच विवेकयुक्त बुद्धीनें मनाचें नियमन करून, तो पित्याच्या नगरांतून बाहेर निघाला ॥ २४ ॥ हे विदुरा, नारदानें तें वर्तमान ऐकून व त्या ध्रुवाच्या मनांतील आशय

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जाणून त्याच्याजवळ आला आणि पापांचा नाश करणारा (परम पवित्र) असा आपला हात त्याच्या मस्तकीं ठेऊन, आश्चर्य पावून आपल्याशींच ह्मणाला कीं, ॥ २९ ॥ अहो! अपमान सहन न करणाऱ्या क्षत्रियांचें तेज तरी पहा किती विलक्षण आहे तें! हा ध्रुव, ल्हान बालक असूनही आपल्या सापत्नमातेचें दुर्भाषण हृदयांत धारण करितो ॥ २६ ॥ नंतर नारद ध्रुवास ह्मणाला– हे बालका, खेळण्याच्या पदार्थांचेठिकाणीं आसक्त असणारा तूं, अद्यापि पांच वर्षांचा कुमार आहेस. या वयांत तुला सन्मान किंवा अवमान यांचा भेद कळत नसावा असें आह्मांस वाटतें ॥ २७ ॥ आतां मान किंवा अपमान ह्यांचे भेद जरी तुला समजत असले तरी पुरुषाच्या असंतोषाला मोहावांचून दुसरीं कोणतींच कारणें नाहींत. कारण, लोकामध्यें जें कांहीं सुख किंवा दुःख प्राप्त होतें तें स्वतःच्या कर्मानींच प्राप्त होतें ॥ २८ ॥ तस्मात् बा ध्रुवा, शहाण्या मनुष्यानें, ईश्वराची अनुकूळता असल्यावांचून प्रयत्न सफल होत नाहींत, असें मनांत आणून आपल्या दैवानें जें प्राप्त झालें असेल तेवढ्यानेंच संतुष्ट असावें॥ २९ ॥ आतां

विस्मित इत्युक्तं तदेवाह । अहो तेजः प्रभावः ॥ २६ ॥ २७ ॥ विकल्पे मानापमानविवेके सत्यपि भिन्ना न संति । किंतु मोहकल्पिता एवेत्यर्थः । कुतः यत्सुखं दुःखं वा तन्निजकर्मभिरेव भवति यतः ॥ २८ ॥ उपशमोपदेशेन निवर्तयति । परितुष्येदिति षड्भिः । ईश्वरगतिं वीक्ष्येश्वरानुकूल्यं विना नोद्यमाः फलहेतव

अहो तेजः क्षत्रियाणां मानभंगममृष्यताम् ॥ बालोऽप्ययं हृदा धत्ते यत्समातुरसद्वचः ॥ २६ ॥ नारद उवाच ॥ नाधुनाप्यवमानं ते सन्मानं वापि पुत्रक ॥ लक्षयामः कुमारस्य सक्तस्य क्रीडनादिषु ॥ २७ ॥ विकल्पे विद्यमानेऽपि न ह्यसंतोषहेतवः ॥ पुंसो मोहमृते भिन्ना यल्लोके निजकर्मभिः ॥ २८ ॥ परितुष्येत्ततस्तात तावन्मात्रेण पूरुषः ॥ दैवोपसादितं यावद्वीक्ष्येश्वरगतिं बुधः ॥ २९ ॥ अथ मात्रोपदिष्टेन योगेनावरुरुत्ससि ॥ यत्प्रसादं स वै पुंसां दुराराध्यो मतो मम ॥ ३० ॥ मुनयः पदवीं यस्य निःसंगेनोरुजन्मभिः ॥ न विदुर्मृगयंतोऽपि तीव्रयोगसमाधिना ॥ ३१ ॥ अतो निवर्ततामेष निर्बंधस्तव निष्फलः ॥ यतिष्यति भवान्काले श्रेयसां समुपस्थिते ॥ ३२ ॥ यस्य यद्दैवविहितं स तेन सुखदुःखयोः ॥ आत्मानं तोषयन्देही तमसः पारमृच्छति ॥ ३३ ॥

इति ज्ञात्वा परितुष्येत्संतोषमेव कुर्यात् ॥ २९ ॥ दुष्करश्च तवायमुद्यम इत्याह । अथेति द्वाभ्याम् । यस्य प्रसादमवरोद्धुं प्राप्तुमिच्छसि ॥ ३० ॥ निःसंगेन तीव्रयोगेन युक्तेन समाधिना मृगयंतोऽपि यस्य पदवीं मार्गं न विदुः स देवो दुराराध्यः ॥ ३१ ॥ श्रेयसां काले वृद्धत्वे ॥ ३२ ॥ सुखदुःखयोर्मध्ये सुखे सति पुण्य-

---

तूं आईनें सांगितलेल्या योगमार्गानें ज्या देवाचा प्रसाद मिळविण्याची इच्छा करितोस तो देव तर, पुरुषांना आराधन करण्यास फार कठीण आहे असें मला वाटतें ॥ ३० ॥ कारण, सर्वसंगपरित्याग करून तीव्रयोगानें युक्त अशा समाधीच्या योगेंकरून मुनिजन पुष्कळ जन्मेंपर्यंत त्याचा मार्ग शोधित असतांहि त्यांना त्याचा पत्ता लागत नाहीं ॥ ३१ ॥ यास्तव ध्रुवा, तूं आतां हा आपला व्यर्थ दुराग्रह सोडून दे. पुढें आपलें कल्याण करून घेण्याचा काल प्राप्त झाला ह्मणजे (वृद्धावस्थेमध्यें) तूं भगवत्प्राप्तीचा यत्न करिशील ॥ ३२ ॥ आणि दुसरें असें आहे कीं, सुख अथवा दुःख यांपैकीं दैवानें जें ज्याला प्राप्त झालें असेल त्याच्या योगानें ह्मणजे सुख मिळालें तर पुण्यक्षय होतो आणि दुःख प्राप्त झालें तर पापक्षय होतो अशा रीतीनें आत्म्याला संतुष्ट करणारा जो प्राणी असतो; तोच ह्या संसाररूप अंधकारांतूनपार पडतो (मुक्त होतो) ॥ ३३ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां आत्मसंतोष कसा करावा? असें विचारशील तर हे बालका, गुणांनीं आपल्याहून अधिक असेल त्याला पाहून प्रीति करावी, निंदा करूं नये; गुणांनीं कमी असेल त्याला पाहून दया करावी, तिरस्कार करूं नये; आणि गुणांनीं जो आपल्याशीं समान असेल त्याच्याशीं मैत्री करावी, स्पर्धा करूं नये. असें करणाऱ्या प्राण्याला तापांच्या योगानें पीडा होत नाहीं ॥ ३४ ॥ ध्रुव ह्मणाला– हे ज्ञानसंपन्ना नारदा, सुखदुःखांच्या प्रसंगांनीं ज्यांची विवेकबुद्धि नष्ट झाली आहे अशा पुरुषांना, शांति धारण करण्याचा जो हा प्रकार आपण कृपा करून दाखविला आहे, तो आमच्यासारख्यांनीं जाणण्यास अगदीं अशक्य आहे ॥ ३५ ॥ कारण, घोर असा क्षत्रियस्वभाव प्राप्त झाल्यानें विनयशून्य अशा माझ्या, 'सुरुचीच्या दुर्भाषणरूप बाणांनीं विदीर्ण झालेल्या' हृदयामध्यें तो आपला उपदेश ठरत नाहीं ॥ ३६ ॥ यास्तव हे ब्रह्मनिष्ठा नारदा, आमच्या पूर्वजांना व दुसऱ्या कोणांलाहि जें प्राप्त झालें नाहीं असें त्रैलोक्यांत अतिशय उत्कृष्ट स्थान जें असेल तें जिंकण्याची इच्छा करणाऱ्या मला आपण सन्मार्गाचा

क्षीयत इति दुःखे सति पापं क्षीयत इत्यात्मानं तोषयंस्तमसः पारं मोक्षं प्राप्नोति ॥ ३३ ॥ किंच गुणैरधिकात्पुंस इति ल्यब्लोपे पंचमी । तं दृष्ट्वा प्रीतिं कुर्यात् नत्वसूयामित्यर्थः अनुक्रोशं कृपां लिप्सेन्नतु तिरस्कारम् । समानान्मैत्रीं नतु स्पर्धाम् ॥ ३४ ॥ ३५ ॥ क्षात्रं स्वभावं प्राप्तवतोऽतएवाविनीतस्य दुर्वाक्यबाणैर्भिन्ने हृदि न श्रयते

गुणाधिकान्मुदं लिप्सेदनुक्रोशं गुणाधमात् ॥ मैत्रीं समानादन्विच्छेन्न तापैरभिभूयते ॥ ३४ ॥ ध्रुव उवाच ॥ सोऽयं शमो भगवता सुखदुःखहतात्मनाम् ॥ दर्शितः कृपया पुंसां दुर्दर्शोऽस्मद्विधैस्तु यः ॥ ३५ ॥ अथापि मेऽविनीतस्य क्षात्रं घोरमुपेयुषः ॥ सुरुच्या दुर्वचोबाणैर्न भिन्ने श्रयते हृदि ॥ ३६ ॥ पदं त्रिभुवनोत्कृष्टं जिगीषोः साधु वर्त्म मे ॥ ब्रूह्यस्मत्पितृभिर्ब्रह्मन्नन्यैरप्यनधिष्ठितम् ॥ ३७ ॥ नूनं भवान्भगवतो योंऽगजः परमेष्ठिनः ॥ वितुदन्नटते वीणां हितार्थं जगतोऽर्कवत् ॥ ३८ ॥ मैत्रेय उवाच ॥ इत्युदाहृतमाकर्ण्य भगवान्नारदस्तदा ॥ प्रीतः प्रत्याह तं बालं सद्वाक्यमनुकंपया ॥ ३९ ॥ नारद उवाच ॥ जनन्याऽभिहितः पंथाः स वै निःश्रेयसस्य ते ॥ भगवान्वासुदेवस्तं भज तत्प्रवणात्मना ॥ ४० ॥ धर्मार्थकाममोक्षार्थं य इच्छेच्छ्रेय आत्मनः ॥ एकमेव हरेस्तत्र कारणं पादसेवनम् ॥ ४१ ॥ तत्तात गच्छ भद्रं ते यमुनायास्तटं शुचि ॥ पुण्यं मधुवनं यत्र सान्निध्यं नित्यदा हरेः ॥ ४२ ॥

न तिष्ठति ॥ ३६ ॥ अन्यैरनधिष्ठितं त्रिभुवने उत्कृष्टं पदं जेतुमिच्छोर्मे साधुवर्त्म मार्गं ब्रूहि ॥ ३७ ॥ अंकज इति पाठे उत्संगाज्जातो यो नारदः स भवान् तत्र लिंगम् । वीणां वितुदन्वादयन् हितायाटति ॥ ३८ ॥ ३९ ॥ निःश्रेयसस्याभिप्रेतार्थस्य पंथाः कोऽसावित्यत आह । भगवान्वासुदेवोऽतएव तं भज ॥ ४० ॥ ४१ ॥ मधुवनाख्यं

उपदेश करा ॥ ३७ ॥ आणि माझें हित करणें आपणास इष्टच आहे. कारण, जे आपण ज्ञानसंपन्न अशा ब्रह्मदेवाच्या शरीरापासून उत्पन्न झालां आहां, ते खरोखर वीणा वाजवीत वाजवीत जगाच्या हिताकरितां सूर्यासारखें पर्यटन करीत आहां ॥ ३८ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा याप्रकारचें ध्रुवाचें भाषण श्रवण करून, तत्काळ संतुष्ट झालेला भगवान् नारद, कृपेनें त्या ध्रुव बालकाला सद्वाक्याचा उपदेश करीत ह्मणाला कीं, ॥ ३९ ॥ नारद ह्मणाला– हे ध्रुवा, सुनीतिमातेनें ज्याचें तुला वर्णन केलें आहे तोच भगवान् वासुदेव, तुझ्या कल्याणाचा मार्ग आहे, यास्तव तूं भगवंताचेठिकाणीं एकाग्रचित्त लावून त्याचें भजन कर ॥ ४० ॥ जो पुरुष, धर्म, अर्थ, काम अथवा मोक्ष यांपैकीं कोणत्याहि कल्याणाची इच्छा करितो, त्याला तें कल्याण प्राप्त होण्यास श्रीहरीच्या चरणाचें सेवन करणें हेंच एक साधन आहे ॥ ४१ ॥ यास्तव बा ध्रुवा, तुझें कल्याण असो. तूं आतां, ज्याठिकाणीं मधुवननामक पवित्र वन आहे आणि हरीचें नित्यदा सांनिध्य आहे, त्या यमुनेच्या पवित्र तीराचेठिकाणीं गमन कर ॥ ४२ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याठिकाणीं यमुनेच्या पवित्र उदकामध्यें त्रिकाल स्नान करून व देवतांना नमस्कार करणें इत्यादिक आपल्या अधिकारास योग्य असलेलीं कर्मे करून, तूं आपणास बसण्याकरितां दर्भादिकांचें आसन घालावें व त्यावर बसावें ॥ ४३ ॥ आणि पूरक, कुंभक व रेचक अशा तीन प्रकारच्या प्राणायामाच्या योगेंकरून, प्राण इंद्रियें आणि मन यांचें चांचल्य हळू हळू कमी करून धैर्ययुक्त मनानें श्रीहरीची धारणा करावी ॥ ४४ ॥ तो भगवान् असा कीं,–जो भक्तांना वर देण्यास उत्सुक आहे, ज्यांचें मुख व नेत्रें सर्वकाल प्रसन्न आहेत, जो उत्तम नासिका, चांगल्या भ्रुकुटी व मनोहर गाल ह्यांनीं युक्त असून देवांमध्यें सुंदर व तरुण आहे, ज्याचे अवयव रमणीय दिसत आहेत, जो आरक्तवर्ण अशीं ओंठ व नेत्रें धारण करीत असून शरणागतांना आश्रयभूत, सुखकर, आश्रय करण्यास योग्य व कृपेचा केवळ सागर आहे ॥ ४५ ॥ ४६ ॥ ज्याच्या वक्षःस्थलावर श्रीवत्सचिन्ह आहे, जो मेघासारखा श्यामवर्ण व पुरुषाच्या लक्षणांनीं युक्त असून कंठामध्यें वनमाळा धारण करणारा आहे, ज्याचे बाहु शंख, चक्र, गदा

यमुनायास्तटं गच्छ यत्र मधुवने ॥ ४२ ॥ अध्ययनाद्यभावेऽप्यात्मन उचितानि योग्यानि देवतानमस्कारादीनि कृत्वेति यमनियमा उक्ताः । आसनकल्पनं च कुशादिभिः स्वस्तिकादिभिश्च ॥ ४३ ॥ प्राणेंद्रियमनसां मलं चांचल्यं व्युदस्येति प्राणायामप्रत्याहारौ । धारणामाह । अभिध्यायेदित्यादि षड्भिः । गुरुणा धीरेण मनसा गुरुं श्रीहरिम्॥४४॥

स्नात्वाऽनुसवनं तस्मिन्कालिंद्याः सलिले शिवे ॥ कृत्वोचितानि निवसन्नात्मनः कल्पितासनः ॥ ४३ ॥ प्राणायामेन त्रिवृता प्राणेंद्रियमनोमलम् ॥ शनैर्व्युदस्याभिध्यायेन्मनसा गुरुणा गुरुम् ॥ ४४ ॥ प्रसादाभिमुखं शश्वत्प्रसन्नवदनेक्षणम् ॥ सुनासं सुभ्रुवं चारुकपोलं सुरसुंदरम् ॥ ४५ ॥ तरुणं रमणीयांगमरुणोष्ठेक्षणाधरम् ॥ प्रणताश्रयणं नृम्णं शरण्यं करुणार्णवम् ॥ ४६ ॥ श्रीवत्सांकं घनश्यामं पुरुषं वनमालिनम् ॥ शंखचक्रगदापद्मैरभिव्यक्तचतुर्भुजम् ॥ ४७ ॥ किरीटिनं कुंडलिनं केयूरवलयान्वितम् ॥ कौस्तुभाभरणग्रीवं पीतकौशेयवाससम् ॥ ४८ ॥ कांचीकलापपर्यस्तं लसत्कांचननूपुरम् ॥ दर्शनीयतमं शांतं मनोनयनवर्धनम् ॥ ४९ ॥ पद्भ्यां नखमणिश्रेण्या विलसद्भ्यां समर्चताम् ॥ हृत्पद्मकर्णिकाधिष्ण्यमाक्रम्यात्मन्यवस्थितम् ॥ ५० ॥ स्मयमानमभिध्यायेत्सानुरागावलोकनम् ॥ नियतेनैकभूतेन मनसा वरदर्षभम् ॥ ५१ ॥

सुरेषु सुंदरम् ॥ ४५ ॥ रमणीयान्यंगानि यस्य ओष्ठश्च ईक्षणा ईक्षणं च ओष्ठेक्षणे अरुणे ओष्ठेक्षणे धारयतीति तथा तम् । अरुणमोष्ठमीक्षणं चाधारयतीति वा । नृम्णं सुखकरम् । यद्वा नृम्णं धनम् । सर्वपुरुषार्थनिधिमित्यर्थः ॥ ४६ ॥ पुरुषं पुरुषलक्षणयुक्तम् ॥ ४७ ॥ कौस्तुभस्याभरणं ग्रीवा यस्य ॥ ४८ ॥ कांचीकलापेन पर्यस्तं परिवेष्टितम् । मनोनयनयोर्वर्धनं हर्षकरम् ॥ ४९ ॥ हृत्पद्मकर्णिकाया धिष्ण्यं मध्यस्थानं तदाक्रम्य समर्चताम् । आत्मनि मनसि स्थितम् ॥ ५० ॥ ध्यानमाह । स्मयमानमिति । नियतेन

व पद्म ह्यांच्या योगानें शोभत आहेत, ॥ ४७ ॥ ज्याच्या मस्तकावर किरीट, कानांत कुंडलें दंडांचेठिकाणीं बाहुभूषणें व हातांत कडीं आहेत, ज्याच्या कंठानें कौस्तुभ मण्याला शोभा आणिली आहे, जो पिंवळा रेशमी पीतांबर नेसला आहे ॥ ४८ ॥ ज्याच्या कटीच्या सभोंवतीं कमरपट्ट्याचें वेष्टन आहे, ज्याच्या पायांत सुवर्णाचीं नूपुरें शोभत आहेत, ज्याचें स्वरूप फार देखणें, शांत व मनाला आणि नेत्रांना आनंद देणारें आहे ॥ ४९ ॥ जो हिरकण्यासारख्या चमकणाऱ्या नखपंक्तीनें युक्त अशा आपल्या चरणांच्या योगानें, पूजा करणाऱ्या भक्तांच्या हृदयकमळांतील कर्णिकेच्या मध्यस्थानाचें आक्रमण करून त्यांच्या हृदयामध्यें राहिला आहे ॥ ५० ॥ याप्रमाणें श्रीहरीच्या स्वरूपाची धारणा करून, नंतर निश्चल व एकाग्र केलेल्या मनानें तो श्रेष्ठ वरदाता प्रभु आपणाकडे प्रेमदृष्टीनें पहात असून हास्य करीत आहे असें चिंतन करावें ॥ ५१ ॥

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

याप्रमाणें भगवंताच्या परम मंगलकारक रूपाचें ध्यान करणाऱ्या पुरुषाचें मन, परमानंदाच्या योगानें भगवत्स्वरूपाचेठिकाणीं सत्वर मिळून गेलें असतां, तें तेथून माघारें फिरत नाहीं ॥ ५२ ॥ हे राजपुत्रा, मी आतां तुला जप करण्यास योग्य असा परम गुह्य मंत्र सांगतों ऐक. ज्या मंत्राचा सात दिवसपर्यंत जप करणारा पुरुष, आकाशामध्यें संचार करणाऱ्या देवगंधर्वादिकांस अवलोकन करितो ॥ ५३ ॥ "ॐनमो भगवते वासुदेवाय" ह्या मंत्राच्या योगानें देश व काल ह्यांच्या वेगवेगळ्या प्रकारांचें तत्त्व जाणणाऱ्या चतुर पुरुषानें, नानाप्रकारच्या पदार्थांनीं श्रीहरीची पदार्थमय पूजा करावी ॥ ५४ ॥ शुद्ध उदकें, वनसंबंधी पुष्पें, मुळें, फळें पत्रें, दूर्वांकुर, व वस्त्राऐवजीं भूर्जवृक्षाच्या त्वचा, या पदार्थांनीं व भगवंताला प्रिय अशा तुळशींनीं प्रभूचें पूजन करावें ॥ ५५ ॥ तें असें कीं, शिला, काष्ठ इत्यादि निर्मित श्रीहरीची मूर्ति संपादन

प्रागुक्तया धारणया सुस्थिरेणातएवैकभूतेनैकाग्रेण । धारणोक्तानि विशेषणानि ध्यानेऽपि द्रष्टव्यानि । यद्वा । यथोक्तमात्रमेव । तदुक्तमेकादशस्कंधे । नान्यानि चिंतयेद्भूयः सुस्मितं भावयेन्मुखमिति ॥ ५१ ॥ समाधिमाह । एवमिति । तूर्णं शीघ्रं संपन्नं सत् ॥ ५२ ॥ जप्यो मंत्रः ॥ ५३ ॥ ५४ ॥ द्रव्याण्येवाह । सलिलैरिति । शस्तैर्दूर्वांकुरै-

एवं भगवतो रूपं सुभद्रं ध्यायतो मनः ॥ निर्वृत्त्या परया तूर्णं संपन्नं न निवर्तते ॥ ५२ ॥ जप्यश्च परमो गुह्यः श्रूयतां मे नृपात्मज ॥ यं सप्तरात्रं प्रपठन्पुमान्पश्यति खेचरान् ॥ ५३ ॥ ॐनमो भगवते वासुदेवाय ॥ मंत्रेणानेन देवस्य कुर्याद्द्रव्यमयीं बुधः ॥ सपर्यां विविधैर्द्रव्यैर्देशकालविभागवित् ॥ ५४ ॥ सलिलैः शुचिभिर्माल्यैर्वन्यैर्मूलफलादिभिः ॥ शस्तांकुरांशुकैश्चार्चेत्तुलस्या प्रियया प्रभुम् ॥ ५५ ॥ लब्ध्वा द्रव्यमयीमर्चां क्षित्यंब्वादिषु वार्चयेत् ॥ आभृतात्मा मुनिः शांतो यतवाङ्मितवन्यभुक् ॥ ५६ ॥ स्वेच्छावतारचरितैरचिंत्यनिजमायया ॥ करिष्यत्युत्तमश्लोकस्तद्ध्यायेद्धृदयंगमम् ॥ ५७ ॥ परिचर्या भगवतो यावत्यः पूर्वसेविताः ॥ ता मंत्रहृदयेनैव प्रयुंज्यान्मंत्रमूर्तये ॥५८॥ एवं कायेन मनसा वचसा च मनोगतम् ॥ परिचर्यमाणो भगवान्भक्तिमत्परिचर्यया ॥५९॥

र्वन्यैरेवांशुकैर्भूर्जत्वगादिभिः ॥ ५५ ॥ पूजाया अधिष्ठानमाह । लब्ध्वा संपाद्य । द्रव्यमयीं शिलादिनिर्मिताम् । अर्चां प्रतिमाम् । पूजासाद्गुण्यहेतूनाह । सार्धाभ्याम् । आभृतात्मा धृतचित्तः । मितं वन्यं भुंक्त इति तथा ॥ ५६ ॥ यत्करिष्यतीति तदानीमवतारप्राचुर्याभावात् ॥ ५७ ॥ पूर्वसेविताः सेवनं कारिताः कार्यत्वेन विहिता इत्यर्थः । मंत्रहृदयेन द्वादशाक्षरेण ॥ ५८ ॥ एवमुक्तरीत्या मनोगतं यथा भवति तथा कायादिभिर्भक्तिमत्या परिचर्यया परिचर्यमाणो धर्मार्थकामेषु यदभिमतं तच्छ्रेयो दिशतीति

करून तिचेठिकाणीं किंवा पृथिवीं उदक इत्यादिकांचेठिकाणींच परमेश्वराची भावना करून पूजा करावी. तीं पूजा सांग होण्याकरितां पूजकानें आपलें चित्त स्थिर राखावें, शांति धरावी, मौनव्रत धारण करावें, व वनांतील कंदमूळफळांचा परिमित आहार करावा. मननशील असावें ॥ ५६ ॥ उत्तमकीर्ति भगवान्, आपल्या अचिंत्य मायारूप शक्तीच्या योगेंकरून स्वेच्छेनें मनोहर अवतार घेऊन, जें जें मनोहर चरित्र करील[1] तें तें मनामध्यें आणून त्याचें चिंतन करावें ॥ ५७ ॥ हे ध्रुवा, पूर्वीं जे तुला मी भगवंताच्या पूजेचे प्रकार सांगितले आहेत ते सर्वही द्वादशाक्षरात्मक गुह्यमंत्रानेंच मंत्रस्वरूपी श्रीहरीला अर्पण करावे ॥ ५८ ॥ याप्रमाणें आपल्या इच्छेनुसार कायावाचाम-

---

१ हा भविष्यकाळचा प्रयोग घालण्याचें कारण, ध्रुवाच्या वेळीं भगवंताचे फार अवतार झाले नव्हते हें होय.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नांनीं भक्तियुक्त पूजनेंकरून पूजिलेला भगवान्, त्या निष्कपटरीतीनें उत्तमप्रकारें सेवा करणाऱ्या देहधारी पुरुषांना धर्म, अर्थ, काम व मोक्ष ह्यांपैकीं जें श्रेय इष्ट असेल तें देऊन त्यांच्या भक्तीची वृद्धि करितो ॥ ५९ ॥ ६० ॥ ह्याकरितां साक्षात् मुक्ति मिळण्याकरितां विषयांच्या भोगाविषयीं विरक्त होऊन, निरंतर प्रेमयुक्त पूर्ण भक्तियोगानें त्या परमेश्वराचें भजन करावें ॥ ६१ ॥ याप्रमाणें नारदानें सांगितलें असतां त्या राजपुत्र ध्रुवानें, त्या नारदाला प्रदक्षिणा व नमस्कार करून हरीच्या चरणचिन्हांनीं मंडित अशा त्या पुण्यकारक मधुवनामध्यें गमन केलें ॥ ६२॥ याप्रमाणें तो ध्रुव बालक तपोवनामध्यें गेला असतां, इकडे नारद मुनि उत्तानपाद राजाच्या नगरामध्यें प्रविष्ट झाला. तेव्हां राजानें सत्कारपूर्वक अर्घ्यपाद्यादिकेंकरून त्याची पूजा केल्यावर सुखासनीं स्वस्थ बसलेल्या त्या नारदानें राजाला विचारिलें कीं,– ॥ ६३ ॥ नारद ह्मणाला– हे राजा, अतिम्लान झालेल्या मुखानें युक्त असा तूं, इतका दीर्घ विचार कशाचा करीत आहेस? तुझा, अर्थानें युक्त असा धर्म किंवा काम हे कांहीं लोपले नाहींत ना? ॥ ६४ ॥

द्वयोरन्वयः ॥ ५९ ॥ ६० ॥ विरक्तः सन्भजेत् । किमर्थं मुक्तये ॥ ६१ ॥ हरेश्चरणाभ्यां चर्चितं मंडितम् ॥ ६२ ॥ अर्हितं सत्कृत्य समर्पितमर्हणमर्घादिकं यस्मै ॥ ६३ ॥

पुंसाममायिनां सम्यग्भजतां भाववर्धनः ॥ श्रेयो दिशत्यभिमतं यद्धर्मादिषु देहिनाम् ॥ ६० ॥ विरक्तश्चेंद्रियरतौ भक्तियोगेन भूयसा ॥ तं निरंतरभावेन भजेताद्धा विमुक्तये ॥ ६१ ॥ इत्युक्तस्तं परिक्रम्य प्रणम्य च नृपार्भकः ॥ ययौ मधुवनं पुण्यं हरेश्चरणचर्चितम् ॥ ६२ ॥ तपोवनं गते तस्मिन्प्रविष्टोऽतःपुरं मुनिः ॥ अर्हितार्हणको राज्ञा सुखासीन उवाच तम् ॥ ६३ ॥ नारद उवाच ॥ राजन्किं ध्यायसे दीर्घं मुखेन परिशुष्यता ॥ किंवा न रिष्यते कामो धर्मो वाऽर्थेन संयुतः ॥ ६४ ॥ राजोवाच ॥ सुतो मे बालको ब्रह्मन्स्त्रैणेनाकरुणात्मना ॥ निर्वासितः पंचवर्षः सहमात्रा महान्कविः ॥ ६५ ॥ अप्यनाथं वने ब्रह्मन्मा स्मादंत्यर्भकं वृकाः ॥ श्रांतं शयानं क्षुधितं परिम्लानमुखांबुजम् ॥ ६६ ॥ अहो मे बत दौरात्म्यं स्त्रीजितस्योपधारय ॥ योऽकं प्रेम्णाऽऽरुरुक्षंतं नाभ्यनंदमसत्तमः ॥ ६७ ॥ नारद उवाच ॥ मा मा शुचः स्वतनयं देवगुप्तं विशांपते ॥ तत्प्रभावमविज्ञाय प्रावृंक्ते यद्यशो जगत् ॥ ६८ ॥ सुदुष्करं कर्म कृत्वा लोकपालैरपि प्रभुः ॥ एष्यत्यचिरतो राजन्यशो विपुलयंस्तव ॥ ६९ ॥

किंवा न रिष्यते न नश्यतीति सवितर्कः प्रश्नः ॥ ६४ ॥ मात्रा सह निर्वासित इति तस्याप्यनादृतत्वात् ॥ ६५ ॥ मा स्मादंति किंस्विन्न खादंतीत्यर्थः ॥ ६६ ॥ ६७ ॥ देवेन श्रीहरिणा गुप्तमात्मसात्कृत्वा रक्षितम् । यस्य यशो जगत्प्रावृंक्ते व्याप्नोति ॥ ६८ ॥ विपुलयन्विस्तारयन् ॥ ६९ ॥

राजा ह्मणाला– हे ब्रह्मनिष्ठ नारदा, काय सांगावें! स्त्रीलंपट व निर्दयचित्त अशा मी, आपला महाबुद्धिमान् पुत्र, पांच वर्षांचा बालक असतां, त्याला त्याच्या आईसह बाहेर घालविलें ॥ ६५ ॥ हे ब्रह्मनिष्ठा, वनामध्यें थकलेल्या, क्षुधाक्रांत व ज्याचें मुखकमल म्लान झालें आहे अशा कोठेंतरी निजलेल्या त्या माझ्या बालकाला, लांडगे तर भक्षण करणार नाहींत ना? ॥ ६६ ॥ अहो! स्त्रीजित झालेल्या माझें दुष्टचित्तत्व तरी किती आहे तें सांगतों ऐका! म्यां दुष्टशिरोमणीनें मुलगा प्रेमानें मांडीवर बसावयास इच्छित असतां त्याचा अंगीकार केला नाहीं! ॥ ६७ ॥ नारद ह्मणाला– हे राजा, ज्याची कीर्ति सर्व जगाला व्यापून टाकित आहे त्या देवानें रक्षण केलेल्या आपल्या पुत्राचा, 'त्याचा प्रभाव अजून तुला समजला नाहीं ह्मणून' तूं अगदीं शोक करूं नकोस ॥ ६८ ॥ हे राजा, तो तुझा महासमर्थ पुत्र, इंद्रादि लोकपालांनींहि करण्यास

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अशक्य असें कर्म करून, तुझ्या यशाचा लोकांत प्रसार करीत होत्साता लवकरच परत येईल ॥ ६९ ॥ मैत्रेय ह्मणाला- हे विदुरा, असें नारदानें सांगितलेलें भाषण श्रवण करून तो राजा, राज्यलक्ष्मीचा अनादर करून पुत्राचेंच चिंतन करीत राहिला ॥ ७० ॥ इकडे ध्रुवानें, मधुवनांत जाऊन यमुनेचें स्नान केलें व ज्या रात्रीं तेथें पोंचला होता त्या रात्रीं देहशुद्ध्यर्थ उपोषण करून एकाग्रचित्त होत्साता, नारदाच्या उपदेशाप्रमाणें तत्परतेनें भगवंताची पूजा केली ॥ ७१ ॥ नंतर तीन तीन दिवस उपोषण करून चवथ्या दिवशीं शरीरनिर्वाहापुरतीं कंवठें व बोरें भक्षण करून त्या ध्रुवानें, श्रीहरीचें आराधन करीत पहिला महिना घालविला ॥ ७२ ॥ तसेंच दुसऱ्या महिन्यांत सहाव्या सहाव्या दिवशीं गळून पडलेलीं पानें व तृणवगैरे भक्षण करून देहनिर्वाह करून त्या ध्रुवानें व्यापक प्रभूचें आराधन केलें ॥ ७३ ॥ तिसऱ्याहि महिन्यामध्यें नवव्या नवव्या दिवशीं देहनिर्वाहार्थ केवळ उदकाचें प्राशन करून, त्या ध्रुवानें समाधीच्या योगानें उत्तमकीर्ति भगवंताचें आराधन केलें ॥ ७४ ॥ चवथ्याहि महिन्याचेठिकाणीं

॥ ७० ॥ ध्रुवो मधुवने किमकरोदित्यपेक्षायामाह तत्रेत्यादिना। अभिषिक्तः स्नातः यस्यां प्राप्तस्ताम् ॥ ७१ ॥ कपित्थानि बदराणि चाशनं यस्य। आत्मवृत्तिर्देहस्थितिस्तदनुसारेण ॥ ७२ ॥ ७३ ॥ तृतीयं च आनयन् ईषदिव नयन्नुपाधावदित्यन्वयः। प्रतिमासमाहारसंकोचं तपोऽतिरेकं च कृतवानित्यर्थः ॥ ७४ ॥ ७५ ॥ ७६ ॥ भूतानि शब्दादीनि इंद्रियाणि च आ-

मैत्रेय उवाच ॥ इति देवर्षिणा प्रोक्तं विश्रुत्य जगतीपतिः ॥ राजलक्ष्मीमनादृत्य पुत्रमेवान्वचिंतयत् ॥ ७० ॥ तत्राभिषिक्तः प्रयतस्तामुपोष्य विभावरीम् ॥ समाहितः पर्यचरदृष्यादेशेन पूरुषम् ॥ ७१ ॥ त्रिरात्रांते त्रिरात्रांते कपित्थबदराशनः ॥ आत्मवृत्त्यनुसारेण मासं निन्येऽर्चयन्हरिम् ॥ ७२ ॥ द्वितीयं च तथा मासं षष्ठे षष्ठेऽर्भको दिने ॥ तृणपर्णादिभिः शीर्णैः कृतान्नोऽभ्यर्चयद्विभुम् ॥ ७३ ॥ तृतीयं चानयन्मासं नवमे नवमेऽहनि ॥ अब्भक्ष उत्तमश्लोकमुपाधावत्समाधिना ॥ ७४ ॥ चतुर्थमपि वै मासं द्वादशे द्वादशेऽहनि ॥ वायुभक्षो जितश्वासो ध्यायन्देवमधारयत् ॥ ७५ ॥ पंचमे मास्यनुप्राप्ते जितश्वासो नृपात्मजः ॥ ध्यायन्ब्रह्म पदैकेन तस्थौ स्थाणुरिवाचलः ॥ ७६ ॥ सर्वतो मन आकृष्य हृदि भूतेंद्रियाशयम् ॥ ध्यायन्भगवतो रूपं नाद्राक्षीत्किंचनापरम् ॥ ७७ ॥ आधारं महदादीनां प्रधानपुरुषेश्वरम् ॥ ब्रह्म धारयमाणस्य त्रयो लोकाश्चकंपिरे ॥ ७८ ॥ यदैकपादेन स पार्थिवार्भकस्तस्थौ तदंगुष्ठनिपीडिता मही ॥ ननाम तत्रार्धमिभेंद्रधिष्ठिता तरीव सव्येतरतः पदेपदे ॥ ७९ ॥

शेरते यस्मिंस्तन्मन आकृष्य ब्रह्म ध्यायन् ॥ ७७ ॥ धारयमाणस्य सततस्तस्य तेजः सोढुमशक्नुवंतः कंपिताः ॥ ७८ ॥ तस्यांगुष्ठेन निपीडिता आक्रांता सती मही तत्र तदा अर्धं ननाम।

त्यानें बाराव्या बाराव्या दिवशीं एकवेळ वायु भक्षण करून, प्राणायामानें श्वास स्वाधीन करून, व हृदयांत श्रीहरीचें ध्यान करीत देहाचें धारण केलें. याप्रमाणें ध्रुवानें दरमहिन्यांत तपाची वृद्धि व आहाराचा संकोच केला ॥ ७५ ॥ तदनंतर पांचवा महिना लागला असतां, तो राजपुत्र, प्राणवायूचा जय करून ब्रह्मवस्तूचें ध्यान करीत एका पायांवर स्तंभासारखा निश्चळ उभा राहिला ॥ ७६ ॥ नंतर शब्दादिक विषय व इंद्रियें ज्याच्याठिकाणीं राहतात असें आपलें मन, सर्व पदार्थांवरून निवृत्त करून त्याचेठिकाणीं भगवंताच्या स्वरूपाचें (ब्रह्माचें) ध्यान करीत असणाऱ्या त्या बालकाला, ब्रह्मवस्तूहून दुसरें कांहींच दिसेनासें झालें ॥ ७७ ॥ याप्रमाणें तो ध्रुव बालक, महत्तत्त्वादिकांचें आधारभूत, व प्रकृतिपुरुषांचें नियामक अशा ब्रह्मस्वरूपाचें हृदयाचेठिकाणीं धारण करीत असतां, त्याचें तेज सहन करण्यास असमर्थ झालेले तिन्ही लोक कंपायमान झाले ॥ ७८ ॥ तो राजपुत्र ध्रुव ब्रह्मस्वरूपाचें ध्यान करीत जेव्हां एका पायांवर उभा राहिला, तेव्हां त्याच्या अंगुष्ठानें दाबलेला पृथिवीचा अर्धा भाग जसा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नौकेमध्यें मोठा हत्ती उभा राहिला असतां त्याच्या डाव्या व उजव्या पावलांनीं दाबलेला नौकेचा अर्धा भाग, डावीकडे व उजवीकडे नम्र होतो तसा नम्र झाला ॥ ७९ ॥ आणि तो ध्रुव आपल्या प्राणाचा व त्याच्या आंतबाहेर जाण्याच्या द्वारांचा निरोध करून, आपल्याहून अभेददृष्टीनें विश्वात्मक श्रीविष्णूचें ध्यान करूं लागला असतां, श्वासोच्छ्वास बंद झाल्यामुळें अत्यंत पीडित झालेले लोकपालांसहवर्तमान सर्व लोक, श्रीहरीला शरण गेले ॥ ८० ॥ देव ह्मणाले– हे भगवन्, स्थावरजंगमात्मक सर्व प्राण्यांच्या शरीरांचा असा एकाएकीं प्राणनिरोध कधींहि झालेला आह्मांस ठाऊक नाहीं, ह्मणून शरण जाण्यास योग्य अशा तुला आह्मीं शरण आलों आहों. तर या संकटांतून आमची मुक्तता कर ॥ ८१ ॥ श्रीभगवान् ह्मणाला– देवहो, तुह्मी भिऊं नका, ज्यापासून तुमच्या प्राणाचा निरोध झाला आहे तो उत्तानपाद राजाचा पुत्र ध्रुव, जगद्रूप अशा माझ्याठिकाणीं सप्रेमभावानें आपला प्राणवायु कोंडून ऐक्यभाव पावला आहे. त्या बालकाला मी दुष्कर तपश्चर्येपासून निवृत्त करितों. तुह्मी आपापल्या स्थानीं गमन करावें

समेंऽशके अर्धशब्दस्य नपुंसकत्वादंशांशिनोरभेदाच्चैवं सामानाधिकरण्यम्। इभेंद्रेणाधिष्ठिता तरी नौर्यथा पदेपदे सव्यतो दक्षिणतश्च नमति तद्वत् ॥७९॥ अन्यदप्याश्चर्यमाह। तस्मिन्ध्रुवे विश्वं विश्वात्मकं विष्णुमात्मनः सकाशादनन्यया धियाऽऽत्माभेददृष्ट्याऽभिध्यायति सति किं कृत्वा असुं प्राणं तद्द्वारं च निरुध्य विश्वमात्मन्येकीकृत्य स्वप्राणनिरोधे कृते विश्वस्य प्राणनिरोधो जात इति भावः ॥ ८० ॥ एवं प्राणनिरोधं कदाचिदपि न विद्मः अखिलसत्त्वधाम्नः सर्वप्राणिशरीरस्य तस्माद्वृजिनात्क्लेशात् ॥ ८१ ॥

तस्मिन्नभिध्यायति विश्वमात्मनो द्वारं निरुध्यासुमनन्यया धिया ॥ लोका निरुच्छ्वासनिपीडिता भृशं सलोकपालाः शरणं ययुर्हरिम् ॥ ८० ॥ देवा ऊचुः ॥ नैवं विदामो भगवन्प्राणरोधं चराचरस्याखिलसत्वधाम्नः ॥ विधेहि तन्नो वृजिनाद्विमोक्षं प्राप्ता वयं त्वां शरणं शरण्यम् ॥ ८१ ॥ श्रीभगवानुवाच ॥ माभैष्ट बालं तपसो दुरत्ययान्निवर्तयिष्ये प्रतियात स्वधाम ॥ यतो हि वः प्राणनिरोध आसीदौत्तानपादिर्मयि संगतात्मा ॥ ८२ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे चतुर्थस्कंधे ध्रुवचरिते अष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥ ॥ मैत्रेय उवाच ॥ त एवमुत्सन्नभया उरुक्रमे कृतावनामाः प्रययुस्त्रिविष्टपम् ॥ सहस्रशीर्षापि ततो गरुत्मता मधोर्वनं भृत्यदिदृक्षयागतः ॥ १ ॥ स वै धिया योगविपाकतीव्रया हृत्पद्मकोशे स्फुरितं तडित्प्रभम् ॥ तिरोहितं सहसैवोपलक्ष्य बहिःस्थितं तदवस्थं ददर्श ॥ २ ॥

यतो बालात् कोऽसौ बालः कथं च तस्मात्प्राणनिरोध इत्यत आह। उत्तानपादस्य पुत्रो मयि विश्वरूपे संगतात्मा ऐक्यं प्राप्तो वर्तत इति ॥ ८२ ॥ इति श्रीमद्भागवते चतुर्थस्कंधे टीकायामष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥ ॥ नवमे तु हरिं स्तुत्वा लब्ध्वा तस्माद्वरान्ध्रुवः ॥ प्रत्यागत्याकरोद्राज्यं पित्रा दत्तमितीर्यते ॥ १ ॥ एवं भगवद्वाक्येन गतभयाः ॥ १ ॥ स वै ध्रुवो योगस्य विपाकेन दार्ढ्येन तीव्रया निश्चलया गरुडाधिरूढं पुरतः स्थितमपि यदांऽतर्दृष्टित्वादसौ नापश्यत्तदा भगवतैवांतःस्थं रूपमाकृष्टमतस्तिरोहित-

---

॥ ८२ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापु[राणां]तील चतुर्थस्कंधामध्यें ध्रुवचरित्रसंबंधी हा आठवा अध्याय समाप्त झाला ॥ ८ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ ७ ॥ आतां या नवव्या अध्यायामध्यें, ध्रुवानें श्रीहरीची स्तुति करून, त्याच्यापासून वर मिळविले आणि त्या मधुवनांतून आपल्या नगरामध्यें येऊन, पित्यानें दिलेलें राज्य केलें, अशी कथा वर्णिली आहे ॥ १ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, याप्रमाणें भगवद्वाक्याच्या योगानें भयरहित झालेले ते देव, उरुक्रम भगवंताला नमस्कार करून, स्वर्गलोकास निघून गेले. इकडे तो विश्वरूपी परमात्माहि ध्रुवभक्ताला अवलोकन करण्याकरितां गरुडावर बसून मधुवनांत प्राप्त झाला ॥ १ ॥ तेव्हां ध्रुवानें, योगाच्या दृढतेमुळें निश्चळ झालेल्या बुद्धीनें हृदयकमळकोशामध्यें स्फुरण पावणारें, विजेसारखें दैदीप्यमान श्रीहरीचें स्वरूप एकाएकीं अंतर्धान पावलें असें जाणून, चटकन आपला समाधि

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

उतरला आणि डोळे उघडून बाहेर पहातो तों हृदयांत दिसत होतें तसेंच बाहेर असलेलें भगवंताचें स्वरूप त्याच्या दृष्टीस पडलें ॥ २ ॥ त्याच्या दर्शनानें गडबडून गेलेल्या त्या ध्रुवानें आपलें शरीर, भूमीवर वेताच्या काठीसारखें लववून देवाकडे पहात पहात देवाला वंदन केलें. तेव्हां तो ध्रुव, आपल्या नेत्रांनीं भगवत्स्वरूपाचें प्राशनच करितो कीं काय ! मुखानें देवाचें चुंबन करितो कीं काय ! आणि आपल्या बाहूंनीं भगवंताचें आलिंगनच करितो कीं काय असा भासला ॥ ३ ॥ तेव्हां ध्रुवाच्या व सर्व जनांच्या हृदयामध्यें व्यापून असणाऱ्या त्या भगवंतानें, आपलें गुणवर्णन करण्याची इच्छा करणारा, परंतु तें कसें करावें तें न जाणणारा, ह्मणूनच केवळ हात जोडून पुढें उभा राहिलेला अशा त्या ध्रुवास जाणून करुणेनें आपल्या [illegible]य शंखाच्या योगानें त्याच्या गालास स्पर्श केला ॥ ४ ॥ त्याचवेळीं भगवंतानें दिलेली दिव्य वाणी पावोन, ज्यानें ईश्वर

मुपलक्ष्य व्युत्थितः सन् तदवस्थं यादृगंतः स्फुरितस्तादृशम् ॥ २ ॥ आगतसाध्वसो जातसंभ्रमः विनमय्य आनतं कृत्वा । संभ्रममेवाह । दृग्भ्यां प्रपिबन्निव पश्यन्नवंदत आस्येन चुंबन्निवावंदत भुजाभ्यामाश्लिषन्निवावंदतेत्यर्थः ॥ ३ ॥ विवक्षंतं तद्गुणान्वक्तुमिच्छंतम् । अतद्विदं स्तुत्यादि कर्तुमजानंतम् । अस्य ध्रुवस्य सर्वस्य च हृद्यवस्थितत्वात् ज्ञात्वा ब्रह्ममयेन वेदात्मकेन शंखेन ॥ ४ ॥ भगवता प्रतिपादितां गिरं प्रतिपद्येति शेषः । प्रतिपद्य तामिति पाठे तां वेदात्मिकाम् । परिज्ञातः परात्मनोरीश्वरजीवयोर्निर्णयो येन सः अतएव भक्त्या भावः प्रेम यस्य असत्वरं स्थैर्येण परितः श्रुतं विख्यातमुरु श्रवः कीर्तिर्यस्य तम् । ध्रुवा क्षितिः स्थानं यस्येति भाविनिर्देशः ॥ ५ ॥

तद्दर्शनेनागतसाध्वसः क्षिताववंदतांगं विनमय्य दंडवत् ॥ दृग्भ्यां प्रपश्यन्प्रपिबन्निवार्भकश्चुंबन्निवास्येन भुजैरिवाश्लिषन् ॥ ३ ॥ स तं विवक्षंतमतद्विदं हरिर्ज्ञात्वाऽस्य सर्वस्य च हृद्यवस्थितः ॥ कृतांजलिं ब्रह्ममयेन कंबुना पस्पर्श बालं कृपया कपोले ॥ ४ ॥ स वै तदैव प्रतिपादितां गिरं दैवीं परिज्ञातपरात्मनिर्णयः ॥ तं भक्तिभावोऽभ्यगृणादसत्वरं परिश्रुतोरुश्रवसं ध्रुवक्षितिः ॥ ५ ॥ ध्रुव उवाच ॥ योंऽतः प्रविश्य मम वाचमिमां प्रसुप्तां संजीवयत्यखिलशक्तिधरः स्वधाम्ना ॥ अन्यांश्च हस्तचरणश्रवणत्वगादीन्प्राणान्नमो भगवते पुरुषाय तुभ्यम् ॥ ६ ॥ एकस्त्वमेव भगवन्निदमात्मशक्त्या मायाख्ययोरुगुणया महदाद्यशेषम् ॥ सृष्ट्वाऽनुविश्य पुरुषस्तदसद्गुणेषु नानेव दारुषु विभावसुवद्विभासि ॥ ७ ॥

ईशानुग्रहसंप्राप्तवागाद्यद्भुतवृत्तिभिः ॥ द्वादशादित्यसंकाशैः श्लोकैरस्तौद्धरिं ध्रुवः ॥ यो मे प्रसुप्तां लीनां वाचमन्यांश्च प्राणानिंद्रियाणि स्वधाम्ना चिच्छक्त्या संजीवयति यतः अखिलाश्चक्षुरादिज्ञानक्रियाशक्तीर्धारयतीति तथा पुरुषायांतर्यामिणे ॥ ६ ॥ ननु वागादींद्रियशक्तिधरा वह्न्यादयः प्रसिद्धा नाहमित्यत आह । एक इति । अनुविश्य पुरुषोंऽतर्यामी त्वमेक एव तस्या मायाया असत्सु गुणेष्विंद्रियादिषु स्थितः संस्तत्तद्देवतारूपो नानेव भासि । ननु त्वद्व्यतिरेकेण ज्ञानक्रियाशक्तिधरः कश्चिदस्तीत्यर्थः ॥ ७ ॥

आणि जीवं यांचा निर्णय जाणला आहे, ह्मणूनच ज्याला ईश्वराचेठिकाणीं प्रेम प्राप्त झालें आहे व ज्याला पुढें अढळपद प्राप्त होणार आहे, असा तो ध्रुव, ज्याची मोठी कीर्ति सर्वत्र प्रख्यात आहे अशा त्या भगवंताची स्तुति करूं लागला—॥ ५ ॥ ध्रुव ह्मणाला—सर्व शक्ति धारण करणारा जो भगवान्, आपल्या चिच्छक्तीच्या योगानें माझ्या अंतःकरणामध्यें प्रवेश करून ह्या माझ्या निद्रिस्त झालेल्या वाणीला आणि हात, पाय, कर्ण, त्वचा आदिकरून इंद्रियांनाही संजीवन करितो त्या सर्वांतर्यामी तुज भगवंताला माझा नमस्कार असो ॥ ६ ॥ हे भगवन्, ज्याप्रमाणें अग्नि, वस्तुतः एकच असून नानाप्रकारच्या काष्ठांमध्यें लांब रुंदवगैरे नानाप्रकारचा भासतो त्याप्रमाणें सर्वांचा अंतर्यामी तूं एकच असून बहुगुणांनीं युक्त असलेल्या आपल्या मायानामक शक्तीच्या योगानें हें महत्तत्त्वादिक सर्व जग उत्पन्न करून, इंद्रियादिरूपानें परिणाम

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पावलेल्या त्या मायेच्या मिथ्याभूत गुणाचेठिकाणीं राहिलास ह्मणजे त्या त्या इंद्रियाच्या अग्न्यादि देवतारूपानें नानाप्रकारचा भासतोस ॥ ७ ॥ हे जगन्नाथा, तूं दिलेल्या ज्ञानाच्या योगानें तुला शरण प्राप्त झालेल्या ब्रह्मदेवानेंहि हें जग, निजून उठलेल्या पुरुषाप्रमाणें अवलोकन केलें. यास्तव हे दीनबंधो, मुक्तपुरुषांनींहि आश्रय करण्यास योग्य असें तुझें, चरणमूळ, तूं केलेले उपकार जाणणाऱ्या पुरुषानें कसें बरें! विसरलें जाईल? कुणींच विसरलें जाणार नाहीं. जर कोणी विसरेल तर तो कृतघ्नच समजला पाहिजे ॥ ८ ॥ हे भगवन्, जें विषयसंबंधी सुख, प्राण्यांना नरकामध्यें सुद्धां प्राप्त होतें, त्या शवतुल्य देहानें उपभोग करण्यास योग्य सुखाची जे पुरुष इच्छा करितात आणि जन्ममरणरूप संसारापासून मुक्ति होण्यास कारणीभूत अशा कल्पवृक्षासारख्या तुझें विषयप्राप्त्यर्थ सेवन करितात ते पुरुष, तुझ्या मायेनें खरोखर मोहितबुद्धि झाले

अपिच किं वक्तव्यं वह्न्यादयो ज्ञानादिशक्तिधरा न भवंतीति यस्माद्ब्रह्मणोऽपि ज्ञानं त्वदधीनमेवेत्याह । त्वद्दत्तया वयुनया ज्ञानेन भवंतं शरणं प्रपन्नो ब्रह्मा इदं विश्वमचष्टापश्यत् । कथम् । सुप्तः पुरुषः प्रबुद्धः सन्यथा पश्यति तद्वत् । अत आपवर्ग्यां मुक्तास्तेषामपि शरणम् । कृतविदा सर्वेंद्रियजीवनेन त्वत्कृतमुपकारं जानता कथं विस्मर्यते । एवंभूतं त्वामभजंतः कृतघ्ना इत्यर्थः ॥ ८ ॥ ये च मादृशाः कामाद्यर्थं भजंति तेऽतिमूढा इत्याह । नूनमिति । भवाप्ययौ जन्ममरणे तद्विमोक्षे हेतुं त्वामन्यहेतोः कामाद्यर्थं ये भजंति ते नूनं विमुष्टमतयो वंचितचित्ताः यतस्ते कल्पतरुं त्वामर्चंति ततः कुणपतुल्येन देहेनोपभोग्यं सुखमिच्छंति नचेच्छायोग्यं तदित्याह । यत्स्पर्शजं

त्वद्दत्तया वयुनयेदमचष्ट विश्वं सुप्तप्रबुद्ध इव नाथ भवत्प्रपन्नः ॥ तस्यापवर्ग्यशरणं तव पादमूलं विस्मर्यते कृतविदा कथमार्तबंधो ॥ ८ ॥ नूनं विमुष्टमतयस्तव मायया ते ये त्वां भवाप्ययविमोक्षणमन्यहेतोः ॥ अर्चंति कल्पकतरुं कुणपोपभोग्यमिच्छंति यत्स्पर्शजं निरयेऽपि नृणाम् ॥ ९ ॥ या निर्वृतिस्तनुभृतां तव पादपद्मध्यानाद्भवज्जनकथाश्रवणेन वा स्यात् ॥ सा ब्रह्मणि स्वमहिमन्यपि नाथ माभूत्किंत्वंतकासिलुलितात्पततां विमानात् ॥ १० ॥ भक्तिं मुहुः प्रवहतां त्वयि मे प्रसंगो भूयादनंत महताममलाशयानाम् ॥ येनांजसोल्बणमुरुव्यसनं भवाब्धिं नेष्ये भवद्गुणकथामृतपानमत्तः ॥ ११ ॥ तेन स्मरंत्यतितरां प्रियमीश मर्त्यं ये चान्वदः सुतसुहृद्गृहवित्तदाराः ॥ ये त्वब्जनाभ भवदीयपदारविंदसौगंध्यलुब्धहृदयेषु कृतप्रसंगाः ॥ १२ ॥

विषयसंबंधजन्यं सुखं तन्नरकेऽपि भवति ॥ ९ ॥ ननु स्वर्गादिसुखं सकामैः प्राप्यते निष्कामभजने तन्न स्यादित्यत आह । येति । स्वमहिमनि निजानंदरूपेऽपि माभूत् न भवतीत्यर्थः । अंतकस्यासिना कालेन लुलितात्खंडिताद्विमानात्पततां सा नास्तीति किमु वक्तव्यम् ॥ १० ॥ अतस्ते कथाश्रवणाय सत्संगतिं देहीत्याह । भक्तिं त्वयि प्रवहतां सातत्येन कुर्वताम् । ननु मोक्षं किं न याचसेऽत आह । येन महत्प्रसंगेनांजसा अयत्नत एवोल्बणि व्यसनानि यस्मिंस्तम् । नेष्ये पारं गमिष्यामि भवद्गुणकथैवामृतं तस्य पानेन मत्तः सन् ॥ ११ ॥ कथामृतपानस्य मादकत्वमाह । तेऽतितरां प्रियमपि मर्त्यं देहं न स्मरंति नानुसंदधते ये च सुतादयः अदः मर्त्यमनुसंबद्धास्तानपि । के ते

आहेत असें समजावें ॥ ९ ॥ हे विश्वनाथा, तुझ्या चरणकमलाचें ध्यान केलें असतां किंवा तुझ्या भक्तांचें चरित्र ऐकिलें असतां, प्राण्यांना जें सुख प्राप्त होतें तें निजानंदरूप ब्रह्माचेठिकाणींहि प्राप्त होत नाहीं मग मृत्यूच्या तरवारीनें (कालानें) तुकडे केलेल्या स्वर्गींच्या विमानांतून खालीं पडणाऱ्या जीवांना तें सुख प्राप्त होणार नाहीं हें काय सांगावें ॥ १० ॥ यास्तव हे अनंता, तुझ्याठिकाणीं निरंतर भक्ति करणाऱ्या शुद्धचित्त सत्पुरुषांचा मला वारंवार समागम घडावा. ह्मणजे ज्या सत्समागमाच्या योगानें मी तुझ्या गुणकथारूप अमृताच्या प्राशनानें मत्त होऊन, अनेक दुःखांनीं भरलेल्या ह्या भयंकर संसारसमुद्राला अनायासानें तरून जाईल ॥ ११ ॥ हे कमलनाभा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ईश्वरा, तुझ्या चरणकमलाच्या सुवासाला ज्यांचीं मनें लुब्ध झालीं आहेत अशा प्रेमळ भक्तांचा समागम करणारे जे मनुष्य आहेत ते, अत्यंत प्रिय अशा ह्या मनुष्यदेहाचें व ह्याच्या संबंधानें प्राप्त झालेल्या, पुत्र, मित्र, गृह, द्रव्य, दारा इत्यादिकांचेंहि स्मरण करीत नाहींत ॥ १२ ॥ हे जन्मादिविकाररहिता परमेश्वरा, पश्वादि तिर्यग्योनि, पर्वत, वृक्ष, पक्षी, सर्प, देव, दैत्य व मनुष्य इत्यादिकांनीं व्याप्त, बऱ्यावाईट प्रकारांनीं भरलेलें व महदादिक अनेक कारणांनीं युक्त असें हें तुझें स्थूल विराड्रूपमात्र मी जाणतों. याहून दुसरें स्वरूप कीं,–जेथें शब्दव्यापार चालत नाहीं (ज्याचें वर्णन करितां येत नाहीं) असें ब्रह्मस्वरूप मी जाणत नाहीं ॥ १३ ॥ हे ईश्वरा, कल्पाच्या समाप्तिकालीं हें सर्व जग, आपल्या उदरांत धारण करून, ज्याला साहाय्यभूत शेष आहे असा जो पुराणपुरुष भगवान् स्वस्वरूपाचेठिकाणीं दृष्टि ठेऊन त्या शेषाच्या अंकावर

न स्मरंति ये कृतप्रसंगाः केषु भवदीयपदारविंदसौगंध्ये लुब्धं हृदयं येषां तेषु । तुशब्देनान्येषां केवलयोगादिनिष्ठानां देहाद्यभिमानानिवृत्तिं दर्शयति ॥ १२ ॥ नन्वेवं विद्वानपि त्वं किमित्यभिमानं वहस्यत आह । तिर्यगिति । तिर्यङ्नगादिभिः परिचितं व्याप्तं संतोऽसंतश्च विशेषा यस्य महदादीन्यनेकानि कारणानि यस्य हेपरम अज ते इदं स्थविष्ठं विराड्रूपं केवलं वेद्मि अतः परमीश्वरस्वरूपं न वेद्मि । यत्र वादः शब्दव्यापारो नास्ति तद्ब्रह्मरूपं च न वेद्मि । अतोऽभिमानो न निवर्तत इति भावः ॥ १३ ॥ तदेवं भगवदनुकंपया तद्रूपद्वयं ज्ञात्वेश्वररूपमनुवर्णयन्नमस्करोति । कल्पांत एतदिति । एतत्त्रैलोक्यं यः पुमान् शेते स्वस्मिन्नेव दृक् न बहिर्यस्य योगनिद्रारूढत्वात् अनंत-

तिर्यङ्नगद्विजसरीसृपदेवदैत्यमर्त्यादिभिः परिचितं सदसद्विशेषम् ॥ रूपं स्थविष्ठमज ते महदाद्यनेकं नातः परं परम वेद्मि न यत्र वादः ॥ १३ ॥ कल्पांत एतदखिलं जठरेण गृह्णञ्छेते पुमान्स्वदृगनंतसखस्तदंके ॥ यन्नाभिसिंधुरुहकांचनलोकपद्मगर्भे द्युमान्भगवते प्रणतोऽस्मि तस्मै ॥ १४ ॥ त्वं नित्यमुक्तपरिशुद्धविबुद्ध आत्मा कूटस्थ आदिपुरुषो भगवांस्त्र्यधीशः ॥ यद्बुद्ध्यवस्थितिमखंडितया स्वदृष्ट्या द्रष्टा स्थितावधिमखो व्यतिरिक्त आस्से ॥ १५ ॥

सखः शेषसहायः तदंके शेषोत्संगे यस्य नाभिरेव सिंधुः समुद्रस्तस्मिन् रोहतीति तथा तस्मिन्कांचनलोकपद्मस्य गर्भे कर्णिकायां द्युमांस्तेजस्वी ब्रह्मा भवति तं प्रणतोऽस्मीत्यर्थः ॥ १४ ॥ ननु ममापि स्वापाद्यवस्थावत्त्वे को जीवाद्विशेष इत्यत आह । त्वं तु व्यतिरिक्तो जीवविलक्षण आस्से तिष्ठसि । वैलक्षण्यमेवाह । त्वं तु नित्यमुक्तो जीवस्तु त्वत्प्रसादान्मुच्यते । त्वं परिशुद्धः स तु मलिनः । त्वं तु विबुद्धः स त्वज्ञः । त्वमात्मा सतु जडः। त्वं कूटस्थः स तु विकारी । त्वमादिपुरुषः स त्वादिमान् । त्वं तु भगवान्स तु भगहीनः । त्वं त्रयाणां गुणानामधीशः स तु परतंत्रः । कुत एतद्वैलक्षण्यं यद्यतो बुद्ध्यवस्थितिं बुद्धेस्तां तामवस्थामखंडितया स्वदृष्ट्या चिच्छक्त्या द्रष्टा

शयन करितो, व ज्याच्या नाभिरूपी समुद्रांत सर्व लोकांचें उत्पत्तिस्थान असें सुवर्णमय कमल उत्पन्न होऊन त्याच्यामध्यें तेजस्वी असा ब्रह्मदेव प्रगट होतो, त्या तुज भगवंताला मी नमस्कार करीत आहें ॥ १४ ॥ आतां जीवाहून माझेठिकाणीं काय विशेष आहे असें ह्मणशील तर–हे ईश्वरा, तूं जीवाहून अत्यंत निराळा आहेस, कसा तें पहा–तूं नित्यमुक्त आहेस, जीव तुझ्या प्रसादानें मुक्त होतो; तूं सर्वप्रकारें शुद्ध आहेस, जीव मलिन आहे; तूं ज्ञानस्वरूपी आहेस, जीव अज्ञानी आहे; तूं आत्मा आहेस, जीव जड आहे; तूं निर्विकारी आहेस, जीवाला अनेक विकार प्राप्त होतात; तूं सर्वांचा आदिपुरुष असून अनादिमान् आहेस, जीव आदिमान् आहे; तूं षड्गुणैश्वर्यसंपन्न आहेस जीव ऐश्वर्यहीन आहे; तूं तिन्ही गुणांचें आधिपत्य चालवितोस, जीव पराधीन आहे. याचें कारण, बुद्धीच्या अनेक प्रकारच्या अवस्था तूं आपल्या अखंड चैतन्यशक्तीच्या ॥ ३० ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

यो गानें पाहणारा आहेस, जीवाला ती शक्ति नाहीं. ह्मणून तूंच जगाच्या पालनाविषयीं यज्ञाधिपति विष्णु होऊन राहिला आहेस ॥ १९ ॥ ज्याचेठिकाणीं एकमेकांशीं
विरुद्ध भावानें असलेल्या विद्यादिक अनेकप्रकारच्या शक्ति, अनुक्रमानें अकस्मात् उत्पन्न होतात, व ज्याच्यापासून जगाची उत्पत्ति होत्ये त्या-एक, अनंत, आद्य,
आनंदरूपी, निर्विकारी व ब्रह्मस्वरूपी अशा तुला मी शरण आलों आहें ॥ १६ ॥ हे भगवन्, परमानंदमूर्ते अशा तुझ्या चरणकमलाचें निष्कामबुद्धीनें सेवन करणाऱ्या
पुरुषाला, राज्यादिकांपेक्षां श्रेष्ठ असें परमार्थ फल जरी निःसंशय प्राप्त होतें तथापि हे श्रेष्ठ ईश्वरा, भक्तांवर अनुग्रह करण्याविषयीं तत्पर असा तूं, नवीन व्यालेली गाय
जशी आपल्या वत्साला दूध पाजित्ये आणि लांडगेवगैरे पशूंपासून त्याचें रक्षण करित्ये त्याप्रमाणें सकाम आराधन करणाऱ्याहि आह्मां भक्तांला इच्छित वर

पश्यसि द्रष्टेति तृन्प्रत्ययांतः अतो बुद्ध्यवस्थितिमित्यत्र षष्ठ्यभावः । तथाभूत एव त्वं स्थितौ पालनेऽधिमखो यज्ञाधिष्ठाता श्रीविष्णुः ॥ १९ ॥ तमेव ब्रह्मरूपेण ज्ञातं
नमस्करोति । यस्मिन्निति । पतंत्यकस्मादुद्भवंति विश्वस्य भवो यस्मात् । एकमखंडम् । आद्यमनादिम् ॥ १६ ॥ सकामभजनादपि मोक्षमाशासान आह । हेभगवन्पुरुषार्थः
परमानंदः स एव मूर्तिर्यस्य तस्य तव पादपद्ममाशिषो राज्यादेः सकाशात्सत्या आशीः परमार्थफलं हि निश्चितम् । कस्य तथा तेन प्रकारेण त्वमेव पुरुषार्थ इत्येवं

यस्मिन्विरुद्धगतयो ह्यनिशं पतंति विद्यादयो विविधशक्तय आनुपूर्व्यात् ॥ तद्ब्रह्म विश्वभवमेकमनंतमाद्यमानंदमात्रमविकारमहं प्रपद्ये
॥ १६ ॥ सत्याशिषो हि भगवंस्तव पादपद्ममाशीस्तथाऽनुभजतः पुरुषार्थमूर्तेः ॥ अप्येवमार्य भगवान्परिपाति दीनान्वाश्रेव वत्स-
कमनुग्रहकातरोऽस्मान् ॥ १७ ॥ मैत्रेय उवाच ॥ अथाभिष्टुत एवं वै सत्संकल्पेन धीमता ॥ भृत्यानुरक्तो भगवान्प्रतिनंद्येदमब्र-
वीत् ॥ १८ ॥ श्रीभगवानुवाच ॥ वेदाहं ते व्यवसितं हृदि राजन्यबालक ॥ तत्प्रयच्छामि भद्रं ते दुरापमपि सुव्रत ॥ १९ ॥ ना-
न्यैरधिष्ठितं भद्र यद्भ्राजिष्णु ध्रुवक्षिति ॥ यत्र ग्रहर्क्षताराणां ज्योतिषां चक्रमाहितम् ॥ २० ॥ मेढ्यां गोचक्रवत्स्थास्नु परस्तात्क-
ल्पवासिनाम् ॥ धर्मोऽग्निः कश्यपः शुक्रो मुनयो ये वनौकसः ॥ चरंति दक्षिणीकृत्य भ्रमंतो यत्सतारकाः ॥ २१ ॥

निष्कामतया अन्वनुभजतः । यद्यप्येवं तथापि हेआर्य स्वामिन्दीनान्सकामानप्यस्मान्भगवान्भवान्परिपाति संसारभयाद्रक्षत्येव । यतः अनुग्रहे हिताचरणे कातरः परवशः
यथा नवप्रसूता वाश्रा धेनुर्वत्सं क्षीरं पाययति वृकादिभ्यो रक्षति च तद्वत् ॥ १७ ॥ १८ ॥ व्यवसितं संकल्पितम् ॥ १९ ॥ तत्प्रयच्छामीत्युक्तं किं तदित्यपेक्षायामाह ।
यथा नवप्रसूता वाश्रा धेनुर्वत्सं क्षीरं पाययति वृकादिभ्यो रक्षति च तद्वत्
नान्यैरिति सार्धद्वाभ्याम् । हेभद्र ध्रुवा क्षितिर्निवासो यस्मिन् । यत्र यस्मिन् आहितमर्पितम् ॥ २० ॥ धान्याक्रमणाय भ्राम्यमाणानां पशूनां बंधनस्तंभो मेढी तस्यां बलीवर्द-

---

देऊन शेवटीं संसारभयापासून आमचे रक्षण करितोस ॥ १७ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, सद्वासना धारण करणाऱ्या बुद्धिमान् ध्रुवानें, याप्रमाणें स्तुति
केली असतां, भक्तवत्सल भगवंतानें त्या स्तुतीचा आनंदपूर्वक स्वीकार करून असें भाषण केलें कीं,– ॥ १८ ॥ श्रीभगवान् ह्मणाला– हे राजपुत्रा ध्रुवा, तुझ्या
मनामध्यें असलेला संकल्प मी जाणत आहें, तुझें कल्याण असो. तुला जें पद पाहिजे तें मिळणें जरी दुर्लभ आहे तथापि तूं उत्तम तपश्चर्या केली आहेस ह्मणून तें पद
मीं तुला देतों ॥ १९ ॥ हे कल्याणरूपा, जें तेजस्वी अचल स्थान आजपर्यंत दुसऱ्या कोणीहि प्राप्त करून घेतलेलें नाहीं. जेथें ग्रह, नक्षत्रें व तारे या ज्योतिर्गणाचें
चक्र, स्थापन केलेलें आहे ॥ २० ॥ जें कल्पपर्यंत राहणाऱ्या लोकांपेक्षां चिरकाल राहणारें आहे. नक्षत्ररूपी धर्म, अग्नि, कश्यप, शुक्र व तसेच तपश्चर्येसाठीं वनांत

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राहणारे ऋषि, हे ज्याला उजवें घालून, खांबाच्या सभोंवतीं धान्यादिकमळण्यासाठीं फिरणाऱ्या बैलांच्या मालिकेप्रमाणें फिरत असतात, तें स्थान मी तुला दिलें आहे ॥ २१ ॥ तुझा पिता उत्तानपाद राजा, तुला पृथ्वीचें राज्य देऊन वनांमध्यें निघून गेला असतां, धर्माचा आश्रय करणारा व ज्याचीं इंद्रियें कधींहि श्रम पावणार नाहींत असा तूं छत्तीस हजारवर्षेंपर्यंत पृथिवीचें संरक्षण करिशील ॥ २२ ॥ पुढें तुझा उत्तमनामक सापत्नभ्राता वनामध्यें मृगयेला जाऊन, तेथें नष्ट झाला असतां, त्याचेठिकाणीं मन ठेवणारी तुझी सापत्नमाता सुरुचि त्याचा शोध करण्याकरितां वनांत जाऊन ती वणव्यामध्यें प्रवेश करील (वणव्यांत सांपडून मरण पावेल) ॥ २३ ॥ नंतर तूं, यज्ञमूर्ति अशा माझें पुष्कळदक्षिणांनीं युक्त अशा यज्ञांनीं यजन करून व या लोकीं उत्तम प्रकारचे विषयभोग भोगून, शेवटीं माझें स्मरण करिशील ॥ २४ ॥ नंतर तूं , जेथें गेलेला मनुष्य पुनः संसारांत येत नाहीं त्या सप्तर्षिमंडळाच्याही वर असलेल्या व सर्व लोकांनीं नमस्कृत अशा माझ्या अचळ स्थानीं गमन करिशील ॥ २५ ॥

समूहवत् अवांतरकल्पवासिनां परस्तादपि स्थास्नु लोकत्रयनाशेऽप्यनश्वरम् । धर्माग्न्यादयो नक्षत्ररूपाः वनौकसः सप्तर्षयो यत्प्रदक्षिणीकृत्य भ्रमंतश्चरंति ॥ २१ ॥ एतच्च राज्यानंतरं भविष्यतीत्याह । प्रस्थित इति । तुभ्यं पृथ्वीं दत्त्वा वनं प्रस्थिते भावे क्तः । वनं प्रति दीर्घंगमने । कृते सति रक्षिता रक्षिष्यसि ॥ २२ ॥ त्वया असंकल्पितमपि

प्रस्थिते तु वनं पित्रा दत्त्वा गां धर्मसंश्रयः ॥ षट्त्रिंशद्वर्षसाहस्रं रक्षिताऽव्याहतेंद्रियः ॥ २२ ॥ त्वद्भ्रातर्युत्तमे नष्टे मृगयायां तु त-
न्मनाः ॥ अन्वेषंती वनं माता दावाग्निं सा प्रवेक्ष्यति ॥ २३ ॥ इष्ट्वा मां यज्ञहृदयं यज्ञैः पुष्कलदक्षिणैः ॥ भुक्त्वा चेहाशिषः सत्या
अंते मां संस्मरिष्यसि ॥ २४ ॥ ततो गंतासि मत्स्थानं सर्वलोकनमस्कृतम् ॥ उपरिष्टादृषिभ्यस्त्वं यतो नावर्तते गतः ॥ २५ ॥
मैत्रेय उवाच ॥ इत्यर्चितः स भगवानतिदिश्यात्मनः पदम् ॥ बालस्य पश्यतो धाम स्वमगाद्गरुडध्वजः ॥ २६ ॥ सोऽपि संक-
ल्पजं विष्णोः पादसेवोपसादितम् ॥ प्राप्य संकल्पनिर्वाणं नातिप्रीतोऽभ्यगात्पुरम् ॥ २७ ॥ विदुर उवाच ॥ सुदुर्लभं यत्परमं
पदं हरेर्मायाविनस्तच्चरणार्चनार्जितम् ॥ लब्ध्वाप्यसिद्धार्थमिवैकजन्मना कथं स्वमात्मानममन्यतार्थवित् ॥ २८ ॥ मैत्रेय उवाच ॥
मातुः सपत्न्या वाग्बाणैर्हृदि विद्धस्तु तान्स्मरन् ॥ नैच्छन्मुक्तिपतेर्मुक्तिं तस्मात्तापमुपेयिवान् ॥ २९ ॥

मद्भक्तस्य तव द्रोहादेवं भविष्यतीत्याह । त्वद्भ्रातरिति । सा सुरुचिर्दावाग्निं प्रवेक्ष्यति ॥ २३ ॥ किंच इष्ट्वा माम् । यज्ञो हृदयं प्रिया मूर्तिर्यस्य तम् ॥ २४ ॥ यतः स्थानात् ॥ २५ ॥ अतिदिश्य दत्त्वा ॥ २६ ॥ संकल्पजं मनोरथम् । पादसेवया प्रापितम् । संकल्पस्य निर्वाणं समाप्तिर्यस्मात् ॥ २७ ॥ मायाविनः सकामस्य यत्सुदुर्लभं हरेः पदं तदेकेनैव जन्मना लब्ध्वाऽपि स्वमात्मानं मनोऽसिद्धार्थमप्राप्तमनोरथमिव कथममन्यत । पुरुषार्थविदपि ॥ २८ ॥ २९ ॥

मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, याप्रमाणें ध्रुवानें आराधन केलेला तो भगवान् गरुडध्वज, ध्रुवाला आपलें अढळपद देऊन, तो ध्रुवबालक पाहत असतां, आपल्या स्थानास निघून गेला ॥ २६ ॥ तो ध्रुवही विष्णूच्या चरणसेवेनें प्राप्त झालेलें व ज्याच्या पुढें सर्व मनोरथांची समाप्ति आहे असें उत्तम मनोरथरूप अढळपद पावोनहि अतिसंतुष्ट न होत्साता आपल्या नगरीला परत आला ॥ २७ ॥ विदुर ह्मणाला– हे मैत्रेय ऋषे, सकाम पुरुषाला अत्यंत दुर्लभ जें श्रीहरीचें परमपद (अढळपद) तें श्रीहरीच्या चरणाची आराधना करून एकाच जन्मानें मिळवून घेतलें असतांहि, पुरुषार्थाचें तत्त्व जाणणाऱ्या त्या ध्रुवानें, आपणाला अपूर्णमनोरथ असल्यासारखें कांबरें मानिलें ? ॥ २८ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, सापत्नमातेच्या वाग्बाणांनीं हृदयामध्यें विद्ध झालेल्या व त्या वाग्बाणांचें स्मरण करणाऱ्या त्या ध्रुवानें मुक्तिदात्या भगवंतापा- ॥ ३१ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सून मुक्तीची इच्छा केली नाहीं, ह्मणून तो पश्चात्ताप पावला ॥ २९ ॥ ध्रुव ह्मणाला– अरेरे ! आमरणांत ब्रह्मचर्य व्रत धारण करणारे सनंदादिक ऋषिहि, अनेक जन्मामध्यें अभ्यास केलेल्या समाधीच्या योगानें ज्याच्या स्वरूपाचें ज्ञान संपादन करितात, त्या देवाच्या चरणाच्या छायेला मी केवळ सहा महिन्यांनीं प्राप्त झालों असूनहि भेदबुद्धि ठेविल्यामुळें दूर झालों !! ॥ ३० ॥ अहो मंदभाग्य अशा माझा केवढा बरें हा अज्ञानपणा तें पहा ! संसाराचा नाश करणाऱ्या भगवंताच्या चरणाजवळ जाऊन जें नश्वर पद त्याची मी याचना केली ॥ ३१ ॥ ज्या मी अतिनीचानें नारदाचें वचन खरें असतांहि तें स्वीकारिलें नाहीं, त्या माझी बुद्धि, माझ्यापेक्षां आपणास कमीपणा येईल ह्मणून तो न सहन करणाऱ्या देवांनीं दूषित (भ्रंशयुक्त) केली ॥ ३२ ॥ आत्मवस्तूखेरीज दुसरें कांहींच सत्य नसतांहि देवाच्या मायेचा आश्रय करून, जसा

तापमेवाह । समाधिनेति सार्धैः षड्भिः। नैके अनेके भवा यस्मिन् । बहुजन्माभ्यस्तेनेत्यर्थः । प्रणामस्तुत्यादिसमये गरुडाधिरूढस्य हरेः पादच्छायायां स्थितमात्मानं स्मरन्नाह । छायामुपेत्येति । पृथङ्मतिर्भेददृष्टिः सन् हाकष्टमिति भावः ॥ ३० ॥ अनात्म्यमात्मशून्यत्वमज्ञत्वम् । भवच्छेत्तुर्यदंतवत्तदयाचे याचितवानस्मि ॥३१॥ अज्ञत्वे कारणं संभावयति । मतिरिति । पतद्भिर्मदपेक्षयाधः प्राप्नुवद्भिरतएवासहनशीलैः नाधुनाप्यवमानं ते इत्यादिसत्यमपि नारदस्य वचो यो न गृहीतवानस्मि तस्य मे मतिर्विदूषिता ॥ ३२॥ किंच दैवीमिति । प्रसुप्तः स्वप्ना-

ध्रुव उवाच ॥ समाधिना नैकभवेन यत्पदं विदुः सनंदादय ऊर्ध्वरेतसः ॥ मासैरहं षड्भिरमुष्य पादयोश्छायामुपेत्यापगतः पृथङ्मतिः ॥ ३० ॥ अहो बत ममानात्म्यं मंदभाग्यस्य पश्यत ॥ भवच्छिदः पादमूलं गत्वाऽयाचे यदंतवत् ॥ ३१ ॥ मतिर्विदूषिता देवैः पतद्भिरसहिष्णुभिः ॥ यो नारदवचस्तथ्यं नाग्राहिषमसत्तमः ॥ ३२ ॥ दैवीं मायामुपाश्रित्य प्रसुप्त इव भिन्नदृक् ॥ तप्ये द्वितीयेऽप्यसति भ्रातृभ्रातृव्यहृद्रुजा ॥ ३३ ॥ मयैतत्प्रार्थितं व्यर्थं चिकित्सेव गतायुषि ॥ प्रसाद्य जगदात्मानं तपसा दुष्प्रसादनम् ॥ भवच्छिदमयाचेऽहं भवं भाग्यविवर्जितः ॥ ३४ ॥ स्वाराज्यं यच्छतो मौढ्यान्मानो मे भिक्षितो बत ॥ ईश्वरात्क्षीणपुण्येन फलीकारानिवाधनः ॥ ३५ ॥ मैत्रेय उवाच ॥ न वै मुकुंदस्य पदारविंदयो रजोजुषस्तात भवादृशा जनाः ॥ वांछंति तद्दास्यमृतेऽर्थमात्मनो यदृच्छया लब्धमनःसमृद्धयः ॥ ३६ ॥

निव पश्यन् द्वितीयेऽसत्यपि भ्रातैव भ्रातृव्यः शत्रुरिति दृष्ट्या हृद्रुजा हृदयशोकेन तप्ये तापमनुभवामि ॥ ३३ ॥ किंच मया प्रसाद्य यत्प्रार्थितं तद्व्यर्थमित्याह । भवच्छिदमिति ॥ ३४ ॥ एतदेव सदृष्टांतमाह । स्वाराज्यं निजानंदं प्रयच्छतः सकाशादभिमानः क्षीणपुण्येन मया भिक्षितो याचितः क्षीणेन पुण्येनेति वा दृष्टांत एव संबंधः । यथाऽधन ईश्वराच्चक्रवर्तिनः फलीकारान्सतुषतंडुलकणान् याचते तद्वत् ॥ ३५ एवं निःस्पृहत्वं तस्य युक्तमित्याह । तस्य दास्यं विनान्यमर्थमात्मनो नैव वांछंति । यदृच्छयैव लब्धेन

निजलेला पुरुष स्वप्नामध्यें मनानेंच कल्पिलेले सर्पव्याघ्रादिक पदार्थ खरे मानून दुःख पावतो त्याप्रमाणें, भेददर्शी असा मी, भ्राता हाच आपला शत्रु अशा भेददृष्टिरूप हृद्रोगानें अनुताप पावत आहें ॥ ३३ ॥ अहो काय सांगावें ! जसें आयुष्य सरलेल्या पुरुषाचेठिकाणीं रोगाचें निदान करणें व्यर्थ आहे त्याप्रमाणें, तपश्चर्येनें प्रसन्न होण्यास फार कठीण अशा जगदात्म्याला प्रसन्न करून त्याच्याजवळ प्रार्थना करून मी मिळविलेलें हें अचल स्थान व्यर्थ आहे. कारण, संसाराचा नाश करणाऱ्या भगवंताजवळ भाग्यहीन अशा मी, संसारच मागून घेतला आहे ॥ ३४ ॥ जसें निर्धन मनुष्यानें, सार्वभौमराजा प्रसन्न झाला असतां, त्यापासून धान्यकणांनीं युक्त असलेला कोंडा मागावा त्याप्रमाणें स्वानंद देणाऱ्या ईश्वरापासून क्षीणपुण्य अशा मी मूर्खपणानें केवळ हा अभिमानच मागून घेतला आहे !! ॥ ३५ ॥ मैत्रेय ह्मणाला– बा विदुरा,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मुकुंद भगवंताच्या चरणारविंदाच्या रजःकणाचें सेवन करणारे व सहज प्राप्त झालेल्या पदार्थांनीं मनाचा संतोष मानणारे तुझ्यासारखे लोक, त्याच्या दास्याखेरीज आपणाला दुसरे कोणतेहि विषय मिळावे अशी इच्छा करीत नाहींत ॥ ३६ ॥ असो, इकडे उत्तानपाद राजानें, जसा मेलेला मनुष्य सजीव होऊन स्मशानांतून परत यावा त्याप्रमाणें आपला पुत्र आला असें वर्तमान श्रवण करून त्यानें, मज भाग्यहीनाला हें कल्याणकारक फल कोठून प्राप्त होणार, असें मानून तें वर्तमान, बराच वेळपर्यंत खरें मानिलें नाहीं ॥ ३७ ॥ परंतु पुढें 'तुझा पुत्र लवकरच परत येईल' अशा नारदाच्या वाक्यावर विश्वास ठेऊन हर्षाच्या वेगानें परवश व अतिसंतुष्ट झालेल्या त्या राजानें, बातमी आणणाऱ्या सेवकाला बहुमोलाचा हार बक्षीस दिला ॥ ३८ ॥ आणि तो राजा, सुवर्णाच्या अलंकारांनीं भूषित व उत्तम घोडे जोडलेल्या रथावर आरूढ होऊन, अनेक ब्राह्मण, कुलवृद्ध अमात्य, व बंधुजन यांनीं परिवेष्टित होत्साता ॥ ३९ ॥ आपल्या पुत्राच्या दर्शनाविषयीं उत्कंठायुक्त होऊन, शंख व दुंदुभि

मनसः समृद्धिर्येषां ते ॥ ३६ ॥ प्रस्तुतमाह । आकर्ण्येति । संपरेत्य मृत्वागतमाकर्ण्य यथा तथा न श्रद्दधे विश्वासं न चकार । अभद्रस्य मम भद्रं कुत इति मत्वा ॥ ३७ ॥ एष्यत्यचिरत इति देवर्षेर्वाक्यं श्रद्धाय ॥ ३८ ॥ ब्राह्मणादिभिः पर्यस्तः परिवृतः ॥ ३९ ॥ ४० ॥ अस्य राज्ञो महिष्यौ मध्ये उत्तमं निधाय एकामेव शिबिकां नरविमान-

आकर्ण्यात्मजमायांतं संपरेत्य यथागतम् ॥ राजा न श्रद्दधे भद्रमभद्रस्य कुतो मम ॥ ३७ ॥ श्रद्धाय वाक्यं देवर्षेर्हर्षवेगेन धर्षितः ॥ वार्ताहर्तुरतिप्रीतो हारं प्रादान्महाधनम् ॥ ३८ ॥ सदश्वं रथमारुह्य कार्तस्वरपरिष्कृतम् ॥ ब्राह्मणैः कुलवृद्धैश्च पर्यस्तोऽमात्यबंधुभिः ॥ ३९ ॥ शंखदुंदुभिनादेन ब्रह्मघोषेण वेणुभिः ॥ निश्चक्राम पुरात्तूर्णमात्मजाभीक्षणोत्सुकः ॥ ४० ॥ सुनीतिः सुरुचिश्चास्य महिष्यौ रुक्मभूषिते ॥ आरुह्य शिबिकां सार्धमुत्तमेनाभिजग्मतुः ॥ ४१ ॥ तं दृष्ट्वोपवनाभ्याश आयांतं तरसा रथात् ॥ अवरुह्य नृपस्तूर्णमासाद्य प्रेमविह्वलः ॥ ४२ ॥ परिरेभेऽगजं दोर्भ्यां दीर्घोत्कंठमनाः श्वसन् ॥ विष्वक्सेनांघ्रिसंस्पर्शहताशेषाघबंधनम् ॥ ४३ ॥ अथाजिघ्रन्मुहुर्मूर्ध्नि शीतैर्नयनवारिभिः ॥ स्नापयामास तनयं जातोद्दाममनोरथः ॥ ४४ ॥ अभिवंद्य पितुः पादावाशीर्भिश्चाभिमंत्रितः ॥ ननाम मातरौ शीर्ष्णा सत्कृतः सज्जनाग्रणीः ॥ ४५ ॥

मारुह्य ॥ ४१ ॥ उपवनस्याभ्याशे समीपे ॥ ४२ ॥ विष्वक्सेनांघ्रिसंस्पर्शेन हतमशेषमघं बंधनं च यस्य ॥ ४३ ॥ जात उद्दामो महान्मनोरथो यस्य ॥ ४४ ॥ अभिमंत्रितः पितु-

---

यांचा नाद, वेदघोष व वेणु (अलगुजें) वगैरे वाद्यांचा नाद यांसहवर्तमान आपल्या नगरांतून सत्वर बाहेर निघाला ॥ ४० ॥ तशाच ह्या राजाच्या राण्या सुनीति आणि सुरुचि ह्या, सुवर्णाचे अलंकार धारण करून उत्तमनामकपुत्रासह एकाच पालखींत बसून ध्रुवाला सामोऱ्या जाण्यास निघाल्या ॥ ४१ ॥ उपवनाजवळ येत असलेल्या त्या ध्रुवाला पाहून प्रेमानें विव्हळ झालेला तो राजा, तत्काळ रथांतून खालीं उतरून त्याच्या जवळ गेला ॥ ४२ ॥ पुत्रदर्शनाविषयीं फार दिवसपर्यंत ज्याचें मन उत्कंठित झालें होतें अशा त्या राजानें, दीर्घ श्वास टाकीत टाकीत, भगवंताच्या चरणस्पर्शानें ज्याचें सर्वपाप व बंधनें नष्ट झालीं आहेत त्या आपल्या ध्रुवपुत्राला दोन्हीं बाहूंनीं दृढ आलिंगन दिलें ॥ ४३ ॥ नंतर ज्याचा मोठा मनोरथ परिपूर्ण झाला आहे अशा त्या राजानें, पुत्राचें मस्तकाचेठिकाणीं वारंवार अवघ्राण केलें व शीतल अशा नेत्रोदकांनीं त्याला स्नान घातलें ॥ ४४ ॥ याप्रमाणें पित्यानें सत्कार केलेल्या व सज्जनांमध्यें अग्रगण्य अशा त्या ध्रुवानें, पित्याच्या चरणांस वंदन केलें असतां पित्यानें आशीर्वाद देऊन कुशलप्रश्नपूर्वक ध्रुवाशीं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

संभाषण केल्यावर त्यानें आपल्या दोन्ही मातांना मस्तकानें प्रणाम केला ॥ ४५ ॥ तेव्हां चरणाचेठिकाणीं नम्र झालेल्या त्या ध्रुवाला सुरुचीनें उठवून आलिंगन दिलें आणि प्रेमानें सद्गदित झालेल्या वाणीनें 'बाळा, पुष्कळ दिवस वांच' असा आशीर्वाद दिला ॥ ४६ ॥ हे विदुरा, सुरुचीला प्रेमभाव उत्पन्न झाला हें कांहीं आश्चर्य नाहीं. कारण, जसें उदक आपोआप खोल प्रदेशाकडे वाहत जातें त्याप्रमाणें मैत्री, सर्वभूतीं समदृष्टि, इत्यादिक गुणांच्या योगानें ज्याला भगवान् हरि प्रसन्न झाला आहे त्याला सर्वभूतें स्वतःच नम्र होतात ॥ ४७ ॥ नंतर उत्तम आणि ध्रुव ह्या उभयतांनींहि परस्परांस आलिंगन केलें. तेव्हां दोघेहि प्रेमानें विव्हळ झाले. अंगस्पर्शानें परस्परांच्या आंगावर रोमांच उभे राहिले आणि त्यांनीं वारंवार नेत्रांमध्यें आनंदाश्रु धारण केले ॥ ४८ ॥ तेव्हां या ध्रुवाची आई जी सुनीति ती तर प्राणापेक्षांहि प्रिय अशा त्या आपल्या पुत्राला आलिंगन करून त्याच्या अंगस्पर्शानें आनंदयुक्त होत्साती सर्व दुःखांना विसरली ॥ ४९ ॥ हे वीरा विदुरा, त्यावेळीं नेत्रांतून उत्पन्न झालेल्या शुभकारक आनंदा-

---

राशीर्भिः सह तेन कृतसंभाषणः ॥ ४५ ॥ ४६ ॥ सुरुच्याः प्रीतिर्नासंभावितेत्याह । यस्येति । नमंत्यनुसरंति आपो यथा स्वयमेव निम्नं देशमवतरंति ॥ ४७ ॥ ऊह-

सुरुचिस्तं समुत्थाप्य पादावनतमर्भकम् ॥ परिष्वज्याह जीवेति बाष्पगद्गदया गिरा ॥ ४६ ॥ यस्य प्रसन्नो भगवान्गुणैर्मैत्र्यादिभिर्हरिः ॥ तस्मै नमंति भूतानि निम्नमाप इव स्वयम् ॥ ४७ ॥ उत्तमश्च ध्रुवश्चोभावन्योन्यं प्रेमविह्वलौ ॥ अंगसंगादुत्पुलकावस्रौघं मुहुरूहतुः ॥ ४८ ॥ सुनीतिरस्य जननी प्राणेभ्योऽपि प्रियं सुतम् ॥ उपगुह्य जहावार्धिं तदंगस्पर्शनिर्वृता ॥ ४९ ॥ पयः स्तनाभ्यां सुस्राव नेत्रजैः सलिलैः शिवैः ॥ तदाभिषिच्यमानाभ्यां वीर वीरसुवो मुहुः ॥ ५० ॥ तां शशंसुर्जना राज्ञीं दिष्ट्या ते पुत्र आर्तिहा ॥ प्रतिलब्धश्चिरं नष्टो रक्षिता मंडलं भुवः ॥ ५१ ॥ अभ्यर्चितस्त्वया नूनं भगवान्प्रणतार्तिहा ॥ यदनुध्यायिनो वीरा मृत्युं जिग्युः सुदुर्जयम् ॥ ५२ ॥ लाल्यमानं जनैरेवं ध्रुवं सभ्रातरं नृपः ॥ आरोप्य करिणीं हृष्टः स्तूयमानोऽविशत्पुरम् ॥ ५३ ॥ तत्रतत्रोपसंक्लृप्तैर्लसन्मकरतोरणैः ॥ सवृंदैः कदलीस्तंभैः पूगपोतैश्च तद्विधैः ॥ ५४ ॥

तुर्दधतुः ॥ ४८ ॥ ४९ ॥ हेवीर वीरसुवो वधुमातुः अभिषिच्यमानाभ्यां पयस्तदा सुस्राव ॥ ५० ॥ चिरं नष्टो दर्शनमप्राप्तः रक्षिता रक्षिष्यति ॥ ५१ ॥ ५२ ॥ एवमिति व्यवहितं पित्राद्युपलालनं परामृश्यते ॥ ५३ ॥ पुरं वर्णयति । तत्रतत्रेति चतुर्भिः । सवृंदैः फलमंजरीयुक्तैः पूगानां पोतैर्बालवृक्षैस्तद्विधैः सवृंदैरुपस्कृतं प्रतिद्वारमित्युत्तरे-

---

श्रूंनीं अभिषेक होत असलेल्या त्या वीरमाता सुनीतीच्या स्तनांतून वारंवार दूध स्रवूं लागलें ॥ ५० ॥ त्यावेळीं सर्वजन, त्या राणी सुनीतीची प्रशंसा करूं लागले कीं,— तुझ्या मनाचें दुःख नाहींसें करणारा हा ध्रुव पुत्र, फार दिवस नष्ट झाला असून पुनः प्राप्त झाला ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. हा चिरकाळ भूमंडलाचें रक्षण करील ॥ ५१ ॥ आम्हांला तर निश्चयपूर्वक असें वाटतें कीं, ज्या भगवंताचें वारंवार ध्यान करणाऱ्या समर्थ पुरुषांनीं अत्यंत दुर्जय अशा मृत्यूला देखील जिंकिलें आहे त्या भक्तांचें दुःखनिवारण करणाऱ्या भगवंताची तूं पूर्वीं उत्तमप्रकारें पूजा केली होतीस ॥ ५२ ॥ हे विदुरा, अशा प्रकारें लोकांनीं गौरव केलेल्या ध्रुवाला भ्रात्यासहवर्तमान हत्तिणीवर बसवून संतुष्टचित्त व सर्वांनीं स्तुति केलेला अशा त्या राजानें नगरामध्यें प्रवेश केला ॥ ५३ ॥ तें नगर, जागोजाग लाविलेल्या शोभायमान मकराकार

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तोरणांनीं, केळफुलांनीं युक्त अशा केळीच्या स्तंभानीं व तशाच प्रकारच्या फळयुक्त असलेल्या पोफळीच्या रोप्यांनीं ॥ ५४ ॥ आणि आंब्याचे पल्लव, वस्त्रें, फुलांच्या माळा व मोत्यांचे सर हे ज्यांच्या कंठामध्यें बांधलेले लोंबत आहेत अशा दीपयुक्त उदकाच्या कलशांनीं प्रत्येक द्वारामध्यें अलंकृत केलेलें होतें ॥ ५५ ॥ तसेंच सुवर्णाच्या जरतारी छतांनीं किंवा झालऱ्यांनीं युक्त व सुंदर विमानासारख्या शिखरांनीं देदीप्यमान अशीं जीं प्राकार (कोट) गोपुरें व उंच उंच मंदिरें यांनीं जिकडेतिकडे अत्यंत सुशोभित होतें ॥ ५६ ॥ तेथें आंगणीं, गल्ल्या, राजमार्ग, दुकानें घालण्याचे कट्टे, हीं सर्व स्वच्छ केलेलीं होतीं व त्यांवर चंदनाचे सडे घातलेले होते, तसेच ठिकठिकाणीं लाह्या, अक्षता, फुलें फळें, तांदूळ व बळि हीं स्थापन केलेलीं होतीं ॥ ५७ ॥ मार्गांत ठिकठिकाणीं नगरांतील स्त्रियांनीं दृष्टी पडलेल्या ध्रुवाला प्रेमानें उत्तम आशीर्वाद देऊन त्याच्यावर पांढऱ्या मोहोऱ्या, अक्षता, दहीं, उदक, दूर्वा, फुलें आणि फळें ह्यांची वृष्टि केली. आणि त्याचीं मनोहर गाणीं गाऊं लागल्या. तेव्हां त्या ध्रुवानें, तीं सुंदर

णान्वयः ॥ ५४ ॥ चूतपल्लवाश्च वासांसि च स्रजश्च मुक्तादामानि च तेषां विशिष्टं लंबनमस्ति येषु कुंभेषु ॥ ५५ ॥ गोपुरैरगारैश्च शातकुंभाः परिच्छदाः परिकरा येषु विमानानामिव शिखरैर्द्युतिर्येषाम् ॥ ५६ ॥ चत्वरमंगनम् । रथ्या महामार्गः अट्ट उच्चस्योपरि निर्मिता भूमिका मार्गो अवांतरः मृष्टाः संमार्जिताश्चत्वरादयो यस्मिन् ॥ ५७॥

चूतपल्लववासःस्रङ्मुक्तादामविलंबिभिः ॥ उपस्कृतं प्रतिद्वारमपां कुंभैः सदीपकैः ॥ ५५ ॥ प्राकारैर्गोपुरागारैः शातकुंभपरिच्छदैः ॥ सर्वतोऽलंकृतं श्रीमद्विमानशिखरद्युभिः ॥ ५६ ॥ मृष्टचत्वररथ्याट्टमार्गं चंदनचर्चितम् ॥ लाजाक्षतैः पुष्पफलैस्तंडुलैर्बलिभिर्युतम् ॥ ५७ ॥ ध्रुवाय पथि दृष्टाय तत्रतत्र पुरस्त्रियः ॥ सिद्धार्थाक्षतदध्यंबुदूर्वापुष्पफलानि च ॥ ५८ ॥ उपजह्रुः प्रयुंजाना वात्सल्यादाशिषः सतीः ॥ शृण्वंस्तद्वल्गुगीतानि प्राविशद्भवनं पितुः ॥ ५९ ॥ महामणिव्रातमये स तस्मिन्भवनोत्तमे ॥ लालितो नितरां पित्रा न्यवसद्दिवि देववत् ॥ ६० ॥ पयःफेननिभाः शय्या दांता रुक्मपरिच्छदाः ॥ आसनानि महार्हाणि यत्र रौक्मा उपस्कराः ॥ ६१ ॥ यत्र स्फटिककुड्येषु महामारकतेषु च ॥ मणिप्रदीपा आभांति ललनारत्नसंयुताः ॥ ६२ ॥ उद्यानानि च रम्याणि विचित्रैरमरद्रुमैः ॥ कूजद्विहंगमिथुनैर्गायन्मत्तमधुव्रतैः ॥ ६३ ॥ वाप्यो वैदूर्यसोपानाः पद्मोत्पलकुमुद्वतीः ॥ हंसकारंडवकुलैर्जुष्टाश्चक्राह्वसारसैः ॥ ६४ ॥

सिद्धार्थः श्वेतसर्षपः अक्षता यवाः ॥ ५८ ॥ उपजह्रुर्व्यकिरन् । सतीः सत्यः ॥ ५९ ॥ ६० ॥ यत्र भवनोत्तमे ॥ ६१ ॥ ६२ ॥ ६३ ॥ कुमुत् कुमुदम् । पद्मादिमत्यो वाप्यः॥६४॥

गाणीं ऐकत ऐकत पित्याच्या मंदिरांत प्रवेश केला ॥ ५८ ॥ ५९ ॥ पित्यानें उत्तमप्रकारें संगोपन केलेल्या त्या ध्रुवानें, उत्तमप्रतीच्या रत्नसमूहानीं बांधलेल्या त्या सुंदर मंदिरामध्यें स्वर्गामध्यें, देव राहतात त्याप्रमाणें, आनंदानें वास केला ॥ ६० ॥ त्या गृहामध्यें दुधाच्या फेंसासारखे शुभ्र व मृदु बिछाने, हस्तिदंती छप्परपलंग, सोन्याचे जरीचे पडदे, महामोल आसनें व सोन्याचीं साहित्यें सर्वत्र पसरलीं होतीं ॥ ६१ ॥ तेथें उंची पाचेच्या व स्फटिकांच्या भिंतींच्याठिकाणीं सुंदर पुतळ्यांच्या हातांत दिलेले रत्नाचे दीप शोभत होते ॥ ६२ ॥ त्या मंदिराच्या सभोवतीं, शब्द करणारीं पक्ष्यांचीं जोडपीं व गुंजारव करणारे मत्त भ्रमरांचे समुदाय यांनीं युक्त अशा देवलोकींच्या अनेक चित्रविचित्र वृक्षांनीं रमणीय अशीं उपवनें होतीं ॥ ६३ ॥ आणि त्या उपवनांमध्यें, वैडूर्यमण्यांनीं ज्यांच्या पायऱ्या बांधलेल्या आहेत व ज्यांमध्यें तांबडीं, काळीं व पांढरीं कमळें आहेत, अशा आणि हंस व कारंडव पक्ष्यांच्या अनेक समुदायांनीं तशाच चक्रवाक आणि सारस पक्षी यांनीं सेवन केलेल्या पुष्कळ वापी (तळ्या)

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होत्या ॥ ६४ ॥ तेथें उत्तानपाद राजर्षीलाहि, पुत्राचा तो अत्यंत अद्भुत पराक्रम ऐकून व पाहून परम आश्चर्य वाटलें ॥ ६५ ॥ पुढें राजानें, आपला पुत्र ध्रुव यौवनावस्थेंत आला, प्रधानमंडळाला त्याचे विचार मान्य होऊं लागले आणि प्रजा त्याच्यावर प्रीति करूं लागल्या असें पाहून, त्याला पृथ्वीच्या राज्याचा अभिषेक केला ॥ ६६ ॥ नंतर त्या प्रजापालक राजानें, आपण वृद्ध झालों असें मनांत आणिलें आणि संसारापासून विरक्त होऊन, आत्म्याच्या गतीचा विचार करण्यासाठीं वनामध्यें गमन केलें ॥ ६७ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील चतुर्थस्कंधामध्यें ध्रुवाख्यानसंबंधी हा नववा अध्याय समाप्त झाला ॥ ९ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

आतां ह्या दहाव्या अध्यायामध्यें एकट्याच ध्रुवानें कुबेराच्या अलकानामक नगरीमध्यें जाऊन, उत्तमनामक आपल्या बंधूचा वध करणाऱ्या यक्षांचा संहार केला असा त्या ध्रुवाचा पराक्रम वर्णन केला आहे ॥ १ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, ध्रुवानें, शिशुमारनामक प्रजापतीची भ्रमिनामक कन्या वरिली. नंतर तिच्या उदरीं त्याला कल्प आणि

॥ ६५ ॥ ऊढवयसं प्राप्तयौवनम् । अनुरक्ताः प्रजा यस्मिन् ॥ ३६ ॥ प्रवयसं वृद्धम् ॥ ६७ ॥ इति चतुर्थे टीकायां नवमोऽध्यायः ॥ ९ ॥ ॥ दशमे भ्रातृहंतॄणां यक्षाणामकरोद्वधम् ॥ एक एवालकां गत्वेत्यस्य विक्रम उच्यते ॥ १ ॥ १ ॥ योषितां रत्नमिवातिमनोहरम् । कन्यारत्नं चेति वा ॥ २ ॥ यक्षेणाद्रौ हिमवति

उत्तानपादो राजर्षिः प्रभावं तनयस्य तम् ॥ श्रुत्वा दृष्ट्वाद्भुततमं प्रपेदे विस्मयं परम् ॥ ६५ ॥ वीक्ष्योढवयसं तं च प्रकृतीनां च संमतम् ॥ अनुरक्तप्रजं राजा ध्रुवं चक्रे भुवः पतिम् ॥ ६६ ॥ आत्मानं च प्रवयसमाकलय्य विशांपतिः ॥ वनं विरक्तः प्रातिष्ठद्विमृशन्नात्मनो गतिम् ॥६७ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे चतुर्थस्कंधे नवमोऽध्यायः ॥ ९ ॥ ॥ मैत्रेय उवाच ॥ प्रजापतेर्दुहितरं शिशुमारस्य वै ध्रुवः ॥ उपयेमे भ्रमिं नाम तत्सुतौ कल्पवत्सरौ ॥ १ ॥ इलायामपि भार्यायां वायोः पुत्र्यां महाबलः ॥ पुत्रमुत्कलनामानं योषिद्रत्नमजीजनत् ॥ २ ॥ उत्तमस्त्वकृतोद्वाहो मृगयायां बलीयसा ॥ हतः पुण्यजनेनाद्रौ तन्माताऽस्य गतिं गता ॥३॥ ध्रुवो भ्रातृवधं श्रुत्वा कोपामर्षशुचार्पितः ॥ जैत्रं स्यंदनमास्थाय गतः पुण्यजनालयम् ॥ ४ ॥ गत्वोदीचीं दिशं राजा रुद्रानुचरसेविताम् ॥ ददर्श हिमवद्द्रोण्यां पुरीं गुह्यकसंकुलाम् ॥ ५ ॥

हतः । आजाविति पाठे युद्धे । अस्य गतिं गता मृतेत्यर्थः ॥ ३ ॥ कोपामर्षशुचां द्वंद्वैक्यम् । तेनार्पितो व्याप्तः जैत्रं जयहेतुम् । पुण्यजनालयमलकाम् ॥ ४ ॥ रुद्रानुचरा

वत्सर असे दोन पुत्र झाले ॥ १ ॥ तसाच त्या महाबळी ध्रुवानें इलानामक वायुकन्येशीं विवाह करून घेतला. पुढें त्या भार्येच्याठिकाणीं त्याला उत्कल नांवाचा एक पुत्र आणि एक सुंदर कन्या अशीं दोन मुलें झालीं ॥ २ ॥ उत्तम तर आपला विवाह करण्यापूर्वींच मृगया करण्याकरितां हिमालय पर्वतावर गेला असतां, तेथें एका बलाढ्य यक्षानें त्याचा वध केला. तेव्हां त्याच्या शोधाकरितां त्याची माता (सुरुचि) वनांत गेली होती तीहि वणव्यांत सांपडून मरण पावली ॥ ३ ॥ इकडे आपल्या भ्रात्याचा वध यक्षानें केला असें वर्तमान ऐकून, क्रोध, असहनशीलता, आणि शोक यांनीं व्याप्त झालेला ध्रुव जयशील अशा रथांत आरोहण करून यक्षांच्या राजधानीवर (अलकेवर) स्वारी करण्यास निघाला ॥ ४ ॥ तो राजा, प्रथम शंकराच्या अनुचरांनीं (भूतगणांनीं) सेवन केलेल्या उत्तरदिशेकडे जाऊन त्यानें हिमाचलाच्या द्रोणीचेठिकाणीं (चोंहोबाजूंकडून उंच उंच टेंकड्यांनीं वेष्टिलेल्या प्रदेशामध्यें) गुह्यकांनीं परिपूर्ण

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अशी एक नगरी अवलोकन केली ॥ ५ ॥ नंतर महाशक्तिमान् अशा त्या ध्रुवानें आकाश व दिशा यांचेठिकाणीं प्रतिध्वनि उत्पन्न करित करीत आपला शंख वाजविला त्याच्या शब्दानें यक्षांच्या स्त्रिया, कावऱ्याबावऱ्या होऊन अत्यंत भयभीत झाल्या ॥ ६ ॥ नंतर त्या शब्दाला असहन करणारे बलाढ्य ते कुबेराचे महायोद्धे यक्ष, लागलेच आयुधें सज्ज करून नगरींतून बाहेर पडले व ध्रुवाच्या अंगावर धांवून आले ॥ ७ ॥ तेव्हां प्रचंड धनुष्य धारण करणाऱ्या त्या महारथी ध्रुववीरानें, आपल्या अंगावर चालून येणाऱ्या त्या एकलक्ष तीस हजार यक्षांना, एकेकाला तीन तीन याप्रमाणें बाण मारून सर्वांना वेधून टाकिलें ॥ ८ ॥ त्या वेळीं ते सर्वहि यक्ष, ललाटाचेठिकाणीं लागलेल्या त्या बाणांनीं आपला पराजय झाला असें मानून त्यांनीं ध्रुवाच्या त्या कर्माची प्रशंसा केली ॥ ९ ॥ नंतर, पादस्पर्श सहन न करणाऱ्या सर्पांप्रमाणें त्याचें तें कर्म सहन न करणाऱ्या व उसनें फेडण्याची इच्छा करणाऱ्या त्या यक्षांनींहि, त्या ध्रुवावर एकदम दुप्पट (सहा सहा) बाणांचे प्रहार केले ॥ १० ॥ नंतर अत्यंत

भूतादयः ॥ ५ ॥ दध्मौ वादितवान् । येन शंखवादनेन हेक्षत्तः उपदेव्यो यक्षस्त्रियः ॥ ६ ॥ ७ ॥ एकैकं त्रिभिस्त्रिभिरित्येवं सर्वांस्त्रयोदशायुतानि यक्षान्युगपदहन् जघान

दध्मौ शंखं बृहद्बाहुः खं दिशश्चानुनादयन् ॥ येनोद्विग्नदृशः क्षत्तरुपदेव्योऽत्रसन् भृशम् ॥ ६ ॥ ततो निष्क्रम्य बलिन उपदेवमहाभटाः ॥ असहंतस्तं निनादमभिपेतुरुदायुधाः ॥ ७ ॥ स तानापततो वीर उग्रधन्वा महारथः ॥ एकैकं युगपत्सर्वानहन् बाणैस्त्रिभिस्त्रिभिः ॥ ८ ॥ ते वै ललाटलग्नैस्तैरिषुभिः सर्व एव हि ॥ मत्वा निरस्तमात्मानमाशंसन् कर्म तस्य तत् ॥ ९ ॥ तेऽपि चामुममृष्यंतः पादस्पर्शमिवोरगाः ॥ शरैरविध्यन्युगपद्द्विगुणं प्रचिकीर्षवः ॥ १० ॥ ततः परिघनिस्त्रिंशैः प्रासशूलपरश्वधैः ॥ शक्त्यृष्टिभिर्भुशुंडीभिश्चित्रवाजैः शरैरपि ॥ ११ ॥ अभ्यवर्षन् प्रकुपिताः सरथं सह सारथिम् ॥ इच्छंतस्तत्प्रतीकर्तुमयुतानि त्रयोदश ॥ १२ ॥ औत्तानपादिः स तदा शस्त्रवर्षेण भूरिणा ॥ न उपादृश्यत छन्न आसारेण यथा गिरिः ॥ १३ ॥ हाहाकारस्तदैवासीत्सिद्धानां दिवि पश्यताम् ॥ हतोऽयं मानवः सूर्यो मग्नः पुण्यजनार्णवे ॥ १४ ॥ नदत्सु यातुधानेषु जयकाशिष्वथो मृधे ॥ उदतिष्ठद्रथस्तस्य नीहारादिव भास्करः ॥ १५ ॥

॥ ८ ॥ निरस्तं पराजितम् । तस्य ध्रुवस्य तत्कर्माशंसन् तुष्टुवुः ॥ ९ ॥ तेऽपि तत्कर्मासहमाना अमुमविध्यन् द्विगुणं यथाभवत्येवं षड्भिः षड्भिः प्रतिकर्तुमिच्छंतः ॥ १० ॥ चित्रवाजैर्विचित्रपक्षैः ॥ १२ ॥ ११ ॥ धारासंपातेन छन्नो गिरिरिव नैवादृश्यत ॥ १३ ॥ सूर्यतुल्यः ॥ १४ ॥ यातुधानेषु राक्षसेषु जयकाशिषु जितंजितमिति जयप्रकाश-

क्रुद्ध झालेल्या व ध्रुवाचा पराभव करण्याची इच्छा करणाऱ्या त्या १३०००० यक्षांनीं रथ व सारथि यांसहवर्तमान स्थित असलेल्या त्या ध्रुवराजावर परिघ, (लोखंडाचे सोटे), खड्ग, प्रास (भाले), शूळ, कुठार, शक्ति (बर्चीं), ऋष्टि, (पट्टे) भुशुंडी (गोफणगुंडे) आणि चित्रविचित्र पिसारे लावलेले बाण ह्यांची सारखी वृष्टि चालविली ॥ ११ ॥ १२ ॥ तेव्हां तो उत्तानपाद राजाचा पुत्र ध्रुव, मोठ्या शस्त्रवृष्टीच्या योगानें, पर्जन्यवृष्टीनें आच्छादित झालेल्या पर्वताप्रमाणें आच्छादित होऊन दिसेनासा झाला ॥ १३ ॥ त्याच वेळीं आकाशामध्यें विमानांत बसून तो प्रकार पाहणाऱ्या सिद्धांच्या मुखांतून हाहाकार शब्द निघाला. तो असा कीं,– आज हा मानव सूर्य, यक्षांच्या सेनासमुद्रांत बुडून नष्ट झाला, हाय हाय! ॥ १४ ॥ इकडे समरांगणांत 'आपणाला जय मिळाला' असें स्पष्ट बोलून दाखविणारे, यक्ष, मोठमोठ्यानीं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

गर्जना करूं लागले असतां, इतक्यांत धुक्यांतून जसा सूर्य बाहेर पडतो त्याप्रमाणें त्या ध्रुवाचा रथ अस्त्रौघांतून बाहेर पडला ॥ १५ ॥ तेव्हां आपल्या दिव्य धनुष्याचा टणत्कार शब्द करणाऱ्या व शत्रूंच्या मनांत खेद उत्पन्न करणाऱ्या अशा त्या ध्रुवानें, जसें वाऱ्यानें अभ्रपटल उडवावें त्याप्रमाणें बाणांच्या योगेंकरून त्या अस्त्रसमूहाचें अगदीं चूर्ण करून टाकिलें ॥ १६ ॥ धनुष्यापासून सुटलेले ध्रुवाचे ते तीक्ष्ण बाण, जशीं इंद्राचीं वज्रें पर्वतांच्या उदरांत शिरावीं त्याप्रमाणें राक्षसांचीं कवचें फोडून त्यांच्या शरीरांत प्रविष्ट झाले ॥ १७ ॥ हे विदुरा, त्यावेळीं वीरांना मनोहर अशा त्या रणभूमी, बाणांनीं तोडलेल्या त्या यक्षांच्या सुंदर कुंडलयुक्त मस्तकांनीं, सुवर्णमय तालवृक्षांसारख्या तेजस्वी मांड्यांनीं, कडीं तोडेवगैरे घातलेल्या सुंदर हातांनीं व महामोलाच्या-हार, बाहुभूषणें, मुकुट व पागोटीं यांनीं व्याप्त झाल्या असल्यानें शोभूं लागल्या ॥ १८ ॥ १९ ॥ त्या क्षत्रियवर्य ध्रुवाच्या बाणांनीं हत झालेल्या यक्षांतून जे कांहीं राक्षसगण अवशिष्ट राहिले होते तेही बहुत करून छिन्नभिन्नअवयव होऊन

केषु सत्सु ॥ १५ ॥ व्यधमत्संचूर्णयामास ॥ १६ ॥ वर्माणि कवचानि ॥ १७ ॥ शिरःप्रमुखैरास्तृताः प्रकीर्णा रेजुरिति द्वयोरन्वयः ॥ १८ ॥ १९ ॥ प्रायो बाहुल्येन विवृक्णाः संछिन्ना अवयवा येषाम् ॥ २० ॥ आततायिनं शस्त्रपाणिम् ॥ २१ ॥ इति ब्रुवन्नित्यत्रापि न मायिनामित्यादेरनुषंगः । चित्ररथो ध्रुवः यत्तो यत्नवान् । प्रतियोगः

धनुर्विस्फूर्जयन्दिव्यं द्विषतां खेदमुद्वहन् ॥ अस्त्रौघं व्यधमद्बाणैर्घनानीकमिवानिलः ॥ १६ ॥ तस्य ते चापनिर्मुक्ता भित्त्वा वर्माणि रक्षसाम् ॥ कायानाविविशुस्तिग्मा गिरीनशनयो यथा ॥ १७ ॥ भल्लैः संछिद्यमानानां शिरोभिश्चारुकुंडलैः ॥ ऊरुभिर्हेमतालाभैर्दोर्भिर्वलयवल्गुभिः ॥ १८ ॥ हारकेयूरमुकुटैरुष्णीषैश्च महाधनैः ॥ आस्तृतास्ता रणभुवो रेजुर्वीरमनोहराः ॥ १९ ॥ हतावशिष्टा इतरे रणाजिराद्रक्षोगणाः क्षत्रियवर्यसायकैः ॥ प्रायो विवृक्णावयवा विदुद्रुवुर्मृगेंद्रविक्रीडितयूथपा इव ॥ २० ॥ अपश्यमानः स तदाततायिनं महामृधे कंचन मानवोत्तमः ॥ पुरीं दिदृक्षन्नपि नाविशद्द्विषां न मायिनां वेद चिकीर्षितं जनः ॥ २१ ॥ इति ब्रुवंश्चित्ररथः स्वसारथिं यत्तः परेषां प्रतियोगशंकितः ॥ शुश्राव शब्दं जलधेरिवेरितं नभस्वतो दिक्षु रजोऽन्वदृश्यत ॥ २२ ॥ क्षणेनाच्छादितं व्योम घनानीकेन सर्वतः ॥ विस्फुरत्तडिता दिक्षु त्रासयन्स्तनयित्नुना ॥ २३ ॥ ववृषू रुधिरौघासृक्पूयविण्मूत्रमेदसः ॥ निपेतुर्गगनादस्य कबंधान्यग्रतोऽनघ ॥ २४ ॥

पुनरुद्योगस्तस्माच्छंकितः नभस्वतो वायोर्हेतोः ॥ २२ ॥ विस्फुरंत्यस्तडितो यस्मिंस्तेन त्रासयंतः स्तनयित्नवोऽशनयो यस्मिन् ॥ २३ ॥ ववृषुर्निपेतुरित्यर्थः । न

जसे सिंहाशीं झूज खेळून दुखापत झालेले गजेंद्र, पळून जातात त्याप्रमाणें रणांगणांतून पळून गेले ॥ २० ॥ त्या वेळीं त्या श्रेष्ठ ध्रुव राजाला, त्या महारणभूमीवर हातांत शस्त्र घेऊन युद्धास उभा राहिलेला कोणी एकहि योद्धा दिसेनासा झाला तेव्हां त्याच्या मनांत शत्रूंची नगरी पहाण्याची इच्छा होती परंतु तो त्या नगरींत प्रविष्ट झाला नाहीं. कारण मायावी शत्रूंचा, पुढें काय करावयाचा बेत असतो तो कोणास कळत नाहीं ॥ २१ ॥ याप्रमाणें आपल्या सारथ्यास सांगून शत्रूंकडून पुनः युद्धाचा उद्योग होईल अशी शंका मनांत आणणाऱ्या व चित्रविचित्र रंगाच्या रथांत बसलेल्या त्या ध्रुवानें, एकाएकीं वाऱ्याच्या योगानें समुद्रांतूनच निघाल्यासारखा एक मोठा शब्द ऐकिला, तों दशदिशांकडे धुरळा दिसूं लागला ॥२२॥ व क्षणमात्रांत जेथें विजा चमकत आहेत व भयंकर गडगडाट शब्द उत्पन्न होत आहेत अशा चारी दिशांकडून प्राप्त झालेल्या मेघमंडळानें आकाश आच्छादून गेलें ॥ २३ ॥ ते मेघ, रक्ताचे प्रवाह, कफ, पू, विष्ठा, मूत्र, मेद यांची वृष्टि करूं लागले; व आकाशांतून या ध्रुवाच्या अग्रभागीं धडें कोसळूं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लागलीं ॥ २४ ॥ नंतर आकाशामध्यें एक पर्वत दिसूं लागला, सर्व दिशांकडून गदा, परिघ, खड्ग, मुसळें हीं आयुधें पडूं लागलीं व दगडांचा वर्षावहि होऊं लागला ॥ २५ ॥ क्रोधानें आपल्या नेत्रांतून अग्नीचें वमन करणारे, व विजेसारखे तीव्र श्वास सोडणारे असे सर्प, चोहोंकडून धाऊं लागले. तसेच उन्मत्त हत्ती, सिंह आणि व्याघ्र ह्यांचे कळपांचे कळप ध्रुवाच्या अंगावर धांवून येऊं लागले ॥ २६ ॥ तसाच समुद्र प्रलयकाळच्या समुद्राप्रमाणें उग्र व भयंकर होऊन मोठ्यानें गर्जना करीत करीत आपल्या लाटांनीं चोहोंकडून पृथ्वीला बुडवीत बुडवीत त्या ध्रुवाच्या जवळ येऊं लागला ॥ २७ ॥ हे विदुरा, क्रूर कर्में करण्याकडे ज्यांची नेहमी प्रवृत्ति असत्ये अशा त्या असुरांनीं (यक्षांनीं) आपल्या आसुरी मायेच्या योगानें याप्रकारचे धैर्यहीन पुरुषांना भयंकर असे अनेक उत्पात उत्पन्न केले ॥ २८ ॥ याप्रमाणें यक्षांनीं त्या अत्यंत दुस्तर मायेचा ध्रुवावर प्रयोग केला असें पाहून तेथें प्राप्त झालेल्या ऋषींनीं त्या ध्रुवाला कल्याणकारक असें भाषण केलें कीं, ॥ २९ ॥ मुनि ह्मणाले– हे उत्तान-

---

सृजति शरीरमित्यसृगिह श्लेष्मादि मेदसः पुंस्त्वमार्षम् । मेदांसि अस्याग्रतो निपेतुः ॥ २४ ॥ साश्मवर्षिणः अश्मसहितं यद्वर्षं तद्वंतः ॥ २५ ॥ अशनिवन्निःश्वासो येषाम् ॥ २६ ॥ २७ ॥ त्रासनानि भयंकराणि तिग्मा क्रूरा गतिः प्रवृत्तिर्येषाम् । असुरराक्षसादिशब्दैरदूरांतरत्वेन यक्षा एवोच्यंते ॥ २८ ॥ तस्य शं कल्याणमाशंसन्प्रार्थि-

ततः खे दृश्यत गिरिर्निपेतुः सर्वतो दिशम् ॥ गदापरिघनिर्स्त्रिंशमुसलाः साश्मवर्षिणः ॥ २५ ॥ अहयोऽशनिनिःश्वासा वमंतोऽग्निं रुषाक्षिभिः ॥ अभ्यधावन्गजा मत्ताः सिंहव्याघ्राश्च यूथशः ॥ २६ ॥ समुद्र ऊर्मिभिर्भीमः प्लावयन्सर्वतो भुवम् ॥ आससाद महाह्रादः कल्पांत इव भीषणः ॥ २७ ॥ एवं विधान्यनेकानि त्रासनान्यमनस्विनाम् ॥ ससृजुस्तिग्मगतय आसुर्या माययासुराः ॥२८॥ ध्रुवे प्रयुक्तामसुरैस्तां मायामतिदुस्तराम् ॥ निशाम्य तस्य मुनयः शमाशंसन्समागताः ॥ २९ ॥ मुनय ऊचुः ॥ औत्तानपादे भगवांस्तव शार्ङ्गधन्वा देवः क्षिणोत्ववनतार्तिहरो विपक्षान् ॥ यन्नामधेयमभिधाय निशम्य चाद्धा लोकोऽजसा तरति दुस्तरमंग मृत्युम् ॥ ३० ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे चतुर्थस्कंधे दशमोऽध्यायः ॥ १० ॥ मैत्रेय उवाच ॥ निशम्य गदतामेवमृषीणां धनुषि ध्रुवः ॥ संदधेऽस्त्रमुपस्पृश्य यन्नारायणनिर्मितम् ॥ १ ॥

तवंतः ॥ २९ ॥ तव विपक्षान् शत्रून्नाशयतु । अद्धा साक्षात् । अंजसा सुखेनैव मृत्युं तरति ॥ ३० ॥ इति श्रीमद्भागवते चतुर्थस्कंधे टीकायां दशमोऽध्यायः ॥ १० ॥ ॥ एकादशे तु यक्षाणां क्षयं दृष्ट्वा मनुः स्वयम् ॥ आगत्य वारयामास ध्रुवं तत्त्वोपदेशतः ॥ १ ॥ एवं गदतां वचनमुपदेशमिव निशम्य उपस्पृश्याचम्य यन्नारायणनिर्मितं नारा-

---

पाद राजाच्या पुत्रा ध्रुवा, ज्याचें नांव उच्चारिलें असतां अथवा श्रवण केलें असतां, लोक अनायासानें दुस्तर मृत्यूलाहि तरून जातो, तो शरणागतांची पीडा हरण करणारा व शार्ङ्गनामक धनुष्य धारण करणारा षड्गुणैश्वर्यसंपन्न साक्षात् नारायण, तुझ्या शत्रूंचा नाश करो ॥ ३० ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील चतुर्थस्कंधामध्यें ध्रुवपराक्रमवर्णनरूप हा दहावा अध्याय समाप्त झाला ॥ १० ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या अकराव्या अध्यायामध्यें तर स्वायंभुव मनूनें, यक्षांचा क्षय झाला असें पाहून तो स्वतः ध्रुवाजवळ आला आणि त्यानें तत्त्वज्ञानाच्या उपदेशेंकरून ध्रुवाला यक्षांच्या वधापासून निवृत्त केलें अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ मैत्रेय ह्मणाला–हे विदुरा, ध्रुवानें, असें बोलणाऱ्या ऋषींचें भाषण उपदेशासारखें श्रवण करून, उदकाचें आचमन केलें आणि नारायणानें निर्माण केलेलें जें नारायणास्त्र

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याचा धनुष्याचेठिकाणीं प्रयोग केला ॥ १ ॥ हे विदुरा, ज्ञानाचा उदय झाला असतां जसे विषयवासनारूप क्लेश नाहींसे होतात त्याप्रमाणें ह्या अस्त्राचा प्रयोग होतांच गुह्यकांनीं निर्माण केलेल्या माया तत्काल अगदीं नाहींशा झाल्या ॥ २ ॥ त्या ध्रुव राजानें, नारायणास्त्राचा धनुष्याचेठिकाणीं प्रयोग करितांच त्यापासून निघालेले सुवर्णाच्या मूलप्रदेशांनीं व राजहंस पक्ष्यांसारख्या पिसाऱ्यांनीं युक्त असे बाण, जसे मोर कठोर केकाशब्द करीत अरण्यांत शिरतात त्याप्रमाणें 'सों सों शब्द करीत' शत्रूंच्या सैन्यांत शिरले ॥ ३ ॥ त्या तीक्ष्णधारांच्या बाणांनीं युद्धामध्यें पीडित झालेले ते यक्ष, क्रोधाविष्ट होऊन, फणा उभारून गरुडाच्या आंगावर धांऊन जाणाऱ्या सर्पांप्रमाणें आपलीं आयुधें उचलून जिकडूनतिकडून ध्रुवाच्या आंगावर धांवून गेले ॥ ४ ॥ तेव्हां ध्रुवानें, युद्धामध्यें आपल्या आंगावर धांवून येणाऱ्या व बाणांनीं तुटलीं आहेत बाहु, मांड्या, कंठ व उदरें ज्याचीं अशा त्या यक्षांना, संन्यासी लोक सूर्यमंडळाचा भेद करून ज्या लोकास जातात त्या परलोकाला पाठवून दिलें ॥ ५ ॥

यणास्त्रं तत्संदधे ॥ १ ॥ क्लेशा रागादयो यथा ॥ २ ॥ किंच तस्यार्षास्त्रमृषेर्नारायणादुद्भूतमस्त्रं प्रयुंजतः संदधतः सतः सुवर्णमयाः पुंखा मूलप्रांता येषाम् । कलहंसानां वासांसि पक्षा येषां शरा विनिःसृता इति द्रष्टव्यम् । उपरिष्टाच्छिलीमुखग्रहणात् ॥ ३ ॥ प्रधने युद्धे उन्नद्धा उच्छ्रिताः फणा येषां ते सर्पाः ॥ ४ ॥ पृषत्कैर्बाणैर्निकृत्ता

संधीयमान एतस्मिन्माया गुह्यकनिर्मिताः ॥ क्षिप्रं विनेशुर्विदुर क्लेशा ज्ञानोदये यथा ॥ २ ॥ तस्यार्षास्त्रं धनुषि प्रयुंजतः सुवर्ण-पुंखाः कलहंसवाससः ॥ विनिःसृता आविविशुर्द्विषद्बलं यथा वनं भीमरवाः शिखंडिनः ॥ ३ ॥ तैस्तिग्मधारैः प्रधने शिलीमुखैरित-स्ततः पुण्यजना उपद्रुताः ॥ तमभ्यधावन्कुपिता उदायुधाः सुपर्णमुन्नद्धफणा इवाहयः ॥ ४ ॥ स तान्पृषत्कैरभिधावतो मृधे निकृत्त-बाहूरुशिरोधरोदरान् ॥ निनाय लोकं परमर्कमंडलं व्रजंति निर्भिद्य यमूर्ध्वरेतसः ॥ ५ ॥ तान्हन्यमानानभिवीक्ष्य गुह्यकाननागसश्चि-त्ररथेन भूरिशः ॥ औत्तानपादिं कृपया पितामहो मनुर्जगादोपगतः सहर्षिभिः ॥ ६ ॥ मनुरुवाच ॥ अलं वत्सातिरोषेण तमोद्वारेण पाप्मना ॥ येन पुण्यजनानेतानवधीस्त्वमनागसः ॥ ७ ॥ नास्मत्कुलोचितं तात कर्मैतत्सद्विगर्हितम् ॥ वधो यदुपदेवानामारब्धस्ते ऽकृतैनसाम् ॥ ८ ॥ नन्वेकस्यापराधेन प्रसंगाद्बहवो हताः ॥ भ्रातुर्वधाभितप्तेन त्वयांग भ्रातृवत्सल ॥ ९ ॥ नायं मार्गो हि साधूनां हृषीकेशानुवर्तिनाम् ॥ यदात्मानं पराग्गृह्य पशुवद्भूतवैशसम् ॥ १० ॥

बाह्वादयो येषां तान् । परं लोकं निनाय । कथंभूतम् । ऊर्ध्वरेतसः संन्यासिनोऽर्कमंडलं निर्भिद्य यं व्रजंति तम् ॥ ५ ॥ताननागसो निरपराधान् ॥ ६ ॥ तमसो नरकस्य द्वारेण येन रोषेण ॥ ७ ॥ ८ ॥ ननु मद्भ्रातृहंतारः कथमकृतैनसोऽत आह । नन्विति ॥ ९ ॥ सत्यप्यपराधे तवैतदुचितं न भवतीत्याह । नायमिति । पराग्गृह्य पराग्भूतं

याप्रमाणें चित्रविचित्र रंगाच्या रथानें युक्त असा ध्रुव राजा, निरपराधी त्या यक्षांचा फारच संहार करीत आहे असें पाहून, त्याचा आजा स्वायंभुव मनु, कृपेनें युक्त होत्साता ऋषींसहवर्तमान तेथें येऊन त्या ध्रुवाला म्हणाला कीं,–॥ ६ ॥ मनु म्हणाला– हे वत्सा ध्रुवा, ज्या क्रोधानें तूं निरपराधी या पुण्यजनांचा (यक्षांचा) वध केलास त्या नरकाचें द्वारभूत अशा पापरूपी अतिक्रोधानें आतां पुरे कर ॥ ७ ॥ बा ध्रुवा, यक्षांनीं तुझा कांहीं अपराध केला नसतां तूं त्यांचा जो वध आरंभिलास हें कर्म आमच्या कुळाला उचित नव्हे. कारण, सत्पुरुष असल्या कर्मांची अतिशय निंदा करितात ॥ ८ ॥ हे बालका, भावावर तुझें प्रेम होतें, त्या भ्रात्याच्या वधानें अगदीं संतप्त झालेल्या तूं, एकानें केलेल्या अपराधाच्या प्रसंगवशेंकरून पुष्कळ यक्षांचा वध केलास हें काय बरें ! ॥ ९ ॥ केवळ जड अशा देहाला आत्मा असें मानून जसे पशू परस्परांस

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मारिताव त्याप्रमाणें प्राणिमात्राची जी हिंसा करणें हा कांहीं हृषीकेश भगवंताला अनुसरून वागणाऱ्या साधूंचा मार्ग नव्हे ॥ १० ॥ ध्रुवा, तूं बाल्यावस्थेमध्यें सर्व प्राणिमात्रांचे ठिकाणीं आत्मबुद्धि ठेवून आराधन करण्यास परम कठीण अशाहि सर्वांतर्यामी श्रीहरीचें आराधन करून, जें विष्णूचें सर्वोत्कृष्ट स्थान तें प्राप्त करून घेतलें आहेस ॥ ११ ॥ तो हरीच्या ध्यानांत असलेला तूं, त्याच्या भक्तांनाहि मान्य झाला आहेस· यास्तव साधूंच्या मार्गाचें परिपालन करणाऱ्या तूं हें पापकर्म कसें केलेंस? ॥ १२॥ थोर पुरुषांचेठिकाणीं सहनशीलता, निकृष्टांचेठिकाणीं करुणा, समान पुरुषांचेठिकाणीं मैत्री आणि सर्व प्राण्यांचेठिकाणीं समदृष्टि ह्या गुणांच्या योगानें सर्वात्मा भगवान् प्रसन्न होतो॥१३॥आणि भगवान् प्रसन्न झाला असतां पुरुष, मायेच्या गुणांपासून व त्याचें कार्यरूप जें लिंगशरीर त्यापासून मुक्त होऊन सुखस्वरूपी ब्रह्मपदास पावतो ॥१४॥ हे ध्रुवा, शरीरादिरूपानें परिणाम

देहमात्मानं गृहीत्वा पशवो यथा देहाभिमानादन्योन्यं घ्नंति तथा भूतानां वैशसं हिंसेति यत् ॥ १० ॥ त्वं च बाल्ये साधुः सन्निदानीं कथमन्यथा कृतवानित्याह । सर्वभूतात्मभावेनेति द्वाभ्याम् ॥ ११ ॥ अनुध्यातो हरेर्हृदि स्थितो विज्ञातो वा तत्पुंसां हरिदासानामपि साधुत्वेन मतः ॥ १२ ॥ सतां व्रतमेवाह । महत्सु तितिक्षया नीचेषु करुणया समेषु मैत्र्याखिलेषु जंतुषु समत्वेन च ॥ १३ ॥ ततः कृतार्थो भवतीत्याह । संप्रसन्ने सति गुणैर्विमुक्तोऽतएव तत्कार्येण जीवेन लिंगशरीरेण निर्मुक्तः सन्निर्वाणं सुखात्मकं ब्रह्म प्राप्नोति ॥ १४ ॥ भ्रातृहंतृत्वमंगीकृत्योक्तमिदानीं तु नात्मनो भ्रातृपुत्रादिसंबंधो नचान्योन्यं हंतृत्वादिकमपीत्याह । भूतैरिति दशभिः । भूतैः पंचभिरारब्धैर्देहा-

सर्वभूतात्मभावेन भूतावासं हरिं भवान् ॥ आराध्याप दुराराध्यं विष्णोस्तत्परमं पदम् ॥ ११ ॥ स त्वं हरेरनुध्यातस्तत्पुंसामपि संमतः ॥ कथं त्ववद्यं कृतवाननुशिक्षन्सतां व्रतम् ॥ १२ ॥ तितिक्षया करुणया मैत्र्या चाखिलजंतुषु ॥ समत्वेन च सर्वात्मा भगवान्संप्रसीदति ॥ १३ ॥ संप्रसन्ने भगवति पुरुषः प्राकृतैर्गुणैः ॥ विमुक्तो जीवनिर्मुक्तो ब्रह्मनिर्वाणमृच्छति ॥ १४ ॥ भूतैः पंचभिरारब्धैर्योषित्पुरुष एव हि ॥ तयोर्व्यवायात्संभूतिर्योषित्पुरुषयोरिह ॥ १५ ॥ एवं प्रवर्तते सर्गः स्थितिः संयम एव च ॥ गुणव्यतिकराद्राजन्मायया परमात्मनः ॥ १६ ॥ निमित्तमात्रं तत्रासीन्निर्गुणः पुरुषर्षभः ॥ व्यक्ताव्यक्तमिदं विश्वं यत्र भ्रमति लोहवत् ॥ १७ ॥ स खल्विदं भगवान्कालशक्त्या गुणप्रवाहेण विभक्तवीर्यः ॥ करोत्यकर्तैव निहंत्यहंता चेष्टा विभूम्नः खलु दुर्विभाव्या ॥ १८ ॥

द्याकारेण परिणतैर्योषित्पुरुषश्चेति प्रसिद्धिः । तयोर्व्यवायान्मैथुनात्संभूतिरन्ययोर्योषित्पुरुषयोरिह संसारे भवति ॥ १५ ॥ एवं तावत्सर्गः प्रवर्तते एवं पालकाकारेण परिणतैर्भूतैरेव स्थितिर्हंतृदेहाकारपरिणतैः संयमः संहारः । स च परमात्मनो मायया गुणानां व्यतिकरात्र तु स्वतः ॥ १६ ॥ ननु जडानां देहानां गुणानां वा कथं सर्गादिहेतुत्वं तत्राह । निमित्तमात्रं पुरुषर्षभ ईश्वरः यत्र यस्मिन्निमित्ते सति कार्यकारणात्मकं विश्वं भ्रमति परिवर्तते यथायस्कांते निमित्ते सति लोहं प्रवर्तते तद्वत् ॥ १७ ॥ ननु स चेन्निमित्तं

पावलेल्या पंचभूतांपासून स्त्री आणि पुरुष हीं दोघें उत्पन्न झालीं असें प्रसिद्ध आहे· ह्या संसारामध्यें त्या स्त्री पुरुषांच्या मैथुनापासून दुसऱ्या स्त्रीपुरुषांची उत्पत्ति होतये ॥ १५ ॥ हे राजा, अशाप्रकारें सृष्टिक्रम चालतो व त्याचप्रमाणें पालन करणारांच्या आकारानें बनलेल्या पंचमहाभूतांच्याच योगानें प्राण्यांचें संरक्षण होतें आणि घातक देहांच्या आकारानें बनलेल्या भूतांच्या योगानें प्राण्यांचा संहार होतो· याप्रमाणें चाललेला हा सर्वहि प्रकार, परमात्म्याच्या मायेच्या योगानें सत्त्वादिक गुणांमध्यें न्यूनाधिकपणा झाला असतां होतो, आपोआप होत नाहीं ॥ १६ ॥ हे वत्सा, निर्गुण जो ईश्वर तो त्या सृष्ट्यादिकांविषयीं निमित्तमात्र असला म्हणजे कार्यकारणरूपी हें सर्व जग त्याच्या आधारानें वर्तत असतें· यास दृष्टांत–लोहचुंबक निमित्तभूत असला म्हणजे त्याच्या आधारानें जसें जड लोखंड फिरत असतें तद्वत् ॥ १७ ॥ आतां जर परमेश्वर निमित्त मात्र आहे

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तर त्याचेठिकाणीं भेद नसल्यामुळें सृष्टि स्थिति व संहार हीं तीनहि एकदम कां होत नाहींत असें ह्मणशील तर–हे ध्रुवा, कालक्रमानें गुणांमध्यें क्षोभ उत्पन्न होऊन न्यूनाधिक्य झालें असतां, परमेश्वराच्या शक्तीचे भेद होतात; तेव्हां तो भगवान् वस्तुतः अकर्ताच असून हें जग उत्पन्न करितो, व संहर्ता नसून याचा संहार करितो, असें भासतें. आतां काल तरी गुणांमध्यें एकदमच कां क्षोभ करीत नाहीं असें ह्मणशील तर– सर्वव्यापक परमात्म्याची कालशक्ति खरोखर अचिंत्य आहे ॥ १८ ॥ आतां पिता पुत्राला उत्पन्न करितो, राजा प्रजेचें पालन करितो, चोर किंवा दुष्ट लोक दुसऱ्यांचा घात करितात; ईश्वर काहींच करीत नाहीं. असें ह्मणशील तर–हे ध्रुवा, तो कालरूपी परमेश्वर, स्वतः जन्मादिरहित अविनाशी व कधींहि क्षीण न होणाऱ्या शक्तीनें युक्त असून पित्रादिकांच्या योगानें पुत्रादिकांची उत्पत्ति करून सृष्टिकर्ता होतो आणि दुसऱ्यांस मारणाऱ्या चोरादिकांसही मृत्यूच्या योगानें मारीत होत्साता अंत करणारा होतो; एतावता पित्रादिकांचीहि उत्पत्तिवगैरे दुसऱ्यांपासून झाली असल्यामुळें ते स्वतंत्ररीतीनें उत्पत्त्यादिकांस कारण नाहींत, ईश्वरच सर्वांचा नियंता असल्यामुळें सर्वांचें कारण आहे ॥ १९ ॥ समभावानें प्रजांमध्यें प्रवेश करणाऱ्या ह्या मृत्युरूपी

तर्हि तस्याविशेषाद्युगपदेव सर्गादित्रयं भवेदत आह । स खल्विति । कालशक्त्या क्रमेण गुणानां प्रवाहः क्षोभस्तेन विभक्तं सृष्ट्यादिविषयं वीर्यं शक्तिर्यस्य। ननु कालोऽपि गुणान्युगपदेव क्षोभयतु तत्राह । चेष्टा कालशक्तिर्दुर्विभाव्याऽचिंत्या ॥ १८ ॥ ननु पित्रादिः सृजति पालयति राजादिर्निहंति च चोरादिर्नत्वीश्वरस्तत्राह । स इति । अजनेन पित्रादिना जनं पुत्रादिं जनयन्नादिकृत् अंतकं चोरादिकं तन्मृत्युहेतुना मारयन्नंतकरः स्वयं त्वनंतोऽनादिश्च अव्ययोऽक्षीणशक्तिश्च। अयं भावः। पित्रादयोऽन्यत

सोऽनंतोंऽतकरः कालोऽनादिरादिकृदव्ययः ॥ जनं जनेन जनयन्मारयन्मृत्युनांतकम् ॥ १९ ॥ न वै स्वपक्षोऽस्य विपक्ष एव वा परस्य मृत्योर्विशतः समं प्रजाः ॥ तं धावमानमनु धावंत्यनीशा यथा रजांस्यनिलं भूतसंघाः ॥ २० ॥ आयुषोऽपचयं जंतोस्तथैवोपचयं विभुः ॥ उभाभ्यां रहितः स्वस्थो दुःस्थस्य विदधात्यसौ ॥ २१ ॥ केचित्कर्म वदंत्येनं स्वभावमपरे नृप ॥ एके कालं परे दैवं पुंसः काममुतापरे ॥ २२ ॥

उत्पत्त्यादिमंतो न स्वातंत्र्येण कारणं किंत्वीश्वर एव तन्नियंता सर्वकारणमिति ॥ १९ ॥ नचैवं कुर्वतोऽपि वैषम्यप्रसक्तिः पक्षपाताभावादित्याह द्वाभ्याम्। न वा इति । मृत्युरूपस्य समं यथा भवति तथा प्रजाः कर्मभूता विशतः तस्य साम्येऽपि भूतेषु फलवैषम्यं तत्कर्मवशादिति सदृष्टांतमाह । तं धावंतमन्वनीशाः कर्माधीना भूतसंघा धावंति अनिलं धावंतमनु रजांसीव तत्र यथा रजसां तमःप्रकाशजलाग्न्यादिप्रवेशेऽपि नानिलस्य वैषम्यमेवमीश्वरस्यापीति भावः ॥ २० ॥ अपचयमकालमृत्युम् । उपचयं कालमृत्योरपि रक्षाम् । यद्वा । अपचयं मशकादावुपचयं देवादौ स्वस्थत्वादुपचयापचयाभ्यां रहितोऽसौ विभुर्दुःस्थस्य कर्माधीनस्य विदधाति ॥ २१ ॥ एवंभूतश्चेश्वरः सर्ववादिसं-

---

(कालरूपी) परमात्म्याचा कोणीच स्वकीय अथवा परकीय नाहीं; परंतु जसा वारा धावूं लागला ह्मणजे त्याच्या मागून रजःकण धांवतात त्याप्रमाणें कालरूपी परमात्मा धाऊं लागला ह्मणजे त्याच्यामागून कर्माधीन असे सर्व प्राण्यांचे समुदाय धांवतात, ह्मणजे स्वस्वकर्मांनुसार सुखदुःखें भोगितात. त्यांत रजःकण अंधकारांत, प्रकाशांत, पाण्यांत किंवा अग्नि इत्यादिकांत कोठेंहि पडले तरी वाऱ्याला जसा कांहींच विकार नाहीं त्याप्रमाणें ज्याच्या त्याच्या कर्माप्रमाणें प्राण्यांना सुखदुःखादिक बरीं वाईट फलें भोगावीं लागलीं तरी त्यापासून कालरूपी परमात्म्याला वैषम्य मुळींच नाहीं ॥ २० ॥ हा व्यापक परमात्मा स्वस्वरूपीं स्थित असल्यामुळें वृद्धी किंवा ऱ्हास यांनीं रहित असून कर्माधीन असलेल्या प्राण्यांच्या आयुष्याची वृद्धि अथवा क्षय (अकालीं मृत्यु) यांस अथवा देवादिकांचेठिकाणीं उत्तमपणा व कीटादिकांचेठिकाणीं अधमपणा यांस उत्पन्न करितो ॥ २१ ॥ हे राजा, ह्याच ईश्वराला कोणी (मीमांसक) कर्म असें ह्मणतात. कोणी (चार्वाक) स्वभाव, कांहींजण (पौराणिक) काल,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दुसरे (ज्योतिषी) दैव आणि कितीएक (वात्स्यायनादिक) काम असें समजतात ॥ २२ ॥ बा ध्रुवा, ज्याच्यापासून महत्तत्त्वादिक अनेक शक्ति उत्पन्न झाल्या आहेत ह्मणून दुर्बोध व अव्यक्त अशा त्या परमेश्वराच्या मनांत काय करावयाचें आहे तें कोणालाहि समजत नाहीं; मग आपणच ज्यापासून उत्पन्न झाला त्याचें वास्तविक स्वरूप कोण बरें प्रत्यक्ष जाणूं शकेल? ॥ २३ ॥ यास्तव हे बालका, हे कुबेराचे सेवक तुझ्या भावाला मारणारेच नव्हत. कारण, बा वत्सा, मनुष्याच्या जन्माला किंवा मृत्यूला ईश्वरच कारण आहे ॥ २४ ॥ आणि जरी तोच ईश्वर विश्वाची सृष्टि करितो, तोच रक्षण करितो आणि तोच संहारही करितो तथापि त्याला अहंकार नसल्यामुळें तो गुणकर्मांनीं लिप्त होत नाहीं ॥ २५ ॥ कारण, आपल्या शक्तिरूप मायेच्या योगानें युक्त होऊन हा भूतात्मा, भूताधिपति व भूतपालक परमेश्वर भूतांना उत्पन्न करितो,

---

मतो विवादस्तु नाममात्र इत्याह । केचिदिति । पुंसः कामं वात्स्यायनादयः । श्रुतिश्च । कामोऽकार्षीत्कामः करोति कामः कर्ता कामः कारयितेत्यादि ॥ २२ ॥ ननु कर्मादीनां जडत्वादिना स्वरूपतोऽपि भिन्नत्वात्कथमैकमत्यं तत्राह । अव्यक्तस्यातएवाप्रमेयस्य तथापि सत्त्वे हेतुः । नानाशक्तीनां महदादीनामुदयो यस्मात् चिकीर्षितमेव तावत्कोऽपि न वेद । अथ स्वस्य संभवो यस्मात्तमीश्वरं को वेद न कोऽपि । अद्धेति पाठे साक्षात् । अतस्तत्त्वज्ञानाभावाद्विशेषांशे विवाद इत्यर्थः । तथा च श्रुतिः । को अद्धा वेद क इह प्रवोचत्कुत आजाता कुत इयं विसृष्टिः । अर्वाग्देवा अस्य विसर्जनेनाथा को वेद यत आबभूवेत्यादिः ॥ २३ ॥ ईश्वरवादस्य प्रकृतोपयोगमाह । न चैते भ्रातु-

अव्यक्तस्याप्रमेयस्य नानाशक्त्युदयस्य च ॥ न वै चिकीर्षितं तात को वेदाथ स्वसंभवम् ॥ २३ ॥ न चैते पुत्रक भ्रातुर्हंतारो धनदानुगाः ॥ विसर्गादानयोस्तात पुंसो दैवं हि कारणम् ॥ २४ ॥ स एव विश्वं सृजति स एवावति हंति च ॥ अथापि ह्यनहंकारान्नाज्यते गुणकर्मभिः ॥ २५ ॥ एष भूतानि भूतात्मा भूतेशो भूतभावनः ॥ स्वशक्त्या मायया युक्तः सृजत्यत्ति च पाति च ॥ २६ ॥ तमेव मृत्युममृतं तात दैवं सर्वात्मनोपेहि जगत्परायणम् ॥ यस्मै बलिं विश्वसृजो हरंति गावो यथा वै नसि दामयंत्रिताः ॥ २७ ॥ यः पंचवर्षो जननीं त्वं विहाय मातुः सपत्न्या वचसा भिन्नमर्मा ॥ वनं गतस्तपसा प्रत्यगक्षमाराध्य लेभे मूर्ध्नि पदं त्रिलोक्याः ॥ २८ ॥

हंतारः उक्तमेव हेतुमनुवदति विसर्गादानयोर्मृत्युजन्मनोः यद्वा विसर्गः सृष्टिः आदानं संहारः दैवमीश्वर एव हि कारणम् ॥ २४ ॥ तथापि निर्लेपतामाह । स एवेति ॥ २५ ॥ अनहंकारत्वे हेतुमाह । एष इति ॥ २६ ॥ सत्यमीश्वर एव कर्ता तथाप्यहंकारादि मया न त्यक्तुं शक्यमिति चेदत्र आह । तमेवेति चतुर्भिः । मृत्युमभक्तानां भक्तानां त्वमृतं उपेहि शरणं गच्छ तमेवेत्यवधारणे हेतुः । यस्मै नसि नासिकायां दामभिर्बद्धा गाव इव विश्वसृजोऽपि नामभिर्यंत्रिता बद्धाः संतो बलिं हरंति तत्कारितं कर्म कुर्वंतीत्यर्थः ॥ २७ ॥ तदाराधनं च तव सुशकमेवेत्याह । यः पंचवर्षः स त्वं यमाराध्य त्रिलोक्या मूर्ध्नि पदं स्थानं लेभे लब्धवानसि इदानीं तमेवान्विच्छावलोकयेत्युक्त-

---

त्यांचा संहार करितो व रक्षणहि करितो ॥ २६ ॥ बा ध्रुवा, जसे नाकामध्यें वेसण घालून दाव्यांनीं बांधलेले वृषभ, धन्याचें ओझें वाहतात त्याप्रमाणें ब्रह्मादिकसुद्धां नामरूप दाव्यांनीं बद्ध होऊन ईश्वराचे बलि वाहतात, ह्मणजे त्यानें नेमून दिलेलें सृष्ट्यादि कर्म करितात. त्याच अभक्तांचा मृत्यू व भक्तांना मोक्ष देणाऱ्या जगदाश्रय भगवंताला तूं सर्वात्मभावानें शरण जा ॥ २७ ॥ कारण, जेव्हां सापत्नमातेच्या भाषणानें मर्मभेद झालेला पांच वर्षांचा तूं होतास, तेव्हांच आपल्या आईला सोडून वनांत गेलास आणि तपश्चर्येच्या योगानें अधोक्षज भगवंताची आराधना करून त्रैलोक्याच्या मस्तकीं असलेलें ध्रुवपद मिळविलें आहेस ॥ २८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तस्मात् हे ध्रुवा, तूं आतां अंतर्दृष्टि हो आणि 'हा मित्र व हा शत्रु' इत्यादिक भेद ज्यामध्यें आहेत असें हें विश्व, वस्तुतः मिथ्याभूत असतांहि ज्याचे ठिकाणीं खरेंसें भासतें त्या–भेद भावरहित मनामध्यें असणाऱ्या, निर्गुण, निर्विकार, एक व नित्यमुक्त अशा परमात्म्याचा शोध कर॥२९॥ ह्मणजे त्याचवेळीं तूं, प्रत्यगात्मा, अनंत आनंदमात्र, सर्वशक्तिमान् अशा षड्गुणैश्वर्यसंपन्न भगवंताचे ठिकाणीं उत्तम भक्ति करून हळू हळू 'हें माझें आणि हा मी' अशा दृढ होऊन गेलेल्या अविद्यारूप ग्रंथीचा अगदीं भेद करून टाकिशील ॥ ३० ॥ एतावता हे राजा, जसें औषधाच्या योगानें रोगाचें उपशमन करितात त्याप्रमाणें कल्याणकारक कर्मामध्यें विघ्न करणारा प्रबळ शत्रु अशा ह्या आपल्या क्रोधाचें तूं पुष्कळ श्रवणाच्या योगानें नियमन कर. तुझें कल्याण असो ॥ ३१ ॥ ज्या क्रोधानें व्याप्त झालेल्या पुरुषापासून लोकाला अतिशय भय प्राप्त होतें त्या क्रोधाच्या आधीन

रेणान्वयः । प्रत्यंचि अक्षाणि यस्मिन् क्रियाविशेषणं वा ॥ २८ ॥ हरिं ध्यायंतं प्रत्याह । हे अंग ध्रुव मुक्तविरोधे आत्मनि मनसि व्यपाश्रितमवस्थितमात्मदृक् प्रत्यग्दृष्टिः सन् अयं भेदो यस्मिंस्तदिदं भेदमसदेव विश्वं यस्मिन्प्रतीयते ॥ २९ ॥ तदन्वेषणफलमाह । त्वं तदान्वेषणकाल एव ॥ ३० ॥ उपदेशसारमाह । संयच्छेति द्वाभ्याम् ।

तमेनमंगात्मनि मुक्तविग्रहे व्यपाश्रितं निर्गुणमेकमक्षरम् ॥ आत्मानमन्विच्छ विमुक्तमात्मदृग्यस्मिन्निदं भेदमसत्प्रतीयते ॥ २९ ॥ त्वं प्रत्यगात्मनि तदा भगवत्यनंत आनंदमात्र उपपन्नसमस्तशक्तौ ॥ भक्तिं विधाय परमां शनकैरविद्याग्रंथिं विभेत्स्यसि ममाहमिति प्ररूढम् ॥ ३० ॥ संयच्छ रोषं भद्रं ते प्रतीपं श्रेयसां परम् ॥ श्रुतेन भूयसा राजन्नगदेन यथाऽऽमयम् ॥ ३१ ॥ येनोपसृष्टात्पुरुषाल्लोक उद्विजते भृशम् ॥ न बुधस्तद्वशं गच्छेदिच्छन्नभयमात्मनः ॥ ३२ ॥ हेलनं गिरिशभ्रातुर्धनदस्य त्वया कृतम् ॥ यज्जघ्निवान्पुण्यजनान्भ्रातृघ्नानित्यमर्षितः ॥ ३३ ॥ तं प्रसादय वत्साशु सन्नत्या प्रश्रयोक्तिभिः ॥ न यावन्महतां तेजः कुलं नोऽभिभविष्यति ॥ ३४ ॥ एवं स्वायंभुवः पौत्रमनुशास्य मनुर्ध्रुवम् ॥ तेनाभिवंदितः साकमृषिभिः स्वपुरं ययौ ॥ ३५ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे चतुर्थस्कंधे एकादशोऽध्यायः ॥ ११ ॥

प्रतीपं प्रतिकूलम् । अगदेनौषधेन यथा रोगं नियच्छति ॥ ३१ ॥ येन रोषेणोपसृष्टाद्व्याप्तात् ॥ ३२ ॥ अन्यच्च त्वया कार्यमित्याह । हेलनमिति द्वाभ्याम् । यद्यतः जघ्निवान् घातितवान् ॥ ३३ ॥ ३४ ॥ ३५ ॥ इति श्रीमद्भागवते चतुर्थे टीकायामेकादशोऽध्यायः ॥ ११ ॥ ॥ ७ ॥

आपलें अभय इच्छिणाऱ्या समंजस पुरुषानें कधींहि होऊं नये ॥ ३२ ॥ आणि यक्षांना भ्रातृघातक असें समजून क्रोधाविष्ट झालेल्या तूं जो त्यांचा वध केला आहेस, ही तरी शंकराचा भावासारखा परम मित्र जो कुबेर त्याची अवज्ञाच केली आहेस ॥ ३३ ॥ यास्तव मोठ्या लोकांच्या तेजानें आपल्या कुलावर जोंपर्यंत कांहीं अरिष्ट आलिलें नाहीं, तोंपर्यंत तूं सावध होऊन नम्रतापूर्वक लीन भाषणांनीं त्या कुबेराला लवकर प्रसन्न करून घे ॥ ३४ ॥ मैत्रेय ह्मणाला–हे विदुरा, स्वायंभुव मनूनें आपला नातु जो ध्रुव त्याला याप्रमाणें उपदेश करून पुढें ध्रुवानें त्याला वंदन केलें असतां, त्या मनूनें ऋषींसहवर्तमान आपल्या नगराप्रत गमन केलें ॥ ३५ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील चतुर्थस्कंधामध्यें ध्रुवसांत्वननामक हा अकरावा अध्याय समाप्त झाला ॥ ११ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ ७ ॥ ॥ ॥ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां या बाराव्या अध्यायामध्यें कुबेरानें येऊन सत्कार केल्यावर आपल्या नगरामध्यें आलेल्या ध्रुवानें, पुष्कळ यज्ञांच्या योगेंकरून हरीचें यजन करून हरीच्या अचलस्थानीं आरोहण केलें, अशी कथा वर्णन केलेली आहे ॥१॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, ध्रुवाचा क्रोध जाऊन तो यक्षांच्या वधापासून निवृत्त झाला असें जाणून, भगवान् कुबेर तेथें प्राप्त झाला. तेव्हां त्याच्या बरोबरचे चारण, यक्ष व किन्नर त्याची स्तुति करीत होते. त्याला पहातांच ध्रुवानें हात जोडिले. तेव्हां कुबेर ध्रुवाला ह्मणाला– ॥ १ ॥ धनद ह्मणाला–हे निष्पापा क्षत्रियपुत्रा, ज्या तूं आपल्या पितामहाच्या (मनूच्या) उपदेशानें, त्याग करण्यास अशक्य अशाहि वैराचा त्याग केलास त्या तुजवर मी अत्यंत संतुष्ट झालों आहें ॥ २ ॥ वास्तविक पाहिलें असतां, तूं यक्षांचा किंवा यक्षांनीं तुझ्या भावाचा वध केला नाहीं. कारण, प्राण्यांचा नाश किंवा उत्पत्ति होण्याला कारण तो समर्थ कालच होय ॥ ३ ॥ जिच्या योगानें बंध व दुःखादिक प्राप्त होतात ती 'मी आणि तूं' अशी स्वप्नांतील स्थितीसारखी व्यर्थ बुद्धि पुरुषाला, अज्ञानानें मिथ्याभूत देहावर अनुसंधान ठेविल्यामुळें

द्वादशे धनदेनाभिनंदितः पुरमागतः ॥ यज्ञैरिष्ट्वा हरेः स्थानमारुरोहेति कीर्त्यते ॥ १ ॥ वैशसाद्वधान्निवृत्तं ज्ञात्वा ॥ १ ॥ हेक्षत्रियदायाद क्षत्रियपुत्र अत्यजः त्यक्तवानसि ॥ २ ॥ न च वैरस्य कारणमस्तीत्याह । न भवानिति । अप्ययभावयोर्मृत्युजन्मनोः ॥ ३॥ कथंतर्ह्यहं हंतेत्यादिबुद्धिस्तत्राह । अहमिति । आभाति प्रकाशते जायत इत्यर्थः । अतद्ध्यानाद्देहानुसंधाना-

मैत्रेय उवाच ॥ ध्रुवं निवृत्तं प्रतिबुध्य वैशसादपेतमन्युं भगवान्धनेश्वरः ॥ तत्रागतश्चारणयक्षकिन्नरैः संस्तूयमानोऽभ्यवदत्कृतांजलिम् ॥ १ ॥ धनद उवाच ॥ भो भो क्षत्रियदायाद परितुष्टोऽस्मि तेऽनघ ॥ यस्त्वं पितामहादेशाद्वैरं दुस्त्यजमत्यजः ॥ २ ॥ न भवानवधीद्यक्षान्न यक्षा भ्रातरं तव ॥ काल एव हि भूतानां प्रभुरप्ययभावयोः ॥ ३ ॥ अहं त्वमित्यपार्था धीरज्ञानात्पुरुषस्य हि ॥ स्वाप्नीवाभात्यतद्ध्यानाद्यया बंधविपर्ययौ ॥ ४ ॥ तद्गच्छ ध्रुव भद्रं ते भगवंतमधोक्षजम् ॥ सर्वभूतात्मभावेन सर्वभूतात्मविग्रहम् ॥५॥ भजस्व भजनीयांघ्रिमभवाय भवच्छिदम् ॥ युक्तं विरहितं शक्त्या गुणमय्यात्ममायया ॥ ६ ॥ वृणीहि कामं नृप यन्मनोगतं मत्तस्त्वमौत्तानपदेऽविशंकितः ॥ वरं वरार्होऽम्बुजनाभपादयोरनंतरं त्वां वयमंग शुश्रुम ॥ ७ ॥ मैत्रेय उवाच ॥ स राजराजेन वराय चोदितो ध्रुवो महाभागवतो महामतिः ॥ हरौ स वव्रेऽचलितां स्मृतिं यया तरत्ययत्नेन दुरत्ययं तमः ॥ ८ ॥

त् यया धिया बंधः विपर्ययो दुःखादिः ॥४ ॥ तत्तस्माद्गच्छ गत्वा च भगवंतं भजस्वेत्युत्तरेणान्वयः । सर्वभूतात्मको विग्रहो यस्य ॥ ५॥ भजनीयावंघ्री यस्य तम् । गुणमय्या शक्त्या युक्तम् । किं तत्त्वतः न आत्ममायया अतस्तत्त्वतस्तया विरहितम् । यद्वा । शक्त्यात्ममायया युक्तं विरहितं च सगुणनिर्गुणभेदेन ॥ ६ ॥ काममसंकोचेन अविशंकितो निर्भयः अनंतरमतिनिकटम् ॥ ७ ॥ स वराय चोदित इत्यनुवादरूपं पृथग्वाक्यम् । अतः स वव्र इति तच्छब्दस्यापौनरुक्त्यम् ॥ ८ ॥

प्राप्त होत्ये ॥ ४ ॥ यास्तव हे ध्रुवा, तुझें कल्याण असो. तूं आतां आपल्या घरीं जा आणि सर्व भूतांचेठिकाणीं आत्मबुद्धि ठेऊन संसारांतून मुक्त होण्यासाठीं, ज्याची मूर्ति सर्वभूतस्वरूपी आहे, ज्याच्या स्वरूपाचें ज्ञान इंद्रियांना होत नाहीं, ज्याचे चरण भजण्यास योग्य आहेत, जो संसाराचा नाश करितो, जो आपल्या मायेच्या योगेंकरून त्रिगुणात्मक शक्तीनें युक्त असूनहि वस्तुतः निर्गुण आहे अशा भगवंताचें आराधन कर ॥ ५ ॥ ६ ॥ हे उत्तानपादराजाच्या पुत्रा ध्रुवराजा, आह्मी तुला कमलनाभ भगवंताच्या पायांजवळ राहणारा असें ऐकिलें आहे, तस्मात् तूं वर देण्यास पात्र आहेस याकरितां तूं संकोच न करितां मनांत असेल तो वर मजपासून निर्भयपणें मागून घे ॥ ७ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, याप्रमाणें महाभगवद्भक्त व महाबुद्धिमान् अशा त्या ध्रुवाला वर मागण्याविषयीं कुबेरानें प्रेरणा केली असतां, त्यानें, जिच्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

योगानें अनायासानें जीव, संसाररूप दुस्तर अंधकाराला तरून जातो अशी श्रीहरीविषयीं निश्चळ स्मृति मागून घेतली ॥ ८ ॥ नंतर प्रीतियुक्त मनानें त्या ध्रुवाला ती अचल स्मृति देऊन तो ध्रुव पहात असतां इडविडेचा पुत्र कुबेर अंतर्धान पावला व तो ध्रुवही आपल्या नगरास परत आला ॥ ९ ॥ नंतर त्या ध्रुवानें, व्रीहि इत्यादिक द्रव्यें, होम इत्यादिक क्रिया आणि इंद्रादिक देवता यांच्या योगानें साध्य होणाऱ्या कर्मांचें फळ देणारा जो यज्ञाधिपति भगवान् त्याचें विपुलदक्षिणायुक्त अनेक यज्ञांच्या योगेंकरून आराधन केलें ॥ १० ॥ याप्रमाणें तो ध्रुव, सर्वांचा आत्मा व सर्व उपाधींनीं रहित अशा अच्युत भगवंताचेठिकाणीं अखंडप्रवाहाची भक्ति करीत होत्सावा, आपलेठिकाणीं व सर्व भूतांच्या अंतरीं तो एक व्यापक परमेश्वरच राहिला आहे असें पाहूं लागला ॥ ११ ॥ याप्रमाणें सुस्वभावयुक्त, ब्राह्मणांचा कैवारी, दीनवत्सल आणि धर्ममर्यादांचें पालन करणारा अशा त्या ध्रुवाला, सर्व प्रजा, पित्यासारखा मानूं लागल्या ॥ १२ ॥ त्या ध्रुवानें ऐश्वर्यादिकांच्या उपभोगानें पुण्याचा क्षय करून व यज्ञया-

॥ ९ ॥ द्रव्यक्रियादेवतानां कर्म साध्यं फलरूपं कर्मफलप्रदं चेत्यर्थः ॥ १० ॥ सर्वस्यात्मनि असर्वे सर्वोपाधिविवर्जिते ॥ ११ ॥ १२ ॥ भोगैरैश्वर्यादिभिः अभोगैर्यज्ञाद्यनुष्ठानैः ॥ १३ ॥

तस्य प्रीतेन मनसा तांदत्त्वैडविडस्ततः ॥ पश्यतोंऽतर्दधे सोऽपि स्वपुरं प्रत्यपद्यत ॥ ९ ॥ अथायजत यज्ञेशं क्रतुभिर्भूरिदक्षिणैः ॥
द्रव्यक्रियादेवतानां कर्म कर्मफलप्रदम् ॥ १० ॥ सर्वात्मन्यच्युते सर्वे तीव्रौघां भक्तिमुद्वहन् ॥ ददर्शात्मनि भूतेषु तमेवावस्थितं
विभुम् ॥ ११ ॥ तमेवं शीलसंपन्नं ब्रह्मण्यं दीनवत्सलम् ॥ गोप्तारं धर्मसेतूनां मेनिरे पितरं प्रजाः ॥ १२ ॥ षट्त्रिंशद्वर्षसाहस्रं
शशास क्षितिमंडलम् ॥ भोगैः पुण्यक्षयं कुर्वन्नभोगैरशुभक्षयम् ॥ १३ ॥ एवं बहुसवं कालं महात्माऽविचलेंद्रियः ॥ त्रिवर्गौपयिकं
नीत्वा पुत्रायादान्नृपासनम् ॥ १४ ॥ मन्यमान इदं विश्वं मायारचितमात्मनि ॥ अविद्यारचितस्वप्नगंधर्वनगरोपमम् ॥ १५ ॥ आ-
त्मस्त्र्यपत्यसुहृदो बलमृद्धकोशमंतःपुरं परिविहारभुवश्च रम्याः ॥ भूमंडलं जलधिमेखलमाकलय्य कालोपसृष्टमिति स प्रययौ वि-
शालाम् ॥ १६ ॥ तस्यां विशुद्धकरणः शिववार्विगाह्य बद्ध्वासनं जितमरुन्मनसा हृताक्षः ॥ स्थूले दधार भगवत्प्रतिरूप एतद्ध्या-
यंस्तदव्यवहितो व्यसृजत्समाधौ ॥ १७ ॥

बहवः सवा यागाः संवत्सरा वा यस्मिंस्तं कालं त्रिवर्गसाधकं नीत्वा अविचलानि संयतानींद्रियाणि यस्य ॥ १४ ॥ इदं देहादि भगवन्माययात्मनि स्वस्मिन् रचितं मन्यमानः । अत्राविचारसृष्टिं दृष्टांतयति अविचारचितेति ॥ १५ ॥ आत्मा देहः आत्मादिमायिकमपि पुनः कालेनोपसृष्टमनित्यमाकलय्य विचिंत्य विशालां बदरिकाश्रमम् ॥ १६ ॥ तत्र तत्कृतमष्टांगयो-

गादिक अनुष्ठानांच्या योगानें पातकांचा क्षय करून, छत्तीस हजार वर्षेंपर्यंत भूमंडळाचें राज्य केलें ॥ १३ ॥ ज्याचीं इंद्रियें स्वाधीन आहेत अशा त्या ध्रुवराजानें, याप्रमाणें धर्म, अर्थ व काम या त्रिवर्गांची सिद्धि करून देणारा बहुसंवत्सरात्मक काल घालवून, नंतर आपल्या वत्सरनामक पुत्राला राज्यासन दिलें ॥ १४ ॥ तो ध्रुव, अज्ञानानें कल्पित स्वप्नाप्रमाणें किंवा गंधर्वनगराप्रमाणें[1] हें देहादिक सर्व विश्व स्वात्म्याचेठिकाणीं भगवंताच्या मायेनें रचिलेलें आहे असें जाणत होत्साता आपलें शरीर, स्त्री, अपत्यें, मित्र, सैन्य, संपत्तीनें भरलेलें भांडार, अंतःपुर, विनोदाचीं रमणीयस्थानें व समुद्रवलयांकित भूमंडळ हें सर्व, कालाच्या फेऱ्यांत सांपडलेलें (अनित्य) आहे असा विचार करून, बदरिकाश्रमीं निघून गेला ॥ १५ ॥ १६ ॥ आणि तेथें पवित्र उदकामध्यें स्नान करून, ज्याचीं इंद्रियें अत्यंत शुद्ध आहेत, अशा त्या ध्रुवानें, आसन घालून

१आकाशांत ढगें आलीं ह्मणजे त्यांमध्यें हत्ती घोडेवगैरे निरनिराळे आकार दिसूं लागतात व त्यांची स्थिति लागलीच बदलत्ये, निश्चळ राहत नाहीं, त्या आकृतीला गंधर्वनगर असें ह्मणतात.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्राणवायु जिंकून, मनाच्या योगानें आपलीं इंद्रियें बाह्यविषयांपासून निवृत्त केलीं आणि भगवंताच्या स्थूल विराट्स्वरूपाचेठिकाणीं आपलें मन लाविलें. नंतर ध्यान करितां करितां, 'मी ध्यान करणारा आणि हें विराट्स्वरूप ध्येय' अशा भेदांचें व्यवधान सोडून देऊन, शेवटीं त्यानें समाधीमध्यें तें स्थूल स्वरूपाचें चिंतनहि सोडून दिलें ह्मणजे त्याला त्याचेंहि स्मरण राहिलें नाहीं ॥ १७ ॥ हे विदुरा, याप्रमाणें भगवान् श्रीहरीचेठिकाणीं सर्वदा अत्यंत भक्ति करणारा तो ध्रुव, आनंदाश्रूंच्या प्रवाहानें व्याकुळ होत्साता ज्याच्या हृदयाला द्रव येत आहे व ज्याचें सर्व शरीर रोमांचांनीं व्याप्त होत आहे असा होऊन शेवटीं त्याचा शरीराभिमान इतका सुटला कीं, त्याला 'हा मी' असें देखील भान राहिलें नाहीं ॥ १८ ॥ नंतर त्या ध्रुवानें, आकाशांतून खालीं उतरणारें व उदय पावलेल्या चंद्राप्रमाणें दशदिशा प्रकाशित करणारें श्रेष्ठ विमान अवलोकन केलें ॥ १९ ॥ आणि त्या विमानामध्यें चतुर्भुज, श्यामवर्ण, अल्पवयस्क, तांबड्या कमळाप्रमाणें असलेल्या सुंदर नेत्रांनीं युक्त, गदेवर भार देऊन उभे राहिलेले,

---

गमाह । तस्यां शिवं वाः उदकं विगाह्य प्रविश्येति स्नानादिनियमा उक्ताः । विशुद्धकरण इति शमादयो यमाः आसनादीनि स्फुटमेवोक्तानि जितो मरुत्प्राणो येन आहृतान्यक्षाणि येन भगवतः प्रतिनिधिभूते स्थूले विराड्रूपे एतन्मनो दधार ध्यायन्नव्यवहितो ध्यातृध्येयभेदशून्यः सन्समाधौ स्थितस्तत्स्थूलं व्यसृजत् ॥ १७ ॥ एवमजस्रं नित्यं हरौ भक्तिं

भक्तिं हरौ भगवति प्रवहन्नजस्रमानंदबाष्पकलया मुहुरर्द्यमानः ॥ विक्लिद्यमानहृदयः पुलकाचितांगो नात्मानमस्मरदसाविति मुक्तलिंगः ॥ १८ ॥ स ददर्श विमानाग्र्यं नभसोऽवतरद्ध्रुवः ॥ विभ्राजयद्दशदिशो राकापतिमिवोदितम् ॥ १९ ॥ तत्रानुदेवप्रवरौ चतुर्भुजौ श्यामौ किशोरावरुणांबुजेक्षणौ ॥ स्थिताववष्टभ्य गदां सुवाससौ किरीटहारांगदचारुकुंडलौ ॥ २० ॥ विज्ञाय तावुत्तमगायकिंकरावभ्युत्थितः साध्वसविस्मृतक्रमः ॥ ननाम नामानि गृणन्मधुद्विषः पार्षत्प्रधानाविति संहतांजलिः ॥ २१ ॥ तं कृष्णपादाभिनिविष्टचेतसं बद्धांजलिं प्रश्रयनम्रकंधरम् ॥ सुनंदनंदावुपसृत्य सस्मितं प्रत्यूचतुः पुष्करनाभसंमतौ ॥ २२ ॥ सुनंदनंदावूचतुः ॥ भो भो राजन्सुभद्रं ते वाचं नोऽवहितः शृणु ॥ यः पंचवर्षस्तपसा भवान्देवमतीतृपत् ॥ २३ ॥

प्रकर्षेण वहन्नसौ ध्रुवोऽहमित्यात्मानं न सस्मार । यतो मुक्तलिंगस्त्यक्तशरीराभिमानः । तत्र हेतवः आनंदबाष्पस्य कलया बिंदुप्रवाहेणाभिभूयमानः विक्लिद्यमानं द्रवद्धृदयं यस्य पुलकैर्व्याप्तांगः ॥ १८ ॥ १९ ॥ अन्वनंतरं देवप्रवरौ ददर्शेत्यनुषंगः गदामवष्टभ्य स्थितौ किरीटादिभिः सहिते चारुणी कुंडले ययोः ॥ २० ॥ उत्तमगायः पुण्यश्लोकस्तस्य किंकरौ तौ विज्ञाय मधुद्विषः पार्षत्प्रधानाविति हेतोः साध्वसेन संभ्रमेण विस्मृतपूजाक्रमः केवलं तस्य नामानि गृणन्ननाम ॥ २१ ॥ २२ ॥ सुभद्रमिति सशरीरस्यैव विष्णु-

---

उत्तम वस्त्रें परिधान केलेले, किरीट हार बाहुभूषणें व सुंदर कुंडलें यांस धारण करणारे असे सुनंद, व नंद नांवांचे दोन देवश्रेष्ठ अवलोकन केले ॥ २० ॥ नंतर ते, उत्तमश्लोक भगवंताचे सेवक आहेत असें जाणून तो ध्रुव, उठून उभा राहिला व हे दोघे मधुसूदनाच्या पार्षदांतील मुख्य आहेत असें त्याच्या मनांत आल्यामुळें आनंदाच्या गडबडीमध्यें त्यांची पूजावगैरे करावयाचा क्रम विसरून तो केवळ भगवंताच्याच नांवांचा उच्चार करीत करीत त्यांना नमस्कार करून त्यांच्यापुढें हात जोडून उभा राहिला ॥ २१ ॥ तेव्हां पद्मनाभ भगवंताला मान्य अशा त्या सुनंदनंद पार्षदांनीं, ज्याचें चित्त श्रीकृष्णाच्या चरणाचेठिकाणीं जडलें आहे व जो सप्रेमभावानें मस्तक नम्र करून हात जोडून पुढें उभा राहिला आहे त्या ध्रुवराजाजवळ जाऊन मंदहास्यपूर्वक भाषण केलें कीं,– ॥ २२ ॥ सुनंदनंद ह्मणाले– हे ध्रुवराजा, तुझें परम

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कल्याण असो. तूं एकाग्रचित्तानें आमचें भाषण श्रवण कर. ज्या तूं पांच वर्षांच्या वयामध्यें आपल्या तपश्चर्येच्या योगानें ज्या देवाला तृप्त केलें आहेस त्या सर्व जगत्पालक शार्ङ्गधन्व्या देवाचे आह्मी पार्षद, त्या तुला भगवत्पदाचेठिकाणीं नेण्याकरितां येथें प्राप्त झालों आहोंत ॥ २३ ॥ २४ ॥ तस्मात् सप्तर्षींसारखे विद्वान् देखील ज्या पदाला प्राप्त न होतां केवळ खालीं राहून त्याच्याकडे पाहतात आणि चंद्रसूर्यादिक ग्रह, नक्षत्रें व तारे, ज्याच्या सभोंवतीं प्रदक्षिणा करीत फिरत असतात. तें अत्यंत दुर्जय विष्णुपद तूं जिंकिलें आहेस, त्या स्थानीं तूं आतां जाऊन स्वस्थ रहा ॥ २५ ॥ हे ध्रुवा, तुझ्या पूर्वजांनीं अथवा दुसऱ्या कोणींहि जें कधींच मिळविलें नाहीं त्या जगद्वंद्य सर्वोत्कृष्ट विष्णुपदावर तूं आतां आरूढ हो ॥ २६ ॥ पुण्यकीर्ति पुरुषांमध्यें श्रेष्ठ अशा भगवंतानें हें उत्तम विमान पाठविलें आहे लो. आयुष्मंता ध्रुवा, तूं ह्यामध्यें आरोहण करण्यास योग्य आहेस ॥ २७ ॥ मैत्रेय ह्मणाला— हे विदुरा, त्या भगवत्प्रिय ध्रुवानें, विष्णूच्या श्रेष्ठ भक्तांचें तें अमृत स्रवणारें भाषण श्रवण करून, स्नान केलें

पदारोहाभिप्रायम् । अतीतृपत्तर्पितवान् ॥ २३ ॥ आवां तस्य पार्षदौ ॥ २४ ॥ सुदुर्जयत्वे हेतुः । सूरयः सप्तर्षयोऽपि यदप्राप्य केवलमधः स्थिताः पश्यंति । यच्चंद्रादयः प्रदक्षिणं यथाभवत्येवं परिक्रामंति तदातिष्ठाधितिष्ठ ॥ २५ ॥ २६ ॥ आयुष्मन्नित्यपि सशरीरयानाभिप्रायमेव ॥ २७ ॥ मधु च्यवते स्रवतीति मधुच्युत्ताम् । पाठांतरे मधु

तस्याखिलजगद्धातुरावां देवस्य शार्ङ्गिणः ॥ पार्षदाविह संप्राप्तौ नेतुं त्वां भगवत्पदम् ॥ २४ ॥ सुदुर्जयं विष्णुपदं जितं त्वया यत्सूरयो
ऽप्राप्य विचक्षते परम् ॥ आतिष्ठ तच्चंद्रदिवाकरादयो ग्रहर्क्षताराः परियंति दक्षिणम् ॥ २५ ॥ अनास्थितं ते पितृभिरन्यैरप्यंग कर्हिचित् ॥
आतिष्ठ जगतां वंद्यं तद्विष्णोः परमं पदम् ॥ २६ ॥ एतद्विमानप्रवरमुत्तमश्लोकमौलिना ॥ उपस्थापितमायुष्मन्नधिरोढुं त्वमर्हसि ॥ २७ ॥
मैत्रेय उवाच ॥ निशम्य वैकुंठनियोज्यमुख्ययोर्मधुच्युतं वाचमुरुक्रमप्रियः ॥ कृताभिषेकः कृतनित्यमंगलो मुनीन्प्रणम्याशिषमभ्य-
वादयत् ॥ २८ ॥ परीत्याभ्यर्च्य धिष्ण्याग्र्यं पार्षदावभिवंद्य च ॥ इयेष तदधिष्ठातुं बिभ्रद्रूपं हिरण्मयम् ॥ २९ ॥ तदोत्तानपदः
पुत्रो ददर्शांतकमागतम् ॥ मृत्योर्मूर्ध्नि पदं दत्त्वा आरुरोहाद्भुतं गृहम् ॥ ३० ॥ तदा दुंदुभयो नेदुर्मृदंगपणवादयः ॥ गंधर्वमुख्याः
प्रजगुः पेतुः कुसुमवृष्टयः ॥ ३१ ॥ स च स्वर्लोकमारोक्ष्यन्सुनीतिं जननीं ध्रुवः ॥ अन्वस्मरदगं हित्वा दीनां यास्ये त्रिविष्टपम् ॥ ३२ ॥

च्युतं यस्यांताममृतस्राविणीमित्यर्थः । कृतं नित्यं कर्म मंगलं चालंकरणं येन अभ्यवादयद्वादयामास ॥ २८ ॥ तदेव रूपं हिरण्मयं प्रकाशबहुलं बिभ्रत्सन्नियेष ऐच्छत् ॥ २९ ॥ गृहं विमानम् । अयं भावः । यदा ध्रुवो विमानमारोढुमैच्छत्तदा मृत्युरागत्य प्रणम्योवाच । हेमहाराज मामंगीकुरु । उवाच ध्रुवः । स्वागतं ते क्षणं तावदुपविश । एवमुक्त्वा ध्रुवो विष्णोः स्मरणं कृत्वा मृत्योर्मूर्ध्नि पदं दत्त्वा विमानाग्र्यमारुरोह ॥ ३० ॥ ३१ ॥ दीनां हित्वा कथमगं दुर्गमं त्रिविष्टपं यास्यामीत्यन्वस्मरत् ॥ ३२ ॥

आणि आपलीं नित्याचीं मंगलकृत्यें आटोपून बदरिकाश्रमवासी ऋषींना नमस्कार करून त्यांचा आशीर्वाद घेतला ॥ २८ ॥ तदनंतर त्यानें त्या श्रेष्ठ विमानाला प्रदक्षिणा घालून नमस्कार केला आणि पार्षदांनाहि नमस्कार करून तेंच आपलें स्वरूप सुवर्णासारखें तेजस्वी धारण करून त्या विमानांत आरोहण करण्याची इच्छा मनांत आणिली ॥ २९ ॥ इतक्यांत त्या उत्तानपाद राजाच्या ध्रुव पुत्रानें, आपल्याजवळ मूर्तिमान् मृत्यु येऊन हात जोडून उभा राहिला आहे असें अवलोकन केलें. तेव्हां त्यानें विष्णूचें स्मरण करून त्या मृत्यूच्या मस्तकीं आपला पाय देऊन अद्भुत विमानांत आरोहण केलें ॥ ३० ॥ त्या वेळीं देवांनीं वाजविलेलीं दुंदुभि, मृदंग, पणव इत्यादिक वाद्यें वाजूं लागलीं. मुख्य मुख्य गंधर्व गायन करूं लागले आणि आकाशांतून भूमीवर पुष्पवृष्टि होऊं लागल्या ॥ ३१ ॥ त्या वेळीं स्वर्गलोकावर आरोहण करणाऱ्या त्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ध्रुवाला सुनीतिमातेचें स्मरण झालें आणि तो मनांत ह्मणाला कीं, मी आपल्या दीन मातेला टाकून दुर्गम अशा स्वर्गलोकास एकटाच कसा बरें निघालों आहें! ॥ ३२ ॥ तेव्हां ध्रुवाचा अभिप्राय त्या देवश्रेष्ठ सुनंदनंदांनीं जाणून त्याला, सुनीतिदेवी दुसऱ्या विमानांत बसून पुढें चालली आहे असें दाखविलें ॥ ३३ ॥ पुढें मार्गामध्यें ठिकठिकाणीं विमानांत बसलेल्या देवांनीं प्रशंसा केलेल्या व पुष्पवृष्टी केलेल्या त्या ध्रुवानें सूर्यादिग्रहांस अवलोकन केलें ॥ ३४ ॥ नंतर विमानाच्या योगानें शाश्वत स्थानाचे ठिकाणीं गमन करणाऱ्या त्या ध्रुवानें, त्रैलोक्याचें व सप्तर्षींचें अतिक्रमण करून त्यांच्यावर असलेलें जें विष्णूचें पद त्याचेठिकाणीं गमन केलें ॥ ३५ ॥ जें ध्रुवपद, स्वतांच्या तेजानेंच नित्य प्रकाशित असून, हे तिन्ही लोक त्याच्या कांतीनें प्रकाशित होतात. प्राण्यांमध्यें जे प्राणी निर्दय असतात ते ज्या पदाचेठिकाणीं गमन करीत नाहींत, जे लोक नित्य पुण्यकारक कर्में करितात तेच त्या स्थानीं गमन करितात ॥ ३६ ॥ शांत, सर्वत्र समदृष्टि ठेवणारे, शुद्ध, सर्व प्राणिमात्रांवर दया करणारे व परमा-

व्यवसितमभिप्रायम् । व्यवसाय ज्ञात्वा ॥ ३३ ॥ ३४ ॥ देवयानेन देवमार्गेण विमानेनेति वा मुनीन्सप्तर्षीनपि ततः परस्ताद्यद्विष्णोः पदं तदभ्यगात् । ध्रुवा गतिर्यस्य सः ॥ ३५ ॥ यद्भ्राजमानमनु यस्य रुचा लोका विभ्राजंते येऽननुग्रहा निष्कृपास्ते यत्रात्रजन्न गतवंतः ॥ ३६ ॥ अच्युतः प्रियो बांधवो येषाम् ॥ ३७ ॥ ३८ ॥ अनिमिषमनलसं ज्योतिषां चक्रं यस्मिन्नाहितमर्पितं सद्भ्रमति । मेढ्यामाहितो गंभीरवेगो गवां गण इव ॥ ३९ ॥ आतोद्यं वीणां वितुदन्वादयन्प्रचेतसां ब्रह्मसत्रे भगवन्माहात्म्यप्रस्य ध्रुवमहिमप्रतिपादनपरांस्त्रीन् श्लोकानगायत् ॥ ४० ॥ नूनमिति । पतिरेव देवता यस्यास्तस्याः सुतस्य यस्तपःप्रभावस्तस्य तां गतिं फलमधिगंतुं वेदवादशीला ब्रह्मष्र्य-

इति व्यवसितं तस्य व्यवसाय सुरोत्तमौ ॥ दर्शयामासतुर्देवीं पुरो यानेन गच्छतीम् ॥ ३३ ॥ तत्र तत्र प्रशंसद्भिः पथि वैमानिकैः सुरैः ॥ अवकीर्यमाणो ददृशे कुसुमैः क्रमशो ग्रहान् ॥ ३४ ॥ त्रिलोकीं देवयानेन सोऽतिव्रज्य मुनीनपि ॥ परस्ताद्यद्ध्रुवगतिर्विष्णोः पदमथाभ्यगात् ॥ ३५ ॥ यद्भ्राजमानं स्वरुचैव सर्वतो लोकास्त्रयो ह्यनुविभ्राजंत एते ॥ यन्नाव्रजन्जंतुषु येऽननुग्रहा व्रजंति भद्राणि चरंति येऽनिशम् ॥ ३६ ॥ शांताः समदृशः शुद्धाः सर्वभूतानुरंजनाः ॥ यांत्यंजसाऽच्युतपदमच्युतप्रियबांधवाः ॥ ३७ ॥ इत्युत्तानपदः पुत्रो ध्रुवः कृष्णपरायणः ॥ अभूत्त्रयाणां लोकानां चूडामणिरिवामलः ॥ ३८ ॥ गंभीरवेगोऽनिमिषं ज्योतिषां चक्रमाहितम् ॥ यस्मिन्भ्रमति कौरव्य मेढ्यामिव गवां गणः ॥ ३९ ॥ महिमानं विलोक्यास्य नारदो भगवानृषिः ॥ आतोद्यं वितुदञ्छ्लोकान्सत्रे गायत्प्रचेतसाम् ॥ ४० ॥ नारद उवाच ॥ नूनं सुनीतेः पतिदेवतायास्तपःप्रभावस्य सुतस्य तां गतिम् ॥ दृष्ट्वाभ्युपायानपि वेदवादिनो नैवाधिगंतुं प्रभवंति किं नृपाः ॥ ४१ ॥

त्म्यालाच प्रिय आणि बांधव असें मानणारे जे पुरुष तेच ह्या भगवत्पदाचेठिकाणीं अनायासानें गमन करितात ॥ ३७ ॥ याप्रमाणें ... आहे मुख्य आश्रय ज्याचा असा तो उत्तानपाद राजाचा पुत्र ध्रुव, त्रैलोक्याच्या मस्तकावरील निर्मळ रत्नासारखा होऊन राहिला ॥ ३८ ॥ हे विदुरा, निरंतर फिरत राहणारें ज्योतिर्गणांचें चक्र, ज्या ध्रुवपदावर बसविलें असल्यामुळें, तें त्याच्या आश्रयानें, खांबाच्या आश्रयानें गंभीरवेगयुक्त बैलांचा समुदाय जसा फिरतो त्याप्रमाणें फिरत असतें ॥ ३९ ॥ भगवान् नारद ऋषीनें, हा ध्रुवाचा महिमा अवलोकन करून, वीणा वाजवीत वाजवीत प्रचेतस् राजांच्या ब्रह्मसत्रामध्यें भगवन्माहात्म्याच्या वर्णनप्रसंगानें ध्रुवाच्या महिम्याचें प्रतिपादन करणाऱ्या तीन श्लोकांचें गायन केलें ॥ ४० ॥ नारद ह्मणाला—फार तर काय परंतु जिचें पति हेंच दैवत आहे अशा त्या सुनीतीच्या पुत्राच्या तपाच्या प्रभावाची जी गति त्याला

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्राप्त झाली ती मोठमोठे ब्रह्मर्षींहि भागवतधर्मांचें आचरण करूनहि प्राप्त करून घेण्याविषयीं खरोखर समर्थ होणार नाहींत, मग राजांची गोष्ट कशाला पाहिजे ! ॥ ४१ ॥ ज्या ध्रुवानें पांच वर्षांचा बालक असतांना, आपल्या सापत्नमातेच्या वाग्बाणांनीं विदीर्ण झाल्यामुळें विव्हळझालेल्या हृदयानें, वनामध्यें जाऊन माझ्या उपदेशाप्रमाणें वागून आपल्या भक्तांच्या मैत्रीवगैरे गुणांनीं वश होणाऱ्या अजिंक्य भगवंताला वश करून घेतलें ॥४२॥ केवढा त्या ध्रुवाचा महिमा हा! अहो! ज्या ध्रुवानें पांच किंवा सहा वर्षांच्या वयामध्यें थोडक्याच दिवसांनीं विष्णूला प्रसन्न करून घेऊन जें पद मिळविलें व आरोहण केलें, त्या पदावर त्या ध्रुवाच्या पुढें भूमंडळावर उत्पन्न होणारा कोणीतरी क्षत्रिय, हजारोंवर्षें यत्न करूनहि आरोहण करण्याची इच्छातरी करील काय? इच्छासुद्धां होणें कठीण मग आरोहण करणें तर फारच लांब आहे ॥ ४३ ॥ मैत्रेय ह्मणाला–

नैव प्रभवंति । अभ्युपायान्भगवद्धर्मान् दृष्ट्वापि किं पुनर्नृपाः ॥ ४१ ॥ तपःप्रभावं गतिं च विशिनष्टि द्वाभ्याम् । गुरुदाराः पितृपत्नी सुरुचिस्तस्या वाक्शरै र्भिन्नात-एव दूयता हृदयेन वनं यातः सन्नजितमपि यो जिगाय वशीकृतवान् ॥ ४२ ॥ तस्याधिरूढं तेन प्राप्तं पदं यो भुवि क्षत्रबंधुः क्षत्रियो भवेत्स तमनु वर्षसमूहैरप्यप्रत्यमिच्छेदपि किम् । तत्संकल्पोऽप्यशक्यो दूरत आरोहणमित्यर्थः । कथं भूतं पदम् । षड्वा पंच वा वर्षाणि यस्य सः अल्पैरेवाहोभिर्वैकुंठं प्रसाद्य यत्तस्य पदमवाप [illegible]त् ।

यः पंचवर्षो गुरुदारवाक्शरैर्भिन्नेन यातो हृदयेन दूयता ॥ वनं मदादेशकरोऽजितं प्रभुं जिगाय तद्भक्तगुणैः पराजितम् ॥ ४२ ॥ यत्क्षत्रबंधुर्भुवि तस्याधिरूढमन्वारुरुक्षेदपि वर्षपूगैः ॥ षट्पंचवर्षो यदहोभिरल्पैः प्रसाद्य वैकुंठमवाप तत्पदम् ॥ ४३ ॥ मैत्रेय उवाच ॥ एतत्तेऽभिहितं सर्वं यत्पृष्टोऽहमिह त्वया ॥ ध्रुवस्योद्दामयशसश्चरितं संमतं सताम् ॥ ४४ ॥ धन्यं यशस्यमायुष्यं पुण्यं स्वस्त्ययनं महत् ॥ स्वर्ग्यं ध्रौव्यं सौमनस्यं प्रशस्यमघमर्षणम् ॥ ४५ ॥ श्रुत्वैतच्छ्रद्धयाभीक्ष्णमच्युतप्रियचेष्टितम् ॥ भवेद्भक्तिर्भगवति यया स्यात्क्लेशसंक्षयः ॥ ४६ ॥ महत्त्वमिच्छतां तीर्थं श्रोतुः शीलादयो गुणाः ॥ यत्र तेजस्तदिच्छूनां मानो यत्र मनस्विनाम् ॥ ४७ ॥ प्रयतः कीर्तयेत्प्रातः समवाये द्विजन्मनाम् ॥ सायं च पुण्यश्लोकस्य ध्रुवस्य चरितं महत् ॥ ४८ ॥

॥ ४३ ॥ उद्दाममुत्कृष्टं यशो यस्य ॥ ४४ ॥ धनादेर्निमित्तम् । ध्रौव्यं ध्रुवस्थानप्रापकम् । प्रशस्यं प्रशंसार्हम् । अघमर्षणं पापनाशनम् ॥ ४५ ॥ अच्युतप्रियस्य ध्रुवस्य चेष्टितं श्रुत्वा यो वर्तते तस्य भक्तिर्भवेत् ॥ ४६ ॥ तीर्थं महत्त्वावाप्तिस्थानम् । गुणा यत्र भवंति ॥ ४७ ॥ समवाये [illegible] ॥

हे विदुरा, जें तूं मला येथें विचारिलें होतेंस तें हें महायशस्वी ध्रुवाचें, साधूंना संमत असें साद्यंत चरित्र मी तुला सांगितलें आहे ॥ ४४ ॥ हें आख्यान–धनदायक, यशाची वृद्धि करणारें, आयुष्याची वृद्धि करणारें, पुण्यकारक, मोठें मंगलकारक, स्वर्गप्रद, ध्रुवस्थानप्रापक, प्रशंसा करण्यास योग्य व पापाचा नाश करणारें आहे ॥ ४५ ॥ हें ध्रुवाचें चरित्र भक्तिपुरःसर वारंवार ऐकिलें असतां, भगवंताचेठिकाणीं, जिच्या योगानें सर्व क्लेशांचा नाश होतो अशी भक्ति उत्पन्न होईल ॥ ४६ ॥ हें चरित्र महत्त्व मिळवूं इच्छिणारांना महत्त्वप्राप्तीचें साधन आहे, ह्याच्या श्रोत्यांला सुशीलवगैरे गुण प्राप्त होतात, ह्याच्या योगानें तेजस्वी होऊं इच्छिणारांना तेज आणि मानाची इच्छा करणाऱ्या पुरुषांना सन्मान प्राप्त होतो ॥ ४७॥ [illegible]मनुष्यानें एकाग्रचित्त होऊन पुण्यकीर्ति ध्रुवाच्या ह्या विस्तीर्ण चरित्राचें प्रातःकाळीं व सायंकाळीं ब्राह्मणांच्या समुदाया-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मध्यें कीर्तन करावें ॥ ४८ ॥ भगवंताचे पवि[illegible]ण हाच कायतो आपल्याला आधार आहे अशी बुद्धि धारण करणारा जो पुरुष, पौर्णिमा, अमावास्या, द्वादशी, श्रवण नक्षत्र, दिनक्षय, व्यतीपात, संक्रांति अथवा रविवार ह्या दिवशीं निष्काम बुद्धीनें श्रद्धालु जनांना हें आख्यान ऐकवील तो पुरुष, आपणच आपलेठिकाणीं संतुष्ट होऊन भगवत्प्रसादरूप सिद्धीला पावेल ॥ ४९ ॥ ५० ॥ आणि भगवंताच्या मार्गाविषयींचें ज्याला तत्त्व समजलें नाहीं त्या पुरुषाला जो हें अमृतरूप ज्ञान देतो त्या कृपालु दीन नाथावर देव अनुग्रह करितात ॥ ५१ ॥ हे कुरुकुलश्रेष्ठ विदुरा, जो ध्रुव, लहान असतांना, आपलीं क्रीडासाधनें व मातेचें गृह ह्यांचा त्याग करून श्रीविष्णूला शरण गेला आणि ज्याचीं जगद्विख्यात व अत्यंत शुद्ध अशीं कर्मे आहेत त्या ध्रुवाचें हें चरित्र मी तुला कथन केलें ॥ ५२ ॥ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील चतुर्थ-स्कंधामध्यें ध्रुवाख्यानसंबंधी हा बारावा अध्याय समाप्त झाला ॥ १२ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ ध्र ॥ ॥ याप्रमाणें पांच अध्यायांनीं ध्रुवचरित्राचें वर्णन केलें.

॥४९॥नेच्छन्निष्कामस्तत्र श्रवणे आत्मनैवात्मानं प्रति संतुष्टो भवतीति हेतोः सिद्धिं प्राप्नोति ॥५०॥ किंच सत्पथे भगवन्मार्गेऽमृतरूपं ज्ञानं यो दद्यात् ॥ ५१ ॥ ध्रुवस्य चरितं मया तेऽभिहितम्। मातुर्गृहं च हित्वा ॥ ५२ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे चतुर्थस्कंधे टीकायां द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥ ॥ एवं पंचभिरध्यायैर्ध्रुवचर्यानुवर्णिता ॥ अथैकादशभिश्चित्रं

पौर्णमास्यां सिनीवाल्यां द्वादश्यां श्रवणेऽथ वा ॥ दिनक्षये व्यतीपाते संक्रमेऽर्कदिनेऽपिवा ॥ ४९ ॥ श्रावयेच्छ्रद्दधानानां तीर्थ-
पादपदाश्रयः ॥ नेच्छंस्तत्रात्मनात्मानं संतुष्ट इति सिद्ध्यति ॥ ५० ॥ ज्ञानमज्ञाततत्त्वाय यो दद्यात्सत्पथेऽमृतम् ॥ कृपालोर्दीन-
नाथस्य देवास्तस्यानुगृह्णते ॥ ५१ ॥ इदं मया तेऽभिहितं कुरूद्वह ध्रुवस्य विख्यातविशुद्धकर्मणः ॥ हित्वाऽर्भकः क्रीडनकानि मातु-
र्गृहं च विष्णुं शरणं यो जगाम ॥ ५२ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे चतुर्थस्कंधे ध्रुवचरितं नाम द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥ ॥
सूत उवाच ॥ निशम्य कौषारविणोपवर्णितं ध्रुवस्य वैकुंठपदाधिरोहणम् ॥ प्ररूढभावो भगवत्यधोक्षजे प्रष्टुं पुनस्तं विदुरः प्रचक्रमे ॥
॥ १ ॥ विदुर उवाच ॥ के ते प्रचेतसो नाम कस्यापत्यानि सुव्रत ॥ कस्यान्ववाये प्रख्याताः कुत्र वा सत्रमासते ॥ २ ॥ मन्ये
महाभागवतं नारदं देवदर्शनम् ॥ येन प्रोक्तः क्रियायोगः परिचर्याविधिर्हरेः ॥ ३ ॥

पृथुचारित्रमुच्यते ॥ १ ॥ तत्र त्रयोदशे वक्तुं पृथोर्जन्म ध्रुवान्वये ॥ अंगो वेनपिता पुत्रक्रौर्याद्गत इतीर्यते ॥ २ ॥ प्ररूढो भावो भक्तिर्यस्य ॥ १ ॥ अन्ववाये वंशे ॥ [illegible] ॥ नारदेन प्रचेतसां सत्रे वर्णिताः कथाः प्रष्टुं तन्महिमानमाह ! मन्य इति । देवस्य दर्शनं यस्य हरेः परिचर्याप्रकारः क्रियायोगः पंचरात्रे येन प्रोक्तः ॥ ३ ॥

आतां अकरा अध्यायांनीं पृथुचरित्राचें वर्णन करितात ॥ १ ॥ त्यांत तेराव्या अध्यायामध्यें पृथुराजाचें जन्म सांगण्यासाठीं ध्रुवाच्या वंशांत उत्पन्न झालेला वेनाचा पिता जो अंगराजा तो आपल्या पुत्राच्या क्रूरपणामुळें राज्याचा त्याग करून अरण्यांत निघून गेला अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ २ ॥ सूत ह्मणाला– हे ऋषिहो, याप्रमाणें मैत्रेयानें वर्णन केलेलें ध्रुवाचें विष्णुपदारोहण श्रवण करून अधोक्षज भगवंताचेठिकाणीं दृढ भक्ति उत्पन्न झालेल्या विदुरानें त्या मैत्रेय ऋषीला पुनः प्रश्न करण्यास आरंभ केला ॥ १ ॥ विदुर ह्मणाला– हे तपोनिष्ठ मैत्रेया, प्रचेतस् राजांच्या ब्रह्मसत्रामध्यें नारदानें ध्रुवमाहात्म्य वर्णन केलें असें आपण मला सांगितलें परंतु ते प्रचेतसूनांवाचे कोण ? कोणाचे पुत्र ? कोणाच्या वंशामध्यें प्रख्यात होते ? व ते कोठें सत्र करित होते ? ॥ २ ॥ हे भगवन् ज्या नारदानें पंचरात्रागमामध्यें श्रीहरीचा पूजाप्रकर-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रूप कर्मयोग सांगितला आहे व ज्याला प्रत्यक्ष देवाचें दर्शन होत असतें त्या नारदाला महाभगवद्भक्त असें मी मानतों ॥ ३ ॥ आपल्या सांगण्यावरून असें उघड दिसतें कीं, प्रचेते ह्या नांवांचे पुरुष स्वधर्मशील असून त्यांनीं यज्ञमूर्ति भगवंताची आराधना चालविली होती आणि त्या प्रसंगीं तेथें भक्तिमान् नारदानें भगवंताच्या लीलांचें वर्णन केलें ॥ ४ ॥ तर हे मुनिश्रेष्ठा, नारदानें त्या सत्रामध्यें ज्या भगवत्कथा वर्णन केल्या असतील त्या श्रवण करण्याची इच्छा करणाऱ्या मला त्या सर्व सांगण्याची कृपा करावी ॥ ५ ॥ ध्रुवाच्या वंशांतच ते प्रचेते झाले असें सांगण्याकरितां मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, ध्रुवाचा उत्कलनामक जो पुत्र त्यानें आपला पिता ध्रुव अरण्यांत निघून गेला असतां, त्याच्या राज्यासनाची व सार्वभौमसंपत्तीची इच्छा मुळींच केली नाहीं ॥ ६ ॥ कारण, तो जन्मापासूनच शांतचित्त, निःसंग व समदृष्टि असून

स्वधर्मशीलैः पुरुषैः प्रचेतोभिः ॥ ४ ॥ ५ ॥ ध्रुवस्य वंशे ते जाता इति वक्तुं ध्रुवस्य वंशमनुक्रामति। ध्रुवस्येत्यादिना। पितुः सार्वभौमश्रियं नैच्छदधिराजासनं च ॥ ६ ॥ अनिच्छाहेतुमाह। स इति चतुर्भिः ॥ ७ ॥ आत्मानं स्वरूपभूतं ब्रह्मावरुंधान आप्नुवन् जानन्नात्मनो नान्यं तदैक्षत। स्वयं तु सर्वस्मादन्यः सन् कथंभूतं ब्रह्म। निर्वाणं शांतम्। प्रत्यस्त-

स्वधर्मशीलैः पुरुषैर्भगवान्यज्ञपूरुषः ॥ इज्यमानो भक्तिमता नारदेनेरितः किल ॥ ४ ॥ यास्ता देवर्षिणा तत्र वर्णिता भगवत्कथाः ॥
मह्यं शुश्रूषवे ब्रह्मन्कात्स्न्र्येनाचष्टुमर्हसि ॥ ५ ॥ मैत्रेय उवाच ॥ ध्रुवस्य चोत्कलः पुत्रः पितरि प्रस्थिते वनम् ॥ सार्वभौमश्रियं
नैच्छदधिराजासनं पितुः ॥ ६ ॥ स जन्मनोपशांतात्मा निःसंगः समदर्शनः ॥ ददर्श लोके विततमात्मानं लोकमात्मनि ॥ ७ ॥
आत्मानं ब्रह्म निर्वाणं प्रत्यस्तमितविग्रहम् ॥ अवबोधरसैकात्म्यमानंदमनुसंततम् ॥ ८ ॥ अव्यवच्छिन्नयोगाग्निदग्धकर्ममलाशयः ॥
स्वरूपमवरुंधानो नात्मनोऽन्यं तदैक्षत ॥ ९ ॥ जडांधबधिरोन्मत्तमूकाकृतिरतन्मतिः ॥ लक्षितः पथि बालानां प्रशांतार्चिरिवानलः
॥ १० ॥ मत्वा तं जडमुन्मत्तं कुलवृद्धाः समंत्रिणः ॥ वत्सरं भूपतिं चक्रुर्यवीयांसं भ्रमेः सुतम् ॥ ११ ॥ स्वर्वीथिर्वत्सरस्येष्टा
भार्याऽसूत षडात्मजान् ॥ पुष्पार्णं तिग्मकेतुं च इषमूर्जं वसुं जयम् ॥ १२ ॥

मितः शांतो विग्रहो भेदो यस्मिन् अवबोधरसेनैकात्म्यं यस्य ॥ ८ ॥ कथंभूतः अव्यवच्छिन्नो यो योगः स एवाग्निस्तेन दग्धः कर्ममल आशयो वासना च यस्य ॥ ९ ॥ जडादीनामिवाकृतिर्यस्य तथाभूतो लक्षितः अतन्मतिः न तेषामिव मतिर्यस्य सर्वज्ञत्वात्। प्रशांतान्यर्चींषि ज्वाला यस्यानलस्य तद्वत्स्थितः ॥ १० ॥ यवीयांसमुत्कलात्कनिष्ठम् ॥ ११ ॥ इष्टा प्रिया भार्या ॥ १२ ॥

सर्वलोकांचेठिकाणीं आपण व्यापून आहें व आपलेठिकाणीं सर्व लोक व्यापून आहेत असें पाहत असे ॥ ७ ॥ आणि ज्याच्या अखंड योगरूप अग्नीनें कर्मरूप मल व मनाच्या वासना अगदीं जळून गेल्या आहेत असा तो उत्कल, आपणाला स्वरूपभूत, शांत, भेदरहित, ज्ञानरसरूप, आनंदमात्र आणि सर्वव्यापक जें ब्रह्म तेंच आहें असें जाणत असून त्या आत्म्याहून निराळें कांहींच पाहत नसे ॥ ८ ॥ ९ ॥ तो उत्कल, अज्ञानी लोकांना रस्त्यामध्यें जड, आंधळा, बहिरा, उन्मत्त किंवा मुका असा वाटत असे परंतु वास्तविकपणें पाहतां त्याची बुद्धि तशी नसून तो, ज्वाला शांत झालेल्या अग्नीसारखा दृष्टोत्पत्तीस न येणारा महाज्ञानी होता ॥ १० ॥ ह्यामुळें मंत्रिमंडळासह वृद्धवृद्ध कुलीन पुरुषांनीं, त्या उत्कलाला जड व उन्मत्त आहे असें मानून त्याचाच धाकटा भाऊ, ध्रुवाच्या भ्रमिनामक दुसऱ्या स्त्रीचा पुत्र जो वत्सर ह्मणून होता त्याला राज्यभिषेक केला ॥ ११ ॥ वत्सराची

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रिय भार्या स्वर्वीथि ती सहा पुत्रांस प्रसवली. त्यांचीं नांवें– पुष्पार्ण, तिग्मकेतु, इष, ऊर्ज, वसु आणि जय हीं होत ॥ १२ ॥ त्यां पैकीं पुष्पार्णाला प्रभा आणि दोषा अशा दोन स्त्रिया होत्या, त्यांतील प्रभानामक भार्येला– प्रातःकाळ, दोनप्रहर आणि सायंकाळ या तीन काळांचे अभिमानी देव तीन पुत्र झाले ॥ १३ ॥ दुसऱ्या दोषानामक भार्येला– प्रदोष, निशीथ आणि व्युष्ट हे तीन पुत्र झाले. त्यां पैकीं व्युष्टाला पुष्करिणीनामक भार्येच्या उदरीं सर्वतेजस् नांवाचा पुत्र झाला ॥ १४ ॥ त्या सर्व तेजाला आकूतिनामक पत्नीच्याठिकाणीं चक्षु ह्मा नांवाचा मनु पुत्र झाला. त्या मनूची पट्टराणी नड्वला बारा पुत्र प्रसवली. त्यांचें आचरण निर्दोष होतें ॥ १५ ॥ त्यांचीं नांवें–पुरु, कुत्स, त्रित, द्युम्न, सत्यवान्, ऋत, व्रत, अग्निष्टोम, अतीरात्र, प्रद्युम्न, शिबि आणि उल्मुक हीं होत ॥ १६ ॥ उल्मुकानें पुष्करिणीच्याठिकाणीं अंग, सुमनस्, ख्याति, क्रतु, अंगिरा आणि गय हे सहा उत्तम पुत्र उत्पन्न केले ॥ १७ ॥ अंगाची जी सुनीथानामक पत्नी ती वेननामक दुष्ट पुत्राला प्रसवली. तो राजर्षि अंग, त्या वेनाच्या दुष्ट स्वभावामुळें कंटाळून विरक्त होत्साता नगरांतून

॥ १३ ॥ निशिथो निशीथः ॥ १४ ॥ स सर्वतेजाश्चक्षुःसंज्ञं मनुं सुतं पुत्रमवाप । मनोर्मेहिषी नड्वला विरजान् शुद्धान्पुरुप्रमुखान्द्वादश सुतानसूत ॥ १५ ॥ ॥ १६ ॥ १७ ॥ १८ ॥ अंग हेविदुर वागेव वज्रं येषाम् ॥ १९ ॥ मथने हेतुः । अराजक इति । आद्यः पुरग्रामादीनां तेन रचितत्वात् ॥ २० ॥ यद्यस्याः

पुष्पार्णस्य प्रभा भार्या दोषा च द्वे बभूवतुः ॥ प्रातर्मध्यंदिनं सायमिति ह्यासन्प्रभासुताः ॥ १३ ॥ प्रदोषो निशिथो व्युष्ट इति दोषासुतास्त्रयः ॥ व्युष्टः सुतं पुष्करिण्यां सर्वतेजसमादधे ॥ १४ ॥ सचक्षुःसुतमाकूत्यां पत्न्यां मनुमवाप ह ॥ मनोरसूत महिषी विरजान्नड्वला सुतान् ॥ १५ ॥ पुरुं कुत्सं त्रितं द्युम्नं सत्यवंतमृतं व्रतम् ॥ अग्निष्टोममतीरात्रं प्रद्युम्नं शिबिमुल्मुकम् ॥ १६ ॥ उल्मुकोऽजनयत्पुत्रान्पुष्करिण्यां षडुत्तमान् ॥ अंगं सुमनसं ख्यातिं क्रतुमंगिरसं गयम् ॥ १७ ॥ सुनीथांगस्य या पत्नी सुषुवे वेनमुल्बणम् ॥ यद्दौःशील्यात्स राजर्षिर्निर्विण्णो निरगात्पुरात् ॥ १८ ॥ यमंगशेपुः कुपिता वाग्वज्रा मुनयः किल ॥ गतासोस्तस्य भूयस्ते ममंथुर्दक्षिणं करम् ॥ १९ ॥ अराजके तदा लोके दस्युभिः पीडिताः प्रजाः ॥ जातो नारायणांशेन पृथुराद्यः क्षितीश्वरः ॥ २० ॥ विदुर उवाच ॥ तस्य शीलनिधेः साधोर्ब्रह्मण्यस्य महात्मनः ॥ राज्ञः कथमभूद्दुष्टा प्रजा यद्विमना ययौ ॥ २१ ॥ किंवांहो वेनउद्दिश्य ब्रह्मदंडमयूयुजन् ॥ दंडव्रतधरे राज्ञि मुनयो धर्मकोविदाः ॥ २२ ॥ नावध्येयः प्रजापालः प्रजाभिरघवानपि ॥ यदसौ लोकपालानां बिभर्त्योजः स्वतेजसा ॥ २३ ॥

प्रजाया हेतोर्विमनाः सन्ययौ ॥ २१ ॥ किंवा अंहः अपराधं वेने उद्दिश्य आलक्ष्य ॥ २२ ॥ यतोऽयमधर्मं इत्याह । नावध्येयोऽवज्ञेयोऽपि न भवति ॥ २३ ॥

निघून गेला ॥ १८ ॥ हे विदुरा, ~~वाणी हेंच आहे वज्र ज्यांचें अशा~~ कोपायमान झालेल्या मुनींनीं खरोखर मरण्याच्या बुद्धीनें त्या वेनाला शाप दिला, त्याच्या योगानें तो तत्काळ मरण पावला. तेव्हां पुनः त्या ऋषींनीं मृत झालेल्या त्याच्या उजव्या बाहूचें मंथन केलें ॥ १९ ॥ कारण, त्या वेळीं लोकांमध्यें राजा नाहींसा झाल्यामुळें सर्व प्रजा चोरांनीं पीडित झाल्या होत्या. त्या मंथनाच्या योगानें वेनाच्या बाहूपासून नारायणाच्या अंशानें पृथुनांवाचा पुत्र उत्पन्न झाला. त्यानें प्रथमच नगरादिकांची रचना केली ह्मणून त्याला आद्य (पहिला) राजा असें ह्मणतात ॥ २० ॥ विदुर ह्मणाला– हे मुनिश्रेष्ठा, अंगराजा तर सुस्वभावाचा निधि, साधु, ब्राह्मणांचा हितकर्ता, व थोरमनाचा होता. त्याला अशी दुष्ट संतति कशी झाली ? कीं जिच्यामुळें खिन्न होऊन त्याला घरांतून निघून जावें लागलें ॥ २१ ॥ आणि धर्मज्ञानकुशल अशा ऋषींनीं तरी दुष्टांचें शासनरूप व्रत धारण करणाऱ्या वेनराजाचेठिकाणीं कोणत्या अपराधाला उद्देशून शापरूप ब्रह्मदंडाची योजना केली? ॥ २२ ॥ ~~धर्मशास्त्र पाहूं~~ गेलें असतां, ॥ ४२ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रजापालन करणाऱ्या राजानें जरी कदाचित् प्रजांचा अपराध केला तरी प्रजांनीं त्याची अवज्ञा देखील करूं नये. कारण, तो आपल्या प्रभावाच्या योगानें इंद्रादिलोकपालांचें सामर्थ्य आपल्या अंगीं धारण करीत असतो ॥ २३ ॥ तस्मात् हे ब्रह्मनिष्ठा, श्रद्धेनें व भक्तीनें युक्त असलेल्या मला हें सुनीथेच्या पुत्राचें (वेनाचें) चरित्र आपण कथन करावें. कारण, भूत भविष्य जाणणाऱ्या लोकांमध्यें आपण अतिश्रेष्ठ आहांत ॥ २४ ॥ प्रारब्धीं नसलेला पुत्र काम्यकर्माच्या योगानें बलात्कारानें मिळविला तर तो सुख देणारा होत नाहीं हें दर्शविण्यासाठीं अंगराजाच्या पुत्रोत्पत्तीचा प्रकार सांगत होत्साता मैत्रेय ह्मणाला—हे विदुरा, ऋषीसारखें आचरण करणाऱ्या अंगराजानें अश्वमेध नांवाचा मोठा यज्ञ आरंभिला त्यामध्यें वेदवेत्त्या ब्राह्मणांनीं हविर्भाग ग्रहण करण्याकरितां बोलाविलेल्या देवता येईनांत ॥ २५ ॥ तेव्हां ते ऋत्विज विस्मय पावोन त्या यजमानाला ह्मणाले कीं,— हे राजा, आह्मी होम केलेलीं तुझीं होमद्रव्यें देवता ग्रहण करीत नाहींत ॥ २६ ॥ हे राजा, होमद्रव्यें वाईट ह्मणावीं तर नाहींत. तीं निर्दोष असून तूं श्रद्धेनें संपादन

परावरविदां मध्येऽतिश्रेष्ठः ॥ २४ ॥ अभावी पुत्रः काम्यकर्मणा बलादापादितो न सुखाय भवेदिति द्योतयन्नंगस्य पुत्रोत्पत्तिक्रममाह । अंग इत्यादिना ॥ २५ ॥ ॥ २६ ॥ अयातयामान्यगतवीर्याणि ॥ २७ ॥ २८ ॥ यज्ञे गृहीतमौनोऽपि वाचं व्यसृजत्प्रायुंक्त ॥ २९ ॥ आहुता आहूताः ग्रहान्सोमपात्राणि इह यज्ञे न गृह्णंति ॥ ३० ॥

एतदाख्याहि मे ब्रह्मन्सुनीथात्मजचेष्टितम् ॥ श्रद्दधानाय भक्ताय त्वं परावरवित्तमः ॥ २४ ॥ मैत्रेय उवाच ॥ अंगोऽश्वमेधं राजर्षिराजहार महाक्रतुम् ॥ नाजग्मुर्देवतास्तस्मिन्नाहूता ब्रह्मवादिभिः ॥ २५ ॥ तमूचुर्विस्मितास्तत्र यजमानमथर्त्विजः ॥ हवींषि हूयमानानि न ते गृह्णंति देवताः ॥ २६ ॥ राजन्हवींष्यदुष्टानि श्रद्धयाऽऽसादितानि ते ॥ छंदांस्ययातयामानि योजितानि धृतव्रतैः ॥ २७ ॥ न विदामेह देवानां हेलनं वयमण्वपि ॥ यन्न गृह्णंति भागान्स्वान्ये देवाः कर्मसाक्षिणः ॥ २८ ॥ मैत्रेय उवाच ॥ अंगो द्विजवचः श्रुत्वा यजमानः सुदुर्मनाः ॥ तत्प्रष्टुं व्यसृजद्वाचं सदस्यांस्तदनुज्ञया ॥ २९ ॥ नागच्छंत्याहुता देवा न गृह्णंति ग्रहानिह ॥ सदसस्पतयो ब्रूत किमवद्यं मया कृतम् ॥ ३० ॥ सदसस्पतय ऊचुः ॥ नरदेवेह भवतो नाघं तावन्मनाक् स्थितम् ॥ अस्त्येकं प्राक्तनमघं यदिहेदृक् त्वमप्रजः ॥ ३१ ॥

इह जन्मनि न तावन्मनागीषदप्यघं स्थितम्। कथंचिज्जातस्याघस्य सद्य एव प्रायश्चित्तैः क्षालनात् किंतु प्राक्तनमेकमघमस्ति यद्यस्मादीदृक् गुणाधिकोऽपि त्वं प्रजारहितः ॥ ३१ ॥

केलेलीं आहेत. मंत्रवैगुण्य ह्मणावें तर तेंही नाहीं. ब्रह्मचर्यादि व्रतें धारण करणाऱ्या आह्मीं योजिलेले मंत्र फारच ताजे आहेत ॥ २७ ॥ व ह्या यज्ञांत कोणत्याहि कारणानें अणुमात्रहि झालेली देवांची हेलना आह्मी जाणत नाहीं. असें असतां कर्मसाक्षी जे देव ते येथें येऊन आपापले हविर्भाग ग्रहण करीत नाहींत याचें कारण काय असावें? ॥ २८ ॥ मैत्रेय ह्मणाला—हे विदुरा, हें ब्राह्मणांचें भाषण ऐकून तो यजमान अंगराजा खिन्न झाला आणि अनुष्ठानामध्यें त्यानें मौनधारण केलें असतांहि त्या ऋत्विजांच्या अनुज्ञेनें तें देवता न येण्याचें कारण सदस्यांना विचारण्याकरितां मौनव्रत सोडून असें ह्मणाला कीं,— ॥ २९ ॥ हे सदसस्पतिहो, या यज्ञामध्यें देवता मंत्रांच्या योगानें बोलाविल्या असतांहि येत नाहींत आणि हविर्भाग ग्रहण करीत नाहींत असें मी पाप काय केलें आहे? तें सांगा ॥ ३० ॥ सदसस्पति ह्मणाले— हे राजा, ह्या जन्मामध्यें तुजकडून घडलेलें पाप स्वल्पसुद्धां अवशेष राहिलेलें नाहीं. एखादेवेळीं कांहीं पाप घडलें असलें तरी प्रायश्चित्तांनीं त्याचें क्षालन झालेंच आहे. परंतु ज्याच्या योगानें तूं ह्या जन्मीं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

निपुत्रिक झाला आहेस असें एक तुझें पूर्वजन्मींचें पाप आहे ॥ ३१ ॥ यास्तव हे राजा, ज्या प्रकारानें देव हविर्भाग ग्रहण करितील तसें तूं आपणास उत्तम पुत्र होण्याचें साधन प्रथम कर. तुझें कल्याण असो. तूं पुत्रकामेष्टीनें यजन केलें असतां यज्ञभोक्ता भगवान् हरि तुला पुत्र देईल ॥ ३२ ॥ जर साक्षात् यज्ञपुरुष हरिच पुत्रप्राप्तीसाठीं वरिला जाईल तर तो वर देण्याकरितां येथें आला असतां त्याचेबरोबर सर्वहि देव येतील आणि ते आपापले भाग ग्रहण करितील ॥ ३३ ॥ हें अतितुच्छ फळ हरि कसें देईल हें मनांत आणूं नकोस. कारण, मनुष्य ज्या ज्या विषयांची इच्छा धारण करितो, ते ते विषय श्रीहरि त्याला देतो. जसें हरीचें आराधन करावें तशीच पुरुषांना फळाची प्राप्ति होत्ये ॥ ३४ ॥ असें सदसस्पतींचें भाषण श्रवण करून पुत्रकामेष्टीविषयीं निश्चययुक्त झालेल्या त्या ऋत्विजांनीं त्या अंगराजाला पुत्रप्राप्ति होण्यासाठीं पशूंच्याठिकाणीं, यज्ञरूपानें असणाऱ्या विष्णूच्या उद्देशानें पुरोडाश तयार करून त्याचा

अतो यथा देवा हविर्ग्रहंति तथात्मानं सुप्रजं साधय। कथं साधनीयं तदाहुः। इष्ट इति ॥ ३२ ॥ तथा सति स्वभागान् ग्रहीष्यंति। यद्यतो हरिः साक्षाद्वृतः स्यात् अतस्तेन सह सर्वे देवा आगमिष्यंतीत्यर्थः ॥ ३३ ॥ नन्वतितुच्छान्कामान्हरिः कथं दद्यात्तत्राह। तांस्तानिति ॥ ३४ ॥ प्रजातये पुत्रोत्पत्तये शिपिविष्टाय शिपिषु पशुषु

तथा साधय भद्रं ते आत्मानं सुप्रजं नृप ॥ इष्टस्ते पुत्रकामस्य पुत्रं दास्यति यज्ञभुक् ॥ ३२ ॥ तथा स्वभागधेयानि ग्रहीष्यंति दिवौकसः ॥ यद्यज्ञपुरुषः साक्षादपत्याय हरिर्वृतः ॥ ३३ ॥ तांस्तान्कामान्हरिर्दद्याद्यान्यान्कामयते जनः ॥ आराधितो यथैवैष तथा पुंसां फलोदयः ॥ ३४ ॥ इति व्यवसिता विप्रास्तस्य राज्ञः प्रजातये ॥ पुरोडाशं निरवपञ्छिपिविष्टाय विष्णवे ॥ ३५ ॥ तस्मात्पुरुष उतस्थौ हेममाल्यमलांबरः ॥ हिरण्मयेन पात्रेण सिद्धमादाय पायसम् ॥ ३६ ॥ स विप्रानुमतो राजा गृहीत्वांजलिनौदनम् ॥ अवघ्राय मुदा युक्तः प्रादात्पन्या उदारधीः ॥ ३७ ॥ सा तत्पुंसवनं राज्ञी प्राश्य वै पत्युरादधे ॥ गर्भं काल उपावृत्ते कुमारं सुषुवेऽप्रजा ॥ ३८ ॥ स बाल एव पुरुषो मातामहमनुव्रतः ॥ अधर्मांशोद्भवं मृत्युं तेनाभवदधार्मिकः ॥ ३९ ॥ सशरासनमुद्यम्य मृगयुर्वनगोचरः ॥ हंत्यसाधुर्मृगान्दीनान्वेनोऽसावित्यरौज्जनः ॥ ४० ॥

यज्ञरूपेण प्रविष्टाय। तथा च श्रुतिः। यज्ञो वै विष्णुः पशवः शिपिर्यज्ञ एव पशुषु प्रतितिष्ठतीति ॥ ३५ ॥ तस्मादिति योग्यतयाग्नेः ॥ ३६ ॥ पत्न्यै प्रादात् ॥ ३७ ॥ पुमांसं सूतेऽनेनेति तथा तत्प्राश्य पत्युः सकाशाद्गर्भमादधे अप्रजा सती ॥ ३८ ॥ मातामहं मृत्युम्। मृत्योर्हि पुत्री सुनीथा ॥ ३९ ॥ मृगयुर्लुब्धकः सन् तं दृष्ट्वा वेनोऽसावागच्छ-

---

होम केला ॥ ३५ ॥ तेव्हां अग्निकुंडांतून सुवर्णपुष्पांच्या माळा धारण करणारा व स्वच्छ वस्त्र परिधान करणारा एक पुरुष, हातांत सुवर्णाच्या पात्रामध्यें सिद्ध झालेलें पायस ग्रहण करून निघाला ॥ ३६ ॥ तेव्हां त्या महाबुद्धिमान् राजानें ब्राह्मणांची अनुज्ञा घेऊन ओंजळीनें तें पायस ग्रहण केलें आणि त्याचें अवघ्राण करून हर्षानें युक्त होऊन आपल्या पत्नीला दिलें ॥ ३७ ॥ तेव्हां त्या अपुत्रवती सुनीथा राणीनें तें पुत्र देणारें पायस प्राशन केलें. पुढें पतीपासून तिला गर्भ राहिला व प्रसूतिकाल प्राप्त झाला असतां तिला पुत्र झाला ॥ ३८ ॥ तो मुलगा लहानपणापासूनच, अधर्माच्या वंशांत उत्पन्न झालेल्या मृत्युनामक आपल्या मातामहाला (आईच्या बापाला) अनुसरला म्हणून तो पुढें अधार्मिक झाला ॥ ३९ ॥ पुढें तो दुष्ट अगदीं व्याधासारखा घातकी होऊन धनुष्य सज्ज करून वनामध्यें जाऊन दीन मृगांना मारीत असे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तेव्हां त्याला पाहून सर्व लोक 'अरे हा वेन येत आहे' असें ह्मणून आक्रोश करीत असत ॥ ४० ॥ तसाच अतिदारुण व निर्दय तो वेन, क्रीडास्थानामध्यें क्रीडा करीत असलेल्या आपल्या बरोबरीच्या बालकांना, दांडगाई करून यज्ञांतील पशूंना बुक्कयांनीं मारतात त्याप्रमाणें ठार मारीत असे ॥ ४१ ॥ तेव्हां अंगराजानें त्या आपल्या दुष्ट पुत्राचें कर्म पाहून, त्याला पुष्कळ प्रकारें बोध केला व शिक्षा केली परंतु शेवटीं जेव्हां त्याच्यानें त्याला ताळ्यावर आणवलें नाहीं, तेव्हां तो राजा अत्यंत खिन्न होऊन ह्मणाला कीं,–॥ ४२ ॥ जे गृहस्थ अपुत्रिक आहेत, त्यांनीं पूर्वजन्मीं बहुतकरून देवाचें पूजनच केलें असावें. कारण, त्यांना कुपुत्राच्या योगानें उत्पन्न होणारें अतिदुःसह दुःख सोसावें लागत नाहीं ॥ ४३ ॥ ज्या कुपुत्रापासून पुरुषांची अपकीर्ति होत्ये, मोठा अधर्म घडतो, सर्वांशीं वैरभाव उत्पन्न होतो आणि अंतःकरणाचे-

---

तीति जनः सर्वोऽप्यरौच्चुक्रोश ॥ ४० ॥ आक्रीडे क्रीडास्थाने बालान्पशूनिवामारयत् ॥ ४१ ॥ विचक्ष्य दृष्ट्वा ॥ ४२ ॥ दुर्मनसस्तस्य कुपुत्रनिंदावाक्यान्याह । प्रायेणेति त्रिभिः अप्रजा ये तैरभ्यर्चितः। तत्र हेतुः। कुत्सितैरपत्यैः संभृतं दुर्भरं धारयितुमशक्यं दुःखं ये न विंदंति ॥ ४३ ॥ सर्वेषां सर्वैः सह आधिर्मानसी व्यथा ॥ ४४ ॥ तं प्रजापदेशं पुत्रनाममात्रमप्यात्मनो मोहेन बंधनम् । यदर्था यन्निमित्ताः क्लेशदा गृहा भवंति ॥ ४५ ॥ इदानीं निर्वेदहेतुत्वेन कुत्सितमेवापत्यमभिनंदति । कदपत्यमिति । शुचां

आक्रीडे क्रीडतो बालान्वयस्यानतिदारुणः ॥ प्रसह्य निरनुक्रोशः पशुमारममारयत् ॥ ४१ ॥ तं विचक्ष्य खलं पुत्रं शासनैर्विविधैर्नृपः ॥ यदा न शासितुं कल्पो भृशमासीत्सुदुर्मनाः ॥ ४२ ॥ प्रायेणाभ्यर्चितो देवो येऽप्रजा गृहमेधिनः ॥ कदपत्यभृतं दुःखं ये न विंदंति दुर्भरम् ॥ ४३ ॥ यतः पापीयसी कीर्तिरधर्मश्च महान्नृणाम् ॥ यतो विरोधः सर्वेषां यत आधिरनंतकः ॥ ४४ ॥ कस्तं प्रजापदेशं वै मोहबंधनमात्मनः ॥ पंडितो बहु मन्येत यदर्थाः क्लेशदा गृहाः ॥ ४५ ॥ कदपत्यं वरं मन्ये सदपत्याच्छुचां पदात् ॥ निर्विद्येत गृहान्मर्त्यो यत्क्लेशनिवहा गृहाः ॥ ४६ ॥ एवं स निर्विण्णमना नृपो गृहान्निशीथ उत्थाय महोदयोदयात् ॥ अलब्धनिद्रोऽनुपलक्षितो नृभिर्हित्वा गतो वेनसुवं प्रसुप्ताम् ॥ ४७ ॥ विज्ञाय निर्विद्य गतं पतिं प्रजाः पुरोहितामात्यसुहृद्गणादयः ॥ विचिक्युरुर्व्यामतिशोककातरा यथा निगूढं पुरुषं कुयोगिनः ॥ ४८ ॥

पदाच्छोकानां स्थानात् । वरत्वे हेतुः । निर्विद्येतेति । तत्कुतः यद्यतः कदपत्यात् गृहाः क्लेशनिवहा भवंति ॥ ४६ ॥ महतामुदयानां विभूतीनामुदयो यस्मिंस्तस्माद्गृहाद्गतः । या वेनं सूते स्म ताम् ॥ ४७ ॥ प्रजाः पुरोहितादयश्च विचिक्युरन्वेषितवंतः तं तत्रैव संतमपि नापश्यन्निति दृष्टांतेनाह । यथेति ॥ ४८ ॥

ठिकाणीं ज्याचा कधींच अंत नाहीं असें दुःख उत्पन्न होतें ॥ ४४ ॥ तसेंच ज्याच्यामुळें घर, दुःखदायक वाटूं लागतें त्या पुत्रनामानें प्रसिद्ध असलेल्या आपल्या मोहबंधनाला कोण बरें शाहाणा मनुष्य चांगलें असें मानील? कोणीच मानणार नाहीं ॥ ४५ ॥ अथवा मला वाटतें कीं, निरंतर शोकाचें स्थान अशा सद्गुणी मुलापेक्षां दुर्गुणी मुलगा असणें हेंच बरें आहे. कारण, दुर्गुणी मुलामुळें घर सर्वप्रकारें दुःखदायक होतें व तसें झालें असतां पुरुषाला त्या घराबद्दल वैराग्य उत्पन्न होत ॥ ४६ ॥ हे विदुरा, याप्रमाणें खिन्नचित्त असल्यामुळें निद्रारहित झालेला तो अंगराजा, एकेदिवशीं मध्यरात्रीच्या सुमारास उठून, गाढ निजलेल्या वेनमातेचा (सुनीथा राणीचा) त्याग करून महान् महान् ऐश्वर्यांच्या उदयाचें स्थान अशा त्या आपल्या घरांतून कोणाच्याही दृष्टीस न पडतां निघून गेला ॥ ४७ ॥ नंतर दुसरे दिवशीं आपला राजा विरक्त होऊन

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

निघून गेला असें समजून पुरोहित, अमात्य, सुहृद्गणवगैरे सर्व प्रजा, अत्यंत शोकानें व्याकुळ होऊन, जसे कुयोगी पुरुष अंतर्यामीं असलेल्या गुप्त पुरुषाचा शोध करितात त्याप्रमाणें त्याचा पृथिवीवर शोध करूं लागल्या परंतु जसा अंतर्यामी आत्मा कुयोगी पुरुषांना सांपडत नाहीं त्याप्रमाणें तो जरी तेथेंच कोठेंतरी होता तरी त्या जनांना सांपडला नाहीं ॥ ४८ ॥ हे विदुरा, तेव्हां अंगराजाचा कोठेंहि पत्ता न लागलेले नेत्रांतून, दुःखाश्रु ढाळणारे व व्यर्थ श्रम झालेले ते लोक नगरामध्यें परत येऊन त्यांनीं त्याठिकाणीं जमलेल्या ऋषींना वंदन केलें आणि त्यांना 'आह्मीं पुष्कळ शोध केला परंतु राजा कोठें सांपडत नाहीं' ही वार्ता सांगितली ॥ ४९ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील चतुर्थस्कंधामध्यें हा तेरावा अध्याय समाप्त झाला ॥ १३ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ७ ॥ याप्रमाणें दुष्ट पुत्राच्या भयानें अंगराजा निघून गेला असतां ब्राह्मणांनीं वेनराजाला राज्याभिषेक केला व पुढें त्याच वेनाच्या रागानें त्या ब्राह्मणांनीं त्याचा वध केला अशी कथा ह्या चवदाव्या अध्यांत सांगितली आहे ॥ १ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, लोकांचे हितचिंतक व ब्रह्मवेत्ते अशा त्या भृग्वादिक ऋषींनीं, प्रजारक्षक

साश्रवो रुदंतः भर्तुर्विप्लवं नाशमदर्शनमित्यर्थः ॥ ४९ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे चतुर्थस्कंधे त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥ ॥ चतुर्दशे तुदुष्पुत्रभयादंगे गते द्विजैः ॥

अलक्षयंतः पदवीं प्रजापतेर्हतोद्यमाः प्रत्युपसृत्य ते पुरीम् ॥ ऋषीन्समेतानभिवंद्य साश्रवो न्यवेदयन्पौरव भर्तृविप्लवम् ॥ ४९ ॥ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे चतुर्थस्कंधे त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥ ॥ मैत्रेय उवाच ॥ भृग्वादयस्ते मुनयो लोकानां क्षेमदर्शिनः ॥ गोप्तर्यसति वै नृणां पश्यंतः पशुसाम्यताम् ॥ १ ॥ वीरमातरमाहूय सुनीथां ब्रह्मवादिनः ॥ प्रकृत्यसंमतं वेनमभ्यषिंचन्पतिं भुवः ॥ २ ॥ श्रुत्वा नृपासनगतं वेनमत्युग्रशासनम् ॥ निलिल्युर्दस्यवः सद्यः सर्पत्रस्ता इवाखवः ॥ ३ ॥ स आरूढनृपस्थान उन्नद्धोऽष्टविभूतिभिः ॥ अवमेने महाभागांस्तब्धः संभावितः स्वतः ॥ ४ ॥ एवं मदांध उत्सिक्तो निरंकुश इव द्विपः ॥ पर्यटन्रथमास्थाय कंपयन्निव रोदसी ॥ ५ ॥ न यष्टव्यं न दातव्यं न होतव्यं द्विजाः क्वचित् ॥ इति न्यवारयद्धर्मं भेरीघोषेण सर्वशः ॥६॥ वेनस्यावेक्ष्य मुनयो दुर्वृत्तस्य विचेष्टितम् ॥ विमृश्य लोकव्यसनं कृपयोचुः स्म सत्रिणः ॥ ७ ॥

अभिषिक्तस्य वेनस्य रोषात्तैर्वधं उच्यते ॥ १ ॥ क्षेमदर्शिनः क्षेमचिंतकाः पशुसमानरूपतां पश्यंतः ॥ १ ॥ अमात्यादीनां प्रकृतीनामसंमतम् । पाठांतरे प्रकृत्या स्वभावेनासंमतम् ॥ २ ॥ चोराः सर्वे लीना बभूवुः ॥ ३ ॥ आरूढं नृपस्थानं राजासनं येन अष्टविभूतिभिर्लोकपालैश्वर्यैः ॥ ४ ॥ ५ ॥ ६ ॥ सत्रिणो मिलिताः संतः ॥ ७ ॥

राजा नाहींसा झाला ह्मणजे सर्व लोक पशुतुल्य होतात असें पाहून वीरमाता (शूरपुत्राची आई) जी सुनीथा तिची संमति घेऊन प्रधानमंडळाला असंमत असा जरी वेन होता तरी त्याला पृथिवीच्या राज्याचा अभिषेक केला ॥ १ ॥ २ ॥ तेव्हां अतिभयंकर शिक्षा करणारा वेन सिंहासनावर बसला असें ऐकून सर्पाच्या भयानें भ्यालेल्या मूषकांप्रमाणें सर्व चोर जेथल्यातेथेंच लपून राहिले ॥ ३ ॥ इकडे राज्यासनावर बसलेला व इंद्रादिक आठ लोकपालांच्या ऐश्वर्यांनीं उन्मत्त झालेला तो वेन, उद्धटपणानें आपल्यालाच 'मी शूर, मी पंडित' इत्यादिप्रकारें मोठपणा मानून घेत होत्साता, महाभाग्यशाली ऋषींचावगैरे अवमान करूं लागला ॥ ४ ॥ याप्रमाणें निरंकुश हत्तीप्रमाणें उच्छृंखळ व मदांध झालेला तो राजा, भूमी व स्वर्ग यांस कांपवीत होत्साता आपल्या रथावर बसून पर्यटण करूं लागला आणि 'हे द्विजहो, तुह्मी कोणीहि यज्ञ करूं नये, दानें देऊं नयेत, होम करूं नये,' याप्रमाणें भूमंडळावर सर्वठिकाणीं डंका वाजवून त्यानें धर्माचरणाचा निषेध केला ॥ ५ ॥ ६ ॥ तेव्हां त्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दुराचरणी वेनाचें हें कृत्य ऋषींनीं पाहून, आतां लोकांवर कांहींतरी संकट ओढवणार असें मनांत आणून दया येऊन ते सर्वजण एकेठिकाणीं मिळाले आणि आपसांतच ह्मणूं लागले कीं, ॥ ७ ॥ अहो ! दोहोंकडून लांकूड पेटूं लागलें असतां त्याच्यामध्यें असणाऱ्या मुंग्यावगैरे प्राण्यांस जसें दोहोंकडून प्राणसंकट प्राप्त होतें त्याप्रमाणें लोकांना चोरांकडून व राजाकडून असें दोन्ही बाजूंनीं मोठें संकट प्राप्त झालें आहे ॥ ८ ॥ राजा नसला ह्मणजे प्रजेला चोरादिकांपासून भय प्राप्त होतें ह्मणून राजपदवीला अयोग्य अशाहि या वेनाला, आह्मी राजा केलें. आतां त्याच्यापासूनच लोकांना भय होऊं लागलें. तेव्हां आतां लोकांचें कल्याण तरी कसें व्हावें ? ॥ ९ ॥ दुधाच्या पोयानें सर्पाचें पोषण करणें हे जसें पोषण करणाराला सुद्धां अनर्थकारक होतें त्याप्रमाणें ही गोष्ट झाली. सुनीथेच्या उदरापासून झालेला हा वेन स्वभावतःच दुष्ट असून आह्मी त्याला प्रजांचें पालन करणारा राजा केला. आतां तोच आह्मी सर्व प्रजांना मारण्याची इच्छा करित आहे. असो. तथापि आह्मी याचें सांत्वन करूंया,

मूलतश्चाग्रतश्च दीप्ते ज्वलिते काष्ठे तन्मध्यवर्तिनां पिपीलिकादीनां यथोभयतो व्यसनमेवं तस्करेभ्यः पालकाच्च दुःखं प्राप्तमित्यर्थः ॥ ८ ॥ तदेवाहुः । अराजकभयादिति । अतदर्हणो राज्यानर्हः ॥९॥ अस्माकमप्यनिष्टं जातमित्याहुः । अहेर्यथा पयःपोषः क्षीरेण पोषणं पोषकस्याप्यनर्थं बिभर्ति पुष्णाति । तदेवाहुः । वेन इति ॥१०॥ निरूपितो नियुक्तोऽस्माभिः । सां-

अहो उभयतः प्राप्तं लोकस्य व्यसनं महत् ॥ दारुण्युभयतो दीप्त इव तस्करपालयोः ॥ ८ ॥ अराजकभयादेष कृतो राजाऽतदर्हणः ॥
ततोऽप्यासीद्भयं त्वद्य कथं स्यात्स्वस्ति देहिनाम् ॥ ९ ॥ अहेरिव पयःपोषः पोषकस्याप्यनर्थभृत् ॥ वेनः प्रकृत्यैव खलः सुनी-
थागर्भसंभवः ॥ १० ॥ निरूपितः प्रजापालः स जिघांसति वै प्रजाः ॥ तथापि सांत्वयेमामुं नास्मांस्तत्पातकं स्पृशेत् ॥ ११ ॥
तद्विद्वद्भिरसद्वृत्तो वेनोऽस्माभिः कृतो नृपः ॥ सांत्वितो यदि नो वाचं न ग्रहीष्यत्यधर्मकृत् ॥ १२ ॥ लोकधिक्कारसंदग्धं दहिष्या-
मः स्वतेजसा ॥ एवमध्यवसायैनं मुनयो गूढमन्यवः ॥ उपव्रज्याब्रुवन्वेनं सांत्वयित्वा च सामभिः ॥ १३ ॥ मुनय ऊचुः ॥ नृप-
वर्य निबोधैतद्यत्ते विज्ञापयाम भोः ॥ आयुःश्रीबलकीर्तीनां तव तात विवर्धनम् ॥ १४ ॥ धर्म आचरितः पुंसां वाङ्मनःकायबु-
द्धिभिः ॥ लोकान्विशोकान्वितरत्यथानंत्यमसंगिनाम् ॥ १५ ॥

त्वयेमोपपत्तिभिः प्रार्थयिष्यामः तस्य पातकम् ॥११॥ स्वस्य तत्पातकस्पर्शे हेतुः । तत्पातकित्वं विद्वद्भिः ॥ १२ ॥ गूढो मन्युर्येषाम् । सामभिः प्रियोक्तिभिः ॥१३॥१४॥ निष्कामाना-

ह्मणजे त्याणें केलेल्या पातकाचा आह्मांला स्पर्श होणार नाहीं ॥ १० ॥ ११ ॥ वेनाचें आचरण दुष्ट आहे, तो अधर्मानें वागतो, हें जाणत असणाऱ्याहि आह्मीं त्याला राज्याभिषेक केला, ह्मणून आतां आह्मी समजुतीच्या चार गोष्टी सांगून त्याचें सांत्वन केलेंच पाहिजे. मग त्यानें जर आमचें उपदेशपर भाषण ऐकिलें नाहीं तर, लोकांच्या धिक्कारानेंच अगदीं दग्ध झालेल्या ह्या वेन राजाला आह्मी आपल्या तेजानें जाळून टाकूं ॥ १२ ॥ असा निश्चय करून, ज्यांचा क्रोध गुप्त आहे अशा त्या ऋषींनीं, वेनराजाजवळ जाऊन व प्रियभाषणांनीं त्याचें सांत्वन करून भाषणाचा उपक्रम केला ॥ १३ ॥ ऋषि ह्मणाले– बा नृपश्रेष्ठा, तुझ्या आयुष्य, संपत्ति, बळ आणि कीर्ति ह्यांची वृद्धि होण्याचें साधन असें आह्मी जें कांहीं तुला विदित करीत आहों हें तूं ऐकून घे ॥ १४ ॥ हे राजा, पुरुषांनीं, वाणी, मन, देह आणि बुद्धि यांच्या योगानें धर्माचें आचरण केलें ह्मणजे तो धर्म, त्या पुरुषांस ज्याठिकाणीं शोक अगदीं नाहीं अशा लोकांची प्राप्ति करून देतो आणि निष्काम पुरुषांना मोक्षाची प्राप्ति

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करून देतो ॥ १५ ॥ यास्तव हे वीरा, जो धर्म नष्ट झाला असतां, राजा आपल्या ऐश्वर्यापासून भ्रष्ट होतो तो ' प्रजांचें कल्याण करणें' हा, तुझा धर्म कधींहि नष्ट होऊं नये ॥ १६ ॥ हे राजन्, दुष्ट प्रधानांपासून व चोरांदिकांपासून प्रजेचें रक्षण करणारा जो राजा, प्रजांकडून यथाशास्त्र करभार ग्रहण करितो तो इहलोकीं व परलोकीं सुख पावतो ॥ १७ ॥ हे महाभाग्यवंता, ज्याच्या राष्ट्रामध्यें अथवा नगरामध्यें वर्ण व आश्रम यांनीं युक्त असलेल्या लोकांनीं आपल्या धर्मानें भगवान् यज्ञपुरुषाचें आराधन केलें जातें व जो राजा परमेश्वराच्या आज्ञेनुसार वर्तन करित असतो त्या राजाला भूतपालक विश्वात्मा भगवान् संतुष्ट होतो ॥ १८ ॥ १९ ॥ ब्रह्मादिकांचाही ईश्वर असा तो भगवान् संतुष्ट झाला असतां मग त्याला दुर्लभ काय आहे? कांहींच नाहीं. मग त्या राजाला इंद्रादिलोकपालांसहवर्तमान सर्व लोक आदरपूर्वक करभार अर्पण करितात ॥ २० ॥ तस्मात् हे राजा, सर्व लोक व त्यांचे पालक इंद्रादिदेव आणि त्यांच्या प्राप्तीला कारणभूत जे यज्ञ त्यांचा नियंता, ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद यांनीं

मानंत्यं मोक्षमपि ॥ १५ ॥ मा विनशेन्मा विनश्यतु ॥ १६ ॥ असाधवो ये अमात्यास्तेभ्यः यथा यथाशास्त्रम् ॥ १७ ॥ १८ ॥ १९ ॥ २० ॥ सर्वान्लोकांश्च

स ते मा विनशेद्वीर प्रजानां क्षेमलक्षणः ॥ यस्मिन्विनष्टे नृपतिरैश्वर्यादवरोहति ॥ १६ ॥ राजन्नसाध्वमात्येभ्यश्चोरादिभ्यः प्रजा नृपः ॥ रक्षन्यथा बलिं गृह्णन्निह प्रेत्य च मोदते ॥ १७ ॥ यस्य राष्ट्रे पुरे चैव भगवान्यज्ञपूरुषः ॥ इज्यते स्वेन धर्मेण जनैर्वर्णाश्रमान्वितैः ॥ १८ ॥ तस्य राज्ञो महाभाग भगवान्भूतभावनः ॥ परितुष्यति विश्वात्मा तिष्ठतो निजशासने ॥ १९ ॥ तस्मिंस्तुष्टे किमप्राप्यं जगतामीश्वरेश्वरे ॥ लोकाः सपाला ह्येतस्मै हरंति बलिमादृताः ॥ २० ॥ तं सर्वलोकामरयज्ञसंग्रहं त्रयीमयं द्रव्यमयं तपोमयम् ॥ यज्ञैर्विचित्रैर्यजतो भवाय ते राजन्स्वदेशाननुरोद्धुमर्हसि ॥ २१ ॥ यज्ञेन युष्मद्विषये द्विजातिभिर्वितायमानेन सुराः कला हरेः ॥ स्विष्टाः सुतुष्टाः प्रदिशंति वांछितं तद्धेलनं नार्हसि वीर चेष्टितुम् ॥ २२ ॥ वेन उवाच ॥ बालिशा बत यूयं वा अधर्मे धर्ममानिनः ॥ ये वृत्तिदं पतिं हित्वा जारं पतिमुपासते ॥ २३ ॥ अवजानंत्यमी मूढा नृपरूपिणमीश्वरम् ॥ नानुविंदंति ते भद्रमिह लोके परत्र च ॥ २४ ॥

तत्पालानमरांश्च तत्प्रापकान्यज्ञांश्च संगृह्णाति नियच्छतीति तथा तं विचित्रैर्द्रव्ययज्ञादिभिः भवाय समृद्धये स्वदेशांस्तद्वासिनो जनान्। अनुरोद्धुमनुवर्तितुम् ॥ २१ ॥ युष्मद्विषये त्वद्देशे हरेः कला अंशाः सुराः तेषां सुराणां हेलनमवज्ञाम् ॥ २२ ॥ बालिशा अज्ञाः वृत्तिदमन्नादिप्रदं मां हित्वा ॥ २३ ॥ २४ ॥

प्रतिपाद्य, होमद्रव्यमय व तपोमय अशा त्या भगवंताचें अनेक प्रकारच्या यज्ञांनीं, तुझ्या समृद्धीसाठीं आराधन करणाऱ्या आपल्या देशांतील लोकांस अनुसरून वर्तन करण्याविषयीं तूं योग्य आहेस ॥ २१ ॥ हे वीरा, तुझ्या देशामध्यें ब्राह्मण क्षत्रिय आणि वैश्य या तिन्हीं वर्णांच्या लोकांनीं यथासांग केलेल्या यज्ञाच्या योगेंकरून उत्तमप्रकारें आराधन केलेले जे हरीचे अंशभूत देव, ते अत्यंत संतुष्ट होऊन इच्छित फळें देतील. यास्तव त्या देवांची अवज्ञा करण्याविषयीं तूं योग्य नाहींस ॥ २२ ॥ वेन ह्मणाला– ब्राह्मण हो! अधर्माचेठिकाणीं धर्म मानणारे तुह्मी अगदीं मूर्ख आहां! जे तुह्मी, उपजीविका चालविणारा व रक्षण करणारा अशा पतीचा (माझा) त्याग करून जारासारख्या भलत्याच पतीची (देवाची) आराधना करितां! त्या तुह्मांला ह्मणावें तरी काय? ॥ २३ ॥ जे हे मूर्ख लोक, नृपरूपी ईश्वराची अवज्ञा करितात ते

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

इहलोकीं किंवा परलोकीं कल्याण पावणार नाहींत ॥ २४ ॥ प्रतीच्याठिकाणीं स्नेहरहित अशा दुष्ट स्त्रियांची जशी जारावर भक्ति असल्ये त्याप्रमाणें तुमची ज्याच्यावर एवढी भक्ति आहे तो यज्ञपुरुष नांवाचा कोण आहे ? ॥ २५ ॥ विष्णु, ब्रह्मदेव, शंकर, इंद्र, वायु, यम, रवि, पर्जन्य, कुबेर, चंद्र, पृथिवी, अग्नि, वरुण हे व इतरहि वर किंवा शाप देण्यास समर्थ असे जे देव आहेत ते राजाच्या शरीरांत असतात ह्मणून राजा हा सर्वदेवमय आहे ॥ २६ ॥ २७ ॥ ह्मणून हे ब्राह्मण हो, तुह्मी मत्सर अगदीं सोडून देऊन सर्व कर्मांच्या योगानें माझें आराधन करा आणि मलाच बलि (करभारादिक) अर्पण करा. माझ्याहून दुसरा कोण पुरुष पूजा करण्यास योग्य आहे ? ॥ २८ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, याप्रमाणें ऋषींनीं प्रार्थना केली असतांहि विपरीतबुद्धि, अतिपापिष्ठ व पुण्यक्षय झालेला तो वेन राजा, शास्त्रविरुद्ध मार्गानें वर्तणूक करित होत्साता त्यांच्या याचनेचा अंगीकार न करितां त्यांसच उलट दोष ठेवूं लागला ॥ २९ ॥ हे विदुरा, याप्रमाणें आपणासच पंडित असें मानणाऱ्या त्या राजानें अप-

भर्तृस्नेहो विदूरो येषाम् ॥ २५ ॥ २६ ॥ देहे भवंति नृपतेरतो नृपतिरेवेश्वर इतरे तदंशा इति भावः ॥ २७ ॥ बलिं च करादिकम् । अग्रभुगाराध्यः ॥ २८ ॥ २९ ॥ तेनासत्कृताः भग्नायां याच्ञायां चुक्रुधुः क्रोधं चक्रुः ॥ ३० ॥ ३१ ३२ ॥ परिचक्षीत निंदेत अशुभं वेनं विना । कृतघ्नतामाहुः । यदनुग्रहविषयः सन्नीदृशमैश्वर्यं यः प्राप्तः ॥ ३३ ॥ पूर्वं गूढ-

को यज्ञपुरुषो नाम यत्र वो भक्तिरीदृशी ॥ भर्तृस्नेहविदूराणां यथा जारे कुयोषिताम् ॥ २५ ॥ विष्णुर्विरिंचो गिरिश इंद्रो वायु-र्यमो रविः ॥ पर्जन्यो धनदः सोमः क्षितिरग्निरपांपतिः ॥ २६ ॥ एते चान्ये च विबुधाः प्रभवो वरशापयोः ॥ देहे भवंति नृपतेः सर्वदेवमयो नृपः ॥ २७ ॥ तस्मान्मां कर्मभिर्विप्रा यजध्वं गतमत्सराः ॥ बलिं च मह्यं हरत मत्तोऽन्यः कोऽग्रभुक् पुमान् ॥ २८॥ मैत्रेय उवाच ॥ इत्थं विपर्ययमतिः पापीयानुत्पथं गतः ॥ अनुनीयमानस्तद्याच्ञां न चक्रे भ्रष्टमंगलः ॥ २९ ॥ इति तेऽसत्कृ-तास्तेन द्विजाः पंडितमानिना ॥ भग्नायां भव्ययाच्ञायां तस्मै विदुर चुक्रुधुः ॥ ३० ॥ हन्यतां हन्यतामेष पापः प्रकृतिदारुणः ॥ जीवन्जगदसावाशु कुरुते भस्मसाद्ध्रुवम् ॥ ३१ ॥ नायमर्हत्यसद्वृत्तो नरदेववरासनम् ॥ योऽधियज्ञपतिं विष्णुं विनिंदत्यनपत्रपः॥३२॥ को वैनं परिचक्षीत वेनमेकमृतेऽशुभम् ॥ प्राप्त ईदृशमैश्वर्यं यदनुग्रहभाजनः ॥ ३३ ॥ इत्थं व्यवसिता हंतुमृषयो रूढमन्यवः ॥ निजघ्नुर्हुंकृतैर्वेनं हतमच्युतनिंदया ॥ ३४ ॥ ऋषिभिः स्वाश्रमपदं गते पुत्रकलेवरम् ॥ सुनीथा पालयामास विद्यायोगेन शोचती ॥३५॥

मन्यव इदानीं रूढमन्यवः प्रकटकोपाः हुंकृतैर्हुंकारैः ॥ ३४ ॥ स्वाश्रमपदं प्रति ऋषिभिर्गते गमने कृते सति विद्यायोगेन मंत्रसहितया युक्त्या पालयामास ॥ ३५ ॥

मान केलेले ते ब्राह्मण, आपली मोठी याचना फुकट गेली असें जाणून त्या राजावर क्रोधाविष्ट झाले आणि ह्मणाले कीं ॥ ३० ॥ अरे हा पापी स्वभावतःच दुष्ट आहे, यास्तव याला मारून टाका, मारून टाका. हा वांचला असतां लवकरच सर्व जगाचें भस्म करून टाकील, यांत संशय नाहीं ॥ ३१ ॥ जो हा दुराचरणी निर्लज्ज पुरुष, यज्ञाधिपति श्रीविष्णूची निंदा करितो तो राजाच्या सिंहासनावर बसण्याला योग्य नाहीं ॥ ३२ ॥ अहो ! ज्याच्या अनुग्रहास पात्र झाल्यामुळें, जो आपण एवढ्या मोठ्या ऐश्वर्यास प्राप्त झाला तो कोण बरें पुरुष, एका ह्या कृतघ्न वेनराजाखेरीज विष्णूची निंदा करील ? कोणीहि करणार नाहीं ॥ ३३ ॥ हे विदुरा, अशाप्रकारें ज्यांचा कोप प्रकट झाला आहे अशा त्या ऋषींनीं, वेनाला मारण्याचा निश्चय करून, अच्युत भगवंताच्या निंदेनेंच हत झालेल्या त्या वेनाचा हुंकारेंकरूनच वध केला ॥ ३४ ॥ नंतर ते ऋषि आपापल्या आश्रमस्थानीं निघून गेले असतां, पुत्रशोक करणाऱ्या सुनीथेनें आपल्या मृतपुत्राचें शरीर, मंत्रविद्येनें व तेल ओषधि इत्यादि उपायांनीं रक्षण केलें ॥ ३५ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

एके वेळीं ते ऋषि, सरस्वती नदीच्या उदकामध्यें स्नान करून व अग्नीमध्यें होम करून नदीच्या तीराचेठिकाणीं परस्पर भगवत्कथा सांगत बसले असतां ॥ ३६ ॥ इतक्यांत लोकांना भय उत्पन्न करणारे मोठमोठे उत्पात चोहोंकडे होत आहेत असें त्यांना दिसून आलें. तेव्हां ते परस्परांशीं ह्मणूं लागले कीं, ह्या राजहीन झालेल्या भूमीला चोरांदिकांपासून उपद्रव तर होणार नाहींना ! असे ते ऋषि विचार करूं लागले, तों इतक्यामध्यें लोकांचें द्रव्य लुटून नेणारे चोर चोहोंकडे धांवूं लागले व त्यांपासून मोठा धुरळा उठला ॥ ३७ ॥ ३८ ॥ तेव्हां तो पृथिवीपति वेनराजा मरण पावला असतां, लोकांचें द्रव्य लुटणाऱ्या चोरांपासून व एकमेकांस मारणाऱ्या दुर्जनांपासून साधुलोकांना उपद्रव होत आहे असें जाणून व सर्वदेश अगदीं चोरमय, निर्बल व राजहीन झाला आहे असें जाणून चोरादिकांच्या निवारणाविषयीं समर्थ व निवारण

पुंवद्भाव आर्षः । सरस्वत्याः सलिले आप्लुताः कृतस्नानाः विष्णुकथाश्चक्रुः ॥ ३६ ॥ तदातूत्पातान्वीक्ष्य भुवो भद्रं न भवेत्किमित्याहुश्च ॥ ३७ ॥ एवं मृशंतस्तर्कयंत ऋषयः स्थिताः तदा धावतां चोराणां भूरिः पांसुः समुत्थितः ॥ ३८ ॥ तत्तदा तेषां लोकस्य धनं लुंपतां जिघांसतां चोपद्रवमाज्ञाय ॥ ३९ ॥ तथा चोरप्रायमराजकं हीनसत्त्वं च जनपदमाज्ञाय शक्ता अप्यवारणे दोषदर्शिनोऽपि जना लुंपतो लोकान्नावारयन्नित्यन्वयः ॥ ४० ॥ शक्तानां क्षत्रियाणामवारणे दोष इति किं वक्तव्यम् । समदृगपि शांतोऽपि

एकदा मुनयस्ते तु सरस्वत्सलिलाप्लुताः ॥ हुत्वाऽग्नीन्सत्कथाश्चक्रुरुपविष्टाः सरित्तटे ॥ ३६ ॥ वीक्ष्योत्थितान्महोत्पातानाहुर्लोकभयंकरान् ॥ अप्यभद्रमनाथाया दस्युभ्यो न भवेद्भुवः ॥ ३७ ॥ एवं मृशंत ऋषयो धावतां सर्वतोदिशम् ॥ पांसुः समुत्थितो भूरिश्चोराणामभिलुंपताम् ॥ ३८ ॥ तदुपद्रवमाज्ञाय लोकस्य वसु लुंपताम् ॥ भर्तर्युपरते तस्मिन्नन्योन्यं च जिघांसताम् ॥ ३९ ॥ चोरप्रायं जनपदं हीनसत्त्वमराजकम् ॥ लोकान्नावारयन् शक्ता अपि तद्दोषदर्शिनः ॥ ४० ॥ ब्राह्मणः समदृक् शांतो दीनानां समुपेक्षकः ॥ स्रवते ब्रह्म तस्यापि भिन्नभांडात्पयो यथा ॥ ४१ ॥ नांगस्य वंशो राजर्षेरेष संस्थातुमर्हति ॥ अमोघवीर्या हि नृपा वंशेऽस्मिन्केशवाश्रयाः ॥ ४२ ॥ विनिश्चित्यैवमृषयो विपन्नस्य महीपतेः ॥ ममंथुरूरुं तरसा तत्रासीद्बाहुको नरः ॥ ४३ ॥

ब्राह्मणोऽपि यदि दीनानां समुपेक्षको भवेत्तर्हि तस्यापि ब्रह्म तपः स्रवति ॥ ४१ ॥ अत उपेक्षादोषपरिहाराय नांगस्येत्यादिविनिश्चित्य महीपतेरूरुं तरसा ममंथुरित्यन्वयः । संस्थातुं नाशं गंतुम् । यद्वा । ऋषय एव लुंपतो लोकान्नावारयन् । कथंभूताः । हुंकारेणैव वेनं निवारयितुं शक्ता अपि । तत्किम् । तस्मिन्निवारणे तन्मरणादिदोषदर्शिनः । नचोदासत चोरोपद्रुते दीनोपेक्षायां तपोहानिप्रसंगात् नचान्यं तन्निवारकं राजानमकुर्वन् । अंगवंशोच्छेदस्यानर्हत्वात् अतो वेनस्यैव देहं ममंथुरिति योज्यम् । बाहुको वामनः ॥४२॥४३॥

केलें नाहीं तर त्यांत दोष आहे असें पाहणाऱ्याहि त्या ऋषींनीं, त्या चोरादिकांचें निवारण केलें नाहीं ॥ ३९ ॥ ४० ॥ सर्वठिकाणीं समदृष्टि ठेवणारा व शांत असा ब्राह्मणही जर दीनाची उपेक्षा करील तर त्याचेंहि तप (पुण्य), जसें पाणी फुटक्या (चीर गेलेल्या) भांड्यांतून हळूहळू पाझरून जातें त्याप्रमाणें उत्तरोत्तर क्षीण होत जाऊन शेवटीं नाहींसें होतें. ब्राह्मणांना देखील दीनाची उपेक्षा केली असतां दोष लागतो मग क्षत्रियांना लागतो हें तर सांगावयासच नको ॥ ४१ ॥ यास्तव दीनाच्या उपेक्षेचा दोष आपणास न लागण्याकरितां त्या ऋषींनीं विचार योजिला तो असा कीं, अंगराजर्षीचा हा वंश नाश पावण्यास योग्य नाहीं. कारण, या वंशामध्यें ज्यांचें वीर्य कधींहि निष्फल व्हावयाचें नाहीं असे नारायणाचा आश्रय करून राहणारे राजे झाले आहेत ॥ ४२ ॥ असा निश्चय करून, ऋषींनीं, त्या मृत झालेल्या वेनराजाच्या ॥ ४६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मांडीचें वेगानें मंथन केलें तों तेथून एक खुजा मनुष्य उत्पन्न झाला ॥ ४३ ॥ त्याचा रंग कावळ्यासारखा काळा होता, शरीर अति आंखूड, बाहू ह्रस्व, हनवटी मोठी,
पायहि आंखूडच, नाकाचें अग्र बसकें, डोळे लाल, केंस तांबडे असा तो होता ॥ ४४ ॥ तो पुरुष उत्पन्न होतांच त्या ऋषींना दीनासारखा नम्र होऊन ह्मणूं लागला
कीं, ‘ मी काय करूं ’ ते ऋषि ह्मणाले- बा वत्सा, नीषीद (बैस) ह्मणून तो पुढें निषाद झाला ॥ ४५ ॥ ज्यां कारणानें त्या उत्पन्न झालेल्या पुरुषानें वेनराजाचें
सगळें भयंकर पाप ओढून घेतलें, ह्मणून तो पापरूपी झाला. त्याचे वंशज, पर्वतावर व अरण्यांत दिसून येणारे नैषाद (भिल्लवगैरे रानटी जातीचे लोक) होत
॥ ४६ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील चतुर्थस्कंधामध्यें निषादोत्पत्तिकथननामक हा चवदावा अध्याय समाप्त झाला ॥ १४ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥
नंतर त्या ब्राह्मणांनीं वेनराजाच्या बाहूंचें मंथन केलें असतां, त्यापासून उत्पन्न झालेल्या पृथुराजाचा सर्वांनीं केलेला राज्याभिषेक व सत्कार या पंधराव्या अध्यायांत

तमेवाह । काक इव कृष्णः महत्यौ हनू कपोलप्रांतौ यस्य ह्रस्वौ पादौ यस्य ॥ ४४ ॥ ४५ ॥ गिरिः काननं च गोचर आश्रयो न तु पुरादिप्रवेशो येषाम् ।
तत्र हेतुः । येन कारणेनासावहरत्ततस्तस्य वंश्यास्तथाभूताः ॥ ४६ ॥ इति श्रीमद्भागवते चतुर्थे टीकायां चतुर्दशोऽध्यायः ॥ १४॥ ॥ ततः पंचदशे विप्रैर्मंथना-

काककृष्णोऽतिन्हस्वांगो न्हस्वबाहुर्महाहनुः ॥ न्हस्वपान्निम्ननासाग्रो रक्ताक्षस्ताम्रमूर्धजः ॥ ४४ ॥ तं तु तेऽवनतं दीनं किंकरोमीति
वादिनम् ॥ निषीदेत्यब्रुवंस्तात स निषादस्ततोऽभवत् ॥ ४५ ॥ तस्य वंश्यास्तु नैषादा गिरिकाननगोचराः ॥ येनाहरज्जायमानो
वेनकल्मषमुल्बणम् ॥ ४६ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे चतुर्थस्कंधे पृथुचरिते निषादोत्पत्तिर्नाम चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥ ॥
मैत्रेय उवाच ॥ अथ तस्य पुनर्विप्रैरपुत्रस्य महीपतेः ॥ बाहुभ्यां मथ्यमानाभ्यां मिथुनं समपद्यत ॥ १ ॥ तद्दृष्ट्वा मिथुनं जातमृ-
षयो ब्रह्मवादिनः ॥ ऊचुः परमसंतुष्टा विदित्वा भगवत्कलाम् ॥ २ ॥ ऋषय ऊचुः ॥ एष विष्णोर्भगवतः कला भुवनपालनी ॥
इयं च लक्ष्म्याः संभूतिः पुरुषस्यानपायिनी ॥ ३ ॥ अत्र तु प्रथमो राज्ञां पुमान्प्रथयिता यशः ॥ पृथुर्नाम महाराजो भविष्यति
पृथुश्रवाः ॥ ४ ॥ इयं च सुदती देवी गुणभूषणभूषणा ॥ अर्चिर्नाम वरारोहा पृथुमेवावरुंधती ॥ ५ ॥

द्वेनबाहुतः ॥ जातस्य तु पृथोरुक्तमभिषेकार्हणादिकम् ॥ १ ॥ १ ॥ २ ॥ किमूचुरित्यत आह । एष इति चतुर्भिः । लक्ष्म्याः संभूतिः कला ॥ ३ ॥ अत्र यः पुमान्स तु
महाराजो भविष्यति ॥ ४ ॥ सुदती शोभनदंतवती गुणानां भूषणानां च भूषणरूपा अवरुंधती भर्तृत्वेन भजंती भविष्यति ॥ ५ ॥

वर्णिला आहे ॥ १ ॥ मैत्रेय ह्मणाला-हे विदुरा, नंतर पुनः ब्राह्मणांनीं त्या निपुत्रिक राजाच्या दोन्हीं बाहूंचें मंथन केलें असतां, त्यापासून एक स्त्री व एक पुरुष असें जोडपें
उत्पन्न झालें ॥ १ ॥ ब्रह्मवेत्ते ऋषि, तें झालेलें जोडपें पाहून व तें परमेश्वराचा अंशावतारी आहे असें जाणून अत्यंत संतुष्ट होत्साते ह्मणाले कीं, ॥ २ ॥ ऋषि ह्मणाले-हा
पुरुष, षड्गुणैश्वर्यसंपन्न विष्णूचा जगाचें संरक्षण करणारा अंशावतार आहे. तशीच ही स्त्री, पुरुषोत्तमाचा कधींहि वियोग न पावणाऱ्या लक्ष्मीचा अवतार आहे ॥ ३ ॥
ह्या जोडप्यामध्यें जो पुरुष आहे तो तर, जगांतील सर्व राजांमध्यें पहिला, असून आपली कीर्ति प्रसिद्ध करणारा व महाकीर्तिमान् असा पृथु या नांवानें प्रख्यात महाराजा
होईल ॥ ४ ॥ आणि उत्तम कटि व सुंदर दंत ह्यांनीं युक्त असून गुणांना व अलंकारांनां देखील शोभा आणणारी अशी ही देवी, अर्चि ह्या नांवानें प्रसिद्ध होऊन पतिभा-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वानें पृथूचेंच सेवन करणारी होईल ॥ ५ ॥ हा साक्षात् हरीचा अंशावतार लोकांचें रक्षण करण्यासाठीं झाला आहे. आणि ही स्त्री विष्णूचा वियोग सहन न करणारी असून नित्य त्याच्याच सेवेंत तत्पर असणारी लक्ष्मी उत्पन्न झाली आहे ॥ ६ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, याप्रकारेंकरून सर्व ब्राह्मण त्या जोडप्याची प्रशंसा करूं लागले, गायकांमध्यें श्रेष्ठ गंधर्व, त्याचें गायन करूं लागले, सिद्धांनीं त्याच्यावर पुष्पधारांची वृष्टि केली आणि अप्सरा नृत्य करूं लागल्या ॥ ७ ॥ तशींच स्वर्गामध्यें देवांनीं वाजविलेलीं शंख, कर्णे, मृदंग, नगारेवगैरे वाद्यें मोठ्यांनीं वाजूं लागलीं. देव, ऋषि आणि पितर यांचे सर्व समुदाय, त्या पृथुराजाच्या दर्शनाकरितां तेथें प्राप्त झाले ॥ ८ ॥ जगद्गुरु ब्रह्मदेवानें, इंद्रादिलोकपालांसहवर्तमान तेथें येऊन, पृथुराजाच्या दक्षिण हस्ताचेठिकाणीं गदाधारी विष्णूचें रेषात्मक चिन्ह पाहिलें व चरणाचेठिकाणीं कमलचिन्ह पाहिलें आणि त्या पृथुराजाला हा हरीचा अवतार आहे असें मानिलें. कारण, ज्याच्या हातावर दुसऱ्या रेषांनीं मिश्र न झालेलें रेषात्मक चक्र असतें तो भगवंताचाच अवतार

अत्र हेतुः। एष इति। लोकस्य रिरक्षया रिरक्षयिषया॥ ६ ॥ स्वःस्त्रियः अप्सरसो नृत्यंति स्म ॥ ७ ॥ ८ ॥ देवैः सहास्तृत्यागत्य वैन्यस्य पृथोः चिह्नं रेखात्मकं चक्रम् ॥ ९ ॥ अप्रतिहतं

एष साक्षाद्धरेरंशो जातो लोकरिरक्षया ॥ इयं च तत्परा हि श्रीरनुजज्ञेऽनपायिनी ॥ ६ ॥ मैत्रेय उवाच ॥ प्रशंसंति स्म तं विप्रा गंधर्वप्रवरा जगुः ॥ मुमुचुः सुमनोधाराः सिद्धा नृत्यंति स्वःस्त्रियः ॥ ७ ॥ शंखतूर्यमृदंगाद्या नेदुर्दुंदुभयो दिवि ॥ तत्र सर्व उपाजग्मुर्देवर्षिपितृणां गणाः ॥ ८ ॥ ब्रह्मा जगद्गुरुर्देवैः सहासृत्य सुरेश्वरैः ॥ वैन्यस्य दक्षिणे हस्ते दृष्ट्वा चिह्नं गदाभृतः ॥ ९ ॥ पादयोररविंदं च तं वै मेने हरेः कलाम् ॥ यस्याप्रतिहतं चक्रमंशः स परमेष्ठिनः ॥ १० ॥ तस्याभिषेक आरब्धो ब्राह्मणैर्ब्रह्मवादिभिः ॥ आभिषेचनिकान्यस्मा आजह्रुः सर्वतो जनाः ॥ ११ ॥ सरित्समुद्रा गिरयो नागा गावः खगा मृगाः ॥ द्यौः क्षितिः सर्वभूतानि समाजह्रुरुपायनम् ॥ १२ ॥ सोऽभिषिक्तो महाराजः सुवासाः साध्वलंकृतः ॥ पत्न्याऽर्चिषाऽलंकृतया विरेजेऽग्निरिवापरः ॥ १३ ॥ तस्मै जहार धनदो हैमं वीर वरासनम् ॥ वरुणः सलिलस्रावमातपत्रं शशिप्रभम् ॥ १४ ॥ वायुश्च वालव्यजने धर्मः कीर्तिमयीं स्रजम् ॥ इंद्रः किरीटमुत्कृष्टं दंडं संयमनं यमः ॥ १५ ॥

रेखांतरैरभिन्नं चक्रं यस्य चिह्नं स परमेश्वरस्यांशः ॥ १० ॥ आभिषेचनिकान्यभिषेकसाधनानि ॥ ११ ॥ १२ ॥ १३ ॥ हेवीर वरासनमुत्तमासनम्। सलिलस्य स्रावो यस्मात् ॥ १४ ॥ द्वे वालव्यजने ॥ १५ ॥

असतो असा सिद्धांत आहे ॥ ९ ॥ १० ॥ पुढें वेदपारंगत अशा ब्राह्मणांनीं त्या पृथुराजाला राज्याभिषेक करण्यास आरंभ केला त्यावेळीं सर्व जनांनीं चोहोंकडून अभिषेकाचीं साहित्यें आणून दिलीं ॥ ११ ॥ नद्या, समुद्र, पर्वत, नाग, गाई, पक्षी, पशु, स्वर्ग, पृथ्वी, व सर्व भूतें ह्यांनीं त्याला आपापल्या अधिकारानुरूप भेटी आणून दिल्या ॥ १२ ॥ ब्राह्मणांनीं अभिषेक केलेला तो महाराजा पृथु, उंची वस्त्रें परिधान करून व आंगावर उत्तम अलंकार धारण करून, अलंकार घातलेल्या आपल्या अर्चिनामक पत्नीसहवर्तमान सुवर्णाच्या सिंहासनाचेठिकाणीं दुसरा अग्निच कीं काय असा विराजमान झाला ॥ १३ ॥ हे विदुरा, त्या पृथुराजाला, कुबेरानें सुवर्णानें निर्माण-केलेलें उत्तम सिंहासन अर्पण केलें. वरुणानें उदकबिंदूंचा स्राव होणारें चंद्रासारखें शुभ्र छत्र अर्पण केलें ॥ १४ ॥ वायूनें वाळ्याच्या दोन चंवऱ्या आणून दिल्या. धर्मानें ॥ ४६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कीर्तिरूपी निरंतर टवटवीत पुष्पें राहणारी शुभ्रमाळा दिली. इंद्रानें उत्तम किरीट अर्पण केला. यमानें शत्रूंला वश करणारा दंड आणून दिला ॥ १९ ॥ ब्रह्मदेवानें वेदमय कवच अर्पण केलें, सरस्वतीनें उत्तम हार समर्पण केला, विष्णूनें सुदर्शननामक चक्र दिलें व लक्ष्मीनें अक्षय संपत्ति दिली ॥ १६ ॥ शिवानें चंद्राकार दहा चिन्हें ज्याच्यावर आहेत असें एक खड्ग दिलें. तशीच पार्वतीनें चंद्राकार शंभर चिन्हाची ढाल दिली. चंद्रानें, मरण, श्रम, खेद इत्यादिकांनीं रहित असे स्वच्छ घोडे दिले व विश्वकर्म्यानें अतिसौंदर्ययुक्त रथ दिला ॥ १७ ॥ अग्नीनें, मेंढा व वृषभ यांच्या शिंगांपासून निर्माण केलेलें दृढ धनुष्य दिलें. सूर्यानें आपल्या किरणाप्रमाणें त्वरेनें दूरदेशीं जाणारे बाण दिले. पृथिवीनें, पायांत घालतांच इच्छितस्थळीं पोचविणाऱ्या पादुका दिल्या, स्वर्गाच्या अभिमानी देवतेनें, मी प्रतिदिवशीं पुष्पवृष्टि करीन अशी प्रतिज्ञा केली ॥ १८ ॥ आकाशांत संचार करणाऱ्या विद्याधरादिकांनीं, नृत्य, गायन, वाद्यें वाजविणें आणि गुप्त होणें ह्यांत कुशलता प्राप्त करून दिली, ऋषींनीं खरे होणारे आशीर्वाद

ब्रह्ममयं वेदमयं वर्म कवचं तत्पत्नी श्रीः श्रियं संपदम् ॥ १६ ॥ दशचंद्राकाराणि बिंबानि कोशे यस्य तं असिं खड्गं शतचंद्रं चर्म रूपाश्रयमतिसुंदरम् ॥ १७ ॥ अजस्य गोश्च शृंगाभ्यां निर्मितं चापम् । योगमय्यौ पादस्पर्शमात्रेणाभीष्टदेशप्रापिके ॥ १८ ॥ नाट्यादिकौशलं खेचराः आत्मजं स्वप्रभवम् ॥ १९ ॥ तं स्तोतुमुप-

ब्रह्मा ब्रह्ममयं वर्म भारती हारमुत्तमम् ॥ हरिः सुदर्शनं चक्रं तत्पत्न्यव्याहतां श्रियम् ॥ १६ ॥ दशचंद्रमसिं रुद्रः शतचंद्रं तथांबिका ॥ सोमोऽमृतमयानश्वांस्त्वष्टा रूपाश्रयं रथम् ॥ १७ ॥ अग्निराजगवं चापं सूर्यो रश्मिमयानिषून् ॥ भूः पादुके योगमय्यौ द्यौः पुष्पावलिमन्वहम् ॥ १८ ॥ नाट्यं सुगीतं वादित्रमंतर्धानं च खेचराः ॥ ऋषयश्चाशिषः सत्याः समुद्रः शंखमात्मजम् ॥ १९ ॥ सिंधवः पर्वता नद्यो रथवीथीर्महात्मनः ॥ सूतोऽथ मागधो बंदी तं स्तोतुमुपतस्थिरे ॥ २० ॥ स्तावकांस्तानभिप्रेत्य पृथुर्वैन्यः प्रतापवान् ॥ मेघनिर्ह्रादया वाचा प्रहसन्निदमब्रवीत् ॥ २१ ॥ पृथुरुवाच ॥ भो सूत हे मागध सौम्य बंदिँल्लोकेऽधुना स्पष्टगुणस्य मे स्यात् ॥ किमाश्रयो मे स्तव एष योज्यतां मामय्यभूवन्वितथा गिरो वः ॥ २२ ॥

स्थिताः ॥ २० ॥ स्तावकान् स्तोतुमुद्यतान् अभिप्रेत्य ज्ञात्वा ॥ २१ ॥ लोके स्पष्ट[illegible]तो मे स्तुतिः स्यात् अधुना तु किमाश्रयो मे स्तवो योज्यताम् । अतो वो गिरोऽधुना मयि वितथा माभूवन् यद्वा लोकेऽधुनाऽस्पष्टगुणस्य मे किमाश्रय[illegible] स्यात् अत एष क्रियमाणः स्तवो म[illegible]दन्यस्य योज्यतां न तु मे । वित

दिले आणि समुद्रानें आपल्यापासून उत्पन्न झालेला शंख दिला ॥ १९ ॥ सप्तसमुद्र[illegible] व नद्या यांनीं त्या महात्म्या पृ[illegible] रथ जाण्याचे मार्ग सिद्ध करून दिले. नंतर सूत (पौराणिक), मागध (वंशावळी गाणारे) आणि बंदी (समयोचित भाषण करणारे) हे त्या राजाची स्तुति [illegible]स उभे राहिले ॥ २० ॥ तेव्हां स्तुतिकरण्यास उद्युक्त झालेल्या त्या सूतादिकांस जाणून वेनाचा पुत्र महापराक्रमी तो पृथुराजा, किंचित् हास्य करून मेघासारख्या [illegible]र वाणीनें असें ह्मणाला कीं, ॥ २१ ॥ पृथु ह्मणाला—भोसूता, हे मागधा, हे सौम्या बंदिन्, लोकांमध्यें माझे गुण स्पष्ट झाले ह्मणजे मग माझी स्तुति घडेल. आतां [illegible]ति करण्यास आश्रय असे माझे गुण स्पष्ट झालेले नाहींत; मग माझी स्तुति कोणत्या गुणांच्या आश्रयानें घडणार? तर माझेविषयीं योजलेल्या तुमच्या वाणी व्यर्थ न ह[illegible]त. ह्मणून ही करावयाची स्तुति तुह्मी

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

स्पष्टगुण झालेल्या भगवंताची करा ॥२२॥ हे मधुरवाणीच्या सूतादिक हो, ज्या अर्थी अजून आह्मी स्पष्टगुण झालों नाहीं त्या अर्थी कालांतरीं गुण स्पष्ट झाले असतां तुह्मी
आमच्या यशांची स्तुति पाहिजे तशी करा. उत्तमश्लोक भगवंताचे गुण वर्णन करण्यास योग्य असतां ते सोडून सभ्य पुरु[illegible]स्पष्टगुण अशा माझी स्तुति करविणार
नाहींत ॥ २३ ॥ सज्जनाचे सौशील्यादिक गुण आपल्याठिकाणीं संपादन करण्यास समर्थ असला तरी नसत्या गुणांचा सं[illegible]त आणून कोण सद्बुद्धि पुरुष त्यांची
स्तुति स्तावकांकडून करवील? कोणीच करविणार नाहीं. जर करवील तर तो मूर्ख होय. कारण, 'ह्याने शास्त्रादिकांचा अ[illegible]केला तर अमुक अमुक गुण याचेठिकाणीं
उद्भवतील अशा भाषणानें' स्तावकांनीं स्तुतिमिषानें थट्टा केलेला तो कुबुद्धि पुरुष[illegible]कांनीं केलेल्या आपल्या थट्टेला ज[illegible]हीं ॥ २४ ॥ मोठ्या मनाचे, समर्थ व

थाभिधानापत्तेरित्यर्थः ॥ २२ ॥ तस्मात्परोक्षे कालांतरे स्पष्टेषु गुणेषु सत्स[illegible] यशांसि प्रतिस्तोत्रमलमत्यर्थं करिष्यथ । हे अपीच्यवाचो मधुरगिरः
सभ्यैः प्रेरिता वयं त्वामेव स्तुम इति चेत्तत्राह । उत्तमश्लोकस्य गुणानुवादे कार्ये सति[illegible]र्वाचीनं न स्तावयंति ॥ २३ ॥ ननु संभावितैरेव गुणैरात्मानं जनः
स्तावयतीति चेत्तत्राह । महतां गुणानात्मनि संपादयितुं शक्तोऽप्यसतो गुणान्संभावन[illegible]कः स्तावयते यद्वा आदावेव सतोऽपि कः स्तावयते स्वत एव प्रख्याति-
सिद्धेः । अन्यस्तु मिथ्यागुणस्तुतिश्लाघी मंद इत्याह । त इति । यद्ययं शास्त्राभ्यासादिकमकरिष्यत्तर्ह्यस्य ते विद्यादयो गुणा अभविष्यन्निति क्रियातिपत्त्या विप्रलब्धो

तस्मात्परोक्षेऽस्मदुपश्रुतान्यलं करिष्यथ स्तोत्रमपीच्यवाचः ॥ सत्युत्तमश्लोकगुणानुवादे जुगुप्सितं न स्तवयंति सभ्याः ॥ २३ ॥ महद्गुणानात्मनि कर्तुमीशः कः स्तावकैः स्तावयतेऽसतोऽपि ॥ तेऽस्याभविष्यन्निति विप्रलब्धो जनावहासं कुमतिर्न वेद ॥२४॥ प्रभवो ह्यात्मनः स्तोत्रं जुगुप्संत्यपि विश्रुताः ॥ ह्रीमंतः परमोदाराः पौरुषं वा विगर्हितम् ॥२५॥ वयं त्वविदिता लोके सूताद्यापि वरीमभिः ॥ कर्मभिः कथमात्मानं गापयिष्याम बालवत् ॥ २६ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे चतुर्थस्कंधे पृथुचरिते पंचदशोऽध्यायः ॥ १५ ॥ ॥ मैत्रेय उवाच ॥ इति ब्रुवाणं नृपतिं गायका मुनिचोदिताः ॥ तुष्टुवुस्तुष्टमनसस्तद्वागमृतसेवया ॥ १ ॥

जनानामवहासं न वेद ॥ २४ ॥ किंच प्रभवोऽपि विश्रुता अपि ह्रीमंतोऽपि जुगुप्संति वेतिदृष्टांते यथाऽतिस्तुतौ क्रियमाणायां विगर्हितं ब्राह्मणवधादि पौरुषं निंदंति तथो-
चितामपि स्तुतिं न सहंत इत्यर्थः ॥ २५ ॥ वरीमभिरिति दीर्घत्वमार्षं भवितृप्रधानोऽयं निर्देशः । वरिष्ठैः कर्मभिरविदिता इत्यर्थः ॥ २६ ॥ ॥ इति चतुर्थे टीकायां पंच-
दशोऽध्यायः ॥ १५ ॥ षोडशे सर्वलोकेशैः सत्कृतं भार्यया युतम् ॥ मुनिप्रयुक्ताः सूताद्याः स्तुवंति स्मेति वर्ण्यते ॥ १ ॥ गायकाः सूतादयः ॥ १ ॥

प्रख्यात असे जे पुरुष आहेत, ते आपली स्तुति ऐकण्याविषयीं लज्जा बाळगीत असून जशी, प्रमादानें घडलेल्या गोब्राह्मणवधादिक निंद्य पराक्रमाची स्तुति करवीत
नाहींत त्याप्रमाणेंच आपल्या वर्णनीय पराक्रमाचीहि स्तुति करवीत नाहींत ॥ २५ ॥ हे स्तुतिपाठक हो, आह्मी तर या लोकांचेठिकाणीं श्रेष्ठ कर्मांनीं अजून मुळींच
प्रख्यात झालों नाहीं, यास्तव अज्ञपुरुषाप्रमाणें तुमच्याकडून आपली स्तुति कशी करून घ्यावी! घेऊंच नये ॥ २६ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील
चतुर्थस्कंधामध्यें पृथुचरित्रांतील हा पंधरावा अध्याय समाप्त झाला ॥ १५ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ याप्रमाणें इंद्रादिक लोकपालांनीं सत्कार केलेल्या भार्यासहित
त्या पृथुराजाची, ऋषींनीं प्रेरणा केलेल्या सूतादिकांनीं स्तुति केली, अशी कथा या सोळाव्या अध्यायांत सांगितली आहे ॥१॥ मैत्रेय ह्मणाला—हे विदुरा, याप्रमाणें पृथुराजानें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भाषण केलें असतां त्याच्या वाणीरूप अमृताच्या सेवनानें संतुष्टचित्त झालेल्या त्या सूतमागधवंदींनीं, ऋषींच्या प्रेरणेवरून त्याची स्तुति केली ॥ १ ॥ ते ह्मणाले कीं,- जो देवश्रेष्ठ (विष्णु) तूं, आपल्या इच्छेनें याठिकाणीं अवतीर्ण झाला आहेस त्या तुझ्या महिम्याच्या वर्णनाविषयीं आह्मीं समर्थ नाहीं· कारण, वेनराजाच्या शरीरापासून उत्पन्न झालेल्या तुझ्या चरित्रांच्या ज्ञानाविषयीं ब्रह्मादिकांच्यासुद्धां बुद्धि भ्रम पावल्या आहेत तेथें आमची गणना काय? ॥ २ ॥ तथापि हरीच्या अंशानें उत्पन्न झालेल्या महायशस्वी अशा तुझ्या कथामृताविषयीं आदरयुक्त व ऋषींनीं प्रेरणा केलेले असे आह्मी, ऋषींनीं आमच्या अंतःकरणांत स्फूर्तिरूपानें जसा उपदेश केला आहे त्याप्रमाणें तुझ्या स्तुत्य कर्मांचें विस्तारानें वर्णन करितों ॥ ३ ॥ अहो, धर्माचें रक्षण करणाऱ्या पुरुषांमध्यें श्रेष्ठ असा हा राजा सर्व लोकांना आपापल्या धर्माच्याठिकाणीं प्रवृत्ति करवून वर्णाश्रमांच्या धर्ममर्यादांचें पालन करणारा आणि त्या धर्ममर्यादांचा उच्छेद करणाऱ्या दुराचारी पुरुषांना दंड करणारा होईल ॥ ४ ॥ हा एकटाच असून

नालं न समर्थाः भवान् अवतारेष्वप्यस्याधिक्यमाहुः । वेनस्यांगाज्जातस्य ते पौरुषाणि प्रत्यवितर्क्यतया ब्रह्मादीनामपि धियो बभ्रमुः कुतः पुनर्वयं तद्वर्णने समर्था भवेम ॥ २ ॥ अथापि यथावद्वर्णयितुमशक्ता अपि कथामृते सादराः मुनिभिः कृत उपदेशो योगबलेन हृदि प्रकाशनं तदनतिक्रम्य वितन्महि विस्तारयामः ॥ ३ ॥ ४ ॥ तनौ स्वदेहे लोकपालानां

नालं वयं ते महिमानुवर्णने यो देववर्योऽवततार मायया ॥ वेनांगजातस्य च पौरुषाणि ते वाचस्पतीनामपि बभ्रमुर्धियः ॥ २ ॥ अथाप्युदारश्रवसः पृथोर्हरेः कलावतारस्य कथामृतादृताः ॥ यथोपदेशं मुनिभिः प्रचोदिताः श्लाघ्यानि कर्माणि वयं वितन्महि ॥ ३ ॥ एष धर्मभृतां श्रेष्ठो लोकं धर्मेऽनुवर्तयन् ॥ गोप्ता च धर्मसेतूनां शास्ता तत्परिपंथिनाम् ॥ ४ ॥ एष वै लोकपालानां बिभर्त्येकस्तनौ तनूः ॥ काले काले यथाभागं लोकयोरुभयोर्हितम् ॥ ५ ॥ वसु काल उपादत्ते काले चायं विमुंचति ॥ समः सर्वेषु भूतेषु प्रतपन्सूर्यवद्विभुः ॥ ६ ॥ तितिक्षत्यक्रमं वैन्य उपर्याक्रमतामपि ॥ भूतानां करुणः शश्वदार्तानां क्षितिवृत्तिमान् ॥ ७ ॥ देवे वर्षत्यसौ देवो नरदेववपुर्हरिः ॥ कृच्छ्रप्राणाः प्रजा ह्येष रक्षिष्यत्यंजसेंद्रवत् ॥ ८ ॥

तनूर्मूर्तीः काले बिभर्ति यथाभागं पालनपोषणानुरंजनादिकार्यानुसारेण यज्ञादिप्रवर्तनेन स्वर्गस्य हितं वृष्ट्यादिना च भूर्लोकस्य हितं यथा भवति तथा ॥ ५ ॥ सूर्योदिततुधारणमेवाहाष्टभिः । वसु धनं करादानकाले आदत्ते दुर्भिक्षादिकाले विमुंचति च । अष्टौ मासान्सूर्यो यथा वसु जलमादत्ते वर्षासु विमुंचति तद्वत् ॥ ६ ॥ मस्तके पादेनाक्रमतामप्यार्तानां भूतानामतिक्रमं सहिष्यते क्षितेर्वृत्तिः सर्वसहनं सा वृत्तिर्यस्यास्ति स तथा ॥ ७ ॥ देवे वर्षति एष कृच्छ्रं गताः प्राणा यासां ताः प्रजाः स्वयं वृष्टिं कृत्वा रक्षि-

---

वेळोवेळीं यज्ञादिक कर्मं प्रवृत्त करून स्वर्गाचें हित करणें व वृष्टिवगैरे करून भूम[illegible] करणें अशाप्रकारें दोन्हीं लोकांचें हित व्हावें ह्मणून पालन, पोषण रंजन वगैरे जसजशा कार्यांचा प्रसंग येईल त्यात्याप्रमाणें आपल्या शरीराचेठिकाणीं इंद्रादि[illegible]पालांच्या मूर्ति (अंश) धारण करील [illegible] सर्व प्राणिमात्रांचेठिकाणीं समबुद्धि ठेवणारा असून आपला प्रताप प्रकट करणारा हा पृथुराजा, सूर्य जसा यो[illegible]वतःच्या किरणांनीं पृथिवीवरील उदकाचें [illegible] करितो व पर्जन्यकाळीं त्याची वृष्टि करितो त्याप्रमाणें हा योग्यकाळीं प्रजांकडून द्रव्य (करभार) घेईल व दुर्भि[illegible] तें पुनः त्यांस देईल ॥ ६ ॥ पृथिवीसारख[illegible]नशील वृत्ति धारण करणारा दयाळु हा पृथुराजा, दुःखानें पीडित झालेल्या जनांनीं प्रत्यक्ष आपल्या मस्तकावर पायांनीं जरी आक्रमण केलें तरी त्यांच्या अपराधांचें सहन करील ॥ ७ ॥ राजाचें स्वरूप धारण

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करणारा हा हरि, इंद्रानें वृष्टि केली नसतां प्राणसंकटांत पडलेल्या प्रजांचें अनायासानें इंद्राप्रमाणें रक्षण करील ॥ ८ ॥ हा राजा सप्रेम अवलोकनानें युक्त व शुभ्र-हास्याच्या योगानें सुंदर अशा आपल्या मुखचंद्राच्या योगानें; लोकांना विपुल [illegible] द देईल ॥ ९ ॥ ज्याचे नगरादिकांत प्रवेश क[illegible]याचे व बाहेर निघण्याचे मार्ग अस्पष्ट आहेत, ज्याचें कर्तव्य कर्म सुरू होण्यापूर्वीं कोणास समजत नाहीं, ज्याचे [illegible] गंभीर आहेत, ज्याचें द्रव्य सुरक्षित आहे [illegible]ा देह प्रधानादिकांनीं सुरक्षित आहे आणि जो अपार माहात्म्यानें युक्त व ज्याचेठिकाणीं सत्यसुशीलत्वादिक गुणां[illegible] असा विष्णु वास करीत आहे असा [illegible] राजा, सर्वप्रकारें वरुणासारखा होईल ॥ १० ॥ हा वेनरूप अरणीपासून उत्पन्न झालेला अग्नि, शत्रूंना प्राप्त होण्यास [illegible]हन करण्यास अशक्य असून हा स[illegible]प असतांहि दूर असल्यासारखा असल्यामुळें

ष्यति । अत्र हेतुः । असौ नरदेववपुर्हरिरिति ॥ ८ ॥ वदनमेवामृतमूर्तिश्चंद्रस्तेन [illegible]ोको यस्मिन् । विशदं यत्स्मितं तेन चारुणा । अत्र च क्वचिद्वर्तमाननिर्देशो वर्तमानसामीप्ये वर्तमानवद्वेति भूतनिर्देशश्चाशंसायां भूतवच्चेति द्रष्टव्यः ॥ ९ ॥ न व्यक्तं वर्त्म प्रवेशनिर्गममार्गो यस्य निगूढं निष्पत्तेः पूर्वमविज्ञातं कार्यं यस्य तच्च कार्यं गंभीरं किमर्थमेतत्कृतमित्यन्यैरज्ञाताभिप्रायं विधत्त इति तथा उपगुप्तं सुरक्षितं वित्तं यस्य अनंतमाहात्म्यश्चासौ गुणानामेकं धाम विष्णुर्यस्मिन् अनंतमाहात्म्योपेता गुणा एवैकं धाम स्थानं यस्येति वा । संवृतात्मा संयतमूर्तिः समुद्रचरत्वेन वरुणस्याप्येते गुणा द्रष्टव्याः ॥ १० ॥ दुरासदः शत्रोर्मनसापि प्राप्तुमशक्यः दुर्विषहः शत्रुभिः सोढुम-

आप्याययत्यसौ लोकं वदनामृतमूर्तिना ॥ सानुरागावलोकेन विशदस्मितचारुणा ॥ ९ ॥ अव्यक्तवर्त्मैष निगूढकार्यो गंभीरवेधा उपगुप्तवित्तः ॥ अनंतमाहात्म्यगुणैकधामा पृथुः प्रचेता इव संवृतात्मा ॥ १० ॥ दुरासदो दुर्विषह आसन्नोऽपि विदूरवत् ॥ नैवाभिभवितुं शक्यो वेनारण्युत्थितोऽनलः ॥ ११ ॥ अंतर्बहिश्च भूतानां पश्यन्कर्माणि चारणैः ॥ उदासीन इवाध्यक्षो वायुरात्मेव देहिनाम् ॥ १२ ॥ नादंड्यं दंडयत्येष सुतमात्मद्विषामपि ॥ दंडयत्यात्मजमपि दंड्यं धर्मपथे स्थितः ॥ १३ ॥ अस्याप्रतिहतं चक्रं पृथोरामानसाचलात् ॥ वर्तते भगवानर्को यावत्तपति गोगणैः ॥ १४ ॥ रंजयिष्यति यल्लोकमयमात्मविचेष्टितैः ॥ अथामुमाहू राजानं मनोरंजनकैः प्रजाः ॥ १५ ॥

शक्यः विदूरवत्पौरुषेणाभिभवितुमशक्यः वेन एवारणिस्तस्मादुत्थितः ॥ ११ ॥ चारणैर्गुप्तभृत्यैः पश्यन्नपि स्वस्तुतिनिंदादावुदासीन इव वर्तिष्यते यथा देहिनामध्यक्षोऽविकृत आत्मभूतो वायुः सूत्रात्मा तद्वत् ॥ १२ ॥ आत्मद्विषां सुतमिति सुतग्रहणं स्वात्मजसाम्यार्थम् । धर्मपथे यमस्य वृत्ते स्थितः ॥ १३ ॥ चक्रमाज्ञा सेना वा रथस्य-वा चक्रं मानसाचलमभिव्याप्य प्रवर्तते । किंपर्यंतमित्यत आह । अर्को रश्मिगणैर्यावत्तपति तावत् ॥ १४ ॥ यद्यस्माद्रंजयिष्यत्यथ तस्मान्मनोरंजनैर्हेतुभिरमुं राजानमाहुः ।

त्यांस पराभव करण्यासहि अशक्य आहे ॥ ११ ॥ हा राजा, सर्व प्राण्यांच्या आंत व बाहेर संचार करणाऱ्या वायूसारखा सर्वांच्या मनांतलीं व बाहेरचीं कर्मं दूतांकडून पहात असतांहि आपल्या स्तुस्तीविषयीं किंवा निंदेविषयीं, 'साक्षी आत्म्यासारखा' उदासीन असून वर्तणूक करील ॥ १२ ॥ नीतिमार्गाचेठिकाणीं राहणारा हा राजा, आपल्या शत्रूंच्या पुत्रालासुद्धां, तो दंडास योग्य नसेल तर त्याला दंड करणार नाहीं आणि दंड करण्यास योग्य असलेल्या आपल्या पुत्रालासुद्धां दंड करील ॥ १३ ॥ या पृथुराजाचें चक्र (आज्ञा किंवा रथाचें चाक) मानसपर्वतापर्यंत, भगवान् सूर्य आपल्या किरणसमूहांनीं जितक्या प्रदेशावर प्रकाश करितो तितक्या प्रदेशापर्यंत चालेल. त्याला प्रतिबंध कोठेंहि होणार नाहीं ॥ १४ ॥ हा राजा, मनोरम अशा आपल्या आचरणांनीं सर्व लोकांचें रंजन करील म्हणून याला सर्व प्रजा 'राजा' असें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्मणतील ॥ १५ ॥ हा अखंडितव्रत, सत्यप्रतिज्ञ, ब्राह्मणभक्त, वृद्धांची सेवा करणारा, सर्व प्राणिमात्रांना आश्रय करण्यास योग्य, दुसऱ्यांचा यथायोग्य सन्मान करणारा, दीनांवर अनुग्रह करणारा ॥ १६ ॥ दुसऱ्यांच्या स्त्रियांचेठिकाणीं मातेप्रमाणें दृष्टि ठेवणारा, आपल्या पत्नीवर देहाच्या अर्धभागासारखी प्रीति ठेवणारा, प्रजांचेठिकाणीं पित्यासारखा स्नेह राखणारा, वेदार्थ जाणणाऱ्यांच्या आज्ञेप्रमाणें वर्तणूक करणारा ॥ १७ ॥ सर्व प्राण्यांनां आपल्या जीवासारखा आवडणारा, मित्रांच्या सुखाला वाढविणारा, भगवद्भक्तांचा समागम करणारा आणि दुराचारी पुरुषांस शिक्षा करण्याविषयीं यमासारखा होईल ॥ १८ ॥ ज्या ईश्वरोला खऱ्या स्वरूपानें जाणलें असतां ज्ञानी पुरुष, अविद्येनें रचलेलें व खरेंसें भासणारेंहि हें सर्व जग, गंधर्वनगरांतील पदार्थांसारखें व्यर्थ आहे असें पहातात. तोच हा साक्षात् भगवान् तिन्ही गुणांचा नियंता, निर्विकारी आत्मा आपल्या अंशानें अवतीर्ण झाला आहे ॥ १९ ॥ निरुपमपराक्रमी राजाधिराज हा पृथुराजा, उदयाचलापर्यंत भूमंडळाचें रक्षण करील व त्याकरितां जयशील अशा

मनोरंजनकैरिति चेष्टितविशेषणं वा ॥ १५ ॥ १६ ॥ मातरीव भक्तिर्भजनं यस्य । आत्मनो देहस्यार्ध इव पत्न्यां प्रीतिमान् ॥ १७ ॥ नंदिं सुखं वर्धयतीति तथा । मुक्तसंगेषु प्रकृष्टः संगो यस्य दंडपाणिरिवेत्यपराधानुपेक्षणमुच्यते नादंड्यमित्यत्र पक्षपाताभाव उक्तः ॥ १८ ॥ अयं त्विति । तुशब्देन निरुपमत्वं दर्शयति । कोसावात्मा तमाह ।

दृढव्रतः सत्यसंधो ब्रह्मण्यो वृद्धसेवकः ॥ शरण्यः सर्वभूतानां मानदो दीनवत्सलः ॥ १६ ॥ मातृभक्तिः परस्त्रीषु पत्न्यामर्ध इवात्मनः ॥ प्रजासु पितृवत्स्निग्धः किंकरो ब्रह्मवादिनाम् ॥ १७ ॥ देहिनामात्मवत्प्रेष्ठः सुहृदां नंदिवर्धनः ॥ मुक्तसंगप्रसंगोऽयं दंडपाणिरसाधुषु ॥ १८ ॥ अयं तु साक्षाद्भगवांस्त्र्यधीशः कूटस्थ आत्मा कलयाऽवतीर्णः ॥ यस्मिन्नविद्यारचितं निरर्थकं पश्यंति नानात्वमपि प्रतीतम् ॥ १९ ॥ अयं भुवो मंडलमोदयाद्रेर्गोप्तैकवीरो नरदेवनाथः ॥ आस्थाय जैत्रं रथमात्तचापः पर्यस्यते दक्षिणतो यथार्कः ॥ २० ॥ अस्मै नृपालाः किल तत्रतत्र बलिं हरिष्यंति सलोकपालाः ॥ मंस्यंत एषां स्त्रिय आदिराजं चक्रायुधं तद्यश उद्धरंत्यः ॥ २१ ॥ अयं महीं गां दुदुहेऽधिराजः प्रजापतिर्वृत्तिकरः प्रजानाम् ॥ यो लीलयाद्रीन्स्वशरासकोट्या भिंदन्समां गामकरोद्यथेंद्रः ॥ २२ ॥ विस्फूर्जयन्नाजगवं धनुः स्वयं यदाऽचरत्क्ष्मामविषह्यमाजौ ॥ तदा निलिल्युर्दिशिदिश्यसंतो लांगूलमुद्यम्य यथा मृगेंद्रः ॥ २३ ॥

यस्मिन्प्रतीतमपि नानात्वमर्थशून्यं पश्यंति ॥ १९ ॥ आउदयाद्रेस्तत्पर्यंतं गोप्ता गोपायिष्यति तदर्थं पर्यस्यते पर्यटिष्यति प्रदक्षिणीकरिष्यतीत्यर्थः ॥ २० ॥ अस्मै तथा प्रदक्षिणं कुर्वते मंस्यंते ज्ञास्यंति तस्य यश उद्धरंत्य उदाहरंत्यः कीर्तयंत्यः ॥ २१ ॥ इंद्र इवाद्रीन्विभिंदन् ॥ २२ ॥ लांगूलमुन्नमय्य यथा मृगेंद्रश्चरति तथा धनुर्विस्फूर्ज-

---

आपल्या रथावर बसून, हातांत धनुष्य ग्रहण करून, सूर्याप्रमाणें भूमंडळाला उजवें घालून प्रदक्षिणा करील ॥ २० ॥ तेव्हां इंद्रादिलोकपालांसहवर्तमान सर्व राजे, आपापल्या देशाचेठिकाणीं या राजाला करभार अर्पण करितील; यांत संशय नाहीं. आणि त्या राजांच्या स्त्रिया, याच्या यशाचें गायन करीत होत्सात्या या आदिराजाला हा चक्रपाणि साक्षात् विष्णूच आहे असें मानितील ॥ २१ ॥ हा सर्व प्रजांची उपजीविका चालविणारा, प्रजापालक, राजाधिराज पृथु, गोरूप धारण करणाऱ्या पृथिवीचें दोहन करील व पर्वतांचा भेद करणाऱ्या इंद्राप्रमाणें आपल्या धनुष्याच्या अग्रानें अनायासानें पर्वतांचें चूर्ण करून पृथिवीला सारखी करील ॥ २२ ॥ आणि जसा सिंह आपलें पुच्छ उभारून वनांमध्यें संचार करूं लागला ह्मणजे सर्व क्षुद्रपशु चोहोंकडे दडूं लागतात त्याप्रमाणें हा जेव्हां शत्रूंना असह्य अशा आपल्या आजगव- (मेंढ्याच्या व

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वैलाच्या शिंगांनीं केलेल्या) धनुष्याचा टनत्कार शब्द करीत युद्धामध्यें भूमीवर संचार करील, तेव्हां दुष्टशत्रु, दिशेदिशेकडे पळून जाऊन गुप्त होतील॥ २३ ॥ ज्याठिकाणीं
सरस्वतीनदीचा उगम झाला आहे त्याठिकाणीं हा राजा, शंभर अश्वमेध करील. त्यांत शेवटचा अश्वमेध चालू झाला असतां, पुरंदर नांवाचा इंद्र, 'हा अश्वमेध समाप्त
झाला असतां, माझें स्थान हा राजा ग्रहण करील अशा भयानें' त्या यज्ञामध्यें विघ्न करण्यासाठीं या पृथूच्या यज्ञाचा घोडा हरण करील ॥ २४ ॥ हा राजा, आपल्या
राजवाड्याच्या आरामबागेंत ज्ञानसंपन्न अशा एकट्या सनत्कुमार ऋषीची भेट घेऊन त्याचें भक्तिपुरःसर आराधन करून त्यापासून, 'ज्याच्या योगानें परब्रह्मस्वरूपाचा
साक्षात्कार घेतात' तें ज्ञान संपादन करील ॥ २५ ॥ याप्रमाणें प्रसिद्धपराक्रम असा हा महापराक्रमी पृथुराजा सर्वठिकाणीं प्रसिद्ध अशा आपल्या संबंधाच्या प्रबंधरूप
वाणी जेथेंतेथें श्रवण करील ॥ २६ ॥ एतावता सर्व दिशा जिंकिल्यामुळें ज्याच्या आज्ञेला कोठेंहि प्रतिबंध होणार नाहीं असा हा राजा, आपल्या तेजानें लोकांना दुःख

यन्यदा क्ष्मामचरत् ॥ २३ ॥ सरस्वती यत्र प्रादुरभावि प्रादुरभूत् । कर्मकर्तरि चिण् । तत्राहार्षीत् हरणं करिष्यतीत्यर्थः ॥ २४ ॥ २५ ॥ विश्रुता विक्रमा यस्य । गाथाः
प्रबंधान् आत्माश्रिता विष्णवाश्रिताः ॥ २६ ॥ उपगीयमानो महानुभावो यस्य ॥ २७ ॥ ॥ इति श्रीमद्भागवते चतुर्थे टीकायां षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥ ततः सप्तदशे

एषोऽश्वमेधान् शतमाजहार सरस्वती प्रादुरभावि यत्र ॥ अहारषीद्यस्य हयं पुरंदरः शतक्रतुश्चरमे वर्तमाने ॥२४ ॥ एष स्वसद्मो-
पवने समेत्य सनत्कुमारं भगवंतमेकम् ॥ आराध्य भक्त्यालभतामलं तज्ज्ञानं यतो ब्रह्मपरं विदंति ॥ २५ ॥ तत्र तत्र गिरस्तास्ता
इति विश्रुतविक्रमः ॥ श्रोष्यत्यात्माश्रिता गाथाः पृथुः पृथुपराक्रमः ॥ २६ ॥ दिशो विजित्याप्रतिरुद्धचक्रः स्वतेजसोत्पाटितलो-
कशल्यः ॥ सुरासुरेंद्रैरुपगीयमानमहानुभावो भविता पतिर्भुवः ॥ २७ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे चतुर्थस्कंधे षोडशोऽध्यायः
॥ १६ ॥ मैत्रेय उवाच ॥ ॥ एवं स भगवान्वैन्यः ख्यापितो गुणकर्मभिः ॥ छंदयामास तान्कामैः प्रतिपूज्याभिनंद्य च ॥ १ ॥
ब्राह्मणप्रमुखान्वर्णान्भृत्यामात्यपुरोधसः ॥ पौरान् जानपदान् श्रेणीः प्रकृतीः समपूजयत ॥ २ ॥

लोकक्षुधाः प्रशमयन्पृथुः ॥ ग्रस्तबीजां महीं हंतुं यत्तो भीत्या तया स्तुतः ॥ १ ॥ छंदयामास तोषितवान् ॥ १ ॥ भृत्यानमात्यान्पुरोधसः पुरोहितांश्च श्रेणीस्तैलिकतांबूलि-

---

देणाऱ्या दुष्टांचें निर्मूलन करून, देवदैत्यांच्या अधिपतींनींहि ज्याचा महापराक्रम गायन केला आहे असा होत्साता पृथिवीचा अधिपति होईल ॥ २७ ॥ याप्रमाणें श्रीमद्भा-
गवतनामक महापुराणांतील चतुर्थस्कंधामध्यें हा सोळावा अध्याय समाप्त झाला ॥ १६ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ ५ ॥ ॥ नंतर, सर्व लोकांच्या क्षुधा शांत
करणारा पृथुराजा, सर्व बीजें गिळून टाकणाऱ्या पृथिवीच्या वधाविषयीं प्रवृत्त झाला असतां, तिनें भयभीत होऊन त्याची स्तुति केली, ही कथा या सत्राव्या अध्यायांत
वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ मैत्रेय म्हणाला– हे विदुरा, याप्रमाणें सूत, मागध व बंदी यांनीं, गुणांच्या व कर्मांच्या वर्णनेंकरून स्तुति केलेल्या त्या भगवान् पृथुराजानें, त्या ॥ ५० ॥
सूतादिकांची प्रशंसा करून व यथेष्ट वस्त्रालंकारादिकांनीं त्यांचा सत्कार करून त्यांना संतुष्ट केलें ॥ १ ॥ तसाच त्यानें, ब्राह्मणादिक चार वर्ण, सेवक, अमात्य, पुरोहित,
नगरवासी लोक, देशवासी लोक, तेली तांबोळीवगैरे साधारण लोक व कामदार लोक या सर्वांचा योग्य सत्कार केला ॥ २ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विदुर ह्मणाला—हे मैत्रेय ऋषे, पृथुराजानें जिचें दोहन केलें ती पृथिवी अनेक रूपें धारण करण्यास समर्थ असतां, तिनें गाईचेंच स्वरूप कशाकरितां धारण केलें? व त्या दोहनाच्यावेळीं वत्स कोण झाला? कशाचें दोहन केलें व पात्र काय होतें? ॥ ३ ॥ बरें पृथिवी ही स्वभावानें सखल व उंच असतां त्यानें सारखी कशी केली? व त्या पृथुराजाच्या यज्ञाचा अश्व इंद्रानें कशाकरितां हरण करून नेला? ॥ ४ ॥ त्याचप्रमाणें हे ब्रह्मनिष्ठा मैत्रेया, ब्रह्मवेत्त्यांमध्यें श्रेष्ठ अशा भगवान् सनत्कुरापासून अपरोक्षज्ञानासहित ब्रह्मज्ञान प्राप्त करून घेतल्यावर तो राजर्षि (पृथु),कोणत्या गतीला गेला? ॥ ५ ॥ हें मी विचारिलेलें व पृथुरूपानें ज्यानें ह्या पृथिवीचें दोहन केलें त्या सत्कीर्तिमान् भगवान् प्रभु श्रीकृष्णाचें जें दुसरेंहि पवित्र 'त्या पृथुनामक अवताराच्या कथासंबंधी,' यश असेल तें मला कथन करावें. कारण, मी तुझा (गुरूचा) व अधोक्षजभगवंताचा भक्त असून तें यश श्रवण करण्याविषयीं तत्पर आहें ॥ ६ ॥ ७ ॥ सूत ह्मणाला— हे शौनका, याप्रमाणें विदुरानें वासुदेवकथेविषयीं प्रेरणा केलेला मैत्रेय ऋषि, संतुष्ट होऊन त्या विदुराची प्रशंसा करून

कादीन्पौरविशेषान् प्रकृतीर्नियोगिनः ॥ २ ॥ दोहनं पात्रम् ॥ ३ ॥ मेध्यं यज्ञार्हम् ॥ ४ ॥ सविज्ञानमपरोक्षज्ञानसहितम् ॥ ५ ॥ पूर्वदेहः पृथ्ववतारस्तत्कथाश्रयम् । श्रवो

विदुर उवाच ॥ कस्माद्दधार गोरूपं धरित्री बहुरूपिणी ॥ यां दुदोह पृथुस्तत्र को वत्सो दोहनं च किम् ॥ ३ ॥ प्रकृत्या विषमां देवी कृता तेन समा कथम् ॥ तस्य मेध्यं हयं देवः कस्य हेतोरपाहरत् ॥ ४ ॥ सनत्कुमाराद्भगवतो ब्रह्मन्ब्रह्मविदुत्तमात् ॥ लब्ध्वा ज्ञानं सविज्ञानं राजर्षिः कां गतिं गतः ॥ ५ ॥ यच्चान्यदपि कृष्णस्य भवान्भगवतः प्रभोः ॥ श्रवः सुश्रवसः पुण्यं पूर्वदेहकथाश्रयम् ॥ ६ ॥ भक्ताय मेऽनुरक्ताय तव चाधोक्षजस्य च ॥ वक्तुमर्हसि योऽदुह्यद्वैन्यरूपेण गामिमाम् ॥ ७ ॥ सूत उवाच ॥ चोदितो विदुरेणैवं वासुदेवकथां प्रति ॥ प्रशस्य तं प्रीतमना मैत्रेयः प्रत्यभाषत ॥ ८ ॥ मैत्रेय उवाच ॥ यदाभिषिक्तः पृथुरंग विप्रैरामंत्रितो जनतायाश्च पालः ॥ प्रजा निरन्ने क्षितिपृष्ठ एत्य क्षुत्क्षामदेहाः पतिमभ्यवोचन् ॥ ९ ॥ वयं राजन् जाठरेणाभितप्ता यथाऽग्निना कोटरस्थेन वृक्षाः ॥ त्वामद्य याताः शरणं शरण्यं यः साधितो वृत्तिकरः पतिर्नः ॥ १० ॥ तन्नो भवानीहतु रातवेऽन्नं क्षुधार्दितानां नरदेवदेव ॥ यावन्न नंक्ष्यामह उज्झितोर्जा वार्तापतिस्त्वं किल लोकपालः ॥ ११ ॥

यशः सुष्ठु श्रवो यस्य ॥ ६ ॥ अदुह्यद्दुग्धवान् ॥ ७ ॥ ८ ॥ जनतायास्त्वं पाल इत्यामंत्रितो नियुक्तः तदा निरन्ने क्षितितले सति क्षुधा क्षामाः क्षीणा देहा यासां ताः प्रजा एत्य पतिं पृथुमब्रुवन् ॥ ९ ॥ जाठरेणाग्निनाऽभितप्ताः यः साधितो विप्रैर्मंथनेन संपादितस्तं त्वां शरणं याताः ॥ १० ॥ तत्तस्मान्नोऽस्माकमन्नं रातवे रातुं दातुमीहतु

ह्मणाला कीं, ॥ ८ ॥ मैत्रेय ह्मणाला—हे विदुरा, जेव्हां ब्राह्मणांनीं पृथूला राज्याभिषेक केला आणि तूं सर्व जनांचा पालक आहेस, असें सांगितलें तेव्हां भूतल अन्नरहित झालें होतें ह्मणून क्षुधेच्या योगेंकरून ज्यांचे देह कृश झाले आहेत अशा प्रजा, त्या पृथुराजाजवळ येऊन ह्मणाल्या कीं— ॥ ९ ॥ हे राजा, जसे वृक्ष, ढोलींत असलेल्या अग्नीच्या योगानें वाळून जातात त्याप्रमाणें आह्मी जठराग्नीच्या योगानें अगदीं तप्त होऊन गेलों आहों. यास्तव ज्या तुला आमची वृत्ति चालविण्याकरितां व चोरादिकांपासून आमचें रक्षण करण्याकरितां ऋषींनीं उत्पन्न केलें आहे, त्या शरण जाण्यास योग्य अशा तुला आह्मी शरण आलों आहों ॥ १० ॥ यास्तव हे राजाधिराजा, तूंच लोकांचा पालक व जीविका चालविणारा धनी आहेस ह्मणून क्षुधेनें पीडित झालेले आह्मी अन्न न मिळाल्यामुळें जोंपर्यंत नाश पावलों नाहीं तोंपर्यंतच आह्मांला अन्न

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

देण्याकरितां तूं प्रयत्न कर ॥ ११ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, पृथुराजानें प्रजांचें करुणायुक्त विलापवचन ऐकून बराच वेळपर्यंत ध्यान केलें, त्याच्या योगानें भूतल अन्नरहित होण्याचें कारण त्यानें जाणिलें ॥ १२ ॥ पृथिवीनें ओषधि व बीजें ग्रासून टाकिलीं आहेत असा त्या राजानें आपल्या बुद्धीनें निश्चय केला आणि हातामध्यें धनुष्य घेऊन 'त्रिपुरासुराचा वध करणाऱ्या शंकराप्रमाणें' क्रुद्ध होऊन भूमीला मारण्याकरितां धनुष्याचेठिकाणीं बाणाचें संधान केलें॥ १३ ॥ त्या काळीं ज्यानें आयुध उचललें आहे अशा त्या राजाला पाहून भयानें कंपित झालेली पृथ्वी, गाईचें रूप धारण करून 'जशी व्याधाच्या भयानें हरिणी पळूं लागल्ये, त्याप्रमाणें' पळूं लागली ॥ १४ ॥ तेव्हां क्रोधायमान व अतिआरक्तनेत्र झालेला तो पृथुराजा, धनुष्याचेठिकाणीं बाणाचें संधान करून, जिकडे जिकडे ती भूमि भयानें पळूं लागली तिकडे तिकडे तिच्या मागोमाग धावूं लागला ॥ १५ ॥ ती भूमि, पूर्वादिक चार दिशा, आग्नेयादिक चार विदिशा, स्वर्ग, पृथ्वी व अंतरिक्ष यांचेठायीं धांवत असतां त्या त्याठिकाणीं मागोमाग

ईहतां यत्नं करोतु । उज्झितोर्जास्त्यक्तान्नाः सत्यः वार्ताया जीविकायाः पतिः ॥ ११ ॥ परिदेवितं विलापम् । निमित्तं हेतुमन्वपद्यत ज्ञातवान् ॥ १२ ॥ पृथिव्या ओषधि-

मैत्रेय उवाच ॥ पृथुः प्रजानां करुणं निशम्य परिदेवितम् ॥ दीर्घं दध्यौ कुरुश्रेष्ठ निमित्तं सोऽन्वपद्यत ॥ १२ ॥ इति व्यवसितो बुद्ध्या प्रगृहीतशरासनः ॥ संदधे विशिखं भूमेः क्रुद्धस्त्रिपुरहा यथा ॥ १३ ॥ प्रवेपमाना धरणी निशाम्योदायुधं च तम् ॥ गौः सत्यपाद्रवद्भीता मृगीव मृगयुद्रुता ॥ १४ ॥ तामन्वधावत्तद्वैन्यः कुपितोऽत्यरुणेक्षणः ॥ शरं धनुषि संधाय यत्रयत्र पलायते ॥ १५ ॥ सा दिशो विदिशो देवी रोदसी चांतरं तयोः ॥ धावती तत्रतत्रैनं ददर्शानूद्यतायुधम् ॥ १६ ॥ लोके नाविंदत त्राणं वैन्यान्मृत्योरिव प्रजाः ॥ त्रस्ता तदा निववृते हृदयेन विदूयता ॥ १७ ॥ उवाच च महाभागं धर्मज्ञापन्नवत्सल ॥ त्राहि मामपि भूतानां पालनेऽवस्थितो भवान् ॥ १८ ॥ स त्वं जिघांससे कस्माद्दीनामकृतकिल्बिषाम् ॥ अहनिष्यत्कथं योषां धर्मज्ञ इति यो मतः ॥ १९ ॥ प्रहरंति न वै स्त्रीषु कृतागःस्वपि जंतवः ॥ किमुत त्वद्विधा राजन्करुणा दीनवत्सलाः ॥ २० ॥

बीजानि ग्रस्तानीति व्यवसितो निश्चितवान्सन् ॥ १३ ॥ मृगयुना द्रुतानुगता मृगीव ॥ १४ ॥ १५ ॥ १६ ॥ १७ ॥ १८ ॥ यो धर्मज्ञ इति मतः स भवान् योषां मां कथमहनिष्यद्धनिष्यति ॥ १९ ॥ २० ॥

मागोमाग धावूं लागला ॥ १६ ॥ आयुध उचलून येणारा राजा तिच्या दृष्टीस पडूं लागला ॥ १६ ॥ जसा मृत्यूपासून भिऊन पळणाऱ्या प्रजांना, त्या मृत्यूपासून सोडविणारा कोणी मिळत नाहीं त्याप्रमाणें पलायन करणाऱ्या त्या भूमीला जेव्हां पृथुराजापासून सोडविणारा लोकामध्यें कोणी मिळेना तेव्हां ती त्रासून खिन्न झालेल्या अंतःकरणानें माघारी फिरली ॥ १७ ॥ आणि त्या महाभाग्यशाली पृथुराजास ह्मणाणी कीं,– हे धर्मज्ञा, हे शरणागतवत्सला, ज्या अर्थीं तूं सर्व प्राणिमात्रांच्या रक्षणाविषयीं प्रवृत्त झाला आहेस त्याअर्थीं तूं माझेंहि रक्षण कर ॥ १८ ॥ हे राजा, दीन व निरपराधी अशा मला तूं कशाकरितां मारण्याची इच्छा करितोस? जो तूं धर्मज्ञ ह्मणून सर्व लोकांना संमत आहेस तो तूं, स्त्री अशा माझा वध कसा करणार? ॥ १९ ॥ हे राजा, स्त्रियांनीं जरी अपराध केला असला तरी, सामान्य लोकसुद्धां त्यांच्यावर प्रहार करीत नाहींत, मग तुझ्यासारखे दयाळू व

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दीनवत्सल पुरुष, निरपराधी स्त्रियांवर शस्त्र धरीत नाहींत हें काय सांगावें! ॥ २० ॥ त्यांतूनहि जिच्यावर सर्व विश्व राहिलें आहे त्या दृढनौकारूप माझा नाश करून नुसत्या पाण्यामध्यें तूं आपणाला व सर्व प्रजांना कसें धारण करिशील? ॥ २१ ॥ पृथु ह्मणाला—हे पृथिवी, तूं माझ्या आज्ञेचें उल्लंघन करीत आहेस यास्तव मी तुझा वध करितों. जी तूं यज्ञामध्यें देवतारूपानें आह्मांपासून हविर्भाग ग्रहण करित्येस आणि आह्मांला धान्यादि द्रव्य देत नाहींस॥ २२ ॥ जी तूं गाय, दररोज धन्याचें गवत मात्र खात्येस आणि कांसेंतील दूध मुळींच देत नाहींस याप्रकारेंकरून दुष्ट व अपराध करणाऱ्या तुझेठिकाणीं दंड करणें हें अयोग्य नाहीं तर योग्यच आहे ॥ २३ ॥ तूं तर, ब्रह्मदेवानें लोकांच्या जीवनाकरितां पूर्वीं उत्पन्न केलेलीं ओषधिबीजें आपल्याचठिकाणीं गडप करून टाकिलीं आहेस 'तीं परत दे' असें मी तुला सांगत असतांहि माझी अवज्ञा करून तीं तूं परत देत नाहींस यास्तव तूं खरोखर मंदबुद्धि (वधाविषयीं योग्य) आहेस ॥ २४ ॥ ह्मणून मी आपल्या बाणांनीं तुझें विदारण करून तुझ्या

अजरां दृढाम् । धास्यसि धारयिष्यसि ॥ २१ ॥ बर्हिषि यज्ञे या भवती देवतारूपेण भागं वृंक्ते भजते । वसु धान्यादिकम् ॥ २२ ॥ गोरूपेण तु यवसं तृणं जग्धि अत्तीत्यर्थः । पयस्तु नैवदोग्धि दुग्धं न स्रवति अत्रास्मिन्नपराधे ॥ २३ ॥ आत्मनि देहे रुद्धानि ॥ २४ ॥ मद्वधे सर्वथा अन्नं न स्यादिति चेदत आह ।

मां विपाट्याजरां नावं यत्र विश्वं प्रतिष्ठितम् ॥ आत्मानं च प्रजाश्चेमाः कथमंभसि धास्यसि ॥ २१ ॥ पृथुरुवाच ॥ वसुधे त्वां वधिष्यामि मच्छासनपराङ्मुखीम् ॥ भागं बर्हिषि या वृंक्ते न तनोषि च नो वसु ॥ २२ ॥ यवसं जग्ध्यनुदिनं नैव दोग्ध्यौधसं पयः ॥ तस्यामेवं हि दुष्टायां दंडो नात्र न शस्यते ॥ २३ ॥ त्वं खल्वोषधिबीजानि प्राक्सृष्टानि स्वयंभुवा ॥ न मुंचस्यात्मरुद्धानि मामवज्ञाय मंदधीः ॥ २४ ॥ अमूषां क्षुत्परीतानामार्तानां परिदेवितम् ॥ शमयिष्यामि मद्बाणैर्भिन्नायास्तव मेदसा ॥ २५ ॥ पुमान्योषिदुत क्लीब आत्मसंभावनोऽधमः ॥ भूतेषु निरनुक्रोशो नृपाणां तद्वधोऽवधः ॥ २६ ॥ त्वां स्तब्धां दुर्मदां नीत्वा मायागां तिलशः शरैः ॥ आत्मयोगबलेनेमा धारयिष्याम्यहं प्रजाः ॥ २७ ॥ एवं मन्युमयीं मूर्तिं कृतांतमिव बिभ्रतम् ॥ प्रणता प्रांजलिः प्राह मही संजातवेपथुः ॥ २८ ॥

अमूषां प्रजानाम् । मेदसा मांसेन ॥ २५ ॥ यदुक्तं योषां कथं हनिष्यतीति तत्राह । पुमानिति तस्य वधोऽवध एव ॥ २६ ॥ यच्चोक्तं कथमंभसि धास्यसीति तत्राह । त्वामिति । तिलशस्तिलप्रमाणानि खंडानि इत्येवं भूतामवस्थां नीत्वा ॥ २७ ॥ मन्युमयीं मूर्तिं बिभ्रतः कृतांततुल्यत्वमुच्यते न तु कृतांतस्य मन्युमयी

मांसाच्या योगानें, क्षुधेनें पीडित झालेल्या ह्या दीन प्रजांची क्षुधा घालवून यांच्या विलापयुक्त भाषणाची शांतता करीन ॥ २५ ॥ पुरुष असो, स्त्री असो किंवा नपुंसक असो जो आपलीमात्र प्रशंसा करून प्राणिमात्रांचेठिकाणीं निर्दय (दुःख उत्पन्न करणारा) असतो तो अधम होय. त्याचा वध राजांना दोषकारक होत नाहीं ॥ २६ ॥ यास्तव कपटानें गाईचें रूप धारण करणारी, दुष्टमदानें युक्त व उद्धट अशा तुझे बाणांनीं तिळप्राय तुकडे करून मी आपल्या योगसामर्थ्यानें या प्रजांचें उदकामध्यें धारण करीन ॥ २७ ॥ याप्रमाणें निष्ठुर भाषण करणाऱ्या व यमासारखी क्रोधमय मूर्ति धारण करणाऱ्या त्या पृथुराजाला, पृथ्वीनें प्रणाम केला व हात जोडून थरथर कांपत कांपत ह्मणाली कीं, ॥ २८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

धरा ह्मणाली– हे देवा, तूं मायेच्या योगानें नानाप्रकारचीं (शांत घोर वगैरे) रूपें धारण करणारा असल्यामुळें सगुणरूपानें भासतोस परंतु वस्तुतः तूं मायेहून पलीकडचा पुरुषोत्तम आहेस. त्या तुजकारणें नमस्कार असो. ज्या तूं आपल्या सच्चिदानंदात्मक स्वरूपाच्या अनुभवेंकरून, पंचमहाभूतें, इंद्रियें आणि देवता यांच्या समुदायरूप देहाचेठिकाणीं अहंकार धारण केल्यामुळें उत्पन्न होणाऱ्या रागद्वेषादिक लाटा दूर करून टाकल्या आहेस त्या तुजकारणें नमस्कार असो ॥ २९ ॥ अहो ज्या माझेठिकाणीं जरायुज, अंडज, स्वेदज आणि उद्भिज्ज अशा चारप्रकारच्या प्राणिसमूहांची स्थिति असल्यामुळें मी सर्व प्राण्याची राहण्याची जागा आहें, त्या मला ज्या तूं जगन्नाथानें निर्माण केलें आहेस तोच स्वतंत्र भगवान् तूं, आतां शस्त्र उचलून मला मारण्याविषयीं उद्युक्त झाला आहेस तेव्हां आतां दुसऱ्या कोणाला बरें शरण

मूर्तिरिति ॥ २८ ॥ शुद्धसत्त्वतनुं देवमकस्मादतिदारुणम् ॥ वीक्षमाणा पृथुं पृथ्वी तुष्टाव करुणोक्तिभिः ॥ मायया विन्यस्ता रचिता नाना घोरादितनवो येन गुणात्मने गुणमयत्वेन प्रतीयमानाय । वस्तुतस्तु निर्धुता निरस्ता द्रव्यक्रियाकारकेष्वधिभूताध्यात्माधिदैवेषु विभ्रमोऽहंकारस्तन्निमित्ता ऊर्मयो रागद्वेषादयश्च यस्मिंस्तस्मै ॥ २९ ॥ अहो सर्वजीवाश्रयत्वेन सृष्टां मां कथं हंतुं प्रवर्तत इत्याह । येन विधात्रात्मनां जीवानामायतनमहं निर्मिता । यतो यस्यां मयि गुणसर्गस्य चतुर्विधभूतग्रामस्य संग्रहो धारणम् ।

धरोवाच ॥ नमः परस्मै पुरुषाय मायया विन्यस्तनानातनवे गुणात्मने ॥ नमः स्वरूपानुभवेन निर्धुतद्रव्यक्रियाकारकविभ्रमोर्मये ॥ २९ ॥ येनाहमात्मायतनं विनिर्मिता धात्रा यतोऽयं गुणसर्गसंग्रहः ॥ स एव मां हंतुमुदायुधः स्वराडुपस्थितोऽन्यं शरणं कमाश्रये ॥ ३० ॥ य एतदादावसृजच्चराचरं स्वमाययात्माश्रयया5वितर्क्यया ॥ तयैव सोऽयं किल गोप्तुमुद्यतः कथं नु मां धर्मपरो जिघांसति ॥ ३१ ॥ नूनं बतेशस्य समीहितं जनैस्तन्मायया दुर्जययाऽकृतात्मभिः ॥ न लक्ष्यते यस्त्वकरोदकारयद्योऽनेक एकः परतश्च ईश्वरः ॥ ३२ ॥ सर्गादि योऽस्यानुरुणद्धि शक्तिभिर्द्रव्यक्रियाकारकचेतनात्मभिः ॥ तस्मै समुन्नद्धनिरुद्धशक्तये नमः परस्मै पुरुषाय वेधसे ॥ ३३ ॥

स्वराट् स्वतंत्रः ॥ ३० ॥ सृष्टिसंहारकारकोऽहमेवेति चेत्तथापि प्रजापालने प्रवृत्तस्य मद्वधोऽनुचित एवेत्याह । य एतदिति आत्माश्रयया जीवविषयिण्या ॥ ३१ ॥ अतो दुर्ज्ञेयमीश्वरचेष्टितमित्याह । नूनमिति । अकृतात्मभिर्विक्षिप्तचित्तैः य ईश्वरः स्वतंत्रः अकरोद्ब्रह्माणम् । परत इति तेन ब्रह्मणा चराचरमकारयत् । यश्च स्वत एकः परतो माययाऽनेकः ॥ ३२ ॥ तस्मादचिंत्यशक्तये केवलं नम इत्याह । सर्गादि जन्मस्थितिभंगमस्य जगतोऽनुरुणद्धि अनुवर्तते करोति द्रव्याणि महाभूतानि क्रिया इंद्रियाणि कारका

जावें? ॥ ३० ॥ ज्या तूं भगवंतानें आपल्याच आश्रयानें राहणाऱ्या अचिंत्य मायेच्या योगानें हें स्थावरजंगमात्मक विश्व प्रथम उत्पन्न केलें आहेस, आणि सांप्रत त्या मायेच्या योगानें पृथुनामक अवतार घेऊन ह्याचें पालन करण्यासाठीं उद्युक्त झाला आहेस, तोच धर्मरक्षण करणारा भगवान् तूं, सांप्रतकालीं गोरूप धारण करणाऱ्या मज पृथिवीला मारण्याची इच्छा करितोस, तेव्हां केवढें हें आश्चर्य!! ॥ ३१ ॥ काय सांगावें! ज्या तूं स्वतंत्र परमात्म्यानें, प्रथम ब्रह्मदेवाला उत्पन्न करून त्याच्याकडून हें जग निर्माण करविलेंस व जो वस्तुतः एक असतांहि मायेच्या योगानें अनेकप्रकारचा भासतोस, त्या तुझी ईश्वराची लीला, तुझ्या दुर्जेयमायेच्या योगानें विक्षिप्तचित्त झालेल्या जनांनीं खरोखर जाणली जात नाहीं ॥ ३२ ॥ यास्तव, पंचमहाभूतें इंद्रियें, देवता, बुद्धि व अहंकार ह्या आपल्या शक्तींच्या योगानें जो तूं, या जगाचे उत्पत्तिस्थितिसंहार करितोस व ज्याच्या अविद्याविद्यारूप शक्ती बंधमोक्षांना कारण आहेत त्या सर्वांतर्यामी तुज परम पुरुषाला माझा नमस्कार असो ॥ ३३ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हे जन्मादिविकाररहितो सर्वव्यापका परमेश्वरा, ज्या तूं पूर्वी भूतें, इंद्रियें व अंतःकरणें एतत्स्वरूपी हें जग, उत्पन्न केलेंस त्याच तूं स्वतः निर्माण केलेल्या जगाची उत्तम प्रकारें करून स्थापना करण्याकरितां आदिवराह अवतार धारण करून, पाताळांत गेलेल्या मला उदकांतून वर काढिलेंस ॥ ३४॥ तोच वराहमूर्ति भगवान् तूं, उदकावर नौकेसारख्या आधारभूत असणाऱ्या माझेठिकाणीं असलेल्या प्रजांचें रक्षण करण्याच्या इच्छेनें सांप्रतकालीं वीरमूर्ति पृथुरूपानें उत्पन्न झाला आहेस, तोच तूं तीक्ष्ण बाणाच्या योगानें मी दूध देत नाहीं या अल्प निमित्तानें माझा वध करूं इच्छितोस, तेव्हां हें योग्य वाटत नाहीं. यास्तव तूं कृपा करून माझेंहि रक्षण कर ॥ ३५ ॥ ज्या तुह्मां ईश्वरांच्या गुणसृष्टिरूप मायेनें ज्यांचा चित्तरूप मार्ग (ज्ञानमार्ग) मोहित झाला आहे त्या माझ्यासारख्या जनांनीं तुमची लीला खरोखर जाणली जात नाहीं, यास्तव

देवाः चेतना बुद्धिः आत्माऽहंकारः तैः स्वशक्तिरूपैः समुन्नद्धाः समुत्कटा निरुद्धाः शक्तयो यस्य ॥ ३३ ॥ प्राणिनां धारणार्थं मां रसातलादुद्धृत्येदानीं प्रजारक्षणे प्रवृत्तस्य मद्वधो न युक्त इति सकरुणमाह । द्वाभ्याम् । हेअज यः सृष्टवान्स एव भवान्स्वनिर्मितं चराचरं जगत्सम्यक् स्थापयितुमादिसूकरः सन्मामभ्युज्जहार ॥ ३४ ॥ स एव धराधरो वराहोऽद्यापामुपस्थे उपरि मयि नावि आधारभूतायामवस्थिताः प्रजा रक्षितुमिच्छुर्वीरमूर्तिः पृथुरूपः समभूत् एवंभूतो यः स त्वं पयसि निमित्ते मां जिघांससीति चित्रमित्यर्थः ॥ ३५ ॥ तस्मादीश्वरचेष्टितं दुर्ज्ञेयमिति कैमुत्यन्यायेनोपसंहरति । नूनमिति । तस्येश्वरस्य गुणसर्गरूपया मायया मोहितं चित्तमेव वर्त्म येषाम् । मोहितानि

स वै भवानात्मविनिर्मितं जगद्भूतेंद्रियांतःकरणात्मकं विभो ॥ संस्थापयिष्यन्नज मां रसातलादभ्युज्जहारांभस आदिसूकरः ॥ ३४॥ अपामुपस्थे मयि नाव्यवस्थिताः प्रजा भवानद्य रिरक्षिषुः किल ॥ स वीरमूर्तिः समभूद्धराधरो यो मां पयस्युग्रशरो जिघांससि ॥ ३५ ॥ नूनं जनैरीहितमीश्वराणामस्मद्विधैस्तद्गुणसर्गमायया ॥ न ज्ञायते मोहितचित्तवर्त्मभिस्तेभ्यो नमो वीरयशस्करेभ्यः ॥३६॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे चतुर्थस्कंधे पृथुविजये धरित्रीनिग्रहो नाम सप्तदशोऽध्यायः ॥ १७ ॥ ॥ मैत्रेय उवाच ॥ इत्थं पृथुमभिष्टूय रुषा प्रस्फुरिताधरम् ॥ पुनराहावनिर्भीता संस्तभ्यात्मानमात्मना ॥ १ ॥ संनियच्छाभिभो मन्युं निबोध श्रावितं च मे ॥ सर्वतः सारमादत्ते यथा मधुकरो बुधः ॥ २ ॥

चित्तवर्त्मानि येषामिति वा तैर्जनैरीश्वराणां हरिभक्तानामेव तावदीहितं न ज्ञायते किं पुनस्तस्य परमेश्वरस्य अतएव परमेश्वरवत्तेभ्योऽपि नम एव केवलम् । वीराणां जितेंद्रियाणां यशः कुर्वंति ये तेभ्यः यथा वीराणां यशो वर्धेत तथा चेष्टतां न तु यथेष्टमिति भावः ॥ ३६ ॥ इति श्रीमद्भागवते चतुर्थे टीकायां सप्तदशोऽध्यायः ॥ १७ ॥ ॥ अष्टादशे महीवाक्याद्वत्सपात्रादिभेदतः ॥ पृथ्वादिभिस्तु सा दुग्धा स्वं स्वं दुग्धमितीर्यते ॥ १ ॥ १ ॥ हे अभिभो प्रभो यद्वा भो देव अभि अभयं यथाभवत्येवं मन्युं संनि-

---

भक्तांचें यश वाढविणाऱ्या त्या तुह्मांकारणें नमस्कार असो ॥३६ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील चतुर्थस्कंधामध्यें पृथुविजयाचेठिकाणीं पृथ्वीनिग्रहरूप हा सत्रावा अध्याय समाप्त झाला ॥ १७ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां या अठराव्या अध्यायाचेठिकाणीं पृथिवीनें सांगितल्यावरून पृथुराजानें व इतर लोकांनीं वत्सांच्या व पात्रांच्या भेदेंकरून त्या गोरूपी पृथिवीचें दोहन करून आपापलें जीवनरूप दूध काढून घेतलें, अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, याप्रमाणें पृथिवीनें पृथूची स्तुति केली परंतु प्रजांचा हेतु पूर्ण न झाल्यामुळें क्रोधाच्या योगानें ज्याचा अधरोष्ठ स्फुरण पावत आहे अशा त्या पृथूला पाहून भ्यालेली ती पृथिवी बुद्धीच्या योगानें मनाचें आवरण करून त्याला पुन्हा ह्मणाली की, ॥ १ ॥ हे राजा, तूं आपल्या क्रोधाचें आवरण कर आणि मी सांगत्यें तें ऐकून घे. जसा भ्रमर प्रत्येक पुष्पांतील मध काढून

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

घेतो त्याप्रमाणें ज्ञानी पुरुष, सर्व गोष्टींतील सारांश ग्रहण करीत असतो ॥ २ ॥ हे राजा, तत्त्ववेत्त्या ऋषींनीं ह्या लोकीं किंवा परलोकीं मनुष्यांचें कल्याण व्हावें यासाठीं अनेक प्रकारचे उपाय योजून ठेविले आहेत व त्यांचे प्रयोगहि करून पाहिले आहेत ॥ ३ ॥ जो आलीकडचा प्राणी, प्राचीन पुरुषांनीं दाखवून दिलेल्या त्या उपायांचें विश्वासपूर्वक उत्तम प्रकारें अनुष्ठान करितो त्याला जीं फळें इच्छित असतात त्यांची अनायासानें प्राप्ति होत्ये ॥ ४ ॥ आणि जो अज्ञानी पुरुष, प्राचीन ऋषींनीं सांगितलेल्या उपायांचा अनादर करून आपणच आपल्या इच्छेनें कल्पित उपायांचा आरंभ करितो त्याचे वारंवार आरंभिलेलेहि ते उद्योग सफल होत नाहींत ॥ ५ ॥ हे नरपते, पूर्वीं ब्रह्मदेवानें ज्या ओषधी उत्पन्न केल्या होत्या, त्या ओषधी, आचारभ्रष्ट दुराचारी लोक भक्षण करूं लागले असें मी पाहिलें ॥ ६ ॥ व लोकांचें पालन करणाऱ्या सामान्य राजांनीं चोरादिकांची निवृत्ति करून माझें रक्षण केलें नाहीं व यज्ञयागादिक बंद करून उलटा माझा अनादर केला आणि सर्व लोक चोरप्राय झाले असें

यच्छ्रावितं विज्ञापितम् । न मद्वाक्येऽनादरः कर्तव्य इत्याह । बुधो हि सर्वतः सारमादत्ते ॥ २ ॥ मयि जीर्णाश्चौषधीरुपायेन ग्रहाणेति वक्तुमुपायेन सर्वं सिद्ध्यति नान्यथेत्याह । अस्मिन्निति त्रिभिः । पुंसां श्रेयसः पुरुषार्थस्य प्रसिद्धयेऽस्मिँल्लोके कृष्यादयोऽमुष्मिंश्च लोकेऽग्निहोत्रादयो योगा उपाया दृष्टाः प्रयुक्ता अनुष्ठिताश्च ॥ ३ ॥ पूर्वैर्दर्शितान्

अस्मिँल्लोकेऽथवाऽमुष्मिन्मुनिभिस्तत्त्वदर्शिभिः ॥ दृष्टा योगाः प्रयुक्ताश्च पुंसां श्रेयःप्रसिद्धये ॥ ३ ॥ तानातिष्ठति यः सम्यगुपायान्पूर्वदर्शितान् ॥ अवरः श्रद्धयोपेत उपेयान्विदतेऽञ्जसा ॥ ४ ॥ ताननादृत्य योऽविद्वानर्थानारभते स्वयम् ॥ तस्य व्यभिचरंत्यर्था आरब्धाश्च पुनः पुनः ॥ ५ ॥ पुरा सृष्टा ह्योषधयो ब्रह्मणा या विशांपते ॥ भुज्यमाना मया दृष्टा असद्भिरधृतव्रतैः ॥ ६ ॥ अपालितानादृता च भवद्भिर्लोकपालकैः ॥ चोरीभूतेऽथ लोकेऽहं यज्ञार्थेऽग्रसमोषधीः ॥ ७ ॥ नूनं ता वीरुधः क्षीणा मयि कालेन भूयसा ॥ तत्र योगेन दृष्टेन भवानादातुमर्हति ॥ ८ ॥ वत्सं कल्पय मे वीर येनाहं वत्सला तव ॥ धोक्ष्ये क्षीरमयान्कामाननुरूपं च दोहनम् ॥ ९ ॥ दोग्धारं च महाबाहो भूतानां भूतभावन ॥ अन्नमीप्सितमूर्जस्वद्भगवान्वांछते यदि ॥ १० ॥

अवरोऽर्वाचीनः ॥ ४ ॥ अविद्वान्विद्वानपीति वा व्यभिचरंति न सिद्ध्यंति ॥ ५ ॥ सहेतुकमुपायमाह । पुरेति षड्भिः ॥ ६ ॥ भवद्भिरिति राजसामान्याभिप्रायेण वेनादिभिरिति वा अपालिता चोराद्यनिवारणात् अनादृता च यज्ञादिप्रवर्तनाभावात् यज्ञार्थे अग्रसं गिलितवती अन्यथा धृतव्रतैर्भुक्ता न प्ररोक्ष्यंते ततश्च यज्ञादयो न सिद्ध्येरन्निति भावः ॥ ७ ॥ क्षीणा जीर्णाः ॥ ८ ॥ दोहनं दोहपात्रम् । दोग्धारं चोपकल्पय धोक्ष्ये प्रपूरयिष्यामि ॥ ९ ॥ भूतानामभीप्सितमन्नम् । ऊर्जस्वद्बलप्रदम् ॥ १० ॥

जाणून मी विचार केला कीं, दुष्टांनीं भक्षण केलेल्या ओषधि पुन्हा उत्पन्न होणार नाहींत व यज्ञादिक कर्में अगदींच बंद होतील, याकरितां यज्ञांचें साधन आपल्याजवळ राखून ठेवावें ह्मणून त्या ओषधि मी ग्रासून टाकिल्या आहेत ॥ ७ ॥ त्या ओषधी पुष्कळ काळ गेल्यामुळें माझेठिकाणीं खरोखर जिरून गेल्या आहेत, ह्मणून त्या प्राप्त करून घेण्याविषयीं पूर्वींच्या ऋषींनीं सांगितलेला जो दोहनरूप उपाय आहे त्याच्या योगेंकरून त्या तूं काढून घ्याव्यास ॥ ८ ॥ हे वीरा, हे महाबाहो, हे भूतपालका, सर्व प्राणिमात्रांना बल संपादन करणारें इष्ट अन्न जर तूं इच्छित असशील तर गोरूप धारण करणाऱ्या मला वत्साची कल्पना कर, त्यावांचून दूध निघणार नाहीं ॥ ९ ॥ तशीच दुधाच्या योग्य पात्राची कल्पना कर व दोहन करणाऱ्या गवळ्याची योजना कर, ह्मणजे ज्यांच्या योगानें मी परमप्रेमयुक्त होऊन तुला क्षीरस्थानापन्न अन्नादि पदार्थांचें

॥ ५३ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुष्कळ दोहन करीन ॥ १० ॥ हे राजा, इंद्रानें वृष्टि केलेलें उदक, वर्षाऋतु गेला असतांहि जसें माझ्यावर सर्वठिकाणीं राहील, तशारीतीनें तूं मला सारखी कर. ह्मणजे
प्रजेचा मनोरथ पूर्ण होऊन तुझें कल्याण होईल ॥ ११ ॥ हे विदुरा, या प्रकारचें संतोषकारक व इष्टसाधक असें भूमीचें वाक्य ऐकून, पृथुराजानें स्वायंभुव मनूला वत्स करून
आपल्या हस्तरूप पात्राचेठिकाणीं व्रीहियवादि सर्व ओषधिरूप दुधाचें दोहन केलें ॥ १२ ॥ ज्याप्रमाणें पृथूनें पृथिवीच्या वाक्यापासून सारग्रहण केलें त्याप्रमाणें दुसरेहि जे
विद्वान लोक आहेत ते सर्वठिकाणीं दुसऱ्याच्या वाक्यांतून आपल्या कार्यानुरूप सारांश काढून घेतात, ह्मणून पृथूनें दोहन केल्यानंतर पृथूनें वश केलेल्या त्या भूमीचें
दुसऱ्या ऋष्यादिकांनींहि यथेच्छपणें दोहन करून इच्छित वस्तूंची प्राप्ति करून घेतली ॥ १३ ॥ हे साधुश्रेष्ठा विदुरा, पृथूच्या दोहनानंतर सर्व ऋषींनीं बृहस्पतीला वत्स

अपगतेऽपि वर्षर्तौ देववृष्टमुदकं यथा मे मयि सर्वतो वर्तेत ॥ ११ ॥ मनुं स्वायंभुवम् । ओषधीर्व्रीह्यादीः ॥ १२ ॥ प्रसंगादर्थांतरमाह । तथेति यथा पृथुरेवं सर्वत्र वाक्ये परेऽपि
सारमाददते प्रस्तुतमनुवर्तयति ततोऽन्ये च ऋष्यादयः पंचदश दुदुहुः पृथुना भावितां वशीकृताम् ॥ १३ ॥ देवीं पृथ्वीम् । वाङ्मनःश्रवणैर्वेदग्रहणादिंद्रियाणां पात्रत्वम् ॥ १४ ॥

समां च कुरु मां राजन्देववृष्टं यथा पयः ॥ अपर्तावपि भद्रं ते उपावर्तेत मे विभो ॥ ११ ॥ इति प्रियं हितं वाक्यं भुव आदाय
भूपतिः ॥ वत्सं कृत्वा मनुं पाणावदुहत्सकलौषधीः ॥ १२ ॥ तथापरे च सर्वत्र सारमाददते बुधाः ॥ ततोऽन्ये च यथाकामं दुदु-
हुः पृथुभाविताम् ॥ १३ ॥ ऋषयो दुदुहुर्देवीमिंद्रियेष्वथ सत्तम ॥ वत्सं बृहस्पतिं कृत्वा पयश्छंदोमयं शुचि ॥ १४ ॥ कृत्वा
वत्सं सुरगणा इंद्रं सोममदूदुहन् ॥ हिरण्मयेन पात्रेण वीर्यमोजो बलं पयः ॥ १५ ॥ दैतेया दानवा वत्सं प्रह्लादमसुरर्षभम् ॥
विधायादूदुहन्क्षीरमयःपात्रे सुरासवम् ॥ १६ ॥ गंधर्वाप्सरसोऽधुक्षन्पात्रे पद्ममये पयः ॥ वत्सं विश्वावसुं कृत्वा गांधर्वं मधु सौभ-
गम् ॥ १७ ॥ वत्सेन पितरोऽर्यम्णा कव्यं क्षीरमधुक्षत ॥ आमपात्रे महाभागाः श्रद्धया श्राद्धदेवताः ॥ १८ ॥ प्रकल्प्य वत्सं
कपिलं सिद्धाः संकल्पनामयीम् ॥ सिद्धिं नभसि विद्यां च ये च विद्याधरादयः ॥ १९ ॥

॥ १५ ॥ सुरामासवं च तालादिमद्यम् ॥ १६ ॥ मधु वाङ्माधुर्यं सौभगं सौंदर्यं तत्स-
सोममृतम् । वीर्यं मनःशक्तिम् । ओज इंद्रियशक्तिम् । बलं देहशक्तिं च तदेव पयः ॥ १५ ॥ सुरामासवं च तालादिमद्यम् ॥ १६ ॥ मधु वाङ्माधुर्यं सौभगं सौंदर्यं तत्स-
हितम् ॥ १७ ॥ कव्यं पितॄणामन्नम् । आमपात्रे अपक्के मृन्मये अधुक्षत दुदुहुः ॥ १८ ॥ संकल्पनामयीमणिमादिसिद्धिम् । ये विद्याधरादयस्ते च तमेव वत्सं प्रकल्प्य नभ-

---

करून भूमिदेवीचें इंद्रियरूप पात्रांचेठिकाणीं पवित्र असें वेदरूपी दूध काढिलें ॥ १४ ॥ देवगणांनीं इंद्राला वत्स करून सुवर्णमय पात्राचेठिकाणीं अमृत, मनाची शक्ति,
इंद्रियांची शक्ति आणि शारीरिक बल हें दूध काढिलें ॥ १५ ॥ दैत्य व दानव यांनीं, असुरश्रेष्ठ जो प्रल्हाद त्याला वत्स करून लोखंडाच्या पात्रांत सुरेचें व ताडीवगैरे
मद्याचें दोहन केलें ॥ १६ ॥ गंधर्व व अप्सरा यांनीं विश्वावसूला वत्स करून कमलमय पात्राचेठिकाणीं वाणीचें माधुर्य (गायन) व सौंदर्य हें दूध काढून घेतलें ॥ १७ ॥
श्राद्धांतील देवता महाभाग्यशाली जे पितर त्यांनीं, अर्यम्याला वत्स करून मातीच्या कच्च्या भाड्यांत श्रद्धेनें कव्यरूपी[1] दूध काढिलें ॥ १८ ॥ सिद्धपुरुषांनीं कपिलमुनीला
वत्स कल्पून आकाशरूप पात्रामध्यें संकल्पमात्रेंकरून उत्पन्न होणारी जी अणिमादि अष्टसिद्धि हें दूध काढिलें, तसेंच जे विद्याधरादिक देव त्यांनींहि कपिलमुनीलाच वत्स

---

१ पितरांच्या उद्देशानें समर्पण करावयाचें जें अन्न त्यास कव्य असें ह्मणतात,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कल्पून आकाशपात्रामध्यें गुप्त होऊन फिरणें इत्यादि विचेंचें दोहन केलें ॥ १९ ॥ त्याचप्रमाणें इतरहि मायावी किंपुरुषादिकांनीं मयासुराला वत्स करून आकाशपात्रामध्येंच
स्वतःचें शरीर गुप्त करून अद्भुतरूपें धारण करणाऱ्या पुरुषांच्या अंतर्धानशक्तिरूप मायेचें दोहन केलें ॥ २० ॥ यक्ष, राक्षस, भूतें व पिशाच ह्या रक्त भक्षण करणाऱ्या सर्व
देवयोनींनीं, भूतपति रुद्राला वत्स करून कपालरूपी पात्रांत रक्तरूपी मादक दुधाचें दोहन केलें ॥ २१ ॥ तसेच फड्या असलेले व फड्या नसलेले साप, कद्रूचे पुत्र नाग आणि
विंचूवगैरे प्राणी यांनीं, तक्षकाला वत्स करून आपल्या मुखादिरूप पात्रांचेठिकाणीं विषरूप दूध काढिलें ॥ २२ ॥ सर्व पशूंनीं नंदिकेश्वराला वत्स करून अरण्यरूप पात्रा-
मध्यें तृणरूप दुधाचें दोहन केलें आणि मांस भक्षण करणाऱ्या दाढांच्या पशूंनीं सिंहाला वत्स करून आपल्या शरीररूप पात्रांत मांसरूप दूध काढून घेतलें. पक्ष्यांनीं गरु-
डाला वत्स करून स्वतांच्या शरीरांत जंगम (किडे वगैरे) आणि स्थावर (फळें वगैरे) भक्ष्यपदार्थरूप दूध मिळविलें ॥ २३ ॥ २४ ॥ सर्व वृक्षांनीं वटवृक्षाला वत्स करून

स्येव पात्रे खेचरत्वादिरूपां विद्यां दुदुहुः ॥ १९ ॥ अन्ये च किंपुरुषादयोऽतर्धानेनाद्भुतात्मनां संबंधिनीं मायाम् । धारणामयीं संकल्पमात्रप्रभवाम् ॥ २० ॥ भूतेशो रुद्रः
स एव वत्सो येषाम् । क्षतजं रुधिरं तदेवासवम् ॥ २१ ॥ अहयो निष्फणाः दंदशूका वृश्चिकादयः सर्पाः सफणास्त एव कद्रुसंततिजा नागाः बिलपात्रे मुखे ॥ २२ ॥ यवसं

अन्ये च मायिनो मायामंतर्धानाद्भुतात्मनाम् ॥ मयं प्रकल्प्य वत्सं ते दुदुहुर्धारणामयीम् ॥ २० ॥ यक्षरक्षांसि भूतानि पिशाचाः
पिशिताशनाः ॥ भूतेशवत्सा दुदुहुः कपाले क्षतजासवम् ॥ २१ ॥ तथाऽहयो दंदशूकाः सर्पा नागाश्च तक्षकम् ॥ विधाय वत्सं
दुदुहुर्बिलपात्रे विषं पयः ॥ २२ ॥ पशवो यवसं क्षीरं वत्सं कृत्वा च गोवृषम् ॥ अरण्यपात्रे चाधुक्षन्मृगेंद्रेण च दंष्ट्रिणः ॥२३॥
क्रव्यादाः प्राणिनः क्रव्यं दुदुहुः स्वे कलेवरे ॥ सुपर्णवत्सा विहगाश्चरं चाचरमेव च ॥ २४ ॥ वटवत्सा वनस्पतयः पृथग्रसमयं
पयः ॥ गिरयो हिमवद्वत्सा नानाधातून्स्वसानुषु ॥ २५ ॥ सर्वे स्वमुख्यवत्सेन स्वे स्वे पात्रे पृथक् पयः ॥ सर्वकामदुघां पृथ्वीं
दुदुहुः पृथुभाविताम् ॥ २६ ॥ एवं पृथ्वादयः पृथ्वीमन्नादाः स्वन्नमात्मनः ॥ दोहवत्सादिभेदेन क्षीरभेदं कुरूद्वह ॥ २७ ॥ ततो
महीपतिः प्रीतः सर्वकामदुघां पृथुः ॥ दुहितृत्वे चकारेमां प्रेम्णा दुहितृवत्सलः ॥ २८ ॥

तृणम् । गोवृषं रुद्रवाहं वृषभम् । मृगेंद्रेणेत्युत्तरेणान्वयः ॥ २३ ॥ क्रव्यं मांसम् । चरं कीटादि । अचरं फलादि ॥ २४ ॥ २५ ॥ अनुक्तसर्वसंग्रहार्थमाह । सर्वे इति । सर्वे
स्वजातौ यो मुख्यस्तेन वत्सेन ॥ २६ ॥ उपसंहरति । एवमिति । स्वन्नमभीष्टमन्नम् । तमेव क्षीरभेदं दुदुहुः । दोहः पात्रम् ॥ २७ ॥ इमां पृथ्वीम् ॥ २८ ॥

स्वतांच्या शरीरांत प्रत्येकाला वेगवेगळा रस हें दूध प्राप्त करून घेतलें. पर्वतांनीं हिमालयाला वत्स करून आपापल्या शिखरादि प्रदेशांचेठायीं अनेक प्रकारच्या
गेरू पिवडी वगैरे धातु, हें दूध संपादन केलें ॥ २५ ॥ याप्रमाणें सर्वांनीं पृथुराजानें व शकेल्या व इच्छित वस्तु प्राप्त करून देणाऱ्या त्या पृथिवीचें आपापल्यांतील
मुख्य वत्सानें आपापल्या पात्रांमध्यें निरनिराळें दूध काढून घेतलें ॥ २६ ॥ हे विदुरा, याप्रमाणें अन्न भक्षण करणाऱ्या पृथुराजा इत्यादिकांनीं पृथिवीचें, वत्स व दोहन
पात्र इत्यादिकांच्या भेदेंकरून दोहन करून निरनिराळ्या दुधाच्या रूपानें आपआपणांस इष्ट असलेले अन्नादि पदार्थ मिळविले ॥ २७ ॥ नंतर संतुष्ट झालेल्या व आपणास
कन्या असावी अशी इच्छा करणाऱ्या त्या महीपति पृथुराजानें, सर्व मनोरथ पूर्ण करणाऱ्या त्या पृथिवीचा प्रेमानें कन्येच्या नात्यानें स्वीकार केला ॥ २८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सोडिलें ॥ २९ ॥ नंतर प्रजांचें रक्षण करून
नंतर त्या समर्थ राजाधिराज पृथुराजानें आपल्या धनुष्याच्या अग्रानें पर्वतांच्या शिखरांचें चूर्ण करून हें भूमंडळ बहुतेक सारखें करून सोडिलें ॥ २९ ॥ नंतर प्रजांचें रक्षण करून नानाप्रकारचे किल्ले, भिल्लांच्या वाड्या
उपजीविका चालविणारा जो भगवान् पृथुराजा त्यानें, या भूमंडलावर लोकांकरितां ठिकठिकाणीं यथायोग्य रीतीनें गांव, पुरें, नगरें, नानाप्रकारचे किल्ले, भिल्लांच्या वाड्या
गौळवाडे, सैन्यांच्या तळाच्या जागा (कोठ) खाणी, शेतकऱ्याचे गांव (खेडीं) डोंगरकठाडीचे गांव इत्यादि वसतिस्थानांची कल्पना केली ॥ ३० ॥ ३१ ॥ हे विदुरा,
या भूमंडलावर पृथुराजाच्या पूर्वीं ही नगरग्रामादिकांची रचना नव्हती, ती पृथुराजानें केल्यापासून सर्व प्रजा त्या त्याठिकाणीं निर्भयपणें सुखानें वास करूं लागल्या
॥ ३२ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील चतुर्थस्कंधामध्यें हा अठरावा अध्याय समाप्त झाला ॥ १८ ॥ ॥श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ७ ॥ ॥ आतां एकुणिसाव्या

धनुषोऽग्रेण गिरिशृंगाणि चूर्णयन् राजराट् राज्ञां राजा सर्वेषामाजीविकादानात् ॥२९॥३०॥ ग्रामा हट्टादिशून्याः । पुरो हट्टादिमत्यः । ता एव महत्यः पत्तनानि । दुर्गाणि विवि-
धानि । यथाह बृहस्पतिः । औदकं पार्वतं वार्क्षमैरिणं धान्वनं तथा इति । घोषान् आभीराणां निवासान् । व्रजान् गवां निवासान् । शिबिरं सेनानिवासस्थानम् । तत्सहिता-
नाकरान्स्वर्णादिस्थानानि । खेटाः कर्षकग्रामाः । खर्वटाः पर्वतप्रांतग्रामास्तांश्च ॥ ३१ ॥ ३२ ॥ ॥ इति श्रीमद्भागवते चतुर्थे टीकायामष्टादशोऽध्यायः ॥ १८ ॥ ॥ ऊनविं-

चूर्णयन्स्वधनुष्कोट्या गिरिकूटानि राजराट् ॥ भूमंडलमिदं वैन्यः प्रायश्चक्रे समं विभुः ॥ २९ ॥ अथास्मिन्भगवान्वैन्यः प्रजानां
वृत्तिदः पिता ॥ निवासान्कल्पयांचक्रे तत्रतत्र यथार्हतः ॥ ३० ॥ ग्रामान्पुरः पत्तनानि दुर्गाणि विविधानि च ॥ घोषान्व्रजान्स-
शिबिरानाकरान्खेटखर्वटान् ॥ ३१ ॥ प्राक् पृथोरिह नैवैषा पुरग्रामादिकल्पना ॥ यथासुखं वसंति स्म तत्र तत्राकुतोभयाः ॥३२॥
इति श्रीमद्भागवते महापुराणे चतुर्थस्कंधे पृथुविजयेऽष्टादशोऽध्यायः ॥ १८ ॥ ॥ मैत्रेय उवाच ॥ अथादीक्षत राजा तु हयमेधशतेन
सः ॥ ब्रह्मावर्ते मनोः क्षेत्रे यत्र प्राची सरस्वती ॥ १ ॥ तदभिप्रेत्य भगवान्कर्मातिशयमात्मनः ॥ शतक्रतुर्न ममृषे पृथोर्यज्ञमहो-
त्सवम् ॥ २ ॥ यत्र यज्ञपतिः साक्षाद्भगवान्हरिरीश्वरः ॥ अन्वभूयत सर्वात्मा सर्वलोकगुरुः प्रभुः ॥ ३ ॥ अन्वितो ब्रह्मशर्वाभ्यां
लोकपालैः सहानुगैः ॥ उपगीयमानो गंधर्वैर्मुनिभिश्चाप्सरोगणैः ॥ ४ ॥

शेऽश्वमेधांगहयापहरणात्पृथोः ॥ इंद्रं हंतुं प्रवृत्तस्य धात्रा वारणमुच्यते ॥ १ ॥ हयमेधशतेन निमित्तेनादीक्षत दीक्षितोऽभूत् शताश्वमेधसंकल्पमकरोदित्यर्थः । ब्रह्मावर्ते । सर-
स्वतीदृषद्वत्योर्देवनद्योर्यदंतरम् ॥ तं देवनिर्मितं देशं ब्रह्मावर्तं प्रचक्षते ॥ १ ॥ आत्मनः स्वस्य कर्मातिशेत इत्यतिशयमभिप्रेत्य ज्ञात्वा । तदिति तं पृथोर्यज्ञमहोत्सवं न
ममृषे न सेहे ॥ २ ॥ अतिशयमेव दर्शयति । यत्रेति सप्तभिः । साक्षादन्वभूयत प्रत्यक्षेणादृश्यत ॥ ३ ॥ ४ ॥

अध्यायामध्यें, अश्वमेध यज्ञसंबंधी घोड्याचा इंद्रानें अपहार केला असतां, इंद्राला मारण्याविषयीं प्रवृत्त झालेल्या पृथुराजाचें ब्रह्मदेवानें निवारण केलें, अशी कथा वर्णन
केलेली आहे ॥ १ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, नंतर जेथें पूर्ववाहिनी सरस्वती नदी आहे अशा मनूच्या ब्रह्मावर्तनामक क्षेत्रामध्यें त्या पृथुराजानें शंभर अश्वमेध करण्या-
साठीं दीक्षा ग्रहण केली ॥ १ ॥ तेव्हां भगवंताचाच अवतार अशा यज्ञनामक इंद्रानें, त्या पृथुरूपी भगवदवताराचें तें शंभर अश्वमेधरूपी यज्ञमहोत्सवरूप कर्म आपल्या
इंद्रपदाचें हरण करणारें आहे असें जाणून सहन केलें नाहीं ॥ २ ॥ ज्या पृथूच्या यज्ञमहोत्साहामध्यें, सर्वांतर्यामी, सर्व लोकांचा गुरु, कर्तुं अकर्तुं अन्यथाकर्तुं समर्थ,
भक्तांची दुःखें हरण करणारा, व षड्गुणैश्वर्यसंपन्न असा साक्षात् यज्ञपति ईश्वर, प्रत्यक्ष दर्शन देत असे ॥ ३ ॥ त्याच्या बरोबर, ब्रह्मदेव, शंकर, व अनुचरांसहवर्तमान

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

इंद्रादिक लोकपाल येत असत आणि गंधर्व, ऋषि, व अप्सरांचे समुदाय समोर उभे राहून त्याची कीर्ति गात असत ॥ ४ ॥ सिद्ध, विद्याधर, दैत्य, दानव, गुह्यकादिक लोक, तसेच नंदसुनंद इत्यादिक विष्णूचे मुख्य मुख्य पार्षद, कपिल, नारद, दत्तात्रेय, सनकादिक महायोगी व आणखी जे कोणी त्या विष्णूच्या सेवेकरितां उत्सुक असे भगवद्भक्त तेही त्याच्या बरोबर येत असत ॥ ५ ॥ ६ ॥ हे भरतकुलोत्पन्ना विदुरा, ज्या यज्ञामध्यें होमद्रव्यें प्राप्त करून देणारी पृथिवी, सर्व इच्छा पूर्ण करणाऱ्या कामधेनूच्या स्वरूपानें यजमानाचे इष्ट मनोरथ परिपूर्ण करीत होती ॥ ७ ॥ नद्या, उंसाचे द्राक्षांचे वगैरे रस, दूध, दहीं, पेयपदार्थ (सरबतें) तूप, ताक वगैरे गोरस वाहून आणीत होत्या. मोठमोठे वृक्ष, आपल्या ढोलींतून मधाचा स्राव करीत असून पुष्कळ फुलें फळें यांनीं युक्त होत असत ॥ ८ ॥ समुद्र, अनेक रत्नें आणून देत असत.

सिद्धादयश्च तं हरिमन्वीयुरित्युत्तरेणान्वयः ॥ ५ ॥ ६ ॥ धर्मदुघा हविर्दोग्ध्री धेनुः सती ॥७॥ ऊहुर्वहंति स्म । सर्वरसानिक्षुद्राक्षादिरसान् । क्षीरं च दधि च अन्नं च पानकादि गोरसो घृतं तक्रं च तांश्च । भूरीणि विस्तृतानि वर्ष्माणि शरीराणि येषां ते फलादि प्रासूयंत । मधुच्युतो मधुस्राविणः संतः ॥ ८ ॥ चतुर्विधं भक्ष्यं भोज्यं चोष्यं लेह्यं च ॥ ९ ॥ अधोक्षज ईशो नाथो

सिद्धविद्याधरा दैत्या दानवा गुह्यकादयः ॥ सुनंदनंदप्रमुखाः पार्षदप्रवरा हरेः ॥ ५ ॥ कपिलो नारदो दत्तो योगेशाः सनकादयः ॥ तमन्वीयुर्भागवता ये च तत्सेवनोत्सुकाः ॥ ६ ॥ यत्र धर्मदुघा भूमिः सर्वकामदुघा सती ॥ दोग्धि स्माभीप्सितानर्थान्यजमानस्य भारत ॥ ७ ॥ ऊहुः सर्वरसान्नद्यः क्षीरदध्यन्नगोरसान् ॥ तरवो भूरिवर्ष्माणः प्रासूयंत मधुच्युतः ॥ ८ ॥ सिंधवो रत्ननिकरान्गिरयोऽन्नं चतुर्विधम् ॥ उपायनमुपाजह्रुः सर्वे लोकाः सपालकाः ॥ ९ ॥ इति चाधोक्षजेशस्य पृथोस्तु परमोदयम् ॥ असूयन्भगवानिंद्रः प्रतिघातमचीकरत् ॥ १० ॥ चरमेणाश्वमेधेन यजमाने यजुष्पतिम् ॥ वैन्ये यज्ञपशुं स्पर्धन्नपोवाह तिरोहितः ॥ ११ ॥ तमत्रिर्भगवानैक्षत्त्वरमाणं विहायसा ॥ आमुक्तमिव पाखंडं योऽधर्मे धर्मविभ्रमः ॥ १२ ॥ अत्रिणा चोदितो हंतुं पृथुपुत्रो महारथः ॥ अन्वधावत संक्रुद्धस्तिष्ठतिष्ठेति चाब्रवीत् ॥ १३ ॥

यस्य । परम उदयोऽभिवृद्धिर्यस्मिंस्तत्कर्मासूयन्नसहमानः प्रतिघातं विघ्नं चकारेत्यर्थः ॥ १० ॥ वैन्ये यजुष्पतिं विष्णुं यजमाने सति स्पर्धमान इंद्रस्तिरोहितः सन्नश्वमपहृतवान् ॥ ११ ॥ त्वरमाणं धावंतम् । आमुक्तः प्रतिमुक्तश्च पिनद्धश्चापिनद्धवत् ॥ सन्नद्धो वर्मितः सज्ज इत्यमरसिंहः । पाखंडं वेषं कवचमिव गृहीतवंतमित्यर्थः । अधर्मे धर्मविभ्रमो धर्मोऽयमिति भ्रांतिकरो यस्तम् ॥ १२ ॥ १३ ॥

पर्वत, चार प्रकारचें अन्न आणून देत असत, पालकांसहवर्तमान सर्व लोक भेटी आणून देत असत ॥ ९ ॥ ज्याचा नाथ अधोक्षज भगवान् आहे अशा त्या पृथुराजाचें पूर्वोक्त प्रकारचें मोठ्या अभ्युदयानें युक्त चाललेलें कर्म पाहून तें सहन न करणाऱ्या भगवान् इंद्रानें, त्या यज्ञांत विघ्न उत्पन्न केलें ॥ १० ॥ तें असें कीं,–शंभराव्या अश्वमेधानें यज्ञपति भगवंताचें यजन करण्यास पृथुराजा प्रवृत्त झाला असतां, स्पर्धा उत्पन्न झालेल्या इंद्रानें, गुप्तरूपानें त्याचा अश्वरूप यज्ञपशु हरण केला ॥ ११ ॥ तेव्हां भगवान् अत्रि ऋषीनें, आकाशमार्गानें घोडा घेऊन धांवत असणाऱ्या व ज्याच्या योगानें लोकांना अधर्माचेठिकाणीं 'हा धर्म आहे' अशी भ्रांति उत्पन्न होते अशा पाखंडवेषाला, वरकमीं कवचाप्रमाणें धारण करणाऱ्या त्या इंद्रास पाहिलें ॥ १२ ॥ तेव्हां अत्रि ऋषीनें त्या इंद्राला मारण्याकरितां प्रेरणा केलेला महारथी पृथुराजाचा पुत्र,

*१ भक्ष्य (चावून खाण्याचें–लाड, पोळीवगैरे). २ भोज्य (न चावलें असतांहि गिळून खाण्याचें–श्रीखंड, खीरवगैरे). ३ लेह्य (चाटून खाण्याचें–मेथकूट, रायतेंवगैरे). ४ चोष्य (चोखून खावयाचें–आंबा, लिंबूवगैरे).

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कुद्ध होऊन त्या धांवणाऱ्या इंद्राच्या मार्गे लागला आणि त्याला 'उभा रहा, उभा रहा' असें ह्मणाला ॥ १३ ॥ परंतु, मस्तकाचेठिकाणीं जटा धारण करणारा व
सर्वांगास भस्म लावलेला असून पाखंडवेषधारी अशा त्या इंद्राला पाहून, हा केवळ धर्मात्मा आहे असें मानून त्या पृथुपुत्रानें त्याला मारण्याकरितां त्याच्यावर बाण सोडिला
नाहीं ॥ १४ ॥ तेव्हां हा धर्मात्मा आहे अशा बुद्धीनें इंद्राच्या वधापासून निवृत्त झालेल्या पृथुपुत्राला पाहून, त्या इंद्रास मारण्याकरितां पुनः अत्रि ऋषीनें प्रेरणा केली कीं,
बाळा, अश्वाचा अपहार करून यज्ञामध्यें विघ्न करणाऱ्या या देवाधम इंद्राला तूं मारून टाक ॥ १५ ॥ अशी आज्ञा केलेला तो पृथूचा पुत्र, अत्यंत कुद्ध झाला आणि जसा
पूर्वी रावण सीतेला घेऊन चालला असतां त्याच्यावर जटायु पक्षी धांवला होता त्याप्रमाणें, आकाशमार्गानें त्वरा करणाऱ्या त्या इंद्राच्या मागोमाग धांवला ॥ १६ ॥
तेव्हां तो स्वतंत्र इंद्र, त्या अश्वाचा व रूपाचा त्याग करून गुप्त झाला. तेव्हां तो वीरपुत्र आपला घोडा घेऊन पित्याच्या यज्ञमंडपांत आला ॥ १७ ॥ हे समर्था विदुरा,

---

न मुंचति स्म ॥ १४ ॥ हंतवे हंतुम् । यज्ञहनं यज्ञं हतवतम् ॥ १५ ॥ गृध्रराट् जटायुः ॥ १६ ॥ तस्मै हित्वा तदर्थमुत्सृज्य ॥ १७ ॥ विचक्ष्य दृष्ट्वा ॥ १८ ॥ उपसृज्य सृष्ट्वा

तं तादृशाकृतिं वीक्ष्य मेने धर्मशरीरिणम् ॥ जटिलं भस्मनाच्छन्नं तस्मै बाणं न मुंचति ॥ १४ ॥ वधान्निवृत्तं तं भूयो हंतवे
ऽत्रिरचोदयत् ॥ जहि यज्ञहनं तात महेंद्रं विबुधाधमम् ॥ १५ ॥ एवं वैन्यसुतः प्रोक्तस्त्वरमाणं विहायसा ॥ अन्वद्रवदभिक्रुद्धो रा-
वणं गृध्रराडिव ॥ १६ ॥ सोऽश्वं रूपं च तद्धित्वा तस्मा अंतर्हितः स्वराट् ॥ वीरः स्वपशुमादाय पितुर्यज्ञमुपेयिवान् ॥ १७ ॥
तत्तस्य चाद्भुतं कर्म विचक्ष्य परमर्षयः ॥ नामधेयं ददुस्तस्मै विजिताश्व इति प्रभो ॥ १८ ॥ उपसृज्य तमस्तीव्रं जहाराश्वं पुनर्ह-
रिः ॥ चषालयूपतश्छन्नो हिरण्यरशनं विभुः ॥ १९ ॥ अत्रिः संदर्शयामास त्वरमाणं विहायसा ॥ कपालखट्वांगधरं वीरो नैनम-
बाधत ॥ २० ॥ अत्रिणा चोदितस्तस्मै संदधे विशिखं रुषा ॥ सोऽश्वं रूपं च तद्धित्वा तस्थावंतर्हितः स्वराट् ॥ २१ ॥ वीरश्चाश्व-
मुपादाय पितृयज्ञमथाव्रजत् ॥ तदवद्यं हरे रूपं जगृहुर्ज्ञानदुर्बलाः ॥ २२ ॥

तेन छन्नः सन् । चषालो यूपाग्रे विक्षिप्तः काष्ठकटकस्तद्युक्ताद्यूपात् । हिरण्यनिर्मिता रशना यस्य तम् । रशनाया दृढत्वेन छेदाशक्त्या रशनासहितमेवोद्धृत्य यूपाग्रान्नी-
तवानित्यर्थः । विभुः समर्थः ॥ १९ ॥ २० ॥ २१ ॥ अवद्यं निंदितं रूपं मंदप्रज्ञा जगृहुः ॥ २२ ॥

तेव्हां त्याठिकाणीं जमलेल्या महान् महान् ऋषींनीं तें त्या पुत्राचें अद्भुत कर्म पाहून त्याला 'विजिताश्व' असें नांव दिलें ॥ १८ ॥ नंतर त्या समर्थ इंद्रानें, निबिड अंध-
कार उत्पन्न करून त्याच्या योगानें आच्छादित होऊन, चषाल[1]युक्त स्तंभाला सुवर्णाच्या दोरीनें बांधून ठेविलेला तो घोडा तेथून दोरीसुद्धां हरण केला ॥ १९ ॥
तेव्हां तो इंद्र, आकाशमार्गानें पळत असतां त्याला अत्रि ऋषीनें पुनरपि पृथुपुत्रास दाखविलें. त्यावेळीं इंद्रानें कपाल व खट्वांग हीं आयुधें धारण केलीं होतीं. ह्मणून हा
धर्मात्मा आहे असें समजून तो वीर, त्याला मारण्यास प्रवृत्त होईना ॥ २० ॥ पुढें अत्रीनें पुनः सांगितल्यावरून राजपुत्रानें त्या इंद्रावर क्रोधानें शरसंधान केलें. इतक्यामध्यें
तो स्वतंत्र इंद्र, अश्वाचा व त्या रूपाचा त्याग करून गुप्त होऊन राहिला ॥ २१ ॥ नंतर तो वीरपुत्र आपला अश्व घेऊन पित्याच्या यज्ञमंडपांत आला. तेव्हां तें इंद्राचें

---

१ यज्ञस्तंभाच्या मस्तकावर एक लांकडाचें कडें असतें त्यास 'चषाल' असें ह्मणतात.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

निंच पाखंडरूप, मूढबुद्धि लोकांनीं 'हें चांगलें आहे' अशा बुद्धीनें स्वीकारिलें ॥ २२ ॥ याप्रमाणें घोडा हरण करण्याच्या इच्छेनें इंद्रानें जीं जीं रूपें धारण केलीं तीं तीं सर्व पापाचीं खंडें (चिन्हें) होत ॥ २३ ॥ याप्रमाणें इंद्र, पृथुराजाच्या यज्ञाचा घात करण्याच्या इच्छेनें पाखंडवेष धारण करून वारंवार घोडा हरण करीत असतां, त्या इंद्रानें घेऊन टाकलेले, धर्मासारखे भासणारे, अविचारी पुरुषांस सुंदर वाटणारे, व बोलण्यांत कुशल असे जे नग्न (जैन) रक्तवस्त्र (बौद्ध कापालिक वगैरे) पाखंडवेष त्यांचेठिकाणीं भ्रांतीनें हा धर्म आहे अशा समजुतीनें मनुष्यांची बुद्धि बहुधा आसक्त होऊं लागली ॥ २४ ॥ २५ ॥ तें इंद्राचें निंच कर्म जाणून क्रुद्ध झालेल्या महापराक्रमी त्या भगवान् पृथुराजानें, आपलें धनुष्य सज्ज करून इंद्राला मारण्यासाठीं हातामध्यें बाण घेतला असतां ॥ २६ ॥ हे विदुरा, इंद्राच्या वधाची इच्छा करणारा, क्रोधाविष्ट झाल्यामुळें त्याच्याकडे पाहण्याससुद्धां अशक्य, व ज्याचा वेग शत्रूंनीं दुःसह आहे अशा त्या पृथुराजाला पाहून, ऋत्विजांनीं त्याचें असें निवारण केलें कीं, हे महामते

तदेव पांखंडनामनिरुक्त्या दर्शयति यानीति । बहुवचनेन चान्यान्यपि गृहीतानीत्युक्तम् ॥ २३ ॥ तत्प्रभृतिपाखंडमार्गाः प्रवृत्ता इत्याह । एवमिति । तेन गृहीतेषु पुनर्विसृष्टेषु । नग्ना जैनाः रक्तपटा बौद्धाः आदिशब्देन कापालिकादयस्तेषूपधर्मेषु धर्मोपमेषु धर्म एवायमिति मतिः सज्जत इति द्वयोरन्वयः । पेशलेषु आपाततो रम्येषु वाग्मिषु हेतूक्तिचतुरेषु ॥२४॥२५॥

यानि रूपाणि जगृहे इंद्रो हयजिहीर्षया ॥ तानि पापस्य खंडानि लिंगं खंडमिहोच्यते ॥ २३ ॥ एवमिंद्रे हरत्यश्वं वैन्ययज्ञजिघांसया ॥ तद्गृहीतविसृष्टेषु पाखंडेषु मतिर्नृणाम् ॥ २४ ॥ धर्म इत्युपधर्मेषु नग्नरक्तपटादिषु ॥ प्रायेण सजते भ्रांत्या पेशलेषु च वाग्मिषु ॥ २५ ॥ तदभिज्ञाय भगवान्पृथुः पृथुपराक्रमः ॥ इंद्राय कुपितो बाणमादत्तोद्यतकार्मुकः ॥ २६ ॥ तमृत्विजः शक्रवधाभिसंधितं विचक्ष्य दुःप्रेक्ष्यमसह्यरंहसम् ॥ निवारयामासुरहो महामते न युज्यतेऽत्रान्यवधः प्रचोदितात् ॥ २७ ॥ वयं मरुत्वंतमिहार्थनाशनं ह्वयामहे त्वच्छ्रवसा हतत्विषम् ॥ अयातयामोपहवैरनंतरं प्रसह्य राजन्जुहवाम तेऽहितम् ॥ २८ ॥ इत्यामंत्र्य क्रतुपतिं विदुरास्यर्त्विजो रुषा ॥ स्रुग्वस्तान्जुह्वतोऽभ्येत्य स्वयंभूः प्रत्यषेधत ॥ २९ ॥ न वध्यो भवतामिंद्रो यद्यज्ञो भगवत्तनुः ॥ यं जिघांसथ यज्ञेन यस्येष्टास्तनवः सुराः ॥ ३० ॥

॥२६॥ शक्रवधेऽभिसंधितं कृताभिप्रायम् । प्रचोदितात्पशोर्वधादन्यस्य वधस्तव न युज्यते ॥ २७ ॥ तद्वधं तु वयं करिष्याम इत्याहुः । वयमिह यज्ञनाशकं त्वत्कीर्त्यैव हतप्रभमिंद्रमाह्वयामहे । कैः । अयातयामैरगतवीर्यैराह्वानमंत्रैः । अनंतरं च ते तवाहितं जुहवाम होष्यामः ॥ २८ ॥ अस्य पृथोः । स्रुक् हस्ते येषां तान् ॥ २९ ॥ यमिंद्रं यज्ञेन

पृथुराजा, ह्या यज्ञकर्मांमध्यें विधीनें सांगितलेल्या पशुवधाखेरीज इतरांचा वध करणें तुला योग्य नाहीं ॥ २७ ॥ यास्तव तुझ्या कीर्तीनें निस्तेज झालेला, यज्ञामध्यें विघ्न करणारा, व तुझा शत्रु अशा ह्या इंद्राला आह्मी नित्यसिद्ध अशा आपल्या मंत्रांनीं येथें बोलावून आणितों आणि नंतर हे राजा, त्या तुझ्या शत्रूचा आह्मी बलात्कारानें अग्नीमध्यें होम करून टाकितों ॥ २८ ॥ हे विदुरा, याप्रमाणें यजमानाला सांगून क्रोधानें हातांत स्रुची घेऊन इंद्रास बोलावण्यासाठीं होम करण्यास प्रवृत्त झालेल्या त्या पृथुराजाच्या ऋत्विजांचा, ब्रह्मदेवानें पुढें होऊन असा निषेध केला कीं, ॥ २९ ॥ हे ऋत्विज हो, यज्ञाच्या योगानें ज्यांची आराधना करावयाची ते सर्व देव, ज्या ह्या इंद्राचे करचरणादिक अवयव होत, व यज्ञाच्या रक्षणाकरितां तुह्मी ज्याला मारण्याची इच्छा करितां तो इंद्र तुह्मापासून वध पावण्यास योग्य नाहीं. कारण, हा यज्ञनामक इंद्र, प्रत्यक्ष

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भगवंताचा अवतार आहे ॥ ३० ॥ तेव्हां हे ब्राह्मणहो, पृथुराजाच्या यज्ञकर्मामध्यें विघ्न करण्याची इच्छा करणाऱ्या इंद्रानें, धर्मनाशक पाखंडमार्ग उत्पन्न करून केवढा मोठा हा अनर्थ उत्पन्न केला आहे पहा! यास्तव आतां ह्या बलाढ्य इंद्राशीं तुह्मी सख्यच करावें. नाहींतर तो अणखीहि पाखंडमार्ग उत्पन्न करील व त्याच्या योगानें लोकांमध्यें अनर्थ होईल॥ ३१ ॥ यास्तव तुह्मी आतां पुनः यज्ञकर्म चालविण्याच्या भरीस पडूं नका. ह्या महाकीर्तिमान् पृथुराजाचें हें अनुष्ठान, नव्याण्णव क्रतूंनींच पुरें होवो. असें ऋत्विजांस सांगून पृथुराजास ह्मणाला– हे राजा, तूं मोक्षधर्म जाणणारा आहेस ह्याकरितां उत्तम प्रकारानें केलेले हे नव्याण्णव क्रतूच तुला आतां पुरे झाले आहेत ॥ ३२ ॥ हे राजा, तुझें कल्याण असो. तूं आणि इंद्र हे उभयतांहि सुकीर्तिमान् परमेश्वराचेच अवतार आहां. ह्मणून तूं त्या आत्मस्वरूपी इंद्रावर रोष करण्याविषयीं योग्य नाहींस.

जिघांसथ । यज्ञेनेष्टाः सर्वे सुरा यस्य तनवः स इंद्रो भवतां वधार्हो न भवति । यद्वस्माद्यज्ञोनामाऽयमिंद्रो भगवतस्ततुरवतारः । ततः सप्तम आकूत्यां रुचेर्यज्ञोऽभ्यजायत ॥ स यामाद्यैः सुरगणैरपात्स्वायंभुवांतरम् इत्युक्तत्वात् ॥ ३० ॥ अतो बलीयसाऽनेन सख्यमेव कर्तव्यमन्यथा भूयः पांखंडं स्रक्ष्यतीत्याशयेनाह । तदिदमिंद्रेणानुष्ठितं महदन्याय्यं पश्यत । किमित्यपेक्षायामाह । धर्मस्य व्यतिकरं विपर्ययं पाखंडपथम् ॥ ३१ ॥ तर्हि किमत्र युक्तमित्यत आह । पृथुकीर्तेरिति । एकेनोनं शतं यस्मिंस्तादृशः क्रतुः क्रतुप्रयोगः पृथोर्भूयात् । पृथुरिति पाठे एकोनशतं क्रतवो यस्य तादृशोऽपि महेंद्रात्पृथुकीर्तिर्भूयादित्यर्थः । तदेवमृत्विजः प्रत्युक्त्वा पृथुं प्रत्येवाह । अलमिति ॥ ३२ ॥

तदिदं पश्यत महद्धर्मव्यतिकरं द्विजाः ॥ इंद्रेणानुष्ठितं राज्ञः कर्मैतद्विजिघांसता ॥ ३१ ॥ पृथुकीर्तेः पृथोर्भूयात्तर्ह्येकोनशतक्रतुः ॥
[illegible] त क्रतुभिः स्विष्टैर्यद्भवान्मोक्षधर्मवित् ॥ ३२ ॥ नैवात्मने महेंद्राय रोषमाहर्तुमर्हसि ॥ उभावपि हि भद्रं त उत्तमश्लोकविग्रहौ ॥ ३३ ॥ माऽस्मिन्महाराज कृथाः स्म चिंतां निशामयास्मद्वच आदृतात्मा ॥ यद्ध्यायतो दैवहतं नु कर्तुं मनोऽतिरुष्टं विशते तमोऽधम् ॥ ३४ ॥ क्रतुर्विरमतामेष देवेषु दुरवग्रहः ॥ धर्मव्यतिकरो यत्र पाखंडैरिंद्रनिर्मितैः ॥ ३५ ॥ एभिरिंद्रोपसंसृष्टैः पाखंडैर्हारिभिर्जनम् ॥ ह्रियमाणं विचक्ष्वैनं यस्ते यज्ञध्रुगश्वमुट् ॥ ३६ ॥

आत्मनैवात्मने महेंद्राय रोषं कर्तुं नार्हसि । तत्र हेतुः । उभावपीति ॥ ३३ ॥ तथापि क्रतुसमाप्तिमेव ध्यायंतं प्रत्याह । अस्मिन्यज्ञविघ्ने चिंतां मा स्म कृथाः । यद्वस्माद्दैवहतं कार्यं कर्तुं ध्यायतो मनो नु निश्चितमतिरुष्टं सदंधं तमो मोहं विशति नतु शांतिं लभते ॥ ३४ ॥ अतएव तव क्रतुर्विरमतु । नन्विद्रः किं न निवार्यतेऽत आह । यतो देवेषु दुराग्रहो भवतीति । यत्र क्रतौ ॥ ३५ ॥ इंद्रदुराग्रहकृतमनर्थं पश्येत्याह । एभिरिंद्रेणोपसंसृष्टैरधिष्ठितैर्हारिभिश्चित्ताकर्षकैः । य इंद्रस्तेऽश्वं मुष्णातीति तथा यज्ञाय

॥ ३३ ॥ हे राजाधिराजा, ‘आरंभिलेलें यज्ञकर्म समाप्त कसें होईल’ ह्याबद्दल तूं कांहीं चिंता करूं नकोस. तूं आदरयुक्त होऊन आमचें वचन श्रवण कर. अरे जें कार्य दैवानेंच मोडून टाकिलेलें असते तें सिद्ध करण्याबद्दल मनुष्य विचार करूं लागला तर त्याचें मन मात्र अतिशय क्रोधाविष्ट होऊन घोर मोहांत पडतें, परंतु दैवानें विघडविलेलें कार्य कधींहि सिद्धीस जात नाहीं ॥ ३४ ॥ तस्मात् हे राजा, इंद्रानें निर्माण केलेल्या पाखंडांच्या योगानें जसा ह्या तुझ्या यज्ञामध्यें धर्माचा विनाश झाला आहे तसा पुढें अनुष्ठान बंद केलें नाहीं तर अणखीहि धर्माचा नाश होईल. यास्तव हा क्रतु आतां राहूंदे. हें तुला सांगण्याचें कारण इतकेंच कीं, देवांचे ठिकाणीं रजोगुणाचा उत्कर्ष असल्यामुळें अतिशय दुराग्रह आहे ह्मणून त्यांस सांगून उपयोग नाहीं ॥ ३५ ॥ हे राजा, जो तुझ्या यज्ञाचा द्रोह करणारा व अश्व चोरणारा इंद्र त्यानें,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

उत्पन्न केलेल्या ह्या मनोहर पाखंडांनीं या लोकाचें मन किती बरें आकर्षण केलें आहे पहा! ॥ ३६ ॥ हे पृथुराजा, शास्त्रप्रमाणें चाललेला लोकांचा धर्म, वेनराजाच्या दुराचरणानें लुप्त होऊं लागला ह्मणून त्याचें रक्षण करण्याकरितां त्या वेनाच्याच देहापासून सांप्रतकालीं ह्या भूमीवर विष्णूचा अवतार असा तूं उत्पन्न झाला आहेस ॥ ३७ ॥ प्रस्तुत हे प्रजापालका, प्रभो, तो तूं ह्या जगाच्या रक्षणाबद्दल विचार करून ज्या विश्वस्रष्ट्या भृग्वादि ऋषींनीं तुला वेनाच्या शरीराचें मंथन करून उत्पन्न केलें आहे, त्यांचा प्रजापालनरूप संकल्प पूर्ण कर आणि अधर्माला प्रसवणारी जी प्रचंड पाखंडमार्गरूप इंद्राची माया तिचें निवारण कर ॥ ३८ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, याप्रमाणें ब्रह्मदेवानें त्या पृथुराजाला उपदेश केला असतां, राजानें त्याप्रमाणें यज्ञ पुढें चालविण्याचा आग्रह सोडून इंद्राशीं सख्य करून संधि केला ॥ ३९ ॥ नंतर त्या पृथूच्या यज्ञामध्यें हविर्भाग देऊन जे वर देणारे देव संतुष्ट केले होते त्या देवांनीं, अवभृथस्नान केलेल्या त्या महापराक्रमी पृथुराजाला वर दिले ॥ ४० ॥ हे विदुरा,

---

द्रुह्यति तथा। तेन सृष्टैः ॥ ३६ ॥ ततो मम किमिति चेत्तत्राह। भवानिति द्वाभ्याम्। सांख्ययोगादिनानासिद्धांतानुरूपं धर्मं वेनस्यान्यायाल्लुप्तं परित्रातुं तद्देहाद्विष्णोः कलैव त्वमवतीर्णोऽसि ॥ ३७ ॥ हे प्रजापते अस्य विश्वस्योद्भवं विचार्य यैरुत्पादितोऽसि तेषां विश्वसृजां संकल्पं पिपीपृहि आर्षः प्रयोगः पूरयेत्यर्थः। प्रचंडो यः पाखंडमार्गः

भवान्परित्रातुमिहावतीर्णो धर्मं जनानां समयानुरूपम् ॥ वेनापचारादवलुप्तमद्य तद्देहतो विष्णुकलाऽसि वैन्य ॥ ३७ ॥ स त्वं विमृश्यास्य भवं प्रजापते संकल्पनं विश्वसृजां पिपीपृहि ॥ ऐंद्रीं च मायामुपधर्ममातरं प्रचंडपाखंडपथं प्रभो जहि ॥ ३८ ॥ मैत्रेय उवाच ॥ इत्थं स लोकगुरुणा समादिष्टो विशांपतिः ॥ तथाच कृत्वा वात्सल्यं मघोनापि च संदधे ॥ ३९ ॥ कृतावभृथस्नानाय पृथवे भूरिकर्मणे ॥ वरान्ददुस्ते वरदा ये तद्बर्हिषि तर्पिताः ॥ ४० ॥ विप्राः सत्याशिषस्तुष्टाः श्रद्धया लब्धदक्षिणाः ॥ आशिषो युयुजुः क्षत्तरादिराजाय सत्कृताः ॥ ४१ ॥ त्वयाहूता महाबाहो सर्व एव समागताः ॥ पूजिता दानमानाभ्यां पितृदेवर्षिमानवाः ॥ ४२ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे चतुर्थस्कंधे पृथुविजये एकोनविंशोऽध्यायः ॥ १९ ॥ ॥ मैत्रेय उवाच ॥ भगवानपि वैकुंठः साकं मघवता विभुः ॥ यज्ञैर्यज्ञपतिस्तुष्टो यज्ञभुक् तमभाषत ॥ १ ॥

सैवैंद्री मायोपधर्मजननी तां जहि ॥ ३८ ॥ तथाच कृत्वा यज्ञाग्रहं हित्वा वात्सल्यं स्नेहं कृत्वेंद्रेण सह संधानं च कृतवान् ॥ ३९ ॥ कृतमवभृथसंबंधि स्नानं येन स तस्मै ॥ ४० ॥ ४१ ॥ तुष्टानां वाक्यं त्वयेति ॥ ४२ ॥ ॥ इति श्रीमद्भागवते चतुर्थस्कंधे टीकायामेकोनविंशोऽध्यायः ॥ १९ ॥ ॥ विंशे तु विष्णुना साक्षात्पृथोर्यज्ञेऽनुशासनम् ॥ वरदानप्रसंगेन प्रीतिश्चान्योन्यमीर्यते ॥ १ ॥ मघवता साकमिंद्रेण सहवर्तमानः ॥ १ ॥

तसेच ज्यांचे आशीर्वाद यथार्थ आहेत व ज्यांस त्या राजाकडून श्रद्धापूर्वक दक्षिणा व सत्कार प्राप्त झाला आहे त्या ब्राह्मणांनीं संतुष्ट होऊन त्या आदिराजाला आशीर्वाद दिले ॥ ४१ ॥ ते ह्मणाले– हे महापराक्रमी राजा, तूं बोलाविलेले पितर, देव, ऋषि व मानव हे सर्व येथें आले व तूंहि दान आणि मान ह्यांच्या योगानें त्या सर्वांचें यथायोग्य पूजन केलें आहेस ॥ ४२ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील चतुर्थस्कंधामध्यें पृथुविजयकथनरूप हा एकुणिसावा अध्याय समाप्त झाला ॥ १९ ॥ आतां या विसाव्या अध्यायामध्यें, साक्षात् महाविष्णूनें पृथुराजाला धर्मोपदेश केला. नंतर वर देण्याच्या व घेण्याच्या प्रसंगानें विष्णु व पृथुराजा या उभयतांचें परस्पर भाषण होऊन परस्परांस आनंद झाला अशी कथा सांगितलेली आहे ॥ १ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, केवळ देवांनींच त्या पृथुराजाला वर दिले असें नाहीं तर वैकुंठाधि-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पति, यज्ञभोक्ता, यज्ञाचा अधिपति व सर्वव्यापक असा भगवान् विष्णूहि पृथुराजाच्या यज्ञानें इंद्रासहवर्तमान संतुष्ट होऊन, वर देण्याच्या इच्छेनें त्या राजाला ह्मणाला कीं,– ॥ १ ॥ श्रीभगवान् ह्मणाला– हे राजा, ज्याअर्थीं ह्या इंद्रानें तुझ्या शंभराव्या अश्वमेधाचा भंग केला आहे त्याअर्थीं आतां लज्जित होऊन 'तुह्मी दोघेहि माझेच अवतार आहां ह्मणून' आपल्याच स्वरूपभूत अशा तुझ्याजवळ हा क्षमा मागत आहे तर तूं ह्याच्या अपराधांची क्षमा करण्यास योग्य आहेस ॥ २ ॥ हे मनुष्यदेवा, ज्याअर्थीं शरीर हा आत्मा नव्हे त्याअर्थीं या लोकीं पुरुषांमध्यें श्रेष्ठ जे विचारशील साधु आहेत ते कोणत्याही प्राणिमात्रांचा विनाकारण द्रोह करीत नाहींत ॥ ३ ॥ जर तुझ्यासारखे विवेकी पुरुष देवाच्या (माझ्या) मायेनें देहादिकांचेठिकाणीं अभिमान धरून द्रोहादिक करण्यास प्रवृत्त होतील तर त्यांना बहुत कालपर्यंत केलेल्या वृद्धांच्या सेवेचें कांहींच फळ न मिळतां केवळ श्रमच झाला असें समजलें पाहिजे ॥ ४ ॥ ह्मणून हे राजा, अज्ञान, विषयवासना व कर्में यांच्या योगानें हा देह उत्पन्न झाला आहे असें

आत्मानं त्वां क्षमां कारयतोऽमुष्य त्वमपि क्षंतुमर्हसि ॥ २ ॥ यर्हि यस्मात्कलेवरमात्मा न भवत्यतस्तदभिमानेन भूतानि नाभिद्रुह्यंति ॥ ३ ॥ ४ ॥ अविद्या स्वरूपाज्ञानं ततः कामस्ततः कर्म तैरारब्ध इति विद्वानतएव प्रतिबुद्ध आत्मज्ञोऽस्मिन्नैवानुषज्जते ॥ ५ ॥ तथापि पुत्रादिममत्वेन भूतद्रोहेण च संगो भवेत्तत्राह । असंसक्त इति ॥ ६॥ प्रतिबोधक्रमं विवृण्वन्देहेऽनुषं-

श्रीभगवानुवाच ॥ एष तेऽकारषीद्भंगं हयमेधशतस्य ह ॥ क्षमापयत आत्मानममुष्य क्षंतुमर्हसि ॥ २ ॥ सुधियः साधवो लोके नरदेव नरोत्तमाः ॥ नाभिद्रुह्यंति भूतेभ्यो यर्हि नात्मा कलेवरम् ॥ ३ ॥ पुरुषा यदि मुह्यंति त्वादृशा देवमायया ॥ श्रम एव परं जातो दीर्घया वृद्धसेवया ॥ ४ ॥ अतः कायमिमं विद्वानविद्याकामकर्मभिः ॥ आरब्ध इति नैवास्मिन्प्रतिबुद्धोऽनुषज्जते ॥ ५ ॥ असंसक्तः शरीरेऽस्मिन्नमुनोत्पादिते गृहे ॥ अपत्ये द्रविणे वापि कः कुर्यान्ममतां बुधः ॥ ६ ॥ एकः शुद्धः स्वयंज्योतिर्निर्गुणोऽसौ गुणाश्रयः ॥ सर्वगोऽनावृतः साक्षी निरात्मात्मात्मनः परः ॥ ७ ॥ य एवं संतमात्मानमात्मस्थं वेद पूरुषः ॥ नाज्यते प्रकृतिस्थोऽपि तद्गुणैः स मयि स्थितः ॥ ८ ॥

गाभावमाह । एक इति द्वाभ्याम् । असावात्मा आत्मनो देहात्परो भिन्नः तत्र नवधा वैलक्षण्येन भेदं साधयति । एक इति नवभिः पदैः । देहो हि बाल्युवादिभेदादनेको मलिनश्च जडश्च सगुणश्च स्वकारणभूतगुणाश्रितश्च परिच्छिन्नश्च गृहादिभिरावृतश्च दृश्यश्च सात्मा च । आत्मा तु नैवमतो भिन्नः ॥७॥ आत्मस्थं स्वस्मिन् स्थितम् । प्रकृतिस्थोऽपि देहस्थोऽपि तद्विकारैर्न

जाणणारा ज्ञानी पुरुष, ह्या देहाचेठिकाणीं कधींहि आसक्त होत नाहीं ॥ ५ ॥ जो ज्ञानी पुरुष, या शरीरावर देखील प्रेम ठेवीत नाहीं तो ह्या शरीरानें निर्माण केलेल्या घरावर, मुलांबाळांवर किंवा द्रव्यावर ममता करील काय? करणारच नाहीं ॥ ६ ॥ तो देहाहून निराळा आत्मा तरी कोणता? कीं ज्याच्या ज्ञानानें देहाच्याठिकाणीं आसक्त होत नाहीं तें दर्शवितात– आत्मा देहाहून अगदीं भिन्न आहे· कारण, तो एक शुद्ध, स्वप्रकाश, निर्गुण, गुणांचो आधार, सर्वव्यापक, आवरणरहित, व दुसऱ्या आधारभूत आत्म्यानें रहित असा आहे आणि देह अनेक प्रकारचा, मलिन, जड, सगुण, गुणांच्या आश्रयानें राहणारा, परिच्छिन्न (साडेतीन हातांचा वगैरे) वस्त्रादिकांनीं आच्छादित, दृश्य व चेतनवलनादि करणाऱ्या प्रेरक आत्म्यानें युक्त आहे ॥ ७ ॥ याप्रकारें आपलेठिकाणीं असणाऱ्या आत्म्याला जो पुरुष जाणतो तो जरी देहामध्यें स्थित असला तथापि त्या देहाच्या सुखदुःखादि विकारांनीं लिप्त होत नाहीं· कारण, तो माझ्या स्वरूपीं (ब्रह्माचेठिकाणीं) मनाचा लय लागलेला असतो ॥ ८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हे राजा, जो पुरुष, निष्कामबुद्धीनें श्रद्धायुक्त होत्साता स्वधर्माच्या योगानें माझें नित्य आराधन करितो त्याचें मन हळू हळू प्रसन्न (शुद्ध) होत जातें ॥ ९ ॥ नंतर मन शुद्ध झालें ह्मणजे तो पुरुष, विषयांपासून विरक्त होऊन उत्तम ज्ञानसंपन्न होत्साता शांतिसुखाला पावतो; ह्मणजे–'कोणतीहि क्रिया किंवा व्यापार न करितां जें राहणें' अशा प्रकारच्या माझ्या सच्चिदानंदरूपी ब्रह्मपदास पावतो ॥ १० ॥ देह, ज्ञानेंद्रियें, कर्मेंद्रियें व मन ह्यांस पाहणारा असूनहि त्यांचेठिकाणीं उदासीन असल्यासारख्या निर्विकारी ह्या आत्म्याला जो जाणतो तो ब्रह्मस्वरूपास पावतो ॥ ११ ॥ हे राजा, पंचमहाभूतें, ज्ञानेंद्रियें, कर्मेंद्रियें, त्यांच्या अभिमानी देवता व चैतन्याभासरूप अंतःकरण ह्यांनीं युक्त व आत्म्याहून भिन्न अशा लिंगदेहालाच जन्ममरण, सुखदुःख इत्यादिरूप संसार लागू आहे, आत्म्याला नाहीं. असें जाणून माझ्याठिकाणीं दृढ प्रेम

लिप्यते। यतः समयि ब्रह्मणि स्थितः ॥ ८ ॥ इयमवस्था कस्योत्पद्यत इत्यपेक्षायामाह। यः स्वधर्मेणेति चतुर्भिः ॥९॥ भवतु मनः प्रसन्नं ततः किं तत्राह। यर्हि विशदाशयः प्रसन्नमनास्तदा परित्यक्तगुणः सन्सम्यग्दर्शनो भूत्वा शांतिमश्नुते। शांतिमेवाह। मम सम्यगौदासीन्येनावस्थानमेव ब्रह्म तदेव कैवल्यमश्नुते ॥ १० ॥ सम्यग्दर्शनमेवाह। उदासीनमेवात्मानं द्रव्यज्ञानक्रियात्मनां देहज्ञानकर्मेंद्रियमनसामध्यक्षमिव स्थितमात्मानं यो वेद ॥ ११ ॥ संसारिणः कथं कूटस्थत्वमत आह। भिन्नस्य लिंगस्य देहस्य गुणप्रवाहः

यः स्वधर्मेण मां नित्यं निराशीः श्रद्धयाऽन्वितः ॥ भजते शनकैस्तस्य मनो राजन्प्रसीदति ॥ ९ ॥ परित्यक्तगुणः सम्यग्दर्शनो विशदाशयः ॥ शांतिं मे समवस्थानं ब्रह्म कैवल्यमश्नुते ॥ १० ॥ उदासीनमिवाध्यक्षं द्रव्यज्ञानक्रियात्मनाम् ॥ कूटस्थमिममात्मानं यो वेदाप्नोति शोभनम् ॥ ११ ॥ भिन्नस्य लिंगस्य गुणप्रवाहो द्रव्यक्रियाकारकचेतनात्मनः ॥ दृष्टासु संपत्सु विपत्सु सूरयो न विक्रियंते मयि बद्धसौहृदाः ॥ १२ ॥ समः समानोत्तममध्यमाधमः सुखे च दुःखे च जितेंद्रियाशयः ॥ मयोपक्लृप्ताखिललोकसंयुतो विधत्स्व वीराखिललोकरक्षणम् ॥ १३ ॥ श्रेयः प्रजापालनमेव राज्ञो यत्सांपराये सुकृतात्षष्ठमंशम् ॥ हर्ताऽन्यथा हृतपुण्यः प्रजानामरक्षिता करहारोऽघमत्ति ॥ १४ ॥

संसारः। भिन्नत्वे हेतुः द्रव्याद्यात्मकस्य। तत्र चेतना चिदाभासः अतो दृष्टासु प्राप्तासु हर्षशोकादिभिर्न विक्रियंते ॥ १२ ॥ त्वं च सूरिरतः सुखे दुःखे च समः सन्समाना उत्तममध्यमाधमा यस्य। जितानींद्रियाण्याशयश्च येन। स त्वमखिललोकरक्षणं विधत्स्व। कथमेकेन मया रक्षणं कर्तुं शक्यं तत्राह। मयेश्वरेणोपक्लृप्ताः संपादिता येऽखिला लोका अमात्यादयस्तैः संयुतः ॥ १३ ॥ ननु रक्षणं दंडादिसापेक्षमतस्तपोऽन्यद्वा पुण्यं करिष्यामीति चेदत आह। श्रेय इति। यद्यस्मात्सांपराये परलोके प्रजाभिः कृतात्सुकृतात्षष्ठमंशं हर्ता हरति। अरक्षणे दोषमाह। अन्यथा प्रजाभिर्हृतं पुण्यं यस्य स प्रजानामघमत्ति पापं भुंक्ते। अन्यथेत्यस्य विवरणम्। करहारः सन्न रक्षिता चेत् ॥१४॥

ठेवणारे विचारी पुरुष, संपत्ति किंवा विपत्ति प्राप्त झाल्या असतांहि हर्षशोकादिक विकार पावत नाहींत ॥ १२ ॥ यास्तव हे वीरा, तूं, सुखें आणि दुःख हीं सारखींच आहेत असें मानून उत्तम, मध्यम व अधम अशा त्रिविध जनांस समदृष्टि ठेव आणि इंद्रियें व मन यांचा जय करून मी ईश्वरानेंच प्राप्त करून दिलेल्या अमात्यादि सर्व लोकांनीं युक्त होत्साता सर्व लोकांचें रक्षण कर ॥ १३ ॥ हे राजा, प्रजापालन करणें हेंच राजाला कल्याणकारक आहे. कारण, प्रजारक्षण करणाऱ्या राजाला, परलोकाचेठिकाणीं प्रजांनीं केलेल्या पुण्याचा सहावा भाग प्राप्त होतो. आणि ह्याच्या विरुद्ध जर तो वागूं लागला ह्मणजे प्रजांचें रक्षण न करितां त्यांच्यापासून कर मात्र घेऊं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लागला तर, प्रजा त्याचें पुण्य हरण करितात व प्रजांनीं केलेल्या पापांचीं फळें त्याला भोगावीं लागतात ॥ १४ ॥ ह्याकरितां थोर थोर ब्राह्मणांना अनुमत व परंपराप्राप्त अशा धर्माचें मुख्यत्वेंकरून पालन करणारा व अर्थकामादिकांचेठिकाणीं आसक्त नसणारा, असा तूं, पृथिवीचें रक्षण करूं लागलास ह्मणजे सर्व लोक तुझ्यावर प्रीति करितील ॥ १५ ॥ हे नरश्रेष्ठा, तूं मजपासून कांहींतरी वर मागून घे. तुझे शांत्यादिक गुण व निर्मत्सरत्वादिक स्वभाव पाहून मी तुला वश झालों आहें. सुखदुःखादिकांचे-ठिकाणीं समबुद्धि धारण करणाऱ्या पुरुषास मी जसा सुलभ आहें तसा यज्ञ, तपश्चर्या आणि योगाभ्यास यांच्या प्रयोगेंकरूनसुद्धां सुलभ नाहीं ॥ १६ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, सर्व लोकांमध्यें ज्याची आज्ञा चालत आहे व सर्व लोकांचा गुरु असा भगवंतानें त्या जगद्विजयी पृथुराजाला असा उपदेश केला असतां त्यानेंहि त्या श्रीहरीची आज्ञा शिरसा मान्य केली ॥ १७ ॥ आणि स्वतःच्या अश्वहरणरूप कर्मानें लज्जित होऊन क्षमा मागण्याकरितां पायां पडणाऱ्या इंद्राला त्या पृथुराजानें प्रेमपूर्वक

एवं च मोक्षोऽप्यनायासेन भविष्यतीत्याह । द्विजाग्र्याणामनुमतश्चासावनुवृत्तश्च परंपराप्राप्तो यो धर्मः स एव प्रधानमर्थकामौ तु प्रासंगिकौ यस्य अन्यतमोऽतिशये-नान्यः । धर्मादिष्वनासक्त इत्यर्थः । ऐकपद्यपाठे धर्मप्रधानावन्यतमावर्थकामौ यस्येत्यर्थः । अस्याः पृथिव्या अविता सन्नल्पेन कालेन गृहागतान्सनकादीन्द्रक्ष्यसि । अनुरक्तो लोको यस्मिन्सः ॥ १५ ॥ मत् मत्तः सकाशात्किंचिद्वरं वृणीष्व । गुणाः शमादयः शीलं निर्मत्सरत्वा दिस्वभावस्तैरहं यंत्रितो वशीकृतः । तद्रहितैस्तु मखादिभिर्नाहं सुलभः ।

एवं द्विजाग्र्यानुमतानुवृत्तधर्मप्रधानोऽन्यतमोऽविताऽस्याः ॥ ह्रस्वेन कालेन गृहोपयातान्द्रष्टासि सिद्धाननुरक्तलोकः ॥ १५ ॥ वरं च मत्कंचन मानवेंद्र वृणीष्व तेऽहं गुणशीलयंत्रितः ॥ नाहं मखैर्वै सुलभस्तपोभिर्योगेन वा यत्समचित्तवर्ती ॥ १६ ॥ मैत्रेय उवाच ॥ स इत्थं लोकगुरुणा विष्वक्सेनेन विश्वजित् ॥ अनुशासित आदेशं शिरसा जगृहे हरेः ॥ १७ ॥ स्पृशंतं पादयोः प्रेम्णा व्रीडितं स्वेन कर्मणा ॥ शतक्रतुं परिष्वज्य विद्वेषं विससर्ज ह ॥ १८ ॥ भगवानथ विश्वात्मा पृथुनोपहृतार्हणः ॥ समुज्जिहानया भक्त्या गृहीतचरणांबुजः ॥ १९ ॥ प्रस्थानाभिमुखोऽप्येनमनुग्रहविलंबितः ॥ पश्यन्पद्मपलाशाक्षो न प्रतस्थे सुहृत्सताम् ॥ २० ॥ स आदिराजो रचितांजलिर्हरिं विलोकितुं नाशकदश्रुलोचनः ॥ न किंचनोवाच सबाष्पविक्लवो हृदोपगुह्यामुमधादवस्थितः ॥ २१ ॥

यतः समं चित्तं येषां तेष्वेव वर्तितुं शीलं यस्य सोऽहम् ॥ १६ ॥ १७ ॥ क्षमापयितुं पादयोः स्पृशंतम् । स्वेन कर्मणाऽश्वापहरणेन व्रीडितम् । प्रेम्णा परिष्वज्य ॥ १८ ॥ भगवान्प्रस्थानाभिमुखोऽप्यनुग्रहेण विलंबितः सन्न प्रतस्थे प्रयाणं न कृतवानिति द्वयोरन्वयः । कथंभूतः । उपहृतमर्पितमर्हणं यस्मै । समुज्जिहानया समुद्गच्छंत्या वर्धमा-नया भक्त्या गृहीते चरणांबुजे यस्य ॥ १९ ॥ पद्मपलाशवदक्षिणी यस्य तथाभूतः सन् एनं पृथुं पश्यन् ॥ २० ॥ भगवतस्तत्कृपातिरेकमुक्त्वा तस्य भक्त्युद्रेकमाह ।

आलिंगन देऊन द्वेष अगदीं सोडून दिला ॥ १८ ॥ नंतर पृथुराजानें क्षणोक्षणीं वृद्धिंगत होणाऱ्या भक्तीच्या योगेंकरून ज्याचें चरणकमल ग्रहण केलें आहे व ज्याला पूजा अर्पण केली आहे असा सज्जनाचा मित्र, जगदात्मा, कमलपत्राक्ष तो षड्गुणैश्वर्यसंपन्न विष्णूहि तेथून निघून वैकुंठास जाण्याविषयीं उद्युक्त झाला परंतु त्या राजा-वर कांहींतरी अनुग्रह करण्यासाठीं जाण्याबद्दल विलंब करीत होत्साता त्याच्याकडे पहात कांहींवेळ तसाच थांबला ॥ १९ ॥ २० ॥ त्यावेळीं हात जोडून उभा राहिलेला तो पृथुराजाहि, आपल्यावर देवाची मोठी कृपा आहे असें पाहून अतिशय प्रेमाच्या योगानें आनंदाश्रूंनीं भरून आलेल्या नेत्रांनीं श्रीहरीला अवलोकन करण्यास समर्थ झाला नाहीं व सद्गदित कंठ झाल्यामुळें कांहीं भाषणहि करण्यास समर्थ झाला नाहीं. शेवटीं तो स्तब्ध उभा राहिला आणि त्यानें त्या हरीला हृदयाच्या योगानें दृढ आलिंगन

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करून हृदयामध्यें त्याचें धारण केलें ॥ २१ ॥ नंतर कांहीं वेळानें तो राजा आपल्या आश्रुधारा पुसून टाकून पाहण्याविषयीं तृप्ति न पावणाऱ्या आपल्या दृष्टींना विषयभूत पायांनें भूमीला स्पर्श करणारा, व गरुडाच्या स्कंधावर आपल्या हस्ताचा अग्रभाग (चंवगा) ठेऊन राहिलेल्या अशा पुरुषोत्तमाला अवलोकन करीत करीत ह्मणाला कीं, ॥ २२ ॥ पृथु ह्मणाला– हे समर्था ईश्वरा, ज्ञानवान् पुरुष, वरदात्या ब्रह्मादिकांनांहि इच्छित वर देणाऱ्या तुजपासून, देहाभिमानी पुरुषांनीं उपभोग घेण्यास योग्य असे वर कसा वरें मागून घेईल? घेणारच नाहीं. कारण, हे मोक्षाधिपते, नरकामध्यें वास करणाऱ्या प्राण्यांनासुद्धां जे विषयभोग प्राप्त होतात त्यांनाच मी तुजपासून मागून

स इति द्वाभ्याम् । बाष्पविक्लवत्वेन तूष्णीमवस्थितः सन्नमुं हरिं हृदोपगुह्याधाद्धृतवान् ॥ २१ ॥ अतृप्तयोर्दृशोर्गोचरं विषयभूतम् । पदा क्षितिं स्पृशंतमिति । अयं भावः । न खलु देवाः पदा भुवं स्पृशंत्यतः कृपापरवशो नूनं हरिरात्मानं विस्मृतवानिवेति । अतएव स्खलनपरिहारायैव गरुडस्योन्नते स्कंधे विन्यस्तं हस्ताग्रं येन तम् ॥ २२ ॥ वरं वृणीष्वेति यदुक्तं तदसहमान आह । हे विभो वरदानां ब्रह्मादीनामीश्वराद्वरप्रदात्त्वत्त्वत्तः सकाशाद्बुधः कथं वरान्वृणीते । कीदृशान् । गुणैर्विक्रियत इति गुणविक्रियोऽहंकारः स एवात्मा येषां तेषां ब्रह्मादीनां संबंधिनः देहाभिमानिनां भोग्यानिति वा । तथा चेद्बुध एव न भवतीत्यर्थः । जुगुप्सितत्वादपीत्याह । ये इति बुध एवाहमपि न वृणे इति

अथावमृज्याश्रुकला विलोकयन्नतृप्तदृग्गोचरमाह पूरुषम् ॥ पदा स्पृशंतं क्षितिमंस उन्नते विन्यस्तहस्ताग्रमुरंगविद्विषः ॥ २२ ॥ पृथुरुवाच ॥ वरान्विभो त्वद्वरदेश्वराद्बुधः कथं वृणीते गुणविक्रियात्मनाम् ॥ ये नारकाणामपि संति देहिनां तानीश कैवल्यपते वृणे न च ॥ २३ ॥ न कामये नाथ तदप्यहं क्वचिन्न यत्र युष्मच्चरणांबुजासवः ॥ महत्तमांतर्हृदयान्मुखच्युतो विधत्स्व कर्णायुतमेष मे वरः ॥ २४ ॥ स उत्तमश्लोकमहन्मुखच्युतो भवत्पदांभोजसुधाकणानिलः ॥ स्मृतिं पुनर्विस्मृततत्त्ववर्त्मनां कुयोगिनां नो वितरत्यलं वरैः ॥ २५ ॥

समुच्चयाय चकारः ॥ २३ ॥ कैवल्यपत इति संबोधनात्कैवल्यं वरिष्यतीति माशंकीरित्याह । नेति । महत्तमानामंतर्हृदयान्मुखद्वारेण निर्गतो भवत्पदांभोजमकरंदो यशःश्रवणादिसुखं यत्र नास्ति तादृशं चेत्कैवल्यं तर्हिं तत्कचित्कदाचिदपि न कामये तर्हिं किं कामयसे तदाह । यशःश्रवणाय कर्णानामयुतं विधत्स्व । ननु कोऽप्येवं न वृतवान् किमन्यचिंतयेत्याह । ममतु एष एव वरः ॥ २४ ॥ ननु तर्हिं कैवल्याभावे रागद्वेषाद्याकुलानां भक्तिसुखमपि न स्यादित्याशंक्याह । स इति । भवत्पदांभोजसुधायाः कणो लेशस्तत्संबंधी योऽनिलः स एव दूरादपि किंचिद्यशःश्रवणमात्रमित्यर्थः। विस्मृतं तत्त्ववर्त्म यैः कुयोगिभिस्तेषामपि पुनः स्मृतिमात्मज्ञानं वितरति अतो न खलु भक्तानां रागादिसंभवोऽतो

घेत नाहीं ॥ २३ ॥ हे नाथा, अत्यंत श्रेष्ठ साधूंच्या हृदयांतून मुखद्वारा बाहेर पडलेला तुझा चरणकमलाचा मकरंद (तुझी कीर्ति ऐकण्यास) जेथें मिळत नाहीं त्या मोक्षपदाला देखील मी तुझ्यापासून मागून घेण्याची इच्छा करीत नाहीं. यास्तव तुझ्या यशाच्या श्रवणासाठीं मला दहा हजार कान दे हाच मला वर पाहिजे ॥ २४ ॥ कारण, हे पुण्यकीर्ते ईश्वरा, साधूंच्या मुखांतून बाहेर पडलेला तुझ्या चरणकमलसंबंधी अमृतकणांचा जो वारा, तो तत्त्वमार्गाचें विस्मरण पडलेल्या भ्रष्टयोग्यांना देखील पुनः आत्मज्ञानाची स्फूर्ति करून देतो. यास्तव आह्मां सारग्राही भक्तांना भक्तीवांचून दुसऱ्या वरांचें प्रयोजन नाहीं. भक्तीमध्येंच मोक्षासुद्धां सर्व सुखें आहेत ॥ २५ ॥

---

१ देव कधींहि आपले पाय भूमीला लावीत नाहींत परंतु भगवंताला ह्या वेळीं भक्तांच्या प्रेमामुळें देहभान राहिलें नाहीं. असें सुचविण्यासाठीं तसें वर्णन केलें आहे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

यास्तव हे मंगलकीर्ते, सर्व पुरुषार्थ आपणास प्राप्त व्हावे ह्या इच्छेनें प्रत्यक्ष लक्ष्मीनेंहि ज्या तुझ्या यशःश्रवणाचाच उत्तमप्रकारें वर मागून घेतला आहे, तें तुझें कल्याणकारक यश, सत्समागम झाल्यामुळें जो सहजीं एकवार तरी श्रवण करितो, तो पुरुष जर गुणज्ञ असेल तर त्या यशाच्या श्रवणाविषयीं एक पशूवांचून दुसरा कोण बरें कंटाळेल? कोणीही कंटाळणार नाहीं ॥ २६ ॥ यास्तव लक्ष्मीप्रमाणें तुझ्या भजनाविषयीं उत्सुक होऊन, सर्व गुणांचा आश्रय व सर्व पुरुषांमध्यें श्रेष्ठ अशा तुझेंच मी सेवन करीन. परंतु मला अशी शंका वाटते कीं, एकाच पतीविषयीं स्पर्धा करणाऱ्या व तुझ्या एकस्याच्याच चरणाचेठिकाणीं एकसारखा मनाचा लय लावून ठेवणाऱ्या आह्मां दोघांचा (लक्ष्मीचा व माझा) 'जसा पूर्वी यज्ञामध्यें इंद्राचा व माझा कलह झाला त्याप्रमाणें' कलह तर होणार नाहींना! ॥ २७ ॥ हे जगन्नाथा, त्या जगन्मातेशीं

नोऽस्माकं सारग्राहिणामन्यैर्वरैरलम् । भक्तावेव मोक्षादिसर्वसुखांतर्भावादिति भावः ॥ २५ ॥ ननु भक्तिर्मुक्तिफलैवातः फलं विहाय साधने भवतः कोऽयमाग्रह इत्याशंक्याह । हे सुश्रवः मंगलकीर्ते ते शिवं यशः सतां संगमे यः सकृदपि यदृच्छयाप्युपशृणोति गुणज्ञश्चेत्स पशुंविनाऽन्यः कथं विरमेत् । गुणातिशयं सूचयति । श्रीर्यद्यश एव प्रकर्षेण वृतवती गुणानां सर्वपुरुषार्थानां संग्रहः स्वस्मिन्समाहारस्तदिच्छया ॥ २६ ॥ अतो लक्ष्मीरिवान्यवरत्यागेन त्वामेवाहं भज इत्याह । अथेति । लालस उत्सुकः सन् कर्मणि क्रियमाणे यथेंद्रेण सह कलिरेवं भक्तावपि किं लक्ष्म्या सह कलिः स्यादिति वितर्कयति । एकस्मिन्पत्यौ स्पर्धमानयोरावयोरपि किं कलिर्न स्यादिति काक्वा वितर्कः । ननु पर्यायेण

यशः शिवं सुश्रव आर्यसंगमे यदृच्छया चोपशृणोति ते सकृत् ॥ कथं गुणज्ञो विरमेद्विना पशुं श्रीर्यत्प्रवव्रे गुणसंग्रहेच्छया
॥ २६ ॥ अथाभजे त्वाखिलपूरुषोत्तमं गुणालयं पद्मकरेव लालसः ॥ अप्यावयोरेकपतिस्पृधोः कलिर्न स्यात्कृतत्वच्चरणैकतानयोः
॥ २७ ॥ जगज्जनन्यां जगदीश वैशसं स्यादेव यत्कर्मणि नः समीहितम् ॥ करोति फल्ग्वप्युरु दीनवत्सलः स्व एव धिष्ण्येऽभिरतस्य किं तया ॥ २८ ॥ भजंत्यथ त्वामतएव साधवो व्युदस्तमायागुणविभ्रमोदयम् ॥ भवत्पदानुस्मरणादृते सतां निमित्तमन्यद्भगवन्न विद्महे ॥ २९ ॥

सेवायां न स्यात् । नैवम् । कृतस्त्वच्चरणयोरेवैकस्तानो मनोविस्तारो याभ्यां तयोः ॥ २७ ॥ भवतु वा कलिस्तथापि भजेयमेवेत्याह । जगज्जनन्यां वैशसं विरोधः स्यादेवं तत्र हेतुर्यस्याः कर्मणि नः समीहितमिच्छा भवति तथापींद्रविरोधे मत्पक्षपातवदत्रापि तव पक्षपात एव स्यादित्याह । फल्गु तुच्छमप्युरु बहु करोषि यतो दीनेषु वत्सलो दयावान् स्वे स्वरूप एव रतस्य तया किं प्रयोजनम् । तां नाद्रियस इत्यर्थः ॥ २८ ॥ यतस्त्वं दीनवत्सलोऽतएव साधवो निष्कामा अथ ज्ञानानंतरमपि त्वां भजंति । कथंभूतम् । मायागुणानां विभ्रमो विलासस्तस्योदयः कार्यं स निरस्तो यस्मिंस्तम् । ते किमर्थं भजंति तत्राह । भवत्पदानुस्मरणाद्विनान्यत्तेषां निमित्तं फलं न विद्मः ॥ २९ ॥

(लक्ष्मीशीं) माझें वैमनस्य येणारच. कारण, तुझी सेवा हें जें तिचें कर्म त्याविषयीं आह्मांला इच्छा झाली आहे. परंतु तूं दीनवत्सल असल्यामुळें भक्ताचें सेवादिक कर्म अतिस्वल्प असलें तरी तें तूं पुष्कळ असें मानून घेतोस. यावरून जसें इंद्राचें व माझें भांडण चाललें असतां तूं माझाच पक्ष स्वीकारिलास त्याप्रमाणें लक्ष्मीचा व माझा विरोध सुरू झाला तरी तूं माझाच पक्ष स्वीकारिशील. कारण, स्वस्वरूपींच रममाण असलेल्या तुला लक्ष्मीची काय गरज आहे? ह्मणजे तूं लक्ष्मीचा देखील आदर करीत नाहींस ॥ २८ ॥ आणि ह्मणूनच निरिच्छ असे साधु, ज्ञान प्राप्त झाल्यावरहि, मायागुणांच्या विलासांचें कार्य जेथें नाहींसें झालें आहे अशा तुझीच भक्ति करीत

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अनुतात. त्यांना तुझ्या चरणाच्या सतत स्मरणाशिवाय दुसरें कांहीं फळ असेल असें आह्मांला तर वाटत नाहीं ॥ २९ ॥ हे परमेश्वरा, तूं स्वतांचे भजन करणाऱ्या मला
'वर माग' असें जें ह्मणतोस ती तुझी वाणी जगाला मोह करणारी आहे असें मला वाटतें. हे देवा, ही वाणी तर काय परंतु तुझी वेदरूप वाणीहि लोकांना मोहित करून
बद्ध करित्ये. जर तुझ्या वेदवाणीरूप दावणीनें हा जन बद्ध झालेला नाहीं ह्मणावें, तर हा वारंवार फलप्राप्तीच्या अभिलाषांनीं मोहित होऊन कर्में कशीं करितो? मुळींच
करता नसता ॥ ३० ॥ हे ईश्वरा, हा मूर्खजन ज्याअर्थीं पुत्र स्त्री इत्यादिकांची इच्छा धरितो त्याअर्थीं तुझ्या मायेनें ह्याला सत्यस्वरूपी अशा तुजपासून निराळा काढिला
आहे, यांत संशय नाहीं. वास्तव माझें ह्मणणें इतकेंच आहे कीं, मायेनें ज्याला फसविलें आहे त्याला तूं अणखी फसवूं नकोस. तर ज्याप्रमाणें पिता, आपणच होऊन
आपल्या पुत्राचें हित करितो त्याप्रमाणें तूंहि आमचें हित करण्याविषयीं समर्थ आहेस ॥ ३१ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, याप्रमाणें त्या आदिराज पृथूनें जगद्द्रष्ट्या

वरैः प्रलोभनं च कृपालोस्तवानुचितमित्याशयेनाह । मन्य इति । नु अहो ते वाचा तंत्या यदि जनो यमसितोऽबद्धः स्यात्तर्हि पुनः पुनः फलैर्मोहितः सन्कथं कर्मकरोति ॥ ३० ॥
त्वन्मायया खंडितस्य त्वया पुनः खंडनं न कर्तव्यं किंतु हितं चेष्टितव्यमित्याह । त्वन्मायया ऋतादात्मनस्त्वत्तः खंडितः पृथक्कृतो यद्यतोऽन्यत्पुत्रादिकमाशास्ते अतः

मन्ये गिरं ते जगतां विमोहिनीं वरं वृणीष्वेति भजंतमात्थ यत् ॥ वाचा नु तंत्या यदि ते जनो ऽसितः कथं पुनः कर्म करोति मोहितः
॥ ३० ॥ त्वन्माययाऽद्धा जन ईश खंडितो यदन्यदाशास्त ऋतात्मनो बुधः ॥ यथा चरेद्बालहितं पिता स्वयं तथा त्वमेवार्हसि नः
समीहितुम् ॥ ३१ ॥ मैत्रेय उवाच ॥ इत्यादिराजेन नुतः स विश्वदृक्तमाह राजन्मयि भक्तिरस्तु ते ॥ दिष्ट्येदृशी धीर्मयि ते कृता यया
मायां मदीयां तरति स्म दुस्त्यजाम् ॥ ३२ ॥ तत्त्वं कुरु मया दिष्टमप्रमत्तः प्रजापते ॥ मदादेशकरो लोकः सर्वत्राप्नोति शोभनम्
॥ ३३ ॥ मैत्रेय उवाच ॥ इति वैन्यस्य राजर्षेः प्रतिनंद्यार्थवद्वचः ॥ पूजितोऽनुगृहीत्वैनं गंतुं चक्रेऽच्युतो मतिम् ॥ ३४ ॥ देव-
र्षिपितृगंधर्वसिद्धचारणपन्नगाः ॥ किन्नराप्सरसो मर्त्याः खगा भूतान्यनेकशः ॥ ३५ ॥ यज्ञेश्वरधिया राज्ञा वाग्वित्तांजलिभक्तितः ॥
सभाजिता ययुः सर्वे वैकुंठानुगतास्ततः ॥ ३६ ॥

स्वयमविज्ञापित एव हितं चेष्टितुमर्हसि ॥ ३१ ॥ ३२ ॥ ३३ ॥ ३४ ॥ ३५ ॥ वाग्वित्तांजलिभिर्भक्तितः पूजिताः संतः । वैकुंठानुगताः पार्षदाश्च ॥ ३६ ॥

परमेश्वराची स्तुति केली असतां, तो त्याला ह्मणाला– हे राजा, माझेठिकाणीं तुला भक्ति असो. तूं माझ्याविषयीं अशी प्रेमयुक्त बुद्धि धारण केलीस हें फार चांगलें झालें-
ज्या बुद्धीच्या योगेंकरून दुस्तर अशाहि माझ्या मायेला जन तरून जातो ॥ ३२ ॥ तस्मात् हे प्रजापते, तूं विषयांचेठिकाणीं आसक्त न होतां मी सांगितलेल्या राजनीती-
प्रमाणें प्रजेचें पालन कर. माझ्या आज्ञेप्रमाणें वर्तणूक करणारा लोक, यालोकीं व परलोकीं सुख पावतो ॥ ३३ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, याप्रमाणें पृथुराजानें यथार्थ
वचनांनीं सत्कार केलेल्या त्या अच्युत भगवंतानें, वैन्य पृथुराजाच्या सर्वांना सुखकारक अशा पूर्वीं सांगितलेल्या वचनाचा सत्कार करून व त्याच्यावर अनुग्रह करून
स्वस्थानीं परत जाण्याचा विचार योजिला ॥ ३४ ॥ तेव्हां देव, ऋषि, पितर, गंधर्व, सिद्ध, चारण, सर्प, किन्नर, अप्सरा, मनुष्य, पक्षी, अनेक प्रकारचे प्राणी ॥ ३५ ॥
आणि विष्णूचे पार्षद या सर्वांचा राजानें 'हे भगवंताचेच अंश आहेत' अशा बुद्धीनें- स्तुति, दक्षिणादान व हात जोडून नमस्कार यांच्या योगेंकरून भक्तिपुरःसर सत्कार

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

केला असतां ते सर्व तेथून आपापल्या स्थानीं निघून गेले ॥ ३६ ॥ नंतर समर्थ असा अच्युत भगवान्‌हि उपाध्याय व ऋत्विज यांसहित असलेल्या त्या राजर्षि पृथूचें मन हरण करीत होत्साता, आपल्या वैकुंठलोकास निघून गेला ॥ ३७ ॥ नंतर पृथुराजानेंहि, ज्यानें आपलें स्वरूप प्रत्यक्ष दाखविलें आहे, त्या दृष्टिमार्गाचें उल्लंघन करून गेलेल्या देवाधिदेव वासुदेवाला नमस्कार करून आपल्या नगरामध्यें प्रवेश केला ॥ ३८ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील चतुर्थस्कंधामध्यें हा विसावा अध्याय समाप्त झाला ॥ २० ॥
आतां ह्या एकविसाव्या अध्यायामध्यें त्या पृथुराजाच्या महासत्रांत देवादिकांची एक मोठी सभा भरली होती तिच्यामध्यें त्या पृथुराजानें सर्वलोकांस उत्तमप्रकारचा उपदेश केला, ही कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, त्या वेळीं पृथुराजाचें नगर, जागोजागीं मोत्यांचे सर, फुलांच्या माळा, रेशमी वस्त्रें, सुवर्णपुष्पांचीं तोरणें, व अत्यंत सुगंधकारक धूप यांनीं सुशोभित केलेलें होतें ॥ १ ॥ त्या नगरांतील गल्ल्या, आंगणीं व राजमार्ग, हीं चंदन आणि कृष्णागरु यांच्या

अमुष्य राज्ञः । हरन्निवेति लोकोक्तिः । वस्तुतस्तस्य मनः सर्वदैव तदधीनमस्त्येव । स्वधाम राज्ञो हृदयम् ॥ ३७ ॥ अदृष्टाय लोचनपथमतिक्रांताय । संदर्शित आत्मा येन तस्मै । वस्तुतो व्यक्ताय ॥ ३८ ॥ इति श्रीमद्भागवते चतुर्थे टीकायां विंशोऽध्यायः ॥ २० ॥ एकविंशे तु पृथुना प्रजानामनुशासनम् ॥ महासत्रे सुरादीनां महासदसि वर्ण्यते ॥ १ ॥ पुरं यथावित्युक्तं तत्पुरमनुवर्णयति । मौक्तिकैरिति त्रिभिः ॥ १ ॥ चंदनागुरुयुक्तैस्तोयैरार्द्रा रथ्यादयस्तद्युक्तम् । तोक्मैर्हरितयवैरंकुरैरिति वा आर्चिर्भिर्दीपैः ॥ २ ॥ सवृंदैः

भगवानपि राजर्षेः सोपाध्यायस्य चाच्युतः ॥ हरन्निव मनोऽमुष्य स्वधाम प्रत्यपद्यत ॥ ३७ ॥ अदृष्टाय नमस्कृत्य नृपः संदर्शितात्मने ॥ अव्यक्ताय च देवानां देवाय स्वपुरं ययौ ॥ ३८ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे चतुर्थस्कंधे विंशोऽध्यायः ॥ २० ॥ ॥ मैत्रेय उवाच ॥ मौक्तिकैः कुसुमस्रग्भिर्दुकूलैः स्वर्णतोरणैः ॥ महासुरभिभिर्धूपैर्मंडितं तत्रतत्र वै ॥ १ ॥ चंदनागुरुतोयार्द्ररथ्याचत्वरमार्गवत् ॥ पुष्पाक्षतफलैस्तोक्मैर्लाजैरर्चिर्भिरर्चितम् ॥ २ ॥ सवृंदैः कदलीस्तंभैः पूगपोतैः परिष्कृतम् ॥ तरुपल्लवमालाभिः सर्वतः समलंकृतम् ॥ ३ ॥ प्रजास्तं दीपबलिभिः संभृताशेषमंगलैः ॥ अभीयुर्मृष्टकन्याश्च मृष्टकुंडलमंडिताः ॥ ४ ॥ शंखदुंदुभिघोषेण ब्रह्मघोषेण चर्त्विजाम् ॥ विवेश भवनं वीरः स्तूयमानो गतस्मयः ॥ ५ ॥ पूजितः पूजयामास तत्र तत्र महायशाः ॥ पौरान्जानपदांस्तांस्तान्प्रीतः प्रियवरप्रदः ॥ ६ ॥

पुष्पफलयुक्तैः कदलीस्तंभैः पूगैर्वृक्षैस्तथाविधैः सर्वतः समलंकृतं शोभितम् ॥ ३ ॥ संभृतान्यशेषाणि मंगलानि दध्यादीनि तैः सहाभिजग्मुः मृष्टा उज्ज्वलाः कन्याश्च ॥ ४ ॥ गतस्मयो निरहंकारः ॥ ५ ॥ प्रियान्वरान्प्रददातीति तथा ॥ ६ ॥

उदकानें सेचन केलेलीं असून तें नगर, जेंथेतेथें मांडून ठेविलेल्या फुलें, अक्षता, फळें, अंकुर, लाह्या व दीप यांनीं पूजित होतें ॥ २ ॥ त्यामध्यें कित्येकठिकाणीं फुलांफळांसुद्धां केळींचे खांब, व पोफळींचे रोपे उभे केलेले होते. तें चोहोंकडे आम्रवृक्षादिकांच्या कोमळ पल्लवांच्या तोरणांनीं अलंकृत होतें ॥ ३ ॥ त्या नगरामध्यें पृथुराजानें प्रवेश केला तेंव्हां त्याला सर्वप्रजा व कानांत देदीप्यमान कुंडलें घातलेल्या सुंदर कन्या, 'दीप, बलि, दहीं, अक्षता, दूर्वा, फलयुक्त कलश व सूत्रवेष्टित लाडूवगैरे मंगलसाहित्यें घेऊन' सामोऱ्या गेल्या ॥ ४ ॥ नंतर तो महाप्रतापी राजा गर्वरहित होत्साता, शंख, दुंदुभि इत्यादिक वाद्यांचा गजर, ऋत्विजब्राह्मणांचा वेदपाठ व सूत, मागध व बंदी यांचा स्तुतिपाठ चालला असतां, राजमंदिरामध्यें प्रविष्ट झाला ॥ ५ ॥ गृहप्रवेशाच्या पूर्वींच त्यात्याठिकाणीं पुरवासी व देशवासी लोकांनीं त्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राजाची पूजा केली असतां, त्यांच्यावर संतुष्ट झालेल्या त्या महायशस्वी राजानें, त्या त्या लोकांना इच्छित वर देऊन त्यांचा यथायोग्य सत्कार केला ॥ ६ ॥ असो, ज्याचें आचरण निर्दोष आहे आणि जो गुणांनीं फार थोर असल्यामुळें परमपूज्य अशा त्या पृथुराजानें लोकांच्या हातून न घडणारीं मोठमोठीं कर्में करून भूमंडलाचें पालन केलें आणि पृथिवीवर आपली उज्ज्वल कीर्ति स्थापन करून, शेवटीं वैकुंठनामक श्रेष्ठपदावर आरोहण केलें ॥ ७ ॥ असें संक्षेपानें उपसंहार केलेलें पृथुराजाचें चरित्र विस्तारानें श्रवण करण्यासाठीं सूत झणाला– हे सभापते शौनका, तो महाभगवद्भक्त विदुर, ज्ञानवैराग्यादि सर्वगुणांनीं परिपूर्ण व गुणी लोकांनीं प्रशंसा केलेलें तें असें आदिराजाचें (पृथूचें) यश वर्णन करणाऱ्या मैत्रेय ऋषीचा सत्कार करीत होत्साता झणाला कीं, ॥ ८ ॥ विदुर झणाला– हे ऋषे, पृथुराजाला ब्राह्मणांनीं अभिषेक केला त्यावेळीं सर्वदेवांकडून ज्यानें मोठमोठीं बक्षिसें मिळविलीं आहेत व ज्यांनीं पृथिवीचें दोहन केलें त्या आपल्या बाहूंच्याठिकाणीं विष्णूचें तेज धारण करणाऱ्या त्या पृथुराजानें पुढें

गुणैर्महानतएव महत्तमः पूज्यतमः ॥ ७ ॥ गुणैर्विजृंभितमूर्जितं गुणवद्भिः सभाजितं सत्कृतं यशो गृणंतमर्चयन्प्राह । सदसस्पते शौनक ॥८॥ लब्धान्यशेषसुराणामर्हणानि येन सः ।किमकरोदिति शेषः ॥ ९ ॥ श्रवणौत्सुक्यमाविष्कुर्वन्प्रार्थयते । को न्विति । यस्यविक्रमः पृथ्वीदोहनं तस्योच्छिष्टतुल्यं कामम् । तत्तस्य कर्म वद ॥ १० ॥ प्राचीनकर्मभिः प्रारब्धानेव बुभुजे

स एवमादीन्यनवद्यचेष्टितः कर्माणि भूयांसि महान्महत्तमः ॥ कुर्वन्शशासावनिमंडलं यशः स्फीतं निधायारुरुहे परं पदम् ॥ ७ ॥ सूत उवाच ॥ तदादिराजस्य यशो विजृंभितं गुणैरशेषैर्गुणवत्सभाजितम् ॥ क्षत्ता महाभागवतः सदस्पते कौषारविं प्राह गृणंतमर्चयन् ॥ ८ ॥ विदुर उवाच ॥ सोऽभिषिक्तः पृथुर्विप्रैर्लब्धाशेषसुरार्हणः ॥ बिभ्रत्स वैष्णवं तेजो बाह्वोर्याभ्यां दुदोह गाम् ॥ ९ ॥ कोन्वस्य कीर्तिं न शृणोत्यभिज्ञो यद्विक्रमोच्छिष्टमशेषभूपाः ॥ लोकाः सपाला उपजीवंति काममद्यापि तन्मे वद कर्म शुद्धम् ॥ १० ॥ मैत्रेय उवाच ॥ गंगायमुनयोर्नद्योरंतरा क्षेत्रमावसन् ॥ आरब्धानेव बुभुजे भोगान्पुण्यजिहासया ॥ ११ ॥ सर्वत्रास्खलितादेशः सप्तद्वीपैकदंडधृक् ॥ अन्यत्र ब्राह्मणकुलादन्यत्राच्युतगोत्रतः ॥ १२ ॥ एकदाऽऽसीन्महासत्रदीक्षा तत्र दिवौकसाम् ॥ समाजो ब्रह्मर्षीणां च राजर्षीणां च सत्तम ॥ १३ ॥

ननु भोगांतरार्थं कर्माणि करोति तदपि भोगेन पुण्यक्षपणेच्छया ननु सुखासक्त्येत्यर्थः ॥११ ॥ अस्खलितोऽप्रतिहतो आदेश आज्ञा यस्य सप्तसु द्वीपेष्वेक एव दंडं धारयतीति तथा किं सर्वत्र नेत्याह । ब्राह्मणकुलव्यतिरेकेण अच्युतो गोत्रप्रवर्तकतुल्यो येषां वैष्णवानां तद्व्यतिरेकेण च ॥१२॥ एकदा तस्य महासत्रदीक्षा आसीत्तत्र सत्रे देवादीनां समाज आसीदित्यर्थः ॥

काय केलें ? ॥ ९ ॥ अहो ज्याच्या पृथिवीदोहनरूप पराक्रमाच्या उच्छिष्टतुल्य असलेल्या भोग्य वस्तूंवर सर्व राजे व इंद्रादिलोकपालांसहवर्तमान सर्व प्राणी, अद्यापि उपजीविका करितात त्याची कीर्ति कोण बरें गुणग्राही पुरुष श्रवण करणार नाहीं ? सर्वही श्रवण करतीलच. यास्तव त्याचें तें शुद्ध कर्म तूं मला वर्णन कर ॥ १० ॥ मैत्रेय झणाला– हे विदुरा, गंगा व यमुना या नद्यांच्या मध्यभागीं असलेल्या क्षेत्रामध्यें (अंतर्वेदीमध्यें) वास करणारा तो पृथुराजा, स्वर्ताच्या प्रारब्धकर्मानें प्राप्त झालेल्या भोगांचा मात्र उपभोग करीत असे. दुसरे भोग मिळविण्याकरितां नवीं नवीं सकाम कर्में करीत नसे. त्याचें भोग भोगणें तरी पुण्यक्षय होण्याच्या इच्छेनेंच असे सुखाच्या आसक्तीनें नसे ॥ ११ ॥ त्याच्या आज्ञेचा कोठेंहि भंग होत नसे. ब्राह्मणाच्या कुलाखेरीज व ज्यांचें कुलदैवत अच्युत भगवान् आहे त्या भगवद्भक्तांखेरीज सप्तद्वीपवती पृथिवीमध्यें तो एकटाच दंडधारण करीत असे ॥ १२ ॥ हे विदुरा, एके वेळीं त्या राजानें महासत्र करण्याची दीक्षा ग्रहण केली होती. त्या सत्रामध्यें देव, ब्रह्मर्षि

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आणि राजर्षि ह्यांचा एक मोठा समाज जमला होता ॥ १३ ॥ त्याठिकाणीं सर्वपूज्य लोकांचें त्यानें यथायोग्य पूजन केल्यानंतर जसा नक्षत्रसमुदायांत चंद्र उदय पावतो त्याप्रमाणें पृथुराजा सभेमध्यें उठून उभा राहिला ॥ १४ ॥ तो शरीरानें उंच होता, त्याचे भुज पुष्ट व लांब होते, त्याचा वर्ण गौर, नेत्र कमळासारखे तांबूस, नासिका सरळ, मुख प्रसन्न, मुद्रा शांत, स्कंध पुष्ट असून दंतपंक्ति व हास्य हीं सुंदर होतीं ॥ १५ ॥ वक्षःस्थळ विशाळ व कटिप्रदेश विस्तीर्ण असून पोट पडलेल्या तीन वळ्यांनीं सुंदर व पिंपळाच्या पानासारखें वरतीं विस्तृत व खालीं संकुचित असें कमानदार होतें. त्याची नाभि भोंवऱ्यासारखी खोल, देह बलवान्, मांड्या सुवर्णासारख्या उज्ज्वळ व पावलांचे चवडे उंच होते, चपटे नव्हते ॥ १६ ॥ त्याच्या मस्तकावरचे केंस, सूक्ष्म, कुरळे, काळे व तुळतुळीत होते, कंठ शंखासारखा तीन

---

१३ तस्मिन्पूज्येष्वार्चितेषु सत्सु सदसो मध्ये उत्थितः सन्समंततः समैक्षतेति षष्ठेनान्वयः ॥१४॥ प्रांशुरुन्नतः पीनावायतौ भुजौ यस्य कंजवदरुणे ईक्षणे यस्य शोभना द्विजाः स्मितं च यस्य ॥ १५ ॥ व्यूढं विस्तीर्णं वक्षो यस्य वलिभिस्तिसृभिर्वल्गु सुंदरं दलवदधोऽग्रमश्वत्थपत्रमिव उपरि विस्तृतमधस्तात्संकुचितमुदरं यस्य आवर्तवन्निम्ना नाभिर्यस्य कांचनवदुज्ज्वलावूरू यस्य उदग्रावुन्नताग्रौ पादौ यस्य ॥ १६ ॥ सूक्ष्माश्च ते वक्राश्चासिताश्च स्निग्धाश्च मूर्धजा यस्य कंबुवत्त्रिरेखांकिता कंधरा यस्य परिधाय वसित्वा उपवीयोत्तरीयं कृत्वा

तस्मिन्नर्हत्सु सर्वेषु स्वर्चितेषु यथार्हतः ॥ उत्थितः सदसो मध्ये ताराणामुडुराडिव ॥ १४ ॥ प्रांशुः पीनायतभुजो गौरः कंजारुणेक्षणः ॥ सुनासः सुमुखः सौम्यः पीनांसः सुद्विजस्मितः ॥ १५ ॥ व्यूढवक्षा बृहच्छ्रोणिर्वलिवल्गुदलोदरः ॥ आवर्तनाभिरोजस्वी कांचनोरुरुदग्रपात् ॥१६ ॥ सूक्ष्मवक्रासितस्निग्धमूर्धजः कंबुकंधरः ॥ महाधने दुकूलाग्र्ये परिधायोपवीय च ॥ १७ ॥ व्यंजिताशेषगात्रश्रीर्नियमे न्यस्तभूषणः ॥ कृष्णाजिनधरः श्रीमान्कुशपाणिः कृतोचितः ॥ १८ ॥ शिशिरः स्निग्धताराक्षः समैक्षत समंततः ॥ ऊचिवानिदमुर्वीशः सदः संहर्षयन्निव ॥ १९ ॥ चारु चित्रपदं श्लक्ष्णं मृष्टं गूढमविक्लवम् ॥ सर्वेषामुपकारार्थं तदा अनुवदन्निव ॥ २० ॥ राजोवाच ॥ सभ्याः शृणुत भद्रं वः साधवो य इहागताः ॥ सत्सु जिज्ञासुभिर्धर्ममावेद्यं स्वमनीषितम् ॥ २१ ॥

॥ १७ ॥ नियमे निमित्ते न्यस्तानि त्यक्तानि भूषणानि येन सः अतएव तैरनावृतत्वाद्व्यंजिताशेषगात्रेषु श्रीः स्वभाविकी शोभा येन कृतान्युचितानि कर्माणि येन ॥ १८ ॥ शिशिरे संतापहरे स्निग्धे च तारे ययोस्ते अक्षिणी यस्य इदं वक्ष्यमाणं वाक्यमुक्तवांश्च ॥ १९ ॥ चारु श्रोत्रप्रियम् । चित्राणि पदानि यस्मिन् श्लक्ष्णं प्रशस्तम् । मृष्टं शुद्धम् । गूढं गंभीरार्थम् । अविक्लवमव्याकुलम् । उत्प्रेक्षते । स्वयमनुभूतमनुवदन्निव ॥ २० ॥ भाषणे हेतुः । धर्मं जिज्ञासुभिः पुंभिः सत्सु स्वमनीषितमावेद्यं वक्तव्यम् । अतः

रेषांनीं चिन्हित होता, तो एक महामोलाचें वस्त्र नेसला असून दुसरें पांघरला होता ॥ १७ ॥ सत्रदीक्षारूप निमित्त उत्पन्न झाल्यामुळें त्यानें आंगावरील भूषणें काढून ठेविलीं होतीं म्हणून वस्त्रांतून त्याच्या सर्व शरीराची शोभा व्यक्त दिसत होती. त्यानें आंगावर कृष्णाजिन धारण केलें होतें, हातांत दर्भांचीं पवित्रकें घातलीं होतीं तो मोठा कांतिमान असून त्यानें योग्यकर्में केलीं होतीं ॥ १८ ॥ त्याच्या नेत्रांच्या बाहुल्या लोकांचा संताप दूर करणाऱ्या व पाणीदार होत्या. तो पृथुराजा, सभोंवार पाहून सभेला आनंद उत्पन्न करित होत्साता स्वतः अनुभव घेतलेल्या गोष्टींचा उच्चार करीत करीत त्यावेळीं सर्वांवर उपकार करण्यासाठीं भाषण करूं लागला. तें त्याचें भाषण, कानाला गोड लागणारें, चमत्कारिक पदांनीं युक्त, प्रशस्त, शुद्ध, गंभीर अर्थानें युक्त व निभ्रांत असें होतें ॥ १९ ॥ २० ॥ राजा म्हणाला— हे सभासदहो, जे तुम्ही सज्जन येथें प्राप्त झालां

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आहां ते माझें भाषण श्रवण करा. तुमचें कल्याण असो. कारण, धर्म जाणण्याची इच्छा करणाऱ्या पुरुषांनीं सज्जनांना आपलें मनोगत सांगावें असें आहे ॥ २१ ॥ या भूलोकाच्याठिकाणीं ऋषींनीं मला सर्वप्रजांचा राजा नेमिला आहे, ह्मणून मी त्यांना दंड करणारा, रक्षण करणारा, त्यांची निरनिराळी वृत्ति चालविणारा व मर्यादांचे ठिकाणीं त्यांचें स्थापन करणारा आहें ॥ २२ ॥ यास्तव प्राचीन कर्मांचा साक्षिभूत परमात्मा, ज्याला प्रसन्न होतो त्या ब्रह्मवेत्त्या पुरुषाला, जे लोक प्राप्त होतात असें ह्मणतात ते सर्वांचे मनोरथ परिपूर्ण करणारे लोक, मला 'मी प्रजांचें पालन केलें असतां' प्राप्त होवोत ॥ २३ ॥ जो राजा, धर्माविषयीं प्रजांना शिक्षण न देतां त्यांच्यापासून करभार मात्र ग्रहण करितो त्याला प्रजांचें पाप भोगावें लागतें आणि तो आपल्या ऐश्वर्यापासून भ्रष्ट होतो ॥ २४ ॥ तस्मात् हे प्रजाजनहो, तुमचा पालक जो मी त्या माझें परलोकीं हित होण्यासाठीं तुह्मी निर्दोष अंतःकरणपूर्वक ईश्वरार्पणबुद्धीनें आपल्या धर्मांचेंच आचरण करीत जा; ह्मणजे मजवर तुह्मी अनुग्रह केल्याप्रमाणें होईल

प्रजानुशासनमिषेण जिज्ञासैव क्रियते न युष्मान्प्रति धर्मप्रवचनमिति भावः ॥ २१ ॥ इदानीं प्रजाः शिक्षयिष्यन्प्रजाशिक्षणादिकं ममावश्यकमित्याह । अहमिति त्रिभिः । पृथक् सेतुषु स्थापिता स्थापयिता ॥ २२ ॥ दिष्टदृक् प्राक्कर्मसाक्षीश्वरो यस्य तुष्यति तस्य वेदवादिनो यान्लोकानाहुः प्रजारक्षणाद्यनुष्ठानात्ते लोका मे स्युः । कथंभूताः कामानां सम्यक्दोहः प्रपूरणं येषु ॥ २३ ॥ अन्यथा त्वनिष्टं स्यादित्याह । य इति । शमलं पापम् । भगमैश्वर्यम् ॥ २४॥ तत्तस्माद्धे प्रजाः भर्तुर्मम पिंडार्थं

अहं दंडधरो राजा प्रजानामिह योजितः ॥ रक्षिता वृत्तिदः स्वेषु सेतुषु स्थापिता पृथक् ॥ २२ ॥ तस्य मे तदनुष्ठानाद्यानाहुर्ब्रह्मवादिनः ॥ लोकाः स्युः कामसंदोहा यस्य तुष्यति दिष्टदृक् ॥ २३ ॥ य उद्धरेत्करं राजा प्रजा धर्मेष्वशिक्षयन् ॥ प्रजानां शमलं भुंक्ते भगं च स्वं जहाति सः ॥ २४ ॥ तत्प्रजा भर्तृपिंडार्थं स्वार्थमेवानसूयवः ॥ कुरुताधोक्षजधियस्तर्हि मेऽनुग्रहः कृतः ॥ २५ ॥ यूयं तदनुमोदध्वं पितृदेवर्षयोऽमलाः ॥ कर्तुः शास्तुरनुज्ञातुस्तुल्यं यत्प्रेत्य तत्फलम् ॥ २६ ॥ अस्ति यज्ञपतिर्नाम केषांचिदर्हसत्तमाः ॥ इहामुत्र च लक्ष्यंते ज्योत्स्नावत्यः क्वचिद्भुवः ॥ २७ ॥

पिंडदानवत्परलोकहितार्थं स्वकार्यमेव कुरुत स्वधर्ममेवानुतिष्ठत । अधोक्षजे धीर्येषां तादृशाः संतः वासुदेवार्पणदृष्ट्येत्यर्थः । अनुग्रहः कृतो भवेदिति शेषः ॥ २५ ॥ शास्तुः शिक्षयितुरनुज्ञातुरनुमोदितुश्च प्रेत्य परलोके यत्फलं तत्तुल्यम् ॥ २६ ॥ कर्मकर्तव्यमित्यनुमोदामहे नतु वासुदेवेऽर्पणीयमिति वेनादिभिस्तदनंगीकारादित्येवंवादिनः शनैः संबोधयन्नाह । हे अर्हसत्तमाः यज्ञपतिर्नाम परमेश्वरः केषांचिन्मते तावदस्ति तथापि विप्रतिपत्तेर्न तत्सिद्धिरित्याशंक्य जगद्वैचित्र्यान्यथानुपपत्तिं प्रमाणयति ।

॥ २५ ॥ हे देव ऋषि पितर हो, हें माझें प्रजाशिक्षणरूप वाक्य जर चांगलें असेल तर याला आपल्या निर्मळ चित्तानें अनुमोदन द्या, ह्मणजे याच्यावर सर्वांचा विश्वास बसेल. कारण, कोणत्याहि कर्माचें परलोकीं जें फल प्राप्त होणें तें कर्म करणारा, शिक्षण देणारा व अनुमोदन देणारा यांस सारखेंच प्राप्त होतें ॥ २६ ॥ हे परमपूज्य जन हो, एकाद्या दुराग्रही पुरुषाच्या मतें नसो, परंतु कित्येक लोकांच्या मतें तरी यज्ञपति (शुभाशुभकर्मांचा फलदाता) परमेश्वर आहे आणि तसें स्वीकारावेंच लागतें. कारण, या लोकीं व परलोकींहि विशेष तेजस्वी (सुखकारक) अशा भोगभूमि व शरीरें दिसून येतात त्यांतहि ज्या वस्तूंपासून ज्याला विशेष सुख होतें त्याच वस्तूंपासून त्याला कालांतरीं दुःख होतें किंवा एकच वस्तु एककालीं एकाला अतिसुखकारक व दुसऱ्याला अतिदुःखकारक होत्ये असें जगाचें विचित्रत्व आहे तें, त्या त्या कर्मांचें फल देणाऱ्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तसेच ह्याच्यासारखे धर्मनिष्ठ (line order per page):

भगवंताच्या सत्तेवांचून घडणार नाहीं ॥ २७ ॥ मनु, उत्तानपाद, ध्रुवराजा, राजर्षि प्रियव्रत, आमच्या पित्याचा (वेनाचा) पिता अंगराजा, तसेच ह्याच्यासारखे धर्मनिष्ठ
व विचारशील असे दुसरे राजे, ब्रह्मदेव, शंकर, प्र्ह्हाद, व बलि, ह्या सर्वांचें परमेश्वराशीं कर्तव्य आहेच, ह्मणजे कर्मांचीं फळें देणारा परमेश्वर असलाच पाहिजे असें ह्या
सर्वांचें मत आहे ॥ २८ ॥ २९ ॥ फार तर काय परंतु धर्मज्ञानाविषयीं मूढ व सत्पुरुषांनीं 'यांचें कल्याण कसें होईल ह्मणून' शोक करण्यास योग्य अशा वेनादिक
राजांवांचून इतरां सर्वांचें मत, 'कर्मफळदाता ईश्वर आहे' असेंच आहे आणि बहुतकरून धर्म, अर्थ, काम, स्वर्ग आणि मोक्ष यांचें फळ अधिकारिपरत्वेंकरून देणारा
सर्वव्यापक एक ईश्वर कारण असलाच पाहिजे; ह्मणजे कर्म जड असल्यामुळें फळ देण्यास योग्य नाहीं, देवतांनाही अंतर्यामिसत्तेशिवाय स्वातंत्र्य नाहीं; बरें कित्येक ठिकाणीं

इहामुत्र च ज्योत्स्नावत्यः कांतिमत्यो भुवो भोगभूमयः शरीराणि च ॥ २७ ॥ नन्विदं कर्मवैचित्र्यादेव सेत्स्यति तथापि विद्वदनुभवेनेश्वरसिद्धिरित्याह। मनोरिति त्रिभिः । अस्मत्पिता-
महस्यांगस्य ॥ २८ ॥ कृत्यमस्ति अवश्यं कर्मफलदात्रा भाव्यमिति तेषां मतमित्यर्थः ॥ २९ ॥ मृत्योर्दौहित्रान्वेनादीन्विना धर्मे विमोहितान् अतः शोच्यान्। ननु कर्मैव फलं
दास्यति विध्युद्देशगता वा देवताः किं परमेश्वरेण तत्राह । वर्गेति । वर्गोऽत्र त्रिवर्गः स्वर्गो धर्मस्य फलमपवर्गो मोक्षस्तेषामैकात्म्येनैकरूप्येण सर्वानुगतेन हेतुना तत्रापि
प्रायेण हेतुना । अयं भावः । न तावज्जडस्य कर्मणः फलदातृत्वं घटते न चार्वाग्देवतानां स्वातंत्र्यम् । अंतर्यामिश्रुतेः । न च तदा कर्मसाम्ये फलतारतम्यं क्वचित्तदसिद्धिश्च

ईदृशानामथान्येषामजस्य च भवस्य
मनोरुत्तानपादस्य ध्रुवस्यापि महीपतेः ॥ प्रियव्रतस्य राजर्षेरंगस्यास्मत्पितुः पितुः ॥ २८ ॥ वर्गस्वर्गापवर्गाणां
च ॥ प्रह्लादस्य बलेश्चापि कृत्यमस्ति गदाभृता ॥ २९ ॥ दौहित्रादीनृते मृत्योः शोच्यान्धर्मविमोहितान् ॥ सद्यः क्षिणोत्यन्वहमेधती सती यथा
प्रायेणैकात्म्यहेतुना ॥ ३० ॥ यत्पादसेवाभिरुचिस्तपस्विनामशेषजन्मोपचितं मलं धियः ॥ यदंघ्रिमूले कृतकेतनः पुनर्न संसृतिं
पदांगुष्ठविनिःसृता सरित् ॥ ३१ ॥ विनिर्धुताशेषमनोमलः पुमानसंगविज्ञानविशेषवीर्यवान् ॥
क्लेशवहां प्रपद्यते ॥ ३२ ॥

संभवति अतः स्वातंत्र्येण कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं समर्थेन परमेश्वरेण भाव्यमिति ॥ ३० ॥ किंच । जीवानां मोक्षदः परमेश्वर एव नार्वाग्देवतास्तासामपि जीवत्वाविशेषादि-
त्याशयेनाह त्रिभिः । यस्य पादयोः सेवायामभिरुचिस्तपस्विनां संसारतप्तानामशेषैर्जन्मभिः समृद्धं धियो मलं सद्यः क्षपयति तमेव भजतेति तृतीयेनान्वयः । कथंभूता अह-
न्यहनि वर्धमाना सती सात्विकी तत्पादसंबंधस्यैवैष महिमेति दृष्टांतेनाह । यथेति ॥ ३१ ॥ न विनिर्धुता अशेषा मनोमला यस्य असंगो वैराग्यं तेन विज्ञानस्य विशेषः साक्षा-

---

करण्यास समर्थ
कर्में सारखीं केलीं असतांहि फळें वेगवेगळींच मिळतात व कोठें मिळतही नाहींत. ह्यावरून स्वातंत्र्यानें पाहिजे तें करण्यास, न करण्यास किंवा विपरीत कांहींतरी करण्यास समर्थ
असा परमेश्वर आहे असें मानावेंच लागतें ॥ ३० ॥ जशी ईश्वराच्या चरणांगुष्ठापासून निघालेली गंगा, उत्तरोत्तर वृद्धिंगत होऊन लोकांच्या पापांचा नाश करित्ये त्याप्र-
माणें ज्या भगवंताच्या चरणाच्या सेवेची अभिरुची (आवड) प्रतिदिवशीं वृद्धिंगत होत्साती संसारतापानें तप्त झालेल्या लोकांच्या, बुद्धीच्या पुष्कळ जन्मांनीं
वाढलेल्या मळाचा तत्काळ नाश करून टाकित्ये ॥ ३१ ॥ नंतर मनाचे सर्व मळ नाहींसे झालेला पुरुष, वैराग्यानें झालेल्या भगवत्स्वरूपाच्या साक्षात्काररूप बळाच्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

योगानें युक्त होऊन् भगवंताच्याच चरणकमलाचेठिकाणीं आश्रय करून राहात होत्सात्या पुनः क्लेशदायक अशा संसाराप्रत पावत नाहीं ॥ ३२ ॥ यास्तव हे जनहो, ज्याचें चरणकमल सर्वांचे मनोरथ परिपूर्ण करणारें आहे, त्या भगवंताचेंच तुह्मीं 'अधिकारानुरूप आपणास फल प्राप्त होईल असा निश्चय करून' निष्कपटपणें स्वतांच्या अध्यापन (शिकविणें) वगैरे वृत्तींनीं मन वाणी व शरीर यांच्या योगानें, ध्यानस्तुतिपूजारूप स्वधर्मेंकरून आराधन करीत जा ॥ ३३ ॥ हा भगवानच स्वरूपानें अविशुद्ध ज्ञानघन असल्यामुळें निर्गुण असतांहि या कर्ममार्गामध्यें तांदूळ, घृत, दहीं इत्यादिक द्रव्यें, शुक्लादिक गुण, कंडणादिक क्रिया, मंत्र, प्रयाज अनुयाज इत्यादिक अंगांनीं केलेली पूर्णता, संकल्प, पदांची अर्थबोधक शक्ति, ज्योतिष्टोम वाजपेय इत्यादिक नांवें, अशा अनेक गुणांच्या योगेंकरून यज्ञरूपी बनतो ॥ ३४ ॥ हाच व्यापक भगवान्, प्रकृति

त्कारस्तदेव वीर्यं यस्य । यस्यांघ्रिमूले कृताश्रयः सन् ॥ ३२ ॥ आत्मवृत्तिभिरध्यापनादिभिः मनोवचःकायानां गुणैर्ध्यानस्तुतिसपर्याभिः अमायिनो निष्कपटाः संतः ननु ब्रह्मादिभिः सेव्ये किमस्मद्भक्त्या भविष्यति तत्राह । यथाधिकारमेवावसिता निश्चिता समाप्ता वार्थसिद्धिर्येषाम् ॥ ३३ ॥ स्वकर्मभिर्यागादिभिर्भजतेत्युक्तं तत्र ब्रह्मार्पणं ब्रह्महविरितिन्यायेन सर्वेषु यागतदंगतत्फलेषु भगवद्दृष्ट्या कर्म कर्तव्यं न भिन्नदृष्ट्येति वक्तुं तेषां भगवद्रूपतामाह । द्वाभ्याम् । असौ भगवानेव स्वरूपतो विशुद्धविज्ञानघनोऽप्यगुणो निर्विशेषणोऽपि सन्निह कर्ममार्गेऽनेकगुणो नानाविशेषणवान् अध्वरो यज्ञः संपद्यते । यज्ञो वै विष्णुरिति श्रुतेः । अनेकगुणत्वमेवाह । पृथग्विधानि यानि द्रव्यादीनि

तमेव यूयं भजतात्मवृत्तिभिर्मनोवचःकायगुणैः स्वकर्मभिः ॥ अमायिनः कामदुघांघ्रिपंकजं यथाधिकारावसितार्थसिद्धयः ॥ ३३ ॥
असाविहानेकगुणोऽगुणोऽध्वरः पृथग्विधद्रव्यगुणक्रियोक्तिभिः ॥ संपद्यतेऽर्थाशयलिंगनामभिर्विशुद्धविज्ञानघनः स्वरूपतः ॥ ३४ ॥
प्रधानकालाशयधर्मसंग्रहे शरीर एष प्रतिपद्य चेतनाम् ॥ क्रियाफलत्वेन विभुर्विभाव्यते यथानलो दारुषु तद्गुणात्मकः ॥ ३५ ॥
अहो ममामी वितरंत्यनुग्रहं हरिं गुरुं यज्ञभुजामधीश्वरम् ॥ स्वधर्मयोगेन यजंति मामका निरंतरं क्षोणितले दृढव्रताः ॥ ३६ ॥
मा जातु तेजः प्रभवेन्महर्धिभिस्तितिक्षया तपसा विद्यया च ॥ देदीप्यमानेऽजितदेवतानां कुले स्वयं राजकुलाद्द्विजानाम् ॥ ३७ ॥

तैः । तत्र द्रव्याणि व्रीह्यादीनि गुणाः शुक्लादयः क्रिया अवघातादयः उक्तयो मंत्राः अर्थोंऽगसाध्य उपकारः आशयः संकल्पः लिंगं पदार्थानां शक्तिः नाम ज्योतिष्टोमादि तैश्चाध्वरः संपद्यते ॥ ३४ ॥ यागतदंगानां भगवद्रूपत्वमुक्त्वा यागफलस्यापि भगवद्रूपतामाह । प्रधानेति । एष विभुः परमानंदोऽपि शरीरे चेतनां विषयाकारां बुद्धिं प्रतिपद्य तदभिव्यंग्यानंदरूपः सन् क्रियाफलत्वेन प्रतीयते । एतस्यैवानंदस्यान्यानि भूतानि मात्रामुपजीवंतीति श्रुतेः । यथानलो दारुषु स्थितस्तद्गुणात्मको दारुधर्मदैर्घ्यवक्रत्वादिमांस्तद्वत् कथंभूते शरीरे प्रधानमव्यक्तम् । कालस्तत्क्षोभकः आशयो वासना धर्मोऽदृष्टं तैः संगृह्यते जन्यत इति तथा तस्मिन् ॥ ३५ ॥ तदेवमप्रवृत्तान्भगवद्भजने प्रवर्त्य स्वतः प्रवृत्तानां प्रवृत्तिमभिनंदनेन द्रढयति । अहो इति । वितरंति कुर्वंति ॥ ३६ ॥ इदानीं हरिभक्तिदार्ढ्याय ब्राह्मणभक्तिं विधत्ते । माजात्वित्यष्टभिः । महत्यश्च ता ऋद्धयश्च

काल, वासना आणि पुण्यपापरूप जीवांचें अदृष्ट यांच्या संग्रहामुळें जन्म पावलेल्या शरीराच्याठिकाणीं चेतना पावोन, 'जसा एकच अग्नि, काष्ठांमध्यें त्यांच्या लांबी, वक्रता इत्यादि गुणांनीं युक्त होऊन लांब वक्र इत्यादिरूपी भासतो त्याप्रमाणें यज्ञादिकांच्या फलरूपत्वेंकरून नानाप्रकारें अनुभवास येतो ॥ ३५ ॥ अहो या पृथिवीतलाचेठिकाणीं दृढ निश्चयवान् असे हे माझे सर्व प्रजाजन, स्वधर्मांच्या योगेंकरून यज्ञामध्यें हविर्भाग ग्रहण करणाऱ्या देवांचा अधिपति अशा जगद्गुरु श्रीहरीचें निरंतर आराधन करितात हे माझ्यावर मोठाच अनुग्रह करीत आहेत ॥ ३६ ॥ असें भाषण करून हरिभक्तीच्या दृढीकरणार्थ पृथुराजा ब्राह्मणाची भक्ति करावी असें सांगतो— मोठमोठ्या समृद्धींनीं उत्कट झालेल्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राजांच्या कुलापासून निघालेलें जें तेज त्यानें, ज्यांचें आराध्य दैवत विष्णु आहे अशा वैष्णवांच्या कुलामध्यें आणि सहनशीलता, तप आणि विद्या ह्यांच्या योगानें
समृद्धिवगैरे नसतांहि स्वतःच देदीप्यमान अशा ब्राह्मणांच्या कुलामध्यें, आपला प्रभाव कधींहि चालवूं नये ॥ ३७ ॥ कारण, ब्रह्मादिकांना पूज्यतम, ब्राह्मणांचा कैवारी व
पुराणपुरुष असा साक्षात् विष्णुहि, निरंतर ज्या ब्राह्मणाच्या चरणांच्या वंदनेंकरून अखंड लक्ष्मी व जगाला पवित्र करणारें यश पावला ॥ ३८ ॥ व ज्या ब्राह्मणाच्या
सेवेच्या योगेंकरून तो सर्वांतर्यामी, स्वयंप्रकाश, ब्राह्मणप्रिय ईश्वर, फार संतुष्ट होतो ह्मणून भगवद्धर्मतत्पर अशा तुह्मी नम्रपणें कायावाचामनेंकरून ब्रह्मणाच्या कुलाची

ताभिर्यद्राजकुलस्य तेजस्तत्तस्मात्सकाशाद्विजानां कुलेऽजितो देवता येषां वैष्णवानां तेषां च कुले मा जातु प्रभवेत्कदाचिदपि प्रभावं न करोतु कथंभूते समृद्धिभिर्विनापि
स्वयमेव तितिक्षाभिर्देदीप्यमाने ॥ ३७ ॥ ब्राह्मणांस्तुवन्नाह । यच्चरणाभिवंदनाद्धरिर्लक्ष्मीं यशश्चावाप यत्सेवया चेश्वरस्तुष्यति तदेव ब्रह्मकुलं निषेव्यतामिति द्वयोरन्वयः
॥ ३८ ॥ तस्य हरेर्लोकसंग्रहरूपो यो धर्मस्तत्परैः ॥ ३९ ॥ ननु ब्रह्मकुल एव नित्यं सेव्यमाने सर्वदेवतामुखभूतेऽग्नौ यज्ञाद्यनुष्ठानं न स्यान्न च तेन विना चित्तशुद्धिर्न च
तया विना मोक्षः स्यादित्याशंक्याह । पुमानिति द्वाभ्याम् । यस्य ब्रह्मकुलस्य नित्यं संबंधेन निषेवया पुमान्स्वयमेव ज्ञानाभ्यासादिकं विनाप्यत्युत्तमं शमं मोक्षं लभेत
कुतः यत्सेवया स्वत एवानतिवेलं शीघ्रं प्रसीदतः शुद्ध्यत आत्मनश्चित्तात् ततः परं श्रेष्ठं देवानां किं मुखमस्ति ब्राह्मणसेवयैव यज्ञादिफलं ज्ञानफलं तत्सर्वं भवतीत्यर्थः

ब्रह्मण्यदेवः पुरुषः पुरातनो नित्यं हरिर्यच्चरणाभिवंदनात् ॥ अवाप लक्ष्मीमनपायिनीं यशो जगत्पवित्रं च महत्तमाग्रणीः ॥ ३८ ॥
यत्सेवयाऽशेषगुहाशयः स्वराट् विप्रप्रियस्तुष्यति काममीश्वरः ॥ तदेव तद्धर्मपरैर्विनीतैः सर्वात्मना ब्रह्मकुलं निषेव्यताम् ॥ ३९ ॥
पुमाँल्लभेतानतिवेलमात्मनः प्रसीदतोऽत्यंतशमं स्वतः स्वयम् ॥ यं नित्यसंबंधनिषेवया ततः परं किमत्रास्ति मुखं हविर्भु-
जाम् ॥ ४० ॥ अश्नात्यनंतः खलु तत्त्वकोविदैः श्रद्धाहुतं यन्मुख इज्यनामभिः ॥ न वै तथा चेतनया बहिष्कृते हुताशने पारमहंस्यप-
र्यगुः ॥ ४१ ॥ यद्ब्रह्म नित्यं विरजं सनातनं श्रद्धातपोमंगलमौनसंयमैः ॥ समाधिना बिभ्रति हार्थदृष्टये यत्रेदमादर्श इवावभासते ॥ ४२ ॥

॥ ४० ॥ हरेरपि तदेव परं मुखमित्याह । अश्नातीति । इज्यानां पूज्यानामिंद्रादीनां नामभिर्यस्य मुखे श्रद्धया हुतं हविरनंतो यथाऽश्नाति तथा चेतनया रहिते हुताशने हुतं
नाश्नाति कैर्हुतमश्नाति तत्त्वकोविदैः सर्वदेवमयश्चैतन्यमूर्तिरनंत इति तत्त्वं विद्वद्भिः । कुत एवंभूतोऽसौ तत्राह । पारमहंस्यं ज्ञानं तत्परानर्हत्यधिकुर्वतीति पारमहंस्यपर्यास्ता
गावो वाचो यस्मिन् उपनिषद्भिर्ज्ञानघनत्वेनोक्त इत्यर्थः । यद्वा । परमहंसानां ज्ञाननिष्ठानां गम्यः पारमहंस्यः परितो न गच्छंति गावो वाचो यस्मात्स पर्यगुरिंद्रियनियंता
स चासौ स च पारमहंस्यपर्यगुर्ज्ञानरूपः सर्वांतर्यामीत्यर्थः ॥ ४१ ॥ न केवलं चेतनत्वेन हुताशनाद्विशेषः किंतु वेदज्ञानादपीत्याह । यदित्यव्ययम् । ये ब्रह्म वेदं नित्यं

सेवा करावी ॥ ३९ जनहो, ज्या ब्राह्मणांची नित्य निष्कपटभावानें उत्तम सेवा केली असतां पुरुष, ज्ञानाचा अभ्यास केल्याशिवाय आपोआपच शीघ्र शुद्धचित्त होऊन मो-
क्षाला पावतो त्या ब्राह्मणकुलापेक्षां मोठ्या योग्यतेचें दुसरें देवांचें मुख जगामध्यें कोणतें आहे ? कोणतेंच नाहीं. अर्थात् ब्राह्मणांच्या सेवेनेंच सर्व फलप्राप्ति होतये ॥ ४० ॥
सर्व उपनिषदांनीं ज्ञानघनत्वें करून सांगितलेला अनंत भगवान्, तत्त्ववेत्त्या पुरुषांनीं, इंद्रादिकांची तृप्ती होण्याच्या उद्देशानें, ज्या ब्राह्मणांच्या मुखामध्यें श्रद्धापूर्वक हवन
केलें असतां (भक्तिपुरःसर ब्राह्मणांना अन्नादिकांचें भोजन घातलें असतां) तें मनापासून जसें भक्षण करितो (जितक्या अंशीं त्याला प्रिय वाटतें) त्याप्रमाणें चेतनाश-
क्तीनें रहित अशा अग्नीमध्यें हवन केलें असतां तें भक्षण करीत नाहीं (त्याला प्रिय वाटत नाहीं) ॥ ४१ ॥ हे आर्य जनहो, आरशामध्यें भासमान होणाऱ्या मुखाप्रमाणें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ज्या वेदामध्यें हें विश्व भासमान होतें त्या शुद्ध व सनातन वेदाला जे ब्राह्मण, श्रद्धा, तपश्चर्या, शुद्ध आचरण, वृथाभाषणाचा त्याग, इंद्रियांचा निग्रह आणि चित्ताची एकाग्रता यांच्या योगेंकरून नित्य धारण करितात त्यांच्या चरणकमळाची धूळ, मी आपल्या मुकुटावर, माझें आयुष्य आहे तोंपर्यंत धारण करीन. कारण, ज्या धुळीला, निरंतर धारण करणाऱ्या पुरुषाचें पातक तत्काल नष्ट होतें व सर्वहि गुण त्याच पुरुषाचा आश्रय करितात ॥ ४२ ॥ ४३ ॥ सर्व गुणाचा आश्रय, सुस्वभावरूप धनानें संपन्न, दुसऱ्याचे उपकार जाणणारा आणि वृद्धजनाची सेवा करणारा अशा पुरुषास सर्व संपत्ति आपण होऊन वरितात. म्हणून मी अशी इच्छा करितों कीं, ब्राह्मणांचें कुल गाईंचा समुदाय, आणि भक्तमंडळासह भगवान् विष्णु हे मजवर प्रसन्न होवोत ॥ ४४ ॥ मैत्रेय म्हणाला– हे विदुरा, याप्रमाणें पृथुराजानें भाषण केलें

बिभ्रति तेषामित्युत्तरेणान्वयः । मंगलं नाम । प्रशस्ताचरणं नित्यमप्रशस्तस्य वर्जनम् । एतद्धि मंगलं प्रोक्तमृषिभिस्तत्त्वदर्शिभिः ॥ मौनमध्ययनविरोधिवार्तात्यागः समाधिना चित्तस्थैर्येण अर्थदृष्टये वेदार्थमपि विचारयंतीत्यर्थः । यत्र वेदे इदं विश्वमवभासते । यथा आदर्शे मुखम् ॥ ४२ ॥ हेआर्या आ आयुर्यावज्जीवमधिकिरीटं मुकुटस्योपरि वहेयेति-

तेषामहं पादसरोजरेणुमार्या वहेयाधिकिरीटमायुः ॥ यं नित्यदा बिभ्रत आशु पापं नश्यत्यमुं सर्वगुणा भजंति ॥ ४३ ॥ गुणायनं शीलधनं कृतज्ञं वृद्धाश्रयं संवृणते नु संपदः ॥ प्रसीदतां ब्रह्मकुलं गवां च जनार्दनः सानुचरश्च मह्यम् ॥ ४४ ॥ मैत्रेय उवाच ॥ इति ब्रुवाणं नृपतिं पितृदेवद्विजातयः ॥ तुष्टुवुर्हृष्टमनसः साधुवादेन साधवः ॥ ४५ ॥ पुत्रेण जयते लोकानिति सत्यवती श्रुतिः ॥ ब्रह्मदंडहतः पापो यद्वेनोऽत्यतरत्तमः ॥ ४६ ॥ हिरण्यकशिपुश्चापि भगवन्निंदया तमः ॥ विविक्षुरत्यगात्सूनोः प्रह्लादस्यानुभावतः ॥ ४७ ॥ वीरवर्य पितः पृथ्व्याः समाः संजीव शाश्वतीः ॥ यस्येदृश्यच्युते भक्तिः सर्वलोकैकभर्तरि ॥ ४८ ॥ अहो वयं ह्यद्य पवित्रकीर्ते त्वयैव नाथेन मुकुंदनाथाः ॥ य उत्तमश्लोकतमस्य विष्णोर्ब्रह्मण्यदेवस्य कथां व्यनक्ति ॥ ४९ ॥

प्रार्थनायां लिङ् । यं रेणुम् ॥ ४३ ॥ गुणभजनस्य फलमाह । गुणायनमन्वनु संपदः संवृणते सम्यग्भजंति तस्मात्प्रसीदतां प्रसीदतु गवां च कुलम् ॥ ४४ ॥ ४५ ॥ साधुवादमाह । पुत्रेणेति षड्भिः । यद्यतो वेनोऽपि तमो नरकमत्यतरदतितितार ॥ ४६ ॥ ४७ ॥ ४८ ॥ मुकुंदनाथाः स्म त्वन्नाथत्वमेव मुकुंदनाथत्वे पर्यवसितमित्यर्थः । तत्र हेतुर्य इति ॥ ४९ ॥

असतां त्या उत्तम भाषणाच्या योगानें संतुष्टचित्त झालेले व सदाचारनिष्ठ असल्यामुळें शुद्धचित्त असे ते पितर, देव आणि ब्राह्मण, त्याची स्तुति करूं लागले ॥ ४५ ॥ ते म्हणाले– पुत्राच्या योगानें पित्याला उत्तम लोक प्राप्त होतात अशी श्रुति आहे ती अगदीं खरी आहे. कारण, ब्राह्मणांच्या शापानें हत झालेला पापी वेनराजासुद्धां पृथुनामक पुत्राच्या योगेंकरून नरकापासून तरला ॥ ४६ ॥ तसाच हिरण्यकशिपुसुद्धां भगवंताच्या निंदेनें नरकामध्यें पडत होता परंतु प्र्ऱ्हादनामक पुत्राच्या भगवद्भजनरूप प्रभावानें उद्धरून गेला ॥ ४७ ॥ हे वीरश्रेष्ठा, हे भूमिपित्या पृथुराजा, सर्व लोकांचा मुख्य पालक अशा अच्युतभगवंताचेठिकाणीं ज्या तुझी, अशी अतिअपूर्व भक्ति आहे तो तूं अनंतसंवत्सरपर्यंत जिवंत राहा ॥ ४८ ॥ हे पवित्रकीर्ते राजा, जो तूं पुण्यकीर्ति पुरुषांत अतिश्रेष्ठ व ब्राह्मणांचा हितकारी अशा विष्णूची कथा वर्णन करीत आहेस,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्या तुझ्यासारखा नाथ मिळाल्यामुळेंच आम्हीं आज, मुकुंद भगवान् ज्यांचा नाथ आहे असे झालों आहों ॥४९॥ हे नाथा, तुला सेवकांना शिक्षण करणें हें अतिआश्चर्यकारक नाहीं; कारण, प्रजाजनांवर प्रेम करणें हा दयाळु अंतःकरणानें युक्त अशा सत्पुरुषांचा स्वभावच आहे ॥ ५० ॥ हे प्रभो, प्रारब्धकर्माच्या योगानें नष्टदृष्टि झालेल्या व संसारामध्यें भ्रमण पावणाऱ्या आम्हांला आज तूं भगवत्तत्त्वाचा उपदेश करून अज्ञानरूप अंधकाराचा पार दाखविला आहेस ॥ ५१ ॥ यास्तव जो ब्रह्मकुलामध्यें प्रवेश करून क्षत्रियकुलाचें रक्षण करितो व क्षत्रियकुलामध्यें प्रवेश करून ब्रह्मकुलाचें रक्षण करितो आणि दोहोंमध्यें प्रवेश करून ह्या जगाचें परिपालन करितो त्या सत्त्वगुणांची वृद्धि पावणाऱ्या व परमपूज्य अशा पुरुषोत्तमाला आमचा नमस्कार असो ॥ ५२ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील चतुर्थ-

---

आजीविनां सेवकानां आ सम्यगनुशासनम् । प्रजास्वनुरागः प्रकृतिः स्वभावः ॥ ५० ॥ उपासादितः प्रापितः कर्मभिर्भ्राम्यताम् ॥ ५१ ॥ ईश्वरदृष्ट्या विप्रादयोऽपि प्रणमंति । नम इति । ब्रह्माविश्य ब्राह्मणजातिमधिष्ठाय क्षत्रं क्षत्रियं बिभर्ति क्षत्रं चाविश्य ब्रह्म बिभर्ति तदुभयं चाविश्येदं विश्वं बिभर्ति ॥ ५२ ॥ इति चतुर्थे टीकायामेकविंशोऽध्यायः ॥ २१ ॥ ॥ द्वाविंशे तु परं ज्ञानं पृथवे हरिशासनात् ॥ सनत्कुमारो भगवानुपादिशदितीर्यते ॥ १ ॥ मुनयः सनकादयः ॥ १ ॥ अर्चिषा

नात्यद्भुतमिदं नाथ तवाजीव्यानुशासनम् ॥ प्रजानुरागो महतां प्रकृतिः करुणात्मनाम् ॥ ५० ॥ अद्य नस्तमसः पारस्त्वयोपासादितः प्रभो ॥ भ्राम्यतां नष्टदृष्टीनां कर्मभिर्दैवसंज्ञितैः ॥ ५१ ॥ नमो विवृद्धसत्त्वाय पुरुषाय महीयसे ॥ यो ब्रह्म क्षत्रमाविश्य बिभर्तीदं स्वतेजसा ॥ ५२ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे चतुर्थस्कंधे एकविंशोऽध्यायः ॥ २१ ॥ ॥ मैत्रेय उवाच ॥ जनेषु प्रगृणत्स्वेवं पृथुं पृथुलविक्रमम् ॥ तत्रोपजग्मुर्मुनयश्चत्वारः सूर्यवर्चसः ॥ १ ॥ तांस्तु सिद्धेश्वरान्राजा व्योम्नोऽवतरतोऽर्चिषा ॥ लोकानपापान्कुर्वत्या सानुगोऽचष्ट लक्षितान् ॥ २ ॥ तद्दर्शनोद्गतान्प्राणान्प्रत्यादित्सुरिवोत्थितः ॥ ससदस्यानुगो वैन्य इंद्रियेशो गुणानिव ॥ ३ ॥

लक्षितान्स नकादय इति ज्ञापितान् । अचष्टापश्यत् ॥ २ ॥ तेषां दर्शनेनोद्गतान्प्राणान्प्राप्तुमिच्छुरिव । अयं भावः । ऊर्ध्वं प्राणा ह्युत्क्रामंति यूनः स्थविर आयति ॥ प्रत्युत्थानाभिवादाभ्यां पुनस्तान्प्रतिपद्यत इति स्मृतेः । प्राणास्तावत्तत्तेजसाक्षिप्तास्तान्प्रत्युद्गच्छंत्यतः स्वयमनुद्गच्छतः प्राणहानिः स्यादिति भयादिव ससंभ्रमं प्रत्युद्गमं

स्कंधामध्यें पृथुकृतप्रजानुशासननामक हा एकविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २१ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ ७ ॥ ॥ आतां या बाविसाव्या अध्यायामध्यें श्रीहरीच्या प्रेरणेवरून भगवान् सनत्कुमार ऋषीनें पृथुराजाला उत्कृष्ट ज्ञानाचा उपदेश केला अशी कथा वर्णन केली आहे ॥ १ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, याप्रमाणें प्रजाजन, त्या महापराक्रमी पृथुराजाची स्तुति करीत आहेत इतक्यांत सूर्यासारखे तेजःपुंज असे चार सनत्कुमारादिक मुनि तेथें प्राप्त झाले ॥ १ ॥ तेव्हां सेवकांसहित असलेल्या त्या राजानें, लोकांना निष्पाप करणाऱ्या कांतीनेंच हे सनकादिक ऋषि आहेत असें जाणविलेल्या व आकाशांतून खालीं उतरणाऱ्या त्या सिद्धेश्वरांना अवलोकन केलें ॥ २ ॥ आणि जसा जीव, सुमंगादि विषयांना उत्सुकतेनें सामोरा जातो त्याप्रमाणें त्या मुनींच्या दर्शनानें निघून जात असलेल्या आपल्या प्राणांना फिरून ग्रहण करण्याच्या इच्छेनेंच कीं काय तो राजा, सभासद व सेवक यांसहवर्तमान उठून उभा राहिला ॥ ३ ॥

---

१ वृद्ध पुरुष प्राप्त झाला असतां, तरुण पुरुषाचे प्राण त्याला सामोरे जाण्याकरितां बाहेर जाऊं लागतात ह्मणून त्यानें त्या वृद्ध पुरुषाला उत्थापन द्यावें व वंदन करावें ह्मणजे ते प्राण पुनः जागच्याजागीं राहतात.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नंतर मुनीच्या महत्त्वामुळें त्यांच्या अंकित झालेल्या व नम्रतेनें आपली मान खालीं वांकविणाऱ्या त्या सभ्य राजानें, आसनाचा व अर्घ्याचा स्वीकार करणाऱ्या त्या मुनीची यथाविधि पूजा केली ॥ ४ ॥ आणि त्यांच्या पादप्रक्षालनोदकानें ज्याच्या केशबंधाचें क्षालन झालें आहे असा तो राजा, त्या सभेमध्यें सदाचारसंपन्न पुरुषांचा आचारच फार चांगला आहे असा त्या सदाचाराचा बहुमान करून स्वतःहि त्याप्रमाणेंच त्याचें आचरण करिता झाला ॥ ५ ॥ नंतर श्रद्धा आणि इंद्रियनिग्रह यांनीं युक्त असा तो राजा संतुष्ट होत्साता, 'आपापल्या स्थानीं स्थित असलेल्या तीन अग्नीप्रमाणें' सुवर्णाच्या आसनांवर बसलेले व शंकराचे वडील बंधु अशा त्या सनत्कुमारादिकांस ह्मणाला कीं– ॥ ६ ॥ पृथु ह्मणाला– हे मुनिहो, आपलें आगमन केवळ मंगलरूप आहे. योगिजनांच्याहि दृष्टीस पडण्यास अशक्य अशा तुमचें ज्या मला दर्शन झालें त्या मी पूर्वीं काय बरें

चकारेति सह सदस्यैरनुगैश्च वर्तमानः इंद्रियेशो जीवो गुणान्गंधादीन्प्रति यथोद्गच्छतीत्यौत्सुक्ये दृष्टांतः ॥ ३ ॥ यंत्रितो वशीकृतः गृहीतमर्घ्यर्हणमर्घ्यमासनं च यैस्तान् ॥ ४ ॥ मार्जितं क्षालितमलकबंधनं यस्य मानयन्निव स्वयं चचार ॥ ५ ॥ भवस्याप्यग्रजत्वेन मान्यान् ॥ ६ ॥ प्रीतः प्राहेरयुक्तं तदेव प्रीतिपूर्वकं वचनमाह । अहो इति

गौरवायंत्रितः सभ्यः प्रश्रयानतकंधरः ॥ विधिवत्पूजयांचक्रे गृहीताध्यर्हणासनान् ॥ ४ ॥ तत्पादशौचसलिलैर्मार्जितालकबंधनः ॥ तत्र शीलवतां वृत्तमाचरन्मानयन्निव ॥ ५ ॥ हाटकासन आसीनान्स्वधिष्ण्येष्विव पावकान् ॥ श्रद्धासंयमसंयुक्तः प्रीतः प्राह भवाग्रजान् ॥ ६ ॥ पृथुरुवाच ॥ अहो आचरितं किं मे मंगलं मंगलायनाः ॥ यस्य वो दर्शनं ह्यासीद्दुर्दर्शानां च योगिभिः ॥ ७ ॥ किं तस्य दुर्लभतरमिह लोके परत्र च ॥ यस्य विप्राः प्रसीदंति शिवो विष्णुश्च सानुगः ॥ ८ ॥ नैव लक्षयते लोको लोकान्पर्यटतोऽपि यान् ॥ यथा सर्वदृशं सर्व आत्मानं येऽस्य हेतवः ॥ ९ ॥ अधना अपि ते धन्याः साधवो गृहमेधिनः ॥ यद्गृहा ह्यर्हवर्यांबुतृणभूमीश्वरावराः ॥ १० ॥ व्यालालयद्रुमा वैतेऽप्यरिक्ताखिलसंपदः ॥ यद्गृहास्तीर्थपादीयपादतीर्थविवर्जिताः ॥ ११ ॥

दशभिः । हेमंगलायनाः मंगलमयनं येषाम् । मया किं मंगलमाचरितम् । यस्य मे योगिभिरपि दुर्दर्शानां वो दर्शनमासीत् ॥ ७ ॥ ८ ॥ दुर्दर्शत्वमेवाह । नैवेति । सर्वदृशमात्मानं यथा सर्वे दृश्या न लक्षयंते येऽस्य विश्वस्य हेतवो महदादयो मन्वादयो वा । यद्वा कथंभूतान् । येऽस्य सर्वदृगात्मदर्शनस्य हेतवस्तान् ॥ ९ ॥ येषां साधूनां गृहा अर्हाणां पूज्यानां वर्या वरणीयाः स्वीकारार्हा अंब्वादयो येषु तादृशाः अंबु च तृणं च भूमिश्च ईश्वरो गृहस्वामी चावरा भृत्यादयश्च ॥ १० ॥ व्यालानामालया द्रुमा एव

पुण्यकर्म केलें असावें! ॥ ७ ॥ आज तर मी खरोखर कृतार्थ झालों आहें. कारण, ज्याच्यावर तुमच्यासारखे ब्राह्मण, तसेच भक्तांसहवर्तमान शंकर आणि विष्णु हे प्रसन्न होतात त्या पुरुषाला या लोकीं किंवा परलोकीं अतिदुर्लभ असें काय बरें आहे? कांहींच नाहीं ॥ ८ ॥ हे ब्रह्मनिष्ठ हो, या जगाला कारणभूत जे महत्तत्त्वादिक सर्व देव ते जसे सर्वसाक्षी परमात्म्याला जाणत नाहींत त्याप्रमाणें सर्वांवर उपकार करण्याकरितां लोकांमध्यें पर्यटण करणाऱ्या तुह्मांला, हा जनसमूह, 'हे अशा सामर्थ्याचे आहेत' असें जाणत नाहीं ॥ ९ ॥ अहो ज्यांच्या घरांमध्यें आपल्यासारख्या पूज्य जनांना स्वीकार करण्यास योग्य अशीं जल, तृणादिकांचीं आसनें, भूमि, गृहस्वामी व सेवक हीं असतात ते सदाचारसंपन्न गृहस्थाश्रमी लोक, निर्धन जरी असले तथापि धन्य होत ॥ १० ॥ आणि जीं घरें भगवद्भक्तांच्या चरणतीर्थानें रहित ॥ ६९ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आहेत तीं जरी सर्व संपत्तींनीं परिपूर्ण असलीं तथापि तीं, सर्पांना आश्रयभूत असलेल्या वृक्षांसारखीं व्यर्थ आहेत ॥ ११ ॥ हे द्विजश्रेष्ठहो, तुमचें आगमन झालें हें फार चांगलें झालें. कारण, तुह्मी बाल्यावस्थेपासून मुमुक्षु असून इंद्रियांचा निग्रह करणारे व नैष्ठिकब्रह्मचर्यादिक मोठमोठीं व्रतें श्रद्धापूर्वक आचरण करणारे आहां; तेव्हां आपली थोरवी किती वर्णन करावी! ॥ १२ ॥ तुह्मी आमचे धनी आहां, तेव्हां दुःखाचें क्षेत्र (शेत) अशा या संसारामध्यें स्वकर्मांच्या योगेंकरून पडलेल्या व इंद्रियांचे उपभोग्य जे विषय हेच पुरुषार्थ असें मानणाऱ्या आमचें कल्याण कोणत्यातरी उपायानें आहे काय? ॥ १३ ॥ आपण ह्मणाल 'राजा, आपल्या घरीं आलेल्या पाहुण्याला, त्याचें कुशल विचारण्याची चाल आहे, असें असतां तूं आह्मांला आपलेंच कुशल विचारितोस हें काय?' तर हे ब्रह्मनिष्ठ हो, स्वस्वरूपाचेठिकाणीं रममाण असणाऱ्या तुमचेठिकाणीं कुशलप्रश्न योग्य होत नाहीं. कारण, कल्याणरूपी आणि अकल्याणरूपी अशा बुद्धीच्या वृत्ति आपल्याठिकाणीं मुळींच नाहींत

ते अरिक्ताः पूर्णा अखिलाः संपदो येषु तादृशा अपि यद्गृहा ये गृहास्तीर्थपादीया वैष्णवास्तेषां पादतीर्थेन विवर्जिताः ॥ ११ ॥ स्वागतं भद्रमागमनं जातम्। यद्यस्माद्बाला एव भवंतो बृहंति व्रतानि चरंति। यद्वा। येषां वो व्रतान्यन्ये बालाश्चरंति ॥ १२ ॥ इंद्रियार्था विषयास्तानेवार्थं पुरुषार्थं ये विदंति तेषां नः व्यसनान्युप्यंते यस्मिंस्तस्मिन्सं

स्वागतं वो द्विजश्रेष्ठा यद्व्रतानि मुमुक्षवः ॥ चरंति श्रद्धया धीरा बाला एव बृहंति च ॥ १२ ॥ कच्चिन्नः कुशलं नाथा इंद्रियार्थार्थवेदिनाम् ॥ व्यसनावाप एतस्मिन्पतितानां स्वकर्मभिः ॥ १३ ॥ भवत्सु कुशलप्रश्न आत्मारामेषु नेष्यते ॥ कुशलाकुशला यत्र न संति मतिवृत्तयः ॥ १४ ॥ तदहं कृतविश्रंभः सुहृदो वस्तपस्विनाम् ॥ संपृच्छे भव एतस्मिन्क्षेमः केनांजसा भवेत् ॥ १५॥ व्यक्तमात्मवतामात्मा भगवानात्मभावनः ॥ स्वानामनुग्रहायेमां सिद्धरूपी चरत्यजः ॥ १६ ॥ मैत्रेय उवाच ॥ पृथोस्तत्सूक्तमाकर्ण्य सारं सुष्ठु मितं मधु ॥ स्मयमान इव प्रीत्या कुमारः प्रत्युवाच ह ॥ १७ ॥ सनत्कुमार उवाच ॥ साधु पृष्टं महाराज सर्वभूतहितात्मना ॥ भवता विदुषा चापि साधूनां मतिरीदृशी ॥ १८ ॥

सारे ॥ १३ ॥ नन्वभ्यागतानां कुशलं पृच्छते लोके न त्वात्मनस्तत्राह। भवत्स्विति ॥ १४ ॥ तत्तस्मात्कृतविश्वासः संस्तपस्विनां संतप्तानां सुहृदो वो युष्मान्पृच्छामि ॥ १५॥ न खल्वन्ययोगितुल्या यूयं किंतु साक्षाद्भगवानेवेत्याह। व्यक्तं निश्चितमात्मवतां धीराणामात्मा तेष्वात्मत्वेन प्रकाशमानः आत्मानं भावयति प्रकाशयतीति तथा अजः श्रीनारायणः इमां पृथ्वीं चरति ॥ १६ ॥ सूक्तं शोभनवचनम्। सारं न्याय्यम्। सुष्ठु गंभीरार्थम्। मितमल्पाक्षरम्। मधु श्रोत्रप्रियम्। मुखप्रसत्त्यास्मयमान इव प्रतीयमानः॥१७॥ विदुषा जानतापि

॥ १४ ॥ तस्मात् आपल्या भाषणावर विश्वास ठेवणारा मी, त्रिविध तापानें संतप्त झालेल्या लोकांचें या संसारामध्यें कोणत्या साधनानें अनायासानें कल्याण होईल, हें आपणास विचारितों. कारण, आपण संसारी लोकांचे हितचिंतक आहां ॥ १५ ॥ अहो आत्मवेत्त्या पुरुषांना अत्यंत प्रिय, असा भगवान् नारायणच आपल्यासारख्या सिद्धांच्या स्वरूपानें आपल्या भक्तांवर अनुग्रह करण्याकरितां ह्या पृथिवीवर संचार करितो, हें अगदीं निश्चित आहे. कारण, तो स्वतः जन्मादि विकाररहित असून भक्तांना आपल्या स्वरूपाचा प्रकाश करून देणारा आहे ॥१६॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, पृथुराजाचें, न्यायास अनुरूप, गंभीर अभिप्रायानें भरलेलें, थोडें व कानांला गोड लागणारें असें तें उत्तम भाषण श्रवण करून, हास्य केल्यासारखा प्रसन्नमुख तो सनत्कुसार मुनि, आनंदानें त्या राजाला ह्मणाला कीं, ॥१७ ॥ सनत्कुमार ह्मणाला– हे महाराज, सर्व भूतांचें हित करण्याची इच्छा करणाऱ्या व तें हित जाणत असणाऱ्याहि तूं, फार चांगला प्रश्न केलास. ठीकच आहे. सत्पुरुषांची बुद्धि अशीच असत्ये॥१८॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

साधूंचा समागम, वक्ते आणि श्रोते ह्या उभयतांनाहि मान्य असतो यांत संशय नाहीं. कारण, ज्या वक्त्याश्रोत्यांचा संभाषणसहित निघालेला उत्तम प्रश्न, तेथें असणाऱ्या सर्वलोकांचें कल्याण करितो ॥ १९ ॥ हेराजा, मधुसूदनाच्या चरणकमलाचे जे पराक्रम त्यांच्या श्रवणाविषयीं तुला निश्चळ प्रीति आहेच. जी प्रीति, अभक्तांना दुर्लभ असून, वस्त्राला लागलेल्या गैरिकादिक धातूंच्या डागाप्रमाणें अन्य उपायांनीं न जाणाऱ्या अंतःकरणाच्या वासनात्मक मळालासुद्धां नाहींसा करित्ये ॥ २० ॥ हे राजा, आत्मव्यतिरिक्त देहादिकांचेठिकाणीं विरक्ति आणि निर्गुण ब्रह्मरूप आत्म्याचेठिकाणीं दृढ प्रीति होणें इतकेंच उत्तम विचारांनीं ओतप्रोत

ईदृशी परार्थैकपरा ॥ १८ ॥ स्वयमपि पृथोः संगममभिनंदति । संगम इति उभयेषां वक्तॄणां श्रोतृणां च येषां संभाषणसहितः संप्रश्नः सर्वेषां शं सुखं विस्तारयति ॥ १९ ॥ तदेवं संगमं प्रश्नं चाभिनंद्यानुवादमुखेनैव मोक्षसाधनमुपदिशति । अस्त्येवेति । गुणानामनुवादने प्रश्नद्वारेणानुवादप्रवर्तने श्रमण इत्यर्थः । आत्मनो मनसोऽतरंतस्थं कामात्मकं मलं विधुनोति कषायं धातुरागवदनिवर्त्यम् ॥ २० ॥ चित्तशुद्ध्यैव बहिर्वैराग्यमात्मरतिश्च भवति न च ततोऽधिकं साधनमस्ति शास्त्रेषु तयोरेव मोक्षहेतुत्वनिश्चयादित्याह । शास्त्रेष्विति । सध्र्यग्विमृशेषु सम्यग्विचारवत्सु शास्त्रेषु क्षेमस्य हेतुरेतावानेव सुनिश्चितः कोऽसौ आत्मव्यतिरिक्ते

संगमः खलु साधूनामुभयेषां च संमतः ॥ यत्संभाषणसंप्रश्नः सर्वेषां वितनोति शम् ॥ १९ ॥ अस्त्येव राजन्भवतो मधुद्विषः पादारविंदस्य गुणानुवादने ॥ रतिर्दुरापा विधुनोति नैष्ठिकी कामं कषायं मलमंतरात्मनः ॥ २० ॥ शास्त्रेष्वियानेव सुनिश्चितो नृणां क्षेमस्य सध्र्यग्विमृशेषु हेतुः ॥ असंग आत्मव्यतिरिक्त आत्मनि दृढा रतिर्ब्रह्मणि निर्गुणे च या ॥ २१ ॥ सा श्रद्धया भगवद्धर्मचर्यया जिज्ञासयाध्यात्मिकयोगनिष्ठया ॥ योगेश्वरोपासनया च नित्यं पुण्यश्रवःकथया पुण्यया च ॥ २२ ॥ अर्थेंद्रियारामसगोष्ठ्यतृष्णया तत्संमतानामपरिग्रहेण च ॥ विविक्तरुच्या परितोष आत्मन्विनाहरेर्गुणपीयूषपानात् ॥ २३ ॥

देहादावसंगो वैराग्यमात्मनि च दृढा रतिः प्रीतिः आत्मनो विशेषणम् । निर्गुणे ब्रह्मणीति ॥ २१ ॥ नन्वेतदेवातिदुर्लभमित्याशंक्योत्तमाधिकारिणः श्रवणमात्रेण भवत्यन्यस्य तु चित्तशुद्ध्यनुसारेण साधनतारतम्यतो वर्धमानया भक्त्येत्यभिप्रेत्याह । सेति चतुर्भिः । सा ब्रह्मणि रतिरसंगश्च श्रद्धादिभिः स्यादिति चतुर्थेनान्वयः । जिज्ञासया तत्तद्विशेषबुभुत्सया पुण्यं श्रवो यशो यस्य तस्य हरेः पुण्यया कथया च ॥ २२ ॥ अर्थारामा अर्थनिष्ठास्तामसा इंद्रियारामाः कामनिष्ठा राजसास्तैः सह या गोष्ठी तस्यामतृष्णया तेषां च ये संमता अर्थाः कामाश्च तेषामपरिग्रहेणानासक्त्या विविक्ते विजने या रुचिस्तया सा चात्मन्येव परितोषे सति स्यात्किंतु हरेर्गुणपीयूषपानाद्विना

भरलेल्या शास्त्रांमध्यें मनुष्यांच्या मोक्षरूप कल्याणाचें साधन ठरविलें आहे ॥ २१ ॥ त्या विरक्ति व प्रीति उत्पन्न होण्याचीं साधनें अशीं आहेत कीं, गुरूच्या व शास्त्रांच्या वचनांवर विश्वास ठेवणें, भागवत धर्मांचें आचरण करणें, भजनादि प्रकार जाणण्याची इच्छा करणें, यमनियमादिक योगाभ्यासांत तत्पर राहणें, योगेश्वर परमात्म्याची उपासना करणें, पुण्यकीर्ति अशा भगवंताच्या पवित्र चरित्रांचें नित्य श्रवण करणें, अर्थप्राप्तीमध्यें व इंद्रियांची तृप्ति करण्यामध्यें रममाण असणाऱ्या तामस व राजस प्रकृतींच्या लोकांशीं सहवास करण्याची इच्छा सोडून देणें, त्या राजस तामस लोकांना आवडणारे जे अर्थ व काम त्यांचेठिकाणीं आसक्ति न करणें, ॥ २२ ॥ एकांत वासाची प्रीति धारण करणें, आत्मस्वरूपाच्या ठिकाणीं समाधान मानणें, परंतु हरीच्या कथामृताचें प्राशन करावयास मिळत असेल तर मात्र एकांत ॥ ६६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वासाची प्रीति व आत्मस्वरूपीं समाधान मानूं नये, तर समाजांत जाऊन मन लावून हरिकथाच श्रवण करावा ॥ २३ ॥ हिंसा न करणें, अनायासानें प्राप्त झालेल्या अन्नादिकांच्या योगानें वृत्ति चालविणें, आपल्या हिताचें अनुसंधान राखणें, मोक्षदात्या हरीच्या लीलारूपी उत्तम अमृताचें स्मरण करणें, कोणतीहि इच्छा न धरितां अहिंसा, सत्य, स्नानसंध्या इत्यादिक यमनियमाचें सेवन करणें, दुसऱ्या मार्गाची किंवा दुसऱ्या देवतांची निंदा न करणें, शरीरनिर्वाहाकरितां (योगक्षेमांकरितां) कोणतेहि व्यापार न करणें, शीत उष्ण क्षुधा तृषा इत्यादि द्वंद्वांचें सहन करणें ॥ २४ ॥ आणि भगवद्भक्तांच्या कर्णांना शोभविणारे अलंकारच अशा हरीच्या गुणानुवादांचें उच्चारण करणें, यांच्या योगानें वृद्धिंगत झालेल्या भक्तीच्या योगेंकरून स्थूलसूक्ष्मरूपी अशा आत्मव्यतिरिक्त प्रपंचाचेठिकाणीं विरक्ति आणि निर्गुणब्रह्मरूप

तस्मिन्सति विविक्ते रुचिर्न कार्या न चात्मनि परितोषः कार्य इत्यर्थः ॥ २३ ॥ पारमहंस्यचर्यया उपशमादिप्रधानया वृत्त्या स्मृत्यात्महितानुसंधानेन मुकुंदाचरितमेवाग्र्यं सीधु श्रेष्ठममृतं तच्चरितस्मृतिसुखेनेत्यर्थः । मार्गांतरस्यानिंदया निरीहया योगक्षेमार्थक्रियाराहित्येन शीतोष्णादिद्वंद्वसहनेन ॥ २४ ॥ कथयेत्यत्रोक्तमपि कथनं भक्तावंतरंगत्वेन पुनरुच्यते तत्परा हरिभक्तास्तेषां कर्णपूराः कर्णालंकारभूता ये हरेर्गुणास्तेषामभिधानेन सदसति कार्यकारणरूपे ॥ २५ ॥ भवत्वन्यत्रासंग आत्मरतिश्च ततः किमत आह । यदा निष्ठां प्राप्तार तिर्भवति तदाचार्यवान्सन् ज्ञानवैराग्ययोर्वेगेनावीर्यं निर्वासनं सज्जीवस्य कोशमावरकं हृदयं पुमान्दहति । कथंभूतम् । पंचमहाभूतप्रधानम् । यद्वा अविद्या-

अहिंसया पारमहंस्यचर्यया स्मृत्या मुकुंदाचरिताग्र्यसीधुना ॥ यमैरकामैर्नियमैश्चाप्यनिंदया निरीहया द्वंद्वतितिक्षया च ॥ २४ ॥
हरेर्मुहुस्तत्परकर्णपूरगुणाभिधानेन विजृंभमाणया ॥ भक्त्या ह्यसंगः सदसत्यनात्मनि स्यान्निर्गुणे ब्रह्मणि चांजसा रतिः ॥ २५ ॥
यदा रतिर्ब्रह्मणि नैष्ठिकी पुमानाचार्यवान्ज्ञानविरागरंहसा ॥ दहत्यवीर्यं हृदयं जीवकोशं पंचात्मकं योनिमिवोत्थितोऽग्निः ॥ २६ ॥
दग्धाशयो मुक्तसमस्ततद्गुणो नैवात्मनो बहिरंतर्विचष्टे ॥ परात्मनोर्यद्व्यवधानं पुरस्तात्स्वप्ने यथा पुरुषस्तद्विनाशे ॥ २७ ॥

स्मितारागद्वेषाभिनिवेशाः पंच तदात्मकम् । उत्थितः प्रज्वलितोऽग्निर्योनिमरणिमिव । यद्वा यदा रतिराचार्यानुग्रहश्च तदा ज्ञानविरागयोर्वेगेनोत्थितः साक्षात्कारो वीर्यं पुनः प्ररोहक्षमं यथा न भवत्येवं हृदयं दहति । शेषं समानम् ॥ २६ ॥ ततः किमत आह । दग्ध आशयो हृदयमुपाधिर्यस्य अतएव मुक्ताः समस्तास्तद्गुणाः कर्तृत्वादयो येन आत्मनः सकाशाद्बहिर्घटाद्यंतः सुखदुःखादि नैव विचष्टे न पश्यत्येव । कुत इत्यपेक्षायां द्रष्टृदृश्यप्रतीतेरंतःकरणहेतुत्वादित्याह । परो दृश्य आत्मा द्रष्टा तयोर्यद्व्यवधानं भेदकं

आत्म्याचेठिकाणीं दृढ प्रीति ह्या अनायासानें प्राप्त होतात ॥ २५ ॥ हे राजा, जेव्हां ब्रह्माचेठिकाणीं निश्चल प्रीति होत्ये तेव्हां पुरुष, ब्रह्मनिष्ठ सद्गुरूचा आश्रय करून ज्ञान आणि वैराग्य यांच्या वेगानें, जसा प्रज्वलित झालेला अग्नि, आपल्या उत्पत्तिस्थानरूप काष्ठाला जाळून टाकितो त्याप्रमाणें, जीवाला आवरण करणारें, पंचमहाभूतात्मक अथवा अविद्या, स्मित, राग, द्वेष आणि अभिनिवेश अशा पांचप्रकारचें जें आपलें अंतःकरण त्याला, 'तें पुनः जसें अंकुर पावणार नाहीं तसें' जाळून टाकितो ॥ २६ ॥ नंतर जसा जागृत झालेला पुरुष, स्वप्नामध्यें भासलेल्या 'मी राजा आहें व माझ्या पुढें पुष्कळ सैन्य उभें केलेलें आहे' इत्यादिक द्रष्टृ दृश्य धर्मांस पाहत नाहीं त्याप्रमाणें ज्याचें अंतःकरण दग्ध झालें आहे व ज्यानें त्याचे कर्तृत्वादिक धर्म सोडून दिले आहेत तो पुरुष, पूर्वीं घटादिक दृश्य पदार्थांचा आणि त्यांना पाहणाऱ्या द्रष्ट्या आत्म्याचा भेद भासण्याचें कारण जें अंतःकरण त्याचा नाश झाला म्हणजे देहाच्या बाहेर असलेल्या घटादि पदार्थांस व आंत असलेल्या सुखदुःखादि

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रकारांस, मुळींच पाहत नाहीं ॥ २७ ॥ कारण, पुरुष, आत्म्याला (द्रष्ट्याला) आणि इंद्रियांच्या विषयांना (दृश्यांना) व दोन्हींच्या संबंधाला कारण असलेल्या अहंकाराला, अंतःकरणरूप उपाधि असली तरच पाहतो नाहीं तर 'समाधि सुषुप्ति इत्यादिक अवस्थांचेठिकाणीं' पाहत नाहीं ॥ २८ ॥ यास दृष्टांत– भेदाला भासविणारें पाणी किंवा आरसावगैरे निमित्त असलें तरच सर्व ठिकाणीं हा पुरुष, बिंबरूप आपला व प्रतिबिंबरूप दुसऱ्याचा भेद पाहतो. इतर वेळीं (उपाधि नसली तर) पाहत नाहीं ॥ २९ ॥ याप्रमाणें विरक्ति व आत्मप्रीति यांचें मोक्षहेतुत्व सांगून, आतां विषयासक्तीचें बंधहेतुत्व सांगतात– जसें डोहाच्या तीराचेठिकाणीं असणारें दर्भाचें

पूर्वमासीत्तस्य विनाशे सति यथा स्वप्ने राजाऽहमित्यारोपितं सैन्यादि द्रष्टारं दृश्यं सैन्यं च स्वप्नावस्थानाशे न पश्यति तद्वत् ॥ २७ ॥ द्रष्टृदृश्यभेदप्रतीतेरंतःकरणहेतुत्व-मन्वयव्यतिरेकाभ्यामुपपादयति । आत्मनमिति । आत्मानं द्रष्टारमिंद्रियार्थं दृश्यमुभयोस्तयोः परं संबंधहेतुमहंकारं चाशयेंऽतःकरणे सत्येव जाग्रत्स्वप्नयोः पश्यत्यन्यदा सुषुप्तौ न । तदुक्तम् । दृश्यानुरंजितं द्रष्टृ दृश्यं द्रष्टृनुरंजितम् ॥ अहंकृत्योभयं रक्तं तन्नाशेऽद्वैततात्मनः इति ॥ २८ ॥ एकस्मिन्नात्मनि दृश्यादिभेदप्रतीतिरौपाधिकीति दृष्टांतेन स्पष्टयति । निमित्त इति । लोकेऽपि च सर्वत्र जलदर्पणादौ भेदनिमित्ते सत्येवात्मनो बिंबभूतस्य परस्य प्रतिबिंबस्य च भेदं पश्यति न तु जलाद्यभावे ॥ २९ ॥ तदेवं चतुर्भिरसंगात्मरत्योर्मोक्षहेतुत्वमुक्तमिदानीमनात्मरतेः संसारहेतुत्वमाह । इंद्रियैरिति चतुर्भिः । ध्यायतां गुणारोपेण स्मरतां पुंसामिंद्रियाणि स्मृतैर्विषयैराकृष्यंते तैश्च मन

आत्मानमिंद्रियार्थं च परं यदुभयोरपि ॥ सत्याशय उपाधौ वै पुमान्पश्यति नान्यदा ॥ २८ ॥ निमित्ते सति सर्वत्र जलादावपि पूरुषः ॥ आत्मनश्च परस्यापि भिदां पश्यति नान्यदा ॥ २९ ॥ इंद्रियैर्विषयाकृष्टैराक्षिप्तं ध्यायतां मनः ॥ चेतनां हरते बुद्धेः स्तंबस्तो-यमिव ह्रदात् ॥ ३० ॥ भ्रश्यत्यनुस्मृतिश्चित्तं ज्ञानभ्रंशः स्मृतिक्षये ॥ तद्रोधं कवयः प्राहुरात्मापन्हवमात्मनः ॥ ३१ ॥ नातः परतरो लोके पुंसः स्वार्थव्यतिक्रमः ॥ यदध्यन्यस्य प्रेयस्त्वमात्मनः स्वव्यतिक्रमात् ॥ ३२ ॥ अर्थेंद्रियार्थाभिध्यानं सर्वार्थापन्हवो नृणाम् ॥ भ्रंशितो ज्ञानविज्ञानाद्येनाविशति मुख्यताम् ॥ ३३ ॥

आकृष्यते विषयासक्तिं प्राप्यते । तच्च बुद्धेः सकाशात्तद्धर्मं चेतनां विचारसामर्थ्यं हरति । एतच्चाविवेकिना न लक्ष्यत इति दृष्टांतेनाह । तीरजः कुशादिस्तंबो यथा मूलैस्तोयं ह्रदादपहरति तद्वत् ॥ ३० ॥ चित्तं चेतनामनु तस्यामपहृतायां स्मृतिः पूर्वापरानुसंधानं भ्रश्यति एवं तद्रोधं ज्ञानभ्रंशमात्मन एव हेतोरात्मनोऽपह्नवं नाशं प्राहुः ॥ ३१ ॥ एवंभूतो नाशो भवतु ततश्च किमित्यत आह । यदधि यमधिकृत्यान्यस्य विषयस्य प्रियतमत्वम् । आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवतीति श्रुतेः । तस्यात्मनः स्वेनैव यो व्यतिक्रमोऽपह्नवस्तस्माद्यः स्वार्थनाशोऽतः परतरः स्वार्थनाशो नास्ति ॥ ३२ ॥ कुत इत्यत आह । अर्थस्याभिध्यानमिंद्रियस्यार्थः

बेट, आपल्या मुळांनीं कोणाला न समजतां डोहांतील उदक हळूहळू ओढून घेतें त्याप्रमाणें ऐकिलेल्या किंवा अनुभव घेतलेल्या विषयांचें चिंतन करणाऱ्या पुरुषांचें मन विषयासक्त झालेल्या इंद्रियांनीं विषयांकडे आकर्षण केलें असतां तें त्यांच्या बुद्धीचा विचारसामर्थ्याला न समजतां हरण करितें ॥ ३० ॥ विचारसामर्थ्य नाहींसें झालें असतां पूर्वापरानुसंधानरूप स्मृति नाहींशी होते. स्मृतीचा नाश होतांच स्वरूपज्ञानाचा भ्रंश होतो. अशाप्रकारें ज्ञानाचा प्रतिबंध होणें ह्यालाच विद्वान लोक, स्वतःच्या आत्म्याचा नाश करून घेणें असें ह्मणतात ॥ ३१ ॥ ज्याकरितां इतर सर्व विषय अत्यंत प्रिय असतात त्या आत्म्याचें स्वतः जें लपवून ठेवणें (विस्मृति पाडून घेणें) त्यापासून जो स्वार्थाचा नाश आहे त्यापेक्षां प्राण्याचा अधिक नाश तो लोकांमध्यें कोणता आहे ? कोणताच नाहीं, हाच सर्वस्वीं नाश होय ॥ ३२ ॥ धनाचें व इंद्रियतृप्तीचें (कामाचें)

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जें निरंतर चिंतन करणें हाच मनुष्यांच्या सर्व पुरुषार्थांचा नाश होय. कारण, ज्या धनादिकांच्या चिंतनेंकरून शाब्दिक व अनुभविक अशा दोन्हीं प्रकारच्याही ज्ञानांपासून भ्रष्ट झालेला पुरुष, वृक्षादियोनीचेठिकाणीं उत्पन्न होतो ॥ ३३ ॥ ह्मणून भयंकर संसारांतून तरून जाण्याची इच्छा करणाऱ्या पुरुषानें; धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष यांचा अत्यंत नाश करणारी जी वस्तु तिचेठिकाणीं कधींहि आसक्ति करूं नये ॥ ३४ ॥ त्यांतहि मोक्ष हाच पुरुषार्थ कधींहि नष्ट न होणारा असल्यामुळें सर्वोत्कृष्ट आहे. कारण, धर्मार्थकामरूप जो त्रिवर्ग अर्थ तो निरंतर कालाच्या भयानें युक्त आहे ॥ ३५ ॥ सृष्टीच्या आरंभीं त्रिगुणांमध्यें क्षोभ झाल्यानंतर उत्पन्न झालेले जे ब्रह्मदेवादिक

कामस्तस्याभिध्यानं सर्वार्थनाशः ज्ञानं विज्ञानं च परोक्षापरोक्षम् । येन ध्यानेन मुख्यतां स्थावरताम् ॥ ३३ ॥ अनात्मरतेरनर्थहेतुत्वमुक्तं संगस्याप्याह । नेति । यद्वस्तु धर्मादीनां विघातकं तस्मिन्संगम् । तमः संसारम् ॥ ३४ ॥ तुल्यवन्निर्देशात्पुरुषार्थसाम्यभ्रांतिं वारयति । तत्रापीति । कृतांतः कालः ॥ ३५ ॥ भयसंयुतत्वमेवाह । परे ब्रह्मादयोऽवरेऽस्मदादयो गुणक्षोभादनुपश्चाद्भवंति ईशः कालस्तेन विध्वंसिता आशिषो येषाम् ॥ ३६ ॥ यस्मादनात्मरतिरनर्थहेतुस्तत्तस्माज्जगतां जंगमानां तस्थुषां स्थावराणां च देहादिभिरात्मनाऽहंकारेण चावृतानां हृदि यश्चकास्ति प्रकाशते तमवेहि । कथं सोऽस्मीति सोऽस्तीति पाठे स एवैकोऽस्ति ततोऽन्यदसदित्यर्थः । ननु जीवो हृदि चकास्ति नान्यस्तत्राह । क्षेत्रविदं जीवं तपति नियमयतीति क्षेत्रवित्तपस्तस्य भावस्तत्ता तयांतर्यामिरूपेण यद्वा क्षेत्र वित्ते अहंममतास्पदे पातीति क्षेत्रवित्तपस्तेन

न कुर्यात्कर्हिचित्संगं तमस्तीव्रं तितीरिषुः ॥ धर्मार्थकाममोक्षाणां यदत्यंतविघातकम् ॥ ३४ ॥ तत्रापि मोक्ष एवार्थ आत्यंतिकतयेष्यते ॥ त्रैवर्ग्योऽर्थो यतो नित्यं कृतांतभयसंयुतः ॥ ३५ ॥ परेऽवरे च ये भावा गुणव्यतिकरादनु ॥ न तेषां विद्यते क्षेममीशविध्वंसिताशिषाम् ॥ ३६ ॥ तत्त्वं नरेंद्र जगतामथ तस्थुषां च देहेंद्रियासुधिषणात्मभिरावृतानाम् ॥ यः क्षेत्रवित्तपतया हृदि विष्वगाविः प्रत्यक् चकास्ति भगवांस्तमवेहि सोऽस्मि ॥ ३७॥ यस्मिन्निदं सदसदात्मतया विभाति माया विवेकविधुति स्रजि वाहिबुद्धिः ॥ तं नित्यमुक्तपरिशुद्धविबुद्धतत्त्वं प्रत्यूढकर्मकलिलप्रकृतिं प्रपद्ये ॥ ३८ ॥

रूपेण जीवस्तु पारतंत्र्यान्न पाति । ननु कर्म जीवं नियच्छति न आविः प्रत्यक्षः तर्हि बुद्धिः न प्रत्यक्प्रतिलोमं चकास्ति बुद्धिस्तु पराग्विषयाकारेण तद्वदहंकारः न विष्वग्व्याप्तत्वेन स तु परिच्छिन्नः एवंभूतो यो भगवांस्तमवेहीति ॥ ३७ ॥ स्थावरजंगमादीनां हृदि चकास्तीत्युक्ते तेषां सत्त्वं तत्संबंधादीश्वरस्य मालिन्यं च प्रसक्तं निराकुर्वन्बुद्धिक्रभक्त्या तं प्रणमति । यस्मिन्निदं विश्वं सदसदात्मतयोत्कृष्टनिकृष्टभावेन कार्यकारणभावेन वा मायैव विभाति तं प्रपद्ये । मायात्वे हेतुः । विवेकेन विधुतिर्निराकृतिर्यस्य तत् स्रजि वेति वाशब्दो दृष्टांते । नित्यमुक्तम् । यतः परिशुद्धम् । तत्कुतः विबुद्धं तत्त्वं सत्यमतएव प्रत्यूढाभिभूता कर्मभिः कलिला मलिना प्रकृतिर्येन तम् ॥ ३८ ॥

उच्च प्राणी व त्यानंतर झालेले जे आमच्यासारखे नीच प्राणी ते जरी अधिकारी असले तरी त्यांचें सुखानें राहणें घडत नाहीं. कारण, त्यांच्या त्रिविध पुरुषार्थांचा, सर्व समर्थ कालानें नाश केला जातो ॥ ३६ ॥ ह्मणून हे राजा, ज्याअर्थी विषयासक्ति अनर्थाला कारण आहे, त्याअर्थी तूं ती सोडून दे आणि देह, इंद्रियें, प्राण, बुद्धि आणि अहंकार ह्यांनीं वेष्टन केलेल्या स्थावरजंगमात्मक जगाच्या हृदयामध्यें जो भगवान्, जीवांच्या अंतर्यामिरूपेंकरून, अंतर्मुखत्वेंकरून व व्यापकत्वेंकरून प्रत्यक्ष प्रकाश पावतो त्याला ‘ तोच मी आहें ’ असें जाण ॥ ३७ ॥ फुलांच्या माळेच्याठिकाणीं जशी सर्पबुद्धि भासते त्याप्रमाणें ज्याच्याठिकाणीं हें विश्व उत्कृष्टनिकृष्टभावानें किंवा कार्यकारणभावानें केवळ खोटेंच भासतें व माळेवर भासलेला सर्प जसा विचारानें नाहींसा होतो त्याप्रमाणें हा विश्वाचा भ्रमसुद्धां ज्याच्या तत्त्वविचारानें नाहींसा होतो

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection.

त्या नित्यमुक्त, अत्यंत शुद्ध, केवळ ज्ञानस्वरूप व ज्यानें कर्मांच्या योगानें मलिन झालेल्या प्रकृतीचा निरास केला आहे अशा परमेश्वराला मी शरण आहें अशी भावना कर ॥ ३८ ॥ ज्याच्या चरणकमलसंबंधी अंगुलींच्या कांतीची स्मरणरूप भक्ति करून भक्तजन जसे कर्मांच्या योगानें घट्ट झालेल्या आपल्या अहंकाररूप हृदयग्रंथीला अगदीं नाहींसा करून टाकितात त्याप्रमाणें ज्यांची बुद्धि निर्विषय झाली आहे व ज्यांनीं आपलीं इंद्रियें अंतर्मुख केलीं आहेत ते यत्न करणारे ज्ञानमार्गी संन्यासीहि आपल्या हृदयग्रंथीचा भेद करून घेण्यास समर्थ होत नाहींत. त्या जगन्निवास वासुदेवाला तूं शरण जा ॥ ३९ ॥ पंचज्ञानेंद्रियें व मन ह्या इंद्रियषड्वर्गरूप सुसरींनीं युक्त असलेल्या संसारसमुद्राला जे पुरुष, केवळ योगादि साधनेंकरून तरण्याची इच्छा करितात त्या ईश्वररूप नांवाड्याचा आश्रय न करणाऱ्या पुरुषांना तो संसारसमुद्र तरून

तमवेहीति ज्ञानमुपदिष्टं तस्य दुष्करत्वेन भक्तिमुपदिशति द्वाभ्याम्। यस्य पादपंकजयोः पलाशान्यंगुलयस्तेषां विलासः कांतिस्तस्य भक्त्या स्मृत्या कर्माशयमहंकाररूपं हृदयग्रंथिम्। कर्मभिरेव ग्रथितम्। रिक्तानिर्विषया मतिर्येषाम्। रुद्धः प्रत्याहृतः स्रोतोगणः इंद्रियवर्गो यैः अरणं शरणम् ॥ ३९ ॥ ननु ब्रह्मविदाप्नोति परमिति श्रुतेः कथं यतयो नोद्ग्रथयंतीत्युच्यते तत्राह। कृच्छ्र इति। अप्लवेशां न प्लवस्तरणहेतुरिट् ईशो येषां तेषां महानिह तरणे कृच्छ्रः क्लेशः ते ह्यसुखेन योगादिनेंद्रियषड्वर्गग्राहं भवार्णवं तितीर्षंति तत्तस्मात् उडुपं प्लवं दुस्तरार्णवमित्यर्थः। अर्णशब्दे वकाराभाव आर्षः। यद्वा। दुस्तरोदकरूपं व्यसनमित्यर्थः ॥ ४० ॥ आत्ममेधसा ब्रह्मविदा दर्शिता आत्मनो गतिस्तत्त्वं यस्मै सः ॥ ४१ ॥ ब्रह्मन्निति संबोधनं प्राधान्यादेकस्य यूयमित्युक्तिः सर्वान्प्रति ॥ ४२ ॥ आत्मना देहेन सह सर्वं राज्यादिकं मदीयं साधूच्छिष्टं साधुभिः स्वीयं सन्मह्यं प्रसादरूपेण दत्तमतस्तत्र मम स्वत्वाभावाद्गुरुदक्षिणार्थं किं ददे। नहि पित्रा दत्तं मोदकादि तस्मै दानरूपेण प्रत्यर्प्यते ॥ ४३ ॥ निवेदनं तु तदीयस्यैव समर्पणं

यत्पादपंकजपलाशविलासभक्त्या कर्माशयं ग्रथितमुद्ग्रथयंति संतः ॥ तद्वन्न रिक्तमतयो यतयोऽपि रुद्धस्रोतोगणास्तमरणं भज वासुदेवम् ॥ ३९ ॥ कृच्छ्रो महानिह भवार्णवमप्लवेशां षड्वर्गनक्रमसुखेन तितीर्षंति ॥ तत्त्वं हरेर्भगवतो भजनीयमंघ्रिं कृत्वोडुपं व्यसनमुत्तर दुस्तरार्णम् ॥ ४० ॥ मैत्रेय उवाच ॥ स एवं ब्रह्मपुत्रेण कुमारेणात्ममेधसा ॥ दर्शितात्मगतिः सम्यक् प्रशस्योवाच तं नृपः ॥ ४१ ॥ राजोवाच ॥ कृतो मेऽनुग्रहः पूर्वं हरिणाऽर्तानुकंपिना ॥ तमापादयितुं ब्रह्मन्भगवन्यूयमागताः ॥ ४२ ॥ निष्पादितश्च कार्त्स्न्येन भगवद्भिर्घृणालुभिः ॥ साधूच्छिष्टं हि मे सर्वमात्मना सह किं ददे ॥ ४३ ॥ प्राणा दाराः सुता ब्रह्मन्गृहाश्च सपरिच्छदाः ॥ राज्यं बलं महीकोश इति सर्वं निवेदितम् ॥ ४४ ॥

जाण्यास फार क्लेश होतात. यास्तव तूं षड्गुणैश्वर्यसंपन्न भगवान् हरीच्या पूज्य चरणरूप नौकेचा आश्रय करून, ह्या दुःखरूप दुस्तर भवसमुद्राला तरून जा ॥ ४० ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, याप्रमाणें ब्रह्मदेवाचा पुत्र आत्मज्ञानी जो सनत्कुमार त्यानें, पृथुराजाला आत्म्याचें तत्त्व उत्तमप्रकारें सांगितलें असतां, तो राजा त्या सनत्कुमाराची उत्तमप्रकारानें प्रशंसा करून ह्मणाला कीं ॥ ४१ ॥ राजा ह्मणाला– हे ब्रह्मनिष्ठ सर्वज्ञ मुने, दीनांवर दया करणाऱ्या हरीनें पूर्वींच मजवर अनुग्रह केला होता, तोच संपादन करण्याकरितां तुह्मी येथें प्राप्त झालां आहां ॥ ४२ ॥ आणि तो अनुग्रह दयालु अशा तुह्मी पूर्णपणें सिद्धीस नेला आहे. ह्या करितां तुह्मांला गुरुदक्षिणारूपानें मी कांहींतरी समर्पण करावें परंतु तें काय समर्पण करावें ? कारण, माझ्या देहासहवर्तमान जें सर्व राज्यादिक आहे तें सर्व साधूंचें उच्छिष्ट आहे ह्मणजे साधूंनीं आपला प्रसाद ह्मणून मला दिलें आहे. पित्यानें दिलेला मोदकादिक खाऊ त्याला उलट दानरूपानें देतां येत नाहीं ॥ ४३ ॥ परंतु निवेदन घडतें ह्मणून हे ब्रह्मनिष्ठा, सनत्कुमारा,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जसे राजाचे सेवक, त्याच्याच पदरचें तांबूलवगैरे घेऊन सेवारूपानें त्याला अर्पण करितात त्याप्रमाणें मी आपले प्राण, पत्नी, सुत, साहित्यांनीं भरलेलीं घरें, राज्य, सैन्य, पृथ्वी व द्रव्यभांडार हें सर्व आपणास निवेदन केलें आहे ॥ ४४ ॥ सेनापतित्व, राज्य, दंडनेतृत्व (लोकांना शिक्षण करण्याचें किंवा न्याय करण्याचें काम) आणि सर्व लोकांवर अधिकार चालविणें हें सर्व करण्याविषयीं वेदशास्त्रवेत्ता ब्राह्मणच योग्य आहे ॥ ४५ ॥ ब्रह्मवेत्ता पुरुष, स्वतांचेच पदार्थ भक्षण करितो, स्वतांचींच वस्त्रें परिधान करितो आणि स्वतःच्याच वस्तु लोकांना देतो. क्षत्रियादिक बाकीचे वर्ण, त्या ब्राह्मणाच्या अनुग्रहानेंच अन्नवस्त्रादिक उपभोग्यपदार्थांचें सेवनमात्र करितात; त्यांना जास्ती अधिकार नाहीं ॥ ४६ ॥ हे ऋषि हो, ज्या वेदवेत्त्या तुह्मीं आत्मविचाराविषयीं निश्चयानें अशी भगवंताची गति (तत्त्व) आह्मांला निरूपण केली आहे, त्या निरंतर परमदयालु अशा तुह्मी आपण केलेल्या दीनोद्धरणरूप कर्मांच्या योगेंकरून आपणच संतुष्ट असावें. कारण, असल्या उपकाराबद्दल केवळ हात जोडणें याखेरीज

यथा भृत्यो राज्ञे सेवादिरूपेण तांबूलादिकमर्पयति तथा मयापि सर्वं निवेदितं स्वीकुरुतेत्याह । प्राणा इति ॥ ४४ ॥ आत्मनः स्वत्वाभावं प्रपंचयति । सैनापत्यं चेति द्वाभ्याम् ॥ ४५ ॥ वस्ते परिधत्ते अन्नमात्रं केवलं भुंजते न तु दाने स्वतंत्राः ॥ ४६ ॥ सत्यपि स्वत्वे सर्वस्वेनापि न गुरोः प्रत्युपकर्तुं शक्यमित्याह । यैरिति । आत्मवा-

सैनापत्यं च राज्यं च दंडनेतृत्वमेव च ॥ सर्वलोकाधिपत्यं च वेदशास्त्रविदर्हति ॥ ४५ ॥ स्वमेव ब्राह्मणो भुंक्ते स्वं वस्ते स्वं ददाति च ॥ तस्यैवानुग्रहेणान्नं भुंजते क्षत्रियादयः ॥ ४६ ॥ यैरीदृशी भगवतो गतिरात्मवाद एकांततो निगमिभिः प्रतिपादिता नः ॥ तुष्यंत्वदभ्रकरुणाः स्वकृतेन नित्यं को नाम तत्प्रतिकरोति विनोदपात्रम् ॥ ४७ ॥ मैत्रेय उवाच ॥ त आत्मयोगपतय आदिराजेन पूजिताः ॥ शीलं तदीयं शंसंतः खेऽभूवन्मिषतां नृणाम् ॥ ४८ ॥ वैन्यस्तु धुर्यो महतां संस्थित्याध्यात्मशिक्षया ॥ आप्तकाममिवात्मानं मेन आत्मन्यवस्थितः ॥ ४९ ॥ कर्माणि च यथाकालं यथादेशं यथाबलम् ॥ यथोचितं यथावित्तमकरोद्ब्रह्मसात्कृतम् ॥ ५० ॥

देऽध्यात्मविचारे एकांततो निश्चयेन निगमिभिर्वेदविद्भिः ते नित्यमनल्पकरुणाः स्वकृतेनैव दीनोद्धरणकर्मणा तुष्यंतु को नाम तत्कृतमुपकारं प्रति स्वयमुपकरोत्युदपात्रमंजलिं विना । मयांजलिरेव तेभ्यो बद्ध इत्यर्थः । यद्वा । विनोदपात्रमुपहासास्पदम् । प्रत्युपकारे प्रवृत्तो जनानामुपहासास्पदं भवेदित्यर्थः ॥ ४७ ॥ खेऽभूवन्नाकाशमार्गेणोद्गताः ॥ ४८ ॥ धुर्यो मुख्यः अध्यात्मशिक्षया संस्थितिरेकाग्रता तयात्मन्यवस्थितः सन्मेने ॥ ४९ ॥ ब्रह्मसात्कृतं ब्रह्मण्यर्पितं यथाभवति तथा ॥ ५० ॥

दुसरा प्रत्युपकार कोण वरें करूं शकेल ? कोणीच करूं शकणार नाहीं; जर कोणी करूं इच्छील तर त्याची लोकांमध्यें थट्टा मात्र होईल ॥ ४७ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, नंतर आत्मज्ञानाचा उपदेश करण्याविषयीं समर्थ अशा त्या सनत्कुमारादिक ऋषींची पृथुराजानें पूजा केली असतां, ते त्याच्या सुस्वभावाची प्रशंसा करीत करीत, तेथें असणारे सर्व लोक पाहत असतां आकाशमार्गानें निघून गेले ॥ ४८ ॥ त्या वेळीं थोरांमध्यें अग्रगण्य असा तो वेनाचा पुत्र पृथुराजा, सनत्कुमारानें केलेल्या आत्मतत्त्वाच्या उपदेशानें आत्म्याचेठिकाणीं मनाची एकाग्रता संपादन करून, तिच्यायोगानें परमात्म्याचेठिकाणीं ऐक्यरूपानें स्थित होत्साता, आपल्याला कृतकृत्य झाल्यासारखें मानूं लागला ॥ ४९ ॥ आणि पुढें तो राजा, लोकव्यवहारासाठीं काल देश बल व वित्त यांच्या योग्यतेप्रमाणें सर्व कर्में यथासांग ब्रह्मार्पणबुद्धीनें करूं लागला ॥ ५० ॥

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याचा ब्रह्माचेठिकाणीं कर्म अर्पण करण्याचा प्रकार असा कीं, तो राजा, कर्माचें फळ ब्रह्माचेठिकाणीं अर्पण करून 'ह्मणजे या कर्मांच्या योगेंकरून कर्मप्रवर्तक भगवानच संतुष्ट असो त्याखेरीज मला कोणत्याहि फळाची अपेक्षा नाहीं असा संकल्प करून,' मी कर्म करितों अशा आसक्तीनें रहित, समाधानयुक्त व प्रकृतीहून पर
॥ ६९ ॥ असलेला आत्माच सर्व कर्मांचा साक्षी आहे असें मानीत असे ॥ ५१ ॥ ह्मणून साम्राज्य लक्ष्मीनें युक्त व गृहाचेठिकाणीं वासकरणाराहि तो पृथुराजा निरभिमानी होत्साता, अ०२२
जसा सर्वठिकाणीं पर्यटन करणारा सूर्य कोठेंहि आसक्त होत नाहीं त्याप्रमाणें तो कोणत्याहि इंद्रियांच्या उपभोग्य विषयांचेठिकाणीं आसक्त झाला नाहीं ॥ ५२ ॥ याप्रमाणें तो पृथुराजा, आत्मज्ञानपूर्वक सर्व कर्में भगवंताचेठिकाणीं समर्पण करित होत्साता, अर्चिनामक आपल्या स्त्रीच्याठिकाणीं गुणांनीं आपल्यासारख्या पांच पुत्रांस उत्पन्न करिता झाला ॥ ५३ ॥ त्यांचीं नांवें-विजिताश्व, धूम्रकेश, हर्यक्ष, द्रविण आणि वृक हीं होत. पृथुराजानें आपल्या एकाच शरीराचेठिकाणीं जगत्स्रष्टीच्या रक्षणासाठीं त्यात्या योग्य कालीं सर्व लोकपालांचे निरनिराळे गुण धारण केले होते; कारण, तो विष्णुरूपीच होता. त्यानें, आपल्या मनाच्या हिर्वाचेतनादिक वृत्तींनीं

निर्विषंगःकर्मस्व नासक्तः कर्माध्यक्षं कर्मसाक्षिणमुदासीनं मन्वानोऽकरोदि ति पूर्वेणैवान्वयः नासज्जतेत्युत्तरेण वा ॥ ५१ ॥ ५२ ॥ अर्चिषि भार्यायाम् ॥ ५३ ॥ ५४ ॥ ५५ ॥

फलं ब्रह्मणि विन्यस्य निर्विषंगः समाहितः ॥ कर्माध्यक्षं च मन्वान आत्मानं प्रकृतेः परम् ॥ ५१ ॥ गृहेषु वर्तमानोऽपि स साम्राज्यश्रियान्वितः ॥ नासज्यतेंद्रियार्थेषु निरहंमतिरर्कवत् ॥ ५२ ॥ एवमध्यात्मयोगेन कर्माण्यनुसमाचरन् ॥ पुत्रानुत्पादयामास पंचार्चिष्यात्मसंमतान् ॥ ५३ ॥ विजिताश्वं धूम्रकेशं हर्यक्षं द्रविणं वृकम् ॥ सर्वेषां लोकपालानां दधारैकः पृथुर्गुणान् ॥ ५४ ॥ गोपीथाय जगत्सृष्टेः काले स्वे स्वेऽच्युतात्मकः ॥ मनो वाग्वृत्तिभिः सौम्यैर्गुणैः संरंजयन्प्रजाः ॥ ५५ ॥ राजेत्यधान्नामधेयं सोमराज इवापरः ॥ सूर्यवद्विसृजन्गृह्णन्प्रतपंश्च भुवो वसु ॥ ५६ ॥ दुर्धर्षस्तेजसेवाग्निर्महेंद्र इव दुर्जयः ॥ तितिक्षया धरित्रीव द्यौरिवाभीष्टदो नृणाम् ॥ ५७ ॥ वर्षति स्म यथाकामं पर्जन्य इव तर्पयन् ॥ समुद्र इव दुर्बोधः सत्त्वेनाचलराडिव ॥ ५८ ॥ धर्मराडिव शिक्षायामाश्चर्ये हिमवानिव ॥ कुबेर इव कोशाढ्यो गुप्तार्थो वरुणो यथा ॥ ५९ ॥

सोमश्चासौ राजा च स इव भुवो वसु धनं गृह्णन्विसृजंश्चासौ सूर्यवत् राज्ञः प्रतपनमाज्ञाकरणम् ॥ ५६ ॥ अग्निरिव दुर्धर्षः द्यौः स्वर्ग इव ॥ ५७ ॥ समुद्रो यथा गांभीर्येणैतावानिति न बुद्ध्यते तथासावभिप्रायतो दुर्बोधः । अचलराण्मेरुरिव ॥ ५८ ॥ ५९ ॥

व वाणीच्या सत्यप्रियभाषणादिक वृत्तींनीं व देहाच्या मनोहर सुस्वभावादिक गुणांनीं सर्व प्रजांना रमवून, हा दुसरा सोमराजच (चंद्रच) आहे कीं काय असें राजा हें नांव सार्थक धारण केलें होतें, सूर्य जसा सर्वठिकाणीं सारखा ताप उत्पन्न करून, भूमीपासून उदकाचें आठ महिने आकर्षण करून, त्याची वर्षाकालीं वृष्टि करितो त्याप्रमाणें हा राजा, सर्व प्रजांना निःपक्षपातानें शिक्षारूप ताप उत्पन्न करित होत्साता घेण्याच्या वेळीं प्रजांपासून कररूपानें द्रव्य घेत असे व दुर्भिक्षकाळीं तें त्यांस देत असे, त्यामुळें सूर्यासारखा वाटत असे ॥ ५४ ॥ ५५ ॥ ५६ ॥ हा राजा, अग्नीसारखा तेजानें असह्य, इंद्रासारखा दुर्जय, पृथिवीसारखा दुसऱ्यांचे ॥ ६२ ॥
अपराध सहन करणारा व स्वर्गासारखा मनुष्यांचे मनोरथ पूर्ण करणारा होता ॥ ५७ ॥ हा, पर्जन्याप्रमाणें यथायोग्य कालीं प्रजांची तृप्ति करण्याकरितां द्रव्याची यथेच्छ वृष्टि करित असे. हा गांभीर्यानें समुद्रासारखा दुर्बोध असून मेरुपर्वतासारखा धैर्यवान् होता ॥ ५८ ॥ दुर्जनांना शिक्षा करण्याविषयीं यमासारखा असून

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आश्चर्यकारक वस्तूंच्या संग्रहाविषयीं हिमाचलासारखा होता. हा कुबेराप्रमाणें पुष्कळ द्रव्यभांडारानें युक्त असून वरुणाप्रमाणें याचें द्रव्य गुप्त व सुरक्षित होतें ॥ ५९ ॥ हा राजा, शरीराचें बळ, इंद्रियांचें पटुत्व व मानसिक धैर्य यांच्यायोगानें वायूसारखा सर्वांचा नियंता असून युद्धामध्यें शत्रूंनीं सहन करण्यास अशक्य-पणानें भगवान् श्रीरुद्रासारखा होता ॥ ६० ॥ हा सौंदर्याविषयीं मदनासारखा, निर्भयपणाविषयीं सिंहासारखा, वात्सल्याविषयीं मनूसारखा व मनुष्यांच्या स्वामित्वावि-षयीं भगवान् ब्रह्मदेवासारखा होता ॥ ६१ ॥ ब्रह्मविचाराविषयीं बृहस्पतीसारखा असून देह इंद्रियादिक स्वाधीन ठेवण्याविषयीं स्वतः विष्णूसारखा होता. गाई, गुरु, ब्राह्मण व भगवद्भक्त यांचेठिकाणीं भक्तीनें, लोकलज्जेनें, नम्रतेनें, आणि सुस्वभावानें युक्त असून परोपकार करण्याविषयीं आपल्या सारखाच ह्मणजे निरुपम होता ॥ ६२ ॥ जसा दाशरथि राम आपल्या कीर्तिद्वारा सत्पुरुषांच्या कर्णरंध्रांचेठिकाणीं प्रविष्ट होता त्याप्रमाणें हा राजा, त्रैलोक्यामध्यें जागोजागीं पुरुषांनीं उच्चस्वरानें गायन केलेल्या कीर्तीच्या यो-

---

सर्वात्मा सर्वत्र संचारशक्तिः बलादिभिर्मातरिश्वेव भूतराट् श्रीरुद्रः ॥ ६० ॥ अजो ब्रह्मेव ॥ ६१ ॥ आत्मवत्त्वे जितेंद्रियत्त्वे भक्त्यादिभिः परार्थोद्यमे चात्मनैव तुल्यो निरुपमः ॥ ६२ ॥ पुंभिः सत्पुरुषैः रामः सीतापतिर्यथा सतां कर्णरंध्रेषु प्रविष्टः ॥ ६३ ॥ इति चतुर्थे टीकायां द्वाविंशतितमोऽध्यायः ॥ २२ ॥ ॥

मातरिश्वेव सर्वात्मा बलेन सहसौजसा ॥ अविषह्यतया देवो भगवान्भूतराडिव ॥ ६० ॥ कंदर्प इव सौंदर्ये मनस्वी मृगराडिव ॥ वात्सल्ये मनुवन्नृणां प्रभुत्वे भगवानजः ॥ ६१ ॥ बृहस्पतिर्ब्रह्मवादे आत्मवत्त्वे स्वयं हरिः ॥ भक्त्या गोगुरुविप्रेषु विष्वक्सेनानुवर्तिषु ॥ ह्रिया प्रश्रयशीलाभ्यामात्मतुल्यः परोद्यमे ॥ ६२ ॥ कीर्त्योर्ध्वगीतया पुंभिस्त्रैलोक्ये तत्रतत्र ह ॥ प्रविष्टः कर्णरंध्रेषु स्त्रीणां रामः सतामिव ॥ ६३ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे चतुर्थस्कंधे पृथुचरिते द्वाविंशतितमोऽध्यायः ॥ २२ ॥ ॥ मैत्रेय उवाच ॥ दृष्ट्वात्मानं प्रवयसमेकदा वैन्य आत्मवान् ॥ आत्मना वर्धिताशेषस्वानुसर्गः प्रजापतिः ॥ १ ॥ जगतस्तस्थुषश्चापि वृत्तिदो धर्मभृत्सताम् ॥ निष्पादितेश्वरादेशो यदर्थमिह जज्ञिवान् ॥ २ ॥

स्वकृतोऽनुसर्गो ऽन्नादिसर्गः पुरग्रामादिसर्गश्च वर्धितोऽशेषः स्वानुसर्गो येन ॥ १ ॥ निष्पादित ईश्वरादेशः प्रजापालनादिर्येन जज्ञिवान् जातः ॥ २ ॥ त्रयोविंशे सभार्यस्य वने नित्यसमाधितः ॥ विमानमधिरुह्याथ वैकुंठगतिरीर्यते ॥ १ ॥ प्रवयसं वृद्धं दृष्ट्वा तपोवनमगादिति तृतीयेनान्वयः ।

ग्रानें सर्व स्त्रियांच्या कर्णच्छिद्रांचेठिकाणीं प्रविष्ट झाला होता ॥ ६३ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील चतुर्थस्कंधामध्यें हा बाविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २२ ॥

आतां या तेविसाव्या अध्यायामध्यें अर्चिनामक भार्येसहवर्तमान तपोवनामध्यें नित्य समाधियोग धारण करणाऱ्या पृथुराजाचें, विमानामध्यें बसून वैकुंठलोकाचेठिकाणीं गमन झालें अशी कथा वर्णन केली आहे ॥ १ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, ज्यानें स्वतः केलेली अन्नादिकांची उत्पत्ति व नगरग्रामादिकांची सर्व रचना वाढविली आहे आणि जिच्याकरितां या भूमितलावर आपण उत्पन्न झाला ती प्रजापालनादिरूप ईश्वराची आज्ञा ज्यानें उत्तमप्रकारें पूर्ण केली आहे, असा, स्थावरजंगमात्मक प्राण्यांची उपजीविका चालविणारा, प्रजांचा पालक, साधूंचा धर्मरक्षक व इंद्रियांचा निग्रह करणारा, तो वेनपुत्र पृथुराजा, एके वेळीं आपल्याला वृद्धदशा प्राप्त झाली असें पाहून, त्यानें

---

१ हिमाचलावर अशा कांहीं वस्तु आश्चर्य कारक आहेत कीं, त्या कांहीं भक्षण केल्या असतां, सहा सहा महिने पर्यंत क्षुधा किंवा तृषा मुळींच लागत नाहीं व शक्ति क्षीण होत नाहीं, कांहींच्या योगानें बळ वाढतें कांहींच्या अंजनानें दिव्य दृष्टि प्राप्त होत्ये इत्यादि.

CC-0. In Public Domain. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तपश्चर्येकरितां वनांत जाण्याचा निश्चय केला ॥ १ ॥ २ ॥ तेव्हां आपल्या विरहानें रोदन करीतच आहे कीं काय अशा कन्यात्वेंकरून स्वीकारलेल्या पृथ्वीला आपल्या पुत्रांच्या स्वाधीन करून, त्या वेळीं सर्व प्रजा खिन्न झाल्या असतां, तो राजा एकटाच स्त्रीसहवर्तमान तपोवनांत निघून गेला ॥ ३ ॥ तो राजा, पूर्वी नगरांत असतांना आपल्या भूमंडळाला जिंकण्याच्या कामीं मोठ्या प्रयत्नानें जसा झटत असे त्याप्रमाणें त्या वनामध्येंहि ज्याचे नियम विघ्नांनीं कधींच खंडित झाले नाहींत असा होऊन वानप्रस्थ आश्रमीलोकांना संमत अशा देहेंद्रियशोषक तपाच्याठिकाणीं प्रवृत्त झाला ॥ ४ ॥ तो राजा, कांहीं दिवसपर्यंत कंद, मुळें व फळें यांचा आहार करून राहिला. नंतर कांहीं दिवस शुष्क पर्णाचें भक्षण करून राहिला, नंतर कांहींएक पंधरावडे उदकाचें प्राशन करून राहिला, त्यानंतर तो आपल्या जाग्यावरच राहून वायूचें भक्षण करणारा झाला ॥ ५ ॥ त्या प्रभावशाली राजानें, ग्रीष्म ऋतूमध्यें (उष्णकाळामध्यें) चार दिशांकडे पेटविलेले चार अग्नि व मस्तकावर सूर्याचा ताप अशा रीतीनें पंचा-

---

आत्मजां पृथ्वीम् । विमनःसु चिंतातुरासु सदारः सभार्यः ॥ ३ ॥ अदाभ्या विघ्नैर्नाशयितुमशक्या नियमा यस्य वानप्रस्थानां सुसंमते उग्रे तपस्यारब्धः प्रवृत्तः कर्तरि क्तः । यथा स्वस्य धरामंडलस्य विजये पूर्वं महता यत्नेन प्रवृत्तस्तथेति ॥ ४ ॥ उग्रं तपो दर्शयति । कंदमूलेति त्रिभिः । क्वचित्कदाचित् ॥ ५ ॥ चतुर्दिक्षु चत्वारोऽग्नय उपरि

आत्मजेष्वात्मजां न्यस्य विरहाद्रुदतीमिव ॥ प्रजासु विमनःस्वेकः सदारोऽगात्तपोवनम् ॥ ३ ॥ तत्राप्यदाभ्यनियमो वैखानस-सुसंमते ॥ आरब्ध उग्रतपसि यथा स्वविजये पुरा ॥ ४ ॥ कंदमूलफलाहारः शुष्कपर्णाशनः क्वचित् ॥ अब्भक्षः कतिचित्पक्षान्वायुभक्षस्ततः परम् ॥ ५ ॥ ग्रीष्मे पंचतपा वीरो वर्षास्वासारषाण्मुनिः ॥ आकंठमग्नः शिशिर उदके स्थंडिलेशयः ॥ ६ ॥ तितिक्षुर्यतवाग्दांत ऊर्ध्वरेता जितानिलः ॥ आरिराधयिषुः कृष्णमचरत्तप उत्तमम् ॥ ७ ॥ तेन क्रमानुसिद्धेन ध्वस्तकर्मामलाशयः ॥ प्राणायामैः सन्निरुद्धषड्वर्गश्छिन्नबंधनः ॥ ८ ॥ सनत्कुमारो भगवान्यदाहाध्यात्मिकं परम् ॥ योगं तेनैव पुरुषमभजत्पुरुषर्षभः ॥ ९ ॥ भगवद्धर्मिणः साधोः श्रद्धया यततः सदा ॥ भक्तिर्भगवति ब्रह्मण्यनन्यविषयाऽभवत् ॥ १० ॥

सूर्य इति पंचानां तपः संतापो यस्य स पंचतपाः आसारं सहत इत्यासारषाट् शिशिरऋतौ स्थंडिलेशयो भूमिशयनः सर्वदा ॥ ६ ॥ ७ ॥ तेंन तपसा क्रमानुसिद्धेन शनैः प्राप्तेन ध्वस्तानि कर्माणि यस्यातोऽमल आशयो यस्य । छिन्नानि बंधनानि वासना यस्य ॥ ८ ॥ ९ ॥ १० ॥

ग्निसाधन केलें. वर्षाऋतूंत (पावसाळ्यांत) आंगावर पाऊस सहन करावा, शिशिर ऋतूंमध्यें (हिंवाळ्यांत) गळ्याइतक्या पाण्यामध्यें बुडून राहावें आणि प्रतिदिवशीं भूमीवर शयन करावें अशी तपश्चर्या केली ॥ ६ ॥ क्षुधा तृषा इत्यादि दुःखाचें सहन करणारा, मौनव्रत धारण करणारा, इंद्रियांचा जय करणारा, जवळ पत्नी असतांहि मैथुन वर्ज्य करणारा व प्राणवायूचा जय करणारा, अशा त्या पृथुराजानें, कृष्णपरमात्म्याचें आराधन व्हावें एवढीच इच्छा धरून उत्तम तप केलें ॥ ७ ॥ अनुक्रमानें परिपक्व झालेल्या त्या तपाच्या योगानें ज्याचीं कर्में नष्ट होऊन अंतःकरण निर्मळ झालें आहे व ज्यानें प्राणायामाच्या योगेंकरून पंचज्ञानेंद्रियें व मन या षड्वर्गाचा निरोध केला आहे ह्मणून ज्याचीं वासनारूप बंधनें तुटून गेलीं आहेत अशा त्या पुरुषश्रेष्ठ पृथुराजानें, सनत्कुमार भगवंतानें आत्मप्राप्तीच्या साधनत्वेंकरून जो श्रेष्ठ भक्तियोग सांगितला होता त्याच्या योगेंकरूनच पुरुषोत्तम भगवंताचें आराधन केलें ॥ ८ ॥ ९ ॥ भगवंताचेठिकाणीं सर्व कर्माचें अर्पण करून आराधन करण्याविषयीं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तत्पर, शुद्धचित्त व विश्वासानें निरंतर भगवंताची सेवा करणारा अशा त्या पृथुराजाला ब्रह्मरूप भगवंताचेठिकाणीं एकनिष्ठ भक्ति उत्पन्न झाली ॥ १० ॥ नंतर, भगवंताच्या
उपासनेनें ज्याचें अंतःकरण शुद्धसत्त्वमय झालें आहे अशा त्या पृथुराजाला, भगवंताच्या निरंतर स्मरणानें वृद्धिंगत झालेल्या भक्तियोगानें वैराग्ययुक्त ज्ञान उत्पन्न झालें.
ज्या तीक्ष्णज्ञानाच्या योगेंकरून, असंभावना विपरीतभावनाइत्यादिक संशयांचा आश्रय अशा आपल्या जीवस्वरूपाचें आवरण करणाऱ्या हृदयग्रंथीचा त्यानें छेद करून
टाकिला ॥ ११ ॥ मग ज्याची भेदबुद्धि निवृत्त झाली आहे व ज्यानें आत्मतत्त्व जाणलें आहे अशा अणिमादिसिद्धींविषयींहि निस्पृह झालेल्या त्या पृथुराजानें, ज्या ज्ञाना-
च्या योगानें हृदयग्रंथीचा छेद केला होता त्या ज्ञानाचासुद्धां (त्याबद्दल प्रयत्न करण्याचासुद्धां) त्याग केला. आणि हेंच योग्य आहे. कारण, आत्मप्राप्तीविषयीं यत्न

परिकर्मणा परिचर्यया शुद्धसत्त्व आत्मा मनो यस्य तस्य ज्ञानमभूत् । कीदृशं येन निजमुपाधिं जीवकोशं हृदयग्रंथिं संशयानामसंभावनादीनां पदमाश्रयं चिच्छेद कीदृशे न अनया भ-
क्त्या निशितेन । तीक्ष्णेन कथंभूतया तस्य भगवतोऽनुसंस्मरणेनानुपूर्तिः संपूर्तिर्यस्यास्तया निशितेन ॥ ११ ॥ किंच । छिन्ना अन्यधीर्देहात्मबुद्धिर्यस्य यतोऽधिगतात्मगतिरतएव
निरीहः प्राप्तासु सिद्धिषु निस्पृहः येन वयुनेन ज्ञानेनेदं संशयपदं चिच्छेद तत्तत्यजे त्यक्तवान् । तत्प्रयत्नादप्युपररामेत्यर्थः । तस्य योगसिद्धिष्वपि निस्पृहत्वं युक्तमेवेत्याह । तावन्नाप्र-

तस्यानया भगवतः परिकर्मशुद्धसत्त्वात्मनस्तदनुसंस्मरणानुपूर्त्या ॥ ज्ञानं विरक्तिमद्भून्निशितेन येन चिच्छेद संशयपदं निजजी-
वकोशम् ॥ ११ ॥ छिन्नान्यधीरधिगतात्मगतिर्निरीहस्तत्तत्यजेऽच्छिनदिदं वयुनेन येन ॥ तावन्न योगगतिभिर्यतिरप्रमत्तो यावद्गदा-
ग्रजकथासु रतिं न कुर्यात् ॥ १२ ॥ एवं स वीरप्रवरः संयोज्यात्मानमात्मनि ॥ ब्रह्मभूतो दृढं काले तत्याज स्वं कलेवरम्
॥ १३ ॥ संपीड्य पायुं पार्ष्णिभ्यां वायुमुत्सारयञ्छनैः ॥ नाभ्यां कोष्ठेष्ववस्थाप्य हृदुरःकंठशीर्षणि ॥ १४ ॥ उत्सर्पयंस्तु तं
मूर्ध्नि क्रमेणावेश्य निस्पृहः ॥ वायुं वायौ क्षितौ कायं तेजस्तेजस्ययूयुजत् ॥ १५ ॥

मत्तः किंतु प्रमत्तो भवति तस्य श्रीकृष्णकथारतत्वान्न तासु लोभो जात इत्यर्थः ॥ १२ ॥ १३ ॥ देहत्यागप्रकारमाह । संपीड्येति पंचभिः । पायुं गुदं संपीड्येति मुक्तासनं सूचितम् । सं-
पीड्य सीवनीं सूक्ष्मां गुल्फेनैव तु मध्यतः ॥ सव्ये दक्षिणगुल्फेन मुक्तासनमितीरितम् । मूलाधाराद्वायुमुत्सारयन्नूर्ध्वं नयन्नाभ्यामवस्थाप्य ततः कोष्ठेष्ववस्थाप्यायूयुज दित्युत्तरेणा-
न्वयः । कोष्ठान्येवाह । हृदादीनां द्वंद्वैक्यम् । शीर्षं भ्रूमध्यं तस्मिन् ॥ १४ ॥ तं वायुम् पाठांतरे एवमसून्प्राणानुत्सर्पयन् क्रमेण मूर्ध्नि ब्रह्मरंध्रे आवेश्य ततो देहारंभकपंचभूतानि समष्टिभूते

करणारा पुरुष, जोंपर्यंत श्रीकृष्णाच्या कथांचेठिकाणीं प्रीति (एकांतभक्ति) करीत नाहीं, तोंपर्यंतच तो अणिमादिक योगसिद्धींच्या योगेंकरून विषयासक्त होतो ॥ १२ ॥
असो. याप्रमाणें त्या वीरश्रेष्ठ पृथुराजानें आपलें मन, परमात्म्याचेठिकाणीं स्थिर करून पूर्णब्रह्मता प्राप्त झाली असतां, देहत्याग करण्याच्या योग्यकालीं आपल्या शरीराचा
त्याग केला ॥ १३ ॥ तो असा– आपल्या पायांच्या टांचांनीं गुदद्वार दाबून मूलाधारापासून प्राणवायु, हळूहळू वर चढवीत नाभिप्रदेशीं व तेथून अनुक्रमानें हृदय, ऊर कंठ
व भ्रूमध्य या स्थानांचेठिकाणीं स्थापन केला ॥ १४ ॥ पुढें त्या वायूला वर चढवून ब्रह्मरंध्राचेठिकाणीं स्थापन केला आणि संसारसंबंधी विषयभोगांच्या इच्छेनें रहित अशा
त्या पृथुराजानें, त्या वायूचा महाभूतरूप वायूचेठिकाणीं ऐक्यरूपानें लय करून देहांतील कठिणांशाचा पृथिवीचेठिकाणीं व शरीरांतील तेजाचा तेजाचेठिकाणीं लय केला ॥ १५ ॥

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नंतर इंद्रियच्छिद्रांत असलेल्या आकाशप्रदेशांचा महाकाशांत लय करून, शरीरांतील रुधिरादिक द्रवांशाचा उदकामध्यें लय केला. याप्रमाणें, देहाचा लय करून, अद्वितीय आत्मस्वरूपाची प्राप्ति होण्यासाठीं महाभूतादिकांचाहि लय केला. तो–पृथिवीचा उदकामध्यें त्याचा तेजाचेठिकाणीं, तेजाचा वायूचेठिकाणीं व वायूचा आकाशामध्यें लय करून ॥ १६ ॥ इंद्रियांचेठिकाणीं देवतेंसहवर्तमान मनाचा लय केला. नंतर कर्णेंद्रियाचा आकाशाच्या सूक्ष्मभूत शब्दामध्यें, त्वचेचा स्पर्शामध्यें इत्यादि उत्पत्तिक्रमानें लय करून, अहंकाराच्या योगानें त्यांना उचलून ह्मणजे अवशिष्ट राहिलेल्या आकाशासुद्धां त्या सूक्ष्मभूतरूप इंद्रियांचा अहंकाराचेठिकाणीं लय करून, त्या अहंकाराचा महात्तत्वाचेठिकाणीं लय केला ॥ १७ ॥ नंतर ज्याचेठिकाणीं सर्व गुणांची व त्या गुणांच्या कार्यांची स्थिति आहे त्या महत्तत्त्वाचा प्रकृतिकार्य अशा जीवोपाधिक

विलापितवांस्तदाह । वायुं वायावयूयुजदेकीकृतवान् कायं देहगतं कठिनांशं क्षितौ ॥ १५ ॥ खानींद्रियच्छिद्राणि द्रवांशं तोये । तदेवं देहं प्रविलाप्याद्वितीयात्मप्रतिपत्त्यर्थं महाभूतानामपि लयमाह । क्षितिमंभस्येकीकृतवान् । तदंभस्तेजसि अदस्तेजो वायौ अमुं वायुं नभसि ॥ १६ ॥ तदेवं तामसाहंकारकार्यस्याकाशपर्यंतस्य लयमुक्त्वा सात्विकराजसाहंकारकार्याणां लयमाह । इंद्रियेष्विति इंद्रियेषु मन इति देवानामप्युपलक्षणम् । सविकल्पकज्ञाने मनस इंद्रियैराकर्षणाच्चेषु लयाभिधानं न तु कार्यत्वात् । तदुक्तं गीतासु । इंद्रियाणां हि चरतां यन्मनोऽनुविधीयत इति । अत्र च इंद्रियैर्विषयाकृष्टैराक्षिप्तं ध्यायतां मन इति इंद्रियेषु नभ इति पाठेऽप्ययमर्थः । भट्टादीनां मते

खान्याकाशे द्रवं तोये यथास्थानं विभागशः ॥ क्षितिमंभसि तत्तेजस्यदो वायौ नभस्यमुम् ॥ १६ ॥ इंद्रियेषु मनस्तानि तन्मात्रेषु यथोद्भवम् ॥ भूतादिनामून्युत्क्षिप्य महत्यात्मनि संदधे ॥ १७ ॥ तं सर्वगुणविन्यासं जीवे मायामये न्यधात् ॥ तं चानुशयमात्मस्थमसावनुशयी पुमान् ॥ ज्ञानवैराग्यवीर्येण स्वरूपस्थोऽजहात्प्रभुः ॥ १८ ॥ अर्चिर्नाम महाराज्ञी तत्पत्न्यनुगता वनम् ॥ सुकुमार्यतदर्हा च यत्पद्भ्यां स्पर्शनं भुवः ॥ १९ ॥ अतीव भर्तुर्व्रतधर्मनिष्ठया शुश्रूषया चारषदेहयात्रया ॥ नाविंदतार्तिं परिकर्शितापि सा प्रेयस्करस्पर्शनमाननिर्वृतिः ॥ २० ॥

नभश्चाक्षुषं केषांचिन्मानसम् । आनुमानिकत्वमतेऽपींद्रियव्यापारोऽस्त्येव नभोगुणश्च शब्दः श्रोत्रग्राह्योऽत इंद्रियग्राह्यत्वादिंद्रियेषु नभो विलापितमिति तानींद्रियाणि यथोद्भवमुद्भवो वृत्तिलाभः स च विषयाधीन इति श्रोत्रादीनां विषयेषु शब्दादिषु लयः । यद्वा तन्मात्रकार्याण्येवेंद्रियाणि मनोऽप्यपंचीकृततन्मात्रकार्यम् । अहंकारिकत्वाभिधानं तदधीनत्वविवक्षयेत्यविरोधः भूतादिनाहंकारेण प्रागवशिष्टनभःसहितानींद्रियाण्युत्कृष्य परतो नीत्वा भूतादौ क्षिप्त्वा तेन सह महत्तत्त्वे संदध इत्यर्थः ॥ १७ ॥ सर्वेषां गुणानां कार्याणां विन्यासः स्थितिर्यस्मिंस्तं महांतं मायामये मायोपाधिप्रधाने जीवे तंचानुशयमुपाधिं यः पूर्वमनुशयी पुमान् जीवोऽसौ पृथुर्ब्रह्मणि स्थितः सन्नजहादित्यर्थः ॥ १८ ॥ वनप्रवेशमारभ्य राज्ञीकथामाह । अर्चिर्नामेति चतुर्भिः । अनुगतानुजगाम अतदर्हा तदपि नार्हति या । किं पद्भ्यां भुवः स्पर्शनमिति यत् ॥ १९ ॥ भर्तुर्व्रतं यद्भूमिशयनादि तस्मिन्

लिंगशरीराचेठिकाणीं लय केला. नंतर ज्ञान आणि वैराग्य यांच्या प्रभावानें स्वस्वरूपीं स्थिर झालेल्या त्या महासमर्थ पृथूनें, आपलेठिकाणीं असलेला तो मायारूप उपाधिहि सोडून दिला, ह्मणजे पूर्वीं मायोपाधि असल्यामुळें जो पृथुनामक जीव होता तो आतां ब्रह्मरूप झाला ॥ १८ ॥ आतां त्याच्या स्त्रीची कथा सांगतात– त्या पृथुराजाची पत्नी जी अर्चिनामक महाराणी होती ती पतीच्या बरोबर वनांत गेली होती, ती इतकी सुकुमार होती कीं, पायांनीं भूमीला स्पर्शकरणें सुद्धां तिला कधीं सोसवत नसे ॥१९॥ ती, पतीचीं जीं भूमिशयनादिक व्रतें व भगवत्परिचर्यादिक धर्म यांच्याठिकाणीं आपली स्थिति राखून पतीच्या सेवेनें व कंदमूलफलादिकांच्या योगेंकरून ऋषींसारख्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

देहनिर्वाहानें, अत्यंत कृश झाली असतांहि तिनें मुळींच दुःख मानिलें नाहीं. कारण, ती, प्रियपतीच्या हस्ताचा आपल्याला स्पर्श होतो यांतच आपला मान व आनंद
आहे असें मानीत असे ॥ २० ॥ त्या अर्चीनें, पृथिवीचा पालक व आपला पति जो पृथुराजा त्याच्या देहाचेठिकाणीं असलेले चैतन्यादिक सर्व धर्म नष्ट झाले असें पाहून,
त्याच्या वियोगदुःखानें कांहीं वेळपर्यंत विलाप केला आणि नंतर त्या पतिव्रतेनें पतीबरोबर सहगमन करण्याकरितां पर्वताच्या एका प्रदेशाचेठिकाणीं काष्ठांच्या योगें-
करून चिता रचून तिच्यावर पतीचा देह स्थापन केला ॥ २१ ॥ नंतर तिनें नदीच्या उदकांत स्नान करून त्या काळीं योग्य असलेलें सौभाग्यधारणादिक कृत्य करून-
पृथिवीदोहनादिक व भगवदाराधनादिक उदार कर्में करणाऱ्या आपल्या पतीला (पृथूला) उदकांजलि दिली आणि अंतरिक्षामध्यें असणाऱ्या देवांना वंदन करून व
चितेला लावलेल्या अग्नीला तीन प्रदक्षिणा घालून, आपल्या पतीच्या चरणाचें ध्यान करीत करीत तिनें अग्नीमध्यें प्रवेश केला ॥ २२ ॥ तेव्हां वीरश्रेष्ठ अशा पृथुनामक

धर्मे या निष्ठा तया ऋषीणामियमार्षी देहयात्रा कंदमूलादिवृत्तिस्तया चार्तिं दुःखं न प्राप। तत्र हेतुः। प्रेयसः करेण स्पर्शनं मानश्च ताभ्यां निर्वृतिर्यस्याः ॥ २० ॥ पृथिव्याः
पत्युः दुहितृत्वं तु तस्या देवतारूपेण। विपन्नं नष्टमखिलं चेतनादिकं यस्मिंस्तथाभूतं देहमालक्ष्य तं देहं चितामारोपयत् ॥ २१ ॥ कृत्यं तत्कालोचितं विधाय ह्रदिन्या

देहं विपन्नाखिलचेतनादिकं पत्युः पृथिव्या दयितस्य चात्मनः ॥ आलक्ष्य किंचिच्च विलप्य सा सती चितामथारोपयदद्रिसा-
नुनि ॥ २१ ॥ विधाय कृत्यं ह्रदिनीजलाप्लुता दत्वोदकं भर्तुरुदारकर्मणः ॥ नत्वा दिविस्थांस्त्रिदशांस्त्रिः परीत्य विवेश वह्निं ध्या-
यती भर्तृपादौ ॥ २२ ॥ विलोक्यानुगतां साध्वीं पृथुं वीरवरं पतिम् ॥ तुष्टुवुर्वरदा देवैर्देवपत्न्यः सहस्रशः ॥ २३ ॥ कुर्वत्यः कुसु-
मासारं तस्मिन्मंदरसानुनि ॥ नदत्स्वमरतूर्येषु गृणंति स्म परस्परम् ॥ २४ ॥ देव्य ऊचुः ॥ अहो इयं वधूर्धन्या या चैवं भूभु-
जां पतिम् ॥ सर्वात्मना पतिं भेजे यज्ञेशं श्रीर्वधूरिव ॥ २५ ॥ सैषा नूनं व्रजत्यूर्ध्वमनुवैन्यं पतिं सती ॥ पश्यतास्मानतीत्या-
र्चिर्दुर्विभाव्येन कर्मणा ॥ २६ ॥ तेषां दुरापं किंत्वन्यन्मर्त्यानां भगवत्पदम् ॥ भुवि लोलायुषो ये वै नैष्कर्म्यं साधयंत्युत ॥२७॥

जले आप्लुता स्नाता सती भर्तुरुदकं दत्त्वा दिव्यंतरिक्षे स्थितान्देवान्नत्वा वह्निं त्रिःप्रदक्षिणीकृत्य ॥ २२ ॥ देवैः सहिताः ॥ २३ ॥ गृणंति स्माभाषंत ॥ २४ ॥ २५ ॥
जले आप्लुता ... (see above)

पतीबरोबर सहगमन केलेल्या त्या सतीला अवलोकन करून वर देण्याविषयीं समर्थ अशा हजारो देवस्त्रिया देवांसहवर्तमान तिची स्तुति करूं लागल्या ॥ २३ ॥ त्या
उभयतां दंपतींच्या वैकुंठगमनाच्या वेळीं मंगलासाठीं देवांचीं वाद्यें वाजूं लागलीं असतां, त्या मंदरपर्वताच्या प्रदेशाचेठिकाणीं पुष्पवृष्टि करणाऱ्या त्या देवांगना परस्पर
म्हणाल्या कीं ॥ २४ ॥ देवी म्हणाल्या- अहो ही स्त्री (अर्चि) अत्यंत धन्य होय. कारण, जशी लक्ष्मी स्त्री, यज्ञपति विष्णूची आराधना करिते त्याप्रमाणें, जिनें
आपल्या राजाधिराज पतीची सर्वभावानें सेवा केली ॥ २५ ॥ ती ही अर्चिनामक पतिव्रता आपल्या दुष्कर कर्मांच्या योगानें आम्हांला खालीं टाकून आपल्या पृथुनामक
पतीच्या मागून उच्च पदवीस खरोखर जात आहे पहा !! ॥ २६ ॥ क्षणभंगुर आयुष्यानें युक्त असेहि जे मनुष्य, या भूमीवर, भगवंताचीसुद्धां प्राप्ति करून देणारें ज्ञानें

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

संपादन करितात त्या मनुष्यांना दुर्लभ असें दुसरें काय बरें आहे ? कांहींच नाहीं ॥ २७ ॥ तस्मात् जन्मांतरीं केलेल्या तपश्चर्यादिक कष्टानें या जन्मामध्यें भूतलावर मोक्षाला साधनभूत असें मनुष्यजन्म प्राप्त झालें असतां, जो मनुष्य विषयांचेठिकाणीं असक्त होतो त्या आत्मद्रोही मनुष्याला ईश्वराच्या मायेनें अगदीं फसविला आहे असें समजावें ॥ २८ ॥ मैत्रेय म्हणाला– हे विदुरा, याप्रमाणें देवांच्या स्त्रिया स्तुति करित असतां, भगवंताचा आश्रय करणारा व ज्ञानिजनामध्यें श्रेष्ठ असा पृथुराजा ज्या लोकाला प्राप्त झाला, त्या पतिलोकालाच त्याची स्त्री अर्चिसुद्धां गेली ॥ २९ ॥ असो हे, विदुरा, तो हा भगवद्भक्तांमध्यें मुख्य पृथुराजा, अशा प्रकारचा पराक्रमी होता, त्या महापुण्यकीर्ति राजाचें चरित्र मी तुला सांगितलें आहे ॥ ३० ॥ जो मनुष्य एकाग्रचित्त होऊन या अतिशय महापुण्यकारक आख्यानाचें श्रद्धेनें पठण करील, दुसऱ्याकडून ऐकवील किंवा स्वतः श्रवण करील तो पृथूच्या पदवीप्रत (वैकुंठाप्रत) पावेल ॥ ३१ ॥ याचें पठण करणारा ब्राह्मण असेल तर तो, ब्रह्मतेजानें

किंचिदित्यर्थः ॥ २७ ॥ अभक्तं शोचंति । स वंचित इति । यत आत्मने द्रुह्यति योऽपवर्गसाधनं मानुष्यं लब्ध्वापि विषयेष्वासक्तिं याति ॥ २८ ॥ २९ ॥ ३० ॥ ३१ ॥

स वंचितो बतात्मध्रुक् कृच्छ्रेण महता भुवि ॥ लब्ध्वाऽपवर्ग्यं मानुष्यं विषयेषु विषज्जते ॥ २८ ॥ मैत्रेय उवाच ॥ स्तुवतीष्वमरस्त्रीषु पतिलोकं गता वधूः ॥ यं वा आत्मविदां धुर्यो वैन्यः प्रापाच्युताशयः ॥ २९ ॥ इत्थं भूतानुभावोऽसौ पृथुः स भगवत्तमः ॥ कीर्तितं तस्य चरितमुद्दामचरितस्य ते ॥ ३० ॥ य इदं सुमहत्पुण्यं श्रद्धयाऽवहितः पठेत् ॥ श्रावयेच्छृणुयाद्वापि स पृथोः पदवीमियात् ॥ ३१ ॥ ब्राह्मणो ब्रह्मवर्चस्वी राजन्यो जगतीपतिः ॥ वैश्यः पठन्विट्पतिः स्याच्छूद्रः सत्तमतामियात् ॥ ३२ ॥ त्रिःकृत्व इदमाकर्ण्य नरो नार्यथवादृता ॥ अप्रजः सुप्रजतमो निर्धनो धनवत्तमः ॥ ३३ ॥ अस्पष्टकीर्तिः सुयशा मूर्खो भवति पंडितः ॥ इदं स्वस्त्ययनं पुंसाममंगल्यनिवारणम् ॥ ३४ ॥ धन्यं यशस्यमायुष्यं स्वर्ग्यं कलिमलापहम् ॥ धर्मार्थकाममोक्षाणां सम्यक्सिद्धिमभीप्सुभिः ॥ श्रद्धयैतदनुश्राव्यं चतुर्णां कारणं परम् ॥ ३५ ॥ विजयाभिमुखो राजा श्रुत्वैतदभियाति यान् ॥ बलिं तस्मै हरंत्यग्रे राजानः पृथवे यथा ॥ ३६ ॥ मुक्तान्यसंगो भगवत्यमलां भक्तिमुद्वहन् ॥ वैन्यस्य चरितं पुण्यं शृणुयाच्छ्रावयेत्पठेत् ॥ ३७ ॥

विशां पश्वादीनां वैश्यादीनां वा पतिः स्यात् । शूद्रः शृण्वन्निति शेषः तस्य पाठानधिकारात् ॥ ३२ ॥ ३३ ॥ ३४ ॥ ३५ ॥ ३६ ॥ यद्यपि बहूनि फलानि भवंति

युक्त होईल, राजा, पृथिवीचा पति होईल, वैश्य, आपल्या जातीमध्यें श्रेष्ठ होईल. व शूद्र श्रवण करील तर मोठ्या योग्यतेला पावेल ॥ ३२ ॥ पुरुष असो अथवा स्त्री असो जो आदरानें युक्त होऊन या आख्यानाचें त्रिवार श्रवण करील तो अपुत्रिक असला तर सुपुत्रवान् होईल व निर्धनी असला तर महाधनी होईल ॥ ३३ ॥ अस्पष्टकीर्ति असला तर सुकीर्तिमान् होईल, मूर्ख असला तर पंडित होईल. हें आख्यान, श्रवणादिक करणाऱ्या पुरुषांचें कल्याणकारक व दुःख देणाऱ्या पातकादिकांचें निवारण करणारें आहे ॥ ३४ ॥ तसेंच धनाची प्राप्ति करून देणारें, यशाची वृद्धि करणारें, आयुष्याची वृद्धि करणारें, स्वर्गाची प्राप्ति करून देणारें व कलिसंबंधी पापाचा नाश करणारें आहे. यास्तव धर्म, अर्थ, काम व मोक्ष ह्यांची उत्तमप्रकारें सिद्धि व्हावी अशी इच्छा करणाऱ्या मनुष्यांनीं श्रद्धेनें याचें श्रवण करावें हेंच धर्मादि चतुर्विध पुरुषार्थांच्या सिद्धीचें परम कारण आहे ॥ ३५ ॥ विजय संपादन करण्याविषयीं तत्पर झालेला राजा, या आख्यानाचें श्रवण करून ज्या देशावर स्वारी करील त्या देशांतील राजे ' जसे पूर्वी पृथुराजाला करभार निवेदन करीत होते त्याप्रमाणें ' त्याला करभार निवेदन करितील ॥ ३६ ॥ या चरित्राच्या श्रवणादि-

CC-0. In Public Domain,Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कांपासून जरी सकाम पुरुषांना पुष्कळ फळें मिळतात तथापि तीं सर्व फळें तुच्छ आहेत असें समजून त्या सर्व कर्मफळांची इच्छा सोडून भगवंताचेठिकाणीं निष्कामभक्ति करणाऱ्या पुरुषानें, पृथुराजाचें हें पवित्र चरित्र, वक्ता मिळाल्यास ऐकावें श्रोता मिळाल्यास ऐकवावें दोन्ही न मिळाल्यास स्वतःच पठण करावें ॥ ३७ ॥ हे विदुरा, भगवंताच्या माहात्म्याचें सूचक असें हें पृथुचरित्र मी तुला सांगितलें आहे. श्रवणादिकेंकरून याचें चिंतन करणारा मनुष्य, पृथूच्या वैकुंठप्राप्तिरूप गतीला पावेल ॥ ३८ ॥ जो फलेच्छारहित मनुष्य, या पृथुचरित्राचें आदरानें प्रतिदिवशीं श्रवण किंवा कीर्तन करील, तो मनुष्य, ज्याचे चरण संसारसमुद्र तरून जाण्याचें साधन अशी नौकाच आहेत त्या भगवंताचेठिकाणीं संसाराच्या निवृत्तीविषयीं कुशल अशा प्रीतीला पावतो ॥ ३९ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील चतुर्थस्कंधामध्यें पृथुराजाच्या वैकुंठगमनसंबंधी हा तेविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २३ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ याप्रमाणें अकरा अध्यायांनीं पृथुराजाचें चरित्र वर्णन केलें. आतां आठ अध्यायांनीं प्रचेत्यांचें चरित्र वर्णन करितात. त्यांमध्यें पहिल्या पांच अध्यायांनीं त्या प्रचेत्यांच्या पित्याचें (प्राचीनबर्हिराजाचें) चरित्र वर्णन

तथापि मुक्तान्यसंग एव श्रवणादि कुर्यात् ॥ ३७ ॥ महतो भगवतो माहात्म्यस्य सूचकम्। पार्थवीं पृथुसंबंधिनीम्। पार्थिवीमिति वा पाठः ॥ ३८ ॥ प्रथयन्कीर्तयन् भवसिंधौ पातः पादो यस्य ॥ ३९ ॥ इति चतुर्थे टीकायां त्रयोविंशोऽध्यायः ॥ २३ ॥ एकादशभिरध्यायैः पृथोश्चरितमीरितम् ॥ प्रचेतसामथाष्टाभिस्तन्मध्ये पंचभिः पितुः ॥ १ ॥ चतु-

वैचित्रवीर्याभिहितं महन्माहात्म्यसूचकम् ॥ अस्मिन्कृतमतिर्मर्त्यः पार्थवीं गतिमाप्नुयात् ॥३८॥ अनुदिनमिदमादरेण शृण्वन्पृथुचरितं प्रथयन्विमुक्तसंगः ॥ भगवति भवसिंधुपोतपादे स च निपुणां लभते रतिं मनुष्यः ॥ ३९ ॥ इति श्रीमद्भागवते म० चतुर्थस्कंधे त्रयोविंशोऽध्यायः ॥ २३ ॥ मैत्रेय उवाच ॥ विजिताश्वोऽधिराजासीत्पृथुपुत्रः पृथुश्रवाः ॥ यवीयोभ्योऽददात्काष्ठा भ्रातृभ्यो भ्रातृवत्सलः ॥ १ ॥ हर्यक्षायादिशत्प्राचीं धूम्रकेशाय दक्षिणाम् ॥ प्रतीचीं वृकसंज्ञाय तुर्यां द्रविणसे विभुः ॥ २ ॥ अंतर्धानगतिं शक्राल्लब्ध्वांतर्धानसंज्ञितः ॥ अपत्यत्रयमाधत्त शिखंडिन्यां सुसंमतम् ॥ ३ ॥ पावकः पवमानश्च शुचिरित्यग्नयः पुरा ॥ वसिष्ठशापादुत्पन्नाः पुनर्योगगतिं गताः ॥ ४ ॥

र्विंशे प्रपौत्रात्तु पृथोः प्राचीनबर्हिषः ॥ प्रचेतसां जनिस्तेभ्यो रुद्रगीतं च वर्ण्यते ॥ २ ॥ अधिराज आसीदित्यर्थः । यवीयोभ्यः कनिष्ठेभ्यः काष्ठा दिशः ॥ १ ॥ तुर्यां चतुर्थीमुत्तरां दिशम् ॥ २ ॥ शक्राल्लब्ध्वा पृथोरश्वमेधेऽश्वविजयावसरे ॥ ३ ॥ अपत्यत्रयमेवाह । पावक इति । पुरा यः शापस्तस्मान्मनुष्येषूत्पन्नाः संतो योगगतिमग्नित्वं प्राप्ताः

केलें आहे. त्यांत या चोविसाव्या अध्यायामध्यें पृथुराजाचा पणतू जो प्राचीनबर्हि राजा त्यापासून प्रचेत्यांची उत्पत्ति व त्यांना श्रीरुद्रानें प्रसन्न होऊन केलेल्या रुद्रगीताचा उपदेश निरूपण केला आहे ॥ १ ॥ मैत्रेय ह्मणाला— हे विदुरा, पृथुराजाच्या नंतर त्याचा पुत्र महायशस्वी विजिताश्वनामक सार्वभौम राजा झाला. तो भावांविषयीं प्रीतियुक्त होता, त्यानें आपल्या कनिष्ठ चार भावांना चारदिशांचें राज्य दिलें ॥ १ ॥ त्यांत त्या समर्थ राजानें, हर्यक्षनामक भावाला पूर्वदिशेचें राज्य दिलें, धूम्रकेशाला दक्षिणदिशेचें राज्य दिलें, वृकनामक भावाला पश्चिमदिशेचें व द्रविणसूनामक भावाला चवथ्या उत्तरदिशेचें राज्य दिलें ॥ २ ॥ त्यानें पृथुराजाच्या अश्वमेधामध्यें इंद्रापासून अश्व जिंकिला होता ह्मणून त्यास विजिताश्व हें नांव पडलें होतें, तसाच त्यानें त्या अश्वविजयाच्या वेळीं भयाभीत झालेल्या इंद्राचा वध केला नाहीं ह्मणून त्याला प्रसन्न झालेल्या इंद्रापासून अंतर्धानगतिरूप (गुप्त होण्याचें सामर्थ्य) वर प्राप्त झाल्यामुळें तो ' अंतर्धान ' या नांवानें प्रसिद्ध झाला. त्या अंतर्धानाला शिखंडिनीनामक भार्येच्याठिकाणीं सर्वसंमत असे तीन पुत्र झाले ॥ ३ ॥ ते पावक, पवमान आणि शुचि या नांवांचे होत. ते तीनहि पुत्र पूर्वींचे अग्नि (दक्षिणाग्नि, गार्हपत्य आणि आहवनीय) असून वसिष्ठ ऋषीच्या शापामुळें मनुष्यांमध्यें उत्पन्न झाले होते ते पुनः योगमार्गाच्या योगेंकरून शापापासून मुक्त होऊन आपलें मूळचें अग्निरू-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पत्व पावले ॥ ४ ॥ नंतर ज्यानें 'अश्वहरण करणारा हा इंद्र आहे' असें जाणत असूनहि त्याचा वध केला नाहीं, त्याच अंतर्धान राजाला (विजिताश्वाला) दुसऱ्या नभस्वतीनामक स्त्रीचेठिकाणीं हविर्धाननामक पुत्र झाला ॥ ५ ॥ त्यानें प्रजांपासून कर घेणें, दंडाचें द्रव्य स्वीकारणें इत्यादिक जी राजांची वृत्ति ती दुसऱ्यांना पीडा करणारी आहे असें जाणून, पुष्कळ वेळपर्यंत चालणारें सत्र करण्याच्या निमित्तानें ती वृत्ति सोडून दिली ॥ ६ ॥ आणि त्या सत्रामध्येंहि द्रव्य, देश, काल, कर्म, देवता इत्यादिकांचेठिकाणीं परमात्मदृष्टि ठेऊन, शुद्ध व पूर्ण अशा परमात्म्याचें पूजन करित होत्साता, पुण्यकारक समाधीच्या योगेंकरून त्या भगवंताच्या वैकुंठलोकास पावला ॥ ७ ॥ त्या हविर्धानापासून त्याच्या हविर्धानीनामक पत्नीला, बर्हिषद्, गय, शुक्ल, कृष्ण, सत्य आणि जितव्रत असे सहा पुत्र झाले ॥ ८ ॥ हे कौरवश्रेष्ठा, त्यांमध्यें हविर्धानाचा पहिला पुत्र जो बर्हिषद् तो प्रजांचें पालन करणारा, यज्ञादि अनुष्ठानरूप कर्मकांडाचेठिकाणीं व प्राणायामादिक योगाभ्यासाचेठिकाणीं निष्णात असा महा-

---

॥ ४ ॥ नभस्वत्यामन्यस्यां भार्यायाम् । अंतर्धानस्य विशेषणं य इति । एतेन शक्रादंतर्धानगतिलाभे कारणमुक्तम् ॥ ५ ॥ स चांतर्धानो राज्ञां वृत्तिं करादानादिभिर्दारुणां परपीडात्मिकां मन्यमानो विससर्ज ह ॥ ६ ॥ हंति स्वानां क्लेशमिति हंसस्तं पुरुषं पूर्णम् । कुशलं पुण्यं तद्रूपेण समाधिना ॥ ७ ॥ ८ ॥ हाविर्धानिर्हविर्धानस्य पुत्रः

अंतर्धानो नभस्वत्यां हविर्धानमविंदत ॥ य इंद्रमश्वहर्तारं विद्वानपि न जघ्निवान् ॥ ५ ॥ राज्ञां वृत्तिं करादानदंडशुल्कादिदारुणाम् ॥
मन्यमानो दीर्घसत्रव्याजेन विससर्ज ह ॥ ६ ॥ तत्रापि हंसं पुरुषं परमात्मानमात्मदृक् ॥ यजंस्तल्लोकतामाप कुशलेन समाधिना ॥ ७ ॥
हविर्धानाद्धविर्धानी विदुरासूत षट् सुतान् ॥ बर्हिषदं गयं शुक्लं कृष्णं सत्यं जितव्रतम् ॥ ८ ॥ बर्हिषत्सुमहाभागो हाविर्धानिः प्रजापतिः ॥
क्रियाकांडेषु निष्णातो योगेषु च कुरूद्वह ॥ ९ ॥ यस्येदं देवयजनमनुयज्ञं वितन्वतः ॥ प्राचीनाग्रैः कुशैरासीदास्तृतं वसुधातलम् ॥ १० ॥
सामुद्रीं देवदेवोक्तामुपयेमे शतद्रुतिम् ॥ यां वीक्ष्य चारुसर्वांगीं किशोरीं सुष्ठ्वलंकृताम् ॥ परिक्रमंतीमुद्वाहे चकमेऽग्निः शुकीमिव ॥ ११ ॥

योगेषु च प्राणायामादिषु ॥ ९ ॥ क्रियाकांडनिष्णातत्वमाह । यस्येति इदं वसुधातलं देवयजनं यज्ञवाटं वितन्वतः यत्रैको यज्ञः कृतस्तत्समीप एव यज्ञांतरं कुर्वतः सतः अतएव प्राचीनबर्हिरित्युच्यते ॥ १० ॥ समुद्रस्य कन्यां देवदेवेन ब्रह्मणोपदिष्टां शतद्रुतिं नाम किशोरीं बालां परिक्रमंतीं प्रदक्षिणं गच्छंतीम् । शुकीमिवेति एवं ह्याख्यायते । सप्तर्षीणां सत्रे तद्भार्यादर्शनेनाग्निः कामसंतप्तोऽभूत् तं च तद्भार्या स्वाहानाम सप्तर्षिभार्यारूपधारिणी सती रमयामास । रमयित्वा च तद्रेतः शुकीरूपेण शरस्तं-

---

पुण्यशाली झाला ॥ ९ ॥ ज्या बर्हिषद् राजानें, 'जेथें एक यज्ञ केला त्याच्या समीपभागीं दुसरा यज्ञ करावयाचा, त्याच्या समीपभागीं तिसरा याप्रमाणें' यज्ञ करण्याचा क्रम चालविला असतां, त्याच्या पूर्वाभिमुख पसरलेल्या दर्भांनीं आच्छादित झालेलें हें सर्वही भूमंडळ यज्ञमंडपरूप झालें, म्हणून त्याचें नांव प्राचीनबर्हि असें पडलें आहे ॥ १० ॥ त्यानें, देवाधिदेवाच्या (ब्रह्मदेवच्या) सांगण्यावरून समुद्राच्या शतद्रुतिनामक कन्येशीं विवाह करून घेतला. त्या विवाहाचे वेळीं, ती वयानें किशोरी (अकराबारा वर्षांची) होती व तिचे सर्व अवयव, सुंदर असून त्यांवर तिनें उत्तम अलंकार धारण केले होते. ती विवाह होमाच्या वेळीं अग्नीला प्रदक्षिणा घालूं लागली असतां, तिला पाहून अग्नीनेंहि कामातुर होऊन तिची इच्छा 'जशी पूर्वीं शुकीची (सप्तर्षिभार्येची) केली होती त्याप्रमाणें, केली ॥ ११ ॥

---

१ पूर्वीं सप्तर्षीच्या सत्रांमध्यें त्यांच्या भार्येच्या दर्शनानें अग्नीला कामवासना उत्पन्न झाली. तें जाणून अग्नीच्या स्वाहानामक भार्येनें, स्वतःच ऋषिपत्नीचें स्वरूप धारण करून, अग्नीबरोबर क्रीडा केली. अशा रीतीनें पतीकडून अनीतिमार्ग घडूं न देतां नंतर तिनें शुकीचें [पोपटाच्या मादीचें] रूप घेऊन तें अग्नीचें रेत एका दर्भांच्या गुच्छामध्यें ठेऊन आपण मूळच्या स्वाहारूपानें अग्नीजवळ आली अशी कथा आहे. तिनें सप्तर्षिभार्येचें व शुकीचें रूप धारण केलें होतें म्हणून तीच शुकी होय.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याचप्रमाणें त्या विवाह झालेल्या शतद्रुतीनें चरणचालीच्या वेळीं पायांतील नूपुरांच्या मंजूळ ध्वनीनेंच सर्व दिशांचेठिकाणीं असणाऱ्या देव, असुर, गंधर्व, ऋषि, सिद्ध, मनुष्य व सर्प ह्या सर्व पुरुषांना जिंकून (मोहित करून) सोडिलें होतें ॥ १२ ॥ त्या शतद्रुतीचेठिकाणीं प्राचीनबर्हि राजाला प्रचेतस्नामक दहा पुत्र झाले. त्या दहांचेंहि नांव व आचार सारखा असून ते सर्वही भगवदाराधनरूप धर्माचेठिकाणीं निष्णात होते ॥ १३ ॥ पुढें पित्यानें (प्राचीनबर्हि राजानें) प्रजेच्या सृष्टिविषयीं आज्ञा केलेले ते प्रचेतस् पुत्र, भगवत्प्रसादावांचून उत्तम संतति होणार नाहीं, असें जाणून त्याच्या संतोषार्थ तप करण्याकरितां समुद्रामध्यें (त्याच्या कमरेइतक्या पाण्यांत) प्रविष्ट झाले आणि तेथें त्यांनीं दहा हजार वर्षेंपर्यंत तपश्चर्या करून तिच्यायोगानें, तपाचें फल देणाऱ्या भगवंताचें आराधन केलें ॥ १४ ॥ जातांना मार्गामध्यें दृष्टी पडलेल्या व प्रसन्न झालेल्या श्रीमहादेवानें त्यांच्यावर प्रसाद करण्यासाठीं जें भगवंताच्या आराधनेचें साधन सांगितलें होतें त्याच्या योगानें भगवंताचें ध्यान, मंत्र-

---

वे निधायागच्छत् तां यथा सप्तर्षिभार्याभ्रांत्याऽग्निः कामितवांस्तद्वदिति स्तुकीमिवेति पाठे स्तोकघृतधारामिवेत्यर्थः ॥ ११ ॥ सूर्यया नवोढयैव विबुधादयो विजिता अभिभूतास्तत्त्व नूपुरैः पादौ क्वणयंत्यैव तद्ध्वनिमात्रेणेत्यर्थः ॥ १२ ॥ तुल्यं नाम व्रतमाचारश्च येषाम् । धर्मस्नाता धर्मपारगाः ॥ १३ ॥ तपसा तपसां पतिं हरिमर्चन्नर्चया

विबुधासुरगंधर्वमुनिसिद्धनरोरगाः ॥ विजिताः सूर्यया दिक्षु क्वणयंत्यैव नूपुरैः ॥ १२ ॥ प्राचीनबर्हिषः पुत्राः शतद्रुत्यां दशाभवन् ॥
तुल्यनामव्रताः सर्वे धर्मस्नाताः प्रचेतसः ॥ १३ ॥ पित्राऽऽदिष्टाः प्रजासर्गे तपसेऽर्णवमाविशन् ॥ दशवर्षसहस्राणि तपसार्चंस्तपस्प-
तिम् ॥ १४ ॥ यदुक्तं पथि दृष्टेन गिरिशेन प्रसीदता ॥ तद्ध्यायंतो जपंतश्च पूजयंतश्च संयताः ॥ १५ ॥ विदुर उवाच ॥ प्रचे-
तसां गिरित्रेण यथासीत्पथि संगमः ॥ यदुताह हरः प्रीतस्तन्नो ब्रह्मन्वदार्थवत् ॥ १६ ॥ संगमः खलु विप्रर्षे शिवेनेह शरीरिणाम् ॥
दुर्लभो मुनयो दध्युरसंगाद्यमभीप्सितम् ॥ १७ ॥ आत्मारामोऽपि यस्त्वस्य लोककल्पस्य राधसे ॥ शक्त्यायुक्तो विचरति घोरया
भगवान्भवः ॥ १८ ॥ मैत्रेय उवाच ॥ प्रचेतसः पितुर्वाक्यं शिरसाऽऽदाय साधवः ॥ दिशं प्रतीचीं प्रययुस्तपस्यादृतचेतसः ॥ १९ ॥
समुद्रमुपविस्तीर्णमपश्यन्सुमहत्सरः ॥ महन्मन इव स्वच्छं प्रसन्नसलिलाशयम् ॥ २० ॥

मासुः ॥ १४ ॥ १५ ॥ १६ ॥ मुनयोऽपि संगत्यागेनाप्तुमिष्टं यं दध्युरेव केवलं न तु प्रापुः । तेन शिवेन ॥ १७ ॥ ननु मुनीनां किं तद्ध्यानेन घोरत्वादित्याशंक्याह । आ-
त्मारामोऽपि लोकरचनायाः पालनाय ॥ १८ ॥ गुर्वाज्ञाकारिणां शिवदर्शनं स्वत एव भवतीत्याशयेनाह । प्रचेतस इति ॥ १९ ॥ समुद्रमुप समुद्रांतिकिचिन्न्यूनम् । उपोऽधिके

जप व पूजावगैरे करणाऱ्या त्या जितेंद्रिय प्रचेत्यांनीं नारायणाचें आराधन केलें ॥ १५ ॥ विदुर ह्मणाला– हे ब्रह्मनिष्ठा मैत्रेय ऋषे, प्रचेत्यांचा शंकराबरोबर मार्गांमध्यें समागम कसा झाला होता ? तें व त्यांत संतुष्ट झालेल्या शंकरानें त्यांना भगवंताच्या आराधनाचें तत्त्वविचारानें भरलेलें जें साधन सांगितलें असेल तें मला सांगावें ॥ १६ ॥ हे ब्रह्मर्षे, सर्व संगपरित्याग करून एकांतस्थलीं वास करणारे मुनि, ज्या आवडत्या शंकराचें केवळ ध्यान करित असतात, त्या शंकराबरोबर समागम घडणें हें ह्या जगांत खरोखर प्राण्यांना फार दुर्लभ आहे ॥ १७ ॥ हे भगवन्, जो भगवान् रुद्र, स्वस्वरूपीं रममाण असतांहि लोकरचनेचें परिपालन करण्यासाठीं आपल्या तमोगुणात्मक भयंकर शक्तीनें युक्त होऊन लोकांमध्यें संचार करीत असतो ॥ १८ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, सदाचारसंपन्न अशा त्या प्रचेत्यांनीं पित्याचें वाक्य बहुमानपूर्वक स्वीकारून तें सिद्धीस नेण्याकरितां भगवदाराधनरूप तप करण्याविषयीं सादरचित्त होऊन ते पश्चिमदिशेस निघून गेले ॥ १९ ॥ ते जातां जातां, समुद्राच्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आलीकडे समुद्रापेक्षां कांहीं लहान असें एक मोठें सरोवर त्यांनीं अवलोकन केलें. त्याचें उदक, सत्पुरुषांच्या अंतःकरणासारखें निर्मळ होतें व त्या उदकांत राहणारे मत्स्य-कूर्मादिक प्राणी शांत होते ॥ २० ॥ तसेंच काळीं कमळें, तांबडीं कमळें, चंद्रविकासी कमळें, सूर्यविकासी कमळें आणि संध्याविकासी कमळें, ह्याचें तें उत्पत्तिस्थान असून, हंस, सारस, चक्रवाक, ह्या पक्ष्यांच्या स्वरांनीं नादयुक्त होतें ॥ २१ ॥ तसेंच मत्तभ्रमरांच्या सुस्वर गायनानें रोमांचयुक्त झाल्यासारखेच कीं काय असे कळ्यांनीं भरलेले वल्ली व वृक्ष ज्यामध्यें होते आणि कमलकोशांतील रज दशदिशांचेठिकाणीं नेऊन टाकणाऱ्या वायूच्या योगानें त्यामध्यें ‘ गुलाल उधळल्यासारखा ’ उत्साह प्राप्त झाला होता ॥ २२ ॥ असो त्याठिकाणीं मृदंग व पणव (झांजा) इत्यादिक वाद्यांच्या तालाला अनुसरून दिव्यपद्धतीवर चाललेलें गंधर्वांचें मनोहर गायन श्रवण करून, ते

चेति कर्मप्रवचनीयः। प्रसन्नाः सलिलाशया मत्स्यादयो यस्मिन् ॥ २० ॥ नीलोत्पलादीनामाकरं जन्मस्थानं उत्पलांभोजकल्हाराणि रात्रिदिनसंध्याविकासीनि इंदीवरं नीलोत्पलम्। तस्य पुनरुक्तिः प्राचुर्यज्ञापनार्थम्। हंसादिभिर्निकूजितम् ॥ २१ ॥ मत्तानां भ्रमराणां सौस्वर्येण हृष्टरोमाणो लतांघ्रिपा यस्मिन्। पद्मकोशरजो दिक्षु विक्षिपता पवनेनोत्सवो यस्मिन् ॥ २२ ॥ तत्र मृदंगपणवादिवाद्यमनु पश्चाद्दिव्यैर्मार्गभेदैर्मनोहरं गांधर्वं गानमाकर्ण्य विस्मयं प्राप्ताः। पाठांतरे मृदंगपणवादि अवत् रक्षत् तेषां ध्वनिम-

नीलरक्तोत्पलांभोजकल्हारेंदीवराकरम् ॥ हंससारसचक्राह्वकारंडवनिकूजितम् ॥ २१ ॥ मत्तभ्रमरसौस्वर्यहृष्टरोमलतांऽघ्रिपम् ॥ पद्मकोशरजो दिक्षु विक्षिपत्पवनोत्सवम् ॥ २२ ॥ तत्र गांधर्वमाकर्ण्य दिव्यमार्गमनोहरम् ॥ विसिस्म्यू राजपुत्रास्ते मृदंगपणवाद्यनु ॥ २३ ॥ तर्ह्येव सरसस्तस्मान्निष्क्रामंतं सहानुगम् ॥ उपगीयमानममरप्रवरं विबुधानुगैः ॥ २४ ॥ तप्तहेमनिकायाभं शितिकंठं त्रिलोचनम् ॥ प्रसादसुमुखं वीक्ष्य प्रणेमुर्जातकौतुकाः ॥ २५ ॥ स तान्प्रपन्नार्तिहरो भगवान्धर्मवत्सलः ॥ धर्मज्ञान् शीलसंपन्नान्प्रीतः प्रीतानुवाच ह ॥ २६ ॥ श्रीरुद्र उवाच ॥ यूयं वेदिषदः पुत्रा विदितं वश्चिकीर्षितम् ॥ अनुग्रहाय भद्रं व एवं मे दर्शनं कृतम् ॥ २७ ॥ यः परं रंहसः साक्षात्त्रिगुणाज्जीवसंज्ञितात् ॥ भगवंतं वासुदेवं प्रपन्नः स प्रियो हि मे ॥ २८ ॥

तिरस्कुर्वदित्यर्थः ॥ २३ ॥ ते च त्रिलोचनं वीक्ष्य जाताश्चर्याः प्रणेमुरित्युत्तरेणान्वयः ॥ २४ ॥ तप्तहेमराशिसदृशकांतिम्। शितिर्नीलः कंठो यस्य तम् ॥ २५ ॥ २६ ॥ वेदिषदो बर्हिषदः चिकीर्षितं भगवदाराधनं विदितम् ॥ २७ ॥ अनुग्रहकारणमाह। यः साक्षाद्वासुदेवं प्रपन्नः स हि मे प्रियः कथंभूतम्। रंहसः सूक्ष्मात्त्रिगुणात्प्रधानाज्जी-

---

राजपुत्र विस्मित झाले ॥ २३ ॥ तों इतक्यांत त्या सरोवरांतून बाहेर पडणारा, नंदिकेश्वरादिक सेवकांनीं युक्त, ज्याच्या यशाचें गंधर्वादिकांनीं गायन चालविलें आहे, ज्याची अंगकांति तापलेल्या सुवर्णासारखी आहे, ज्याचा कंठ निळा आहे, ज्याला तीन नेत्रें आहेत आणि जो भक्तांवर अनुग्रह करण्याकरितां उद्युक्त आहे, अशा त्या देवाधिदेव शंकराला अवलोकन करून, ज्यांना कौतुक वाटलें आहे अशा त्या राजपुत्रांनीं त्याला वंदन केलें ॥ २४ ॥ २५ ॥ शरणागतांची पीडा दूर करणारा व धर्मवत्सल असा तो भगवान् शंकर, संतुष्ट होऊन धर्मज्ञ, शीलसंपन्न व आपल्या दर्शनानें आनंदित झालेले अशा त्या प्रचेत्यांस ह्मणाला कीं, ॥ २६ ॥ श्रीरुद्र ह्मणाला– तुह्मी प्राचीनबर्हि राजाचे पुत्र अहां असें मला ठाऊक आहे व तुमच्या मनांत करावयाचें जें भगवंताचें आराधन तेंहि मला समजलें आहे. तुमचें कल्याण असो. तुमच्यावर अनुग्रह करण्याकरितांच हें मी तुह्मांला दर्शन दिलें आहे ॥ २७ ॥ कारण, जो प्राणी, सूक्ष्म अशा त्रिगुणात्मक प्रधानाहून व जीवसंज्ञक पुरुषाहून पर (प्रकृतिपुरुषांचा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नियंता) अशा साक्षात् भगवान् वासुदेवाला शरण गेला आहे तो मला प्रिय आहे ॥ २८ ॥ कारण, स्वधर्मानें उत्तमप्रकारें आचरण करणारा पुरुष, शंभर जन्मांनीं ब्रह्मदेवाच्या स्वरूपीं लय पावतो. त्यापेक्षांहि अधिक पुण्यवान् असेल तर माझ्या स्वरूपीं मिळतो. आणि जसा मी (रुद्र) व इतरहि अधिकारांवर असलेले देव आपापले अधिकार संपले आणि लिंगदेहाचा भंग झाला ह्मणजे भगवद्रूपीं मिळतात त्याप्रमाणें भगवद्भक्त पुरुष, देहांतीं सनातन वैष्णव पदास पावतो ॥ २९ ॥ यास्तव तुह्मी भगवद्भक्त असल्यामुळें जसा भगवान् मला प्रिय आहे त्याप्रमाणेंच तुह्मीहि मला प्रिय अहां. भगवद्भक्तांनाहि माझ्याहून दुसरा कोणीहि कधींहि अतिप्रिय होत नाहीं ॥ ३० ॥

वसंज्ञितात्पुरुषाच्च परम् । प्रकृतिपुरुषयोर्नियंतारमित्यर्थः ॥ २८ ॥ तत्किं तस्य महत्तमत्वादित्याह । स्वधर्मनिष्ठः पुमान्बहुभिर्जन्मभिर्विरिंचतां प्राप्नोति ततोऽपि पुण्यातिशयेन मामेति भागवतस्त्वथ देहांतेऽव्याकृतं प्रपंचातीतं वैष्णवं पदमेति । यथाहं रुद्रो भूत्वाऽधिकारिकवद्वर्तमानो विबुधा देवाश्चाधिकारिकाः कलात्ययेऽधिकारांते लिंगभंगे सत्येष्यंति ॥ २९ ॥ अथ भागवतत्वाद्यूयं मे प्रियाः स्थ । भवद्भिरपि मयि प्रीतिः कार्येत्याशयेनाह । मदन्यो भागवतानां च प्रेयान्नास्ति ॥ ३० ॥ अत इदं जप्तव्यम् । श्रूयतामिति विविक्तमसंकीर्णं यथा भवति ॥ ३१ ॥ सृष्ट्यादौ ब्रह्मणा सृष्टा पुत्रेभ्यः प्रोक्तमिष्टदम् । स्तोत्रं प्राह प्रचेतोभ्यः कृपया भगवान् शिवः ॥ ३२ ॥ ते जितं तवो-

स्वधर्मनिष्ठः शतजन्मभिः पुमान्विरिंचतामेति ततः परं हि माम् ॥ अव्याकृतं भागवतोऽथ वैष्णवं पदं यथाऽहं विबुधाः कलात्यये ॥ २९ ॥ अथ भागवता यूयं प्रियाः स्थ भगवान्यथा ॥ न मद्भागवतानां च प्रेमानन्योऽस्ति कर्हिचित् ॥ ३० ॥ इदं विविक्तं जप्तव्यं पवित्रं मंगलं परम् ॥ निःश्रेयसकरं चापि श्रूयतां तद्वदामि वः ॥ ३१ ॥ मैत्रेय उवाच ॥ इत्यनुक्रोशहृदयो भगवानाह तान् शिवः ॥ बद्धांजलीन्राजपुत्रान्नारायणपरो वचः ॥ ३२ ॥ श्रीरुद्र उवाच ॥ जितं त आत्मविद्धुर्य स्वस्तये स्वस्तिरस्तु मे ॥ भवता राधसा राद्धं सर्वस्मा आत्मने नमः ॥ ३३ ॥ नमः पंकजनाभाय भूतसूक्ष्मेंद्रियात्मने ॥ वासुदेवाय शांताय कूटस्थाय स्वरोचिषे ॥ ३४ ॥

त्कर्षः आत्मविद्धुर्याणां स्वस्तये शोभनसत्तायै स्वानंदलाभायेत्यर्थः । अतो मे स्वस्तिः स्वानंद सत्तास्तु । ननु ममोत्कर्षो मदर्थ एव किं न स्यात्तत्राह । भवता राधसा स्वानंदरूपेण राद्धं सिद्धम् । त्वं परमानंदरूपेणैव नित्यं स्थित इत्यर्थः । अत एवंभूतायात्मने तुभ्यं नमः सर्वस्मै सर्वरूपाय च ॥ ३३ ॥ सर्वरूपत्वं प्रपंचयन्प्रणमति । सार्धैर्दशभिः । पंकजं लोकात्मकं नाभौ यस्य तस्मै कारणात्मने नमः । कारणत्वादेव सृज्यानां प्राणिनां ये उपाधयो भूतानि सूक्ष्माणि तन्मात्राणींद्रियाणि च तेषामात्मने नियंत्रे अंतः-

---

यास्तव जप करण्यास योग्य, पवित्र, मंगलकारक, श्रेष्ठ आणि भगवत्स्वरूपाची प्राप्ति करून देणारें असें जें हें स्तोत्र मी तुह्मांस सांगतों, तें तुह्मी श्रवण करा. आणि एकांतस्थळीं त्याचा जप करा ॥ ३१ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, याप्रमाणें ज्याचें अंतःकरण सदय आहे व ज्याचें नारायण हेंच मुख्य दैवत आहे असा तो भगवान् शंकर, हात जोडून अतिनम्रपणें उभे राहिलेल्या त्या राजपुत्रांस ह्मणाला कीं, ॥ ३२ ॥ श्रीरुद्र ह्मणाला– हे देवा, आत्मवेत्त्यांमध्यें श्रेष्ठ जे भगवद्भक्त त्यांना परमानंदलाभाची प्राप्ति होण्याकरितांच तूं आपला उत्कर्ष प्रकट केला आहेस, यास्तव मलाही स्वानंदाचा लाभ असो. तूं परमानंदरूपानेंच नित्यस्थित आहेस ह्मणून सर्वरूपी तुज परमात्म्याला नमस्कार असो ॥ ३३ ॥ तसाच जो तूं कमलनाभ भगवान्, आकाशादिक पंचमहाभूतें, त्यांचीं शब्दादिक सूक्ष्मरूपें व इंद्रियें ह्यांचा आत्मा, शांत, निर्वि-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कार आणि स्वयंप्रकाश आहेस त्या तुज चित्ताधिष्ठात्या वासुदेवाला नमस्कार असो ॥ ३४ ॥ सूक्ष्म, (दुर्लक्ष्य) अविनाशी आणि विश्वसंहारक अशा अहंकाराधिष्ठात्या तुज संकर्षणाला नमस्कार असो. ज्यापासून विश्वाचा बोध होतो अशा बुद्धीच्या अधिष्ठात्या तुज प्रद्युम्नाला नमस्कार असो ॥ ३५ ॥ विषय ग्रहण करणाऱ्या इंद्रियांचा राजा अशा मनाच्या अधिष्ठात्या तुज अनिरुद्धला वारंवार नमस्कार असो. आपल्या तेजानें जगाला व्यापणाऱ्या वृद्धिक्षयरहित अशा सूर्यरूपी तुला नमस्कार असो ॥ ३६ ॥ तसाच स्वर्ग व मोक्ष यांचें द्वार, निरंतर पवित्र अंतःकरणामध्यें राहणारा, कर्मविस्तारक असल्यामुळें होता अध्वर्यु इत्यादिक चार ऋत्विजांनीं घडणाऱ्या कर्माला साधनभूत आणि सुवर्णरूप वीर्यानें युक्त अशा अग्निरूपी तुला नमस्कार असो ॥ ३७ ॥ तसाच पितरांचें अन्नरूप व देवांचें अन्नरूप अशा सोमरूपी तुला नमस्कार

करणचतुष्टयाधिष्ठातृत्वेन प्रणमति । चतुर्भिः श्लोकार्धैः । वासुदेवाय चित्ताधिष्ठात्रे कूटस्थाय निर्विकाराय चित्तस्यैकरूपत्वात् ॥ ३४ ॥ संकर्षणायाहंकाराधिष्ठात्रे सूक्ष्माय अव्यक्ताय दुरंतायानंताय अंतकाय मुखाग्निना लोकदाहकाय विश्वस्य प्रकृष्टो बोधो यस्मात् । अंतरात्मने बुद्ध्यधिष्ठात्रे ॥ ३५ ॥ हृषीकाणामीशं यदिंद्रियं मनस्तदात्मने सूर्यरूपेण प्रणमति । परमहंसाय सूर्याय पूर्णाय तेजसा विश्वव्यापिने निभृतात्मने क्षयवृद्धिशून्याय ॥ ३६ ॥ स्वर्गापवर्गयोर्द्वाराय शुचिन्यंतःकरणे निषीदतीति शुचिषत्तस्मै । हंसः शुचिषदिति श्रुतेः । हिरण्यं वीर्यं यस्य तस्मै अग्निरूपाय चातुर्होत्रं कर्म तस्मै तत्साधनायेत्यर्थः । कुतस्तंतवे तद्विस्तारकाय ॥ ३७ ॥ सोमत्वमाह ।

संकर्षणाय सूक्ष्माय दुरंतायांतकाय च ॥ नमो विश्वप्रबोधाय प्रद्युम्नायांतरात्मने ॥ ३५ ॥ नमो नमोऽनिरुद्धाय हृषीकेशेंद्रियात्मने ॥ नमः परमहंसाय पूर्णाय निभृतात्मने ॥ ३६ ॥ स्वर्गापवर्गद्वाराय नित्यं शुचिषदे नमः ॥ नमो हिरण्यवीर्याय चातुर्होत्राय तंतवे ॥ ३७ ॥ नम ऊर्जे इषे त्रय्याः पतये यज्ञरेतसे ॥ तृप्तिदाय च जीवानां नमः सर्वरसात्मने ॥ ३८ ॥ सर्वसत्त्वात्मदेहाय विशेषाय स्थवीयसे ॥ नमस्त्रैलोक्यपालाय सहओजोबलाय च ॥ ३९ ॥ अर्थलिंगाय नभसे नमोंऽतर्बहिरात्मने ॥ नमः पुण्याय लोकाय अमुष्मै भूरिवर्चसे ॥ ४० ॥ प्रवृत्ताय निवृत्ताय पितृदेवाय कर्मणे ॥ नमो धर्मविपाकाय मृत्यवे दुःखदाय च ॥ ४१ ॥

ऊर्जे पितॄणामन्नाय इषे देवानामन्नाय यज्ञरेतसे सोमाय स हि पितॄणां देवानां चान्नम् । एवंरूपाय त्रय्याः पतये हरये नमः । सूर्याग्निसोमत्वेनैव तेजस्त्वमुक्तम् । जलत्वमाह । सर्वरसात्मने जलरूपाय ॥ ३८ ॥ विशेषाय पृथ्वीरूपाय सर्वेषां सत्त्वानां प्राणिनां ये आत्मानस्तेषां देहाय स्थवीयसे विराड्देहाय च त्रैलोक्यपालाय वायवे सहआदिरूपाय स हि प्राणरूपेण त्रैलोक्यं पालयति सहआदिधर्मा च ॥ ३९ ॥ नभसे आकाशायार्थानां लिंगाय ज्ञापकाय शब्दगुणत्वात् अंतर्बहिरात्मनेंऽतर्बहिर्व्यवहारालंबनाय एवं महाभूतरूपत्वमुक्तम् । अमुष्मै स्वर्गाय भूरिवर्चसे। एष वै ज्योतिष्मंतं पुण्यं लोकं यातीति श्रुतेः ॥ ४० ॥ प्रवृत्ताय च निवृत्ताय च कर्मणे पितृदेवाय यथा-

असो. याप्रमाणें सूर्य, अग्नि आणि सोम यांच्या रूपानें वेदत्रयाचा अधिपति अशा तुज हरीला नमस्कार असो. सर्व जीवांनां तृप्ति देणाऱ्या सर्वरसरूपी (उदकरूपी) तुला नमस्कार असो ॥ ३८ ॥ सर्व प्राण्यांचा देहरूपी, पृथिवीरूपी व विराड्रूपी अशा तुला नमस्कार असो. मनस्सामर्थ्य, इंद्रियसामर्थ्य आणि देहसामर्थ्य हे ज्याचे धर्म आहेत असा त्रैलोक्याचें पालन करणारा वायुरूपी जो तूं त्याला नमस्कार असो ॥ ३९ ॥ शब्दगुणांच्या योगानें लोकांतील सर्व पदार्थांचा ज्ञापक अवकाशदातृत्वाच्या योगानें सर्वांच्या आंतला व बाहेरचा व्यवहार करणारा अशा आकाशरूपी तुज भगवंताला नमस्कार असो. पुण्याच्या योगानें प्राप्त होणारा व प्रकाशमय असा स्वर्गवैकुंठादि लोकरूपी जो तूं त्याला नमस्कार असो ॥ ४० ॥ पितृलोकाला पोंचविणारा प्रवृत्तकर्मरूपी, देवलोकाला पोंचविरणा निवृत्तकर्मरूपी आणि अधर्माचें फल देणारा दुःखदायक

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मृत्युरूपी अशा तुला नमस्कार असो ॥ ४१ ॥ हे ईश्वरा, इच्छित फलांचा दाता, सर्वज्ञ, पुराणपुरुष, सांख्यशास्त्र व योगशास्त्र यांचा अधिपति, अकुंठ बुद्धीनें युक्त अशा परमधर्मरूपी तुज कृष्णाला नमस्कार असो ॥ ४२ ॥ कर्ता, करण आणि कर्म ह्या तीन शक्तींनीं युक्त अशा अहंकाररूपी तुज रुद्राला नमस्कार असो. आणि ज्याच्यापासून वाणीची ' परा, पश्यंती, मध्यमा आणि वैखरी या रूपांनीं ' अनेकप्रकारची उत्पत्ति होत्ये व जो ज्ञानक्रियाशक्तिरूप आहे अशा ब्रह्मस्वरूपी तुला नमस्कार असो. ॥ ४३ ॥ हे भगवन्, तुझ्या दर्शनाची इच्छा करणाऱ्या आह्मांला, तूं आपलें, भगवद्भक्तांनीं बहुमानपूर्वक सत्कार केलेलें दर्शन दे. ह्मणजे भक्तांना अत्यंत प्रिय असें आपलें स्वरूप आह्मांला दाखीव. तें तुझें स्वरूप, सर्व इंद्रियांना तृप्त करणारें अलौकिक विषययुक्त आहे ॥ ४४ ॥ आणि वर्षाऋतूंतील दाट मेघाप्रमाणें श्यामवर्ण असून ज्यावेठि-

क्रमं पितृदेवप्राप्तिफलाय अधर्मफलरूपाय च मृत्यवे ॥ ४१ ॥ हेईश आशिषां कारणात्मने सर्वकर्मफलदात्रे मनवे सर्वज्ञाय मंत्रात्मकायेति वा विष्णुत्वेन प्रणमति बृहते धर्माय परमधर्मात्मने कृष्णाय ॥ ४२ ॥ रुद्ररूपेण प्रणमति । मीढुषे रुद्राय अहंकृतमहंकारस्तदात्मने स च कर्तृकरणकर्मशक्तित्रयसमेतस्तस्मै ब्रह्मत्वेन प्रणमति ! चेतो ज्ञानमाकूतिः क्रिया तद्रूपाय वाचो विविधा भूतिः सृष्टिर्यस्मात्तस्मै ॥ ४३ ॥ एवं नमस्कृत्य दर्शनं प्रार्थयते । दर्शनमिति नवभिः । भागवतैः सत्कृतं दर्शनं देहीत्यस्य विवरणं

नमस्त आशिषामीश मनवे कारणात्मने ॥ नमो धर्माय बृहते कृष्णायाकुंठमेधसे ॥ पुरुषाय पुराणाय सांख्ययोगेश्वराय च ॥ ४२ ॥ शक्तित्रयसमेताय मीढुषेऽहंकृतात्मने ॥ चेत आकूतिरूपाय नमो वाचो विभूतये ॥ ४३ ॥ दर्शनं नो दिदृक्षूणां देहि भागवतार्चितम् ॥ रूपं प्रियतमं स्वानां सर्वेंद्रियगुणांजनम् ॥ ४४ ॥ स्निग्धप्रावृड्घनश्यामं सर्वसौंदर्यसंग्रहम् ॥ चार्वायतचतुर्बाहुं सुजातरुचिराननम् ॥ ४५ ॥ पद्मकोशपलाशाक्षं सुंदरभ्रु सुनासिकम् ॥ सुद्विजं सुकपोलास्यं समकर्णविभूषणम् ॥ ४६ ॥ प्रीतिप्रहसितापांगमलकैरुपशोभितम् ॥ लसत्पंकजकिंजल्कदुकूलं मृष्टकुंडलम् ॥ ४७ ॥ स्फुरत्किरीटवलयहारनूपुरमेखलम् ॥ शंखचक्रगदापद्ममालामण्युत्तमर्धिमत् ॥ ४८ ॥

रूपमित्यादि प्रदर्शयेत्यंतम् । स्वानां भक्तानां प्रियतमं रूपं प्रदर्शयेति नवमेनान्वयः । सर्वेषामिंद्रियाणां ये गुणा विषयास्तेषामंजनं व्यंजकम् । सर्वेंद्रियविषयविषयिरूपमित्यर्थः । सर्वेंद्रियाणि स्वगुणैरनक्ति रंजयतीति वा ॥ ४४ ॥ स्निग्धः प्रावृषि यो घनस्तद्वच्छ्यामम् । सर्वेषां सौंदर्याणां संग्रहो यस्मिन् चारव आयताश्चत्वारो बाहवो यस्मिन् । सुजातं यथोचितं सर्वावयवरुचिरमाननं यस्मिन् ॥ ४५ ॥ पद्मस्य कोशे मध्ये यानि पलाशानि तद्वदक्षिणी यस्मिन् । सुकपोलमास्यं यस्मिन् । समौ कर्णौ विभूषणं यस्य कुंडलयोरग्रे वक्ष्यमाणत्वात् ॥ ४६ ॥ प्रीत्या प्रहसिताविवापांगौ यस्मिन् ॥ ४७ ॥ स्फुरंति किरीटादीनि यस्मिन् शंखादिमत् उत्तमर्धिर्लक्ष्मीः । यद्वा एतैरुत्तमा ऋद्धिरुत्क-

काणीं सर्व सौंदर्यांचा संग्रह आहे, जेथें मनोहर आणि दीर्घ असे चार बाहु आहेत, ज्याचेठिकाणीं यथायोग्य सर्व अवयवांनीं युक्त सुंदर मुख आहे, ॥ ४५ ॥ जेथें कमळांच्या कोशामध्यें असणाऱ्या पत्रांप्रमाणें आरक्त रेखेंनीं युक्त नेत्रें आहेत, जेथें सुंदर भ्रुकुटी आहेत, जेथें सुरेख नासिका आहे, जेथें सुशोभित दांत आहेत, जेथें सुंदर गालांनीं युक्त मुख आहे, ज्याचे कान सारखे असून रूपाचें सौंदर्य वाढविणारे आहेत ॥ ४६ ॥ ज्याच्या कटाक्षांचेठिकाणीं संतोषसूचक किंचित् हास्य आहे, जें कुरळ केशांनीं सुशोभित आहे, ज्याच्याठिकाणीं कमळांतील केसरांप्रमाणें तेजस्वी भरजरीचे दोन पीतांबर आहेत, ज्याच्या कानांमध्यें उज्ज्वल कुंडलें आहेत ॥४७॥ ज्याचेठिकाणीं देदीप्यमान अशीं किरीट, कडीं तोडे, रत्नाचे हार, नूपुरें व करगोटा हीं भूषणें आहेत, जें शंख चक्र, गदा, पद्म, वनमाला, व अलंकारांवर जडित असलेलीं रत्नें यांच्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

उत्तम शोभेनें युक्त आहे ॥ ४८ ॥ जें, सिंहाच्या स्कंधासारख्या स्थूल स्कंधाचेठिकाणीं कुंडलहारादिकांच्या दीप्ति धारण करणारें आहे, ज्याच्या योगानें कंठ सुशोभित दिसतो असा कौस्तुभ मणि ज्याचेठिकाणीं आहे, कधींहि वियोग न पावणाऱ्या लक्ष्मीनें (लक्ष्मीच्या रेखारूप चिन्हानें) ज्यानें सुवर्णाच्या कसोटीच्या पाषाणाची शोभा मागें सारिली आहे अशा वक्षःस्थलानें जें सुशोभित आहे ॥ ४९ ॥ ज्याचेठिकाणीं श्वासोच्छ्वासांच्या योगानें हालत असलेल्या तीन वळ्यांनीं मनोहर असें अश्वत्थ-पर्णासारखें पोट दिसत आहे; जें भोवऱ्यानें युक्त व खोल असलेल्या नाभीच्या योगानें, जेथून जग बाहेर पडलें त्याच द्वारानें पुनः आंत प्रवेश करीत आहे कीं काय असें दिसत आहे ॥ ५० ॥ जेथें श्यामवर्ण कटिभागानें अधिकच झळकणाऱ्या पीतांबरावर सुवर्णमय मेखला धारण केलेली आहे, ज्याचेठिकाणीं पाय, पोटऱ्या व मांड्या हे दोन

र्षों यस्यास्ति तत् ॥ ४८ ॥ सौभगयुता ग्रीवा येन सिंहस्य स्कंधे परितः प्रसरंतः केसरा एव त्विषस्तादृशीः सर्वतस्त्विषो बिभ्रच्चासौ सौभगग्रीवः कौस्तुभो यस्मिन् । यद्वा सिंहस्येव स्कंधौ तयोस्त्विषः कुंडलहारादिदीप्तीर्बिभ्रदिति पृथग्विशेषणं सौभगयुक्ता ग्रीवा येन स कौस्तुभो यस्मिन् श्रिया हेतुभूतया क्षिप्तस्तिरस्कृतो निकषाश्मा स्वर्णरेखांकितो निकषणपाषाणो येन तादृशेनोरसा उल्लसच्छोभमानम् ॥ ४९ ॥ श्वासोच्छ्वासाभ्यां संविग्नाश्चंचला वलयास्ताभिर्वल्गु सुंदरं दलवदश्वत्थपत्रसदृशमुदरं यस्मिन् प्रतिसंक्रामयच्चतो निर्गतं तेनैव द्वारेण पुनः प्रवेशयदिव ॥ ५० ॥ श्यामश्रोण्याधिकं रोचिष्णु यत्पीतं दुकूलं तत्र स्वर्णमयी मेखला यस्मिन् अंघ्री च जंघे च उरू च

सिंहस्कंधत्विषो बिभ्रत्सौभगग्रीवकौस्तुभम् ॥ श्रियानपायिन्याक्षिप्तनिकषाश्मोरसोल्लसत् ॥ ४९ ॥ पूररेचकसंविग्नवलिवल्गुदलोद-रम् ॥ प्रतिसंक्रामयद्विश्वं नाभ्यावर्तगभीरया ॥ ५० ॥ श्यामश्रोण्यधिरोचिष्णुदुकूलस्वर्णमेखलम् ॥ समचार्वंघ्रिजंघोरुनिम्नजानुसु-दर्शनम् ॥ ५१ ॥ पदा शरत्पद्मपलाशरोचिषा नखद्युभिर्नोंतरघं विधुन्वता ॥ प्रदर्शय स्वीयमपास्तसाध्वसं पदं गुरोमार्गगुरुस्तमो-जुषाम् ॥ ५२ ॥ एतद्रूपमनुध्येयमात्मशुद्धिमभीप्सताम् ॥ यद्भक्तियोगोऽभयदः स्वधर्ममनुतिष्ठताम् ॥ ५३ ॥ भवान्भक्तिमता लभ्यो दुर्लभः सर्वदेहिनाम् ॥ स्वाराज्यस्याप्यभिमत एकांतेनात्मविद्गतिः ॥ ५४ ॥

निम्ने अनुन्नते जानुनी च समैश्चारुभिरेतैः शोभनं दर्शनं यस्य समाश्चारवोंध्र्यादयो यस्मिन् निम्ने जानुनी यस्मिन् शोभनं दर्शनं यस्येति पदत्रयं वा ॥ ५१ ॥ पदा दीपस्थानीयेन यद्वा एवंभूतेन पदोपलक्षितं रूपं पदं शरणं प्रदर्शयेत्यर्थः । शरदि यत्पद्मं तस्य पलाशं तद्वद्रोचिर्यस्य तेन नखदीप्तिभिरंतर्भवमघमज्ञानं विधुन्वता स्वीयं पदं शरणं प्रदर्शय अपास्तं मद्वादादीनां साध्वसं येन तत् हेगुरो यतस्त्वमेव तमोजुषामज्ञानामस्माकं मार्गप्रदर्शको गुरुः ॥ ५२ ॥ अतिदुर्लभमिदं मया प्रार्थितमिति स्तोतैवाह । एतद्रूपमनुध्येयं ध्यानार्हमेव न तु प्रत्यक्षतः प्राप्यमित्यर्थः ॥ ५३ ॥ तर्हि किं केनापि न प्राप्यते तत्राह । भवानिति । दुर्लभत्वमेवाह । स्वर्गे राज्यं यस्य

दोन अवयव एकसारखे असून सुंदर आहेत, जेथें खोलगट गुडघे आहेत, जें स्वरूप दिसण्यांत सुरेख आहे ॥ ४१ ॥ हे प्रभो, तें– शरदृतूंतील कमलाच्या पत्रांप्रमाणें कांतीनें युक्त असलेल्या नखांच्या प्रभांनीं आमचें अंतर्गत अज्ञान नाहींसें करणाऱ्या पावलानें युक्त असून व भक्तांचें संसारभय दूर करणारें आपलें आश्रयस्थानभूत स्वरूप तूं आह्मांला दाखीव. कारण, हे गुरो, आह्मां अज्ञजनांना मार्ग दाखविणारा तूं गुरुच आहेस ॥ ५२ ॥ हे देवा, ज्या तुझ्या स्वरूपाचा, ध्यान, सेवा, स्तुति व नमस्कारादिरूप भक्तियोग, केला असतां तो स्वधर्माचरण करणाऱ्या भक्तांच्या जन्ममरणादिरूप संसारभयाची निवृत्ति करितो, तें तुझें स्वरूप अंतःकरणाची शुद्धि व्हावी अशी इच्छा करणाऱ्या जनांनीं केवळ ध्यान करण्यास योग्य आहे. तें प्रत्यक्ष प्राप्त होणारें नव्हे ॥ ५३ ॥ विषयासक्त अशा सर्व प्राणिमात्रांना जरी तूं दुर्लभ आहेस तथापि भक्तिमान् पुरुषांना सुलभ आहेस.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कारण, तूं स्वर्गाचें राज्य करणाऱ्या इंद्रालाही पूज्यत्वेंकरून मान्य आहेस आणि जो केवळ आत्मवेत्ता पुरुष आहे त्यालाहि तुझ्याहून दुसरें कांहींच प्राप्त करून घ्या-वयाचें नाहीं ॥ ५४ ॥ यास्तव दुःखानें आराधन करण्यास योग्य अशा हि तुला, सदाचारसंपन्न पुरुषांनाहि दुर्लभ अशा एकांतभक्तीनें प्रसन्न करून घेऊन, तुझ्या चरण-मूलांशिवाय दुसऱ्या विषयसुखाची कोण बरें विचारी पुरुष इच्छा करील ? कोणीहि करणार नाहीं ॥ ५५ ॥ शौर्य आणि उत्साहशक्ति ह्यांनीं क्षोभ पावलेल्या आपल्या भ्रुकुटीच्या योगानें सर्व विश्वाचा विध्वंस करणाराहि काळ, ज्या तुझ्या चरणाचेठिकाणीं शरण गेलेल्या पुरुषाला, 'हा माझ्या स्वाधीन आहे' असा अभिमान करीत ना-हीं, त्या चरणकमलाहून दुसरें निर्भय स्थान कोणतें आहे ? कोणतेंच नाहीं ॥ ५६ ॥ तुझ्या भक्तांची संगति तर सर्व पुरुषार्थांमध्यें श्रेष्ठ आहे. कारण, तुझ्या भक्तांच्या

तस्याप्यभिमतः स्पृहणीयः । किंच । एकांतेन य आत्मवित्तस्यापि गतिर्गम्यः ॥ ५४ ॥ अतस्त्वद्व्यतिरेकेण न किंचिद्वांछामीत्याह । तं त्वामेकांतभक्त्याराध्य बहिः स्वर्गादि सुखम् ॥ ५५ ॥ तत्र हेतुः । यत्र पादमूले शरणं प्रविष्टं कृतांतः कालो ममायं वश्य इति नाभिमानं करोति । किं कुर्वन् वीर्यं प्रभावः शौर्यमुत्साहस्ताभ्यां विस्फूर्जितया क्षुभितया भ्रुवा विश्वं विध्वंसयन्नपि ॥ ५६ ॥ त्वत्पादमूले प्रविष्टस्य कृतांतभयाभावः कियानयं लाभो यतस्त्वद्भक्तसंग एव सकलपुरुषार्थश्रेणिशिरसि नरीनर्तीत्याह । भग-

तं दुराराध्यमाराध्य सतामपि दुरापया ॥ एकांतभक्त्या को वांछेत्पादमूलं विना बहिः ॥ ५५ ॥ यत्र निर्विष्टमरणं कृतांतो नाभि-मन्यते ॥ विश्वं विध्वंसयन्वीर्यशौर्यविस्फूर्जितभ्रुवा ॥ ५६ ॥ क्षणार्धेनापि तुलये न स्वर्गं नापुनर्भवम् ॥ भगवत्संगिसंगस्य मर्त्यानां किमुताशिषः ॥ ५७ ॥ अथानघांघ्रेस्तव कीर्तितीर्थयोरंतर्बहिः स्नानविधूतपाप्मनाम् ॥ भूतेष्वनुक्रोशसुसत्वशीलिनां स्यात्संगमोऽनु-ग्रह एष नस्तव ॥ ५८ ॥ न यस्य चित्तं बहिरर्थविभ्रमं तमो गुहायां च विशुद्धमाविशत् ॥ यद्भक्तियोगानुगृहीतमंजसा मुनिर्विच-ष्टे ननु तत्र ते गतिम् ॥ ५९ ॥

वतस्तव संगिनां संगस्य क्षणार्धेनापि स्वर्गं न तुलये समं न गणयामि न चापुनर्भवं मोक्षं मर्त्यानामाशिषो राज्याद्याः किमुत ॥ ५७ ॥ अथ अतोहेतोरनघावघहरावंघ्री यस्य तस्य तव कीर्तिर्यशस्तीर्थं गंगा तयोः क्रमेणांतर्बहिः स्नानाभ्यां विधूतः पाप्मा येषाम् । अतएव भूतेष्वनुक्रोशः कृपा सुसत्त्वं च रागादिरहितं चित्तं शीलं चार्जवादि विद्यते येषां तेषां संगमोऽस्माकं स्यात् एष एव नस्तवानुग्रहः ॥ ५८ ॥ तत्त्वज्ञानं च त्वद्भक्तसंगादेव भवतीत्याह । न यस्येति । येषां सतां भक्तियोगेनानुगृहीतं शुद्धं

संगतीच्या अर्ध्या क्षणाच्याहि बरोबरीनें आह्मी स्वर्गाची किंवा मोक्षाचीहि तुळणा करीत नाहीं, मग मनुष्यांच्या राज्यादिक संपत्तींची त्याच्या बरोबर तुळणा होणार नाहीं हें काय सांगावें ! ह्मणजे भगवद्भक्ताची अर्धा क्षणहि संगति झाली असतां, जो भजनानंद प्राप्त होतो त्याच्या संस्कारानें वृद्धिंगत झालेल्या प्रेमाच्या योगानें निरंतर भक्ति करणाऱ्या पुरुषाला भगवंताच्या अखंडानंद स्वरूपाचा जसा अनुभवानंद प्राप्त होतो तसा दुसऱ्या कोणत्याहि साधनानें प्राप्त होत नाहीं ॥ ५७ ॥ ह्मणून ज्याचे चरण पापनाशक आहेत अशा तुझ्या कीर्ति व गंगातीर्थ ह्यांच्या आंतून व बाहेरून घडलेल्या स्नानांच्या योगानें ज्यांचें पाप अगदीं नाहींसें झालें आहे व त्यामुळें भूतदया, कामक्रोधादिराहित्य आणि चांगलें शील हे गुण ज्यांचे आंगीं प्राप्त झाले आहेत त्या सत्पुरुषांचा आह्मांला समागम होवो हाच तुझा आमच्यावर अनुग्रह व्हावा ॥ ५८ ॥ जेव्हां तुझ्या भक्तांच्या संगतीपासून झालेल्या भक्तियोगानें साधक पुरुषाच्या चित्तावर अनुग्रह होऊन तें शुद्ध होतें, ह्मणजे रजोगुणानें व्याप्त होऊन विषयांचे ठिकाणीं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आसक्त होत नाहीं व तमोरूप गुहेचेठिकाणीं (अज्ञानरूप सुषुप्त्यवस्थेमध्यें) लय पावत नाहीं, तेव्हांच अनायासानें तो मननशील पुरुष तुझें तत्त्व पाहतो, नाहींतर पाहत नाहीं ॥५९॥ हे देवा, ज्याचेठिकाणीं हें जग प्रकाश पावतें, व जगतामध्यें जें सच्चिदानंदरूपत्वेंकरून भासतें आणि जें आकाशासारखें व्यापक आहे व जें सर्वांपेक्षां अधिक प्रकाशक आहे तें तुझें ब्रह्मतत्त्व होय ॥ ६० ॥ हे भगवन्, जिच्यायोगानें तुझ्याहून इतरांचेठिकाणीं आत्मबुद्धि उत्पन्न होत्ये ह्मणजे त्यांना हें जग तुझ्याहून निराळें आहे असें भासतें आणि जी आत्मरूप तुझ्याठिकाणीं आपलें कार्य मोहादिक करण्यास समर्थ होत नाहीं अशा त्रिगुणात्मक मायेच्या योगेंकरून विकाररहित असाहि जो तूं, हें जग ब्रह्मादिरूपेंकरून उत्पन्न करितोस. विष्णवादिरूपेंकरून पालन करितोस आणि रुद्रादिरूपेंकरून संहार करितोस त्या तुज भग-

---

सत्यस्य चित्तं बाह्यार्थविक्षिप्तं न भवति तमोरूपायां गुहायां च नाविशल्लयं न प्राप तत्र तदा मुनिस्तव गतिं तत्त्वं पश्यति ॥ ५९ ॥ कीदृशं तत्त्वं तदाह । यत्रेति- ॥ ६० ॥ जगत उपादानत्वेन तत्त्वं लक्षितं निमित्तत्वेनापि तदेव लक्षयन्नाह । य इदं विश्वं सदिव परमार्थमिव माययाऽसृजत् । कथंभूतया । यया भेदबुद्धिरन्येषां भवति तया आत्मनि त्वयि दुःस्थया स्वकार्यं कर्तुमसमर्थया । तं त्वां निरस्तभेदं प्रतीमहि जानीमः ॥ ६१ ॥ यद्यपि त्वमेव निर्भेदं ब्रह्म तथापि प्रागुक्तं साकारमिदं तव रूपं ये यजंति त एव वेदागमतत्त्वज्ञा इत्याह । क्रियाकलापैर्येकर्मयोगिनः पूजयंति त एव कोविदाः नत्वेतदनादृत्य केवलज्ञाने प्रवृत्ताः । तंत्रे आगमे । कथंभूतमिदम् । भूतेंद्रियांतः-

यत्रेदं व्यज्यते विश्वं विश्वस्मिन्नवभाति यत् ॥ तत्त्वं ब्रह्म परं ज्योतिराकाशमिव विस्तृतम् ॥ ६० ॥ यो माययेदं पुरुरूपयाऽसृजद्बिभर्ति भूयः क्षपयत्यविक्रियः ॥ यद्भेदबुद्धिः सदिवात्मदुःस्थया तमात्मतंत्रं भगवन्प्रतीमहि ॥ ६१ ॥ क्रियाकलापैरिदमेव योगिनः श्रद्धान्विताः साधु यजंति सिद्धये ॥ भूतेंद्रियांतःकरणोपलक्षितं वेदे च तंत्रे च त एव कोविदाः ॥ ६२ ॥ त्वमेक आद्यः पुरुषः सुप्तशक्तिस्तया रजःसत्त्वतमो विभिद्यते ॥ महानहं खं मरुदग्निवार्धराः सुरर्षयो भूतगणा इदं यतः ॥ ६३ ॥ सृष्टं स्वशक्त्येदमनुप्रविष्टश्चतुर्विधं पुरमात्मांशकेन ॥ अथो विदुस्तं पुरुषं संतमंतर्भुंक्ते हृषीकैर्मधु सारघं यः ॥ ६४ ॥

करणैरस्वतंत्रैर्यदुपलक्ष्यते नियंतृरूपं तत् ॥ ६२ ॥ नन्वभिन्ने मयि भेदं कुर्वंतः संतः कथं ते कोविदाः नहि तैर्भेदः क्रियते त्वयैव क्रीडार्थं चेतनाचेतनात्मको भेदः कृत इत्याह । त्वमिति । आद्यस्त्वमेक एव सुप्ता मायाख्या शक्तिर्यस्य पश्चात्तया शक्त्या रजःसत्वतमसां द्वंद्वैक्यं यतो रजआदेः महानहंकारः खं च मरुदग्निर्वार्धराश्च । वारुदकम् । सुराश्चर्षयश्च भूतगणाश्चैवमिदं जगद्यतो भवति तद्विभिद्यत इत्यन्वयः ॥ ६३ ॥ एतदुपपादयति । सृष्टमिति । जरायुजांडजस्वेदजोद्भिज्जरूपेण चतुर्विधं स्वांशेन प्रविष्टः ।

वंताला आह्मीं स्वतंत्र असें जाणतों ॥ ६१ ॥ हे देवा, जे कर्मयोगी, विश्वासयुक्त होऊन, कर्मांची सिद्धि होण्यासाठीं, ‘ज्याचें ज्ञान पृथिव्यादिभूतें, इंद्रियें आणि अंतःकरण यांच्या योगानें प्रवर्तकत्वेंकरून होतें अशा’ ह्या तुझ्या स्वरूपाचेंच ध्यान, सेवा इत्यादिकेंकरून उत्तमप्रकारें पूजन करितात तेच वेदोक्त व आगमनोक्त कर्म करण्यामध्यें निपुण आहेत असें समजावें ॥ ६२ ॥ हे भगवन्, सृष्टीच्या पूर्वीं ज्याची मायाशक्ति निजून राहिली आहे असा आदिपुरुष तूं एकच असतोस, नंतर सृष्टीच्या आरंभीं उठलेल्या त्या तुझ्या मायाशक्तीच्या योगानें सत्त्व, रज आणि तम अशा तीन शक्ति निरनिराळ्या होतात. पुढें त्यांच्यापासून महत्तत्व, अहंकार, आकाश, वायु, तेज, जल, पृथ्वी, देव, ऋषि, आणि भूतगण असें हें विश्व उत्पन्न होतें ॥ ६३ ॥ याप्रमाणें आपल्या मायाशक्तीनें, जरायुज, स्वेदज, अंडज आणि उद्भिज्ज अशा चार प्रकारचें उत्पन्न केलेलें जें हें शरीररूपी नगर त्यामध्यें तूं आपल्या जीव आणि अंतर्यामी अशा दोनप्रकारच्या अंशांनीं प्रविष्ट झाला आहेस. ह्मणून शरीराच्या आंत असणाऱ्या त्या दोनप्रकारच्याहि

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तुला पुरुष असें ह्मणतात. त्यांमध्यें जो मधुमक्षिकांनीं निर्माण केलेल्या मधासारख्या तुच्छ विषयसुखाला इंद्रियांनीं सेवन करितो तो जीव होय आणि तेथें जो अभोक्ता असून सर्व जाणणारा आहे तो अंतर्यामी भगवान् होय ॥ ६४ ॥ याप्रमाणें जगाला उत्पन्न करून त्यामध्यें प्रविष्ट झालेला जो तूं तोच मेघपंक्तींना जिकडे तिकडे चाळविणाऱ्या वायूप्रमाणें भूतांच्याच योगेंकरून स्थावरजंगमात्मक सर्व भूतांचा उपसंहार करितोस. कारण, तुझा वेग अतिप्रचंड असून तुझ्या स्वरूपज्ञानाविषयींहि केवळ अनुमानच करावें लागतें ॥ ६५ ॥ हे ईश्वरा, क्षुधेच्या योगानें जिभल्या चाटीत असलेला सर्प, जसा उंदराला गिळून टाकितो त्याप्रमाणें विषयांविषयीं लंपट आणि विषय प्राप्त झाले तरीसुद्धां अत्यंत लोभी असल्यामुळें 'असेंच हें करावयाचें अशा चिंतेनें' फार असावध असलेल्या या जनांला, सावध असा कालरूपी तूं, एकाएकीं

अथो इति हेतोः पुरस्यांतः संतमंशं चिदाभासं पुरि शयनात्पुरुषं विदुः । तर्हि किमीश्वरमेव संसारिणं विदुर्नेत्याह । सरघा मधुमक्षिकास्ताभिः सृष्टं मध्विव क्षुल्लकं विषयसुखमविद्यावृतः सन्यो भुंक्ते तं जीवं विदुः । तथा च श्रुतिः । तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्त्यनश्नन्नन्यो अभिचाकशीति । निर्णीतं च गुहां प्रविष्टावात्मानौ हि तद्दर्शनादित्यत्र ॥ ६४ ॥ तव तु सर्वनियंतुः कुतः संसार इत्याह । यः स्वशक्त्येदं सृष्टवान्स एष त्वं खलु भूतैरेव भूतानि मेघपंक्तीर्वायुरिव कालयन्विचालयँल्लोकान्विकर्षसि संहरसि अनु-

स एष लोकानतिचंडवेगो विकर्षसि त्वं खलु कालयानः ॥ भूतानि भूतैरनुमेयतत्त्वो घनावलीर्वायुरिवाविषह्यः ॥ ६५ ॥ प्रमत्तमुच्चैरितिकृत्यचिंतया प्रवृद्धलोभं विषयेषु लालसम् ॥ त्वमप्रमत्तः सहसाऽभिपद्यसे क्षुल्लेलिहानोऽहिरिवाखुमंतकः ॥ ६६ ॥ कस्त्वत्पदाब्जं विजहाति पंडितो यस्तेऽवमानव्ययमानकेतनः ॥ विशंकयाऽस्मद्गुरुरर्चति स्म यद्विनोपपत्तिं मनवश्चतुर्दश ॥६७॥ अथ त्वमसि नो ब्रह्मन्परमात्मन्विपश्चिताम् ॥ विश्वं रुद्रभयध्वस्तमकुतश्चिद्भया गतिः ॥ ६८ ॥ इदं जपत भद्रं वो विशुद्धा नृपनंदनाः ॥ स्वधर्ममनुतिष्ठंतो भगवत्यर्पिताशयाः ॥ ६९ ॥

मेयतत्त्वो लक्ष्यस्वरूपः ॥ ६५ ॥ विकर्षणप्रकारमाह । प्रमत्तमिति । इतिकृत्यमेवमेवमिदं कर्तव्यमिति चिंतयोच्चैः प्रमत्तम् । तत्र हेतुः । विषयेषु लालसमतिकामुकम् । प्राप्तेऽपि विषये प्रवृद्धलोभम् । अंतकस्त्वमभिपद्यसे आक्रमसि । क्षुधा लेलिहानो जिह्वयौष्ठप्रांतौ स्पृशन्सर्पो मूषकमिव ॥ ६६ ॥ अतः कस्तव पदाब्जं त्यजेत्पंडितश्चेत् । कथंभूतः । यस्तवावमानोऽनादरस्तेन व्ययमानं केतनं शरीरं यस्य सः यदस्माकं गुरुर्ब्रह्मार्चतिस्मेति सर्वेषां स्तोतॄणां वाक्यम् । विशंकयानाशशंकया । विनोपपत्तिमिति दृढविश्वासेन मनवश्चतुर्दशार्चंति स्म ॥ ६७ ॥ उपसंहरति । अथेति । रुद्रभयेन ध्वस्तं अतो न कुतश्चिद्भयं यस्यां तादृशी गतिरसि ॥ ६८ ॥ ६९ ॥

गट्ट करून टाकितोस ॥ ६६ ॥ ह्मणून कालापासून नाश होईल या भीतीनें आमचा गुरु ब्रह्मदेव आणि स्वायंभुवादिक चवदा मनु, यांनीं दृढ विश्वासानें ज्या तुझ्या चरणकमलाचें अर्चन केलें आहे त्या तुझ्या चरणकमलाला, 'तुज पुरुषोत्तमाच्या अनादरानें ज्याचें शरीर कालाच्या भयानें कंपित होत आहे असा' कोण बरें विद्वान् पुरुष, सोडून देईल ? कोणीच सोडून देणार नाहीं ॥ ६७ ॥ असो. कालरुद्रादिकांच्या भयानें हें सर्व जग ग्रासून टाकिलेलें आहे, यास्तव हे ब्रह्मस्वरूप परमात्मन्, तुला शरण जाणें हेंच कालादिकांच्या भयाचें निवर्तक आहे असें जाणणाऱ्या आमची, सर्वथा भयरहित अशी गति तूंच आहेस ॥ ६८ ॥ हे राजपुत्र हो, तुह्मी शुद्ध चित्त व स्वधर्माचें आचरण करित होत्साते भगवंताचेठिकाणीं आपलें अंतःकरण समर्पण करून मी सांगितलेल्या ह्या स्तोत्राचा जप करीत जा ह्मणजे तुमचें कल्याण (मोक्ष-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्राप्तिरूप) होईल ॥ ६९ ॥ आपल्याठिकाणीं व सर्व प्राणिमात्रांचेठिकाणीं असणाऱ्या त्याच परमात्मरूपी हरीचें तुह्मी ध्यान व स्तवन करीत होत्साते पूजन करीत जा ॥ ७० ॥ तसेंच योगादेशनामक हें स्तोत्र माझ्यापासून पावोन, मनानें धारण करणारे मौनव्रती व सावधानचित्त असे सर्व तुह्मी, आदरपूर्वक याचा जप करीत जा ॥ ७१ ॥ पूर्वी सृष्टि करण्याची इच्छा करणारा व मरीच्यादिक ऋषींचा अधिपति जो भगवान् ब्रह्मदेव, त्यानें, प्रजोत्पत्ति करण्याची इच्छा करणाऱ्या आह्मां भृग्वादिक पुत्रांना हेंच स्तोत्र सांगितलें होतें ॥ ७२ ॥ प्रजोत्पत्ति करण्याविषयीं ब्रह्मदेवानें प्रेरणा केलेल्या त्या सर्व आह्मी प्रजापतींनीं, ह्या स्तोत्राच्या योगानें सर्व प्रतिबंधांचें निवारण करून अनेक प्रकारच्या प्रजा उत्पन्न केल्या ॥ ७३ ॥ यास्तव आतां सुद्धां जो प्रयत्न करणारा पुरुष, वासुदेवपरायण व एकाग्रचित्त होऊन नित्य या स्तोत्राचा जप करितो तो लवकरच धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष यांपैकीं पाहिजे असेल तें फल पावतो ॥ ७४ ॥ हे राजपुत्र हो, या लोकीं असलेल्या सर्व फळांमध्यें ज्ञान हेंच मोक्ष

॥ ७० ॥ योगादेशं नामैतत्स्तोत्रमुपासाद्य पाठतः प्राप्य मनसा धारयंतोऽभ्यासेन जपंतः ॥ ७१ ॥ विश्वसृजां पतिर्ब्रह्मा ॥ ७२ ॥ सिसृक्ष्मः स्रष्टवंतः ॥ ७३ ॥ युक्त एकाग्रचित्तः ॥ ७४ ॥

तमेवात्मानमात्मस्थं सर्वभूतेष्ववस्थितम् ॥ पूजयध्वं गृणंतश्च ध्यायंतश्चासकृद्धरिम् ॥ ७० ॥ योगादेशमुपासाद्य धारयंतो मुनिव्रताः ॥ समाहितधियः सर्व एतदभ्यसतादृताः ॥७१॥ इदमाह पुराऽस्माकं भगवान्विश्वसृक्पतिः ॥ भृग्वादीनामात्मजानां सिसृक्षुः संसिसृक्षताम् ॥ ७२ ॥ ते वयं नोदिताः सर्वे प्रजासर्गे प्रजेश्वराः ॥ अनेन ध्वस्ततमसः सिसृक्ष्मो विविधाः प्रजाः ॥ ७३ ॥ अथेदं नित्यदा युक्तो जपन्नवहितः पुमान् ॥ अचिराच्छ्रेय आप्नोति वासुदेवपरायणः ॥ ७४ ॥ श्रेयसामिह सर्वेषां ज्ञानं निःश्रेयसं परम् ॥ सुखं तरति दुष्पारं ज्ञाननौर्व्यसनार्णवम् ॥ ७५ ॥ य इमं श्रद्धया युक्तो मद्गीतं भगवत्स्तवम् ॥ अधीयानो दुराराध्यं हरिमाराधयत्यसौ ॥ ७६ ॥ विंदते पुरुषोऽमुष्माद्यद्यदिच्छत्यसत्वरन् ॥ मद्गीतगीतात्सुप्रीताच्छ्रेयसामेकवल्लभात् ॥ ७७ ॥ इदं यः कल्य उत्थाय प्रांजलिः श्रद्धयाऽन्वितः ॥ शृणुयाच्छ्रावयेन्मर्त्यो मुच्यते कर्मबंधनैः ॥७८॥ गीतं मयेदं नरदेवनंदनाः परस्य पुंसः परमात्मनः स्तवम् ॥ जपंत एकाग्रधियस्तपो महच्चरध्वमंते तत आप्स्यथेप्सितम् ॥ ७९ ॥ इति श्रीम० भा० च० रुद्रगीतं नाम चतुर्विंशोऽध्यायः ॥ २४ ॥

ज्ञानमेव नौर्यस्य ॥७५॥ योऽधीयानो भवत्यसौ हरिमाराधयति ॥ ७६ ॥ अमुष्माद्धरेः असत्वरन् स्थिरः सन् मद्गीतं स्तोत्रं तेन गीतात्स्तुतात् यद्यदिच्छति तत्तद्विंदते। एक एव वल्लभः प्रिय आश्रयस्तस्मात् ॥ ७७ ॥ कल्ये उषसि ॥ ७८ ॥ तपश्चरत तपसोंऽते ईप्सितं प्राप्स्यथ ॥ ७९ ॥ इति चतुर्थे टीकायां चतुर्विंशोऽध्यायः ॥ २४ ॥ ॥

देणारें उत्कृष्ट फळ होय. कारण, ज्ञानरूप नौकेचा आश्रय करणारा पुरुष, दुस्तर अशाहि संसारसमुद्राला अनायासानें तरून जातो ॥ ७५ ॥ असो, मी सांगितलेलें हें भगवंताचें स्तोत्र, जो पुरुष श्रद्धेनें युक्त होऊन पठण करितो तो दुःखानें प्रसन्न होण्यास योग्य अशाहि श्रीहरीला सुखानें प्रसन्न करून घेतो ॥ ७६ ॥ आणि मी सांगितलेल्या स्तोत्रानें सावकाशपणें स्तुति केलेल्या ह्या श्रीहरीपासून पुरुष, जें जें इष्ट फल इच्छितो ते तें त्यास प्राप्त होतें. कारण, तो भगवान् सर्व फलांचा एकच आश्रय आहे ॥ ७७ ॥ जो मनुष्य, पहांटेच्या वेळीं उठून श्रद्धेनें युक्त होत्साता, हात जोडून या स्तोत्राचें श्रवण करितो किंवा पठण करितो तोही कर्मबंधापासून मुक्त होतो ॥ ७८ ॥ हे राजपुत्र हो, मी गायन केलेल्या ह्या परमपुरुष परमात्म्याच्या स्तोत्राचा जप करीत होत्साते तुह्मी मोठें तप करा ह्मणजे त्याच्या योगानें शेवटीं इच्छित फलाला पावाल ॥ ७९ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील चतुर्थस्कंधामध्यें रुद्रगीतकथननामक हा चोविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २४ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

या प्रमाणें रुद्रगीत श्रवण करून ते प्रचेते, समुद्राच्या पाण्यांत उभे राहून तपश्चर्या करूं लागले असतां, त्यांच्या प्राचीनबर्हिनामक पित्याजवळ येऊन दयालु नारदानें, पुढील पांच अध्यायांनीं त्याला कथारूपानें अध्यात्मज्ञानाचा उपदेश केला आहे. त्यांत या पंचविसाव्या अध्यायामध्यें नारदानें पुरंजनराजाच्या कथामिषानें आत्म्याला बुद्धीच्या संगतीनें अनेकप्रकारचा संसार प्राप्त होतो असा प्रकार वर्णन केला आहे ॥ १ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, याप्रमाणें भगवान् रुद्रानें प्रचेत्यांना भगवत्स्तोत्राचा उपदेश केला असतां त्या प्राचीनबर्हि राजाच्या पुत्रांनीं त्या रुद्राचें पूजन केलें. नंतर त्या राजपुत्रांच्या देखत तो रुद्र, त्या ठिकाणींच अंतर्धान पावला ॥ १ ॥ हे नंतर रुद्रानें उपदेश केलेल्या भगवंताच्या स्तोत्राचा जप करणाऱ्या त्या सर्व प्रचेत्यांनीं, समुद्राच्या पाण्यांत उभें राहून दहाहजार वर्षेंपर्यंत तप केलें ॥ २ ॥ हे विदुरा, इकडे प्राचीनबर्हि राजा, कर्मांचेठिकाणीं आसक्तचित्त असल्यामुळें त्याला आत्मतत्त्व जाणणाऱ्या दयालु नारदानें अध्यात्मतत्त्वाचा उपदेश केला ॥ ३ ॥ तो असा

प्रचेतस्सु तपस्यत्सु तत्पित्रे नारदो घृणी ॥ प्राचीनबर्हिषेऽध्यात्मं पारोक्ष्येणाह पंचभिः ॥१॥ पुरंजनकथाव्याजात्पंचविंशे तु नारदः ॥ आत्मनो बुद्धिसंगेन विविधामाह संसृतिम् ॥ २ ॥ प्रचेतस्सु तपस्तीव्रं तप्यमानेषु नारदः ॥ पुरंजनकथाकूटं प्राह प्राचीनबर्हिषे ॥ ३ ॥ १ ॥ २ ॥ प्रचेतस्सु तपश्चरत्सु नारदः प्राचीनबर्हिषं बोधितवान् । अतः प्रचे-

मैत्रेय उवाच ॥ इति संदिश्य भगवान्बार्हिषदैरभिपूजितः ॥ पश्यतां राजपुत्राणां तत्रैवांतर्दधे हरः ॥ १ ॥ रुद्रगीतं भगवतः स्तोत्रं सर्वे प्रचेतसः ॥ जपंतस्ते तपस्तेपुर्वर्षाणामयुतं जले ॥ २ ॥ प्राचीनबर्हिषं क्षत्तः कर्मस्वासक्तमानसम् ॥ नारदोऽध्यात्मतत्त्वज्ञः कृपालुः प्रत्यबोधयत् ॥ ३ ॥ श्रेयस्त्वं कतमद्राजन्कर्मणात्मन ईहसे ॥ दुःखहानिः सुखावाप्तिः श्रेयस्तन्नेह चेष्यते ॥ ४ ॥ राजोवाच ॥ न जानामि महाभाग परं कर्मापविद्धधीः ॥ ब्रूहि मे विमलं ज्ञानं येन मुच्येय कर्मभिः ॥ ५ ॥ गृहेषु कूटधर्मेषु पुत्रदारधनार्थधीः ॥ न परं विंदते मूढो भ्राम्यन्संसारवर्त्मसु ॥ ६ ॥ नारद उवाच ॥ भोभो प्रजापते राजन्पशून्पश्य त्वयाध्वरे ॥ संज्ञापितान् जीवसंघान्निर्घृणेन सहस्रशः ॥ ७ ॥

तसां कथामसमाप्यैव तत्पितुर्वृत्तमाह । प्राचीनबर्हिषमिति ॥ ३ ॥ श्रेयः फलमीहसे इच्छसि इह कर्मणि तदुभयं नेष्यते विचारकैः ॥ ४ ॥ परं श्रेयो मोक्षम् । कर्मभिरपविद्धा विक्षिप्ता धीर्यस्य ॥ ५ ॥ किंच । गृहेषु स्थितः पुत्रादिष्वेव पुरुषार्थधीर्यस्य ॥ ६ ॥ कर्मफलेषु वैराग्यमुत्पाद्य ब्रह्मविद्यामुपदेष्टुं योगानुभावेन यज्ञपशून्प्रत्यक्षं प्रदर्श्याह । भोभो

कीं,–हे राजा तूं, काम्यकर्मांच्या अनुष्ठानेंकरून स्वार्थाकरितां कोणत्या फलाची इच्छा करित आहेस ? आतां अज्ञलोकांच्या दृष्टीनें दुःखाची हानि व सुखाची प्राप्ति असें दोनप्रकारचें जरी कर्मफल दिसत आहे तथापि तें नश्वर असल्यामुळें या कर्ममार्गामध्यें विचारी पुरुष, त्या दोन्हींचीहि इच्छा करीत नाहींत ॥ ४ ॥ प्राचीनबर्हि राजा ह्मणाला हे महाभाग्यशालिन् नारद ऋषे, कर्मांच्या योगानें माझी बुद्धि विक्षिप्त झाली आहे ह्मणून मी मोक्षरूप कल्याण जाणत नाहीं; यास्तव ज्याच्या योगानें मी कर्मांनें उत्पन्न होणाऱ्या पुण्यपापांपासून मुक्त होईन असें मला निर्मळ (अहंताममतांची निवृत्ति करणारें) ज्ञान सांग ॥ ५ ॥ कारण, कपटधर्मीनें युक्त व जन्ममरणरूप संसाराला मार्गभूत अशा गृहाचेठिकाणीं भ्रमण पावणारा आणि पुत्र, स्त्री व धन यांचेठिकाणीं, हाच परम पुरुषार्थ आहे अशी बुद्धि धारण करणारा हा मूढ पुरुष, मोक्षाला कधींहि पावत नाहीं ॥ ६ ॥ नारद ह्मणाला– हे प्रजापालका राजा, निर्दय अशा तूं यज्ञामध्यें जे हजारो पशु मारविले आहेस व जे इतरहि पक्ष्यादिक जीवांचे समुदाय मारविले आहेस ते सर्व आकाशामध्यें दिसत आहेत पहा ! (असें ह्मणून नारदानें योगसामर्थ्यानें, राजानें मारविलेले सर्व पशुपक्ष्यादिक आकाशामध्यें त्यास दाखविले) ॥ ७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राजा, तूं केलेल्या पीडेचें स्मरण करणारे व अतिशय रागावलेले हे पशुपक्ष्यादिक ‘ केव्हां हा राजा मरून आमच्या स्वाधीन होईल अशी ’ तुझी वाट पहात आहेत. तूं मृत झालास ह्मणजे हे लोखंडाच्या भाल्यांसारख्या आपल्या शिंगांनीं मोठ्या त्वरेनें तुला छिन्नभिन्न करितील ॥ ८ ॥ प्रस्तुत या संकटांतून तुला तारणारा पुरंजन चरित्ररूप हा पुरातन इतिहास मी सांगतों, तो तूं एकाग्रचित्तानें श्रवण कर ॥ ९ ॥ हे राजा, पुरंजन ह्या नांवाचा एक मोठा कीर्तिमान् राजा होता. त्याचा ‘ ज्याचें कर्म

इति । संज्ञापितान्मारितान् ॥ ७ ॥ एते त्वां संपरेतं मृतं संप्रतीक्षंते वैशसं त्वत्कृतां पीडां स्मरंतः ततश्चायःकूटैर्लोहयंत्रमयैः शृंगैश्छिंदंति छेत्स्यंति ॥ ८ ॥ अत्रास्मिन्संकटे निस्तारकममुमितिहासं कथयिष्यामि ॥ ९ ॥ तत्र जीवस्य विषयासक्त्या संसारः स चेश्वरानुग्रहेण निवर्तत इति वक्तुं विपर्ययग्रहीतस्य साक्षाद्बोधयितुमशक्ते राजवृत्तांतमिवाह । आसीदिति पुरंजनादीन्स्वयमेवेतःपंचमेऽध्याये व्याख्यास्यति । तथापि सुखग्रहणाय यथोपयोगं किंचित्किंचिद्व्याख्यास्यामः । तत्र स्वकर्मभिः पुरं शरीरं जनयतीति पुरंजनो जीवः न विज्ञातं नाम यस्य नच विज्ञातं चेष्टितं यस्य स ईश्वरस्तस्य सखा यद्वा विज्ञातं चेष्टितं जीवप्रेरणादिलक्षणं यस्य जीवपारतंत्र्यस्यानुभवसिद्धत्वात्

एते त्वां संप्रतीक्षंते स्मरंतो वैशसं तव ॥ संपरेतमयःकूटैश्छिदंत्युत्थितमन्यवः ॥ ८ ॥ अत्र ते कथयिष्येऽमुमितिहासं पुरातनम् ॥
पुरंजनस्य चरितं निबोध गदतो मम ॥ ९ ॥ आसीत्पुरंजनो नाम राजा राजन्बृहच्छ्रवाः ॥ तस्याविज्ञातनामासीत्सखाऽविज्ञा-
तचेष्टितः ॥ १० ॥ सोऽन्वेषमाणः शरणं बभ्राम पृथिवीं प्रभुः ॥ नानुरूपं यदाविंददभूत्स विमना इव ॥ ११ ॥ न साधु मेने
ताः सर्वा भूतले यावतीः पुरः ॥ कामान्कामयमानोऽसौ तस्य तस्योपपत्तये ॥ १२ ॥ स एकदा हिमवतो दक्षिणेष्वथ सानुषु ॥
ददर्श नवभिर्द्वार्भिः पुरं लक्षितलक्षणाम् ॥ १३ ॥ प्राकारोपवनाट्टालपरिखैरक्षतोरणैः ॥ स्वर्णरौप्यायसैः शृंगैः संकुलां सर्वतो गृहैः ॥ १४ ॥

॥ १० ॥ शरणं भोगायतनं देहं पृथिवीं तदुपलक्षितं ब्रह्मांडम् ॥ ११ ॥ यावत्यः पुरस्तास्तस्य तस्य कामस्योपपत्तये प्राप्त्यै असौ साधु न मेने । गवादिदेहानामैहिकपारलौकिकभोगभोग्यत्वाभावात् । तथा च श्रुतिः । ताभ्यो गामानयत्ता अब्रुवन्नवै नोऽयमलमिति ताभ्योऽश्वमानयत्ता अब्रुवन्नवै नोऽयमलमितीति ॥ १२ ॥ हिमवतो दक्षिणेषु सानुषु कर्मक्षेत्रे भारतवर्षे पुरं मनुष्यशरीरम् । लक्षितानि दृष्टानि सर्वाणि लक्षणानि यस्याम् । अंधपंगुत्वादिदोषरहितामित्यर्थः ॥ १३ ॥ तामनुवर्णयति त्रिभिः । अत्र किंचित्किंचित्साहश्यमवलंब्य कथासौंदर्याय प्राकारादीनि वर्ण्यंते परिखैरिति पुस्त्वमार्षम् । अक्षाणींद्रियाणि गवाक्षाः त्वगादयः शरीरावयवाः प्राकारादिपुरावयवत्वेन निरूप्यंते स्वर्णादि-

---

कोणालाहि माहित नाहीं असा ’ एक अविज्ञातनामक मित्र होता ॥ १० ॥ तो पुरंजन राजा, आपणास राहण्याचें स्थान पाहण्याकरितां पृथ्वीवर भ्रमण करूं लागला. परंतु त्याला राहण्यास योग्य असें स्थान जेव्हां मिळालें नाहीं तेव्हां तो मनांत खिन्न झाला ॥ ११ ॥ विषयभोगांची इच्छा करणाऱ्या त्या पुरंजन राजानें त्या त्या विषयाच्या सिद्धतेविषयीं जितक्या ह्मणून भूमीवर नगऱ्या पाहिल्या होत्या तितक्या सर्वहि त्याला योग्य वाटल्या नाहींत ॥ १२ ॥ त्या राजानें, एके वेळीं हिमाचलाच्या दक्षिणप्रदेशांचेठिकाणीं नऊ दरवाँज्यांनीं विषयभोग घेण्यास योग्य अशी एक सुलक्षणिक नगरी पाहिली ॥ १३ ॥ ती अशी कीं, जीच्या सभोंवार तट, उपवनें, व ॥ ७९ ॥

---

१ आपल्या कर्मांनीं शरीर उत्पन्न करणारा जीव. २ ज्याचें नांव कोणासहि ठाऊक नाहीं असा ईश्वर. ३ शरीर. ४ ब्रह्मांडांत. ५ शरीरें. ६ कर्मक्षेत्र अशा भरतखंडांत. ७ कानांचीं दोन छिद्रें, नाकाचीं दोन, डोळ्यांचीं दोन, मुखाचें एक, शिश्नाचें एक व गुदाचें एक अशा नऊ छिद्रांनीं युक्त मनुष्यशरीर.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

खंदक होते. जिच्यामध्यें उप्परमाड्या, गवाक्षें व शोभेकरितां बांधलेलीं तोरणें होतीं. जी, सुवर्णाच्या, रुप्याच्या व लोखंडाच्या शिखरांनीं युक्त अशा घरांनीं सर्वठिकाणीं गच्च भरून गेलेली होती ॥ १४ ॥ इंद्रनीलमणि, स्फटिक, वैडूर्य, मोतीं, पाच व माणकें यांच्या योगानें जिच्यामध्यें घरांच्या फरसबंधा केलेल्या असल्यामुळें जी प्रकाशयुक्त आणि नागांच्या भोगवतीनामक नगरीप्रमाणें शोभत होती ॥ १५ ॥ तशीच सभा, चवाठे, राजमार्ग, क्रीडास्थानें, बाजार, विश्रांतिस्थानें, ध्वजांवर असलेल्या पताका आणि पोंवळ्यांनीं बांधिवलेल्या ओव्या यांनीं युक्त होती ॥ १६ ॥ त्या नगरीच्या बाहेर एक आरामबाग होती. ती मनोहर वृक्ष व वल्ली यांनीं भरून गेलेली

शृंगैः शिखरैर्युक्ता ये गृहास्तैः संकुलामिति आधारादिचक्राणि गृहाः शृंगाणि च राजसादिस्वभावा विवक्षिताः ॥ १४ ॥ नीलादिभिः क्लृप्ता हर्म्यस्थली यस्याम्। अरुणं माणिक्यम्। स्थली हृदयम्। नाड्यो नीलादिभावेन निरूप्यंते तत्तद्विषयवासना वा। भोगवतीं नागानां पुरीमिव ॥ १५ ॥ सभा समाजस्थानम्। चत्वरं चतुष्पथः रथ्या राजमार्गः आक्रीडायतनं द्यूतादिस्थानम्। आपणो हट्टस्तैः चैत्यं जनानां विश्रामस्थानम्। ध्वजेषु पताकास्ताभिश्च युक्ताम् ॥ १६ ॥ अत्र च विषयनिष्ठबुद्धियोगेन जीवस्य देहसंबंध इति विवक्षया विषयवर्गं बाह्योपवनत्वेन निरूपयति। तद्विशेषान् स्रक्चंदनादीन् दिव्यद्रुमलतादिभावेन। शेषः कथालंकारः। बाह्योपवने प्रमदां ददर्शेति चतुर्थेनान्वयः। नदतां

नीलस्फटिकवैदूर्यमुक्तामरकतारुणैः क्लृप्तहर्म्यस्थलीं दीप्तां श्रिया भोगवतीमिव ॥ १५ ॥ सभाचत्वररथ्याभिराक्रीडायतनापणैः ॥
चैत्यध्वजपताकाभिर्युक्तां विद्रुमवेदिभिः ॥ १६ ॥ पुर्यास्तु बाह्योपवने दिव्यद्रुमलताकुले ॥ नदद्विहंगालिकुलकोलाहलजलाशये
॥ १७ ॥ हिमनिर्झरविप्रुष्मत्कुसुमाकरवायुना ॥ चलत्प्रवालविटपनलिनीतटसंपदि ॥ १८ ॥ नानारण्यमृगव्रातैरनाबाधे मुनिव्रतैः ॥
आहूतं मन्यते पांथो यत्र कोकिलकूजितैः ॥ १९ ॥ यदृच्छयागतां तत्र ददर्श प्रमदोत्तमाम् ॥ भृत्यैर्दशभिरायांतीमेकैकशतनाय-
कैः ॥ २० ॥ पंचशीर्षाहिना गुप्तां प्रतीहारेण सर्वतः ॥ अन्वेषमाणामृषभमप्रौढां कामरूपिणीम् ॥ २१ ॥

विहंगालिकुलानां कोलाहलो येषु ते जलाशया यस्मिन् ॥ १७ ॥ हिमनिर्झराणां विप्रुषो बिंदवस्तद्वता कुसुमाकरसंबंधिना वायुना चलंतः प्रवाला विटपाः शाखाश्च येषां तैर्वृक्षैर्नलिनीनां सरसीनां तटेषु संपत्समृद्धिर्यस्मिन् ॥ १८ ॥ अनाबाधे तत्कृतबाधारहिते मुनिव्रतैरहिंस्रैः आत्मानमाहूतं मन्यते यत्र ॥ १९ ॥ तत्र प्रमदोत्तमां विषयविवेकवतीं बुद्धिं ददर्श यदृच्छयागतामिति तयोः संबंधस्य दुर्निरूप्यत्वं दर्शयति। तामनुवर्णयति सार्धैश्चतुर्भिः। दशभिर्ज्ञानकर्मेंद्रियैः एकैकं प्रत्येकं शतमनंता वृत्तयस्तासां नायकैः पतिभिः सह पाठांतरे नायिकास्त्रियो येषां तैः ॥ २० ॥ पंचशीर्षाणि वृत्तयो यस्य तेनाहिना प्राणेन प्रतीहारेण पालकेन गुप्ताम्। ऋषभं भर्तारम्। अप्रौढां षोडश-

असून मधुर शब्द करणारे व गुंजारव करणारे भ्रमर ह्यांचा कलकलाट ज्यांमध्यें होत आहे अशा तलावांनीं युक्त होती ॥ १७ ॥ गार पाणी वाहणाऱ्या झऱ्यांच्या तुषारांनीं युक्त असलेल्या वसंत ऋतुसंबंधी वायूनें, ज्यांचे अंकुर व शाखा हालत आहेत अशा वृक्षांच्या योगानें जिच्यामध्यें सरोवरांच्या तीरांचे ठिकाणीं समृद्धि प्राप्त झाली होती ॥ १८ ॥ अहिंसा व्रत धारण करणाऱ्या अनेकप्रकारच्या वनपशूंच्या समुदायांनीं जिच्यामध्यें कोणाशाही पीडा होत नसे आणि ज्या बागेमध्यें कोकिलपक्ष्यांच्या मधुर शब्दांनीं, मार्गानें जाणाऱ्या पुरुषाला, आपल्याला ही बाग बोलावितच आहे कीं काय असें वाटत असे ॥ १९ ॥ त्या बागेमध्यें सहज प्राप्त होणारी एक अत्युत्तम स्त्री त्या पुरंजनराजानें अवलोकन केली. ती, 'प्रत्येकजण शेंकडो लोकांचे नायक अशा' दहा सेवकांसहवर्तमान तेथें येत होती, ॥ २० ॥ पांच फड्यांच्या द्वाररक्षक नागानें

१ शब्दस्पर्शादिक विषयांचा समुदाय. २ बुद्धि. ३ अनंतवृत्तींचे. ४ पंच ज्ञानेंद्रियें व पंचकर्मेंद्रियें यांसहवर्तमान. ५ प्राण, अपान, व्यान, उदान आणि समान अशा पांच प्रकारच्या प्राणानें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सर्व बाजूंनीं रक्षण केलेली होती. ती आपणास योग्य असा श्रेष्ठ पति मिळविण्याच्या खटपटीत होती, ती सोळा वर्षांच्या वयाची असून नानाप्रकारचे शृंगार धारण केलेली होती, ॥ २१ ॥ ती अगदीं सुकुमार असून तिचीं नांक, दांत, गाल आणि मुख हीं फार सुंदर होतीं तिच्या दोन्ही कानांची ठेव एकसारखी असून त्यांच्या योगानें ती कुंडलांची शोभा धारण करीत होती, ॥ २२ ॥ ती पिंवळी पैठणी नेसलेली, सुंदर कटिपश्चाद्भागानें युक्त, श्यामवर्ण व सुवर्णाचा कमरपट्टा धारण करणारी होती, ती तोरड्यांच्या योगानें शब्द करणाऱ्या पायांनीं चालत असल्यामुळें देवतेसारखी शोभत होती ॥ २३ ॥ ती गजगामिनी असून, ज्यांनीं तारुण्य वयाचा आरंभ सुचविला आहे अशा सारख्या, वाटोळ्या व मध्यें अंतर नसलेल्या आपल्या स्तनांना लज्जेमुळें वारंवार पदरानें झांकीत होती ॥ २४ ॥ आणि ती लज्जायुक्त हास्याच्या योगानें मनोहर दिसत होती. अशा त्या स्त्रीला अवलो

वार्षिकीम् ॥ २१ ॥ गंधज्ञानादिभिर्बुद्ध्यवयवैः सुनासत्वादि निरूप्यते । समं विन्यस्तौ रचितौ कर्णौ ताभ्यां कुंडलशोभां दधतीम् ॥ २२ ॥ अन्नमयं हि सौम्य मन इति यत्कृष्णं तदन्नस्येत्यादिश्रुत्यनुसारेण श्यामामित्युक्तम् । नूपुरैः क्वणद्भ्याम् । नूपुरेण पादांगुलीयकानामप्युलक्षणाद्बहुवचनम् ॥ २३ ॥ व्यंजितं कैशोरं यौवनोपक्रमो याभ्याम् । समौ च वृत्तौ च ॥ २४ ॥ तामाहेति तयोः संवादोक्तिः संबंधदार्ढ्याय अपांग एव पुंखो मूलप्रांतो यस्य कटाक्षस्य बाणस्य तेन स्पृष्टो विद्धः प्रेम्णा उच्चैर्भ्रमंती

सुनासां सुदतीं बालां सुकपोलां वराननाम् ॥ समविन्यस्तकर्णाभ्यां बिभ्रतीं कुंडलश्रियम् ॥ २२ ॥ पिशंगनीवीं सुश्रोणीं श्यामां कनकमेखलाम् ॥ पद्भ्यां क्वणद्भ्यां चलतीं नूपुरैर्देवतामिव ॥ २३ ॥ स्तनौ व्यंजितकैशोरौ समवृत्तौ निरंतरौ ॥ वस्त्रांतेन निगूहंतीं व्रीडया गजगामिनीम् ॥ २४ ॥ तामाह ललितं वीरः सव्रीडस्मितशोभनाम् ॥ स्निग्धेनापांगपुंखेन स्पृष्टः प्रेमोद्भ्रमद्भ्रुवा ॥ २५ ॥ का त्वं कंजपलाशाक्षि कस्यासीह कुतः सति ॥ इमामुपपुरीं भीरु किं चिकीर्षसि शंस मे ॥ २६ ॥ क एतेऽनुपथा ये त एकादश महाभटाः ॥ एता वा ललनाः सुभ्रूः कोऽयं तेऽहिः पुरःसरः ॥ २७ ॥ त्वं ह्रीर्भवान्यस्यथ वाग्रमा पतिं विचिन्वती किं मुनिवद्रहो वने ॥ त्वदंघ्रिकामाप्तसमस्तकामं क्व पद्मकोशः पतितः कराग्रात् ॥ २८ ॥

भ्रूर्धनुःस्थानीया यस्मिंस्तेन ॥ २५ ॥ कुतः स्थानादिहागताऽसि । हेसति पुर्याः समीपस्था उपपुरी भूस्तामालक्ष्य किं कर्तुमिच्छसीत्यर्थः ॥ २६ ॥ ते तव येऽनुपथा अनुवर्तिन एते के एकादशो महान्भटो बृहद्बलत्वेन वक्ष्यमाणो येषु दशसु ते । बुद्धेर्मनसः पृथगुपादानं बुद्धिपरिचारकेंद्रियसहायतया तत्परिचारकत्वविवक्षया ॥ २७ ॥ त्वं ह्रीः किं पतिं धर्मं विचिन्वती । अथवा भवानी पतिं शिवं विचिन्वती । अथवा किं वाक् सरस्वती पतिं ब्रह्माणम् । रमा पतिं विष्णुम् । मुनिरिव संयता सती । कथंभूतं पतिम् ।

कन करून, प्रेमानें भ्रमण पावणाऱ्या भ्रुकुटीरूप धनुष्यापासून सुटलेला, नेत्राचा प्रांतभाग हाच ज्याचा पिसारा आहे अशा तिच्या स्नेहयुक्त कटाक्षबाणानें विद्ध झालेला तो वीर पुरंजन राजा, तिच्याशीं मनोहर भाषण करूं लागला कीं,—॥ २५ ॥ हे कमलपत्राक्षि, तूं जातीनें कोण आहेस? कोणाची कन्या आहेस? हे सति, तूं येथें कोठून आली आहेस? हे भीरु (भित्र्ये) नगरीजवळच्या या भूमीला पाहून काय करण्याची तुझी इच्छा आहे? हें मला सांग ॥ २६ ॥ तसाच ज्यांच्यामध्यें अकरावा महायोद्धा आहे असे जे तुझे दाहाजण अनुचर आहेत हे कोण आहेत? हे सुभ्रु, या तुझ्या बरोबरच्या स्त्रिया कोण आहेत? हा तुझ्यापुढें चालणारा सर्प कोण आहे? ॥ २७ ॥ हे सुंदरि, ऋषीप्रमाणें आपल्या इंद्रियांचा निग्रह करून, या एकांत वनामध्यें तुझ्या चरणाच्या सेवनेंकरूनच ज्यावे सर्व मनोरथ परिपूर्ण झाले आहेत अशा आपल्या धर्मनामक

१ भोक्ता जीव. २ मन. ३ दहा इंद्रियें. ४ इंद्रियांच्या वृत्ति. ५ प्राण.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पतीचा शोध करणारी तूंही लज्जानामक त्याची स्त्री आहेस कीं काय ? किंवा आपल्या पतीचा (शिवाचा) शोध करणारी पार्वती आहेस कीं काय? किंवा ब्रह्मदेवाचा शोध करणारी सरस्वती आहेस कीं काय? अथवा विष्णूचा शोध करणारी लक्ष्मी आहेस कीं काय ? जर लक्ष्मी असलीस तर तूं लीलेकरितां धारण केलेला कमळाचा कळा तुझ्या हातांतून कोठें पडून गेला ? ॥ २८ ॥ परंतु हे रंभोरु, तूं पायांनीं भूमीला स्पर्श करीत आहेस यावरून तूं ह्या देवतेंपैकीं कोणीही नव्हेस. यास्तव, विष्णूसहवर्तमान लक्ष्मी जशी वैकुंठ लोकाला शोभा आणित्ये त्याप्रमाणें, या लोकींच्या व परलोकींच्या भोगसाधनांविषयीं दक्ष व महावीर अशा माझ्यासहवर्तमान ही नगरी सुशोभित करण्याविषयीं तूं योग्य आहेस ॥ २९ ॥ हे सुंदरि, ज्या, अर्थी तुझ्या कटाक्ष अवलोकनानें मोहितचित्त झालेल्या मला, तुझ्या सलज्ज व सप्रेम हास्यपूर्वक भ्र-

त्वदंघ्रिकामेनैव तत्कृतया त्वदंघ्रिकामनयैव प्राप्ताः समस्ताः कामा येन तम् ॥ २८ ॥ हे वरोरु आसां मध्ये त्वमन्यतमाऽपि न संभवसि ॥ यतो भुविस्पृक् नहि देवता भुवं स्पृशंति । वीरवरेण मया । ननु त्वमकर्मा कथं त्वया सहालंकरोमीति चेत्तत्राह । अदभ्रमनकल्पं कर्म त्वत्संगाद्यस्य मम तेन स्वतोऽकर्मत्वेन त्वत्संगात्सकर्मा भवामीत्यर्थः । परं वैकुंठम् ॥ २९ ॥ यद्यस्मात्तवापांगेन विखंडितमिंद्रियं मनो यस्य तं मां मनोभवो बाधते अथ तस्मादनुगृहाण सव्रीडं यद्भावेन प्रेम्णा स्मितं तेन विभ्रमंती या भ्रूस्तयो-

नासां वरोर्वन्यतमा भुविस्पृक्पुरीमिमां वीरवरेण साकम् ॥ अर्हस्यलंकर्तुमदभ्रकर्मणा लोकं परं श्रीरिव यज्ञपुंसा ॥ २९ ॥ यदेष माऽपांगविखंडितेंद्रियं सव्रीडभावस्मितविभ्रमद्भ्रुवा ॥ त्वयोपसृष्टो भगवान्मनोभवः प्रबाधतेऽथानुगृहाण शोभने ॥ ३० ॥ तदाननं सुभ्रु सुतारलोचनं व्यालंबिनीलालकवृंदसंवृतम् ॥ उन्नीय मे दर्शय वल्गुवाचकं यद्व्रीडयाऽनाभिमुखं शुचिस्मिते ॥ ३१ ॥ नारद उवाच ॥इत्थं पुरंजनं नारी याचमानमधीरवत् ॥ अभ्यनंदत तं वीरं हसंती वीर मोहिता ॥ ३२॥ न विदाम वयं सम्यक्कर्तारं पुरुषर्षभ ॥ आत्मनश्च परस्यापि गोत्रं नाम च यत्कृतम् ॥ ३३ ॥ इहाद्य संतमात्मानं विदाम न ततः परम् ॥ येनेयं निर्मिता वीर पुरी शरणमात्मनः ॥ ३४ ॥

पसृष्टः प्रेरितः ॥ ३० ॥ यद्व्रीडया संमुखं न भवति तदाननमुन्नीय मे दर्शय । शोभने भ्रुवौ यस्मिन् सुतारे शोभनकनीनिके लोचने यस्मिन् व्यालंबिनो दीर्घा ये अलकास्तेषां वृंदेन संवृतम् । वल्गूनि वाचकानि वाक्यानि यस्मिन् ॥ ३१ ॥ हेवीर सापि तं दृष्ट्वा मोहिता सती तमाह ॥ ३२ ॥ यत्पृष्टं कस्यासीत्यनेन कस्य पुत्री गोत्रजेति का त्वमिति च किंनामासीति तत्राह । आत्मनो मम परस्य तवापि कर्तारं सम्यङ्न विद्मः । गोत्रं नाम च यत्कृतं भवति तं च न विद्मः ॥ ३३॥ आत्मनो मम शरणमियं

मन पावणाऱ्या भ्रुकुटीच्या योगानें तूं प्रेरित केलेला भगवान् मदन, अतिशय पीडा करीत आहे त्या अर्थी तूं माझ्यावर अनुग्रह कर ॥ ३० ॥ हे चारुहास्ये, जें तुझें मुख लज्जेनें माझ्या समोर होत नसून सुंदर भ्रुकुटींनीं युक्त आहे, ज्याचे ठिकाणीं उत्तम तारकांनीं युक्त नेत्रें आहेत, जें लांब लांब अशा निळ्या कुरळ केंसांनीं वेष्टित आहे, आणि ज्याचेठिकाणीं सुंदर भाषणें आहेत असें तूं आपलें मुख वर करून मला दाखीव ॥ ३१ ॥ नारद ह्मणाला– हे वीरश्रेष्ठ राजा, याप्रमाणें कामवश होऊन तो पुरंजन राजा, अधीर पुरुषासारखी त्या स्त्रीची प्रार्थना करूं लागला असतां त्याच्या स्वरूपसौंदर्यानें मोहित होऊन सप्रेम हास्य करणाऱ्या त्या स्त्रीनें आपणास इच्छित विषयभोग देणाऱ्या त्या राजाचा पतित्वेंकरून स्वीकार केला. आणि त्यास ह्मणाली कीं, ॥ ३२ ॥ हे पुरुषश्रेष्ठा, माझा व तुझा उत्पादक कोण आहे हें मी जाणत नाहीं. तसेंच आह्मां उभयतांना गोत्र व नांव ज्यानें केलें आहे त्यालाही आह्मी जाणत नाहीं ॥ ३३ ॥ तसेंच माझें राहण्याचें स्थान अशी ही

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नगरी कोणीं निर्माण केली तेंही मला ठाऊक नाहीं. आज ह्या नगरीमध्यें तूं मी व हे माझे मित्रवगैरे आहेत इतकें मात्र आह्मी जाणतों, याहून दुसरें आह्मांस कांहींच ठाऊक नाहीं ॥ ३४ ॥ हे प्रियकरा, हे अकरा पुरुष माझे मित्र आहेत व ह्या स्त्रिया माझ्या सख्या आहेत; मी निद्रिस्थ झाल्यें ह्मणजे हा सर्प माझ्या ह्या नगरीचें रक्षण करीत जागृत राहतो ॥ ३५ ॥ हे शत्रुमदना, तुझें कल्याण असो. माझ्या सुदैवानें तूं येथें आलास व तूंही विषयभोगांची इच्छा करीत आहेस ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. जे पाहिजे असतील ते विषय मी तुला आपल्या मित्रांसहवर्तमान व सख्यांसहवर्तमान संपादन करून देईन ॥ ३६ ॥ हे नाथा, मीं प्राप्त करून दिलेल्या विषयांचा उपभोग करित होत्साता तूं शंभर वर्षेंपर्यंत ह्या माझ्या नऊ दरवाज्यांच्या नगरीमध्यें सुखानें वास कर ॥ ३७ ॥ हे प्राणप्रिया, तुझ्याहून इतर या लोकीं

पुरी येन निर्मिता तं च न विद्मः ॥ ३४ ॥ यत्पृष्टं क एते अनुपथा इति तत्राह । एत इति ॥ ३५ ॥ आस्तां नामगोत्रादि यदत्रागतोऽसि एतद्दिष्ट्या भद्रं तावत् । ग्राम्यानिंद्रियग्रामार्हान् उद्वहिष्यामि संपादयिष्यामि स्वबंधुभिः सखिभिः सखीभिश्च ॥ ३६ ॥ समाः संवत्सरान् मनुष्यदेहप्रवेशाच्छतमित्युक्तम् ॥ ३७ ॥ प्रवृत्तिस्वभावत्वान्निवृत्तिनिंदापूर्वकं तत्संगमभिनंदति । कमिति पंचभिः । त्वत्तोऽन्यं कं नु रमये अरतिज्ञं नैष्ठिकम् । अकोविदमनिषिद्धसुखत्यागिनम् । संपरायो मृत्युस्तदनभिमुखं परलोकचिंता-

एते सखायः सख्यो मे नरा नार्यश्च मानद ॥ सुप्तायां मयि जागर्ति नागोऽयं पालयन्पुरीम् ॥ ३५ ॥ दिष्ट्याऽऽगतोऽसि भद्रं ते ग्राम्यान्कामानभीप्ससे ॥ उद्वहिष्यामि तांस्तेऽहं स्वबंधुभिररिंदम ॥ ३६ ॥ इमां त्वमधितिष्ठस्व पुरीं नवमुखीं विभो ॥ मयोपनीतान्गृह्णानः कामभोगान् शतं समाः ॥ ३७ ॥ कं नु त्वदन्यं रमये ह्यरतिज्ञमकोविदम् ॥ असंपरायाभिमुखमश्वस्तनविदं पशुम् ॥ ३८ ॥ धर्मो ह्यत्रार्थकामौ च प्रजानंदोऽमृतं यशः ॥ लोका विशोका विरजा यान्न केवलिनो विदुः ॥ ३९ ॥ पितृदेवर्षिमर्त्यानां भूतानामात्मनश्च ह ॥ क्षेम्यं वदंति शरणं भवेऽस्मिन्यद्गृहाश्रमः ॥ ४० ॥ का नाम वीरविख्यातं वदान्यं प्रियदर्शनम् ॥ न वृणीत प्रियं प्राप्तं मादृशी त्वादृशं पतिम् ॥ ४१ ॥

शून्यम् । अश्वस्तनविदं श्व इदं कर्तव्यमितीहलोकचिंताशून्यम् । अतएव पशुतुल्यम् ॥ ३८ ॥ अत्र गार्हस्थ्ये । प्रजानंदः पुत्रसुखम् । अमृतं मोक्षः । केवलिनो यतयः ॥ ३९ ॥ गृहाश्रम इति यदेतत्क्षेमार्हं शरणमाश्रयं वदंति ॥ ४० ॥ ४१ ॥

विषयसुख न जाणणारा व परलोकीं सुख होण्याचें साधनानुष्ठान न करणारा व उद्यां आपलें कसें चालेल याचा विचार न करणारा (द्रव्यसंपादनाची काळजी न बाळगणारा) अशा पशुतुल्य कोणत्या बरें पुरुषाशीं मी रममाण होईन? कोणाशींच होणार नाहीं ॥ ३८ ॥ अहो! या लोकीं गृहस्थाश्रमामध्यें यज्ञादिकांच्या अनुष्ठानेंकरून धर्म, अर्थ, काम, प्रजोत्पत्तीसाठीं रतिसुखाचा आनंद किंवा पुत्रपौत्रादिकांच्या लालनपालनांपासून उत्पन्न झालेला आनंद व यश हीं प्राप्त करून घेतां येतात तसेंच गृहस्थाश्रमाचा त्याग करणारे संन्यासी लोक ज्यांना जाणत नाहींत ते परलोकीं प्राप्त होणारे स्वर्गादिक लोकही याच गृहस्थाश्रमांत संपादन करितां येतात, अथवा मोक्ष सुद्धां मिळवितां येतो ॥ ३९ ॥ ह्मणून या संसारामध्यें गृहस्थाश्रम हा, पितर, देव, ऋषि, मनुष्य, सर्व प्राणी व स्वतः आपण या सर्वांचा निर्वाह करणारा आश्रय आहे असें वेदवेत्ते ह्मणतात ॥ ४० ॥ यास्तव हे नाथा, लोकामध्यें वीर ह्मणून प्रख्यात, उदारचित्त, व अतिसुंदर अशा तुझ्यासारख्या आपण होऊन प्राप्त झालेल्या प्रियपतीला कोण बरें माझ्यासारखी स्त्री वरणार

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नाहीं? ॥४१॥ हे महापराक्रमयुक्ता, जी तूं, कृपेनें प्रवृत्त झालेल्या आपल्या हास्यपूर्वक अवलोकनाच्या योगेंकरून आह्मांसारिख्या दीन जनांची मनःपीडा समूल नाहींशी करण्याकरितां येथें संचार करित आहेस, त्या तुझ्या सर्पदेहासारख्या अतिमृदु बाहूंचेठिकाणीं ह्या भूतलावर कोणत्या बरें स्त्रीचें मन आसक्त होणार नाहीं? सर्वांचेंही होईलच ॥ ४२॥
नारद ह्मणाले:– हे राजा, याप्रमाणें त्या बागेमध्यें त्या स्त्रीपुरुषांनीं परस्परांस वरण्याचा संकेत करून त्या नगरीमध्यें प्रवेश केला आणि तीं उभयतां तेथें शंभर वर्षेंपर्यंत आनंद पावलीं ॥ ४३ ॥ तो पुरंजन राजा, त्या नगरीमध्यें जेथेंतेथें सूतमागधवंदींनीं स्तुत होत्साता स्त्रियांनीं परिवेष्टित होऊन क्रीडा करूं लागला. नंतर उष्णकाळामध्यें तो

भोगिभोगयोः सर्पदेहाकारयोस्तव भुजयोर्यन्न सज्जेदेवंभूतं कस्याः स्त्रिया मनः स्यान्न कस्या अपि। यो भवाननाथवर्गा दीनस्तोमास्तेषामाधिमलमत्यर्थमपोहितुं सर्वत्र चरति। केनापोहितुम्। घृणयोद्धतोऽतिशयितो यः स्मितपूर्वकोऽवलोकस्तेन ॥४२॥ समुद्य समुदीर्य समासंवत्सरान् ॥ ४३ ॥ तत्र जाग्रदवस्थां संक्षेपेणाह। उपगीयमान इति। सुषुप्ताऽवस्थामाह। ह्रदिनीं हृदयाकाशं स्वापस्थानम्। शुचौ निदाघे॥ ४४॥ इदानीं नवद्वारप्रदर्शनपूर्वकं जाग्रदवस्थां प्रपंचयति सप्तेति यावदध्यायसमाप्ति। तस्याः पुर उपरि कृता द्वारः सप्त

कस्या मनस्ते भुवि भोगिभोगयोः स्त्रिया न सज्जेद्भुजयोर्महाभुज ॥ योऽनाथवर्गाधिमलं घृणोद्धतस्मितावलोकेन चरत्यपोहितुम् ॥ ४२॥ नारद उवाच ॥ इति तौ दंपती तत्र समुद्य समयं मिथः॥ तां प्रविश्य पुरीं राजन्मुमुदाते शतं समाः ॥ ४३ ॥ उपगीयमानो ललितं तत्रतत्र च गायकैः ॥ क्रीडन्परिवृतः स्त्रीभिर्ह्रदिनीमाविशच्छुचौ ॥ ४४ ॥ सप्तोपरि कृताद्वारः पुरस्तस्यास्तु द्वे अधः ॥ पृथग्विषयगत्यर्थं तस्यां यः कश्चनेश्वरः ॥ ४५ ॥ पंचद्वारस्तु पौरस्त्या दक्षिणैका तथोत्तरा ॥ पश्चिमे द्वे अमूषां ते नामानि नृप वर्णये ॥ ॥ ४६ ॥ खद्योताविर्मुखी च प्राग्द्वारावेकत्र निर्मिते ॥ विभ्राजितं जनपदं याति ताभ्यां द्युमत्सखः ॥ ४७ ॥ नलिनी नालिनी च प्राग्द्वारावेकत्र निर्मिते ॥ अवधूतसखस्ताभ्यां विषयं याति सौरभम् ॥ ४८ ॥

वृता इति पाठे संवृताः नेत्रे नासिके श्रोत्रे मुखं चेति सप्त अधो द्वे द्वारौ गुदलिंगे यः कश्चनेति आत्मनः सम्यगविज्ञानादनियतत्वाच्च ॥ ४५ ॥ तासु सप्तसु पंच द्वारः पौरस्त्याः पूर्वदिग्भवाः ॥ ४६ ॥ खद्योतवदल्पप्रकाशा वामनेत्ररूपा आविः प्रकटं मुखं यस्याः सा बहुप्रकाशा दक्षिणनेत्रलक्षणा। तस्माद्दक्षिणोऽर्ध आत्मनो वीर्यावत्तर इति श्रुतेः। स्वानुभवाच्च तत्र प्रकाशाधिक्यम्। एकत्र संलग्ने विभ्राजितं रूपम्। द्युमत्सखश्चक्षुःसहितः॥ ४७ ॥ नलनालशब्दौ छिद्रवचनौ तद्वती नलिनी नालिनी च वामदक्षिणनासिके अत्रापि संज्ञाभेदादेव

तापशांत्यर्थ एका नदीमध्यें प्रविष्ट झाला ॥ ४४ ॥ त्या नगरीमध्यें राहणाऱ्या पुरंजनराजला नगरींतून बाहेर निरनिराळ्या देशांमध्यें जाण्यासाठीं त्या नगरीच्या वरच्या बाजूला सात दरवाजे केलेले आहेत व तिच्या खालच्या बाजूला दोन केलेले आहेत ॥ ४५॥ त्या सात दरवाज्यांमध्यें पांच दरवाजे पूर्वदिशेकडे, एक दक्षिणेकडे, एक उत्तरेकडे व दोन पश्चिमेकडे असे आहेत. हे राजा, यांचीं तुला नांवें सांगतों श्रवण करे ॥ ४६ ॥ खद्योता आणि आविर्मुखी या नांवांचे पूर्वेकडचे दोन दरवाजे एकेचठिकाणीं केलेले बरोबर उघडणारे व झांकणारे आहेत. त्या दरवाज्यांनीं, द्युमान हा ज्याचा सखा आहे असा तो पुरंजन राजा, विभ्राजितनामक देशाकडे गमन करितो ॥ ४७ ॥ तशींच नलिनी व नालिनी अशीं दोन द्वारें पूर्वेकडेच एकेठिकाणीं निर्माण केलेलीं असून त्या द्वारांनीं अवधूतनामक मित्रासहवर्तमान पुरंजन राजा, सौरभनांवाच्या देशास गमन करितो ॥४८॥

---

अनुमानाचें दुसरें एक लक्षण असें आहे कीं,- ह्या विद्यमान असलेल्या स्थूलदेहानें ज्याचा कधींच अनुभव घेतलेला नाहीं किंवा जें कधींच पाहिलेलें अथवा ऐकिलेलें नाहीं असेंहि एखादें विलक्षण प्रकारचें स्वरूप, ज्याअर्थीं स्वप्नामध्यें किंवा मनोराज्यामध्यें मनांत स्फुरण पावतें त्याअर्थीं हे राजा ह्या वासनाश्रयरूप जीवालाच तो तशाप्रकारचा अनुभव पूर्वदेहापासून झालेला आहे असें तूं निश्चयानें समज. कारण, ज्या वस्तूचा पूर्वीं कधींच अनुभव घेतलेला नाहीं ती वस्तु पुढें कधींच मनांत यावयाची नाहीं असा सिद्धांत आहे ॥ ६४ ॥ ६५ ॥ राजा, तुझें कल्याण असो. मी सांगतों इकडे नीट लक्ष्य दे. मनुष्य, पूर्वीं कोणकोणत्या जन्मास गेला होता, पुढें कोणकोणत्या जन्मास जाणार आहे व कोणकोणत्या जन्मास जाणार नाहीं ह्या सर्व गोष्टी त्याचें मनच सांगत असतें. ह्मणजे मनाच्या औदार्य कृपणता इत्यादिक धर्मांवरून हा पूर्वीं ॥ ९७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अमुक होता व पुढें अमुक योनींत जाईल हें सर्व कळून येतें ॥ ६६ ॥ आतां कधीं कधीं पर्वतावर समुद्र, दिवसास नक्षत्रें अथवा स्वतःचाच शिरच्छेद इत्यादिक दृष्टी पडण्यास अयोग्य असेही प्रकार स्वप्नांत दिसतात ते कसे ? असें ह्मणशील तर–हे राजा, देश काल अथवा कर्म ह्यांच्या आश्रयानें असलेलें, कधीं न पाहिलेलें व कधीं न ऐकिलेलें असें जें कांहीं एखादेवेळीं मनामध्यें स्फुरण पावतें तेंसुद्धां निद्रादिदोषेंकरून तसें तसें भासतें असें अनुमान करावें ॥ ६७ ॥ ह्यावर तूं ह्मणशील कीं, एखाद्या दरिद्री पुरुषाला' मी राजा आहें' असें स्वप्न पडतें किंवा राजाला मी यःकश्चित् रंक झालों आहें असें दिसतें याची योजना काय ? तर बाबा, सगळ्या प्राण्यांचीं मनें सारखींच आहेत ह्मणून त्या मनांमध्यें सर्वप्रकारचे इंद्रियांचे विषय क्रमाक्रमानें वर्गावर्गानें प्राप्त होतात व तेथून निघूनहि जातात. ह्मणजे त्यांचें त्यांना विस्मणही होतें.

प्राप्स्यतोऽपि भावीनि रूपाणि शंसति मन एवौदार्यकार्पण्यादिवृत्तिभिः पूर्वमप्येवमेवासीत्पश्चादप्येवमेव भविष्यतीति ज्ञापयतीत्यर्थः ॥ ६६ ॥ ननु कदाचिद्दर्शनानर्हमपि स्वप्ने प्रतीयते य था पर्वताग्रे समुद्रो दिवा नक्षत्राणि स्वशिरश्छेद इत्यादि तत्राह । अदृष्टमिति । अन्यदेशाश्रयं समुद्रादिकं पर्वताग्रे निशाश्रयं नक्षत्रादिकं दिवा अभ्यंगादिक्रियाश्रयं स्वशिरश्छेदनाश्रयम् । निद्रादिदोषेण हि तथा प्रतीयत इत्यनुमंतव्यम् । परस्यापि तदनुपपत्तेस्तुल्यत्वादिति भावः ॥ ६७ ॥ ननु दरिद्रः क्वचिदात्मानं महाराजं पश्यति राजा च रंकमात्मानं पश्यति तत्कथमसंभावितं संगच्छेत तत्राह । सर्व इति । आयांति भोग्यत्वेन प्राप्नुवंति यांति च भोगानंतरम् । यदि च कश्चिदमना भवेत्तर्ह्येवं न स्यान्न त्वेतदस्तीत्याह । सर्वे समनस इति । अतः सर्वेषां समनस्कत्वान्मनसि च सर्वार्थानां क्रमेण प्रवेशान्नात्यंतादृष्टचरः कस्यापि कश्चिदर्थोऽस्तीत्यर्थः ॥ ६८ ॥

अदृष्टमश्रुतं चात्र क्वचिन्मनसि दृश्यते ॥ यथातथाऽनुमंतव्यं देशकालक्रियाश्रयम् ॥ ६७ ॥ सर्वे क्रमानुरोधेन मनसींद्रियगोचराः ॥
आयांति वर्गशो यांति सर्वे समनसो जनाः ॥ ६८ ॥ सत्त्वैकनिष्ठे मनसि भगवत्पार्श्ववर्तिनि ॥ तमश्चंद्रमसीवेदमुपरज्यावभासते ॥
॥६९॥ नाहंममेति भावोऽयं पुरुषे व्यवधीयते ॥ यावद्बुद्धिमनोक्षार्थगुणव्यूहो ह्यनादिमान् ॥ ७० ॥ सुप्तिमूर्छोपतापेषु प्राणायनविघाततः ॥ नेहतेऽहमिति ज्ञानं मृत्युप्रज्वारयोरपि ॥ ७१ ॥

तदेवं सर्वैरपि सर्वेऽर्थाः क्रमेण दृश्यंत इत्युक्तमिदानीं युगपदपि सर्वदर्शनं कदाचिद्भवतीत्याह । सत्वैकनिष्ठे भगवत्पार्श्ववर्तिनि भगवद्ध्यानपरे मनसीदं विश्वमुपरज्य संयोगमिव प्राप्यावभासते । प्रतीत्यनर्हस्यापि कदाचित्प्रतीतौ दृष्टांतः । चंद्रमस्युपरज्य तमो राहुरिव तदिदं शुद्धे मनसि सर्वविषयस्फुरणं योगिप्रत्यक्षमिति प्रसिद्धम् ॥ ६९ ॥ तदेवं स्थूलदेहनाशेऽपि लिंगदेहस्यानाशादन्यः कर्ता भोक्तेति दोषो नास्तीत्युक्तम् । तत्रैवं शंकते । ननु लिंगदेहस्य स्थूलदेहद्वारेणैव कर्तृत्वभोक्तृत्वे न तु केवलस्य तत्र कदाचित्स्थूलदेहाभावे जीवस्य कर्तृत्वभोक्तृत्वाभावान्मुक्तिः प्रसज्येत तत्राह । अहंममेति भावः स्थूलदेहसंबंधः पुरुषे जीवे न व्यवधीयते न विच्छिन्नो भवति । किं पर्यंतम् । बुद्ध्यादीनां व्यूहः परिणामो लिंगं यावदस्ति अनादिमाननादिः सन् ॥ ७० ॥ स्वापादावहंकाराद्यभावात्तद्विच्छेदमाशंक्याह । द्वाभ्याम् । सुप्त्यादिषु उपताप इष्टवियोगादिदुःखम् ।

एतावता सर्वांच्या मनामध्यें जर सर्व विषय प्राप्त होतात तर राजाला रंकत्व भासणें किंवा रंकाला राजत्व भासणें हें कांहीं असंभवनीय नाहीं ॥ ६८ ॥ हे राजा, जसा न दिसणाराहि राहु चंद्राच्याठिकाणीं (ग्रहणाच्या वेळीं) दृष्टोत्पत्तीस येतो त्याप्रमाणें सत्त्वगुणानें युक्त व भगवद्ध्यानपरायण झालेल्या योग्याच्या मनामध्यें, हें सर्व जग संयोग पावल्यासारखें होऊन एकदमसुद्धां प्रकाशमान होतें असें प्रसिद्ध आहे ॥ ६९ ॥ असो, हे राजा, अनादि काळापासून चालत आलेला, बुद्धि, मन, इंद्रियें व शब्दस्पर्शादिक विषय अशाप्रकारचा हा गुणकार्यरूप लिंगदेह, जोपर्यंत आहे तोंपर्यंत 'मी आणि माझें' असा जीवाचेठिकाणीं असलेला हा अध्यासरूपी धर्म नाहींसा होत नाहीं ॥ ७० ॥ आतां तूं ह्मणशील कीं, सुषुप्ति, मृत्यु इत्यादिकांचेठिकाणीं अहंभाव नसतो ह्मणून त्या वेळीं जीवाला स्थूलदेहाचा वियोग व मुक्ति प्राप्त व्हावी

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तर त्याचें उत्तर सांगतों ऐक--सुषुप्ति,मूर्छा, इष्टवियोगादिक दुःख,मृत्यु, व मोठा ज्वर ह्या अवस्थांमध्यें सर्व इंद्रियें व्याकुळ झालेलीं असल्यामुळें, 'हा मी' असें ज्ञान, सूक्ष्मरीतीनें असतांही तें स्पष्टपणें प्रकाश पावत नाहीं ॥ ७१ ॥ तसेंच गर्भावस्था व बाल्यावस्था यांचेठिकाणींहि इंद्रियांचें सूक्ष्मत्व असल्या मुळें, अहंकाराचें स्वरूप,जसें अमावास्येचेठिकाणीं असणाऱ्याहि चंद्राचें स्वरूप दिसून येत नाहीं· त्याप्रमाणें स्पष्टपणें दिसून येतनाहीं· तथापि तरुण पुरुषाच्याठिकाणीं 'मी पाहतों मी ऐकितों' इत्यादि प्रकारचें अकरा इंद्रियांनीं स्पष्ट भासणारें तें अहंकाराचें स्वरूप दिसून येतें· यावरून सुषुप्त्यादिक अवस्थेंमध्यें सूक्ष्मरूपानें असलेल्या अहंकाराच्या निवृत्तीवाचून जीवात्मा मुक्ति प्राप्त होत नाहीं ॥ ७२ ॥ जसा स्वप्नावस्थेमध्यें दृष्टोत्पत्तीस येणारा 'आपलें मस्तक तुटलें' इत्यादिक, अनर्थांचा अनुभव, वस्तुतः खरा नसतांहि जाग्रदवस्थेवांचून निवृत्त होत नाहीं त्याप्रमाणें रूपरसादिक विषयांचें ध्यान करणाऱ्या, पुरुषाचा संसार वस्तुतः खरा नसतांहि आत्मज्ञानादि साधनावांचून निवृत्त होत नाहीं ॥ ७३ ॥ एतावता पंचमहाभूतात्मक

तेष्वहमिति ज्ञानमहंकारो नेहते न प्रकाशते प्राणायननानामिंद्रियाणां विघातात् । इंद्रियैरिदंकारास्पदवस्तुग्रहणे ह्यहंकारः स्फुरति नान्यथेत्यर्थः ॥ ७१ ॥ अपौष्कल्यादसंपूर्णत्वात्प्राणायनानामिति शेषः । यूनस्तरुणस्य यदेकादशविधमेकादशेंद्रियैः स्फुटं लिंगमहंकरणं तन्न दृश्यते गर्भादाविति । सतोऽप्यनभिव्यक्तौ दृष्टांतः । कुह्वाममावास्यायां चंद्रमसो लिंगं रूपमिव ॥ ७२ ॥ तस्मादहंकारास्पदस्य स्थूलदेहस्याविच्छेदाद्वस्तुभूतार्थाभावेऽपि संसृतिनिवृत्तिर्नास्तीत्याह । अर्थे हीति ॥ ७३ ॥ यावल्लिंगं स्थूलदेहाविच्छेदा-

गर्भे बाल्येऽप्यपौष्कल्यादेकादशविधं तदा ॥ लिंगं न दृश्यते यूनः कुह्वां चंद्रमसो यथा ॥ ७२ ॥ अर्थे ह्यविद्यमानेऽपि संसृतिर्न निवर्तते ॥ ध्यायतो विषयानस्य स्वप्नेऽनर्थागमो यथा ॥ ७३ ॥ एवं पंचविधं लिंगं त्रिवृत्षोडशविस्तृतम् ॥ एष चेतनया युक्तो जीव इत्यभिधीयते ॥ ७४ ॥ अनेन पुरुषो देहानुपादत्ते विमुंचति ॥ हर्षं शोकं भयं दुःखं सुखं चानेन विंदति ॥ ७५ ॥ यथा तृणजलूकेयं नापयात्यपयाति च ॥ न त्यजेन्म्रियमाणोऽपि प्राग्देहाभिमतिं जनः ॥ ७६ ॥ यावदन्यं न विंदेत व्यवधानेन कर्मणाम् ॥ मन एव मनुष्येंद्र भूतानां भवभावनम् ॥ ७७ ॥

त्संसारानिवृत्तिरित्येतत्प्रपंचयति । एवमिति सार्धैस्त्रिभिः । पंचविधं पंचतन्मात्रात्मकम् । त्रिवृत्त्रिगुणम् । षोडशविकारात्मना विस्तृतम् ॥ ७४ ॥ ७५ ॥ नन्वेकं देहं विसृज्य देहांतरप्रवेशात्पूर्वं विदेहता स्यादेवेत्यत आह । यथेति । नापयाति पूर्वतृणस्यात्यागात् अपयाति च तृणांतरधारणात् । तथा प्राग्देहाभिमतिं न त्यजेन्म्रियमाणोऽपि ॥ ७६ ॥ अन्यं देहम् । कर्मणां प्राग्देहारंभकाणां व्यवधानेन विच्छेदेन समाप्त्या प्रकरणार्थमुपसंहरति । मन एवेति । भवभावनं संसारहेतुः ॥ ७७ ॥

असून सोळा प्रकारांनीं विस्तार पावलेला जो हा त्रिगुणात्मक लिंगदेह तोच चैतन्यानें युक्त झाला ह्मणजे त्याला 'जीव' असें ह्मणतात ॥७४॥ ह्याच लिंगदेहानें युक्त झालेला जीव देव तिर्यक् मनुष्य इत्यादि स्थूल देहांचा स्वीकार करितो आणि त्याग करितो व ह्यानें युक्त असलेलाच तो जीव सुख, दुःख हर्ष,शोक, व भय यांस पावतो॥ ७५॥ जशी प्रसिद्ध असलेली गवतावरची कीड, पुढच्या पायांनीं दुसऱ्या गवताला घट्ट धरल्याखेरीज मागचे पाय सोडून चालत नाहीं; तर पुढच्या पायांनीं दुसरें गवत घट्ट धरित्ये व मग मागचे, पाय सोडून चालत्ये त्याप्रमाणें मरणोन्मुख झालेलाहि प्राणी, पूर्वदेहाला उत्पन्न करणाऱ्या कर्मांची समाप्ति होऊन दुसऱ्या देहाला उत्पन्न करणाऱ्या कर्मांच्या संबंधानें, दुसऱ्या देहाचा स्वीकार करी तोपर्यंत पूर्वदेहाचेठिकाणीं असलेला 'मी व माझें' हा अभिमान सोडीत नाहीं, मिळून हे राजा, मन हेंच सर्व प्राण्यांच्या जन्ममरणरूप संसाराचें कारण आहे ॥ ७६ ॥ ७७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तें असें कीं, देहादिकांचेठिकाणीं अभिमानरूप अज्ञान असलें ह्मणजे आत्मानुसंधानरहित अशा प्राण्याच्या हातून चांगलें किंवा वाईट कर्म घडतें, तें घडलें ह्मणजे तदनुसार विषयोपभोग प्राप्त होतो. नंतर तो पुरुष इंद्रियांनीं उपभोग घेतलेल्या विषयांचें चिंतन करून पुन्हा पुन्हा त्या विषयांची प्राप्ति होण्यासाठीं कर्में करितो, त्यांच्या योगानें त्याला वारंवार संसारबंध प्राप्त होतो ॥ ७८ ॥ ह्मणून त्याची निवृत्ति होण्याकरितां हें सर्व विश्व भगवन्मयच आहे असें समजून तूं एकाग्रह अंतःकरणानें श्रीहरीचें सेवन कर. कारण, त्यापासूनच ह्या जगाचे उत्पत्तिस्थितिसंहार होत असतात ॥ ७९ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, याप्रमाणें भगवद्भक्तांमध्यें श्रेष्ठ अशा भगवान् नारद, प्राचीनबर्हि राजाला जीवेश्वरांचें तत्त्व निरूपण करून नंतर त्या राजाचा निरोप घेऊन तेथून सिद्धलोकास निघून गेला ॥ ८० ॥ नंतर तो प्राचीनबर्हि राजर्षिहि, प्रजांच्या पालनाविषयींचा पुत्रांना सांगण्याचा निरोप प्रधानमंडळाजवळच सांगून आपण तपश्चर्या करण्याकरितां कपिलाश्रमास (गंगा व समुद्र यांच्या संगमस्थानीं)

कथं सति तदाह । यदेति । चरितानुपभुक्तान् यतः कर्मणि सति । नन्वसंगस्य कुतः कर्म तत्राह । अविद्यायां सत्यामनात्मनो देहादेः कर्मणि बंधो भवति ॥ ७८ ॥ विश्वस्थित्यादयो

यदाक्षैश्चरितान् ध्यायन्कर्माण्याऽचिनुतेऽसकृत् ॥ सति कर्मण्यविद्यायां बंधः कर्मण्यनात्मनः ॥ ७८ ॥ अतस्तदपवादार्थं भज सर्वात्मना हरिम् ॥ पश्यंस्तदात्मकं विश्वं स्थित्युत्पत्त्यप्यया यतः ॥ ७९ ॥ मैत्रेय उवाच ॥ भागवतमुख्यो भगवान्नारदो हंसयोर्गतिम् ॥ प्रदर्श्य ह्यमुमामंत्र्य सिद्धलोकं ततोऽगमत् ॥ ८० ॥ प्राचीनबर्हीं राजर्षिः प्रजासर्गाभिरक्षणे ॥ आदिश्य पुत्रानगमत्तपसे कपिलाश्रमम् ॥ ८१ ॥ तत्रैकाग्रमना वीरो गोविंदचरणांबुजम् ॥ विमुक्तसंगोऽनुभजन्भक्त्या तत्साम्यतामगात् ॥ ८२ ॥ एतदध्यात्मपारोक्ष्यं गीतं देवर्षिणाऽनघ ॥ यः श्रावयेद्यः शृणुयात्स लिंगेन विमुच्यते ॥ ८३ ॥ एतन्मुकुंदयशसा भुवनं पुनानं देवर्षिवर्यमुखनिःसृतमात्मशौचम् ॥ यः कीर्त्यमानमधिगच्छति पारमेष्ठ्यं नास्मिन्भवे भ्रमति मुक्तसमस्तबंधः ॥ ८४ ॥ अध्यात्मपारोक्ष्यमिदं मयाधिगतमद्भुतम् ॥ एवं स्त्रियाश्रमः पुंसश्छिन्नोऽमुत्र च संशयः ॥ ८५ ॥

यतो हरेर्भवंति ॥ ७९ ॥ हंसयोर्जीवेश्वरयोः ॥ ८० ॥ पुत्रानादिश्येति पुत्राणामादेशं मंत्रिणामग्रे कथयित्वा । कपिलाश्रमं गंगासागरसंगमम् ॥ ८१ ॥ ८२ ॥ ८३ ॥ आत्मशौचं मनःशोधकं पारमेष्ठ्यं सर्वोत्कृष्टफलदम् ॥ ८४ ॥ स्त्रीबुद्धिस्तत्सहितस्याश्रमोऽहंकारश्छिन्नो भवति अमुत्र कर्मफलभोगः कथमिति संशयश्छिन्नः ॥ ८५ ॥

निघून गेला ॥ ८१ ॥ तेथें विषयांपासून इंद्रियें अंतर्मुख करून एकाग्रचित्त झालेला तो राजा, भगवंताच्या चरणकमलाचें सेवन करित होत्साता त्याच्या साम्यतेला पावला (मुक्त झाला) ॥ ८२ ॥ हे निष्पापा विदुरा, देवर्षि नारदानें परोक्षरीतीनें वर्णन केलेल्या ह्या आख्यानाचें जो पुरुष पठण करितो किंवा श्रवण करितो तो संसारास कारणभूत अशा लिंगशरीरापासून मुक्त होतो ॥ ८३ ॥ श्रीनारदाच्या मुखापासून निघालेलें, मनाची शुद्धि करणारें, सर्वोत्कृष्ट फल देणारें व मुक्तिदात्या भगवंताच्या संसारोद्धारकर्तेंकरून प्रसिद्ध असलेल्या महात्म्यानें युक्त व जगताला पवित्र करणारें अशा ह्या आख्यानाचें वर्णन चाललें असतां जो पुरुष श्रवणाच्या योगेंकरून तें आपल्या हृदयामध्यें धारण करितो तोहि सर्वबंधांपासून मुक्त होऊन या संसारामध्यें भ्रमण पावत नाहीं. तर मुक्तच होतो ॥ ८४ ॥ हे विदुरा, परोक्षरीतीनें वर्णन केलेलें हें अध्यात्मविषयक कथानक, मी गुरूपासून निःसंशयपणें श्रवण केलें होतें, तें तुला सांगितलें आहे. याप्रमाणें बुद्धियुक्त पुरुषाचा अहंकार (संसारभ्रमणक्लेश) व तसाच याला परलोकीं कर्मफलाचा

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

उपभोग कसा प्राप्त होतो याबद्दलचा संशय निरस्त झाला आहे ॥ ८५ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील चतुर्थस्कंधामध्यें प्राचीनबर्हिनारदसंवादरूप हा एकुणतिसावा अध्याय समाप्त झाला ॥ २९ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ एकुणतिसाव्या अध्यायापर्यंत पांच अध्यायांनीं प्रसंगानें प्राप्त झालेलें प्राचीनबर्हि राजाचें चरित्र सांगितलें. आतां कथाप्रसंगानें प्रस्तुत प्राप्त झालेलें जें प्रचेत्यांचें चरित्र तें दोन अध्यायांनीं वर्णन करितात ॥ १ ॥ त्यांमध्यें या तिसाव्या अध्यायांत तपश्चर्येच्या योगानें संतुष्ट झालेल्या परमेश्वरापासून वर प्राप्त झालेले ते प्रचेते, त्या स्थानापासून आपल्या घरीं येऊन वृक्षांच्या कन्येला वरून राज्य करूं लागले. अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ २ ॥ विदुर ह्मणाला—हे ब्रह्मनिष्ठ मैत्रेय ऋषे, तूं जे पूर्वीं प्राचीनबर्हि राजाचे पुत्र प्रचेते ह्मणून मला सांगितलेस ते, रुद्रानें वर्णन केलेल्या योगादेशनामक स्तोत्राच्या योगेंकरून हरीला संतुष्ट करून कोणत्या सिद्धीला पावले ? ॥ १ ॥ हे बृहस्पतिशिष्या मैत्रेया, त्या प्रचेत्यांना कांहीं सुदैवानें शंकराचें दर्शन झालें असतां, त्या

इति चतुर्थे टीकायामेकोनत्रिंशोऽध्यायः ॥ २९ ॥ ॥ प्रसंगात्पंचभिः प्रोक्तं वृत्तं प्राचीनबर्हिषः ॥ वर्ण्यते च पुनर्द्वाभ्यां प्रस्तुतं तत्प्रचेतसाम् ॥ १ ॥ तत्र त्रिंशे तपस्तुष्टादीशाल्लब्धवरास्ततः ॥ आगत्य वार्क्षीमुद्वाह्य राज्यं चक्रुरितीर्यते ॥ २ ॥ हरिं प्रतोष्य कां सिद्धिमापुः ॥ १ ॥ हेबार्हस्पत्य कस्यांचिद्धिद्यायां बृहस्पतेर्मैत्रेयः शिष्य इति ज्ञातव्यम् ।

॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे चतुर्थस्कंधे विदुरमैत्रेयसंवादे प्राचीनबर्हिर्नारदसंवादो नाम एकोनत्रिंशोऽध्यायः ॥ २९ ॥ ॥ विदुर उवाच ॥ ये त्वयाऽभिहिता ब्रह्मन्सुताः प्राचीनबर्हिषः ॥ ते रुद्रगीतेन हरिं सिद्धिमापुः प्रतोष्य काम् ॥ १ ॥ किं बार्हस्पत्येह परत्र वाथ कैवल्यनाथप्रियपार्श्ववर्तिनः ॥ आसाद्य देवं गिरिशं यदृच्छया प्रापुः परं नूनमथ प्रचेतसः ॥ २ ॥ मैत्रेय उवाच ॥ प्रचेतसोऽतरुदधौ पितुरादेशकारिणः ॥ जपयज्ञेन तपसा पुरंजनमतोषयन् ॥ ३ ॥ दशवर्षसहस्रांते पुरुषस्तु सनातनः ॥ तेषामाविरभूत्कृच्छ्रं शांतेन शमयन्रुचा ॥ ४ ॥ सुपर्णस्कंधमारूढो मेरुशृंगमिवांबुदः ॥ पीतवासा मणिग्रीवः कुर्वन्वितिमिरा दिशः ॥ ५ ॥ काशिष्णुना कनकवर्णविभूषणेन भ्राजत्कपोलवदनो विलसत्किरीटः ॥ अष्टायुधैरनुचरैर्मुनिभिः सुरेंद्रैरासेवितो गरुडकिन्नरगीतकीर्तिः ॥ ६ ॥

ते यदृच्छया गिरिशं प्राप्य तस्यैव कैवल्यनाथप्रियस्य गिरिशस्य पार्श्ववर्तिनस्तदनुग्रहीताः संतो नूनं परं मोक्षं प्रापुरेव ततः पूर्वं त्विहाथवा परत्र किं प्रापुः ॥ २ ॥ रुद्रगीतजपरूपेण यज्ञेन तपसा च । पुरंजनं हरिम् ॥ ३ ॥ तेषां कृच्छ्रं तपःक्लेशं रुचा कांत्या शमयन् शांतेन शुद्धसत्त्वेन वपुषा आविर्भूतः ॥ ४ ॥ सुपर्णस्कंधमारूढ इत्यादीनां बर्हिष्मतः सुतानाहेति तृतीयेनान्वयः ॥५॥ कनकमयेन वर्णवता विभूषणेन भ्राजमानं कपोलं वदनं च यस्य अष्टभिरायुधैः गरुड एव किन्नरस्तेन पक्षस्वनैर्गीता कीर्तिर्यस्य ॥६॥

शंकरानें अनुग्रह केलेल्या त्यांना मोक्ष तर निःसंशय प्राप्त झालाच असेल परंतु त्याच्या पूर्वीं या लोकीं किंवा परलोकीं त्यांना काय फल प्राप्त झालें ? हें मला सांग ॥ २ ॥ मैत्रेय ह्मणाला—हे विदुरा, पित्याच्या आज्ञेप्रमाणें वागणाऱ्या त्या प्रचेत्यांनीं रुद्रगीताच्या जपरूप यज्ञाच्या योगेंकरून व आहारसंकोचादिक तपाच्या योगेंकरून भगवंताला संतुष्ट करण्याचा क्रम चालविला ॥ ३ ॥ अशाप्रकारें दहा हजार वर्षें निघून गेलीं असतां, नंतर पुराण पुरुष भगवान्, शुद्धसत्त्वमयमूर्ति धारण करून आपल्या कांतीच्या योगानें, त्यांचे तपःसंबंधी क्लेश दूर करित होत्साता त्यांच्याजवळ प्रगट झाला ॥ ४ ॥ तो मेरुपर्वताच्या शिखरावर आरूढ झालेल्या मेघाप्रमाणें गरुडाच्या स्कंधावर बसला होता, तो पिंवळा पीतांबर धारण करणारा, कंठामध्यें कौस्तुभ मणि धारण करणारा व आपल्या कांतीनें दश दिशा प्रकाशयुक्त करणारा होता ॥ ५ ॥ ज्याचे गाल व मुख हीं, देदीप्यमान व हिरव्या, पिंवळ्यावगैरे अनेक वर्णांच्या रत्नांनीं जडित अशा सुवर्णाच्या कुंडलादिक अलंकारांनीं शोभायमान दिसत होतीं. ज्याच्या म- ॥ ९९ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

स्तकीं तेजःपुंज किरीट होता, ज्याला आठ भुज असून त्या प्रत्येकाचेठिकाणीं धारण केलेलें एकेक आयुध होतें, पार्षद, मुनि व मोठमोठे देव, ज्याची सेवा करित होते, गरुडरूपी किंनर आपल्या पक्षांच्या शब्दांनीं ज्याची कीर्ति गात होता, पुष्ट व दीर्घ अशा आठ भुजांच्या समुदायामध्यें वक्षःस्थलावर असणाऱ्या लक्ष्मीनें जिच्या शोभेबरोवर स्पर्धा चालविली आहे अशा वनमालेनें परिवेष्टित आणि कृपापूर्वक अवलोकनानें युक्त असा तो आद्य पुरुष भगवान्, मेघासारख्या गंभीरनादाच्या वाणीनें आपल्याला शरण आलेल्या त्या प्राचीनबर्हि राजाच्या पुत्रांस ह्मणाला कीं, ॥ ६ ॥ ७ ॥ श्रीभगवान् ह्मणाला– हे राजपुत्र हो, ज्या अर्थीं तुह्मी एकमेकांच्या प्रेमानें भगवदाराधनरूप एकाच धर्माचेठिकाणीं तत्पर आहां, त्या अर्थीं तुमच्या सख्याच्या योगानें मी संतुष्ट झालों आहें. तुमचें कल्याण असो. तुह्मी माझ्यापासून वर मागून घ्या ॥ ८ ॥ जो मनुष्य, संध्याकाळीं प्रत्यहीं तुमचें स्मरण करील त्याला बंधूंचेठिकाणीं तसेंच सर्व प्राणिमात्रांचेठिकाणीं तुमच्यासारखें प्रेम उत्पन्न होईल ॥ ९ ॥

पीनाश्च ते आयता अष्टौ भुजास्तेषां मंडलं समूहस्तन्मध्ये स्थितया लक्ष्म्या स्पर्धमाना श्रीः शोभा यस्यास्तया वनमालया परिवृत आद्यः पुरुष आह । पर्जन्यस्य नाद इव रुतं नादो यस्यास्तया वाचा । सघृणोऽवलोको यस्य ॥ ७ ॥ यूयं मे मत्तो वृणीध्वम् । सौहार्देन हेतुना पृथग्धर्मो येषां तेषां संबोधनं वः परस्परं सौहृ-

पीनायताष्टभुजमंडलमध्यलक्ष्या स्पर्धच्छ्रिया परिवृतो वनमालयाऽऽद्यः ॥ बर्हिष्मतः पुरुष आह सुतान्प्रपन्नान्पर्जन्यनादरुतया सघृणावलोकः ॥ ७ ॥ श्रीभगवानुवाच ॥ वरं वृणीध्वं भद्रं वो यूयं मे नृपनंदनाः ॥ सौहार्देनापृथग्धर्मास्तुष्टोऽहं सौहृदेन वः ॥ ८ ॥ योऽनुस्मरति संध्यायां युष्माननुदिनं नरः ॥ तस्य भ्रातृष्वात्मसाम्यं तथा भूतेषु सौहृदम् ॥ ९ ॥ ये तु मां रुद्रगीतेन सायं प्रातः समाहिताः ॥ स्तुवंत्यहं कामवरान्दास्ये प्रज्ञां च शोभनाम् ॥ १० ॥ यद्यूयं पितुरादेशमग्रहीष्ट मुदान्विताः ॥ अथो व उशती कीर्तिर्लोकाननुभविष्यति ॥ ११ ॥ भविता विश्रुतः पुत्रोऽनवमो ब्रह्मणो गुणैः ॥ य एतामात्मवीर्येण त्रिलोकीं पूरयिष्यति ॥१२॥ कंडोः प्रम्लोचया लब्धा कन्या कमललोचना ॥ तां चापविद्धां जगृहुर्भूरुहा नृपनंदनाः ॥ १३ ॥

देन तुष्टोऽहम् ॥ ८ ॥ भूतेषु सौहृदं च भविष्यति ॥ ९ ॥ तेभ्यो दास्ये किं पुनर्युष्मभ्यमिति शेषः ॥ १० ॥ अग्रहीष्ट गृहीतवंतः । अथो इति हेतोः लोकाननु लोकेषु भविष्यति यद्वा लोकाननुभविष्यति द्रक्ष्यति व्याप्स्यतीत्यर्थः ॥ ११ ॥ आत्मनो वीर्येण संतानेन ॥ १२ ॥ पुत्रार्थमादौ भार्यां संपादयति । भगवान् कंडोरिति त्रिभिः । तपोनाशार्थमिंद्रप्रेषितया प्रम्लोचया कंडुर्नाम ऋषिर्बहुकालं रेमे । सा च ततः स्वर्गं गच्छंती कंडोर्जातं गर्भं वृक्षेषु त्यक्त्वा जगाम । तदेतदुक्तम् । अपविद्धां त्यक्ताम् ॥ १३ ॥

आणि जे पुरुष एकाग्रचित्त होऊन सायंकाळीं व प्रातःकाळीं या रुद्रगीतानें माझी स्तुती करितील त्यांनाहि मी संतुष्ट होऊन इच्छित विषयभोग व उद्धाराविषयीं योग्य अशी बुद्धि देईन; मग तुह्मांला देईन यांत संशय काय आहे? ॥ १० ॥ ज्याअर्थीं तुह्मी आनंदयुक्त होऊन पित्याच्या प्रजावृद्धि करण्याबद्दलच्या आज्ञेचा स्वीकार केलात त्याअर्थीं तुमची उत्तम कीर्ति लोकांना व्यापून राहील ॥ ११ ॥ हे राजपुत्र हो, सत्कीर्ति इत्यादिक गुणांच्या योगेंकरून ब्रह्मदेवाहून कांहीं कमी नाहीं व लोकांमध्यें प्रख्यात असा तुह्मांला एक पुत्र होईल व तो आपल्या संततीच्या योगानें हें त्रैलोक्य भरून टाकील ॥ १२ ॥ हे राजपुत्र हो, पूर्वीं तपाच्या नाशाकरितां इंद्रानें पाठविलेल्या प्रम्लोचानामक अप्सरेसहवर्तमान कंडुनामक ऋषीनें बहुत काळपर्यंत क्रीडा केली. नंतर स्वर्गावर जाणारी ती अप्सरा, कंडुऋषीपासून आपणास झालेल्या कन्येचा वृक्षांच्या झाडीमध्यें त्याग करून निघून गेली. तेव्हां तिनें टाकलेल्या त्या कमळासारखे नेत्र असलेल्या (सर्वसौंदर्ययुक्त) कन्येचा वृक्षांनींच स्वीकार केला आहे

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्मणजे वृक्षांचींच फळेंवगैरे भक्षण करून ती त्या झाडींत राहिली आहे ॥ १३ ॥ ऐके वेळीं तीं कन्या क्षुधेनें पीडित होऊन रोदन करूं लागली असतां, सर्व वनस्पतींचा राजा जो सोम, तो दयायुक्त होऊन त्यानें अमृत स्रवणारी आपली तर्जनी (हाताची बोटी) तिच्या मुखामध्यें घातली होती. मिळून अप्सरेपासून झालेली, अमृतपान घडलेली व अतिलावण्ययुक्त अशी ती कन्या आहे ॥ १४ ॥ आणि तुह्मी तर माझा परमभक्त जो तुमचा पिता प्राचीनबर्हि राजा त्यानें पुत्रादिकांच्या उत्पत्तीविषयीं आज्ञा केलेले आहां, यास्तव त्या सर्वलावण्ययुक्त कन्येला लवकर (दुसऱ्या कोणी वरिली नाहीं तोंपर्यंत) वरा ॥ १५ ॥ आतां ती एकच सर्वांची भार्या कशी होईल? असें ह्मणाल तर हे--राजपुत्रहो, तुमचे सर्वांचे धर्म आणि स्वभाव एकसारखे आहेत ह्मणून तुह्मां सर्वांचीही पत्नी ती सुंदरी होवो. कारण, तिचे हि धर्म व स्वभाव तुह्मांशीं

स प्रसिद्धो वनस्पतीनां राजा सोमोऽमृतस्राविणीं देशिनीं तर्जनीं रुदत्यास्तस्या मुखे निदधे । अनेनाप्सरोगर्भसंभवेनामृताहारेण च तस्या लावण्यं क्लमस्वेददौर्गंध्यादिराहित्यं चोक्तम् ॥ १४ ॥ मामनुवर्तमानेन पित्रा नियुक्ताः संतस्तत्र प्रजाविसर्गे निमित्ते तामुद्वहत ॥ १५ ॥ ननु बहूनां कथमेका भार्या स्यात्तत्राह । अपृथग्धर्मः शीलं येषां तेषां वः पत्नी भूयात् । अर्पितो भवत्सु आशयो यया धर्मशीलयोरैक्यान्मद्वाक्याच्च न दृष्टादृष्टविरोध इति भावः ॥ १६ ॥ अहतौजसोऽप्रतिहतबलाः संतः ॥ १७ ॥ पक्वगुणो

क्षुत्क्षामाया मुखे राजा सोमः पीयूषवर्षिणीम् ॥ देशिनीं रोदमानाया निदधे स दयान्वितः ॥ १४ ॥ प्रजाविसर्ग आदिष्टाः पित्रा
मामनुवर्तता ॥ तत्र कन्यां वरारोहां तामुद्वहत मा चिरम् ॥ १५ ॥ अपृथग्धर्मशीलानां सर्वेषां वः सुमध्यमा ॥ अपृथग्धर्मशीले-
यं भूयात्पत्न्यर्पिताशया ॥ १६ ॥ दिव्यवर्षसहस्राणां सहस्रमहतौजसः ॥ भौमान्भोक्ष्यथ भोगान्वै दिव्यांश्चानुग्रहान्मम ॥ १७ ॥
अथ मय्यनपायिन्या भक्त्या पक्वगुणाशयाः ॥ उपयास्यथ मद्धाम निर्विद्य निरयादतः ॥ १८ ॥ गृहेष्वाविशतां चापि पुंसां
कुशलकर्मणाम् ॥ मद्वार्तायातयामानां न बंधाय गृहा मताः ॥ १९ ॥ नव्यवद्धृदये यज्ज्ञो ब्रह्मैतद्ब्रह्मवादिभिः ॥ न मुह्यंति न शो-
चंति न हृष्यंति यतो गताः ॥ २० ॥

दग्धकामादिमल आशयो येषाम् । अतो लोकद्वयभोगान्निरयप्रायान्निर्विद्य मत्स्थानं प्राप्स्यथ ॥ १८ ॥ ननु गृहेषु प्रविष्टानामस्माकं तदासक्त्या बंध एव स्यात्कुतस्त्वद्भक्ति-निर्वेदो वा तत्राह । गृहेष्विति । कुशलं मय्यर्पितं कर्म येषाम् । मद्वार्तया यातो यामः कालो येषाम् ॥ १९ ॥ त्वद्वार्ताश्रोतॄणां गृहैर्न बंध इति कुतस्तत्राह । नव्यवदिति । यद्यस्मात्कथाश्रवणात् ज्ञः सर्वज्ञोऽहमीश्वरो ब्रह्मवादिभिः प्रवक्तृभिर्निमित्तभूतैः श्रोतॄणां हृत् हृदयं नव्यवत्प्रतिपदं नूतनवत् अये प्राप्नोमि ब्रह्मसाक्षात्कारो भवतीत्यर्थः । ननु

पूर्णपणें जुळत असून तिनें आपलें अंतःकरण तुह्मांला अर्पण केलेलें आहे. एतावता सर्वप्रकारें तुमच्याशीं तिचें ऐक्य असल्यामुळें व मीच प्रत्यक्ष तुह्मांला सांगत असल्यामुळें तुमच्या ह्या विवाहांत दृष्टादृष्टसंबंधी विरोध मुळींच यावयाचा नाहीं ॥ १६ ॥ आतां तुह्मी माझ्या अनुग्रहेंकरून देवांचीं सहस्र वर्षें, सहस्र वेळां जात तोंपर्यंत अकुंठितबल होत्साते भूमीवरील व स्वर्गांतील भोगांचे उपभोग घ्या ॥ १७ ॥ नंतर माझेठिकाणीं एकनिष्ठ भक्तीच्या योगेंकरून तुमच्या अंतःकरणांतील कामादिक सर्व मळ जळून जातील व तुह्मी इहलोक व परलोकसंबंधी नरकतुल्य विषयभोगांपासून विरक्त होऊन माझ्या स्थानाला पावाल ॥ १८ ॥ कारण, ज्यांचा काळ माझ्या कथेनेंच जात असतो व ज्यांचें कर्म माझ्याठिकाणींच अर्पण होत असतें ते पुरुष, जरी गृहस्थाश्रमी असले तथापि त्यांचे ते गृहस्थाश्रम, त्यांच्या बंधाला कारण होत नाहींत ॥ १९ ॥ याचें कारण, तशा गृहस्थाश्रमी पुरुषांना साधूंचा समागम घडतो मग त्या साधूंनीं वर्णन केलेल्या कथेच्या श्रवणेंकरून त्या श्रोत्यांच्या हृद- ॥१००॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

यामध्यें सर्वज्ञ ईश्वर मी, पदोपदीं नव्या नव्यासारखा प्रविष्ट होतों. ह्मणजे त्यांना ब्रह्मसाक्षात्कार होतो. कारण जो मी हेंच ब्रह्म आहे, दुसरें काहीं नाहीं. ह्मणून त्या मजप्रत प्राप्त झालेल्या पुरुषांना, मोह, शोक व हर्ष हीं मुळींच प्राप्त होत नाहींत ॥ २० ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, याप्रमाणें पुरुषार्थ देणारा जनार्दन भगवान् भाषण करित असतां, त्याच्या दर्शनानें ज्यांच्या तमोगुण संबंधी व रजोगुणसंबंधी मळांचें निरसन झालें आहे असे ते प्रचेते, हात जोडून त्या परम हितकर्त्या भगवंताची सद्गदित वाणीच्या योगेंकरून स्तुति करूं लागले ॥ २१ ॥ प्रचेते ह्मणाले– हे देवा, भक्तांचे क्लेश दूर करणाऱ्या तुजकारणें नमस्कार असो. ज्या तुझे भक्तवात्सल्यादिक गुण व नांवें वेदांनीं सर्व पुरुषार्थांचें साधन ह्मणून निरूपण केलीं आहेत, ज्या तुझा वेग मन आणि वाणी यांच्या वेगापेक्षांहि पलीकडे आहे आणि ज्या तुझा मार्ग, सर्व इंद्रियांच्या मार्गांनीं जाणला जात नाहीं त्या तुजकारणें नमस्कार असो ॥ २२ ॥ जो तूं स्वरूपस्थितीनें शुद्ध असल्यामुळें शांत आहेस, व मन हें निमित्त असलें ह्मणजे, ज्या तुझे-

---

त्वत्कथाश्रवणे कथं ब्रह्मसाक्षात्कारस्तत्राह । योऽहमेतदेव ब्रह्म। तत्र हेतुः । यतो गताः यं मां प्राप्ताः संतो मोहशोकहर्षान्न प्राप्नुवंत्यतो मत्कथाश्रवणेन नव्यवन्मम हृद्याविर्भावादस्यैव ब्रह्मसाक्षात्कारत्वाद्गृहेषु वसतामपि न बंध इत्यर्थः ॥ २० ॥ पुरुषार्थं भाजयति प्रापयतीति तथा तम् ॥ २१ ॥ वेदैः सकलश्रेयःसाधनत्वेन निरूपिता उदारगुणा

मैत्रेय उवाच ॥ एवं ब्रुवाणं पुरुषार्थभाजनं जनार्दनं प्रांजलयः प्रचेतसः ॥ तद्दर्शनध्वस्ततमोरजोमला गिरा गृणन्गद्गदया सुहृत्तमम्
॥ २१ ॥ प्रचेतस ऊचुः ॥ नमो नमः क्लेशविनाशनाय निरूपितोदारगुणाह्वयाय ॥ मनोवचोवेगपुरोजवाय सर्वाक्षमार्गैरगताध्वने
नमः ॥ २२ ॥ शुद्धाय शांताय नमः स्वनिष्ठया मनस्यपार्थं विलसद्द्वयाय ॥ नमो जगत्स्थानलयोदयेषु गृहीतमायागुणविग्रहाय
॥ २३ ॥ नमो विशुद्धसत्त्वाय हरये हरिमेधसे ॥ वासुदेवाय कृष्णाय प्रभवे सर्वसात्वताम् ॥ २४ ॥ नमः कमलनाभाय नमः
कमलमालिने ॥ नमः कमलपादाय नमस्ते कमलेक्षण ॥ २५ ॥ नमः कमलकिंजल्कपिशंगामलवाससे ॥ सर्वभूतनिवासाय नमोऽ-
ऽयुंक्ष्महि साक्षिणे ॥ २६ ॥

आह्वया नामानि च यस्य मनोवचसोर्वेगादपि पुरोऽग्रतो जवो वेगो यस्य मनोवचसोरगोचरायेत्यर्थः । अतएव सर्वेषामक्षाणां मार्गैरगतोऽनवगतोऽध्वा यस्य तस्मै ते नमः ॥ २२ ॥ स्वनिष्ठया स्वरूपस्थित्या शुद्धाय अतः शांताय मनसि निमित्ते सत्यपार्थं व्यर्थमेव विलसद्विस्फुरितं द्वयं यस्मिन् । गृहीता मायागुणैर्विग्रहा ब्रह्मादिमूर्तयो येन ॥ २३ ॥ स्वतस्तु विशुद्धसत्त्वरूपाय संसारं हरति मेधा ज्ञानं यस्य तस्मै ॥ २४ ॥ २५ ॥ अयुंक्ष्महि कृतवंतो वयम् ॥ २६ ॥

ठिकाणीं वस्तुतः मिथ्याभूत असलेलें हें द्वैत (एकाचा निग्रह करणें व एकावर अनुग्रह करणें इत्यादिक) स्फुरण पावतें. त्या तुजकारणें नमस्कार असो. जगाचें पालन प्रलय व उत्पत्ति यांविषयीं ज्या तूं मायेच्या सत्त्वादिक गुणांच्या योगेंकरून विष्णु, रुद्र व ब्रह्मदेव यांचीं स्वरूपें धारण केलीं आहेस, त्या तुला नमस्कार असो ॥ २३ ॥ तूं विशुद्धसत्त्वमूर्ति, व भक्तदुःखनिवारक आहेस. तुझें ज्ञान संसाराचा नाश करणारें आहे तूं सर्व यादवांचा पाळक असून वसुदेवाच्या पुत्रत्वेंकरून प्रसिद्ध आहेस; त्या तुज कृष्णाला नमस्कार असो ॥ २४ ॥ ज्या तुझ्या नाभीपासून ब्रह्मांडात्मक कमल उत्पन्न झालें, त्या तुला नमस्कार असो. ज्या तूं आपल्या कंठांत कमळांची माळा धारण केली आहेस त्या तुला नमस्कार असो. ज्या तुझे चरण, कमळासारखे कोमळ आहेत त्या तुला नमस्कार असो. ज्या तुझीं नेत्रें कमळासारखीं आहेत अशा हे देवा, तुला आह्मी नमस्कार करितों ॥ २५ ॥ तुझीं वस्त्रें, कमळाच्या केसरांप्रमाणें पिंवळवर्ण असून स्वच्छ आहेत, तुला नमस्कार असो. तूं सर्व भूतांचें निवासस्थान व सर्व-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

साक्षी आहेस तुला आह्मी नमस्कार करितों ॥ २६ ॥ हे भगवन्, तूं अज्ञानादिक क्लेशांनीं व्याप्त झालेल्या आमच्या सर्व क्लेशांचा नाश करणारें हें रूप प्रगट केलें आहेस. ह्याहून दुसरी आह्मांवर कृपा ती करावयाची कोणती ? ॥ २७ ॥ हे अमंगलनाशका, योग्यसमयीं ' हे आमचे आहेत ', अशा कृपाबुद्धीनें जें दीनांचें स्मरण करणें एवढेंच दीनवत्सल समर्थ पुरुषांचें कर्तव्य कर्म होय. तूं तर तें करून शिवाय आह्मांला दर्शनेहि दिलें आहेस, तेव्हां तुझा आह्मांवर अत्यंत अनुग्रह आहे ॥ २८ ॥ कारण, समर्थांनीं ज्यांचें स्मरण ठेविलेलें असतें ते प्राणी, जरी अगदीं क्षुल्लक असले तरी देखील त्यांच्या सर्व क्लेशांची निवृत्ति होऊन त्यांना परमानंदाची प्राप्ति होतये. हे देवा, आमचा मनोरथ तर तूं जाणलाच आहेस. कारण, क्षुल्लक प्राण्यांच्याहि हृदयामध्यें अंतर्यामित्वेंकरून राहणारा तूं, त्यांचे मनोरथ जाणतोस, मग तुझी उपासना करणाऱ्या

यदुक्तं वरं वृणीध्वमिति तन्मनसि निधायाहुः । रूपमिति । समस्तानां क्लेशानां संक्षयो यस्मात् नः आविष्कृतं प्रकटितम् । अतोऽन्यत्किमनुकंपितमनुकंपा इयमेवास्माकं परमानुकंपेत्यर्थः ॥ २७ ॥ कुत इत्यत आह । हे अभद्ररंधनामंगलनाशन त्वप्रत्ययोऽत्र न विवक्षितः । एतावदेव दीनेषु वत्सलैः प्रभुभिर्भाव्यं कार्यम् । किं तत्तदाह । यदिति । अस्मदीया एत इति बुद्ध्या उचिते कालेऽनु स्मर्येत इति यत् । त्वया तु रूपमपि दर्शितमिति भावः ॥ २८॥ येनानुस्मरणेन स्मृतानां तेषामुपशांतिः सुखं भवति । किंच । क्षुल्लकानामपि भूतानामंतर्हृदयेंऽतर्हितोंऽतर्यामित्वेन स्थितो भवानीहतामिच्छतां त्वदुपासकानां नोऽस्माकमाशिषः कस्माद्धेतोर्न वेद जानात्येवेत्यर्थः ॥२९॥ तथापि वक्तव्यं चेत्तर्हि येषामस्माकं भगवान्प्रसन्नोऽसावेव वरः भगवत्प्रसाद एवास्माकमीप्सितो वर इत्यर्थः । अपवर्गगुरुर्मोक्षमार्गप्रदर्शकः गतिः स्वतश्च पुरुषार्थभूतः ॥ ३० ॥ यद्यप्येवं तथापि हेनाथ त्वत्त्वत्तो वरमेकं वृणीमहे । कथंभूतात् । परतः कारणादपि परात् । अक्षरात्परतः पर इति श्रुतेः । अतो यद्यपि त्वं दातुं समर्थो न च देयानां त्वद्विभूतीनामंतोऽस्ति यतोऽनंतविभूतित्वादनंत इति गीयसे ॥ ३१ ॥ तथापि यथा सारंगो भ्रमरः पारिजाते सुखेन लब्धे सति सुलभमप्यन्यद्वृक्षांतरं न सेवते तथा वयमपि साक्षात्त्वदंघ्रिमूलं प्राप्य किंकिं वृणीमहि न किंचि-

रूपं भगवता त्वेतदशेषक्लेशसंक्षयम् ॥ आविष्कृतं नः क्लिष्टानां किमन्यदनुकंपितम् ॥ २७ ॥ एतावत्त्वं हि विभुभिर्भाव्यं दीनेषु वत्सलैः ॥ यदनुस्मर्यते काले स्वबुद्ध्याऽभद्ररंधन ॥ २८ ॥ येनोपशांतिर्भूतानां क्षुल्लकानामपीहताम् ॥ अंतर्हितोंऽतर्हृदये कस्मान्नो वेद नाशिषः ॥ २९ ॥ असावेव वरोऽस्माकमीप्सितो जगतः पते ॥ प्रसन्नो भगवान्येषामपवर्गगुरुर्गतिः ॥ ३० ॥ वरं वृणीमहेऽथापि नाथ त्वत्परतः परात् ॥ नह्यंतस्त्वद्विभूतीनां सोऽनंत इति गीयसे ॥ ३१ ॥ पारिजातेंऽजसा लब्धे सारंगोऽन्यन्न सेवते ॥ त्वदंघ्रिमूलमासाद्य साक्षात्किं किं वृणीमहि ॥ ३२ ॥

आमचे मनोरथ तूं, कसे बरें जाणणार नाहींस ? तर जाणतच आहेस ॥ २९ ॥ आतां आमच्या मुखानें ऐकावें असें असेल तर हे जगत्पालका, मोक्षमार्ग दाखविणारा आणि स्वतः पुरुषार्थरूपी असा भगवान् तूं, ज्या आह्मांला प्रसन्न झालास त्या आह्मांला हाच इष्ट वर आहे, ह्मणजे भगवत्प्रसाद हाच आह्मांला वर पाहिजे होता ॥ ३० ॥ तथापि हे ईश्वरा, प्रकृतिरूप कारणाहूनही पर अशा तुजपासून आह्मी एक वर मागून घेतों. हे देवा, तुझ्या विभूतींचा अंत नाहीं ह्मणून लोक तुला अनंत असें ह्मणतात. यावरून तूं पाहिजे तें देण्यास समर्थ आहेस मागण्याजोग्या संपत्तीहि पुष्कळ आहेत तथापि ॥ ३१ ॥ भ्रमराला अनायासानें पारिजातक वृक्ष (कल्पवृक्ष) प्राप्त झाला असतां तो जसा दुसऱ्या वृक्षाचा आश्रय करित नाहीं, त्याप्रमाणें तुझ्या कृपेनें आह्मांला तुझें चरणसामीप्य प्राप्त झालें असतां, दुसरें आह्मी काय काय बरें मागावें ? कांहींच मागूं नये ॥३२॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तस्मात् एवढीच आमची प्रार्थना आहे कीं, तुझ्या मायेनें मोहित झालेले आह्मी, आपल्या कर्मांच्या योगेंकरून या संसारामध्यें जोंपर्यंत भ्रमण करित आहों तोंपर्यंत प्रत्येक जन्मांमध्यें आह्मांला तुझ्या भक्तांची संगति घडो ॥ ३३ ॥ राज्यभोग, स्वर्ग किंवा मोक्ष यांचा त्याग करून, तुह्मी काय ह्मणून ही प्रार्थना करितां, असें ह्मणशील तर–हे भगवन्, तुझ्याठिकाणीं रत असणाऱ्या साधूंच्या समागमाच्या एका क्षणाच्याहि बरोबरीनें आह्मी स्वर्गाची किंवा मोक्षाचीहि तुलना करीत नाहीं, मग त्याच्या-पुढें मनुष्यांच्या राज्यभोगादि सुखांचा तर पाड काय आहे? ॥ ३४ ॥ ज्या भगवद्भक्तांच्या समाजामध्यें विषयभोगसंबंधीं तृष्णेला शांत करणाऱ्या शुद्ध भगवत्कथांचें वर्णन चाललेलें असतें, जेथें सर्व प्राणिमात्रांविषयीं वैरभाव मुळींच राहत नाहीं, जेथें कोणत्याहि प्रकारचें भय असत नाहीं ॥ ३५ ॥ जेथें निरपेक्ष भगवद्भक्त, सत्कथांमध्यें

दित्यर्थः । यद्वा । किमप्यन्यत्तुच्छं किमर्थं वृणीमहि यद्वा यदि वृणीमहि तर्हि किंकिं वृणीमहि । अनंतत्वेन मनोरथानामनवस्थानादित्यर्थः ॥ ३२ ॥ अतएतावदेव प्रार्थयाम इत्याहुः । यावदिति । स्पृष्टा व्याप्ताः भवति प्रकृष्टः संगो येषां तेषां संगोऽस्माकं स्यात् ॥ ३३ ॥ ननु राज्यभोगान्स्वर्गापवर्गौ च विहाय किमिदं प्रार्थ्यते तत्राहुः । तुलया-मेति भगवत्संगिनां संगस्य लवेनापि ॥ ३४ ॥ सत्संगस्य श्रैष्ठ्यं प्रपंचयति । यत्रेति त्रिभिः । यत्र येषु यतो याभ्यः कथाभ्यः निर्वैरं वैराभावः उद्वेगो भयम् ॥ ३५ ॥

यावत्ते मायया स्पृष्टा भ्रमाम इह कर्मभिः ॥ तावद्भवत्प्रसंगानां संगः स्यान्नो भवे भवे ॥ ३३ ॥ तुलयाम लवेनापि न स्वर्गं नापुन-र्भवम् ॥ भगवत्संगिसंगस्य मर्त्यानां किमुताशिषः ॥ ३४ ॥ यत्रेड्यंते कथा मृष्टास्तृष्णायाः प्रशमो यतः ॥ निर्वैरं यत्र भूतेषु नो-द्वेगो यत्र कश्चन ॥ ३५ ॥ यत्र नारायणः साक्षाद्भगवान्न्यासिनां गतिः ॥ संस्तूयते सत्कथासु मुक्तसंगैः पुनः पुनः ॥ ३६ ॥ तेषां विचरतां पद्भ्यां तीर्थानां पावनेच्छया ॥ भीतस्य किं न रोचेत तावकानां समागमः ॥ ३७ ॥ वयं तु साक्षाद्भगवन्भवस्य प्रियस्य सख्युः क्षणसंगमेन ॥ सुदुश्चिकित्सस्य भवस्य मृत्योर्भिषक्तमं त्वाद्य गतिं गताः स्म ॥ ३८ ॥ यन्नः स्वधीतं गुरवः प्रसादिता वि-प्राश्च वृद्धाश्च सदानुवृत्त्या ॥ आर्या नताः सुहृदो भ्रातरश्च सर्वाणि भूतान्यनसूययैव ॥ ३९ ॥ यन्नः सुतप्तं तप एतदीश निरंध-सां कालमदभ्रमप्सु ॥ सर्वं तदेतत्पुरुषस्य भूम्नो वृणीमहे ते परितोषणाय ॥ ४० ॥

॥ ३६ ॥ पद्भ्यां पावनेच्छया संसाराद्भीतस्य ॥ ३७ ॥ सत्संगफलमस्माभिरेवानुभूतमित्याहुः । वयंत्विति । तव यः प्रियः सखा तस्य भवस्य । अत्यंतमचिकित्सस्य भवस्य जन्मनो मृत्योश्च भिषक्तमं सद्वैद्यं त्वां गतिं प्राप्ताः ॥ ३८ ॥ वरांतरं वृणते । यन्न इति द्वाभ्याम् । नता नमस्कृताः ॥ ३९ ॥ निरंधसां निरन्नानाम् । अदभ्रं बहुकालम् ।

संन्यासीलोकांचीहि परमगति अशा साक्षात् भगवान् नारायणाचें वारंवार स्तवन करित असतात व जे गंगादिक तीर्थांनासुद्धां पवित्र करण्याच्या इच्छेनें आपल्या पायांनीं भूमीवर संचार करित असतात त्या तुझ्या भक्तांचा समागम, संसारापासून, भ्यालेल्या जनाला कसा बरें आवडणार नाहीं? तर आवडेलच ॥ ३६ ॥ ३७ ॥ सत्संगाच्या फलाचा अनुभव तर आह्मीच घेत आहों पहा! हे भगवन् तुझा प्रियसखा जो शंकर त्याच्या एक क्षणभर झालेल्या समागमाच्या योगेंकरून, अतिप्रयत्ना-नेंहि निवृत्त होण्यास अशक्य अशा जन्ममरणरूप रोगाची निवृत्ति करणाऱ्या उत्तम वैद्यरूपी प्रत्यक्ष तुला आज आह्मी शरण प्राप्त झालों आहों ॥ ३८ ॥ असो. हे ईश्वरा, पूर्वी आह्मीं जें कांहीं उत्तमप्रकारें अध्ययन केलें असेल, तसेंच गुरु, ब्राह्मण व वृद्ध यांस नित्यसेवेच्या योगेंकरून प्रसन्न करून घेतलें असेल, अथवा श्रेष्ठ जनांना, मित्रांना बंधुजनांना आणि सर्व प्राणिमात्रांना, दोषबुद्धि सोडून शुद्धभावानें, वंदन केलें असेल ॥ ३९ ॥ तसेंच आतां अन्नसुद्धां वर्ज्य करून पुष्कळ वर्षेंपर्यंत

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

उदकामध्यें उभें राहून जें हें तप केलें आहे, तीं आमचीं सर्व कर्में, सर्वांतर्यामी व सर्वव्यापक अशा तुझ्या संतोषार्थ होवोत असाहि एक वर आह्मी तुजपासून मागून घेतों ॥ ४० ॥ स्वायंभुव मनु, ब्रह्मदेव, महासमर्थ शंकर तसेच 'तप आणि ज्ञान यांच्या योगानें ज्यांचें अंतःकरण शुद्ध झालें आहे असे दुसरे ' कितीएक पुरूष, तुझ्या महिम्याचा अंत जाणत नसतांहि ज्याअर्थीं यथामति तुझी स्तुति करितात त्याअर्थीं आह्मीहि आपली बुद्धि चालेल त्याप्रमाणें तुझीच स्तुति करितों ॥ ४१ ॥ हे भगवंता, तूं सर्वठिकाणीं शत्रुमित्रादि भेदरहित, निर्दोष, सर्वांतर्यामी सर्वोत्तम आहेस. यास्तव हे शुद्धसत्त्वरूपा वासुदेवा तुला वारंवार नमस्कार असो ॥ ४२ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, याप्रमाणें प्रचेत्यांनीं स्तुति केलेला, शरणागतवत्सल व अकुंठितशक्ति असा तो भगवान् हरि, संतुष्ट होऊन तथास्तु (तुह्मी जें मागितलें आहे तें तुह्मांस

ते परितोषणाय भवत्विति वृणीमहे ॥ ४० ॥ अज्ञानामप्यस्माकं त्वत्स्तुतिर्न्याय्येत्याहुः । मनुरिति यस्य तव महिम्नो न दृष्टं पारं यैस्तेऽपि त्वामात्मसमं स्वमत्यनुरूपं यथा स्तुवंति अथो अतो वयमपि गृणीमः ॥ ४१ ॥ सत्त्वमूर्तये वासुदेवाय ॥ ४२ ॥ यानं स्वप्रयाणमनिच्छतामपि सतां स्वधाम ययौ भक्तहृदयं विवेश । अनपवर्गवीर्योऽकुंठितप्र-

मनुः स्वयंभूर्भगवान्भवश्च येऽन्ये तपोज्ञानविशुद्धसत्वाः ॥ अदृष्टपारा अपि यन्महिम्नः स्तुवंत्यथो त्वात्मसमं गृणीमः ॥ ४१ ॥ नमः समाय शुद्धाय पुरुषाय पराय च ॥ वासुदेवाय सत्त्वाय तुभ्यं भगवते नमः ॥ ४२ ॥ मैत्रेय उवाच ॥ इति प्रचेतोभिरभिष्टुतो हरिः प्रीतस्तथेत्याह शरण्यवत्सलः ॥ अनिच्छतां यानमतृप्तचक्षुषां ययौ स्वधामानपवर्गवीर्यः ॥ ४३ ॥ अथ निर्याय सलिलात्प्रचेतस उदन्वतः ॥ वीक्ष्याकुप्यन्द्रुमैश्छन्नां गां गां रोद्धुमिवोच्छ्रितैः ॥ ४४ ॥ ततोऽग्निमारुतौ राजन्नमुंचन्मुखतो रुषा ॥ महीं निर्वीरुधं कर्तुं संवर्तक इवात्यये ॥ ४५ ॥ भस्मसात्क्रियमाणांस्तान्द्रुमान्वीक्ष्य पितामहः ॥ आगतः शमयामास पुत्रान्बर्हिष्मतो नयैः ॥ ४६ ॥ तत्रावशिष्टा ये वृक्षा भीता दुहितरं तदा ॥ उज्जन्हुस्ते प्रचेतोभ्य उपदिष्टाः स्वयंभुवा ॥ ४७ ॥

भावः ॥ ४३ ॥ उदन्वतः सिंधोः सलिलान्निर्याय निर्गत्य गां स्वर्गं रोद्धुमिवोच्छ्रितैर्द्रुमैर्गां महीं छन्नां वीक्ष्य द्रुमेभ्योऽकुप्यन् । तदाहि प्राचीनबर्हिषः प्रव्रजितत्वादराजके कर्षणाद्यभावात्द्रुमैर्भूमिश्छन्नाऽभूत् ॥ ४४ ॥ निरस्तो वीरुधोऽपि यस्यास्तथाभूतां कर्तुम् । संवर्तकः कालाग्निरुद्रः । अत्यये प्रलये ॥ ४५ ॥ नयैर्युक्तिभिः ॥ ४६ ॥ उज्जन्हुः समर्प-

---

प्राप्त होवो) असें ह्मणाला आणि त्याच्या दर्शनाविषयीं ज्यांचे नेत्र तृप्त झाले नव्हते असे ते प्रचेते त्याच्या गमनाची इच्छा करित नसतांहि तो आपल्या भक्तहृदयरूप स्थानाप्रत निघून गेला ॥ ४३ ॥ नंतर ते प्रचेते, सागराच्या उदकांतून बाहेर पडले तों आपल्या विस्तारानें स्वर्गाचा रोधच करित आहेत कीं काय ! अशा अतिरिक्त उंच वाढलेल्या वृक्षांनीं आच्छादित झालेल्या पृथिवीला अवलोकन करून त्यांना वृक्षांविषयीं क्रोध प्राप्त झाला ॥ ४४ ॥ नंतर, हे राजा, त्या प्रचेत्यांनीं प्रळयकाळींच्या कालाग्निरुद्रांप्रमाणें पृथिवीवरील सर्व वृक्ष व वल्लीही नाहींशा करून टाकण्याकरितां, आपल्या मुखांतून अग्नि व वायु सोडून दिले ॥ ४५ ॥ तेव्हां त्यांच्या योगानें जळून भस्म होत असलेल्या त्या वृक्षांस अवलोकन करून, ब्रह्मदेव त्याठिकाणीं प्राप्त झाला आणि त्यानें अनेक युक्तींनीं त्या प्राचीनबर्हि राजाच्या पुत्रांचें सांत्वन केलें ॥ ४६ ॥ तेव्हां त्या ठिकाणीं जे वृक्ष अवशेष राहिले होते त्यांनाही भीति होतीच ह्मणून त्यांनीं ब्रह्मदेवाच्या आज्ञेवरून आपली कन्या त्या प्रचेत्यांना अर्पण केली ॥ ४७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्या प्रचेत्यांनींहि ब्रह्मदेवाच्या आज्ञेवरून वृक्षांनीं दिलेल्या त्या मारिषानामक कन्येबरोबर विवाह करून घेतला. पुढें तिच्या उदरीं दक्ष जन्मास आला. ह्मणजे जो पूर्वी ब्रह्मपुत्र दक्षप्रजापति होता त्याला महादेवाच्या अपराधानें बोकडाचें मुख लागलें होतें, त्याच दक्षानें त्या आपल्या निंद्य देहाचा त्याग करून प्रचेत्यांच्या मारिषानामक पत्नीच्या उदरीं दुसरें जन्म ग्रहण केलें ॥ ४८ ॥ चाक्षुष मन्वंतर प्राप्त झालें तेव्हां, ज्याचा पूर्वदेह कालगतीनें नाहींसा झाला, तो प्रसिद्ध दक्ष हाच होय. ज्यानें परमेश्वराच्या प्रेरणेवरून आपल्या इच्छेप्रमाणें पुष्कळ प्रजा उत्पन्न केल्या होत्या ॥ ४९ ॥ ज्यानें झाला त्या वेळींच आपल्या कांतीनें सर्व तेजस्वी पुरुषांचें तेज फिकें पाडिलें आणि जो आपल्या कर्मांमध्यें निरंतर दक्ष असे ह्मणून त्याला सर्व लोक दक्ष असें ह्मणूं लागले ॥ ५० ॥ त्याला ब्रह्मदेवानें अभिषेक करून प्रजांची सृष्टि व रक्षण कर-

---

यामासुः ॥ ४७ ॥ मारिषां वार्क्षीम् । अजनयोनिर्ब्रह्मा तस्माज्जातो दक्षः । महतः श्रीमहादेवस्यावज्ञानात् पूर्वमजनयोनिजो ब्रह्मपुत्रोऽपि सन् क्षत्रियजातौ यस्यामजनि जातः ॥ ४८ ॥ प्राक्सर्गे पूर्वदेहे कालेन विद्रुते गते दैवेनेश्वरेण चोदितः सन्निष्टाः प्रजाः ससर्ज । स दक्ष इति प्रसिद्धः ॥ ४९ ॥ स्वया रुचा प्रभया तेज उपादत्त ाच्छादितवान् यं च कर्मदाक्ष्याद्दक्षमब्रुवन् ॥ ५० ॥ तमभिषिच्यानादिर्ब्रह्मा प्रजासर्गरक्षायां युयोज सच दक्षोऽन्यान्मरीच्यादींस्तत्तद्व्यापारेषु नियुक्तवान् ॥ ५१ ॥ इति चतुर्थे

ते च ब्रह्मण आदेशान्मारिषामुपयेमिरे ॥ यस्यां महदवज्ञानादजन्यजनयोनिजः ॥ ४८ ॥ चाक्षुषे त्वंतरे प्राप्ते प्राक्सर्गे कालविद्रुते ॥ यः ससर्ज प्रजा इष्टाः स दक्षो दैवचोदितः ॥ ४९ ॥ यो जायमानः सर्वेषां तेजस्तेजस्विनां रुचा ॥ स्वयोपादत्त दाक्ष्याच्च कर्मणां दक्षमब्रुवन् ॥ ५० ॥ तं प्रजासर्गरक्षायामनादिरभिषिच्य च ॥ युयोज युयुजेऽन्यांश्च स वै सर्वप्रजापतीन् ॥ ५१ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे चतुर्थस्कंधे त्रिंशोऽध्यायः ॥ ३० ॥ ॥ मैत्रेय उवाच ॥ तत उत्पन्नविज्ञाना आश्वधोक्षजभाषितम् ॥ स्मरंत आत्मजे भार्यां विसृज्य प्राव्रजन्गृहात् ॥ १ ॥ दीक्षिता ब्रह्मसत्रेण सर्वभूतात्ममेधसा ॥ प्रतीच्यां दिशि वेलायां सिद्धोऽभूद्यत्र जाजलिः ॥ २ ॥

टीकायां त्रिंशोऽध्यायः ॥ ३० ॥ ॥ एकत्रिंशे सुते दक्षे धुरं न्यस्य वने सताम् । नारदोक्तेन मार्गेण मुक्तिरुक्ता प्रचेतसाम् ॥ १ ॥ ततो दिव्यवर्षसहस्राणां सहस्रस्यांते उत्पन्नविवेकज्ञानास्ते । उपयास्यथ मद्धाम निर्विंद्यनिरयादत इत्यधोक्षजभाषितं स्मरंत आशु प्राव्रजन् ॥ १ ॥ ब्रह्मसत्रेणात्मविमर्शेन दीक्षिताः कृतसंकल्पा बभूवुः । सर्वेषु भूतेषु

ण्याविषयीं योजिलें. पुढें त्याच दक्षानें, दुसऱ्या सर्व मरीच्यादिक प्रजापतींची, त्यांच्या त्यांच्या कामावर योजना केली ॥ ५१ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील चतुर्थस्कंधामध्यें हा तिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३० ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां या एकतिसाव्या अध्यायामध्यें दक्षाला राज्याभिषेक करून वनामध्यें वास करणाऱ्या त्या प्रचेत्यांना, नारदानें उपदेश केलेल्या मार्गाच्या योगेंकरून मुक्ति प्राप्त झाली अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ मैत्रेय ह्मणाला— हेविदुरा. नंतर दिव्यमानानें दहा लक्ष वर्षें होऊन गेल्यावर ज्यांना विवेकज्ञान उत्पन्न झालें, असे ते प्रचेते, ' तुह्मी इहपरलोकांविषयीं विरक्त होऊन माझ्या स्वरूपास पावाल, असें ' अधोक्षज भगवंताचें भाषण स्मरण करून तत्काल आपल्या भार्येला (मारिषेला) पुत्राच्या (दक्षाच्या) स्वाधीन करून घर सोडून निघून गेले ॥ १ ॥ त्यांनीं पश्चिम दिशेस समुद्रतीरीं जाऊन, जेथें जाजलिनामक ऋषीला मुक्ति प्राप्त झाली होती त्या ठिकाणीं, ज्याच्यापासून सर्व भूतांचेठिकाणीं 'हीं आत्माच आहेत '

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असें ज्ञान होतें अशा ब्रह्मसत्राची दीक्षा केली, ह्मणजे आत्मविचार करण्याचा संकल्प केला ॥ २ ॥ पुढें प्राण, मन, वाणी, आणि दृष्टि यांचें नियमन करणाऱ्या, आसनांचा जय करणाऱ्या, मूलाधार चक्रापासून मस्तकापर्यंत आपले सर्व अवयव शांत व निश्चळ धारण करणाऱ्या आणि शुद्ध परब्रह्माचेठिकाणीं आपलें मन योजणाऱ्या त्या प्रचेत्यांना, देवदैत्यांनीं स्तुत्य अशा नारद ऋषीनें अवलोकन केलें ॥ ३ ॥ तेव्हां नारदमुनि येत आहे असें पाहिल्याबरोबर त्यांनीं त्याला उत्थापन देऊन वंदन केलें आणि येण्याची कृपा केल्याबद्दल आपला आनंद प्रदर्शित करून, यथाशास्त्र त्याचें पूजन केलें. पुढें नारद स्वस्थ बसला असतां, ते प्रचेते ह्मणाले कीं ॥ ४ ॥ प्रचेते ह्मणाले– हे देवर्षे, तुझें आगमन आमच्या कल्याणार्थ आहे. ह्मणून आमच्या सुदैवानेंच तूं आमच्या दृष्टीस पडला आहेस. कारण, हे ब्रह्मनिष्ठा, जसें सूर्याचें

आत्मेति मेधा ज्ञानं यस्मिंस्तेन । क्व वेलायां समुद्रतटे जाजलिर्नाम ऋषिः ॥ २ ॥ निर्जिताः प्राणमनोवचोदृशो यैस्तान् । शांता उपरताः समाना मूलाधारादारभ्य ऋजवो विग्रहा येषाम् । ब्रह्मणि योजित आत्मा यैः सुरासुरैरीड्यो दृष्टवान् ॥ ३ ॥ उत्थाय प्रणिपत्य यथादेशं यथाविधि पूजयित्वा ॥ ४ ॥ ५ ॥ आदिष्टमुपदिष्टं यदात्मतत्त्वम् ।

तान्निर्जितप्राणमनोवचोदृशो जितासनान् शांतसमानविग्रहान् ॥ परेऽमले ब्रह्मणि योजितात्मनः सुरासुरेड्यो ददृशे स्म नारदः ॥
॥ ३ ॥ तमागतं त उत्थाय प्रणिपत्याभिनंद्य च ॥ पूजयित्वा यथादेशं सुखासीनमथाब्रुवन् ॥ ४ ॥ प्रचेतस ऊचुः ॥ स्वागतं ते
सुरर्षेऽद्य दिष्ट्या नो दर्शनं गतः ॥ तव चंक्रमणं ब्रह्मन्नभयाय यथा रवेः ॥ ५ ॥ यदादिष्टं भगवता शिवेनाधोक्षजेन च ॥ तद्गृहेषु
प्रसक्तानां प्रायशः क्षपितं प्रभो ॥ ६ ॥ तन्नः प्रद्योतयाध्यात्मज्ञानं तत्त्वार्थदर्शनम् ॥ येनांजसा तरिष्यामो दुस्तरं भवसागरम्
॥ ७ ॥ मैत्रेय उवाच ॥ इति प्रचेतसां पृष्टो भगवान्नारदो मुनिः ॥ भगवत्युत्तमश्लोक आविष्टात्मा ब्रवीन्नृपान् ॥ ८ ॥ नारद उवाच ॥
तज्जन्म तानि कर्माणि तदायुस्तन्मनो वचः ॥ नृणां येनेह विश्वात्मा सेव्यते हरिरीश्वरः ॥ ९ ॥ किं जन्मभिस्त्रिभिर्वेह शौक्लसावित्र-
याज्ञिकैः ॥ कर्मभिर्वा त्रयीप्रोक्तैः पुंसोऽपि विबुधायुषा ॥ १० ॥

क्षपितं विस्मृतम् ॥ ६ ॥ ७ ॥ इति प्रचेतोभिः पृष्टः ॥ ८ ॥ अहो गृहप्रसक्त्या हरिसेवां विना सर्वं जन्मकर्मादिकं व्यर्थीकृतमिति तान् शोचन्नाह । तज्जन्मेति चतुर्भिः । यतो जन्मादेर्हरिसेवैव फलमतस्तद्विहीनं सर्वं व्यर्थमित्यर्थः ॥ ९ ॥ शुक्लसंबंधि जन्म विशुद्धमातापितृभ्यामुत्पत्तिः सावित्रमुपनयनेन याज्ञिकं दीक्षया विबुधानामिव दीर्घायुषाऽपि ॥ १० ॥

दर्शन अंधकार घालविण्याच्या योगानें लोकांच्या भयनिवृत्तीला कारण असतें त्याप्रमाणें तुझें पर्यटण अज्ञानाच्या निवर्तनानें लोकांच्या संसारभयनिवृत्तीला कारण आहे ॥ ५ ॥ हे समर्था, भगवान् शंकरानें व श्रीविष्णूनें आह्मांला जें पूर्वी तत्त्वज्ञान सांगितलें होतें, ते गृहाचेठिकाणीं (संसारांत) आसक्त झालेल्या आमचें बहुत करून विसरल्यासारखें झालें आहे तें भगवंताच्या स्वरूपाचा प्रकाश करणारें अध्यात्मज्ञान आह्मांला तूं पुनः प्रकाशित कर. ह्मणजे त्याच्या योगेंकरून आह्मी ह्या दुस्तर भवसागरांतून तरून जाऊं ॥ ६ ॥ ७ ॥ मैत्रेय ह्मणाला– हे विदुरा, याप्रमाणें प्रचेत्यांनीं प्रश्न केला असतां, तो भगवान् नारद ऋषि, उत्तमश्लोक भगवंताचेठिकाणीं आपलें चित्त स्थापन करून, त्या प्रचेतस् राजांना ह्मणाला कीं ॥ ८ ॥ नारद ह्मणाला– हे नृप हो, या संसारामध्यें ज्यांच्या योगानें विश्वव्यापक श्रीहरीची सेवा घडते तेंच जन्म तेंच आयुष्य, तेंच मन, तेंच भाषण, व तींच कर्मे श्रेष्ठ होत ॥ ९ ॥ नाहींतर ज्यांच्या योगानें श्रीहरि प्रसन्न होऊन भक्तांना आत्मस्वरूपाचा लाभ देत नाहीं त्या ‘शुद्ध माता-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पितरांपासून उत्पन्न होणें, उपनयनसंस्कार घडणें व यज्ञांची दीक्षा प्राप्त होणें, अशा तीन प्रकारच्या जन्मांनीं किंवा वेदोक्त कर्मांनीं अथवा देवांसारख्या पुष्कळ असलेल्या आयुष्यानें काय फळ आहे? काहींच नाहीं. किंवा पुष्कळ अध्ययन, व्रत उपवासादिक तपश्चर्या, भाषणाची चतुराई, अनेक अवधानें ठेवण्याचें सामर्थ्य, उत्तम बुद्धि, शारीर बल, इंद्रियांचें पटुत्व, प्राणायामादिक योगसाधन, सांख्य (देहादिकांहून निराळा आत्मा आहे असें ज्ञान) संन्यास, वेदांचें अध्ययन व इतरही जीं दान, तीर्थयात्रादिक कल्याणांचीं साधनें आहेत त्यांच्या योगेंकरून, तरी उपयोग काय आहे? काहींच नाहीं ॥ १० ॥ ११ ॥ १२ ॥ कारण, विचार करून पाहिलें असतां, आत्म्याकरितांच इतरांचें प्रियत्व आहे ह्मणून सर्वप्रकारच्याहि कल्याणकारक फलांची पराकाष्ठा आत्माच होय तसाच सर्व प्राणिमात्रांचा अंतर्यामी व

वचोभिर्वाग्विलासैः चित्तवृत्तिभिर्नानावधानसामर्थ्यैः। इंद्रियाणां राधसा पाटवेन ॥ ११ ॥ योगेन प्राणायामादिना सांख्येन देहादिव्यतिरिक्तात्मज्ञानमात्रेण संन्यासवेदाध्ययनाभ्यामपि अन्यैरपि व्रतवैराग्यादिभिः श्रेयःसाधनैः ॥ १२ ॥ नन्वेषां नानाफलसाधनानां हरिसेवाभावमात्रेण कुतो वैयर्थ्यं तत्राह। श्रेयसां फलानामात्मैवावधिः पराकाष्ठा अर्थतः परमार्थतः आत्मार्थत्वेनैवान्येषां प्रियत्वादित्यर्थः। भवत्वात्मावधिर्हरेः किमायातं तत्राह। सर्वेषामपीति। आत्मा आत्मदश्चाविद्यानिरासेन स्वरूपाभिव्यंजकः ऐश्वरेणापि रूपेण बलिप्रभृतिभ्य इवात्मप्रदः प्रियश्च परमानंदरूपत्वात् ॥ १३ ॥ किंच। नानाकर्मभिस्तत्तद्देवताप्रीतिनिमित्तान्यपि फलानि हरिप्रीत्या भवंति केवलं तत्तद्देव-

श्रुतेन तपसा वा किं वचोभिश्चित्तवृत्तिभिः ॥ बुद्ध्या वा किं निपुणया बलेनेंद्रियराधसा ॥ ११ ॥ किंवा योगेन सांख्येन न्यासस्वाध्याययोरपि ॥ किंवा श्रेयोभिरन्यैश्च न यत्रात्मप्रदो हरिः ॥ १२ ॥ श्रेयसामपि सर्वेषामात्मा ह्यवधिरर्थतः ॥ सर्वेषामपि भूतानां हरिरात्मात्मदः प्रियः ॥ १३ ॥ यथा तरोर्मूलनिषेचनेन तृप्यंति तत्स्कंधभुजोपशाखाः ॥ प्राणोपहाराच्च यथेंद्रियाणां तथैव सर्वार्हणमच्युतेज्या ॥ १४ ॥ यथैव सूर्यात्प्रभवंति वारः पुनश्च तस्मिन्प्रविशंति काले ॥ भूतानि भूमौ स्थिरजंगमानि तथा हरावेव गुणप्रवाहः ॥ १५ ॥

ताराधनेन तु न किंचिदिति सदृष्टांतमाह। यथेति। मूलात्प्रथमविभागाः स्कंधाः तद्विभागा भुजाः तेषामप्युपशाखाः उपलक्षणं पत्रपुष्पादयोऽपि तृप्यंति नतु मूलसेकं विना ताः स्वस्वनिषेचनेन। प्राणस्योपहारो भोजनं तस्मादेवेंद्रियाणां तृप्तिर्न तु तत्तदिंद्रियेषु पृथक्पृथगन्नलेपनेन तथाऽच्युताराधनमेव सर्वदेवताराधनं न पृथगित्यर्थः ॥ १४ ॥ कुतः सर्वमूलत्वादिति सदृष्टांतांतरमाह। यथैव वारो जलानि वर्षाकाले सूर्यादुद्भवंति ग्रीष्मे तस्मिन्नेव प्रविशंति अस्याप्रसिद्धत्वेन दृष्टांतांतरमाह। यथा भूतानि भूमाविति

त्यांच्या अविद्येचा निरास करून त्यांना आत्मप्राप्ति करून देणारा आणि परमानंदरूप असल्यामुळें सर्वांना अत्यंत प्रिय तो आत्मा हरिच आहे ॥ १३ ॥ ज्याप्रमाणें वृक्षाच्या मुळांत पाणी घातलें असतां त्याचे मोठमोठे खांदे, त्यांच्या लहान लहान फांद्या, त्यांच्या लहान लहान उपशाखा व पुढें त्यांचे पत्रपुष्पादिक विस्तार हीं सर्वहि तृप्त (टवटवीत) होतात, हीं केवळ त्यांच्यावर पाणी घातल्यानें होत नाहींत. किंवा जशी भोजन केलें असतां तेणेंकरून निरनिराळ्या सर्व इंद्रियांचीहि तृप्ति होत्ये ती त्यांच्यावर अन्नाचा लेप केल्यानें होत नाहीं त्याप्रमाणें अच्युतभगवंताचें आराधन केलें असतां सर्व देवतांचें आराधन केल्यासारखें होतें ॥ १४ ॥ कारण, ज्याप्रमाणें सूर्यापासून वर्षाकाळामध्यें जल उत्पन्न होतें आणि तें ग्रीष्मकाळामध्यें पुन्हा त्याचेचठिकाणीं प्रविष्ट होतें किंवा जशीं स्थावर जंगमात्मक भूतें पृथिवीपासून उत्पन्न होऊन शेवटीं तिच्याठिकाणींच लय पावतात त्याप्रमाणें हा चेतनाचेतनात्मक प्रपंच सृष्टिकालीं ज्या श्रीहरीपासूनच उत्पन्न होतो तो प्रलयकालीं त्याचेच ठिकाणीं लय पावतो ॥ १५ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हें जग, सृष्टिकाळीं जरी गंधर्वनगराप्रमाणें स्फुरण पावलें तरी तें भगवंताचें निरुपाधिक स्वरूपच आहे त्याहून निराळें नाहीं. जशी सूर्यापासून उत्पन्न झालेली प्रभा निराळी भासली तरी ती वस्तुतः त्याहून निराळी नाहीं किंवा जशीं इंद्रियें जाग्रदवस्थेमध्यें निरनिराळीं स्फुरण पावलीं तरी त्यांचा लय सुषप्तीमध्यें आत्म्याचेच ठिकाणीं होतो त्याप्रमाणें पंचमहाभूतें शब्दादिक विषय अकरा इंद्रियें, व त्यांच्या देवता व त्यांचा भेदरूप भ्रम, हा सृष्टिकाळीं निरनिराळा स्फुरण पावला तरी त्याचा लय भगवंताचेच ठिकाणीं होतो ॥ १६ ॥ आतां असंग अशा हरीचेठिकाणीं प्रपंचाचे उत्पत्तिलय कसे होतात असें म्हणाल तर– हे भूपहो, जसे आकाशामध्यें मेघ, अंधकार आणि प्रकाश हे अनुक्रमानें उत्पन्न होतात व लय पावतात परंतु त्यांच्या योगानें आकाश लिप्त होत नाहीं त्याप्रमाणें परब्रह्माचेठिकाणीं रज तम आणि सत्त्व ह्या शक्ति, कधीं

गुणप्रवाहश्चेतनाचेतनात्मकः प्रपंचः ॥ १५ ॥ ननु हरावेव गुणप्रवाह इत्युक्ते तदाधारत्वेन सोपाधिकत्वं हरेः स्यादित्याशंक्याह । एतदिति । एतद्विश्वं विष्णोस्तत्सर्वशास्त्रप्रसिद्धं पदं परं सर्वोपाधिरहितम् । तदुत्पन्नत्वान्न ततः पृथगित्यर्थः । तर्हि कथमन्यथा भाति तत्राह । सकृदिति । सकृत्कदाचिद्विभातं स्फुरितं गंधर्वनगरवत् यथा सवितुः प्रभा न ततो भिन्ना यथा च जाग्रत्यसव इंद्रियाणि स्फुरंति सुषुप्तौ तु सुप्तशक्तयो भवंतीत्यर्थः । कथंभूतोऽसौ हरिः । द्रव्यादीनां त्रिविधाहंकारकार्याणां तन्निमित्तस्य भेदभ्रमस्य चात्ययो यस्मात्सः । यद्वा । अजाग्रति सुषुप्तावसवः सुप्ताः शक्तयो येषां ते भवंति द्रव्यादेरप्यत्ययो भवति सवितुः प्रभेत्युद्गतौ दृष्टांत इति ॥ १६ ॥ नन्वसंगे हरौ

एतत्पदं तज्जगदात्मनः परं सकृद्विभातं सवितुर्यथा प्रभा ॥ यथाऽसवो जाग्रति सुप्तशक्तयो द्रव्यक्रियाज्ञानभिदाभ्रमात्ययः ॥ १६ ॥ यथा नभस्यभ्रतमःप्रकाशा भवंति भूपा न भवंत्यनुक्रमात् ॥ एवं परे ब्रह्मणि शक्तयस्त्वमू रजस्तमः सत्त्वमिति प्रवाहः ॥ १७ ॥ तेनैकमात्मानमशेषदेहिनां कालं प्रधानं पुरुषं परेशम् ॥ स्वतेजसा ध्वस्तगुणप्रवाहमात्मैकभावेन भजध्वमद्धा ॥ १८ ॥ दयया सर्वभूतेषु संतुष्ट्या येनकेन वा ॥ सर्वेंद्रियोपशांत्या च तुष्यत्याशु जनार्दनः ॥ १९ ॥ अपहतसकलैषणामलात्मन्यविरतमेधितभावनोपहूतः ॥ निजजनवशगत्वमात्मनोऽयन्न सरति छिद्रवदक्षरः सतां हि ॥ २० ॥

कथं प्रपंचोत्पत्तिलयौ तत्राह । यथेति । अभ्रतमःप्रकाशा आगमापायिनो रजस्तमःसत्त्वस्थानीयाः हे भूपाः प्रचेतसः अमू शक्तय उद्भवंति न भवंति लीयंते इत्येवमयं जगत्प्रवाहः ॥ १७ ॥ तेन सर्वकारणत्वेन हेतुना । कालो निमित्तम् । प्रधानमुपादानम् । पुरुषः कर्ता एतत्त्रितयात्मकत्वात्सर्वकारणं परमेश्वरमद्धा साक्षाद्भजध्वम् । कथम् । आत्मन एकभावेनाभिन्नत्वेन ॥ १८ ॥ साधनमाह । दयादिभिः शीघ्रं तुष्यति ॥ १९ ॥ ततो न कदाचित्त्यजतीत्याह । अपहता निरस्ताः सकला एषणाः कामा यस्मात्स चासावमल आत्मा मनस्तस्मिन्सतां मनसि निरंतरं समेधितया भावनयोपहूतः संनिधापितः सन्नक्षरो हरिश्छिद्रवत्तत्रत्याकाशवत्ततो न सरति नापयाति हि । किं कुर्वन् । आत्म-

---

कधीं उत्पन्न होतात व कधीं कधीं लय पावतात अशा प्रकारें हा जगत्प्रवाह चालतो तथापि त्याच्या योगेंकरून भगवान् लिप्त होत नाहीं ॥ १७ ॥ त्या कारणानें, सर्व प्राणिमात्रांचा आत्मा, जगाचें निमित्तकारण, उपादानकारण, कर्ता, ब्रह्मादिकांचाहि नियंता आणि आपल्या चिच्छक्तीच्या योगानें गुणप्रवाहरूप प्रपंचाचा निरास करणारा अशा त्या एका परमेश्वराचेंच तुह्मी आपल्या अंतर्यामी, स्फुरण पावणाऱ्या चैतन्यरूपी आत्म्यासीं, कांहीं व्यवधान न ठेवितां अभेदबुद्धीनें सेवन करा ॥ १८ ॥ सर्व भूतांवर दया करणें, प्रारब्धयोगानें जें प्राप्त होईल त्याच्या योगानें संतोष मानणें आणि सर्व इंद्रियें स्वाधीन ठेवणें यांच्या योगेंकरून संसारनिवर्तक भगवान् शीघ्र प्रसन्न होतो ॥ १९ ॥ ज्यापासून सर्व कामना निरास पावल्या आहेत अशा शुद्ध झालेल्या साधूंच्या मनामध्यें, निरंतर वृद्धिंगत होणाऱ्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भक्तीच्या योगेंकरून स्थापना केलेला अविनाशी भगवान्, 'मी भक्तजनांच्या स्वाधीन आहें, असें जाणत होत्साता त्या साधूंच्या हृदयांतून हृदयाकाशाप्रमाणें निघून जात नाहीं ॥ २० ॥ ज्याली लोकदृष्टीनें निर्धन परंतु स्वरूपानुभवरूप धनानें युक्त असे भक्तजन प्रिय आहेत व जो भक्तांचें प्रेमलक्षण भक्तिसुख जाणतो तो हरि, विद्या, धन, कुल आणि कर्म यांच्या मदांनीं रहित अशा सज्जनांचा तिरस्कार करणाऱ्या दुष्ट कुबुद्धि पुरुषांच्या पूजेचाही स्वीकार करीत नाहीं ॥ २१ ॥ तसाच जो निरंतर सेवा करणाऱ्या लक्ष्मीला किंवा तिची इच्छा करणाऱ्या राजांना किंवा देवांना अनुसरत (त्यांच्या तंत्रानें वागत) नसून आपल्या स्वरूपानंदानें परिपूर्ण असल्यामुळें आपल्या ऐकांतभक्तांच्या तंत्रानें वागत असतो. त्या ह्या परमेश्वराचा क्षणमात्र तरी कोण कृ पुरुष, त्याग करील ? कोणीहि करणार नाहीं ॥ २२ ॥ मैत्रेय ह्मणाला—

नो निजजनवशगत्वं स्वभक्ताधीनत्वमयन्नवगच्छन् ॥ २० ॥ सतामेव वश्योऽसावसतां तु पूजामपि न गृह्णातीत्याह । नेति । कुमनीषिणां कुत्सितमतीनाम् । अधनाश्च ते आत्मधनाश्च भगवद्धनास्ते प्रिया यस्य रसज्ञो भक्तिसुखज्ञः । के कुमनीषिणस्तानाह । श्रुतादिनिमित्तैर्मदैर्ये सत्सु पापं तिरस्कारं कुर्वंति ॥ २१ ॥ भक्ताधीनत्वं प्रपंचयन्नाह ।

न भजति कुमनीषिणां स इज्यां हरिरधनात्मधनप्रियो रसज्ञः ॥ श्रुतधनकुलकर्मणां मदैर्ये विदधति पापमकिंचनेषु सत्सु ॥ २१ ॥ श्रियमनुचरतीं तदर्थिनश्च द्विपदपतीन्विबुधांश्च यत्स्वपूर्णः ॥ न भजति निजभृत्यवर्गतंत्रः कथममुमुद्विसृजेत्पुमान्कृतज्ञः ॥ २२ ॥ मैत्रेय उवाच ॥ इति प्रचेतसो राजन्नन्याश्च भगवत्कथाः ॥ श्रावयित्वा ब्रह्मलोकं ययौ स्वायंभुवो मुनिः ॥ २३ ॥ तेऽपि तन्मुखनिर्यातं यशो लोकमलापहम् ॥ हरेर्निशम्य तत्पादं ध्यायंतस्तद्गतिं ययुः ॥ २४ ॥ एतत्तेऽभिहितं क्षत्तर्यन्मां त्वं परिपृष्टवान् ॥ प्रचेतसां नारदस्य संवादं हरिकीर्तनम् ॥ २५ ॥ श्रीशुक उवाच ॥ य एष उत्तानपदो मानवस्यानुवर्णितः ॥ वंशः प्रियव्रतस्यापि निबोध नृपसत्तम ॥ २६ ॥ यो नारदादात्मविद्यामधिगम्य पुनर्महीम् ॥ भुक्त्वा विभज्य पुत्रेभ्य ऐश्वर्यं समगात्पदम् ॥ २७ ॥

विषयांचा उपभोग घेतला ॥ १८ ॥ त्या राजश्रेष्ठ अग्नीध्रालाहि तिच्याठिकाणीं, नाभि, किंपुरुष, हरिवर्ष, इलावृत, रम्यक, हिरण्मय, कुरु, भद्राश्व आणि केतुमाल या
नांवांचे नऊ पुत्र झाले ॥ १९ ॥ याप्रमाणें ती पूर्वचित्ति अप्सरा, प्रतिवर्षीं एक एक याप्रमाणें नऊ पुत्रांना प्रसवून त्यांना राजाच्याच घरीं टाकून नंतर ती पुन्हा ब्रह्मदे-
वाजवळ जाऊन त्याची सेवा करूं लागली ॥ २० ॥ ते आग्नीध्रराजाचे पुत्र, मातेच्या अनुग्रहानें स्वाभाविक गुणानेंच दृढशरीर व बळ यांनीं युक्त होत्साते, पित्यानें निर-
निराळे भूमीचे विभाग करून राज्यावर स्थापन केले असतां ते जंबुद्वीपाच्या अपापल्या नांवांच्या खंडांचें राज्य करूं लागले ॥ २१ ॥ आग्नीध्रराजा, विषयांच्या भोगां-

भाषया वाचा । सभाजयामास पूजया मास संमुखीचकारेत्यर्थः ॥१७॥ बुद्ध्यादीनां द्वंद्वैक्यम् ॥ १८ ॥१९ ॥ सूत्वा प्रसूय । उपतस्थेऽभजत् ॥२०॥ औत्पत्तिकेनैव स्वभावेन

सा च ततस्तस्य वीरयूथपतेर्बुद्धिशीलरूपवयःश्रियौदार्येण पराक्षिप्तमनास्तेन सहायुतायुतपरिवत्सरोपलक्षणं कालं जंबूद्वीपपतिना
भौमस्वर्गभोगान्बुभुजे ॥ १८ ॥ तस्यामुहवा आत्मजान्स राजवर आग्नीध्रो नाभिकिंपुरुषहरिवर्षेलावृतरम्यकहिरण्मयकुरुभद्राश्व-
केतुमालसंज्ञान्नव पुत्रानजनयत् ॥ १९ ॥ सा सूत्वाऽथ सुतान्नवानुवत्सरं गृह एवापहाय पूर्वचित्तिर्भूय एवाजं देवमुपतस्थे ॥२०॥
आग्नीध्रसुतास्ते मातुरनुग्रहादौत्पत्तिकेनैव संहननबलोपेताः पित्रा विभक्ता आत्मतुल्यनामानि यथाभागं जंबूद्वीपवर्षाणि बुभुजुः
॥ २१ ॥ आग्नीध्रो राजाऽतृप्तः कामानामप्सरसमेवानुदिनमधिमन्यमानस्तस्याः सलोकतां श्रुतिभिरवारुंध यत्र पितरो मादयंते
॥ २२ ॥ संपरेते पितरि नव भ्रातरो मेरुदुहितॄर्मेरुदेवीं प्रतिरूपामुग्रदंष्ट्रीं लतां रम्यां श्यामां नारीं भद्रां देववीतिमितिसंज्ञा नवोद-
वहन् ॥ २३ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे पंचमस्कंधे आग्नीध्रवर्णनं नाम द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ ना-
भिरपत्यकामोऽप्रजया मेरुदेव्या भगवंतं यज्ञपुरुषमवहितात्माऽयजत ॥ १ ॥

संहननं दृढांगत्वम् ॥ २१ ॥ कामानां भोगैः अध्यधिकं मन्यमानः । श्रुतिभिर्वेदोक्तैः कर्मभिः । अवारुंध प्राप । मादयंते मोदंते ॥ २२ ॥ इत्येवंभूताः संज्ञा यासां ताः
परिणीतवंतः ॥ २३ ॥ इति पंचमस्कंधे टीकायां द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥ तृतीये चरितं नाभेः परं मंगलमीर्यते ॥ यस्य यज्ञे प्रतीतः सन्पुत्रोऽभूदृषभो हरिः ॥१॥ नाभिराग्नीध्रसुतः ।

विषयीं अतृप्त होत्साता, निरंतर त्या अप्सरेलाच परमपुरुषार्थ असें मानून श्रुत्युक्त कर्मांच्या योगानें तिच्या लोकाला पावला. तो लोक असा आहे कीं,—जेथें पितर आनंद
पावतात ॥ २२ ॥ हे राजा, याप्रमाणें पिता परलोकवासी झाला असतां, त्या नाभि इत्यादिक नऊ भावांनीं मेरूच्या नऊ कन्यांशीं आपले विवाह करून घेतले. त्या कंन्यांचीं
नांवें— मेरुदेवी, प्रतिरूपा, उग्रदंष्ट्री, लता, रम्या, श्यामा, नारी, भद्रा आणि देववीति अशीं होतीं ॥ २३ ॥ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील पंचमस्कंधा-
मध्यें आग्नीध्रचरित्रवर्णनरूप हा दुसरा अध्याय समाप्त झाला ॥ २ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां या तिसऱ्या अध्यायामध्यें, ज्याच्या यज्ञांत साक्षात् हरि प्रकट
झाला व नंतर ऋषभावताररूपानें त्याचें पुत्रत्व पावला त्या नाभिराजाचें परममंगलकारक चरित्र वर्णन केलें आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला— हे राजा, पुत्राची

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

इच्छा करणाऱ्या नाभिराजानें, अपत्यरहित अशा आपल्या मरुदेवीनामक भार्येसहवर्तमान एकाग्रचित्त होऊन यज्ञपुरुष भगवंताचें यजन केलें ॥ १ ॥ श्रद्धापूर्वक अत्यंत शुद्ध अंतःकरणानें यज्ञ करणाऱ्या त्या राजाचीं यज्ञांतील प्रवर्ग्यनांवांचीं कर्में सुरू झालीं असतां, द्रव्यें, देश, काल, मंत्र, ऋत्विज, दक्षिणा आणि विधानयोग यांच्या संपत्तीनेंहि प्राप्त होण्यास दुर्लभ व आपल्या भक्तजनांस इच्छित फळें देणाऱ्या इच्छेनें ज्याचें मन वेधून गेलें आहे असा भगवान्, भगवद्भक्तांच्या कृपाळुपणामुळें, सुंदर अवयवांनीं युक्त होऊन, कोठेंहि पराजय न पावणाऱ्या व स्वतंत्र अशाहि आपणास, सर्वांच्या मनाला व नेत्रांना आनंदविणाऱ्या अवयवांच्या योगानें रमणीय व सुखकारक अशा रूपानें प्रकट करिता झाला ॥ २ ॥ याप्रमाणें भगवान् प्रकट झाल्यानंतर ऋत्विज, सादस्य व यजमान (नाभिराजा) हे, जसे दरिद्री लोक, एकादा निधि प्राप्त

अपुत्रया मेरुदेव्या भार्यया सह ॥ १ ॥ प्रवर्ग्यसञ्ज्ञकेषु कर्मसु क्रियमाणेषु । द्रव्यादयः सप्त ये योगा उपायास्तेषामुपपत्त्या संपत्त्या दुरधिगमो दुष्प्रापोऽपि भागवतेषु कृपालुतया सुप्रतीकः शोभनावयवः सन्नात्मानमाविश्चकार । अपराजितं स्वतंत्रम् । निजभक्तानां येऽभिप्रेतार्थास्तेषां विधित्सया गृहीतमाकृष्टं हृदयं चित्तं यस्य । हृदयंगमं सुखकरम् । यतो मनो नयनान्यानंदयंति येऽवयवास्तैरभिरामं सुंदरम्॥ २ ॥ अथहेत्यादिनिपातबाहुल्यं वाक्यालंकाराय । आविष्कृतं भुजानां युगलद्वयं चतुष्टयं

तस्य हवाव श्रद्धया विशुद्धभावेन यजतः प्रवर्ग्येषु प्रचरत्सु द्रव्यदेशकालमंत्रर्त्विग्दक्षिणाविधानयोगोपपत्त्या दुरधिगमोऽपि भगवान्भागवतवात्सल्यतया सुप्रतीक आत्मानमपराजितं निजजनाभिप्रेतार्थविधित्सया गृहीतहृदयो हृदयंगमं मनोनयनानंदनावयवाभिराममाविश्चकार ॥ २ ॥ अथह तमाविष्कृतभुजयुगलद्वयं हिरण्मयं पुरुषविशेषं कपिशकौशेयांबरधरमुरसि विलसच्छ्रीवत्सललामं दरवरवनरुहवनमालाच्छूर्यमृतमणिगदादिभिरुपलक्षितं स्फुटकिरणप्रवरमुकुटकुंडलकटककटिसूत्रहारकेयूरनूपुराद्यंगभूषणविभूषितमृत्विक्सदस्यगृहपतयोऽधना इवोत्तमधनमुपलभ्य सबहुमानमर्हणेनावनतशीर्षाण उपतस्थुः ॥ ३ ॥ ऋत्विज ऊचुः ॥ अर्हसि मुहुरर्हत्तमार्हणमस्माकमनुपथानां नमोनम इत्येतावत्सदुपशिक्षितं कोऽर्हति पुमान्प्रकृतिगुणव्यतिकरमतिरनीश ईश्वरस्य परस्य प्रकृतिपुरुषयोरर्वाक्तनाभिर्नामरूपाकृतिभी रूपनिरूपणम् ॥ ४ ॥

येन । हिरण्मयं तेजोमयम् । पुरुषेषु विशिष्यत इति तथा पुरुषोत्तममित्यर्थः । अर्हणेनार्घ्येण सहोपतस्थुरभजन्नित्यन्वयः । विलसन् श्रीवत्स एव ललामं चिह्नं यस्य । दरवरः शंखश्रेष्ठः वनरुहं पद्मं अच्छूरि चक्रं अमृतमणिः कौस्तुभः एवमादिभिरुपलक्षितम् । स्फुटकिरणा ये प्रवरा मणयस्तन्मयानि यानि मुकुटादीन्यंगानां भूषणानि तैर्विभूषितम् । बहुमाने दृष्टांतः । अधना इवोत्तमधनं निधिम् ॥ ३ ॥ अर्हसीत्यादिना निगदेन स्तुवंति । हे अर्हत्तम परिपूर्णोऽपि त्वमनुपथानां भृत्यानामस्माकमर्हणं मुहुः

झाला असतां त्याचा बहुमान करितात त्याप्रमाणें त्या पुरुषाकार भगवंताला पाहून ज्यांनीं आपलीं मस्तकें नम्र केलीं आहेत असे होत्साते, त्याची पूजा करून बहुमानानें स्तुति करूं लागले. तो भगवान् असा होता कीं, ज्यानें चार बाहु प्रकट केले होते, तो सुवर्णासारख्या तेजानें प्रकाशमान होता, पिंवळे दोन पीतांबर धारण करणारा असून त्याच्या वक्षस्थळावर श्रीवत्सचिन्ह शोभत होतें, चार हातांमध्यें क्रमानें, उत्तम शंख, कमळ, चक्र, आणि गदा हीं आयुधें असून कंठाचेठिकाणीं वनमाला कौस्तुभ इत्यादिक अलंकार दिसत होते, त्याप्रमाणेंच शरीरावर योग्यस्थळीं ज्यांचे किरण फांकत आहेत, अशीं मुकुट, कुंडलें, कडीं, करगोटा, हार, बाजुबंद, नूपुरें इत्यादि भूषणें घातलेलीं असल्यामुळें तो फारच सुंदर दिसत होता ॥ ३ ॥ ऋत्विज ह्मणाले– हे पूज्यश्रेष्ठा, जरी तूं अत्यंत परिपूर्ण असल्यामुळें निरिच्छ आहेस तथापि तुझे

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सेवक अशा आह्मी केलेल्या पूजेचा वारंवार स्वीकार करण्यास तूं योग्य आहेस. हे देवा, आह्मांला तुझी स्तुति करण्याचें सामर्थ्य नाहीं तथापि तुला वारंवार नमस्कार करावे एवढेंच आह्मांला साधूंनीं शिकवून ठेविलें आहे. कारण, प्रकृतीच्या गुणांच्या मिश्रणरूप प्रपंचांत ज्याची बुद्धि गढून गेली आहे ह्मणूनच स्तुति करण्यास असमर्थ असा कोण बरें पुरुष, तुझ्या स्वरूपाला न स्पर्श करणाऱ्या (प्रपंचांतील) नांवें, रूपें व आकृति यांच्या योगेंकरून, प्रकृतिपुरुषांहून पलीकडचा ईश्वर अशा तुझ्या स्वरूपाचें वर्णन करण्याला समर्थ होईल? कोणींच होणार नाहीं ॥ ४ ॥ तो कदाचित् तुझ्या सकलजनसमूहाचें पातक निरसन करणाऱ्या अतिमंगलकारक उत्तम गुणसमूहाच्या एका अंशाचें वर्णन करील परंतु त्याहून जास्ती त्याच्यानें तुझें कांहींच वर्णन करवणार नाहीं ॥ ५ ॥ असें जरी आहे तथापि हे परमेश्वरा, भक्तजनांनीं प्रेमपूर्वक अर्पण

स्वयमेव स्वीकर्तुमर्हसि । ननु वयं स्तोतुं शक्ता इत्याहुः । नमोनम इत्येतावदेवास्माकं सद्भिरुपशिक्षितं त्वद्रूपस्य दुर्ज्ञेयत्वात् । तदेवाहुः । कोऽर्हतीति । प्रकृतिगुणानां व्यतिकरः प्रपंचस्तस्मिन्नेव मतिर्यस्यातएवानीशः । प्रकृतिपुरुषयोः परस्यातएवेश्वरस्यावाक्तनाभिस्त्वामस्पृशंतीभिः प्रपंचांतर्गताभिर्नाम च रूपं चाकृतिश्चाकारस्ताभिस्तव रूपनिरूपणं कर्तुं को नाम पुमानर्हति ॥ ४ ॥ स ह्येतन्मात्रमेवार्हति नाधिकमित्याहुः । सकलजननिकायस्य वृजिनं निरस्यंतीति तथा शिवतमाः प्रवराश्च ये गुणगणास्तेषामेकदेशस्तस्य कथनाद्विनाऽधिकं नार्हति ॥ ५ ॥ वाङ्मनसाऽगोचरोऽपि त्वं भक्तानां सुखाराध्य एवेत्याहुः । हे परम परिजनैरनुरागेण विरचिता ये शबलसंशब्दा गद्गदा-

सकलजननिकायवृजिननिरसनशिवतमप्रवरगुणगणैकदेशकथनादृते ॥ ५ ॥ परिजनानुरागविरचितशबलसंशब्दसलिलसितकिसलयतुलसिकादूर्वांकुरैरपि संभृतया सपर्यया किल परम परितुष्यसि ॥ ६ ॥ अथानयाऽपि न भवत इज्ययोरुभारभरया समुचितमर्थमिहोपलभामहे ॥ ७ ॥ आत्मन एवानुसवनमंजसाऽव्यतिरेकेण बोभूयमानाशेषपुरुषार्थस्वरूपस्य किंतु नाथाशिष आशासानानामेतदभिसंराधनमात्रं भवितुमर्हति ॥ ८ ॥ तद्यथा बालिशानां स्वयमात्मनः श्रेयः परमविदुषां परमपरमपुरुष प्रकर्षकरुणया स्वमहिमानं चापवर्गाख्यमुपकल्पयिष्यन्स्वयं नापचित एवेतरवदिहोपलक्षितः ॥ ९ ॥

क्षरस्तुतयः सलिलं च सितकिसलयाश्च शुद्धपल्लवाः । शिलेति पाठे शिलं कुशादिमंजरी । एवमादिभिः संभृतया संपादितया पूजया परितुष्यसि ॥ ६ ॥ अथेति प्रकारांतरे । अन्यथा त्वनयेज्यया यागेनाप्युरुभारभरयाऽनेकांगसमृद्धयाऽपि भवतः समुचितमपेक्षितं प्रयोजनं नैव पश्यामः ॥ ७ ॥ अत्र हेतुः । आत्मनः स्वत एवानुसवनं सर्वदांजसा साक्षादव्यतिरेकेण समन्वयेन बोभूयमाना अतिशयेन भवंतो येऽशेषाः पुरुषार्थास्ते स्वरूपं यस्य परमानंदस्य । नचैवं सत्यपि यागानर्थक्यमित्याहुः । किंत्विति । सकामानामस्माकमेवैतदुपपद्यते न तवेत्यर्थः ॥ ८ ॥ स्वोपयोगमेव प्रदर्शयंति । तद्यथेति । परमेभ्योऽपि हे परमपुरुष प्रकर्षयुक्तया करुणया । उपकल्पयिष्यन्संपादयिष्यन् ।

केलेलीं जीं गद्गदाक्षरस्तुति, उदक, शुद्ध पल्लव, तुलसी व दूर्वांकुर यांच्या योगानेंहि संपादन केलेल्या पूजेनें तूं खरोखर संतुष्ट होतोस ॥ ६ ॥ असें न ह्मणावें तर, पुष्कळ साहित्यांनीं युक्त (सर्वांगसंपन्न) अशा या यज्ञाच्या योगेंकरूनहि, 'स्वस्वरूपानेंच सर्वकाळ साक्षात् समन्वयेंकरून अतिशयें प्राप्त होणारे जे सर्व पुरुषार्थ ते ज्या परमानंदरूपी तुझें स्वरूपच आहेत त्या तुला' या यज्ञामध्यें प्रकट होण्याचें कांहीं विशेष प्रयोजन आहे असें आह्मांस वाटत नाहीं. तथापि हे प्रभो, विषयभोगांची इच्छा करणाऱ्या आमच्यासारख्या जनांना 'त्यांनीं अशी आराधना करणें' हेंच योग्य आहे ॥ ७ ॥ ८ ॥ तस्मात् हे उत्तमोत्तम पुरुषा, आपला नाश कशांत आहे किंवा आपलें उत्कृष्ट कल्याण कशापासून होईल हें न जाणणाऱ्या आमच्या मूढजनांच्या करुणेनें तूं मोक्षसंज्ञक आपलें महत् स्थान आह्मांस प्राप्त करून देत होतसातां, वस्तुतः

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पूजेच्या अपेक्षेनें रहित असूनहि पूजेविषयीं सापेक्ष असल्यासारखा या यज्ञामध्यें आमच्या दृष्टी पडला आहेस ॥ ९ ॥ यास्तव हे परमपूज्या भगवंता, वर देणारांत श्रेष्ठ अशा तूं जेव्हां आपल्या भक्तजनांना (आह्मांला) आपलें दर्शन दिलेंस तेव्हां हाच आह्मांला वर प्राप्त झाला, असें आह्मी समजतों ॥ १० ॥ देवा, तुझें दर्शन फारच दुर्लभ आहे. कारण, वैराग्यानें तीक्ष्ण झालेल्या ज्ञानरूप अग्नीच्या योगानें ज्यांनीं आपल्या अंतःकरणांतील रागलोभादिक सर्व मळांचें निरसन केलें आहे अशा तुझ्यासारख्या स्वभावाच्या आत्मस्वरूपीं रममाण होणाऱ्या ऋषींना देखील ज्या तुझ्या गुणसमुदायाचें वर्णन हेंच परम आनंद उत्पन्न करणारें आहे, असा तूं आहेस; ह्मणजे त्यांना-देखील तुझें दर्शन घडत नाहीं, ह्मणून ते निरंतर अभ्यासानें तुझ्या गुणसमुदायाचें वर्णन करित असतात ॥ ११ ॥ यास्तव हे भगवन् तुझ्या दर्शनानेंच जरी आह्मी कृतार्थ आहों तथापि एक वर तुझ्याजवळ मागून घेतों कीं,– स्खलन (ठेंच कळणें) क्षुधा, पतन (पडणें) जृंभण (जांभई देणें) व संकटसमय यांचेठिकाणीं व ज्वर, मरण

चकारात्कामितं च नापचितोऽनपचितो ऽपूजित एव पूजाऽनपेक्षत्वात्स्वयमेवोपलक्षितो दृष्टोऽसि । इतरवत्सापेक्षवत् ॥ ९ ॥ यद्यपि त्वं वरान्दातुमाविर्भूतोऽसि तथापि हे अर्हत्तम राजर्षेर्बर्हिषि यज्ञे निजपुरुषाणां त्वद्भक्तानामस्माकमीक्षणविषयो भवान् यर्हि यदा आसीत्तदा ह्ययमेव वरः संजातः ॥ १० ॥ दर्शनस्य दुर्लभतामाहुः । असंगेन वैराग्येण निशितं यज्ज्ञानं स एवानलस्तेन विधूता अशेषा मला येषां अतो भवत इव स्वभावो येषाम् । तानेवाहुः । आत्मारामाणामेवंभूतानां मुनीनामपि परममंगलायनं गुण-

अथायमेव वरो ह्यर्हत्तम यर्हि बर्हिषि राजर्षेर्वरदर्षभो भवान्निजपुरुषेक्षणविषय आसीत् ॥ १० ॥ असंगनिशितज्ञानानलविधूताशेषमलानां भवत्स्वभावानामात्मारामाणां मुनीनामनवरतपरिगुणितगुणगण परममंगलायनगुणगणकथनोऽसि ॥ ११ ॥ अथ कथंचित्स्खलनक्षुत्पतनजृंभणदुरवस्थानादिषु विवशानां नः स्मरणाय ज्वरमरणदशायामपि सकलकश्मलनिरसनानि तव गुणकृतनामधेयानि वचनगोचराणि भवंतु ॥ १२ ॥ किंचायं राजर्षिरपत्यकामः प्रजां भवादृशीमाशासान ईश्वरमाशिषां स्वर्गापवर्गयोरपि भवंतमुपधावति प्रजायामर्थप्रत्ययो धनदमिवाधनः फलीकरणम् ॥ १३ ॥ को वा इह तेऽपराजितोऽपराजितया माययाऽनवसितपदव्याऽनावृतमतिर्विषयविषरयानावृतप्रकृतिरनुपासितमहच्चरणः ॥ १४ ॥

गणकथनमेव नतु दर्शनं यस्य अतस्तैरनवरतं परिगणिता अभ्यस्ता गुणगणा यस्येति संबोधनम् ॥ ११ ॥ दर्शनेनैव कृतार्था अपि वरमेकं प्रार्थयंते । अथेति । स्मरणाय विवशानां त्वां स्मर्तुमशक्तानां नः ॥ १२ ॥ अन्यच्च प्रार्थनीयमस्तीत्याहुः । किंचेति । आशिषामैहिकानां स्वर्गापवर्गयोरपीश्वरं त्वामुपधावति । प्रजायामेव पुरुषार्थ इति प्रत्ययो यस्य । अधनो यथा फलीकरणं तुषकणादिकमाशासानो धनदमुपधावति ॥ १३ ॥ इदं च नातिचित्रमित्याहुः । इह संसारे तेऽपराजितया माययाऽनवसितपद-

---

वगैरे अवस्थांमध्येंहि तुझें स्मरण करण्यास अशक्त असलेल्या आमच्या मुखांतून तुझीं सर्व पातकांचा नाश करणारीं–भगवान्, भक्तवत्सल, दीनबंधु इत्यादिक गुणकृत (गुणांनीं केलेलीं) नांवें उच्चार करण्यांत येवोत ॥ १२ ॥ आणि दुसरीहि आमची अशी प्रार्थना आहे कीं,–हा राजर्षि (नाभि) पुत्राची इच्छा करणारा, पुत्राचेचठिकाणीं हा पुरुषार्थ आहे असा विश्वास ठेवणारा आणि तो पुत्र तुझ्यासारखा असावा अशी इच्छा करणारा असल्यामुळें, ऐहिक विषयभोग, स्वर्ग व मोक्षहि देणाऱ्या तुझें, जसा धनहीन पुरुष, कोंडा किंवा कांहीं धान्यकण मिळण्याच्या आशेनें धनाढ्य पुरुषाचें आराधन करितो त्याप्रमाणें आराधन करीत आहे ॥ १३ ॥ हें तरी विशेष आश्चर्य ह्मणण्यासारखें नाहीं–कारण, या संसारामध्यें महात्म्या पुरुषांची चरणसेवा न करणारा असून जिचा मार्ग (ही कोठून आली असा) निश्चित होत नाहीं व

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जिचा पराजय कोणाच्यानेंहि करवत नाहीं अशा तुझ्या मायेनें पराभव व बुद्धिभ्रंश न केलेला व विषयरूपी विषाच्या वेगानें ज्याच्या स्वभावाला गुंग केलें नाहीं असा कोण बरें पुरुष आहे ? कोणींच नाहीं ॥ १४ ॥ हे पुष्कळ कार्यें करणाऱ्या देवदेवा, तुला आह्मी जें येथें पुत्रप्राप्तिरूप स्वल्प कार्य करण्यासाठीं बोलाविलें आहे त्यामध्यें कार्यार्थी, अज्ञानी व मंद अशा आह्मांकडून जी अवज्ञा घडली असेल ती, ज्ञानी व अज्ञानी या सर्वांना समबुद्धीनें मानणारा तूं सहन करण्याविषयीं योग्य आहेस ॥ १५ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, याप्रमाणें गद्यरूप स्तोत्रानें स्तुति केलेला तो देवश्रेष्ठ भगवान्, नाभिराजानें वंदन केलेल्या ऋत्विजांनीं ज्याच्या चरणांला वंदन केलें आहे असा होत्साता सदय अंतःकरणानें ह्मणाला कीं ॥ १६ ॥ श्रीभगवान् ह्मणाला– हे ऋषिहो, काय सांगावें ! सत्यभाषण करणाऱ्या तुह्मी माझ्याजवळ 'या राजाला माझ्यासारखा पुत्र व्हावा' असा दुर्लभ वर मागितला आहे, आणि पाहूं गलें असतां माझ्यासारखा मीच आहें दुसरा कोणी नाहीं, तथापि ब्राह्मणाचें भाषण खोटें होण्यास

व्याऽलक्षितमार्गयाऽपराजितः को वै न कोऽपि । अतस्तयाऽनावृतमतिः कः अतएव विषय एव विषं तस्य रया वेगास्तैरनावृता प्रकृतिर्यस्य । स कः । यद्यनुपासितमहच्चरणः अ-तस्त्वन्मायया मोहितस्यैवमाशंसा घटत इत्यर्थः ॥ १४ ॥ अदभ्रकर्तः हे बहुकार्यकारिन् अल्पीयसे कार्याय त्वं यद्यस्मादिह समाहूतोऽसि । तत्र प्रजायामर्थे धीर्येषां मंदा-

यदुहवाव तव पुनरदभ्रकर्तरिह समाहूतस्तत्रार्थधियां मंदानां नस्तद्यद्देवहेलनं देववेवार्हसि साम्येन सर्वान्प्रतिवोढुमविदुषाम् ॥ १५॥
श्रीशुक उवाच ॥ इति निगदेनाभिष्टूयमानो भगवाननिमिषर्षभो वर्षधराभिवादिताभिवंदितचरणः सदयमिदमाह ॥ १६ ॥ श्रीभ-
गवानुवाच ॥ अहो बताहमृषयो भवद्भिरवितथगीर्भिर्वरमसुलभमभियाचितो यदमुष्यात्मजो मया सदृशो भूयादिति ममाहमेवाभि-
रूपः कैवल्यादथापि ब्रह्मवादो न मृषा भवितुमर्हति ममैव हि मुखं यद्द्विजदेवकुलम् ॥ १७ ॥ तत आग्नीध्रीयेंऽशकलयाऽवतरि-
ष्याम्यात्मतुल्यमनुपलभमानः ॥ १८ ॥ श्रीशुक उवाच ॥ इति निशामयंत्या मेरुदेव्याः पतिमभिधायांतर्दधे भगवान् ॥ १९ ॥ बर्हिषि
तस्मिन्नेव विष्णुदत्त भगवान्परमर्षिभिः प्रसादितो नाभेः प्रियचिकीर्षया तदवरोधायने मेरुदेव्यां धर्मान् दर्शयितुकामो वातरशनानां श्र-
मणानामृषीणामूर्ध्वमंथिनां शुक्लया तनुवाऽवततार ॥ २० ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे पंचमस्कंधे नाभिचरित्रे तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥

नां तेषां नो यद्देवहेलनमवज्ञानं तत्सर्वान्प्रति तव साम्येन हेतुना प्रतिवोढुं सोढुमर्हसि ॥ १५ ॥ इति निगदेन गद्यात्मकस्तोत्रेण । वर्षधरो भारतवर्षपतिर्नाभिस्तेनाभिवा-दिता ये ऋत्विजस्तैरभिवंदितौ चरणौ यस्य ॥ १६ ॥ असुलभत्वे हेतुः । ममाहमेवाभिरूपः सदृशः कैवल्याददद्वितीयत्वात् । द्विजेषु देवा इव ये ब्राह्मणास्तेषां कुलम् ॥ १७ ॥ आग्नीध्रीये नाभौ ॥ १८ ॥ पतिं नाभिम् ॥ १९ ॥ हे विष्णुदत्त तस्यावरोधायनेंऽतःपुरे मेरुदेव्यां शुक्लया शुद्धसत्त्वरूपया मूर्त्याऽवततार । केषां धर्मान् । वातरशनानां दिग्वा-

---

योग्य नाहीं. कारण, ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य ह्या तिन्ही द्विजाति वर्णांत श्रेष्ठ जे ब्राह्मण त्यांचें कुल हें माझेंच मुख आहे ॥ १७ ॥ वास्तव ऐश्वर्यादिकांनीं माझ्यासारखा दुसरा पुरुष कोठेंच दृष्टी पडत नसल्यामुळें मीच, ह्या नाभिराजाच्या पोटीं अंशानें अवतार धारण करीन ॥ १८ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणला– याप्रमाणें मेरुदेवी राणी पाहत असतां तिच्या पतीला (नाभिराजाला) सांगून भगवान् तेथेंच अंतर्धान पावला ॥ १९ ॥ हे परीक्षित् राजा, याप्रमाणें नाभिराजाच्या त्या यज्ञामध्यें ऋत्विजांनीं प्रसन्न केलेला जो भगवान् त्यानें, दिगंबर, तपस्वी, ज्ञानी व नैष्ठिकब्रह्मचारी यांचे धर्म आचरण करून प्रसिद्ध करण्यासाठीं व नाभिराजाचे मनोरथ पूर्ण करण्यासाठीं त्याच्या अंतःपुरामध्यें मेरुदेवीच्याठिकाणीं शुद्ध सत्त्वात्मक मूर्तीनें अवतार धारण केला ॥ २० ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवत नामक महापुराणांतील पंचमस्कंधामध्यें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हा तिसरा अध्याय समाप्त झाला ॥ ३ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां पुढें चतुर्थादिक तीन अध्यायांनीं, ज्यानें लोकांवर उपकार करण्याकरितां सत्कर्मांचें व योगचर्येचें आवरण करून दाखविलें, त्या ऋषभरूपी हरीचें चरित्र वर्णन केलें आहे ॥ १ ॥ त्यांत चवथ्या अध्यायामध्यें, ज्याच्या राज्यामध्यें सर्व जन संतोषरूप अमृतानें अत्यंत तृप्त झाले, त्या शंभर पुत्रांनीं युक्त असलेल्या ऋषभदेवाचें राज्य वर्णन केलें आहे ॥ २ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला— हे राजा अवतार झाला असतां उत्पत्तीच्याच योगेंकरून ज्याच्या पादतलादिकांचेठिकाणीं वज्रांकुशादिक भगवंताचीं चिन्हें व्यक्त दिसत आहेत व समता, शांति, वैराग्य, ऐश्वर्य व सर्व संपत्ति यांनीं प्रतिदिवशीं वृद्धिंगत होणाऱ्या प्रभावानें युक्त अशा त्या आपल्या पुत्राला अवलोकन करून, मंत्रिमंडळ, प्रजा, ब्राह्मण आणि देवता ह्या सर्वांना, ह्या मुलानेंच पृथिवीचें संरक्षण

ससाम् । पाषंडिव्यावृत्त्यर्थमाह । श्रमणानां तपस्विनाम् । ऋषीणां ज्ञानिनाम् । ऊर्ध्वमंथिनां नैष्ठिकब्रह्मचारिणाम् ॥ २० ॥ इति पंचमे टीकायां तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥ ॥ चतुर्थादित्रिभिः प्रोक्तमृषभस्येहितं महत् ॥ लोकार्थं येन सत्कर्म नैष्कर्म्यं च निदर्शितम् ॥ १ ॥ चतुर्थे शतपुत्रस्य राज्यं तस्योपवर्ण्यते ॥ यस्य राज्ये जनः सर्वः संतोषामृतनिर्वृतः ॥ २ ॥ अभिव्यज्यमानानि भगवल्लक्षणानि पादतलादिषु वज्रांकुशादीनि यस्य । महाविभूतिः सर्वसंपत्तिः । साम्यादिभिः सह वर्धमानप्रभावम् । प्रकृतयोऽमा-

॥ श्रीशुक उवाच ॥ अथ ह तमुत्पत्त्यैवाभिव्यज्यमानभगवल्लक्षणं साम्योपशमवैराग्यैश्वर्यमहाविभूतिभिरनुदिनमेधमानानुभावं प्रकृतयः प्रजा ब्राह्मणा देवताश्चावनितलसमवनायातितरां जगृधुः ॥ १ ॥ तस्य हवा इत्थं वर्ष्मणा वरीयसा बृहच्छ्लोकेन चौजसा बलेन श्रिया यशसा वीर्यशौर्याभ्यां च पिता ऋषभ इतीदं नाम चकार ॥ २ ॥ तस्य हींद्रः स्पर्धमानो भगवान्वर्षे न ववर्ष तदवधार्य भगवानृषभदेवो योगेश्वरः प्रहस्यात्मयोगमायया स्ववर्षमजनाभं नामाभ्यवर्षत् ॥ ३ ॥ नाभिस्तु यथाभिलषितं सुप्रजस्त्वमवरुध्यातिप्रमोदभरविह्वलो गद्गदाक्षरया गिरा स्वैरं गृहीतनरलोकसधर्मं भगवंतं पुराणपुरुषं मायाविलसितमतिर्वत्सताततेति सानुरागमुपलालयन्परां निर्वृतिमुपगतः ॥ ४ ॥

त्यादयः । जगृधुरभिकांक्षंतिस्म ॥ १ ॥ वर्ष्मणा देहेन । तस्य विशेषणद्वयम् । वरीयसा श्रेष्ठतमेन । बृहंतः श्लोकाः पद्यानि कवीनां यस्मिंस्तेन च । ओजस्तेजः वीर्यं प्रभावः शौर्यमुत्साहः । एतैर्गुणैरतिश्रेष्ठत्वादृषभः श्रेष्ठ इति नाम चकार ॥ २ ॥ तस्य वर्षे मंडले ॥ ३ ॥ अवरुध्य प्राप्य । स्वैरमिच्छया गृहीतो नरलोकसमानधर्मो मनु-

---

करावें अशी उत्कट इच्छा उत्पन्न झाली ॥ १ ॥ याप्रमाणें मोठ्या देहानें, कीर्तीनें, तेजानें, बलानें, संपत्तीनें, यशानें, प्रभावानें व शौर्यानें युक्त असलेल्या त्या पुत्राचें पित्यानें (नाभिराजानें) ऋषभ (श्रेष्ठ) असें नांव ठेविलें ॥ २ ॥ त्या पुत्राचीं ऐश्वर्यादिक पाहून त्याच्याशीं स्पर्धा करणाऱ्या भगवान् इंद्रानें, त्याच्या खंडांत (राष्ट्रमंडळांत) पर्जन्यवृष्टि मुळींच केली नाहीं, तें जाणून योगेश्वर भगवान् ऋषभ देवानें हास्य केलें आणि आपल्या योगमायेच्या प्रभावेंकरून 'अजनाभ' या नांवाच्या आपल्या खंडांत वृष्टि पाडिली ॥ ३ ॥ नाभिराजा तर इच्छेप्रमाणें उत्तम पुत्राला पावोन अतिशय प्रेमभरानें विव्हळ होत्साता सद्गदित झालेल्या वाणीनें, ज्यानें स्वेच्छेनें मनुष्याकार स्वीकारला आहे अशा भगवान् पुराण पुरुषाला, हे वत्सा, हे ताता, अशीं प्रेमभावानें संबोधनें देऊन मायेनें हा आपला पुत्र आहे अशी बुद्धि धारण करणारा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तो राजा, त्याचें लालन करीत असतांना परम संतोष पावला ॥ ४ ॥ नंतर नागरिक जनांच्या मताप्रमाणें वागत असलेला तो नाभिराजा, नगरवासी जनांपासून तों प्रधानमंडळापर्यंत सर्वलोक आपल्या पुत्रावर प्रेम करित आहेत असें जाणून, समयानुरूप धर्ममर्यादांचें संरक्षण करण्याकरितां, त्या ऋषभपुत्राला राज्याचेठिकाणीं अभिषेक केला व त्याला ब्राह्मणांच्या स्वाधीन करून, आपण आपल्या मेरुदेवीनामक भार्येसहवर्तमान बदरिकाश्रमामध्यें जाऊन, दुसऱ्याला उपद्रव न करणारें व तीव्र अशा तपानें व एकाग्र मनाच्या समाधियोगानें, नरनारायणनामक भगवान् वासुदेवाची उपासना करून कांहीं काळानें त्याच्या महिम्याला पावला (जीवन्मुक्त झाला) ॥ ५ ॥ हे पांडवकुलोत्पन्ना राजा, त्याचे हे पुरातनकाळचे दोन श्लोक वर्णन करितात कीं— ज्याच्या भक्तिपुरःसर केलेल्या यज्ञानुष्ठानरूप कर्मानें हरिसुद्धां पुत्रत्व पावला, त्या नाभिराजाचें प्रसिद्ध असलेलें तें कर्म त्याच्या पश्चात् कोण बरें पुरुष आचरण करील? कोणीही करणार नाहीं ॥ ६ ॥ ज्याच्या यज्ञामध्यें यथेच्छ

ष्याकारो येन तम् । अतएव मायया स्वपुत्र इति विलसिता मतिर्यस्य ॥ ४ ॥ आपौरप्रकृति पौरान्प्रकृतींश्चाभिव्याप्य विदितोऽनुरागो यस्मिन् । कथंभूतो नाभिः । जनपदः जनाः पौरादयः पदं प्रमाणं यस्य सः । आत्मजं धर्ममर्यादारक्षणार्थमभिषिच्य । ब्राह्मणानामुत्संगे निधाय विशालायां बदरिकाश्रमे । प्रसन्नं परानुद्वेजकं निपुणं

विदितानुरागमापौरप्रकृति जनपदो राजा नाभिरात्मजं समयसेतुरक्षायामभिषिच्य ब्राह्मणेषूपनिधाय सह मेरुदेव्या विशालाया प्रसन्ननिपुणेन तपसा समाधियोगेन नरनारायणाख्यं भगवंतं वासुदेवमुपासीनः कालेन तन्महिमानमवाप ॥ ५ ॥ यस्य ह पाडवेय श्लोकावुदाहरंति ॥ को नु तत्कर्म राजर्षेर्नाभेरन्वाचरेत्पुमान् ॥ अपत्यतामगाद्यस्य हरिः शुद्धेन कर्मणा ॥ ६ ॥ ब्रह्मण्योऽन्यः कुतो नाभेर्विप्रा मंगलपूजिताः ॥ यस्य बर्हिषि यज्ञेशं दर्शयामासुरोजसा ॥ ७ ॥ अथ ह भगवानृषभदेवः स्ववर्षं कर्मक्षेत्रमनुमन्यमानः प्रदर्शितगुरुकुलवासो लब्धवरैर्गुरुभिरनुज्ञातो गृहमेधिनां धर्माननुशिक्षमाणो जयंत्यामिंद्रदत्तायामुभयलक्षणं कर्म समाम्नायाम्नातमभियुंजन्नात्मजानामात्मसमानानां शतं जनयामास ॥ ८ ॥

च तीव्रं तेन उपासीनः सेवमानः कालेन तन्महिमानं जीवन्मुक्तिमवाप ॥ ५ ॥ नाभेस्तत्प्रसिद्धं कर्म । अनु तदनंतरं को नु पुमानाचरेत् । न कोऽपीत्यर्थः ॥ ६ ॥ मंगलैर्दक्षिणाभिः पूजिताः संतः । ओजसा मंत्रबलेन ॥ ७ ॥ अन्येषां ग्रहणाय प्रदर्शितो गुरुकुलवासो येन । अनुशिक्षमाणोऽनुशिक्षयन् । उभयविधं श्रुतिस्मृतिलक्षणं कर्मविधि-

---

दक्षिणा देऊन पूजन केलेल्या ब्राह्मणांनीं, आपल्या प्रभावानें, यज्ञाधिपति अशा भगवंतालाहि प्रत्यक्ष दाखविलें त्या नाभिराजाहून दुसरा त्याच्यासारखा ब्राह्मणभक्त कोठें बरें आहे? कोठेंच नाहीं ॥ ७ ॥ असो इकडे नाभिराजाच्या पश्चात् राज्य करणाऱ्या त्या भगवान् ऋषभदेवानें, आपलें खंडच स्वर्गाला किंवा मोक्षाला साधनभूत असें कर्मानुष्ठान घडण्याचें क्षेत्र आहे असें जाणून, गृहस्थांनीं धर्माचरण कसें करावें त्याचें शिक्षण करण्याकरितां स्वतः गुरूच्या घरीं वास करून वेदाध्ययन केलें. नंतर इच्छित दक्षिणा मिळालेल्या गुरूंनीं गृहस्थाश्रम स्वीकारण्याविषयीं त्याला आज्ञा दिली असतां, त्यानें गृहस्थाश्रम स्वीकारून शास्त्रांत सांगितलेल्या श्रुत्युक्त व स्मृत्युक्त अशा दोन्ही प्रकारच्या श्रौतस्मार्त कर्मांचें अनुष्ठान चालविलें आणि इंद्रानें दिलेल्या जयंतीनामक कन्येच्या (आपल्या भार्येच्या) उदरीं गुणादिकांनीं आपल्यासारखे शंभर

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुत्र उत्पन्न केले ॥ ८ ॥ त्यांच्यामध्यें ज्येष्ठपुत्र भरत, तो प्रजानुरंजनादिक अत्युत्तम गुणांनीं युक्त व महायोगी होता, ज्या भरताचे उत्तम गुण असल्यामुळें त्याच्या या खंडालाहि सर्वलोक 'भरतखंड' असें ह्मणतात ॥ ९ ॥ त्याच्या मागचे– कुशावर्त, इलावर्त, ब्रह्मावर्त, मलय, केतु, भद्रसेन, इंद्रस्पृक्, विदर्भ आणि कीकट असे हे नऊ पुत्र नव्वदांपेक्षां वडील होते ॥ १० ॥ व त्या नव्वदांपैकीं, कवि, हरि, अंतरिक्ष, प्रबुद्ध, पिप्पलायन, आविर्होत्र, द्रुमिल, चमस आणि करभाजन हे नऊ पुत्र भागवतधर्माचा उपदेश करणारे झाले. त्यांचा पुढें वंश झाला नाहीं. ते जन्मापासूनच भगवंताची एकनिष्ठ भक्ति करणारे होते. त्यांचें भगवंताच्या माहात्म्यानें भरलेलें व शांतीचें केवळ निधानच असें उत्तम चरित्र वसुदेवनारदसंवादरूपानें पुढें एकादशस्कंधामध्यें आह्मी वर्णन करूं ॥ ११ ॥ १२ ॥ त्यांचे कनिष्ठ बंधु एक्यायशीं जयंतीचे पुत्र, पित्याची आज्ञा मान्य करण्यासाठीं वारंवार यज्ञ करणारे अतिनम्र व कर्माचरणानें अत्यंत शुद्ध असे महावैदिक ब्राह्मण झाले ॥ १३ ॥ भगवान् ऋषभदेवही ई॰_र, स्वतंत्र, व

मभियुंजन्ननुतिष्ठन् । जयंत्यां भार्यायामात्मजानां शतं जनयामास ॥ ८ ॥ ९ ॥ तं भरतमनु कुशावर्तादयो नव पुत्रा नवतेः प्रधाना ज्येष्ठाः ॥ १० ॥ ११ ॥ तदनंतरं कविप्रमुखा नव भागवतधर्मप्रदर्शकाः । वसुदेवनारदयोः संवादो यस्मिन् । उपरिष्टादेकादशस्कंधे ॥ १२ ॥ महाशालीना अतिविनीताः ॥ १३ ॥ केवलः शुद्धः । विपरी-

येषां खलु महायोगी भरतो ज्येष्ठः श्रेष्ठगुण आसीद्येनेदं वर्षं भारतमिति व्यपदिशंति ॥ ९ ॥ तमनु कुशावर्त इलावर्तो ब्रह्मावर्तो
मलयः केतुर्भद्रसेन इंद्रस्पृग्विदर्भः कीकट इति नव नवतिप्रधानाः ॥ १० ॥ कविर्हरिरंतरिक्षः प्रबुद्धः पिप्पलायनः ॥ आविर्होत्रो-
ऽथद्रुमिलश्चमसः करभाजनः ॥ ११ ॥ इति भागवतधर्मदर्शना नव महाभागवतास्तेषां सुचरितं भगवन्महिमोपबृंहितं वसुदेवना-
रदसंवादमुपशमायनमुपरिष्टाद्वर्णयिष्यामः ॥ १२ ॥ यवीयांस एकाशीतिर्जायंतेयाः पितुरादेशकरा महाशालीना महाश्रोत्रिया
यज्ञशीलाः कर्मविशुद्धा ब्राह्मणा बभूवुः ॥ १३ ॥ भगवानृषभसंज्ञ आत्मतंत्रः स्वयं नित्यनिवृत्तानर्थपरंपरः केवलानंदानुभव
ईश्वर एव विपरीतवत्कर्माण्यारभमाणः कालेनानुगतं धर्ममाचरणेनोपशिक्षयन्नतद्विदां सम उपशांतो मैत्रः कारुणिको धर्मार्थयशः-
प्रजानंदामृतावरोधेन गृहेषु लोकं नियमयत् ॥ १४ ॥ यद्यच्छीर्षण्याचरितं तत्तदनुवर्तते लोकः ॥ १५ ॥ यद्यपि स्वविदितं सक-
लधर्मं ब्राह्मं गुह्यं ब्राह्मणैर्दर्शितमार्गेण सामादिभिरुपायैर्जनतामनुशशास ॥ १६ ॥

तवदनीश्वरवत्कर्माणि कुर्वन् । नियमयत् नियमितवान् । पाठांतरे नितरामरमयत् । कर्मकरणे हेतुः । अनुगतमुत्सन्नं धर्मं स्वयमाचरणेनातद्विदामुपशिक्षयन् । कथम् । धर्मादीनामवरोधेन संग्रहेण । आनंदो भोगः । अमृतं मोक्षः ॥ १४ ॥ शीर्षण्यः श्रेष्ठस्तेनाचरितम् । तत्तदनुवर्तते यतः ॥ १५ ॥ सकलो धर्मो यस्मिंस्तद्ब्राह्मं गुह्यं वेदरहस्यं

केवळ आनंदानुभवरूपी असल्यामुळें ज्यापासून सर्व अनर्थपरंपरा नित्य दूर झाल्या होत्या असा तो सर्वांचेठिकाणीं समदृष्टि, रागलोभादिदोषरहित, सर्वांच्या हिताविषयीं प्रयत्न करणारा व सर्वांवर दया करणारा होता, तथापि तो असमर्थ जीवांसारखें कर्म आचरण करीत होत्साता काळानें उच्छिन्न झालेल्या धर्माचें स्वतः आचरण करून धर्माचरण न जाणणाऱ्या लोकांना शिकवीत शिकवीत धर्म, अर्थ, सत्कीर्ति, पुत्रादिसंतति व विषयभोगजनित आनंद, यांच्या संग्रहानें सर्वलोकांनां स्वेच्छाचारापासून निवृत्त करून शास्त्राचाराचेठिकाणीं योजिता झाला ॥ १४ ॥ कारण, श्रेष्ठ पुरुषानें चांगलें किंवा वाईट जें कर्म आचरण केलें असेल तेंच इतरहि लोक आचरण करितात ॥ १५ ॥ सर्व धर्मांनीं युक्त असें वेदानें सांगितलेलें धर्मरहस्य जरी त्या ऋषभदेवाला स्वतःला ठाऊक होतें तथापि त्यानें तें ब्राह्मणांना विचारून त्यांनीं सांगितलेल्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मार्गानेंच सामादिक उपायांनीं सर्व लोकांना शिकविलें ॥ १६ ॥ आणि त्यानें द्रव्य (व्रीह्यादिक), देश (पवित्रभूमि), काल (वसंतादिक), वय (तारुण्यादिक), श्रद्धा, ऋत्विज आणि नानाप्रकारचे देवतांचे उद्देश यांणीं समृद्ध अशा सर्व प्रकारच्याहि यज्ञांनीं यज्ञेश्वर भगवंताचें यथाशास्त्र शंभरवेळां यजन केलें ॥ १७ ॥ त्या भगवान् ऋषभानें रक्षण केलेल्या या भरतखंडामध्यें अंत्यजादि नीचयोनीमध्यें उत्पन्न झालेलाहि कोणी पुरुष, मुळींच नसणाऱ्या आकाशपुष्पादिक वस्तूंप्रमाणें, सर्वलोकपोषक अशा ऋषभदेवाचेठिकाणीं प्रतिक्षणीं वृद्धिंगत झालेल्या स्नेहातिशयावांचून दुसरी कोणतीहि वस्तु कधींहि कोणत्याहि कारणानें दुसऱ्याकडून आपणाला मिळावी अशी इच्छा करीत नसे. व ती वस्तु दुसऱ्याची आहे असेंही पाहत नसे ॥ १८ ॥ तो भगवान् ऋषभदेव, एकेवेळीं भूमीवरपर्यटन करित असतां ब्रह्मावर्तक्षेत्रांत जाऊन, तेथें

यद्यपि स्वेनैव विदितं तथाऽपि ब्राह्मणान् पृष्ट्वैव करोतीत्यर्थः ॥ १६ ॥ द्रव्यादिभिरुपचितैर्यज्ञैरिष्टवान् । तत्र वयो यौवनम् युवैव धर्ममन्विच्छेदिति वचनात् । वि-यद्यपि... विधोद्देशा नानादेवतोद्देशाः । यथोपदेशं यथाविधि ॥ १७ ॥ अन्यस्मात्सकाशादात्मनः कश्चिदपि किमपि कथंचनापि न वांछति । इच्छानुदये दृष्टांतः । अविद्यमानं खपुष्पादिकमिव । न चान्यदीयमवेक्षतेऽपीत्यर्थः । भर्तरि ऋषभदेवे प्रतिक्षणमुल्लसितस्नेहोद्रेकं विनाऽन्यत्र वांछति ॥ १८ ॥ अवहितात्मनः संयतचित्तानपि प्रजानुशासनार्थमुपशि-

द्रव्यदेशकालवयःश्रद्धर्त्विग्विविधोद्देशोपचितैः सर्वैरपि क्रतुभिर्यथोपदेशं शतकृत्व इयाज ॥ १७ ॥ भगवतर्षभेण परिरक्ष्यमाण एतस्मिन्वर्षे न कश्चन पुरुषो वांछत्यविद्यमानमिवात्मनोऽन्यस्मात्कथंचन किमपि कर्हिचिदवेक्षते भर्तर्यनुसवनं विजृंभितस्नेहातिशयमंतरेण ॥ १८ ॥ स कदाचिदटमानो भगवानृषभो ब्रह्मावर्तगतो ब्रह्मर्षिप्रवरसभायां प्रजानां निशामयंतीनामात्मजानवहितात्मनः प्रश्रयप्रणयभरसुयंत्रितानप्युपशिक्षयन्निति होवाच ॥ १९ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे पंचमस्कंधे ऋषभदेवानुचरिते चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥ ॥ ऋषभ उवाच ॥ नायं देहो देहभाजां नृलोके कष्टान्कामानर्हते विड्भुजां ये ॥ तपो दिव्यं पुत्रका येन सत्त्वं शुद्ध्येद्यस्माद्ब्रह्मसौख्यं त्वनंतम् ॥ १ ॥

क्षयन्निति वक्ष्यमाणमुवाच ॥ १९ ॥ इति पंचमस्कंधे भावार्थदीपिकायां टीकायां चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥ ॥ पंचमे मोक्षधर्मोपदेशैः पुत्रानुशासनम् । उक्तं पारमहंस्यं च तस्य द्वंद्वतितिक्षया ॥ १ ॥ विड्भुजामपि ये संति तान्कष्टान्दुःखदान्कामान्विषयान्नार्हति तद्योग्योऽयं मनुष्यदेहो न भवति । दिव्यमुत्कृष्टम् । येन तपसा । यस्माच्छुद्धात्सत्त्वात्-

अतिश्रेष्ठ ब्रह्मर्षींच्या सभेमध्यें सर्व प्रजा श्रवण करित असतां, अंतःकरणाचा निग्रह केलेल्या व नम्रता आणि प्रेम ह्यांच्या अतिशयामुळें उत्तम वर्तन असलेल्याहि आपल्या पुत्रांस सर्वप्रजांना समजण्याकरितां उपदेश करित होत्साता असें ह्मणाला कीं,— ॥ १९ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील पंचमस्कंधामध्यें हा चवथा अध्याय समाप्त झाला ॥ ४ ॥ आतां या पांचव्या अध्यायामध्यें ऋषभदेवानें, मोक्षधर्माचा उपदेश करणाऱ्या वाक्यांनीं पुत्रांना केलेल्या शिक्षणाचें व त्यानें स्वतः सुखदुःखादिक द्वंद्वें सहन करून केलेल्या परमहंसधर्माच्या आचरणाचें वर्णन केलें आहे ॥ १ ॥ ऋषभदेव ह्मणाला— हे पुत्रहो, या मनुष्यलोकाचेठिकाणीं प्राण्यामध्यें प्राप्त झालेला हा मनुष्यदेह, विष्ठा भक्षण करणाऱ्या श्वानसूकरादिकांनाहि प्राप्त होणारे जे विषयभोग त्यांचें सेवन करण्यास योग्य नाहीं; तर ज्याच्या योगानें अंतःकरण शुद्ध होतें व जें अंतःकरण शुद्ध झालें असतां

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अखंड ब्रह्मसुखाची प्राप्ति होत्ये तें स्वधर्माचरणरूप उत्कृष्ट तपच आचरण करण्यास योग्य आहे ॥ १ ॥ हे पुत्रहो, मोठमोठे विचारी पुरुष, साधूंची सेवा करणें हेंच मुक्तीचें द्वार आहे असें ह्मणतात आणि स्त्रीलंपट असलेल्या पुरुषांची संगति धरणें हेंच नरकाचें द्वार आहे असें ह्मणतात. त्या साधूंचें लक्षण असें आहे कीं,-- जे अत्यंत शांत, क्रोधरहित, सर्व प्राणिमात्रांचेठिकाणीं समबुद्धि धारण करणारे व सदाचारसंपन्न असतात तेच माहात्मे साधु होत ॥ २ ॥ अथवा मी जो ईश्वर त्याचेठिकाणीं केलेंले सख्य (प्रेम) हेंच ज्यांचा पुरुषार्थ आहे, देहनिर्वाहापेक्षां ज्यास्ती वस्तूंची ज्यांना इच्छा नाहीं आणि ज्यांच्यामध्यें पोट भरण्याच्या संबंधाच्याच वार्ता निघत असतात त्या लोकाचेठिकाणीं व स्त्री, पुत्र आणि द्रव्य यांनीं युक्त असलेल्या गृहाचेठिकाणीं ज्यांना प्रीति नसत्ये ते माहात्मे होत ॥ ३ ॥ हे पुत्रहो, जेव्हां हा पुरुष. दुष्टांच्या संगतीच्या योगानें आपल्या इंद्रियांची तृप्ति करून घेण्याकरितां खटपट करितो तेव्हां खरोखर उन्मत्त झाल्यासारखा (करावें काय व न करावें काय

त्वादनंतं ब्रह्मसुखं भवति ॥ १ ॥ मोक्षबंधयोर्निदानमाह । महत्सेवामिति । तमसः संसारस्य द्वारं योषितां ये संगिनस्तेषां संगम् । महतां लक्षणमाह सार्धेन । महांत इति । साधवः सदाचाराः ॥ २ ॥ मयि ईशे कृतं सौहृदमेवार्थः पुरुषार्थो येषाम् । वाशब्देनान्यनिरपेक्षस्यैवास्य लक्षणत्वं दर्शयति । देहं बिभर्तीति । देहंभरा विषयवार्तैव न धर्मविषया येषु तेषु जनेषु जायादियुक्तेषु गृहेषु च । रातिर्मित्रं धनं वा । पाठांतरे जायादिप्रदेषु यावदर्थाश्च यावदर्थमेवार्थो येषामिति मध्यमपदलोपी समासः । देहनि-

महत्सेवां द्वारमाहुर्विमुक्तेस्तमोद्वारं योषितां संगिसंगम् ॥ महांतस्ते समचित्ताः प्रशांता विमन्यवः सुहृदः साधवो ये ॥ २ ॥ ये वा मयीशे कृतसौहृदार्था जनेषु देहंभरवार्तिकेषु ॥ गृहेषु जायात्मजरातिमत्सु न प्रीतियुक्ता यावदर्थाश्च लोके ॥ ३ ॥ नूनं प्रमत्तः कुरुते विकर्म यदिंद्रियप्रीतय आपृणोति ॥ न साधु मन्ये यत आत्मनोऽयमसन्नपि क्लेशद आस देहः ॥ ४ ॥ पराभवस्तावदबोधजातो यावन्न जिज्ञासत आत्मतत्त्वम् ॥ यावत्क्रियास्तावदिदं मनो वै कर्मात्मकं येन शरीरबंधः ॥ ५ ॥ एवं मनः कर्मवशं प्रयुंक्ते अविद्ययाऽऽत्मन्युपधीयमाने ॥ प्रीतिर्न यावन्मयि वासुदेवे न मुच्यते देहयोगेन तावत् ॥ ६ ॥

र्वाहाधिकस्पृहाशून्या इत्यर्थः ॥ ३ ॥ कामान्नार्हतीति यदुक्तं तदुपपादयति । नूनमिति । यद्यदा इंद्रियप्रीतये आपृणोति व्याप्रियते तदा प्रमत्तःसन्विकर्म पापं नूनं कुरुते । यतो विकर्मणः प्राचीनादयं क्लेशदो दोहो जातस्तस्यैव पुनःकरणं साधु न मन्ये ॥ ४ ॥ देहादेर्नश्वरत्वात्कियानयमनर्थ इत्याशंक्याह । पराभवो देहादिना स्वरूपाभिभवोऽज्ञानकृतस्तावद्भवति । तत्र हेतुः । यावत्क्रियाः स्युस्तावदिदं मनो हि कर्मस्वभावमेव स्यात् । येन कर्मात्मकेन मनसा ॥ ५ ॥ उक्तमुपसंहरति । एवं पूर्वकृतं कर्म कर्तृभूतं मनः कर्मभूतं वशं प्रयुंक्ते पुनः कर्मनिष्ठं करोतीति । जीवन्मुक्तकर्मव्यावृत्त्यर्थमाह । अविद्ययेति। अविद्यया आत्मनि उपधीयमाने आच्छाद्यमाने सति एवं मनः कर्तृ पुरुषं कर्मवशं

यांच्या अनुसंधानानें रहित) होऊन पापकर्म आचरण करितो, तें मी चांगलें असें मानीत नाहीं. कारण, त्या पूर्वीं केलेल्या पापकर्मांच्या योगेंकरूनच हा देह वस्तुतः मिथ्याभूत असतांहि आत्म्याला क्लेश देणारा झाला आहे ॥ ४ ॥ जोंपर्यंत प्राणी, आपल्या खऱ्या सच्चिदानंदस्वरूपाच्या विचाराची इच्छा करून त्याचा साक्षात्कार करून घेत नाहीं तोंपर्यंत त्याला अज्ञानेंकरून झालेला स्वरूपविस्मृतिरूप पराभव प्राप्त होतो ह्मणजे जोंपर्यंत अज्ञानानें देहाभिमान असतो तोंपर्यंत नित्यनैमित्तिकादिक कर्में सुटत नाहींत व जोंपर्यंत तीं कर्में आहेत तोंपर्यंत हें मन प्रवृत्तिस्वभावानेंच युक्त होतें त्याच्या योगानें संसारबंध प्राप्त होतो ॥ ५ ॥ याप्रमाणें देहादिकांच्या अध्यासेंकरून आत्म्याचें आच्छादन झालें असतां पूर्वीं केलेलें कर्मच, पुरुषाच्या मनाला आपल्या स्वाधीन करून घेतें ह्मणजे त्या पुरुषाकडून वारंवार कर्मेंच करवितें. ह्मणून जोंपर्यंत

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुरुषाला वासुदेव अशा माझेठिकाणीं प्रीति उत्पन्न झाली नाहीं तोंपर्यंत तो पुरुष देहसंबंधापासून मुक्त होत नाहीं ॥ ६ ॥ जेव्हां स्वार्थाविषयीं असावध व मीच विद्वान् असा अभिमान धारण करणारा हा पुरुष, स्त्रीसंगी पुरुषांच्या नादीं लागून, 'इंद्रियांची विषयासक्तिरूप चेष्टा मिथ्याभूत आहे' असें पाहत नाहीं (विषयासक्त होतो) तेव्हां तो अज्ञानी पुरुष, एकाएकीं आपल्या स्वरूपस्थितीला विसरून, ज्यामध्यें मैथुनसुख हेंच मुख्य आहे अशा घराचा आश्रय करून, तेथें नानाप्रकारचीं दुःखें पावतो ॥ ७ ॥ पुरुष व स्त्री ह्या उभयतांचा परस्पर असलेला जो 'ही आपली स्त्री व हा आपला पति असा' अभिमान त्याला त्यांचा हा मोठाच दुसरा दुर्भेद्य हृदयग्रंथि आहे असें ह्मणतात. कारण, प्रत्येक प्राण्याला हृदयग्रंथीच्या योगानें देहेंद्रियादिकांचेठिकाणींमात्र 'मी आणि माझें' असा अभिमान असतो आणि या मिथुनीभावाच्या योगें-करून तर प्राण्याला- घर, क्षेत्र, पुत्र, आप्त, द्रव्य इत्यादिकांच्याठिकाणीं 'हीं माझीं आहेत' असा मोठाच मोह प्राप्त होतो ॥ ८ ॥ वास्तव जेव्हां या जनाचा कर्मांच्या

प्रयुंक्त इति वा ॥ ६ ॥ न केवलं देहयोगमात्रमनर्थांतरं चेत्याह । यदा गुणानामिंद्रियाणामीहां चेष्टामयथा मिथ्या आत्मीया न भवतीति विपश्चिद्विवेकी सन्न पश्यति । नु पश्यतीति पाठे अयथा आत्मीयत्वेनेत्यर्थः । तत्र तदा सहसा गतस्मृतिः स्वरूपस्मृतिशून्यः सन्नज्ञो मूढो मैथुनसुखप्रधानं गृहं प्राप्य तापान्विंदति ॥ ७ ॥ ननु यथोपयोगं स्त्रिया मिथुनीभूय सुखमात्रमनुभवतः कुतस्तापाः स्युस्तत्राह । पुंस इति । प्रत्येकं तयोरेकैको हृदयग्रंथिरस्त्येव । एवं मिथः परस्परं स्थूलमन्यं हृदययोर्ग्रंथिं दुर्भेदं वदंति ।

यदा न पश्यत्ययथा गुणेहां स्वार्थे प्रमत्तः सहसा विपश्चित् ॥ गतस्मृतिर्विंदति तत्र तापानासाद्य मैथुन्यमगारमज्ञः ॥ ७ ॥ पुंसः स्त्रिया मिथुनीभावमेतं तयोर्मिथो हृदयग्रंथिमाहुः ॥ अतो गृहक्षेत्रसुताप्तवित्तैर्जनस्य मोहोऽयमहंममेति ॥ ८ ॥ यदा मनो हृदयग्रंथिरस्य कर्मानुबद्धो दृढ आश्लथेत ॥ तदा जनः संपरिवर्ततेऽस्मान्मुक्तः परं यात्यतिहाय हेतुम् ॥ ९ ॥ हंसे गुरौ मयि भक्त्याऽनुवृत्त्या वितृष्णया द्वंद्वतितिक्षया च ॥ सर्वत्र जंतोर्व्यसनावगत्या जिज्ञासया तपसेहानिवृत्त्या ॥ १० ॥ मत्कर्मभिर्मत्कथया च नित्यं मद्देवसंगाद्गुणकीर्तनान्मे ॥ निर्वैरसाम्योपशमेन पुत्रा जिहासया देहगेहात्मबुद्धेः ॥ ११ ॥

कुत इत्यत आह । अतोऽस्मान्मिथुनीभावात् । प्रत्येकं हृदयग्रंथिना तु देहेंद्रियमात्रेऽहंममेति मोहोऽस्माच्चु गृहादिभिर्विषयभूतैर्महान्मोहो भवेदित्यर्थः ॥ ८ ॥ कदा तर्हि तस्य निवृत्तिरत आह । यदाऽस्य जनस्य कर्मभिरनुबद्धो दृढो मनोरूपो हृदयग्रंथिः शिथिलो भवेत्तदाऽस्मान्मिथुनीभावान्निवर्तते । ततश्च हेतुमहंकारं त्यक्त्वा मुक्तः सन्परं पदं याति ॥ ९ ॥ हेतुमतिहायेत्युक्तं तत्र पंचविंशतिसाधनान्याह चतुर्भिः । हंसे मयि गुरौ भक्तिः सेवा । अनुवृत्तिस्तत्परता विगततृष्णया । सर्वत्र लोकांतरेऽपि व्यसनावगत्या दुःखानुसंधानेन । ईहानिवृत्त्या काम्यकर्मत्यागेन ॥ १० ॥ मदर्थैः कर्मभिः । अहमेव देवो येषां तैः संगात् । हे पुत्राः देहगेहयोरात्मबुद्धेरहंममेति बुद्धेः ॥ ११ ॥

योगानें बांधला गेलेला हा मनोरूप दृढ हृदयग्रंथि, शिथिल होतो तेव्हांच हा जन, या मिथुनीभावादिरूप संसारापासून विमुक्त होऊन अनर्थाला कारणभूत अशा अहंकाराचा त्याग करून संसारापासून मुक्त होत्साता परमपदाप्रत पावतो ॥ ९ ॥ आतां अहंकारनिवृत्तीविषयीं साधनें सांगतात– हे पुत्रहो, सदसद्विवेकयुक्त अशा गुरुरूपी माझेठिकाणीं भक्ति करणें, माझी सेवा करणें, माझ्या सेवेंत तत्परता राखणें, भोगेच्छा सोडून देणें, शीतोष्णादिक द्वंद्वें सहन करणें, प्राण्याला यालोकीं व परलोकीं दुःखेंच भोगावीं लागतात असें मनांत वागविणें, ज्ञानप्राप्तीची इच्छा धारण करणें, तपश्चर्या करणें, काम्य कर्में करण्याचें सोडून देणें,– ॥ १० ॥ सर्व कर्में माझ्या प्रीत्यर्थ करीत जाणें, नित्य माझ्या कथा वर्णन करणें, जे लोक मला आपला देव मानितात त्यांचा समागम करणें, माझ्या गुणांचें गायन करणें, कोणाशींहि वैर न

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करणें, समदृष्टि ठेवणें, शांति धारण करणें, शरीर व घर ह्यांवरील अहंता व ममता तोडण्याची इच्छा धारण करणें, ॥ ११ ॥ अध्यात्मशास्त्राचा अभ्यास चालविणें, एकांतस्थळीं वास करणें, प्राण, इंद्रियें व मन यांना पूर्णपणें स्वाधीन ठेवणें, गुरुवेदांतवाक्यांवर उत्तमप्रकारें विश्वास ठेवणें, निरंतर ब्रह्मचर्यव्रत धारण करणें, कर्तव्य कर्म करण्यास कधींही न चुकणें, व्यर्थ भाषणांचें वर्जन करणें ॥ १२ ॥ सर्वठिकाणीं परमेश्वर व्यापून राहिला आहे असा बोध करून देण्यांत निपुण असें अनुभवपर्यंत ज्ञान संपादन करणें, आणि समाधियोगाचा अभ्यास करणें. यांच्या योगेंकरून धैर्य, प्रयत्न आणि विवेक यांनीं युक्त असलेला कुशल पुरुष, संसाराला कारणभूत अशा अहंकाररूपी लिंगशरीराचा निरास करील ॥ १३ ॥ यास्तव सावध असलेल्या पुरुषानें, अज्ञानानें प्राप्त झालेला व कर्मांचें वसतिस्थान अशा आपल्या हृदयग्रंथिरूप बंधनाचा, या वर सांगितलेल्या उपायांच्या यथाशास्त्र आचरणेंकरून वासनेसहवर्तमान निरास करून नंतर मुक्तिसाधनाचा प्रयत्न सोडून द्यावा ॥ १४ ॥ माझा लोक प्राप्त होण्याची इच्छा करणारा व माझा अनुग्रह होणें हाच पुरुषार्थ आहे असें मानणारा, पिता, गुरु किंवा राजा

अध्यात्मयोगेनाध्यात्मशास्त्राभ्यासेन सध्र्यक् सम्यगिति सर्वत्र संबंधः । असंप्रमादेन कर्तव्यस्यापरित्यागेन ॥ १२ ॥ सर्वत्र मद्भावो मद्भावना तत्र विचक्षणेन निपुणेन विज्ञानविराजितेनानुभवपर्यंतेन ज्ञानेन योगेन समाधिना धृत्युद्यमसत्त्वयुक्तो धैर्यप्रयत्नविवेकैर्युक्तः सन्नहंकाराख्यमुपाधिं व्यपोहेन्निरस्येत् ॥ १३ ॥ ततः साधनादुपरमेदि-

अध्यात्मयोगेन विविक्तसेवया प्राणेंद्रियात्माभिजयेन सध्र्यक् ॥ सच्छ्रद्धया ब्रह्मचर्येण शश्वदसंप्रमादेन यमेन वाचाम् ॥ १२ ॥ सर्वत्र मद्भावविचक्षणेन ज्ञानेन विज्ञानविराजितेन ॥ योगेन धृत्युद्यमसत्त्वयुक्तो लिंगं व्यपोहेत्कुशलोऽहमाख्यम् ॥ १३ ॥ कर्माशयं हृदयग्रंथिबंधमविद्ययाऽऽसादितमप्रमत्तः ॥ अनेन योगेन यथोपदेशं सम्यग्व्यपोह्योपरमेत योगात् ॥ १४ ॥ पुत्रांश्च शिष्यांश्च नृपो गुरुर्वा मल्लोककामो मदनुग्रहार्थः ॥ इत्थं विमन्युरनुशिष्यादतज्ज्ञान्न योजयेत्कर्मसु कर्ममूढान् ॥ कं योजयन्मनुजोऽर्थं लभेत निपातयन्नष्टदृशं हि गर्ते ॥ १५ ॥ लोकः स्वयं श्रेयसि नष्टदृष्टिर्योऽर्थान्समीहेत निकामकामः ॥ अन्योन्यवैरः सुखलेशहेतोरनंतदुःखं च न वेद मूढः ॥ १६ ॥

त्याह । कर्माण्याशेरते यस्मिन् । योगेनोपायेन । यद्यपि फले सिद्धे साधनोपरमः सिद्ध एव तथापि यावद्देहपातं तदभ्यासशंकावारणायोक्तम् ॥ १४ ॥ किंच । पुत्रान्पिता शिष्यान्वा गुरुर्नृपश्च प्रजा एवमनुशिक्षयेत् । मम लोकं यः कामयते । यद्वा । मदनुग्रह एवार्थो यस्य । विमन्युः शिक्षितस्याकरणेऽपि कोपशून्यः। अतज्ज्ञांस्तत्त्वमविदुषः। श्रेयोबुद्ध्या कर्मसु मूढान् । अन्यथोपदेशे प्रत्यवायमाह । मनुजः काम्यकर्मसु पुरुषं योजयन् गर्ते संसारकूपे तं पातयति स मनुजः कमर्थं पुरुषार्थं लभेत न कमपीत्यर्थः ॥ १५ ॥ न योजयेदित्ये-

यांनीं पुत्रांना, शिष्यांना किंवा प्रजांना पूर्वीं सांगितल्याप्रमाणें, आपलें जरी त्यांनीं ऐकिलें नाहीं तरी क्रोधरहित होऊन शिक्षण करावें. पुरुषार्थप्राप्तीचें साधन न जाणणाऱ्या कर्ममूढ पुरुषांना पुन्हा काम्यकर्मांचेठिकाणींच योजूं नये; कारण, आंधळ्या पुरुषाला आणखी खाड्यांत पाडण्याप्रमाणें अज्ञानी कर्मांध पुरुषाला पुन्हा त्या काम्यकर्मांमध्यें प्रवृत्त करून संसारकूपामध्यें पाडणारा पुरुष, कोणत्यावरें पुरुषार्थाला पावेल ? कोणत्याच पावणार नाहीं ॥ १५ ॥ याचेंच स्पष्टीकरण करितात—हा लोकव्यवहारांतील प्राणी स्वतःचें कल्याण साधून घेण्याविषयीं ज्ञानशून्य असतो; कारण, जो अतिशय भोगेच्छा धारण करणारा असल्यामुळें परस्पर वैरभावानें युक्त होऊन दुसऱ्याच्या द्रोहानें भोग्य विषयांची इच्छा करितो, तो अज्ञानानें मोहित होत्साता स्वल्प सुखासाठीं दुसऱ्याच्या द्रोहापासून उत्पन्न झालेलें नरकपातादिक अपरिमित ॥ १३ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दुःख जाणत नाहीं ॥ १६ ॥ त्या अविचेमध्यें निमग्न झालेल्या कुबुद्धि पुरुषाला पाहून, ह्याला तुच्छ विषयसुखाकरितां अनंत दुःख भोगावें लागतें, असें स्वतः जाणणारा कोण बरें विवेकी दयाळु पुरुष, त्याला पुन्हा त्याच मार्गाचेठिकाणीं, जसें आडमार्गानें जाणाऱ्या आंधळ्याला, तूं याचमार्गानें जा असें सांगणें त्याप्रमाणें प्रवृत्त करील ? कोणीच करणार नाहीं ॥ १७ ॥ यास्तव भक्तिमार्गाच्या उपदेशानें संसाररूप मृत्यूच्या तावडींत सांपडलेल्या पुरुषाला जो सोडवीत नाहीं तो गुरु नव्हे; तो स्वजन नव्हे; तो पिता नव्हे; ती जननी नव्हे; तें दैवत नव्हे, व तो पतिहि नव्हे. अथवा संसाररूप मृत्यूनें गांठलेल्या पुरुषाला मुक्त करण्यास जो समर्थ नसेल त्यानें त्याचा गुरुच होऊं नये. स्वजन होउं नये, पुत्रोत्पादनाविषयीं यत्नच करूं नये. माता होऊं नये, कोणापासून पूजा ग्रहण करूं नये व कोणाचें पाणिग्रहणहि करूं नये ॥ १८ ॥ याप्रमाणें

तदुपपादयति । लोक इति त्रिभिः । नष्टदृष्टित्वे हेतुः । य इति । निकाममतिशयेन कामो यस्य ॥ १६ ॥ तमीदृशं कुबुद्धिं दृष्ट्वा तत्रैव कस्तं प्रवर्तयेन्न कोऽपि । उत्पथेन गच्छंतमंधं यथा तेनैव गच्छेति को ब्रूयात् ॥ १७ ॥ समुपेतः संप्राप्तो मृत्युः संसारो येन तम् । ततो भक्तिमार्गोपदेशेन यो न मोचयेत्स गुर्वादिर्न भवतीत्यर्थः । यद्वा यस्तं मोचयितुं न शक्नुयात्स तस्य गुर्वादिर्न स्यादिति निषेधः । ततश्च पिता न स्यादिति पुत्रोत्पत्तौ यत्नो न कार्य इत्यर्थः । दैवं देवता न स्यादिति पूजा न ग्राह्येत्यर्थः । एवमन्यदपि द्रष्टव्यम् ॥ १८ ॥ एवं मोक्षधर्मानुपदिश्य भ्रातृशुश्रूषणलक्षणं धर्मं स्पर्धादिनिवृत्तये तेषां जन्मकथनपूर्वकमाह ।

कस्तं स्वयं तदभिज्ञो विपश्चिद्विद्यायामंतरे वर्तमानम् ॥ दृष्ट्वा पुनस्तं सघृणः कुबुद्धिं प्रयोजयेदुत्पथगं यथांधम् ॥ १७ ॥ गुरुर्न स
स्यात्स्वजनो न स स्यात्पिता न स स्याज्जननी न सा स्यात् ॥ दैवं न तत्स्यान्न पतिश्च स स्यान्न मोचयेद्यः समुपेतमृत्युम् ॥ १८ ॥ इदं
शरीरं मम दुर्विभाव्यं सत्त्वं हि मे हृदयं यत्र धर्मः ॥ पृष्ठे कृतो मे यदधर्म आरादतो हि मामृषभं प्राहुरार्याः ॥ १९ ॥ तस्माद्भवंतो
हृदयेन जाताः सर्वे महीयांसममुं सनाभम् ॥ अक्लिष्टबुद्ध्या भरतं भजध्वं शुश्रूषणं तद्भरणं प्रजानाम् ॥ २० ॥ भूतेषु वीरुद्भ्य
उदुत्तमा ये सरीसृपास्तेषु सबोधनिष्ठाः ॥ ततो मनुष्याः प्रमथास्ततोऽपि गंधर्वसिद्धा विबुधानुगा ये ॥ २१ ॥

द्वाभ्याम् । इदं मनुष्याकारं शरीरं मम दुर्विभाव्यमवितर्क्यं मदिच्छाविलसितम् । नत्वहं प्राकृतो मनुष्य इत्यर्थः । मे हृदयं तु सत्त्वम् । किं यद्धृदयम् । यत्र धर्मस्तत् शुद्धं सत्त्वमित्यर्थः । कुतः । यद्यस्मान्मयाऽधर्मो दूरादेव पृष्ठे कृत उत्सारितः अतएव मामृषभं श्रेष्ठं प्राहुः ॥ १९ ॥ भवंतश्च हृदयेन शुद्धसत्त्वमयेन जातास्तस्मान्मत्सरं हित्वा महत्तमं सनाभं सोदरं भजध्वम् । ननु त्वत्पुत्रत्वात्त्वां वयं भजेम राजपुत्रत्वात्प्रजाश्च पालयामेति चेदत आह । तदेव मे शुश्रूषणं प्रजानां च पालनम् । भरतानुवृत्त्यैव सर्वं कृतं स्यादिति भावः ॥ २० ॥ इदानीं ब्राह्मणाश्च सेव्या इत्याशयेन तेषां सर्वेभ्यः श्रैष्ठ्यमाह पंचभिः । भूतेषु चेतनाचेतनेषु । विरोहंतीति वीरुधः स्थावरा उदुच्चैर-

---

मोक्षधर्मांचा उपदेश करून आतां आपल्या पुत्रांची परस्परांविषयीं स्पर्धा नाहींशी होण्याकरितां ऋषभदेव आपलें जन्मकथानक सांगून त्यांना भ्रातृशुश्रूषेचा उपदेश करितो—हे पुत्रहो, हें मनुष्याकाररूप माझें शरीर मी स्वेच्छेनें ग्रहणकेलेलें असल्यामुळें अतर्क्य आहे. जेथें धर्म राहतो असें शुद्धसत्त्वरूपी माझें हृदय आहे आणि ज्याअर्थी मी आपल्या पृष्ठभागीं अधर्माचा दुरूनच त्याग केला आहे त्याअर्थी मला वृद्धजन ऋषभ (श्रेष्ठ) असें ह्मणतात ॥ १९ ॥ आणि तुह्मीं माझ्या शुद्धसत्त्वात्मक हृदयापासून उत्पन्न झालां आहां, ह्मणून तुह्मीं सर्वजण, गुणांनीं श्रेष्ठ अशा ह्या आपल्या बंधुरूपी भरताचें निष्कपटबुद्धिनें सेवन करा. तेंच माझें शुश्रूषण व प्रजांचें पालन होईल. ह्मणजे भरताच्या अनुवृत्तीनेंच प्रजांचें पालन करावें स्वातंत्र्यानें करूं नये ॥ २० ॥ आतां ब्राह्मणांची सेवा सांगण्याक

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रितां त्यांचें श्रेष्ठत्व वर्णन करितो—हे पुत्रहो, सचेतन व अचेतन अशा दोनप्रकारच्या प्राणिमात्रांमध्यें मृत्तिका पाषाण इत्यादिक स्थावरांपेक्षां वृक्षादिक स्थावर श्रेष्ठ होत. त्यांच्यापेक्षां जंगम प्राणी श्रेष्ठ होत. त्यांमध्येंहि ज्यांना ज्ञानस्थिति आहे ते पश्वादिक श्रेष्ठ होत, त्यांमध्येंहि मनुष्य श्रेष्ठ, त्यांमध्येंहि प्रमथ, भूत, प्रेत इत्यादिक देवयोनि असल्यामुळें श्रेष्ठ होत. त्यांहून गंधर्व, त्यांहून सिद्ध, त्यांहून ही देवांचे सेवक जे किंनरादिक ते श्रेष्ठ होत ॥ २१ ॥ त्यां-पेक्षां असुर श्रेष्ठ, त्यांपेक्षां देव श्रेष्ठ, त्यांमध्यें इंद्र श्रेष्ठ, त्याच्यापेक्षां दक्षादिक ब्रह्मपुत्र श्रेष्ठ, त्यांमध्यें शंकर श्रेष्ठ, तो ब्रह्मदेवापासून उत्पन्न झाला आहे ह्मणून त्यापेक्षां ब्रह्मदेव श्रेष्ठ होय. त्या ब्रह्मदेवाला मीच पूज्य आहें ह्मणून त्याहून मी श्रेष्ठ आहें आणि मला द्विजांमध्यें देवांसारिखे जे ब्राह्मण ते पूज्य आहेत ह्मणून ते माझ्यापेक्षांहि श्रेष्ठ होत ॥ २२ ॥ असें ह्मणून सभेंतील ब्राह्मणास ह्मणतो— हे ब्राह्मणहो, मी ब्राह्मणांबरोबर दुसऱ्या कोणत्याच प्राण्यांची तुलना करीत नाहीं. कारण,

---

तिशयेनोत्तमाः तेभ्योऽपि ये सरीसृपाः सर्पंतीति जंगमास्ते उदुत्तमा इति सर्वत्रानुषंगः । तेष्वपि सबोधा निष्ठा स्थितिर्येषां पश्वादीनां ते कीटकादिभ्यः । ततस्तेष्वपि मनुष्याः । ततोऽपि प्रमथा भूतप्रेतादयः । ततोऽपि गंधर्वाः । ततः सिद्धाः । ततोऽन्ये विबुधानुगाः किन्नरादयः ॥ २१ ॥ तेभ्योऽसुराः देवा असुरेभ्यः । संधिरार्षः । देवाश्च मघवत्प्रधानाः देवेभ्य इंद्रः श्रेष्ठ इत्यर्थः । ततोऽपि ब्रह्मसुता दक्षादयः । तेषां मध्ये भवः परः श्रेष्ठः । स भवो विरिंचवीर्यो विरिंचो वीर्यं शक्तिः कारणं यस्य स

देवासुरेभ्यो मघवत्प्रधाना दक्षादयो ब्रह्मसुतास्तु तेषाम् ॥ भवः परः सोऽथ विरिंचवीर्यः स मत्परोऽहं द्विजदेवदेवः ॥ २२ ॥ न ब्राह्मणैस्तुलये भूतमन्यत्पश्यामि विप्राः किमतः परं तु ॥ यस्मिन्नृभिः प्रहुतं श्रद्धयाऽहमश्नामि कामं न तथाऽग्निहोत्रे ॥ २३ ॥ धृता तनूरुशती मे पुराणी येनेह सत्त्वं परमं पवित्रम् ॥ शमो दमः सत्यमनुग्रहश्च तपस्तितिक्षानुभवश्च यत्र ॥ २४ ॥ मत्तोऽप्यनंतात्परतः परस्मात्स्वर्गापवर्गाधिपतेर्न किंचित् ॥ येषां किमु स्यादितरेण तेषामकिंचनानां मयि भक्तिभाजाम् ॥ २५ ॥

विरिंचवीर्यः अतस्तज्जनकत्वाद्विरिंचस्ततः पर इत्यर्थः । स विरिंचो मत्परः अहं परो यस्य । द्विजदेवा ब्राह्मणा एव देवाः पूज्या यस्य सोऽहम् ॥ २२ ॥ ब्राह्मणैरन्यद्भूतं न तुलये समं न पश्यामि । अतो ब्राह्मणात्परं तु भूतं किं पश्यामि न किंचित् । विप्रा इति तत्रत्यानां ब्राह्मणानां संबोधनम् । समस्यैवाभावादधिकं कुतस्त्यमित्यर्थः । तत्र हेतूनाह सार्धाभ्याम् । यस्मिन् ब्राह्मणे श्रद्धया प्रकर्षेण हुतमन्नादि कामं यथेच्छमहमश्नामि ॥ २३ ॥ मे तनूर्मूर्तिर्वेदाख्या येन ब्राह्मणेनेह लोके धृता यत्र च ब्राह्मणे सत्त्वादयोऽष्टौ गुणाः संति ततःपरं किं पश्यामीत्यन्वयः ॥२४॥ निःस्पृहत्वमाह । मत्तोऽपि येषां न किंचित्प्रार्थनीयमस्ति तेषामितरेण राज्यादिना किमु स्यान्न किमपि॥२५॥

त्यांच्या सारख्या योग्यतेचा दुसरा कोणीच प्राणी मला दिसत नाहीं. मग त्यांच्यापेक्षां अधिक योग्यतेचा कोठून दिसणार. दिसावयाचाच नाहीं. ज्या ब्राह्मणांच्या मुखीं लोकांनीं श्रद्धेनें हवन केलेलें (अर्पण केलेलें) अन्नादिक जसें मी यथेच्छ भक्षण करितों त्याप्रमाणें अग्निहोत्रामध्यें अग्नीच्या मुखीं हवन केलेलें होमद्रव्य मी भक्षण करीत नाहीं ॥ २३ ॥ ज्यांनीं या लोकाचेठिकाणीं सुंदर व प्राचीन अशी माझी वेदरूप मूर्ति अध्ययनादिरूपेंकरून धारण केली आहे व ज्यांचेठिकाणीं परम पवित्र असा सत्त्वगुण, शम, दम, सत्य, अनुग्रह, तप, सहनशीलता आणि अनुग्रह हे आठ गुण वास करितात ॥ २४ ॥ आणि ज्यांना, ब्रह्मादिकांपेक्षांहि श्रेष्ठ, स्वर्ग व मोक्ष यांचा अधिपति व अनंतशक्तीनीं युक्त अशा मजपासूनहि कांहींच मागावयाची इच्छा नसत्ये, त्या माझेठिकाणीं भक्ति करणाऱ्या, भोगसंपत्तिरहित अशाहि ब्राह्मणांना

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दुसऱ्या राज्यादिकांच्या योगानें काय करावयाचें आहे? कांहींच नाहीं ॥ २५ ॥ याप्रमाणें ब्राह्मणांचा सन्मान करावा असें सांगून आतां सर्वभूतांचा सन्मान करावा असें सांगतो– हे पुत्रहो, तुह्मीं व सर्वही सभाजनांनीं, स्थावरजंगमात्मक सर्वहि भूतें, माझीं स्थानें आहेत असें समजून, क्षणोक्षणीं मत्सरादिरहित दृष्टीनें त्यांचा सन्मान करावा, ह्मणजे तेंच माझें पूजन केल्यासारखें होईल ॥ २६ ॥ मन, वाणी, दृष्टि, किंवा दुसरीं कोणतींहि इंद्रियें ह्यांच्या व्यापाराचें प्रत्यक्ष फळ ह्मटलें ह्मणजे माझें आराधन करणें हेंच होय. कारण, त्या माझ्या आराधनावांचून हा पुरुष, प्रचंड मोहरूपी काळपाशापासून आपली मुक्तता करून घेण्यास समर्थ होत नाहीं ॥ २७ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, याप्रमाणें महापराक्रमी व सर्व प्राण्यांचें हितचिंतन करणारा तो भगवान् ऋषभदेव, लोकांना हितोपदेश करण्याकरितां, स्वतःच

तदेवं ब्राह्मणसंमानं विधायेदानीं सर्वभूतसंमानं विधत्ते। हे सुताः सर्वाणि जंगमानि स्थावराणि च भूतानि मदधिष्ठानतया वो युष्माभिः संमाननीयानि । पदेपदे क्षणेक्षणे । विविक्ता पूता मत्सरादिरहिता दृष्टिर्येषां तैः । तदेव ममार्हणम् ॥२६॥ सर्वकर्मणामीश्वरार्पणं विधत्ते । मनोवचोदृशामन्येषां च करणानामीहितस्य व्यापारस्य मे परिबर्हणमाराधनमेव

सर्वाणि मद्धिष्ण्यतया भवद्भिश्चराणि भूतानि सुता ध्रुवाणि ॥ संभावितव्यानि पदेपदे वो विविक्तदृग्भिस्तदुहार्हणं मे ॥ २६ ॥ मनोवचोदृक्करणेहितस्य साक्षात्कृतं मे परिबर्हणं हि ॥ विना पुमान्येन महाविमोहात्कृतांतपाशान्न विमोक्तुमीशेत् ॥ २७ ॥ श्रीशुक उवाच ॥ एवमनुशास्यात्मजान्स्वयमनुशिष्टानपि लोकानुशासनार्थं महानुभावः परमसुहृद्भगवानृषभापदेश उपशमशीलानामुपरतकर्मणां महामुनीनां भक्तिज्ञानवैराग्यलक्षणं पारमहंस्यधर्ममुपशिक्षमाणः स्वतनयशतज्येष्ठं परमभागवतं भगवज्जनपरायणं भरतं धरणिपालनायाभिषिच्य स्वयं भवन एवोर्वरितशरीरमात्रपरिग्रह उन्मत्त इव गगनपरिधानः प्रकीर्णकेश आत्मन्यारोपिताहवनीयो ब्रह्मावर्तात्प्रवव्राज ॥ २८ ॥ जडांधमूकबधिरपिशाचोन्मादकवदवधूतवेषोऽभिभाष्यमाणोऽपि जनानां गृहीतमौनव्रतस्तूष्णीं बभूव ॥ २९ ॥

साक्षात्कृतं फलम् । येन परिबर्हणेन विना कालपाशाद्विमोक्तुं न ईशेत समर्थो भवेत् ॥ २७ ॥ स्वत एव सुशिक्षितानपि लोकानुशासनार्थमनुशास्य मुनीनां पारमहंस्यधर्ममुपशिक्षयिष्यन्भरतमभिषिच्य ऋषभ इत्यपदेशो नाम यस्य स भगवान् ब्रह्मावर्तात्स्वदेशात्प्रवव्राजेत्यन्वयः । उर्वरितोऽवशिष्टः शरीरमात्रपरिग्रहो यस्य ॥ २८ ॥ अभिभाष्यमाणोऽपि

सुशिक्षित असलेल्याहि आपल्या पुत्रांना (पूर्वोक्त) उपदेश करून, नंतर ज्यांचा स्वभाव अत्यंत शांत आहे व ज्यांच्यापासून सर्व कर्में निवृत्त झालीं आहेत अशा महामुनींना, भक्तिज्ञान वैराग्यरूप परमहंसांच्या धर्मांचा उपदेश करण्याकरितां, आपल्या शंभर पुत्रांमध्यें ज्येष्ठ, परम भगवद्भक्त आणि ज्याचें भगवद्भक्त हेंच मुख्य आश्रयस्थान आहे अशा भरतनामक पुत्राला पृथिवीच्या रक्षणाकरितां राज्याभिषेक करून, घरामध्येंच सर्व वस्तूंचा त्याग केल्यामुळें ज्याच्या संग्रहीं केवळ शरीरमात्र अवशेष राहिलें आहे असा तो ऋषभदेव, अस्ताव्यस्त केंस पसरलेला वेड्यासारखा दिगंबर बनून आपलेठिकाणींच आहवनीय अग्नीचा समारोप करून, ब्रह्मवर्तांतून बाहेर निघाला ॥ २८ ॥ तो अवधूतासारखा (मातीवगैरे चिकटलेला) वेष धारण करून, लोकांमध्यें जड, अंध, मुक्या, बहिऱ्या किंवा पिशाच्यानें झपाटलेल्या मनुष्यासारखा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

फिरत असून लोकांनीं अनेक प्रकारचे प्रश्न विचारून बोलविला असतांहि मौनव्रत धारण करून निमूट राहत असे ॥ २९ ॥ तो, नगरें, गांव, खाणी, शेतकऱ्यांचीं खेडीं, पुष्पवाटिका, डोंगरपायथ्याचे गांव, सैन्याचे तळ, गाईंचे गोठे, गौळवाडे, यात्रेकरू लोकांचे समुदाय, पर्वत, वनें, ऋषींचे आश्रम इत्यादिठिकाणीं, मार्गामार्गामध्यें त्याला अधम मनुष्यांनीं, भेडसावणें, मारणें, त्याच्यावर मूत्रोत्सर्ग करणें, थुंकी टाकणें, दगड, विष्ठा, व धूळ फेंकणें, गुदद्वाराचा वायु सोडणें, व अपशब्द भाषण करणें इत्यादिकांनीं त्रास दिला असतांहि, वनांतील माशांनीं त्रास दिलेल्या जंगलांतील हत्तीप्रमाणें त्या त्रासाला न जुमानितां, मिथ्याभूत रचनेनें युक्त परंतु ज्याला 'सत्' (आहे) असें नांवमात्र प्राप्त झालें आहे अशा देहाकाररूपी या शरीराचेठिकाणीं, 'सत् आणि असत् अथवा चैतन्य आणि जड या उभयतांच्या अनुभवस्वरूपानें

तदानीमपि पार्श्ववर्तिनमात्मजमिवानुशोचंतमभिवीक्षमाणो मृग एवाभिनिवेशितमना विसृज्य लोकमिमं सह मृगेण कलेवरं मृतमनु न मृतजन्मानुस्मृतिरितरवन्मृगशरीरमवाप ॥ २७ ॥ तत्रापि हवा आत्मनो मृगत्वकारणं भगवदाराधनसमीहानुभावेनानुस्मृत्य भृशमनुतप्यमान आह ॥ २८ ॥ अहो कष्टं भ्रष्टोऽहमात्मवतामनुपथाद्यद्विमुक्तसमस्तसंगस्य विविक्तपुण्यारण्यशरणस्यात्मवत आत्मनि सर्वेषामात्मनां भगवति वासुदेवे तदनुश्रवणमननसंकीर्तनाराधनानुस्मरणाभियोगेनाशून्यसकलयामेन कालेन समावेशितं समाहितं कार्त्स्न्येन मनस्तत्तु पुनर्ममाबुधस्यारान्मृगसुतमनुपरिसुस्राव ॥ २९ ॥ इत्येवं निगूढनिर्वेदो विसृज्य मृगीं मातरं पुनर्भगवत्क्षेत्रमुपशमशीलमुनिगणदयितं शालग्रामं पुलस्त्यपुलहाश्रमं कालंजरात्प्रत्याजगाम ॥ ३० ॥

अहो कष्टं धीराणां मार्गाद्भ्रष्टोऽहम् । भ्रंशमेवाह । यद्यतो विमुक्ताः समस्ताः संगा येन । विविक्तं पुण्यारण्यं शरणं यस्य । आत्मवतो धीरस्य मम मनः सर्वेषां भूतानामात्मनि वासुदेवे समावेशितं समाहितं च निश्चलं सदाराद्दूरादेव सुस्राव गलितं निःसृतम् । केन समावेशितम् । तस्यानुश्रवणादिष्वभियोगेनाभिनिवेशेनाशून्याः सकला यामा यस्मिंस्तेन कालेन ॥ २९ ॥ निगूढोऽनाविष्कृतो निर्वेदो येन । शालवृक्षोपलक्षितं ग्रामम् । कालंजराद्यत्र हरिणो जातस्तस्मात्पर्वतात् ॥ ३० ॥

अत्यंत पश्चात्ताप पावून, आपलेठिकाणींच ह्मणाला कीं—॥ २८ ॥ अहो, फार वाईट गोष्ट झाली. विवेकी पुरुषांच्या मार्गापासून मी भ्रष्ट झालों. कारण, माझा अधिकार मोठा होता. मी पूर्वी सर्वसंगाचा परित्याग केला, एकांतवास करण्याकरितां पवित्र अरण्याचा आश्रय धरिला, आत्मज्ञान संपादन केलें, भगवंताच्या कथांचें वारंवार श्रवण करणें, मनन करणें, कीर्तन करणें, आराधन करणें आणि स्मरण करणें ह्यांच्या असक्तीमुळें सर्व प्रहर सफळ होत असलेल्या काळाच्या योगानें माझें मन, सर्व जीवांचा आत्मा जो षड्गुणैश्वर्यसंपन्न वासुदेव त्याचेठिकाणीं, स्थापन केलेलें असून तें निश्चळहि झालें होतें, परंतु तेंच माझें मूर्खाचें मन, पुन्हा पूर्णपणें अलिकडे भगवत्स्वरूपापासून चलित होऊन हरिणीच्या पाडसावर गुंतून राहिलें, ह्याला ह्मणावें तरी काय ! ॥ २९ ॥ हे राजा, याप्रमाणें मनामध्यें वैराग्य प्राप्त झालेला तो

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हरिण, त्या जन्मांतील आपली माता जी हरिणी तिला सोडून, ज्या ठिकाणीं उत्पन्न झाला होता त्या कालंजर पर्वतावरून पुन्हा, शांतस्वभावाच्या मुनिजनांना आवडणारें, भगवंताचें वसतिक्षेत्र व शालवृक्षांनीं युक्त असलेला गांव अशा त्या पुलस्त्य पुलहऋषींच्या आश्रमीं येऊन पोंचला ॥ ३० ॥ त्याठिकाणींहि तो हरिण, मृत्युकालाची वाट पाहत असून कोणाशींहि सहवास करण्याबद्दल पराकाष्ठेचा कंटाळा मानून एकटाच फिरत असे. सुकलेलीं पानें, वेली व गवत ह्यांच्या योगानें तो निर्वाह करित असून आपणास हरिणजन्म प्राप्त होण्यास कारणीभूत असलेलें कर्म केव्हां संपेल अशी वाट पाहत असतां, पुढें त्यानें आपला मृत्युकाल प्राप्त झाला असें जाणून गंडकीनदीच्या उदकांत स्नान केलेल्या आपल्या शरीराचा त्याग केला ॥ ३१ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील पंचमस्कंधामध्यें हा आठवा अध्याय समाप्त झाला ॥ ८ ॥ ॥ आतां नवव्या अध्यायामध्यें भरतानें हर्षखेदादिकांचा त्याग करून जडधर्मानें युक्त असें ब्राह्मणत्व स्वीकारिलें असतां, त्याला कोणी एकानें भद्रकाली देवीजवळ

आत्मैव सहचरो यस्य एकाकी प्रतीक्षमाणस्यैव प्रपंचः मृगत्वनिमित्तेति। तीर्थोदकेन क्लिन्नमार्द्रमर्धोदकस्थमित्यर्थः ॥ ३१ ॥ इति श्रीमद्भागवते पंचमस्कंधे टीकायामष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥ ॥ नवमे जडविप्रत्वे तस्य रागाद्यभावतः ॥ भद्रकालीपशुत्वेऽपि निर्विकारत्वमीर्यते ॥ १ ॥ पितुः प्राप्तात्मविज्ञानो भरतो मृगतां गतः ॥ प्रारब्धकर्मवेगेन तदंते जड-

तस्मिन्नपि कालं प्रतीक्षमाणः संगाच्च भृशमुद्विग्न आत्मसहचरः शुष्कपर्णतृणवीरुधावर्तमानो मृगत्वनिमित्तावसानमेव गणयन्मृगशरीरं तीर्थोदकक्लिन्नमुत्ससर्ज ॥३१॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे पंचमस्कंधे भरतचरितेऽष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ अथ कस्यचिद्द्विजवरस्यांगिरःप्रवरस्य शमदमतपःस्वाध्यायाध्ययनत्यागसंतोषतितिक्षाप्रश्रयविद्याऽनसूयात्मज्ञानानंदयुक्तस्यात्मसदृशश्रुतशीलाचाररूपौदार्यगुणा नव सोदर्या अंगजा बभूवुर्मिथुनं च यवीयस्यां भार्यायाम् ॥ १ ॥ यस्तु तत्र पुमांस्तं परमभागवतं राजर्षिप्रवरं भरतमुत्सृष्टमृगशरीरं चरमशरीरेण विप्रत्वं गतमाहुः ॥ २ ॥ तत्रापि स्वजनसंगाच्च भृशमुद्विजमानो भगवतः कर्मबंधविध्वंसनश्रवणस्मरणगुणविवरणचरणारविंदयुगलं मनसा विदधदात्मनः प्रतिघातमाशंकमानो भगवदनुग्रहेणानुस्मृतस्वपूर्वजन्मावलिरात्मानमुन्मत्तजडांधबधिरस्वरूपेण दर्शयामास लोकस्य ॥ ३ ॥

विप्रताम् ॥ २ ॥ आंगिरसगोत्रजानां प्रवरस्य श्रेष्ठस्य शमादियुक्तस्य। त्यागोऽत्रातिथ्यादिभ्योऽन्नदानादि। विद्या कर्मविद्या। आत्मज्ञानं देहादिव्यतिरिक्तभोक्त्रात्मज्ञानम्। आनंदो धर्मसंपत्तिजः। आत्मना सदृशाः श्रुतादयो गुणा येषां ते समानोदरा नव पुत्रा बभूवुः। यवीयस्यां कनिष्ठायां च मिथुनं स्त्रीपुरुषयुग्मम् ॥ १ ॥ उत्सृष्टं मृगशरीरं येन तम्। शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायत इति स्मृतेः ॥ २ ॥ तत्रापि चान्यसंगादात्मनो भ्रंशमाशंकमानश्चात्मानमुन्मत्तादिरूपेण दर्शयामासेत्य-

बळी देण्यास नेलें, त्या वेळींसुद्धां त्याला क्रोधादिक विकार प्राप्त झाले नाहींत, असें वर्णन केलें आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, भरतानें मृगदेह सोडिल्यानंतर पुढें आंगिरसगोत्रांत उत्पन्न झालेल्या व शम, दम, तप, स्वशाखोक्त वेदाध्ययन, सत्पात्रीं अन्नादिकांचें दान, संतोष, क्षमा, नम्रता, स्वकर्मविद्या, इतरांच्या गुणांवर दोषारोप न करणें, आत्मज्ञान, आणि धर्मसंपत्तीपासून उत्पन्न झालेला आनंद यांनीं युक्त अशा कोणीएक श्रेष्ठ ब्राह्मणाला, पहिल्या स्त्रीच्याठिकाणीं त्याच्यासारखेच वेदाध्ययनशील, सदाचारसंपन्न, रूप व औदार्यादिक गुण यांनीं युक्त असे नऊ सहोदर पुत्र झाले आणि कनिष्ठभार्येच्याठिकाणीं एक पुत्र व एक कन्या अशीं दोन मुलें झालीं ॥ १ ॥ त्यांमध्यें जो पुत्र होता तो, मृगशरीराचा त्याग करून शेवटींच्या शरीरानें ब्राह्मणत्व पावलेला राजर्षिश्रेष्ठ भरत असें ह्मणतात ॥ २ ॥ त्या ब्राह्मणकुलांतही तो

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भरत, स्वजनांच्या संगापासून आपणाला पुनः जन्मांतर प्राप्त होईल अशी शंका धारण करून अत्यंत उद्विग्न होत्साता, ज्यावें श्रवण, स्मरण व गुणक-
थन कर्मबंधाचा नाश करणारें आहे त्या भगवंताच्या चरणारविंदयुगुलाचें मनानें विशेषेंकरून धारण करीत करीत, भगवंताच्या अनुग्रहानेंच ज्यानें आपल्या पूर्वज-
न्मांच्या परंपरेचें स्मरण केलें आहे असा तो भरत, लोकांस, आपण उन्मत्त जड (वेडा) आंधळा व किंवडा आहें असें दर्शवीत संचार करूं लागला ॥ ३ ॥ त्या
उन्मत्तादिरूपानें वागणाऱ्याहि पुत्राचे, पुत्रस्नेहामध्यें ज्याचें मन आसक्त आहे अशा त्या ब्राह्मणानें, समावर्तनापर्यंत संस्कार यथाशास्त्र करण्याचें मनांत आणून उप-
नयन केलें आणि त्या उपनयन केलेल्या आपल्या पुत्राला, शौच आचमन इत्यादिक कर्मनियमांची अपेक्षा नसतांहि ते त्याला, 'पुत्रानें पित्यापासून शिक्षण ग्रहण करावें
असें शास्त्र असल्यामुळें' शिकविले ॥ ४ ॥ तेव्हां तो भरत, आत्मनिष्ठ असल्यामुळें आपल्याला शिक्षण देण्याविषयींचा पित्याचा आग्रह निवृत्त व्हावा याकरितां, त्या

न्वयः । किं कुर्वन् । कर्मबंधविध्वंसनं श्रवणं स्मरणं गुणानां विवरणं कथनं च यस्य तद्भगवतश्चरणारविंदयुगलं मनसा विशेषेण धारयन् । प्रतिघातशंकायां हेतुः । अनु-
स्मृता स्वीयपूर्वजन्मनामावलिः परंपरा येन सः ॥ ३ ॥ पुत्रस्नेहेऽनुबद्धं मनो यस्य । जडस्य गार्हस्थ्यानधिकारात्समावर्तनांतान्संस्कारान्विदधानस्तमुपनीयोपनीतस्य
पुनः शौचादींस्तस्यानभिप्रेतानपि शिक्षितवान् । तत्र हेतुः । अनुशिष्टेन हि भाव्यं पितुः सकाशात्पुत्रेणेति ॥ ४ ॥ सोऽपि च पितुः शिक्षानिर्बंधनिवृत्तये असध्रीचीनमसमी-

तस्यापि हवा आत्मजस्य विप्रः पुत्रस्नेहानुबद्धमना आसमावर्तनात्संस्कारान्यथोपदेशं विदधान उपनीतस्य च पुनः शौचाचमना-
दीन्कर्मनियमाननभिप्रेतानपि समशिक्षयत् अनुशिष्टेन हि भाव्यं पितुः पुत्रेणेति ॥ ४ ॥ स चापि तदुह पितृसन्निधावेवासध्रीची-
नमिव स्म करोति छंदांस्यध्यापयिष्यन्सह व्याहृतिभिः सप्रणवशिरस्त्रिपदीं सावित्रीं ग्रैष्मवासंतिकान् मासानधीयानमप्यसमवेतरूपं
ग्राहयामास ॥ ५ ॥ एवं स्वतनुज आत्मन्यनुरागावेशितचित्तः शौचाध्ययनव्रतनियमगुर्वनलशुश्रूषणाद्यौपकुर्वाणककर्माण्यनभियुक्ता-
न्यपि समनुशिष्टेन भाव्यमित्यसदाग्रहः पुत्रमनुशास्य स्वयं तावदनधिगतमनोरथः कालेनाप्रमत्तेन स्वयं गृह एव प्रमत्त उपसंहृतः ॥ ६ ॥

चीनमिव करोति स्म । उपाकरणवेदव्रताद्यनंतरं श्रावणादिमासेषु वेदानध्यापयिष्यन्नादौ तावद्व्याहृतिभिः सह प्रणवशिरःसहितां त्रिपदीं चैत्रादिचतुरो मासानधीयानमप्य-
समवेतरूपं यथाभवत्येवं ग्राहयामास । तावतापि कालेन स्वरानुपूर्व्या वियुक्तं व्याहृत्यादि तस्य नागतमित्यर्थः ॥ ५ ॥ आत्मभूते स्वतनुजेऽनुरागेणावेशितं चित्तं
येन । शौचादीनि यान्यौपकुर्वाणकस्य सावधिब्रह्मचर्यंवतः कर्माणि तेनानभियुक्तान्यनादृतान्यपि तं पुत्रं प्रत्यनुशास्याप्यप्राप्तपुत्रपांडित्यमनोरथः स्वयं कालेनोपसंहृतो

पित्याच्या संनिध असतांनांच त्याच्या शिक्षणाच्या उलट वेडेंवांकडें आचरण करून दाखवीत असे. तो ब्राह्मणहि पुढें श्रावणादिक मासांमध्यें त्याचें उपाकरण (वेदव्रत)
वगैरे झाल्यावर त्याला वेदाध्ययन सांगण्याचें मनांत आणून त्याच्या (उपाकरणाच्या) पूर्वींच चैत्र, वैशाख ज्येष्ठ व आषाढ या चार महिन्यामध्यें व्याहृति, प्रणव
आणि शिर यांसहवर्तमान त्रिपदा गायत्रीमंत्राचें एकसारखें त्याच्याकडून अध्ययन करवीत असतांहि तितक्या काळामध्येंसुद्धां त्या पुत्राला तो मंत्र स्वरादिकांनीं युक्त
आला नाहीं ॥ ५ ॥ याप्रमाणें आत्मत्वेंकरून अभिमत असलेल्या त्या आपल्या पुत्राचेठिकाणीं प्रेमानें लक्ष्य ठेवणारा तो पिता, त्या भरतानें अनादर केलेलींहि शौचा-
चार, अध्ययन, व्रतनियम आणि गुरु व अग्नि यांची शुश्रूषा इत्यादिक ब्रह्मचाऱ्याला आवश्यक असलेलीं कर्में, 'पुत्रानें चांगलें शिकावें' अशा दुराग्रहानें शिकवूनहि,
पुत्राचें पांडित्य अवलोकन करण्याचे ज्याचे मनोरथ पूर्ण झाले नाहींत तों इतक्यांत स्वतः घरच्या कामामध्येंच गुंतून भगवंताच्या आराधनाविषयीं अनुसंधानरहित

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असलेला तो ब्राह्मण नेमलेल्या वेळीं प्राप्त होणाऱ्या काळाच्या योगानें मरण पावला ॥ ६ ॥ त्या वेळीं, त्या ब्राह्मणाची कनिष्ठ भार्या, आपल्या पोटीं झालेलीं पुत्र व कन्या अशीं दोन्हीं मुलें आपल्या सवतीच्या स्वाधीन करून, स्वतः सहगमनाच्या योगानें पतिलोकांप्रत निघून गेली ॥ ७ ॥ याप्रमाणें पिता मरण पावला असतां, त्यां भरताचे जे नऊ भ्राते होते त्यांच्या बुद्धीचें पर्यवसान कर्मकांडामध्येंच होतें, आत्मविद्येमध्यें नव्हतें, ह्मणून त्यांना त्या भ्रात्याचा (भरताचा) प्रभाव समजला नाहीं, त्यामुळें त्यांनीं आपला भाऊ जडबुद्धि आहे असें समजून त्याला पुढें शिकविण्याचा आग्रह सोडून दिला ॥ ८ ॥ आणि तो जडभरतहि, ज्यांना दोन पायांचे पशु ह्मटलें तरी चालेल अशा नीच लोकांनीं, जेव्हां हे उन्मत्ता, दे जडा, हे भेऱ्या अशा हाका मारून बोलविला जात असे तेव्हां तो त्यांना तशाच योग्यतेचीं उत्तरें देत असे, लोकांनीं त्याच्याकडून कर्में करविलीं असतां तीं त्यांच्या इच्छेप्रमाणें करित असे, कधीं वेठीनें (बिगारीनें) कधीं मजुरीनें, एखादेवेळीं भिक्षामा

मृत इत्यर्थः । अनुशासननिर्बंधे पुनस्तमेव हेतुमाह । अनुशिष्टेन भाव्यमित्यसन्नयोग्य आग्रहो यस्य ॥ ६ ॥ सपत्न्यै समर्प्य । अनुसंस्थयाऽनुमरणेन । सप्तम्यंतपाठेऽप्ययमेवार्थः ॥ ७ ॥ न्यवृत्सत निवर्तितुमैच्छन् । निवृत्ता इत्यर्थः ॥ ८ ॥ यदाऽभिभाष्यमाणस्तदा तदनुरूपाणि प्रभाषते । मूल्यमंतरेण बलाद्यत्कर्म कार्यते सा

अथ यवीयसी द्विजसती स्वगर्भजातं मिथुनं सपत्न्या उपन्यस्य स्वयमनुसंस्थया पतिलोकमगात् ॥ ७ ॥ पितर्युपरते भ्रातर एनमतत्प्रभावविदस्त्रय्यां विद्यायामेव पर्यवसितमतयो न परविद्यायां जडमतिरिति भ्रातुरनुशासननिर्बंधान्न्यवृत्सत ॥ ८ ॥ स च प्राकृतैर्द्विपदपशुभिरुन्मत्तजडबधिरेत्यभिभाष्यमाणो यदा तदनुरूपाणि प्रभाषते कर्माणि च स कार्यमाणः परेच्छया करोति विष्टितो वेतनतो वा याच्ञया यदृच्छया वोपसादितमल्पं बहुमिष्टं कदन्नं वाऽभ्यवहरति परं नेंद्रियप्रीतिनिमित्तम् , नित्यनिवृत्तनिमित्तस्वसिद्धविशुद्धानुभवानंदस्वात्मलाभाधिगमः सुखदुःखयोर्द्वंद्वनिमित्तयोरसंभावितदेहाभिमानः ॥ ९ ॥ शीतोष्णवातवर्षेषु वृष इवानावृतांगः पीनः संहननांगः स्थंडिलसंवेशनानुन्मर्दनामज्जनरजसा महामणिरिवानभिव्यक्तब्रह्मवर्चसः कुपटावृतकटिरुपवीतेनोरुमषिणा द्विजातिरिति ब्रह्मबंधुरिति संज्ञयाऽतज्ज्ञजनावमतो विचचार ॥ १० ॥

विष्टिः । वेतनं मूल्यन् । विष्ट्यादिभिरुपसादितमन्नमभ्यवहरति परं भुक्ते केवलं नत्विंद्रियप्रीतये । अत्र हेतुद्वयमाह । नित्यं सदा निवृत्तं निमित्तं यस्मात्स उत्पादकशून्यः स्वसिद्धोऽभिव्यंजकशून्यो विशुद्धः केवलो योऽनुभवः स एवानंदरूपः स्वात्मा तस्य लाभ एवंभूतोऽहमिति ज्ञानं तस्याधिगमः प्राप्तिरस्ति यस्य । द्वंद्वानि सन्मानावमानादीनि तद्धेतुकयोः सुखदुःखयोरकृतदेहाभिमानः तस्मान्नेंद्रियप्रीतिनिमित्तमभ्यवहरतीत्यन्वयः ॥ ९ ॥ अतएव शीतोष्णादिष्वनावृतांगो विचचारेत्यन्वयः । कीदृशः । पीनः

गितल्यानें किंवा प्रयत्नांवांचून जें कांहीं, थोडेंबहुत, चांगलें वाईट अन्न मिळेल तें तो केवळ निर्वाहाकरितां भक्षण करित असे, इंद्रियांच्या संतोषाकरितां भक्षण करित नसे· कारण, ज्याचा उत्पादक कोणी नाहीं असा स्वतःसिद्ध केवळ अनुभवस्वरूपी आनंदरूप आत्मा मीच आहें असें त्याला आत्मज्ञान प्राप्त झालें होतें आणि सन्मान, अपमान, जय, पराजय इत्यादि द्वंद्वांपासून उत्पन्न होणाऱ्या सुखदुःखांबद्दल तो देहाभिमान बाळगीत नसे ॥ ९ ॥ तो जडभरत, थंडी उन्हाळा, वारा, आणि पावसाळा यांचेठिकाणीं वृषभासारखा नेहमी उघडा राहत असे· तो पुष्ट व सदृढ अवयवांनीं युक्त होता· जसें धुराळ्यानें व्याप्त झालेल्या हिऱ्याचें तेज व्यक्त होत

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नाहीं त्याप्रमाणें भूमीवर शयन करणें, शरीराला तेलवगैरे न लावणें आणि स्नान न करणें यांच्या योगानें शरीरावर बसलेल्या धुरळ्यानें त्याचें ब्रह्मतेज प्रकट दिसत नसे. त्याची कमर एका मळिण वस्त्रानें आच्छादिलेली असे. फार मलकट झालेल्या यज्ञोपवीतानें हा जातीचामात्र ब्राह्मण आहे किंवा अधम ब्राह्मण आहे अशा समजुतीनें त्याचें तथ्यस्वरूप न जाणणाऱ्या लोकांनीं त्याचा अवमान केला असतांहि तो तिकडे लक्ष्य न देतां तसाच फिरत असे ॥ १० ॥ तो जडभरत, जेव्हां कामाच्या मजुरीनें लोकांपासून आहार मिळविण्याची इच्छा करीत असे तेव्हां लोकलज्जेस्तव त्याच्या बंधूनींच भाताच्या शेतांत चिखल सारखा करण्याच्यावगैरे कामीं त्याला लावलें असतां तेंहि काम तो करित असे परंतु 'तेथें चिखल टाकला असतां शेत सारखें होईल व तेथून चिखल काढला असतां तें विषम होईल तसेंच याठिकाणीं बांध घातला असतां शेत कमी होईल व याठिकाणीं बांध घातला असतां जास्त होईल इत्यादि' कामांकडे तो लक्ष ठेवीत नसे आणि भ्रात्यांनीं दिलेल्या तांदुळांच्या

पुष्टः संहननांगः संहन्यंते निबिडीभवंति स्मांगानि यस्य कठिनावयव इत्यर्थः । स्थंडिलसंवेशनं भूमिशयनं अनुन्मर्दनं मर्दनाभावः अमज्जनं स्नानाभावः तैर्यद्रजस्तेनाप्रकटं ब्रह्मवर्चसं ब्राह्मं तेजो यस्य । यथा महामणिरनभिव्यक्ततेजा भवति कुत्सितेन पटेनावृता कटिर्यस्य । उरुमषिणाऽतिमलिनेन । तत्त्वतस्तं न जानंति ये तैर्जनै-रवमतः सन् ॥ १० ॥ यदा तु परेभ्यः कर्ममूल्येनाहारमपेक्षमाणो भवति तदा केदारकर्मणि शालिक्षेत्रे कर्दमविलोडनादावाहारप्रलोभनेन नियुक्तः सन्करोति किंत्वत्र

यदा तु परत आहारं कर्म वेतनत ईहमानः स्वभ्रातृभिरपि केदारकर्मणि निरूपितस्तदपि करोति किंतु न समविषमन्यूनमधिकमिति वेद कणपिण्याकफलीकरणकुल्माषस्थालीपुरीषादीन्यप्यमृतवदभ्यवहरति ॥ ११ ॥ अथ कदाचित्कश्चिद्वृषलपतिर्भद्रकाल्यै पुरुषपशुमालभतापत्यकामः ॥ १२ ॥ तस्य ह दैवमुक्तस्य पशोः पदवीं तदनुचराः परिधावंतो निशि निशीथसमये तमसावृतायामनधिगतपशव आकस्मिकेन विधिना केदारान् वीरासनेन मृगवराहादिभ्यः संरक्षमाणमंगिरःप्रवरसुतमपश्यन् ॥ १३ ॥

कर्दमस्य प्रक्षेपे क्षेत्रं समं भवेदिति उद्धरणे विषमं स्यादित्यादि न वेद । भ्रातृभिर्दत्तान्कणादीनप्यमृतवद्भुंक्ते । कणाश्चूर्णतंडुलाः । पिण्याकं तैलयंत्रोद्धृतं तिलकिट्टम् । फलीकरणं तुषाः । कुल्माषाः कीटदष्टा माषाः । स्थालीपुरीषं स्थालीलग्नं दग्धान्नम् ॥ ११ ॥ तस्य रागादिराहित्यमलौल्यं चैवमीरितम् ॥ अथान्यच्चरितं प्राह चित्रं मृत्यावसंभ्रमम् ॥ वृषलपतिः शूद्रसामंतश्चोरराजः आलभतालब्धुं प्रवृत्तः ॥ १२ ॥ दैवाद्बंधनविमुक्तस्य पशोः । तमसा व्याप्तायां निशि तत्रापि निशीथसमयेऽर्धरात्रावसरे ।

कण्या, पेंड, कोंडा, किडके उडीद, व भांड्यांतल्या जळक्या अन्नाच्या खरपुड्या इत्यादिकांचेंसुद्धां तो अमृतप्रमाणें भक्षण करित असे ॥ ११ ॥ आतां त्यानें स्वतःवर मृत्यूचा प्रसंग आला असतांहि आपल्या स्थितींत बदल केला नाहीं अशा प्रसंगाचें त्याचें विलक्षण आख्यान सांगतात.—एकेवेळीं कोणीएक चोरट्या शूद्रांचा राजा, आपल्याला संतति व्हावी या इच्छेनें भद्रकाली देवीला पुरुषपशूचा बळि अर्पण करण्यास प्रवृत्त झाला ॥ १२ ॥ त्यानें एक पशु (पुरुष) धरून आणिला होता तो दैवानें त्याच्या हातांतून मरणभयानें पळून गेला, त्याच्यामार्गाचा पत्ता पाडण्याकरितां त्या चोरांच्या राजाचे दूत, जिकडेतिकडे धांवत सुटले असूनहि, ती रात्र मध्यरात्रीच्या वेळीं अंधकारानें व्याप्त झालेली असल्यामुळें त्यांना तो पशु सांपडला नाहीं; तों अकस्मात् दैवयोगानें एका माळ्यावर उभा राहून मृग, डुकर इत्यादिकांपासून

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शेतांचें रक्षण करणाऱ्या जडभरताला त्यांनीं अवलोकन केलें ॥ १३ ॥ नंतर ते, 'पुरुषपशु चांगल्या लक्षणांनीं युक्त आहे' असें जाणून व ह्याच्या योगानें आपल्या धन्याची कार्यसिद्धि होईल असें मनांत आणून, हर्षानें प्रफुल्लितमुख होत्साते त्याला दोरीनें बांधून चंडिकादेवीच्या मंदिरांत घेऊन गेले ॥ १४ ॥ नंतर त्याला त्या चोरांनीं स्वतःच्या विधीप्रमाणें स्नान घालून त्याच्याकडून कोरें वस्त्र पांघरवून, त्याला अलंकार, उटी, माळा, टिळे इत्यादिकांनीं सुशोभित करून भोजन घातलें; आणि धूप, दीप, फुलें, लाह्या, आम्रपल्लव, दूर्वांकुर, फळें व नैवेद्य या सामुग्रीनें युक्त अशी वधाची सिद्धता करून, गायन, स्तुति, मृदंग व टिमक्या ह्यांचा मोठा घोष करीत करीत त्या पुरुषपशूला भद्रकाली देवीच्या पुढें नेऊन बसविलें ॥ १५ ॥ नंतर त्या चोरांच्या राजाच्या पुरोहितानें, त्या पुरुषपशूच्या (जडभरताच्या) रक्तरूप मद्यानें

आकस्मिको दैवनिर्मितो विधिः प्रकारस्तेन। वीरासनेनोर्ध्वावस्थानेन॥ १३ ॥ अवमृश्य ज्ञात्वा ॥ १४ ॥ पणयश्चोराः । अहतेन नूतनेन। उपस्कृतमलंकृतम् । वैशससंस्थया हिंसाविधानेन गीतादिघोषेण सह ॥ १५ ॥ वृषलराजस्य पणिः पुरोहितत्वेन वर्तमानश्चोरः । तदभिमंत्रितं भद्रकालीमंत्राभिमंत्रितम् ॥ १६ ॥ धनमद एव रजस्तेनोत्सिक्तं त्यक्तमर्यादं

अथ त एनमनवद्यलक्षणमवमृश्य भर्तृकर्मनिष्पत्तिं मन्यमाना बध्वा रशनया चंडिकागृहमुपनिन्युर्मुदा विकसितवदनाः ॥ १४ ॥ अथ पणयस्तं स्वविधिनाऽभिषिच्याहतेन वाससाऽऽच्छाद्य भूषणालेपस्रक्तिलकादिभिरुपस्कृतं भुक्तवंतं धूपदीपमाल्यलाजकिसलयांकुरफलोपहारोपेतया वैशससंस्थया महता गीतस्तुतिमृदंगपणवघोषेण च पुरुषपशुं भद्रकाल्याः पुरत उपवेशयामासुः ॥ १५ ॥ अथ वृषलराजपणिः पुरुषपशोरसृगासवेन देवीं भद्रकालीं यक्ष्यमाणस्तदभिमंत्रितमसिमतिकरालनिशितमुपाददे ॥ १६ ॥ इति तेषां वृषलानां रजस्तमःप्रकृतीनां धनमदरजउत्सिक्तमनसां भगवत्कलावीरकुलं कदर्थीकृत्योत्पथेन स्वैरं विहरतां हिंसाविहाराणां कर्मातिदारुणं यद्ब्रह्मभूतस्य साक्षाद्ब्रह्मर्षिसुतस्य निर्वैरस्य सर्वभूतसुहृदः सूनायामप्यननुमतमालंभनं तदुपलभ्य ब्रह्मतेजसाऽतिदुर्विषहेण दंदह्यमानेन वपुषा सहसोच्चचाट सैव देवी भद्रकाली ॥ १७ ॥ भृशममर्षरोषावेशरभसविलसितभ्रुकुटिविटपकुटिलदंष्ट्रारुणेक्षणाटोपातिभयानकवदना हंतुकामेवेदं महाट्टहासमतिसंरंभेण विमुंचंती तत उत्पत्य पापीयसां दुष्टानां तेनैवासिना विवृक्णशीर्ष्णां गलात्स्रवंतमसृगासवमत्युष्णं सह गणेन निपीयातिपानमदविह्वलोच्चैस्तरां स्वपार्षदैः सह जगौ ननर्त च विजहार च शिरःकंदुकलीलया ॥ १८ ॥

मनो येषाम् । भगवत्कलायुक्तं वीराणां ब्राह्मणानां कुलं तुच्छीकृत्य यथेच्छं वर्तमानानां यत्कर्म तदुपलभ्य देवी उच्चचाट प्रतिमां त्यक्त्वा बहिर्निर्गता । कथंभूतमालंभनम् । सूनायामप्यापत्कालेऽनुज्ञातायामपि हिंसायामननुज्ञातम् । भद्रकालीत्यंतं गद्यम् ॥ १७ ॥ अमर्षोऽपराधासहनं रोषश्च वपुषो दाहनं तयोरावेशस्तस्य रभसेन वेगेन विल-

भद्रकाली देवीची तृप्ति करण्यासाठीं देवीमंत्रानें अभिमंत्रित केलेला अतिभयंकर तीक्ष्ण खड्ग उचलिला ॥ १६ ॥ हे राजा, ज्यांचे स्वभाव रजोगुण व तमोगुण यांनीं व्याप्त झाले आहेत, ज्यांचीं मनें, द्रव्यमदरूपी रजोगुणाचें आधिक्य झाल्यामुळें मर्यादा सोडून बहकून गेलीं आहेत, जे भगवदंशानें युक्त अशा ब्राह्मणकुलाला तुच्छ मानून कुमार्गानें यथेच्छपणें संचार करीत आहेत व ज्यांच्या चित्ताचा उल्हास हिंसेकडेच झाला आहे अशा त्या चोरांच्या हातून, आपत्कालीं सांगितलेल्या हिंसेमध्यें-सुद्धां न सांगितलेलें जें साक्षात् ब्रह्मभूत व निर्वैर अशा ब्रह्मर्षिपुत्राचें अतिभयंकर वधरूप कर्म, तें होणार असें पाहून, अतिदुःसह अशा ब्रह्मतेजाच्या योगानें अतिसंतप्त झालेल्या शरीरानें तीच भद्रकाली देवी, एकाएकीं आपली मूर्ति टाकून बाहेर निघाली ॥ १७ ॥ त्या वेळीं अत्यंत अपराधाचें सहन न होणें, व शरीराचा दाह होणें ह्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दोहोंच्या आवेशाच्या वेगामुळें चढून गेलेला जो भ्रुकुटींचा विस्तार, वक्र दाढा आणि लाल डोळे ह्यांच्या संभ्रमानें जिचें मुख अतिभयंकर दिसूं लागलें आहे आणि या जगाला मारूनच टाकण्यास उद्युक्त झाली कीं काय अशा अतिशय क्रोधाच्या आवेशानें मोठ्यानें गर्जना करणाऱ्या त्या भद्रकाली देवीनें, त्या स्थानापासून एकदम उडी मारून, जडभरताला मारण्याकरितां पूर्वीं अभिमंत्रण केलेला तोच खड्ग, त्या पुरोहिताच्या हातांतून हिसकून घेऊन, त्याच्याच योगानें त्या पापी दुष्ट चोरांचीं मस्तकें तोडिलीं आणि त्यांच्या कंठापासून स्रवणाऱ्या अतिउष्ण रक्तरूपी मद्याचें आपल्या गणासहवर्तमान प्राशन करून, त्याच्या अतिप्राशनामुळें उद्भवलेल्या मदानें धुंद झालेली ती देवी, आपल्या पार्षदांसहवर्तमान फार मोठ्यानें गायन करीत व नृत्य करीत मस्तकरूप चेंडूच्या खेळानें खेळूं लागली ॥ १८ ॥ हे राजा, याप्रमाणेंच सत्पु-

---

सित उत्तंभितो भ्रुकुटिलक्षणो विटपः शाखा कुटिला दंष्ट्राश्चारुणानीक्षणानि च तेषामाटोपः संभ्रमस्तेनातिभयानकं वदनं यस्याः । इदं जगद्धंतुमुद्यतेव । महांतमट्टहासं सनादं हासम् । ततः स्थानादुत्पत्य विवृक्णानि छिन्नानि शीर्षाणि येषाम् । गणेन परिवारेण सह । शिरांस्येव कंदुकानि तेषां लीलया विक्रीड च ॥ १८ ॥ ननु कथं देव्याराधकानामेवं विपरीतं फलं तत्राह । एवमेवेति । महत्स्वभिचाररूपोऽतिक्रमोऽपराधः ॥ १९ ॥ नन्वसंभावितमिदमेवं यन्मरणेऽप्यव्याकुलत्वं मारकेषु च क्रोधाभाव

एवमेव खलु महदभिचारातिक्रमः कार्त्स्न्यैनात्मने फलति ॥ १९ ॥ न वा एतद्विष्णुदत्त महदद्भुतं यदसंभ्रमः स्वशिरश्छेदन आपतितेऽपि विमुक्तदेहाद्यात्मभावसुदृढहृदयग्रंथीनां सर्वसत्त्वसुहृदात्मनां निर्वैराणां साक्षाद्भगवताऽनिमिषारिवरायुधेनाप्रमत्तेन तैस्तैर्भावैः परिरक्ष्यमाणानां तत्पादमूलमकुतश्चिद्भयमुपसृतानां भागवतपरमहंसानाम् ॥ २० ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे पंचमस्कंधे जडभरतचरितं नाम नवमोऽध्यायः ॥ ९ ॥ ॥

इत्यादि तत्राह । नवा इति । विमुक्तो देहाद्यात्मभावलक्षणः सुदृढो हृदयग्रंथिर्यैः सर्वसत्त्वानां सुहृद आत्मानश्च ये तेषाम् । नच तेषां देहाद्यभिमानसद्भावेऽपि मरणादिभयमस्तीत्याह । साक्षाद्भगवताभितो रक्ष्यमाणानाम् । केन । अनिमिषः कालः स एवारि चक्रं तेन वरायुधेन तैस्तैर्भावैश्चांतर्यामितया प्रवर्त्यमानैर्भद्रकाल्यादिरूपैः । न कुतश्चिदपि भयं यस्मिन् । भागवतानां भगवदुपासकानां परमहंसानाम् ॥ २० ॥ इति पंचमस्कंधे टीकायां नवमोऽध्यायः ॥ ९ ॥ ॥

रुषांवर योजलेला मारणरूप अपराध, सर्वप्रकारेंकरून योजणाऱ्यालाच खरोखर फलद्रूप होतो ॥ १९ ॥ हे परीक्षिता, ज्यांनीं देहादिकांवर आत्मभावरूप असलेला अतिबळकट हृदयग्रंथि सोडिला आहे, जे सर्वभूतांचे मित्र व आत्मे झाले आहेत, जे कोणाशींहि वैर करीत नाहींत, ज्यांचें साक्षात् भगवंतानें, आपल्या नेहमीं सावध असलेल्या कालचक्ररूपी उत्तम शस्त्राच्या योगानें त्या त्या अंतर्यामिरूपानें प्रेरणा केलेल्या भद्रकालीवगैरे स्वरूपांनीं संरक्षण केलें आहे, आणि जे निर्भय अशा भगवंताच्या चरणमूलाप्रत शरण गेले आहे. त्या महाभगवद्भक्त परमहंसांना स्वतांचा शिरच्छेद होण्याची वेळ आली असतांहि, जी व्याकुलता प्राप्त न होणें हें कांहीं मोठेंसें आश्चर्य नव्हे ॥ २० ॥ याप्रकारें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील पंचमस्कंधामध्यें जडभरताच्या आख्यानांतील हा नववा अध्याय समाप्त झाला ॥ ९ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां ह्या दहाव्या अध्यायामध्यें, आपली पालखी वाहणाऱ्या जडभरताचा तिरस्कार करणाऱ्या रहूगणराजानें, आपल्या दुर्वाक्यांचा जडभरतानें केलेला अनुवाद जाणून, त्याला त्वरित प्रसन्न केलें अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ त्यांत प्रथम त्या जडभरताचें ज्ञानित्व सांगण्यासाठीं श्रीशुकाचार्य ह्मणाला- हे राजा, नंतर एकेवेळीं सिंधुसौवीर देशांचा रहूगणनामक राजा, तत्त्वज्ञान प्राप्त होण्याकरितां कपिलमहामुनीच्या आश्रमाप्रत जाऊं लागला असतां, इक्षुमतीनामक नदीच्या तीरीं भोईलोकांच्या अधिपतीला, राजाची पालखी वाहण्यासाठीं भोई शोधून आणण्याची वेळ पडली. तेव्हां, दैवानेंच तेथें आणून पोंचविलेला हा ब्राह्मणश्रेष्ठ त्याच्या दृष्टीस पडला. आणि त्याला वाटलें कीं,- हा पुरुष, पुष्ट, तरुण व घट्ट अशा अवयवांनीं युक्त असल्यामुळें वृषभासारखा किंवा गर्दभासारखा भार (पालखीचा दांडा) वाहण्यास समर्थ आहे, असें मानून त्यानें पूर्वीं बलात्कारानें वेठीला धरलेल्या पुरुषांबरोबर यालाहि धरिलें. तें काम त्याच्या योग्यतेचें नव्हतें तथापि तो महासमर्थ जडभरत,

---

दशमे क्षिपता राज्ञा शिबिकां स्वां वहन्मुनिः ॥ स्वदुर्वादानुवादेन विज्ञायाशु प्रसादितः ॥ १ ॥ एवंभूताविकारित्वमज्ञसर्वज्ञयोः समम् ॥ इति सर्वज्ञतासिद्ध्यै रहूगणकथेरणम् ॥ २॥ रहूगणो नाम सिंधुसौवीरदेशयो राजा तत्त्वजिज्ञासुः कपिलाश्रमं यदा गच्छति स्म तदा यद्वृत्तं तदाह । अथेति । इक्षुमत्या नद्यास्तीरे । तेषां शिबिकावाहानां कुलस्य नाथेन

॥ श्रीशुक उवाच ॥ अथ सिंधुसौवीरपते रहूगणस्य व्रजत इक्षुमत्यास्तटे तत्कुलपतिना शिबिकावाहपुरुषान्वेषणसमये दैवेनोपसादितः स द्विजवर उपलब्ध एष पीवा युवा संहननांगो गोखरवद्धुरं वोढुमलमिति पूर्वविष्टिगृहीतैः सह गृहीतः प्रसभमतदर्ह उवाह शिबिकां स महानुभावः ॥ १ ॥ यदा हि द्विजवरस्येषुमात्रावलोकानुगतेर्न समाहिता पुरुषगतिस्तदा विषमगतां स्वशिबिकां रहूगण उपधार्य पुरुषानधिवहत आह हे वोढारः साध्वतिक्रमत किमिति विषममुह्यते यानमिति ॥ २॥ अथ त ईश्वरवचः सोपालंभमुपाकर्ण्योपायतुरीयाच्छंकितमनसस्तं विज्ञापयांबभूवुः ॥ ३ ॥ न वयं नरदेव प्रमत्ता भवन्नियमानुपथाः साध्वेव वहामः अयमधुनैव नियुक्तोऽपि न द्रुतं व्रजति नानेन सह वोढुमुह वयं पारयाम इति ॥ ४ ॥

एष गौरिव खर इव च भारं वोढुं समर्थ इति धिया पूर्वं ये केचन विष्ट्या बलाद्गृहीतास्तैः सह प्रसभं बलाद्गृहीतः सन्नतदर्होऽपि स महानुभावः शिबिकामुवाहेत्यन्वयः ॥ १ ॥ हिंसापरिहारार्थमिषुमात्रप्रदेशावलोकस्यानु पश्चाद्या गतिस्तस्या हेतुभूतायाः पुरुषाणां गतिर्न सम्यगाहिता एकरूपा नाभूत् ॥ २ ॥ सोपालंभं साक्षेपम् । सामदानभेददंडेषूपायेषु चतुर्थाच्छकितचित्ताः ॥ ३ ॥ भवन्नियमानुपथास्त्वदाज्ञानुवर्तिनः । न पारयामो न शक्नुमः ॥ ४ ॥

राजाची पालखी वाहूं लागला ॥ १ ॥ तेव्हां चालतांना हिंसा होईल ह्मणून हा श्रेष्ठ ब्राह्मण, बाणाइतका प्रदेश पाहून तेथें किडा मुंगी, वगैरे नाहीं अशी खात्री झाल्यावर पावलें ठेऊन चालत असे, ह्मणून याच्या गतीबरोबर जेव्हां दुसऱ्या पुरुषांची गति सारखी होईना व पालखी वांकडी होऊं लागली तेव्हां तें पाहून, त्या वाहक पुरुषांना रहूगण राजा, ह्मणाला कीं, हे वाहकहो, तुह्मी पालखी चांगल्या रीतीनें वहा, वांकडी पालखी काय ह्मणून वाहतां? ॥ २ ॥ असें स्वामीचें निंदायुक्त भाषण श्रवण करून, ते भोई आपणास राजा दंड करील अशी शंका मनांत आणून त्याच्या जवळ विज्ञापना करूं लागले कीं, ॥ ३ ॥ हे महाराज, आह्मी उन्मत्तपणानें मुळींच वागत नाहीं, तर आपल्या आज्ञेप्रमाणें नीट पालखी वहात आहों, परंतु हा आतांच लावलेला नवा भोई श्रमला नसूनहि जलद चालत नाहीं. याच्या बरो-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वर पालखी वाहण्यास आह्मी समर्थ नाहीं ॥ ४ ॥ याप्रमाणें त्या गरीब भोयांचें भाषण ऐकून, 'संसर्गनिमित्तक एकाचाहि दोष, त्याच्या बरोबर संबंध ठेवणाऱ्या सर्वांहि लोकांस बाधक होण्यास योग्य होतो' असा निश्चय करून रहूगण राजा, वृद्धांची सेवा करून शांतस्वभाव झालेला होता तथापि ह्या प्रसंगीं त्याच्या पूर्वीच्या मूळच्या क्षत्रियस्वभावानें बलात्कारानें परवश केल्यामुळें त्याची बुद्धि रजोगुणानें व्याप्त झाली होती, ह्मणून तो थोडासा क्रोधयुक्त होऊन, भस्मानें आच्छादित असलेल्या अग्नीप्रमाणें ज्याचेठिकाणीं ब्रह्मतेज स्पष्ट दिसत नव्हतें अशा त्या ब्राह्मणाला ह्मणाला कीं,– ॥ ५ ॥ हे बंधो, मोठी दुःखाची गोष्ट आहे कीं ! तूं खरोखर फार श्रमला आहेस ! पुष्कळ वेळपर्यंत तूं एकट्यानेंच ही पालखी फार लांब रस्त्यावर वाहून आणिली आहेस ! आणि तूं फारसा पुष्टही नाहींस ! तुझे अवयवहि सुदृढ नाहींत ! व

कृपणानां वचो निशम्य सांसर्गिकः संसर्गनिमित्त एकस्यापि दोषः सर्वेषामेव भवितुमर्हतीति निश्चित्य रहूगण आहेत्यन्वयः । कथंभूतः । उपासिता वृद्धा येन सोऽपि स्वभावेन बलात्परवशः कृतः सन् । कथंभूतं प्रत्याह । न विस्पष्टं ब्रह्म तेजो यस्मिन् । भस्मनाच्छन्नमग्निमिव स्थितम् ॥ ५ ॥ भ्रातरिति संबोधनमाक्षेपाभिप्रायम् । व्यक्तं निश्चितमुरु अधिकं परिश्रांतोऽसीत्यादीनि विपरीतार्थानि षड्वाक्यानि । ऊहिवान्प्रापितवान् । तत्रापि सुचिरम् । जरसा च वृद्धत्वेन । संघट्टिनः सहचराः । बहु यथाभवत्येवं

सांसर्गिको दोष एव नूनमेकस्यापि सर्वेषां सांसर्गिकाणां भवितुमर्हतीति निश्चित्य निशम्य कृपणवचो राजा रहूगण उपासितवृद्धोऽपि निसर्गेण बलात्कृत ईषदुत्थितमन्युरविस्पष्टब्रह्मतेजसं जातवेदसमिव रजसावृतमतिराह ॥ ५ ॥ अहो कष्टं भ्रातर्व्यक्तमुरुपरिश्रांतो दीर्घमध्वानमेक एव ऊहिवान्सुचिरं नातिपीवा न संहननांगो जरसा चोपद्रुतो भवान् सखे नो एवापर एते संघट्टिन इति बहुविप्रलब्धोऽप्यविद्यया विहितद्रव्यगुणकर्माशयस्वचरमकलेवरेऽवस्तुनि संस्थानविशेषेऽहंममेत्यनध्यारोपितमिथ्याप्रत्ययो ब्रह्मभूतस्तूष्णीं शिबिकां पूर्ववदुवाह ॥ ६ ॥ अथ पुनः स्वशिबिकायां विषमगतायां प्रकुपित उवाच रहूगणः किमिदमरे त्वं जीवन्मृतो मां कदर्थीकृत्य भर्तृशासनमतिचरसि प्रमत्तस्य च ते करोमि चिकित्सां दंडपाणिरिव जनताया यथा प्रकृतिं स्वां भजिष्यस इति ॥ ७ ॥

विप्रलब्धोऽपि वक्रोक्त्योपहसितोऽपि तूष्णीमुवाहेत्यन्वयः । तूष्णींभावे हेतुः । अविद्यया रचिता द्रव्यादयो यस्मिंस्तस्मिन्स्वचरमकलेवरे नाध्यारोपितो मिथ्याप्रत्ययो येन । तत्र द्रव्याणि महाभूतानि । गुणा इंद्रियाणि । कर्माणि पुण्यपापानि । आशयोंऽतःकरणम् । यतो ब्रह्मभूतः ॥ ६ ॥ मामनादृत्य भर्तुः स्वामिनो मम शासनमाज्ञामतिक्रामसि चिकित्सां शास्तिम् । दंडपाणिर्यमो यथा जनसमूहस्य शास्तिं करोति तथा । स्वां प्रकृतिमप्रमत्तताम् ॥ ७ ॥

ह्मातारपणानेंहि तूं अगदीं पीडित झाला आहेस ! हे मित्रा, तुझे हे दुसरे साथीदार, पालखी मुळींच वाहत नसतील ! याप्रमाणें वक्र भाषणानें राजानें त्याचा पुष्कळ उपहास केला असतांहि, ज्यामध्यें, पंचमहाभूतें, इंद्रियें, पुण्यपापरूप कर्में व अंतःकरण यांची रचना अविद्येनें रचलेली आहे अशा आपल्या हस्तपादादिक आकारविशेषांनीं परिणाम पावलेल्या मिथ्याभूत शेवटच्या देहावर 'हा मी व हें माझें' अशा प्रकारचा अभिमान ज्यानें मुळींच बाळगलेला नाहीं असा तो ब्रह्मरूप झालेला जडभरत, मुकाट्यानें पूर्वींप्रमाणें पालखी वाहूं लागला ॥ ६ ॥ नंतर पुनः पालखी डळमळूं लागलीं असतां, अतिक्रुद्ध झालेला रहूगण राजा ह्मणाला कीं, काय हें ! अरे तूं जीवंत असतांनांच मेला आहेस कीं काय? अरे माझा अनादर करून तूं मज स्वामीची आज्ञा उल्लंघन करीत आहेस काय? हे उन्मत्ता, जसा दंडपाणि (यम) जीवस-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मुदायाला शासन करितो त्याप्रमाणें मी तुला शिक्षा करितों, ह्मणजे तूं नीट ताळ्यावर येशील ॥ ७ ॥ हे राजा, याप्रमाणें पुष्कळ अयोग्य भाषण करणारा, 'मी राजा आहें' असा अभिमान धारण करणारा रजोगुणानें व फार वाढलेल्या मदानें भगवंताच्या सर्वप्रिय स्थानाचा (भक्तांचा) तिरस्कार करणारा, आपणासच पंडित असें मानणारा आणि भगवद्भक्तांचा अभिप्राय जाणण्याविषयीं ज्याच्या बुद्धीनें अभ्यास केलेलाच नाहीं अशा त्या रहूगण राजाला, सर्वभूतांचा मित्र, आत्मा, ब्रह्मरूपीं ऐक्य पावलेला व गर्वरहित असा तो भगवान् ब्राह्मण (जडभरत) किंचित् हास्य केल्यासारखें दाखवून ह्मणाला कीं, ॥ ८ ॥ ब्राह्मण ह्मणाला– हे वीरा राजा, तूं मला, फार श्रमला आहेस वगैरे जें भाषण केलेंस तें वर्मीं लागण्यासारखें खोंचेचें नसून खरेंच आहे. कारण, हेवीरा, जर भार ह्मणून कांहीं पदार्थ असता व तो वाहणाऱ्या

अबद्धमनन्वितम् । नरदेवोऽहमित्यभिमानो यस्य तम् । अनुविद्धेन संगुणितेन । तिरस्कृतोऽशेषः संपूर्णो भगवतः प्रियनिकेत आश्रयो येन तम् । यद्वा । अशेषाणां भगवत्प्रियाणां निकेतः सर्वेषां भूतानां सुहृच्च आत्मा च योगेश्वराणां चर्या जडादिवदाचरणं तस्यां नात्यंतं व्युत्पन्ना परिचिता मतिर्यस्य स तम् । स्मयमानो हसन्निवेति मुखप्रसत्तिर्द्योत्यते । विगतस्मयो गतगर्वः ॥ ८ ॥ तत्र वक्रोक्त्या यदुक्तं त्वं न श्रांतो न च दीर्घमध्वानमागत इति तत्रोत्तरमाह । त्वया यदुदितमुक्तं श्रमादि नास्तीति तद्व्यक्तं स्फुटं तत्तथैव । अविप्रलब्धं विप्रलंभो न भवति । तदेवाह । हे वीर यदि भारो नाम कश्चित्स्यात्स च भर्तुर्वो-

एवं बह्वबद्धमपि भाषमाणं नरदेवाभिमानं रजसा तमसाऽनुविद्धेन मदेन तिरस्कृताशेषभगवत्प्रियनिकेतं पंडितमानिनं स भगवान्ब्राह्मणो ब्रह्मभूतः सर्वभूतसुहृदात्मा योगेश्वरचर्यायां नातिव्युत्पन्नमतिं स्मयमान इव विगतस्मय इदमाह ॥ ८ ॥ ब्राह्मण उवाच ॥ त्वयोदितं व्यक्तमविप्रलब्धं भर्तुः स मे स्याद्यदि वीर भारः ॥ गंतुर्यदि स्यादधिगम्यमध्वा पीवेति राशौ न विदां प्रवादः ॥ ९ ॥ स्थौल्यं कार्श्यं व्याधय आधयश्च क्षुत्तृड्भयं कलिरिच्छा जरा च ॥ निद्रा रतिर्मन्युरहंमदः शुचो देहेन जातस्य हि मे न संति ॥ १० ॥

ढुर्देहस्य यदि स्यात्स च मे यदि प्रसक्तः स्यात्तर्हींदानीं भाराभावाद्विप्रलंभः स्यान्न त्वेतदस्ति भारस्य वोढुश्चानिरूप्यत्वान्मम च तत्संबंधाभावात् । तथा गंतुरधिगम्यं प्राप्यमध्वा वा यदि स्यात् । अद्धेति पाठे साक्षात्परमार्थतः । तच्च मे यदि स्यादित्यादि योज्यम् । यत्त्वयोक्तं नातिपीवेति तत्राह । चेतनमुद्दिश्य त्वं पीवेति प्रवादो विदां विदुषां न भवति किंतु मूर्खाणाम् । यतोऽयं प्रवादो राशौ भूतसंघे देहे एव न त्वात्मनि । देह एव पीनो नाहमित्यर्थः ॥ ९ ॥ एतत्प्रपंचयति । स्थौल्यमिति । कलिः कलहः । अहंकारेण मदश्च । देहेन सह तदभिमानेन जातस्य हि भवंति । मम तु निरभिमानस्य न संति । यद्वा । देहे जाते यो जातस्तस्यैव तानि मम तु तत्र न जातस्य न संति ॥१०॥

देहाला लागत असता आणि तो मला जर प्राप्त झाला असता, ह्मणजे त्या भार वाहणाऱ्या शरीराचा जर माझ्याशीं कांहीं संबंध असता तर तुझें तें खोंचेचें बोलणें मला वर्मीं लागलें असतें; परंतु भार आणि शरीर हीं दोन्हीं ह्मणण्यासारखीं नाहींत व त्यांचा माझ्याशीं संबंध नाहीं. तसेंच चालणाऱ्याला अमुकठिकाणीं पोंचावयाचें स्थान व मार्ग हीं जर सत्य असतीं व त्यांचा जर माझ्याशीं संबंध असता तर तुझें तें छद्मी बोलणें मला खोंचलें असतें. तें कांहींच नाहीं. आतां हे राजा, तूं मला, फारसा [illegible]
नाहींस वगैरे जें ह्मणालास तें चैतन्याला उद्देशून 'तूं पुष्ट आहेस' असें ह्मणणें विद्वानांचें संभवत नाहीं, मूर्खांचेंच संभवतें, कारण, तें बोलणें पंचमहाभूतांच्या [illegible]
देहालाच अवलंबून असतें, आत्म्याला अवलंबून नसतें ॥ ९ ॥ स्थूळपणा, कृशपणा, रोग, मानसिक पीडा, क्षुधा, तृषा, भय, कलह, इच्छा, जरा, निद्रा, ग[illegible]

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अहंकार, गर्व आणि शोक हे सर्व धर्म, देहाभिमानासहवर्तमान उत्पन्न होणाऱ्या पुरुषालाच आहेत, ते निरभिमानी अशा मला मुळींच नाहींत ॥ १० ॥ आतां जीवंत असून तूं मेल्यासारखा आहेस असें जें तूं ह्मणालास त्याबद्दल सागतों ऐक.– हे राजा, जन्म आणि मरण हे धर्म, केवळ मलाच आहेत असें नाहीं, तर जितके ह्मणून परिणामी पदार्थ आहेत त्या सर्वांनाहि ते नियमानें दिसून येतात. कारण, ते विकारी पदार्थ प्रतिक्षणीं उत्पत्ति आणि नाश यांणीं युक्त आहेत. आतां स्वामीची आज्ञा उल्लंघन करितोस, असें जें तूं मला ह्मटलेंस त्याबद्दल सांगतों ऐक.– हे स्तुत्य राजा, जेथें सेव्यसेवकभाव कायमचा निश्चित असेल तेथें धन्याची आज्ञा आणि चाकराचें काम हा प्रकार योग्य होईल, नाहींतर योग्य होणार नाहीं. जर कदाचित् तूं राज्यभ्रष्ट झालास आणि मला राज्य मिळालें तर हें उलट होणार नाहीं काय ? होईलच ॥ ११ ॥ राजा आणि सेवक यांची भेदबुद्धि वाटण्याला अवकाश (जागा) ह्मटला तर व्यवहारावांचून दुसरा थोडादेखील माझ्या दृष्टीस पडत नाहीं. तेव्हां तेथें

यच्चोक्तं जीवन्मृतोऽसीति तत्राप्याह । जीवन्मृतत्वं न केवलं मम किंतु विकृतस्य सर्वस्यापि परिणामिनो दृष्टम् । यद्यस्माद्विकृतं प्रतिक्षणमाद्यंतवत् । यदुक्तं भर्तृशासनमतिचरसीति तत्राह । स्वं च स्वाम्यं च तयोर्भावः सत्ता हेईड्य यत्र पक्षे ध्रुवो यदि व्यवस्थितः स्यादित्यर्थः । तर्हि विधिर्नियोगः कृत्यं कर्म तयोर्योगो ध्रुव उच्यते उचितो भवति । उच समवाये इति धातुः । यदि तु तव राज्यभ्रंशो मम च राज्यं स्यात्तदा सर्वमेतद्विपरीतं स्यादित्यर्थः ॥ ११ ॥ ननु यावद्राजाऽहं तावत्तव स्वामी

जीवन्मृतत्वं नियमेन राजन्नाद्यंतवद्यद्विकृतस्य दृष्टम् ॥ स्वस्वाम्यभावो ध्रुव ईड्य यत्र तर्ह्युच्यतेऽसौ विधिकृत्ययोगः ॥ ११ ॥ विशेषबुद्धेर्विवरं मनाक्च पश्यामि यन्न व्यवहारतोऽन्यत् ॥ क ईश्वरस्तत्र किमीशितव्यं तथापि राजन्करवाम किं ते ॥ १२ ॥ उन्मत्तमत्तजडवत्स्वसंस्थां गतस्य मे वीर चिकित्सितेन ॥ अर्थः कियान्भवता शिक्षितेन स्तब्धप्रमत्तस्य च पिष्टपेषः ॥ १३ ॥ श्रीशुक उवाच ॥ एतावदनुवादपरिभाषया प्रत्युदीर्य मुनिवर उपशमशील उपरतानात्म्यनिमित्त उपभोगेन कर्मारब्धं व्यपनयन्राजयानमपि तथोवाह ॥ १४ ॥

भवाम्येवेति चेत्तत्राह । विशेषो राजभृत्यादिभेदस्तद्बुद्धेर्विवरमवकाशं व्यवहारादन्यन्न पश्याम । मनाक् च ईषदपि । अथापि तवायमभिमानश्चेत्तर्हि ब्रूहि किं ते करवामेति ॥ १२ ॥ यच्चूक्तं प्रमत्तस्य ते चिकित्सां करोमि यथा स्वां प्रकृतिं भजिष्यस इति तत्राह । उन्मत्तादिवद्वर्तमानस्य वस्तुतः स्वसंस्थां ब्रह्मभावं गतस्य भवता कृतेन चिकित्सितेन दंडेन शिक्षितेन वा कियानर्थः मुक्तस्यार्थानर्थयोरसंभवात् । यदि पुनरहं न मुक्तः किंतु प्रमत्तः स्तब्ध एव तथापि मम शिक्षादिकं पिष्टपेषणवद्व्यर्थमित्यर्थः । नहि जडस्वभावः शिक्षयापि पटूकर्तुं शक्यत इति ॥ १३ ॥ अनुवादरूपया परिभाषया भाषणेन तं प्रत्युत्तरं दत्त्वा उपरतमनात्म्ये देहात्मत्वे

धनी तो काय ? आणि त्यानें आज्ञा करावयाची ती कोणती ? कांहींच नाहीं: असें असून तुला अभिमानच असेल तर हे राजा, मी तुझी कोणती सेवा करावी ? तें सांग ॥ १२ ॥ आतां मी तुला शासन केलें ह्मणजे तूं ताळ्यावर येशील असें तूं ह्मणतोस तर– हे वीरा, उन्मत्त, मत्त किंवा जड यांच्यासारखा बाह्यदृष्टीनें वागत असून वस्तुतः ब्रह्मरूपास पावलेल्या मला तूं केलेल्या दंडानें किंवा शिक्षेनें तुझा काय उपयोग होणार आहे ? कांहींच नाही. आतां मी मुक्त नसून प्रमत्त किंवा उद्धट आहें असें तुझें ह्मणणें असेल तरीदेखील तुझें मला शिक्षा करणें हें पिष्टपेषणासारखें (पिठाच्या वारंवार दळण्यासारखें) निरर्थक होणार आहे ॥ १३ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, ज्याचें देहाला आत्मा मानण्याचें निमित्त (अविद्या) नाश पावलें आहे आणि ज्याचा स्वभाव शांत आहे असा तो ऋषिश्रेष्ठ जडभरत, याप्रमाणें त्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रहूगणाला अनुवादरूप भाषणानें प्रत्युत्तर देऊन, प्रारब्धकर्मांचा उपभोगानेंच क्षय करण्यासाठीं राजाची पालखी पूर्वीप्रमाणें वाहूं लागला ॥ १४ ॥ हे पांडवपुत्रा, सिंधुसौवीरदेशांचा अधिपति तो रहूगण राजाहि, उत्तम श्रद्धेच्या योगानें तत्त्वजिज्ञासेविषयीं अधिकार प्राप्त झालेला होता. त्यानें हृदयग्रंथीचा भेद करणारें व अनेक योगग्रंथांना मान्य असें तें जडभरताचें भाषण ऐकिल्याबरोबर त्याचा 'मी मोठा राजा असा असलेला' गर्व अगदीं नाहींसा होऊन तो त्वरेनें पालखींतून खालीं उतरला आणि त्या ब्राह्मणाच्या चरणाप्रत मस्तकानें नमस्कार करून त्याजवळ क्षमा मागत होत्साता ह्मणाला कीं, ॥ १९ ॥ हे भगवन्, आपले वर्णाश्रमादिक धर्म समजूं न देतां गुप्तरूपानें संचार करणारा तूं कोण आहेस ? तूं यज्ञोपवीत धारण करित आहेस त्यावरून ब्राह्मण, क्षत्रिय किंवा वैश्य या तिघां द्विजांपैकीं कोणीतरी आहेस कीं काय ?

निमित्तमविद्या यस्य । आरब्धफलं कर्म क्षपयन् ॥ १४ ॥ हे पांडवेय सम्यग्या श्रद्धा तयैव तत्त्वजिज्ञासायां प्राप्तोऽधिकारो येन । यथा दर्शपूर्णमासाधिकृतस्यैव गोदोहनेन पशुकामस्यापः प्रणयेदिति गुणफलसंबंधेऽप्यधिकारः । एवं सात्त्विकश्रद्धायामधिकृतस्यैवास्यामधिकार इत्यर्थः । बहुयोगग्रंथसंमतं द्विजस्य तद्वचः श्रुत्वा विगतो नृपदेवोऽधिराज इति गर्वो यस्य ॥ १९ ॥ द्विजानां मध्ये कतमः । यतः सूत्रमुपवीतं बिभर्षि । यद्वा । दत्तात्रेयादीनां मध्ये कतमोऽवधूतः । इहापि कस्माद्धेतोः प्राप्तः ।

स चापि पांडवेय सिंधुसौवीरपतिस्तत्त्वजिज्ञासायां सम्यक्श्रद्धयाऽधिकृताधिकारस्तद्धृदयग्रंथिमोचनं द्विजवच आश्रुत्य बहुयोगग्रंथसंमतं त्वरयाऽवरुह्य शिरसा पादमूलमुपसृतः क्षमापयन्विगतनृपदेवस्मय उवाच ॥ १५ ॥ कस्त्वं निगूढश्चरसि द्विजानां बिभर्षि सूत्रं कतमोऽवधूतः ॥ कस्यासि कुत्रत्य इहापि कस्मात्क्षेमाय नश्चेदसि नोत शुक्लः ॥ १६ ॥ नाहं विशंके सुरराजवज्रान्न त्र्यक्षशूलान्न यमस्य दंडात् ॥ नाग्न्यर्कसोमानिलवित्तपास्त्राच्छंके भृशं ब्रह्मकुलावमानात् ॥ १७ ॥ तद्ब्रूह्यसंगो जडवन्निगूढविज्ञानवीर्यो विचरस्यपारः ॥ वचांसि योगग्रथितानि साधो न नः क्षमंते मनसाऽपि भेत्तुम् ॥ १८ ॥ अहं च योगेश्वरमात्मतत्त्वविदां मुनीनां परमं गुरुं वै ॥ प्रष्टुं प्रवृत्तः किमिहारणं तत्साक्षाद्धरिं ज्ञानकलावतीर्णम् ॥ १९ ॥

नोऽस्माकं क्षेमाय चेत्प्राप्तस्तर्हि शुक्लः कपिलो मुनिर्न भवसि किम् । उतेति वितर्के ॥ १६ ॥ किमनया चिंतया शिबिकां तावद्वहामीति चेदत आह । नाहमिति । वित्तपः कुबेरः ॥ १७ ॥ यस्माद्भृशं शंके तत्तस्मात्कस्त्वमित्यादिप्रश्नानामुत्तरं ब्रूहि । निगूढं पिहितं विज्ञानरूपं वीर्यं प्रभावो येन । अपारोऽनंतमहिमा । तत्र हेतुः । नो मनसापि भेत्तुं न क्षमं न शक्यम् । किं भेत्तुमित्यपेक्षायामाह । ते वचांसीति । यद्वा मनसा युक्ताः सूक्ष्मदृष्टयोऽपि भेत्तुं न शक्नुवंतीत्यर्थः ॥ १८ ॥ स्वस्य ज्ञानार्थितां

किंवा दत्तात्रेयादिकांपैकीं तूं कोणी अवधूत आहेस कीं काय ? तूं कोणत्या देशामध्यें राहणारा, कोणाचा कोण आहेस व या ठिकाणीं कोणत्या कारणानें आला आहेस ? आमच्या कल्याणाकरितां जर येथें प्राप्त झाला आहेस तर तूं शुद्धसत्त्वमूर्ति कपिल महामुनि तर नव्हेसना ? ॥ १६ ॥ हे भगवन्, मी इंद्राच्या वज्रापासून भीत नाहीं, रुद्राच्या शूळापासून भीत नाहीं, यमाच्या दंडापासून भीत नाहीं, तसाच अग्नि, सूर्य, चंद्र, वायु आणि कुबेर यांच्या शस्त्रांपासूनहि भीत नाहीं, परंतु ब्राह्मणकुलाच्या अपमानापासून फार भीत असतों ॥ १७ ॥ योस्तव जो तूं आपला अपरोक्षज्ञानरूपी प्रभाव गुप्त राखून, अनंतमहिम्यानें युक्त असूनहि जनसंगरहित होत्साता जडासारखा फिरत आहेस तो तूं कोण आहेस ? तें मला सांग. कारण, हे साधो, तुझीं योगमार्गानें घटलेलीं जीं भाषणें तीं आह्मांस मनानेंहि अर्थविचार करण्यास शक्य होत नाहींत. किंवा मोठमोठे सूक्ष्मविचारी पुरुषही तुझीं वचनें अर्थविचारानें उकलण्यास समर्थ होत नाहींत ॥ १८ ॥ मीतर, आत्मतत्त्व जाणणाऱ्या मुनींचाहि परमगुरु

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अशा ज्ञानकलेनें अवतार धारण करणाऱ्या साक्षात् हरिरूपी कपिलमहामुनीला, या संसारामध्यें शरण जाण्यास योग्य असें वस्तु कोणतें आहे. तें विचारण्यासाठीं त्याच्या आश्रमाकडे जात आहें ॥ १९ ॥ तो कपिलमहामुनिच तूं असून लोकस्थिति पाहण्यासाठीं स्वतांचें स्वरूप गुप्त ठेऊन फिरत आहेस कीं काय? ग्रहाचेठिकाणीं आसक्त असल्यामुळें विवेकशून्य असलेला पुरुष, योगेश्वरांच्या गतीला कशा बरें जाणेल? जाणणारच नाहीं ॥ २० ॥ असा प्रश्न करून तो रहूगण राजा, त्यानें दिलेल्या उत्तरांवर शंका करितो कीं, मला श्रम नाहीं, असें जें तूं ह्मटलेंस त्याविषयीं मला असें वाटतें कीं, मला तर युद्धादिक कर्म केल्यापासून श्रम झालेला दिसतो, त्याप्रमाणेंच भार वाहणाऱ्या व चालणाऱ्या तुलाहि श्रम होत आहे असें मी अनुमान करितों. आतां हा केवळ व्यवहारमात्र आहे परंतु खरें कांहींच नाहीं, असें तूं ह्मणशील तर, हा व्यवहारमार्ग (प्रपंच) मूळकारणासहित सत्यच दिसत आहे. कारण, खोट्या वस्तूच्या योगानें व्यवहार चालणार नाहीं. घट जर खोटा आहे असें मानिलें तर त्यापासून

दर्शयति । अहं चेति । इह संसारे यदरणं शरणं तत्किमिति प्रष्टुं प्रवृत्तोऽस्मि । ज्ञानशक्त्याऽवतीर्णं कपिलम् ॥ १९ ॥ स एव भवान्किंस्विदेवं विचरति । ग्रहाविष्टः कथं विचक्षीत पश्येत् ॥ २० ॥ एवं तत्स्वरूपं पृष्ट्वा तदुक्तोत्तराण्याक्षिपति । तत्र यदुक्तं मम श्रमो नास्तीति तत्राह । दृष्ट इति । आत्मनो मे । अनुमन्ये अनुमिमे । अनुमानं चैवम्, भवान्भारवाहनादिना श्रांतः कर्तृत्वात् । यः कर्ता स श्राम्यति । यथाऽहं युद्धादिकर्तेति । नन्विदं व्यवहारमात्रं नतु सत्यम् । यदुक्तं व्यवहारतोऽन्यत्र पश्यामीति तत्राह । यथेति । व्यवहारमार्गः प्रपंचः समूलः सप्रमाणक एव इष्टः । यथा यथावत् । असता घटादिनोदकानयनादेरभावात् । एवं प्रयोगः, प्रपंचः सत्यः

स वै भवाँल्लोकनिरीक्षणार्थमव्यक्तलिंगो विचरत्यपि स्वित् ॥ योगेश्वराणां गतिमंधबुद्धिः कथं विचक्षीत गृहानुबंधः ॥ २० ॥
दृष्टः श्रमः कर्मत आत्मनो वै भर्तुर्गंतुर्भवतश्चानुमन्ये ॥ यथाऽसतोदानयनाद्यभावात्समूल इष्टो व्यवहारमार्गः ॥ २१ ॥ स्थाल्यग्नितापात्पयसोऽभितापस्तत्तापतस्तंडुलगर्भरंधिः ॥ देहेंद्रियास्वाशयसन्निकर्षात्तत्संसृतिः पुरुषस्यानुरोधात् ॥ २२ ॥ शास्ताऽभिगोप्ता नृपतिः प्रजानां यः किंकरो वै न पिनष्टि पिष्टम् ॥ स्वधर्ममाराधनमच्युतस्य यदीहमानो विजहात्यघौघम् ॥ २३ ॥

अर्थक्रियाकारित्वात् यः पुनरसत्यः नासावर्थक्रियाकारी यथा मिथ्याघटादिरिति ॥ २१ ॥ यदुक्तमुपाधिधर्माः स्थौल्यादयो मे न वस्तुतः संतीति तत्रौपाधिकत्वेऽपि सत्यत्वं किं न स्यादित्याह । स्थाल्या अग्निना तापात्तन्मध्यवर्तिनः क्षीरस्य तापः तस्य तापात्तंडुलानां बहिर्भागस्य ततस्तद्गर्भस्य च रंधिः पाकः । न चात्र किंचिन्मिथ्या । एवं देहादिभिः सन्निकर्षात्संबंधात्तन्निमित्ता संसृतिः पुरुषस्य भवति । असवः प्राणाः आशयो मनः अनुरोधादुपाधिधर्मानुवृत्तेः । तथाहि । निदाघादिना देहे तप्ते इंद्रियाणां तापस्ततः प्राणस्य ततो मनस इत्येवं यथायथमूह्यम् ॥ २२ ॥ यदुक्तं स्वस्वाम्यभावो ध्रुव इति तत्राह । अध्रुत्वेऽपि यदा यो नृपतिः स प्रजानां शास्ता

पाणी आणणेंवगैरे कामें कशीं होतील? होणारच नाहींत ॥ २१ ॥ ज्याप्रमाणें चुलीवर भांडें ठेऊन त्याच्या खालीं अग्नि प्रदीप्त केला ह्मणजे त्याच्या योगानें प्रथम तें भांडें तापतें, नंतर त्यांतील पाणी तापतें, नंतर तांदूळ बाहेरून व आंतून शिजतात. त्याप्रमाणें देह, इंद्रियें, प्राण, आणि मन ह्यांच्या संबंधामुळें क्रमाक्रमानें उपाधींचे धर्म पुरुषावर येऊन पोंचतात, त्यांच्या योगानें पुरुषाला संसार प्राप्त होतो. ह्मणजे उन्हानें शरीराला ताप झाला कीं इंद्रियें तापतात, नंतर प्राण तापतात, नंतर मनाला ताप होतो आणि शेवटीं परमात्म्याचा अंशभूत असलेल्या जीवालाहि ताप होतो ॥ २२ ॥ आतां तुझ्या ह्मणण्याप्रमाणें सेव्यसेवकभाव जरी अशाश्वत मानिला तथापि ज्या वेळीं जो राजा असतो त्या वेळीं तो प्रजांना शिक्षण लावणारा व रक्षण करणारा असतोच. प्रमत्ताला शिक्षा करणें हें केवळ पिष्टपेषण ह्मणावें तर, जो भगवंताचा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दास असतो तो कदापि पिष्टपेषणासारखें निरर्थक काम करावयाचा नाहीं. कारण, उन्मत्तादिकांना त्यानें शिक्षा केली असतांहि जरी त्यांचा उन्मत्तादिपणा गेला नाहीं तथापि त्याच्या योगानें स्वधर्मरूप भगवंताचें आराधन करणाऱ्या त्या पुरुषाचीं सर्वे पापें नष्ट होतात ॥ २३ ॥ यास्तव हे दुःखितांच्या हितकर्त्या, मला जरी तुझें भाषण विपरीत वाटत आहे तथापि 'मी राजा आहें' अशा अभिमानामुळें प्राप्त झालेल्या उन्मत्तपणानें तुझ्यासारख्या महासाधूंचा अपमान केल्याचा दोष मजकडे येत आहे, ह्मणून तूं माझ्यावर स्नेहयुक्त दृष्टि करावीस ह्मणजे तिच्या योगानें मी सत्पुरुषांच्या अपराधरूप दोषापासून मुक्त होईन ॥ २४ ॥ जगाचा हितकर्ता, मित्र आणि सर्वांशीं सारखा भाव असल्यामुळें कोठेंहि अभिमानरहित अशा तुला जरी सुखदुःखादिक विकार नाहींत तथापि आपण केलेल्या सत्पुरुषांच्या अपमानानें,

---

गोप्ता च । यच्चोक्तं स्तब्धादेः शिक्षा पिष्टपेष इति तत्राह । योऽच्युतस्य किंकरः स पिष्टं न पिनष्टि निष्फलं न करोति । स्तब्धत्वाद्यनपगमेऽपि शास्तुरीश्वराज्ञासंपादनेनैव सफलत्वात्तदाह । स्वधर्मरूपमच्युतस्याराधनं कुर्वन्यस्मादघौघं विजहाति ॥ २३ ॥ यस्मादेवं मम त्वदुक्तं विपरीतं प्रतिभाति तत्तस्मान्नरदेवाभिमानमदेन तुच्छीकृतास्तिरस्कृताः सत्तमा भवादृशा येन तस्य मे मैत्रीदृशं स्नेहयुक्तां दृष्टिं कृषीष्ट करोतु । सतामवज्ञारूपं पापं यथा तरिष्यामि ॥ २४ ॥ ननु ममावज्ञाकृतविकाराभावात्कुतः पापं तत्राह । नेति । यद्यपि तव विक्रिया नास्ति । विश्वस्य सुहृच्चासौ सखा च तस्य । अतः सर्वत्र साम्येन स्वदेहे विगताभिमानस्य तथापि महतामवमानान्मा-

तन्मे भवान्नरदेवाभिमानमदेन तुच्छीकृतसत्तमस्य ॥ कृषीष्ट मैत्रींदृशमार्तबंधो यथा तरे सदवध्यानमंहः ॥ २४ ॥ न विक्रिया विश्वसुहृत्सखस्य साम्येन वीताभिमतेस्तवापि ॥ महद्विमानात्स्वकृताद्धि मादृङ्नंक्ष्यत्यदूरादपि शूलपाणिः ॥ २५ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे पंचमस्कंधे जडभरतचरिते दशमोऽध्यायः ॥ १० ॥ ॥ ब्राह्मण उवाच ॥ अकोविदः कोविदवादवादान्वदस्यथो नातिविदां वरिष्ठः ॥ न सूरयो हि व्यवहारमेनं तत्त्वावमर्शेन सहामनंति ॥ १ ॥

दृशो विनंक्ष्यति । अदूरात्क्षिप्रम् । शूलपाणिरिवातिसमर्थोऽपीत्यर्थः ॥ २५ ॥ इति पंचमे टीकायां दशमोऽध्यायः ॥ १० ॥ ॥ एकादशे तु संपृष्टो रहूगणमहीभृता ॥ उपादिशत्परं ज्ञानं स योगीति निगद्यते ॥ अकोविदोऽविद्वानपि त्वं कोविदानां वादा उद्ग्रहणिकास्तत्तुल्यान्वादानेव वदसि । अथो अतः अत्यंतं विदुषां मध्ये श्रेष्ठो न भवसि । कुतः । हि यस्मात् यं स्वामिभृत्यादिलौकिकव्यवहारं त्वं सत्यमात्थ । एनं सूरयस्तत्त्वविचारेण सह न वदंति किंत्वविचारसुंदरं वदंति अतो न सत्यः ॥ १ ॥

माझ्यासारखा मनुष्य तर काय परंतु प्रत्यक्ष त्रिशूलधारण करणाऱ्या शंकरासारखा महासमर्थहि तत्क्षणींच नाश पावेल यांत संशय नाहीं ॥ २५ ॥ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील पंचमस्कंधामध्यें ब्राह्मणरहूगणसंवादांतील हा दहावा अध्याय समाप्त झाला ॥ १० ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां अकराव्या अध्यायामध्यें रहूगणराजानें प्रश्न केलेल्या त्या जडभरतयोग्यानें त्याला तत्त्वज्ञानाचा उपदेश केला अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ ब्राह्मण ह्मणाला— हे रहूगणराजा, तूं ज्ञानमार्गांत निष्णात नसूनहि, ज्ञानमार्गांत निष्णात असलेल्या पुरुषाचे पक्ष उचलून भाषणें करीत आहेस, इतक्या योगानें तूं महाविद्वानांमध्यें श्रेष्ठ ह्मणून गणला जाणार नाहींस. कारण, जे पंडित आहेत ते, तूं सत्यत्वेंकरून सांगितलेल्या ह्या लौकिक व्यवहाराचा, तत्त्वविचाराच्या बरोबरीनें कधीं उच्चारहि करीत नाहींत, तर

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हा व्यवहार अज्ञानविलसित आहे असें ह्मणतात, ह्मणून हा सत्य नव्हे ॥ १ ॥ हे राजा, तसाच वैदिककर्मव्यवहारहि सत्य नव्हे. कारण, तोहि गृहस्थाश्रमसंबंधी यज्ञविस्ताररूप विद्यांमध्यें अतिविलसित असलेल्या (पूर्णपणें भरून राहिलेल्या) वेदवादांमध्यें, बहुतकरून शुद्ध (हिंसादिरहित) व निष्काम असा तत्त्ववाद खरोखर प्रकाश पावत नाहीं ॥ २ ॥ तूं ह्मणशील कीं, वेदांतशास्त्र ऐकणाऱ्याहि पुरुषाची व्यावहारिक कर्मांत प्रवृत्ति होत्ये, मग त्या व्यवहाराला मिथ्या ह्मणतां येईल कसें? तर त्याबद्दल सांगतों ऐक– गृहस्थाश्रमांतील कर्मजन्य सुख, स्वप्नांतील सुखासारखें त्याज्य आहे असें ज्याला स्वतांच अनुमान ठरवितां येत नसेल, त्या पुरुषाला उत्तमप्रकारचा तत्त्वबोध करून देण्यास, अतिश्रेष्ठ अशीं उपनिषद्वाक्येंहि समर्थ होणार नाहींत ॥ ३ ॥ जोंपर्यंत मनुष्याचें मन, रजोगुण, सत्त्वगुण किंवा तमोगुण यांनीं वश केलेलें

वैदिकोऽपि कर्मव्यवहारो न सत्य इत्याह । तथैवेति । उरवो गार्हां गृहसंबंधिनो मेधा यज्ञास्तेषां वितानो विस्तारस्तद्विषयासु विद्यासु उरु अधिकं विजृंभितेषु विलसितेषु वेदवादेषु तत्त्ववादो नु निश्चितं न चकास्ति न प्रकाशते । तथाच श्रुतिः । नेह नानाऽस्ति किंचनेत्यादि । शुद्धो हिंसादिशून्यः साधू रागादिशून्यश्च । प्रायेणेतीश्वरार्पितकर्मणां परमार्थफलत्वाभिप्रायेणोक्तम् ॥ २ ॥ ननु श्रुतवेदांतस्यापि पुंसः कर्मसु प्रवृत्तेः कथमसत्यता तत्राह । नेति साक्षाद्यथावत्तत्त्वज्ञानाय वरीयस्योऽपि वेदांतवाचस्तस्य न सम्यगासन्बभूवुः । स्वप्ने या निरुक्तिस्तया स्वप्नदृष्टांतेन दृश्यत्वादिहेतुना स्वयमेव हेयत्वेनानुमितं यस्य न स्यात् ॥ ३ ॥ एवं प्रपंचस्य सत्यत्वं

तथैव राजन्नुरुगार्हमेधवितानविद्योरुविजृंभितेषु ॥ न वेदवादेषु हि तत्त्ववादः प्रायेण शुद्धो नु चकास्ति साधुः ॥ २ ॥
न तस्य तत्त्वग्रहणाय साक्षाद्वरीयसीरपि वाचः समासन् ॥ स्वप्ने निरुक्त्या गृहमेधिसौख्यं न यस्य हेयानुमितं स्वयं स्यात् ॥ ३ ॥
यावन्मनो रजसा पूरुषस्य सत्त्वेन वा तमसा वाऽनुरुद्धम् ॥ चेतोभिराकूतिभिरातनोति निरंकुशं कुशलं चेतरं वा ॥ ४ ॥ स वासनात्मा विषयोपरक्तो गुणप्रवाहो विकृतः षोडशात्मा ॥ बिभ्रत्पृथङ्नामभि रूपभेदमंतर्बहिष्ट्वं च पुरैस्तनोति ॥ ५ ॥ दुःखं सुखं व्यतिरिक्तं च तीव्रं कालोपपन्नं फलमाव्यनक्ति ॥ आलिंग्य मायारचितांतरात्मा स्वदेहिनं संसृतिचक्रकूटः ॥ ६ ॥

तदुक्तं निराकृत्य संसारस्यापि तदुक्तां सत्यतां निराकर्तुं तस्य मनोनिमित्ततामाह । यावदित्यादिना यावत्समाप्ति । मनो यावद्रजआदिभिर्गुणैरनुरुद्धं वशीकृतं भवति तावत्तन्मनो निरंकुशं सत्पुरुषस्य कुशलं धर्ममितरमधर्मं वा आतनोति । कैः । चेतोभिर्ज्ञानेंद्रियैः आकूतिभिः कर्मेंद्रियैश्च ॥ ४ ॥ ततश्च धर्माधर्मवासनायुक्तं तदेवानेकदेहादिवैचित्र्यं करोतीत्याह । स इति । पुंस्त्वमात्मशब्दविशेषणत्वेन तन्मन इत्यर्थः । वासनायुक्त आत्मोपाधित्वादात्मा । अतो विषयैरुपरक्तोऽनुविद्धः । अतो गुणप्रवाहो गुणैरितस्ततश्चाल्यमानः । अतएव विकृतः कामादिपरिणामवान् । षोडश आत्मा षोडशकलासु भूतेंद्रियरूपासु मुख्यः । पृथङ्नामभिः सह पृथग्रूपभेदं देवतिर्यगादिरूपं बिभ्रत् । अंतर्बहिष्ट्वमुत्कृष्टत्वं निकृष्टत्वं च पुरैस्तैरेव देहैर्हेतुभूतैस्तनोति । नामभिरित्यत्र रेफलोपे दीर्घाभाव आर्षः ॥ ५ ॥ फलं च तदनुरूपं करोती-

---

असतें, तोंपर्यंत तें मन, स्वतंत्रपणें कोणाला न जुमानितां, ज्ञानेंद्रियांच्या व कर्मेंद्रियाच्या साह्यानें पुरुषाकडून चांगल्या किंवा वाईट कर्मांचा विस्तार करवितें ॥ ४ ॥ नंतर वासनायुक्त आत्मरूपी, विषयासक्त, गुणांच्या योगानें चलन पावणारें, कामादिरूपानें परिणाम पावणारें, भूतेंद्रियरूप सोळा कलांमध्यें मुख्य आणि निरनिराळ्या नांवांसहवर्तमान देवतिर्यगादि रूपें धारण करणारें असें तें मन, त्या त्या देवादिशरीरांच्या योगानें जीवाच्या उत्कृष्टतेला व निकृष्टतेला वाढवितें ॥ ५ ॥ नंतर संसारचक्रामध्यें छळणारें व मायेनें रचलेलें तें अंतःकरण, आपल्यामध्यें असलेल्या जीवात्म्याला चिकटून राहून, दुःख, सुख किंवा तिसरेंच कांहीं (मोहरूप) असें, काळानें प्राप्त

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

झालेलें दुर्निवार फळ उत्पन्न करितें ॥ ६ ॥ जोंपर्यंत मनाचा असा क्रम चालला आहे तोंपर्यंत प्रकाशमान होणारा हा जाग्रत्स्वप्नरूप व्यहवार, निरंतर क्षेत्रज्ञाला (जीवाला) दिसून येतो. तस्मात् या मनालाच त्रिगुणमय निकृष्ट संसाराचें व त्रिगुणातीत उत्कृष्ट मोक्षाचें कारण आहे असें ह्मणतात ॥ ७ ॥ मन विषयासक्त असलें ह्मणजे जीवाच्या संसाराला कारण होतें आणि तेंच मन, निर्गुण झालें ह्मणजे जीवाच्या मोक्षाला कारण होतें. जसा तुपानें भिजलेली वात भक्षण करणारा दळदळीत दिवा जोंपर्यंत तेवत असतो तोंपर्यंत तो काजळानें युक्त असलेल्या ज्वाला धारण करितो आणि तुपाचा क्षय होतांच तो आपल्या शुद्ध भास्वर स्वरूपाला अथवा महाभूतरूपी

त्याह । दुःखं सुखं व्यतिरिक्तं च मोहं तीव्रं दुर्निवारं कालप्राप्तं सर्वतोऽभिव्यनक्ति सृजति । ननु जडः कथं सृजति तत्राह । स्वदेहिनमालिंग्य । आलिंगने कारणमाह । मायारचितोंऽतरात्मा जीवोपाधिः । उपाधितामाह । संसृतिचक्रे कूटयति छलयतीति तथा यथा ग्रामकूटक इति ॥ ६ ॥ एवमयं मनोनिबंधनः । संसारो जीवे फलतीत्याह । तावानिति । आविः प्रकाशमानः सदा क्षेत्रज्ञस्य साक्ष्यो दृश्यो भवति । स्थूलसूक्ष्मो जाग्रत्स्वप्नस्वरूपः । मनसः संसारहेतुत्वमुपसंहरन्मोक्षस्यापि तदेव कारणमित्याह । तस्मादिति । अदो मनः लिंगं कारणम् । गुणत्वं गुणाभिमानित्वमगुणत्वं तद्राहित्यं तदेव परमवरं च तस्य ॥ ७ ॥ कथमेकमेव विलक्षणयोः कारणमवस्थाभेदादित्याह । गुणेति । नैर्गुण्यं निर्गुणम् । अथो इति कार्त्स्न्येन दृष्टांतेन स्फुटयति । यथेति । अन्यदा तु घृतक्षये । स्वं पदं शुक्लभास्वररूपं महाभूतात्मत्वं वा ।

तावानयं व्यवहारः सदाऽऽविः क्षेत्रज्ञसाक्ष्यो भवति स्थूलसूक्ष्मः ॥ तस्मान्मनो लिंगमदो वदंति गुणागुणत्वस्य परावरस्य ॥ ७ ॥
गुणानुरक्तं व्यसनाय जंतोः क्षेमाय नैर्गुण्यमथो मनः स्यात् ॥ यथा प्रदीपो घृतवर्तिमश्नन् शिखाः सधूमा भजति ह्यन्यदा स्वम् ॥
पदं तथा गुणकर्मानुबद्धं वृत्तीर्मनः श्रयतेऽन्यत्र तत्त्वम् ॥ ८ ॥ एकादशासन्मनसो हि वृत्तय आकूतयः पंच धियोऽभिमानः ॥
मात्राणि कर्माणि पुरं च तासां वदंति हैकादश वीर भूमीः ॥ ९ ॥ गंधाकृतिः स्पर्शरसश्रवांसि विसर्गरत्यर्त्यभिजल्पशिल्पाः ॥
एकादशं स्वीकरणं ममेति शय्यामहं द्वादशमेक आहुः ॥ १० ॥

आपल्या मूर्तींच्या समूहानें स्वतांचें रूप अद्यापि प्रकट करित असतो ॥ १४ ॥ इलावृत खंडामध्येंतर भगवान् शंकर एकटाच पुरुष राहत असतो. कारण, तेथें पार्वतीच्या शापाचें कारण जाणणारा अलीकडचा दुसरा कोणीहि पुरुष प्रवेश करीत नाहीं. त्या खंडामध्यें प्रवेश करणाऱ्या पुरुषाला स्त्रीचें स्वरूप प्राप्त होतें त्याचें, पार्वतीशापरूप कारण मी तुला पुढें नवमस्कंधामध्यें सांगेन ॥ १५ ॥ त्या इलावृतखंडामध्यें, ज्यांची धनीन पार्वती आहे अशा दहाकोटि हजार स्त्रियांच्या समूहांनीं सर्वप्रकारें सेवा केलेला तो शंकर, आपणाला कारणभूत अशा चतुर्व्यूहमूर्ति (वासुदेव, प्रद्युम्न, अनिरुद्ध व संकर्षण ह्या) धारण करणाऱ्या षड्गुणैश्वर्यसंपन्न महापुरुषाची चवथी जी संकर्षणनामक तामसी मूर्ति तिचें समा-धियोगानें मनांत चिंतन करून पुढील अर्थाच्या मंत्राचा जप करीत त्या मूर्तीची स्तुति करितो ॥ १६ ॥ श्रीभगवान् महादेव ह्मणतो– जो स्वतः अव्यक्त असून ज्यापासून सर्वगुण

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रकट होतात त्या षड्गुणैश्वर्यसंपन्न अविनाशी महापुरुषाला ॐकारपूर्वक वारंवार नमस्कार असो ॥ १७ ॥ हे भजन करण्यास योग्य अशा परमेश्वरा, ज्या तुझें चरणकमल, भक्तांना संरक्षण करणारें आहे, जो तूं, षड्गुणैश्वर्यांचें परमस्थान आहेस, ज्या तूं, भक्तांचेठिकाणीं आपलें स्वरूप अत्यंत प्रकट केलें आहेस आणि जो तूं, भक्तांना संसारांतून पार पाडणारा असून अभक्तांना संसारांत टाकणारा आहेस, त्या तुझी मी उपासना करितों ॥ १८ ॥ हे देवा, क्रोधाचा वेग न जिंकणाऱ्या आमची दृष्टि, जशी विषयांच्या योगानें लिप्त होत्ये त्याप्रमाणें जगाच्या नियमनाकरितां त्याच्याकडे पाहणाऱ्याहि ज्या तुझी दृष्टि, मायासंबंधी विषयवासनायुक्त चित्तवृत्तींनीं किंचित्सुद्धां लिप्त होत नाहीं, त्या तुझा, कोणवरें इंद्रियांचें दमन करण्यास इच्छिणारा पुरुष, आदर करणार नाहीं? सर्वही करतीलच ॥ १९ ॥ हे भगवन्, जो तूं, पापदृष्टी पुरुषाला

हेभजन्य भजनीयत्वात्त्वां परमेश्वरं भज इत्यन्वयः। अरणं शरणं पादपंकजं यस्य। कृत्स्नस्य भगस्यैश्वर्यादिषाड्गुण्यस्य परमयनमाश्रयम्। भक्तेष्वलमत्यर्थं भावितं प्रकटितं भूतभावनं स्वरूपं येन। भवापहं संसारहरम्। भक्तेष्वित्यनुषंगः। भवं भावयतीति तथा तम्। अर्थादभक्तेष्विति द्रष्टव्यम् ॥ १८ ॥ ईश्वरत्वमुपपादयंस्तामसत्वेन प्रसक्तमनादरं वारयति। न यस्येति। यस्य निरीक्षमाणस्यापि दृष्टिर्मायागुणैर्विषयैश्चित्तवृत्तिभिः करणैश्चाण्वपीषदपि नाज्यते न लिप्यते। किमर्थं निरीक्षमाणस्य। ईशे ईशनाय नियमनाय। ईशनमीट् संपदादित्वाद्भावे क्विप्। अत्र वैधर्म्ये दृष्टांतः। यथा अजितक्रोधवेगानां नोऽस्माकं दृष्टिरज्यते न तथेति। अत आत्मन इंद्रियाणि जि-

भजे भजन्यारणपादपंकजं भगस्य कृत्स्नस्य परं परायणम् ॥ भक्तेष्वलंभावितभूतभावनं भवापहं त्वा भवभावमीश्वरम् ॥ १८ ॥ न यस्य मायागुणचित्तवृत्तिभिर्निरीक्षतो ह्यण्वपि दृष्टिरज्यते ॥ ईशे यथा नोऽजितमन्युरंहसां कस्तं न मन्येत जिगीषुरात्मनः ॥ १९ ॥ असद्दृशो यः प्रतिभाति मायया क्षीबेव मध्वासवताम्रलोचनः ॥ न नागवध्वोऽर्हण ईशिरे ह्रिया यत्पादयोः स्पर्शनधर्षितेंद्रियाः ॥ २० ॥ यमाहुरस्य स्थितिजन्मसंयमं त्रिभिर्विहीनं यमनंतमृषयः ॥ न वेदसिद्धार्थमिव क्वचित्स्थितं भूमंडलं मूर्धसहस्रधामसु ॥ २१ ॥

गीषुर्जेतुमिच्छुर्मुमुक्षुस्तं को न मन्येत नाद्रियेत ॥ १९ ॥ ननु सुरामद्याभ्यां मत्तस्य कुतो दृष्टिर्नाज्यते तत्राह। असती दृष्टिर्यस्य त्वस्य स्वमायया क्षीबा मत्त इव यो भयंकरः प्रतिभाति मध्वासवाभ्यां ताम्रलोचन इव च। नागवधूविमोहनेन तथा प्रतिभानं युक्तमित्याह। नेति। पादार्चने यस्य पादयोः स्पर्शनेन धर्षितं मोहितमिंद्रियं मनो यासां ता ह्रिया लज्जया भुजाद्यर्हणे न ईशिरे न शेकुः। कस्तं न मन्येतेति पूर्वेणैवान्वयः ॥ २० ॥ अस्य विश्वस्य स्थितिजन्मसंयमहेतुं यमाहुः। अतएव त्रिभिः स्थित्यादिभिर्विहीनमनंतं च यमाहुः। ऋषयो मंत्राः छंदोऽनुरोधेन दीर्घपाठे, ऋकारो देवमाता लक्ष्मीः सा च ऋषपश्चेत्यर्थः। अनंतत्वं दर्शयति। मूर्धसहस्रमेव

आपल्या मायेच्या योगानें मत्त असल्यासारखा आणि सुरा व तालादिकांचें आसव यांच्या सेवनानें तांबडे डोळे झाल्यासारखा भासतोस आणि ज्या तुझ्या चरणाच्या पूजेच्या वेळीं, तुझ्या चरणाच्या स्पर्शानें, ज्यांचीं मनें काममोहित झालीं आहेत अशा नागपत्न्या, लज्जित होऊन पुढें भुजादिकांचें पूजन करण्यास समर्थ झाल्या नाहींत, त्या तुझा कोणबरें आदर करणार नाहीं? सर्वही करतीलच ॥ २० ॥ हे ईश्वरा, जो तूं, जगाची उत्पत्ति, पालन व नाश यांचें कारण आहेस आणि तिन्हीं गुणांनीं रहित असल्यामुळें अनंत आहेस असें वेदमंत्र म्हणतात. जो तूं, आपल्या सहस्र मस्तकरूप स्थानांपैकीं कोणत्या स्थानीं हें भूमंडळ, मोहरीसारखें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राहिलें आहे तें जाणतसुद्धां नाहींस त्या अनंतरूपी तुला नमस्कार असो ॥ २१ ॥ ज्या तुझा पहिला गुणनिमित्तक अवतार झटला झणजे महत्तत्त्वनामक होय, त्याला सत्त्वगुणाचा आश्रय असल्यामुळें तोच चित्तरूपानें वासुदेवरूपी व ब्रह्मदेवरूपी झाला आहे, त्या ब्रह्मदेवापासून झालेला मी आपल्या त्रिगुणात्मक तेजानें (अहंकारानें) सात्त्विक तामस व राजस अशा देवतांच्या, महाभूतांच्या व इंद्रियांच्या समूहांनां उत्पन्न करितों ॥ २२ ॥ आणि हे महत्तत्त्व, अहंकार, व सत्त्वतमोरजात्मक देवादिसमूह-रूप सर्वही आह्मी, सूत्रांनीं बांधून स्वाधीन करून ठेवलेल्या पक्ष्यांप्रमाणें ज्या तुज महात्म्या भगवंताच्या स्वाधीन राहत होत्सातें, तुझ्या अनुग्रहामुळें हें जग उत्पन्न करितों ॥ २३ ॥ सत्त्वादिगुणांच्या प्रतिसृष्टीनें मोहित झालेला हा जन, ज्यानें निर्माण केलेल्या व कर्मांच्या गांठीवर गांठी घालणाऱ्या अशा स्त्रीपुत्रादिरूप माये-

धामानि स्थानानि तेषु क्वचिदेकदेशस्थितं भूमंडलं यो न वेद। सिद्धार्थं सर्षपमिव । तस्मै नम इति चतुर्थेनान्वयः ॥ २१ ॥ तत्र जन्महेतुत्वं महदादिद्वारेण प्रपंचयति । यस्य गुणनिमित्तो महान्नामविग्रह आसीत् । विज्ञानं सत्त्वधिष्ण्यमाश्रयो यस्य सः । तस्य चित्तरूपत्वेन सत्वप्रधानत्वात् । स एव किलाधिदैवो वासुदेवाभेदविवक्षया भगवानजो ब्रह्मा । यत्संभवो यस्माद्ब्रह्मणः संभूतोऽहं रुद्रः । त्रिवृता त्रिगुणेन स्वतेजसा स्वविभूतिरूपेणाहंकारेण वैकारिकं देवतावर्गं तामसं भूतवर्गमैंद्रियमिंद्रियवर्गं च सृजे सृजामि ॥ २२ ॥ किंच एते वयं महदादयः सर्वे यस्यानुग्रहादिदं ब्रह्मांडं सृजामः । कथंभूताः यस्य महात्मनो वशे स्थिताः संतः । यतः सूत्रेण क्रियाशक्त्या यंत्रिताः

यस्याद्य आसीद्गुणविग्रहो महान्विज्ञानधिष्ण्यो भगवानजः किल ॥ यत्संभवोऽहं त्रिवृता स्वतेजसा वैकारिकं तामसमैंद्रियं सृजे ॥२२॥ एते वयं यस्य वशे महात्मनः स्थिताः शकुंता इव सूत्रयंत्रिताः ॥ महानहं वैकृततामसेंद्रियाः सृजाम सर्वे यदनुग्रहादिदम् ॥ २३ ॥ यन्निर्मितां कर्ह्यपि कर्मपर्वणीं मायां जनोऽयं गुणसर्गमोहितः ॥ न वेद विस्तारणयोगमंजसा तस्मै नमस्ते विलयोदयात्मने ॥२४॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे पंचमस्कंधे सप्तदशोऽध्यायः ॥ १७ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ तथाच भद्रश्रवानाम धर्मसुतस्तत्कुलपतयः पुरुषा भद्राश्ववर्षे साक्षाद्भगवतो वासुदेवस्य प्रियां तनूं धर्ममयीं हयशीर्षाभिधानां परमेण समाधिना सन्निधाप्येदमभिगृणंत उपधावंति ॥ १ ॥

प्रोताः शकुंताः पक्षिण इव लौकिकेन सूत्रेण वयमित्युक्तं तानेवाह । महानहंकारश्च वैकृतादयः पूर्वोक्तावर्गाश्च ॥ २३ ॥ स्थितिलयहेतुत्वं दर्शयन्प्रणमति । येन निर्मितामेतां मायामेवायं जनोंऽजसा वेद नतु तन्निस्तारणयोगमुपायं कर्हिचिदपि वेदेति स्थितिहेतुत्वं दर्शितम् । कीदृशीम् । कर्माण्येव पर्वाणि ग्रंथयस्तानि नयति प्रापयतीति तथा ताम् । प्रलयहेतुत्वमाह । विलीयतेऽस्मिन्निति विलयः उदेत्यस्मादित्युदयः विलयश्चोदयश्चात्मा स्वरूपं यस्य तस्मै नमः ॥ २४ ॥ इति पंचमे टीकायां सप्तदशोऽध्यायः ॥ १७ ॥ अष्टादशे ततो मेरोः पूर्वादिक्रमतस्त्रिषु ॥ त्रिषु चोत्तरवर्षेषु सेव्यसेवकवर्णनम् ॥ १ ॥ भद्रश्रवा वर्षपतिः तस्य कुलपतयः सेवकमुख्याश्च ॥ १ ॥

लामात्र अनायासानें जाणतों, परंतु तिला तरून जाण्याचा उपाय कधींहि जाणत नाहीं. त्या संहार व उत्पत्तिस्वरूपी तुज भगवंताला नमस्कार असो ॥ २४ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील पंचमस्कंधामध्यें गंगोत्पत्त्यादिकथनरूप हा सत्रावा अध्याय समाप्त झाला ॥ १७ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां अठराव्या अध्यायामध्यें मेरुपर्वताच्या पूर्व, दक्षिण व पश्चिमेंकडील भद्राश्व, हरिवर्ष व केतुमाल या तीन खंडांमध्यें व उत्तरेकडील रम्यक हिरण्मय व कुरु या तीन खंडांमध्यें असलेल्या सेव्यसेवकांचें वर्णन केलें आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य झणाला—हे राजा, तसेच भद्राश्वखंडामध्यें त्या खंडाचा अधिपति धर्माचा पुत्र भद्रश्रवा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आणि त्याचे मुख्य सेवक पुरुष राहतात. ते प्रत्यक्ष भगवान् वासुदेवाच्या हयग्रीवनामक धर्ममय प्रिय मूर्तीचें उत्कृष्ट समाधीच्या योगानें चिंतन करून, पुढील अर्थ मंत्राचा जप करीत करीत तिची स्तुति करितात ॥ १ ॥ भद्रश्रवा आणि त्याचे सेवकगण ह्मणतात कीं— हे भगवन् अंतःकरणाचा शोधक असून धर्मरूपी अशा ॐकार पूर्वक नमस्कार असो ॥ २ ॥ अहो, तुच्छ अशा विषय सुखांचा उपभोग घेण्याकरितां पापांचें चिंतन करीत असणारा हा जन, मेलेल्या पुत्राला किंवा पितर जाळून टाकून त्यांच्या द्रव्यानें आपला निर्वाह करून जिवंत राहण्याची इच्छा करितो, परंतु आपणालाहि मारणारा काल अकस्मात् प्राप्त होईल असें पहात असतां पाहिल्यासारिखें करितो. तस्मात् ही भगवंताची लीला मोठी आश्चर्यकारक आहे ॥ ३ ॥ अहो, हें संपूर्ण जग, नश्वर आहे असें विवेकी पुरुष, शास्त्रानें व अनुभव

भद्रश्रवस ऊचुरिति । प्राणभृत उपदधातीतिवद्गुणलक्षणया तद्योगाद्गणिषु लिंगसमवायन्यायेन बहुवचनम् ॥ २ ॥ अयं जनो मिषन्नपि पश्यन्नपि घ्नंतं हिंसंतं न पश्य नालोचयतीति भगवद्विचेष्टितमेव तच्च विचित्रम् । अदर्शने लिंगम् । पुत्रं बालं पितरं वृद्धं मृतं निर्हृत्य दग्ध्वा स्वयं तदुभयधनैर्जिजीविषति जीवितुमिच्छति । पा तरे तु छंदःसामंजस्यम् । किं धर्माद्यर्थम् । न यर्हि यतोऽसत्तुच्छं विषयसुखं सेवितुं विकर्म पापमेव ध्यायन् ॥ ३ ॥ नन्वविद्वान्न पश्यति किमत्र चित्रं तत्राह । नश्

भद्रश्रवस ऊचुः ॥ ॐनमो भगवते धर्मायात्मविशोधनाय नम इति ॥ २ ॥ अहो विचित्रं भगवद्विचेष्टितं घ्नंतं जनोऽयं हि मिषन्न पश्यति ॥ ध्यायन्नसद्यर्हि विकर्म सेवितुं निर्हृत्य पुत्रं पितरं जिजीविषति ॥ ३ ॥ वदंति विश्वं कवयः स्म नश्वरं पश्यंति चाध्यात्मविदो विपश्चितः ॥ तथापि मुह्यंति तवाज मायया सुविस्मितं कृत्यमजं नतोऽस्मि तम् ॥ ४ ॥ विश्वोद्भवस्थाननिरोधकर्म ते ह्यकर्तुरंगीकृतमप्यपावृतः ॥ युक्तं न चित्रं त्वयि कार्यकारणे सर्वात्मनि व्यतिरिक्ते च वस्तुतः ॥ ५ ॥ वेदान्युगांते तमसा तिरस्कृतान् रसातलाद्यो नृतुरंगविग्रहः ॥ प्रत्याददे वै कवयेऽभियाचते तस्मै नमस्तेऽवितथेहिताय इति ॥ ६ ॥

वदंति स्म शाश्वतः पश्यंति च समाधौ । हे अज तथापि मायया मुह्यंति एतच्च तव कृत्यं चेष्टितं सुविस्मितमतिचित्रमतः शास्त्रादिश्रमं विहाय तं त्वामजं नतोऽस्मि ॥ ४ ॥ इदमपरं चित्रवत्प्रतीयमानमपि त्वयि न चित्रमित्याह । विश्वोद्भवादिकर्माकर्तुरप्यपगता आवृदावरणं यस्मात्ताद्दशस्यापि तेंऽगीकृतं वेदेन । त्वयि तन्न चित्रम् । यतो मायया सर्वात्मनि कार्यस्य कारणे स्रष्टरि कर्मयुक्तम् । वस्तुतः सर्वव्यतिरिक्ते निरुपाधावनावृतत्वमकर्तृत्वं च युक्तम् ॥ ५ ॥ परमेश्वरत्वेन स्तुत्वा प्रस्तुतावतारचरितमाह । वेदानि-

---

जाणतात, त्याप्रमाणेंच अध्यात्मवेत्ते ज्ञानी, समाधीमध्यें प्रत्यक्ष पाहतात. तथापि हे जन्मरहिता परमेश्वरा, तेच लोक, तुझ्या मायेनें मोहित होतात, हें तुझें कृत्य अतिआश्चर्यकारक आहे, ह्मणून मी, शास्त्रादिकांच्या श्रमाचा त्याग करून जन्मादिविकारशून्य अशा तुला केवळ नमस्कार करितों ॥ ४ ॥ हे परमेश्वरा, अकर्ता व-आवरणरहित अशाहि तुझें, विश्वाची उत्पत्ति, स्थिति व लयरूप कर्म, वेदानें स्वीकारिलें आहे, तें योग्यच आहे, आश्चर्यकारक नव्हे. कारण, तूं मायेमुळें सर्वांचा आत्मा व सर्व कार्यांचा उत्पादक असून वस्तुतः उपाधिरहित आहेस ॥ ५ ॥ हे देवा, मनुष्य व घोडा ह्यांसारखा देह (हयग्रीवावतार) धारण करणाऱ्या ज्या तूं, प्रलय-कालाचेठिकाणीं ब्रह्मदेवाच्या मुखांतून निद्रारूप दोषानें गलित झालेल्या (अथवा दैत्यानें चोरून नेलेल्या) वेदांना पाताळांतून आणून याचना करणाऱ्या ब्रह्मदेवाला

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

समर्पण केलेंस त्या सत्यसंकल्प तुज परमेश्वराला नमस्कार असो ॥ ६ ॥ हरिवर्ष खंडामध्येंहि भगवान् नृसिंहरूपानें राहतो. तें रूप ग्रहण करण्याचें कारण पुढें (सातव्या स्कंधांत) मी तुला सांगेन. परमेश्वराच्या गुणांचें पात्र, महाभगवद्भक्त आणि दैत्यदानवांच्या कुळाला पवित्र करणाऱ्या स्वभावानें व आचरणानें युक्त असा प्रह्लाद, त्या खंडांतील पुरुषांसहवर्तमान त्या भगवंताच्या प्रियस्वरूपाची एकनिष्ठ भक्तीच्या योगानें उपासना करितो आणि या मंत्राचा व स्तोत्राचा जप करितो ॥ ७ ॥ हे भगवंता नरसिंहा, तूं अंधकाराचा नाश करणाऱ्या अग्निवगैरे तेजांचाहि प्रकाशक आहेस, तुला ॐकारपूर्वक वारंवार नमस्कार असो. तूं प्रकट हो, प्रकट हो. हे वज्रनखा, हे वज्रदंष्ट्रा, तूं, आमच्या कर्मवासनांना जाळून टाक, जाळून टाक. आणि 'ॐस्वाहा' असें ह्मणून आमचें अज्ञानरूप तम गिळून टाक गिळून टाक, तसाच 'ॐक्ष्रौम्'

ति। तमसा दैत्यरूपेण तिरस्कृतानपनीतान्। ना च तुरंगश्च नृतुरंगौ तद्रूपो विग्रहो यस्य। कवये ब्रह्मणे। तदर्थमवितथेहिताय सत्यसंकल्पाय ॥ ६ ॥ उत्तरत्र प्रह्लादचरित्रे। महापुरुषस्य गुणानां भाजन आश्रयः। दैत्यदानवकुलस्य तीर्थीकरणं शीलमाचरितं च यस्य। फलसंकल्पेन व्यवधानशून्यश्चासावनन्यश्चाव्यभिचारी यो भक्तियोगस्तेनोपास्ते सेवते ॥ ७ ॥ तेजसामपि तेजसे। आविराविः अतिप्रकटो भव वीप्सा वा। कर्माशयान्कर्मवासनाः। कर्माश्रयानिति पाठे रागादीन् रंधय निर्दह। भूयिष्ठाः भूयाः ॥ ८ ॥

हरिवर्षे चापि भगवान्नरहरिरूपेणास्ते तद्रूपग्रहणनिमित्तमुत्तरत्राभिधास्ये तद्दयितं रूपं महापुरुषगुणभाजनो महाभागवतो दैत्यदा-
नवकुलतीर्थीकरणशीलाचरितः प्रह्लादोऽव्यवधानानन्यभक्तियोगेन सह तद्वर्षपुरुषैरुपास्ते इदं चोदाहरति ॥ ७ ॥ ॐनमो भगवते
नरसिंहाय नमस्तेजस्तेजसे आविराविर्भव वज्रनख वज्रदंष्ट्र कर्माशयान् रंधय रंधय तमो ग्रस ग्रस ॐस्वाहा अभयमभयमात्मनि भूयि-
ष्ठा ॐक्ष्रौम् ॥ ८ ॥ स्वस्त्यस्तु विश्वस्य खलः प्रसीदतां ध्यायंतु भूतानि शिवं मिथो धिया ॥ मनश्च भद्रं भजतादधोक्षज आ-
वेश्यतां नो मतिरप्यहैतुकी ॥ ९ ॥ माऽगारदारात्मजवित्तबंधुषु संगो यदि स्याद्भगवत्प्रियेषु नः ॥ यः प्राणवृत्त्या परितुष्ट आत्म-
वान्सिद्ध्यत्यदूरान्न तथेंद्रियप्रियः ॥ १० ॥ यत्संगलब्धं निजवीर्यवैभवं तीर्थं मुहुः संस्पृशतां हि मानसम् ॥ हरत्यजोऽतः श्रुतिभि-
र्गतोऽगजं को वै न सेवेत मुकुंदविक्रमम् ॥ ११ ॥

विश्वस्य स्वस्ति प्रार्थने खलस्यापि भवेत्तच्च साधुपीडां विना न स्यात्। अन्योन्यममंगलं ध्यायतां च भूतानामन्योन्यघातं विना न भवेदित्याशंक्याह। खलः प्रसीदतां प्र-सीदतु क्रौर्यं त्यजतु। भूतानि च मिथः शिवमेव ध्यायंतु। तेषां मनश्च भद्रमुपशमादिकं भजतु। नोऽस्माकमपि मतिरपि शब्दाद्भूतानां च मतिरहैतुकी निष्कामा सती ॥९ नः संगः क्वापि मा स्यात् यदि कथंचित्स्याच्चर्ह्यगारादिषु मा स्यात्किंतु भगवत्प्रियेष्वेव। अगारादिसंगे दोषमाह। य इति। इंद्रियप्रियो गृहाद्यासक्तः ॥ १० ॥ भगवत्प्रियसं

असें ह्मणून या जीवाला जसें वारंवार अभय प्राप्त होईल तसा हो ॥ ८ ॥ हे प्रभो, सर्व जगाचें कल्याण असो, दुष्ट असेल त्याणें क्रूरपणा सोडून शांतता धरावी. प्राणिमात्रांनीं आपल्या बुद्धीच्या योगानें परस्परांचें कल्याण चिंतावें, त्यांच्या मनानें शांतीचें सेवन करावें. आमच्या व सर्व प्राण्यांच्या बुद्धीनें, निष्काम होऊन, क्षज भगवंताचेठिकाणीं प्रवेश करावा ॥ ९ ॥ घर स्त्रिया, पुत्र द्रव्य व बंधु यांचेंठिकाणीं कोठेंहि आह्मांला आसक्ति प्राप्त न होवो, जर कदाचित् झालीच तर ती वद्भक्तांचेठिकाणींच होवो. कारण, जो पुरुष, भगवद्भक्तांच्या संगतीनें विषयांचेठिकाणीं आसक्त न होतां प्राण वांचण्यापुरत्या आहारादिवृत्तीनें संतुष्ट व जितें असतो, त्याला लवकरच सिद्धि प्राप्त होत्ये, तशी गृहादिकांचेठिकाणीं आसक्त असणाऱ्या पुरुषाला प्राप्त होत नाहीं ॥ १० ॥ ज्या भगवद्भक्तांच्या संगतीनें प्राप्त झाले

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

व अत्युत्तम पराक्रमानें संपन्न अशा भगवच्चरित्रांचें श्रवणादिकेंकरून सेवन करणाऱ्या पुरुषांच्या, मनामध्यें प्राप्त झालेला जन्मरहित भगवान्, मनांतील पापवासनारूप मळांचा नाश करितो आणि गंगादिक तीर्थें तर, वारंवार सेवन करणाऱ्या पुरुषाचा केवळ अंगसंबंधीमात्र मळ हरण करितात, यास्तव त्या सत्पुरुषांचें कोण बरें पुरुष सेवन करणार नाहीं, सर्वही करतीलच ॥ ११ ॥ ज्या पुरुषाला, भगवंताचेठिकाणीं निष्काम भक्ति असल्ये त्याच्यावर ईश्वराचा प्रसाद होतो आणि त्याच्याजवळ सर्व देव, धर्मज्ञानादि सर्व गुणांसहवर्तमान नित्य वास करितात. जो मनुष्य, भगवंताची भक्ति करीत नाहीं त्या नुसत्या मनोराज्यानें बाहेरच्या मिथ्याभूत विषयांकडे धांवणाऱ्या पुरुषाला, थोरपुरुषांचे ज्ञानवैराग्यादिक गुण कोठून प्राप्त होणार? व्हावयाचेच नाहींत ॥ १२ ॥ ज्याप्रमाणें मत्स्यांचें जीवन उदकावरच अवलंबून असतें म्हणून तें त्यांचा आत्मा होय त्याप्रमाणें साक्षात् भगवान् श्रीहरि हाच देहधारी जीवांचा आत्मा होय. यास्तव त्याला सोडून जर एखादा अतिप्रसिद्धहि पुरुष, गृहामध्यें आसक्त झाला

गुणमाह । येषां भगवत्प्रियाणां संगाल्लब्धं मुकुंदविक्रमं श्रुतिभिः श्रवणादिभिः संस्पृशतां सेवमानानां पुंसामंतर्गतोऽजो मानसं मलं हरति । कथंभूतं विक्रमम् । निजमसाधारणं वीर्यवैभवं प्रभावातिशयो यस्य । तीर्थं तु गंगादि मुहुःसंस्पृशतामंगजं मलं केवलं हरति नतु वासनाः तान्को वै न सेवेतेत्यन्वयः ॥ ११ ॥ मानसमलापगमफलमाह । यस्येति । अकिंचना निष्कामा । मनःशुद्धौ हरेर्भक्तिर्भवति ततश्च तत्प्रसादे सति सर्वे देवाः सर्वैर्गुणैर्धर्मज्ञानादिभिः सह तत्र सम्यगासते नित्यं वसंति । गृहाद्यासक्तस्य तु हरिभक्त्यसंभवात्कुतो महतां गुणा ज्ञानवैराग्यादयो भवंति । असति विषयसुखे मनोरथेन बहिर्धावतः ॥ १२ ॥ ननु हरिविमुखस्य गृहाद्यासक्तस्यापि लोके महत्त्वं

यस्यास्ति भक्तिर्भगवत्यकिंचना सर्वैर्गुणैस्तत्र समासते सुराः ॥ हरावभक्तस्य कुतो महद्गुणा मनोरथेनासति धावतो बहिः ॥ १२ ॥
हरिर्हि साक्षाद्भगवान् शरीरिणामात्मा झषाणामिव तोयमीप्सितम् ॥ हित्वा महांस्तं यदि सज्जते गृहे तदा महत्त्वं वयसा दंपतीनाम् ॥ १३ ॥ तस्माद्रजोरागविषादमन्युमानस्पृहाभयदैन्याधिमूलम् ॥ हित्वा गृहं संसृतिचक्रवालं नृसिंहपादं भजताकुतोभयमिति ॥ १४ ॥ केतुमालेऽपि भगवान्कामदेवस्वरूपेण लक्ष्म्याः प्रियचिकीर्षया प्रजापतेर्दुहितॄणां पुत्राणां तद्वर्षपतीनां पुरुषायुषाऽहोरात्रपरिसंख्यानानां यासां गर्भा महापुरुषमहास्त्रतेजसोद्वेजितमनसां विध्वस्ता व्यसवः संवत्सरांते विनिपतंति ॥ १५ ॥

दृश्यते सत्यं दृश्यते तत्तूपहासास्पदमिति सहेतुकमाह । हरिर्हीति । यथा झषाणां मीनानामीप्सितं तोयमेवात्मा तेन विना जीवनाभावात् । महानतिप्रसिद्धोऽपि गृहे यदि सज्जते तदा दंपतीनां मिथुनानां शूद्रादिष्वपि प्रसिद्धं वयसैव केवलं यन्महत्त्वं तदेव तस्य भवति नतु ज्ञानादिना । मिथुनेषु पूज्यमानेषु स्त्रीभ्यः पुंसां महत्त्वं बालमिथुनेभ्यश्च वृद्धमिथुनानां महत्त्वं यथेत्यर्थः ॥ १३ ॥ यस्मादेवं तस्माद्गृहं हित्वाऽकुतोभयं नृसिंहपादं भजतेत्यसुरानुपदिशति । कीदृशं गृहम् । रजस्तृष्णा रागोऽभिनिवेशः रजआदीनां मूलं कारणमतएव संसृतीनां जन्ममरणादीनां चक्रवालं मंडलमविच्छेदो यस्मात् ॥ १४ ॥ केतुमालेऽपि कामदेवस्वरूपेणास्त इति शेषः । किमर्थमास्तेऽत आ-

---

तर त्याचें महत्त्व म्हटलें म्हणजे, स्त्रीपुरुषरूप दंपत्यांतील पुरुषांच्या महत्त्वाप्रमाणें केवळ वयोमानानेंच होईल, म्हणजे दंपत्यांची पूजा करितांना जशी स्त्रियांपेक्षां पुरुष वयानें अधिक असल्यामुळें त्यांची पूजा प्रथम करितात किंवा बालदंपत्यांपेक्षां वृद्धदंपत्यांची पूजा प्रथम करितात अथवा पुत्रांच्या दंपत्यांच्या पूर्वीं पित्याच्या दंपत्याची पूजा करितात त्याप्रमाणेंच त्याचें महत्त्व सिद्ध होईल, ज्ञानादिकगुणांनीं सिद्ध होणार नाहीं ॥ १३ ॥ यास्तव हे दैत्य हो, तुम्हीं; तृष्णा, प्रीती, खेद, क्रोध, अहंपणा, काम, भीति, दैन्य व चिंता या सर्वांचें मूळकारण आणि जन्ममरणरूप संसाराचें निरंतर फिरणारें मंडळच अशा घराचा त्याग करून, निर्भय अशा नृसिंहचरणाची सेवा करीत जा ॥ १४ ॥ केतुमालखंडामध्येंहि लक्ष्मीचें आणि संवत्सररूपी देवाच्या कन्यांचें व पुत्रांचें प्रिय करण्याच्या इच्छेनें कामदेवाच्या स्वरूपानें भगवान् राहतो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्या कन्या व पुत्र त्या खंडाचे अधिपति असून तीं पुरुषाच्या आयुष्यमानानें शंभरवर्षांच्या अहोरात्रांइतकीं असून, त्या रात्रीच्या अभिमानी देवता ३६००० कन्या आणि दिवसाच्या अभिमानी देवता ३६००० पुत्र अशीं आहेत. प्रत्येक वर्षाच्या शेवटीं विष्णुचक्राच्या तेजानें त्या कन्यांच्या मनांत भीति उत्पन्न होऊन, त्यांचे गर्भ, गर्भाशयांतून चलित होऊन मरून पडतात ॥ १५ ॥ तेथें राहणारा तो कामदेव, आपल्या अत्यंत सुंदरगतीच्या विलासानें शोभणाऱ्या सुंदर मंदहास्यायुक्त अवलोकनलीलेनें किंचित् वर उचललेलें जें सुंदर भ्रुकुटिमंडळ त्याच्या योगानें अतिरमणीय दिसणाऱ्या मुखकमलाच्या शोभेनें, लक्ष्मीला रमवीत होत्साता, स्वतांच्या इंद्रियांना तृप्त करून घेतो ॥ १६ ॥ त्या भगवंताच्या मायामयस्वरूपाची उपासना, लक्ष्मी देवी, रात्रींच्या वेळीं संवत्सररूप प्रजापतीच्या कन्यांना बरोबर घेऊन आणि दिव-

ह । लक्ष्म्या इति । प्रजापतिः संवत्सरः । संवत्सरो वै प्रजापतिरिति श्रुतेः । तस्य दुहितरो रात्र्यभिमानिन्यो देवताः पुत्रा दिवसाभिमानिनो देवास्तेषां च प्रियचिकीर्षया । पुरुषायुषा वर्षशतेन यान्यहोरात्राणि तैः परिसंख्यानं गणना येषाम् । षट्त्रिंशत्सहस्राणामित्यर्थः । यासां दुहितॄणां महापुरुषस्य महास्त्रं चक्रं तस्य तेजसा ॥ १५ ॥ रमां रमयन् स्वीयानींद्रियाणि रमयते । केन साधनेन रमयंस्तदाह । अतीव सुललितया गत्या यो विलासस्तेन विलसितो रुचिरो हासलेशो मंदस्मितं तत्सहितोऽवलोक एव लीला तया किंचिदुत्तंभितमुत्तुंगितं सुंदरं यद्भ्रूमंडलं तेन सुभगं यद्वदनारविंदं तस्य श्रिया ॥ १६ ॥ तद्भर्तृभिर्दिवसाधिष्ठातृभिरुपेता ॥ १७ ॥ सर्वैर्गुणविशेषैः श्रेष्ठवस्तुभिर्वि-

अतीव सुललितगतिविलासविलसितरुचिरहासलेशावलोकलीलया किंचिदुत्तंभितसुंदरभ्रूमंडलसुभगवदनारविंदश्रिया रमां रमयन्निंद्रियाणि रमयते ॥ १६ ॥ तद्भगवतो मायामयं रूपं परमसमाधियोगेन रमा देवी संवत्सरस्य रात्रिषु प्रजापतेर्दुहितृभिरुपेताऽहस्सु च तद्भर्तृभिरुपास्ते इदं चोदाहरति ॥ १७ ॥ ॐ ह्रां ह्रीं ह्रूं ॐ नमो भगवते हृषीकेशाय सर्वगुणविशेषैर्विलक्षितात्मने आकूतीनां चित्तीनां चेतसां विशेषाणां चाधिपतये षोडशकलाय छंदोमयायान्नमयायामृतमयाय सर्वमयाय सहसे ओजसे बलाय कांताय कामाय नमस्ते उभयत्र भूयात् ॥ १८ ॥ स्त्रियो व्रतैस्त्वा हृषिकेश्वरं स्वतो ह्याराध्य लोके पतिमाशासतेऽन्यम् ॥ तासां न ते वै परिपांत्यपत्यं प्रियं धनायूंषि यतोऽस्वतंत्राः ॥ १९ ॥

लक्षितो लक्षीकृत आत्मा यस्य । आकूतीनां क्रियाणाम् । चित्तीनां ज्ञानानाम् । चेतसां संकल्पाध्यवसायादीनाम् । विशेषाणां तत्तद्विषयाणाम् । षोडश कला अंशा एकादशेंद्रियपंचविषयलक्षणा यस्य । छंदोमयाय वेदोक्तकर्मप्राप्याय । अन्नमयायान्नोपष्टभ्यत्वात् । अमृतमयाय परमानंदाविष्कारत्वात् । सर्वमयाय सर्वविषयत्वात् । सहसे ओजसे बलाय तद्धेतुत्वात् ॥ १८ ॥ त्वत्कामेनैव त्वत्सेवकत्वादहं कृतार्थाऽस्मि । अन्यकामनया तु त्वामर्चंत्यो न परिपूर्णमनोरथाः स्युरित्याह । स्त्रिय इति स्वत एव हृषीकाणामीश्वरं

सांच्या वेळीं त्या कन्यांच्या पतींना बरोबर घेऊन करत्ये व पुढील अर्थाच्या मंत्राचा जप करून स्तव करित्ये ॥ १७ ॥ हे भगवन् कामदेवा, तूं इंद्रियांचा नियंता सर्व प्रकारच्या उत्तम वस्तूंनीं स्वरूप कळून येणारा; क्रियाशक्ति, ज्ञानशक्ति, अंतःकरणांतील संकल्प निश्चयादिक धर्म व त्याचे विषय ह्याचा अधिपति; अकरा इंद्रियें व पांच विषय अशा सोळा अंशांनीं युक्त; वेदोक्तकर्मांनीं प्राप्त होणारा, अन्नरूप, अमृतरूप, सर्वरूप, मनःशक्तिरूप, इंद्रियशक्तिरूप, देहशक्तिरूप असा सुंदर कामरूपी आहेस तुला, 'ॐ ह्रां ह्रीं ह्रूं ॐ' या बीजांच्या उच्चारपूर्वक मनांतून व देहानें अथवा या लोकीं व परलोकीं वारंवार नमस्कार असो ॥ १८ ॥ हे भगवन्, ज्या स्त्रिया, या लोकामध्यें स्वतांच इंद्रियांचा नियंता अशा तुज पतीचें नानाप्रकारच्या व्रतांनीं आराधन करून, तुझ्याजवळ अन्य पति प्राप्त होण्याविषयीं प्रार्थना करितात, त्यांना अन्य

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पति प्राप्त होतात परंतु ते पति, परतंत्र असल्यामुळें त्या स्त्रियांच्या प्रियपुत्रांचें, धनांचें व आयुष्यांचें रक्षण करण्यास समर्थ होत नाहींत ॥ १९ ॥ जो स्वतः कोठूनहि कालादिकांपासून भयरहित असून कालादिकांच्या भयानें व्याकुळ झालेल्या जनांचें सर्वप्रकारें रक्षण करितो तोच पति होय. अशा प्रकारचा पति तूं एकच आहेस. कारण, तूं पूर्णानंदलाभाहून दुसरें कांहींच अधिक मानीत नाहींस. दुसऱ्या अज्ञानयुक्त विषयाभिलाषी दीनजनांना स्वतंत्रता नसल्यामुळें, कालादिकांपासून किंवा मांडलिकराजांसारखें परस्परांपासून भय प्राप्त होतें ॥ २० ॥ हे भगवन्, जी स्त्री त्या तुझ्या चरणकमलाचें केवळ पूजनच इच्छित्ये, फलाची इच्छा करीत नाहीं, तिचे सर्वहि मनोरथ परिपूर्ण होतात. आणि एकाद्या फलाची इच्छा धरून जर ती तुझी पूजा करित्ये तर तूं तेंच एक फळ तिला देतोस. जें फळ भोगून संपलें कीं तिची

पतिं संतं त्वामाराध्य याः स्त्रियोऽन्यं पतिं प्रार्थयंते । पतिकामानां हि कामाराधनं व्रतेषु प्रसिद्धम् । तासामपत्यादीनि ते पतयो न पातुं शक्ताः ॥ १९ ॥ अतस्ते पतय एव न भवंतीत्याह । सवा इति । स चैवंभूतः पतिर्भवानेक एव नान्यो यो भवानात्मलाभात्परमन्यदधिकं न मन्यते इतरथाऽन्याधीनसुखस्य न स्वतंत्रता।स्वतंत्रनानात्वे च मंडलेश्वराणामिव मिथो भयं स्यादित्यर्थः ॥२०॥ किंच निष्कामभजनेऽप्रार्थिता एव सर्वे कामा भवंति सकामभजने तु कामितमात्रमनित्यं चेत्याह । या स्त्री तस्योक्तलक्षणस्य तव पादसरोरुहस्यार्हणं पूजामेव कामये न्न फलांतरं साखिलेषु कामेषु लंपटा सर्वान्कामान्प्राप्नोतीत्यर्थः । ईप्सितमीप्सितः फलांतरमाप्तुमपेक्षितः सन्नर्चितश्चेत्तर्हि तदेवैकं रासिं ददासि । किंच । यद्यतः फलभोगानंतरं

स वै पतिः स्यादकुतोभयः स्वयं समंततः पाति भयातुरं जनम् ॥ स एक एवेतरथा मिथोभयं नैवात्मलाभादधिमन्यते परम् ॥ २० ॥ या तस्य ते पादसरोरुहार्हणं निकामयेत्साऽखिलकामलंपटा ॥ तदेव रासीप्सितमीप्सितोऽर्चितो यद्भग्नयाच्ञा भगवन्प्रतप्यते ॥ २१ ॥ मत्प्राप्तयेऽजेशसुरासुरादयस्तप्यंत उग्रं तप ऐंद्रियेधियः ॥ ऋते भवत्पादपरायणान्न मां विंदंत्यहं त्वद्धृदया यतोऽजित ॥ २२ ॥ स त्वं ममाप्यच्युत शीर्ष्णि वंदितं करांबुजं यत्त्वदधायि सात्वताम् ॥ बिभर्षि मां लक्ष्म वरेण्य मायया क ईश्वरस्येहितमूहितुं विभुरिति ॥ २३ ॥

भग्ना याच्ञा याचितोऽर्थो यस्याः सा प्रतप्यते दुःखं प्राप्नोति तदेव रासि नतु नित्यम् ॥ २१ ॥ ननु ममार्हणे कुतः सर्वकामप्राप्तिस्त्वमेव कामार्थिभिः सेव्यसेऽत आह । मत्प्राप्तये ब्रह्मादयस्तपस्तप्यंते कुर्वंति । कथंभूताः । ऐंद्रिये सुखे धीर्येषां अलुक्समासः तथापि भवत्पादपरायणादृते मां न विंदंति । मत्कटाक्षविलसिता विभूतीर्न लभंत इत्यर्थः । यतस्त्वय्येव हृदयं यस्याः साऽहं त्वत्परतंत्रत्वात्त्वदनुवर्तिनमेव विलोकयामि नान्यमित्यर्थः ॥ २२ ॥ इदानीं कृपां प्रार्थयते । स त्वमिति । यद्भजनं विना न कश्चित्पुरुषार्थः

मागणी फुकट गेल्यामुळें ती पुनः दुःख पावत्ये ॥ २१ ॥ हे अजिता, माझ्या प्राप्तीसाठीं, विषयसुखांची इच्छा धारण करणारे ब्रह्मदेव, शंकर, देव आणि दैत्यप्रभृति लोक, उग्रतप करितात परंतु तुमच्या चरणकमलाच्या सर्वोत्कृष्ट आश्रयावांचून त्यांना माझी ह्मणजे माझ्या कटाक्षापासून होणाऱ्या संपत्तींची प्राप्ति होत नाहीं. कारण, माझें हृदय तुमच्याठिकाणीं असतें ह्मणजे मी तुमच्या तंत्रानें वागत असल्यामुळें, तुमची सेवा करणारांकडेसच पाहत्यें दुसऱ्याकडे पाहत नाहीं ॥ २२ ॥ हे अजिता, ज्याच्या भजनावांचून कोणताच पुरुषार्थ नाहीं अशा तूं, आपलें जें सर्व मनोरथपूरक व भक्तांनीं स्तुति केलेलें हस्तकमळ भक्तांच्या मस्तकीं कृपेनें स्थापन केलें आहेस, तें माझ्याही मस्तकीं स्थापन कर. हे सर्वश्रेष्ठा, तूं आपल्या वक्षस्थळावर मला चिन्हरूपानें धारण केली आहेस, त्यावरून माझेठिकाणीं तुझा आदर आहे असें सिद्ध होतें, परंतु माझेठिकाणीं केवळ आदरमात्र करावयाचा आणि भक्तांवर मोठी दया करावयाची. हें आश्चर्य आहे. तेव्हां कर्तुं अकर्तुं अन्यथाकर्तुं समर्थ अशा तुझ्या चेष्टिताचा तर्क कर-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ण्यास कोण समर्थ आहे? कोणीच नाहीं ॥ २३ ॥ रम्यक खंडामध्येंहि, त्या खंडाचा अधिपति अशा मनूला भगवंतानें जें आपलें अत्यंतप्रिय मत्स्यावताररूप, पूर्वीं दाखविलें होतें त्याची तो मनु, आतांसुद्धां मोठ्या भक्तियोगानें आराधना करितो आणि या अर्थाच्या मंत्राचा जप करितो कीं, ॥ २४ ॥ सर्वांमध्यें मुख्य, सत्वगुणप्रधान, सूत्रात्मा, इंद्रियशक्तिरूप, अंतःकरणशक्तिरूप आणि देहशक्तिरूप असा जो महामत्स्यरूपी भगवान् त्याला माझा ॐकारपूर्वक वारंवार नमस्कार असो ॥ २५ ॥ आणि अशी स्तुति करितो कीं, जसा एखादा पुरुष, लांकडाच्या बाहुलीला सूत्राच्या योगानें बांधून आपल्या स्वाधींन करून ठेवितो त्याप्रमाणें वेदरूपी मोठ्या शब्दानें युक्त अशा ज्या तूं, विधिनिषेधांना आश्रयभूत अशा ब्राह्मणादिक नांवांनीं, त्या त्या कर्मांचेठिकाणीं योजून, हें जग आपल्या स्वाधीन करून ठेविलें आहेस, तोच तूं ईश्वर,

---

स त्वं त्वदिति त्वया यत्करांबुजं सात्वतां भक्तानां शीर्ष्ण्यधायि कृपया न्यस्तं तन्ममापि शीर्ष्णि निधेहीति शेषः। कथंभूतम्। वंदितं सर्वकामवर्षित्वेन सद्भिः स्तुतम्। नच मयि तवानादरः यतो हे वरेण्य मां वक्षसि लक्ष्म बिभर्षि। अहो चित्रमेतत् मयि केवलमादरमात्रं भक्तेषु तु परमा कृपाऽत ईश्वरस्य तव यन्मायया ईहितं तत्को वितर्कयितुं समर्थः ॥ २३ ॥ २४ ॥ सत्त्वाय सत्त्वप्रधानाय। मुख्यतमाय प्राणाय सूत्रात्मने ॥ २५ ॥ उरुः स्वनो वेदात्मको नादो यस्य। य इदं विश्वं ब्राह्मणादिनाम्ना विधिनिषेधालंबनभूतेन वशोऽनयन्नियमितवान्स त्वमीश्वरः। तथाच श्रुतिः। तस्य वाक्तंतिर्नामानि दामानीति ॥ २६ ॥ नन्विंद्रादयो वशं नयंति लोकपालत्वात्कुतोऽहं तत्राह।

रम्यके च भगवतः प्रियतमं मात्स्यमवताररूपं तद्वर्षपुरुषस्य मनोः प्राक्प्रदर्शितं स इदानीमपि महता भक्तियोगेनाराधयतीदं चोदाहरति ॥ २४ ॥ ॐनमो भगवते मुख्यतमाय नमः सत्त्वाय प्राणायौजसे सहसे बलाय महामत्स्याय नम इति ॥ २५ ॥ अंतर्बहिश्चाखिललोकपालकैरदृष्टरूपो विचरस्युरुस्वनः ॥ स ईश्वरस्त्वं य इदं वशेऽनयन्नाम्ना यथा दारुमयीं नरः स्त्रियम् ॥ २६ ॥ यं लोकपालाः किल मत्सरज्वरा हित्वा यतंतोऽपि पृथक्समेत्य च ॥ पातुं न शेकुर्द्विपदश्चतुष्पदः सरीसृपं स्थाणु यदत्र दृश्यते ॥ २७ ॥ भवान्युगांतार्णव ऊर्मिमालिनि क्षोणीमिमामोषधिवीरुधां निधिम् ॥ मया सहोरु क्रमतेऽज ओजसा तस्मै जगत्प्राणगणात्मने नम इति ॥ २८ ॥

यमिति मत्सर एव ज्वरो येषां ते। यं हित्वा द्विपदश्चतुष्पदः सरीसृपं जंगमं स्थाणु स्थावरं च यदत्र दृश्यते तत्किंचिदपि पातुं न शक्ताः स त्वमेव प्राणरूपेण पालक ईश्वरश्चेत्यर्थः। तथाच श्रुतिः। ता अहिंसंताहमुक्थमस्म्यहमुक्थमस्मीत्यादि ॥ २७ ॥ अवतारचरितमाह। भवानिमां क्षोणीं मया मनुना सह मत्सहितां धृत्वेत्यध्याहारः। ऊर्मिमालावति प्रलयार्णवे ओजसा क्रमते विचरति। यद्वा पातुमित्यस्यानुषंगः। क्षोणीं पातुं क्रमते उत्सहत इत्यर्थः। यतोऽजः। कीदृशीम्। ओषधीनां वीरुधां च नि-

---

सर्व लोकांच्या पालकांनीं (ब्रह्मादिकांनीं) हि अदृष्टस्वरूप होत्साता, सर्व प्राण्यांच्या आंत प्राणरूपानें व बाहेर वायुरूपानें संचार करित आहेस ॥ २६ ॥ हे भगवन्, दुसऱ्याचा उत्कर्ष सहन न करणें या मत्सररूप ज्वरानें युक्त असे इंद्रादिक लोकपाल, वेगवेगळे राहून अथवा सर्व एकत्र मिळूनहि, ज्या प्राणरूपी तुझा त्याग करून द्विपद (मनुष्यादिक), चतुष्पद (गोमहिष्यादिक), जंगम व स्थावर असें जें कांहीं प्राणिमात्र येथें दिसत आहे, त्यांतील थोड्याचेंहि रक्षण करण्यास समर्थ झाले नाहींत, तो (प्राणरूपानें रक्षण करणारा) तूंच ईश्वर आहेस ॥ २७ ॥ हे भगवन्, जन्मरहित अशा ज्या तूं, ओषधि (साळीवगैरे) आणि वल्ली यांना आश्रयभूत अशा ह्या पृथिवीला माझ्या (मनूच्या) सहवर्तमान धारण करून सामर्थ्यानें मोठमोठ्या लाटांनीं युक्त असलेल्या प्रलयकालीन समुद्रामध्यें पुष्कळ वेळपर्यंत संचार केलास, त्या जगताच्या ॥ ५० ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्राणसमूहाचें नियमन करणाऱ्या तुज भगवंताला नमस्कार असो ॥ २८ ॥ हिरण्मय खंडामध्येंहि कूर्मरूप धारण करणारा भगवान् वास करितो. त्याच्या त्या आपणास फार आवडणाऱ्या मूर्तीची उपासना, तेथें राहणारा पितृगणाचा अधिपति अर्यमा, त्या खंडांतील पुरुषांसहवर्तमान करितो आणि ह्या अर्थाच्या मंत्राचा जप करितो कीं, ॥ २९ ॥ जो पूर्णसत्वगुणप्रधान आहे, ज्याच्या राहण्याच्या ठिकाणाचा पत्ता (पाण्यांत फिरत असल्यामुळें) लागत नाहीं, जो अमुक वर्षें वांचणार अशा काळाच्या प्रमाणांत सांपडला नाहीं, अशा सर्वव्यापक व सर्वाधाररूप कूर्मरूपी तुज भगवंताला ॐकारपूर्वक वारंवार नमस्कार असो ॥ ३० ॥ आणि अशी स्तुति करितों कीं, हे भगवन्, नानाप्रकारच्या रूपांनीं नटलेलें व आपल्या (तुझ्या) मायेनें प्रकाशित केलेलें हें दृश्य पृथिव्यादि जग, ज्या तुझेंच स्वरूप आहे (तुझ्याहून निराळें नाहीं)

धिमाश्रयभूताम् । तस्मै नमः जगतो यः प्राणगणस्तस्यात्मने नियंत्रे ॥ २८ ॥ तत्प्रियतमां तां प्रियतमाम् ॥ २९ ॥ अकूपाराय कूर्माय । सर्वः संपूर्णः सत्त्वगुणो विशेषणं यस्य न उपलक्षितं स्थानं यस्य वारिचरत्वात् । वर्ष्मणे वर्षीयसे कालानवच्छिन्नाय भूम्ने सर्वगताय अवस्थानायाधाराय ॥ ३० ॥ निजमाययार्पितं प्रकाशितमेतदर्थस्वरूपं दृश्यं पृथिव्यादि यस्यैव रूपं यतः पृथङ्नास्ति । कथंभूतम् । बहुभी रूपै रूपितं निरूपितम् । यस्य च संख्या नास्ति । कुतः । अयथा मिथ्यैवोपलंभनात् । न हि मरीचि-

हिरण्मयेऽपि भगवान्निवसति कूर्मतनुं बिभ्राणस्तस्य तत्प्रियतमां तनुमर्यमा सह वर्षपुरुषैः पितृगणाधिपतिरुपधावति मंत्रमिमं चानुजपति ॥ २९ ॥ ॐनमो भगवते अकूपाराय सर्वसत्त्वगुणविशेषणाय नोपलक्षितस्थानाय नमो वर्ष्मणे नमो भूम्ने नमोनमोऽवस्थानाय नमस्ते ॥ ३० ॥ यद्रूपमेतन्निजमाययाऽर्पितमर्थस्वरूपं बहुरूपरूपितम् ॥ संख्या न यस्यास्त्ययथोपलंभनात्तस्मै नमस्ते व्यपदेशरूपिणे ॥ ३१ ॥ जरायुजं स्वेदजमंडजोद्भिदं चराचरं देवर्षिपितृभूतमैंद्रियम् ॥ द्यौः खं क्षितिः शैलसरित्समुद्रद्वीपग्रहर्क्षेत्यभिधेय एकः ॥ ३२ ॥ यस्मिन्नसंख्येयविशेषनामरूपाकृतौ कविभिः कल्पितेयम् ॥ संख्या यया तत्त्वदृशाऽपनीयते तस्मै नमः सांख्यनिदर्शनाय त इति ॥ ३३ ॥

जलमेतावदिति संख्यातुं शक्यते । अव्यपदेशरूपिणे निरुक्तप्रपंचाकाराय ॥ ३१ ॥ बहुरूपत्वं दर्शयंस्तस्येश्वराद्व्यतिरेकमाह । जरायुजमिति । द्वीपग्रहर्क्षमित्यभिधेयस्त्वमेवैको न त्वद्व्यतिरिक्तोऽस्ति । सर्वं खल्विदं ब्रह्मेत्यादिश्रुतेरित्यर्थः ॥ ३२ ॥ सप्रपंचतामनूद्य तन्निरासेन प्रणमति यस्मिन्निति । असंख्येया अनंता विशेषा येषां तानि नामानि रूपाण्याकृतयश्च यस्य तादृशे यस्मिंस्त्वयि कविभिः कपिलादिभिरियं चतुर्विंशत्यादिसंख्या कल्पिता सती यया तत्त्वदृशा येन तत्त्वज्ञानेनापनीयते तस्मै ते सांख्य-

---

आणि जशी मृगजळाची गणती (अमुक मण किंवा अमुक खंडी आहे अशी) करितां येत नाहीं त्याप्रमाणें ज्या (जगत्स्वरूपी) तुझी, मिथ्यात्वेंकरून अनुभव येत असल्यामुळें, गणती करितां येत नाहीं, त्या अनिर्वचनीय प्रपंचाकाररूपी तुज भगवंताला नमस्कार असो ॥ ३१ ॥ हे भगवन्, गर्भाशयांतून जन्म पावणारें (मनुष्यादिक) घामापासून उद्भवणारें (ढेंकूणवगैरे), अंड्यांतून निघणारें (पक्ष्यादिक), भूमीला फोडून उगवणारें (वृक्षादिक), स्थावर, जंगम, देव, ऋषि, पितर, पंचमहाभूतें, इंद्रियें, स्वर्ग, अंतरिक्ष लोक, भूमि, पर्वत, नद्या, समुद्र, द्वीपें, ग्रह आणि नक्षत्रें याप्रमाणें त्या त्या नांवानें उच्चार करण्यास योग्य असा तूं एकच आहेस ॥ ३२ ॥ असंख्य भेदांच्या नांवांनीं, रूपांनीं व आकारांनीं युक्त अशा ज्या तुझेठिकाणीं कपिलादिकांनीं जी ही चोवीसवगैरे तत्त्वांची संख्या (स्पष्टीकरणासाठीं) कल्पिली आहे, ती

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तत्त्वज्ञानेंकरून दूर होत्ये त्या सांख्यसिद्धांतरूपी तुज भगवंताला नमस्कार असो ॥ ३३ ॥ उत्तरकुरुनामक खंडाचेठिकाणींहि वराहावतार धारण केलेला भगवान् यज्ञ-पुरुष राहतो. तेथें दिव्यरूप धारण करणारी ही भूमि, कुरुखंडांत राहणाऱ्या पुरुषांसहवर्तमान त्या वराहरूपी भगवंताची उपासना करित्ये आणि ह्या मंत्रात्मक सर्वोत्कृष्ट उपनिषदाचा जप करित्ये ॥ ३४ ॥ हे भगवन् मंत्रांनीं ज्याचें यथार्थ ज्ञान होतें, यज्ञ व क्रतु हें ज्याचें स्वरूप आहे, मोठमोठे याग हे ज्याचे अवयव आहेत, कर्मांच्या योगानें जो शुद्ध आहे आणि तीन युगांमध्यें जो प्रसिद्ध असतो, त्यातुज वराहरूपी महापुरुषाला ॐकारपूर्वक वारंवार नमस्कार असो ॥ ३५ ॥ आणि अशी प्रार्थना करित्ये कीं, हे प्रभो, अनेक प्रकारचीं कर्में व त्यांचीं फळें यांच्या योगानें प्रकाश न पावणारें ज्या तुझें स्वरूप, पाहण्याची इच्छा करणारे विद्वान् व निपुण पुरुष, जसे

सिद्धांतरूपाय नमः परमार्थज्ञानरूपायेति वा ॥ ३३ ॥ एषा भूरुपधावति हेत्यन्वयः ॥ ३४ ॥ मंत्रैस्तत्त्वेन लिंग्यत इति तथा तस्मै । यज्ञा अयूपाः क्रतवः सयूपास्तद्रू-पाय अतएव महांतोऽध्वरा अवयवभूता यस्य । कर्मणा शुक्लाय शुद्धाय यज्ञानुष्ठात्रे । त्रियुगाय कृतयुगे यज्ञाभावात् । यद्वा । कलियुगे छन्नत्वात् ॥ ३५ ॥ कवयो विद्वांसो वि-पश्चितो निपुणा गुणेषु देहेंद्रियादिषु मथ्नंति विचिन्वंति । मथ्ना विवेकसाधनेन मनसा । क्रियार्थैः कर्मभिस्तत्फलैश्च गूढमप्रकाशमानं दिदृक्षवः । एवं मथने ईरितः प्रकटित आत्मा स्वरूपं यस्य तस्मै नमः ॥ ३६ ॥ मथनमेव दर्शयंत्याह । द्रव्येति । द्रव्यं विषयः क्रिया इंद्रियव्यापारः हेतुर्देवता अयनं देहः ईशः कालः कर्ताऽहंकारः एतैर्माया

उत्तरेषु च कुरुषु भगवान्यज्ञपुरुषः कृतवराहरूप आस्ते तं तु देवी हैषा भूः सहकुरुभिरस्खलितभक्तियोगेनोपधावति इमां च पर-मामुपनिषदमावर्तयति ॥ ३४ ॥ ॐनमो भगवते मंत्रतत्त्वलिंगाय यज्ञक्रतवे महाध्वरावयवाय महापुरुषाय नमः कर्मशुक्लाय त्रि-युगाय नमस्ते ॥ ३५ ॥ यस्य स्वरूपं कवयो विपश्चितो गुणेषु दारुष्विव जातवेदसम् ॥ मथ्नंति मथ्ना मनसा दिदृक्षवो गूढं क्रियार्थैर्नम ईरितात्मने ॥ ३६ ॥ द्रव्यक्रियाहेत्वयनेशकर्तृभिर्मायागुणैर्वस्तुनिरीक्षितात्मने ॥ अन्वीक्षयांगातिशयात्मबुद्धिभिर्निर-स्तमायाकृतये नमो नमः ॥ ३७ ॥ करोति विश्वस्थितिसंयमोदयं यस्येप्सितं नेप्सितमीक्षितुर्गुणैः ॥ माया यथाऽयो भ्रमते तदा-श्रयं ग्राव्णो नमस्ते गुणकर्मसाक्षिणे ॥ ३८ ॥

गुणैः कार्यैरुपलक्षणैर्वस्तुत्वेन निरीक्षितो य आत्मा तस्मै । अन्वीक्षया विचारेणांगैर्यमनियमादिभिरतिशयात्मा निश्चयवती बुद्धिर्येषां तैर्निरस्ता मायानिमित्ता आकृतिर्य-स्मात्तस्मै ॥ ३७ ॥ तदेवं निर्गुणरूपेण नत्वा परमेश्वररूपेण प्रणमति । करोतीति । यस्येक्षितुर्जीवार्थमीप्सितम् । अत्यंतानिच्छायामीक्षणायोगात् । स्वार्थं तु नेप्सितम् । विश्वस्थित्यादि स्वगुणैर्माया करोति तस्या जडत्वेऽपीश्वरसन्निधानात्प्रवृत्तिं दृष्टांतेनाह । यथायो लोहं ग्राव्णोऽयस्कांतात्निमित्तद्भ्रमति तदाश्रयं तदभिमुखं सत् गुणानां कर्म-

अग्निहोत्री, अरणिरूप काष्ठामध्यें मंथनदंडानें अग्नीचें मंथनकरितात त्याप्रमाणें आपल्या देहेंद्रियादिकांचेठिकाणीं मनोरूप विवेकसाधनानें तुझें विवेचन करितात. व असें केलें असतां, ज्या तुझें स्वरूप प्रकट होतें, त्या तुला माझा नमस्कार असो ॥ ३६ ॥ यमनियमादिक साधनांनीं ज्यांची बुद्धि आत्मस्वरूप जाणण्यास समर्थ झाली आहे अशा पुरुषांनीं, विचाराच्या योगानें व विषय, इंद्रियांचे व्यापार, देवता, देह, काल आणि अहंकार ह्या मायेच्या कार्यरूपी लक्षणांनीं, 'शाखाचंद्रन्यायानें' ज्याचें स्वरूप वस्तुत्वेंकरून जाणलें जातें, त्या मायानिमित्तक आकारानें रहित अशा तुज परमेश्वराला वारंवार नमस्कार असो ॥ ३७ ॥ जसें लोहचुंबकाचा आश्रय करणारें लोखंड, त्याच्या सांनिध्यमात्रेंकरून भ्रमण पावतें त्याप्रमाणें ज्या तुझ्या अवलोकनमात्रेंकरून माया, आपल्या सत्वरजतमोरूप गुणांनीं, 'तूं आपणाकरितां नसून जीवांकरितां

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

इच्छिलेलें' जगाचें स्थितिसंहारोत्पत्तिरूप कार्य करितये, त्या गुणकर्मांचा साक्षी अशा तुला नमस्कार असो ॥ ३८ ॥ जो तूं, जगांचा कारणभूत वराहरूपी भगवान्, मला दाढेच्या टोंकावर धारण करून, रसातलापासून निघून प्रलयकालच्या समुद्रांतून हत्तीसारखा बाहेर पडलास व नंतर प्रतिगजासारख्या प्राप्त झालेल्या हिरण्याक्ष-दैत्याला मारून क्रीडा करित असल्यासारखा राहिला आहेस, त्या तुज समर्थ भगवंताला मी नित्य नमस्कार करित्यें ॥ ३९ ॥ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील पंचमस्कंधामध्यें भुवनकोशवर्णननामक हा अठरावा अध्याय समाप्त झाला ॥ १८ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां या एकुणीसाव्या अध्यायामध्यें, किंपुरुषखंड व भरतखंड यांमध्यें असलेल्या सेव्यसेवकभावाचें वर्णन करून, सर्व पृथ्वीवरील खंडांमध्यें भरतखंडाचेंच श्रेष्ठत्व वर्णन केलें आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला— हे राजा, किंपुरुषनामक खंडामध्यें, लक्ष्मणाचा ज्येष्ठ भ्राता जो भगवान् आदिपुरुष सीतापति रामचंद्र त्याची— त्याच्या सेवेविषयीं

णां जीवादृष्टानां च साक्षिणे तस्मै ते नमः ॥ ३८ ॥ अवतारचरितमाह । प्रमथ्येति । यो जगतामादिः कारणभूतः सूकरो मां पृथ्वीमग्रदंष्ट्रे दंष्ट्राग्रे कृत्वा रसातलादारभ्योदन्वतः प्रलयार्णवादिभो गज इव निरगात् ततश्च प्रतिगजतुल्यं दैत्यं प्रमथ्य यः क्रीडन् स्थितस्तं विभुं प्रणतास्मीत्यन्वयः ॥ ३९ ॥ इति पंचमे टीकायामष्टादशोऽध्यायः ॥

प्रमथ्य दैत्यं प्रतिवारणं मृधे यो मां रसाया जगदादिसूकरः ॥ कृत्वाऽग्रदंष्ट्रे निरगादुदन्वतः क्रीडन्निवेभः प्रणताऽस्मि तं विभुमिति ॥ ३९ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे पंचमस्कंधे भुवनकोशवर्णनं नामाष्टादशोऽध्यायः ॥ १८ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ किंपुरुषे वर्षे भगवंतमादिपुरुषं लक्ष्मणाग्रजं सीताभिरामं रामं तच्चरणसन्निकर्षाभिरतः परमभागवतो हनुमान्सह किंपुरुषैरविरतभक्तिरुपास्ते ॥ १ ॥ आर्ष्टिषेणेन सह गंधर्वैरनुगीयमानां परमकल्याणीं भर्तृभगवत्कथां समुपशृणोति स्वयं चेदं गायति ॥ २ ॥ ॐनमो भगवते उत्तमश्लोकाय नम आर्यलक्षणशीलव्रताय नम उपशिक्षितात्मन उपासितलोकाय नमः साधुवादनिकषणाय नमो ब्रह्मण्यदेवाय महापुरुषाय महाराजाय नम इति ॥ ३ ॥ यत्तद्विशुद्धानुभवमात्रमेकं स्वतेजसा ध्वस्तगुणव्यवस्थम् ॥ प्रत्यक् प्रशांतं सुधियोपलंभनं ह्यनामरूपं निरहं प्रपद्ये ॥ ४ ॥

॥ १८ ॥ ॥ ऊनविंशे किंपुरुषे भारते चोपवर्ण्यते ॥ सेव्यसेवकभावश्च भारतश्रैष्ठ्यमेव च ॥[1] १ ॥ ॥ १ ॥ भर्ता चासौ भगवांश्च तस्य कथाम् ॥ २ ॥ आर्याणि लक्षणानि शीलं व्रतं च यस्मिन् । उपशिक्षितात्मने संयतचित्ताय उपासितोऽनुसृतो लोको येन । साधुवादः साधुत्वप्रसिद्धिस्तस्य निकषणाय निकषाश्मवन्निर्धारस्थानाय परमसीम्न इत्यर्थः ॥ ३ ॥ श्रीरामं परमार्थरूपेण प्रणमति । यदेकं वेदांतेषु प्रसिद्धं तत्त्वं तत्प्रपद्ये । तत्कथंभूतम् । विशुद्धश्चासावनुभवश्च स एव मात्रा स्वरूपं यस्य । विशुद्ध-

---

तत्पर असलेला महाभगवद्भक्त हनुमान्, किंनरांसहवर्तमान एकनिष्ठभक्तीनें उपासना करितो ॥ १ ॥ आणि गंधर्वांनीं वारंवार गायन केलेली धनी अशा भगवान् रामचंद्राची अत्यंत कल्याणकारक कथा, किंपुरुषांत मुख्य अशा आर्ष्टिषेणासहवर्तमान एकाग्रचित्तानें श्रवण करितो, आणि स्वतः हें गायन करितो कीं— ॥ २ ॥ ज्याची कीर्ति पवित्र आहे, ज्याचीं लक्षणें, स्वभाव व आचार हीं श्रेष्ठ आहे, ज्यानें आपलें मन वश करून घेतलें आहे, जो लोकमार्गाला अनुसरला आहे, जो साधुपणाची कसोटीच (परमस्थान) आहे आणि जो वस्तुतः परमेश्वर असून लोकसंग्रहाकरितां ब्राह्मणभक्त आहे, त्या महापुरुषरूपी षड्गुणैश्वर्यसंपन्न राजाधिराज रामचंद्रा माझा ॐकारपूर्वक वारंवार नमस्कार असो ॥ ३ ॥ आणि अशी स्तुति करितो कीं, वेदाचेठिकाणीं जें एक, परमशुद्ध, अनुभवरूप, आपल्या प्रकाशानें अनेकप्रकारत-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जाग्रदादिक अवस्थांचा निरास करणारें, अंतर्यामि, शांतरूप, सुबुद्धि पुरुषानें ब्रह्मत्वेंकरून जाणलेलें, नामरूपातीत व अहंकाररहित असें (रामरूप) तत्त्व, आहे, त्याला मी शरण जातों ॥ ४ ॥ प्रभूचा ह्या भूतलावर जो (रामरूपी) मनुष्यावतार झाला आहे, तो केवळ रावणाच्या वधासाठींच झाला असें नव्हे, तर संसारामध्यें स्त्रीसंगादिकांपासून होणारें दुःख, दुर्निवार आहे, असें मनुष्यांना शिक्षण देण्याकरितांहि झाला आहे. असें न म्हणावें तर स्वस्वरूपाचेठिकाणीं रममाण असणाऱ्या जगदात्मरूपी ईश्वराला (श्रीरामाला) सीतेच्या विरहापासून दुःखें झालीं हें कसें झालें असतें? झालेंच नसतें ॥ ५ ॥ कारण, तो भगवान् वासुदेव (रामचंद्र) धीर पुरुषांचा

त्वे हेतुः । प्रशांतम् । तत्रापि हेतुः । स्व तेजसा स्वरूपप्रकाशेन ध्वस्ता गुणानां विविधा जाग्रदाद्यवस्था यस्मिन् । अनुभवमात्रत्वे हेतुः । प्रत्यक् दृश्यादन्यत् । तत्कुतः । अनामरूपम् । ननु वस्तुत एवंभूतस्यापि जीवस्योक्तसर्वविपर्ययो दृश्यते तत्राह । निरहम् । अहंकाराभावान्न तथा वैपरीत्यमित्यर्थः । ननु श्रीरामस्य स्वरूपं नैवं प्रतीयते तत्राह । सुधिया पुंसा उपलभ्यत इत्युपलंभनम् । शुद्धचित्तेन ब्रह्मत्वेनैवोपलभ्यत इत्यर्थः ॥ ४ ॥ कथं तर्हि दशरथपुत्रत्वं तत्राह । विभोर्मर्त्यावतारस्तु रक्षसो रावणस्य वधाय तस्य मनुष्यादन्यतोऽवध्यत्वात् । न केवलमेतावत्किंत्विह संसारे स्त्रीसंगादिकृतं दुःखं दुर्वारमिति मर्त्यानां शिक्षणं च शिक्षार्थमपीत्यर्थः । अन्यथा स्वे स्वरूपे रम-

मर्त्यावतारस्त्विह मर्त्यशिक्षणं रक्षोवधायैव न केवलं विभोः ॥ कुतोऽन्यथा स्याद्रमतः स्व आत्मनः सीताकृतानि व्यसनानीश्व-
रस्य ॥ ५ ॥ न वै स आत्मात्मवतां सुहृत्तमः सक्तस्त्रिलोक्यां भगवान्वासुदेवः ॥ न स्त्रीकृतं कश्मलमश्नुवीत न लक्ष्मणं चापि
विहातुमर्हति ॥ ६ ॥ न जन्म नूनं महतो न सौभगं न वाङ्न बुद्धिर्नाकृतिस्तोषहेतुः ॥ तैर्यद्विसृष्टानपि नो वनौकसश्चकार स-
ख्ये बत लक्ष्मणाग्रजः ॥ ७ ॥

माणस्य जगदात्मनः सीताविरहकृतानि व्यसनानीति कुतः स्यात् ॥ ५ ॥ विषयासक्त्यभावेन व्यसनानर्हत्वमुपपादयति । न वै स भगवांस्त्रिलोक्यां क्वापि सक्तः । यत आत्मवतां धीराणामात्मा सुहृत्तमश्च । अतो न स्त्रीकृतं मोहं प्राप्नुयात् न लक्ष्मणं चेति । देवदूतेन श्रीरामं संमंत्रयता विज्ञापितमत्रागतस्त्वया वध्य इति । तदैव द्वारि स्थितं लक्ष्मणं दुर्वाससमागतं विज्ञापयितुं प्रविष्टं हंतुमुद्यतो वसिष्ठवाक्यात्तत्याज तच्च न युज्येतेत्यर्थः ॥ ६ ॥ अतः श्रीराम एव सर्वैः सेव्य इति वक्तुं न तस्य तोषहेतुः सत्कुलजन्मादि किंतु भक्तिरेवेत्याह । न जन्मेति । महतः पुरुषाज्जन्म महतः श्रीरामस्येति वा । सौभगं सौंदर्यम् । आकृतिर्जातिः । यद्यस्मात्तैर्जन्मादिभिर्विसृष्टांस्त्यक्तानपि नो

आत्मा व अत्यंत हितकर्ता असल्यामुळें त्रैलोक्यामध्यें कोठेंहि आसक्त नव्हता, तो सीतावियोगापासून झालेल्या मोहाला (दुःखाला) पावला नसता, आणि तो लक्ष्मणाचाहि त्याग करण्यास योग्य नव्हता. वास्तव, त्याचीं कृत्यें, केवळ लोकशिक्षेकरितांच आहेत ॥ ६ ॥ सत्कुलांत झालेलें जन्म, त्या श्रीरामचंद्राच्या संतोषाला कारण होत नाहीं. सौंदर्य नाहीं, वक्तृत्व नाहीं, बुद्धि नाहीं, किंवा आकारहि नाहीं. कारण, त्या लक्ष्मणाग्रज रामचंद्रानें, त्या कुलीनता सौंदर्य इत्यादिकांनीं रहित अशाहि आम्हां

---

१ ही कथा रामायणांत अशी आहे कीं, एकेवेळीं देवदूतानें अयोध्येंत येऊन श्रीरामाबरोबर कांहीं गुप्त भाषण करण्यासाठीं रामाची अशी प्रार्थना केली कीं, आम्ही दोघे बोलत असतां, जर येथें कोणी तिसरा मनुष्य आला तर त्याचा तूं वध करावास. तें रामानें कबूल करून दरवाज्यांत लक्ष्मणास ठेविलें आणि त्याच्याशीं गुप्त भाषण सुरू केलें. इतक्यांत आलेल्या दुर्वास ऋषीला रामास कळविण्यासाठीं तेथें लक्ष्मणानें प्रवेश केला असतां, त्याला मारण्यास राम उद्युक्त झाला. तेव्हां तेथें वसिष्ठानें येऊन सांगितलें कीं, तूं ह्याचा वधस्थानीं त्याग कर. मग रामानें त्याप्रमाणें त्याचा त्याग केला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अरण्यवासी वानरांचा मित्रत्वेंकरून स्वीकार केला आहे ॥ ७ ॥ तस्मात् देव असो, दैत्य असो, मनुष्य असो, अथवा पशुपक्ष्यादिक कोणीहि असोत, जो सर्वात्मभावेंकरून उत्तम सुकृतज्ञ (थोडें भजन केलें असतांहि पुष्कळ मानणारा,) अशा मनुष्यावतार धारण करणाऱ्या रामरूपी श्रीहरीचें सेवन करील तोच त्याला प्रिय होईल. तो श्रीराम कृपाळू असा आहे कीं, ज्यानें अयोध्यानगरवासी सर्व प्राणिमात्रांस आपल्या बराबर विमानांत बसवून स्वर्गास नेलें ॥ ८ ॥ या भरतखंडामध्येंहि ज्याचें स्वरूप लोकांना स्पष्टपणें कळत नाहीं असा भगवान्, नरनारायणनामक दोनमूर्ति धारण करून, बदरिकाश्रमाचेठिकाणीं कृपेनें धैर्यवान् पुरुषांवर अनुग्रह करण्याकरितां, कल्प संपेपर्यंत वृद्धि पावलेल्या– धर्म, ज्ञान वैराग्य, ऐश्वर्य, शांति आणि विषयत्याग यांच्या योगानें, जेणेंकरून आत्म्याचा अनुभव मिळवो अशा तपाचें आचरण करित राहिला आहे ॥ ९ ॥ त्या भगवंताची, भगवंतानें सांगितलेल्या सांख्यशास्त्र व योगशास्त्र यांसहवर्तमान, 'ज्यामध्यें भगवंताचा पराक्रम वर्णन केलेला आहे अशा'

वनचरान् बत अहो लक्ष्मणस्याग्रजोऽपि सखित्वे कृतवान् ॥ ७ ॥ तस्मात्सुरो वान्यो वा यः कोऽपि श्रीराममेव सर्वप्रकारेण भजेत् । सुकृतज्ञमल्पीयस्यपि भजने बहुमानिनम् । उत्तरान्कोशलानयोध्यावासिनः ॥ ८ ॥ उपचितैर्धर्मादिभिरात्मोपलभ्यते येन तत्तपश्चरति । तत्रोपशम इंद्रियाणां संयमः । उपरमो निरहंकारता आत्मवतामनुग्रहाय न

सुरोऽसुरो वाऽप्यथवा नरो नरः सर्वात्मना यः सुकृतज्ञमुत्तमम् ॥ भजेत रामं मनुजाकृतिं हरिं य उत्तराननयत्कोशलान्दिवमिति ॥८॥ भारतेऽपि वर्षे भगवान्नरनारायणाख्य आकल्पांतमुपचितधर्मज्ञानवैराग्यैश्वर्योपशमोपरमात्मोपलंभनमनुग्रहायात्मवतामनुकंपया तपोऽव्यक्तगतिश्चरति ॥ ९ ॥ तं भगवान्नारदो वर्णाश्रमवतीभिर्भारतीभिः प्रजाभिर्भगवत्प्रोक्ताभ्यां सांख्ययोगाभ्यां भगवदनुभावोपवर्णनं सावर्णेरुपदेक्ष्यमाणः परमभक्तिभावेनोपसरति इदं चाभिगृणाति ॥ १० ॥ ॐनमो भगवते उपशमशीलायोपरतानात्म्याय नमोऽकिंचनवित्ताय ऋषिऋषभाय नरनारायणाय परमहंसपरमगुरव आत्मारामाधिपतये नमोनम इति ॥ ११ ॥ गायति चेदम् । कर्ताऽस्य सर्गादिषु यो न बद्ध्यते न हन्यते देहगतोऽपि दैहिकैः ॥ द्रष्टुर्न दृग्यस्य गुणैर्विदूष्यते तस्मै नमोऽसक्तविविक्तसाक्षिणे ॥ १२ ॥

स्वार्थम् । ईश्वरत्वात् ॥९॥ भगवदनुभाव उपवर्ण्यते येन पंचरात्रेण तत् । सावर्णेर्मनोः । उपसरति सेवते ॥ १० ॥ उपरतानात्म्याय निरहंकाराय ॥ ११ ॥ असक्तश्चासौ विविक्तश्च साक्षी च तस्मै नमः । असक्तत्वं दर्शयति । अस्य विश्वस्य सर्गादिषु कर्तापि यो न बद्धचतेऽहंकर्तेति न मन्यते । विविक्तत्वमाह । देहगतोऽपि दैहिकैः क्षुत्पिपासादिभिर्यो न

पंचरात्रागमाचा सावर्णि मनूला उपदेश करणारा भगवान् नारद, वर्णाश्रमधर्मांचें आचरण करणाऱ्या भरतखंडांतील प्रजांसहवर्तमान उपासना करितो आणि अशा अर्थाच्या मंत्राचा जप करितो कीं, ॥ १० ॥ इंद्रियांचा निग्रह करणें हाच ज्याचा स्वभाव आहे, अहंकारानें जो रहित आहे, भगवद्भक्त हेंच ज्याचें द्रव्य आहे, ऋषींमध्यें जो श्रेष्ठ आहे, परमहंसांचाही जो परमगुरु आहे व आत्म्याचेचठिकाणीं रममाण होणाऱ्या लोकांचा जो अधिपति आहे त्या षड्गुणैश्वर्यसंपन्न नरनारायणाला माझा ॐकारपूर्वक वारंवार नमस्कार असो ॥ ११ ॥ आणि असें गायन करितो कीं, ह्या जगाच्या उत्पत्तिस्थितिसंहारांविषयीं कर्ता असतांनाहि जो 'मी कर्ता वें आहें' असा अभिमान धारण करीत नाहीं, देहामध्यें असतांनाहि देहसंबंधी क्षुधा, तृषा इत्यादि धर्मांनीं जो पराभव पावत नाहीं, आणि द्रष्टा असतांहि दृश्य विषयांनी भरत-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

योगानें ज्याच्या दृष्टीला विकार होत नाहीं त्या निःसंग, परमपवित्र व सर्वसाक्षी परमेश्वराला नमस्कार असो ॥ १२ ॥ हे योगेश्वरा, भगवान् ब्रह्मदेवानें, जें योगमा-तील निपुणत्व सांगून ठेविलें आहे तें हेंच होय कीं, पुरुषानें देहाभिमान सोडून जन्मापासून केलेल्या भक्तीनें अंतकाळीं निर्गुण अशा तुज परमेश्वराचेठिकाणीं आपलें मन लावावें ॥ १३ ॥ हे भगवन्, जसा मूढ पुरुष, या लोकींच्या व परलोकींच्या विषयांचेठिकाणीं आसक्त होऊन पुत्र, स्त्री, व द्रव्य यांविषयींची 'मी मेलों असतां यांचें कसें चालेल अशी' चिंता करित होत्साता विष्ठादि मलांनीं पूर्ण व अनेक प्रकारच्या दुःखांचें स्थान अशाहि आपल्या शरीराच्या नाशापासून भीत असतो, तसाच जर विद्वान् पुरुषही भिऊं लागेल तर त्याचा शास्त्रादिकांच्या ज्ञानसंपादना विषयींचा प्रयत्न केवळ श्रमच होईल ॥ १४ ॥ तस्मात् हे प्रभो, हे अधोक्षजा, तूंच कृपा-

हन्यते नाभिभूयते । साक्षित्वमाह । यस्य द्रष्टुरपि सतो दृष्टिर्गुणैर्हर्श्यैर्न विदूष्यते न विक्रियते ॥ १२ ॥ योगकौशलं निरूपयन्योगं प्रार्थयते । इदमिति त्रिभिः । हेयोगेश्वर हिरण्यगर्भो यद्योगनैपुणं जगाद इदमेव तत् । किम् । जन्मप्रभृति भक्त्यांतकाले पुमांस्त्वयि मनो धारयेदिति यत् । कथंभूतः सन् । उज्झितं दुष्कलेवरं तदभिमानो येन ॥ १३ ॥ अन्यथा तस्य शास्त्राभ्यासादि श्रमो व्यर्थ इत्याह । यथैहिकामुष्मिककामेषु लंपटो मूर्खः सुतादिषु योगक्षेमं चिंतयन्कुत्सितस्य कलेवरस्यात्ययान्मृत्योः शंकते

इदं हि योगेश्वरयोगनैपुणं हिरण्यगर्भो भगवान् जगाद यत् ॥ यदंतकाले त्वयि निर्गुणे मनो भक्त्या दधीतोज्झितदुष्कलेवरः
॥ १३ ॥ यथैहिकामुष्मिककामलंपटः सुतेषु दारेषु धनेषु चिंतयन् ॥ शंकेत विद्वान्कुकलेवरात्ययाद्यस्तस्य यत्नः श्रम एव केव-
लम् ॥ १४ ॥ तन्नः प्रभो त्वं कुकलेवरार्पितां त्वन्माययाऽहंममतामधोक्षज ॥ भिंद्याम येनाशु वयं सुदुर्भिदां विधेहि योगं त्वयि
नः स्वभावमिति ॥ १५ ॥ भारतेऽप्यस्मिन्वर्षे सरिच्छैलाः संति बहवो मलयो मंगलप्रस्थो मैनाकस्त्रिकूट ऋषभः कूटकः कोल्लकः
सह्यो देवगिरिर्ऋष्यमूकः श्रीशैलो वेंकटो महेंद्रो वारिधारो विंध्यः शुक्तिमानृक्षगिरिः पारियात्रो द्रोणश्चित्रकूटो गोवर्धनो रैवतकः
ककुभो नीलो गोकामुख इंद्रकीलः कामगिरिरिति चान्ये च शतसहस्रशः शैलास्तेषां नितंबप्रभवा नदा नद्यश्च संत्यसंख्याताः
॥ १६ ॥ एतासामपो भारत्यः प्रजानामभिरेव पुनंतीनामात्मना चोपस्पृशंति ॥ १७ ॥

तथा विद्वानपि सन्यः शंकेत तस्य यत्नः शास्त्रश्रवणादिः श्रम एव ॥ १४ ॥ यस्माद्विदुषोऽपीयमेव दशा तत्तस्माद्धे प्रभो अधोक्षज त्वमेव नो योगं विधेहि । कीदृशम् । त्वयि स्वभावं सहजवासनारूपम् । येन योगेन वयं त्वन्मायया नः कुकलेवरेऽर्पितामहंममतां शीघ्रं भिंद्याम त्यजेम । सुदुर्भिदामुपायांतरैः सर्वथा त्यक्तुमशक्याम् ॥ १५ ॥ इलावृतवदस्मिन्नपि वर्षे सरितः शैलाश्च संति नितंबप्रभवास्तटेभ्यः संभूताः ॥ १६ ॥ आत्मना च देहेनाप्युपस्पृशंति ॥ १७ ॥

करून आपलेठिकाणीं आह्मांला स्वाभाविक प्रेमलक्षण भक्तियोग संपादन कर, ह्मणजे त्याच्या योगानें आह्मी तुझ्या मायेनें ह्या कुत्सित शरीराचेठिकाणीं स्थापित केलेल्या व दुसऱ्या उपायांनीं त्याग करण्यास अशक्य अशा अहंममतेचा लवकर त्याग करूं ॥ १५ ॥ हे राजा, ह्या भरतखंडामध्यें नद्या व पर्वतहि पुष्कळ आहेत त्यांमध्यें मलय, मंगलप्रस्थ, मैनाक, त्रिकूट, ऋषभ, कूटक, कोल्लक, सह्य, देवगिरि, ऋष्यमूक, श्रीशैल, वेंकट, महेंद्र, वारिधार, विंध्य, शुक्तिमान, ऋक्षगिरि, पारियात्र, द्रोण, चित्रकूट, गोवर्धन, रैवतक, ककुभ, नील, गोकामुख, इंद्रकील आणि कामगिरि हे पर्वत मुख्य असून दुसरेहि शेंकडो हजारो पर्वत आहेत व त्यांच्या पायथ्यांपासून निघालेले नद व नद्याहि असंख्यात आहेत ॥ १६ ॥ ह्या नद्या, नामोच्चारणमात्रेंकरूनसुद्धां पवित्र करणाऱ्या असून यांच्या उदकाचा, भरतखंडांतील सर्व प्रजा स्नान-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पानादिकेंकरून उपयोग करितात तेव्हां ह्या त्यांना पवित्र करतील हें काय सांगावें ! ॥ १७ ॥ त्या नद्यांपैकीं, चंद्रवशा, ताम्रपर्णी, अवटोदा, कृतमाला, वैहायसी,
कावेरी, वेणी, पयस्विनी, शर्करावर्ता, तुंगभद्रा, कृष्णा, वेण्या, भीमरथी, गोदावरी, निर्विंध्या, पयोष्णी, तापी, रेवा, सुरसा, नर्मदा, चर्मण्वती, सिंधु, 'अंध आणि
शोण हे दोन नद,' महानदी, वेदस्मृति, ऋषिकुल्या, त्रिसामा, कौशिकी, मंदाकिनी, यमुना, सरस्वती, दृषद्वती, गोमती, सरयू , रोधस्वती, सप्तवती, सुषोमा, शतद्रु,
चंद्रभागा, मरुद्वृधा, वितस्ता, असिक्री आणि विश्वा ह्या ४४ महानद्या आहेत ॥ १८ ॥ ह्याच खंडामध्यें जन्म घेणारे पुरुष, स्वतां आचरण केलेल्या सात्विक, राजस व
तामस कर्मांच्या योगेंकरून त्या त्या कर्मांनुसार पुष्कळ देवलोकींच्या, मनुष्यलोकींच्या आणि नरकांतील गति आपणास मिळवितात. कारण, कर्मांनुसारेंकरून सर्वही गति

॥ १८ ॥ लब्धं जन्म यैस्तैः पुरुषैः । सात्त्विकादिना स्वकृतेन कर्मणा दिव्यादिगतय आत्मनो विधीयंते साध्यंते । हि यस्मात् । सर्वा एव गतयः कर्मानुसारेण सर्वेषां भवंति
यस्य वर्णस्य यद्विधानं मोक्षप्रकारः संन्यासवनस्थत्वादिस्तदनतिक्रमेणास्मिन्नेव वर्षे नृणामपवर्गश्च भवति । एतच्च कर्मादिबहुसाधनसंभवाभिप्रायेणोक्तं नत्वयत्रापवर्गाभावेन ।
तदुपर्यपि बादरायणः संभवादिति देवानामपि मोक्षस्य सूचितत्वात् ॥ १९ ॥ अपवर्गस्वरूपमाह । योऽसाविति । अनात्म्ये आत्मनि भवमात्म्यं रागादि तद्रहिते । अनिरुक्ते वाचाम-

चंद्रवशा ताम्रपर्णी अवटोदा कृतमाला वैहायसी कावेरी वेणी पयस्विनी शर्करावर्ता तुंगभद्रा कृष्णा वेण्या भीमरथी गोदावरी
निर्विंध्या पयोष्णी तापी रेवा सुरसा नर्मदा चर्मण्वती सिंधुरंधः शोणश्च नदौ महानदी वेदस्मृतिर्ऋषिकुल्या त्रिसामा कौशिकी
मंदाकिनी यमुना सरस्वती दृषद्वती गोमती सरयू रोधस्वती सप्तवती सुषोमा शतद्रूश्चंद्रभागा मरुद्वृधा वितस्ता असिक्री विश्वेति
महानद्यः ॥ १८ ॥ अस्मिन्नेव वर्षे पुरुषैर्लब्धजन्मभिः शुक्ललोहितकृष्णवर्णेन स्वारब्धेन कर्मणा दिव्यमानुषनारकगतयो बह्वय
आत्मन आनुपूर्व्येण सर्वा ह्येव सर्वेषां विधीयंते यथा वर्णविधानमपवर्गश्चापि भवति ॥ १९ ॥ योऽसौ भगवति सर्वभूतात्मन्य-
नात्म्येऽनिरुक्तेऽनिलयने परमात्मनि वासुदेवेऽनन्यनिमित्तभक्तियोगलक्षणो नानागतिनिमित्ताविद्याग्रंथिरंधनद्वारेण यदा हि महा-
पुरुषपुरुषप्रसंगः ॥२०॥ एतदेव हि देवा गायंति ॥ अहो अमीषां किमकारि शोभनं प्रसन्न एषां स्विदुत स्वयं हरिः॥ यैर्जन्म लब्धं
नृषु भारताजिरे मुकुंदसेवौपयिकं स्पृहा हि नः ॥ २१ ॥

गोचरे । अनिलयनेऽनाधारे । अनन्यनिमित्तोऽहैतुको भक्तियोग एव लक्षणं स्वरूपं यस्य । कथं भवति । नानागतीनां निमित्तं यो विद्याग्रंथिस्तस्य रंधनं छेदनं तद्वारेण
महापुरुषपुरुषा विष्णुभक्तास्तैः प्रकृष्टः संयोगो यदा भवति तदा ॥ २० ॥ एतदेव मानुष्यमेव सर्वपुरुषार्थसाधनं गायंति । अमीषामेभिः । उत स्वित् । अथवा स्वयमेव साधनं

सर्वांस प्राप्त होत असतात आणि ज्या ब्राह्मणादि वर्णाला जें संन्यासग्रहणादिक मोक्षप्राप्तीचें साधन ह्मणून सांगितलें आहे, त्या क्रमानें याच खंडामध्यें मनुष्यांना मोक्षहि प्राप्त
होतो ॥ १९ ॥ हे राजा, सर्वभूतांचा आत्मा, रागादि दोषरहित, वाणींना अगोचर, आधाररहित , सर्वव्यापी, व सर्वांतर्यामी अशा भगवान् वासुदेवाचेठिकाणीं, को-
णत्याहि कामनारूप कारणांवाचून जें भक्ति जडणें हेंच मोक्षाचें स्वरूप होय. तो मोक्ष, जेव्हां भगवद्भक्तांचा फारवेळ समागम घडतो तेव्हां नानाप्रकारच्या गति प्राप्त
होण्याचें निमित्त जो अविद्यारूप हृदयग्रंथि त्याच्या छेदनद्वारा प्राप्त होतो ॥ २० ॥ हें भरतखंड मोक्षप्राप्तीचें साधन आहे ह्मणून यांत प्राप्त झालेल्या मनुष्यजन्माचें
देवसुद्धां असें गायन करितात कीं, अहो ज्याच्याविषयीं आह्मां देवांनाहि केवळ इच्छाच उत्पन्न होत्ये तें मुक्तिदात्या भगवंताच्या सेवेविषयीं उपयोगी पडणारें भरत-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

खंडांत मनुष्यांमध्यें जन्म, ज्या मनुष्यांनीं मिळविलें आहे, त्यांनीं जन्मांतरीं काय बरें आश्चर्यकारक पुण्यकर्म केलें असावें ? अथवा कांहीं साधन केल्यावांचूनच यांना हरि प्रसन्न झाला असावा कीं काय? ॥ २१ ॥ करण्यास फार कठीण अशा- यज्ञ, तपें, व्रतें व दानें इत्यादिकांनीं आह्मांला प्राप्त झालेल्या ह्या तुच्छ अशा स्वर्गानेंतरी काय फळ झालें आहे ? कांहींच नाहीं. कारण, येथें नारायणाच्या चरणकमलांची स्मृति नाहीं, कदाचित् असली तर ती अतिशय विषयभोगांच्या योगानें लोपून गेलेली आहे ॥२२॥ स्वर्गलोकाची तर वार्ता राहूंदे, परंतु कल्पपर्यंत आयुष्य असणाऱ्या लोकांच्या पुनरावृत्तीनें युक्त अशा ब्रह्मलोकाच्या प्राप्तीपेक्षांहि, अल्प आयुष्य असणाऱ्या मनुष्यांना भरतखंडभूमिरूप स्थानाची प्राप्ति होणें हें श्रेष्ठ आहे. कारण, विचारी पुरुष, तेथील क्षणभंगुर अशाहि देहानें क्षणामध्यें सर्व कर्माचें ईश्वराचेठिकाणीं समर्पण करून हरीच्या पुनरावृत्तिरहित अभयस्थानास जाऊन पोंचतात ॥ २३ ॥ ह्मणून ज्याठिकाणीं भगवत्कथामृताच्या नद्या नाहींत, व जेथें भगवत्कथावर्णन करणारे भगवद्भक्त नाहींत

विनैव हरिरेषां प्रसन्नोऽभूत् । एवंभूतस्य पुण्यस्य दुष्करत्वात् । भारताजिरे भारतांगणे नः केवलं स्पृहैव यत्र तन्मुकुंदसेवोपयोगि नृषु जन्म यैर्लब्धम् ॥ २१ ॥ स्पृहामेवाहुः । किमित्यादिसप्तभिः । दुष्करैः क्रत्वादिभिर्नः फल्गुना तुच्छेन द्युजयेन स्वर्गप्राप्त्या किं न किंचित्फलम् । कुतः । यत्र नारायणपादपंकजस्मृतिर्नास्ति । प्रत्युतातिशयितादिंद्रियाणामुत्सवाद्भोगात्प्रमुष्टाऽभूत ॥ २२ ॥ क्षणमल्पमेवायुर्येषाम् । वरत्वे हेतुः । मर्त्येनापि देहेन क्षणेनैव कालेन कृतं कर्म संन्यस्य हरेः पदं सम्यग्यांति ॥ २३ ॥

किं दुष्करैर्नः क्रतुभिस्तपोव्रतैर्दानादिभिर्वा द्युजयेन फल्गुना ॥ न यत्र नारायणपादपंकजस्मृतिः प्रमुष्टातिशयेंद्रियोत्सवात् ॥ २२ ॥
कल्पायुषां स्थानजयात्पुनर्भवात्क्षणायुषां भारत भूजयो वरम् ॥ क्षणेन मर्त्येन कृतं मनस्विनः संन्यस्य संयांत्यभयं पदं हरेः
॥ २३ ॥ न यत्र वैकुंठकथासुधापगा न साधवो भागवतास्तदाश्रयाः ॥ न यत्र यज्ञेशमखा महोत्सवाः सुरेशलोकोऽपि न वै स
सेव्यताम् ॥ २४ ॥ प्राप्ता नृजातिं त्विह ये च जंतवो ज्ञानक्रियाद्रव्यकलापसंभृताम् ॥ न वै यतेरन्नपुनर्भवाय ते भूयो वनौका
इव यांति बंधनम् ॥ २५ ॥ यैः श्रद्धया बर्हिषि भागशो हविर्निरुप्तमिष्टं विधिमंत्रवस्तुतः ॥ एकः पृथङ्नामभिराहुतो मुदा गृह्णाति
पूर्णः स्वयमाशिषां प्रभुः ॥ २६ ॥

अतो यत्र वैकुंठकथामृतनद्यो न संति तदाश्रयाः कथापगाश्रयाः महांतो नृत्याद्युत्सवा येषु तादृशा यज्ञेशस्य मखाश्च पूजाः स सुरेशस्य ब्रह्मणोऽपि लोको न सेव्यताम् ॥२४॥ अमुमुक्षून्नरान्निंदति । प्राप्ता इति । ज्ञानं च तदर्थाः क्रियाश्च तदर्थानि द्रव्याणि च तेषां कलापेन संभृतां पूर्णाम् । अपुनर्भवाय मोक्षाय वनौका इव वनौकसः पक्षिणो यथा लुब्धकान्मुक्ता अपि पुनर्यदि तस्मिन्नेव वृक्षे प्रमत्ता विहरंति तर्हि यथा बध्यंते तद्वत् ॥ २५ ॥ अहो भारतवासिनां भाग्यमित्याहुः । यैरिति । अग्नये जुष्टं निर्वपामि इंद्राय जुष्टं निर्वपा-

---

आणि येथें मोठ्या गीतनृत्यादिक उत्साहांनीं युक्त असे भगवंताचे पूजाप्रकार नाहींत, तो ब्रह्मलोक जरी असेल तरी त्याचा सत्पुरुषांनीं आश्रय करूं नये ॥ २४ ॥ ज्ञानेंद्रियें, कर्मेंद्रियें, पंचमहाभूतें यांच्या कौशल्यानें परिपूर्ण अशा मनुष्यजन्माला या भरतखंडांत प्राप्त झालेले जे प्राणी आहेत त्यांनीं, पुनः मृत्यु न यावा यासाठीं जर प्रयत्न केला नाहीं तर ते पुन्हा जसे वनांत राहणारे पक्षी, पारध्याच्या हातून एकवेळ सुटले असतांहि, फळांच्या लोभानें त्याच वृक्षावर बेसावधपणें फिरूं लागले ह्मणजे पुन्हां बंधन पावतात त्याप्रमाणें बंधन पावतात ॥ २५ ॥ कायहो भरतखंडांतील लोकांचें भाग्य हें ? अहो ! ज्या भरतखंडांतील मनुष्यांनीं यज्ञामध्यें श्रद्धापूर्वक निरनिराळ्या इंद्र, अग्नि इत्यादिक भिन्नभिन्न नांवांनीं बोलावलेला, सर्व ऐश्वर्यें देणारा, एक, वस्तुतः परिपूर्ण असा हरि, आनंदानें तेथें येऊन विधि, मंत्र व द्रव्यें, यांच्या योगानें देवतांच्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

उद्देशानें दिलेलें व ' हें इंद्राला ' ' हें अग्नीला ' इत्यादि देवांना निरनिराळा निर्वाप केलेल्या चरुपुरोडाशादिक द्रव्याचा 'हें माझें आहे' अशा बुद्धीनें स्वीकार करितो ॥ २६ ॥ आतां निष्काम भक्तच कृतार्थ आहेत असें सांगतात- सकाम भक्तांनींहि प्रार्थना केलेला हरि, त्यांना मागितलेलें फळ देतो हें खरें आहे तथापि तो त्यांना परमार्थ देणारा होत नाहीं. कारण, दिलेल्या फळाचा भोग झाला ह्मणजे पुन्हां त्यांना फळ मागण्याची, इच्छा होत्ये, आणि इच्छा न करणाऱ्या भक्तांना तर तो भगवान्, सर्व इच्छांची निवृत्ति करणाऱ्या आपल्या चरणपल्लवाला आपण होऊन देतो ॥ २७ ॥ यास्तव जर आतां या वेळीं आमचें चांगल्या यजनाचें, चांगल्या अध्ययनाचें अथवा दुसऱ्या कोणत्याहि चांगल्या कर्माचें, भोगलेल्या स्वर्गसुखाहून अवशेष पुण्य कांहीं राहिलें असेल तर त्याच्या योगानें भरतखंडामध्यें आह्मांला, हरीच

मीत्येवं भागशो निरुप्तं पृथक्कृतम्। कथम् । विधिना प्रकारेण मंत्रेण च वस्तुतश्चरुपुरोडाशादिभेदेन चेष्टं देवतामुद्दिश्य त्यक्तं निरुप्तं च ममेदमिति स्वीकृत्य त्यागानंतरमश्नातीत्यर्थः । पृथगिंद्रादीनामभिराहुत आहूतः आशिषां प्रभुः स्वयं पूर्णोऽपि हरिः ॥ २६ ॥ तत्रापि निष्कामाः कृतार्था इत्याहुः। सत्यमिति प्रार्थितः सन्नर्थितं ददातीति सत्यं तथापि परमार्थदो न भवत्येव । यद्यस्माद्यतो दत्तादनंतरं पुनरप्यर्थिता भवति । ननु नार्थितश्चेत्किमपि न दद्यादित्याशंक्याहुः । अनिच्छतां निष्कामानां तु इच्छानां पिधान-

सत्यं दिशत्यर्थितमर्थितो नृणां नैवार्थदो यत्पुनरर्थिता यतः ॥ स्वयं विधत्ते भजतामनिच्छतामिच्छापिधानं निजपादपल्लवम् ॥२७॥
यद्यत्र नः स्वर्गसुखावशेषितं स्विष्टस्य सूक्तस्य कृतस्य शोभनम् ॥ तेनाजनाभे स्मृतिमज्जन्म नः स्याद्वर्षे हरिर्यद्भजतां शं तनोति
॥ २८ ॥ श्रीशुक उवाच ॥ जंबूद्वीपस्य च राजन्नुपद्वीपानष्टौ हैक उपदिशंति सगरात्मजैरश्वान्वेषण इमां महीं परितो निखनद्भि-
रुपकल्पितान् ॥ २९ ॥ तद्यथा स्वर्णप्रस्थश्चंद्रशुक्ल आवर्तनो रमणको मंदरहरिणः पांजचन्यः सिंहलो लंकेति ॥ ३० ॥ एवं तव
भारतोत्तम जंबूद्वीपवर्षविभागो यथोपदेशमुपवर्णित इति ॥ ३१ ॥ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे पंचमस्कंधे जंबूद्वीपवर्णनं नाम
एकोनविंशतितमोऽध्यायः ॥ १९ ॥

माच्छादकं सर्वकामपरिपूरकं निजपादपल्लवं स्वयमेव संपादयति ॥ २७ ॥ स्विष्टस्य सम्यग्यजनस्य । सूक्तस्य प्रवचनस्य । कृतस्यान्यस्यापि कर्मणः । स्वर्गसुखादुपभुक्तादवशेषितं यदि किंचिदस्ति तेनाजनाभे वर्षे नोऽस्माकं जन्म स्यात् । कीदृशम् । स्मृतिमत् हरिरेव सेव्य इत्यनुसंधानयुक्तम् । यतो हरिर्भजतां शं सुखं तनोति ॥ २८ ॥ ॥ २९ ॥ ३० ॥ ३१ ॥ इति पंचमे टीकायामेकोनविंशोऽध्यायः ॥ १९ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

सेवन करण्यास योग्य आहे अशा अनुसंधनानें युक्त जन्म प्राप्त होवो. कारण, तेथें हरि, भक्तांना स्वानुभवरूप सुख देतो ॥ २८ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला- हेराजन्, पूर्वीं सगरराजाच्या पुत्रांनीं घोड्याचा शोध करित असतांना ही पृथीवी सभोंवार खणली, त्या वेळीं जंबूद्वीपाचे दुसरे आठ विभाग झाले आहेत त्यांनाच तीं जंबूद्वीपाचीं आठ उपद्वीपें आहेत असें कोणी ह्मणतात ॥ २९ ॥ त्यांचीं नांवें- स्वर्णप्रस्थ, चंद्रशुक्ल, आवर्तन, रमणक, मंदरहरिण, पांचजन्य, सिंहल आणि लंका हीं होत ॥ ३० ॥ हे भरतकुलश्रेष्ठा, याप्रमाणें तुला जंबूद्वीपाच्या खंडांचा विभाग मला माहित असल्याप्रमाणें वर्णन केला आहे ॥ ३१ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील पं-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

चमस्कंधामध्यें जंबूद्वीपवर्णननामक हा एकुणिसावा अध्याय समाप्त झाला ॥ १९ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां या विसाव्या अध्यायामध्यें समुद्रांसहवर्तमान प्लक्षादिक सहा द्वीपांची स्थिति आणि आंतल्या व बाहेरच्या प्रमाणांसहवर्तमान लोकालोकपर्वताची स्थिति सांगितली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हेराजा, आतां पुढें प्रमाण लक्षण व रचना यांच्या योगानें प्लक्षादिक द्वीपांच्या खंडविभागांचें वर्णन करितों ॥ १ ॥ जसा मेरुपर्वत, जंबूद्वीपाच्या योगानें परिवेष्टित आहे त्याप्रमाणेंच हें जंबूद्वीपहि क्षारसमुद्रानें परिवेष्टित आहे आणि या द्वीपाचा जितका (लक्षयोजनें) विस्तार आहे तितकाच क्षारसमुद्राचाहि आहे. तसेंच, जसा खंदक बाहेरील उपवनानें वेष्टित असतो त्याप्रमाणें क्षारसमुद्रहि त्याच्यापेक्षां दुप्पट विस्तृत असलेल्या प्लक्षनामक द्वीपानें सभोवतीं वेष्टित आहे. या द्वीपामध्यें प्लक्ष (पायरी) या नांवाचा सुवर्णाचा वृक्ष, द्वीपाचें नांव पाडणारा, जंबुद्वीपांतील जांबळीएवढा ह्मणजे अकराशें योजनें उंच व अकराशें योजनें विस्ताराचा असून तो मुळांत शंभरयोजनें घेराचा आहे. तेथें सप्तजिह्व

विंशे प्लक्षादि षड्द्वीपस्थितिमाह सहार्णवैः ॥ लोकालोकस्थितिश्चांतर्बहिर्भागादिमानतः ॥ १ ॥ १ ॥ तावता लक्षविस्तारेण परिक्षिप्तः परिवेष्टितः । उपास्ते तिष्ठति । आकलय्य समर्प्य ॥ २ ॥ अभिज्ञाताः प्रसिद्धाः सप्तैव । अन्ये च पर्वता नद्यश्च सहस्रशः संतीत्यर्थः । मानसोत्तरस्य मंडलाकारत्वोक्तेरेतेषु प्लक्षादिपंचद्वीपे-

॥ श्रीशुक उवाच ॥ अतः परं प्लक्षादीनां प्रमाणलक्षणसंस्थानतो वर्षविभाग उपवर्ण्यते ॥ १ ॥ जंबूद्वीपोऽयं यावत्प्रमाणविस्तारस्तावता क्षारोदधिना परिवेष्टितो यथा मेरुर्जंब्वाख्येन लवणोदधिरपि ततो द्विगुणविशालेन प्लक्षाख्येन परिक्षिप्तो यथा परिखा बाह्योपवनेन प्लक्षो जंबूप्रमाणो द्वीपाख्याकरो हिरण्मय उत्थितो यत्राग्निरुपास्ते सप्तजिह्वस्तस्याधिपतिः प्रियव्रतात्मज इध्मजिह्वः स्वं द्वीपं सप्तवर्षाणि विभज्य सप्तवर्षनामभ्य आत्मजेभ्य आकलय्य स्वयमात्मयोगेनोपरराम ॥ २ ॥ शिवं यवयसं सुभद्रं शांतं क्षेममममृतमभयमिति वर्षाणि तेषु गिरयो नद्यश्च सप्तैवाभिज्ञाताः ॥ ३ ॥ मणिकूटो वज्रकूट इंद्रसेनो ज्योतिष्मान्सुपर्णो हिरण्यष्ठीवो मेघमाल इति सेतुशैलाः अरुणा नृम्णाऽऽगिरसी सावित्री सुप्रभाता ऋतंभरा सत्यंभरा इति महानद्यः यासां जलोपस्पर्शनविधूतरजस्तमसो हंसपतंगोर्ध्वायनसत्यांगसंज्ञाश्चत्वारो वर्णाः सहस्रायुषो विबुधोपमसंदर्शनप्रजननाः स्वर्गद्वारं त्रय्या विद्यया भगवंतं त्रयीमयं सूर्यमात्मानं यजंते ॥ ४ ॥

षु वर्षाद्रयस्तिर्यग्रेखाकारा उभयतोऽब्धिस्पृश इति गम्यते अन्यथा सप्तभिः सप्तवर्षविभागासंभवात् । वैष्णवे वर्षाणां पूर्वादिक्रमोक्तेश्च ॥ ३ ॥ जलोपस्पर्शनेन विधूतं रज-

या नावांचा अग्नि राहतो. त्या द्वीपाचा अधिपति प्रियव्रताचा पुत्र इध्मजिह्व होता. त्यानें त्या आपल्या द्वीपाचीं सात खंडें करून त्या खंडांचींच नावें असलेल्या आपल्या सात पुत्रांना देऊन आपण आत्मयोगसाधनानें उपराम पावला ॥ २ ॥ त्या खंडाचीं व पुत्रांचीं नांवें– शिव, यवयस, सुभद्र, शांत, क्षेम, अमृत व अभय अशीं होत. त्यामध्यें पर्वत आणि नद्याहि सातसातच प्रसिद्ध आहेत ॥ ३ ॥ मणिकूट, वज्रकूट, इंद्रसेन, ज्योतिष्मान् , सुपर्ण, हिरण्यष्ठीव आणि मेघमाल, हे त्या खंडांचे विभाग पाडणारे सात पर्वत होत. तशाच प्रत्येक खंडांत एक एक अशा अरुणा, नृम्णा, आंगिरसी, सावित्री, सुप्रभाता, ऋतंभरा, आणि सत्यंभरा ह्या सात महानद्या आहेत आणि त्या नद्यांच्या स्नानपानादिकेंकरून ज्यांचा रजोगुण व तमोगुण नाहींसा झाला आहे, ज्यांना आयुष्य हजार वर्षें आहे आणि ज्यांचें रूप व अपत्योत्पत्ति हीं देवांप्रमाणें सुंदर आहेत असे हंस, पतंग, ऊर्ध्वायन आणि सत्यांग ह्या नांवांचे चार वर्ण, वेदत्रयात्मक विद्येच्या योगानें, स्वर्गाचें केवळ द्वारच अशा वेदत्रयप्रतिपाद्य, षड्गुणैश्वर्यसंपन्न,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सर्वांतर्यामी सूर्यनारायणाचें पूजन करितात ॥ ४ ॥ तें असें कीं– जो सत्याचा (प्रचारांत असलेल्या धर्माचा), ऋताचा (प्रचारांत आणावयाच्या धर्माचा), वेदाचा, शुभफलाचा (मोक्षाचा) आणि अशुभफलाचा (वारंवार जन्ममरणादिरूप संसाराचा) नियंता असून पुराणपुरुष विष्णूचें स्वरूप आहे, त्या सूर्यनारायणाला आह्मी शरण जातों ॥ ५ ॥ प्लक्षादिक पांचही द्वीपांमध्यें असणाऱ्या सर्व पुरुषांना आयुष्य, इंद्रियें, इंद्रियांचें पटुत्व, कांति, सहनशीलता, बळ, बुद्धि आणि पराक्रम यांची स्वाभाविक सिद्धि, सर्वांना सारखीच असत्ये ॥ ६ ॥ जसें प्लक्षद्वीप, आपल्याएवढ्या दोनलक्षयोजनें विस्ताराच्या उसांच्या रसाच्या समुद्रानें वेष्टित आहे तसेंच त्याच्या दुप्पट चार-लक्ष योजनें विस्ताराचें शाल्मलिद्वीपहि आपल्या इतक्या विस्ताराच्या सुरासमुद्रानें वेष्टित असून तें सर्वबाजूंनीं शोभत आहे ॥ ७ ॥ त्या द्वीपामध्यें वर सांगितलेल्या पिंपरीच्या वृक्षाएवढी ह्मणजे अकराशें योजनें उंच व अकराशें योजनें विस्ताराची आणि शंभर योजनें मुळांत घेर असलेली शाल्मली (सांवर) आहे तिच्यावर आपल्या

स्तमश्च येषाम् । हंसादयो ब्राह्मणादिस्थानीयाः । विबुधोपमं संदर्शनं क्लमस्वेदादिरहितं रूपं प्रजननमपत्योत्पादनं च येषाम् ॥ ४ ॥ विगीता अपि द्वीपमंत्रा व्याख्यायंते । प्रत्नस्य पुराणपुरुषस्य विष्णोर्यद्रूपं तं सूर्यमीमहि शरणं व्रजेम । कथंभूतम् । सत्यादीनामात्मानमधिष्ठातारम् । तत्र सत्यमनुष्ठीयमानो धर्मः । ऋतं प्रमीयमाणो धर्मः । ब्रह्म-

प्रत्नस्य विष्णो रूपं यत्सत्यस्यर्तस्य ब्रह्मणः॥ अमृतस्य च मृत्योश्च सूर्यमात्मानमीमहीति ॥ ५॥ प्लक्षादिषु पंचसु पुरुषाणामायुरिंद्रियमोजः सहो बलं बुद्धिर्विक्रम इति च सर्वेषामौत्पत्तिकी सिद्धिरविशेषेण वर्तते ॥ ६ ॥ प्लक्षः स्वसमानेनेक्षुरसोदेनावृतो यथातथा द्वीपोऽपि शाल्मलो द्विगुणविशालः समानेन सुरोदेनावृतः परिवृंक्ते ॥ ७ ॥ यत्र ह वै शाल्मली प्लक्षायामा यस्यां वाव किल निलयमाहुर्भगवतश्छंदःस्तुतः पतत्रिराजस्य सा द्वीपहूतये उपलक्ष्यते ॥ ८ ॥ तद्द्वीपाधिपतिः प्रियव्रतात्मजो यज्ञबाहुः स्वसुतेभ्यः सप्तभ्यस्तन्नामानि सप्त वर्षाणि व्यभजत्सुरोचनं सौमनस्यं रमणकं देववर्षं पारिभद्रमाप्यायनमविज्ञातमिति ॥ ९ ॥ तेषु वर्षाद्रयो नद्यश्च सप्तैवाभिज्ञाताः स्वरसः शतशृंगो वामदेवः कुंदो मुकुंदः पुष्पवर्षः सहस्रश्रुतिरिति अनुमतिः सिनीवाली सरस्वती कुहू रजनी नंदा राकेति ॥ १० ॥ तद्वर्षपुरुषाः श्रुतधरवीर्यधरवसुंधरेषंधरसंज्ञा भगवंतं वेदमयं सोममात्मानं वेदेन यजंते ॥ ११ ॥

णस्तद्बोधकस्य वेदस्य । अमृतस्य शुभफलस्य । मृत्योरशुभफलस्य ॥ ५ ॥ ६ ॥ ७ ॥ सुपर्णोसि गरुत्मान् त्रिवृत्तेशिर इत्यादिश्रुतेश्छंदोभिः स्वावयवभूतैः श्रीविष्णुं स्तौतीति छंदःस्तुत् तस्य गरुडस्य । निलयनं स्थानम् । सा शाल्मली । द्वीपस्य हूतये व्यपदेशाय ॥ ८ ॥ ९ ॥ १० ॥ ११ ॥

अवयवभूत वेदांनीं (पक्षांनीं) ईश्वराची स्तुति करणाऱ्या भगवान् गरुडाचें स्थान (घरटें) आहे. ती त्या द्वीपाला शाल्मलद्वीप असें नांव पाडण्यास कारण झाली आहे ॥ ८ ॥ त्या द्वीपाचा अधिपति प्रियव्रताचा पुत्र यज्ञबाहु असून, त्यानें आपल्या सात पुत्रांना त्यांच्या नांवांचींच द्वीपाचीं सात खंडें करून वांटून दिलीं. त्यांचीं नांवें-सुरोचन, सौमनस्य, रमणक, देववर्ष, पारिभद्र, आप्यायन आणि अविज्ञात अशीं आहेत ॥ ९ ॥ त्या खंडांमध्यें खंडांच्या मर्यादा पाडणारे पर्वत व नद्या सातसातच प्रसिद्ध आहेत. स्वरस, शतशृंग, वामदेव, कुंद, मुकुंद, पुष्पवर्ण आणि सहस्रश्रुति हे सात पर्वत आणि अनुमती सिनीवाली, सरस्वती, कुहू, रजनी, नंदा आणि राका ह्या सात नद्या आहेत ॥ १० ॥ त्या खंडांत राहणारे पुरुष– श्रुतधर, वीर्यधर, वसुंधर, आणि इषंधर या नांवांचे चार वर्ण असून ते, वेदमय आत्मरूप भगवान् चंद्राची

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वेदमंत्रांच्या योगेंकरून आराधना करितात ॥ ११ ॥ ती अशी कीं,– जो कृष्णपक्षीं आणि शुक्लपक्षीं पितरांना देवांना तसाच सर्वप्रजांना अन्नाचा विभाग करित असतो, तो सोम आमचा राजा (पालन करणारा) असो ॥ १२ ॥ याप्रमाणें सुरासमुद्राच्या बाहेर आठलक्ष योजनें विस्तृत असें कुशद्वीप असून तें पूर्वीच्या द्वीपाप्रमाणेंच आठलक्ष योजनें विस्तृत असलेल्या घृतसमुद्रानें वेष्टित आहे, त्याचेठिकाणीं त्या द्वीपाचें नांव पाडणारा, दुसरा अग्निच कीं काय असा प्रकाशमान, परमेश्वरानें रचिलेला एक कुशस्तंब (दर्भाचें बेट) आहे तो आपल्या कोमळशिखांच्या कांतीनें सर्वदिशा प्रकाशित करितो ॥ १३ ॥ हे राजा, त्या द्वीपाचा अधिपति प्रियव्रताचा पुत्र हिरण्यरेतानामक असून त्यानें, आपल्या वसु, वसुदान, दृढरुचि, नाभिगुप्त, स्तुत्यव्रत, विविक्त आणि वामदेव ह्या नांवांच्या सात पुत्रांना आपल्या द्वीपाचे यथायोग्य सात विभाग करून देऊन आपण तप आचरण केलें ॥ १४ ॥ त्यांच्या खंडांमध्येंहि मर्यादापर्वत व नद्या सातसातच प्रसिद्ध आहेत. चक्र, चतुःशृंग, कपिल, चित्रकूट, देवानीक,

स्वगोभिः स्वरश्मिभिः । अंधोऽन्नम् । सोमो नो राजा आस्तु आभिमुख्येन भवतु । ह्रस्वपाठे त्वविवक्षया संध्यभावः ॥ १२ ॥ एवं सुरोदाद्बहिर्घृतोदेनावृतः कुशद्वीप इत्यन्वयः ।

स्वगोभिः पितृदेवेभ्यो विभजन्कृष्णशुक्लयोः ॥ प्रजानां सर्वासां राजांऽधः सोमो न आस्त्विति ॥ १२ ॥ एवं सुरोदाद्बहिस्तद्द्विगुणः समानेनावृतो घृतोदेन यथा पूर्वः कुशद्वीपो यस्मिन्कुशस्तंबो देवकृतस्तद्द्वीपाख्याकरो ज्वलन इवापरः स्वशष्परोचिषा दिशो विराजयति ॥ १३ ॥ तद्द्वीपपतिः प्रैयव्रतो राजन्हिरण्यरेतो नाम स्वं द्वीपं सप्तभ्यः स्वपुत्रेभ्यो यथाभागं विभज्य स्वयं तप आतिष्ठत वसुवसुदानदृढरुचिनाभिगुप्तस्तुत्यव्रतविविक्तवामदेवनामभ्यः ॥ १४ ॥ तेषां वर्षेषु सीमागिरयो नद्यश्चाभिज्ञाताः सप्तसप्तैव चक्रश्चतुःशृंगः कपिलश्चित्रकूटो देवानीक ऊर्ध्वरोमा द्रविण इति रसकुल्या मधुकल्या मित्रविंदा श्रुतविंदा देवगर्भा घृतच्युता मंत्रमालेति ॥ १५ ॥ यासां पयोभिः कुशद्वीपौकसः कुशलकोविदाभियुक्तकुलकसंज्ञा भगवंतं जातवेदसरूपिणं कर्मकौशलेन जयंते ॥ १६ ॥ परस्य ब्रह्मणः साक्षाज्जातवेदोऽसि हव्यवाट् ॥ देवानां पुरुषांगानां यज्ञेन पुरुषं यजेति ॥ १७ ॥ तथा घृतोदाद्बहिः क्रौंचद्वीपो द्विगुणः स्वमानेन क्षीरोदेन परित उपक्लृप्तो वृतो यथा कुशद्वीपो घृतोदेन, यस्मिन्क्रौंचो नाम पर्वतराजो द्वीपनामनिर्वर्तक आस्ते ॥ १८ ॥ योऽसौ गुहप्रहरणोन्मथितनितंबकुंजोऽपि क्षीरोदेनासिच्यमानो भगवता वरुणेनाभिगुप्तो विभयो बभूव ॥ १९ ॥

स्वशष्पाणि स्वकोमलशिखास्तेषां रोचिषा ॥ १३ ॥ १४ ॥ १५ ॥ १६ ॥ हे जातवेदस्त्वं साक्षात्परस्य ब्रह्मणो हरेर्हव्यवाडसि अतो देवानां यज्ञेन पुरुषं हरिमेव यज । अंगानां नाम्ना दत्तमंगिने समर्पयेत्यर्थः ॥ १७ ॥ उपक्लृप्तो वेष्टितः । यथा कुशद्वीपो घृतोदेन वृतः ॥ १८ ॥ गुहस्य कार्तिकेयस्य प्रहरणेनायुधेनोन्मथिता नितंबाः कुंजानि च यस्य ॥ १९ ॥

ऊर्ध्वरोमा व द्रविण हे सात पर्वत आणि रसकुल्या, मधुकुल्या, मित्रविंदा, श्रुतविंदा, वेदगर्भा, घृतच्युता, व मंत्रमाला ह्या सात नद्या होत ॥ १५ ॥ त्यांच्या उदकानें शुद्ध असलेले, कुशल, कोविद, अभियुक्त आणि कुलक या नांवांचे चार वर्ण, अग्निस्वरूपी भगवंताचें यज्ञादिकर्मांच्या कौशल्येंकरून पूजन करितात. तें असें कीं– ॥ १६ ॥ हे अग्ने, तूं साक्षात् परब्रह्मरूपी भगवंताचे हविर्भाग वाहून नेणारा आहेस, यास्तव पुरुषरूपी भगवंताच्या अवयवरूपी देवांच्या यज्ञानें (त्यांना अर्पण केलेल्या हविर्भागानें) त्या पुरुषरूपी भगवंताचेंच यजन कर ॥ १७ ॥ जसा कुशद्वीप घृतसमुद्रानें वेष्टित आहे त्याप्रमाणें त्या घृतसमुद्राच्या बाहेर सोळालक्ष योजनें विस्ताराचा क्रौंचद्वीप सोळालक्ष योजनें विस्तृत अशा क्षीरसमुद्रानें सभोंवार वेष्टन केलेला आहे. त्या द्वीपामध्यें क्रौंचनामक एक महापर्वत त्या द्वीपाचें नांव पाडणारा आहे ॥ १८ ॥ ॥ ५६ ॥
जो पूर्वीं कार्तिकस्वामीच्या शक्तिनामक आयुधानें कटिप्रदेश फुटून गेलेला व वरील लतामंडप उद्ध्वस्त झालेला असून क्षीरसमुद्रानें आपल्या पोटांत घेतल्यामुळें व वरु-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

णानें रक्षण केल्यामुळें निर्भय झाला होता तोच हा क्रौंचपर्वत होय ॥ १९ ॥ त्या क्रौंचद्वीपामध्येंहि त्याचा अधिपति प्रियव्रताचा पुत्र घृतपृष्ठनामक असून त्यानें आपल्या पुत्रांच्या नांवांचीं सात खंडें करून त्यांमध्यें त्या आपल्या सात पुत्रांना प्रजापालनाविषयीं स्थापन करून आपण, ज्ञानसंपन्न होत्साता ज्याची कीर्ति परमकल्याणकारक आहे अशा भक्तांचीं दुःखें हरण करणाऱ्या सर्वांतर्यामी भगवंताच्या चरणारविंदाला शरण गेला ॥ २० ॥ आम, मधुरुह, मेघपृष्ठ, सुधामा, भ्राजिष्ठ, लोहितार्ण आणि वनस्पति हे घृतपृष्ठाचे पुत्र होत. त्यांचे मर्यादापर्वत सात व नद्याहि सातच प्रसिद्ध आहेत. शुक्ल, वर्धमान, भोजन, उपबर्हिण, नंद, नंदन आणि सर्वतोभद्र हे सात पर्वत आणि अभया, अमृतौघा, आर्यका, तीर्थवती, वृत्तिरूपवती, पवित्रवती आणि शुक्ला ह्या सात नद्या आहेत ॥ २१ ॥ त्यांचें निर्मळ व पवित्र उदक सेवन क-

स्वयं भगवान् ज्ञानी । परमकल्याणं यशो यस्य ॥२०॥२१॥ आपोमयमंभोमयम् ॥ २२ ॥ हे आपः पुरुषवीर्या ईश्वराल्लब्धसामर्थ्याः स्थ भवथ अतएव भूर्भुवःस्वस्त्रैलोक्यं पु-

तस्मिन्नपि प्रैयव्रतो घृतपृष्ठो नामाधिपतिः स्वे द्वीपे वर्षाणि सप्त विभज्य तेषु पुत्रनामसु सप्त रिक्थादान्वर्षपान्निवेश्य स्वयं भगवान्भगवतः परमकल्याणयशस आत्मभूतस्य हरेश्चरणारविंदमुपजगाम ॥ २० ॥ आमो मधुरुहो मेघपृष्ठः सुधामा भ्राजिष्ठो लोहितार्णो वनस्पतिरिति घृतपृष्ठसुतास्तेषां वर्षगिरयः सप्तसप्तैव नद्यश्चाभिख्याताः शुक्लो वर्धमानो भोजन उपबर्हिणो नंदो नंदनः सर्वतोभद्र इति अभया अमृतौघा आर्यका तीर्थवती वृत्तिरूपवती पवित्रवती शुक्लेति ॥ २१ ॥ यासामंभः पवित्रममलमुपयुंजानाः पुरुषऋषभद्रविणदेवकसंज्ञा वर्षपुरुषा आपोमयं देवमपां पूर्णेनांजलिना यजंते ॥ २२ ॥ आपः पुरुषवीर्याः स्थः पुनंतीर्भूर्भुवः सुवः ॥ ता नः पुनीतामीवघ्नीः स्पृशतामात्मना भुव इति ॥ २३ ॥ एवं पुरस्तात्क्षीरोदात्परित उपवेशितः शाकद्वीपो द्वात्रिंशल्लक्षयोजनायामः समानेन च दधिमंडोदेन परितो यस्मिन् शाको नाम महीरुहः स्वक्षेत्रव्यपदेशको यस्य ह महासुरभिगंधस्तं द्वीपमनुवासयति ॥ २४ ॥

नंत्यस्ता भवत्यो नोऽस्माकं स्पृशतां स्पर्शनं कुर्वतां भुवः शरीराणि पुनंतु । यत आत्मना स्वरूपेणैवामीवघ्नीः पापहंत्र्यः ॥ २३ ॥ दध्नो मंडं रसः स एवोदकं यस्य । यस्य

रणारे पुरुष, ऋषभ, द्रविण आणि देवक या नांवांचे त्या खंडांतील चार वर्णांचे पुरुष, उदकमय देवाचें उदकानें पूर्ण अशी अंजलि अर्पण करून आराधन करितात ॥ २२ ॥ तें असें कीं,– हे उदका, तुला ईश्वरापासून सामर्थ्य प्राप्त झालेलें असून तूं भूलोक, अंतरिक्षलोक व स्वर्गलोक यांना पवित्र करणारें व स्वरूपानेंच पाप नाश करणारें आहेस तें तूं, आपल्या शरीरानें, तुझें स्नानपान करणाऱ्या आमच्या देहांना पवित्र कर ॥ २३ ॥ याप्रमाणें पुढें क्षीरसमुद्राच्या बाहेर सभोंवार शाकद्वीप आहे, तें बत्तीस लक्ष योजनें विस्तृत असून तेवढ्याच विस्तारानें, युक्त असलेल्या दह्यांच्या मठ्ठाच्या समुद्रानें सभोंवार वेष्टित आहे. त्याचेठिकाणीं द्वीपाचें नांव पाडणारा, ज्याचीं पानें आंतल्याबाजूनें खरखरीत व बाहेरच्या बाजूनें गुळगुळीत असतात असा एक शाक या नांवांचा वृक्ष आहे. त्याच्या महासुगंधानें युक्त असलेला वास त्या द्वीपाला सुगंधयुक्त करित असतो ॥ २४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्या द्वीपाचा अधिपतीहि प्रियव्रताचा पुत्र मेधातिथि नांवाचा होता त्यानेंहि त्या द्वीपाचीं आपल्या सात पुत्रांच्या नांवांनीं प्रसिद्ध अशीं सात खंडें करून त्यांमध्यें पुरोजव, मनोजव, पवमान, धूम्रानीक, चित्ररेफ, बहुरूप आणि विश्वधार ह्या नांवांच्या आपल्या पुत्रांना अधिपति नेमून, आपण अनंत भगवंताचे- ठिकाणीं आपलें मन लावून तो तपोवनांत निघून गेला ॥ २५ ॥ ह्या खंडांमध्येंहि ईशान, उरुशृंग, बलभद्र, शतकेसर, सहस्रस्रोत, देवपाल आणि महानस असे सात खंडमर्यादापर्वत असून अनघा, आयुर्दा, उभयस्पृष्टि, अपराजिता, पंचपदी, सहस्रस्रुति आणि निजधृति अशा नद्याही सातच आहेत ॥ २६ ॥ त्या खंडांतील– ऋतव्रत, सत्यव्रत, दानव्रत आणि अनुव्रत ह्या नांवांचे चारवर्णांचे पुरुष, प्राणायामाच्या योगानें आपला रजोगुण व तमोगुण दूर करीत होत्साते परम समाधीच्या,

---

पर्णान्यंतः खरस्पर्शानि बहिर्मृदुस्पर्शानि स शाको नाम वृक्षः ॥ २४ ॥ २५ ॥ २६ ॥ २७ ॥ आत्मकेतुभिः प्राणादिवृत्तिभिः ॥ २८ ॥ ज्वलनशिखावदमलानां कनकपत्रा-

तस्यापि प्रैयव्रत एवाधिपतिर्नाम्ना मेधातिथिः सोऽपि विभज्य सप्त वर्षाणि पुत्रनामानि तेषु स्वात्मजान्पुरोजवमनोजवपवमानधू- म्रानीकचित्ररेफबहुरूपविश्वधारसंज्ञान्निधाप्याधिपतीन्स्वयं भगवत्यनंत आवेशितमतिस्तपोवनं प्रविवेश ॥ २५ ॥ एतेषां वर्षमर्यादा- गिरयो नद्यश्च सप्तसप्तैव ईशान उरुशृंगो बलभद्रः शतकेसरः सहस्रस्रोतो देवपालो महानस इति अनघाऽऽयुर्दा उभयस्पृष्टिरपराजिता पंचपदी सहस्रस्रुतिर्निजधृतिरिति ॥ २६ ॥ तद्वर्षपुरुषा ऋतव्रतसत्यव्रतदानव्रतानुव्रतनामानो भगवंतं वाय्वात्मकं प्राणायामविधु- तरजस्तमसः परमसमाधिना यजंते ॥ २७ ॥ अंतः प्रविश्य भूतानि यो बिभर्त्यात्मकेतुभिः ॥ अंतर्यामीश्वरः साक्षात्पातु नो यद्वशे स्फुटम् ॥ २८ ॥ एवमेव दधिमंडोदात्परतः पुष्करद्वीपस्ततो द्विगुणायामः समंतत उपकल्पितः समानेन स्वादूदकेन समुद्रेण ब- हिरावृतो यस्मिन् बृहत्पुष्करं ज्वलनशिखामलकनकपत्रायुतायुतं भगवतः कमलासनस्याध्यासनं परिकल्पितम् ॥ २९ ॥ तद्द्वीप- मध्ये मानसोत्तरनामैक एवार्वाचीनपराचीनवर्षयोर्मर्यादाचलोऽयुतयोजनोच्छ्रायायामो यत्र तु चतसृषु दिक्षु चत्वारि पुराणि लोकपालानामिंद्रादीनां यदुपरिष्टात्सूर्यरथस्य मेरुं परिभ्रमतः संवत्सरात्मकं चक्रं देवानामहोरात्राभ्यां परिभ्रमति ॥ ३० ॥

णामयुतानामयुतानि यस्य तत् ॥ २९ ॥ देवानामहोरात्राभ्यामुत्तरदक्षिणायनाभ्यामित्यर्थः ॥ ३० ॥

योगानें वायुरूपी भगवंताचें आराधन करितात ॥ २७ ॥ जो आंत प्रवेश करून स्थावरजंगमात्मक प्राण्यांचें प्राणादिक वृत्तींच्या योगेंकरून रक्षण करितो आणि ज्याच्या स्वाधीन हें सर्व जग आहे तो साक्षात् अंतर्यामी ईश्वर, आमचें रक्षण करो ॥ २८ ॥ याप्रमाणेंच दह्यांच्या मठ्याच्या समुद्राच्या बाहेर सभोंवतीं चौसष्ट लक्ष योजनें विस्तृत असें पुष्करद्वीप आहे तें तितक्याच विस्ताराच्या गोडपाण्याच्या समुद्रानें बाहेरून वेष्टिलेलें आहे. त्याचेठिकाणीं अग्नीच्या ज्वालांप्रमाणें निर्मळ अशा कोट्यावधि सुवर्णपत्रांनीं युक्त असें एक भगवान् ब्रह्मदेवाचें आसनभूत मोठें पुष्कर (कमळ) रचिलेलें आहे, त्यावरून ह्या द्वीपाचें पुष्कर असें नांव पडलें आहे ॥ २९ ॥ त्या द्वीपामध्यें मानसोत्तर नांवाचा दहाहजार योजनें उंचीचा व विस्ताराचा द्वीपासारखा मंडळाकार पूर्वोत्तर खंडाचा एकच मर्यादापर्वत आहे; त्याच्यावर पूर्व, दक्षिण, पश्चिम व उत्तर ह्या चार दिशांकडे इंद्रादि चार लोकपालांच्या चार नगऱ्या आहेत. तसेंच त्या पर्वतावरून मेरूच्या सभोंवार फिरणाऱ्या सूर्यरथाचें संवत्सरात्मक चक्र देवांच्या अ-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होरात्रांनीं (उत्तरायणदक्षिणायनांनीं) फिरत असतें ॥ ३० ॥ त्या द्वीपाचाहि अधिपति प्रियव्रताचा पुत्र वीतिहोत्रनामक असून तोहि रमणक व धातकि या नांवां-च्या आपल्या दोन पुत्रांना खंडांचे अधिपति नेमून, आपण आपल्या वडीलभावांप्रमाणें ईश्वराराधनामध्यें तत्पर होऊन राहिला आहे ॥ ३१ ॥ त्या खंडांतील पुरुष ब्रह्मसालोक्यादिकांना साधनभूत अशा कर्मांनें ब्रह्मदेवस्वरूपी भगवंताचें आराधन करितात आणि असें स्तवन करितात कीं,– ॥ ३२ ॥ कर्मफलरूप, ब्रह्मप्राप्ति करून देणाऱ्या ब्रह्माचेचठिकाणीं निष्ठा असणाऱ्या, अद्वितीय आणि शांत अशा ज्या स्वरूपाचें लोक पूजन करितात त्या भगवंताला आमचा नमस्कार असो ॥ ३३ ॥ श्रीशु-

---

॥ ३१ ॥ ब्रह्मरूपिणं कमलासनमूर्तिम् । सकर्मकेन ब्रह्मसालोक्यादिसाधनेन ॥ ३२ ॥ कर्ममयं कर्मफलरूपम् । ब्रह्म लिंग्यते यस्मात् । एकस्मिन्नेव परमेश्वरेंऽतो निष्ठा यस्य तदत एव वस्तुतोऽद्वैतम् ॥ ३३ ॥ ततः शुद्धोदात्परस्तात् । लोकः सूर्याद्यालोकवान्देशः अलोकस्तद्रहितस्तयोरंतराले मध्ये । तयोर्विभागार्थमित्यर्थः ॥ ३४ ॥ ततः परस्तादित्युक्तं तदेव कियतांतरेणेत्यपेक्षायां तदंतर्वर्तिनीं भूमिमाह । यावन्मानसोत्तरमेर्वोरंतरं सार्धसप्तलक्षोत्तरसार्धकोटिपरिमितं तावती भूः शुद्धोदात्पराऽस्ति तत्र च प्राणिनोऽपि संति ततः कांचनीभूमिरन्याऽस्तीत्यर्थः । सा चैकोनचत्वारिंशल्लक्षोत्तरकोट्यष्टकपरिमिता ज्ञेया, एवं हि सति मेरुलोकालोकयोरंतरं सार्धद्वादशकोटिपरिमितं

तद्वीपस्याप्यधिपतिः प्रैयव्रतो वीतिहोत्रो नामैतस्यात्मजौ रमणकधातकिनामानौ वर्षपती नियुज्य स स्वयं पूर्वजवद्भगवत्कर्मशील एवास्ते ॥ ३१ ॥ तद्वर्षपुरुषा भगवंतं ब्रह्मरूपिणं सकर्मकेन कर्मणाऽऽराधयंतीदं चोदाहरंति ॥ ३२ ॥ यत्तत्कर्ममयं लिंगं ब्रह्मलिंगं जनोऽर्चयेत् ॥ एकांतमद्वयं शांतं तस्मै भगवते नम इति ॥ ३३ ॥ ऋषिरुवाच ॥ ततः परस्ताल्लोकालोकनामाचलो लोकालोक-योरंतराले परित उपक्षिप्तः ॥ ३४ ॥ यावन्मानसोत्तरमेर्वोरंतरं तावती भूमिः कांचन्यन्यादर्शतलोपमा यस्यां प्रहितः पदार्थो न कथंचित्पुनः प्रत्युपलभ्यते तस्मात्सर्वसत्वपरिहृताऽऽसीत् ॥ ३५ ॥ लोकालोक इति समाख्या यदनेनाचलेन लोकालोकस्यांत-र्वर्तिनाऽवस्थाप्यते ॥ ३६ ॥

वक्ष्यमाणमुपपन्नं भवति । एतदेव शैवतंत्रेषूक्तम् । कोटिद्वयं त्रिपंचाशल्लक्षाणि च ततःपरम् ॥ पंचाशच्च सहस्राणि सप्तद्वीपाः ससागराः ॥ ततो हेममयी भूमिर्दशकोट्यो वरानने ॥ देवानां क्रीडनार्थाय लोकालोकस्ततः परमिति ॥ अत्र च दशकोटित्वं पूर्वोक्तभूम्या सह द्रष्टव्यम् । सर्वसत्वपरिहृतेति देवव्यतिरेकेणेति विज्ञेयं देवानां क्रीडनार्था-येत्युक्तत्वात् ॥ ३५ ॥ ३६ ॥

काचार्य ह्मणाला– हे परीक्षित् राजा, त्या गोडपाण्याच्या समुद्राच्या पलिकडे, सभोंवार सूर्यप्रकाशयुक्त व सूर्यप्रकाशरहित असलेल्या दोन्हीं प्रदेशांचा विभाग करण्या-करितां त्या दोन्ही प्रदेशांमध्यें लोकालोकनामक पर्वत ईश्वरानें स्थापन केला आहे ॥ ३४ ॥ हेराजा, मानसोत्तरपर्वत व मेरुपर्वत यांच्यामध्यें जितकें अंतर (एककोटि सत्तावन लक्ष पन्नास हजार योजनें आहे) तितकी भूमि शुद्धोदसमुद्रापलिकडे आहे· हिच्यावर प्राणी राहतात; पण हिच्या पलिकडे लोकालोकपर्वताजवळ दुसरी आठ कोटि एकुण चाळीस लक्ष योजनें आरशासारखी गुळगुळीत व चकचकीत भूमि आहे· तिच्यावर मात्र पडलेला पदार्थ, पुन्हा कधींहि प्राप्त होत नाहीं· कारण, ती देवांवां-चून इतर सर्व प्राण्यांचा प्रवेश होण्यास अशक्य आहे ॥ ३५ ॥ लोकमय प्रदेश आणि अलोकमय प्रदेश ह्या दोन्हींचा सांधा जेथें मिळाला आहे तेथें हा पर्वत आहे ह्मणून

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

याला लोकालोक असें नांव पडलें आहे ॥ ३६ ॥ तो पर्वत त्रैलोक्याच्या बाहेर सभोंवतीं परमेश्वरानें स्थापन केला आहे. त्याची उंची व विस्तार इतका आहे कीं, सूर्यापासून ध्रुवापर्यंत सर्व ज्योतिर्गणांचे, 'त्या पर्वताच्या आलीकडच्या त्रैलोक्याला प्रकाश करणारे' किरण, कधींहि त्या पर्वताच्या पलिकडे जाण्यास समर्थ होत नाहींत ॥ ३७ ॥ याप्रमाणें परिमाणें, लक्षणें व रचना ह्यांसहवर्तमान व्यासादि कवींनीं विचारपूर्वक निश्चित केलेला लोकविस्तार इतकाच आहे ह्मणजे तो लोकविस्तार पंनास कोटि योजनें आहे. त्या गणलेल्या भूगोलाचा चवथा भाग ह्मणजे साडेबाराकोटि योजनें हा लोकालोक पर्वत आहे ॥ ३८ ॥ त्या पर्वतावर चार दिशांकडे सर्वजगाचा

लोकत्रयस्यांते परितो मर्यादारूपो विहितः । यस्मात्प्रतिबंधकात् । सूर्य आदिर्येषाम् । ध्रुवोऽपवर्गोंऽतो येषाम् । आवितन्वानाः समंतात्प्रकाशयंतः परतो गंतुं न शक्नुवंति ताव-दुन्नहनमुत्सेधस्तदनुरूप आयामश्च विस्तारो यस्य । ध्रुवादप्युच्छ्रितत्वात्त्रिलोकीमर्यादाभूत इत्यर्थः ॥ ३७ ॥ सोऽयं तु लोकालोकाचलस्तुरीयभागश्चतुर्थोंशः सार्धद्वादशकोट्य: मेरोरेकत इति द्रष्टव्यम् ॥ ३८ ॥ आशासु दिक्षु येऽधिनिवेशितास्ते आसते ॥ ३९ ॥ तेषां दिग्गजानां स्वविभूतीनां स्वांशभूतानां महेंद्रादीनां च विविधवीर्योपबृंहणाय सकललो-

स लोकत्रयांते परित ईश्वरेण विहितो यस्मात्सूर्यादीनां ध्रुवापवर्गाणां ज्योतिर्गणानां गभस्तयोऽर्वाचीनांस्त्रीँल्लोकानावितन्वाना न कदाचित्पराचीना भवितुमुत्सहंते तावदुन्नहनायामः ॥ ३७ ॥ एतावाँल्लोकविन्यासो मानलक्षणसंस्थाभिर्विचिंतितः कविभिः सतु पंचाशत्कोटिश्च गणितस्य भूगोलस्य तुरीयभागोऽयं लोकालोकाचलः ॥ ३८ ॥ तदुपरिष्टाच्चतसृष्वाशास्वात्मयोनिनाऽखिलजग-द्गुरुणा ऽधिनिवेशिता ये द्विरदपतय ऋषभः पुष्करचूडो वामनोऽपराजित इति सकललोकस्थितिहेतवः ॥ ३९ ॥ तेषां स्वविभू-तीनां लोकपालानां च विविधवीर्योपबृंहणाय भगवान्परममहापुरुषो महाविभूतिपतिरंतर्याम्यात्मनो विशुद्धसत्त्वं धर्मज्ञानवैराग्यै-श्वर्याद्यष्टमहासिद्ध्युपलक्षणं विष्वक्सेनादिभिः स्वपार्षदप्रवरैः परिवारितो निजवरायुधोपशोभितैर्निजभुजदंडैः संधारयमाणस्तस्मि-न्गिरिवरे समंतात्सकललोकस्वस्तय आस्ते ॥ ४० ॥ आकल्पमेवं वेषं गत एष भगवानात्मयोगमायया विरचितविविधलोकयात्रागो-पीथायेत्यर्थः ॥ ४१ ॥

कस्वस्तये च भगवांस्तस्मिन्नास्ते इत्यन्वयः । किं कुर्वन् । आत्मनः स्वस्य यद्विशुद्धं सत्त्वं तत्संधारयमाण आविष्कुर्वन् । कीदृशम् । धर्मज्ञानादीन्यष्टमहासिद्धयश्चोपलक्षणं यस्य तत् । दोर्दंडैरुपलक्षितः सन्महाविभूतेः परमैश्वर्यस्य पतित्वादेकयैव मूर्त्या समंतादास्ते ॥ ४० ॥ नन्वंतर्यामिणांतःस्थेनैव सर्वं कर्तुं शक्यं किं तस्य बहिःसमंतादवस्थानेनेत्याशंक्य तस्यार्थं स्वयमेव व्याचष्टे । आत्मनो योगमायया विरचिता या विविधलोकयात्रा तस्या गोपीथाय रक्षणाय एष भगवानेवंभूतमाकल्पं वेषं गतो लीलया प्राप्त इति समंतादास्त

गुरु अशा ब्रह्मदेवानें ऋषभ, पुष्कर वामन आणि अपराजित असे जे चार गजेंद्र स्थापन केले आहेत ते सर्वलोकांना स्थिरपणें धारण करण्यास कारण आहेत ॥ ३९ ॥ त्या दिग्गजांचें व आपल्या अंशभूत इंद्रादि लोकपालांचें अनेकप्रकारचें सामर्थ्य वाढविण्यासाठीं आणि सर्वलोकांच्या कल्याणासाठीं, सुदर्शनादिक आपल्या श्रेष्ठ आयुधांनीं सुशोभित अशा बाहुदंडांनीं युक्त, परम ऐश्वर्याचा अधिपति, विष्वक्सेनादिक आपल्या मुख्य मुख्य पार्षदांनीं परिवेष्टित आणि धर्म, ज्ञान, वैराग्य, ऐश्वर्य, व अष्टमहासिद्धि या लक्षणांनीं युक्त असें आपलें शुद्धसत्त्वात्मक स्वरूप धारण करणारा असा महापुरुषरूपी सर्वांतर्यामी जो भगवान्, तो त्या लोकालोक पर्वतावर निरंतर चहूंकडे फिरत असतो ॥ ४० ॥ हे राजा, चहूंकडे फिरत असतो याचा अर्थ इतकाच कीं, आपल्या योगमायेनें रचलेल्या अनेक प्रकारच्या लोकयात्रेचें रक्षण करण्याकरितांच

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्या भगवंतानें अशा प्रकाराचा एक वेष कल्पसमाप्तीपर्यंत स्वीकारिलेला आहे ॥ ४१ ॥ हा जो लोकालोकपर्वताच्या आंतील भूमीचा मेरुपर्वतापर्यंत एका बाजूनें साडेबाराकोटि योजनें विस्तार सांगितला आहे ह्यावरूनच लोकालोकपर्वताच्या बाहेर ब्रह्मकटाहापर्यंत असलेलें जें अलोकभागाचें प्रमाण तेंही सांगितल्यासारखेंच आहे. त्याच्या पलिकडे शुद्ध अशी योगेश्वरांचीमात्र गति आहे असें ह्मणतात. ती गति, ब्राह्मणाचा मरण पावलेला पुत्र परत आणत्येवेळीं श्रीकृष्णानें अर्जुनास दाखविली होती ॥ ४२ ॥ एतावता स्वर्ग आणि भूमि ह्या दोहोंचा जो मध्यभाग तो ब्रह्मांडाचा मध्यभाग होय, तेथें सूर्य असतो. सूर्याच्या आणि ब्रह्मांडगोलकाच्या मध्यें सर्वबाजूंनीं ब्रह्मांड पंचवीस पंचवीस कोटि योजनें आहे ॥ ४३ ॥ तो सूर्य ह्या मृत (अचेतन, जड) अंडांमध्यें झाला ह्मणून त्यांचें नांव मार्तंड असें पडलें आहे, तसाच तो पुष्कळ प्रकाशयुक्त अशा

इत्यस्यार्थः ॥ ४१ ॥ अलोकपरिमाणं च मेरोरेकतः सार्धद्वादशकोट्यः । ततो लोकालोकात् अलोकाद्वा । परस्तात् विशुद्धां द्विजपुत्रानयनेऽर्जुनस्य श्रीकृष्णेन प्रदर्शिताम् ॥४२॥ विस्तरेणोक्तं ब्रह्मांडमानं सर्वतोऽपि निरूपयति । अंडमध्यगतः किं तन्मध्यं तदाह । द्यावाभूम्योः पूर्वोत्तरकपालयोर्यदंतरं मध्यस्थानम् । सर्वतः पंचविंशतिकोट्यः ॥ ४३ ॥ अंडमध्यावस्थाने कारणं तन्नाम निर्वचनेनाह । मृतेऽचेतने एष सूर्यो वैराजरूपेण यस्मात्प्रविष्टः ॥ ४४ ॥ किंच । सूर्येणैव विभज्यंते दिशः । खमंतरिक्षम् । भिदा अन्यो

योंऽतर्विस्तार एतेन ह्यलोकपरिमाणं च व्याख्यातं यद्बहिर्लोकालोकाचलात् ॥ ततः परस्ताद्योगेश्वरगतिं विशुद्धामुदाहरंति ॥४२॥ अंडमध्यगतः सूर्यो द्यावाभूम्योर्यदंतरम् ॥ सूर्यांडगोलयोर्मध्ये कोट्यः स्युः पंचविंशतिः ॥ ४३ ॥ मृतेऽड एष एतस्मिन्यदभूत्ततो मार्तंड इति व्यपदेशः ॥ हिरण्यगर्भ इति यद्धिरण्यांडसमुद्भवः ॥४४॥ सूर्येण हि विभज्यंते दिशः खं द्यौर्मही भिदा ॥ स्वर्गापवर्गौ नरका रसौकांसि च सर्वशः ॥ ४५ ॥ देवतिर्यङ्मनुष्याणां सरीसृपसवीरुधाम् ॥ सर्वजीवनिकायानां सूर्य आत्मा दृगीश्वरः ॥ ४६ ॥
॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे पंचमस्कंधे भुवनकोशवर्णने समुद्रद्वीपवर्षसन्निवेशपरिमाणलक्षणो विंशतितमोऽध्यायः ॥ २० ॥ ॥
श्रीशुक उवाच ॥ एतावानेव भूवलयस्य सन्निवेशः प्रमाणलक्षणतो व्याख्यातः ॥ १ ॥

ऽपि विभागः । स्वर्गापवर्गौ भोगमोक्षदेशौ रसौकांस्यतलादीनि ॥ ४५ ॥ उपासनार्थमाह । देवादीनां सूर्य आत्मा दृगीश्वरो नेत्राधिष्ठाता च ॥ ४६ ॥ इति पंचमे टीकायां विंशतितमोऽध्यायः ॥ २० ॥ ॥ एवमध्यायविंशत्या भूमर्यादा निरूपिता ॥ अतःपरं द्युमर्यादापालनं त्रिभिरुच्यते ॥ १ ॥ एकविंशे रवेः कालचक्रेण भ्रमतोऽन्वहम् ॥ स्वगत्या राशिसंचारैर्लोकयात्रा निरूप्यते ॥ २ ॥ एतावान्विस्तारेण कोट्यः पंचाशत् । उत्सेधेन पंचविंशतिः ॥ १ ॥

ब्रह्मांडापासून उत्पन्न झाला ह्मणून ह्याला हिरण्यगर्भ असें ह्मणतात ॥ ४४ ॥ दिशा, आकाश, स्वर्ग, पृथिवी, दुसरेहि अनेक विभाग, स्वर्ग, मोक्ष, नरक, आणि पाताळांतील स्थानें हीं सर्व सूर्यानेंच विभाग पाडिलेलीं आहेत ॥ ४५ ॥ ह्मणून सूर्य हा, देव, तिर्यग्योनि, मनुष्य, सर्प, ओषधि व सर्व जीवांचे समुदाय यां सर्वांचा आत्मा असून चक्षुइंद्रियाची अधिष्ठाती देवताही तोच आहे ॥ ४६ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील पंचमस्कंधामध्यें द्वीपादिवर्णनरूप हा विसावा अध्याय समाप्त झाला ॥ २० ॥ याप्रमाणें वीस अध्यायांनीं भूमीच्या मर्यादेचें निरूपण केलें. आतां पुढें तीन अध्यायांनीं खगोलमर्यादेचें पालन सांगतात ॥ १ ॥ त्यांत या एकविसाव्या अध्यायामध्यें कालचक्रानें प्रतिदिवशीं भ्रमण पावणाऱ्या सूर्याच्या मेषादिराशींचें उल्लंघन होऊन अंतरिक्षलोकाचेठिकाणीं घडणाऱ्या गतीच्या योगानें लोकयात्रेचा प्रकार वर्णन केला आहे ॥ २ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाले– हे राजा, या भूमंडळाची विस्तारानें पन्नास कोटियोजनें व उंचीनें पंचवीस कोटियोजनें इतकीच प्रमाण व लक्षणपूर्वक रचना सांगितली

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आहे ॥ १ ॥ या पन्नास कोटि योजनात्मक प्रमाणानें स्वर्गलोकाच्या मंडळाचें प्रमाण, प्रमाणवेत्ते पुरुष, जसें पावटेवगैरे धान्यांच्या द्विदलांपैकीं एकाचें मान सांगितलें ह्मणजे दुसऱ्याचें मान सांगितल्यासारखें होतें त्याप्रमाणें उपदेश करितात. असो. भूगोल आणि खगोल यांच्यामध्यें त्या उभयतांनाहि संलग्न असें आकाश आहे ॥ २ ॥ त्या आकाशामध्यें असलेला ज्योतिर्गणाचा अधिपति भगवान् सूर्य आहे, तो आपल्या तापानें त्रैलोक्याला तप्त करितो आणि आपल्या प्रकाशानें प्रकाशित करितो. तोच हा सूर्य, उत्तरायण, दक्षिणायन आणि वैषुवत या नांवांच्या मंद, शीघ्र आणि मध्यम गतींनीं चढण, उतरण व सपाटी ह्या स्थानांचेठिकाणीं त्यात्या काळीं गमन करित होत्साता, मकरादिक राशींचेठिकाणीं संचार करित असतां, दिवसरात्रींना मोठीं लहान व सारखीं करितो ॥ ३ ॥ जेव्हां मेष आणि तुला ह्या राशींवर सूर्य असतो

द्विदलयोर्मध्ये यथैकस्य मानेनापरस्य मानमुपदिश्यते तद्वत् ते अंतरेण तयोर्मध्ये तदुभयसंधितं ताभ्यामुभयतः संलग्नम्॥२॥उदगयनादिसंज्ञाभिर्मंदक्षिप्रसमगतिभिर्यथाकालमारोहणादिस्थानेष्वारोहणाद्यभिपद्यमानो मकरादिष्वहोरात्राणि दीर्घह्रस्वसमानानि विधत्ते ॥३॥ तत्प्रपंचयति । यदेति । अत्यंतवैषम्याभावात्समानानीत्युक्तं सर्वथा साम्यं त्वेकस्यैवा-

एतेन हि दिवो मंडलमानं तद्विद उपदिशंति यथा द्विदलयोर्निष्पावादीनां ते अंतरेणांतरिक्षं तदुभयसंधितम् ॥ २ ॥ यन्मध्यगतो भगवांस्तपतां पतिस्तपन आतपेन त्रिलोकीं प्रतपत्यवभासयत्यात्मभासा स एष उदगयनदक्षिणायनवैषुवतसंज्ञाभिर्मांद्यशैघ्र्यसमानाभिर्गतिभिरारोहणावरोहणसमानस्थानेषु यथासवनमभिपद्यमानो मकरादिषु राशिष्वहोरात्राणि दीर्घह्रस्वसमानानि विधत्ते ॥ ३ ॥ यदा मेषतुलयोर्वर्तते तदाऽहोरात्राणि समानानि भवंति यदा वृषभादिषु पंचसु च राशिषु चरति तदाऽहान्येव वर्धते ह्रसति च मासिमास्येकैका घटिका रात्रिषु ॥ ४ ॥ यदा वृश्चिकादिषु पंचसु वर्तते तदाऽहोरात्राणि विपर्ययाणि भवंति ॥ ५ ॥ यावद्दक्षिणायनमहानि वर्धते यावदुदगयनं रात्रयः ॥ ६ ॥ एवं नव कोटय एकपंचाशल्लक्षाणि योजनानां मानसोत्तरगिरिपरिवर्तनस्योपदिशंति तस्मिन्नैंद्रीं पुरीं पूर्वस्मान्मेरोर्देवधानीं नाम दक्षिणतो याम्यां संयमनीं नाम पश्चाद्वारुणीं निम्लोचनीं नाम उत्तरतः सौम्यां विभावरीं नाम तासूदयमध्याह्नास्तमयनिशीथानीति भूतानां प्रवृत्तिनिवृत्तिनिमित्तानि समयविशेषेण मेरोश्चतुर्दिशम् ॥७॥

होरात्रस्य यद्यपि वृषभमिथुनयोरेवाह्नां वृद्धिः कर्कटादिषु ह्रासस्तथापि रात्र्यपेक्षयाऽधिकत्वाद्वर्धंत इत्युक्तम् । एवं रात्रिवृद्धावपि दिनापेक्षया ह्रसतीत्युक्तम् । एकैकेति स्थूलदृष्ट्योक्तम् । वृद्धिह्रासयोः प्रतिमासवैषम्यात् ॥४॥ विपर्ययाणीति अहानि न्यूनानि रात्रयोऽधिका इत्यर्थः ॥ ५ ॥ तद्वृद्धिह्रासकालमाह । यावदिति ॥ ६ ॥ एवं मंदादिगतिभिः । नव कोटय इति

तेव्हां दिवस व रात्री सारख्या असतात आणि जेव्हां वृषभादिक पांच राशींचेठिकाणीं संचार करितो तेव्हां दिवसच वाढत जातात आणि रात्रींचेठिकाणीं प्रत्येक महिन्यामध्यें एकेक घटिका कमी कमी होव जात्ये ॥ ४ ॥ जेव्हां वृश्चिकादिक पांच राशींवर सूर्य असतो तेव्हां रात्री मोठ्या मोठ्या होऊन दिवस लहान लहान होतात ॥ ५ ॥ दक्षिणायन प्राप्त होईपर्यंत (उत्तरायणामध्यें) दिवस वाढतात आणि उत्तरायणापर्यंत (दक्षिणायनामध्यें) रात्री वाढतात ॥ ६ ॥ याप्रमाणें मेरुपर्वताच्या सभोंवार मानसोत्तरपर्वतावर सूर्याची प्रदक्षिणा होण्याची लांबी नऊ कोटि एकावनलक्ष योजनें आहे असें ज्ञानी सांगतात. त्या मानसोत्तरपर्वतावर मेरूच्या पूर्वेस इंद्राची देवधानीनामक नगरी आहे, दक्षिणेस यमाची संयमनीनामक आहे, पश्चिमेस वरुणाची निम्लोचनीनामक आणि उत्तरेस सोमाची विभावरीनामक आहे. त्या चार नगऱ्यांचेठिकाणीं काल-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विशेषेंकरून प्राणिमात्रांचीं कर्मादिकांचेठिकाणीं प्रवृत्ति व निवृत्ति होण्यास कारण अशीं सूर्याचीं उदय, मध्यान्ह, अस्तमान आणि मध्यरात्र हीं मेरूच्या चारी दिशांकडे

मेरोरुभयतो मानसोत्तरस्यांतर्विस्तारेण पंचदशलक्षाधिककोटित्रयपरिमितेनेदं परिमंडलमानमुन्नेयम् । एवं पंचदशभिर्घटिकाभिरित्यादिष्वपि त्रैराशिकगणितेन तत्तन्मानमुन्नेयम् । अत्रापेक्षितो विशेषः पुराणांतरादवगंतव्यः । तत्रारोहणादिस्थानानि वायुपुराणे दर्शितानि । सर्वग्रहाणां त्रीण्येव स्थानानि द्विजसत्तमाः ॥ स्थानं जरद्गवं मध्यं तथैरावतमुत्तरम् ॥ वैश्वानरं दक्षिणतो निर्दिष्टमिह तत्त्वत इति ॥ तदेव मध्यमोत्तरदक्षिणमार्गत्रयं प्रत्येकं वीथीत्रयेण त्रिधा भिद्यते । त्रिभिस्त्रिभिरश्विन्यादिनक्षत्रैर्नागवीथी गजवीथी ऐरावती चेत्युत्तरमार्गे वीथीत्रयम् । आर्षभी गोवीथी जरद्गवी चेति वैषुवते मध्यममार्गे वीथीत्रयम् । अजवीथी मृगवीथी वैश्वानरी चेति दक्षिणमार्गे वीथीत्रयम् । तदप्युक्तं तत्रैव । अश्विनी कृत्तिका याम्या नागवीथीति शब्दिता ॥ रोहिण्यार्द्रा मृगशिरो गजवीथ्यभिधीयते ॥ पुष्याश्लेषा तथाऽऽदित्या वीथी चैरावती स्मृता ॥ एतास्तु वीथयस्तिस्र उत्तरो मार्ग उच्यते ॥ तथा द्वे चापि फाल्गुन्यौ मघा चैवार्षभी मता ॥ हस्तश्चित्रा तथा स्वाती गोवीथीति तु शब्दिता ॥ ज्येष्ठा विशाखाऽनुराधा वीथी जारद्गवी मता ॥ एतास्तु वीथयस्तिस्रो मध्यमो मार्ग उच्यते ॥ मूलाषाढोत्तराषाढा अजवीथ्यभिशब्दिता ॥ श्रवणं च धनिष्ठा च मार्गी शतभिषस्तथा ॥ वैश्वानरी भाद्रपदे रेवती चैव कीर्तिता ॥ एतास्तु वीथयस्तिस्रो दक्षिणो मार्ग उच्यत इति ॥ याम्या भरणी आदित्या अदितिदेवताका पुनर्वसुः । मार्गी मृगवीथी । एवं स्थिते उत्तरायणे ध्रुवेण युगाक्षकोटिनिबद्धवायुपाशद्वयाकर्षणे रथस्यारोहणम् । तदाभ्यंतरमंडलप्रवेशो गतिमांद्यं चेति दिनवृद्धी रात्रिह्रासश्च । दक्षिणायने च पाशप्रेरणादवरोहणे बहिर्मंडलप्रवेशो

तत्रत्यानां दिवसमध्यंगत एव सदाऽऽदित्यस्तपति सव्येनाचलं दक्षिणेन करोति ॥ ८ ॥

गतिशैघ्र्यं चैत्यहोरात्रयोर्विपर्ययः । वैषुवते तु पाशसाम्यात्समावस्थाने मध्यमंडलप्रवेशो गतिसाम्यं चेत्यहोरात्रयोः साम्यमिति । तथा च पुराणांतरम् । आकृष्येते यदा तौ तु ध्रुवेण समधिष्ठितौ ॥ तदाभ्यंतरतः सूर्यो भ्रमते मंडलानि तु ॥ ध्रुवेण मुच्यमानेन पुना रश्मियुगेन तु ॥ तथैव बाह्यतः सूर्यो भ्रमते मंडलानि चेति ॥ तदेतदुक्तम् यदा मेषतुलयोरित्यादिना । उदयास्तादिकं वक्तुमाह । तस्मिन्मानसोत्तरे मेरोः पूर्वत ऐंद्रीं पुरीमुपदिशंतीत्यनुषंगः । तासु पुरीषूदयादीन्युपदिशंति । चतुर्दिशमित्युक्ते ये मेरोर्दक्षिणे देशे तेषामैंद्रीमारभ्य पूर्वादयः ये पश्चिमे तेषां याम्यामारभ्य ये उत्तरे तेषां वारुणीमारभ्य ये पूर्वे तेषां सौम्यामारभ्य ॥ ७ ॥ तत्रत्यानां मेरुस्थानाम् । सव्येनेति । नक्षत्राभिमुखतया स्वगत्या मेरुं वामतः कुर्वन्नपि प्रदक्षिणावर्तप्रवहाख्यवायुभ्राम्यमाणज्योतिश्चक्रवशात्प्रत्यहं दक्षिणतः करोति । अतश्चक्रगतिवशादतिदूरतो भूसंलग्नस्येव दर्शनमुदयः आकाशमारूढस्येव दर्शनं मध्याह्नः भूमिं प्रविष्टस्येव दर्शनमस्तमयः ततोऽतीव दूरगमने निशीथ इति समुद्रतीरस्थदृष्ट्या च । अद्भ्यो वा एष प्रातरुदेत्यपः सायं प्रविशतीति श्रुतिव्यवहारो न वस्तुतः । तदुक्तं वैष्णवे । उदयास्तमये चैव सर्वकालं तु संमुखे ॥ दिशास्वशेषासु तथा मैत्रेय विदिशासु च ॥ यैर्यत्र दृश्यते भास्वान्स तेषामुदयः स्मृतः ॥ तिरोभावं च यत्रैति तत्रैवास्तमनं रवेः ॥ नैवास्तमनमर्कस्य नोदयः सर्वदा स्मृतः ॥ उदयास्तमनाख्यं हि दर्शनादर्शनं रवेः ॥ शक्रादीनां पुरो-

होतात ॥ ७ ॥ मेरुपर्वतावर असणाऱ्या लोकांना सूर्य, निरंतर दिवसाच्या मध्यभागींच राहून प्रकाश करितो आणि तो अश्विन्यादि नक्षत्राभिमुख चालत असल्यामुळें मेरूला डावा घालून जात असतो परंतु प्रदक्षिणाकार फिरणाऱ्या प्रवहनामक वायूनें फिरविलेल्या ज्योतिश्चक्राच्या योगानें प्रतिदिवशीं तो मेरूला प्रदक्षिणा करित आहे असें

१ यावरून मेरूच्या दक्षिणप्रदेशीं राहणाऱ्या लोकांनीं, मेरूच्या पूर्वेस असलेल्या इंद्राच्या नगरीपासून पूर्वादिक दिशा किंवा उदयादिक समजावेत. मेरूच्या पश्चिमेस असणारांनीं यमनगरीपासून, उत्तरेस असणारांनीं वरुणनगरीपासून आणि पूर्वेस असणारांनीं सोमनगरीपासून पूर्वादिक दिशा व उदयादिक समजावेत असें सिद्ध होतें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दिसतें ॥ ८ ॥ ज्या स्थानीं सूर्यांचा उदय होतो त्याच्या समोर शंकूच्या सरळरेषेंत सूत्र धरलें असतां तें ज्या दिशेकडील प्रदेशांत पडेल तेथें तो अस्तमान पावतो आणि जेथें तो लोकांना घाम उत्पन्न करून ताप देत असतो म्हणजे मध्यान्हीं असतो त्याच्या समोर सरळरेषेंत असलेल्या दिशेमध्यें तो गेला म्हणजे तो लोकांना निजवितो म्हणजे मध्यरात्र करितो. कारण, ज्यांनीं पूर्वीं उदय अस्तमान इत्यादिक अवस्थेंमध्यें सूर्याला पाहिलें होतें तेच पुरुष त्या (मध्यरात्रीच्या) स्थळाचेठिकाणीं असणाऱ्या सूर्याला पहात नाहींत ॥ ९ ॥ जेव्हां सूर्य इंद्राच्या नगरीपासून यमपुरीकडे जाऊं लागतो तेव्हां पंधरा घटिकांनीं सवादोन कोट आणि साडेबारा लक्षांपेक्षां कांहीं अधिक इतकीं योजनें जातो ॥ १० ॥ याप्रमाणेंच पुढें वरुणपुरीकडे, तेथून सोमपुरीकडे व तेथून इंद्रपुरीकडे तितक्या घटिकांनीं तितकीं योजनें जातो. तसेच

तिष्ठन् स्पृशत्येष पुरत्रयम् ॥ विकर्णौ द्वौ विकर्णस्थस्त्रीन्कोणान् द्वे पुरे तथेति ॥ अतएव तत्रैवोक्तम् तस्माद्दिश्युत्तरस्यां वै दिवारात्रिः सदैव हि ॥ सर्वेषां द्वीपवर्षाणां मेरोरुत्तरतः स्थितिरिति ॥ यतो यत्र यः पश्यति सैव तस्य प्राची तस्य च वामतो मेरुस्तिष्ठतीति ॥ ८ ॥ यथोक्तमुदयास्तमनाद्यनियमं दर्शयति यत्रोदेतीत्यादिना । स्यंदेन स्वेदोद्गमेन । प्रस्वापयति निशीथं करोति । ये तं समनुपश्येरन् प्रस्वापसमानसूत्रस्थाः ॥ ९ ॥ साधिकानि पंचविंशतिसहस्राधिकानि ॥ १० ॥ सहवा सहैव । यद्यपि

यत्रोदेति तस्य ह समानसूत्रनिपाते निम्लोचति यत्र क्वचन स्यंदेनाभितपति तस्य हैष समानसूत्रनिपाते प्रस्वापयति तत्र गतं न
पश्यंति ये तं समनुपश्येरन् ॥ ९ ॥ यदा चैंद्र्याः पुर्याः प्रचलते पंचदशघटिकाभिर्याम्यां सपादकोटिद्वयं योजनानां सार्धद्वादशल-
क्षाणि साधिकानि चोपयाति ॥ १० ॥ एवं ततो वारुणीं सौम्यामैंद्रीं च पुनस्तथाऽन्ये च ग्रहाः सोमादयो नक्षत्रैः सह ज्योति-
श्चक्रे समभ्युद्यंति सहवा निम्लोचंति ॥ ११ ॥ एवं मुहूर्तेन चतुस्त्रिंशल्लक्षयोजनान्यष्टशताधिकानि सौरो रथस्त्रयीमयोऽसौ चतसृषु
परिवर्तते पुरीषु ॥ १२ ॥ यस्यैकं चक्रं द्वादशारं षण्नेमि त्रिणाभि संवत्सरात्मकं समामनंति तस्याक्षो मेरोर्मूर्धनि कृतो मानसोत्त-
रे कृतेतरभागो यत्र प्रोतं रविरथचक्रं तैलयंत्रचक्रवद्भ्रमन्मानसोत्तरगिरौ परिभ्रमति ॥ १३ ॥ तस्मिन्नक्षे कृतमूलो द्वितीयोऽक्षस्तुर्य-
मानेन संमितस्तैलयंत्राक्षवद्ध्रुवे कृतोपरिभागः ॥ १४ ॥

वस्तुतः सूर्यस्यापि नक्षत्रैः सहैवोदयास्तमयौ तथापि तस्य तत्साहित्यादर्शनात्सोमादीनामेव तत्साहित्यमुक्तम् ॥ ११ ॥ त्रयीमय इत्याद्युपासनार्थम् ॥ १२ ॥ द्वादशमासा अरा यस्य । षड्ऋतवो नेमयो यस्य । त्रीणि चातुर्मास्यानि नाभयो यस्य । कृत इतरभागो यस्य । मानसोत्तरगिरौ लक्षार्धादुपरि वायुबद्धभूमाविति द्रष्टव्यं चक्रं वा तावदुच्छ्रितमिति मंतव्यम् । अन्यथाऽयुतमात्रोच्छ्रायत्वान्मानसोत्तरस्य मेरोश्चतुरशीत्युच्छ्रायत्वादक्षस्य साम्यानुपपत्तेः ॥ १३ ॥ तस्मिन्नक्षे चक्रमांते कृतमूलो निबद्धपूर्वभागः प्र-

चंद्रादिक दुसरे ग्रहही ज्योतिश्चक्राचेठिकाणीं नक्षत्रगणासहवर्तमान उदय पावतात व अस्त पावतात ॥ ११ ॥ एतावता एका मुहूर्तामध्यें चवतीस लक्ष आणि आठशेंपेक्षां कांहीं अधिक योजनें सूर्यांचा हा वेदमय रथ, चार नगऱ्यांचेठिकाणीं संचार करीत असतो ॥ १२ ॥ त्या रथाला, संवत्सररूप एक चक्र असून तें मासरूप बारा अऱ्यांनीं ऋतुरूप सहा धांवांनीं आणि चातुर्मास्यरूप तीन मध्यमण्यांनीं युक्त आहे असें वर्णन करितात. त्या रथाच्या आंसाचें एक टोंक मेरुपर्वताच्या मस्तकीं ठेवलेलें असून दुसरें टोंक मानसोत्तरपर्वतावर वायुबद्ध भूमीचेठिकाणीं ठेवलेलें आहे. ज्या आंसामध्यें ओंवलेलें सूर्याच्या रथाचें चक्र, तेलाच्या यंत्रचक्राप्रमाणें मेरूच्या सभोंवार फिरत असून मानसोत्तरपर्वतावर फिरत असतें ॥ १३ ॥ त्याच आंसावर छिद्र पाडून एक टोंक बसविलेला दुसरा एक आंस आहे तो एक कोट सत्तावनलक्ष पन्नास हजार योजनें अस-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लेल्या पहिल्या त्या आंसाच्या एकचतुर्थांशाइतका ह्मणजे एकुणचाळीस लक्ष सततीस हजार पांचशें योजनें असून त्याचें दुसरें टोंक वायुपाशानें ध्रुवमंडळावर बांधलेलें आहे ॥ १४ ॥ सूर्याच्या रथांतील बसण्याची जागा तर छत्तीस लक्ष योजनें लांब असून नऊ लक्ष योजनें रुंद आहे आणि त्या सूर्यरथाचें जुखड (जूं) हि नऊ लक्ष योजनें लांब आहे. त्या ठिकाणीं अरुणसारथ्यानें योजिलेले गायत्र्यादि छंदोनामक सात घोडे आहेत, ते सूर्यदेवाला वाहतात ॥ १५ ॥ सारथ्यकर्माचेठिकाणीं योजिलेला तो अरुण, पूर्वाभिमुख बसलेल्या सूर्याच्या पुढें पश्चिमाभिमुख ह्मणजे सूर्याकडे तोंड करून बसला आहे ॥ १६ ॥ त्याप्रमाणें सूर्याच्या पुढें स्तुति करण्याकरितां ईश्वरानें योजिलेले आंगठ्याच्या पेराएवढे साठहजार वालखिल्य ऋषि त्या सूर्याची स्तुति करीत असतात ॥ १७ ॥ तसेच दुसरेहि ऋषि, गंधर्व, अप्सरा, नाग, यक्ष, राक्षस

थमाक्षो मेरुमानसोत्तरायतः सार्धसप्तलक्षाधिकसार्धकोटिप्रमाणस्तस्य तुर्यमानेन सार्धसप्तत्रिंशत्सहस्राधिकैकोनचत्वारिंशल्लक्षमानेन । ध्रुवे कृतो वायुपाशेन निबद्ध उपरिभागो यस्य ॥ १४ ॥ नीड उपवेशस्थानम् । गायत्र्यादिछंदोनामानः । अरुणेन योजिताः संतो देवं वहंति ॥ १५ ॥ पुरस्तात्स्थितोऽपि पश्चात्प्रत्यङ्मुख आस्ते । यद्वा । यत्सूर्यस्य पुरस्ताचस्य वै पश्चिमत्वात्पश्चादित्युक्तम् । अश्वस्थानं च वायुनोक्तम् । सप्ताश्वरूपछंदांसि वहंते वामतो रविम् ॥ चक्रपक्षनिबद्धानि चक्रे वाक्षः समाहित इति ॥ १६ ॥

रथनीडस्तु षट्त्रिंशल्लक्षयोजनायतस्तत्तुरीयभागविशालस्तावान्रविरथयुगो यत्र हयाश्छंदोनामानः सप्तारुणयोजिता वहंति देवमादित्यम् ॥ १५ ॥ पुरस्तात्सवितुररुणः पश्चाच्च नियुक्तः सौत्ये कर्मणि किलास्ते ॥ १६ ॥ तथा वालखिल्या ऋषयोऽङ्गुष्ठपर्वमात्राः षष्टिसहस्राणि पुरतः सूर्यं सूक्तवाकाय नियुक्ताः संस्तुवंति ॥ १७ ॥ तथाऽन्ये च ऋषयो गंधर्वाप्सरसो नागा ग्रामण्यो यातुधाना देवा इत्येकैकशो गणाः सप्त चतुर्दश मासिमासि भगवंतं सूर्यमात्मानं नानानामानं पृथङ्नानानामानः पृथक्कर्मभिर्द्वंद्वश उपासते ॥ १८ ॥ लक्षोत्तरं सार्धनवकोटियोजनपरिमंडलं भूवलयस्य क्षणेन सगव्यूत्युत्तरं द्विसहस्रयोजनानि स भुंक्ते ॥ १९ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे पंचमस्कंधे ज्योतिश्चक्रसूर्यरथमंडलवर्णनं नामैकविंशतितमोऽध्यायः ॥ २१ ॥ ॥ राजोवाच ॥ यदेतद्भगवत आदित्यस्य मेरुं ध्रुवं च प्रदक्षिणेन परिक्रामतो राशीनामभिमुखं प्रचलितं चाप्रदक्षिणं भगवतोपवर्णितममुष्य वयं कथमनुमिमीमहीति ॥ १ ॥

सूक्तवाकाय सुभाषिताय ॥ १७ ॥ एकैकशश्चतुर्दश द्वंद्वशः सप्तगणाः संतो मासिमास्युपासत इत्यन्वयः ॥ १८ ॥ गव्यूतिः क्रोशद्वयं सगव्यूत्युत्तरं यथा भवति तथा ॥ १९ ॥ इति श्रीमद्भागवते पंचमे टीकायामेकविंशोऽध्यायः ॥ २१ ॥ ॥ द्वाविंशे सोमशुक्रादेः स्थानमाहोत्तरोत्तरम् ॥ तत्तद्गत्यनुसारेण इष्टानिष्टे तथा नृणाम् ॥ १ ॥ राशीनामभिमुखमप्रद-

---

आणि देव हे एकएकटे चवदा व दोनदोन मिळून सात गण, प्रत्येक महिन्यामध्यें निरनिराळीं नांवें धारण करीत होत्साते, निरनिराळ्या कर्मांनीं प्रत्येक महिन्यामध्यें निरनिराळीं नांवें धारण करणाऱ्या सूर्याची जोडीजोडीनें उपासना करितात ॥ १८ ॥ असो. मानसोत्तरपर्वतावर जें भूमंडळाच्या सभोंवार घेराचें मान नऊ कोटि एकावन लक्ष योजनें आहे त्यापैकीं दोन हजार योजनें आणि दोन कोस, तो सूर्यनारायण एका क्षणामध्यें चालत असतो ॥ १९ ॥ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील पंचमस्कंधामध्यें सूर्यरथमंडलवर्णनसंबंधी हा एकविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २१ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ श्रीरस्तु ॥ आतां या बाविसाव्या अध्यायामध्यें चंद्र व शुक्र इत्यादिक ग्रहांचीं स्थानें सांगून त्या ग्रहांच्या गतींच्या अनुसार प्राणिमात्रांना इष्टानिष्ट फळें प्राप्त होतात असें वर्णन केलें आहे ॥ १ ॥ राजा ह्मणाला–हे शुकाचार्य, मेरुपर्वत व ध्रुव यांना प्रदक्षिणा करीत फिरणाऱ्या भगवान् सूर्याचें, मेषादिराशींच्या संमुख अप्रदक्षणिक गमन होतें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असें जें हें आपण सांगितलें हें विरुद्ध भासत असल्यामुळें आह्मीं खरें कसें समजावें? ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला— हे राजा, जशी फिरत असणाऱ्या कुंभाराच्या चक्रानें फिरणाऱ्या, परंतु चक्रगतीच्या उलटगतीनें चालणाऱ्या पिपीलिकादिकांची गति उलटच घडत्ये. कारण, तीं पिपीलिकादिक निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या स्थलीं आढळतात त्याप्रमाणें ध्रुवाला व मेरूला प्रदक्षिणा घालीत भराभर फिरत असणाऱ्या नक्षत्रराशियुक्त कालचक्रासहवर्तमान फिरणाऱ्या परंतु ध्रुवाच्या व मेरूच्या अप्रदक्षणिक क्रमानें असलेल्या नक्षत्रांच्या व राशींच्या सन्मुख चालणाऱ्या सूर्यादिकांची गति उलटच घडत्ये. कारण, निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या नक्षत्रांचे व राशींचेठिकाणीं ते सूर्यादिक ग्रह दृष्टीस पडतात ॥ २ ॥ असो. वेद आणि ज्ञानीपुरुष ज्याचा तर्क करित असतात तो हा भगवान् आदिपुरुष साक्षात् सूर्यनारायण, लोकांच्या कल्याणाक-

---

क्षिणं चोपवर्णितं सव्येन चलन् दक्षिणेन करोतीति वदता । अमुष्य वयं कथमनुमिमीमहि एतत्कथं ज्ञास्यामो विरुद्धत्वादित्यर्थः ॥ १ ॥ चक्रवशात्स्वतश्च गतिद्वयमविरुद्धमिति परिहारार्थः ॥ २ ॥ तत्तत्कालनियमेन कर्मणां विशुद्धेः साद्गुण्यस्य निमित्तभूतमात्मानं विभज्य । विजिज्ञास्यमानो वितर्क्यमाणः । यथोपजोषं यथाक-

स होवाच ॥ यथाकुलालचक्रेण भ्रमता सह भ्रमतां तदाश्रयाणां पिपीलिकादीनां गतिरन्यैव प्रदेशांतरेष्वप्युपलभ्यमानत्वादेवं नक्षत्रराशिभिरुपलक्षितेन कालचक्रेण ध्रुवं मेरुं च प्रदक्षिणेन परिधावता सह परिधावमानानां तदाश्रयाणां सूर्यादीनां ग्रहाणां गतिरन्यैव नक्षत्रांते राश्यंतरे चोपलभ्यमानत्वात् ॥ २ ॥ स एष भगवानादिपुरुष एव साक्षान्नारायणो लोकानां स्वस्तय आत्मानं त्रयीमयं कर्मविशुद्धिनिमित्तं कविभिरपि च वेदेन विजिज्ञास्यमानो द्वादशधा विभज्य षट्सु वसंतादिषु ऋतुषु यथोपजोषमृतुगुणान्विदधाति ॥ ३ ॥ तमेतमिह पुरुषास्त्रय्याविद्यया वर्णाश्रमाचारानुपथा उच्चावचैः कर्मभिराम्नातैर्योगवितानैश्च श्रद्धया यजंतोऽजसा श्रेयः समधिगच्छंति ॥ ४ ॥ अथ स एष आत्मा लोकानां द्यावापृथिव्योरंतरेण नभोवलयस्य कालचक्रगतो द्वादशमासान्भुंक्ते राशिसंज्ञान्संवत्सरावयवान्मासः पक्षद्वयं दिवा नक्तं चेति सपादर्क्षद्वयमुपदिशंति यावता षष्ठमंशं भुंजीत स वै ऋतुरित्युपदिश्यते संवत्सरावयवः ॥ ५ ॥

र्मभोगं ऋतुगुणान् शीतोष्णादीन् ॥ ३ ॥ वर्णाश्रमाचारानुवर्तिनः पुरुषास्त्रय्या आम्नातैः कर्मभिरिंद्रादिरूपं योगवितानैश्च ध्यानादिभिरंतर्यामिरूपं पूजयंतः ॥ ४ ॥ स एव स्वगत्या मासादिव्यवहारकारणमित्याह । स एष लोकानामात्मा द्यावापृथिव्योरंतरेण मध्ये यन्नभोवलयमंतरिक्षं तस्य मध्ये यत्कालचक्रं तद्गतः । राशिभिर्मेषादिभिः संज्ञा

रितां वेदत्रयानें प्रतिपाद्य व कर्मांची शुद्धि होण्यास निमित्त अशा कालस्वरूपी आपल्या स्वरूपाचे बारा विभाग करून, वसंतादिक सहा ऋतूंमध्यें कर्मभोगास योग्य अशा शीतोष्णादिक धर्मांस उत्पन्न करितो ॥ ३ ॥ या मनुष्यलोकामध्यें वर्ण आश्रम आणि आचार यांना अनुसरणारे लोक, त्या सूर्यरूपी भगवंताचें वेदत्रयानें सांगितलेल्या संध्या अग्निहोत्रादि कर्मांच्या योगानें इंद्रादिदेवरूपानें व ध्यानादिक योगमार्गांच्या योगानें अंतर्यामिरूपानें श्रद्धापूर्वक आराधन करित होत्साते अनायासानें कल्याण पावतात ॥ ४ ॥ असो तो हा लोकांचा आत्मा सूर्य, स्वर्ग आणि भूमि ह्यांच्यामध्यें आकाशमंडळांत फिरत असलेल्या कालचक्रावर राहून संवत्साराचे अवयवरूप अशा मेषादिराशिरूप बारा मासांचा उपभोग घेतो. तो एकेक मास—चांद्रमानानें शुक्ल व कृष्ण या दोन पक्षांचा, पितरांच्या मानानें एक अहोरात्राचा आणि सौरमानानें सवादोन महानक्षत्रांचा असें ह्मणतात. तो सूर्य, जितक्या काळानें संवत्सराचा सहावा भाग भोगतो त्या काळाला ऋतु असें ह्मणतात हा तरी संवत्सराचा एक अवयवच होय ॥ ५ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तरींसुद्धां ते असल्याचें अनुमान होतें ॥ ४६ ॥ आतां सांप्रतच्या जन्मानेंच मागल्या व पुढल्या जन्मांतील धर्म व अधर्म ह्यांचें ज्ञान होतें हें दृष्टांतासहित असें सांगतात कीं– सध्या असलेला काल (वसंतादिक) ज्याप्रमाणें मागें गेलेल्या व पुढें येणाऱ्या वसंतादिक दोन कालांचे गुण दर्शवितो त्याचप्रमाणें हा जन्महीं, मागल्या व पुढल्या अशा दुसऱ्या दोन जन्मांतील धर्म व अधर्म यांना दाखविणारा होतो ॥ ४७ ॥ हा धर्माधर्म जाणण्याचा प्रकार इतरांचा आहे, धर्मराज तर मनोमात्रेंकरूनच हें सर्व जाणतो असें सांगतात– अंतर्यामिरूपानें देहामध्यें असलेला हा यमनामक देव, जीवाचें पूर्वरूप विशेषेंकरून मनानेंच अवलोकन करितो आणि नंतर मनाच्याच योगानें तो अपूर्वरूपाचा विचार करितो. कारण, तो षड्गुणैश्वर्यसंपन्न असून जन्मादिविकाररहित आहे ॥ ४८ ॥ परंतु हा जीव तर ईश्वरानें प्राप्त करून दिलेल्या

देवप्रवराः इह जन्मनि शांतघोरमूढत्वेन वा सुखदुःखमिश्रत्वेन वा धार्मिकत्वादिना वा त्रैविध्यं भूतेषु यथोपलभ्यते तथाऽन्यत्र जन्मांतरेऽनुमीयते त्रैविध्यान्यथानुपपत्त्या कल्प्यते ॥ ४६ ॥ वर्तमानजन्मना पूर्वापरजन्मधर्माधर्मज्ञानं भवतीति सदृष्टांतमाहुः । वर्तमानो वसंतादिकालोऽन्ययोर्भूतभविष्ययोर्वसंतयोर्ये गुणाः पुष्पफलादयस्तेषामभिज्ञापको यथैवमेतज्जन्म अन्ययोर्भूतभाविजन्मनोर्धर्माधर्मौ निदर्शयतीति तथा ॥ ४७ ॥ अयं च धर्माधर्मज्ञानप्रकारोऽन्येषां धर्मराजस्तु मनसैव सर्वं पश्यतीत्याहुः । पुरे संयमिन्यां स्थित एव देवो यमो देहे स्थितोंऽतर्यामी वा जीवस्य पूर्वरूपं धर्माधर्मादियुक्तं विशेषेण पश्यति । अन्वनंतरमपूर्वं रूपं मीमांसते । यद्यस्यानुरूपं तद्विचारयति यतोऽसौ भगवान-

वर्तमानोऽन्ययोः कालो गुणाभिज्ञापको यथा ॥ एवं जन्मान्ययोरेतद्धर्माधर्मनिदर्शनम् ॥ ४७ ॥ मनसैव पुरे देवः पूर्वरूपं विपश्यति ॥ अनुमीमांसतेऽपूर्वं मनसा भगवानजः ॥ ४८ ॥ यथाऽज्ञस्तमसा युक्त उपास्ते व्यक्तमेव हि ॥ न वेद पूर्वमपरं नष्टजन्मस्मृतिस्तथा ॥ ४९ ॥ पंचभिः कुरुते स्वार्थान्पंचवेदाथ पंभिः ॥ एकस्तु षोडशेन त्रीन्स्वयं सप्तदशोऽश्नुते ॥ ५० ॥ तदेतत्षोडशकलं लिंगं शक्तित्रयं महत् ॥ धत्तेऽनु संसृतिं पुंसि हर्षशोकभयार्तिदाम् ॥ ५१ ॥

जः ॥ ४८ ॥ जीवस्त्वीश्वरेणोपस्थापितं वर्तमानं देहं पश्यति न तु पूर्वमपरं चेत्याहुः । यथेति । अज्ञोऽविद्योपाधिर्जीवस्तु व्यक्तमेव प्राचीनकर्माभिव्यक्तं वर्तमानमेव देहाद्युपास्तेऽहमिति मन्यते पूर्वमपरं वा न वेद । अत्र हेतुः । नष्टा जन्मनां स्मृतिर्यस्य । अत्र दृष्टांतः । तमसा निद्रया युक्तो यथा स्वप्नेऽपि व्यक्तमेव देहाद्युपास्ते न तु जाग्रद्देहादिपूर्वस्वप्नादिगतं वा तद्वदित्यर्थः ॥ ४९ ॥ एवंभूतस्य जीवस्य संसारं प्रपंचयंति पंचभिः श्लोकैः । पंचभिः कर्मेंद्रियैः स्वार्थानुपादानादीन्कुरुते । पंच शब्दादीन्वेद पंचभिर्ज्ञानेंद्रियैः । षोडशेन मनसा सह सप्तदशः षोडशोपाध्यंतर्गतोऽपि स्वयं त्वेक एव सर्वेन्द्रियविषयप्रतिसंधानात् त्रीन् ज्ञानकर्मेंद्रियमनोविषयान्प्राप्नोति ॥ ५० ॥ तदेतल्लिंगशरीरं

विद्यमान देहालाच जाणत असून मागचा आणि पुढचा हे दोन देह तो जाणत नाहीं अशा आशयानें ह्मणतात कीं– निद्रेनें युक्त असलेला पुरुष ज्याप्रमाणें स्वप्नामध्यें प्राप्त झालेल्याच देहादिकांविषयीं ‘ हा मी ’ असा अभिमान धारण करितो, जाग्रदवस्थेमध्यें असलेल्या देहादिकांचें त्याला भान राहत नाहीं; त्याचप्रमाणें हा अज्ञ जीव, पूर्वकर्मांच्या योगानें प्राप्त झालेल्या ह्या देहालाच ‘ हा मी ’ असें मानितो, पूर्वींच्या अथवा पुढच्या देहास तो जाणत नाहीं. कारण, ह्या जन्माच्या योगानें त्याची ‘इतर जन्माविषयींची’ स्मृति नष्ट झालेली असत्ये ॥ ४९ ॥ ह्याप्रमाणें असलेल्या जीवाचा संसार पांच श्लोकांनीं दाखवितात तो असा कीं– हा जीव, पांच कर्मेंद्रियांच्या योगानें ग्रहण व त्याग इत्यादि कर्में करितो, पांच ज्ञानेंद्रियांच्या योगानें शब्दादि पांच विषय जाणतो, प्राणपंचकाच्या योगानें देहवृत्ति चालवितो आणि सोळाव्या मनासहवर्तमान सतरावा आपण स्वतः एकटाच असून ज्ञानेंद्रियें, कर्मेंद्रियें व मन ह्यांच्या विषयांना पावतो ॥ ५० ॥ असो; तें हें षोडशकलांनीं युक्त, गुणत्रयापासून झा- ॥ ४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लेलें व अनादि असें लिंगशरीर, त्यांत बद्ध झालेल्या जीवाला, हर्ष, शोक, भय व पीडा देणाऱ्या संसारामध्यें वारंवार भ्रमण करवितें ॥ ५१ ॥ यास्तव हें लिंगशरीरच, कामक्रोधादि षड्रिपु ज्यानें जिंकिले नाहींत अशा ह्या देहधारी अज्ञ जीवाकडून त्याला इच्छा नसतांहि कर्में करवितें; नंतर तो जीव, ज्याप्रमाणें कोळी आपल्या तंतुवेष्टनरूप कर्माच्या योगानें आपल्याला बद्ध करून घेऊन, त्यांतून बाहेर जाण्याचा उपाय जाणत नाहीं, त्याचप्रमाणें कर्माच्या योगानें आपल्याला आच्छादित करून घेऊन मुक्त होण्याचा मार्ग जाणत नाहीं ॥ ५२ ॥ ह्याविषयीं अनुभावावेंच, प्रमाण सांगतात कीं,– कोणीहि जीव क्षणभरदेखील कर्म केल्यावांचून कदापि रहात नाहीं. कारण, पूर्वकर्मसंस्कारापासून झालेल्या गुणकार्यरूप वासनादिकांनींच, परवश झालेल्या त्या जीवाकडून बलात्कारानें कर्म करविलें जातें ॥५३॥

शक्तित्रयं गुणत्रयकार्यं महदनादि पुंसि जीवे अन्वनु संसृतिं धत्ते ॥ ५१ ॥ नेच्छन्ननिच्छन्नप्यनेनैव कर्माणि कार्यते । कोशकारः कीटविशेषः । मुह्यति निर्गमोपायं न जानाति ॥ ५२ ॥ कार्यत इत्यत्रानुभवं प्रमाणयंति । न हीति । गुणैर्गुणकार्यरागादिभिः स्वाभाविकैः पूर्वकर्मसंस्कारोद्भूतैः ॥ ५३ ॥ कर्मवशेन च तदनुरूपो देहो भवतीत्याहुः । लब्ध्वेति । अव्यक्तमदृष्टं निमित्तं लब्ध्वा व्यक्ताव्यक्तं तदनुरूपं स्थूलं सूक्ष्मं च शरीरं भवति । यथायोनि मातृसदृशम् । यथाबीजं पितृसदृशम् । स्वभावो वासना । शुक्रशो-

देह्यज्ञोऽजितषड्वर्गो नेच्छन्कर्माणि कार्यते ॥ कोशकार इवात्मानं कर्मणाऽऽच्छाद्य मुह्यति ॥ ५२ ॥ न हि कश्चित्क्षणमपि जातु
तिष्ठत्यकर्मकृत् ॥ कार्यते ह्यवशः कर्म गुणैः स्वाभाविकैर्बलात् ॥ ५३ ॥ लब्ध्वा निमित्तमव्यक्तं व्यक्ताव्यक्तं भवत्युत ॥ यथायोनि
यथाबीजं स्वभावेन बलीयसा ॥ ५४ ॥ एष प्रकृतिसंगेन पुरुषस्य विपर्ययः ॥ आसीत्स एव न चिरादीशसंगाद्विलीयते ॥ ५५ ॥
अयं हि श्रुतसंपन्नः शीलवृत्तगुणालयः ॥ धृतव्रतो मृदुर्दांतः सत्यवान्मंत्रविच्छुचिः ॥ ५६ ॥ गुर्वग्न्यतिथिवृद्धानां शुश्रूषुर्निरहंकृतः ॥
सर्वभूतसुहृत्साधुर्मितवागनसूयकः ॥ ५७ ॥ एकदाऽसौ वनं यातः पितृसंदेशकृद्द्विजः ॥ आदाय तत आवृत्तः फलपुष्पसमित्कुशान् ॥ ५८ ॥

णितयोरेकत्वेऽपि कर्मवासनया मातापितृसदृशो देहो भवतीत्यर्थः ॥ ५४ ॥ संसारचक्रमुपसंहरंतो मुक्तिप्रकारमाहुः । एष इति । ईशसंगातपरमेश्वरभजनात् ॥ ५५ ॥ तदेवं सामान्यतो धर्मादिनिर्णयमुक्त्वा प्रस्तुतस्याजामिलस्याधर्मं प्रपंचयंतो दंड्यत्वमाहुः । अयं हीति यावदध्यायसमाप्ति । तत्र द्वाभ्यां तत्पूर्ववृत्तांतानुवादोऽन्यायातिरेकप्रदर्शनार्थः । शीलं सुस्वभावो वृत्तं सदाचारो गुणाः क्षमादयस्तेषामालयः ॥ ५६ ॥ निरहंकृतो निरहंकारः ॥ ५७ ॥ तत आवृत्तो वनात्परावृत्तः ॥ ५८ ॥

आतां जीवाला कर्मानुरूप देह प्राप्त होतो असें सांगतात– अदृष्टरूप निमित्त प्राप्त झालें असतां, त्या निमित्ताला अनुरूप असें स्थूल अथवा सूक्ष्म शरीर जीवाला प्राप्त होतें; तें तरी बलिष्ठ कर्मवासनांमुळें आईच्या स्वभावासारखें किंवा पित्याच्या स्वभावासारखें होतें ॥ ५४ ॥ आतां संसारचक्राचा उपसंहार करून मुक्तिप्रकार दर्शवितात कीं– प्रकृतिसंगामुळें पुरुषाला हा जो विपर्यास प्राप्त होतो तो, परमेश्वराच्या भजनानें स्वल्प कालांतच नाहींसा होतो ॥ ५५ ॥ असो. याप्रमाणें साधारणरीतीनें धर्मादिनिर्णय सांगून अतां प्रस्तुत अजामिळाचा अधर्म कथन करीत तो दंडास पात्र आहे असें सांगतात–हा अजामिळ विद्यासंपन्न, सुस्वभाव, सदाचार आणि क्षमादिक गुण, ह्यांचें केवळ निवासस्थान, पूजादि नियम धारण करणारा, सौम्य, इंद्रियदमन करणारा, सत्यवादी, मंत्रवेत्ता; शुचि, गुरु, अग्नि, अतिथि आणि वृद्ध ह्यांची शुश्रूषा करणारा, निरभिमानी, सर्व प्राणिमात्रांचा मित्र, साधु, मितभाषी आणि मत्सररहित असा होता ॥ ५६ ॥ ५७ ॥ परंतु एकदां पित्याच्या आज्ञेप्रमाणें वागणारा हा ब्राह्मण, वनामध्यें गेल

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आणि फळें, पुष्पें, समिधा व दर्भ हे घेऊन तेथून घरीं येण्यास माघारा फिरला ॥ ५८ ॥ येतांना त्यानें आपल्या समीपभागीं मार्गामध्यें, पिठापासून निर्माण केलेल्या सुरेचें प्राशन केल्यामुळें मदाच्या योगानें जिचे नेत्र फिरून गेले आहेत व मत्त झाल्यामुळें जिचें वस्त्र अतिशय सैल झालें आहे अशा एका वेश्येसहवर्तमान क्रीडा, गायन व हास्य करणारा, आपल्या आचारापासून भ्रष्ट झालेला, निर्लज्ज आणि कामुक असा कोणीएक शूद्र अवलोकन केला ॥ ५९ ॥ ६० ॥ नंतर कामोद्दीपन करणाऱ्या तिच्या हरिद्रादिक अंगरागानें लिप्त झालेल्या आपल्या बाहूनें तो शूद्र तिला आलिंगन देत आहे असें अवलोकन करून, हा अजामिळ एकाएकींच अत्यंत मोहित होऊन कामवश झाला. ॥ ६१ ॥ आणि जितकें म्हणून धैर्य व ज्ञान होतें त्यांच्या बलानें तो स्वतः आपलें मन आवरूं लागला असतांहि, मदनानें कंपित झालेल्या आपल्या मनाचें निय-

भुजिष्यया भोगस्त्रिया दास्या । मैरेयं मधु पैष्टीं सुरां पीत्वा मदेनाघूर्णिते भ्रांते नेत्रे यस्याः ॥ ५९ ॥ विशेषेण श्लथंती नीवी यस्यास्तया सह । व्यपेतं स्वाचाराद्भ्रष्टम् ॥ ६० ॥ कामेन कामोद्दीपकेन तदंगरागेण हरिद्रादिना लिप्तेन ॥ ६१ ॥ सत्त्वं धैर्यं श्रुतं ज्ञानं तद्बलेन स्तंभयन्नपि मदनेन कंपितं मनः समाधातुं नियमितुं शक्तो नाभूत्

दद‌र्श कामिनं कंचिच्छूद्रं सह भुजिष्यया ॥ पीत्वा च मधु मैरेयं मदाघूर्णितनेत्रया ॥ ५९ ॥ मत्तया विश्लथन्नीव्या व्यपेतं निर-
पत्रपम् ॥ क्रीडंतमनुगायंतं हसंतमनयांऽतिके ॥ ६० ॥ दृष्ट्वा तां कामलिप्तेन बाहुना परिरंभिताम् ॥ जगाम हृच्छयवशं सहसैव
विमोहितः ॥ ६१ ॥ स्तंभयन्नात्मनाऽऽत्मानं यावत्सत्त्वं यथाश्रुतम् ॥ न शशाक समाधातुं मनो मदनवेपितम् ॥ ६२ ॥ तन्निमि-
त्तस्मरव्याजग्रहग्रस्तो विचेतनः ॥ तामेव मनसा ध्यायन्स्वधर्माद्विरराम ह ॥ ६३ ॥ तामेव तोषयामास पित्र्येणार्थेन यावता ॥ ग्रा-
म्यैर्मनोरमैः कामैः प्रसीदेत यथा तथा ॥ ६४ ॥ विप्रां स्वभार्यामप्रौढां कुले महति लंभिताम् ॥ विससर्जाचिरात्पापः स्वैरिण्या-
ऽपांगविद्धधीः ॥ ६५ ॥ यतस्ततश्चोपनिन्ये न्यायतोऽन्यायतो धनम् ॥ बभारास्याः कुटुंबिन्याः कुटुंबं मंदधीरयम् ॥ ६६ ॥ यद-
सौ शास्त्रमुल्लंघ्य स्वैरचार्यार्यगर्हितः ॥ अवर्तत चिरं कालमघायुरशुचिर्मलात् ॥ ६७ ॥

॥ ६२ ॥ तद्दर्शनमेव निमित्तं यस्य स्मरव्याजग्रहस्य तेन ग्रस्तः । विचेतनो गतस्मृतिः ॥ ६३ ॥ यावता समग्रेण ॥ ६४ ॥ लंभितां परिणीताम् ॥ ६५ ॥ ६६ ॥ अघरूपमायुर्य-

मन करण्यास तो समर्थ झाला नाहीं ॥ ६२ ॥ ह्याप्रमाणें स्त्रीदर्शनामुळें उत्पन्न झालेल्या कामरूप ग्रहानें त्या अजामिळाला ग्रासून टाकिला असतां, त्याची स्मृति नष्ट झाली आणि सर्वदा मनामध्यें तिचेंच चिंतन करीत होत्साता तो स्वधर्मापासून भ्रष्ट झाला ॥ ६३ ॥ नंतर मनोहर अशा ग्राम्यविषयांनीं ज्या रीतीनें ती प्रसन्न होईल त्या रीतीनें आपल्या पित्याच्या सर्व द्रव्यानें त्यानें तिला संतुष्ट केलें ॥ ६४ ॥ आणि त्या जारिणी स्त्रीच्या नेत्रकटाक्षानें अंतःकरण विद्ध झाल्यामुळें त्या पातकी अजामिळानें, मोठ्या कुलामध्यें उत्पन्न झालेल्या अशा आपल्या विवाहित व तरुण ब्राह्मणी भार्येचा लवकरच त्याग केला ॥ ६५ ॥ पुढें बापानें मिळविलेलें द्रव्य संपल्यावर हा मंदमति अजामिळ, न्यायानें अथवा अन्यायानें कोठून तरी द्रव्य संपादन करून ह्या कुटुंबिनी वेश्येचें कुटुंबपोषण करूं लागला ॥ ६६ ॥ याप्रमाणें शास्त्राचें उल्लंघन करून यथेच्छ वागत असल्यामुळें सज्जनांनीं निंदित, वेश्यान्नरूप मल भक्षण करणारा, अशुचि आणि पापरूप आयुष्यानें युक्त असलेला हा अजामिळ, ज्यामअर्थी चिरकाल

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पर्यंत असाच वागला आहे ॥ ६७ ॥ व पातक करूनहि ह्यानें प्रायश्चित्त केलें नाहीं त्याअर्थीं यमराजाच्या समीप आह्मीं ह्याला घेऊन जातों; ह्मणजे, त्याठिकाणीं हा दंडानें
शुद्ध होईल ६८ ॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील षष्ठस्कंधामध्यें अजामिलोपाख्यानसंबंधी हा पहिला अध्याय समाप्त झाला ॥ १ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥
आतां, ह्या दुसऱ्या अध्यायामध्यें विष्णुदूतांनीं यमदूतांना भगवंताच्या नांवाचें अद्भुत माहात्म्य कथन करून, त्या अजामिलनामक ब्राह्मणाला विष्णुलोकाप्रत नेला असें कथ-
न केलें आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हेपरीक्षिति राजा, त्या न्यायनिपुण विष्णुदूतांनीं, ह्याप्रमाणें यमदूतांनीं केलेलें भाषण श्रवण करून, त्यांना प्रत्युत्तर दिलें कीं,
॥ १ ॥ विष्णुदूत ह्मणाले– हरहर! धर्मज्ञ पुरुषांच्या सभेला अधर्म, स्पर्श करीत आहे ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. कारण, ज्या सभेमध्यें धर्मवेत्ते पुरुष, दंडास अयोग्य
अशा निष्पाप पुरुषांना उगीच दंड करीत आहेत ॥ २ ॥ अरेरे! जे समदृष्टि साधुलोक, प्रजाजनांचें आई बापांप्रमाणें परिपालन करून त्यांना शिक्षण देतात, त्यांचेच-

---

स्य मलमेव तदीयमन्नादिकमत्तीति मलात् ॥ ६७ ॥ अकृतनिर्वेशमकृतप्रायश्चित्तम् । अस्यैव च हितार्थे नेष्याम इत्याहुः । यत्रेति ॥६८॥ ॥ इति श्रीमद्भा० महापुराणे षष्ठस्कंधे
टीकायां प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥ ॥ द्वितीये वैष्णवैर्याम्यान्नाममाहात्म्यमद्भुतम् ॥ श्रावयित्वा द्विजो विष्णोर्लोकं नीत इतीर्यते ॥ १ ॥ नयकोविदा न्यायनिपुणाः ॥ १ ॥ धर्मदृशां

तत एनं दंडपाणेः सकाशं कृतकिल्बषम् ॥ नेष्यामोऽकृतनिर्वेशं यत्र दंडेन शुद्ध्यति ॥ ६८ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे षष्ठस्कंधे
अजामिलोपाख्याने प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ एवं ते भगवद्दूता यमदूताभिभाषितम् ॥ उपधार्याथ तान्राजन्प्र-
त्याहुर्नयकोविदाः ॥ १ ॥ विष्णुदूता ऊचुः ॥ अहो कष्टं धर्मदृशामधर्मः स्पृशते सभाम् ॥ यत्रादंड्येष्वपापेषु दंडो यैर्ध्रियते वृथा ॥२॥
प्रजानां पितरो ये च शास्तारः साधवः समाः ॥ यदि स्यात्तेषु वैषम्यं कं यांति शरणं प्रजाः ॥ ३ ॥ यद्यदाचरति श्रेयानितरस्तत्त-
दीहते ॥ स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥ ४ ॥ यस्यांके शिर आधाय लोकः स्वपिति निर्वृतः ॥ स्वयं धर्ममधर्मं वा न हि
वेद यथा पशुः ॥ ५ ॥ स कथं न्यर्पितात्मानं कृतमैत्रमचेतनम् ॥ विश्रंभणीयो भूतानां सघृणो द्रोग्धुमर्हति ॥ ६ ॥

एतत्प्रवर्ति-
सभामधर्मः स्पृशति । तदाहुः । यत्र सभायाम् । यैर्धर्मदृग्भिस्तेषां तां सभाम् ॥ २ ॥ पितरः पितृवत्पालकाः । शास्तारोऽनुशिक्षकाः । वैषम्यमदंड्यदंडनम् ॥ ३ ॥ एतत्प्रवर्ति-
तमधर्ममन्योऽपि करिष्यतीति महत्कष्टमभूदित्याहुः । यद्यदिति । श्रेयान् श्रेष्ठः ॥ ४ ॥ विश्वस्तघातादपीत्याहुः । यस्येति द्वाभ्याम् । निर्वृतो निश्चिंतः ॥ ५ ॥ विश्वासेन नितरामर्पित

ठिकाणीं त्यांचा जर असा विपरीतपणा होऊं लागला तर प्रजाजनांनीं कोणाला शरण जावें? ॥ ३ ॥ अहो ह्यांनीं केलेला अधर्म दुसरेही करूं लागतील ह्याकरितां हें
फार वाईट आहे. कारण, श्रेष्ठ पुरुष जें जें कर्म करितो तेंतेंच कर्म इतर लोकहि करितात व तो श्रेष्ठ पुरुष, जें शास्त्र प्रमाण मानितो त्या शास्त्रालाच लोकहि अनुसरतात,
ह्मणजे प्रमाण मानितात ॥ ४ ॥ अरेरे! जसा पशु, धनी आपलें रक्षण करील किंवा मारील हें कांहींच न जाणतां खुशाल निजतो त्याप्रमाणें हा लोक, धर्म अथवा अधर्म
हें स्वतः कांहीं एक न जाणतां निश्चिंत होऊन ज्याच्या मांडीवर आपलें शिर ठेऊन खुशाल निजतो ॥ ५ ॥ प्राणिमात्रांना विश्वास ठेवण्यास योग्य, असा तोच पुरुष, जर
खरोखर सदय असेल तर ज्यानें विश्वासानें आपला आत्मा स्वाधीन केला आहे व आपणाशीं मित्रपणा जोडिला आहे त्या अज्ञानी जनाचा द्रोह करण्यास कसा बरें योग्य
होईल? होणारच नाहीं ॥ ६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वरें ह्या पाप्याच्या दंडाविषयीं तुह्मीं विष्णुदूत कशाकरितां आक्रोश करितां असें ह्मणाल तर–हे यमदूतहो, मोक्षसाधनभूत अशा श्रीहरीच्या नामाचा ज्याअर्थीं ह्यानें विवश असतांनाही उच्चार केला आहे त्याअर्थीं कोटिजन्मसंबंधीं पातकांचेंही ह्यानें प्रायश्चित्त केलें आहे ॥ ७ ॥ अहो, 'कर्माला सफल करणारें हरीचें नाम आहे' असें ह्मणणें हें योग्य आहे; परंतु तें हरीचें नाम, स्वतंत्रपणानें पातकनिवृत्ति करणारें कसें होईल? ह्मणून शंका घ्याल तर–हे यमदूतहो, 'नारायणा इकडे ये' असा आक्रोश करून पुत्राला हाक मारण्याच्या बुद्धीनें ह्यानें जें आभासमात्र चतुरक्षर नाम उच्चारिलें, तेवढ्यानेंच ह्या पातक्याच्या पापाचें प्रायश्चित्त झालें आहे ॥ ८ ॥ आतां हजारोवेळां बुद्धिपुरस्सर केलेलीं व कोट्यावधि द्वादशाब्दप्रायश्चितांनींही निवृत्त न होणारीं अशीं जीं अनेक महापातकें आहेत ह्यांचें हें एकच प्रायश्चित्त

आत्मा येन तं विश्रंभणीयो विश्वसनीयः सघृणश्चेत् ॥ ६ ॥ नन्वस्य पापिनो दंडे किमर्थमाक्रोशः क्रियते तत्राहुः । अयं हीति । यद्यस्माद्विवशोऽपि हरेर्नाम व्याजहारोच्चारितवान् । न केवलं प्रायश्चित्तमात्रं हरेर्नामापि तु स्वस्त्ययनं मोक्षसाधनमपि। सकृदुच्चरितं येन हरिरित्यक्षरद्वयम् ॥ बद्धः परिकरस्तेन मोक्षाय गमनं प्रतीति स्मृतेः ॥ ७ ॥ ननु कर्मसाद्गुण्यकरं हरेर्नामेति युक्तम् यस्य स्मृत्या च नामोक्त्या तपोयज्ञक्रियादिषु ॥ न्यूनं संपूर्णतां याति सद्यो वंदे तमच्युतमित्यादिवचनात् । स्वातंत्र्येण त्वघनिवर्तकं हरेर्नाम कथं स्यात्तत्राहुः । एतेनैवेति । अघोनः अघवतो मघवच्छब्दवद्रूपम् । यत् आ इति च्छेदः । आ ईषदाभासमात्रं चतुरक्षरं यन्नाम जगाद । एतेनैव केवलेन चतुरक्षरमित्यनेनाधिक्यं च दर्शितम् । कथं जगाद नारायण आय आगच्छेत्येवं विक्रोशरूपेण पुत्राह्वानेन । अयं भावः । कर्मांगत्वेऽपि हरिनाम्नः खादिरत्वादिवत्संयोगपृथक्त्वेन सर्वप्रायश्चित्तार्थत्वं युक्तमेव । तथा हि । अवशेनापि यन्नाम्नि कीर्तिते सर्वपातकैः॥ पुमान्विमुच्यते सद्यः सिंहत्रस्तैर्मृगैरिवेत्यादिभिः पुराणे । तावत्सहस्रशो

अयं हि कृतनिर्वेशो जन्मकोट्यंहसामपि ॥ यद्व्याजहार विवशो नाम स्वस्त्ययनं हरेः ॥ ७ ॥ एतेनैव ह्यघोनोऽस्य कृतं स्यादघनिष्कृतम् ॥ यदा नारायणायेति जगाद चतुरक्षरम् ॥ ८ ॥ स्तेनः सुरापो मित्रध्रुग्ब्रह्महा गुरुतल्पगः ॥ स्त्रीराजपितृगोहंता ये च पातकिनोऽपरे ॥ ९ ॥ सर्वेषामप्यघवतामिदमेव सुनिष्कृतम् ॥ नामव्याहरणं विष्णोर्यतस्तद्विषया मतिः ॥ १० ॥ न निष्कृतैरुदितैर्ब्रह्मवादिभिस्तथा विशुद्ध्यत्यघवान्व्रतादिभिः ॥ यथा हरेर्नामपदैरुदाहृतैस्तदुत्तमश्लोकगुणोपलंभकम् ॥ ११ ॥

नाम्नः स्वातंत्र्यमवगम्यते। न चैतेऽर्थवादा इति शंकनीयं विधिशेषत्वाभावात्। न च विध्यश्रवणादन्यशेषता कल्पनीया। यदाग्नेयोऽष्टाकपालो भवतीत्यादिवदप्राप्तार्थत्वेन विधिकल्पनोपपत्तेः । मंत्रेषु च । मर्ता अमर्त्यस्य ते भूरि नाम मनामहे ॥ विप्रासो जातवेदसः॥ आस्य जानंतो नाम चिद्विवक्तनेत्यादिषु नाम्नस्तपोदानादिसर्वधर्माधिक्यमवगम्यते । उपपादितं च मंत्रार्थवादानामपि स्वार्थे प्रामाण्यं देवताधिकरणे । तस्माच्छ्रीनारायणनामाभासमात्रेणैव सर्वाघनिष्कृतं कृतं स्यादिति ॥ ८ ॥ ननु कामकृतानां बहूनां महापातकानां सहस्रश आवर्तितानां द्वादशाब्दादिकोटिभिरप्यनिवर्त्यानां कथमिदमेकमेव प्रायश्चित्तं स्यात्तत्राहुः । स्तेन इति द्वाभ्याम् ॥ ९ ॥ सुनिष्कृतं श्रेष्ठं प्रायश्चित्तमिदमेव । तत्र हेतुः । यतो नामव्याहरणात् । तद्विषया नामोच्चारकपुरुषविषया मदीयोऽयं मया सर्वतो रक्षणीय इति विष्णोर्मतिर्भवति ॥१०॥ श्रेष्ठत्वमेवोपपादयंति । नेति द्वाभ्याम् ।

कसें होईल? अशी शंका घ्याल तर– हे यमदूतहो, चोर, मद्यपी, मित्रद्रोही, ब्रह्मघातकी, गुरुस्त्रीगामी आणि त्याचप्रमाणें स्त्री, राजा, मातापितर आणि गाई ह्यांची हत्या करणारा हे व दुसरेही जे पातकी आहेत त्या सर्वपातक्यांचें भगवन्नामोच्चारण हेंच श्रेष्ठ प्रायश्चित्त होय. कारण, नामोच्चारण करणाऱ्या पुरुषाविषयीं, 'हा माझा आहे मी सर्वप्रकारें ह्याचें रक्षण केलें पाहिजे' अशी विष्णूला बुद्धि उत्पन्न होत्ये ॥ ९ ॥ १० ॥ खरोखर श्रीहरीच्या नामपदांचा उच्चार केला असतां, पातकी पुरुष, जसा शुद्ध होतो तसा मन्वादिक वेदवेत्त्यांनीं सांगितलेल्या प्रायश्चितांनीं शुद्ध होत नाहीं. आणि दुसरें असें कीं, कृच्छ्रचांद्रायणादि प्रायश्चित्तें, जशीं केवळ पातकनिवृत्तीनेंच क्षीण

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होऊन जातात त्याप्रमाणें नामपदाचें उच्चारण क्षीण होत नसून तें, श्रेष्ठकीर्ति परमेश्वराच्या गुणांचें ज्ञान करून देतें ॥ ११ ॥ असो. जें केलें असतांही जर मन फिरून पापमार्गाकडे धावूं लागेल तर तें प्रायश्चित्त अत्यंत शोधक नव्हे. ह्याकरितां पापांचा समूल नाश करण्याची इच्छा करणाऱ्या पुरुषांना, वारंवार हरीचें गुणवर्णन करणें हेंच प्रायश्चित्त होय. कारण, हा गुणानुवादच खरोखर चित्तशोधक आहे ॥ १२ ॥ तस्मात्, ज्याअर्थी ह्यानें मरतांमरतां भगवन्नामाचा संपूर्ण उच्चार करून सर्व पातकांची निष्कृति केली आहे त्याअर्थी तुह्मी ह्याला वाईट मार्गानें (यमलोकाकडे) नेऊं नका ॥ १३ ॥ बरें तेंही असो. परंतु, 'ह्यानें भगवंताचें नांव न घेतां पुत्राचें नांव घे-

---

ब्रह्मवादिभिर्मन्वादिभिरुक्तैर्व्रतादिभिर्निष्कृतैस्तथा न शुद्ध्यति। उदाहृतैरुच्चारितैर्यथा । नामपदैरित्यनेन नमामीत्यादिक्रियायोगोऽपि नापेक्षित इति दर्शितम्। किंच। तन्नामपदोच्चारणमुत्तमश्लोकस्य गुणानां चोपलंभकं ज्ञापकं भवति । न तु कृच्छ्रचांद्रायणादिवत्पापनिवृत्तिमात्रोपक्षीणमित्यर्थः ॥ ११ ॥ नैकांतिकं नात्यंतशोधकं तन्निष्कृतं यस्मिन्कृतेऽप्यसत्पथे पापमार्गे मनो धावति चेत्। कर्मणां पापानां निर्हारमात्यंतिकं नाशमिच्छतां हरेर्गुणानुवाद एव प्रायश्चित्तम्। यतोऽसौ खलु सत्त्वभावनश्चित्तशोधकः ॥ १२ ॥ अथ तस्मादेनं माऽपमार्गेण नयत। कृतमशेषाणामघानां निष्कृतं येन। यद्यस्मात्समग्रहीत्संपूर्णमुच्चारितवान्। नामैकदेशेनाप्यलमिति भावः। म्रियमाण इत्यनेन पुनः पापांतरासंभव उक्तो न तु तत्कालत्वमेव विवक्षितं तदानीं कृच्छ्रादिविधिवन्नामोच्चारणविधेरप्यसंभवात्। न च विधिं विना काकतालीयनामोच्चारणं पापापहमिति प्रमाण-

नैकांतिकं तद्धि कृतेऽपि निष्कृते मनः पुनर्धावति चेदसत्पथे ॥ तत्कर्मनिर्हारमभीप्सतां हरेर्गुणानुवादः खलु सत्त्वभावनः ॥ १२ ॥
अथैनं माऽपनयत कृताशेषाघनिष्कृतम् ॥ यदसौ भगवन्नाम म्रियमाणः समग्रहीत् ॥ १३ ॥ सांकेत्यं पारिहास्यं वा स्तोभं हेलनमेव वा ॥ वैकुंठनामग्रहणमशेषाघहरं विदुः ॥ १४ ॥ पतितः स्खलितो भग्नः संदष्टस्तप्त आहतः ॥ हरिरित्यवशेनाह पुमान्नार्हति यातनाम् ॥ १५ ॥ गुरूणां च लघूनां च गुरूणि च लघूनि च ॥ प्रायश्चित्तानि पापानां ज्ञात्वोक्तानि महर्षिभिः ॥ १६ ॥

मस्ति ॥ १३ ॥ नन्वयं पुत्रनामाग्रहीन्न तु भगवन्नाम तत्राहुः। सांकेत्यं पुत्रादौ संकेतितं पारिहास्यं परिहासेन कृतं स्तोभं गीतालापपूरणार्थं कृतं हेलनं किं विष्णुनेति सावज्ञमपि च वैकुंठनामोच्चारणम् ॥ १४ ॥ ननु नायं संकल्पपूर्वकं वैकुंठनामाग्रहीत्किंतु पुत्रस्नेहपरवशः संस्तत्राहुः। पतित इति। अवशेनापि यो हरिरित्याह स यातनां नार्हति। पुमानित्यनेन नात्र वर्णाश्रमादिनियम इत्युक्तम्। अवशत्वमेवाह। पतितः प्रासादादिभ्यः। स्खलितो मार्गे । भग्नो भग्नगात्रः। संदष्टः सर्पादिभिः। तप्तो ज्वरादिना। आहतो दंडादिना ॥ १५ ॥ ननु महतः पापस्य महदेव प्रायश्चित्तं युक्तं न स्वल्पं नामग्रहणमात्रं पापतारतम्येन कृच्छ्रादितारतम्यवत्तत्राहुर्द्वाभ्याम्। गुरूणां पापानां गुरूणि प्रायश्चित्तानि लघूनां च लघूनि तारतम्यं ज्ञात्वा मन्वादिभिरुक्तानि अतस्तत्र तथैव व्यवस्था। हरिनाम्नस्तु नेयं व्यवस्थोक्ता। विष्णोः स्मरणमात्रेण मुच्यते

तलें' अशी शंका घ्याल तर– हे यमदूतहो, पुत्रादिकांचेठिकाणीं संकेतानें ठेविलेलें, थट्टेनें अथवा गायनसंबंधीं आलाप परिपूर्ण करण्याकरितां घेतलेलें किंवा 'विष्णूचा काय उपयोग आहे अशा' अवज्ञेनेंही केलेलें विष्णुनामोच्चारण सर्वपातकांचा नाश करणारें आहे, असें वेदवेत्ते समजतात ॥ १४ ॥ अहो, ह्यानें कांहीं संकल्पपूर्वक भगवंताचें नांव न घेतां केवळ पुत्रस्नेहाच्या अधीन होऊन घेतलें असें ह्मणाला तर– घरावरूनवगैरे पडलेला, मार्गामध्यें अडखळून पडलेला, अवयव भग्न झालेला, सर्पादिकांनीं दंश केलेला, ज्वरानेंवगैरे तप्त झालेला व दंडादिकानें ताडित झालेला अशा पराधीन अवस्थेमध्यें ही ज्या पुरुषानें 'हरि' असें ह्मटलें तो, यातना भोगण्यास योग्य नाहीं ॥ १५ ॥ आतां मोठ्या पापाला केवळ नामोच्चारणरूप अल्प प्रायश्चित्त योग्य नसून मोठेंच प्रायश्चित्त योग्य आहे असें ह्मणाल तर– हे यमदूतहो, मोठ्या आणि लहान पातकांना

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मोठीं आणि लहान प्रायश्चित्तें तारतम्य जाणून मन्वादिमहर्षींनीं सांगितलीं आहेत ॥ १६ ॥ ह्मणून तप, दान व जप इत्यादि त्यात्या प्रायश्चित्तांनीं तींतींमात्र पातकें नष्ट होत असून अधर्माचरणानें मलिन झालेलें त्या पातक्याचें अंतःकरण शुद्ध होत नाहीं. आणि ईश्वराच्या चरणसेवेनें तर तेंहि शुद्ध होतें ॥ १७ ॥ तथापि हें पापाचें प्रायश्चित्त आहे असें जाणून त्यानें कांहीं भगवन्नामाचा उच्चार केला नाहीं. असें ह्मणाल तर—हे यमदूतहो, ज्याप्रमाणें समजून अथवा न समजूनही टाकिलेला अग्नि, काष्ठांना दग्ध करितो त्याप्रमाणें अज्ञानानें अथवा ज्ञानानें उच्चारिलेलें जें पवित्रकीर्ति परमेश्वराचें नाम तें, पुरुषाच्या पातकांना दग्ध करितें ॥ १८ ॥ 'परंतु, ब्राह्मणसभेच्या द्वारानें

सर्वपातकैरिति वचनात् । न च सुराबिंदुपाने महापातकत्वस्मरणवन्नाम्नस्तत्प्रायश्चित्तत्वस्मरणस्यायमतिभारः ॥ १६ ॥ किंच तैस्तपोदानादिभिस्तान्यघान्येव पूयंते नश्यंति । अधर्माज्जातं मलिनं तु तस्य पापकर्तुर्हृदयम् । यद्वा । तेषामघानां हृदयं सूक्ष्मं रूपं संस्काराख्यं न शुद्ध्यति । तदपीशांघ्रिसेवया कीर्तनादिना शुद्ध्यतीत्यर्थः । अयं भावः । महांत्यपि पापानि सकृदुच्चारितेनैव नाम्ना नश्यंति सकृत्प्रवर्तितेन दीपेनेव गाढध्वांतानि । तदावृत्त्या तु पापांतरस्यानुत्पत्तिर्दीपधारण इव तमोंऽतरस्य । ततश्च वासनाक्षयाद्धृदयशुद्धिः । एतदर्थमेव तत्र तत्राऽऽवृत्तिविधानं पापक्षयश्च भवति स्मरतां तमहर्निशमित्यादिषु । तदेवात्राप्युक्तम् । गुणानुवादः खलु सत्त्वभावनः तदपीशांघ्रिसेवयेति च । अतोऽस्य हरिनाम्नैव सर्वपापक्षयो वासनाक्षयस्तु महापुरुषदर्शनादिभिरिति ॥ १७ ॥ तथापि पापप्रायश्चित्तमिदमिति ज्ञात्वा नोच्चारितमिति चेत्तत्राहुः । अज्ञानादिति

तैस्तान्यघानि पूयंते तपोदानजपादिभिः ॥ नाधर्मजं तद्धृदयं तदपीशांघ्रिसेवया ॥ १७ ॥ अज्ञानादथवा ज्ञानादुत्तमश्लोकनाम यत् ॥ संकीर्तितमघं पुंसो दहेदेधो यथाऽनलः ॥ १८ ॥ यथाऽगदं वीर्यतममुपयुक्तं यदृच्छया ॥ अजानतोऽप्यात्मगुणं कुर्यान्मंत्रोऽप्युदाहृतः ॥ १९ ॥ श्रीशुक उवाच ॥ त एवं सुविनिर्णीय धर्मं भागवतं नृप ॥ तं याम्यपाशान्निर्मुच्य विप्रं मृत्योरमूमुचन् ॥ ॥ २० ॥ इति प्रत्युदिता याम्या दूता यात्वा यमांतिके ॥ यमराज्ञे यथा सर्वमाचचक्षुररिंदम ॥ २१ ॥ द्विजः पाशाद्विनिर्मुक्तो गतभीः प्रकृतिं गतः ॥ ववंदे शिरसा विष्णोः किंकरान्दर्शनोत्सवः ॥ २२ ॥

बालकेनाज्ञानादपि प्रक्षिप्तोऽग्निर्यथा काष्ठराशिं दहति तद्वत् ॥ १८ ॥ नन्विदमपि पर्षदनुपदिष्टं श्रद्धाहीनं च कथं प्रायश्चित्तं स्यात्तत्राहुः यथेति । अगदमौषधम् । वीर्यवत्तममिति वक्तव्ये वीर्यतममित्युक्तम् । यदृच्छया श्रद्धादिहीनमुपयुक्तं भक्षितं पर्षन्मुखादजानतोऽपि स्वगुणमारोग्यं कुर्यात् । मंत्रोऽपि नामात्मकस्तथा स्वकार्यं कुर्यादेव न हि वस्तुशक्तिः श्रद्धादिकमपेक्षत इत्यर्थः । तदुक्तं विष्णुधर्मेषु । हरिर्हरति पापानि दुष्टचित्तैरपि स्मृतः ॥ अनिच्छयाऽपि संस्पृष्टो दहत्येव हि पावक इति ॥ १९ ॥ तं विप्रममूमुचन्मोचयामासुः ॥ २० ॥ प्रत्युदिता निराकृताः संतो यात्वा गत्वा यमराजाय यथावत्कथयामासुः ॥ २१ ॥ दर्शनेनोत्सवो यस्य ॥ २२ ॥

ह्याला भगवन्नामाचा उपदेश झालेला नाहीं व श्रद्धापूर्वक याचा उच्चारहीं झालेला नाहीं. तस्मात्, हें प्रायश्चित्त कसें होईल ? असें ह्मणाल तर—हे यमदूतहो, ज्याप्रमाणें अतिशय वीर्यवान् औषध यदृच्छेनें भक्षण केलें असतां तें, त्याचे गुण न जाणणाऱ्याही रोग्याचेठिकाणीं आपला गुण करितें, त्याप्रमाणें उच्चारिलेला भगवन्नामात्मक मंत्रही आपला गुण करीलच यांत संशय नाहीं ॥ १९ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला— हे राजा, ह्याप्रमाणें त्या विष्णुदूतांनीं भागवतधर्माचा चांगला निर्णय करून, त्या ब्राह्मणाला यमपाशांतून मुक्त करून मृत्यूपासूनही सोडविलें ॥ २० ॥ हे शत्रुदमना, ह्याप्रमाणें विष्णुदूतांनीं निराकरण केलेल्या त्या यमदूतांनीं यमाजवळ जाऊन यमराजाला घडलेला सर्व वृत्तांत यथास्थितपणें कथन केला ॥ २१ ॥ इकडे यमपाशांतून मुक्त झाल्यामुळें निर्भय झालेला तो ब्राह्मण, शुद्धीवर आला आणि विष्णुदूतांच्या दर्शनानें आनंदयुक्त

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होऊन त्यानें त्यांना मस्तकानें वंदन केलें ॥ २२ ॥ आणि हे निष्पापा राजा, तो अजामिळ कांहींतरी बोलण्याच्या बेतामध्यें आहे असें जाणून त्याच्या समक्ष विष्णुदूत त्याठिकाणीं एकदम गुप्त झाले ॥ २३ ॥ इकडे, तो अजामिळ, यमदूतांच्या मुखांतून वेदत्रयप्रतिपाद्य असा गुणाश्रयरूप धर्म श्रवण करून व विष्णुदूतांच्या मुखांतून भगवत्प्रणीत असा निर्गुण धर्म श्रवण करून, श्रीहरीचें माहात्म्य श्रवण केल्यामुळें तत्काळ भगवंताचेठिकाणीं भक्तिमान् झाला व आपल्या पातकाचें स्मरण होऊं लागल्यामुळें त्याला मोठा पश्चात्ताप होऊन तो ह्मणाला कीं– ॥ २४ ॥ २५ ॥ अहो, इंद्रियदमन न करणाऱ्या माझी ही मोठीच हानि झाली. कारण, शूद्रीचेठिकाणीं पुत्रत्वानें उत्पन्न होणाऱ्या मी स्वतांच आपलें ब्राह्मणत्व नाहींसें करून टाकिलें ॥ २६ ॥ अरेरे! आपल्या पतिव्रता तरुण स्त्रीचा त्याग करून ज्यानें मद्यपान करणाऱ्या जा-

---

विवक्षुं वक्तुमिच्छंतं ज्ञात्वा ॥ २३ ॥ त्रैविद्यं वेदत्रयप्रतिपाद्यं गुणाश्रयं यमदूतानां धर्मं कृष्णदूतानां च भागवतं भगवत्प्रणीतं शुद्धं निर्गुणं धर्ममाकर्ण्येति योज्यम्। भक्तिमानासीदित्युत्तरस्यानुषंगः ॥ २४ ॥ २५ ॥ अनुतापं प्रपंचयति। अहो इति चतुर्भिः। येनात्मना मया वृषल्यां पुत्रतया जायमानेन ब्रह्म ब्राह्मणजातिर्विप्लावितं नाशितम् ॥ २६ ॥

तं विवक्षुमभिप्रेत्य महापुरुषकिंकराः ॥ सहसा पश्यतस्तस्य तंत्रांतर्दधिरेऽनघ ॥ २३ ॥ अजामिलोऽप्यथाकर्ण्य दूतानां यमकृष्णयोः ॥ धर्मं भागवतं शुद्धं त्रैविद्यं च गुणाश्रयम् ॥ २४ ॥ भक्तिमान्भगवत्याशु माहात्म्यश्रवणाद्धरेः ॥ अनुतापो महानासीत्स्मरतोऽशुभमात्मनः ॥ २५ ॥ अहो मे परमं कष्टमभूदविजितात्मनः ॥ येन विप्लावितं ब्रह्म वृषल्यां जायतात्मना ॥ २६ ॥ धिङ्मां विगर्हितं सद्भिर्दुष्कृतं कुलकज्जलम् ॥ हित्वा बालां सतीं योऽहं सुरापामसतीमगाम् ॥ २७ ॥ वृद्धावनाथौ पितरौ नान्यबंधू तपस्विनौ ॥ अहो मयाऽधुना त्यक्तावकृतज्ञेन नीचवत् ॥ २८ ॥ सोऽहं व्यक्तं पतिष्यामि नरके भृशदारुणे ॥ धर्मघ्नाः कामिनो यत्र विंदंति यमयातनाः ॥ २९ ॥ किमिदं स्वप्न आहोस्वित्साक्षाद्दृष्टमिहाद्भुतम् ॥ क्व याता अद्य ते ये मां व्यकर्षन्पाशपाणयः ॥ ३० ॥ अथ ते क्व गताः सिद्धाश्चत्वारश्चारुदर्शनाः ॥ व्यमोचयन्नीयमानं बध्वापाशैरधो भुवः ॥ ३१ ॥ अथापि मे दुर्भगस्य विबुधोत्तमदर्शने ॥ भवितव्यं मंगलेन येनात्मा मे प्रसीदति ॥ ३२ ॥

दुष्कृतं दोषकर्तारम्। कुलस्य कज्जलं कलंकम् ॥ २७ ॥ नास्त्यन्यो बंधुः पुत्रादिर्ययोः। तपस्विनौ संतप्तौ। अधुना तत्क्षणमेव ॥ २८ ॥ २९ ॥ इदानीं तस्य विमर्शपूर्वकं मोक्षक्रममाह किमिदमित्यष्टभिः। साक्षात्प्रत्यक्षमिह जाग्रतैव दृष्टम् ॥ ३० ॥ ये मां व्यमोचयंस्ते च क्व गताः ॥ ३१ ॥ यद्यप्यहमस्मिन् जन्मनि दुर्भगः पापीयानथापि

रिणी स्त्रीशीं गमन केलें असा जो सज्जनांनीं निंदित, कुलाचा केवल कलंक आणि पापाचरण करणारा मी त्या मला धिक्कार असो ॥ २७ ॥ अहो, ज्यांना मजवांचून कोणीही आप्तवगैरे नव्हता व जे वृद्ध असून अनाथ होते आणि जे संसारतापानें व माझ्या रागानें संतप्त झाले होते त्या मातापितरांचा वेदाध्ययन करणाऱ्याहि मी कृतघ्नानें, नीच पुरुषाप्रमाणें तत्क्षणीं त्याग केला आहे ॥ २८ ॥ तस्मात्, धर्म बुडविणाऱ्या कामिजनांना ज्याठिकाणीं यमयातना प्राप्त होतात अशा अतिभयंकर नरकामध्यें तो मी खरोखर जाऊन पडेन ॥ २९ ॥ अहो, हें आश्चर्य मी काय स्वप्नामध्यें पाहिलें आहे? अथवा हें या जाग्रदवस्थेमध्येंच प्रत्यक्ष अवलोकन केलें आहे? बरें! जे पुरुष, हस्तामध्यें पाश धारण करून मला ओढित होते ते आतां कोठें गेले? ॥ ३० ॥ आणि मला पाशांनीं बांधून यमदूत भूमीच्या अधोभागीं (नरकांत) घेऊन चालले असतां, ज्यांनीं सोडविलें ते दिसण्यांत सुंदर असलेले चार सिद्ध पुरुष आतां कोठें गेलें? ॥ ३१ ॥ असो. जरी मी याजन्मीं पातकी आहें तथापि जन्मांतरीं मी त्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सुरश्रेष्ठांच्या दर्शनाकरितां खरोखर कांहींतरी पुण्य केलें असावें; ज्या पुण्याच्या योगानें माझें मन प्रसन्न होत आहे ॥ ३२ ॥ पूर्वपुण्यावांचून मरणोन्मुख झालेल्या अशुचि शूद्रस्त्रीचा पति अशा माझी जिव्हा या जन्मीं भगवंतालासुद्धां वश करणाऱ्या अशा भगवन्नामाचा उच्चार करण्यास योग्य होणार नाहीं ॥ ३३ ॥ अहो, कपटी, पापी, ब्राह्मण्यनाशक आणि निर्लज्ज असा मी कोणीकडे व 'नारायण' असें हें मंगलकारक भगवन्नाम कोणीकडे ? ॥ ३४ ॥ तस्मात् तो महापातकी असलेलाहि मी, आतां ज्या रीतीनें फिरून आपणाला अंधतम नरकामध्यें पाडणार नाहीं तशा रीतीनें चित्त दहा इंद्रियें व प्राणवायु यांचा निग्रह करून साधन करण्याविषयीं प्रयत्न करीन ॥ ३५ ॥ आणि अज्ञान, काम व कर्म ह्यांपासून उत्पन्न झालेल्या त्या ह्या संसारबंधाचा त्याग करून, मी सर्वभूतांचा सुहृद्, त्यांचें हित करणारा, शांत, दयालु आणि इंद्रियदमन

जन्मांतरे नूनं पुण्यवानित्याह । विबुधोत्तमदर्शन इति निमित्तसप्तमी । तेषां दर्शनार्थं पूर्वेण मंगलेन महता पुण्येन भवितव्यम् । येन दर्शनेन ॥ ३२ ॥ अन्यथा पूर्वपुण्यं विना । कथंभूतं वैकुंठनाम । गृह्यते वशीक्रियते चित्तमनेनेति ग्रहणम् ॥ ३३ ॥ ब्रह्मघ्नो विप्रत्वनाशकः ॥ ३४ ॥ ३५ ॥ ३६ ॥ ३७ ॥ अमिथ्याभूतेऽर्थे धीर्यस्य तथाभूतः

अन्यथा म्रियमाणस्य नाशुचेर्वृषलीपतेः ॥ वैकुंठनामग्रहणं जिह्वा वक्तुमिहार्हति ॥ ३३ ॥ क्व चाहं कितवः पापो ब्रह्मघ्नो निरपत्रपः ॥ क्व च नारायणेत्येतद्भगवन्नाम मंगलम् ॥ ३४ ॥ सोऽहं तथा यतिष्यामि यतचित्तेंद्रियानिलः ॥ यथा न भूय आत्मानमंधे तमसि मज्जये ॥ ३५ ॥ विमुच्य तमिमं बंधमविद्याकामकर्मजम् ॥ सर्वभूतसुहृच्छांतो मैत्रः करुण आत्मवान् ॥ ३६ ॥ मोचये ग्रस्तमात्मानं योषिन्मय्याऽऽत्ममायया ॥ विक्रीडितो ययैवाहं क्रीडामृग इवाधमः ॥ ३७ ॥ ममाहमिति देहादौ हित्वाऽमिथ्यार्थधीर्मतिम् ॥ धास्ये मनो भगवति शुद्धं तत्कीर्तनादिभिः ॥ ३८ ॥ श्रीशुक उवाच ॥ इति जातसुनिर्वेदः क्षणसंगेन साधुषु ॥ गंगाद्वारमुपेयाय मुक्तसर्वानुबंधनः ॥ ३९ ॥ स तस्मिन्देवसदन आसीनो योगमाश्रितः ॥ प्रत्याहृतेंद्रियग्रामो युयोज मन आत्मनि ॥ ४० ॥ ततो गुणेभ्य आत्मानं वियुज्यात्मसमाधिना ॥ युयुजे भगवद्धाम्नि ब्रह्मण्यनुभवात्मनि ॥ ४१ ॥

सन् देहादौ ममाहमिति मतिं हित्वा मनो धास्ये ॥ ३८ ॥ मुक्तं सर्वमनुबंधनं पुत्रादिस्नेहो येन सः ॥ ३९ ॥ प्रत्याहृत इंद्रियग्रामो येन ॥ ४० ॥ गुणेभ्यो देहेंद्रियादिभ्य आत्मानं

करणारा असा होईन ॥ ३६ ॥ व जिनें मज अधमाला वानराप्रमाणें खेळविलें आहे त्या स्त्रीमय ईश्वरमायेनें ग्रासलेल्या आत्म्याला मी आतां मुक्त करीन ॥ ३७ ॥ परमार्थवस्तूचेठिकाणीं बुद्धीची योजना करणारा मी 'हा मी व हें माझें' अशाप्रकारच्या देहादिकाचेठिकाणीं असलेल्या अभिमानाचा त्याग करून, भगवंताच्या कीर्तनादिकांनीं शुद्ध झालेलें आपलें मन त्याचेठिकाणीं लावीन ॥ ३८ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, ह्याप्रमाणें साधूंचेठिकाणीं झालेल्या एकक्षणमात्र संगानें अत्यंत वैराग्य उत्पन्न झालेला तो अजामिळ, पुत्रादिकांचेठिकाणीं असलेल्या सर्व स्नेहांचा परित्याग करून, त्या दासीच्या घरांतून हरिद्वारास निघून गेला ॥ ३९ ॥ तो ब्राह्मण, देवाचा साक्षात्कार होणाऱ्या त्या क्षेत्रांत योगमार्गाचा आश्रय करून आसनावर बसला व सर्व इंद्रियसमुदाय विषयांपासून परावृत्त करून त्यानें आपलें मन आत्म्याचेठिकाणीं लाविलें ॥ ४० ॥ नंतर, देह व इंद्रियें इत्यादि गुणकार्यांपासून आपल्या आत्म्याला पृथक् करून, चित्ताच्या एकाग्रतेनें त्याला अनुभवात्मक भगवत्स्वरूप ब्रह्माचेठिका- ॥ ८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

णीं योजिलें ॥ ४१ ॥ नंतर जेव्हां भगवत्स्वरूपाचेठिकाणीं त्याची बुद्धि निश्चल झाली त्यावेळीं त्यानें आपल्या अग्रभागीं विष्णुदूत अवलोकन केले आणि हे पुरुष, आ-
पण पूर्वीं अवलोकन केलेले आहेत असें जाणून त्यानें त्यांना साष्टांग नमस्कार केला ॥ ४२ ॥ आणि त्यांच्या दर्शनानंतर तत्काल त्यानें गंगारूप तीर्थामध्यें आपल्या
कलेवराचा त्याग करून, भगवंताच्या पार्षदगणांचें रूप धारण केलें ॥ ४३ ॥ नंतर तो अजामिळ ब्राह्मण, विष्णुदूतांसहवर्तमान सुवर्णाच्या विमानामध्यें आरूढ होऊन
ज्याठिकाणीं श्रीपति विष्णु राहतो त्या वैकुंठामध्यें आकाशमार्गानें निघून गेला ॥ ४४ ॥ हे राजा, ज्यानें दासीपति होऊन सर्व धर्म बुडविले होते, जो निंद्य क-
र्मामुळें पतित झाला होता, जो व्रतापासून भ्रष्ट झाला होता आणि ज्याला यमदूत नरकामध्यें टाकीत होते असाहि तो अजामिळ, याप्रमाणें अंतकालीं भगवन्नामाचा
उच्चार करून तत्क्षणीं यमपाशांतून मुक्त झाला ॥ ४५ ॥ तस्मात्, ज्याच्या चरणाचेठिकाणीं तीर्थें आहेत त्या भगवंताच्या कीर्तनाहून दुसरें मुमुक्षुजनांना पापवासना

वियुज्य विशोध्य । आत्मसमाधिना चित्तैकाग्र्येण । भगवतो धाम्नि स्वरूपे ॥ ४१ ॥ तस्मिन्भगवद्धाम्नि उपारता निश्चला धीर्यस्य सः । तस्मिन्कालेऽद्राक्षीदिति वा ।
पुरः पुरतः । ततश्च प्रागुपलब्धानेव तानुपलभ्य प्रत्यभिज्ञाय ववंदे ॥ ४२ ॥ ४३ ॥ ४४ ॥ उपसंहरति । एवमिति द्वाभ्याम् । विप्लाविताः सर्वे धर्मा येन । हतं व्रतं स्वदार-

यर्ह्युपारतधीस्तस्मिन्नद्राक्षीत्पुरुषान्पुरः ॥ उपलभ्योपलब्धान्प्राग्ववन्दे शिरसा द्विजः ॥ ४२ ॥ हित्वा कलेवरं तीर्थे गंगायां दर्शना-
दनु ॥ सद्यः स्वरूपं जगृहे भगवत्पार्श्ववर्तिनाम् ॥ ४३ ॥ साकं विहायसा विप्रो महापुरुषकिंकरैः ॥ हैमं विमानमारुह्य ययौ यत्र
श्रियः पतिः ॥ ४४ ॥ एवं स विप्लावितसर्वधर्मा दास्याः पतिः पतितो गर्ह्यकर्मणा ॥ निपात्यमानो निरये हतव्रतः सद्यो विमुक्तो
भगवन्नाम गृह्णन् ॥ ४५ ॥ नातः परं कर्मनिबंधकृंतनं मुमुक्षतां तीर्थपदानुकीर्तनात् ॥ न यत्पुनः कर्मसु सज्जते मनो रजस्तमोभ्यां
कलिलं ततोऽन्यथा ॥ ४६ ॥ य एवं परमं गुह्यमितिहासमघापहम् ॥ शृणुयाच्छ्रद्धया युक्तो यश्च भक्त्याऽनुकीर्तयेत् ॥४७॥ न वै स
नरकं याति नेक्षितो यमकिंकरैः ॥ यद्यप्यमंगलो मर्त्यो विष्णुलोके महीयते ॥ ४८ ॥ म्रियमाणो हरेर्नाम गृणन्पुत्रोपचारितम् ॥
अजामिलोऽप्यगाद्धाम किं पुनः श्रद्धया गृणन्॥४९॥इति श्रीमद्भागवते महापुराणे षष्ठस्कंधे अजामिलोपाख्याने द्वितीयोऽध्यायः॥२॥

नियमादि यस्य ॥ ४५ ॥ कर्मनिबंधस्य पापमूलस्य कृंतनं छेदकमतः परं नास्ति । कस्मात्परम् । तीर्थपदस्यानुकीर्तिनात् । तत्र हेतुः । यद्यतोऽनुकीर्तनात् । ततोऽनुकी-
र्तनात् । अन्यथा प्रायश्चित्तांतरे रजस्तमोभ्यां कलिलं मलिनमेव तिष्ठति यत्तन्मनः कर्मसु पुनर्न सज्जते ॥ ४६ ॥ ४७ ॥ न चेक्षितो भवति ॥ ४८ ॥ म्रियमाणोऽवशत्वेन

छेदन करणारें असें कोणतेंहि श्रेष्ठ प्रायश्चित्त नाहीं. कारण, भगवत्कीर्तनावांचून इतर प्रायश्चितें केलीं असतांहि मन, रज व तम ह्यांच्या योगानें मलिनच राहतें आणि
भगवन्नामसंकीर्तनेंकरून तें मन, कर्माचेठिकाणीं फिरून कधींही आसक्त होत नाहीं ॥ ४६ ॥ असो. याप्रमाणें हा पापनाशक परम गुह्य इतिहास जो पुरुष, श्रद्धेनें
युक्त होऊन श्रवण करितो अथवा भक्तीनें कथन करितो तो पुरुष, निःसंशय नरकाप्रत जात नाहीं, यमदूत त्याच्याकडे पाहतही नाहींत आणि जरी तो पातकी असला
तरी तो विष्णूलोकीं विराजमान होतो ॥ ४७ ॥ ४८ ॥ हे राजा, अजामिलासारखा महापातकीसुद्धां मरतांमरतां पुत्रमिषानें हरिनामाचा उच्चार करून जर त्याच्या
स्थानाप्रत गेला आहे तर श्रद्धापूर्वक हरिनामाचा उच्चार करणाऱ्या पुरुषाला तें स्थान प्राप्त होईल ह्याविषयीं संशय कशाला पाहिजे ? ॥ ४९ ॥ ह्याप्रमाणें श्री-
मद्भागवतनामक महापुराणांतील षष्ठस्कंधापैकीं अजामिलोपाख्यानसंबंधीं हा दुसरा अध्याय समाप्त झाला ॥ २ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां या तिसऱ्या अध्यायामध्यें यमधर्मानें विष्णुभक्तांचा उत्कर्ष वर्णन करून आपल्या दूतांचें सांत्वन केलें व त्यांस विष्णुभक्तांचे सेवक केलें अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ विष्णुदूतांनीं ज्या शास्त्रार्थाचा निर्णय केला त्याचें यममुखानें दृढीकरण करण्याकरितां या तिसऱ्या अध्यायाचा आरंभ आहे. त्यामध्यें घडलेला सर्व-वृत्तांत यमदूतांनीं यमराजाला सांगितला असतां, पुढें तेथें काय झालें तें समजण्याकरितां राजा प्रश्न करितो– हे मुने, याप्रमाणें ज्याच्या आज्ञेचा भंग झाला आहे व हे सर्व लोक ज्याच्या स्वाधीन आहेत तो देव धर्मराज, आपल्या दूतांनीं वर्णन केलेला वृत्तांत श्रवण करून, विष्णुदूतांनीं ताडण करून परत पाठविलेल्या त्या दूतांना काय ह्मणाला ? ॥ १ ॥ काय आश्चर्य हें ! हे ऋषे, यमदेवाच्या आज्ञेचा भंग, आह्मीं पूर्वीं कोणापासूनहि कधींहि झालेला ऐकिला नाहीं; आतां तर हें त्याच्या दूतांचेंसुद्धां निराकरण झालें. यास्तव सर्वहि लोकांना असलेला हा संशय तुजवांचून दुसरा कोणीहि छेदन करणार नाहीं असा माझा निश्चय आहे, ह्मणून याचें उत्तर

श्रद्धाविहीनोऽपि ॥ ४९ ॥ इति श्रीमद्भागवते षष्ठस्कंधे टीकायां द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥ ॥ तृतीये तु यमेनापि वैष्णवोत्कर्षवर्णनैः ॥ सांत्वयित्वा स्वदूतांस्ते वैष्णवे किंकरी कृताः ॥ १ ॥ विष्णुदूतैर्निर्णीतं शास्त्रार्थं यममुखेन द्रढयितुं तृतीयाध्यायारंभः । तत्र यदुक्तं यमराज्ञे यथा सर्वमावचक्षुरिति ततः किं तत्र वृत्तमिति पृच्छति । निशम्येति । मुरारेर्नैदेशिकैः किंकरैरेवं विहतान् । अतएव हता आज्ञा यस्य । यस्य वशवर्त्ययं जनः सोऽपि तान्प्रति किमाह ॥ १ ॥ अत्याश्चर्यमेतदित्याह । यमस्येति । हे ऋषे यमस्य

॥ राजोवाच ॥ निशम्य देवः स्वभटोपवर्णितं प्रत्याह किं तान्प्रति धर्मराजः ॥ एवं हताज्ञो विहतान्मुरारेर्नैदेशिकैर्यस्य वशे जनो-ऽयम् ॥ १ ॥ यमस्य देवस्य न दंडभंगः कुतश्चनर्षे श्रुतपूर्व आसीत् ॥ एतन्मुने वृश्चति लोकसंशयं न हि त्वदन्य इति मे वि-निश्चितम् ॥ २ ॥ श्रीशुक उवाच ॥ भगवत्पुरुषै राजन्याम्याः प्रतिहतोद्यमाः ॥ पतिं विज्ञापयामासुर्यमं संयमिनीपतिम् ॥ ३ ॥ यमदूता ऊचुः ॥ कति संतीह शास्तारो जीवलोकस्य वै प्रभो ॥ त्रैविध्यं कुर्वतः कर्म फलाभिव्यक्तिहेतवः ॥ ४ ॥ यदि स्युर्बहवो लोके शास्तारो दंडधारिणः ॥ कस्य स्यातां न वा कस्य मृत्युश्चामृतमेव वा ॥ ५ ॥

दंडभंगः कुतश्च न कस्माचिदपि श्रुतपूर्वो नासीत् । एतदेतस्मिन्नर्थे । यद्वा न श्रुतपूर्वः । एतद्यमदूतनिराकरणं चासीत् । अतः सर्वस्यापि लोकस्य संशयो वर्तते तं त्वत्तोऽन्यो न छिनत्तीति मे निश्चितमतः कथयेति शेषः ॥ २ ॥ भगवतः पुरुषैः प्रतिहत उद्यमो येषां ते याम्याः पुरुषाः ॥ ३ ॥ कति संतीत्याक्षेपोक्तिः । त्रैविध्यं त्रिविधम् । स्वार्थे ष्यञ् । यद्वा त्रैविध्यं यथा भवति तथा कर्म कुर्वतः । तथा कर्मफलस्याभिव्यक्तिहेतवः कति संतीति ॥ ४ ॥ संतु बहवः को बाधस्तत्राहुः । यदीति । मृत्युर्दुःखम-मृतं सुखं तेषां विप्रतिपत्तौ ते उभे कस्य स्यातां न कस्यापि परस्परविरोधेनोभयोरपि प्रतिबंधात् । ऐकमत्ये तु कस्य वा न स्याताम् । एकः सुखं कर्तुमिच्छति दुःखं चान्यः ।

तूंच मला सांग ॥ २ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, विष्णुदूतांनीं ज्यांचा प्रयत्न हाणून पाडला आहे अशा त्या यमदूतांनीं, संयमिनी नगरीचें परिपालन करणाऱ्या आपल्या यमनामक प्रभूजवळ अशी विज्ञापना केली कीं, ॥ ३ ॥ यमदूत ह्मणाले– हे प्रभो, पुण्य, पाप व मिश्र असें तीनप्रकारचें कर्म करणाऱ्या जीवलोकाला कर्मफल देणारे असे शास्तेतरी ह्या त्रैलोक्यामध्यें खरोखर किती आहेत ? ॥ ४ ॥ आतां, असेनात पुष्कळ शास्ते ! त्यांपासून बाध काय येणार आहे असें, ह्मणाल तर– हे प्रभो लो-कांमध्यें जर दंड धारण करणारे अनेक शास्ते असले तर सुख आणि दुःख हीं कोणाला बरें होणार आहेत ? व कोणाला होणार नाहींत ? ह्मणजे त्या शास्त्यांमध्यें जर परस्परांचा विरोध असेल तर एकजण प्राण्याला दुःख देण्याची इच्छा करील व दुसरा सुख देण्याची इच्छा करील, ह्यामुळें, परस्परांच्या विरोधानें सुख व दुःख ह्या

॥ ९ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दोहोंचाही प्रतिबंध झाला ह्मणजे तीं दोन्हींही कोणालाच प्राप्त होणार नाहींत. बरें कदाचित्, ते शास्ते जर, एकमतानें वागत असले तर एकमेकांच्या कार्याला एकमेक अनुमोदन देतील आणि यामुळें सुख व दुःख ह्या उभयतांचीहि प्राप्ति आली असतां, तीं दोन्ही कोणाला बरें प्राप्त होणार नाहींत ? मिळून बहुनायकी झाली तर पाप्यां-नांच दुःख व्हावयाचें व धर्मात्म्यांनाच सुख व्हावयाचें ह्या मर्यादांचा भंग होईल ॥ ५ ॥ बरें, पुष्कळ कर्मकर्त्या पुरुषांच्या व्यवस्थेकरितां पुष्कळ शास्ते असले तर हा दोष येणार नाहीं, असें ह्मणाल तर– हे प्रभो, अनेक कर्मकर्त्या पुरुषांना अनेक शास्ते असणें हें संभवेल. परंतु, सार्वभौमराजाच्याचठिकाणीं मुख्य शास्तृत्व असून मांडलिक राजांचेठिकाणीं जसें नुसतें नांवाचें शास्तृत्व असतें तसें ह्या जीवलोकांचा जो मुख्य शास्ता असेल त्याचेचठिकाणीं मुख्य शास्तृत्व राहून इतरांचेठिकाणीं तें केवळ नाममात्रानेंच राहील ॥ ६ ॥ असो. ज्याअर्थीं ह्याप्रमाणें बहुनायकी संभवत नाहीं त्याअर्थीं आमच्या मतें तर देवांसहवर्तमान सर्व प्राण्यांचा एक अधिपति तूंच

ऐकमत्ये च तयोः परस्परकार्यानुमोदनेनोभयोरपि प्राप्ते कस्य वा ते उभे अपि न स्यातामित्यर्थः ॥ ५ ॥ ननु बहूनां कर्मिणां व्यवस्थया बहवः शास्तारो भवंतु तथा सति नायं दोषः स्यात्तत्राहुः । बहूनां कर्मिणां व्यवस्थया शास्तृबहुत्वे शास्तृत्वं स्यात् घटेत किंतु तदा यत्सर्वशास्तरि मुख्यं शास्तृत्वं तदेकदेश उपचारमात्रमेव स्यात् । यथा

किंतु शास्तृबहूत्वे स्याद्बहूनामिह कर्मिणाम् ॥ शास्तृत्वमुपचारो हि यथा मंडलवर्तिनाम् ॥ ६ ॥ अतस्त्वमेको भूतानां सेश्वराणा-
मधीश्वरः ॥ शास्ता दंडधरो नृणां शुभाशुभविवेचनः ॥ ७ ॥ तस्य ते विहतो दंडो न लोके वर्ततेऽधुना ॥ चतुर्भिरद्भुतैः सिद्धै-
राज्ञा ते विप्रलंभिता ॥ ८ ॥ नीयमानं तवादेशादस्माभिर्यातनागृहान् ॥ व्यमोचयन्पातकिनं छित्त्वा पाशान्प्रसह्यते ॥ ९ ॥ तां-
स्ते वेदितुमिच्छामो यदि नो मन्यसे क्षमम् ॥ नारायणेत्यभिहिते मा भैरित्याययुर्द्रुतम् ॥ १० ॥ श्रीशुक उवाच ॥ इति देवः स
आपृष्टः प्रजासंयमनो यमः ॥ प्रीतः स्वदूतान्प्रत्याह स्मरन्पादांबुजं हरेः ॥ ११ ॥

चक्रवर्तिन एव मुख्यं शास्तृत्वं मंडलवर्तिनामुपचारमात्रं निरंकुशत्वाभावात् ॥ ६ ॥ यस्मादेवं शास्तृबहुत्वं न घटतेऽतस्त्वमेक एव शास्ता । शुभाशुभे विविनक्तीति तथा ॥ ७ ॥ विप्रलंभिता वंचिता लंघितेत्यर्थः ॥ ८ ॥ तदेवाहुः । नीयमानमिति ॥ ९ ॥ ते त्वत्तः । यदि नोऽस्माकं क्षमं हितं मन्यसे । अन्यथाऽज्ञानतस्तदवज्ञाने तवाप्य-नर्थः स्यात् । अतर्क्यो हि तेषां प्रभावो यतो नारायणेति केवलमभिहिते मा भयं कुर्विति वदंतः शीघ्रमागताः ॥ १० ॥ प्रजाः संयमयतीति तथा ॥ ११ ॥

असून सर्व मनुष्यांच्या पुण्यपापांचा निर्णय करणारा, शास्ता व दंडधारण करणाराहि तूंच आहेस ॥ ७ ॥ परंतु, त्या तूं, केलेला दंड सांप्रतकालीं लोकांमध्यें चालत नाहीं. कारण, चार अद्भुत सिद्धांनीं तुझ्या आज्ञेचें अगदीं उल्लंघन केलें आहे ॥ ८ ॥ तें असें कीं, तुझ्या आज्ञेप्रमाणें आह्मीं पातकी अजामिळाला यातनागृहामध्यें घेऊन चाललों असतां, चार सिद्धपुरुषांनीं येऊन बलात्कारानें आमचे पाश तोडून टाकून त्याला सोडविलें ॥ ९ ॥ यास्तव तुजपासून आमचें हित व्हावें व कामाची व्यवस्था लागून आपलेंहि कल्याण व्हावें असें जर तूं मानीत असशील तर त्या पातकी अजामिळानें, ‘ नारायण ’ असें ह्मणतां क्षणींच ‘ भिऊं नको ’ असें ह्मणत ह्मणत त्याच्या समीप जे सत्वर आले ते महाप्रभावशाली कोण होते ? त्यांना तुजपासून जाणण्याची आमची इच्छा आहे ॥ १० ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, प्रजांचें संयमन करणाऱ्या त्या यमदेवाला ह्याप्रमाणें दूतांनीं प्रश्न केला असतां, तो प्रसन्न झाला आणि श्रीहरीच्या चरणकमळाचें स्मरण करीत तो आपल्या दूतांना ह्मणाला कीं, ॥ ११ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

यम ह्मणाला– हे दूतहो, उभ्या व आडव्या तंतूंचेठिकाणीं विणलेल्या वस्त्राप्रमाणें ज्याचेठिकाणीं हें विश्व ओतप्रोत भरलेलें आहे, ज्याच्या (विष्णु ब्रह्मा व रुद्र ह्या) अंशांपासून ह्या विश्वाची स्थिति, उत्पत्ति व लय हीं होतात आणि वेसण घातलेल्या बैलांप्रमाणें हा जीवलोक, ज्याच्या स्वाधीन आहे असा तो स्थावरजंगमाचा मुख्य अधिपति, माझ्याहून वेगळाच आहे ॥१२॥ अहो, ज्याप्रमाणें शेतकरी लोक, दावणीचेठिकाणीं दाव्यांनीं बैलांना बांधितात, त्याप्रमाणें जो आपल्या वेदवाणीरूप दावणीचेठिकाणीं ब्राह्मणादि नांवांनीं, जनांना बद्ध करून टाकितो व नामकर्मरूप बंधनसाधनांनीं बद्ध होऊन भयभीत झालेले ते हे जीव, ज्याच्या स्वाधीन असून आपआपलीं कर्में करि-

मत्तोऽन्यो जगतस्तस्थुषश्च परोऽधीश्वरोऽस्ति । अहं तु जंगमानामेव तत्रापि नृणामेव तत्रापि पापिनामेव तत्किंकरः सत्रीश्वरः स तु सर्वेश्वरः । कोऽसौ । यत्र यस्मिन्विश्वमोतं प्रोतं चोर्ध्वतिर्यक्तंतुषु पटवत् । यस्य त्वंशेभ्यो विष्णुब्रह्मरुद्रेभ्योऽस्य स्थित्यादयो भवंति यस्य च वशे लोको वर्तते नसि नासिकायां प्रोतबलीवर्दवत् ॥१२॥ एतत्प्रपंचयति । ब्राह्मणादिनामभिर्वाचि निजायां तंत्यां दामन्यां जनान्यो बध्नाति दामभिर्गा बलीवर्दानिव त इमे जीवा नामकर्मभिर्निबंधैर्दृढबंधसाधनैर्बद्धा यस्मै बलिं वहंति यदधीनाः कर्म

यम उवाच ॥ परो मदन्यो जगतस्तस्थुषश्च ओतं प्रोतं पटवद्यत्र विश्वम् ॥ यदंशतोऽस्य स्थितिजन्मनाशा नस्योतवद्यस्य वशे च लोकः ॥ १२ ॥ यो नामभिर्वाचि जनान्निजायां बध्नाति तंत्यामिव दामभिर्गाः ॥ यस्मै बलिं त इमे नामकर्मनिबंधबद्धाश्चकिता वहंति ॥ १३ ॥ अहं महेंद्रो निर्ऋतिः प्रचेताः सोमोऽग्निरीशः पवनोऽर्को विरिंचः ॥ आदित्यविश्वे वसवोऽथ साध्या मरुद्गणा रुद्रगणाः ससिद्धाः ॥ १४ ॥ अन्ये च ये विश्वसृजोऽमरेशा भृग्वादयोऽस्पृष्टरजस्तमस्काः ॥ यस्येहितं न विदुः स्पृष्टमायाः सत्वप्रधाना अपि किं ततोऽन्ये ॥ १५ ॥ यं वै न गोभिर्मनसाऽसुभिर्वा हृदा गिरा वाऽसुभृतो विचक्षते ॥ आत्मानमंतर्हृदि संतमात्मनां चक्षुर्यथैवाकृतयस्ततः परम् ॥ १६ ॥

कुर्वंतीत्यर्थः ॥ १३ ॥ यस्य च लीला दुर्विभाव्येत्याह । अहमिति द्वाभ्याम् ॥ १४ ॥ न स्पृष्टं रजस्तमश्च यैः । ईहितमभिप्रेतं चेष्टितं वा न विदुः । स्पृष्टमाया मायया स्पृष्टाः । ततस्तेभ्योऽन्ये न विदुरिति किं पुनर्वक्तव्यम् ॥ १५ ॥ तन्मायया विमोहितत्वान्न जानंतीत्युक्तमविषयत्वाच्च तस्येत्याह । यमिति । गोभिरिंद्रियैर्हृदा चित्तेन न विचक्षते न पश्यंति । यद्वाचानभ्युदितं यन्मनो न मनुत इत्यादिश्रुतेः । आत्मनां जीवानामात्मानं द्रष्टारम् । आकृतयो रूपाणि चक्षुर्यथा कर्मभूतं न जानंति ततः परमा-

तात ॥ १३ ॥ इतरांची तर गोष्ट पाहिजे कशाला ? परंतु, मी यम, महेंद्र, निर्ऋति, वरुण, चंद्र, अग्नि, शंकर, वायु, सूर्य, ब्रह्मदेव, द्वादशादित्य, विश्वेदेव, अष्टवसु, साध्य, मरुद्गण, सिद्धांसहवर्तमान रुद्रगण तसेच इतर जे मरीचिप्रभृति जगत्स्रष्टे आहेत ते, बृहस्पति आदिकरून सुरेश्वर आणि रजोगुण व तमोगुण यांचा स्पर्शहि नसल्यामुळें सत्त्वगुणच ज्यांच्यामध्यें मुख्य आहे असे भृग्वादिक ऋषीहि, मायेनें मोहित झाल्यामुळें ज्याची लीला जाणत नाहींत ॥ १४ ॥ १५ ॥ आणि जसें तांबड्या काळ्यावगैरे रंगांनीं युक्त असलेले रूपवान् पदार्थ, आपणास पाहणाऱ्या व आपणाहून निराळ्या नेत्रेंद्रियाला पहात नाहींत त्याप्रमाणें सर्वहि प्राणी आपल्या हृदयामध्यें असलेल्या त्या आपल्या द्रष्ट्याला, इंद्रियें, मन, प्राण, चित्त अथवा वाणी ह्यांच्या योगेंकरून जाणत नाहींत, अशाप्रकारचा तो परमेश्वर माझ्याहून निराळाच आहे ॥ १६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां याप्रकारचा परमेश्वर तुझ्याहून भिन्न असो. परंतु आमची निर्भर्त्सना करून ज्यांनीं त्या पातक्यांचें रक्षण केलें ते कोण ? ह्मणून विचाराल तर—हे दूतहो, स्वतंत्र, सर्वोत्कृष्ट, सर्वेश्वर, मायाधिपति आणि महात्मा असा जो श्रीहरि त्याचे दूत, प्रायशः या त्रैलोक्यामध्यें संचार करित असतात व दिसण्यांत ते मनोहर असून त्यांचें रूप, गुण व स्वभाव हे श्रीहरीसारखेच असतात ॥ १७ ॥ आणि जे देवांनाहि पूज्य आहेत, ज्यांची रूपें अवलोकन करण्यासहि अशक्य आहेत व जे अत्यंत अलौकिक आहेत असे ते विष्णुदूत, त्या विष्णूची भक्ति करणाऱ्या मनुष्यजनांचें माझ्यापासून, शत्रूंपासून व अग्नि इत्यादिकांपासून सर्वठिकाणीं रक्षण करितात ॥ १८ ॥ बरें; ते जर विष्णुभक्त असतील तर त्यांनीं अधार्मिक अजामिळाचा पक्षपात कसा केला ह्मणून विचाराल तर—हे दूतहो साक्षात् भगवंतानें सांगितलेला हा धर्म तर ऋषि, देव, सिद्धां-

---

कृतीनां प्रकाशकम् । न हि प्रमाता प्रमाणस्य विषय इति भावः । एवंभूतः परमेश्वरो मदन्योऽस्तीति पूर्वेणैव संबंधः ॥ १६ ॥ भवत्वेवंभूतोऽन्यः परमेश्वरो ये पुनरस्मान्निर्भर्त्स्यं पापिनं रक्षितवंतस्ते के । तानाह । तस्येति द्वाभ्याम् । तस्यैव रूपं गुणाः प्रभावादयः स्वभावो भक्तवात्सल्यादिर्येषां ते ॥ १७ ॥ विष्णोर्भूतानि भृत्याः । दुर्दर्शानि द्रष्टु-

तस्यात्मतंत्रस्य हरेरधीशितुः परस्य मायाधिपतेर्महात्मनः ॥ प्रायेण दूता इह वै मनोहराश्चरंति तद्रूपगुणस्वभावाः ॥ १७ ॥ भूतानि विष्णोः सुरपूजितानि दुर्दर्शलिंगानि महाद्भुतानि ॥ रक्षंति तद्भक्तिमतः परेभ्यो मत्तश्च मर्त्यानथ सर्वतश्च ॥ १८ ॥ धर्मं तु साक्षाद्भगवत्प्रणीतं न वै विदुर्ऋषयो नापि देवाः ॥ न सिद्धमुख्या असुरा मनुष्याः कुतश्च विद्याधरचारणादयः ॥ १९ ॥ स्वयंभूर्नारदः शंभुः कुमारः कपिलो मनुः ॥ प्रह्लादो जनको भीष्मो बलिर्वैयासकिर्वयम् ॥ २० ॥ द्वादशैते विजानीमो धर्मं भागवतं भटाः ॥ गुह्यं विशुद्धं दुर्बोधं यं ज्ञात्वाऽमृतमश्नुते ॥ २१ ॥ एतावानेव लोकेऽस्मिन्पुंसां धर्मः परः स्मृतः ॥ भक्तियोगो भगवति तन्नामग्रहणादिभिः ॥ २२ ॥ नामोच्चारणमाहात्म्यं हरेः पश्यत पुत्रकाः ॥ अजामिलोऽपि येनैव मृत्युपाशादमुच्यत ॥ २३ ॥

मप्यशक्यानि लिंगानि रूपाणि येषां तानि । तद्भक्तिमतो विष्णुभक्तान् । परेभ्यः शत्रुभ्यो मत्तः सर्वतोऽग्न्यादिभ्यश्च रक्षंति ॥ १८ ॥ ननु विष्णुभक्ताश्चेत्कथमधर्मपक्षपातं कृतवंतस्तत्राह । धर्ममिति । ऋषयो भृग्वादयः ॥ १९ ॥ ननु केऽपि चेन्न जानंति तस्य सत्त्वे किं प्रमाणं तत्राह । स्वयंभूरिति । कुमारः नसत्कुमारः । वयमित्यात्मानमेव बहुमन्यमानो निर्दिशति ॥ २० ॥ हे भटाः ॥ २१ ॥ तमेव धर्ममाह । एतावानिति ॥ २२ ॥ न चात्र प्रमाणं वक्तव्यं दृष्टत्वादित्याह । नामोच्चारणेति ।

तील मुख्य, असुर आणि मनुष्य हेसुद्धां कोणी जाणत नाहींत, मग विद्याधर आणि चारण इत्यादिक कोठून जाणणार ! ॥ १९ ॥ आतां कोणीच जर जाणत नाहींत तर तो धर्म आहे, ह्याविषयीं प्रमाण काय ? असें ह्मणाल तर— हे योद्धे हो, ब्रह्मदेव, नारद, शंकर, सनत्कुमार, कपिल, मनु, प्रह्लाद, जनक, भीष्म, बलि, शुक व मी (यम) हे बाराजण आह्मीं गुह्य, अत्यंत शुद्ध आणि दुर्बोध असा भगवंतानें सांगितलेला धर्म जाणतों. त्या धर्माचें महत्त्व इतकें आहे कीं, जो धर्म केवळ जाणला असतांहि मोक्ष प्राप्त होतो, मग आचरण केला असतां मोक्ष प्राप्त होईल यांत आश्चर्य काय ? ॥ २० ॥ २१ ॥ अहो, भगवंताच्या नामोच्चारणादिकांनीं त्याचेठिकाणीं भक्ति करणें इतकाच पुरुषांचा या मनुष्यलोकीं श्रेष्ठ धर्म सांगितला आहे ॥ २२ ॥ हे वत्सहो, ज्या पुत्राला ठेवलेल्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नांवाच्या केवल एकवार उच्चारानें अजामिलसुद्धां मृत्युपाशांतून मुक्त झाला असें हें हरिनामोच्चारणमाहात्म्य कसें आहे तें पहा! ॥ २३ ॥ आतां केवल नामाच्या आभासानेंच सर्व पातकांचा क्षय कसा होईल? असें ह्मणाल तर, हे दूतहो, भगवंताच्या गुणांचें, कर्माचें व नामांचें उत्तम प्रकारेंकरून कीर्तन करणें ह्या एवढ्या मोठ्या साधनांची पुरुषांच्या केवल पापनाशाकरितांच उपयोग करण्याची गरज नाहीं. कारण, महापातकी अजामिल मरणदुःखानें विवश झाल्यामुळें अस्वस्थचित्त असतांना

येनैव केवलेन सकृदुच्चारितेन ॥ २३ ॥ ननु नामाभासेन कथं सर्वपापक्षयः स्यात्। श्रद्धाभक्त्यावृत्त्यादेरपि विधानात्। तथाहि। सायंप्रातर्गृणन् भक्त्या दुःखग्रामाद्विमुच्यत इति ॥ अनुदिनमिदमादरेण शृण्वन्निति श्रवणं कीर्तनं ध्यानं हरेरद्भुतकर्मणः ॥ जन्मकर्मगुणानां च तदर्थेऽखिलचेष्टितमित्याद्यस्मिन्नेव पुराणे तत्र तत्र पठ्यते। पुराणांतरे च। पापक्षयश्च भवति स्मरतां तमहर्निशमिति ॥ अत्रैव च। तस्मात्संकीर्तनं विष्णोर्जगन्मगलमंहसाम् ॥ महतामपि कौरव्य विद्ध्यैकांतिकनिष्कृतमित्यादिना सम्यक्कीर्तनादेव मुच्यते। किंच तथा सति किमिति मन्वादयो द्वादशाब्दादीनि स्मरेयुः तस्मादिदमनुपपन्नमिव तत्राह। एतावतेति। भगवतो गुणानां कर्मणां च नाम्नां च सम्यक्कीर्तनमिति यदेतावता पुंसामघनिर्हरणाय पापक्षयमात्रायालमुपयोगो नास्ति। अलंशब्दोऽत्र वारणे। यथाहामरसिंहः। अलं भूषणपर्याप्तिशक्तिवारणवाचकमिति ॥ उपयोगाभावमेवाह। अजामिलो महापातक्यपि नारायणेति विक्रुश्य न तु सम्यक्कीर्तयित्वा तच्च पुत्रं विक्रुश्य न तु हरिम्। अघवानश्चिरपि म्रियमाणोऽस्वस्थचि-

एतावताऽलमघनिर्हरणाय पुंसां संकीर्तनं भगवतो गुणकर्मनाम्नाम् ॥ विक्रुश्य पुत्रमघवान्यदजामिलोऽपि नारायणेति म्रियमाण इयाय मुक्तिम् ॥ २४ ॥ प्रायेण वेद तदिदं न महाजनोऽयं देव्या विमोहितमतिर्बत मायया5लम् ॥ त्रय्यां जडीकृतमतिर्मधुपुष्पितायां वैतानिके महति कर्मणि युज्यमानः ॥ २५ ॥

त्तोऽपि मुक्तिमवाप न त्वघनिर्हरणमात्रमतो नामाभासेनापि सर्वपापक्षय इत्येव तत्त्वम्। आवृत्तिश्रद्धादिविधयस्तु पापवासनाक्षयार्था इत्युक्तमेव हरेर्गुणानुवादः खलु सत्त्वभावन इत्यत्र ॥ २४ ॥ यत्तूक्तं व्यर्थं तर्हि द्वादशाब्दादिस्मरणमिति तत्राह। प्रायेणेति। महाजनो मन्वादिः। अयं भावः। यथा मृतसंजीवनौषधिमजानंतो वैद्या रोगनिर्हरणाय त्रिकटुकनिंबादीनि स्मरंति तथा स्वयंभूशंभुप्रमुखद्वादशव्यतिरेकेणायं महाजनोऽतिगुह्यमिदमज्ञात्वा द्वादशाब्दादिकं स्मरतीति। किंच मायया देव्या अलं विमोहितमतिरयं जनो मधु मधुरं यथा भवत्येवं पुष्पितायां पुष्पस्थानीयैरर्थवादैर्मनोहरायां त्रय्यां जडीकृताऽभिनिविष्टा मतिर्यस्य अतो महत्येव कर्मणि श्रद्धया युज्यमानो नाल्पे प्रवर्तते। दृश्यते हि। प्राकृतस्य लोकस्य महति मंत्रादौ श्रद्धाल्पे चाश्रद्धा तस्मादस्य ग्राहको नास्तीति तैर्नोक्तम्। यद्वा स्वाधीनः सिंहोऽस्त्येतावता श्वसृगालादिनिवारणाय तं यथा न प्रयुंजते तथाऽतितुच्छत्वात्पापस्य न तन्निरसनाय परममंगलं हरेर्नाम स्मरंति। यद्वा नाममाहात्म्यज्ञाने सर्वमुक्तिप्रसंगादित्येषा दिक्।

'नारायण' ह्मणून पुत्राकरितां आक्रोश करूनही मुक्तीस गेला ॥ २४ ॥ तर मग मन्वादिकांनीं द्वादशाब्दादिक प्रायश्चित्तें उगीच सांगितलीं असें ह्मणाल तर– हे दूतहो हे मनुप्रभृति मोठमोठे लोक प्रायशः तें हें हरिनाममाहात्म्य जाणत नाहींत ह्मणूनच ते पापक्षयार्थ द्वादशाब्दादि प्रायश्चित्तें सांगतात व मायादेवीनें त्यांच्या बुद्धीला अत्यंत मोह पाडल्यामुळें श्रवण करणाऱ्यास मधुर लागेल अशा रीतीनें पुष्पस्थानभूत अर्थवादांनीं मनोहर असलेल्या तिन्ही वेदांमध्यें त्यांच्या मतीचा अभिनिवेश होतो आणि त्यामुळें विस्तारयुक्त अशा मोठ्या कर्मांमध्येंच ते श्रद्धापूर्वक प्रवृत्त होऊन हरिनामोच्चारणासारख्या अल्प अशा प्रायश्चित्तरूप कर्मांमध्यें ते प्रवृत्त होत नाहींत ॥ २५ ॥ ॥११॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

याप्रमाणें विचार करून जे ज्ञानवान् लोक, खरोखर एकाग्रमनानें अविनाशी भगवंताचेठिकाणीं भक्ति करित असतात, त्यांना मजपासून दंड होणें योग्य नाहीं. कारण, त्यांचे-ठिकाणीं पातक नसतेंच व जरी कदाचित् असलें तरी त्याचाही महाकीर्तिमान् परमेश्वराचें नामसंकीर्तनच नाश करितें ॥२६॥ असो. याप्रमाणें धर्मतत्त्वाचा निर्णय करून, सेवकांना यमधर्म आज्ञा करितो कीं, जे समदृष्टि साधु लोक भगवंताला शरण गेलेले असतात, त्यांच्या पवित्र कथांचें देव व सिद्ध वर्णन करीत असतात. तस्मात् श्रीहरीच्या गदेनें चोहोंकडून रक्षण केलेल्या त्यांच्या समीपदेखील तुह्मीं कधीं जाऊं नका. कारण, त्यांना दंड करण्यास आह्मीं व प्रत्यक्ष काळही समर्थ नाहीं ॥ २७ ॥ तर मग येथें शिक्षा करण्याकरितां आह्मी कोणांला आणावें ? असें विचाराल तर–हे दूतहो, सर्वसंग परित्याग केलेल्या रसज्ञ परमहंसगणांनीं निरंतर सेवन केलेल्या भगवं-

ग्रंथविस्तरभयात्तु नातिप्रपंचयते ॥ २५ ॥ भावयोगं भक्तियोगम् । अमीषां पातकं न स्यादेव । यदि स्यात् । उरुगायस्य वादः कीर्तनम् ॥ २६ ॥ तदेवं धर्मतत्त्वं निर्णीय भृत्याननुशास्ति । त इति । ये भगवंतं प्रपन्नास्ते देवैः सिद्धैश्च परिगीतपवित्रगाथा वर्णितपवित्रकथा अतस्तान्नोपसीदत तत्समीपमपि न गच्छत । वयः कालोऽपि न प्रभवति ॥ २७ ॥ के तर्हि दंडार्थमानेया इत्यत्राह । तानिति द्वाभ्याम् । असतो दुष्टान् । तानेवाह । मुकुंदपादारविंदयोर्यो मकरंदरूपो रसस्तस्माद्विमुखान् । कथंभूतात् ।

एवं विमृश्य सुधियो भगवत्यनंते सर्वात्मना विदधते खलु भावयोगम् ॥ ते मे न दंडमर्हंत्यथ यद्यमीषां स्यात्पातकं तदपि हंत्युरुगायवादः ॥ २६ ॥ ते देवसिद्धपरिगीतपवित्रगाथा ये साधवः समदृशो भगवत्प्रपन्नाः ॥ तान्नोपसीदत हरेर्गदयाऽभिगुप्तान्नैषां वयं न च वयः प्रभावम दंडे ॥ २७ ॥ तानानयध्वमसतो विमुखान्मुकुंदपादारविंदमकरंदरसादजस्रम् ॥ निष्किंचनैः परमहंसकुलैरसङ्गैर्जुष्टाद्गृहे निरयवर्त्मनि बद्धतृष्णान् ॥ २८ ॥ जिह्वा न वक्ति भगवद्गुण नामधेयं चेतश्च न स्मरति तच्चरणारविंदम् ॥ कृष्णाय नो नमति यच्छिर एकदाऽपि तानानयध्वमसतोऽकृतविष्णुकृत्यान् ॥ २९ ॥ तत्क्षम्यतां स भगवान्पुरुषः पुराणो नारायणः स्वपुरुषैर्यद्सत्कृतं नः ॥ स्वानामहो न विदुषां रचितांजलीनां क्षांतिर्गरीयसि नमः पुरुषाय भूम्ने ॥ ३० ॥

निष्किंचनैरजस्रं जुष्टात् । तेषां ज्ञापकमाह । निरयवर्त्मनि स्वधर्मशून्ये गृहे बद्धा तृष्णा यैस्तान् ॥२८॥ किंच जिह्वेत्यादि । यच्चेषां जिह्वेत्याद्यन्वयः । न कृतं विष्णुकृत्यं भगवद्व्रतं यैः २९ ॥ भगवंतं क्षमापयति तदिति । अयं भावः । नः स्वपुरुषैरस्मदीयत्वेन स्थितैः स्वीयैरेव पुरुषैर्यद्यस्मादसदन्याय्यं कृतं तत्तस्मात्स्वयमेव क्षम्यतां सहताम् । स्वानां स्वीयानां भक्तानां नोऽस्माकं न विदुषामज्ञानाम् । अहो गरीयसि तस्मिन्क्षांतिर्युक्तैव । मह इति पाठे स्वीयानां माहात्म्यमविदुषां नः क्षमां करोत्वित्यर्थः ॥ ३० ॥

ताच्या चरणकमलांतील मकरंदरूप रसापासून पराङ्मुख असून नरकाचा मार्गच कीं काय अशा आपल्या स्वधर्मशून्य घरामध्यें ज्यांनीं आशा धारण केली आहे त्या दुष्ट लोकांना तुह्मीं येथें आणीत जा ॥ २८ ॥ आणि ज्यांची जिव्हा एकदांही भगवंताच्या गुणयुक्त नामाचा उच्चार करित नाहीं, ज्यांचें मन कधींही त्याच्या चरणारविंदाचें स्मरण करित नाहीं आणि ज्यांचें मस्तक एकदांसुद्धां श्रीकृष्णाला नम्र होत नाहीं, असे जे भगवत्सेवा न करणारे दुष्ट असतील त्यांना तुह्मी आणित जा ॥ २९ ॥ असो. ज्याअर्थीं आमच्या लोकांनीं अन्यायाचें वर्तन केलें त्याअर्थीं षड्गुणैश्वर्यसंपन्न असा तो पुराणपुरुष नारायण, आपण होऊनच तें सहन करो. कारण, हात जोडून असलेल्या आह्मां अज्ञ स्वभक्तांची क्षमा करणें हेंच त्या सर्वश्रेष्ठ परमेश्वराला योग्य आहे. त्या सर्वव्यापी व सर्वांतर्यामी परमेश्वराला नमस्कार असो ॥३०॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तस्मात् हे कुरुकुलोत्पन्ना राजा, जगन्मंगलरूप असें विष्णूचें जें नामसंकीर्तन तेंच मोठमोठ्या पातकांचेंही सर्वोत्कृष्ट प्रायश्चित्त आहे असें जाण ॥ ३१ ॥ कारण श्रीहरीचे अमर्याद पराक्रम वारंवार श्रवण करणाऱ्या व पठण करणाऱ्या पुरुषांचें अंतःकरण, अनायासानें उत्पन्न झालेल्या भक्तीच्या योगानें जसें शुद्ध होतें, तसें व्रतादिकांच्या योगानें शुद्ध होत नाहीं ॥ ३२ ॥ श्रीकृष्णाच्या चरणकमलांतील मकरंदाचा स्वाद घेणारा जो पुरुष आहे तो, पूर्वीं अतितुच्छ मानून टाकिलेल्या दुःखप्रद विषयांचेठिकाणीं फिरून कधींही रममाण होत नाहीं आणि त्या मकरंदाचा आस्वाद न घेणारा व विषयवासनांनीं घेरलेला असा जो अन्य पुरुष तो तर, आपल्या

तस्मादित्यादिः शुकोक्तिः । जगतोऽपि मंगलरूपम् ॥ ३१ ॥ एकांतिकत्वमेवाह । गृण्वतामिति । व्रतादिभिस्तथा न शुद्ध्येत् ॥ ३२ ॥ एतदुपपादयति । कृष्णांघ्रिपद्मयोर्मधु लेढि आस्वादयतीति तथा । मधुलिहताऽतितुच्छत्वेन विसृष्टा ये मायागुणा विषयास्तेषु पुनर्न रमते । अन्यस्तु तन्मध्वास्वादरहितोऽत एव कामाभिभूतः सन्नात्मनो रजः पापं प्रमार्ष्टुमपि कर्मैव प्रायश्चित्तरूपमीहेत यतः कर्मणः पुनरपि रजः पापं स्यादेव कुंजरशौचवत् सत्त्वशोधकत्वाभावात् ॥ ३३ ॥ नैव विस्मितधियो ब-

तस्मात्संकीर्तनं विष्णोर्जगन्मंगलमंहसाम् ॥ महतामपि कौरव्य विद्ध्येकांतिकनिष्कृतम् ॥ ३१ ॥ शृण्वतां गृणतां वीर्याण्युद्दामानि हरेर्मुहुः ॥ यथा सुजातया भक्त्या शुद्ध्येन्नात्मा व्रतादिभिः ॥ ३२ ॥ कृष्णांघ्रिपद्ममधुलिण्न पुनर्विसृष्टमायागुणेषु रमते वृजिनावहेषु ॥ अन्यस्तु कामहत आत्मरजः प्रमार्ष्टुमीहेत कर्म यत एव रजः पुनः स्यात् ॥ ३३ ॥ इत्थं स्वभर्तृगदितं भगवन्महित्वं संस्मृत्य विस्मितधियो यमकिंकरास्ते ॥ नैवाच्युताश्रयजनं प्रतिशंकमाना द्रष्टुं च बिभ्यति ततःप्रभृति स्म राजन् ॥ ३४ ॥ इतिहासमिमं गुह्यं भगवान्कुंभसंभवः ॥ कथयामास मलय आसीनो हरिमर्चयन् ॥ ३५ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे षष्ठस्कंधे तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥ ॥

भूवुः किंतु सत्यमुक्तमित्येव मेनिरे । ततःप्रभृति प्रतिशंकमाना अस्मानेवैष हन्यादिति शंकं वहंतस्तं द्रष्टुमपि बिभ्यति स्म । पाठांतरे तु विस्मितधियो जाताः । ते च ततःप्रभृति बिभ्यति स्मेत्यर्थः ॥ ३४ ॥ कुंभसंभवोऽगस्त्यो मलये पर्वत आसीनोऽव्यग्रो हरिमर्चयन् । पुनः पुनर्विश्वासार्थं हरेः पादौ स्पृशन्नित्यर्थः ॥ ३५ ॥ इति श्रीमद्भागवते षष्ठस्कंधे टीकायां तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥ ॥

पातकांचे परिमार्जन करण्याकरितांही पुन्हा प्रायश्चित्तरूप कर्मच करितो व त्या कर्मापासून फिरूनही पातकच उत्पन्न होतें ॥ ३३ ॥ हे राजा, याप्रमाणें आपल्या प्रभूनें निवेदन केलेलें भगवन्माहात्म्य स्मरण करून त्या यमदूतांच्या मनाला विस्मय न वाटतां 'हें सांगितलेलें सर्व खरें आहे' असेंच ते मानूं लागले व तेव्हांपासून 'हा आमचाच घात करील म्हणून' शंका बाळगित असलेले ते यमदूत, विष्णूच्या आश्रयानें राहिलेल्या जनाला अवलोकन करण्यासही भिऊं लागले ॥ ३४ ॥ हे राजा, हा गुह्य इतिहास, पूर्वीं एकाग्र अंतःकरणपूर्वक मलयपर्वतावर बसून श्रीहरीचें अर्चन करणाऱ्या भगवान् अगस्त्यऋषीनें मला कथन केला होता ॥ ३५ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील षष्ठस्कंधापैकीं यमकृत स्वदूतसांत्वननामक हा तिसरा अध्याय समाप्त झाला ॥ ३ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां विश्वरूपाचें जन्म कथन करण्याकरितां या चवथ्या अध्यायापासून तीन अध्यायांनीं प्रथम, प्रचेत्यांचा दक्षनामक जो पुत्र त्याचा वंश कथन केला आहे ॥ १ ॥ त्यांत या चवथ्या अध्यायामध्यें, प्रजोत्पत्तीकरितां दक्षानें तपश्चर्या करून हंसगुह्यनामक स्तोत्रानें श्रीहरीचें आराधन केलें, अशी कथा वर्णन केली आहे ॥ २ ॥ प्रसंगोपात्त नाममाहात्म्य श्रवण करून स्वायंभुव मनूच्या पुत्रांच्या वंशांतील वंशविस्तार जाणण्याची इच्छा करणारा राजा ह्मणाला– हे भगवन्, देव, असुर, नर, नाग, मृग आणि पक्षी ह्यांची जी स्वायंभुव मन्वंतरांत झालेली सृष्टि, तृतीयस्कंधामध्यें तूं संक्षेपानें मला कथन केलीस तिचाच विस्तार तुझ्यापासून जाणण्याची मी इच्छा करितों आणि मायातीत भगवंतानें ज्या शक्तीनें व ज्या प्रकारानें दक्षाच्या पुढील सृष्टी उत्पन्न केली त्या शक्तीला व त्या प्रकारालाहि जाणण्याची मी इच्छा करितों ॥ १ ॥ २ ॥ सूत ह्मणाला– हे मुनि-

---

चतुर्थादित्रिभिर्विश्वरूपजन्मविवक्षया ॥ प्रचेतःसुतदक्षस्य वंशस्तावत्प्रतन्यते ॥ १ ॥ चतुर्थे तु प्रजासृष्ट्यै दक्षेणाराधनं हरेः ॥ तपसा हंसगुह्याख्यस्तोत्रेण च निरूप्यते ॥ २ ॥ प्रसक्तानुप्रसक्तेन स्वायंभुवसुतान्वये ॥ नामप्रभावमाकर्ण्य वंशव्यासं बुभुत्सते ॥ देवासुरेति द्वाभ्याम् । सामासिकः संक्षिप्तो यः प्रोक्तस्तृतीयस्कंधे ॥ १ ॥ व्यासं विस्तारं ते त्वत्तो यया शक्त्या यथा ससर्ज तां शक्तिं तत्प्रकारं च ज्ञातुमिच्छामि । अनुसर्गमनुवृत्तं सर्गम् ॥ २ ॥ ३ ॥ दक्षादिरू-

राजोवाच ॥ देवासुरनृणां सर्गो नागानां मृगपक्षिणाम् ॥ सामासिकस्त्वया प्रोक्तो यस्तु स्वायंभुवेऽतरे ॥ १ ॥ तस्यैव व्यासमिच्छामि ज्ञातुं ते भगवन्यथा ॥ अनुसर्गं यया शक्त्या ससर्ज भगवान्परः ॥ २ ॥ सूत उवाच ॥ इति संप्रश्नमाकर्ण्य राजर्षेर्बादरायणिः ॥ प्रतिनंद्य महायोगी जगाद मुनिसत्तमाः ॥ ३ ॥ श्रीशुक उवाच ॥ यदा प्रचेतसः पुत्रा दश प्राचीनबर्हिषः ॥ अंतःसमुद्रादुन्मग्ना ददृशुर्गां द्रुमैर्वृताम् ॥ ४ ॥ द्रुमेभ्यः क्रुध्यमानास्ते तपोदीपितमन्यवः ॥ मुखतो वायुमग्निं च ससृजुस्तद्दिधक्षया ॥ ५ ॥ ताभ्यां निर्दह्यमानांस्तानुपलभ्य कुरूद्वह ॥ राजोवाच महान्सोमो मन्युं प्रशमयन्निव ॥ ६ ॥ मा द्रुमेभ्यो महाभागा दीनेभ्यो द्रोग्धुमर्हथ ॥ विवर्धयिषवो यूयं प्रजानां पतयः स्मृताः ॥७॥ अहो प्रजापतिपतिर्भगवान्हरिरव्ययः ॥ वनस्पतीनोषधीश्च ससर्जोर्जमिषं विभुः ॥८॥

पेण ससर्जेति वक्तुं दक्षजन्मप्रकारमाह । यदेति । प्राचीनबर्हिषः पुत्रा यदा समुद्रमध्यादुन्मग्ना निर्गतास्तदा गां पृथ्वीं द्रुमैर्वृतां ददृशुः । नारदोपदेशतः प्राचीनबर्हिषो निवृत्त्याऽराजके सति कृष्याद्यभावात् ॥ ४ ॥ तपसा दीपितो मन्युर्येषां ते । तेषां द्रुमाणां दग्धुमिच्छया ॥ ५ ॥ ताभ्यां वाय्वग्निभ्यां दह्यमानांस्तान्द्रुमान् । वनस्पतीनां राजा सोम उवाच । मा द्रुमेभ्य इति नवभिः ॥ ६ ॥ हे महाभागाः । विवर्धयिषवो विशेषेण वर्धयितुमिच्छवः ॥ ७ ॥ प्रजापतीनां तद्भक्ष्यभोज्यदाहोऽनुचित इत्याह । अहो

श्रेष्ठहो, ह्याप्रमाणें परीक्षित्‌राजर्षीनें केलेला उत्तम प्रश्न श्रवण करून, महायोगी ऋषिश्रेष्ठ श्रीशुकाचार्य, त्यांची प्रशंसा करून ह्मणाला कीं, ॥ ३ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, जेव्हां प्राचीनबर्हिराजाच्या प्रचेतसूनामक दहा पुत्रांनीं समुद्रांतून बाहेर येऊन वृक्षांनीं व्याप्त झालेली पृथ्वी अवलोकन केली, ॥ ४ ॥ तेव्हां संतापामुळें त्यांना कोप प्राप्त होऊन, ते वृक्षांवर क्रुद्ध झाले आणि त्यांना दग्ध करण्याच्या इच्छेनें त्यांनीं आपल्या मुखांतून वायु आणि अग्नि हे उत्पन्न केले ॥ ५ ॥ नंतर, हे कुरुश्रेष्ठा, त्या वायूच्या व अग्नीच्या योगानें दग्ध, होऊं लागलेल्या त्या वृक्षांना अवलोकन करून त्यांचा सोमनामक महाराजा, त्या प्रचेत्यांचा कोप शांत करित होत्साता ह्मणाला कीं,– ॥ ६ ॥ हे महाभाग्यवंत प्रचेतेहो, तुह्मी सर्वप्रजांचे अधिपति असल्यामुळें विशेषेंकरून त्यांची वृद्धि करण्याची इच्छा करणारे आहां. यास्तव या दीन वृक्षांचा द्रोह करणें हें तुह्मांला योग्य नाहीं ॥ ७ ॥ अहो, प्रजापालकांचा अधिपति जो अविनाशी भगवान् प्रभु श्रीहरि, त्यानें वनस्पतिरूपानें भक्ष्य व ओषधिरूपानें अन्न हीं उत्पन्न केलीं आहेत ॥ ८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तसेंच पक्षांनीं संचार करणाऱ्या पक्ष्यांचें अचल असें पुष्पफलादि अन्न, पादचारि गवादिपशूंचें पादरहित असें तृणादि अन्न, हस्तांनीं युक्त असलेल्या व्याघ्रादिकांचें हस्तरहित असें मृगादिपशुरूप अन्न आणि दोन पायांनीं युक्त असलेल्या मनुष्यांचें चतुष्पादादिरूप अन्न हें श्रीहरीनेंच उत्पन्न केलें आहे ॥ ९ ॥ तस्मात् हे निष्पापहो, पित्यानें (प्राचीनबर्हिराजानें) व देवाधिदेव भगवंतानें प्रजोत्पत्तीकरितां आज्ञा केलेले तुह्मी, वृक्षांना दग्ध करण्यास कसे बरें योग्य व्हाल ? ॥ १० ॥ ह्याकरितां तुमच्या पित्यानें, पितामहानें व प्रपितामहानींसुद्धां सेवन केलेल्या सन्मार्गाचा तुह्मी आश्रय करा आणि वृद्धिंगत झालेला हा आपला कोप शांत करा ॥ ११ ॥ हे प्रचेतेहो, बालकांचें रक्षण करणारे जसे मातापितरच आहेत, नेत्रांचें रक्षण करणाऱ्या जशा पापण्याच आहेत, स्त्रीचा रक्षक व पोषक जसा पतिच आहे, भिक्षूंचा निर्वाह करणारा जसा गृहस्थच आहे आणि अज्ञजनांचा सुहृद् जसा ज्ञानोपदेश करणारा ज्ञानीच आहे त्याप्रमाणें प्रजाजनांचा रक्षण करणारा राजाच होय ॥ १२ ॥ त्यांतूनहि प्राणी हें ईश्वराचें अधि-

---

इति त्रिभिः । ऊर्जं भक्ष्यम् । इषमन्नम् ॥ ८ ॥ ९ ॥ १० ॥ अत आतिष्ठताश्रयत सतां मार्गमुपशमं पित्रादिभिर्जुष्टम् ॥ ११ ॥ प्रजानां प्रजापतिरेव बंधुरतस्तज्जीविकानाशो न कर्तव्य इति दृष्टांतपंचकेनाह । तोकानां बालानां मातापितरौ । अज्ञानां ज्ञानदो बुध एव सुहृत् ॥ १२ ॥ ईश्वराधिष्ठानत्वाच्च भूतद्रोहो न युक्त इत्याह । अंत-

अन्नं चराणामचरा ह्यपदः पादचारिणाम् ॥ अहस्ता हस्तयुक्तानां द्विपदां च चतुष्पदः ॥ ९ ॥ यूयं च पित्राऽन्वादिष्टा देवदेवेन चानघाः ॥ प्रजासर्गाय हि कथं वृक्षान्निर्दग्धुमर्हथ ॥ १० ॥ आतिष्ठत सतां मार्गं कोपं यच्छत दीपितम् ॥ पित्रा पितामहेनापि जुष्टं वः प्रपितामहैः ॥ ११ ॥ तोकानां पितरौ बंधुर्दृशः पक्ष्म स्त्रियाः पतिः ॥ पतिः प्रजानां भिक्षूणां गृह्यज्ञानां बुधः सुहृत् ॥ १२ ॥ अंतर्देहेषु भूतानामात्माऽऽस्ते हरिरीश्वरः ॥ सर्वं तद्धिष्ण्यमीक्षध्वमेवं वस्तोषितो ह्यसौ ॥ १३ ॥ यः समुत्पतितं देह आकाशान्मन्युमुल्बणम् ॥ आत्मजिज्ञासया यच्छेत्स गुणानतिवर्तते ॥ १४ ॥ अलं दग्धैर्द्रुमैर्दीनैः खिलानां शिवमस्तु वः ॥ वार्क्षी ह्येषा वरा कन्या पत्नीत्वे प्रतिगृह्यताम् ॥ १५ ॥ इत्यामंत्र्य वरारोहां कन्यामाप्सरसीं नृप ॥ सोमो राजा ययौ दत्वा ते धर्मेणोपयेमिरे ॥ १६ ॥ तेभ्यस्तस्यां समभवद्दक्षः प्राचेतसः किल ॥ यस्य प्रजाविसर्गेण लोका आपूरितास्त्रयः ॥ १७ ॥

र्देहेष्विति । वो युष्माभिः ॥ १३ ॥ आकाशाद्देहे समुत्पतितमाकस्मिकमित्यर्थः । आत्मविचारेण यो नियच्छेत् ॥ १४ ॥ खिलानां शेषाणां वो युष्माकं च शिवमस्तु । वृक्षरक्षणार्थं तदीयां कन्यां ददाति । वार्क्षी वृक्षैः पालिता ॥ १५ ॥ आमंत्र्य सांत्वयित्वा । आप्सरसीमप्सरसः प्रम्लोचायाः सुताम् ॥ १६ ॥ १७ ॥

ष्ठान असल्यामुळें त्यांच्यापाशीं द्रोह करणें योग्य नाहीं असें सांगतो– प्राण्यांच्या देहामध्यें अंतर्यामिरूपानें समर्थ हरि वास करीत असतो. यास्तव सर्व चराचर विश्व त्याचेंच निवासस्थान आहे असें तुह्मीं अवलोकन करा, असें केल्यानें तुह्मीं त्याला संतुष्ट केलेसें होईल ॥ १३ ॥ हे प्रचेतेहो, देहामध्यें हृदयाकाशापासून अकस्मात् उत्पन्न झालेल्या भयंकर क्रोधाचें आत्मविचारानें जो संयमन करितो तोच गुणत्रयाचें अतिक्रमण करून भगवत्स्वरूपास पावतो ॥ १४ ॥ तस्मात् दीन वृक्षांना दग्ध करणें हें आतां पुरे करा. अवशिष्ट राहिलेल्या वृक्षांचें व तुमचें कल्याण असो; आणि वृक्षांनीं पालन केलेल्या व वरण्यास योग्य अशा ह्या कन्येचा तुह्मीं पत्नी ह्या नात्यानें स्वीकार करा ॥ १५ ॥ हे परीक्षित्‌राजा, याप्रमाणें प्रचेत्यांचें सांत्वन करून आणि सर्वोत्कृष्ट नितंबप्रदेशानें युक्त असलेली ती प्रम्लोचानामक अप्सरेची कन्या त्यांना अर्पण करून, सोमराजानें तेथून गमन केलें व त्यांनींही धर्मविधीनें तिच्यापाशीं विवाह करून घेतला ॥ १६ ॥ पुढें त्यांच्यापासून त्या मारिषेचेठिकाणीं प्राचेतस ह्मणून

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रसिद्ध असा दक्षनामक पुत्र प्रसिद्ध उत्पन्न झाला आणि त्याच्याच प्रजोत्पादनानें हें त्रैलोक्य भरून गेलें आहे ॥ १७ ॥ आतां कन्यांचेठिकाणीं प्रेम करणाऱ्या त्या दक्षानें, वीर्यद्वारा व मनोद्वारा प्राणी कसे उत्पन्न केले तें तूं सावधपणानें मजपासून श्रवण कर ॥ १८ ॥ हे राजा, आकाश, भूमी व जल ह्यांमध्यें राहणाऱ्या ह्या देव असुर व मनुष्य इत्यादिक प्रजा दक्षप्रजापतीनें पूर्वीं मनोमात्रेंकरूनच उत्पन्न केल्या ॥ १९ ॥ परंतु ती प्रजासृष्टि वृद्धिंगत होईना असें अवलोकन करून त्या दक्षप्रजापतीनें विंध्याचळाजवळ असलेल्या पर्वतावर जाऊन दुष्कर तपश्चर्या केली ॥ २० ॥ ती अशी कीं, त्याठिकाणीं पापनाशक असें एक अघमर्षणनामक सर्वोत्कृष्ट तीर्थ आहे; त्यामध्यें त्या दक्षानें त्रिकाल स्नान करून तपाच्या योगानें श्रीहरीला संतुष्ट केलें ॥ २१ ॥ हे राजा, ज्या हंसगुह्यनामक स्तोत्रानें अधोक्षज भगवंताची

दुहितृवत्सल इति तस्य कन्यावंश एवेत्युक्तम् । मम मत्तः ॥ १८ ॥ प्रजापतिर्दक्षः ॥ १९ ॥ अबृंहितमसंवृद्धम् । विंध्यस्य पादान्सन्निहितपर्वतान् ॥ २० ॥ २१ ॥ हंसगुह्याख्येन स्तोत्रेण । कस्य दक्षस्य ॥ २२ ॥ पराय सर्वोत्तमाय नमो दधे नमनं करोमि । परत्वे हेतुः । अवितथाऽनुभूतिश्चिच्छक्तिर्यस्य । अतो गुणत्रयाभासो जीवो निमित्तं माया च तयोर्बंधवे नि यं

यथा ससर्ज भूतानि दक्षो दुहितृवत्सलः ॥ रेतसा मनसा चैव तन्ममावहितः शृणु ॥ १८ ॥ मनसैवासृजत्पूर्वं प्रजापतिरिमाः प्रजाः ॥ देवासुरमनुष्यादीन्नभस्थलजलौकसः ॥ १९ ॥ तमबृंहितमालोक्य प्रजासर्गं प्रजापतिः ॥ विंध्यपादानुपव्रज्य सोऽचरद्दुष्करं तपः ॥ २० ॥ तत्राघमर्षणं नाम तीर्थं पापहरं परम् ॥ उपस्पृश्यानुसवनं तपसाऽतोषयद्धरिम् ॥ २१ ॥ अस्तौषीद्धंसगुह्येन भगवंतमधोक्षजम् ॥ तुभ्यं तदभिधास्यामि कस्यातुष्यद्यतो हरिः ॥ २२ ॥ प्रजापतिरुवाच ॥ नमः परायावितथानुभूतये गुणत्रयाभासनिमित्तबंधवे ॥ अदृष्टधाम्ने गुणतत्त्वबुद्धिभिर्निवृत्तमानाय दधे स्वयंभुवे ॥ २३ ॥ न यस्य सख्यं पुरुषोऽवैति सख्युः सखा वसन्संवसतः पुरेऽस्मिन् ॥ गुणो यथा गुणिनो व्यक्तदृष्टेस्तस्मै महेशाय नमस्करोमि ॥ २४ ॥

त्रे । एवमपि गुणेषु तत्त्वबुद्धिर्येषां तैर्जीवैरदृष्टं धाम स्वरूपं यस्य । तत्र हेतुः । निवृत्तं मानं यस्मात् । पाठांतरे निवृत्तं निरस्तं मानमवधिश्च यस्मात् । तर्हि कथं तस्य सिद्धिरत आह । स्वयंभुवे स्वप्रकाशाय ॥ २३ ॥ अदृष्टधामत्वं दर्शयन्नाह । नेति । पुरुषः सखा जीवोऽस्मिन्पुरे देहे वसन्नप्यत्रैव संवसतः सख्युर्यस्य सख्यं करणप्रवर्तकत्वादिकं नावैति न जानाति तस्मै । कुतः । व्यक्तदृष्टेः प्रपंचद्रष्टुः । न हि द्रष्टा दृश्यो भवतीति । प्रथमांतपाठे व्यक्ते प्रपंच एव दृष्टिर्यस्य सः । गुणो विषयो गुणिनो विषयिण

दक्षप्रजापतीनें स्तुति केली व ज्याच्यायोगानें श्रीहरि त्याच्यावर संतुष्ट झाला तें स्तोत्र तुला मी कथन करितों ॥ २२ ॥ दक्षप्रजापति ह्मणाला— ज्याची चिच्छक्ति सफल असल्यामुळें जो जीव आणि माया ह्यांचा नियंता आहे, ज्याच्यापासून प्रत्यक्षादि प्रमाणें माघारीं फिरलीं असल्यामुळें, विषयांनाच परमार्थ समजणाऱ्या जीवांनीं ज्याचें स्वरूप अवलोकन केलें जात नाहीं आणि जो स्वयंप्रकाश आहे त्या सर्वोत्कृष्ट परमात्म्याला मी नमस्कार करितों ॥ २३ ॥ आतां ईश्वराचें स्वरूप अदृष्ट कसें हें दर्शविण्याच्या अभिप्रायानें भाषण करितो कीं— जसा रूपादिक विषय, आपणाला प्रकाश करणाऱ्या इंद्रियादिकांचें प्रकाशकत्व जाणत नाहीं त्याप्रमाणें ह्या देहामध्यें वास करणारा अंतर्यामी सखा जीव, तेथेंच वास करीत असलेल्या ज्या प्रपंचसाक्षी सख्या ईश्वराचें, अंतःकरणाला प्रेरणा करणें इत्यादिक सख्य, जाणत नाहीं.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्या महेश्वराला नमस्कार असो ॥ २४ ॥ बरें; रूपादि विषय जड असल्यामुळें ते इंद्रियादिकांना न जाणोत परंतु सचेतन असलेला जीव, साक्षी आत्म्याला कां जाणत नाहीं? ह्या शंकेचें निरसन करीत ह्मणतो कीं– देह, प्राण, इंद्रियें, अंतःकरणें, महाभूतें व त्यांचीं सूक्ष्मरूपें हीं आपल्या स्वरूपाला, अन्य इंद्रियवर्गाला व ह्या दोहोंपेक्षांही भिन्न अशा देवतावर्गाला जाणत नाहींत आणि जीव तर, ह्या सर्व तिघांनाही जाणतो व ह्यांना कारणीभूत असलेले गुणही त्याला माहित आहेत, परंतु तोहि ज्या सर्वज्ञाला जाणत नाहीं. ह्मणजे तो जीव, देशादिपरिच्छिन्न असल्यामुळें अपरिच्छिन्न आत्म्याला जाणण्यास समर्थ होत नाहीं. त्या अनंताचें मी स्तवन करितों ॥२५॥ ह्याप्रमाणें परमेश्वराचें स्वरूप अदृष्ट कसें तें निवेदन करून त्याचें स्वप्रकाशत्व कथन करण्याच्या अभिप्रायानें भाषण करितो कीं– दर्शन व स्मरण यांचा नाश झाल्यामुळें ज्याकालीं नामरूपांचें बोधक अशा मनाची

इंद्रियादेः सख्यं प्रकाशकत्वं यथा न वेत्ति तद्वत् ॥ २४ ॥ ननु गुणो जडत्वान्न जानातीति जीवस्तु चेतनः किमिति न जानात्यत आह । देह इति । देहश्चासवश्च प्राणा अक्षाणींद्रियाणि मनवश्चांतःकरणानि भूतानि च मात्राश्च तन्मात्राण्यात्मानं स्वरूपं दृश्यमन्यमिंद्रियवर्गं तयोः परं देवतावर्गं च न विदुः। पुमान् जीवस्तु सर्वमेतत्त्रयं वेद गुणांश्च तन्मूलभूतान्वेद तज्ज्ञोऽपि सन्यं सर्वज्ञं न वेद तमनंतमीडे स्तौमि ॥ २५ ॥ अदृष्टधामत्वमुक्त्वा स्वप्रकाशत्वमाह । यदा मनस उपरामः समाधिर्न तु सुषुप्ताविव लयो न च जाग्रत्स्वप्नयोरिव विक्षेपः । तदाह । नामरूपे रूप्यते येन तत्तथा तस्य । उपरामे हेतुः । दृष्टं दर्शनं स्मृतिश्च तयोः संप्रमोषान्नाशात् । तदा यः केवलेन स्वरूपज्ञानेन प्रती-

देहोऽसवो ऽक्षामनवो भूतमात्रा नात्मानमन्यं च विदुः परं यत् ॥ सर्वं पुमान्वेद गुणांश्च तज्ज्ञो न वेद सर्वज्ञमनंतमीडे ॥ २५ ॥ यदोपरामो मनसो नामरूपरूपस्य दृष्टस्मृतिसंप्रमोषात् ॥ य ईयते केवलया स्वसंस्थया हंसाय तस्मै शुचिसद्मने नमः ॥ २६ ॥ मनीषिणोंऽतर्हृदि संनिवेशितं स्वशक्तिभिर्नवभिश्च त्रिवृद्भिः ॥ वह्निं यथा दारुणि पांचदश्यं मनीषया निष्कर्षंति गूढम् ॥ २७ ॥ स वै ममाशेषविशेषमायानिषेधनिर्वाणसुखानुभूतिः ॥ स सर्वनामा स च विश्वरूपः प्रसीदतामनिरुक्तात्मशक्तिः ॥ २८ ॥

यते तस्मै हंसाय शुद्धाय शुचि शुद्धं मनः सद्म प्रतीतिस्थानं यस्य तस्मै नमः ॥ २६ ॥ एवंभूतः केषां प्रतीयत इत्यपेक्षायामाह । मनीषिण इति द्वाभ्याम् । विवेकिनो यं निष्कर्षंति विविच्य ध्यायंति स निर्वाणसुखानुभूतिर्मम प्रसीदतामिति द्वयोरन्वयः । एवं निष्कर्षतां प्रतीयत इति भावः । किमिति निष्कर्षंति स्वशक्तिभिर्गूढमप्रकाशमानं कतिभिर्नवभिः पुनश्च त्रिवृद्भिस्त्रिगुणाभिः सप्तविंशत्युपाधिभिर्गूढमष्टाविंशं निष्कर्षंतीत्यर्थः । यद्वा नवभिः प्रकृतिपुरुषमहदहंकारपंचतन्मात्ररूपाभिः । त्रिवृद्भिस्त्रिगुणात्मिकाभिः । चकारात्षोडशविकाररूपाभिश्च । कथंभूतं निष्कर्षंति । मनीषयांऽतर्हृदि संनिवेशितं निश्चलीकृतं पांचदश्यं पंचदशसामिधेनीमंत्रैः प्रकाश्यमलौकिकं वह्निमिवाहंकारास्पदादात्मनोऽन्यं परमात्मानं निष्कर्षंतीत्यर्थः ॥ २७ ॥ अशेषा विशेषा यस्यास्तस्या मायाया निषेधेन निर्वाणसुखेऽनुभूतिर्यस्य । अप्रसक्तनिषेधासंभवात्प्रसक्तिमाह । स एव सर्वनामा

समाधि लागत्ये,त्या वेळीं केवल स्वरूपज्ञानानेंच जो समजला जातो व शुद्ध मन हेंच ज्याचें समजण्याचें स्थान आहे त्या शुद्धस्वरूप परमात्म्याला नमस्कार असो ॥ २६ ॥ परंतु अशाप्रकाराचा परमेश्वर कोणाला समजतो ह्या अपेक्षेचें पूरण करण्याकरितां ह्मणतो कीं– सामिधेनीनामकपंधरा मंत्रांनीं प्रकाशमान होणाऱ्या काष्ठस्थित अलौकिक अग्नीला जसें याज्ञिकलोक मंथनानें पृथक् करून काढितात त्याप्रमाणें हृदयामध्यें निश्चल केलेल्या व सत्तावीस तत्त्वरूप आपल्या शक्तिभूत उपाधींनीं प्रकाशमान नसलेल्या ज्या अठ्ठाविसाव्याचें स्वबुद्धीनें विवेचन करून, विवेकी लोक, ध्यान करितात आणि सर्व भेदांनीं परिपूर्ण असलेल्या मायेचा त्याग केल्यामुळें प्राप्त झालेल्या मुक्तिसुखामध्यें ज्याचा अनुभव येतो, ज्याचीं सर्व नामें सर्व रूपें आहेत आणि ज्याच्या स्वरूपीं मायारूप अचिंत्यशक्ति आहे तो परमात्मा मजवर प्रसन्न होवो ॥ २७ ॥ २८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

बरें, केवल स्वरूपज्ञानानेंच जर ईश्वर समजला जातो तर वागादिक इंद्रियांना अगोचर असल्यामुळें त्याला सर्वनामत्व व विश्वरूपत्व संभवणार नाहीं, अशी शंका घेऊन, सर्व नांवांच्या योगानें वाच्य व प्रत्यक्षादिकांच्या योगानें दृश्य असें जरी त्याचें स्वरूप संभवत नाहीं तथापि मायेमुळें सर्व संभवतें हें तीन श्लोकांनीं उपपादन करण्याच्या अभिप्रायानें नमन करितो कीं– जें जें वाणीनें उक्त, बुद्धीनें निश्चित, इंद्रियानीं गृहीत अथवा मनानें संकल्पित आहे तें तें स्वप्रकाश परमात्म्याचें रूप नव्हे. कारण, तें सर्व गुणांचेंच रूप होय आणि सचेतन अधिष्ठान असल्यावांचून गुणांचा लय व उत्पत्ति हीं संभवत नाहींत; ह्याकरितां, गुणांचा लय व उत्पत्ति ह्यांच्या योगानें ज्याचें

स एव विश्वरूप इति । तद्रूपत्वेऽपि वास्तवत्वाभावान्निषेधः संभवतीत्याह । अनिरुक्ताऽऽत्मनि शक्तिर्माया यस्य सः ॥ २८ ॥ ननु यदि केवलया स्वसंस्थया प्रतीयते तर्हि सर्वनामत्वं विश्वरूपत्वं चानुपपन्नं वागाद्यगोचरत्वादित्याशंक्य सर्वैर्नामभिर्वाच्यं प्रत्यक्षादिदृश्यं च तस्य स्वरूपं वस्तुतो मा भूत्तथापि मायया घटत इति श्लोकत्रयेणोपपादयन्नमस्करोति । यद्यदिति । यद्यद्वचसा निरुक्तमभिहितं धिया निरूपितं व्यवसितमक्षभिर्वैंद्रियैर्निरूपितं गृहीतमुतापि मनसाऽपि निरूपितं संकल्पितं यस्य स्वप्रकाशत्वं तस्य तत्स्वरूपं माभूत् । स्वरूपत्वाभावे हेतुः । हि यस्मात्तत्तद्गुणानामेव रूपम् । पाठांतरे गुणैर्वर्धितम् । स तु गुणव्यतिरिक्तः । यतो गुणानामपायविसर्गाभ्यां प्रलयोत्पत्तिभ्यां लक्ष्यत इति तथा । चेतनाधिष्ठानं विना तयोरसंभवात् । यद्वा यस्य स्वरूपं माभून्न भवति तस्मै नम इति तृतीयेनान्वयः ॥ २९ ॥ तदेवं वस्तुतो गुणस्वरूपत्वाभाव मंगीकृत्यानिरुक्तात्मशक्तिरित्यनेन द्योतितं मायया सर्ववाच्यत्वेन विश्वरूपत्वमाह । यस्मिन्नधिकरणे । यतोऽपादानात् । येन करणेन । यस्य संबंधि । यस्मै संप्रदानाय । यदी-

यद्यन्निरुक्तं वचसा निरूपितं धियाऽक्षभिर्वा मनसा वोत यस्य ॥ माभूत्स्वरूपं गुणरूपं हि तत्तत्स वै गुणापायविसर्गलक्षणः ॥ २९ ॥
यस्मिन्यतो येन च यस्य यस्मै यद्यो यथा कुरुते कार्यते च ॥ परावरेषां परमं प्राक्प्रसिद्धं तद्ब्रह्म तद्धेतुरनन्यदेकम् ॥ ३० ॥
यच्छक्तयो वदतां वादिनां वै विवादसंवादभुवो भवंति ॥ कुर्वंति चैषां मुहुरात्ममोहं तस्मै नमोऽनंतगुणाय भूम्ने ॥ ३१ ॥

प्सिततमम् । यः कर्ता । कुरुते स्वतंत्रः कार्यते चान्येन प्रयोज्यकर्त्रा । तद्ब्रह्मेति प्रत्येकं संबंधः । अत्र च सप्तभिर्यच्छब्दैः सप्तविभक्त्यर्था दर्शिताः । यथेति च क्रियाकारकसंबंधप्रकारवाचिनामव्ययानामर्थाः । कुरुते कार्यते चेति स्वार्थपरार्थक्रियान्वयश्च सर्वेषां दर्शितः । चशब्देन भावकर्मादिविहितप्रत्ययार्थाः संगृहीताः । तद्ब्रह्मैवेति कुतस्तत्राह । तद्धेतुस्तेषां कारणम् । तत्कुतः सर्वेभ्यः प्राक्प्रसिद्धम् । ननु ब्रह्मादयस्तद्धेतवः श्रूयंतेऽवरे च दृश्यंते तत्कथं ब्रह्मैव तद्धेतुस्तत्राह । परेषामवरेषां च हेतूनां परमं कारणम् । ननु सर्वकारणत्वे तस्य किं नाम सहकारि भवेत्तदानीमन्यस्याभावात् । सत्यं निरपेक्षमेव तत्कारणमित्याह । अनन्यद्विजातीयशून्यं एकं सजातीयशून्यं च । तस्मै नम इत्युत्तरेणान्वयः ॥ ३० ॥ नन्वेवं ब्रह्म चेद्विश्वस्य हेतुस्तर्हि न कदाचिदनीदृशं जगदिति वदंतो मीमांसकाः कुतोऽत्र विवदंते तैश्चान्ये स्वभाववादिनः संवदंते ते च

अनुमान होतें तो परमेश्वर गुणव्यतिरिक्त आहे ॥ २९ ॥ ह्याप्रमाणें वस्तुतः ईश्वराला गुणस्वरूप नाहीं असें स्वीकारून त्याचेठिकाणीं मायारूप अचिंत्यशक्ति आहे असें पूर्वीं सांगितल्यावरून मायेनें सर्ववाच्यत्वेंकरून सूचित झालेलें विश्वरूपच कथन करण्याच्या अभिप्रायानें भाषण करितो कीं– अधिकरण (सप्तमी), अपादान (पंचमी), करण (तृतीया), संबंधी (षष्ठी), संप्रदान (चतुर्थी), कर्म (द्वितीया), कर्ता व प्रयोजककर्ता (प्रथमा), हे सात विभक्तींचे अर्थ व भावकर्मादिक अर्थीं होणाऱ्या प्रत्ययांचे अर्थ हें सर्व ब्रह्मच आहे. कारण, ह्या सर्वांच्या पूर्वीं तें प्रसिद्ध असल्यामुळें तें त्यांचें कारण आहे, आणि ब्रह्मादिक उत्कृष्ट व अस्मदादिक निकृष्ट अशा असलेल्या कारणाचें तें मुख्य कारण असून सजातीयविजातीयभेदशून्य असें तें निरपेक्षच आहे ॥ ३० ॥ आतां, ह्याप्रमाणें ब्रह्म जर विश्वाचें कारण असेल तर ह्याविषयीं मी

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मांसक कां विवाद करितात? व दुसरे स्वभाववादी लोक त्यांना अनुमोदन कां देतात? आणि त्या उभयतांना तत्त्ववेत्त्यांनीं बोध केला असताहि ते फिरून फिरून मोहित कां होतात ? ह्या शंकेचें निरसन करण्याच्या अभिप्रायानें भाषण करितो कीं– ज्याच्या माया व अविद्या इत्यादि शक्ति वाद करणाऱ्या वादिजनांच्या विवादांचीं आणि कधीं कधीं संवादाचीं स्थानें होतात व ह्या वादिजनांच्या मनाला वारंवार मोह उत्पन्न करितात त्या सर्वव्यापी अनंतगुण परमात्म्याला नमस्कार असो ॥ ३१ ॥ बरें; ज्याच्या शक्ति विवादादिकांचीं स्थानें होतात तें ब्रह्म कोणतें ? हें सांगण्याच्या आशयानें भाषण करितो कीं– उपासनाशास्त्रामध्यें पाताल हें देवाचें पादमूल आहे येथून– देवाच्या

ते च तत्त्वविद्भिर्बोधिता अपि कुतः पुनः पुनर्मुह्यंति तत्राह । यस्य मायाविद्याद्याः शक्तयो विवादस्य क्वचित्संवादस्य भुवः स्थानानि भवंति तस्मै नमः ॥ ३१ ॥ ननु किं तद्ब्रह्म यस्य शक्तयो विवादादिभुवो भवंति तत्राह । अस्तीति । योग उपासनाशास्त्रं तत्र हि विराड्रूपेणोपासनायां पातालपादादिकमस्तीत्युपास्यत्वेन विधीयते । नास्तीति सांख्यं ज्ञानशास्त्रं तत्र ह्यपाणिपादः अचक्षुरश्रोत्रमिति च पादादि नास्तीति निषिद्ध्यते । तयोर्योगसांख्ययोर्यत्किंचित्सममनुवर्तमानमवेक्षितं प्रतीतं तद्बृहद्ब्रह्म । विवादास्पदं ब्रह्मेत्यर्थः । विवादं स्फुटयति । भिन्नावस्ति नास्तीत्येवंभूतौ विरुद्धौ धर्मौ ययोस्तयोर्भिन्नविषयत्वेऽपि विरोधो न स्यादित्येकस्थयोरित्युक्तमेकविषययोः । कुतो वस्तुनिष्ठयोः पादादिविधिप्रतिषेधयोरेकवस्तुनिष्ठत्वात् । समत्वे हेतुः । परम् । हि यतो विधिप्रतिषेधयोरविषयस्तयोः पादादिविषयत्वात् । तथा तद्विषयस्य सद्भावे किं प्रमाणं तदाह । अनुकूलमधिष्ठानं विना पादादिकल्पनायोगात् । अवधिं विना तन्निषेधायोगाच्च । तयोरुपपादकत्वेन सिद्धमित्यर्थः । तस्मै नम इति पूर्वस्यानुषंगः ॥ ३२ ॥

अस्तीति नास्तिति च वस्तुनिष्ठयेरेकस्थयोर्भिन्नविरुद्धधर्मयोः ॥ अवेक्षितं किंचन योगसांख्ययोः समं परं ह्यनुकूलं बृहत्तत् ॥३२॥
योऽनुग्रहार्थं भजतां पादमूलमनामरूपो भगवाननंतः ॥ नामानि रूपाणि च जन्मकर्मभिर्भेजे स मह्यं परमः प्रसीदतु ॥ ३३ ॥
यः प्राकृतैर्ज्ञानपथैर्जनानां यथाशयं देहगतो विभाति ॥ यथाऽनिलः पार्थिवमाश्रितो गुणं स ईश्वरो मे कुरुतान्मनोरथम् ॥ ३४॥

ननूदासीनस्य समस्य नमस्कारे को लाभस्तत्राह । य इति । पादमूलं भजतामनुग्रहार्थं प्राकृतनामरूपरहितोऽपि जन्मभिरवतारैर्विशुद्धोर्जितसत्त्वानि रूपाणि कर्मभिर्नामानि च यो भेजे । तत्कुतः । भगवानचिंत्यैश्वर्यः स मह्यं प्रसीदतु ॥ ३३ ॥ ननु त्वादृशाः सकामा गणेशादीन्प्रार्थयंते त्वं तु तान्विहाय किमिति भगवंतमेव प्रार्थयसे तत्राह । प्राकृतैरर्वाचीनैर्ज्ञानपथैरुपासनामार्गैर्यथाशयं तत्तद्वासनानुसारेण यो देहगतोऽतर्यामी तत्तद्देवतारूपेण विविधो भाति यथा वायुः पार्थिवं गुणं चंपकादिगंधभेदमाश्रित्य नानागंधवान्विभाति रेणोर्गुणं धूसरत्वादिकमाश्रित्य नानारूपवान् प्रतीयते तद्वत्तस्यैव तत्तद्देवतारूपेण फलदातृत्वात्स ईश्वर एव मे मनोरथं सत्यं करोतु । किमंतर्गतबहुभिर्देवतांतरैरित्यर्थः । तदुक्तं गीतासु। यो यो यां यां तनुं भक्तः श्रद्धयाऽर्चितुमिच्छति ॥ तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम् ॥ स तया श्रद्धया युक्तस्तस्याराधनमीहते ॥

शिरस्थानीं सत्यलोक आहे एथपर्यंत विराड्रूपानें सांगितलेल्या, उपासनेमध्यें ईश्वर आहे आणि ज्ञानशास्त्रांत ब्रह्माला पादादिक अवयव नाहींत ह्मणून अवयवयुक्त ईश्वर नाहीं अशाप्रकारचे निरनिराळे व परस्पर विरुद्ध धर्म,ज्यांमध्यें प्रतिपादन केले आहेत अशीं एकाच वस्तूचा आश्रय करून राहणारीं व एकाच वस्तूचें प्रतिपादन करणारीं जीं उपासना व ज्ञान हीं दोन शास्त्रें त्यांचेठिकाणीं विवादविषयाहून निराळें आणि विवादाला अनुकूळ असें जें कांहीं समत्वेंकरून समजण्यांत येतें तें सर्वव्यापि ब्रह्म होय, त्याला नमस्कार असो ॥ ३२ ॥ आतां उदासीन व सर्वत्र सारखा असणाऱ्या परमेश्वराला नमस्कार करून काय लाभ होणार आहे ? ह्या शंकेचें निरसन करण्याच्या अभिप्रायानें भाषण करितो कीं– प्राकृत नामरूपरहित असतांनाही ज्या अचिंत्य ऐश्वर्यांनी युक्त असलेल्या अनंत परमात्म्यानें, आपल्या चरणमूलाची सेवा करणाऱ्या ॥ १९ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लोकांवर अनुग्रह करण्याकरितां अवतारांच्या योगानें रूपें व कर्मांच्या योगानें नामें धारण केलीं आहेत तो मजवर प्रसन्न होवो ॥ ३३ ॥ आतां तुझ्यासारखे सकाम जन गणेशादिकांची प्रार्थना करितात परंतु त्यांना सोडून तूं कशाकरितां भगवंताचीच प्रार्थना करितोस, ह्या प्रश्नाचें उत्तर देण्याकरितां दक्षप्रजापति पुनरपि भाषण करितो कीं– ज्याप्रमाणें वायु चंपकादिक अनेक सुगंधिपुष्पांचा आश्रय करून नानाप्रकारच्या गंधांनीं युक्त असल्यासारखा भासतो त्याचप्रमाणें जो अंतर्यामी ईश्वर, अर्वाचीन ज्ञानमार्गांनीं जनांच्या इच्छेनुसार अनेकदेवतारूपानें भासमान होतो तो माझा मनोरथ सत्य करो ॥ ३४ ॥ श्रीशुकाचार्य म्हणाला– हे कुरुश्रेष्ठा, त्या अघमर्षणनामक तीर्थाचेठिकाणीं याप्रमाणें स्तुति केलेला तो भक्तवत्सल भगवान्, उत्तम स्तुति करणाऱ्या त्या दक्षच्या अग्रभागीं प्रकट झाला ॥ ३५ ॥ हे राजा, त्यानें आपले पाय गरुडाच्या स्कंधावर ठेविले होते, तो लांबलांब अशा आठ महाभुजांनीं युक्त असून त्यानें त्या हातांमध्यें चक्र, शंख, खड्ग, ढाल, बाण, धनुष्य, पाश व गदा हीं आठ

लभते च ततः कामान्मयैव विहितान्हि तानिति ॥ ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहमिति चेति ॥ ३४ ॥ संस्तुवतो दक्षस्य स भगवान् प्रत्यक्षोऽभूत् ॥ ३५ ॥ तं वर्णयति सार्धैश्चतुर्भिः । सुपर्णस्यांसे स्कंधे कृतौ पादौ येन । प्रलंबा अष्टौ महांतो भुजा यस्य । चक्राद्यष्टायुधधरः ॥ ३६ ॥ प्रसन्नं वदनमीक्षणे च यस्य । वनमालया नि-

श्रीशुक उवाच ॥ इतिस्तुतः संस्तुवतः स तस्मिन्नघमर्षणे ॥ आविरासीत्कुरुश्रेष्ठ भगवान्भक्तवत्सलः ॥ ३५ ॥ कृतपादः सुपर्णांसे प्रलंबाष्टमहाभुजः ॥ चक्रशंखासिचर्मेषुधनुष्पाशगदाधरः ॥ ३६ ॥ पीतवासा घनश्यामः प्रसन्नवदनेक्षणः ॥ वनमालानिवीतांगो लसच्छ्रीवत्सकौस्तुभः ॥ ३७ ॥ महाकिरीटकटकः स्फुरन्मकरकुंडलः ॥ कांच्यंगुलीयवलयनूपुरांगदभूषितः ॥ ३८ ॥ त्रैलोक्यमोहनं रूपं बिभ्रत्त्रिभुवनेश्वरः ॥ वृतो नारदनंदाद्यैः पार्षदैः सुरयूथपैः ॥ स्तूयमानोऽनुगायद्भिः सिद्धगंधर्वचारणैः ॥ ३९ ॥ रूपं तन्महदाश्चर्यं विचक्ष्यागतसाध्वसः ॥ ननाम दंडवद्भूमौ प्रहृष्टात्मा प्रजापतिः ॥ ४० ॥

वीतं कंठादिपादांतव्याप्तमंगं यस्य । लसंतौ श्रीवत्सकौस्तुभौ यस्य ॥ ३७ ॥ महांति किरीटकटकानि यस्य । स्फुरती मकरकुंडले यस्य । कांच्यादिभिर्विभूषितः । वलयमत्र पादभूषणं द्रष्टव्यं कटकस्योक्तत्वात् ॥ ३८ ॥ त्रैलोक्यमोहनं श्रीपुरुषोत्तमाख्यम् । सुरयूथपैर्लोकपालैः ॥ ३९ ॥ ४० ॥

आयुधें धारण केलीं होतीं ॥ ३६ ॥ त्यानें पीतवस्त्र परिधान केलें होतें, तो मेघासारखा श्यामवर्ण होता, त्याचें मुख व नेत्र, प्रसन्न असून त्याचें शरीर वनमालेच्या योगानें कंठापासून तों पायांपर्यंत व्याप्त झालें होतें, त्याचे श्रीवत्सलांछन व कौस्तुभमणि हे झळकत होते ॥ ३७ ॥ त्यानें मोठा मुकुट मस्तकीं धारण केला होता, त्यानें हातांमध्यें मोठमोठे कडीं तोडे घातले होते, त्यानें स्फुरण पावणारीं मकराकृति कुंडलें कर्णांचेठिकाणीं धारण केलीं होतीं; तो कटिसूत्र, आंगठ्या, सांखळ्या व तोरड्या आणि बाहुभूषणें ह्यांनीं भूषित झाला होता ॥ ३८ ॥ त्या त्रैलोक्याधिपती भगवंतानें तें श्रीपुरुषोत्तमनामक रूप धारण केलें होतें, तो इंद्रादिलोकपालांनीं, नारद व नंद इत्यादि पार्षदगणांनीं परिवेष्टित होता आणि त्याची स्तुति पश्चाद्भागीं गायन करीत असलेले सिद्ध, गंधर्व व चारण करीत होते ॥ ३९ ॥ असो तें अत्यंत आश्चर्यकारक रूप अवलोकन करून दक्षप्रजापतीच्या मनाला फारच आनंद झाला व त्यामुळें अगदीं गोंधळून जाऊन त्यानें भूमीवर दंडासारखा त्याला प्रणाम केला ॥ ४० ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नंतर झऱ्यांच्या योगानें जशा नद्या भरून जातात त्याप्रमाणें तीव्र आनंदाच्या योगानें इंद्रियें अगदीं भरून गेल्यामुळें तो दक्षप्रजापति, कांहींएक भाषण करण्यास समर्थ झाला नाहीं ॥ ४१ ॥ तथापि सर्वभूतांचें हृद्गत जाणणारा भगवान् जनार्दन, त्याप्रकारेंकरून नम्र झालेल्या त्या दक्षप्रजापतिनामक प्रजोत्पादनेच्छु भक्ताला, असें ह्मणाला कीं ॥ ४२ ॥ श्रीभगवान् ह्मणाला– हे महाभाग्यवान् प्रचेतस्पुत्रा, तूं तपाच्या योगानें चांगला सिद्ध झाला आहेस. कारण, मजविषयींच्या श्रद्धेनें माझेठिकाणीं तुला उत्कृष्ट भक्ति उत्पन्न झाली आहे ॥ ४३ ॥ तस्मात् हे प्रजानाथ, ज्याअर्थीं ह्या विश्वाची वृद्धि करणारें तुझें तप आहे त्याअर्थीं मी तुजवर प्रसन्न झालों आहें. आतां मी लोक-

---

आपूरितानि मनोद्वाराणींद्रियाणि तैः । यथा ह्रदिन्यो नद्यो निर्झरैरापूर्यंते तथा महानंदपूर्णत्वेनावृत्तिकत्वाद्वागादीनां न किंचिद्वक्तुं शक्तोऽभूदित्यर्थः ॥ ४१ ॥ यद्यप्यसौ नावोचत्तथाऽपि चित्तज्ञ इदं वक्ष्यमाणमाह ॥ ४२ ॥ भावं भक्तिं गतः प्राप्तः ॥ ४३ ॥ यद्यतस्ते तपोऽस्य विश्वस्योद्बृहणं वृद्धिकरमतस्तेऽहं प्रीतः । मत्तपसो लोकसमृद्ध्यर्थत्वे त्वत्प्रीतेः किं कारणं तत्राह । ममेति । भूतानां विभूतयः समृद्धयो भूयासुरिति यदेष एव मम कामः । अतो मत्कामपूरणादेवाहं प्रीतोऽस्मीत्यर्थः ॥ ४४ ॥ भूतिविस्तारप्रयत्नश्च तवोचित एवेत्याह । ब्रह्मेति । भवंतः प्रजापतयः भूतेरुद्भवस्य हेतवः ॥ ४५ ॥ विश्ववृद्ध्यर्थेन त्वत्तपसाऽहं प्रीत इत्युक्तं तदेव तपः स्तुव-

न किंचनोदीरयितुमशकत्तीव्रया मुदा ॥ आपूरितमनोद्वारैर्ह्रदिन्य इव निर्झरैः ॥ ४१ ॥ तं तथाऽवनतं भक्तं प्रजाकामं प्रजापतिम् ॥ चित्तज्ञः सर्वभूतानामिदमाह जनार्दनः ॥ ४२ ॥ श्रीभगवानुवाच ॥ प्राचेतस महाभाग संसिद्धस्तपसा भवान् ॥ यच्छ्रद्धया मत्परया मयि भावं परं गतः ॥ ४३ ॥ प्रीतोऽहं ते प्रजानाथ यत्तेऽस्योद्बृहणं तपः ॥ ममैष कामो भूतानां यद्भूयासुर्विभूतयः ॥ ४४ ॥ ब्रह्मा भवो भवंतश्च मनवो विबुधेश्वराः ॥ विभूतयो मम ह्येता भूतानां भूतिहेतवः ॥ ४५ ॥ तपो मे हृदयं ब्रह्मंस्तनुर्विद्या क्रियाऽऽकृतिः ॥ अंगानि क्रतवो जाता धर्म आत्माऽसवः सुराः ॥ ४६ ॥ अहमेवासमेवाग्रे नान्यत्किंचांतरं बहिः ॥ संज्ञानमात्रमव्यक्तं प्रसुप्तमिव विश्वतः ॥ ४७ ॥

न्प्रसंगादन्यान्यपि लोकवृद्धिकराणि विद्यादीनि स्तौति । तपो यमनियमादिसहितं ध्यानं मे हृदयम् । विद्या सांगमंत्रजपः सा ध्यानं तनोतीति तनुर्देहः । क्रिया ध्यानादिविषयः पुंव्यापारो भावनाशब्दवाच्यस्तेन हि ध्यानादिकमाक्रियत इत्याकृतिः । जाताः सुनिष्पन्नाः क्रतवोंऽगानि शिरो वा एतद्यत्प्रवर्ग्यो ग्रीवा उपसदश्चक्षुषी आज्यभागावित्यादिश्रुतेः । धर्मः क्रत्वाद्यपूर्वमात्मा मनः । हृदयाश्रयत्वात् । सुरायज्ञभुजस्त एवासवः प्राणाः । संतर्पणीयत्वात् ॥ ४६ ॥ तपसः संतानवृद्धिहेतुत्वं दर्शयितुं द्वितीयतृतीयोक्तमितिहासमाह चतुर्भिः । अहमेवेति वस्त्वंतरव्यावृत्तिः । आसमेवेति क्रियांतरव्यावृत्तिः । आंतरं ग्राहकम् । बहिर्ग्राह्यम् । संज्ञानमात्रं चैतन्यमात्रम् । अव्यक्तमिंद्रियवृ-

---

वृद्ध्यर्थ तप केलें असतांना तुला प्रसन्न होण्याचें कारण काय ? असें तूं ह्मणशील तर–हे प्रजापते, प्राण्यांची समृद्धि व्हावी हीच माझी इच्छा असून ती तुझ्या तपानें परिपूर्ण होणार असल्यामुळें मी प्रसन्न झालों आहें ॥ ४४ ॥ आणि लोकविभूतींचा विस्तार करण्याचा प्रयत्न तुझा उचितच आहे. कारण, ब्रह्मा, रुद्र, तुह्मी प्रजापति, मनु व इंद्रादिसुरेश्वर ह्या सर्व माझ्याच विभूति असून भूतांच्या उत्पत्तीला कारण आहेत ॥ ४५ ॥ आतां तपाची प्रशंसा करीत करीत प्रसंगोपात्त अन्यहि लोकवृद्धिकारक विद्यादिकांची भगवान् स्तुति करितात कीं– हे ब्रह्मनिष्ठा, तप हें माझें हृदय, विद्या ही माझी तनु, क्रिया हा माझा आकार, उत्तमप्रकारेंकरून निष्पन्न झालेले क्रतु हे माझे अवयव, धर्म हें माझें मन आणि देव हे माझे प्राण आहेत ॥ ४६ ॥ आतां संतानाची वृद्धि करणारें तपच आहे हें दर्शविण्याकरितां दुसऱ्या व तिसऱ्या स्कंधामध्यें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सांगितलेला इतिहास चार श्लोकांनीं कथन करितो कीं– सृष्टीच्या पूर्वीं केवळ मी एकटाच होतों, ग्राहक अथवा ग्राह्य अशी कांहीं एक अन्य वस्तु नसून केवळ चैतन्य मात्र होतें आणि तेंहि व्यक्त नसल्यामुळें सर्वत्र स्वस्थ निद्रिस्त असल्यासारिखें होतें ॥ ४७ ॥ पुढें अनंतगुणांनीं युक्त असलेल्या मज अनंताचेठिकाणीं जेव्हां मायेच्या योगानें गुणमय ब्रह्मांडरूप देह उत्पन्न झाला तेव्हांच अयोनिसंभव आद्य ब्रह्मदेव उत्पन्न झाला ॥ ४८ ॥ नंतर माझ्या सामर्थ्यानें युक्त होऊन सृष्टि करण्याकरितां उद्युक्त झालेला तो सुरश्रेष्ठ, जेव्हां आपल्याला असमर्थ असल्यासारिखें मानूं लागला तेव्हां 'तप कर' ह्मणून मी त्याला उपदेश केला असतां त्या समर्थ ब्रह्मदेवानें उग्र तप करून त्याच्या योगानें तुह्मां नऊ जगत्स्रष्ट्यांना प्रथम उत्पन्न केलें ॥ ४९ ॥ ५० ॥ असें सांगून आतां संतानवृद्धीचा उपाय कथन करितो कीं– हे प्रजाधिपते दक्षा, पंचजननामक प्रजापतीच्या ह्या असिक्नीनामक कन्येचा, पत्नी ह्या नात्यानें तूं निश्चयेंकरून स्वीकार कर ॥ ५१ ॥ ह्मणजे स्त्रीपुरुषसंबंधीं रतिरूप धर्मानें युक्त असा तूं, त्याच

त्तिभिरनभिव्यक्तम् । अतएव प्रसुप्तमिव । विश्वतः सर्वत्र ॥ ४७ ॥ गुणतो मायातः । गुणमयो विग्रहो ब्रह्मांडम् । ततस्तदैव । अजोऽयोनिजः ॥ ४८ ॥ खिलमसमर्थमिव ॥ ४९ ॥ मे मया तप तपेत्यभिहितः सन् । येन तपसा ॥ ५० ॥ संततिवृद्ध्युपायमाह । एषेति । अंग हे दक्ष । पंचजनाख्यस्य प्रजापतेः ॥ ५१ ॥ मिथुनस्य यो व्यवायो

मय्यनंतगुणेऽनंते गुणतो गुणविग्रहः ॥ यदासीत्तत एवाद्यः स्वयंभूः समभूदजः ॥ ४८ ॥ स वै यदा महादेवो मम वीर्योपबृंहितः ॥ मेने खिलमिवात्मानमुद्यतः सर्गकर्मणि ॥ ४९ ॥ अथ मेऽभिहितो देवस्तपोऽतप्यत दारुणम् ॥ नव विश्वसृजो युष्मान्येनादावसृजद्विभुः ॥ ५० ॥ एषा पंचजनस्यांग दुहिता वै प्रजापतेः ॥ असिक्नी नाम पत्नीत्वे प्रजेश प्रतिगृह्यताम् ॥ ५१ ॥ मिथुनव्यवायधर्मस्त्वं प्रजासर्गमिमं पुनः ॥ मिथुनव्यवायधर्मिण्यां भूरिशो भावयिष्यसि ॥ ५२ ॥ त्वत्तोऽधस्तात्प्रजाः सर्वा मिथुनीभूय मायया ॥ मदीयया भविष्यंति हरिष्यंति च मे बलिम् ॥ ५३ ॥ श्रीशुक उवाच ॥ इत्युक्त्वा मिषतस्तस्य भगवान्विश्वभावनः ॥ स्वप्नोपलब्धार्थ इव तत्रैवांतर्दधे हरिः ॥ ५४ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे षष्ठस्कंधे चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ तस्यां स पांचजन्यां वै विष्णुमायोपबृंहितः ॥ हर्यश्वसंज्ञानयुतं पुत्रानजनयद्विभुः ॥ १ ॥

रतिः स एव धर्मो यस्य स त्वम् । तथाभूतायां तस्याम् ॥ ५२ ॥ मायया निमित्तभूतया । स्त्रिया सह मिथुनीभूय भविष्यंति पुत्रादिरूपेणोत्पत्स्यंते ॥ ५३ ॥ ५४ ॥ इति षष्ठे टीकायां चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥ ॥ पंचमे नारदेनाथ वाचःकूटैस्तु नाशितान् ॥ सुतानाकर्ण्य दक्षोऽमुं शशापेति निरूप्यते ॥ १ ॥ १ ॥

प्रकारच्या धर्मानें युक्त असलेल्या त्या भार्येचेठिकाणीं फिरून बहुतप्रकारानें ही (भावी) प्रजासृष्टि उत्पन्न करिशील ॥ ५२ ॥ नंतर तुझ्यापुढील सर्व प्रजा, माझ्या मायेच्या योगानें स्त्रीशीं संयुक्त होऊन पुत्रादिरूपानें उत्पन्न होतील व माझें पूजन करितील ॥ ५३ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे परिक्षित्‌राजा विश्ववर्धक भगवान् श्रीहरि, याप्रमाणें भाषण करून त्या दक्षप्रजापतीसमक्ष स्वप्नामध्यें प्राप्त झालेल्या वस्तूप्रमाणें त्याचठिकाणीं अंतर्धान पावला ॥ ५४ ॥ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील षष्ठस्कंधापैकीं दक्षप्रसादनिरूपणनामक हा चवथा अध्याय समाप्त झाला ॥ ४ ॥ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ श्रीरस्तु ॥ ॥ ॥ ॥ ॥

आतां पांचव्या अध्यायांत, भाषणसंबंधी कूटें घालून नारदानें, आपल्या पुत्रांचा नाश केला असें श्रवण करून दक्षप्रजापतीनें त्या नारदाला शाप दिला असें निरूपण केलें आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, खरोखर विष्णूच्या मायाशक्तीनें वृद्धिंगत झालेल्या त्या समर्थ दक्षानें पंचजननामक प्रजापतीच्या त्या कन्येचेठिकाणीं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हर्यश्वनामक दहा हजार पुत्र उत्पन्न केले ॥ १ ॥ हे राजा, त्या दक्षाच्या सर्व पुत्रांचा आचार व स्वभाव हे सारखेच होते आणि प्रजासृष्टीविषयीं त्यांना पित्यानें आज्ञा केली असतां, ते भगवंताचें आराधन करण्याकरितां पश्चिमदिशेस निघून गेले ॥ २ ॥ त्या पश्चिमदिशेस सिंधुनदी व समुद्र यांचा जेथें संगम झाला आहे तेथें मुनि व सिद्ध यांनीं सेवन केलेल्या अतिविस्तीर्ण अशा नारायणसरोवरनामक तीर्थाच्या कांठीं ते गेले ॥ ३ ॥ आणि त्या तीर्थाच्या स्नानमात्रेंकरूनच त्या हर्यश्वांच्या अंतःकरणांतील रागादि मल अगदीं नाहींसा झाला आणि त्यांना परमहंसधर्माविषयीं मति उत्पन्न झाली ॥ ४ ॥ परंतु पित्याच्या आज्ञेनें विवश झालेल्या त्या हर्यश्वांनीं, उग्र तपच आच-

---

अपृथग्धर्मशीला एकाचारस्वभावाः ॥ २ ॥ तत्र प्रतीच्यां दिशि सिंधोर्नद्याः समुद्रस्य च यत्र संगमस्तत्रस्थं नारायणसरो नाम तीर्थं प्रययुरित्यन्वयः । सुमहदतिविस्तीर्णम् ॥ ३ ॥ विनिर्धूतो मलो रागादिर्यस्मात्स आशयो येषाम् ॥ ४ ॥ तान् शुद्धसत्त्वानपि पित्रादेशजाड्येन प्रजाविवृद्धये यत्तानुद्युक्तान्ददर्श ॥ ५ ॥ अहो कष्टं मोक्षमार्गाधिकारिणः संत एते प्रवृत्तिनिष्ठैः कर्मभिर्नश्येरन्निति कृपया तान्निगूढार्थैर्वाक्यैरुपदिशति स्म । तदाह उवाचेति चतुर्भिः । पालकाः संतोऽपि बालिशा अज्ञा यूयं कथं प्रजाः स्रक्ष्यथ । बतेति खेदे । बालका

अपृथग्धर्मशीलास्ते सर्वे दाक्षायणा नृप ॥ पित्रा प्रोक्ताः प्रजासर्गे प्रतीचीं प्रययुर्दिशम् ॥ २ ॥ तत्र नारायणसरस्तीर्थं सिंधुसमुद्रयोः ॥ संगमो यत्र सुमहन्मुनिसिद्धनिषेवितम् ॥ ३ ॥ तदुपस्पर्शनादेव विनिर्धूतमलाशयाः ॥ धर्मे पारमहंस्ये च प्रोत्पन्नमतयोऽप्युत ॥ ४ ॥ तेपिरे तप एवोग्रं पित्रादेशेन यंत्रिताः ॥ प्रजाविवृद्धये यत्तान्देवर्षिस्तान्ददर्श ह ॥ ५ ॥ उवाच चाथ हर्यश्वाः कथं स्रक्ष्यथ वै प्रजाः ॥ अदृष्ट्वांऽतं भुवो यूयं बालिशा बत पालकाः ॥ ६ ॥ तथैकपुरुषं राष्ट्रं बिलं चादृष्टनिर्गमम् ॥ बहुरूपां स्त्रियं चापि पुमांसं पुंश्चलीपतिम् ॥ ७ ॥ नदीमुभयतोवाहां पंचपंचाद्भुतं गृहम् ॥ क्वचिद्धंसं चित्रकथं क्षौरपव्यं स्वयं भ्रमिम् ॥ ८ ॥ कथं स्वपितुरादेशमविद्वांसो विपश्चितः ॥ अनुरूपमविज्ञाय अहो सर्गं करिष्यथ ॥ ९ ॥ श्रीशुक उवाच ॥ तन्निशम्याथ हर्यश्वा औत्पत्तिकमनीषया ॥ वाचःकूटं तु देवर्षेः स्वयं विममृशुर्धिया ॥ १० ॥

इति पाठे बालिशत्वे हेतुः ॥ ६ ॥ एक एव पुरुषो यस्मिंस्तद्राष्ट्रमदृष्ट्वेत्यनुषंगः । बिलं चेत्यादिद्वितीयांतानामविज्ञाय कथं सर्गं करिष्यथेति तृतीयेनान्वयः ॥ ७ ॥ पंचपंचानां पंचविंशतेरद्भुतं गृहं क्षौरपव्यं क्षुरैः पविभिर्वज्रैश्च निर्मितमिवातितीक्ष्णं दृढं चेत्यर्थः । स्वयं स्वतंत्रम् । भ्रामिं भ्रमणस्वभावम् ॥ ८ ॥ विपश्चितः सर्वज्ञस्य स्वपितुरादेशमात्मनोऽनुरूपमविद्वांसोऽजानंतः पूर्वोक्तं चैकपुरुषं राष्ट्रमित्याद्यविज्ञायाहो कथं सर्गं करिष्यथेत्यन्वयः ॥ ९ ॥ वाचःकूटं परोक्षवादेनार्थांतरमिव प्रतीयमानं वचनम् । औत्पत्ति-

---

रण केलें. तेव्हां प्रजेच्या वृद्धीकरितां उद्युक्त झालेल्या त्यांना देवर्षि नारदानें अवलोकन केले ॥ ५ ॥ आणि भाषण केलें कीं,–हे हर्यश्वहो, ज्यामध्यें एकच पुरुष, आहे असें राष्ट्र व भूमीचा अंत अवलोकन न करितां तुह्मीं प्रजापालक असूनहि अज्ञानी असल्यामुळें प्रजा कशा उत्पन्न कराल ? ॥ ६ ॥ व त्याचप्रमाणें तुह्मी, जेथें बाहेर पडण्याला मार्ग दृष्टीस पडत नाहीं असें बिळ, बहुरूपिणी स्त्री, जारिणीचा पति पुरुष, दोहोंकडून वाहणारी नदी, पंचवीस पदार्थांचें अद्भुत घर, विचित्र कथेनें युक्त असलेला एक हंस आणि वस्तऱ्यांनीं व वज्रांनीं निर्माण केलेलें अतितीक्ष्ण व दृढ असें एक भ्रमण करणारें स्वतंत्र वस्तु न जाणणारे आणि आपल्या सर्वज्ञ पित्याची आपणास योग्य असलेली आज्ञा न जाणणारे तुह्मीं सृष्टि कशी उत्पन्न कराल? ॥ ७ ॥ ८ ॥ ९ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे परीक्षित्राजा, हर्यश्वांनीं तें भाषण श्रवण केल्यानंतर स्वाभा- ॥ १७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विक विचारशक्तीनें युक्त असलेल्या बुद्धीनें, देवर्षींच्या भाषणरूपी कूटांचा त्यांनीं स्वतःच विचार केला ॥ १० ॥ आतां नारदानें सांगितलेल्या दहा वाक्यांचे अर्थ त्या हर्यश्वांनीं विचारपूर्वक जे ठरविले तेच अनुक्रमानें दहा श्लोकांनीं सांगतात– हे राजा, भू ह्मणजे आपल्या अनादिबंधास कारणभूत जें लिंगशरीर त्याच्या नाशाचा उपाय अवलोकन न करितां बंधहेतुभूत कर्मांचा काय उपयोग होणार आहे ? ॥ ११ ॥ तसाच षड्गुणैश्वर्यसंपन्न, स्वतःच्याच आधारानें असलेला आणि सर्वसाक्षी असा मायातीत ईश्वर एकच आहे, तस्मात् त्या नित्यमुक्त परमात्म्याला अवलोकन न करितां ईश्वराचेठिकाणीं अर्पण न केलेल्या कर्मांनीं पुरुषाला काय उपयोग होणार

की सहजा मनीषा विचारशक्तिर्यस्यास्तया धिया स्वयमेव विमृश्यविचारितवंतः ॥ १० ॥ नारदोक्तदशवाक्यानां तैर्विमृश्य निर्णीतानर्थानाह दशभिः । अदृष्ट्वांऽतं भुव इत्यत्र भूशब्दार्थमाह । भूरिति । क्षेत्रं तच्चात्र जीवसंज्ञं लिंगशरीरं यन्निजबंधनमात्मनो बंधकारणम् । अंतशब्दार्थमाह । निर्वाणं नाशम् । असद्भिर्मोक्षानुपयोगिभिः कर्मभिः किं भवेन्न किमपि ॥ ११ ॥ एकपुरुषमित्यस्यार्थमाह । एक एवेति । तुर्यः सर्वसाक्षी । स्वाश्रयः स्वाधारः । अभवं नित्यमुक्तम् । असद्भिरीश्वरासमर्पितैः कर्मभिः ॥ १२ ॥ बिलं चादृष्टनिर्गममित्यस्यार्थमाह । पुमान् यद्गत्वा प्राप्य बिलस्वर्गं पातालं गत इव नैवैति नावर्तते तत्प्रत्यग्धाम ज्योतीरूपं ब्रह्माविदोऽविदुषोऽसद्भिर्नश्वरस्वर्गादिसाधनैः कर्मभिः ॥ १३ ॥ बहुरूपां स्त्रियमित्यस्यार्थमाह । नानारूपेति । स्वैरिणीव पुंश्चलीव विमोहकै रजआदिगुणैरन्विता । तन्निष्ठां तस्या अवसानं विवेकमगतस्याप्राप्तस्य ।

भूः क्षेत्रं जीवसंज्ञं यदनादिनिजबंधनम् ॥ अदृष्ट्वा तस्य निर्वाणं किमसत्कर्मभिर्भवेत् ॥ ११ ॥ एक एवेश्वरस्तुर्यो भगवान्स्वाश्रयः परः ॥ तमदृष्ट्वाऽभवं पुंसः किमसत्कर्मभिर्भवेत् ॥ १२ ॥ पुमान्नैवैति यद्गत्वा बिलस्वर्गं गतो यथा ॥ प्रत्यग्धामाऽविद इह किमसत्कर्मभिर्भवेत् ॥ १३ ॥ नानारूपात्मनो बुद्धिः स्वैरिणीव गुणान्विता ॥ तन्निष्ठामगतस्येह किमसत्कर्मभिर्भवेत् ॥ १४ ॥ तत्संगभ्रंशितैश्वर्यं संसरंतं कुभार्यवत् ॥ तद्गतीरबुधस्येह किमसत्कर्मभिर्भवेत् ॥ १५ ॥ सृष्ट्यप्ययकरीं मायां वेलाकूलांतवेगिताम् ॥ मत्तस्य तामविज्ञस्य किमसत्कर्मभिर्भवेत् ॥ १६ ॥

असद्भिरशांतैः ॥ १४ ॥ पुमांसं पुंश्चलीपतिमित्यस्यार्थमाह । तस्याः संगेन भ्रंशितमैश्वर्यं स्वातंत्र्यं यस्य । कुत्सिता भार्या यस्य तद्वत् । तस्या गतीः सुखदुःखलक्षणाः संसरंतं गच्छंतं जीवमबुधस्याजानतः । असद्भिर्बुद्ध्यविवेकप्राप्तैः ॥ १५ ॥ नदीमुभयतोवाहामित्यस्यार्थमाह । सृष्ट्यप्ययौ करोतीत्युभयतः प्रवाहो दर्शितः । वेलाकूलं प्रवाहपतितानां निर्गमस्थानं तपो विद्यादि तस्यांते समीपे वेगितां निर्गमप्रतिबंधाय क्रोधाहंकारादिभिः कृतवेगां मत्तस्य तद्वेगेन विवशस्यात एव तां तथाभूतामविज्ञस्याविचारयतः । असद्भिर्मायिकैः । यद्वा वेलाकूलं समुद्रस्य व्यवहारस्थानं तस्य समीपे समुद्रवृद्धिह्रासाभ्यां यथोभयतोऽन्तर्बहिः कृतवेगा नदी भवेत्येवं समुद्रतुल्यस्यात्मनो व्यवहारस्थाने

आहे ? ॥ १२ ॥ तशीच ज्याची प्राप्ति झाली असतां पाताळांत गेल्याप्रमाणें पुरुष तेथून कधींहि परत येत नाहीं, तें ज्योतीरूप ब्रह्म न जाणणाऱ्या पुरुषाला नश्वर अशा स्वर्गादिसाधनरूप कर्मांनीं या जगतामध्यें काय उपयोग होणार आहे ? ॥ १३ ॥ तशीच जारिणी स्त्रीप्रमाणें आपल्याला मोहक अशा रजआदिक गुणांनीं युक्त असून अनेक रूपें धारण करणारी जी आपली बुद्धि तिचा नाश (विवेक) ज्याला प्राप्त झाला नाहीं त्या पुरुषाला अशांत कर्मांनीं इहलोकीं काय उपयोग होणार आहे ? ॥ १४ ॥ त्याचप्रमाणें त्या बुद्धीच्या संगानें स्वातंत्र्य नष्ट होऊन 'दुष्ट स्त्रीच्या पतीप्रमाणें' तिच्या सुखदुःखरूप गतींचा अनुभव घेणाऱ्या जीवाला न जाणणाऱ्या पुरुषाला इहलोकीं विवेकरहित कर्मांनीं काय उपयोग होणार आहे ? ॥ १५ ॥ तशीच सृष्टि व लय करणारी आणि संसाररूप प्रवाहामध्यें पडलेल्या जनांचें जें तपोविद्यादि

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

निर्गम स्थान त्याच्या समीप त्याचा प्रतिबंध करण्याकरितां क्रोध, अहंकार इत्यादिकांनीं वेगयुक्त अशी जी माया तिच्या वेगानें विवश होऊन तिच्या स्वरूपाचा विचार न करणारा जो पुरुष, त्याला मायिक कर्मांनीं काय उपयोग होणार आहे ? ॥ १६ ॥ तसाच पंचवीस तत्त्वांचा जो अंतर्यामी आश्चर्यकारक आश्रय आहे त्या अध्यात्म-रूप ईश्वराला (देहादि कार्यें व महत्तत्त्वादि कारणें ह्यांच्या समुदायाच्या अधिष्ठात्याला) न जाणणाऱ्या पुरुषाला मिथ्या स्वातंत्र्याभिमानानें इहलोकीं केलेल्या कर्मांनीं काय उपयोग होणार आहे ? ॥ १७ ॥ तसेंच चिज्जडात्मक वस्तूचें ज्यानें विवेचन केलें आहे व जें बंध आणि मोक्ष ह्यांना दर्शविणारें आहे त्या ईश्वरप्रतिपादक शास्त्राचा

देहे जन्ममरणादिभिः कृतवेगामित्यर्थः । वेगिनीमिति पाठे वेगवतीम् ॥ १६ ॥ पंचपंचेत्यस्यार्थमाह । पंचविंशतितत्त्वानां पुरुषोंऽतर्यामी । अद्भुतदर्पणमाश्चर्यरूप आश्रयः अध्यात्मकं कार्यकारणसंघाताधिष्ठातारं तमबुधस्य । असद्भिर्मिथ्यास्वातंत्र्यकृतैः ॥ १७ ॥ क्वचिद्धंसमित्यस्यार्थमाह । ऐश्वरमीश्वरप्रतिपादकं विविक्तं पदं चिज्जडरूपं वस्तु येनेति हंसपदव्याख्यानम् । बंधमोक्षावनुदर्शयतीति तथा । अनेन चित्राः कथा यस्येति व्याख्यातम् । तदुत्सृज्यानभ्यस्य अज्ञायाविदुषः । असद्भिर्बहिर्मुखैः ॥ १८ ॥ क्षौर-पव्यमित्यस्यार्थमाह । कालचक्रमिति । भ्रमिर्भ्रमणात्मकम् । तीक्ष्णमिति निष्कर्षयदिति च क्षौरपव्यपदं व्याख्यातम् । तदबुधस्यातएव फलस्य नित्यबुद्ध्या काम्यकर्मानु-

पंचविंशतितत्त्वानां पुरुषोऽद्भुतदर्पणम् ॥ अध्यात्ममबुधस्येह किमसत्कर्मभिर्भवेत् ॥ १७ ॥ ऐश्वरं शास्त्रमुत्सृज्य बंधमोक्षानुदर्शनम् ॥ विविक्तपदमज्ञाय किमसत्कर्मभिर्भवेत् ॥ १८ ॥ कालचक्रं भ्रमिस्तीक्ष्णं सर्वं निष्कर्षयज्जगत् ॥ स्वतंत्रमबुधस्येह किमसत्कर्मभिर्भवेत् ॥ १९ ॥ शास्त्रस्य पितुरादेशं यो न वेद निवर्तकम् ॥ कथं तदनुरूपाय गुणविश्रंभ्युपक्रमेत् ॥ २० ॥ इति व्यवसिता राजन्हर्यश्वा एकचेतसः ॥ प्रययुस्तं परिक्रम्य पंथानमनिवर्तनम् ॥ २१ ॥ स्वरब्रह्मणि निर्भातहृषीकेशपदांबुजे ॥ अखंडं चित्तमावेश्य लोकाननुचरन्मुनिः ॥ २२ ॥

ष्ठाने वैगुण्यबाहुल्यादसद्भिः ॥ १९ ॥ स्वपितुरादेशमित्यस्यार्थमाह । शास्त्रस्य स्वपितुर्द्वितीयजन्महेतोः । तदनुरूपाय निवृत्त्यनुरूपाय निवर्तकमादेशं यो न वेद स कथं गुणविश्रंभी गुणमयप्रवृत्तिमार्गेविश्वासवान्सन्नुपक्रमेत्सृष्ट्यादौ प्रवर्तेत । मोक्षेशब्रह्मबुद्धीनां जीवमायांतरात्मनाम् ॥ शास्त्रकालोपदेशानामज्ञाने किमु कर्मभिरिति वाचःकूटसंग्रह-श्लोकः ॥ २० ॥ इति व्यवसिता एवं निश्चितवंतः । एकचेतस ऐकमत्ययुक्ताः । तं नारदं प्रदक्षिणीकृत्यापुनरावृत्तिमार्गं प्रययुः ॥ २१ ॥ निर्भातः साक्षात्कृतो यो हृषीकेश-

---

अभ्यास न केल्यामुळें त्याविषयीं अज्ञानानें युक्त असलेल्या पुरुषाला, बहिर्मुख कर्मांनीं काय उपयोग होणार आहे ? ॥ १८ ॥ त्याचप्रमाणें तीक्ष्ण व सर्व जगताचें आकर्षण करणारें असें जें भ्रमणात्मक स्वतंत्र कालचक्र तें न जाणणाऱ्या पुरुषाला दुष्ट कर्मांनीं इहलोकीं काय उपयोग होणार आहे ? ॥ १९ ॥ आणि शास्त्ररूप पित्याची निवृत्ति मार्गाच्या उपयोगार्थ असलेली निवृत्तिकारक आज्ञा जो पुरुष जाणत नाहीं, तो गुणमय प्रवृत्तिमार्गाचेठिकाणीं विश्वास युक्त होऊन सृष्ट्यादिकर्मांविषयीं कसा प्रवृत्त होईल ? ॥ २० ॥ असो. हे राजा, एक विचारानें युक्त असलेल्या त्या हर्यश्वांनीं ह्याप्रमाणें नारदवाक्यांचा निश्चय करून नारदाला प्रदक्षिणा केली आणि ते मोक्षमार्गास गेले ॥ २१ ॥ इकडे तो नारदहि स्वरब्रह्मामध्यें साक्षात्कार झालेल्या हृषीकेशाच्या चरणकमलीं आपलें एकाग्रचित्त स्थापन करून लोकांत संचार करूं लागला ॥ २२ ॥ ॥ १८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नंतर सुस्वभावानें शोभणारे आपले पुत्र नारदाच्या योगानें धर्मापासून भ्रष्ट झाले असें श्रवण करून, दक्षप्रजापति शोक करीत अत्यंत ताप पावला. कारण, सत्पुत्र असणें हें एक शोकाचें स्थानच आहे ॥ २३ ॥ पुढें ब्रह्मदेवानें त्याचें सांत्वन केलें असतां त्या दक्षप्रजापतीनें आपल्या असिक्नीनामक भार्येचेठिकाणीं पुनरपि शबलाश्वनामक हजारो पुत्र उत्पन्न केले ॥ २४ ॥ नंतर त्याहि पुत्रांना प्रजोत्पादनाविषयीं पित्यानें आज्ञा केली असतां तेहि आपले पूर्वज भ्राते ज्याठिकाणीं सिद्ध झाले होते त्या नारायणनामक सरोवराच्या कांठीं ब्रह्मचर्यादि व्रत ग्रहण करून तपश्चर्या करण्याकरितां निघून गेले ॥ २५ ॥ त्या सरोवराच्या स्नानमात्रेंकरूनच त्यांच्या अंतःकरणांतील रागादि मल अगदीं नाहींसा झाला व त्याठिकाणीं परमब्रह्मरूप प्रणवमंत्राचा जप करीत करीत त्यांनीं मोठी तपश्चर्या केली ॥ २६ ॥ त्यामध्यें प्रथमतः कांहीं महिने जलपान करून

स्तस्य पदांबुजे । अनुचरदन्वचरदित्यर्थः ॥ २२ ॥ नाशमदर्शनं स्वधर्मभ्रंशं वा । शीलेन शालंते शोभंत इति तथा तेषाम् । को दक्षः । सुप्रजास्त्वं सत्पुत्रवत्त्वं शुचां शोकानां स्थानम् ॥ २३ ॥ अजेन ब्रह्मणा । सहस्रशः सहस्रसंख्यान् ॥ २४ ॥ २५ ॥ परमं ब्रह्म प्रणवं वक्ष्यमाणमंत्रं वा ॥ २६ ॥ इडस्पतिं वाचां मंत्राणां पतिं विष्णुमाराध-

नाशं निशम्य पुत्राणां नारदाच्छीलशालिनाम् ॥ अन्वतप्यत कः शोचन्सुप्रजास्त्वं शुचां पदम् ॥ २३ ॥ स भूयः पांचजन्यायामजेन परिसांत्वितः ॥ पुत्रानजनयद्दक्षः सबलाश्वान्सहस्रशः ॥ २४ ॥ तेऽपि पित्रा समादिष्टाः प्रजासर्गे धृतव्रताः ॥ नारायणसरो जग्मुर्यत्र सिद्धाः स्वपूर्वजाः ॥ २५ ॥ तदुपस्पर्शनादेव विनिर्धूतमलाशयाः ॥ जपंतो ब्रह्म परमं तेपुस्तेऽत्र महत्तपः ॥ २६ ॥ अब्भक्षाः कतिचिन्मासान्कतिचिद्वायुभोजनाः ॥ आराधयन्मंत्रमिममभ्यस्यंत इडस्पतिम् ॥ २७ ॥ ॐ नमो नारायणाय पुरुषाय महात्मने ॥ विशुद्धसत्त्वधिष्ण्याय महाहंसाय धीमहि ॥ २८ ॥ इति तानपि राजेंद्र प्रतिसर्गधियो मुनिः ॥ उपेत्य नारदः प्राह वाचःकूटानि पूर्ववत् ॥ २९ ॥ दाक्षायणाः संशृणुत गदतो निगमं मम ॥ अन्विच्छतानुपदवीं भ्रातॄणां भ्रातृवत्सलाः ॥ ३० ॥ भ्रातॄणां प्रायणं भ्राता योऽनुतिष्ठति धर्मवित् ॥ स पुण्यबंधुः पुरुषो मरुद्भिः सह मोदते ॥ ३१ ॥ एतावदुक्त्वा प्रययौ नारदोऽमोघदर्शनः ॥ तेऽपि चान्वगमन्मार्गं भ्रातॄणामेव मारिष ॥ ३२ ॥

यामासुः ॥२७॥ विशुद्धसत्त्वाश्रयाय परमहंसाय नमो धीमहि ॥२८॥ प्रतिसर्गे धीर्येषां तान् । वाचःकूटान्यदृष्टांऽतं भुव इत्यादीनि पूर्वोक्तानि प्राह ॥२९॥ हे दाक्षायणाः संशृणुते त्यादि पुनरन्यदपि प्राह । निगममुपदेशम् । अन्विच्छतावलोकयत ॥ ३० ॥ प्रायणं प्रकृष्टं गमनम् । पुण्यमेव बंधुर्यस्य मरुद्भिर्भ्रातृवत्सलैर्देवैः ॥ ३१ ॥ अमोघं दर्शनं यस्य ।

व पुढें कांहीं महिने वायुभक्षण करून त्यांनीं पुढें सांगितलेल्या अर्थाच्या मंत्राचा जप करीत करीत मंत्राधिपति भगवंताचें आराधन केलें ॥ २७ ॥ त्या मंत्राचा अर्थ असा कीं– विशुद्धचित्ताचा आश्रय करून राहणाऱ्या सर्वांतर्यामी व सर्वव्यापी परमहंस नारायणाचें आम्हीं ॐकारपूर्वक नमस्कार करून ध्यान करितों ॥ २८ ॥ हे राजेंद्रा, ह्याप्रमाणें सृष्टीची वृद्धि करण्याची इच्छा करणाऱ्या त्या शबलाश्वांनाही नारदमुनीनें येऊन पूर्ववत् वाक्संबंधीं कूटें घालून आणखीहि असें भाषण केलें कीं– ॥ २९ ॥ हे दक्षपुत्रहो, तुह्मीं उपदेश करणाऱ्या माझें भाषण एकाग्रचित्तानें श्रवण करा. तें असें कीं, हे भ्रातृवत्सलहो, तुह्मीं आपल्या ज्येष्ठबंधूंचा मार्ग अवलोकन करा ॥ ३० ॥ कारण, जो धर्मवेत्ता भाऊ, आपल्या भ्रात्यांच्या श्रेष्ठ मार्गाला अनुसरतो तो पुण्यवान् पुरुष, भ्रातृवत्सल अशा मरुद्गणनामक देवांसहवर्तमान स्वर्गामध्यें आनंद पावतो ॥ ३१ ॥ हे राजा, ह्याप्रमाणें यथार्थज्ञानी असा तो नारदमुनि त्यांना उपदेश करून तेथून निघून गेला व ते शबलाश्वहि आपल्या ज्येष्ठबंधूंच्याच मार्गाला अनुसरले ॥ ३२ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आणि गेलेल्या रात्री जशा फिरून माघाऱ्या येत नाहींत त्याप्रमाणें अंतर्मुख वृत्तीनें प्राप्त होणारा जो परमेश्वराचा चांगला योग्य मार्ग त्याप्रत गेलेले ते अद्यापि परत येत नाहींत ॥ ३३ ॥ असो. इकडे ह्या वेळीं झालेले बहुत उत्पात अवलोकन करणाऱ्या दक्षप्रजापतीनें, आपले पुत्र नारदानें पूर्वींप्रमाणें धर्मापासून भ्रष्ट केले असें वर्तमान ऐकिलें ॥ ३४ ॥ आणि पुत्रशोकानें अगदीं मोहित झालेला तो दक्षप्रजापति नारदावर क्रुद्ध झाला. तेव्हां आपल्या पुत्रांची परमहंसधर्माविषयीं झालेली निष्ठा श्रवण करून, दक्षहि प्रायशः विरक्त होईल ह्मणून त्याजवर अनुग्रह करण्याकरितां त्याच्या समीप प्राप्त झालेल्या देवर्षि नारदाला अवलोकन करून तो दक्ष, ज्याचा अधरोष्ठ रोषानें स्फुरण

हे मारिषार्य ॥ ३२ ॥ सध्रीचीनं समीचीनम् । प्रतीचीनं प्रत्यग्वृत्तिलभ्यम् । अनुपथमनुगुणं पंथानम् । पश्चिमा यामिनीर्गता रात्रय इव ॥ ३३ ॥ ३४ ॥ पुत्राणां पारमहंस्यनिष्ठामुपश्रुत्य दक्षोऽपि प्रायशो विरक्तः स्यादिति तदनुग्रहार्थं देवर्षिस्तत्पार्श्वं गतस्तदा तमुपलभ्य दक्ष आह ॥ ३५ ॥ साधोरिव लिंगं वेषो यस्य तेन त्वया नोऽस्मदीयानामर्भकाणामसाध्वकारि कृतम् । तदेवाह । साधूनां स्वधर्मे प्रवृत्तानां भिक्षोर्यो मार्गः स प्रदर्शितः ॥ ३६ ॥ ननु संन्यासिनो मार्गः साधुरेव मोक्षहेतुत्वात् सत्यम् । ऋणत्रयापाकरणं विना तु महाननर्थ एवेत्याह । ऋणैरिति । जायमानो वै ब्राह्मणस्त्रिभिर्ऋणवा जायते । ब्रह्मचर्येण ऋषिभ्यो यज्ञेन देवेभ्यः प्रजया पितृभ्यः एष वा अ-

सध्रीचीनं प्रतीचीनं परस्यानुपथं गताः ॥ नाद्यापि ते निवर्तंते पश्चिमा यामिनीरिव ॥ ३३ ॥ एतस्मिन्काल उत्पातान्बहून्पश्यन्प्रजापतिः ॥ पूर्ववन्नारदकृतं पुत्रनाशमुपाशृणोत् ॥ ३४ ॥ चुक्रोध नारदायासौ पुत्रशोकविमूर्छितः ॥ देवर्षिमुपलभ्याह रोषाद्विस्फुरिताधरः ॥ ३५ ॥ दक्ष उवाच ॥ अहो असाधो साधूनां साधुलिंगेन नस्त्वया ॥ असाध्वकार्यर्भकाणां भिक्षोर्मार्गः प्रदर्शितः ॥ ३६ ॥ ऋणैस्त्रिभिरमुक्तानाममीमांसितकर्मणाम् ॥ विघातः श्रेयसः पाप लोकयोरुभयोः कृतः ॥ ३७ ॥ एवं त्वं निरनुक्रोशो बालानां मतिभिद्धरेः ॥ पार्षदमध्ये चरसि यशोहा निरपत्रपः ॥ ३८ ॥

नृणो यः पुत्री यज्वा ब्रह्मचारी वासीति श्रुतेः । ऋणैरमुक्तानां न मीमांसितानि विचारितानि कर्माणि यैः । तेषां तावदृणविमोको नास्ति । तदुत्तरकालभावित्वाच्च पुत्रोत्पादनयज्ञानुष्ठानयोरभावेन पितृदेवर्षिऋणाद्विमुक्तिश्च नास्ति । अतो हे पाप विषयभोगत्यागादिह लोके श्रेयसो विघातः कृतः । मोक्षानधिकारित्वाच्च परलोकेऽपि श्रेयसो विघातः कृत इत्यर्थः । तथा च मनुः । ऋणानि त्रीण्यपाकृत्य मनो मोक्षे निवेशयेत् ॥ अनपाकृत्य मोक्षं तु सेवमानो व्रजत्यध इति ॥ ३७ ॥ बालानां मतिं पुत्रादिविषयां भिन-

---

पावूं लागला आहे असा होत्साता, त्या नारदाला ह्मणाला कीं, ॥ ३५ ॥ दक्ष ह्मणाला– हे असाधो, साधुवेष धारण करणाऱ्या तूं आमच्या बालकांचें अकल्याण केलें आहेस. कारण, ते स्वधर्मामध्यें प्रवृत्त झाले असतां तूं त्यांना संन्याशाचा मार्ग दाखविलास ॥ ३६ ॥ आतां मोक्षाला हेतुभूत असल्यामुळें संन्याशाचा मार्ग चांगलाच आहे हें खरें; परंतु ऋणत्रयाचें अपाकरण केल्यावांचून संन्यासाचा आश्रय केला तर तो मोठा अनर्थच होतो. यास्तव हे पाप्या (नारदा) ब्रह्मचर्यव्रत, पुत्रोत्पादन व यज्ञानुष्ठान यांच्यायोगेंकरून ऋषि, पितर व देव यांच्या ऋणापासून जे मुक्त झाले नाहींत व ज्यांनीं कर्मांचा विचार केला नाहीं, त्या माझ्या बालकांच्या, या लोकसंबंधीं व परलोकसंबंधीं कल्याणांचा तूं विघात केला आहेस ॥ ३७ ॥ आणि बालकांच्या कोमळ मतींचा नाश करणारा असा निर्दय तूं, श्रीहरीच्या यशाचा नाशक असून त्याच्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पार्षदगणांमध्यें निर्लज्जपणानें कसा संचार करितोस? ॥ ३८ ॥ अरे, खरोखर वैरभावरहित प्राण्यांशीं वैर करून त्यांच्या मित्रभावाचा नाश करणाऱ्या अशा तुझ्यावांचून इतर सर्व भगवद्भक्त, भूतांवर अनुग्रह करण्याविषयीं अगदीं तत्पर असतात आणि तुलातर प्राण्यांचें अप्रिय करण्याविषयीं लाजतरी कशी वाटत नाहीं ॥ ३९ ॥ आतां वैराग्यापासून शांति प्राप्त होत्ये व शांतीपासून प्राण्यांचा स्नेहपाश तुटून जातो ह्मणून ज्या दिवशीं विरक्ति उत्पन्न होईल त्याचदिवशीं संन्यास ग्रहण करावा इत्यादि श्रुतिवाक्यें असल्यामुळें विरक्त पुरुषाला ऋणत्रयाचें अपाकरण करणें आवश्यक नाहीं; ह्यामुळें वैराग्याचा उपदेश करून मी तुझ्या पुत्रांवर अनुग्रहच केला आहे असें तूं ह्मणशील तर– हे नारदा, तुला जरी असें वाटतें तथापि ज्ञानावांचून केवल अवधूतवेष धारण करणाऱ्या तूं ह्याप्रमाणें जरी मति फिरविलीस तथापि पुरुषांस वैराग्य कधीं-

---

तीति तथा। एवं निरनुक्रोशो निर्घृणो हरेर्यशोनाशकः संस्तत्पार्षदानां मध्ये कथं चरसि ॥ ३८ ॥ निर्लज्जत्वमेवाह । नन्विति । ननु त्वामृते भागवताः सर्वे भूतानुग्रहपरवशास्त्वं तु भूतविप्रियं कुर्वन्कथं न लज्जस इति भावः ॥ ३९ ॥ ननु वैराग्याद्धुपशम उपशमाच्च भूतस्नेहपाशच्छेदनं भवति न च विरक्तस्य ऋणत्रयापाकरणमावश्यकम्। यदहरेव विरजेत्तदहरेव प्रव्रजेत् । यदि वेतरथा ब्रह्मचर्यादेव प्रव्रजेदित्यादिश्रुतेः । अतो वैराग्योपदेशेन तेषां मयानुग्रह एव कृत इति चेत्तत्राह । नेति । यद्यपि त्वमेवं मन्यसे तथाऽपि मृषा केवलिना ज्ञानं विनाऽवधूतवेषेण त्वयेत्थं मतिचालने कृतेऽपि पुंसां विरागो नैव स्यात् । न च विरागं विनोपशमो न च तेन विना स्नेहपाशनिकृंतनमित्यर्थः

ननु भागवता नित्यं भूतानुग्रहकातराः ॥ ऋते त्वां सौहृदघ्नं वै वैरंकरमवैरिणाम् ॥ ३९ ॥ नेत्थं पुंसां विरागः स्यात्त्वया केवलिना मृषा ॥ मन्यसे यद्युपशमं स्नेहपाशनिकृंतनम् ॥ ४० ॥ नानुभूय न जानाति पुमान्विषयतीक्ष्णताम् ॥ निर्विंद्येत स्वयं तस्मान्न तथा भिन्नधीः परैः ॥ ४१ ॥ यन्नस्त्वं कर्मसंधानां साधूनां गृहमेधिनाम् ॥ कृतवानसि दुर्मर्ष विप्रियं तव मर्षितम् ॥ ४२ ॥ तंतुकृंतन यन्नस्त्वमभद्रमचरः पुनः ॥ तस्माल्लोकेषु ते मूढ न भवेद्भ्रमतः पदम् ॥ ४३ ॥ श्रीशुक उवाच ॥ प्रतिजग्राह तद्बाढं नारदः साधुसंमतः ॥ एतावान्साधुवादो हि तितिक्षेतेश्वरः स्वयम् ॥ ४४ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे षष्ठस्कंधे नारदशापो नाम पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥

॥ ४० ॥ इत्थं विरागो न स्यादित्यत्र हेतुमाह । नानुभूयाननुभूय विषयाणां तीक्ष्णतां दुःखहेतुत्वं न जानाति । तस्माद्विषयानुभवेन तीक्ष्णत्वज्ञानात् ॥ ४१ ॥ अतस्त्वयाऽस्माकमप्रियमेव कृतं तथापि वयं न कुर्म इत्याह । यदिति । कर्मसंधानां कर्ममर्यादानाम् । कर्तुमंधानामिति पाठे विप्रियं कर्तुमजानतामित्यर्थः । दुःसहं यत्त्वं कृतवानसि तन्मर्षितं सोढं ॥ ४२ ॥ तथापि तवाभद्रं भविष्यत्येवेत्याह । तंतुकृंतन संतानच्छेदक । यद्यस्मादभद्रं पुत्राणां स्थानभ्रंशमचरस्तत्तस्माच्च लोकेषु भ्रमतः पदं स्थानं न भवेदिति मृदुच्छलेन शापः ॥ ४३ ॥ बाढं तथेति स्वीकृतवान् । ईश्वरोऽपि प्रतिशप्तुं समर्थोऽपि तितिक्षेत सहेतेति यदेतावानेव ॥ ४४ ॥ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे षष्ठस्कंधे

हि उत्पन्न होणार नाहीं. आणि वैराग्यावांचून ज्ञान नाहीं व ज्ञानावांचून स्नेहपाश तुटून जाणार नाहीं ॥ ४० ॥ कारण, विषय दुःखास कारण आहेत हें पुरुषाला अनुभव घेतल्यावांचून समजत नाहीं. तस्मात् अनुभवानें ती गोष्ट जाणून पुरुषाला स्वतःच जसें वैराग्य उत्पन्न होतें तसें इतरांनीं बुद्धिभेद केल्यानें होत नाहीं ॥ ४१ ॥ असो ह्याप्रमाणें कर्ममर्यादेनें वागणाऱ्या आह्मां सदाचारसंपन्न गृहस्थांचें जें तूं असह्य अप्रिय केलेंस तें आह्मी तुझें सहनच केलें आहे ॥ ४२ ॥ तथापि, हे संतानच्छेदका ज्याअर्थीं तूं आमचें अकल्याण केलें आहेस ह्मणजे आमच्या पुत्रांना स्थानापासून भ्रष्ट केलें आहेस त्याअर्थीं हेमूढा, लोकामध्यें भ्रमण करणाऱ्या तुला कोठेंही एकत्र निवासस्थान प्राप्त होणार नाहीं ॥ ४३ ॥ श्रीशुकाचार्य सांगतातः– हे परीक्षित् राजा, लोकामध्यें साधु ह्मणून संमत अशा नारदमुनीनें त्या दक्षाच्या शापाचा 'तथास्तु'

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्मणून स्वीकार केला. कारण, स्वतः उलट शाप देण्यास समर्थ असतांही सहन करणें हाच साधुशब्दाचा अर्थ आहे ॥ ४४ ॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील षष्ठस्कंधापैकीं नारदशापकथननामक हा पांचवा अध्याय समाप्त झाला ॥ ५ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां सहाव्या अध्यायामध्यें दक्षानें उत्पन्न केलेल्या ६० कन्यांचेठिकाणीं जे भिन्नभिन्न वंश झाले त्यांचें वर्णन व त्या वंशांमध्यें अदितीच्या पुत्रापासून विश्वरूपाची उत्पत्ति झाली, ही कथा वर्णन केली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, नंतर ब्रह्मदेवानें त्या दक्षनामक प्रचेतसपुत्राचें सांत्वन केलें असतां त्यानें आपल्या असिक्नीनामक भार्येचेठिकाणीं साठ कन्या उत्पन्न केल्या. त्या कन्या, प्रजावृद्धिरूप पित्याचा संकल्प पूर्ण करणाऱ्या झाल्या ॥ १ ॥ त्यांपैकीं, धर्माला दहा, कश्यपाला तेरा, चंद्राला सत्तावीस, भूत, अंगिरा आणि कृशाश्व ह्या प्रत्येकांना दोन दोन आणि अवशिष्ट राहिलेल्या चार कन्या, तार्क्ष्यनाम धारण केलेल्या कश्यपालाच त्यानें अर्पण केल्या ॥ २ ॥ हे राजा, ज्यांच्या पुत्रपौत्रादिकांनीं त्रैलोक्य भरून

टीकायां पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥ ॥ षष्ठे दक्षेण सृष्टायां कन्याषष्ट्यां प्रकीर्तिताः ॥ पृथग्वंशा यतो जातो विश्वरूपोऽदितेः सुतात् ॥ १ ॥ नारदात्पुत्राणां नाशमाशंकमानो दुहितृर्जनयामास ॥ १ ॥ काय कश्यपाय द्विषट् द्विगुणाः षट् द्वादश यासु ताः । त्रयोदशेत्यर्थः । इंदोः सोमाय त्रिणव सप्तविंशतिं तार्क्ष्याय नामांतरं प्राप्ताय कश्यपायैव अपरा

श्रीशुक उवाच ॥ ततः प्राचेतसोऽसिक्न्यामनुनीतः स्वयंभुवा ॥ षष्टिं संजनयामास दुहितॄः पितृवत्सलाः ॥ १ ॥ दश धर्माय कायेंदोर्द्विषट्त्रिण वदत्तवान् ॥ भूतांगिरःकृशाश्वेभ्यो द्वे द्वे तार्क्ष्याय चापराः ॥ २ ॥ नामधेयान्यमूषां त्वं सापत्यानां च मे शृणु ॥ यासां प्रसूतिप्रसवैर्लोका आपूरितास्त्रयः ॥ ३ ॥ भानुर्लंबा ककुब्जामिर्विश्वा साध्या मरुत्वती ॥ वसुर्मुहूर्ता संकल्पा धर्मपत्न्यः सुताञ्छृणु ॥ ४ ॥ भानोस्तु देवऋषभ इंद्रसेनस्ततो नृप ॥ विद्योत आसील्लंबायास्ततश्च स्तनयित्नवः ॥ ५ ॥ ककुभः संकटस्तस्य कीकटस्तनयो यतः ॥ भुवो दुर्गाणि जामेयः स्वर्गो नंदिस्ततोऽभवत् ॥ ६ ॥ विश्वेदेवास्तु विश्वाया अप्रजांस्तान्प्रचक्षते ॥ साध्यो गणस्तु साध्याया अर्थसिद्धिस्तु तत्सुतः ॥ ७ ॥ मरुत्वांश्च जयंतश्च मरुत्वत्यां बभूवतुः ॥ जयंतो वासुदेवांश उपेंद्र इति यं विदुः ॥ ८ ॥ मौहूर्तिका देवगणा मुहूर्तायाश्च जज्ञिरे ॥ ये वै फलं प्रयच्छंति भूतानां स्वस्वकालजम् ॥ ९ ॥

अवशिष्टाश्चतस्रः ॥ २ ॥ सापत्यानामपत्यसहितानाम् । मे मत्तः शृणु । प्रसूतिप्रसवैः पुत्रपौत्रादिभिः ॥ ३ ॥ ४ ॥ ततो देवऋषभात् ॥ ५ ॥ यतः कीकटाद्भुवो दुर्गाणि दुर्गाभिमानिनो देवाः । जामेयो जाम्याः पुत्रः स्वर्गस्ततः स्वर्गान्नंदिः पुत्रोऽभवत् ॥ ६ ॥ तत्सुतः साध्यानां सुतः ॥ ७ ॥ ८ ॥ ९ ॥

गेलें आहे अशा ह्या अपत्यां सहवर्तमान दक्षकन्यांचीं नामें तूं मजपासून श्रवण कर ॥ ३ ॥ हे राजा, १ भानु, २ लंबा, ३ ककुभ्, ४ जामि, ५ विश्वा, ६ साध्या, ७ मरुत्वती, ८ वसु, ९ मुहूर्ता आणि १० संकल्पा ह्या दहा धर्माच्या पत्न्या होत. आतां त्यांचे पुत्र श्रवण कर ॥ ४ ॥ हे राजा, भानूपासून देवऋषभ झाला व त्या देवऋषभापासून इंद्रसेन झाला. लंबेपासून विद्योतनामक पुत्र झाला व त्या विद्योतापासून स्तनयित्नु नामक पुत्र झाले. ॥ ५ ॥ ककुभेपासून संकट, त्याच्यापासून कीकटनामक पुत्र व त्या कीकटापासून भूमीवरील दुर्गाभिमानी देव उत्पन्न झाले. जामीपासून स्वर्ग व स्वर्गापासून नंदिनामक पुत्र उत्पन्न झाला ॥ ६ ॥ विश्वेपासून विश्वेदेवनामक पुत्र झाले, त्यांना पुढें संतति झाली नाहीं असें ह्मणतात. तसाच साध्येपासून साध्यनामक गण व त्यांच्यापासून अर्थसिद्धिनामक पुत्र उत्पन्न जाहला ॥ ७ ॥ मरुत्वतीचेठिकाणीं मरुत्वान् आणि जयंत असे दोन पुत्र उत्पन्न जाहले. त्यांपैकीं, जो जयंत तो वासुदेवाचा अंश असून त्याला उपेंद्र असें ह्मणतात ॥ ८ ॥ तसेंच मुहूर्ताभिमानी

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

देवगण मुहूर्तेंपासून उत्पन्न जाहले व तेच प्राण्यांना आपआपल्या मुहूर्तमात्र कालापासून उत्पन्न जाहलेलें फल देतात ॥ ९ ॥ संकल्पेपासून संकल्प नामक पुत्र झाला व त्या-
पासून कामनामक पुत्र उत्पन्न झाला असें ह्मटलें आहे. आतां वसूपासून जे अष्टवसुनामक आठ पुत्र उत्पन्न झाले त्यांचीं नांवें तूं मजपासून श्रवण कर ॥ १० ॥ हेराजा,
१ द्रोण, २ प्राण, ३ ध्रुव, ४ अर्क, ५ अग्नि, ६ दोष, ७ वसु आणि ८ विभावसु हीं त्यांचीं नांवें असून त्यांपैकीं द्रोणाच्या अभिमतिनामक पत्नीपासून हर्ष, शोक व
भय इत्यादिक पुत्र उत्पन्न झाले ॥ ११ ॥ प्राणाची ऊर्जस्वतीनामक भार्या असून तिच्यापासून सह, आयु व पुरोजव असे तीन पुत्र झाले. ध्रुवाच्या धरणिना-
मक भार्येला नानाप्रकारचे नगराभिमानी देव झाले ॥ १२ ॥ तशींच अर्कांची वासनानामक भार्या असून तिला तर्षादिक पुत्र झाले. अग्नीची भार्या वसोर्धारा असून तिचे-
ठिकाणीं द्रविणकवगैरे पुत्र उत्पन्न झाले ॥ १३ ॥ त्याचप्रमाणें स्कंद हा कृत्तिकांचा पुत्र असून तो अग्नीचा पुत्र आहे. त्या स्कंदापासून विशाखादिक पुत्र उत्पन्न झा-

---

वसोर्वंशस्य भूयस्त्वादंते निर्देशः । मे मत्तः ॥ १० ॥ अभिमतिर्नाम पत्नी तस्या हर्षादयः पुत्राः ॥ ११ ॥ सहश्चायुश्च पुरोजवश्च पुत्राः । पुरः पुराणि ॥ १२ ॥ १३ ॥ स्कंदश्च कृत्तिकासु-
तोऽग्नेः पुत्रः षाण्मातुर इत्यग्निभूरिति च प्रसिद्धेः । ततः स्कंदात् ॥ १४ ॥ आकृतीपतिः शिल्पाचार्यः । ततो विश्वकर्मणश्चाक्षुषो मनुरासीत् ॥ १५ ॥ विभावसोरुषा नाम भार्या ।

संकल्पायाश्च संकल्पः कामः संकल्पजः स्मृतः ॥ वसवोऽष्टौ वसोः पुत्रास्तेषां नामानि मे शृणु ॥ १० ॥ द्रोणः प्राणो ध्रुवोऽर्को-
ऽग्निर्दोषो वसुर्विभावसुः ॥ द्रोणस्याभिमतेः पत्न्या हर्षशोकभयादयः ॥ ११ ॥ प्राणस्योर्जस्वती भार्या सह आयुः पुरोजवः ॥
ध्रुवस्य भार्या धरणिरसूत विविधाः पुरः ॥ १२ ॥ अर्कस्य वासना भार्या पुत्रास्तर्षादयः स्मृताः ॥ अग्नेर्भार्या वसोर्धारा पुत्रा द्रवि-
णकादयः ॥ १३ ॥ स्कंदश्च कृत्तिकापुत्रो ये विशाखादयस्ततः ॥ दोषस्य शर्वरीपुत्रः शिशुमारो हरेः कला ॥ १४ ॥ वसोरांगि-
रसी पुत्रो विश्वकर्मा कृतीपतिः ॥ ततो मनुश्चाक्षुषोऽभूद्विश्वे साध्या मनोः सुताः ॥ १५ ॥ विभावसोरसूतोषा व्युष्टं रोचिषमात-
पम् ॥ पंचयामोऽथ भूतानि येन जाग्रति कर्मसु ॥ १६ ॥ सरूपाऽसूत भूतस्य भार्या रुद्रांश्च कोटिशः ॥ रैवतोऽजो भवो भीमो
वाम उग्रो वृषाकपिः ॥ १७ ॥ अजैकपादहिर्बुध्न्यो बहुरूपो महानिति ॥ रुद्रस्य पार्षदाश्चान्ये घोरा भूतविनायकाः ॥ १८ ॥

अथ आतपात्पंचयामो दिवसो जातः । अतएव रात्रिस्त्रियामा प्रदोषप्रत्यूषयोर्दिवसस्यावयवत्वात् ॥ १६ ॥ भूतस्य द्वे भार्ये तयोर्वंशमाह । सरूपेति ॥ १७ ॥ महानित्येवमेकादशरूपस्य

ले. दोषाची भार्या शर्वरी असून तिचेठिकाणीं श्रीहरीचा अंश असा शिशुमारनामक पुत्र उत्पन्न झाला ॥ १४ ॥ तशींच आंगिरसी ही वसूची भार्या असून तिचेठिकाणीं
विश्वकर्मा हा शिल्पाचार्य पुत्र उत्पन्न झाला; त्या विश्वकर्म्यांपासून चाक्षुषनामक मनु पुत्र उत्पन्न झाला. मनूपासून विश्वेदेव व साध्यगण हे पुत्र उत्पन्न झाले ॥ १५ ॥
विभावसूची उषानामक भार्या असून तिचेठिकाणीं व्युष्ट, रोचिष आणि आतप असे तीन पुत्र उत्पन्न झाले, त्यांतील आतपापासून ज्याच्यायोगानें सर्वप्राणी कर्माचेठिका-
णीं प्रवृत्त होतात असा पंचयाम (पांच प्रहरांनीं युक्त असा दिवस) नामक पुत्र झाला ह्मणूनच रात्रीला त्रियामा ह्मणतात. कारण, अवशींच्या ३ घटिका (प्रदोष)
व पहाटेच्या ५ घटिका (उषःकाळ) यांस दिवसाचे अवयव असें मानिलें आहे ॥ १६ ॥ त्याचप्रमाणें भूतनामक ऋषीची जी सरूपानामक भार्या तिचेठिकाणीं कोट्यावधि
रुद्र उत्पन्न झाले; व १ रैवत, २ अज, ३ भव, ४ भीम, ५ वाम, ६ उग्र, ७ वृषाकपि, ८ अजैकपाद्, ९ अहिर्बुध्न्य, १० बहुरूप आणि ११ महान् अशा अकरा रूपांनीं
युक्त असलेल्या रुद्राचे जे भूत, प्रेत, विनायक इत्यादिक भयंकर पार्षद ते त्या भूतऋषीच्या दुसऱ्या भूतानामक भार्येचेठिकाणीं उत्पन्न झाले ॥ १७ ॥ १८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तशाच अंगिरानामक प्रजापतीच्या एका स्वधानामक पत्नीनें पितरांचा व दुसऱ्या सतीनामक पत्नीनें अथर्वांगिरसनामक वेदाचा पुत्र या नात्यानें स्वीकार केला ॥ १९ ॥ कृशाश्व ऋषीनें आपल्या एका अर्चिनामक भार्येचेठिकाणीं धूम्रकेशनामक पुत्रास व दुसऱ्या धिषणानामक भार्येचेठिकाणीं वेदशिरस्, देवल, वयुन आणि मनु ह्या चार पुत्रांस उत्पन्न केलें ॥ २० ॥ तशाच तार्क्ष्य हें नांव धारण करणाऱ्या कश्यपाच्या विनता, कद्रू, पतंगी आणि यामिनी ह्या चार भार्या असून त्यांपैकीं पतंगीचेठिकाणीं पक्षी, यामिनीचेठिकाणीं शलभ (टोळ), सुपर्णेचेठिकाणीं (विनतेचेठिकाणीं) साक्षात् यज्ञाधिपति विष्णूचें वाहन गरुड व सूर्याचा सारथि अरुण आणि कद्रूचेठिकाणीं अनेक नाग उत्पन्न झाले ॥ २१ ॥ २२ ॥ हे भरतकुलोत्पन्ना परीक्षित् राजा, कृत्तिकादिक सत्तावीस जीं नक्षत्रें ह्या चंद्राच्या भार्या होत. परंतु त्यांपैकीं रोहिणीचेचठि-

---

रुद्रस्य पार्षदाः प्रेतादयोऽन्येऽन्यस्यां जाताः ॥ १८ ॥ अंगिरसः स्वधा सती चेति द्वे भार्ये तयोर्वंशमाह । प्रजापतेरिति । स्वधा नाम पत्नी पितॄन्पुत्रत्वेऽकरोत् । अथ सती चाथर्वांगिरसं नाम वेदम् ॥ १९ ॥ कृशाश्वस्यार्चिर्धिषणेति द्वे भार्ये तयोर्वंशमाह । कृशाश्व इति ॥ २० ॥ २१ ॥ सुपर्णा विनता । अनूरुमरुणम् ॥ २२ ॥ रोहिण्यामेव

प्रजापतेरंगिरसः स्वधा पत्नी पितॄनथ ॥ अथर्वांगिरसं वेदं पुत्रत्वे चाकरोत्सती ॥ १९ ॥ कृशाश्वोऽर्चिषि भार्यायां धूम्रकेशमजीजनत् ॥ धिषणायां वेदशिरो देवलं वयुनं मनुम् ॥ २० ॥ तार्क्ष्यस्य विनता कद्रूः पतंगी यामिनी इति ॥ पतंग्यसूत पतगान्यामिनी शलभानथ ॥ २१ ॥ सुपर्णाऽसूत गरुडं साक्षाद्यज्ञेशवाहनम् ॥ सूर्यसूतमनूरुं च कद्रूर्नागाननेकशः ॥ २२ ॥ कृत्तिकादीनि नक्षत्राणींदोः पत्न्यस्तु भारत ॥ दक्षशापात्सोऽनपत्यस्तासु यक्ष्मग्रहार्दितः ॥ २३ ॥ पुनः प्रसाद्य तं सोमः कला लेभे क्षये दिताः ॥ शृणु नामानि लोकानां मातॄणां शंकराणि च ॥ २४ ॥ अथ कश्यपपत्नीनां यत्प्रसूतमिदं जगत् ॥ अदितिर्दितिर्दनुः काष्ठा अरिष्टा सुरसा इला ॥ २५ ॥ मुनिः क्रोधवशा ताम्रा सुरभिः सरमा तिमिः ॥ तिमेर्यादोगणा आसन् श्वापदाः सरमासुताः ॥ २६ ॥

प्रेमातिशयेनान्यासामुपेक्षणात्कुपितस्य दक्षस्य शापाद्यक्ष्मग्रहार्दितः क्षयरोगपीडितः संस्तास्वनपत्योऽभूत् ॥ २३ ॥ तं दक्षं प्रसाद्य केवलं कला एव लेभे न त्वपत्यानि । कथंभूताः । क्षये कृष्णपक्षे दिताः खंडिताः सतीः । पाठांतरे क्षये सति पुनरेधितास्तेनैव वर्धिताः सतीः ॥ २४ ॥ २५ ॥ अल्पत्वेन सुगमत्वाद्यथायथं व्युत्क्रमेण तासां वंशानाह । तिमेरित्यादिना ॥ २६ ॥

काणीं चंद्राचें अतिशय प्रेम असल्यामुळें तो इतरांची उपेक्षा करीत असे ह्मणून दक्षानें क्रुद्ध होऊन त्याला शाप दिल्यामुळें तो क्षयरोगानें ग्रस्त झाला असतां, त्याला त्यांचे ठिकाणीं अपत्यें प्राप्त झालीं नाहींत त्या चंद्रानें जरी– ॥ २३ ॥ त्या दक्षाला फिरून प्रसन्न करून घेतला तथापि कृष्णपक्षामध्यें क्षय पावणाऱ्या आणि शुक्लपक्षामध्यें वृद्धिंगत होणाऱ्या अशा सोळा कला मात्र त्याला प्राप्त झाल्या; अपत्यें प्राप्त झालीं नाहींत. आतां हे राजा, ज्यांच्या संततीपासून हें सर्वजग भरून गेलें आहे त्या लोकमाता कश्यपपत्नींचीं कल्याणकारक नांवें तूं श्रवण कर. हे राजा, १ अदिति, २ दिति, ३ दनु, ४ काष्ठा, ५ अरिष्टा, ६ सुरसा, ७ इला, ॥२४॥२५॥ ८ मुनि, ९ क्रोधवशा, १० ताम्रा, ११ सुरभि, १२ सरमा व १३ तिमि हीं त्यांचीं तेरा नांवें असून त्यांपैकीं तिमीचेठिकाणीं जलचरगण आणि सरमेचेठिकाणीं व्याघ्रादि वनचर प्राणी उत्पन्न झा- ॥ २१ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ले ॥ २६ ॥ हे राजा, सुरभीपासून म्हशी, गाई व जे अणखी पायांस दोन नख्या असणारे मेंढे बकरेवगैरे पशु आहेत ते उत्पन्न झाले आणि तसेच ताम्रेपासून श्येन व गृध्र इत्यादि क्रूरपक्षी आणि मुनीपासून अप्सरांचे समुदाय उत्पन्न झाले आहेत ॥ २७ ॥ हे राजा, दंदशूकादिक सर्प हे क्रोधवशेचे पुत्र होत, सर्व वृक्ष इलेचे पुत्र होत, आणि यातुधाननामक राक्षसगण हे सुरसेचे पुत्र होत ॥ २८ ॥ तसेच अरिष्टेचे गंधर्व व काष्ठेचे एकखुरांचे अश्वादिक पशु हे पुत्र होत. आतां दनूचे एकसष्ठ पुत्र होते, त्यांपैकीं मुख्य मुख्य तूं श्रवण कर ॥ २९ ॥ हे राजा, द्विमूर्धा, शंबर, अरिष्ट, हयग्रीव, विभावसु, अयोमुख, शंकुशिरा, स्वर्भानु, कपिल, अरुण, पुलोमा, वृषपर्वा, एकचक्र, अनुतापन, धूम्रकेश, विरूपाक्ष, विप्रचित्ति आणि दुर्जय हे अठरा पुत्र मुख्य होत ॥ ३० ॥ ३१ ॥ त्यांपैकीं स्वर्भानूच्या स्वप्रभानामक कन्येशीं नमुचीनें व

॥ २७ ॥ सौरसाः सुरसायाः पुत्राः ॥ २८ ॥ प्राधानिकान्मुख्यानष्टादश शृणु ॥ २९ ॥ ३० ॥ ३१ ॥ ३२ ॥ वैश्वानरो दनोः पुत्रस्तस्य सुताः ॥ ३३ ॥

सुरभेर्महिषा गावो ये चान्ये द्विशफा नृप ॥ ताम्रायाः श्येनगृध्राद्या मुनेरप्सरसां गणाः ॥ २७ ॥ दंदशूकादयः सर्पा राजन्क्रोधवशात्मजाः ॥ इलाया भूरुहाः सर्वे यातुधानाश्च सौरसाः ॥ २८ ॥ अरिष्टायाश्च गंधर्वाः काष्ठाया द्विशफेतराः ॥ सुता दनोरेकषष्टिस्तेषां प्राधानिकाञ्छृणु ॥ २९ ॥ द्विमूर्धा शंभरोऽरिष्टो हयग्रीवो विभावसुः ॥ अयोमुखः शंकुशिराः स्वर्भानुः कपिलोऽरुणः ॥ ३० ॥ पुलोमा वृषपर्वा च एकचक्रोऽनुतापनः ॥ धूमकेशो विरूपाक्षो विप्रचित्तिश्च दुर्जयः ॥ ३१ ॥ स्वर्भानोः सुप्रभां कन्यामुवाह नमुचिः किल ॥ वृषपर्वणस्तु शर्मिष्ठां ययातिर्नाहुषो बली ॥ ३२ ॥ वैश्वानरसुतायाश्च चतस्रश्चारुदर्शनाः ॥ उपदानवी हयशिरा पुलोमा कालका तथा ॥ ३३ ॥ उपदानवीं हिरण्याक्षः क्रतुर्हयशिरां नृप ॥ पुलोमां कालकां च द्वे वैश्वानरसुते तु कः ॥ ३४ ॥ उपयेमेऽथ भगवान्कश्यपो ब्रह्मचोदितः ॥ पौलोमाः कालकेयाश्च दानवा युद्धशालिनः ॥ ३५ ॥ तयोः षष्टिसहस्राणि यज्ञघ्नांस्ते पितुः पिता ॥ जघान स्वर्गतो राजन्नेक इंद्रप्रियंकरः ॥ ३६ ॥ विप्रचित्तिः सिंहिकायां शतं चैकमजीजनत् ॥ राहुज्येष्ठं केतुशतं ग्रहत्वं य उपागतः ॥ ३७ ॥

कः प्रजापतिः कश्यप उपयेम इत्यन्वयः ॥ ३४ ॥ दानवीपरिणयने हेतुः । ब्रह्मणा चोदित इति ॥ ३५ ॥ तयोः षष्टिसहस्राणि निवातकवचाः पुत्रा जातास्तांश्च स्वर्गतः संस्ते पितामहोऽर्जुनो जघान ॥ ३६ ॥ राहुर्ज्येष्ठो यस्य ॥ ३७ ॥

वृषपर्व्याच्या शर्मिष्ठानामक कन्येशीं महाबलाढ्य नहुषपुत्र ययाति राजानें विवाह केला ॥ ३२ ॥ तसाच दनूचा वैश्वानरनामक एक पुत्र होता त्याच्या उपदानवी, हयशिरा, पुलोमा व कालका अशा ज्या सुंदररूप संपन्न चार कन्या होत्या त्यांपैकीं हे राजा हिरण्याक्षानें, उपदानवीशीं, क्रतूनें हयशिरेशीं व भगवान् कश्यपनामक प्रजापतीनें ब्रह्मदेवाच्या आज्ञेमुळें पुलोमा आणि कालका ह्या दोन्हीं वैश्वानरकन्यांशीं विवाह करून घेतला. कश्यपानें वरिलेल्या त्या कन्यांचेठिकाणीं पौलोम व कालकेय असे निवातकवचनामक साठहजार युद्धशाली दानव उत्पन्न झाले. हे राजा, तुझापितामह अर्जुन स्वर्गावर गेला होता तेव्हां इंद्राचें प्रिय करण्याकरितां त्यानें एकट्यानेंच त्या यज्ञविघातक साठहजार निवातकवचांचा वध केला ॥ ३३ ॥ ३४ ॥ ३५ ॥ ३६ ॥ त्याचप्रमाणें विप्रचित्ति नामक दानवानें सिंहिकेचेठिकाणीं १०१ पुत्र उत्पन्न

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

केले. त्यामध्यें ज्याला ग्रहत्व प्राप्त झालें तो राहु ज्येष्ठपुत्र असून बाकीचे केतुनामक शंभर पुत्र त्यापेक्षां कनिष्ठ होते ॥ ३७ ॥ हे राजा, आतां पुढें ज्यामध्यें प्रभु नारायण देव, आपल्या अंशानें अवतीर्ण झाला असा जो अदितीचा वंश तो तूं मजपासून अनुक्रमानें श्रवण कर ॥ ३८ ॥ १ विवस्वान्, २ अर्यमा, ३ पूषा, ४ त्वष्टा, ५ सविता, ६ भग, ७ धाता, ८ विधाता, ९ वरुण, १० मित्र, ११ शक्र आणि १२ उरुक्रम हे द्वादशादित्य होत ॥ ३९ ॥ त्यांपैकीं विवस्वानाच्या महाभाग्यवती संज्ञानामक भार्येला श्राद्धदेवनामक मनु व यमदेव आणि यमुना हें जुळें अशीं अपत्यें झालीं व तीच संज्ञास्त्री घोडीचें रूप धारण करून पृथ्वीवर गेली असतां तिला अश्विनी कुमार नामक दोन पुत्र झाले ॥ ४० ॥ तशीच विवस्वानाची जी छायानामक दुसरी पत्नी तिला शनैश्वर व सावर्णिनामक मनु हे दोन पुत्र आणि जिनें संवरणनामक ऋषीला पति वरिलें ती तपतीनामक कन्या अशीं तीन अपत्यें झालीं ॥ ४१ ॥ त्याचप्रमाणें अर्यमानामक आदित्याची मातृका ही पत्नी होय; व त्या उभयतांना कृताकृतज्ञानसंपन्न

॥ ३८ ॥ ३९ ॥ असूयताजनयत् । भुवि वर्तमाना ॥ ४० ॥ ततो विवस्वतः ॥ ४१ ॥ चर्षणयः कृताकृतज्ञानवंतः । पश्यतिकर्मत्वेन निघंटावुक्तेः । यत्र येषु आत्मानुसंधा-

अथातः श्रूयतां वंशो योऽदितेरनुपूर्वशः ॥ यत्र नारायणो देवः स्वांशेनावतरद्विभुः ॥ ३८ ॥ विवस्वानर्यमा पूषा त्वष्टाऽथ सविता भगः ॥ धाता विधाता वरुणो मित्रः शक्र उरुक्रमः ॥ ३९ ॥ विवस्वतः श्राद्धदेवं संज्ञाऽसूयत वै मनुम् ॥ मिथुनं च महाभागा यमं देवं यमीं तथा ॥ सैव भूत्वाऽथ वडवा नासत्यौ सुषुवे भुवि ॥ ४० ॥ छाया शनैश्चरं लेभे सावर्णिं च मनुं ततः ॥ कन्यां च तपतीं या वै वव्रे संवरणं पतिम् ॥ ४१ ॥ अर्यम्णो मातृका पत्नी तयोश्चर्षणयः सुताः ॥ यत्र वै मानुषी जातिर्ब्रह्मणा चोपकल्पिता ॥ ४२ ॥ पूषाऽनपत्यः पिष्टादो भग्नदंतोऽभवत्पुरा ॥ योऽसौ दक्षाय कुपितं जहास विवृतद्विजः ॥ ४३ ॥ त्वष्टुर्दैत्यानुजा भार्या रचना नाम कन्यका ॥ संनिवेशस्तयोर्जज्ञे विश्वरूपश्च वीर्यवान् ॥ ४४ ॥ तं वव्रिरे सुरगणा दौहित्रं द्विषतामपि ॥ विमतेन परित्यक्ता गुरुणांगिरसेन यत् ॥ ४५ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे षष्ठस्कंधे षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥ ॥

नविशेषेण मानुषी जातिश्चोपकल्पिता । तथा च श्रुतिः । पुरुषत्वे चाविस्तरामात्मेति ॥ ४२ ॥ कुपितं हरमिति शेषः । विवृतद्विजः प्रकटितदंतः सन् ॥ ४३ ॥ ४४ ॥ यद्यदा विमतेनावज्ञातेन बृहस्पतिना परित्यक्तास्तदा द्विषतां शत्रूणां भागिनेयमपि विश्वरूपं पौरोहित्ये वृतवंतः ॥ ४५ ॥ इति षष्ठे टीकायां षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥ ॥

असे पुष्कळ पुत्र झाले आणि त्या पुत्रांची सृष्टि झाली तिच्यामध्यें आपलें पूर्वापर अनुसंधान राखण्याचें ज्ञान असल्यामुळें तिला ब्रह्मदेवानें मनुष्यजाति कल्पिली आहे ॥ ४२ ॥ तसाच पूषानामक आदित्य दक्ष प्रजापतीवर क्रुद्ध झालेल्या महेश्वरास दांत बाहेर काढून हंसल्यामुळें जो भग्नदंत होऊन पिष्टभक्षण करणारा झाला असें पूर्वीं मी तुला चतुर्थ स्कंधामध्यें सांगितलेंच आहे, त्या पूषाला कांहींच संतति झाली नाहीं ॥ ४३ ॥ तशीच दैत्यांची कनिष्ठभगिनी जी रचनानामक कन्या ती त्वष्ट्याची भार्या असून त्या उभयतांना संनिवेश आणि महापराक्रमी विश्वरूप असे दोन पुत्र झाले ॥ ४४ ॥ जेव्हां देवांनीं अवज्ञा केलेल्या बृहस्पति गुरूनें त्यांचा त्याग केला होता तेव्हां शत्रूंचा कन्यापुत्र अशाही त्या विश्वरूपाला देवांनीं आपल्या गुरुत्वाविषयीं वरिलें होतें ॥ ४५ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवत नामक महापुराणांतील षष्ठस्कंधापैकीं दक्षकन्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वंशकथननामक हा सहावा अध्याय समाप्त जाहला ॥ ६ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां या सातव्या अध्यायामध्यें बृहस्पति गुरूनें त्याग केलेल्या देवांनीं विश्वरू-
पाला पुरोहित होण्याविषयीं वरिलें असतां त्यानें तें पुरोहितपणाचें कृत्य केलें अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ परीक्षित् राजा ह्मणाला– हे भगवन्, आचार्य बृह-
स्पतीनें आपल्या देवशिष्यांचा त्याग कशाकरितां केला ? कारण अपराधावांचून असें होण्याचा संभव नाहीं. यास्तव शिष्यांनीं गुरूचा काय अपराध केला? हें तूं मला क-
थन कर ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे भरतकुलोत्पन्ना राजा, त्रिभुवनाच्या ऐश्वर्यमदानें ज्यानें सन्मार्गाचें उल्लंघन केलें आहे; मरुद्गण, अष्टवसु, एकादशरुद्र,
द्वादशादित्य, ऋभुगण, विश्वेदेव, साध्य आणि अश्विनीकुमार हे ज्याच्या सभोंवती आहेत; सिद्ध, चारण, गंधर्व, ब्रह्मवेत्ते मुनि, विद्याधर, अप्सरोगण, किन्नर, पक्षी आणि-

---

सप्तमे विश्वरूपोऽसौ पौरोहित्ये वृतः सुरैः ॥ गुरुणा संपरित्यक्तैः पौरोहित्यमथाकरोत् ॥ १ ॥ कस्य हेतोः कस्माद्धेतोरात्मनः शिष्याः सुराः परित्यक्ताः । अक्रममपराधम्
॥ १ ॥ स इंद्रो यदा संप्राप्तं वाचस्पतिं नाभ्यनंदत नाद्दतवांस्तदा स आंगिरसस्ततो निर्गत्य तूष्णीं स्वगृहमाययावित्यष्टानामन्वयः । अनादरे हेतुं मदं दर्शयितुं तं विशि-
नष्टि । त्रिभुवनैश्वर्यमदेनोल्लंघितः सतां पंथा येन सः ॥ २ ॥ परिश्रितः परिवृतः ॥ ३ ॥ ४ ॥ आस्थानं सभा तस्मिन्नध्यासनं सिंहासनं तदास्थितः ॥ ५ ॥ पारमेष्ठ्यै-

॥ राजोवाच ॥ कस्य हेतोः परित्यक्ता आचार्येणात्मनः सुराः ॥ एतदाचक्ष्व भगवञ्छिष्याणामक्रमं गुरौ ॥ १ ॥ श्रीशुक उवाच ॥
इंद्रस्त्रिभुवनैश्वर्यमदोल्लंघितसत्पथः ॥ मरुद्भिर्वसुभी रुद्रैरादित्यैर्ऋभुभिर्नृप ॥ २ ॥ विश्वेदेवैश्च साध्यैश्च नासत्याभ्यां परिश्रितः ॥
सिद्धचारणगंधर्वैर्मुनिभिर्ब्रह्मवादिभिः ॥ ३ ॥ विद्याधराप्सरोभिश्च किन्नरैः पतगोरगैः ॥ निषेव्यमाणो मघवान्स्तूयमानश्च भारत
॥ ४ ॥ उपगीयमानो ललितमास्थानाध्यासनाश्रितः ॥ पांडुरेणातपत्रेण चंद्रमंडलचारुणा ॥ ५ ॥ युक्तश्चान्यैः पारमेष्ठ्यैश्चामर-
व्यजनादिभिः ॥ विराजमानः पौलोम्या सहार्धासनया भृशम् ॥ ६ ॥ स यदा परमाचार्यं देवानामात्मनश्च ह ॥ नाभ्यनंदत सं-
प्राप्तं प्रत्युत्थानासनादिभिः ॥ ७ ॥ वाचस्पतिं मुनिवरं सुरासुरनमस्कृतम् ॥ नोच्चचालासनादिंद्रः पश्यन्नपि सभागतम् ॥ ८ ॥
ततो निर्गत्य सहसा कविरांगिरसः प्रभुः ॥ आययौ स्वगृहं तूष्णीं विद्वान् श्रीमदविक्रियाम् ॥ ९ ॥

र्महाराजचिह्नैः । आसनस्यार्धे स्थितया पौलोम्या सह विराजमानः सन् ॥ ६ ॥ प्रत्युत्थानादिना नाभ्यनंदत नाद्दतवान् ॥ ७ ॥ नचोच्चचाल आसन एव स्थितोऽपि
किंचिन्न चलितवान् ॥ ८ ॥ श्रीमदेन या विक्रिया तां विद्वान् जानन् ॥ ९ ॥

नाग हे ज्याची उत्तमरीतीनें सेवा व गुणांची गायनपूर्वक स्तुति करीत आहेत, सभेमध्यें जो सिंहासनारूढ झाला आहे, चंद्रमंडलासारखें मनोहर असें श्वेतछत्र व इत-
रही चौंऱ्या व विंझणेवगैरे सार्वभौमचिन्हांनीं जो युक्त आहे आणि आसनाच्या अर्धभागावर स्थित असलेल्या इंद्राणीसहवर्तमान जो अतिशय विराजमान होत आहे ॥ २ ॥
॥ ३ ॥ ४ ॥ ५ ॥ ६ ॥ त्या इंद्रानें देवदैत्यांनीं पूजित, मुनीमध्यें श्रेष्ठ, स्वतःचा व देवांचा परमगुरु आणि सभेमध्यें प्राप्त झालेला अशा बृहस्पतीला अवलोकन करीत
असतांनाही जेव्हां प्रत्युत्थान व आसन इत्यादिकांच्या योगानें त्याचा आदर केला नाहीं व जेव्हां आसनावर बसला असतांहि तो किंचित् हाललासुद्धां नाहीं तेव्हां ऐश्वर्य-
मदापासून उत्पन्न झालेला विकार जाणणारा तो अंगिराऋषीचा पुत्र ज्ञानसंपन्न प्रभु बृहस्पति, एकाएकीं तेथून निघून मुकाट्यानें आपल्या घरीं परत आला ॥ ७ ॥ ८ ॥ ९ ॥

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याचवेळीं इकडे इंद्र आपल्या हातून गुरूची हेलना झाली हें जाणून सभेमध्यें स्वतः आपणच आपली निंदा करूं लागला कीं– ॥ १० ॥ अरेरे! मीं केलेलें कर्म अगदीं अयोग्य आहे. कारण, मी मंदमतीनें ऐश्वर्यांच्या योगानें मत्त होऊन सभेमध्यें गुरूचा तिरस्कार केला आहे ॥ ११ ॥ अहो! जिच्यायोगानें सत्त्वगुणप्रधान अशा देवांचाही मी राजा असतां, मला आज अहंकार प्राप्त झाला त्या स्वर्गाधिपतीच्याही लक्ष्मीची कोण ज्ञानी पुरुष इच्छा करील? कोणीहि करणार नाहीं ॥ १२ ॥ सिंहासनस्थ राजानें अभ्युत्थानवगैरे करूं नये, असें वृद्धजन ह्मणतात तर त्याविषयीं ह्मणतो कीं,– हे देवहो, सार्वभौम राजाच्या सिंहासनावर आरूढ झालेल्यानें कोणालाही प्रत्युत्थान देऊं नये, असें जे कोणी ह्मणत असतील ते उत्तम प्रकारचा धर्म जाणत नाहींत. कारण, कुलसंपन्न ब्राह्मण अथवा सर्वव्यापी विष्णूचा भक्त

प्रतिबुध्यानुस्मृत्य ॥ १० ॥ मम कृतं कर्म अहो असाधु यद्यस्माद्दभ्रबुद्धिनाऽल्पमतिना मया कात्कृतस्तिरस्कृतः ॥ ११ ॥ विबुधानां सात्विकानां देवानामीश्वरोऽप्यहम् ॥ १२ ॥ ननु सिंहासनस्थो राजाऽभ्युत्थानं न कुर्यादिति वृद्धा वदंति तत्राह । य इति द्वाभ्याम् । धिषणमासनम् ॥ १३ ॥ कुपथं दिशंत्युपदिशंतीति कुपथदेष्टारस्तेषां

तर्ह्येव प्रतिबुद्धयेंद्रो गुरुहेलनमात्मनः ॥ गर्हयामास सदसि स्वयमात्मानमात्मना ॥ १० ॥ अहो बत ममासाधु कृतं वै दभ्रबुद्धिना ॥ यन्मयैश्वर्यमत्तेन गुरुः सदसि कात्कृतः ॥ ११ ॥ को गृध्द्येत्पंडितो लक्ष्मीं त्रिविष्टपपतेरपि ॥ ययाऽहमासुरं भावं नीतोऽद्य विबुधेश्वरः ॥ १२ ॥ ये पारमेष्ठ्यं धिषणमधितिष्ठन्न कंचन ॥ प्रत्युत्तिष्ठेदिति ब्रूयुर्धर्मं ते न परं विदुः ॥ १३ ॥ तेषां कुपथदेष्टॄणां पततां तमसि ह्यधः ॥ ये श्रद्दध्युर्वचस्ते वै मज्जंत्यश्मप्लवा इव ॥ १४ ॥ अथाहममराचार्यमगाधधिषणं द्विजम् ॥ प्रसादयिष्ये निशठः शीर्ष्णा तच्चरणं स्पृशन् ॥ १५ ॥ एवं चिंतयतस्तस्य मघोनो भगवान्गृहात् ॥ बृहस्पतिर्गतोऽदृष्टां गतिमध्यात्ममायया ॥ १६ ॥ गुरोर्नाधिगतः संज्ञां परीक्षन्भगवान्स्वराट् ॥ ध्यायन्धिया सुरैर्युक्तः शर्म नालभतात्मनः ॥ १७ ॥ तच्छ्रुत्वैवासुराः सर्व आश्रित्यौशनसंमतम् ॥ देवान्प्रत्युद्यमं चक्रुर्दुर्मदा आततायिनः ॥ १८ ॥

वचः । अश्ममयः प्लवो येषां ते यथा मज्जंतं प्लवमनु मज्जंति तद्वत् ॥ १४ ॥ अगाधा गंभीरा धिषणा यस्य तम् । निशठः शाठ्यहीनः सन् ॥ १५ ॥ अधिकया आत्ममायया ॥ १६ ॥ गुरोः संज्ञां ज्ञानोपायं परीक्षमाणोऽपि नाधिगतोऽप्राप्तः सन् ॥ १७ ॥ आततायिन उद्यतास्त्राः ॥ १८ ॥

येत असतां त्याला पाहून, जो असनावरून उठत नाहीं तो दुःखांनीं पीडित होतो असें शास्त्र आहे. ह्याकरितां कुमार्गाचा उपदेश करून अधोभागीं नरकामध्यें पडणाऱ्या त्या लोकांच्या वचनावर जे विश्वास ठेवितात तेसुद्धां पाषाणमय होडीमध्यें बसलेल्या लोकांप्रमाणें बुडून जातात ॥ १३ ॥ १४ ॥ तस्मात्, गंभीरबुद्धीनें युक्त असलेल्या त्या देवगुरु ब्राह्मणाच्या चरणीं मस्तक ठेवून मी त्याला निष्कपटपणानें प्रसन्न करून घेईन ॥ १५ ॥ ह्याप्रमाणें तो इंद्र विचार करीत असतां, भगवान् बृहस्पति आपल्या सर्वोत्कृष्ट मायेच्या योगानें स्वगृहांतूनही अंतर्धान पावला ॥ १६ ॥ नंतर आपला गुरु कोठें आहे याचा शोध करून पहात असतांही जेव्हां त्या भगवान् देवाधिपति इंद्राला त्याचा पत्ता लागेना तेव्हां तो इंद्र, असुरांपासून आमचें रक्षण कसें होईल ह्याविषयीं देवांसहवर्तमान बुद्धिपूर्वक विचार करित असतांहि त्याच्या मनाला स्वस्थता वाटेना ॥ १७ ॥ इतक्यामध्यें तो वृत्तांत श्रवण करितांच दुर्मद असे सर्व असुर, शुक्राचार्यांची संमति घेऊन व शस्त्रास्त्रें धारण करून देवांबरोबर युद्ध कर-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ण्यास उद्युक्त झाले ॥ १८ ॥ नंतर त्यांनीं टाकिलेल्या तीक्ष्ण बाणांच्या योगानें ज्यांचीं मस्तकें, मांड्या व बाहु हीं फुटून गेलीं आहेत असे ते देव, इंद्रासहवर्तमान माना खालीं घालून ब्रह्मदेवाला शरण गेले ॥ १९ ॥ त्या वेळीं भगवान् अयोनिसंभव ब्रह्मदेव, तशाप्रकारें पीडित झालेल्या त्या देवांना पाहून, मोठ्या कृपेनें त्यांचें सांत्वन करीत करीत असें ह्मणाला कीं, ॥ २० ॥ ब्रह्मदेव ह्मणाला– अरेरे ! हे सुरश्रेष्ठहो, तुह्मीं ऐश्वर्याच्या मदानें, इंद्रियदमन केलेल्या ब्रह्मज्ञानी ब्राह्मणाचा अनादर केलात, हें तुमचें करणें फारच वाईट झालें आहे ॥ २१ ॥ तस्मात् हे देवहो, तुह्मीं समृद्ध असूनही तुह्मी स्वतः ज्यांना मारणारे आहांत त्या तुमच्या क्षीण झालेल्या शत्रूंपासूनही जो तुमचा पराभव झाला हें त्या अन्यायाचेंच फळ होय ॥ २२ ॥ ह्याप्रमाणें सांगून गुरूचा तिरस्कार आणि सत्कार हेच अनुक्रमें क्षयवृद्धींला कारण आहेत हें असुरांच्या

निर्भिन्नान्यंगान्युत्तमांगानि शिरांसि ऊरवो बाहवश्च येषाम् ॥ १९ ॥ २० ॥ वो युष्माकं कृतं करणं महदभद्रम् । तदाह । ब्रह्मिष्ठमिति । नाभ्यनंदत नाभिनंदितवंतः ॥ २१ ॥ परेभ्यः शत्रुभ्यो वः पराभव इति यदयं तस्यानयस्यान्यायस्य संबंधी फलरूप आसीत् । उक्तं च । ब्राह्मणं कुलसंपन्नं भक्तं विष्णोर्महात्मनः ॥ आयांतं वीक्ष्य नोत्तिष्ठेत्स दुःखैः परिभूयत इति । स्वयमेव वैरिणो हंतारो येषां तेभ्यः ॥ २२ ॥ गुरुतिरस्कारसत्कारावेवापचयोपचयकारणमित्यसुरदृष्टांतेनाह । मघवन्निति । द्विषतः

तैर्विसृष्टेषुभिस्तीक्ष्णैर्निर्भिन्नांगोरुबाहवः ॥ ब्रह्माणं शरणं जग्मुः सहेंद्रा नतकंधराः ॥ १९ ॥ तांस्तथाऽभ्यर्दितान्वीक्ष्य भगवानात्मभूरजः ॥ कृपया परया देव उवाच परिसांत्वयन् ॥ २० ॥ ब्रह्मोवाच ॥ ॥ अहो बत सुरश्रेष्ठा ह्यभद्रं वः कृतं महत् ॥ ब्रह्मिष्ठं ब्राह्मणं दांतमैश्वर्यान्नाभ्यनंदत ॥ २१ ॥ तस्यायमनयस्यासीत्परेभ्यो वः पराभवः ॥ प्रक्षीणेभ्यः स्ववैरिभ्यः समृद्धानां च यत्सुराः ॥ २२ ॥ मघवन्द्विषतः पश्य प्रक्षीणान्गुर्वतिक्रमात् ॥ संप्रत्युपचितान्भूयः काव्यमाराध्य भक्तितः ॥ आददीरन्निलयनं ममापि भृगुदेवताः ॥ २३ ॥ त्रिविष्टपं किं गणयंत्यभेद्यमंत्रा भृगूणामनुशिक्षितार्थाः ॥ न विप्रगोविंदगवीश्वराणां भवंत्यभद्राणि नरेश्वराणाम् ॥ २४ ॥ तद्विश्वरूपं भजताशु विप्रं तपस्विनं त्वाष्ट्रमथात्मवंतम् ॥ सभाजितोऽर्थान्स विधास्यते वो यदि क्षमिष्यध्वमुतास्य कर्म ॥२५॥ श्रीशुक उवाच ॥ त एवमुदिता राजन्ब्रह्मणा विगतज्वराः ॥ ऋषिं त्वाष्ट्रमुपव्रज्य परिष्वज्येदमब्रुवन् ॥२६॥

शत्रून् । काव्यं भार्गवं गुरुमेवासेव्योपचितान् । उपचितत्वमेवाह । आददीरन्गृह्णीयुः ॥ २३ ॥ अभेद्यो मंत्रो येषाम् । अनुशिक्षितार्थाः शिष्याः । यतो विप्रा गोविंदो गावश्चेश्वरा अनुग्राहका येषां तेषामेवाभद्राणि न भवंत्यन्येषां तु भवंति ॥ २४ ॥ तत्तस्मात् । अथानंतरमेव भजत । अस्य कर्मासुरपक्षपातम् ॥ २५ ॥ उदिता उक्ताः ॥ २६ ॥

दृष्टांतानें सांगतो कीं,– हे इंद्रा, गुरूचा तिरस्कार केल्यामुळें अगदीं क्षीण झालेल्या व सांप्रतकालीं त्या शुक्राचार्यांचीच भक्तिपूर्वक सेवा करून समृद्ध झालेल्या ह्या शत्रूंकडे तूं पहा ! अरे फारतर काय परंतु आपल्या शुक्रगुरूला देवतेसमान मानणारे हे असुर, आज माझेंही स्थान ग्रहण करितील ॥ २३ ॥ अभेद्यमंत्रानें युक्त असलेले ते शुक्राचार्यांचे शिष्य (असुर) या वेळीं स्वर्गाची गणना तरी करीत आहेत काय? नाहींच करीत. परंतु ब्राह्मण, गोविंद आणि गाई हीं, ज्यांच्यावर अनुग्रह करणारीं आहेत त्या श्रेष्ठ पुरुषांचें मात्र अकल्याण होत नाहीं, इतरांचें होतें ॥ २४ ॥ यास्तव हे देवहो, जितेंद्रिय, तपस्वी आणि आत्मज्ञानसंपन्न असा जो त्वष्ट्याचा पुत्र ब्राह्मण विश्वरूप आहे, त्याच्याकडे तुह्मीं आतांच सत्वर गमन करा आणि त्याचा सत्कार करून त्याला गुरु करून घ्या. ह्मणजे तो तुमचे मनोरथ पूर्ण करील. परंतु; तुह्मी जर त्याचें असुर पक्षपातरूप कर्म सहन कराल तरच हें घडेल ॥ २५ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, याप्रमाणें ब्रह्मदेवानें आज्ञा केलेले ते देव, चिंतारहित होऊन त्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विश्वरूप ऋषीजवळ जाऊन व त्यास आलिंगन देऊन असें ह्मणाले कीं ॥ २६ ॥ देव ह्मणाले– बा विश्वरूपा, तुझें कल्याण असो. आह्मीं तुझ्या आश्रमाप्रत अतिथि प्राप्त झालों आहों याकरितां आह्मां पितरांचा या समयीं योग्य असलेला मनोरथ तूं पूर्ण करावास ॥ २७ ॥ हे ब्रह्मनिष्ठा, जे सत्पुत्र आहेत ते जरी पुत्रवंत असले तथापि पितरांची शुश्रूषा करणें हाच त्यांचा उत्कृष्ट धर्म होय. तेव्हां, तुह्मांसारिख्या ब्रह्मचारी पुत्रांचा हाच धर्म आहे ह्यांत काय सांगावयाचें आहे ? ॥ २८ ॥ याप्रमाणें सांगून-अतिथि व पितर ह्यांची प्रशंसा करण्याकरितां देव पुन्हा ह्मणतात कीं,–आचार्य ही वेदाची मूर्ति, पिता ब्रह्मदेवाची मूर्ति, भ्राता इंद्राची मूर्ति, माता ही साक्षात् पृथ्वीची मूर्ति, भगिनी दयेची मूर्ति, अतिथि ही साक्षात् धर्माची मूर्ति, अभ्यागत ही अग्नीची मूर्ति आणि सर्वभूतें ही ईश्वराची मूर्ति होय ॥ २९ ॥ ३० ॥ तस्मात् बा विश्वरूपा, पीडित

॥ २७ ॥ २८ ॥ अतिथीनां पितॄणां च प्रशंसार्थमाहुः । आचार्य उपनीय वेदाध्यापकः । ब्रह्मणो वेदस्य मूर्तिः ॥ २९ ॥ धर्मस्यात्मा मूर्तिरतिथिः । स्वयं साक्षात् । आत्मनः श्रीविष्णोः । यद्वा आत्मनः स्वस्य । सर्वभूतेष्वात्मदृष्टिः कर्तव्येत्यर्थः ॥ ३० ॥ परेभ्यः पराभव एवार्तिस्ताम् ॥ ३१ ॥ संदेशमा-

देवा ऊचुः॥ वयं तेऽतिथयः प्राप्ता आश्रमं भद्रमस्तु ते ॥ कामः संपाद्यतां तात पितॄणां समयोचितः ॥२७॥ पुत्राणां हि परो धर्मः पितृशुश्रूषणं सताम् ॥ अपि पुत्रवतां ब्रह्मन्किमुत ब्रह्मचारिणाम् ॥२८॥ आचार्यो ब्रह्मणो मूर्तिः पिता मूर्तिः प्रजापतेः ॥ भ्राता मरुत्पतेर्मूर्तिर्माता साक्षात्क्षितेस्तनुः ॥ २९ ॥ दयाया भगिनी मूर्तिर्धर्मस्यात्माऽतिथिः स्वयम् ॥ अग्नेरभ्यागतो मूर्तिः सर्वभूतानि चात्मनः ॥ ३० ॥ तस्मात्पितॄणामार्तानामार्तिं परपराभवम् ॥ तपसाऽपनयंस्तात संदेशं कर्तुमर्हसि ॥ ३१ ॥ वृणीमहे त्वोपाध्यायं ब्रह्मिष्ठं ब्राह्मणं गुरुम् ॥ यथांऽजसा विजेष्यामः सपत्नांस्तव तेजसा ॥ ३२ ॥ न गर्हयंति ह्यर्थेषु यविष्ठांघ्र्यभिवादनम् ॥ छंदोभ्योऽन्यत्र न ब्रह्मन्वयो ज्यैष्ठ्यस्य कारणम् ॥ ३३ ॥ ऋषिरुवाच ॥ अभ्यर्थितः सुरगणैः पौरोहित्ये महातपाः ॥ स विश्वरूपस्तानाह प्रसन्नः श्लक्ष्णया गिरा ॥ ३४ ॥

हुः । वृणीमह इति ॥ ३२ ॥ ननूपाध्यायत्वे कनिष्ठस्य ममाभिवंदनं करिष्यथ तच्च गर्हितं तत्राहुः । नेति । अर्थेषु प्रयोजननिमित्तं यविष्ठानामभिवादनं न निंदंति । किंच छंदोभ्यो मंत्रेभ्योऽन्यत्र वयो ज्यैष्ठ्यस्य कारणं न तु मंत्रेषु । अतोऽस्मभ्यं मंत्रदातृत्वेन त्वमेव ज्येष्ठो भविष्यसि । यद्वा छंदोभ्योऽन्यत्र वेदान्विहाय वय एव ज्यैष्ठ्यस्य कारणं न भवति किंतु वेदा एव मुख्यं कारणं तत्साम्ये तु वयः । वेदज्ञत्वाच्च त्वमेव ज्येष्ठ इत्यर्थः ॥ ३३ ॥ ३४ ॥

झालेल्या आह्मां पितरांची शत्रुजन्य पराभवरूप पीडा तूं आपल्या तपानें दूर करण्याकरितां आमच्या आज्ञेचा अंगीकार करण्यास योग्य आहेस ॥ ३१ ॥ ती आज्ञा अशी कीं,– हे विश्वरूपा, तूं ब्रह्मज्ञानी व ब्राह्मण असल्यामुळें आह्मी तुला गुरुस्थानीं उपाध्याय वरितों ह्मणजे तुझ्या तेजाच्या योगानें आह्मीं अनायासें आपल्या शत्रूंना जिंकून टाकूं ॥ ३२ ॥ आतां तुमचें उपाध्यायत्व स्वीकारिलें असतां, मज कनिष्ठाला तुह्मीं अभिवंदन कराल आणि तें तर निंद्य आहे असें ह्मणशील तर–हे ब्रह्मनिष्ठा, प्रयोजननिमित्त ज्येष्ठांनीं कनिष्ठांचें पादाभिवंदन केलें असतां तें निंद्य आहे असें वृद्धजन मानीत नाहींत; आणि त्यांतूनही मंत्रांहून अन्यत्रठिकाणीं वय हें ज्येष्ठत्वाचें कारण आहे मंत्राविषयीं नाहीं. याकरितां आह्मांला मंत्र सांगणारा या नात्यानें तूंच आमचा ज्येष्ठ आहेस ॥ ३३ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– ह्याप्रमाणें देवगणांनीं उपा- ॥ २४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ध्यायत्वाविषयीं त्या महातपस्वी विश्वरूपाची प्रार्थना केली असतां, तो प्रसन्न झाला आणि मधुरवाणीनें त्यांना असें ह्मणाला कीं, ॥ ३४ ॥ हे नाथहो– उपाध्यायत्व हें वृद्धिंगत झालेल्या ब्रह्मतेजाचा व्यय करणारें असल्यामुळें धर्मशील लोकानीं निंद्य मानिलें आहे; परंतु आपल्यासारिख्या लोकनाथांनीं त्याविषयीं याचना केली असतां मजसारिखा आपला शिष्य तें कसें नाकारील? कारण, 'तुमच्यासारख्यांचें वचन अमान्य न करणें हाच शिष्याचा पुरुषार्थ आहे' असें शास्त्रवेत्ते ह्मणतात ॥ ३५ ॥ आतां उपाध्यायत्वाच्या योगानें द्रव्यलाभ झाला असतां त्यापासून धर्म होईल. नाहींतर निर्धन पुरुषाचा धर्म कोठून होणार? ह्मणूनच उपाध्यायपणाच्या योगानें लोकांला हर्ष होतो असें ह्मणाल तर– हे देवहो, द्रव्यहीन तपस्विजनांचें धन ह्मटलें ह्मणजे 'शिलोंछन'[1] हें होय. त्या द्रव्यानें ह्या गृहस्थाश्रमामध्यें साधूंचीं सत्कर्में आचरण कर-

---

निंदितमपीदं युष्मद्वाक्यभंगभयेन करिष्यामीत्याह सार्धेन । विगर्हितं पौरोहित्यं धर्मशीलैः अधर्महेतुत्वात् । किंच ब्रह्मवर्चउपव्ययं पूर्वेसिद्धस्य ब्रह्मवर्चसो व्ययकरम् । प्रत्याख्यातुं च मादृशो नार्हतीत्याह । कथं न्विति । तेषां शिष्यः शिक्षणार्हः । स एव प्रत्याख्यानाभाव एव हि शिष्यस्य स्वार्थ उच्यते ॥ ३५ ॥ ननु पौरोहित्येन धनलाभाद्धर्मः सिद्ध्येत् । अन्यथा निर्धनस्य कुतो धर्मः । अतएव तेन लोको हृष्यति तत्राह । अकिंचनानां शिलोंछनं हि धनम् । क्षेत्रे स्वाम्युपेक्षितकणिशोपादानं शिलम् ।

विश्वरूप उवाच ॥ विगर्हितं धर्मशीलैर्ब्रह्मवर्चउपव्ययम् ॥ कथं नु मद्विधो नाथा लोकेशैरभियाचितम् ॥ प्रत्याख्यास्यति तच्छिष्यः स एव स्वार्थ उच्यते ॥ ३५ ॥ अकिंचनानां हि धनं शिलोंछनं तेनेह निर्वर्तितसाधुसत्क्रियः ॥ कथं विगर्ह्यं नु करोम्यधीश्वराः पौरोधसं हृष्यति येन दुर्मतिः ॥ ३६ ॥ तथाऽपि न प्रतिब्रूयां गुरुभिः प्रार्थितं कियत् ॥ भवतां प्रार्थितं सर्वं प्राणैरर्थैश्च साधये ॥ ३७ ॥ श्रीशुक उवाच ॥ तेभ्य एवं प्रतिश्रुत्य विश्वरूपो महातपाः ॥ पौरोहित्यं वृतश्चक्रे परमेण समाधिना ॥ ३८ ॥ सुरद्विषां श्रियं गुप्तामौशनस्यापि विद्यया ॥ आच्छिद्यादान्महेंद्राय वैष्णव्या विद्यया विभुः ॥ ३९ ॥ यया गुप्तः सहस्राक्षो जिग्येऽसुरचमूर्विभुः ॥ तां प्राह स महेंद्राय विश्वरूप उदारधीः ॥ ४० ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे षष्ठस्कंधे सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥

हट्टादौ पतितव्रीह्यादेरुपादानमुंछनम् । इह गृहाश्रमे । तेनैव निर्वर्तिता साधूनां सत्क्रिया येन ॥ ३६ ॥ कियदेतत्प्रार्थितमल्पमेव । अभ्यधिकमपि करिष्यामीत्याह । भवतामिति ॥ ३७ ॥ परमेण समाधिना परमोद्यमेन ॥ ३८ ॥ वैष्णव्या श्रीनारायणकवचात्मिकया ॥ ३९ ॥ असुरचमूर्दैत्यसेनाः ॥ ४० ॥ इति षष्ठस्कंधे टीकायां सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥

णारा जो मी तो, ज्याच्यायोगानें दुर्मति जन हर्ष पावतो. तें निंद्य उपाध्यायत्व (मनापासून) कसें बरें स्वीकारीन? स्वीकारणारच नाहीं ॥ ३६ ॥ असें जरी आहे तथापि तुमचें ह्मणणें मी अमान्य करीत नाहीं. कारण, आपलें गुरूंचें मागणें अगदीं अल्प आहे याकरितां मी अर्थ व प्राण ह्यांच्यायोगानें आपलें सर्व मागणें परिपूर्ण करीन ॥ ३७ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे परीक्षित् राजा, त्या महातपस्वी विश्वरूपानें ह्याप्रमाणें त्यांना वचन दिलें. तेव्हां त्यांनीं त्याला वरिलें असतां त्यानें दीर्घ प्रयत्नानें त्यांचें उपाध्यायत्व केलें ॥ ३८ ॥ तें असें कीं, त्या समर्थ विश्वरूपानें, शुक्राचार्यांच्या विद्येनें रक्षित असलेली देवद्वेषी असुरांची जी संपत्ति ती, नारायणकवचात्मक वैष्णवविद्येच्या योगानें बलात्कारानें त्यांपासून हिरावून घेऊन इंद्राला अर्पण केली ॥ ३९ ॥ ह्मणजे जिच्यायोगानें सुरक्षित झालेल्या प्रभुइंद्रानें दैत्यांच्या सैन्याचा पराभव केला ती नारायणकवचरूप वैष्णवी विद्या इंद्राला त्या उदारबुद्धि विश्वरूपानें सांगितली ॥ ४० ॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील षष्ठस्कंधापैकीं विश्वरू-

---

१ शेतामध्यें धन्यानें उपेक्षा केलेल्या धान्याच्या कणसांचें ग्रहण करणें हें 'शिल' होय आणि बाजारवगैरेठिकाणीं पडलेल्या धान्याचे कण वेंचून घेणें हें 'उंछन' होय.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पकृत पौरोहित्यस्वीकारकथननामक हा सातवा अध्याय समाप्त झाला ॥ ७ ॥ ॥ ७ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां या आठव्या अध्यायामध्यें, विश्वरूपानें इंद्राला नारायणात्मक कवच सांगितलें व त्याच्यायोगानें सुरक्षित झालेल्या इंद्रानें, दैत्यांचा पराभव केला, अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ राजा ह्मणाला— हे भगवन्, ज्याच्यायोगानें सुरक्षित झालेल्या इंद्रानें वाहनासहवर्तमान शत्रूंच्या सेनाधिपतींचा खेळल्यासारखा सहज पराभव करून त्रैलोक्यसंबंधी ऐश्वर्याचा उपभोग घेतला तें नारायणात्मक कवच मला सांग व ज्या दुसऱ्या साहायभूत सेनाधिपतीनें रक्षित झालेल्या इंद्रानें युद्धामध्यें शस्त्रपाणि शत्रूंचा पराभव केला आणि तो ज्या प्रकारानें केला तें सर्वही मला सांग ॥ १ ॥ २ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला— हे राजा, पुरोहित ह्मणून वरिलेला त्वष्ट्याचा पुत्र जो विश्वरूप त्यानें, प्रश्न करणाऱ्या इंद्राला जें नारायणनामक कवच सांगितलें आहे तें तूं आतां एकाग्रमनानें मजपासून श्रवण कर ॥ ३ ॥ विश्वरूप ह्मणाला— हे महेंद्रा, कोणाहि

अष्टमे विश्वरूपस्तु वर्म नारायणात्मकम् ॥ इंद्राय प्राह येनेंद्रो गुप्तो दैत्यानथाजयत् ॥ १ ॥ त्रिलोक्याः संबंधिनीं श्रियम् ॥ १ ॥ २ ॥ ३ ॥ मंत्राभ्यामष्टाक्षरद्वादशाक्षराभ्य-

राजोवाच ॥ यया गुप्तः सहस्राक्षः सवाहान्रिपुसैनिकान् ॥ क्रीडन्निव विनिर्जित्य त्रिलोक्या बुभुजे श्रियम् ॥ १ ॥ भगवंस्तन्ममाख्याहि वर्म नारायणात्मकम् ॥ यथाऽऽततायिनः शत्रून्येन गुप्तोऽजयन्मृधे ॥ २ ॥ श्रीशुक उवाच ॥ वृतः पुरोहितस्त्वाष्ट्रो महेंद्रायानुपृच्छते ॥ नारायणाख्यं वर्माह तदिहैकमनाः शृणु ॥ ३ ॥ विश्वरूप उवाच ॥ धौतांघ्रिपाणिराचम्य सपवित्र उदङ्मुखः ॥ कृतस्वांगकरन्यासो मंत्राभ्यां वाग्यतः शुचिः ॥ ४ ॥ नारायणमयं वर्म संनह्येद्भय आगते ॥ पादयोर्जानुनोरूर्वोरुदरे हृद्यथोरसि ॥ ५ ॥ मुखे शिरस्यानुपूर्व्यादोंकारादीनि विन्यसेत् ॥ ॐ नमो नारायणायेति विपर्ययमथापि वा ॥ ६ ॥ करन्यासं ततः कुर्याद्द्वादशाक्षरविद्यया ॥ प्रणवादियकारांतमंगुल्यंगुष्ठपर्वसु ॥ ७ ॥

कृतः स्वांगेषु करयोश्च न्यासो येन ॥ ४ ॥ नारायणमयं वर्म संनह्येद्धध्नीयात् । तत्राष्टाक्षरेण पादाद्यष्टांगेषु न्यासमाह । पादयोरिति सार्धेन ॥ ५ ॥ प्रणवसंपुटितमोंकाराद्यैकैकमक्षरं विन्यसेत् । विपर्ययं यथा भवत्येवं शिरआदिपादांतं वा विन्यसेत् । उत्पत्तिन्यासं संहारन्यासं वा कुर्यादित्यर्थः ॥ ६ ॥ द्वादशाक्षरस्योद्धारः प्रणवादियका-

---

पुरुषास भय प्राप्त झालें असतां त्यानें हस्तपादप्रक्षालनपूर्वक आचमन करून, हातांत पवित्रक धारण करून उत्तरेकडे तोंड करून बसावें, आणि विष्णूच्या अष्टाक्षर व द्वादशाक्षर मंत्रांनीं अंगन्यास व करन्यास करून, मौनव्रतधारणपूर्वक शुचिर्भूत व्हावें. नंतर आपल्या शरीराचेठिकाणीं नारायणमय कवच बांधावें, तें असें कीं,— ‘ ॐ नमो नारायणाय ’ ह्या अष्टाक्षरमंत्रांतील, प्रणवसंपुटित अशा ॐकारादि एकेक अक्षराचा अनुक्रमानें पाय, गुडघे, मांड्या, उदर, हृदय, उर, मुख आणि मस्तक यांचेठिकाणीं न्यास करावा अथवा यकारादि एकेक अक्षराचा मस्तकापासून पायांपर्यंत विपरीतक्रमानें न्यास करावा ॥ ४ ॥ ५ ॥ ६ ॥ नंतर ‘ॐ नमो भगवते वासुदेवाय’ ह्या द्वादशाक्षर मंत्रानें अंगुली अंगुष्ठपर्वें ह्यांचेठिकाणीं ॐकारापासून यकारापर्यंत बारा अक्षरांनीं करन्यास करावा ह्मणजे ॐकारसंपुटित अशा ॐकारादिक एकेक अक्षराचा अनुक्रमानें दक्षिणतर्जनीपासून वामतर्जनीपर्यंत अंगुलींचेठिकाणीं न्यास करून अवशिष्ट राहिलेल्या चार अक्षरांचा अंगुष्ठांच्या पहिल्या व शेव-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ठल्या पर्वांचेठिकाणीं न्यास करावा ॥ ७ ॥ नंतर 'ॐ विष्णवे नमः' या मंत्रांतील ॐकाराचा हृदयाचेठिकाणीं, नंतर विकाराचा मस्तकाचेठिकाणीं, षकाराचा भ्रूमध्याचेठिकाणीं, णकाराचा शिखेचेठिकाणीं वेकाराचा नेत्रांचेठिकाणीं, व नकाराचा सर्वसंधींचेठिकाणीं न्यास करावा आणि फडंत अशा सविसर्ग मकाराचा सर्वदिशांचेठिकाणीं निर्देश करावा ह्मणजे 'ॐमः अस्त्रायफट् इति दिग्बंधः' असें ह्मणून दिग्बंधन करावें, ह्मणजे तो ज्ञानी मंत्रमूर्ति होतो. तो मंत्र 'ॐविष्णवे नमः' असा होय ॥ ८ ॥ ९ ॥ १० ॥ नंतर विद्या, तेज आणि तप हीं ज्याची मूर्ति आहे व जो ऐश्वर्यादि सहा शक्तींनीं युक्त आहे, त्या ईश्वररूप परमात्म्याचें ध्यान करावें आणि नंतर ह्या पुढील नारायणकवचनामक मंत्राचा पाठ करावा ॥ ११ ॥ तो असा कीं,–ज्यानें गरुडाच्या पृष्ठभागावर आपलीं चरणकमलें ठेविलीं आहेत, ज्याला

रांतमिति । प्रणवसंपुटितमेकैकमक्षरं दक्षिणतर्जनीमारभ्य वामतर्जनीपर्यंतमंगुलीषु परिशिष्टमक्षरचतुष्टयमंगुष्ठयोराद्यंतपर्वसु न्यसेत् ॥ ७ ॥ मंत्रांतरन्यासमाह । न्यसेदिति । षकारणकायोर्विश्लेषेण षडक्षराणि हृदयादिषु न्यसेत् ॥ ८ ॥ मकारमस्त्रमुद्दिश्य ध्यात्वा ॥ ९ ॥ तन्मकारास्त्रं मः अस्त्रायफडित्येवं दिग्बंधे विनिर्दिशेत् ॥ १० ॥ ध्येयमीश्वररूपमात्मानं ध्यायेत् । षड्शक्तिभिरैश्वर्यादिभिर्भगशब्दवाच्याभिः । विद्या च तेजश्च तपश्च मूर्तिर्यस्य तम् । इमं वक्ष्यमाणं श्रीमन्नारायणकवचाख्यम् ॥ ११ ॥

न्यसेद्धृदय ओंकारं विकारमनु मूर्धनि ॥ षकारं तु भ्रुवोर्मध्ये णकारं शिखया दिशेत् ॥ ८ ॥ वेकारं नेत्रयोर्युंज्यान्नकारं सर्वसंधिषु ॥ मकारमस्त्रमुद्दिश्य मंत्रमूर्तिर्भवेद्बुधः ॥ ९ ॥ सविसर्गं फडंतं तत्सर्वदिक्षु विनिर्दिशेत् ॥ ओं विष्णवे नम इति ॥ १० ॥ आत्मानं परमं ध्यायेद्ध्येयं षट्शक्तिभिर्युतम् ॥ विद्यातेजस्तपोमूर्तिमिमं मंत्रमुदाहरेत् ॥ ११ ॥ ॐ हरिर्विदध्यान्मम सर्वरक्षां न्यस्तांघ्रिपद्मः पतगेंद्रपृष्ठे ॥ दरारिचर्मासिगदेषुचापपाशान्दधानोऽष्टगुणोऽष्टबाहुः ॥ १२ ॥ जलेषु मां रक्षतु मत्स्यमूर्तिर्यादोगणेभ्यो वरुणस्य पाशात् ॥ स्थलेषु मायाबटुवामनोऽव्यात्त्रिविक्रमः खेऽवतु विश्वरूपः ॥ १३ ॥ दुर्गेष्वटव्याजिमुखादिषु प्रभुः पायान्नृसिंहोऽसुरयूथपारिः ॥ विमुंचतो यस्य महाट्टहासं दिशो विनेदुर्न्यपतंश्च गर्भाः ॥ १४ ॥ रक्षत्वसौ माऽध्वनि यज्ञकल्पः स्वदंष्ट्रयोन्नीतधरो वराहः ॥ रामोऽद्रिकूटेष्वथ विप्रवासे सलक्ष्मणोऽव्याद्भरताग्रजोऽस्मान् ॥ १५ ॥

अष्टगुणोऽणिमाद्यष्टैश्वर्ययुक्तः ॥ १२ ॥ यादसां गणा एव वरुणस्य पाशस्तस्मात् ॥ १३ ॥ अटवी आजिमुखं संग्रामोपक्रमश्च आदिर्येषां तेषु संकटस्थानेषु ॥ १४ ॥ असौ प्रसिद्धो वराहो मामध्वनि रक्षतु । यज्ञैरवयवरूपैः कल्प्यते निरूप्यत इति तथा । उन्नीतोद्धृता धरा येन सः । अद्रिकूटेषु गिरिशिखरेषु रामो जामदग्न्यः ॥ १५ ॥

आठ भुजा आहेत, जो शंख, चक्र, ढाल, तलवार गदा, बाण, धनुष्य आणि पाश यांना धारण करणारा आहे व जो अणिमादि आठ ऐश्वर्यांनीं युक्त आहे तो श्रीहरि सर्वत्र-ठिकाणीं व सर्वकालीं माझें रक्षण करो ॥ १२ ॥ त्यांत उदकामध्यें जलजंतुसमुदायरूप वरुणपाशापासून मत्स्यावतार धारण करणारा भगवान्, माझें रक्षण करो, स्थळाचेठिकाणीं स्वेच्छेनें बटुवामनरूप धारण करणारा श्रीहरी, माझें रक्षण करो व आकाशामध्यें विश्वरूपी त्रिविक्रम, माझें रक्षण करो ॥ १३ ॥ तसाच, जो महान् अट्टहास करित असतां दशदिशा नादित झाल्या व असुरस्त्रियांचे गर्भ पतन पावले तो हिरण्यकशिपूचा शत्रु समर्थ नृसिंह, अरण्य व युद्धप्रसंग इत्यादि संकटस्थानांमध्यें माझें रक्षण करो ॥ १४ ॥ तसाच, ज्यानें आपल्या दंष्ट्रेच्या योगानें पृथ्वीचा उद्धार केला आहे व ज्याच्या अवयवांनीं यज्ञांचें निरूपण करितात तो वराहरूपी परमात्मा, मार्गामध्यें माझें रक्षण करो. गिरिशिखरांचेठिकाणीं परशुराम आमचें रक्षण करो आणि देशांतरामध्यें लक्ष्मणासहवर्तमान असणारा भरताग्रज दाशरथि

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रामचंद्र आमचें रक्षण करो ॥ १५ ॥ त्याचप्रमाणें अभिचारादिरूप भयंकर धर्म आणि सर्वप्रमाद ह्यांपासून श्रीनारायण माझें रक्षण करो, गर्वापासून नर, माझें रक्षण करो, योगभ्रंशापासून योगनाथ असा दत्तात्रेय माझें रक्षण करो. व कर्मबंधापासून सर्वगुणांचा अधिपति कपिलमहामुनि, माझें रक्षण करो ॥ १६ ॥ तसेंच मदनापासून सनत्कुमार, मार्गामध्यें घडत असलेल्या देवांच्या (त्यांना नमस्कार न करितां पुढें जाणें इत्यादि) अवज्ञेपासून हयग्रीव, देवपूजासंबंधीं अपराधांपासून देवर्षिश्रेष्ठ नारद आणि सकल नरकांपासून कूर्मरूप धारण करणारा श्रीहरि, माझें रक्षण करो ॥१७॥ अपथ्यापासून भगवान् धन्वंतरि, शीतोष्णादि भयांपासून इंद्रियदमन करणारा ऋषभ योगी, लोकापवादापासून यज्ञमूर्ति परमात्मा, लोकांपासून होणाऱ्या घातापासून बलराम आणि क्रोधाधीन असलेल्या सर्पगणापासून शेष माझें रक्षण

उग्रधर्मादभिचारादिलक्षणात् । हासाद्दर्वान्नरोऽवतु । दत्तो दत्तात्रेयः । अयोगाद्योगभ्रंशात् ॥ १६ ॥ पथि यद्देवानां हेलनं नमस्कारमकृत्वा गमनं तस्मात् । पुरुषार्चनस्यांतरादेवपूजाच्छिद्राद्द्वात्रिंशदपराधरूपान्नारदः ॥ १७ ॥ लोकाज्जनापवादाद्यज्ञः । जननिमित्तो योऽत उपघातस्तस्माद्बलभद्रोऽवतात् । कृतांतादिति पाठे कृतांतात्कालाद्रक्षतु । क्रोधवशात्सर्पाणां गणात् । अहींद्रः शेषः ॥ १८ ॥ कालमलभूतात्कलेः कल्किः । धर्मावनाय धर्मरक्षणायोरुर्महान्कृतोऽवतारो येन ॥ १९ ॥ दिनस्य षट्सु

मामुग्रधर्मादखिलात्प्रमादान्नारायणः पातु नरश्च हासात् ॥ दत्तस्त्वयोगादथ योगनाथः पायाद्गुणेशः कपिलः कर्मबंधात् ॥ १६ ॥
सनत्कुमारोऽवतु कामदेवाद्धयशीर्षा मां पथि देवहेलनात् ॥ देवर्षिवर्यः पुरुषार्चनांतरात्कूर्मो हरिर्मां निरयादशेषात् ॥ १७ ॥ धन्वंतरिर्भगवान्पात्वपथ्याद्द्वंद्वाद्भयादृषभो निर्जितात्मा ॥ यज्ञश्च लोकादवताज्जनांताद्बलो गणात्क्रोधवशादहींद्रः ॥ १८ ॥ द्वैपायनो भगवानप्रबोधाद्बुद्धस्तु पाखंडगणात्प्रमादात् ॥ कल्किः कलेः कालमलात्प्रपातु धर्मावनायोरुकृतावतारः ॥ १९ ॥ मां केशवो गदया प्रातरव्याद्गोविंद आसंगवमात्तवेणुः ॥ नारायणः प्राह्ण उदात्तशक्तिर्मध्यंदिने विष्णुररींद्रपाणिः ॥ २० ॥ देवोऽपराह्णे मधुहोग्रधन्वा सायं त्रिधामाऽवतु माधवो माम् ॥ दोषे हृषीकेश उतार्धरात्रे निशीथ एकोऽवतु पद्मनाभः ॥ २१ ॥ श्रीवत्सधामाऽपररात्र ईशः प्रत्यूष ईशोऽसिधरो जनार्दनः ॥ दामोदरोऽव्यादनुसंध्यं प्रभाते विश्वेश्वरो भगवान्कालमूर्तिः ॥ २२ ॥

भागेषु क्रमेण प्रातरादिसंज्ञेषु रात्रेश्च प्रदोषादिसंज्ञेषु रक्षा प्रार्थनम् । मां केशव इति त्रिभिः । आसंगवं संगवमभिव्याप्य ॥ २० ॥ त्रिधामा ब्रह्मादित्रिमूर्तिः श्रीमाधवः । दोषे प्रदोषे । आर्धरात्रे अर्धरात्रिपर्यंते काले निशीथे चैक एव पद्मनाभोऽवतु ॥ २१ ॥ अपररात्रे ईशः श्रीवत्सधामाऽवतु । प्रत्यूष ईशः श्रीजनार्दनः । श्रीदामोदरः प्रभाते ।

करो ॥ १८ ॥ अज्ञानापासून भगवान् वेदव्यास, पाखंडसमुदाय आणि प्रमाद ह्यांपासून बुद्ध आणि काळाच्या मलरूपी कलीपासून धर्मरक्षण करण्याकरितां ज्यानें मोठा अवतार धारण केला आहे तो भगवान् कल्कि माझें रक्षण करो ॥ १९ ॥ तसाच, प्रातःकाळीं पांच घटिका दिवसपर्यंत गदेच्या योगानें केशव, पुढें दहाघटिका दिवसपर्यंत हातामध्यें मुरली धारण करणारा गोविंद, पुढें पंधरा घटिका दिवसपर्यंत शक्तिआयुध धारण करणारा नारायण, पुढें मध्याह्नकाळीं वीस घटिका दिवसपर्यंत हस्तामध्यें चक्र धारण करणारा विष्णु, ॥ २० ॥ पुढें अपराह्णकाळीं पंचवीस घटिका दिवसपर्यंत भयंकर असें शार्ङ्गनामक धनुष्य धारण करणारा देव मधुसूदन, त्यानंतर सायंकाळीं तीस घटिका दिवसपर्यंत ब्रह्मादित्रिमूर्ति धारण करणारा माधव माझें रक्षण करो. प्रदोषकाळीं तीन घटिका रात्रपर्यंत हृषीकेश, नंतर चवदा घटिका रात्रपर्यंत व अर्धरात्रीच्या वेळीं ह्मणजे सोळा घटिका रात्रपर्यंत एक पद्मनाभच माझें रक्षण करो ॥२१॥ नंतर उत्तररात्रीच्या वेळीं ह्मणजे सव्वीस घटिका रात्रपर्यंत, ज्याच्या वक्षःस्थळाचेठिकाणीं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रीवत्सलांछन चिन्ह आहे तो ईश्वर, त्यानंतर अरुणोदयाचेवेळीं अठ्ठावीस घटिका रात्रपर्यंत खड्ग धारण करणारा जनार्दन, त्यानंतर प्रभातकालीं ह्मणजे सूर्योदयापर्यंत श्रीदामोदर आणि दिवसाच्या व रात्रीच्या संधींच्या वेळीं (सकाळीं व संध्याकाळीं) भगवान् कालमूर्ति विश्वेश्वर माझें रक्षण करो ॥ २२ ॥ हे सुदर्शनचक्रा, तुझी धांव प्रलयकालच्या अग्नीसारखी तीक्ष्ण आहे भगवंतानें प्रेरणा केलेलें तूं आमच्या सभोंवती भ्रमण करीत करीत, जसा वायूच्या साहाय्यानें युक्त असलेला अग्नि, वाळून गेलेल्या गवताला सत्वर जाळून टाकितो त्याप्रमाणें तूं आमच्या शत्रुसैन्याला सत्वर जाळून टाक, जाळून टाक ॥ २३ ॥ हे गदे, तुझ्याठिणग्यांचा स्पर्श वज्रासारिखा असह्य आहे आणि तूं अच्युताला प्रिय आहेस व मीहि अच्युताचा दास आहें, ह्मणून तूं माझ्या कूश्मांड, वैनायक, यक्ष, राक्षस, भूत व ग्रह ह्या शत्रूंचें तूं अतिशीघ्र चूर्ण कर,

---

श्रीविश्वेश्वरोऽनुसंध्याम् ॥ २२ ॥ युगांतानलवत्तिग्मा तीक्ष्णा नेमिर्यस्य तच्चक्रं भगवता प्रयुक्तं सदरिसैन्यंदं दग्धि दंदग्ध्यतिशयेन दहति । तस्यायं स्वभाव एव न तु तस्मात्प्रार्थनीयमित्यर्थः । यद्वा दंदग्धीति लोण्मध्यमपुरुषः । अत्र त्वमेवंभूतं चक्रमिति स्वरूपमुक्त्वा संबोध्य प्रार्थ्यतेऽतिशयेन दहेति । कक्षं शुष्कतृणम् ॥ २३ ॥ अशनिवत्स्पर्शो येषां ते विस्फुलिंगा यस्यास्तस्याः संबोधनं हे गदे त्वमजितस्य प्रियाऽसि । अहमच्युतस्य दासः । अतः कूश्मांडादीन्निष्पिंढि निष्पिंढि संचूर्णय संचूर्णय । अरींश्च

चक्रं युगांतानलतिग्मनेमि भ्रमत्समंताद्भगवत्प्रयुक्तम् ॥ दंदग्धि दंदग्ध्यरिसैन्यमाशु कक्षं यथा वातसखो हुताशः ॥ २३ ॥ गदेऽशनिस्पर्शनविस्फुलिंगे निष्पिंढि निष्पिंढ्यजितप्रियाऽसि ॥ कूश्मांडवैनायकयक्षरक्षोभूतग्रहांश्चूर्णय चूर्णयारीन् ॥ २४ ॥ त्वं यातुधानप्रमथप्रेतमातृपिशाचविप्रग्रहघोरदृष्टीन् ॥ दरेंद्र विद्रावय कृष्णपूरितो भीमस्वनोऽरेर्हृदयानि कंपयन् ॥ २५ ॥ त्वं तिग्मधारासिवरारिसैन्यमीशप्रयुक्तो मम छिंधि छिंधि ॥ चक्षूंषि चर्मन् शतचंद्र छादय द्विषामघोनां हर पापचक्षुषाम् ॥ २६ ॥ यन्नो भयं ग्रहेभ्योऽभूत्केतुभ्यो नृभ्य एव च ॥ सरीसृपेभ्यो दंष्ट्रिभ्यो भूतेभ्योंऽहोभ्य एव वा ॥ २७ ॥ सर्वाण्येतानि भगवन्नामरूपास्त्रकीर्तनात् ॥ प्रयांतु संक्षयं सद्यो ये नः श्रेयःप्रतीपकाः ॥ २८ ॥

चूर्णय चूर्णय । सर्वत्र वीप्साऽतिशीघ्रत्वाय ॥ २४ ॥ हे दरेंद्र पांचजन्य त्वं याधातुनादीन्विद्रावय विप्रग्रहा ब्रह्मराक्षसा येऽन्ये च घोरदृष्टयस्तान् ॥ २५ ॥ तिग्मा धारा यस्य हे तिग्मधार । असिवर खड्गश्रेष्ठ । त्वं ममारिसैन्यं छिंधिछिंधि । शतं चंद्राकाराणि मंडलानि यस्मिन्हे शतचंद्र चर्मन् अघोनामघवतां द्विषां चक्षूंषि छादय पापचक्षुषां चोग्रदृष्टीनां चक्षूंषि हर ॥ २६ ॥ यत् येभ्यो भयम् । अंहोभ्यः पापेभ्यः ॥ २७ ॥ श्रेयः प्रतीपका इष्टव्याघातकाः ॥ २८ ॥

चूर्ण कर ॥ २४ ॥ हे पांचजन्यनामक शंखा, कृष्णानें आपल्या मुखवायूनें तुला पूरित केलें असतां, तूं भयंकर शब्द करून आमच्या शत्रूंच्या हृदयांना कांपवित होत्साता यातुधान, प्रमथ, प्रेत, मातृगण, पिशाच, ब्रह्मराक्षस व अणखीहि जे कोणी घोरदृष्टीनें युक्त असतील त्या सर्वांना पळवून लाव ॥ २५ ॥ हे तीक्ष्णधारेनें युक्त अशा श्रेष्ठ खड्गा, ईश्वरानें प्रेरित असें तूं माझ्या शत्रूंच्या सैन्याचा छेद कर, छेद कर. हे ढाले, चंद्राकार शंभर मंडलांनीं युक्त अशी तूं माझ्या पापी शत्रूंच्या नेत्रांचें आच्छादन कर व उग्र दृष्टिलोकांचे नेत्र हरण कर ॥ २६ ॥ हे भगवन् ज्या सूर्यादिक ग्रहांपासून, उल्कापातादि केतूंपासून, दुष्ट लोकांपासून, सर्पवृश्चिकांपासून, उग्रदंष्ट्रांनीं युक्त अशा व्याघ्रसिंहादि श्वापदांपासून, भूतप्रेतादिकांपासून आणि पातकांपासून आह्मांला जीं जीं भयें प्राप्त झालीं आहेत ॥२७॥ तीं सर्व भयें, आणि जे आमच्या इष्टसिद्धीला अडथळे आणणारे

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

यक्ष राक्षसादिक असतील ते सर्वेहि तुझ्या नांवांच्या रूपांच्या व अस्त्रांच्या कीर्तनानें सत्वर क्षय पावोत ॥ २८ ॥ त्याचप्रमाणें स्तोत्रांनीं (बृहद्रथंतरादिक सामांनीं) स्तविलेला जो वेदमूर्ति प्रभु भगवान् गरुड, तो माझें सर्वं संकटांपासून रक्षण करो व विष्वक्सेननामक मुख्य पार्षदही आपल्या नांवांनीं माझें सर्व संकटांपासून रक्षण करो ॥ २९ ॥ तशींच श्रीहरीचीं नामें, रूपें, वाहनें व आयुधें हीं, आमच्या बुद्धि, इंद्रियें, मन आणि प्राण ह्यांचें सर्वसंकटांपासून रक्षण करोत व भगवंताचे मुख्य पार्षदहि आमचें रक्षण करोत ॥ ३० ॥ तसेंच मूर्तामूर्त असें जें जगत् तें सर्व वस्तुतः भगवानूच आहे असें जर यथार्थरीतीनें सत्य असेल तर ह्या सत्याच्या योगानें आमचे सर्वं उपद्रव नाश पावोत ॥ ३१ ॥ ज्या प्रकारानें सर्वत्र एकरूप आत्मस्वरूपाचें वारंवार चिंतन करणाऱ्या ज्ञानी पुरुषांना ईश्वर, स्वतः भेदरहित असतांही आपल्या

स्तोत्राणि बृहद्रथंतरादिसामानि तैः स्तोभ्यते संस्तूयत इति स्तोत्रस्तोभः । छंदोमयो वेदमूर्तिः । सुपर्णोऽसि गरुत्मानित्यादिश्रुतेः । ऐकपद्यपाठे स्तोभा गीतिपूरकाक्षराणि । स्तोत्रस्तोमेति पाठे सामाधारभूत ऋक्स्तोमः ॥ २९ ॥ नामानि च रूपाणि च यानानि च वाहनानि आयुधानि च नो बुद्ध्यादीन् पांतु पार्षदभूषणाः पार्षदमुख्याश्च पांतु ॥ ३० ॥ सच्च असच्च मूर्तामूर्तं यत्तत्सर्वं जगत् ॥ ३१ ॥ ऐकात्म्यस्यानुभावोऽनुध्यानं येषां तेषाम् । विकल्पो भेदस्तद्रहितोऽपि ॥ ३२ ॥ सत्यमानेन सत्यभूतेन प्रमाणेन

गरुडो भगवान्स्तोत्रस्तोभश्छंदोमयः प्रभुः ॥ रक्षत्वशेषकृच्छ्रेभ्यो विष्वक्सेनः स्वनामभिः ॥ २९ ॥ सर्वापद्भ्यो हरेर्नामरूपयानायुधानि नः ॥ बुद्धींद्रियमनःप्राणान्पांतु पार्षदभूषणाः ॥ ३० ॥ यथा हि भगवानेव वस्तुतः सदसच्च यत् ॥ सत्येनानेन नः सर्वे यांतु नाशमुपद्रवाः ॥ ३१ ॥ यथैकात्म्यानुभावानां विकल्परहितः स्वयम् ॥ भूषणायुधलिंगाख्या धत्ते शक्तीः स्वमायया ॥ ३२ ॥ तेनैव सत्यमानेन सर्वज्ञो भगवान्हरिः ॥ पातु सर्वैः स्वरूपैर्नः सदा सर्वत्र सर्वगः ॥ ३३ ॥ विदिक्षु दिक्षूर्ध्वमधः समंतादंतर्बहिर्भगवान्नारसिंहः ॥ प्रहापयँल्लोकभयं स्वनेन स्वतेजसा ग्रस्तसमस्ततेजाः ॥ ३४ ॥ मघवन्निदमाख्यातं वर्म नारायणात्मकम् ॥ विजेष्यस्यंजसा येन दंशितोऽसुरयूथपान् ॥ ३५ ॥ एतद्धारयमाणस्तु यं यं पश्यति चक्षुषा ॥ पदा वा संस्पृशेत्सद्यः साध्वसात्स विमुच्यते ॥ ३६ ॥ न कुतश्चिद्भयं तस्य विद्यां धारयतो भवेत् ॥ राजदस्युग्रहादिभ्यो व्याघ्रादिभ्यश्च कर्हिचित् ॥ ३७ ॥

॥ ३३ ॥ पुनरपि श्रीनृसिंह एव प्रार्थ्यते । विदिक्ष्विति पांक्तित्यनुषंगः । यद्वा नारसिंहः प्रह्लादः स्वनेन श्रीनृसिंहनामगर्जनेन स्वतेजसा स्वप्रभावेण ग्रस्तानि समस्तानि दिग्गजविषशस्त्रजलवाय्वग्न्यादीनां तेजांसि प्रभावा येन सः ॥ ३४ ॥ दंशितः कवचितः ॥ ३५ ॥ सोऽपि साध्वसाद्भयाद्विमुच्यते ॥ ३६ ॥ तस्य तु भयं न भवेदेव ॥ ३७ ॥

मायेच्यायोगानें भूषणें, आयुधें, मूर्ति व नामें ह्या शक्ति धारण करीत आहे असें भासतें; हें जर यथार्थ असेल तर त्याच सत्यभूत प्रमाणाच्या योगानें सर्वज्ञ व सर्वगत असा भगवान् श्रीहरि आपल्या सर्वस्वरूपांनीं आमचें सर्वठिकाणीं सर्वदा रक्षण करो ॥ ३२ ॥ ३३ ॥ आणि ज्यानें आपल्या प्रभावानें सर्वांचें तेज गिळून टाकिलें आहे व जो आपल्या अट्टहासाच्या योगानें लोकांपासून होणारें भय दूर करीत आहे तो भगवान् नारसिंह, दिशा, विदिशा, ऊर्ध्वप्रदेश, अधःप्रदेश, आसमंताद्भाग, आंत व बाहेर अशा सर्वठिकाणीं आमचें रक्षण करो ॥ ३४ ॥ हे इंद्रा, मी तुला हें नारायणात्मक कवच सांगितलें आहे. आतां याच्यायोगानें तूं कवचयुक्त होऊन अनायासानें दैत्यसेनाधिपतींचा पराजय करिशील ॥ ३५ ॥ हें कवच धारण करणारा पुरुष ज्याला ज्याला नेत्रानें पाहतो किंवा आपल्या पायानें स्पर्श करितो तो तो प्राणीसुद्धां भयापासून तत्काल मुक्त होतो ॥ ३६ ॥ आणि त्या (नारायणकवचात्मक) विद्या धारण करणाऱ्या पुरुषाला तर राजे, चोर व ग्रह इत्यादिकांपासून आणि व्याघ्रादिकां-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पासून व कोठूनही कधींही भय प्राप्त होतच नाहीं ॥ ३७ ॥ हे इंद्रा, पूर्वीं कौशिकनांवाचा कोणीएक ब्राह्मण हें कवच धारण करीत होता, त्यानें योगधारणेनें निर्जल प्रदेशामध्यें आपल्या देहाचा त्याग केला ॥ ३८ ॥ पुढें एकेवेळीं जेथें त्या ब्राह्मणानें देहत्याग केला होता त्या स्थानावरून आकाशांतून विमानांत बसून स्त्रियांनीं परिवेष्टित असा गंधर्वाधिपति चित्ररथ जात असतां, तो विमानासहवर्तमान अधोमुख होऊन आकाशांतून तत्काल खालीं पडला. नंतर वालखिल्य ऋषींच्या 'तूं त्याच्या अस्थि गंगेंत टाकशील तर येथून आपल्या गंधर्वलोकास जाण्यास समर्थ होशील नाहींतर जाणार नाहीस. अशा' उपदेशावरून त्यानें त्याच्या अस्थि घेऊन पूर्ववाहिनी सरस्वतीन-दीमध्यें टाकिल्या व तेथें स्नान करून तो त्या कौशिक ब्राह्मणाच्या प्रभावाविषयीं विस्मययुक्तहोत्साता विमानांत बसून पुन्हां आपल्या गंधर्वलोकाप्रत निघून गेला ॥ ३९ ॥ ४० ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे परीक्षित्‌राजा, जो पुरुष योग्यकालीं आदरपूर्वक हें नारायणात्मक कवच श्रवण करितो व जो धारण करितो त्याला सर्व

एतद्विद्याप्रभावमितिहासेनाह। इमामिति सार्धैस्त्रिभिः। मरुधन्वनि निरुदकेदेशे। अनेन विद्यायाः क्षेत्रतीर्थानपेक्षत्वं दर्शितम् ॥ ३८ ॥ यत्र द्विजस्य क्षयो देहत्यागस्तस्योपरि ॥३९॥ सद्यस्तत्क्षणादेव गगनान्न्यपतत्। पाठांतरे अंगनाभिः सह। वालखिल्योपदेशात्तस्यास्थीनि प्रास्य प्रक्षिप्य विस्मितः सन् स्वं धाम गंधर्वलोकं जगाम ॥ ४० ॥ ४१ ॥

इमां विद्यां पुरा कश्चित्कौशिको धारयन्द्विजः ॥ योगधारणया स्वांगं जहौ स मरुधन्वनि ॥ ३८॥ तस्योपरि विमानेन गंधर्वपति-रेकदा ॥ ययौ चित्ररथः स्त्रीभिर्वृतो यत्र द्विजक्षयः ॥ ३९ ॥ गगनान्न्यपतत्सद्यः सविमानो ह्यवाक्शिराः ॥ स वालखिल्यवचनाद-स्थीन्यादाय विस्मितः ॥ प्रास्य प्राचीसरस्वत्यां स्नात्वा धाम स्वमन्वगात् ॥ ४० ॥ श्रीशुक उवाच ॥ य इदं शृणुयात्काले यो धारयति चादृतः ॥ तं नमस्यंति भूतानि मुच्यते सर्वतो भयात् ॥ ४१ ॥ एतां विद्यामधिगतो विश्वरूपाच्छतक्रतुः ॥ त्रैलोक्यल-क्ष्मीं बुभुजे विनिर्जित्य मृधेऽसुरान् ॥ ४२ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे षष्ठस्कंधे नारायणवर्म नामाष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ तस्यासन्विश्वरूपस्य शिरांसि त्रीणि भारत ॥ सोमपीथं सुरापीथमन्नादमिति शुश्रुम ॥ १ ॥ स वै बर्हिषि देवेभ्यो भागं प्रत्यक्षमुच्चकैः ॥ अवदद्यस्य पितरो देवाः सप्रश्रयं नृप ॥ २ ॥

अधिगतः प्राप्तः सन् ॥४२॥ इति षष्ठे टीकायामष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥ ॥ नवमे विश्वरूपे तु हते शक्रेण कोपतः ॥ त्वष्ट्रा चोत्पादिते वृत्रे भीतैर्देवैर्हरेः स्तुतिः ॥ १ ॥ सोमस्य पीथं पानं यस्मिन्। एवं सुरापीथम्। अन्नमत्तीत्यन्नादम्। अत्र विश्वरूपो वै त्वाष्ट्रः पुरोहितो देवानामासीदित्यादिश्रुतिरनुसंधेया ॥ १ ॥ तस्यासुरपक्षपातमाह। स वा इति द्वाभ्याम्।

भूतें पूज्य मानितात आणि तो सर्व भयांपासून मुक्त होतो ॥ ४१ ॥ असो विश्वरूपापासून इंद्रानें ही विद्या प्राप्त करून घेतली व तिच्या योगानें युद्धामध्यें दैत्यांना जिंकून त्रैलोक्यसंबंधीं ऐश्वर्याचा उपभोग घेतला ॥ ४२ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील षष्ठस्कंधापैकीं नारायणकवचकथननामक हा अठवा अध्याय समाप्त झाला ॥ ८ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां या नवव्या अध्यायामध्यें इंद्रानें कोपामुळें विश्वरूपाचा वध केला असतां, त्वष्ट्यानें वृत्रासुर उत्पन्न केला व त्यापासून भयभीत झालेल्या देवांनीं श्रीहरीची स्तुति केली; हा विषय वर्णन केला आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे भरतकुलोत्पन्ना राजा, त्या विश्वरूपाला सोमपीथ (सोमपान करण्याचें एक) सुरापीथ (सुरापान करण्याचें एक) व अन्नाद (अन्न भक्षण करण्याचें एक) अशीं तीन शिरें होतीं असें आह्मीं ऐकिलें आहे ॥ १ ॥ हे राजा, तो विश्वरूप, यज्ञामध्यें उघडरीतीनें विनयपूर्वक देवांना (हें इंद्राला व हें अग्नीला असें) उच्चस्वरानें उच्चारून हविर्भाग देत असे. कारण, देव त्याचे पितर होते ॥२॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आणि तोच विश्वरूप, त्याची माता असुरकन्या असल्यामुळें मातेच्या पक्षपातानें असुरांस अनुकूल होता ह्मणून देवांचा याग करीत असतांना असुरांप्रत गुप्तरीतीनें (कोणत्यातरी उपायानें) हविर्भाग पोंचवीत असे ॥ ३ ॥ इंद्रानें त्या विश्वरूपाचा तो देवांचा अपराध व धर्मामध्यें असलेलें कपट जाणून, ह्याप्रमाणें हा असुरांना वाढवून आमचा घात करील असें मनांत आणून भयभीत झाला आणि त्यानें क्रोधाच्या वेगानें त्याचीं तिन्हीं शिरें तोडून टाकिलीं ॥ ४ ॥ त्या वेळीं त्याचें जें सोमपीथसंज्ञक शिर होतें त्याचा कपिंजल पक्षी (कवडा), सुरापीथसंज्ञक होतें त्याचा कलविंक पक्षी (चिमणी) आणि अन्नादसंज्ञक होतें त्याचा तित्तिरि पक्षी (लावा) असे तीन जातीचे पक्षी उत्पन्न झाले ॥ ५ ॥ पुढें इंद्र जरी त्या ब्रह्महत्येचें निवारण करण्यास समर्थ होता तथापि त्यानें तिचा ओंजळीनें स्वीकार केला व संवत्सरपर्यंत तसेंच राहून

प्रत्यक्षं प्रकटं यथा भवति तथा सविनयं देवेभ्यो हविर्भागमिंद्रायेदमग्नय इदमित्युच्चैरवदत् । अत्र हेतुः । यस्य पितरो देवाः सः ॥२॥ असुरेभ्यस्तु परोक्षं गुप्तं भागं ददौ । तदेवाह । देवान्यजमानोऽसावसुरान्प्रति भागमवहत् केनाप्युपायेन प्रापयामास । यतो मातृस्नेहवशेनासुराननुगच्छति ॥ ३ ॥ ४ ॥ ५ ॥ तां वारयितुं समर्थस्तथापि जग्राह । संवत्सरं तथैव स्थित्वा संवत्सरांते भूताक्रोशभीतः सन् भूतानां मध्ये विशुद्धये लोकापवादपरिहाराय स हरिरिंद्रो भूम्यादिभ्यस्तदघं व्यभजद्विभज्य ददावित्यन्वयः ॥ ६ ॥

स एव हि ददौ भागं परोक्षमसुरान्प्रति ॥ यजमानोऽवहद्भागं मातृस्नेहवशानुगः ॥ ३ ॥ तद्देवहेलनं तस्य धर्मालीकं सुरेश्वरः ॥ आलक्ष्य तरसा भीतस्तच्छीर्षाण्यच्छिनद्रुषा ॥ ४ ॥ सोमपीथं तु यत्तस्य शिर आसीत्कपिंजलः ॥ कलविंकः सुरापीथमन्नादं यत्स तित्तिरिः ॥ ५ ॥ ब्रह्महत्यामंजलिना जग्राह यदपीश्वरः ॥ संवत्सरांते तदघं भूतानां स विशुद्धये ॥ भूम्यंबुद्रुमयोषिद्भ्यश्चतुर्धा व्यभजद्धरिः ॥ ६ ॥ भूमिस्तुरीयं जग्राह खातपूरवरेण वै ॥ ईरणं ब्रह्महत्याया रूपं भूमौ प्रदृश्यते ॥ ७ ॥ तुर्यं छेदविरोहेण वरेण जगृहुर्द्रुमाः ॥ तेषां निर्यासरूपेण ब्रह्महत्या प्रदृश्यते ॥ ८ ॥ शश्वत्कामवरेणांहस्तुरीयं जगृहुः स्त्रियः ॥ रजोरूपेण तास्वंहो मासि मासि प्रदृश्यते ॥ ९ ॥

तुरीयं चतुर्थं भागम् । खातस्य गर्तस्य पूरः पूरणं तेन वरेण यदि खातपूरणं स्वत एव भविष्यति तर्हि ग्रहीष्यामीत्येवंभाषाबंधेन जग्राहेत्यर्थः ॥ ७ ॥ ईरणमूषरम् । अतएवोषरेऽध्ययनादि निषिद्ध्यते । छेदे सति पुनर्विरोहः प्ररोहो भवत्विति वरेण ॥ ८ ॥ निर्यासरूपेण ब्रह्महत्याया दृष्टत्वान्निर्यासो न भक्ष्यः । शश्वत्कामवरेण याव-

---

संवत्सराच्या अंतीं ‘ हे ब्रह्मघातक्या ह्मणून सर्व प्राणी निंचनांवानें त्याला हाक मारूं लागले असतां, ’ तो लोकापवाद दूर करण्याकरितां त्यानें ती ब्रह्महत्या भूमि, उदक, वृक्ष आणि स्त्री ह्यांना, चार विभाग करून वांटून दिली ॥ ६ ॥ त्या वेळीं ‘जर माझ्यावर खणलेला खळगा आपोआप भरून येईल तर मी ब्रह्महत्येचा चवथा भाग ग्रहण करीन’ अशा बोलीनें त्या वरासहवर्तमान भूमीनें चवथा भाग ग्रहण केला. त्या ब्रह्महत्येचें स्वरूप, भूमीचेठिकाणीं खाऱ्या मातीमध्यें कोठें कोठें उखररूपानें दृष्टीस पडतें. तेथें अध्ययनादिकांचा निषेध आहे ॥ ७ ॥ तसेंच ‘छेदन केलें असतां फिरून अंकुर उत्पन्न होवोत,’ असा वर मागून घेऊन वृक्षांनीं ब्रह्महत्येचा दुसरा भाग ग्रहण केला तें ब्रह्महत्येचें रूप, त्यांचेठिकाणीं डिंकाच्या रूपानें दृष्टीस पडतें ह्मणून वृक्षांचा डिंक भक्षण करूं नये ॥ ८ ॥ त्याचप्रमाणें ‘गर्भाला पीडा न होतां प्रसूतिकालपर्यंत पुरुषाशीं निरंतर संभोग व्हावा ’ हा वर मागून घेऊन स्त्रियांनीं ब्रह्महत्येचा चतुर्थभाग ग्रहण केला तें पातक त्यांचेठिकाणीं प्रत्येक महिन्यामध्यें रजो-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रूपानें दृष्टीस पडतें ह्मणूनच त्यांचा संगवगैरे करूं नये ॥ ९ ॥ तसेंच दुग्धादिपदार्थांत आपलें मिश्रण केलें असतां त्या पदार्थांची वृद्धि व्हावी असा वर मागून घेऊन जलानें पातकाचा चतुर्थभाग ग्रहण केला, तें पातक बुडबुडे आणि फेंस ह्यांच्या रूपानें पाण्याचेठिकाणीं दृष्टीस पडतें ह्मणून बुडबुडे फेंसवगैरे जलाच्या बाहेर टाकून नंतर त्या उदकानें स्नानादिक कर्मैं करावींत ह्मणजे तें उदक पापनाश करणारें होतें ॥ १० ॥ असो. नंतर ज्याच्या पुत्राचा वध झाला त्या त्वष्ट्यानें 'इंद्रोशत्रो, विलंब न करितां वृद्धिंगत हो आणि शत्रूचा वध कर' असें उच्चारून इंद्राच्या वधार्थ शत्रू उत्पन्न करण्याकरितां अग्नीमध्यें हवन केलें ॥ ११ ॥ नंतर त्याचवेळीं, जसा प्रलय

त्प्रसवं गर्भानुपघातेनैव संभोगवरेण । रज इति । अतएव रजोदर्शने तत्संगादि न कार्यम् ॥ ९ ॥ द्रव्यभूयोवरेण यस्मिन्द्रव्ये क्षीरादावापो मिश्रा भवेयुस्तस्यभूय स्त्वमाधिक्यं स्यादिति वरेण। यद्वा स्वस्यैव निर्झरोद्गमादिना भूयस्त्ववरेण । द्रवभूय इति पाठेऽप्ययमेवार्थः । यद्वा द्रवभूयस्त्वं सांसिद्धिकद्रवत्वं तेन वरेण । अस्य विभागस्य विश्वरूपो वै त्वाष्ट्र इत्यस्यां श्रुतावुक्तेः ॥ तद्विभागफलमाह तत्पापं हरति निराकरोति । कः क्षिपन् । बुद्बुदादि जलाद्बहिः प्रक्षिपन्नित्यर्थः । यद्वा क्षिपन् जलं पापं हरत्याहरति गृह्णातीत्यर्थः । अयं च तस्मादापो न परिचक्ष्या इत्यादिश्रुत्यर्थ उक्तः । पाठांतरे हरिकिल्बिषमिंद्रपापम् ॥ १० ॥ इंद्रायेंद्रं हंतुम् । शत्रवे शत्रूत्पत्त्यै । तदाह । इंद्रशत्रो विवर्धस्वेति । अत्र चेंद्रशत्रुपदस्याद्युदात्तत्वाद्बहुव्रीहौ प्रकृत्या पूर्वपदमिति स्मृतेर्बहुव्रीहिलक्षणापत्त्या इंद्र एव तस्य शत्रुरभूत् । तदुक्तं श्रुत्या पदव्र-

द्रव्यभूयो वरेणापस्तुरीयं जागृहुर्मलम् ॥ तासु बुद्बुदफेनाभ्यां दृष्टं तद्धरति क्षिपन् ॥ १० ॥ हतपुत्रस्ततस्त्वष्टा जुहावेंद्राय शत्रवे ॥ इंद्रशत्रो विवर्धस्व माचिरं जहि विद्विषम् ॥ ११ ॥ अथान्वाहार्यपचनादुत्थितो घोरदर्शनः ॥ कृतांत इव लोकानां युगांतसमये यथा ॥१२॥ विष्वग्विवर्धमानं तमिषुमात्रं दिने दिने ॥ १३ ॥ दग्धशैलप्रतीकाशं संध्याऽभ्रानीकवर्चसम् ॥ तप्तताम्रशिखास्मश्रुं मध्याह्नार्कोग्रलोचनम् ॥ १४ ॥ देदीप्यमाने त्रिशिखे शूल आरोप्य रोदसी ॥ नृत्यंतमुन्नदंतं च चालयंतं पदा महीम् ॥ १५ ॥ दरीगंभीरवक्त्रेण पिबता च नभस्तलम् ॥ लिहता जिह्वयर्क्षाणि ग्रसता भुवनत्रयम् ॥ १६ ॥

वीत्स्वाहेंद्रशत्रुर्वर्धस्वेति तस्मादस्येंद्रः शत्रुरभवदिति । तथा च शिक्षायाम्। मंत्रो हीनः स्वरतो वर्णतो वा मिथ्याप्रयुक्तो न तमर्थमाह । स वाग्वज्रो यजमानं हिनस्ति यथेंद्रशत्रुः स्वरतोऽपराधादिति ॥ ११ ॥ अन्वाहार्यपचनाद्दक्षिणाग्नेः तं वीक्ष्य वित्रस्ता लोका दश दिशो विदुद्रुवुरिति पंचमेनान्वयः ॥ १२ ॥ कथंभूतम्। विष्वक्समंतत इषुविक्षेपमात्रं प्रतिदिनं वर्धमानम् ॥ १३ ॥ दग्धशैलप्रतीकाशं कृष्णवर्णम् । संध्याभ्रानीकवद्वर्चो दिप्तिर्यस्य तम् । तप्तताम्रवच्छिखाः श्मश्रूणि च यस्य । मध्याह्नार्कवदुग्रे लोचने यस्य ॥ १४ ॥ रोदसी आरोप्येवेत्यर्थः ॥ १५ ॥ दरीवद्गंभीरेण वक्त्रेण मुहुर्मुहुर्जृंभमाणमित्यन्वयः । कथंभूतेन । नभस्तलं पिबता । ऋक्षाणि जिह्वया

कालीं सर्व लोकांचा संहार करण्याकरितां काळ प्रकट होतो त्याप्रमाणें दक्षिणाग्नीपासून भयंकर रूप धारण करणारा तो वृत्रासुर प्रगट झाला ॥ १२ ॥ हे राजा, तो वृत्रासुर प्रतिदिवशीं आपल्या सभोंवतीं बाण टाकण्याच्या प्रदेशाइतका वाढत असून अग्नीनें जाळलेल्या पर्वतासारखा उंच होता, त्याचें तेज, संध्याकाळच्या मेघसमुदायासारखें काळें होतें त्याची शिखा व श्मश्रु तापलेल्या तांब्याप्रमाणें लाल होत्या, त्याचे नेत्र मध्यान्हकाळच्या सूर्याप्रमाणें उग्र होते ॥ १३ ॥ १४ ॥ तो पृथ्वी व आकाश ह्यांना आपल्या देदीप्यमान त्रिशूळावर आरोपण करूनच कीं काय उच्चस्वरानें गर्जना करीत आहे व पायानें पृथिवी कंपित करीत नृत्य करीत आहे असा भासत होता ! ॥१५॥ तो, आकाशाचें प्राशनच करीत आहे कीं काय! जिव्हेच्या योगानें नक्षत्रांना चाटीतच आहे कीं काय! आणि त्रैलोक्याला गिळूनच टाकित आहे कीं काय! अशा आ-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पल्या मोठ्या, भयंकर दाढेनें युक्त व पर्वताच्या गुहेप्रमाणें खोल असलेल्या मुखानें वारंवार जांभया देत होता. त्या वृत्रासुराला पाहून सर्वलोक, भयभीत झाले व दशदिशांकडे पलायन करूं लागले ॥ १६ ॥ १७ ॥ हे राजा, ज्या त्वष्ट्याच्या पुत्ररूपी तमोगुणात्मक असुरानें हे सर्व लोक व्यापून टाकिले, ह्मणून त्या अतिभयंकर पापी असुराला वृत्र असें नांव पडलें आहे ॥ १८ ॥ त्या वेळीं स्वकीयगणांसहवर्तमान देवश्रेष्ठांनीं त्याच्या अंगावर धांवून जाऊन आपआपल्या दिव्य शस्त्रास्त्रसमुदायांनीं त्याला प्रहार केला. परंतु त्यानें तीं सर्व शस्त्रास्त्रें गिळून टाकिलीं ॥ १९ ॥ नंतर ग्रस्ततेज झालेले व वृत्रासुरानें त्रैलोक्य व्याप्त केल्यामुळें ज्यांचें कोठेंहि गमन होईना असे ते सर्व देव विस्मित व खिन्न होऊन त्याचठिकाणीं एकाग्र अंतःकरणपूर्वक अंतर्यामी आदिपुरुषाची स्तुति करूं लागले ॥ २० ॥ देव ह्मणाले— अहो! वायु, आकाश, अग्नि,

---

लिहता। भुवनत्रयं ग्रसता ॥ १६ ॥ महता विस्तीर्णेन। रौद्रा दंष्ट्रा यस्मिन् ॥ १७ ॥ वृत्रनाम निर्वक्ति। येनावृता इति। त्वाष्ट्रो मूर्तिर्यस्य तमसस्तेन । तथा च श्रुतिः। स इमाँल्लोकानावृणोद्यत्तत्रस्य वृत्रत्वमिति ॥ १८ ॥ अग्रसद्भक्षितवान् ॥ १९ ॥ ग्रस्तं तेजो येषाम्। प्रत्यञ्चमंतर्यामिणं त्रिभुवनस्य तेन व्याप्तत्वात्क्वापि गमनासंभवात्तत्रैव स्थित्वा तुष्टुवुरित्यर्थः। महाभये परित्राणमन्यतो न भवेदिति ॥ हरिमेव प्रपद्यंते सुराः शरणमातुराः ॥ २० ॥ वाय्वादीनि पंचमहाभूतानि तैर्निर्मितास्त्रयो लोकास्तेषामधिपतयो ब्रह्मादयश्च ततोऽर्वाचीना वयं च सर्वे यस्मै अंतकाय कालायोद्विजंतः संतो बलिं हरामासावपि यस्माद्बिभेति ततः परमेश्वरादेव नोऽस्मा-

महता रौद्रदंष्ट्रेण जृंभमाणं मुहुर्मुहुः ॥ वित्रस्ता दुद्रुवुर्लोका वीक्ष्य सर्वे दिशो दश ॥ १७ ॥ येनावृता इमे लोकास्तमसा त्वाष्ट्र-
मूर्तिना ॥ स वै वृत्र इति प्रोक्तः पापः परमदारुणः ॥ १८ ॥ तं निजघ्नुरभिद्रुत्य सगणा विबुधर्षभाः ॥ स्वैः स्वैर्दिव्यास्त्रशस्त्रौघैः
सोऽग्रसत्तानि कृत्स्नशः ॥ १९ ॥ ततस्ते विस्मिताः सर्वे विषण्णा ग्रस्ततेजसः ॥ प्रत्यञ्चमादिपुरुषमुपतस्थुः समाहिताः ॥ २० ॥
देवा ऊचुः ॥ वाय्वंबराग्न्यप्क्षितयस्त्रिलोका ब्रह्मादयो ये वयमुद्विजंतः ॥ हराम यस्मै बलिमंतकोऽसौ बिभेति यस्मादरणं ततो नः
॥२१॥ अविस्मितं तं परिपूर्णकामं स्वेनैव लाभेन समं प्रशांतम् ॥ विनोपसर्पत्यपरं हि बालिशः श्वलांगुलेनातितितर्ति सिंधुम् ॥२२॥
यस्योरुशृंगे जगतीं स्वनावं मनुर्यथाऽऽबद्ध्य ततार दुर्गम् ॥ स एव नस्त्वाष्ट्रभयाद्दुरंतात्त्राता श्रितान्वारिचरोऽपि नूनम् ॥ २३ ॥

कमरणं शरणं रक्षणमस्तु ॥ २१ ॥ तत एवेत्यवधारणे हेतुमाहुः। अविस्मितं निरहंकारं कुतूहलशून्यं वा। कुतः। प्रशांतं रागादिशून्यम्। तच्च कुतः। स्वेनैव लाभेन परिपूर्णकामम्। तच्च कुतः। समम् उपाधिपरिच्छेदशून्यम्। एवंभूतं परमेश्वरं विना परं यः शरणार्थमुपसर्पति स बालिशोऽज्ञः। यतोऽसौ शुनो लांगूलेन पुच्छेन समुद्रमतितितर्ति अतितर्तुमिच्छतीत्यर्थः। यथा तेन समुद्रतरणं न भवति तथा निरीश्वराश्रयणेन व्यसनार्णवतरणं न भवतीति भावः ॥ २२ ॥ महाभये स एव

उदक व पृथ्वी हीं पंचमहाभूतें, त्यांनीं निर्माण केलेलें त्रैलोक्य, त्याचे अधिपति ब्रह्मादिक व त्यांपेक्षांहि आलीकडचे जे आह्मी सर्व देव ते ज्या कालाला भिऊन त्याची पूजा करितों ह्मणजे त्यात्याकालीं सांगितलेलें कर्म नियमानें करितों, तो कालही ज्याला भितो त्या परमेश्वरापासूनच आमचें रक्षण होवो ॥ २१ ॥ कारण, सर्वठिकाणीं सम, आपल्याच लाभानें पूर्णमनोरथ, रागादिशून्य, व अहंकाररहित अशा त्या परमेश्वरावांचून दुसऱ्याकडे जो अज्ञ जन आपल्या रक्षणार्थ जातो तो श्वानाच्या पुच्छानें समुद्र तरून जाण्याची इच्छा करितो. ह्मणजे जसें श्वानपुच्छाचा आश्रय करून समुद्राचें तरणें होत नाहीं तसें ईश्वरावांचून इतरांच्या आश्रयानें दुःखसमुदायांतून पार पडणें होत नाहीं ॥ २२ ॥ ह्याप्रमाणें भाषण करून आतां, महाभय प्राप्त झालें असतां तो ईश्वरच रक्षण करतो असें दृष्टांतपत्तीस आलें आहे ह्मणून सांगतात— ज्याच्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

महाशृंगाचेठिकाणीं पृथ्वी हीच आपली नाव बांधून सत्यव्रत मनु अनायासानें संकटांतून तरून गेला, तोच मत्स्यमूर्ति भगवान् शरण आलेल्या आमचें दुस्तर अशा वृत्रासुराच्या भयापासून खरोखर रक्षण करील ॥ २३ ॥ अहो पूर्वीं मोठ्या सुटलेल्या वाऱ्यानें उत्पन्न झालेल्या लाटांच्या शब्दामुळें भयंकर झालेल्या प्रलयकालीन उदकामध्यें नाभिकमलापासून पडल्यासारखा झालेला एकटाच ब्रह्मदेवही ज्याच्या योगानें त्या भयापासून तरला, तोच भगवान् आमचा तारक असो ॥ २४ ॥ अशी ईश्वराची प्रार्थना करून आतां ज्याअर्थीं भगवंतानेंच आह्मांला उत्पन्न करून पुष्कळवेळां आमचें पालन केलें आहे त्याअर्थीं आह्मीं त्यालाच शरण जातों असें सांगतात—ज्या अद्वितीय ईश्वरानें आपल्या मायेनें आह्मांस उत्पन्न केलें आहे, ज्यानें अनुग्रह केला असतां आह्मीं विश्व उत्पन्न करितों, आणि 'स्वतंत्र ईश्वर आहोंत' असा अभिमान धारण

रक्षक इति दृष्टमित्याहुः। यस्येति द्वाभ्याम्। यस्य महाशृंगे जगतीं पृथ्वीमेव स्वनावं बद्ध्वा मनुः सत्यव्रतो यथावद्दुर्गं संकटं ततार स एव वारिचरो मत्स्यमूर्तिर्नोऽस्मान्प्याश्रितान्सतो नूनं त्राता रक्षिष्यति ॥ २३ ॥ संयमांभसि प्रलयोदके उदीर्णैरुद्गतैर्वातैर्य ऊर्मयस्तेषां रवैः कराले भयंकरे। अरविंदान्नाभिकमलात्पतितप्राय एकोऽसहाय एव तस्माद्भयाचेन ततार स एव नः पारस्तारकोऽस्तु ॥ २४ ॥ किंच। वयं भगवतैव सृष्टाः पालिताश्च बहुशोऽतस्तमेव शरणं व्रजामेत्याहुः। य एव इति त्रिभिः। येनानुगृहीताः संतो विश्वं सृजाम। ननु यूयमेव स्रष्टारो नान्यो युष्माकमनुग्राहकोऽस्ति तस्यादर्शनात्तत्राहुः। अस्मत्तः पुरः पूर्वमेवांतर्यामितया समीहमान-

पुरा स्वयंभूरपि संयमांभस्युदीर्णवातोर्मिरवैः कराले ॥ एकोऽरविंदात्पतितस्ततार तस्माद्भयाद्येन स नोऽस्तु पारः ॥ २४ ॥ य एक ईशो निजमायया नः ससर्ज येनानुसृजाम विश्वम् ॥ वयं न यस्यापि पुरः समीहतः पश्याम लिंगं पृथगीशमानिनः ॥ २५ ॥ यो नः सपत्नैर्भृशमर्द्यमानान्देवर्षितिर्यङ्नृषु नित्य एव ॥ कृतावतारस्तनुभिः स्वमायया कृत्वात्मसात्पाति युगे युगे च ॥ २६ ॥ तमेव देवं वयमात्मदैवतं परं प्रधानं पुरुषं विश्वमन्यम् ॥ व्रजाम सर्वे शरणं शरण्यं स्वानां स नो धास्यति शं महात्मा ॥ २७ ॥ श्रीशुक उवाच ॥ इति तेषां महाराज सुराणामुपतिष्ठताम् ॥ प्रतीच्यां दिश्यभूदाविः शंखचक्रगदाधरः ॥ २८ ॥

स्यापि यस्य लिंगं रूपं न पश्यामः। तत्र हेतुः पृथक्पृथगीशा इत्यभिमानिनः ॥ २५ ॥ देवादिषूपेंद्रपरशुराममत्स्यरामादितनुभिः कृतावतारः सन्नात्मसात्कृत्वा पाति च ॥ २६ ॥ आत्मभूतं दैवतं कुतो विश्वं विश्वात्मकम्। तथापि विकारं वारयंति। अन्यम्। विश्वात्मत्वे हेतुः। परं कारणम्। ननु प्रधानं पुरुषश्च विश्वस्य कारणं तत्राहुः। प्रधानं पुरुषं च। तदात्मकोऽपि स एवेत्यर्थः। स एव नः शं विधास्यति ॥ २७ ॥ प्रतीच्यां दिशि हृदि प्रथममाविरभूत् ॥ २८ ॥

करणारे आह्मी आमच्या पूर्वींच अंतर्यामिरूपानें त्यात्या कार्याचेठिकाणीं आमची प्रेरणा करणाऱ्या ज्या ईश्वराचें स्वरूप जाणत नाहीं, ॥ २५ ॥ जो वस्तुतः निर्विकारच असून देव, ऋषि, पश्वादि ज्ञानहीन जाति व मानव ह्यांचेठिकाणीं आपल्या मायेच्या योगानें उपेंद्र, परशुराम, मत्स्य आणि राम इत्यादि रूपांनीं अवतार धारण करून शत्रूंपासून अत्यंत पीडा झालेल्या आमचें, आपले असें समजून प्रत्येक युगामध्यें संरक्षण करितो, ॥ २६ ॥ जो विश्वाहून भिन्न असूनहि विश्वरूपी आहे, जो प्रकृतिरूपी व पुरुषरूपी असल्यामुळें विश्वाचें कारण आहे, जो सर्वांचा आत्मा असून परम दैवत आहे आणि जो शरण जाण्यास योग्य आहे, त्याच देवाला आह्मीं सर्व शरण जातों. आणि तोच महात्मा आह्मां स्वभक्तांचें कल्याण करील ॥ २७ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला— हे महाराजा, ह्याप्रमाणें ते देव स्तुति करीत असतां,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शंख, चक्र व गदा धारण करणारा भगवान् प्रथम त्या देवांच्या हृदयामध्यें प्रगट झाला आणि नंतर अग्रभागीं दृष्टिगोचर झाला ॥ २८ ॥ तेव्हां हे राजा, श्रीवत्सलांछन व कौस्तुभमणि या दोन चिन्हांवांचून भगवंतासारख्याच सर्व लक्षणांनीं युक्त असलेल्या सोळा पार्षदगणांनीं आसमंताद्भागीं सेवन केलेल्या व विकसित झालेल्या शरदृतूंतील कमलाप्रमाणें ज्याचे नेत्र आहेत अशा त्या भगवंताला पाहून त्याच्या दर्शनापासून झालेल्या आनंदानें विवश झालेल्या सर्वदेवांनीं, त्याला भूमीवर साष्टांग नमस्कार घातला आणि कांहीं वेळानें उठून ते देव त्याची पुनरपि स्तुति करूं लागले ॥ २९ ॥ ३० ॥ देव ह्मणाले– हे देवा, स्वर्गादि फलोत्पादनाकरितां यज्ञरूप सामर्थ्यानें युक्त, त्या फलांना देणारा कालरूपी व त्या यज्ञाचा घात करणाऱ्या दैत्यांचेठिकाणीं आपलें चक्र फेंकणारा आणि पराक्रमांनीं युक्त असलेल्या पुष्कळ नांवांनीं

पुनश्च तं पुरो दृष्ट्वेक्षणाह्लादेन विवशा अवनौ दंडवत्पतिताः संतः शनैरुत्थाय तुष्टुवुरित्यन्वयः । कथंभूतम् । श्रीवत्सकौस्तुभौ विना स्वतुल्यैः षोडशभिः सुनंदादिभिः परितः सेवितम् । उन्निद्रशरदंबुरुहवदीक्षणे यस्य तम् ॥ २९ ॥ ३० ॥ यज्ञो वीर्यं स्वर्गादिफलजननाय सामर्थ्यं यस्य तस्मै नमः । वयसे उत तत्फलपरिच्छेदककालात्मनेऽपि । तद्विघातकेषु दैत्येष्वस्तं प्रक्षिप्तं चक्रं येन । एवंभूतैः प्रभावैः सुपुरुहूतये शोभनबहुनाम्ने ॥ ३१ ॥ ननु मम गुणातीतं रूपं विहाय गुणोपाधिकं

आत्मतुल्यैः षोडशभिर्विना श्रीवत्सकौस्तुभौ ॥ पर्युपासितमुन्निद्रशरदंबुरुहेक्षणम् ॥ २९ ॥ दृष्ट्वा तमवनौ सर्व ईक्षणाह्लादविक्लवाः ॥ दंडवत्पतिता राजन् शनैरुत्थाय तुष्टुवुः ॥ ३० ॥ देवा ऊचुः ॥ नमस्ते यज्ञवीर्याय वयसे उत ते नमः ॥ नमस्ते ह्यस्तचक्राय नमः सुपुरुहूतये ॥ ३१ ॥ यत्ते गतीनां तिसृणामीशितुः परमं पदम् ॥ नार्वाचीनो विसर्गस्य धातर्वेदितुमर्हति ॥ ३२ ॥ ॐ नमस्तेऽस्तु भगवन्नारायण वासुदेवादिपुरुष महापुरुष महानुभाव परममंगल परमकल्याण परमकारुणिक केवल जगदाधार लोकैकनाथ सर्वेश्वर लक्ष्मीनाथ परमहंस परिव्राजकैः परमेणात्मयोगसमाधिना परिभावितपरिस्फुटपारमहंस्यधर्मेणोद्घाटिततमः कपाटद्वारे चित्तेऽपावृत आत्मलोके स्वयमुपलब्धनिजसुखानुभवो भवान् ॥ ३३ ॥

यज्ञवीर्यत्वादि किमिति वर्ण्यते तत्राहुः । यत्तव गुणत्रयस्येशितुर्नियंतुस्त्रिगुणात्मिकानां तिसृणां गतीनां परमं पदं निर्गुणस्वरूपं तद्विसर्गस्यार्वाचीन इदानींतनो हे धातर्वेदितुं नार्हति । अतः केवलं तस्मै ते नमोऽस्तु ॥ ३२ ॥ मिताक्षराणि पद्यानि न मीयंते हरेर्गुणाः ॥ इति पद्यैरतुष्यंतः सद्यो गद्येन तुष्टुवुः ॥ भक्त्युद्रेकेण बहुधा संबोधयंतो दुर्ज्ञेयत्वं प्रपंचयति । भगवन्नित्यादिना । परमं मंगलं शुद्धो धर्मो यस्मिन् । आत्मयोगेनाष्टांगेन यः समाधिश्चित्तैकाग्र्यं तेन परिभावितः सुशीलितः परि-

---

युक्त अशा तुला नमस्कार असो ॥ ३१ ॥ आतां माझें गुणातीत रूप सोडून, गुणोपाधिक रूपाचें तुह्मी कशाकरितां वर्णन करितां, असें ह्मणशील तर– हे विधात्या, सात्विकादिक तिन्हीं गतींचें परमस्थानभूत असें जें तुज गुणत्रय नियंत्याचें निर्गुण स्वरूप तें जाणण्यास अलीकडच्या सृष्टींतील कोणीहि प्राणी समर्थ होणार नाहीं; याकरितां त्या तुला केवळ नमस्कार करितों ॥ ३२ ॥ ह्याप्रमाणें सामान्यतः स्तुति करून आतां उत्कटभक्तीच्या योगानें नानाप्रकारचीं संबोधनें देऊन त्या ईश्वराचें दुर्ज्ञेयत्व वर्णन करितात कीं– हे भगवंता, हे नारायणा, हे वासुदेवा, हे आदिपुरुषा, हे महापुरुषा, हे महानुभावा, हे शुद्धधर्मा, हे परमकल्याणा, हे परमदयाळो, हे केवला, हे जगदाधारा, ॥ ३० ॥
हे लोकैकनाथा, हे सर्वेश्वरा, हे लक्ष्मीनाथा, आणि हे परमहंसा, संन्याशांनीं अष्टांगयोगानें चित्ताची एकाग्रता करून अभ्यासिलेला जो भगवद्भजनरूप परमहंस धर्म त्यानें, ज्याचें अज्ञानरूप कवाड उघडलें आहे ह्मणजे ज्यांतील अज्ञान नाहींसें झालें आहे त्या चित्तामध्यें प्रकट झालेल्या अंतर्यामिरूपाचेठिकाणीं स्वतःच ज्याच्या आनंदरूपाचा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अनुभव येतो तोच तूं आहेस ॥ ३३ ॥ आतां केवलानुभवस्वरूप जर मी आहें तर मी सृष्टिवगैरे करितों हें कसें? असें विचारशील तर–हे परमेश्वरा, तुझा हा क्रीडेचा प्रकार खरोखर दुर्बोधच आहे. कारण, तूं निराश्रय, शरीररहित, आमच्या साहाय्याची अपेक्षा न करणारा आणि निर्गुण असून आपल्या निर्विकार स्वरूपानेंच हें सगुण विश्व उत्पन्न करितोस, रक्षण करितोस आणि ह्याचा संहारहि करितोस ॥ ३४ ॥ बरें आणखीहि तुजविषयीं एक दुर्बोध गोष्ट आहे ती अशीकीं–हे परमेश्वरा, जसा एकादा पुरुष, इहलोकीं गृहादि निर्माण करून त्याठिकाणीं परतंत्रतेमुळें आपण केलेल्या पुण्यपापांचें फल भोगतो, त्याप्रमाणें ब्रह्मस्वरूप असा तूं जीवरूपानें गुणकार्यरूप देहामध्यें प्रविष्ट होऊन, पारतंत्र्यानें पुण्यपापांचें फळ भोगतोस किंवा स्वस्वरूपीं रममाण व शांतस्वभाव आणि कधींहि लोप न पावणाऱ्या चैतन्यशक्तीनें युक्त असा होत्सा·

स्फुटो यः पारमहंस्यधर्मो भगवद्भजनं तेनोद्घाटितं तमोरूपं कपाटं यस्मिंस्तस्मिन् द्वारभूते चित्ते अपावृते प्रकट आत्मलोके प्रत्यग्रूपे स्वयमेवोपलब्धमभिव्यक्तं यन्निजसुखं तदनुभवरूपो भवान् ॥ ३३ ॥ ननु केवलानुभवरूपत्वे मम सृष्ट्यादिकर्तृत्वं कथं तत्राहुः । दुरवबोध इव तवायं विहारयोगो यद्यस्मादशरणो निराश्रयः । इदं विश्वम् । अनवेक्षितोऽस्माकं समवायो मेलनं साहाय्यं येन सः ॥ ३४ ॥ दुर्ज्ञेयांतरमाहुः । अथ तत्रेति । यथेह देवदत्तो गृहादि निर्माय तत्र स्वकृतशुभाशुभयोः फलमुपादत्ते एवं भवान् ब्रह्मस्वरूपो जीवरूपेण गुणविसर्गे पतितः सन्नुपाददाति । यद्वा समंजसमप्रच्युतं दर्शनं चिच्छक्तिर्यस्य स भवानुदास्ते उदासीनः साक्षितया वर्तत इति ॥ ३५ ॥ तदेवं विरो-

दुरवबोध इव तवायं विहारयोगो यदशरणोऽशरीर इदमनवेक्षितास्मत्समवाय आत्मनैवाविक्रियमाणेन सगुणमगुणः सृजसि पासि हरसि ॥३४॥ अथ तत्र भवान्किं देवदत्तवदिह गुणविसर्गपतितः पारतंत्र्येण स्वकृतकुशलाकुशलं फलमुपाददात्याहोस्विदात्माराम उपशमशीलः समंजसदर्शन उदास्त इति ह वाव न विदामः ॥ ३५ ॥ न हि विरोध उभयं भगवत्यपरिमितगुणगण ईश्वरेऽनवगाह्यमाहात्म्येऽर्वाचीनविकल्पवितर्कविचारप्रमाणाभासकुतर्कशास्त्रकलिलांतःकरणाश्रयदुरवग्रहवादिनां विवादानवसर उपरतसमस्तमायामये केवल एवात्ममायामंतर्धाय को न्वर्थो दुर्घट इव भवति स्वरूपद्वयाभावात् ॥ ३६ ॥

धेन दुर्ज्ञेयत्वमुक्त्वा तत्परिहारेण ज्ञानप्रकारमाहुः न हीति । विरुध्यत इति विरोधः । उभयं न विरुद्धमित्यर्थः । न ह्यन्यदृष्टांतेन त्वयि विकल्पो युज्यतेऽतर्क्यैश्वर्यत्वादित्याहुः । भगवतीति । अपरिमिता गुणगणा यस्य तस्मिन्नीश्वरे स्वतंत्रेऽनवगाह्यमतर्क्यं माहात्म्यं यस्य तस्मिन् । विकल्प एवं वा एवं वेति वितर्कः किमत्र युक्तमिति विचार इत्थमेवेति तत्र प्रमाणाभासास्तदनुग्राहकाः कुतर्काश्चार्वाचीना वस्तुस्वरूपासंस्पर्शिनो ये विकल्पादयस्ते येषु शास्त्रेषु तैः कलिलं व्याकुलमंतःकरणमाश्रयो यस्य दुरवग्रहस्य तेन वादिनां विवादस्यानवसरेऽगोचरे । ननु श्रद्धामात्रमेतत् । युक्तिरुच्यतां तत्राहुः । उपरतो मायामयः संसारो यस्मिंस्तस्मिन्केवलेऽप्यात्ममायां मध्ये नि-

---

ता उदासीनपणानें असतोस हें आह्मांस खरोखर समजत नाहीं ॥ ३५ ॥ ह्याप्रमाणें विरोधानें भगवंताचें दुर्ज्ञेयत्व कथन करून, आतां त्या विरोधाच्या परिहारानें ज्ञानप्रकार वर्णन करितात कीं,–तुझ्या षड्गुणैश्वर्यसंपन्न स्वरूपीं पूर्वोक्त दोन्ही गोष्टी विरुद्ध नाहींत. कारण, तूं अपरिमित गुणसमुदायांचा निधि व स्वतंत्र, असा ईश्वर असल्यामुळें तुझें माहात्म्य अतर्क्य आहे. आणि वस्तुस्वरूपाला स्पर्शही न करणारे असे जे आलीकडचे विकल्प (असें करावें किंवा असें करावें असे,) वितर्क (काय बरें येथें योग्य आहे असे,) विचार (असेंच करावें असे निश्चयरूप) आणि कुतर्क ह्यांनीं युक्त असलेल्या शास्त्रांनीं व्याकुळ झालेलें अंतःकरणच ज्या दुराग्रहाचा आश्रय आहे. त्याच्यायोगानें वाद करणाऱ्या लोकांच्या विवादाला ज्या तुझें स्वरूप गोचर होत नाहीं आणि हा सर्व मायामय संसार जेथें शांत झाला आहे, त्या तुझ्या केवळ

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

स्वरूपावेठिकाणीं आपली माया मध्यें स्थापन केली असतां कोणता बरें कर्तृत्वादिक प्रकार संभवणार नाहीं? सर्वही संभवतीलच आणि त्यांतूनही कर्तृत्वादि धर्म जर वस्तुतः तुझेठिकाणीं खरे असतील तर विरोध येईल परंतु ते धर्म तुझेठिकाणीं खरे मुळींच नाहींत कारण, तूं दोन्ही स्वरूपांहून निराळाच आहेस ॥ ३६ ॥ याप्रमाणें भाषण करून तोच अविरोध पुरुषमतिभेदानें दर्शवितात कीं,–हे परमात्म्या, जसा दोरीचा तुकडा त्याचें यथार्थ ज्ञान असणाऱ्या लोकांना दोरीच्या रूपानें भासत असतांही सर्पादि विषयक बुद्धि असणाऱ्या लोकांना सर्पादि भयंकररूपानें भासतो त्याचप्रमाणें यथार्थबुद्धीच्या लोकांना तूं केवळ निर्गुणस्वरूपानें भासत असतांहि भ्रांतबुद्धीच्या लोकांना कर्तृत्वादिरूपानें भासतोस. एतावता तुझ्या मायेनें तुझेठिकाणीं लोकांची जसजशी मति होईल तसतसा तूं त्यांना अनुग्रह करणारा किंवा निग्रह करणा-

धाय को न्वर्थः कर्तृत्वादिर्न संभवति यदि वस्तुतः कर्तृत्वादि भवेत्तर्हि विरोधः स्यान्न तु तदस्तीत्याहुः । स्वरूपद्वयाभावादिति ॥ ३६ ॥ अनुग्रहनिग्रहादिकं तु तत्तन्मतिभेदेन त्वन्मायया त्वयि स्फुरतीत्याहुः । समा विषमा च मतिर्येषां तेषां मतमभिप्रायम् । सर्पादिविषया धीर्येषां तेषां यथा रज्जुखंडस्तथा तथा भाति । यद्वा तमेवाविरोधं पुरुषमतिभेदेन दर्शयति । समविषमेति ॥ ३७ ॥ तदेवं विरोधं परिहृत्य निश्चितं परमार्थमाहुः । स एव हि नानारूपेण प्रतीतः । वस्तुस्वरूपः सद्रूपः । सर्वेषां गुणानां विषयाणामाभासैः प्रकाशैरुपलक्षितः । ननु तैर्जीव एवोपलक्ष्यते । न । सर्वप्रत्यगात्मत्वात्सर्वजीवांतर्यामित्वात् । जडतादात्म्याध्यासेन जीवस्यापि जडप्रायत्वान्न

समविषममतीनां मतमनुसरसि यथा रज्जुखंडः सर्पादिधियाम् ॥ ३७ ॥ स एव हि पुनः सर्ववस्तुनि वस्तुस्वरूपः सर्वेश्वरः सकलजगत्कारणकारणभूतः सर्वप्रत्यगात्मत्वात्सर्वगुणाभासोपलक्षित एक एव पर्यवशेषितः ॥ ३८ ॥ अथ हवाव तव महिमामृतरससमुद्रविप्रुषा सकृदवलीढया स्वमनसि निष्यंदमानानवरतसुखेन विस्मारितदृष्टश्रुतविषयसुखलेशाभासाः परमभागवता एकांतिनो भगवति सर्वभूतप्रियसुहृदि सर्वात्मनि नितरां निरंतरं निर्वृतमनसः कथमु ह वा एते मधुमथन पुनः स्वार्थकुशला ह्यात्मप्रियसुहृदः साधवस्त्वच्चरणांबुजानुसेवां विसृजंति न यत्र पुनरयं संसारपर्यावर्तः ॥ ३९ ॥

तेन विना प्रकाश इति भावः । पर्यवशेषितो नेति नेतीत्यादिश्रुतिभिः ॥ ३८ ॥ अतस्त्वद्भक्तिरेव परमपुरुषार्थ इत्याहुः । अथ हेत्यादिपर्यावर्त इत्यंतेन । यस्मादेवंभूतस्त्वं परमेश्वरः । अथ हवाव अतएव हि । हे मधुमथन परमभागवता एते त्वत्पादांभोजानुसेवां कथं मुहुर्मुहुर्विसृजंतीत्यन्वयः । हि यस्मात्स्वार्थे पुरुषार्थे कुशला निपुणाः । अतएव आत्मत्वमेव प्रियः सुहृच्च येषां ते साधवो रागादिशून्याः । तत्र हेतुः । तव महिमैवामृतरससमुद्रस्तस्य विप्रुषा बिंदुमात्रेण सकृदवलीढया आस्वादितया स्वमनसि निष्यंदमानमतिशयेन स्रवच्चनिरंतरं सुखं तेन विस्मारिता दृष्टश्रुतविषयाः सुखलेशाभासा येषां ते । अतएव भगवति त्वयि नितरां निरंतरं निर्वृतं च मनो येषां ते ।

रा भासतोस ॥ ३७ ॥ याप्रमाणें विरोधाचा परिहार करून आतां निश्चित केलेल्या परमार्थस्वरूपाचें वर्णन करितात,– विचार करून पाहिलें असतां नानाप्रकारच्या रूपांनीं प्रतीत होणारा तूंच सर्व वस्तूंमध्यें सद्रूपानें स्थित आहेस, सर्व जगताला कारण असलेल्या महत्तत्त्वादिकांनाही कारणभूत असा सर्वेश्वरही तूंच आहेस, सर्व जीवांचेठिकाणीं अंतर्यामिरूपानें रहात असल्यामुळें सर्व विषयांच्या प्रकाशांनीं तुझें अनुमान होत आहे आणि तुझ्यावांचून इतर वस्तूंचा निषेध करणाऱ्या सर्व श्रुतींनींहि सत्यत्वानें तुझें एकाचेंच वर्णन केलें आहे ॥ ३८ ॥ याप्रमाणें परमार्थस्वरूपाचें वर्णन करून आतां त्याची भक्ति करणें हाच मुख्य पुरुषार्थ आहे असें सांगतात– हे मधुसूदना, ॥ ३१ ॥
एकवार आस्वाद घेतलेला तुझ्या माहात्म्यरूप अमृतरससमुद्राचा जो बिंदु त्याच्यायोगानें आपल्या मनामध्यें अत्यंत स्रवत असलेल्या निरंतर सुखानें पाहिलेल्या व ऐ-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

किलेल्या सुखलेशांच्या आभासांची ज्यांना विस्मृति पडली आहे ह्मणूनच सर्वांचा आत्मा असल्यामुळें सर्वभूतांचा प्रिय आणि हितकर्ता अशा तुज भगवंताचेठिकाणीं ज्यांचें मन अतिशय आणि निरंतर सुखानें तृप्त असतें, जे रागादिरहित आहेत, जे आपल्या पुरुषार्थाविषयीं निपुण आहेत आणि ज्यांचा तूंच प्रिय व सुहृद् आहेस असे हे एकनिष्ठ परम भगवद्भक्त, 'जी केली असतां फिरून हें संसारभ्रमण प्राप्त होत नाहीं त्या' तुझ्या चरणकमलांच्या निरंतर सेवेला कसें बरें सोडून देतील? देणारच नाहींत ॥ ३९ ॥ असो. हे त्रिविक्रमा, हे त्रैलोक्यनायका, तूंच त्रैलोक्याचा आत्मा व उत्पत्तिस्थान असून तुझी लीला त्रैलोक्यामध्यें मनोहर आहे व दैत्य आणि दानववैगेरे सर्व तुझ्याच विभूति आहेत. तस्मात्, हे भगवन्, त्यांचा हा उत्कर्षकाल नाहीं असें समजून ज्याप्रमाणें पूर्वीं देव, नर, पशु व मिश्रजाति ह्यांचीं रूपें आपल्या

यत्र यस्यामनुसेवायां सत्याम् ॥ ३९ ॥ प्रस्तुतं विज्ञापयंति त्रिभुवनेत्यादिना यावत्समाप्ति । त्रिभुवनमात्मा स्वरूपं भवनं च यस्य त्रिभुवनस्यात्मा भवनं चेति वा। त्रयो विक्रमा यस्य । त्रीँल्लोकान्नयतीति तथा । त्रयाणां लोकानां मनोहरोऽनुभावो यस्य । एवं चतुर्धा संबोध्याहुः । तेषामनुपक्रमसमय उद्यमकालो न भवतीति मत्वा। हे दंडधर पूर्वं यथा दंडं दधर्थ धृतवानस्येवमेनं त्वाष्ट्रमपि जहि यदि मन्यसे हंतुं यदीच्छसि ॥ ४० ॥ प्रथमं तावत्त्वदीयानामस्माकमंतस्तापं शमयितुमर्हसि । तावका-

त्रिभुवनात्मभवन त्रिविक्रम त्रिनयन त्रिलोकमनोहरानुभाव तवैव विभूतयो दितिजदनुजादयश्चापि तेषामनुपक्रमसमयोऽयमिति स्वात्ममायया सुरनरमृगमिश्रितजलचराकृतिभिर्यथापराधं दंडं दंडधर दधर्थ एवमेनमपि भगवन् जहि त्वाष्ट्रमुत यदि मन्यसे ॥ ४० ॥
अस्माकं तावकानां तव नतानां तत ततामह तव चरणनलिनयुगलध्यानानुबद्धहृदयनिगडानां स्वलिंगविवरणेनात्मसात्कृतानामनुकंपाऽनुरंजितविशदरुचिरशिशिरस्मितावलोकेन विगलितमधुरसुखरसामृतकलया चांतस्तापमनघार्हसि शमयितुम् ॥ ४१ ॥
अथ ह भगवंस्तवास्माभिरखिलजगदुत्पत्तिस्थितिलयनिमित्तायमानदिव्यमायाविनोदस्य सकलजीवनिकायानामंतर्हृदयेषु बहिरपि च ब्रह्मप्रत्यगात्मस्वरूपेण प्रधानरूपेण च यथा देशकालदेहावस्थानविशेषं तदुपादानोपलंभकतयाऽनुभवतः सर्वप्रत्ययसाक्षिण आकाशशरीरस्य साक्षात्परब्रह्मणः परमात्मनः कियानिह वा अर्थविशेषो विज्ञापनीयः स्याद्विस्फुलिंगादिभिरिव हिरण्यरेतसः ॥ ४२ ॥

नामित्यत्र हेतुः । हे पितः हे पितामह तव चरणनलिनयुगलध्यानेनैवानुबद्धो हृदये निगडः शृंखला येषाम् । स्वलिंगविवरणेन निजमूर्तिप्रकटनेन स्वीकृतानाम् । केन । अनुकंपयाऽनुरंजितं सानुरागं च तद्विशदं रुचिरं शिशिरं च स्मितं तत्सहितेनावलोकेन तथाऽनुकंपयैव विगलितो मधुरो सुखरसः प्रियवाक्सैवामृतकला तया च ॥ ४१ ॥ किंच । अस्मदभिप्रायस्त्वया ज्ञायत एव किमत्रास्माभिर्विज्ञापनीयमित्याहुः । अथ हे भगवंस्तवास्माभिरिह कियान्वार्थविशेषो विज्ञापनीयः स्यादित्यन्वयः । यथा हिरण्यरेत-

---

मायेच्या योगानें धारण करून त्या दैत्यांना अपराधानुरूप दंड धारण केला आहेस त्याप्रमाणेंच सांप्रतकालींही हे दंडधारणकरणाऱ्या देवा, जर तूं इच्छित असशील तर ह्या त्वष्ट्याच्या पुत्राचा (वृत्रासुराचा) वध करावास ॥ ४० ॥ परंतु प्रथमतः हे पित्या, हे पितामहा, हे निष्पापा, तुझ्या चरणकमलांच्या ध्यानानेंच ज्या आमच्या हृदयामध्यें तूं प्रेमरूप शृंखला बांधून ठेविली आहेस आणि आपली मूर्ति प्रकट करून ज्यांना तूं आपले असे ह्मणवून स्वीकारिले आहेस त्या तुला नम्र असणाऱ्या व तुझे भक्त अशा आमच्या अंतःकरणांतील ताप, तूं आपल्या सदय, निर्मल, मनोहर आणि शीतल अशा हास्यसहित अवलोकनानें आणि कृपेमुळेंच बाहेर निघालेल्या प्रियवाणीरूप अमृताच्या कलेनें शांत करण्यास योग्य आहेस ॥ ४१ ॥ ह्याप्रमाणें सांगून आतां आमचा अभिप्राय तूं जाणतच आहेस तेव्हां ह्याविषयीं आह्मी तुला काय विदित करा-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वयाचें आहे ? असें सांगतात– हे भगवन् ज्याप्रमाणें अग्नीच्या अंशभूत असलेल्या किटळें इत्यादिकांनीं त्या मुख्य अग्नीला प्रकाश केला जात नाहीं त्याप्रमाणें आह्मीतरी आपल्या कार्याविषयीं तुला विशेष काय सांगावें ? कारण, तूं सर्व जगताची उत्पत्ति, स्थिति व लय ह्यांना निमित्तभूत असणाऱ्या दिव्यमायेच्या योगानें आपली क्रीडा चालविणारा, सर्व जीवसमूहांच्या हृदयांमध्यें ब्रह्मस्वरूपानें व अंतर्यामिरूपानें आणि बाहेर प्रकृतिरूपानें, देश, काळ, देह व त्याच्या विशेष अवस्था ह्यांचें उल्लंघन न करितां उपादान कारणत्वेंकरून व प्रकाशकत्वेंकरून त्यांचा अनुभव घेणारा, सर्वांच्या बुद्ध्यादिकांचा साक्षी,आकाशासारख्या अलिप्त असलेल्या शरीरानें युक्त व शुद्धसत्त्वमूर्ति असा साक्षात् परब्रह्मरूप आहेस ॥ ४२ ॥ ह्मणूनच अचिंत्यैश्वर्यसंपन्न व सर्वांचा परमगुरु अशा तुला शरण प्राप्त झालेल्या भक्तांना नानाप्रकारच्या दुःखांसहित प्राप्त होणाऱ्या

सोऽग्नेस्तदंशभूतैर्विस्फुलिंगादिभिः प्रकाशो न क्रियते तथा तवास्माभिः कार्यार्थप्रकाशनं न कार्यमित्यर्थः । अत्र हेतुगर्भाणि विशेषणानि । अखिलजगतामुत्पत्त्यादिषु निमित्तायमानया दिव्यमायया विनोदो यस्य । अतएव सर्वजीवनिकायानामंतर्हृदयेषु ब्रह्मस्वरूपेण प्रत्यगात्मांतर्यामी तद्रूपेण च बहिरपि प्रधानरूपेण देशकालदेहावस्थानविशेषाननुल्लंघ्यानुभवतः । कथम् । तेषामुपादानतयोपलंभकतया च उपादानस्योपलंभकतयेति वा । अतएव सर्वेषां प्रत्ययानां बुद्ध्यादीनामपि साक्षिणः । साक्षित्वे हेतुः । आकाशवदलिप्तं शरीरं स्वरूपं यस्य। अलिप्तत्वे हेतुद्वयम् । साक्षात्परब्रह्मणो निरुपाधेः परमात्मनः शुद्धसत्त्वमूर्तेश्च ॥ ४२ ॥ अतएव सर्वज्ञत्वादेव वयं यत्कामेन यस्य-

अत एव स्वयं तदुपकल्पयास्माकं भगवतः परमगुरोस्तव चरणशतपलाशच्छायां विविधवृजिनसंसारपरिश्रमोपशमनीमुपसृतानां वयं यत्कामेनोपसादिताः ॥ ४३ ॥ अथो ईश जहि त्वाष्ट्रं ग्रसंतं भुवनत्रयम् ॥ ग्रस्तानि येन नः कृष्ण तेजांस्यस्त्रायुधानि च ॥ ४४ ॥ हंसाय दह्रनिलयाय निरीक्षकाय कृष्णाय मृष्टयशसे निरुपक्रमाय ॥ सत्संग्रहाय भवपांथनिजाश्रमाप्तावंते परीष्टगतये हरये नमस्ते ॥ ४५ ॥

कार्यस्य कामेनोपसादिताः प्रापितास्तदस्माकं कार्यं स्वयमेवोपकल्पय संपादयेति । चरणमेव शतपलाशं कमलं तस्य छायां विविधैर्वृजिनैर्यः संसारपरिश्रमस्तस्योपशमकरीमुपसृतानां प्राप्तानाम् ॥ ४३ ॥ पूर्वं भक्तेरुत्कर्षोक्तेस्तत्कामशंका माभूदिति स्वकामं कथयंति । अथो ऽनंतरमेव ॥ ४४ ॥ शीघ्रं तद्वधाय पुनः प्रणमंति । हंसाय शुद्धाय हरये आर्तिहराय ते नमः । शुद्धत्वे हेतवः । दह्रनिलयाय हृदयाकाशनिकेताय । निरीक्षकाय । बुद्ध्यादिसाक्षिणे । कृष्णाय सदानंदरूपाय । कृषिर्भूवाचकः शब्दो णश्च निर्वृतिवाचकः ॥ तयोरैक्यं परं ब्रह्म कृष्ण इत्यभिधीयते इति निरुक्तेः । आर्तिहरत्वे हेतवः मृष्टं रुचिकरं यशो यस्य । निरुपक्रमायादिशून्याय । सद्भिः संगृह्यत इति तथा तस्मै । भवपांथो भवरूपे पथि वर्तमानस्तस्य जनस्य निजाश्रमाप्तौ स्वशरणप्राप्तौ सत्यां संसारस्यांते परीष्टा सर्वतः पूजिता उत्तमा गतिः फलं यस्तस्मै ॥ ४५ ॥

संसारपरिश्रमाला दूर करणारी जी तुझ्या चरणकमलाची छाया तीप्रत आह्मी ज्या कार्याच्या इच्छेनें प्राप्त झालों आहों तें आमचें कार्य, तूं आपण होऊनच संपादन करावेंस ॥ ४३ ॥ ह्याप्रमाणें आपली कामना पूर्ण करण्याविषयीं देवांनीं परमेश्वराची प्रार्थना केली परंतु पूर्वी आपण भक्तीचें श्रेष्ठत्व वर्णन केलें होतें ह्मणून आह्मांला भक्तीचीच इच्छा आहे अशी परमेश्वराला शंका न यावी ह्मणून आपला मनोरथ कथन करितात कीं,– हे सदानंदरूप परमेश्वरा, ज्यानें आमचीं तेजें, अस्त्रें व आयुधें गिळून टाकिलीं आहेत त्या त्रैलोक्याला ग्रासून टाकणाऱ्या वृत्रासुराचा तूं सत्वर वध करावास ॥ ४४ ॥ आतां वृत्रासुराचा शीघ्र वध व्हावा ह्मणून देव ईश्वराला पुन्हा नमस्कार करितात कीं,– हृदयाकाश हें ज्याचें निवासस्थान आहे, जो सर्व बुद्ध्यादिकांचा साक्षी आहे, जो सदानंदरूप, अनादि व शुद्ध आहे, ज्याचें यश रुचिकर आहे,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सज्जन लोक सर्वसंग परित्याग करून ज्याचा स्वीकार करितात, संसाररूप मार्गामध्यें असलेल्या जनाला ज्याचा आश्रय प्राप्त झाला असतां शेवटीं अत्यंत सुख प्राप्त होतें त्या तुज हरीला नमस्कार असो ॥ ४९ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, ह्याप्रमाणें आदरपूर्वक देवांनीं स्तुति करून संतुष्ट केलेला श्रीहरि, आपलें स्तोत्र श्रवण करून त्यांना ह्मणाला ॥ ४६ ॥ श्रीभगवान् ह्मणाला– हे सुरश्रेष्ठहो, माझ्या स्तुतीनें युक्त जें हें तुमचें ज्ञान त्याच्या योगानें मी तुह्मांस प्रसन्न झालों आहे. कारण, ज्या ज्ञानाच्या योगानें पुरुषांना माझेठिकाणीं 'मी परमात्मा संसाररहित आहें अशी' स्मृति व भक्ति प्राप्त होत्ये ॥ ४७ ॥ आतां देवांनीं पूर्वी भक्तीचें श्रेष्ठत्व वर्णन केलें होतें ह्यास्तव भगवान् भक्तांचें अभिनंदन करितो कीं,–हे सुरश्रेष्ठहो, मी प्रसन्न झालों असतां पुरुषाला दुर्लभ असें काय आहे ? कांहींच नाहीं. तथापि माझेठिकाणीं ज्याला एकनिष्ठ मति प्राप्त झाली आहे तो तत्त्ववेत्ता पुरुष, माझ्या सेवेवांचून दुसऱ्या कशाचीच इच्छा करीत नाहीं ॥ ४८ ॥ आतां तूंच होऊन आमचें कार्य सिद्धीस न्यावें अशी

अभिनंदितः संतोषितः ॥ ४६ ॥ मदीयमुपस्थानं स्तोत्रं तत्सहितया विद्यया ज्ञानेन । आत्मन ऐश्वर्यमसंसारित्वं तस्य स्मृतिर्यया । नहि विरोध उभयमित्यादिना कर्तृत्वभोक्तृत्वादेर्मायिकत्वोक्तेः भक्तिश्च यया भवति ॥ ४७ ॥ अथ ह भगवन्नित्यादिना भक्तेः सर्वोत्कर्षोक्तेर्भक्तमभिनंदति । किमिति ॥ ४८ ॥ यदुक्तं देवैः स्वयं तदुपकल्पया

श्रीशुक उवाच ॥ अथैवमीडितो राजन्सादरं त्रिदशैर्हरिः ॥ स्वमुपस्थानमाकर्ण्य प्राह तानभिनंदितः ॥४६॥ श्रीभगवानुवाच ॥ प्रीतोऽहं वः सुरश्रेष्ठा मदुपस्थानविद्यया ॥ आत्मैश्वर्यस्मृतिः पुंसां भक्तिश्चैव यया मयि ॥ ४७ ॥ किं दुरापं मयि प्रीते तथाऽपि विबुधर्षभाः ॥ मय्येकांतमतिर्नान्यन्मत्तोवांछति तत्त्ववित् ॥ ४८ ॥ न वेद कृपणः श्रेय आत्मनो गुणवस्तुदृक् ॥ तस्य तानिच्छतो यच्छेद्यदि सोऽपि तथाविधः ॥ ४९ ॥ स्वयं निःश्रेयसं विद्वान्नवक्त्यज्ञाय कर्म हि ॥ न राति रोगिणोऽपथ्यं वांछतो हि भिषक्तमः ॥ ५० ॥ मघवन्यात भद्रं वो दध्यंचमृषिसत्तमम् ॥ विद्याव्रततपःसारं गात्रं याचत मा चिरम् ॥ ५१ ॥ स वा अधिगतो दध्यङ्ङश्विभ्यां ब्रह्म निष्कलम् ॥ यद्वा अश्वशिरो नाम तयोरमरतां व्यधात् ॥ ५२ ॥

स्माकमित्यादि तत्संपादनं कृपालोर्ममानुचितमित्याशयेनाह । न वेदेति द्वाभ्याम् । गुणेषु विषयेषु तत्त्वदर्शी । तान्विषयान् । तथाविधोऽज्ञ एव ॥ ४९ ॥ कर्म न वक्ति प्रवृत्तिमार्गं न वक्ति हि । अपथ्यं यथा न राति न ददाति भिषक्तमः सद्वैद्यः ॥ ५० ॥ एवं तत्त्वकथनेनानौचित्यं परिहृत्य तदभिप्रायमनुसरन्नाह । मघवन्निति । विद्यया व्रतैस्तपसा च सारं दृढं गात्रं शरीरं याचत याचध्वम् ॥ ५१ ॥ तत्र तदीयं विद्यातिशयमाह । स वा इति द्वाभ्याम् । एवं ह्यत्र प्रसिद्धा कथा । निशम्याथर्वणं दक्षं प्रवर्ग्य-

---

जी तुह्मीं प्रार्थना केलीत त्याप्रमाणेंच करणें मज दयाळु परमेश्वराला योग्य नाहीं, असें सांगण्याच्या अभिप्रायानें ह्मणतो कीं,– विषयांचेठिकाणीं तत्त्वबुद्धि धारण करणारा कृपण पुरुष, आपलें कल्याण जाणत नाहीं व त्या विषयेच्छु अज्ञानी पुरुषाला, जर कोणी ते विषयच प्राप्त करून देईल तर तोही त्याच्यासारखाच अज्ञानी होय ॥ ४९ ॥ जसा अपथ्य पदार्थांची इच्छा करणाऱ्या रोग्याला, उत्तम वैद्य, तोच पदार्थ देत नाहीं त्याप्रमाणें स्वतः कल्याण जाणणारा ज्ञानी पुरुष, अज्ञजनाला त्या प्रवृत्तिमार्गाचा उपदेश करीत नाहीं ॥ ५० ॥ ह्याप्रमाणें तत्त्वकथनाच्या योगानें अयोग्यत्वाचा परिहार करून, आतां त्यांच्या अभिप्रायाला अनुसरून भाषण करितो कीं,– हे इंद्रा, तुमचें कल्याण असो. आतां तुह्मीं दधीचनामक श्रेष्ठऋषीजवळ जा आणि विद्या, व्रत व तप ह्यांच्या योगानें दृढ झालेल्या त्याच्या शरीराची त्याच्याजवळच याचना करा, या गोष्टीला विलंब करूं नको ॥ ५१ ॥ ह्याप्रमाणें देवांना जाण्याची आज्ञा देऊन, दधीचऋषीच्या विद्येचा उत्कर्ष त्याचे शरीराचेठिकाणीं आहे हें कथन

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करण्यासाठीं भाषण करितो कीं– हे इंद्रा, अश्वशिरस् नांवानें प्रसिद्ध असलेलें जें शुद्ध ब्रह्म तें दधीचऋषीला माहित आहे तें त्यानें अश्विनीकुमारांना उपदेशिलें व त्याच्या योगानें त्यांना जीवन्मुक्तत्व प्राप्त झालें ॥ ५२ ॥ आणि त्याचप्रमाणें त्या अथर्वणवेदी दधीच ऋषीला मत्स्वरूपी (नारायणनामक) अभेद्य कवचही माहित आहे. कारण

ब्रह्मविद्ययोः ॥ दध्यञ्चं समुपागम्य तमूचतुरथाश्विनौ ॥ भगवन्देहि नौ विद्यामिति श्रुत्वा स चाब्रवीत् ॥ कर्मण्यवस्थितोऽद्याहं पश्चाद्वाक्ष्यामि गच्छतम् ॥ तयोर्निर्गतयोरेव शक्र आगत्य तं मुनिम् ॥ उवाच भिषजोर्विद्यां मा वदीरश्विनोर्मुने ॥ यदि मद्वाक्यमुलंघ्य ब्रवीषि सहसैव ते ॥ शिरश्छिद्यां न संदेह इत्युक्त्वा स ययौ हरिः ॥ इंद्रे गते तथाऽभ्येत्य नासत्यावूचतुर्द्विजम्॥ तन्मुखादिंद्रगदितं श्रुत्वा तावूचतुः पुनः ॥ आवां तवशिरश्छित्त्वा पूर्वमश्वस्य मस्तकम्॥संधास्यावस्ततो ब्रूहि तेन विद्यां च नौ द्विज ॥ तस्मिन्निंद्रेण संछिन्ने पुनः संधाय मस्तकम् ॥ निजं ते दक्षिणां दत्त्वा गमिष्यावो यथातथम् ॥ एतच्छ्रुत्वा तथोवाच दध्याङ्ङाथर्वणस्तयोः ॥ प्रवर्ग्यं ब्रह्मविद्यां च सत्कृ-

दध्यङ्ङाथर्वणस्त्वष्ट्रे वर्माभेद्यं मदात्मकम् ॥ विश्वरूपाय यत्प्रादात्त्वष्टा यत्त्वमधास्ततः ॥ ५३ ॥ युष्मभ्यं याचितोऽश्विभ्यां धर्मज्ञोंऽगानि दास्यति ॥ ततस्तैरायुधश्रेष्ठो विश्वकर्मविनिर्मितः ॥ ५४ ॥

तोऽसत्यशंकित इति । ततश्चायमर्थः दध्यङ् निष्कलं शुद्धं ब्रह्माधिगतो ज्ञानवान् । पाठांतरे तु निष्कृतं नितरां कृतं भवति धनं येन तं प्रवर्ग्यं चाधिगतो ज्ञातवान् । ततोऽश्विभ्यां प्रादादित्युत्तरस्यानुषंगः उपदिदेशेत्यर्थः । कथं भूतं ब्रह्म । यद्वा अश्वशिरसा प्रोक्तत्वादश्वशिरो नाम प्रसिद्धम् । तयोरमरतां जीवन्मुक्तत्वं व्यधात् । तथा च श्रुतिः । अश्वस्य शीर्ष्णा प्रयदीमुवाचेति ॥ ५२ ॥ मदात्मकं वर्म श्रीनारायणकवचं चाधिगत इति पूर्वस्यानुषंगः । तत्र हेतुः । यस्मात्त्वष्ट्रे प्रादात् । किं तत् । यत्त्वष्टा विश्वरूपाय पुत्राय प्रादात् । कीदृशम् । यत्त्वं ततो विश्वरूपादधाः धृतवानसि । तदेवं विद्यया सारं गात्रं याचध्वमित्यर्थः ॥ ५३ ॥ ननु प्रेष्ठं देहं कथं दास्यति तत्राह । युष्मभ्यमंगा-

---

त्यानें तें त्वष्ट्याला दिलें, त्वष्ट्यानें आपल्या विश्वरूपनामक पुत्राला अर्पण केलें, तेंच त्या विश्वरूपापासून तूं धारण केलें आहेस, तस्मात् ह्याप्रमाणें विद्येच्या योगानें दृढ झालेल्या त्याच्या शरीराची तुह्मीं त्याच्याजवळ जाऊन याचना करा ॥ ५३ ॥ आतां, अत्यंत प्रिय असा आपला देह, तो आह्मांला कसा देईल, असें ह्मणाल तर– हे देवेंद्रा, तो धर्मज्ञ असल्यामुळें याचना केली असतां तो तुह्मांला, त्यांत विशेषतः अश्विनीकुमारांना आपल्या अस्थि देईलच. नंतर त्यांच्या योगानें विश्वकर्म्यानें निर्माण केलेलें

---

१ याविषयीं अशी कथा आहे कीं,– दधीच ऋषीला प्रवर्ग्याचें (यज्ञांतील महावीर नांवांच्या एका कर्माचें) व ब्रह्मविद्येचें उत्कृष्ट ज्ञान आहे, असें अश्विनीकुमारांना समजल्या वरून ते एकेवेळीं त्याच्या जवळ आले आणि ह्मणाले कीं, हे दधीचऋषे, तूं आह्मांस त्या दोन्ही विद्यांचा उपदेश कर. तेव्हां तो ह्मणाला कीं,– या वेळीं मी आपल्या नित्याच्या कर्मास आरंभ केला आहे ह्मणून तुह्मी आतां जाऊन मग या, ह्मणजे मी तुह्मांस त्या विद्या सांगेन. तें ऐकून अश्विनीकुमार निघून गेले असतां, त्या ऋषीजवळ इंद्र येऊन ह्मणाला कीं, हे मुने, अश्विनीकुमार वैद्य आहेत, ह्मणून त्यांना तूं ब्रह्मविद्येचा उपदेश करूं नकोस. या माझ्या वचनाचा अनादर करून जर तूं त्यांना ब्रह्मविद्या सांगितलीस तर मी तुझा शिरच्छेद करीन. असें सांगून इंद्र तेथून निघून गेल्यावर पुन्हा अश्विनीकुमार येऊन ह्मणाले कीं,– हे ऋषे, आतां आह्मांस ब्रह्मविद्या सांग. तेव्हां त्यानें, इंद्राचें भाषण त्यांस कळविलें. तें ऐकून ते ह्मणाले कीं, आह्मी प्रथमच तुझें मस्तक तोडून ठेऊन तुझ्या धडाला दुसरें घोड्याचें मस्तक लाऊन तुला संजीवन करितों, मग त्या शिराच्या योगानें तूं आह्मांस विद्या सांग. इंद्रानें तें तुझें (घोड्याचें) मस्तक तोडून नेलें ह्मणजे पुन्हा आह्मी तुझें मस्तक तुला लावून संजीवन करून गुरुदक्षिणा देऊन निघून जाऊं. हें ऐकून असत्याची भीति बाळगणाऱ्या त्यानें तशा रीतीनें [घोड्याच्या मस्तकानें] त्या अश्विनीकुमारांना प्रवर्ग्याचा व ब्रह्मविद्येचा उपदेश केला ह्मणून त्या विद्येला अश्वशिरस् असें नांव पडलें आहे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

एक वज्रनामक श्रेष्ठ आयुध तयार होईल ॥ ५४ ॥ नंतर माझ्या तेजानें संवर्धित झालेला असा तूं, त्या वज्राच्या योगानें वृत्रासुराचें शिर हरण करिशील आणि त्याचा वध झाला ह्मणजे पुन्हा तुह्मांला तेज, अस्त्रें आयुधें आणि संपत्ति हीं सर्व प्राप्त होतील. तस्मात् हे देवहो, मोठा देह धारण करणारा तो त्रैलोक्यभक्षक वृत्रासुर आमचा वध करील असें तुह्मी मनांत आणूं नको. कारण, मजविषयीं तत्पर असलेल्या पुरुषांची कोणीहि हिंसा करीत नाहीं; ह्याकरितां तुमचें कल्याणच होईल ॥ ५५ ॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील षष्ठस्कंधापैकीं इंद्रानुग्रहनिरूपणनामक हा नववा अध्याय समाप्त झाला ॥ ९ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां या दहाव्या अध्यायामध्यें भगवंताच्या आज्ञेवरून दधीचऋषीच्या अस्थींचें वज्र धारण करणाऱ्या व देवांनीं युक्त अशा इंद्रानें, असुरांनीं युक्त अशा वृत्रासुराशीं युद्ध

न्यस्थीनि याचितः सन् दास्यति यतो धर्मज्ञः। विशेषतोऽश्विभ्यां शिष्यप्रीत्या दास्यति। अस्थीनीत्यनेन हेयत्वं दर्शितम्। तैरस्थिभिर्विश्वकर्मणा विनिर्मितं आयुधश्रेष्ठो वज्रो भविष्यतीति शेषः ॥ ५४ ॥ येन भवान्वृत्रशिरो हर्ता हरिष्यति मम तेजसा उपबृंहितः सन्। तेजश्चास्त्राणि चायुधानि च संपदश्च भूयः प्राप्स्यथ। महाकायस्त्रिभुवनग्रासी स एवास्मान् हन्यादिति शंकाकुलचित्तान्प्रत्याह। मत्परांश्च केऽपि न हिंसंत्यतो युष्माकं भद्रमेवेति ॥ ५५ ॥ इति षष्ठस्कंधे टीकायां नवमोऽध्यायः ॥ ९ ॥ ॥

येन वृत्रशिरो हर्ता मत्तेजउपबृंहितः ॥ तस्मिन्विनिहते यूयं तेजोऽस्त्रायुधसंपदः ॥ भूयः प्राप्स्यथ भद्रं वो न हिंसंति च मत्परान् ॥ ५५ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे षष्ठस्कंधे नवमोऽध्यायः ॥ ९ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ इंद्रमेवं समादिश्य भगवान्विश्वभावनः ॥ पश्यतामनिमेषाणां तत्रैवांतर्दधे हरिः ॥ १ ॥ तथाऽभियाचितो देवैर्ऋषिराथर्वणो महान् ॥ मोदमान उवाचेदं प्रहसन्निव भारत ॥ २ ॥ अपि वृंदारका यूयं न जानीथ शरीरिणाम् ॥ संस्थायां यस्त्वभिद्रोहो दुःसहश्चेतनापहः ॥ ३ ॥ जिजीविषूणां जीवानामात्मा प्रेष्ठ इहेप्सितः ॥ क उत्सहेत तं दातुं भिक्षमाणाय विष्णवे ॥ ४ ॥

दशमे केशवादिष्टध्यङ्ङस्थिजवज्रधृत् ॥ इंद्रोऽयुध्यत वृत्रेण सासुरेण सनिर्जरः ॥ १ ॥ १ ॥ मोदमान एव तन्मुखाद्धर्मं श्रोतुकामः प्रत्याचक्षाण इवोवाच। अपीति द्वाभ्याम् ॥ २ ॥ हे वृंदारका अपि किं संस्थायां मृत्यौ योऽभिद्रोहो दुःखं तं न जानीथ ॥ ३ ॥ आत्मा देहः वयं जानीम एव किंतु श्रीविष्णुरस्मन्मुखेन याचत इति चेत्त-

---

केलें अशी कथा वर्णन केली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे परीक्षित् राजा, ह्याप्रमाणें इंद्राला सांगून भगवान् विश्वपालक श्रीहरि, सर्व देव पाहत असतां तेथेंच गुप्त झाला ॥ १ ॥ हे भरतकुलोत्पन्ना राजा, इकडे भगवंतानें सांगितल्याप्रमाणें देवांनीं त्या अथर्वण वेदी महर्षि दधीचीजवळ जाऊन याचना केली असतां, तो आनंदित झाला आणि त्या देवांच्या मुखांतून धर्म श्रवण करण्याच्या इच्छेनें त्यांचें मागणें अमान्य करीत आहे कीं काय असें दर्शवीत ह्मणाला कीं,— ॥ २ ॥ हे देवहो, तुह्मी सत्वगुणात्मक असल्यामुळें इंद्रियांच्या देवता असतांहि शरीर धारण करणाऱ्या प्राण्यांना अंतकाळीं मूर्छा उत्पन्न करणारें दुःसह जें दुःख प्राप्त होतें ते जाणत नाहीं काय? ॥ ३ ॥ आतां 'तें दुःख आह्मीं जाणतोंच; परंतु, आमच्या द्वारानें श्रीविष्णूच याचना करीत आहे' असें ह्मणाल तर— देवहो, जगण्याची इच्छा करणाऱ्या जीवांना इहलोकीं जो देह अत्यंत प्रिय आहे, तो त्याची याचना करणाऱ्या विष्णूलासुद्धां देण्यास कोण बरें उत्साह पावेल? कोणीहि पावणार नाहीं ॥ ४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

देव ह्मणाले– हे ब्रह्मनिष्ठा, ज्यांचीं कर्में सत्कीर्तिमान् लोकांनींहि वर्णनीय आहेत त्या तुह्मांसारिख्या प्राणिमात्रांवर दया करणाऱ्या महापुरुषांना त्याग करण्यास अशक्य अशी वस्तु कोणती बरें आहे? कोणतीच नाहीं ॥५॥ हे ऋषे, स्वार्थाविषयीं तत्पर असलेल्या लोकांना दुसऱ्याचें संकट खरोखर समजत नाहीं. जर समजेल तर ते याचनाच करणार नाहींत. तसेंच ज्याच्याजवळ याचना केली तो जर देण्यास समर्थ असेल तर व दुसऱ्याचें संकट जाणणारा असेल तर, नाहीं असें कधींच ह्मणणार नाहीं. यास्तव ज्याप्रमाणें आह्मीं स्वार्थनिष्ठ असल्यामुळें तुझें संकट जाणत नाहीं त्याप्रमाणें आमची प्रार्थना अमान्य करणारा तूंहि आमचें संकट जाणत नाहींस ॥ ६ ॥ ऋषि ह्मणाला– हे देवहो, तुमच्या मुखांतून धर्म श्रवण करण्याच्या इच्छेनेंच खरोखर मी तुह्मांला नाहीं असें ह्मटलें आहे, तस्मात् आतां हा मी, कधींतरी मला सोडूनच जाणाऱ्या प्रिय अस-

---

त्राह। याचते विष्णवेऽपि दातुं क उत्सहेत ॥ ४ ॥ पुण्यश्लोकैरीड्यानि कर्माणि येषाम् ॥ ५ ॥ याचको यदि वेद तर्हि न याचेत यदीश्वरो दानसमर्थश्चेत्तर्हि सोऽपि नेति नाह। अतो यथा तव संकटं स्वार्थपरा वयं न जानीम एवं प्रत्याचक्षाणस्त्वमस्मत्संकटं न जानासीति भावः ॥ ६ ॥ मे मया प्रत्युदाहृताः प्रत्युक्ताः मां त्यजंतं त्यक्त्वा

देवा ऊचुः ॥ किं नु तद्दुस्त्यजं ब्रह्मन्पुंसां भूतानुकंपिनाम् ॥ भवद्विधानां महतां पुण्यश्लोकेड्यकर्मणाम् ॥ ५ ॥ ननु स्वार्थपरो लोको न वेद परसंकटम् ॥ यदि वेद न याचेत नेति नाह यदीश्वरः ॥ ६ ॥ ऋषिरुवाच ॥ धर्मं वः श्रोतुकामेन यूयं मे प्रत्युदाहृताः ॥ एष वः प्रियमात्मानं त्यजंतं संत्यजाम्यहम् ॥ ७ ॥ योऽध्रुवेणात्मना नाथा न धर्मं न यशः पुमान् ॥ ईहेत भूतदयया स शोच्यः स्थावरैरपि ॥ ८ ॥ एतावानव्ययो धर्मः पुण्यश्लोकैरुपासितः ॥ यो भूतशोकहर्षाभ्यामात्मा शोचति हृष्यति ॥ ९ ॥ अहो दैन्यमहो कष्टं पारक्यैः क्षणभंगुरैः ॥ यन्नोपकुर्यादस्वार्थैर्मर्त्यः स्वज्ञातिविग्रहैः ॥ १० ॥ श्रीशुक उवाच ॥ एवं कृतव्यवसितो दध्यङ्ङाथर्वणस्तनुम् ॥ परे भगवति ब्रह्मण्यात्मानं संनयन् जहौ ॥ ११ ॥

यांतमात्मानं देहम् ॥ ७ ॥ अध्रुवेणात्मना देहेन हे नाथाः ॥ ८ ॥ भूतानां शोकेन शोचति हर्षेण हृष्यति य आत्मा स्वयं तस्य यो धर्मः एतावानेवाव्यय इत्यर्थः ॥ ९ ॥ पारक्यैः श्वसृगालादिभक्ष्यैः अस्वार्थैरात्मोपयोगशून्यैः स्वं वित्तम्। ज्ञातयः पुत्रादयः। विग्रहो देहः। तैर्नोपकुर्यादिति यत् ॥ १० ॥ कृतं व्यवसितं निश्चयो येन। आ-

---

लेल्याहि देहाचा तुमच्याकरितां त्याग करितों ॥ ७ ॥ हे नाथहो, जो पुरुष, भूतांच्या दयेनें आपल्या अनित्य देहाच्या योगानें धर्म किंवा कीर्ति ह्यांपैकीं कांहींच संपादन करण्यास इच्छित नाहीं त्याचा, वृक्षादिस्थावरगणही खेद करीत असतात ह्मणजे तो त्यांपेक्षांहि जड होय ॥ ८ ॥ यास्तव प्राण्यांनां दुःख झालें असतां ज्याला स्वतःला दुःख होतें व त्यांना हर्ष झाला असतां ज्याला हर्ष होतो, त्या पुरुषाचा जो धर्म तोच अक्षय धर्म होय. कारण, सत्कीर्तिमान् लोकांनीं त्याच धर्माचें सेवन केलें आहे. ॥ ९ ॥ अरेरे? ज्यांचा आपल्या स्वतःकरितां तिळमात्रही उपयोग होत नाहीं, ज्यांना कोल्हीं कुत्रीं खाऊन टाकणार व ज्यांचा एक क्षणभरही भरंवसा नाहीं त्या द्रव्य, पुत्रादिक बांधव आणि देह ह्यांच्या योगानें मर्त्यजनानें कोणावरही उपकार न करणें ही कीतितरी दैन्याची व दुःखाची गोष्ट आहे! ॥ १० ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे परीक्षित् राजा, ह्याप्रमाणें निश्चय केलेल्या त्या अथर्वणवेदी दधीच ऋषीनें, परब्रह्मरूप भगवंताचेठिकाणीं आपल्या जीवाचें एकीकरण करून देहाचा त्याग केला ॥ ११ ॥ ॥ ३४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तो असा कीं, ज्यानें इंद्रियें, प्राण, मन व बुद्धि ह्यांचें संयमन केलें आहे आणि ज्याचीं बंधनें तुटून गेलीं आहेत अशा त्या तत्त्वदर्शी मुनीनें उत्तम समाधीचा स्वीकार केला, त्या वेळीं देह पडला हेंसुद्धां त्याला समजलें नाहीं ॥ १२ ॥ नंतर, भगवंताच्या तेजानें युक्त झाल्यामुळें जो महाबलाढ्य झाला आहे, ज्याच्या सभोंवतीं सर्व देवगण आहेत व ज्याची मुनिगण स्तुति करीत आहेत असा तो इंद्र, विश्वकर्म्यानें दधीचऋषीच्या अस्थींनीं निर्माण केलेलें वज्र धारण करून, त्रैलोक्याला हर्ष उत्पन्न करीत होत्साता, ऐरावतावर आरूढ होऊन शोभूं लागला ॥ १३ ॥ १४ ॥ आणि हे राजा, ज्याप्रमाणें प्रलयकालीं क्रुद्ध झालेला रुद्र, यमाला मारण्याकरितां त्याच्या अंगावर धांवून जातो त्याप्रमाणें असुरसेनापतींनीं परिवेष्टित असलेल्या वृत्रासुराचा वध करण्याकरितां तो इंद्र, वेगानें त्याच्या अंगावर धावून गेला ॥ १५ ॥ नंतर वैवस्वतमन्वंतराच्या

त्मानं क्षेत्रज्ञं सन्नयन्नेकीकुर्वंस्तनुं जहौ ॥ ११ ॥ यता अक्षादयो येन । तत्त्वं पश्यतीति तथा । ध्वस्तानि बंधनानि यस्य ॥ १२ ॥ अथेंद्रोऽशोभतेत्युत्तरेणान्वयः । मुनेः शुक्तिभिरस्थिभिर्निर्मितम् । उत्सिक्त ऊर्जितः । मुनेरस्थिभिरिति वा पाठः ॥ १३ ॥ १४ ॥ असुरानीकानां यूथपैः पर्यस्तं परिवृतम् ॥ १५ ॥ रणः संग्रामः । प्रथमे चतुर्युगे

यताक्षासुमनोबुद्धिस्तत्त्वदृग्ध्वस्तबंधनः ॥ आस्थितः परमं योगं न देहं बुबुधे गतम् ॥ १२ ॥ अथेंद्रो वज्रमुद्यम्य निर्मितं विश्वकर्मणा ॥ मुनेः शुक्तिभिरुत्सिक्तो भगवत्तेजसान्वितः ॥ १३ ॥ वृतो देवगणैः सर्वैर्गजेंद्रोपर्यशोभत ॥ स्तूयमानो मुनिगणैस्त्रैलोक्यं हर्षयन्निव ॥ १४ ॥ वृत्रमभ्यद्रवच्छेत्तुमसुरानीकयूथपैः ॥ पर्यस्तमोजसा राजन्क्रुद्धो रुद्र इवांतकम् ॥ १५ ॥ ततः सुराणामसुरैः रणः परमदारुणः ॥ त्रेतामुखे नर्मदायामभवत्प्रथमे युगे ॥ १६ ॥ रुद्रैर्वसुभिरादित्यैरश्विभ्यां पितृवह्निभिः ॥ मरुद्भिर्ऋभुभिः साध्यैर्विश्वेदेवैर्मरुत्पतिम् ॥ १७ ॥ दृष्ट्वा वज्रधरं शक्रं रोचमानं स्वमायया ॥ नामृष्यन्नसुरा राजन्मृधे वृत्रपुरःसराः ॥ १८ ॥ नमुचिः शंबरोऽनर्वा द्विमूर्धा ऋषभोऽंबरः ॥ हयग्रीवः शंकुशिरा विप्रचित्तिरयोमुखः ॥ १९ ॥ पुलोमा वृषपर्वा च प्रहेतिर्हेतिरुत्कलः ॥ दैतेया दानवा यक्षा रक्षांसि च सहस्रशः ॥ २० ॥ सुमालिमालिप्रमुखाः कार्तस्वरपरिच्छदाः ॥ प्रतिषिद्ध्येंद्रसेनाग्र्यं मृत्योरपि दुरासदम् ॥ २१ ॥ अभ्यर्दयन्नसंभ्रांताः सिंहनादेन दुर्मदाः ॥ गदाभिः परिघैर्बाणैः प्रासमुद्गरतोमरैः ॥ २२ ॥ शूलैः परश्वधैः खड्गैः शतघ्नीभिर्भुशुंडिभिः ॥ सर्वतोऽवाकिरन् शस्त्रैरस्त्रैश्च विबुधर्षभान् ॥ २३ ॥

त्रेतायुगस्य मुखे आरंभे ॥ १६ ॥ १७ ॥ नामृष्यन्नासहंत ॥ १८ ॥ १९ ॥ २० ॥ २१ ॥ २२ ॥ शतघ्नी च चतुर्हस्ता लोहकंटकसंचिता ॥ भुशुंडी सर्वतो लोहकंटका-

---

प्रारंभीं पहिल्यानेंच सुरू झालेल्या चार युगांमध्यें त्रेतायुगाच्या आरंभीं नर्मदेचे तीरीं देवांचा असुरांसहवर्तमान अतिभयंकर संग्राम झाला ॥ १६ ॥ यामध्यें हे राजा, रुद्र, अष्टवसु, द्वादशादित्य अश्विनीकुमार, अर्यमादि पितर, अग्नि, मरुद्गण, ऋभुसंज्ञक व साध्यसंज्ञक देव आणि विश्वेदेव ह्यांच्या योगानें व स्वतःच्या मायेनें शोभत असलेल्या वज्रधारी देवाधिपति इंद्राला, युद्धामध्यें अवलोकन करून, वृत्रासुरप्रभृति दैत्यांस त्याचा उत्कर्ष सहन झाला नाहीं ॥ १७ ॥ १८ ॥ ह्याकरितां नमुचि, शंबर, अनर्वा, ऋषभ, अंबर, हयग्रीव, शंकुशिरा, विप्रचित्ति, अयोमुख, पुलोमा, वृषपर्वा, प्रहेति, हेति व उत्कल इत्यादि दैत्य, दानव, यक्ष, व हजारो राक्षस आणि सुमाली व माली हे ज्यामध्यें प्रमुख आहेत व सुवर्णाचे अलंकार ज्यांनीं धारण केले आहेत असे वृत्रासुराकडील दुर्मद व निर्भय असे दैत्य, प्रत्यक्ष मृत्यूलाही दुःसह अशा इंद्रसैन्याच्या अग्रेसरांचें सिंहासारिख्या गर्जनेनें निवारण करून, त्यांना पीडा देऊं लागले आणि गदा, परिघ, बाण, प्रास, मुद्गर, तोमर, शूल, परशु, खड्ग, शतघ्नी आणि भुशुंडी

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

इत्यादि शस्त्रास्त्रांनीं ते असुर सुरश्रेष्ठावर चोहोंकडून वृष्टि करूं लागले ॥ १९ ॥ २० ॥ २१ ॥ २२ ॥ २३ ॥ हे राजा, एका बाणाच्या पिसाऱ्याला दुसऱ्या बाणाचा पिसारा लागून राहील अशा रीतीनें सोडलेल्या बाणजालांनीं आसमंतात् आच्छादित झालेले ते देव आकाशांतील मेघांनीं आच्छादित झालेल्या नक्षत्रांप्रमाणें दिसेनासे झाले ॥ २४ ॥ हे राजा, ते शस्त्रास्त्रवृष्टींचे ओघ, शीघ्र वेध करणाऱ्या देवांनीं अंतरिक्षामध्येंच हजारोठिकाणीं छेदून टाकिल्यामुळें देवसैनिकांना येऊन लागले नाहींत ॥ २५ ॥ नंतर ज्यांचे सर्व शस्त्रास्त्रांचे समुदाय क्षीण झाले आहेत असे ते असुर, पर्वतशिखरें, वृक्ष व पाषाण ह्यांच्या योगानें देवसैन्यावर वृष्टि करूं लागले परंतु त्या गिरिशिखरादिकांचेही पूर्वीप्रमाणेंच देवांनीं तुकडे तुकडे केले ॥ २६ ॥ हे राजा, नंतर वृत्रासुर ज्यांचा स्वामी आहे असे ते असुर, आपल्या शस्त्रास्त्रसमुदायांनीं त्या

नुक्रमोन्नतेत्यभिधानम् ॥ २३ ॥ पुंखो मूलदेशः । एकस्य मूलदेशमनु तत्संलग्नोऽपरस्य पुंखो यथा भवति तथा नभस्थैर्घनैर्ज्योतींषीवेत्यनेन तेषां तदप्राप्तिः सूचिता ॥ २४ ॥ तामेवाह । न त इति । शस्त्राणामस्त्राणां च यानि वर्षाणि तेषामोघाः नाऽऽसेदुर्न प्रापुः । सिद्धपथे आकाशे ॥ २५ ॥ क्षीणा अस्त्राणां च ओघा येषाम् । गिरिशृंगैर्द्रुमैरुपलैश्च ॥ २६ ॥ तानिंद्रसैनिकान् शस्त्राणामस्त्राणां च पूगैः समूहैरक्षतान् क्षतशून्यान्स्वस्तिमतः सुखिनो द्रुमादिभिश्चाविक्षतान्निशाम्य दृष्ट्वा । वृत्रो नाथो येषां ते तत्रसुर्भीताः ॥ २७ ॥

न तेऽदृश्यंत संछन्नाः शरजालैः समंततः ॥ पुंखानुपुंखपतितैर्ज्योतींषीव नभोघनैः ॥ २४ ॥ न ते शस्त्रास्त्रवर्षौघा ह्यासेदुः सुरसैनिकान् ॥ छिन्नाः सिद्धपथे देवैर्लघुहस्तैः सहस्रधा ॥ २५ ॥ अथ क्षीणास्त्रशस्त्रौघा गिरिशृंगद्रुमोपलैः ॥ अभ्यवर्षन्सुरबलं चिच्छिदुस्तांश्च पूर्ववत् ॥ २६ ॥ तानक्षतान्स्वस्तिमतो निशाम्य शस्त्रास्त्रपूगैरथ वृत्रनाथाः ॥ द्रुमैर्दृषद्भिर्विविधाद्रिशृंगैरविक्षतांस्तत्रसुरिंद्रसैनिकान् ॥ २७ ॥ सर्वे प्रयासा अभवन्विमोघाः कृताःकृता देवगणेषु दैत्यैः ॥ कृष्णानुकूलेषु यथा महत्सु क्षुद्रैः प्रयुक्ता रुशती रूक्षवाचः ॥ २८ ॥ ते स्वप्रयासं वितथं निरीक्ष्य हरावभक्ता हतयुद्धदर्पाः ॥ पलायनायाजिमुखे विसृज्य पतिं मनस्ते दधुरात्तसाराः ॥ २९ ॥ वृत्रोऽसुरांस्ताननुगान्मनस्वी प्रधावतः प्रेक्ष्य बभाष एतत् ॥ पलायितं प्रेक्ष्य बलं च भग्नं भयेन तीव्रेण विहस्य वीरः ॥ ३० ॥

कृताःकृताः पुनःपुनः कृताः । कृष्णोऽनुकूलो येषां तेषु देवगणेषु । रुशतीः रुशत्यः । अकल्याण्यो रूक्षाः परुषा वाचो यथा महत्सु क्षोभकर्त्र्यो न भवंति तद्वत् ॥ २८ ॥ हतो युद्धे दर्पो येषां ते । आत्तः परैर्गृहीतः सारो धैर्यं येषां ते अतिप्रसिद्धा अपि ते दैत्याः एवं ते इत्यस्यापौनरुक्त्यम् । आजिमुखे युद्धारंभे पतिं विसृज्य पलायनाय मनो दधुः । यतो हरावभक्ताः ॥ २९ ॥ प्रधावतः पलायमानान्प्रेक्ष्य आदावेव तीव्रेण भयेन पलायितं भग्नं च तद्बलं सैन्यं तच्च प्रेक्ष्य एतद्वक्ष्यमाणं बभाषे ॥ ३० ॥

इंद्राच्या सेनेंतील लोकांना कांहीं जखमसुद्धां न होतां ते सुखरूप आहेत आणि वृक्ष, पाषाण व अनेक प्रकारचीं पर्वतशिखरें ह्यांच्या योगानेंही त्यांना कांहींच इजा झाली नाहीं असें अवलोकन करून भयभीत झाले ॥ २७ ॥ सारांश— जशीं सत्पुरुषांचेठिकाणीं दुर्जनांनीं योजिलेलीं निंदापर कठोर भाषणें व्यर्थ होतात म्हणजे त्यांना क्षोभ उत्पन्न करित नाहींत त्याप्रमाणें कृष्ण परमात्मा अनुकूल असलेल्या त्या देवगणांचेठिकाणीं दैत्यांनीं पुन्हापुन्हा त्यांच्या नाशाविषयीं केलेले सर्व प्रयत्न व्यर्थ झाले ॥ २८ ॥ नंतर श्रीहरीचे भक्त नसल्यामुळें ज्यांचें धैर्य शत्रूंनीं हरण केलें आहे व युद्धाविषयींचा ज्यांचा गर्व नष्ट झाला आहे अशा त्या जगद्विख्यात असुरांनीं आपले प्रयत्न व्यर्थ झाले असें पाहून युद्धारंभीं व आपल्या अधिपतीचा त्याग करून पलायन करण्याचें मनांत आणिलें व त्याप्रमाणें पलायन करूं लागले ॥ २९ ॥ त्या वेळीं पलायन करीत असलेल्या आपल्या अनुयायी असुरांना व मोठ्या भयानें पळत सुटलेलें व अस्ताव्यस्त झालेलें तें सैन्य अवलोकन करून तो पुरुषश्रेष्ठ महापराक्रमी

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

धैर्यवान् वृत्रासुर हास्य करून धैर्यवान् लोकांना मनोहर वाटणारें असें हें समयोचित भाषण करूं लागला. हे विप्रचित्ते, हे नमुचे, हे पुलोमन् हे मय, हे अनर्वन् आणि हे
शंबर तुह्मी माझें भाषण श्रवण करा ॥ ३० ॥ ३१ ॥ अहो शूरपुरुषहो, जो प्राणी उत्पन्न झाला आहे त्याला सर्वठिकाणीं मृत्यु हा निःसंशय येणारच आहे. कारण, या
संसारमार्गामध्यें मृत्यूच्या निवृत्तीचा उपाय ईश्वरानें निर्माण केलाच नाहीं. तस्मात् ह्याच्यापासून अनायासानें जर इहलोकीं यश आणि परलोकीं स्वर्ग हे प्राप्त होत अस-
तील तर ह्या प्राप्त झालेल्या योग्य मृत्यूचा कोण बरें स्वीकार करणार नाहीं ? सर्वही करतीलच ॥ ३२ ॥ कारण, योगमार्गामध्यें प्रवृत्त होऊन व इंद्रियदमन करून ब्र-
ह्मचिंतनानें देहाचा त्याग करणें आणि रणभूमीचेठिकाणीं अग्रेसर होऊन माघारा न फिरतां देहत्याग करणें, असे हे दोन प्रकारचे मृत्यूच या लोकीं शास्त्रसंमत असून

तदेव विशिनष्टि । कालोपपन्नामवसरोचितां मनस्विनां रुचिरां हे मय हे अनर्वन् मे वाचं शृणुत ॥ ३१ ॥ ततो मृत्योरिह यशो लोकः स्वर्गश्च यदि स्यात् । अथ तर्हि । अ-
मुं मृत्युं युक्तं समीचीनं प्राप्तं वा ॥ ३२ ॥ ब्रह्मसंधारणया कलेवरं जह्यादिति यत्स एको मृत्युः वीरशये रणभूमावनिवृत्तोऽपराङ्मुखः सन् जह्यादिति यत्स एकः । तौ द्वाविह
शास्त्रे संमतौ मृत्यू । तथा च स्मृतिः । द्वाविमौ पुरुषौ लोके सूर्यमंडलभेदिनौ ॥ परिव्राड्योगयुक्तश्च रणे चाभिमुखो हत इति ॥ ३३ ॥ इति षष्ठस्कंधे टीकायां दशमो-

कालोपपन्नां रुचिरां मनस्विनामुवाच वाचं पुरुषप्रवीरः ॥ हे विप्रचित्ते नमुचे पुलोमन्मयानर्वन् शंबर मे शृणुध्वम् ॥ ३१ ॥ जा-
तस्य मृत्युर्ध्रुव एष सर्वतः प्रतिक्रिया यस्य न चेह कॢप्ता ॥ लोको यशश्चाथ ततो यदि ह्यमुं को नाम मृत्युं न वृणीत युक्तम्
॥ ३२ ॥ द्वौ संमताविह मृत्यू दुरापौ यद्ब्रह्मसंधारणया जितासुः ॥ कलेवरं योगरतो विजह्याद्यदग्रणीर्वीरशयेऽनिवृत्तः ॥ ३३ ॥
इति श्रीमद्भागवते महापुराणे षष्ठस्कंधे दशमोऽध्यायः ॥ १० ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ त एवं शंसतो धर्मं वचः पत्युरचेतसः ॥ नै-
वागृह्णन्भयत्रस्ताः पलायनपरा नृप ॥ १ ॥ विशीर्यमाणां पृतनामासुरीमसुरर्षभः ॥ कालानुकूलैस्त्रिदशैः काल्यमानामनाथवत्
॥ २ ॥ दृष्ट्वाऽतप्यत संक्रुद्ध इंद्रशत्रुरमर्षितः ॥ तान्निवार्यौजसा राजन्निर्भर्त्स्येदमुवाच ह ॥ ३ ॥ किं व उच्चरितैर्मातुर्धावद्भिः पृष्ठतो
हतैः ॥ न हि भीतवधः श्लाघ्यो न स्वर्ग्यः शूरमानिनाम् ॥ ४ ॥

ऽध्यायः ॥ १० ॥ ॥ एकादशे तु वृत्रस्य युध्यमानस्य वज्रिणा ॥ भक्तिज्ञानबलोदर्काश्चित्रा वाचोऽनुवर्णिताः ॥ १ ॥ शंसतः कथयतः पत्युर्वचः ॥ १ ॥ का-
लानुकूलैः कालानुवर्तिभिः । काल्यमानां विद्राव्यमाणाम् ॥ २ ॥ अमर्षितोऽसहमानस्तांस्त्रिदशान्निवार्य निर्भर्त्स्य चेदं वक्ष्यमाणमुवाच ॥ ३ ॥ तदेवाह द्वाभ्याम् । मातुरु-

खरोखर दुर्लभ आहेत ॥ ३३ ॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील षष्ठस्कंधापैकीं दहावा अध्याय समाप्त झाला ॥ १० ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥
आतां या अकराव्या अध्यायामध्यें, इंद्रासहवर्तमान युद्ध करणाऱ्या वृत्रासुराची भक्ति, ज्ञान व बल ह्यांमध्यें पर्यवसान असलेलीं मनोहर भाषणें वर्णन केलीं आहेत ॥ १ ॥
श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, ह्याप्रमाणें तो दैत्याधिपति वृत्रासुर धर्मकथन करीत असतांही भयभीत झाल्यामुळें अंतःकरण व्याकुल होऊन पळत सुटलेल्या त्या
असुरांनीं तें त्या आपल्या प्रभूचें भाषण श्रवण केलें नाहीं ॥ १ ॥ हे राजा, कालानुसार वर्तन करणाऱ्या देवांनीं पळविलेली ती दैत्यांची सेना, अनाथाप्रमाणें अस्ता-
व्यस्त होत आहे असें अवलोकन करून, देवांचा पराक्रम सहन न करणारा तो इंद्रशत्रु असुरश्रेष्ठ वृत्रासुर, अत्यंत क्रुद्ध होऊन संतप्त झाला, आणि बलात्कारानें त्या
देवांचें निवारण करून निर्भर्त्सनापूर्वक असें ह्मणाला की,– ॥ २ ॥ ३ ॥ अहो, मातेच्या उदरांतून विष्ठेप्रमाणें बाहेर निघालेल्या आणि संग्रामांतून पळत सुटलेल्या दै-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्यांना पृष्ठभागीं धांवून ताडण करणाऱ्या तुह्मांस काय बरें फल प्राप्त होणार आहे ? यश किंवा धर्म यांपैकीं कांहींच प्राप्त होणार नाहीं. कारण, आपणास शूर मानणाऱ्या पुरुषांना, भयभीत झालेल्या पुरुषांचा वध करणें हें या लोकीं स्तुत्य नाहीं व परलोकीं स्वर्गाची प्राप्ति करून देणारेंहि नाहीं ॥ ४ ॥ तस्मात् हे क्षुद्रहो, जर तुह्मांला संग्रामाची हौस असेल, अथवा तुमच्या हृदयामध्यें धैर्य असेल आणि विषयसुखाविषयीं इच्छा नसेल तर एकक्षणभर माझ्या अग्रभागीं उभे रहा ॥ ५ ॥ हे राजा, ह्याप्रमाणें भाषण करून शरीराच्या योगानें आपल्या देवगण शत्रूंना भयभीत करणाऱ्या त्या महाबलिष्ठ वृत्रासुरानें अशी मोठी गर्जना केली कीं, तिच्या योगानें सर्व प्राणी निश्चेष्ट झाले ॥ ६ ॥ आणि त्या वृत्रासुराच्या गर्जनेनें व त्यानें केलेल्या बाहुताडणाच्या नादानें सर्व देवगण, वज्रानें ताडित झाल्याप्रमाणें मूर्छित होऊन भूमीवर पडले ॥ ७ ॥ ते समयीं ज्याप्रमाणें मदोन्मत्त गज, देवनळांच्या वनाचें मर्दन करितो त्याप्रमाणें रणभूमीवर मदोन्मत्त झालेला वृत्रासुर, हस्तामध्यें शूल धा-

---

चरितैः पुरीषप्रायैः । प्रथमांतपाठे देवानां संबोधनम् । पृष्ठतो हतैर्दैत्यैः किंचित् । न यशो नापि धर्मः । तदेवाह । न हीति ॥ ४ ॥ प्रधने संग्रामे । सारं धैर्यं हृदि चेत्तर्हि हे क्षुल्लकाः क्षुद्राः मात्रं क्षणमात्रमग्रे तिष्ठत । न चेदिह लोकभोगे स्पृहाऽस्ति ॥ ५ ॥ सुरगणान् रिपून् । सुमहान्प्राणो बलं यस्य । येन विचेतसो बभूवुः ॥ ६ ॥ वृत्रस्य

यदि वः प्रधने श्रद्धा सारं वा क्षुल्लका हृदि ॥ अग्रे तिष्ठत मात्रं मे न चेद्ग्राम्यसुखे स्पृहा ॥ ५ ॥ एवं सुरगणान्क्रुद्धो भीषयन्वपुषा रिपून् ॥ व्यनदत्सुमहाप्राणो येन लोका विचेतसः ॥ ६ ॥ तेन देवगणाः सर्वे वृत्रविस्फोटनेन वै ॥ निपेतुर्मूर्छिता भूमौ यथैवाशनिना हताः ॥ ७ ॥ ममर्द पद्भ्यां सुरसैन्यमातुरं निमीलिताक्षं रणरंगदुर्मदः ॥ गां कंपयन्नुद्यतशूल ओजसा नालं वनं यूथपतिर्यथोन्मदः ॥ ८ ॥ विलोक्य तं वज्रधरोऽत्यमर्षितः स्वशत्रवेऽभिद्रवते महागदाम् ॥ चिक्षेप तामापततीं सुदुःसहां जग्राह वामेन करेण लीलया ॥ ९ ॥ स इंद्रशत्रुः कुपितो भृशं तया महेंद्रवाहं गदयोग्रविक्रमः ॥ जघान कुंभस्थल उन्नदन्मृधे तत्कर्म सर्वे समपूजयन्नृप ॥ १० ॥ ऐरावतो वृत्रगदाऽभिमृष्टो विघूर्णितोऽद्रिः कुलिशाहतो यथा ॥ अपासरद्भिन्नमुखः सहेंद्रो मुंचन्नसृक्सप्तधनुर्भृशार्तः ॥ ११ ॥ न सन्नवाहाय विषण्णचेतसे प्रायुंक्त भूयः स गदां महात्मा ॥ इंद्रोऽमृतस्यंदिकराभिमर्शवीतव्यथः क्षतवाहोऽवतस्थे ॥ १२ ॥

विस्फोटनेन नादेन ॥ ७ ॥ उद्यतं शूलं येन । नालं वनं नलानां वनं उद्गतो मदो यस्य स यूथपतिर्गजो यथा मर्दयति ॥ ८ ॥ ९ ॥ १० ॥ सप्तधनुःप्रमाणं देशम् ॥ ११ ॥ सन्नोऽवसन्नो वाहो यस्य तस्मै न प्रायुंक्त । अमृतस्यंदी अमृतस्रावी यः स्वकरस्तेनाभिमर्शः स्पर्शस्तेन वीतव्यथो गतदुःखः क्षतो वाहो यस्येंद्रस्य स तथाभूतोऽवतस्थे ॥ १२ ॥

रण करून स्वसामर्थ्यानें पृथ्वीला कंपित करीत करीत, भयभीत होऊन, डोळे मिटून पडलेल्या देवसैन्याचें पायांनीं मर्दन करूं लागला ॥ ८ ॥ नंतर, देवसैन्याचें मर्दन सहन न करणाऱ्या इंद्रानें, त्या वृत्रासुराला अवलोकन करून संमुख धावून येणाऱ्या त्या आपल्या शत्रूवर एक मोठी गदा फेंकिली. ती अत्यंत दुःसह गदा, आपल्या आंगावर येत आहे असें जाणून ती वृत्रासुरानें डाव्या हातानें सहज धरिली ॥ ९ ॥ हे राजा, नंतर अत्यंत क्रुद्ध झालेल्या त्या महापराक्रमी इंद्रशत्रू वृत्रासुरानें, युद्धामध्यें गर्जना करीत करीत त्याच गदेनें इंद्रवाहन ऐरावताच्या गंडस्थलावर प्रहार केला; तेव्हां त्याची त्या कर्माबद्दल सर्वांनीं प्रशंसा केली ॥ १० ॥ ह्याप्रमाणें तो ऐरावत वृत्रासुराच्या गदेनें ताडित झाला असतां, वज्रानें ताडित झालेल्या पर्वताप्रमाणें त्याचें सर्वांग चुरून गेलें आणि तो भ्रम पावून फुटून गेलेल्या आपल्या मुखांतून रक्ताचें वमन करीत करीत अत्यंत पीडित होत्साता, इंद्रासहवर्तमान तत्क्षणीं २८ हात मागें सरला ॥ ११ ॥ त्या वेळीं वाहन मूर्छित झाल्यामुळें खिन्न झालेल्या इंद्रावर त्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

महात्म्या वृत्रासुरानें पुनरपि गदेचा प्रहार केला नाहीं व त्यासमयीं अमृतस्राव होणाऱ्या आपल्या हस्ताच्या स्पर्शानें जखमी झालेल्या ऐरावत वाहनाची पीडा दूर करून इंद्र पुन्हा युद्धार्थ उभा राहिला ॥ १२ ॥ हे राजेंद्रा, वज्र धारण करून युद्धाच्या इच्छेनें स्थित असलेल्या त्या भ्रातृघातक (विश्वरूपाला मारणाऱ्या) शत्रूला अवलोकन करून व त्याचें तें भ्रातृवधरूप क्रूर पापकर्म स्मरण करून, शोकानें संतप्त झालेला तो वृत्रासुर, मोहानें व्याप्त होऊन हंसत हंसत त्याला ह्मणाला कीं, ॥ १३ ॥ वृत्रासुर ह्मणाला– हे अतिदुष्टा, जो तूं ब्रह्मघातकी, गुरुघातकी आणि भ्रातृघातकी आहेस तो तूं शत्रु, आज माझ्या अग्रभागीं स्थित झालास ही फार आनंदाची गोष्ट आहे. आणि आज मी आपल्या शूलानें तुझें पाषाणसदृश हृदय विदारण करून तत्काल आपल्या भ्रात्याच्या ऋणापासून मुक्त होईन, हीहि गोष्ट आनंदाचीच आहे

स वृत्रः । हे नृपेंद्र । आहवकाम्यया युद्धेच्छयाऽवस्थितम् । भ्रातृहणं भ्राता विश्वरूपस्तस्य हंतारम् । नृशंसं क्रूरं तदेवांहः पापं तस्य कर्म स्मरन् ॥ १३ ॥ यो ब्रह्महब्राह्मणं हतवान्विशेषतः स्वगुरुं मम च भ्रातरं स भवानग्रतः समवस्थितः एतद्दिष्ट्या भद्रं जातम् । दिष्ट्येत्यव्ययमानंदार्थे । हे असत्तम मम शूलेन निर्भिन्नं दृषत्तुल्यं हृत् हृदयं यस्य तेन त्वया निमित्तभूतेनाद्याचिरादेव भ्रातुरनृणोऽहं स्यामेतच्च दिष्ट्या ॥ १४ ॥ स्वर्गकामो यो भवानवृश्चत् । स्वर्गकामो याज्ञिकः पशोरिवेति वा ॥ १५ ॥ तं

स तं नृपेंद्राहवकाम्यया रिपुं वज्रायुधं भ्रातृहणं विलोक्य ॥ स्मरंश्च तत्कर्म नृशंसमंहः शोकेन मोहेन हसन् जगाद ॥ १३ ॥ वृत्र उवाच ॥ दिष्ट्या भवान्मे समवस्थितो रिपुर्यो ब्रह्महा गुरुहा भ्रातृहा च ॥ दिष्ट्याऽनृणोऽद्याहमसत्तम त्वया मच्छूलनिर्भिन्नदृषद्धृदाऽचिरात् ॥ १४ ॥ यो नोऽग्रजस्यात्मविदो द्विजातेर्गुरोरपापस्य च दीक्षितस्य ॥ विश्रभ्य खड्गेन शिरांस्यवृश्चत्पशोरिवाकरुणः स्वर्गकामः ॥ १५ ॥ ह्रीश्रीदयाकीर्तिभिरुज्झितं त्वां स्वकर्मणा पुरुषादैश्च गर्ह्यम् ॥ कृच्छ्रेण मच्छूलविभिन्नदेहमस्पृष्टवह्निं समदंति गृध्राः ॥ १६ ॥ अन्येऽनु ये त्वेह नृशंसमज्ञा ये ह्युद्यतास्त्राः प्रहरंति मह्यम् ॥ तैर्भूतनाथान्सगणान्निशातत्रिशूलनिर्भिन्नगलैर्यजामि ॥१७॥ अथो हरे मे कुलिशेन वीर हर्ता प्रमथ्यैव शिरो यदीह ॥ तत्रानृणो भूतबलिं विधाय मनस्विनां पादरजः प्रपत्स्ये ॥ १८ ॥

त्वामस्पृष्टवह्निमदग्धदेहं समदंति । वर्तमानसामीप्ये वर्तमानवन्निर्देशः ॥ १६ ॥ अन्येऽपि ये अज्ञा इह त्वा त्वां नृशंसमनु मह्यमुद्यतास्त्राः संतो यदि प्रहरंति तैर्भूतनाथान्भैरवादीन्यक्ष्यामि । कथंभूतैः । निशातं तीक्ष्णीकृतं यन्मम त्रिशूलं तेन निर्भिन्नो गलो येषां तैः ॥ १७ ॥ अथो अथवा । हरे भो इंद्र । यदि भवानेव मम शिरो हर्ता

॥ १४ ॥ अरे, स्वर्गप्राप्तीची इच्छा करणारा निर्दय याज्ञिकजन, जसा पशूचा शिरच्छेद करितो त्याप्रमाणें ज्या तूं आत्मज्ञानी, ब्राह्मण, स्वतःचा गुरु, निष्पाप आणि यज्ञार्थ दीक्षा घेतलेला अशा माझ्या ज्येष्ठ बंधूचा विश्वासपूर्वक शिरश्छेद केला आहेस व ह्यामुळें लज्जा, संपत्ति, दया व कीर्ति ह्यांनीं त्याग केलेल्या आणि स्वतःच्या त्या कर्मामुळें पुरुषभक्षक राक्षसांनीं सुद्धां निंदा केलेल्या त्या 'माझ्या शूलानें देह विदीर्ण होऊन दुःखानें मरण पावलेल्या व अग्नीचाही स्पर्श न झालेल्या' तुला, गृध्रपक्षी यथेष्ट भक्षण करितील ॥ १५ ॥ १६ ॥ आतां ह्याप्रमाणें जरी मी मृत झालों तरी तूं कसा सुखी राहशील ? कारण, माझे अनुयायी देव तुला मारितीलच असें ह्मणशील तर– हे दुष्टा, तुज घातक्याच्या अनुरोधानें वागणारे जे कोणी इतर अज्ञ देव येथें अग्रधारण करून मला प्रहार करितील त्यांचे कंठ मी आपल्या तीक्ष्ण धारेच्या शूलानें तोडून त्यांच्या योगानें गणासहवर्तमान भैरवादि भूतनाथांचें यजन करीन ॥ १७ ॥ अथवा हे वीरा इंद्रा, ह्या संग्रामामध्यें माझ्या सैन्याचा नाश करून कदा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

चित् तूंच जर माझें शिर वज्रानें हरण केलेस तर मी कर्मबंधापासून मुक्त होऊन व देहाच्या योगानें भूतांना बळि अर्पण करून, धीर सत्पुरुषांच्या पदास प्राप्त होईन ॥ १८ ॥ याप्रमाणें भाषण करून 'वांचण्यापेक्षां मला मृत्यूच अभिमत आहे' अशा आशयानें पुनरपि भाषण करितो कीं,– हे सुरेश्वरा, मी तुझा शत्रु तुझ्या पुढें उभा असतांना, तूं आपलें अमोघ वज्र मजवर कशाकरितां टाकित नाहींस? अरे, जशी कृपणपुरुषापाशीं केलेली कार्य होण्याविषयींची याचना व्यर्थ होत्ये त्याप्रमाणें व व्यर्थ झालेल्या पूर्वीच्या गदेप्रमाणें आतां वज्रहि निष्फळ होईल, असा तूं संशय मनामध्यें आणूं नकोस ॥ १९ ॥ आतां माझें हें वज्र अमोघ कसें ह्मणून विचारशील तर– हे इंद्रा, तुझें हें वज्र खरोखर श्रीहरीच्या तेजानें व दधीच ऋषीच्या तपानें पाजळलेलें आहे, याकरितां विष्णूनें प्रेरणा केलेला असा तूं, त्याच वज्राच्या योगानें मज शत्रूचा वध कर. स्वतःच्या विजयाविषयीं तुला संदेह नको. कारण, जिकडे श्रीहरि असतो तिकडेच विजय, तिकडेच लक्ष्मी व तिकडेच दयावगैरे सर्वहि गुण असतात ॥ २० ॥

हरिष्यति तत्र तथा सत्यनृणो विमुक्तकर्मबंधः सन्भूतेभ्यो बलिं देहेन विधाय मनस्विनां पादरजः प्रपत्स्ये धीराणां पदं प्राप्स्यामि ॥ १८ ॥ जीवितादपि मृत्युरेव ममाभिमत इत्याशयेनाह । सुरेशेति । न हिनोषि नहि क्षिपसि । गदेव विफलो यास्यतीति संशयं मा कार्षीः । कृपणादर्थः प्रयोजनं यस्याः सा याच्ञा यथा निष्फला तथा न स्यात् ॥ १९ ॥ अमोघत्वे हेतुं वदंस्तं प्रोत्साहयति । नन्विति । तेजितस्तीक्ष्णीकृतः । शत्रुं मां जहि । विष्णुना यंत्रितः प्रेरितः ॥ २० ॥ हवनेन मम पीडा स्यादि-

सुरेश कस्मान्न हिनोषि वज्रं पुरःस्थिते वैरिणि मय्यमोघम् ॥ मा संशयिष्ठा न गदेव वज्रं स्यान्निष्फलं कृपणार्थेव याच्ञा ॥ १९ ॥
नन्वेष वज्रस्तव शक्र तेजसा हरेर्दधीचेस्तपसा च तेजितः ॥ तेनैव शत्रुं जहि विष्णुयंत्रितो यतो हरिर्विजयः श्रीर्गुणास्ततः ॥ २० ॥
अहं समाधाय मनो यथाह संकर्षणस्तच्चरणारविंदे ॥ त्वद्वज्ररंहोलुलितग्राम्यपाशो गतिं मुनेर्याम्यपविद्धलोकः ॥ २१ ॥ पुंसां
किलैकांतधियां स्वकानां याः संपदो दिवि भूमौ रसायाम् ॥ न राति यद्द्वेष उद्वेग आधिर्मदः कलिर्व्यसनं संप्रयासः ॥ २२ ॥ त्रैव-
र्गिकायासविघातमस्मत्पतिर्विधत्ते पुरुषस्य शक्र ॥ ततोऽनुमेयो भगवत्प्रसादो यो दुर्लभोऽकिंचनगोचरोऽन्यैः ॥ २३ ॥

त्यपि मा संशयिष्ठा इत्याह । अहमिति । संकर्षणो मत्पतिर्यथाह तथा तदीयचरणारविंदे मनः समाधाय मुनेर्योगिनो गतिमहं यास्यामि । तव वज्रस्य रंहसा लुलितश्छिन्नो ग्राम्यपाशो विषयभोगलक्षणो यस्य । अपविद्धलोकस्त्यक्तदेहः ॥ २१ ॥ तर्हि भगवान्संकर्षणः स्वभृत्याय मह्यमेव स्वर्गादिसंपदो दास्यतीत्यपि मा संशयिष्ठा इत्याह । पुंसामिति । स्वर्गे भूमौ रसातले च याः संपदस्ताः किल निश्चितं न राति न ददाति । तत्र हेतुः । यद्याभ्यो द्वेषादयो भवंति ॥ २२ ॥ तर्हि स्वभक्तस्य किं विधत्ते तत्राह ।

आतां वधाच्या योगानें मला पीडा होईल हाही संशय तूं मनामध्यें मुळींच आणूं नकोस; कारण, माझा स्वामी जो भगवान् संकर्षण त्यानें सांगितल्याप्रमाणें त्याच्या चरणकमलीं मी आपलें मन स्थिर करून, तुझ्या वज्राच्या योगानें विषयभोगरूप पाश छिन्न झाला असतां, देहाचा त्याग करून, योगिजनांला प्राप्त होणाऱ्या मोक्षरूप गतीला पावेन ॥ २१ ॥ तर मग 'भगवान् संकर्षण मज स्वदासालाच स्वर्गादिसंपत्ति देईल' हीसुद्धां शंका तूं मनामध्यें आणूं नकोस अशा अभिप्रायानें पुनरपि भाषण करितो कीं,– आपलेठिकाणीं ज्यांची बुद्धि निश्चित झाली आहे अशा आपल्या भक्तजनांना परमेश्वर स्वर्गांचेठिकाणीं, भूतलावर आणि पाताळांत ज्या संपत्ति आहेत त्या निःसंशय देत नाहीं. कारण, त्यांच्यापासून वैर, उद्वेग, मानस संताप, गर्व, कलह, दुःख आणि श्रम हीं उत्पन्न होतात ॥ २२ ॥ बरें तर मग 'स्वभक्तास भगवान् काय देतो' असें ह्मणशील तर– हे इंद्रा, आमचा स्वामी संकर्षण, आपल्या भक्ताला धर्मार्थकामसंबंधीं होत असलेल्या आयासांचा नाश करितो त्या आयासांच्या नाशेंकरूनच

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

एकांतभक्ताला प्राप्त होणारा व इतरांना दुर्लभ असा जो भगवत्प्रसाद त्याचें अनुमान करावयाचें आहे. तस्मात् ज्याअर्थी धर्मार्थकामसंबंधीं प्रयत्न तुमचेठिकाणीं नाहींसा झाला नाहीं त्याअर्थी भगवत्प्रसाद तुह्मांवर झाला नाहीं, ह्मणूनच स्वर्गादि संपत्तीहि तुह्मांलाच प्राप्त होतील ॥ २३ ॥ ह्याप्रमाणें इंद्राला आपला अभिप्राय सांगून, वृत्रासुर भगवंताची प्रार्थना करितो कीं,– हे हरे, तुझे पायच ज्यांचा मुख्य आश्रय आहे त्या दासांचा अनुदास पुनरपि मी होण्याची इच्छा करितों, माझें मन, तुज प्राणनाथाच्या गुणांचें स्मरण करो, माझी वाणीहि त्यांचेंच कीर्तन करो व माझा देहहि तुझेंच सेवनरूप कर्म करो ॥ २४ ॥ आतां 'दास्याच्या योगानें तुला काय उपयोग होणार आहे? मी तुला मोठमोठीं फळें देतों' असें ह्मणशील तर हे सर्वसौभाग्यनिधे, मी स्वतःपासून तुला निराळा करून, ध्रुवपद, ब्रह्मपद, सार्वभौमपद, पातालाधिपत्य,

---

त्रैवर्गिको धर्मार्थकामविषयो य आयासस्तस्य विघातं विधत्ते तत आयासोपरमादनुमेयो न त्वैश्वर्यादिना । अतः सम्यग्भगवत्प्रसादाभावात्तव संपदो भविष्यंतीति भावः ॥ २३ ॥ एवमिंद्राय स्वाभिप्रायं निवेद्य भगवंतं प्रार्थयते । अहमिति । तव पादावेव एकं मूलमाश्रयो येषां तेषां दासानामनुदासो भूयो भवितास्मि भविष्यामि भवेयम् । असुपतेः प्राणनाथस्य तव गुणान्मम मनः स्मरतु । वागपि तानेव कीर्तयतु । कायस्तवैव कर्म करोतु ॥ २४ ॥ ननु किं दास्येन तुभ्यं महाफलानि दास्यामि तत्राह । नाक-

अहं हरे तव पादैकमूलदासानुदासो भवितास्मि भूयः ॥ मनः स्मरेतासुपतेर्गुणांस्ते गृणीत वाक्कर्म करोतु कायः ॥ २४ ॥ न नाकपृष्ठं न च पारमेष्ठ्यं न सार्वभौमं न रसाधिपत्यम् ॥ न योगसिद्धीरपुनर्भवं वा समंजस त्वा विरहय्य कांक्षे ॥ २५ ॥ अजातपक्षा इव मातरं खगाः स्तन्यं यथा वत्सतराः क्षुधार्ताः ॥ प्रियं प्रियेव व्युषितं विषण्णा मनोऽरविंदाक्ष दिदृक्षते त्वाम् ॥ २६ ॥ ममोत्तमश्लोकजनेषु सख्यं संसारचक्रे भ्रमतः स्वकर्मभिः ॥ त्वन्माययात्मात्मजदारगेहेष्वासक्तचित्तस्य न नाथ भूयात् ॥ २७ ॥ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे षष्ठस्कंधे एकादशोऽध्यायः ॥ ११ ॥ ॥

पृष्ठं ध्रुवपदं ब्रह्मलोकादिकं च हे समंजस निखिलसौभाग्यनिधे त्वा त्वां विरहय्य पृथक्कृत्य न कांक्षे नेच्छामि ॥ २५ ॥ तर्हि किमिच्छसि तदाह । अजातपक्षाः खगा घूकादिभिः पीडिता यथा मातरं यथा च दाम्ना बद्धा बालवत्साः स्तन्यं यथा च व्युषितं दूरदेशगतं प्रियं कामेन विषण्णा प्रिया तथा मे मनस्तापत्रयपीडितं कर्मभिर्बद्धं च कामादिभिर्विषण्णं च त्वां दिदृक्षते द्रष्टुमिच्छतीत्यर्थः ॥ २६ ॥ उत्तमश्लोकस्य तव जनेषु भक्तेष्वेव सख्यं भूयात् । त्वन्मायया देहादिष्वासक्तचित्तस्य भूयोऽपि तेष्वा-

---

योगसिद्धि अथवा मोक्षहि इच्छित नाहीं ॥ २५ ॥ तर मग तुला इच्छा तरी कशाची आहे' असें विचारशील तर–हे कमलनयना, ज्याप्रमाणें पंख न फुटलेले पक्ष्यांचे बालक, दिवाभीतादि पक्ष्यांपासून पीडित झाले असतां ते आपल्या मातेला अवलोकन करण्याची इच्छा करितात, किंवा दांव्यांनीं बांधिलेलीं लहान लहान वासरें ज्याप्रमाणें स्तनपानाची इच्छा करितात अथवा कामानें खिन्न झालेली स्त्री, ज्याप्रमाणें दूरदेशास गेलेल्या पतीला अवलोकन करण्याची इच्छा करित्ये त्याप्रमाणें तापत्रयानें पीडित, कर्मांनीं बद्ध आणि कामादिकांनीं खिन्न झालेलें माझें मन, तुला अवलोकन करण्याची इच्छा करितें ॥ २६ ॥ हे नाथ, स्वकर्मांच्या योगानें संसारचक्रामध्यें भ्रमण करीत असलेल्या माझें, तुज श्रेष्ठकीर्ति परमेश्वराच्या भक्तांचेचठिकाणीं सख्य होवो; आणि तुझ्या मायेनें पुत्र, दारा आणि गृह ह्यांचेठिकाणीं मी आसक्तचित्त आहेंच ह्यास्तव पुनरपि त्यांचेठिकाणीं माझी आसक्ति न व्हावी ॥ २७ ॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील षष्ठस्कंधापैकीं वृत्रासुरसंभाषणनामक हा अकरावा अध्याय समाप्त झाला ॥ ११ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां या बाराव्या अध्यायामध्यें अतिखिन्न झालेल्या इंद्राला स्वतांच वृत्रासुरानें आपल्या वधाविषयीं उत्तेजन दिलें असतां, महायुद्धामध्यें त्या इंद्रानें वृत्रासुराचा वध केला असें वर्णन केलें आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला— हे परीक्षित्‌राजा, याप्रमाणें विजयापेक्षां मृत्यूच श्रेष्ठ असें मानणारा व युद्धामध्यें देहत्याग करण्याची इच्छा करणारा तो वृत्रासुर, जसा कैटभनामक दैत्य प्रलयोदकामध्यें श्रीविष्णूवर चाल करून गेला होता त्याप्रमाणें शूल घेऊन देवेंद्राच्या अंगावर धांवला ॥ १ ॥ नंतर त्या असुरश्रेष्ठ वृत्रासुरानें प्रलयकालच्या अग्नीप्रमाणें कठोरशिखांनीं युक्त असलेला शूल गरगर फिरवून वेगानें महेंद्राला मारण्याकरितां फेंकला आणि गर्जना करून 'हे पाप्या मेलास' असें तो वीर क्रोधानें ह्मणाला ॥ २ ॥ तेसमयीं ग्रह व उल्का ह्यांप्रमाणें पाहण्यास अशक्य असा तो शूल, भ्रमण करीत करीत आकाशामध्यें येत आहे असें पाहून भयरहित अशा त्या वज्रधारी इंद्रानें, शंभर अरांनीं युक्त असलेल्या वज्रानें त्या शूलाचें व त्या वृत्रासुराच्या वासुकिसर्पासारख्या बाहूचें छेदन केलें ॥ ३ ॥ नंतर ज्याचा

सक्तिर्न भूयात् ॥ २७ ॥ इति षष्ठस्कंधे टीकायामेकादशोऽध्यायः ॥ ११ ॥ ॥ द्वादशेऽतिविषण्णेन स्वयमुत्साहितेन तु ॥ महेंद्रेण महायुद्धे वृत्रस्य वध ईर्यते ॥ १ ॥ महापुरुषं श्रीविष्णुम् । अप्सु प्रलयोदके ॥१॥ युगांताग्निवत्कठोरा जिह्वा शिखा यस्य तत् । आविध्य भ्रामयित्वा ॥ २॥ तत्खे आपतदागच्छत् । विचलत्परिभ्रमत् । ग्रहश्चोल्का च ग्रहोल्कं तद्वद्दु-

ऋषिरुवाच ॥ एवं जिहासुर्नृप देहमाजौ मृत्युं वरं विजयान्मन्यमानः ॥ शूलं प्रगृह्याभ्यपतत्सुरेंद्रं यथा महापुरुषं कैटभोऽप्सु ॥ १ ॥
ततो युगांताग्निकठोरजिह्वमाविद्ध्य शूलं तरसाऽसुरेंद्रः ॥ क्षिप्त्वा महेंद्राय विनद्य वीरो हतोऽसि पापेति रुषा जगाद ॥ २ ॥ ख
आपतत्तद्विचलद्ग्रहोल्कवन्निरीक्ष्य दुष्प्रेक्ष्यमजातविक्लवः ॥ वज्रेण वज्री शतपर्वणाऽच्छिनद्भुजं च तस्योरगराजभोगम् ॥ ३ ॥ छिन्नै-
कबाहुः परिघेण वृत्रः संरब्ध आसाद्य गृहीतवज्रम् ॥ हनौ तताडेंद्रमथामरेभं वज्रं च हस्तान्न्यपतन्मघोनः ॥ ४ ॥ वृत्रस्य कर्मा-
तिमहाऽद्भुतं तत्सुरासुराश्चारणसिद्धसंघाः ॥ अपूजयंस्तत्पुरुहूतसंकटं निरीक्ष्य हाहेति विचुक्रुशुर्भृशम् ॥ ५ ॥ इंद्रो न वज्रं जगृहे
विलज्जितश्च्युतं स्वहस्तादरिसन्निधौ पुनः ॥ तमाह वृत्रो हर आत्तवज्रो जहि स्वशत्रुं न विषादकालः ॥ ६ ॥ युयुत्सतां कुत्रचिदा-
तताायिनां जयः सदैकत्र न वै परात्मनाम् ॥ विनैकमुत्पत्तिलयस्थितीश्वरं सर्वज्ञमाद्यं पुरुषं सनातनम् ॥ ७ ॥

ष्प्रेक्ष्यम् । शतं पर्वाणि यस्य तेन । उरगराजो वासुकिस्तस्य भोगो देहस्तदाकारम् ॥ ३ ॥ हनौ कपोलप्रांते । अमरेभमैरावतं च ॥ ४ ॥ ५ ॥ पुनश्च तमाह वृत्रः । हे हरे इदं ॥ ६ ॥ सदा जयो नैव किंतु कुत्रचिज्जय एकत्र कुत्रचिन्नैव । यद्वा कुत्रचिदपि युयुत्सतां सदा जयो नैव किंत्वेकत्रैव । कदाचिदेवेत्यर्थः । परो देह आत्मा येषां

एक बाहु छिन्न झाला आहे अशा खवळलेल्या त्या वृत्रासुरानें वज्रधारण करणाऱ्या इंद्राजवळ येऊन, आपल्या परिघ आयुधानें, हनुवटीवर इंद्राला आणि ऐरावताला ताडण केलें. त्या बरोबर इंद्राच्या हातांतून वज्र खालीं पडलें ॥ ४ ॥ त्याकालीं देव, असुर व सिद्धचारणांचे समुदाय, त्या वृत्रासुराच्या महाअद्भुत कर्माची प्रशंसा करूं लागले आणि इंद्राचें तें संकट पाहून हाहाकारपूर्वक अत्यंत आक्रोश करूं लागले ॥ ५ ॥ नंतर शत्रूसमीप आपल्या हातांतून गळून पडलेलें वज्र, जेव्हां इंद्र लज्जित होऊन घेईनासा झाला तेव्हां पुनरपि वृत्रासुर त्याला ह्मणाला कीं— हे इंद्रा, खेद करण्याची ही वेळ नव्हे. आतां तूं वज्र धारण करून आपल्या शत्रूचा (माझा) वध कर ॥ ६ ॥ कारण उत्पत्ति, स्थिति व लय ह्यांचा अधिपति जो सर्वज्ञ, अनादि, नित्य आणि अंतर्यामी परमात्मा त्यावांचून, युद्धाची इच्छा धरून शस्त्र धारण करणाऱ्या व देहालाच आत्मा समजणाऱ्या लोकांना सर्वदा जय कधींहि प्राप्त होत नाहीं. परंतु, क्वचित्‌ठिकाणीं जय मिळतो व क्वचित्‌ठिकाणीं मिळतच नाहीं, असें होत असतें ॥ ७ ॥ ॥ ३८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्यानंतर जीवाला पराधीनत्व कसें हें सांगण्याच्या अभिप्रायानें भाषण करितो कीं, जाळ्यानें बद्ध झालेले पक्षी जशी हालचाल करितात त्याप्रमाणें पालकांसहवर्तमान हे चतुर्दशलोक ज्याच्या अधीन असल्यामुळें स्वतः विवश होत्साते चलनवलनादि चेष्टा करितात तोच सर्वचालक भगवान् ह्या जयादिकांविषयीं मुख्य कारण आहे ॥ ८ ॥ आतां इंद्रियशक्ति, मनःशक्ति व शरीरशक्ति हीं, जयाचीं कारणें असून त्यांचें कारण प्राण आहे व प्राणाच्याच स्थितीला वांचणें व वियोगाला मृत्यु असें ह्मणण्याची प्रसिद्धि आहे. तेव्हां भगवानच जयादिकांचें कारण आहे हें तूं कसें ह्मणतोस असें ह्मणशील तर– हे इंद्रा, इंद्रियशक्ति, मानसशक्ति, शारीरशक्ति, प्राण, जीवन व मृत्यु ह्यांच्या रूपानें स्थित असलेला तो भगवानच सर्वांला कारण आहे. हें न जाणून लोक, मोहानें जड देहच कारण आहे असें समजतात ॥ ९ ॥ हे इंद्रा, ज्याप्रमाणें काष्ठमय स्त्री आणि यंत्रमय मृग हे पराधीन असतात तशींच सर्वभूतें ईश्वराधीन आहेत असें समज ॥ १० ॥ परंतु अहो, आपल्या उत्पत्तीला कारणभूत अशा

पराधीनात्मनामिति वा । आद्यमनादिम् । सनातनं नित्यम् ॥ ७ ॥ पराधीनतामेवाह । लोका इति सप्तभिः । यस्य वशे स्थिताः स्वयं विवशाः संतः श्वसंति चेष्टंते । द्विजाः पक्षिणः । शिचा जालेन कालः कलयतीति भगवान् इह जयादौ कारणम् ॥ ८ ॥ ओजआदिरूपं कालं तं हेतुमज्ञायाविज्ञाय जडं संतमात्मानं देहं हेतुं मन्यते ॥ ९ ॥ १० ॥

लोकाः सपाला यस्येमे श्वसंति विवशा वशे ॥ द्विजा इव शिचा बद्धाः स काल इह कारणम् ॥ ८ ॥ ओजः सहो बलं प्राणममृतं मृत्युमेव च ॥ तमज्ञाय जनो हेतुमात्मानं मन्यते जडम् ॥ ९ ॥ यथा दारुमयी नारी यथा यंत्रमयो मृगः ॥ एवं भूतानि मघवन्नीशतंत्राणि विद्धि भोः ॥ १० ॥ पुरुषः प्रकृतिर्व्यक्तमात्मा भूतेंद्रियाशयाः ॥ शक्नुवंत्यस्य सर्गादौ न विना यदनुग्रहात् ॥ ११ ॥ अविद्वानेव मात्मानं मन्यतेऽनीशमीश्वरम् ॥ भूतैः सृजति भूतानि ग्रसते तानि तैः स्वयम् ॥ १२ ॥ आयुः श्रीः कीर्तिरैश्वर्यमाशिषः पुरुषस्य याः ॥ भवंत्येव हि तत्काले यथाऽनिच्छोर्विपर्ययाः ॥ १३ ॥

ननु स्वारंभकप्रधानपुरुषादितंत्राणीति युक्तं तत्राह । पुरुष इति । व्यक्तं महत्तत्त्वम् । आत्माऽहंकारः ॥ ११ ॥ ननु स्वकर्मद्वारा जीव एव सृष्ट्यादिहेतुरिति मीमांसका मन्यंते तत्राह । एवमविद्वाननीशमेवात्मानमीश्वरं स्वतंत्रं मन्यते । ननु पित्रादयः स्रष्टारो दृश्यंते व्याघ्रादयस्तु हंतारस्तत्राह । भूतैरिति । स्वयमीश्वरः ॥ १२ ॥ ननु त्वया पराजि-

---

प्रधानपुरुषादिकोंच्या स्वाधीन भूतें आहेत असें ह्मणणें योग्य दिसतें अशी शंका घ्यावी तर– हे इंद्रा, पुरुष, प्रकृति, महत्तत्त्व, अहंकार, पंचमहाभूतें, इंद्रियें व मन हीं ईश्वराच्या अनुग्रहावांचून ह्या विश्वाची उत्पत्तिवगैरे करण्यास समर्थ होत नाहींत ॥ ११ ॥ बरें स्वकर्मद्वारा जीवच सृष्ट्यादिकांविषयीं कारण आहे असें मीमांसक मानितात असें ह्मणशील तर– हे इंद्रा, वर सांगितलेल्याप्रमाणें ईश्वरच स्वतंत्र व सर्वनियंता आहे हें न जाणणारा पुरुष, पराधीन जीवालाच स्वतंत्र मानितो. आतां त्याचप्रमाणें ‘ पित्रादिक हेच स्रष्टे व व्याघ्रादिक हेच घातक दृष्टीस पडतात ’ असें ह्मणशील तर– हे इंद्रा, स्वतः ईश्वरच भूतांच्या योगानें भूतें उत्पन्न करितो व त्यांच्याच योगानें त्यांचा संहार करितो ॥ १२ ॥ आतां तुजपासून पराजय पावलेल्या मला जयाचीवगैरे शंकाहि नाहीं. तस्मात्, कशाकरितां मला बलात्कारानें युद्धाविषयीं प्रवृत्त करितोस असें ह्मणशील तर– हे इंद्रा, पराजयकालीं पुरुषाची इच्छा नसूनहि जशीं त्याला अकीर्ति, ऐश्वर्य हानि व अलक्ष्मी इत्यादिक प्राप्त होतात त्याचप्रमाणें जयकालीं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आयुष्य, श्री, कीर्ति, ऐश्वर्य आणि इतरहि ज्या संपत्ति आहेत त्या सर्वहि पुरुषांस प्राप्त होतात ॥ १३ ॥ असो. ज्याअर्थी याप्रमाणें सर्व ईश्वराधीन आहे त्याअर्थी पुरुषानें अपकीर्ति अथवा यश, जय अथवा पराजय, सुख अथवा दुःख आणि त्याचप्रमाणें मृत्यु अथवा जीवित ह्यांविषयीं हर्ष किंवा विषाद न मानितां समदृष्टीनें रहावें ॥ १४ ॥ आतां समदृष्टि होण्यास उपाय काय? असें विचारशील तर,– हे इंद्रा, सत्त्व, रज आणि तम हे प्रकृतीचेच गुण असून आत्म्याचे नाहींत, यास्तव त्या गुणकार्य-भूत देहाचेठिकाणीं आपण साक्षिमात्र आहें असें जो जाणतो तो हर्षादिकांनीं लिप्त होत नाहीं ॥ १५ ॥ असें सांगून आतां 'हर्ष आणि खेद ह्यांच्या निवृत्तीविषयीं मीच तुझा गुरु आहें' असें सांगण्याच्या अभिप्रायानें वृत्रासुर ह्मणतो कीं,– हे इंद्रा, माझें आयुध व भुज ह्यांचा छेद झाल्यामुळें जरी तूं माझा पराजय केलास तथापि, तुझे प्राण हरण करण्याच्या इच्छेनें मी युद्धामध्यें यथाशक्ति उद्योग करितच आहें हें तूं पहा! ॥ १६ ॥ असो. जयादिक अनियत आहेत हें जें आरंभीं कथन केलें त्याचाच आतां

तस्य मम जयादिशंकैव नास्ति किमिति मां बलाद्युद्धे प्रवर्तयसि तत्राह। आयुरिति। तत्काले जयादिकाले। विपर्यया अकीर्त्यादयः ॥ १३ ॥ यस्मादेवं सर्वमीश्वराधीनं तस्मात्समः स्याद्धर्षविषादहीनो भवेत् ॥ १४ ॥ समदृष्टावुपायमाह। सत्त्वमिति। हर्षादिभिर्न बद्ध्यते ॥ १५ ॥ हर्षविषादनिवृत्त्यै तवाहमेव गुरुरित्याह। पश्येति। वृक्ण-

तस्मादकीर्तियशसोर्जयापजययोरपि ॥ समः स्यात्सुखदुःखाभ्यां मृत्युजीवितयोस्तथा ॥ १४ ॥ सत्त्वं रजस्तम इति प्रकृतेर्नात्मनो गुणाः ॥ तत्र साक्षिणमात्मानं यो वेद न स बद्ध्यते ॥ १५ ॥ पश्य मां निर्जितं शक्र वृक्णायुधभुजं मृधे ॥ घटमानं यथाशक्ति तव प्राणजिहीर्षया ॥ १६ ॥ प्राणग्लहोऽयं समर इष्वक्षो वाहनासनः ॥ अत्र न ज्ञायतेऽमुष्य जयोऽमुष्य पराजयः ॥ १७ ॥ श्रीशुक उवाच ॥ इंद्रो वृत्रवचः श्रुत्वा गतालीकमपूजयत् ॥ गृहीतवज्रः प्रहसंस्तमाह गतविस्मयः ॥ १८ ॥ इंद्र उवाच ॥ अहो दानव सिद्धोऽसि यस्य ते मतिरीदृशी ॥ भक्तः सर्वात्मनात्मानं सुहृदं जगदीश्वरम् ॥ १९ ॥ भवानतार्षीन्मायां वै वैष्णवीं जनमोहिनीम् ॥ यद्विहायासुरं भावं महापुरुषतां गतः ॥ २० ॥

मायुधं भुजश्च यस्य ॥ १६ ॥ अनियतत्वं द्यूतरूपकेणोपसंहरति। प्राण एव ग्लहः पणो यस्मिन्। इषव एवाक्षाः पाशका यस्मिन्। वाहनान्येवेतस्ततश्चाल्यमानान्यासनानि फलका यस्मिन् ॥ १७ ॥ गतालीकं निष्कपटम् ॥ १८ ॥ भक्तः सेवितवानसि ॥ १९ ॥ २० ॥

वृत्रासुर द्यूतरूपकानें उपसंहार करितो. तो असा कीं,– ह्या समररूप द्यूतामध्यें प्राण हीच पणाला लावण्याची वस्तु होय, बाण हेच फांसे होत, वाहनें ह्याच इकडे तिकडे फिरविण्याच्या सोंगट्या होत आणि ह्या रणद्यूतामध्यें बाणरूप फांसा पडण्याचे पूर्वीं अमक्याचा जय होईल अथवा अमक्याचा पराजय होईल हें समजत नाहीं ॥ १७ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे परीक्षित्राजा, असें वृत्रासुराचें निष्कपट भाषण श्रवण करून इंद्रानें त्याची प्रशंसा केली व हस्तामध्यें वज्र ग्रहण करून, विस्मयरहित होत्साता हंसत हंसत त्याला असें ह्मणाला कीं, ॥ १८ ॥ इंद्र ह्मणाला– हे दानवा, तूं जन्मतः निकृष्ट असूनहि कृतार्थ आहेस, हें मोठें आश्चर्य आहे. आणि ज्याअर्थीं अशा संकट-समयींसुद्धां तुझी अशाप्रकारची मति आहे त्याअर्थीं तूं पूर्वीं अनन्यभावानें अगदीं मनापासून जगन्मित्र जगदीश्वर परमात्म्याची सेवा केली आहेस ॥ १९ ॥ आणि त्याचप्रमाणें तूं ज्याअर्थीं आपल्या असुरस्वभावाचा त्याग करून सत्पुरुषस्वभावाला पावला आहेस त्याअर्थीं तूं खरोखर जनमोहक जशा वैष्णवीमायेला तरला आहेस ॥२०॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अहाहा! हे वृत्रासुरा, तूं स्वभावतः रजोगुणी असून ही सत्त्वमूर्ति भगवान् वासुदेवाचेठिकाणीं तुझी बुद्धि दृढ झाली आहे हें खरोखर मोठें आश्चर्य होय ॥ २१ ॥ आणि ह्यामुळेंच स्वर्गादिसुखांची तुला अपेक्षा नाहीं हें अगदीं योग्य आहे; कारण, ज्या तुला मोक्षाधिपति भगवान् श्रीहरीचेठिकाणीं भक्ति प्राप्त झाली आहे त्या आनंदरूप अमृतसागरामध्यें क्रीडा करीत असणाऱ्या तुला खावेंतील उदकासारखा अत्यंत क्षुद्र अशा स्वर्गादिकांनीं काय करावयाचें आहे? कांहींच नाहीं ॥ २२ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे परीक्षित् राजा, याप्रमाणें धर्म जाणण्याच्या इच्छेनें परस्पर भाषण करणारे, संग्राममुख्य व महापराक्रमी असे ते इंद्र आणि वृत्रासुर, एकमेकांबरोबर युद्ध करूं लागले ॥ २३ ॥ हे श्रेष्ठराजा, शत्रुदमन करणाऱ्या वृत्रासुरानें, आपला भयंकर लोहमयपरिघ वामहस्तानें फिरवून इंद्रावर फेंकिला ॥ २४ ॥ त्या वेळीं

॥२१॥ तस्य तव खातकोदकैर्गर्वादिजलोपमैः स्वार्गादिभिः किम् ॥ २२ ॥ युधां संग्रामाणां पती मुख्यौ ॥२३॥ हे मारिष श्रेष्ठ राजन् ॥२४॥२५॥ उत्कृत्तं मूलं ययोस्ताभ्य.

खल्विदं महदाश्चर्यं यद्रजः प्रकृतेस्तव ॥ वासुदेवे भगवति सत्त्वात्मनि दृढा मतिः ॥ २१ ॥ यस्य भक्तिर्भगवति हरौ निःश्रेयसेश्वरे ॥ विक्रीडतोऽमृतांभोधौ किं क्षुद्रैः खातकोदकैः ॥ २२ ॥ श्रीशुक उवाच ॥ इति ब्रुवाणावन्योन्यं धर्मजिज्ञासया नृप ॥ युयुधाते महावीर्याविंद्रवृत्रौ युधांपती ॥ २३ ॥ आविद्ध्य परिघं वृत्रः कार्ष्णायसमरिंदमः ॥ इंद्राय प्राहिणोद्धोरं वामहस्तेन मारिष ॥ २४ ॥ स तु वृत्रस्य परिघं करं च करभोपमम् ॥ चिच्छेद युगपद्देवो वज्रेण शतपर्वणा ॥ २५ ॥ दोर्भ्यामुत्कृत्तमूलाभ्यां बभौ रक्तस्रवोऽसुरः ॥ छिन्नपक्षो यथा गोत्रः खाद्भ्रष्टो वज्रिणा हतः ॥ २६ ॥ कृत्वा धरां हनुं भूमौ दैत्यो दिव्युत्तरां हनुम् ॥ नभोगंभीरवक्त्रेण लेलिहोल्बणजिह्वया ॥ २७ ॥ दंष्ट्राभिः कालकल्पाभिर्ग्रसन्निव जगत्त्रयम् ॥ अतिमात्रमहाकाय आक्षिपंस्तरसा गिरीन् ॥ २८ ॥ गिरिराट् पादचारीव पद्भ्यां निर्जरयन्महीम् ॥ जग्रास स समासाद्य वज्रिणं सहवाहनम् ॥ २९ ॥

रक्तं स्रवतीति तथा । गोत्रः पर्वतः ॥ २६ ॥ कृत्वा धरामित्यादेर्जग्रासेति तृतीयेनान्वयः । नभोवद्गंभीरेण वक्त्रेण । लेलिहः सर्पस्तद्वदुल्बणया जिह्वया ॥ २७ ॥ कालकल्पाभिः कालतुल्याभिर्दंष्ट्राभिर्ग्रसन्निव । आक्षिपन् चालयन् ॥ २८ ॥ निर्जरयन् चूर्णयन् ॥ २९ ॥

देवेंद्रानें, तो वृत्रासुराचा परिघ व अवशिष्ट राहिलेला तो हत्तीच्या सोंडेसारखा हात ह्यांना एकदमच आपल्या शंभर अरांनीं युक्त असलेल्या वज्रानें तोडून टाकिलें ॥ २५ ॥ तेसमयीं हे राजा, इंद्रानें वज्राच्या योगानें ताडण केल्यामुळें पंख तुटून आकाशांतून खालीं पडलेल्या पर्वताप्रमाणें, समूल छेदून टाकिलेल्या बाहूच्या मुळांपासून होणाऱ्या रक्तस्रावानें युक्त असलेला तो वृत्रासुर शोभूं लागला ॥ २६ ॥ नंतर, ज्यानें अधरोष्ठ भूमीला लावून वरचा ओंठ स्वर्गाला लाविला आहे, जो आपल्या आकाशासारख्या गंभीर मुखानें, सर्पासारख्या भयंकरजिव्हेनें आणि मृत्यूसारख्या उग्रदंष्ट्रांनीं त्रैलोक्य गिळूनच टाकीत आहे कीं काय? असा दिसत आहे, ज्यानें अतिशय उंच असा मोठा देह धारण केला आहे, जो वेगानें पर्वतांना स्थानापासून हालवीत आहे व जो पायांनीं पृथ्वीचें चूर्ण करून टाकीत आहे, अशा त्या साक्षात् पादचारी पर्वतराजाप्रमाणें असलेल्या वृत्रासुरानें इंद्रासमीप येऊन, ऐरावतनामक वाहनासहवर्तमान त्याला गिळून टाकिलें ॥ २७ ॥ २८ ॥ २९ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हे राजा, महाबलाढ्य व महापराक्रमी अजगर, जसा हत्तीला गिळून टाकितो त्याप्रमाणें वृत्रासुरानें ग्रस्त केलेल्या त्या इंद्राला पाहून, प्रजापति व महर्षि ह्यांसहवर्तमान सर्व देव उद्विग्न होऊन 'अरेरे! फार वाईट झालें' ह्मणून आक्रोश करूं लागले ॥ ३० ॥ असो त्या दानवश्रेष्ठ वृत्रासुरानें जरी त्या इंद्राला गिळून टाकिलें होतें तथापि पोटांत गेलेला तो इंद्र, धारण केलेल्या नारायणकवचाच्या योगानें, योगबलानें व मायेच्या बलानें युक्त झालेला असल्यामुळें मरण पावला नाहीं ॥ ३१ ॥ नंतर वज्रानें त्याच्या उदराचा भेद करून तो समर्थ इंद्र बाहेर निघाला आणि पर्वतशिखराप्रमाणें असलेलें त्या शत्रूचें शिर, त्यानें आपल्या बळाच्या योगानें छेदून टाकिलें ॥ ३२ ॥ हे राजा, वृत्राला मारण्याकरितां त्याची मान तोडीत तोडीत सभोंवतीं फिरत असलेल्या त्या अतिवेगवान् वज्रानें सूर्यादिकांच्या दक्षिणायन व उत्तरायण गतिरूप संवत्सर पूर्ण

महाप्राणो महाबलः । महावीर्यो महाप्रभावः ॥ ३० ॥ महापुरुषेण कवचरूपेण श्रीनारायणेन सन्नद्धो दंशितः । योगबलेन मायाबलेन च ॥ ३१ ॥ बलभिदिंद्रः । उच्चकर्त विच्छेद ॥ ३२ ॥ तस्य कंधरं कंधराम् । आशुवेगोऽतिवेगवान् । ज्योतिषां सूर्यादीनाम् । अयने दक्षिणोत्तरगतिरूपे संवत्सरे योऽहर्गणः षष्ट्युत्तरशतत्रयात्मकस्तावताऽहर्गणेन वार्त्रहत्ये वृत्रहत्यायोग्ये काले न्यपातयत् । यद्वा स्वार्थे तद्धितः । वृत्रहत्यायां वृत्रहननार्थं परिवर्तमान इत्यर्थः ॥ ३३ ॥ वार्त्रघ्नलिंगैर्वृत्रहंतुर्वीर्यप्रकाशकैः । वार्त्रहत्याय

महाप्राणो महावीर्यो महासर्प इव द्विपम् ॥ वृत्रग्रस्तं तमालक्ष्य सप्रजापतयः सुराः ॥ हा कष्टमिति निर्विण्णाश्चुक्रुशुः समहर्षयः ॥ ३० ॥ निगीर्णोऽप्यसुरेंद्रेण न ममारोदरं गतः ॥ महापुरुषसन्नद्धो योगमायाबलेन च ॥ ३१ ॥ भित्त्वा वज्रेण तत्कुक्षिं निष्क्रम्य बलभिद्विभुः ॥ उच्चकर्त शिरः शत्रोर्गिरिशृंगमिवौजसा ॥ ३२ ॥ वज्रस्तु तत्कंधरमाशुवेगः कृंतन्समंतात्परिवर्तमानः ॥ न्यपातयत्तावदहर्गणेन यो ज्योतिषामयने वार्त्रहत्ये ॥ ३३ ॥ तदा च खे दुंदुभयो विनेदुर्गंधर्वसिद्धाः समहर्षिसंघाः ॥ वार्त्रघ्नलिंगैस्तमभिष्टुवाना मंत्रैर्मुदा कुसुमैरभ्यवर्षन् ॥ ३४ ॥ वृत्रस्य देहान्निष्क्रांतमात्मज्योतिररिंदम ॥ पश्यतां सर्वलोकानामलोकं समपद्यत ॥ ३५ ॥

॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे षष्ठस्कंधे वृत्रवधो नाम द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥

॥ श्रीशुक उवाच ॥ ॥ वृत्रे हते त्रयो लोका विना शक्रेण भूरिद ॥ सपाला ह्यभवन्सद्यो विज्वरा निर्वृतेंद्रियाः ॥ १ ॥

शवसे ॥ पृतनासाह्याय चेत्याचैस्तमिंद्रमभिष्टुवाना अभिष्टुवंतः ॥ ३४ ॥ अलोकं लोकातीतं भगवंतम् ॥ ३५ ॥ इति षष्ठस्कंधे टीकायां द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥ त्रयोदशे तु वृत्रस्य ब्रह्महत्यामहाभयात् ॥ चिरं नष्टोऽवितः शक्रो विष्णुनेति निरूप्यते ॥ १ ॥ १ ॥

होण्यास जितके दिवस लागतात तितक्या (३६०) दिवसांनंतर वृत्रासुराची हत्या होण्याचा योग्यकाल प्राप्त झाला असतां त्याचें मस्तक तोडून खालीं पाडिलें ॥ ३३ ॥ ते समयीं स्वर्गामध्यें दुंदुभि वाजूं लागले आणि महर्षिगणासहवर्तमान सिद्ध व गंधर्व ह्यांनीं इंद्रवीर्यप्रकाशक मंत्रांनीं त्या इंद्राची स्तुति करीत करीत आनंदानें त्याच्यावर पुष्पवृष्टि केली ॥ ३४ ॥ हे शत्रुदमना राजा, त्या कालीं, वृत्रासुराच्या देहांतून निघालेलें जें जीवनामक तेज तें सर्व लोक पहात असतांना लोकातीत अशा भगवत्स्वरूपाचेठिकाणीं जाऊन मिळालें ॥ ३५ ॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील षष्ठस्कंधापैकीं वृत्रवधनामक हा बारावा अध्याय समाप्त झाला ॥ १२ ॥ ॥ आतां या तेराव्या अध्यायामध्यें वृत्रासुराच्या ब्रह्महत्येच्या महाभयामुळें पुष्कळ दिवसपर्यंत इंद्र नाहींसा झाला असतां, विष्णूनें त्याचें संरक्षण केलें अशी कथा निरूपण केली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे बहुदान देणाऱ्या राजा, वृत्रासुराचा वध होतांक्षणींच एका इंद्रावांचून तिन्ही लोक, लोकपालांसहवर्तमान संतापरहित

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होऊन त्यांचीं मनें आनंदित झालीं ॥ १ ॥ त्या युद्धभूमीपासून देव, ऋषि, पितर, इतर प्राणी, देवानुयायी गंधर्ववगैरे, दैत्य आणि ब्रह्मदेव, महादेव व इतरेहि लोकपाळ 'अस्वस्थचित्त असलेल्या इंद्राला न विचारतां' आपआपल्या स्थानाप्रत स्वतःच परत गेले ॥ २ ॥ राजा ह्मगाला– हे मुने, ज्या वृत्रासुराच्या वधानें सर्वहि देवांना सुख प्राप्त झालें, त्याच्याच योगानें इंद्राला दुःख काय ह्मणून झालें? तें इंद्राच्या दुःखाचें कारण श्रवण करण्याची मी इच्छा करितों ॥ ३ ॥ ह्याप्रमाणें राजाचा प्रश्न श्रवण करून, इंद्राच्या दुःखाचें कारण उपोद्घातासहित सांगण्याकरितां श्रीशुकाचार्य ह्मगाला– हे राजा, वृत्रासुराच्या पराक्रमामुळें ऋषींसहवर्तमान उद्विग्न झालेल्या सर्वदेवांनीं त्याचा वध करण्याकरितां इंद्राची प्रार्थना केली असतां, ब्राह्मणवधापासून भयभीत झालेल्या त्या इंद्रानें त्याचा वध करण्याचें मनामध्यें न आणितां, देवांप्रत भाषण केलें कीं ॥ ४ ॥ इंद्र ह्मणाला– हे देवहो, स्त्रिया, भूमि, उदक आणि वृक्ष ह्यांनीं मजवर अनुग्रह करून विश्वरूपवधापासून उत्पन्न झालेलें माझें पातक वांटून घेतलें, ह्मणून मी

अनिर्वृतं शक्रमपृष्ट्वा स्वयमेव प्रतिजग्मुः ॥ २ ॥ हरेरिंद्रस्य ॥ ३ ॥ तस्य दुःखहेतुं वक्तुं प्रस्तावकथामाह । वृत्रविक्रमेत्यादिना । आर्थयन्प्रार्थयंत । बृहद्वधाद्ब्राह्मणवधा-

देवर्षिपितृभूतानि दैत्या देवानुगाः स्वयम् ॥ प्रतिजग्मुः स्वधिष्ण्यानि ब्रह्मेशेंद्रादयस्ततः ॥ २ ॥ राजोवाच ॥ इंद्रस्यानिर्वृतेर्हेतुं श्रोतुमिच्छामि भो मुने ॥ येनासन्सुखिनो देवा हरेर्दुःखं कुतोऽभवत् ॥ ३ ॥ श्रीशुक उवाच ॥ वृत्रविक्रमसंविग्नाः सर्वे देवाः सहर्षिभिः ॥ तद्वधायार्थयन्निंद्रं नैच्छद्भीतो बृहद्वधात् ॥ ४ ॥ इंद्र उवाच ॥ स्त्रीभूजलद्रुमैरेनो विश्वरूपवधोद्भवम् ॥ विभक्तमनुगृह्णद्भिर्वृत्रहत्यां क्व मार्ज्म्यहम् ॥ ५ ॥ श्रीशुक उवाच ॥ ऋषयस्तदुपाकर्ण्य महेंद्रमिदमब्रुवन् ॥ याजयिष्याम भद्रं ते हयमेधेन मा स्म भैः ॥ ६ ॥ हयमेधेन पुरुषं परमात्मानमीश्वरम् ॥ इष्ट्वा नारायणं देवं मोक्ष्यसेऽपि जगद्वधात् ॥ ७ ॥ ब्रह्महा पितृहा गोघ्नो मातृहाऽचार्यहाऽघवान् ॥ श्वादः पुल्कसको वाऽपि शुद्धयेरन्यस्य कीर्तनात् ॥ ८ ॥ तमश्वमेधेन महामखेन श्रद्धाऽन्वितोऽस्माभिरनुष्ठितेन ॥ हत्वाऽपि सब्रह्म चराचरं त्वं न लिप्यसे किं खलनिग्रहेण ॥ ९ ॥ श्रीशुक उवाच ॥ एवं संचोदितो विप्रैर्मरुत्वानहनद्रिपुम् ॥ ब्रह्महत्या हते तस्मिन्नाससाद वृषाकपिम् ॥ १० ॥

द्भीतः सन् ॥ ४ ॥ एनः पापं विभक्तं विभज्य गृहीतम् । मार्ज्मि शोधयामि ॥ ५ ॥ ६ ॥ ७ ॥ ८ ॥ ९ ॥ वृषाकपिमिंद्रम् ॥ १० ॥

त्या पातकापासून मुक्त झालों. आतां मी वृत्रहत्या कोणाला देऊन आपल्या पातकापासून मुक्त होऊं? ॥ ५ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, तें भाषण श्रवण करून, महेंद्राप्रत ऋषींनीं सांगितलें कीं– हे इंद्रा, आह्मीं तुझ्याकडून अश्वमेधयज्ञानें श्रीहरीचें यजन करवूं ह्मणजे तेणेंकरून तुझें कल्याण होईल तूं भिऊं नकोस ॥ ६ ॥ अरे, ब्रह्महत्येच्या पातकाची तर गोष्ट कशाला पाहिजे? परंतु परिपूर्ण, परमात्मा आणि समर्थ अशा देवाधिदेव नारायणाचें, अश्वमेधाच्या योगानें तूं पूजन करून जगताच्या वधापासूनहि मुक्त होशील ॥ ७ ॥ अरे, ब्राह्मण, पिता, गाय, माता व गुरु ह्यांचा घात करणारा पातकी जन व त्याचप्रमाणें श्वानभक्षक आणि चांडाल हेसुद्धां ज्याच्या नामसंकीर्तनानें शुद्ध होतात त्या परमात्म्याचें आह्मीं अनुष्ठान केलेल्या अश्वमेधनामक महाक्रतूनें, तूं श्रद्धापूर्वक यजन केलें असतां, ब्रह्मदेवासहवर्तमान ह्या चराचरविश्वाचा वध जरी केलास तथापि त्या पातकानें लिप्त होणार नाहींस. मग ह्या दुष्टाच्या वधानें तुला काय होणार आहे? ॥ ८ ॥ ९ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्याप्रमाणें ब्राह्मणांनीं प्रेरणा केली असतां, इंद्रानें शत्रूचा वध केला परंतु त्याचा वध होतांक्षणींच मूर्तिमती ब्रह्महत्या त्या इंद्रासमीप प्राप्त झाली ॥ १० ॥ असो. देवादि-कांनीं करविलेल्या त्या ब्रह्महत्येच्या योगानें झालेला ताप इंद्रालाच सहन करावा लागला, त्यामुळें त्याला सुख प्राप्त होईना. आतां धैर्यादिगुणांनीं युक्त अशा इंद्राला दुःख कसें प्राप्त झालें? असें विचारशील तर–हे राजा, नांवलौकिकांची लाज बाळगणारा अब्रूदार पुरुष निंदेस प्राप्त झाला असतां धैर्यादिक गुणहि त्याला सुख देत नाहींत ॥ ११ ॥ हे प्रजाधिपते परीक्षित् राजा, जी स्वरूपानें चांडालस्त्रीसारिखी आहे, जिच्या शरीराला वार्धक्यदशेमुळें कंप सुटला आहे, जी क्षयरोगानें अगदीं व्याप्त झा-ली आहे, जिचें वस्त्र रक्तानें भरलेलें आहे, जी मस्तकावरील आपले शुभ्र केंस पिंजारून ‘उभा रहा उभा रहा’ असें इंद्राला म्हणत आहे व जी मत्स्यासारख्या दुर्गंधीनें

तया देवादिभिः कारितया । स्मेत्यवधारणे । इंद्र एव तापमसहत नान्यः । अमुमिंद्रं निर्वृतिर्नाविशत् । ननु धैर्यादिगुणयुक्तस्य कुतोऽनिर्वृतिस्तत्राह । ह्रीमंतं लज्जावंतम् । वाच्यतां निंद्यताम् ॥ ११ ॥ यक्ष्मग्रस्तां क्षयरोगव्याप्ताम् ॥ १२ ॥ मीनस्येव गंधो यस्य स मीनगंधिः स चासावसुश्च श्वासवायुस्तस्य गंधेन ॥ १३ ॥ प्रागुदीचीं दिशं गतः संस्तूर्णं मानसं सरः ॥ १४ ॥ स इंद्रः सहस्रं वर्षाणि पुष्करनालस्य तंतूनावसत् । कथंभूतः । न लब्धो भोगो येन सः । कुतः । यद्यस्मादिह जले वसन्न-ग्निदूतश्च स्वयम् । अग्नेश्च स्वदूतस्य हविर्भागान्नेतुर्जले प्रवेशासंभवादलब्धभोग इत्यर्थः । पाठांतरे न लब्धो यज्ञभागो येन सः ॥ १५ ॥ त्रिणाकं न अकं दुःखं यस्मि-

तयेंद्रः स्मासहत्तापं निर्वृतिर्नामुमाविशत् ॥ ह्रीमंतं वाच्यतां प्राप्तं सुखयंत्यपि नो गुणाः ॥ ११ ॥ तां ददर्शानुधावंतीं चांडाली-मिव रूपिणीम् ॥ जरया वेपमानांगीं यक्ष्मग्रस्तामसृक्पटाम् ॥ १२ ॥ विकीर्य पलितान्केशांस्तिष्ठतिष्ठेति भाषिणीम् ॥ मीनगंध्य-सुगंधेन कुर्वतीं मार्गदूषणम् ॥ १३ ॥ नभोगतो दिशः सर्वाः सहस्राक्षो विशांपते ॥ प्रागुदीचीं दिशं तूर्णं प्रविष्टो नृप मान-सम् ॥ १४ ॥ स आवसत्पुष्करनालतंतूनलब्धभोगो यदिहाग्निदूतः ॥ वर्षाणि साहस्रमलक्षितोऽतः स चिंतयन्ब्रह्मवधाद्विमोक्षम् ॥ ॥ १५ ॥ तावत्त्रिणाकं नहुषः शशास विद्यातपोयोगबलानुभावः ॥ स संपदैश्वर्यमदांधबुद्धिर्नीतस्तिरश्चां गतिमिंद्रपत्न्या ॥ १६ ॥

न्निति नाकः पुण्यलोकः । तृतीयं नाकं स्वर्गम् । ननु मनुष्यस्य कुतः स्वर्गराज्यं तत्राह । विद्यादिभिरनुभावः स्वर्गपालनसामर्थ्यं यस्य सः । तर्हि तस्मिन्सति कथमिंद्रस्य पुनः स्वर्गप्राप्तिस्तत्राह । स नहुषः संपदैश्वर्याभ्यां यो मदस्तेनांधा बुद्धिर्यस्य स इंद्रपत्न्या शच्या तिरश्चां गतिं सर्पयोनिं नीत उपायेन प्रापितः । एवं ह्या-ख्यायते । नहुषः किल कदाचिदिंद्राणीमुवाच इंद्रस्तावदहमतस्त्वं मां भजेति तया चावेदितवृत्तांतो बृहस्पतिस्तामुवाच ब्राह्मणवाह्यशिबिकायामारुह्यागतं त्वां भजिष्या-मीति ब्रूहि ततोऽसौ ब्रह्मशापात्पतिष्यतीति तया च तथोक्तो नहुषोऽगस्त्यादीन् शिबिकां वाहयामास तदा शीघ्रं सर्पसर्पेत्यगस्त्यं पदा पस्पर्श तेन कुपितेन सर्पो

युक्त असलेल्या आपल्या श्वासवायूच्या दुर्गंधानें मार्ग दूषित करीत आहे; अशी ती ब्रह्महत्या, आपल्या मागोमाग धांवत येत आहे असें पाहून इंद्र, प्रथमतः आकाशामध्यें गेला; परंतु, तेथेंहि ती आहेच असें पाहून नंतर तो सर्व दिशांप्रत हिंडूं लागला. नंतर जिकडे जावें तिकडे ती आहेच असें जेव्हां त्यानें पाहिलें तेव्हां हे राजा, ईशान्य-दिशेस जाऊन तो सत्वर मानससरोवरामध्यें प्रविष्ट झाला ॥ १२ ॥ १३ ॥ १४ ॥ त्या ठिकाणीं कमलदंटाच्या तंतूंमध्यें कोणाच्या दृष्टीस न पडतां ‘ब्रह्महत्येपासून आ-पली सुटका कशी होईल’ अशी चिंता करीत सहस्रसंवत्सरपर्यंत तो इंद्र तेथें राहिला. त्या वेळीं त्याला भोगप्राप्ति मुळींच झाली नाहीं. कारण, त्यानें जलामध्यें वास केला असल्यामुळें त्याला हविर्भाग नेऊन देणाऱ्या अग्निरूपी दूताचा तेथें (पाण्यांत) प्रवेश होईना ॥ १५ ॥ असो. जोंपर्यंत त्या ठिकाणीं इंद्र गुप्त होऊन राहिला होता तों- ॥ ४१ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पर्यंत विद्या, तप, विचार, सामर्थ्य आणि शरीरबल ह्यांच्या योगानें, स्वर्गाचें पालन करण्यास समर्थ असलेल्या नहुष राजानें स्वर्गाचें राज्य केलें. परंतु संपत्ति व ऐश्वर्य ह्यांच्या योगानें उत्पन्न झालेल्या मदामुळें त्याची बुद्धि विवेकशून्य झाली असतां, इंद्रपत्नी शचीनें कांहीं उपाय करून, त्याला सर्पयोनीस पोंचविलें ॥ १६ ॥ तदनंतर ब्राह्मणाच्या वचनानें बोलावलेला तो इंद्र, स्वर्गलोकास प्राप्त झाला. तो पूर्वींच सत्यपालक श्रीहरीच्या ध्यानानें निष्पाप झाला होता व ईशान्यदिशेस असणाऱ्या श्रीरुद्रदेवतेनें निर्बळ केलेलें त्याचें तें ब्रह्महत्यारूप पातक, मानससरोवरांत राहणाऱ्या लक्ष्मीनें रक्षण केलेल्या त्या इंद्राचा पराभव करण्यास समर्थ झालें नाहीं ॥ १७ ॥ हे भरतकुलोत्पन्ना राजा, नंतर ब्रह्मर्षींनीं त्याच्याजवळ येऊन त्याला, ज्यामध्यें श्रीहरीचें आराधन आहे अशा अश्वमेधाची यथाविधि दीक्षा दिली ॥ १८ ॥ नंतर हे

भवेति शप्तो महासर्पोऽजगरोऽभूदिति ॥ १६ ॥ तत इंद्रः स्वर्गं गतः प्राप्तः । कथंभूतः । ब्रह्मगिरा ब्राह्मणवाक्येनोपहूतः सन् । ऋतंभरः सत्यपालको हरिस्तस्य ध्यानेन निवारितमघं येन । प्रागपि तु पापो ब्रह्मवधस्तमिंद्रं नाभ्यभूत्तस्याभिभवं नाकरोत् । कुतः । दिग्देवतया प्रागुदीच्यां दिशि स्थितया श्रीरुद्रेण अवितं रक्षितं संतम् ॥ १७ ॥

ततो गतो ब्रह्मगिरोपहूत ऋतंभरध्याननिवारिताघः ॥ पापस्तु दिग्देवतया हतौजास्तं नाभ्यभूदवितं विष्णुपत्न्या ॥ १७ ॥ तं च ब्रह्मर्षयोऽभ्येत्य हयमेधेन भारत ॥ यथावद्दीक्षयांचक्रुः पुरुषाराधनेन ह ॥ १८ ॥ अथेज्यमाने पुरुषे सर्वदेवमयात्मनि ॥ अश्वमेधे महेंद्रेण वितते ब्रह्मवादिभिः ॥ १९ ॥ स वै त्वाष्ट्रवधो भूयानपि पापचयो नृप ॥ नीतस्तेनैव शून्याय नीहार इव भानुना ॥ २० ॥ स वाजिमेधेन यथोदितेन वितायमानेन मरीचिमिश्रैः ॥ इष्ट्वाऽधियज्ञं पुरुषं पुराणमिंद्रो महानास विधूतपापः ॥ २१ ॥ इदं महाख्यानमशेषपाप्मनां प्रक्षालनं तीर्थपदानुकीर्तनम् ॥ भक्त्युच्छ्रयं भक्तजनानुवर्णनं महेंद्रमोक्षं विजयं मरुत्वतः ॥ २२ ॥

पुरुषस्य हरेराराधनं यस्मिंस्तेन ॥ १८ ॥ सर्ववेदमयात्मनीति वा पाठः । ब्रह्मवादिभिर्विततेऽनुष्ठितेऽश्वमेधे महेंद्रेणेज्यमाने पुरुषे सति ॥ १९ ॥ तेनैव पुरुषेणैव शून्याय नीतः नाशित इत्यर्थः ॥ २० ॥ अधिकृता यज्ञा येन तम् ॥ २१ ॥ पाठादि विधातुमाख्यानं स्तौति । इदमिति । प्रक्षाल्यतेऽनेनेति प्रक्षालनम् । तीर्थपदस्यानुकीर्तनं

राजा, वेदवेत्त्या ऋषींनीं अनुष्ठान केलेल्या त्या अश्वमेधामध्यें इंद्रानें ज्याच्या शरीरामध्यें सर्व देव आहेत अशा सर्वांतर्यामी भगवंताचें पूजन केलें असतां, सूर्याच्या योगानें जसें धुकें नाहींसें होतें तसा तो वृत्रासुरवधरूपी मोठाहि पापसंचय, त्या परमात्म्यानेंच खरोखर नाहींसा केला ॥ १९ ॥ २० ॥ याप्रमाणें तो इंद्र, मरीचिप्रभृति ऋषींनीं यथाविधि अनुष्ठान केलेल्या अश्वमेधाच्या योगानें यज्ञाधिपति पुराणपुरुषाचें पूजन करून, निष्पाप झाला आणि पूर्वींप्रमाणें सर्वांना पूज्य झाला ॥ २१ ॥ असो. जें सर्वपातकांचें क्षालन करितें, ज्यामध्यें पवित्रचरण श्रीहरीचें कीर्तन, भक्तीची वृद्धी, भक्तजनांचें वर्णन, ब्रह्महत्येपासून महेंद्राचा मोक्ष आणि विशेषेंकरून इं-

---

१ याविषयीं अशी कथा आहे कीं,–एकेवेळीं नहुष राजानें इंद्राणीला सांगितलें कीं, आतां मीच, इंद्र आहें, यास्तव तूं माझें सेवन कर. तिनें तो वृत्तांत बृहस्पतीला कळविला असतां तो ह्मणाला–तूं त्याला असें सांग कीं, तूं ब्राह्मणांनीं वाहिलेल्या पालखींत बसून आलास ह्मणजे मी तुझें सेवन करीन. ह्मणजे तो ब्राह्मणाच्या शापानें स्वर्गावरून भ्रष्ट होईल. पुढें इंद्राणीनें तसें केलें असतां, नहुषानें, अगस्त्यादिक ऋषींना पालखीचे वाहक करून आपण, आंत बसला आणि 'लवकर चला लवकर चला' असें ह्मणून त्यानें, अगस्त्य ऋषीला पायानें स्पर्श केला, तेव्हां क्रुद्ध झालेल्या त्या अगस्त्य ऋषीनें, 'तूं सर्प हो' असा शाप दिला असतां, तो अजगर सर्प होऊन स्वर्गावरून खालीं पडला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

द्राचा जय हीं वर्णन केलेलीं आहेत व जें धनदायक, यशस्कर, सर्वपापनिवर्तक, शत्रुनाशक, कल्याणकारक आणि आयुर्वर्धक आहे. असें हें इंद्रसंबंधी महाख्यान, ज्ञानिजनांनीं सर्वदां पठण करावें किंवा प्रत्येक पर्वणीला तरी अवश्य श्रवण करावें ॥ २२ ॥ २३ ॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील षष्ठस्कंधामध्यें इंद्रविजयकथनरूप हा तेरावा अध्याय समाप्त झाला ॥ १३ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या चवदाव्यापासून चार अध्यायांमध्यें, वृत्रासुराचें ज्ञान व भक्ति इत्यादिक गुण श्रवण करून परीक्षित् राजानें प्रश्न केला असतां, वृत्रासुराचें पूर्वजन्मसंबंधीं चरित्र सांगून त्याच्या ज्ञानादिकांचें कारण सांगितलें आहे ॥ १ ॥ त्यांपैकीं ह्या पहिल्या (चवदाव्या) अध्यायामध्यें मोठ्या कष्टानें प्राप्त झालेला चित्रकेतुराजाचा पुत्र एकाएकीं मरण पावला असतां, पुत्राचेठिकाणीं अत्यंत प्रेम असल्यामुळें त्यानें फार शोक केला हें निरूपण केलें आहे ॥ २ ॥ परीक्षित् राजा प्रश्न करितोः– हे ब्रह्मनिष्ठा, रजोगुणात्मक व तमोगुणात्मक स्वभाव असलेल्या त्या पापी वृत्रासुराला, भगवान् नारा-

---

यस्मिन् । भक्तेरुच्छ्रयो यस्मिन् । भक्तजनानामनुवर्णनं यस्मिन् । महेंद्रस्य मोक्षो यस्मिन् । मरुत्त्वतो विशेषेण जयो यस्मिन् ॥ २२ ॥ इंद्रियं तत्पाटवकरं इंद्रसंबंधीति वा । आयुषमायुष्यम् ॥ २३ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे षष्ठस्कंधे टीकायां त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥ ॥ वृत्रस्य ज्ञानभक्त्यादि श्रुत्वा पृष्टः परीक्षिता ॥ हेतुमाह

पठेयुराख्यानमिदं सदा बुधाः शृण्वंत्यथो पर्वणि पर्वणींद्रियम् ॥ धन्यं यशस्यं निखिलाघमोचनं रिपुंजयं स्वस्त्ययनं तथायुषम् ॥ २३ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे षष्ठस्कंधे इंद्रविजयो नाम त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥ ॥ परीक्षिदुवाच ॥ रजस्तमःस्वभावस्य ब्रह्मन्वृत्रस्य पाप्मनः ॥ नारायणे भगवति कथमासीद्दृढा मतिः ॥ १ ॥ देवानां शुद्धसत्त्वानामृषीणां चामलात्मनाम् ॥ भक्तिर्मुकुंदचरणे न प्रायेणोपजायते ॥ २ ॥ रजोभिः समसंख्याताः पार्थिवैरिह जंतवः ॥ तेषां ये केचनेहंते श्रेयो वै मनुजादयः ॥ ३ ॥ प्रायो मुमुक्षवस्तेषां केचनैव द्विजोत्तम ॥ मुमुक्षूणां सहस्रेषु कश्चिन्मुच्येत सिद्ध्यति ॥ ४ ॥ मुक्तानामपि सिद्धानां नारायणपरायणः ॥ सुदुर्लभः प्रशांतात्मा कोटिष्वपि महामुने ॥ ५ ॥ वृत्रस्तु स कथं पापः सर्वलोकोपतापनः ॥ इत्थं दृढमतिः कृष्ण आसीत्संग्राम उल्बणे ॥ ६ ॥

चतुर्भिस्तत्प्राग्जन्मचरितोक्तिभिः ॥ १ ॥ चतुर्दशे तु सहसा कृच्छ्रलब्धे सुते मृते ॥ चित्रकेतोरतिस्नेहादतिशोको निरूप्यते ॥ २ ॥ रजश्च तमश्च स्वभावो यस्य ॥ १ ॥ ॥ २ ॥ भक्तेर्दुर्लभत्वं प्रपंचयति रजोभिरिति त्रिभिः । पार्थिवै रजोभिः परमाणुभिः समाः संख्याताः अनंता इत्यर्थः । जंतवो जीवास्तेषां मध्ये ये केचन कतिपये श्रेयो धर्ममीहंते कुर्वंति ॥ ३ ॥ गृहादिसंगाद्विमुच्यते । सिद्ध्यति तत्त्वं जानाति ॥ ४ ॥ ५ ॥ ६ ॥

यणाचेठिकाणीं दृढमति कशी प्राप्त झाली होती ? ॥ १ ॥ कारण, शुद्धसत्त्वगुणरूपी असलेल्या देवांना व शुद्धचित्त असलेल्या ऋषींनाहि बहुतकरून मुकुंदचरणाचेठिकाणीं भक्ति प्राप्त होत नाहीं ॥ २ ॥ आतां भक्तीचें दुर्लभत्व सांगतो– ह्या भूमंडळावर पृथ्वीच्या परमाणूंइतके असंख्यात प्राणी आहेत परंतु त्यांपैकीं कांहीं जे मनुष्यादिक प्राणी आहेत तेमात्र धर्माचरण करितात ॥ ३ ॥ त्यांमध्येंहि कांहीं श्रेष्ठ ब्राह्मणच बहुतकरून मुमुक्षु (मोक्षाची इच्छा करणारे) असतात व त्या हजारो मुमुक्षूमध्येंहि एखादाच गृहादिसंगापासून मुक्त होऊन तत्त्व जाणतो ॥ ४ ॥ आणि हे महर्षे, मुक्त व तत्त्वज्ञानी अशा कोट्यावधि लोकांमध्येंसुद्धां ज्याचें अंतःकरण अत्यंत शांत आहे व नारायण हाच ज्याचा मुख्य आश्रय आहे असा पुरुष अत्यंत दुर्लभ आहे ॥ ५ ॥ असें असून सर्वलोकांना अत्यंत ताप देणारा असा तो पापी वृत्रासुर,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भयंकर संग्रामामध्येंहि सदानंदरूप परमात्म्याचेठिकाणीं अशाप्रकारचा दृढभक्तिमान् कसा झाला ? ॥ ६ ॥ आतां इंद्राच्या भीतीनेंच सदानंदरूप परमात्म्याला तो शरण गेला, असेंही ह्मणतां येत नाहीं. कारण, पराक्रमाच्या योगानें त्यानें संग्रामामध्यें इंद्राला संतुष्ट केलें. तस्मात् हे प्रभो, त्या वृत्रासुराच्या भक्त्यादिकांविषयीं आह्मांला मोठा संशय आला असल्यामुळें त्याचें कारण श्रवण करण्याची उत्सुकता प्राप्त झाली आहे ॥ ७ ॥ सूत ह्मणाला– हे शौनका, श्रद्धायुक्त अशा त्या परीक्षित् राजानें केलेला उत्तम प्रश्न श्रवण करून, भगवान् व्यासपुत्र शुकाचार्यानें त्याची प्रशंसा करून भाषण केलें कीं– ॥ ८ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, नारदापासून, देवलापासून आणि व्यासमुखापासूनहि श्रवण केलेला हा इतिहास तूं स्वस्थ अंतःकरणपूर्वक उत्तम प्रकारेंकरून श्रवण कर ॥ ९ ॥ हे राजा, शूरसेननामक देशामध्यें चित्रकेतु नांवानें प्रसिद्ध असा एक सार्वभौम राजा होता, त्याचे सर्व मनोरथ पृथ्वी पूर्ण करीत असे ॥ १० ॥ त्याला एककोटि भार्या असून तो स्वतः पुत्रोत्पादनास समर्थ

न चेंद्रभिया कृष्णं शरणं गत इत्याह । यः पौरुषेणेति ॥ ७ ॥ ८ ॥ यथा यथावत् शृणु ॥ ९ ॥ १० ॥ भार्यासहस्राणां दशसहस्राणि कोटिरित्यर्थः । सांतानिकः स्वयं

अत्र नः संशयो भूयान् श्रोतुं कौतूहलं प्रभो ॥ यः पौरुषेण समरे सहस्राक्षमतोषयत् ॥ ७ ॥ सूत उवाच ॥ परीक्षितोऽथ संप्रश्नं भगवान्बादरायणिः ॥ निशम्य श्रद्दधानस्य प्रतिनंद्य वचोऽब्रवीत् ॥ ८ ॥ श्रीशुक उवाच ॥ शृणुष्वावहितो राजन्नितिहासमिमं यथा ॥ श्रुतं द्वैपायनमुखान्नारदाद्देवलादपि ॥ ९ ॥ आसीद्राजा सार्वभौमः शूरसेनेषु वै नृप ॥ चित्रकेतुरिति ख्यातो यस्यासीत्कामधुङ्मही ॥ १० ॥ तस्य भार्यासहस्राणां सहस्राणि दशाभवन् ॥ सांतानिकश्चापि नृपो न लेभे तासु संततिम् ॥ ११ ॥ रूपौदार्यवयोजन्मविद्यैश्वर्यश्रियादिभिः ॥ संपन्नस्य गुणैः सर्वैश्चिंता वंध्यापतेरभूत् ॥ १२ ॥ न तस्य संपदः सर्वा महिष्यो वामलोचनाः सार्वभौमस्य भूश्चेयमभवन्प्रीतिहेतवः ॥ १३ ॥ तस्यैकदा तु भवनमंगिरा भगवानृषिः ॥ लोकाननुचरन्नेतानुपागच्छद्यदृच्छया ॥ १४ ॥ तं पूजयित्वा विधिवत्प्रत्युत्थानार्हणादिभिः ॥ कृतातिथ्यमुपासीदत्सुखासीनं समाहितः ॥ १५ ॥ महर्षिस्तमुपासीनं प्रश्रयावनतं क्षितौ ॥ प्रतिपूज्य महाराज समाभाष्येदमब्रवीत् ॥ १६ ॥

संतानार्होऽपि पुत्रोत्पादनसमर्थोऽपि तासु संततिं न लेभे । सर्वास्ता वंध्या एव दैवयोगेन मिलिता इति भावः ॥ ११ ॥ तदेवाह । वंध्यापतेरिति ॥ १२ ॥ १३ ॥ १४ ॥ उपासीदत्तस्य समीपमुपविवेश । समाहितः संयतः ॥ १५ ॥ १६ ॥

असतांहि दैवयोगानें त्या सर्व वंध्याच मिळाल्या असल्यामुळें त्यांचेठिकाणीं त्या राजाला संतति प्राप्त झाली नाहीं ॥ ११ ॥ ह्यास्तव रूप, औदार्य, वय, जन्म, विद्या, ऐश्वर्य आणि संपत्ति इत्यादि सर्वगुणांनीं संपन्न असलेल्याहि त्या वंध्यापति चित्रकेतु राजाला मोठी चिंता उत्पन्न झाली ॥ १२ ॥ त्यामुळें सर्व संपत्ति, सुंदरनयनांनीं युक्त असलेल्या राण्या आणि पाहिजे ते पदार्थ देणारी ही पृथ्वी, ह्यांच्या योगानें त्या सार्वभौम राजाला आनंद होईना ॥ १३ ॥ नंतर एकेदिवशीं भगवान् अंगिरा ऋषि, ह्या त्रैलोक्यामध्यें पर्यटन करीत करीत भगवत्प्रेरणेनें त्याचे घरीं प्राप्त झाला ॥ १४ ॥ त्या कालीं चित्रकेतुराजानें प्रत्युत्थान व पूजासाहित्य इत्यादि उपचारांनीं त्याचें यथाविधि पूजन केलें आणि भोजन करून तो आसनावर स्वस्थ बसला असतां, तो राजा, विनयपूर्वक त्याचे समीप बसला ॥ १५ ॥ त्या वेळीं हे महाराजा परीक्षिते, विनयानें नम्र होऊन आपल्या समीपभागीं भूमीवर बसलेल्या राजाचा त्या महर्षीनें सत्कार केला व त्याला चांगल्या प्रकारानें संबोधन देऊन

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असें भाषण केलें कीं ॥ १६ ॥ अंगिरा ऋषि ह्मणाला—हे राजा, जसा महत्तत्त्व अहंकारादिक सात प्रकृतींच्या योगानें जीव नित्य सुरक्षित असतो व तो त्यांच्यावांचून क्षणभरहि राहत नाहीं तसाच राजाहि गुरु, अमात्य, देश, किल्ले, द्रव्यसंचय, दंड आणि मित्र ह्या सात प्रकृतींनीं नित्य सुरक्षित असला ह्मणजे राज्यसुखाचा अनुभव घेतो. ह्याकरितां तुझें स्वतःचें तसेंच प्रकृतींचें आरोग्य व स्वस्तिक्षेम आहेना ? ॥ १७ ॥ हे नृपा, सात प्रधानांवर आपला सर्वभार टाकून जसा राजा त्या प्रधानांच्या साह्यानें राज्यसुखाचा उपभोग घेतो तसेच प्रधानहि आपल्या सर्व अधिकारांचें मुख्य प्रभुत्व राजावर टाकून राजाच्याच योगानें धनांनीं समृद्ध होतात ॥ १८ ॥ तस्मात् भार्या, प्रजा, अमात्य, सेवक, व्यापारी लोक, मंत्री, नगरवासी लोक, मांडलिक राजे आणि पुत्र हे सर्व तुझ्या आज्ञेंत आहेत ना ? ॥ १९ ॥ व त्याचप्र-

---

अपि किम् । अनामयमारोग्यम् । स्वस्ति शुभम् । प्रकृत्यधीनमेव हि राज्यमिति सदृष्टांतमाह । यथा महदाद्याभिः सप्तभिः प्रकृतिभिः पुमान् जीवो नित्यं गुप्तो भवति नतु तद्व्यतिरेकेण क्षणमपि तिष्ठति तथा राजाऽपि सप्तप्रकृतिभिः स्वाम्यमात्यौ जनपदा दुर्गद्रविणसंचयाः । दंडो मित्रं च तस्यैताः सप्त प्रकृतयो मता इत्युक्तलक्षणाभिर्नित्यं गुप्तः सन् । स्वामी गुरुः स्वयं वा ॥ १७॥ आत्मानं प्रकृतिष्वद्धा साक्षान्निधाय तदनुवर्तिनं कृत्वा श्रेयो राज्यसुखं प्राप्नुयादित्यर्थः । प्रकृतीनां च सुखं राजाधीनमेवेत्याह । हे नरदेव तथा प्रकृत-

अंगिरा उवाच ॥ अपि तेऽनामयं स्वस्ति प्रकृतीनां तथात्मनः ॥ यथा प्रकृतिभिर्गुप्तः पुमान् राजाऽपि सप्तभिः ॥ १७ ॥ आत्मानं प्रकृतिष्वद्धा निधाय श्रेय आप्नुयात् ॥ राज्ञा तथा प्रकृतयो नरदेवाहिताधयः ॥ १८॥ अपि दाराः प्रजाऽमात्या भृत्याः श्रेण्योऽथ मंत्रिणः ॥ पौरा जानपदा भूपा आत्मजा वशवर्तिनः ॥ १९ ॥ यस्यात्माऽनुवशश्चेत्स्यात्सर्वे तद्वशगा इमे ॥ लोकाः सपाला यच्छंति सर्वे बलिमतंद्रिताः ॥ २० ॥ आत्मना प्रीयते नात्मा परतः स्वत एव वा ॥ लक्षयेऽलब्धकामं त्वां चिंतया शबलं मुखम् ॥ २१ ॥ एवं विकल्पितो राजन्विदुषा मुनिनाऽपि सः ॥ प्रश्रयावनतोऽभ्याह प्रजाकामस्ततो मुनिम् ॥ २२ ॥ चित्रकेतुरुवाच ॥ भगवन्किं न विदितं तपोज्ञानसमाधिभिः ॥ योगिनां ध्वस्तपापानां बहिरंतः शरीरिषु ॥ २३ ॥

योऽपि राज्ञा आहिताधयो निहितनिक्षेपा धनैः समृद्धा भवंति । पाठांतरे आ समंततो हताधयो निरस्तमनोदुःखा भवंतीत्यर्थः ॥ १८ ॥ प्रजाश्च अमात्याश्च श्रेण्यश्च समयविशेषेण संघशो वर्तमाना वणिक्प्रभृतयः । पौराः पुरवासिनः । जानपदास्तत्तद्देशाधिकारिणः मंत्रसहायो मंत्री कर्मसहायोऽमात्य इति भेदः ॥ १९ ॥ तव मनः स्ववशे वा न वेत्यर्थात्पृच्छति । यस्यात्मा मनोऽनुवशोऽनुवर्ती अधीनः स्यात्तस्य वशगा इमे सर्वे भवंति किंच लोकाश्च तस्य बलिं यच्छंति ॥ २० ॥ आत्मा भवान् आत्मना न प्रीयते न तुष्यति तत्किम् । परतो वा स्वतो वाऽलब्धकामं त्वां लक्षये ॥ २१ ॥ विदुषा सर्वज्ञेनापि ॥ २२ ॥ लब्धकामत्वं कथयन्पुत्रं याचते । भगवन्निति चतुर्भिः ॥ २३ ॥

माणें तुझें मनहि तुझ्या स्वाधीन आहेना ? कारण ज्याचें मन स्वाधीन असेल त्याच्याच आज्ञेमध्यें हे सर्व भार्यादि असतात व सर्व लोकहि आपल्या पालकांसहवर्तमान आळस न करितां त्याला करभार आणून देतात ॥ २० ॥ परंतु हे राजा, तूं आपल्या मनांच्या योगानें संतुष्ट दिसत नाहींस ह्याचें कारण काय ? कारण, तुझें मुख अगदीं चिंताक्रांत झाल्यासारिखें दिसत आहे, ह्यावरून तुझा कांहींतरी मनोरथ स्वतां तुझ्याकडून अथवा दुसऱ्याकडून पूर्ण झाला नाहीं असें मला वाटतें ॥ २१ ॥ हे राजा, याप्रमाणें स्वतः सर्वज्ञ असूनहि त्या मुनीनें, चित्रकेतु राजाला नानाप्रकारचे प्रश्न केले असतां, नंतर विनयानें नम्र झालेला तो प्रजेच्छु राजा, त्या मुनीला ह्मणाला कीं ॥ २२ ॥ चित्रकेतु ह्मणाला– हे भगवन्, तप, ज्ञान व समाधि ह्यांच्या योगानें ज्यांचें पातक नाहींसें झालें आहे, त्या तुह्मां योगिजनांना आह्मांसार-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ख्या देहधारी प्राण्यांच्या बाहेर व आंत (मनांत) जें कांहीं आहे तें ठाऊक नाहीं काय? सर्वहि ठाऊक आहे ॥ २३ ॥ तथापि हे ब्रह्मनिष्ठा, तूं जाणत असूनहि ज्या-अर्थीं मला प्रेरणा करून माझ्या मनामध्यें चिंतित असलेलें विचारीत आहेस त्याअर्थीं तुझ्या आज्ञेनेंच मी आतां तुला कथन करितों ॥ २४ ॥ हे भगवन्, क्षुधा व तृषा ह्यांनीं व्याप्त होऊन अन्नोदकांची इच्छा करणाऱ्या पुरुषाला जसे इतर चंदनादिक पदार्थ सुख देत नाहींत त्याप्रमाणें लोकपालांनींहि इच्छा करण्यास योग्य अशा ह्या सार्वभौम ऐश्वर्यसंबंधीं संपत्ति मज निपुत्रिकाला आनंद देत नाहींत ॥ २५ ॥ तस्मात् हे महाभाग्यशाली मुने, निपुत्रिकपणापासून तूं माझें रक्षण कर, ह्मणजे पूर्वजांसहवर्तमान प्राप्त होणाऱ्या दुस्तर नरकांतून प्रजेच्या योगानें जसे आह्मी तरून जाऊं तसा आह्मांस कांहींतरी उपाय सांगावा ॥ २६ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला— हे परीक्षित् राजा, ह्याप्रमाणें चित्रकेतु राजानें त्या दयालु भगवान् ब्रह्मपुत्राची प्रार्थना केली असतां, त्या समर्थ ब्राह्मणानें राजाला पुत्रप्राप्ति होण्याकरितां त्वष्टानामक आदित्याला

॥ २४ ॥ अप्रजमपुत्रम्। क्षुत्तृड्भ्यामन्नपानकाममदरे स्रक्चंदनादयो यथा न सुखयंति ॥ २५ ॥ पूर्वैः पित्रादिभिः सह गतं प्राप्तं तमो नरकं प्रजया यथा तरेम तत्तथा विधेहि ॥ २६ ॥

तथापि पृच्छतो ब्रूयां ब्रह्मन्नात्मनि चिंतितम् ॥ भवतो विदुषश्चापि चोदितस्त्वदनुज्ञया ॥ २४ ॥ लोकपालैरपि प्रार्थ्याः साम्राज्यैश्वर्यसंपदः ॥ न नंदयंत्यप्रजं मां क्षुत्तृट्काममिवापरे ॥ २५ ॥ ततः पाहि महाभाग पूर्वैः सह गतं तमः ॥ यथा तरेम दुस्तारं प्रजया तद्विधेहि नः ॥ २६ ॥ श्रीशुक उवाच ॥ इत्यर्थितः स भगवान्कृपालुर्ब्रह्मणः सुतः ॥ श्रपयित्वा चरुं त्वाष्ट्रं त्वष्टारमयजद्विभुः ॥ २७ ॥ ज्येष्ठा श्रेष्ठा च या राज्ञो महिषीणां च भारत ॥ नाम्ना कृतद्युतिस्तस्यै यज्ञोच्छिष्टमदाद्द्विजः ॥ २८ ॥ अथाह नृपतिं राजन्भवितैकस्तवात्मजः ॥ हर्षशोकप्रदस्तुभ्यमिति ब्रह्मसुतो ययौ ॥ २९ ॥ साऽपि तत्प्राशनादेव चित्रकेतोरधारयत् ॥ गर्भं कृतद्युतिर्देवी कृत्तिकाग्नेरिवात्मजम् ॥ ३० ॥ तस्या अनुदिनं गर्भः शुक्लपक्ष इवोडुपः ॥ ववृधे शूरसेनेशतेजसा शनकैर्नृप ॥ ३१ ॥ अथ काल उपावृत्ते कुमारः समजायत ॥ जनयन् शूरसेनानां शृण्वतां परमां मुदम् ॥ ३२ ॥

॥ २७ ॥ यज्ञोच्छिष्टं यज्ञशेषम् ॥ २८ ॥ जन्मना हर्षं मरणेन च शोकं प्रददातीति तथा। इत्येवमुक्त्वा ययौ ॥ २९ ॥ ३० ॥ शूरसेनानामीशस्य तेजसा वीर्येण यो गर्भः स ववृधे ॥ ३१ ॥ ३२ ॥

अर्पण करण्याच्या उद्देशानें चरु सिद्ध करून त्याच्या योगानें त्वष्ट्याचें यजन केलें ॥ २७ ॥ आणि हे भरतकुलोत्पन्ना राजा, त्या अंगिरानामक ब्राह्मणानें राजाच्या राण्यांमध्यें ज्येष्ठ व गुणांनींहि श्रेष्ठ अशी जी कृतद्युति नांवाची राणी होती तिला, यज्ञशेष राहिलेला चरु अर्पण करून राजाप्रत भाषण केलें कीं,—हे राजा, तुला हर्ष आणि शोक देणारा असा एकपुत्र होईल. असें सांगून तो ब्रह्मपुत्र निघून गेला ॥ २८ ॥ २९ ॥ नंतर कृत्तिकादेवींनें ज्याप्रमाणें अग्नीपासून स्कंदरूप पुत्र धारण केला होता त्याप्रमाणें त्या वंध्या कृतद्युतीनेंहि तो हविःशेष भक्षण केल्यामुळेंच चित्रकेतूपासून गर्भधारण केलें ॥ ३० ॥ हे राजा, शूरसेन देशांचा अधिपति अशा चित्रकेतु राजाच्या वीर्यापासून झालेला तो तिचा गर्भ शुक्लपक्षांतील चंद्राप्रमाणें दिवसानुदिवस हळूहळू वाढूं लागला ॥ ३१ ॥ नंतर प्रसूतिकाल प्राप्त झाला असतां, शूरसेननामक देशां-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मध्यें राहणाऱ्या प्राण्यांना अत्यंत आनंद उत्पन्न करीत होत्साता तो पुत्र जन्मास आला ॥ ३२ ॥ इकडे तें वर्तमान ऐकतांक्षणींच आनंदित झालेल्या त्या राजानें स्नान करून, शुचिर्भूत होऊन अलंकार धारण केले; आणि ब्राह्मणांकडून पुण्याहवाचनद्वारा आशीर्वाद ग्रहण करून पुत्राचें जातककर्म करविलें ॥ ३३ ॥ आणि त्या ब्राह्मणांना, उदारचित्त अशा त्या चित्रकेतुराजानें, त्या कालीं सुवर्ण, रौप्य, वस्त्रें, भूषणें, गांव, अश्व, गज आणि साठकोटि गाई अर्पण करून 'ह्या वेळेस लोकांचे मनोरथ पूर्ण केले असतां आपल्या पुत्राला यश व संपत्ति प्राप्त होऊन त्याच्या आयुष्याचीहि वृद्धि होईल' अशा अभिप्रायानें त्या राजानें इतर प्राण्यांचेहि मनोरथ, पर्जन्य जसा वृष्टि करून लोकांचे मनोरथ पूर्ण करितो त्याप्रमाणें पूर्ण केले ॥ ३४ ॥ ३५ ॥ नंतर, जसें निर्धन मनुष्यास संकटानें धन प्राप्त झालें असतां त्याचेठिकाणीं त्याची प्रीति वाढत जात्ये त्याप्रमाणें मोठ्या संकटानें प्राप्त झालेल्या पुत्राचेठिकाणीं त्या राजर्षि पित्याचें प्रेम दिवसानुदिवस अधिकाधिक वाढूं लागलें ॥ ३६ ॥ त्याचप्रमाणें कृत-

जातकं जातकर्म ॥ ३३ ॥ अर्बुदं दश कोट्यः । वेदे तु कोटिरेवार्बुदम् । नियुतं च प्रयुतं चार्बुदं चेति प्रयुतानंतरं निर्देशात् ॥ ३४ ॥ धन्यं धनकरम् । आयुष्यमायु-

हृष्टो राजा कुमारस्य स्नातः शुचिरलंकृतः ॥ वाचयित्वाऽऽशिषो विप्रैः कारयामास जातकम् ॥ ३३ ॥ तेभ्यो हिरण्यं रजतं वासांस्याभरणानि च ॥ ग्रामान्हयान्गजान्प्रादाद्धेनूनामर्बुदानि षट् ॥ ३४ ॥ ववर्ष काममन्येषां पर्जन्य इव देहिनाम् ॥ धन्यं यशस्यमायुष्यं कुमारस्य महामनाः ॥ ३५ ॥ कृच्छ्रलब्धेऽथ राजर्षेस्तनयेऽनुदिनं पितुः ॥ यथा निःस्वस्य कृच्छ्राप्ते धने स्नेहोऽन्ववर्धत ॥ ३६ ॥ मातुस्त्वतितरां पुत्रे स्नेहो मोहसमुद्भवः ॥ कृतद्युतेः सपत्नीनां प्रजाकामज्वरोऽभवत् ॥ ३७ ॥ चित्रकेतोरतिप्रीतिर्यथा दारे प्रजावति ॥ न तथाऽन्येषु संजज्ञे बालं लालयतोऽन्वहम् ॥ ३८ ॥ ताः पर्यतप्यन्नात्मानं गर्हयंत्योऽभ्यसूयया ॥ आनपत्येन दुःखेन राज्ञोऽनादरणेन च ॥ ३९ ॥ धिगप्रजां स्त्रियं पापां पत्युश्चागृहसंमताम् ॥ सुप्रजाभिः सपत्नीभिर्दासीमिव तिरस्कृताम् ॥ ४० ॥ दासीनां को नु संतापः स्वामिनः परिचर्यया ॥ अभीक्ष्णं लब्धमानानां दास्या दासीव दुर्भगाः ॥ ४१ ॥

ष्करम् । महामना अत्युदारः ॥ ३५ ॥ ३६ ॥ मोहस्य समुद्भवो यस्मिन् । प्रजाकामरूपो ज्वरस्तापः ॥ ३७ ॥ दार इत्येकवचनमार्षम् ॥ ३८ ॥ आनपत्येनापुत्रत्वनिमित्तेन ॥ ३९ ॥ न गृहे संमतां न बहुमताम् । यद्वा । गृहिण्येव गृहं न भार्येति संमतामित्यर्थः ॥ ४० ॥ दास्या दासी यथा तथा वयं दुर्भगाः ॥ ४१ ॥

द्युति मातेचें त्या पुत्रावर अत्यंत मोहकारक प्रेम वाढूं लागलें व तिच्या सर्व सवतींना प्रजेच्छारूप ताप होऊं लागला ॥ ३७ ॥ इकडे प्रतिदिवशीं बालकाचें लालन करीत असल्यामुळें चित्रकेतु राजाची जशी त्या पुत्रवती भार्येचेठिकाणीं अतिप्रीति जडली तशी इतरांचेठिकाणीं जडली नाहीं ॥ ३८ ॥ ह्मणून त्या सर्व सवती, पोटीं संतान नसल्यामुळें होणारें दुःख व त्यामुळेंच होत असलेला राजापासून अनादर ह्यांच्या योगानें अतिशय संतप्त होऊन पुत्रयुक्त असलेल्या सवतीचेठिकाणीं मत्सर बुद्धीनें आपलीच निंदा करूं लागल्या ॥ ३९ ॥ अरेरे ! चांगल्या संततीनें युक्त असलेल्या सवती, जिचा दासीप्रमाणें तिरस्कार करितात व पतिहि गृहामध्यें जिला बहुमान देत नाहीं त्या पापिणी निपुत्रिक स्त्रीला धिक्कार असो ॥ ४० ॥ अहो, स्वामिसेवेमुळें ज्यांना वारंवार सन्मान मिळतो त्या दासींनातरी खरोखर कायबरें दुःख आहे ? कांहींच नाहीं. कारण, त्यांच्याहातून सेवा घडत असल्यामुळें त्यांना मानतरी मिळत असतो आणि आह्मींतर वंध्या असल्यामुळें केवळ अनादरालाच पात्र आहों. तस्मात् दासीच्याहि दासी-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सारख्या खरोखर भाग्यहीन आहों ॥ ४१ ॥ हे राजा, ह्याप्रमाणें सवतीच्या पुत्रसंपत्तीनें अतिसंतप्त झालेल्या व ज्यांचें वांचणेंहि राजाला अगदीं नकोसें झालें आहे अशा त्या सर्व स्त्रियांना कृतद्युतीविषयीं बलवत्तर द्वेष उत्पन्न झाला ॥ ४२ ॥ तेव्हां द्वेषामुळें त्या स्त्रियांची बुद्धि अगदीं नष्ट होऊन त्यांचें मनहि फार क्रूर झालें व राजा पुत्रावर प्रेम करीत असे तें त्यांना सहन झालें नाहीं, ह्मणून त्यांनीं त्या पुत्राला विष घातलें ॥ ४३ ॥ इकडे सवतींचें तें महापातकरूप कृत्य कृतद्युतीला माहित नसल्यामुळें 'आपला बालक निद्रिस्तच आहे' असें मानून त्याला दुरूनच पाहून ती घरांत संचार करीत होती ॥ ४४ ॥ परंतु पुढें आपला बालक फारवेळ निजला आहे असें जाणून त्या चतुर राणी-नें 'हे भद्रे, माझ्या पुत्राला घेऊन ये' ह्मणून दाईला आज्ञा केली ॥ ४५ ॥ नंतर ती दासी निद्रिस्त बालकाजवळ गेली आणि त्याच्या नेत्रांतील बुबळें बाहेर आलीं आ-हेत व प्राण, इंद्रियें आणि आत्मा ह्यांनीं त्याचा त्याग केला आहे असें समजून 'अरेरे ! माझा सर्वस्वीं घात झाला' अशा मोठ्यानें आक्रोश करून ती भूमीवर पडली

न संमता वृत्तिर्जीवनं यासाम् ॥ ४२ ॥ विद्वेषेण नष्टा मतिर्यासां ताः । गरं विषम् । दुर्मर्षा असहमानाः ॥ ४३ ॥ ४४ ॥ धात्रीं स्तनदायिनीम् ॥ ४५ ॥ उद्गते तारके

एवं संदह्यमानानां सपत्न्याः पुत्रसंपदा ॥ राज्ञोऽसंमतवृत्तीनां विद्वेषो बलवानभूत् ॥ ४२ ॥ विद्वेषनष्टमतयस्त्रियो दारुणचेतसः ॥ गरं ददुः कुमाराय दुर्मर्षा नृपतिं प्रति ॥ ४३ ॥ कृतद्युतिरजानंती सपत्नीनामघं महत् ॥ सुप्त एवेति संचिंत्य निरीक्ष्य व्यचरद्गृहे ॥ ४४ ॥ शयानं सुचिरं बालमुपधार्य मनीषिणी ॥ पुत्रमानय मे भद्रे इति धात्रीमचोदयत् ॥ ४५ ॥ सा शयानमुपव्रज्य दृष्ट्वा चोत्तारलोचनम् ॥ प्राणेंद्रियात्मभिस्त्यक्तं हतास्मीत्यपतद्भुवि ॥ ४६ ॥ तस्यास्तदाकर्ण्य भृशातुरं स्वरं घ्नंत्याः कराभ्यामुर उच्चकै-रपि ॥ प्रविश्य राज्ञी त्वरयाऽऽत्मजांतिकं ददर्श बालं सहसा मृतं सुतम् ॥ ४७ ॥ पपात भूमौ परिवृद्धया शुचा मुमोह विभ्रष्टशि-रोरुहांबरा ॥ ४८ ॥ ततो नृपांतःपुरवर्तिनो जना नराश्च नार्यश्च निशम्य रोदनम् ॥ आगत्य तुल्यव्यसनाः सुदुःखितास्ताश्च व्यलीकं रुरुदुः कृतागसः ॥ ४९ ॥ श्रुत्वा मृतं पुत्रमलक्षितांतकं विनष्टदृष्टिः प्रपतन्स्खलन्पथि ॥ स्नेहानुबंधैधितया शुचा भृशं विमूर्छितोऽनुप्रकृतिर्द्विजैर्वृतः ॥ ५० ॥

कनीनिके ययोस्ते लोचने यस्य तम् ॥ ४६ ॥ ४७ ॥ विभ्रष्टाः शिरोरुहा अंबरं च यस्याः सा ॥ ४८ ॥ ताश्च सपत्न्योऽपि ॥ ४९ ॥ अलक्षितोंऽतको मृत्युहेतुर्यस्य तम् ।

॥ ४६ ॥ नंतर हातांनीं वक्षःस्थळ बडवून घेणाऱ्या त्या दासीचा तो अत्यंत आक्रोशयुक्त उच्चस्वर श्रवण करून, राणी मोठ्या त्वरेनें पुत्राजवळ आली आणि पहाते तों बाल्यावस्थेमध्यें असलेला आपला पुत्र एकाएकीं मरण पावला असें तिच्या दृष्टीस पडलें ॥ ४७ ॥ आणि अतिशय वाढलेल्या शोकामुळें ती अगदीं मूर्छित होऊन भूमीवर पडली असतां, तिचे केंस व वस्त्र हीं अगदीं अस्ताव्यस्त होऊन गेलीं ॥ ४८ ॥ नंतर राजाच्या अंतःपुरांतील पुरुष व स्त्रियावगैरे सर्वलोक, तें राजपत्नीचें रोदन श्रवण करून तेथें आले व समदुःखी होत्साते ते रोदन करूं लागले तेव्हां अपराध करणाऱ्या त्या सवतीहि अत्यंत दुःखित होऊन मिथ्याच रोदन करूं लागल्या ॥ ४९ ॥ नंतर कांहींएक कारण नसतां पुत्र मरण पावला हें वर्तमान श्रवण करून, ज्याच्या डोळ्यांपुढें वारंवार आंधेरी येत आहे, ज्याच्या मागून प्रधानमंडळ धांवत आहे व जो स्ने-हानुबंधानें वाढलेल्या शोकानें मार्गामध्यें वारंवार ठेंचकळत, पडत व मूर्छित होत आहे असा तो चित्रकेतु राजा, ब्राह्मणांनीं परिवेष्टित होऊन, मरण पावलेल्या त्या बा-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लकाच्या पायांसमीप येऊन पडला; त्या वेळीं त्याचे केंस व वस्त्रें हीं अगदीं अस्ताव्यस्त झालीं होतीं. तो दीर्घश्वास टाकीत असे, त्याचे नेत्र अश्रुबिंदूनीं भरून गेले होते व त्याचा कंठ दाटून आल्यामुळें त्याच्यानें कांहींच भाषण करवेनासें झालें ॥५०॥५१॥ त्या कालीं कृतद्युति राणी, अतिशोकानें व्याप्त झालेल्या त्या आपल्या पतीला आणि एकच संततिरूप असून मरण पावलेल्या बालपुत्राला अवलोकन करून, अंतःपुरवासी जन आणि अमात्यादि प्रधानमंडळ ह्यांना शोक उत्पन्न करीत होत्साती नानाप्रकारांनीं विलाप करूं लागली ॥ ५२ ॥ तेव्हां केशर व चंदन ह्यांनीं भूषित असलेल्या आपल्या दोन्ही स्तनांवर कज्जलयुक्त बाष्प बिंदूंनीं सिंचन करणारी ती कृतद्युति, ज्यांच्यापासून पुष्पें गळून पडत आहेत असे आपले केंस अस्ताव्यस्त करून सुस्वर आणि विचित्र असें टिटवीपक्षिणीप्रमाणें रोदन करीत करीत पुत्राचा असा शोक करूं लागली कीं, ॥ ५३ ॥ हे विधात्या, वृद्ध जीवंत असतांना बालकाला मरण प्राप्त होतें. ह्यावरून तूं आपल्या सृष्टीच्या विरुद्ध वागत आहेस. कारण, जीवंत अस-

अनुगताः प्रकृतयोऽमात्यादयो यस्य सोऽनुप्रकृतिः ॥ ५० ॥ बाष्पकलाभिरश्रुबिंदुभिरुपरोधतः संवृतत्वेन निरुद्धः कंठो यस्य ॥ ५१ ॥ उरुशुचाऽर्पितं बहुशोकेन व्याप्तम्। एकमेव संततिरूपम् ॥ ५२ ॥ विगलंत्यः स्रजो येभ्यस्तान् केशान् ॥ ५३ ॥ आत्मसृष्टेरप्रतिरूपमननुरूपं चेष्टसे। तदेवाह। नु अहो परे वृद्धे जीवत्यपरस्य बालस्य या मृतिस्तत्। तदा हि वृद्धस्य सृष्टिसामर्थ्याभावे बाले च मृते सति तव सृष्टिर्नष्टा स्यादित्यर्थः। ननु सांप्रतं स्वसृष्टेर्विपरीतोऽस्मीति चेत्तत्राह। विपर्ययो विपरीतोऽसि चेत्तर्हि त्वं

पपात बालस्य स पादमूले मृतस्य विस्रस्तशिरोरुहांबरः ॥ दीर्घं श्वसन्बाष्पकलोपरोधतो निरुद्धकंठो न शशाक भाषितुम् ॥५१॥
पतिं निरीक्ष्योरुशुचाऽर्पितं तदा मृतं च बालं सुतमेकसंततिम् ॥ जनस्य राज्ञी प्रकृतेश्च हृद्रुजं सती दधाना विललाप चित्रधा ॥५२॥
स्तनद्वयं कुंकुमगंधमंडितं निषिंचती सांजनबाष्पबिंदुभिः ॥ विकीर्य केशान्विगलत्स्रजः सुतं शुशोच चित्रं कुररीव सुस्वरम् ॥ ५३ ॥
अहो विधातस्त्वमतीव बालिशो यस्त्वात्मसृष्ट्यप्रतिरूपमीहसे ॥ परे नु जीवत्यपरस्य या मृतिर्विपर्ययश्चेत्त्वमसि ध्रुवः परः ॥ ५४ ॥
न हि क्रमश्चेदिह मृत्युजन्मनोः शरीरिणामस्तु तदात्मकर्मभिः ॥ यः स्नेहपाशो निजसर्गवृद्धये स्वयं कृतस्ते तमिमं विवृश्चसि ॥५५॥

प्राणिनामतिदुःखकारित्वात् ध्रुवो नित्यः परः शत्रुरसि। न तु कृपालुरित्यर्थः ॥ ५४ ॥ ननु जीवकर्मानुसारेण जन्मादि कुर्वतो मम कोऽपराधस्तत्राह। न हीति। पुत्रे जीवत्येव पिता म्रियते पितरि जीवत्येव पुत्रो जायत इति क्रमो नास्ति। कर्माधीनत्वादिति चेत्तर्ह्यात्मकर्मभिरेव तज्जन्मादिकमस्तु किं त्वया कृत्यम्। ननु मयेश्वरेण विना जडैः कर्मभिरिदं कथं सिध्येत्। भवतु नाम तथाऽपि निजसर्गवृद्धये ते त्वया यः स्नेहपाशः कृतस्तमिमं स्वयमेव विवृश्चसि छिनत्सीत्यादि क्रोशति। न ह्येवंविधं दुःखं दृष्ट्वा कश्चि

लेल्या वृद्धजनांला सृष्टि उत्पन्न करण्याचें सामर्थ्य नाहीं व तशामध्यें बालकहि मरण पावला म्हणजे तुझी सृष्टिच नष्ट होणार. तस्मात् तूं अतिशयच मूर्ख आहेस. बरें 'मी सांप्रतकालीं सृष्टीच्या विरुद्धच झालों आहें' असें म्हणशील तर– हे ब्रह्मदेवा, जर तूं विपरीत असशील तर तूं प्राण्यांना अतिदुःख देणारा असल्यामुळें त्यांचा नित्यशत्रूच आहेस, कृपालु नाहींस असें होईल ॥५४॥ आतां 'जीवाच्या कर्मानुसार त्याची उत्पत्तिवगैरे करणाऱ्या माझा काय बरें अपराध आहे' असें म्हणशील तर–हे विधात्या, अरे, पुत्र जीवंत असतांनाच पिता मरण पावावयाचा व पिता जीवंत असतांनाच पुत्र उत्पन्न व्हावयाचा असा जर 'जीवांना कर्माधीनत्व असल्यामुळें' जीवलोकामध्यें जन्ममरणाविषयीं नियम नसेल तर ते जन्मादिक प्राण्यांच्या स्वकर्मांनींच त्यांना प्राप्त व्हावेत, मग येथें तुझें काय प्रयोजन आहे? कांहींच नाहीं. बरें आतां 'मज ईश्वरावांचून हीं जड कर्मेंच जगाची उत्पत्तिवगैरे करण्यास कशीं समर्थ होतील'? हें तुझें म्हणणें जरी खरें असलें तथापि आपल्या सृष्टीच्या वृद्धीकरितां तूं जो स्नेहपाश उत्पन्न केला आहेस

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याला तूं स्वतःच छेदून टाकित आहेस तेव्हां अशाप्रकारचें तुझें दुखःकारक कर्म पाहून कोणीहि पुत्रादिकांवर प्रेम करणार नाहीं ॥ ५५ ॥ ह्याप्रमाणें ब्रह्मदेवाची निंदा करून पुत्रालाच उद्देशून राणी भाषण करित्ये कीं,–अरे बाबा, तूं मज दीन अनाथेचा त्याग करण्यास योग्य नाहींस. अरे, तुझ्या शोकामुळें संतप्त झालेल्या आपल्या पित्याकडे तरी तूं पहा; अरे बाळा, निपुत्रिक लोकांना दुस्तर असें घोर नरकदुःख आह्मीं तुझ्या योगानें अनायासानें तरून जाऊं. तस्मात् त्या निर्दय यमासहवर्तमान तूं दूर जाऊं नकोस ॥ ५६ ॥ हे बाबा, आतां ऊठ, अरे तुला निजून पुष्कळ वेळ झाला; हे राजपुत्रा, ते तुझे हे खेळगडी लहान बालक, तुला खेळण्याकरितां बोलावीत आहेत; अरे तुला फार भूक लागली असेल ह्याकरितां तूं भोजन कर व स्तनपान कर आणि हे बाळा, आह्मां स्वजनांचें दुःख हरण कर ॥ ५७ ॥ हें पुत्रा, पूर्वीं मी तुझ्याजवळ आल्यें असूनहि हतभाग्य असल्यामुळें तुझें मनोहर हास्य आणि सानंदहृष्टि ह्यांनीं युक्त असलेलें मुखकमल अवलोकन केलें नाहीं व आतांहि तुझ्या बोब-

---

दपि पुत्रादिषु स्नेहं करिष्यतीति भावः ॥ ५५ ॥ अप्रजदुस्तरमप्रजानां दुस्तरम् । अकरुणेन सह ॥ ५६ ॥ अशनया क्षुधा ॥ ५७ ॥ तनुज हे पुत्र

त्वं तात नार्हसि च मां कृपणामनाथां त्यक्तुं विचक्ष्व पितरं तव शोकतप्तम् ॥ अंजस्तरेम भवताऽप्रजदुस्तरं यद्ध्वांतं न याह्यकरुणेन यमेन दूरम् ॥ ५६ ॥ उत्तिष्ठ तात त इमे शिशवो वयस्यास्त्वामाह्वयंति नृपनंदन संविहर्तुम् ॥ सुप्तश्चिरं ह्यशनया च भवान्परीतो भुंक्ष्व स्तनं पिब शुचो हर नः स्वकानाम् ॥ ५७ ॥ नाहं तनूज ददृशे हतमंगला ते मुग्धस्मितं मुदितवीक्षणमाननाब्जम् ॥ किंवा गतोऽस्यपुनरन्वयमन्यलोकं नीतोऽघृणेन न शृणोमि कला गिरस्ते ॥ ५८ ॥ श्रीशुक उवाच ॥ विलपंत्या मृतं पुत्रमिति चित्रविलापनैः ॥ चित्रकेतुर्भृशं तप्तो मुक्तकंठो रुरोद ह ॥ ५९ ॥ तयोर्विलपतोः सर्वे दंपत्योस्तदनुव्रताः ॥ रुरुदुः स्म नरा नार्यः सर्वमासीदचेतनम् ॥ ६० ॥ एवं कश्मलमापन्नं नष्टसंज्ञमनायकम् ॥ ज्ञात्वांऽगिरा नाम मुनिराजगाम सनारदः ॥ ६१ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे षष्ठस्कंधे चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥ ॥

नाहं प्रथमं त्वत्पार्श्वमागता सती तव मुग्धस्मितं वक्त्रं ददृशे दृष्टवत्यस्मि । इदानीमपि गिरो न शृणोमि । तर्हि किमपुनरन्वयं पुनरागमनं यथा न भविष्यति तथा गतोऽसि ॥ ५८ ॥ ५९ ॥ ६० ॥ ६१ ॥ इति श्रीमद्भागवते षष्ठस्कंधे टीकायां चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥ ॥

ड्या मधुरवाणी श्रवण करीत नाहीं. तस्मात् त्या निर्दय यमानें तुला नेल्यामुळें पुनरपि कधींच परत न येण्याच्या बेतानें तूं परलोकास गेलास कीं काय ? ॥ ५८ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे परीक्षित्राजा, ह्याप्रमाणें नानाप्रकारच्या विलापवाक्यांनीं ती राजपत्नी मृतपुत्राविषयीं शोक करीत असतां, चित्रकेतु राजा अत्यंत संतप्त होऊन, कंठ मोकळा करून मोठ्यानें रडूं लागला ॥ ५९ ॥ ह्याप्रमाणें तीं उभयतां स्त्रीपुरुषें विलाप करूं लागलीं, तेव्हां त्यांचे अनुयायी अमात्यवगैरे सर्व पुरुष आणि स्त्रिया हीं रोदन करूं लागलीं. असें होतां होतां सर्व नगरांतील लोक निश्चेष्ट पडले ॥ ६० ॥ ह्याप्रमाणें सर्व लोक मोहित होऊन निश्चेष्ट झाले आहेत व त्यांना बोध करणाराहि कोणी नाहीं असें जाणून, अंगिरानामक मुनि नारदासहवर्तमान त्या ठिकाणीं प्राप्त झाला ॥ ६१ ॥ ह्या प्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील षष्ठस्कंधापैकीं चित्रकेतुशोकनि-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रूपणनामक हा चवदा अध्याय समाप्त जाहला ॥ १४ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या पंधराव्या अध्यायामध्यें अंगिरा ऋषीसहवर्तमान प्राप्त झालेल्या नारद मुनीनें तत्त्वोपदेशाच्या योगानें चित्रकेतु राजाच्या शोकाचा परिहार केला, अशी कथा वर्णन केली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे परीक्षित् राजा, त्या वेळीं शोकानें व्याप्त होऊन पुत्रप्रेताजवळ प्रेतासारख्या पडलेल्या त्या चित्रकेतु राजाला चांगल्या वाक्यांनीं बोध करण्याकरितां नारद व अंगिरा ऋषि भाषण करूं लागले कीं,– ॥ १ ॥ हे राजेंद्रा, ज्याकरितां तूं शोक करीत आहेस तो, ह्या प्रजारूप सृष्टीमध्यें भूत, वर्तमान व भविष्य जन्मांमध्यें तुझा कोण असावा ? व तूं तरी ह्याच्या बांधवांपैकीं कोण असावास ? आतां 'हा माझा पुत्र व मी ह्याचा पिता आहें' असें ह्मणशील तर– हे राजा, पूर्वजन्मीं पित्रादिरूपानें जे संयुक्त झालेले असतात तेच मरणानंतर वियुक्त झाले ह्मणजे इहजन्मीं कदाचित् त्याचेच अथवा दुसऱ्याचे पुत्रादिक होतात व पुनरपि जन्मान्तरीं ते त्याचे अथवा दुसऱ्याचे भार्यादिक किंवा शत्रुमित्रादिक होतात. तस्मात्

ततः पंचदशे चित्रकेतोः शोकापनोदनम् ॥ कृतं तत्त्वोपदेशेन नारदेनांगिरोयुजा ॥ १ ॥ मृतकोपांते शवसमीपे ॥ १ ॥ त्वं चास्य बंधूनां मध्ये कतमः सृष्टौ प्रजारूपायाम् । अयं पुत्रोऽहं चास्य पितेति चेत्तत्राहतुः । पुरेति । ये पूर्वजन्मनि पित्रादिरूपेण संयुक्ता आसंस्त एव मरणेन वियुक्ताः संतो वर्तमानजन्मनि कदाचित्तस्यैवान्यस्य वा पुत्रादयो भवंति । ते जन्मांतरे तस्यैवान्यस्य वा कलत्रादयः शत्रुमित्रादयो वा भवंत्यतो नायं नियम इति भावः ॥ २ ॥ तमेवाभिप्रायं प्रकटयति । यथेति । स्रोतसः प्रवाहस्य

॥ श्रीशुक उवाच ॥ ऊचतुर्मृतकोपांते पतितं मृतकोपमम् ॥ शोकाभिभूतं राजानं बोधयंतौ सदुक्तिभिः ॥ १ ॥ कोऽयं स्यात्तव राजेंद्र भवान्यमनुशोचति ॥ त्वं चास्य कतमः सृष्टौ पुरेदानीमतः परम् ॥ २ ॥ यथा प्रयांति संयांति स्रोतोवेगेन वालुकाः ॥ संयुज्यंते वियुज्यंते तथा कालेन देहिनः ॥ ३ ॥ यथा धानासु वै धाना भवंति न भवंति च ॥ एवं भूतेषु भूतानि चोदितानीशमायया ॥ ४ ॥

वेगेन यथा प्रयांति वियुज्यंते संयांति संयुज्यंते तथा कालवेगेन देहिनो जीवा अपि ॥ ३ ॥ तथाऽप्येतावंतं कालं मम पुत्रो नाभूद्वार्धके जातो मृत इति दुःखमिति चेत्तत्राहतुः । यथा धानासु बीजेषु धाना बीजांतराणि भवंति कासुचित्कदाचिन्न भवंति नोत्पद्यंते नश्यंति च न तु भवंत्येव तिष्ठंत्येवेति वा नियमः । एवमेव भूतानि पुत्रादिरूपाणि भूतेषु पित्रादिषु । अतो धानानां जन्यजनकत्वेऽपि यथा पितृपुत्रादिभावो नास्त्येवमत्रापीति न शोकः कार्य इति भावः । ईशमायाप्रेरितानामेव भवनमभवनं न वस्तुतः ॥ ४ ॥

'जो ज्याचा पुत्र तो त्याचा पुत्रच असावयाचा व जो ज्याचा पिता तो त्याचा पिताच असावयाचा' हा नियम मुळींच नाहीं ॥ २ ॥ जशी नदीच्या प्रवाहवेगानें वाळू वियुक्त व संयुक्त होत्ये त्याचप्रमाणें जीवहि कालवेगानें संयुक्त व वियुक्त होतात ॥ ३ ॥ तथापि इतका काल लोटेपर्यंत मला पुत्र नव्हता व वृद्धपणीं होऊन तो मरण पावला ह्मणून मला दुःख होतें असें ह्मणशील तर– हे राजा, ज्याप्रमाणें बीजांचेठिकाणीं कधींकधीं बीजें उत्पन्न होतात आणि कांहींकांचेठिकाणीं उत्पन्न होतच नाहींत अथवा झालीं असतांहि नाश पावतात त्याचप्रमाणें ईश्वरमायेनें प्रेरित झालेलीं पुत्रादिरूप भूतें पित्रादिरूप भूतांचेठिकाणीं उत्पन्न होतात आणि कांहींकांचेठिकाणीं कदाचित् उत्पन्न होतच नाहींत अथवा झालीं असतांहि नाश पावतात. तस्मात् बीजांमध्यें जन्यजनकभाव असतांनाहि जसा पितृपुत्रादिभाव नसतो ह्मणूनच त्यांचेठिकाणीं शोकवगैरे नाहीं त्याचप्रमाणें प्राण्यांची स्थिति असल्यामुळें त्यांच्याविषयींहि शोक करणें योग्य नाहीं. कारण, ईश्वरमायेनें प्रेरणा केलेल्या भूतांचीच उत्पत्ति

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होत्ये व होत नाहीं ह्या दोन्ही गोष्टी वस्तुतः सत्य नाहींत ॥ ४ ॥ आणि त्यांतूनहि उत्पत्ति व नाश ह्या गोष्टी सर्वसाधारण असल्यामुळें केवळ पुत्राकरितांच शोक करूं नये ह्या अभिप्रायानें भाषण करितात कीं,– हे राजा, सांप्रतकालीं असणारे आह्मी, तूं व हे इतरहि जे चराचर प्राणी आहेत ते जसे जन्माच्या पूर्वीं नव्हते व मरणानंतरहि असणार नाहींत त्याप्रमाणेंच सध्यांहि नाहींतच असें समजलें पाहिजे. कारण, जी गोष्ट स्वप्नाप्रमाणें आदीं व अंतीं नसत्ये ती मध्येंहि नसत्येच ॥ ५ ॥ आतां हे नाहींत ह्मणावें तर ह्यांची प्रतीति कशी होत्ये आणि मी ह्याचा जनक इत्यादि अभिमान तरी कसा होतो ? असें ह्मणशील तर– हे राजा, भूताधिपति व जन्मादिविकारशून्य असा जो ईश्वर तो, स्वतः उत्पन्न केलेल्या व परतंत्र अशा भूतांच्याच योगानें भूतांची उत्पत्ति, स्थिति व लय करितो. ह्यास्तव ईश्वरानें मायेच्या योगानें भूतें उत्पन्न केलीं असल्यामुळें आह्मीं आतां आहों व पूर्वीं नव्हतों अशी प्रतीति होत्ये व मी ह्याचा जनक इत्यादि अभिमानहि भूतांना निमित्तमात्रत्वेंकरूनच होतो. आतां, 'सृष्ट्यादि-

---

तस्य च सर्वसाधारणत्वान्न पुत्र एव शोचनीय इत्याहतुः । वयं चेति । तुल्यकाला वर्तमानकालीनाः । जन्मनः प्राक् मृत्योः पश्चाच्च यथा न संत्येवमधुनापि न संति । भो राजन् । आद्यंतयोरसत्त्वात्स्वप्नवदित्यर्थः ॥ ५ ॥ असत्त्वे कथं प्रतीतिः कथं वाऽहमस्य जनक इत्याद्यभिमानस्तत्राहतुः । भूतैरिति । ईश्वरेण मायया सृष्टत्वात्प्रतीतिर्निमित्तमात्रत्वेनैव च भूतानामयमभिमान इति भावः । नन्वीश्वरस्य सृष्ट्यादिभिः साध्यमस्ति चेत्तर्ह्यपूर्णकामता प्राप्ता नास्ति चेत्कुतः प्रवृत्तिस्तत्राहतुः । अनपेक्षोऽपि बालवल्लीलया करो-

वयं च त्वं च ये चेमे तुल्यकालाश्चराचराः ॥ जन्ममृत्योर्यथा पश्चात्प्राङ्नैवमधुनाऽपि भोः ॥ ५ ॥ भूतैर्भूतानि भूतेशः सृजत्यवति हंत्यजः ॥ आत्मसृष्टैरस्वतंत्रैरनपेक्षोऽपि बालवत् ॥ ६ ॥ देहेन देहिनो राजन्देहाद्देहोऽभिजायते ॥ बीजादेव यथा बीजं देह्यर्थ इव शाश्वतः ॥ ७ ॥ देहदेहिविभागोऽयमविवेककृतः पुरा ॥ जातिव्यक्तिविभागोऽयं यथा वस्तुनि कल्पितः ॥ ८ ॥ श्रीशुक उवाच ॥ एवमाश्वासितो राजा चित्रकेतुर्द्विजोक्तिभिः ॥ प्रमृज्य पाणिना वक्त्रमाधिम्लानमभाषत ॥ ९ ॥

तीति ॥ ६ ॥ अयं च जन्मादिव्यवहारो देहानामेव न त्वात्मन इत्याहतुः । देहिनः पितुर्देहेन देहिनः पुत्रस्य देहो मातुर्देहिनो देहादभिजायते यथा बीजादेव बीजं जायते । देही तु शाश्वत एव । अर्थो भूम्यादिर्यथा तद्वत् ॥ ७ ॥ ननु नश्वरदेहप्रतियोगित्वाद्देह्यपि न शाश्वतः स्यात्तत्राहतुः । देहदेहिनोरयं परस्परप्रतियोगिविभागः पुराऽनादिरविवेककृतोऽज्ञानकल्पितः । जातिः सामान्यं व्यक्तिर्विशेषस्तयोर्विभागो यथा वस्तुनि सन्मात्रे कल्पितः । परस्परापेक्षसिद्धत्वेनानिरूप्यत्वात्तद्वत् ॥ ८ ॥ आधिम्लानं वक्त्रम् ॥ ९ ॥

कांच्या योगानें ईश्वराला जर कांहीं साध्य असेल तर तो पूर्णकाम नाहीं असें होईल आणि जर कांहीं साध्य नसेल तर त्याची सृष्ट्यादिकांविषयीं प्रवृत्ति कशी होईल? अशी शंका घेशील तर– हे राजा, ज्याप्रमाणें बालक वस्तुतः अपेक्षा नसूनहि खेळण्याची लीला करितो त्याप्रमाणें ईश्वरालाहि वस्तुतः कसलीच अपेक्षा नसून तो सृष्ट्यादिकांच्या योगानें लीला करीत असतो ॥ ६ ॥ आतां 'जन्मादि व्यवहारहि आत्म्याचा नसून देहांचाच आहे' असें सांगण्याच्या अभिप्रायानें भाषण करितात कीं,– हे राजा, ज्याप्रमाणें बीजापासून बीज उत्पन्न होतें त्याचप्रमाणें पित्याच्या देहानें मातेच्या देहापासून पुत्राचा देह उत्पन्न होतो तथापि पृथ्वीरूप अर्थ जसा निर्विकार आहे त्याप्रमाणें देहधारी जीवात्मा, देहसंबंधी जन्मादिविकारांनीं अलिप्त असल्यामुळें, सर्वकाळ एकरूपच आहे ॥ ७ ॥ आतां जीव हा नश्वरदेहाचा संबंधवान् असल्यामुळें अशाश्वतच असणार असें ह्मणशील तर– हे राजा, जसा घटत्वपटत्वादिक जातींचा व त्यांचा घागर, परळ, धोतरजोडा, पीतांबर इत्यादिक व्यक्तींचा निरनिराळेपणा वस्तुमात्रावर कल्पित आहे त्याप्रमाणें देह व देही (जीव) ह्यांचा परस्परसंबंधानें असलेला हा विभाग अनादि असून अज्ञानानें कल्पित आहे ॥ ८ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हे राजा, ह्याप्रमाणें नारद व अंगिरा ऋषि यांच्या भाषणांनीं समाधान पावलेला तो चित्रकेतु राजा, मानसिक दुःखानें म्लान झालेलें आपलें मुख हस्तानें पुसून, त्या ऋषींप्रत भाषण करूं लागला कीं–॥ ९ ॥ चित्रकेतु राजा ह्मणाला– अवधूतवेष धारण करून गुप्तरीतीनें संचार करणारे, पूज्यलोकांमध्येंहि अतिपूज्य आणि ज्ञानसंपन्न असे तुह्मी दोघेजण येथें कोण आलां आहां ? ॥ १० ॥ कारण, उन्मत्तासारखा वेष धारण करणारे भगवद्भक्त ब्राह्मण, विषयांचेठिकाणीं असक्तबुद्धि असणाऱ्या माझ्यासारख्या लोकांना बोध करण्याकरितां पृथ्वीवर यथेष्ट संचार करीत असतात ॥ ११ ॥ आतां असे परोपकारी तरी कोण आहेत असें ह्मणाल तर–हे ब्रह्मनिष्ठहो, सनत्कुमार, नारद, ऋभु, अंगिरा, देवल, असित, अपांतरतम, व्यास, मार्कंडेय, गौतम, वसिष्ठ, भगवान् परशुराम, कपिल, शुकाचार्य, दुर्वासा, याज्ञवल्क्य जातूकर्ण्य, उद्दालक,

॥ १० ॥ उन्मत्तस्येव लिंगं येषां ते ॥ ११ ॥ १२ ॥ १३ ॥ १४ ॥ १५ ॥ मम प्रभू रक्षकौ बोधे समर्थाविति वा । अतो युवाभ्यां ज्ञानदीपः प्रवर्त्यताम् ॥ १६ ॥ १७ ॥

राजोवाच ॥ कौ युवां ज्ञानसंपन्नौ महिष्ठौ च महीयसाम् ॥ अवधूतेन वेषेण गूढाविह समागतौ ॥ १० ॥ चरंति ह्यवनौ कामं ब्राह्मणा भगवत्प्रियाः ॥ मादृशां ग्राम्यबुद्धीनां बोधायोन्मत्तलिंगिनः ॥ ११ ॥ कुमारो नारद ऋभुरंगिरा देवलोऽसितः ॥ अपांतरतमो व्यासो मार्कंडेयोऽथ गौतमः ॥ १२ ॥ वसिष्ठो भगवान्रामः कपिलो बादरायणिः ॥ दुर्वासा याज्ञवल्क्यश्च जातूकर्ण्यस्तथाऽऽरुणिः ॥ १३ ॥ रोमशश्च्यवनो दत्त आसुरिः सपतंजलिः ॥ ऋषिर्वेदशिरा बोध्यो मुनिः पंचशिरास्तथा ॥ १४ ॥ हिरण्यनाभः कौसल्यः श्रुतदेव ऋतध्वजः ॥ एते परे च सिद्धेशाश्चरंति ज्ञानहेतवः ॥ १५ ॥ तस्माद्युवां ग्राम्यपशोर्मम मूढधियः प्रभू ॥ अंधे तमसि मग्नस्य ज्ञानदीप उदीर्यताम् ॥ १६ ॥ अंगिरा उवाच ॥ अहं ते पुत्रकामस्य पुत्रदोऽस्म्यंगिरा नृप ॥ एष ब्रह्मसुतः साक्षान्नारदो भगवानृषिः ॥ १७ ॥ इत्थं त्वां पुत्रशोकेन मग्नं तमसि दुस्तरे ॥ अतदर्हमनुस्मृत्य महापुरुषगोचरम् ॥ १८ ॥ अनुग्रहाय भवतः प्राप्तावावामिह प्रभो ॥ ब्रह्मण्यो भगवद्भक्तो नावसीदितुमर्हति ॥ १९ ॥ तदैव ते परं ज्ञानं ददामि गृहमागतः ॥ ज्ञात्वाऽन्याभिनिवेशं ते पुत्रमेव ददावहम् ॥ २० ॥

महापुरुषगोचरं हरिभक्तं त्वाम् ॥ १८ ॥ १९ ॥ तदैव यदा पूर्वमागतोऽस्मि ॥ २० ॥

रोमश, च्यवन, दत्त, पतंजलीसहवर्तमान आसुरि, वेदशिरा ऋषि, बोध्य, पंचशिरा मुनि, हिरण्यनाभ, कौसल्य, श्रुतदेव आणि ऋतध्वज हे व अन्यहि सिद्धाधिपति लोकांस ज्ञानाचा उपदेश करण्याकरितां पृथ्वीवर संचार करीत असतात ॥ १२ ॥ १३ ॥ १४ ॥ १५ ॥ तस्मात् ग्राम्यपशूसारखा विषयलंपट असल्यामुळें मूढबुद्धि व महामोहरूप अंधकारामध्यें मग्न झालेल्या माझा तुह्मी उद्धार करण्याविषयीं समर्थ आहां; यास्तव मला ज्ञानरूप दिवा दाखवा ॥ १६ ॥ अंगिरा ऋषि ह्मणाला– हे राजा, तुज पुत्रेच्छूला पुत्र देणारा जो अंगिरा ऋषि तोच मी आहें व हा साक्षात् ब्रह्मपुत्र भगवान् नारद आहे ॥ १७ ॥ हे प्रभो, पुत्रशोकामुळें याप्रमाणें तूं दुस्तर दुःखामध्यें निमग्न झालास परंतु तूं भगवद्भक्त असल्यामुळें असें दुःख भोगण्यास योग्य नाहींस असें जाणून, तुजवर अनुग्रह करण्याकरितां आह्मी येथें प्राप्त झालों आहों. कारण, ब्राह्मणवत्सल असा भगवद्भक्त खिन्न होण्यास योग्य नाहीं ॥ १८ ॥ १९ ॥ हे राजा, जेव्हां मी पूर्वीं तुझ्या घरीं आलों होतों तेव्हांच तुला उत्तम ज्ञानाचा उपदेश करणार

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होतों; परंतु, 'तुला पुत्रप्राप्तीची फार इच्छा आहे,' असें समजून मीं तुला त्या वेळीं पुत्रच दिला आहे ॥ २० ॥ आतां पुत्रवान् लोकांना काय दुःख होतें ह्याचा तुला अनुभव येतच आहे. पुत्रच केवळ दुःखाला कारण आहे असें नव्हे तर, हे शूरसेना (चित्रकेतु राजा), यावप्रमाणें दारा, गृह, द्रव्य, अनेक प्रकारच्या ऐश्वर्यसंपत्ति व शब्दादि विषय राज्यसंबंधी ऐश्वर्यें भूमि, राज्य, सैन्य, जामदारखाना, सेवक, अमात्य व सुहृज्जन हे सर्वहि शोक, मोह, भय आणि पीडा देणारे असून अनित्य आहेत. आणि गंधर्वनगराप्रमाणें क्वचित् भासमान होऊन लय पावतात आणि स्वप्न, माया व मनोरथ ह्याप्रमाणें मिथ्या आहेत ॥ २१ ॥ २२ ॥ २३ ॥ कारण, वास्तविक सत्यत्वावांचू-

---

रायः अर्थाः ॥ २१ ॥ चला अनित्याः । किंच महीति ॥ २२ ॥ हे शूरसेन । इमे सर्वेऽपि शोकादिप्रदाः । किंच । आगमापायित्वेन गंधर्वनगरतुल्याः । गंधर्वनगरं ह्यकस्मादेव क्वचिदायात्यपयाति चेति प्रसिद्धम् । तदेवमनित्यत्वं शोकादिहेतुत्वं चागमापायित्वं चोक्तम् । मिथ्यात्वमप्याह । स्वप्नश्च माया च मनोरथश्च यथा तद्वत् ॥ २३ ॥ मनोभवा मनोमात्रविजृंभिताः । अत्र हेतुः । अर्थेन तात्विकस्वरूपेण विनैव दृश्यमानाः । तत्कुतः । यस्मात्क्षणांतरे न दृश्यंते तात्त्विकत्वे हि क्षणांतरे बाधो न स्यात् । अतो मनोमात्रविजृंभितत्वेन स्वप्नादिवन्मिथ्याभूता इत्यर्थः । नन्वेते पुण्यापुण्यकृता इति मीमांसकाः प्राहुस्तत्कुतो मनोभवत्वं तत्राह । कर्मभिः कर्मवासनाभिरर्थान्ध्यायतः पुंसो मनस एव निमित्तात्कर्माण्यभवन् । पाठांतरे कर्म इप्सिततममभिध्यायत इत्यर्थः । कर्मणोऽपि मनोभवत्वात्तत्साध्या अर्था अपि मनोभवा एवेति भावः ॥ २४ ॥ तदेवं ममतास्पदानां पुत्रादीनां दुःखादिहेतुत्वमुक्तं तत्र देहसंबंधो मूलमित्याह । अयं हीति । हीत्यवधारणे । अयं द्रव्यज्ञानक्रियात्मकोऽधिभूताधिदैवाध्यात्मरूपो देह एव देहिनो देहोऽहमिति मन्यमानस्य देहिनो जीवस्य विविधान्क्लेशान्संतापांश्च करोतीति तथा ॥ २५ ॥ स्वस्थेनाव्यग्रेण । गतिं तत्त्वम् । ध्रुवोऽयमर्थ इति विश्रंभं विश्वासं प्रणयं वा त्यज ततश्चोपशममाविशाश्रय ॥ २६ ॥

अधुना पुत्रिणां तापो भवतैवानुभूयते ॥ एवं दारा गृहा रायो विविधैश्वर्यसंपदः ॥ २१ ॥ शब्दादयश्च विषयाश्चला राज्यविभूतयः ॥ मही राज्यं बलं कोशो भृत्यामात्याः सुहृज्जनाः ॥ २२ ॥ सर्वेऽपि शूरसेनेमे शोकमोहभयार्तिदाः ॥ गंधर्वनगरप्रख्याः स्वप्नमायामनोरथाः ॥ २३ ॥ दृश्यमाना विनाऽर्थेन न दृश्यंते मनोभवाः ॥ कर्मभिर्ध्यायतो नाना कर्माणि मनसोऽभवन् ॥ २४ ॥ अयं हि देहिनो देहो द्रव्यज्ञानक्रियात्मकः ॥ देहिनो विविधक्लेशसंतापकृदुदाहृतः ॥ २५ ॥ तस्मात्स्वस्थेन मनसा विमृश्य गतिमात्मनः ॥ द्वैते ध्रुवार्थविश्रंभं त्यजोपशममाविश ॥ २६ ॥

नच ते दृश्यमान होत असल्यामुळें क्षणांतरीं दिसत नाहींसे होतात ह्मणून केवळ मनःकल्पितच आहेत. आतां हे पापपुण्यांपासून होतात असें मीमांसक ह्मणतात; वास्तव ते मनःकल्पित कसे? असें ह्मणशील तर– हे राजा, कर्मवासनांच्या योगानें विषयांचें चिंतन करणाऱ्या पुरुषाच्या मनापासूनच कर्में उत्पन्न झालीं आहेत. यास्तव पापपुण्यरूप कर्मच जर मनापासून होतें तर त्या कर्मांच्या योगानें साध्य होणारे अर्थहि मनःकल्पितच आहेत ॥ २४ ॥ ह्याप्रमाणें ममतास्पद असलेले पुत्रादिक हे सर्व दुःखाला कारण आहेत असें सांगून त्या सर्वांचें मूळ, देहसंबंध आहे हें सांगण्याच्या अभिप्रायानें भाषण करितात कीं,– हे राजा, पंचमहाभूतरूप द्रव्यें, ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें ह्यांच्या समुदायानें बनलेला हा देहच, देहाभिमानी जीवाला नानाप्रकारचे क्लेश व संताप उत्पन्न करितो असें सांगितलें आहे ॥ २५ ॥ तस्मात् अव्यग्र मनानें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आत्मतत्त्वाचा विचार करून, हे विषय नित्य आहेत अशाप्रकारच्या द्वैतप्रपंचसंबंधी विश्वासाचा त्याग कर आणि शांतीचा आश्रय कर ॥ २६ ॥ याप्रमाणें अंगिरा ऋषी-
नें उपदेश केलेलें तत्त्व भगवत्प्रसादावांचून प्राप्त होत नाहीं याकरितां त्याचा प्रसाद होण्यासाठीं मंत्रविद्येचा उपदेश करण्याच्या अभिप्रायानें नारद भाषण करितो कीं–
हे राजा, तूं शुचिर्भूत होऊन, ह्या मंत्ररूप उपनिषदाचा मजपासून स्वीकार कर; ह्मणजे तिचें जपरूपानें धारण करीत असतां सात रात्रींमध्येंच तूं संकर्षण प्रभूला अव-
लोकन करिशील ॥ २७ ॥ कारण, हे नृपा, त्या संकर्षणाच्या चरणासमीप प्राप्त होऊन पूर्वींचे रुद्रादि देव ह्या द्वैतभ्रमाचा त्याग करून समानाधिकशून्य अशा त्याच्या
सर्वोत्कृष्ट महिम्याला तत्काल पावले आहेत त्याप्रमाणें तूंहि लवकरच पावशील ॥ २८ ॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील षष्ठस्कंधापैकीं चित्रकेतुशोकहर-

---

अंगिरसोपदिष्टं तत्त्वं परमेश्वरप्रसादं विना न प्राप्यत इति तत्प्रसादाय मंत्रविद्यां नारद उपदिशति । एतामिति । उपनिषण्णं परं श्रेयोऽस्यामित्युपनिषत् । मंत्र एवोपनि-
षत्तां प्रतीच्छ गृहाण । द्रष्टा द्रक्ष्यति भवान् ॥ २७ ॥ अतुलं च तदनधिकं च समानाधिकशून्यं परं महिमानं प्रापुः । उपैत्युपैष्यति ॥ २८ ॥ इति श्रीमद्भा० षष्ठे टीकायां
पंचदशोऽध्यायः ॥ १५ ॥ ॥ षोडशे तत्स्तुतोक्त्यैव विशोकीकृत्य तं नृपम् ॥ आदिदेश महाविद्यां नारदः शेषतोषणीम् ॥ १ ॥ आदौ तावत् तत्पुत्रमुखेनैव पितृपुत्रादिसंबंधो

नारद उवाच ॥ एतां मंत्रोपनिषदं प्रतीच्छ प्रयतो मम ॥ यां धारयन्सप्तरात्राद्द्रष्टा संकर्षणं प्रभुम् ॥ २७॥ यत्पादमूलमुपसृत्य न-
रेंद्र पूर्वे शर्वादयो भ्रममिमं द्वितयं विसृज्य ॥ सद्यस्तदीयमतुलानधिकं महित्वं प्रापुर्भवानपि परं न चिरादुपैति ॥ २८ ॥ इति
श्रीमद्भागवते महापुराणे षष्ठस्कंधे पंचदशोऽध्यायः ॥१५॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ अथ देवऋषी राजन्संपरेतं नृपात्मजम् ॥ दर्शयित्वे-
ति होवाच ज्ञातीनामनुशोचताम् ॥ १ ॥ नारद उवाच ॥ जीवात्मन्पश्य भद्रं ते मातरं पितरं च ते ॥ सुहृदो बांधवांस्तप्ताञ्छु-
चा त्वत्कृतया भृशम् ॥ २ ॥ कलेवरं स्वमाविश्य शेषमायुः सुहृद्वृतः ॥ भुंक्ष्व भोगान् पितृप्रत्तानधितिष्ठ नृपासनम् ॥ ३ ॥ जीव
उवाच ॥ कस्मिन्जन्मन्यमी मह्यं पितरो मातरोऽभवन् ॥ कर्मभिर्भ्राम्यमाणस्य देवतिर्यङ्नृयोनिषु ॥ ४ ॥

मिथ्येति दर्शयितुं योगबलेन तमेव ज्ञातीनां दर्शयित्वा जीवात्मन्नित्याद्युवाच ॥ १ ॥ २ ॥ शेषमवशिष्टमायुरस्ति । अपमृत्युना मृतत्वादित्यर्थः ॥ ३ ॥ तदेव कलेवरं
प्रविश्योत्थितो जीव उवाच यद्वा अंतराले प्रेतशरीरे स्थित्वेति ज्ञेयम् ॥ ४ ॥

णनामक हा पंधरावा अध्याय समाप्त झाला ॥ १५ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या सोळाव्या अध्यायांत, पुत्राच्या भाषणानेंच त्या चित्रकेतु राजाचा शोक घालवून
त्याला शेषाचा संतोष करणाऱ्या महाविद्येचा नारदानें उपदेश केला, अशी कथा वर्णन केली आहे ॥१॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे परीक्षित् राजा, तदनंतर देवर्षि नार-
दानें, मरण पावलेल्या त्या राजपुत्राला योगसामर्थ्यानें उठवून शोक करीत असलेल्या त्याच्या ज्ञातींना दाखवून असें भाषण केलें कीं ॥ १ ॥ नारद ह्मणाला– हे जी-
वात्म्या, तुझें कल्याण असो. तुझ्यापासून उत्पन्न झालेल्या शोकानें अत्यंत संतप्त झालेल्या ह्या सुहृदांना, बांधवांना व मातापितरांना तूं अवलोकन कर ॥ २ ॥ अरे अप-
मृत्यूनें मृत झाल्यामुळें तुझें आयुष्य अवशिष्ट राहिलें आहे ह्याकरितां आपल्या देहामध्यें प्रवेश करून पित्यानें दिलेल्या भोगांचा तूं सुहृद्गणासहवर्तमान उपभोग घे,
व राजासनावर आरूढ हो ॥ ३ ॥ ह्याप्रकारचें नारदमुनीचें भाषण श्रवण करून तत्क्षणींच शरीरामध्यें प्रविष्ट झालेला जीव, त्या पुत्रमुखानें ह्मणाला कीं–हे नारदा,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कर्मांच्या योगानें देव, पशु, पक्षी व मनुष्य ह्या योनींमध्यें भ्रमण करणाऱ्या माझे कोणत्या जन्मामध्यें हे मातापितर झाले होते ? ॥ ४ ॥ आतां मी मरण पावल्यामुळें पुत्रबुद्धीनें जर हे मजकरितां शोक करीत असतील तर शत्रुबुद्धीनें माझ्या मरणाबद्दल ह्यांना हर्षतरी कां होवूं नये ? कारण, सर्वच प्राणी क्रमाक्रमानें सर्वांचे परस्पर बंधु, सपिंड, शत्रु, मध्यस्थ, मित्र, उदासीन आणि द्वेषी होत असतात ॥ ५ ॥ अहो, ज्याप्रमाणें क्रयविक्रयांस योग्य अशा सुवर्णादि वस्तु व्यवहार करणाऱ्या पुरुषांमध्यें इकडेतिकडे हिंडत असतात त्याचप्रमाणें जीवहि जनकांचे– (आईबापांचे) ठिकाणीं हिंडत असतो ॥ ६ ॥ ह्याप्रमाणें कर्मांच्या योगानें जीव कसा भ्रमण करीत असतो हें

मयि मृते पुत्रदृष्ट्या शोकश्चेच्छत्रुदृष्ट्या हर्षः किं न क्रियत इत्याशयेन संबंधस्यानियतत्वमाह । बंधवो विवाहादिभिः संबंधिनः । ज्ञातयः सपिंडाः । अरयो घातकाः । मित्राणि रक्षकाः । मध्यस्था उभयव्यतिरिक्ताः साधारणाः । विद्विषो द्रव्यादिनिमित्तेन द्वेषिणः । उदासीनास्तद्द्वयतिरिक्ता इति भेदः ॥ ५ ॥ कर्मभिर्भ्राम्यमाणत्वे दृष्टांतः । यथा पण्यानि क्रयविक्रयाद्यर्हाणि कर्तृषु व्यवहर्तृषु परिभ्रमंति एवं जीवोऽपि योनिषु जनकेषु ॥ ६ ॥ एकस्मिन्नपि जन्मनि संबंधस्यानियतत्वं सदृष्टांतमाह द्वाभ्याम् । नित्यस्य जीवतोऽपि अर्थस्य पश्वादेः । अनित्यः अनियतः । विक्रयादिना संबंधनिवृत्तेः ॥ ७ ॥ एवं योनिगतः पित्रादिसंबंधं प्राप्तोऽपि स जीवो नित्यः । देहजन्मादिना तस्य जन्माद्यभावात् अतएव वस्तुतो निरहंकृतोऽहमस्य पुत्र इत्यभिमानशून्यः । यत्र पित्रादौ संबंधिनि यावदुपलभ्येत कर्मवशेन वर्तेत तावदेव तस्य पित्रादेस्तत्तस्मिन् स्वत्वं न तु विक्रयादुरत्तकालमपि ।

बंधुज्ञात्यरिमध्यस्थमित्रोदासीनविद्विषः ॥ सर्व एव हि सर्वेषां भवंति क्रमशो मिथः ॥ ५ ॥ यथा वस्तूनि पण्यानि हेमादीनि ततस्ततः ॥ पर्यटंति नरेष्वेवं जीवो योनिषु कर्तृषु ॥ ६ ॥ नित्यस्यार्थस्य संबंधो ह्यनित्यो दृश्यते नृषु ॥ यावद्यस्य हि संबंधो ममत्वं तावदेव हि ॥ ७ ॥ एवं योनिगतो जीवः स नित्यो निरहंकृतः ॥ यावद्यत्रोपलभ्येत तावत्स्वत्वं हि तस्य तत् ॥ ८ ॥ एष नित्योऽव्ययः सूक्ष्म एष सर्वाश्रयः स्वदृक् ॥ आत्ममायागुणैर्विश्वमात्मानं सृजते प्रभुः ॥ ९ ॥

अथवैवं संबंधः । यदुक्तं कलेवरं स्वमाविश्येति तत्र यस्मिन् कलेवरे ममेदानीं स्वत्वं निवृत्तमिति सदृष्टांतमाह । नित्यस्य चिरकालावस्थायिनः सुवर्णादेः । योनिगतो देहं प्रविष्टः यत्र देहे तस्य जीवस्य तत्तस्मिन् देहे स्वत्वम् । न तु मरणोत्तरकालमपीत्यर्थः । शेषं समानम् ॥ ८ ॥ जीवस्य नित्यत्वं साधयति । एष नित्यः । तत्र हेतुः । अव्ययोऽपक्षयशून्यः । तत्कुतः । सूक्ष्मः जन्मादिशून्यः । तच्च कुतः । सर्वाश्रयः जन्मादिमतो देहादेराश्रयः । न तु देहादिरूपः । यतः स्वदृक् स्वप्रकाशः । सर्वाश्रयत्वमुपपादयति । आत्मनो मायाया गुणैरात्मानमेव विश्वं विश्वात्मकं सृजति तदात्मानꣳ स्वयमकुरुतेति श्रुतेः । उपादानकारणत्वात्सर्वाश्रय इत्यर्थः । जीवस्य वस्तुतो ब्रह्मत्वाद्ब्रह्मण एव चिच्छक्तिविशिष्टस्येश्वरत्वेन स्रष्टृत्वाज्जीवः । सृजतीति वाचोयुक्तिः । यद्वा स्वकर्मद्वारा सृष्टिनिमित्तत्वेन स्रष्टृत्वं भोग्यस्य च सर्वस्य भोक्त्राश्रयत्वात्सर्वाश्रयत्वं

दृष्टांतानें, सांगून एका जन्मामध्येंहि होणारा संबंध नियत नाहीं हें दृष्टांतपूर्वक सांगण्याच्या अभिप्रायानें पुनरपि भाषण करितो कीं,– सुवर्णादि नित्य वस्तूंचाहि संबंध पुरुषांचेठिकाणीं अनित्यच दृष्टीस पडतो. कारण, जोंपर्यंत ज्या वस्तूचा ज्या पुरुषाशीं संबंध असतो तोंपर्यंतच त्या वस्तूचेठिकाणीं त्या पुरुषाचें ममत्व असतें तीच वस्तु, विकणें किंवा बक्षीस देणेंवगैरे कारणांनीं दुसऱ्याकडे गेली ह्मणजे तिच्यावरील त्याचें ममत्व नाहींसें होतें ॥ ७ ॥ ह्याचप्रमाणें पित्रादिसंबंधाला प्राप्त झालेला नित्य व वस्तुतः अहंकाररहित असाहि तो जीव, ज्या पित्रादिकांचेठिकाणीं जोंपर्यंत विद्यमान असतो तोंपर्यंतच त्याच्या त्या पित्रादिकांचें त्याचेठिकाणीं स्वत्व असतें ॥ ८ ॥ आतां, जीव नित्य आहे हें सिद्ध करण्याकरितां ह्मणतो कीं–, हा जीव नित्य आहे. कारण, हा अविनाशी व जन्मादिरहित आहे. हाच स्वप्रकाश असल्यामुळें ज-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

न्मादिकांनीं युक्त असलेल्या देहादिकांचा आश्रय आहे. हा समर्थ असल्यामुळें आपल्या मायेच्या गुणांनीं आपणांसच विश्वरूपानें उत्पन्न करितो ॥ ९ ॥ ह्या जीवाला अतिप्रिय, अथवा अप्रिय, किंवा स्वकीय अथवा परकीय असा कोणीच नाहीं. कारण, हित आणि अहित करणाऱ्या मित्रादिकांच्या सर्व विचित्रबुद्धींचा हा साक्षी असल्यामुळें असंग आहे तस्मात् 'सुहृदांनीं युक्त हो आणि शोकसंतप्त झालेल्या सुहृदांना व बांधवांना अवलोकन कर' असें तुझें ह्मणणें बरोबर नाहीं ॥ १० ॥ आतां 'भोगांचा उपभोग घे' इत्यादिक जें ह्मणालास त्याबद्दल सांगतों ऐक– हा जीवात्मा,स्वतंत्र, कारण व कार्य ह्यांचा साक्षी आणि उदासीनासारखा सर्वत्र स्थित असल्यामुळें सुख, दुःख व राज्यादिक कर्मफल ह्यांचा स्वीकार करीत नाहीं. यास्तव अशाप्रकारच्या माझा व तुमचा कांहींच संबंध नसल्यामुळें तुह्मी मजविषयीं शोक करूं नये ॥ ११ ॥ श्रीशुका-

---

चोक्तमिति द्रष्टव्यम् ॥ ९ ॥ यदुक्तं सुहृद्वृत इति सुहृदो बांधवांस्तप्तानिति च तदप्याह । न ह्यस्येति । तत्र हेतुः । एकः सुहृदादिसंगरहितः । तत्कुतः । गुणदोषयोर्हिताहितयोः कर्तॄणां मित्रादीनां याः सर्वा धियो विचित्रा बुद्धयस्तासां द्रष्टा साक्षी ॥ १० ॥ यच्चोक्तं भुंक्ष्व भोगानित्यादि तत्राप्याह । नादत्त इति । गुणं सुखं दोषं दुःखं क्रियाफलं च राज्यादिकम् । उदासीनत्वे हेतुः । परावरदृक् कारणस्य कार्यस्य च साक्षी न तु भोक्ता । यतः ईश्वरः देहादिपारतंत्र्यशून्यः । अत एवंभूतस्य मम च युष्माकं

न ह्यस्यातिप्रियः कश्चिन्नाप्रियः स्वः परोऽपि वा ॥ एकः सर्वधियां द्रष्टा कर्तॄणां गुणदोषयोः ॥ १० ॥ नादत्त आत्मा हि गुणं न दोषं न क्रियाफलम् ॥ उदासीनवदासीनः परावरदृगीश्वरः ॥ ११ ॥ श्रीशुक उवाच ॥ इत्युदीर्य गतो जीवो ज्ञातयस्तस्य ते तदा ॥ विस्मिता मुमुचुः शोकं छित्त्वाऽऽत्मस्नेहशृंखलाम् ॥ १२ ॥ निर्हृत्य ज्ञातयो देहं तथा कृत्वोचिताः क्रियाः ॥ तत्यजुर्दुस्त्यजं स्नेहं शोकमोहभयार्तिदम् ॥ १३ ॥ बालघ्न्यो व्रीडितास्तत्र बालहत्याहतप्रभाः ॥ बालहत्याव्रतं चेरुर्ब्राह्मणैर्यन्निरूपितम् ॥ यमुनायां महाराज स्मरंत्यो द्विजभाषितम् ॥ १४ ॥ स इत्थं प्रतिबुद्धात्मा चित्रकेतुर्द्विजोक्तिभिः ॥ गृहांधकूपान्निष्क्रांतः सरःपंकादिव द्विपः ॥ १५ ॥

च संबंधाभावाच्छोकं मा कुरुतेति वाक्यार्थः ॥ ११ ॥ १२ ॥ १३ ॥ द्विजभाषितमंगिरसा प्रोक्तं पुत्रादीनां दुःखहेतुत्वं स्मरंत्यः । पुत्रकामनाशून्या निर्मत्सराः सत्य इति भावः ॥ १४ ॥ निबिडपंकतुल्यं गृहं विहाय निष्क्रमणमतिधीरस्य तस्यैव योग्यं नान्यस्येति सदृष्टांतमाह । स इत्थमिति । सरसः पंकात् द्विपो गज इव ॥ १५ ॥

चार्य ह्मणाला– हे परीक्षित् राजा, ह्याप्रमाणें भाषण करून जेव्हां तो जीव निघून गेला, तेव्हां त्या बालकाचे ते चित्रकेतुप्रभृति ज्ञातिबांधव विस्मित होऊन, त्यांनीं आपली स्नेहरूप शृंखला तोडून टाकून शोकाचा त्याग केला ॥ १२ ॥ नंतर सपिंडांनीं त्या बालकाचा देह दग्ध करून, त्याच्या योग्य अशा श्राद्धतर्पणादि क्रिया केल्या आणि शोक, मोह, भय आणि दैन्य उत्पन्न करणारा व त्याग करण्याविषयीं अशक्य असा जो स्नेह त्याचा त्यांनीं त्याग केला ॥ १३ ॥ हे महाराजा, त्या वेळीं बालहत्येमुळें निस्तेज होऊन लज्जित झालेल्या व 'पुत्रादिक हे सर्व दुःखाला कारण आहेत' ह्या अंगिराऋषीच्या भाषणाचें स्मरण करणाऱ्या त्या बालघातकी राजस्त्रियांनीं, पुत्रकामनाशून्य व निर्मत्सर होऊन, बालहत्येविषयीं ब्राह्मणांनीं सांगितलेलें जें प्रायश्चित्त तें त्या यमुनेचे तीरीं केलें ॥ १४ ॥ असो, ह्याप्रमाणें अंगिरा ऋषि व नारद ह्यांच्या भाषणांनीं आत्मज्ञान झालेला तो चित्रकेतु राजा, सरोवराच्या चिखलांतून बाहेर निघणाऱ्या हत्तीप्रमाणें गृहरूप अंधकूपांतून बाहेर निघाला ॥ १५ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुढें त्यानें, यमुनेमध्यें यथाविधि स्नान करून व पापनाशक अशा पितृतर्पणादि जलक्रिया केल्यावर मौनधारण पूर्वक इंद्रियसंयमन करून, त्या ब्रह्मपुत्रांना प्रणाम केला ॥ १६ ॥ नंतर ज्यानें इंद्रियदमन केलें आहे व जो शरण आला आहे अशा त्या भगवद्भक्त चित्रकेतु राजावर भगवान् नारदमुनीनें प्रसन्न होऊन त्याला ह्या पुढील विद्येचा उपदेश केला ॥ १७ ॥ तो असा कीं,– हे भगवन् (चित्त, बुद्धि, मन आणि अहंकार ह्यांचेठिकाणीं अनुक्रमानें) वासुदेव, प्रद्युम्न, अनिरुद्ध आणि संकर्षण ह्या रूपांनीं असलेला जो तूं त्या तुला आह्मीं मनानें नमस्कार करितों ॥ १८ ॥ हे विज्ञानमय परमात्म्या, तुझ्यापासून द्वैतदृष्टि निवृत्त झाल्यामुळें आपलेचठिकाणीं तूं रममाण होत असल्यानें परमानंदरूप आहेस आणि ह्मणूनच शांत आहेस. तस्मात्, तुला नमस्कार असो ॥ १९ ॥ हे ईश्वरा, ज्या तूं, स्वानंदानुभवानेंच मायानिमित्तक

कृताः पुण्यजलक्रियाः पितृतर्पणाद्या येन । संयतप्राणो नियतेंद्रियः ॥ १६ ॥ १७ ॥ नमो धीमहि ध्यायेम । मनसा नमस्याम इत्यर्थः ॥ १८ ॥ निवृत्ता द्वैतदृष्टिर्यस्मात् ॥ १९ ॥ न्यस्ता निरस्ताः शक्त्यूर्मयो मायानिमित्ता रागद्वेषादयो येन ॥ २० ॥ मनसा सह वचस्यप्राप्योपरते सति य एक एव प्रकाशते । वचसीति सर्वेंद्रियोपलक्षणम् ।

कालिंद्यां विधिवत्स्नात्वा कृतपुण्यजलक्रियः ॥ मौनेन संयतप्राणो ब्रह्मपुत्राववंदत ॥ १६ ॥ अथ तस्मै प्रपन्नाय भक्ताय प्रयतात्मने ॥ भगवान्नारदः प्रीतो विद्यामेतामुवाच ह ॥ १७ ॥ ॐ नमस्तुभ्यं भगवते वासुदेवाय धीमहि ॥ प्रद्युम्नायानिरुद्धाय नमः संकर्षणाय च ॥ १८ ॥ नमो विज्ञानमात्राय परमानंदमूर्तये ॥ आत्मारामाय शांताय निवृत्तद्वैतदृष्टये ॥ १९ ॥ आत्मानंदानुभूत्यैव न्यस्तशक्त्यूर्मये नमः ॥ हृषीकेशाय महते नमस्ते विश्वमूर्तये ॥ २० ॥ वचस्युपरते प्राप्य य एको मनसा सह ॥ अनामरूपश्चिन्मात्रः सोऽव्यान्नः सदसत्परः ॥ २१ ॥ यस्मिन्निदं यतश्चेदं तिष्ठत्यप्येति जायते ॥ मृन्मयेष्विव मृज्जातिस्तस्मै ते ब्रह्मणे नमः ॥ २२ ॥ यन्न स्पृशंति न विदुर्मनोबुद्धींद्रियासवः ॥ अंतर्बहिश्च विततं व्योमवत्तं नतोऽस्म्यहम् ॥ २३ ॥

सोऽस्मानव्यात्सदसत्परः कार्यकारणयोः कारणम् ॥ २१ ॥ तदेवाह । यस्मिन्निति । यस्मिन्निदं कार्यकारणं तिष्ठति अप्येति च यतश्च जायते मृन्मयेषु घटादिषु मृज्जातिर्मृन्मात्रमिव सर्वानुस्यूतं यत्तस्मै ॥ २२ ॥ ननु सर्वानुस्यूतं चेन्मृज्जातिवत्प्रतीयेत कथं मनोवचसोरप्राप्तिस्तत्राह । यद्ब्रह्म व्योमवद्विततमपि असवः प्राणाः क्रियाशक्त्या न

रागद्वेषादि लाटांचें निरसन केलें आहेस व जो तूं अंतर्यामिरूपानें इंद्रियांचा प्रवर्तक व्यापक, व जगद्रूपी आहेस त्या तुज परमेश्वराला नमस्कार असो ॥ २० ॥ हे परमात्म्या, मनासहवर्तमान सर्व इंद्रियें तुझ्या स्वरूपाला प्राप्त न होतां उपराम पावलीं असतां, प्रकृत्यादि कारणांचा व देहादिक कार्यांचा मूळकारण आणि नामरूपरहित असा जो एक तूं चैतन्यरूपानें प्रकाश पावतोस त्या तूं आमचें रक्षण करावेंस ॥ २१ ॥ हे ईश्वरा, हें कार्यकारणात्मक विश्व ज्याचेठिकाणीं असतें, ज्याचेठिकाणीं लय पावतें व ज्याच्यापासून उत्पन्न होतें आणि मातीच्या घटादिक पदार्थांमध्यें जशी माती असत्ये त्याप्रमाणें जें सर्वत्रठिकाणीं व्याप्त आहे त्या तुज ब्रह्मस्वरूपाला नमस्कार असो ॥२२॥ आतां सर्वत्रठिकाणीं जर ब्रह्म व्याप्त असेल तर घटादिकांचेठिकाणीं असलेल्या मातीप्रमाणें तें अनुभवास येईल मग मनासह सर्व इंद्रियांना तें अगोचर कसें! अशी ! शंका येईल तर– हे ईश्वरा, सर्वप्राणिमात्रांच्या आंत व बाहेर आकाशाप्रमाणें व्यापून असणाऱ्या ज्याला कर्मेंद्रियें स्पर्श करीत नाहींत व मन, बुद्धि आणि

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ज्ञानेंद्रियें जाणत नाहींत, त्या तुज ब्रह्मस्वरूपाला मी नम्र आहें ॥ २३ ॥ आतां इंद्रियादिकांना ब्रह्मस्वरूपाचें अज्ञान असण्याचें कारण असें आहे कीं,—देह, इंद्रियें, प्राण, मन व बुद्धि हे सर्व ब्रह्माच्या चैतन्यांशानें युक्त झालेले असतात तेव्हांच जाग्रत् व स्वप्न ह्या अवस्थांमध्यें आपापल्या कर्मांविषयीं प्रवृत्त होतात; नाहींतर तापलें नसलेलें लोखंड जसें दाह करीत नाहीं त्याप्रमाणें सुषुप्ति व मूर्छा इत्यादि अवस्थांमध्यें ते देहादिक कर्मांचेठिकाणीं प्रवृत्त होत नाहींत. ह्मणून जसें लोखंड अग्निशक्तीनेंच दाह करणारें असून अग्नीवांचून दाह करीत नाहीं त्याप्रमाणें ब्रह्मामध्यें असलेल्या ज्ञानक्रियाशक्तींच्या योगानेंच प्रवृत्त होणारे देहादिक, त्या ब्रह्माला स्पर्श करीत नाहींत व जाणतहि नाहींत. आतां जीव हा अवस्थात्रयाचा साक्षी असल्यामुळें त्या ब्रह्माला जाणत असेल असें ह्मणावें तर जाग्रदादि अवस्थांमध्यें साक्षी ही संज्ञाहि त्या ब्रह्मालाच

स्पृशंति मनआदीनि च ज्ञानशक्त्या न विदुः तद्ब्रह्म नतोऽस्मि ॥ २३ ॥ तेषां तदज्ञाने हेतुमाह । देहेंद्रियादयोऽमी यदंशविद्धा यच्चैतन्यांशेनाविष्टाः संतः कर्मसु स्वस्वविषयेषु प्रचरंति जाग्रत्स्वप्नयोरन्यदा सुषुप्तिमूर्छादौ नैव प्रचरंति यथा अप्रतप्तं लोहं न दहति । अतो यथा लोहमग्निशक्त्यैव दाहकं सदग्निं विना न दहति एवं ब्रह्मगतज्ञानक्रियाशक्तिभ्यां प्रवर्तमाना देहादयस्तत्र स्पृशंति न विदुश्चेति भावः । जीवस्तर्हि द्रष्टृत्वात् जानातु नेत्याह । स्थानेषु जाग्रदादिषु द्रष्टृपदेशं द्रष्टृसंज्ञां तदेवैति प्राप्नोति ।

देहेंद्रियप्राणमनोधियोऽमी यदंशविद्धाः प्रचरंति कर्मसु ॥ नैवान्यदा लोहमिवाप्रतप्तं स्थानेषु तद्द्रष्टृपदेशमेति ॥ २४ ॥ ॐ नमो भगवते महापुरुषाय महानुभावाय महाविभूतिपतये सकलसात्वतपरिवृढनिकरकरकमलकुड्मलोपलालितचरणारविंदयुगल परम परमेष्ठिन्नमस्ते ॥ २५ ॥ श्रीशुक उवाच ॥ भक्तायैतां प्रपन्नाय विद्यामादिश्य नारदः ॥ ययावंगिरसा साकं धाम स्वायंभुवं प्रभो ॥ २६ ॥ चित्रकेतुस्तु विद्यां तां यथा नारदभाषिताम् ॥ धारयामास सप्ताहमब्भक्षः सुसमाहितः ॥ २७ ॥ ततश्च सप्तरात्रांते विद्यया धार्यमाणया ॥ विद्याधराधिपत्यं स लेभेऽप्रतिहतं नृप ॥ २८ ॥

नान्यो जीवो नामास्ति । नान्योऽतोऽस्ति द्रष्टेत्यादिश्रुतेः । यद्वा द्रष्टृपदेशं द्रष्टृसंज्ञं जीवमपि तदेवैति जानाति । न तु जीवस्तज्जानातीत्यर्थः । तदुक्तं हंसगुह्यस्तोत्रे । देहोऽसवोऽक्षा इत्यादि ॥ २४ ॥ सकला ये सात्वतपरिवृढास्तेषां निकरः समूहस्तस्य करकमलानां कुड्मलैर्मुकुलैरुपलालितं चरणारविंदयुगलं यस्य तस्य संबोधनम् । परम उत्कृष्ट परमेष्ठिन् सर्वेश्वर ॥ २५ ॥ पूर्वं सनारदोंऽगिरा आजगामेत्यंगिराः प्राधान्येनोक्तः । चित्रकेतोः पुत्रप्रदत्वेन तस्य पृथगुक्तत्वात् । इह तु नारदोंऽगिरसा साकं ययाविति नारदस्य प्राधान्यनिर्देशः । तदुपदेशेन तस्य वैराग्योत्पत्तेः । प्रभो हे समर्थ ॥ २६ ॥ यथा यथावद्धारयामास ॥ २७ ॥ विद्याधराधिपत्यं चावांतरफलं लेभे । अप्र-

---

प्राप्त होत्ये दुसरा जीव ह्मणून कोणी असून त्याला प्राप्त होत्ये असें नाहीं ॥ २४ ॥ तस्मात् हे सर्वोत्कृष्टा सर्वेश्वरा, सर्वश्रेष्ठ जे भक्त त्यांच्या समुदायाच्या करकमलरूप कळ्यांनीं ज्याच्या दोन्हीं चरणकमलांची सेवा होत आहे व जो महापुरुष, महापराक्रमी आणि महाऐश्वर्यांचा पति आहे त्या तुज भगवंताला नमस्कार असो ॥ २५ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला— हे समर्थ परीक्षित् राजा, ह्याप्रमाणें नारदानें, त्या शरणागत आलेल्या चित्रकेतुनामक भगवद्भक्ताला, ह्या विद्येचा उपदेश करून, नंतर अंगिरा ऋषीसहवर्तमान ब्रह्मलोकीं गमन केलें ॥ २६ ॥ नंतर केवळ उदकाचें सेवन करून एकाग्र अंतःकरणानें युक्त अशा त्या चित्रकेतु राजानें, नारदानें उपदेश केलेल्या त्या विद्येचा सात दिवसपर्यंत सांगितल्याप्रमाणें यथासांग जप केला ॥ २७ ॥ नंतर, हे राजा, त्या जप केलेल्या विद्येच्या योगानें चित्रकेतु राजाला अकुंठित असें (अवांतर-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

फलरूप) विद्याधराधिपत्य प्राप्त झालें ॥ २८ ॥ नंतर कांहीं दिवसांनीं विद्येनें दीप्त झालेल्या मनानें गमन करणारा तो चित्रकेतु राजा, देवाधिदेव शेषाच्या चरणसमीप गेला ॥ २९ ॥ आणि त्यानें, जो कमलकंदाप्रमाणें गौरवर्ण आहे, ज्यानें नीलवस्त्र परिधान केलें आहे, ज्यानें देदीप्यमान किरीट, बाहुभूषणें, कटिसूत्र व कडीं तोडे हे अलंकार धारण केले आहेत, जो प्रसन्न मुखें व आरक्तवर्ण नेत्र ह्यांनीं युक्त आहे आणि जो सनत्कुमारादि सिद्धाधिपतींच्या समूहांनीं परिवेष्टित आहे त्या प्रभूला अवलोकन केलें ॥ ३० ॥ हे राजा, त्याच्या दर्शनाच्या योगानें ज्याचें सर्व किल्बिष नाहींसें झालें आहे, ज्याचें अंतःकरण स्वच्छ व निर्मळ झालें आहे, ज्यानें मौन धारण केलें आहे, ज्याच्या नेत्रामध्यें प्रेमामुळें आनंदाश्रु आले आहेत व ज्याच्या शरीरावर रोमांच उठले आहेत अशा त्या चित्रकेतु राजानें, त्या आदिपुरुष संकर्षणाला अत्यंत

तिहतमस्खलितम् ॥ २८ ॥ कतिपयैरहोभिः विद्ययेद्धेन दीप्तेन मनसा गतिर्यस्य ॥ २९ ॥ मृणालवद्गौरं शितिवाससं नीलांबरम् । स्फुरंति किरीटादीनि यस्य । कटित्रं कटिसूत्रम् । प्रसन्नानि वक्त्राणि यस्य अरुणानि लोचनानि यस्य तं च तं च ॥ ३० ॥ दृष्ट्वा च तमादिपूरुषमभ्ययाच्छरणं गतः । अनमन्ननाम । कथंभूतः । यस्य दर्शनेन ध्वस्तं समस्तं किल्बिषं यस्य स्वच्छममलं चांतःकरणं यस्य प्रणयेनाश्रुयुक्ते लोचने यस्य प्रहृष्टानि रोमाणि यस्य सः ॥ ३१ ॥ तं प्रसमीडितुं स्तोतुं चिरं नैवाशकन्न

ततः कतिपयाहोभिर्विद्ययेद्धमनोगतिः ॥ जगाम देवदेवस्य शेषस्य चरणांतिकम् ॥ २९ ॥ मृणालगौरं शितिवाससं स्फुरत्किरीटकेयूरकटित्रकंकणम् ॥ प्रसन्नवक्त्रारुणलोचनं वृतं ददर्श सिद्धेश्वरमंडलैः प्रभुम् ॥ ३० ॥ तद्दर्शनध्वस्तसमस्तकिल्बिषः स्वच्छामलांतःकरणोऽभ्ययान्मुनिः ॥ प्रवृद्धभक्त्या प्रणयाश्रुलोचनः प्रहृष्टरोमाऽनमदादिपूरुषम् ॥ ३१ ॥ स उत्तमश्लोकपदाब्जविष्टरं प्रेमाश्रुलेशैरुपमेहयन्मुहुः ॥ प्रेमोपरुद्धाखिलवर्णनिर्गमो नैवाशकत्तं प्रसमीडितुं चिरम् ॥ ३२ ॥ ततः समाधाय मनो मनीषया बभाष एतत्प्रतिलब्धवागसौ ॥ नियम्य सर्वेंद्रियबाह्यवर्तनं जगद्गुरुं सात्वतशास्त्रविग्रहम् ॥ ३३ ॥ चित्रकेतुरुवाच ॥ अजितजितः सममतिभिः साधुभिर्भवान् जितात्मभिर्भवता ॥ विजितास्तेऽपि च भजतामकामात्मनां य आत्मदोऽतिकरुणः ॥ ३४ ॥

शशाक । तत्र हेतुः । उत्तमश्लोकस्य पादाब्जयोर्विष्टरमासनमुपमेहयन् अभिषिंचन् प्रेम्णा उपरुद्धः अखिलानां वर्णानां निर्गम उच्चारणं यस्य सः ॥ ३२ ॥ मनीषया बुद्ध्या मनः समाधायैतद्वक्ष्यमाणं बभाषे । प्रतिलब्धा वाग्येन सात्वतशास्त्रोक्तो विग्रहो यस्य तम् ॥ ३३ ॥ अन्योऽन्यप्रेमजानंदनिभृतान्स्वामिसेवकान् ॥ अभिनंदन्मुदा स्तौति दशभिः पंचभिर्विभुम् ॥ हे अजित अन्यैरजितोऽपि भवान्साधुभिर्भक्तैर्जितः । स्वाधीन एव कृतः यतो भवानतिकरुणः । तेऽपि च निष्कामा अपि भवता विजिताः । यो

भक्तिपूर्वक शरण जाऊन प्रणाम केला ॥ ३१ ॥ परंतु, प्रेमाश्रुबिंदूंनीं श्रेष्ठकीर्ति परमेश्वराच्या चरणकमलांच्या आसनाला वारंवार अभिषेक करीत असलेला तो चित्रकेतु राजा, प्रेमानें कंठ दाटून आल्यामुळें सर्वहि वर्णांचें उच्चारण बंद पडलें ह्मणून त्या प्रभूचें स्तवन करण्यास पुष्कळ वेळपर्यंत समर्थ झाला नाहीं ॥ ३९ ॥ नंतर बुद्धिपूर्वक मनाला वश करून व सर्व इंद्रियांच्या बाह्यवृत्तींचा निरोध करून, भाषण करण्यास समर्थ झालेल्या चित्रकेतु राजानें भक्तिप्रतिपादक अशा पंचरात्रादि शास्त्रोक्तरूपानें युक्त असलेल्या त्या जगद्गुरु परमेश्वराची अशी स्तुति केली कीं, ॥ ३३ ॥ चित्रकेतु राजा ह्मणाला– हे अजिता, देवादिकांना तूं अजिंक्य असतांहि अतिदयाळु असल्यामुळें इंद्रियदमन केलेल्या समदृष्टि भक्तांनीं तुला अगदीं स्वाधीन करून घेतलें आहे व तूंहि त्यांना अगदीं खरोखर वश केलें आहेस. कारण, निष्काम सेवा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करणाऱ्या भक्तांना तूं आपलें स्वरूप देणारा आहेस ॥ ३४ ॥ बरें मी भक्तांना वश आहें असें कशावरून? कारण, माझ्या बरोबर स्पर्धा करणाऱ्या सृष्ट्यादिकारक अन्य ईश्वरांकडून माझा पराजय होण्याचा संभव आहे असें ह्मणशील तर-| हे भगवन्, जगताची उत्पत्ति, स्थिति व लय इत्यादिक ही सर्व खरोखर तुझीच लीला आहे व ब्रह्मादिक जगत्स्रष्टे हे ईश्वर नसून तुझ्या पुरुषरूप अंशाचे अंश आहेत आणि त्याविषयीं वास्तविक स्थिति अशी असतांहि 'आह्मी पृथक् ईश्वर आहोंत' अशा अभिमानानें ते व्यर्थ स्पर्धा करीत असतात ॥ ३५ ॥ आतां ईश्वरच सृष्ट्यादिकांचा कर्ता आहे ह्याचें उपपादन करितो कीं,- परमाणुरूप जें अगदीं सूक्ष्म मूळकारण व ब्रह्मांडरूप जें अगदीं शेवटचें अतिविस्तीर्ण कार्य ह्या उभयतांच्या आदीं, अंतीं व मध्यंतरीं तूं असल्यामुळें आदि, अंत व मध्य हे तुला मुळींच नाहींत. ह्यावरून तूं नित्यच आहेस आणि ते परमाणुप्रभृति तुझ्यापासूनच उत्पन्न होत असल्यामुळें अनित्य आहेत. कारण, सत्यत्वेंकरून प्रतितीला येणाऱ्या कार्यांच्या आदी व अंतीं जें नाशरहित

भवानकामात्मनामात्मानमेव ददाति ॥ ३४ ॥ ननु भक्तैरेव जित इति कथं स्पर्धमानैरपि सृष्ट्यादिकर्तृभिरन्यैरीश्वरैर्जयसंभवात्तत्राह । तवेति । जगत उदयादीनि तवैव विभवो विभवनं महिमा लीलेति यावत् । आदिशब्देन प्रवेशनियमनादीनि । विश्वसृजस्तु ब्रह्मादयो नेश्वराः किंतु ते तवांशो यः पुरुषस्तस्यांशाः । तत्र एवं स्थितेऽपि पृथक्पृथगीश्वरा वयमित्यभिमानेन वृथैव स्पर्धंते ॥३५॥ त्वमेव सृष्ट्यादिकर्तेत्येतदुपपादयति । परमाणुः सूक्ष्ममूलकारणं परममहदंतिमं कार्यं तयोस्त्वमेवाद्यंतांतरवर्ती । आदावंते चांतरे मध्ये च वर्तितुं शीलं यस्य सः । अतएव त्रयविधुर आद्यंतमध्यशून्यो ध्रुवः । ते च त्वया सृज्यंते न तु ध्रुवाः । कुत इत्यत आह । सत्त्वानां सत्त्वेन प्रतीतानां कार्याणामादावंते

तव विभवः खलु भगवन् जगदुदयस्थितिलयादीनि ॥ विश्वसृजस्तेंऽशांशास्तत्र मृषा स्पर्धंते पृथगभिमत्या ॥ ३५ ॥ परमाणुपरममहतोस्त्वमाद्यंतांतरवर्ती त्रयविधुरः ॥ आदावंतेऽपि च सत्त्वानां यद्ध्रुवं तदेवांतरालेऽपि ॥ ३६ ॥ क्षित्यादिभिरेष किलावृतः सप्तभिर्दशगुणोत्तरैरांडकोशः ॥ यत्र पतत्यणुकल्पः सहांडकोटिकोटिभिस्तदनंतः ॥ ३७ ॥ विषयतृषो नरपशवो य उपासते विभूतीर्न परं त्वाम् ॥ तेषामाशिष ईश तदनुविनश्यंति यथा राजकुलम् ॥ ३८ ॥

ऽपि यद्ध्रुवमनपाय्यंतरालेऽपि च तदेव ध्रुवं सुवर्णादिवत् ॥ ३६ ॥ एवं ध्रुवत्वेन कालतः परिच्छेदो नास्तीत्युक्तम् । देशतोऽप्यपरिच्छेदमाह । क्षित्यादिभिरिति । पूर्वस्मात्पूर्वस्माद्दशगुणमुत्तरोत्तरैरधिकैरावृतो यत्र त्वय्यणुकल्पोऽणुतुल्यः पतति परिभ्रमति तत्तस्मादनंतस्त्वम् ॥ ३७ ॥ यस्मादेवं परमेश्वरस्त्वमेवान्ये देवास्तव विभूतयोऽतस्त्वां विहाय विषयकामनयाऽन्योपासका अतिमंदा इत्याह । विषयेषु तृट् तृष्णा येषां ते नराकाराः पशवः । कुतः । ये विभूतीरिंद्राद्या उपासते न तु परं त्वाम् । ततः किं तत्राह । तेषामिति । तदनु-

---

असतें तेंच मध्यस्थितींतहि नित्य असतें ॥ ३६ ॥ ह्याप्रमाणें नित्यत्व प्रतिपादन करून ईश्वराचा कालानें परिच्छेद होत नाहीं असें सांगितलें, आतां देशानेंहि त्याचा परिच्छेद होत नाहीं हें सांगण्याच्या अभिप्रायानें भाषण करितो कीं,- पहिल्यापहिल्यापेक्षां उत्तरोत्तर दहादहापट अधिक असलेल्या भूमिप्रभृति सात आवरणांनीं परिवेष्टित असें हें ब्रह्मांड, दुसऱ्या कोट्यावधी ब्रह्मांडांसहवर्तमान तुझेठिकाणीं अगदीं परमाणुप्राय भ्रमण करितें. तस्मात् तूं खरोखर अनंत आहेस ॥ ३७ ॥ ह्याप्रमाणें देश व काल ह्या दोहोंनींहि ईश्वराचा अंत लागत नाहीं हें प्रतिपादन करून आतां ज्याअर्थीं ह्याप्रमाणें परमेश्वर तूंच आहेस व इतर देव तुझ्या विभूति आहेत त्याअर्थीं तुला टाकून विषयांच्या इच्छेनें दुसऱ्याची उपासना करणारे पुरुष अतिमंद आहेत हें सांगण्याच्या आशयानें चित्रकेतु राजा भाषण करितो कीं,- हे ईशा, जे विषयेच्छु पुरुष तुज सर्वोत्कृष्टाला न भजतां तुझ्या विभूतींची (इंद्रादिकांची) उपासना करितात, ते खरोखर नराकार पशु होत. कारण, जसा राजकुलाचा नाश झाला ह्मणजे सेवकांचे भोगहि

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नाहींसे होतात त्याप्रमाणें उपास्य देवतेचा नाश झाला ह्मणजे उपासकांचेहि भोग नाश पावतात ॥ ३८ ॥ ह्यानंतर विषयांच्या इच्छेनेंहि केलेली ईश्वरसेवा मोक्षफळाला कारण होत्ये हें सांगण्याच्या अभिप्रायानें ह्मणतो कीं–हे परमेश्वरा, जशीं भाजलेलीं बीजें अंकुरोत्पत्तीला कारण होत नाहींत त्याप्रमाणें ज्ञानस्वरूप आणि निर्गुण अशा तुझेठिकाणीं केलेल्या विषयवासनाहि दुसऱ्या देहांच्या उत्पत्तीस कारण होत नाहींत; कारण, ह्या जीवाच्याच गुणसमुदायापासून संसारास कारण असे अहंताममतादिक द्वंद्वसमूह उत्पन्न होतात. तस्मात् कामनेनेंहि तुजनिर्गुण परमेश्वराची सेवा केली असतां हळूहळू निर्गुणत्व प्राप्त होतें ॥ ३९ ॥ आतां फळाच्या इच्छेनेंहि केलेलें तुझें आराधन जर मोक्षाला कारण होतें तर मग भगवद्धर्मांच्या माहात्म्याची गोष्ट काय सांगावी. हें सांगण्याच्या अभिप्रायानें व त्या धर्मांच्या संप्रदायाची प्रवृत्ति करणारा हि तूंच आहेस, असें दर्शविण्याच्या आशयानें चित्रकेतु राजा पुनरपि भगवंताची स्तुति करितो कीं, हे अपराजिता, ज्या वेळीं तूं निर्दोष असा

उपास्यनाशानंतरम् । यथा राजकुलमनु राजकुलनाशानंतरं तत्सेवकानामाशिषो नश्यंति तद्वत् । अयं च परमोऽवधिर्मध्येऽपि नश्यंत्येव ॥ ३८ ॥ विषयकामेनापि कृता त्वत्सेवा मोक्षफलैवेत्याह । कामधियो विषयकामना अपि हे परम त्वयि रचिताः कृताश्चेन्न रोहंति देहांतरोत्पत्तये न वर्धंति करंभबीजानि भर्जितबीजानि यथा । यतोऽस्य जीवस्य गुणगणादेव द्वंद्वसमूहा भवंति अतः कामेनापि निर्गुणस्य तव भजनाच्छनैर्नैर्गुण्यं भवतीत्यर्थः ॥ ३९ ॥ फलकामनयापि त्वदाराधनं यदा मोक्षहेतुस्तदा किं वक्तव्यं

कामधियस्त्वयि रचिता न परम रोहंति यथा करंभबीजानि ॥ ज्ञानात्मन्यगुणमये गुणगणतोऽस्य द्वंद्वजालानि ॥ ३९ ॥ जितमजित तदा भवता यदाह भागवतं धर्ममनवद्यम् ॥ निष्किंचना ये मुनय आत्मारामा यमुपासतेऽपवर्गाय ॥ ४० ॥ विषममतिर्न यत्र नृणां त्वमहमिति मम तवेति च यदन्यत्र ॥ विषमधिया रचितो यः स ह्यविशुद्धः क्षयिष्णुरधर्मबहुलः ॥ ४१ ॥ कः क्षेमो निजपरयोः कियानर्थः स्वपरद्रुहा धर्मेण ॥ स्वद्रोहात्तव कोपः परसंपीडया च तथाऽधर्मः ॥ ४२ ॥

भगवद्धर्ममाहात्म्यमिति वक्तुं तत्संप्रदायप्रवर्तकत्वेन च भगवंतं स्तौति । जितमिति । यदा भवान्भागवतं धर्ममाह तदा हे भगवंस्त्वया जितं सर्वोत्कर्षेण स्थितम् । तत्र हेतुः । ये निष्किंचनाः सनत्कुमारादयो मुनयस्ते यं भवंतमपवर्गाय सेवंते तेन भवता जितम् । यं धर्ममिति वा ॥ ४० ॥ अनवद्यतामेवाह । विषममतिर्यत्र यस्मिन्भागवते धर्मे नास्ति यदन्यत्र यथाऽन्यस्मिन्काम्ये धर्मे । ननु सोऽपि वेदोक्तत्वादनवद्य एव तत्राह । विषमधिया शत्रुमरणादिकामनया रचितो विहितो यः स ह्यविशुद्धः रागद्वेषादिमत्त्वात् । क्षयिष्णुश्च नश्वरफलत्वात् । अधर्मबहुलश्च हिंसादिबाहुल्यात् । तदुक्तं शबरस्वामिभिः उभयमिह चोदनायां लक्ष्यतेऽर्थोऽनर्थश्चेत्यादि ॥ ४१ ॥ एतत्प्रपंचयति । क

भागवतधर्म कथन केलास त्या वेळीं खरोखर तूं सर्वांना जिंकिलें आहेस. कारण, लोकैषणा वित्तैषणा आणि पुत्रैषणा ह्यांनीं रहित आणि आत्मस्वरूपीं रममाण होणारे जे सनत्कुमारादि मुनि, तेसुद्धां मोक्षाकरितां त्या भगवद्धर्मांचें अद्यापि सेवन करितात ॥४०॥ आतां, भागवतधर्म निर्दोष कसा ? ह्मणून शंका घ्यावी तर–हे परमेश्वरा, इतर काम्यधर्मांमध्यें जशी 'तूं आणि मी, माझें आणि तुझें अशी' विषम बुद्धि उत्पन्न होत्ये त्याप्रमाणें भागवतधर्मांमध्यें पुरुषांना विषम बुद्धि होत नाहीं. आतां तो काम्यधर्महि वेदोक्त असल्यामुळें निर्दोषच आहे' असें ह्मणावें तर– हे भगवन्, शत्रुमरणादि कामनेनें सांगितलेला जो काम्य धर्म तो रागद्वेषादिकांनीं युक्त असल्यामुळें फार अशुद्ध आहे, त्याचें फळ नश्वर असल्यामुळें तो विनाशी आहे आणि त्यामध्यें हिंसावगैरे पुष्कळ असल्यामुळें तो अधर्मांनीं भरलेला आहे ॥ ४१ ॥ आतां हीच गोष्ट पुन्हा विस्तरानें वर्णन करितो कीं,– आपल्याला आणि दुसऱ्याला ज्यामध्यें पीडा होत्ये अशा धर्मानें आपलें किंवा दुसऱ्याचें काय कल्याण व काय फळ होणार आहे ? कांहींच नाहीं.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कारण, अतिक्लेश भोगून जीवाला पीडा दिली असतां तुला पीडा होत्ये आणि दुसऱ्याला पीडा दिली असतां अधर्म होतो व तुलाहि पीडा होत्ये ॥ ४२ ॥ आतां भागवतधर्मापासून तर पीडा होत नाहीं असें दर्शविण्याच्या अभिप्रायानें स्तवन करितो कीं,– हे परमेश्वरा, जिच्या योगानें तूं भागवत धर्म सांगितला आहेस ती तुझी दृष्टि कधींहि परमार्थाला सोडून असत नाहीं. कारण, स्थावरजंगमात्मक प्राणिसमूहांचे ठिकाणीं समबुद्धि ठेवणारे श्रेष्ठ भगवद्भक्तच त्या भागवतधर्माचें सेवन करितात ॥४३॥ तस्मात् हे भगवन्, तुझ्या दर्शनापासून पुरुषांचीं सर्वपातकें नाहींशीं होतात, हें कांहीं अघटित नव्हे. कारण, तुझें नांव एकदा ऐकिलें असतां, निकृष्ट जातीचा चांडाळहि संसारापासून मुक्त होतो

क्षेमः किं कुशलं न किंचित् । निजपरयोः स्वस्य परस्य च । स्वपरद्रुहा स्वस्मै परस्मै च द्रुह्यतीति स्वपरध्रुक् तेन यतः स्वद्रोहादत्यंतकायक्लेशात्तव कोपः पीडा संभवति । तदुक्तं गीतासु । कर्षयंतः शरीरस्थं भूतग्राममचेतसः ॥ मां चैवांतःशरीरस्थं तान्विद्ध्यासुरनिश्चयानिति । तथा परसंपीडयाऽधर्मः । चशब्दात्तव कोपश्च । अतस्त्वया रागांधमपि कथंचिद्वेदमार्गे प्रवर्तयितुं काम्यधर्मोऽभिहितो न तत्त्वदृष्ट्या ॥ ४२ ॥ भागवतधर्मेण तु न द्रोह इत्याह । नेति । न व्यभिचरति न परमार्थं जहाति । तवेक्षा दृष्टिः । अव्यभिचारे हेतुः । स्थिरेति । स्थावरजंगमप्राणिसमूहेषु समबुद्धयो भागवता यं धर्मं सेवंते ॥ ४३ ॥ एवंभूतस्य भागवतधर्मप्रवर्तकस्य तव दर्शनात्सर्वपापक्षयो भव-

न व्यभिचरति तवेक्षा यया ह्यभिहितो भागवतो धर्मः ॥ स्थिरचरसत्त्वकदंबेष्वपृथग्धियो यमुपासते त्वार्याः ॥ ४३ ॥ न हि भगवन्नघटितमिदं त्वद्दर्शनान्नृणामखिलपापक्षयः ॥ यन्नामसकृच्छ्रवणात्पुल्कसकोऽपि विमुच्यते संसारात् ॥ ४४ ॥ अथ भगवन्वयमधुना त्वदवलोकपरिमृष्टाशयमलाः ॥ सुरऋषिणा यदुदितं तावकेन कथमन्यथा भवति ॥ ४५ ॥ विदितमनंत समस्तं तव जगदात्मनो जनैरिहाचरितम् ॥ विज्ञाप्यं परमगुरोः कियदिव सवितुरिव खद्योतैः ॥ ४६ ॥ नमस्तुभ्यं भगवते सकलजगत्स्थितिलयोदयेशाय ॥ दुरवसितात्मगतये कुयोगिनां भिदा परमहंसाय ॥ ४७ ॥

तीति किं चित्रमित्याह । न हीति ॥ ४४ ॥ अतोऽहं कृतार्थोऽस्मीत्याह । अथेति । अथ अतो हेतोः । तवावलोकनेन परिमृष्टा निरस्ता आशये चित्ते मला येषां ते । त्वद्दर्शनं च मम नारदोपदेशेन जातमित्याह । सुरऋषिणेति ॥ ४५ ॥ यथा चाहं पूर्वमतिमूढ आसं यथा च नारदेनानुगृहीतोऽस्मि तत्सर्वांतर्यामिणस्तव मया किं प्रकाशनीयमित्याह । विदितमिति । विशेषेण ज्ञाप्यं प्रकाशनीयं कियदिव न किमपीत्यर्थः । सवितुर्यथा खद्योतैः प्रकाशनीयं नास्ति तद्वत् ॥ ४६ ॥ उक्तलक्षणं भगवंतं प्रणमति । नम इति द्वाभ्याम् । सकलस्य जगतः स्थित्यादीनामीशाय समर्थाय । दुरवसिताऽविज्ञाताऽऽत्मगतिर्निजतत्त्वं यस्य तस्मै । केषां कुयोगिनाम् । केन भिदा भेददृष्ट्या ॥ ४७ ॥

॥ ४४ ॥ याकरितां हे भगवन्, तुझ्या अवलोकनानें आमच्या अंतःकरणांतील सर्व दोष आज नाहींसे झाले व आम्हीं कृतार्थ झालों आहों आणि असें होणें हें योग्यच आहे. कारण, तुमचा परमभक्त अशा देवर्षिनारदानें जें भाषण केलें तें अन्यथा कसें होईल ? होणारच नाहीं ॥ ४५ ॥ ह्याप्रमाणें आपली कृतार्थता दर्शवून पूर्वीं मी कसा अत्यंत मूढ होतों व आतां नारदानें कसा मजवर अनुग्रह केला तें सर्व तुज सर्वांतर्यामी परमात्म्याला मी कितीसें सांगणार आहे’? अशा अभिप्रायानें स्तुति करितो कीं– हे अनंता, ह्या संसारामध्यें लोक जें आचरण करितात तें तुज जगदात्म्याला सर्व विदित आहेच. तस्मात् जसा काजव्यांनीं सूर्याला कांहींएक प्रकाश कर्तव्य नाहीं तसें तुज परमगुरूला विशेषेंकरून कळविण्याजोगें काय बरें आहे ? कांहींच नाहींत ॥ ४६ ॥ तस्मात् हे भगवन्, सर्व जगताची उत्पत्ति, स्थिति व लय करण्यास जो समर्थ ॥ ५२ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आहे, भेददृष्टि असणाऱ्या कुयोगिजनांना ज्याचें आत्मतत्त्व समजत नाहीं, त्या अत्यंत शुद्ध तुज भगवंताला नमस्कार असो ॥ ४७ ॥ जो हालचाल करूं लागला असतां ब्रह्मादिक जगत्स्रष्टे आपआपले व्यापार करूं लागतात, जो अवलोकन करूं लागला असतां ज्ञानेंद्रियें आपआपला विषय अवलोकन करितात, ज्याच्या मस्तकावर हें भूमंडल केवल मोहरीप्रमाणें भासत आहे आणि जो सहस्र मस्तकांनीं युक्त आहे त्या तुज भगवंताला नमस्कार असो ॥ ४८ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला— हे कुरुद्वहा परीक्षित् राजा, ह्याप्रमाणें उत्तम प्रकारानें, भगवान् अनंताची स्तुति केल्यावर तो प्रसन्न होऊन विद्याधराधिपति चित्रकेतूला ह्मणाला कीं ॥ ४९ ॥ श्रीभगवान् ह्मणाला— हे राजा नारद आणि अंगिरा ह्यांनीं जो मजविषयीं तुला उपदेश केला त्याच्या योगानें व त्याचप्रमाणें नारदानें उपदेश केलेल्या त्या विद्येच्या योगानें आणि ह्या माझ्या दर्शनानें तूं उ-

---

श्वसंति चेष्टंते । चेकितानं पश्यंतमनु चित्तयो ज्ञानेंद्रियाण्युच्चकंति स्वारूढं पश्यंति ॥ ४८ ॥ ४९ ॥ मेऽनुशासनं मद्विषय उपदेशः तेन तया च विद्ययाऽस्माच्च दर्शनात्संसिद्धोऽसि ॥ ५० ॥ तद्बोधदार्ढ्याय स्वयमप्युपदिशति । अहमित्यादिना । सर्वभूतान्यहमेव । भूतानामात्मा भोक्ताऽप्यहमेव । भोक्तृभोग्यात्मकं विश्वं मद्व्यतिरिक्तं नानास्तीत्यर्थः । यतोऽहं भूतभावनः भूतानां प्रकाशकः कारणं च । ननु शब्दब्रह्म प्रकाशकं परं ब्रह्म कारणं च प्रकाशकं च सत्यम् । ते उभे ममैव रूपे इत्याह । शब्दब्रह्मे-

यं वै श्वसंतमनु विश्वसृजः श्वसंति यं चेकितानमनुचित्तय उच्चकंति ॥ भूमंडलं सर्षपायति यस्य मूर्ध्नि तस्मै नमो भगवतेऽस्तु सहस्रमूर्ध्ने ॥ ४८ ॥ श्रीशुक उवाच ॥ संस्तुतो भगवानेवमनंतस्तमभाषत ॥ विद्याधरपतिं प्रीतश्चित्रकेतुं कुरूद्वह ॥ ४९ ॥ श्रीभगवानुवाच ॥ यन्नारदांगिरोभ्यां ते व्याहृतं मेऽनुशासनम् ॥ संसिद्धोऽसि तया राजन्विद्यया दर्शनाच्च मे ॥ ५० ॥ अहं वै सर्वभूतानि भूतात्मा भूतभावनः ॥ शब्दब्रह्म परं ब्रह्म ममोभे शाश्वती तनू ॥ ५१ ॥ लोके विततमात्मानं लोकं चात्मनि संततम् ॥ उभयं च मया व्याप्तं मयि चैवोभयं कृतम् ॥ ५२ ॥ यथा सुषुप्तः पुरुषो विश्वं पश्यति चात्मनि ॥ आत्मानमेकदेशस्थं मन्यते स्वप्न उत्थितः ॥ ५३ ॥

ति । शाश्वती शाश्वत्यौ ॥ ५१ ॥ अतस्त्वमेवं पश्येत्याह । लोके भोग्यप्रपंचे भोक्तृत्वेन विततमनुगतमात्मानं लोकं चात्मनि भोग्यत्वेन संततं व्याप्तं तदुभयं च मया कारणात्मना व्याप्तम् । मयि चैवोभयं कृतं प्रकल्पितं स्मरेदिति तृतीयेनान्वयः । पश्येदित्यध्याहारो वा ॥ ५२ ॥ ननु जाग्रदाद्यवस्थाभेदेन भोक्तृभोग्यात्मकं विश्वं स्फुटं प्रतीयमानं कल्पितं स्यादित्याशंक्य स्वप्नगतजाग्रदादिदृष्टांतेन संभावयन्नाह । यथेति द्वाभ्याम् । यथा स्वप्ने सुप्तो विश्वं गिरिवनादिरूपं दर्शांतरस्थमात्मन्येव पश्यति । स्व-

---

त्तम प्रकारेंकरून कृतार्थ झाला आहे ॥ ५० ॥ ह्याप्रमाणें सामान्यतः सांगून नारदानें केलेला उपदेश दृढ व्हावा ह्याकरितां भगवान् स्वतः उपदेश करितात कीं—हे राजा, भूतांचा प्रकाशक व भूतांचें कारण मीच असल्यामुळें सर्व भूतें व त्यांचा आत्मा मीच आहें. आतां धर्माधर्मादिप्रकाशक शब्दब्रह्म असून परब्रह्म हें भूतांचें प्रकाशक व कारण असें प्रसिद्ध आहे. मग तें सर्वहि तूंच कसा आहेस?' असें विचारशील तर—हे राजा शब्दब्रह्म व परब्रह्म हीं दोन्हीं माझींच नित्य स्वरूपें आहेत ॥ ५१ ॥ ह्याकरितां भोग्य प्रपंच्यामध्यें भोक्तृरूपानें आत्मा अनुगत आहे व तो प्रपंच आत्म्याचेठिकाणीं भोग्यरूपानें व्याप्त आहे आणि त्या उभयतांनाहि मीं कारणरूपानें व्याप्त केलें असून तीं दोन्हीहि माझेठिकाणीं कल्पित आहेत असें तूं अवलोकन कर ॥ ५२ ॥ आतां, जाग्रदादि अवस्थाभेदानें भोक्तृभोग्यात्मक विश्व स्पष्ट अनुभवास येत असून तें कल्पित कसें? असें विचारशील तर—हे राजा, जसा निजलेला पुरुष स्वप्नामध्यें दुसऱ्या देशांत असलेलें पर्वतवनादिरूप जग आपलेठिकाणीं अवलोकन करितो ह्मणजे

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

स्वप्नामध्येंच सुषुप्ति व स्वप्न अनुभवितो आणि त्या स्वप्नामध्येंच उठून, 'मी शय्येवर बसलों आहें' असें मानितो ह्मणजे स्वप्नामध्येंच जाग्रदवस्थेचा अनुभव घेतो त्याप्रमाणें प्रत्यक्ष जागरणवगैरे ह्या जीवोपाधिभूत बुद्धीच्याच अवस्था असून आत्म्याचेठिकाणीं त्या केवल मायेनें कल्पित आहेत असें जाणून, आत्मा हा त्यांचा द्रष्टा व त्या अवस्थांनीं रहित आहे असें समजावें ॥ ५३ ॥ ५४ ॥ आतां निद्रावस्थेमध्यें दृश्य वस्तूंचा अभाव असल्यामुळें द्रष्टृत्वाचाहि अभावच आहे, तस्मात् आत्मा हा त्या अवस्थांचा द्रष्टा आहे असें कसें ह्मणतां येईल? अशी शंका घेशील तर– हे राजा, निजलेला पुरुष, ज्या स्वरूपानें त्या सुषुप्ति अवस्थेमध्यें आपल्या गाढ निद्रेला व अतींद्रिय सुखाला जाणतो तें आत्मस्वरूप ब्रह्म मीच आहें असें जाण. आणि दुसरें असें कीं– सुषुप्ति अवस्थेमध्यें द्रष्टा नाहीं असें जर ह्मणावें तर– गाढ निद्रा व तिच्यामध्यें होत असलेलें सुख ह्यावें ज्ञान होणार नाहीं व तसें झालें असतां 'मला चांगली झोंप लागली होती' असें स्मरण होणेंहि संभवत नाहीं परंतु हें स्मरण तर सर्वांना होतेंच

प्नमध्ये सुषुप्तिं स्वप्नं च पश्यतीत्यर्थः । तथा स्वप्न एवोत्थितः सन्नात्मानमेकदेशस्थं शयनदेशे स्थितं मन्यते जाग्रदवस्थामनुभवति ॥ ५३ ॥ एवं प्रसिद्धान्यपि जागरादीनि जीवस्थानानि जीवोपाधेर्बुद्धेरवस्थानभूतान्यात्मनो मायामात्राणीत्येवं विज्ञाय तेषां द्रष्टारमतएव परं तदवस्थारहितमात्मानं स्मरेत् ॥ ५४ ॥ ननु तेषां द्रष्टारमिति कथमुच्यते स्वापे दृश्याभावेन द्रष्टृत्वाभावात्तत्राह । येनेति । प्रसुप्तः पुरुषो जीवो येन रूपेण तदा स्वापकाले आत्मनः स्वापं निर्गुणमतींद्रियं सुखं च वेद तमात्मानं ब्रह्म मामवेहि । तदा स्वापसुखयोरसंवेदने सुखमहमस्वाप्समिति स्मृतेरसंभवात् ॥ ५५ ॥ ननु स्वापसाक्षिणा दृष्टं कथं जाग्रदवस्थः स्मरेन्न ह्यन्येन दृष्टमन्यः स्मरति तत्राह । उभयं प्रस्वापं

एवं जागरणादीनि जीवस्थानानि चात्मनः ॥ मायामात्राणि विज्ञाय तद्द्रष्टारं परं स्मरेत् ॥ ५४ ॥ येन प्रसुप्तः पुरुषः स्वापं वेदात्मनस्तदा ॥ सुखं च निर्गुणं ब्रह्म तमात्मानमवेहि माम् ॥ ५५ ॥ उभयं स्मरतः पुंसः प्रस्वापप्रतिबोधयोः ॥ अन्वेति व्यतिरिच्येत तज्ज्ञानं ब्रह्म तत्परम् ॥ ५६ ॥ यदेतद्विस्मृतं पुंसो मद्भावं भिन्नमात्मनः ॥ ततः संसार एतस्य देहाद्देहो मृतेर्मृतिः ॥ ५७ ॥

प्रतिबोधं च स्मरतोऽनुसंदधतः । तयोः प्रस्वापप्रतिबोधयोः प्रकाशकत्वेन यदन्वेति ताभ्यां व्यतिरिच्येत च । एकैकापायेऽप्यनपायात् । तज्ज्ञानं परं ब्रह्म तदेव न तु भिन्नमित्यर्थः । अतो बाल्ये दृष्टस्य यौवने स्मृतिवदवस्थांतरत्वेऽपि स्वापानंदयोः स्मरणं घटत इति भावः । तदेवंभूतं ब्रह्मात्मानमवेहीत्यनुषंगः ॥ ५६ ॥ विपक्षे दोषमाह । यद्यदिएतन्मद्भावं मत्स्वरूपं ब्रह्म विस्मृतं तदात्मनः सकाशाद्भिन्नं भवति तत एतस्य पुंसः संसारो भवति । संसारस्वरूपमाह । देहाद्देहो जन्मानंतरं पुनर्जन्म मृतेरनंतरं

ह्मणून जाग्रदादि अवस्थांचा कोणीतरी साक्षी असणें हें अगदीं अवश्य आहे ॥ ५५ ॥ आतां, एकानें अवलोकन केलेल्या वस्तूचें दुसऱ्याला स्मरण होणें संभवत नाहीं; ह्मणून सुषुप्तिअवस्थेमध्यें साक्षिभूत असलेल्या आत्म्यानें अवलोकन केलेल्याचें जाग्रदवस्थेंतील जीवाला कसें स्मरण होईल? असा प्रश्न करिशील तर– हे राजा, निद्रा व जागरण ह्या दोन्ही अवस्थांचें अनुसंधान राखणाऱ्या पुरुषाच्या त्या दोन्ही अवस्थांमध्यें जें ज्ञान प्रकाशकरूपानें स्थित असून त्यांहून भिन्न असतें तें ज्ञानच परब्रह्म होय. त्या ज्ञानाहून परब्रह्म ह्मणजे कांहीं निराळें आहे असें नाहीं. ह्मणून जसें यौवनावस्थेमध्यें बाल्यावस्थेंत पाहिलेल्या वस्तूंचें स्मरण होतें त्याप्रमाणें जाग्रदवस्थेमध्यें निद्रेचें व तिच्यामध्यें झालेल्या आनंदाचें जीवाला स्मरण घडतें. यास्तव अशाप्रकारचें तें ब्रह्मरूपच आहे असें तूं जाग ॥ ५६ ॥ आतां मी सांगितलेल्या ह्या मद्रूप ब्रह्माचें पुरुषाला विस्मरण झालें तर पुरुषाचें स्वरूप आत्मस्वरूपापासून निराळें होतें आणि त्यामुळें त्या पुरुषाला जन्मानंतर जन्म व मरणानंतर मरण असा ॥ ९३ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

संसार प्राप्त होतो ॥ ५७ ॥ ह्याप्रमाणें संसारांतून मुक्त होण्यास ब्रह्मज्ञानाचीच आवश्यकता आहे हें कथन केलें. आतां भोगादिकांची प्राप्ति होणें हें इतर देहामध्येंहि शक्य आहे; परंतु, ज्ञानप्राप्तीकरितां तर मनुष्यजन्मामध्येंच यत्न केला पाहिजे हें सांगण्याच्या अभिप्रायानें भगवान् भाषण करितो कीं–हे राजा, ह्या भारतखंडामध्यें जिच्यामध्यें शास्त्रोक्त ज्ञान व अपरोक्ष ज्ञान होण्याचा संभव आहे अशी मनुष्ययोनि प्राप्त झाली असतां, जो तिच्यामध्यें आत्म्याला जाणत नाहीं त्याला कोणत्याहि योनीमध्यें मोक्षप्राप्ति होत नाहीं ॥ ५८ ॥ तस्मात् प्रवृत्तिमार्गामध्यें अतिक्लेश असून त्यामध्यें फलविपर्यय होतो आणि निवृत्तिमार्गामध्यें मोक्षप्राप्ति होत्ये असें जाणून विवेकी पुरुषानें फलकामनेचा त्याग करावा ॥ ५९ ॥ आतां ह्याच गोष्टीचें फिरून विवरण करितो कीं,–स्त्री व पुरुष हे उभयतां सुखप्राप्ति व दुःखनिवृत्ति होण्याकरितां नानाप्रकारचीं कर्में करीत

मृतिश्चेति ॥ ५७ ॥ योन्यंतरेऽपि भोगादिसंपादनं शक्यं ज्ञानार्थं त्वत्रैव पतितव्यमित्याह । लब्ध्वेति । ज्ञानं शास्त्रोक्तं विज्ञानमपरोक्षं तयोः संभवो यस्यां ताम् ॥ ५८ ॥ वैराग्यार्थमाह । ईहायां प्रवृत्तिमार्गे । तत ईहातः । अनीहायां निवृत्तिमार्गे त्वभयं मोक्षो भवतीति च स्मृत्वा फलसंकल्पाद्विरमेत् । पाठांतरे नोभयं परिक्लेशः फलविपर्ययश्च नास्तीत्येवं स्मृत्वा ॥ ५९ ॥ एतद्विवृणोति । सुखायेति त्रिभिः । दुःखस्यानिवृत्तिः सुखस्याप्राप्तिः ॥ ६० ॥ विज्ञा उद्यमे प्रवीणा वयमित्यभिमानवताम् । स्थानत्रयविलक्षणां तुरीयां बुद्ध्वा ॥ ६१ ॥ दृष्टश्रुताभिर्मात्राभिरैहिकामुष्मिकैर्विषयैः । स्वेन तेजसा विवेकबलेन ॥ ६२ ॥ न चातः परः पुरुषार्थोऽस्तीत्याह । एतावानिति । योगे नैपुणं यस्यां सा बुद्धिर्येषां परस्यात्मन एकं दर्शनमिति यदेतावानेव ॥ ६३ ॥ ६४ ॥

लब्ध्वेह मानुषीं योनिं ज्ञानविज्ञानसंभवाम् ॥ आत्मानं यो न बुद्ध्येत न क्वचिच्छममाप्नुयात् ॥ ५८ ॥ स्मृत्वेहायां परिक्लेशं ततः फलविपर्ययम् ॥ अभयं चाप्यनीहायां संकल्पाद्विरमेत्कविः ॥ ५९ ॥ सुखाय दुःखमोक्षाय कुर्वाते दंपती क्रियाः ॥ ततोऽनिवृत्तिरप्राप्तिर्दुःखस्य च सुखस्य च ॥ ६० ॥ एवं विपर्ययं बुध्वा नृणां विज्ञाभिमानिनाम् ॥ आत्मनश्च गतिं सूक्ष्मां स्थानत्रयविलक्षणाम् ॥ ६१ ॥ दृष्टश्रुताभिर्मात्राभिर्निर्मुक्तः स्वेन तेजसा ॥ ज्ञानविज्ञानसंतुष्टो मद्भक्तः पुरुषो भवेत् ॥ ६२ ॥ एतावानेव मनुजैर्योगनैपुणबुद्धिभिः ॥ स्वार्थः सर्वात्मना ज्ञेयो यत्परात्मैकदर्शनम् ॥ ६३ ॥ त्वमेतच्छ्रद्धया राजन्नप्रमत्तो वचो मम ॥ ज्ञानविज्ञानसंपन्नो धारयन्नाशु सिद्ध्यसि ॥ ६४ ॥

असतात; परंतु त्यांपासून त्यांच्या दुःखाची निवृत्ति व त्यांना सुखाची प्राप्ति मुळींच होत नाहीं ॥ ६० ॥ याप्रमाणें उद्योगाविषयीं आह्मी प्रवीण आहों असा अभिमान बाळगणाऱ्या पुरुषांना फलप्राप्ति होत नाहीं असें जाणून व जाग्रदादि अवस्थात्रयाहून निराळें चवथें सूक्ष्म आत्म्याचें स्वरूप, आहे असें जाणून पुरुषानें विवेकबलाच्या योगानें ऐहिक व आमुष्मिक विषयांपासून अगदीं मुक्त व्हावें आणि शास्त्रोक्त ज्ञान व अपरोक्ष ज्ञान ह्यांच्या योगानें संतुष्ट होऊन माझ्या सेवेविषयीं तत्पर असावें ॥ ६१ ॥ ॥ ६२ ॥ आतां ह्या वर सांगितलेल्या पुरुषार्थाहून श्रेष्ठ पुरुषार्थ कांहींच नाहीं हें सांगण्याच्या अभिप्रायानें तो परमात्मा भाषण करितो कीं,–हे राजा, योगमार्गाविषयीं निपुणबुद्धि असलेल्या पुरुषांनीं, परमात्मा सर्वत्र एकच आहे असें जाणणें हा इतकाच सर्वप्रकारच्या प्रयत्नांनीं साधन करावयाचा पुरुषार्थ आहे असें समजावें ॥ ६३ ॥ तस्मात् हे राजा, तूं सावधानचित्त होऊन श्रद्धेनें हें माझें उपदेशरूप भाषण धारण कर ह्मणजे ज्ञान व विज्ञान ह्यांनीं युक्त होऊन लवकरच माझ्या स्वरूपाला पावशील ॥ ६४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे परीक्षित् राजा; ह्याप्रमाणें, चित्रकेतु राजाचें आश्वासन करून, त्याच्या समक्षच तो जगद्गुरु विश्वात्मा भगवान् श्रीहरि अंतर्धान पावला ॥ ६५ ॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील षष्ठस्कंधापैकीं चित्रकेतूपदेशनामक हा सोळावा अध्याय समाप्त झाला ॥ १६ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ अवां या सत्राव्या अध्यायामध्यें, अतिउत्कृष्ट अशी महासिद्धि प्राप्त झाल्यावर आकाशामधून संचार करणारा तो चित्रकेतु राजा, कैलासाधिपति महादेवाला हंसल्यामुळें पार्वतीच्या शापानें वृत्रासुर झाला, अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे परीक्षित् राजा, ज्या दिशेकडे तो भगवान् अनंत गुप्त झाला होता त्या दिशेला नमस्कार करून तो चित्रकेतु विद्याधर, आकाशमार्गानें संचार करूं लागला ॥ १ ॥ अनंतलक्ष वर्षेंपर्यंत ज्याचें बल व इंद्रियसामर्थ्य कुंठित झालें नाहीं व

॥ ६५ ॥ इति षष्ठे टीकायां षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥ ततः सप्तदशेऽमोघमहर्द्धिं प्राप्य खे चरन् ॥ विहस्य गिरिशं शापादुमाया वृत्रतां गतः ॥ १ ॥ यतो यस्यां तस्यै दिशे नमः नमनं कृत्वा ॥ १ ॥ स चित्रकेतुर्विद्याधरस्त्रीभिर्हरिं गापयन् रेम इति द्वयोरन्वयः । अव्याहतं बलमिंद्रियपाटवं च यस्य ॥ २ ॥ नानाविधाः संकल्पेनैव सिद्धयो

॥ श्रीशुक उवाच ॥ आश्वास्य भगवानित्थं चित्रकेतुं जगद्गुरुः ॥ पश्यतस्तस्य विश्वात्मा ततश्चांतर्दधे हरिः ॥ ६५ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे षष्ठस्कंधे षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ यतश्चांतर्हितोऽनंतस्तस्यै कृत्वा दिशे नमः ॥ विद्याधरश्चित्रकेतुश्चचार गगनेचरः ॥ १ ॥ स लक्षं वर्षलक्षाणामव्याहतबलेंद्रियः ॥ स्तूयमानो महायोगी मुनिभिः सिद्धचारणैः ॥ २ ॥ कुलाचलेंद्रद्रोणीषु नानासंकल्पसिद्धिषु ॥ रेमे विद्याधरस्त्रीभिर्गापयन्हरिमीश्वरम् ॥ ३ ॥ एकदा स विमानेन विष्णुदत्तेन भास्वता ॥ गिरिशं ददृशे गच्छन्परीतं सिद्धचारणैः ॥ ४ ॥ आलिंग्यांकीकृतां देवीं बाहुना मुनिसंसदि ॥ उवाच देव्याः शृण्वत्या जहासोच्चैस्तदंतिके ॥ ५ ॥ चित्रकेतुरुवाच ॥ एष लोकगुरुः साक्षाद्धर्मं वक्ता शरीरिणाम् ॥ आस्ते मुख्यः सभायां वै मिथुनीभूय भार्यया ॥ ६ ॥ जटाधरस्तीव्रतपा ब्रह्मवादी सभापतिः ॥ अंकीकृत्य स्त्रियं चास्ते गतह्रीः प्राकृतो यथा ॥ ७ ॥

यास्तु तासु ॥ ३ ॥ अकस्मादद्भुतैश्वर्यगर्वात्प्राचीनकर्मतः ॥ आसुरीं योनिमापन्नो भवानीशापतः स तु ॥ तदाह एकदेत्यादिना ॥ ४ ॥ अंकीकृतामुत्संगेनैकीकृत्य देवीं बाहुनाऽऽलिंग्य स्थितम् । उवाच जहास च । तस्यांतिके स्थितः सन् ॥ ५ ॥ धर्मं वक्ता वदति शरीरिणां मध्ये मुख्यश्च भार्यया मिथुनीभूय चास्ते ॥ ६ ॥ ७ ॥

ज्याची स्तुति मुनि, सिद्ध आणि चारण हे करीत आहेत असा तो महायोगी चित्रकेतु, भक्तदुःखनिवारण करणाऱ्या ईश्वराचें गायन करीत, करीत ज्यांमध्यें संकल्पमात्रेंकरूनच नानाप्रकारच्या सिद्धि प्राप्त होतात अशा मेरुपर्वताच्या गुहांमध्यें विद्याधरांच्या स्त्रियांसहवर्तमान रममाण होता झाला ॥ २ ॥ ३ ॥ एकेदिवशीं विष्णूनें दिलेल्या दिव्य विमानामध्यें बसून संचार करीत असतां त्यानें, सिद्धचारणांनीं परिवेष्टित आणि ऋषींच्या सभेमध्यें पार्वतीला मांडीवर घेऊन व बाहूनें तिला अलिंगन करून बसलेल्या अशा महादेवाला अवलोकन केलें आणि ती देवी पार्वती श्रवण करीत असतांना, तिच्या समीप त्यानें उच्चस्वरानें हास्य करून असें भाषण केलें कीं, ॥४॥ ॥ ५ ॥ चित्रकेतु ह्मणाला– अहो, सर्वलोकांचा साक्षात् गुरु व देहधारी मनुष्यांमध्यें मुख्य असा हा शंकर, सर्वांना धर्म सांगत असून आपण या भरसभेमध्येंच भार्येशीं संलग्न होऊन बसला आहे ॥ ६ ॥ अहो हा, जटाधारण करून तीव्र तपश्चर्या करणारा, ब्रह्मवादी व सभापति असून एखाद्या विषयासक्त पुरुषाप्रमाणें अगदीं निर्लज्ज ॥ ५४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होऊन स्त्रीला मांडीवर घेऊन बसला आहे ॥ ७ ॥ अहो काय सांगावें ! अतिनिकृष्ट लोकसुद्धां बहुतकरून एकांतामध्येंच स्त्रीला अंकावर बसवून घेतात आणि हा तर महाव्रतस्थ असून अगदीं सभेमध्येंच स्त्रीला अंकावर धारण करित आहे ॥ ८ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, तें त्याचें भाषण श्रवण करून, गंभीरमति असा भगवान् महादेव व त्याचे अनुयायी सर्व सभासद, सभेमध्यें मौन धारण करून राहिले ॥ ९ ॥ याप्रमाणें महादेवाचा प्रभाव न जाणून त्यानें फारच वाईट भाषण केलें असतां, 'मी जितेंद्रिय आहें' ह्मणून व्यर्थ अभिमान बाळगणाऱ्या त्या उद्धट चित्रकेतु राजाला, देवी क्रोधानें असें ह्मणाली कीं, ॥ १० ॥ पार्वती ह्मणाली– अहो, सांप्रतकाळीं इहलोकीं दंडधारी, समर्थ आणि आह्मांसारिख्या निर्लज्ज दुष्टांचा अतिशय निषेध करणारा असा हाच शास्ता आहे काय ? ॥ ११ ॥ अहो, कमलयोनि ब्रह्मदेव, तसेच

॥ ८ ॥ अगाधा गंभीरा धीर्यस्य सः ॥ ९ ॥ न तस्य वीर्यं प्रभावं विद्वानतद्वीर्यविद्वांस्तस्मिन् । निर्जितात्माभिमानिने जितेंद्रियोऽहमित्यभिमानवते । इति रुषा क्रोधेनाह ॥ १० ॥ विरुद्धं प्रकर्षेण करोतीति विप्रकृत् ॥ ११ ॥ अतिवर्तिनं शास्त्रमतिक्रम्य वर्तनशीलं ये नो निषेधंति न निवारयंति ॥ १२ ॥ एषां ब्रह्मादीनामनुध्येयं पदाब्जयुग्मं यस्य तम् । मंगलमंगलं परमधर्ममूर्तिम् । सूरीन्परिभूयाज्ञान्कृत्वा जगद्गुरुं यः प्रशास्ति तत्तस्मात् ॥ १३ ॥ ननु हरिभक्तोऽयं न दंडार्ह इति चेत्तत्राह । नायं साधुभिः

प्रायशः प्राकृताश्चापि स्त्रियं रहसि बिभ्रति ॥ अयं महाव्रतधरो बिभर्ति सदसि स्त्रियम् ॥ ८ ॥ श्रीशुक उवाच ॥ भगवानपि तच्छ्रुत्वा प्रहस्यागाधधीर्नृप ॥ तूष्णीं बभूव सदसि सभ्याश्च तदनुव्रताः ॥ ९ ॥ इत्यतद्वीर्यविदुषि ब्रुवाणे बह्वशोभनम् ॥ रुषाऽऽह देवी धृष्टाय निर्जितात्माभिमानिने ॥ १० ॥ पार्वत्युवाच ॥ अयं किमधुना लोके शास्ता दंडधरः प्रभुः ॥ अस्मद्विधानां दुष्टानां निर्लज्जानां च विप्रकृत् ॥ ११ ॥ न वेद धर्मं किल पद्मयोनिर्न ब्रह्मपुत्रा भृगुनारदाद्याः ॥ न वै कुमारः कपिलो मनुश्च ये नो निषेधंत्यतिवर्तिनं हरम् ॥ १२ ॥ एषामनुध्येयपदाब्जयुग्मं जगद्गुरुं मंगलमंगलं स्वयम् ॥ यः क्षत्रबंधुः परिभूय सूरीन्प्रशास्ति धृष्टस्तदयं हि दंड्यः ॥ १३ ॥ नायमर्हति वैकुंठपादमूलोपसर्पणम् ॥ संभावितमतिः स्तब्धः साधुभिः पर्युपासितम् ॥ १४ ॥ अतः पापीयसीं योनिमासुरीं याहि दुर्मते ॥ यथेह भूयो महतां न कर्ता पुत्र किल्बिषम् ॥ १५ ॥

परिसेवितं वैकुंठस्य पादमूलोपसर्पणमर्हति । यतः संभाविता अहमधिक इति कृता मतिर्येन । अतएव स्तब्धोऽनम्रः ॥ १४ ॥ तदेवं स्वयं दंड्यत्वं निश्चित्य तं प्राह । अत इति हे पुत्र यथा भूयो महतां किल्बिषमपराधं न कर्ता न करिष्यसि तथा याहीत्यर्थः ॥ १५ ॥

भृगु व नारदप्रभृति ब्रह्मपुत्र सनत्कुमार, कपिल आणि मनु, हे जे शास्त्राचें अतिक्रमण करून वागणाऱ्या महादेवाचें निवारण करीत नाहींत त्यांना, धर्म समजतच नाहीं कीं काय ? ॥ १२ ॥ तस्मात् ह्या ब्रह्मादिकांनींहि ज्याचीं चरणकमलें ध्यान करण्यास योग्य आहेत व जो परम धर्ममूर्ति आहे त्या ह्या जगद्गुरु महादेवाला, ज्याअर्थीं हा स्वतः क्षत्रियाधम असून त्या ब्रह्मादिकांना अज्ञानी समजून निःशंकपणें शासन करीत आहे त्याअर्थीं ह्याला दंड करणें हेंच योग्य आहे ॥ १३ ॥ आतां 'हा हरिभक्त असल्यामुळें दंडाला योग्य नाहीं' असें ह्मणाल तर– हे सभासदहो, साधूंनीं सेवित अशा श्रीविष्णूच्या चरणासमीप प्राप्त होण्यास हा योग्य नाहीं. कारण, 'मी श्रेष्ठ आहें' असें ह्याला वाटत असल्यामुळें हा उद्धट झाला आहे ॥ १४ ॥ तस्मात् हे दुर्मते, तूं महापातकी अशा असुरयोनीमध्यें गमन कर. ह्मणजे हे पुत्रा, तूं फिरून या लोकीं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मोठ्या लोकांचा असा अपराध करणार नाहींस ॥ १५ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे भरतकुलोत्पन्ना राजा, ह्याप्रमाणें पार्वतीनें चित्रकेतूला शाप दिला असतां, तो विमानांतून खालीं उतरला आणि मस्तक नम्र करून त्या सतीला प्रसन्न करूं लागला ॥ १६ ॥ चित्रकेतु ह्मणाला– हे अंबिके, मी आपल्या ओंजळीनें तुझ्या शापाचें ग्रहण करितों. कारण, देवांनीं मर्त्यजनाला जें (सुख अथवा दुःख) सांगितलेलें असतें तें त्याला पूर्वकर्मानेंच प्राप्त झालेलें असतें ॥ १७ ॥ आणि हा तर संसारचक्राचा स्वभावच आहे, तेव्हां ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. कारण, अज्ञानानें मोहित झालेला प्राणी ह्या संसारचक्रामध्यें भ्रमण करीत असतांना सर्वत्रठिकाणीं आणि सर्वकालीं सुखदुःखांचा उपभोग घेतच असतो ॥ १८ ॥ तस्मात् मी अयोग्य भाषण केलें व तूं मला शाप दिलास ह्यांमध्यें माझा आणि तुझाहि मुळींच दोष नाहीं. कारण, ह्या संसारामध्यें सुखाचा कर्ता आपण स्वतः व दुःखाचा कर्ता कोणी अन्य हें वास्तविक मुळींच नसून, जो पुरुष अतिमूर्ख असतो तोच आपल्याला व दुसऱ्याला अनुक्रमानें सुखा

॥ १६ ॥ पूर्वदिष्टं प्राचीनकर्मप्राप्तमेव ॥ १७ ॥ अयं च संसारचक्रस्वभाव एव न चित्रमित्याह । संसारचक्र इति ॥ १८ ॥ अतएवात्र मम च तव च न कोऽपि दोष इत्याह । नैवेति ॥ १९ ॥ एवं तावत्सुखदुःखादिकमंगीकृत्योक्तमिदानीं तदपि वस्तुतो नास्तीत्याह । गुणानां मायामयानां प्रवाहे संसारे ॥ २० ॥ ननु

॥ श्रीशुक उवाच ॥ एवं शप्तश्चित्रकेतुर्विमानादवरुह्य सः ॥ प्रसादयामास सतीं मूर्ध्ना नम्रेण भारत ॥ १६ ॥ चित्रकेतुरुवाच ॥ प्रतिगृह्णामि ते शापमात्मनोंऽजलिनांऽबिके ॥ देवैर्मर्त्याय यत्प्रोक्तं पूर्वदिष्टं हि तस्य तत् ॥ १७ ॥ संसारचक्र एतस्मिन् जंतुरज्ञानमोहितः ॥ भ्राम्यन्सुखं च दुःखं च भुंक्ते सर्वत्र सर्वदा ॥ १८ ॥ नैवात्मा न परश्चापि कर्ता स्यात्सुखदुःखयोः ॥ कर्तारं मन्यतेऽप्राज्ञ आत्मानं परमेव च ॥ १९ ॥ गुणप्रवाह एतस्मिन्कः शापः को न्वनुग्रहः ॥ कः स्वर्गो नरकः को वा किं सुखं दुःखमेव वा ॥ २० ॥ एकः सृजति भूतानि भगवानात्ममायया ॥ एषां बंधं च मोक्षं च सुखं दुःखं च निष्कलः ॥ २१ ॥ न तस्य कश्चिद्दयितः प्रतीपो न ज्ञातिबंधुर्न परो न च स्वः ॥ समस्य सर्वत्र निरंजनस्य सुखे न रागः कुत एव रोषः ॥ २२ ॥

मायागुणानां चेदयं प्रवाहस्तर्हि तेषां जडत्वाद्बंधमोक्षाद्यनुभवो न स्यात्तत्राह । एकः परमेश्वरो मायया निमित्तभूतया भूतानि प्राणिनः सृजति । एषां बंधादिकं च सृजति । निष्कलः स्वयं बंधादिशून्यः ॥ २१ ॥ नन्वेवं भूतविषमसृष्टौ तस्य किं कारणं प्रियादिवैषम्याभावादित्याशंक्य यद्यपि प्रियादयो न संति तथापि तत्तत्कर्मवशात्सर्वं घटत इत्याह । न तस्येति द्वाभ्याम् । प्रतीपोऽप्रियः । न ज्ञातिर्बंधुश्चेत्यर्थः । तत्र हेतुः । सर्वत्र समस्य । तत्कुतः निरंजनस्य निःसंगस्य । अतएव तन्निमित्ते सुखे

चा आणि दुःखाचा कर्ता असें मानतो ॥ १९ ॥ असो. येथेपर्यंत सुखदुःखादिकांचा अंगीकार करून चित्रकेतु राजानें भाषण केलें; परंतु, आतां तीं सुखदुःखादिक वस्तुतः खरीं नाहींत असें सांगण्याच्या अभिप्रायानें ह्मणतो कीं,–हे अंबिके, ह्या गुणप्रवाहरूप संसारामध्यें पडलेल्या जीवाला प्राप्त होणारा शाप अनुग्रह, स्वर्ग, नरक, सुख आणि दुःख हे सर्व खरे आहेत काय? नाहींतच ॥ २० ॥ आतां, मायेच्या गुणांचाच जर हा प्रवाह आहे तर ते गुण जड असल्यामुळें बंधमोक्षादिकांचा अनुभव येणार नाहीं असें ह्मणावें तर–हे देवि, स्वतः बंधादिशून्य असा एक भगवान् परमेश्वरच आपल्या निमित्तभूत मायेच्या योगानें प्राण्यांना आणि त्यांच्या बंध, मोक्ष, सुख व दुःख ह्यांना उत्पन्न करितो ॥ २१ ॥ आतां प्रिय आणि अप्रिय असें वैषम्य जर ईश्वराचेठिकाणीं नाहीं तर त्याला कोणी सुखी व कोणी दुःखी अशा प्रकारची विषम सृष्टि उत्पन्न करण्याचें कारण काय? अशी शंका आली असतां,–जरी ईश्वराचेठिकाणीं प्रिय आणि अप्रिय हीं दोन्ही नाहींत तथापि प्राण्यांच्या कर्मानुसारच त्यांना सुख

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अथवा दुःख इत्यादि सर्व भोगावें लागतें, असें सांगण्याच्या अभिप्रायानें ह्मणतो कीं,– हे माते, त्या ईश्वराला प्रिय, अप्रिय, ज्ञाति, बंधु, स्वकीय अथवा परकीय असा कोणीहि नाहीं. ह्मणून सर्वठिकाणीं सम व निःसंग अशा त्याला संगनिमित्तक सुखाविषयीं प्रीतीच नाहीं मग प्रीतीपासून उत्पन्न होणारा क्रोध कोठून असणार; असावयाचाच नाहीं ॥२२॥ असें जरी आहे तथापि, त्याच्या मायेनें उत्पन्न झालेलें जें पुण्यपापरूप कर्म तेंच ह्या प्राण्यांच्या सुखदुःखांला, हिताहितांला, बंधमोक्षांला जन्ममृत्यूंला व संसाराला कारण होतें ॥ २३ ॥ तस्मात् हे कोपिष्टे पतिव्रते, शापापासून मुक्त होण्याकरितां मी तुझी प्रार्थना करीत नसून माझें भाषण योग्य असतांहि तूं जें अयोग्य असल्याप्रमाणें मानीत आहेस त्याची मात्र तूं क्षमा करावीस ऐवढ्याकरितां मी तुझी प्रार्थना करित आहें ॥ २४ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे शत्रुदमना राजा, ह्याप्रमा-

---

रागो नास्ति रागानुबंधी रोषः कुतः स्यात् ॥ २२ ॥ यद्यप्येवं तथाऽपि तस्य शक्त्या मायया यो विसर्गः पुण्यपापादिलक्षणं कर्म एषां शरीरिणां सुखाद्यर्थमवकल्पते समर्थो भवति । यथोक्तं गीतासु । भूतभावोद्भवकरो विसर्गः कर्मसंज्ञित इति ॥ २३ ॥ अथ तस्माद्भामिनि हे कोपने त्वां केवलं प्रसादयामि न तु शापमोक्षाय । तर्हि किं प्रसादनेनात आह । ममोक्तमुक्तिं साध्वप्यसाधुवन्मन्यसे तत्त्वया क्षम्यताम् ॥ २४ ॥ गिरिशौ भवानीशंकरौ प्रसाद्य स्मयतोर्विस्मयं कुर्वतोः सतोः ॥ २५ ॥ २६ ॥ २७ ॥

तथाऽपि तच्छक्तिविसर्ग एषां सुखाय दुःखाय हिताहिताय ॥ बंधाय मोक्षाय च मृत्युजन्मनोः शरीरिणां संसृतयेऽवकल्पते ॥२३॥ अथ प्रसादये न त्वां शापमोक्षाय भामिनि ॥ यन्मन्यसे ह्यसाधूक्तं मम तत्क्षम्यतां सति ॥ २४॥ श्रीशुक उवाच ॥ इति प्रसाद्य गिरिशौ चित्रकेतुररिंदम ॥ जगाम स्वविमानेन पश्यतोः स्मयतोस्तयोः ॥ २५ ॥ ततस्तु भगवान् रुद्रो रुद्राणीमिदमब्रवीत् ॥ देवर्षिदैत्यसिद्धानां पार्षदानां च शृण्वताम् ॥ २६॥ श्रीरुद्र उवाच॥ दृष्टवत्यसि सुश्रोणि हरेरद्भुतकर्मणः ॥ माहात्म्यं भृत्यभृत्यानां निस्पृहाणां महात्मनाम् ॥ २७ ॥ नारायणपराः सर्वे न कुतश्चन बिभ्यति ॥ स्वर्गापवर्गनरकेष्वपि तुल्यार्थदर्शिनः ॥ २८ ॥ देहिनां देहसंयोगाद्द्वंद्वानीश्वरलीलया ॥ सुखं दुःखं मृतिर्जन्म शापोऽनुग्रह एव च ॥ २९ ॥ अविवेककृतः पुंसो ह्यर्थभेद इवात्मनि ॥ गुणदोषविकल्पश्च भिदेव स्रजिवत्कृतः ॥ ३० ॥

स्वर्गादावेव तुल्योऽर्थः प्रयोजनमिति द्रष्टुं शीलं येषां ते तथा ॥ २८ ॥ तत्र तदुक्तमेव हेतुमाह द्वाभ्याम् । देहिनां सुखं दुःखमित्यादिद्वंद्वानीश्वरस्य लीलया मायया भवंति । तेषु च गुणदोषविकल्पश्चेत्यन्वयः ॥ २९ ॥ इष्टानिष्टभेद इव यः स्फुरति स आत्मन्यर्थभेदः सुखादिभेदः पुंसः स्वप्ने यथा अविवेककृतो भवति स्रजिवत्सर्पमालादिभिर्यथा

णें ईश्वरपार्वतींनां प्रसन्न करून चित्रकेतु राजा तीं उभयतां, विस्मय करीत असतां त्यांच्या समक्ष आपल्या विमानांत बसून निघून गेला ॥ २५ ॥ नंतर, देव, ऋषि दैत्य, सिद्ध आणि पार्षदगण हे सर्व श्रवण करीत असतां भगवान् रुद्र, पार्वतीला असें ह्मणाला कीं, ॥ २६ ॥ श्रीरुद्र ह्मणाला– हे सुंदरि, अद्भुत कर्म करणाऱ्या श्रीहरीच्या महात्म्या निस्पृह दासानुदासांचें माहात्म्य तूं अवलोकन केलेंस ना ? ॥ २७ ॥ कारण, स्वर्ग, मोक्ष आणि नरक हे आपल्याला सारखेच आहेत असें मानण्याचा ज्यांचा स्वभावच पडून गेला आहे ते नारायणाचे परम भक्त, सर्वठिकाणीं कोठेंहि भय बाळ्गित नाहींत ॥ २८ ॥ आतां ह्याप्रमाणें सर्वत्र समदृष्टि होण्याविषयीं चित्रकेतूनेंच दर्शविलेला हेतु कथन करण्याच्या अभिप्रायानें ह्मणतो कीं,– हे पार्वति, ईश्वराच्या मायेनेंच जीवांना देहसंयोगापासून सुख, दुःख, जन्म, मरण आणि शाप व अनुग्रह अशीं द्वंद्वें प्राप्त होत असून त्यांचेठिकाणीं जसा पुरुषाला स्वप्नामध्यें आपलेठिकाणींच 'मी राजा आहें किंवा रंक आहें' अशा बुद्धीनें सुखदुःखांचा भेद भासतो अथवा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जाग्रदवस्थेमध्यें जसा अज्ञानामुळें माळेचेठिकाणीं सर्पाचा भास होतो त्याचप्रमाणें अविवेकानें गुणदोषांचा भेद उत्पन्न होतो ॥ २९ ॥ ३० ॥ तस्मात् ज्ञान व वैराग्य ह्यांच्या बलानें युक्त असून भगवान् वासुदेवाचेठिकाणीं जे भक्ति करीत आहेत त्या पुरुषांना ह्या संसारामध्यें, 'हा चांगला आहे अशा बुद्धीनें' आश्रय करण्यास योग्य असा कोणताहि पदार्थ नाहीं ॥ ३१ ॥ आतां हा चित्रकेतु राजा श्रीहरीचा दास असल्यामुळें, असें भाषण करणें हा त्याचा स्वभावच आहे याकरितां, हीं कांहीं आश्चर्याची गोष्ट नाहीं असें सांगण्याच्या अभिप्रायानें श्रीहरीचें माहात्म्य वर्णन करितो कीं,—ज्याची लीला मी, ब्रह्मदेव, सनत्कुमार, नारद, ब्रह्मपुत्र, मुनि व इंद्रादिक सर्व देव, हे सर्व आह्मी ज्याचा अभिप्राय अथवा लीला जाणण्यास समर्थ नाहीं, तेव्हां त्याच्या अंशाचे अंशभूत असूनहि 'आह्मींच स्वतंत्र ईश्वर आहोंत' असा अभिमान बाळगणारे

तथैव कृत इत्यर्थः । स्रग्वदिति वक्तव्ये स्रजिवदित्यार्षम् । पाठांतरे तु सुगमम् ॥ ३० ॥ अतो भागवतानां निस्पृहत्वमुचितमेवेत्याह । वासुदेव इति । ज्ञानवैराग्ययोर्वीर्यं बलं येषां तेषां व्यपाश्रयो विशिष्टबुद्ध्या आश्रयणीयोऽर्थो नास्ती ॥ ३१ ॥ अस्य च हरिदासत्वेन तत्स्वभावत्वान्नैतच्चित्रमिति वक्तुं हरेर्माहात्म्यमाह । नाहमिति द्वाभ्याम् ।

वासुदेवे भगवति भक्तिमुद्वहतां नृणाम् ॥ ज्ञानवैराग्यवीर्याणां नेह कश्चिद्व्यपाश्रयः ॥ ३१ ॥ नाहं विरिंचो न कुमारनारदौ न ब्रह्मपुत्रा मुनयः सुरेशाः ॥ विदाम यस्येहितमंशकांशका न तत्स्वरूपं पृथगीशमानिनः ॥ ३२ ॥ न ह्यस्यास्ति प्रियः कश्चिन्नाप्रियः स्वः परोऽपि वा ॥ आत्मत्वात्सर्वभूतानां सर्वभूतप्रियो हरिः ॥ ३३ ॥ तस्य चायं महाभागश्चित्रकेतुः प्रियोऽनुगः ॥ सर्वत्र समदृक्शांतो ह्यहं चैवाच्युतप्रियः ॥ ३४ ॥ तस्मान्न विस्मयः कार्यः पुरुषेषु महात्मसु ॥ महापुरुषभक्तेषु शांतेषु समदर्शिषु ॥ ३५ ॥ श्रीशुक उवाच ॥ इति श्रुत्वा भगवतः शिवस्योमाऽभिभाषितम् ॥ बभूव शांतधी राजन्देवी विगतविस्मया ॥ ३६ ॥ इति भागवतो देव्याः प्रतिशप्तुमलंतमः ॥ मूर्ध्ना संजगृहे शापमेतावत्साधुलक्षणम् ॥ ३७ ॥ जज्ञे त्वष्टुर्दक्षिणाग्नौ दानवीं योनिमाश्रितः ॥ वृत्र इत्यभिविख्यातो ज्ञानविज्ञानसंयुतः ॥ ३८ ॥

ईहितमभिप्रायं लीलां वा यदा वयं न विद्मस्तदा तस्य स्वरूपमंशकांशका अपि संतः पृथगीशमानिनो न विदुरेव ॥ ३२ ॥ अतएव हरिरपि सर्वेषां भूतानां प्रियः ॥ ३३ ॥ अहं चैवाच्युतस्य प्रियः तस्मान्ममास्मिन् क्रोधो नाभूदिति भावः ॥ ३४ ॥ ३५ ३६ ॥ प्रतिशापं दातुमलंतमः समर्थतमोऽपि ॥ ३७ ॥ ३८ ॥

लोक, त्याचें स्वरूप जाणत नाहींतच ॥ ३२ ॥ आणि त्याला प्रिय, अप्रिय अथवा परकीय असा कोणीहि नाहीं, तथापि सर्व प्राण्यांचा आत्मा असल्यामुळें तो श्रीहरीच सर्वांना प्रिय आहे ॥ ३३ ॥ हे पार्वति, सर्वत्र समदृष्टि आणि शांत असा हा महाभाग्यवान् चित्रकेतु राजा, त्याला अनुसरून वागणारा असल्यामुळें त्याला प्रिय आहे व मीहि त्या अच्युताला प्रिय आहें ह्याकरितांच ह्या चित्रकेतूवर मी क्रुद्ध झालों नाहीं ॥ ३४ ॥ तस्मात् शांत, समदृष्टि व विष्णुभक्त अशा महात्म्या पुरुषांविषयीं तूं आश्चर्य मानूं नकोस ॥ ३५ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, ह्याप्रमाणें भगवान् शिवाचें भाषण श्रवण करून, उमादेवीचा विस्मय नाहींसा होऊन मनहि शांत झालें ॥ ३६ ॥ असो. याप्रमाणें उलट शाप देण्यास अत्यंत समर्थ असूनहि भगवद्भक्त अशा त्या चित्रकेतूनें त्या देवीचा शाप शिरसा मान्य केला. कारण, दुसऱ्यांनीं अपकार केला असतांहि उलट आपण न करणें हेंच साधूंचें लक्षण होय ॥ ३७ ॥ असो. पुढें तो चित्रकेतु असुरयोनीचा आश्रय करून शास्त्रोक्त व अपरोक्ष ज्ञानासहवर्तमानच

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्वष्ट्याच्या दक्षिणाग्नीमध्यें उत्पन्न होऊन 'वृत्रासुर 'ह्या नांवानें प्रसिद्ध झाला ॥ ३८ ॥ हे राजा, वृत्रासुराची असुरभावानें उत्पत्ति होण्याचें कारण व त्याची भगवंताचे ठिकाणीं भक्ति असण्याचें कारण जें तूं मला विचारिलें होतेंस तें हें मी सर्व तुला वर्णन केलें आहे ॥ ३९ ॥ असो. हे राजा, असा महात्म्या चित्रकेतूचा पुण्यकारक हा इतिहास व विष्णुभक्ताचें माहात्म्य श्रवण केलें असतां प्राणी बंधापासून मुक्त होतो ॥ ४० ॥ आणि प्रातःकालीं उठून श्रीहरीचें स्मरण करून व्यवहारसंबंधीं कांहींएक भाषण न करितां जो पुरुष नियमानें या इतिहासाचें पठण करील त्याला उत्कृष्ट गति प्राप्त होईल ॥ ४१ ॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील षष्ठस्कंधापैकीं हा सतरावा अध्याय समाप्त झाला ॥ १७ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ याप्रमाणें दक्षकन्यांच्या वंशवर्णनामध्यें विवस्वान्, अर्यमा, पूषा, त्वष्टा, सविता, भग, धाता, विधाता, वरुण, मित्र, शक्र आणि उरुक्रम असे अदितीचे बारा पुत्र सांगितले; त्यांमध्यें विश्वरूप, वृत्रासुर आणि चित्रकेतु ह्यांच्या आख्यानांनीं त्वष्टानामक चवथ्या

असुरजातेरसुरभावेनोत्पत्तेर्भगवति मतेश्च ॥ ३९ ॥ ४० ॥ एतदेतम् ॥ ४१ ॥ इति षष्ठस्कंधे टीकायां सप्तदशोऽध्यायः ॥ १७ ॥ ॥ आदित्यानां चतुर्थस्य त्वष्टुर्वंशप्रसंगतः ॥ प्रोक्तमिंद्रकृतं विश्वरूपवृत्रवधादिकम् ॥१॥ अदितेः पंचमादीनां पुत्राणामन्वयोक्तिभिः ॥ अष्टादशे दितेर्गर्भे शक्रेण मरुतां भिदा ॥ २ ॥ त्वष्टुर्वंशमनुकम्प्य सप्रसंगं यथाक्रमम् ॥ आदित्यानामथान्येषां वंशानाह मुनीश्वरः ॥ ३ ॥ दक्षकन्यान्वयानुकथने अदित्या द्वादश पुत्राः प्रोक्ताः । विवस्वानर्यमा पूषा त्वष्टाऽथ सविता भगः ॥ धाता विधाता वरुणो

एतत्ते सर्वमाख्यातं यन्मां त्वं परिपृच्छसि ॥ वृत्रस्यासुरजातेश्च कारणं भगवन्मतेः ॥ ३९ ॥ इतिहासमिमं पुण्यं चित्रकेतोर्महात्मनः ॥ माहात्म्यं विष्णुभक्तानां श्रुत्वा बंधाद्विमुच्यते ॥ ४० ॥ य एतत्प्रातरुत्थाय श्रद्धया वाग्यतः पठेत् ॥ इतिहासं हरिं स्मृत्वा स याति परमां गतिम् ॥४१॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे षष्ठस्कंधे सप्तदशोऽध्यायः ॥ १७ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ पृश्निस्तु पत्नी सवितुः सावित्रीं व्याहृतिं त्रयीम् ॥ अग्निहोत्रं पशुं सोमं चातुर्मास्यं महामखान् ॥ १ ॥ सिद्धिर्भगस्य भार्यांग महिमानं विभुं प्रभुम् ॥ आशिषं च वरारोहां कन्यां प्रासूत सुव्रताम् ॥ २ ॥ धातुः कहूः सिनीवाली राका चानुमतिस्तथा ॥ सायं दर्शमथ प्रातः पूर्णमासमनुक्रमात् ॥ ३ ॥ अग्नीन्पुरीष्यानाधत्त क्रियायां समनंतरः ॥ चर्षणी वरुणस्यासीद्यस्यां जातो भृगुः पुनः ॥४॥

मित्रः शक्र उरुक्रम इति । तत्र षष्ठाध्यायांतमारभ्य विश्वरूपवृत्रचित्रकेतूपाख्यानैस्त्वष्टुर्वंशमनुवर्ण्येदानीं सवितुर्वंशमाह । पृश्निस्त्विति । सावित्रीमित्यादिषु प्रासूतेत्युत्तरस्यानुषंगः । पशुं पशुयागम् । महामखान्पंचयज्ञान् ॥ १ ॥ २ ॥ धातुर्भार्या कुहूः सायं पुत्रं प्रासूत । एवं सिनीवाली दर्शमित्यनुक्रमात् ॥ ३ ॥ समनंतरो विधाता क्रियायां भा-

---

आदित्याचा वंश वर्णन केला. आतां ह्या अठराव्या अध्यायामध्यें अदितीच्या पांचव्यापासून राहिलेल्या पुत्रांचा वंश कथन केला आहे व दितीच्या उदरामध्यें जाऊन इंद्रानें तिच्या गर्भाचे मरुद्गणरूप एकुणपन्नास तुकडे केले असें निरूपण केलें आहे ॥ १ ॥ असो. अध्यायाच्या आरंभीं सवितानामक पांचव्या आदित्याचा वंश सांगण्याच्या अभिप्रायानें श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, सवितानामक पांचव्या आदित्याच्या पृश्नि ह्या नांवाच्या भार्येला सावित्री, व्याहृति, त्रयी, अग्निहोत्र, पशु, सोम, चातुर्मास्य व पंचमहायज्ञ अशीं अपत्यें उत्पन्न झालीं ॥ १ ॥ हे राजा, भगनामक सहाव्या आदित्याच्या सिद्धिनामक भार्येला महिमा, विभु, प्रभु आणि सौंदर्यसंपन्न व उत्तम व्रत धारण करणारी आशीर्नामक कन्या हीं अपत्यें झालीं ॥ २ ॥ धातानामक सातव्या आदित्याच्या कुहू, सिनीवाली, राका आणि अनुमति ह्या चार भार्यांना अनुक्रमें सायंकाल, दर्श, प्रातःकाल आणि पूर्णमास हे पुत्र झाले ॥ ३ ॥ त्याचप्रमाणें धातानामक आदित्याच्या नंतरचा जो विधातानामक आठवा आदित्य त्यानें, आपल्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

क्रियानामक भार्येचेठिकाणीं पुरीष्यनांवांचे पंचचित अग्नि उत्पन्न केले व वरुणानामक नवव्या आदित्याची चर्षणीनामक भार्या होती तिचेठिकाणीं पूर्वी ब्रह्मदेवाचा पुत्र असलेला भृगुऋषि पुनरपि उत्पन्न झाला ॥ ४ ॥ पूर्वी वारुळापासून उत्पन्न झालेला जो महायोगी वाल्मीकि तोहि वरुणाचाच पुत्र होय. अगत्स्य आणि वसिष्ठ हे दोन ऋषि मित्र आणि वरुण ह्या उभयतांचे मिळून पुत्र होत. कारण, उर्वशीसमीप पतन पावलेलें वीर्य त्या उभयतांनीं कुंभामध्यें सिंचन केलें असल्यामुळें त्यापासून ते उत्पन्न झाले होते. असो, मित्रानें आपल्या रेवतीनामक भार्येचेठिकाणीं दुसरे उत्सर्ग, अरिष्ट आणि पिप्पल असे तीन पुत्र उत्पन्न केले ॥ ५ ॥ ६ ॥ बा परीक्षिते, इंद्रनामक अकराव्या समर्थ आदित्यानें आपल्या पौलोमीनामक भार्येचेठिकाणीं जयंत, ऋषभ आणि तिसरा मीढुष असे तीन पुत्र उत्पन्न केले, असें आमच्या ऐकण्यांत आहे ॥ ७ ॥

यांयां पुरीष्यानग्नीन्पंचचितान् । पुरीष्यासो अग्नय इति पंच वा एतेऽग्नयो यच्चित्तय इति श्रुतेः । चर्षणी वरुणस्य भार्याऽऽसीत् । पूर्वं ब्रह्मणः पुत्रो भृगुर्यस्यां पुनर्जातः ॥ ४ ॥ वाल्मीकिर्वरुणस्यैव पुत्रोऽभवत् । एतौ वरुणस्यासाधारणौ पुत्रौ तथोत्सर्गादयोऽपि मित्रस्यासाधारणाः । तयोरेव साधारणौ द्वौ पुत्रावाह । अगस्त्यश्च वसिष्ठश्च

वाल्मीकिश्च महायोगी वल्मीकादभवत्किल ॥ अगस्त्यश्च वसिष्ठश्च मित्रावरुणयोर्ऋषी ॥ ५ ॥ रेतः सिषिचतुः कुंभे उर्वश्याः सन्निधौ द्रुतम् ॥ रेवत्यां मित्र उत्सर्गमरिष्टं पिप्पलं व्यधात् ॥ ६ ॥ पौलोम्यामिंद्र आधत्त त्रीन्पुत्रानिति नः श्रुतम् ॥ जयंतमृषभं तात तृतीयं मीढुषं प्रभुः ॥ ७ ॥ उरुक्रमस्य देवस्य मायावामनरूपिणः ॥ कीर्तौ पत्न्यां बृहच्छ्लोकस्तस्यासन्सौभगादयः ॥ ८ ॥ तत्कर्मगुणवीर्याणि काश्यपस्य महात्मनः ॥ पश्चाद्वक्ष्यामहेऽदित्यां यथैवावततार ह ॥ ९ ॥ अथ काश्यपदायादान्दैतेयान्कीर्तयामि ते ॥ यत्र भागवतः श्रीमान्प्रह्लादो बलिरेव च ॥ १० ॥ दितेर्द्वावेव दायादौ दैत्यदानववंदितौ ॥ हिरण्यकशिपुर्नाम हिरण्याक्षश्च कीर्तितौ ॥ ११ ॥ हिरण्यकशिपोर्भार्या कयाधुर्नाम दानवी ॥ जंभस्य तनया दत्ता सुषुवे चतुरः सुतान् ॥ १२ ॥

ऋषी मित्रावरुणयोरभवताम् ॥५॥ यत उभावपि कुंभे रेतः सिषिचतुः । सत्रे ह जाता विशिता नमोभिः कुंभे रेतः सिषिचतुः समानमिति श्रुतेः । द्रुतं स्कन्नम् ॥ ६ ॥ ७ ॥ ॥ ८ ॥ पश्चादष्टमस्कंधे ॥ ९ ॥ अथेति । कश्यपस्यादितेः पुत्राणां द्वादशादित्यानां संततिमुक्त्वा दितेः पुत्रान्कथयामीत्यर्थः ॥ १० ॥ हिरण्यकशिपुर्हिरण्याक्षश्चेति प्रथमं द्वावेव तौ च कीर्तितौ तृतीयस्कंधे ॥ ११ ॥ १२ ॥

मायेनें वामनरूप धारण केलेला जो भगवदवताररूप उरुक्रम नांवाचा बारावा आदित्य त्याच्या कीर्तिनामक पत्नीचेठिकाणीं बृहच्छ्लोक नांवाचा पुत्र झाला व त्या बृहच्छ्लोकालाहि सौभगादिक पुत्र झाले ॥ ८ ॥ त्या महात्म्या वामनानें अदितीचेठिकाणीं कसा अवतार धारण केला तो प्रकार आणि त्याचीं कर्मे, गुण आणि प्रभाव हे कसे होते हें सर्व मी तुला पुढें (आठव्या स्कंधामध्यें) कथन करीन ॥ ९ ॥ हे राजा, आतां ज्याच्यामध्यें श्रीमान् भगवद्भक्त प्रल्हाद व बलि हे झाले आहेत असे दितीपासून झालेले कश्यपाचे पुत्र मी तुला कथन करितों ॥ १० ॥ दितीला प्रथमतः दैत्यांना व दानवांनाहि पूज्य असे हिरण्यकशिपु आणि हिरण्याक्ष या नांवांचे दोन पुत्र झाले ते तुला मी तृतीयस्कंधामध्यें सांगितले आहेत ॥ ११ ॥ कयाधुनामक दानवी जी जंभासुराची त्यानें दिलेली कन्या ती हिरण्यकशिपूची भार्या असून तिला चार पुत्र ॥ ९७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

झाले ॥ १२ ॥ त्यांचीं नांवें– संऱ्हाद, अनुऱ्हाद, ऱ्हाद आणि प्रऱ्हाद अशीं होती. त्यांची सिंहिकानामक एक भगिनी होती तिला, विप्रचित्नामक दैत्यापासून राहु हा पुत्र झाला. तो अमृतपान करीत असतांना श्रीहरीनें चक्राच्या योगानें त्याचें मस्तक हरण केलें. संऱ्हादाच्या कृतिनामक भार्येला पंचजननांवाचा पुत्र उत्पन्न झाला ॥ १३ ॥ ॥ १४ ॥ ऱ्हादाची जी धमनीनामक भार्या होती तिला, 'अतिथिरूपानें प्राप्त झालेल्या अगस्त्य ऋषीला मारण्याकरितां, मेषरूप धारण करणाऱ्या' वातापीचा ज्यानें पाक केला होता. तो इल्वल आणि ज्याचा पाक केला तो वातापि असे दोन पुत्र झाले ॥१५॥ अनुऱ्हादाला सूर्म्यानामक भार्येचेठिकाणीं बाष्कल आणि महिष असे दोन पुत्र झाले. विरोचन हा तर प्रऱ्हादाचा पुत्र असून त्याला देवीनामक भार्येचेठिकाणीं बलिनामक पुत्र झाला ॥ १६ ॥ त्या बलीपासून अशनानामक भार्येचेठिकाणीं ज्यांच्यामध्यें बाण हा ज्येष्ठ आहे असे शंभर पुत्र उत्पन्न झाले. हे राजा, पुण्यकारक कीर्तीला योग्य असा त्या बलीचा प्रभाव, मी तुला पुढें अष्टमस्कंधामध्यें कथन करीन ॥ १७ ॥

विप्रचितो दानवाद्भर्तुः सकाशाद्राहुं पुत्रमग्रहीत् ॥ १३ ॥ ततः संह्रादादसूत ॥ १४ ॥ यो मेषरूपं वातापिं पेचे तमिल्वलम् । यं पेचे तं वातापिं चासूतेत्यन्वयः ॥ १५ ॥ ॥१६॥ ततो बलेः सकाशादभवत् । तस्य बलेरनुभावः सुश्लोक्यः पुण्यकीर्त्यर्हः यद्वा अनुभाव्यते सद्भिः स्तूयत इत्यनुभावम् । सुश्लोक्यं यश इति शेषः ॥ १७ ॥ तस्य गणेषु ।

संह्रादं प्रागनुह्रादं ह्रादं प्रह्लादमेव च ॥ तत्स्वसा सिंहिका नाम राहुं विप्रचितोऽग्रहीत् ॥ १३ ॥ शिरोऽहरद्यस्य हरिश्चक्रेण पिबतोऽमृतम् ॥ संह्रादस्य कृतिर्भार्याऽसूत पंचजनं ततः ॥ १४ ॥ ह्रादस्य धमनिर्भार्याऽसूत वातापिमिल्वलम् ॥ योऽगस्त्याय त्वतिथये पेचे वातापिमिल्वलम् ॥ १५ ॥ अनुह्रादस्य सूर्म्यायां बाष्कलो महिषस्तथा ॥ विरोचनस्तु प्राह्लादिर्देव्यास्तस्याभवद्बलिः ॥ ॥ १६ ॥ बाणज्येष्ठं पुत्रशतमशनायां ततोऽभवत् ॥ तस्यानुभावः सुश्लोक्यः पश्चादेवाभिधास्यते ॥ १७ ॥ बाण आराध्य गिरिशं लेभे तद्गणमुख्यताम् ॥ यत्पार्श्वे भगवानास्ते ह्यद्यापि पुरपालकः ॥ १८ ॥ मरुतश्च दितेः पुत्राश्चत्वारिंशन्नवाधिकाः ॥ त आसन्नप्रजाः सर्वे नीता इंद्रेण सात्मताम् ॥ १९ ॥ राजोवाच ॥ कथं त आसुरं भावमपोह्यौत्पत्तिकं गुरो ॥ इंद्रेण प्रापिताः सात्म्यं किं तत्साधु कृतं हि तैः ॥ २० ॥ इमे श्रद्दधते ब्रह्मन्नृषयो हि मया सह ॥ परिज्ञानाय भगवंस्तन्नो व्याख्यातुमर्हसि ॥ २१ ॥ सूत उवाच ॥ तद्विष्णुरातस्य स बादरायणिर्वचो निशम्याहृतमल्पमर्थवत् ॥ सभाजयत्संनिभृतेन चेतसा जगाद सत्रायण सर्वदर्शनः ॥ २२ ॥

मुख्यतां प्राधान्यम् ॥ १८ ॥ सात्मतां समानरूपताम् ॥ १९ ॥ सात्म्यं देवत्वं प्रापिताः ॥ २० ॥ २१ ॥ आहृतं सादरम् । अल्पं मिताक्षरम् । अर्थवद्बह्वर्थयुक्तम् । सत्रमयनमाश्रयो तस्य हे सत्रायण शौनक ॥ २२ ॥

बाणासुरानें कैलासनाथ महादेवाचें आराधन करून त्याच्या गणामध्यें प्राधान्य मिळविलें व अद्यापि भगवान् शिव, त्याच्या पार्श्वभागीं राहत असून त्याच्या नगराचें रक्षण करीत आहे ॥ १८ ॥ त्याचप्रमाणें दितीला मरुत्नांवांचे एकुणपन्नास पुत्र होते ते सर्व संततिरहित असून इंद्रानें त्यांना आपल्यासारखे देव केले होते ॥ १९ ॥ राजा ह्मणाला– हे गुरो, स्वाभाविक असुरभावाचा त्याग करवून इंद्रानें त्यांना देवत्व कसें दिलें व त्यांनीं तरी त्याजवर काय उपकार केला होता हें जाणण्याची; हे ऋषि देखील मजसहवर्तमान इच्छा करीत आहेत; तस्मात् हे ब्रह्मनिष्ठा, भगवंता, हें तूं आह्मांस कथन कर ॥ २० ॥ २१ ॥ सूत ह्मणाला– हे शौनका, आदरयुक्त, मित व अर्थानें भरलेलें असें तें परीक्षित् राजाचें भाषण श्रवण करून, त्या सर्वज्ञ व्यासपुत्रानें आनंदपूर्ण अंतःकरणानें त्याचा सत्कार करीत उत्तर दिलें कीं ॥ २२ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे परीक्षित् राजा, इंद्राला मागाहून साहाय्य करणाऱ्या विष्णूनें दितीचे पुत्र मारविले असतां शोकानें प्रदीप्त झालेल्या क्रोधाच्या योगानें संतप्त होऊन ती दिति असें चिंतन करूं लागली कीं, ॥ २३ ॥ अहो, विषयासक्त, क्रूरस्वभावाचा, कठिणचित्तानें युक्त आणि भ्रातृघातकी अशा इंद्राला मारवून मी कधीं बरें सुखी होईन ? ॥ २४ ॥ आतां 'स्वदेहरक्षणार्थ राजा इतरांचा घात करीतच असतो तेव्हां ह्मानें आपल्या भ्रात्यांचा घात केला ह्मांत काय आश्चर्य आहे' असें ह्मणावें तर–अहो पूर्वकालीन राजांच्या देहाविषयीं विचार केला तर असें दिसून येतें कीं, ज्याला पूर्वी 'प्रभु' असें ह्मणत असतात तोच देह, मरणानंतर दोन तीन दिवस राहिल्यानें कृमि, श्वानादिकांनीं भक्षण केला असतां विष्ठा आणि दग्ध झाला असतां भस्म अशीं नांवें पावतो. तस्मात्, त्या देहाकरितां जो भूतांचा द्रोह करितो तो आपला स्वार्थ जाणतो काय ?

शक्रस्य पार्ष्णिग्राहेण पृष्ठतः सहायेन ॥ २३ ॥ भ्रातृहंतारमिंद्रं मारयित्वा सुखिनी कदा स्यामिति चिंतयामास दितिः । उल्बणं क्रूरम् । अक्लिन्नहृदयं कठिनचित्तम् ॥ २४ ॥ ननु राजा स्वदेहरक्षार्थमन्येषां घातं करोत्येव किमत्र चित्रं तत्राह । कृमीति । ईशः प्रभुरित्यभिहितस्यापि यस्य पूर्वेषां राज्ञां देहस्य मरणानंतरं द्वित्रिदिनावस्थितस्य कृमय इति श्वादिभिर्भक्षितस्य तु विष्ठेति दग्धस्य भस्मेति संज्ञा आसीत्तत्कृते तस्य देहस्वार्थे यो भूतेभ्यो द्रुह्यति स किं स्वार्थं वेद न वेदैव । तत्र हेतुः । यतो भूत-

॥ श्रीशुक उवाच ॥ हतपुत्रा दितिः शक्रपार्ष्णिग्राहेण विष्णुना ॥ मन्युना शोकदीप्तेन ज्वलंती पर्यचिंतयत् ॥ २३ ॥ कदा नु भ्रातृहंतारमिंद्रियाराममुल्बणम् ॥ अक्लिन्नहृदयं पापं घातयित्वा शये सुखम् ॥ २४ ॥ कृमिविड्भस्मसंज्ञासीद्यस्येशाभिहितस्य च ॥ भूतध्रुक्तत्कृते स्वार्थं किं वेद निरयो यतः ॥ २५ ॥ आशासानस्य तस्येदं ध्रुवमुन्नद्धचेतसः ॥ मदशोषक इंद्रस्य भूयाद्येन सुतो हि मे ॥ २६ ॥ इति भावेन सा भर्तुराचचारासकृत्प्रियम् ॥ शुश्रूषयाऽनुरागेण प्रश्रयेण दमेन च ॥ २७ ॥ भक्त्या परमया राजन्मनोज्ञैर्वल्गुभाषितैः ॥ मनो जग्राह भावज्ञा सुस्मितापांगवीक्षणैः ॥ २८ ॥ एवं स्त्रिया जडीभूतो विद्वानपि विदग्धया ॥ बाढमित्याह विवशो न तच्चित्रं हि योषिति ॥ २९ ॥ विलोक्यैकांतभूतानि भूतान्यादौ प्रजापतिः ॥ स्त्रियं चक्रे स्वदेहार्धं यया पुंसां मतिर्हृता ॥ ३० ॥

द्रोहान्निरयो भवति ॥ २५ ॥ इदं देहादिकं ध्रुवं नित्यमाशासानस्य मन्यमानस्यात उन्नद्धमुच्छृंखलं चेतो यस्य तस्येंद्रस्य यो मदस्तस्य शोषकः पुत्रो मे येन हेतुना भूयाद्भवेत् ॥ २६ ॥ भर्तुः प्रियाचरणमेवेति भावेन सा भर्तुः प्रियमसकृदाचचार ॥ २७ ॥ २८ ॥ विवशः स्त्रीपरतंत्रः सन्बाढं तव मनोरथं पूरयिष्यामीति यदाह तन्न चित्रम् ॥ २९ ॥ तत्र हेतुमाह । विलोक्येति । एकांतभूतानि निःसंगानि मैथुनेन सृष्टिवृद्ध्यर्थं स्वदेहार्धमेव स्त्रियं चक्रे ॥ ३० ॥

नाहींच जाणत कारण, भूतद्रोहापासून नरक प्राप्त होतो ॥ २५ ॥ तस्मात् हे देहादिक नित्य आहेत असें मानित असल्यामुळें ज्याचें चित्त उच्छृंखल झालें आहे त्या इंद्राचा मद नाहींसा करणारा असा पुत्र मला कोणत्या उपायानें होईल ? खरोखर अशा प्रकारचा पुत्र उत्पन्न होण्यास भर्त्यांचें प्रिय करणें ह्मावांचून इतर साधन नाहीं ॥ २६ ॥ असें मनांत आणून ती दिति, शुश्रूषा, प्रेम, विनय आणि इंद्रियदमन ह्मांच्या योगानें भर्त्यांचें निरंतर प्रिय करूं लागली ॥ २७ ॥ आणि हे राजा, असें होतांहोतां पतीचा अभिप्राय जाणणाऱ्या त्या दितीनें उत्कृष्ट भक्ति, मनोहर आणि मधुर अशीं वचनें व सुंदरहास्यपूर्वक कटाक्ष ह्मांच्या योगानें कश्यपाचें मन वश केलें ॥ २८ ॥ ह्मप्रमाणें शुश्रूषादिकांनीं त्या चतुर स्त्रीनें ज्ञानी कश्यपालाहि मोहित करून टाकिलें असतां, त्यानें स्त्रीच्या अधीन होऊन 'ठीक आहे, मी तुझे मनोरथ पूर्ण करीन' असें भाषण केलें, तें कांहीं त्या स्त्रीचेठिकाणीं आश्चर्य नव्हे ॥ २९ ॥ कारण, सृष्टीचे आरंभीं ब्रह्मदेवानें सर्व प्राणी

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

निःसंग आहेत असें पाहून मैथुनधर्मानें सृष्टि वाढविण्याकरितां आपल्या अर्ध्या देहाचीच त्यानें स्त्री बनविली व तिनें पुरुषाची मति हरण केली ॥ ३० ॥ असो. बा परीक्षिते, ह्याप्रमाणें स्त्रीनें भगवान् कश्यपाची शुश्रूषा केली असतां तो अत्यंत प्रसन्न झाला आणि हास्यपूर्वक दितीची प्रसंशा करून असें ह्मणाला कीं ॥ ३१ ॥ कश्यप ह्मणाला- हे निर्दोषे सुंदरि, मी तुजवर प्रसन्न झालों आहें, याकरितां तूं वर माग. कारण, भर्ता सुप्रसन्न झाला असतां इहलोकसंबंधीं अथवा परलोकसंबंधीं कोणता मनोरथ स्त्रीला दुर्लभ आहे? कोणताच नाहीं ॥ ३२ ॥ आतां 'परमेश्वर सुप्रसन्न झाला असतां सर्व मनोरथ प्राप्त होतात' अशी प्रसिद्धि आहे असें ह्मणशील तर हे शोभने, पति हेंच स्त्रियांचें परम दैवत आहे असें सांगितलें आहे. परंतु मनामध्यें असलेला वासुदेव श्रीपतिच सर्वप्राण्यांचें परम दैवत असल्याचें प्रसिद्ध आहे असें ह्मणशील तर, तें ह्मणणें सत्य आहे ॥ ३३ ॥ कारण, नामें आणि रूपें ह्यांच्या योगानें नानाप्रकारांनीं कल्पिलेल्या देवतारूपांनीं पुरुष त्याच

एवं स्त्रिया शुश्रूषितः सन् ॥३१॥ इह चकारात्परत्र च अगमोऽप्राप्यः ॥ ३२॥ ननु परमेश्वरे सुप्रीते सर्वकामप्राप्तिरिति प्रसिद्धं तत्राह। पतिरेवेति। ननु मनसि स्थितः श्रीवासुदेव

एवं शुश्रूषितस्तात भगवान्कश्यपः स्त्रिया ॥ प्रहस्य परमप्रीतो दितिमाहाभिनंद्य च ॥ ३१ ॥ कश्यप उवाच ॥ वरं वरय वामोरु प्रीतस्तेऽहमनिंदिते ॥ स्त्रिया भर्तरि सुप्रीते कः काम इह चागमः ॥ ३२ ॥ पतिरेव हि नारीणां दैवतं परमं स्मृतम् ॥ मानसः सर्वभूतानां वासुदेवः श्रियः पतिः ॥ ३३ ॥ स एव देवतालिंगैर्नामरूपविकल्पितैः ॥ इज्यते भगवान्पुंभिः स्त्रीभिश्च पतिरूपधृक् ॥ ३४ ॥ तस्मात्पतिव्रता नार्यः श्रेयस्कामाः सुमध्यमे ॥ यजंतेऽनन्यभावेन पतिमात्मानमीश्वरम् ॥ ३५ ॥ सोऽहं त्वयाऽर्चितो भद्रे ईदृग्भावेन भक्तितः ॥ तत्ते संपादये काममसतीनां सुदुर्लभम् ॥ ३६ ॥ दितिरुवाच ॥ वरदो यदि मे ब्रह्मन्पुत्रमिंद्रहणं वृणे ॥ अमृत्युं मृतपुत्राऽहं येन मे घातितौ सुतौ ॥ ३७ ॥ निशम्य तद्वचो विप्रो विमनाः पर्यतप्यत ॥ अहो अधर्मः सुमहानद्य मे समुपस्थितः ॥ ३८ ॥ अहो अर्थेंद्रियारामो योषिन्मय्येह मायया ॥ गृहीतचेताः कृपणः पतिष्ये नरके ध्रुवम् ॥ ३९ ॥

एव लक्ष्मीपतिः परं दैवतमिति प्रसिद्धं सत्यम्। स एव स्वाधिकारेण रूपभेदैः पूज्यत इत्याह। मानस इति सार्धेन ॥ ३३ ॥ देवतालिंगैर्मूर्तिभिरुपलक्षितः। तान्येवाह। नाम इंद्रादि रूपं वज्रहस्तत्वादि ताभ्यां विविधं कल्पितैः ॥ ३४ ॥ ३५ ॥ ३६ ॥ इंद्रहणं इंद्रहंतारम्। अमृत्युं मृत्युशून्यम्। येनेंद्रेण विष्णुना सहायेन घातितौ ॥ ३७॥ ३८॥ ३९ ॥

भगवंताचें पूजन करीत असतात व स्त्रियाहि त्याच पतिरूपधारी भगवंताचें पूजन करितात ॥ ३४ ॥ तस्मात् हे सुमध्यमे, आपलें कल्याण व्हावें अशी इच्छा करणाऱ्या पतिव्रता स्त्रिया, अनन्यभावानें पतिरूपी सर्वात्म्या ईश्वराचें पूजन करितात ॥ ३५ ॥ त्याचप्रमाणें हे भद्रे, ज्याअर्थी अशा भावानें भक्तिपूर्वक तूं माझें अर्चन केलें आहेस त्याअर्थीं असाध्वी स्त्रियांस अत्यंत दुर्लभ असाहि मी तुझा मनोरथ पूर्ण करीन ॥ ३६ ॥ दिति ह्मणाली-हे ब्रह्मन्, आपण जर मला वर देत असाल तर, ज्यानें विष्णूच्या साहाय्यानें माझ्या दोन पुत्रांचा घात केल्यामुळें मी मृतपुत्र जाहल्यें आहें, त्या इंद्राला मारणारा असा एक मृत्युरहित पुत्र मी मागत्यें ॥ ३७ ॥ हे राजा, तें वचन श्रवण करितांच तो विप्र कश्यप, मनामध्यें खिन्न होऊन संतप्त झाला आणि आपल्या मनामध्येंच ह्मणाला कीं,- अहो फारच मोठा हा अधर्म आज मला प्राप्त झाला आहे ॥ ३८ ॥ अरे! काय आश्चर्य हें! विषयासक्त झाल्यामुळें माझा विवेकवगैरे नष्ट होऊन स्त्रीरूप मायेनें ह्याप-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

संगीं माझें मन अगदीं वश करून घेतलें. तस्मात्, मी निःसंशय आज नरकामध्यें पडणार ॥ ३९ ॥ अहो, खरोखर पाहूं गेलें असतां, आपल्या स्वभावाप्रमाणें वागणाऱ्या स्त्रीचा कायवरें ह्यामध्यें अपराध आहे ? तस्मात्, ज्याअर्थीं इंद्रियांच्या अधीन होऊन मीच स्वार्थाविषयीं मूढ झालों त्याअर्थीं मलाच धिक्कार असो ॥ ४० ॥ अरे स्त्रियांचें मुख पाहावें तर अगदीं शरदृतूंतील कमलाप्रमाणें विकसित असतें, भाषण ऐकावें तर अमृताप्रमाणें कर्णाला मधुर लागणारें असतें परंतु हृदयाविषयीं जर विचार केला तर तेंमात्र अगदीं वस्तऱ्याच्या धारेसारखें तीक्ष्ण असतें. यास्तव स्त्रियांचें कृत्य कोणवरें जाणत असेल ? ॥ ४१ ॥ अहो, स्वार्थाच्या कामनेमुळें ज्या साक्षात् आत्म्याप्रमाणें अत्यंत प्रिय वाटतात अशा स्त्रियांना खरोखर कोणीहि प्रिय नाहीं. कारण, स्वार्थाकरितां पतीचा, पुत्राचा अथवा भ्रात्याचा त्या आपण स्वतां घात करितात किंवा दुसऱ्याकडूनहि करवितात ॥ ४२ ॥ असो. वर देतों ह्मणून जी मीं प्रतिज्ञा केली आहे तें माझें भाषण असत्य होऊं नये व इंद्र

स्वभावमनुवर्तमानाया योषितः कोऽतिक्रमोऽपराधः ॥ ४० ॥ स्वभावमेवाह द्वाभ्याम् । शरत्पद्मस्येवोत्सवो विकासो यस्मिन् । श्रवणे श्रुती तयोरमृतम् । क्षुरधारोपमं चित्तम् ॥ ४१ ॥ स्वाशिषात्मनां स्वार्थकामनयात्मवत्प्रेष्ठत्वेन प्रतीयमानानाम् ॥ ४२ ॥ तत्रेदमुपकल्पते योग्यं भवति । अयं भावः । वैष्णवं व्रतं तावदुपदेक्ष्यामि तेनै-

कोऽतिक्रमोऽनुवर्तंत्याः स्वभावमिह योषितः ॥ धिङ्मां बताबुधं स्वार्थे यदहं त्वजितेंद्रियः ॥ ४० ॥ शरत्पद्मोत्सवं वक्त्रं वचश्च श्रव-
णामृतम् ॥ हृदयं क्षुरधाराभं स्त्रीणां को वेद चेष्टितम् ॥ ४१ ॥ न हि कश्चित्प्रियः स्त्रीणामंजसा स्वाशिषात्मनाम् ॥ पतिं पुत्रं
भ्रातरं वा घ्नंत्यर्थे घातयंति च ॥ ४२ ॥ प्रतिश्रुतं ददामीति वचस्तन्न मृषा भवेत् ॥ वधं नार्हति चेंद्रोऽपि तत्रेदमुपकल्पते ॥ ४३ ॥
इति संचिंत्य भगवान्मारीचः कुरुनंदन ॥ उवाच किंचित्कुपित आत्मानं च विगर्हयन् ॥ ४४ ॥ कश्यप उवाच ॥ पुत्रस्ते भविता
भद्रे इंद्रहा देवबांधवः ॥ संवत्सरं व्रतमिदं यद्यंजो धारयिष्यसि ॥ ४५ ॥ दितिरुवाच ॥ धारयिष्ये व्रतं ब्रह्मन्ब्रूहि कार्याणि यानि
मे ॥ यानि चेह निषिद्धानि न व्रतं घ्नंति यानि तु ॥ ४६ ॥

वास्याः शुद्धचित्ताया इंद्रंप्रति क्रोधो निर्वर्तिष्यते पुत्रस्त्वमर्त्यो भविष्यति दीर्घकालत्वे च व्रतस्य कथंचिद्वैगुण्ये सतींद्रस्य वधोऽपि न भविष्यतीति ॥ ४३ ॥ ४४ ॥ हे भद्रे अंजः यथावद्यदि धारयिष्यसि तर्हींद्रहा भविष्यति वैगुण्ये तु देवबांधवो भविष्यति । वैष्णवत्वाद्व्रतस्य कथंचिद्वैगुण्येऽपि सर्वथा वैकल्याभावात् ॥ ४५ ॥ कार्याण्यावश्यकानि ।

हा देवराज असल्यानें वधाला योग्य नसल्यामुळें त्याचाहि वध होऊं नये, ह्या दोन्ही गोष्टी सिद्धीस जाण्याविषयीं वैष्णवव्रताचा आपण ह्या दितीला उपदेश करावा. ह्मणजे त्याच्या योगानेंच हिचें चित्त शुद्ध झालें असतां, हिचा इंद्राविषयींचा क्रोध नाहींसा होईल व मृत्युरहित असा हिला पुत्रहि प्राप्त होईल आणि त्या व्रताला दीर्घकाल लागत असल्यामुळें कांहींतरी त्यांत वैगुण्य प्राप्त झालें ह्मणजे इंद्राचाहि वध होणार नाहीं तस्मात् ह्याप्रसंगीं असें करणें हें योग्य दिसतें ॥ ४३ ॥ हे कुरुनंदना, याप्रमाणें भगवान् मरीचिपुत्र कश्यपानें विचार केला आणि किंचित् क्रुद्ध होऊन आपली निंदा करीत करीत तिला असें ह्मणाला कीं, ॥ ४४ ॥ कश्यप ह्मणाला— हे भद्रे, मी सांगतों हें व्रत जर तूं एक वर्षपर्यंत अगदीं सांगितल्याप्रमाणें धारण केलेंस तर तुला इंद्राला मारणारा पुत्र होईल आणि त्या व्रतांत जर कांहीं वैगुण्य झालें तर तो पुत्र देवांचा बंधु (इंद्राचा पक्षपाती) होईल ॥ ४५ ॥ दिति ह्मणाली— हे ब्रह्मन्, मी व्रत धारण करीन, तस्मात् ह्या व्रताविषयीं आवश्यक कृत्यें कोणतीं, निषिद्ध कृत्यें कोणतीं आणि व्रतविघात न करणारीं, आवश्यक नसणारीं व निषिद्धहि नसणारी अशीं विहित कृत्यें कोणतीं ? तीं सर्व आपण मला

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कथन करावीं ॥ ४६ ॥ कश्यप ह्मणाला– हे कल्याणि, प्राणिसमुदायापैकीं कोणाचीहि हिंसा करूं नये, कोणाला शाप देऊं नये, अनृत भाषण करूं नये, नखें व केश ह्यांचें छेदन करूं नये व अमंगल पदार्थांस स्पर्श करूं नये ॥ ४७ ॥ तसेंच उदकामध्यें प्रविष्ट होऊन स्नान करूं नये, कोणावर कोप करूं नये, दुर्जनांशीं संभाषण करूं नये, धुतलेलें नसेल तें वस्त्र परिधान करूं नये आणि पूर्वीं धारण केलेली माळा कधींहि धारण करूं नये ॥ ४८ ॥ त्याचप्रमाणें उच्छिष्ट, भद्रकाली देवीला अर्पण केलेलें, मांसानें युक्त, शूद्रानें आणिलेलें आणि रजस्वलेनें अवलोकन केलेलें असें अन्न भक्षण करूं नये, ओंजळीनें उदकाचें प्राशन करूं नये ॥ ४९ ॥ तसेंच मुख उच्छिष्ट असतां, हातपाय धुतले नसतां, संध्याकाल असतां, केंस मोकळे असतां, अलंकार धारण केले नसतां मौनव्रत ग्रहण केलें नसतां आणि अंगा-

---

व्रतं यानि न घ्नंति नावश्यकानि न च निषिद्धानि किं त्वभ्यनुज्ञातानि तानि सर्वाण्यपि ब्रूहि ॥ ४६ ॥ तत्रैकत्रिंशन्निषेधानाह । न हिंस्यादिति पंचभिः । न शपेन्नाक्रोशेत् । यदमंगलं कपालास्थ्यादिकं तन्न स्पृशेत् ॥ ४७ ॥ नाप्सु प्रविश्य स्नायात् । पूर्वं विधृतां स्रजं पुनर्न धारयेत् ॥ ४८ ॥ भोजने पंच निषेधानाह । नोच्छिष्टमिति । चंडिकान्नं भद्रकाल्यै निवेदितं पिपीलिकादिदूषितं वा अंजलिना त्वपो न पिबेत् ॥ ४९ ॥ गृहाद्बहिर्निर्गमे सप्त निषेधानाह । नोच्छिष्टेति । अनर्चिता मंडनहीना ।

कश्यप उवाच ॥ न हिंस्याद्भूतजातानि न शपेन्नानृतं वदेत् ॥ न छिंद्यान्नखरोमाणि न स्पृशेद्यदमंगलम् ॥ ४७ ॥ नाप्सु स्नायान्न कुप्येत न संभाषेत दुर्जनैः ॥ न वसीताधौतवासः स्रजं च विधृतां क्वचित् ॥ ४८ ॥ नोच्छिष्टं चंडिकान्नं च सामिषं वृषलाहृतम् ॥ भुंजीतोदक्यया दृष्टं पिबेदंजलिना त्वपः ॥ ४९ ॥ नोच्छिष्टाऽस्पृष्टसलिला संध्यायां मुक्तमूर्धजा ॥ अनर्चिताऽसंयतवागसंवीता बहिश्चरेत् ॥ ५० ॥ नाधौतपादाप्रयता नार्द्रपान्नो उदक्शिराः ॥ शयीत नापराङ्नान्यैर्न नग्ना न च संध्ययोः ॥ ५१ ॥ धौतवासाः शुचिर्नित्यं सर्वमंगलसंयुता ॥ पूजयेत्प्रातराशात्प्राग्गोविप्रान् श्रियमच्युतम् ॥ ५२ ॥ स्त्रियो वीरवतीश्चार्चेत्स्रग्गंधबलिमंडनैः ॥ पतिं चार्च्योपतिष्ठेत ध्यायेत्कोष्ठगतं च तम् ॥ ५३ ॥ सांवत्सरं पुंसवनं व्रतमेतदविप्लुतम् ॥ धारयिष्यसि चेत्तुभ्यं शक्रहा भविता सुतः ॥ ५४ ॥ बाढमित्यभिप्रेत्याथ दिती राजन्महामनाः ॥ काश्यपं गर्भमाधत्त व्रतं चांजो दधार सा ॥ ५५ ॥

असंवीताऽप्रावृता ॥ ५० ॥ शयनेऽष्टौ निषेधानाह । नाधौतपादेति । नापराक्पश्चिमशिराः ॥ ५१ ॥ कार्याण्याह । धौतवासा इति द्वाभ्याम् । प्रातराशात्प्रथमभोजनात् ॥ ५२ ॥ वीरवतीर्जीवद्भर्तृकाः । आर्च्य संपूज्य । कोष्ठगतं कुक्ष्यंतरगतम् ॥ ५३ ॥ पुंसवनं पुत्रोत्पत्तिकरम् । तुभ्यं तव ॥ ५४ ॥ ५५ ॥

वर पांघरण्यास कांहीं वस्त्र घेतलें नसतां कधींहि गृहांतून बाहेर जाऊं नये ॥ ५० ॥ त्याचप्रमाणें हस्तपादप्रक्षालन न करितां, असावध असतां, पाय ओले असतां, उत्तरेस मस्तक असतां, पश्चिमेस मस्तक असतां, इतरांशीं संलग्न असतां, नग्न असतां आणि संध्याकाल असतां कधींहि शयन करूं नये ॥ ५१ ॥ असो. ह्याप्रमाणें सांगितलेल्या निषेधांचें परिपालन करावें आणि धौतवस्त्र परिधान करून शुचिर्भूत असून व सौभाग्यादि सर्वमंगलांनीं युक्त होऊन, प्रथम भोजन करण्याचे पूर्वीं गाई, ब्राह्मण, लक्ष्मी आणि नारायण ह्यांचें पूजन करावें ॥ ५२ ॥ त्याचप्रमाणें माला, गंध, नैवेद्य आणि भूषणें ह्या उपचारांनीं सुवासिनी-स्त्रियांचें पूजन करावें आणि त्याचप्रमाणें पतीचें पूजन करून त्याच्या सेवेविषयीं तत्पर असावें व तो आपल्या कुक्षीमध्यें आहे असें चिंतन करीत असावें ॥ ५३ ॥ असो. हें पुत्रोत्पत्ति करणारें संवत्सरात्मक व्रत जर तूं अविच्छिन्न धारण करिशील तर तुला इंद्रघातक पुत्र होईल ॥ ५४ ॥ हे राजा, नंतर त्या दितीनें ‘ठीक

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आहे, मी ह्याप्रमाणेंच व्रत धारण करीन' असें ह्मटलें आणि इंद्राला मारणारा पुत्र आतां आपल्याला होणार ह्या अभिमानानें तिच्या मनाला हर्ष होऊन, तिनें कश्यपाचें वीर्य धारण केलें व व्रतहि अगदीं सांगितल्याप्रमाणें धारण केलें ॥ ५५ ॥ हे मानप्रद राजा, इकडे ज्ञानसंपन्न इंद्रानें, त्या आपल्या मातृभगिनीचा अभिप्राय जाणून, आश्रमामध्यें व्रतस्थ असलेल्या त्या दितीचें सेवकवृत्तीनें तो शुश्रूषण करूं लागला ॥ ५३ ॥ पुष्पें, फळें, मूळें, समिधा, कुश, पत्रें, अंकुर, मृत्तिका आणि उदक हे सर्व पदार्थ तो तिला नित्य वेळोवेळीं वनांतून आणून देत असे ॥ ५७ ॥ हे राजा, ज्याप्रमाणें पारधी मृगांना फसविण्याकरितां मृगाचा वेष धारण करितो त्याप्रमाणें त्या व्रतस्थ दितीच्या व्रतामध्यें कांहींतरी छिद्र प्राप्त होण्याची इच्छा करणारा तो इंद्र, कपटानें साधुवेष धारण करून, ह्याप्रमाणें तिची सेवा करूं लागला ॥ ५८ ॥ परंतु हे भूपते, छिद्रान्वेषणाविषयीं तत्पर असणाऱ्याहि त्या इंद्राला जेव्हां कांहींच व्रतामध्यें छिद्र सांपडेना तेव्हां तो ह्या प्रसंगीं कशाच्या योगानें माझें कार्य होईल अशी तीव्र चिंता करूं लागला ॥ ५९ ॥ असें होतां होतां एकेवेळीं, व्रताचरणाच्या श्रमामुळें कृश होऊन प्रारब्धानें मोहित झालेली ती दिति, उच्छिष्ट असून

॥ ५६ ॥ ५७ ॥ हरिरिंद्रो व्रतस्य छिद्रं प्रेप्सुः प्राप्तुमिच्छुः । जिह्मः कुटिलः साधुवेषः । मृगहा लुब्धको यथा मृगवंचनाय मृगवेषो भवति तद्वत् ॥ ५८ ॥ केन मे शिवं

मातृष्वसुरभिप्रायमिंद्र आज्ञाय मानद ॥ शुश्रूषणेनाश्रमस्थां दितिं पर्यचरत्कविः ॥ ५६ ॥ नित्यं वनात्सुमनसः फलमूलसमित्कुशान् ॥ पत्रांकुरमृदोपश्च काले काल उपाहरत् ॥ ५७ ॥ एवं तस्या व्रतस्थाया व्रतच्छिद्रं हरिर्नृप ॥ प्रेप्सुः पर्यचरज्जिह्मो मृगहेव मृगाकृतिः ॥ ५८ ॥ नाध्यगच्छद्व्रतच्छिद्रं तत्परोऽथ महीपते ॥ चिंतां तीव्रां गतः शक्रः केन मे स्याच्छिवं त्विह ॥ ५९ ॥ एकदा सा तु संध्यायामुच्छिष्टा व्रतकर्शिता ॥ अस्पृष्टवार्यधौतांघ्रिः सुष्वाप विधिमोहिता ॥ ६० ॥ लब्ध्वा तदंतरं शक्रो निद्राऽपहृतचेतसः ॥ दितेः प्रविष्ट उदरं योगेशो योगमायया ॥ ६१ ॥ चकर्त सप्तधा गर्भं वज्रेण कनकप्रभम् ॥ रुदंतं सप्तधैकैकं मा रोदीरिति तान्पुनः ॥ ६२ ॥ ते तमूचुः पाट्यमानाः सर्वे प्रांजलयो नृप ॥ नो जिघांससि किमिंद्र भ्रातरो मरुतस्तव ॥ ६३ ॥ मा भैष्ट भ्रातरो मह्यं यूयमित्याह कौशिकः ॥ अनन्यभावान्पार्षदानात्मनो मरुतां गणान् ॥ ६४ ॥

स्यादिति चिंतां प्राप्तः ॥ ५९ ॥ अस्पृष्टवारिश्चासावधौतांघ्रिश्च ॥ ६० ॥ निद्रयाऽपहृतं चेतो यस्याः ॥ ६१ ॥ मा रोदीरित्युपलालयन्निव तान्पुनः सप्तधा चकर्त चिच्छेद ॥ ६२ ॥ ६३ ॥ कौशिक इंद्रः । गणान्सप्त । सप्तगणा वै मरुत इति श्रुतेः ॥ ६४ ॥

मुखमार्जन व पादप्रक्षालन न करितां संध्याकाळीं निद्रिस्त झाली ॥ ६० ॥ इतक्यामध्यें ती संधि साधून, जिचें चित्त निद्रेनें हरण केलें आहे अशा त्या दितीच्या उदरामध्यें योगाधिपति इंद्र आपल्या योगमायेनें प्रविष्ट झाला ॥ ६१ ॥ आणि त्यानें त्याठिकाणीं सुवर्णासारख्या कांतीनें युक्त असलेल्या गर्भाचे वज्राच्या योगानें सात तुकडे केले. असें केल्यानंतरहि जेव्हां तो गर्भ रोदन करूं लागला तेव्हां इंद्रानें, 'तूं रोदन करूं नकोस' अशा भाषणानें त्याचें लालन केल्यासारखें करून, त्या एकेकाचे फिरून सात सात तुकडे केले ॥ ६२ ॥ हे राजा, ह्याप्रमाणें जेव्हां तो इंद्र, त्यांना वज्रानें चिरूं लागला तेव्हां ते सर्व हात जोडून त्याला ह्मणाले कीं,– हे इंद्रा, आह्मीं मरुद्गणनामक तुझे भ्राते असतां तूं आह्मांस मारण्याची काय ह्मणून इच्छा करितोस ॥ ६३ ॥ ह्या त्यांच्या भाषणावरून इंद्रानें, हे अगदीं अनन्यभावानें आपल्या आज्ञेमध्यें वागणारे मरुद्गण आहेत असा निश्चय करून त्यांस सांगितलें कीं,–हे मरुद्गणहो, आतां तुह्मीं भिऊं नका, तुह्मीं माझे भ्राते आहां ॥ ६४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असो. हे राजा, द्रोणपुत्र अश्वत्थाम्याच्या ब्रह्मास्त्रानें दग्ध झालेला असूनहि तूं जसा मरण पावला नाहींस त्याचप्रमाणें इंद्रवज्रानें अनेकप्रकारांनीं छिन्नभिन्न झालेलाहि तो दितीचा गर्भ भगवत्कृपेमुळें मरण पावला नाहीं ॥ ६५ ॥ हे राजा, आदिपुरुष भगवंताचें एकावार पूजन करूनहि पुरुषाला त्याची साम्यता प्राप्त होत्ये तेव्हां कांहीं कमी असें एकवर्षपर्यंत दितीनें श्रीहरीचें अर्चन केलें असल्यामुळें तिचा गर्भ मरण पावला नाहीं हें आश्चर्य नव्हे; तर त्याच्या शकलांपासून मरुद्गणनामक इंद्रासहवर्तमान पन्नास देव उत्पन्न झाले आणि त्यांचेठिकाणीं असलेला दैत्यत्वरूप मातृदोष दूर करून इंद्रानें त्यांना यज्ञामध्यें सोमपानाचे अधिकारी केले ॥ ६६ ॥ ६७ ॥ इकडे दितीनें, उठल्यावर इंद्रासहवर्तमान त्या अग्नीसारख्या तेजस्वी असलेल्या कुमारांना अवलोकन केलें आणि इंद्राविषयीं मनांत क्रोध न आणितां ती दिति संतुष्टच झाली ॥ ६८ ॥ नंतर ती इंद्राला ह्मणाली, बा इंद्रा, देवांना भय उत्पन्न करणारा पुत्र प्राप्त व्हावा ह्या इच्छेनें मी हें अतिदुष्कर व्रत आचरण केलें होतें ॥ ६९ ॥ हे पुत्रा, मी ए-

---

॥ ६५ ॥ ६६ ॥ सजूः सह ॥ ६७ ॥ ६८ ॥ ६९ ॥ ७० ॥ दित्या निष्कपटमुक्ते सतींद्रोऽपि निष्कपटमेवाह। अंबेति । लब्धमंतरं येन। अर्थे एव बुद्धिर्यस्य ॥ ७१ ॥

न ममार दितेर्गर्भः श्रीनिवासानुकंपया ॥ बहुधा कुलिशक्षुण्णो द्रौण्यस्त्रेण यथा भवान् ॥ ६५ ॥ सकृदिष्ट्वाऽऽदिपुरुषं पुरुषो याति साम्यताम् ॥ संवत्सरं किंचिदूनं दित्या यद्धरिरर्चितः ॥ ६६ ॥ सजूरिंद्रेण पंचाशद्देवास्ते मरुतोऽभवन् ॥ व्यपोह्य मातृदोषं ते हरिणा सोमपाः कृताः ॥ ६७ ॥ दितिरुत्थाय ददृशे कुमाराननलप्रभान् ॥ इंद्रेण सहितान्देवी पर्यतुष्यदनिंदिता ॥ ६८ ॥ अथेंद्रमाह ताताहमादित्यानां भयावहम् ॥ अपत्यमिच्छंत्यचरं व्रतमेतत्सुदुष्करम् ॥ ६९ ॥ एकः संकल्पितः पुत्रः सप्तसप्ताभवन्कथम् ॥ यदि ते विदितं पुत्र सत्यं कथय मा मृषा ॥ ७० ॥ इंद्र उवाच ॥ अंब तेऽहं व्यवसितमुपधार्यागतोऽतिकम् ॥ लब्धांतरोऽच्छिदं गर्भमर्थबुद्धिर्न धर्मवित् ॥ ७१ ॥ कृत्तो मे सप्तधा गर्भ आसन्सप्त कुमारकाः ॥ तेऽपि चैकैकशो वृक्णाः सप्तधा नापि मम्रिरे ॥ ७२ ॥ ततस्तत्परमाश्चर्यं वीक्ष्याध्यवसितं मया ॥ महापुरुषपूजायाः सिद्धिः काऽप्यनुषंगिणी ॥ ७३ ॥ आराधनं भगवत ईहमाना निराशिषः ॥ ये तु नेच्छंत्यपि परं ते स्वार्थकुशलाः स्मृताः ॥ ७४ ॥ आराध्यात्मप्रदं देवं स्वात्मानं जगदीश्वरम् ॥ को वृणीते गुणस्पर्शं बुधः स्यान्नरकेऽपि यत् ॥ ७५ ॥

॥ ७२ ॥ ७३ ॥ अपि परं मोक्षमपि ॥ ७४ ॥ गुणस्पर्शं विषयभोगं बुधः को वृणीते यद्यस्मान्नरकेऽपि विषयभोगः स्यात् ॥ ७५ ॥

काच पुत्राचा संकल्प केलेला असून हे एकुणपन्नास कसे झाले? हें जर तुला माहीत असेल तर मला खरें सांग खोटें सांगूं नकोस ॥ ७० ॥ इंद्र ह्मणाला– हे माते, मी तुझ्या मनांतील निश्चय जाणून धर्माकडे लक्ष न देतां केवल स्वार्थबुद्धीनें तुझ्यासमीप येऊन राहिलों होतों; त्या मी संधि साधून तुझ्या गर्भाचें छेदन केलें ॥ ७१ ॥ तें असें कीं–प्रथमतः मी तुझ्या गर्भाचे सात तुकडे केले असतां ते तत्काळ सात पुत्र झाले. नंतर त्या सातांचेहि, एकेकाचे सात सात असे एकुणपन्नास तुकडे केले. तेसुद्धां मरण पावले नाहींत तर पुत्रच झाले. तेव्हां तें अत्यंत आश्चर्य पाहून भगवत्पूजेची ही कांहींतरी अवांतरफलभूत अवर्णनीय सिद्धिच आहे असा मीं निश्चय केला ॥ ७२ ॥ ॥ ७३ ॥ तस्मात् जे निष्कामबुद्धीनें भगवंताचें आराधन करीत असून त्याच्यापासून मोक्षाची इच्छा करीत नाहींत तेच पुरुष, स्वार्थाविषयीं निपुण होत असें शास्त्रामध्यें सांगितलें आहे ॥ ७४ ॥ ह्यास्तव आपला आत्मा आणि स्वानंदप्रद अशा जगन्नाथ देवाचें आराधन करून, कोण बरें ज्ञानी पुरुष, विषयभोगाची इच्छा करील? कोणीच

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करणार नाहीं. कारण, नरकामध्येंसुद्धां विषयभोग आहेतच ॥ ७५ ॥ तस्मात् हे परमपूज्य माते, मज मूढाचा हा अपराध क्षमा करणें हें तुला योग्य आहे. कारण, तुझा हा गर्भ मृत झाला असूनहि ईश्वरकृपेनें वांचला हें फार चांगलें झालें ॥ ७६ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—ह्याप्रमाणें इंद्रानें आपला शुद्ध भाव दर्शविला असतां त्याच्या योगानें संतुष्ट झालेल्या त्या दितीनें इंद्राला स्वर्गीं जाण्याविषयीं आज्ञा दिली तेव्हां तो प्रभु इंद्र, मरुद्गणांसहवर्तमान तिला नमस्कार करून स्वर्गाप्रत निघून गेला ॥ ७७ ॥ हे राजा, तूं, मरुद्गणांच्या मंगलकारक जन्माविषयीं जें मला विचारिलें होतेंस तें हें सर्व आख्यान मीं तुला कथन केलें आहे, आतां तुला मी दुसरें काय कथन करूं ? त्याचा प्रश्न कर ॥ ७८ ॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील षष्ठस्कंधापैकीं मरुद्गणोत्पत्तिकथननामक हा अठरावा अध्याय समाप्त झाला ॥ १८ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

महीयसि हे महत्तमे । मृतः सन्नुत्थितः ॥ ७६ ॥ ७७ ॥ ७८ ॥ इति श्रीमद्भागवते षष्ठस्कंधे टीकायामष्टादशोऽध्यायः ॥ १८ ॥ ॥ऊनविंशे तु यत्प्रोक्तं कश्यपेन दितेर्व्रतम् ॥ तदेव विवृतं लोकहिताय हरितोषणम् ॥ १ ॥ तस्य प्रकारमिति शेषः ॥ १ ॥ मार्गशिरे मासे शुक्लपक्षे । आदितः प्रतिपदि ॥ २ ॥ अनुमंत्र्य पृष्ट्वा । शुक्ला दंता यस्याः सा

तदिदं मम दौर्जन्यं बालिशस्य महीयसि ॥ क्षंतुमर्हसि मातस्त्वं दिष्ट्या गर्भो मृतोत्थितः ॥ ७६ ॥ श्रीशुक उवाच ॥ इंद्रस्तया-ऽभ्यनुज्ञातः शुद्धभावेन तुष्टया ॥ मरुद्भिः सह तां नत्वा जगाम त्रिदिवं प्रभुः ॥ ७७ ॥ एवं ते सर्वमाख्यातं यन्मां त्वं परिपृच्छ-सि ॥ मंगलं मरुतां जन्म किं भूयः कथयामि ते ॥ ७८ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे षष्ठस्कंधेऽष्टादशोऽध्यायः ॥ १८ ॥ ॥ राजोवाच ॥ व्रतं पुंसवनं ब्रह्मन्भवता यदुदीरितम् ॥ तस्य वेदितुमिच्छामि येन विष्णुः प्रसीदति ॥ १ ॥ श्रीशुक उवाच ॥ शुक्ले मार्गशिरे पक्षे योषिद्भर्तुरनुज्ञया ॥ आरभेत व्रतमिदं सार्वकामिकमादितः ॥ २ ॥ निशम्य मरुतां जन्म ब्राह्मणाननुमंत्र्य च ॥ स्नात्वा शुक्लदती शुक्ले वसीतालंकृतांबरे ॥ पूजयेत्प्रातराशात्प्राग्भगवंतं श्रिया सह ॥ ३ ॥ अलं ते निरपेक्षाय पूर्णकाम नमोऽस्तु ते ॥ महाविभूतिपतये नमः सकलसिद्धये ॥ ४ ॥

शुक्लदती धौतदंता अलंकृता सती पूजयेत् ॥ ३ ॥ आदौ तावन्नमस्कारमंत्रानाह त्रिभिः । ते तुभ्यमलं पर्याप्तमेव सर्वं न किंचिदन्यैः कृत्यमस्त्यतः केवलं ते तुभ्यं नमोऽस्तु । पर्याप्तौ हेतवः निरपेक्षाय हे पूर्णकाम महाविभूतिपतये लक्ष्मीपतये सकलाः सिद्धयोऽणिमाद्या यस्मिंस्तस्मै ॥ ४ ॥

आतां ह्या एकुणिसाव्या अध्यायामध्यें, श्रीहरीला संतुष्ट करणारें असें जें व्रत कश्यपानें दितीला सांगितलें, त्याचेंच लोकहिताकरितां विवरण केलें आहे ॥ १ ॥ परीक्षित् राजा ह्मणाला— हे ब्रह्मनिष्ठा, ज्याच्या योगानें विष्णु प्रसन्न होतो असें जें पुंसवननामक (पुत्रोत्पत्तिकारक) व्रत तूं सांगितलें आहेस, त्याचा विस्तार जाणण्याची मला इच्छा आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला— हे परीक्षित्राजा, मार्गशीर्षमहिन्यांतील शुक्लपक्षामध्यें भर्त्याची आज्ञा घेऊन स्त्रीनें प्रतिपदेस ह्या सर्व मनोरथ पूर्ण करणाऱ्या व्रता-चा आरंभ करावा ॥ २ ॥ तो असा कीं— प्रथमतः मरुद्गणांचें जन्म श्रवण करून व्रत करण्याकरितां ब्राह्मणांना विचारावें आणि दंतधावन, स्नान व शुभ्रवस्त्रपरिधान करून अलंकार धारण करावे व प्रथम भोजनाचे पूर्वीं लक्ष्मीसहवर्तमान भगवान् नारायणाचें पूजन करावें ॥ ३ ॥ त्यांत प्रथमतः नमस्काराचे मंत्र सांगतात. हे पूर्णम-नोरथा परमेश्वरा, तुझेठिकाणीं सर्वकांहीं वस्तूंची परिपूर्णता आहे. कारण, तूं निरपेक्ष असून लक्ष्मीपति आहेस व तुझेठिकाणीं सर्व अणिमादि सिद्धि आहेत त्या तुज

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भगवंताला वारंवार नमस्कार असो ॥ ४ ॥ हे ईश्वरा, ज्याअर्थीं तूं कृपा, श्री, ऐश्वर्य, महिमा, वीर्य आणि सत्यसंकल्पवगैरे इतरहि सर्वगुणांनीं परिपूर्ण आहेस त्याअर्थीं तूं भगवान् आणि सर्वसमर्थ आहेस ॥ ५ ॥ हे विष्णुपत्नि, हे महामाये, हे परमेश्वरलक्षणयुक्ते, हे महाभागे, आणि हे लोकमाते, तूं मजवर प्रसन्न व्हावेंस ह्याकरितां मी तुला नमस्कार करित्यें. ह्या मंत्रांनीं नमस्कार करावे ॥ ६ ॥ आतां पूजेचा मंत्र सांगतात कीं,–हे राजा, षड्गुणैश्वर्यसंपन्न, पुरुषोत्तम, महाप्रभाववान्, लक्ष्मीपति आणि महाविभूतींनीं युक्त अशा तुज भगवंताला ॐकारपूर्वक नमस्कार करून, मीं पूजेचे उपचार अर्पण करित्यें ह्या अर्थाच्या मंत्रानें स्वस्थ अंतःकरणपूर्वक प्रतिदिवशीं आवाहन, अर्घ्य, पाद्य, आचमन स्नान, वस्त्र, यज्ञोपवीत, भूषणें, गंध, पुष्पें, धूप, दीप आणि नैवेद्य इत्यादि उपचार श्रीविष्णूला समर्पण करावे ॥ ७ ॥ आणि नैवेद्याचा जो शेष राहिला असेल,

---

भो ईश यथा यथावत् त्वं कृपादिभिर्जुष्टः अन्यैश्च सत्यसंकल्पत्वादिभिः सर्वैर्गुणैः ततस्तस्मात् ॥ ५ ॥ महापुरुषस्य परमेश्वरस्येव लक्षणानि निरपेक्षत्वादीनि यस्यास्तस्याः

यथा त्वं कृपया भूत्या तेजसा महिनौजसा ॥ जुष्ट ईशगुणैः सर्वैस्ततोऽसि भगवान्प्रभुः ॥ ५ ॥ विष्णुपत्नि महामाये महापुरुषलक्षणे ॥ प्रीयेथा मे महाभागे लोकमातर्नमोऽस्तु ते ॥ ६ ॥ ॐ नमो भगवते महापुरुषाय महानुभावाय महाविभूतिपतये सह महाविभूतिभिर्बलिमुपहराणीति ॥ अनेनाहरहर्मंत्रेण विष्णोरावाहनार्घ्यपाद्योपस्पर्शनस्नानवासउपवीतविभूषणगंधपुष्पधूपदीपोपहाराद्युपचारांश्च समाहित उपाहरेत् ॥ ७ ॥ हविःशेषं तु जुहुयादनले द्वादशाहुतीः ॥ ॐ नमो भगवते महापुरुषाय महाविभूतिपतये स्वाहेति ॥ ८ ॥ श्रियं विष्णुं च वरदावाशिषां प्रभवावुभौ ॥ भक्त्या संपूजयेन्नित्यं यदीच्छेत्सर्वसंपदः ॥ ९ ॥ प्रणमेद्दंडवद्भूमौ भक्तिप्रह्वेण चेतसा ॥ दशवारं जपेन्मंत्रं ततः स्तोत्रमुदीरयेत् ॥१०॥ युवां तु विश्वस्य विभू जगतः कारणं परम् ॥ इयं हि प्रकृतिः सूक्ष्मा माया शक्तिर्दुरत्यया ॥११॥ तस्या अधीश्वरः साक्षात्त्वमेव पुरुषः परः ॥ त्वं सर्वयज्ञ इज्येयं क्रियेयं फलभुग्भवान् ॥१२॥

संबोधनम् ॥ ६ ॥ पूजामंत्रमाह । ओं नमो इति ॥ ७ ॥ हविःशेषमुपहारावशिष्टम् । होममंत्रं दर्शयति । ओमिति ॥ ८ ॥ प्रकर्षेण भवंत्याभ्यामिति प्रभवौ ॥ ९ ॥ १० ॥ ११ ॥ इज्या यज्ञाभिनिवर्तकः पुरुषव्यापारो भावनाख्यः । क्रिया लौकिकी ॥ १२ ॥

त्याच्या बारा आहुतींवा अग्नीमध्यें, षड्गुणैश्वर्य संपन्न, पुरुषोत्तम आणि लक्ष्मीपति अशा तुज परमेश्वराला 'ॐनमःस्वाहा' (ओंकारपूर्वक व नमस्कारपूर्वक हा हविर्भाग समर्पण असो) ह्या अर्थाच्या मंत्रानें होम करावा ॥ ८ ॥ असो. ह्याप्रमाणें जिला सर्व संपत्तींची इच्छा असेल तिनें ज्यांच्यापासून सर्व लोकांची उत्पत्ति होत्ये व जे सर्व मनोरथ पूर्ण करणारे आहेत त्या उभयतां लक्ष्मीनारायणांचें नित्य भक्तीनें पूजन करावें ॥ ९ ॥ आणि नंतर भक्तीनें नम्र झालेल्या अंतःकरणानें भूमीवर साष्टांग नमस्कार घालून नंतर पूर्वोक्त मंत्राचा दहावेळ जप करावा आणि स्तोत्र पठण करावें तें असें–॥१०॥ हे लक्ष्मीनारायणहो, तुम्ही सर्व जगताचें मुख्य कारण व प्रभु आहां. हे प्रभो, ही तुझी स्त्री लक्ष्मीतर सूक्ष्म, दुर्ज्ञेय, माया आणि शक्ति ह्या नांवांनीं युक्त अशी साक्षात् प्रकृतिच आहे ॥११॥ व तिचा नियंता जो परमपुरुष तो तूंच आहेस. हे परमेश्वरा, तूं सर्व यज्ञरूपी आहेस

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

व ही इज्या आहे, तूं फलभोक्ता आणि ही लौकिक क्रिया आहे.॥१२॥ तूं सत्त्वादिक गुणांना प्रकट करणारा व उपभोग करणारा काल व ही देवी सत्त्वादि गुणांची साम्यावस्था आहे. तूं सर्व शरीरांत राहणारा अंतरात्मा आणि ही लक्ष्मी, शरीर व इंद्रियें ह्यांना आश्रयभूत आहे आणि तूं नामरूपांचा आधार आणि प्रकाशक असून ही भगवती लक्ष्मी नामरूपस्वरूपिणी आहे. ह्याप्रमाणें तुह्मां उभयतांचा संबंध आहे ॥ १३ ॥ ज्याअर्थीं तुह्मी उभयतां त्रैलोक्याचीं वरप्रद आणि परमेश्वर आहां त्याअर्थीं हे श्रेष्ठकीर्तिमंता देवा, माझे मोठेहि मनोरथ तुजपासून परिपूर्ण होवोत ॥ १४ ॥ हे राजा, ह्याप्रमाणें वरप्रद नारायणाची लक्ष्मीसहवर्तमान स्तुति करून तो नैवेद्य एकीकडे करावा आणि आचमन देऊन पुनरपि पूजन करावें ॥ १५ ॥ नंतर भक्तिनम्र अंतःकरणपूर्वक (पूर्वोक्त) स्तोत्रानें स्तुति करावी, यज्ञपुरुषाचें उच्छिष्ट

प्रत्ययो नामरूपयोः प्रकाशकः । अपाश्रयस्तयोराधारः ॥ १३ ॥ १४ ॥ १५ ॥ १६ ॥ महापुरुषचेतसा ईश्वरबुद्ध्योपनमेद्भजेत् । पतिश्च स्वयं प्रेमशीलः सन् पत्न्याः कर्माणि बिभृयात् । तदनुकूलो भवेदित्यर्थः ॥ १७ ॥ यतो दंपत्योर्मध्ये एकतरेण कृतमुभयोरपि भवति ॥ १८ ॥ न विहन्यान्न विच्छिद्यात् ॥ १९ ॥ २० ॥ द्वादशमासानित्युक्ते

गुणव्यक्तिरियं देवी व्यंजको गुणभुग्भवान् ॥ त्वं हि सर्वशरीर्यात्मा श्रीः शरीरेंद्रियाशया ॥ नामरूपे भगवती प्रत्ययस्त्वमपाश्रयः
॥ १३ ॥ यथा युवां त्रिलोकस्य वरदौ परमेष्ठिनौ ॥ तथा म उत्तमश्लोक संतु सत्या महाशिषः ॥ १४ ॥ इत्यभिष्टूय वरदं श्री-
निवासं श्रिया सह ॥ तन्निःसार्योपहरणं दत्वाऽऽचमनमर्चयेत् ॥ १५ ॥ ततः स्तुवीत स्तोत्रेण भक्तिप्रह्वेण चेतसा ॥ यज्ञोच्छिष्ट-
मवघ्राय पुनरभ्यर्चयेद्धरिम् ॥ १६ ॥ पतिं च परया भक्त्या महापुरुषचेतसा ॥ प्रियैस्तैस्तैरुपनमेत्प्रेमशीलः स्वयं पतिः ॥ बि-
भृयात्सर्वकर्माणि पत्न्या उच्चावचानि च ॥ १७ ॥ कृतमेकतरेणापि दंपत्योरुभयोरपि ॥ पत्न्यां कुर्यादनर्हायां पतिरेतत्समाहितः
॥ १८ ॥ विष्णोर्व्रतमिदं बिभ्रन्न विहन्यात्कथंचन ॥ विप्रान्स्त्रियो वीरवतीः स्रग्गंधबलिमंडनैः ॥ अर्चेदहरहर्भक्त्या देवं नियममा-
स्थितः ॥ १९ ॥ उद्वास्य देवं स्वे धाम्नि तन्निवेदितमग्रतः ॥ अद्यादात्मविशुद्ध्यर्थं सर्वकामर्धये तथा ॥ २० ॥ एतेन पूजाविधिना
मासान्द्वादश हायनम् ॥ नीत्वाऽथोपचरेत्साध्वी कार्तिके चरमेऽहनि ॥ २१ ॥

कदाचित्तन्मध्ये मलमासे सति तेन सह द्वादशसंख्यायां सत्यां शुद्धस्यैकस्य त्यागः स्यात् । हायनमित्युक्ते तन्मध्यपतितस्य तस्यापि प्रसंगः स्यात् । तदुभयं वारयितुमुभयमुक्तम् । उपचरेदुपवसेत् ॥ २१ ॥

अवघ्राण करून (हुंगून) पुनरपि श्रीहरीचें पूजन करावें आणि त्याचप्रमाणें ईश्वरबुद्धीनें परम भक्तिपूर्वक जे जे उपचार पतीला प्रिय असतील त्यात्या उपचारांनीं त्याला भजावें व पतीनेंहि स्वतः प्रेमशील होऊन पत्नीच्या ल्हानमोठ्या कर्मांना अनुकूळ असावें ॥ १६ ॥ १७ ॥ दंपत्यापैकीं एकानेंहि केलेलें कर्म उभयतांना फलदायक होतें ह्याकरितां पत्नी जर (रजोदर्शनादिकामुळें) पूजन करण्यास अयोग्य असली तर पतीनेंच स्वस्थ अंतःकरणपूर्वक हें सर्व करावें ॥ १८ ॥ कारण, कसा जरी प्रसंग आला तरी हें विष्णुव्रत धारण करणाऱ्यानें त्याचा विच्छेद करूं नये. असो. नियमपूर्वक हें व्रत धारण करणाऱ्यानें देवाचें पूजन केल्यानंतर माला, गंध, नैवेद्य आणि अलंकार इत्यादि उपचारांनीं ब्राह्मण व सुवासिनी ह्यांचें प्रतिदिवशीं पूजन करावें ॥ १९ ॥ नंतर देवास देवघरामध्यें स्थापन करून देहाची शुद्धि आणि सर्व मनोरथांची पूर्णता होण्याकरितां त्याला निवेदन केलेला प्रसाद प्रथमतः यथायोग्य विभागानें इतरांस देऊन आपण भक्षण करावा ॥ २० ॥ असो. ह्या पूजाप्रकारानें बारा-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

महिन्याचें एकवर्षपर्यंत पूजन करून कार्तिकमहिन्याच्या शेवटच्या दिवशीं त्या साध्वीनें उपवास करावा ॥ २१ ॥ नंतर प्रभातकाल झाल्यावर स्नान करून पूर्वींप्रमाणें भगवान् विष्णूचें पूजन करावें आणि दुधामध्यें शिजविलेल्या घृतयुक्त चरूनें पार्वणस्थालीपाकाच्या विधानानें पतीनें बाराच आहुतींचा होम करावा ॥ २२ ॥ तदनंतर सुप्रसन्न झालेल्या द्विजांनीं दिलेले आशीर्वाद शिरसा मान्य करून, त्यांना मस्तकानें प्रणाम करावा आणि त्यांच्या अनुज्ञेनें आचार्यास अग्रभागीं भोजनास बसवून मौनपूर्वक बंधुवर्गासहवर्तमान आपण भोजन करावें. नंतर सत्पुत्रदायक व सौभाग्यकारक असा चरुशेष पत्नीला अर्पण करावा ॥ २३ ॥ २४ ॥ हे राजा, पुरुषानें यथाविधि हें व्रत केलें असतां त्याला भगवंतापासून इहलोकींच इष्टार्थप्राप्ति होत्ये. स्त्रीनें हें व्रत आचरिलें असतां तिला सौभाग्य, संपत्ति, संतति, दीर्घायुषी

श्वोभूते प्रभाते सति । पयसि शृतेन पक्केन । पाकयज्ञविधानेन पार्वणस्थालीपाकविधानेन ॥ २२ ॥ २३ ॥ सुप्रजास्त्वं सत्पुत्रत्वमित्यर्थः । तच्चतस्त्वं शेषम् ॥ २४ ॥

श्वोभूतेऽप उपस्पृश्य कृष्णमभ्यर्च्य पूर्ववत् ॥ पयःशृतेन जुहुयाच्चरुणा सह सर्पिषा ॥ पाकयज्ञविधानेन द्वादशैवाहुतीः पतिः ॥ २२ ॥ आशिषः शिरसाऽऽदाय द्विजैः प्रीतैः समीरिताः ॥ प्रणम्य शिरसा भक्त्या भुंजीत तदनुज्ञया ॥ २३ ॥ आचार्यमग्रतः कृत्वा वाग्यतः सह बंधुभिः ॥ दद्यात्पत्न्यै चरोः शेषं सुप्रजास्त्वं सुसौभगम् ॥ २४ ॥ एतच्चरित्वा विधिवद्व्रतं विभोरभीप्सितार्थं लभते पुमानिह ॥ स्त्री त्वेतदास्थाय लभेत सौभगं श्रियं प्रजां जीवपतिं यशो गृहम् ॥ २५ ॥ कन्या च विंदेत समग्रलक्षणं वरं त्ववीरा हतकिल्बिषा गतिम् ॥ मृतप्रजा जीवसुता धनेश्वरी सुदुर्भगा सुभगा रूपमग्र्यम् ॥ २६ ॥ विंदेद्विरूपा विरुजा विमुच्यते य आमयावींद्रियकल्पदेहम् ॥ एतत्पठन्नाभ्युदये च कर्मण्यनंततृप्तिः पितृदेवतानाम् ॥ २७ ॥

॥ २५ ॥ अवीरा विधवा । धनेश्वरी सत्यपि या सुदुर्भगा सा सुभगा भवति ॥ २६ ॥ य आमयावी रोगी स विरुजा विशिष्टया रुजा विमुच्यते । इंद्रियैः सहितं कल्पं देहं च विंदेदिति शेषः । पठन्यो वर्तेत तस्य पितॄणां देवतानां चानंता तृप्तिर्भवतीत्यर्थः ॥ २७ ॥

पति, यश व गृह हीं प्राप्त होतात ॥ २५ ॥ त्याचप्रमाणें कन्येनें केलें असतां तिला सर्वलक्षणसंपन्न पति प्राप्त होतो, विधवेनें केलें असतां पापापासून मुक्त होऊन ती उत्तमगतीस जात्ये. जिचीं मुलें वांचत नाहींत अशा स्त्रीनें हें व्रत केलें असतां तिला दीर्घायुषी पुत्र प्राप्त होतात, धनाढ्य असूनहि भाग्यहीन अशा स्त्रीनें हें व्रत केलें असतां ती सौभाग्यवती होत्ये, कुरूपस्त्रीनें केलें असतां तिला उत्तम रूप प्राप्त होते, रोग्यानें हें व्रत केलें असतां तो आपल्या विशेष रोगापासून मुक्त होऊन इंद्रियांसहवर्तमान दृढदेही होतो आणि यज्ञयागादिक कर्मांमध्यें पुरुषानें हें पठण केलें असतां त्याचे पितर व देव अत्यंत तृप्त होतात ॥ २६ ॥ २७ ॥

---

१ यावरून ज्या वर्षांत, अधिक महिन्यासह तेरा महिने असतील तें वर्ष या व्रतास घेऊं नये असें सिद्ध होतें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आणि ते संतुष्ट झाले ह्मणजे सर्वमनोरथ पूर्ण करितात तशींच अग्निद्वारा हविर्भागग्रहण करणारीं श्रीहरि आणि लक्ष्मी हीं उभयतां होमसमाप्तिकालीं संतुष्ट होऊन व्रत करणाऱ्याचे

उपसंहरति । राजन्निति । महत्पुण्यं जन्म महद्व्रतं च ॥ २८ ॥ षष्ठस्कंधनिगूढार्थपदभावार्थदीपिका ॥ सद्भिरासेव्यतामेषा यतिश्रीधरनिर्मिता ॥ १ ॥ इति श्रीमद्भागवते

तुष्टाः प्रयच्छंति समस्तकामान्होमावसाने हुतभुक् श्रीर्हरिश्च ॥ राजन्महन्मरुतां जन्म पुण्यं दितेर्व्रतं चाभिहितं महत्ते ॥ २८ ॥
इति श्रीमद्भागवते महापुराणे षष्ठस्कंधे पुंसवनव्रतकथनं नामैकोनविंशोऽध्यायः ॥ १९ ॥ ॥ समाप्तोऽयं षष्ठस्कंधः ॥ ६ ॥ ॥

महापुराणे षष्ठस्कंधे श्रीधरस्वामिविरचितायां टीकायां भावार्थदीपिकायामेकोनविंशोऽध्यायः ॥ १९ ॥ ॥ समाप्तोऽयं षष्ठस्कंधः ॥ ६ ॥ ॥ ॥

सर्व मनोरथ परिपूर्ण करितात. असो, हे राजा, ह्याप्रमाणें मरुद्गणांचें मोठें पुण्यकारक जन्म व दितीचें महाव्रत हें सर्व मी तुला कथन केलें ॥ २८ ॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील षष्ठस्कंधापैकीं पुंसवनव्रतनिरूपणनामक हा एकोणिसावा अध्याय समाप्त झाला ॥ १९ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

इति श्रीमद्भागवते षष्ठस्कंधः
सटीकः सार्थश्च समाप्तः

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अथ श्रीमद्भागवते सप्तमस्कंधः
सटीकः सार्थश्च प्रारभ्यते

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ श्रीगणेशाय नमः ॥ ॥ आतां या सप्तमस्कंधामध्यें पंधरा अध्यायांनीं ऊतींचे (जीवाच्या त्यात्या कर्मांनुसार होणाऱ्या वासनांचें) वर्णन केलें आहे. त्यांत पहिल्या दहा अध्यायांनीं, हिरण्यकशिपु व त्याचा पुत्र प्रल्हाद यांची बुद्धि निरनिराळी असल्यामुळें सज्जनांचा कोप आणि कृपा यांच्या योगानें उत्पन्न झालेल्या वासनांचा भेद सांगितला आहे व कर्मांच्या योगानें चित्तशुद्धि झाली ह्मणजे जीवाला सद्वासना उत्पन्न होत्ये ह्मणून पुढच्या पांच अध्यायांनीं धर्मनिर्णय केला आहे. ह्या पंधरा अध्यायांपैकीं पहिल्या अध्यायांत आपल्या विष्णुभक्त पुत्राचेठिकाणीं हिरण्यकशिपूचा ब्राह्मणाच्या शापामुळें घडलेला विरोध सांगितला आहे ॥ १ ॥ राजा ह्मणाला–

॥ श्रीगणेशाय नमः ॥ स्वभक्तपक्षपातेन तद्विपक्षविदारणम् ॥ नृसिंहमद्भुतं वंदे परमानंदविग्रहम् ॥ १ ॥ ऊतिः पंचदशाध्यायैः सप्तमे वर्ण्यतेऽधुना ॥ ऊतिश्च वासना प्रोक्ता तत्तत्कर्मानुसारिणी ॥ २ ॥ अशुभा च शुभा चेति द्विधा सा हेतुभेदतः ॥ अशुभा महतां कोपाच्छुभा महदनुग्रहात् ॥ ३ ॥ हरेर्द्वारपयोर्यद्वद्वैकुंठे वसतोरपि ॥ चतुःसनरुषा विष्णुद्वेषाद्यशुभवासना ॥ ४ ॥ यथा च दैत्यगर्भेऽपि प्रह्रादस्य सतः स्थिरा ॥ नारदानुग्रहादास विष्णौ सद्भक्तिवासना ॥ ५ ॥ स्वभक्तं च सदा विष्णुर्द्विषंतमपि रक्षति ॥ तृतीयेऽथ भवे द्वास्थावकरोदात्मसात्पुनः ॥ ६ ॥ अतो मनीषिणा यत्नः कार्यो महदनुग्रहे ॥ इत्येतदर्थमूतीनामत्र लक्षणमुच्यते ॥ ७ ॥ तत्रादौ दशभिर्दैत्यतत्पुत्रमतिभेदतः ॥ महत्कोपानुकंपोत्थवासनाभेद उच्यते ॥ ८ ॥ सद्वासना च युज्येत कर्मभिः शुद्धचेतसः ॥ परैस्तु पंचभिस्तस्मात्क्रियते धर्मनिर्णयः ॥ ९ ॥ तत्र तु प्रथमेऽध्याये हिरण्यकशिपोः सुते ॥ विष्णुभक्ते विरोधस्तु विप्रशापज ईर्यते ॥ १० ॥ यदुक्तं पूर्वस्कंधांते । हतपुत्रा दितिः शक्रपार्ष्णिग्राहेण विष्णुना ॥ मन्युना शोकदीप्तेन ज्वलंती पर्यचिंतयदिति तच्छ्रुत्वा विस्मितः परीक्षित्पृच्छति । सम इति त्रिभिः । न हि समस्य सुहृदश्च वैषम्यं नामास्ति नच प्रियस्य प्रीतिकर्तृषु वैषम्यं युक्तमित्यर्थः ॥ १ ॥ किंच । यस्य यैः प्रयोजनं सिद्ध्यति स तत्पक्षपाती भवति येभ्यो बिभेति तान्द्वेषेण हंति न तु तदत्रास्तीत्याह । न हीति । निःश्रेयसं परमानंद एव आत्मा स्वरूपं यस्य । असुरेभ्यश्चोद्वेगो भयं नास्ति । अतो विद्वेषोऽपि नास्त्येव । तत्र हेतुः । अगुणस्येति । गुणाधीनौ प्रीतिद्वेषावित्यर्थः ॥ २ ॥ श्रीनारायणस्य गुणाननुग्रहनिग्रहादीन्प्रति तत्तं संशयम् ॥ ३ ॥ भागवतस्य प्रह्रादस्य माहात्म्यं गीयत इति संबंधः ॥ ४ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ राजोवाच ॥ ॥ समः प्रियः सुहृद्ब्रह्मन् भूतानां भगवान् स्वयम् ॥ इंद्रस्यार्थे कथं दैत्यानवधीद्विषमो यथा ॥१॥ न ह्यस्यार्थः सुरगणैः साक्षान्निःश्रेयसात्मनः ॥ नैवासुरेभ्यो विद्वेषो नोद्वेगश्चागुणस्य हि ॥ २ ॥ इति नः सुमहाभाग नारायणगुणान्प्रति ॥ संशयः सुमहान् जातस्तद्भवान् छेत्तुमर्हति ॥ ३ ॥ श्रीशुक उवाच ॥ साधु पृष्टं महाराज हरेश्चरितमद्भुतम् ॥ यत्र भागवतमाहात्म्यं भगवद्भक्तिवर्धनम् ॥ ४ ॥

हे ब्रह्मन्, सर्वभूतांचें हित करणारा, त्यांना आवडणारा व त्यांचेठिकाणीं समदृष्टि ठेवणारा अशा भगवंतानें इंद्राच्या पक्षपातानें केवळ शत्रूप्रमाणें दैत्यांचा वध स्वतः कसा केला ? ॥ १ ॥ कारण, साक्षात् परमानंदस्वरूपी अशा ह्या विष्णूला देवांपासून कांहीं कार्यभाग करून घ्यावयाचा नसल्यामुळें देवांवर त्याची प्रीति संभवत नाहीं, व असुरांपासून त्याला भीति नसल्यामुळें त्यांच्याशीं त्याचा द्वेष असण्याचाहि संभव नाहीं ॥ २ ॥ असें असतां हे महाभाग्यवंता, देवांवर अनुग्रह व दैत्यांचा निग्रह त्यानें केलेला दिसतो ह्मणून श्रीनारायणाच्या गुणांविषयीं आह्मांला हा मोठा संशय उत्पन्न झाला आहे तो तूं दूर करावास ॥ ३ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हे महाराजा, ज्यामध्यें, अतिशय पुण्यकारक आणि ईश्वरभक्तीची वृद्धि करणारें भगवद्भक्त प्रल्हादाचें माहात्म्य नारदादि ऋषींनीं गायन केलें आहे त्या अद्भुत हरिचरित्राविषयीं तूं फार उत्तम प्रश्न केलास; तस्मात् व्यासमुनीला नमस्कार करून मी आतां हरिकथा कथन करण्यास आरंभ करितों ॥ ४ ॥ ५ ॥ हे राजा, मायातीत, निर्गुण, जन्मादिविकारशून्य व देहेंद्रियादिरहित असाहि भगवान्, आपल्या मायेच्या सत्वादि गुणांमध्यें प्रवेश करून देवदैत्यांमध्यें परस्पर असलेल्या बाध्यबाधक धर्माला कारण झाला आहे ॥ ६ ॥ आतां सत्त्वादिगुण जर स्वतः ईश्वराचेठिकाणीं असतील तर प्राकृतपुरुषाप्रमाणें तोहि विषमबुद्धि होईल परंतु तो प्रकार मुळींच नाहीं असें सांगतात—हे राजा, सत्त्व, रज आणि तम हे गुण प्रकृतीचेच आहेत, परमात्म्याचे मुळींच नाहींत. आतां, ईश्वरानें स्वेच्छेनें गुणांमध्यें प्रवेश केल्यामुळें पक्षपातरूप वैषम्य त्याला प्राप्त होईलच अशी शंका घ्यावी तर ती ठीक नाहीं. कारण, गुणांमध्यें ईश्वराचा प्रवेश, काळामुळें होतो असें सांगतात—हे राजा, त्या सत्त्वादिगुणांचा ऱ्हास किंवा वृद्धि हीं एकदम घडत नाहींत ॥ ७ ॥ सत्त्वगुणाच्या जयकालीं परमात्मा त्या काळाला अनुकूळ होऊन देव आणि ऋषि ह्यांच्या देहांमध्यें प्रविष्ट होऊन त्यांना

कृष्णाय व्यासाय । कृष्णं मुनिं नत्वेत्यर्थः ॥ ५ ॥ यस्मात्प्रकृतेः परः अतो निर्गुण ऽत एवाजोऽतएवाव्यक्तो रागद्वेषादिनिमितभूतदेहेंद्रियादिरहितः सोऽपि स्वमायागुणं सत्त्वादिकमाविश्याधिष्ठाय बाध्यान्प्रति यद्वा देवासुराणां परस्परं या बाध्यबाधकता तां गतः प्राप्तः । तत्र हेतुर्जात इत्यर्थः ॥ ६ ॥ तत्र गुणानां स्वीयत्वे सति प्राकृतपुरुषवद्विषमः स्यात्तत्तु नास्तीत्याह । सत्त्वमिति । ननु स्वेच्छया गुणाधिष्ठानेनापि पक्षपातवैषम्यं स्यादेव । न । तस्य कालकृतकत्वादित्याह । न

गीयते परमं पुण्यमृषिभिर्नारदादिभिः ॥ नत्वा कृष्णाय मुनये कथयिष्ये हरेः कथाम् ॥ ५ ॥ निर्गुणोऽपि ह्यजोऽव्यक्तो भगवान् प्रकृतेः परः ॥ स्वमायागुणमाविश्य बाध्यबाधकतां गतः ॥ ६ ॥ सत्त्वं रजस्तम इति प्रकृतेर्नात्मनो गुणाः ॥ न तेषां युगपद्राजन्ह्रास उल्लास एव वा ॥ ७ ॥ जयकाले तु सत्त्वस्य देवर्षीन्रजसोऽसुरान् ॥ तमसो यक्षरक्षांसि तत्कालानुगुणोऽभजत् ॥ ८ ॥ ज्योतिरादिरिवाभाति संघातान्न विविच्यते ॥ विदंत्यात्मानमात्मस्थं मथित्वा कवयोंऽततः ॥ ९ ॥

तेषामिति सार्धेन । उल्लासो वृद्धिः ॥ ७ ॥ सत्त्वस्य जयकाले देवादीनृषींश्चाभजत् । तत्तदेहं प्रविश्य वर्धयतीत्यर्थः । रजसो जयकालेऽसुरान् । तमसो जयकाले यक्षरक्षांसि तस्य कालस्यानुगुणः सन् ॥ ८ ॥ समस्यापि निमित्तभेदेन वैषम्ये दृष्टांतः । ज्योतिरादिरिव । ज्योतिरग्निर्यथा काष्ठादिषु जलं यथा पात्रेषु आकाशो यथा घटादिषु तथा भगवान्नानारूप आभाति ननु तर्हि तद्वदेव विवेकेन किं न प्रतीयते तत्राह । संघातात्सुरादिदेहान्न विविच्यते न पृथक्प्रतीयते । तर्हि तान्भजतीति कुतो ज्ञायते तत्राह । विदंतीति । आत्मस्थं परमात्मानं कवयो निपुणाः मथित्वा कार्यदर्शनलिंगेन विचार्य जानंति । अंततः स्वभावकालकर्मादिवादनिषेधेन ।

वाढवितो; तसाच रजोगुणाच्या जयकालीं असुरांच्या देहांमध्यें प्रविष्ट होऊन त्यांना वाढवितो आणि तमोगुणाच्या जयकालीं यक्ष व राक्षस ह्यांच्या देहांमध्यें प्रविष्ट होऊन त्यांना वाढवितो ॥ ८ ॥ आतां, समपदार्थ असूनहि निमित्तभेदामुळें त्याचेठिकाणीं वैषम्य प्राप्त होतें ह्याविषयीं दृष्टांतपूर्वक सांगतात कीं— जसे अग्नि, उदक व आकाशवगैरे पदार्थ, काष्ठ, जळपात्र व घटादिकांचेठिकाणीं त्यांच्यात्यांच्या सारखे अनेकरूपांनीं भासतात त्याचप्रमाणें भगवानहि देवादिदेहांचेठिकाणीं भासमान होतो परंतु जसे अग्निवगैरे काष्ठादिकांचेठिकाणीं भिन्नत्वानें अनुभवास येतात तसा मात्र तो अनुभवास येत नाहीं. परंतु, एवढ्यावरून तो नाहींच असेंहि ह्मणतां येत नाहीं. कारण, सूर्यकांतामध्यें अग्नि प्रत्यक्ष दिसत नसूनहि दाहकशक्तीच्या अनुभवानें जसा त्याठिकाणीं तो आहे असें समजतें अथवा वायु दृष्टिगोचर नसूनहि गंधाचा अनुभव आला ह्मणजे जसें त्याचें ज्ञान होतें त्याचप्रमाणें सृष्ट्यादि कार्यें अनुभवास आलीं ह्मणजे निपुण लोक, विचार करून व स्वभाव, काल आणि कर्म इत्यादि वादांचा ॥ १ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

निषेध करून, आपलेठिकाणींच असलेल्या परमात्म्याला जाणतात ॥ ९ ॥ असो. याप्रमाणें मायागुणांच्या योगानेंच हें ईश्वराचेठिकाणीं वैषम्य भासतें तें स्वाभाविक नाहीं असें सांगितलें. आतां, गुणांच्या अधीन असल्यामुळें ईश्वराला अनीश्वरपणा प्राप्त होईल तर सांगतात कीं–जेव्हां जीवाच्या भोगाकरितां परमेश्वराला शरीरें उत्पन्न करण्याची इच्छा होत्ये तेव्हां तो साम्यावस्थेमध्यें असलेल्या रजोगुणाला आपल्याला मायेच्या योगानें निराळा करून त्याची वृद्धि करितो, तशीच जेव्हां त्याला विचित्रविचित्र शरीरांमध्यें क्रीडा करण्याची इच्छा होत्ये तेव्हां सत्त्वगुणाला निराळा करून त्याची वृद्धि करितो आणि जेव्हां क्रीडेचा उपसंहार करण्याची त्याला इच्छा होते तेव्हां तो विश्वाचा संहार करण्याकरितां तमोगुणाला पृथक् करून त्याची वृद्धि करितो ॥ १० ॥ आतां जेव्हां आणि तेव्हां ह्या कालबोधक शब्दांवरून ईश्वर कालाधीन आहे असें भासतें त्याचें निवारण करीत ईश्वर प्रकृतीच्या व पुरुषाच्याहि अधीन नाहीं असें सांगतात– हे नरेंद्रा, निमित्तभूत असलेल्या प्रकृतिपुरुषांच्या योगानें सृष्ट्यादिक सकल व्यापा-

---

विंदंतीति पाठे लाभोऽपि ज्ञानमेव । अत्रापि ज्योतिरादिरिवेति द्रष्टव्यं यथा सूर्यकांतादौ दाहदर्शनाज्ज्योतिर्ज्ञायते यथा च गंधदर्शनाद्वायुरित्यादि ॥ ९ ॥ तदेवं मायागुणवशेनैतद्वैषम्यं न स्वाभाविकमित्युक्तम् । तर्हि गुणपारतंत्र्यादनीश्वरत्वमाशंक्याह । यदा आत्मानो जीवस्य भोगाय पुरः शरीराणि परः परमेश्वरः सिसृक्षुर्भवति तदा साम्येन स्थितं रजः पृथक्सृजति । विचित्रासु तासु पूर्षु रिरंसुः क्रीडितुमिच्छुर्यदा तदा सत्त्वं पृथक्सृजति । शयिष्यमाणः संहरिष्यन्यदा तदा तमः पृथगीरयति प्रेरयति । आधिक्यं नयतीत्यर्थः ॥ १० ॥ यदा सिसृक्षुरित्यादिनिर्देशात्प्रतीतं कालपारतंत्र्यं वारयन्प्रधानपुरुषपारतंत्र्यमपि वारयति । कालमिति । हे नरदेव

यदा सिसृक्षुः पुर आत्मनः परो रजः सृजत्येष पृथक्स्वमायया ॥ सत्त्वं विचित्रासु रिरंसुरीश्वरः शयिष्यमाणस्तम ईरयत्यसौ ॥ १० ॥ कालं चरंतं सृजतीश आश्रयं प्रधानपुंभ्यां नरदेव सत्यकृत् ॥ य एष राजन्नपि काल ईशिता सत्त्वं सुरानीकमिवैधयत्यतः ॥ तत्प्रत्यनीकानसुरान्सुरप्रियो रजस्तमस्कान्प्रमिणोत्युरुश्रवाः ॥ ११ ॥ अत्रैवोदाहृतः पूर्वमितिहासः सुरर्षिणा ॥ प्रीत्या महाक्रतौ राजन्पृच्छतेऽजातशत्रवे ॥ १२ ॥

प्रधानपुंम्यां निमित्तभूताभ्यां सत्यकृदमोघकर्ता ईशस्तयोः सहकारित्वेनाश्रयभूतं चरंतं वर्तमानं कालं स्वयमेव सृजति । स्वचेष्टारूपत्वात्कालस्य न तत्पारतंत्र्यमित्यर्थः । तथाऽपि प्रस्तुते किमायातं तत्राह । य एष कालः सत्त्वमेधयति वर्धयत्यतो हेतोरीशिताऽपीश्वरोऽपि सत्त्वप्रधानं सुरानीकं देवसमूहमेधयतीव तत्प्रत्यनीकानसुरान्सुरप्रतिपक्षान्प्रमिणोति हिनस्ति चेत्यन्वयः । उरु प्रभूतं श्रवः कीर्तिर्यस्य सः । कालशक्तिक्षुभितगुणगतवैषम्यमिह सन्निधिमात्रेण तदधिष्ठातरि स्फुरतीति प्रकरणार्थः ॥ ११ ॥ तदानीं तयोर्न सुरपक्षपातेन वधः किंतु ब्रह्मशापेनासुरीं योनिं प्राप्तयोरनुग्रहार्थ एवेति वक्तुमितिहासमुपक्षिपति । अत्रैवेति । अत्र द्वेषादिरहितस्यापि दैत्यवधे नार-

---

र करणारा हा ईश्वर, प्रकृतिपुरुषांना साहाय्य असल्यामुळें त्यांचा आश्रयभूत अशा कालाला आपण स्वतःच उत्पन्न करितो. तो काल, ईश्वरचेष्टारूप असल्यामुळें ईश्वराला कालाधीनपणा नाहीं. परंतु, हें सांगण्याचा प्रस्तुतविषयाशीं काय संबंध आहे? असें ह्मणशील तर– हेराजा, हा जो काल आहे तो सत्त्वगुणाची वृद्धि करितो ह्मणून त्याचा नियंता हा महाकीर्तिमान् देवप्रिय ईश्वरहि सत्त्वगुणप्रधान अशा देवसमुदायाची वृद्धि करितो आणि रजोगुणतमोगुणप्रधान असे देवांचे शत्रु जे असुर त्यांचा वध करितो. सारांश, कालशक्तीमुळें क्षुभित झालेल्या गुणांमध्यें असलेलें वैषम्य, त्यांचा अधिष्ठाता जो ईश्वर त्याचेठिकाणीं सांनिध्यामुळें स्फुरण पावतें ॥ ११ ॥ असो. ह्याप्रमाणें भगवंताच्या गुणांविषयीं प्राप्त झालेला राजाचा संशय दूर करून आतां ईश्वरानें त्या कालीं त्या हिरण्याक्षहिरण्यकशिपूंचा जो वध केला तो देवांच्या पक्षपातानें केला नाहीं; तर ब्रह्मशापामुळें दैत्ययोनी पावलेल्या त्या आपल्या द्वारपालांवर अनुग्रह करण्याकरितांच त्यांचा वध केला. हें सांगण्याच्या आशयानें इतिहास

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कथन करितात कीं–हे राजा, 'ईश्वर द्वेषादिशून्य असतांहि त्यानें दैत्यांचा वध केला' ह्याविषयीं राजसूयनामक महाक्रतूमध्यें पूर्वीं युधिष्ठिरानें प्रश्न केला असतां देवर्षि नारदानें प्रीतीनें त्याला इतिहास सांगितला आहे तो असा कीं–॥ १२ ॥ राजसूयनामक महाक्रतूमध्यें भगवान् वासुदेवाचेठिकाणीं शिशुपालाला प्राप्त झालेलें अतिआश्चर्यकारक सायुज्य अवलोकन करून, पांडुपुत्र धर्मराजाच्या मनाला आश्चर्य वाटलें तेव्हां सर्व मुनि ऐकत असतां यज्ञामध्यें त्या धर्मराजानें तेथें बसलेल्या देवर्षि नारदमुनीला असा प्रश्न केला कीं ॥ १३ ॥ १४ ॥ युधिष्ठिर ह्मणाला–अहो नारदमुने, हा शिशुपाल श्रीकृष्णाचा द्वेष करीत असून त्याला मायातीत अशा वासुदेवरूप तत्त्वामध्यें, एकनिष्ठ भक्तांनाहि दुर्लभ अशी सायुज्यमुक्ति प्राप्त झाली हें अत्यंत आश्चर्य आहे ! ॥ १५ ॥ तस्मात् हे मुने, आह्मां सर्वांनाहि हें जाणण्याची इच्छा आहे. कारण,

---

देनेतिहासः प्रस्तावितः ॥ १२ ॥ चेदिभूभुजः शिशुपालस्य ॥ १३ ॥ १४ ॥ एकांतभक्तानामपि दुर्लभा प्राप्तिर्विद्विषो जातेत्येतदत्यद्भुतं हि ॥ १५ ॥ तस्य तु वेनवन्नरकपात एवोचित इत्याह । भगवन्निंदयेति । तमसि नरके ॥ १६ ॥ दमघोषस्य सुतः शिशुपालः कलभाषणाद्बाल्ये कोमलभाषणमारभ्य संप्रत्यधुनाऽप्यमर्षी क्रोधी मत्सरी

दृष्ट्वा महाद्भुतं राजा राजसूये महाक्रतौ ॥ वासुदेवे भगवति सायुज्यं चेदिभूभुजः ॥ १३ ॥ तत्रासीनं सुरऋषिं राजा पांडुसुतः क्रतौ ॥ पप्रच्छ विस्मितमना मुनीनां शृण्वतामिदम् ॥ १४ ॥ युधिष्ठिर उवाच ॥ अहो अत्यद्भुतं ह्येतदुर्लभैकांतिनामपि ॥ वासुदेवे परे तत्त्वे प्राप्तिश्चैद्यस्य विद्विषः ॥१५॥ एतद्वेदितुमिच्छामः सर्व एव वयं मुने ॥ भगवन्निंदया वेनो द्विजैस्तमसि पातितः ॥१६॥ दमघोषसुतः पाप आरभ्य कलभाषणात् ॥ संप्रत्यमर्षी गोविंदे दंतवक्रश्च दुर्मतिः ॥ १७ ॥ शपतोरसकृद्विष्णुं यद्ब्रह्म परमव्ययम् ॥ श्वित्रो न जातो जिह्वायां नांधं विविशतुस्तमः ॥ १८ ॥ कथं तस्मिन् भगवति दुरवग्राहधामनि ॥ पश्यतां सर्वलोकानां लयमीयतुरंजसा ॥ १९ ॥ एतद्भ्राम्यति मे बुद्धिर्दीपार्चिरिव वायुना ॥ ब्रूह्येतदद्भुततमं भगवांस्तत्र कारणम् ॥ २० ॥ श्रीशुक उवाच ॥ राज्ञस्तद्वच आकर्ण्य नारदो भगवानृषिः ॥ तुष्टः प्राह तमाभाष्य शृण्वत्यास्तत्सदः कथाः ॥ २१ ॥

वा ॥ १७ ॥ श्वित्रः श्वेतकुष्ठम् ॥ १८ ॥ दुरवग्राहं दुष्प्रापं धाम स्वरूपं यस्य तस्मिँल्लयं सायुज्यमीयतुर्जग्मतुः । अभूतस्यापि दंतवक्रलयस्य तज्जातकप्रामाण्येन सिद्धवन्निर्देशः ॥ १९ ॥ एतदद्भुततममत एतत्प्रति मे धीर्भ्राम्यति । भगवान्सर्वज्ञस्त्वं ब्रूहि ॥२०॥ आभाष्य संबोध्य सीदंति निषीदंत्यस्यामिति सद् सभा तस्याः सदः सदसः शृण्वत्याः

भगवन्निंदेमुळें वेनराजाला ब्राह्मणांनीं नरकांत पाडिलें, त्याप्रमाणेंच यालाहि नरकप्राप्ति व्हावयाची ॥ १६ ॥ कारण, दमघोषाचा पुत्र पापी शिशुपाल तसाच त्याचा कनिष्ठ बंधु दुर्बुद्धि दंतवक्र हे दोघेहि अगदीं बाल्यावस्थेमध्यें कोमल (बोबडे) शब्द उच्चारूं लागल्यापासून तों आतांपर्यंत भगवान् गोविंदाशीं मत्सरबुद्धीनें गालिप्रदान करीत आहेत ॥ १७ ॥ ह्मणून अपक्षयशून्य अशा परब्रह्मस्वरूप श्रीविष्णूची वारंवार निंदा करणाऱ्या ह्यांच्या जिव्हेवर कुष्ठ न उठतां व ते स्वतः घोर नरकामध्यें प्रविष्ट न होतां त्या दुर्लभस्वरूप भगवंताचेठिकाणीं सर्वलोकांसमक्ष अनायासानें त्यांचा लय कसा झाला ? हें अवलोकन करून, वायूनें भ्रमण पावणाऱ्या दीपज्वालेप्रमाणें माझी बुद्धि भ्रमण करीत आहे. कारण, हें अत्यंत आश्चर्य आहे ! यास्तव, ह्याविषयीं हेतु काय आहे तें तूं सर्वज्ञानें कथन करावेंस ॥ १८ ॥ १९ ॥ २० ॥ ॥ २ ॥
श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे परीक्षित् राजा, धर्मराजाचें तें भाषण श्रवण करून भगवान् नारद ऋषि संतुष्ट झाला आणि सर्वसभा श्रवण करीत असतां, त्या धर्मराजाला

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

संबोधन देऊन कथा सांगूं लागला कीं,– ॥ २१ ॥ अहो, भगवन्निंदकाला अवश्य नरकपात प्राप्त व्हावा असें ह्मणण्यामध्यें तुझा अभिप्राय काय आहे? निंदा केली असतां ईश्वराला पीडा झाल्यामुळें त्याच्या क्रोधानें निंदकाला नरक प्राप्त होतो असें तुला वाटतें किंवा पीडावगैरे जरी होत नाहीं तथापि सुरापानादिकाप्रमाणें निषिद्ध असलेल्या भगवन्निंदेच्या आचरणापासून उत्पन्न झालेल्या दोषानेंच नरकप्राप्ति होत्ये असें तुझें मत आहे? बरें निंदेमुळें भगवंताला पीडा होत्ये, असें जर ह्मणावें तर पीडादिक होण्यास देहाभिमानानें केलेलीं निंदादिकच कारणें आहेत आणि ईश्वराचेठिकाणीं देहाभिमानाचावगैरे गंधहि नाहीं; तस्मात् त्याला पीडा होत असेल अशी शंकासुद्धां नको, असें सांगण्याच्या अभिप्रायानें नारद ह्मणाला कीं,–हे राजा, निंदा, स्तुति, सत्कार आणि तिरस्कार ह्यांचें ज्ञान होण्याकरितां प्रकृतिपुरुषांच्या अविवेकानें शरीराची रचना झाली आहे ॥२२॥ हे राजा, त्याच्या अभिमानानें प्राण्यांना जसें त्याविषयीं अहंममतारूप वैषम्य उत्पन्न होतें आणि त्या वैषम्यानें ताडण व निंदा,

---

सत्याः कथाः प्राहेत्यन्वयः ॥ २१ ॥ अहो भगवन्निंदकस्य नरकपातेन भाव्यमिति वदतस्तव कोऽभिप्रायः भगवत्पीडाकरत्वेन वा तदभावेऽपि सुरापानादिवन्निषिद्धानिंद्याचरणाद्वा तत्र तावद्देहाभिमानकृतनिंदादिनिमित्तत्वात्पीडादीनां भगवतश्च तदभावान्न पीडाशंकास्तीत्याह । निंदनेति सार्द्धैस्त्रिभिः । निंदनं दोषकीर्तनम् । न्यक्कारस्तिरस्कारः। निंदास्तुत्यादिज्ञानार्थं प्रधानपुरुषयोरविवेकेन कलेवरं कल्पितं रचितम् ॥ २२ ॥ तदभिमानेन भूतानां यथा ममाहमिति वैषम्यं तत्कृतं हिंसादिकं च भवति तथा न

नारद उवाच ॥ निंदनस्तवसत्कारन्यक्कारार्थं कलेवरम् ॥ प्रधानपरयो राजन्नविवेकेन कल्पितम् ॥ २२ ॥ हिंसा तदभिमानेन दंडपारुष्ययोर्यथा ॥ वैषम्यमिह भूतानां ममाहमिति पार्थिव ॥ २३ ॥ यन्निबद्धोऽभिमानोऽयं तद्वधात्प्राणिनां वधः ॥ तथा न यस्य कैवल्यादभिमानोऽखिलात्मनः ॥ परस्य दमकर्तुर्हि हिंसा केनास्य कल्प्यते ॥ २४ ॥ तस्माद्वैरानुबंधेन निर्वैरेण भयेन वा ॥ स्नेहात्कामेन वा युंज्यात्कथंचिन्नेक्षते पृथक् ॥ २५ ॥

यस्येत्युत्तरेणान्वयः । दंडस्ताडनं पारुष्यं निंदा तयोर्हेतुभूतयोर्हिंसा पीडा च भवति ॥२३॥ यस्मिन्निबद्धोऽयमभिमानस्तस्य देहस्य वधाद्वधश्च यथा तथा यस्याभिमानो नास्ति अतोऽस्य परमेश्वरस्य हिंसा केन हेतुना कल्प्यते न केनापीति । अभिमानाभावे हेतुः । कैवल्यादद्वितीयत्वेनाभिमंतव्याभावात् । वैषम्याभावे हेतुः । अखिलात्मनः सर्वात्मन इति । तर्हि किमिति हंति दैत्यांस्तत्राह। परस्य दमकर्तुः हितार्थं दंडं करोतीत्यर्थः ॥ २४ ॥ यस्माद्भगवतो निंदादिकृतं वैषम्यं नास्ति तस्माद्येन केनाप्युपायेन ध्यायतस्तेनैव ध्यानेन निंदादिकृतपापस्यापि नाशात्सायुज्यं युक्तमित्याशयेनाह । तस्मादिति सप्तभिः । निर्वैरेण नास्ति वैरं केनापि यस्मिंस्तेन भक्तियोगेनेत्यर्थः । युंज्यान्मन इति शेषः ।

ह्मणजे मारण्याच्या योगानें हिंसा व निंदेच्यायोगानें पीडा हीं होतात आणि ज्या देहाचेठिकाणीं हा अभिमान अतिदृढ झालेला असतो त्या देहाचा वध झाला ह्मणजे प्राण्यांना वध केल्याचें पाप लागतें तसें ईश्वरास लागत नाहीं. कारण, तो सर्वांचा आत्मा अद्वितीय असल्यामुळें त्याचेठिकाणीं प्राण्यांसारखा अभिमान नाहीं व तो परमात्मा दैत्यांच्या हिताकरितांच त्यांना दंड करीत असतो ह्मणून त्याला हिंसादोष कशानें लागणार? लागावयाचाच नाहीं ॥ २३ ॥ २४ ॥ असो. ज्याअर्थीं भगवंताचेठिकाणीं निंदादिकृत वैषम्य नाहीं त्याअर्थीं जो पुरुष कोणत्यातरी उपायानें त्या भगवंताचें ध्यान करितो, त्याचें 'त्या ध्यानाच्याच योगानें' निंदादिकृत पातक नाहींसें होऊन त्याला सायुज्य प्राप्त होणें योग्य आहे अशा आशयानें नारद ह्मणतो कीं,–हे राजा, ह्याकरितां वैरानुबंध, निर्वैर भक्तियोग, भय, स्नेह अथवा काम

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्यांपैकीं कोणत्याहि उपायानें ईश्वराचेठिकाणीं मन लावावें. कारण, ह्या उपायांनीं मन लागलें असतां पुरुषाला ईश्वरव्यतिरिक्त वस्तु अगदीं दिसेनाशी होत्ये ॥ २५ ॥ आतां त्या उपायांमध्येंहि वैरानुबंध श्रेष्ठ आहे अशा अभिप्रायानें ह्मणतो कीं–हे राजा, वैरानुबंधाच्या योगानें जसा मानव तन्मय होऊन जातो तसा भक्तियोगानें होत नाहीं, असा माझ्या, बुद्धीचा निश्चय झाला आहे ॥ २६ ॥ कारण, जसा 'कुंभारीण' या नांवाच्या भ्रमरानें भितीवर घर बांधून ठेविलेला कीटक द्वेष व भय यांच्या योगानें निरंतर त्याचें स्मरण करीत असल्यामुळें त्याच्या स्वरूपास पावतो त्याप्रमाणें मायेनें मनुष्यरूप धारण करणाऱ्या भगवान् सदानंदरूप ईश्वराचेठिकाणीं वैरभाव धारण करून त्याचें वारंवार चिंतन करणारे कितीएक प्राणी निष्पाप होऊन त्याच्या स्वरूपास प्राप्त झाले आहेत ॥ २७ ॥ २८ ॥ हे राजा, काम, द्वेष, भय, स्नेह अथवा भक्ति ह्या साधनांनीं ईश्वराचेठिकाणीं मन लावून व त्या कामादिनिमित्तक पातकाचें निरसन करून पुष्कळ लोक त्याच्या सायुज्यगतीला प्राप्त

यस्मादेतैरुपायैः पृथङ्नेक्षते ॥ २५ ॥ तेष्वपि वैरानुबंधः श्रेष्ठ इत्याह । यथेति । न तथा भक्तियोगेनापि ॥ २६ ॥ अत्र दृष्टांतः । कीटः पेशस्कृता भ्रमरेण संरंभो द्वेषो भयं च स एव योगस्तेन ॥ २७ ॥ वैरेण याऽनुचिंता चिंतनं तयैव पूतः पाप्मा येषां ते तं प्रापुः ॥ २८ ॥ तदघं कामादिनिमित्तं पापं हित्वा ॥ २९ ॥ तानाह । गोप्य इति

यथा वैरानुबंधेन मर्त्यस्तन्मयतामियात् ॥ न तथा भक्तियोगेन इति मे निश्चिता मतिः ॥ २६ ॥ कीटः पेशस्कृता रुद्धः कुड्यायां तमनुस्मरन् ॥ संरंभभययोगेन विंदते तत्सरूपताम् ॥ २७ ॥ एवं कृष्णे भगवति मायामनुज ईश्वरे ॥ वैरेण पूतपाप्मानस्तमीयुरनुचिंतया ॥ २८ ॥ कामाद्द्वेषाद्भयात्स्नेहाद्यथा भक्त्येश्वरे मनः ॥ आवेश्य तदघं हित्वा बहवस्तद्गतिं गताः ॥ २९ ॥ गोप्यः कामाद्भयात्कंसो द्वेषाच्चैद्यादयो नृपाः ॥ संबंधाद्वृष्णयः स्नेहाद्यूयं भक्त्या वयं विभो ॥ ३० ॥ कतमोऽपि न वेनः स्यात्पंचानां पुरुषं प्रति ॥ तस्मात्केनाप्युपायेन मनः कृष्णे निवेशयेत् ॥ ३१ ॥ मातृष्वस्रेयो वश्चैद्यो दंतवक्रश्च पांडव ॥ पार्षदप्रवरौ विष्णोर्विप्रशापात्पदाच्च्युतौ ॥ ३२ ॥ युधिष्ठिर उवाच ॥ कीदृशः कस्य वा शापो हरिदासाभिमर्शनः ॥ अश्रद्धेय इवाभाति हरेरेकांतिनां भवः ॥ ३३ ॥

॥ ३० ॥ तर्हि वेनः किमिति नरके पातितः तीव्रध्यानाभावात्पापमेव तस्य फलितमित्याह । कतमोऽपीति । पुरुषं श्रीहरिं प्रति पुरुषे पुरुषस्य कामासंभवाद्भयादिभिश्चिंतयतां पंचानां मध्ये वेनो न कतमोऽपीत्युक्तम् ॥ ३१ ॥ तदेवमितिहासप्रस्तावकथामुक्त्वा श्रीकृष्णे शिशुपालस्य वैरानुबंधे को हेतुरित्यपेक्षायां तमेवेतिहासं वक्तुमाह । मातृष्वस्रेय इति । पदाद्वैकुंठाच्च्युतौ ॥ ३२ ॥ हरिदासावभिमृशत्यभिभवतीति तथा । कस्य शापः कीदृशो वा । अश्रद्धेयोऽनादरणीय इव । असंभवात् । भवो जन्म ॥ ३३ ॥

झाले आहेत ॥ २९ ॥ ते येणेंप्रमाणें–कामाच्या योगानें गोपी, भयामुळें कंस, द्वेषानें शिशुपालप्रभृति राजे, संबंधानें यादव, स्नेहामुळें तुह्मीं आणि हे धर्मराजा, भक्तीनें आह्मीं त्याच्या स्वरूपाला प्राप्त झालों आहों ॥ ३० ॥ तर मग वेनराजाला ब्राह्मणांनीं कशाकरितां नरकामध्यें पाडिला असें ह्मणशील तर त्याला भगवंताचें तीव्र ध्यान न घडल्यामुळें त्याचें पातकच फलद्रूप झालें असें सांगतो– हे राजा भयादिकांनीं श्रीहरीचें चिंतन करणाऱ्या वर सांगितलेल्या पांचांपैकीं वेनराजा कोणीहि नव्हता, ह्मणून त्याची तशी गति झाली. असो कोणत्यातरी उपायानें कृष्णाचेठिकाणीं मन लावावें ॥ ३१ ॥ ह्याप्रमाणें इतिहाससंबंधीं उपोद्धात कथन करून, श्रीकृष्णाचेठिकाणीं शिशुपालाचें वैर असण्याचें कारण काय? हें समजण्यासाठीं तो इतिहास कथन करितात कीं,– हे पांडुपुत्रा, शिशुपाल आणि दंतवक्त्र हे जे तुह्मां पांडवांचे माऊसभाऊ ते विष्णूच्या पार्षदगणांपैकीं मुख्य असून ब्राह्मणांच्या शापामुळें वैकुंठस्थानापासून च्युत झाले होते ॥ ३२ ॥ युधिष्ठिर ह्मणाला– हे मुने, हरिदासांचाहि पराभव

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करणारा असा कोणाचा व कसला शाप झाला ? अहो, हा शाप मलातर अविश्वसनीय असल्यासारिखा भासतो. कारण, श्रीहरीच्या एकनिष्ठ भक्तांना जन्म प्राप्त होणें झटलें ह्मणजे असंभवनीय आहे ॥ ३३ ॥ आणि त्यांना जन्महेतुभूत असे प्राकृत देह, इंद्रियें व प्राण हे मुळींच नसून त्यांचे देह शुद्धसत्त्वमय आहेत व ते वैकुंठपुरीमध्यें वास करीत असतां त्यांनाहि प्राकृतदेहाचा संबंध झाला असें ज्यामध्यें आहे तें हें आख्यान तुह्मीं आह्मांला कथन करा ॥ ३४ ॥ नारद ह्मणाला— हे राजा, एकेवेळीं ब्रह्मदेवाचे चार पुत्र जे सनत्कुमार, सनक, सनंदन आणि सनातन, ते त्रैलोक्यामध्यें संचार करीत करीत भगवदिच्छेनें वैकुंठामध्यें गेले ॥ ३५ ॥ मरीचिप्रभृति पूर्वजांच्याहि आधीं उत्पन्न झालेले ते मुनि, नग्न असून पांच सहा वर्षांच्या बालकांसारखे दिसत होते ह्मणून दोघां द्वारपालांनीं त्यांस बालक असें समजून आंत जाण्या-

---

असंभवमेवाह । जन्महेतुभूतैः प्राकृतैर्देहेंद्रियासुभिर्हीनानां । शुद्धसत्त्वमयदेहानामित्यर्थः । प्राकृतदेहसंबंधेन संबद्धमेतदाख्यानमाख्यातुमर्हसि ॥ ३४ ॥ ३५ ॥ कथंभूताः । पंच वा षड्वा हायनानि वर्षाणि येषां ते । अर्भा बालास्तद्वदाभा येषां ते पूर्वेषां मरीच्यादीनामपि पूर्वजास्तेभ्यः प्रथमं जाताः । दिग्वाससो दिगंबराः । अतः शिशून्मत्वा

देहेंद्रियासुहीनानां वैकुंठपुरवासिनाम् ॥ देहसंबंधसंबद्धमेतदाख्यातुमर्हसि ॥ ३४ ॥ नारद उवाच ॥ एकदा ब्रह्मणः पुत्रा विष्णोर्लोकं यदृच्छया ॥ सनंदनादयो जग्मुश्चरंतो भुवनत्रयम् ॥ ३५ ॥ पंचषड्ढायनार्भाभाः पूर्वेषामपि पूर्वजाः ॥ दिग्वाससः शिशून्मत्वा द्वास्थौ तान्प्रत्यषेधताम् ॥ ३६ ॥ अशपन्कुपिता एवं युवां वासं न चार्हथः ॥ रजस्तमोभ्यां रहिते पादमूले मधुद्विषः ॥ पापिष्ठामासुरीं योनिं बालिशौ यातमाश्वतः ॥ ३७ ॥ एवं शप्तौ स्वभवनात्पतंतौ तैः कृपालुभिः ॥ प्रोक्तौ पुनर्जन्मभिर्वां त्रिभिर्लोकाय कल्पताम् ॥ ३८ ॥ जज्ञाते तौ दितेः पुत्रौ दैत्यदानववंदितौ ॥ हिरण्यकशिपुर्ज्येष्ठो हिरण्याक्षोऽनुजस्ततः ॥ ३९ ॥ हतो हिरण्यकशिपुर्हरिणा सिंहरूपिणा ॥ हिरण्याक्षो धरोद्धारे बिभ्रता सौकरं वपुः ॥ ४० ॥ हिरण्यकशिपुः पुत्रं प्रह्लादं केशवप्रियम् ॥ जिघांसुरकरोन्नाना यातना मृत्युहेतवे ॥ ४१ ॥

॥ ३६ ॥ वासमपि नार्हथः कुतः पुनस्तत्सेवामिति चकारार्थः । हे बालिशौ । अतो हेतोराशु यातम् ॥ ३७ ॥ वां युवयोस्त्रिभिर्जन्मभिः लोकाय स्वस्थानप्राप्तये कल्पतां तावताऽयं शापः समाप्यतामिति पुनः प्रोक्तावित्यर्थः ॥ ३८ ॥ ३९ ॥ धरोद्धारे निमित्ते तत्प्रतिघाती हतः ॥ ४० ॥ हिरण्यकशिपोर्वधे कारणं सूचयति । हिरण्यकशिपुः

विषयीं प्रतिबंध केला ॥ ३६ ॥ तेव्हां क्रुद्ध झालेल्या त्यांनीं त्या द्वारपालांस असा शाप दिला कीं, तुह्मीं रजोगुण व तमोगुण ह्यांनीं रहित अशा मधुसूदनाच्या चरणांसमीप नुसता वास करण्यासहि योग्य नाहीं, मग त्याची सेवा करण्यास योग्य कोठून असणार ? ह्याकरितां हे मूढहो, तुह्मीं पापिष्ठ अशा असुरयोनीप्रत सत्वर निघून चला ॥ ३७ ॥ असा शाप देतांच जेव्हां ते स्वस्थानापासून भ्रष्ट होऊं लागले तेव्हां त्या दयाळु मुनींनीं पुन्हां त्यांना असें सांगितलें कीं, तुमचे तीन जन्म झाले ह्मणजे हा शाप समाप्त होऊन तुह्मांला पुन्हां स्वस्थानाची प्राप्ति होईल ॥ ३८ ॥ नंतर ते दोघे द्वारपाळ, दैत्य आणि दानव ह्यांना पूज्य असे दितीचे पुत्र झाले. त्यांत हिरण्यकशिपु हा ज्येष्ठ असून हिरण्याक्ष हा त्यापेक्षां कनिष्ठ होता ॥ ३९ ॥ श्रीहरीनें नृसिंहरूप धारण करून हिरण्यकशिपूचा वध केला आणि पृथ्वीचा उद्धार करण्याकरितां वाराहरूप धारण करणाऱ्या त्याच श्रीहरीनें हिरण्याक्षाचाहि वध केला ॥ ४० ॥ आतां हिरण्यकशिपूचा वध करण्यास कारण काय ? ह्मणून विचारशील

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तर–हे राजा, हिरण्यकशिपूनें केशवप्रिय अशा आपल्या प्रऱ्हादनामक पुत्राचा वध करण्याची इच्छा धरून त्यास मृत्यु प्राप्त होण्या करितां, नानाप्रकारच्या यातना केल्या ॥४१॥ परंतु प्रऱ्हाद, सर्वत्र सबाह्याभ्यंतरीं व्यापक ब्रह्मच आहे असें पाहणारा, सर्वभूतांचा आत्मभूत, द्वेषादिशून्य आणि ईश्वराच्या तेजानें व्याप्त असल्यामुळें, शस्त्रास्त्रप्रहारादिकांनींहि त्याचा वध करण्यास हिरण्यकशिपु समर्थ झाला नाहीं ॥४२॥ नंतर दुसऱ्या जन्मीं ते उभयतां विश्रवानामक ऋषीचे पुत्र केशिनीनामक स्त्रीचेठिकाणीं रावण आणि कुंभकर्ण ह्या नांवांनीं प्रसिद्ध असे सर्वलोकांना पीडा देणारे राक्षस झाले ॥ ४३ ॥ तेव्हांहि भगवंतानें ब्राह्मणशापापासून त्यांना मुक्त करण्याकरितां रघुवंशामध्यें रामावतार धारण करून त्यांचा वध केला. हे प्रभो त्या भगवान् रामाचा पराक्रम तूं मार्कंडेय ऋषीच्या मुखापासून श्रवण करिशील, ह्याकरितां मी तुला येथें सांगत नाहीं ॥ ४४ ॥ असो. पुढें तेच रावणकुंभकर्ण तिसऱ्या जन्मीं क्षत्रिय होऊन तुझे माऊसबंधु शिशुपाल आणि दंतवक्त्र झाले आणि श्रीकृष्णाच्या चक्रानें निष्पाप होऊन संपूर्णत्का-

---

पुत्रमिति ॥ ४१ ॥ सर्वभूतानामात्मभूतम् । कुतः । समं ब्रह्मैव पश्यतीति तथा तम् । अतः प्रशांतं द्वेषादिरहितम् । अतएव भगवत्तेजसा स्पृष्टं व्याप्तम् । उद्यमैः शस्त्रास्त्रप्रहारादिभिः ॥ ४२ ॥ विश्रवसः सुतौ ॥ ४३ ॥ न्यहनत् हतवानित्यर्थः । तर्हि तदेव कथनीयमित्युत्सुकं प्रत्याह । रामवीर्यमिति ॥ ४४ ॥ कृष्णचक्रेण हतमंहो ययोस्तौ ।

सर्वभूतात्मभूतं तं प्रशांतं समदर्शनम् ॥ भगवत्तेजसा स्पृष्टं नाशक्रोद्धंतुमुद्यमैः ॥ ४२ ॥ ततस्तौ राक्षसौ जातौ केशिन्यां विश्रवःसुतौ ॥ रावणः कुंभकर्णश्च सर्वलोकोपतापनौ ॥ ४३ ॥ तत्रापि राघवो भूत्वा न्यहनच्छापमुक्तये ॥ रामवीर्यं श्रोष्यसि त्वं मार्कंडेयमुखात्प्रभो ॥ ४४ ॥ तावेव क्षत्रियौ जातौ मातृष्वस्रात्मजौ तव ॥ अधुना शापनिर्मुक्तौ कृष्णचक्रहतांहसौ ॥ ४५ ॥ वैरानुबंधतीव्रेण ध्यानेनाच्युतसात्मताम् ॥ नीतौ पुनर्हरेः पार्श्वं जग्मतुर्विष्णुपार्षदौ ॥ ४६ ॥ युधिष्ठिर उवाच ॥ विद्वेषो दयिते पुत्रे कथमासीन्महात्मनि ॥ ब्रूहि मे भगवन्येन प्रह्लादस्याच्युतात्मता ॥ ४७ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे सप्तमस्कंधे प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥ ॥ नारद उवाच ॥ भ्रातर्येवं विनिहते हरिणा क्रोडमूर्तिना ॥ हिरण्यकशिपू राजन्पर्यतप्यद्रुषा शुचा ॥ १ ॥

तयोः पापमेव हतं न तु तावित्यर्थः ॥४५॥४६॥ येन कारणेन प्रह्लादस्याच्युतात्मताच्युतैकचित्तत्वं तदपि ब्रूहीति शेषः ॥४७॥ इति सप्तमे टीकायां प्रथमोऽध्यायः ॥१॥ ॥ द्वितीये विष्णुरोषेण लोकं विप्लाव्य दानवैः ॥ तद्धतभ्रातृपुत्रादीनितिहासैरसांत्वयत् ॥१॥ भगवद्द्वेष एव तद्द्वेषेऽपि कारणमित्याशयेनाह । भ्रातरीत्यादिना । एवं देवपक्षपातेन॥१॥

ब्रांच ब्रह्मशापापासून मुक्त झाले ॥ ४५ ॥ ह्याप्रमाणें ते विष्णुपार्षद वैरानुबंधामुळें घडलेल्या तीव्र ध्यानानें अच्युतरूपी होऊन पुनरपि पूर्ववत् श्रीहरीच्या पार्श्वभागीं निघून गेले ॥ ४६ ॥ युधिष्ठिर ह्मणाला– हे भगवन्, महात्म्या प्रियपुत्राचेठिकाणीं हिरण्यकशिपूला अत्यंत द्वेष करण्यास व त्या प्रऱ्हादाचें अच्युताचेठिकाणीं एकचित्तत्व होण्यास कारण काय झालें? हें तूं मला सांग ॥ ४७ ॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील सप्तमस्कंधापैकीं हिरण्यकशिपुजन्मकथननामक हा पहिला अध्याय समाप्त झाला ॥ १ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां या दुसऱ्या अध्यायामध्यें, हिरण्यकशिपूनें, विष्णूचेठिकाणीं असलेल्या रोषामुळें दानवांकडून लोकांचा नाश करवून विष्णूनें मारिलेल्या आपल्या भ्रात्याच्या पुत्रादिकांचें इतिहासांनीं सांत्वन केलें अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ त्यांत प्रथमतः भगवंताचा द्वेषच पुत्रद्वेषाला कारण झाला असें सांगण्याच्या अभिप्रायानें नारद ह्मणाला कीं,– हे राजा, ह्याप्रमाणें देवपक्षपातानें वराहरूप धारण करणाऱ्या श्रीहरीनें, भ्रात्याचा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

(हिरण्याक्षाचा) वध केला असतां रोषानें व शोकानें हिरण्यकशिपु अगदीं संतप्त झाला ॥ १ ॥ क्रोधामुळें ज्याच्या शरीराला कंप सुटला आहे, ज्यानें अधरोष्ठ
चावला आहे, जो कोपानें अत्यंत प्रज्वलित झालेल्या नेत्रांनीं 'कोपाग्निधूमानेंव' धूम्रवर्ण झालेलें आकाश अवलोकन करीत आहे आणि भयंकर दाढांनीं युक्त अस-
लेल्या उग्रदृष्टीमुळें ज्याचें भ्रुकुटियुक्त मुख अवलोकन करण्यासहि अशक्य झालें आहे असा तो हिरण्यकशिपु, सभेमध्यें दानवांना असें ह्मणाला कीं—॥२॥३॥ हे शकुनप्रभृति
दैत्यदानव हो, हे द्विमूर्धन्, हे त्र्यक्षा, हे शंबरा, हे शतबाहो, हे हयग्रीवा, हे नमुचे, हे पाका, हे इल्वला, हे विप्रचित्ते आणि हे पुलोम्या तुह्मीं सर्वजण माझें वचन
श्रवण करा व विलंब न करितां सत्वर त्याप्रमाणें आचरण करा ॥ ४ ॥ ५ ॥ अहो, समदृष्टि असूनहि भजननिमित्तानें सहायीभूत झालेल्या श्रीहरीकडून या आमच्या

कोपेन उत् अतिशयेन ज्वलद्भ्यां कोपाग्निधूमेनैव धूम्रमंबरं निरीक्षमाणः ॥ २ ॥ करालदंष्ट्राभिर्युक्तयोग्रया दृष्ट्या दुष्प्रेक्ष्यं भ्रुकुटीयुक्तं मुखं यस्य सः ॥ ३ ॥ ४ ॥ ५ ॥
समेनाप्युपधावनैर्भजनैर्निमित्तभूतैः पार्ष्णिग्राहेण सता ॥ ६ ॥ एवं त्यक्तः स्वभावः समत्वं येन तस्य घृणेः शुद्धतेजोमयस्यापि मायया वनौकसो वराहरूपस्य सतः ।

आह चेदं रुषा घूर्णः संदष्टदशनच्छदः ॥ कोपोज्ज्वलद्भ्यां चक्षुर्भ्यां निरीक्षन्धूम्रमंबरम् ॥ २ ॥ करालदंष्ट्रोग्रदृष्ट्या दुष्प्रेक्ष्यभ्रुकुटी-
मुखः ॥ शूलमुद्यम्य सदसि दानवानिदमब्रवीत् ॥ ३ ॥ भो भो दानवदैतेया द्विमूर्धंस्त्र्यक्ष शंबर ॥ शतबाहो हयग्रीव नमुचे पाक
इल्वल ॥ ४ ॥ विप्रचित्ते मम वचः पुलोमन् शकुनादयः ॥ शृणुतानंतरं सर्वे क्रियतामाशु मा चिरम् ॥ ५ ॥ सपत्नैर्घातितः क्षुद्रै-
र्भ्राता मे दयितः सुहृत् ॥ पार्ष्णिग्राहेण हरिणा समेनाप्युपधावनैः ॥ ६ ॥ तस्य त्यक्तस्वभावस्य घृणेर्मायावनौकसः ॥ भजंतं भ-
जमानस्य बालस्येवास्थिरात्मनः ॥ ७ ॥ मच्छूलभिन्नग्रीवस्य भूरिणा रुधिरेण वै ॥ रुधिरप्रियं तर्पयिष्ये भ्रातरं मे गतव्यथः
॥ ८ ॥ तस्मिन्कूटेऽहिते नष्टे कृत्तमूले वनस्पतौ ॥ विटपा इव शुष्यंति विष्णुप्राणा दिवौकसः ॥ ९ ॥ तावद्यात भुवं यूयं वि-
प्रक्षत्रसमेधिताम् ॥ सूदयध्वं तपोयज्ञस्वाध्यायव्रतदानिनः ॥ १० ॥

अस्थिरात्मनोऽव्यवस्थितचित्तस्य । कुतः यो यो भजति तं तं भजमानस्यानुसरतः ॥ ७ ॥ तस्य रुधिरेण यावत्तर्पयिष्यामि तावद्यूयं भुवं यातेति तृतीयेनान्वयः ॥ ८ ॥
ननु देवैस्तद्वधः कारितोऽतस्ते किं न हन्यंते तत्राह । तस्मिन्हरौ कूटे कपटे अहिते प्रतिपक्षे कूटमीहितं यस्येति वा नष्टेऽदृष्टे सति देवाः शुष्यंति स्वयमेव नाशं यास्यंति ।
कुतः । विष्णुरेव प्राणो येषां ते । यथा कृत्तमूले वृक्षे शाखाः स्वयं शुष्यंति तद्वत् ॥ ९ ॥ तपोयज्ञादियुक्तान्सूदयध्वं घातयत ॥ १० ॥

क्षुद्रशत्रूंनीं (देवांनीं) माझ्या अत्यंत प्रिय भ्रात्याचा वध करविला आहे ॥ ६ ॥ त्या, स्वतःशुद्ध तेजोमय असून जो जो आपली भक्ति करील त्याला त्याला अनुसरणाऱ्या,
मायेनें वराहरूप धारण करणाऱ्या, बालकाप्रमाणें अस्थिरचित्त आणि आपल्या 'समत्वरूप' स्वभावाचा त्याग करणाऱ्या श्रीहरीचा कंठ मी आपल्या शूलानें विदीर्ण करून
त्यांतील विपुल रक्तानें जेव्हां आपल्या रक्तप्रिय भ्रात्याचें तर्पण करीन तेव्हां माझ्या अंतःकरणांतील व्यथा नाहींशी होईल ॥ ७ ॥ ८ ॥ आतां, देवांनीं तुझ्या भ्रात्याचा वध
करविला ह्मणून देवांचाच कां वध करीत नाहींस असें ह्मणाल तर–हे दानव हो, ज्याप्रमाणें वृक्षाचें मूल तोडिलें असतां, शाखा आपोआप शुष्क होऊन जातात त्याप्र-
माणें तो कपटी प्रतिपक्षी नाहींसा झाला असतां, देव स्वतःच नाश पावतील. कारण, विष्णु हाच त्यांचा प्राण आहे ॥ ९ ॥ यास्तव, ह्माणींचे तुह्मीं ब्राह्मण व क्षत्रिय

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्यांनीं समृद्ध झालेल्या भूमीवर जा आणि जे जे ह्मणून तप, यज्ञ, वेदाध्ययन, व्रत आणि दान करीत असतील त्यांचा घात करा ॥ १० ॥ आतां, त्यांनीं आपला काय अपराध केला आहे? असें ह्मणाल तर– हे दैत्य हो, हा पुरुषोत्तम विष्णु यज्ञरूप असून धर्ममय असल्यामुळें द्विजांचें अनुष्ठान हेंच त्याचें मूळ आहे आणि देव, ऋषि, पितर, भूतें व धर्म ह्यांचा मुख्य आश्रयहि तोच आहे ह्याकरितां तपश्चर्यावगैरे करणारे ते सर्व द्विज, माझा अनादर करून त्याचा आश्रय करीत असल्यामुळें ते आपणास वध्य आहेत ॥ ११ ॥ तस्मात् ही माझी मसलत ऐका आणि जेथें जेथें द्विज, गाई, वेद, वर्णाश्रम व वर्णाश्रमविहित कर्मे असतील त्यात्या देशाप्रत जाऊन तुह्मीं आगी लावा आणि जीविका चालविणारे वृक्ष तोडून टाका ॥ १२॥ अशी आपल्या स्वामीनें केलेली आज्ञा आदरपूर्वक शिरसा मान्य करून ते हिंसाप्रिय दानव,

नन्तु तैः किमपराद्धं तत्राह । विष्णुरिति । द्विजानां क्रियाऽनुष्ठानं मूलं यस्य सः । यतोऽसौ यज्ञो धर्ममयश्च । देवादीनां परायणं परम आश्रयः । अतो यज्ञरूपस्य विष्णोर्मूलत्वान्मामनादृत्य तदाश्रयणाच्च ते वध्या इति भावः ॥ ११ ॥ तस्मात्परमं मंत्रं शृणुतेत्याह । यत्र यत्रेति । संदीपयत दहत वृश्चत । आजीव्यानां वृक्षाणां छेदं कुरुत ॥ १२ ॥ ॥ १३ ॥ पुरं हट्टादिमत् । ग्रामस्तद्रहितः । व्रजो गवां वासः । उद्यानं कृत्रिमं वनम् । क्षेत्रं व्रीह्यादेः । आरामोऽकृत्रिमं वनम् । आश्रमः ऋषीणां स्थानम् । आकरो रत्नादीनाम् । खेटः कृषीवलानां वासः । खर्वटो गिरिद्रोण्याश्रयो ग्रामः । घोष आभीराणां वासः । पत्तनं राजधानी ॥ १४ ॥ खनित्रैः खननसाधनैः । आजीव्यानुपजीव्यान् जंब्वाम्रकपित्थादीन् । शरणानि गृहान् ॥ १५ ॥ विप्रकृते उपद्रुते यज्ञभागानामभावाद्दिवं परित्यज्यालक्षिताः संतो भुवि चेरुः ॥ १६ ॥ तदेवं प्रजानां कदनं दानवेषु कुर्वत्सु स्वयं स्वर्गराज्यादि साधयितुं तपस्तप्तुकामः प्रथमं यत्कृतवांस्तदाह हिरण्यकशिपुरित्यादिना । कटोदकं प्रेताय प्रदेयमुदकम् । आदिशब्दात्प्रेतश्राद्धादिकम् ॥ १७ ॥

विष्णुर्द्विजक्रियामूलो यज्ञो धर्ममयः पुमान् ॥ देवर्षिपितृभूतानां धर्मस्य च परायणम् ॥ ११ ॥ यत्र यत्र द्विजा गावो वेदा वर्णा-
श्रमाः क्रियाः ॥ तं तं जनपदं यात संदीपयत वृश्चत ॥ १२ ॥ इति ते भर्तृनिर्देशमादाय शिरसाहृताः ॥ तथा प्रजानां कदनं वि-
दधुः कदनप्रियाः ॥ १३ ॥ पुरग्रामव्रजोद्यानक्षेत्रारामाश्रमाकरान् ॥ खेटखर्वटघोषांश्च ददहुः पत्तनानि च ॥ १४ ॥ केचित्खनि-
त्रैर्बिभिदुः सेतुप्राकारगोपुरान् ॥ आजीव्यांश्चिच्छिदुर्वृक्षान्केचित्परशुपाणयः ॥ प्रादहञ्छरणान्यन्ये प्रजानां ज्वलितोल्मुकैः ॥१५॥
एवं विप्रकृते लोके दैत्येंद्रानुचरैर्मुहुः ॥ दिवं देवाः परित्यज्य भुवि चेरुरलक्षिताः ॥ १६ ॥ हिरण्यकशिपुर्भ्रातुः संपरेतस्य दुःखि-
तः ॥ कृत्वा कटोदकादीनि भ्रातृपुत्रानसांत्वयत् ॥ १७ ॥

त्याप्रमाणें प्रजाजनांची हिंसा करूं लागले ॥ १३ ॥ हे राजा, शहरें, गांव, गोठे, बागा, शेतें, आरामस्थानें, ऋषींचे आश्रम, खाणी, शेतकऱ्यांचीं घरें, डोंगराच्या पायथ्याशीं असलेलीं खेडीं, गुराख्यांच्या झोपड्या आणि नगरें हीं त्या दानवांनीं जाळून टाकिलीं ॥ १४ ॥ कांहींजणांनीं खोरीं कुदळी घेऊन पूल, कोट आणि वेशी पाडिल्या, कांहींनीं हातांमध्यें कुऱ्हाडी घेऊन जीविकेला साधनभूत असलेले वृक्ष तोडिले आणि कांहींजणांनीं जळक्या लांकडांनीं लोकांचीं घरें जाळिलीं ॥ १५ ॥ ह्याप्रमाणें दैत्यराज हिरण्यकशिपूचे आज्ञाधारक ते दैत्य, वारंवार लोकांना उपद्रव देऊं लागले असतां 'यज्ञभागसंबंधी हविर्भाग नाहींसा झाल्यानें' देव स्वर्गाचा त्याग करून गुप्तरीतीनें भूमीवर संचार करूं लागले ॥ १६ ॥ असो. ह्याप्रमाणें दानव, प्रजाजनांची हिंसा करित असतां, स्वतः स्वर्गाचें राज्य प्राप्त करून घेण्याकरितां तप करण्याची इच्छा करणाऱ्या हिरण्यकशिपूनें प्रथमतः काय केलें तें सांगण्याच्या अभिप्रायानें नारद ह्मणतो कीं,– हे धर्मराजा, भ्रातृमरणामुळें दुःखित झाले- ॥ ५ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ल्या हिरण्यकशिपूनें आपल्या हिरण्याक्ष भ्रात्याला तिलांजलीवगैरे देऊन त्याच्या पुत्रांचें सांत्वन केलें ॥ १७ ॥ हे लोकनाथा धर्मराजा, देश व काल जाणणारा तो हिरण्यकशिपु, मधुरवाणीनें– शकुनि, शंबर, धृष्ट, भूतसंतापन, वृक, कालनाभ, महानाभ, हरिश्मश्रु आणि उत्कच ह्यांना आणि त्यांच्या रुषाभानुनामक मातेला व आपल्या दितीमातेला असें ह्मणाला कीं, ॥ १८ ॥ १९ ॥ हिरण्यकशिपु ह्मणाला– हे आई माते, हे वहिनी आणि हे पुत्रहो, वीर हिरण्याक्षाकरितां शोक करणें, तुह्मांला योग्य नाहीं. कारण, शत्रूच्या संमुख जो वध तो स्तुत्य असल्यामुळें शूरांना इष्टच आहे ॥ २० ॥ आतां त्याचा वध स्तुत्य असो. परंतु तो आमचा बंधु तर गेलाच कीं नाहीं, असें ह्मणशील तर– हे सुव्रते माते, पाणशाळेमध्यें ज्याप्रमाणें प्राण्यांचा सहवास क्षणिक असतो त्याचप्रमाणें ह्या मृत्युलोकीं माता व पुत्र इत्यादिकांचा सहवास क्षणिक असतो. कारण, दैवयोगानें प्राणी एकत्र संयुक्त होतात व पुनरपि आपापल्या कर्मामुळें वियुक्त होतात ॥ २१ ॥ ह्याप्रमाणें, लौकिकदृष्टीनें शोक निवारण करून तात्त्विक-

---

॥ १८ ॥ १९ ॥ हे वधूरिति भ्रातुर्भार्यां संबोधयति ॥ २० ॥ भवतु नाम तस्य श्लाघ्यो वधस्तथाऽप्यस्माकं तावद्बंधुर्गत एवेति चेत्तत्राह। भूतानामिति । दैवेन प्राचीनकर्मणा एकत्र नीतानां संयोजितानां पुनश्च स्वैः स्वैः कर्मभिरुन्नीतानां वियोजितानाम् ॥ २१ ॥ एवं लौकिकदृष्ट्या शोकं निवार्य तत्त्वदृष्ट्या वारयति । नित्य इति । आत्मा नित्यो मृत्युशून्यः अव्ययोऽपक्षयशून्यः शुद्धो निर्मलः सर्वगतः सर्ववित्सर्वज्ञश्च । सर्वत्र हेतुः परो देहादिव्यतिरिक्तः अतो मृत इति कृश इति मलिन इति वियुक्त इत्यज्ञ

शकुनिं शंबरं धृष्टं भूतसंतापनं वृकम् ॥ कालनाभं महानाभं हरिश्मश्रुमथोत्कचम् ॥ १८ ॥ तन्मातरं रुषाभानुं दितिं च जननीं गिरा ॥ श्लक्ष्णया देशकालज्ञ इदमाह जनेश्वर ॥ १९ ॥ हिरण्यकशिपुरुवाच ॥ अंबांब हे वधूः पुत्रा वीरं मार्हथ शोचितुम् ॥ रिपोरभिमुखे श्लाघ्यः शूराणां वध ईप्सितः ॥ २० ॥ भूतानामिह संवासः प्रपायामिव सुव्रते ॥ दैवेनैकत्र नीतानामुन्नीतानां स्वकर्मभिः ॥ २१ ॥ नित्य आत्माऽव्ययः शुद्धः सर्वगः सर्ववित्परः ॥ धत्तेऽसावात्मनो लिंगं मायया विसृजन्गुणान् ॥ २२ ॥ यथांऽभसा प्रचलता तरवोऽपि चला इव ॥ चक्षुषा भ्राम्यमाणेन दृश्यते चलतीव भूः ॥ २३ ॥

इति च मत्वा शोको न कार्य इत्यर्थः । कथं तर्हि तस्य संसारस्तत्राह । धत्त इति । आत्मनो मायया स्वाविद्यया लिंगं मूर्तीर्धत्ते गुणानुच्चावचान्देहान्सुखदुःखादीन्वा विशेषेण सृजन्स्वीकुर्वन् । लिंगशरीरोपाधिः संसार इत्यर्थः ॥ २२ ॥ एतत्सदृष्टांतं प्रपंचयति यथेति । चतुर्भिः । तरवः प्रतिबिंबिताः । उपाधिधर्मा उपहिते भवंतीति दृष्टांतमुक्त्वा ग्राहकधर्मा ग्राह्ये भवंतीति दृष्टांतमाह । चक्षुषेति ॥ २३ ॥

दृष्टीनें निवारण करण्याच्या अभिप्रायानें भाषण करितो कीं,–हे माते, मृत्युरहित, अपक्षयशून्य, निर्मल, सर्वगत आणि सर्वज्ञ असा आत्मा आहे. कारण, तो देहादिकांहून भिन्न आहे. ह्मणून त्याला मृत, कृश, मलिन, वियुक्त आणि अज्ञ असें समजून शोक करणें योग्य नाहीं. आतां, जर असें आहे तर त्याला संसार कसा प्राप्त होतो असा प्रश्न करिशील तर–हे माते, हा आत्मा आपल्या अविद्येमुळें मोहित होऊन सुखदुःखादिकांचा विशेषेंकरूनस्वीकार करीत असल्यामुळें शरीरें धारण करितो. सारांश, त्याला लिंगशरीररूप जो उपाधि प्राप्त झाला आहे तोच संसार होय ॥ २२ ॥ आतां ह्याचेंच दृष्टांतपूर्वक विवरण करितो कीं,–हे माते जसे उपाधीचे धर्म उपाधियुक्त वस्तूचेठिकाणीं भासमान होतात अथवा ग्राहक वस्तूचे धर्म जसे ग्राह्यवस्तूचेठिकाणीं भासमान होतात, ह्मणजे ज्याप्रमाणें उदक हालत असल्यामुळें त्यामध्यें प्रतिबिंबित झालेले वृक्षहि हालत आहेत असें दिसतें अथवा ज्याप्रमाणें नेत्रांला भ्रमण झाल्यामुळें पृथ्वी हालल्यासारिखी दिसत्ये, त्याप्रमाणें हे भद्रे गुणांच्या योगानें मनाचें भ्रमण झालें ह्मणजे आत्मा वस्तुतः

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

परिपूर्ण असून त्या मनाची साम्यता पावतो आणि वस्तुतः देहादिसंबंधरहित असतांहि तो देहधारी असल्यासारखा दिसतो ॥ २३ ॥ २४ ॥ ह्मणून वस्तुतः देहादिसंबंध नसतांहि त्याविषयीं देहाभिमान असणें, प्रियवस्तूशीं वियोग, अप्रिय वस्तूशीं संयोग, कर्म, अनेक योनींमध्यें प्रवेश, नंतर उत्पत्ति, विनाश, नानाप्रकारचा शोक, अविवेक, चिंता आणि विवेकाची विस्मृति इत्यादि हे सर्व धर्म, आत्मस्वरूपाहून अगदीं निराळे असल्यामुळें त्यांचा आत्मस्वरूपीं मुळींच प्रसंग नाहीं ॥ २५ ॥ २६ ॥ असो. शोकाचें कारण नसून तुह्मीं हा व्यर्थ शोक करीत आहां ह्या विषयींहि कोणा एका मृतपुरुषाचे स्त्रीपुत्रादिक आप्त आणि यम ह्यांचा हा संवादरूप पुरातन इतिहास लोक सांगत असतात तो तुह्मीं श्रवण करा ॥ २७ ॥ अहो, उशीनरदेशामध्यें 'सुयज्ञ' ह्मणून प्रसिद्ध असा एक राजा होता. त्याचा शत्रूंनीं युद्धामध्यें वध केला

अविकलः परिपूर्ण एव । तत्साम्यतां । मनःसमतामित्यर्थः ॥ २४ ॥ लिंगभावना देहाभिमानः एष आत्मनो विपर्यासोऽन्यथाभावः । तमेवाह। प्रियैर्वियोगोऽप्रियैर्योगश्च कर्म च संसृतिश्च नानागर्भेषु प्रवेशः ॥ २५ ॥ ततश्च संभव उत्पत्तिः । विवेकस्यास्मृतिरननुसंधानम् ॥ २६ ॥ अत्रापि शोकहेतुं विना वृथैवायं शोक इत्यस्मिन्नर्थे । प्रेतस्य मृतस्य

एवं गुणैर्भ्राम्यमाणे मनस्यविकलः पुमान् ॥ याति तत्साम्यतां भद्रे ह्यलिंगो लिंगवानिव ॥ २४ ॥ एष आत्मविपर्यासो ह्यलिंगे लिंगभावना ॥ एष प्रियाप्रियैर्योगो वियोगः कर्म संसृतिः ॥ २५ ॥ संभवश्च विनाशश्च शोकश्च विविधः स्मृतः ॥ अविवेकश्च चिंता च विवेकास्मृतिरेव च ॥ २६ ॥ अत्राप्युदाहरंतीममितिहासं पुरातनम् ॥ यमस्य प्रेतबंधूनां संवादं तं निबोधत ॥ २७ ॥ उशीनरेष्वभूद्राजा सुयज्ञ इति विश्रुतः ॥ सपत्नैर्निहतो युद्धे ज्ञातयस्तमुपासत ॥ २८ ॥ विशीर्णरत्नकवचं विभ्रष्टाभरणस्रजम् ॥ शरनिर्भिन्नहृदयं शयानमसृगाविलम् ॥ २९ ॥ प्रकीर्णकेशं ध्वस्ताक्षं रभसा दष्टदच्छदम् ॥ रजःकुंठमुखांभोजं छिन्नायुधभुजं मृधे ॥ ३० ॥ उशीनरेंद्रं विधिना तथा कृतं पतिं महिष्यः प्रसमीक्ष्य दुःखिताः ॥ हताः स्म नाथेति करैरुरो भृशं घ्नंत्यो मुहुस्तत्पदयोरुपापतन् ॥ ३१ ॥ रुदत्य उच्चैर्दयितांघ्रिपंकजं सिंचंत्य अस्रैः कुचकुंकुमारुणैः ॥ विस्रस्तकेशाभरणाः शुचं नृणां सृजंत्य आक्रंदनया विलेपिरे ॥ ३२ ॥

कस्यचित्चे बंधवस्तेषां च संवादं शृणुत ॥ २७ ॥ उपासत तत्समीपे आवृत्य स्थिताः ॥ २८ ॥ विशीर्णं रत्नमयं कवचं यस्य । विभ्रष्टान्याभरणानि स्रजश्च यस्य । शरेण निर्भिन्नं हृदयं यस्य । असृजा रक्तेनाविलं लिप्तम् ॥ २९ ॥ प्रकीर्णाः केशा यस्य । ध्वस्ते अक्षिणी यस्य । रभसा संरंभेण दष्टो दच्छद ओष्ठो येन । रजसा कुंठमावृतं मुखांभोजं यस्य । छिन्नमायुधं भुजश्च यस्य ॥ ३० ॥ तस्य पदयोरुप समीपे आसमंतादपतन् ॥ ३१ ॥ ३२ ॥

असतां, त्याचे सर्व नातलक त्याच्या सभोंवतीं शोक करीत बसले होते ॥ २८ ॥ हे माते, त्याच्या रत्नमय कवचाचे तुकडे तुकडे होऊन गेले होते, शरीरावरील भूषणें व माळा गळून गेल्या होत्या, बाणांनीं हृदय विदीर्ण झालें होतें व सर्वांग रक्तानें भरून तो भूमीवर पडला होता, त्याचे केंस अस्ताव्यस्त झाले होते, डोळे फुटले होते, आवेशामुळें त्यानें आपला ओठ चावला होता, त्याचें मुखकमळ धुळीनें भरलें होतें आणि त्याचें आयुध व भुजा हीं युद्धामध्यें छिन्न भिन्न झालीं होतीं ॥ २९ ॥ ३० ॥ याप्रमाणें प्रारब्धकर्मामुळें तशा स्थितीमध्यें असलेला जो आपला भर्ता उशीनर देशांचा राजा त्याला अवलोकन करून राण्या दुःखित झाल्या आणि हे नाथा, 'आमचा सर्वस्वीं घात झाला' असें ह्मणून वारंवार हातांनीं ऊर बडवून घेत होत्सात्या त्याच्या पायांजवळ शोक करीत पडल्या ॥ ३१ ॥ नंतर उच्चस्वरानें रोदन करतां करतां

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

स्तनांवरील केशरानें आरक्तवर्ण झालेल्या अश्रूंनीं त्या आपल्या प्रिय भर्त्याचें चरणकमल सिंचन करित होत्सात्या, केंस मोकळे टाकून व अलंकारांचा त्याग करून लो-
कांना शोक उत्पन्न करीत करीत आक्रोशपूर्वक विलाप करूं लागल्या कीं– ॥ ३२ ॥ हे प्राणप्रिया प्रभो, ज्या विधात्यानें, आमच्या दृष्टींनाहि अगोचर होण्याची दशा
तुला आणिली आहे तो खरोखर निर्दय आहे. कारण, तूं पूर्वीं उशीनरदेशांतील लोकांची उपजीविका चालविणारा राजा असतां सांप्रतकाळीं त्या विधात्यानें तुला त्यां-
च्या शोकांची वृद्धि करणारा केला आहे ॥ ३३ ॥ हे भूपते, कृतज्ञ आणि सर्वोत्कृष्ट सुहृद् अशा तुजवांचून आह्मीं कसें बरें राहवें ? तस्मात् हे वीरा, ज्याठिकाणीं तूं जा-
वयास निघाला आहेस त्याठिकाणीं तुझ्या चरणकमलांची सेवा करणाऱ्या आह्मांलाहि आपल्या मागोमाग येण्यास आज्ञा दे ॥ ३४ ॥ ह्याप्रमाणें आपल्या मृत पतीला

विलापमेवाह अहो इति द्वाभ्याम् । अकरुणत्वमेवाहुः । येन विधात्रा दृशामगोचरां दशां भवान्प्रणीतो गमितस्तेन विधात्रा त्वमधुना शुचां विवर्धनः कृतोऽसीत्यन्वयः ॥ ३३ ॥
हे महीपते त्वया सुहृत्तमेन विना वयं कथं स्याम भवेम जीवेमेत्यर्थः । अतो हे वीर यत्र त्वं यास्यसि तत्र तेऽनुयानमनुगमनं तव पादयोः शुश्रूषां कुर्वतीनामस्माकं दिश
देहि ॥ ३४ ॥ निर्हारं दाहार्थं नयनमनिच्छंतीनाम् । अस्तमस्ताचलं प्रति ॥ ३५ ॥ परिदेवितं रोदनं स्वपुर्यामेव स्थित आश्रुत्य श्रुत्वा तत्र स्वयमेवोपागतो यमो बालको

अहो विधात्राऽकरुणेन नः प्रभो भवान्प्रणीतो दृगगोचरां दशाम् ॥ उशीनराणामसि वृत्तिदः पुरा कृतोऽधुना येन शुचां विवर्धनः
॥ ३३ ॥ त्वया कृतज्ञेन वयं महीपते कथं विना स्याम सुहृत्तमेन ते ॥ तत्रानुयानं तव वीर पादयोः शुश्रूषतीनां दिश यत्र या-
स्यसि ॥ ३४ ॥ एवं विलपतीनां वै परिगृह्य मृतं पतिम् ॥ अनिच्छतीनां निर्हारमर्कोऽस्तं संन्यवर्तत ॥ ३५ ॥ तत्र ह प्रेतबंधू-
नामाश्रुत्य परिदेवितम् ॥ आहतान्बालको भूत्वा यमः स्वयमुपागतः ॥ ३६ ॥ यम उवाच ॥ अहो अमीषां वयसाधिकानां वि-
पश्यतां लोकविधिं विमोहः ॥ यत्रागतस्तत्र गतं मनुष्यं स्वयं सधर्मा अपि शोचंत्यपार्थम् ॥ ३७ ॥ अहो वयं धन्यतमा यदत्र
त्यक्ताः पितृभ्यां न विचिंतयामः ॥ अभक्ष्यमाणा अबला वृकादिभिः सरक्षिता रक्षति यो हि गर्भे ॥ ३८ ॥

भूत्वा तानाह । अहो इत्यादिना ॥ ३६ ॥ अहो आश्चर्यम् । अस्मत्तो वयसाऽधिकानामपि लोकस्य विधिं जन्ममरणादिप्रकारं विपश्यतामपि विमोहः । मोहमेवाह । यत्र यस्मा-
दव्यक्तादागतस्तत्रैव गतमपार्थं शोचंति । तदुक्तं गीतासु । अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत ॥ अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवनेति । किंच स्वयमपि सधर्माः मृतेन
सह समानो मृत्युलक्षणो धर्मो येषां तथाभूता अपि ॥ ३७ ॥ अबला दुर्बला वृकादिभिरभक्ष्यमाणा वयं न विचिंतयामः । तत्र हेतुः । यो गर्भे रक्षति स एव सर्वत्र रक्षिता ॥३८॥

आलिंगन देऊन दाह करण्यास त्याला नेण्याची इच्छा न करितां त्या स्त्रिया ह्याप्रकारचे विलाप करीत बसल्या असतां, रवि अस्ताचलास गेला ॥ ३५ ॥ इकडे यमानें
आपल्या पुरीमध्यें असतांनाच त्या मृतपुरुषाच्या बंधूंचें रोदन श्रवण केलें आणि बालकाचें रूप धारण करून आपण स्वतः तेथें आला व त्यांना ह्मणाला ॥ ३६ ॥
यम ह्मणाला– अहो काय आश्चर्य हें ! अरे आमच्यापेक्षां वयानें अधिक असून लोकांचा जन्ममरणादि प्रकार अवलोकन करीत असतांहि ह्यांना अतिशय मोह प्राप्त झा-
ला आहे. तो असा कीं– आपणहि मरणधर्मानें युक्त असून ज्या अव्यक्त रूपापासून हा प्राणी जन्मास आला तेथेंच गेला असतां हे व्यर्थ शोक करीत आहेत ॥ ३७ ॥
अहो, ह्या संसारामध्यें ज्यांना मातापितर सोडून गेले आहेत असे आह्मी, दुर्बळ असूनहि लांडग्यांनींवगैरे भक्षण न केले असून, ज्यानें गर्भामध्यें रक्षण केलें तोच सर्वत्र

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आमचें रक्षण करील असें समजून आपल्या रक्षणाचीहि आह्मी चिंता करीत नाहीं. तस्मात्, सर्वांपेक्षां आह्मी धन्य आहों ॥ ३८ ॥ आतां, ईश्वर आमचें रक्षण करितो ह्यामध्यें त्याचें कांहीं एक प्रयोजन नसूनहि त्याची केवल क्रीडाच आहे असें सांगतो कीं,–हे अबलांनों, जो ईश्वर स्वतः नाशरहित असून स्वेच्छेनें हें विश्व उत्पन्न करितो, याचें रक्षण करितो व याचा संहारहि करितो त्या ईश्वराचें हें चराचर विश्व क्रीडासाधन आहे असें ह्मणतात. ह्मणूनच तो त्याचें पालन व संहार करण्यास समर्थ आहे ॥ ३९ ॥ आतां, पालन आणि संहार करण्याविषयीं ईश्वराचें सामर्थ्य दर्शवितो कीं,–मार्गामध्येंहि पडलेली वस्तु ईश्वरानें रक्षित असतां तशीच राहत्ये तिला कोणी नेत नाहीं व ईश्वरानें ज्या वस्तूची उपेक्षा केली ती गृहामध्यें असली तरी नाहींशी होत्ये त्याप्रमाणेंच एकादा पुरुष अनाथ असूनहि ईश्वरानें त्याच्यावर कृपादृष्टि

ननु तस्य रक्षणे किं प्रयोजनं न किंचिदपि किंतु क्रीडैव केवलमित्याह । य इति । य ईश इदं विश्वं सृजति रक्षत्यवलुंपते संहरति च भो अबलास्तस्येशितुश्चराचरं क्रीडासाधनमाहुः अतः स एव निग्रहे संहारे संग्रहे पालने च प्रभुः ॥३९॥ प्रभुत्वमेवान्वयव्यतिरेकाभ्यां दर्शयति । पथीति । दिष्टेन दैवेनेश्वरेण रक्षितम् । तेनेश्वरेण विहतमुपेक्षितम् । अस्य हतस्तेनोपेक्षितः ॥४०॥ तदेवमात्मनो जन्ममरणादिकमंगीकृत्येश्वराधीनत्वान्न शोकः कार्य इत्युक्तमिदानीं तु देहानामेव जन्मादि न त्वात्मन इत्याह । भूतानीति त्रिभिः । भूतानि देहा निजयोनिः स्वकारणभूतं लिंगशरीरं तन्निमित्तैः कर्मभिर्भवंति जायंते न भवंति नश्यंति च सर्वशो देवादिदेहा अपि तत्र ह तदा प्रकृतौ देहे स्थितोऽप्यात्मा तस्याः प्रकृतेर्गुणैर्देहधर्मैर्जन्मादि-

य इच्छयेशः सृजतीदमव्ययो य एव रक्षत्यवलुंपते च यः ॥ तस्याबलाः क्रीडनमाहुरीशितुश्चराचरं निग्रहसंग्रहे प्रभुः ॥ ३९ ॥
पथि च्युतं तिष्ठति दिष्टरक्षितं गृहे स्थितं तद्विहतं विनश्यति ॥ जीवत्यनाथोऽपि तदीक्षितो वने गृहेऽपि गुप्तोऽस्य हतो न जीवति
॥ ४० ॥ भूतानि तैस्तैर्निजयोनिकर्मभिर्भवंति काले न भवंति सर्वशः ॥ न तत्र हात्मा प्रकृतावपि स्थितस्तस्या गुणैरन्यतमो
निबध्यते ॥ ४१ ॥ इदं शरीरं पुरुषस्य मोहजं यथा पृथग्भौतिकमीयते गृहम् ॥ यथौदकैः पार्थिवतैजसैर्जनः कालेन जातो विकृतो विनश्यति ॥ ४२ ॥

भिर्न निबध्यते न युज्यते यतोऽन्यतमो देहादत्यंतविलक्षणः ॥ ४१ ॥ नन्वहं कृशः स्थूल इत्यादौ वैलक्षण्यं न प्रतीयते तत्राह । इदमिति । इदं शरीरं मोहजमविवेकादात्मत्वेन जातं वस्तुतस्तु पृथगेव यत ईयते दृश्यते भौतिकं च यथा गृहमित्यन्वयः । अत्रैवं प्रयोगः द्रष्टुरभौतिकाच्च पुरुषाच्छरीरं भिन्नम् । दृश्यत्वाद्भौतिकत्वाच्च यथाऽत्यंताविवेकिन आत्मत्वेनाभिमतमपि गृहं ततः पृथक् तद्वदिति । भौतिकत्वानुमानं विवृण्वन्नात्मनो जन्माद्यभावमुपसंहरति । यथा औदकैः परमाणुभिर्जातो बुद्बुदादिर्यथा च पार्थिवैर्जातो घटादिर्यथा च तैजसैर्जातः कुंडलादिर्विनश्यति तथा तैरेव त्रिविधैः परमाणुभिर्जातो जनो देह एव विकृतः परिणतः सन्विनश्यति न त्वात्मेत्यर्थः ॥ ४२ ॥

ठेविली असतां, तो वनामध्येंहि जीवंत राहतोच आणि ईश्वरानें ज्याची उपेक्षा केली तो पुरुष, गृहामध्यें रक्षित असूनहि जगत नाहीं ॥ ४० ॥ असो. येथपर्यंत आत्म्याला जन्ममरणादिकांचा अंगीकार करून तीं ईश्वराधीन असल्यामुळें शोक करणें योग्य नाहीं असें सांगितलें. आतां देहांनाच जन्मवगैरे असून आत्म्याला मुळींच नाहींत असें सांगतो– हे अबलांनो, सर्व देह स्वकारणभूत लिंगशरीरापासून झालेल्या नानाप्रकारच्या कर्मांमुळें त्यात्या काळीं उत्पन्न होतात व नाशहि पावतात परंतु आत्मा हा त्या वेळीं देहामध्यें असूनहि त्याहून अत्यंत विलक्षण असल्यामुळें त्याच्या जन्मादि धर्मांनीं बद्ध होत नाहीं ॥ ४१ ॥ आतां, मी कृश आहें व स्थूळ आहें इत्यादि वाक्यांवरून आत्मा देहाहून विलक्षण आहे असें अनुभवास येत नाहीं, असें ह्मणाल तर–हे स्त्रियांनो, ज्याप्रमाणें अत्यंत अविवेकी पुरुषानें आपलें ह्मणून मानिलेलेंहि घर

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याच्याहून निराळें असतें त्याचप्रमाणें अविवेकानें आपलें ह्मणून भासत असलेलें हें पुरुषाचें शरीर, भौतिक (पंचमहाभूतात्मक) असून दृष्टिगोचर होत असल्यामुळें अभौतिक आणि द्रष्टा अशा पुरुषापासून वस्तुतः पृथकच आहे. आणि जसे उदकापासून झालेले बुडबुडे, पृथ्वीपासून झालेले घट व तेजापासून झालेले कुंडलादिक अलंकार हे नाश पावतात त्याप्रमाणें त्या तिन्ही भूतांच्या परमाणूंनीं उत्पन्न झालेला देहच काळामुळें विकारयुक्त होऊन नाश पावतो, आत्मा नाश पावत नाहीं ॥ ४२ ॥ आतां, दोन वस्तु एकेठिकाणीं असूनहि त्या परस्पर भिन्न असतात हें दृष्टांतपूर्वक सांगतो– जसा अग्नि, काष्ठांमध्यें असतांहि प्रकाशकरूपानें व दाहकरूपानें निराळाच अनुभवास येतो आणि जसा देहगतहि वायु मुख व नासिका इत्यादि स्थानांमध्यें निराळाच प्रतीतीला येतो, तसा आत्मा देहामध्यें असूनहि त्याहून भिन्न आहे. कारण, आत्मा देहामध्यें असतांनाहि त्याचेठिकाणीं देहधर्म मुळींच नसतात; ह्यास दृष्टांत– जसें आकाश सर्वत्रठिकाणीं असूनहि कोठें लिप्त होत नाहीं त्याप्रमाणें आत्मा देहेंद्रियादि

पृथगवस्थानाभावेऽपि भिन्नत्वे दृष्टांतद्वयमाह। यथेति। यथाऽनलो दारुष्वेव स्थितोऽपि दाहकत्वेन प्रकाशकत्वेन भिन्न एव प्रतीयते यथा च देहगतोऽप्यनिलो मुखनासिकादिषु पृथक्स्थित एव प्रतीयते। देहस्थत्वेऽप्यात्मनस्तद्धर्मयोगाभावे दृष्टांतमाह। यथा नभो न सज्जते क्वापि संगं न प्राप्नोति तथा पुमानपि सर्वेषां गुणानां देहेंद्रियादीनामाश्रयस्तेष्वाश्रितो वा परः पृथगेवेत्यर्थः ॥ ४३ ॥ किंच हे मूढा यमनुशोचथ सोऽयं युष्मद्भर्ता सुयज्ञः शेते किमिति शोचथ। नन्वेतावंतं कालमसौ शृणोत्यनंतरं प्रति-

यथाऽनलो दारुषु भिन्न ईयते यथाऽनिलो देहगतः पृथक्स्थितः॥ यथा नभः सर्वगतं न सज्जते तथा पुमान् सर्वगुणाश्रयः परः ॥ ४३ ॥ सुयज्ञो नन्वयं शेते मूढा यमनुशोचथ ॥ यः श्रोता योऽनुवक्तेह स न दृश्येत कर्हिचित् ॥ ४४ ॥ न श्रोता नानुवक्ताऽयं मुख्योऽप्यत्र महानसुः ॥ यस्त्विहेंद्रियवानात्मा स चान्यः प्राणदेहयोः ॥ ४५ ॥

वक्ति च। इदानीं तस्यादर्शनान्मृत इति शोचामेति चेत्स तु शोच्यो न भवति प्रागपि तस्यादर्शनादित्याह। यः श्रोतेति ॥ ४४ ॥ ननु मुखनासिकासंचारी प्राणः श्रोता वक्ता च दृष्ट एवेति चेन्नासौ श्रोता वक्ता वाऽचेतनत्वादित्याह। न श्रोतेति। महान्सर्वेंद्रियचेष्टाहेतुः। अतएव मुख्य प्राणो वै मुख्य इति श्रुतेः । कस्तर्हि श्रोता वक्ता

सर्वगुणांच्या आश्रयानें असतांहि त्यांहून निराळाच आहे ॥ ४३ ॥ आणि त्यांतूनहि, हे मूढहो, ज्याकरितां तुह्मीं शोक करित अहां, तो हा तुमचा भर्ता सुयज्ञ तर येथें शयन करीत आहेच; तस्मात्, तुह्मीं कशाकरितां व्यर्थ शोक करित आहां? बरें, ह्या वेळेपर्यंत हा बोललेलें ऐकत असून नंतर उत्तरहि देत असे आणि आतां त्यांतील कांहींच दृष्टीस पडत नाहीं, ह्यावरून हा मरण पावला असें समजून आह्मीं शोक करितों असें ह्मणाल तर– पूर्वींहि तो तुह्मांला दृष्टिगोचर होत नव्हता, ह्यास्तव त्याच्याकरितां शोक करणें योग्य नाहीं. असें सांगतो– ह्याठिकाणीं जो श्रवण करीत होता व प्रत्युत्तर देत होता तो सुयज्ञ कधींहि दृष्टिगोचर होणार नाहीं ॥ ४४ ॥ आतां, मुख व नासिका ह्या द्वारांनीं संचार करणारा प्राण श्रोता व वक्ता प्रत्यक्ष दिसतच आहे असें ह्मणावें तर– प्राण हा श्रोता व वक्ता नाहीं; कारण, तो अचेतन आहे असें सांगतो– सर्व इंद्रियांच्या चेष्टांना कारण असल्यामुळें मोठा व मुख्य असा जरी हा प्राण आहे तथापि ह्या देहांतील श्रोता व वक्ता हा नव्हे. बरें तर मग श्रोता आणि वक्ता कोण? असें ह्मणाल तर– हे स्त्रियांनों, इंद्रियांच्या योगानें त्यांचे विषय जाणणारा जो आत्मा तो तर, प्राण व देह ह्या दोन्ही अचेतन वस्तूंहून

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वेगळा सचेतन आहे ॥ ४५ ॥ बरें, जर आत्मा सचेतन असून प्राण व देह ह्याच्यांहून भिन्न आहे तर 'मी कृश आहें, स्थूल आहें, काणा आहें अथवा बहिरा आहें' इत्यादि देहधर्मांचा अनुभव त्याला कसा येतो' असें ह्मणाल तर– हे स्त्रियांनो, तो सर्वव्यापी आत्मा भूतें, इंद्रियें व मन ह्यांच्या योगानें लक्षित होणाऱ्या बऱ्या वाईट देहांचा स्वीकार करितो ह्मणजे त्या देहांना, मीच आहें असें मानितो. परंतु तो त्यांच्याहून निराळा आहे. तर मग त्या देहांपासून त्याचा मोक्ष कसा होतो ? असें ह्मणाल तर– हे अबलांनो, आपल्या विवेकबलाच्या योगानें त्या स्वीकाराचाहि तो त्याग करितो हें अगदीं अनुभवसिद्ध आहे ॥ ४६ ॥ आतां विवेक झाल्यानंतरहि आहारादि कर्मांचेठिकाणीं प्रवृत्ति होत असल्यामुळें बंध होणारच असें ह्मणावें तर जोंपर्यंत आत्म्याला लिंगशरीराचा अभिमान असतो तोंपर्यंतच त्याचें तें कर्म बंधाला

च तत्राह । यस्त्विह देहेंद्रियैस्तत्तदर्थद्रष्टा आत्मा स तु प्राणदेहाभ्यामचेतनाभ्यामन्य एव सचेतनः ॥ ४५ ॥ ननु चेतनत्वेऽन्यत्वे च तस्याहं कृशः स्थूलः काणो बधिर इत्यादिदेहधर्मोपलब्धिः कुतस्तत्राह । भूतेंद्रियमनोभिर्लिंग्यंते लक्ष्यंत इति तथा तान्देहांस्तेभ्योऽन्य एव भजत्यहमिति मन्यते । तर्हि कथं मोक्षस्तत्राह । तच्च भजनं स्वेन तेजसा विवेकबलेनोत्सृजत्यपि । हीत्यनुभवं प्रमाणयति ॥ ४६ ॥ ननु विवेकानंतरमप्याहारादिकर्मसु प्रवृत्तेर्बंधः स्यादेवेत्यत आह । यावदिति । यावल्लिंगशरीरेणान्वितस्तदभिमानवानात्मा भवति तावदेव तस्य तत्कर्मनिबंधनं बंधहेतुर्भवति ततो विपर्ययो देहधर्मभाक्त्वं ततः क्लेशश्चानुवर्तते न तु लिंगाभिमाने निवृत्तेऽपि यतोऽयं माया-

भूतेंद्रियमनोलिंगान् देहानुच्चावचान्विभुः ॥ भजत्युत्सृजति ह्यन्यस्तच्चापि स्वेन तेजसा ॥ ४६ ॥ यावल्लिंगान्वितो ह्यात्मा तावत्कर्मनिबंधनम् ॥ ततो विपर्ययः क्लेशो मायायोगोऽनुवर्तते ॥ ४७ ॥ वितथाऽभिनिवेशोऽयं यद्गुणेष्वर्थदृग्वचः ॥ यथा मनोरथः स्वप्नः सर्वमैंद्रियकं मृषा ॥ ४८ ॥ अथ नित्यमनित्यं वा नेह शोचंति तद्विदः ॥ नान्यथा शक्यते कर्तुं स्वभावः शोचतामिति ॥ ४९ ॥

योगो विपर्ययादिः । मायया युज्यत इति तथा । न परमार्थ इत्यर्थः ॥ ४७ ॥ ननु सुखदुःखादीनां तत्साधनानां च सत्यत्वप्रतीतेः कुतो मायामयत्वम् । तथा च बहवो वादिनः सत्यत्वमेव वदंति तत्राह । वितथेति । वितथो मिथ्याभूतोऽयमभिनिवेशः कोऽसौ गुणेषु तत्कार्येषु सुखदुःखादिष्वर्थः । परमार्थ इति दृग्वचश्चेति यत् स कुत इत्यत आह यथेति ॥४८॥ उपसंहरति । अथेति । अथ तस्मात् नित्यमात्मानमनित्यं देहं वा तद्विदो नित्यमनित्यं च जानंतो न शोचंति । नन्वेवमुपदेष्टारोऽपि शोचंतो दृश्यंते तत्राह । नान्य-

---

कारण होतें व त्यापासून देहधर्मांचें भोक्तृत्व प्राप्त होऊन क्लेश होतात; लिंगशरीराविषयींचा अभिमान निवृत्त झाल्यानंतर असा प्रकार घडत नाहीं. कारण, हा देहधर्मभोक्तृत्वरूप विपर्यय मायेनें होत असतो तो वस्तुतः खरा नाहीं ॥ ४७ ॥ आतां सुखदुःखादिक आणि त्यांचीं साधनें हीं सर्व सत्यरूपानें जर अनुभवास येत आहेत तर तीं मायामय कशीं ? आणि त्यांतूनहि पुष्कळ वादी लोक तीं सत्यच आहेत असें ह्मणतात, अशी शंका घ्याल तर– हे स्त्रियांनो, सुखदुःखादि गुणकार्यें खरीं आहेत असें मानणें व ह्मणणें हा अगदीं व्यर्थ अभिमान होय. कारण, जाग्रदवस्थेमध्यें मनोरथानें प्राप्त होणारें राज्यादि सुख अथवा स्वप्नावस्थेमध्यें प्राप्त होणारें स्त्रीसंभोगादि सुख जसें वस्तुतः खरें नाहीं तसेंच सर्व इंद्रियजन्य सुखहि वस्तुतः खरें नाहीं ॥ ४८ ॥ तस्मात् आत्मा नित्य असून देह अनित्य आहे असें जाणणारे लोक आत्म्याविषयीं अथवा देहाविषयीं ह्या संसारामध्यें शोक करीत नाहींत. आतां ह्याप्रमाणें उपदेश करणारेसुद्धां शोक करीत असतांना दृष्टीस पडतात, असें ह्मणाल तर–

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हे अबलांनो, त्या शोक करणाऱ्यांचा स्वभाव निवृत्त करणें अशक्य आहे ह्मणजे ज्ञान दृढ झाल्यावांचून त्यांचा स्वभाव निवृत्त होव नाहीं ॥ ४९ ॥ असो. स्वतः मरणधर्मानें युक्त असूनहि इतरांकरितां शोक करीत आहेत असें जें सांगितलें त्याविषयीं एक ऐतिहासिक गोष्ट सांगतो– हे स्त्रियांनो, पक्ष्यांना मारणारा असा कोणीएक व्याध, अरण्यामध्यें ईश्वरानें निर्माण केला होता. तो जेथें जेथें ते पक्षी असत तेथें तेथें (धान्यकणादिकांनीं) त्यांना लोभ उत्पन्न करीत असे आणि जाळें पसरून त्यांना धरीत असे ॥ ५० ॥ एकदां एक कुलिंग या नांवाच्या पक्ष्यांचें जोडपें त्याठिकाणीं संचार करित असतांना त्या व्याधाच्या दृष्टीस पडलें. तेव्हां त्या उभयतांपैकीं कुलिंगीला त्यानें धान्यवगैरे पसरलेलें दाखवून एकाएकीं मोहित केलें ॥ ५१ ॥ नंतर कालानें प्रेरित झालेली ती कुलिंगपक्ष्याची भार्या जाळ्याच्या दोऱ्यांमध्यें अडकली असतां ती तशाप्रकारच्या संकटांत सांपडून अगदीं दीन झाली आहे असें कुलिंगपक्ष्यानें अवलोकन करून, तो अत्यंत दुःखित झाला आणि तिला सोडविण्याविषयीं

थेति । ज्ञानदार्ढ्याभावात्स्वभावो न निवर्तत इत्यर्थः ॥ ४९ ॥ स्वयं सधर्मा अपीति यदुक्तं तत्रेतिहासमाह । लुब्धक इत्यादिना । पक्षिणामंतक ईश्वरेण निर्मितः सन्यत्र यत्र ते तत्र तत्र तान्कणादिभिः प्रलोभयन् जालं विस्तार्य विशेषेण धृतवान् । पाठांतरे तेषामामिषादिभिः प्रलोभनं कृतवानित्यर्थः ॥ ५० ॥ कुलिंगः कंदभक्षी पक्षिविशेषः । कुलिंगयोर्मि-

लुब्धको विपिने कश्चित्पक्षिणां निर्मितोऽतकः ॥ वितत्य जालं विदधे तत्र तत्र प्रलोभयन् ॥ ५० ॥ कुलिंगमिथुनं तत्र विचरत्स-
मदृश्यत ॥ तयोः कुलिंगी सहसा लुब्धकेन प्रलोभिता ॥ ५१ ॥ साऽसज्जत शिचस्तंत्यां महिषी कालयंत्रिता ॥ कुलिंगस्तां तथा-
पन्नां निरीक्ष्य भृशदुःखितः ॥ स्नेहादकल्पः कृपणः कृपणां पर्यदेवयत् ॥५२॥ अहो अकरुणो देवः स्त्रियाऽऽकरुणया विभुः ॥ कृपणं
माऽनुशोचंत्या दीनया किं करिष्यति ॥ ५३ ॥ कामं नयतु मा देवः किमर्धेनात्मनो हि मे ॥ दीनेन जीवता दुःखमनेन विधुरा-
युषा ॥ ५४ ॥ कथं त्वजातपक्षांस्तान्मातृहीनान्बिभर्म्यहम् ॥ मंदभाग्याः प्रतीक्ष्यंते नीडे मे मातरं प्रजाः ॥ ५५ ॥ एवं कुलिंगं
विलपंतमारात्प्रियावियोगातुरमश्रुकंठम् ॥ स एव तं शाकुनिकः शरेण विव्याध कालप्रहितो विलीनः ॥ ५६ ॥

थुनम् ॥ ५१ ॥ शिचस्तंत्यां जालस्य सूत्रेऽसज्जत बंधं प्राप तामापन्नामापदं प्राप्तां दृष्ट्वा कुलिंगः पक्षी तां मोचयितुमकल्पः सन्पर्यदेवयद्वृक्षशाखामाश्रित्य विलापं चकार ॥ ५२ ॥ आकरुणया सर्वतोऽनुकंप्यया स्त्रिया किं करिष्यति ॥ ५३ ॥ आत्मनो देहस्यार्धेन । अनेन विधुरायुषा भार्याशून्यजीवितेन दुःखं यथा भवत्येवं जीवता किं मे प्रयोजनम् । अतो मामपि कामं नयत्वित्यन्वयः ॥ ५४ ॥ न जाताः पक्षा येषां तान्बालकान्कथं बिभर्मि पुष्यामि । मंदभाग्या मे प्रजा मातरं प्रतीक्षंते ॥ ५५ ॥ शाकुनिकः पक्षिहंता

असमर्थ असल्यानें अगदीं दीन होऊन प्रेमामुळें एका वृक्षाच्या शाखेवर बसून, विलाप करूं लागला कीं– ॥ ५२ ॥ अहो ! हा निर्दय ब्रह्मदेव, सर्वप्रकारें दयेस पात्र व मज दीनाकरितां शोक करणाऱ्या ह्या माझ्या दीन स्त्रीला नेऊन काय बरें करणार आहे ! ॥ ५३ ॥ अरेरे ! भार्येवांचून वांचत असल्यामुळें दीन होऊन दुःखानें जीवंत राहणाऱ्या ह्या माझ्या अर्ध्यादेहाचें आतां मला काय बरें प्रयोजन आहे ? ह्यास्तव आतां तो ब्रह्मदेव मलाहि खुशाल नेवो ॥ ५४ ॥ हे परमेश्वरा ! जे माझे दुर्दैवी पुत्र (खाण्याकरितां) घरट्यामध्यें मातेची वाट पाहत आहेत त्या पंखसुद्धां न फुटलेल्या मातृहीन बालकांचें मी आतां पोषण कसें बरें करूं ? ॥ ५५ ॥ ह्याप्रमाणें प्रियेच्या वियोगानें व्याकुल झाल्यामुळें अश्रूंनीं कंठ दाटून येऊन विलाप करीत बसणाऱ्या त्या कुलिंगपक्ष्याला, काळानें प्रेरणा केलेल्या त्याच पक्षिघातक्यानें, दडून बसून दुरू-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नच बाण मारिला ॥ ५६ ॥ असो. हे मूढस्त्रियांनो, त्या पक्ष्याप्रमाणेंच आपला मृत्यु न जाणून शेकडों वर्षे जरी तुह्मी शोक करीत बसलां तथापि हा पति तुह्मांला प्राप्त होणार नाहीं ॥ ५७ ॥ हिरण्यकशिपु ह्मणाला– हे माते, ह्याप्रमाणें बालक भाषण करीत असतां त्या सुयज्ञराजाचे सर्व नातलग, मनामध्यें विस्मित झाले आणि हें सर्व जगत् अनित्य असून मिथ्यारूपानेंच प्रकट झालें आहे असें मानूं लागले ॥ ५८ ॥ असो. यमधर्म, हें आख्यान सांगून त्याचठिकाणीं गुप्त झाला. व त्या नातेवाइकांनींहि सुयज्ञाचें परलोकप्राप्तीविषयीं करावयाचें जें (दाहादिक) कर्म तें सर्व केलें ॥ ५९ ॥ तस्मात् आपल्याकरितां व दुसऱ्याकरितां तुह्मीं मुळींच शोक करूं नका. कारण, स्वपराभिमानरूप अज्ञानावांचून प्राणिमात्रांचा आत्मा कोण व इतर कोण आणि तसाच ह्या संसारामध्यें स्वकीय अथवा परकीय कोण आहे? कोणीहि नाहीं. सर्व एकच आहे ॥ ६० ॥ नारद ह्मणाला–हे धर्म राजा, ह्याप्रमाणें दैत्याधिपति हिरण्यकशिपूचें भाषण सुनेसहवर्तमान दितीनें श्रवण करून, एकाक्षणामध्यें

विलीनः सन् ॥ ५६ ॥ आत्मापायं स्वमृत्युम् ॥ ५७ ॥ अयथोत्थितं मिथ्यैवाविर्भूतम् ॥ ५८ ॥ सांपरायिकं परलोककृत्यम् ॥ ५९ ॥ अशोचतेति पाठेऽडागम आर्षः । स्वः पर इत्यभिनिवेश एवाज्ञानं तेन विना ॥ ६० ॥ सस्नुषा स्नुषासहिता ॥ ६१ ॥ इति सप्तमे टीकायां द्वितीयोऽध्यायः ॥ २॥ ॥ तृतीये तस्य तपसा तप्तं वीक्ष्य जग-

एवं यूयमपश्यंत्य आत्मापायमबुद्धयः ॥ नैनं प्राप्स्यथ शोचंत्यः पतिं वर्षशतैरपि ॥ ५७ ॥ हिण्यकशिपुरुवाच ॥ बाल एवं प्रवदति सर्वे विस्मितचेतसः ॥ ज्ञातयो मेनिरे सर्वमनित्यमयथोत्थितम् ॥ ५८ ॥ यम एतदुपाख्याय तत्रैवांतरधीयत ॥ ज्ञातयोऽपि सुयज्ञस्य चक्रुर्यत्सांपरायिकम् ॥ ५९ ॥ ततः शोचत मा यूयं परं चात्मानमेव च ॥ क आत्मा कः परो वाऽत्र स्वीयः पारक्य एव वा ॥ स्वपराभिनिवेशेन विनाऽज्ञानेन देहिनाम् ॥ ६० ॥ नारद उवाच ॥ इति दैत्यपतेर्वाक्यं दितिराकर्ण्य सस्नुषा ॥ पुत्रशोकं क्षणात्त्यक्त्वा तत्त्वे चित्तमधारयत् ॥ ६१ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे सप्तमस्कंधे दितिशोकापनयनं नाम द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥ ॥ नारद उवाच ॥ हिरण्यकशिपू राजन्नजेयमजरामरम् ॥ आत्मानमप्रतिद्वंद्वमेकराजं व्यधित्सत ॥ १ ॥ स तेपे मंदरद्रोण्यां तपः परमदारुणम् ॥ ऊर्ध्वबाहुर्नभोदृष्टिः पादांगुष्ठाश्रितावनिः ॥ २ ॥

द्विधिः ॥ आगत्य विस्मितस्तेन संस्तुतश्च वरानदात् ॥ १ ॥ तदेवं साधूनां कदने दानवानादिश्य बंधूनां शोकं तत्त्वनिरूपणेनापनीय यत्कृतवांस्तदाह । हिरण्यकशिपुरित्यादिना । अप्रतिद्वंद्वं प्रतिपक्षहीनमेकराजमेकमेव राजानं व्यधित्सत कर्तुमैच्छत् ॥ १ ॥ ऊर्ध्वौ बाहू यस्य । नभसि दृष्टिर्यस्य । पादांगुष्ठेनाश्रिताऽवनिर्येन ॥ २ ॥

पुत्रशोकाचा त्याग केला आणि तिनें आपलें मन तत्त्वस्वरूपाचेठिकाणीं लाविलें ॥ ६१ ॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील सप्तमस्कंधापैकीं हिरण्याक्षपुत्रादिसांत्वननामक हा दुसरा अध्याय समाप्त झाला ॥ २ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ शुभंभवतु ॥ ॥ ॥

आतां या तिसऱ्या अध्यायामध्यें हिरण्यकशिपूच्या तपानें सर्व जगत् संतप्त झालें असें पाहून ब्रह्मदेव विस्मित होऊन तेथें आला. तेव्हां हिरण्यकशिपूनें त्याची आदरपूर्वक स्तुति केली असतां, त्यानें त्याला वरदान केलें अशी कथा वर्णन केली आहे ॥ १ ॥ असो; ह्याप्रमाणें साधूंची हिंसा करण्याकरितां दानवांना आज्ञा देऊन व तत्त्वनिरूपणानें बंधूंचा शोक निवारण करून, हिरण्यकशिपूनें काय केलें तें सांगण्याकरितां नारद ह्मणाला– हे राजा, एकेवेळीं हिरण्यकशिपूनें, आपण अजिंक्य, अजरामर, प्रतिपक्षशून्य आणि अद्वितीय प्रभु व्हावें असें मनांत आणिलें ॥ १ ॥ आणि त्यानें मंदरपर्वताच्या दरीमध्यें बाहू वर करून, आकाशाकडे दृष्टि ठेऊन आणि एकापायांच्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आंगठ्यावर उभें राहून अतिभयंकर तप केलें ॥ २ ॥ त्या वेळीं तो, प्रळयकालचा सूर्य जसा शोभतो त्याप्रमाणें जटांच्या कांतींनीं शोभूं लागला. याप्रमाणें तो तप करूं
लागला असतां, पूर्वीं गुप्तरीतीनें भूमीवर संचार करीत असलेले देव, फिरून आपापल्या स्थानांवर गेले ॥ ३ ॥ नंतर त्याच्या मस्तकांतून धुरासहवर्तमान निघालेला तपो-
मय अग्नि, सर्वत्र पसरून त्यानें, खालीं, वरतीं व मध्यें असलेले सर्वलोक संतप्त केले ॥ ४ ॥ तेव्हां नद्या व समुद्र क्षुब्ध होऊन गेले, द्वीपें व पर्वत ह्यांसहवर्तमान भूमि कं-
पित होऊं लागली, ग्रहांसहवर्तमान नक्षत्रें गळून पडूं लागलीं आणि दशदिशा प्रज्वलित होऊं लागल्या ॥ ५ ॥ नंतर त्या अग्नीनें तप्त झालेले देव स्वर्गाचा त्याग करून
ब्रह्मलोकाप्रत गेले आणि ब्रह्मदेवाला विज्ञप्ति करूं लागले कीं,– हे जगत्पते देवाधिदेवा, दैत्यश्रेष्ठ हिरण्यकशिपूच्या तपानें संतप्त झाल्यामुळें आम्हीं स्वर्गावर राहण्यास
समर्थ नाहीं. तस्मात्, हे महात्म्या सर्वाधिपते, तुझी पूजा करणाऱ्या लोकांचा जोंपर्यंत नाश झाला नाहीं तोंपर्यंत, जर तुला वाटत असेल तर त्याचें तूं निवारण कर

जटानां दीधितिभिः कांतिभिः अंशुभी रश्मिभिः प्रलयकर्ताऽर्क इव रेजे । पूर्वं येऽलक्षिताः संतो भुवि चेरुस्ते देवाः पुनः स्वानि स्थानानि भेजिरे ॥ ३ ॥ विष्वगी-
रितः सर्वतः प्रसृतः सन् ॥ ४ ॥ द्वीपैरद्रिभिश्च सहिता भूश्चलिता ॥ ५ ॥ ६ ॥ तव बलिहाराः करप्रदाः पूजाकारिण इति वा । अभितो भवतीत्यभिभूः हे अभिभूर्है

जटादीधितिभी रेजे संवर्तार्क इवांशुभिः ॥ तस्मिंस्तपस्तप्यमाने देवाः स्थानानि भेजिरे ॥ ३ ॥ तस्य मूर्ध्नः समुद्भूतः सधूमोऽग्नि-
स्तपोमयः ॥ तिर्यगूर्ध्वमधोलोकानतपद्विष्वगीरितः ॥ ४ ॥ चुक्षुभुर्नद्युदन्वंतः सद्वीपाद्रिश्चचाल भूः ॥ निपेतुः सग्रहास्तारा जज्व-
लुश्च दिशो दश ॥ ५ ॥ तेन तप्ता दिवं त्यक्त्वा ब्रह्मलोकं ययुः सुराः ॥ धात्रे विज्ञापयामासुर्देवदेव जगत्पते ॥ ६ ॥ दैत्येंद्रतपसा
तप्ता दिवि स्थातुं न शक्नुमः ॥ तस्य चोपशमं भूमन् विधेहि यदि मन्यसे ॥ लोका न यावन्नंक्ष्यंति बलिहारास्तवाभिभूः ॥ ७ ॥
तस्यायं किलसंकल्पश्चरतो दुश्चरं तपः ॥ श्रूयतां किं न विदितस्तवाथापि निवेदितः ॥ ८ ॥ सृष्ट्वा चराचरमिदं तपोयोगसमाधिना ॥
अध्यास्ते सर्वधिष्ण्येभ्यः परमेष्ठी निजासनम् ॥ ९ ॥

सर्वाधिपते । पाठांतरे भो इति संबोधनम् । अभितो यावन्न नंक्ष्यंतीति संबंधः ॥ ७ ॥ ब्रह्मणस्तस्मिन्द्वेषमुत्पादयितुं तत्संकल्पमाहुस्तस्येति चतुर्भिः । तस्य संकल्पस्तव किं न
विदितोऽथाप्यस्माभिर्निवेदितस्त्वया श्रूयताम् ॥ ८ ॥ तपोयोगयोः समाधिना निष्ठया सर्वधिष्ण्येभ्यः श्रेष्ठं निजासनं सत्यलोकं यथाऽध्यास्तेऽधितिष्ठति ॥ ९ ॥

॥ ६ ॥ ७ ॥ ह्याप्रमाणें लोकांना होत असलेला उपद्रव विदित करून हिरण्यकशिपूविषयीं ब्रह्मदेवाच्या मनामध्यें द्वेष उत्पन्न करण्याकरितां त्याचा संकल्प कथन कर
तात कीं– हे जगदीशा, दुश्चर तप करणाऱ्या त्या हिरण्यकशिपूचा संकल्प तुम्हांला ठाऊक नाहीं काय ? निःसंशय ठाऊक आहे, तथापि आम्ही निवेदन करितों तो श्रवण
करावा ॥ ८ ॥ हे ईश्वरा, त्यानें असें मनामध्यें आणिलें आहे कीं, तप व योग ह्यांच्या निष्ठेनें चरावर विश्व उत्पन्न करून, ब्रह्मदेव ज्याप्रमाणें सर्वस्थानांपेक्षां श्रेष्ठ अशा
आपल्या सत्यलोकरूप स्थानावर बसला आहे, तसा मीहि तप व योग ह्यांच्या दिवसानुदिवस वृद्धिंगत होणाऱ्या समाधीच्या योगानें तें स्थान आपल्याला प्राप्त करून घेईन.
आतां, अतिदीर्घायुषी ब्रह्मदेवानें तपश्चर्येनें प्राप्त करून घेतलेलें स्थान दुसऱ्याला कसें प्राप्त करून घेतां येईल ? ही शंका तर मुळींच नको. कारण,– अल्पायु असल्या-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मुळें देहाला जरी वारंवार मृत्यु प्राप्त झाला तथापि काल व आत्मा हे दोघेहि नित्य असल्यामुळें अनेक जन्मांच्या योगानें तपश्चर्या करून तें पद मी प्राप्त करून घेईनच ॥ ९ ॥
॥ १० ॥ आणि तपोबलाच्या योगानें पूर्वींपेक्षां हें जगत् मी अगदीं विपरीत करीन, म्हणजे ब्रह्मचर्यव्रतादिक पुण्यकर्में करणारांस नरकादि दुःखेंच भोगावयास लावीन व विषयासक्त असून पापकर्में करणारांस स्वर्गसुखांचा उपभोग घ्यावयास लावीन, आणि स्वर्ग हें असुरांचें स्थान आणि नरक हें देवांचें स्थान असें विपरीत करून मी आपणास सत्यलोकाची प्राप्ति करून घेईन. कारण, अवांतरकल्पाच्या अंतीं कालानें नाश पावणाऱ्या वैष्णवादि इतर स्थानांनीं मला काय करावयाचें आहे? ॥ ११ ॥
असो. हे त्रैलोक्याधिपते, ह्याप्रमाणें तुझें स्थान हरण करण्याविषयीं त्याचा निश्चय झालेला आह्मीं श्रवण केला आहे, ह्मणूनच हा मोठें तप करीत बसला आहे. तस्मात्, त्याविषयीं जें योग्य असेल तें तूं स्वतःच सत्वर कर ॥ १२ ॥ तुझा स्थानापासून भ्रंश झाला असतां साधूंचें फारच अनिष्ट होणार आहे ह्याकरितां आह्मीं अगदीं शोक

तत्तथैवात्मनः साधयिष्यामि । ननु ब्रह्मणाऽतिदीर्घायुषा तपस्तप्त्वा तत्साधितमन्यः कुतस्तत्साधयेत्तत्राहुः । कालात्मनोरिति । यद्यप्यायुषोऽल्पत्वेन देहो वारं वारं म्रियेत तथाऽपि कालस्यात्मनश्च नित्यत्वाद्बहुभिर्जन्मभिस्तपस्तप्त्वा तत्पदं साधयिष्याम्येवेति ॥ १० ॥ वर्धमानेनेति यदुक्तं तदभिप्रायमाह। अन्यथेति । अन्यथा सुरासुरादिव्यत्ययेन अयथापूर्वं पुण्यपापादिव्यत्ययेन इदं जगद्विधास्यामि । अन्यैर्वैष्णवादिभिर्ध्रुवादिपदैः किं प्रयोजनमतस्तदेव साधयिष्यामि ॥ ११ ॥ इति त्वत्पदापहरणे तस्य निर्बंधं शुश्रुम । अतएवासौ तपः परममास्थितो वर्तते यदत्र युक्तं तदनंतरमेव विधत्स्व ॥ १२ ॥ अन्यथा तव स्थानभ्रंशे सति साधूनामनिष्टं स्यादिति शोचंत आहुः ।

तदहं वर्धमानेन तपोयोगसमाधिना ॥ कालात्मनोश्च नित्यत्वात्साधयिष्ये तथाऽऽत्मनः ॥ १० ॥ अन्यथेदं विधास्येऽहमयथापूर्व-
मोजसा ॥ किमन्यैः कालनिर्धूतैः कल्पांते वैष्णवादिभिः ॥ ११ ॥ इति शुश्रुम निर्बंधं तपः परममास्थितः ॥ विधत्स्वानंतरं युक्तं स्वयं
त्रिभुवनेश्वर ॥ १२ ॥ तवासनं द्विजगवां पारमेष्ठ्यं जगत्पते ॥ भवाय श्रेयसे भूत्यै क्षेमाय विजयाय च ॥ १३ ॥ इति विज्ञापितो
देवैर्भगवानात्मभूर्नृप ॥ परीतो भृगुदक्षाद्यैर्ययौ दैत्येश्वराश्रमम् ॥ १४ ॥ न ददर्श प्रतिच्छन्नं वल्मीकतृणकीचकैः ॥ पिपीलिकाभिराची-
र्णमेदस्त्वङ्मांसशोणितम् ॥ १५ ॥ तपंतं तपसा लोकान् यथाऽभ्रापिहितं रविम् ॥ विलक्ष्य विस्मितः प्राह प्रहसन् हंसवाहनः ॥ १६ ॥

तव पारमेष्ठ्यमिदमासनम् । द्विजानां गवां च । भवायोद्भवाय । श्रेयसे सुखाय । भूत्यै ऐश्वर्याय । क्षेमाय लब्धपालनाय । विजयायोत्कर्षाय ॥ १३ ॥ १४ ॥ वल्मीकादिभिः प्रतिच्छन्नं प्रथमं न ददर्श पश्चात्कथंचिद्विलक्ष्य तं प्राहेति द्वयोरन्वयः । पिपीलिकाभिराचीर्णं समंताद्भक्षितं मेदश्च त्वक्च मांसं च शोणितं च यस्य ॥ १५ ॥ अभ्रैरपिहितं छन्नं रविमिव विलक्ष्य विस्मितः प्राह ॥ १६ ॥

करीत आहों. कारण, हे जगदीशा ब्रह्मदेवा, तुझें आसनावर बसून अधिकार चालवणें हें, द्विज व गाई ह्यांच्या उत्पत्ति, सुख, ऐश्वर्य, क्षेम आणि उत्कर्ष ह्यांना कारण आहे ॥ १३ ॥ हे राजा, ह्याप्रमाणें भगवान् ब्रह्मदेवाची देवांनीं प्रार्थना केली असतां, भृगु दक्ष इत्यादि प्रजाधिपतींनीं परिवेष्टित असलेला तो ब्रह्मदेव, त्या दैत्याधिपति हिरण्यकशिपूच्या आश्रमाप्रत निघून गेला ॥ १४ ॥ तों तेथें मुंग्यांनीं ज्याच्या शरीरांतील मेद त्वचा, मांस आणि रक्त हीं अगदीं खाऊन टाकिलीं आहेत, व जो आंगावर वाढलेल्या वारुळें, तृण आणि वेळु ह्यांनीं आच्छादित झाला आहे त्या हिरण्यकशिपूला प्रथमतः ब्रह्मदेवानें अवलोकन केलें नाहीं ॥ १५ ॥ नंतर मेघांनीं आच्छादित झालेल्या सूर्यांप्रमाणें वारुळादिकांनीं आच्छादित असलेला व तपाच्या योगानें लोकांना त्रास देणारा, अशा त्या हिरण्यकशिपूला अवलोकन करून, ब्रह्मदेव विस्मित

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

झाला आणि हंसत हंसत त्याला ह्मणाला कीं, ॥ १६ ॥ ब्रह्मदेव ह्मणाला– हे कश्यपपुत्रा हिरण्यकशिपो, तुझें कल्याण असो. तपाच्या योगानें तूं कृतार्थ झाला आहेस,
ह्माकरितां आतां ऊठ ऊठ, मी तुला वर देण्याकरितां येथें प्राप्त झालों आहें, तर तूं मजपासून इच्छित वर मागून घे ॥ १७ ॥ हें मीं तुझें मोठेंच अद्भुत धैर्य अवलोकन
केलें. कारण, अरे वनमक्षिकांनीं देह भक्षण केलेल्या तुझे प्राण, केवळ अस्थींचा आश्रय करून राहिले आहेत ॥ १८ ॥ असें तप पूर्वींच्या ऋषींनीं कधींच केलें नाहीं व
पुढेंहि कोणी करणार नाहींत. कारण, उदकावेंसुद्धां प्राशन सोडून देणारा कोणवरें पुरुष, देवमानानें शंभर वर्षेंपर्यंत प्राणाचें धारण करील? कोणीच करणार नाहीं
॥ १९ ॥ हे दितिपुत्रा, मनोनिग्रह केलेल्या जनांनाहि करण्यास दुष्कर असा निश्चय करून तपोनिष्ठ झालेल्या तूं मला केवळ जिंकिलें आहेस ॥ २० ॥ यास्तव हे असुर-
श्रेष्ठा, तुझे सर्व मनोरथ मी परिपूर्ण करितों; कारण, तुज मनुष्याला मज देवाचें झालेलें दर्शन निष्फल होणार नाहीं ॥ २१ ॥ नारद ह्मणाला– हे धर्मराजा, असें भाषण

॥ १७ ॥ हृत्सारं धैर्यम् । दंशैर्मक्षिकादिविशेषैर्भक्षितो देहो यस्य ॥ १८ ॥ निरंबुर्निषिद्धमंबु येन सः । त्यक्तोदक इत्यर्थः ॥ १९ ॥ ते त्वयाऽनेन व्यवसाये-

ब्रह्मोवाच ॥ उत्तिष्ठोत्तिष्ठ भद्रं ते तपःसिद्धोऽसि काश्यप ॥ वरदोऽहमनुप्राप्तो व्रियतामीप्सितो वरः ॥ १७ ॥ अद्राक्षमहमेतत्ते हृत्सारं
महदद्भुतम् ॥ दंशभक्षितदेहस्य प्राणा ह्यस्थिषु शेरते ॥ १८ ॥ नैतत्पूर्वर्षयश्चक्रुर्न करिष्यंति चापरे ॥ निरंबुर्धारयेत्प्राणान्को वै
दिव्यसमाः शतम् ॥ १९ ॥ व्यवसायेन तेऽनेन दुष्करेण मनस्विनाम् ॥ तपोनिष्ठेन भवता जितोऽहं दितिनंदन ॥ २० ॥ ततस्त
आशिषः सर्वा ददाम्यसुरपुंगव ॥ मर्त्यस्य ते अमर्त्यस्य दर्शनं नाफलं मम ॥ २१ ॥ नारद उवाच ॥ इत्युक्त्वाऽऽदिभवो देवो भक्षि-
तांगं पिपीलिकैः ॥ कमंडलुजलेनौक्षद्दिव्येनामोघराधसा ॥ २२ ॥ स तत्कीचकवल्मीकात्सहओजोबलान्वितः ॥ सर्वावयवसंपन्नो
वज्रसंहननो युवा ॥ उत्थितस्तप्तहेमाभो विभावसुरिवैधसः ॥ २३ ॥ स निरीक्ष्यांबरे देवं हंसवाहमवस्थितम् ॥ ननाम शिरसा
भूमौ तद्दर्शनमहोत्सवः ॥ २४ ॥ उत्थाय प्रांजलिः प्रह्व ईक्षमाणो दृशा विभुम् ॥ हर्षाश्रुपुलकोद्भेदो गिरा गद्गदयाऽगृणात् ॥ २५ ॥

नैव तावज्जितोऽहम् । तपोनिष्ठेन भवता तु सुतरां जितः ॥ २० ॥ मर्त्यस्य तवामर्त्यस्य मम दर्शनमफलं निष्फलं न भवति ॥ २१ ॥ आदौ भवतीत्यादिभवो ब्रह्मा ।
औक्षत्प्रोक्षितवान् ॥ २२ ॥ वज्रवत्संहननमंगदार्ढ्यं यस्य । तप्तस्य हेम्न इवाभा देहकांतिर्यस्य ॥ २३ ॥ तस्य दर्शनेन महानुत्सवो यस्य ॥ २४ ॥ हर्षेणाश्रूणि

करून ब्रह्मदेवानें अमोघ सामर्थ्यानें युक्त अशा आपल्या दिव्य कमंडलूंतील जलानें, मुंग्यांनीं भक्षण केलेल्या हिरण्यकशिपूच्या त्या देहावर प्रोक्षण केलें ॥ २२ ॥ तें प्रोक्ष-
ण होतांच तो हिरण्यकशिपु, मानसिकशक्ति, इंद्रियशक्ति व शारीरशक्ति ह्यांनीं युक्त होऊन सर्व अवयवांनीं संपन्न, वज्रासारखा दृढशरीरी, तरुण व तापलेल्या सुवर्णा-
सारख्या कांतीनें युक्त होत्साता, जसा काष्ठापासून अग्नि प्रकट होतो त्याप्रमाणें वेळवांनीं आच्छादित झालेल्या वारुळापासून तो बाहेर निघाला ॥ २३ ॥ आणि आका-
शामध्यें असलेल्या ब्रह्मदेवाला अवलोकन करून, त्याच्या दर्शनानें आनंदयुक्त झाला आणि त्यानें, त्याला भूमीवर साष्टांग नमस्कार घातला ॥ २४ ॥ नंतर उठून ज्या-
च्या नेत्रामध्यें हर्षानें आनंदाश्रु प्राप्त झाले आहेत व शरीरावर रोमांच उठले आहेत असा तो हिरण्यकशिपु, हात जोडून नम्रपणें, दृष्टीनें ब्रह्मदेवाकडे अवलोकन करीत

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करीत गद्गदवाणीनें ब्रह्मदेवाची स्तुति करूं लागला ॥ २५ ॥ हिरण्यकशिपु ह्मणाला— कल्पाच्या अंतीं कालानें निर्माण केलेल्या प्रकृतिगुणरूप निबिड अंधकारानें व्याप्त झालेलें हें जग, ज्या स्वयंप्रकाश ईश्वरानें, आपल्या प्रकाशानें अभिव्यक्त केलें आहे आणि जो त्रिगुणात्मक अशा आपल्या स्वरूपानें ह्या विश्वाची उत्पत्ति, स्थिति व लय करितो त्या रज, सत्त्व व तम ह्यांच्या आश्रयभूत महात्म्या परमेश्वराला नमस्कार असो ॥ २६ ॥ २७ ॥ ह्याठिकाणीं स्वप्रकाशत्व, जगत्प्रकाशकत्व, जगत्कारणत्व, जगज्जन्मादिकर्तृत्व, महत्त्व आणि परमेश्वरत्व असें जें ब्रह्मदेवाचें सहाप्रकारचें माहात्म्य वर्णन केलें आहे, त्याचेंच चार श्लोकांनीं सविस्तर प्रतिपादन करीत नमस्कार करितो कीं—जो आद्य आहे, जो सर्वांचें कारण आहे, ज्याचें ज्ञान आणि विज्ञान हें स्वरूप आहे, व ज्याला प्राण, इंद्रियें, मन आणि बुद्धि ह्या विकारांनीं कार्यांचा आकार प्राप्त

पुलकोद्भेदश्च यस्य सः ॥ २५ ॥ अंधेन निबिडेन । तत्र हेतुः कालसृष्टेन प्रकृतिगुणरूपेण न तु ध्वांतेन । तमसाऽऽवृतमिदं जगद्योऽभिव्यनगभिव्यक्तमकरोद्यश्च त्रिगुणेनात्मनेदं जगत्सृजत्यवति पालयति लुंपति संहरति च तस्मै रजःसत्त्वतमसां धाम्न आश्रयाय महते पराय परमेश्वराय नम इति द्वयोरन्वयः ॥ २६ ॥ २७ ॥ अत्र च स्वप्रकाशत्वं जगत्प्रकाशकत्वं तत्कारणत्वं तत्सृष्ट्यादिकर्तृत्वं महत्त्वं परमेश्वरत्वं चेति षड्विधत्वमुक्तं तदेव प्रपंचयन्नमस्करोति । नम इति चतुर्भिः । बीजाय कारणाय । तत्र हेतुराद्याय । ज्ञानं ज्ञप्तिर्विज्ञानं विषयाकारं ज्ञानं मूर्तिर्यस्य तस्मै अनेन स्वप्रकाशत्वं जगत्प्रकाशकत्वं च दर्शितम् । बीजायेति निमित्तत्वमुक्तम् । उपा-

हिरण्यकशिपुरुवाच ॥ कल्पांते कालसृष्टेन योंऽधेन तमसाऽऽवृतम् ॥ अभिव्यनग्जगदिदं स्वयंज्योतिः स्वरोचिषा ॥ २६ ॥ आत्मना त्रिवृता चेदं सृजत्यवति लुंपति ॥ रजःसत्त्वतमोधाम्ने पराय महते नमः ॥ २७ ॥ नम आद्याय बीजाय ज्ञानविज्ञानमूर्तये ॥ प्राणेंद्रियमनोबुद्धिविकारैर्व्यक्तिमीयुषे ॥ २८ ॥ त्वमीशिषे जगतस्तस्थुषश्च प्राणेन मुख्येन पतिः प्रजानाम् ॥ चित्तस्य चित्तेर्मनइंद्रियाणां पतिर्महान्भूतगुणाशयेशः ॥ २९ ॥ त्वं सप्ततंतून्वितनोषि तन्वा त्रय्या चातुर्होत्रकविद्यया च ॥ त्वमेक आत्मात्मवतामनादिरनंतपारः कविरंतरात्मा ॥ ३० ॥

दानत्वमाह । प्राणादयो ये विकारास्तै रूपैर्व्यक्तिं कार्याकारमीयुषे प्राप्तवते ॥ २८ ॥ एवमात्मना त्रिवृता चेत्यनेनोक्तं कारणत्वं द्वेधा दर्शितम् । महत्त्वमीश्वरत्वं चाह । त्वमिति । त्वमेव जगतो जंगमस्य तस्थुषः स्थावरस्य च ईशिषे नियंता भवसि । केन मुख्येन प्राणेन सूत्रात्मरूपेण । अतस्त्वं प्रजानां पतिः । तासां चित्तस्य चित्तेश्च तत्परिणामभूतायाश्चेतनाया मनसश्च तन्नियम्यानामिंद्रियाणां च पतिः । अतस्त्वमेव महान् । भूतानामाकाशादीनां तद्गुणानां शब्दादिविषयाणामाशयानां तद्वासनानामीशश्च । एतेनैव स्रष्टृत्वं दर्शितम् ॥ २९ ॥ इदानीं यज्ञप्रवर्तकत्वेनांतर्यामित्वेन जगत्पालकत्वमाह । त्वमेव सप्ततंतूनग्निष्टोमादियज्ञान्विस्तारयसि । कथम् । त्रय्या तन्वा वेदत्रयरूपेण ।

होतो त्या तुला नमस्कार असो. ह्या श्लोकामध्यें ज्ञान आणि विज्ञान ह्या पदांनीं स्वप्रकाशत्व व जगत्प्रकाशकत्व दर्शविलें, बीजाय ह्या पदानें निमित्तकारणत्व आणि श्लोकाच्या उत्तरार्धानें उपादान कारणत्व दर्शविलें आहे ॥ २८ ॥ आतां महत्त्व जगत्स्रष्टृत्व आणि ईश्वरत्व सविस्तर दर्शविण्याकरितां स्तुति करितो कीं— हे विधात्या, तूंच सूत्रात्मरूप मुख्य प्राणाच्या योगानें स्थावरजंगमात्मक विश्वाचें नियमन करीत असल्यामुळें प्रजांचा व त्यांच्या चित्त, चेतना, मन आणि इंद्रियें ह्यांचाहि पति आहेस व तूंच महत्तत्त्वरूपी असल्यामुळें आकाशादि भूतें, शब्दादि विषय आणि तत्संबंधीं वासना ह्यांचा उत्पादक आहेस ॥ २९ ॥ आतां, तूंच यज्ञांचा प्रवर्तक आणि भूतांचा अंतर्यामी असल्यामुळें जगत्पालकहि तूंच आहेस असें दर्शवितो—जेथें होता अध्वर्यु इत्यादिक चार ऋत्विज असतात त्या यज्ञकर्माचें प्रतिपादन करणाऱ्या वेदत्रयरूपानें तूंच

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अग्निष्टोमादि सात यज्ञाचा विस्तार करितोस व प्राण्यांचा आत्मा आणि अंतर्यामी तसाच कालानें व देशानें अंतपाररहित असा अनादि अखंड व सर्वज्ञ तूंच आहेस ॥ ३० ॥ आतां, कालरूप असल्यामुळें संहार करणारा तूंच आहेस हें दर्शवितो– निमेषरहित असा तूंच कालरूपी होऊन त्या कालाच्या लवादिक अवयवांनीं जनांचें आयुष्य नाहींसें करितोस परंतु वस्तुतः तूं, ज्ञानरूप, अपरिच्छिन्न, परमेश्वर आणि जन्मशून्य असल्यामुळें निर्विकार आहेस. आणि दुसरें असे कीं, जीव लोकच कर्मवश असल्यामुळें जन्मादिविकारांनीं युक्त होतो परंतु तूं तर त्या जीवलोकाचा नियंता असल्यामुळें त्याच्या जीवनाचें कारण आहेस ॥ ३१ ॥ आतां, तुझ्याहून जर कांहीं व्यतिरिक्त वस्तु असेल तर त्यापासून तुला जन्मादि विकार व पराधीनता असण्याचा संभव येईल परंतु, तसा प्रकार मुळींच नाहीं हें सांगतो– हे देवा, स्थावर अथवा जंगम असें

कथंभूतया । चत्वारो होतारो यत्र तच्चातुर्होत्रकं कर्म तद्विषयया विद्यया । आत्मवतां प्राणिनामात्मभूतस्त्वमेवांतरात्मा चांतर्यामी । कुतः । यतः कविः सर्वज्ञः । तत्कुतः । एकोऽखंडः । तत्र हेतुरनादिरनंतपारश्चेति । नास्त्यंतः कालतः पारश्च देशतो यस्य सः ॥ ३० ॥ कालरूपेण संहर्तृत्वमाह । त्वमेवेति । लवाद्यैः कालावयवैः क्षिणोषि क्षपयसि । तदेव सृष्ट्यादिकर्तृत्वेऽपि निर्विकारत्वमेवाह । कूटस्थ इति । तत्र हेतवः । आत्मा ज्ञानरूपः परमेष्ठी परमेश्वरोऽजो जन्मशून्यो महानपरिच्छिन्नः । किंच जीवलोक एव कर्मवशाज्जन्मादिभिर्विक्रियते त्वं तु तस्य जीवो जीवनहेतुर्यतस्तस्यात्मा नियंता ॥ ३१ ॥ तत्कुतस्तत्राह । त्वत्त इति । त्वत्तो व्यतिरिक्तं यदि किंचिद्भवेत्तर्हि तस्मात्तव

त्वमेव कालोऽनिमिषो जनानामायुर्लवाद्यावयवैः क्षिणोषि ॥ कूटस्थ आत्मा परमेष्ठ्यजो महांस्त्वं जीवलोकस्य च जीव आत्मा ॥ ३१ ॥ त्वत्तः परं नापरमप्यनेजदेजच्च किंचिद्व्यतिरिक्तमस्ति ॥ विद्याः कलास्ते तनवश्च सर्वा हिरण्यगर्भोऽसि बृहत्त्रिपृष्ठः ॥ ३२ ॥ व्यक्तं विभो स्थूलमिदं शरीरं येनेंद्रियप्राणमनोगुणांस्त्वम् ॥ भुंक्षे स्थितो धामनि पारमेष्ठ्य अव्यक्त आत्मा पुरुषः पुराणः ॥ ३३ ॥ अनंताव्यक्तरूपेण येनेदमखिलं ततम् ॥ चिदचिच्छक्तियुक्ताय तस्मै भगवते नमः ॥ ३४ ॥

जन्मादिविकारो नियम्यत्वादिकं वा भवेत्तत्तु नास्तीत्याह । परं कारणमपरं कार्यम् । तत्र चैजज्जंगममनेजत्स्थावरं च त्वद्व्यतिरिक्तं नास्ति । ननु मद्बोधकशास्त्रं व्यतिरिक्तमस्तीति चेन्न । यतो विद्या वेदोपवेदादिविद्यास्थानानि कलाश्च तदंगानि तवैव तनवो न तु त्वद्व्यतिरिक्ताः । तत्कुतः । यतस्त्वं बृहद्ब्रह्मैवासि । तदपि कुतस्तत्राह । हिरण्यरूपं ब्रह्मांडं गर्भे यस्य सः त्रिपृष्ठस्त्रिगुणात्मकस्य प्रधानस्य पृष्ठे परतः स्थितः । अक्षरात्परतः पर इत्यादिश्रुतेः ॥ ३२ ॥ ननु ब्रह्मांडशरीरस्य जीवस्य मम कुतो ब्रह्मत्वं कुतो वा ब्रह्मांडगर्भत्वादि तत्राह । व्यक्तं कार्यमिदं तव शरीरं व्यक्तं सत्यमिति वा येन शरीरेण त्वमिंद्रियप्राणमनसां गुणान्विषयान्भुंक्षे किंच पारमेष्ठ्ये पारमैश्वर्ये धामनि स्वरूपे स्थित एव भुंक्षे न त्वस्मदादिवत्स्वरूपतिरोधानेन । अतस्त्वमव्यक्त आत्मा निरुपाधिब्रह्मैव पुराणः पुरुषश्चेत्यर्थः ॥ ३३ ॥ ननु ब्रह्मत्वं पुराणपुरुषत्वं कथमेकस्य तत्राह ।

कोणतेंहि कारण अथवा कार्य तुझ्याहून व्यतिरिक्त नाहीं. बरें, माझें ज्ञान करून देणारें शास्त्र माझ्याहून वेगळें आहे, असें ह्मणशील तर– हे विधात्या, विद्या आणि कला ह्या सर्व तुझ्याच तनु आहेत. कारण, हिरण्यरूप ब्रह्मांड तुझ्या गर्भामध्यें असून तूं त्रिगुणात्मक मायेहून निराळा ब्रह्मरूप आहेस ॥ ३२ ॥ आतां, ब्रह्मांडशरीरी असा मी जीव असल्यामुळें मला ब्रह्मत्व आणि ब्रह्मांडगर्भत्ववगैरे कोठून असणार? असें ह्मणशील तर– हे सर्वव्यापका, हें ब्रह्मांड, तुझें स्थूल शरीर आहे व त्याच्या योगानें तूं इंद्रियें, प्राण व मन ह्यांच्या विषयांचा उपभोग घेत आहेस हें सत्य आहे. परंतु आपल्या स्वरूपीं स्थित असूनच तूं त्या विषयांचा उपभोग घेत आहेस; ह्मणून उपाधिशून्य ब्रह्मरूप व पुराणपुरुष असा तूंच आहेस ॥ ३३ ॥ आतां, ब्रह्मत्व व पुराणपुरुषत्व हीं दोन्हीं एकाचेठिकाणीं कशीं संभवतील? असें ह्मणशील तर– हे अनंता,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ज्यानें आपल्या अव्यक्तरूपानें हें सर्व जग व्यापून ठाकिलें आहे आणि ज्याचें ऐश्वर्य, विद्या व माया ह्यांनीं युक्त असल्यामुळें अचिंत्य आहे त्या तुला नमस्कार असो ॥३४॥ हे वरदोत्तमा, तूं जर मला पाहिजे असलेले वर देत असलास तर हे प्रभो, तूं उत्पन्न केलेल्या भूतांपासून मला मृत्यु प्राप्त होऊं नये ॥ ३५ ॥ त्याचप्रमाणें घराच्या आंत अथवा बाहेर, दिवसा अथवा रात्रीं, तूं उत्पन्न केलेल्या प्राण्यांहून दुसऱ्या प्राण्यांपासून, भूमीवर अथवा आकाशामध्यें, मनुष्य, मृग, असुर, देव, महानाग आणि आणखीहि ज्या कांहीं सचेतन अथवा अचेतन वस्तु असतील त्यांपासून मला मृत्यु प्राप्त होऊं नये. तसेंच ज्याप्रमाणें तुझा महिमा आहे त्याप्रमाणें माझा असून मला युद्धामध्यें कोणी प्रतिपक्षी नसावा, सर्व प्राण्यांचा अधिपति मी एकटाच असावें आणि तप व योग ह्यांच्या योगानें प्रभावशाली अशा लोकांचें जें अणिमादि ऐश्वर्य कधींहि नाश पावत नाहीं तें मला प्राप्त व्हावें, हे वर तूं मला दे ॥ ३६ ॥ ३७ ॥ ३८ ॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भा० महापुराणांतील सप्तमस्कंधापैकीं हिरण्यकशिपुवरयाचननामक हा तिसरा अध्याय समाप्त झाला ॥ ३ ॥

अनंतेति । हे अनंत येन त्वया व्यक्तेन मनोवचनागोचरेण रूपेणेदं विश्वं ततं व्याप्तं तस्मै तुभ्यं भगवतेऽचिंत्यैश्वर्याय नमः । भगवत्त्वे हेतुः विदविच्छक्तियुक्ताय चिच्छक्तिर्विद्याऽविच्छक्तिर्माया ताभ्यां युक्तायेति ॥ ३४ ॥ ३५ ॥ अन्यस्मात्त्वत्सृष्टव्यतिरिक्तादपि आयुधैर्मृत्युर्मा भूत् ॥ ३६ ॥ व्यसुभिरप्राणैः असुमद्भिः सप्राणैः । यथा

यदि दास्यस्यभिमतान्वरान्मे वरदोत्तम ॥ भूतेभ्यस्त्वद्विसृष्टेभ्यो मृत्युर्मा भून्मम प्रभो ॥ ३५ ॥ नांतर्बहिर्दिवा नक्तमन्यस्मादपि चायुधैः ॥ न भूमौ नांबरे मृत्युर्न नरैर्न मृगैरपि ॥ ३६ ॥ व्यसुभिर्वाऽसुमद्भिर्वा सुरासुरमहोरगैः ॥ अप्रतिद्वंद्वतां युद्धे ऐकपत्यं च देहिनाम् ॥ ३७ ॥ सर्वेषां लोकपालानां महिमानं यथात्मनः ॥ तपोयोगप्रभावाणां यन्न रिष्यति कर्हिचित् ॥ ३८ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे सप्तमस्कंधे हिरण्यकशिपोर्वरयाचनं नाम तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥ ॥ नारद उवाच ॥ एवं वृतः शतधृतिर्हिरण्यकशिपोरथ ॥ प्रादात्तत्तपसा प्रीतो वरांस्तस्य सुदुर्लभान् ॥ १ ॥ ब्रह्मोवाच ॥ तातेमे दुर्लभाः पुंसां यान्वृणीषे वरान्मम ॥ तथाऽपि वितराम्यंग वरान् यदपि दुर्लभाम् ॥२॥ ततो जगाम भगवानमोघानुग्रहो विभुः ॥ पूजितोऽसुरवर्येण स्तूयमानः प्रजेश्वरैः ॥३॥

आत्मनस्तवास्ति महिमा तथाऽप्रतिद्वंद्वतादिकं देहीति शेषः ॥ ३७ ॥ तपसा योगेन च प्रभावो येषां तेषां यदणिमाद्यैश्वर्यं न रिष्यति न नश्यति तच्च देहीत्यर्थः ॥ ३८ ॥ इति सप्तमे टीकायां तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥ ॥ चतुर्थे तु वराँल्लब्ध्वा विजित्याखिललोकपान् ॥ विष्णुद्वेषेण तान्सर्वान् दैत्येंद्रः समपीडयत् ॥ १ ॥ शतधृतिर्ब्रह्मा ॥ १ ॥ मम मत्तः । यदपि यद्यपीमे दुर्लभाः ॥ २ ॥ अमोघोऽनुग्रहो यस्य प्रजेश्वरैर्मरीच्यादिभिः ॥ ३ ॥

आतां, ह्या चवथ्या अध्यायामध्यें, दैत्यराज हिरण्यकशिपूनें ब्रह्मदेवापासून वर मागून घेऊन सर्व लोकपालांना जिंकिलें आणि विष्णूच्या द्वेषामुळें त्या सर्वांना अत्यंत पीडा दिली ही कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ नारद ह्मणाला– हे धर्मराजा, ह्याप्रमाणें हिरण्यकशिपूनें ब्रह्मदेवापाशीं वर मागितले असतां, त्याच्या तपानें प्रसन्न झालेल्या त्या ब्रह्मदेवानें अत्यंत दुर्लभ असेहि ते वर त्याला दिले ॥ १ ॥ ब्रह्मदेव ह्मणाला– बा दैत्यराजा, तूं जे मजपाशीं वर मागत आहेस ते हे पुरुषांना प्राप्त होण्यास दुर्लभ आहेत तथापि हे दैत्यश्रेष्ठा दुर्लभ अशाहि त्या वरांस मी तुला देतों ॥ २ ॥ असें ह्मणून त्यानें वर दिले असतां, ज्याचा अनुग्रह कधींच निष्फल होत नाहीं अशा त्याभगवान् ब्रह्मदेवाची असुरश्रेष्ठ हिरण्यकशिपूनें पूजा केली व मरीच्यादि प्रजापति त्याची स्तुति करीत असतां तो ब्रह्मदेव स्वस्थानाप्रत निघून गेला ॥ ३ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्याप्रमाणें वर प्राप्त झालेला तो दैत्य सुवर्णासारिखें तेजःपुंज शरीर धारण करून, आपल्या भ्रात्याच्या वधाचें स्मरण करीत होत्साता भगवंताचेठिकाणीं द्वेष करूं लागला ॥ ४ ॥ त्या जगद्विजयी महादैत्यानें सर्वदिशा, तिन्ही लोक, देव, असुर व मानव त्यांचे राजे, गंधर्व, गरुड, नाग, सिद्ध, चारण, विद्याधर, ऋषि, पितृगणाधिपति, मनु, यक्ष, राक्षस व पिशाच ह्यांचे अधिपति, प्रेतें व भूतें ह्यांचे स्वामी आणि सर्व प्राण्यांचे अधिपति ह्या सर्वांना जिंकून वश करून घेतलें व तेजासहवर्तमान लोकपालांचीं स्थानें त्यानें हरण केलीं ॥ ५ ॥ ६ ॥ ७ ॥ नंतर तो हिरण्यकशिपु देवांच्या क्रीडावनसंबंधीं शोभेनें युक्त अशा स्वर्गलोकावर अधिष्ठित होऊन, तेथें विश्वकर्म्यानें निर्माण केलेलें, त्रैलोक्यलक्ष्मीचें केवल वसतिस्थान आणि सर्वसमृद्धींनीं युक्त अशा इंद्राच्या गृहामध्यें वास करूं लागला ॥ ८ ॥ आतां, तें महेंद्राचें गृह कसें होतें तें सांग-

---

यदर्थं तपस्तप्तं तदाह एवमित्यादिना ॥ ४ ॥ ५ ॥ ६ ॥ सर्वेषां सत्वानां प्राणिजातानां ये ये पतयस्तान् ॥ ७ ॥ त्रिविष्टपं स्वर्गमध्यास्ते स्माधिष्ठितवान् । तत्र स्वर्गेऽपि

एवं लब्धवरो दैत्यो बिभ्रद्धेममयं वपुः ॥ भगवत्यकरोद्द्वेषं भ्रातुर्वधमनुस्मरन् ॥ ४ ॥ स विजित्य दिशः सर्वा लोकांश्च त्रीन्महा-
सुरः ॥ देवासुरमनुष्येंद्रान् गंधर्वगरुडोरगान् ॥ ५ ॥ सिद्धचारणविद्याध्रानृषीन् पितृपतीन्मनून् ॥ यक्षरक्षःपिशाचेशान्प्रेतभूतपती-
नथ ॥ ६ ॥ सर्वसत्वपतीन् जित्वा वशमानीय विश्वजित् ॥ जहार लोकपालानां स्थानानि सह तेजसा ॥ ७ ॥ देवोद्यानश्रिया
जुष्टमध्यास्ते स्म त्रिविष्टपम् ॥ महेंद्रभवनं साक्षान्निर्मितं विश्वकर्मणा ॥ त्रैलोक्यलक्ष्म्यायतनमध्युवासाखिलर्धिमत् ॥ ८ ॥ यत्र
विद्रुमसोपाना महामारकता भुवः ॥ यत्र स्फाटिककुड्यानि वैदूर्यस्तंभपंक्तयः ॥ ९ ॥ यत्र चित्रवितानानि पद्मरागासनानि च ॥
पयःफेननिभाः शय्या मुक्तादामपरिच्छदाः ॥ १० ॥ कूजद्भिर्नूपुरैर्देव्यः शब्दयंत्य इतस्ततः ॥ रत्नस्थलीषु पश्यंति सुदतीः
सुंदरं मुखम् ॥ ११ ॥ तस्मिन्महेंद्रभवने महाबलो महामना निर्जितलोक एकराट् ॥ रेमेऽभिवंद्यांघ्रियुगः सुरादिभिः प्रता-
पितैरूर्जितचंडशासनः ॥ १२ ॥

महेंद्रभवनमध्युवासाधिवसति स्म ॥ ८ ॥ अखिलसमृद्धियुक्तत्वमेवाह । यत्रेति त्रिभिः ॥ ९ ॥ मुक्तादामानि परिच्छदाः परिकरा यासाम् ॥ १० ॥ सुदतीः सुदत्यः ॥ ११ ॥ ऊर्जितमधिकं चंडं तीव्रं शासनं यस्य ॥ १२ ॥

तात– हे धर्मराजा, जेथें पोंवळ्याच्या जिन्यांनीं युक्त अशा पाचेच्या जागा आहेत, स्फटिक मण्याच्या भिंति आहेत, वैडूर्यमण्यांच्या स्तंभपंक्ति आहेत ॥ ९ ॥ जेथें चित्रविचित्र चांदवे लाविलेले आहेत, पद्मराग मण्यांचीं आसनें मांडून ठेविलेलीं आहेत, आणि जेथें सभोंवार मोत्यांचे सर लोंबत असलेल्या हस्तिदंती दुधाच्या फेंसासारख्या मृदु व शुभ्र अशा शय्या आहेत, ॥ १० ॥ जेथें रुणझुण वाजणाऱ्या तोरड्यांनीं ठिकठिकाणीं शब्द करीत संचार करणाऱ्या देवांगना रत्नमय भूमीमध्यें (प्रतिबिंबित झालेलें) आपलें सुंदर मुख अवलोकन करीत असतात ॥ ११ ॥ त्या इंद्राच्या मंदिरामध्यें, इच्छितमनोरथ परिपूर्ण होत असल्यामुळें प्रसन्नचित्त होणारा, महाबलाढ्य, सर्वलोकांस पराजित करून त्रैलोक्याचें राज्य एकटाच करणारा आणि अतिशय कडक आज्ञाधारी असल्यामुळें अत्यंत ताप पावलेल्याहि देवादिकांनीं चरणद्वयाचेठि-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कार्णीं अभिवंदन केलेला असा तो दैत्यराज हिरण्यकशिपु रममाण होऊं लागला ॥ १२ ॥ हे राजा, तेव्हां उग्रगंधानें युक्त अशा सुरेनें जो मत्त झाला आहे, ज्याचे नेत्र धुंद होऊन आरक्त झाले आहेत आणि जो तेज, मनःसामर्थ्य, शरीरसामर्थ्य आणि इंद्रियसामर्थ्य ह्यांचा आश्रय आहे अशा त्या हिरण्यकशिपूची, ब्रह्मा, विष्णु व महेश्वर ह्या तीन देवांवांचून इतर सर्व लोकपालांनीं हातानें नजराणे अर्पण करून सेवा केली ॥ १३ ॥ ती अशी कीं—हे पंडुपुत्रा, स्वसामर्थ्यानें महेंद्राच्या आसनावर बसलेल्या त्या हिरण्यकशिपूच्या गुणांचें विश्वावसु, तुंबरु आणि मी इत्यादिक सर्वांनीं गायन केलें व गंधर्व, सिद्ध, ऋषि, विद्याधर आणि अप्सरा ह्यांनीं वारंवार त्याची स्तुति केली ॥१४॥ पुढें तोच हिरण्यकशिपु वर्णाश्रमनिष्ठ लोकांनीं बहुदक्षिणायुक्त यज्ञांच्या योगानें आराधन केला होत्साता, आपल्या तेजानें सर्वांचे हविर्भाग ग्रहण करूं लागला ॥ १५ ॥ त्याच्या राज्याचे वेळीं सप्तद्वीपवती पृथ्वी नांगरल्यावांचूनच पिकूं लागली, स्वर्गलोक त्याचे इच्छित मनोरथ पूर्ण करूं लागला आणि अंतरिक्षलोक नानाप्रकारच्या

अंग हे राजन् उरु गंधिनोग्रगंधेन मधुना सुरया मत्तम् । अतएव विवृत्ते विघूर्णिते ताम्रे अक्षिणी यस्य तम् । अशेषधिष्ण्यपाः सर्वलोकपाला उपायनयुक्तैः पाणिभिरुपासत सेवंते । त्रिभिर्ब्रह्मविष्णुरुद्रैर्विना पदमाश्रयभूतम् ॥ १३ ॥ उपासनप्रकारमाह । जगुरिति ॥ १४ ॥ १५ ॥ १६ ॥ तत्पत्न्यो नद्यः ऊहुर्वहंति स्म । रत्नाकरानेवाह । क्षारेति

तमंग मत्तं मधुनोरुगंधिना निवृत्तताम्राक्षमशेषधिष्ण्यपाः ॥ उपासतोपायनपाणिभिर्विना त्रिभिस्तपोयोगबलौजसां पदम् ॥ १३ ॥ जगुर्महेंद्रासनमोजसा स्थितं विश्वावसुस्तुंबुरुरस्मदादयः ॥ गंधर्वसिद्धा ऋषयोऽस्तुवन्मुहुर्विद्याधरा अप्सरसश्च पांडव ॥ १४ ॥ स एव वर्णाश्रमिभिः क्रतुभिर्भूरिदक्षिणैः ॥ इज्यमानो हविर्भागानग्रहीत्स्वेन तेजसा ॥ १५ ॥ अकृष्टपच्या तस्यासीत्सप्तद्वीपवती मही ॥ तथा कामदुघा द्यौस्तु नानाश्चर्यपदं नभः ॥ १६ ॥ रत्नाकराश्च रत्नौघांस्तत्पत्न्यश्चोहुरूर्मिभिः ॥ क्षारसीधुघृतक्षौद्रदधिक्षीरामृतोदकाः ॥ १७ ॥ शैला द्रोणीभिराक्रीडं सर्वर्तुषु गुणान् द्रुमाः ॥ दधार लोकपालानामेक एव पृथग्गुणान् ॥ १८ ॥ स इत्थं निर्जितककुबेकराड्विषयान् प्रियान् ॥ यथोपजोषं भुंजानो नातृप्यदजितेंद्रियः ॥ १९ ॥ एवमैश्वर्यमत्तस्य दृप्तस्योच्छास्त्रवर्तिनः ॥ कालो महान्व्यतीयाय ब्रह्मशापमुपेयुषः ॥ २० ॥ तस्योग्रदंडसंविग्नाः सर्वे लोकाः सपालकाः ॥ अन्यत्रालब्धशरणाःशरणं ययुरच्युतम् ॥ २१ ॥

॥ १७ ॥ आक्रीडं क्रीडास्थानम् । द्रुमाः सर्वेषु ऋतुषु गुणान्पुष्पफलादीन् स च लोकपालानां पृथग्विधान्गुणान्वर्षणदहनशोषणादीनेक एव दधार ॥ १८ ॥ निर्जिताः ककुभो येन । यथोपजोषं यथाप्रीति ॥ १९ ॥ महान्कालः एकसप्ततियुगानि किंचिदधिकानि ॥ २० ॥ २१ ॥

आश्चर्यकारक वस्तु उत्पन्न करण्याचें स्थान झाला ॥ १६ ॥ त्याचप्रमाणें त्याला, खारें पाणी, सुरा, घृत, उसांचा रस, दहीं, दूध आणि गोड पाणी, ह्यांचे सात समुद्र नद्यांसहवर्तमान लाटांच्या योगानें रत्नसमूहांना आणून देऊं लागले; सर्व पर्वत आपआपल्या खोऱ्यांतील जाग्यांनीं त्याच्याकरितां क्रीडास्थानें सिद्ध करून ठेऊं लागले; सर्व ऋतूंमध्यें वृक्ष पुष्पफलादिक पदार्थ त्याला देऊं लागले आणि तो एकटाच सर्व लोकपालांचे भिन्नभिन्न प्रकारचे (वृष्टि करणें, दहन करणें शोषण करणें इत्यादिक) गुण धारण करूं लागला ॥ १७॥ १८ ॥ ह्याप्रमाणें तो दिग्विजयी व एकटाच राजा झालेला हिरण्यकशिपु प्रिय विषयांचा यथेच्छ उपभोग घेत असतां, ॥ १३ ॥
जितेंद्रिय नसल्यामुळें तृप्त झाला नाहीं ॥ १९ ॥ असो ह्याप्रमाणें ब्राह्मणांचा (सनकादिकांचा) शाप झाल्यामुळें ऐश्वर्यानें मत्त व गर्विष्ठ होऊन शास्त्रविरुद्ध वर्तन करणाऱ्या त्या हिरण्यकशिपूचा ७१ युगांपेक्षां कांहीं अधिक इतका मोठा काळ निघून गेला ॥ २० ॥ अशाप्रकारच्या त्या हिरण्यकशिपूच्या उग्रदंडानें, पालकांसहवर्तमान

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अत्यंत उद्विग्न झालेले सर्व लोक, दुसरा कोणीहि रक्षक नसल्यामुळें अच्युत भगवंताला शरण गेले ॥ २१ ॥ आणि ह्मणाले कीं,– शांत आणि निर्मलचित्त असे संन्यासी-
लोक ज्या स्थानीं गेले असतां ते पुन्हां संसारांत माघारे येत नाहींत व ज्या स्थानीं सकल दुःखहर्ता, परमात्मा ईश्वर राहतो त्या स्थानाला आमचा नमस्कार असो ॥ २२ ॥
अशा रीतीनें नमस्कार करून ज्यांनीं बाह्येंद्रियें व मन ह्यांचें संयमन केलें आहे, ज्यांच्या अंतःकरणांतील रागादि मल नाहींसे झाले आहेत, ज्यांच्या बुद्धीच्या एका-
ग्रता झाल्या आहेत, ज्यांनीं निद्रेचाहि त्याग केला आहे आणि जे वायु भक्षण करून निर्वाह करीत आहेत असे ते देव हृषीकेशाची स्तुति करीत असतां, ॥ २३ ॥
त्यांनीं साधूंना अभय देणारी आणि मेघासारख्या गंभीरशब्दानें युक्त असल्यामुळें दशदिशा नादित करणारी अशी वक्तृरहित आकाशवाणी ऐकिली ॥ २४ ॥ ती
अशी कीं,– हे सुरश्रेष्ठ हो, तुह्मीं भिऊं नका, तुह्मांसर्वांचें कल्याण असो. कारण, प्राण्यांना माझें श्रवण झालें असतां तें, त्यांच्या सर्व कल्याणास कारण होतें ॥ २५ ॥ हे
देवहो, ह्या दैत्याधमाचें दुर्जनत्व मी जाणिलें आहे व मी त्याचा वधहि करणार आहें; परंतु तुह्मीं कांहीं कालावधीची प्रतीक्षा करा ॥ २६ ॥ अहो, देव, वेद, गाई, ब्राह्मण,

---

॥ २२ ॥ २३ ॥ अरूपा वक्तृरहिता ॥ २४ ॥ मम दर्शनं श्रवणं सर्वेषां श्रेयसामुपपत्तये भवति ॥ २५ ॥ २६ ॥ २७ ॥ ननु देवादिविद्वेषेऽप्यस्य विनाशो नास्ति

तस्यै नमोऽस्तु काष्ठायै यत्रात्मा हरिरीश्वरः ॥ यद्गत्वा न निवर्तंते शांताः संन्यासिनोऽमलाः ॥ २२ ॥ इति ते संयतात्मानः समा-
हितधियोऽमलाः ॥ उपतस्थुर्हृषीकेशं विनिद्रा वायुभोजनाः ॥ २३ ॥ तेषामाविरभूद्वाणी अरूपा मेघनिःस्वना ॥ संनादयंती ककुभः
साधूनामभयंकरी ॥ २४ ॥ माभैष्ट विबुधश्रेष्ठाः सर्वेषां भद्रमस्तु वः ॥ मद्दर्शनं हि भूतानां सर्वश्रेयोपपत्तये ॥ २५ ॥ ज्ञातमेतस्य
दौरात्म्यं दैतेयापसदस्य च ॥ तस्य शांतिं करिष्यामि कालं तावत्प्रतीक्षत ॥ २६ ॥ यदा देवेषु वेदेषु गोषु विप्रेषु साधुषु ॥ धर्मे
मयि च विद्वेषः स वा आशु विनश्यति ॥ २७ ॥ निर्वैराय प्रशांताय स्वसुताय महात्मने ॥ प्रह्लादाय यदा द्रुह्येद्धनिष्येऽपि वरो-
र्जितम् ॥ २८ ॥ नारद उवाच ॥ इत्युक्ता लोकगुरुणा तं प्रणम्य दिवौकसः ॥ न्यवर्तंत गतोद्वेगा मेनिरे चासुरं हतम् ॥ २९ ॥
तस्य दैत्यपतेः पुत्राश्चत्वारः परमाद्भुताः ॥ प्रह्लादोऽभून्महांस्तेषां गुणैर्महदुपासकः ॥ ३० ॥

ब्रह्मवरेणोर्जितत्वात्तत्राह । निर्वैरायेति । सर्वमहं सहे न मद्भक्तद्रोहमिति भावः ॥ २८ ॥ असुरं च हतं मेनिरे । तदानीं तद्द्वेषे प्रवृत्तत्वादिति भावः ॥ २९ ॥ तमेव द्वेषं वक्तुमादौ
सुतस्य महत्त्वमाह । तस्येति । गुणैर्महानभूत् । गुणानेवाह महदुपासक इत्यादिना ॥ ३० ॥

साधु, धर्म आणि मी ह्यांचेठिकाणीं जेव्हां पुरुषाचा द्वेष उत्पन्न होतो तेव्हां तो पुरुष, लवकरच नाश पावतो ॥ २७ ॥ आतां देवादिकांबरोबर हा द्वेष करीत अस-
तांहि ब्रह्मदेवाच्या वरानें हा प्रबल झाल्यामुळें ह्याचा नाश होत नाहीं असें ह्मणाल तर–हे सुरश्रेष्ठहो, कदाचित् देवादिकांबरोबर केलेलाहि द्वेष मला सहन होतो परंतु
माझ्या भक्ताशीं केलेला द्वेष मला सहन होत नाहीं. यास्तव वैररहित आणि अत्यंत शांत अशा आपल्या महात्म्या प्रल्हाद पुत्राशीं जेव्हां हा द्रोह करूं लागेल तेव्हां ब्रह्म-
देवाच्या वरानें जरी हा प्रबल झाला आहे तथापि मी ह्याचा वध करीन ॥ २८ ॥ नारद ह्मणाला– हे धर्मराजा, ह्याप्रमाणें जगद्गुरु परमात्म्यानें आकाशवाणीनें सांगि-
तलें असतां, त्याला नमस्कार करून त्या स्तुतिपासून निवृत्त झाले आणि ईश्वरवचनानें निर्भय होऊन त्या असुराचा वध झालाच असें त्यांनीं मानिलें ॥ २९ ॥
आतां, तो द्वेष कसा झाला हें सांगण्याकरितां प्रथमतः त्याच्या पुत्राचें महत्त्व वर्णन करितो– हे धर्मराजा, त्या दैत्याधिपति हिरण्यकशिपूला परमप्रतापी असे चार

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुत्र होते. त्यापैकीं प्रल्हाद हा वयानें सर्वांपेक्षां लहान असून गुणांनीं मोठा होता. कारण, तो सत्पुरुषांचा उपासक, ब्राह्मणभक्त, शीलसंपन्न, सत्यवादी, जितेंद्रिय, आत्म्याप्रमाणें सर्वभूतांचा एकच प्रिय व हितेच्छु, दासाप्रमाणें श्रेष्ठजनांच्या चरणीं नम्र, पित्याप्रमाणें दीनावर प्रेम करणारा, आपल्या बरोबरीच्यांवर भ्रात्याप्रमाणें प्रीति करणारा, गुरूंचेठिकाणीं ईश्वरबुद्धीनें वागणारा; विद्या, वित्त, सौंदर्य आणि उत्तम जन्म ह्यांनीं युक्त असूनहि मान व गर्व ह्यांनीं रहित, संकटें प्राप्त झालीं असतांहि मनामध्यें उद्विग्न न होणारा, परमात्म्यावांचून इतर सर्व मिथ्या आहे असें समजत असल्यामुळें या लोकींच्या व परलोकींच्या विषयांविषयीं निस्पृह; इंद्रियें, प्राण, शरीर आणि बुद्धि ह्यांना वश केलेला, मत्सरादिक असुरभावानेंरहित आणि असुर असूनहि विषयवासना शांत झालेला असा होता ॥ ३० ॥ ३१ ॥ ३२ ॥ ३३ ॥ हे राजा, भग-

---

सत्या संधा प्रतिज्ञा यस्य । एक एव प्रियश्च सुहृत्तमश्च ॥ ३१ ॥ दासवत्सम्यङ्नता आर्याणामंघ्रयो येन । गुरुषु ईश्वर इति भावना यस्य ॥ ३२ ॥ व्यसनेषु प्राप्तेष्वपि नोद्विग्नचित्तः । दृष्टेषु श्रुतेषु गुणेषु विषयेषु निस्पृहः । यतस्तेष्ववस्तुदृक् दांता इंद्रियादयो यस्य । रहित आसुरो भावो मत्सरादिर्यस्य सः । असुरोऽपि

ब्रह्मण्यः शीलसंपन्नः सत्यसंधो जितेंद्रियः ॥ आत्मवत्सर्वभूतानामेकः प्रियसुहृत्तमः ॥ ३१ ॥ दासवत्संनतार्यांघ्रिः पितृवद्दीनवत्सलः ॥ भ्रातृवत्सदृशे स्निग्धो गुरुष्वीश्वरभावनः ॥ विद्याऽर्थरूपजन्माढ्यो मानस्तंभविवर्जितः ॥ ३२ ॥ नोद्विग्नचित्तो व्यसनेषु निस्पृहः श्रुतेषु दृष्टेषु गुणेष्ववस्तुदृक् ॥ दांतेंद्रियप्राणशरीरधीः सदा प्रशांतकामो रहितासुरोऽसुरः ॥ ३३ ॥ यस्मिन्महद्गुणा राजन् गृह्यंते कविभिर्मुहुः ॥ न तेऽधुनाऽपि धीयंते यथा भगवतीश्वरे ॥ ३४ ॥ यं साधुगाथासदसि रिपवोऽपि सुरा नृप ॥ प्रतिमानं प्रकुर्वंति किमुतान्ये भवादृशाः ॥ ३५ ॥ गुणैरलमसंख्येयैर्माहात्म्यं तस्य सूच्यते ॥ वासुदेवे भगवति यस्य नैसर्गिकी रतिः ॥ ३६ ॥ न्यस्तक्रीडनको बालो जडवत्तन्मनस्तया ॥ कृष्णग्रहगृहीतात्मा न वेद जगदीदृशम् ॥ ३७ ॥

सन् प्रशांतकामः ॥ ३३ ॥ अधुनाऽपि ते गुणा नापिधीयंते तिरोहिता न भवंति ॥ ३४ ॥ साधुगाथासदसि साधुकथाप्रसंगवत्यां सभायां यं प्रह्लादं प्रतिमानं दृष्टांतं रिपवोऽपि सुराः कुर्वंति किं वक्तव्यं भवादृशा विष्णुभक्ताः ॥ ३५ ॥ सूच्यते मया केवलं द्योत्यते सुष्ठु कथ्यत इति वा ॥ ३६ ॥ नैसर्गिकरतेर्लिंगान्याह ।

वान् ईश्वराचेठिकाणीं असलेले गुण जसे कधीं लुप्त होत नाहींत त्याप्रमाणें त्या प्रल्हादाचेठिकाणीं असलेल्या मोठ्या गुणांचें विवेकी जन वारंवार ग्रहण करीत असतात ते अद्यापि झांकून जात नाहींत ॥ ३४ ॥ हे राजा, तुझ्यासारखे विष्णुभक्त त्या प्रल्हादाची प्रशंसा करितील यांत आश्चर्य नाहीं परंतु त्या असुरांचे शत्रु जे देव तेहि, भरसभेमध्यें साधुजनांच्या कथा निघाल्याअसतां ज्या प्रल्हादाची उपमा, देत असतात ॥ ३५ ॥ त्या प्रल्हादाचें असंख्यात गुणांनीं भूषित असें माहात्म्य मी तुला थोडक्यांत केवळ दिक्प्रदर्शनानें सुचवितों– कारण, ज्याला भगवान् वासुदेवाचेठिकाणीं स्वाभाविक प्रीति प्राप्त झाली होती ॥ ३६ ॥ ती अशी कीं,– हे धर्मराजा, तो अगदीं बालक ॥ १४ ॥
असतांनाच कृष्णरूप पिशाचानें त्याचें मन घेऊन टाकिलें असल्यामुळें तें चित्त, त्या कृष्णाचेठिकाणीं एकसारखें लागलें होतें म्हणून तो, क्रीडासाधनांचाहि त्याग करून सर्वदा कृष्णचिंतन करीत असे. त्यानें हें जग, अशाप्रकारचें (विषयासक्त) आहे हें जाणलेंच नाहीं. यावरून त्याची स्थिति लोकामध्यें जडासारखी भासत होती ॥ ३७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तो बसत असतां, हिंडत असतां, भोजन करीत असतां, शयन करीत असतां, उदकवगैरे प्राशन करीत असतां, आणि भाषण करीत असतां, त्या प्रऱ्हादानें त्या आसनादि पदार्थांसंबंधीं उपभोगांच्या गुणदोषांचें अनुसंधान राखिलें नव्हतें. कारण, त्याचें गोविंदानें आपल्याशीं अगदीं एकीकरण केलें होतें ॥ ३८ ॥ केव्हां तरी भगवच्चिंतनानें त्याचें अंतःकरण क्षुब्ध झालें ह्मणजे तो रोदन करीत असे, केव्हांतरी भगवच्चिंतनानें आनंद झाला ह्मणजे तो हास्य करीत असे व कधींकधीं उच्चस्वरानें भगवताच्या गुणांचें गायन करीत असे ॥ ३९ ॥ कधींकधीं तो मोठ्यानें (हे हरे, प्रभो इत्यादिक) गर्जना करी, केव्हांतरी निर्भीड होऊन नृत्य करी, आणि एखादे वेळीं ईश्वराचिंतनामध्यें अगदीं गढून गेला ह्मणजे तन्मय होऊन भगवंताच्या लीलांचें स्वतःच अनुकरण करी ॥ ४० ॥ केव्हांकेव्हां भगव-

---

न्यस्तक्रीडनक इति षड्भिः । तन्मनस्तया सदेकचित्तत्वेन ॥ ३७ ॥ एतान्यासनादीनि । गोविंदेन परिरंभित आत्मना एकीकृतः ॥ ३८ ॥ रुदति रोदिति रौति । वैकुंठस्य चिंतया शबला व्यामिश्रा क्षुभिता चेतना यस्य तस्य चिंतयाऽऽल्हादो यस्य ॥३९॥ क्वचिदुत्कंठो मुक्तकंठः सन् । अनुचकार तच्चेष्टादिकं स्वयं कृतवान् ॥४०॥ संस्पर्शस्तद्भावाप-

आसीनः पर्यटन्नश्नन् शयानः प्रपिबन्ब्रुवन् ॥ नानुसंधत्त एतानि गोविंदपरिरंभितः ॥ ३८ ॥ क्वचिद्रुदति वैकुंठचिंताशबलचेतनः ॥ क्वचिद्धसति तच्चिंताल्हाद उद्गायति क्वचित् ॥ ३९ ॥ नदति क्वचिदुत्कंठो विलज्जो नृत्यति क्वचित् ॥ क्वचित्तद्भावनायुक्तस्तन्मयोऽनुचकार ह ॥ ४० ॥ क्वचिदुत्पुलकस्तूष्णीमास्ते संस्पर्शनिर्वृतः ॥ अस्पंदप्रणयानंदसलिलामीलितेक्षणः ॥ ४१ ॥ स उत्तमश्लोकपदारविंदयोर्निषेवयाऽकिंचनसंगलब्धया ॥ तन्वन्परां निर्वृतिमात्मनो मुहुर्दुःसंगदीनान्यमनःशमं व्यधात् ॥ ४२ ॥ तस्मिन्महाभागवते महाभागे महात्मनि ॥ हिरण्यकशिपू राजन्नकरोदघमात्मजे ॥ ४३ ॥ युधिष्ठिर उवाच ॥ देवर्ष एतदिच्छामो वेदितुं तव सुव्रत ॥ यदात्मजाय शुद्धाय पिताऽदात्साधवे ह्यघम् ॥ ४४ ॥

त्तिस्तेन निर्वृतः । अस्पंदः स्थिरो यः प्रणयस्तेन य आनंदस्तेन यत्सलिलं तेन युक्ते आ[illegible]ते इषन्निमीलिते ईक्षणे यस्य सः ॥ ४१ ॥ आत्मनः परां निर्वृतिं तन्वन्दुःसंगेन दीनस्यान्यस्यापि मनः शमं शांतं व्यधात् ॥ ४२ ॥ अघं द्रोहमकरोत् ॥ ४३ ॥ प्रथमाध्यायांते [illegible]मेवार्थमतिविस्मयेन पुनः पृच्छति । देवर्ष इति । तव त्वत्तस्तव वाक्यमिति वा साधवेऽघ-

---

त्स्वरूपीं लीन होऊन गेल्यामुळें तो सुखामध्यें निमग्न होई, त्याच्या शरीरावर रोमांच उठत असत आणि स्थिरप्रेमापासून झालेल्या आनंदाश्रूंनीं युक्त झाल्यामुळें त्याचे नेत्र किंचित् मिटले असत, तेव्हां तो कांहींएक न बोलतां स्वस्थ राहत असे ॥ ४१ ॥ याप्रमाणें तो निःसंग अशा साधूंच्या समागमानें प्राप्त झालेली जी श्रेष्ठकीर्ति परमेश्वराच्या चरणकमलांची निरंतर सेवा, तिच्या योगानें आपणाला, वारंवार परमानंद सुखाची वृद्धि करून घेत होत्साता, दुर्जनांच्या संगामुळें दीन झालेल्या दुसऱ्या पुरुषांच्याहि मनाला शांत करीत असे ॥ ४२ ॥ असो. हे राजा, ह्याप्रमाणें महाभगवद्भक्त, महाभाग्यशाली आणि महात्मा असा जो आपला पुत्र प्रऱ्हाद त्याचेठिकाणीं हिरण्यकशिपु द्रोह करूं लागला ॥ ४३ ॥ ह्याप्रमाणें नारदाचें भाषण श्रवण करून अतिविस्मय झाल्यामुळें पूर्वीं प्रथम अध्यायाच्या अंतीं विचारलेल्याच विषयाचा धर्मराजा पुन्हा प्रश्न करितो कीं,–हे सुव्रता देवर्षे, शुद्ध आणि साधु असा जो आपला पुत्र प्रऱ्हाद त्याच्याशीं पित्यानें द्रोह केला हें (आश्चर्य) आह्मीं तुजपासून (सविस्तर)

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जाणण्याची इच्छा करितों ॥ ४४ ॥ कारण, आपले पुत्र जरी आपणास प्रतिकूल असले तथापि त्यांचे पिते, पुत्रवत्सल असल्यामुळें, केवल शिक्षणार्थ भाषणानेंच त्यांचा तिरस्कार करितात; परंतु, शत्रूप्रमाणें त्यांच्याशीं द्रोह कधींहि करीत नाहींत ॥ ४५ ॥ तेव्हां ज्यांचें पिता हेंच दैवत आहे व जे कामक्रोधरहित असून आपणांस अनुकूल आहेत त्या प्रऱ्हादासारिख्या पुत्रांशीं, तर पिते द्रोह करीत नाहींत हें काय सांगावें ? तस्मात्, हे प्रभो ब्रह्मनिष्ठा, हिरण्यकशिपु पित्यानें स्वपुत्र प्रऱ्हादाच्या वधार्थ द्वेष केला असून त्यापासून तो वध न होतां, तो द्वेष उलटा त्या हिरण्यकशिपूच्याच मरणास कारण झाला हें मोठें आश्चर्य आहे! यास्तव ह्याचें तूं निराकरण करावें ॥ ४६ ॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील सप्तमस्कंधापैकीं हिरण्यकशिपुकृत त्रैलोक्यपीडावर्णननामक हा चवथा अध्याय समाप्त झाला ॥ ४ ॥ ॥

मदात् साधोर्द्रोहं कृतवानिति यदेतद्वेदितुं ज्ञातुमिच्छामः ॥ ४४ ॥ उपालभंते आक्षेपंति । अघं तु नैव कुर्वंति । अपरः शत्रुरिव ॥ ४५ ॥ अनुवशाननुकूलान् साधूनरागरोषान् । गुरुः पितैव देवता येषां तानुद्दिश्याघं न कुर्वंतीति किमु वक्तव्यमित्यर्थः । पुत्राय पुत्रमुद्दिश्य पितुर्द्वेषः पित्रा कृतो द्वेषः पुत्रस्य मरणार्थं प्रयोजितः प्रवर्तित इति यदेतत्कौतूहलं विधमापाकुरु । यद्वा यद्यस्मात्पुत्राय यो द्वेषः स पितुर्मरणाय प्रयोजितोऽत एतत्कौतूहलं विधमेत्यर्थः ॥ ४६ ॥ इति सप्तमे टीकायां चतुर्थो-

पुत्रान् विप्रतिकूलान्स्वान्पितरः पुत्रवत्सलाः ॥ उपालभंते शिक्षार्थं नैवाघमपरो यथा ॥ ४५ ॥ किमुतानुवशान्साधूंस्तादृशान्गुरुदेवतान् ॥ एतत्कौतूहलं ब्रह्मन्नस्माकं विधम प्रभो ॥ पितुः पुत्राय यद्द्वेषो मरणाय प्रयोजितः ॥ ४६ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे सप्तमस्कंधे प्रह्लादचरिते चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥ ॥ नारद उवाच ॥ पौरोहित्याय भगवान्वृतः काव्यः किलासुरैः ॥ शंडामर्कौ सुतौ तस्य दैत्यराजगृहांतिके ॥ १ ॥ तौ राज्ञा प्रापितं बालं प्रह्लादं नयकोविदम् ॥ पाठयामासतुः पाठ्यानन्यांश्चासुरबालकान् ॥ २ ॥ यत्तत्र गुरुणा प्रोक्तं शुश्रुवेऽनुपपाठ च ॥ न साधु मनसा मेने स्वपरासद्ग्रहाश्रयम् ॥ ३ ॥

ऽध्यायः ॥४॥ पंचमे गुरुतोऽधीतं त्यक्त्वा विष्णुस्तुतौ रतम् ॥ घातयन्द्विपसर्पाद्यैः सुतं दैत्यो न चाशकत् ॥ १ ॥ भगवद्भक्तिरेव विद्वेषे कारणमिति वक्तुमाह । पौरोहित्यायेत्यादिना । काव्यः शुक्रः । अतस्तस्य सुतौ दैत्यराजगृहांतिके न्यवसतामिति शेषः ॥१॥ पाठ्यान्दंडनीत्यादीन् । पाठ्यानसुरबालकानिति वाऽन्वयः ॥२॥ अनु श्रवणानंतरं

आतां पांचव्या अध्यायामध्यें, गुरूपासून केलेल्या अध्ययनाचा त्याग करून विष्णूची स्तुति करण्यामध्यें रत झालेल्या प्रऱ्हादपुत्राला, हत्ती व सर्प इत्यादिकांच्या योगानें मारविण्यास प्रवृत्त झालेला हिरण्यकशिपु, तें करण्यास समर्थ झाला नाहीं, अशी कथा वर्णन केली आहे ॥ १ ॥ त्यामध्यें प्रथमतः प्रऱ्हादानें केलेली भगवंताची भक्ति, हिरण्यकशिपूला प्रऱ्हादाचा द्वेष करण्यास कारण झाली असें सांगण्याच्या अभिप्रायानें नारद ह्मणाला—हे धर्मराजा, भगवान् शुक्राचार्याला असुरांनीं आपला पुरोहित केला होता ह्मणून त्याचे शंडामर्क नामक दोन पुत्र दैत्यराज हिरण्यकशिपूच्या गृहासमीप वास करीत होते ॥ १ ॥ राजानें आपला प्रऱ्हाद बालक, नीतिशास्त्रामध्यें निपुण असतांहि तो अज्ञानी आहे असें समजून त्या शंडामर्कांकडे पाठविला असतां, त्यांनीं पढविण्यास योग्य असे राजनीतिवगैरे विषय, असुरबालकांसहवर्तमान त्याला पढविले ॥ २ ॥ त्या गुरुगृहीं गुरूनें जें दंडनीतिशास्त्र सांगितलें तें प्रऱ्हादानें श्रवण केलें व पठणहि केलें. परंतु, ‘ हा स्वतः मी आणि हा दुसरा ’ अशाप्रकारचा जो मि-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

थ्याभिमान तोच त्या नीतिशास्त्राचा आश्रय असल्यामुळें त्याला तें मनापासून चांगलें वाटलें नाहीं ॥ ३ ॥ ह्याप्रमाणें चाललें असतां, हे पाडुपुत्रा धर्मराजा, एकेदिवशीं दैत्यराज हिरण्यकशिपूनें, आपल्या पुत्राला मांडीवर घेऊन ' हेवत्सा तुला काय चांगलें वाटतें तें सांग ' असें विचारिलें ॥ ४ ॥ तेव्हां प्रऱ्हाद ह्मणाला–हे दैत्यश्रेष्ठा, 'मी व माझें' ह्या मिथ्याभिमानामुळें सर्वदा अत्यंत उद्विग्नमति झालेल्या देहधारी प्राण्यांनीं–अंधकूपाप्रमाणें मोहकारक व आपल्या अधःपाताला कारण अशा गृहाचा त्याग करावा आणि वनामध्यें जाऊन श्रीहरीला भजावें हें मला चांगलें वाटतें ॥ ५ ॥ नारद ह्मणालाः–हे धर्मराजा, शत्रुरूपी विष्णूचेठिकाणीं अत्यंत निष्ठायुक्त असलेलीं तीं पुत्राचीं भाषणें श्रवण करून, त्या दैत्यानें हास्य केलें आणि ह्मणाला कीं,–अहो, शत्रूच्या पक्षाकडे ज्यांची मति आहे ते लोक, बालकांची बुद्धि विपरीत करून

तथैव पपाठ च किंतु तत्साधु न मेने । तत्र हेतुः । स्वः पर इत्यसद्ग्रहो मिथ्याभिनिवेश एवाश्रयो यस्य तत् ॥ ३ ॥ ४ ॥ हे असुरवर्य असद्ग्रहादहं ममेति मिथ्याऽभिनिवेशाद्धेतोः सम्यगुद्विग्ना विषण्णा धीर्येषां ते । वनं गतः सन्हरिमाश्रयेतेति य' देवाहं साधु मन्ये । कथंभूतं गृहम् । आत्मपातमात्मनोऽधःपातनिमित्तम् । कुतः । अंध-

एकदाऽसुरराट् पुत्रमंकमारोप्य पांडव ॥ पप्रच्छ कथ्यतां वत्स ''न्यते साधु यद्भवान् ॥ ४ ॥ प्रह्लाद उवाच ॥ तत्साधु मन्येऽसुरवर्य देहिनां सदा समुद्विग्नधियामसद्ग्रहात् ॥ हित्वाऽऽत्मपातं गृहमंधकूपं वनं गतो यद्धरिमाश्रयेत ॥ ५ ॥ नारद उवाच ॥ श्रुत्वा पुत्रगिरो दैत्यः परपक्षसमाहिताः ॥ जहास बुद्धिर्बालानां भिद्यते परबुद्धिभिः ॥ ६ ॥ सम्यग्विधार्यतां बालो गुरुगेहे द्विजातिभिः ॥ विष्णुपक्षैः प्रतिच्छन्नैर्न भिद्येतास्य धीर्यथा ॥ ७ ॥ गृहमानीतमाहूय प्रह्लादं दैत्ययाजकाः ॥ प्रशस्य श्लक्ष्णया वाचा समपृच्छंत सामभिः ॥ ८ ॥ वत्स प्रह्लाद भद्रं ते सत्यं कथय मा मृषा ॥ बालानति कुतस्तुभ्यमेष बुद्धिविपर्ययः ॥ ९ ॥ बुद्धिभेदः परकृत उताहो ते स्वतोऽभवत् ॥ भण्यतां श्रोतुकामानां गुरूणां कुलनंदन ॥ १० ॥ प्रह्लाद उवाच ॥ स्वः परश्चेत्यसद्ग्राहः पुंसां यन्मायया कृतः ॥ विमोहितधियां दृष्टस्तस्मै भगवते नमः ॥ ११ ॥

कूपवन्मोहावहम् ॥ ५ ॥ परपक्षे विष्णौ समाहिताः परिनिष्ठिताः । हासे हेतुः । बुद्धिरिति ॥ ६ ॥ विष्णुपक्षैर्भागवतैर्हेतुभूतैः । ननु त्वद्गृहे कुतस्तेषां प्रवेशः सत्यम् । तथापि प्रतिच्छन्नैर्वेषांतरेण छन्नैः ॥ ७ ॥ दैत्यैर्गृहमानीतम् ॥ ८ ॥ बालान्सर्वानति अतिक्रम्य । तुभ्यं तव ॥ ९ ॥ १० ॥ अहो मायामोहिता भवंतो मामाक्षिपंतीत्याशयेन ताव-

---

टाकितात ॥ ६ ॥ हे शंडामर्कहो, दुसरा वेष धारण करून गुप्तरीतीनें संचार करणारे विष्णुपक्षपाती ब्राह्मण, ह्याच्या बुद्धीला जसा भेद न करितील तशाप्रकारच्या चांगल्या बंदोबस्तानें तुह्मीं आपल्या घरीं ह्याबालकाचें रक्षण ठेवावें ॥ ७ ॥ नंतर आपल्या घरीं पोंचविलेल्या प्रऱ्हादाला त्या दैत्यपुरोहितांनीं हाक मारून त्याची प्रशंसा केली आणि मृदुभाषणपूर्वक सामोपचारानें त्याला असें विचारिलें कीं,–॥ ८ ॥ बाळा प्रऱ्हादा, तुझें कल्याण असो. जें आह्मीं तुला विचारित आहों, तें तूं खरें सांग; खोटें सांगूं नकोस. अरे, या बालकांना सोडून तुझ्याच बुद्धीला हा विपर्यास कोठून झाला ? ॥ ९ ॥ हे कुलनंदना, दुसऱ्यांनीं तुझ्या बुद्धीला भेद केला आहे अथवा तो आपोआप झाला आहे हें तूं आह्मां श्रवण करण्याची इच्छा करणाऱ्या गुरूंना कथन कर ॥ १० ॥ हें भाषण श्रवण करून, अहो तुह्मीं मायेनें मोहित होऊन उगीच मला असल्या भलभलत्या शंका करीत आहां, अशा आशयानें प्रथमतः प्रऱ्हाद ह्मणाला– अहो ! 'मी व दुसरा' असा मिथ्या अभिमान ज्याच्या मायेनें केलेला आहे, वास्तविक नाहीं,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

व तो त्याच्या मायेनें बुद्धीला मोह पडलेल्या तुह्मांसारिख्या पुरुषांचेठिकाणींच दृष्टीस पडतो त्या भगवंताला नमस्कार असो ॥ ११ ॥ त्यानंतर ‘ अरे हें काय बडबडतोस? तुझ्या बुद्धीला विपर्यास कोणी केला तें सांग ’ असें दटावून विचारिलें असतां, ‘ त्या भगवंताच्या प्रसादानेंच झाला ’असें सांगतो–तो भगवान् जेव्हां पुरुषांना अनुकूल होतो तेव्हां, ‘हा वेगळा व मी वेगळा अशी’ अविवेकी पशूंसारखी मिथ्याभूत असलेली संसारविषयक बुद्धि, भेद पावत्ये, ह्मणजे ती भेदरहित होऊन आत्मनिष्ठ होत्ये ॥ १२ ॥ आतां, वास्तविक पाहूं गेलें असतां भेद नाहींच हें दर्शविण्यासाठीं ह्मणतो कीं, त्या ह्या परमात्म्याचेंच अविवेकी लोक, ‘हा मी आहें व हा परकी आहे’ असें निरूपण करितात आणि असें होणें हेंच योग्य आहे. कारण, त्या परमात्म्याची लीला दुर्घट आहे, त्याला जाणण्याविषयीं ब्रह्मादिक वेदवादीसुद्धां मोहपावतात हा पर-

---

दाह । स्वः परश्चेति । मिथ्याभिनिवेशो यदीयया माययैव कृतो न तु वास्तवः अत एव तदीयया मायया विमोहितबुद्धीनां भवतामेव दृष्टो न तु मम । तस्मै अचिंत्यमायेश्वराय नमः ॥ ११ ॥ अहो किमेतत्प्रलपसि तव बुद्धिभेदो यतो जातस्तं कथयेत्याक्षिप्तः संस्तत्प्रसादादेवेत्युत्तरमाह । स इति त्रिभिः । स भगवान्यदाऽनुव्रतोऽनुकूलो भवति तदा पशूनामविवेकिनामिव बुद्धिर्भेदगताऽसती मिथ्यासंसारविषया विभिद्यतेऽभिन्नात्मनिष्ठा भवति ॥ १२ ॥ भेदस्यासत्त्वं दर्शयन्नाह । स एष परमात्मैव स्वः पर इति चाविवेकिभिर्निरूप्यते । युक्तं चैतत् । यतो यस्य वर्त्मनि जिज्ञासायां ब्रह्मादयोऽपि मुह्यंति । तत्र हेतुः । दुरत्ययं दुर्घटमनुक्रमणमनुचरितमनुवर्णनं वा यस्य ॥ १३ ॥ ननु निर्विका-

स यदाऽनुव्रतः पुंसां पशुबुद्धिर्विभिद्यते ॥ अन्य एष तथाऽन्योऽहमिति भेदगताऽसती ॥ १२ ॥ स एष आत्मा स्वपरेत्यबुद्धिभिर्दुरत्ययानुक्रमणो निरूप्यते ॥ मुह्यंति यद्वर्त्मनि वेदवादिनो ब्रह्मादयो ह्येष भिनत्ति मे मतिम् ॥ १३ ॥ यथा भ्राम्यत्ययो ब्रह्मन्स्वयमाकर्षसन्निधौ ॥ तथा मे भिद्यते चेतश्चक्रपाणेर्यदृच्छया ॥ १४ ॥ नारद उवाच ॥ एतावद्ब्राह्मणायोक्त्वा विरराम महामतिः ॥ तं निर्भर्त्स्याथ कुपितः स दीनो राजसेवकः ॥ १५ ॥ आनीयतामरे वेत्रमस्माकमयशस्करः ॥ कुलांगारस्य दुर्बुद्धेश्चतुर्थोऽस्योदितो दमः ॥ १६ ॥ दैतेयचंदनवने जातोऽयं कंटकद्रुमः ॥ यन्मूलोन्मूलपरशोर्विष्णोर्नालायितोऽर्भकः ॥ १७ ॥

रस्य कथं मतिभेदकत्वं तत्राह । यथेति । यथाऽयो लोहमाकर्षस्यायस्कांतस्य समीपे स्वयमेव भ्रमति तथा मे चेतश्चक्रपाणेः सन्निधौ । तव कुतो जातस्तत्सन्निधिस्तत्राह । यदृच्छयेति । कस्य तपोदानादेः फलमेतदिति न ज्ञायत इत्यर्थः ॥ १४ ॥ राजसेवक उवाचेति शेषः ॥ १५ ॥ अरे वेत्रं कशाऽऽनीयताम् । सामदानभेददंडानां मध्ये चतुर्थो दमो दंडोऽस्य दुर्बुद्धेरुदित उक्तः शास्त्रेषु । दुर्बुद्धित्वे हेतुः । कुलांगारस्य कुलस्यांगारवन्नाशहेतोः ॥ १६ ॥ तत्कुतस्तत्राह । दैतेया एव चंदनद्रुमास्तेषां वनेऽयं कंटकद्रुमतुल्यो जातः तदेवाह । यस्य दैतेयचंदनवनस्य मूलोन्मूलने परशुस्थानीयस्य विष्णोरयमर्भक एव नालायितो नालमिवाचरत् । यथापरशोश्छेदकत्वे बब्बूलादिद्रुमनिर्मितो दंडः सह-

---

मात्माच माझ्या बुद्धीचा भेद करीत आहे ॥ १३ ॥ आतां, परमात्मा जर निर्विकार आहे तर तो इतरांच्या बुद्धींचा भेद करितो हें ह्मणणें योग्य कसें होईल ? असें ह्मणाल तर–हे ब्रह्मन्, ज्याप्रमाणें लोहचुंबकासमीप लोह, आपण होऊनच भ्रमण करूं लागतें त्याप्रमाणें चक्रपाणी श्रीहरीच्या समीप माझें चित्त, कांहीं एक अवर्णनीय दैवयोगानें विपर्यास पावतें ॥ १४ ॥ नारद ह्मणाला–हे धर्मराजा, एवढेंच त्या ब्राह्मणाला सांगून तो महाबुद्धिमान् प्रल्हाद स्तब्ध राहिला. तेव्हां तो अविवेकी राजसेवक ब्राह्मण, क्रुद्ध होऊन व त्याची निर्भर्त्सना करून ह्मणाला– ॥ १५ ॥ अरे, हा आह्मांला अपयश देणारा आहे ह्यास्तव एक चाबूक आणा, ह्या दुर्बुद्धि कुलांगाराला, सामदानादिक चार उपायांमध्यें चवथा उपाय जो दंड तोच शास्त्रविहित आहे ॥ १६ ॥ अहो, काय सांगावें ! दैत्यरूप चंदनवृक्षांच्या वनामध्यें हा कंटकवृक्षाप्रमाणें उत्पन्न- ॥ १६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

झाला आहे तो असा कीं, दैत्यरूपचंदनवृक्षाचीं मुळें तोडून टाकण्यास तयार असलेल्या विष्णुरूप कुन्हाडीला हा बालकच दांडा झाला आहे ॥ १७ ॥
असो. ह्याप्रमाणें तर्जनादि नानाप्रकारच्या उपायांनीं त्या प्रल्हादास भय दाखवून त्या ब्राह्मणानें त्याला धर्म, अर्थ व काम ह्यांचें प्रतिपादन करणारें शास्त्रच पढविलें
॥ १८ ॥ नंतर, जाणण्यास योग्य असे सामदानादिक चारहि उपाय ह्याला समजले असें जाणून, गुरूनें त्यास मातेकडून अभ्यंगपूर्वक स्नान घालविलें
आणि तिलकादिकांनीं अलंकृत करून दैत्यराज हिरण्यकशिपूप्रत त्याला दाखविलें ॥ १९ ॥ नंतर चरणीं लीन झालेल्या त्या बालकाचें आशीर्वादपूर्वक अभिनंदन
करून व बाहूंनीं पुष्कळ वेळपर्यंत त्याला आलिंगन देऊन, त्या असुर हिरण्यकशिपूला परमानंद झाला ॥ २० ॥ हे युधिष्ठिरा, स्वाभाविक प्रसन्नमुख असलेल्या त्या
पुत्राला, हिरण्यकशिपूनें अंकावर घेऊन त्याचें मस्तकीं अवघ्राण केलें आणि अश्रुबिंदूंनीं त्याला सिंचन करीत करीत असें भाषण केलें कीं, ॥ २१ ॥ हिरण्यकशिपु ह्मणा-

---

कारी तं विना छेदनासंभवात्तथाऽयं विष्णोर्दैत्यमूलोच्छेदे हेतुर्जात इत्यर्थः ॥ १७ ॥ इति तं प्रल्हादं भीषयन्धर्मार्थकामवर्गस्य प्रतिपादकं शास्त्रमध्यापयामास ॥ १८ ॥
ज्ञातं ज्ञेयमुपायानां चतुष्टयं सामदानादि येन तं दैत्येंद्रं प्रति मात्रा मृष्टमुद्वर्त्य स्नापितमलंकृतं भूषणतिलकादिभिः ॥ १९ ॥ २० ॥ २१ ॥ २२॥ पादसेवनं परिचर्या ।

इति तं विविधोपायैर्भीषयंस्तर्जनादिभिः ॥ प्रह्लादं ग्राहयामास त्रिवर्गस्योपपादनम् ॥ १८ ॥ तत एनं गुरुर्ज्ञात्वा ज्ञातज्ञेयचतुष्ट-
यम् ॥ दैत्येंद्रं दर्शयामास मातृमृष्टमलंकृतम् ॥ १९ ॥ पादयोः पतितं बालं प्रतिनंद्याशिषाऽसुरः ॥ परिष्वज्य चिरं दोर्भ्यां
परमामाप निर्वृतिम् ॥ २० ॥ आरोप्यांकमवघ्राय मूर्धन्यश्रुकलांबुभिः ॥ आसिंचन्विकसद्वक्त्रमिदमाह युधिष्ठिर ॥ २१ ॥ हिर-
ण्यकशिपुरुवाच ॥ प्रह्लादानूच्यतां तात स्वधीतं किंचिदुत्तमम् ॥ कालेनैतावताऽऽयुष्मन्यदशिक्षद्गुरोर्भवान् ॥ २२ ॥ प्रह्लाद
उवाच ॥ श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् ॥ अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥ २३ ॥ इति पुंसाऽर्पिता विष्णौ
भक्तिश्चेन्नवलक्षणा ॥ क्रियते भगवत्यद्धा तन्मन्येऽधीतमुत्तमम् ॥ २४ ॥ निशम्यैतत्सुतवचो हिरण्यकशिपुस्तदा ॥ गुरुपुत्रमुवाचेदं
रुषा प्रस्फुरिताधरः ॥ २५ ॥ ब्रह्मबंधो किमेतत्ते विपक्षं श्रयताऽसता ॥ असारं ग्राहितो बालो मामनादृत्य दुर्मते ॥ २६ ॥

अर्चनं पूजा । दास्यं कर्मार्पणम् । सख्यं तद्विश्वासादि । आत्मनिवेदनं स्वशरीरसमर्पणम् । यथा विक्रीतस्य गवाश्वादेर्भरणपालनादिचिंता न क्रियते तथा देहं तस्मै समर्प्य
तच्चिंतावर्जनमित्यर्थः ॥ २३ ॥ इति नवलक्षणानि यस्याः साऽधीतेन चेद्भगवति विष्णौ भक्तिः क्रियते सा चार्पितैव सती यदि क्रियेत न तु कृता सती पश्चादर्प्येत तदुत्तममधीतं
मन्ये । न त्वस्माद्गुरोरधीतं शिक्षितं वा तथाविधं किंचिदस्तीति भावः ॥ २४ ॥ २५ ॥ न विद्यते सारं यत्र तदसारम् । न विद्यते सारं यस्मादिति वास्तवोऽर्थः ॥ २६ ॥

ला- बा दीर्घायुप्रल्हादा, ह्या वेळपर्यंत गुरूपासून जें तूं शिकलास असशील त्यापैकीं कांहीं चांगलें अध्ययन केलेलें आणि श्रेष्ठ असेल तें तूं मला सांग ॥ २२ ॥ प्रल्हाद
ह्मणाला- हे ताता, विष्णूचें श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, पूजन, वंदन, कर्माचें अर्पण, सख्य आणि स्वशरीराचें समर्पण ह्या नवलक्षणांनीं युक्त अशी भगवान् विष्णू-
चेठिकाणीं अर्पण केलेली भक्ति, ज्याच्या योगानें साक्षात् उत्पन्न होत्ये तेंच उत्तम अध्ययन असें मी समजतों. तशाप्रकारचें अध्ययन शिक्षण ह्या गुरूपासून आह्मांला
मुळींच प्राप्त झालें नाहीं ॥ २३ ॥ २४ ॥ ह्याप्रमाणें हें पुत्राचें भाषण श्रवण करून, क्रोधाच्या योगानें हिरण्यकशिपूचा अधरोष्ठ स्फुरण पावूं लागला आणि त्या वेळीं तो
गुरुपुत्राला असें ह्मणाला कीं,- ॥ २५ ॥ हे ब्राह्मणाधमा, हें तूं काय केलेंस? मी काय अपराध केला? असें ह्मणशील तर-हे दुर्मते, माझ्या प्रतिपक्षाचा आश्रय करणाऱ्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तूं दुष्टानें मला न जुमानितां ज्याच्या मध्यें कांहीं अर्थ नाहीं असें तें ह्या बालकाला शिकविलें आहेस ॥ २६ ॥ असो· मित्रत्वानें वागत असूनहि तुझें आचरण आमच्या विरुद्ध झालें हें कांहीं मोठें असंभवनीय नाहीं· कारण, ज्यांची मैत्री कपटयुक्त असत्ये असे तुह्मांसारिखे कपटवेष धारण करून संचार करणारे दुर्जन, ह्या लोकामध्यें आहेत· आणि जसा पातकीजनांना नरक भोगानंतरसुद्धां रोगाचा उद्भव होतो त्याप्रमाणें वरकमीं सज्जनांसारख्या वागणाऱ्या त्या दुर्जनांच्या अंतर्यामींहि असलेला द्वेष, कालांतरानें उदयास येतो ॥ २७ ॥ गुरुपुत्र ह्मणाला– हे इंद्रशत्रो, हा तुझा पुत्र जें सांगत आहे, तें त्याला मीं पढविलेलें नाहीं व दुसऱ्याहि कोणी पढविलेलें नाहीं· तर ही ह्याची स्वाभाविकच बुद्धि आहे· तस्मात्, हे राजा आपला क्रोध आवरून धर· आमच्यावर भलताच दोषारोप करूं नकोस ॥ २८ ॥ नारद ह्मणाला– हे धर्मराजा, ह्याप्रमाणें गुरूनें प्रत्युत्तर दिलें असतां, तो असुर हिरण्यकशिपु, पुन्हा आपल्या पुत्राला असें ह्मणाला कीं,–हे अभद्रा, गुरुवाक्यापासून जर ही दुष्टमति तुला प्राप्त झाली

मित्रत्वेन प्रवर्तमानस्यापि तव विरोधाचरणं नासंभावितमित्याह । संति हीति । दुष्टं मैत्रं मित्रत्वं येषां ते दुर्मैत्राः । रोग इति । ब्रह्महा क्षयरोगी स्यात्सुरापः श्यावदंतकः ॥ स्वर्णहारी तु कुनखी दुश्चर्मा गुरुतल्पग इत्यादि स्मृत्युक्तपातकिनां काले नरकभोगानंतरं रोगो यथोदेति तथा तेषां दुर्जनानां सुजनत्वेन वर्तमानानामप्यघं विद्वेषादिकमुदेतीत्यर्थः ॥२७॥ मत्प्रणीतं मया पाठितम् । नोऽस्मभ्यं कत्कुत्सितं दोषं मा स्मादाः । अडागम आर्षः । मयि दोषारोपं मा कृथा इत्यर्थः । इंद्रशत्रो इति । नहि ब्राह्मणेषु तव कोप उचित इति भावः ॥ २८ ॥

संति ह्यसाधवो लोके दुर्मैत्राश्छद्मवेषिणः ॥ तेषामुदेत्यघं काले रोगः पातकिनामिव ॥ २७ ॥ गुरुपुत्र उवाच ॥ न मत्प्रणीतं न परप्रणीतं सुतो वदत्येष तवेंद्रशत्रो ॥ नैसर्गिकीयं मतिरस्य राजन्नियच्छ मन्युं कददाः स्म मा नः ॥ २८ ॥ नारद उवाच ॥ गुरुणैवं प्रतिप्रोक्तो भूय आहासुरः सुतम् ॥ न चेद्गुरुमुखीयं ते कुतोऽभद्राऽसती मतिः ॥ २९ ॥ प्रह्लाद उवाच ॥ मतिर्न कृष्णे परतः स्वतो वा मिथोऽभिपद्येत गृहव्रतानाम् ॥ अदांतगोभिर्विशतां तमिस्रं पुनः पुनश्चर्वितचर्वणानाम् ॥ ३० ॥ न ते विदुः स्वार्थगतिं हि विष्णुं दुराशया ये बहिरर्थमानिनः ॥ अंधा यथांऽधैरुपनीयमाना वाचीशतंत्यामुरुदाम्नि बद्धाः ॥ ३१ ॥

गुरुमुखी गुरुवाक्यजनिता । हे अभद्र ॥ २९ ॥ आस्तामियं वार्ता भवादृशानां विषयासक्तानामत्रानधिकारादित्याशयेनाह । मतिरिति । परतो गुरोः स्वतो वा मिथो वाऽन्योन्यतो नाभिपद्येत न संपद्येत । केषाम् गृहव्रतानां गृह एव व्रतं संकल्प इतिकृत्यचिंता येषाम् । अतएवादांतैरनुपरतैर्गोभिरिंद्रियैर्हेतुभूतैस्तमिस्रं संसारं विशताम् । तत्र चर्वितस्यैव चर्वणं येषाम् ॥ ३० ॥ ननु श्रीकृष्णस्य परमानंदस्वरूपत्वात्तेऽपि तन्निष्ठा एव किं न स्युरिति चेत्तदज्ञानादित्याह । नेति । येदुराशया विषयवासितांतःकरणास्ते हि विष्णुं न विदुः । तत्र हेतुः । स्वस्मिन्नेवार्थः पुरुषार्थो येषां तेषां गतिं गम्यम् । ननु तेऽपि गुरूपदेशाद्विष्णुं ज्ञास्यंति तत्राह । बहिर्विषयेष्वर्थो येषां

नाहीं तर कोठून प्राप्त झाली ? ॥ २९ ॥ हें पित्याचें भाषण श्रवण करून, असूंचा ही वार्ता, तुह्मांसारख्या विषयासक्त जनांना ह्याविषयीं अधिकार नाहीं, अशा अभिप्रायानें प्रल्हाद भाषण करितो कीं,– ज्यांची गृहसौख्याविषयींच निरंतर चिंता चाललेली असत्ये त्या विषयांपासून उपराम न पावलेल्या व इंद्रियांच्या योगानें संसारामध्यें प्रवेश करून वारंवार विषयांचें सेवन करणाऱ्या पुरुषांची बुद्धि, दुसऱ्यापासून, स्वतःपासून अथवा परस्परांच्या योगानें श्रीकृष्णाचेठिकाणीं कधींहि आसक्त होत नाहीं ॥ ३० ॥ आतां, श्रीकृष्ण परमानंदस्वरूप असल्यामुळें ते लोकसुद्धां तत्परच कां नसावेत अशी शंका घ्यावी तर हें त्यांचें अज्ञान होय असें सांगतो–ज्यांचीं अंतःकरणें विषयाविष्ट झालीं आहेत ते लोक, स्वतःचेचठिकाणीं पुरुषार्थ आहे असें समजणाऱ्या लोकांनीं जाणण्यास योग्य अशा श्रीविष्णूला जाणत नाहींत· आतां, गुरूच्या उपदेशानें ते

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विष्णूला जाणतील असें ह्मणावें तर हे ताता, बाह्यविषयांचेठिकाणीं परमार्थ बुद्धि धारण करणाऱ्यांनाच गुरु असें समजण्याचा त्यांचा स्वभाव असल्यामुळें, जसे आंध-
ळ्यांनीं नेलेले आंधळे, मार्ग न जाणतां खाड्यामध्यें पडतात त्याप्रमाणें तेहि ब्राह्मणादिसंज्ञारूप बहुत दाव्यांनीं युक्त असलेल्या ईश्वराच्या वेदवाणीरूप दावणीचेठिकाणीं
काम्यकर्मांच्या योगानें बद्धच होतात ॥ ३१ ॥ आतां, अद्वितीय, चिदेकरस, सर्वभूतांचेठिकाणीं गुप्तरीतीनें असणारा, सर्वव्यापी आणि सर्वभूतांचा अंतरात्मा असा
ईश्वर आहे इत्यादि श्रुतींनीं प्रतिपादित असलेल्या विष्णूला ते कसे जाणत नाहींत व संसारामध्यें तरी कोणत्या कारणामुळें त्यांचा प्रवेश होतो, असें ह्मणावें तर–हे ताता,
ज्यांचा विषयसंबंधीं अभिमान अगदीं निरस्त झाला आहे, त्या अत्यंत पूज्य पुरुषांच्या चरणरजांचा अभिषेक जोंपर्यंत ह्यांनीं संपादन केला नाहीं तोंपर्यंत, श्रुतिवा
क्यांनीं उत्पन्न झालेलीसुद्धां ह्यांची बुद्धि, भगवंताच्या चरणीं रत होत नाहीं; ह्मणजे असंभावनादि दोषांच्या योगानें विघात पावत्ये. कारण, संसाराची निवृत्ति होणें हेंच

ते बहिरर्थास्तानेव गुरुत्वेन मंतुंशीलं येषां तेऽतोंऽधैरुपनीयमाना अंधा यथा पंथानं न विदुः किंतु गर्ते पतंति तथा तेऽपीशस्य तंत्यां दीर्घरज्ज्वां वेदलक्षणायामुरूणि
दामानि ब्राह्मणादिनामानि यस्यां तस्यां काम्यैः कर्मभिर्बद्धा एव भवंतीत्यर्थः। तदुक्तम्। विषयाविष्टचित्तानां विष्ण्वावेशः सुदूरतः ॥ वारुणीदिग्गतं वस्तु व्रजन्नैंद्रीं
किमाप्नुयादिति ॥ ३१ ॥ ननु च एको देवः सर्वभूतेषु गूढः सर्वव्यापी सर्वभूतांतरात्मेत्यादिश्रुतिप्रतिपादितं विष्णुं कथं न विदु कुतो वा तेषां तमिस्रप्रवेशस्तत्राह।

नैषां मतिस्तावदुरुक्रमांघ्रिं स्पृशत्यनर्थापगमो यदर्थः ॥ महीयसां पादरजोभिषेकं निष्किंचनानां न वृणीत यावत् ॥ ३२ ॥ इत्यु-
क्त्वोपरतं पुत्रं हिरण्यकशिपू रुषा ॥ अंधीकृतात्मा स्वोत्संगान्निरस्यत महीतले ॥ ३३ ॥ आहामर्षरुषाविष्टः कषायीभूतलोचनः ॥
वध्यतामाश्वयं वध्यो निःसारयत नैर्ऋताः ॥ ३४ ॥ अयं मे भ्रातृहा सोऽयं हित्वा स्वान्सुहृदोऽधमः ॥ पितृव्यहंतुर्यः पादौ विष्णो-
र्दासवदर्चति ॥ ३५ ॥ विष्णोर्वा साध्वसौ किं नु करिष्यत्यसमंजसः ॥ सौहृदं दुस्त्यजं पित्रोरहाद्यः पंचहायनः ॥ ३६ ॥

नैषामिति। निष्किंचनानां निरस्तविषयाभिमानानां महत्तमानां पादरजसाऽभिषेकं यावन्न वृणीत तावच्छ्रुतिवाक्यतो जाताऽप्येषां मतिरुरुक्रमस्यांघ्रिं न स्पृशति न प्राप्नोति।
असंभावनादिभिर्विहन्यत इत्यर्थः। अनर्थस्य संसारस्यापगमो यदर्थो यस्या अंघ्रिस्पर्शिन्या मतेरर्थः प्रयोजनम्। महदनुग्रहाभावान्न तत्त्वनिश्चयो नापि मोक्षस्तेषामित्यर्थः
॥ ३२ ॥ निरस्यत विक्षेप ॥ ३३ ॥ अमर्षोऽसहनं तेन सहितया रुषाऽऽविष्टो व्याप्तः। कषायीभूते आताम्रे लोचने यस्य। हे नैर्ऋता राक्षसाः ॥ ३४ ॥ वध्यत्वे
हेतुर्यतोऽयं मे भ्रातृहा। कुतः। यो विष्णोः पादौ दासवदर्चति तत्पक्षपातीत्यर्थः। अतः स एवायमित्यन्वयः ॥ ३५ ॥ अहो विष्णुरप्यविश्वसनीयं किमिति स्वीकृतवानि-

---

त्या बुद्धीचें फळ होय. एतावता महात्म्यांच्या अनुग्रहावांचून त्या गृहासक्त मनुष्यांना निश्चयेंकरून तत्त्वज्ञान होत नाहीं व मोक्षहि प्राप्त होत नाहीं ॥ ३२ ॥ इतकें बो-
लून स्वस्थ बसलेल्या पुत्राला, विवेकशून्य असलेल्या अंतःकरणानें युक्त अशा त्या हिरण्यकशिपूनें क्रोधामुळें आपल्या मांडीवरून भूतलावर लोटून दिलें ॥ ३३ ॥ आणि
असहिष्णुता व क्रोध ह्यांनीं व्याप्त झाल्यामुळें ज्याचे नेत्र आरक्तवर्ण झाले आहेत असा तो हिरण्यकशिपु ह्मणाला कीं,–हे राक्षसहो, ह्याला येथून लवकर बाहेर काढा
आणि ह्याचा वध करा. कारण, हा वधास योग्य आहे ॥ ३४ ॥ आतां हा वध्य कसा असें ह्मणाल तर–हे राक्षसहो, सुहृदांना टाकून हा अधम पुत्र, ज्याअर्थीं पितृव्यघातकी
विष्णूच्या चरणांचें एकाद्या दासाप्रमाणें अर्चन करितो त्याअर्थीं माझ्या भ्रात्याचा घात करणारा हाच विष्णु आहे, ह्मणून वध करण्यास योग्य आहे ॥ ३५ ॥ अरे, विष्णू-
नें तरी ह्या अविश्वसनीय दुष्टाचा कशा करितां स्वीकार केला आहे? अहो! ज्यानें पांचवर्षांचा असतांनाच त्याग करण्यास अशक्य अशा मातापितरांचेठिकाणीं असलेल्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

स्नेहाचासुद्धां त्याग केला आहे तो हा कृतघ्न विष्णूचें तरी काय हित करणार आहे ? ॥ ३६ ॥ आतां, कसा झाला तरी हा आपला पुत्र आहे, तेव्हां ह्याचा वध कसा करावा ? असें ह्मणाल तर—हे राक्षसहो, जसें औषध परिणामी हितकारक असतें त्याप्रमाणें एकादा परकीसुद्धां जर आपला हितकारक असेल तर तो आपलें अपत्यच समजला पाहिजे आणि आपला औरस पुत्र असला तरी जर अहित करणारा असेल तर त्याला रोगाप्रमाणें आपला शत्रु समजलें पाहिजे. फार तर काय, प्रेमस्थानभूत अशा अपत्यादिकांची तर गोष्ट राहूंद्याच परंतु, आपल्या शरीराचाहि एकादा अवयव जर आपलें हित करणारा नसेल तर तो तोडून टाकावा. कारण, तेवढ्याचा त्याग केला असतां, बाकीचें शरीर सुखानें वांचतें ॥ ३७ ॥ तस्मात्, भोजन, शयन आणि आसन इत्यादि सर्व उपायांनीं ह्मणजे भोजनादिकांचेठिकाणीं विषप्रयोगवगैरे करून, ह्याचा वध करा. कारण, विषयासक्त झालेलें इंद्रिय जसें मुनीला शत्रुवत् असतें त्याप्रमाणें पुत्रवेष धारण करणारा हा माझा शत्रूच आहे ॥ ३८ ॥ असो. तीक्ष्णदंष्ट्रा, भयंकर मुखें

त्याह । विष्णोर्वेति । अहाज्जहौ ॥ ३६ ॥ ननु तवायमपत्यं कथं वध्यस्तत्राह । परोऽप्यौषधमिव हितकृच्चेत्तर्ह्यपत्यमेव ज्ञेयः । सुतः स्वदेहजोऽप्यहितश्चेदामय इव ज्ञेयः । आस्तां ममतास्पदस्य कथा अंगमपि च यत्करचरणादि तदप्यात्मनोऽहितं चेच्छिंद्यादेवेत्यर्थः ॥ ३७ ॥ अतः सर्वैरुपायैर्हंतव्यः । संभोजो भोजनम् । भोजनादिषु विषा-

परोऽप्यपत्यं हितकृद्यथौषधं स्वदेहजोऽप्यामयवत्सुतोऽहितः ॥ छिंद्यात्तदंगं यदुतात्मनोऽहितं शेषं सुखं जीवति यद्विवर्जनात् ॥ ३७ ॥ सर्वैरुपायैर्हंतव्यः संभोजशयनासनैः ॥ सुहृल्लिंगधरः शत्रुर्मुनेर्दुष्टमिवेंद्रियम् ॥ ३८ ॥ नैर्ऋतास्ते समादिष्टा भर्त्रा वै शूलपाणयः ॥ तिग्मदंष्ट्रकरालास्यास्ताम्रश्मश्रुशिरोरुहाः ॥ ३९ ॥ नदंतो भैरवान्नादांश्छिंधि भिंधीति वादिनः ॥ आसीनं चाहनञ्छूलैः प्रह्लादं सर्वमर्मसु ॥ ४० ॥ परे ब्रह्मण्यनिर्देश्ये भगवत्यखिलात्मनि ॥ मुक्तात्मन्यफला आसन्नपुण्यस्येव सत्क्रियाः ॥ ४१ ॥ प्रयासेऽपहते तस्मिन्दैत्येंद्रः परिशंकितः ॥ चकार तद्वधोपायान्निर्बंधेन युधिष्ठिर ॥ ४२ ॥ दिग्गजैर्दंदशूकैश्च अभिचारावपातनैः ॥ मायाभिः सन्निरोधैश्च गरदानैरभोजनैः ॥ ४३ ॥

दिप्रयोगैरित्यर्थः । यथा दुष्टमिंद्रियं मुनेः शत्रुः ॥ ३८ ॥ तिग्मास्तीक्ष्णा दंष्ट्रा येषां करालान्यास्यानि भयंकराणि मुखानि येषां ते च तेच । ताम्राणि श्मश्रूणि शिरोरुहाश्च येषाम् ॥ ३९ ॥ ४० ॥ पर ईश्वरे युक्तः समाहित आत्मा मनो यस्य तस्मिन्प्रह्लादे तेषां नैर्ऋतादीनां प्रहारा निष्फला आसन्‌जाताः । तत्र हेतवः । ब्रह्मणि निर्विकारेऽनिर्देश्येऽविषये भगवति निरतिशयैश्वर्येऽखिलात्मनि शस्त्रादीनामपि नियंतर्येवंभूते परेऽपुण्यस्य निर्दैवस्य सत्क्रिया महोद्यमा इव ॥ ४१ ॥ ४२ ॥ दंदशूकैः सर्पैः । अभिचाराः कृ-

---

आणि आरक्तवर्ण अशा श्मश्रु व केंस ह्यांनीं युक्त असलेल्या त्या राक्षसांना, स्वामी हिरण्यकशिपूनें अशी आज्ञा केली असतां, त्यांनीं हातांमध्यें शूलें धारण केलीं ॥ ३९ ॥ आणि भयंकर गर्जना करणाऱ्या व 'तोडा, मारा' असें ह्मणणाऱ्या त्यां राक्षसांनीं, शूलांच्या योगानें स्वस्थ बसलेल्या त्या प्रल्हादाला सर्व मर्मांचेठिकाणीं प्रहार केले ॥ ४० ॥ परंतु, दैवहीन पुरुषाचे जसे मोठमोठेहि उद्योग व्यर्थ होऊन जातात त्याप्रमाणें प्रल्हादाचेठिकाणीं केलेले त्या राक्षसादिकांचे प्रहार निष्फल झाले. कारण, त्यानें आपलें मन, निर्विकार, निर्विषय, निरतिशय ऐश्वर्यांनीं युक्त आणि शस्त्रादिकांचाहि नियंता अशा परमेश्वराचेठिकाणीं लावलें होतें ॥ ४१ ॥ हे युधिष्ठिरा, ह्याप्रमाणें त्या प्रल्हादाचेठिकाणीं दैत्यांचा मारण्याविषयींचा प्रयत्न निष्फल झाला असतां, दैत्यराज हिरण्यकशिपूला फारच शंका उत्पन्न झाली व अत्यंत आग्रहपूर्वक त्यानें त्याच्या वधाविषयीं उपाय योजिले ॥ ४२ ॥ ते असे कीं,—दिग्गजांच्या पायाखालीं तुडविणें, मोठमोठ्या सर्पांकडून दंश करविणें, कृत्यादि अभिचारांनीं मारविणें पर्वत

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शिखरादिकांपासून खालीं लोटून देणें, नानाप्रकारच्या मायांनीं घात करविणें, खाड्यामध्यें घालून आच्छादित करणें, विषप्रयोग करणें, उपवास घालणें, थंडीमध्यें ठेवणें, वाऱ्यामध्यें बसविणें, अग्नीमध्यें टाकणें, पाण्यामध्यें बुडविणें आणि त्याच्यावर पर्वत फेंकणें इत्यादि अनेकवेळां योजिलेल्या उपायांनीं जेव्हां तो असुर, आपल्या निष्पाप पुत्रास मारण्यास समर्थ झाला नाहीं व त्याचा वध करण्यास जेव्हां त्याला कांहींच उपाय सुचेनासा झाला तेव्हां तो अत्यंत चिंताग्रस्त होऊन मनामध्यें ह्मणाला कीं,– ॥ ४३ ॥ ४४ ॥ अहो, मी ह्याला पुष्कळ वाईट वाईट भाषण केलें, तसेंच नानाप्रकारचे द्रोह व अभिचारादि निंद्यधर्म ह्यांच्या योगानें ह्याच्या वधाचे उपायहि योजिले. परंतु, त्यांपासून हा आपल्याच सामर्थ्यानें मुक्त झाला ॥ ४५ ॥ तसाच हा बालक असतांहि व अगदीं माझ्यासमीप असतांहि ह्याच्या चित्ताला माझी मुळींच भीति वाटत नाहीं, तेव्हां मलाहि मारण्यास समर्थ असा हा बालक शुनःशेपाप्रमाणें ह्मणजे अजीगर्तांचा मध्यमपुत्र जो शुनःशेप त्याला आईबापांनीं हरिश्चंद्र राजास विक-

---

त्यादयः । अवपातनानि गिरिशृंगादधः पातनानि तैः । मायाभिः शंबरनिर्मिताभिः । अवटादिषु संनिरोधैश्च ॥४३॥ पर्वताक्रमणैः पर्वतानां तदुपरि क्षेपैः । बहुवचनैरभिचाराद्यावृत्तिं दर्शयति । तद्धननं कर्तुं नाभ्यपद्यत न प्राप नाशक्नोदित्यर्थः ॥४४॥ चिंतामेवाह । एष इति त्रिभिः । मे मयाऽसाधु परुषं यथा भवति तथोक्तः । असद्धर्मैरपकारैरभिचारैर्वा ॥४५॥ अविदूरे समीपे वर्तमानोऽपि बालोऽप्ययमजडधीर्निर्भयचित्तो मेऽनार्यमन्याय्यं शत्रुत्वं वा न विस्मरति । अजीगर्तस्य मध्यमपुत्रः शुनःशेपो नाम पितृभ्यां हरिश्चंद्राय विक्रीतः सन्यथा

हिमवाय्वग्निसलिलैः पर्वताक्रमणैरपि ॥ न शशाक यदा हंतुमपापमसुरः सुतम् ॥ चिंतां दीर्घतमां प्राप्तस्तत्कर्तुं नाभ्यपद्यत ॥ ४४ ॥ एष मे बह्वसाधूक्तो वधोपायाश्च निर्मिताः ॥ तैस्तैर्द्रोहैरसद्धर्मैर्मुक्तः स्वेनैव तेजसा ॥ ४५ ॥ वर्तमानोऽविदूरेवै बालोऽप्यजडधीरयम् ॥ न विस्मरति मेऽनार्यं शुनःशेप इव प्रभुः ॥ ४६ ॥ अप्रमेयानुभावोऽयमकुतश्चिद्भयोऽमरः ॥ नूनमेतद्विरोधेन मृत्युर्मे भविता न वा ॥ ४७ ॥ इति तं चिंतया किंचिन्म्लानश्रियमधोमुखम् ॥ शंडामर्कावौशनसौ विविक्त इति होचतुः ॥ ४८ ॥ जितं त्वयैकेन जगत्रयं भ्रुवोर्विजंभणत्रस्तसमस्तधिष्ण्यपम् ॥ न तस्य चिंत्यं तव नाथ चक्ष्महे न वै शिशूनां गुणदोषयोः पदम् ॥४९॥

तयोरपकारमविस्मरंस्तद्विपक्षं विश्वामित्रमाश्रित्य गोत्रांतरमापन्नस्तद्वत् । यद्वा स्वभावापरित्यागे दृष्टांतः । शुनः शेपः पुच्छमिवेति ॥ ४६ ॥ अप्रमेयोऽपरिमेयोऽनुभावो यस्य । न कुतश्चिद्भयं यस्य । अमरो मृत्युशून्यश्च । न वा भविता अन्यथा मृत्युर्नैव भविष्यतीत्यर्थः ॥ ४७ ॥ औशनसावुशनसः पुत्रौ नीतिज्ञौ । विविक्त एकांते ॥ ४८ ॥ भ्रुवोर्विजृंभणेनैव त्रस्ताः समस्ता धिष्ण्यपा लोकपाला यस्मिंस्तस्य तव चिंत्यं न चक्ष्महे न पश्यामः । पदमालंबनं नैवास्ति । यद्वा शिशूनां वृत्तं गुणदोषयोः पदं विषयो

लें असतां, जसा त्यानें आईबापांचा अपकार मनांत धरून त्यांचा शत्रु असलेल्या विश्वामित्राचा आश्रय करून, दुसरें गोत्र पावला, त्याप्रमाणें माझें शत्रुत्व विसरणार नाहीं ॥ ४६ ॥ अहो काय सांगावें ! ह्याचा प्रभाव अपरिमित असल्यामुळें ह्याला कोणापासूनहि भय नाहीं, हा अमर आहे. तस्मात्, ह्याच्याच विरोधामुळें निःसंशय मला मृत्यु प्राप्त होईल; नाहीं तर मुळींच प्राप्त होणार नाहीं ॥ ४७ ॥ असो. अशा प्रकारच्या चिंतेनें किंचित् निस्तेज होऊन एकांतस्थलीं खालीं मान घालून बसलेल्या त्या हिरण्यकशिपूला, शुक्राचार्यांचे पुत्र शंडामर्क असें ह्मणाले कीं,–॥ ४८ ॥ हे प्रभो, भ्रुकुटींच्या चलनानेंच ज्यांतील सर्व लोकपाल भयभीत झाले आहेत असें हें त्रैलोक्य, ज्याअर्थी तूं एकट्यानें जिंकिलें आहेस त्याअर्थीं तुला चिंतास्पद असें आह्मी कांहींच पाहत नाहीं. आतां, प्रल्हादाचा शत्रुपक्षपात आणि प्रभाव अवलोकन करून मला चिं-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ता प्राप्त झाली आहे असें ह्मणशील तर–हे राजा, बालकांची वर्तणूक मुळींच गुणदोषांला विषय होत नाहीं ॥ ४९ ॥ तथापि हे असुरश्रेष्ठा, शुक्राचार्य गुरु, तपश्चर्या पुरी करून माघारा येईपर्यंत, हा भयभीत होऊन पळूनवगैरे न जाईल अशारीतीनें तूं याला वरुणपाशांनीं बंधन करून ठेव. कारण, वय आणि महत्सेवा ह्यांच्या योगानें पुरुषाची बुद्धि चांगली होत्ये ॥ ५० ॥ ह्याप्रमाणें गुरुपुत्रानें केलेल्या भाषणाचा 'ठीक आहे' ह्मणून अंगीकार करून, हिरण्यकशिपूनें असें भाषण केलें कीं, हे गुरुपुत्रहो, गृहस्थाश्रमी राजांचे जे धर्म आहेत तेच तुह्मीं ह्याला शिकवावे ॥ ५१ ॥ हे धर्मराजा, नंतर त्या शंडामर्कांनीं विनययुक्त आणि नम्र अशा प्रऱ्हादाला अनुक्रमानें धर्म, अर्थ व काम हेच निरंतर पढविले ॥ ५२ ॥ परंतु, गुरूंनीं आपल्याला यथासांग शिकविलेले जे धर्म, अर्थ व काम ते त्यानें चांगले असे मानिले नाहींत. कारण ती शिक्षा रागद्वे-

---

न भवतीत्यर्थः ॥ ४९ ॥ तथाऽपि तु बंधनमस्योचितमित्याहतुः इमं त्विति । यावद्गुरुर्भार्गव आगमिष्यति तावद्बद्ध्वा निधेहि । ततः किमत ऊचतुः । यतः पुंसो बुद्धिश्च वयसा तथा आर्यसेवया समीचीना भवति ॥ ५० ॥ अनुज्ञाय तथेत्यंगीकृत्य ॥ ५१ ॥ ततश्च तौ प्रह्लादाय धर्मादिकमूचतुः प्रश्रितश्चासाववनतश्च तस्मै ॥ ५२ ॥ यथा यथाव-

इमं तु पाशैर्वरुणस्य बद्ध्वा निधेहि भीतो न पलायते यथा ॥ बुद्धिश्च पुंसो वयसार्यसेवया यावद्गुरुर्भार्गव आगमिष्यति ॥ ५० ॥
तथेति गुरुपुत्रोक्तमनुज्ञायेदमब्रवीत् ॥ धर्मा ह्यस्योपदेष्टव्या राज्ञां ये गृहमेधिनाम् ॥ ५१ ॥ धर्ममर्थं च कामं च नितरां चानु-
पूर्वशः ॥ प्रह्रादायोचतू राजन्प्रश्रितावनताय च ॥ ५२ ॥ यथा त्रिवर्गं गुरुभिरात्मने उपशिक्षितम् ॥ न साधु मेने तच्छिक्षां
द्वंद्वारामोपवर्णिताम् ॥ ५३ ॥ यदाचार्यः परावृत्तो गृहमेधीयकर्मसु ॥ वयस्यैर्बालकैस्तत्र सोपहूतः कृतक्षणैः ॥ ५४ ॥ अथ तान्-
श्लक्ष्णया वाचा प्रत्याहूय महाबुधः ॥ उवाच विद्वांस्तन्निष्ठां कृपया प्रहसन्निव ॥ ५५ ॥ ते तु तद्गौरवात्सर्वे त्यक्तक्रीडापरिच्छदाः ॥
बाला न दूषितधियो द्वंद्वारामेरितेहितैः ॥ ५६ ॥

त्रिवर्गमुपशिक्षितमपि न साधु मेने तत्तां शिक्षां च । कुतः । द्वंद्वैः रागद्वेषादिभिर्विषयेष्वारमणं येषां तैरुपवर्णिताम् ॥ ५३ ॥ परावृत्तोऽन्यत्र गतः स उपहूतः । संधिः पादपूरणार्थम् । क्रीडार्थं कृतक्षणैः कृतोत्सवैर्लब्धावसरैरिति वा ॥ ५४ ॥ तन्निष्ठां तेषां निष्ठां जन्ममरणादिलक्षणां विद्वान् ॥ ५५ ॥ द्वंद्वारामाणामीरितैरीहितैश्च न

षादि द्वंद्वांनीं विषयांचेठिकाणीं रममाण होणाऱ्या पुरुषांनींमात्र चांगली ह्मणून वर्णन केलेली होती, सत्पुरुषांनीं वर्णन केलेली नव्हती ॥ ५३ ॥ एकेवेळीं तो गुरु पढविण्याच्या स्थानापासून निवृत्त होऊनगृहकर्मांमध्यें आसक्त झाला असतां, त्याठिकाणीं खेळण्याची संधि सांपडलेल्या समवयस्क बालकांनीं, त्या प्रऱ्हादाला खेळण्याकरितां हाक मारिली ॥ ५४ ॥ तेव्हां त्यांची जन्ममरणरूप स्थिति जाणणाऱ्या त्या महाज्ञानी प्रऱ्हादानें, मधुरवाणीनें त्यांनाच उलट आपल्या जवळ बोलाविलें आणि त्यांचा उपहास केल्यासारिखें करून कृपेनें त्यांप्रत भाषण केलें ॥ ५५ ॥ हे राजेंद्रा, ते बालक असल्यामुळें रागद्वेषादि द्वंद्वांनीं विषयासक्त झालेल्या पुरुषांच्या उपदेशांनीं व आचरणांनीं त्यांची बुद्धि दूषित झाली नव्हती ह्मणून प्रऱ्हादाच्या भाषणाच्या गौरवामुळें त्या सर्वांनीं क्रीडासाधनभूत पदार्थांचा त्याग केला व आपलें अंतःकरण

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आणि दृष्टि त्याच्याकडे लाऊन ते त्याच्या सभोंवतीं बसले असतां, दयालु व हितकारी अशा त्या महाभगवद्भक्त प्रन्हाद असुरानें त्यांना उपदेश केला ॥ ५६ ॥ ५७ ॥
ह्याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील सप्तमस्कंधापैकीं प्रन्हादवधोपायवर्णननामक हा पांचवा अध्याय समाप्त झाला ॥ ५ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ ॥
आतां ह्या सहाव्या अध्यायामध्यें, गृहामध्यें गुरु व्यग्र झाला असतां प्रन्हादानें दैत्य बालकांवर कृपाकरून नारदांनीं सांगितलेल्या परमतत्त्वाचा त्यांना उपदेश केला,
ही कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ त्यामध्यें प्रथमतः निरर्थक कर्मे व भाषणें ह्यांच्या योगानें आयुष्याचा व्यय होतो हें न जाणणाऱ्या त्या बालकांना, धर्मात्म्या प्रन्हा-
दानें कृपापूर्वक भागवतधर्मांचें कथन केलें आहे ॥ २ ॥ प्रन्हाद ह्मणाला– हे बालक हो, ज्ञानीपुरुषानें ह्या मनुष्यजन्मामध्येंच व त्यांतूनहि अगदीं कौमारावस्थेम-

---

दूषिता धीर्येषाम्। यतो बालाः ॥ ५६ ॥ तस्मिन्नेव न्यस्तं हृदयमीक्षणं च यैः ॥ ५७ ॥ ॥ इति सप्तमे टीकायां पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥ ॥ षष्ठे गुरौ गृहव्यग्रे प्रह्रादो दैत्य-
बालकान् ॥ अनुकंप्य परं तत्त्वं नारदोक्तमुपादिशत् ॥ १ ॥ निरर्थकक्रियालापैरायुर्व्ययमजानताम् ॥ प्रह्रादः सदयं प्राह धर्मं भागवतं कृती ॥ २ ॥ कौमार इत्यादिना।
इहैव मानुषजन्मनि धर्मानाचरेत् । यतोऽर्थदमेतत् । तत्र च कौमार एव यतस्तदप्यध्रुवम् । न चैवंभूतं जन्मांतरम् । यतो दुर्लभम् । तत्र धर्मानेवाचरेन्न सुखार्थे प्रयासान् ।

पर्युपासत राजेंद्र तन्न्यस्तहृदयेक्षणाः ॥ तानाह करुणो मैत्रो महाभागवतोऽसुरः ॥ ५७ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे सप्तम-
स्कंधे पंचमोऽध्यायः ॥ ॥ ५ ॥ ॥ प्रह्राद उवाच ॥ कौमार आचरेत्प्राज्ञो धर्मान्भागवतानिह ॥ दुर्लभं मानुषं जन्म तदप्यध्रुवमर्थ-
दम् ॥ १ ॥ यथा हि पुरुषस्येह विष्णोः पादोपसर्पणम् ॥ यदेष सर्वभूतानां प्रिय आत्मेश्वरः सुहृत् ॥ २ ॥ सुखमैंद्रियकं दैत्या
देहयोगेन देहिनाम् ॥ सर्वत्र लभ्यते दैवाद्यथा दुःखमयत्नतः ॥ ३ ॥ तत्प्रयासो न कर्तव्यो यत आयुर्व्ययः परम् ॥ न तथा
विंदते क्षेमं मुकुंदचरणांबुजम् ॥ ४ ॥ ततो यतेत कुशलः क्षेमाय भयमाश्रितः ॥ शरीरं पौरुषं यावन्न विपद्येत पुष्कलम् ॥ ५ ॥

तत्र भागवतानेव न काम्यान् ॥१॥ इह भागवतानेव धर्मानाचरेदित्येतदुपपादयति । यथाहीति चतुर्भिः । इह पुरुषस्य विष्णोः पादोपसर्पणमेव यथाऽनुरूपं योग्यमित्यर्थः ।
यद्यस्मादेष प्रिय इत्यादि ॥ २ ॥ ननु भोगोद्यमः कथं त्याज्य इति चेत्तत्राह । सुखमिति । सर्वत्र पश्वादावपि । दैवात्पूर्वादृष्टादेव ॥ ३ ॥ अतस्तदर्थं प्रयासो न कर्त-
व्यः । यतः प्रयासात्परं केवलमायुषो व्यय एव यतस्तथा तेन प्रकारेण क्षेमं न प्राप्नोति ॥ ४ ॥ भयमाश्रितः संसारं प्राप्तः पुरुषरूपं शरीरं यावत्पुष्कलमस्ति न विपद्येता-

---

ध्येंच भागवतधर्मांचें आचरण करावें सकामधर्मांचें आचरण करूं नये. कारण, हा मनुष्यजन्मच दुर्लभ असून पुरुषार्थप्रद आहे व त्यांतूनहि तो अशाश्वत आहे ॥ १ ॥
आतां ह्या मनुष्यजन्मामध्यें भागवतधर्मांचेंच आचरण करावें, हें चार श्लोकांनीं उपपादन करितो– ह्या मनुष्यजन्मामध्यें विष्णूच्या चरणाप्रत शरण जाणें हेंच पुरु-
षाला योग्य आहे. कारण, हा विष्णूच सर्व भूतांचा आत्मा, ईश्वर, प्रिय आणि हितकारी आहे ॥ २ ॥ आतां विषयभोग प्राप्त होण्याचा उद्योग कसा सोडावा असें
ह्मणाल तर,– हे दैत्यहो, जसें प्राण्यांना आयास न करितां पूर्वकर्मानेंच दुःख प्राप्त होतें त्याप्रमाणें देहाच्या योगानें इंद्रियसंबंधीं सुखहि सर्वयोनींमध्यें दैवयोगानेंच प्राप्त
होतें ॥ ३ ॥ ह्मणून त्याच्याकरितां प्रयत्न करूं नये. त्या प्रयासेंकरून केवळ आयुष्याचा व्यय मात्र होतो. कांहींच फळ प्राप्त होत नाहीं. जसा मुकुंदाच्या चरणकमलाची
सेवा करणारा पुरुष, परमानंदरूप क्षेम पावतो तसा विषयसुखार्थ प्रयत्न करणारा पुरुष, क्षेम पावत नाहीं, तर दुःखच पावतो ॥ ४ ॥ ह्यास्तव संसारामध्यें प्राप्त झाले–

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्या विवेकी पुरुषानें जोंपर्यंत सर्वांगांनीं परिपूर्ण असलेल्या आपल्या शरीराचा नाश झाला नाहीं तोंपर्यंत लवकरच कल्याणाकरितां प्रयत्न करावा ॥ ५ ॥ अहो, पुरुषाचें आयुष्य आधीं मुळीं शंभरवर्षें; त्यांतील अर्धें इंद्रियनिग्रह न करणाऱ्या पुरुषाचें व्यर्थ जातें. कारण, तो पुरुष, रात्रीचेठिकाणीं निद्रात्मक अज्ञानामध्यें निमग्न होऊन निजून राहतो ॥ ६ ॥ तसेंच बाल्यावस्थेंमध्यें अज्ञानी असल्यामुळें दहावर्षें, कौमारावस्थेमध्यें खेळत असल्यामुळें दहावर्षें, मिळून वीसवर्षें आणि वृद्धावस्थेमध्यें जरेनें शरीर ग्रस्त होऊन अशक्त झाल्यामुळें वीसवर्षें असें आयुष्य फुकटच जातें ॥ ७ ॥ आणि बाकीचें आयुष्य, प्रबल मोहानें व दुःखांनीं चोहोंकडून परिपूर्ण अशा कामाच्या योगानें गृहामध्यें आसक्त झालेल्या त्या प्रमत्त पुरुषाचें व्यर्थ जातें ॥ ८ ॥ आतां यौवनावस्थेमध्यें पुरुष जरी गृहासक्त असला तथापि नंतर विरक्त होऊन क्षेममार्गाचें अवलंबन करील, असें ह्मणावें तर तें असंभवनीय आहे असें दर्शवीत होत्साता कौमारावस्थेमध्येंच भागवतधर्माचें आचरण केलें पाहिजे असें प्रतिपादन करितो—

क्षमं न भवेन्न नश्येदिति वा तावच्छीघ्रं क्षेमाय यतेत ॥ ५ ॥ आयुर्व्ययक्रममाह पुंस इति त्रिभिः । यचस्माच्छेते ॥ ६ ॥ विंशतिर्वर्षाण्यायुर्याति ॥ ७ ॥ दुरापूरेण दुःखैः समंतादापूर्यमाणेन ॥ ८ ॥ ननु यौवने गृहासक्तोऽपि पश्चाद्विरक्तः सन् क्षेमं यास्यतीत्याशंक्य तदसंभवं दर्शयन्कौमार एवाचरेदित्येतदुपपादयति । को गृहेष्विति सप्तभिः

पुंसो वर्षशतं ह्यायुस्तदर्धं चाजितात्मनः ॥ निष्फलं यदसौ रात्र्यां शेतेंऽधं प्रापितस्तमः ॥ ६ ॥ मुग्धस्य बाल्ये कौमारे क्रीडतो याति विंशतिः ॥ जरया ग्रस्तदेहस्य यात्यकल्पस्य विंशतिः ॥ ७ ॥ दुरापूरेण कामेन मोहेन च बलीयसा ॥ शेषं गृहेषु सक्तस्य प्रमत्तस्यापयाति हि ॥ ८ ॥ को गृहेषु पुमान्सक्तमात्मानमजितेंद्रियः ॥ स्नेहपाशैर्दृढैर्बद्धमुत्सहेत विमोचितुम् ॥ ९ ॥ को न्वर्थतृष्णां विसृजेत्प्राणेभ्योऽपि य ईप्सितः ॥ यं क्रीणात्यसुभिः प्रेष्ठैस्तस्करः सेवको वणिक् ॥ १० ॥ कथं प्रियाया अनुकंपितायाः संगं रहस्यं रुचिरांश्च मंत्रान् ॥ सुहृत्सु च स्नेहसितः शिशूनां कलाक्षराणामनुरक्तचित्तः ॥ ११ ॥ पुत्रान्स्मरंस्ता दुहितॄर्हृदय्या भ्रातॄन्स्वसॄर्वा पितरौ च दीनौ ॥ गृहान्मनोज्ञोरुपरिच्छदांश्च वृत्तीश्च कुल्याः पशुभृत्यवर्गान् ॥ १२ ॥ त्यजेत कोशस्कृदिवेहमानः कर्माणि लोभादवितृप्तकामः ॥ औपस्थ्यजैह्वं बहु मन्यमानः कथं विरज्येत दुरंतमोहः ॥ १३ ॥

॥ ९ ॥ यमर्थमसुभिः क्रीणाति प्राणहानिमंगीकृत्यापि साधयति तस्कारादिः । तस्मिन्नर्थे तृष्णां को नु विसृजेत् ॥१०॥ किंच । कथमित्यादि । प्रियायाः संगादिकं स्मरन्कथं त्यजेतेति तृतीयेनान्वयः । मंत्रान्हितशिक्षालापान् सुहृत्सु च संगम्। तेषां स्नेहेन सितो बद्धः कलानि मधुराण्यक्षराणि येषां तेषां च संगम्। तेष्वनुरक्तं चित्तं यस्य॥ ११ ॥ ताः श्वशुरगृहे स्थिताः हृदय्या हृदयंगमाः मनोज्ञा उरवः परिच्छदा येषु तान्गृहान् वृत्तीर्जीविकाः कुल्याः कुलपरंपरागताः ॥ १२ ॥ कोशस्कृत्कोशस्कारी कीटः स यथा

हे दैत्य हो, इंद्रियदमन केलेला असा कोण बरें पुरुष, गृहामध्यें आसक्त झालेल्या व स्नेहरूप दृढ पाशांनीं बद्ध झालेल्या आपल्या स्वतःची सुटका करण्यास समर्थ होईल? कोणीच होणार नाहीं ॥ ९ ॥ तसाच ज्या द्रव्याला, चोर सेवक आणि वाणी हे अतिप्रिय अशा आपल्या प्राणांनींसुद्धां विकत घेतात, ह्मणजे प्राणाची हानिसुद्धां पतकरून मिळविण्याचा प्रयत्न करितात त्या प्राणापेक्षांहि प्रिय असलेल्या द्रव्याची इच्छा कोण बरें पुरुष, सोडून देईल? कोणीच देणार नाहीं ॥ १० ॥ जसा कोशस्कारीनांवांचा कीटक आपणाला हितकारक असें घर कांड्यांनीं निर्माण करीत असतां, शेवटीं आपणास त्यांतून बाहेर पडण्यासहि मार्ग ठेवीत नाहीं त्याप्रमाणें विषयांची इच्छा तृप्त न झाल्यामुळें लोभानें स्वतःच्या बंधास कारण होणारीं कर्में करणारा जो पुरुष, पुत्रकलत्रादिकांचेठिकाणीं अनुरक्त चित्त असल्यामुळें त्याच्या स्नेह-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रूप पाशानें बद्ध होऊन राहतो तो पुरुष, दयायुक्त अशा प्रिय भार्येचा एकांतस्थळीं घडलेला संग, तिच्या बरोबर झालेलीं मनोहर व हितकारक भाषणें, सुहृदांचेठि-
काणीं असलेली संगति, मधुर शब्द उच्चारणाऱ्या बायकांची संगति, पुत्र, सासरीं असलेल्या त्या मनोहर कन्या, भ्राते, भगिनी, वृद्धावस्थेमुळें दीन झालेले मातापितर,
सुंदर आणि पुष्कळ अशा सामानांनीं युक्त असलेलीं घरें, कुलपरंपरेनें आलेल्या वृत्ति, पशुसमुदाय आणि भृत्यगण ह्या सर्वांचें स्मरण करीत होत्साता, ह्या सर्वांचा त्याग
करण्यास कसा बरें समर्थ होईल ? आतां विषयांचेठिकाणीं दोषदर्शनामुळें विरक्त होऊन तो त्या भार्यादिकांचा त्याग करील, असें ह्मणावें तर–हे दैत्यहो, जो शिश्न आणि
जिव्हा ह्या इंद्रियांपासून होणारें सुखच अधिक मानित आहे व ज्याला दुरंत मोह प्राप्त झाला आहे तो कसा बरें विरक्त होईल ? होणारच नाहीं ॥ ११ ॥ १२ ॥ १३ ॥
आतां दुरंत मोहपणा तो कसा तें सांगतो–हे असुरबालक हो, संसारी पुरुष प्रमत्त होत्साता, कुटुंबाच्या पोषणार्थ आपल्या आयुष्याचा क्षय होत आहे व आपण पुरुषा-
र्थाला मुकलों आहें हें जाणत नाहीं व सर्वकाळीं आणि सर्वठिकाणीं तापत्रयानें दुःख पावत असूनहि कुटुंबामध्यें रममाण होत असल्यामुळें त्याला त्या कुटुंबामध्यें दुःख

आत्मनो हितं गृहं कुर्वाणो निर्गमाय द्वारमपि नावशेषयति तथा कर्माणीहमानः । नन्ववितृप्तकामोऽपि दोषदर्शनेन विरक्तः संस्त्यजेत्तत्राह । औपस्थ्यं शैश्न्यं जैह्व्यं च
सुखं बहु मन्यमानस्तदेवाधिकं मन्यमानः अतो दुरंतो मोहो यस्य स कथं विरज्येत विरक्तः स्यात् ॥ १३ ॥ दुरंतमोहत्वं दर्शयन्नाह । कुटुंबपोषणाय वियत्क्षीयमाणं निज-
मायुः पुरुषार्थं च विहतं न बुध्यते अतएव तापत्रयेण दुःखितचित्तोऽपि न निर्विद्यते तत्र दुःखबुद्धिं न करोति यतः स्वकुटुंबे रामो रतिर्यस्य ॥ १४ ॥ प्रत्युत चौर्यं क-

कुटुंबपोषाय वियन्निजायुर्न बुद्ध्यतेऽर्थं विहतं प्रमत्तः ॥ सर्वत्र तापत्रयदुःखितात्मा निर्विद्यते न स्वकुटुंबरामः ॥ १४ ॥ वित्तेषु
नित्याभिनिविष्टचेता विद्वांश्च दोषं परवित्तहर्तुः ॥ प्रेत्येह चाथाप्यजितेंद्रियस्तदशांतकामो हरते कुटुंबी ॥ १५ ॥ विद्वानपीत्थं
दनुजाः कुटुंबं पुष्णन्स्वलोकाय न कल्पते वै ॥ यः स्वीयपारक्यविभिन्नभावस्तमः प्रपद्येत यथा विमूढः ॥ १६ ॥ यतो न क-
श्चित्क्व च कुत्रचिद्वा दीनः स्वमात्मानमलं समर्थः ॥ विमोचितुं कामदृशां विहारक्रीडामृगो यन्निगडो विसर्गः ॥ १७ ॥

रोतीत्याह । वित्तेष्विति । नित्यमभिनिविष्टं चेतो यस्य स परवित्तहर्तुः प्रेत्य नरकलक्षणमिह च दंडादिरूपं दोषं यद्यपि विद्वान् जानन्नथाप्यशांताभिलाषस्तत्परवित्तं हरत्येव
॥ १५ ॥ तदेवं को गृहेषु पुमानित्यादिसप्तभिः श्लोकैरुपपादितं गृहादिषु प्रसक्तस्य वैराग्याद्यसंभवमुपसंहरति । विद्वानिति । स्वलोकायात्मपरामर्शाय न कल्पते किंतु विमू-
ढो यथा तथा विद्वानपि तमोऽभिनिवेशमेव प्रपद्यते । तत्र हेतुः य इति । स्वीयमिदं पारक्यमिदमिति विभिन्नो भावो भावना यस्य सः ॥ १६ ॥ तस्मात्कौमार एव भागव-

---

आहे असें वाटत नाहीं ॥१४॥ अहो फारतर काय परंतु, ज्याचें चित्त द्रव्याचेठिकाणीं संलग्न झालेलें असतें तो कुटुंबी पुरुष, परवित्त हरण करणाऱ्या पुरुषांला परलोकीं नरक-
रूप व इहलोकीं राजदंडादिरूप दुःख भोगावें लागतें हें जाणत असूनहि जितेंद्रिय नसल्यामुळें व त्याच्या द्रव्याभिलाषाची शांति झाली नसल्यामुळें तो तें परवित्त हरण करितोच
॥१५॥ असो. ह्याप्रमाणें गृहादिकांचेठिकाणीं आसक्त असलेल्या पुरुषाला वैराग्य वगैरे होण्याचा संभव नाहीं असें जें सात श्लोकांनीं उपपादन केलें त्याचा उपसंहार करितो–हे
दानवहो, ह्याप्रमाणें कुटुंबप्रोषण करणारा विद्वान् पुरुषहि निश्चयेंकरून आत्मज्ञानाविषयीं समर्थ होत नाहीं. तर अत्यंत मूढजनांप्रमाणें तो विद्वान्सुद्धां गृहादिकांचेठिकाणींच
आसक्ति करूं लागतो; कारण, 'हें माझें व हें दुसऱ्याचें' असा भिन्नभाव त्याचेठिकाणीं वास करीत असतो ॥१६॥ असें सांगून आतां कौमारावस्थेमध्येंच भागवतधर्माचें आचरण करावें
ह्याचा हेतुदर्शनपूर्वक उपसंहार करितो कीं,–हे दैत्यहो, ज्याअर्थीं विषयांचेठिकाणीं अत्यंत लंपट आणि ज्याच्या नेत्रकटाक्षामध्यें मदन आहे व ज्यांच्यासंबंधानें शृंखले-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रमाणें बंधास कारण अशी पुत्रपौत्रादि संतति प्राप्त होत्ये त्या स्त्रियांबरोबर क्रीडा करण्याकरितां वानराप्रमाणें अतिलंपट असा कोणीहि पुरुष, कोणत्याहिठिकाणीं व कोणत्याहि कालीं आपली स्वतःची सुटका करून घेण्यास समर्थ होत नाहीं त्याअर्थीं तुह्मीं विषयांचेच ठिकाणीं आसक्त असणाऱ्या दैत्यांचा संग सोडून देऊन, आदिदेव नारायणाला सत्वर शरण जा. कारण, सर्वसंग परित्याग केलेल्या विवेकी पुरुषांनींहि त्याचाच मोक्षत्वेंकरून स्वीकार केला आहे ॥ १७ ॥ १८ ॥ आतां, आह्मां बालकांच्या हातून त्याची सेवा होणें अशक्य आहे, असें ह्मणाल तर– हे दैत्यपुत्रहो, भगवान् अच्युत सर्वभूतांचा आत्मा व ह्या ब्रह्मांडामध्यें सर्वत्र सिद्ध असल्यामुळें त्याला प्रसन्न करून घेणाऱ्या पुरुषाला फारसा प्रयास पडत नाहीं ॥ १९ ॥ आतां, अच्युत सर्वभूतांचा आत्मा व सर्वत्र सिद्ध आहे हें कशावरून, असें ह्मणाल

तान्धर्मानाचरेदिति सहेतुकमुपसंहरति । यत इति । यतः कश्चिदपि स्वमात्मानं मोचितुं न समर्थस्ततो नारायणमुपेत शरणं यातेत्युत्तरेणान्वयः । असामर्थ्ये हेतुः अलं दीनो लंपटः । अतः कामो दृशि यासां तासां विहारे क्रीडायां निमित्ते क्रीडामृगः । विहारमिति पृथक्पाठे तासां विहारसाधनमात्मानं यतस्तासां क्रीडामृगः स इत्यन्वयः । किंच यचासु निगडः शृंखलातुल्यो विसर्गः पुत्रपौत्रादिरूपो भवति ॥ १७ ॥ विदूराद्दूरतः संगं परिहृत्य । यद्वाअविदूराच्छीघ्रं नारायणमुपेतेत्यन्वयः । यस्मात्स एवापवर्ग इषित इष्टः ॥ १८ ॥ ननु बालानामस्माकं तद्भजनमशक्यमिति चेत्तत्राह । न हीति । बह्वायासोऽतिप्रयासः ॥ १९ ॥ आत्मत्वात्सर्वत्र सिद्धत्वादिति च हेतुद्वयमुपपादयति

ततो विदूरात्परिहृत्य दैत्या दैत्येषु संगं विषयात्मकेषु ॥ उपेत नारायणमादिदेवं स मुक्तसंगैरिषितोऽपवर्गः ॥ १८ ॥ न ह्यच्युतं प्रीणयतो बह्वायासोऽसुरात्मजाः ॥ आत्मत्वात्सर्वभूतानां सिद्धत्वादिह सर्वतः ॥ १९ ॥ परावरेषु भूतेषु ब्रह्मांतस्थावरादिषु ॥ भौतिकेषु विकारेषु भूतेष्वथ महत्सु च ॥ २० ॥ गुणेषु गुणसाम्ये च गुणव्यतिकरे तथा ॥ एक एव परो ह्यात्मा भगवानीश्वरोऽव्ययः ॥ २१ ॥ प्रत्यगात्मस्वरूपेण दृश्यरूपेण च स्वयम् ॥ व्याप्यव्यापकनिर्देश्यो ह्यनिर्देश्योऽविकल्पितः ॥ २२ ॥ केवलानुभवानंदस्वरूपः परमेश्वरः ॥ माययांतर्हितैश्वर्य ईयते गुणसर्गया ॥ २३ ॥

परावरेष्विति चतुर्भिः । ब्रह्मा अंतो येषां स्थावर आदिर्येषां तेषु भूतेषु जीवेषु भौतिकेष्वजीवेषु घटादिषु महत्सु च भूतेष्वाकाशादिषु ॥ २० ॥ गुणसाम्ये प्रधाने गुणव्यतिकरे महत्तत्त्वादौ च परो ब्रह्मस्वरूपः ॥ २१ ॥ कथं तर्हि द्रष्टृदृश्यभोक्तृभोग्यादिभेदो माययेत्याह । प्रत्यगात्मा द्रष्टा भोक्ता तत्स्वरूपेण व्यापकतया निर्देश्यः दृश्यं भोग्यं देहादि तद्रूपेण च व्याप्यतया निर्देश्यो मायया ईयत इत्युत्तरेणान्वयः । वस्तुतस्तु स्वयमविकल्पितोऽनिर्देश्योऽपि सन् । यद्वाऽनिर्देश्योऽप्येवं निर्देश्यः सन् विकल्पित ईयत इत्यन्वयः ॥ २२ ॥ यतः केवलोनुभवात्मक आनंद एव स्वरूपं यस्य । ननु स एव चेत्सर्वत्र तर्हि सर्वत्र सर्वज्ञत्वाद्युपलभ्येत तत्राह । गुणात्मकः सर्गो यस्याः

तर हे बालक हो, वृक्षपाषाणादिकांपासून तो ब्रह्मदेवापर्यंत असलेल्या लहानथोर जीवांमध्यें, पंचभूतांपासून झालेल्या अचेतन घटपटादिक पदार्थांमध्यें, आकाशादि पंचमहाभूतांमध्यें सत्त्वादिगुणांमध्यें, मायेमध्यें व गुणांचेविकार अशा महत्तत्वादिकांमध्यें ब्रह्मस्वरूप, सर्वांतर्यामी, अचिंत्यऐश्वर्यानीं युक्त आणि अपक्षयादिविकारशून्य असा एकच ईश्वर भासत आहे ॥ २० ॥ २१ ॥ बरें, तर मग द्रष्टा व दृश्य आणि भोक्ता व भोग्य इत्यादिभेद कसा घडतो असें ह्मणाल तर– हे मित्रहो, केवल अनुभवात्मक आनंदस्वरूपी ॥ २१ ॥
जो ईश्वर तो स्वतः भेदरहित व निर्देश करण्यास अशक्य असूनहि, अंतर्यामी द्रष्ट्याच्या स्वरूपानें व्यापकत्वेंकरून व भोग्य अशा देहादिदृश्याच्या स्वरूपानें व्याप्यत्वेंकरून जाणावयास योग्य आहे तथापि त्यानें गुणमय सृष्टि उत्पन्न करणाऱ्या मायेच्या योगानें आपलें ऐश्वर्य आच्छादित करून टाकिलें आहे ह्मणून तो सर्वत्र असतांहि त्याचे सर्व

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ठिकाणीं सर्वज्ञत्वादिक गुण उपलब्ध होत नाहींत ॥२२॥२३॥ यास्तव तुह्मीं असुरस्वभावाचा त्याग करून, जिच्यायोगानें अधोक्षज भगवान् संतुष्ट होतो ती सर्वभूतांचेठिकाणीं
दया आणि मैत्री धारण करा ॥ २४ ॥ बरें, भगवान् संतुष्ट झाला असतां काय फळ माप्त होतें असें ह्मणाल तर– तो आदिपुरुष भगवान् अनंत संतुष्ट झाला असतां, काय
बरें दुर्लभ आहे? कांहींच नाहीं; यास्तव गुणपरिणामरूप दैवानेंच अनायासानें आपोआप प्राप्त होणारे जे धर्मादि पुरुषार्थ ते आचरण करून त्यांच्यायोगानें आह्मांला
काय करावयाचें आहे व मोक्षाची इच्छा करून तरी काय उपयोग आहे? कारण, भगवच्चरणांच्या सान्निध्यानें भगवंताचें माहात्म्य गायन करणाऱ्या आह्मांस इच्छा
केल्यावांचूनहि तो मोक्ष प्राप्त होणारच आहे. बरें कदाचित् नाहीं प्राप्त झाला तर न होवो. भगवच्चरणसंबंधी अमृताचें सेवन करणाऱ्या आह्मांस त्या मोक्षाची इच्छा करून

सा गुणसर्गा तया मायययांऽतर्हितमैश्वर्यं येन सः ॥ २३ ॥ यस्मादेवं तस्मात्सर्वेषु भूतेषु यथोचितं दयां सौहृदं च कुरुत । यया दयया । उन्मुच्य संत्यज्य ॥ २४ ॥
ततः किमत आह । तुष्टे च तत्र तस्मिन्किमलभ्यम् । तथापि गुणपरिणामाद्दैवादेव स्वसिद्धा अयत्नतः सिद्धा ये धर्मादयस्तैः किम् । अगुणेन च मोक्षेण कांक्षितेन किम् ।
तमुपगायतां नोऽस्माकमकांक्षितस्यापि तस्य सिद्धेः । यद्वा मा भून्मोक्षस्तस्य चरणयोः सारं जुषां सुधां सेवमानानां तेनापि किमित्यर्थः ॥ २५ ॥ ननु च धर्मादेरपुरु-
षार्थत्वे किमित्याचार्याभ्यां वेदोक्तत्वेन सत्य एवाभिहितस्तत्राह । धर्मोऽर्थः कामश्चेति यस्त्रिवर्गस्तदर्थं च य ईक्षाद्या अभिहिताः । ईक्षा आत्मविद्या । त्रयी कर्मविद्या । नय-

तस्मात्सर्वेषु भूतेषु दयां कुरुत सौहृदम् ॥ आसुरं भावमुन्मुच्य यया तुष्यत्यधोक्षजः ॥ २४ ॥ तुष्टे च तत्र किमलभ्यमनंत आद्ये
किं तैर्गुणव्यतिकरादिह ये स्वसिद्धाः ॥ धर्मादयः किमगुणेन च कांक्षितेन सारं जुषां चरणयोरुपगायतां नः ॥ २५ ॥ धर्मार्थकाम
इति योऽभिहितस्त्रिवर्ग ईक्षा त्रयी नयदमौ विविधा च वार्ता ॥ मन्ये तदेतदखिलं निगमस्य सत्यं स्वात्मार्पणं स्वसुहृदः परमस्य
पुंसः ॥ २६ ॥ ज्ञानं तदेतदमलं दुरवापमाह नारायणो नरसखः किल नारदाय ॥ एकांतिनां भगवतस्तदकिंचनानां पादारविंदर-
जसाप्लुतदेहिनां स्यात् ॥ २७ ॥

दमौ तर्कों दंडनीतिश्च । द्विविधा च वार्ता जीविका । तदेतत्सर्वं निगमस्यार्थजातं स्वसुहृदः स्वांतर्यामिणः परमस्य पुंसः स्वात्मार्पणसाधनं चेत्तर्हि सर्वं सत्यं मन्ये सत्य-
परत्वात् । अन्यथा तदसत्यमेव यद्वा तदेतदखिलं निगमस्य त्रैगुण्यविषयस्य प्रतिपाद्यं मन्ये सत्यं पुनर्निस्त्रैगुण्यलक्षणं परमस्य पुंसः स्वात्मार्पणमेवेत्यर्थः । तदुक्तं भगवता ।
त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुनेति ॥ २६ ॥ तेषां पुनर्विश्वासार्थं गुरुसंप्रदायमाह । ज्ञानमिति । यत्र नारदः श्रोता तत्र कुतो माहशानामधिकार इति माशंकीत्याह ।

तरी काय करावयाचें आहे? कांहींच नाहीं ॥ २५ ॥ आतां धर्मादिक जर पुरुषार्थ नाहींत तर गुरूंनीं तरी ते वेदोक्त असल्यामुळें सत्य आहेत असें कसें प्रतिपादन केलें,
असें ह्मणाल तर– हे असुरहो, धर्म, अर्थ व काम ह्मणून जो त्रिवर्ग सांगितला आहे व त्याकरितां आत्मविद्या, कर्मविद्या, तर्कशास्त्र, दंडनीति, व नानाप्रकारचीं जीं जीविका
साधनें आहेत, तें हें सर्व, वेदामध्यें सांगितलें आहे परंतु तें जर अंतर्यामी परम पुरुष भगवंतास स्वात्मनिवेदन करण्याविषयीं साधनभूत असेल तरच त्याला मी सत्य
मानितों, नाहीं तर तें असत्यच आहे ॥ २६ ॥ आतां, आपल्या भाषणावर त्यांचा विश्वास बसावा ह्याकरितां त्यांना गुरुसंप्रदाय कथन करण्याच्या अभिप्रायानें पुनरपि
प्रल्हाद भाषण करितो कीं, हे दैत्यपुत्रहो, निर्मल व दुर्लभ असें जें हें ज्ञान तें पूर्वी ज्याचा नर हा सखा आहे अशा नारायणानें खरोखर नारदाला सांगितलें होतें. आतां
जेथें नारद श्रोता तेथें आह्मांसारख्यांचा अधिकार कोठून असणार अशी ही तुह्मी शंका घेऊं नका. कारण, सर्वसंग परित्यागकेलेल्या एकनिष्ठ भगवद्भक्तांच्या चरण-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कमलांच्या रजःकणांचें ज्या प्राण्यांना स्नान झालें आहे त्या सर्वांनाहि तें ज्ञान प्राप्त होतें, उत्तम पुरुषांनाच होतें असा नियम नाहीं ॥ २७ ॥ ह्मणूनच मींसुद्धां अनुभव-पर्यंत हें ज्ञान व शुद्ध असा भागवत धर्म हे दोन्ही प्रकार, भगवंताचें दर्शन होणाऱ्या नारदापासून श्रवण केले आहेत ॥ २८ ॥ असो. ह्याप्रमाणें प्रऱ्हादानें केलेलें भाषण श्रवण करून अत्यंत विस्मित झालेले ते दैत्यपुत्र ह्मणाले कीं– हे प्रऱ्हादा, ह्या गुरुपुत्रांवांचून तुला व आह्मांला दुसरा गुरु मुळींच माहीत नाहीं. आतां ह्यांच्याजवळ येण्यापूर्वींच मी नारदासमीप गेलों होतों असें ह्मणशील तर,–आपण अगदीं लहान होतों तेव्हांपासूनच हे आपले गुरु आहेत, तेव्हां येथून इतरठिकाणीं कोठेंतरी तूं गेला होतास हें संभवत नाहीं ॥ २९ ॥ आतां, तो नारदमुनिच येथें आला होता असें ह्मणावें तर, तेंहि संभवत नाहीं. कारण– अंतःपुरामध्यें असलेल्या बालकाला महात्म्यांचा समागम होणें दुर्घट आहे. तस्मात् हे प्रियदर्शना प्रऱ्हादा, तुझ्या वचनावर आमचा विश्वास बसण्यास जर कांहीं योग्य कारण असेल तर तें सांगून तूं आमचा संशय दूरकर ॥ ३० ॥ ह्याप्रमाणें श्रीम० सप्तमस्कंधापैकीं प्रऱ्हादकृत तत्त्वोपदेशकथननामक हा सहावा अध्याय समाप्त झाला ॥ ६ ॥ ॥

भगवत एकांतभक्तानां यत्पादरजस्तेनाप्लुतानां स्नातानां देहिनां सर्वेषामपि तज्ज्ञानं स्यान्नतूत्तमानामेवेति नियमः ॥ २७ ॥ अतएव मयाऽपि पूर्वं नारदाच्छ्रुतम् । विज्ञानसहितमनुभवपर्यंतं ज्ञानं धर्मं च श्रुतम् ॥ २८ ॥ तत्रातिविस्मिताः पृच्छंति । प्रह्रादेति । हे प्रह्राद त्वं वयमेताभ्यां शंडामर्काभ्यामृतेऽन्यं गुरुं न विद्मः । एत-दागमनात्पूर्वमेवाहं नारदपार्श्वं गत इति चेत्तत्राहुः । बालानामप्यतिशिशूनामस्माकमेतावीश्वरौ नियंतारावतस्तवान्यत्र गमनं न संभवति ॥ २९ ॥ स एवात्रागत इत्यपि

श्रुतमेतन्मया पूर्वं ज्ञानं विज्ञानसंयुतम् ॥ धर्मं भागवतं शुद्धं नारदाद्देवदर्शनात् ॥ २८ ॥ दैत्यपुत्रा ऊचुः ॥ प्रह्राद त्वं वयं चापि नर्तेऽन्यं विद्महे गुरुम् ॥ एताभ्यां गुरुपुत्राभ्यां बालानामपि हीश्वरौ ॥ २९ ॥ बालस्यांतःपुरस्थस्य महत्संगो दुरन्वयः ॥ छिंधि नः संशयं सौम्य स्याच्चेद्विश्रंभकारणम् ॥ ३० ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे सप्तमस्कंधे प्रह्रादानुचरिते षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥ ॥

॥ नारद उवाच ॥ एवं दैत्यसुतैः पृष्टो महाभागवतोऽसुरः ॥ उवाच स्मयमानांस्तान्स्मरन्मदनुभाषितम् ॥ १ ॥ प्रह्राद उवाच ॥ पितरि प्रस्थितेऽस्माकं तपसे मंदराचलम् ॥ युद्धोद्यमं परं चक्रुर्विबुधा दानवान्प्रति ॥ २ ॥ पिपीलिकैरहिरिव दिष्ट्या लोकोपताः-पनः ॥ पापेन पापोऽभक्षीति वादिनो वासवादयः ॥ ३ ॥

न संभवतीत्याहुः । बालस्येति । दुरन्वयो दुर्घटः । विश्रंभकारणं विश्वासहेतुः ॥ ३० ॥ इति श्रीमद्भागवते सप्तमे टीकायां षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥ ॥ सप्तमे मातृगर्भस्थे स्वस्मिन्नारद-भाषितम् । प्रह्रादो वर्णयामास शिष्यप्रत्ययसिद्धये ॥ १ ॥ अश्रावि नारदादेतन्मया गर्भे इतीरितुम् ॥ तत्प्रस्तावकथामाह पद्यैः षोडशभिः सुधीः ॥ २ ॥ १ ॥ अस्माकं पितरि हिरण्यकशिपौ । स्वकृतेनैव पापेन पापोऽसावभक्षि भक्षित इति हर्षेण वदंतो युद्धोद्यमं चक्रुः ॥ २ ॥ ३ ॥

आतां, ह्या सातव्या अध्यायामध्यें, प्रऱ्हादानें, आपण मातेच्या गर्भामध्यें असतांना आपणास नारद मुनींनें जो उपदेश केला होता तो, आपण सांगितलेल्या विषयावर दैत्यबालकांचा विश्वास बसण्याकरितां त्यांना वर्णन केला, अशी कथा आहे ॥ १ ॥ त्यामध्यें प्रथमतः मी गर्भामध्यें असतांनाच नारदापासून हें श्रवण केलें असें सांग-ण्यासाठीं बुद्धिमान् प्रऱ्हादानें १६ श्लोकांनीं त्याची प्रस्तावकथा सांगितली आहे ॥ २ ॥ नारद ह्मणाला– हे धर्मराजा, ह्याप्रमाणें महाभगवद्भक्त प्रऱ्हादाला दैत्यपुत्रांनीं प्रश्न केला असतां, विस्मययुक्त असलेल्या दैत्यपुत्रांना माझ्या उपदेशाचें स्मरण करीत होत्साता तो प्रऱ्हाद ह्मणाला कीं, ॥ १ ॥ प्रऱ्हाद ह्मणाला– हे दैत्यपुत्रहो, आम-चा पिता (हिरण्यकशिपु) तप करण्याकरितां मंदरपर्वतावर गेला असतां, जशा मुंग्या सर्पाला भक्षण करतात त्याप्रमाणें लोकांना अतिशय ताप देणाऱ्या ह्या पाप्याला

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याच्या पापानेंच भक्षण केलें हें फार चांगलें झालें, असें हर्षपूर्वक भाषण करणाऱ्या इंद्रादि देवांनीं, दानवांबरोबर युद्ध करण्याकरितां मोठा उद्योग आरंभिला ॥ २ ॥ ३ ॥
तेव्हां तो त्यांचा अतिपराक्रमांचा उद्योग अवलोकन करून, सर्वेहि असुरांचे सेनापति, भयभीत झाले आणि देवांनीं वध्यमान होत्साते आपल्या स्त्रिया, पुत्र, मित्र, आप्त,
गृहें, पशु आणि भोगसाधनभूत पदार्थ ह्यांच्याकडे लक्ष न देतां त्यांचा त्याग करून, आपल्या प्राणाचें रक्षण होण्याची इच्छा धरित होत्साते दशदिशांकडे पळून गेले
॥ ४ ॥ ५ ॥ त्या वेळीं विजयेच्छु देवांनीं राजवाडा लुटून त्यांतील सर्व द्रव्याचा अपहार केला. इंद्रानें तर राजाची पट्टराणी माझी माता जी कयाधु, तिचें ग्रहणकरून
घेऊन चालला ॥ ६ ॥ तेव्हां मार्गामध्यें कुररीपक्षिणीप्रमाणें भयानें उद्विग्न होऊन रोदन करीत असलेल्या तिला त्याठिकाणीं अकस्मात् प्राप्त झालेल्या नारदानें अवलोकन
करून, तिला घेऊन जाणाऱ्या इंद्राला असें सांगितलें कीं, हे देवेंद्रा, ह्या निरपराधी स्त्रीला घेऊन जाणें हें तुला योग्य नाहीं. हे महाभाग्यवंता, तूं इला सोडसोड. कार-

॥ ४॥ ५॥ राज्ञः शिबिरमावासं व्यलुंपन्सर्वस्वापहारे ण नाशितवंतः ॥६॥ ७॥ अनागसं निरपराधमेनां नेतुं माऽर्हसीति प्राह ॥ ८ ॥ अविषह्यं दुःसहम्। अतोऽनया प्रसवपर्यंतमत्रा-

तेषामतिबलोद्योगं निशम्यासुरयूथपाः ॥ वध्यमानाः सुरैर्भीता दुद्रुवुः सर्वतो दिशम् ॥ ४ ॥ कलत्रपुत्रमित्राप्तान्गृहान्पशुपरिच्छ-
दान् ॥ नावेक्षमाणास्त्वरिताः सर्वे प्राणपरीप्सवः ॥ ५ ॥ व्यलुंपन्राजशिबिरममरा जयकांक्षिणः ॥ इंद्रस्तु राजमहिषीं मातरं
मम चाग्रहीत् ॥ ६ ॥ नीयमानां भयोद्विग्नां रुदतीं कुररीमिव ॥ यदृच्छयागतस्तत्र देवर्षिर्ददृशे पथि ॥ ७ ॥ प्राह मैनां सुरपते
नेतुमर्हस्यनागसम् ॥ मुंच मुंच महाभाग सतीं परपरिग्रहम् ॥ ८ ॥ इंद्र उवाच ॥ आस्तेऽस्या जठरे वीर्यमविषह्यं सुरद्विषः ॥
आस्यतां यावत्प्रसवं मोक्ष्येऽर्थपदवीं गतः ॥ ९ ॥ नारद उवाच ॥ अयं निष्किल्बिषः साक्षान्महाभागवतो महान् ॥ त्वया न
प्राप्स्यते संस्थामनंतानुचरो बली ॥ १० ॥ इत्युक्तस्तां विहायेंद्रो देवर्षेर्मानयन्वचः ॥ अनंतप्रियभक्त्यैनां परिक्रम्य दिवं ययौ
॥ ११ ॥ ततो नो मातरमृषिः समानीय निजाश्रमम् ॥ आश्वास्येहोष्यतां वत्से यावत्ते भर्तुरागमः ॥ १२ ॥ तथेत्यवात्सीद्देवर्षे-
रंति साऽप्यकुतोभया ॥ यावद्दैत्यपतिर्घोरात्तपसो न न्यवर्तत ॥ १३ ॥

स्यताम्। ततश्चार्थस्य पदवीं मार्गं गतः प्राप्तः सन्। जातं पुत्रं हत्वा मोक्ष्यामीत्यर्थः ॥९॥ साक्षात्स्वगुणैरेव महान्न तु पित्रादिसंबंधात्। त्वया हेतुभूतेन संस्थां मृत्युं न यास्यति। तत्र
हेतवो निष्किल्बिष इत्यादयः ॥ १० ॥ अनंतस्य प्रियो योऽहं स वा प्रियो यस्य तस्य मम भक्त्यैनां प्रदक्षिणीकृत्य ॥११॥ इहोष्यतामित्याहेति शेषः ॥१२॥ अंति समीपे ॥१३॥

ण, ही पतिव्रता असून परस्त्री आहे ॥ ७ ॥ ८ ॥ तेव्हां इंद्र ह्मणाला- हे देवर्षे, हिच्या कुक्षीमध्यें देवद्वेषी हिरण्यकशिपूचें, सहन करण्यास अत्यंत अशक्य असें वीर्य
(गर्भरूपानें वाढत) आहे; ह्यास्तव हिला प्रसूत होईपर्यंत असूंदे. नंतर हिच्यापासून उत्पन्न झालेल्या पुत्राचा वध केल्यावर मी हिला सोडून देईन ॥ ९ ॥ नारद ह्मणाला-
हे इंद्रा, हा हिचा गर्भ, साक्षात् भगवान् अनंताचा सेवक, बलाढ्य, निर्दोष, आपल्या गुणांनींच मोठा आणि महाभगवद्भक्त असल्यामुळें तुझ्या हातून मरण पावणार नाहीं
॥ १० ॥ ह्याप्रमाणें नारदानें सांगितलें असतां इंद्रानें त्या नारदाच्या वचनाला मान देऊन, तिला सोडून दिलें आणि तिच्या पोटीं असणारा भगवद्भक्त जो मी त्याच्या
भक्तीनें तिला प्रदक्षिणा करून स्वर्गाप्रत गमन केलें ॥ ११ ॥ नंतर तो देवर्षि माझ्या मातेला आपल्या आश्रमाप्रत घेऊन गेला आणि तिचें आश्वासन करून, हे वत्से
तुझा भर्ता तपश्चर्या करून माघारा येईपर्यंत तूं ह्या आश्रमामध्यें खुशाल रहा, असें ह्मणाला ॥ १२ ॥ तेव्हां तिनेंहि 'ठीक आहे' असें ह्मणून, तो दैत्याधिपति हिरण्यक-

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शिपु जोंपर्यंत घोरतपापासून निवृत्त झाला नाहीं तोंपर्यंत ती कयाधु नारदाच्या समीपभागीं निर्भयपणें राहिली ॥ १३ ॥ आणि त्या गर्भिणी पतिव्रतेनें आपली इच्छेनें (पति घरीं आल्यानंतर) प्रसूति व्हावी यासाठीं व तोंपर्यंत आपल्या गर्भाचें संरक्षण व्हावें यासाठीं परमभक्तीनें त्या आश्रमामध्यें नारदऋषीची सेवा केली ॥ १४ ॥ तेव्हां त्या दयालु समर्थ ऋषीनें, तिच्या शोकाची निवृत्ति होण्याकरितां व माझ्याहि उद्देशानें धर्माचें भक्तिरूप तत्त्व व आत्मानात्मविवेकरूप निर्मल ज्ञान ह्या दोहोंचा तिला उपदेश केला ॥ १५ ॥ परंतु, पुष्कळ काल लोटल्यामुळें व जात्या स्त्री असल्यामुळें माझ्या मातेचें तें ज्ञानवगैरे विसरून गेलें आणि मजवर ऋषीचा अनुग्रह असल्यामुळें अद्यापिसुद्धां मला त्याची विस्मृति पडत नाहीं ॥ १६ ॥ आतां, तुह्मी जर माझ्या भाषणावर विश्वास ठेवाल तर तुह्मांलासुद्धां तीं दोन्हीं प्राप्त होतील. कारण, जशी मला श्रद्धेनें, देहादिकांचेठिकाणीं असलेल्या अहंकाराचा नाश करण्याविषयीं निपुण बुद्धि प्राप्त झाली आहे तशीच स्त्रिया व बालक ह्यांनाहि प्राप्त होणार आहे

गर्भिणी । इच्छया भर्तुरागमनानंतरं प्रसूतये । एवमपि स्वगर्भस्य क्षेमाय ॥ १४ ॥ तस्याः शोकशांत्यै धर्मस्य तत्त्वं भक्तिलक्षणं ज्ञानमात्मानात्मविवेकस्तदुभयं प्रादात् । ईश्वरः समर्थः ॥ १५ ॥ १६ ॥ भूयाद्भवेत् । वैशारदी स्वार्थे तद्धितः । देहाद्यहंकारच्छेदनिपुणेत्यर्थः ॥ १७ ॥ काऽसौ वैशारदी धीरित्यपेक्षायां नारदोक्तमेव देहात्मविवेकप्रकारमाह । जन्मेति दशभिः । जन्माद्या जायते अस्ति वर्धते विपरिणमतेऽपक्षीयते नश्यतीत्येवंभूता इमे षड्भावा विकारा वृक्षे सत्येव यथा फलानां दृश्यंते

ऋषिं पर्यचरत्तत्र भक्त्या परमया सती ॥ अंतर्वत्नी स्वगर्भस्य क्षेमायेच्छाप्रसूतये ॥ १४ ॥ ऋषिः कारुणिकस्तस्याः प्रादादुभयमीश्वरः ॥ धर्मस्य तत्त्वं ज्ञानं च मामप्युद्दिश्य निर्मलम् ॥ १५ ॥ तत्तु कालस्य दीर्घत्वात्स्त्रीत्वान्मातुस्तिरोदधे ॥ ऋषिणाऽनुगृहीतं मां नाधुनाऽप्यजहात्स्मृतिः ॥ १६ ॥ भवतामपि भूयान्मे यदि श्रद्दधते वचः ॥ वैशारदी धीः श्रद्धातः स्त्रीबालानां च मे यथा ॥ १७ ॥ जन्माद्याः षडिमे भावा दृष्टा देहस्य नात्मनः ॥ फलानामिव वृक्षस्य कालेनेश्वरमूर्तिना ॥ १८ ॥ आत्मा नित्योऽव्ययः शुद्ध एकः क्षेत्रज्ञ आश्रयः ॥ अविक्रियः स्वदृग्घेतुर्व्यापकोऽसंग्यनावृतः ॥ १९ ॥

तद्वदात्मनि तथैव स्थिते देहस्य दृष्टा इत्यर्थः ईश्वरी विकारसमर्था मूर्तिर्यस्य तेन ॥ १८ ॥ तदेवं देहधर्मैस्तद्वैलक्षण्येनात्मनो देहाद्भेदो दर्शित इदानीमात्मधर्मैरेव भेदं स्फुटयंस्तदहंकारादिकं त्याजयति । आत्मेति । आत्मा नित्यः अविनाशी वारेऽयमात्मेति श्रुतेः । अव्ययोऽपक्षयशून्यः । ऋचो अक्षरे परमे व्योमन्निति श्रुतेः । शुद्धः निरवद्यं निरंजनमिति श्रुतेः । एकः एकमेवाद्वितीयमिति श्रुतेः । क्षेत्रज्ञः विज्ञातारमरे केन विजानीयादिति श्रुतेः । आश्रयः यस्मिन्द्यौः पृथिवी चांतरिक्षमिश्रुतेः । अविक्रियः निष्कलं निष्क्रियं शांतमिति श्रुतेः । स्वदृक् आत्मज्योतिः सम्राडिति होवाचेति श्रुतेः । हेतुः स इमाँल्लोकानसृजतेति श्रुतेः । व्यापकः सत्यं ज्ञानमनंतमि-

---

॥ १७ ॥ आतां ती मति कोणती असें ह्मणाल तर नारदानें सांगितलेला देहात्मविवेकप्रकार तुह्मांस सांगतों ऐका– हे मित्रहो, नानाप्रकारें विकार उत्पन्न करण्यास समर्थ अशा कालाच्या योगानें, वृक्ष असतांना जसे त्याच्या फलांनाच उत्पन्न होणें, असणें, वाढणें, परिणाम पावणें, संकोचित होणें व नाश पावणें हे सहा विकार दिसून येतात, ते त्या फलांच्या आधारभूत वृक्षाला दिसून येत नाहींत त्याप्रमाणें, आत्मा असतांना देहालाच जन्मादि विकार दिसून येतात आत्म्याला दिसून येत नाहींत ॥ २३ ॥
॥ १८ ॥ ह्याप्रमाणें देहधर्म कथन करून आत्मा त्यांहून विलक्षण असल्यामुळें तो देहाहून भिन्न आहे असें दर्शविलें. आतां आत्मधर्मांच्या योगानेंच तो भेद स्पष्ट करून आपल्या मित्रांनीं अहंकारादिकांचा त्याग करावा अशा आशयानें भाषण करितो कीं–हे दैत्यपुत्रहो, आत्मा तर नित्य, अपक्षय शून्य, शुद्ध, अद्वितीय, शरीरादिकांचा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ज्ञाता, सर्वांना आश्रयभूत, क्रियाशून्य, स्वयंप्रकाश, सर्वांचा उत्पादक, सर्वव्यापक, अलिप्त, आणि अवेष्टित असा आहे ॥ १९ ॥ ह्यास्तव विवेक उत्पन्न करण्यास समर्थ अशा ह्या आत्म्याच्या बारा लक्षणांनीं तो, देहाहून भिन्न आहे असें जाणणाऱ्या पुरुषानें देहादिकाचेठिकाणीं 'मी व माझें' अशा प्रकारच्या असलेल्या मोहजन्य मिथ्याबुद्धीचा त्याग करावा ॥ २० ॥ आतां, आत्मा देहाहून भिन्न आहे असें जरी पुरुषाला ज्ञान झालें तथापि अहंकारादिकांचा त्याग करण्यास त्याला प्रत्यक्ष अनुभवानें ब्रह्मत्वाची प्राप्ति झाली पाहिजे ती कशी होत्ये तें दृष्टांतपूर्वक दाखवितो कीं– हे असुरबालकहो, सुवर्णाच्या खाणीमध्यें चकचकणाऱ्या स्वर्णकणांनीं युक्त असलेल्या पाषाणांचेठिकाणीं, सुवर्ण काढण्याचे उपाय जाणणारा सोनार जसें भट्टीवगैरे लावून त्या पाषाणांतील सुवर्ण प्राप्त करून घेतो त्याचप्रमाणें देहरूप क्षेत्रांचेठिकाणीं

ति श्रुतेः । असंगी असंगो ह्ययं पुरुष इति श्रुतेः । अनावृतः पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यत इति श्रुतेः ॥ १९॥ एतैर्द्वादशभिरात्मनो लक्षणैः परैः श्रेष्ठैर्विवेकसमर्थैर्देहाद्भेदं विद्वानसद्भावं मिथ्याबुद्धिं त्यजेत् ॥ २० ॥ नन्वेवं विविक्तात्मज्ञानिनोऽप्यपरोक्षानुभवेन ब्रह्मताप्राप्तिः कथं स्याद्यतोऽहंकारादिकं त्यजेदित्यपेक्षायां तत्प्राप्तिप्रकारं सदृष्टांतमाह । स्वर्णाकरक्षेत्रेषु स्फुरत्स्वर्णकणेषु ग्रावसु योगैर्धमनाद्युपायैस्तदभिज्ञ उपायाभिज्ञो हेमकारो यथा स्वर्णं प्राप्नुयात् । आत्मयोगैरात्मप्राप्त्युपायैः । ब्रह्मगतिं ब्रह्मताम् । अध्यात्मविदात्माधिकृतकार्यकारणसंघातज्ञाता ॥ २१ ॥ अध्यात्मविवेकमात्मप्राप्त्युपायमाह । अष्टाविति त्रिभिः । मूलप्रकृतिर्महदहंकारौ पंचतन्मात्राणि चेत्यष्टौ त्रयः सत्त्वाद-

एतैर्द्वादशभिर्विद्वानात्मनो लक्षणैः परैः ॥ अहं ममेत्यसद्भावं देहादौ मोहजं त्यजेत् ॥ २० ॥ स्वर्णं यथा ग्रावसु हेमकारः क्षेत्रेषु योगैस्तदभिज्ञ आप्नुयात् ॥ क्षेत्रेषु देहेषु तथाऽऽत्मयोगैरध्यात्मविद्ब्रह्मगतिं लभेत ॥ २१ ॥ अष्टौ प्रकृतयः प्रोक्तास्त्रय एव हि तद्गुणाः ॥ विकाराः षोडशाचार्यैः पुमानेकः समन्वयात् ॥ २२ ॥ देहस्तु सर्वसंघातो जगत्तस्थुरिति द्विधा ॥ अत्रैव मृग्यः पुरुषो नेति नेतीत्यतत्त्यजन् ॥ २३ ॥ अन्वयव्यतिरेकेण विवेकेनोशताऽऽत्मना ॥ सर्गस्थानसमाम्नायैर्विमृशद्भिरसत्वरैः ॥ २४ ॥

यस्ते च प्रकृतिगुणा एव न तु भिन्नाः । एकादशेंद्रियाणि पंच महाभूतानि चेति षोडश । पुमानात्मैकः प्रोक्तः कपिलादिभिराचार्यैः । एकत्वे हेतुः । एषु साक्षित्वेनान्वयात् । तदुक्तम् । मूलप्रकृतिरविकृतिर्महदाद्याः प्रकृतिविकृतयः सप्त । षोडशकस्तु विकारो न प्रकृतिर्न विकृतिः पुरुष इति ॥ २२ ॥ जगज्जंगमम् । तस्थुः स्थावरम् । अत्रैव सर्वसंघातात्मके देह एव पुरुषो मृग्योऽन्वेष्टव्यः । सुशकं चैतदित्याह । नेति नेतीत्यन्यापोहे क्रियमाणे स्वयमेवात्त्यजन् । अनात्मवर्गात्पृथगुपलभ्यमान इत्यर्थः ॥ २३ ॥ मणिषु सूत्रमिव सर्वत्रानुस्यूतत्वेनान्वयः । अत एव मणिभ्यः सूत्रस्येवैकैकव्यतिरेकश्च तयोर्द्वंद्वैक्यम् । तेन यो विवेकः पूर्वोक्तो वा तेन उशता शुद्धेनात्मना मनसा सर्गस्थानसमा-

---

अध्यात्मज्ञानी पुरुष आत्मप्राप्तीच्या उपायांनीं ब्रह्मत्त्व प्राप्त करून घेतो ॥ २१ ॥ आतां अध्यात्मज्ञानरूप आत्मप्राप्तीचा उपाय सांगतो– मूलप्रकृति, महत्तत्व, अहंकार, शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध ह्या आठ प्रकृति आहेत; सत्त्व, रज आणि तम हे तीन प्रकृतीचेच गुण आहेत; श्रोत्र, त्वचा, नेत्र, जिव्हा, नासिका, पायु, उपस्थ, हस्त, पाद, वाणी आणि मन हीं अकरा इंद्रियें व पृथ्वी, अप्, तेज, वायु, आणि आकाश हीं पंच महाभूतें मिळून सोळा विकार आहेत व ह्या सर्वांचेठिकाणीं साक्षित्वें-करून व्यापून असणारा एक आत्मा आहे असें कपिलप्रभृति आचार्यांनीं सांगितलें आहे ॥ २२ ॥ असो. देह तर प्रकृत्यादि सर्व समुदायात्मक असून स्थावर आणि जंगम असा दोन प्रकारचा आहे ह्या देहामध्येंच 'नेति नेति' आत्मा गंधवान् होत नाहीं, रसवान् होत नाहीं अशा प्रकारानें, आत्मव्यतिरिक्त जें पृथिव्यादिक वस्तु त्याचा निरास करून त्यांहून निराळा असणाऱ्या त्या प्रत्यगात्म्याचें शोधन करून घ्यावें ॥ २३ ॥ तें असें कीं,– जसें मण्यांच्या माळेमध्यें सूत्र सर्वमण्यांत शिरून व्यापून राहतें

गकर्तारो भक्ता एव नान्ये । न च वयमसुरा इव वैरभावेनैते भक्ताः किंतु श्रद्धयैव । तव रुचिरैरवतारैर्विविधं क्रीडनमस्य विश्वस्य क्षेमादिप्रयोजनाय न तु भयोत्पादनाय ॥ १३ ॥ तत्तस्मादेषां भयपरिहाराय मन्युं यच्छोपसंहर । यदर्थमयं मन्युः स चासुरः साधूनां संतोषार्थमद्य हतः । अतःपरं क्रोधेन कार्याभावात्त्वं नियच्छ । नन्वन्येषां वधेन साधुः किं मोदेत तत्राह । वृश्चिकादेः परोपद्रवकारिणोऽन्यतो जातया हत्या वधेन तस्यैव तद्भद्रं जातमिति साधुरपि मोदेतैव । तर्हि बहूनां सुखावहत्वादमुं क्रोधं न

तद्यच्छ मन्युमसुरश्च हतस्त्वयाऽद्य मोदेत साधुरपि वृश्चिकसर्पहत्या ॥ लोकाश्च निर्वृतिमिताः प्रतियंति सर्वे रूपं नृसिंह विभयाय जनाः स्मरंति ॥ १४ ॥ नाहं बिभेम्यजित तेऽतिभयानकास्यजिह्वार्कनेत्रभ्रुकुटीरभसोग्रदंष्ट्रात् ॥ आंत्रस्रजः क्षतजकेसरशंकुकर्णान्निर्ह्रादभीतदिगिभादरिभिन्नखाग्रात् ॥ १५ ॥

त्यजामीति चेत्तत्राह । लोकाश्च निर्वृतिमिताः प्राप्ताः संतः प्रतियंति क्रोधोपसंहारं प्रतीक्षंते । तर्हि जनानां पुनर्भयाभावाय मन्युं धारयामीति चेतत्राह । रूपमिति । विभयाय भयनिवृत्त्यै एतद्रूपस्मरणादेव भयनिवृत्तेर्न मन्युधारणेन कृत्यमस्तीत्यर्थः ॥ १४ ॥ त्वं चेद्बिभेषि तर्हि त्यजामीति चेत्तत्राह । नाहमिति । भो अजित तेऽस्माद्रूपादहं न बिभेमि । कथंभूतात् । आस्यं च जिह्वा चार्कसदृशनेत्राणि च भ्रुकुटीनां रभस आटोपश्च उग्रा दंष्ट्राश्चैतान्यतिभयानकानि यस्मिंस्तस्मात् । अंत्रमय्यः स्रजो यस्मिंस्तदांत्रस्रक् तस्मात् । क्षतजाक्ताः केसरा यस्मिन् । शंकुवदुन्नतौ स्तब्धौ कर्णौ यस्मिन् तच्च तच्च तस्मात् । निर्ह्रादेन भीता दिगिभा यस्मात् । अरीन् भिंदंतीत्यरिभिंदि तानि नखाग्राणि

आहेत. तर मग जनांना पुन्हां भय प्राप्त होऊं नये ह्मणून मी क्रोध धारण करितों असें ह्मणशील तर–हे नृसिंहा, भयनिवृत्तीकरितां सर्वलोक, ह्या नृसिंहस्वरूपाचें स्मरण करितील. ह्मणजे ह्या रूपाच्या केवळ स्मरणानेंच जर भयनिवृत्ति होणार आहे तर क्रोध धारण करण्याचें कांहींच प्रयोजन नाहीं ॥ १४ ॥ आतां, तूं जर भीत असशील तर मी क्रोधाचा त्याग करितों, असें ह्मणशील तर–हे अजिता, ज्याचेठिकाणीं अतिभयंकर अशीं मुख, जिव्हा, सूर्यासारिखे नेत्र, भ्रुकुटींचा वेग आणि उग्रदंष्ट्रा हीं आहेत, ज्याच्या गळ्यांत आंतड्यांच्या माळा घातलेल्या आहेत, ज्याच्या मानेवरील केंस रक्तानें भरलेले आहेत, ज्याचे कान, शंकूसारखे उभे टवकारलेले आहेत, ज्याच्यापासून निघालेल्या शब्दानें दिग्गज भयभीत होऊन गेले आहेत आणि ज्याचीं नखाग्रें शत्रूंना विदारण करणारीं आहेत त्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तुझ्या भयंकर रूपापासून मी तर मुळींच भीत नाहीं ॥ १९ ॥ मला मोठें भयतर दुसरेंच आहेत तें असें कीं,–हे दीनवत्सला, दुःसह आणि उग्र असें जें
संसारचक्रांतील दुःख त्यापासून मी अगदीं भिवून गेलों आहें. कारण, त्याठिकाणीं घातकी लोकांमध्यें मला, कर्मांनीं बद्ध करून टाकून दिलें आहे. तेव्हां हे
अतिसुंदरा, परमात्म्या, मजवर तूं प्रसन्न होऊन संसारदुःखनिवर्तक अशा आपल्या आश्रयभूत चरण कमलाजवळ मला केव्हां बरें हाक मारिशील ? ॥ १६ ॥
आतां, दास्य केलें तरच मी प्रसन्न होतों असें ह्मणशील तर–नानाप्रकारच्या योनींमध्यें दुःख पावत असलेल्या मला दास्य करण्याचें कांहींच ज्ञान नाहीं. तस्मात्
तूंच त्याचा मला उपदेश कर अशी प्रार्थना करितो–हे विभो, प्रियवस्तूंपासून वियोग आणि अप्रिय वस्तूंशीं संयोग ह्यांच्यामुळें उत्पन्न होणाऱ्या शोकाग्नीनें सर्व योनींमध्यें

यस्मिन् । एवंभूतादपि ते रूपादहं न बिभेमि ॥१९॥ महद्भयं त्वन्यदस्तीत्याह । त्रस्तोऽस्मीति । दुःसहं यदुग्रं संसारचक्रे कदनं दुःखं तस्मादहं त्रस्तोऽस्मि तत्र च ग्रसतां हिंस्राणां मध्ये
स्वकर्मभिर्बद्धः सन्प्रणीतो निक्षिप्तोऽस्मि हे कृपणवत्सल हे उशत्तम कदा नु त्वं प्रीतः सन्नपवर्गभूतं शरणं तवांघ्रिकमलं प्रति ह्वयसे मामाह्वयसि॥१६॥ दास्ये सति मत्प्रीतिरिति
चेत्तर्हि नानायोनिषु क्लिश्यमानस्य मम दास्यज्ञानाभावात्त्वमेव तदुपदिशेति प्रार्थयते । यस्मात्प्रियैरप्रियैश्च यथासंख्यं वियोगसंयोगाभ्यां जन्म यस्य तेन शोकाग्निना सकलयो-
निषु दह्यमानोऽस्मि। दुःखस्य प्रतीकारः कार्य इति चेत्तत्राह । दुःखस्यौषधं प्रतीकारस्तदपि दुःखमेव । एवमप्यतद्धिया देहाद्यभिमानेन मुह्यामि । अतो हे भूमन्विभो मे तव

त्रस्तोऽस्म्यहं कृपणवत्सल दुःसहोग्रसंसारचक्रकदनाद्ग्रसतां प्रणीतः ॥ बद्धः स्वकर्मभिरुशत्तम तेंऽघ्रिमूलं प्रीतोऽपवर्गशरणं ह्वयसे
कदा नु ॥ १६ ॥ यस्मात्प्रियाप्रियवियोगसयोगजन्मशोकाग्निना सकलयोनिषु दह्यमानः ॥ दुःखौषधं तदपि दुःखमतद्धियाऽहं
भूमन्भ्रमामि वद मे तव दास्ययोगम् ॥ १७ ॥ सोऽहं प्रियस्य सुहृदः परदेवताया लीलाकथास्तव नृसिंहविरिंचगीताः ॥ अंज-
स्तितर्म्यनुगृणन्गुणविप्रमुक्तो दुर्गाणि ते पदयुगालयहंससंगः ॥ १८ ॥

दास्यरूपं योगं निस्तारोपायं वद ॥ १७ ॥ ननु दास्ययोगेन प्रवृत्तस्यापि तदंतरायभूतानां पूर्वोक्तनानादुःखानां कुतः परिहारस्तत्राह । सोऽहं त्वद्दासः सन् भो नृसिंह तव
लीला कथाऽनुगृणन्दुर्गाणि महादुःखान्यंजसा तितर्मि तरामि न गणयिष्यामीत्यर्थः तत्र हेतुः गुणै रागादिभिर्विशेषेण प्रमुक्तः सन् । तत्कुतस्ते पदयुगमेवालयो येषां
भक्तानां त एव हंसा ज्ञानिनस्तैः संगो यस्य मम सोऽहम् । कथंभूतस्य कथास्तत्राह प्रियस्येत्यादि । कुतो ज्ञाताः विरिंचेन गीतास्तत्संप्रदायप्रवृत्ताः । तथा चाथर्व-
णी श्रुतिः । देवा ह वै प्रजापतिमब्रुवन्नित्यादि । दास्ये प्रवृत्तस्य भवदनुग्रहेण सत्संगस्ततो वीतरागतया भगवद्गुणानुवर्णनं ततश्च न दुःखाभिभवः स्यादिति वाक्यार्थः ॥ १८ ॥

मी पोळून गेलों आहें. आतां दुःखाचा प्रतीकार करावा असें ह्मणशील तर दुःखाच्या निवृत्तीकरितां औषधरूप जें द्रव्यसंपादनादिक करणें तेंहि दुःखमयच आहे असें
जाणून देहादिकांचेठिकाणीं असलेल्या अभिमानानें मी मोह पावत आहें; यास्तव तूं आपला दास्यरूप उपाय मला कथन कर ॥ १७ ॥ आतां, दास्यरूप उपाय करण्या-
विषयीं जरी प्रवृत्त झालास तथापि त्याला अडथळा करणाऱ्या पूर्वोक्त नानाप्रकारच्या दुखांचा परिहार कोठून होणार असें ह्मणशील तर–हे नृसिंहा, तूं अनुग्रह केल्यामु-
ळें तुझ्या दासाचेठिकाणीं प्रवृत्त झालेला, तुझ्या चरणद्वयाचा आश्रय करणाऱ्या सत्पुरुषांचा समागम करणारा मी, विषयांपासून विशेषेंकरून मुक्त होऊन, प्रिय, मित्र
व श्रेष्ठ देवतारूप, अशा तुझ्या, ब्रह्मदेवानें गायन केलेल्या लीलासंबधीं कथांचें वर्णन करूं लागलों ह्मणजे सर्वदुःखांना अनायासानें तरून जाईन, ह्मणजे त्यांची गणना कर-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

णार नाहीं ॥ १८ ॥ आतां दुःखांनीं संतप्त झालेल्या जनाला दुःखनिवृत्तीचा उपाय लोकामध्यें प्रसिद्धच आहे. मग माझें दास्यवगैरे करण्याचें काय कारण आहे, असें ह्मणशील तर—हे नृसिंहा, दुःखांनीं संतप्त झालेल्या जनास दुःखनिवृत्तीचा उपाय ह्मणून जो या लोकीं सांगितलेला आहे तो हे विभो, तूं उपेक्षा केलेल्या लोकांना क्षण मात्रच होतो कायमचा होत नाहीं. यास उदाहरणें—माता पितर हे बालकाचे रक्षक या लोकीं जरी आहेत तथापि ते कायमचे नव्हत. कारण, ते रक्षण करीत असतांहि बालकांना दुःख होत असलेलें दृष्टोत्पत्तीस येतें. तसेंच औषध, रोग्याचें रक्षक ह्मणावें तर तेंहि नाहीं. कारण, औषध दिलें असतांहि मृत्यु येतो असें आपल्या अनुभवास येतें. आणि त्याप्रमाणेंच नौकाहि समुद्रामध्यें बुडत असलेल्या प्राण्याचें रक्षण करणारी आहे असें ह्मणावें तर तीहि नाहीं. कारण, कधीं कधीं नौकेसहवर्तमानहि लोकस-

---

ननु दुःखैस्तप्तस्य तत्प्रतीकारो लोके प्रसिद्ध एव किं मद्दास्यादिना तत्राह । बालस्येति । भो नृसिंह तप्तस्य तत्प्रतिविधिर्दुःखप्रतीकार इह लोके योंऽजसेष्टः स त्वयोपेक्षितानां तावदेव क्षणमात्रमेव न त्वात्यंतिकः । तदेवाह । बालस्य पितरौ शरणं रक्षकाविह न भवतस्ताभ्यां पाल्यमानस्यापि तस्य दुःखदर्शनात् क्वचिदजीगर्तादिषु ताभ्यामेव तद्वधदर्शनाच्च । न चाऽर्तस्य रोगिणो गदमौषधं शरणं कृतेऽप्यौषधे मृत्युदर्शनात् । न चोदन्वति समुद्रे मज्जतः पुंसो नौः शरणं तया सह मज्जनदर्शनात् । अतस्त्वमेव शरणमित्यर्थः । अथवैवं काका व्याख्येयं तप्तस्य तत्प्रतिविधिर्य इह तावत्प्रसिद्धः स त्वदुपेक्षितानां किमंजसेष्टोऽपितु नेष्ट एव । यद्वा यस्तावदिह प्रतिविधिरिष्टः स किमं-

बालस्य नेह शरणं पितरौ नृसिंह नार्तस्य चागदमुदन्वति मज्जतो नौः ॥ तप्तस्य तत्प्रतिविधिर्य इहांजसेष्टस्तावद्विभो तनुभृतां त्वदुपेक्षितानाम् ॥ १९ ॥ यस्मिन्यतो यर्हि येन च यस्य यस्माद्यस्मै यथा यदुत यस्त्वपरः परो वा ॥ भावः करोति विकरोति पृथक्स्वभावः संचोदितस्तदखिलं भवतः स्वरूपम् ॥ २० ॥ माया मनः सृजति कर्ममयं बलीयः कालेन नोदितगुणानुमतेन पुंसः ॥ छंदोमयं यदजयाऽर्पितषोडशारं संसारचक्रमज कोऽतितरेत्त्वदन्यः ॥ २१ ॥

जसा नैवांजसेत्यादि योज्यम् । बालस्येत्यादि पूर्ववदेव ॥ १९ ॥ ननु क्वचित्कुतश्चित्केनचित्कदाचित्कश्चिद्रक्षकोऽपि दृश्यत एवेत्याशंक्य तत्रापि तत्तद्रूपेण त्वमेव रक्षक इत्युररीकृत्य तस्यैव सर्वात्मतामाह । यस्मिन्निति । अपरोऽर्वाचीनः पित्रादिः परो ब्रह्मादिर्वा भावः कर्ता तत्तत्कारकैर्यद्यत्करोति तत्सर्वं भवत एव स्वरूपं न तु पृथक् । यस्मिन्नधिकरणे यतो निमित्ताद्यर्हि यस्मिन्काले येन करणेन येन हेतुकर्त्रा संचोदितश्च यस्य संबंधि यस्मादपादानाद्यस्मै संप्रदानाय यदीप्सिततमं यः करोत्येवं सप्त विभक्त्यर्थाः । यथा येन प्रकारेणेति क्रियाविशेषणभूतानामव्ययानामर्थः । पृथक्स्वभावः सत्त्वादिप्रकृतिः । करोत्युत्पादयति विकरोति रूपान्तरं नयतीति ॥ २० ॥ अतोऽन्यस्य रक्षकस्याभावादसंसारित्वाच्च नित्यमुक्तस्त्वमेव मां शरणागतं रक्षेति प्रार्थयते । मायेति द्वाभ्याम् । त्वदंशस्य पुंसोऽनुमतेनेक्षणरूपेणानुग्रहेण मनो मनःप्रधानं

मुद्रामध्यें बुडतात असें आपल्या दृष्टीस पडतें. तस्मात्, वास्तविक रक्षक असा एक तूंच आहेस ॥ १९ ॥ बरें, कांहींठिकाणीं कोठूनतरी कोणत्यातरी प्रकारानें कदाचित् कोणीतरी रक्षक दृष्टीस पडतोच असें ह्मणशील तर, त्याठिकाणींसुद्धां त्यात्या रूपानें तूंच रक्षक असतोस असें घेऊन भगवंताचीच सर्वरूपें आहेत हें सांगण्याकरितां प्रऱ्हाद भाषण करितो कीं,—हे भगवन्, सत्त्वादिस्वभावयुक्त असा प्राचीन ब्रह्मादिक मुख्यकर्ता अथवा त्यानें प्रेरित असा अर्वाचीन पित्रादिक कर्ता, जेथें, ज्या निमित्तास्तव, ज्या कालीं, ज्या साधनानें, ज्या संबंधानें, ज्याच्यापासून, ज्याकरितां, ज्या प्रकारनें, जें उत्पन्न करितो अथवा ज्याचें रूपांतर करितो तें सर्व तुझेंच स्वरूप आहे ॥ २० ॥ आतां तुझ्यावांचून इतर कोणीच रक्षक नाहीं ह्मणून असंसारी व नित्यमुक्त अशा तूंच मजशरणागताचें रक्षण करावें अशी प्रार्थना करितो, हे जन्मादिवि- ॥ ३४॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कारशून्या परमेश्वरा, त्वदंशभूत पुरुषाच्या अवलोकनरूप अनुग्रहानें प्रेरित झालेल्या कालाच्या योगानें, जिच्यांतील सत्त्वादिगुणांचा क्षोभ झाला आहे ती माया, अविद्येच्या द्वारानें जीवाच्या भोगाकरितां जें सोळा विकारांनीं युक्त, दुर्जय, अनंत कर्मवासनांनीं युक्त आणि वेदोक्त कर्मप्रधान असें मन (लिंगशरीर) उत्पन्न करित्ये, त्या संसारचक्ररूप मनाला (मनःप्रधान लिंगशरीराला) तुझ्याहून निराळा ह्मणजे तुझी भक्ति न करणारा कोण बरें पुरुष तरून जाईल ? कोणीच जाणार नाहीं ॥ २१ ॥ आतां मलाहि मायेच्या संबंधानें कर्तृत्वादिक असल्यामुळें तुझ्यापेक्षां माझेठिकाणीं विशेष काय आहे ? असें ह्मणशील तर–हे समर्था ईश्वरा, ज्या तूं आपल्या चैतन्यशक्तीच्या योगानें निरंतर बुद्धीचे गुण जिंकिले आहेस व जो तूं मायेचा नियंता असून सर्व कार्यांच्या व साधनांच्या शक्ति आपल्या स्वाधीन ठेवणारा आहेस, तो तूं, अ-

---

लिंगं माया सृजति । कथंभूता । कालेन नोदिताः क्षोभिता गुणा यस्याः । कथंभूतं मनः । कर्ममयं कुर्वद्रूपं बलीयो दुर्जयं छंदोमयं वेदोक्तकर्मप्रधानं च । अजया जीवस्याविद्यया तद्भोगार्थमर्पिताः षोडशारा विकारा यस्मिन् । यदेवंभूतं संसारचक्रात्मकं मनस्तत्कोऽतितरेत् । भो अज त्वदन्यस्त्वत्तः पृथक्स्थितः । त्वामभजन्नित्यर्थः ॥ २१ ॥ ननु ममापि मायासंबंधात्कर्तृत्वाद्यविशेषाच्च त्वत्तः को विशेष इत्याह । स इति । स्वधाम्ना चिच्छक्त्या नित्यं विजिता आत्मनो बुद्धेर्गुणा येन स हि त्वम् । यतः कालो

स त्वं हि नित्यविजितात्मगुणः स्वधाम्ना कालो वशीकृतविसृज्यविसर्गशक्तिः ॥ चक्रे विसृष्टमजयेश्वर षोडशारे निष्पीड्यमानमुपकर्ष विभो प्रपन्नम् ॥ २२ ॥ दृष्टा मया दिवि विभोऽखिलधिष्ण्यपानामायुः श्रियो विभव इच्छति यान्जनोऽयम् ॥ येऽस्मत्पितुः कुपितहासविजृंभितभ्रूविस्फूर्जितेन लुलिताः स तु ते निरस्तः ॥ २३ ॥ तस्मादमूस्तनुभृतामहमाशिषो ज्ञ आयुः श्रियं विभवमैंद्रियमाविरिंचात् ॥ नेच्छामि ते विलुलितानुरुविक्रमेण कालात्मनोऽपनय मां निजभृत्यपार्श्वम् ॥ २४ ॥

मायाप्रेरकः । अतएव वशीकृता विसृज्यानां कार्याणां विसर्गाणां साधनानां च शक्तयो येन । अत इक्षुदंडवन्निष्पीड्यमानं मामुपकर्ष स्वसमीपं नय ॥ २२ ॥ ननु लोकपालानां भोगान्भुंक्ष्व पित्र्यं वा राज्यमिदं दास्यामि किमिति संसारादुद्विजसे तत्राह । दृष्टा इति त्रिभिः । श्रियः संपदः । विभव उद्भवः । आयुरादयो दृष्टा इति काका तुच्छत्वमुक्तम् । तदेवाह । येऽस्मत्पितुः कोपहासविकृतभ्रूभंगमात्रेण विध्वस्ताः स च त्वया निरस्तः ॥ २३ ॥ यस्मादेवं तस्मादाशिषो भोगान् ज्ञस्तत्परिपाकं

विद्येनें षोडशविकारात्मक संसारचक्रामध्यें टाकिलेला असल्यामुळें इक्षुदंडाप्रमाणें अत्यंत पीडित होणाऱ्या मज शरणागताला आपल्या समीप आकर्षण करून घे ॥ २२ ॥ आतां, तूं संसारापासून उद्विग्न कां होत आहेस? अरे तूं लोकपालांच्या भोगांचा उपभोग घे; अथवा पित्याचें राज्य मी देतों तें ग्रहण कर असें ह्मणशील तर– हे प्रभो, हा संसारी जन, स्वर्गलोकाचेठिकाणीं जे प्राप्त होण्याची इच्छा करितो ते सर्व लोकपालांचे–आयुष्य, संपत्ति व आधिपत्यरूप अधिकार अतितुच्छ आहेत असें मी पाहिलें आहे. कारण, जे माझ्या पित्याच्या कोपयुक्त हास्यानें फिरविलेल्या भ्रुकुटीच्या चालनमात्रेंकरूनच विध्वंस पावले आहेत. तर मग आपल्या पित्याचें राज्य घे असें ह्मणशील तर, तो माझा पिताहि तूं मारून टाकिला आहेस. तेव्हां त्याच्या राज्याचें महत्त्व काय असणार? ॥२३॥ तस्मात्, जीवांचे हे भोग, आयुष्य, संपत्ति आणि वैभव ह्यांचा परिणाम जाणणारा मी, ब्रह्मदेवाच्या भोगांपर्यंत इंद्रियांनीं उपभोग घेण्यास योग्य असलेल्या सर्व विषयांची इच्छा करीत नाहीं. कारण, त्या सर्वहि अणिमादि

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

संपत्ति, तुज कालरूप परमेश्वराच्या महापराक्रमानें विध्वस्त झालेल्या आहेत. यास्तव मला तूं आपल्या सेवकांच्या समीपभागींच नेऊन पोंचीव ॥ २४ ॥ आतां वर्तमान कालींहि भोगण्यास विषय योग्य नाहींत असें सांगतो–कानालामात्र गोड लागणाऱ्या परंतु मृगजळाप्रमाणें मिथ्या असलेल्या सर्व संपत्ति कोठें ? (कितीशा सुख देणार आहेत?) आणि सर्वरोगांचें उद्भवस्थान असें शरीर तरी कोठें ? (कितीसा उपभोग घेणार आहे ?) परंतु यद्यपि हा लोक असें विषयांचें नश्वरत्व जाणणारा आहे तथापि मधासारख्या दुःसाध्यहि सुखलेशांनीं कामरूप अग्नीची शांति करीत असल्यामुळें हा विरक्त होत नाहीं, ह्मणजे कामाग्नीचें शमन करण्यामध्यें व्यग्र झालेल्या जनाला विरक्त होण्यास अवकाशच मिळत नाहीं ॥ २५ ॥ तर मग तूं कसा विरक्त झालास असें ह्मणशील तर, अयोग्य अशाहि माझ्याठिकाणीं प्रवृत्त झालेल्या तुझ्या कृपेनेंच हें

विद्वान हमैंद्रियमिंद्रियैर्भोग्यं ब्रह्मणो भोगमभिव्याप्य किमपि नेच्छामि ते कालात्मन उरुविक्रमेण विलुलितान्विध्वस्तानणिमादीनपि ॥ २४ ॥ किंच वर्तमानकालेऽपि न भोगार्हा इत्याह । कुत्रेति । श्रुतिः श्रवणं तदेव सुखं यासु ताः मृगतृष्णिकावन्मिथ्याभूताश्चाशिषः क्व । अशेषाणां रुजां रोगाणां विरोह उद्भवस्थानं क्व चेदं कलेवरम् । एवं चेत्सर्वोऽपि जनः किं न विरज्यते तत्राह । यदपि यद्यपीत्येवं विद्वानयं जनस्तथापि न निर्विंद्यते विरक्तो न भवति । कुतः । काम एवानलस्तं मधुतुल्यैः सुखलवैर्दुःसाध्यैरपि शमयन् कामाग्निशमनव्यग्रस्य निर्वेदावकाशो नास्तीत्यर्थः । यद्वाऽचिंत्यमिदं त्वन्मायाचेष्टितमिति भावः ॥ २५ ॥ तर्हि त्वं कथं निर्विण्णोऽसि अनर्हेऽपि मयि प्रवृत्तया

कुत्राशिषः श्रुतिसुखा मृगतृष्णिरूपाः क्वेदं कलेवरमशेषरुजां विरोहः ॥ निर्विद्यते न तु जनो यदपीति विद्वान्कामानलं मधुलवैः शमयन्दुरापैः ॥ २५ ॥ क्वाहं रजःप्रभव ईशतमोऽधिकेऽस्मिन्जातः सुरेतरकुले क्व तवानुकंपा ॥ न ब्रह्मणो न तु भवस्य न वै रमाया यन्मेऽर्पितः शिरसि पद्मकरः प्रसादः ॥ २६ ॥ नैषा परावरमतिर्भवतो ननु स्याज्जंतोर्यथाऽऽत्मसुहृदो जगतस्तथाऽपि ॥ संसेवया सुरतरोरिव ते प्रसादः सेवाऽनुरूपमुदयो न परावरत्वम् ॥ २७ ॥

त्वत्कृपयैवेत्याशयेनाऽह क्वेति । रजसैव प्रभवो जन्म यस्य सः सप्तम्यंतं वा कुलविशेषणम् । तमोऽधिकं यस्मिंस्तस्मिन्नसुराणां कुले जातोऽहं क्व क्व च तवानुकम्पा । तामेवाह । ब्रह्मादीनां शिरसि यो नैवार्पितः स पद्मवत्सकलसंतापहरः करः प्रसादः पुरुषार्थरूपो मे शिरस्यर्पित इति यत् । यद्वयाऽनुकंम्पयेति वा ॥ २६ ॥ न च त्वयीदमतिचित्रमित्याह । नैषेति । एते ब्रह्मादय उत्तमा अयमसुरो नीच इत्येषा परावरमतिर्जंतोः प्राकृतस्य यथा तथा भवतो नैव स्यात् । अत्र हेतुः जगत आत्मनः सुहृदश्च । तर्हि सर्वत्र मत्प्रसाद एवंरूपश्च किं न स्यात्तत्राह । संसेवया तव प्रसादो भवति तत्र च सेवानुरूपं तत्तदिच्छानुसारेण धर्मादीनामुदयो भवति । एवंसत्यपि वैषम्याभावे दृष्टांतः ।

झालें, अशा आशयानें ह्मणतो कीं, हे ईश्वरा, ज्यामध्यें तमोगुण अधिक आहे व जें रजोगुणानेंच उत्पन्न झालें आहे अशा असुरकुळामध्यें उत्पन्न झालेला मी कोणीकडे ? आणि तुझी कृपा कोणीकडे ? कारण, ब्रह्मदेव, रुद्र, व लक्ष्मी ह्यांच्यां मस्तकीं जो कधींहि अर्पण केलेला नाहीं तो कमलाप्रमाणें सर्व संताप दूर करणारा पुरुषार्थरूप आपला हात, तू माझे मस्तकीं अर्पण केला आहेस ॥ २६ ॥ असें होणें हें तरी तुझेठिकाणीं कांहीं आश्चर्य नव्हे. कारण, हे ब्रह्मादिक देव उत्तम आहेत व हा असुर नीच आहे ही उत्कृष्टनिकृष्टबुद्धि एखाद्या प्राकृत जनासारखी तुझेठिकाणीं नाहीं. कारण, तूं जगाचा आत्मा व सुहृद् आहेस. तर मग माझा प्रसाद सर्वांचेठिकाणीं सारखा कां होत नाहीं ? असें ह्मणशील तर– हे परमेश्वरा, सेवेच्या योगानें तुझा प्रसाद होतो परंतु जसा कल्पवृक्ष सेवकाच्याच इच्छेनुसार फळ देतो तो स्वतः विषम मुळींच ॥ ३५ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नसत। त्याप्रमाणें सेवातारतम्यानें तुझ्या प्रसादापासून धर्मादिकांची प्राप्ति होत्ये. ह्मणून उत्कृष्टत्व व निकृष्टत्व हें कांहीं तुझ्या प्रसादाविषयीं कारण नाहीं ॥ २७ ॥ आतां, तुझ्या भक्तांच्या कृपेमुळें मला हें ज्ञान झालें आहे, याकरितां त्यांच्याच समीप तूं मला पोंचीव असें सांगण्याच्या आशयानें प्रल्हाद भाषण करितो कीं,—संसाररूप सर्पयुक्त कूपामध्यें पडलेल्या विषयेच्छु जनांच्या मागून, त्यांच्या सहवासानें त्या संसारकूपांत पडणाऱ्या मजवर जसा आतां तुझा हा प्रसाद झाला आहे तसाच पूर्वीं देवर्षि नारदानें मला आपला असें ह्मणून माझ्यावर अनुग्रह केला आहे ह्मणजे साधनसामुग्रीचा उपदेश केला आहे. तो मी, त्या तुझ्या सेवकांच्या सेवेचा कसा बरें त्याग करीन? करणारच नाहीं. एतावता नारदाच्या अनुग्रहरूपानें पूर्वीं जी तूं मजवर अत्यंत दया केलीस तोच मी तुझा मोठा अनुग्रह समजतों. आतां माझें प्राणरक्षणवगैरे केलेंस हा काहीं मोठासा अनुग्रह नव्हे ॥ २८ ॥ आणि हें माझें प्राणरक्षण तूं, माझ्यावर अनुग्रह करण्याकरितां केलें नाहींस, तर दुसऱ्याकरितां केलेलें आहेस असें सांगतो—हे

सुरतरुर्यथा सेवकस्यैव संकल्पानुसारेण फलं ददाति न च विषमस्तद्वत् । न परावरत्वमत्र कारणमिति शेषः ॥ २७ ॥ एतच्च त्वद्भृत्यकृपया मया प्राप्तमिति त्वद्भृत्यपार्श्वमेव मां नयेत्याशयेनाह । एवमिति । यथा त्वयाऽनुकंपितोऽस्म्येवं नारदेनाऽऽत्मसात्कृत्वा पूर्वमनुगृहीतः सोऽहं कथं नु त्वद्भृत्यसेवां विसृजामि । कथंभूतोऽनुगृहीतोऽस्मि । प्रभव एवाहियुक्तः कूपस्तस्मिन्कामानभितः कामयमानं जनं निपतितमनु तत्प्रसंगात्प्रपतन्योऽहम् । तदेवं त्वद्भृत्यस्य नारदस्यानुग्रहेण त्वयाऽत्यंतमनुकंपितोऽस्म्ययमेव च मम परमोऽनुग्रहो न पुनरिदमतितुच्छं मत्प्राणरक्षणादि ॥ २८ ॥ न चेदं त्वया मदनुग्रहार्थं कृतं किंत्वन्यार्थमित्याह । भो अनंत यदेतन्मत्प्राणरक्षणं मां हंतुमुद्यतस्य

एवं जनं निपतितं प्रभवाहिकूपे कामाभिकाममनु यः प्रपतन्प्रसंगात् ॥ कृत्वाऽऽत्मसात्सुरर्षिणा भगवन्गृहीतः सोऽहं कथं नु विसृजे तव भृत्यसेवाम् ॥ २८ ॥ मत्प्राणरक्षणमनंत पितुर्वधश्च मन्ये स्वभृत्यऋषिवाक्यमृतं विधातुम् ॥ खड्गं प्रगृह्य यदवोचदसद्विधित्सुस्त्वामीश्वरो मदपरोऽवतु कं हरामि ॥ २९ ॥ एकस्त्वमेव जगदेतदमुष्य यत्त्वमाद्यंतयोः पृथगवस्यसि मध्यतश्च ॥ सृष्ट्वा गुणव्यतिकरं निजमाययेदं नानेव तैरवसितस्तदनुप्रविष्टः ॥ ३० ॥

मत्पितुर्वधश्च तदुभयं स्वभृत्यऋषिवाक्यमृतं सत्यं विधातुमित्यहं मन्ये । कुतः । यद्यस्मादसदयुक्तं विधित्सुः खड्गं प्रगृह्यावोचत् । किं मदपरो मद्व्यतिरिक्तश्चेदीश्वरोऽस्ति तर्हि त्वामिदानीमवतु तव कं शिरोऽहं हरामीति । पाठांतरेऽप्ययमेवार्थः । यद्यदाऽवोचत्तदा मत्प्राणरक्षणमिति वाऽन्वयः । एतच्च सत्यं विधातुं निजभृत्यभाषितमित्यत्रैव बहुधा व्याख्यातम् ॥ २९ ॥ न चेदं पक्षपातेन रक्षणं दैत्यहननं च त्वयि स्वाभाविकं किंतु मायागुणोपाधिकं सर्वात्मके त्वयि स्वतस्तदयोगादित्याह एक इति । एतच्च जगत्त्वमेवैकः । यद्यतोऽमुष्यादावंते च पृथगवस्यसि विरामं करोषि सन्मात्रतयाकारणत्वेनावधित्वेन च वर्तस इत्यर्थः । अतो मध्यतश्च त्वमेव । कुतस्तर्हि भेदप्रतीतिस्तत्राह । निज-

---

अनंता, जेव्हां माझा पिता, पुत्रवधरूप अयोग्य कर्म करण्याच्या इच्छेनें, हातांत खड्ग घेऊन, माझ्याहून निराळा तुला मान्य ईश्वर जर आहे तर तो आतां तुझें रक्षण करो; मी तुझें शिर उडवितों, असें जेव्हां ह्मणाला तेव्हां तूं प्रकट होऊन, माझें प्राणरक्षण व पित्याचा वध केलास, तें आपला सेवक जो नारदऋषि त्याचें वाक्य खरें करण्याकरितां केलें आहेस ॥ २९ ॥ आतां माझ्या प्राणाचें रक्षण व दैत्याचा वध हें तुझेठिकाणीं पक्षपातानें घडलेलें कर्म नव्हे. तर मायागुणरूप उपाधीनें घडलेलें आहे अशा अभिप्रायानें ह्मणतो कीं,—हे भगवन्, हें सर्व जग, तूंच एक आहेस. कारण, तूं ह्याच्या आरंभीं कारणत्वानें व शेवटीं अवधित्वानें व निराळेपणानें वर्तणूक करितोस आणि मध्येंहि तूंच आहेस. तर मग भेद प्रतीति कशी होत्ये? असें ह्मणशील तर—हे जगदात्म्या, आपल्या मायेनें हें गुणपरिणामात्मक जग उत्पन्न करून त्याच्याम-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ध्यें प्रविष्ट झालेला तूं त्या गुणाच्या योगानें, उत्पन्न करणारा, रक्षण करणारा व मारणारा अशा अनेक रूपांनीं युक्त असल्यासारखा भासतोस ॥ ३० ॥ आतां, जर हें जग मीच आहें तर जगाच्या वैषम्यामुळें मला वैषम्य कां नसावें ? असें ह्मणशील तर, हे ईश्वरा, हें कार्यकारणात्मक जग तूंच आहेस, तुझ्याहून निराळें नाहीं. तूं तर जगाच्या आदी व अंतीं निराळा राहत असल्यामुळें ह्याच्याहून भिन्न आहेस ह्मणून 'हा आपला व हा दुसऱ्याचा' अशी जी बुद्धि ही केवल व्यर्थ माया आहे. जसें बीज (कारण) आणि वृक्ष (कार्य) ह्यांमध्यें वृक्षाला पृथ्वीपणा व बीजाला भूतसूक्ष्म (गंधगुण) पणा आहे त्याप्रमाणें ज्या मातीवगैरे पदार्थांपासून ज्या घटादिकांची उत्पत्ति, प्रकाश, लय व स्थिति हीं होतात ते घटादिक तद्रूप (मृत्तिकादिरूपच) असतात ह्मणून हें सर्वहि कार्यकारणात्मक जग, परम कारण अशा तुझेंच स्वरूप आहे ॥ ३१ ॥

मायया गुणपरिणामात्मकमिदं जगत्स्रष्ट्वा तदनुप्रविष्टस्त्वं तैर्गुणैर्हेतुभूतैर्नानेव रक्षक इव हंतेव चावसितः प्रतीतः । तदुक्तं स्कंधोपक्रमे । निर्गुणोऽपि ह्यजोऽव्यक्तो भगवान्प्रकृतेः परः ॥ स्वमायागुणमाविश्य बाध्यबाधकतां गत इत्यादिना ॥ ३० ॥ ननु यद्येतज्जगदहमेव तर्हि जगतो वैषम्येण मम वैषम्यमपि किं न स्यादित्यत आह । त्वं वै त्वमेवेदं सदसत्कार्यकारणात्मकं जगन्न तु त्वत्तः पृथक् । भवांस्तु ततोऽन्यः आद्यंतयोः पृथगवस्थानात् । यद्यस्मादेवमतोऽयमात्मीयोऽयं पर इति या बुद्धिः साऽपार्था मायैव । कार्यकरणाभेदं दृष्टांतेन साधयति । यद्यतो यस्य जन्म ईक्षणं प्रकाशश्च यस्मिन्निधनं च स्थितिश्च तद्धै तदेव । अष्टिर्बीजं कारणं तरुः कार्यं तयोर्यथा वसुकालमात्रत्वम् । अयमर्थः ।

त्वं वा इदं सदसदीश भवांस्ततोऽन्यो माया यदात्मपरबुद्धिरियं ह्यपार्था ॥ यद्यस्य जन्म निधनं स्थितिरीक्षणं च तद्वै तदेव वसुकालवदष्टितर्वोः ॥ ३१ ॥ न्यस्येदमात्मनि जगद्विलयांबुमध्ये शेषेऽऽत्मना निजसुखानुभवो निरीहः ॥ योगेन मीलितदृगात्मनिपीतनिद्रस्तुर्ये स्थितो न तु तमो न गुणांश्च युंक्षे ॥ ३२ ॥ तस्यैव ते वपुरिदं निजकालशक्त्या संचोदितप्रकृतिधर्मण आत्मगूढम् ॥ अंभस्यनंतशयनाद्विरमत्समाधेर्नाभेरभूत्स्वकणिकावटवन्महाब्जम् ॥ ३३ ॥

कालशब्देन नीलत्वाद्यसाधारणगुणयोगात्पृथ्वी । वसुशब्देन वस्तुमात्रं भूतसूक्ष्मम् । तत्र तरोर्यथा पृथ्वीमयबीजमात्रत्वं तस्य च यथा भूतसूक्ष्ममात्रत्वमेवं सर्वमपि कार्यकारणात्मकं जगत्परमकारणात्मकमेवेति । तथा च पारमर्षं सूत्रं तदनन्यत्वमारंभणशब्दादिभ्य इति । श्रुतिश्च । वाचारंभणं विकारो नामधेयं मृत्तिकेत्येव सत्यमिति ॥ ३१ ॥ तत्र तावदंते पृथगवस्थानं दर्शयति । न्यस्येदमिति । इदं जगदात्मनैवात्मनि निक्षिप्य स्वसुखमेवानुभवन्निष्क्रियः सन्प्रलयोदकमध्ये शयनं करोषि । तर्हि किं जीवस्येव ममापि तमोवृत्तिरूपा निद्राऽस्ति नहि नहि योग एव तु बहिर्वृत्त्यभावसाम्यान्निद्रोच्यत इत्याह । योगेन मीलिते दृशौ येन । आत्मना स्वरूपप्रकाशेन निपीता निद्रा येन । यतस्तुर्येऽवस्थात्रयातीते स्वरूपे स्थितस्त्वं न तु सुप्त इवात्मना तमो युंक्षे योजयसि न पश्यसि न जाग्रत्स्वप्नयोरिव गुणान्विषयांश्चेत्यर्थः ॥ ३२ ॥ इदानीं कारणत्वेनादावपि

त्यामध्यें विश्वाच्या अंतीं ईश्वर भिन्नरूपानें कसा असतो हें दर्शवितो कीं,– हे भगवन्, तूं प्रलयकालच्या उदकामध्यें आपल्याच योगानें आपलेठिकाणीं या जगाचा उपसंहार करून, आत्मसुखाचा अनुभव घेत होत्साता कर्मरहित होऊन शयन करितोस. तर जीवासारखी मलाहि तमोवृत्तिरूप निद्रा आहे कीं काय ? असें ह्मणशील तर– नाहींनाहीं; तर स्वरूपानुसंधानरूप योगानें डोळे मिटून व स्वरूपप्रकाशानें निद्रा जिंकून तूं ज्याअर्थीं जाग्रदादिक अवस्थात्रयाहून निराळ्या आपल्या तुरीयस्वरूपावेठिकाणीं राहतोस त्याअर्थीं जीवाप्रमाणें सुषुप्तिअवस्थेमध्यें तूं तम अवलोकन करीत नाहींस व जाग्रत् व स्वप्नावस्थांमध्यें विषयांशींहि संबद्ध होत नाहींस ॥ ३२ ॥ आतां, जगताचें कारण असल्यामुळें जगताच्या पूर्वींहि ईश्वर भिन्नरूपानें असतो हें दाखवित होत्साता, जगाच्या स्थितिकालींहि तोच असतो हें स्पष्ट करितो कीं,– ज्यानें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

स्वतःच्या कालशक्तीनें प्रकृतीचें सत्त्वादिधर्म प्रेरित केले आहेत व जो तूं, उदकामध्यें शेषशय्येवर निजतोस त्या तुझेंच स्वरूप हें जग आहे व याच्यामध्येंहि तूंच आहेस. कारण, शेषशय्येपासून तुझ्या योगनिद्रारूप समाधीचें जेव्हां विसर्जन होऊं लागलें तेव्हां, सूक्ष्म वटबीजापासून उत्पन्न होणाऱ्या महावटवृक्षाप्रमाणें, तुझेचठिकाणीं लीन असलेलें हें ब्रह्मांडरूप महाकमळ तुझ्या नाभीपासून प्रलयोदकामध्यें उत्पन्न झालें ॥ ३३ ॥ ह्याप्रमाणें जगाच्या कारणत्वेंकरून अनुगत असलेला ईश्वर, जगामध्येंहि आहे असें जें सांगितलें तेंच शुद्धसत्त्वरूप ब्रह्मदेवाच्या अनुभवानें स्पष्ट करण्याकरितां, त्याची पूर्वावस्था प्रल्हाद कथन करितो कीं–हे ईश्वरा, त्या कमळापासून उत्पन्न झालेला सूक्ष्मद्रष्टा ब्रह्मदेवहि, त्या कमळावांचून इतर कांहींच न पहात होत्साता, स्वतःचेठिकाणीं व्याप्त असलेल्या बीजभूत अशाहि तुला, स्वतःहून बाहेर आहेस असें मानून, शोध करण्याकरितां उदकामध्यें प्रवेश करून शंभर वर्षेंपर्यंत शोध करीत असतांहि त्याला तुझी प्राप्ति झाली नाहीं. आणि हें योग्यच आहे. कारण, अहो!

पृथगवस्थानं दर्शयन्मध्यतश्च त्वमेवेत्येतत्प्रपंचयति चतुर्भिः । यस्त्वमंभसि शेषे तस्यैव ते इदं जगद्वपुः स्वरूपं नान्यस्य यतस्त्वं मध्यतोऽपि तस्य । कथंभूतस्य निजया कालशक्त्या संचोदिताः प्रकृतेर्धर्माः सत्त्वादयो येन । स्वरूपत्वे हेतुः । अनंतशयनाच्छेषपर्यंकाद्विरमन्समाधिर्यस्य तस्य तव नाभेः सकाशात् । एकार्णवोदके महाब्जं लोकपद्ममभूत् । कथंभूतम् । आत्मनि त्वय्येव गूढं सत् । स्वकणिकातः सूक्ष्माद्वटबीजान्महावट इव ॥ ३३ ॥ तदेवं कारणत्वेनानुगतः सन्मध्यतश्च त्वमेव वर्तस इत्युक्तमेतदेव

तत्संभवः कविरतोऽन्यदपश्यमानस्त्वां बीजमात्मनि ततं स्वबहिर्विचिंत्य ॥ नाविंददब्दशतमप्सु निमज्जमानो जातेंऽकुरे कथमु होपलभेत बीजम् ॥ ३४ ॥ स त्वात्मयोनिरतिविस्मित आस्थितोऽब्जं कालेन तीव्रतपसा परिशुद्धभावः ॥ त्वामात्मनीश भुवि गंधमिवातिसूक्ष्मं भूतेंद्रियाशयमये विततं ददर्श ॥ ३५ ॥ एवं सहस्रवदनांघ्रिशिरःकरोरुनासास्यकर्णनयनाभरणायुधाढ्यम् ॥ मायामयं सदुपलक्षितसन्निवेशं दृष्ट्वा महापुरुषमाप मुदं विरिंचः ॥ ३६ ॥

शुद्धसत्त्वस्य ब्रह्मणोऽनुभवेन स्फुटयितुं तस्य प्राक्तनीमवस्थामाह । तस्मिन्नब्जे संभवो यस्य कविर्ब्रह्मा । अतः पश्चादन्यदपश्यन् बीजमुपादानकारणभूतं त्वां स्वस्मिन्व्याप्तं संतमपि नाविंदत् । युक्तं चैतत् । उ ह अहो अंकुरे जाते सति बीजं तदनुगतं कारणं पृथक्कथं नाम पुमान्पश्येत् ॥ ३४ ॥ भवदुपासनया तु स्वस्मिन्नेव दृष्टवानित्याह । स त्विति । परावृत्त्याब्जमास्थितः सन् । तीव्रेण तपसा ध्यानेन । अनेन सन्मात्ररूपेणोपादानतया दर्शनमुक्तम् ॥ ३५ ॥ ईश्वरत्वेन च दृष्ट्वा कृतार्थोऽभवदित्याह । एवमनेन प्रकारेण सहस्रमपरिमितानि यानि वदनादीनि तैराढ्यं समृद्धम् । मायामयं मायाप्रधानम् । सता प्रपंचेनोपलक्षितः संन्निवेशः पादादिरचना यस्य ॥ ३६ ॥

अंकुर उत्पन्न झाला असतां त्यामध्यें अनुगत असलेलें कारणरूप बीज त्याहून निराळें पुरुषाला कसें बरें मिळेल? मिळणारच नाहीं ॥ ३४ ॥ नंतर तुझ्या उपासनेनें त्यानें आपलेठिकाणींच तुला पाहिलें असें सांगतो–हे ईश्वरा, त्या ब्रह्मदेवानें, शंभर वर्षेंपर्यंत उदकामध्यें शोध करीत असतांहि जेव्हां तुला पाहिलें नाहीं तेव्हां, अतिविस्मित होऊन तुझा शोध करण्याचें त्यानें सोडून दिलें आणि नाभिकमलाचा आश्रय करून बहुकालपर्यंत केलेल्या तीव्रतपानें अंतःकरण शुद्ध झाल्यावर, जसा भूमीचेठिकाणीं सूक्ष्मरूपानें गंध व्याप्त असतो त्याप्रमाणें भूतें, इंद्रियें आणि मन ह्यांनीं बनलेल्या स्वदेहाचेचठिकाणीं अतिसूक्ष्मरूपानें व्याप्त असलेल्या तुला अवलोकन केलें ॥ ३५ ॥ आणि ईश्वरत्वेंकरून तुला पाहून तो कृतार्थ झाला असें सांगतो– याप्रकारेंकरून अपरिमित, वदनें, पाद, मस्तकें, हस्त, मांड्या, नासिका, मुखें, कर्णे, नेत्र, भूषणें आणि आयुधें ह्यांनीं समृद्ध, चतुर्दशलोकविस्तारात्मक पादादिरचनेनें युक्त आणि मायामय अशा विराट्पुरुषरूपानें स्थित असलेल्या तुला पाहून त्या ब्रह्मदेवाला आनंद झाला ॥ ३६॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्या वेळीं हयग्रीवमूर्ति धारण करणाऱ्या तूंहि वेदद्रोही व अतिप्रबल अशा रजस्तमोरूप मधुकैटभनामक दैत्यांचा वध करून, त्या ब्रह्मदेवाला वेदसमूह अर्पण केलेस
॥ ३७ ॥ म्हणून सत्त्वगुण हीच तुझी अत्यंत प्रिय मूर्ति आहे असें म्हणतात ॥ ३७ ॥ याप्रमाणें, 'हें जग तूंच एक आहेस इत्यादि' आठ श्लोकांनीं पक्षपातानें भक्तांचें
रक्षण व त्यांच्या शत्रूंचा वध हें कृत्य ईश्वराचें स्वाभाविक नसून सत्त्वगुणरूप उपाधीमुळें घडलें आहे असें जें सांगितलें त्याचाच उपसंहार करण्याच्या अभिप्रायानें
प्रल्हाद भाषण करितो कीं,–हे महापुरुषा, ह्याप्रमाणें तूं मनुष्यांमध्यें रामादिक, तिर्यग्योनींमध्यें वराहादिक, ऋषींमध्यें परशुरामादिक, देवांमध्यें वामनादिक, व
जलचरांमध्यें मत्स्यकूर्मादिक अवतार धारण करून, लोकांचें पालन करितोस, जगाला प्रतिकूल जे असतील त्यांचा वध करितोस आणि युगामध्यें असलेल्या धर्मांचें रक्षण

तदा च भवांस्तस्यानुग्रहं कृतवानित्याह। तस्मा इति। हयग्रीवमूर्तिं बिभ्रत्सन्। रजस्तमोरूपौ मधुकैटभाख्यौ हत्वा तस्मै श्रुतिगणान्समर्पितवान्। तत्र हेतुः। स त्वमिति ॥३७॥ एक-
स्त्वमेवेत्यादिभिरष्टभिः श्लोकैर्यदुक्तं पक्षपातेन रक्षणं तद्विपक्षवधश्च सत्त्वोपाधिको न तु स्वत इति तदुपसंहरति। इत्थमिति। विभावयसि पालयसि हंसि घातयसि कलौ तु
तन्न करोषि यतस्तदा त्वं छन्नोऽभवः। अतस्त्रिष्वपि युगेष्वाविर्भावात्स एवंभूतस्त्वं त्रियुग इति प्रसिद्धः ॥ ३८ ॥ तदेवं भगवतस्तत्त्वं निरूप्य स्वस्य च तद्विचारायो-

तस्मै भवान्हयशिरस्तनुवं च बिभ्रद्वेदद्रुहावतिबलौ मधुकैटभाख्यौ ॥ हत्वाऽनयच्छ्रुतिगणांस्तु रजस्तमश्च सत्त्वं तव प्रियतमां तनु-
मामनंति ॥ ३७ ॥ इत्थं नृतिर्यगृषिदेवझषावतारैर्लोकान्विभावयसि हंसि जगत्प्रतीपान् ॥ धर्मं महापुरुष पासि युगानुवृत्तं छन्नः
कलौ यदभवस्त्रियुगोऽथ स त्वम् ॥ ३८ ॥ नैतन्मनस्तव कथासु विकुंठनाथ संप्रीयते दुरितदुष्टमसाधु तीव्रम् ॥ कामातुरं हर्षशो-
कभयैषणार्तं तस्मिन्कथं तव गतिं विमृशामि दीनः ॥ ३९ ॥ जिह्वैकतोऽच्युत विकर्षति माऽवितृप्ता शिश्नोऽन्यतस्त्वगुदरं श्रवणं
कुतश्चित् ॥ घ्राणोऽन्यतश्चपलदृक् क्व च कर्मशक्तिर्बह्व्यः सपत्न्य इव गेहपतिं लुनंति ॥ ४० ॥

ग्यतां निवेदयन्प्रार्थयते। नैतदिति त्रिभिः। असाधु बहिर्मुखम्। तीव्रं दुर्धरम्। हर्षशोकभयैरेषणात्रयेण चार्तं दुःखितमपि त्वत्कथासु न संप्रीयते। तस्मिन्नेवंभूते मनसि सति
कथं तव तत्त्वं विचारयामि ॥ ३९ ॥ किंच जिह्वा अवितृप्ता सती भो अच्युत मा मां यतो मधुरादिरसस्तत आकर्षति उदरं तु क्षुधासंतप्तं सत्सद्य एव यत्किंचिदाहारमात्रं प्रति।

करितोस; परंतु, ज्याअर्थीं कलियुगामध्यें तूं गुप्त झाला आहेस म्हणजे अवतार धारण करून तें पालनादिक करीत नाहींस त्याअर्थीं तीनच युगांमध्यें प्रकट
होणारा तूं 'त्रियुग' ह्या नांवानें प्रसिद्ध आहेस ॥ ३८ ॥ ह्याप्रमाणें भगवंताचें तत्त्व निवेदन करून त्याचा विचार करण्यास मी अयोग्य आहें असें निवेदन करीत प्रार्थना
करितो कीं– हे वैकुंठनाथा, पातकांनीं दूषित, बहिर्मुख, दुर्धर, कामातुर व हर्ष, शोक, भय, पुत्रैषणा, वित्तैषणा आणि लोकैषणा ह्यांनीं दुःखित झालेलेंहि हें माझें मन, तुझ्या ॥ ३७ ॥
कथांचेठिकाणीं प्रीतियुक्त होत नाहीं. अशाप्रकारच्या त्या मनामध्यें, मी दीनानें तुझ्या तत्त्वाचा विचार, कसा करावा ? ॥ ३९ ॥ त्याप्रमाणें हे अच्युता, जशा
अनेक सवती आपल्या पतीला आपआपल्या घरीं येण्याकरितां आकर्षण करून त्रास देतात त्याप्रमाणें अत्यंत अतृप्त झालेली माझी जिव्हा मला मधुरादि रसांकडे आ-
कर्षण करित्ये, शिश्न, कामिनीकडे ओढून नेतें, त्वचा चंदनादि पदार्थांकडे ओढित्ये, क्षुधेनें तप्त झालेलें उदर, आहाराकडे नेतें, श्रवणेंद्रिय गीतादिकांकडे घेऊन जातें,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

घ्राणेंद्रिय, सुगंधाप्रत नेतें· चंचलदृष्टि, रूपाकडे वळवित्ये आणि कर्मेंद्रियें, आपआपल्या विषयांकडे मला आकर्षण करितात ॥ ४० ॥ आतां, मला एकालाच ही दुःखद दशा प्राप्त झाली आहे असें नाहीं तर, पुष्कळ लोक असेच क्लेश भोगीत आहेत; तस्मात्, सर्वांचेंच तूं रक्षण कर अशी प्रार्थना करितो– हे नित्यमुक्ता, संसाररूप वैतरणी नदीमध्यें आपल्या कर्मांनें पडून परस्परांपासून प्राप्त होणारें मरण, जन्म व भोजन ह्यांपासून अत्यंत भयभीत झालेल्या आणि स्वजनांच्या देहांचेठिकाणीं मैत्री व इतरांच्या देहांचेठिकाणीं वैर धारण करणाऱ्या ह्या मूढजनसमुदायाला तूं पाहून 'अरेरे ह्याला फार दुःख होत आहे ! अशी ' दया करून, ह्याला वैतरणी नदींतून तत्काल बाहेर काढून रक्षण कर ॥ ४१ ॥ आतां मी एकट्यानें सर्वांचा उद्धार कसा करावा असें ह्मणशील तर– हे जगद्गुरो, भगवन्, ह्या विश्वाची उत्पत्ति, स्थिति व लय ह्यांचें कारण, अशा तुला सर्वजनांचा उद्धार करणें ह्यामध्यें प्रयास काय बरें आहे ? कांहींच नाहीं· कारण, जगताची उत्पत्तिवगैरे करणें ह्यापेक्षां हें

चपलादृक् चक्षुः । कर्मशक्तिः कर्मेंद्रियाणि । लुनंति त्रोटयंति ॥ ४० ॥ न केवलमहमेक एवैवं कष्टां दशामापन्नः किंतु महाजनोऽप्येवमेव क्लिश्यत्यतः सर्वं जनं पालयेति प्रार्थयते । एवमिति । भवः संसार एव वैतरणी यमद्वारनदी तस्याम् । अन्योऽन्यतो यानि जन्मादीनि तेभ्योऽतिभीतं स्वेषां परेषां च विग्रहेषु यथायथं वैरं मैत्रं च यस्य एवं मूढं जनं पश्यंस्त्वम् । हे पारचर तस्याः पारे स्थित नित्यमुक्त हंतेति अहो कष्टमित्येवमनुकंप्याद्य पीप्टहि वैतरणीमुत्तार्य पालय ॥ ४१ ॥ एकेन मया कथं सर्वो जनस्तारणीय इति चेत्तत्राह । को न्विति । को नु ते अत्र सर्वजनोत्तारणे प्रयासो न कोऽपि । कुतः । अस्य विश्वस्य भवसंभवलोपानामुत्पत्तिस्थितिसंहाराणां हेतोः । ततोऽपि

एवं स्वकर्मपतितं भववैतरण्यामन्योन्यजन्ममरणाशनभीतभीतम् ॥ पश्यन्जनं स्वपरविग्रहवैरमैत्रं हंतेति पारचर पीप्टहि मूढमद्य ॥ ४१ ॥ को न्वत्र तेऽखिलगुरो भगवन्प्रयास उत्तारणेऽस्य भवसंभवलोपहेतोः ॥ मूढेषु वै महदनुग्रह आर्तबंधो किं तेन ते प्रियजनाननुसेवतां नः ॥ ४२ ॥ नैवोद्विजे पर दुरत्ययवैतरण्यास्त्वद्वीर्यगायनमहामृतमग्नचित्तः ॥ शोचे ततो विमुखचेतस इंद्रियार्थमायासुखाय भरमुद्वहतो विमूढान् ॥ ४३ ॥

किमेतद्दुष्करमिति भावः । उचितं चैतदित्याह । मूढेष्विति । त्वां च त्वदीयांश्च तारयिष्यामीमं दुराग्रहं मा कृथा इति चेत्तत्राह । तव ये प्रियजना भक्तास्ताननु सेवमानानां नोऽस्माकं तेनोत्तारणेन किम् । कोऽतिप्रयासोऽसुरबालका हरेः कोऽन्वत्र तेऽखिलगुरो भगवन्प्रयासः ॥ प्रह्लाद इत्थमुपमंत्र्य मिथो नराणामीशेन सख्यमकरोदपनीय मायाम् ॥ ४२ ॥ वत्स प्रह्लाद त्वां तावत्तारयिष्यामि तावतैव कृतार्थः स्याः किमनेन निर्बंधेनेत्यत आह । नैवेति । हे पर सर्वोत्तम त्वद्वीर्यगायनमेव महामृतं तस्मिन्मग्नं चित्तं यस्य सोऽहं भववैतरण्या नैवोद्विजे किंतु विमूढान् शोचामि । तानेवाह । ततो महामृताद्विमुखं चेतो येषाम् । प्रत्युतेंद्रियार्थनिमित्तं यन्मायासुखं तदर्थं भरं कुटुंबादिभार-

---

कठिण आहे काय ? मुळींच नाहीं· आणि मूढजनांचेठिकाणीं तुज महात्म्याचा अनुग्रह होणें हेंच योग्य आहे· आतां, तुला व त्वत्संबंधीं लोकांना मी तारीन· परंतु, सर्वजनांचा उद्धार करण्याचा तूं दुराग्रह धरूं नकोस, असें ह्मणशील तर– हे दीनबंधो, तुझ्या भक्तजनांची सेवा करणाऱ्या आह्मांस त्या तुझ्या संसारापासून उद्धार करण्याचा काय उपयोग आहे ? कांहींच नाहीं· कारण, भगवद्भक्तसेवेच्या प्रभावानें आह्मीं स्वतःच संसारांतून तरून जाऊं ॥ ४२ ॥ परंतु वत्सा प्ऱ्हादा, तुलामात्र मी तारतों व तेवढ्यानेंच तूं कृतार्थ हो· अरे हा लोकांना तारण्याचा आग्रह धरून काय उपयोग आहे असें ह्मणशील तर, हे सर्वोत्तमा, मलातर, दुस्तर अशा ह्या संसाररूप वैतरणीनदीची मुळींच भीति वाटत नाहीं· कारण, तुझ्या चरित्रांच्या गायनरूप महामृतामध्यें माझें अंतःकरण अगदीं मग्न होऊन गेलें आहे, परंतु त्या महामृतापा-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सून ज्यांचें चित्त पराङ्मुख झालें आहे व इंद्रियनिमित्त मायिक विषयसुखाकरितां कुटुंबपोषणाचावगैरे भार वाहणाऱ्या अत्यंत मूढजनांचें मला फार वाईट वाटत आहे ॥ ४३ आतां तूं तर आधीं मुक्ति घे, त्या लोकांना तत्त्वज्ञानी मुनि उपदेश करितील असें ह्मणशील तर–हे देवा, प्रायशः स्वतःलाच मुक्ति प्राप्त होण्याविषयींची इच्छा करणारे मुनि, एकांतस्थलीं मौन धारण करून ध्यानादिक करीत असतात, ह्यामुळें परोपकाराविषयीं ते तत्पर नाहींत आणि ह्या दीनजनांना सोडून आपण मुक्त व्हावें अशी मी इच्छा करित नाहीं. तर मग त्यांच्या उद्धाराकरितां दुसऱ्या कोणाचीतरी प्रार्थना कर; मलाच कां आग्रह करितोस असें ह्मणशील तर–हे परमेश्वरा, अनेक योनींमध्यें भ्रमण पावत असणाऱ्या ह्या मूढजनांचा उद्धार करणारा तुजवांचून दुसरा मला कोणीहि दिसत नाहीं ॥ ४४ ॥ आतां स्त्रीसंभोगादिकानें हे सुखीच आहेत हे कांहीं दीन नाहींत असें ह्मणशील तर–हे परमात्म्या, मैथुनादिकांच्या योगानें गृहस्थांना होणारें जें सुख तें अतितुच्छ असून, जसें हातांनीं खाजविलेल्या खरजीपासून

मुद्धृतः ॥ ४३ ॥ त्वं तावन्मुक्तिं गृहाण तांस्तु तत्त्वज्ञा मुनय उपदेक्ष्यंतीति चेत्तत्राह। प्रायेणेति। न विमुमुक्षे विमुक्तिं नेच्छामि। तर्ह्यन्यं कमपि प्रार्थय मामेव किमिति निर्बध्नासीति चेदत आह। त्वत्तोऽन्यमस्य जनस्य शरणं न पश्यामि ॥ ४४ ॥ नन्वेते स्त्रीसंभोगादिना सुखिन एव, न, कृपणास्तत्राह।यदिति। करयोः कुंडूयनेन संघर्षणेनेव दुःखमनु दुःखं यस्मिन्। तर्हि दुःखत्वादेव ततो निर्विद्य मुच्येरंस्तत्राह। कृपणाः कामुका बहुदुःखभाजोऽपीह गृहमेधिसुखे न तृप्यंत्यलमिति न मन्यंते कंडूतिवत्कामस्य

प्रायेण देवमुनयः स्वविमुक्तिकामा मौनं चरंति विजने न परार्थनिष्ठाः ॥ नैतान्विहाय कृपणान्विमुमुक्ष एको नान्यं त्वदस्य शरणं भ्रमतोऽनुपश्ये ॥ ४४ ॥ यन्मैथुनादि गृहमेधिसुखं हि तुच्छं कंडूयनेन करयोरिव दुःखदुःखम् ॥ तृप्यंति नेह कृपणा बहुदुःख-भाजः कंडूतिवन्मनसिजं विषहेत धीरः ॥ ४५ ॥ मौनव्रतश्रुततपोऽध्ययनस्वधर्मव्याख्यारहोजपसमाधय आपवर्ग्याः ॥ प्रायः परं पुरुष ते त्वजितेंद्रियाणां वार्ता भवंत्युत न वात्र तु दांभिकानाम् ॥ ४६ ॥ रूपे इमे सदसती तव वेदसृष्टे बीजांकुराविव न चान्यदरूपकस्य ॥ युक्ताः समक्षमुभयत्र विचिन्वते त्वां योगेन वह्निमिव दारुषु नान्यतः स्यात् ॥ ४७ ॥

दुःसहत्वात्। ननु केचित्कंडूतिमपि सहंते कामं चेत्यत्राह। त्वत्प्रसादात्तु कश्चिद्धीर एव मनसिजं कामं विषहेत न तु सर्वे। अत्रापि कंडूतिवदिति दृष्टांतः ॥ ४५ ॥ ननु मौनादिभिर्मोक्षसाधनैः सुलभैव तेषामपि मुक्तिस्तत्राह। मौनेति। हे पुरुष अंतर्यामिन्ये मौनादयो दश आपवर्ग्या अपवर्गहेतवः प्रसिद्धाः। रहो विविक्तवासः ते तु प्रायशोऽजि-तेंद्रियाणामिंद्रियभोगायार्थार्थं विक्रीणतां वार्ता जीवनोपाया भवंति। दांभिकानां तु वार्ता अपि भवंति वा न वा। दंभस्यानियतफलत्वात्॥४६॥त्वज्ज्ञानं भक्तिं विना सकामैर्मौनादि-

दुःखकारक आहे. तरमग त्यापासून लोक प्रथम किंचित् सुख होतें परंतु मागाहून तें अधिकच दुःख देणारें होतें, तसें हें गृहस्थाश्रमसंबंधीं सुखहि उत्तरोत्तर अधिकच दुःखकारक आहे. तरमग त्यापासून लोक विरक्त होऊन मुक्त कां होत नाहींत असें ह्मणशील तर–काम दुःसह असल्यामुळें कामुक जन नानाप्रकारचीं दुखें भोगित असूनहि गृहसंबंधीं सुख आतां पुरे असें कधींहि मानीत नाहींत. तुझ्या प्रसादानें एखादामात्र धीर पुरुष कंडूप्रमाणें कामाचेंहि सहन करितो ॥ ४५ ॥ आतां, मौनादिक मोक्षसाधनांनीं त्यांनाहि मुक्ति सुलभच आहे असें ह्मणशील तर–हे अंतर्यामी परमात्म्या, मौन, व्रतें, श्रवण, तप, वेदाध्ययन, स्वधर्म, ग्रंथव्याख्यान, एकांतवास, जप आणि समाधि हे जे मोक्षाला साधनभूत ह्मणून प्रसिद्ध असे दहा धर्म आहेत तेहि बहुतकरून अजितेंद्रिय लोकांना केवल जीवनोपायच होतात व दांभिकांना तर केव्हांतरी जीवनोपाय होतात व केव्हांतरी त्यांचा दांभिकपणा प्रसिद्ध झाला ह्मणजे जीवनोपायहि होत नाहींत ॥ ४६ ॥ आतां तुझें ज्ञानतर भक्तीवांचून सकाम अशा मौनादिसाधनांनीं होतच नाहीं असें सांगतो, ॥ ३८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हे प्रभो, प्राकृतरूपानें रहित अशाहि तुझीं, बीजांकुरांप्रमाणें प्रवाहानें प्राप्त झालेलीं हीं कार्यकारणात्मक दोन रूपें, वेदानें प्रकाशित केलीं आहेत, यांखेरीज तुझें ज्ञापक चिन्ह 'जसें देवदत्तादिकांचें गोरेपणावगैरे असतें तसें' कांहींच नाहीं, म्हणून जसे अग्निहोत्री काष्ठाचेठिकाणीं असलेल्या अग्नीला मंथनानें प्राप्त करून घेतात त्याप्रमाणें इंद्रियनिग्रह करणारे योगी, कार्यकारणांचेठिकाणीं व्यापकत्वेंकरून असणाऱ्या तुला भक्तियोगानें प्रत्यक्ष अवलोकन करितात, तसें दुसऱ्या उपायांनीं तुझें तत्त्वज्ञान होत नाहीं ॥ ४७ ॥ आतां हेंच फिरून स्पष्ट करण्याच्या अभिप्रायानें भाषण करितो कीं–हे सर्वव्यापी परमेश्वरा, वायु, अग्नि, पृथ्वी, आकाश, जल, शब्दादिविषय, प्राण, इंद्रियें, मन, चित्त, अहंकार व स्थूलसूक्ष्मात्मक हें सर्व जग तूंच आहेस. किंबहुना मन व वाणी ह्यांनीं प्रकाशित केलेली कोणतीहि वस्तु तुझ्याहून भिन्न नाहीं ॥ ४८ ॥ असें

भिर्न भवत्येवेत्याह । रूपे इति त्रिभिः । बीजांकुराविव प्रवाहापन्ने इमे सदसती कार्यकारणे एव ते रूपे उपलक्षणभूते वेदेन सृष्टे प्रकाशिते न चान्यत् स्वसमवेतं गौरत्वादिकमिव देवदत्तादेः । कुतः । अरूपकस्य प्राकृतरूपादिशून्यस्य । अतो युक्ताः संयता एव भक्तियोगेन प्रत्यक्षं त्वामुभयत्र कार्ये कारणे चानुगतं पश्यंति । मथनेन दारुषु वह्निमिव । नान्यतः स्यात्त्वज्ज्ञानमिति शेषः । यद्वा ज्ञानप्रकारमेवाह । एतदुभयमन्यतः प्रधानपरमाण्वादेर्न स्यात् । स ऐक्षतेत्यादिश्रुतेः । अतस्त्वमेव कारणत्वात्सर्वत्रानुस्यूत इति ॥ ४७ ॥ तदेवाह । त्वं वायुरिति । हृदयं मनः । चिच्चित्तम् । अनुग्रहोऽहंकारो देवतावर्गो वा । सगुणः स्थूलः विगुणः सूक्ष्मः । मनश्च वचश्च मनोवचस्तेन निरुक्तं प्रकाशितं

त्वं वायुरग्निरवनिर्वियदंबुमात्राः प्राणेंद्रियाणि हृदयं चिदनुग्रहश्च ॥ सर्वं त्वमेव सगुणो विगुणश्च भूमन्नान्यत्त्वदस्त्यपि मनोवचसा निरुक्तम् ॥ ४८ ॥ नैते गुणा न गुणिनो महदादयो ये सर्वे मनःप्रभृतयः सहदेवमर्त्याः ॥ आद्यंतवंत उरुगाय विदंति हि त्वामेवं विमृश्य सुधियो विरमंति शब्दात् ॥ ४९ ॥ तत्तेऽर्हत्तम नमःस्तुतिकर्मपूजाः कर्म स्मृतिश्चरणयोः श्रवणं कथायाम् ॥ संसेवया त्वयि विनेति षडंगया किं भक्तिं जनः परमहंसगतौ लभेत ॥ ५० ॥

किमपि त्वत्तोऽन्यन्नास्ति ॥ ४८ ॥ अभक्तास्तु स्वस्मिन्ननुगतमपि त्वां न जानंतीत्याह । नैत इति । एते गुणाद्यभिमानिनो देवा आद्यंतवंतो जडोपाधित्वादनाद्यंतं निरुपाधिं त्वां विदंति हि यस्मात्सुधियो विद्वांस एवं विचार्य शब्दादध्ययनादिव्यापाराडुपरमंति । त्वामेव समाधिनोपासत इत्यर्थः । तथा च श्रुतिः । किमर्थां वयमध्येष्यामहे किमर्थां वयं यक्ष्यामह इति । नानुध्यायेद्बहून् शब्दान्वाचो विग्लापनं हि तदिति । स्मृतिश्च । यदा ते मोहकलिलं बुद्धिर्व्यतितरिष्यति ॥ तदा गंताऽसि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्य चेत्यादिः ॥ ४९ ॥ उपसंहरति तदिति । हे अर्हत्तम नमःस्तुतिकर्मपूजाः प्रणिपातस्तुतिसर्वकर्मार्पणानि कर्म च परिचर्या चरणयोः स्मृतिश्च कथायां श्रवणं चेत्येवं षडंगया सम्यक्सेवया विना परमहंसानां गतौ प्राप्ये त्वयि जनः कथं भक्तिं लभेत । यस्मादेवं भक्तिं विना न मोक्षो न च भक्तिः संसेवया विनाऽतः प्राक् प्रार्थितं त्वद्दा-

---

सांगतो–हे उरुगाय भगवन्, जे सत्त्वादिगुण, गुणाभिमानी देव, देव व मनुष्यें यांसहवर्तमान महदादितत्त्वें, मन बुद्धि इत्यादिकांचे अभिमानी देव हे सर्व, आदि व अंत ह्यांनीं युक्त असल्यामुळें तुला जाणत नाहींत. ह्यास्तव विद्वान् लोक, असा विचार करून अध्ययनादि व्यापारांपासून उपरम पावतात म्हणजे समाधीच्या योगानें तुझीच उपासना करितात ॥ ४९ ॥ यास्तव हे अतिपूज्या परमात्म्या, प्रणिपात, स्तुति, सर्वकर्मसमर्पण, उपासना, चरणांचें स्मरण व कथेचें श्रवण अशा चांगल्या षडंगसेवेवांचून पुरुषाला, परमहंसांना प्राप्त होण्यास योग्य अशा तुझ्याठिकाणीं भक्ति कशी प्राप्त होईल? होणारच नाहीं. तस्मात्, ज्याअर्थीं भक्तीवांचून मोक्ष नाहीं. व उत्तमसेवेवांचून भक्ति नाहीं त्याअर्थीं पूर्वीं प्रार्थना केलेला तुझा दास्ययोगच

असून तुझी भक्ति न करणारे पुरुष स्वस्वरूपीं स्थित असलेल्या तुला अवलोकन करीत नाहींत असें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तूं मला दे ॥ ५० ॥ नारद ह्मणाला- हे धर्मराजा, याप्रमाणें भक्तप्रऱ्हादानें भक्तिपूर्वक निर्गुणपरमात्म्याच्या गुणांचें वर्णन केलें असतां, तो परमात्मा प्रसन्न झाला आणि कोप आवरून धरून त्या नम्र असलेल्या प्रऱ्हादाला ह्मणाला कीं, ॥ ५१ ॥ श्रीभगवान् ह्मणाला- हे असुरश्रेष्ठा प्रऱ्हादा, तुझें कल्याण असो; मी तुजवर प्रसन्न झालों आहें. तस्मात् हे कल्याणा, तूं इष्ट वर माग. कारण, मी पुरुषांच्या मनकामना पूर्ण करणारा आहें ॥ ५२ ॥ हे आयुष्मन्, मला प्रसन्न न करणाऱ्या पुरुषास माझें दर्शन होणें खरोखर दुर्लभ आहे, परंतु माझें ज्याला दर्शन झालें तो प्राणी 'आपली कामना परिपूर्ण झाली नाहीं असा' शोक करण्यास योग्य होत नाहीं ॥ ५३ ॥ ह्याकरितां सदाचारसंपन्न, महाभाग्यवान् आणि आपलें कल्याण व्हावें अशी इच्छा करणारे विवेकी पुरुष, परमभक्तीच्या योगानें सर्व मनोरथ पूर्ण करणाऱ्या मज परमेश्वराला

स्ययोगमेव देहीति प्रकारणार्थः ॥ ५० ॥ एतावंतो वर्णिता गुणा यस्य। यतमन्युरुपसंहृतकोपः ॥ ५१ ॥ कामान्पूरयतीति तथा । यद्वा पुरुषार्थप्रवाहोऽस्मीत्यर्थः ॥ ५२ ॥ अप्रीणतः अप्रीणयतः तप्तुमपूर्णकामत्वेन शोचितुम् ॥ ५३ ॥ प्रीणंति तोषयंति ॥ ५४ ॥ एकांतित्वान्निरुपाधिभक्तत्वात् ॥ ५५ ॥ इति श्रीमद्भागवते सप्तमे टीकायां नवमोऽध्यायः ॥ ९ ॥ ॥ दशमे त्वनुगृह्यामुं भक्तमंतर्हिते हरौ ॥ प्रसंगाद्धरिणा रुद्रे कृतोऽनुग्रह ईर्यते ॥ १ ॥ तत्सर्वं वरजातम् ॥ १ ॥ उत्पत्त्या स्वभावेनैवासक्तं माम्। तेषां कामानां संगाद्भीतः ॥ २ ॥ ननु किमहं भक्तं प्रलोभयामि न हि किंतु वरं वृणीष्वेति वदतस्तवाभिप्रायोऽन्य एवेत्याह ।

॥ नारद उवाच ॥ एतावद्वर्णितगुणो भक्त्या भक्तेन निर्गुणः ॥ प्रह्लादं प्रणतं प्रीतो यतमन्युरभाषत ॥ ५१ ॥ श्रीभगवानुवाच ॥ प्रह्लाद भद्र भद्रं ते प्रीतोऽहं तेऽसुरोत्तम ॥ वरं वृणीष्वाभिमतं कामपूरोऽस्म्यहं नृणाम् ॥ ५२ ॥ मामप्रीणत आयुष्मन्दर्शनं दुर्लभं हि मे ॥ दृष्ट्वा मां न पुनर्जंतुरात्मानं तप्तुमर्हति ॥ ५३ ॥ प्रीणंति ह्यथ मां धीराः सर्वभावेन साधवः ॥ श्रेयस्कामा महाभागाः सर्वासामाशिषां पतिम् ॥ ५४ ॥ एवं प्रलोभ्यमानोऽपि वरैर्लोकप्रलोभनैः ॥ एकांतित्वाद्भगवति नैच्छत्तानसुरोत्तमः ॥ ५५ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे सप्तमस्कंधे प्रह्लादचरिते भगवत्स्तवो नाम नवमोऽध्यायः ॥ ९ ॥ नारद उवाच ॥ भक्तियोगस्य तत्सर्वमंतरायतयार्भकः ॥ मन्यमानो हृषीकेशं स्मयमान उवाच ह ॥ १ ॥ प्रह्लाद उवाच ॥ मा मां प्रलोभयोत्पत्त्यासक्तं कामेषु तैर्वरैः ॥ तत्संगभीतो निर्विण्णो मुमुक्षुस्त्वामुपाश्रितः ॥ २ ॥ भृत्यलक्षणजिज्ञासुर्भक्तं कामेष्वचोदयत् ॥ भवान्संसारबीजेषु हृदयग्रंथिषु प्रभो ॥ ३ ॥

संतुष्ट करितात ॥ ५४ ॥ हे धर्मराजा, याप्रमाणें प्राण्यांना लोभ उत्पन्न करणाऱ्या वरांच्या योगानें, भगवंतानें लोभ दाखविलेल्याहि त्या असुरश्रेष्ठ प्रऱ्हादानें, भगवंताचेठिकाणीं एकांतभक्त असल्यामुळें, वरांची इच्छाच केली नाहीं ॥ ५५ ॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागव० महापु० सप्तमस्कंधांत भगवत्स्तवनामक हा नववा अध्याय समाप्त झाला ॥ ९ ॥ आतां, ह्या दहाव्या अध्यायामध्यें, प्रऱ्हादभक्तावर अनुग्रह करून श्रीहरि गुप्त झाला व प्रसंगोपात्त त्या श्रीहरीनेंच रुद्रावर अनुग्रह केला, अशी कथा वर्णन केली आहे ॥१॥ नारद ह्मणाला- हे धर्मराजा, तें 'वर मागवगैरे' भगवंताचें सर्व बोलणें भक्तियोगाला विघ्नकारक आहे असें मानणारा तो प्रऱ्हाद बालक, आश्चर्य करीत करीत हृषीकेश भगवंताला असें ह्मणाला कीं,- ॥ १ ॥ प्रऱ्हाद ह्मणाला- हे परमेश्वरा, स्वभावतःच विषयांचेठिकाणीं आसक्त असलेल्या मला त्याच वरांनीं लुब्ध करूं नकोस. कारण, त्यांच्या संगाची भीति बाळगून त्यांपासून विरक्त झालेला मी, मोक्षप्राप्ति होण्याच्या इच्छेनें तुला शरण आलों आहें ॥ २ ॥ आतां मी कां भक्ताला लुब्ध करीन, असें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्मणशील तर तसें नाहीं परंतु वर माग असें ह्मणणाऱ्या तुझा अभिप्राय वेगळाच आहे. तो असा कीं, हे प्रभो, हृदयाला गांठीसारखे बंधास कारण व संसाराला बीजभूत
अशा विषयांचेठिकाणीं मज भक्ताला जी तूं प्रेरणा केलीस ती केवळ भृत्यलक्षण जाणण्याच्या इच्छेनेंच केली आहेस ॥ ३ ॥ नाहीं तर हे जगद्गुरो, कृपाळु अशा तुला अनर्थ
साधनामध्यें स्वभक्ताची प्रवृत्ति करणें हें घडत नाहीं. आतां, असें केल्यानें भृत्यलक्षण कसें समजेल असें ह्मणशील तर- हे ईश्वरा, तुझ्यापासून जो सेवक विषय प्राप्त
होण्याची इच्छा करितो तो सेवक नव्हे. वर तो केवळ वाणी होय ॥ ४ ॥ आतां कामनेनेंहि स्वामिसेवकांमध्यें स्वामिसेवकपणा असतो असें ह्मणशील तर खरें, परंतु
तो उपाधीमुळें झालेला असतो वास्तविक नसतो असें सांगतो- जो सेवक स्वामीपासून आपले मनोरथ पूर्ण करण्याची इच्छा करितो तो सेवक नव्हे व जो सेवकापासून

भृत्यलक्षणेति । हृदयस्य ग्रंथिवद्बंधकेषु । अन्यथाऽनर्थसाधने प्रवर्तनं न घटेत इत्यर्थः ॥ ३ ॥ कथमेवं भृत्यलक्षणज्ञानं स्यात्तत्राह । य इति ते त्वत्तः ॥ ४ ॥
ननु कामनयाऽपि सेव्यसेवकयोः स्वामिभृत्यभावः प्रसिद्धः सत्यम् । सोपाधिकोऽसौ न तु तात्त्विक इत्याह । स्वामिन्यात्मन आशिषोऽपेक्षमाणो नैव भृत्यः । भृत्यहेतुकमात्मनः
स्वाम्यमिच्छन्यो भृत्याय ददाति स च नैव स्वामी ॥ ५ ॥ आवयोस्तु तात्त्विकोऽसावित्याह । अहं त्विति । अनपाश्रयो निरभिसंधिः । अन्यथा कामाद्यभिसंधिनाऽर्थः

नान्यथा तेऽखिलगुरो घटेत करुणात्मनः ॥ यस्त आशिष आशास्ते न स भृत्यः स वै वणिक् ॥ ४ ॥ आशासानो न वै भृत्यः
स्वामिन्याशिष आत्मनः ॥ न स्वामी भृत्यतः स्वाम्यमिच्छन्यो राति चाशिषः ॥ ५ ॥ अहं त्वकामस्त्वद्भक्तस्त्वं च स्वाम्यनपा-
श्रयः ॥ नान्यथेहावयोरर्थो राजसेवकयोरिव ॥ ६ ॥ यदि रासीश मे कामान्वरांस्त्वं वरदर्षभ ॥ कामानां हृद्यसंरोहं भवतस्तु
वृणे वरम् ॥ ७ ॥ इंद्रियाणि मनः प्राण आत्मा धर्मो धृतिर्मतिः ॥ ह्रीः श्रीस्तेजः स्मृतिः सत्यं यस्य नश्यंति जन्मना ॥ ८ ॥
विमुंचति यदा कामान्मानवो मनसि स्थितान् ॥ तर्ह्येव पुंडरीकाक्ष भगवत्त्वाय कल्पते ॥ ९ ॥

प्रयोजनं नास्ति ॥ ६ ॥ ननु तथापि परमोदारस्य मम संतोषार्थं किमपि वृणीष्वेति चेदत आह । यदीति । कामांकुराणामसंरोहमनुत्पत्तिं भवतः सकाशात् ॥ ७ ॥ ननु
कामोत्पत्तौ सत्यां को दोषस्तत्राह । इंद्रियादीनि यस्य जन्मना नश्यंति । आत्मा देहः ॥ ८ ॥ कामाभावे गुणमाह । विमुंचतीति । भगवत्त्वाय त्वत्समानैश्वर्याय । तथा च

स्वकार्य होण्याच्या इच्छेनें त्याला द्रव्यवगैरे देतो तो स्वामीहि नव्हे, तर ते परस्पर व्यापारी समजले पाहिजेत ॥ ५ ॥ तुझ्या माझ्यामध्यें असलेलामात्र स्वामिसेवक-
भाव वास्तविक आहे. कारण, मी तुझा निष्काम भक्त आहें व तूंहि माझा निरपेक्ष स्वामी आहेस. ह्यामुळें जसा राजा आणि सेवक ह्यांच्यामध्यें स्वामिभृत्यभाव
असतो तसा आमच्यामध्यें नाहीं ॥ ६ ॥ तथापि तूं, मज परम उदार परमेश्वराच्या संतोषाकरितां कांहींतरी वर माग असें ह्मणत असशील तर- हे वरदश्रेष्ठ परमे-
श्वरा, तूं जर मला इष्ट वर देत असलास तर, माझ्या हृदयामध्यें कामवासनांचा अंकुर उत्पन्न होऊं नये हा मी तुजपासून वर मागतों ॥ ७ ॥ बरें कामाची उत्पत्ति झा-
ली असतां काय दोष आहे? असें ह्मणशील तर- हे कमलनयना, कामांकुराच्या उत्पत्तीमुळें इंद्रियें, मन, प्राण, देह, धर्म, धैर्य, सारासार विवेक, लज्जा, ऐश्वर्य, प्रताप,
स्मृति आणि सत्य हीं सर्व नाहींशीं होतात ॥ ८ ॥ हे पुंडरीकाक्षा, जेव्हां पुरुष मनामध्यें असलेल्या सर्वकामनांचा त्याग करितो तेव्हांच तुझ्यासारिखें ऐश्वर्य प्राप्त

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होण्यास तो योग्य होतो ॥ ९ ॥ ह्यानंतर निर्दोष वर देण्याची इच्छा करणाऱ्या भगवंताचें निराकरण करित होत्साता प्रल्हाद नमस्कार करितो कीं,– हे भगवंता, हे महात्म्या पुराणपुरुषा, हे श्रीहरे व हे अद्भुत सिंहरूप धारण करणाऱ्या ब्रह्मस्वरूप परमात्म्या, तुला नमस्कार असो ॥ १० ॥ नंतर तूं एकनिष्ठ भक्त आहेस हें खरें तथापि माझी आज्ञा स्वीकारावीस अशा अभिप्रायानें श्रीनृसिंह ह्मणाला कीं,– हे प्रल्हादा, तुझ्यासारिखे जे माझे एकनिष्ठ भक्त आहेत ते कधींहि इहलोकसंबंधीं अथवा परलोकसंबंधीं विषय मजपासून प्राप्त होण्याची इच्छा करीत नाहींत. तथापि हें मन्वंतर संपेपर्यंत तूं दैत्याधिपतींचा राजा होऊन ह्या भूलोकींच्या विषयभोगांचा उपभोग घे ॥ ११ ॥ बरें तसें केलें असतां बंध प्राप्त होईल असें ह्मणशील तर–हे प्रल्हादा, माझ्या प्रियकथांचें श्रवण करीत होत्साता तूं, सर्वभूतांचेठिकाणीं राहणाऱ्या एका मज

श्रुतिः । यदा सर्वे प्रमुच्यंते कामा येऽस्य हृदि श्रिताः ॥ अथ मर्त्योऽमृतो भवत्यत्र ब्रह्म समश्नुत इति ॥९॥ निर्दोषान्कामान्दातुमिच्छंतं प्रत्याख्यास्यन्नमस्यति । नम इति ॥ १० ॥ सत्यमेकांतभक्तस्त्वं तथापि मदाज्ञाकरणीयेत्याह । नेति । मे एकांतिनः कदाचिदपीहामुत्र च मय्याशिषो न वांछंत्येव तथाप्येतन्मन्वंतरमात्रं भोगान्भुंक्ष्व ॥ ११ ॥ ननु तर्हि बंधः स्यादित्यत आह । कथा इति द्वाभ्यां । सर्वेषु भूतेषु संतमेकमीशं यज्ञाधिष्ठातारं मामात्मन्यावेश्य यजस्व । तद्यज्ञेनैवापि कर्मणा बंधः स्यान्नेत्याह । योगेन मय्यर्पणेन

नमो भगवते तुभ्यं पुरुषाय महात्मने ॥ हरयेऽद्भुतसिंहाय ब्रह्मणे परमात्मने ॥ १० ॥ नृसिंह उवाच ॥ नैकांतिनो मे मयि जात्विहाशिष आशासतेऽमुत्र च ये भवद्विधाः ॥ अथापि मन्वंतरमेतदत्र दैत्येश्वराणामनुभुंक्ष्व भोगान् ॥ ११ ॥ कथा मदीया जुषमाणः प्रियास्त्वमावेश्य मामात्मनि संतमेकम् ॥ सर्वेषु भूतेष्वधियज्ञमीशं यजस्व योगेन च कर्म हिन्वन् ॥ १२ ॥ भोगेन पुण्यं कुशलेन पापं कलेवरं कालजवेन हित्वा ॥ कीर्तिं विशुद्धां सुरलोकगीतां विताय मामेष्यसि मुक्तबंधः ॥ १३ ॥ य एतत्कीर्तयेन्मह्यं त्वया गीतमिदं नरः ॥ त्वां च मां च स्मरन्काले कर्मबंधात्प्रमुच्यते ॥ १४ ॥

कर्म हिन्वंस्त्यजन्यजस्व ॥ १२ ॥ किंच भोगेन सुखानुभवेन प्रारब्धं पुण्यं हित्वा मुक्तबंधः सँल्लोकानुग्रहार्थं कीर्तिं च विस्तार्य मां प्राप्स्यसि कुशलेन पुण्याचरणेन पापं हित्वेति बिभीषामात्रमन्यथा तस्य राज्येऽप्रवृत्तेः । न तु तस्य प्राचीनं पापमस्ति तदधिगम उत्तरपूर्वाघयोरश्लेषविनाशौ तद्व्यपदेशादिति न्यायात् तत्सुकृतदुष्कृते विधुनुत इति श्रुतेश्च । न चेदं प्रारब्धं पापाभिप्रायं तस्य भोगेनैव क्षयात्कुशलेन हित्वेति वचनानुपपत्तेः । न चासावविद्वानिति वाच्यं भगवतैव कृतार्थत्वस्यानंतरं वक्ष्यमाणत्वात् । अतएव योगेन कर्म हिन्वन्नितीदमपि लोकसंग्रहार्थकर्मणि प्रवर्तितस्यानुद्वेगमात्रायेति सर्वमनवद्यम् ॥ १३ ॥ किंच । य इति । त्वां च मां चेदं मच्चरित्रं च स्मरन्नेतत्स्तोत्रं

यज्ञाधिष्ठात्या परमेश्वराचें मनामध्यें धारण करून माझें आराधन कर. आतां ह्याव कर्मांच्या योगानें बंध प्राप्त होईल असें ह्मणशील तर–नाहीं. माझेठिकाणीं समर्पणरूपानें तूं कर्मांचा त्याग करून माझें आराधन कर ॥ १२ ॥ ह्मणजे सुखानुभवानें पुण्याचा, सदाचरणानें पातकाचा आणि कालवेगानें देहाचा त्याग करून व देवलोकींहि गायन करण्यास योग्य अशी अत्यंत पवित्र कीर्ति इहलोकीं प्रख्यात करून, कर्मबंधनापासून मुक्त होत्साता तूं मजप्रत प्राप्त होशील ॥ १३ ॥ आणि फार तर काय परंतु, तुझें माझें व ह्या माझ्या चरित्राचें स्मरण करणारा जो पुरुष, तूं वर्णन केलेल्या ह्या माझ्या स्तोत्राचें पठण करील तोहि कर्मबंधापासून मुक्त होईल मग तुला

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कर्मबंधाची शंका नाहीं हें काय सांगावें ? ॥ १४ ॥ ह्याप्रमाणें ईश्वराच्या आज्ञेनें कर्माधिकार प्राप्त झाला असतां, पित्याच्या दुष्कर्मनिवृत्तीकरितां प्रऱ्हाद प्रार्थना करितो कीं,— हे महेश्वरा, वर देणाऱ्या ब्रह्मादिकांचा अधिपति अशा तुजपासून मी दुसरें असें एक मागणें मागतों कीं,— क्रोधानें अंतःकरण व्याप्त झाल्यामुळें ईश्वरी तेज न जाणणाऱ्या माझ्या पित्यानें 'हा माझ्या भ्रात्याचा घात करणारा आहे अशा' असत्य दृष्टीनें साक्षात् तुज त्रैलोक्याधिपति सर्वलोकगुरूची जी निंदा केली व तुझ्या भक्ताशीं ह्मणजे माझ्याशीं जो द्रोह केला त्या दुरंत व दुस्तर पातकापासून तो माझा पिता शुद्ध होवो. हे दीनवत्सला, तूं कटाक्षानें अवलोकन केलेंस तेव्हांच तो पवित्र झाला आहे तथापि दीनपणामुळें मी ही तुझी पुनरपि प्रार्थना करित आहें ॥ १५ ॥ १६ ॥ १७ ॥ श्रीभगवान् ह्मणाला— हे निष्पापा, तुझा पिता आपल्या एकवीस पूर्व-

यः कीर्तयेत्सोऽपि कर्मबंधाद्विमुच्यते कुतस्तव बंधशंकेत्यर्थः ॥ १४ ॥ ईश्वराज्ञया प्राप्तकर्माधिकारः सन्पितुर्निष्कृतिं प्रार्थयते त्रिभिः । वरं वरणीयमेतदपरं वृणे ते त्वत्तः ॥ १५ ॥ विद्धोऽमर्षेण क्रोधेनाशयो यस्य ॥ १६ ॥ तेऽपांगेन संदृष्टोऽतः पूत एव तथापि भो कृपणवत्सल कार्पण्येन प्रार्थय इत्यर्थः ॥ १७ ॥ यद्यपि कश्यपो मरीचि-

॥ प्रह्लाद उवाच ॥ वरं वरय एतत्ते वरदेशान्महेश्वर ॥ यदनिंदत्पिता मे त्वामविद्वांस्तेज ऐश्वरम् ॥ १५ ॥ विद्धामर्षाशयः साक्षा-
त्सर्वलोकगुरुं प्रभुम् ॥ भ्रातृहेति मृषा दृष्टिस्त्वद्भक्ते मयि चाघवान् ॥ १६ ॥ तस्मात्पिता मे पूयेत दुरंताद्दुस्तरादघात् ॥ पूतस्ते-
ऽपांगसंदृष्टस्तदा कृपणवत्सल ॥ १७ ॥ श्रीभगवानुवाच ॥ त्रिःसप्तभिः पिता पूतः पितृभिः सह तेऽनघ ॥ यत्साधोऽस्य गृहे जातो
भवान्वै कुलपावनः ॥ १८ ॥ यत्र यत्र च मद्भक्ताः प्रशांताः समदर्शिनः ॥ साधवः समुदाचारास्ते पूयंत्यपि कीकटाः ॥ १९ ॥
सर्वात्मना न हिंसंति भूतग्रामेषु किंचन ॥ उच्चावचेषु दैत्येंद्र मद्भावेन गतस्पृहाः ॥ २० ॥ भवंति पुरुषा लोके मद्भक्तास्त्वामनु-
व्रताः ॥ भवान्मे खलु भक्तानां सर्वेषां प्रतिरूपधृक् ॥ २१ ॥

र्ब्रह्मा चेति तत्पितृत्रय एव पूर्वजास्तथापि त्रिःसप्तभिः सहेति प्राक्कल्पगतपित्रभिप्रायेणोक्तम् । यद्यस्मात् ॥ १८ ॥ सम्यगुत्तम आचारो येषां ते कीकटा अपि देशास्ततुल्यावं-शाश्च पूयंते शुद्धा भवंति ॥ १९ ॥ ननु त्वद्भक्तानामयं महिमेति न चित्रम् । अहं तु तादृशो न भवामीति चेत्तत्राह । सर्वात्मनेति द्वाभ्याम् । मद्भावेन मद्भक्त्या विगता स्पृहा येषाम् ॥ २० ॥ त्वामनुगता ये केचित्पुरुषास्तेऽप्येवंलक्षणाः संतो मद्भक्ता भवंत्यतो भवान्मे भक्तानां सर्वेषां प्रतिरूपधृगुपमानास्पदम् । श्रेष्ठः खल्वित्यर्थः ॥ २१ ॥

जांसहवर्तमान पवित्र झाला आहे. कारण, हे साधो, ह्याच्या घरीं कुल पवित्र करणारा असा तूं उत्पन्न झाला आहेस ॥ १८ ॥ हे प्रऱ्हादा, जेथें जेथें अत्यंत शांत, समदर्शी, परोपकारी आणि सदाचारसंपन्न असे माझे भक्त राहतात ते कीकट देशांसारखे अत्यंत अपवित्र असलेलेहि वंश पवित्र होतात ॥ १९ ॥ आतां 'तुझ्या भक्तांचा हा महिमाच आहे तेव्हां ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. परंतु, मी कांहीं तसा नाहीं असें ह्मणशील तर'—हे दैत्यश्रेष्ठा, माझ्या भक्तीनें निरिच्छ झालेले जे लोक आहेत ते कामक्रोधादिकांमुळें जरी कदाचित् परतंत्र झाले तथापि ते लहानथोर प्राण्यांच्या समुदायांमध्यें कोणाचीहि हिंसा करीत नाहींत ॥ २० ॥ फारतर काय परंतु, या लोकीं जे

१ हिरण्यकशिपूचे जरी, ब्रह्मदेव, मरीचि व कश्यप असे तीनच पूर्वज होते तथापि पूर्वीच्या कल्पांतील पितरांच्या अभिप्रायानें हें भाषण आहे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुरुष, तुला अनुसरून वागतील तेसुद्धां माझे भक्त होतील, तूंतर खरोखर माझ्या सर्व भक्तांमध्यें श्रेष्ठ आहेस ॥ २१ ॥ हे प्रल्हादा, माझ्या शरीराचा स्पर्श झाल्यामुळें सर्वप्रकारें पवित्र झालेल्या आपल्या पित्याचीं केवल शास्त्रमर्यादारक्षणार्थ तूं दाहादिक प्रेतकार्यें कर. ह्मणजे तुज सत्पुत्राच्या योगानें तो उत्तमलोकांस जाईल ॥ २२ ॥ आणि बा प्रल्हादा, ब्रह्मवेत्त्यांच्या वचनाला अनुसरून तूं पित्याच्या स्थानावर आरूढ हो आणि माझ्याठिकाणीं मन लावून व मजविषयीं तत्पर होऊन सर्व कर्में आचरण कर ॥ २३ ॥ श्रीनारद ह्मणाला– हे धर्मराजा, याप्रमाणें भगवंतानें सांगितलें असतां प्रल्हादानेंहि पित्याचें जें और्ध्वदेहिक कृत्य तें सर्व केलें; नंतर द्विजश्रेष्ठांनीं त्याला राज्याभिषेक केल्यावर तो प्रल्हाद भगवत्पर होऊन सर्व कर्में करूं लागला ॥ २४ ॥ इकडे देवादिकांनीं परिवेष्टित असलेल्या ब्रह्मदेवानें, प्रसन्नतेमुळें सौम्यवदन अशा नृसिंहरूपी श्रीहरीला पाहून व पवित्र वाणींनीं त्याची स्तुति करून असें भाषण केलें कीं, ॥ २५ ॥ ब्रह्मदेव ह्मणाला– हे देवाधिदेवा, हे सर्वांतर्यामी परमात्म्या, तूं जग-

मदंगस्पर्शनेन सर्वशः पूतस्य ते पितुः पापशंकैव नास्ति केवलं पुत्रकृत्यानि प्रेतकार्याणि कुरु ॥२२॥ ब्रह्मवादिभिर्वेदवादिभिरुक्तमनतिक्रम्य मत्परः सन्कर्माणि कुरु ॥२३॥

कुरु त्वं प्रेतकार्याणि पितुः पूतस्य सर्वशः ॥ मदंगस्पर्शनेनांग लोकान्यास्यति सुप्रजाः ॥ २२ ॥ पित्र्यं च स्थानमातिष्ठ यथोक्तं ब्रह्मवादिभिः ॥ मय्यावेश्य मनस्तात कुरु कर्माणि मत्परः ॥ २३ ॥ श्रीनारद उवाच ॥ प्रह्लादोऽपि तथा चक्रे पितुर्यत्सांपरायिकम् ॥ यथाऽऽह भगवान्राजन्नभिषिक्तो द्विजोत्तमैः ॥ २४ ॥ प्रसादसुमुखं दृष्ट्वा ब्रह्मा नरहरिं हरिम् ॥ स्तुत्वा वाग्भिः पवित्राभिः प्राह देवादिभिर्वृतः ॥ २५ ॥ ब्रह्मोवाच ॥ देवदेवाखिलाध्यक्ष भूतभावन पूर्वज ॥ दिष्ट्या ते निहतः पापो लोकसंतापनोऽसुरः ॥ ॥ २६ ॥ योऽसौ लब्धवरो मत्तो न वध्यो मम सृष्टिभिः ॥ तपोयोगबलोन्नद्धः समस्तनिगमानहन् ॥ २७ ॥ दिष्ट्याऽस्य तनयः साधुर्महाभागवतोऽर्भकः ॥ त्वया विमोचितो मृत्योर्दिष्ट्या त्वां समितोऽधुना ॥ २८ ॥ एतद्वपुस्ते भगवन्ध्यायतः प्रयतात्मनः ॥ सर्वतो गोप्तृ संत्रासान्मृत्योरपि जिघांसतः ॥ २९ ॥ श्रीनृसिंह उवाच ॥ मैवं वरोऽसुराणां ते प्रदेयः पद्मसंभव ॥ वरः क्रूरनिसर्गाणामहीनाममृतं यथा ॥ ३० ॥

॥ २४ ॥ २५ ॥ २६ ॥ मम सृष्टिभिर्मया सृष्टैर्भूतैः । समस्तान्निगमान्धर्मानित्यर्थः । अहन्हतवान् । स त्वया हत एतद्दिष्ट्या भद्रम् ॥ २७ ॥ समितः सम्यक्प्राप्तः ॥ २८ ॥ सर्वतः संत्रासात् । गोप्तृ रक्षकम् ॥ २९ ॥ एवं वरस्त्वया न प्रदेयः । क्रूरो निसर्गः स्वभावो येषाम् । अमृतं क्षीरम् ॥ ३० ॥

त्स्रष्ट्यांचाहि पूर्वज आहेस. हा लोकांना त्रास देणारा पापी असुर, तूं मारिलास ही फार चांगली गोष्ट झाली ॥ २६ ॥ जो हा दैत्य, माझ्यापासून वर प्राप्त झाल्यामुळें मीं उत्पन्न केलेल्या देवमनुष्यादिकांपासून मृत्यु पावण्यास अशक्य झाला होता व तपोयोगसंबंधी बलानें गर्विष्ठ होऊन ह्यानें वेदप्रणीत सर्व धर्म नाहींसे करून टाकिले होते त्याला तूं मारिलेंस ही फार चांगली गोष्ट झाली ॥ २७ ॥ त्याप्रमाणें बालक असूनहि सदाचारसंपन्न व महाभगवद्भक्त असा ह्याचा पुत्र प्रल्हाद तूं मृत्यूपासून सोडविलास हें चांगलें झालें व सांप्रतकालीं तो तुला शरण आला हेंहि फार चांगलें झालें ॥ २८ ॥ हे भगवन्, तुझें हें स्वरूप, मनोनिग्रह करून तुझें ध्यान करणाऱ्या पुरुषाला, सर्व त्रासांपासून किंबहुना वध करण्याची इच्छा करणाऱ्या मृत्यूपासूनहि रक्षण करणारें आहे ॥ २९ ॥ श्रीनृसिंह ह्मणाला– हे ब्रह्मदेवा, आजपासून अशा प्रकारचा वर, क्रूरस्वभावाच्या असुरांना तूं कधींहि देऊं नकोस. कारण, सर्पांना दूध पाजिलें असतां तें जसें सज्जनांना उपद्रव करणारें होतें तसें स्वभावतःच भयंकर

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अशा असुरांना दिलेला वरहि लोकांना उपद्रव करणारा होतो ॥ ३० ॥ नारद ह्मणाला— हे धर्मराजा, ह्याप्रमाणें ब्रह्मदेवाला सांगून त्यानें पूजन केल्यावर, भगवान् श्रीहरि तेथेंच अंतर्धान पावला. ह्मणजे सर्वभूतांना अदृश्य झाला ॥ ३१ ॥ नंतर प्ऱ्हादानें, भगवंताचे अंशभूत अशा ब्रह्मदेव, महादेव, कश्यपादि प्रजापति व इंद्रादि देव ह्यांचें उत्तम प्रकारानें पूजन करून, त्यांना मस्तकानें वंदन केलें ॥ ३२ ॥ तदनंतर, भृगुप्रभृति मुनींसहवर्तमान ब्रह्मदेवानें, प्ऱ्हादाला, दैत्य व दानव ह्यांचें आधिपत्य दिलें ॥ ३३ ॥ नंतर हे राजा, प्ऱ्हादानें पूजित असे ते ब्रह्मादिक देव त्याची प्रशंसा करून व त्याला उत्तमप्रकारचे आशीर्वाद देऊन आपापल्या स्थानाप्रत निघून गेले ॥ ३४ ॥ असो. हे धर्मराजा, ह्याप्रमाणें पूर्वी जयविजयसंज्ञक असलेले जे विष्णुपार्षद ते विप्रशापामुळें दितीचे पुत्र झाले असतां, हृदयामध्यें असलेल्या श्रीहरीनें वैरभावानें त्यांचा वध केला ॥ ३५ ॥ नंतर पुनरपि त्याच विप्रशापामुळें ते रावण व कुंभकर्ण या नांवांचे दोन राक्षस झाले असतां, तेथें रामाच्या पराक्रमांनीं त्यांचा

॥३१ ॥ ३२॥ ३३ ॥३४ ॥ शिशुपालदंतवक्रयोर्द्विषतोः श्रीकृष्णसायुज्यं कथमिति यत्पृष्टं तदेव तयोः पूर्वजन्मकथनादिभिरुपपादितमुपसंहरति । एवमिति सप्तभिः । दितेः पुत्रत्वं

॥ नारद उवाच ॥ इत्युक्त्वा भगवान्राजंस्तत्रैवांतर्दधे हरिः ॥ अदृश्यः सर्वभूतानां पूजितः परमेष्ठिना ॥ ३१ ॥ ततः संपूज्य शिरसा ववंदे परमेष्ठिनम् ॥ भवं प्रजापतीन्देवान्प्रह्लादो भगवत्कलाः ॥ ३२ ॥ ततः काव्यादिभिः सार्धं मुनिभिः कमलासनः ॥ दैत्यानां दानवानां च प्रह्लादमकरोत्पतिम् ॥ ३३ ॥ प्रतिनंद्य ततो देवाः प्रयुज्य परमाशिषः ॥ स्वधामानि ययू राजन्ब्रह्माद्याः प्रतिपूजिताः ॥ ३४ ॥ एवं तौ पार्षदौ विष्णोः पुत्रत्वं प्रापितौ दितेः ॥ हृदि स्थितेन हरिणा वैरभावेन तौ हतौ ॥ ३५ ॥ पुनश्च विप्रशापेन राक्षसौ तौ बभूवतुः ॥ कुंभकर्णदशग्रीवौ हतौ तौ रामविक्रमैः ॥ ३६ ॥ शयानौ युधि निर्भिन्नहृदयौ रामसायकैः ॥ तच्चित्तौ जहतुर्देहं यथा प्राक्तनजन्मनि ॥ ३७ ॥ ताविहाथ पुनर्जातौ शिशुपालकरूषजौ ॥ हरौ वैरानुबंधेन पश्यतस्ते समीयतुः ॥ ३८ ॥ एनः पूर्वकृतं यत्तद्राजानः कृष्णवैरिणः ॥ जहुस्त्वंते तदात्मानः कीटः पेशस्कृतो यथा ॥ ३९ ॥ यथा यथा भगवतो भक्त्या परमयाऽभिदा ॥ नृपाश्चैद्यादयः सात्म्यं हरेस्तच्चिंतया ययुः ॥ ४० ॥

प्रापितौ । विप्रशापेनेत्युत्तरस्यानुषंगः ॥ ३५ ॥ ३६॥ तच्चित्तौ श्रीरामे चित्तं ययोस्तौ ॥३७॥ करूषजो दंतवक्त्रः । हरौ सायुज्यं समीयतुः ॥३८॥ कृष्णनिंदादिना पूर्वकृतं च यदेनः पापं तद्ध्यानेन तदात्मानः संतो जहुः । तदात्मत्वे दृष्टांतः । कीटः पेशस्कृतो ध्यानेन यथा तदात्मा भवतीति ॥ ३९ ॥ अभेदाभेददर्शनशून्यया हरेः सात्म्यं सारूप्यम् ॥४०॥

वध केला ॥ ३६ ॥ तो असा कीं,— रामाच्या बाणांनीं हृदय विदीर्ण होऊन युद्धभूमीवर शयन करणाऱ्या त्यांनीं, पूर्वजन्माप्रमाणेंच आपलें चित्त रामाकडे लाऊन देहाचा त्याग केला ॥ ३७ ॥ नंतर तेच फिरून ह्या भूलोकीं शिशुपाल व दंतवक्र ह्या रूपांनीं उत्पन्न झाले आणि वैरानुबंधानें हे धर्मराजा, तूं पहात असतांच श्रीहरीचेठिकाणीं सायुज्यमुक्ति पावले ॥ ३८ ॥ हे राजा, कुंभारीणनामक माशीनें वारंवार दंश केलेला कीटक जसा निरंतर तिच्या ध्यानानें तिचें स्वरूप पावतो त्याप्रमाणें कृष्णद्रोही राजांनीं कृष्णनिंदादिकांच्या योगानें जें पूर्वी पातक केलें होतें त्याचा श्रीकृष्णाच्या ध्यानानें त्याग करून, शेवटीं ते तत्स्वरूप पावले ॥ ३९ ॥ असो. जे एकनिष्ठ भक्त, आहेत ते भेददृष्टिरहित अशा सर्वोत्कृष्ट भगवद्भक्तीनें श्रीहरीचें चिंतन करून जसेजसे पूर्वी त्याच्या सारूप्याप्रत पावले, त्याप्रमाणें शिशुपालप्रभृति राजेहि वैरानुबंधानें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रीहरीचें चिंतन करून त्याच्या सारूप्याप्रत पावले आहेत ॥ ४० ॥ हे राजा, दमघोषाचा पुत्रवगैरे श्रीकृष्णाचा द्वेष करीत असूनहि त्याच्या सायुज्याप्रत कसे पावले असें जें तूं मला विचारिलें होतेंस तें हें सर्व तुला मीं कथन केलें आहे ॥ ४१ ॥ ह्याप्रमाणें हिरण्याक्ष व हिरण्यकशिपु ह्या आदिदैत्यांचा वध जिच्यामध्यें आहे अशी ही ब्राह्मणाविषयीं भक्तिमान् अशा परमपूज्य माहात्म्या श्रीकृष्णाच्या श्रीनृसिंहावताराची पुण्यकारक कथा, मी तुला कथन केली आहे ॥ ४२ ॥ त्याचप्रमाणें ह्या आख्यानामध्यें महाभगवद्भक्त प्रल्हादाचें चरित्र ह्मणजे त्याची भक्ति, त्याला झालेलें भगवंताचें तत्त्वज्ञान व वैराग्य हीं सर्व कथन केलीं आहेत. तसेंच उत्पत्ति, स्थिति व लय ह्यांचा अधिपति जो श्रीहरि त्याचें खरें स्वरूप, त्याच्या गुणकर्मांचें प्रल्हादानें केलेलें वर्णन तसाच देवदैत्यादिकांच्या स्थानांचा कालेंकरून झालेला मोठा फेरफार, व ज्याच्या योगानें भगवंताची प्राप्ति होत्ये असा भगवद्भक्तांचा धर्म आणि आत्मानात्मविवेक करण्याचें साधन हे सर्वहि प्रकार या आख्यानामध्यें पूर्णरीतीनें वर्णन केले

॥४१॥प्रह्लादचरितार्थमुपसंहरति । एषेति चतुर्भिः । अवतारः श्रीनृसिंहरूपस्तस्य कथाख्यातेति शेषः ॥ ४२ ॥ प्रह्लादस्यानुचरितमित्यादेः समाम्नातमिति तृतीयेनान्वयः । अस्येत्यनेनोक्तं सर्गस्थित्यप्ययानामीशस्य हरेर्याथात्म्यं तत्त्वम् । अनेन कृतं हरेर्गुणकर्मानुवर्णनं चेत्यर्थः ॥ ४३ ॥ परावरेषां देवदैत्यादीनां यानि स्थानानि तेषां व्यत्ययो विपर्यासः

आख्यातं सर्वमेतत्ते यन्मां त्वं परिपृष्टवान् ॥ दमघोषसुतादीनां हरेः सात्म्यमपि द्विषाम् ॥ ४१ ॥ एषा ब्रह्मण्यदेवस्य कृष्णस्य च महात्मनः ॥ अवतारकथा पुण्या वधो यत्रादिदैत्ययोः ॥ ४२ ॥ प्रह्लादस्यानुचरितं महाभागवतस्य च ॥ भक्तिर्ज्ञानं विरक्तिश्च याथात्म्यं चास्य वै हरेः ॥ ४३ ॥ सर्गस्थित्यप्ययेशस्य गुणकर्मानुवर्णनम् ॥ परावरेषां स्थानानां कालेन व्यत्ययो महान् ॥ ४४॥ धर्मो भागवतानां च भगवान्येन गम्यते ॥ आख्यानेऽस्मिन्समाम्नातमाध्यात्मिकमशेषतः ॥ ४५ ॥ य एतत्पुण्यमाख्यानं विष्णोर्वीर्योपबृंहितम् ॥ कीर्तयेच्छ्रद्धया श्रुत्वा कर्मपाशाद्विमुच्यते ॥ ४६ ॥ एतद्य आदिपुरुषस्य मृगेंद्रलीलां दैत्येंद्रयूथपवधं प्रयतः पठेत ॥ दैत्यात्मजस्य च सतां प्रवरस्य पुण्यं श्रुत्वाऽनुभावमकुतोभयमेति लोकम् ॥ ४७ ॥ यूयं नृलोके बत भूरिभागा लोकं पुनाना मुनयोऽभियंति ॥ येषां गृहानावसतीति साक्षाद्गूढं परं ब्रह्म मनुष्यलिंगम् ॥ ४८ ॥

॥ ४४ ॥ आध्यात्मिकमात्मानात्मविवेकादि ॥ ४५ ॥ एतच्छ्रवणादिफलमाह । य इति द्वाभ्याम् । एतच्छ्रुत्वा यः कीर्तयेत् ॥ ४६ ॥ एतदेतां मृगेंद्रस्य लीलाम् । तामेवाह । दैत्येंद्रस्य यूथपानां च वधं यः शुचिः सन्पठेत । पुण्यमनुभावं प्रभावं मतिनिश्चयं वा लोकं वैकुंठम् ॥ ४७ ॥ अहो प्रह्लादस्य भाग्यं येन देवो दृष्टो वयं तु मंदभाग्या इति विषीदंतं प्रत्याह । यूयमिति त्रिभिः । येषां युष्माकं गृहान्मुनयोऽभियंति सर्वतः समायांति तत्कस्य हेतोर्येषु गृहेषु नराकारं गूढं सच्छ्रीकृष्णाख्यं परं ब्रह्म साक्षाद्वसतीति ॥ ४८ ॥

आहेत ॥ ४३ ॥ ४४ ॥ ४५ ॥ ह्याच्यो श्रवणादिकांचें फळ सांगतो– विष्णूच्या पराक्रमवर्णनानें विस्तार पावलेलें हें पुण्यकारक आख्यान जो पुरुष, श्रद्धेनें श्रवण करील व कथन करील तो पुण्यपापरूप कर्मपाशापासून मुक्त होईल ॥ ४६ ॥ ह्या आदिपुरुष विष्णूच्या नृसिंहरूपानें केलेल्या हिरण्यकशिपुवधरूप व सेनाधिपतिवधरूप लीलांचें व भगवद्भक्तांमध्यें श्रेष्ठ अशा दैत्यपुत्र प्रल्हादाच्या पुण्यकारक प्रभावांचें जो पुरुष, शुचिर्भूत होऊन श्रवण करून पठण करील, तो निर्भय अशा वैकुंठलोकाप्रत पावेल ॥ ४७ ॥ असें नारदानें सांगितलेलें आख्यान श्रवण करून, 'कायहो प्रल्हादाचें भाग्य हें! ज्यानें देवाला प्रत्यक्ष अवलोकन केलें' आह्मीं तर भाग्यहीन आहों असा खेद मानणाऱ्या धर्मराजास नारद ह्मणतो कीं,– हे राजा, ह्या मनुष्यलोकामध्यें तुह्मीं खरोखर महाभाग्यशाली आहां. कारण,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ज्या तुमच्या घरीं मनुष्यरूप धारण करून गुप्त असलेलें साक्षात् श्रीकृष्णनामक परब्रह्म वास करीत असल्यामुळें, त्या तुमच्या घरीं दर्शनमात्रेंकरून सर्वलोकांस पवित्र करणारे महासमर्थ ऋषि, चोहोंकडून येतात ॥४८॥ आतां, कृष्ण हा आमच्या मामाचा पुत्र असून त्याला तूं परब्रह्म कसें म्हणतोस असें म्हणशील तर–हे धर्मराजा, महाविवेकी लोकांना इच्छा करण्यास योग्य असा जो उपाधिरहित परमानंद, तदनुभवरूप जें ब्रह्म तोच हा खरोखर तुमचा प्रिय, सुहृद्, मातुलपुत्र, आत्मा, आज्ञाधारक, गुरु आणि तुम्हांला पूज्य असा श्रीकृष्ण होय ॥ ४९ ॥ बरें, हा जर परब्रह्म असेल तर षोडशसहस्र स्त्रियांचेठिकाणीं रममाण होणें व धर्मादिकांचें आचरण करणें हें झाला कशाला पाहिजे ? असें म्हणशील तर–हे राजा शंकर ब्रह्मादिकांनींहि आपल्या बुद्धीच्या योगानेंसुद्धां ज्याचें वास्तविक तत्त्व 'हें असें आहे' अशारीतीनें साक्षात् वर्णन केलें नाहीं, तो

ननु कृष्णोऽस्माकं मातुलेयः कथं ब्रह्मेत्युच्यते तत्राह। स वा इति। सोऽयं ब्रह्मैव। कथंभूतः। महद्भिर्विमृग्यं यत्कैवल्यनिर्वाणसुखं निरुपाधिः परमानंदस्तदनुभूतिरूपो वो युष्माकं खलु प्रियः सुहृदित्यादिरूपो भवति। विधिकृदाज्ञानुवर्ती ॥ ४९ ॥ ननु परं ब्रह्म चेत्कथं द्व्यष्टसहस्रस्त्रीषु रतिः कथं वा धर्माद्याचरणं तस्येत्यत आह। नेति। यस्य रूपं तत्त्वं भवादिभिरपि धिया स्वबुद्ध्या वस्तुतयेदमित्थमिति साक्षान्नोपवर्णितं स युष्माकं स्वयमेव प्रसन्नः। अस्माकं तु मौनादिसाधनैस्तत्प्रसादः प्रार्थनीय एवेत्याह। मौनेनेति। स एष सात्वतांपतिर्नः प्रसीदतु। न हि प्रह्लादस्य गृहेषु परं ब्रह्म वसति न च तद्दर्शनाय मुनयस्तद्गृहानभियंति न च तस्य ब्रह्म मातुलेयादिरूपेण वर्तते न च स्वयमेव प्रसन्नमतो यूयमेव ततोऽप्यस्मत्तोऽपि भूरिभागा इति भावः ॥ ५० ॥ नन्वन्यैर्दुष्करं त्रिपुरभेदादिकं श्रीरुद्रः कृतवान्। स एवंभूत ईश्वरोऽप्यस्य तत्त्वं न जानातीति कथमित्यपेक्षायां तस्याप्येतत्साहाय्यादेवासौ प्रभावो न केवलस्येति वक्तुमाख्यानमुपक्षिपति। स एष इति ॥ ५१ ॥ राजा युधिष्ठिर उवाच। जगदीशितुर्देवस्य कीर्तिं कस्मि-

स वा अयं ब्रह्म महद्विमृग्यं कैवल्यनिर्वाणसुखानुभूतिः ॥ प्रियः सुहृद्वः खलु मातुलेय आत्माऽर्हणीयो विधिकृद्गुरुश्च ॥ ४९ ॥
न यस्य साक्षाद्भवपद्मजादिभी रूपं धिया वस्तुतयोपवर्णितम् ॥ मौनेन भक्त्योपशमेन पूजितः प्रसीदतामेष स सात्वतां पतिः ॥ ५० ॥ स एष भगवान्राजन्व्यतनोद्विहतं यशः ॥ पुरा रुद्रस्य देवस्य मयेनानंतमायिना ॥ ५१ ॥ राजोवाच ॥ कस्मिन्कर्मणि देवस्य मयोऽहन्जगदीशितुः ॥ यथा चोपचिता कीर्तिः कृष्णेनानेन कथ्यताम् ॥ ५२ ॥

हा भक्तपालक भगवान्, मौन, भक्ति आणि इंद्रियदमन यांच्या योगानें आम्हीं पूजन केला आहे, तो आम्हांवर प्रसन्न होवो. सारांश, प्रल्हादाच्या घरीं परब्रह्म वास करीत नाहीं, त्याच्या दर्शनाकरितां त्याच्या घरीं ऋषि येत नाहींत, तसेंच तें परब्रह्म मातुलपुत्रादिरूपानें त्याच्याशीं संबद्ध होऊन राहिलेलें नाहीं, व तें स्वतःच प्रसन्नहि होत नाहीं. म्हणून तुम्हींच त्याच्यापेक्षां व आमच्यापेक्षांहि महाभाग्यशाली आहां ॥ ५० ॥ आतां इतरांना दुष्कर असें त्रिपुरभेदादिक कर्म श्रीरुद्रानें केलें तेव्हां तो अशाप्रकारचा ईश्वर असूनहि तो भगवंताचें तत्त्व जाणत नाहीं हें कसें ? अशी शंका आली असतां त्या रुद्राचाहि पुरभेदादि प्रभाव ह्याच्या साहाय्यानेंच आहे केवळ स्वतःचा नाहीं असें हें सांगण्याच्या अभिप्रायानें नारदऋषि आख्यानाचा उपक्रम करितो कीं,–हे राजा, पूर्वीं अनंतमायावी अशा मयासुरानें नाहींसें केलेलें श्रीरुद्रदेवाचें यश, त्या ह्या श्रीकृष्णानें भगवंतानेंच विस्तृत केलें आहे ॥ ५१ ॥ युधिष्ठिर म्हणाला– हे देवर्षे, कोणत्या कर्मामध्यें जगदीश्वर महादेवाची कीर्ति मयासुरानें नष्ट केली होती व ती ह्या श्रीकृष्णानें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुनरपि कशी वृद्धिंगत केली हें मला सांगावें ॥५२॥ नारद ह्मणाला– हे धर्मराजा, ह्या श्रीकृष्णानें वाढविलेल्या देवांनीं, युद्धामध्यें पराजित केलेले असुर, मायावीलोकांचा श्रेष्ठ आचार्य अशा मयासुराला शरण गेले ॥ ५३ ॥ तेव्हां त्या समर्थ मयासुरानें, एक सुवर्णाची एक रुप्याची आणि एक लोखंडाची अशा तीन नगऱ्या उत्पन्न करून त्यांना दिल्या. त्या अशा होत्या कीं,– त्यांचें जवळ येणें व दूर जाणें हें मुळींच लक्षांत येत नसे. व त्यांमध्यें युद्धाच्या बाणखड्गादिक सामुग्री अतर्क्य ठेवलेल्या होत्या ॥ ५४ ॥ हे राजा, त्या विमानरूप नगऱ्यांनीं असुरांचे सेनाधिपति अलक्षित होत्साते, पूर्वीचें वैर स्मरून, पालकांसहवर्तमान तिन्ही लोकांचा नाश करण्यास प्रवृत्त झाले ॥ ५५ ॥ नंतर इंद्रादिलोकपालांसहवर्तमान सर्वलोक, श्रीरुद्राजवळ जाऊन ह्मणाले कीं,– हे सर्वव्यापका देवा, ज्यांना तीन नगररूप स्थानें मिळालीं आहेत

न्कर्मणि मयो हतवान् ॥ ५२ ॥ अनेन श्रीकृष्णेनोपबृंहितैः संवर्धितैः ॥ ५३ ॥ हैमी च रौप्या चायसी चेति तिस्रः पुरो निर्माय तेभ्यो ददाविति शेषः । दुर्लक्ष्यावपायसंयोगौ गमनागमने यासाम् । दुर्वितर्क्याः परिच्छदा यासु ॥ ५४ ॥ सेनान्यः सेनापतयः पूर्ववैरं स्मरंतः ॥ ५५ ॥ ५६ ॥ अस्त्रमभिमंत्रितं शरं पुरेषु व्यमुंचत

नारद उवाच ॥ निर्जिता असुरा देवैर्युध्यनेनोपबृंहितैः ॥ मायिनां परमाचार्यं मयं शरणमाययुः ॥ ५३ ॥ स निर्माय पुरस्तिस्रो हैमी रौप्यायसीर्विभुः ॥ दुर्लक्ष्यापायसंयोगा दुर्वितर्क्यपरिच्छदाः ॥ ५४ ॥ ताभिस्तेसुरसेनान्यो लोकांस्त्रीन्सेश्वरान्नृप ॥ स्मरंतो नाशयांचक्रुः पूर्ववैरमलक्षिताः ॥ ५५ ॥ ततस्ते सेश्वरा लोका उपासाद्येश्वरं विभो ॥ त्राहि नस्तावकान्देव विनष्टांस्त्रिपुरालयैः ॥ ५६ ॥ अथानुगृह्य भगवान्मा भैष्टेति सुरान्विभुः ॥ शरं धनुषि संधाय पुरेष्वस्त्रं व्यमुंचत ॥ ५७ ॥ ततोऽग्निवर्णा इषव उत्पेतुः सूर्यमंडलात् ॥ यथा मयूखसंदोहा नादृश्यंत पुरो यतः ॥ ५८ ॥ तैः स्पृष्टा व्यसवः सर्वे निपेतुः स्म पुरौकसः ॥ ताननीय महायोगी मयः कूपरसेऽक्षिपत् ॥ ५९ ॥ सिद्धामृतरसस्पृष्टा वज्रसारा महौजसः ॥ उत्तस्थुर्मेघदलना वैद्युता इव वह्नयः ॥ ६० ॥ विलोक्य भग्नसंकल्पं विमनस्कं वृषध्वजम् ॥ तदाऽयं भगवान्विष्णुस्तत्रोपायमकल्पयत् ॥ ६१ ॥ वत्स आसीत्तदा ब्रह्मा स्वयं विष्णुरयं हि गौः ॥ प्रविश्य त्रिपुरं काले रसकूपामृतं पपौ ॥ ६२ ॥

॥ ५७ ॥ ततः शरात् । सूर्यमंडलान्मयूखसंदोहा रश्मिसमूहा इव । यतो येभ्यः ॥ ५८ ॥ कूपरसे स्वयं निर्मितकूपामृते ॥ ५९ ॥ वज्रसारा वज्रवद्दृढांगाः महौजसो महाबलाः मेघदलना मेघभेदिनो विद्युद्रूपा वह्नय इव ॥ ६० ॥ ६१ ॥ काले मध्याह्ने ॥ ६२ ॥

त्या असुरांनीं नष्टप्राय केलेल्या आह्मां त्वदीय जनांचें तूं रक्षण कर ॥ ५६ ॥ नंतर त्या देवांचें, भगवान् सर्वसमर्थ रुद्रानें 'भिऊं नका असें' आश्वासन करून पाशुपतास्त्रानें अभिमंत्रित केलेला बाण धनुष्याला लावून त्या पुरांवर सोडिला ॥५७॥ तेव्हां ज्याप्रमाणें सूर्यमंडलापासून किरणसमूह उत्पन्न होतात त्याप्रमाणें त्या बाणांपासून अग्नीसारखे बाण उत्पन्न झाले व त्यांमुळें तीं पुरें दिसेनाशीं झालीं ॥ ५८ ॥ नंतर, त्या बाणांचा स्पर्श होतांक्षणींच पुरांमध्यें राहणारे सर्व असुर गतप्राण होऊन पडले त्यावेळीं महामायावी मयासुरानें गतप्राण झालेल्या त्या असुरांना आणून स्वतः निर्माण केलेल्या कूपामृतामध्यें टाकिलें ॥५९॥ तेव्हां त्या सिद्धामृतरसानें स्पर्श केलेले असुर, वज्रासारखे दृढशरीरी व महाबळी होऊन मेघांचें विदारण करणाऱ्या विद्युद्रूप अग्नीप्रमाणें एकदम उठले ॥६०॥ त्याकालीं भग्नसंकल्प झालेल्या व मनामध्यें खिन्न झालेल्या श्रीरुद्राला अवलोकन करून ह्या भगवान् विष्णूनें त्या सिद्धामृतरसाच्या नाशाकरितां उपाय योजिला ॥६१॥ तो असा कीं- त्याकालीं ब्रह्मदेव वत्स झाला व हा विष्णु स्वतः गाय झाला आणि मध्यान्हकालीं त्रिपु- ॥ ४३ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रासुरांच्या रसकूपाजवळ प्रवेश करून त्यांतील अमृताचें प्राशन केलें ॥ ६२ ॥ तेव्हां त्या रक्षक असुरांनीं, प्राशन करणाऱ्या गाईला पाहिलें असतांहि तिचें निवारण केलें नाहीं. कारण, ते भगवंताच्या मायेनें मोहित झाले होते. तें गाईनें अमृताचें प्राशन केलेलें जाणून, अचिंत्यकार्यकर्तृत्वरूप भगवंताच्या गतीचें स्मरण करून, स्वतः शोकरहित असा महामायावी तो मयासुर, त्या शोक करणाऱ्या असुरांना ह्मणाला कीं,—अहो, देव, असुर, मनुष्य अथवा इतरहि कोणी यक्षगंधर्वादिक असलातरी तो यालोकीं आपणाला, दुसऱ्याला अथवा उभयतानांहि दैवानें जें प्राप्त झालें असेल त्याचा परिहार करण्यास समर्थ होत नाहीं. असो. नंतर ह्या विष्णूनें धर्म, ज्ञान, वैराग्य, समृद्धि, तप, विद्या आणि क्रिया इत्यादि आपल्या शक्तींच्या योगानें शंभूला— रथ, सारथि, ध्वज, अश्व, धनुष्य, कवच व बाणवगैरे सर्व युद्धसामग्री निर्माण करून दिली ॥ ६३ ॥ ६४ ॥ ६५ ॥ ६६ ॥ नंतर युद्धार्थ तयार झालेल्या भगवान् ईश्वरानें रथारूढ होऊन, धनुष्य व बाण हस्तामध्यें धारण केले आणि हे राजा, मध्या-

---

॥ ६३ ॥ ६४ ॥ आत्मनो वाऽन्यस्य वा द्वयोरपि वा दैवेन दिष्टमुपकल्पितमपोहितुं परिहर्तुमिह कश्चिदपीश्वरः समर्थो नास्ति । असौ श्रीकृष्णः । प्रधनं संग्रामस्तत्साधनम् ।

तेऽसुरा ह्यपि पश्यंतो न न्यषेधन्विमोहिताः ॥ तद्विज्ञाय महायोगी रसपालानिदं जगौ ॥ ६३ ॥ स्वयं विशोकः शोकार्तान्स्मरन्दैवगतिं च ताम् ॥ देवोऽसुरो नरोऽन्यो वा नेश्वरोऽस्तीह कश्चन ॥ ६४ ॥ आत्मनोऽन्यस्य वा दिष्टं दैवेनापोहितुं द्वयोः ॥ अथासौ शक्तिभिः स्वाभिः शंभोः प्राधनिकं व्यधात् ॥ ६५ ॥ धर्मज्ञानविरक्त्यृद्धितपोविद्याक्रियादिभिः ॥ रथं सूतं ध्वजं वाहान्धनुर्वर्म शरादि यत् ॥ ६६ ॥ सन्नद्धो रथमास्थाय शरं धनुरुपाददे ॥ शरं धनुषि संधाय मुहूर्तेऽभिजितीश्वरः ॥ ६७ ॥ ददाह तेन दुर्भेद्या हरोऽथ त्रिपुरो नृप ॥ दिवि दुंदुभयो नेदुर्विमानशतसंकुलाः ॥ ६८ ॥ देवर्षिपितृसिद्धेशा जयेति कुसुमोत्करैः ॥ अवाकिरन्जगुर्हृष्टा ननृतुश्चाप्सरोगणाः ॥ ६९ ॥ एवं दग्ध्वा पुरस्तिस्रो भगवान्पुरहा नृप ॥ ब्रह्मादिभिः स्तूयमानः स्वधाम प्रत्यपद्यत ॥ ७० ॥ एवंविधान्यस्य हरेः स्वमायया विडंबमानस्य नृलोकमात्मनः ॥ वीर्याणि गीतान्यृषिभिर्जगद्गुरोर्लोकान्पुनानान्यपरं वदामि किम् ॥ ७१ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे सप्तमस्कंधे युधिष्ठिरनारदसंवादे त्रिपुरविजयो नाम दशमोऽध्यायः ॥ १० ॥ ॥

॥ ६५ ॥ ६६ ॥ अभिजिति मध्याह्ने ॥ ६७ ॥ विमानशतानि संकुलानि संकीर्णानि येषां ते देवादयः ॥ ६८ ॥ ६९ ॥ आदित आरभ्य स्कंधार्थं निगमयति एवंविधानीति । नृलोकं नराकारमात्मनो विडंबमानस्यानुकुर्वतः ॥ ७० ॥ ७१ ॥ इति श्रीमद्भागवते सप्तमे टीकायां दशमोऽध्यायः ॥ १० ॥ ॥ ॥

न्हसमयीं धनुष्याला बाण लावून त्याच्या योगानें दुर्भेद्य अशीं तीं तीनहि पुरें दग्ध करूनटाकिलीं. त्या कालीं स्वर्गामध्यें दुंदुभि वाजूं लागल्या, आकाशामध्यें दाटी झालेल्या शेंकडों विमानामध्यें बसलेले देव, ऋषि, पितर आणि सिद्धाधिपति हे जयजयकार करून पुष्पांची वृष्टि करूं लागले आणि अप्सरोगण आनंदित होऊन गायन व नृत्य करूं लागले ॥ ६७ ॥ ६८ ॥ ६९ ॥ हे राजा, ह्याप्रमाणें भगवान् त्रिपुरारीनें तिन्ही पुरें दग्ध करून ब्रह्मादिक स्तुति करीत असतां आपल्या स्थानाप्रत गमन केलें ॥ ७० ॥ हे धर्मराजा, ह्या प्रकारचीं आपल्या मायेनें आपल्या नरदेहाचें अनुकरण करणाऱ्या ह्या जगद्गुरु श्रीहरीचीं सर्वलोकांस पवित्र करणारीं चरित्रें, ऋषींनीं वर्णन केलेलीं आहेत. आतां, तुला दुसरें काय कथन करूं तें सांग ॥ ७१ ॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील सप्तमस्कंधापैकीं युधिष्ठिरनारदसंवादसंबंधीं त्रिपुरविजयनामक हा दहावा अध्याय समाप्त झाला ॥ १० ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ शुभं भवतु ॥ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्मप्रमाणें दहा अध्यायांनीं ज्ञानयोगाचें व भक्तियोगाचें कथन केलें. आतां पांच अध्यायांनीं कर्मयोगाचें वर्णन करितात. त्यांपैकीं ह्या अकराव्या अध्यायामध्यें, मनुष्याचे साधारण धर्म प्रथमतः सांगून, नंतर ब्राह्मणादिवर्णांचे व स्त्रियांचे मुख्य व गौण असे धर्म कथन केले आहेत ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे परीक्षित् राजा, ज्याचें मन भगवंताचे ठिकाणीं आहे व जो अतिश्रेष्ठ लोकांमध्येंहि श्रेष्ठ आहे त्या दैत्यराज प्रल्हादाचें साधूंच्या सभांमध्यें सत्कार केलेलें चरित्र श्रवण करून, आनंदानें युक्त झालेल्या युधिष्ठिरानें पुनरपि त्या ब्रह्मपुत्र नारदाला प्रश्न केला कीं– युधिष्ठिर ह्मणाला– हे भगवन्, ज्याअर्थीं पुरुषाला धर्माचरणानें ज्ञान व भक्ति हीं प्राप्त होतात त्याअर्थीं वर्ण व आश्रम ह्यांच्या आचारांनीं युक्त असा मनुष्यांचा सनातन धर्म श्रवण करण्याची मी इच्छा करितों ॥ २ ॥ आतां, तुह्मांला हा प्रश्न करण्याचें कारण इतकेंच कीं हे ब्रह्मनिष्ठऋषे, साक्षात् प्रजाधिपति ब्रह्मदेवाचे तुह्मी पुत्र

तदेवं दशभिर्ज्ञानभक्तियोगावुदीरितौ ॥ अथ पंचभिरध्यायैः कर्मयोगोऽनुवर्ण्यते ॥ १ ॥ एकादशे नृणां धर्माः साधारण्येन वर्णिताः ॥ विशेषेण च वर्णानां मुख्यामुख्याश्च योषिताम् ॥ २ ॥ दैत्यपतेः प्रह्लादस्य साधूनां सभासु सभाजितं सत्कृतमीहितं चरितं श्रुत्वा पुनर्नारदं पप्रच्छ । कथं भूतस्येहितम् । महत्तमानामग्रण्यो मुख्यस्य । तत्र हेतुः । उरुक्रमे आत्मा मनो यस्य ॥ १ ॥ श्रवणेच्छायां हेतुः । यद्यतो धर्मादनुष्ठितात्परं ज्ञानं भक्तिं च विंदते ॥ २ ॥ ३ ॥

॥ श्रीशुक उवाच ॥ श्रुत्वेहितं साधुसभासभाजितं महत्तमाग्रण्य उरुक्रमात्मनः ॥ युधिष्ठिरो दैत्यपतेर्मुदा युतः पप्रच्छ भूयस्तनयं स्वयंभुवः ॥ १ ॥ युधिष्ठिर उवाच ॥ भगवन्श्रोतुमिच्छामि नृणां धर्मं सनातनम् ॥ वर्णाश्रमाचारयुतं यत्पुमान्विंदते परम् ॥ २ ॥ भवान्प्रजापतेः साक्षादात्मजः परमेष्ठिनः ॥ सुतानां संमतो ब्रह्मंस्तपोयोगसमाधिभिः ॥ ३ ॥ नारायणपरा विप्रा धर्मं गुह्यं परं विदुः ॥ करुणाः साधवः शांतास्त्वद्विधा न तथा परे ॥ ४ ॥ नारद उवाच ॥ नत्वा भगवतेऽजाय लोकानां धर्महेतवे ॥ वक्ष्ये सनातनं धर्मं नारायणमुखाच्छ्रुतम् ॥ ५ ॥ योऽवतीर्यात्मनोंऽशेन दाक्षायण्यां तु धर्मतः ॥ लोकानां स्वस्तयेऽध्यास्ते तपो बदरिकाश्रमे ॥ ६ ॥ धर्ममूलं हि भगवान्सर्ववेदमयो हरिः ॥ स्मृतं च तद्विदां राजन्येन चात्मा प्रसीदति ॥ ७ ॥

ननु स्मृतिकारैर्धर्म उक्त एव तत्राह । नारायणपरा इति ॥ ४ ॥ अजाय श्रीनारायणाय तस्यैव मुखाच्छ्रुतम् ॥ ५ ॥ तन्मुखादात्मनः श्रवणं संभावयन्विशिनष्टि । य इति ॥ ६ ॥ प्रथमं तावद्धर्मे प्रमाणमाह । धर्मेति । धर्मस्य मूलं प्रमाणम् । स्मृतं च स्मृतिः । तद्विदां वेदविदाम् । येन चात्मा मनः प्रसीदति तुष्यति च । तथा च याज्ञवल्क्यः । श्रुतिः स्मृतिः सदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः ॥ सम्यक्संकल्पजः कामो धर्ममूलमिदं स्मृतमिति ॥ मनुश्च । वेदोऽखिलो धर्ममूलं स्मृतिशीले च तद्विदाम् ॥

आहां व तप, योग आणि समाधि ह्यांच्या योगानें त्याच्या पुत्रांमध्यें श्रेष्ठ असे संमत आहां ॥ ३ ॥ आतां स्मृतिकारांनीं धर्म सांगितलाच आहे असें ह्मणाल तर– हे भगवन् ज्यांचें नारायण हेंच मुख्यदैवत आहे असे आपणासारिखे दयालु, सदाचारसंपन्न आणि शांत असे ब्राह्मण, जसे सर्वोत्कृष्ट व गुह्य असलेल्या धर्माला जाणतात त्याप्रमाणें इतर जाणत नाहींत ॥ ४ ॥ नारद ह्मणाला– हे धर्मराजा, सर्वलोकांच्या धर्माला कारणभूत असा जो जन्मादिविकारशून्य भगवान् नारायण त्याला नमस्कार करून त्याच्या मुखापासून श्रवण केलेला सनातन धर्म मी तुला सांगतों ॥ ५ ॥ आतां त्याच्या मुखापासून आपल्याला श्रवण होण्याची संभावना करीत नारायणाचें वर्णन करितों कीं,– लोकांच्या कल्याणाकरितां जो नारायण आपल्या नरनामक अंशासहवर्तमान धर्मापासून दक्षकन्येचे ठिकाणीं अवतार धारण करून, अजूनहि बदरिकाश्रमामध्यें तप करीत राहिला आहे ॥ ६ ॥ आतां प्रथमतः धर्माविषयीं प्रमाण सांगतो कीं–हे राजा, सर्व वेदमय असा भगवान् श्रीहरि, वेदवेत्त्यांची स्मृति व ज्याच्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

योगानें मन संतुष्ट होतें तें सदाचरण हीं धर्माचीं मुख्य प्रमाणें होत ॥ ७ ॥ आतां, प्रथमतः मनुष्यमात्राला साधारण धर्म कोणता हें सांगण्याच्या अभिप्रायानें नारद भाषण करितो कीं,–हे राजा पांडुपुत्रा, सत्य, दया, तप (एकादश्युपवासादि) शुद्धत्व, सहनशीलता, युक्तायुक्त विवेक, मनोनिग्रह, बाह्येंद्रियदमन, अहिंसा, ब्रह्मचर्य, दान यथायोग्यमंत्राचा जप, सरलता, ॥ ८ ॥ संतोष, सर्वत्र समदृष्टि ठेवणाऱ्या माहात्म्यांची सेवा, प्रवृत्तकर्मांपासून हळूहळू निवृत्ति, मनुष्यांना कर्मांचें फळ विपरीत प्राप्त होतें हें पाहणें, व्यर्थभाषणापासून निवृत्त होणें, आत्मविचार करणें, ॥ ९ ॥ अन्नादिकांचें सर्वभूतांना यथायोग्यरीतीनें वाटून देणें, त्यांचेठिकाणीं आणि विशेषतः मनुष्यांचे

आचारश्चैव साधूनामात्मनस्तुष्टिरेव चेति ॥७॥ तत्र तावन्नरमात्रसाधारणधर्ममाह । सत्यमिति पंचभिः । तप एकादश्युपवासादि । ईक्षा युक्तायुक्तविवेकः शमो मनसः संयमः । दमो बाह्येंद्रियाणाम् । त्यागो दानम् । स्वाध्यायो यथोचितजपः ॥ ८ ॥ संतोषो दैवलब्धेनालंबुद्धिः । समदृशा महतां सेवा । ग्राम्येहोपरमः प्रवृत्तकर्मभ्यो निवृत्तिः । विपर्ययेहेक्षा निष्फलक्रियाणामीक्षणम् । मौनं वृथालापनिवृत्तिः । आत्मविमर्शनं देहादिव्यतिरिक्तात्मानुसंधानम् ॥ ९ ॥ आत्मेति देवतेति च बुद्धिः ॥ १० ॥ अस्य श्रीकृष्णस्य । श्रवणादयो नव । इज्याऽर्चनम् ॥ ११ ॥ एवं त्रिंशल्लक्षणवान् ॥ १२ ॥ इदानीं वर्णधर्मान्वक्तुं द्विजानां लक्षणमाह । संस्कारा मंत्रवंतो गर्भाधानादयो यस्मिन्नविच्छि-

सत्यं दया तपः शौचं तितिक्षेक्षा शमो दमः ॥ अहिंसा ब्रह्मचर्यं च त्यागः स्वाध्याय आर्जवम् ॥ ८ ॥ संतोषः समदृक्सेवा ग्राम्येहोपरमः शनैः ॥ नृणां विपर्ययेहेक्षा मौनमात्मविमर्शनम् ॥ ९ ॥ अन्नाद्यादेः संविभागो भूतेभ्यश्च यथाऽर्हतः ॥ तेष्वात्मदेवताबुद्धिः सुतरां नृषु पांडव ॥ १० ॥ श्रवणं कीर्तनं चास्य स्मरणं महतां गतेः ॥ सेवेज्यावनतिर्दास्यं सख्यमात्मसमर्पणम् ॥ ११ ॥ नृणामयं परो धर्मः सर्वेषां समुदाहृतः ॥ त्रिंशल्लक्षणवान्राजन्सर्वात्मा येन तुष्यति ॥ १२ ॥ संस्कारा यत्राविच्छिन्नाः स द्विजोऽजो जगाद यम् ॥ इज्याध्ययनदानानि विहितानि द्विजन्मनाम् ॥ जन्मकर्मावदातानां क्रियाश्चाश्रमचोदिताः ॥ १३ ॥

न्नाः स द्विजः । तर्हि शूद्रस्यापि संस्काराविच्छेदे सति द्विजत्वं स्यात्तत्राह । अजो ब्रह्मा यमेवंभूतसंस्कारयुक्तं जगाद स द्विजः शूद्रं तु न मंत्रवत्संस्कारयुक्तं जगाद न चोपनयनवंतमतो नासौ द्विजः । तथा च स्मृतिः । विवाहमात्रसंस्कारं शूद्रोऽपि लभतां सदा ॥ न केनचित्समसृजच्छंदसा तं प्रजापतिरिति । श्रुतिश्च । गायत्र्या ब्राह्मणमसृजत् त्रिष्टुभा राजन्यं जगत्या वैश्यं न केनचिच्छूद्रमिति । अतो विवाहव्यतिरिक्तसंस्कारस्यानावश्यकत्वादुपनयनस्य तु सर्वथा निषेधान्न तस्य द्विजत्वमित्यर्थः । पाठांतरे वैदिकादय इति गर्भाधानादय इत्यर्थः । त्रैवर्णिकानामावश्यकान्धर्मानाह । इज्येति । जन्मना विशुद्धेन कुलेन कर्मणा चाचारेणावदातानां शुद्धानां दुष्कुलानां दुराचाराणां च

ठिकाणीं आत्मबुद्धि व देवताबुद्धि धारण करणें, ॥ १० ॥ माहात्म्यांना आश्रयभूत अशा ह्या श्रीकृष्णाचें कीर्तन, श्रवण, स्मरण, सेवन, अर्चन, नमन, दास्य, सख्य व आत्मनिवेदन करणें,॥ ११ ॥ असा हा तीस लक्षणांनीं युक्त असलेला सर्व मनुष्यांचा उत्कृष्ट साधारण धर्म, ऋषींनीं उत्तमप्रकारेंकरून सांगितला आहे. कारण, ह्याच्या योगानें सर्वात्मा भगवान् प्रसन्न होतो ॥ १२ ॥ आतां, वर्णधर्म कथन करण्याच्या अभिप्रायानें द्विजांचें लक्षण सांगतों कीं,–हे राजा, ज्याचेठिकाणीं गर्भाधानादि संस्कार मंत्रयुक्त अविच्छिन्न झाले आहेत व ब्रह्मदेवानें ज्याला संस्कारानें युक्त असें म्हटलें आहे, तोच द्विज होय. जन्मानें व आचारानें शुद्ध असलेल्या द्विजांना (ब्राह्मण, क्षत्रिय

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

व वैश्य यांना) यजन, अध्ययन व दान हीं कर्में सांगितलीं आहेत व ब्रह्मचर्यादिक आश्रमांचीं कर्मेंहि सांगितलीं आहेत ॥ १३ ॥ याप्रमाणें तिन्ही वर्णांचे आवश्यक धर्म सांगून आतां ब्राह्मणादिक चारहि वर्णांचे जीवनोपयुक्त धर्म सांगतो कीं– हे राजा, अध्ययन, अध्यापन, यजन, याजन, दान आणि प्रतिग्रह हीं सहा कर्में ब्राह्मणाला विहित असून त्यांपैकीं अध्यापन, याजन आणि प्रतिग्रह हीं उपजीविकार्थ आहेत. क्षत्रियाला आपत्कालामध्यें प्रतिग्रहावांचून सर्व कर्में विहित आहेत. प्रजापालन करणाऱ्या राजानें, ब्राह्मणावांचून इतरांकडून करवगैरे घेऊन उपजीविका करावी असें सांगितलें आहे ॥ १४ ॥ तसेंच वैश्यानें सर्वदा ब्राह्मणकुलाला अनुसरून कृषिकर्म, व्यापार, गोरक्षण आणि व्याजबट्टा ह्यांच्यावर उपजीविका चालवावी. शूद्रानें द्विजशुश्रूषा करावी व स्वामीची सेवा करणें हेंच त्याच्या उपजीविकेचें साधन

नैतानि विहितानीत्यर्थः । ब्रह्मचर्याद्याश्रमविहिताः क्रियाश्च । शूद्रस्य तु वर्णधर्मा एव । आश्रमभेदकृतविशेषाभावात् ॥ १३ ॥ ब्राह्मणादीनां चतुर्णामपि वृत्तिरूपान्धर्मानाह । विप्रस्येति सार्धैः सप्तभिः । विप्रस्य षट्कर्माणि विहितानीत्यनुषंगः । तत्र त्वध्यापनं याजनं प्रतिग्रहश्च जीविका । यथाह मनुः । षण्णां तु कर्मणामस्य त्रीणि कर्माणि जीविका ॥ याजनाध्यापने चैव विशुद्धाच्च प्रतिग्रह इति । अन्यस्य क्षत्रियस्य अप्रतिग्रह इति प्रतिग्रहातिरिक्तं याजनमध्यापनं चापद्यनुजानाति । वक्ष्यति चानंतरमेव

विप्रस्याध्ययनादीनि षडन्यस्याप्रतिग्रहः ॥ राज्ञो वृत्तिः प्रजागोप्तुरविप्राद्वा करादिभिः ॥ १४ ॥ वैश्यस्तु वार्तावृत्तिश्च नित्यं ब्रह्मकुलानुगः ॥ शूद्रस्य द्विजशुश्रूषा वृत्तिश्च स्वामिनो भवेत् ॥ १५ ॥ वार्ता विचित्रा शालीनयायावरशिलोंछनम् ॥ विप्रवृत्तिश्चतुर्धेयं श्रेयसी चोत्तरोत्तरा ॥ १६ ॥ जघन्यो नोत्तमां वृत्तिमनापदि भजेन्नरः ॥ ऋते राजन्यमापत्सु सर्वेषामपि सर्वशः ॥ १७ ॥

ऋते राजन्यमिति । श्रूयते चाश्वपतिकैकयप्रभृतीनां क्षत्रियाणामुपदेष्टृत्वादि । प्रजापालनेऽधिकृतस्य क्षत्रियस्य वृत्त्यंतरमाह । राज्ञ इति । आदिशब्देन दंडशुल्कादि ॥१४॥ वार्ता कृषिवाणिज्यादिलक्षणा वृत्तिर्यस्य । शूद्रस्य द्विजानां शुश्रूषा विहिता । स्वामिनो द्विजस्य तु शुश्रूषा वृत्तिश्च भवेत् ॥ १५ ॥ विप्रस्य मुख्यानुकल्पभेदेन वृत्त्यंतराण्याह । वार्तेति । वार्ता विचित्रा कृष्यादिरूपा शालीनं धाष्टर्यं विनैव प्राप्तमयाचितम् । यायावरं प्रत्यहं धान्ययाच्ञा शिलं शालिक्षेत्रादौ स्वामित्यक्तकणिशोपादानम् । उंछनमापणादिपतितकणोपादानम् । शिलोंछनद्वयमेकीकृत्य चतुर्धेत्युक्तम् । श्रेयसी उत्तमा ॥ १६ ॥ वृत्तिष्वेव व्यवस्थां दर्शयन्नापद्वृत्तीराह । जघन्यो नीचः उत्तमामध्या-

होय ॥ १५ ॥ आतां ब्राह्मणाच्या मुख्य वृत्ति कथन करितो कीं,– हेराजा, कृषिकर्मादि अनेकप्रकारची वृत्ति, अयाचित, प्रत्यहीं धान्याची याचना करणें, आणि शिलोंछन[1] ही चारप्रकारची वृत्ति ब्राह्मणाला विहित असून त्यांपैकीं पहिल्यापहिल्यापेक्षां पुढलीपुढली वृत्ति अनुक्रमानें श्रेष्ठ आहे ॥ १६ ॥ आतां कोणत्या वृत्तीचा कोणी स्वीकार करावा ही व्यवस्था दर्शविण्याकरितां आपद्वृत्ति कथन करितो कीं,– हे राजा, कनिष्ठवर्णाच्या पुरुषानें आपत्काल नसतांना श्रेष्ठवर्णाला विहित असलेल्या वृत्तीचा स्वीकार करूं नये व आपत्कालीं तर क्षत्रियावांचून सर्वांना सर्व वृत्ति विहित आहेत. परंतु, क्षत्रियानें मात्र आपत्कालींहि प्रतिग्रहावांचून इतर वृत्तीं-

१ शेतकऱ्यानें शेत कापून नेल्यावर त्यांत राहिलेलीं कणसें वेंचून त्यांजवर उपजीविका करणें ह्याला शिल असें ह्मणतात व बाजारामध्यें वगैरे पडलेले धान्यकण वेंचून त्यांच्यावर निर्वाह करणें ह्याला उंछन ह्मणतात.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

चा स्वीकार करावा ॥ १७ ॥ तशीच चार प्रकारची पूर्वीं सांगितलेली जी ब्राह्मणांची वृत्ति ती इतरांनाहि विहित आहे हें दर्शविण्याकरितां भाषण करितों कीं,– हे धर्म राजा, मनुष्यानें ऋत, अमृत, मृत, प्रमृत आणि सत्यानृत ह्यांतील कोणत्याहि वृत्तीनें उपजीविका करावी. परंतु, कसाजरी प्रसंग आला तथापि श्ववृत्तीनें कधींहि निर्वाह करूं नये ॥ १८ ॥ आतां ऋतादिकांचें स्पष्टीकरण करितों कीं,– हे राजा, ऋत ह्मणजे शिलोंछन, अमृत ह्मणजे अयाचित, मृत ह्मणजे नित्य याचना, प्रमृत ह्मणजे कृषिकर्म, सत्यानृत ह्मणजे वाणिज्य व श्ववृत्ति ह्मणजे नीचाचें सेवन असें ह्मटलें आहे. असो. ती श्ववृत्ति निंद्य असल्यामुळें ब्राह्मण व क्षत्रिय ह्यांनीं सर्वदा वर्ज करावी. कारण, ब्राह्मण हा सर्ववेदमय आहे व राजा हा सर्वदेवमय आहे ॥ १९ ॥ २० ॥ आतां, ब्राह्मणादि वर्णांचे स्वरूपबोधक धर्म कथन करितों कीं– हे राजा, मनःसंयमन,

---

पनादिरूपाम् । ऋते राजन्यं क्षत्रियस्तु प्रतिग्रहादन्यां भजेत् ॥ १७ ॥ चतुर्विधां पूर्वोक्तां विप्रवृत्तिमितरेषामपि दर्शयन्नाह । ऋतामृताभ्यामिति ॥ १८॥ श्लोकं व्याचष्टे । ऋतमिति ॥ १९ ॥ तयोस्तद्वर्जने हेतुमाह । सर्ववेदमय इति ॥ २० ॥ वर्णानामभिव्यंजकरूपान्धार्मानाह । शम इति चतुर्भिः । अच्युतात्मत्वं श्रीविष्णुपरत्वम् ॥ २१ ॥ शौर्यं

ऋतामृताभ्यां जीवेत मृतेन प्रमृतेन वा ॥ सत्यानृताभ्यां जीवेत न श्ववृत्त्या कथंचन ॥ १८ ॥ ऋतमुंछशिलं प्रोक्तममृतं यदयाचितम् ॥ मृतं तु नित्ययाञ्चा स्यात्प्रमृतं कर्षणं स्मृतम् ॥ १९ ॥ सत्यानृतं तु वाणिज्यं श्ववृत्तिर्नीचसेवनम् ॥ वर्जयेत्तां सदा विप्रो राजन्यश्च जुगुप्सिताम् ॥ सर्ववेदमयो विप्रः सर्वदेवमयो नृपः ॥ २० ॥ शमो दमस्तपः शौचं संतोषः क्षांतिरार्जवम् ॥ ज्ञानं दयाऽच्युतात्मत्वं सत्यं च ब्रह्मलक्षणम् ॥ २१ ॥ शौर्यं वीर्यं धृतिस्तेजस्त्याग आत्मजयः क्षमा ॥ ब्रह्मण्यता प्रसादश्च रक्षा च क्षत्रलक्षणम् ॥ २२ ॥ देवगुर्वच्युते भक्तिस्त्रिवर्गपरिपोषणम् ॥ आस्तिक्यमुद्यमो नित्यं नैपुणं वैश्यलक्षणम् ॥ २३ ॥ शूद्रस्य सन्नतिः शौचं सेवा स्वामिन्यमायया ॥ अमंत्रयज्ञो ह्यस्तेयं सत्यं गोविप्ररक्षणम् ॥ २४ ॥ स्त्रीणां च पतिदेवानां तच्छुश्रूषानुकूलता ॥ तद्बंधुष्वनुवृत्तिश्च नित्यं तद्व्रतधारणम् ॥ २५ ॥

युद्धोत्साहः । वीर्यं प्रभावः । तेजः प्रागल्भ्यम् । त्यागो दानम् । आत्मनो मनसो जयः ॥ २२ ॥ २३ ॥ अमंत्रयज्ञो नमस्कारेणैव पंचयज्ञानुष्ठानम् । तथा च याज्ञवल्क्यः । नमस्कारेण मंत्रेण पंच यज्ञान्न हापयेदिति ॥ २४ ॥ स्त्रीधर्मानाह । स्त्रीणामिति पंचभिः । पतिरेव देवो यासां तस्य पत्युरेव शुश्रूषा पादसंवाहनादिभिः । तदनुकूलता च हिताच-

---

बाह्येंद्रियदमन, तप, शुद्धत्व, संतोष, क्षमा, मनाची सरलता, विवेक, दया, भगवन्निष्ठत्व आणि सत्य हें ब्राह्मणांचें लक्षण होय ॥ २१ ॥ तसेंच शौर्य, प्रभाव, धैर्य, तेज, औदार्य, मनोनिग्रह, क्षमा, ब्राह्मणांचेठिकाणीं भक्ति, अनुग्रह आणि प्रजापालन हें क्षत्रियांचें लक्षण होय ॥ २२ ॥ देव, गुरु आणि भगवान् अच्युत ह्यांचेठिकाणीं भक्ति; धर्म, अर्थ व काम ह्या त्रिवर्गाच्या योगानें संतुष्ट होणें, आस्तिक्य, नित्य उद्योग आणि चातुर्य हें वैश्याचें लक्षण होय ॥ २३ ॥ आणि नम्रता, स्नानादिकानें शुद्धत्व, निष्कपट भावानें स्वामिची सेवा, अमंत्रक यज्ञ, चौर्य न करणें, सत्य भाषण करणें आणि गोब्राह्मणांचें रक्षण करणें हें शूद्रांचें लक्षण होय ॥ २४ ॥ आतां स्त्रीधर्म सांगतो कीं,– हे राजा, पतिशुश्रूषा करणें, त्याला अनुकूल असणें, त्याच्या बंधूंच्या हिताचें आचरण करणें आणि पतीचा जो नियम असेल त्याचेंच आपण आचरण

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करणें हें पतिव्रतास्त्रियांचें लक्षण आहे व हाच धर्महि आहे ॥ २५ ॥ त्याचप्रमाणें पतिव्रतास्त्रीनें घरची झाडसारव करावी व त्यामध्यें रांगोळ्यावगैरे घालाव्या, स्वतःहि सौभाग्यादिक अलंकारांनीं भूषित असावें, घरांतील भांडींकुंडींवगैरे स्वच्छ ठेवावीं. आणि लहानमोठे पदार्थ, विनय, इंद्रियनिग्रह, सत्य व प्रियवाक्यें व प्रेम ह्यांच्या योगानें यथायोग्यकालीं पतीची सेवा करावी ॥ २६ ॥ २७ ॥ आणि त्याचप्रमाणें दैवानें मिळालेल्या लाभानें संतुष्ट, विषयभोगाविषयीं अनासक्त, दक्ष, धर्मज्ञ, प्रिय व सत्य भाषण करणारी, सर्वठिकाणीं सावध, शुद्ध आणि सप्रेम अशा स्त्रीनें महापातकरहित अशा आपल्या पतीचें सेवन करावें ॥ २८ ॥ पति हेंच मुख्य दैवत आहे असें मानणारी जी स्त्री, श्रीहरीच्या सेवेविषयीं तत्पर असलेल्या लक्ष्मीप्रमाणें, हरिभावानें पतीचें सेवन करित्ये, ती स्त्री, जशी वैकुंठामध्यें श्रीहरिसहवर्तमान ल-

---

रणं तस्य यद्व्रतं नियमस्तस्य धारणमाचरणम् । एतच्चतुष्टयं पतिव्रतानां लक्षणं धर्मश्च ॥ २५ ॥ किंच । संमार्जनोपलेपाभ्यामित्यादेः पतिं भजेदित्युत्तरेणान्वयः । परिमृष्टा उद्वर्तनादिना निर्मलीकृताः परिच्छदा गृहोपकरणानि यया ॥ २६ ॥ २७ ॥ किंच । संतुष्टा यथालाभेन तावन्मात्रभोगेऽप्यलोलुपा दक्षाऽनलसा प्रिया सत्या च वाग्यस्याः सर्वत्राप्यप्रमत्ताऽवहिता । अपतितं महापातकशून्यम् । यथाह याज्ञवल्क्यः । आशुद्धेः संप्रतीक्ष्यो हि महापातकदूषित इति ॥ २८ ॥ तत्परा सती भजेत् । श्रीर्हरिमिव हर्यात्मना

संमार्जनोपलेपाभ्यां गृहमंडलवर्तनैः ॥ स्वयं च मंडिता नित्यं परिमृष्टपरिच्छदा ॥ २६ ॥ कामैरुच्चावचैः साध्वी प्रश्रयेण दमेन च ॥ वाक्यैः सत्यैः प्रियैः प्रेम्णा काले काले भजेत्पतिम् ॥ २७ ॥ संतुष्टाऽलोलुपा दक्षा धर्मज्ञा प्रियसत्यवाक् ॥ अप्रमत्ता शुचिः स्निग्धा पतिं त्वपतितं भजेत् ॥ २८ ॥ या पतिं हरिभावेन भजेच्छ्रीरिव तत्परा ॥ हर्यात्मना हरेर्लोके पत्या श्रीरिव मोदते ॥ २९ ॥ वृत्तिः संकरजातीनां तत्तत्कुलकृता भवेत् ॥ अचौराणामपापानामंत्यजांतेऽवसायिनाम् ॥ ३० ॥ प्रायः स्वभावविहितो नृणां धर्मो युगे युगे ॥ वेददृग्भिः स्मृतो राजन्प्रेत्य चेह च शर्मकृत् ॥ ३१ ॥

पत्या सह ॥ २९ ॥ प्रतिलोमजानुलोमजानां वृत्तिमाह । वृत्तिरिति । तत्तत्कुलकृता कुलपरंपराप्राप्ता । परंपराप्राप्तमपि चौर्यं हिंसादिकं च प्रतिषेधति । अचौराणामपापानां चेति । तत्तत्प्रदर्शनार्थं कांश्चित्प्रतिलोमजविशेषानाह । अंत्यजेति । रजकश्चर्मकारश्च नटो बुरुड एव च ॥ कैवर्तमेदभिल्लाश्च सप्तैते अंत्यजाः स्मृताः ॥ अंतेवसायिनस्तु चांडालपुल्कसमातंगादयः । तेषां परंपराप्राप्तैव वस्त्रनिर्णेजनादिवृत्तिरित्यर्थः ॥ ३० ॥ श्रेष्ठादपि परधर्मान्नीचोऽपि स्वधर्म एव श्रेयानित्याह । प्राय इति । स्वभावेन सत्त्वादि-

---

क्ष्मी आनंदानें क्रीडा करित्ये त्याप्रमाणें, हरीचें स्वरूप पावलेल्या आपल्या पतीसहवर्तमान त्याचवैकुंठाचेठिकाणीं आनंदानें क्रीडा करित्ये ॥ २९ ॥ आतां, हीनवर्णांच्या पुरुषांपासून उत्तमवर्णांच्या स्त्रियांचेठिकाणीं झालेले प्रतिलोमज व उत्तमवर्णांच्या पुरुषांपासून हीनवर्णांच्या स्त्रियांचेठिकाणीं झालेले अनुलोमज ह्यांची वृत्ति सांगण्याच्या अभिप्रायानें नारद ह्मणतो कीं,– हे राजा, चोर व पातकी नसणारे जे रजकचर्मकारादिक अंत्यज आणि चांडालपुल्कसादिक अंतेवसायी लोक आहेत त्यांच्या कुलपरंपरेनें प्राप्त झालेली जी वस्त्रक्षालनादिक वृत्ति असेल तीच त्यांची होय ॥ ३० ॥ आतां, श्रेष्ठ अशाहि परधर्मापेक्षां नीच असाहि आपला स्वधर्मच चांगला असें सांगतो–हे राजा, युगायुगाचेठिकाणीं सत्त्वादिगुणांच्या स्वभावानुसार ज्या पुरुषांना जो धर्म विहित असेल तोच त्यांना बहुतकरून इहलोकीं आणि परलोकीं सुखाला कारण

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होतो असे वेदद्रष्ट्या मुनींनीं सांगितलें आहे ॥ ३१ ॥ बरें, स्वाभाविक कर्म जर बंधाला कारण आहे तर तें सुखाला कारण कसें होतें; असें ह्मणशीलतर– हे राजा, स्वाभाविक वृत्तीनें स्वकर्माचरण करून वर्तणूक करणारा पुरुष, पुढें हळू हळू त्या स्वाभाविक कर्मांचा त्याग करून निर्गुणावस्थेला पावतो ॥ ३२ ॥ आतां, फलोपभोगाच्या इच्छेनें काम्य कर्में करीत असलेल्या पुरुषाला निर्गुणावस्था कशी प्राप्त होणार असें ह्मणशील तर– हे राजा, दरसाल पेरणी होत असलेलें शेत जसें कांहीं कालानें निःसत्त्व होऊन धान्य उत्पन्न करण्यास समर्थ होत नाहीं व त्यामध्यें पेरलेलें बीजहि जसें नाहींसें होतें त्याप्रमाणेंच वासनारूपानें ज्यामध्यें विषय वास करीत आहेत असें चित्त, जसा प्रज्वलित झालेला अग्नि, घृताच्या बिंदूंनीं शांत न होतां मोठ्या घृतधारेनें शांत होतो त्याप्रमाणें, विषयांच्या अतिभोगानें त्यांविषयीं विरक्त होतें

प्रकृत्या विहितो धर्मः शर्मकृत्सुखहेतुः स्मृतः । कैः । वेद एव दृक् चक्षुर्येषां तैः । भगवता चोक्तम् । श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितादिति ॥ ३१ ॥ ननु स्वाभाविकस्य कर्मणो बंधहेतुत्वात्कथं सुखहेतुत्वं तत्राह । वृत्त्येति ॥ ३२ ॥ ननु काम्यानि कर्माणि कुर्वतस्तत्फलभोगपरस्य कथं नैर्गुण्यं स्यात् । तदुक्तं प्रह्लादेन । औपस्थ्यजैह्व्यं बहु मन्यमानः यथं विरज्येत दुरंतमोह इत्यादि । तत्राधिकारिभेदेन व्यवस्थां सदृष्टांतामाह । उप्यमानमिति द्वाभ्याम् । पुनः सूत्यै सस्यप्रसवाय ॥ ३३ ॥ कामा आशेरते वासनारूपेण यस्मिंस्तत् । अयं भावः । उत्कटवासनाविष्टस्य सहसैव कामत्यागासंभवाद्वद्दोक्तनियमेन बहुशः कामान्भुंजानस्यैव नित्यनैमित्तिकैर्विशुद्धचेतसस्तद्दोषदर्शनेन ययाति-

वृत्त्या स्वभावकृतया वर्तमानः स्वकर्मकृत् ॥ हित्वा स्वभावजं कर्म शनैर्निर्गुणतामियात् ॥ ३२ ॥ उप्यमानं बहु क्षेत्रं स्वयं निर्वीर्यतामियात् ॥ न कल्पते पुनः सूत्या उप्तं बीजं च नश्यति ॥ ३३ ॥ एवं कामाशयं चित्तं कामानामतिसेवया ॥ विरज्येत यथा राजन्नाग्निवत्कामबिंदुभिः ॥ ३४ ॥ यस्य यल्लक्षणं प्रोक्तं पुंसो वर्णाभिव्यंजकम् ॥ यदन्यत्रापि दृश्येत तत्तेनैव विनिर्दिशेत् ॥ ३५ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे सप्तमस्कंधे युधिष्ठिरनारदसंवादे सदाचारनिर्णयो नाम एकादशोऽध्यायः ॥ ११ ॥ ॥ नारद उवाच ॥ ब्रह्मचारी गुरुकुले वसन्दांतो गुरोर्हितम् ॥ आचरन्दासवन्नीचो गुरौ सुदृढसौहृदः ॥ १ ॥

सौभरिप्रमुखानामिव शनैर्विरागो भवति । यथा सवीर्यं क्षेत्रं शनैर्निर्वीर्यं भवति यथा च प्रज्वलितोऽग्निर्न घृतबिंदुभिः शाम्यति महता तु घृतपूरेण शाम्यत्येव तद्वत् । प्रह्लादकृतस्तुतौ कौमार एव निवृत्त्युपदेशो मंदवासनानामधिकारेण । तदुक्तं तत्रैव । बालानदूषितधियो द्वंद्वारामेरितेहितैरिति । अतः सर्वमनवद्यम् ॥ ३४ ॥ शमादिभिरेव ब्राह्मणादिव्यवहारो मुख्यो न जातिमात्रादित्याह । यस्येति । यद्यदि अन्यत्र वर्णांतरेऽपि दृश्येत तद्वर्णांतरं तेनैव लक्षणनिमित्तेनैव वर्णेन विनिर्दिशेत् । न तज्जातिनिमित्तेनेत्यर्थः ॥ ३५ ॥ इति स० टी० एकादशोऽध्यायः ॥ ११ ॥ द्वादशे वर्ण्यंते धर्मो ब्रह्मचारिवनस्थयोः ॥ चतुर्णामाश्रमाणां च साधारण्येन कश्चन ॥ १ ॥ वर्णादीनां धर्मा उक्ता इदानीमाश्रमधर्मा उच्यंते । तत्रास्मिन्द्वाद-

---

॥ ३३ ॥ ३४ ॥ असो. मनोनिग्रहवगैरे लक्षणांवरूनच ब्राह्मणादिक वर्णांचा व्यवहार करणें हेंच मुख्य आहे केवळ जाति मुख्य नाहीं, असें दर्शविण्याच्या अभिप्रायानें नारद ह्मणतो कीं– हे धर्मराजा, ज्या पुरुषाचें जें वर्णबोधक लक्षण सांगितलें आहे तें लक्षण इतर वर्णांच्या पुरुषांचेठिकाणीं जर दृष्टीस पडेल तर तो अन्यवर्णांतील पुरुषहि त्या लक्षणाच्या निमित्तानें त्या वर्णांतील आहे असें समजावें. केवळ जातीमुळेंच तो त्या वर्णांतील आहे असें समजूं नये ॥ ३५ ॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील सप्तमस्कंधामध्यें सदाचारनिर्णयनामक हा अकरावा अध्याय समाप्त झाला ॥ ११ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ शुभं भवतु ॥ आतां ह्या बाराव्या अध्यायामध्यें, ब्रह्मचारी आणि वानप्रस्थ ह्यांचे धर्म व चारी आश्रमांचे साधारण धर्म सांगितले आहेत ॥ १ ॥ असो. अकराव्या अध्यायामध्यें ब्राह्म-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

णादि वर्णांचेवगैरे धर्म कथन केले. आतां स्कंधसंपेपर्यंत आश्रमधर्मांचें कथन करितात त्यांत ह्या बाराव्या अध्यायामध्यें ब्रह्मचारी आणि वानप्रस्थ ह्यांच्या असाधारण धर्मांचें आणि चारहि आश्रमांच्या साधारण धर्मांचें वर्णन करून तेराव्या अध्यायामध्यें यतीचे धर्म, व चवदाव्या अध्यायामध्यें गृहस्थाश्रमाचे धर्म सांगितले आहेत, आणि पंधराव्या अध्यायांत सर्वधर्मांचें सार वर्णन केलें आहे. नारद ह्मणाला:– हे धर्मराजा, गुरूच्या घरीं वास करणाऱ्या ब्रह्मचाऱ्यानें इंद्रियदमन करून व आपण नीच आहें असें मानून दासाप्रमाणें गुरूचें हित करीत असावें आणि गुरूचेठिकाणीं अत्यंत दृढ प्रेम धारण करावें ॥ १ ॥ सायंकालीं व प्रातःकालीं गुरु, अग्नि, रवि आणि सुरश्रेष्ठ विष्णु ह्यांचें पूजन करावें; एकाग्रअंतःकरणपूर्वक गायत्रीचा जप करून त्रिकाल संध्या करावी. त्यांत सायंकालीं व प्रातःकालीं संध्याकालनिमित्तक मौन धारण करावें ॥ १ ॥ तशीच गुरूनें जर हाक मारिली तर सावधगिरीनें त्याच्यापासून वेदाध्ययन करावें व अध्ययनाच्या आरंभीं आणि शेवटीं गुरुचरणांना मस्त-

---

शेऽध्याये ब्रह्मचारिवानप्रस्थयोरसाधारणाश्चतुर्णां साधारणाश्चोच्यंते। त्रयोदशे यतेर्धर्माः। चतुर्दशे गृहस्थस्य। पंचदशे सर्वधर्मसारसंग्रहः। ब्रह्मचारी गुरुकुले वसन्गुर्वादीनुपासीतेत्युत्तरेणान्वयः ॥ १ ॥ तानाह। सायमिति। ब्रह्म गायत्रीं जपन् संध्यात्रयमुपासीत। उभे संध्ये तु यतवाक्। सायं प्रातः संध्याकालनिमित्तं मौनं कुर्यादित्यर्थः ॥ २ ॥ उपक्रमे आदाववसाने अंते गुरोश्चरणौ नमेत् ॥ ३ ॥ यथोदितमिति। पालाशो दंडो ब्राह्मणस्येत्यादिनियममनतिक्रम्य। जटाधारणं तु केशप्रसाधनाभावमात्रम् ॥ ४ ॥ ५ ॥ याव-

सायं प्रातरुपासीत गुर्वग्न्यर्कसुरोत्तमान् ॥ उभे संध्ये च यतवाग्जपन्ब्रह्म समाहितः ॥ २ ॥ छंदांस्यधीयीत गुरोराहूतश्चेत्सुयंत्रितः ॥ उपक्रमेऽवसाने च चरणौ शिरसा नमेत् ॥ ३ ॥ मेखलाजिनवासांसि जटादंडकमंडलून् ॥ बिभृयादुपवीतं च दर्भपाणिर्यथोदितम् ॥ ४ ॥ सायं प्रातश्चरेद्भैक्षं गुरवे तन्निवेदयेत् ॥ भुंजीत यद्यनुज्ञातो नोचेदुपवसेत्क्वचित् ॥ ५ ॥ सुशीलो मितभुग्दक्षः श्रद्दधानो जितेंद्रियः ॥ यावदर्थं व्यवहरेत्स्त्रीषु स्त्रीनिर्जितेषु च ॥ ६ ॥ वर्जयेत्प्रमदागाथामगृहस्थो बृहद्व्रतः ॥ इंद्रियाणि प्रमाथीनि हरंति प्रसभं मनः ॥ ७ ॥ केशप्रसाधनोन्मर्दस्नपनाभ्यंजनादिकम् ॥ गुरुस्त्रीभिर्युवतिभिः कारयेन्नात्मनो युवा ॥ ८ ॥ नन्वग्निः प्रमदा नाम घृतकुंभमयः पुमान् ॥ सुतामपि रहो जह्यादन्यदा यावदर्थकृत् ॥ ९ ॥

दर्थं यथोपयोगमेव ॥ ६ ॥ बृहद्व्रतो ब्रह्मचर्यवान्गृहस्थव्यतिरिक्तः सर्वोऽपि प्रमदागाथां वर्जयेत्। तत्र हेतुः। इंद्रियाणि बलवंति संयतस्यापि मनो हरंतीति ॥ ७ ॥ ॥ ८ ॥ न कारयेदित्यत्र हेतुः। नन्विति। रहः एकांते। अन्यदा केशप्रसाधनादिव्यतिरिक्तावसरे अनेकांतावसरे वा। यावदर्थं तदुक्तं कुर्यात् ॥ ९ ॥

कानें नमस्कार करावा ॥ ३ ॥ हस्तामध्यें दर्भ धारण करून मेखला, कृष्णाजिन, वस्त्र, जटा, दंड, कमंडलु आणि यज्ञोपवीत हीं यथोक्तरीतीनें धारण करावीं ॥ ४ ॥ तसेंच सकाळीं संध्याकाळीं भिक्षाटन करून ती भिक्षा गुरूला अर्पण करावी आणि त्यानें आज्ञा दिली तर भोजन करावें व जर कदाचित् आज्ञा दिली नाहीं तर उपवास करावा ॥ ५ ॥ त्याचप्रमाणें सुशील, मिताहारी, श्रद्धायुक्त आणि जितेंद्रिय होऊन त्यानें, स्त्रिया व स्त्रैण पुरुष ह्यांच्याशीं कार्यापुरताच व्यवहार ठेवावा ॥ ६ ॥ आणि गृहस्थाव्यतिरिक्त ब्रह्मचाऱ्यानें स्त्रियांच्या कथा वर्ज कराव्या. कारण, इंद्रियें बलवत्तर आहेत तीं जितेंद्रिय पुरुषाचेंहि मन बलात्कारानें हरण करितात ॥ ७ ॥ तसेंच तरुण पुरुषानें; आपले केंस विंचरणें, शरीरमर्दन करणें व अभ्यंगवगैरे करणें हीं कधींहि गुरुपत्न्या अथवा तरुण स्त्रिया ह्यांच्याकडून करवूं नयेत ॥ ८ ॥ कारण, स्त्री ही खरोखर अग्निरूप आहे व पुरुष हा घृतकुंभरूप आहे. तस्मात् एकांतामध्यें प्रत्यक्ष कन्येशींहि संभाषणादि व्यवहार करूं नये व एकांत नसतांहि कारणापुरतेंच

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तिनें सांगितलेलें करावें ॥ ९ ॥ अशा, स्त्रियावगैरे हें सर्व, मिथ्या असून फार वाईट असल्यामुळें तें स्वतः टाकिल्यासारिखेंच आहे. मग त्यांचा त्याग करण्याविषयीं काय हा अतिआग्रह असें ह्मणशील तर– हे धर्मराजा, स्वरूपसाक्षात्काराच्या योगानें देह व इंद्रियेंवगैरे हें सर्व आभासमात्र आहे, असा निश्चय करून जोंपर्यंत हा जीव स्वतंत्र झाला नाहीं तोंपर्यंत हा पुरुष व ही स्त्री इत्यादि भेदबुद्धि नाहींशी होत नाहीं व त्या भेदबुद्धीमुळें विषयचिंतनाच्या योगानें जीवाला उपभोग करण्याची बुद्धि उत्पन्न होत्ये ह्याकरितां त्यागच केला पाहिजे ॥ १० ॥ असो. सहाव्या श्लोकापासून सांगितलेले हे सर्व धर्म, गृहस्थाला व यतीलाहि विहितच आहेत. परंतु, ऋतुकालीं स्त्रीचेठिकाणीं गमन करणाऱ्या व तिजपासून झालेल्या पुत्रादिकांच्या रक्षणाविषयीं व्यग्र असलेल्या गृहस्थालामात्र गुरूची जीविका चालविण्याचा विकल्प आहे ह्मणजे जर सामर्थ्य असेल तर त्यानें गुरुची उपजीविका चालवावी व सामर्थ्य नसेल तर चालवूं नये ॥ ११ ॥ त्याप्रमाणें ज्या गृहस्थांनीं व्रत ग्रहण केलें असेल

ननु मिथ्यात्वादतिकश्मलत्वाच्च स्वयं त्यक्तप्रायं स्त्र्यादि जह्यादिति कोऽयमतिनिर्बंधस्तत्राह । कल्पयित्वेति । आत्मना स्वरूपसाक्षात्कारेणेदं देहेंद्रियाद्याभासमात्रं कल्पयित्वा निश्चित्य यावदसौ जीव ईश्वरः स्वतंत्रो न भवेत्तावद्द्वैतमयं पुमानियं स्त्रीत्यादिभेदो न विरमेत् ततः किमत आह । ततो हि द्वैतात् । विपर्ययो गुणाध्यासेन भोग्यताबुद्धिः । अतो जह्यादेवेत्यर्थः ॥ १० ॥ एतत्सर्वं सुशील इत्याद्युक्तं गृहस्थस्य विशेषमाह । गुरुवृत्तिरिति ॥ ११ ॥ अंजनादीनामामिषांतानां द्वंद्वैक्यम् । अंजनं शरीरस्य । अभ्यंजनं

कल्पयित्वाऽऽत्मना यावदाभासमिदमीश्वरः ॥ द्वैतं तावन्न विरमेत्ततो ह्यस्य विपर्ययः ॥ १० ॥ एतत्सर्वं गृहस्थस्य समाम्नातं यतेरपि ॥ गुरुवृत्तिर्विकल्पेन गृहस्थस्यर्तुगामिनः ॥ ११ ॥ अंजनाभ्यंजनोन्मर्दस्त्र्यवलेखामिषं मधु ॥ स्रग्गंधलेपालंकारांस्त्यजेयुर्ये धृतव्रताः ॥ १२ ॥ उषित्वैवं गुरुकुले द्विजोऽधीत्यावबुध्य च ॥ त्रयीं सांगोपनिषदं यावदर्थं यथाबलम् ॥ १३ ॥ दत्त्वा वरमनुज्ञातो गुरोः कामं यदीश्वरः ॥ गृहं वनं वा प्रविशेत्प्रव्रजेत्तत्र वा वसेत् ॥ १४ ॥ अग्नौ गुरावात्मनि च सर्वभूतेष्वधोक्षजम् ॥ भूतैः स्वधामभिः पश्येदप्रविष्टं प्रविष्टवत् ॥ १५ ॥

शिरसः । स्त्रियं चावलेखां च । चित्रकर्म स्त्रीणां कुड्यादौ लेखनं वा तन्निरीक्षणं वा अत्राभ्यंगादि स्वरूपतो निषिध्यते । पूर्वं तु कथंचिदापदि प्राप्तमपि स्त्रीकर्तृकं निषिद्धमिति भेदः ॥ १२ ॥ अंगैः शिक्षादिभिरुपनिषद्भिश्च सहितां वेदत्रयीमधीत्यावबुध्य च तदर्थं च विचार्य । यावदर्थं स्वाधिकारानुसारेण ॥ १३ ॥ यदीश्वरः शक्तस्तर्हि गुरोः काममपेक्षितं वरं दत्त्वा यथाधिकारं गृहस्थाद्याश्रमं स्वीकुर्यात्प्रव्रजेत वा तत्रैव वा वसेत् । नैष्ठिकः स्यादित्यर्थः ॥ १४ ॥ स्वधामभिः स्वाश्रयैर्भूतैर्जीवैः सह तन्नियंतृतया ॥ १५ ॥

त्यांनीं मस्तकाला तेल लावणें, न्हाणें, शरीरमर्दन करणें, स्त्रीचें सेवन करणें, स्त्रियांचीं चित्रेंवगैरे काढणें, मांस व मद्य ह्यांचें सेवन करणें, माला धारण करणें, चंदनाची उटि लावणें आणि शरीरावर अलंकार घालणें हीं सर्व वर्ज्य करावींत ॥ १२ ॥ ह्याप्रमाणें द्विजानें गुरुगृहीं वास करून स्वाधिकारानुरूप यथाशक्ति शिक्षादि अंगें व उपनिषदें ह्यांसहवर्तमान वेदत्रयीचें अध्ययन करून, त्यांच्या अर्थांचा विचार करावा ॥ १३ ॥ आणि नंतर जर सामर्थ्य असेल तर गुरूला अभीष्ट असा वर देऊन, त्यानें आज्ञा दिली असतां गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम अथवा संन्यासाश्रम स्वीकारावा किंवा नैष्ठिक ब्रह्मचारी होऊन गुरुगृहींच वास करावा ॥ १४ ॥ आणि अग्नि गुरु, आत्मा व सर्वभूतें ह्यांचेठिकाणीं जरी वस्तुतः अधोक्षज भगवान् प्रविष्ट नाहीं तथापि आपल्या आश्रयाला असलेल्या जीवांसहवर्तमान त्यामध्यें तो प्रविष्ट आहे असें अवलोकन

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करावें ॥ १५ ॥ हे राजा, ह्याप्रमाणें आचरण करणारा ब्रह्मचारी, वानप्रस्थ, यति अथवा गृहस्थ अपरोक्षज्ञानसंपन्न होऊन परब्रह्मस्वरूपास पावतो ॥ १६ ॥ असो. आतां, ऋषींनीं सांगितलेले वानप्रस्थाचे धर्म मी कथन करितों. ज्या धर्मांचें यालोकीं आचरण करणारा मुनि, अनायासानेंच महर्लोकाप्रत जातो ॥ १७ ॥ हे राजा, वानप्रस्थाश्रमी पुरुषानें, नांगरलेल्या जमीनीपासून उत्पन्न झालेले (तांदूळवगैरे) भक्षण करूं नयेत, नांगरल्या वांचूनहि जमीनीमध्यें निष्पन्न होऊन परिपक्व होण्याच्या कालापूर्वींच परिपक्व दशेस आलेलें (फलमूलादिक) भक्षण करूं नये. तसेंच अग्नीवर शिजविलेलें व कच्चें भक्षण करूं नये. तर केवल सूर्यकिरणांनीं परिपक्व झालेलें फलादिकच भक्षण करावें ॥ १८ ॥ त्यानें वनसंबंधीं नीवारादि धान्यांच्या योगानें नित्य अशा चरुपुरोडाशांचा निर्वाप करावा व नवें नवें अन्न प्राप्त झालें असतां पूर्वसंचित अन्नाचा त्याग करावा ॥ १९ ॥ आणि केवल अग्निसंरक्षणार्थंच पर्णकुटिकेचा अथवा पर्वतगुहेचा आश्रय करावा. स्वतां तर शीत, वायु, अग्नि, पर्जन्य आणि सूर्याचा

चरन्नेवमाचरन् । विदितं विज्ञानं विज्ञेयं येन सः ॥ १६ ॥ ऋषिलोकं महर्लोकम् ॥ १७ ॥ अकृष्टमकृष्टपच्यम् । अकालतः पाककालात्पूर्वमेव निष्पन्नमित्यर्थः । अर्कपक्वं फलादि आहरेदश्नीयात् ॥ १८ ॥ वन्यैर्नीवारादिभिश्चरुपुरोडाशान् । कालचोदितान्नित्यान् । पुराणं पूर्वसंचितम् ॥ १९ ॥ हिमादीन्सहत इति तथा ॥ २० ॥ केशादीन्मलं

विरक्तः कामभोगेषु शतरूपापतिः प्रभुः ॥ विसृज्य राज्यं तपसे सभार्यो वनमाविशत् ॥ ७ ॥ सुनंदायां वर्षशतं पदैकेन भुवं स्पृशन् ॥ तप्यमानस्तपो घोरमिदमन्वाह भारत ॥ ८ ॥ मनुरुवाच ॥ येनचेतयते विश्वं विश्वं चेतयते न यम् ॥ यो जागर्ति शयानेऽस्मिन्नायं तं वेद वेद सः ॥ ९ ॥ आत्मावास्यमिदं विश्वं यत्किंचिज्जगत्यां जगत् ॥ तेन त्यक्तेन भुंजीथा मा गृधः कस्यस्विद्धनम् ॥ १० ॥ यन्न पश्यति पश्यंतं चक्षुर्यस्य न रिष्यति ॥ तं भूतनिलयं देवं सुपर्णमुपधावत ॥ ११ ॥ न यस्याद्यंतौ मध्यं च स्वः परो नांतरं बहिः ॥ विश्वस्यामूनि यद्यस्माद्विश्वं च तद्दतं महत् ॥ १२ ॥

हो आश्चर्य हें ! ॥ ९ ॥ आतां त्याचें ईश्वरत्व दर्शवून लोकांला हिताचा उपदेश करितो कीं– हे माण्या, ब्रह्मांडामध्यें जें ह्मणून कांहीं चेतनाचेतनात्मक पदार्थमात्र आहे तें सर्व ईश्वरानें व्यापलेलें आहे, ह्याकरितां त्या ईश्वरानेंच जें कांहीं द्रव्यवगैरे दिलें असेल त्याच्याच योगानें तूं भोगांचा उपभोग घे, दुसऱ्या कोणाच्याहि धनाची आकांक्षा धरूं नकोस ॥ १० ॥ आतां, जर परमेश्वर सर्व विश्वाला व्यापीत आहे तर चक्षुरिंद्रियाच्या योगानें त्याची प्रतीति कां होत नाहीं ? असें ह्मणाल तर–हे जनहो, ज्या अवलोकन करणाऱ्या द्रष्ट्याला सर्वांचें चक्षुरिंद्रिय अवलोकन करीत नाहीं. कारण, जो नेत्रादिकांना अगोचर आहे व ज्याचें ज्ञान कधींहि नष्ट होत नाहीं; त्या सर्वांतर्यामी व निःसंग अशा परमेश्वराला तुह्मी भजा ॥ ११ ॥ आतां त्या ईश्वराचें स्वरूप नित्य आहे असें सांगतो,– हे जनहो, उत्पत्ति, स्थिति, नाश, स्वकीय, परकीय आभ्यंतर अथवा बाह्य हीं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ज्याला नाहींत, विश्वाची उत्पत्ति स्थिति व लय हीं ज्यापासून होतात व विश्व हें ज्याचें रूप आहे तें सत्यस्वरूप परिपूर्ण ब्रह्म होय ॥ १२ ॥ बरें विश्व जर त्याचें स्वरूप आहे तर त्याला उत्पत्तिवगैरे कां नाहींत ? व तो स्वप्रकाश तरी कसा ? आणि जगाची उत्पत्तिवगैरे करीत असल्यामुळें विकारयुक्त असलेल्या त्या परमेश्वराला सत्यत्व व पूर्णत्व हीं कोठून असणार ? असें ह्मणाल तर– हे जनहो, तो ईश्वर, जन्मादिविकाररहित, कालत्रयाबाधित, स्वयंप्रकाश व अनादि असल्यामुळें त्या परमेश्वराचें जरी हें विश्व स्वरूप आहे आणि तो जरी बहुनामांनीं युक्त आहे तथापि तो ह्या विश्वाचे उत्पत्ति, स्थिति व संहार आपल्या मायेच्या योगानें करीत असतो आणि त्या मायेचाहि, नित्यसिद्ध असलेल्या विद्येच्या योगानें त्याग करून तो कर्मरहितच असतो ॥ १३ ॥ ह्मणून ऋषिसुद्धां प्रथमतः मोक्षाकरितां कर्में करितात. कारण निष्काम कर्में करणाराच पुरुष, प्रा-

---

ननु विश्वं चेत्तद्रूपं तर्हि तस्य कुतो जन्माद्यभावः स्वप्रकाशत्वं वा कथं वा जगज्जन्मादिकर्तृत्वेन विकारिणः सत्यत्वं पूर्णत्वं च तत्राह । स ईशोऽजः सत्यश्च स्वप्रकाशश्च पुराणश्च निर्विकारो विश्वं कायो यस्य पुरूणि हुतानि नामानि यस्य तथाविधोऽपि यतोऽस्य विश्वस्य जन्मादि स्वशक्त्या मायया धत्ते तां च नित्यसिद्धया विद्ययोदस्य हित्वा निष्क्रिय एवास्ते ॥ १३ ॥ यस्मादेवमीश्वरः कर्म कृत्वा संत्यज्य नैष्कर्म्येणास्ते अथास्माद्धेतोः ऋषयोऽप्यग्रे आदौ कर्माणि कुर्वंति । किमर्थमकर्मंहेतवे मोक्षार्थम् । पा-

स विश्वकायः पुरुहूत ईशः सत्यः स्वयंज्योतिरजः पुराणः ॥ धत्तेऽस्य जन्माद्यजयात्मशक्त्या तां विद्ययोदस्य निरीह आस्ते ॥ १३ ॥ अथाग्रे ऋषयः कर्माणीहंतेऽकर्महेतवे ॥ ईहमानो हि पुरुषः प्रायोऽनीहां प्रपद्यते ॥ १४ ॥ ईहते भगवानीशो नहि तत्र विषज्जते ॥ आत्मलाभेन पूर्णार्थो नावसीदंति येऽनु तम् ॥ १५ ॥ तमीहमानं निरहंकृतं बुधं निराशिषं पूर्णमनन्यचोदितम् ॥ नॄन् शिक्षयंतं निजवर्त्मसंस्थितं प्रभुं प्रपद्येऽखिलधर्मभावनम् ॥ १६ ॥ श्रीशुक उवाच ॥ इति मंत्रोपनिषदं व्याहरंतं समाहितम् ॥ दृष्ट्वाऽसुरा यातुधाना जग्धुमभ्यद्रवन्क्षुधा ॥ १७ ॥

ठांतरे कर्मनाशाय हि यस्मात् ॥ १४ ॥ नन्वीहमानः कर्मभिरवगुंठितः कोशकार इव बध्येतैव तत्राह । ईहत इति । अतस्तमनुवर्तमाना ये ते नावसीदंति न विषज्जंते ॥१५॥ तदेवं लोकानुग्रहाय विश्वसृष्ट्यादि यः करोति श्रीरामकृष्णाद्यवतारैश्च वेदोक्तमप्याचरति तं शरणं व्रजामीत्याह । तमिति । निजं वर्त्म नरावतारानुरूपो मार्गस्तत्र सम्यक् स्थितमत ईहमानं कर्माचरंतम् । तथाऽपि जीववैलक्षण्यमाह । निरहंकृतं निराशिषमनन्यचोदितमिति च । निरहंकारत्वे हेतुः । बुधम् । निराशीष्ट्वे हेतुः । पूर्णम् । अनन्यनियुक्तत्वे हेतुः । प्रभुम् । तथाऽपि कर्मानुष्ठाने हेतुः । नॄन्स्वाचारेण शिक्षयंतम् । तत्किमर्थं तत्राह । अखिलान्धर्मान्भावयति प्रवर्तयतीति तथा तम् ॥ १६ ॥ समाहितमपि संतं मं-

---

यशः निरिच्छ होतो ॥ १४ ॥ आतां कर्में करीत असतांना कर्मांनीं वेष्टित होऊन कोशकार नांवाच्या किड्याप्रमाणें बद्ध होत असेल अशी जर शंका घ्याल तर– हे जनहो, आत्मलाभानेंच पूर्णकाम असल्यामुळें भगवान् ईश्वर कर्में करितो. परंतु, त्यांचेठिकाणीं आसक्त होत नाहीं, अधिक तर काय परंतु त्याला अनुसरून वागणारे लोकहि कर्मांचेठिकाणीं आसक्त होत नाहींत ॥ १५ ॥ असो. ह्याप्रमाणें लोकांवर अनुग्रह करण्याकरितां जो विश्वोत्पत्त्यादि कर्में करितो व रामकृष्णादिक अवतारांनीं वेदोक्त कर्मांवेंहि जो आचरण करितो त्याला मी शरण जातों. असें सांगतो– हे जनहो, जो सर्वधर्मप्रवर्तक असल्यामुळें स्वतःच्या आचरणानें मनुष्यांना शिक्षण देण्याकरितां आपल्या मनुष्यावताररूप मार्गाचें उत्तम प्रकारानें अवलंबन करून कर्माचें आचरण करीत आहे, जो ज्ञानी असल्यामुळें अहंकाररहित आहे , जो परिपूर्ण असल्यामुळें निष्काम आणि स्वतंत्र आहे त्या परमात्म्याला मी शरण जातों ॥ १६ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला:–हे परिक्षिति राजा, एकाग्र अंतःकरणानें युक्त असूनहि ह्याप्रमाणें मंत्ररूप उपनिषदाचा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

उच्चार करीत असलेल्या मनूला अवलोकन करून, झोपेंत बडबडत असल्यासारखा हा विवश आहे असें मानणारे असुर व यातुधान, क्षुधेनें पीडित होऊन त्याला भक्षण करण्याकरितां सत्वर त्याच्या समीप गेले ॥ १७ ॥ इतक्यांत मनूला भक्षण करण्याविषयीं निश्चित झालेल्या त्या असुरादिकांना पाहून सर्वसाक्षी यज्ञनामक श्रीहरीनें, आपल्या यामसंज्ञक पुत्ररूपी देवांनीं परिवेष्टित होऊन तेथें येऊन त्यांचा वध केला आणि स्वर्गाचें परिपालन केलें ह्मणजे तो यज्ञरूपी श्रीहरि स्वतःच इंद्र झाला ॥ १८ ॥ आतां दुसऱ्या, तिसऱ्या व चवथ्या मन्वंतरामध्यें मनु, देव, मनुपुत्र इंद्र ऋषि आणि श्रीहरीचा अवतार हे सहा कोण कोण झाले तें सांगतो,– हे राजा, अग्नीचा स्वारोचिषनामक जो पुत्र तो दुसरा मनु झाला आणि द्युमान्, सुषेण व रोचिष्मान्वगैरे त्याचे पुत्र होते ॥ १९ ॥ त्या मन्वंतरामध्यें यज्ञाचा पुत्र जो रोचन तो इंद्र होता, तसेच दुसरे यज्ञाचे पुत्र जे

त्रोपनिषदं व्याहरंतं दृष्ट्वा सुप्तोच्छ्वसितवद्विवशमिव मन्वाना असुरा यातुधानाश्च क्षुधा निमित्तेन जग्धुमत्तुमभ्यद्रवन्नभिदुद्रुवुः ॥ १७ ॥ यामैः स्वपुत्रैः । त्रिविष्टपं स्वर्गमपालयत् । स्वयमेवेंद्रो बभूवेत्यर्थः । तत्र प्रतिमन्वंतरं मन्वादयः षडन्येऽन्ये भवंति । तथाहि सूतो द्वादशे वक्ष्यति । मन्वंतरं मनुर्देवा मनुपुत्राः सुरेश्वरः ॥ ऋषयोंऽशावतारश्च

तांस्तथाऽवसितान्वीक्ष्य यज्ञः सर्वगतो हरिः ॥ यामैः परिवृतो देवैर्हत्वाऽशासत्त्रिविष्टपम् ॥ १८ ॥ स्वारोचिषो द्वितीयस्तु मनुरग्नेः सुतोऽभवत् ॥ द्युमत्सुषेणरोचिष्मत्प्रमुखास्तस्य चात्मजाः ॥ १९ ॥ तत्रेंद्रो रोचनस्त्वासीद्देवाश्च तुषितादयः ॥ ऊर्जस्तंभादयः सप्त ऋषयो ब्रह्मवादिनः ॥ २० ॥ ऋषेस्तु वेदशिरसस्तुषितानाम पत्न्यभूत् ॥ तस्यां जज्ञे ततो देवो विभुरित्यभिविश्रुतः ॥ २१ ॥ अष्टाशीतिसहस्राणि मुनयो ये धृतव्रताः ॥ अन्वशिक्षन्व्रतं तस्य कौमारब्रह्मचारिणः ॥ २२ ॥ तृतीय उत्तमो नाम प्रियव्रतसुतो मनुः ॥ पवनः सृंजयो यज्ञहोत्राद्यास्तत्सुता नृप ॥ २३ ॥ वसिष्ठतनयाः सप्त ऋषयः प्रमदादयः ॥ सत्या वेदश्रुता भद्रा देवा इंद्रस्तु सत्यजित् ॥ २४ ॥ धर्मस्य सूनृतायां तु भगवान्पुरुषोत्तमः ॥ सत्यसेन इति ख्यातो जातः सत्यव्रतैः सह ॥ २५ ॥

हरेः षड्विधमुच्यत इति । तत्राद्ये स्वायंभुवो मनुः । प्रियव्रतोत्तानपादौ मनुपुत्रौ । यामादयो देवाः । मरीचिप्रमुखाः सप्तऋषयः । यज्ञो हरेरवतारः । इंद्रश्च स एवेति तन्मन्वंतरं पंचविधमेव तच्चतुर्थस्कंधोपक्रमे निरूपितम् ॥ १८ ॥ द्वितीयादिषु त्रिषु मन्वंतरेषु मन्वादिषट्कमाह । स्वारोचिषो द्वितीयस्त्विति यावद्गजेंद्रमोक्षप्रश्नम् ॥ १९ ॥ २० ॥ २१ ॥ विभोरसाधारणं चरितमाह । अष्टाशीतिसहस्राणीति ॥ २२ ॥ २३ ॥ २४ ॥ २५ ॥

तुषितादिक ह्मणजे तोष, प्रतोष, संतोष, भद्र, शांति, इडस्पति, इध्म, कवि, विभु, स्वह्न आणि सुदेव, ते देव होते व उर्जस्तंभादिक ह्मणजे ऊर्ज, स्तंभ, प्राण, बृहस्पति दत्त, अत्रि आणि च्यवन हे ब्रह्मवेत्ते सप्तर्षि होते ॥ २० ॥ नंतर वेदशिरानामक ऋषीची तुषिता नांवाची जी पत्नी होती तिचेठिकाणीं विभु ह्या नांवानें प्रख्यात असा भगवंताचा अवतार झाला ॥ २१ ॥ आतां विभूचें अलौकिक चरित्र कथन करितात कीं– हे राजा, संख्येनें अठ्यायशी हजार ८८००० असे जे यमनियमादि साधनसंपन्न मुनि त्यांनीं कौमार अवस्थेमध्यें ब्रह्मचारी असलेल्या त्या विभूच्या आचरणव्रताची शिक्षा ग्रहण केली ॥ २२ ॥ असो. हे राजा, प्रियव्रताचा उत्तमनामक जो पुत्र तो तिसरा मनु, झाला व पवन, सृंजय आणि यज्ञहोत्र इत्यादिक त्याचे पुत्र होते ॥ २३ ॥ तसेच वसिष्ठाचे पुत्र जे प्रमदादिक ते सप्तर्षि होते, सत्य वेदश्रुत व भद्र ह्या नांवांचे देवगण होते आणि सत्यजित् नांवाचा इंद्र होता ॥२४॥ त्याप्रमाणें धर्माच्या सूनृतानामक भार्येचेठिकाणीं भगवान् पुरुषोत्तम सत्यसेन नांवानें प्रसिद्ध होऊन सत्यव्रतांसहवर्तमान अवतीर्ण झाला ॥२५॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आणि इंद्राशीं सख्य करून त्यानें खोटें भाषण हेंच ज्यांचें व्रत आहे, स्वभावानें जे दुष्ट आहेत, आणि प्राणिमात्रांशीं जे द्रोह करणारे आहेत अशा त्या यक्षराक्षसनामक
भूतगणांचा वध केला ॥ २६ ॥ नंतर ह्या उत्तमनामक तिसऱ्या मनूचा जो तामसनामक भ्राता होता तो चवथा मनु झाला, त्याचे पृथु, ख्याति, नर आणि केतु इत्यादिक
दहाजण पुत्र होते ॥ २७ ॥ तसेच सत्यक, हरि व वीर ह्या नांवांचे देव असून त्रिशिख या नांवाचा इंद्र होता आणि त्या तामस मन्वंतरामध्यें ज्योतिर्धामादि-
क ह्मणजे ज्योतिर्धामा, पृथु, काव्य, चैत्र, अग्नि, धनद व पीवर, हे सप्तर्षि होते ॥२८ ॥ तसेच हे राजा, विधृतीचे पुत्र असे अन्यहि वैधृतिनामक देव त्या कालीं असून त्यांनीं
कालेंकरून नष्ट झालेले वेद स्वसामर्थ्यानें धारण केले ॥ २९ ॥ आणि त्याहि मन्वंतरामध्यें हरिमेधानामक ऋषीपासून हरिणीनामक स्त्रीचेठिकाणीं भगवंतानें हरि ह्या नांवानें

सत्यजित इंद्रस्य सखा सन् ॥ २६ ॥ उत्तमस्तृतीयो मनुस्तस्य भ्राता तामसश्चतुर्थो मनुः ॥ २७ ॥ त्रिशिख ईश्वर इंद्रः ॥ २८ ॥ अन्यानपि विशिष्टपराक्रमान्दे-

सोऽनृतव्रतदुःशीलानसतो यक्षराक्षसान् ॥ भूतद्रुहो भूतगणांस्त्ववधीत्सत्यजित्सखः ॥ २६ ॥ चतुर्थ उत्तमभ्राता मनुर्नाम्ना च ता-
मसः ॥ पृथुः ख्यातिर्नरः केतुरित्याद्या दश तत्सुताः ॥ २७ ॥ सत्यका हरयो वीरा देवास्त्रिशिख ईश्वरः ॥ ज्योतिर्धामादयः सप्त
ऋषयस्तामसेंऽतरे ॥ २८ ॥ देवा वैधृतयो नाम विधृतेस्तनया नृप ॥ नष्टाः कालेन यैर्वेदा विधृताः स्वेन तेजसा ॥ २९ ॥ त-
त्रापि जज्ञे भगवान्हरिण्यां हरिमेधसः ॥ हरिरित्याहृतो येन गजेंद्रो मोचितो ग्रहात् ॥ ३० ॥ राजोवाच ॥ बादरायण एतत्ते श्रो-
तुमिच्छामहे वयम् ॥ हरिर्यथा गजपतिं ग्राहग्रस्तममूमुचत् ॥ ३१ ॥ तत्कथासु महत्पुण्यं धन्यं स्वस्त्ययनं शुभम् ॥ यत्र यत्रो-
त्तमश्लोको भगवान्गीयते हरिः ॥ ३२ ॥ सूत उवाच ॥ परीक्षितैवं स तु बादरायणिः प्रायोपविष्टेन कथासु चोदितः ॥ उवाच वि-
प्राः प्रतिनंद्य पार्थिवं मुदा मुनीनां सदसि स्म शृण्वताम् ॥ ३३ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे अष्टमस्कंधे मन्वंतरानुचरिते प्र-
थमोऽध्यायः ॥ १ ॥ ॥

वानाह । देवा वैधृतय इति ॥ २९ ॥ हरिरित्याहृतो व्याहृतः ग्रहात् ग्राहात् ॥ ३० ॥ अमूमुचत् मोचयामास ॥ ३१ ॥ श्रवणेच्छायां हेतुः । तत्कथासु तासु कथासु । सा
कथैव वा सुमहत्पुण्यम् । पुण्यस्य विशेषणं धन्यमित्यादि ॥ ३२ ॥ ३३ ॥ इति श्रीमद्भागवते अष्टमस्कंधे टीकायां प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥

प्रसिद्ध असा अवतार धारण करून मकरापासून गजेंद्राला मुक्त केलें ॥ ३० ॥ राजा ह्मणालाः–हे व्यासपुत्रा, मकरानें ग्रासून टाकिलेल्या गजेंद्राला श्रीहरीनें कसा सोडविला
हें आह्मीं तुजपासून श्रवण करण्याची इच्छा करितों ॥ ३१ ॥ कारण, जेथें जेथें श्रेष्ठकीर्ति भगवान् श्रीहरीचें गायन होत आहे ती कथा ह्मटली ह्मणजे धनाची प्राप्ति करून देणा-
री, अभीष्ट फळ देणारी आणि मोक्षकारक अशी फारच पुण्यरूपी आहे ॥ ३२ ॥ सूत ह्मणाला,–हे विप्रहो, ह्याप्रमाणें प्रायोपवेशन करून बसलेल्या परीक्षित राजानें व्यासपुत्र शुका-
चार्यांची भगवत्कथांचेठिकाणीं प्रश्नद्वारा प्रवृत्ति केली असतां, त्यानेंहि राजाला मान दिला आणि त्या सभेमध्यें सर्व ऋषि श्रवण करीत असतां, मोठ्या आनंदानें ती कथा वर्णन
करण्यास आरंभ केला ॥ ३३ ॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील अष्टमस्कंधापैकीं मन्वंतर निरूपणसंबंधीं हा पहिला अध्याय समाप्त जाहला ॥१॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां चवथ्यामन्वंतरामध्यें संक्षेपानें कथन केलेल्या गजेंद्रमोक्षाचेंच दुसऱ्या तिसऱ्या व चवथ्या अध्यायांमध्यें सविस्तर वर्णन केलें आहे आणि त्यांपैकीं ह्या दुसऱ्या अध्यायामध्यें हस्तिनीसहवर्तमान जलामध्यें क्रीडा करणाऱ्या गजेंद्राला दैवयोगामुळें मकरानें धरलें असतां श्रीहरीचें स्मरण झालें असें वर्णन केलें आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हेराजा, त्रिकूट ह्या नांवानें प्रख्यात असा एक श्रेष्ठ पर्वत आहे, तो क्षीरसमुद्रानें परिवेष्टित, रत्नादिसमृद्धीनें शोभायुक्त दहाहजार योजनें उंच व आसमंताद्भागींहि तितकाच दहाहजार योजनें विस्तारयुक्त असून रौप्यमय, लोहमय व सुवर्णमय अशा आपल्या तीन शिखरांनीं क्षीरसागर, दशदिशा आणि आकाश यांना प्रकाशित करित आहे ॥ १ ॥ २ ॥ त्याप्रमाणें तो रत्नें व धातु ह्यांच्या योगानें चित्रविचित्र असून नानाप्रकारच्या लतावृक्षांच्या बेटांनीं युक्त अशीं इतर शिखरें आणि झऱ्यांच्या उदकांचे प्रवाह

तुर्ये मन्वंतरे प्रोक्तं गजेंद्रस्य विमोक्षणम् ॥ द्वितीयादित्रिभिस्तत्तु विस्तरेणोपवर्ण्यते ॥ १ ॥द्वितीये तु गजेंद्रस्य गजीभिः क्रीडतो जले ॥ दैवाद्ग्राहगृहीतस्य हरिस्मृतिरुदीर्यते ॥ २ ॥ आसीदस्ति ॥ १ ॥ तावता योजनायुतेन । पर्यक् परितः । त्रिकूटसमाख्याबीजमाह । त्रिभिः शृंगैर्मुख्यैः ॥२॥ अन्यैश्च शृंगैर्निर्झरांभसां निर्घोषैश्च ककुभः सर्वा रोचयन्नास्त इति पूर्वेणैवान्वयः । कंथभूतैः शृंगैः । रत्नैर्धातुभिश्च विचित्रितैः । नानाविधानां द्रुमलतानां गुल्मा येषु तैः॥ ३ ॥ पयस ऊर्मिभिः समंतादवनिज्यमाना अंघ्रयो मूलप्रांता यस्य । हरिद्भिः पला-

श्रीशुक उवाच ॥ आसीद्गिरिवरो राजंस्त्रिकूट इति विश्रुतः ॥ क्षीरोदेनावृतः श्रीमान्योजनायुतमुच्छ्रितः ॥ १ ॥ तावता विस्तृतः पर्यक् त्रिभिः शृंगैः पयोनिधिम् ॥ दिशः खं रोचयन्नास्ते रोप्यायसहिरण्मयैः ॥२॥ अन्यैश्च ककुभः सर्वा रत्नधातुविचित्रितैः ॥ नानाद्रुमलतागुल्मैर्निर्घोषैर्निर्झरांभसाम् ॥३॥ स चावनिज्यमानांघ्रिः समंतात्पयऊर्मिभिः ॥ करोति श्यामलां भूमिं हरिन्मरकताश्मभिः ॥ ४ ॥ सिद्धचारणगंधर्वविद्याधरमहोरगैः ॥ किन्नरैरप्सरोभिश्च क्रीडद्भिर्जुष्टकंदरः ॥ ५ ॥ यत्र संगीतसन्नादैर्नदद्गुहममर्षया ॥ अभिगर्जंति हरयःश्लघिनः परशंकया ॥ ६ ॥ नानाऽऽरण्यपशुव्रातसंकुलद्रोण्यलंकृतः ॥ चित्रद्रुमसुरोद्यानकलकंठविहंगमः ॥ ७ ॥ सरित्सरोभिरच्छोदैः पुलिनैर्मणिवालुकैः ॥ देवस्त्रीमज्जनामोदसौरभांब्वनिलैर्युतः ॥ ८ ॥

शवर्णैः ॥ ४ ॥ ५ ॥ किन्नरादीनां संगीतसन्नादैर्नदंत्यो गुहा यस्मिन्प्रदेशे तमभिगर्जंति । हरयः सिंहाः । अमर्षया असहनेन ॥ ६ ॥ नाना ये आरण्याः पशवस्तेषां व्रातैः संकुलाभिर्द्रोणीभिरलंकृत आस्ते । किंच चित्रा द्रुमा येषु तेषु सुरोद्यानेषु कलकंठा मधुरस्वना विहंगमा यस्मिन् ॥ ७ ॥ किंच स्वच्छोदकैः सरित्सरोभिर्युतः । मणय इव वालुका येषु तैः पुलिनैश्च युतः । देवस्त्रीणां मज्जनेन य आमोदस्तेन सौरभयुक्तान्यंबून्यनिलश्च तैश्च युत आस्ते ॥ ८ ॥

ह्यांच्यायोगानें सर्व दिशांना शोभा आणीत आहे ॥ ३ ॥ तसेंच त्या पर्वताच्या मूलप्रांताचें प्रक्षालन, आसमंताद्भागीं उत्पन्न होणाऱ्या क्षीरसमुद्राच्या लाटांनीं होत असल्यामुळें तो आपल्या हिरव्या रंगाच्या पाषाणांनीं (पाचेच्या धोंडयांनीं) तेथील भूमि श्यामवर्ण करित आहे ॥ ४ ॥ त्या पर्वताच्या गुहांमध्यें सिद्ध, चारण, गंधर्व, विद्याधर, महोरग, किंनर आणि अप्सरोगण हे क्रीडा करीत असतात ॥ ५ ॥ त्या पर्वतावर किंनरादिकांच्या गायनांच्या मोठ्या नादानें ज्या प्रदेशाचेठिकाणीं गुहा नादयुक्त होत असतात त्या प्रदेशांकडे तोंड करून आपली प्रशंसा करणारे सिंह, तो नाद सहन न झाल्यामुळें येथें कोणीतरी दुसरा सिंह आहे कीं काय! अशी शंका घेऊन गर्जना करीत असतात ॥ ६ ॥ हेराजा, तो पर्वत, नानाप्रकारच्या वनपशूंच्या समूहांनीं व्याप्त झालेल्या गुहांच्या योगानें भूषित व चित्रविचित्र वृक्षांनीं युक्त असलेल्या देवांच्या क्रीडावनांमध्यें मधुर शब्द करणाऱ्या पक्ष्यांनीं युक्त आहे ॥ ७ ॥ तसाच तो, स्वच्छ उदकांनीं युक्त असलेल्या नद्यांनीं व सरोवरांनीं युक्त, ज्यामध्यें रत्नतुल्य वालुका आहेत अशा वाळवंटांनीं युक्त व देवांगनाच्या स्ना- ॥ ३ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नानें उत्पन्न झालेल्या परिमलाच्या योगानें सुवासित झालेल्या उदकांनीं व वायूंनीं युक्त आहे ॥ ८ ॥ त्या पर्वताच्या एका प्रदेशाचेठिकाणीं ऐश्वर्यादिसंपन्न महात्म्या वरुणाचें ऋतुमत्नांवाचें एक उपवन असून तें निरंतर पुष्पफलांनीं युक्त अशा दिव्य वृक्षांनीं सर्व बाजूंनीं सुशोभित आणि देवांगनांचें क्रीडास्थान आहे. तसाच तो पर्वत मंदार, पारिजात, पाडळी, अशोक, चंपक, ॥ ९ ॥ १० ॥ चार, फणस, आम्र, अंबाडा, पोफळी, नारळी, खर्जूर, महाळुंग, मोह, सागवान, ताड, तमाल, असाणा, अर्जुनवृक्ष, रिठे, उंबर, पिंपरी, वट, पळस, चंदन, ॥ ११ ॥ १२ ॥ लिंब, कांचन, सुरू, देवदारु, द्राक्ष, ऊंस, केळी, जांबळी, बोरी, बेहेडे, हिरडे, भुईआवळी, बिल्व, कपित्थ, जंबीर, व बिबवा इत्यादि वृक्षांनीं व्याप्त झालेला आहे आणि त्या पर्वतावर एक अत्यंत विस्तीर्ण असें सरोवर आहे, त्याच्यामध्यें सुवर्णकमळें प्रफुल्लित झालेलीं असतात ॥ १३ ॥ १४ ॥

तस्य द्रोण्यां वरुणस्योद्यानमास्ते ॥ ९ ॥ गिरिवनादिसर्वं ध्येयमिति वक्ष्यत्यतो गिरिमुपवर्ण्य वनं वर्णयति । सर्वतोऽलंकृतमिति । पुनर्गिरिं वर्णयति । मंदारैरिति चतुर्भिः । मंदारादिभिर्वृत इत्यन्वयः ॥ १० ॥ ११ ॥ १२ ॥ १३ ॥ तस्मिन् गिरौ सर आस्ते । तद्वर्णयति । सुविपुलमित्यादिसार्धैः पंचभिः । लसंति कांचनपंकजानि यस्मिन् ॥ १४ ॥ कुमुदा-

तस्य द्रोण्यां भगवतो वरुणस्य महात्मनः ॥ उद्यानमृतुमन्नाम आक्रीडं सुरयोषिताम् ॥ ९ ॥ सर्वतोऽलंकृतं दिव्यैर्नित्यं पुष्पफलद्रुमैः ॥ मंदारैः पारिजातैश्च पाटलाशोकचंपकैः ॥ १० ॥ चूतैः प्रियालैः पनसैराम्रैराम्रातकैरपि ॥ क्रमुकैर्नालिकेरैश्च खर्जूरैर्बीजपूरकैः ॥ ११ ॥ मधूकैः सालतालैश्च तमालैरसनार्जुनैः ॥ अरिष्टोदुंबरप्लक्षैर्वटैः किंशुकचंदनैः ॥ १२ ॥ पिचुमंदैः कोविदारैः सरलैः सुरदारुभिः ॥ द्राक्षेक्षुरंभाजंबूभिर्बदर्यक्षाभयामलैः ॥ १३ ॥ बिल्वैः कपित्थैर्जंबीरैर्वृतो भल्लातकादिभिः ॥ तस्मिन्सरः सुविपुलं लसत्कांचनपंकजम् ॥ १४ ॥ कुमुदोत्पलकह्लारशतपत्रश्रियोर्जितम् ॥ मत्तषट्पदनिर्घुष्टं शकुंतैश्च कलस्वनैः ॥ १५ ॥ हंसकारंडवाकीर्णं चक्राह्वैः सारसैरपि ॥ जलकुक्कुटकोयष्टिदात्यूहकुलकूजितम् ॥ १६ ॥ मत्स्यकच्छपसंचारचलत्पद्मरजःपयः ॥ कदंबवेतसनलनीपवंजुलकैर्वृतम् ॥ १७ ॥ कुंदैः कुरबकाशोकैः शिरीषैः कुटजेंगुदैः ॥ कुब्जकैः स्वर्णयूथीभिर्नागपुन्नागजातिभिः ॥ १८ ॥ मल्लिकाशतपत्रैश्च माधवीजालकादिभिः ॥ शोभितं तीरजैश्चान्यैर्नित्यर्तुभिरलं द्रुमैः ॥ १९ ॥ तत्रैकदा तद्गिरिकाननाश्रयः करेणुभिर्वारणयूथपश्चरन् ॥ सकंटकान्कीचकवेणुवेत्रवद्विशालगुल्मं प्ररुजन्वनस्पतीन् ॥ २० ॥

दीनां श्रिया ऊर्जितम् । कलः स्वनो येषां तैः शकुंतैश्च निर्घुष्टम् ॥ १५ ॥ चक्राह्वैः सारसैरप्याकीर्णम् । जलकुक्कुटादीनां कुलैः कूजितम् ॥ १६ ॥ मत्स्यानां कच्छपानां च संचारेण चलतां पद्मानां रजसा युक्तं पयो यस्मिंस्तत् ॥ १७ ॥ १८ ॥ नित्यमृतवः फलपुष्पादिसंपत्तिहेतवो येषां तैरलं शोभितम् ॥ १९ ॥ तत्रैवं सत्येकदा तद्गिरिकानना-

---

श्वेतकमळें, निळीं कमळें, संध्याविकासी श्वेतकमळें आणि साधारण कमळें ह्यांच्या शोभेनें तें समृद्ध आहे. मत्त झालेल्या भ्रमरांनीं व मधुर शब्द करणाऱ्या पक्ष्यांनीं तें नादित केलेलें आहे ॥ १५ ॥ हंस, कारंडव, चक्रवाक आणि सारस ह्या पक्ष्यांनीं तें अगदीं गजबजून गेलें आहे. पाणकोंबडे, टिटवे व पाणकावळे ह्यांच्या समुदायांनीं तें गर्जित झालेलें आहे ॥ १६ ॥ मत्स्य व कूर्म ह्यांच्या संचारामुळें चलित झालेल्या कमळांच्या रजःकणांनीं त्यांतील उदक मिश्र झालेलें आहे; कदंब, वेतस, देवनळ, नीलवर्ण, अशोक व तिवस ह्या वृक्षांनीं तें परिवेष्टित आहे ॥ १७ ॥ कुंद, तांबडी कोरांटी, अशोक, शिरस, कुडा, हिंगणबेट, कुब्जक, पिंवळी जाई, नागचांफा, जाई, मोगरा, शतपत्र व बटमोगरा इत्यादि पुष्पलतासमूहांनीं आणि सर्वदा फलपुष्पांनीं युक्त अशा इतरहि तीरस्थ वृक्षांनीं तें अत्यंत सुशोभित आहे ॥ १८ ॥ १९ ॥ असें असतां, त्या चित्रकूट पर्वता-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

च्या वनाच्या आश्रयानें राहणारा, गजसमूहाचा अधिपति एक गजेंद्र, ज्याच्या केवळ गंधामुळेंच सिंह, मोठमोठे हत्ती, व्याघ्रादिक श्वापदें, सर्प, हरिण, गेंडे, मोठमोठे साप, पांढरे व काळे शहामृग व चमरीनामक वनगाई, हे सर्व भयभीत होऊन पलायन करीत आहेत; ज्याच्या अनुज्ञेनें, लांडगे, डुकर, महिष, आस्वलें, साळई, गोपुच्छसंज्ञक वानर, श्वान, मर्कट, हरिण व ससे इत्यादिक क्षुद्रप्राणी, दृष्टीच्या आड निर्भयपणें संचार करित आहेत; जो आपल्या कळपांतील गजांनीं व हत्तिणींनीं परिवेष्टित आहे; ज्याच्या मागोमाग मदस्रावी छावे येत आहेत; जो मद भक्षण करणाऱ्या भ्रमरांच्या समुदायांनीं अत्यंत सेवन केलेला आहे आणि ज्याचे नेत्र मदानें धुंद झालेले आहेत; तो हत्तिणीसहवर्तमान संचार करणारा गजेंद्र, सूर्याच्या तापानें संतप्त होऊन, तृषाक्रांत झालेल्या गजसमूहानें परिवेष्टित होत्साता, कमळांच्या परागांनीं व्याप्त होऊन सरोवरावरून लांबून येणाऱ्या वायूचा वास घेत घेत, स्वतःच्या स्थूलपणानें चालतांना आसमंताद्भागीं पर्वताला वारंवार कांपवीत होत्साता, पोकळ वेळू, भरींव वेळु, कांटेरे वृक्ष, वेलींच्या जाळ्या व

श्रयो वारणयूथपः करेणुभिश्चरंस्तृषार्दितेन स्वयूथेन वृतः सरोवरस्याभ्याशं समीपमगमदिति पंचमेनान्वयः । किं कुर्वन् । कीचकवेणुवेत्रवंतं विशालं गुल्मं लतादिसंदर्भं व-

यद्गंधमात्राद्धरयो गजेंद्रा व्याघ्रादयो व्यालमृगाः सखड्गाः ॥ महोरगाश्चापि भयाद्द्रवंति सगौरकृष्णाः शरभाश्चमर्यः ॥ २१ ॥ वृका
वराहा महिषर्क्षशल्या गोपुच्छशालावृकमर्कटाश्च ॥ अन्यत्र क्षुद्रा हरिणाः शशादयश्चरंत्यभीता यदनुग्रहेण ॥ २२ ॥ स घर्मतप्तः क-
रिभिः करेणुभिर्वृतो मदच्युत्कलभैरनुद्रुतः ॥ गिरिं गरिम्णा परितः प्रकंपयन्निषेव्यमाणोऽलिकुलैर्मदाशनैः ॥ २३ ॥ सरोऽनिलं पंक-
जरेणुरूषितं जिघ्रन्विदूरान्मदविह्वलेक्षणः ॥ वृतः स्वयूथेन तृषार्दितेन तत्सरोवराभ्याशमथागमद्द्रुतम् ॥ २४ ॥ विगाह्य तस्मिन्नमृतां-
बुनिर्मलं हेमारविंदोत्पलरेणुवासितम् ॥ पपौ निकामं निजपुष्करोद्धृतमात्मानमद्भिः स्नपयन्गतक्लमः ॥ २५ ॥ स्वपुष्करेणोद्धृतशी-
करांबुभिर्निपाययन्संस्नपयन्यथा गृही ॥ घृणी करेणूः कलभांश्च दुर्मदो नाचष्ट कृच्छ्रं कृपणोऽजमायया ॥ २६ ॥ तं तत्र कश्चि-
न्नृप दैवचोदितो ग्राहो बलीयांश्चरणे रुषाऽग्रहीत् ॥ यदृच्छयैवं व्यसनं गतो गजो यथाबलं सोऽतिबलो विचक्रमे ॥ २७ ॥

नस्पतींश्च प्ररुजन्प्रभजन् ॥ २० ॥ कथंभूतः । यस्य गंधमात्राद्धरयः सिंहा गजेंद्रादयश्च भयाद्द्रवंति पलायंते ॥ २१ ॥ वृकादयः क्षुद्रा अल्पाः प्राणिनोऽन्यत्र तद्दृष्टिपथं त्यक्त्वा चरंति ॥ २२ ॥ पुनः कीदृशः । घर्मतप्तः । मदच्युन्मदस्रावी । मदमश्नंतीति तथा तैः ॥ २३ ॥ २४ ॥ निजेन पुष्करेण कराग्रेणोद्धृतम् । गतक्लमः सन्निकामं पपौ ॥ २५ ॥ २६ ॥ २७ ॥

करवंदींवगैरे झुडपें यांना कडाकड मोडून टाकीत त्या सरोवराजवळ मोठ्या त्वरेनें प्राप्त झाला ॥ २० ॥ २१ ॥ २२ ॥ २३ ॥ २४ ॥ नंतर त्या सरोवराच्या मध्यें तो प्रवेश करून आपल्या देहाला उदकांनीं स्नान घालीत घालीत श्रमरहित झाल्यावर पिंवळ्या व काळ्या कमळांच्या परागांनीं सुगंधयुक्त, अमृताप्रमाणें मधुर आणि शुंडाग्रानें वर उचललेलें अशा निर्मळ जलाचें त्यानें यथेष्ट पान केलें ॥ २५ ॥ तदनंतर गृहादिकांचेठिकाणीं आसक्त असलेल्या पुरुषाप्रमाणें भगवंताच्या मायेनें मोहित झालेला तो दुर्मद व दयाळु गजेंद्र, आपल्या शुंडाग्रानें बाहेर काढिलेल्या जलबिंदूंच्या योगानें हत्तिणींची व छाव्यांची ताहान भागवीत व त्यांना स्नान घालीत असतां, आपणास काय संकट प्राप्त झालें आहे हें त्यानें जाणलें नाहीं ॥ २६ ॥ असो. इतक्यामध्यें हेराजा, दैवानें प्रेरणा केलेल्या कोणीएक बलाढ्य नक्रानें, क्रोधाच्या योगानें त्याला चरणाचेठिकाणीं धरिलें. ह्याप्रमाणें दैवयोगानें संकटांत सांपडलेला तो महाबलाढ्य गजेंद्र, त्या संकटांतून आपल्याला सोडविण्याकरितां यथाशक्ति यत्न करूं लागला ॥ २७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्यावेळीं महावलाढ्य नक्रानें जोरानें आंत ओढीत असलेल्या व अगदीं विवश झालेल्या त्या गजेंद्राला पाहून मनामध्यें खिन्न झालेल्या हत्तिणी केवल दीनबुद्धि होऊन आक्रोश करूं लागल्या व त्याचे अनुयायी इतर गजहि कोणी त्याला सोडविण्यास समर्थ झाले नाहींत ॥ २८ ॥ हेभूपते, ह्याप्रमाणें ते महाबलिष्ठ नक्र व गजेंद्र एकमेकांबरोबर निकरानें युद्ध करीत असतां, ह्मणजे एकमेकांना आंत व बाहेर ओढीत असतां हजार वर्षें निघून गेलीं तेव्हां देवांनींहि तें आश्चर्य मानिलें ॥ २९ ॥ हजार वर्षांनंतरहि बहुकालपर्यंत जलामध्यें ओढला जात असल्यामुळें खेद पावणाऱ्या त्या गजेंद्राचा आहार बंद पडल्यामुळें मनाचा उत्साह, शरीरसामर्थ्य आणि इंद्रियबल ह्यांचा अगदीं क्षय होत चालला व त्या जलचर नक्राची उत्साहशक्ति, शरीरसामर्थ्य आणि इंद्रियबळ हीं सर्व वृद्धिंगत होत चाललीं ॥ ३० ॥ हेराजा, ह्याप्रमाणें दैवगतीनें नक्राच्या कचाट्यांत सांपडून आप-

---

दीनधियः करेणवस्तं केवलं विचुक्रुशुः ॥ २८ ॥ २९ ॥ मन उत्साहशक्तिर्बलं शारीरमोज ऐंद्रियं तेषाम् । सकलं बलादि । विपर्ययो विपरीतमधिकम् । जलौकसो ग्राहस्य ॥ ३० ॥ स इत्थं यदा प्राणस्य संकटमाप । यतो देही ॥ ३१ ॥ बुद्धिमेवाह । न मामिति । अहं न च प्रभवामि यतो ग्राहरूपेण केवलं विधातुः पाशेनावृतस्त

तथातुरं यूथपतिं करेणवो विक्रुष्यमाणं तरसा बलियसा ॥ विचुक्रुशुर्दीनधियोऽपरे गजाः पार्ष्णिग्रहास्तारयितुं न चाशकन् ॥ २८ ॥ नियुध्यतोरेवमिभेंद्रनक्रयोर्विकर्षतोरंतरतो बहिर्मिथः ॥ समाः सहस्रं व्यगमन्महीपते सप्राणयोश्चित्रममंसतामराः ॥ २९ ॥ ततो गजेंद्रस्य मनोबलौजसां कालेन दीर्घेण महानभूद्व्ययः ॥ विक्रुष्यमाणस्य जलेऽवसीदतो विपर्ययोऽभूत्सकलं जलौकसः ॥ ३० ॥ इत्थं गजेंद्रः स यदाऽऽप संकटं प्राणस्य देही विवशो यदृच्छया ॥ अपारयन्नात्मविमोक्षणे चिरं दध्याविमां बुद्धिमथाभ्यपद्यत ॥ ३१ ॥ न मामिमे ज्ञातय आतुरं गजाः कुतः करिण्यः प्रभवंति मोचितुम् ॥ ग्राहेण पाशेन विधातुरावृतोऽप्यहं च तं यामि परं परायणम् ॥ ३२ ॥ यः कश्चनेशो बलिनोऽतकोरगात्प्रचंडवेगादभिधावतो भृशम् ॥ भीतं प्रपन्नं परिपाति यद्भयान्मृत्युः प्रधावत्यरणं तमीमहि ॥ ३३ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे अष्टमस्कंधे मन्वंतरानुवर्णने गजेंद्रोपाख्याने द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥ ॥

थाऽपि तं परं परमेश्वरं परेषां ब्रह्मादीनामयनमाश्रयभूतं शरणं यामि ॥ ३२ ॥ कोऽसौ यं शरणं यासि तत्राह । यः कश्चनेति । अतंक एवोरगस्तस्मात् । तं शरणमीमहि व्रजेम । यद्भयादित्यत्र श्रुतिः । भीषाऽस्माद्वातः पवते ॥ भीषोदेति सूर्यः ॥ भीषाऽस्मादग्निश्चेंद्रश्च ॥ मृत्युर्धावति पंचम इति ॥ ३३ ॥ इति श्रीमद्भागवते अष्टमस्कंधे टीका-

---

णाला सोडविण्यास असमर्थ झालेला तो देहधारी गजेंद्र जेव्हां प्राणाचें संकट (प्राण वाचण्याविषयींहि संशय) पावला तेव्हां तो आपली सुटका होण्याविषयीं बहुकाल विचार करित असतां, त्याला एकाएकीं, अशी बुद्धि उत्पन्न झाली कीं– ॥ ३१ ॥ केवल नक्ररूप दैवपाशानें मी बद्ध झालों आहें, ह्मणून मज आतुराला या पाशांतून सोडविण्यास हे ज्ञातिसंबंधी गज समर्थ नाहींत व मीहि समर्थ नाहीं· मग या हत्तिणी कोठून समर्थ होणार? होणारच नाहींत· यास्तव आतां मी ब्रह्मादिकांना हि आश्रयभूत अशा त्या परमेश्वरालाच शरण जातों ॥ ३२ ॥ कारण, असह्यवेगानें युक्त, चोहोंकडून येत असलेला आणि महाबलिष्ठ अशा मृत्युरूप महाभुजंगापासून अत्यंत भिऊन शरण आलेल्या जनाचें जो कोणीएक ईश्वर रक्षण करितो व ज्याच्या भयानें प्राण्यांना मारण्याकरितां मृत्युसुद्धां ठिकठिकाणीं धांवत असतो त्यालाच आह्मीं शरण जातों ॥ ३३ ॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील अष्टमस्कंधापैकीं मन्वंतरानुवर्णनांतर्गत गजेंद्रोपाख्यानसंबंधीं हरिस्मरणनामक हा दुसरा अध्याय समाप्त जाहला ॥२॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां ह्या तिसऱ्या अध्यायामध्यें गजेंद्रानें स्तुति केली असतां, श्रीहरीनें तेथें येऊन त्या गजेंद्राला नक्रापासून सोडविलें व त्या नक्रालाहि देवलऋषीच्या शापापासून मुक्त केलें अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हेपरिक्षित् राजा, ह्याप्रमाणें निश्चय केलेल्या गजेंद्रानें, बुद्धीनें आपलें मन हृदयामध्यें स्थिर करून, इंद्रद्युम्न-संज्ञक पूर्वजन्मामध्यें अभ्यास केलेल्या सर्वोत्कृष्ट स्तोत्राचा जप केला ॥ १॥ गजेंद्र ह्मणाला–ज्या चिद्रूपी परमात्म्यापासून हें देहादिक सचेतन होतें, त्या कारणरूपानें देहामध्यें प्रविष्ट असलेल्या षड्गुणैश्वर्यसंपन्न व प्रकृतिपुरुषरूप परमेश्वराला आह्मीं केवल मनामध्यें नमस्कार करितों ॥२॥ आतां अध्यायसमाप्तीपर्यंत परमेश्वरत्वाचेंच स्पष्टीकरण करण्या-च्या अभिप्रायानें गजेंद्र ह्मणतो कीं,– ज्याचेठिकाणीं हें विश्व स्थित आहे, ज्याच्यापासून हें उत्पन्न झालें आहे, ज्यानें हें केलें आहे, जो स्वतःच हें आहे आणि जो ह्या कार्यापा-

---

यां द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥ ॥ तृतीये तु गजेंद्रेण स्तुतो हरिरुपेत्य तम् ॥ समुद्दधार तं ग्राहाद्ग्राहं देवलशापतः ॥ १ ॥ जाप्यं जप्यं स्तोत्रम् । प्राग्जन्मनि इंद्रद्युम्नसंज्ञे ॥ १ ॥ तस्मै नमो नमनमभिधीमह्यभिध्यायेम केवलम् । ग्राहगृहीतत्वेन कायप्रणतेरशक्यत्वात् । स्वस्य तज्ज्ञानं संभावयितुं विशिनष्टि। यतश्चिद्रूपादेतद्देहादि चिदात्मकं चेतनं भवति । तदुक्तम् । येन चेतयते विश्वमिति । तत्र हेतुः । पुरुषाय पूर्षु कारणत्वेन प्रविष्टाय । ननु प्रकृतिपुरुषौ कारणमिति प्रसिद्धं तत्राह । आदिः प्रकृतिर्बीजं पुरुषस्तद्रूपा-य । प्रविष्टत्वेऽपि जीववत्पारतंत्र्यं वारयति । परेशायेति ॥ २ ॥ परमैश्वर्यं विवृण्वन्नाह । यावत्समाप्ति । यस्मिन्नधिष्ठाने यत उपादानाद्येन कर्त्रा यश्च स्वयमेवेदं विश्वं भवति ।

श्रीशुक उवाच ॥ एवं व्यवसितो बुद्ध्या समाधाय मनो हृदि ॥ जजाप परमं जाप्यं प्राग्जन्मन्यनुशिक्षितम् ॥ १ ॥ गजेंद्र उवा-च ॥ ॐनमो भगवते तस्मै यत एतच्चिदात्मकम् ॥ पुरुषायादिबीजाय परेशायाभिधीमहि ॥ २ ॥ यस्मिन्निदं यतश्चेदं येनेदं य इदं स्वयम् ॥ योऽस्मात्परस्माच्च परस्तं प्रपद्ये स्वयंभुवम् ॥ ३ ॥ यः स्वात्मनीदं निजमाययाऽर्पितं क्वचिद्विभातं क्व च तत्तिरोहितम् ॥ अविद्धदृक्साक्ष्युभयं तदीक्षते स आत्ममूलोऽवतु मां परात्परः ॥४॥ कालेन पंचत्वमितेषु कृत्स्नशो लोकेषु पालेषु च सर्वहेतुषु ॥ तमस्तदासीद्गहनं गभीरं यस्तस्य पारेऽभिविराजते विभुः ॥ ५ ॥

अस्मात्कार्यात्परस्मात्कारणाच्च यः परस्तं स्वयंभुवं स्वतःसिद्धं प्रपद्ये शरणं व्रजामि ॥ ३ ॥ विश्वहेतुत्वं स्वतःसिद्धत्वं चोक्तमिदानीं विश्वप्रकाशकत्वं स्वप्रकाशत्वं च वर्णयन्प्रार्थयते । यः स्वात्मनीति । विभातमभिव्यक्तं सत्क्वचित्प्रलये तिरोहितं लीनं सत् । तदुभयं कार्यं कारणं च साक्षी सन्नीक्षते । साक्षित्वे हेतुः अविद्धदृगलुप्तदृष्टिः । आत्ममूलः स्वयंप्रकाशः । कुतः । परात्प्रकाशकाच्चक्षुरादेरपि परस्तस्यापि प्रकाशक इत्यर्थः। चक्षुषश्चक्षुरित्यादिश्रुतेः ॥ ४ ॥ तिरोहित-मीक्षत इत्येतत्प्रपंचपूर्वकं दुर्ज्ञेयत्वं वदन्प्रार्थयते। कालेनेति द्वाभ्याम् । पंचत्वमितेषु नाशं प्राप्तेषु । गहनं दुरवगाहम् । गभीरमनंतम् । तस्य तमसः । आदित्यवर्णं

सून व महत्तत्त्वादि कारणांपासून भिन्न आहे, त्या स्वतःसिद्ध परमेश्वराला मी शरण जातों ॥ ३ ॥ ह्याप्रमाणें ईश्वर हा स्वतःसिद्ध असून विश्वाला कारण आहे असें सांगितलें. आतां तो स्वयंप्रकाश असून जगत्प्रकाशक आहे हें वर्णन करीत प्रार्थना करितो कीं,– जो साक्षिरूपी भगवान्, स्वतःचेठिकाणीं स्वमायेनें रचिलेलें असून कधींकधीं सृष्टिसम-यीं प्रकट होणारें व कधींकधीं 'प्रलयकालीं' लीन होणारें असें हें दोन्हींप्रकारचें कार्यकारणात्मक विश्व, आपल्या अलुप्त दृष्टीनें अवलोकन करितो तो परप्रकाश्य अशा नेत्रादिकांचाहि प्रकाशक व स्वयंप्रकाश, असा परमात्मा, माझें रक्षण करो ॥ ४ ॥ आतां लीन असलेलें विश्व अवलोकन करितो असें जें सांगितलें त्याचेंच प्रथमतः विवरण करून ईश्वराचें दुर्ज्ञेयत्व कथन करीत प्रार्थना करितो कीं,– प्रळयकालीं सर्व लोक, त्या लोकांचे पालक व त्यांचीं सर्व कारणें हीं कालाच्या योगानें नाश पावलीं असतां, त्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वेळीं, प्रवेश करण्यास अशक्य व अपार असा अंधकार होता त्याच्या पलीकडेहि जो सर्वव्यापक प्रभु विराजमान होत असतो ॥ ५ ॥ ज्याचें स्वरूप देव व ऋषि हेदेखील जाणत नाहींत त्याला जाणण्यास अथवा वर्णन करण्यास अलीकडचा प्राणी कोण बरें समर्थ होणार आहे? कोणीच होणार नाहीं. यास्तव जसें नानाप्रकारचे वेष धारण करून रंगभूमीवर क्रीडा करणाऱ्या नटाचें स्वरूप लोकांस समजत नाहीं त्याप्रमाणें ज्याचें चरित्र दुर्गम आहे तो परमेश्वर माझें रक्षण करो ॥ ६ ॥ तर मग त्यालाच जाणलें असतां मोक्ष प्राप्त होतो ही श्रुति कशी आहे? अशी आशंका घेऊन त्याला जाणण्याचा उपाय कथन करीत भाषण करितो कीं,– अत्यंत सदाचारसंपन्न, निःसंग, भूतांचे ठिकाणीं आत्मदृष्टि ठेवणारे व सर्वांचें हित करणारे असे मुनि, ज्याचें परम मंगलकारक स्वरूप पाहण्याच्या इच्छेनें वनामध्यें राहून निरंतर ब्रह्मचर्यादिव्रतें आचरण करितात

तमसः परस्तादिति श्रुतेः ॥ ५ ॥ अतएव देवादयो यस्य स्वरूपं न विदुः । जंतुरर्वाचीनः कोऽपि गंतुं ज्ञातुमीरितुं वक्तुं वा । दुरत्ययं दुर्गममनुक्रमणं चरितं कथनं वा यस्य सः । मा माम् ॥ ६ ॥ कथं तर्हि तमेव विदित्वाऽतिमृत्युमेतीत्यादिश्रुतिरित्याशंक्य तज्ज्ञानोपायं कथयन्नाह । दिदृक्षव इति । अलोकव्रतं ब्रह्मचर्यादि । अव्रणमच्छिद्रम् । भूतानामात्मभूता भूतेष्वात्मदृष्टयः संतः । स मे गतिरस्तु ॥ ७॥ दुरत्ययानुक्रमणत्वं प्रपंचयन्प्रणमति । न विद्यत इत्यादिना । लोकानामप्ययः प्रलयः संभवो जन्म तयोर्द्वंद्वे-

नयस्य देवा ऋषयः पदं विदुर्जंतुः पुनः कोऽर्हति गंतुमीरितुम् ॥ यथा नटस्याकृतिभिर्विचेष्टतो दुरत्यया नुक्रमणः स माऽवतु ॥ ६ ॥ दिदृक्षवो यस्य पदं सुमंगलं विमुक्तसंगा मुनयः सुसाधवः ॥ चरंत्यलोकव्रतमव्रणं वने भूतात्मभूताः सुहृदः स मे गतिः ॥ ७ ॥ न विद्यते यस्य च जन्म कर्म वा न नामरूपे गुणदोष एव वा ॥ तथापि लोकाप्ययसंभवाय यः स्वमायया तान्यनुकालमृच्छति ॥ ८ ॥ तस्मै नमः परेशाय ब्रह्मणेऽनंतशक्तये ॥ अरूपायोरुरूपाय नम आश्चर्यकर्मणे ॥ ९ ॥ नम आत्मप्रदीपाय साक्षिणे परमात्मने ॥ नमो गिरां विदूराय मनसश्चेतसामपि ॥१०॥ सत्वेन प्रतिलभ्याय नैष्कर्म्येण विपश्चिता ॥ नमः कैवल्यनाथाय निर्वाणसुखसंविदे ॥ ११ ॥ नमः शांताय घोराय मूढाय गुणधर्मिणे ॥ निर्विशेषाय साम्याय नमो ज्ञानघनाय च ॥ १२ ॥

क्ययम् । तदर्थं यस्तानि जन्मादीनि स्वीकरोति तस्मै नम इत्युत्तरेणान्वयः ॥ ८ ॥ ब्रह्मणेऽरूपाय । अनंतशक्तये उरुरूपाय अत आश्चर्याणि कर्माणि यस्य तस्मै परेशाय नमः ॥ ९ ॥ आत्मप्रदीपाय प्रकाशांतरस्याविषयाय । कुतः । साक्षिणे प्रकाशकाय । परमात्मने जीवनियंत्रे । अतएव गिरां विदूरायाप्राप्याय । चेतसां चित्तवृत्तीनाम् । तथाच श्रुतिः । यतो वाचो निवर्तंते अप्राप्य मनसा सहेति ॥ १० ॥ एवमपि विपश्चिता निपुणेन । नैष्कर्म्येण संन्यासेन । सत्त्वेन शुद्धेन । संन्यासयोगाद्यतयः शुद्धसत्त्वा इति श्रुतेः । प्रतिलभ्याय प्रत्यक्त्वेन प्राप्याय । निर्वाणसुखसंविदे मोक्षानंदानुभूतये ॥ ११ ॥ गुणधर्मिणे सत्वादिधर्मानुकारिणे । ज्ञानघनाय चेति निर्विशेषत्वेऽपि प्रधानवैल-

---

तोच माझी गति असो ॥ ७ ॥ आतां ईश्वराचें चरित्र दुर्गम कसें हें सविस्तर कथन करीत प्रणाम करितो कीं, –ज्याला जन्म, कर्म, नाम, रूप, गुण अथवा दोष ह्यापैकीं कांहींएक नसूनहि जो वेळोवेळीं लोकांच्या जन्ममरणाकरितां आपल्या मायेच्या योगानें त्या जन्मकर्मादिकांचा स्वीकार क रितो, जो ब्रह्मस्वरूप असल्यामुळें रूपरहित आहे, जो अनंतशक्ति असल्यामुळें बहुरूपी आहे आणि ज्याचीं कर्में आश्चर्यकारक आहेत त्या परमेश्वराला वारंवार नमस्कार असो ॥ ८ ॥ ९ ॥ तसाच जो दुसऱ्यांच्या प्रकाशांना विषय न होतां स्वयंप्रकाश असून सर्वांचा प्रकाशक आहे त्या वाणींना, मनाला व चित्तवृत्तींना अगोचर अशा परमात्म्याला वारंवार नमस्कार असो ॥ १० ॥ निपुण संन्यासानें शुद्धचित्त झालेल्या पुरुषांना ज्याची प्राप्ति होतये त्या आनंदानुभवरूप मोक्षाधिपति परमेश्वराला नमस्कार असो ॥ ११ ॥ तसाच शांत, भयंकर, व मूढ अशा सत्वादि

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

गुणधर्मांचें अनुकरण करणारा, भेदशून्य, सर्वत्र साम्यस्थितीनें वर्तणारा आणि ज्ञानस्वरूप असा जो परमात्मा त्याला नमस्कार असो ॥ १२ ॥ त्याचप्रमाणें क्षेत्रज्ञ, सर्वाध्यक्ष सर्वसाक्षी, सकल जीवांस मूलकारणभूत आणि सर्वांच्या पूर्वींच विद्यमान असल्यामुळें मायेच्याहि उत्पत्तीस कारण अशा तुला नमस्कार असो ॥ १३ ॥ तसाच जो सर्व इंद्रियांच्या विषयांस पाहणारा आहे, विषयांचेठिकाणीं ज्याचा सद्रूप आभास आहे, प्रतिबिंबानें सूचित होत असलेल्या बिंबाप्रमाणें जो मिथ्याभूत असलेल्या अहंकारादि प्रपंचानें सूचित होत आहे आणि ज्याचें सर्व इंद्रियवृत्तींच्या योगानें ज्ञान होत आहे त्या तुला नमस्कार असो ॥ १४ ॥ जसें महासागरामध्यें सर्वप्रवाहांचें पर्यवसान होतें तसें ज्याचे

ण्यमुक्तम् ॥ १२ ॥ साक्षिण इति सर्वाध्यक्षत्वेऽपि निर्विकारत्वमुक्तम् । आत्मनां क्षेत्रज्ञानां मूलाय । मूलस्य प्रधानस्यापि प्रकृतये उद्भवहेतवे । तत्र हेतुः । पुरुषाय पूर्वमेव सते । तथाच श्रुतिः । पूर्वमेवाहमिहासमिति तत्पुरुषस्य पुरुषत्वमिति । पूर्णायेति वा ॥ १३ ॥ सर्वेंद्रियाणां ये गुणा विषयास्तेषां द्रष्ट्रे । सर्वे प्रत्यया इंद्रियवृत्तयो हेतवो ज्ञापका यस्य तस्मै । तदेवाह । असताऽहंकारादिप्रपंचेन । छाययाऽसद्रूपया उक्ताय प्रतिबिंबेन बिंबमिव सूचिताय । तत्र हेतुः । सद्रूपो विषयेष्वाभासो यस्य तस्मै । तदुक्तं तृतीये । यथा जलस्थ आभास इत्यादिना । पाठांतरे असत्यस्य छाययाऽध्यासेनोक्ताय युक्ताय तदधिष्ठानायेत्यर्थः ॥ १४ ॥ अखिलकारणाय सर्वकारणरूपाय । अतएव स्वयं निष्कारणाय । कारणत्वेऽपि मृदादिवद्विकारं वारयति । अद्भुतकारणायेति । एवंभूतत्वे प्रमाणमाह । सर्वे आगमाः पंचरात्रादय आम्नायाश्च वेदास्तेषां महार्णवाय स्रोत-

क्षेत्रज्ञाय नमस्तुभ्यं सर्वाध्यक्षाय साक्षिणे ॥ पुरुषायात्ममूलाय मूलप्रकृतये नमः ॥ १३ ॥ सर्वेंद्रियगुणद्रष्ट्रे सर्वप्रत्ययहेतवे ॥ असता छाययोक्ताय सदाभासाय ते नमः ॥ १४ ॥ नमो नमस्तेऽखिलकारणाय निष्कारणायाद्भुतकारणाय ॥ सर्वागमाम्नायमहार्णवाय नमोऽपवर्गाय परायणाय ॥ १५ ॥ गुणारणिच्छन्नचिदूष्मपाय तत्क्षोभविस्फूर्जितमानसाय ॥ नैष्कर्म्यभावेन विवर्जितागमस्वयंप्रकाशाय नमस्करोमि ॥ १६ ॥ मादृक्प्रपन्नपशुपाशविमोक्षणाय मुक्ताय भूरिकरुणाय नमोऽलयाय ॥ स्वांशेन सर्वतनुभृन्मनसि प्रतीतप्रत्यग्दृशे भगवते बृहते नमस्ते ॥ १७ ॥

सामिव पर्यवसानस्थानाय । अपवर्गाय मोक्षरूपाय । अतः परायणायोत्तमानामाश्रयाय ॥ १५ ॥ गुणा एवारणि स्तया छन्नश्चिदूष्मपो ज्ञानाग्निस्तस्मै । तेषां गुणानां क्षोभे कार्ये विस्फूर्जितं बहिर्वृत्तिकं मानसं यस्य । सोऽकामयत बहुस्यामिति श्रुतेः । नैष्कर्म्यमात्मतत्त्वं तस्य भावेन भावनया विवर्जिता अगमा विधिनिषेधलक्षणा यैस्तेषु स्वयमेव प्रकाशो यस्य तस्मै ॥ १६ ॥ मादृक् मद्विधश्चासौ प्रपन्नः पशुस्तस्य पाशोऽविद्या तस्य विशेषेण मोक्षणं येन । तत्र योग्यतामाह । मुक्ताय । मोचने हेतुः । भूरिः करुणा यस्य । अतस्तत्रार्थेऽलयायानलसाय । स्वांशेनांतर्यामिरूपेण सर्वेषां तनुभृतां मनसि प्रतीता प्रख्याता या प्रत्यक् दृक्तस्मै । तथाच श्रुतिः । य आत्मनि तिष्ठन्नात्मानमंतरो यमयतीति । भगवते सर्वेषां तनुभृतां नियमने समर्थाय । तेषां मनःस्थितत्वेऽपि बृहतेऽपरिच्छिन्नाय ॥ १७ ॥

ठिकाणीं सर्वआगमांचें व वेदांचें पर्यवसान होत आहे, जो सर्व कारणरूप असून स्वतः निष्कारण आहे, असें असूनहि मृत्तिकादिकांसारखा विकार नसल्यामुळें जो अद्भुतकारणरूप आहे आणि मोक्षरूप असल्यामुळें जो उत्तम जनांना आश्रयभूत आहे त्या तुला नमस्कार असो ॥ १५ ॥ तसाच जो गुणरूप अरणीनें आच्छादित झालेला ज्ञानाग्निरूप आहे, ज्याचें मन त्या गुणांच्या क्षोभरूप कार्याचेठिकाणीं बहिर्वृत्ति झालें आहे आणि आत्मतत्त्वभावनेनें विधिनिषेधरूप आगमांचा त्याग करणाऱ्या ज्ञानिजनांचेठिकाणीं ज्याचा स्वतःच प्रकाश होत आहे त्याला मी नमस्कार करितों ॥ १६ ॥ त्याप्रमाणें, जो अतिदयाळू असल्यामुळें भक्तांचें संकट निवारण करण्याविषयीं आलस्यरहित आहे, जो

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मुक्त असल्यामुळें मजसारिख्या शरणागत पशूंच्या अज्ञानरूप पाशाचा समूल नाश करण्यास योग्य आहे, जो अंतर्यामिरूपानें सर्व देहधारी प्राण्यांच्या मनामध्यें प्रख्यात असलेला आंतरज्ञानरूपी असूनहि अपरिच्छिन्न आहे आणि जो सर्व प्राण्यांचें नियमन करण्यास समर्थ आहे त्या तुला नमस्कार असो ॥ १७ ॥ तसाच जो गुणसंगरहित असल्यामुळें अंतःकरणामध्यें असूनहि देह, पुत्र, आप्त, गृह, वित्त आणि सेवकजन ह्यांचेठिकाणीं आसक्त असलेल्या पुरुषांना प्राप्त होण्यास अशक्य आहे व ह्मणूनच देहादिकां-विषयीं आसक्त नसलेल्या ज्ञानिजनांनीं ज्याचें आपल्या हृदयामध्यें ज्ञानरूप, अचिंत्य ऐश्वर्यांनीं युक्त आणि सर्वनियंता अशा प्रकारें निरंतर चिंतन केलें आहे त्या परमेश्वराला नमस्कार असो ॥ १८ ॥ ज्याची सेवा करीत असलेले धर्म, अर्थ, काम अथवा मोक्ष ह्यांची इच्छा करणारे पुरुष इच्छित फळ प्राप्त करून घेतात इतकेंच नाहीं तर जो भगवान्

अंतःस्थत्वेऽपि देहादिष्वासक्तैर्दुष्प्रापणाया प्रुमशक्याय । तत्र हेतुः । गुणसंगेन विवर्जिताय । अतएव मुक्तात्मभिर्देहादिष्वनासक्तैश्चिंतिताय । तैः परिभावितं रूपमाह । ज्ञानात्मन इत्यादि ॥ १८ ॥ इष्टां गतिं कामितं धर्मादि फलं प्राप्नुवंत्येव न तु तावदेव किंतु यास्तैरकामिता अन्या अप्याशिषो राति । देहमप्यव्ययं राति । एवं योऽदभ्रदयः स मे विमोक्षणमेव केवलं करोतु नाधिकं प्रार्थये ॥ १९ ॥ एतावदप्यहं भक्तिसुखानभिज्ञत्वेन वांछामि । यस्यैकांतभक्ता न कंचिदर्थं वांछंति परेशं परमे-

आत्मात्मजाप्तगृहवित्तजनेषु सक्तैर्दुष्प्रापणाय गुणसंगविवर्जिताय ॥ मुक्तात्मभिः स्वहृदये परिभाविताय ज्ञानात्मने भगवते नम ई-श्वराय ॥ १८ ॥ यं धर्मकामार्थविमुक्तिकामा भजंत इष्टां गतिमाप्नुवंति ॥ किं त्वाशिषो रात्यपि देहमव्ययं करोतु मेऽदभ्रदयो वि-मोक्षणम् ॥ १९ ॥ एकांतिनो यस्य न कंचनार्थं वांछंति ये वै भगवत्प्रपन्नाः ॥ अत्यद्भुतं तच्चरितं सुमंगलं गायंत आनंदसमुद्रम-ग्नाः ॥ २० ॥ तमक्षरं ब्रह्म परं परेशमव्यक्तमाध्यात्मिकयोगगम्यम् ॥ अतींद्रियं सूक्ष्ममिवातिदूरमनंतमाद्यं परिपूर्णमीडे ॥ २१ ॥ यस्य ब्रह्मादयो देवा वेदा लोकाश्चराचराः ॥ नामरूपविभेदेन फल्ग्व्या च कलया कृताः ॥ २२ ॥ यथाऽर्चिषोऽग्नेः सवितुर्गभस्तयो निर्यांति संयात्यसकृत्स्वरोचिषः ॥ तथा यतोऽयं गुणसंप्रवाहो बुद्धिर्मनः खानि शरीरसर्गाः ॥ २३ ॥

श्वरमीडे स्तौमीत्युत्तरेणान्वयः । तेषां निष्कामत्वे हेतुः । ये वै भगवतः सर्वज्ञान्मुक्तान्प्रपन्नाः सेवितवंतः ॥ २० ॥ अत्यद्भुतसुमंगलत्वप्रदर्शनार्थमक्षरत्वादीनि विशेषणानि ॥ २१ ॥ परिपूर्णत्वं प्रदर्शयन्नाह त्रिभिः । यस्य फल्ग्व्या च स्वल्पयैव कलयांऽशेन कृताः स जयतादिति तृतीयेनान्वयः ॥ २२ ॥ कथं कृता इत्यपेक्षायां दृष्टांतौ । यथाऽर्चिषोऽग्नेरिति प्रवाहे दृष्टांतः । सवितुर्गभस्तय इत्यानंत्ये । निर्यांत्युद्गच्छंति । संयांति लीयंते । गुणसंप्रवाहमेवाह । बुद्धिर्मन इति । खानि करणानि शरीरसर्गाः कार्य-

---

त्यांनीं न इच्छिलेलेहि भोग व सदृढ देह त्यांना देत असतो तो अत्यंत दयाळू परमात्मा माझी मुक्तता करो ॥ १९ ॥ हेंतरी मी भक्तिसुखाविषयीं अनभिज्ञ असल्यामुळें मागत आहें. परंतु ज्यांनीं सर्वज्ञ अशा मुक्तपुरुषांची सेवा केली आहे असे ज्याचे एकनिष्ठ भक्त, चतुर्विध पुरुषार्थांमध्यें कोणत्याहि अर्थाची इच्छा करीत नाहींत आणि अतिशय आश्चर्यकारक व मंगलकारक असें त्या भगवंताचें चरित्र गायन करीत होत्साते आनंदसागरामध्यें निमग्न होतात तो जो अविनाशी सर्वव्यापी, सर्वोत्कृष्ट, ब्रह्मादिकांचाहि नियंता, अव्यक्त, अध्यात्मिकयोगानें प्राप्त होणारा, सूक्ष्म असल्यानें अतिदूर वस्तूप्रमाणें इंद्रियगोचर न होणारा, विनाशरहित, सर्वांच्या पूर्वीं विद्यमान आणि परिपूर्ण असा परमात्मा त्याचें मी स्तवन करितों ॥ २० ॥ २१ ॥ ज्याच्या अगदीं स्वल्प अंशानें ब्रह्मादिदेव, वेद व चराचरात्मक लोक हे सर्व नामरूपभेदेंकरून उत्पन्न झाले आहेत ॥ २२ ॥ जशा अग्नीच्या ज्वाळा अथवा सूर्याचीं किरणें हीं वरचेवर त्यांच्यापासून उत्पन्न होऊन फिरून त्यांचेठिकाणीं लीन होतात तसा बुद्धि, मन, इंद्रियें आणि शरीरें हा गुणप्रवाह

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

 ज्या स्वयंप्रकाश परमात्म्यापासून उत्पन्न होतो जो परमात्मा, देव नव्हे, असुर नव्हे, मानव नव्हे, पशुपक्षी नव्हे, स्त्री नव्हे, नपुंसक नव्हे, पुरुष नव्हे, अथवा कोणीहि प्राणी नव्हे
गुण, कर्म, कार्य व कारण ह्यांपैकीं कांहींच नव्हे, सर्वांचा बाध झाला असतां जो अवशिष्ट राहतो आणि जो मायेनें सर्वात्मक आहे, तो परमेश्वर मला मुक्त करण्याकरितां
प्रकट होवो ॥ २३ ॥ २४ ॥ आतां वारंवार आपली मुक्तता होण्याविषयीं प्रार्थना करीत असल्यामुळें हा नक्रापासूनच मुक्त होण्याकरितां प्रार्थना करीत आहे, अशी शंका
 न यावी ह्मणून आपला अभिप्राय दर्शवितो कीं,– ह्या नक्रापासून देहाची मुक्तता होऊन वांचण्याची मी इच्छा करित नाहीं. कारण आंत व बाहेर अविवेकानें व्याप्त असलेल्या
ह्या हत्तीच्या जातीचें मला येथें काय बरें प्रयोजन आहे? कांहींच नाहीं. तर कालेंकरून ज्याचा नाश होत नाहीं त्या आत्मप्रकाशाला अच्छादित करणाऱ्या अज्ञानाची निवृ-

---

देहप्रवाहाश्च यतो भवंति सः ॥ २३ ॥ अतएव देवादीनां मध्ये कोऽपि न भवति । न जंतुर्लिंगत्रयशून्यं प्राणिमात्रमपि किंतु सर्वस्य निषेधेऽवधित्वेनावशिष्यत इति नि-
षेधशेषो मायया अशेषोऽशेषात्मकश्च जयतान्मद्विमोक्षणायाविर्भवतु ॥ २४ ॥ न च ग्राहाच्छरीरस्य मोक्षणेनाहं जीवितुमिच्छामि । तत्र हेतुः । अमुया अंतर्बहिश्चाविवेक-
व्याप्तया गजजात्या किं प्रयोजनम् । आत्मलोकस्यात्मप्रकाशस्य यदावरणमज्ञानं तस्यैव तु मोक्षमिच्छामि । यस्य मोक्षस्य कालेन नाशो नास्ति । यद्वा । देहस्य बंधो-

स वै न देवासुरमर्त्यतिर्यङ्न स्त्री न षंढो न पुमान्न जंतुः ॥ नायं गुणः कर्म न सन्न चासन्निषेधशेषो जयतादशेषः ॥ २४ ॥ जि-
जीविषे नाहमिहामुया किमंतर्बहिश्चावृतयेभयोन्या ॥ इच्छामि कालेन न यस्य विप्लवस्तस्यात्मलोकावरणस्य मोक्षम् ॥ २५ ॥ सो
ऽहं विश्वसृजं विश्वमविश्वं विश्ववेदसम् ॥ विश्वात्मानमजं ब्रह्म प्रणतोऽस्मि परं पदम् ॥ २६ ॥ योगरंधितकर्माणो हृदि योगवि-
भाविते ॥ योगिनो यं प्रपश्यंति योगेशं तं नतोऽस्म्यहम् ॥ २७ ॥ नमो नमस्तुभ्यमसह्यवेगशक्तित्रयायाखिलधीगुणाय ॥ प्रपन्न-
पालाय दुरंतशक्तये कदिंद्रियाणामनवाप्यवर्त्मने ॥ २८ ॥

देहनाशे नश्येदेव किं तन्मोक्षप्रार्थनेन । आत्मलोकावरणस्य तु कालेन विप्लवो नास्ति ज्ञानैकनिवर्त्यत्वात् । अतस्तस्यैव मोक्षमिच्छामीत्यर्थः ॥ २५ ॥ सोहं मुमुक्षुः विश्वं
विश्वरूपम् । अविश्वं विश्वव्यतिरिक्तं च । विश्वं वेदो धनमुपकरणं यस्य तम् । विश्वस्यात्मानं च । केवलं प्रणतोऽस्मि न तु तं जानामि ॥ २६ ॥ योगं विना दुर्ज्ञेयत्वादि-
त्याह । योगेन भगवद्धर्मेण रंधितानि दग्धानि कर्माणि येषां ते यं प्रपश्यंति ॥ २७ ॥ तर्हि सर्वेऽपि योगमेव किं नास्थितास्तत्राह । नम इति द्वाभ्याम् । असह्यो वेगो रागा-
दिलक्षणो यस्य तथाभूतं शक्तित्रयं यस्य तस्मै । बहिश्चाखिलधियां सर्वेंद्रियाणां गुणाय शब्दादिरूपेण प्रतीयमानाय । अतः कदिंद्रियाणां कुत्सितानींद्रियाणि येषां तेषाम-

---

त्ति होण्याची मी इच्छा करितों ॥ २५ ॥ असो, असा केवल मुमुक्षु मी विश्वोपादक, जगन्मूर्ति, जगाहून निराळा, जगद्रूप क्रीडासाधनानें युक्त, जगदात्मरूप व जन्मादिविकार-
शून्य अशा उत्कृष्ट पदरूपी ब्रह्माला केवळ नम्र आहें ॥ २६ ॥ आतां योगावांचून भगवंताचें ज्ञान होणें अशक्य आहे असें दर्शवितो– भगवद्धर्मानें ज्यांचीं कर्में भाजलेल्या
बीजांप्रमाणें दग्ध झालीं आहेत ते योगिजन योगानें शुद्ध झालेल्या हृदयाचेठिकाणीं ज्याला अवलोकन करितात त्या योगेश्वराला मी नमस्कार करितों ॥ २७ ॥ असें जर
आहे तर सर्वहि जन, योगधारणच कां करीत नाहींत ह्या शंकेचा परिहार करण्याकरितां गजेंद्र भाषण करितो कीं,– ज्याच्या सत्त्वादि तिन्ही शक्तींचा वेग असह्य आहे, जो सर्व
इंद्रियांच्या शब्दादि विषयरूपानें बाह्यदृष्टचा प्रतीत होत आहे, विषयोन्मुख इंद्रियांनीं युक्त असलेल्या जनांना ज्याचा मार्ग उपलब्ध होत नाहीं, जो शरणागतांचा पालक

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आहे आणि ज्याच्या शक्तींचा अंत नाहीं त्या तुला नमस्कार असो ॥ २८ ॥ ज्याच्या मायेनें उत्पन्न झालेल्या अहंकाराच्या योगानें आच्छादित झालेल्या स्वरूपभूत आत्म्याला हा जन जाणत नाहीं आणि ज्याचा प्रभाव उल्लंघन करण्यास अशक्य आहे त्या भगवंताच्याच आश्रयानें मी राहिलों आहें ॥ २९ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हेपरिक्षित् राजा, ह्याप्रमाणें त्या गजेंद्रानें भेदशून्य अशा परमतत्त्वाचें वर्णन केलें असतां नानाप्रकारच्या आपआपल्या मूर्तिभेदांविषयीं अभिमान बाळगणारे ब्रह्मादिक देव, जेव्हां कोणीच त्याच्याजवळ प्राप्त होईनांत तेव्हां सर्वदेवमय असा भगवान् श्रीहरि तेथें प्रकट झाला ॥ ३० ॥ आणि तशाप्रकारें पीडित झालेल्या त्या गजेंद्राला जाणून व त्यानें केलेलें स्तोत्र श्रवण करून, तो जगन्निवास परमात्मा, वेदमय गरुडावर आरूढ जाहला आणि हस्तामध्यें चक्रायुध घेऊन, स्वतःचें स्तवन करीत असलेल्या देवांसहवर्तमान त्या-

---

नवाप्यं वर्त्म यस्य ॥ २८ ॥ यच्छक्त्या यस्य मायया या अहंधीस्तया हतमावृतमयं जनो न वेद । दुरत्ययं माहात्म्यं यस्य । तमित आश्रितोऽस्मि ॥ २९ ॥ उपवर्णितं निर्विशेषं मूर्तिभेदं विना परं तत्त्वं येन तम् । विविधा चासौ लिंगभिदा मूर्तिभेदस्तस्यामभिमानो येषां ते । अत एते यदा नोपजग्मुः । तत्र तदा । अखिलामरमयः सर्वदेवमयमूर्तिः ॥ ३० ॥ दिविजैर्देवैः सह । छंदोमयेनेति शैघ्र्यायोक्तम् ॥ ३१ ॥ खे दृष्ट्वा । उपात्तमुद्यतं चक्रं येन ॥ ३२ ॥ गरुडोऽपि मंदगतिरिति ततः सहसाऽवतीर्यारिणा चक्रेण विपाटितं मुखं यस्य । उच्छ्रियाणां देवानाम् ॥ ३३ ॥ इति श्रीमद्भागवते अष्टमस्कंधे तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥ ॥ ॥

नायं वेद स्वमात्मानं यच्छक्त्याऽहंधिया हतम् ॥ तं दुरत्ययमाहात्म्यं भगवंतमितोऽस्म्यहम् ॥ २९ ॥ श्रीशुक उवाच ॥ एवं गजेंद्रमुपवर्णितनिर्विशेषं ब्रह्मादयो विविधलिंगभिदाऽभिमानाः ॥ नैते यदोपससृपुर्निखिलात्मकत्वात्तत्राखिलामरमयो हरिराविरासीत् ॥३०॥ तं तद्वदार्तमुपलभ्य जगन्निवासः स्तोत्रं निशम्य दिविजैः सह संस्तुवद्भिः ॥ छंदोमयेन गरुडेन समुह्यमानश्चक्रायुधोऽभ्यगमदाशु यतो गजेंद्रः ॥ ३१ ॥ सोंऽतःसरस्युरुबलेन गृहीत आर्तो दृष्ट्वा गरुत्मति हरिं ख उपात्तचक्रम् ॥ उत्क्षिप्य सांबुजकरं गिरमाहकृच्छ्रान्नारायणाखिलगुरो भगवन्नमस्ते ॥३२॥ तं वीक्ष्य पीडितमजः सहसाऽवतीर्य सग्राहमाशु सरसः कृपयोज्जहार ॥ ग्राहाद्विपाटितमुखादरिणा गजेंद्रं संपश्यतां हरिरमूमुचदुच्छ्रियाणाम् ॥३३॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे अष्टमस्कंधे गजेंद्रमोक्षणे तृतीयोऽध्यायः ॥३॥ ॥

गजेंद्राच्या जवळ आला ॥ ३१ ॥ हे राजा त्यावेळीं सरोवरांमध्यें महाबलाढ्य नक्रानें पायांचेठिकाणीं धरिल्यामुळें पीडित झालेल्या त्या गजेंद्रानें, हातामध्यें चक्र घेऊन आकाशामध्यें गरुडावर आरूढ झालेल्या श्रीहरीला पाहून, भगवच्चरणाचेठिकाणीं अर्पण करण्याकरितां आपल्या शुंडाग्रानें कमळें घेऊन ती कमलांसहित शुंडा वर उचलून, " हेषड्गुणैश्वर्यसंपन्ना जगद्गुरो नारायणा तुला नमस्कार असो " अशी वाणी मोठ्या संकटानें उच्चारिली ॥ ३२ ॥ तेव्हां त्या पीडित झालेल्या गजेंद्राला अवलोकन करितांक्षणींच गरुडहि मंदगामी आहे अशा बुद्धीनें झटकर त्यावरून खालीं उतरून जन्मादिविकाररहित अशा श्रीहरीनें मोठ्या कृपेनें नक्रासहवर्तमान त्या गजेंद्राला सत्वर सरोवराच्या बाहेर काढिलें आणि चक्राच्या योगानें नक्राचें मुख विदारण करून सर्व देव पाहत असतां त्याला मुक्त केलें ॥ ३३ ॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील अष्टमस्कंधामध्यें गजेंद्रमोक्षकथननामक हा तिसरा अध्याय समाप्त जाहला ॥ ३ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ शुभं भवतु ॥ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां ह्या चवथ्या अध्यायामध्यें नक्र व गजेंद्र ह्या उभयतांपैकीं नक्र पुनरपि गंधर्व झाला व गजेंद्राला आपला पार्षद करून श्रीहरीनें आपल्या वैकुंठ स्थानाप्रत नेलें अशी-
कथा वर्णन केली आहे ॥ १ ॥ श्री शुकाचार्य ह्मणाला,-हे परिक्षिति राजा, त्या गजेंद्रमोक्षणसमयीं ब्रह्मरुद्रप्रभृति देव, ऋषि आणि गंधर्व हे श्रीहरीच्या त्या कर्माची प्रशं-
सा करीत करीत पुष्पवृष्टि करूं लागले ॥ १ ॥ देवांनीं वाजविलेल्या दुंदुभि वाजूं लागल्या, गंधर्व नृत्य व गायन करूं लागले आणि ऋषि, चारण व सिद्ध हे पुरुषोत्तमाची
स्तुति करूं लागले ॥ २ ॥ असो. तो जो नक्र होता तो पूर्वजन्मीं हूहूनामक श्रेष्ठ गंधर्व असून देवलमुनीच्या शापानें त्याला नक्राचें जन्म प्राप्त झालें होतें,तो तेसमयीं तत्काल
शापापासून मुक्त जाहला आणि आश्चर्यकारक रूप धारण करून अविनाशी, यशाचें केवळ आश्रयस्थानच असल्यामुळें वर्णनीयगुण व पवित्र कथा ह्यांनीं युक्त अशा श्रेष्ठकीर्ति

चतुर्थे तु तयोर्ग्राहः प्राप गंधर्वतां पुनः ॥ गजं स्वपार्षदं कृत्वा हरिर्निन्ये निजं पदम् ॥ १ ॥ १ ॥ २ ॥ हूहूसंज्ञो गंधर्वसत्तमः असौ देवलस्य शापेन ग्राहो जातः ।
स वै स तु ततः सद्यो मुक्तः सन्नुत्तमश्लोकमगायतेत्यन्वयः । एवं हीतिहासोत्तमे कथा । सरसि स्त्रीभिः क्रीडन्नसौ स्नातुं प्रविष्टं देवलं पादे प्रगृह्य विचकर्ष । स-

॥ श्रीशुक उवाच ॥ तदा देवर्षिगंधर्वा ब्रह्मेशानपुरोगमाः ॥ मुमुचुः कुसुमासारं शंसंतः कर्म तद्धरेः ॥ १ ॥ नेदुर्दुंदुभयो दिव्या
गंधर्वा ननृतुर्जगुः ॥ ऋषयश्चारणाः सिद्धास्तुष्टुवुः पुरुषोत्तमम् ॥ २ ॥ योऽसौ ग्राहः स वै सद्यः परमाश्चर्यरूपधृक् ॥ मुक्तो देव-
लशापेन हूहूर्गंधर्वसत्तमः ॥ ३ ॥ प्रणम्य शिरसाऽधीशमुत्तमश्लोकमव्ययम् ॥ अगायत यशोधाम कीर्तन्यगुणसत्कथम् ॥ ४ ॥
सोऽनुकंपित ईशेन परिक्रम्य प्रणम्य तम् ॥ लोकस्य पश्यतो लोकं स्वमगान्मुक्तकिल्बिषः ॥ ५ ॥ गजेंद्रो भगवत्स्पर्शाद्विमुक्तोऽज्ञान-
बंधनात् ॥ प्राप्तो भगवतो रूपं पीतवासाश्चतुर्भुजः ॥ ६ ॥ स वै पूर्वमभूद्राजा पांड्यो द्रविडसत्तमः ॥ इंद्रद्युम्न इति ख्यातो वि-
ष्णुव्रतपरायणः ॥ ७ ॥ स एकदाऽऽराधनकाल आत्मवान्गृहीतमौनव्रत ईश्वरं हरिम् ॥ जटाधरस्तापस आप्लुतोऽच्युतं समर्चया-
मास कुलाचलाश्रमः ॥ ८ ॥

च प्रकुपितो ग्राहो भवेति शशाप । तेन च प्रसादितः सन्नुवाच एवमेव गजेंद्रं गृह्णीष्व । ततश्च गजेंद्रमुद्धरन्हरिस्त्वामपि मोचयिष्यतीति ॥ ३ ॥ कथंभूतम्।
यशसो धाम आश्रयम् । अतः कीर्तन्याः कीर्तनीया गुणाः सती कथा च यस्य तम् ॥ ४ ॥ स्वं लोकं गंधर्वलोकम् ॥ ५ ॥ ६ ॥ ७ ॥ कुलाचले मलयाद्रावाश्रमो यस्य ॥ ८ ॥

परमेश्वराला मस्तकानें प्रणाम करून त्याचें महात्म्य गायन करूं लागला ॥ ३ ॥ ४ ॥ नंतर परमेश्वरानें त्यावर कृपा केली असतां तो हूहूनामक गंधर्व, त्या परमेश्वराला प्रद-
क्षिणा व नमस्कार करून सर्व लोकांसमक्ष तो गंधर्वलोकाप्रत निघून गेला ॥ ५ ॥ इकडे तो गजेंद्रहि भगवंताच्या स्पर्शामुळें अज्ञानरूप बंधनापासून मुक्त झाला आणि भगवंता-
च्या सारूप्याप्रत प्राप्त होऊन पीतांबरधारी व चतुर्भुज झाला ॥ ६ ॥ हे परीक्षित् राजा, तो गजेंद्र पूर्वजन्मीं द्रविडदेशनिवासी लोकामध्यें श्रेष्ठ आणि मुख्यत्वेंकरून विष्णुव्र-
ताचाच आश्रय करणारा इंद्रद्युम्न ह्या नांवानें प्रसिद्ध असा पांड्य देशाचा राजा होता ॥ ७ ॥ हे परीक्षिते, एकेवेळीं मलयपर्वतावर आपल्या आश्रमामध्यें राहत असलेला
तो जटाधारी तपोनिष्ठ इंद्रद्युम्न राजा, पूजेचा समय झाला असतां स्नान करून, अंतःकरणाचा निग्रह करून व मौनव्रत धारण करून सर्वसमर्थ आणि सर्वदुःखनिवारक
अशा अच्युत भगवंताचें पूजन करीत होता ॥ ८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तेव्हां शिष्यगणांनीं परिवेष्टित असा महायशस्वी अगस्त्य ऋषि, त्या इंद्रद्युम्न राजाच्या आश्रमामध्यें भगवदिच्छेनेंच प्राप्त झाला. त्यानें, राजा आपलें पूजनवगैरे न करितां
एकांतामध्यें स्वस्थ बसला आहे असें पाहून क्रुद्ध झाला ॥ ९ ॥ आणि त्यानें त्या इंद्रद्युम्न राजाला असा शाप दिला कीं,जसा हत्ती उद्धट बुद्धीनें युक्त असतो तसा
अशिक्षितबुद्धि हा दुष्ट दुरात्मा राजा, ब्राह्मणांचा अवमान करित आहे, यास्तव हा अत्यंत अज्ञानरूप अशा त्या गजयोनीलाच पावो ॥ १० ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा,
ह्याप्रमाणें शाप देऊन भगवान् अगस्त्य मुनि, अनुयायी शिष्यगणांसहवर्तमान निघून गेला असतां, इकडे राजर्षि इंद्रद्युम्नहि तें प्रारब्धकर्माचें फळ आहे असें जाणून–॥ ११ ॥
आत्मस्वरूपाच्या स्मृतीचा नाश करणाऱ्या गजयोनीला प्राप्त झाला परंतु हरिपूजेच्या प्रभावामुळें त्या गजयोनीमध्येंहि त्याला पुन्हा आत्मस्मृति प्राप्त झाली ॥ १२ ॥

तूष्णीं रहस्युपासीनं वीक्ष्य ॥ ९ ॥ शापमेवाह । असाधुरित्यादि । अकृताऽशिक्षिता बुद्धिर्यस्य । गजो यथा स्तब्धमतिस्तथैवायमतः स एव गज एव भ-
वत्विति शेषः ॥ १० ॥ दिष्टं दैवप्रापितं तदुपधारयन्नालोचयन् ॥ ११ ॥ कौंजरीं योनिमापन्नः । तर्हि पश्चात्कथं स्मृतिर्जाता तत्राह । हरेरर्चनस्यानुभावेनेति ॥ १२ ॥

यदृच्छया तत्र महायशा मुनिः समागमच्छिष्यगणैः परिश्रितः ॥ तं वीक्ष्य तूष्णीमकृतार्हणादिकं रहस्युपासीनमृषिश्चुकोप ह
॥ ९ ॥ तस्मा इमं शापमदादसाधुरयं दुरात्माऽकृतबुद्धिरद्य ॥ विप्रावमंताविशतां तमोंऽधं यथा गजः स्तब्धमतिः स एव ॥ १० ॥
श्रीशुक उवाच ॥ एवं शप्त्वा गतोऽगस्त्यो भगवान्नृप सानुगः ॥ इंद्रद्युम्नोऽपि राजर्षिर्दिष्टं तदुपधारयन् ॥ ११ ॥ आपन्नः कौंजरीं
योनिमात्मस्मृतिविनाशनीम् ॥ हर्यर्चनानुभावेन यद्गजत्वेऽप्यनुस्मृतिः ॥ १२ ॥ एवं विमोक्ष्य गजयूथपमब्जनाभस्तेनापि पार्षद-
गतिं गमितेन युक्तः ॥ गंधर्वसिद्धविबुधैरुपगीयमानकर्माद्भुतं स्वभवनं गरुडासनोऽगात् ॥ १३ ॥ एतन्महाराज तवेरितो मया कृ-
ष्णानुभावो गजराजमोक्षणम् ॥ स्वर्ग्यं यशस्यं कलिकल्मषापहं दुःस्वप्ननाशं कुरुवर्य शृण्वताम् ॥ १४ ॥ यथाऽनुकीर्तयंत्येतच्छ्रे-
यस्कामा द्विजातयः ॥ शुचयः प्रातरुत्थाय दुःस्वप्नाद्युपशांतये ॥ १५ ॥ इदमाह हरिः प्रीतो गजेंद्रं कुरुसत्तम ॥ शृण्वतां सर्वभू-
तानां सर्वभूतमयो विभुः ॥ १६ ॥

अद्भुतं स्वभवनमगात् ॥ १३ ॥ एतद्गजराजमोक्षणं नाम कृष्णानुभावस्तवेरितः । कथंभूतं तत्राह । स्वर्ग्यमित्यादि । दुःस्वप्नं नाशयतीति तथा ॥ १४ ॥ अतः श्रेयस्कामा ये
एतद्यथावदनुकीर्तयंति ॥ १५ ॥ अनेन श्रेयो भवतीति कुतो ज्ञातं साक्षाद्भगवद्वचनादेवेत्याह । इदमाहेत्यादि यावत्समाप्ति ॥ १६ ॥

ह्याप्रकारेंकरून कमलनाभ भगवंतानें गजेंद्राची मुक्तता करून पार्षदांच्या स्वरूपाला पावविलेल्या त्या गजेंद्रानें व इतरहि आपल्या पार्षदांनीं युक्त होऊन, ज्याचें
गजेंद्रमोक्षणादिरूप कर्म, गंधर्व सिद्ध आणि देव यांनीं गायन केलें आहे अशा त्या पद्मनाभानें गरुडावर आरूढ होऊन अलौकिक अशा आपल्या वैकुंठस्थानाप्रत गमन
केलें ॥ १३ ॥ हे कुरुश्रेष्ठा महाराजा, हा गजेंद्रमोक्षरूप कृष्णाचा पराक्रम, मी तुला सांगितला आहे. हें चरित्र, श्रवण करणाऱ्या लोकांना स्वर्गाची प्राप्ति करून देणारें,
यशाची वृद्धि करणारें, कलिसंबंधीं पापांचा नाश करणारें, आणि दुःस्वप्नाचा नाश करणारें आहे ॥ १४ ॥ हे राजा, ह्याप्रकारच्या ह्या पुण्यकारक आख्यानाचें धर्मादि-
पुरुषार्थांच्या प्राप्तीची इच्छा करणारे ब्राह्मण, प्रातःकालीं उठून स्नानादिकेंकरून शुद्ध होत्साते दुःस्वप्नादिकांच्या शांततेकरितां पठण करितात ॥ १५ ॥ हे कौरवश्रेष्ठा,
गजेंद्राची मुक्तता केल्यानंतर सर्व भूतात्मक व सर्वव्यापी श्रीहरि प्रसन्न होऊन, सर्व प्राणिमात्र श्रवण करीत असतां, त्या गजेंद्राला असें ह्मणाला कीं,–॥ १६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रीभगवान् ह्मणाला- हे वत्सा जे पुरुष, मला, तुला व हें सरोवर, त्रिकूटपर्वत, त्यांतील गुहा, वनें, वेत, पोकळ कळक, आणि भरीव कळक, ह्यांचीं बेटें, देववृक्ष ॥ १७ ॥ हीं त्रिकूटपर्वताचीं शिखरें, ब्रह्मदेव, मी व शिव ह्यांचीं निवासस्थानें; क्षीरसागर व देदीप्यमान असें श्वेतद्वीप हीं दोन माझीं प्रिय स्थानें, श्रीवत्सलांछन, कौस्तुभमणि, वैजयंती माळा, माझी कौमोदकीनामक गदा, सुदर्शन चक्र, पांचजन्य शंख, पक्षिराज गरुड, ॥ १८ ॥ १९ ॥ माझी सूक्ष्मकलारूप शेष, माझ्या आश्रयाला असणारी लक्ष्मी देवी, ब्रह्मदेव, नारद ऋषि, शंकर, प्रल्हाद; ॥ २० ॥ मत्स्य, कूर्म व वराह इत्यादिक अवतारांनीं केलेलीं माझीं अत्यंत पुण्यकारक कर्में, सूर्य, चंद्र, अग्नि, प्रणव;

प्रसंगादन्यस्यापि स्मरणे फलमुच्यते सर्वेषां द्वितीयांतानां स्मरंतीत्यष्टमेनान्वयः ॥ १७ ॥ १८ ॥ १९ ॥ २० ॥ २१ ॥ अव्यक्तं मायाम् । अव्ययं धर्मं भक्तिलक्षणम् ।

श्रीभगवानुवाच ॥ ये मां त्वां च सरश्चेदं गिरिकंदरकाननम् ॥ वेत्रकीचकवेणूनां गुल्मानि सुरपादपान् ॥ १७ ॥ शृंगाणीमानि धिष्ण्यानि ब्रह्मणो मे शिवस्य च ॥ क्षीरोदं मे प्रियं धाम श्वेतद्वीपं च भास्वरम् ॥ १८ ॥ श्रीवत्सं कौस्तुभं मालां गदां कौमोदकीं मम ॥ सुदर्शनं पांचजन्यं सुपर्णं पतगेश्वरम् ॥ १९ ॥ शेषं च मत्कलां सूक्ष्मां श्रियं देवीं मदाश्रयाम् ॥ ब्रह्माणं नारदमृषिं भवं प्रह्लादमेव च ॥ २० ॥ मत्स्यकूर्मवराहाद्यैरवतारैः कृतानि मे ॥ कर्माण्यनंतपुण्यानि सूर्यं सोमं हुताशनम् ॥ २१ ॥ प्रणवं सत्यमव्यक्तं गोविप्रान्धर्ममव्ययम् ॥ दाक्षायणीर्धर्मपत्नीः सोमकश्यपयोरपि ॥ २२ ॥ गंगां सरस्वतीं नंदां कालिंदीं सितवारणम् ॥ ध्रुवं ब्रह्मऋषीन्सप्त पुण्यश्लोकांश्च मानवान् ॥ २३ ॥ उत्थायापररात्रांते प्रयताः सुसमाहिताः ॥ स्मरंति मम रूपाणि मुच्यंते ह्येनसोऽखिलात् ॥ २४ ॥ येमां स्तुवंत्यनेनांग प्रतिबुध्य निशात्यये ॥ तेषां प्राणात्यये चाहं ददामि विमलां मतिम् ॥ २५ ॥ श्रीशुक उवाच ॥ इत्यादिश्य हृषीकेशः प्रध्माय जलजोत्तमम् ॥ हर्षयन्विबुधानीकमारुरोह खगाधिपम् ॥ २६ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे अष्टमस्कंधे गजेंद्रमोक्षणं नाम चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥ ॥

सोमकश्यपयोरपि । पत्नीर्दाक्षायणीः ॥ २२ ॥ सितवारणमैरावतम् ॥ २३ ॥ सुसमाहिता एकाग्रचित्ताः । मम रूपाणि मद्विभूतीः ॥ २४ ॥ २५ ॥ जलजोत्तमं शंखवरं प्रध्माय वादयित्वा ॥ २६ ॥ इति श्रीमद्भागवतेऽष्टमस्कंधे टीकायां चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥ ॥

यथार्थभाषण, माया, गाई, ब्राह्मण, अविनाशी धर्म, दक्षाच्या कन्या ह्या- धर्म, सोम व कश्यप ह्यांच्या भार्या ॥ २१ ॥ २२ ॥ गंगा, सरस्वती, नंदा, यमुना, ऐरावत, ध्रुव, सात ब्रह्मर्षि आणि पवित्रकीर्ति असे धार्मिक मनुष्य, तशाच माझ्या विभूति यांचें जे पुरुष प्रभातकालीं उठून व शुचिर्भूत होऊन एकाग्र अंतःकरणानें स्मरण करितात ते सर्व पातकांपासून मुक्त होतात ॥ २३ ॥ २४ ॥ आणि हे राजा, प्रभातकालीं उठून जे पुरुष, ह्या तूं केलेल्या स्तोत्रानें, माझें स्तवन करितात त्यांना मी अंतकालीं निर्मल मति देतों ॥ २५ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला- हे राजा, ह्याप्रमाणें त्या गजेंद्राला सांगून व आपला सर्वोत्कृष्ट शंख वाजवून देवगणांना आनंद देणारा भगवान् हृषीकेश, वैकुंठास जाण्याकरितां गरुडावर आरूढ झाला ॥ २६ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील अष्टमस्कंधामध्यें गजेंद्रमोक्षकथननामक हा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

न्वयथा अध्याय समाप्त झाला ॥ ४ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां पुढें आठ अध्यायांनीं, ज्यामध्यें स्वभक्तांच्या पक्षपातानें प्रभूनें स्त्रीरूप धारण केलें आहे असें अमृताख्यान वर्णन केलें आहे त्यांपैकीं ह्या पांचव्या अध्यायामध्यें पांचवें व साहावें मन्वंतर आणि विप्रशापामुळें संपत्तिरहित झालेल्या देवांनीं केलेली श्रीहरीची स्तुति सांगितली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, पुण्यकारक व पापनाशक असें हें हरीचें गजेंद्रमोक्षणरूप कर्म तुला कथन केलें. आतां रैवतमन्वंतर श्रवण कर ॥ १ ॥ तामसमनूचा सखा भाऊ जो रैवत तो पांचवा मनु झाला व त्याचे अर्जुनप्रमुख बलिविंध्यादिक पुत्र झाले ॥ २ ॥ हे राजा, विभुनामक इंद्र झाला; भूतरय इत्यादिक देवगण झाले आणि हिरण्यरोमा, वेदशिरा, ऊर्ध्वबाहु, देवबाहु, सुधामा, पर्जन्य व महामुनि हे सप्तर्षि झाले ॥ ३ ॥ तेथें शुभ्रनामक ऋषि, व त्याची विकुंठानामक पत्नी ह्या उभयतांपासून वैकुंठनामक श्रेष्ठ देवांसहवर्तमान आपल्या अंशानें स्वतः भगवान् अवतीर्ण होऊन तो वैकुंठ ह्या नांवानें प्रसिद्ध झाला ॥ ४ ॥ हे राजा, त्या भग-

---

अमृताख्यानमष्टाभिरध्यायैरनुवर्ण्यते ॥ स्वभक्तपक्षपातेन यत्र योषायितं प्रभोः ॥ १ ॥ पंचमे पंचमं चाथ षष्ठं चाकथयन्मनुम् ॥ विप्रशापाच्च निःश्रीकैः कृतां देवैर्हरेः

॥ श्रीशुक उवाच ॥ राजन्नुदितमेतत्ते हरेः कर्माघनाशनम् ॥ गजेंद्रमोक्षणं पुण्यं रैवतं त्वंतरं शृणु ॥ १ ॥ पंचमो रैवतो नाम मनुस्तामससोदरः ॥ बलिविंध्यादयस्तस्य सुता अर्जुनपूर्वकाः ॥ २ ॥ विभुरिंद्रः सुरगणा राजन्भूतरयादयः ॥ हिरण्यरोमा वेदशिरा उर्ध्वबाह्वादयो द्विजाः ॥ ३ ॥ पत्नी विकुंठा शुभ्रस्य वैकुंठैः सुरसत्तमैः ॥ तयोः स्वकलया जज्ञे वैकुंठो भगवान्स्वयम् ॥ ४ ॥ वैकुंठः कल्पितो येन लोको लोकनमस्कृतः ॥ रमया प्रार्थ्यमानेन देव्या तत्प्रियकाम्यया ॥ ५ ॥ तस्यानुभावः कथितो गुणाश्च परमोदयाः ॥ भौमान्रेणून्स विममे यो विष्णोर्वर्णयेद्गुणान् ॥ ६ ॥ षष्ठश्च चक्षुषः पुत्रश्चाक्षुषो नाम वै मनुः ॥ पूरुपूरुषसुद्युम्नप्रमुखाश्चाक्षुषात्मजाः ॥ ७ ॥ इंद्रो मंत्रद्रुमस्तत्र देवा आप्यादयो गणाः ॥ मुनयस्तत्र वै राजन्हविष्मद्वीरकादयः ॥ ८ ॥ तत्रापि देवः संभूत्यां वैराजस्याभवत्सुतः ॥ अजितो नाम भगवानंशेन जगतः पतिः ॥ ९ ॥ पयोधिं येन निर्मथ्य सुराणां साधिता सुधा ॥ भ्रममाणोऽम्भसि धृतः कूर्मरूपेण मंदरः ॥ १० ॥

स्तुतिम् ॥ २ ॥ १ ॥ तामसश्चतुर्थो मनुस्तस्य सोदरो भ्राता ॥ २ ॥ ३ ॥ ४ ॥ ५ ॥ तस्य वैकुंठसंज्ञस्य हरेरनुभावः सनकादिशापेन दैत्यतां प्राप्ताभ्यां स्वपार्षदाभ्यां वराहादिरूपेण युद्धादिलक्षणः गुणाश्च ब्रह्मण्यतादयः परमोदयाश्च महर्द्धयः कथितास्तृतीयस्कंधादिषु ॥ ६ ॥ ७ ॥ ८ ॥ ९ ॥ १० ॥

वंतानें रमादेवीच्या प्रार्थनेवरून तिचें प्रिय करण्याच्या इच्छेनें सर्व लोकांना पूज्य असा वैकुंठ लोक रचिला आहे. त्या वैकुंठनामक श्रीहरीचा पराक्रम, ब्राह्मणभक्ति इत्यादिक गुण आणि मोठ्या समृद्धि हीं मीं सर्व तुला संक्षेपानें पूर्वीं कथन केलींच आहेत; कारण, विष्णूचे संपूर्ण गुण जो वर्णन करील तो भूमिसंबंधीं रजःकणांचीहि गणना करील ॥ ५ ॥ ६ ॥ असो. चक्षूचा पुत्र चाक्षुष हा सहावा मनु झाला आणि पूरु, पूरुष व सुद्युम्न हे ज्यामध्यें प्रमुख आहेत असे त्याचे पुत्र झाले ॥ ७ ॥ हे राजा, त्या मन्वंतरामध्यें मंत्रद्रुमनामक इंद्र झाला; आप्यादिक देवगण झाले आणि हविष्मान्, वीरक, सुमेधा उत्तम, मधु, अतिनामा व सहिष्णु हे सात मुनि झाले ॥ ८ ॥ तसाच त्याहि मन्वंतरामध्यें वैराज व त्याची पत्नी संभूति ह्या उभयतांपासून नानाप्रकारच्या क्रीडा करणारा जगत्पालक भगवान्, पुत्ररूपानें आपल्या अंशानें अवतीर्ण होऊन तो अजित नांवानें प्रसिद्ध झाला ॥ ९ ॥ आणि हे राजा, त्यानेंच क्षीरसागराचें मंथन करून देवांना अमृत साधून दिलें व जलामध्यें भ्रमण करणारा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मंदरपर्वत कूर्मरूपानें आपल्या पृष्ठभागीं धारण केला ॥ १० ॥ राजा ह्मणाला- हे ब्रह्मन्, भगवंतानें ज्या प्रकारानें क्षीरसागराचें मंथन केलें व ज्यांच्याकरितां केलें व ज्याकारणास्तव कूर्मरूपानें मंदराचलाचें धारण केलें ॥ ११ ॥ तसेंच ज्याप्रकारेंकरून देवांनीं अमृत प्राप्त करून घेतलें आणि त्या मंथनापासून अमृताखेरीज दुसरें काय उत्पन्न झालें, हें सर्व भगवंताचें अत्यंत अद्भुत कर्म मला कथन कर ॥ १२ ॥ कारण, तूं उत्तमप्रकारेंकरून वर्णन केलेल्या भक्तपालक भगवंताच्या महिम्यानें बहुकालपर्यंत तापत्रयानें दुःखित झालेलें माझें चित्त तृप्तच होत नाहीं ॥ १३ ॥ सूत ह्मणाला- हे द्विज हो, ह्याप्रमाणें भगवान् व्यासपुत्राला, राजानें उत्तमप्रकारेंकरून प्रश्न

यतो हेतोः अंबुचरात्मना कूर्मरूपेण ॥ ११ ॥ सुराणां साधिता सुधेत्युक्त्या युद्धाद्यपि सूचितमतः पृच्छति । किं चान्यदिति ॥ १२ ॥ १३ ॥ १४ ॥ नोत्तिष्ठेरन्न पुनर्जीवंति स्मेत्यर्थः ॥ १५ ॥ दुर्वाससा हि कदाचिन्मार्गे गच्छंतमिंद्रं दृष्ट्वा स्वकंठस्था माला तस्मै दत्ता तेन च श्रीमदेनानादृत्यैरावतस्य कुंभयोर्निक्षिप्ता स

राजोवाच ॥ यथा भगवता ब्रह्मन्मथितः क्षीरसागरः ॥ यदर्थं वा यतश्चाद्रिं दधरांबुचरात्मना ॥ ११ ॥ यथाऽमृतं सुरैः प्राप्तं किंचान्यदभवत्ततः ॥ एतद्भगवतः कर्म वदस्व परमाद्भुतम् ॥ १२ ॥ त्वया संकथ्यमानेन महिम्ना सात्वतां पतेः ॥ नातितृप्यति मे चित्तं सुचिरं तापतापितम् ॥ १३ ॥ सूत उवाच ॥ संपृष्टो भगवानेवं द्वैपायनसुतो द्विजाः ॥ अभिनंद्य हरेर्वीर्यमभ्याचष्टुं प्रचक्रमे ॥ १४ ॥ श्रीशुक उवाच ॥ यदा युद्धेऽसुरैर्देवा बाध्यमानाः शितायुधैः ॥ गतासवो निपतिता नोत्तिष्ठेरन्स्म भूयशः ॥ १५ ॥ यदा दुर्वाससः शापात्सेंद्रा लोकास्त्रयो नृप ॥ निःश्रीकाश्चाभवंस्तत्र नेशुरिज्यादयः क्रियाः ॥ १६ ॥ निशाम्यैतत्सुरगणा महेंद्रवरुणादयः ॥ नाध्यगच्छन्स्वयं मंत्रैर्मंत्रयंतो विनिश्चयम् ॥ १७ ॥ ततो ब्रह्मसभां जग्मुर्मेरोर्मूर्धनि सर्वशः ॥ सर्वं विज्ञापयांचक्रुः प्रणताः परमेष्ठिने ॥ १८ ॥

च गजो मत्तः पद्भ्यां तां मालां चूर्णीचकार। ततः कुपितो दुर्वासास्तं शशाप त्रिभिर्लोकैः सह त्वं निःश्रीको भवेति । तदेतदाह । यदा दुर्वाससः शापादिति । इज्यादयो यागाद्याः ॥ १६ ॥ १७ ॥ १८ ॥

केला असतां, त्याच्या प्रश्नाचा आनंदपूर्वक स्वीकार करून, त्यानें हरीचें माहात्म्य कथन करण्यास प्रारंभ केला ॥ १४ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला- हे राजा, जेव्हां युद्धामध्यें असुरांनीं, सोडिलेल्या तीक्ष्ण आयुधांच्या योगेंकरून प्रहार केलेले व गतप्राण होऊन पडलेले पुष्कळ देव, पुनरपि जीवंत होऊन उठत नाहींसे झाले ॥ १५ ॥ आणि हे राजा, जेव्हां दुर्वासमुनीच्या शापानें[1] इंद्रासहवर्तमान तिन्ही लोक लक्ष्मीरहित झाले, तेव्हां यज्ञयागादि कर्में नष्ट झालीं. तें इंद्रवरुणप्रभृति देवगणांनीं पाहून, नानाप्रकारच्या युक्तींनीं आपापल्यामध्यें विचार चालविला असतांहि जेव्हां त्यांना लक्ष्मीवगैरे प्राप्त होण्याचा निश्चयपूर्वक उपाय कांहींच सुचेना, तेव्हां त्या सर्वांनीं मेरुपर्वताच्या मस्तकावर ब्रह्मदेवाच्या सभेमध्यें गमन केलें आणि ब्रह्मदेवाला प्रणाम करून झालेला सर्व वृत्तांत कथन केला ॥ १६ ॥ १७ ॥ १८ ॥

१ एकेवेळीं दुर्वासऋषीनें, मार्गामध्यें ऐरावतावर अंबारीमध्यें बसून जाणाऱ्या इंद्राला पाहिलें, तेव्हां आपल्या कंठांतली माळा प्रसाद ह्मणून त्याला अर्पण केली. तेव्हां ऐश्वर्यमदानें मत्त झालेल्या त्या इंद्रानें, अनादरपूर्वक ती माळा, ऐरावताच्या मस्तकावर ठेविली असतां त्या मत्त ऐरावतानें त्या माळेचें पांयानीं चूर्ण करून टाकिलें. तेव्हां क्रुद्ध झालेल्या त्या दुर्वासऋषीनें इंद्राला शाप दिला कीं, तूं तिन्हीं लोकांसहवर्तमान संपत्तिरहित हो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हेराजा, तेव्हां त्या ब्रह्मदेवानें, निर्बल व निस्तेज झालेल्या इंद्रवायुप्रभृति देवांना व अमंगलप्राय झालेल्या लोकांना पाहून आणि त्यांच्या विपरीत तेजोबलादिकांनीं युक्त असलेल्या असुरांना पाहून, एकाग्र मनानें पुरुषोत्तमाचें स्मरण करीत होत्साता, हरीला शरण गेलों असतां आह्मांला पूर्वींप्रमाणें सर्व संपत्ति प्राप्त होतील असा निश्चय करून, प्रफुल्लित मुख झालेला तो सुरश्रेष्ठ भगवान् ब्रह्मदेव, त्या देवांना ह्मणाला कीं,– ॥ १९ ॥ २० ॥ हे देवहो, मी, शंकर, तुह्मीं व असुरवगैरे, मानव, पशु, पक्षी, वृक्ष व स्वेदज प्राणी हे सर्व ज्याच्या पुरुषरूप अवताराच्या अंशाच्या अंशांनीं (मरीच्यादिकांनीं) उत्पन्न केलेले आहेत त्याच अक्षय परमात्म्याला आह्मीं शरण जाऊंया ॥ २१ ॥ आतां, असुरादिकांचीसुद्धां जर उत्पत्ति ह्याच्याचपासून झाली आहे तर हा सर्वांशीं सारखाच असणार मग त्याला शरण जाऊन उपयोग तरी काय? असें ह्मणाल तर खरें

असुरान् अयथा देववैलक्षण्येन बलपुष्ट्यादियुक्तान्विलोक्येत्यर्थः ॥ १९ ॥ हरिं शरणं गताः संतो यथापूर्वं सर्वं प्राप्स्याम इति हर्षेणोत्फुल्लं विकसितं वदनं यस्य ॥ २० ॥ मनुष्यादयो जरायुजांडजोद्भिज्जस्वेदजाः । यस्यावतारः पुरुषस्तस्यांशो ब्रह्मा तस्य कला मरीच्यादयस्ताभिर्विसर्जिताः पुत्रपौत्रादिद्वारा

स विलोक्येंद्रवाय्वादीन्निःसत्त्वान्विगतप्रभान् ॥ लोकानमंगलप्रायानसुरानयथा विभुः ॥ १९ ॥ समाहितेन मनसा संस्मरन्पुरुषं परम् ॥ उवाचोत्फुल्लवदनो देवान्स भगवान्परः ॥ २० ॥ अहं भवो यूयमथोऽसुरादयो मनुष्यतिर्यग्द्रुमघर्मजातयः ॥ यस्यावतारांशकलाविसर्जिता व्रजाम सर्वे शरणं तमव्ययम् ॥ २१ ॥ न यस्य वध्यो न च रक्षणीयो नोपेक्षणीयादरणीयपक्षः ॥ अथापि सर्गस्थितिसंयमार्थं धत्ते रजःसत्त्वतमांसि काले ॥ २२ ॥ अयं च तस्य स्थितिपालनक्षणः सत्त्वं जुषाणस्य भवाय देहिनाम् ॥ तस्माद्व्रजामः शरणं जगद्गुरुं स्वानां स नो धास्यति शं सुरप्रियः ॥ २३ ॥ श्रीशुक उवाच ॥ इत्याभाष्य सुरान्वेधाः सह देवैररिंदम ॥ अजितस्य पदं साक्षाज्जगाम तमसः परम् ॥ २४ ॥ तत्रादृष्टस्वरूपाय श्रुतपूर्वाय वै विभो ॥ स्तुतिमब्रूत दैवीभिर्गीर्भिस्त्ववहितेंद्रियः ॥ २५ ॥

जनिताः ॥ २१ ॥ ननु तर्हि सर्वेष्वसौ समः स्यात्किं तच्छरणाश्रयेण । सत्यम् । यद्यप्येवं तथाऽप्यस्मत्पक्षपाती भविष्यतीत्याशयेनाह । न यस्येति द्वाभ्याम् ॥ २२ ॥ स्थितिपालनस्य क्षणः कालः अतः सुरप्रियः सन्स्वीयानां नः शं सुखं करिष्यति ॥ २३ ॥ यत्र क्षीराब्धौ हरेर्वासस्तदेव तमसः परं स्थानम् । यद्वा लोकालोकात्परतो यत्तमस्ततः परं स्थानं जगाम ॥ २४ ॥ दैवीभिर्लोकेऽप्रसिद्धाभिर्वैदिकीभिर्गीर्भिः स्तुतिमकरोत् ॥ २५ ॥

तथापि हा आमचा पक्षपाती होईल असें सांगतो– हे देवहो, ज्याला, कोणाचा वध, रक्षण, उपेक्षा अथवा आदर करण्याचा पक्षपात नाहीं तथापि जगताची उत्पत्ति स्थिति व लय करण्याकरितां यथायोग्य कालीं जो अनुक्रमानें रज, सत्त्व व तम ह्या गुणांचा स्वीकार करितो ॥ २२ ॥ ही वेळ तर, त्या प्राण्यांच्या स्थितीकरितां सत्त्वगुणांचा स्वीकार करणाऱ्या भगवंताची मर्यादा परिपालन करण्याची आहे. ह्मणून त्या जगद्गुरूला आह्मी शरण जाऊंया, ह्मणजे तो देवांचा प्रिय परमेश्वर आह्मां स्वकीयजनांचें कल्याण करील ॥ २३ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे शत्रुदमना राजा, ब्रह्मदेवानें, ह्याप्रमाणें देवांना सांगून त्यांच्यासहवर्तमान ज्या क्षीरसमुद्राचेठिकाणीं श्रीहरी राहतो त्या साक्षात् भगवंताच्या स्थानाप्रत गमन केलें ॥२४॥ आणि हे राजा, त्याठिकाणीं पूर्वीं ऐकिलेल्या व दृष्टि न पडणाऱ्या भगवंताची प्राप्ति होण्याकरितां इंद्रिय-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

स्थैर्यपूर्वक लोकामध्यें अप्रसिद्ध अशा वेदवाणींच्या योगानें त्याची स्तुति केली ॥२५॥ ब्रह्मदेव ह्मणाला– हे देवा, मनापेक्षांहि वेगवान् व वाणीला अविषय, अतर्क्य, उपाधिशून्य, सर्वांतर्यामी, अनंत, आद्य, विकारशून्य, सत्यस्वरूप, सर्वांपेक्षां श्रेष्ठ आणि संकटकालीं सर्वप्रकारें रक्षण करीत असल्यामुळें आश्रय करण्यास योग्य अशा तुला आह्मीं नमस्कार करितों ॥२६॥ त्याचप्रमाणें प्राण, मन, बुद्धि आणि अहंकार ह्यांचा ज्ञाता, शब्दादि विषय व इंद्रियें ह्या उभयतांच्या रूपानें भासमान होणारा, देहशून्य, स्वप्नदर्शी पुरुषाप्रमाणें अज्ञानरहित अक्षय, आकाशाप्रमाणें सर्वव्यापी तिन्ही युगांमध्यें प्रकट होणारा आणि ज्याचेठिकाणीं जीव पक्षपाती, अविद्या व तिला निवृत्त करणारी विद्या ह्या दोन्हीहि नाहींत त्या तुला आह्मीं शरण आलों आहों ॥ २७ ॥ ह्याप्रमाणें अविक्रियत्वादिक व सर्वज्ञत्वादिक गुणांनीं ईश्वराचें सत्यत्व व श्रेष्ठत्व कथन केलें. आतां संसारचक्रा-

देववरं त्वां नमामहे ननाम। हे देव वरं त्वां नमामेति वा। वरत्वे हेतुः। सत्यम्। कुतः। अविक्रियम्। तत्कुतः। अनंतमाद्यं चानादिम्। आद्यंतवंतो हि वृद्ध्यादिविक्रियायुक्ता भवंति। किंच गुहाशयं सर्वांतरम्। कुतः। निष्कलं निरुपाधिम्। तत्कुतः। अप्रतर्क्यम्। तत्कुतः। मनोऽग्रयानं मनसोऽपि जविष्ठम्। मनःप्राप्ये स्थाने ततः प्रागेव विद्यमानत्वात्। तथाच श्रुतिः अनेजदेकं मनसो जवीयो नैनद्देवा आप्नुवन्पूर्वमर्शत्॥ तद्धावतोऽन्यानत्येति तिष्ठदिति। वचसा अनिरुक्तं अविषयत्वात्। यद्वाचाऽनभ्युदितं येन वागभ्युद्यत इति श्रुतेः। मनोवचसोरगोचरत्वादप्रतर्क्यम्। यथेष्टं वा सर्वेषां हेतुहेतुमद्भावः॥ २६॥ किंच प्राणादीनां विपश्चितं ज्ञातारम्। आत्माऽहंकारो देहो वा। न तु तद्व्यतिरिक्तं ज्ञेयमस्तीत्याह। अर्थो विषयः

ब्रह्मोवाच॥ अविक्रियं सत्यमनंतमाद्यं गुहाशयं निष्कलमप्रतर्क्यम्॥ मनोऽग्रयानं वचसाऽनिरुक्तं नमामहे देववरं वरेण्यम्॥ २६॥
विपश्चितं प्राणमनोधियात्मनामर्थेंद्रियाभासमनिद्रमव्रणम्॥ छायातपौ यत्र न गृध्रपक्षौ तमक्षरं खं त्रियुगं व्रजामहे ॥ २७॥ अ-
जस्य चक्रं त्वजयेर्यमाणं मनोमयं पंचदशारमाशु॥ त्रिणाभि विद्युच्चलमष्टनेमि यदक्षमाहुस्तमृतं प्रपद्ये॥ २८॥ य एकवर्ण तम-
सः परं तदलोकमव्यक्तमनंतपारम्॥ आसांचकारोपसुपर्णमेनमुपासते योगरथेन धीराः॥ २९॥

इंद्रियाणि तद्ग्राहकाणि तदुभयरूपेणाभासत इति तथा तम्। तथाऽप्यनिद्रं स्वप्नद्रष्टृवदज्ञानरहितम्। कुतः। अव्रणमदेहम्। अतएवाक्षरं खमिव व्यापिनं च। सर्वत्र हेतुः। यत्र यस्मिन्गृध्रपक्षौ जीवपक्षपातिनौ छायातपावविद्या च तन्निवर्तिका विद्या च नास्ति तं त्रियुगं त्रिषु युगेष्वाविर्भवंतं शरणं व्रजाम ॥ २७॥ तदेवमविक्रियत्वादिभिः सर्वज्ञत्वादिभिश्च सत्यत्वं वरेण्यत्वं चोक्तं संसारचक्राधारत्वेनापि तदेव दर्शयन्नाह। अजस्य जीवस्य चक्रं चक्रवदावर्तमानं देहाद्यजया मायया प्रेर्यमाणं योऽक्षो यस्य यदधिष्ठानमाहुस्तमृतं सत्यं प्रपद्ये। कथंभूतं चक्रम्। मनोमयं मनःप्रधानम्। दशेंद्रियाणि पंचप्राणाश्चेत्येवं पंचदश अरा यस्य। आशु शीघ्रगम्। त्रयो गुणा नाभिरिव मध्ये यस्य। विद्युदिव चलम्। अष्टौ प्रकृतयो नेमय इवावरणानि यस्य॥ २८॥ सर्वजीवनियंतृत्वादिना च वरिष्ठत्वमाह। य इति। य उपसुपर्णं जीवसमीपे तन्नियंतृत्वेनासांचकारा-

च्या आधारपणानेंहि पुनरपि तेंच दर्शवित होत्साता ह्मणतो कीं,– हे परमेश्वरा, ज्यामध्यें मन हें मुख्य आहे, ज्याला दहा इंद्रियें व पंचप्राण अशा पंधरा अरा आहेत, ज्याची गति शीघ्र आहे, ज्याच्या मध्यभागीं तीन गुण हे तुंबे आहेत, जें विद्युल्लतेसारिखें चंचल आहे, ज्याची आठ प्रकृति हीं धांवाप्रमाणें आवरणें आहेत आणि जें मायेच्या योगानें प्रेरित आहे, असें हें जीवाचें देहरूप चक्र ज्याच्या आश्रयानें राहिलें आहे त्या तुज सत्यस्वरूप परमात्म्याला मी शरण आलों आहें ॥ २८ ॥ आतां सर्व जीवांचा नियंतावगैरे असल्यामुळें ईश्वरच सर्वांमध्यें वरिष्ठ आहे हें सांगण्याच्या अभिप्रायानें ब्रह्मदेव भाषण करितो कीं,– जो जीवांच्या समीपभागीं नियंतृरूपानें असतो, ज्याचें ज्ञान हेंच मुख्य स्वरूप आहे, जो प्रकृतीहून पर, अदृश्य, निर्विकल्प आणि देशतः व कालतः परिच्छेदरहित असें जें ब्रह्म तत्स्वरूपी आहे आणि ज्याची ॥ ११ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

उपासना विवेकी पुरुष, योगरूप प्राप्तिसाधनानें करितात ॥ २९ ॥ जिच्या योगानें जन मोहित होऊन आत्मस्वरूप जाणत नाहींत अशा–ज्याच्या मायेचें कोणीहि अतिक्रमण करूं शकत नाहीं, मायारूप स्वशक्ति व तिचे गुण ह्यांना ज्यानें अगदीं जिंकिलें आहे आणि जो सर्वभूतांचेठिकाणीं सारखा आहे, त्या परमेश्वराला आह्मीं नमन करितों ॥ ३० ॥ आतां स्वरूप जाणत नाहीं असें जें म्हटलें होतें तेंच कथन करितो कीं,–ज्यांच्यामध्यें रजोगुण व तमोगुण मुख्य आहेत अशा असुरांचीतर गोष्ट नकोच परंतु, ज्यांच्या प्रियतनुरूप सत्त्वगुणानेंच उत्पन्न झालेले असे हे आह्मीं देव व ऋषिहि, सत्ता व प्रकाश ह्यांच्या योगानें आंत व बाहेर प्रकट असलेलें-

स्ते स्म । द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषस्वजात इति श्रुतेः । यद्वा भक्तरक्षणार्थं गरुडस्योपरि य उपविष्ट इत्यर्थः । तर्हि देहस्थत्वाद्भक्तरक्षणादिक्रियावेशाज्जीवसाम्यं स्यात्तत्राह । एकवर्णं ज्ञानैकस्वरूपं तमसः प्रकृतेः परमलोकमदृश्यमव्यक्तं निर्विकल्पमनंतपारं कालतो देशतश्चापरिच्छिन्नं तद्ब्रह्मैव यः । अप्रच्युतस्वरूपत्वान्न जीवसाम्यम् । तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्त्यनश्नन्नन्यो अभिचाकशीतीति विशेषश्रवणादित्यर्थः । अतएव यमेनं धीरा योगेन रथेन प्राप्तिसाधनेनोपासते भजंते तं नमामेत्युत्तरेणान्वयः ॥ २९ ॥ मायानियंतृत्वेनापि जीवसाम्यं परिहरन्वरिष्ठत्वमाह । यस्य मायां कश्च कश्चिदपि नातितितर्ति नातिक्रामति । कथंभूताम् । जनो यया मुह्यति । अर्थ-

न यस्य कश्चातितितर्ति मायां यया जनो मुह्यति वेद नार्थम् ॥ तं निर्जितात्मात्मगुणं परेशं नमाम भूतेषु समं चरंतम् ॥ ३० ॥
इमे वयं यत्प्रिययैव तन्वा सत्त्वेन सृष्टा बहिरंतराविः ॥ गतिं न सूक्ष्मामृषयश्च विद्महे कुतोऽसुराद्या इतरप्रधानाः ॥ ३१ ॥ पादौ महीयं स्वकृतैव यस्य चतुर्विधो यत्र हि भूतसर्गः ॥ स वै महापूरुष आत्मतंत्रः प्रसीदतां ब्रह्म महाविभूतिः ॥ ३२ ॥ अंभस्तु यद्रेत उदारवीर्यं सिद्ध्यंति जीवंत्युत वर्धमानाः ॥ लोकास्त्रयोऽथाखिललोकपालाः प्रसीदतां ब्रह्म महाविभूतिः ॥ ३३ ॥ सोमं मनो यस्य समामनंति दिवौकसां वै बलमंध आयुः ॥ ईशो नगानां प्रजनः प्रजानां प्रसीदतां नः स महाविभूतिः ॥ ३४ ॥

मात्मस्वरूपं न तु वेद । निर्जित आत्मा आत्मशक्तिर्माया च तद्गुणाश्च येन तम् ॥ ३० ॥ अर्थं न वेदेति यदुक्तं तत्प्रपंचयन्नाह । इमे वयं देवा ऋषयश्च यस्य प्रियया तन्वा सत्त्वेनैव सृष्टा अपि बहिरंतश्च सत्ताप्रकाशाभ्यामाविः प्रकटामपि सूक्ष्मां गतिं निरुपाधिस्वरूपं न विद्मः । इतरप्रधाना रजस्तमोमयाः कुतो विदुः । तं नमामेति पूर्वेणान्वयः ॥ ३१ ॥ इदानीं वैराजरूपेण स्तुवन्प्रार्थयते । पादौ महीति द्वादशभिः । यत्र मह्यां जरायुजादिभूतसर्गः सा मही यस्य पादौ स नः प्रसीदतु । आत्मतंत्रः पादादिमत्त्वेऽपि न तत्परतंत्रः । कुतः । ब्रह्म अप्रच्युतरूपः । तत्कुतः । महती विभूतिरैश्वर्यं यस्य सः ॥ ३२ ॥ उदारं वीर्यं शक्तिर्यस्य तदंभो यस्य रेतः स नः प्रसीदतु । उदारवीर्यतामाह । यतोंऽभसो लोकादयः सिद्ध्यंति जायंते ॥ ३३ ॥ यः सोमो देवानामंधोऽन्नं अतएव बलमायुश्च नगानां वृक्षाणाम् । प्रकर्षेण जनयति वर्धयतीति प्रजनः

हि ज्याचें निरुपाधिक स्वरूप जाणत नाहीं, त्याला नमस्कार करितों ॥ ३१ ॥ असो. आतां विराड्रूपानें स्तुति करीत प्रार्थना करितो कीं– जरायुज, अंडज, स्वेदज आणि उद्भिज्ज अशा चार प्रकारच्या भूतसृष्टीनें युक्त अशी त्याणेंच उत्पन्न केलेली ही पृथ्वी, ज्याच्या चरणस्थानीं आहे आणि जो अचिंत्यैश्वर्यसंपन्न, अप्रच्युतस्वरूप व स्वतंत्र आहे तो महापुरुष भगवान् आह्मांवर प्रसन्न होवो ॥ ३२ ॥ तसेंच ज्यापासून तिन्ही लोक व सर्व लोकपाल उत्पन्न होतात, वांचतात व वृद्धि पावतात तें महाशक्तियुक्त उदक, ज्याचें रेत आहे तो अचिंत्यैश्वर्यसंपन्न असल्यामुळें अप्रच्युतस्वरूप असा परमात्मा आह्मांवर प्रसन्न होवो ॥ ३३ ॥ तसेंच ज्याला देवांचें अन्न, बल व

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आयुष्य असें ह्मणतात आणि जो प्रजांची वृद्धि करणारा व वृक्षांचा अधिपति आहे तो चंद्र ज्याचें मन आहे, तो अचिंत्यैश्वर्यसंपन्न परमात्मा आह्मांवर प्रसन्न होवो ॥ ३४ ॥ यज्ञादि कर्मानुष्ठानाकरितां ज्याची उत्पत्ति झाली आहे, जो उदरामध्यें पाक होण्यास योग्य अशा अन्नादिकांचें पचन करीत असून समुद्रामध्येंहि वाडवरूपानें उदकाचें शोषण करितो आणि ज्याच्यापासून द्रव्य उत्पन्न झालें आहे तो अग्नि ज्याचें मुख झाला आहे तो अचिंत्यैश्वर्य परमात्मा आह्मांवर प्रसन्न होवो ॥ ३५ ॥ तसाच वेदत्रयाचें स्वरूप, ब्रह्माचें उपासनास्थान, अर्चिरादि मार्गाधिष्ठात्री देवता, मुक्तीचें द्वार, अमृतस्वरूपी आणि कालात्मक असल्यामुळें मृत्युरूपी असा हा सूर्य ज्याची दृष्टि आहे तो अचिंत्यैश्वर्यसंपन्न परमात्मा आह्मांवर प्रसन्न होवो ॥ ३६ ॥ तसाच जो चराचर प्राण्यांची मानसिक शक्ति, शारीर बल आणि इंद्रियसामर्थ्य

तं यस्य मनः समामनंति स नः प्रसीदतु ॥ ३४ ॥ अग्निर्यस्य तु मुखं जातः । कथंभूतः । जातं वेदो धनं यस्मात् । क्रियाकांडं तत्प्रतिपाद्यं कर्म तन्निमित्तं जन्म यस्य अंतःसमुद्रे उदरमध्ये स्वधातून्पाकार्हानेवान्नादीननुपचन् प्रसिद्धसमुद्रेऽपि वाडवरूपेणोदकान्येवानुपचन्नग्निः ॥ ३५ ॥ एष तरणिर्यस्य चक्षुरासीत् । कथंभूतः । देवयानमर्चिरादिमार्गदेवता । त्रयीमयः सैषा त्रय्येव विद्या तपतीति श्रुतेः । ब्रह्मणो धिष्ण्यमुपासनास्थानम् । य एषोंऽतरादित्यो हिरण्मयः पुरुष इति श्रुतेः । मुक्तेर्द्वारं देवयान-

अग्निर्मुखं यस्य तु जातवेदा जातः क्रियाकाडनिमित्तजन्मा ॥ अंतःसमुद्रेऽनुपचन्स्वधातून्प्रसीदता नः स महाविभूतिः ॥ ३५ ॥
यच्चक्षुरासीत्तरणिर्देवयानं त्रयीमयो ब्रह्मण एष धिष्ण्यम् ॥ द्वारं च मुक्तेरमृतं च मृत्युः प्रसीदतां नः स महाविभूतिः ॥३६॥ प्राणा-
दभूद्यस्य चराचराणां प्राणः सहो बलमोजश्च वायुः ॥ अन्वास्म संम्राजमिवानुगा वयं प्रसीदतां नः स महाविभूतिः ॥ ३७ ॥ श्रोत्रा-
द्दिशो यस्य हृदश्च खानि प्रजज्ञिरे खं पुरुषस्य नाभ्याः ॥ प्राणेंद्रियात्माऽसुशरीरकेतं प्रसीदतां नः स महाविभूतिः ॥ ३८ ॥ ब-
लान्महेंद्रस्त्रिदशाः प्रसादान्मन्योर्गिरीशो धिषणाद्विरिंचः ॥ खेभ्यश्च छंदांस्यृषयो मेढ्रतः कः प्रसीदता नः स महाविभूतिः ॥ ३९ ॥

त्वात् । अमृतं च पुण्यलोकत्वात् । मृत्युश्च कालात्मकत्वात् । एवंभूतस्तरणिर्यस्य चक्षुः स प्रसीदतु ॥ ३६ ॥ कथंभूतो वायुश्चराचराणां सहआदिधर्मवान्प्राणः यं प्राणं वयं बुद्ध्याद्यधिष्ठातारो देवाः संम्राजं भृत्या इवान्वास्मानुसृत्य स्थिताः । एवंभूतो वायुर्यस्य प्राणादभूत्सः ॥ ३७ ॥ खानि देहगतानि छिद्राणि प्राणः पंचवृत्तिः इंद्रियाणि च आत्मा मनश्च असवो नागकूर्मादयः शरीरं च तेषां केतमाश्रयभूतं खं यस्य पुरुषस्य नाभ्याः प्रजज्ञे सः ॥ ३८ ॥ यस्य बलान्महेंद्रो जज्ञे । छंदांसि ऋषयश्च खेभ्यः । कः प्रजापतिः ॥ ३९ ॥

ह्या धर्मांनीं युक्त आहे व जसे सार्वभौम राजाला त्याचे सेवक अनुसरून राहतात त्याप्रमाणें ज्याला आह्मीं अनुसरून राहिलों आहों असा हा प्राणरूप वायु ज्याच्या प्राणापासून उत्पन्न झाला आहे तो अचिंत्यैश्वर्यसंपन्न परमात्मा आह्मांवर प्रसन्न होवो ॥ ३७ ॥ तशाच ज्याच्या श्रवणेंद्रियापासून दिशा उत्पन्न झाल्या, ज्याच्या हृदयापासून देहगत छिद्रें उत्पन्न झालीं आणि प्राण,अपान, व्यान, उदान, समान, नाग, कूर्म कृकल, देवदत्त व धनंजय हे दहाप्राण, इंद्रियें, मन आणि शरीर ह्यांना आश्रयभूत असें आकाश ज्या पुरुषाच्या नाभीपासून उत्पन्न झालें आहे तो अचिंत्यैश्वर्यसंपन्न परमात्मा आह्मांवर प्रसन्न होवो ॥ ३८ ॥ तसाच ज्याच्या बलापासून महेंद्र, प्रसादापासून सर्व देव, क्रोधापासून रुद्र, बुद्धीपासून ब्रह्मा, देहच्छिद्रांपासून छंद व ऋषि आणि शिश्नापासून प्रजापति हे उत्पन्न झाले, तो अचिंत्यैश्वर्यसंपन्न परमात्मा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आह्मांवर प्रसन्न होवो ॥ ३९ ॥ तशीच ज्याच्या वक्षस्थलापासून महालक्ष्मी, छायेपासून पितर, स्तनांपासून धर्म, पृष्ठभागापासून अधर्म, मस्तकापासून स्वर्ग आणि क्रीडेपासून अप्सरा उत्पन्न झाल्या, तो अचिंत्यैश्वर्यसंपन्न परमात्मा आह्मांवर प्रसन्न होवो ॥ ४० ॥ तसाच ज्याच्या मुखापासून ब्राह्मण व इंद्रियांनीं न समजणाऱ्या अर्थाचा बोध करणारा वेद, बाहूंपासून क्षत्रिय व प्रजापालनसामर्थ्य, मांड्यांपासून वैश्य व त्याची वृत्ति (व्यापाराचें नैपुण्य) आणि चरणांपासून वेदव्यतिरिक्त शुश्रूषा वृत्ति व तिच्यावर उपजीविका करणारा शूद्र ह्यांची उत्पत्ति झाली. तो अचिंत्यैश्वर्यसंपन्न परमात्मा आह्मांवर प्रसन्न होवो ॥ ४१ ॥ तसाच ज्याच्या अधरोष्ठापासून लोभ, उत्तरोष्ठापासून प्रीति, नासिकेपासून कांति, स्पर्शापासून पशूंना हितकारक काम, भ्रुकुटीपासून यम आणि पापण्यांपासून काल ह्यांची उत्पत्ति झाली तो अचिंत्यैश्वर्यसंपन्न परमात्मा आह्मांवर प्रसन्न होवो ॥ ४२ ॥ आणि फार तर काय परंतु पंचमहाभूतें, काल, कर्म, सत्त्वादिगुण व भौतिक प्रपंच मिळून असलेलें, विद्वान् लोकांनीं त्या

इतरोऽधर्मः ॥ ४० ॥ विड्वैश्यः । ओजो नैपुणं तस्य वृत्तिः अंघ्रिः अंघ्रिजावित्यर्थः । अवेदशूद्रौ अवेदा वेदव्यतिरिक्ता शुश्रूषा तद्वृत्तिमान् शूद्रश्च । पाठांतरं सुगमम् ॥४१॥ उपर्युत्तरोष्ठात् । नस्तो नासिकातः । द्युतिः कांतिः । पशव्यः पशूनां हितः कामः स्पर्शेनाभूत् ॥ ४२ ॥ द्रव्यं भूतानि । वयः कालम् । विशेषं भौतिकप्रपंचम् । यद्यस्माद्दुर्विभाव्यम् । कुतः । प्रबु-

श्रीर्विक्षसः पितरश्छायया ऽऽसन्धर्मः स्तनादितरः पृष्ठतोऽभूत् ॥ द्यौर्यस्य शीर्ष्णोऽप्सरसो विहारात्प्रसीदतां नः स महाविभूतिः ॥४०॥ विप्रो मुखं ब्रह्म च यस्य गुह्यं राजन्य आसीद्भुजयोर्बलं च ॥ ऊर्वोर्विडोजोंऽघ्रिरवेदशूद्रौ प्रसीदतां नः स महाविभूतिः ॥ ४१ ॥ लोभोऽधरात्प्रीतिरुपर्यभूद्द्युतिर्नस्तः पशव्यः स्पर्शेन कामः ॥ भ्रुवोर्यमः पक्ष्मभवस्तु कालः प्रसीदतां नः स महाविभूतिः ॥४२॥ द्रव्यं वयः कर्म गुणान्विशेषं यद्योगमायाविहितान्वदंति ॥ यद्दुर्विभाव्यं प्रबुधापबाधं प्रसीदतां नः स महाविभूतिः ॥ ४३ ॥ नमोऽस्तु तस्मा उपशांतशक्तये स्वाराज्यलाभप्रतिपूरितात्मने ॥ गुणेषु मायारचितेषु वृत्तिभिर्न सज्जमानाय नभस्वदूतये ॥ ४४ ॥स त्वं नो दर्शयात्मानमस्मत्करणगोचरम् ॥ प्रपन्नानां दिदृक्षूणां सस्मितं ते मुखांबुजम् ॥ ४५ ॥ तैस्तैः स्वेच्छाधृतै रूपैः काले काले स्वयं विभो ॥ कर्म दुर्विषहं यन्नो भगवांस्तत्करोति हि ॥ ४६ ॥

धापबाधं विद्वद्भिरपोह्यमानम् । पाठांतरे प्रबुधानां मायेत्यवबोधो यस्मिन्नित्यर्थः ॥४३॥ तदेवं सप्रपंचमुपवर्ण्य निष्प्रपंचमनुवर्णयन्प्रणमति । नमोऽस्त्विति । वृत्तिभिर्दर्शनादिभिः । नभस्वान्वायुस्तस्येव ऊतिर्लीला यस्य तस्मै ॥ ४४ ॥ सस्मितं मुखांबुजं दिदृक्षूणां नोऽस्मच्चक्षुरादिकरणगोचरं यथा भवत्येवं चात्मानं दर्शय ॥ ४५ ॥ भक्तेच्छानुवर्तित्वं

ज्य व अतर्क्य असें हें कार्यकारणात्मक सर्व जग, ज्याच्या योगमायेनें उत्पन्न केलें आहे असें ह्मणतात तो अचिंत्यैश्वर्यसंपन्न परमात्मा आह्मांवर प्रसन्न होवो ॥ ४३ ॥ ह्याप्रमाणें ईश्वराचें सप्रपंच रूप वर्णन करून, आतां निष्प्रपंचरूप वर्णन करीत त्याला नमस्कार करितो कीं,—ज्याचें मन स्वानंदलाभानेंच परिपूर्ण झालें आहे, ज्याचेठिकाणीं सर्व शक्ति उपराम पावल्या आहेत आणि जो मायेनें रचिलेल्या प्रकृतिगुणाचेठिकाणीं दर्शनादि वृत्तींनीं आसक्त होत नाहीं. त्या वायूप्रमाणें सर्वत्र संचार करीत असलेल्या व कोठेंच आसक्त न होणाऱ्या तुला नमस्कार असो ॥ ४४ ॥ याप्रमाणें भगवत्प्रसादाची प्रार्थना करून, आतां त्याच्या दर्शनाची प्रार्थना करितो कीं,—असा अचिंत्यशक्ति व भक्तवत्सल तूं ‘ तुझें हास्ययुक्त मुखकमल अवलोकन करण्याची इच्छा धरून शरण आलेल्या आह्मांला, आमच्या इंद्रियांना गोचर होईल असें ’ आपलें स्वरूप दाखीव ॥ ४५ ॥ हे विभो, तुझें वागणें पुष्कळ वेळ भक्तांच्या इच्छेनुरूप घडत आहे. कारण, त्या त्या प्रसंगीं भक्तांच्या इच्छेनें किंवा आपल्या इच्छेनें धारण केले

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्या स्वरूपांनीं आह्मांला अशक्य असें जें कर्म तें तूं स्वतः करीत आहेस ॥ ४६ ॥ आतां तुझ्यापासून विमुख असलेल्या लोकांनीं केलेलीं कर्में जशीं विपरीत फल देणारीं होतात, तशीं भक्तिपुरःसर तुझेठिकाणीं अर्पण केलेलीं आमचीं पूर्वींचीं पुण्यकर्में विपरीत फळ देणारीं होण्यास योग्य नाहींत असें सांगतो– देहाभिमानी व विषयासक्त अशा जनांचीं कर्में जशीं बहुत क्लेश व अल्प फल ह्यांनीं युक्त असून परिणामी निष्फल होतात तसें तुझ्याठिकाणीं अर्पण केलेलें कर्म निष्फल होत नाहीं ॥ ४७ ॥ तसेंच, अतिअल्प व आभासमात्र असलेलेंहि कर्म ईश्वराचेठिकाणीं अर्पण केलें असतां त्यापासून आयास होत नाहींत; कारण, तो हा ईश्वरच पुरुषाचा आत्मा, प्रिय व हितकारक आहे ह्मणून त्याचेठिकाणीं अर्पण कलेलें कर्म निष्फल होत नाहीं ॥ ४८ ॥ आतां ईश्वराचेठिकाणीं कर्म अर्पण केलें असतां त्यापासून अनंत फल प्राप्त होतें हें दर्शवितो– ज्याप्रमाणें उदकानें वृक्षाच्या मूलाचेठिकाणीं सेचन केलें असतां त्याच्या स्कंधांचें व शाखांचेंहि सेचन होतें, त्याप्रमाणें विष्णूचें आराधन केलें असतां सर्व प्रा-

---

च तव बहुशो दृष्टमेत्याह । तैस्तैरिति । यन्नो दुर्विषहमशक्यं कर्म तद्भगवान्स्वयमेव करोति हि ॥ ४६ ॥ न च बहिर्मुखानामिव त्वद्भक्तानामस्माकं त्वय्यर्पितानि पूर्वपुण्यानि विपरीतफलानि भवितुमर्हंतीत्याह । क्लेशो भूरिर्येषु अल्पं सारं फलं येषु । यद्वा विफलान्येव सकामानां कर्माणि त्वय्यर्पितं तु नैव तथा ॥ ४७ ॥ तत्रावैफल्यमुपपादयति । अवमोऽल्पोऽपि कर्मकल्पः कर्माभासोऽपीश्वरार्पितश्चेद्विफलायायासाय न कल्पते । हि यस्मात्स एष ईश्वरः पुरुषस्यात्मा । अतएव दयितो हितश्च

क्लेशभूर्यल्पसाराणि कर्माणि विफलानि वा ॥ देहिनां विषयार्तानां न तथैवार्पितं त्वयि ॥ ४७ ॥ नावमः कर्मकल्पोऽपि विफलायेश्वरार्पितः ॥ कल्पते पुरुषस्यैष स ह्यात्मा दयितो हितः ॥ ४८ ॥ यथा हि स्कंधशाखानां तरोर्मूलावसेचनम् ॥ एवमाराधनं विष्णोः सर्वेषामात्मनश्च हि ॥ ४९ ॥ नमस्तुभ्यमनंताय दुर्वितर्क्यात्मकर्मणे ॥ निर्गुणाय गुणेशाय सत्त्वस्थाय च सांप्रतम् ॥ ५० ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे अष्टमस्कंधेऽमृतमथने पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ एवं स्तुतः सुरगणैर्भगवान्हरिरीश्वरः ॥ तेषामाविरभूद्राजन्सहस्रार्कोदयद्युतिः ॥ १ ॥

नह्यात्मनि दयिते हिते चार्पितं निष्फलं स्यात् ॥ ४८ ॥ अनंतफलत्वमाह । यथा हि मूलावसेचनं स्कंधानां शाखानां च भवति ॥ ४९ ॥ एवं सत्यपि त्वदर्पितकर्मणां त्वद्भक्तानामस्माकं किंनिमित्तमिदं दुःखमिति त्वमेव वेत्सीत्याशयेनाह । नम इति । दुर्वितर्क्याण्यात्मकर्माणि स्वभावचेष्टितानि यस्य तस्मै ॥ ५० ॥ इति श्रीमद्भागवते अष्टमस्कंधे टीकायां पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥ ॥ षष्ठे पुनः स्तुतिर्विष्णावाविर्भूते सुरैः कृता ॥ तन्मंत्राच्चासुरैः साकममृतार्थे महोद्यमः ॥ १ ॥ हसस्राकार्णां द्युतिरिव द्युतिर्यस्य ॥१॥

ण्यांचें व आपलें स्वतःचेंहि आराधन होतें ॥४९॥ परंतु, असें असूनहि भक्तिपुरःसर तुझेठिकाणीं कर्म अर्पण करूनसुद्धां आह्मांला हें दुःख होण्याचें कारण काय तें तूंच जाणत आहेस अशा आशयानें ह्मणतो कीं,–ज्याचीं स्वाभाविक कर्में अतर्क्य आहेत, ज्याचा अंत नाहीं, जो स्वतः निर्गुण असून गुणांचा नियंता आहे आणि ज्यानें सांप्रतकालीं सत्त्वगुणांचा अंगीकार केला आहे त्या तुला नमस्कार असो ॥ ५० ॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील अष्टमस्कंधामध्यें हरिस्तुतिनिरूपणनामक हा पांचवा अध्याय समाप्त झाला ॥ ५॥ ॥ आतां, ह्या सहाव्या अध्यायामध्यें विष्णु प्रकट झाला असतां, देवांनीं त्याची स्तुति करून त्याच्या सल्लयानें असुरांसहवर्तमान अमृतप्राप्तीकरितां समुद्रमंथनरूप मोठा उद्योग आरंभिला अशी कथा आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणालाः–हे राजा, ह्याप्रमाणें देवगणांनीं स्तुति केली असतां, सहस्रसूर्योदयाप्रमाणें ज्याची कांति आहे असा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दुःखहर्ता भगवान् ईश्वर, त्यांच्या अग्रभागीं प्रकट झाला ॥ १ ॥ त्याच तेजाच्या योगानें ज्यांचे नेत्र दिपून गेले आहेत अशा देवांना आकाश, दिशा, पृथ्वी व आपला देह हींसुद्धां दिसत नाहींशीं झालीं, मग सर्वव्यापी ईश्वर कोठून दिसणार, दिसलाच नाहीं ॥ २ ॥ असो. त्यावेळीं शंकरासहवर्तमान ब्रह्मदेवानें, ती भगवंताची मूर्ति अवलोकन केली. ती निर्मळ असून पाचेसारख्या श्यामवर्णानें युक्त होती. तिचे नेत्र कमलगर्भाप्रमाणें आरक्तवर्ण होते ॥ ३ ॥ ती तापलेल्या सुवर्णाप्रमाणें पिंवळ्या वर्णाच्या रेशमी वस्त्रानें युक्त होती, तिचे सर्व अवयव प्रसन्न व मनोहर होते, ती उत्तम मुख व सुंदर भ्रुकुटी ह्यांनीं युक्त होती ॥ ४ ॥ ती महारत्नांनीं युक्त असलेल्या मुकुटानें व बाहुभूषणांनीं भूषित होती. कर्णाचेठिकाणीं असलेल्या कुंडलांच्या योगानें अत्यंत प्रकाशित झालेल्या गालांनीं तिच्या मुखकमलावर शोभा आली

महसा तेजसा प्रतिहतानीक्षणानि चक्षूंषि येषाम् ॥ २ ॥ तामाविर्भूतां तनुं विरिंचो दृष्ट्वा तुष्टावेति पंचमेनान्वयः । कंजगर्भवदरुणे ईक्षणे यस्याः ॥ ३ ॥ तप्तहेमवदवदातेन पीतेन लसता कौशेयवाससा युक्ताम् । प्रसन्नानि चारूणि सर्वाण्यंगानि यस्याः । शोभनं मुखं यस्याः । सुंदरे भ्रुवौ यस्याः ॥ ४ ॥ महांतो मणयो यस्मिंस्तेन किरिटेन कर्णाभरणे कुंडले ताभ्यां निर्भातौ यौ कपोलौ ताभ्यां श्रीर्मुखांबुजे यस्याः ॥ ५ ॥ कौस्तुभ आभरणं कंठे यस्याः । लक्ष्मीं वक्षसि बिभ्रतीम् ॥ ६ ॥ देवप्रवरो

तेनैव महसा सर्वे देवाः प्रतिहतेक्षणाः ॥ नापश्यन्खं दिशः क्षोणीमात्मानं च कुतो विभुम् ॥ २ ॥ विरिंचो भगवान्दृष्ट्वा सह शर्वेण तां तनुम् ॥ स्वच्छां मरकतश्यामां कंजगर्भारुणेक्षणाम् ॥ ३ ॥ तप्तहेमावदातेन लसत्कौशेयवाससा ॥ प्रसन्नचारुसर्वांगीं सुमुखीं सुंदरभ्रुवम् ॥ ४ ॥ महामणिकिरीटेन केयूराभ्यां च भूषिताम् ॥ कर्णाभरणनिर्भातकपोलश्रीमुखांबुजाम् ॥ ५ ॥ कांचीकलापवलयहारनूपुरशोभिताम् ॥ कौस्तुभाभरणां लक्ष्मीं बिभ्रतीं वनमालिनीम् ॥ ६ ॥ सुदर्शनादिभिः स्वास्त्रैर्मूर्तिमद्भिरुपासिताम् ॥ तुष्टाव देवप्रवरः सशर्वः पुरुषं परम् ॥ सर्वामरगणैः साकं सर्वांगैरवनिंगतैः ॥ ७ ॥ ब्रह्मोवाच ॥ अजातजन्मस्थितिसंयमायागुणाय निर्वाणसुखार्णवाय ॥ अणोरणिम्नेऽपरिगण्यधाम्ने महानुभावाय नमो नमस्ते ॥ ८ ॥

ब्रह्मा । सर्वांगैरवनिं गतैः साष्टांगं प्रणतैः ॥ ७ ॥ अनाविराविरासेयं नाभूताऽभूदिति ब्रुवन् ॥ ब्रह्माऽभिप्रैति नित्यत्वविभुत्वे भगवत्तनोः ॥ १ ॥ श्रीमूर्तेरयमाविर्भाव एव नत्वस्मदादिवज्जन्मादि तवास्तीत्याह । न जाता जन्मादयो यस्य । कुतः अगुणाय अतो निर्वाणसुखस्यार्णवाय । अपारमोक्षसुखरूपायेत्यर्थः । तथाऽप्यणोरप्यणिम्नेऽतिसूक्ष्माय । दुर्ज्ञानत्वात् । वस्तुतस्त्वपरिगण्यमियत्तातीतं धाम मूर्तिर्यस्य तस्मै । न चैतदसंभावितम् । यतो महानचिंत्योऽनुभावो यस्य तस्मै ॥ ८ ॥

होती, ती कमरेच्या ठिकाणीं मेखला, हातामध्यें कडींतोडे, कंठामध्यें हार व पायांमध्यें नूपुरें ह्यांनीं सुशोभित होती, तिच्या कंठामध्यें कौस्तुभरूपी भूषण होतें, ती वक्षस्थलाचेठिकाणीं लक्ष्मीला धारण करीत असे, तिनें गळ्यामध्यें वनमाला धारण केली होती आणि तिची उपासना मूर्तिमंत सुदर्शनादि अस्त्रें करीत असत. अशा त्या परमपुरुषाच्या मूर्तीला अवलोकन करून साष्टांग नमस्कार केलेल्या सर्व देवांसहवर्तमान तो ब्रह्मदेव स्तुति करूं लागला कीं, ॥ ५ ॥ ६ ॥ ७ ॥ ब्रह्मदेव ह्मणाला— हे प्रभो, निर्गुण, उत्पत्तिस्थितिलयशून्य, अपार मोक्षसुखाचा समुद्र, परमाणूपेक्षांसुद्धां सूक्ष्म, अचिंत्य प्रभावानें युक्त व ज्याच्या स्वरूपाला इयत्ता नाहींअशा तुला नम-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

स्कार असो ॥ ८ ॥ आतां ईश्वरोचें स्वरूप सनातन व अपरिमेय आहे असें दर्शवितो– हे पुरुषश्रेष्ठा विधात्या, तुझें हें स्वरूपच वेदानें व तंत्रानें सांगितलेल्या उपायांच्या योगानें कल्याणेच्छु पुरुषांनीं सर्वदा पूजन करण्यास योग्य आहे. अहो खरोखर विश्वमूर्ति अशा ह्या तुझ्या स्वरूपाचेठिकाणीं आह्मां सर्व देवगणांसहवर्तमान तिन्ही लोकांना मी अवलोकन करितों ह्मणून हें तुझें स्वरूप अपरिच्छिन्न आहे ॥ ९ ॥ आतां त्यावें विश्वमूर्तित्व सांगतो– हे परमेश्वरा, ज्याप्रमाणें मृत्तिका, घटाचा आदि अंत व मध्य असत्ये त्याप्रमाणें तूंच ह्या जगताच्या आदीं, अंतीं व मध्यें असून प्रकृतीपेक्षां पलिकडचा आहेस ह्मणून हें जग सृष्टीच्या पूर्वीं स्वतंत्र अशा तुझेचठिकाणीं होतें सृष्टिकालीं तुझेठिकाणींच आहे व सृष्टीच्या अंतींहि तुझेचठिकाणीं लय पावेल ॥ १० ॥ आतां मृत्तिकादृष्टांतानें प्राप्त झालेल्या परिणामवादाचा निरास करितो–

तन्मूर्तेः सनातनत्वमपरिमेयत्वं चोपपादयति । रूपमिति । हे पुरुषर्षभ हे धातः एतत्तव रूपं वैदिकेन तांत्रिकेण च योगेनोपायेन श्रेयोर्थिभिः सदेज्यं पूज्यम् । अतो नेदमिदानीमपूर्वं जातमिति भावः । ननु यूयं देवाः पूज्यत्वेन प्रसिद्धाः, सत्यं, सर्वेऽप्यत्रैवांतर्भूता इत्याह । उ अहो । ह स्फुटम् । अमुष्मिंस्त्वयि नोऽस्मांस्त्रीन् लोकांश्च सह पश्यामि । तत्र हेतुः । विश्वं मूर्तौ यस्य अतस्तवैतद्रूपं परिच्छिन्नमपि न भवतीति भावः ॥ ९ ॥ विश्वमूर्तित्वमेवाह । त्वयीति । घटस्य मृत्तिका यथा आदिरंतश्च मध्यं च तथा

रूपं तवैतत्पुरुषर्षभेज्यं श्रेयोर्थिभिर्वैदिकतांत्रिकेण ॥ योगेन धातः सह नस्त्रिलोकान्पश्याम्यमुष्मिन्नु ह विश्वमूर्तौ ॥ ९ ॥ त्वय्यग्र आसीत्त्वयि मध्य आसीत्त्वय्यंत आसीदिदमात्मतंत्रे ॥ त्वमादिरंतो जगतोऽस्य मध्यं घटस्य मृत्स्नेव परः परस्मात् ॥ १० ॥ त्वं माययाऽऽत्माश्रयया स्वयेदं निर्माय विश्वं तदनु प्रविष्टः ॥ पश्यंति युक्ता मनसा मनीषिणो गुणव्यवायेऽप्यगुणं विपश्चितः ॥ ११ ॥ यथाऽग्निमेधस्यमृतं च गोषु भुव्यन्नमंबूद्यमने च वृत्तिम् ॥ योगैर्मनुष्या अधियंति हि त्वां गुणेषु बुद्ध्या कवयो वदंति ॥ १२ ॥ तं त्वां वयं नाथ समुज्जिहानं सरोजनाभातिचिरेप्सितार्थम् ॥ दृष्ट्वा गता निर्वृतिमद्य सर्वे गजा दवार्ता इव गांगमंभः ॥ १३ ॥

त्वमस्य जगतः । तत्र हेतुः । परस्मात्प्रधानादपि परः ॥ १० ॥ मृत्तिकादृष्टांतेन परिणामं प्राप्तं वारयति । त्वमिति । स्वया स्वाधीनया । अतएव गुणानां व्यवाये परिणामेऽप्यगुणमेव त्वां युक्ताः पश्यंति । मनीषिणो विवेकिनः । विपश्चितः शास्त्रज्ञाः ॥ ११ ॥ एतदेव सदृष्टांतमाह । यथाऽग्निं काष्ठे मथनेन । अमृतमाज्यं गोषु दोहनादिना । भुव्यन्नं व्रीह्यादिकर्षणादिना अंबु च खननेन । उद्यमने पुरुषकारे वाणिज्यादिना वृत्तिं जीविकाम् । यद्वा अंबु उद्यमने घटीयंत्रादिनोद्धरणे । योगैरुपायैर्मनुष्या अधियंति प्राप्नुवंति यथा कवयस्त्वां बुद्ध्या गुणेष्वधियंति वदंति च ॥ १२ ॥ हे नाथ सरोजनाभ अतिचिरादीप्सितमर्थं तं योगैकप्राप्यं त्वां सम्यगुज्जिहानमाविर्भवंतं

हे देवा, तूं स्वाधीन असलेल्या आपल्या मायेच्या योगानें हें विश्व निर्माण करून त्यामध्यें प्रविष्ट झाला आहेस ह्मणून गुणांच्या परिणामकालींहि सावधानचित्त असलेले शास्त्रज्ञ विवेकी जन, मनांच्या योगानें निर्गुण अशा तुलाच अवलोकन करितात ॥ ११ ॥ आतां हेंच सदृष्टांत सांगतो– जसे मनुष्य, काष्ठामध्यें असलेला अग्नि, गाईंचेठिकाणीं असलेलें तूप, भूमीमध्यें असलेलें अन्न व उदक व उद्योगाचेठिकाणीं असलेली जीविका अनुक्रमें मंथन, दोहन, कर्षण, खनन आणि व्यापार इत्यादिक उपायांनीं प्राप्त करून घेतात त्याप्रमाणें गुणांचेचठिकाणीं असलेल्या तुला बुद्धीच्या योगानें विवेकीजन प्राप्त करून घेतात व तुझ्याशीं संभाषणहि करितात ॥ १२ ॥ तस्मात्, ॥ १४ ॥
हे प्रभो पद्मनाभा, ज्याप्रमाणें वणव्याच्या योगानें पीडित झालेले हत्ती गंगाजल प्राप्त झालें असतां सुखी होतात त्याप्रमाणें बहुकालपर्यंत मनांत असलेल्या ह्या सांप्रत-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

काळीं प्रकट होणाऱ्या परमपुरुषार्थरूपी तुला प्रत्यक्ष अवलोकन करून, आज आह्मां सर्वांना परमानंद प्राप्त झाला आहे ॥ १३ ॥ आतां काय करावयाचें असेल तें सांग असें ह्मणशील तर,—हे अंतरात्म्या, आह्मीं सर्व लोकपाल, ज्याकरितां तुझ्या चरणाजवळ प्राप्त झालों आहों तें कार्य तूं कर. कारण,—अंतर्यामिरूपानें सर्वसाक्षी असलेल्या तुला इतरांनीं समजविण्यास योग्य अशी बाहेरची वस्तु काय बरें आहे? काहींच नाहीं ॥ १४ ॥ आतां, तुह्मींच कांहीं तरी उपाय करा, असें ह्मणशील तर—हे ईश्वरा, मी, रुद्र, इतर देवादिक व दक्षप्रभृति प्रजापति हे सर्व, अग्नीपासून उत्पन्न झालेल्या ठिणग्यांप्रमाणें तुझ्यापासून निराळे भासमान होत असल्यामुळें आपल्या सुखाचें साधन जाणत आहों कीं काय? नाहींच जाणत. ह्मणून तूं ब्राह्मणांच्या व देवांच्या सुखाचा उपाय 'हें अमुक कृत्य करा, असा' आह्मांस सांग ॥ १५ ॥ श्रीशुकाचार्य

प्रत्यक्षतो दृष्ट्वाऽद्य वयं निर्वृतिं गताः । दवार्ता दाव ग्निपीडिताः ॥ १३ ॥ यद्विधेयं तत्कथयेति चेत्तत्राह । हे अंतरात्मन् अशेषसाक्षिणस्ते बहिः किं वाऽन्यैर्विज्ञाप्यमस्ति ॥ १४ ॥ यूयमेव किंचित्कुरुतेति चेत्तत्राह । अहमिति । अग्नेः केतवो विस्फुलिंगा इव ते त्वत्तो वयं पृथग्विभाताः संत आत्मनः श्रेयः किं वा विद्मः । अतस्त्वमेव द्विजानां देवानां च मंत्रं विधत्स्व । इदं कुरुतेत्युपायमुपदिशेत्यर्थः ॥१५॥ हृदयं मंत्र उपदेष्टव्य इत्यभिमेतं यथा तथैव विज्ञाय जगाद । संवृतानि नियमितानि सर्वाणि कारकाणीं-

स त्वं विधत्स्वाखिललोकपाला वयं यदर्थास्तव पादमूलम् ॥ समागतास्ते बहिरंतरात्मन्किं वाऽन्यविज्ञाप्यमशेषसाक्षिणः ॥ १४ ॥ अहं गिरित्रश्च सुरादयो ये दक्षादयोऽग्नेरिव केतवस्ते ॥ किं वा विदामेश पृथग्विभाता विधत्स्व शं नो द्विजदेवमंत्रम् ॥ १५ ॥ श्रीशुक उवाच ॥ एवं विरिंचादिभिरीडितस्तद्विज्ञाय तेषां हृदयं तथैव ॥ जगाद जीमूतगभीरया गिरा बद्धांजलीन्संवृतसर्वकारकान् ॥ १६ ॥ एक एवेश्वरस्तस्मिन्सुरकार्ये सुरेश्वरः ॥ विहर्तुकामस्तानाह समुद्रोन्मथनादिभिः ॥ १७ ॥ श्रीभगवानुवाच ॥ हंत ब्रह्मन्नहो शंभो हे देवा मम भाषितम् ॥ शृणुतावहिताः सर्वे श्रेयो वः स्याद्यथा सुराः ॥ १८ ॥ यात दानवदैतेयैस्तावत्संधिर्विधीयताम् ॥ कालेनानुगृहीतैस्तैर्यावद्वो भव आत्मनः ॥ १९ ॥ अरयोऽपि हि संधेयाः सति कार्यार्थगौरवे ॥ अहिमूषकवद्देवा अर्थस्य पदवीं गतैः ॥ २० ॥

द्रियाणि यैस्तान् ॥ १६ ॥ ईश्वरस्यापि तथैवाभिमेतमित्याह । एक एवेश्वरः समर्थोऽपि ॥ १७ ॥ हे सुरा हेदेवा अन्ये च गंधर्वादयः ॥ १८ ॥ वः आत्मनः स्वतो यावद्भवो वृद्धिर्भवति ॥ १९ ॥ अर्थस्य प्रयोजनस्य पदवीं सिद्धिं प्राप्तैः पश्चादहिमूषकवद्वध्यघातकभावेन वर्तितव्यमिति शेषः । यद्वा पेटिकायां निरुद्धोऽहिर्यथा निर्गमद्वारविधानार्थं प्रथमं

ह्मणाला— हे राजा, ह्याप्रमाणें ब्रह्मादिकांनीं स्तुति केलेला तो भगवान्, जसा त्यांचा अभिप्राय होता त्याप्रमाणें जाणून, सर्व इंद्रियांचें संयमन करून आपल्यापुढें हात जोडून उभे राहणाऱ्या त्या देवांस, मेघांसारिख्या गंभीर वाणीनें ह्मणाला कीं,— ॥ १६ ॥ आतां ईश्वराचाहि अभिप्राय देवांप्रमाणेंच होता हें सुचविण्याकरितां शुकाचार्य ह्मणतो कीं,— हे राजा, देवाधिपति भगवान् तें देवकार्य करण्याविषयीं जरी एकटाच समर्थ होता तथापि तो स्वतांहि समुद्रमंथनादिकांनीं क्रीडा करण्याची इच्छा करीत होत्साता, त्यांना ह्मणाला ॥ १७ ॥ श्रीभगवान् ह्मणाला— हे ब्रह्मन्, हे शंभो, हे देवहो व हे गंधर्वादिकहो, तुह्मीं सर्वजण एकाग्र अंतःकरणपूर्वक माझें भाषण श्रवण करा, ह्मणजे तुमचें उत्तमप्रकारें कल्याण होईल ॥ १८ ॥ हे देवहो, तुह्मीं आधीं दैत्यदानवांकडे जा आणि तुमची स्वतःची जोंपर्यंत वृद्धि होईल तोंपर्यंत कालानें अनुग्रह केलेल्या त्या दैत्यदानवांबरोबर सख्य करा ॥ १९ ॥ कारण, हे देवहो, एकादें मोठें कार्य व्हावयाचें असलें ह्मणजे तें सिद्ध होण्याकरितां शत्रूंबरोबरसुद्धां मैत्री

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

केली पाहिजे, ती तुह्मी करून तुमचा कार्यभाग झाला ह्मणजे नंतर तुह्मी सर्पमूषकांप्रमाणें वध्यघातकभावानें वागावें ॥ २० ॥ असो. सख्य केल्यानंतर, ज्याचें प्राशन केलें असतां मृत्यूनें ग्रासलेलाहि प्राणी अमर होतो असें अमृत उत्पन्न करण्याकरितां तुह्मीं त्यांच्यासहवर्तमान सत्वर यत्न करा ॥ २१ ॥ आतां, अमृत कसें उत्पन्न करावें ? असें ह्मणाल तर– हे देवहो, प्रथमतः क्षीरसागरामध्यें वल्ली, तृण, लता व ओषधी ह्या घालून मंदरपर्वताचा मंथा करून आणि वासुकीची रज्जू करून माझ्या साहाय्यानें तुह्मीं आळस न करितां मंथन करा ह्मणजे दैत्य क्लेशमात्र भोगणारे होतील व तुह्मीं फलग्राही व्हाल ॥२२ ॥ २३ ॥ आतां, बलिष्ठ सहकाऱ्यांच्या योगानें साध्य होणाऱ्या गोष्टी त्यांना अनुसरून वागल्यावांचून सिद्ध होत नाहींत, असें मनांत आणून सामादिकांचा उपदेश करितो कीं–हे देवहो, असुर जें इच्छितील त्याला तुह्मीं अनुमोदन द्या.

मूषकेण संधिं विधत्ते पश्चात्तमेव कदाचिद्भक्षयति तथाऽर्थमार्गप्रवृत्तैः प्रथमं संधेया इत्यर्थः ॥२०॥ ततस्तैः सह यत्कार्यं तदाह । अमृतोत्पादन इति । यस्यामृतस्य पीतस्य सतः ॥२१॥ नेत्रं रज्जुम् ॥ २२ ॥ ननु तर्हि तेऽप्यमृतपानेनामराः स्युस्तत्राह । क्लेशभाज इति ॥ २३ ॥ बलिभिः सहकारिभिः साध्या अर्थास्तदनुसरणं विना न सिद्ध्यंतीति कृत्वा सा-

अमृतोत्पादने यत्नः क्रियतामविलंबितम् ॥ यस्य पीतस्य वै जंतुर्मृत्युग्रस्तोऽमरो भवेत् ॥ २१ ॥ क्षिप्त्वा क्षीरोदधौ सर्वा वीरुत्तृणलतौषधीः ॥ मंथानं मंदरं कृत्वा नेत्रं कृत्वा तु वासुकिम् ॥ २२ ॥ सहायेन मया देवा निर्मंथध्वमतंद्रिताः ॥ क्लेशभाजो भविष्यंति दैत्या यूयं फलग्रहाः ॥ २३ ॥ यूयं तदनुमोदध्वं यदिच्छंत्यसुराः सुराः ॥ न संरंभेण सिद्ध्यंति सर्वेऽर्थाः सांत्वया यथा ॥ २४ ॥ न भेतव्यं कालकूटाद्विषाज्जलधिसंभवात् ॥ लोभः कार्यो न वै जातु रोषः कामस्तु वस्तुषु ॥ २५ ॥ श्रीशुक उवाच ॥ इति देवान्समादिश्य भगवान्पुरुषोत्तमः ॥ तेषामंतर्दधे राजन्स्वच्छंदगतिरीश्वरः ॥ २६ ॥ अथ तस्मै भगवते नमस्कृत्य पितामहः ॥ भवश्च जग्मतुः स्वं स्वं धामोपेयुर्बलिं सुराः ॥ २७ ॥ दृष्ट्वाऽरीनप्यसंयत्तान् जातक्षोभान्स्वनायकान् ॥ न्यषेधद्दैत्यराट् श्लोक्यः संधिविग्रहकालवित् ॥ २८ ॥

मादिकमुपदिशति । यूयमिति द्वाभ्याम् । हे सुराः । संरंभेण संभ्रमेण सांत्वया साममार्गेण यथा सिद्ध्यंति ॥ २४ ॥ वस्तुषु मथनादुत्पन्नेषु ॥ २५ ॥ २६ ॥ सुरास्तु बलिमुपेयुरुपजग्मुः ॥ २७ ॥ असंयत्तानपि दृष्ट्वा । श्लोक्यः कीर्त्यर्हः ॥ २८ ॥

कारण, साममार्गानें जशीं कार्यें सिद्ध होतात तशीं क्रोधावेशानें सिद्ध होत नाहींत ॥ २४ ॥ आणि समुद्रांतून उत्पन्न झालेल्या कालकूट विषापासून तुह्मीं मुळींच भय बाळगूं नका व मंथनापासून उत्पन्न होतील त्या वस्तूंविषयीं तुह्मी काम क्रोध अथवा लोभ कदापि धारण करूं नका ॥ २५ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, ह्याप्रमाणें देवांना सांगून स्वेच्छानुसार वागणारा भगवान् पुरुषोत्तम ईश्वर त्यांच्यासमक्ष गुप्त झाला ॥ २६ ॥ नंतर त्या भगवंताला नमस्कार करून ब्रह्मदेव व रुद्र हे उभयतां आपापल्या स्थानाप्रत निघून गेले आणि इतर सर्व देव बलीच्या दरवाज्यांत प्राप्त झाले॥२७॥तेव्हां संधि आणि विग्रह ह्यांना योग्यकाल कोणता हें जाणणारा व ह्मणूनच स्तुतीस पात्र अशा त्या दैत्याधिपति बलीनें युद्धासाठीं उद्युक्त नसलेल्या त्या देवरूपी शत्रूंना पाहून युद्धाकरितां क्षोभून गेलेल्या आपल्या सेनापतींचें निवारण केलें ॥२८ ॥ ॥ १९ ॥

---

१ जसा पेटाऱ्यांत कोंडलेला साप, बाहेर पडण्याचें द्वार करण्याकरितां प्रथम मूषकाबरोबर संधि करितो आणि बाहेर पडल्यावर त्या मूषकालाच कदाचित् भक्षण करितो त्याप्रमाणें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नंतर, ते देव, सर्वांना जिंकणारा, परम संपत्तीनें युक्त व असुरसेनाधिपतींनीं सुरक्षित अशा सिंहासनावर बसलेल्या त्या विरोचनपुत्र बलिराजाजवळ गेले ॥ २९ ॥
तदनंतर महाबुद्धिमान् अशा इंद्रानें मधुरवाणीनें त्याचें सांत्वन करून, पुरुषोत्तमानें सांगितलेलें तें अमृत मंथनादिक सर्व त्याला निवेदन केलें ॥ ३० ॥ तेव्हां तें इंद्रानें
केलेलें भाषण, बलिराजाला व जे तेथें पौलोम, कालकेय, शंबरासुर व अरिष्टनेमिवगैरे दैत्याधिपति होते त्यांना आणि जे त्रिपुरवासी होते त्यांनाहि पसंत पडलें
॥ ३१ ॥ नंतर हे शत्रुतापना राजा, देवासुरांनीं एकमेकांचें भाषण मान्य करून परस्परांशीं मैत्री केली व अमृतप्राप्तीकरितां मोठा उद्योग आरंभिला ॥ ३२ ॥ तेव्हां
परिघासारख्या बाहूंनीं युक्त व सशक्त असल्यामुळें दुर्मद अशा त्या देवदैत्यांनीं मंदरपर्वताला बलात्कारानें उपटून गर्जना करीत करीत ते त्याला समुद्राच्या कांठीं

वैरोचनिं बलिम् । जितमशेषं त्रैलोक्यं येन तम् ॥ २९ ॥ तत्सर्वममृतोन्मथनादि ॥ ३० ॥ तत्र ये अन्ये चासुराधिपाः पौलोमकालेयादयः शंबरादयश्च

ते वैरोचनिमासीनं गुप्तं चासुरयूथपैः ॥ श्रिया परमया जुष्टं जिताशेषमुपागमन् ॥ २९ ॥ महेंद्रः श्लक्ष्णया वाचा सांत्वयित्वा म-
हामतिः ॥ अभ्यभाषत तत्सर्वं शिक्षितं पुरुषोत्तमात् ॥ ३० ॥ तदरोचत दैत्यस्य तत्रान्ये येऽसुराधिपाः ॥ शंबरोऽरिष्टनेमिश्च ये
च त्रिपुरवासिनः ॥ ३१ ॥ ततो देवासुराः कृत्वा संविदं कृतसौहृदाः ॥ उद्यमं परमं चक्रुरमृतार्थे परंतप ॥ ३२ ॥ ततस्ते मंदरगि-
रिमोजसोत्पाट्य दुर्मदाः ॥ नदंत उदधिं निन्युः शक्ताः परिघबाहवः ॥ ३३ ॥ दूरभारोद्वहश्रांताः शक्रवैरोचनादयः ॥ अपारयंत-
स्तं वोढुं विवशा विजहुः पथि ॥ ३४ ॥ निपतन्स गिरिस्तत्र बहूनमरदानवान् ॥ चूर्णयामास महता भारेण कनकाचलः ॥ ३५ ॥
तांस्तथा भग्नमनसो भग्नबाहूरुकंधरान् ॥ विज्ञाय भगवांस्तत्र बभूव गरुडध्वजः ॥ ३६ ॥ गिरिपातविनिष्पिष्टान्विलोक्यामरदानवा-
न् ॥ ईक्षया जीवयामास निर्जरान्निर्व्रणान्यथा ॥ ३७ ॥ गिरिं चारोप्य गरुडे हस्तेनैकेन लीलया ॥ आरुह्य प्रययावब्धिं सुरासुरगणैर्वृतः
॥ ३८ ॥ अवरोप्य गिरिं स्कंधात्सुपर्णः पततां वरः ॥ ययौ जलांत उत्सृज्य हरिणा स विसर्जितः ॥ ३९ ॥

तेभ्यश्चारोचत ॥ ३१ ॥ संविदं समयम् ॥ ३२ ॥ परिघा इव बाहवो येषाम् ॥ ३३ ॥ ३४ ॥ ३५ ॥ ३६ ॥ ३७ ॥ ३८ ॥ विसर्जितः प्रस्थापितः ।

नेऊं लागले ॥ ३३ ॥ तेव्हां, नेतांनेतां इंद्रादिक देव व बलिप्रभृति दैत्य हे सर्व दूरपर्यंत पर्वताचा भार वाहिल्यामुळें श्रम पाऊन अगदीं जेरीस आले. आणि पुढें ने-
ण्यास असमर्थ होऊन त्यांनीं मार्गामध्येंच त्या पर्वताचा त्याग केला ॥ ३४ ॥ त्याठिकाणीं पडतांपडतां त्या कनकपर्वतानें आपल्या महाभाराच्या योगानें पुष्कळ
देवदैत्यांचें चूर्ण करून टाकिलें ॥ ३५ ॥ इतक्यांमध्यें ज्यांचे बाहु, मांड्या व माना भग्न झाल्या आहेत आणि ज्यांच्या मनाचा उत्साह नाहींसा झाला आहे अशा त्या
देवदैत्यांना जाणून त्याठिकाणीं भगवान् गरुडध्वज अकस्मात् प्रकट झाला ॥ ३६ ॥ आणि पर्वताच्या पडण्यानें अगदीं चूर्ण झालेल्या देवदैत्यांना पाहून त्यानें आपल्या
अमृतदृष्टीनें त्यांस जिवंत केलें. आणि पूर्वींप्रमाणें, शक्तियुक्त व व्रणरहित केलें ॥ ३७ ॥ नंतर त्यानें एका हातानें लीलेनें तो पर्वत उचलून गरुडावर ठेविला आणि आपणहि
त्याच्यावर आरूढ होऊन देवदैत्यगणांसहवर्तमान समुद्राच्या समीपभागीं गमन केलें ॥ ३८ ॥ तेव्हां पक्षिश्रेष्ठ गरुडानें आपल्या स्कंधावरून त्या पर्वताला खालीं उत-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रून समुद्राच्या उदकाजवळ ठेविला आणि श्रीहरीनें जाण्याकरितां आज्ञा केल्यावरून तो गरुड तेथून निघून गेला ॥ ३९ ॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील अष्टमस्कंधापैकीं अमृताख्यानसंबंधीं मंदरपर्वतानयननामक हा सहावा अध्याय समाप्त झाला ॥ ६ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या सातव्या अध्यायामध्यें मंथनापासून झालेल्या विषाच्या भीतीनें सर्व जनांनीं भगवान् श्रीरुद्राची स्तुति केली असतां, त्यानें परमकृपेनें त्या विषाचें प्राशन केलें ही कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, नंतर त्या देवदैत्यांनीं नागराज वासुकीला, तुह्माहि अमृतापैकीं कांहीं भाग मिळेल असें सांगून, त्याचा देहरूप रज्जु, त्या मंदरपर्वताच्या सभोंवती गुंडाळून अमृतप्राप्तीकरितां प्रयत्नपूर्वक मोठ्या हर्षानें समुद्रमंथन करण्यास प्रारंभ केला. त्यावेळीं वासुकीचे विषोद्गार करणारें अतितीव्र मुख, दैत्यांकडून धरविण्याकरितांच श्रीहरीनें प्रथमतः तें मुख ग्रहण केलें तेव्हां देवहि त्या मुखाकडेच लागले ॥ १ ॥ २ ॥ तें महापुरुष भगवंताचें चेष्टित दैत्याधिपतींना बरोबर

सुपर्णे तत्र स्थिते वासुकेरागमनायोगादिति भावः ॥ ३९ ॥ इति श्रीमद्भागवते अष्टमस्कंधे षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥ ॥ सप्तमे मथनोद्भूतविषभीत्याऽखिलैर्जनैः ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणे अष्टमस्कंधेऽमृतमथने मंदराचलानयनं नाम षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ ते नागराजमामंत्र्य फलभागेन वासुकिम् ॥ परिवीय गिरौ तस्मिन्नेत्रमब्धिं मुदान्विताः ॥ १ ॥ आरेभिरे सुसंयत्ता अमृतार्थं कुरूद्वह ॥ हरिः पुरस्ताज्जगृहे पूर्वं देवास्ततोऽभवन् ॥ २ ॥ तन्नैच्छन्दैत्यपतयो महापुरुषचेष्टितम् ॥ न गृह्णीमो वयं पुच्छमहेरंगममंगलम् ॥ ३ ॥ स्वाध्यायश्रुतसंपन्नाः प्रख्याता जन्मकर्मभिः ॥ इति तूष्णीं स्थितान्दैत्यान्विलोक्य पुरुषोत्तमः ॥ स्मयमानो विसृज्याग्रं पुच्छं जग्राह सामरः ॥ ४ ॥ कृतस्थानविभागास्त एवं कश्यपनंदनाः ॥ ममंथुः परमायत्ता अमृतार्थं पयोनिधिम् ॥ ५ ॥ मथ्यमानेऽर्णवे सोऽद्रिरनाधारो ह्यपोऽविशत् ॥ ध्रियमाणोऽपि बलिभिर्गौरवात्पांडुनंदन ॥ ६ ॥ ते सुनिर्विण्णमनसः परिम्लानमुखश्रियः ॥ आसन्स्वपौरुषे नष्टे दैवेनातिबलीयसा ॥ ७ ॥

स्तुतः सन्कृपया रुद्रः पपौ विषमितीर्यते ॥ १ ॥ फलभागेन तवाप्यमृतभागो भविष्यतीत्यामंत्र्य संमंत्र्य वासुकिं नेत्रं गिरौ परिवीय संवेष्ट्याब्धिं मथितुमारेभिरे ॥ १ ॥ वासुकेर्मुखं तीव्रं दैत्यान्ग्राहयितुमेव पूर्वं हरिः पुरस्तान्मुखे जगृहे । ततोऽभवन्मुखं जगृहुः ॥ २॥ ३ ॥ ४ ॥ कृतो धारणे स्थानविभागो यैः ॥ ५ ॥ ६ ॥ दैवेन हेतुना स्वपौ-

---

वाटलें नाहीं ह्मणून ते ह्मणाले कीं,—वेदशास्त्राध्ययनसंपन्न आणि जन्मकर्मांनीं प्रख्यात असे आह्मीं सर्पाचें पुच्छरूप हें अमंगल अंग ग्रहण करणार नाहीं. असें ह्मणून स्वस्थ बसलेल्या त्या दैत्यांना पाहून पुरुषोत्तम भगवंतानें हंसतहंसत त्या मुखाचा त्याग करून देवांसहवर्तमान पुच्छाचा स्वीकार केला. ह्याप्रमाणें रज्जुग्रहणाविषयीं स्थानविभाग करून ते कश्यपपुत्र देवदैत्य मोठ्या प्रयत्नानें अमृताकरितां क्षीरसमुद्राचें मंथन करूं लागले ॥ ३ ॥ ४ ॥ ५ ॥ हे पांडुनंदना, क्षीरसागराचें मंथन होऊं लागलें असतां महाबलाढ्य देवदैत्य, त्या पर्वताला सांवरून धरीत असतांहि तो निराधार असल्यामुळें उदकामध्यें बुडून गेला. याप्रमाणें अतिबलाढ्य दैवयोगानें समुद्रमंथनरूप आपला पराक्रम व्यर्थ झाला असें जाणून ते देवदैत्य मनामध्यें अगदीं खिन्न व ज्यांची मुखश्री म्लान होऊन गेली आहे असे झाले ॥ ६ ॥ ७ ॥ ॥ १६ ॥

---

१ गरुड तेथें असला तर वासुकी सर्प तेथें येणार नाहीं ह्मणून त्याला तेथून जाण्याविषयीं भगवंतानें आज्ञा केली असें समजावें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्या कालीं ज्याच्या पराक्रमाचा अंत लागणें अशक्य आहे व ज्याचा संकल्प कधींहि असत्य होत नाहीं त्या ईश्वरानें, विघ्नराजानें केलेलें तें विघ्न पाहून, मोठें अद्भुत असें कूर्मरूप धारण केलें आणि उदकामध्यें प्रविष्ट झालेला मंदर पर्वत वर काढिला॥ ८ ॥ हे पांडुनंदना राजा, त्यावेळीं इकडे पुनः वर आलेल्या त्या मंदरपर्वताला पाहून देव दैत्य पुनरपि क्षीरसमुद्राचें मंथन करण्यास उठले. इकडे दुसरें जंबुद्वीपचकीं काय असा मोठा देह धारण करणाऱ्या कूर्मरूपी भगवंतानें, लक्ष योजनें विस्तीर्ण अशा आपल्या पृष्ठभागाच्या योगानें त्या पर्वताचें धारण केलें॥ ९ ॥ हे राजा, जेव्हां देवदैत्यांनीं आपल्या बाहुबलानें कांपविलेल्या व आसमंतात् भ्रमण पावणाऱ्या त्या पर्वताला पृष्ठभागीं धारण करणाऱ्या अपरिमित बलशक्तीनें युक्त अशा त्या कूर्मरूपी भगवंतानें, त्या पर्वताच्या फिरण्याला, हें आपल्या आंगाचें खाजविणेंच आहे असें मानिलें॥१०॥ ह्याप्रमाणें कूर्मरूपानें असलेलाहि तो भगवान् विष्णु, मंथन करितांकरितां देवदैत्यांना फार श्रम झाल्यामुळें तो पर्वत फिरविण्याचें काम बरोबर चालत नाहीं असें पाहून, असुरामध्यें

रुषे नष्टे सति ॥ ७ ॥ विघ्नेशस्य विधिं तेन रचितं विघ्नम् । अवितथः सत्योऽभिसंधिः संकल्पो यस्य ॥ ८ ॥ लक्षयोजनः प्रस्तारो विस्तारोऽस्यास्तीति तथा तेन पृष्ठेन

विलोक्य विघ्नेशविधिं तदेश्वरो दुरंतवीर्योऽवितथाभिसंधिः ॥ कृत्वा वपुः काच्छपमद्भुतं महत्प्रविश्य तोयं गिरिमुज्जहार ॥ ८ ॥
तमुत्थितं वीक्ष्य कुलाचलं पुनः समुत्थिता निर्मथितुं सुरासुराः ॥ दधार पृष्ठेन स लक्षयोजनप्रस्तारिणा द्वीप इवापरो महान्
॥ ९ ॥ सुरासुरेंद्रैर्भुजवीर्यवेपितं परिभ्रमंतं गिरिमंग पृष्ठतः ॥ बिभ्रत्तदाऽऽवर्तनमादिकच्छपो मेनेंऽगकंडूयनमप्रमेयः ॥ १०॥ तथा-
ऽसुरानाविशदासुरेण रूपेण तेषां बलवीर्यमीरयन् ॥ उद्दीपयन्देवगणांश्च विष्णुर्दैवेन नागेंद्रमबोधरूपः ॥ ११ ॥ उपर्यगेंद्रं गिरि-
राडिवान्य आक्रम्य हस्तेन सहस्रबाहुः ॥ तस्थौ दिवि ब्रह्मभवेंद्रमुख्यैरभिष्टुवद्भिः सुमनोऽभिवृष्टः ॥ १२ ॥ उपर्यधश्चात्मनि गोत्र-
नेत्रयोः परेण ते प्राविशता समेधिताः ॥ ममंथुरब्धिं तरसा मदोत्कटा महाद्रिणा क्षोभितनक्रचक्रम् ॥ १३ ॥ अहींद्रसाहस्रकठोर-
दृङ्मुखश्वासाग्निधूमाहतवर्चसोऽसुराः ॥ पौलोमकालेयबलील्वलादयो दवाग्निदग्धाः सरला इवाभवन् ॥ १४ ॥

॥ ९ ॥ तस्य गिरेरावर्तनं भ्रमणमंगकंडूयनं मेने ॥ १० ॥ आसुरेणासुराकारेण दैवेन देवाकारेण रूपेणाविशत् ॥ ११ ॥ १२ ॥ आत्मनि देवदैत्यमध्ये । गोत्रे दार्ढ्यरूपेण नेत्रे अभेद्याबोधरूपेण । परेण हरिणा । क्षोभितं नक्राणां चक्रं समूहो यस्मिन् ॥ १३ ॥ दृशश्च मुखानि च श्वासाश्च । अहींद्रस्य साहस्रमपरिमिताः कठोरा ये दृगादयस्तेभ्यो

असुराकाररूपानें, देवगणांमध्यें देवाकार रूपानें आणि नागराजामध्यें निद्रारूपानें त्यांच्या बलवीर्यांना उत्तेजन देत देत प्रविष्ट झाला ॥११॥ आणि त्या पर्वताचें मस्तक हालत असल्यामुळें, त्याच्यावर महापर्वतासारखा दुसरा सहस्रबाहूंनीं युक्त देह धारण करून व एका हातानें त्या पर्वतराजाला धरून भगवान् जेव्हां राहिला, तेव्हां त्याची स्तुति करणाऱ्या स्वर्गवासी ब्रह्मदेव शंकर व इंद्रप्रभृति देवांनीं त्याच्यावर पुष्पवृष्टि केली ॥ १२ ॥ असो. ह्याप्रमाणें त्या पर्वताच्या ऊर्ध्वभागीं सहस्रबाहुरूपानें; अधोभागीं कूर्मरूपानें, देवदैत्यांच्या शरीरांमध्यें देवदैत्यरूपानें, पर्वतामध्यें दृढरूपानें व सर्परूप रज्जूमध्यें अभेद्य व अबोधरूपानें प्रविष्ट झालेल्या परमात्म्याच्या योगानें, बलादिवृद्धीनें युक्त व मदोन्मत्त झालेले ते देवदैत्य, महापर्वताच्या योगानें ज्यामध्यें सुसरींचा समुदाय क्षोभ पावला आहे अशा त्या समुद्राचें मोठ्या वेगानें मंथन करूं लागले ॥ १३ ॥ त्यावेळीं त्या सर्पराज वासुकीच्या अपरिमित व कठोर अशा नेत्र, मुख आणि श्वास यांपासून निघालेल्या अग्नीच्या व धुराच्या योगानें ज्याचें तेज नष्ट झालें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आहे असे ते पौलोम, कालेय, बलि व इल्वल इत्यादि असुर वणव्यानें दग्ध झालेल्या सुरूच्या वृक्षांप्रमाणें दिसूं लागले ॥ १४ ॥ तसेच त्या वासुकीच्या श्वासाच्या शिखांनीं निस्तेज झाल्यामुळें धूम्रवर्ण झालीं आहेत वस्त्रें, माला, उत्कृष्ट कवचें व मुखें ज्यांचीं अशा देवांवर, भगवंताच्या अधीन असलेले मेघ वृष्टि करूं लागले व समुद्राच्या लाटांनीं आलिंगन केलेले गार वारे वाहूं लागले ॥ १५ ॥ असो. ह्याप्रमाणें देवदैत्यांच्या अधिपतींनीं मंथन केलेल्या त्या समुद्रापासून जेव्हां अमृत उत्पन्न होईना तेव्हां अजित भगवान् स्वतःच मंथन करूं लागला ॥ १६ ॥ हे राजा, त्यावेळीं मेघासारखा श्यामवर्ण, ज्यानें पिंवळा पीतांबर नेसला आहे, ज्याच्या कर्णांचेठिकाणीं कुंडलरूप विद्युल्लता चमकत आहेत, ज्याच्या मस्तकाचेठिकाणीं दैदीप्यमान केंस चंचल होत आहेत, ज्यानें वनमाला धारण केली आहे, ज्याचे नेत्र आरक्तवर्ण आहेत व ज्यानें पर्वत

निर्गताभ्यामग्निधूमाभ्यामाहतं वर्चो येषां ते । सरला द्रुमविशेषाः ॥ १४ ॥ देवांस्तु भगवद्वशा घनाः समभ्यवर्षन् । समुद्रोर्मिभिरुपगूढा वायवश्च शीतला ववुर्वांति स्म । कथंभूतान् । तस्याहींद्रस्य श्वासशिखाभिर्हता प्रभा येषाम् । धूम्राण्यंबरादीनि येषाम् ॥ १५ ॥ १६ ॥ धृतोऽद्रिर्येन स धृताद्रिर्भगवान्परमपुरुषोऽनंतरमशोभतेत्यन्वयः । कथंभूतः । कनकपरिधिः पीतवासाः । कर्णयोर्विद्योतमाना विद्युत्कुंडललक्षणा यस्य । तथा मूर्ध्नि भ्राजंतो विलुलिताः कचा यस्य स तथा । जैत्रैर्जिष्णुभिः । दंदशूकं सर्पम् ।

देवाश्च तच्छ्वासशिखाहतप्रभान्धूम्रांबरस्रग्वरकंचुकाननान् ॥ समभ्यवर्षन्भगवद्वशा घना ववुः समुद्रोर्म्युपगूढवायवः ॥ १५ ॥ मथ्यमानात्तथा सिंधोर्देवासुरवरूथपैः ॥ यदा सुधा न जायेत निर्ममंथाजितः स्वयम् ॥ १६ ॥ मेघश्यामः कनकपरिधिः कर्णविद्योतविद्युन्मूर्ध्नि भ्राजद्विलुलितकचः स्रग्धरो रक्तनेत्रः ॥ जैत्रैर्दोर्भिर्जगदभयदैर्दंदशूकं गृहीत्वा मथ्नन्मथ्ना प्रतिगिरिरिवाशोभताथो धृताद्रिः ॥ १७ ॥ निर्मथ्यमानादुदधेरभूद्विषं महोल्बणं हालहलाह्वमग्रतः ॥ संभ्रांतमीनोन्मकारादिकच्छपात्तिमिद्विपग्राहतिमिंगिलाकुलात् ॥ १८ ॥ तदुग्रवेगं दिशि दिश्युपर्यधो विसर्पदुत्सर्पदसह्यमप्रति ॥ भीताः प्रजा दुद्रुवुरंग सेश्वरा अरक्ष्यमाणाः शरणं सदाशिवम् ॥ १९ ॥ विलोक्य तं देववरं त्रिलोक्या भवाय देव्याऽभिमतं मुनीनाम् ॥ आसीनमद्रावपवर्गहेतोस्तपोजुषाणं स्तुतिभिः प्रणेमुः ॥ २० ॥

प्रतिगिरिः प्रतिद्वंद्वी पर्वतः ॥ १७ ॥ हालाहलमित्याह्वा नाम यस्य । संभ्रांता मीना उद्गता मकरादयश्च यस्मिंस्तस्मात् । तिम्यादिभिराकुलाच्च ॥ १८ ॥ तद्विषम् । अप्रति अप्रतिमं प्रतिक्रियाशून्यमिति वा । कुतः । उग्रो वेगो यस्य । तदेवाह । दिशिदिशीति । यद्वा उग्रा वेगा रोमांचस्वेदादयो यस्मादत एवासह्यं विलोक्य भीता अन्येन केनाप्यरक्ष्यमाणाः सदाशिवं शरणं दुद्रुवुर्जग्मुः ॥ १९ ॥ त्रिलोक्या उद्भवाय देव्या सहाद्रौ कैलासे आसीनं तथाऽपि मुनीनामभिमतं तेषामेवापवर्गाय तपोजुषाणम् ॥ २० ॥

धारण केला आहे अशाप्रकारचा तो भगवान्, आपल्या जयशाली भुजांच्या योगानें सर्परूप रज्जु ग्रहण करून, पर्वतरूप मंथ्यानें मंथन करूं लागला असतां, दुसऱ्या पर्वतासारखा शोभूं लागला ॥ १७ ॥ असो. याप्रमाणें मंथन केलेल्या, तिमिनामक मत्स्य, गज, नक्र व तिमिंगिल (महामत्स्य) ह्यांनीं व्याप्त व ज्याचेठिकाणीं मत्स्य खवळले आहेत व मकर, सर्प व कांसव हे वर आले आहेत अशा त्या क्षीरसागरापासून प्रथमतः अत्यंत दुःसह असें हालाहलनामक विष उत्पन्न झालें ॥ १८ ॥ भयंकर वेगानें युक्त ज्याच्यापुढें कांहींच उपाय चालत नाहीं, प्रत्येक दिशेचेठिकाणीं वर उसळणारें व खालीं पसरणारें असें तें असह्य विष पाहून, हे राजा, भयभीत झालेल्या पालकांसहित सर्व प्रजा, दुसऱ्या कोणाच्यानेंहि रक्षण होईना तेव्हां सदाशिवभगवंताला शरण गेल्या ॥ १९ ॥ त्यांनीं त्रैलोक्याच्या समृद्धीकरितां भवानीसहवर्तमान कैलासपर्वतावर बसलेला, मुनींना मान्य व त्याच मुनींना मोक्षप्राप्ति होण्याकरितां तपश्चर्या करणारा अशा त्या देवश्रेष्ठ महादेवाला पाहून नमस्कारपूर्वक स्तुति करूं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लागल्या ॥ २० ॥ प्रजापति ह्मणाले–हे देवाधिदेवा, हे महादेवा, हे जगदात्म्या व हे भूतपालका, तूं आह्मां शरणागतांचें त्रैलोक्याला जाळून टाकणाऱ्या ह्या विषापासून रक्षण कर ॥ २१ ॥ हे परमात्म्या, सर्व जगतांच्या बंधमोक्षांचा अधिपति एक तूंच आहेस, ह्यास्तव शरणागतांचें दुःख निवारण करणाऱ्या तुज जगद्गुरूचेंच विवेकी जन पूजन करितात ॥ २२ ॥ आतां तुह्मी ह्मणतां तसा विष्णु प्रसिद्ध आहे, असें ह्मणशील तर– हे विभो, हे सर्वव्यापका, ह्या विश्वाची उत्पत्ति, स्थिति व लय करण्याची जेव्हां तुला इच्छा होत्ये तेव्हां स्वतःसिद्ध ज्ञानवान् असा तूंच, आपल्या गुणमय शक्तीच्या योगानें ब्रह्मा, विष्णु आणि शिव अशा संज्ञा धारण करितोस ॥ २३ ॥ कारण, अत्यंत गुह्य जें ब्रह्म तें तूंच असून देवतिर्यगादि प्राण्यांचा उत्पादकहि तूंच आहेस आणि आत्मरूपीच तूं, नानाप्रकारच्या शक्तींनी जगद्रूपानें भासणारा असे

निर्गुणं सगुणं चैव शिवं हरिपराक्रमैः ॥ स्तुवंतस्तु प्रजेशाना नामान्यंतांतरं तयोः ॥ २१ ॥ २२ ॥ नन्वेवंभूतो विष्णुरिति प्रसिद्धं तत्राहुः । गुणमय्येति । अस्य जगतो यदा सर्गादीन्धत्से तदा हे भूमन्स्वदृक् स्वतःसिद्धज्ञानस्त्वं ब्रह्मादिसंज्ञां धत्से ॥ २३ ॥ तत्र हेतुः । त्वं ब्रह्मेति । सदसतो भावान्देवतिर्यगादिरूपान्भावयतीति तथा सृज्यं तु त्वद्व्यतिरिक्तं नास्तीत्याहुः । आत्मैव त्वं नानाशक्तिभिर्जगद्रूपेणाभातस्तस्मादीश्वरः ॥ २४ ॥ स्वतःसिद्धज्ञानत्वमुपपादयंतो जगदात्मना आभानप्रकारमाहुः । त्वं शब्दस्य

प्रजापतय ऊचुः ॥ देवदेव महादेव भूतात्मन्भूतभावन ॥ त्राहि नः शरणापन्नांस्त्रैलोक्यदहनाद्विषात् ॥ २१ ॥ त्वमेकः सर्वजगत ईश्वरो बंधमोक्षयोः ॥ तं त्वामर्चंति कुशलाः प्रपन्नार्तिहरं गुरुम् ॥ २२ ॥ गुणमय्या स्वशक्त्यास्य सर्गस्थित्यप्ययान्विभो ॥ धत्से यदा स्वदृग्भूमन्ब्रह्मविष्णुशिवाभिधाम् ॥ २३ ॥ त्वं ब्रह्म परमं गुह्यं सदसद्भावभावनः ॥ नानाशक्तिभिराभातस्त्वमात्मा जगदीश्वरः ॥ २४ ॥ त्वं शब्दयोनिर्जगदादिरात्मा प्राणेंद्रियद्रव्यगुणस्वभावः ॥ कालः क्रतुः सत्यमृतं च धर्मस्त्वय्यक्षरं यत्त्रिवृदामनंति ॥ २५ ॥ अग्निर्मुखं तेऽखिलदेवतात्मा क्षितिं विदुर्लोकभवांघ्रिपंकजम् ॥ कालं गतिं तेऽखिलदेवतात्मनो दिशश्च कर्णौ रसनं जलेशम् ॥ २६ ॥ नाभिर्नभस्ते श्वसनं नभस्वान्सूर्यश्च चक्षूंषि जलं स्म रेतः ॥ परावरात्माश्रयणं तवात्मा सोमो मनो द्यौर्भगवन् शिरस्ते ॥ २७ ॥

वेदस्य योनिरतः स्वतःसिद्धज्ञानः । त्वं जगदादिर्महत्तत्त्वम् । आत्मा चाहंकारः । कथंभूतः । प्राणेंद्रियद्रव्याणां कारणभूता गुणा यस्य । राजसादित्रिविध इत्यर्थः । स्वभावादयश्च त्वमेव । क्रतुः संकल्पः सत्यमृतं चेति यो धर्मः स त्वम् । महदादिस्वरूपत्वे हेतुः । त्रिवृत् त्रिगुणात्मकं यदक्षरं प्रधानं त्वयि त्वदाश्रयं तदामनंति । यद्वा एवंभूते त्वयि त्रिवृदक्षरं प्रणवं प्रकाशकमाहुरित्यर्थः ॥ २५ ॥ अखिलदेवतात्मा । अग्निः सर्वा देवता इति श्रुतेः ॥ सोऽग्निस्ते मुखम् । हे लोकभव । द्वितीयांतेषु विदुरित्यस्य संबंधः ॥ २६ ॥ परे अवरे च ये आत्मानो जीवास्तेषामाश्रयस्तवात्माऽहंकारः ॥ २७ ॥

त्यामुळें जगचालकहि तूंच आहेस ॥ २४ ॥ आतां भगवान् महादेव स्वतःसिद्ध ज्ञानवान् कसा व जगद्रूपानें तो भासतो कसा? हें कथन करण्याकरितां ह्मणतात कीं,– हे प्रभो, तूं वेदांचें कारण असल्यामुळें स्वतःसिद्धज्ञानवान् आहेस. तसाच तूं महत्तत्त्वरूपी असून प्राण, इंद्रियें व पृथिव्यादि द्रव्यें ह्यांस कारणभूत अशा गुणांनीं युक्त असा त्रिविध अहंकार, स्वभाव, काल व संकल्परूपी आहेस आणि सत्य व ऋत असा दोनप्रकारचा धर्महि तूंच आहेस. कारण, त्रिगुणात्मक जी माया ती तुझ्याच आश्रयानें असत्ये असें वेदवेत्ते ह्मणतात ॥ २५ ॥ त्याप्रमाणेंच हे विश्वोत्पादका, सर्व देवतात्मक जो अग्नि हें तुझें मुख, भूमि हें तुझें चरणकमल, काल हें सर्वदेवतारूपी असलेल्या तुझें चालणें, दिशा ह्या तुझे कर्ण व वरुण हा तुझें रसनेंद्रिय असें ह्मणतात ॥ २६ ॥ तसेंच हे भगवन् आकाश ही तुझी नाभि, वायु हा तुझा श्वास, सूर्य हा नेत्र,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नांना मीं अभय दिलेंच पाहिजे. कारण, जें दीनांचें परिपालन करणें हेंच प्रभूचें कर्तव्य होय ॥ ३८ ॥ यास्तव साधुजन आपल्या क्षणभंगुर प्राणांच्या योगानें इतर प्राण्यांचें रक्षण करितात व हे भद्रे, परमात्म्या भगवंताच्या मायेनें मोहित होऊन एकमेकांचेठिकाणीं वैरभाव धारण करून परस्परांचा घात करणाऱ्या प्राण्यांवर जो पुरुष कृपा करितो त्यावर सर्वात्मा हरि प्रसन्न होतो आणि भगवान् श्रीहरि प्रसन्न झाला असतां, ह्या चराचर विश्वासहवर्तमान मीहि संतुष्ट होतों. तस्मात् मी हें विष भक्षण करितों, माझ्या प्रजाजनांचें सुखानें वांचणें होवो ॥ ३९ ॥ ४० ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला,– हे राजा, भगवान् विश्वपालक शंकरानें ह्याप्रमाणें भवानीला सांगून तें विष भक्षण करण्यास प्रवृत्त झाला त्यावेळीं त्याचा प्रभाव जाणणाऱ्या पार्वतीनें त्या कृत्यास अनुमोदन दिलें ॥ ४१ ॥ नंतर सर्व जगाला व्यापणारें

किंच बद्धवैरेषु भूतेषु परस्परं जिघांसत्सु ॥ ३९ ॥ कृपयतः कृपां कुर्वतः पुंसः । ये मत्तः स्वस्तिः शोभना सत्ता । सुखेन जीवितमस्त्वित्यर्थः ॥ ४० ॥ जग्धुमत्तुम्

प्राणैः स्वैः प्राणिनः पांति साधवः क्षणभंगुरैः ॥ बद्धवैरेषु भूतेषु मोहितेष्वात्ममायया ॥३९॥ पुंसः कृपयतो भद्रे सर्वात्मा प्रीयते हरिः ॥ प्रीते हरौ भगवति प्रीयेऽहं सचराचरः ॥ तस्मादिदं गरं भुंजे प्रजानां स्वस्तिरस्तु मे ॥ ४० ॥ श्रीशुक उवाच ॥ एवमामंत्र्य भगवान्भवानीं विश्वभावनः ॥ तद्विषं जग्धुमारेभे प्रभावज्ञाऽन्वमोदत ॥ ४१ ॥ ततः करतलीकृत्य व्यापि हालाहलं विषम् ॥ अभक्षयन्महादेवः कृपया भूतभावनः ॥ ४२ ॥ तस्यापि दर्शयामास स्ववीर्यं जलकल्मषः ॥ यच्चकार गले नीलं तच्च साधोर्विभूषणम् ॥ ४३ ॥ तप्यंते लोकतापेन साधवः प्रायशो जनाः ॥ परमाराधनं तद्धि पुरुषस्याखिलात्मनः ॥ ४४ ॥ निशम्य कर्म तच्छंभोर्देवदेवस्य मीढुषः ॥ प्रजा दाक्षायणी ब्रह्मा वैकुंठश्च शशंसिरे ॥ ४५ ॥ प्रस्कन्नं पिबतः पाणेर्यत्किंचिज्जगृहुः स्म तत् ॥ वृश्चिकाहिविषौषध्यो दंदशूकाश्च येऽपरे ॥ ४६ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे अष्टमस्कंधेऽमृतमथने सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥

॥ ४१ ॥ करतलीकृत्य करतलपरिमितमात्रं कृत्वा ॥ ४२ ॥ जलकल्मषो जलदोषो विषम् । यस्मात्तं गले नीलं चकार । साधोः कृपालोः ॥ ४३ ॥ ४४ ॥ ४५ ॥ प्रस्कन्नं गलितम् । अपरे ये सविषास्तेऽपि जगृहुः । अनेन विषस्य तीव्रतोक्ता ॥ ४६ ॥ इति श्रीमद्भागवतेऽष्टमस्कंधे टीकायां सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥ ॥

तें हालाहलनामक विष आपल्या सामर्थ्यानें हाताच्या तळव्यावर घेऊन तें भूतपालक महादेवानें कृपेनें भक्षण केलें ॥ ४२ ॥ त्यावेळीं त्या विषानें, आपलें सामर्थ्य त्या महादेवालाहि असें दाखविलें कीं,– त्या महादेवाच्या कंठाचेठिकाणीं निळा वर्ण उत्पन्न केला परंतु तो काळेपणाहि त्या दयालु महादेवाला भूषणच झाला ॥ ४३ ॥ याप्रमाणें साधुजन बहुतकरून लोकांच्या दुःखानें स्वतःहि दुःखी होतात ह्मणजे लोकांचें दुःख पाहून त्याच्या निवृत्तीकरितां स्वतः दुःख भोगितात. दुसऱ्याकरितां दुःख सहन करणें हेंच सर्वात्म्या पुरुषोत्तमाचें सर्वोत्कृष्ट आराधन होय ॥ ४४ ॥ असो, भक्तमनोरथपूरक अशा त्या देवाधिदेव शंकराचें तें कर्म अवलोकन करून, सर्वप्रजा, ॥ १९ ॥
पार्वती, ब्रह्मदेव आणि विष्णु ह्यांनीं त्याची प्रशंसा केली ॥ ४५ ॥ हे राजा, तो महादेव विष प्राशन करीत असतांना त्याच्या हातांतून जें यत्किंचित् विष खालीं पडलें होतें तें वृश्चिक, सर्प, विषौषधि, सर्पांतल्या जाति व जे विषारी प्राणी आहेत त्यांनीं ग्रहण केलें ॥४६॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील अष्टमस्कंधापैकीं अमृ-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ताख्यान संबंधीं विषपाननिरूपणनामक हा सातवा अध्याय समाप्त झाला ॥७॥ ॥ आतां ह्या आठव्या अध्यायामध्यें समुद्रमंथन चाललें असतां त्यापासून उत्पन्न झालेल्या लक्ष्मीनें श्रीहरीस वरिल्यानंतर धन्वंतरीपासून असुरांनीं अमृताचा कलश हरण केला असतां, श्रीहरीनें मोहिनीरूप धारण केलें अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणालाः—हे राजा, शंकरानें विषाचें प्राशन केलें असतां संतुष्ट झालेले ते देवदानव मोठ्या वेगानें समुद्राचें मंथन करूं लागले. नंतर त्यापासून कामधेनु उत्पन्न झाली ॥ १ ॥ हे राजा, अग्निहोत्राला साधनभूत अशा घृतादिकांना उत्पन्न करणारी ती कामधेनु ब्रह्मलोकाला पोंचविणाऱ्या यज्ञाच्या होमद्रव्याकरितां वेदवेत्त्या ऋषींनीं ग्रहण केली ॥ २ ॥ नंतर चंद्राप्रमाणें शुभ्रवर्ण असा उच्चैःश्रवानामक अश्व उत्पन्न झाला, त्याविषयीं दैत्यराज बलीनें इच्छा धारण केली. असुर जें इच्छितील त्याला तुह्मी अनुमोदन द्या असा पूर्वींच श्रीविष्णूनें उपदेश केला असल्यामुळें इंद्रानें त्या अश्वाविषयीं इच्छा धारण केली नाहीं ॥ ३ ॥ नंतर आपल्या चार

अष्टमे मथ्यमानेऽब्धौ लक्ष्म्या विष्णौ वृतेऽसुरैः ॥ धन्वंतरेर्हृते सोमे मोहिन्युद्भव ईर्यते ॥ १ ॥ हविर्धानी सुरभिः ॥ १ ॥ देवयानस्य ब्रह्मलोकमार्गप्रापकस्य यज्ञस्य संबंधिने हविषे ॥ २ ॥ ईश्वरशिक्षया प्रागेव कृतया ॥ ३ ॥ भगवतो यः श्वेताद्रिः कैलासस्तस्य महिं महिमानम् । दंतैः शिखरकल्पैर्हरंश्चंद्रवत्पांडुर इत्यनुषंगः ॥ ४ ॥ ५ ॥ ६ ॥

॥ श्रीशुक उवाच ॥ पीते गरे वृषांकेण प्रीतास्तेऽमरदानवाः ॥ ममंथुस्तरसा सिंधुं हविर्धानी ततोऽभवत् ॥ १ ॥ तामग्निहोत्रीमृषयो जगृहुर्ब्रह्मवादिनः ॥ यज्ञस्य देवयानस्य मेध्याय हविषे नृप ॥ २ ॥ तत उच्चैःश्रवा नाम हयोऽभूच्चंद्रपांडुरः ॥ तस्मिन्बलिः स्पृहां चक्रे नेंद्र ईश्वरशिक्षया ॥ ३ ॥ तत ऐरावतो नाम वारणेंद्रो विनिर्गतः ॥ दंतैश्चतुर्भिः श्वेताद्रेर्हरन्भगवतो महिम् ॥ ४ ॥ कौस्तुभाख्यमभूद्रत्नं पद्मरागो महोदधेः ॥ तस्मिन्हरिः स्पृहां चक्रे वक्षोऽलंकरणे मणौ ॥ ५ ॥ ततोऽभवत्पारिजातः सुरलोकविभूषणम् ॥ पूरयत्यर्थिनो योऽर्थैः शश्वद्भुवि यथा भवान् ॥ ६ ॥ ततश्चाप्सरसो जाता निष्ककंठ्यः सुवाससः ॥ रमण्यः स्वर्गिणां वल्गुगतिलीलाऽवलोकनैः ॥ ७ ॥ ततश्चाविरभूत्साक्षाच्छ्री रमा भगवत्परा ॥ रंजयंती दिशः कांत्या विद्युत्सौदामिनी यथा ॥ ८ ॥

वल्गुभिर्गत्यादिभिः स्वर्गिणां रमण्यो रतिकर्त्र्यः ॥ ७ ॥ सुदामापर्वतस्तत्रैकस्यां दिशि जाता सौदामनी । स्फटिकादिमयगिरिशृंगेष्वधिकं स्फुरंती विद्युदिव कांत्या दिशो रंजयंती श्रीः संपत्साक्षान्मूर्तिधारिणी सती सैव भगवत्परा रमा आविरभूदित्यर्थः ॥ ८ ॥

दंताच्या योगानें भगवान् महादेवाच्या कैलासपर्वताची शोभा हरण करणारा व चंद्राप्रमाणें शुभ्र असा एक ऐरावत नामक हत्ती निघाला ॥ ४ ॥ तदनंतर त्या महासागरापासून पद्मरागमणिरूपी कौस्तुभनामक एक रत्न उत्पन्न झालें. त्या कौस्तुभमण्याविषयीं आपलें वक्षःस्थल भूषित करण्याविषयीं श्रीहरीनें इच्छा धारण केली ॥ ५ ॥ तदनंतर देवलोकाचें भूषणच असा पारिजातक वृक्ष उत्पन्न झाला. हे राजा, जसा भूतलावेठिकाणीं तूं सर्वदा याचकांचे मनोरथ पूर्ण करितोस त्याप्रमाणें तो वृक्षहि इच्छित वस्तु देऊन स्वर्गस्थ याचकांचे मनोरथ सर्वदा परिपूर्ण करीत असतो ॥ ६ ॥ तदनंतर, उत्तम वस्त्रें परिधान करणाऱ्या, कंठामध्यें पदकादिक भूषणें धारण करणाऱ्या आणि सुंदर अशा गतिविलास व अवलोकन ह्यांच्या योगानें स्वर्गांवर राहणाऱ्या देवांना रमविणाऱ्या अशा अप्सरा उत्पन्न झाल्या ॥ ७ ॥ नंतर सुदामानामक पर्वताच्या एका दिशेस उत्पन्न झालेल्या विद्युल्लतेप्रमाणें आपल्या कांतीनें सर्व दिशा प्रकाशित करणारी व साक्षात् संपत्तीचेंच रूप धारण करणारी अशी भग-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वंताविषयीं तत्पर लक्ष्मी उत्पन्न जाहली ॥ ८ ॥ तिचें, सुंदर रूप, औदार्य, वय व कांति ह्यांच्या महिम्यानें मोहितचित्त झालेले सर्वहि देव असुर व मनुष्य तिजविषयीं इच्छा करूं लागले ॥ ९ ॥ ~~अस्तां, भगवंताच्या वक्षस्थलावेठिकाणीं राहिलेल्या लक्ष्मीनें अवलोकन केलेल्या देवांना पूर्वीप्रमाणें संपत्ति प्राप्त झाली व असुरांना विपत्ति प्राप्त झाली हें सांगण्याकरितां तिचा अभिषेकादि महोत्सवपूर्वक ब्रह्मादिकांचा त्याग करून भगवत्प्राप्तीचा प्रकार सांगतो कीं,~~ – हे राजा, त्या लक्ष्मीला महेंद्रानें एक मोठें अद्भुत आसन समर्पण केलें व मूर्तिमंत श्रेष्ठ नद्यांनीं सुवर्णकुंभांच्या योगानें तिच्या अभिषेकाकरितां पवित्र जळ आणिलें ॥ १० ॥ त्याचप्रमाणें भूमीनें अभिषेकास लागणाऱ्या सर्व ओषधी समर्पण केल्या, गाईंनीं दुधादिक पंचगव्यें समर्पण केलीं आणि वसंत ऋतूनें आपल्या चैत्र वैशाखमासांमध्यें होणारी फलपुष्पादिसंपत्ति समर्पण केली ॥ ११ ॥ नंतर ऋषींनीं शास्त्रोक्तप्रकारानें तिला अभिषेक करण्यास आरंभ केला; त्यावेळीं गंधर्व, मंगलकारक गीतांचें गायन करूं लागले, तशाच नटांच्या स्त्रिया

तस्य रूपादिमहिम्ना आक्षिप्तं चेतो येषाम् ॥ ९ ॥ भगवद्वक्षसि स्थितया श्रिया विलोकितानां सुराणां यथा पूर्वं संपत्प्राप्तिमसुराणां च तद्विपर्ययं वक्तुमभिषेकादिमहोत्सवपूर्वकं ब्रह्मादिपरिहारेण भगवत्प्राप्तिप्रकारमाह । तस्या आसनमित्यादिना अथासीद्वारुणीत्यतः प्राक्तनेन ग्रंथेन ॥ १० ॥ आभिषेचनिका आभिषेकोचिताः । पंच पवित्राणि

तस्यां चक्रुः स्पृहां सर्वे ससुरासुरमानवाः ॥ रूपौदार्यवयोवर्णमहिमाक्षिप्तचेतसः ॥ ९ ॥ तस्या आसनमानिन्ये महेंद्रो महदद्भुतम् ॥
मूर्तिमत्यः सरिच्छ्रेष्ठा हेमकुंभैर्जलं शुचि ॥ १० ॥ आभिषेचनिका भूमिराहरत्सकलौषधीः ॥ गावः पंच पवित्राणि वसंतो मधुमाधवौ ॥ ११ ॥ ऋषयः कल्पयांचक्रुरभिषेकं यथाविधि ॥ जगुर्भद्राणि गंधर्वा नट्यश्च ननृतुर्जगुः ॥ १२ ॥ मेघा मृदंगपणवमुरजानकगोमुखान् ॥ व्यनादयन् शंखवेणुवीणास्तुमुलनिःस्वनान् ॥ १३ ॥ ततोऽभिषिषिचुर्देवीं श्रियं पद्मकरां सतीम् ॥ दिगिभाः पूर्णकलशैः सूक्तवाक्यैर्द्विजेरितैः ॥ १४ ॥ समुद्रः पीतकौशेयवाससी समुपाहरत् ॥ वरुणः स्रजं वैजयंतीं मधुना मत्तषट्पदाम् ॥ १५ ॥ भूषणानि विचित्राणि विश्वकर्मा प्रजापतिः ॥ हारं सरस्वती पद्ममजो नागाश्च कुंडले ॥ १६ ॥ ततः कृतस्वस्त्ययनोत्पलस्रजं नदद्द्विरेफां परिगृह्य पाणिना ॥ चचाल वक्त्रं सुकपोलकुंडलं सव्रीडहासं दधती सुशोभनम् ॥ १७ ॥

पंचगव्यानि । मधुमाधवौ चैत्रवैशाखभवं फलपुष्पादि । पाठांतरेऽपि द्वंद्वैक्ये स एवार्थः । मधुमासे भवं मध्विति वा ॥ ११ ॥ अभिषेकमभिषेकोचितं विधिम् । नट्यो नटानां स्त्रियः ॥ १२ ॥ शंखवेणुवीणाश्च व्यनादयन् । तुमुलो निःस्वनो येषां तान्मृदंगादीन् ॥ १३ ॥ १४ ॥ १५ ॥ १६ ॥ १७ ॥

नृत्य व गायन करूं लागल्या ॥ १२ ॥ त्यावेळीं मेघ मंद मंद गर्जना करूं लागले; व लोक, मोठा शब्द करणारीं मृदंग, पणव, मुरज, आनक व गोमुख इत्यादि वाद्यें वाजवूं लागले आणि शंख, वेणु व वीणा ह्यांचाहि नाद होऊं लागला ॥ १३ ॥ नंतर हातांमध्यें कमल धारण केलेल्या पतिव्रता लक्ष्मीदेवीला, ब्राह्मणांनीं पठण केलेल्या सूक्तवाक्यांसहवर्तमान जलपूर्ण घटांच्या योगानें दिग्गजांनीं अभिषेक केला ॥ १४ ॥ तदनंतर सागरानें त्या लक्ष्मीला किरमिजी रेशमाचीं पिंवळीं परिधानीय व उत्तरीय अशीं दोन वस्त्रें अर्पण केलीं. वरुणानें, जिच्यावर मध भक्षण करून मत्त झालेले भ्रमर गुंजारव शब्द करीत आहेत अशी वैजयंतीनामक माळा अर्पण केली. विश्वकर्म्या प्रजापतीनें नानाप्रकारच्या रंगाच्या रत्नाच्या जडावाचीं भूषणें दिलीं. सरस्वतीनें हार अर्पण केला. ब्रह्मदेवानें कमळ समर्पण केलें व नागांनीं दोन कुंडलें दिलीं ॥ १५ ॥ १६ ॥ नंतर भूषणें व कुंकुमादिक सौभाग्यद्रव्यें धारण करून, सुंदर गालांवर कुंडलांची कांति झळकणारें व सलज्ज हास्ययुक्त असें सुशोभित मुख धारण

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करणारी ती लक्ष्मी, जिच्यावर गुंजारव शब्द करणारे भ्रमर आहेत अशी कमलमाला हातानें ग्रहण करून, आपणाला योग्य वर पाहण्याकरितां आसनावरून उठली ॥ १७ ॥ तशीच जिचें उदर अतिकृश आहे अशी ती लक्ष्मी, चंदन व केशर ह्यांनीं लिप्त असून सारखें व एकमेकांमध्यें अंतररहित असें स्तनद्वय धारण करित होत्साती, नूपुरांच्या मनोहर शब्दांनीं उपलक्षित होऊन इकडेतिकडे संचार करीत असतांना सुवर्णलतिकेसारिखी शोभूं लागली ॥ १८ ॥ हे राजा, ती लक्ष्मी, निर्दोष, शाश्वत व निरंतर असणाऱ्या सद्गुणांनीं युक्त असा आपल्याला आश्रयभूत पति, गंधर्व, यक्ष, असुर, सिद्ध, चारण व स्वर्गवासी देवादिक ह्यांचेठिकाणीं शोध करीत होती. परंतु कोठेंकोठें कांहींकांहीं दोष असल्यामुळें तिला तसा पति प्राप्त झाला नाहीं ॥ १९ ॥ तेंच सांगतो– दुर्वासासारख्यांचेठिकाणीं तप आहे परंतु, क्रोध जिंकिले-

---

॥ १८ ॥ पदमाश्रयम् । ध्रुवं नित्यमव्यभिचारिणो नित्याः संतो गुणा यस्मिंस्तं नान्वविंदत । क्वचित्कस्यचिद्दोषस्य सद्भावात् ॥ १९ ॥ तदेवाह नूनमिति त्रिभिः । मन्युनिर्जयो नास्ति दुर्वासःप्रभृतिषु । गुरुशुक्रादिषु संगवर्जितं ज्ञानं नास्ति । महत्त्वेऽपि ब्रह्मसोमादौ न कामनिर्जयः । परतो व्यपाश्रयः परापेक्ष इंद्रादिः । स किमीश्वरः ॥ २० ॥ न भूतसौहृदं परशुरामादिषु । न मुक्तिकारणं त्यागः शिबिप्रभृतिषु । पुंसः कार्तवीर्यादेर्वीर्यमस्ति । अजवेगनिष्कृतं कालवेगेन परिहृतं तु न भवति । गुणसंगवर्जितः सन-

स्तनद्वयं चातिकृशोदरी समं निरंतरं चंदनकुंकुमोक्षितम् ॥ ततस्ततो नूपुरवल्गुसिंजितैर्विसर्पती हेमलतेव सा बभौ ॥ १८ ॥ वि-
लोकयंती निरवद्यमात्मनः पदं ध्रुवं चाव्यभिचारि सद्गुणम् ॥ गंधर्वयक्षासुरसिद्धचारणत्रैविष्टपेयादिषु नान्वविंदत ॥ १९ ॥ नूनं
तपो यस्य न मन्युनिर्जयो ज्ञानं क्वचित्तच्च न संगवर्जितम् ॥ कश्चिन्महांस्तस्य न कामनिर्जयः स ईश्वरः किं परतो व्यपाश्रयः
॥ २० ॥ धर्मः क्वचित्तत्र न भूतसौहृदं त्यागः क्वचित्तत्र न मुक्तिकारणम् ॥ वीर्यं न पुंसोऽस्त्यजवेगनिष्कृतं नहि द्वितीयो गुणसं-
गवर्जितः ॥ २१ ॥ क्वचिच्चिरायुर्नहि शीलमंगलं क्वचित्तदप्यस्ति न वेद्यमायुषः ॥ यत्रोभयं कुत्र च सोऽप्यमंगलः सुमंगलः क-
श्च न कांक्षते हि माम् ॥ २२ ॥

कादिर्द्वितीयो मम वरो नहि समाधिनिष्ठत्वात् ॥ २१ ॥ चिरायुष्यपि मार्कंडेयादौ शीलमंगलं नास्ति इंद्रियदमनशीलत्वात् । क्वचित्तदप्यस्ति हिरण्यकशिपुप्रभृतौ आयुषः स्थैर्यं न वेद्यं दुर्ज्ञातम् । भगवद्द्वेषेणाकस्मादेव मृत्युसंभवात् । यत्र कुत्र च श्रीरुद्रे मार्कंडेयादिवदिंद्रियदमनाद्यभावाच्छीलमंगलं चायुर्निश्चयश्चेत्युभयमस्ति न चान्यः पूर्वोक्तः कश्चिद्दोषस्तथाऽपि सोऽप्यमंगलः श्मशानवासाद्यमंगलचेष्टितः । श्रीमुकुंदं लक्षीकृत्याह । कश्चेति । कश्चित्सुमंगलो निरवद्यश्च स तु मां नहि कांक्षते आत्मारामत्वात् ॥ २२॥

ला नाहीं, कोठेंकोठें गुरुशुक्रादिकांचेठिकाणीं ज्ञान आहे, परंतु तें वैराग्यविशिष्ट नाहीं. ब्रह्मदेव चंद्र इत्यादिक कोणी महात्मा आहे परंतु त्याच्या कामाचा जय झालेला नाहीं. आतां जो कोणी इंद्रादिक, दुसऱ्याच्या आश्रयाची अपेक्षा धरणारा आहे तो ईश्वर ह्मणावा कीं काय? ह्मणूंच नये. तेव्हां तोहि वरण्यास योग्य नाहीं ॥ २० ॥ तसाच एखादा परशुरामादिक धर्मनिष्ठ आहे परंतु त्याचेठिकाणीं भूतदया नाहीं, कोठें, शिबिराजावगैरेंचेठिकाणीं दान आहे परंतु तें मुक्तीला कारण होत नाहीं. एखाद्या कार्तवीर्यासारिख्या पुरुषाचेठिकाणीं बल आहे परंतु तें कालवेगाच्या तडाक्यांतून सुटलेलें नाहीं. विषयसंग्रहरहित असा एखादा सनकादिक आहे परंतु तो निरंतर समाधिनिष्ठ असल्यामुळें मला वरण्यास योग्य नाहीं ॥ २१ ॥ कोठें मार्कंडेयादिकांचेठिकाणीं दीर्घ आयुष्य आहे परंतु स्त्रियांना सुखकारक असा स्वभाव नाहीं, कोठेंकोठें हिरण्यकशिपूसारिख्या पुरुषांचेठिकाणीं स्त्रियांना सुखदायक असा स्वभावहि आहे, परंतु आयुष्याची स्थिरता निश्चयानें समजत नाहीं. कोठें श्रीशंकराचेठिका-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

र्णी स्त्रियांना सुखकारक स्वभाव व आयुष्याचा निश्चय हीं दोन्हींहि आहेत परंतु तो अमंगल आहे आणि कोणीएक पुरुष (श्रीमुकुंद) अत्यंत मंगलकारक आचरणांनीं युक्त असून अगदीं निर्दोष आहे परंतु तो माझी इच्छा करीत नाहीं ॥ २२ ॥ ह्याप्रमाणें विचार करून, मायागुणातीत, नित्य असणाऱ्या धर्मज्ञानादि सद्गुणांनीं युक्त व आपणाला मुख्य आश्रय असल्यामुळें सर्वोत्तम, आणि स्वतःला आवडणारा व अणिमादि सर्व गुणांनीं वरिलेला असा जो मुकुंद तो निरपेक्ष असतांहि त्याला लक्ष्मीनें पति वरिलें ॥ २३ ॥ ह्मणजे मदोन्मत्त अशा भ्रमरसमूहाच्या वाणीनें नादित झालेली रमणीय नूतन कमळांची माळा मुकुंदाच्या स्कंधप्रदेशीं स्थापन करून समीपभागीं लज्जायुक्त हास्यानें विकसित होणाऱ्या नयनानें, आपल्या निवासभूत असा त्याच्या वक्षःस्थलाकडे 'हें स्थान मला प्राप्त होवो' अशी प्रतीक्षा करीत उभी राहिली ॥ २४ ॥

एवं विमृश्य रमा निरपेक्षमपि मुकुंदमेव वरं वव्रे । तत्किम् । अव्यभिचारिभिः सद्भिर्धर्मज्ञानादिभिर्गुणैर्निजैकाश्रयतया च नैरपेक्ष्येण वरं सर्वोत्तमम् । तत्र हेतुः । अगुणाश्रयं प्रकृतिगुणातीतम् । पाठांतरेऽप्ययमेवार्थः । अतएव स्वस्य ईप्सितम् । किंच सर्वैर्गुणैरणिमादिभिरपेक्षितं वृत्तम् । अयं भावः । यद्यपि स्वयमात्मारामत्वेनान्यनिरपेक्षस्तथाप्याश्रिता अणिमादिसिद्धीर्यथा नोपेक्षते तद्वन्मामपि नोपेक्षेत तावतैव तत्सेवयाऽहं कृतार्था स्यां किमन्यैः प्राकृतैरिति तमेव वृतवतीति ॥ २३ ॥ तदेवाह । तस्यांसदेशे

एवं विमृश्याव्यभिचारिसद्गुणैर्वरं निजैकाश्रयतयाऽगुणाश्रयम् ॥ वव्रे वरं सर्वगुणैरपेक्षितं रमा मुकुंदं निरपेक्षमीप्सितम् ॥ २३ ॥ तस्यांसदेश उशतीं नवकंजमालां माद्यन्मधुव्रतवरूथगिरोपघुष्टाम् ॥ तस्थौ निधाय निकटे तदुरः स्वधाम सव्रीडहासविकसन्नयनेन याता ॥ २४ ॥ तस्याः श्रियस्त्रिजगतो जनको जनन्या वक्षोनिवासमकरोत्परमं विभूतेः ॥ श्रीः स्वाः प्रजाः सकरुणेन निरीक्षणेन यत्र स्थितैधयत साधिपतींस्त्रिलोकान् ॥ २५ ॥ शंखतूर्यमृदंगानां वादित्राणां पृथुः स्वनः ॥ देवानुगानां सस्त्रीणां नृत्यतां गायतामभूत् ॥ २६ ॥ ब्रह्मरुद्रांगिरोमुख्याः सर्वे विश्वसृजो विभुम् ॥ ईडिरेऽवितथैर्मंत्रैस्तल्लिंगैः पुष्पवर्षिणः ॥ २७ ॥ श्रिया विलोकिता देवाः सप्रजापतयः प्रजाः ॥ शीलादिगुणसंपन्ना लेभिरे निर्वृतिं पराम् ॥ २८ ॥

कमनीयां नवकंजमालां निधाय तदनुग्रहं प्रतीक्षमाणा तूष्णीं तस्य निकटे तस्थौ । कथंभूतां मालाम् । माद्यंतो ये मधुव्रतास्तेषां वरूथस्य गिरा उपघुष्टां नादिताम् । कथंभूता श्रीः । सव्रीडहासेन विकसन्नयनं तेन तस्योरः स्वधाम याता सती । वक्षः प्रतीक्षमाणा तस्थावित्यर्थः ॥ २४ ॥ भगवानपि त्रैलोक्याभिवृद्धये स्ववक्षस्तस्याः स्थानं ददावित्याह । तस्या इति । विशिष्टा भूतयो विभवा यस्याः तस्यास्त्रिजगतो जनन्याः श्रियः । परमं सुस्थिरम् । ऐधयतावर्धयत् ॥ २५ ॥ २६ ॥ तल्लिंगैर्विष्णुप्रतिपादकैः । अवितथैर्यथार्थैः ॥ २७ ॥ २८ ॥

आतां त्रैलोक्याची अभिवृद्धि होण्यास्तव भगवंतानेंहि तिला निवासस्थानाकरितां आपलें वक्षःस्थळ अर्पण केलें हें सांगण्याच्या अभिप्रायानें ह्मणतो कीं:-हे राजा, संपूर्ण वैभवांनीं युक्त अशा त्या त्रिभुवनजनक श्रीविष्णूनें आपलें वक्षःस्थळच त्या त्रैलोक्यजननी लक्ष्मीचें सुस्थिर निवासस्थान केलें. नंतर त्याठिकाणीं असलेल्या त्या लक्ष्मीनें सदय अवलोकनाच्या योगानें आपल्या प्रजाजनांची ह्मणजे लोकपालांसहवर्तमान त्रैलोक्यांतील जनांची वृद्धि केली ॥ २५ ॥ असो. त्याकालीं शंख, तूर्य व मृदंग ह्या वाद्यांचा व स्त्रियांसहवर्तमान नृत्य व गायन करणाऱ्या देवानुयायी गंधर्वादिकांचा मोठा नाद होऊं लागला ॥ २६ ॥ आणि तसेच ब्रह्म, रुद्र व अंगिरा हे ज्यांत मुख्य आहेत असे सर्व प्रजाधिपति, पुष्पवृष्टि करीत करीत विष्णुप्रतिपादक यथार्थ मंत्रांनीं भगवान् प्रभूची स्तुति करूं लागले ॥ २७ ॥ नंतर लक्ष्मीनें अवलोकन ॥ २१ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

केलेल्या प्रजाधिपतींसहवर्तमान सर्व प्रजा, सुस्वभावादि गुणांनीं संपन्न होऊन परमानंद पावल्या ॥ २८ ॥ हे राजा, जेव्हां लक्ष्मीनें देवदानवांची उपेक्षा केली तेव्हां ते धैर्यहीन, विषयासक्त, निरुद्योगी व निर्लज्ज झाले ॥ २९ ॥ असो, नंतर त्या क्षीरसमुद्रापासून, जिचे कमलाप्रमाणें नेत्र आहेत अशी सुरारूपिणी देवी, कन्यारूपानें उत्पन्न झाली तेव्हां श्रीहरीच्या अनुमतानें त्या सुरेचा असुरांनीं स्वीकार केला ॥ ३० ॥ नंतर हे महाराजा, अमृतप्राप्तीकरितां देवदैत्य क्षीरसागराचें मंथन करीत असतां, त्यापासून अत्यंत अद्भुत असा एक पुरुष निघाला ॥ ३१ ॥ त्याचे भुज दीर्घ व पुष्ट होते, शंखासारिखा तीन रेषांनीं युक्त कंठ होता, आरक्तवर्ण नेत्र होते, मेघासारखा श्यामवर्ण होता, अवस्था तरुण होती, कंठामध्यें पुष्पमाला होती व तो सर्व भूषणांनीं भूषित होता ॥ ३२ ॥ तसेंच त्यानें पिंवळें वस्त्र परिधान केलें होतें, त्याचें वक्षःस्थळ विशाळ होतें, त्याचीं रत्नमय कुंडलें फारच स्वच्छ होतीं, त्याच्या केसांचीं अग्रें तुळतुळीत व कुरळ होतीं, तो दिसण्यामध्यें सुंदर होता व त्याचा पराक्रम

॥ २९ ॥ वारुणी वरुणदैवत्यं यदन्नं तन्मयी सुरा ॥ ३० ॥ ३१ ॥ दीर्घौ पीवरौ दोर्दंडौ यस्य । कंबुग्रीवः शंखनाभिरिव त्रिरेखा सुवृत्ता ग्रीवा यस्य

निःसत्त्वा लोलुपा राजन्निरुद्योगा गतत्रपाः ॥ यदा चोपेक्षिता लक्ष्म्या बभूवुर्दैत्यदानवाः ॥ २९ ॥ अथासीद्वारुणी देवी कन्या कमललोचना ॥ आसुरा जगृहुस्तां वै हरेरनुमतेन ते ॥ ३० ॥ अथोदधेर्मथ्यमानात्काश्यपैरमृतार्थिभिः ॥ उदतिष्ठन्महाराज पुरुषः परमाद्भुतः ॥ ३१ ॥ दीर्घपीवरदोर्दंडः कंबुग्रीवोऽरुणेक्षणः ॥ श्यामलस्तरुणः स्रग्वी सर्वाभरणभूषितः ॥ ३२ ॥ पीतवासा महोरस्कः सुमृष्टमणिकुंडलः ॥ स्निग्धकुंचितकेशांतः सुभगः सिंहविक्रमः ॥ ३३ ॥ अमृतापूर्णकलशं बिभ्रद्वलयभूषितः ॥ स वै भगवतः साक्षाद्विष्णोरंशांशसंभवः ॥ ३४ ॥ धन्वंतरिरिति ख्यात आयुर्वेददृगिज्यभाक् ॥ तमालोक्यासुराः सर्वे कलशं चामृताभृतम् ॥ लिप्संतः सर्ववस्तूनि कलशं तरसाऽहरन् ॥ ३५ ॥ नीयमानेऽसुरैस्तस्मिन् कलशेऽमृतभोजने ॥ विषण्णमनसो देवा हरिं शरणमाययुः ॥ ३६ ॥ इति तद्दैन्यमालोक्य भगवान्भृत्यकामकृत् ॥ मा खिद्यत मिथोऽर्थं वः साधयिष्ये स्वमायया ॥ ३७ ॥ मिथः कलिरभूत्तेषां तदर्थे तर्षचेतसाम् ॥ अहं पूर्वमहं पूर्वं न त्वं न त्वमिति प्रभो ॥ ३८ ॥

॥ ३२ ॥ स्निग्धः कुंचितः केशानामंतो यस्य ॥ ३३ ॥ ३४ ॥ इज्यभाक् यज्ञभागभोक्ता । अमृतेन आभृतं परिपूर्णम् ॥ ३५ ॥ ३६ ॥ मिथो दैत्यानां परस्परं कलहोत्पादनेन योगमायया च मोहिन्या वोऽर्थं साधयिष्याम्यतो मा खिद्यतेत्याहेति शेषः ॥ ३७ ॥ तदेवाह । मिथ इति । तर्षः कामस्तद्युक्तानि चेतांसि येषाम् । इत्येवं सम-

सिंहासारिखा होता ॥ ३३ ॥ त्यानें हातांमध्यें अमृतानें भरलेला कलश धारण केला होता, तो हातामध्यें धारण केलेल्या कडींतोड्यांनीं भूषित होता, तो साक्षात् भगवान् विष्णूच्या अंशाच्या अंशापासून उत्पन्न झालेला धन्वंतरी या नांवानें प्रसिद्ध असून वैद्यशास्त्राचा प्रवर्तक व यज्ञांमध्यें हविर्भाग ग्रहण करणारा होता, असो, त्याला व त्यानें धारण केलेल्या अमृतानें पूर्ण असलेल्या कलशाला अवलोकन करून कामधेनुप्रभृति सर्व वस्तु आपणास प्राप्त होण्याची इच्छा करणाऱ्या त्या सर्व असुरांनीं वेगानें तो अमृताचा कलश त्यापासून हिसकाऊन घेतला ॥ ३४ ॥ ३५ ॥ हे राजा, अमृताचें पात्र असा तो कलश, असुर घेऊन चाललेअसतां देव मनांमध्यें खिन्न होऊन श्रीहरीला शरण गेले ॥ ३६ ॥ नंतर त्यांचें तें दैन्य अवलोकन करून, स्वभृत्यमनोरथ पूर्ण करणाऱ्या भगवंतानें, त्या देवांना सांगितलें कीं,– तुह्मी खेद करूं नका. मी आपल्या मायेच्या योगानें त्यांच्यामध्यें परस्परांत कलह उत्पन्न करून तुमचें कार्य साधीन ॥ ३७ ॥ हे प्रभो, नंतर त्या अमृताकरितां ज्यांचीं मनें आशेनें व्याप्त

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

झालीं आहेत अशा त्या असुरांचा ' मी पूर्वी अमृत प्राशन करीन, मी पूर्वी अमृत प्राशन करीन; तूं करूं नको, तूं करूं नको, असा ' परस्परांत कलह सुरू झाला ॥ ३८॥ त्यांत कांहीं दुर्बल असुर होते त्यांचा आक्रोशप्रकार सांगतो– हे राजा, सारिखे श्रम केल्यामुळें अमृतोत्पत्तीला कारण असलेले देवहि, सत्रयागाप्रमाणें ह्या अमृतापैकीं आपापला भाग ग्रहण करण्यास योग्य आहेत, हा सनातन धर्म आहे, असें बोलून मत्सर उत्पन्न झालेले दुर्बल दैत्य, कलश हरण केलेल्या आपल्या प्रबल दैत्यांचा वारंवार निषेध करूं लागले ॥ ३९ ॥ ४० ॥ ह्याप्रमाणें त्या दैत्यांमध्यें कलह सुरू झाला तों इतक्यामध्यें सर्व उपाय जाणणाऱ्या सर्वसमर्थ विष्णूनें, अत्यंत अद्भुत व वर्णन करण्यास अशक्य असें स्त्रीरूप धारण केलें ॥ ४१ ॥ तें असें कीं, जें पहाण्यास योग्य अशा निळ्या कमळाप्रमाणें श्यामवर्ण असून; सर्व अवयवांनीं सुंदर होतें; ज्याचेठिकाणीं सारख्या

बलानां कलिरभूत् ॥ ३८ ॥ दुर्बलानां त्वाक्रोशप्रकारमाह । देवा इति द्वाभ्याम् । ये देवास्तुल्येनायासेन हेतवः साधकाः । तुल्य आयासो हेतुश्च धनादिर्येषामिति वा । सत्रयागे यथा सर्वेषां समं फलं तद्वत् । तथाच श्रुतिः । ऋद्धिकामाः सत्रमासीरन्निति । ये यजमानास्त ऋत्विज इति च ॥ ३९ ॥ ४० ॥ ४१ ॥ तद्रूपं वर्णयति पंचभिः । प्रेक्षणीयमुत्पलमिव श्यामम् । सर्वेष्ववयवेषु सुंदरम् । समानयोः कर्णयोराभरणे यस्मिन् । सुकपोलं च तदुत्कृष्टनासिकं चाननं य-

देवाः स्वं भागमर्हंति ये तुल्यायासहेतवः ॥ सत्रयाग इवैतस्मिन्नेष धर्मः सनातनः ॥ ३९ ॥ इति स्वान्प्रत्यषेधन्वै दैतेया जातमत्सराः ॥ दुर्बलाः प्रबलान्राजन्गृहीतकलशान्मुहुः ॥ ४० ॥ एतस्मिन्नंतरे विष्णुः सर्वोपायविदीश्वरः ॥ योषिद्रूपमनिर्देश्यं दधार परमाद्भुतम् ॥ ४१ ॥ प्रेक्षणीयोत्पलश्यामं सर्वावयवसुंदरम् ॥ समानकर्णाभरणं सुकपोलोन्नसाननम् ॥ ४२ ॥ नवयौवननिर्वृत्तस्तनभारकृशोदरम् ॥ मुखामोदानुरक्तालिझंकारोद्विग्नलोचनम् ॥ ४३ ॥ बिभ्रत्स्वकेशभारेण मालामुत्फुल्लमल्लिकाम् ॥ सुग्रीवकंठाभरणं सुभुजांगदभूषितम् ॥ ४४ ॥ विरजांबरसंवीतनितंबद्वीपशोभया ॥ कांच्या प्रविलसद्वल्गुचलच्चरणनूपुरम् ॥ ४५ ॥ सव्रीडस्मितविक्षिप्तभ्रूविलासावलोकनैः ॥ दैत्ययूथपचेतस्सु काममुद्दीपयन्मुहुः ॥ ४६ ॥

स्मिन् ॥ ४२ ॥ नवयौवननिर्वृत्तयोः स्तनयोर्भारेण च कृशमुदरं यस्मिन् ॥ ४३ ॥ सुष्ठु ग्रीवा यस्मिन्कंठे आभरणं यस्मिंस्तच्च तच्च । शोभना ग्रीवा येन तत्कंठाभरणं यस्मिन्निति वा । सुभुजयोरंगदाभ्यां भूषितम् ॥ ४४ ॥ विरजांबरेण संवीतो नितंब एव द्वीपो विशालत्वात्तत्र शोभा यस्यास्तया कांच्या प्रकर्षेण विलसत् । वल्गु यथा भवत्येवं चलतोश्चरणयोर्नूपुरे यस्मिन् ॥ ४५ ॥ सव्रीडेन स्मितेन सह विक्षिप्ता कंपिता या भ्रूस्तस्या विलासेन सह यान्यवलोकितानि तैर्दैत्ययूथपानां चेतस्सु मुहुः काम-

---

कर्णांवर भूषणें घातलेलीं असून उत्तम गाल व उत्कृष्ट नासिका ह्यांनीं युक्त असें मुख होतें ॥ ४२ ॥ ज्याचें उदर, नूतन यौवनानें वर्तुळाकार झालेल्या स्तनांच्या भारानें कृश झालें होतें. ज्याचे नेत्र मुखकमलाच्या सुगंधाविषयीं आसक्त झालेल्या भ्रमरांच्या झंकार शब्दांनीं उद्विग्न झाले होते ॥ ४३ ॥ ज्यानें आपल्या वेणीमध्यें मोगऱ्यांच्या पुष्पांची प्रफुल्लित माळा धारण केली होती, जें कंठाला शोभविणाऱ्या कंठभूषणांनीं भूषित होतें ॥ ४४ ॥ जें उत्तम भुजांचेठिकाणीं धारण केलेल्या बाजुबंदांनीं सुशोभित होतें, जें निर्मल वस्त्र नेसलेल्या नितंबरूप द्वीपावर शोभणाऱ्या कमरपट्ट्यानें फारच सुंदर दिसत होतें, ज्याच्या सुंदर गतीनें चालणाऱ्या चरणांचे ठिकाणीं तोरड्या धारण केलेल्या होत्या ॥ ४५ ॥ आणि जें स्वरूप, सलज्ज हास्यासहित फेंकलेल्या भ्रुकुटींच्या कंपित भ्रूविलासांसहवर्तमान अवलोकनांनीं दैत्यसेनाधिपतींच्या अंतःकरणामध्यें वारंवार कामोद्दीपन करीत होतें ॥ ४६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्मप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील अष्टमस्कंधापैकीं अमृताख्यान संबंधीं मोहिन्युद्भवनामक हा आठवा अध्याय समाप्त झाला ॥ ८ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥
आतां ह्या नवव्या अध्यायांत, मोहित झालेल्या दैत्यांनीं अमृतपात्र मोहिनीला अर्पण केलें असतां त्यांना फसवून देवांना अमृत पाजिलें ही कथा आहे ॥ १ ॥ श्रीशुका-
चार्य ह्मणालाः—हे राजा, नंतर ते असुर, अमृताकरितां स्नेहाचा त्याग करून, परस्परांची निंदा करीत व जबरीनें चोरी करणाऱ्या चोरांप्रमाणें एकमेकांपासून अमृत-
पात्र हरण करीत असलेल्या त्या दैत्यांनीं येत असलेल्या एका स्त्रीला अवलोकन केलें ॥ १ ॥ नंतर तिच्या दर्शनानें कामवासना उत्पन्न झालेले ते असुर 'कायहो हिचें
सौंदर्य, कायहो हिची कांति!, कायहो हिचें वय!,' असें ह्मणत ह्मणत तिच्या समीप जाऊन तिला विचारूं लागले कीं,— ॥ २ ॥ हे कमलपत्राक्षि, हे सुंदर ऊरुयुक्ते,
आमचीं मनें क्षोभवून टाकणारी अशी तूं कोणाची कोण आहेस? कोठून आली आहेस,? व येथें येऊन तूं कोणतें कार्य करावयाची इच्छा करीत आहेस? ॥ ३ ॥ आतां ह्या

मुदीपयत् ॥ ४६ ॥ इति श्रीमद्भागवते अष्टमस्कंधे टीकायामष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥ ॥ नवमे मोहितैर्दैत्यैरर्पितेऽमृतभाजने ॥ तद्वंचनेन देवेभ्योऽमृतं दत्तं तयेर्यते ॥ १ ॥ १ ॥
अहो रूपं सौंदर्यं धाम द्युतिरिति वदंतः का त्वमित्यादि पप्रच्छुः ॥ २ ॥ मथ्नंतीव क्षोभयंतीव ॥ ३ ॥ कस्यासीत्ययुक्तमुक्तमस्माभिर्यतस्त्वं न केनचिद्भुक्तपूर्वेत्याहुः । नेति

इति श्रीमद्भागवते महापुराणे अष्टमस्कंधे अष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ तेऽन्योन्यतोऽसुराः पात्रं हरंतस्त्यक्तसौ-
हृदाः ॥ क्षिपंतो दस्युधर्माण आयातीं ददृशुः स्त्रियम् ॥ १ ॥ अहो रूपमहो धाम अहो अस्या नवं वयः ॥ इति ते तामभिद्रुत्य
पप्रच्छुर्जातहृच्छयाः ॥ २ ॥ का त्वं कंजपलाशाक्षि कुतो वा किं चिकीर्षसि ॥ कस्यासि वद वामोरु मथ्नंतीव मनांसि नः ॥ ३ ॥
न वयं त्वाऽमरैर्दैत्यैः सिद्धगंधर्वचारणैः ॥ नास्पृष्टपूर्वां जानीमो लोकेशैश्च कुतो नृभिः ॥४॥ नूनं त्वं विधिना सुभ्रूः प्रेषिताऽसि शरीरि-
णाम् ॥ सर्वेंद्रियमनःप्रीतिं विधातुं सघृणेन किम् ॥ ५ ॥ सा त्वं नः स्पर्धमानानामेकवस्तुनि मानिनि ॥ ज्ञातीनां बद्धवैराणा शं
विधत्स्व सुमध्यमे ॥ ६ ॥ वयं कश्यपदायादा भ्रातरः कृतपौरुषाः ॥ विभजस्व यथान्यायं नैव भेदो यथा भवेत् ॥ ७ ॥

द्वाभ्याम् । त्वा त्वाममरादिभिरस्पृष्टपूर्वां न जानीम इति नापितु जानीम एव ॥ ४ ॥ आस्तामिदं त्वद्दर्शनं त्वीश्वरेणैव संपादितमित्याहुः । नूनमिति । सर्वेंद्रियाणां च
मनसश्च प्रीतिं विधातुं सघृणेन प्रेषिताऽसि किंवा यदृच्छयाऽऽगतासि नैवं नूनं प्रेषितैवेत्यर्थः ॥ ५ ॥ ६ ॥ भेदो विग्रहो यथा न भवेत्तथा ॥ ७ ॥

पूर्वीं तुझा कोणीहि उपभोग घेतला नसल्यामुळें तूं कोणाची आहेस ह्मणून जो आह्मीं तुला प्रश्न केला तो बरोबर नाहीं, असें सांगण्याच्या अभिप्रायानें ह्मणतात कीं,— हे
सुंदरि, देव, दैत्य, सिद्ध, गंधर्व, चारण व लोकाधिपति ह्यांपैकीं कोणीहि तुला आजपर्यंत स्पर्श केला नाहीं. असें आह्मीं समजतों, तेव्हां मनुष्यांचा तुला स्पर्श कोठून
होणार? ॥ ४ ॥ आतां असूंदे ही गोष्ट. परंतु, तुझें दर्शन तर ईश्वरानेंच आह्मांला करून दिलें हें दर्शविण्याच्या अभिप्रायानें ह्मणतात कीं,—हे सुभ्रु, देहधारी प्राण्यांचीं सर्व
इंद्रियें व मन यांची तृप्ति करण्याकरितां परमदयाळू ईश्वरानेंच खरोखर तुला पाठविली आहे काय? ॥ ५ ॥ तस्मात्, हे सुमध्यमे, हे मानिनि, एकाच वस्तूविषयीं
स्पर्धा करणाऱ्या व एकमेकांचे वैरी झालेल्या आह्मां ज्ञातिजनांचें तूं कल्याण कर ॥ ६ ॥ हे सुंदरि, आह्मीं सर्व कश्यपाचे पुत्र परस्परांचे भ्राते आहों व अमृतप्राप्ती-
करितां आह्मीं सर्वांनीं मिळून मोठा प्रयत्न केला आहे, ह्यास्तव आह्मां परस्परांमध्यें जसा विरोध न येईल त्या योग्य रीतीनें तूं आह्मांस या अमृताचा विभाग करून दे ॥ ७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

याप्रमाणें दैत्यांनीं प्रार्थना केलेला व मायेनें स्त्रीरूप धारण केलेला श्रीहरि, किंचित् हास्य करून मनोहर नेत्रकटाक्षांनीं त्यांच्याकडे पहात पहात त्यांना ह्मणाला कीं,– ॥ ८ ॥ श्रीभगवान् ह्मणालाः–हे कश्यपपुत्रहो, मज व्यभिचारिणी स्त्रीचेठिकाणीं तुह्मीं आसक्त कसे झालां आहां? कारण, जो पंडित आहे तो कामिनीस्त्रियांचेठिकाणीं कधींहि विश्वास ठेवीत नाहीं ॥ ९ ॥ हे दैत्यहो, नित्य नव्यानव्याचा शोध करीत असणाऱ्या लांडग्यांचीं व व्यभिचारिणी स्त्रियांचीं सख्यें अनित्य आहेत असें ज्ञाते पुरुष ह्मणतात ॥ १० ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, ह्याप्रमाणें तिच्या लीलायुक्त वचनांनीं ज्यांच्या मनाला विश्वास वाटला आहे अशा त्या असुरांनीं काहींएक अनिर्वचनीय अभिप्रायानें गंभीर असें हास्य करून, अमृतपात्र तिच्या हातांत दिलें ॥ ११ ॥ नंतर तें अमृतपात्र घेऊन किंचित् हास्याच्या योगानें शोभणाऱ्या वाणीनें श्रीहरीनें असें भाषण केलें कीं,–हे दैत्यहो, मी केलेलें कृत्य चांगलें असो किंवा वाईट असो जर तुह्मीं तें अंगीकारीत असाल तर मी ह्या अमृताचा विभाग करून देत्यें ॥१२॥

॥८॥ संगता अनुरक्ताः ॥९॥ हे सुरद्विषः ॥१०॥ भावेन केनाप्यभिप्रायेण गंभीरं यथा भवत्येवं जहसुः ॥११॥ ईषत्स्मितेन शोभा यस्यास्तया। मया कृतं साधु वा असाधु यद्यभ्युपेतां-

इत्युपामंत्रितो दैत्यैर्मायायोषिद्वपुर्हरिः ॥ प्रहस्य रुचिरापांगैर्निरीक्षन्निदमब्रवीत् ॥ ८ ॥ श्रीभगवानुवाच ॥ कथं कश्यपदायादाः पुंश्चल्यां मयि संगताः ॥ विश्वासं पंडितो जातु कामिनीषु न याति हि ॥ ९ ॥ सालावृकाणां स्त्रीणां च स्वैरिणीनां सुरद्विषः ॥ सख्यान्याहुरनित्यानि नूत्नं नूत्नं विचिन्वताम् ॥ १० ॥ श्रीशुक उवाच ॥ इति ते क्ष्वेलितैस्तस्या आश्वस्तमनसोऽसुराः ॥ जहसुर्भावगंभीरं ददुश्चामृतभाजनम् ॥ ११ ॥ ततो गृहीत्वाऽमृतभाजनं हरिर्बभाष ईषत्स्मितशोभया गिरा ॥ यद्यभ्युपेत क्व च साध्वसाधु वा कृतं मया वो विभजे सुधामिमाम् ॥ १२ ॥ इत्यभिव्याहृतं तस्या आकर्ण्यासुरपुंगवाः ॥ अप्रमाणविदस्तस्यास्तत्तथेत्यन्वमंसत ॥ १३ ॥ अथोपोष्य कृतस्नाना हुत्वा च हविषाऽनलम् ॥ दत्त्वा गोविप्रभूतेभ्यः कृतस्वस्त्ययना द्विजैः ॥ १४ ॥ यथोपजोषं वासांसि परिधायाहतानि ते ॥ कुशेषु प्राविशन्सर्वे प्रागग्रेष्वभिभूषिताः ॥ १५ ॥ प्राङ्मुखेषूपविष्टेषु सुरेषु दितिजेषु च ॥ धूपामोदितशालायां जुष्टायां माल्यदीपकैः ॥ १६ ॥

ङ्गीकुरुत तर्हि विभजे ॥१२॥ असुरपुंगवा दैत्यश्रेष्ठाः। प्रमाणमियत्तामजानंतः ॥ १३ ॥१४॥ यथोपजोषं यथाप्रीति। अहतस्य लक्षणम्। अहतं यंत्रनिर्मुक्तमुक्तं वासः स्वयंभुवा ॥ शस्तं तन्मांगलिक्येषु तावन्मात्रेण सर्वदा ॥ प्रागग्रेषु कुशेषु विविशुः ॥ १५ ॥ धूपैरामोदितायां सुरभीकृतायां शालायाम् ॥ १६ ॥ अथ तस्यां शालायां हे नरेंद्र स।

ह्याप्रमाणें तिचें भाषण श्रवण करून तिची इयत्ता न जाणणाऱ्या असुरांनीं 'ठीक आहे; असें ह्मणून' तिला तें अमृत वाटण्याविषयीं अनुमोदन दिलें ॥ १३ ॥ नंतर उपोषणपूर्वक स्नान करून, अग्नीमध्यें हविर्द्रव्यांचा होम करून, गाई, ब्राह्मण व इतर प्राणी ह्यांना, यथायोग्य कोमल तृणादिकांचें दान केलें, तसेंच ब्राह्मणांकडून पुण्याहवाचन करवून, आपल्या मनाप्रमाणें नवींनवीं वस्त्रें परिधान करून व भूषणें धारण करून ते सर्वहि देवदैत्य पूर्वेकडे अग्रें केलेल्या दर्भांवर बसले ॥ १४ ॥ १५ ॥ हे राजा, पुष्पें व दीप ह्यांनीं युक्त व धूपांनीं सुवासित अशा त्या शाळेमध्यें देव आणि दैत्य प्राङ्मुख बसले असतां, जिच्या मांड्या करभाप्रमाणें (मणगठापासून करांगुळीपर्यंत हाताच्या बाहेरच्या भागाप्रमाणें) वर्तुळ आहेत जिची गति, सुंदर पातांव नेसलेल्या विशाळ कटिभागाच्या योगानें मंद झाली आहे, जी सुवर्णमय तोरड्यांच्या नादानें शब्द करीत आहे, जिचे नेत्र मदाच्यायोगानें विव्हळ झाले आहेत आणि जिचे स्तन कुंभाप्रमाणें वर्तुळ व पुष्ट आहेत, अशी ती मोहिनी स्त्री, हातामध्यें अमृताचा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कलश घेऊन त्या सभेमध्यें प्रविष्ट झाली ॥ १६ ॥ १७ ॥ त्यावेळीं, जिनें सुवर्णमय कुंडलें धारण केलीं आहेत, जिचे कर्ण, नासिका, गाल व मुख हे अवयव मनोहर आहेत व जिच्या चोळीचा कांठ स्तनावरून किंचित् एकीकडे सरल्यासारखा झाला आहे अशा त्या परदेवतानामक लक्ष्मीच्या सखीला अवलोकन करून, तिच्या उत्कट हास्यपूर्वक अवलोकनानें ते देवदैत्य अगदीं मोहित झाले ॥ १८ ॥ असो. ह्याप्रमाणें त्यांना मोहित करून श्रीहरीनें काय केलें तें सांगण्याच्या आशयानें शुकाचार्य भाषण करितो कीं,— हे राजा, स्वभावतःच क्रूर असलेल्या असुरांना अमृत देणें हें सर्पांना दूध दिल्यासारखें अन्यायाचें आहे असें जाणून अच्युतानें त्यांना तें अमृत

कलशपाणिराविवेश । कथंभूता । मणिबंधादाकनिष्ठं करस्य करभो बहिः ॥ करभसदृशौ सुवृत्तावूरू यस्याः सा । उशत्कमनीयं दुकूलं यस्मिंस्तेन श्रोणीतटेन । विशालया श्रोण्या अलसा मंदा गतिर्यस्याः । पाठांतरे करभसदृशयोरूर्वोर्लसद्दुकूलं यस्याः सा चासौ श्रोणीतटेनालसगतिश्च । मदेन विह्वले अक्षिणी यस्याः ॥ १७ ॥ तां श्रियः सखीं संवीक्ष्य देवासुराः संमुमुहुः । कथंभूताम् । कनकमये कुंडले यस्याः सा चासौ चारवः कर्णादयो यस्याः सा च ताम् । विगलितः स्रस्तः स्तनपट्टिकाया अंतो यस्याः ॥१८॥ एवं तान्मोहयित्वा यत्कृतवांस्तदाह त्रिभिः । असुराणां सुधादानं सर्पाणां क्षीरदानमिव दुर्नयमन्याय्यं मत्वा तां सुधां तेभ्यो न व्यभजत् । अयं भावः । दैत्यैर्मदीयं साध्वसाधु वा सर्व

तस्यां नरेंद्र करभोरुरुशद्दुकूलश्रोणीतटालसगतिर्मदविह्वलाक्षी ॥ सा कूजती कनकनूपुरसिंजितेन कुंभस्तनी कलशपाणिरथाविवेश ॥ १७ ॥ तां श्रीसखीं कनककुंडलचारुकर्णनासाकपोलवदनां परदेवताख्याम् ॥ संवीक्ष्य संमुमुहुरुत्स्मितवीक्षणेन देवासुरा विगलितस्तनपट्टिकां ताम् ॥ १८ ॥ असुराणां सुधादानं सर्पाणामिव दुर्नयम् ॥ मत्वा जातिनृशंसानां न तां व्यभजदच्युतः ॥ १९ ॥ कल्पयित्वा पृथक्पंक्तीरुभयेषां जगत्पतिः ॥ तांश्चोपवेशयामास स्वेषु स्वेषु च पंक्तिषु ॥ २० ॥ दैत्यान् गृहीतकलशो वंचयन्नुपसंचरैः ॥ दूरस्थान्पाययामास जरामृत्युहरां सुधाम् ॥ २१ ॥ ते पालयंतः समयमसुराः स्वकृतं नृप ॥ तूष्णीमासन्कृतस्नेहाः स्त्रीविवादजुगुप्सया ॥ २२ ॥ तस्यां कृतातिप्रणयाः प्रणयापायकातराः ॥ बहुमानेन चाबद्धा नोचुः किंचन विप्रियम् ॥ २३ ॥

मनुमतमेवातो मद्भक्तान्देवानेव सुधां पाययिष्यामि किंच तैर्यथान्यायं विभजस्वेत्युक्तं न चैतेभ्यो जात्यैव क्रूरेभ्यो दानं न्याय्यमतस्तेभ्यः सुधां न दद्यामिति ॥ १९ ॥ पंक्तीः पृथग्विविक्ताः कल्पयित्वा विधाय । तासु पंक्तिषु स्वेषु स्वेषु तत्समजातीयेषु । तांश्चासुरानपि प्रतारणार्थमेवोपवेशयामास ॥२०॥ उपसंचरैर्बहुमानप्रियवाक्यादिना तानतिक्रम्यातिक्रम्य गमनैः । दूरस्थानपि देवान् ॥ २१ ॥ तया कृतः स्नेहो येषु । स्त्रिया सह विवादस्य जुगुप्सया ॥२२॥ कृतोऽतिप्रणयः स्नेहो यैः । प्रणयापायेन कातरा भीताः । एते तावत्क्रपणाः पूर्वं किंचित्पिबंतु यूयं तु धीराः क्षणं प्रतीक्षध्वमित्यादिबहुमानेनाऽऽबद्धा नियंत्रिताः । समयपालनादिभिः षड्भिरेतैः कारणैरप्रियं किंचिदपि नोचुः किंतु तूष्णीमासन् ॥ २३ ॥

दिलें नाहीं ॥ १९ ॥ नंतर त्या जगत्पति श्रीहरीनें त्या उभयतांच्या वेगवेगळ्या पंक्ति करून त्यांना आपापल्या पंक्तीमध्यें बसविलें ॥ २० ॥ नंतर हस्तामध्यें अमृताचा कलश धारण करणाऱ्या श्रीहरीनें, बहुमानपुरःसर नेत्रकटाक्ष, हास्य, लज्जा, व प्रियभाषणादिकांच्या योगानें दैत्यांना, फसवून दूर असलेल्याहि देवांना, जरा व मृत्यु यांचा नाश करणारें अमृत पाजिलें ॥ २१ ॥ हे राजा, त्यावेळीं आपण केलेल्या नियमाचें पाळण करणारे ते असुर, स्त्रीच्याबरोबर वादविवाद करण्याच्या लज्जेमुळें व तिनें त्यांना प्रेम दाखविलें असल्यामुळें निवात बसले ॥ २२ ॥ कारण, तिचेठिकाणीं त्यांनीं अत्यंत प्रेम धारण केलें होतें, त्यामध्यें व्यत्यय येण्याची त्यांना भीति होती व हे देव अगदीं अधीरी आहेत ह्मणून प्रथम थोडेंसें अमृत प्राशन करूंदेत; तुह्मी धैर्यवान् आहां ह्याकरितां क्षणभर धीर धरा अशा बहुमानानें ते अगदीं वश करून

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

घेतले होते, ह्मणून त्यांनीं कांहींच अप्रिय भाषण केलें नाहीं ॥ २३ ॥ इतक्यामध्यें देववेषानें आपलें रूप आच्छादित करून व देवांच्या पंक्तींत सूर्यचंद्रांच्या मध्यें बसले-
ल्या राहूनें अमृताचें प्राशन केलें तों इतक्यांत त्या चंद्रसूर्यांनीं हा दैत्य आहे. असें श्रीविष्णूला सुचविलें ॥ २४ ॥ त्याबरोबर वस्तऱ्यासारख्या तीक्ष्णधारेनें युक्त अशा
॥ २४ ॥ आपल्या चक्रानें श्रीहरीनें त्या अमृतपान करणाऱ्या राहूचें शिर तोडिलें असतां अमृताचा स्पर्श न झालेलें त्याचें धड गतप्राण होऊन भूमीवर पडलें ॥ २५ ॥ परंतु अ० ९
त्याचें मस्तक तर अमृताचा स्पर्श झाल्यामुळें अमर झालें ह्मणून त्याला भगवंतानें सूर्यादिकांसारखा ग्रहत्वाचा अधिकार दिला. तो राहु चंद्रसूर्यांनीं सुचविलेला असल्या-
मुळें त्यांच्याबरोबर वैरभाव धारण करून अजूनहि पर्वाचे दिवशीं सूर्यचंद्रांच्या सन्मुख धांवत असतो ॥ २६ ॥ असो. देवांनीं बहुतकरून अमृत प्राशन केलें असतां,

---

देवपंक्तौ चंद्रार्कयोर्मध्ये प्रविष्टः सोमममृतमपिबत् ॥ २४ ॥ हरिस्तस्य शिरो जहार । अप्लावितोऽसंस्पृष्टः ॥ २५ ॥ ग्रहं सूर्यादिवद्ग्रहत्वाधिकारिणम् ॥ २६ ॥ २७ ॥ हरिभक्तानामेवोद्यमः फलति नान्येषामित्येवमाख्यानतात्पर्यमाह । एवमिति । समा देशादयो येषाम् । हेतुर्मंदराद्रिः । अर्थः समुद्रे क्षिप्तं वीरुदादि । विविधः कल्पः फलं केषांचिज्जातं केषांचिन्नेति वैचित्र्यमेषां ते फलवैषम्यवंतो बभूवुरित्यर्थः । तदेवाह । तत्र तेषु यस्य पादपंकजरजःश्रयणादेवा अमृतं फलमापुः स एव सेव्य इत्यर्थः । यत्तदोर्नित्यसंबंधात्

देवलिंगप्रतिच्छन्नः स्वर्भानुर्देवसंसदि ॥ प्रविष्टः सोममपिबच्चंद्रार्काभ्यां च सूचितः ॥ २४ ॥ चक्रेण क्षुरधारेण जहार पिबतः शिरः ॥ हरिस्तस्य कबंधस्तु सुधयाऽप्लावितोऽपतत् ॥ २५ ॥ शिरस्त्वमरतां नीतमजो ग्रहमचीक्लृपत् ॥ यस्तु पर्वणि चंद्रार्कावभिधावति वैरधीः ॥ २६ ॥ पीतप्रायेऽमृते देवैर्भगवाँल्लोकभावनः ॥ पश्यतामसुरेंद्राणां स्वं रूपं जगृहे हरिः ॥ २७ ॥ एवं सुरासुरगणाः समदेशकालहेत्वर्थकर्ममतयोऽपि फले विकल्पाः ॥ तत्रामृतं सुरगणाः फलमंजसाऽऽपुर्यत्पादपंकजरजःश्रयणान्न दैत्याः ॥ २८ ॥ यद्युज्यतेऽसुवसुकर्मवचोमनोभिर्देहात्मजादिषु नृभिस्तदसत्पृथक्त्वात् ॥ तैरेव सद्भवति यत्क्रियतेऽपृथक्त्वात्सर्वस्य तद्भवति मूलनिषेचनं यत् ॥ २९ ॥

॥ २८ ॥ एतदेवोपपादयति । यदिति । असुः प्राणः । वसु धनम् । प्राणादिभिर्देहात्मजादिषु नृभिर्यद्युज्यते प्रयुज्यते देहाद्यर्थं यत्क्रियत इत्यर्थः । तदसद्व्यर्थं भवति । कुतः । पृथक्त्वाद्भेदाश्रयत्वात् शाखानिषेचनवत् । तैरेव प्राणादिभिरीश्वरोद्देशेन यत्क्रियते तत्तु सन्महाफलं भवति अपृथक्त्वादीश्वरस्य सर्वत्रानुगतत्वात् । तत्र दृष्टांतः । यत्तरोर्मूलनिषेचनं तद्यथा सर्वस्य स्कंधशाखादेरपि भवतीति । यद्वा ल्यब्लोपे पंचम्यौ । पृथक्त्वं पर्यालोच्य भेददृष्ट्या देहाद्युद्देशेन यत्क्रियते तदसत् । अपृथक्त्वं पर्यालोच्येश्वर-

---

लोकपालक भगवान् श्रीहरीनें, दैत्याधिपतींच्या समक्ष आपलें स्वरूप धारण केलें ॥ २७॥ आतां, भगवद्भक्तांचाच प्रयत्न सफल होतो इतरांचा होत नाहीं, असें आख्याना-
चें तात्पर्य सांगण्याकरितां शुकाचार्य ह्मणतो कीं,—हे राजा, ह्मप्रमाणें देश, काल, हेतु (मंदरादिक), अर्थ (समुद्रांत, वल्ली टाकणें इत्यादिक), प्रयत्न व मति हें सर्व
देवगणांचें व दैत्यगणांचें एकसारखेंच होतें तथापि ते देवदैत्य फलप्राप्तीविषयीं भेदयुक्त झाले. त्यांमध्यें, ज्याच्या चरणकमलांच्या रजःकणांचा आश्रय केल्यामुळें
देवगणांना अनायासानें अमृतरूप फल प्राप्त झालें व ज्याच्यापासून विमुख असल्यामुळें दैत्यांना तें प्राप्त झालें नाहीं, त्या हरीचीच सर्वांनीं सेवा करावी ॥ २८ ॥ कारण, ॥ २४ ॥
प्राण, द्रव्य, कर्म, वाणी व मन ह्यांच्या योगानें देह व पुत्र इत्यादिकांकरितां लोक जें कर्म करितात तें भेदबुद्धीनें केलेलें असल्यामुळें, जसें वृक्षाच्या शाखांचें सेचन
व्यर्थ होतें त्याप्रमाणें व्यर्थ होतें आणि त्याच प्राणादिकांच्या योगानें ईश्वराला उद्देशून, लोक जें कर्म करितात तें ऐक्यबुद्धीनें केलेलें असल्यामुळें, जसें वृक्षाच्या मूलाचें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सेचन सर्व स्कंध शाखादिकांची तृप्ति करणारें होतें त्याप्रमाणें सर्वांना पोंचून महाफलदायक होतें ॥ २९ ॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील अष्टमस्कंधापैकीं अमृताख्यानसंबंधीं अमृतपान निरूपणनामक हा नववा अध्याय समाप्त झाला ॥ ९ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या दहाव्या अध्यायामध्यें मत्सरामुळें दैत्यांनीं देवांसहवर्तमान युद्ध करण्यास आरंभ केला असतां दैत्यांच्या मायेनें खिन्न झालेल्या देवांमध्यें श्रीहरि प्रकट झाला अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ असो. ह्याप्रमाणें अभक्तांना अमृताची प्राप्ति झाली नाहीं हें सांगितलें. आतां त्यांनीं पुनरपि भक्तांबरोबर मत्सर केल्यामुळें त्यांच्या प्राणांची हानि झाली असें सांगण्यासाठीं श्रीशुकाचार्य ह्मणालाः–हे राजा, याप्रमाणें एकाग्रपणानें समुद्रमंथनरूप कर्माचेठिकाणीं प्रयत्न करणाऱ्याहि त्या दानवदैत्यांना, अमृत प्राप्त झालें नाहीं. कारण, ते वासुदेवाविषयीं पराङ्मुख होते ॥ १ ॥ हे राजा, ह्याप्रमाणें समुद्रमंथनानें अमृत प्राप्त करून घेऊन व तें आपले भक्त अशा देवांना पाजून, तेथें असणारे सर्व प्राणिमात्र

दृष्ट्या तैरेव तेष्वेव च यत्क्रियते तत्सद्भवतीति । शेषं समानम् ॥ २९ ॥ इति श्रीमद्भागवतेऽष्टमस्कंधे टीकायां नवमोऽध्यायः ॥ ९ ॥ ॥ दशमे मत्सराद्दैत्यैरारब्धे तु मृधे

इति श्रीमद्भागवते महापुराणे अष्टमस्कंधे अमृतमथने नवमोऽध्यायः ॥ ९ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ इति दानवदैतेया नाविदन्न-
मृतं नृप ॥ युक्ताः कर्मणि यत्ताश्च वासुदेवपराङ्मुखाः ॥ १ ॥ साधयित्वाऽमृतं राजन्पाययित्वा स्वकान्सुरान् ॥ पश्यतां सर्वभू-
तानां ययौ गरुडवाहनः ॥ २ ॥ सपत्नानां परामृद्धिं दृष्ट्वा ते दितिनंदनाः ॥ अमृष्यमाणा उत्पेतुर्देवान्प्रत्युद्यतायुधाः ॥ ३ ॥
ततः सुरगणाः सर्वे सुधया पीतयैधिताः ॥ प्रतिसंयुयुधुः शस्त्रैर्नारायणपदाश्रयाः ॥ ४ ॥ तत्र देवासुरो नाम रणः परमदारुणः ॥
रोधस्युदन्वतो राजंस्तुमुलो रोमहर्षणः ॥ ५ ॥ तत्रान्योन्यं सपत्नास्ते संरब्धमनसो रणे ॥ समासाद्यासिभिर्बाणैर्निजघ्नुर्विविधा-
युधैः ॥ ६ ॥ शंखतूर्यमृदंगानां भेरीडमरिणां महान् ॥ हस्त्यश्वरथपत्तीनां नदतां निःस्वनोऽभवत् ॥ ७ ॥ रथिनो रथिभिस्तत्र
पत्तिभिः सह पत्तयः ॥ हया हयैरिभाश्चेभैः समसज्जंत संयुगे ॥ ८ ॥

सुरैः ॥ दैत्यमायाविषण्णेषु देवेष्वाविर्बभौ हरिः ॥ १ ॥ तदेवममृतावाप्तिर्नाभक्तानामितीरितम् ॥ भक्तमत्सरतः प्राणहानिः पुनरुदीर्यते ॥ २ ॥ १ ॥ २ ॥ ३ ॥ ४ ॥ रणः संग्रामः । उदन्वतः समुद्रस्य रोधसि तीरे बभूव ॥ ५ ॥ अन्योन्यं समासाद्य निजघ्नुः ॥ ६ ॥ ७ ॥ ८ ॥

पाहत असतां तो भगवान्, गरुडावर बसून आपल्या वैकुंठलोकाप्रत निघून गेला ॥ २ ॥ नंतर आपल्या शत्रूंची उत्कृष्ट समृद्धि पाहून ती सहन न करणारे दैत्य आयुधें उचलून युद्ध करण्याकरितां देवांवर धांवले ॥ ३ ॥ तदनंतर नारायणचरणाचा आश्रय केल्यामुळें प्राशन केलेल्या अमृतानें, बलपुष्टयादि संपत्तीनें वृद्धिंगत झालेले सर्व देवगण, शस्त्रास्त्रें ग्रहण करून असुरांबरोबर युद्ध करूं लागले ॥ ४ ॥ हे राजा, त्या क्षीरसमुद्राचे तीरीं शरीरावर रोमांच उठविणारें असें देवासुरनामक महाभयंकर तुमुल युद्ध झालें ॥ ५ ॥ त्या युद्धामध्यें ज्यांचें चित्त खवळून गेलें आहे असे ते देवदैत्यरूपी शत्रु, आपापल्या बलऐश्वर्यादिकांचा सारखेपणा जाणून एकमेकांजवळ येऊन, खड्ग, बाण व नानाप्रकारचीं आयुधें ह्यांच्या योगानें परस्पर प्रहार करूं लागले ॥ ६ ॥ तेव्हां तेथें शंख, डंका, मृदंग, भेरी व डमरु ह्या वाद्यांचा आणि गर्जना करणारे हत्ति, घोडे, रथ व शिपाई ह्यांचा मोठा नाद होऊं लागला ॥ ७ ॥ तसेच त्या युद्धामध्यें रथ्यांसहवर्तमान रथी, पदातींसहवर्तमान पदाति अश्वांसहवर्तमान अश्व व

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

गजांसहवर्तमान गज युद्ध करूं लागले ॥ ८ ॥ तसेंच हे राजा, कांहीं योद्धे उंटांवर, कांहीं गजांवर, कांहीं गर्दभांवर, कांहीं गौरवर्ण मृगांवर, कांहीं आस्वलांवर, कांहीं व्याघ्रांवर, कांहीं सिंहांवर, कांहीं गृध्रांवर, कांहीं कंकपक्षांवर, कांहीं बगळ्यांवर, कांहीं ससाण्यांवर, कांहीं भास पक्ष्यांवर, कांहीं तिमिंगिलनामक मत्स्यांवर, कांहीं शरभांवर, कांहीं महिषांवर, कांहीं गेंड्यांवर, कांहीं वृषभांवर, कांहीं गव्यांवर, कांहीं अरुणांवर, कांहीं कोल्ह्यांवर, कांहीं मूषकांवर, कांहीं सरडांवर, कांहीं ससांवर, कांहीं मनुष्यांवर, कांहीं बोकडांवर, कांहीं काळविटांवर, कांहीं हंसांवर, कांहीं डुकरांवर, कांहीं जलचर व स्थलचर अशा पक्ष्यांवर आणि कांहीं अकाळ विकाळ देह धारण करणाऱ्या प्राण्यांवर आरूढ होऊन दोहों सैन्यामध्यें एकापुढें एक प्रविष्ट झाले व ते युद्ध करूं लागले ॥ ९ ॥ १० ॥ ११ ॥ १२ ॥ हे पांडुनंदना राजा, नानाप्रकारच्या रंगाच्या ध्वजपताका, शुभ्र व निर्मळ अशीं छत्रें, रत्नजडित दांड्यांनीं युक्त अशीं बहुत मोलाचीं व्यजनें (पंखे) मोरचेलें व चामरें, वायूनें उडणारीं

॥ ९ ॥ १० ॥ ११ ॥ १२॥ चित्रध्वजपटादिभिश्च वीराणां मालाभिश्च राजिभिर्देवदानववीराणां ध्वजिन्यौ यादसां मालाभिः सागराविव रेजतुरिति त्रयाणामन्वयः । यादोभि-

उष्ट्रैः केचिदिभैः केचिदपरे युयुधुः खरैः ॥ केचिद्गौरमृगैर्ऋक्षैर्द्वीपिभिर्हरिभिर्भटाः ॥ ९ ॥ गृध्रैः कंकैर्बकैरन्ये श्येनभासैस्तिमिंगिलैः ॥ शरभैर्महिषैः खड्गैर्गोवृषैर्गवयारुणैः ॥ १० ॥ शिवाभिराखुभिः केचित्कृकलासैः शशैर्नरैः ॥ बस्तैरेके कृष्णसारैर्हंसैरन्ये च सूकरैः ॥ ११ ॥ अन्ये जलस्थलखगैः सत्वैर्विकृतविग्रहैः ॥ सेनयोरुभयो राजन्विविशुस्तेऽग्रतोऽग्रतः ॥ १२ ॥ चित्रध्वजपटै राजन्नातपत्रैः सितामलैः ॥ महाधनैर्वज्रदंडैर्व्यजनैर्बर्हिचामरैः ॥ १३ ॥ वातोद्धूतोत्तरोष्णीषैरर्चिभिर्वर्मभूषणैः ॥ स्फुरद्भिर्विशदैः शस्त्रैः सुतरां सूर्यरश्मिभिः ॥ १४ ॥ देवदानववीराणां ध्वजिन्यौ पांडुनंदन ॥ रेजतुर्वीरमालाभिर्यादसामिव सागरौ ॥ १५॥ वैरोचनो बलिः संख्ये सोऽसुराणां चमूपतिः ॥ यानं वैहायसं नाम कामगं मयनिर्मितम् ॥ १६ ॥ सर्वसांग्रामिकोपेतं सर्वाश्चर्यमयं प्रभो ॥ अप्रतर्क्यमनिर्देश्यं दृश्यमानमदर्शनम् ॥ १७ ॥ आस्थितस्तद्विमानाग्र्यं सर्वानीकाधिपैर्वृतः ॥ वालव्यजनछत्राग्र्यै रेजे चंद्र इवोदये ॥ १८ ॥ तस्यासन्सर्वतो यानैर्यूथानां पतयोऽसुराः ॥ नमुचिः शंबरो बाणो विप्रचित्तिरयोमुखः ॥ १९ ॥

रिति वा । सितैरमलैरातपत्रैश्च । बार्हैश्चामरैश्च व्यजनैश्च ॥ १३ ॥ वातेनोद्धूतैरुत्तरीयैरुष्णीषैश्च सूर्यरश्मिभिः सुतरां स्फुरद्भिः ॥ १४ ॥ १५ ॥ असुराणां या चमूस्तस्याः पतिः स बलिर्यानमास्थितः ॥ १६ ॥ १७ ॥ उदये उदयगिरिशिखरे स्थितश्चंद्र इव रेजे इति त्रयाणामन्वयः ॥ १८ ॥ १९ ॥

प्रावरण वस्त्रें व मंदिलांचे पदर, दैदीप्यमान अशीं कवचें व भूषणें, आणि सूर्याच्या किरणांनीं फारच चमकणारीं उज्ज्वल शस्त्रें, यांच्यायोगानें शोभणारे जे शूरांचे समूह त्यांच्या योगानें त्या देवदैत्यवीरांच्या दोन्ही सेना, जलचर प्राण्यांच्या समुदायांनीं शोभणाऱ्या दोन समुद्रांप्रमाणें शोभूं लागल्या ॥ १३ ॥ १४ ॥ १५ ॥ हे प्रभो त्या युद्धामध्यें सर्व सेनाधिपतींनीं परिवेष्टित असा तो दैत्यसेनाधिपति विरोचनपुत्र बलि राजा, सर्व युद्धोपयोगी साधनांनीं युक्त, सर्व आश्चर्यांनीं भरलेलें, कधीं दृश्य व कधीं अदृश्य असल्यामुळें मनानें तर्क करण्यास व वाणीनें निरूपण करण्यास अशक्य, मयासुरानें निर्माण केलेलें आणि यथेष्ट प्रदेशावर गमन करणारें असें जें वैहायस नामक श्रेष्ठ विमान त्याच्यामध्यें आरूढ झाला असतां वाळ्याचे पंखे व उत्कृष्ट छत्रें ह्यांच्या योगानें, उदयकालीं शोभणाऱ्या चंद्राप्रमाणें शोभूं लागला ॥ १६ ॥ १७ ॥ ॥ १८ ॥ त्या बलीच्या सर्व बाजूंकडे आपापल्या रथादिकांवर आरूढ झालेले आपापल्या समुदायाचे अधिपति असुर नमुचि, शंबर, बाण, विप्रचित्ति, अयोमुख, द्विमूर्धा,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कालनाभ, प्रहेति, हेति, इल्वल, शकुनि, भूतसंताप, वज्रदंष्ट्र, विरोचन, हयग्रीव, शंकुशिरा, कपिल, मेघदुंदुभि, तारक, चक्रदृक्, शुंभ, निशुंभ, जंभ, उत्कल, अरिष्ट,
अरिष्टनेमि, त्रिपुराधिपति मयासुर हे व इतरहि पौलोम, कालेय आणि निवातकवचादिक होते ॥ १९ ॥ २० ॥ २१ ॥ २२ ॥ असो. हे सर्वहि, अमृताचा भाग न
मिळाल्यामुळें केवळ क्लेशाचे मात्र वांटेकरी झाले होते आणि ह्या सर्वांनीं पूर्वीं रणभूमीचेठिकाणीं पुष्कळवेळा देवांना पराजित केलें होतें म्हणून ते सिंहासारिखी गर्जना
करीत करीत मोठ्या नादानें युक्त अशा शंखांना वाजवूं लागले तेव्हां आपले शत्रु उन्मत्त झाले असें पाहून अत्यंत क्रुद्ध झालेला देवराज इंद्र, ऐरावतनामक दिग्गजावर
आरूढ झाला तेव्हां तो ज्याच्यावर उदकप्रवाह वाहत आहेत अशा उदयाचलावरून आरूढ झालेल्या सूर्याप्रमाणें शोभूं लागला ॥२३॥ २४ ॥ २५ ॥ तेव्हां नानाप्रकारचीं

॥ २० ॥ २१ ॥ २२ ॥ २३ ॥ २४ ॥ स्रवंति प्रस्रवणानि यस्मिन्निति मदधारासादृश्यम् ॥ २५ ॥ नानावाहनादीनि येषां ते देवा असुराश्च मिथो युयुधुः ॥ २६ ॥ २७ ॥

द्विमूर्धा कालनाभोऽथ प्रहेतिर्हेतिरिल्वलः ॥ शकुनिर्भूतसंतापो वज्रदंष्ट्रो विरोचनः ॥ २० ॥ हयग्रीवः शंकुशिराः कपिलो मेघदुंदुभिः ॥
तारकश्चक्रदृक्शुंभो निशुंभो जंभ उत्कलः ॥ २१ ॥ अरिष्टोऽरिष्टनेमिश्च मयश्च त्रिपुराधिपः ॥ अन्ये पौलोमकालेया निवातकवचा-
दयः ॥ २२ ॥ अलब्धभागाः सोमस्य केवलं क्लेशभागिनः ॥ सर्व एते रणमुखे बहुशो निर्जितामराः ॥ २३ ॥ सिंहनादान्विमुंचं-
तः शंखान्दध्मुर्महारवान् ॥ दृष्ट्वा सपत्नानुत्सिक्तान्बलभित्कुपितो भृशम् ॥ २४ ॥ ऐरावतं दिक्करिणमारूढः शुशुभे स्वराट् ॥ य-
था स्रवत्प्रस्रवणमुदयाद्रिमहर्पतिः ॥ २५ ॥ तस्यासन्सर्वतो देवा नानावाहध्वजायुधाः ॥ लोकपालाः सहगणैर्वाय्वग्निवरुणादयः
॥ २६ ॥ तेऽन्योन्यमभिसंसृत्य क्षिपंतो मर्मभिर्मिथः ॥ आह्वयंतो विशंतोऽग्रे युयुधुर्द्वंद्वयोधिनः ॥ २७ ॥ युयोध बलिरिंद्रेण ता-
रकेण गुहोऽस्यत ॥ वरुणो हेतिनाऽयुध्यन्मित्रो राजन्प्रहेतिना ॥ २८ ॥ यमस्तु कालनाभेन विश्वकर्मा मयेन वै ॥ शंबरो युयु-
धे त्वष्ट्रा सवित्रा तु विरोचनः ॥ २९ ॥ अपराजितेन नमुचिरश्विनौ वृषपर्वणा ॥ सूर्यो बलिसुतैर्देवो बाणज्येष्ठैः शतेन च ॥ ३० ॥
राहुणा च तथा सोमः पुलोम्ना युयुधेऽनिलः ॥ निशुंभशुंभयोर्देवी भद्रकाली तरस्विनी ॥ ३१ ॥

द्वंद्वान्येवाह । युयोधेति सप्तभिः । अस्यत आस्यदयुध्यतेत्यर्थः ॥२८॥२९॥ सूर्यो देव एक एव शतेन बलिसुतैः बाणो ज्येष्ठो येषां तैः ॥३०॥ निशुंभशुंभाभ्यां देवी ॥ ३१ ॥

वाहनें, ध्वज आणि आयुधें ह्यांनीं युक्त असलेले देव व आपआपल्या गणांसहवर्तमान युक्त असलेले वायु, अग्नि, वरुण इत्यादि लोकपाल, त्या इंद्राच्या आसमंतात् भागीं
उभे राहिले ॥ २६ ॥ नंतर ते देवदैत्य एकमेकांच्या सन्मुख जाऊन, मर्मभेदक भाषणांनीं परस्परांचा तिरस्कार करीत व एकमेकांचीं नांवें घेऊन हाका मारीत होत्साते
पुढें पुढें सरसावून परस्परांशीं द्वंद्वयुद्ध करूं लागले ॥ २७ ॥ त्यापैकीं कांहीं द्वंद्वें सांगतोः– हे राजा, इंद्रावरोबर बलिराजा युद्ध करूं लागला, तारकासुरावरोबर
षडानन, हेतीशीं वरुण आणि प्रहेतीशीं मित्र असे युद्ध करूं लागला ॥२८॥ हे शत्रुदमना, कालनाभाशीं यम, मयासुराशीं विश्वकर्मा, त्वष्ट्याशीं शंबर, सवित्याशीं विरोचन,
अपराजिताशीं नमुचि, वृषपर्व्याशीं अश्विनीकुमार आणि बाणासुर हा ज्यांच्यामध्यें ज्येष्ठ आहे अशा बलीच्या शंभर पुत्रांशीं सूर्यदेव, युद्ध करूं लागला ॥ २९ ॥ ३० ॥
राहूशीं चंद्र, पुलोम्याशीं वायु, शुंभनिशुंभांशीं महावेगवती देवी भद्रकाली, जंभासुराशीं वृषाकपि, महिषासुराशीं विभावसु, ब्रह्मपुत्रांशीं वातापीसहवर्तमान इल्वल युद्ध

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करूं लागला ॥ ३१ ॥ ३२ ॥ कामदेवाशीं दुर्मर्ष, मातृगणांशीं उत्कल, शुक्राचार्यांशीं बृहस्पति, नरकासुराशीं शनैश्वर, निवातकवचांशीं मरुद्गण, कालेयांशीं देव अष्टवसु पौलोमांसहवर्तमान विश्वेदेव व क्रोधवशनामक दैत्यगणांसहवर्तमान एकादशरुद्र युद्ध करूं लागले ॥ ३३ ॥ ३४ ॥ ह्याप्रमाणें ते असुर व देव, युद्धभूमीमध्यें, द्वंद्वानें एकमेकांशीं संलग्न होऊन युद्ध करीत होत्साते वेगानें परस्परांच्या अंगावर धांवून तीक्ष्ण बाण, खड्ग आणि तोमर ह्यांनीं प्रहार करूं लागले ॥ ३५ ॥ भृशुंडि, चक्रें, गदा, खड्ग, पट्टे, शक्ति, उल्मुक, प्रास, परशु, निस्त्रिंश, भल्ल, परिघ, मुद्गर आणि भिंदिपाल ह्या आयुधांच्या योगेंकरून परस्परांचीं मस्तकें तोडूं लागले ॥ ३६ ॥ त्याकालीं गज, अश्व, रथांवर बसलेले रथी, पदाति व आरूढ होणाऱ्या वीरांसहवर्तमान पूर्वीं सांगितलेलीं नानाप्रकारचीं उष्ट्रादिक वाहनेंहि युद्ध करूं लागलीं. तेव्हां त्या कित्येकांचे

॥ ३२ ॥ ३३ ॥ ३४ ॥ ३५ ॥ ३६ ॥ आरोहंतीत्यारोहास्तैः सहिता अन्ये च वाहाः पूर्वं तु केवलं गजादय उक्ताः । कथंभूताः । निकृत्ता बाह्वादयो येषाम् । छिन्नानि ध्वजादीनि येषां ते ॥ ३७ ॥ तेषां देवादीनां पदाघातै रथांगैश्च चूर्णितादायोधनाद्रणभूमेरुत्थितो रेणुर्दिशः खं द्युमणिं च सूर्यं छादयंस्तदैव खादेर्न्यवर्तत । कथंभूतात् । असृ-

वृषाकपिस्तु जंभेन महिषेण विभावसुः ॥ इल्वलः सहवातापिर्ब्रह्मपुत्रैररिंदम ॥ ३२ ॥ कामदेवेन दुर्मर्ष उत्कलो मातृभिः सह ॥ बृहस्पतिश्चोशनसा नरकेण शनैश्वरः ॥ ३३ ॥ मरुतो निवातकवचैः कालेयैर्वसवोऽमराः ॥ विश्वेदेवास्तु पौलोमै रुद्राः क्रोधवशैः सह ॥ ३४ ॥ त एवमाजावसुराः सुरेंद्रा द्वंद्वेन संहत्य च युध्यमानाः ॥ अन्योन्यमासाद्य निजघ्नुरोजसा जिगीषवस्तीक्ष्णशरासितोमरैः ॥ ३५ ॥ भुशुंडिभिश्चक्रगदर्ष्टिपट्टिशैः शक्त्युल्मुकैः प्रासपरश्वधैरपि ॥ निस्त्रिंशभल्लैः परिघैः समुद्गरैः सभिंदिपालैश्च शिरांसि चिच्छिदुः ॥ ३६ ॥ गजास्तुरंगाः सरथाः पदातयः सारोहवाहा विविधा विखंडिताः ॥ निकृत्तबाहूरुशिरोधरांघ्रयश्छिन्नध्वजेष्वासतनुत्रभूषणाः ॥ ३७ ॥ तेषां पदाघातरथांगचूर्णितादायोधनादुल्बण उत्थितस्तदा ॥ रेणुर्दिशः खं द्युमणिं च छादयन्न्यवर्ततासृक्स्रुतिभिः परिप्लुतात् ॥ ३८ ॥ शिरोभिरुद्धूतकिरीटकुंडलैः संरंभदृग्भिः परिदष्टदच्छदैः ॥ महाभुजैः साभरणैः सहायुधैः सा प्रास्तृता भूः करभोरुभिर्बभौ ॥ ३९ ॥ कबंधास्तत्र चोत्पेतुः पश्यंतः स्वशिरोऽक्षिभिः ॥ उद्यतायुधदोर्दंडैराधावंतो भटान्मृधे ॥ ४० ॥

क्स्रुतिभिः रक्तक्षरणैः परिप्लुतात्सिक्तात् । यद्वा परिप्लवनाद्धेतोर्न्यवर्तत । भावे क्तः । रक्तधाराणां तत्पर्यंतमुच्छलनादित्यर्थः । प्रथमांतपाठे रेणोर्विशेषणम् ॥ ३८ ॥ शिरोभिर्महाभुजैश्च करभसदृशैरूरुभिश्च सा रणभूः प्रकर्षेणास्तृता सती बभौ । कथंभूतैः शिरोभिः । उद्धूतान्युत्पतितानि किरीटानि कुंडलानि च येभ्यस्तैः । संरंभयुक्ता दृशो येषु तैः । परिदष्टा दच्छदा ओष्ठा येषु तैः ॥ ३९ ॥ पतितानि यानि स्वशिरांसि तत्रत्यैरक्षिभिस्तैः पश्यंत इत्यर्थः । उद्यतान्यायुधानि यैः स्तैर्दोर्दंडैर्युक्ताः ॥ ४० ॥

अगदीं तुकडे तुकडे होऊन मरून पडले; कित्येकांचे बाहु, मांड्या, माना व पाय तुटून गेले आणि कित्येकांचे ध्वज, धनुष्यें, कवचें व अलंकार हे अगदीं छिन्नभिन्न झाले ॥ ३७ ॥ त्याकालीं त्या देवादिकांच्या पादताडनांनीं व रथांच्या चक्रांनीं चूर्णयुक्त झालेल्या रणभूमीपासून अतिशय उठलेला धुरळा, आकाश, दिशा व सूर्य ह्यांना आच्छादन करूं लागला असतां इतक्यांत रक्तस्रावानें रणभूमी भिजून गेल्यामुळें तो धुरळा त्या आकाशादिकांपासून निवृत्त झाला ॥ ३८ ॥ नंतर ती रणभूमी, ज्यांपासून किरीट व कुंडलें पडलीं आहेत आणि ज्यांचेठिकाणीं क्रोधयुक्त दृष्टी व चावलेले ओंठ दिसत आहेत अशा मस्तकांनीं, आयुधांसहित व भूषणांसहित असलेल्या मोठमोठ्या भुजांनीं, आणि हत्तीच्या सोंडेसारख्या मांड्यांनीं आच्छादित झाली असतां शोभूं लागली ॥ ३९ ॥ त्या युद्धांमध्यें ज्यांनीं आयुधें उचललीं आहेत

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अशा हस्तांनीं युक्त असे कितीएक कबंध पडलेल्या आपल्या मस्तकांच्या नेत्रांनीं पाहत होत्साते, योद्ध्यांच्या अंगावर धांवत धांवत जाऊन पडूं लागले ॥ ४० ॥
याप्रमाणें सामान्य युद्ध सांगून आतां विशेष युद्ध सांगतोः—त्या युद्धामध्यें बलिराजानें दहा बाणांनीं महेंद्राला, तीन बाणांनीं ऐरावताला, चार बाणांनीं ऐरावतांच्या
चार पादरक्षकांना आणि एका बाणानें महाताला प्रहार केला ॥ ४१ ॥ परंतु, शीघ्र पराक्रमी अशा त्या इंद्रानें ते बाण आपणापर्यंत आले नाहींत तोंच त्या येणाऱ्या
बाणांचे तीक्ष्ण अशा तितक्याच भल्लनामक बाणांनीं हंसत हंसत तुकडे करून टाकिले ॥४२॥ त्या इंद्राचें तें बाणच्छेदनरूप उत्तम कर्म पाहून तें सहन न करणाऱ्या बलीनें
त्याला मारण्याकरितां हस्तामध्यें शक्ति ग्रहण केली ती, मोठ्या ज्वाळेप्रमाणें जाज्वल्यमान असलेली शक्ति त्याच्या हातांत असतांनाच इंद्रानें तोडून टाकिली ॥ ४३ ॥
तदनंतर शूल, नंतर प्रास, नंतर तोमर व नंतर खड्ग इत्यादि जें जें म्हणून आयुध इंद्राला मारण्याकरितां बलीनें ग्रहण केलें तें तें सर्व त्या समर्थ इंद्रानें तोडून टाकिलें

वाहान्ऐरावतपादरक्षकान् । आरोहं गजयंतारमार्छयद्विव्याध ॥ ४१ ॥ ४२ ॥ दुर्मर्षोऽसहनो बलिः ॥ ४३ ॥ ४४ ॥ ४५ ॥ टंकवत्तीक्ष्णाग्रैः शिखरैः सहिताः

बलिर्महेंद्रं दशभिस्त्रिभिरैरावतं शरैः ॥ चतुर्भिश्चतुरो वाहानेकेनारोहमार्छयत् ॥ ४१ ॥ स तानापततः शक्रस्तावद्भिः शीघ्रविक्र-
मः ॥ चिच्छेद निशितैर्भल्लैरसंप्राप्तान्हसन्निव ॥ ४२ ॥ तस्य कर्मोत्तमं वीक्ष्य दुर्मर्षः शक्तिमाददे ॥ तां ज्वलंतीं महोल्काभां हस्त-
स्थामच्छिनद्धरिः ॥ ४३ ॥ ततः शूलं ततः प्रासं ततस्तोमरमृष्टयः ॥ यद्यच्छस्त्रं समादद्यात्सर्वं तदच्छिनद्विभुः ॥ ४४ ॥ ससर्जा-
थासुरीं मायामंतर्धानगतोऽसुरः ॥ ततः प्रादुरभूच्छैलः सुरानीकोपरि प्रभो ॥ ४५ ॥ ततो निपेतुस्तरवो दह्यमाना दवाग्निना ॥
शिलाः सटंकशिखराश्चूर्णयंत्यो द्विषद्बलम् ॥ ४६ ॥ महोरगाः समुत्पेतुर्दंदशूकाः सवृश्चिकाः ॥ सिंहव्याघ्रवराहाश्च मर्दयंतो महा-
गजान् ॥ ४७ ॥ यातुधान्यश्च शतशः शूलहस्ता विवाससः ॥ छिंधिभिंधीति वादिन्यस्तथा रक्षोगणाः प्रभो ॥ ४८ ॥ ततो म-
हाघना व्योम्नि गंभीरपरुषस्वनाः ॥ अंगारान्मुमुचुर्वातैराहताः स्तनयित्नवः ॥ ४९ ॥ सृष्टो दैत्येन सुमहान्वह्निः श्वसनसारथिः ॥
सांवर्तक इवात्युग्रो विबुधध्वजिनीमधाक् ॥ ५० ॥

॥४६ ॥ ४७ ॥ ४८ स्तनयित्नवश्चांगारान्मुमुचुरित्यनुषंगः ॥ ४९ ॥ अधाक् आर्षः । अधाक्षीदित्यर्थः ॥ ५० ॥

॥ ४४ ॥ नंतर हे प्रभो, त्या बलिराजानें अंतर्धान पावोन आसुरी माया उत्पन्न केली, ती अशी कीं,—देवसैन्यावर आकाशामध्यें प्रथम एक पर्वत उत्पन्न झाला ॥ ४५ ॥
आणि त्यापासून, वणव्याच्या योगानें जळत असलेले वृक्ष, आणि देवरूप शत्रूंच्या सैन्यांचें चूर्ण करणाऱ्या टांकीसारख्या तीक्ष्ण शिखरांच्या शिळा खालीं पडूं
लागल्या ॥ ४६ ॥ नंतर मोठमोठे भुजंग वृश्चिकांसहवर्तमान सर्प व मोठमोठ्या गजांचें मर्दन करणारे सिंह, व्याघ्र व वराह देवांसमोर येऊं लागले ॥ ४७ ॥ त्याचप्रमाणें
हे प्रभो, हस्तामध्यें शूळ धारण करून "तोडा फोडा" असें भाषण करणाऱ्या शेकडों नग्न राक्षसी व तसेच राक्षसांचे गण देवांवर येऊं लागले ॥ ४८ ॥ नंतर गंभीर
व भयंकर शब्द करणारे आणि वायूंनीं प्रेरित झालेले मोठमोठे मेघ आकाशांत प्राप्त होऊन ते अंगारांची वृष्टि करूं लागले व विजाहि अंगारांची वृष्टि करूं लागल्या
॥ ४९ ॥ नंतर वायुरूप सारथ्यानें युक्त व प्रळयकालच्या अग्नीप्रमाणें अतिभयंकर असा बलिदैत्यानें उत्पन्न केलेला फारच मोठा अग्नि, देवांच्या सेनेला जाळूं लागला॥ ५० ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नंतर प्रचंडवायूंनीं उसळलेल्या त्या लाटा व भोंवरे ह्यांच्या योगानें भयंकर असा मर्यादेचें उल्लंघन करणारा समुद्र, सर्व बाजूंनीं लोकांना बुडवीत येत आहे असें दिसूं लागलें ॥ ५१ ॥ याप्रकारच्या अलक्ष्य गतीच्या योगानें भयंकर अशा इतरहि महामायावी दैत्यांनीं माया उत्पन्न केल्या असतां, देवांचे सेनाधिपति खिन्न झाले ॥ ५२ ॥ हे राजा, जेव्हां इंद्रादिदेव, त्या दैत्यांनीं निर्माण केलेल्या मायेच्या निवृत्तीचा उपाय जाणेनासे झाले. तेव्हां त्यांनीं विश्वपालक भगवंताचें चिंतन केलें असतां तो तेथें प्रकट झाला ॥ ५३ ॥ तो त्यावेळीं गरुडाच्या स्कंधावर चरणकमळ ठेवलेला, पितांबर नेसलेला, नूतन कमळांसारख्या नेत्रांनीं युक्त, आयुधांनीं युक्त असे आठ बाहु धारण करणारा आणि ज्याच्या वक्षःस्थलाचेठिकाणीं लक्ष्मी, कंठाचेठिकाणीं कौस्तुभ, मस्तकाचेठिकाणीं बहुमूल्यवान् किरीट व कर्णांचेठिकाणीं मकराकार कुंडलें शोभत आहेत असा दृष्टीस पडला ॥ ५४ ॥ तेव्हां जशी जाग्रदवस्था प्राप्त झाली असतां स्वप्न नाहींसें होतें त्याप्रमाणें तो श्रीहरि देवसेनेमध्यें प्रविष्ट झाला असतां

उद्भूतैस्तरंगैरावर्तैश्च भीषणः ॥ ५१ ॥ एवमन्यैश्च दैत्यैः सृज्यमानासु ॥ ५२ ॥ यत्र यदा तत्र तदा तैर्ध्यातः सन् ॥ ५३ ॥ अष्टावायुधयुक्ता बाहवो यस्य । श्रीश्च कौस्तुभश्च अनर्घ्यं किरीटं च कुंडले च उल्लसंति श्रीकौस्तुभादीनि यस्मिन् ॥ ५४ ॥ असुराणां कूटकर्म मंत्रादिप्रयोगस्तस्माज्जाताः । महिना महिम्ना ।

ततः समुद्र उद्वेलः सर्वतः प्रत्यदृश्यत ॥ प्रचंडवातैरुद्धूततरंगावर्तभीषणः ॥ ५१ ॥ एवं दैत्यैर्महामायैरलक्ष्यगतिभीषणैः ॥ सृज्यमानासु मायासु विषेदुः सुरसैनिकाः ॥ ५२ ॥ न तत्प्रतिविधिं यत्र विदुरिंद्रादयो नृप ॥ ध्यातः प्रादुरभूत्तत्र भगवान्विश्वभावनः ॥ ५३ ॥ ततः सुपर्णांसकृतांघ्रिपल्लवः पिशंगवासा नवकंजलोचनः ॥ अदृश्यताष्टायुधबाहुरुल्लसच्छ्रीकौस्तुभानर्घ्यकिरीटकुंडलः ॥ ५४ ॥ तस्मिन्प्रविष्टेऽसुरकूटकर्मजा माया विनेशुर्महिना महीयसः ॥ स्वप्नो यथा हि प्रतिबोध आगते हरिस्मृतिः सर्वविपद्विमोक्षणम् ॥ ५५ ॥ दृष्ट्वा मृधे गरुडवाहमिभारिवाह आविध्यशूलमहिनोदथ कालनेमिः ॥ तल्लीलया गरुडमूर्ध्नि पतद्गृहीत्वा तेनाहनन्नृप सवाहमरिं त्र्यधीशः ॥ ५६ ॥ माली सुमाल्यतिबलौ युधि पेततुर्यच्चक्रेण कृत्तशिरसावथ माल्यवांस्तम् ॥ आहत्य तिग्मगदयाऽहनदंडजेंद्रं तावच्छिरोऽच्छिनदरेर्नदतोऽरिणाऽऽद्यः ॥ ५७ ॥

हरेः स्मृतिरेव सर्वासां विपदां मोक्षणरूपा किमुत हरेः प्रवेश इत्यर्थः ॥ ५५ ॥ इभारिवाहः सिंहवाहः । अहिनोच्चिक्षेप । लीलयैव त द्गृहीत्वा अहनदहन् । हे नृप ॥ ५६ ॥ यस्य चक्रेण कृत्तशिरसौ पेततुस्तं तथाभूतमप्याहत्य संघर्ष्यांडजेंद्रं गरुडमहनत् । तं हंतुं गदामुन्निन्य इत्यर्थः । आद्यो हरिः ॥ ५७ ॥

त्या माहात्म्या भगवंताच्या महिम्यानें मंत्रादि प्रयोगापासून उत्पन्न झालेल्या असुरांच्या त्या सर्व माया नाहींशा झाल्या. कारण, श्रीहरीचें स्मरण सर्व विपत्तींचा नाश करणारें आहे, मग त्या हरीचा प्रत्यक्ष प्रवेश झाल्यावर आसुरी माया नाहींशा होतील हें काय सांगावें ! ॥ ५५ ॥ नंतर, हे राजा, गरुडावर बसलेल्या श्रीहरीला युद्धामध्यें पाहून सिंहावर बसलेल्या कालनेमिनामक दैत्यानें आपलें शूळ गरगर फिरवून श्रीहरीच्या आंगावर फेंकलें. तें गरुडाच्या मस्तकावर पडत आहे इतक्यांत त्रैलोक्याधिपति श्रीहरीनें अनायासानें त्याचें ग्रहण करून त्याच्यायोगानेंच वाहनासहवर्तमान त्या कालनेमिनामक शत्रूचा वध केला ॥ ५६ ॥ नंतर महाबलाढ्य असे माली व सुमाली हे उभयतां दैत्य युद्धांमध्यें भगवंताच्या आंगावर आले असतां भगवंताच्या चक्रानें त्यांचीं मस्तकें तुटून ते मरून पडले. नंतर माल्यवान्नामक असुरानें तीक्ष्ण गदेनें त्या भगवंताला प्रहार करून गरुडाला प्रहार करण्याकरितां पुन्हा गदा उचलिली तों इतक्यांत आदिपुरुष श्रीहरीनें त्या गर्जना करणाऱ्या दैत्याचें मस्तक

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

चक्रानें तोडून टाकिलें ॥ ५७ ॥ ॥ ह्मप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील अष्टमस्कंधामध्यें देवदैत्ययुद्धवर्णनामक हा दहावा अध्याय समाप्त झाला ॥ १० ॥ ॥ आतां ह्या अकराव्या अध्यायामध्यें दैत्यांचा देव वध करीत असतां नारदानें देवांचें निवारण केलें व शुक्राचार्यांनें मरण पावलेले दैत्य उठविले ही कथा सांगितलेली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणालाः–हे परिक्षित् राजा, नंतर पुरुषोत्तमाच्या परमकृपेमुळें इंद्रवायुप्रभृति देवांचें अंतःकरण शांत झालें असतां पूर्वीं ज्या ज्या दैत्यांसहवर्तमान ते युद्ध करण्यास उद्युक्त झाले होते त्यांना त्यांना ते युद्धामध्यें पुन्हां प्रहार करूं लागले ॥ १ ॥ नंतर भगवान् इंद्रानें युद्ध होऊन विरोचन पुत्र बलीला मारण्याकरितां जेव्हां वज्र उगारिलें, तेव्हां सर्वहि दैत्य हाहाकार करूं लागले ॥ २ ॥ त्या कालीं धैर्यवान् युद्धसामुग्रीनें युक्त आणि त्या घोरसंग्रामामध्यें निर्भयपणानें संचार करीत असून आपल्या अग्रभागीं स्थित असलेल्या त्या बलीला वज्रपाणि इंद्र तिरस्कार करून असें ह्मणाला कीं,– ॥ ३॥ हे मूढा, जसा कपटी पुरुष, मंत्रादिकांच्या प्रभा-

---

इति श्रीमद्भागवते अष्टमस्कंधे टीकायां दशमोऽध्यायः ॥ १० ॥ ॥ एकादशे तु देवेषु दैत्यघातिषु नारदः ॥ देवानवारयच्छुक्रो मृतान्दैत्यानजीवयत् ॥ १ ॥ १ ॥ उदयच्छदुन्निन्ये ॥ २ ॥ ३ ॥ निबद्धान्यक्षीणि येषां तान्बालान् जित्वा नटः कपटवृत्तिर्यथा तेषां धनं हरति तथा हे मूढ मायेशानस्मान्जेतुमिच्छसि ॥ ४ ॥ मत्प्रभावं शृण्वित्याह ।

इति श्रीमद्भागवते महापुराणे अष्टमस्कंधे दशमोऽध्यायः ॥ १० ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ अथो सुराः प्रत्युपलब्धचेतसः परस्य पुंसः परमानुकंपया ॥ जघ्नुर्भृशं शक्रसमीरणादयस्तांस्तात्रणे यैरभिसंहताः पुरा ॥ १ ॥ वैरोचनाय संरब्धो भगवान्पाकशासनः ॥ उदयच्छद्यदा वज्रं प्रजा हाहेति चुक्रुशुः ॥ २ ॥ वज्रपाणिस्तमाहेदं तिरस्कृत्य पुरःस्थितम् ॥ मनस्विनं सुसंपन्नं विचरंतं महामृधे ॥ ३ ॥ नटवन्मूढ मायाभिर्मायेशान्नो जिगीषसि ॥ जित्वा बालान्निबद्धाक्षान्नटो हरति तद्धनम् ॥ ४ ॥ आरुरुक्षंति मायाभिरुत्सिसृप्संति ये दिवम् ॥ तान्दस्यून्विधुनोम्यज्ञान्पूर्वस्माच्च पदादधः ॥ ५ ॥ सोऽहं दुर्मायिनस्तेऽद्य वज्रेण शतपर्वणा ॥ शिरो हरिष्ये मंदात्मन्घटस्व ज्ञातिभिः सह ॥ ६ ॥ बलिरुवाच ॥ संग्रामे वर्तमानानां कालचोदितकर्मणाम् ॥ कीर्तिर्जयोऽजयो मृत्युः सर्वेषां स्युरनुक्रमात् ॥ ७ ॥ तदिदं कालरशनं जनाः पश्यंति सूरयः ॥ न हृष्यंति न शोचंति तत्र यूयमपंडिताः ॥ ८ ॥

आरुरुक्षंत्यारोढुमिच्छंति । ये चोत्सिसृप्संत्युल्लंघयितुमिच्छंति । मोक्षमिच्छंतीत्यर्थः । अधो विधुनोमि पातयामि ॥ ५ ॥ ६ ॥ ७ ॥ कालरशनं कालयंत्रितम् । अतो न हृष्यंति । तत्र एवं विवेके यूयमपंडिता अनिपुणाः ॥ ८ ॥

वानें भ्रांतनेत्र झालेल्या अज्ञ जनांना आपल्या स्वाधीन करून घेतो आणि त्यांचें धन हरण करितो त्याप्रमाणें तूं मायांच्या योगानें आह्मां मायाधिपतींना जिंकण्याची इच्छा करीत आहेस परंतु तुझ्या मायांचें प्राबल्य आमचेठिकाणीं कांहीं चालावयाचें नाहीं ॥ ४ ॥ हे मूढा, माझा प्रभाव श्रवण कर. जे पुरुष आपल्या मायांच्या योगानें स्वर्गारोहण करण्याची व मोक्षास जाण्याची इच्छा करीत असतील त्या मूढ चोरांना पहिल्याहि स्थानापेक्षां मी खालीं पाडितों ॥ ५ ॥ तो मी आज शतपर्व वज्रानें लोकमोहक मायेनें युक्त असलेल्या तुझें शिर हरण करीन. यास्तव हे मंदबुद्धे, मत्स जिंकिण्याविषयीं तूं आपल्या ज्ञातिजनांसहवर्तमान हवीतितकी खटपट कर ॥ ६ ॥ बलि ह्मणाला,– हे इंद्रा, कीर्ति, जय, पराजय इत्यादिकांना अनुकूळ असलेल्या काळानें ज्यांच्या कर्मांची प्रेरणा केली आहे, त्या युद्ध करीत असलेल्या सर्वहि जनांना अनुक्रमानें कीर्ति, जय, अपजय व मृत्यु हे प्राप्त होतात ॥ ७ ॥ तस्मात्, हें कीर्त्यादिक सर्व कालाधीन आहे असें पाहणारे विवेकी जन, त्याविषयीं हर्ष

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पावत नाहींत व शोकहि करीत नाहींत. परंतु, त्या विवेकाविषयीं तुझी अज्ञानी आहां ॥ ८ ॥ तस्मात् त्या कीर्तिजयादिकांविषयीं आपणालाच साधन असें मानणाऱ्या व साधुजनांना शोचनीय अशा तुमच्या मर्मभेदक वाणी ज्या आहेत असें आझी मानीत नाहीं ॥ ९ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणालाः– हे राजा, प्रतिपक्षी वीरांचें मर्दन करणाऱ्या त्या बलिनामक वीरानें ह्याप्रमाणें महेंद्राची निंदा करून, कर्णापर्यंत ओढिलेल्या बाणांनीं, निंदावचनांनीं ताडण केलेल्याहि त्या इंद्राला पुनरपि ताडण केलें ॥ १० ॥ याप्रमाणें खरें भाषण करणाऱ्या त्या बलीनें इंद्राचें निराकरण केलें असतां तें निराकरण इंद्रानें, ज्सा अंकुशानें ताडण केलेला हत्ती तें ताडण सहन करीत नाहीं त्याप्रमाणें सहन केलें नाहीं ॥ ११ ॥ आणि त्या शत्रुनाशक इंद्रानें, आपल्या अमोघ वज्राच्या योगेंकरून त्या बलिराजाला प्रहार केला तेव्हां तो बलि पंख तुटलेल्या पर्वताप्रमाणें विमानासहवर्तमान भूमीवर पडला ॥ १२ ॥ त्या कालीं बलीचेठिकाणीं प्रेम करणारा त्याचा सखा जो जंभासुर त्यानें

तत्र कीर्तिजयादावात्मानं साधनं मन्यमानानां वो गिरो न गृह्णीमः । मर्मसु ताडनं याभिस्ताः ॥ ९ ॥ विभुमिंद्रम् । वीरो बलिः ॥ १० ॥ तोत्रमंकुशस्तेनाहत इव ॥ ११ ॥

न वयं मन्यमानानामात्मानं तत्र साधनम् ॥ गिरो वः साधुशोच्यानां गृह्णीमो मर्मताडनाः ॥ ९ ॥ श्रीशुक उवाच ॥ इत्याक्षिप्य विभुं वीरो नाराचैर्वीरमर्दनः ॥ आकर्णपूर्णैरहनदाक्षेपैराहतं पुनः ॥ १० ॥ एवं निराकृतो देवो वैरिणा तथ्यवादिना ॥ नामृष्यत्तदधिक्षेपं तोत्राहत इव द्विपः ॥ ११ ॥ प्राहरत्कुलिशं तस्मा अमोघं परमर्दनः ॥ सयानो न्यपतद्भूमौ छिन्नपक्ष इवाचलः ॥ १२ ॥ सखायं पतितं दृष्ट्वा जंभो बलिसखः सुहृत् ॥ अभ्ययात्सौहृदं सख्युर्हतस्यापि समाचरन् ॥ १३ ॥ स सिंहवाह आसाद्य गदामुद्यम्य रंहसा ॥ जत्रावताडयच्छक्रं गजं च सुमहाबलः ॥ १४ ॥ गदाप्रहारव्यथितो भृशं विह्वलितो गजः ॥ जानुभ्यां धरणीं स्पृष्ट्वा कश्मलं परमं ययौ ॥ १५ ॥ ततो रथो मातलिना हरिभिर्दशशतैर्वृतः ॥ आनीतो द्विपमुत्सृज्य रथमारुरुहे विभुः ॥ १६ ॥ तस्य तत्पूजयन्कर्म यंतुर्दानवसत्तमः ॥ शूलेन ज्वलता तं तु स्मयमानोऽहनन्मृधे ॥ १७ ॥ सेहे रुजं सुदुर्मर्षां सत्त्वमालंब्य मातलिः ॥ इंद्रो जंभस्य संक्रुद्धो वज्रेणापाहरच्छिरः ॥ १८ ॥ जंभं श्रुत्वा हतं तस्य ज्ञातयो नारदादृषेः ॥ नमुचिश्च बलः पाकस्तत्रापेतुस्त्वरान्विताः ॥ १९ ॥

सयानो विमानसहितः ॥ १२ ॥ १३ ॥ १४ ॥ १५ ॥ १६ ॥ १७ ॥ १८ ॥ नमुचिर्बलः पाकश्चेति त्रय आजग्मुः ॥ १९ ॥

पतन पावलेल्या आपल्या मित्राला पाहून वज्रानें ताडित झालेल्याहि आपल्या सख्याचें हित करण्याकरितां युद्धार्थ इंद्रासन्मुख गमन केलें ॥ १३ ॥ नंतर हे राजा, त्या सिंहारूढ झालेल्या अत्यंत महाबलाढ्य जंभासुरानें इंद्रासमीप येऊन गदा उचलून तिच्या योगानें मोठ्या वेगानें स्कंधसंधींचेठिकाणीं इंद्राला व ऐरावताला प्रहार केला ॥ १४ ॥ तेव्हां गदाप्रहारानें पीडित झाल्यामुळें अत्यंत व्याकुळ झालेला तो गज, धरणीवर गुडघे टेकून अतिशय मूर्छित झाला ॥ १५ ॥ नंतर सहस्र अश्वांनीं युक्त असा रथ मातलीनें इंद्राजवळ आणिला असतां, इंद्रानें त्या ऐरावत गजाला सोडून देऊन रथावर आरोहण केलें ॥ १६ ॥ तेव्हां दैत्यश्रेष्ठ जंभासुरानें, त्या सारथ्याच्या कर्माची प्रशंसा करीत व आश्चर्य करीत त्या संग्रामामध्यें आपल्या जाज्वल्यमान शूलाच्या योगानें त्या सारथ्याला प्रहार केला ॥ १७ ॥ त्याकालीं मातलीनें धैर्य धारण करून ती अत्यंत दुःसह व्यथा सहन केली, तेव्हां इंद्रानें क्रुद्ध होऊन वज्राच्या योगानें जंभासुराचें शिर हरण केलें ॥ १८ ॥ नंतर जंभासुराचा वध झाला हें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नारद ऋषीपासून ऐकून नमुचि, बल व पाक हे त्याचे तिघे बांधव मोठ्या त्वरेनें त्या युद्धभूमीवर प्राप्त झाले ॥ १९ ॥ आणि कठोर भाषणांनीं इंद्राला मर्मस्थानीं पीडा करणाऱ्या त्या असुरांनीं, जसें मेघांनीं धारांच्या योगानें पर्वताला आच्छादित करावें त्याप्रमाणें बाणाच्या योगानें इंद्राला आच्छादित केलें ॥ २० ॥ त्या तिघांचेहि निरनिराळे पराक्रम सांगतो कीं,—शीघ्रपराक्रमी अशा त्या बलनामक असुरानें इंद्राच्या हजार घोड्यांना तितक्या (हजार) बाणांनीं एकदम समरभूमीचेठिकाणीं पीडित केलें ॥ २१ ॥ तसेंच पाक नामक असुरानें एकदम दोनशें बाण धनुष्याचेठिकाणीं लावून व ते सोडून त्यांच्या योगानें मातलीला व अवयवांसहित रथाला निरनिराळे ठिकाणीं खिळून टाकिलें. तें त्यांचें कर्म युद्धामध्यें मोठें आश्चर्यकारक झालें ॥ २२ ॥ तसाच नमुचिनामक असुरहि, ज्यांचा पूर्वभाग सुवर्णमय आहे अशा मोठ्या पंधरा बाणांनीं संग्रामामध्यें इंद्राला वेध करून पाण्यानें भरलेल्या मेघाप्रमाणें गर्जना करूं लागला ॥ २३ ॥ त्याप्रमाणेंच इतरहि असुरांनीं, जसें मेघांनीं वर्षाकालांतील

॥ २० ॥ त्रयाणां पृथग्विक्रमानाह। हरीनिति त्रिभिः । हर्यश्वस्येंद्रस्य । तावद्भिर्दशभिः शतैः ॥ २१ ॥ २२ ॥ आहत्येंद्रं विद्ध्वा ॥ २३ ॥ प्रावृट्कालीनं सूर्यम् ॥ २४ ॥ वणि-

वचोभिः परुषैरिंद्रमर्दयंतोऽस्य मर्मसु ॥ शरैरवाकिरन्मेघा धाराभिरिव पर्वतम् ॥ २० ॥ हरीन्दशशतान्याजौ हर्यश्वस्य बलः शरैः ॥ तावद्भिरर्दयामास युगपल्लघुहस्तवान् ॥ २१ ॥ शताभ्यां मातलिं पाको रथं सावयवं पृथक् ॥ सकृत्संधानमोक्षेण तदद्भुतमभूद्रणे ॥ २२ ॥ नमुचिः पंचदशभिः स्वर्णपुंखैर्महेषुभिः ॥ आहत्य व्यनदत्संख्ये सतोय इव तोयदः ॥ २३ ॥ सर्वतः शरकूटेन शक्रं सरथसारथिम् ॥ छादयामासुरसुराः प्रावृट्सूर्यमिवांबुदाः ॥ २४ ॥ अलक्षयंतस्तमतीव विह्वला विचुक्रुशुर्देवगणाः सहानुगाः ॥ अनायकाः शत्रुबलेन निर्जिता वणिक्पथा भिन्ननवो यथाऽर्णवे ॥ २५ ॥ ततस्तुराषाडिषुबद्धपंजराद्विनिर्गतः साश्वरथध्वजाग्रणीः ॥ बभौ दिशः खं पृथिवीं च रोचयन्स्वतेजसा सूर्य इव क्षपात्यये ॥ २६ ॥ निरीक्ष्य पृतनां देवः परैरभ्यर्दितां रणे ॥ उदयच्छद्रिपुं हंतुं वज्रं वज्रधरो रुषा ॥ २७ ॥ स तेनैवाष्टधारेण शिरसी बलपाकयोः ॥ ज्ञातीनां पश्यतां राजन् जहार जनयन्भयम् ॥ २८ ॥

क्पथा वणिजः । भिन्ना नौर्येषां ते भिन्ननाव इत्यर्थः ॥ २५ ॥ तुराषाडिंद्रः । अश्वादिसहितो विनिर्गतः । अग्रणीः सारथिः ॥ २६ ॥ २७ ॥ २८ ॥

सूर्याला चोहोंकडून आच्छादन करावें त्याप्रमाणें सारथि व रथ ह्यांसहवर्तमान इंद्राला सर्व बाजूंनीं बाणजालाच्या योगानें आच्छादित केलें ॥ २४ ॥ तेव्हां समुद्रामध्यें नौका फुटलेले व्यापारी लोक जसे आक्रोश करूं लागतात त्याप्रमाणें, शत्रुसेनेनें पराजित केलेले नायकरहित असे ते देवगण, त्या इंद्राला अवलोकन करीत नसल्यामुळें अत्यंत विव्हल होऊन अनुयायांसहवर्तमान आक्रोश करूं लागले ॥ २५ ॥ नंतर रात्र संपली असतां त्याप्रमाणें सूर्य आपल्या तेजाच्या योगानें दिशा आकाश व पृथिवी यांना प्रकाशित करीत करीत शोभूं लागतो त्याप्रमाणें अश्व, रथ, ध्वज व सारथि ह्यांसहवर्तमान इंद्र, बाणांनीं रचिलेल्या पंजरापासून बाहेर निघून, आपल्या तेजाच्या योगानें दिशा, आकाश व पृथ्वी यांस प्रकाशित करूं लागला ॥ २६ ॥ आणि त्या वज्रधारी इंद्रानें आपली सेना शत्रूंनीं पीडित केली आहे असें अवलोकन करून संग्रामामध्यें शत्रूंचा वध करण्याकरितां क्रोधपूर्वक वज्र उगारिलें ॥ २७ ॥ हे राजा, इंद्रानें त्याच अष्टधारी वज्राच्या योगानें दैत्यांच्या ज्ञातिबांधवांना भय उत्पन्न करीत

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्यांच्या समक्ष बल व पाक ह्या दोन्ही असुरांचीं मस्तकें हरण केलीं ॥ २८ ॥ तेव्हां हे राजा, त्यांचा वध झाला हें पाहून ज्ञातींचा शोक व विष्णूविषयीं असहिष्णुता ह्यांच्यायोगानें क्रुद्ध झालेल्या त्या नमुचि असुरानें इंद्राचा वध करण्याकरितां दीर्घ प्रयत्न केला ॥ २९ ॥ तो असा कीं, क्रुद्ध झालेला तो नमुचि, घंटांनीं व सुवर्णभूषणांनीं युक्त असा एक लोहमय शूल हातामध्यें घेऊन ' मरण पावलास ' अशी इंद्राची निर्भर्त्सना करीत करीत त्याच्या सन्मुख धांवला व सिंहाप्रमाणें गर्जना करून त्यानें तो शूल इंद्राला मारण्याकरितां त्याच्या आंगावर फेंकिला ॥ ३० ॥ तेव्हां हे राजा, आपणाकडे येत असलेल्या त्या महावेगवान् शूलाचे आकाशामध्येंच इंद्रानें बाणांच्या योगानें हजारो तुकडे करून टाकिले. नंतर क्रोधानें युक्त झालेल्या त्या देवराज इंद्रानें, त्या असुराचें शिर हरण करण्याकरितां वज्रानें त्याच्या कंठावर प्रहार केला ॥ ३१ ॥ परंतु, देवराज इंद्रानें मोठ्या बलानें फेंकलेल्या त्या महाप्रभावशाली वज्राच्यानें, त्या असुराच्या त्वचेचाहि भेद झाला नाहीं; तेव्हां लोकांना तें मोठें आश्चर्य वाटलें. कारण,

शोकामर्षाभ्यां युक्तया रुषा क्रोधेनान्वित इंद्रं हंतुं परमोद्योगं चकार ॥ २९ ॥ घंटावद्धंटाभिर्युक्तम् ॥ ३० ॥ ३१ ॥अतिवीर्यं वृत्रमभिनदिति तथा ॥ ३२ ॥ ३३ ॥

नमुचिस्तद्वधं दृष्ट्वा शोकामर्षरुषान्वितः ॥ जिघांसुरिंद्रं नृपते चकार परमोद्यमम् ॥ २९ ॥ अश्मसारमयं शूलं घंटावद्धेमभूषणम् ॥ प्रगृह्याभ्यद्रवत्क्रुद्धो हतोऽसीति वितर्जयन् ॥ प्राहिणोद्देवराजाय निनदन्मृगराडिव ॥ ३० ॥ तदाऽऽपतद्गगनतले महाजवं विचिच्छिदे हरिरिषुभिः सहस्रधा ॥ तमाहनन्नृप कुलिशेन कंधरे रुषाऽन्वितस्त्रिदशपतिः शिरो हरन् ॥ ३१ ॥ न तस्य हि त्वचमपि वज्र ऊर्जितो बिभेद यः सुरपतिनौजसेरितः ॥ तदद्भुतं परमतिवीर्यवृत्रभित्तिरस्कृतो नमुचिशिरोधरत्वचा ॥ ३२ ॥ तस्मादिंद्रोऽबिभेच्छत्रोर्वज्रः प्रतिहतो यतः ॥ किमिदं दैवयोगेन भूतं लोकविमोहनम् ॥ ३३ ॥ येन मे पूर्वमद्रीणां पक्षच्छेदः प्रजात्यये ॥ कृतो निविशतां भारैः पतत्रैः पततां भुवि ॥ ३४ ॥ तपःसारमयं त्वाष्ट्रं वृत्रो येन विपाटितः ॥ अन्ये चापि बलोपेताः सर्वास्त्रैरक्षतत्वचः ॥ ३५ ॥ सोऽयं प्रतिहतो वज्रो मया मुक्तोऽसुरेऽल्पके ॥ नाहं तदाददे दंडं ब्रह्मतेजोऽप्यकारणम् ॥ ३६ ॥ इति शक्रं विषीदंतमाह वागशरीरिणी ॥ नायं शुष्कैरथो नार्द्रैर्वधमर्हति दानवः ॥ ३७ ॥

तथा पतत्रैः पक्षैः ॥३४॥ सारमयं वीर्याधिकं त्वाष्ट्रं तप एव वृत्रः स येन वज्रेण मया विपाटितः ॥३५॥ दंडं लगुडतुल्यं कुलिशम् । ब्रह्मतेजो दधीचेः सामर्थ्यम् ॥३६॥३७॥

ज्यानें पूर्वीं अतिवीर्यवान् अशा वृत्रासुराचाहि वध केला, त्याला सांप्रतकालीं नमुचीच्या कंठाच्या त्वचेनेंहि धुडकावून लाविलें ॥ ३२ ॥ हे राजा, ज्यापासून वज्र कुंठित झालें त्या शत्रूपासूनमात्र इंद्र भयभीत झाला आणि मनामध्यें विचार करूं लागला कीं,– अहो ! दैवयोगानें लोकांना मोहकारक असें हें काय झालें! ॥ ३३ ॥ अहो पूर्वीं प्रजांचा नाश होऊं लागला असतां ज्या वज्राच्या योगानें मीं, पक्ष्यांच्या योगानें यथेष्ट गमन करणाऱ्या व आपल्या भारांनीं भूमीवर पडणाऱ्या पर्वतांचा पक्षछेद केला आहे व पराक्रमानें अधिक असें त्वष्ट्याचें मूर्तिमंत तपच अशा वृत्रासुराचा ज्याच्या योगानें मीं नाश केला व सर्व अस्त्रांनीं ज्यांच्या त्वचेलाहि धक्का लागावयाचा नाहीं अशा बलाढ्य इतर वीरांचाहि ज्याच्या योगानें मीं वध केला, तें हें वज्र, ह्या क्षुद्र असुरावर मीं टाकिलें असतां कुंठित झालें. तस्मात्, ब्रह्मतेजोरूप असूनहि निरुपयोगी झालेल्या ह्या दंडतुल्य वज्राचा मी आतां स्वीकार करणार नाहीं ॥ ३४ ॥ ३५ ॥ ३६ ॥ ह्याप्रमाणें भाषण करून खेद पावणाऱ्या, इंद्राला, आकाशवाणी ह्मणाली कीं,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हे इंद्रा, हा नमुचि दानव, शुष्क अथवा आर्द्र वस्तूंनीं वध पावण्यास योग्य होणार नाहीं ॥ ३७ ॥ कारण, 'आर्द्र अथवा शुष्क ह्यांपासून तुला मृत्यु येणार नाहीं' असा मीं याला वर दिला आहे. तस्मात्, हे मघवन्, शत्रूच्या वधाकरितां तूं दुसरा कांहींतरी उपाय मनामध्यें आणावास ॥ ३८ ॥ हे राजा, ती परमेश्वराची वाणी ऐकून स्वस्थ अंतःकरणपूर्वक इंद्र चिंतन करीत असतां, आर्द्र व शुष्क ह्या दोन्ही गुणांनीं युक्त असा उदकांचा फेण त्याच्या दृष्टीस पडला ॥ ३९ ॥ तेव्हां इंद्रानें, केवळ शुष्क नव्हे व केवळ आर्द्र नव्हे अशा फेणानें त्या नमुचीचें शिर हरण केलें. तेव्हां त्या इंद्राची मुनिगणांनीं स्तुति केली व त्याच्यावर पुष्पवृष्टि केली ॥ ४० ॥ त्यावेळीं विश्वावसु व परावसु हे दोन मुख्य गंधर्व गायन करूं लागले, देवांच्या दुंदुभि वाजूं लागल्या आणि अप्सरा आनंदपूर्वक नृत्य करूं लागल्या ॥ ४१ ॥ असो याप्रमाणें इतरहि अग्नि, वायु व वरुण इत्यादि देवांनीं अस्त्रसमूहांच्या योगानें आपल्याशीं द्वंद्वयुद्ध करणाऱ्या प्रतिपक्ष्यांचा, जसे सिंह हरिणांचा नाश करितात त्याप्रमाणें नाश

आर्द्रशुष्काभ्यां मृत्युर्नैवेति ॥ ३८ ॥ ३९ ॥ उभयात्मकत्वमेवाह । न शुष्केण न चार्द्रेण फेनेन । तथाच श्रुतिः । अपां फेनेन नमुचेः शिर इंद्रोदवर्तयदिति ॥ ४० ॥ ४१ ॥

मयाऽस्मै यद्वरो दत्तो मृत्युर्नैवार्द्रशुष्कयोः ॥ अतोऽन्यश्चिंतनीयस्ते उपायो मघवन्रिपोः ॥ ३८ ॥ तां दैवीं गिरमाकर्ण्य मघवान्सुसमाहितः ॥ ध्यायन्फेनमथापश्यदुपायमुभयात्मकम् ॥ ३९ ॥ न शुष्केण न चार्द्रेण जहार नमुचेः शिरः ॥ तं तुष्टुवुर्मुनिगणा माल्यैश्चावाकिरन्विभुम् ॥ ४० ॥ गंधर्वमुख्यौ जगतुर्विश्वावसुपरावसू ॥ देवदुंदुभयो नेदुर्नर्तक्यो ननृतुर्मुदा ॥ ४१ ॥ अन्येऽप्येवं प्रतिद्वंद्वान्वाय्वग्निवरुणादयः ॥ सूदयामासुरस्त्रौघैर्मृगान्केसरिणो यथा ॥ ४२ ॥ ब्रह्मणा प्रेषितो देवान्देवर्षिर्नारदो नृप ॥ वारयामास विबुधान्दृष्ट्वा दानवसंक्षयम् ॥ ४३ ॥ नारद उवाच ॥ भवद्भिरमृतं प्राप्तं नारायणभुजाश्रयैः ॥ श्रिया समेधिताः सर्व उपारमत विग्रहात् ॥ ४४ ॥ श्रीशुक उवाच ॥ संयम्य मन्युसंरंभं मानयंतो मुनेर्वचः ॥ गीयमाना अनुचरैर्ययुः सर्वे त्रिविष्टपम् ॥ ४५ ॥ येऽवशिष्टा रणे तस्मिन्नारदानुमतेन ते ॥ बलिं विपन्नमादाय अस्तं गिरिमुपागमन् ॥ ४६ ॥ तत्राविनष्टावयवान्विद्यमानशिरोधरान् ॥ उशना जीवयामास संजीविन्या स्वविद्यया ॥ ४७ ॥

॥ ४२ ॥ ४३ ॥ ४४ ॥ अनुचरैरनुगीयमाना इत्यर्थः । उपगीयमानैरनुचरैः स हेति वा ॥ ४५ ॥ ४६ ॥ अविनष्टा अवयवा येषाम् । विद्यमानाः शिरोधरा येषां तान् ॥ ४७ ॥

केला ॥ ४२ ॥ हे राजा, याप्रमाणें देवांचा जय झाला असतांहि, वैरभावानें त्यांनीं मारलेल्या दानवांचा अगदीं क्षय होत आहे असें पाहून, ब्रह्मदेवानें पाठविलेल्या देवर्षि नारदानें देवांचें निवारण केलें ॥ ४३ ॥ नारद ह्मणालाः—हे देवहो, नारायणाच्या भुजांचा आश्रय करणाऱ्या तुह्मीं अमृत प्राप्त करून घेतलें व लक्ष्मीच्या योगानें तुह्मी सर्व उत्तम प्रकारानें वृद्धिंगतहि झालां आहां. तस्मात्, आतां युद्ध पुरे करा ॥ ४४ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणालाः— हे राजा, त्या नारदाच्या वचनाला मान देणाऱ्या सर्व देवांनीं क्रोधावेशाचा उपसंहार करून, आपली स्तुति करणाऱ्या गंधर्वादिक अनुचरांसहवर्तमान स्वर्गाचेठिकाणीं गमन केलें ॥ ४५ ॥ आणि त्या संग्रामामध्यें जे असुर अवशेष राहिले होते ते नारदाच्या संमतीनें वज्रप्रहारानें पीडित झाल्यामुळें व्याकुळ झालेल्या बलीचें ग्रहण करून अस्ताचलाप्रत निघून गेले ॥ ४६ ॥ नंतर त्याठिकाणीं ज्यांचे अवयव नष्ट झालेले नव्हते व ज्यांचे कंठ विद्यमान होते त्या असुरांना आपल्या संजीविनीनामक विद्येच्या योगानें शुक्राचार्यानें जीवंत केलें ॥ ४७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

बलिराजा तर शुक्राचार्यानें स्पर्श करतांक्षणींच पुनरपि इंद्रियें व स्मृति यांस पावला आणि तो लोकतत्त्व जाणणारा असल्यामुळें पराभव पावला असूनहि खिन्न झाला नाहीं ॥ ४८ ॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील अष्टमस्कंधापैकीं अमृताख्यानान्तर्गत देवासुरसंग्रामकथनरूप हा अकरावा अध्याय समाप्त झाला ॥ ११ ॥ ॥ आतां ह्या बाराव्या अध्यायामध्यें मोहिनीरूपाचें सौंदर्य अवलोकन करण्याविषयीं उत्सुक झालेल्या महादेवाला अत्यंत मोहित करून, श्रीहरीनें पुनरपि त्याचें सांत्वन केलें ही कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ विष्णूच्या मायेनें असुर मोहित झाले हें कांहीं आश्चर्य नव्हे असें सांगण्याकरितां ह्या अध्यायामध्यें श्रीरुद्राचा मोह वर्णन करीत श्रीशुकाचार्य ह्मणाला- हे परिक्षित राजा, स्त्रीरूपानें दानवांना मोहित करून श्रीहरीनें देवगणांना अमृत पाजिलें हें वर्तमान वृषभध्वज महादेवानें श्रवण करून तें मोहिनीरूप

प्रत्यापन्नानि पुनः प्राप्तानींद्रियाणि स्मृतिश्च येन सः ॥ ४८ ॥ इति श्रीमद्भागवतेऽष्टमस्कंधे टीकायामेकादशोऽध्यायः ॥ ११ ॥ ॥ द्वादशे मोहिनीरूपविभ्रमालोकनोत्सुकम् ॥ भवं संमोहयामास हरिः पुनरसांत्वयत् ॥ १ ॥ अमुह्यन्नसुरा विष्णुमायया न तदद्भुतम् ॥ इति वक्तुं महादेवमोहोऽयमुपवर्ण्यते ॥ २ ॥ हरिः सोममपाययदितीदं निशम्य स यत्रास्ते तत्र तद्रूपं द्रष्टुं ययावित्युत्तरेणान्वयः ॥ १ ॥ २ ॥ सोमया उमया सह ॥ ३ ॥ त्वयि किंचिन्न चाश्चर्यं वयं त्वाश्चर्यमानसाः ॥ इति वक्ष्यन्महादेवस्तुष्टाव हरिमष्टभिः ॥ त्वयि महामायाविनि परमेश्वरे नहि

बलिश्चोशनसा स्पृष्टः प्रत्यापन्नेंद्रियस्मृतिः ॥ पराजितोऽपि नाखिद्यल्लोकतत्त्वविचक्षणः ॥ ४८ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे अष्टमस्कंधे देवासुरसंग्रामे एकादशोऽध्यायः ॥ ११ ॥ ॥ श्रीबादरायणिरुवाच ॥ वृषध्वजो निशम्येदं योषिद्रूपेण दानवान् ॥ मोहयित्वा सुरगणान्हरिः सोममपाययत् ॥ १ ॥ वृषमारुह्य गिरिशः सर्वभूतगणैर्वृतः ॥ सह देव्या ययौ द्रष्टुं यत्रास्ते मधुसूदनः ॥ २ ॥ सभाजितो भगवता सादरं सोमया भवः ॥ सूपविष्ट उवाचेदं प्रतिपूज्य स्मयन्हरिम् ॥ ३ ॥ श्रीमहादेव उवाच ॥ देवदेव जगद्व्यापिन् जगदीश जगन्मय ॥ सर्वेषामपि भावानां त्वमात्मा हेतुरीश्वरः ॥ ४ ॥ आद्यंतावस्य यन्मध्यमिदमन्यदहं बहिः ॥ यतोऽव्ययस्य नैतानि तत्सत्यं ब्रह्म चिद्भवान् ॥ ५ ॥

किंचिदघटितमिव वयं तु परमकौतूहलेन द्रष्टुमागता इति बहुधा संबोधयन्स्तौति । हे देवदेव । कुतोऽहं देवानां देव इत्यत आह । हे जगद्व्यापिन् । तत्कुतः । हे जगन्मय । तर्हि किंप्रधानम् । न । हे जगदीश । तच्च कुतस्तत्राह । सर्वेषामपि त्वं हेतुरत ईश्वरः आत्मत्वाच्च न जडं प्रधानं त्वमित्यर्थः ॥ ४ ॥ ननु जगन्मयत्वोक्त्या जगत उत्पत्त्यादिनाऽसत्यत्वेन जाड्येन च ममापि किं तथा त्वं ब्रूषे नहिनहीत्याह । आद्यंतौ मध्यं चास्य जगतो यतो ब्रह्मणा भवंति । यस्य चाव्ययस्यैतान्याद्यंतमध्यानि न संति । यच्च ब्रह्म

अवलोकन करण्याकरितां तो पार्वतीसहवर्तमान नंदीवर आरूढ झाला आणि सर्व भूतगणांनीं परिवेष्टित होत्साता, जेथें मधुसूदन भगवान् होता तेथें प्राप्त झाला ॥ १ ॥ ॥ २ ॥ तेव्हां भगवान् विष्णूनें, आदरपूर्वक पार्वतीसहवर्तमान त्या शंकराचा पूजाप्रशंसादिकेंकरून सत्कार केला व त्यानेंहि आसनावर स्वस्थपणें बसल्यानंतर श्रीहरीचा उलट सत्कार करून, आश्चर्यपूर्वक असें भाषण केलें कीं, ॥ ३ ॥ श्रीमहादेव ह्मणाला- हे जगदीशा, हे जगन्मया, हे जगद्व्यापिन् व हे देवाधिदेवा, तूं सर्व पदार्थांचा आत्मा व कारण असल्यामुळें ईश्वरहि तूंच आहेस ॥ ४ ॥ आतां, तूं मला जगन्मयत्त्व प्रतिपादन केलेंस ह्यावरून, उत्पत्त्यादिकांच्या योगानें जगत् जसें असत्य व जड आहे तसा च मीहि आहें कीं काय असें ह्मणशील तर- हे परमेश्वरा, छेछे तसें नव्हे. कारण, या जगताची उत्पत्ति स्थिति व लय हीं ज्या ब्रह्मापासून होतात व स्वतः अविना- ॥ ३० ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शी अशा ज्यो ब्रह्माला हीं तिन्हींहि नाहींत व जें इदंशब्दानें वाच्य दृश्यरूपि व अहंशब्दानें वाच्य द्रष्टृरूपि आणि बाहेरून भोग्यरूपि व आंतून भोक्तृरूपि आहे तें सत्य व चैतन्यरूप ब्रह्म तूंच आहेस ह्मणून तुझेठिकाणीं विकारांची शंकाहि नाहीं ॥ ५ ॥ आतां, भगवान् अशाप्रकारचा असल्याविषयीं मुमुक्षु जनांचा आचारच प्रमाण आहे असें सुचवितो हे प्रभो, इहलोकसंबंधीं व परलोकसंबंधीं भोगासक्तीचा त्याग करून निष्काम झालेले मुमुक्षु मुनिजन, तुझ्याच चरणकमलाची आदरपूर्वक उपासना करितात ॥ ६ ॥ बरें ब्रह्मच जर मी आहें तर निःसंग व उदासीन अशा माझ्या चरणकमलाची उपासना करून त्यांना काय फल प्राप्त होणार आहे ? असें ह्मणशील तर- हे परमेश्वरा, तूं निर्गुण, शोकरहित, निर्विकार, आनंदमय, सर्वव्यापक व सर्वांहून निराळें, सुखस्वरूप आणि परिपूर्ण असें ब्रह्म जरी आहेस तथापि अत्यंत उदासीन नाहींस तर प्रपंचाच्या उत्पत्तिस्थितिलयांचें कारण असून उत्पत्त्यादिक उपाधींनीं युक्त असलेल्या जीवांना कर्मांचें फळ देणारा आहेस. तर मग कांहींतरी अपेक्षा धरून

इदंकारास्पदं दृश्यमहंकारास्पदं द्रष्टृ च बहिर्भोग्यमन्यद्भोक्तृ च तत्सत्यं च चिद्रूपं च ब्रह्मैव भवानतो न तव विकारादिशंकेत्यर्थः ॥ ५ ॥ तवैवंभूतत्वे मुमुक्षूणामाचारः प्रमाणमित्याह । तवैवेति । उभयत इहामुत्र च संगं त्यक्त्वा ॥ ६ ॥ ननु ब्रह्मैव चेदहं तर्ह्यसंगोदासीनस्य मम चरणांभोजोपासनया किं तेषां तत्राह । त्वमिति । ब्रह्मत्वेऽपि त्वं नात्यंतमुदासीनः किंतु विश्वस्य प्रपंचस्योदयादीनां हेतुस्तदुपाधीनामात्मनां जीवानामीश्वरश्च तत्तत्फलदाता । तर्हि किं राजादिवत्कयाऽप्यपेक्षया सेवकेभ्यः फलं ददामि न हिनहि अनपेक्ष एव त्वम् । तर्हि किमीश्वरत्वेन तत्राह । तैरात्मभिस्तत्फलदानार्थमपेक्ष्यत इति तदपेक्षस्तस्य भावस्तदपेक्षता तया । अनपेक्षत्वमेव दर्शयितुं तदीयं ब्रह्मत्वं

तवैव चरणांभोजं श्रेयस्कामा निराशिषः ॥ विसृज्योभयतः संगं मुनयः समुपासते ॥ ६ ॥ त्वं ब्रह्म पूर्णममृतं विगुणं विशोकमानंदमात्रमविकारमनन्यदन्यत् ॥ विश्वस्य हेतुरुदयस्थितिसंयमानामात्मेश्वरश्च तदपेक्षतयाऽनपेक्षः ॥ ७ ॥ एकस्त्वमेव सदसद्द्वयमद्वयं च स्वर्णं कृताकृतमिवेह न वस्तुभेदः ॥ अज्ञानतस्त्वयि जनैर्विहितो विकल्पो यस्माद्गुणैर्व्यतिकरो निरुपाधिकस्य ॥ ८ ॥

विशिनष्टि । पूर्णममृतं च सुखरूपम् । विषयसुखवैलक्षण्यार्थमाह । अविकारं नित्यमानंदमात्रं च । कुतः । विशोकम् । तत्कुतः । विगुणम् । किंच अनन्यत् न विद्यतेऽन्यद्यस्मात् । ब्रह्मव्यतिरिक्ताभावादपि निरपेक्षस्त्वमित्यर्थः । तर्हि सर्वात्मकत्वे तत्तद्विकारप्रसंगो दुर्वारस्तत्राह । अन्यत्सर्वतो व्यतिरिक्तं च कारणत्वात् । नह्येवंभूतसुखात्मकब्रह्मस्वरूपस्य तवान्यापेक्षाऽस्त्यतः केवलं भक्तानुग्रहार्थमेव तवैश्वर्यं न स्वार्थमित्यर्थः ॥ ७ ॥ अन्यत्वमनन्यत्वं चैकस्य कुत इत्याशंक्य दृष्टांतेनोपपादयति । सदसत्कार्यकारणरूपं द्वयमद्वयं च परमकारणं त्वमेवैकः । कृतं कुंडलादिरूपं द्वयमकृतं च केवलमद्वयं स्वर्णं यथैकमेव तद्वदेवेह त्वयि वस्तुतो भेदो नास्ति । कथं तर्हि भेदप्रतीतिस्तत्राह ।

राजादिकांप्रमाणें सेवक जनांना मी फळ देतों कीं काय ? असें ह्मणशील तर- हे परमात्म्या, तसा प्रकार मुळींच नाहीं. तर तूं निरपेक्ष असून त्या जीवांनींच आपणांस फळें मिळण्याकरितां तुझी अपेक्षा केलेली असत्ये, ह्मणून त्यांना फळें देतोस. सारांश, सुखात्मक ब्रह्मस्वरूपी असलेल्या तुला इतरांची अपेक्षा नाहीं. ह्मणून तुझें ऐश्वर्य स्वार्थाकरितां नसून केवल भक्तांवर अनुग्रह करण्याकरितांच आहे ॥ ७ ॥ आतां सर्वांहून व्यतिरिक्तत्व व सर्वरूपत्व हीं दोन्हीं एकालाच कशीं प्राप्त होतील ? अशी शंका घेऊन तीं दृष्टांतानें उपपादन करण्याकरितां महादेव भाषण करितो कीं,–हे जगदीशा, द्वैतभावानें भासमान होणारें कार्य व अद्वैतभावानें प्रतीत होणारें कारण, हीं दोन्हीं तूंच एक असल्यामुळें, कुंडलादि कार्यरूपानें कृतीनें बनविलेलें व कारण रूपानें अकृत्रिम असलेलें सुवर्ण जसें वस्तुतः एकच आहे तसाच तुझेठिकाणीं वस्तुतः भेद नाहीं. तर मग भेदप्रतीति कशी होत्ये असें ह्मणशील तर- हे परमात्म्या, अज्ञानामुळें तुझेठिकाणीं जनांनीं भेद कल्पिला आहे. कारण, उपाधिरहित अशा तुझेठिकाणीं हा भेद,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

केवल मायागुणांनींच अनुभवास येतो स्वतः अनुभवास येत नाहीं ॥ ८ ॥ ह्मणूनच नानाप्रकारांनीं लोक तुझें वर्णन करितात. तुझें वास्तविक स्वरूप, कोणींच जाणत नाहींत असें सांगतो–हे जगदीशा, कितीएक वेदांतवादी तुला ब्रह्म असें मानितात, कितीएक मीमांसक तुला धर्म असें मानितात, कितीएक सांख्य तुला प्रकृतिपुरुषांहून भिन्न असा ब्रह्मादिकांचा ईश्वर पुरुषोत्तम आहेस असें समजतात, कितीएक पंचरात्र आगमांत सांगितलेली दीक्षा धारण करणारे लोक, तुला, विमला, उत्कर्षिणी, ज्ञाना, क्रिया, योगा, प्रह्वी, सत्या, ईशाना आणि अनुग्रहा ह्या नऊ शक्तींनीं युक्त असा तूं परमेश्वर आहेस असें मानितात व कितीएक पातंजल मताचे लोक, तुला, जन्मादिविकाररहित असा तूं स्वतंत्र महापुरुष आहेस असें समजतात ॥ ९ ॥ त्याचप्रमाणें मी, ब्रह्मदेव व मरीचिप्रभृति ऋषि हे सर्वहि आह्मी सत्त्वगुणानें उत्पन्न झालेले असूनहि ज्या तूं रचिलेल्या

अज्ञानत इति । कुतः । यस्मान्निरुपाधिकस्यैव तवायं गुणैर्व्यतिकरो भेदो न स्वतः ॥ ८ ॥ अतएव त्व बहुधा वर्णयंति तत्त्वतस्तु केऽपि न जानंतीत्याह द्वाभ्याम् । त्वां ब्रह्म वेदांतिनोऽवयंति मन्यंते । त्वामेव धर्मं मीमांसका मन्यंते । प्रकृतिपुरुषयोः परं पुमांसं सांख्याः । विमलोत्कर्षणी ज्ञाना क्रिया योगा प्रह्वी सत्या ईशाना अनुग्रहा चेत्येवं नवशक्तियुतं परं पांचरात्राः । महापुरुषं पातंजलाः ॥ ९ ॥ परायुर्ब्रह्मा । सत्त्वसर्गाः सत्त्वगुणेन सृष्टा अपि येन त्वया विरचितं विश्वमपि खलु तत्त्वतो न जानंति किं पुन-

त्वां ब्रह्म केचिदवयंत्युत धर्ममेक एके परं सदसतोः पुरुषं परेशम् ॥ अन्येऽवयंति नवशक्तियुतं परं त्वां केचिन्महापुरुषमव्ययमात्मतंत्रम्
॥ ९ ॥ नाहं परायुर्ऋषयो न मरीचिमुख्या जानंति यद्विरचितं खलु सत्त्वसर्गाः ॥ यन्मायया मुषितचेतस ईश दैत्यमर्त्यादयः किमुत शश्वदभद्रवृत्ताः ॥ १० ॥ स त्वं समीहितमदः स्थितिजन्मनाशं भूतेहितं च जगतो भवबंधमोक्षौ ॥ वायुर्यथा विशति खं च चराचराख्यं सर्वं तदात्मकतयाऽवगमोऽवरुंत्से ॥ ११ ॥ अवतारा मया दृष्टा रममाणस्य ते गुणैः ॥ सोऽहं तद्द्रष्टुमिच्छामि यत्ते योषिद्वपुर्धृतम् ॥ १२ ॥

स्त्वाम् । हे ईश अभद्रं राजसं तामसं च वृत्तमुत्पत्तिर्येषां ते न जानंतीति किमु वक्तव्यम् ॥ १० ॥ किंतु त्वं तत्सर्वं जानासीत्याह । स त्वं सर्वमवरुंत्से व्याप्नोषि जानासि । किं तत्सर्वम् । समीहितं स्वकृतमदःस्थितिजन्मनाशममुष्य जगतो जन्मादिभूतानामीहितं च जगतो भवबंधमोक्षौ च । व्याप्तौ दृष्टांतः । चराचराख्यं देहजातं खं च यथा वायुराविशति तथा । कथमवरुंत्से । तदात्मकतया तस्य सर्वस्यात्मतयेत्यर्थः । आत्मत्वे हेतुः । अवगमो ज्ञानरूप इति ॥ ११ ॥ एवं स्तुत्वा प्रस्तुतं विज्ञापयति । अवतारा इति द्वाभ्याम् ॥ १२ ॥

ह्या जगालासुद्धां यथार्थरीतीनें बरोबर जाणत नाहीं, मग त्या तुला जाणण्यास कसें समर्थ होऊं? होणारच नाहीं. आमची जेथें ही दशा तेथें हे ईश्वरा, सर्वदां रजोगुण व तमोगुण ह्यांच्या योगानें उत्पन्न होणारे व तुझ्या मायेनें मोहित झालेले दैत्यमनुष्यादिक तुला जाणत नाहींत हें काय सांगावें! ॥ १० ॥ हे परमेश्वरा, तो तूं, सर्व जगताचा आत्मा व ज्ञानरूप असल्यामुळें, जसा वायु चराचर प्राणिमात्रांच्या देहांत व आकाशांत प्रवेश करितो त्याप्रमाणें सर्वजगांत प्रविष्ट होऊन आपण केलेल्या जगाचे उत्पत्तिस्थितिनाश, प्राणिमात्रांचें कर्म, जगताला प्राप्त झालेला संसारबंध व त्यापासून होणारा मोक्ष ह्या सर्वांना जाणत आहेस ॥ ११ ॥ ह्याप्रमाणें स्तुति करून प्रस्तुत कार्याविषयीं विज्ञप्ति करितो कीं,– हे ईश्वरा, सत्वादिक गुणांच्या योगानें रममाण होणाऱ्या तुझे, ज्या मी पूर्वीं नरसिंहादिक अवतार अवलोकन केले. तोच

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मी आतां तूं जें स्त्रीरूप धारण केलें होतेंस तें अवलोकन करण्याची इच्छा करितों ॥१२॥ आम्हां, केवळ मलाच तें रूप पाहण्याची इच्छा आहे असें नाहीं तर माझ्या परिवार भूतगणांच्याहि मनामध्यें तें पहावयाचें आहे असें दर्शवितो– ज्या रूपानें तूं दैत्यांना अगदीं मोहित करून देवांना अमृत पाजिलेंस तें तुझें रूप अवलोकन करण्याकरितां आह्मी सर्व येथें आलों आहों. कारण, त्याविषयीं आह्मांला अत्यंत आश्चर्य वाटत आहे ॥ १३ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला:– हे परिक्षित् राजा, ह्याप्रमाणें शूलपाणि शंकरानें प्रार्थना केलेला भगवान् विष्णु, गंभीर अभिप्रायानें हास्य करून त्या महादेवाला ह्मणाला कीं,– ॥ १४ ॥ श्रीभगवान् ह्मणाला—हे शंकरा, अमृताचें पात्र दैत्यांच्या हस्तगत झालें असतां वंचनमोहनादि धर्मयुक्त स्त्रीवेषानेंच देवांचीं कार्यें होतील असें जाणणाऱ्या मी, दैत्यांना मोह पाडण्याकरितां तो वेष धारण केला होता ॥ १५ ॥ असो. हे सुरश्रेष्ठा, कामोत्पादक व कामिजनांना बहुमान्य असें तें रूप, अवलोकन करण्याची इच्छा करणाऱ्या तुला मी आतां दाखवितों ॥ १६ ॥ श्रीशुकाचार्य

॥१३॥१४॥सुरकार्याणि योषिद्वेषेण भविष्यंतीति पश्यता। अयं भावः। अवश्यं तावदुन्मत्तान्दैत्यान्वंचयित्वा देवेभ्योऽमृतं देयं न चैवं वैषम्यं रूपांतरेण कर्तुमुचितं अतो वंचनमोहनादिसारं कामिनीरूपं मया धृतमिति ॥१५॥ तद्रूपं दर्शयिष्यामि संकल्पप्रभवः कामस्तस्योदयो यस्मात् ॥ १६॥ १७॥ विचित्राणि पुष्पाण्यरुणाः पल्लवाश्च येषां ते द्रुमा यस्मिन्।

येन संमोहिता दैत्याः पायिताश्चामृतं सुराः ॥ तद्दिदृक्षव आयाताः परं कौतूहलं हि नः ॥ १३ ॥ श्रीशुक उवाच ॥ एवमभ्यर्थितो विष्णुर्भगवान् शूलपाणिना ॥ प्रहस्य भावगंभीरं गिरिशं प्रत्यभाषत ॥ १४ ॥ श्रीभगवानुवाच ॥ कौतूहलाय दैत्यानां योषिद्वेषो मया कृतः ॥ पश्यता सुरकार्याणि गते पीयूषभाजने ॥ १५ ॥ तत्तेऽहं दर्शयिष्यामि दिदृक्षोः सुरसत्तम ॥ कामिनां बहुमंतव्यं संकल्पप्रभवोदयम् ॥ १६ ॥ श्रीशुक उवाच ॥ इति ब्रुवाणो भगवांस्तत्रैवांतरधीयत ॥ सर्वतश्चारयंश्चक्षुर्भव आस्ते सहोमया ॥ १७ ॥ ततो ददर्शोपवने वरस्त्रियं विचित्रपुष्पारुणपल्लवद्रुमे ॥ विक्रीडतीं कंदुकलीलया लसद्दुकूलपर्यस्तनितंबमेखलाम् ॥ १८ ॥ आवर्तनोद्वर्तनकंपितस्तनप्रकृष्टहारोरुभरैः पदे पदे ॥ प्रभज्यमानामिव मध्यतश्चलत्पदप्रवालं नयतीं ततस्ततः ॥ १९ ॥ दिक्षु भ्रमत्कंदुकचापलैर्भृशं प्रोद्विग्नतारायतलोललोचनाम् ॥ स्वकर्णविभ्राजितकुंडलोल्लसत्कपोलनीलालकमंडिताननाम् ॥ २० ॥

लसद्दुकूलेन पर्यस्ते परिवृते नितंबे मेखला यस्यास्ताम् ॥ १८ ॥ उत्पतत्पतत्कंदुकलीलावशेन ये आवर्तनोद्वर्तने नमनोन्नमने ताभ्यां कंपितयोः स्तनयोः प्रकृष्टहाराणां चोरुभारैः प्रतिपदं मध्ये प्रभज्यमानामिव चलत्पदमेव प्रवालवत्कोमलं ततस्ततो नयंतीम् ॥ १९ ॥ दिक्षु भ्रमतः कंदुकस्य चापलैश्चांचल्यैर्भृशं प्रोद्विग्नतारे आयते लोले चंचले लोच-

ह्मणाला:–हे राजा, ह्याप्रमाणें भगवान् विष्णु, महादेवाबरोबर भाषण करीत असतां, तेथेंच अंतर्धान पावला व त्यावेळीं पार्वतीसहवर्तमान महादेव, चोहोंकडे अवलोकन करीत तेथेंच राहिला ॥ १७ ॥ तदनंतर चित्रविचित्र पुष्पें व आरक्तवर्ण पल्लव ह्यांनीं युक्त असलेले वृक्ष ज्यामध्यें आहेत अशा उपवनामध्यें एक श्रेष्ठ स्त्री त्या महादेवानें अवलोकन केली. ती चेंडू झेलण्याच्या लीलेनें क्रीडा करीत होती व तिच्या देदीप्यमान पीतांबरानें परिवेष्टित असलेल्या कटिप्रदेशावर कमरपट्टा होता ॥ १८ ॥ वर उडणाऱ्या व खालीं पडणाऱ्या चेंडूच्या लीलावशेंकरून वारंवार वांकणें व ताठ होणें ह्यांच्यायोगानें कंपित झालेल्या स्तनांच्या व सर्वोत्कृष्ट हारांच्या अतिभारामुळें पदोपदीं कटिप्रदेशीं अगदीं भग्नच होत आहे कीं काय अशी ती स्त्री पल्लवांप्रमाणें नाजूक असलेल्या आपल्या चंचळ पावलांना इकडेतिकडे चालवीत होती ॥ १९ ॥ चोहोंकडे भ्रमण करीत असलेल्या चेंडूच्या चपळपणामुळें तिच्या विशाल व चंचल नेत्रांतील बुबुळें फारच उद्विग्न झालीं होतीं, तिच्या कर्णांच्या योगानें झळकत

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असलेल्या कुंडलांच्या कांतीनें देदीप्यमान होणाऱ्या गालांनीं व काळ्याभोर असलेल्या केंसांनीं तिचें मुख भूषित झालें होतें ॥ २० ॥ सैल होत असलेल्या वस्त्राला व सुटलेल्या वेणीला आपल्या मनोहर डाव्या हातानें ती सांवरीत होती व दुसऱ्या हातानें चेंडूला प्रहार करीत करीत आपल्या मायेनें ती सर्व जगताला मोह उत्पन्न करित होती ॥ २१ ॥ असो. त्या स्त्रीला अवलोकन करितांक्षणींच महादेवानें आपल्या समीप असलेल्या पार्वतीला व आपल्या पार्षदगणांना मुळींच जाणिलें नाहीं. कारण, कंदुक-क्रीडेनें जी किंचित् लज्जा तिच्या योगानें अस्पष्ट जें हास्य त्यासहवर्तमान तिनें फेंकलेल्या कटाक्षानें त्याला अगदीं वश केलें होतें, व त्यानें केलेलें जें त्या स्त्रीचें अवलोकन व तिनें केलेलें जें त्याकडे प्रति अवलोकन त्यांच्या योगानें त्याचें मन अगदीं विव्हळ झालें होतें ॥ २२ ॥ नंतर तिच्या हातांतून तो चेंडू जेव्हां दूर गेला

ने यस्याः । स्वकर्णाभ्यां विभ्राजिते ये कुंडले ताभ्यामुल्लसंतौ कपोलौ ताभ्यां नीलालकैश्च मंडितमाननं यस्याः ॥ २० ॥ संनह्यतीं बध्नंतीम् । जगद्विमोहयंतीम् ॥ २१ ॥ तां वीक्ष्य देवः श्रीरुद्र आत्मानमंतिके स्थितामुमां स्वगणांश्च न वेद । कथंभूतः । इति एवंभूतया कंदुकलीलया या ईषद्व्रीडा तयाऽस्फुटं स्मितं तेन सह विसृष्टो यः कटाक्ष-

श्लथद्दुकूलं कबरीं च विच्युतां सन्नह्यतीं वामकरेण वल्गुना ॥ विनिघ्नतीमन्यकरेण कंदुकं विमोहयंतीं जगदात्ममायया ॥ २१ ॥ ता वीक्ष्य देव इति कंदुकलीलयेषद्व्रीडास्फुटस्मितविसृष्टकटाक्षमुष्टः ॥ स्त्रीप्रेक्षणप्रतिसमीक्षणविह्वलात्मा नात्मानमंतिक उमां स्वगणांश्च वेद ॥ २२ ॥ तस्याः कराग्रात्स तु कंदुको यदा गतो विदूरं तमनुव्रजत्स्त्रियाः ॥ वासः ससूत्रं लघु मारुतोऽहरद्भवस्य देवस्य किलानुपश्यतः ॥ २३ ॥ एवं तां रुचिरापांगीं दर्शनीयां मनोरमाम् ॥ दृष्ट्वा तस्यां मनश्चक्रे विषज्जंत्यां भवः किल ॥ २४ ॥ तयाऽपहृतविज्ञानस्तत्कृतस्मरविह्वलः ॥ भवान्या अपि पश्यंत्या गतह्रीस्तत्पदं ययौ ॥२५॥ सा तमायांतमालोक्य विवस्त्रा व्रीडिता भृशम् ॥ निलीयमाना वृक्षेषु हसंती नान्वतिष्ठत ॥२६॥ तामन्वगच्छद्भगवान्भवः प्रमुषितेंद्रियः ॥ कामस्य च वशं नीतः करेणुमिव यूथपः ॥ २७॥

स्तेन मुष्टो वंचितः अतएव स्वयं यत् स्त्रियाः प्रेक्षणं तया च प्रतिसमीक्षणं ताभ्यां विह्वल आत्मा मनो यस्य ॥ २२॥ तं कंदुकमनुव्रजंत्याः स्त्रियाः । लघु सूक्ष्मं वासः । ससूत्रं कांचीसहितम् ॥ २३ ॥ विषज्जंत्यां कुंचितकटाक्षैरात्मानं निरीक्षमाणायाम् ॥ २४ ॥ तत्पदं तस्याः समीपं ययौ ॥ २५ ॥ २६ ॥ २७ ॥

तेव्हां तो महादेव निरंतर पहात असतां, त्या कंदुकाच्या मागोमाग जात असणाऱ्या त्या स्त्रीचें सूक्ष्म वस्त्र कमरपट्ट्यासहवर्तमान वायूनें हरण केलें ॥ २३ ॥ याप्रमाणें नग्न झालेल्या, पाहण्यास योग्य, सुंदर नेत्रकटाक्षानीं युक्त, मनोरम व आकुंचित केलेल्या कटाक्षांनीं महादेवाला आपली आसक्ति दर्शविणाऱ्या त्या स्त्रीला पाहतांच त्या महादेवानें तिचेठिकाणीं आपलें मन आसक्त केलें ॥ २४ ॥ तेव्हां तिनें स्वतः उत्पन्न केलेल्या मदनानें त्या महादेवाला विव्हल करून त्याचें भान हरण केलें असतां तो महादेव, भवानीदेवी पहात असतांहि (तिच्यासमक्ष) निर्लज्ज होऊन त्या स्त्रीच्या समीप जावयास निघाला ॥ २५ ॥ ती स्त्री, तो महादेव आपल्याकडे येत आहे असें ॥ ३२ ॥
पाहून वस्त्ररहित असल्यामुळें अत्यंत लज्जित होऊन एकठिकाणीं उभी न राहतां हंसत हंसत वृक्षांमध्यें लपूं लागली ॥ २६ ॥ त्याकालीं आकृष्टचित्त व कामाच्या स्वाधीन झालेला तो भगवान् महादेव, जसा कामातुर झालेला गजेंद्र हत्तिणीच्या मागोमाग धाऊं लागतो त्याप्रमाणें तिच्या मागोमाग धांवूं लागला ॥ २७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नंतर त्या महादेवानें, मोठ्या वेगानें तिच्या मागोमाग धांवत जाऊन, आलिंगनादिकांची इच्छा न करणाऱ्याहि त्या स्त्रीला केशबंधाचेठिकाणीं धरून आपल्यासमीप आकर्षण केलें आणि बाहूंनीं तिला दृढ आलिंगन दिलें ॥ २८ ॥ याप्रमाणें जसा हत्ती हत्तिणीला आलिंगन देतो त्याप्रमाणें भगवान् महादेवांनें त्या स्त्रीला बलात्कारानें आलिंगन दिलें असतां, तिचे केंस अस्ताव्यस्त होऊन ती इकडेतिकडे चळवळ करूं लागली ॥ २९ ॥ आणि हे राजा, स्थूलनितंबानें युक्त अशी ती देवनिर्मित माया, सुरश्रेष्ठ महादेवाच्या भुजांमधून आपणाला सोडवून घेऊन पलायन करूं लागली ॥ ३० ॥ त्याकालीं हा रुद्र, कामरूप शत्रूनें जिंकिल्यासारखा अगदीं परवश होऊन, अद्भुत लीला धारण करणाऱ्या त्याविष्णूच्या मागून धाऊं लागला ॥ ३१ ॥ ऋतुसमयीं गर्भधारणाची वेळ प्राप्त झालेल्या गाईच्या मागोमाग धांवत असलेल्या मदोन्मत्त वृषभाचा जसा रेतःस्राव होतो त्याप्रमाणें त्या स्त्रीच्या मागोमाग धांवत असलेल्या अमोघरेत्या शंकराचा वीर्यपात होऊं लागला ॥ ३२ ॥ आणि हे भूपते, पृथ्वीवर जेथें

॥ २८ ॥ २९ ॥ अंग हे राजन् ॥ ३० ॥ ३१ ॥ ३२ ॥ ३३ ॥ एवं तामनुधावन् हरः सरित्सरस्सु शैलादिषु च सन्निहितो बभूव ॥ ३४ ॥

सोऽनुव्रज्यातिवेगेन गृहीत्वाऽनिच्छतीं स्त्रियम् ॥ केशबंध उपानीय बाहुभ्यां परिषस्वजे ॥ २८ ॥ सोपगूढा भगवता करिणा करिणी यथा ॥ इतस्ततः प्रसर्पंती विप्रकीर्णशिरोरुहा ॥ २९ ॥ आत्मानं मोचयित्वांग सुरर्षभभुजांतरात् ॥ प्राद्रवत्सा पृथुश्रोणी माया देवविनिर्मिता ॥ ३० ॥ तस्यासौ पदवीं रुद्रो विष्णोरद्भुतकर्मणः ॥ प्रत्यपद्यत कामेन वैरिणेव विनिर्जितः ॥ ३१ ॥ तस्यानुधावतो रेतश्चस्कंदामोघरेतसः ॥ शुष्मिणो यूथपस्येव वासितामनुधावतः ॥ ३२ ॥ यत्र यत्रापतन्मह्यां रेतस्तस्य महात्मनः ॥ तानि रूप्यस्य हेम्नश्च क्षेत्राण्यासन्महीपते ॥ ३३ ॥ सरित्सरस्सु शैलेषु वनेषूपवनेषु च ॥ यत्र क्व चासन्नृषयस्तत्र सन्निहितो हरः ॥ ३४ ॥ स्कन्ने रेतसि सोऽपश्यदात्मानं देवमायया ॥ जडीकृतं नृपश्रेष्ठ स न्यवर्तत कश्मलात् ॥ ३५ ॥ अथावगतमाहात्म्य आत्मनो जगदात्मनः ॥ अपरिज्ञेयवीर्यस्य न मेने तदु हाद्भुतम् ॥ ३६ ॥ तमविक्लवमव्रीडमालक्ष्य मधुसूदनः ॥ उवाच परमप्रीतो बिभ्रत्स्वां पौरुषीं तनुम् ॥ ३७ ॥

॥ ३५ ॥ तदु ह देवमायया जडीकरणम् ॥ ३६ ॥ ३७ ॥

जेथें त्या महात्म्या शंकराचें वीर्य पतन पावलें होतें तीं तीं रुप्याचीं व सोन्याचीं क्षेत्रें (खाणी) झालीं ॥ ३३ ॥ आणि तिच्या मार्गे धांवतांधांवतां नद्या, सरोवरें, पर्वत, वनें, उपवनें आणि ज्या ज्या स्थानांचेठिकाणीं ऋषि वास करीत होते तेथें तो महादेव, मोहिनीस्त्रीच्या बरोबर जाऊन सांनिध्य पावला, ह्मणजे तीं तीं क्षेत्रें भक्तांना महादेवाचा त्वरित साक्षात्कार होण्याचीं स्थळें झालीं ॥ ३४ ॥ असो. हे नृपश्रेष्ठा, रेतस्खलन झालें असतां त्या महादेवानें देवाच्या (विष्णूच्या) मायेनें आपणाला अगदीं जड करून टाकिलें आहे असें जाणिलें ह्मणजे मोहिनीदर्शनापासूनच जड झालेल्या आपणास त्यावेळीं तसें जाणिलें आणि नंतर तो शंकर मोहापासून निवृत्त झाला ॥ ३५ ॥ नंतर अपरिमित योगमायासामर्थ्यानें युक्त अशा जगदात्म्या श्रीहरीचें व आपलें मूळचें माहात्म्य जाणून, त्यानें देवमायेनें आपणास जें जड करून टाकिलें होतें तें आश्चर्य असें मानिलें नाहीं ॥ ३६ ॥ त्याकालीं व्याकुळता व लज्जा ह्यांनीं रहित अशा त्या शंकराला पाहून, अत्यंत संतुष्ट झालेल्या त्या मधुसूदन भगवं-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तानें आपलें पुरुषस्वरूप धारण करून असें भाषण केलें कीं, ॥ ३७ ॥ श्रीभगवान् ह्मणालाः— हे सुरश्रेष्ठा, माझ्या स्त्रीरूप मायेच्या योगानें, तूं अगदीं यथेष्ठ मोहित झालेला असूनहि स्वतःच पुनरपि आपल्या स्थितीला प्राप्त झालास हें फार उत्तम झालें ॥ ३८ ॥ कारण, नानाप्रकारचे विषय उत्पन्न करणाऱ्या व अजितेंद्रिय पुरुषांना दुस्तर अशा ह्या माझ्या मायेला तुजवांचून दुसरा कोण वरें विषयासक्त पुरुष तरून जाणार आहे? कोणीच जाणार नाहीं ॥ ३९ ॥ तस्मात्, गुणविभागानें सृष्ट्यादिप्रवर्तक अशा मज कालरूपी परमेश्वराच्या अधीन असलेली ती ही गुणमयी माया, आजपासून तुला कधींच मोहित करण्यास समर्थ होणार नाहीं ॥ ४० ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला— हे राजा, ह्याप्रमाणें श्रीवत्सलांछन भगवंतानें सत्कार केला असतां तो महादेव त्याचा निरोप घेऊन व त्याला प्रदक्षिणा करून, आपल्या गणांसहवर्तमान स्वस्थानाप्रत निघून गेला ॥ ४१ ॥ हे भरतकुलोत्पन्ना राजा, तो भगवान् रुद्र, स्वस्थानाप्रत गेल्या नंतर, ऋषिश्रेष्ठ श्रवण करित असतां, आपली अंशभूत माया जी भवानी तिला,

---

स्वां निष्ठां प्रकृतिम् ॥ ३८ ॥ ३९ ॥ कालेन सृष्ट्यादिनिमित्तेन मया कालरूपेण । भागशो रजआद्यंशेन । समेता मदधीना सती ॥ ४० ॥ ४१ ॥ ४२ ॥ ४३ ॥ ४४ ॥

श्रीभगवानुवाच ॥ दिष्ट्या त्वं विबुधश्रेष्ठ स्वां निष्ठामात्मना स्थितः ॥ यन्मे स्त्रीरूपया स्वैरं मोहितोऽप्यंग मायया ॥ ३८ ॥ को नु मेऽतितरेन्मायां विषक्तस्त्वदृते पुमान् ॥ तांस्तान्विसृजतीं भावान्दुस्तरामकृतात्मभिः ॥ ३९ ॥ सेयं गुणमयी माया न त्वामभिभविष्यति ॥ मया समेता कालेन कालरूपेण भागशः ॥ ४० ॥ श्रीशुक उवाच ॥ एवं भगवता राजन् श्रीवत्सांकेन सत्कृतः ॥ आमंत्र्य तं परिक्रम्य सगणः स्वालयं ययौ ॥ ४१ ॥ आत्मांशभूतां तां मायां भवानीं भगवान्भवः ॥ शंसतामृषिमुख्यानां प्रीत्याऽऽचष्टाथ भारत ॥ ४२ ॥ अपि व्यपश्यस्त्वमजस्य मायां परस्य पुंसः परदेवतायाः ॥ अहं कलानामृषभो विमुह्ये यया वशोऽन्ये किमुतास्वतंत्राः ॥ ४३ ॥ यं मामपृच्छस्त्वमुपेत्य योगात्समासहस्रांत उपारतं वै ॥ स एष साक्षात्पुरुषः पुराणो न यत्र कालो विशते न वेदः ॥ ४४ ॥ श्रीशुक उवाच ॥ इति तेऽभिहितस्तात विक्रमः शार्ङ्गधन्वनः ॥ सिंधोर्निर्मथने येन धृतः पृष्ठे महाचलः ॥ ४५ ॥ एतन्मुहुः कीर्तयतोऽनुशृण्वतो न रिष्यते जातु समुद्यमः क्वचित् ॥ यदुत्तमश्लोकगुणानुवर्णनं समस्तसंसारपरिश्रमापहम् ॥ ४६ ॥

अष्टाध्यायार्थनिगमनम् । इतीति ॥ ४५ ॥ एतत्कीर्तनादौ फलमाह । एतदिति ॥ ४६ ॥

नीतिपूर्वक भगवन्मायेचें प्राबल्य वर्णन करीत असें ह्मणाला कीं,— ॥ ४२ ॥ हे देवि, जन्मादिविकारशून्य अशा परमात्म्या पुरुषोत्तमाची माया तूं विशेषेंकरून अवलोकन केलीस ना? ज्या मायेच्या योगानें भगवंताच्या अंशावतारांमध्यें श्रेष्ठ असा मी रुद्रहि, केवळ परवश होऊन मोह पावलों. मग इंद्रियादिकांच्या स्वाधीन असलेले दुसरे लोक मोह पावतील हें काय सांगावें! ४३ ॥ असो. हे पार्वति, पूर्वीं सहस्र संवत्सरांच्या अंतीं समाधीपासून निवृत्त झालेल्या माझ्याजवळ तूं येऊन ‘ तूं परमेश्वर असून कोणाचें ध्यान करितोस असें ’ ज्याविषयीं मला विचारिलें होतेंस व ज्याचेठिकाणीं कालाचा अथवा वेदाचा प्रवेश होत नाहीं, तोच हा खरोखर साक्षात् पुराणपुरुष होय ॥ ४४ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला— बा परीक्षित् राजा, ह्याप्रमाणें समुद्रमंथनसमयीं ज्यानें आपल्या पृष्ठभागाचेठिकाणीं मंदरनामक महापर्वत धारण केला आहे, त्या शार्ङ्गधन्व्या भगवंताचा समुद्रमंथनादिरूप पराक्रम तुला मी सांगितला आहे ॥ ४५ ॥ हे राजा, जो पुरुष ह्या आख्यानाचें वारंवार श्रवण अथवा कीर्तन करितो त्याचा चांगला प्रयत्न कधींहि निष्फळ होत नाहीं. कारण, श्रेष्ठकीर्ति परमेश्वराच्या गुणांचें वर्णन संसारसंबंधीं सर्वहि परिश्रमांना दूर करणारें आहे ॥ ४६ ॥

CC-0. In Public Domain,Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां भगवंतानें केलेल्या आपल्या भक्तांच्या पक्षपाताचें स्मरण करीत श्रीशुकाचार्य भगवंताला नमस्कार करितो कीं,—ज्या भगवंतानें आपल्या मायेनें स्त्रीवेष धारण करून दैत्यांना मोहित करीत करीत दुर्जनांना दुर्ज्ञेय व भक्तीनें सम जण्यास योग्य अशा आपल्या चरणाप्रत शरण आलेल्या देवश्रेष्ठांना, समुद्रमंथनापासून उत्पन्न झालेलें अमृत पाजिलें आहे आणि जो शरणागतांच्या कामना परिपूर्ण करितो त्यापरमात्म्याला मी नमस्कार करितों ॥ ४७ ॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील अष्टमस्कंधापैकीं अमृताख्यानसंबंधीं शंकरमोहननामक हा बारावा अध्याय समाप्त झाला ॥ १२ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या तेराव्या अध्यायामध्यें सातव्यापासून चवदापर्यंत पुढच्या सर्व मन्वंतराचें, मनु मनुपुत्र इत्यादिक सहा प्रकारच्या भेदांसहवर्तमान अनुक्रमानें वेगवेगळें वर्णन केलें आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणालाः—

भगवता कृतं भक्तपक्षपातं स्मरन्नमस्करोति । असतामविषयम् । भावो भजनं तेन गम्यमंघ्रिं प्रपन्नान् शरणागतान्सिंधुमथ्यं सिंधोर्मथनेन जातममृतं य आशयदभोजयत् ॥ ४७ ॥ इति श्रीमद्भागवतेऽष्टमस्कंधे टीकायां द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥ ॥ त्रयोदशे तु वर्ण्यंते सप्तमादीन्यनुक्रमात् ॥ मन्वंतराणि सर्वांणि षड्विधानि पृथक्पृथक् ॥ १ ॥

असदविषयमंघ्रिं भावगम्यं प्रपन्नानमृतममरवर्यानाशयत्सिंधुमथ्यम् ॥ कपटयुवतिवेषो मोहयन्यः सुरारींस्तमहमुपसृतानां कामपूरं नतोऽस्मि ॥ ४७ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टमस्कंधे शंकरमोहनं नाम द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ मनुर्विवस्वतः पुत्रः श्राद्धदेव इति श्रुतः ॥ सप्तमो वर्तमानो यस्तदपत्यानि मे शृणु ॥ १ ॥ इक्ष्वाकुर्नभगश्चैव धृष्टः शर्यातिरेव च ॥ नरिष्यंतोऽथ नाभागः सप्तमो दिष्ट उच्यते ॥ २ ॥ करूषश्च पृषध्रश्च दशमो वसुमान्स्मृतः ॥ मनोर्वैवस्वतस्यैते दश पुत्राः परंतप ॥ ३ ॥ आदित्या वसवो रुद्रा विश्वेदेवा मरुद्गणाः ॥ अश्विनावृभवो राजन्निंद्रस्तेषां पुरंदरः ॥ ४ ॥ कश्यपोऽत्रिर्वसिष्ठश्च विश्वामित्रोऽथ गौतमः ॥ जमदग्निर्भरद्वाज इति सप्तर्षयः स्मृताः ॥ ५ ॥ अत्रापि भगवज्जन्म कश्यपाददितेरभूत् ॥ आदित्यानामवरजो विष्णुर्वामनरूपधृक् ॥ ६ ॥ संक्षेपतो मयोक्तानि सप्त मन्वंतराणि ते ॥ भविष्याण्यथ वक्ष्यामि विष्णोः शक्त्याऽन्वितानि च ॥ ७ ॥

सप्तमादिमन्वंतराण्याह । मनुरित्यादिना यावदध्यायसमाप्ति ॥ १ ॥ २ ॥ ३ ॥ आदित्यादयो देवाइत्यन्वयः ॥ ४ ॥ ५ ॥ भगवतो जन्म अवतारः । त मेवाह । आदित्यानां विवस्वानर्यमापूषेत्याद्युक्तानां मध्ये अवरं जन्म यस्य सः ॥ ६ ॥ शक्त्याऽवतारेणान्वितानि ॥ ७ ॥

हे परीक्षित् राजा, विवस्वानाचा (सूर्याचा) श्राद्धदेव ह्मणून प्रसिद्ध असलेला जो पुत्र तो हल्लीं चालू असलेल्या सातव्या मन्वंतरांतील मनु होय. आतां त्याचीं अपत्यें तूं मजपासून श्रवण कर ॥ १ ॥ हे शत्रुतापना, इक्ष्वाकु, नभग, धृष्ट, शर्याति, नरिष्यंत व नाभाग हे सहा आणि दिष्ट हा त्याचा सातवा पुत्र असें ह्मटलें आहे ॥ २ ॥ तसेच करूष आणि पृषध्र हे दोन आणि दहावा वसुमान् मिळून वैवस्वत मनूचे हे दहा पुत्र होत. हे परंतपा राजा, द्वादशादित्य, अष्टवसु, एकादश रुद्र, विश्वेदेव, मरुद्गण, अश्विनीकुमार आणि ऋभुगण हे ह्या मन्वंतरांतील देव असून पुरंदर नामक त्यांचा इंद्र आहे ॥ ३ ॥ ४ ॥ तसेच कश्यप, अत्रि, वसिष्ठ, विश्वामित्र, गौतम, जमदग्नि आणि भरद्वाज हे ह्या मन्वंतरांत सप्तर्षि सांगितले आहेत ॥ ५ ॥ या मन्वंतरामध्येंहि कश्यपापासून अदितीचेठिकाणीं द्वादशादित्यामध्यें कनिष्ठ असा जो वामनरूप धारण करणारा विष्णु तोच भगवंताचा अवतार झाला ॥ ६ ॥ असो, ह्याप्रमाणें सात मन्वंतरें मीं तुला संक्षेपानें सांगितलीं आहेत. आतां विष्णूच्या अवता-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रानें युक्त अशीं पुढें येणारीं मन्वंतरेंहि मी कथन करितों ॥ ७ ॥ आतां अष्टम मन्वंतर कथन करण्याच्या अभिप्रायानें श्रीशुकाचार्य प्रथमतः प्रस्ताव कथा सांगतात कीं,— हे राजेंद्रा, विवस्वान्नामक सूर्याच्या संज्ञा आणि छाया या नांवांच्या दोन स्त्रिया होत्या, त्या दोघीहि विश्वकर्म्याच्या कन्या होत, त्या मी तुला पूर्वीं षष्ठस्कंधामध्यें सांगितल्या आहेत ॥ ८ ॥ त्या विवस्वानाचीच तिसरी वडवा ह्मणून एक भार्या होती असें कोणी ह्मणतात; परंतु मला संज्ञा हीच वडवा असें वाटतें, असो. ह्या तिघींपैकीं यम, यमुना व श्राद्धदेव मनु हीं तीन संज्ञेचीं अपत्यें होत. आतां छायेचीं अपत्यें श्रवण कर ॥ ९ ॥ सावर्णिनामक पुत्र, जी पुढें संवरणऋषीची भार्या झाली ती तपती नांवाची कन्या आणि तिसरा शनैश्चर हीं तीन छायेचीं अपत्यें होत. अश्विनीकुमार हे वडवेचे पुत्र होत ॥ १० ॥ असो. हे राजा, आठवें मन्वंतर प्राप्त झालें असतां सावर्णि हा मनु होईल व निर्मोक आणि विरजस्क इत्यादिक त्या सावर्णीचे पुत्र होतील ॥ ११ ॥ तसेच त्या मन्वंतरामध्यें सुतपस्, विरज व अमृतप्रभ हे देव होतील.

अष्टमं मनुं वक्तुं कथामाह । विवस्वत इति त्रिभिः ॥ ८ ॥ एके वडवां तृतीयामाहुः। मम तु संज्ञैव वडवेति मतम् । तदुक्तं षष्ठे । सैव भूत्वाऽथ वडवा नासत्यौ सुषुवे भुवीति ।

विवस्वतश्च द्वे जाये विश्वकर्मसुते उभे ॥ संज्ञा छाया च राजेंद्र ये प्रागभिहिते तव ॥ ८ ॥ तृतीयां वडवामेके तासां संज्ञा सुतास्त्र-
यः ॥ यमो यमी श्राद्धदेवश्छायायाश्च सुतान् शृणु ॥ ९ ॥ सावर्णिस्तपती कन्या भार्या संवरणस्य या ॥ शनैश्चरस्तृतीयोऽभूद-
श्विनौ वडवात्मजौ ॥ १० ॥ अष्टमेंऽतर आयाते सावर्णिर्भविता मनुः ॥ निर्मोकविरजस्काद्याः सावर्णितनया नृप ॥ ११ ॥ तत्र
देवाः सुतपसो विरजा अमृतप्रभाः ॥ तेषां विरोचनसुतो बलिरिंद्रो भविष्यति ॥ १२ ॥ दत्त्वेमां याचमानाय विष्णवे यः पद-
त्रयम् ॥ राद्धमिंद्रपदं हित्वा ततः सिद्धिमवाप्स्यति ॥ १३ ॥ योऽसौ भगवता बद्धः प्रीतेन सुतले पुनः ॥ निवेशितोऽधिके स्व-
र्गादधुनाऽऽस्ते स्वराडिव ॥ १४ ॥ गालवो दीप्तिमान्रामो द्रोणपुत्रः कृपस्तथा ॥ ऋष्यशृंगः पिताऽस्माकं भगवान्बादरायणः ॥ १५ ॥
इमे सप्तर्षयस्तत्र भविष्यंति स्वयोगतः ॥ इदानीमासते राजन्स्वे स्वे आश्रममंडले ॥ १६ ॥ देवगुह्यां सरस्वत्यां सार्वभौम इति प्रभुः ॥
स्थानं पुरंदराद्धृत्वा बलये दास्यतीश्वरः ॥ १७ ॥ नवमो दक्षसावर्णिर्मनुर्वरुणसंभवः ॥ भूतकेतुर्दीप्तिकेतुरित्याद्यास्तत्सुता नृप ॥ १८ ॥

यमश्च यमी च यमुना श्राद्धदेवश्चेति त्रयः सुताः ॥ ९ ॥ सावर्णिः पुत्रः ॥ १० ॥ ११ ॥ १२ ॥ पदत्रयं याचमानायेमां सर्वां महीं सप्तमे मन्वंतरे दत्त्वाऽष्टमे मन्वंतरे विष्णोः प्रसादेन च राद्धं लब्धमिंद्रपदं हित्वेत्यर्थः ॥ १३ ॥ १४ ॥ रामः परशुरामः द्रोणपुत्रोऽश्वत्थामा ॥ १५ ॥ इदानीं तु स्वयोगत आसते ॥ १६ ॥ १७ ॥ १८ ॥

आणि ज्यानें ह्या सप्तमन्वंतरांत त्रिपाद भूमीची याचना करणाऱ्या विष्णूला, ही संपूर्ण पृथ्वी अर्पण केली आहे व जो पूर्वीं भगवंतानें बद्ध केला असूनहि नंतर प्रसन्न होऊन स्वर्गापेक्षांहि अधिक सुखकारक अशा सुतलामध्यें स्थापन केला असल्यामुळें, सांप्रत कालींहि त्याठिकाणीं इंद्राप्रमाणें ऐश्वर्याचा उपभोग घेत आहे, तो विरोचनपुत्र बलि इंद्र होईल व नंतर तो विष्णूच्या प्रसादानें प्राप्त झालेल्या त्या इंद्रपदाचा त्याग करून मोक्षसिद्धीला पावेल ॥ १२ ॥ १३ ॥ १४ ॥ त्या मन्वंतरामध्यें गालव, दीप्तिमान्, परशुराम, अश्वत्थामा, कृपाचार्य, ऋष्यशृंग व आमचा पिता भगवान् वेदव्यास हे सप्तर्षि होतील. हे राजा; सांप्रतकालीं ते ऋषि योगप्रभावानें आपापल्या आश्रममंडलामध्यें वास करीत आहेत ॥ १५ ॥ १६ ॥ त्या मन्वंतरामध्यें ईश्वर प्रभु, देवगुह्यनामक ब्राह्मणाच्या सरस्वतीनामक स्त्रीचेठिकाणीं सार्वभौम ह्या नांवानें अवतार धारण करून, सांप्रतच्या पुरंदरनामक इंद्रापासून इंद्रपद हरण करून बलीला देईल ॥ १७ ॥ नंतर हे राजा, दक्षसावर्णिनामक वरुणाचा पुत्र नववा मनु होईल आणि भूतकेतु ॥ ३४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

व दीप्तकेतु इत्यादिकांचे पुत्र होतील ॥ १८ ॥ तसेंच त्या मन्वंतरामध्यें पार व मरीचिगर्भ इत्यादिक देव होतील, अद्भुत नांवानें प्रसिद्ध असा इंद्र होईल आणि द्युतिमत्प्रभृति ह्मणजे द्युतिमान्, सवन, हव्य, वसु, मेधातिथि, ज्योतिष्मान् व सत्य हे त्या कालीं सप्तर्षि होतील ॥ १९ ॥ आणि आयुष्मान्नामक पित्यापासून अंबुधारानामक मातेचेठिकाणीं ऋषभ नांवानें भगवान् अवतीर्ण होईल व त्यानें वश केलेल्या त्रैलोक्याचा, अद्भुतनामक इंद्र उपभोग घेईल ॥ २० ॥ नंतर गुणांनीं मोठा असा उपश्लोकाचा पुत्र ब्रह्मसावर्णि हा दहावा मनु होईल, त्याचे पुत्र भूरिषेणादिक होतील व हविष्मान् ज्यामध्यें प्रमुख आहे असे ऋषि होतील ॥ २१ ॥ आतां हविष्मत्प्रमुख ह्मणून सांगितलेल्या ऋषींपैकीं कांहीं ऋषींचीं नांवें सांगतों. हेराजा, हविष्मान् , सुकृति, सत्य, जय व मूर्ति हे तेव्हां ऋषि होतील. सुवासन आणि विरुद्ध इत्यादिक देव होतील व शंभु नामक इंद्र होईल ॥ २२ ॥ आणि विश्वस्रष्ट्याच्या घरीं विषूचीनामक स्त्रीचेठिकाणीं समर्थ भगवान्, विष्वक्सेन ह्या नांवानें आपला अंशावतार धारण करून शंभुना-

अद्भुत इंद्रः ॥ १९ ॥ २० ॥ २१ ॥ हविष्मत्प्रमुखा इत्युक्तानामेव केषांचिन्नामान्याह । हविष्मानिति ॥ २२ ॥ विषूच्यां जातः सन् ॥ २३ ॥ एकादशम इत्यादिरार्षः

पारा मरीचिगर्भाद्या देवा इंद्रोऽद्भुतः स्मृतः ॥ द्युतिमत्प्रमुखास्तत्र भविष्यंत्यृषयस्ततः ॥ १९ ॥ आयुष्मतोंऽबुधारायामृषभो भगवत्कला ॥ भविता येन संराद्धां त्रिलोकीं भोक्ष्यतेऽद्भुतः ॥ २० ॥ दशमो ब्रह्मसावर्णिरुपश्लोकसुतो महान् ॥ तत्सुता भूरिषेणाद्या हविष्मत्प्रमुखा द्विजाः ॥ २१ ॥ हविष्मान्सुकृतिः सत्यो जयो मूर्तिस्तदा द्विजाः ॥ सुवासनविरुद्धाद्या देवाः शंभुः सुरेश्वरः ॥ २२ ॥ विष्वक्सेनो विषूच्यां तु शंभोः सख्यं करिष्यति ॥ जातः स्वांशेन भगवान्गृहे विश्वसृजो विभुः ॥ २३ ॥ मनुर्वै धर्मसावर्णिरेकादशम आत्मवान् ॥ अनागतास्तत्सुताश्च सत्यधर्मादयो दश ॥ २४ ॥ विहंगमाः कामगमा निर्वाणरुचयः सुराः ॥ इंद्रश्च वैधृतस्तेषामृषयश्चारुणादयः ॥ २५ ॥ आर्यकस्य सुतस्तत्र धर्मसेतुरिति स्मृतः ॥ वैधृतायां हरेरंशस्त्रिलोकीं धारयिष्यति ॥ २६ ॥ भविता रुद्रसावर्णी राजन्द्वादशमो मनुः ॥ देववानुपदेवश्च देवश्रेष्ठादयः सुताः ॥ २७ ॥ ऋतधामा च तत्रेंद्रो देवाश्च हरितादयः ॥ ऋषयश्च तपोमूर्तिस्तपस्व्याग्नीध्रकादयः ॥ २८ ॥ स्वधामाख्यो हरेरंशः साधयिष्यति तन्मनोः ॥ अंतरं सत्यसहसः सूनृतायाः सुतो विभुः ॥ २९ ॥ मनुस्त्रयोदशो भाव्यो देवसावर्णिरात्मवान् ॥ चित्रसेनविचित्राद्या देवसावर्णिदेहजाः ॥ ३० ॥

॥ २४ ॥ २५ ॥ २६ ॥ २७ ॥ २८ ॥ तस्य मनोरंतरं साधयिष्यति । सत्यसहसः सूनृतायाश्च सुतः सन् ॥ २९ ॥ ३० ॥

मक इंद्राचें सहाय्य करील ॥ २३ ॥ नंतर जितेंद्रिय असा धर्मसावर्णिनामक अकरावा मनु होईल व सत्यधर्म इत्यादिक त्याचे दहा पुत्र होतील ॥ २४ ॥ तसेच विहंगम, कामगम व निर्वाणरुचि हे त्या मन्वंतरामध्यें देव होतील. आणि त्यांचा वैधृतनामक इंद्र होईल आणि अरुणप्रभृति ह्मणजे अरुण, हविष्मान् , वपुष्मान्, अनघ उरुधिष्ण्य, निश्चर व अग्नितेजा हे सप्तर्षि होतील ॥ २५ ॥ आणि त्या मन्वंतरामध्यें आर्यकनामक पित्यापासून वैधृतानामक मातेचेठिकाणीं धर्मसेतु ह्या नांवानें प्रसिद्ध असा श्रीहरि अवतीर्ण होऊन त्रैलोक्याचें पोषण करील ॥ २६ ॥ नंतर हे राजा, रुद्रसावर्णि हा बारावा मनु होईल आणि देववान्, उपदेव व देवश्रेष्ठ इत्यादिक त्याचे पुत्र होतील ॥ २७ ॥ आणि त्या मन्वंतरामध्यें ऋतधामानामक इंद्र होईल, हरितादिक देव होतील आणि तपोमूर्ति, तपस्वी व आग्नीध्रक इत्यादि सप्तर्षि होतील ॥ २८ ॥ आणि तेथें सत्यसहस् ऋषीच्या सूनृता भार्येचेठिकाणीं स्वधामानामक श्रीहरीचा अवतार होऊन त्या मन्वंतराचें परिपालन करील ॥ २९ ॥ नंतर जितेंद्रिय असा देव-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सावर्णिनामक तेरावा मनु होईल आणि चित्रसेन व विचित्र इत्यादिक देवसावर्णिचे पुत्र होतील ॥ ३० ॥ तसेच सुकर्मा व सुत्रामा ह्या नांवांचे देव होतील, दिवस्पतिनामक इंद्र होईल आणि निर्मोक, तत्त्वदर्शी, निष्कंप, निरुत्सुक, धृतिमान्, अव्यय व सुतपा हे त्याकाळीं सप्तर्षि होतील ॥ ३१ ॥ आणि दिवस्पतिनामक इंद्राला त्रैलोक्याचें राज्य प्राप्त करून देणारा बृहतीनामक मातेचेठिकाणीं देवहोत्राचा पुत्र योगेश्वरनामक उत्पन्न होईल ॥ ३२ ॥ आणि नंतर इंद्रसावर्णि ह्मणून चवदावा मनु होईल आणि उरु, गंभीरबुद्धि इत्यादिक त्या इंद्रसावर्णीचे पुत्र होतील ॥ ३३ ॥ तसेच पवित्र व चाक्षुष ह्या नांवाचे देव होतील, शुचि ह्या नांवाचा इंद्र होईल व अग्निबाहु, शुचि, शुद्ध आणि मागधवगैरे सप्तर्षि होतील ॥ ३४ ॥ हे महाराजा, त्या मन्वंतरामध्यें वितानानामक मातेचेठिकाणीं सत्रायणाच्या पुत्ररूपानें अवतीर्ण झालेला बृहद्भानुनामक श्रीहरि, कर्मसंततींचा विस्तार करील ॥ ३५ ॥ हे राजा, याप्रमाणें भूत, भविष्य व वर्तमान अशा तिन्हीकाळीं होणारीं हीं चवदा मन्वंतरें मी तुला कथन केलीं आहेत. ह्या

॥ ३१॥ दिवस्पतेरिंद्रस्योपहर्ता संपादकः संभविष्यति ॥ ३२ ॥ ३३ ॥ ३४ ॥ क्रियातंतून् कर्मसंततीः वितायिता विस्तारयिष्यति ॥ ३५ ॥ युगसाहस्रेण पर्ययः परिवर्तो

देवाः सुकर्मसुत्रामसंज्ञा इंद्रो दिवस्पतिः ॥ निर्मोकतत्त्वदर्शाद्या भविष्यंत्यृषयस्तदा ॥ ३१ ॥ देवहोत्रस्य तनय उपहर्ता दिवस्पतेः ॥ योगेश्वरो हरेरंशो बृहत्यां संभविष्यति ॥ ३२ ॥ मनुर्वा इंद्रसावर्णिश्चतुर्दशम एष्यति ॥ उरुगंभीरबुद्ध्याद्या इंद्रसावर्णिवीर्यजाः ॥ ३३ ॥ पवित्राश्चाक्षुषा देवाः शुचिरिंद्रो भविष्यति ॥ अग्निबाहुः शुचिः शुद्धो मागधाद्यास्तपस्विनः ॥ ३४ ॥ सत्रायणस्य तनयो बृहद्भानुस्तदा हरिः ॥ वितानायां महाराज क्रियातंतून्वितायिता ॥ ३५ ॥ राजंश्चतुर्दशैतानि त्रिकालानुगतानि ते ॥ प्रोक्तान्येभिर्मितः कल्पो युगसाहस्रपर्ययः ॥ ३६ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे अष्टमस्कंधे मन्वंतरानुवर्णनं नाम त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥ ॥ राजोवाच ॥ मन्वंतरेषु भगवन्यथा मन्वादयस्त्विमे ॥ यस्मिन्कर्मणि ये येन नियुक्तास्तद्वदस्व मे ॥ १ ॥ ऋषिरुवाच ॥ मनवो मनुपुत्राश्च मुनयश्च महीपते ॥ इंद्राः सुरगणाश्चैव सर्वे पुरुषशासनाः ॥ २ ॥ यज्ञादयो याः कथिताः पौरुष्यस्तनवो नृप ॥ मन्वादयो जगद्यात्रां नयंत्याभिः प्रचोदिताः ॥ ३ ॥

यस्य । युगसहस्रप्रमाण इत्यर्थः ॥ ३६ ॥ इति श्रीमद्भागवतेऽष्टमस्कंधे टीकायां त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥ ॥ चतुर्दशे तु सर्वेषां मन्वादीनां यथायथम् ॥ पृथक्कर्माणि वर्ण्यंते भगवद्वशवर्तिनाम् ॥ १ ॥ १ ॥ पुरुषेणेश्वरेण यज्ञाद्यवतारैः शास्यंते नियुज्यंते इति तथा ॥ २ ॥ तदेवाह । यज्ञादय इति ॥ ३ ॥

चवदाहि मन्वंतरांनीं परिमित झालेला काळ सहस्रयुगप्रमाणाचा होतो त्यालाच कल्प (ब्रह्मदेवाचा एक दिवस) असें ह्मणतात ॥ ३६ ॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील अष्टमस्कंधापैकीं मन्वंतरानुवर्णननामक हा तेरावा अध्याय समाप्त झाला ॥ १३ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या चवदाव्या अध्यायामध्यें भगवंताच्या अधीन असलेल्या मन्वादिक सर्वांचीं निरनिराळीं कर्में यथायोग्यरीतीनें वर्णन केलीं आहेत ॥ १ ॥ राजा ह्मणालाः- हे भगवन्, हे पूर्वीं सांगितलेले सर्व मन्वादिक, प्रत्येक मन्वंतराचेठिकाणीं ज्या कर्मांमध्यें जे ज्यानें जसे योजिले आहेत तें मला वर्णन कर ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला- हे भूपते, मनु, मनुपुत्र, मुनि, इंद्र व देवगण हे सर्वहि भगवंतानें त्यात्या कर्मांचेठिकाणीं योजिलेले आहेत ॥ २ ॥ ह्मणजे हे राजा, परमेश्वराच्या ज्या यज्ञादिक अवतारमूर्ति मी पूर्वीं तुला सांगितल्या

॥ ३५ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आहेत त्यांनीं प्रेरित झालेले मन्वादिक, जगताचा निर्वाह करितात ह्मणजे जगताच्या स्थितीकरितां आपआपलीं कर्मे करितात ॥ ३ ॥ आतां ऋष्यादिकांचीं कर्मे कथन करण्याच्या अभिप्रायानें श्रीशुकाचार्य भाषण करितात कीं,– हे राजा, कालगतीनें लुप्त झालेले वेदांचे समुदाय चारी युगांच्या अंतीं, कृतयुगाच्या प्रारंभीं आपल्या तपोबलानें यथायोग्यरीतीनें ऋषि अवलोकन करितात व वर्णन करितात. मग त्यांपासून लोकामध्यें सनातन धर्माची प्रवृत्ति होत्ये ॥ ४ ॥ नंतर हे राजा, श्रीहरीनें आज्ञा केलेले मनुरूपी राजे, मनोनिग्रह करून आपापल्या मन्वंतररूप कालामध्यें पृथ्वीवर साक्षात् चतुष्पाद धर्माची प्रवृत्ति करितात ॥ ५ ॥ तसेच मनुपुत्र, मन्वंतरसमाप्तीपर्यंत पुत्रपौत्रादिक्रमानें त्या धर्मांचें रक्षण करितात व त्या मन्वंतरामध्यें यज्ञभाग ग्रहण करणारे जे देव सांगितले आहेत तेहि धर्मांचें रक्षण करितात ॥ ६ ॥

ऋष्यादीनां कर्माण्याह। चतुर्युगांत इति चतुर्भिः । यतो येभ्यः श्रुतिगणेभ्यः ॥ ४ ॥ उदिता उक्ताः युक्ताः संयताः संतो महीं धर्मं संचारयंति । मह्यां धर्मं प्रवर्तयंतीत्यर्थः ॥ ५ ॥ प्रजापाला मनुपुत्रास्तं धर्मं पालयंति । यावदंतं यावन्मन्वंतरावसानम् । विभागशः पुत्रपौत्रादिक्रमेण । ये चान्ये द्यावापृथिव्यादयो यत्र कर्मणि भोक्तृत्वेनान्वितास्तैश्च

चतुर्युगांते कालेन ग्रस्तान् श्रुतिगणान्यथा ॥ तपसा ऋषयोऽपश्यन्यतो धर्मः सनातनः ॥ ४ ॥ ततो धर्मं चतुष्पादं मनवो हरिणोदिताः ॥ युक्ताः संचारयंत्यद्धा स्वे स्वे काले महीं नृपाः ॥ ५ ॥ पालयंति प्रजापाला यावदंतं विभागशः ॥ यज्ञभागभुजो देवा ये च तत्रान्विताश्च तैः ॥ ६ ॥ इंद्रो भगवता दत्तां त्रैलोक्यश्रियमूर्जिताम् ॥ भुंजानः पाति लोकांस्त्रीन्कामं लोके प्रवर्षति ॥ ७ ॥ ज्ञानं चानुयुगं ब्रूते हरिः सिद्धस्वरूपधृक् ॥ ऋषिरूपधरः कर्मयोगं योगेशरूपधृक् ॥ ८ ॥ सर्गं प्रजेशरूपेण दस्यून्हन्यात्स्वराड्वपुः ॥ कालरूपेण सर्वेषामभवाय पृथग्गुणः ॥ ९ ॥ स्तूयमानो जनैरेभिर्मायया नामरूपया ॥ विमोहितात्मभिर्नानादर्शनैर्न च दृश्यते ॥ १० ॥

सह ॥ ६ ॥ ७ ॥ प्रसंगाद्रूपांतरैरपि जगद्यात्राप्रवर्तनमाह । ज्ञानमिति द्वाभ्याम् । सिद्धाः सनकादयः । ऋषयो याज्ञवल्क्यादयः । योगेशा दत्तात्रेयादयः तत्तद्रूपः सन् ज्ञानं कर्म च योगं च ब्रूते ॥ ८ ॥ प्रजेशा मरीच्यादयस्तेन रूपेण सर्गं करोतीति शेषः । स्वराड्वपू राजमूर्तिः । सर्वेषामभावाय भवति । पृथग्विधा गुणाः शीतोष्णादयो यस्य ॥ ९ ॥ नामरूपात्मिकया मायया विमोहितात्मभिर्जनैर्नानादर्शनैः शास्त्रैः स्तूयमानो निरूप्यमाणोऽपि नैव दृश्यत इत्यर्थः ॥ १० ॥

आणि भगवंतानें दिलेल्या समृद्ध अशा त्रिभुवनसंबंधीं ऐश्वर्याचा उपभोग घेणारा इंद्र, लोकामध्यें यथेष्ट जलवृष्टि करून त्रैलोक्याचें परिपालन करितो ॥ ७ ॥ आतां प्रसंगोपात्त अन्यरूपांनींहि ईश्वर जगाचा निर्वाह करितो हें सांगण्याकरितां श्रीशुकाचार्य ह्मणतो कीं,– हे राजा, प्रत्येक युगामध्यें श्रीहरि सनकादि सिद्धांचें रूप धारण करून ज्ञानाचा, याज्ञवल्क्यप्रभृति ऋषींचें रूप धारण करून कर्ममार्गाचा, दत्तात्रेयादिक योगेश्वरांच्या रूपानें योगाचा उपदेश करीत असतो ॥ ८ ॥ तसाच मरीचिप्रभृति प्रजाधिपतींच्या रूपानें प्रजोत्पत्ति करितो, राजाच्या रूपानें चोरांचा वध करितो व भिन्नभिन्न प्रकारच्या गुणांनीं युक्त होऊन कालरूपानें तो सर्वांच्या नाशाला कारण होतो ॥ ९ ॥ परंतु, नामरूपात्मक मायेच्या योगानें ज्यांचीं अंतःकरणें मोहित झालीं आहेत असे हे जन, नानाप्रकारच्या शास्त्रांनीं त्याचें निरूपण करीत असतांहि तो

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्यांच्या दृष्टिगोचर होतच नाहीं, ह्मणजे तो अशाच प्रकारचा आहे हें त्यांस समजून येत नाहीं ॥ १० ॥ याप्रमाणें प्रसंगानें प्राप्त झालेल्याचें निरूपण करून, आतां प्रस्तुत कथेचा उपसंहार करितो कीं,– हे राजा, ज्यामध्यें चवदा मन्वंतरें होतात असें पूर्वीचे ज्ञाते ह्मणतात, तें हें अवांतरकल्पाचें प्रमाण मी तुला कथन केलें आहे ॥ ११ ॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील अष्टमस्कंधापैकीं मन्वादिपृथक्कर्मवर्णननामक हा चवदावा अध्याय समाप्त झाला ॥ १४ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां पंधराव्या अध्यायामध्यें शुक्राचार्यादिक ब्राह्मणांनीं बलीकडून विश्वजित्‌नामक याग करविला. नंतर त्यानें स्वर्ग जिंकिला, तेव्हां भयानें देव गुप्तरीतीनें संचार करूं लागले ॥ १ ॥ असो. आतां निग्रहमिषानें जिच्यामध्यें परमेश्वरानें बलीवर मोठा अनुग्रह केला आहे अशी मनोहर वामनावतारलीला यापुढें नऊ अध्यायांनीं वर्णन केलेली आहे ॥ २ ॥ राजा ह्मणालाः– हे भगवन्, श्रीहरीनें स्वतः ईश्वर असूनहि कृपणाप्रमाणें बलीपासून भूमीचीं तीन पावलें कशाकरितां मागितलीं? बरें, त्रैलोक्यग्रहणानें पूर्णमनोरथ झालेल्याहि त्यानें, त्या बलीचें कशाकरितां बंधन केलें? हें आह्मांला मोठें कौतुक वाटत आहे ह्मणून जाणावयाची आह्मी इच्छा करितों.

प्रासंगिकं निरूप्य प्रस्तुतमेवोपसंहरति । एतत्कल्पविकल्पस्यावांतरकल्पस्य ॥ ११ ॥ इति श्रीमद्भागवतेऽष्टमस्कंधे टीकायां चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥ ॥ बलिं पंचदशे विश्वजिताचार्या अयाजयन् ॥ ततोऽसौ स्वर्गमजयद्भयादेवा निलिल्यिरे ॥ १ ॥ अत्रेर्यंते नवाध्याय्या वामं वामनचेष्टितम् ॥ निग्रहच्छलतो यत्र बलेर्भूयाननुग्रहः ॥ २ ॥ ईश्वरः

एतत्कल्पविकल्पस्य प्रमाणं परिकीर्तितम् ॥ यत्र मन्वंतराण्याहुश्चतुर्दश पुराविदः ॥ ११ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे अष्टमस्कंधे चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥ ॥ राजोवाच ॥ बलेः पदत्रयं भूमेः कस्माद्धरिरयाचत ॥ भूतेश्वरः कृपणवल्लब्धार्थोऽपि बबंध तम् ॥ १ ॥ एतद्वेदितुमिच्छामो महत्कौतूहलं हि नः ॥ यज्ञेश्वरस्य पूर्णस्य बंधनं चाप्यनागसः ॥ २ ॥ श्रीशुक उवाच ॥ पराजितश्रीरसुभिश्च हापितो हींद्रेण राजन्भृगुभिः स जीवितः ॥ सर्वात्मना तानभजद्भृगून्बलिः शिष्यो महात्माऽर्थनिवेदनेन ॥ ३ ॥ तं ब्राह्मणा भृगवः प्रीयमाणा अयाजयन्विश्वजिता त्रिणाकम् ॥ जिगीषमाणं विधिनाऽभिषिच्य महाभिषेकेण महानुभावः ॥ ४ ॥

स्वयं कृपणवत्कस्माद्धेतोरयाचत । लब्धार्थो भूत्वाऽपि तं कस्माद्बबंध ॥ १ ॥ २ ॥ तत्र तावद्बलेस्त्रिलोकीमपहर्तुं याच्ञादिच्छलनं कृतवानिति वक्तुं ब्राह्मणाराधनेन बलेरकांड एव स्वर्गविजयक्रममाह। पराजितश्रीरित्यादिना यावदध्यायसमाप्ति । युद्धे पराजिता श्रीर्येन सः । इंद्रेणासुभिश्च त्याजितः सन् । भृगून्भृगोर्वंश्यान् शुक्रादीन् । महात्मा उदारचित्तः । अर्थानां निवेदनेनार्पणेन ॥ ३ ॥ त्रिणाकं स्वर्गं जेतुमिच्छंतं विश्वजिता यागेनायाजयन् महाभिषेकेणैंद्रेण बह्वृचब्राह्मणप्रसिद्धेन ॥ ४ ॥

कारण, यज्ञफलदाता व पूर्णकाम अशा परमेश्वराची याचना व देहादि समर्पणानें निरपराधी असलेल्या बलीचें बंधन ह्या दोन्ही गोष्टी मोठ्या असंभवनीय वाटत आहेत ॥ १ ॥ २ ॥ आतां प्रथमतः बलीपासून त्रैलोक्याचा अपहार करण्याकरितां ईश्वरानें याचनेचेंवगैरे मिष केलें हें सांगण्याकरितां ब्राह्मणपूजनाच्या योगानें बलीचा अकालींच स्वर्गविजय सांगण्याकरितां श्रीशुकाचार्य ह्मणाला कीं,– हे राजा, युद्धांत ज्यानें आपली संपत्ति घालविली होती व इंद्रानें ज्याला मूर्छितहि केलें होतें, त्या बलीला ज्याअर्थीं भृगुवंशांत उत्पन्न झालेल्या शुक्रादिकांनीं जीवंत केला त्याअर्थीं तो उदारचित्त बलि त्यांचा शिष्य होऊन, ह्यांच्या सेवेनेंच मला ऐश्वर्यादि संपत्ति प्राप्त होईल, अन्यथा प्राप्त होणार नाहीं, अशा दृढ विश्वासानें व त्यांना इष्ट असलेल्या पदार्थांच्या समर्पणानें त्यांची सेवा करूं लागला ॥ ३ ॥ तेव्हां संतुष्ट होणाऱ्या महाप्रभावशाली त्या भृगुवंशस्थ ब्राह्मणांनीं, स्वर्ग जिंकण्याची इच्छा करणाऱ्या त्या बलीला ऋग्वेदी ब्राह्मणामध्यें प्रसिद्ध असलेल्या इंद्राच्या महाभिषेकविधीनें अभिषेक

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करून त्याच्याकडून विश्वजित्‌नामक यज्ञ करविला ॥ ४ ॥ नंतर होमद्रव्यांनीं पूजित झालेल्या अग्नीपासून सुवर्णाच्या पट्ट्यांनीं बांधविलेला रथ, इंद्राच्या अश्वांप्रमाणें हिरव्या वर्णांचे अश्व व सिंहाच्या योगानें शोभणारा ध्वज अशा तीन वस्तु निघाल्या ॥ ५ ॥ तसेंच सुवर्णानें बांधिवलेलें दिव्य धनुष्य, अक्षय्य भाते व दिव्य कवच हींहि त्या अग्नीपासूनच निघालीं. त्यावेळीं प्रऱ्हादनामक पितामहानें, जिचीं पुष्पें कधींहि म्लान होत नाहींत अशी माळा त्याबळीला दिली व शुक्राचार्यानें शंख दिला ॥ ६ ॥ ह्याप्रमाणें ब्राह्मणांनीं त्याची युद्धसामुग्री संपादन करून त्याचें स्वस्तिवाचनवगैरे केलें असतां, त्यानें त्या ब्राह्मणांना प्रदक्षिणापूर्वक नमस्कार केला आणि प्रऱ्हादाला नमस्कार करून त्याची आज्ञा घेतली ॥ ७ ॥ नंतर सर्वोत्कृष्ट माळा, उत्तम कवच, धनुष्य, खड्ग व भाते धारण करून तो महारथी बलि, भृगुवंशस्थ ब्राह्मणांनीं दिलेल्या रथावर आरूढ झाला ॥ ८ ॥ त्यावेळीं सुवर्णमय बाहुभूषणांच्या योगानें ज्याचे बाहू झळकत आहेत व मकराकार कुंडलें ज्याच्या कर्णांचेठिकाणीं स्फुरण पावत आहेत असा

हर्यश्वस्येंद्रस्य ये तुरंगास्तेषामिव वर्णो हरितो येषाम् ॥५॥ पुरटं सुवर्णम् । तूणाविषुधी । अरिक्तावक्षय्यशरौ । पितामहः प्रऱ्हादः जलजं शंखम् ॥ ६ ॥ विप्रैरर्जितः संपादितो योधनार्थो युद्धपरिकरो यस्य तैरेव कल्पितं कृतं स्वस्त्ययनं मंगलवाचनादि यस्य । आमंत्र्य पृष्ट्वा ॥ ७ ॥ अथारुह्य रराजेति द्वयोरन्वयः । सुस्रग्धरः शोभनमालाधरः ॥८॥

ततो रथः कांचनपट्टनद्धो हयाश्च हर्यश्वतुरंगवर्णाः ॥ ध्वजश्च सिंहेन विराजमानो हुताशनादास हविर्भिरिष्टात् ॥ ५ ॥ धनुश्च दिव्यं पुरटोपनद्धं तूणावरिक्तौ कवचं च दिव्यम् ॥ पितामहस्तस्य ददौ च मालामम्लानपुष्पां जलजं च शुक्रः ॥ ६ ॥ एवं स विप्रार्जितयोधनार्थस्तैः कल्पितस्वस्त्ययनोऽथ विप्रान् ॥ प्रदक्षिणीकृत्य कृतप्रणामः प्रह्लादमामंत्र्य नमश्चकार ॥ ७ ॥ अथारुह्य रथं दिव्यं भृगुदत्तं महारथः ॥ सुस्रग्धरोऽथ संनह्य धन्वी खड्गी धृतेषुधिः ॥ ८ ॥ हेमांगदलसद्बाहुः स्फुरन्मकरकुंडलः ॥ रराज रथमारूढो धिष्ण्यस्थ इव हव्यवाट् ॥ ९ ॥ तुल्यैश्वर्यबलश्रीभिः स्वयूथैर्दैत्ययूथपैः ॥ पिबद्भिरिव खं दृग्भिर्दहद्भिः परिधीनिव ॥ १० ॥ वृतो विकर्षन्महतीमासुरीं ध्वजिनीं विभुः ॥ययाविंद्रपुरीं स्वृद्धां कंपयन्निव रोदसी ॥ ११ ॥ रम्यामुपवनोद्यानैः श्रीमद्भिर्नंदनादिभिः ॥ कूजद्विहंगमिथुनैर्गायन्मत्तमधुव्रतैः ॥ १२ ॥

हेमांगदाभ्यां लसंतौ बाहू यस्य । धिष्ण्यस्थो वने प्रज्वलितः । कुंडस्थ आहवनीय इवेति वा ॥ ९॥ तुल्यमैश्वर्यं बलं च श्रीश्च येषां तैर्दैत्ययूथपैर्वृतो ययाविति द्वयोरन्वयः । परिधीन् दिशः ॥ १० ॥ स्वृद्धामतिसमृद्धाम् ॥ ११ ॥ धिक् ग्राम्यसुखं तथाविधां पुरीमकस्मादेव परित्यज्येंद्रादयः पलायिता इति वैराग्यार्थमिंद्रपुरीमनुवर्णयति । रम्यामिति सार्धैरेकादशभिः । उपवनानि फलप्रधानानि निकटानि वा उद्यानानि पुष्पप्रधानानि दूरस्थानि वा तै रम्याम् । कूजंति विहंगमिथुनानि येषु । गायंतो मत्त-

---

तो बलि, रथारूढ झाला असतां, कुंडामध्यें प्रज्वलित झालेल्या अग्नीप्रमाणें शोभूं लागला ॥ ९ ॥ तदनंतर (मुखाच्या योगानें) आकाशाचें पानच करीत आहेत कीं काय व नेत्रांच्या योगानें दिशा दग्धच करीत आहेत कीं काय असा आणि ज्यांचा प्रभाव, बल व संपत्ति हीं अगदीं एकसारखींच आहेत अशा दैत्यसेनाधिपतिरूप आपल्या गणांनीं परिवेष्टित झालेला तो समर्थ बलि, स्वर्ग व पृथ्वी यांना कंपित करीत होत्साता, प्रचंड असुरसेना बरोबर घेऊन वेगानें अत्यंत समृद्ध असलेल्या इंद्रपुरीकडे निघाला ॥ १० ॥ ११ ॥ आतां, धिक्कार असो ह्या ग्राम्यसुखाला! अहो तशाप्रकारच्या अत्यंत समृद्ध पुरीचा एकाएकींच त्याग करून इंद्रादिकांनीं पलायन केलें, अशाप्रकारचें वैराग्य होण्याकरितां, श्रीशुकाचार्य इंद्रपुरीचें वर्णन करितो कीं,–हे राजा, जी नगरी, शोभायुक्त अशा नंदनादिक उपवनांनीं व बगीच्यांनीं सुंदर

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आहे, तीं उपवनादिक अशीं कीं, ज्यांमध्यें मधुर शब्द करणारीं पक्ष्यांचीं जोडपीं आहेत, गुंजारव शब्द करणारे मत्त भ्रमर आहेत, कोमल पल्लव, फळें व पुष्पें ह्यांच्या अत्यंत भारानें व्याप्त झालेल्या शाखांनीं युक्त असे कल्पवृक्ष आहेत आणि ज्यामध्यें देवांनीं उपभोग घेण्यास योग्य अशा उत्तम स्त्रिया क्रीडा करीत असलेलीं, हंस, सारस, चक्रवाक व कारंडव ह्यांच्या कळपांनीं व्याप्त अशीं सरोवरें आहेत, त्या उपवनांच्या योगानें रमणीय अशी ती नगरी आहे ॥ १२ ॥ १३ ॥ तशीच जी, सर्वदेवांनीं पूज्य अशा खंदकाप्रमाणें असलेल्या आकाशगंगेनें, आणि उंच व बुरुजांनीं युक्त अशा अग्नीसारख्या तेजःपुंज सुवर्णमय तटानें परिवेष्टित आहे ॥ १४ ॥ जी, सोन्याच्या पट्ट्या मोरलेल्या झडपांनीं युक्त असलेल्या दरवाज्यांनीं, स्फटिकांच्या नगरद्वारांनीं, आणि निरनिराळ्या राजमार्गांनीं युक्त आहे. जी, विश्वक-

मधुव्रता येषु ॥ १२ ॥ प्रवालादीनामुरुर्भारो यासु ताः शाखा येषां तेऽमरद्रुमा येषु तैः । तत्र यासु सुरसेविताः प्रमदाः क्रीडंति ता हंसादिकुलैराकुला व्याप्ता नलिन्यः सरांसि यत्र येषु संति तैरुपवनोद्यानै रम्यामिति पूर्वेणैवान्वयः ॥ १३ ॥ किंच परिखाभूतया आकाशगंगया वृताम् । प्राकारेण सौवर्णेन चावृताम् । अट्टालाः प्राकारोपरि रचितान्युन्नतानि युद्धस्थानानि तत्सहितेन ॥ १४ ॥ रुक्मपट्टानि कपाटानि येषु तैर्द्वारैरवांतरैः स्फटिकमयैर्गोपुरैश्च पुरद्वारैर्जुष्टाम् । विभक्ताः प्रपथा राजमार्गा यस्याम्

प्रवालफलपुष्पोरुभारशाखामरद्रुमैः ॥ हंससारसचक्राह्वकारंडवकुलाकुलाः ॥ नलिन्यो यत्र क्रीडंति प्रमदाः सुरसेविताः ॥ १३ ॥ आकाशगंगया देव्या वृतां परिखभूतया ॥ प्राकारेणाग्निवर्णेन साट्टालेनोन्नतेन च ॥ १४ ॥ रुक्मपट्टकपाटैश्च द्वारैः स्फटिकगोपुरैः ॥ जुष्टां विभक्तप्रपथां विश्वकर्मविनिर्मिताम् ॥ १५ ॥ सभाचत्वररथ्याढ्यां विमानैर्न्यर्बुदैर्युताम् ॥ शृंगाटकैर्मणिमयैर्वज्रविद्रुमवेदिभिः ॥ १६ ॥ यत्र नित्यवयोरूपाः श्यामा विरजवाससः ॥ भ्राजंते रूपवन्नार्यो ह्यर्चिर्भिरिव वह्नयः ॥ १७ ॥ सुरस्त्रीकेशविभ्रष्टनवसौगंधिकस्रजाम् ॥ यत्रामोदमुपादाय मार्ग आवाति मारुतः ॥ १८ ॥ हेमजालाक्षनिर्गच्छद्धूमेनागुरुगंधिना ॥ पांडुरेण प्रतिच्छन्नमार्गे यांति सुरप्रियाः ॥ १९ ॥

॥ १५ ॥ सभा उपवेशस्थानानि चत्वराण्यंगणानि रथ्या उपमार्गास्तैराढ्यां संपन्नाम् । न्यर्बुदं दशकोटयस्तैर्गणनीयैरनंतैर्विमानैर्युताम् । वज्रविद्रुममय्यो वेदयो येषु तैः शृंगाटकैश्चतुष्पथैर्युताम् ॥ १६ ॥ नित्यं वयस्तारुण्यं रूपं च सौकुमार्यं यासां ताः रूपवन्नार्यः स्वलंकृताः स्त्रियः यत्र यस्यां भ्राजंते ॥ १७ ॥ सुरस्त्रीणां केशेभ्यो विभ्रष्टानां नवसौगंधिकस्रजामामोदम् ॥ १८ ॥ हेमगवाक्षेभ्यो निर्गच्छता धूमेन । सुरप्रिया अप्सरसः ॥ १९ ॥

र्म्यानें निर्माण केलेली आहे ॥ १५ ॥ जी, सभा, अंगणीं व उपमार्ग ह्यांनीं संपन्न असून दहाकोटिसंख्येनें गणनीय अशा अनंत विमानांनीं युक्त आहे. जी, हिऱ्यांच्या व पोंवळ्यांच्या ओळ्यांनीं युक्त असून मणिखचित चव्हाट्यांनीं युक्त आहे ॥ १६ ॥ जिच्यामध्यें सर्वदा तारुण्य व सौकुमार्य ह्यांनीं युक्त, निर्मलवस्त्रें परिधान करणाऱ्या आणि उत्तम प्रकारचे अलंकार धारण करणाऱ्या अशा श्यामा[1] स्त्रिया, ज्वालांनीं शोभणाऱ्या अग्नीप्रमाणें शोभत असतात ॥ १७ ॥ तसाच जिच्यामध्यें, वायु, देवांगनांच्या केंसांतून गळलेल्या नूतन चंपकमालांचा परिमल ग्रहण करून मार्गाचेठिकाणीं वाहत असतो ॥ १८ ॥ जिच्यामध्यें अप्सरा, सुवर्णाच्या जाळ्यांतून बाहेर निघणाऱ्या अगुरुगं-

१ शीतकालीं उष्ण व उष्णकालीं फारच शीतल असून अत्यंत कठिण स्तनांनीं युक्त असलेल्या स्त्रीला 'श्यामा' असें ह्मणतात.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

धयुक्त श्वेतवर्ण धूमानें व्याप्त झालेल्या मार्गावरून संचार करित असतात ॥ १९ ॥ जी मोत्यें लाविलेले चांदवे, रत्नजडित सुवर्णध्वज व नानाप्रकाच्या पताकांनीं युक्त असलेले सज्जे ह्यांनीं व्याप्त व मयूरपक्षी, पारवे आणि भ्रमर ह्यांच्या नादानें नादित आहे; जी, देवांगनांच्या मधुरगीतांनीं मंगलयुक्त झालेली आहे ॥ २० ॥ जी मृदंग, शंख आनक व दुंदुभि ह्यांचे ध्वनि, टाळांसहवर्तमान वीणा, मुरज, ऋष्टि व वेणु हीं वाद्यें, वाद्यांसहवर्तमान नृत्यें आणि गंधर्वादिकांचीं गीतें ह्यांच्या योगानें मनोरम असून जिनें आपल्या प्रभेनें प्रभेची अधिष्ठाती देवता जिंकिली आहे ॥ २१ ॥ जिच्यामध्यें पातकी, दुष्ट, प्राण्यांना पीडा देणारे, वंचक, अभिमानी, विषयासक्त व लोभी असे पुरुष गमन करीत नाहींत व जिच्यामध्यें ह्या अधर्मादि दोषांनीं रहित असलेले पुरुष गमन करितात ॥ २२ ॥ अशा त्या देवनिवासभूत नगरीला बाहेरच्याबाजूनें सभोंवार, त्या सेनाधिपति

मुक्तामयैर्वितानैर्मणिहेममयैः केतुभिश्च ध्वजैर्नानापताकायुक्ताभिर्वलभीभिश्च विमानानां पुरोभागैरावृतां व्याप्ताम् । वैमानिकस्त्रीणां कलगीतैर्मंगलाम् ॥ २० ॥ उपदेवानां गंधर्वादीनां गीतकैश्च मनोरमाम् । जिता प्रभा साक्षाद्दीप्त्यधिष्ठात्री देवता यया ताम् । अन्यैरजितप्रभामिति वा । पाठांतरे जिता ग्रहाः सूर्यादयो यया ॥ २१ ॥ यत्

मुक्तावितानैर्मणिहेमकेतुभिर्नानापताकावलभीभिरावृताम् ॥ शिखंडिपारावतभृंगनादितां वैमानिकस्त्रीकलगीतमंगलाम् ॥ २० ॥ मृदंगशंखानकदुंदुभिस्वनैः सतालवीणामुरजर्ष्टिवेणुभिः ॥ नृत्यैः सवाद्यैरुपदेवगीतकैर्मनोरमां स्वप्रभया जितप्रभाम् ॥ २१ ॥ यां न व्रजंत्यधर्मिष्ठाः खला भूतद्रुहः शठाः ॥ मानिनः कामिनो लुब्धा एभिर्हीना व्रजंति यत् ॥ २२ ॥ तां देवधानीं स वरूथिनीपतिर्बहिः समंताद्रुरुधे पृतन्यया ॥ आचार्यदत्तं जलजं महास्वनं दध्मौ प्रयुंजन्भयमिंद्रयोषिताम् ॥ २३ ॥ मघवांस्तमभिप्रेत्य बलेः परममुद्यमम् ॥ सर्वदेवगणोपेतो गुरुमेतदुवाच ह ॥ २४ ॥ भगवन्नुद्यमो भूयान्बलेर्नः पूर्ववैरिणः ॥ अविषह्यमिमं मन्ये केनासीत्तेजसोर्जितः ॥ २५ ॥ नैनं कश्चित्कुतो वापि प्रतिव्योढुमधीश्वरः ॥ पिबन्निव मुखेनेदं लिहन्निव दिशो दश ॥ दहन्निव दिशो दृग्भिः संवर्ताग्निरिवोत्थितः ॥ २६ ॥ ब्रूहि कारणमेतस्य दुर्धर्षत्वस्य मद्रिपोः ॥ ओजः सहो बलं तेजो यत एतत्समुद्यमः ॥ २७ ॥

याम् ॥ २२ ॥ पृतन्यया सेनया ॥ २३ ॥ २४ ॥ केन हेतुनैवं तेजसोर्जित आसीत् ॥ २५ ॥ प्रतिव्योढुमपाकर्तुम् ॥ २६ ॥ यतः कारणादेतस्य ओजआदि । यत ओजआदेः । एतस्य समुद्यमः ॥ २७ ॥

बलीनें आपल्या सेनेच्या योगानें वेढा घातला आणि इंद्रस्त्रियांना भय उत्पन्न करण्याकरितां शुक्राचार्यांनें दिलेला महानादयुक्त शंख वाजविला ॥ २३ ॥ तो बलीचा महा प्रयत्न जाणून, इंद्रानें सर्वदेवगणासहवर्तमान गुरूला असें विचारिलें कीं– ॥ २४ ॥ हे भगवन्, आपला पूर्ववैरी जो बलि ह्याचा हा महान् उद्योग चालला आहे. ह्यास्तव हा अत्यंत असह्य आहे असें मला वाटतें. तस्मात् सांप्रतकालीं तो कोणत्या कारणानें वृद्धिंगत झाला आहे हें तूं मला कथन कर ॥ २५ ॥ हा केवल मलाच असह्य आहे असें नाहीं तर ह्याचें निराकरण करण्यास कोणत्याहि उपायानें कोणीहि पुरुष समर्थ नाहीं. कारण, हा मुखानें विश्व पिऊनच टाकीत आहे कीं काय? जिव्हेनें दशदिशा चाटीतच आहे कीं काय? व नेत्रांनीं सर्वदिशा दग्धच करित आहे कीं काय? असा प्रलयकालच्या अग्नीप्रमाणें आमचा नाश करण्याकरितां उद्युक्त झाला आहे ॥ २६ ॥ तस्मात् ज्या कारणास्तव ह्याला इंद्रियसामर्थ्य, मानसिक शक्ति, शारीर बल व प्रभाव हीं उत्पन्न झालीं व ज्या इंद्रियसामर्थ्यादिकांपासून ह्याचा मोठा उद्योग चालला आहे तें ह्या माझ्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शत्रूचें असह्य होण्याचें कारण सांग ॥ २७ ॥ तेव्हां गुरु ह्मणाला कीं– हे मघवन्, ह्या तुझ्या शत्रूच्या उन्नतीचें कारण मीं जाणत आहें, तें कोणतें ह्मणशील तर– हे इंद्रा, आपणाला सर्वस्व अर्पण करणाऱ्या शिष्यरूपी ह्या बलीला, ब्रह्मवेत्त्या भृगुकुलोत्पन्न शुक्रादिक गुरूंनीं, हें तेज अर्पण केलें आहे ॥ २८ ॥ ह्मास्तव जसे कोणीहि जन मृत्यूच्या अग्रभागीं उभे रहाण्यास समर्थ होत नाहींत त्याप्रमाणें, एक ईश्वर श्रीहरीवांचून तूं किंवा तुझ्यासारिखा दुसरा कोणीहि पुरुष, ह्याच्या अग्रभागीं उभा रहाण्यास समर्थ नाहीं ॥ २९ ॥ ह्मस्मात्, तुह्मीं सर्वांनीं स्वर्गाचा त्याग करून अदृश्य व्हावें आणि ज्याच्या योगानें तुमच्या शत्रूचा (बलीचा) पराभव होईल त्या कालाची प्रतीक्षा करीत रहावें ॥ ३० ॥ आतां कशानें ह्याचा पराभव होईल ? असें ह्मणाल तर, हे देवहो, ह्या बलीची ब्राह्मणांच्या बलानें उत्तरोत्तर अभिवृद्धि होत आहे ह्मणून सांप्रतकालीं हा अतिशय पराक्रमी झाला आहे ह्मास्तव हा त्याच ब्राह्मणांचा अपमान जेव्हां करील तेव्हां परिवार दैत्यांसहवर्तमान पराभव पावले ॥ ३१ ॥ ह्याप्रमाणें

उपधृतं संचितम् ॥ २८ ॥ २९ ॥ तत्रोचितं मंत्रमाह । तस्माद्यूयं त्रिविष्टपमुत्सृज्य निलयमदर्शनं यात । यतः कालात् ॥ ३० ॥ केनास्य विपर्ययः स्यादित्यत आह ।

गुरुरुवाच ॥ जानामि मघवन् शत्रोरुन्नतेरस्य कारणम् ॥ शिष्यायोपभृतं तेजो भृगुभिर्ब्रह्मवादिभिः ॥ २८ ॥ भवद्विधो भवान्वापि वर्जयित्वेश्वरं हरिम् ॥ नास्य शक्तः पुरः स्थातुं कृतांतस्य यथा जनाः ॥ २९ ॥ तस्मान्निलयमुत्सृज्य यूयं सर्वे त्रिविष्टपम् ॥ यात कालं प्रतीक्षंतो यतः शत्रोर्विपर्ययः ॥ ३० ॥ एष विप्रबलोदर्कः संप्रत्यूर्जितविक्रमः ॥ तेषामेवापमानेन सानुबंधो विनंक्ष्यति ॥ ३१ ॥ एवं सुमंत्रितार्थास्ते गुरुणार्थानुदर्शिना ॥ हित्वा त्रिविष्टपं जग्मुर्गीर्वाणाः कामरूपिणः ॥ ३२ ॥ देवेष्वथ निलीनेषु बलिर्वैरोचनः पुरीम् ॥ देवधानीमधिष्ठाय वशं निन्ये जगत्त्रयम् ॥ ३३ ॥ तं विश्वजयिनं शिष्यं भृगवः शिष्यवत्सलाः ॥ शतेन हयमेधानामनुव्रतमयाजयन् ॥ ३४ ॥ ततस्तदनुभावेन भुवनत्रयविश्रुताम् ॥ कीर्तिं दिक्षु वितन्वानः सरेजे उडुराडिव ॥ ॥ ३५ ॥ बुभुजे च श्रियं स्वृद्धां द्विजदेवोपलंभिताम् ॥ कृतकृत्यमिवात्मानं मन्यमानो महामनाः ॥ ३६ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टमस्कंधे पंचदशोऽध्यायः ॥ १५ ॥ ॥ छ ॥

एष इति । विप्राणां बलेनोदर्क उत्तरोत्तरमधिकं फलं यस्य सः ॥ ३१ ॥ सुमंत्रितोऽर्थः कार्यं येषां ते निलयं जग्मुः ॥ ३२ ॥ ३३ ॥ एवं प्राप्तमिंद्रपदं स्थिरीकर्तुमयाजयन् ॥ अनुव्रतमनुवर्तिनम् ॥ ३४ ॥ ३५ ॥ द्विजदेवैर्ब्राह्मणैरुपलंभितां प्रापिताम् ॥ ३६ ॥ इति श्रीमद्भागवतेऽष्टमस्कंधे टीकायां पंचदशोऽध्यायः ॥ १५ ॥ ॥

यथार्थ विचार करणाऱ्या गुरूनें, त्यांनीं काय करावें हें विचारपूर्वक सांगितलें असतां ते देव, यथेष्टरूपें धारण करून स्वर्गाचा त्याग करून अदृश्य झाले ॥ ३२ ॥ ह्याप्रमाणें देव गुप्त झाले असतां नंतर विरोचनपुत्र बलीनें देवांच्या निवासस्थानरूप अशा इंद्रपुरीचें आधिपत्य स्वीकारून सर्व त्रैलोक्य वश केलें ॥ ३३ ॥ ह्याप्रमाणें प्राप्त झालेलें इंद्रपद स्थिर करण्याकरितां आपल्या आज्ञेमध्यें वागणाऱ्या त्या जगद्विजयी शिष्याकडून, शिष्यवत्सल अशा त्या भृगुवंशस्थ ब्राह्मणांनीं शंभर अश्वमेध करविले ॥ ३४ ॥ तदनंतर त्या अनुष्ठानाच्या प्रभावानें त्रिभुवनामध्यें प्रसिद्ध झालेली आपली कीर्ति दशदिशांप्रत विस्तृत करणारा तो बलि, नक्षत्राधिप चंद्राप्रमाणें शोभूं लागला ॥ ३५ ॥ आणि उदार अंतःकरणानें युक्त व आपणाला कृतकृत्य झाल्यासारिखें मानणारा तो बलि, क्षत्रियादिकांना देवांप्रमाणें पूज्य अशा ब्राह्मणांनीं प्राप्त करून दिलेल्या समृद्ध संपत्तीचा उपभोग घेऊं लागला ॥ ३६ ॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागवत नामक महापुराणांतील अष्टमस्कंधापैकीं बलिकृत स्वर्गविजयादिनिरूपण-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पक हा पंधरावा अध्याय समाप्त जाहला ॥ १५ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या सोळाव्या अध्यायामध्यें पुत्रनाशानें शोक करणाऱ्या अदितीनें कश्यपाची प्रार्थना केली असतां, त्यानें तिला पयोव्रताचा उपदेश केला ही कथा सांगितली आहे ॥ १ ॥ आतां श्रीवामनावतारप्रसंग कथन करण्याकरितां श्रीशुकाचार्य ह्मणाले- हे राजा, ह्याप्रमाणें इंद्रादिक पुत्र दिसेनासे झाले असतां व दैत्यांनीं स्वर्गलोक हरण केला असतां, देवमाता अदिति अनाथाप्रमाणें संताप पावली ॥ १ ॥ तेव्हां बहुकालानें समाधीपासून निवृत्त झालेला भगवान् कश्यप, एकेवेळीं उत्साहरहित व आनंदरहित अशा तिच्या आश्रमाप्रत प्राप्त झाला ॥ २ ॥ तेव्हां हे कुरुश्रेष्ठा, यथायोग्य रीतीनें अदितीनें पूजन केलेला तो कश्यप ऋषि, आसनाचा स्वीकार करून दीनवदन झालेल्या त्या पत्नीला पाहून असें ह्मणाला कीं,– ॥ ३ ॥ हे भद्रे, सांप्रतकालीं

षोडशे पुत्रनाशेन शोचंत्या अदितेः पतिः ॥ प्रार्थितः कश्यपः प्राह पयोव्रतमितीर्यते ॥ १ ॥ इदानीं श्रीवामनावतारप्रसंगमाह । एवमित्यादि यावत्समाप्ति । नष्टेष्वदृष्टेषु सत्सु ॥ १ ॥ २ ॥ स कश्यपः पत्नीमिदमाह ॥ ३ ॥ दीनवदनत्वादिकमालक्ष्य बहुधा विकल्पयन्पृच्छति । अप्यभद्रमिति सप्तभिः । हे भद्रे मृत्योश्छंदमिच्छामनुवर्तंत इति

श्रीशुक उवाच ॥ एवं पुत्रेषु नष्टेषु देवमाताऽदितिस्तदा ॥ हृते त्रिविष्टपे दैत्यैः पर्यतप्यदनाथवत् ॥ १ ॥ एकदा कश्यपस्तस्या आश्रमं भगवानगात् ॥ निरुत्सवं निरानंदं समाधेर्विरतश्चिरात् ॥ २ ॥ स पत्नीं दीनवदनां कृतासनपरिग्रहः ॥ सभाजितो यथान्यायमिदमाह कुरूद्वह ॥ ३ ॥ अप्यभद्रं न विप्राणां भद्रे लोकेऽधुनागतम् ॥ न धर्मस्य न लोकस्य मृत्योश्छंदानुवर्तिनः ॥ ४ ॥ अपिवा कुशलं किंचिद्गृहेषु गृहमेधिनि ॥ धर्मस्यार्थस्य कामस्य यत्र योगो ह्ययोगिनाम् ॥ ५ ॥ अपिवाऽतिथयोऽभ्येत्य कुटुंबासक्तया त्वया ॥ गृहादपूजिता याताः प्रत्युत्थानेन वा क्वचित् ॥ ६ ॥ गृहेषु येष्वतिथयो नार्चिताः सलिलैरपि ॥ यदि निर्यांति ते नूनं फेरुराजगृहोपमाः ॥ ७ ॥ अप्यग्नयस्तु वेलायां न हुता हविषा सति ॥ त्वयोद्विग्नधिया भद्रे प्रोषिते मयि कर्हिचित् ॥ ८

तथा । मृत्युवशवर्तिनो जनस्येत्यर्थः ॥ ४ ॥ हे गृहमेधिनि । अपिवा किंवा गृहेषु धर्मादेः किंचिदकुशलमिति काका प्रश्नः । यत्र येषु गृहेषु । अयोगिनामपि योगः स्वधर्मादिना योगफलं भवति ॥ ५ ॥ किंवा त्वयाऽपूजिता एवाभ्येत्य गृहाद्याताः ॥ ६ ॥ नार्चिता अनर्चिताः संतो यदि निर्गच्छंति ते गृहाः फेरुराजः सृगालराजस्तदीयविवरतुल्याः ॥ ७ ॥ वेलायां होमकाले कर्हिचिन्न हुताः किम् ॥ ८ ॥

ब्राह्मणांना या लोकीं कांहीं आपत्ति तर प्राप्त झाली नाहींना ? अथवा धर्माला व मृत्यूच्या स्वाधीन असलेल्या जनांला कांहीं अनिष्ट तर प्राप्त झालें नाहींना ? ॥ ४ ॥ अथवा हे गृहमेधिनि ज्या गृहस्थाश्रमाचेठिकाणीं योगाभ्यास न करणाऱ्याहि पुरुषांना, स्वधर्मादिकांच्या योगानें योगाचें फळ प्राप्त होतें अशा गृहस्थाश्रमामध्यें धर्म अर्थ व काम ह्यांपैकीं एखाद्याचा ऱ्हास तर झाला नाहींना? ॥ ५ ॥ किंवा एखादेवेळीं अतिथिवगैरे प्राप्त झाले असतां, कुटुंबाविषयीं आसक्त असलेल्या तूं, प्रत्युत्थानानें हि सत्कार केल्यावांचून ते घरांतून परत गेले नाहींतना ? ॥ ६ ॥ कारण, ज्या घरांचेठिकाणीं आलेले अतिथि उदकांनींहि सत्कार न पावतां जर परत निघून जातील तर तीं घरें निःसंशयें कोल्ह्याच्या राजाच्या विवराप्रमाणें होत ॥ ७ ॥ असो हे पतिव्रते, हे भद्रे, मी देशांतरास गेलों असतां, मनामध्यें उद्विग्न झालेल्या तूं होमकालीं कदाचित् अग्नीमध्यें होमद्रव्यानें होम केला नाहींस असें तर तुझ्या हातून कधीं घडलें नाहींना ? ॥ ८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ज्यांच्या पूजनानें गृहस्थाश्रमी पुरुष मनोरथ पूर्ण करणाऱ्या लोकांप्रत गमन करितो, ते ब्राह्मण व अग्नि सर्व देवतांचा आत्मा अशा विष्णूचें मुख आहेत ॥९॥ बरें हे मनस्विनि, तुझे सर्व पुत्र कुशळ आहेतना ? कारण, तुझी मुखम्लानतावगैरे लक्षणांवरून तुझें मन अस्वस्थ आहे असें मी जाणतों ॥ १० ॥ आतां तूं ज्याविषयीं प्रश्न केलास ती आपत्तिवगैरे कांहींएक नसून अस्वस्थपणा असण्याचें कारण वेगळेंच आहे असें सांगण्याच्या अभिप्रायानें अदिति भाषण करिते कीं,– हे ब्रह्मनिष्ठा कश्यपा, द्विज, गाई, धर्म व हे जन हे सर्व कुशळ आहेत. कारण, हे गृहमेधिन्, हें गृह खरोखर (धर्म अर्थ व काम ह्या) त्रिवर्गाचें मुख्य उद्भवस्थान आहे ॥ ११ ॥ हे ब्रह्मन्, अग्नि, अतिथि, भृत्य, संन्यासी व इतरहि द्रव्यादिकांची इच्छा धरून येणारे जे जन, त्या सर्वांचाहि मी यथायोग्य सत्कार केला आहे. कारण,

---

॥ ९ ॥ भवत्या आत्मानं मनः अस्वस्थमप्रकृतिस्थं लक्षणैर्मुखम्लान्यादिभिर्लक्षयामि ॥ १० ॥ अस्वास्थ्यकारणमन्यदस्तीति वक्तुं त्वत्पृष्टमभद्रादिकं नास्तीत्याह । भद्रमिति द्वाभ्याम् । इमे गृहास्त्रिवर्गस्य परं क्षेत्रमुद्भवस्थानम् । त्रिवर्गोऽपि यथावद्वर्तत इत्यर्थः ॥ ११ ॥ भगवतस्तवानुध्यानं यन्मया क्रियते तस्मादग्न्योऽति-

यत्पूजया कामदुघान्याति लोकान्गृहान्वितः ॥ ब्राह्मणोऽग्निश्च वै विष्णोः सर्वदेवात्मनो मुखम् ॥ ९ ॥ अपि सर्वे कुशलिनस्तव पुत्रा मनस्विनि ॥ लक्षयेऽस्वस्थमात्मानं भवत्या लक्षणैरहम् ॥ १० ॥ अदितिरुवाच ॥ भद्रं द्विजगवां ब्रह्मन्धर्मस्यास्य जनस्य च ॥ त्रिवर्गस्य परं क्षेत्रं गृहमेधिन्गृहा इमे ॥ ११ ॥ अग्नयोऽतिथयो भृत्या भिक्षवो ये च लिप्सवः ॥ सर्वं भगवतो ब्रह्मन्ननुध्यानान्न रिष्यति ॥ १२ ॥ को नु मे भगवन्कामो न संपद्येत मानसः ॥ यस्या भवान्प्रजाध्यक्ष एवं धर्मान्प्रभाषते ॥ १३ ॥ तवैव मारीच मनःशरीरजाः प्रजा इमाः सत्त्वरजस्तमोजुषः ॥ समो भवांस्तास्वसुरादिषु प्रभो तथाऽपि भक्तं भजते महेश्वरः ॥ १४ ॥ तस्मादीश भजंत्या मे श्रेयश्चिंतय सुव्रत ॥ हृतश्रियो हृतस्थानान्सपत्नैः पाहि नः प्रभो ॥ १५ ॥ परैर्विवासिता साऽहं मग्ना व्यसनसागरे ॥ ऐश्वर्यं श्रीर्यशः स्थानं हृतानि प्रबलैर्मम ॥ १६ ॥

थय इत्यादिसर्वं न रिष्यति न हीयते ॥ १२ ॥ प्रस्तुतं विज्ञापयितुमाह । को न्विति ॥ १३ ॥ संपाद्यं काममाह । तवैवेति चतुर्भिः ॥ १४ ॥ सपत्नैर्दैत्यैर्हृता श्रीर्येषाम् । हृतं स्थानं येषामिति पुत्राभिप्रायेण बहुवचनम् ॥ १५ ॥ १६ ॥

तुज भगवंताचें प्रतिक्षिणीं जें मी ध्यान करीत असत्यें त्याच्या योगानें मला कांहीं, कमी पडत नाहीं सर्व यथास्थित चाललें आहे ॥ १२ ॥ असो. हे भगवन्, तूं प्रजाधिपति जिला ह्याप्रमाणें धर्मोपदेश करीत आहेस त्या माझा, कोणता बरें मनोरथ सिद्धीस जाणार नाहीं ? सर्वहि जातीलच ॥ १३ ॥ आतां आपला मनोरथ कथन करित्ये कीं,– हे प्रभो मरीचिपुत्रा, सत्त्व, रज व तम ह्या गुणांनीं युक्त असलेल्या ह्या प्रजा तुझ्याच मनापासून आणि शरीरापासून उत्पन्न झालेल्या आहेत, ह्यास्तव त्या असुरप्रभृतिप्रजांचेठिकाणीं जरी तुझी समदृष्टि आहे, तथापि ज्याप्रमाणें महेश्वर स्वभक्तांचेच मनोरथ परिपूर्ण करितो त्याप्रमाणें हे समर्था सुव्रता, तूंहि तुला भजत असलेल्या माझ्या कल्याणाचें चिंतन कर आणि हे प्रभो, शत्रूंनीं संपत्ति हरण करून स्थानभ्रष्ट केलेल्या माझें रक्षण कर ॥ १४ ॥ १५ ॥ हे नाथ, ऐश्वर्यादि संपत्तींच्या योगानें जिचें तूं परिपालन केलेंस, त्या मला शत्रूंनीं स्थानभ्रष्ट करून बाहेर घालविलें आहे, त्यामुळें मी दुःखसागरामध्यें निमग्न झाल्यें आहें, ह्मणजे त्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रबल शत्रूंनीं माझें ऐश्वर्य, संपत्ति, यश व स्थान हीं सर्व हरण केलीं आहेत ॥ १६ ॥ तस्मात्, हे कल्याण करणारांमध्यें श्रेष्ठा, कार्यसाधका, ज्या प्रकारानें माझे पुत्र, त्या ऐश्वर्यादिकांस पुन्हां पावतील, तसा बुद्धीनें विचार करून त्या साधनाचा मला उपदेश कर ॥ १७ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाले:–हे राजा, ह्याप्रमाणें प्रजाधिपति कश्यपाची अदितीनें प्रार्थना केली असतां, विस्मय वाटल्यासारिखें करून तिला तो ह्मणाला कीं– अहो, विष्णूच्या मायेचें बळ, किती तरी आश्चर्यकारक आहे ! कारण, त्याच्यामुळें हें जगत् स्नेहपाशानें बद्ध झालें आहे ॥ १८ ॥ अहो पंचमहाभूतांपासून झालेला हा अनात्मरूप देह कोणीकडे आणि प्रकृतीहून भिन्न असा आत्मा कोणीकडे ? तस्मात् पति व पुत्रादिक संबंधि जन हे पाहूं गेलें असतां, कोणाचे कोण आहेत ? कोणीच नाहींत, तथापि त्यांच्या ममतास्नेहादिकांविषयीं मोहच कारण आहे ॥ १९ ॥ ह्याप्रमाणें अदितीनें पुत्रस्नेहाचा त्याग करावा ह्याकरितां विस्मयमिषानेंच कश्यपानें तिला तत्त्वाचा उपदेश केला; परंतु त्याच्या योगानें ती संतुष्ट होत

॥ १७ ॥ कः कश्यपः प्रथमं तावत्पुत्रस्नेहं त्याजयितुं विस्मयव्याजेनैव तत्त्वमुपदिशति। अहो इति सार्धेन ॥ १८ ॥ १९ ॥ अत्रापरितुष्यंतीं प्रत्याह । उपतिष्ठस्वेति द्वाभ्याम्

यथा तानि पुनः साधो प्रपद्येरन्ममात्मजाः ॥ तथा विधेहि कल्याणं धिया कल्याणकृत्तम ॥ १७ ॥ श्रीशुक उवाच ॥ एवमभ्यर्थितोऽदित्या कस्तामाह स्मयन्निव ॥ अहो मायाबलं विष्णोः स्नेहबद्धमिदं जगत् ॥ १८ ॥ क्व देहो भौतिकोऽनात्मा क्व चात्मा प्रकृतेः परः ॥ कस्य के पतिपुत्राद्या मोह एव हि कारणम् ॥ १९ ॥ उपतिष्ठस्व पुरुषं भगवंतं जनार्दनम् ॥ सर्वभूतगुहावासं वासुदेवं जगद्गुरुम् ॥ २० ॥ स विधास्यति ते कामान्हरिर्दीनानुकंपनः ॥ अमोघा भगवद्भक्तिर्नेतरेति मतिर्मम ॥ २१ ॥ अदितिरुवाच ॥ केनाहं विधिना ब्रह्मन्नुपस्थास्ये जगत्पतिम् ॥ यथा मे सत्यसंकल्पो विदध्यात्स मनोरथम् ॥ २२ ॥ आदिश त्वं द्विजश्रेष्ठ विधिं तदुपधावनम् ॥ आशु तुष्यति मे देवः सीदंत्याः सह पुत्रकैः ॥ २३ ॥ कश्यप उवाच ॥ एतन्मे भगवान्पृष्टः प्रजाकामस्य पद्मजः ॥ यथाऽऽह ते प्रवक्ष्यामि व्रतं केशवतोषणम् ॥ २४ ॥

॥ २० ॥ नन्वेवंभूतकामप्राप्तिहेतुर्देवांतरसेवाप्रसिद्धा तत्राह । अमोघेति ॥ २१ ॥ यथा च मे मनोरथं विदध्यात् ॥ २२ ॥ यथा च मे आशु तुष्यति तथा तत्सेवाप्रकारमादिश ॥ २३ ॥ मे मया पृष्टः पद्मजो मे यद्व्रतमाह एतत्ते तव प्रवक्ष्यामीत्यन्वयः ॥ २४ ॥

नाहीं असें पाहून तो ह्मणाला कीं,– हे अदिति, षड्गुणैश्वर्यसंपन्न, परिपूर्ण, मायानिवर्तक व सर्व प्राण्यांच्या अंतःकरणामध्यें वास करणारा असा जो जगद्गुरु वासुदेव त्याचें तूं आराधन कर ॥ २० ॥ ह्मणजे तो दीनदयालु श्रीहरि, तुझे मनोरथ परिपूर्ण करील. परंतु, हे अदिति, ह्या मनोरथाची सिद्धि इतर देवांच्या सेवेनें होईल, अशी जर तुला कदाचित् शंका येईल तर सांगतों ऐक.– भगवंताची भक्ति केली असतां तीच सफल होते इतरांची सफळ होत नाहीं. अशी माझी तर खात्री आहे ॥ २१ ॥ अदिति ह्मणाली:–हे ब्रह्मन्, विश्वपालक भगवंताचें मी कोणत्या प्रकारेंकरून सेवन करावें ? कीं ज्याच्या योगानें तो सत्यसंकल्प भगवान् माझा मनोरथ पूर्ण करील ॥ २२ ॥ ह्यास्तव हे द्विजश्रेष्ठा, पुत्रांसहवर्तमान क्लेश भोगणाऱ्या मजवर, तो देव जशा रीतीनें सत्वर संतुष्ट होईल तसा त्याच्या सेवेचा प्रकार तूं मला कथन कर ॥ २३ ॥ कश्यप ह्मणाला– हे भद्रे, प्रजोत्पादन करण्याच्या इच्छेनें मीं पूर्वीं भगवान् ब्रह्मदेवाला प्रश्न केला असतां, त्यानें जें मला व्रत सांगितलें आहे तें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भगवंताला संतुष्ट करणारें व्रत मी तुला कथन करितों ॥ २४ ॥ हे अदिति, फाल्गुन मासाच्या शुक्ल पक्षामध्यें प्रतिपदेपासून द्वादशीपर्यंत बारा दिवस केवळ दूध प्राशन करून भक्तीनें युक्त होत्साता कमलनयन भगवंताचें पूजन करावें ॥ २५ ॥ आतां, व्रतारंभाचे पूर्वदिवशीं काय करावें तें कथन करितो. अमावास्येचे दिवशीं मिळाल्यास रानडुकरानें उकरलेली मृत्तिका घेऊन प्रवाहामध्यें उभें रहावें आणि ‘ हे देवि, प्राण्यांना निवासस्थान प्राप्त व्हावें या इच्छेनें भगवंतानें वराह अवतार धारण करून रसातलापासून तुझा उद्धार केला आहे, तुला नमस्कार असो तूं माझ्या पातकाचा नाश कर ’ अशा अर्थाचा मंत्र ह्मणावा, नंतर ती मृत्तिका शरीराला लाऊन स्नान करावें ॥२६॥ ॥२७॥नंतर नित्यनैमित्तिक कृत्य आटोपून प्रतिमा, स्थंडिल, सूर्य, जल, अग्नि अथवा गुरु ह्यां पैकीं कोणत्या तरी ठिकाणीं स्वस्थांतःकरणपूर्वक देवाचें अर्चन करावें॥२८॥

अमले शुक्ले॥२५॥तत्रादौ पूर्वेद्युः कृत्यमाह । सिनीवा[ल्या]मित्यादिना ब्रह्मचार्यथ तद्रात्र्यामित्यंतेन ग्रंथेन । यदि लभ्येत तर्हि क्रोडविदीर्णया वन्यवराहोत्खातया आलिप्य॥२६॥तत्र मंत्रः । त्वं देवीति । हे देवि त्वं रसाया उद्धृतासि ॥ २७ ॥ निर्वर्तित आत्मनियमो नित्यनैमित्तिको येन ॥२८॥ तत्रावाहनादौ नव मंत्रानाह । नमस्तुभ्यमिति । पाद्यादौ विशेषतस्तु

फाल्गुनस्यामले पक्षे द्वादशाहं पयोव्रतः ॥ अर्चयेदरविंदाक्षं भक्त्या परमयाऽन्वितः ॥ २५ ॥ सिनीवाल्यां मृदालिप्य स्नायात्क्रोडविदीर्णया ॥ यदि लभ्येत वै स्रोतस्येतं मंत्रमुदीरयेत् ॥ २६ ॥ त्वं देव्यादिवराहेण रसायाः स्थानमिच्छता ॥ उद्धृताऽसि नमस्तुभ्यं पाप्मानं मे प्रणाशय ॥ २७ ॥ निर्वर्तितात्मनियमो देवमर्चेत्समाहितः ॥ अर्चायां स्थंडिले सूर्ये जले वह्नौ गुरावपि ॥ २८ ॥ नमस्तुभ्यं भगवते पुरुषाय महीयसे ॥ सर्वभूतनिवासाय वासुदेवाय साक्षिणे ॥ २९ ॥ नमो व्यक्ताय सूक्ष्माय प्रधानपुरुषाय च ॥ चतुर्विंशद्गुणज्ञाय गुणसंख्यानहेतवे ॥ ३० ॥ नमो द्विशीर्ष्णे त्रिपदे चतुःशृंगाय तंतवे ॥ सप्तहस्ताय यज्ञाय त्रयीविद्यात्मने नमः ॥ ३१ ॥ नमः शिवाय रुद्राय नमः शक्तिधराय च ॥ सर्वविद्याधिपतये भूतानां पतये नमः ॥ ३२ ॥ नमो हिरण्यगर्भाय प्राणाय जगदात्मने ॥ योगैश्वर्यशरीराय नमस्ते योगहेतवे ॥ ३३ ॥

द्वादशाक्षरं वक्ष्यति ॥ २९ ॥ चतुर्विंशतिगुणास्तत्त्वानि जानातीति तथा तस्मै । गुणसंख्यानस्य हेतवे सांख्यप्रवर्तकाय ॥ ३० ॥ एवं सामान्यतो नत्वा गुणावतारान्प्रणमति त्रिभिः । तत्रादौ मंत्रोक्तयज्ञरूपेण विष्णोः प्रणामो नम इति । द्वे शीर्षे यस्य । त्रयः पादा यस्य । तंतवे फलविस्तारकाय । त्रय्यां विद्यायामात्मा यस्येति त्रिधा बद्ध इत्यस्यार्थ उक्तः । तथाच मंत्रः । चत्वारि शृंगा त्रयो अस्य पादा द्वे शीर्षे सप्तहस्ता सो अस्य ॥ त्रिधा बद्धो वृषभो रोरवीति महो देवो मर्त्यां आविवेशेति ॥ ३१ ॥ ३२ ॥ प्राणाय सूत्रात्मने ।

आणि हे भगवंता, हे पुरुषोत्तमा, ब्रह्मादिकांना पूज्य, सर्वभूतांचें निवासस्थान व सर्वसाक्षी अशा तुज वासुदेवाला नमस्कार असो ॥ २९ ॥ तसाच अव्यक्त, अतिसूक्ष्म, प्रकृतिपुरुषरूप, चोवीस तत्त्वांचा ज्ञाता आणि सांख्यशास्त्रप्रवर्तक अशा तुज भगवंताला नमस्कार असो ॥ ३० ॥ तसेंच प्रायणीय व उदयनीय या नांवांचीं जीं यज्ञांतील दोन कर्में तीं ज्याचीं दोन मस्तकें आहेत, प्रातःसवन, माध्याह्नसवन व तृतीयसवनरूप तीन पायांनीं जो युक्त आहे, ज्याला वेदरूप चार शिंगें आहेत, जो फलविस्तारक आहे, गायत्र्यादिक सात छंद हे ज्याचे सात हात आहेत व मंत्रब्राह्मणकल्परूप त्रयी विद्येचेठिकाणीं ज्याचें स्वरूप आहे त्या तुज यज्ञमूर्तीला नमस्कार असो ॥ ३१ ॥ त्याप्रमाणें सर्वभूतांचा व सर्वविद्यांचा अधिपति, सर्वशक्तिधर आणि परमानंदस्वरूप अशा तुज रुद्रमूर्तीला नमस्कार असो ॥ ३२ ॥ तसाच हिरण्यगर्भ, सूत्ररूप, जग-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दात्मा, योगैश्वर्यशरीरानें युक्त व योगप्रवर्तक अशा तुज ब्रह्ममूर्तीला नमस्कार असो ॥ ३३ ॥ सर्व जगत्पूज्य, सर्वसाक्षिभूत आणि दुःखनिवर्तक अशा तुज नरनारायण ऋषिरूपी हरीला नमस्कार असो ॥ ३४ ॥ ज्याचें शरीर पाचेप्रमाणें श्यामवर्ण आहे व ज्याचेठिकाणीं लक्ष्मी प्राप्त झाली आहे त्या तुज पीतांबरधारी केशवाला नमस्कार असो ॥ ३५ ॥ हे वरदश्रेष्ठा, हे सर्वोत्तमा, तूं पुरुषांना सर्वप्रकारचे वर देणारा असल्यामुळें विवेकी जन आपल्या मनोरथांची सिद्धि होण्याकरितां तुझ्या चरणरजाचें सेवन करितात ॥ ३६ ॥ त्याच्या चरणकमलांचा परिमल सेवन करण्याच्या इच्छेनेंच कीं काय देवांनीं व लक्ष्मीनें ज्याची सेवा केली आहे तो भगवान् मजवर प्रसन्न होवो ॥ ३७ ॥ ह्या २९व्या श्लोकापासून ३८ व्या श्लोकापर्यंत सांगितलेल्या श्लोकरूप नऊ मंत्रांनीं ध्यान करून आवाहनमुद्रेनें पुढें असलेल्या प्रतिमेचेठिकाणीं स्थिर केलेल्या भगवंताचें, श्रद्धायुक्त पुरुषानें पाद्य, आचमन इत्यादि उपचारांनीं पूजन करावें ॥ ३८ ॥ नंतर गंधपुष्पादि उपचारांनीं पूर्वपूजा करून प्रभूला दुधाचा अभिषेक

योगैश्वर्यं शरीरं यस्य ॥ ३३ ॥ ३४ ॥ अधिगता प्राप्ता श्रीर्यस्य तस्मै ॥३५॥ ३६ ॥ तत्पादपद्मयोरामोदं स्पृहयंत इव देवाश्च श्रीश्च यमन्ववर्तंत स मे प्रसीदतु ॥ ३७ ॥

नमस्ते आदिदेवाय साक्षिभूताय ते नमः ॥ नारायणाय ऋषये नराय हरये नमः ॥ ३४ ॥ नमो मरकतश्यामवपुषेऽधिगतश्रिये ॥ केशवाय नमस्तुभ्यं नमस्ते पीतवाससे ॥ ३५ ॥ त्वं सर्ववरदः पुंसां वरेण्य वरदर्षभ ॥ अतस्ते श्रेयसे धीराः पादरेणुमुपासते ॥ ३६ ॥ अन्ववर्तंत यं देवाः श्रीश्च तत्पादपद्मयोः ॥ स्पृहयंत इवामोदं भगवान्मे प्रसीदताम् ॥ ३७ ॥ एतैर्मंत्रैर्हृषीकेशमावाहनपुरस्कृतम् ॥ अर्चयेच्छ्रद्धया युक्तः पाद्योपस्पर्शनादिभिः ॥ ३८ ॥ अर्चित्वा गंधमाल्याद्यैः पयसा स्नपयेद्विभुम् ॥ वस्त्रोपवीताभरणपाद्योपस्पर्शनैस्ततः ॥ गंधधूपादिभिश्चार्चेद्द्वादशाक्षरविद्यया ॥ ३९ ॥ शृतं पयसि नैवेद्यं शाल्यन्नं विभवे सति ॥ ससर्पिः सगुडं दत्त्वा जुहुयान्मूलविद्यया ॥ ४० ॥ निवेदितं तद्भक्ताय दद्याद्भुंजीत वा स्वयम् ॥ दत्त्वाऽऽचमनमर्चित्वा तांबूलं च निवेदयेत् ॥ ४१ ॥ जपेदष्टोत्तरशतं स्तुवीत स्तुतिभिः प्रभुम् ॥ कृत्वा प्रदक्षिणं भूमौ प्रणमेद्दंडवन्मुदा ॥ ४२ ॥ कृत्वा शिरसि तच्छेषां देवमुद्वासयेत्ततः ॥ द्व्यवरान्भोजयेद्विप्रान्पायसेन यथोचितम् ॥ ४३ ॥ भुंजीत तैरनुज्ञातः शेषं सेष्टः सभाजितैः ॥ ब्रह्मचार्यथ तद्रात्र्यां श्वोभूते प्रथमेऽहनि ॥ ४४ ॥

आवाहने पुरस्कृतं संमानितम् ॥ ३८ ॥ ३९ ॥ पयसि शृतं पक्कं पायसम् । मूलविद्यया द्वादशाक्षरेणैव ॥ ४० ॥ ४१ ॥ पूर्वोक्ताभिरन्याभिश्च स्तुतिभिः ॥ ४२ ॥ तस्य शेषां निर्माल्यम् । द्वाववरौ येषां तान् । असंभवे द्वावपि भोजयेदित्यर्थः ॥ ४३ ॥ सभाजितैस्तैरनुज्ञातः सन् । सेष्टो बंधुभिः सहितः । तस्यां रात्र्यां ब्रह्मचारी सन् । श्वोभूते

करावा आणि तदनंतर वस्त्रें, यज्ञोपवीतें, भूषणें, पाद्य, आचमन, गंध व धूप इत्यादि उपचारांनीं द्वादशाक्षर मंत्रानें पूजन करावें ॥ ३९ ॥ आणि सामर्थ्य असल्यास दुधामध्यें शिजविलेल्या आणि तूप व गूळ ह्यांनीं मिश्र केलेल्या शाल्योदनाचा नैवेद्य दाखवून द्वादशाक्षरी मूलमंत्रानें त्याच शाल्योदनाचा होम करावा ॥ ४० ॥ आणि निवेदन केलेलें तें अन्न भगवद्भक्ताला द्यावें किंवा आपण भक्षण करावें. असो याप्रमाणें पूजा व नैवेद्य झाल्यानंतर आचमन देऊन तांबूल समर्पण करावें ॥ ४१ ॥ पश्चात् मूलमंत्राचा अष्टोत्तरशत जप करून पूर्वोक्त व इतर स्तुतींनीं प्रभूचें स्तवन करावें आणि प्रदक्षिणा करून आनंदानें भूमीवर साष्टांग नमस्कार घालावा ॥ ४२ ॥ नंतर त्याचा निर्माल्य मस्तकीं धारण करून, देवाचें विसर्जन करावें आणि दोहोंपेक्षां अधिक ब्राह्मणांस पायसानें यथोचित भोजन घालावें ॥ ४३ ॥ नंतर दक्षिणावगैरे देऊन

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सत्कार केलेल्या त्या ब्राह्मणांनीं आज्ञा दिली असतां अवशिष्ट राहिलेल्या अन्नाचें बंधूंसहवर्तमान आपण भोजन करावें आणि त्या रात्रीं ब्रह्मचर्यव्रतानें राहून दुसरे दिवशीं (प्रतिपदेचे दिवशीं) प्रभातकालीं स्नान करून शुचिर्भूत व्हावें आणि स्वस्थ अंतःकरणपूर्वक दुधाचा अभिषेक करून, पूर्वीं सांगितलेल्या विधीनें भगवंताचें पूजन करावें. असेंच व्रतसमाप्तीपर्यंत करीत जावें ॥ ४४ ॥ ४५ ॥ ह्याप्रमाणें दुग्ध हाच ज्याचा आहार आहे व विष्णुपूजेचेठिकाणीं ज्याला भक्ति आहे अशा पुरुषानें, हें व्रत करावें. आणि दररोज पूर्वीं सांगितल्याप्रमाणें द्वादशाक्षरी मंत्रानें अग्नीमध्यें हवन करून ब्राह्मणांनाहि भोजन घालावें ॥ ४६ ॥ असें बारादिवसपर्यंत केवळ दुधाचें सेवन करून हवन, पूजन व ब्राह्मणभोजन असें कर्मत्रयात्मक हें श्रीहरीचें आराधनरूप व्रत करावें ॥ ४७ ॥ ~~अशा व्रताच्या आरंभापासून समाप्तीपर्यंत इतरहि नियमवगैरे काय काय करावे तें कथन करण्याच्या अभिप्रायानें कश्यप ह्मणतो-~~ हे अदिति, प्रतिपदेपासून तों शुक्लत्रयोदशीपर्यंत व्रत करणाऱ्यानें ब्रह्मचर्य, भूमिशयन आणि त्रिकाल स्नान हीं करीत

प्रभाते सति ॥ ४४ ॥ ४५ ॥ पय एव भक्ष आहारो यस्य ॥ ४६ ॥ ४७ ॥ अधः स्वप्नं शयनम् ॥ ४८ ॥ ४९ ॥ पंचकैः पंचामृतैः ॥ ५० ॥ ५१ ॥ ५२ ॥ ५३ ॥ ५४ ॥ ५५ ॥

स्नातः शुचिर्यथोक्तेन विधिना सुसमाहितः ॥ पयसा स्नापयित्वाऽर्चेद्यावद्व्रतसमापनम् ॥ ४५ ॥ पयोभक्षो व्रतमिदं चरेद्विष्णवर्चना-
दृतः ॥ पूर्ववज्जुहयादग्निं ब्राह्मणांश्चापि भोजयेत् ॥ ४६ ॥ एवं त्वहरहः कुर्याद्द्वादशाहं पयोव्रतः ॥ हरेराराधनं होममर्हणं द्विज-
तर्पणम् ॥ ४७ ॥ प्रतिपद्दिनमारभ्य यावच्छुक्लत्रयोदशी ॥ ब्रह्मचर्यमधः स्वप्नं स्नानं त्रिषवणं चरेत् ॥ ४८ ॥ वर्जयेदसदालापं
भोगानुच्चावचांस्तथा ॥ अहिंस्रः सर्वभूतानां वासुदेवपरायणः ॥ ४९ ॥ त्रयोदश्यामथो विष्णोः स्नपनं पंचकैर्विभोः ॥ कारयेच्छा-
स्त्रदृष्टेन विधिना विधिकोविदैः ॥ ५० ॥ पूजां च महतीं कुर्याद्वित्तशाठ्यविवर्जितः ॥ चरुं निरूप्य पयसि शिपिविष्टाय विष्णवे
॥ ५१ ॥ कृतेन तेन पुरुषं यजेत सुसमाहितः ॥ नैवेद्यं चातिगुणवद्दद्यात्पुरुषतुष्टिदम् ॥ ५२ ॥ आचार्यं ज्ञानसंपन्नं वस्त्राभरणधे-
नुभिः ॥ तोषयेदृत्विजश्चैव तद्विद्ध्याराधनं हरेः ॥ ५३ ॥ भोजयेत्तान्गुणवता सदन्नेन शुचिस्मिते ॥ अन्यांश्च ब्राह्मणान् शक्त्या
ये च तत्र समागताः ॥ ५४ ॥ दक्षिणां गुरवे दद्यादृत्विग्भ्यश्च यथाऽर्हतः ॥ अन्नाद्येनाऽश्वपाकांश्च प्रीणयेत्समुपागतान् ॥ ५५ ॥

जावीं ॥ ४८ ॥ तसेंच असद्भाषण, लहान मोठे भोग व कोणत्याहि प्राण्याची हिंसा, ह्यांचा त्याग करून वासुदेवाच्या ध्यानाविषयीं तत्पर असावें ॥ ४९ ॥ नंतर त्रयोदशीचे दिवशीं विधिज्ञ ब्राह्मणांकडून शास्त्रोक्तविधीनें प्रभु विष्णूला पंचामृतांनीं स्नान घालवावें ॥ ५० ॥ नंतर वित्तशाठ्य न करितां महापूजा करून शिपिविष्ट (अंतर्यामि) संज्ञक विष्णूच्या उद्देशानें दुधांमध्यें चरूचें श्रपण करून त्या सिद्ध झालेल्या पक्व चरूनें अंतर्यामी भगवंताचें अगदीं एकाग्र मनानें यजन करून त्या परमात्म्याला संतोषकारक असा सर्वोत्कृष्ट महानैवेद्य अर्पण करावा ॥ ५१ ॥ ५२ ॥ नंतर ज्ञानसंपन्न अशा आचार्याला आणि ऋत्विजांना वस्त्रें, भूषणें व धेनु ह्यांच्या योगानें संतुष्ट करावें. कारण, त्यांना संतुष्ट करणें हेंच श्रीहरीचें आराधन असें तूं समज ॥ ५३ ॥ तस्मात् हे शुचिस्मिते, त्या आचार्यादिकांना, इतर ब्राह्मणांना व दुसरेहि जे कोणी तेथें आले असतील त्यांनाहि यथाशक्तीनें माधुर्यादिगुणयुक्त अशा उत्तम अन्नानें भोजन घालावें ॥ ५४ ॥ नंतर आचार्य व ऋत्विज यांना यथायोग्य दक्षिणा देऊन, अगदीं चांडाळा-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पर्यंत जे तेथें आले असतील त्यांना अन्नादिकेंकरून तृप्त करावें ॥ ५५ ॥ आणि दीन, अंध व अतिदरिद्री ह्या सर्वांना भोजन केलें असतां तें भोजन विष्णूचा संतोष कर-णारें आहे असें जाणत होत्साता स्वतां बंधुजनांसहवर्तमान भोजन करावें ॥ ५६ ॥ याप्रमाणें प्रतिपदेपासून त्रयोदशीपर्यंत नृत्य, वाद्य, गीत स्वस्तिवाचन, स्तुति व भग-वत्कथा ह्यांच्या योगानें प्रत्यहीं भगवंताचें पूजन करावें अथवा आपण अशक्त असल्यास दुसऱ्याकडून करवावें ॥ ५७ ॥ असो. ब्रह्मदेवानें मला हें पयोव्रतनामक सर्वोत्कृष्ट ईश्वराचें आराधन कथन केलें होतें तेंच मी तुला उत्तम प्रकारानें सांगितलें आहे ॥ ५८ ॥ तस्मात् हे महाभाग्यवति, शुद्धभावानें युक्त असलेल्या चित्तानें इंद्रियांचें दमन करून उत्तमप्रकारानें आचरण केलेल्या ह्या व्रताच्या योगानें तूं अविनाशी अशा भगवंताचें सेवन कर ॥ ५९ ॥ हे भद्रे, ह्याच्या योगानें ईश्वर संतुष्ट होत असल्यामुळें ह्या अनुष्ठानप्रकारालाच सर्वयज्ञ असें नांव आहे, ह्यालाच सर्वव्रत असें ह्मणतात, तपाचें सार कायतें हेंच होय व उत्तम दान हेंच होय. ह्मणजे हें व्रत केलें असतां, सर्व यज्ञ,

---

॥ ५६ ॥ ५७ ॥ मया च ते समुदाहृतम् ॥ ५८ ॥ ५९ ॥ सर्वयज्ञाख्योऽयं यज्ञः सर्वव्रतमिति च स्मृतमेतद्व्रतम् ॥ ६० ॥ ६१ ६२ ॥ इति

भुक्तवत्सु च सर्वेषु दीनांधकृपणेषु च ॥ विष्णोस्तत्प्रीणनं विद्वान्भुंजीत सह बंधुभिः ॥ ५६ ॥ नृत्यवादित्रगीतैश्च स्तुतिभिः स्व-स्तिवाचकैः ॥ कारयेत्तत्कथाभिश्च पूजां भगवतोऽन्वहम् ॥ ५७ ॥ एतत्पयोव्रतं नाम पुरुषाराधनं परम् ॥ पितामहेनाभिहितं मया ते समुदाहृतम् ॥ ५८ ॥ त्वं चानेन महाभागे सम्यक्चीर्णेन केशवम् ॥ आत्मना शुद्धभावेन नियतात्मा भजाव्ययम् ॥५९॥ अयं वै सर्वयज्ञाख्यः सर्वव्रतमिति स्मृतम् ॥ तपःसारमिदं भद्रे दानं चेश्वरतर्पणम् ॥ ६० ॥ त एव नियमाः साक्षात्त एव च य-मोत्तमाः ॥ तपो दानं व्रतं यज्ञो येन तुष्यत्यधोक्षजः ॥ ६१ ॥ तस्मादेतद्व्रतं भद्रे प्रयता श्रद्धया चर ॥ भगवान्परितुष्टस्ते वरा-नाशु विधास्यति ॥ ६२ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे अष्टमस्कंधेऽदितिपयोव्रतं नाम षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ इत्युक्ता साऽदिती राजन्स्वभर्त्रा कश्यपेन वै ॥ अन्वतिष्ठद्व्रतमिदं द्वादशाहमतंद्रिता ॥ १ ॥ चिंतयंत्येकया बुद्ध्या महा-पुरुषमीश्वरम् ॥ प्रगृह्येंद्रियदुष्टाश्वान्मनसा बुद्धिसारथिः ॥ २ ॥

श्रीमद्भागवतेऽष्टमस्कंधे टीकायां षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥ ॥ ततः सप्तदशेऽदित्या कृते तस्मिन्व्रते हरिः ॥ तत्कामपूरणायादौ तत्पुत्रोऽभूदितीर्यते ॥ १ ॥ १ ॥ २ ॥

सर्व व्रतें, सर्वप्रकारचें तप व सर्व दानें केल्याचें श्रेय प्राप्त होतें ॥ ६० ॥ कारण, ज्याच्या योगानें अधोक्षज भगवान् संतुष्ट होतो तेंच सर्वोत्कृष्ट तप, तेंच सर्वोत्कृष्ट दान, तेंच सर्वोत्कृष्ट व्रत, तोच सर्वोत्कृष्ट यज्ञ, तेच साक्षात् सर्वोत्कृष्ट नियम व तेच सर्वोत्कृष्ट यम होत ॥ ६१ ॥ तस्मात् हे भद्रे, प्रयत्नपुरःसर श्रद्धेनें तूं ह्या व्रताचें आचरण कर ह्मणजे भगवान् संतुष्ट होऊन तुझे मनोरथ पूर्ण करील ॥ ६२ ॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागवतांतील अष्टमस्कंधामध्यें पयोव्रतकथननामक हा सोळावा अध्याय समाप्त झाला ॥ १६ ॥ ॥ आतां ह्या सतराव्या अध्यायामध्यें अदितीनें तें व्रत केलें असतां तिचा मनोरथ परिपूर्ण करण्याकरितां प्रथमतः श्रीहरि तिचेठिकाणीं अवतीर्ण झाला ही कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणालाः—हे राजा, याप्रमाणें आपल्या कश्यप भर्त्यानें उपदेश केलेल्या त्या अदितीनें, आलस्यरहित होऊन बारा दिवसपर्यंत हें व्रत आचरण केलें ॥ १ ॥ त्यावेळीं बुद्धिरूप सारथ्यानें युक्त अशी ती अदिती, मनोरूप रज्जूनें इंद्रियरूप दुष्ट अश्वांना आवरून धरून एकाग्र बुद्धीनें समर्थ पुरुषोत्तमाचें चिंतन

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करीत होत्साती एकाग्र बुद्धीच्या योगानें विश्वात्म्या भगवान् वासुदेवाचेठिकाणीं आपलें मन स्थिर करून, पयोव्रत आचरण करूं लागली ॥ २ ॥ ३ ॥ बा परिक्षित् राजा, याप्रमाणें ती व्रतानुष्ठान करीत असतां, त्या व्रताच्या प्रभावानें शंख, चक्र, गदा, चार भुज व पीतांबर धारण करणारा भगवान्, तिच्या समीपभागीं प्रकट झाला ॥ ४ ॥ त्या दृष्टिगोचर झालेल्या भगवंताला अवलोकन करितांक्षणींच प्रीतीनें व्याकुळ झालेल्या त्या अदितीनें, एकाएकीं उठून आदरपूर्वक त्याला भूमीवर साष्टांग प्रणिपात केला ॥ ५ ॥ नंतर जिचे नेत्र आनंदाश्रूंनीं भरून आले आहेत, जिचा देह रोमांचांनीं व्याप्त झाला आहे व त्याच्या दर्शनानें अत्यंत आनंद झाल्यामुळें जिच्या शरीराला कंप सुटला आहे अशी ती अदिति, भूमीवरून उठून प्रीतीनें विव्हल जाहल्यामुळें केवळ हात जोडून उभी राहिली. परंतु स्तुति करण्यास समर्थ झाली नाहीं ॥ ६ ॥ तदनं-

---

॥ ३ ॥ ४ ॥ ५ ॥ प्रीतिविह्वलत्वादेव सा बद्धांजलिः सती स्थिता केवलमीडितुं पुनर्नोत्सेहे न शशाकापितु तूष्णीं बभूव । कथंभूता । आनंदजलैराकुले ईक्षणे यस्याः । पुलकैराकुला आकृतिर्देहो यस्याः । तस्य दर्शनेन योऽत्युत्सवस्तेन गात्रे वेपथुः कंपो यस्याः ॥ ६ ॥ तुष्टाव पिबतीवोद्वीक्षमाणेति च क्रियाभेदात्सेत्यस्य पदस्य

मनश्चैकाग्रया बुद्ध्या भगवत्यखिलात्मनि ॥ वासुदेवे समाधाय चचार ह पयोव्रतम् ॥ ३ ॥ तस्मात्प्रादुरभूत्तात भगवानादिपूरु-
षः ॥ पीतवासाश्चतुर्बाहुः शंखचक्रगदाधरः ॥ ४ ॥ तं नेत्रगोचरं वीक्ष्य सहसोत्थाय सादरम् ॥ ननाम भुवि कायेन दंडवत्प्रीति-
विह्वला ॥ ५ ॥ सोत्थाय बद्धांजलिरीडितुं स्थिता नोत्सेह आनंदजलाकुलेक्षणा ॥ बभूव तूष्णीं पुलकाकुलाकृतिस्तद्दर्शनात्युत्स-
वगात्रवेपथुः ॥ ६ ॥ प्रीत्या शनैर्गद्गदया गिरा हरिं तुष्टाव सा देव्यदितिः कुरूद्वह ॥ उद्वीक्षती सा पिबतीव चक्षुषा रमापतिं य-
ज्ञपतिं जगत्पतिम् ॥ ७ ॥ अदितिरुवाच ॥ यज्ञेश यज्ञपुरुषाच्युत तीर्थपाद तीर्थश्रवः श्रवणमंगलनामधेय ॥ आपन्नलोकवृजि-
नोपशमोदयाद्य शं नः कृधीश भगवन्नसि दीननाथः ॥ ८ ॥ विश्वाय विश्वभवनस्थितिसंयमाय स्वैरं गृहीतपुरुशक्तिगुणाय भूम्ने ॥
स्वस्थाय शश्वदुपबृंहितपूर्णबोधव्यापादितात्मतमसे हरये नमस्ते ॥ ९ ॥

द्विरुक्तिरदोषः ॥ ७ ॥ अयत्नतो विनिर्जित्य दैत्यानत्यूर्जितानपि ॥ भक्तान्रक्षितुमीशस्त्वमित्यस्तौददितिस्त्रिभिः ॥ यज्ञेशेत्यादिदशभिः संबोधनैस्तवाशक्यं किमपि नास्तीति वदंती प्रार्थयते । शं नः कृधि कुरु । यतो दीनानां नाथोऽसि त्वम् । तीर्थं श्रवः कीर्तिर्यस्य । श्रवणमेव मंगलं यस्य तन्नामधेयं यस्य । आपन्नानां शरणागतानां वृजिनोपशमायोदयो यस्य ॥ ८ ॥ भूम्ने महते नमः । महत्त्वे हेतवः । विश्वाय विश्वस्य भवनस्थितिसंयमार्थं स्वैरं गृहीताः पुरुशक्तेर्मायाया गुणा येन तस्मै । तथाऽपि स्वस्थायाप्रच्युत-

---

तर, हे कुरुश्रेष्ठा, नेत्रानें त्या देवाला पिऊनच टाकीत आहे कीं काय अशा प्रकारानें औत्सुक्यपूर्वक अवलोकन करणारी ती अदिति देवी, प्रीतीमुळें जिच्यांतील अक्षरें स्खलित होत आहेत अशा वाणीनें त्या रमाकांत, यज्ञाधिष्ठात्या जगत्पालक श्रीहरीची हळुहळू स्तुति करूं लागली ॥ ७ ॥ त्यामध्यें प्रथमतः ' तुला कांहीं एक अशक्य नाहीं हें सांमर्थ्याच्या आशयानें ' नानाप्रकारचीं संबोधनें देऊन अदिति प्रार्थना करित्ये कीं:—हे यज्ञफलदात्या, हे यज्ञपुरुषा, हे अच्युता, हे पवित्रचरणा, हे पवित्रकीर्ते, श्रवणमात्रानेंच मंगल करणारें ज्याचें नांव आहे अशा हे आदिपुरुषा, शरणागत जनांच्या दुःखनिवृत्तीकरितां प्रकट होणाऱ्या हे ईश्वरा आणि हे भगवंता, तूं आमचें कल्याण कर. कारण, तूं दीनांचा नाथ आहेस ॥ ८ ॥ विश्वाची उत्पत्ति, स्थिति व लय ह्यांकरितां स्वेच्छेनें मायागुणांचा स्वीकार करणारा, निरंतर प्रकट असलेल्या पूर्ण

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ज्ञानानें सर्वदा आपलेठिकाणीं असलेल्या मायारूप अज्ञानाचें निरसन करणारा व अप्रच्युतस्वरूपी अशा तुज महात्म्या विश्वरूपी श्रीहरीला नमस्कार असो ॥ ९ ॥ आतां आमचा मनोरथ पूर्ण करणें हें तर तुला विशेष कांहींच नाहीं असें सुचविण्याच्या अभिप्रायानें अदिति ह्मणत्ये कीं,– हे अनंता, तुझा संतोष झाला असतां तुजपासून मानवांना ब्रह्मदेवाचें आयुष्य, ईप्सित देह, अनुपम संपत्ति, स्वर्ग, भूमि, रसातल, अणिमादि सर्व योगसिद्धि, धर्म अर्थ व काम हा त्रिवर्ग आणि मोक्षसाधनभूत ज्ञान, हीं प्राप्त होतात; तेव्हां शत्रुजयादि मनोरथ परिपूर्ण होतील हें काय सांगावें ! ॥ १० ॥ श्रीशुकाचार्य ह्मणालाः–हे भरतकुलोत्पन्ना परीक्षित् राजा, याप्रमाणें अदितीनें स्तुति केलेला, तो सर्वभूतांचा अंतर्यामी कमलनयन भगवान् तिला असें ह्मणाला कीं:– ॥ ११ ॥ श्रीभगवान् ह्मणाला– हे देवमाते, शत्रूंनीं संपत्ति हरण करून स्वस्थानापासून भ्रष्ट केलेल्या पुत्रांसंबंधीं जें

स्वरूपाय । कुतः । शश्वदुपबृंहितो नित्योर्जितो यः पूर्णबोधस्तेन व्यापादितं नित्यनिरस्तमात्मनि तमो मायालक्षणं येन तस्मै ॥ ९ ॥ अस्मदीयमनोरथपूरणमीषत्करमेव तवेति कैमुत्यन्यायेनाह । आयुः परं ब्रह्मायुः। पुनरपि द्यौश्च भूश्च रसातलं च द्योभूरसाः । द्यौरिति पृथक्पाठे भूश्च रसाश्च बिलस्वर्गा इति विग्रहः । रसेति पाठे त्रीणि पदानि ।

आयुः परं वपुरभीष्टमतुल्यलक्ष्मीर्द्योभूरसाः सकलयोगगुणास्त्रिवर्गः ॥ ज्ञानं च केवलमनंत भवंति तुष्टात्त्वत्तो नृणां किमु सपत्नजयादिराशीः ॥ १० ॥ श्रीशुक उवाच ॥ अदित्यैवं स्तुतो राजन्भगवान्पुष्करेक्षणः ॥ क्षेत्रज्ञः सर्वभूतानामिति होवाच भारत ॥ ११ ॥ श्रीभगवानुवाच ॥ देवमातर्भवत्या मे विज्ञातं चिरकांक्षितम् ॥ यत्सपत्नैर्हृतश्रीणां च्यावितानां स्वधामतः ॥ १२ ॥ तान्विनिर्जित्य समरे दुर्मदानसुरर्षभान् ॥ प्रतिलब्धजयश्रीभिः पुत्रैरिच्छस्युपासितुम् ॥ १३ ॥ इंद्रज्येष्ठैः स्वतनयैर्हतानां युधि विद्विषाम् ॥ स्त्रियो रुदंतीरासाद्य द्रष्टुमिच्छसि दुःखिताः ॥ १४ ॥ आत्मजान्सुसमृद्धांस्त्वं प्रत्याहृतयशःश्रियः ॥ नाकपृष्ठमधिष्ठाय क्रीडतो द्रष्टुमिच्छसि ॥ १५ ॥ प्रायोऽधुना तेऽसुरयूथनाथा अपारणीया इति देवि मे मतिः ॥ यत्तेऽनुकूलेश्वरविप्रगुप्ता न विक्रमस्तत्र सुखं ददाति ॥ १६ ॥

सकला योगगुणा अणिमादयः ॥ १० ॥ क्षेत्रज्ञोंऽतर्यामी ॥ ११ ॥ सपत्नैर्हृता श्रीर्येषां स्वधामतश्च्यावितानां च पुत्राणां संबंधि यत्त्वद्भवत्याश्चिरमाकांक्षितं मया विज्ञातम् ॥ १२ ॥ कांक्षितमेवाह । तानिति त्रिभिः । प्रतिलब्धो जयश्च श्रीश्च यैस्तैः पुत्रैः सहोपासितुमेकत्र स्थातुमिच्छसि ॥१३॥१४॥ प्रत्याहृतं यशश्च श्रीश्च यैस्तान् ॥ १५ ॥ अपारणीया अन

कांहीं बहुत कालपर्यंत तुला अपेक्षित आहे तें मीं जाणिलें आहें ॥ १२ ॥ आतां तें अपेक्षित कोणतें ह्मणून विचारशील तर–हे भद्रे, त्या दुर्मद असुरश्रेष्ठांना समरांगणामध्यें अगदीं पूर्णपणें जिंकून, पुनरपि जय व संपत्ति प्राप्त झालेल्या आपल्या पुत्रांसहवर्तमान एकत्र राहण्याची तूं इच्छा करींत आहेस ॥ १३ ॥ त्याचप्रमाणें हे वीरमाते, ज्यामध्यें इंद्र ज्येष्ठ आहे अशा आपल्या पुत्रांनीं मारिलेल्या शत्रूंच्या दुःखित स्त्रियांना आपआपल्या भर्त्यासमीप जाऊन रोदन करीत असतांना तूं अवलोकन करण्याची इच्छा करीत आहेस ॥ १४ ॥ व तसेंच शत्रूंना जिंकून त्यांपासून कीर्ति व संपत्ति पुनरपि परत घेऊन अत्यंत समृद्ध झालेल्या व स्वर्गावर येऊन क्रीडा करणाऱ्या आपल्या पुत्रांना तूं पाहण्याची इच्छा करींत आहेस ॥ १५ ॥ परंतु हे देवि, सांप्रतकाळीं ते असुरसेनाधिपति प्रायशः अजिंक्य आहेत असें मला वाटतें. कारण, अनुकूल अशा स-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

र्थ विप्रांनीं त्यांचें रक्षण केलें आहे, ह्मणून या वेळीं त्यांच्या पराभवाविषयीं केलेला पराक्रम सुखकारक होणार नाहीं ॥ १६ ॥ तथापि हे देवि, ज्याअर्थीं तूं मला व्रताचरणानें संतुष्ट केलें आहेस त्याअर्थीं मला काहींतरी उपाय योजणें अवश्यच आहे. कारण माझें पूजन, इच्छेनुरूप फल देणारें असल्यामुळें व्यर्थ होण्यास योग्य नाहीं ॥ १७ ॥ आणि तूं तर आपल्या पुत्रांच्या रक्षणाकरितां पयोव्रतानें माझें यथोचित पूजन व उत्तम प्रकारानें स्तवनहि केलें आहेस. तस्मात् कश्यपाच्या तपापासून उत्पन्न झालेल्या तेजाचेठिकाणीं स्थित झालेला मी, आपल्या अंशानें तुझें पुत्रत्व स्वीकारून तुझ्या पुत्रांचें रक्षण करीन ॥ १८ ॥ ह्मास्तव हे भद्रे, पतीचेठिकाणीं तेजोरूपानें मी स्थित आहें अशी भावना करून, आपल्या निर्दोष प्रजाधिपति पतीची तूं सेवा कर ॥ १९ ॥ आणि तुला जरी कोणी प्रश्न केला तथापि तूं हें मीं तुला सांगि-

---

तिक्रमणीयाः । यद्यस्मात् अनुकूल ईश्वरः कालो येषां तैर्विप्रैर्गुप्ता रक्षिताः । अनुकूलैरीश्वरैः समर्थैर्विप्रैर्गुप्ता इति वा ॥ १६ ॥ मम मया चिंत्य एव । तत्र हेतुः संतोषितस्येत्यादि । श्रद्धानुरूपमिच्छानुसारेण फलहेतुत्वात् ॥ १७ ॥ मारीचस्य तपस्यधिष्ठाय स्थितः सन् । गोप्ताऽस्मि पालयिष्यामि ॥ १८ ॥ अतः पतिमुपधाव

अथाप्युपायो मम देवि चिंत्यः संतोषितस्य व्रतचर्यया ते ॥ ममार्चनं नार्हति गंतुमन्यथा श्रद्धानुरूपं फलहेतुकत्वात् ॥ १७ ॥
त्वयार्चितश्चाहमपत्यगुप्तये पयोव्रतेनानुगुणं समीडितः ॥ स्वांशेन पुत्रत्वमुपेत्य ते सुतान्गोप्ताऽस्मि मारीचतपस्यधिष्ठितः ॥ १८ ॥
उपधाव पतिं भद्रे प्रजापतिमकल्मषम् ॥ मां च भावयती पत्यावेवंरूपमवस्थितम् ॥ १९ ॥ नैतत्परस्मा आख्येयं पृष्टयाऽपि कथंचन ॥ सर्वं संपद्यते देवि देवगुह्यं सुसंवृतम् ॥ २० ॥ श्रीशुक उवाच ॥ एतावदुक्त्वा भगवांस्तत्रैवांतरधीयत ॥ अदितिर्दुर्लभं लब्ध्वा हरेर्जन्मात्मनि प्रभोः ॥ २१ ॥ उपाधावत्पतिं भक्त्या परया कृतकृत्यवत् ॥ स वै समाधियोगेन कश्यपस्तदबुद्ध्यत ॥ २२ ॥ प्रविष्टमात्मनि हरेरंशं ह्यवितथेक्षणः ॥ सोऽदित्यां वीर्यमाधत्त तपसा चिरसंभृतम् ॥ समाहितमना राजन्दारुण्यग्निं यथाऽनिलः ॥ २३ ॥ अदितेर्धिष्ठितं गर्भं भगवंतं सनातनम् ॥ हिरण्यगर्भो विज्ञाय समीडे गुह्यनामभिः ॥ २४ ॥

भजस्व ॥ १९ ॥ देवानां गुह्यं रहस्यं सर्वं सुसंवृतं सुगुप्तं सत्संपद्यते सिद्ध्यति ॥ २० ॥ प्रभोर्हरेरात्मनि जन्म लब्ध्वा ॥ २१ ॥ २२ ॥ अवितथमीक्षणं दृष्टिर्यस्य सः । अनिलो यथा सर्वत्र समोऽपि दारुणि संघर्षेण वनदाहकमग्निमाधत्ते एवं स्वयं पुत्रेषु समोऽपि दैत्यक्षपणं वीर्यमाधत्तेत्यर्थः ॥ २३ ॥ धिष्ठितमधिष्ठाय स्थितम् । समीडे तुष्टावेत्यर्थः ॥ २४ ॥

तलेलें कोणाला व कशाहि प्रकारानें सांगूं नये. कारण, हे देवि, देवांचें सर्व रहस्य उत्तम प्रकारानें गुप्त असलें तरच सिद्ध होतें ॥ २० ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, इतकें सांगून भगवान् त्याचठिकाणीं गुप्त झाला. तेव्हां प्रभु श्रीहरीचें दुर्लभ जन्म, आपलेठिकाणीं होणार असें जाणून स्वतःला कृतकृत्य झाल्यासारखें मानणारी ती अदिति, परम प्रेमानें पतीची सेवा करूं लागली ॥ २१ ॥ इकडे सर्वज्ञ अशा त्या कश्यपानेंहि आपलेठिकाणीं श्रीहरीचा अंश प्रविष्ट झाला आहे असें समाधीच्या योगानें जाणिलें ॥ २२ ॥ नंतर हे राजा, ज्याप्रमाणें वायु सर्वत्र सारखा असूनहि काष्ठाचेठिकाणीं संघर्षणाच्या योगानें वनाला जाळणाऱ्या अग्नीला स्थापन करितो त्याप्रमाणें स्वस्थ अंतःकरणानें युक्त अशा त्या कश्यपानें, स्वतः सर्व पुत्रांविषयीं समदृष्टि धारण केली असूनहि तपाच्या योगानें बहुतकालपर्यंत धारण केलेलें दैत्यनाशक वीर्य अदितीचेठिकाणीं स्थापन केलें ॥ २३ ॥ असो. तदनंतर अदितीच्या गर्भाचा आश्रय करून सनातन भगवान् राहिला आहे असें जाणून, ब्रह्मदेवानें विशेष गुणांना दर्शविणाऱ्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

गुह्य नांवांनीं उत्तमप्रकारेंकरून त्याची स्तुति केली ॥ २४ ॥ ब्रह्मदेव ह्मणाला—हे महाकीर्तिमान् भगवान् उरुक्रमा, तुझा जयजयकार असो; तूं ब्राह्मणांचें हित करणारा, असून नानाप्रकारची क्रीडा करणारा आहेस. तुज गुणत्रयनियंत्या भगवंताला वारंवार नमस्कार असो ॥ २५ ॥ तसाच पृश्निपुत्र, वेदांचेठिकाणीं प्रकाशमान, नाभीचेठिकाणीं त्रैलोक्य स्थापन करणारा असल्यामुळें सर्व उत्पन्न करणारा, त्रैलोक्याच्या पृष्ठभागीं (वैकुंठाचेठिकाणीं राहणारा), अंतर्यामिरूपानें जीवांचेठिकाणीं प्रविष्ट व सर्वव्यापी असा जो तूं त्या तुला नमस्कार असो ॥ २६ ॥ हे ईश्वरा, जगताचा आदि अंत व मध्य तूंच असल्यामुळें ज्या तुला 'अनंतशक्ति पुरुष' असें ह्मणतात आणि जसा उदकाचा मोठा प्रवाह आपल्या मध्यें पडलेलें तृणवगैरे ओढून नेतो त्याप्रमाणें हें संपूर्ण विश्व कालात्मा तूं प्रलयकालीं आकर्षण करितोस ॥ २७ ॥ व हे देवा, स्थावर-

---

॥ २५ ॥ अदितेरेव पूर्वस्मिन् जन्मनि पृश्निरिति नाम तस्या गर्भायार्भकाय । वेदा गर्भे यस्य । यद्वा वेदानां गर्भाय वेदेषु प्रकाशमानायेत्यर्थः । त्रयो लोका नाभौ यस्य स त्रिनाभस्तस्मै । त्रयाणां लोकानां पृष्ठे उपरि स्थिताय । शिपिशब्देन पशवो जीवास्तेष्वंतर्यामितया प्रविष्टाय । यज्ञो वै विष्णुः पशवः शिपिर्यज्ञ एव पशुषु प्रतितिष्ठतीति श्रुतेः । यद्वा शिपयो रश्मयस्तैर्वेष्टितायेत्यर्थः । तथापि विष्णवे व्यापिने ॥२६॥अंतः पतितं तृणादि यथा गंभीरं स्रोत आक्षिपत्याकर्षति तथा कालात्मा भवान्विश्वमाक्षिपति

ब्रह्मोवाच ॥ जयोरुगाय भगवन्नुरुक्रम नमोऽस्तु ते ॥ नमो ब्रह्मण्यदेवाय त्रिगुणाय नमो नमः ॥ २५ ॥ नमस्ते पृश्निगर्भाय वेदगर्भाय वेधसे ॥ त्रिनाभाय त्रिपृष्ठाय शिपिविष्टाय विष्णवे ॥ २६ ॥ त्वमादिरंतो भुवनस्य मध्यमनंतशक्तिं पुरुषं यमाहुः ॥ कालो भवानाक्षिपतीश विश्वं स्रोतो यथांऽतः पतितं गभीरम् ॥ २७ ॥ त्वं वै प्रजानां स्थिरजंगमानां प्रजापतीनामसि संभविष्णुः ॥ दिवौकसां देव दिवश्च्युतानां परायणं नौरिव मज्जतोऽप्सु ॥ २८ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे अष्टमस्कंधे सप्तदशोऽध्यायः ॥ १७ ॥

श्रीशुक उवाच ॥ इत्थं विरिंचस्तुतकर्मवीर्यः प्रादुर्बभूवामृतभूरदित्याम् ॥ चतुर्भुजः शंखगदाब्जचक्रः पिशंगवासा नलिनायतेक्षणः ॥ १ ॥

॥ २७ ॥ प्रजापतीनां च त्वमेव संभविष्णुरुत्पादनशीलोऽसि । अयं भावः । नह्येवंभूतस्य तव जन्मादिसंभवः किंतु देवानां प्रजापतीनां प्रजानां च परमाश्रयत्वेन तत्कार्यसाधना यावतारोऽयमतस्तान्स्वर्गच्युतान्पुनः स्वर्गे स्थापयेति ॥२८॥ इति श्रीमद्भागवतेऽष्टमस्कंधे टीकायां सप्तदशोऽध्यायः ॥ १७ ॥ ॥ ततस्त्वष्टादशे भूत्वा वामनः सत्कृतोऽखिलैः ॥ यज्ञं गतस्ततस्तेन सत्कृत्योक्तो वरान् वृणु ॥ १ ॥ इत्थं विरिंचेन स्तुतं कर्म देवकार्यलक्षणं वीर्यं च प्रभावो यस्य स हरिरदित्यां प्रादुर्बभूवेति त्रयाणामन्वयः ।

जंगमात्मक प्रजा आणि अस्मदादिक प्रजापति ह्यांना उत्पन्न करणें हा तुझा स्वभावच आहे. तस्मात्, उदकामध्यें बुडत असलेल्या लोकांना ज्याप्रमाणें नांव उत्तम प्रकारचा आश्रय आहे, त्याप्रमाणें स्वर्गापासून च्युत झालेल्या देवांचा सर्वोत्कृष्ट आश्रय तूंच आहेस ह्मणून तूं त्यांना पुनरपि स्वर्गावर स्थापन कर ॥ २८ ॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील अष्टमस्कंधांमध्यें अदितिवरप्रदानकथननामक हा सतरावा अध्याय समाप्त झाला ॥ १७ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां अठराव्या अध्यायामध्यें भगवंताचा वामनावतार झाला असतां त्याचा सर्वांनीं सत्कार केला. नंतर तो बलीच्या यज्ञामध्यें गेल्यावर बलीनें त्याचा सत्कार करून वर मागण्याविषयीं त्याची प्रार्थना केली, अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला— हे राजा, याप्रमाणें ब्रह्मदेवानें श्रीहरीच्या कर्मांची व प्रभावाची प्रशंसा केली असतां, जन्ममरणशून्य शंख, चक्र, गदा व पद्म हीं आयुधें धारण करणारा, पीतांबरधारी, चतुर्भुज, आणि कमलाप्रमाणें सुंदर व दीर्घ ज्याचे नेत्र आहेत असा तो

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रीहरि अदितीचेठिकाणीं प्रकट झाला ॥ १ ॥ तो पुरुषोत्तम, श्यामवर्ण असून निर्मल होता, मकराकार कुंडलांच्या प्रभेनें त्याच्या मुखकमलाचेठिकाणीं उत्तम शोभा आलेली होती, त्याच्या वक्षस्थलाचेठिकाणीं श्रीवत्सलांछन होतें, त्यानें कडीं तोडे व बाहुभूषणें ह्यांसहवर्तमान उज्ज्वल किरीट, मेखला व सर्वोत्कृष्ट नूपुरें हीं धारण केलीं होतीं ॥ २ ॥ तो भ्रमरसमूहानें नादित झालेल्या आपल्या सुंदर वनमालेच्या योगानें प्रकाशित झाला होता, त्या हरीनें कंठामध्यें कौस्तुभमणि धारण केला होता आणि आपल्या कांतीनें प्रजाधिपति कश्यपाच्या गृहामध्यें असलेल्या अंधकाराचा नाश केला होता ॥ ३ ॥ असो. त्या अवताराच्या वेळीं दिशा प्रसन्न झाल्या, सरोवरांतील उदकें निर्मल

अमृतभूर्मृत्युजन्मशून्यः । शंखगदाब्जचक्राण्यस्य संतीति तथा । अर्श आदित्वेन मत्वर्थीयोऽच् प्रत्ययः । अविसर्गपाठे स चासौ पिशंगवासाश्च ॥ १ ॥ झषराजो मकरस्तदाकारयोः कुंडलयोस्त्विषा उल्लसंती श्रीर्वदनांबुजे यस्य । श्रीवत्सो वक्षसि यस्य । वलयैरंगदैश्च सहोल्लसंति किरीटादीनि यस्य ॥ २ ॥ श्रीमत्या वनमालया विराजितः । वेश्मगतं तमः ॥ ३ ॥ अग्निजिह्वा देवाः । नगाः पर्वताः ॥ ४ ॥ तत्प्रादुर्भावसमयमाह । श्रोणायामिति । भाद्रपदशुक्लद्वादशी श्रवणद्वादशीति प्रसिद्धा तस्याम् । तत्रापि श्रोणायां श्रवणस्थे चंद्र इत्यर्थः । तत्रापि श्रवणस्य प्रथमांशेऽभिजिति नक्षत्रे । तच्च श्रुत्या दर्शितम् । अभिजिन्नाम नक्षत्रमुपरिष्टादषाढानामधस्ताच्छ्रोणाया इति । एवंविशिष्टे

श्यामावदातो झषराजकुंडलत्विषोल्लसच्छ्रीवदनांबुजः पुमान् ॥ श्रीवत्सवक्षा वलयांगदोल्लसत्किरीटकांचीगुणचारुनूपुरः ॥ २ ॥ मधुव्रतव्रातविघुष्टया स्वया विराजितः श्रीवनमालया हरिः ॥ प्रजापतेर्वेश्मतमः स्वरोचिषा विनाशयन्कंठनिविष्टकौस्तुभः ॥ ३ ॥ दिशः प्रसेदुः सलिलाशयास्तदा प्रजाः प्रहृष्टा ऋतवो गुणान्विताः ॥ द्यौरंतरिक्षं क्षितिरग्निजिह्वा गावो द्विजाः संजहृषुर्नगाश्च ॥ ४ ॥ श्रोणायां श्रवणद्वादश्यां मुहूर्तेऽभिजिति प्रभुः ॥ सर्वे नक्षत्रताराद्याश्चक्रुस्तज्जन्म दक्षिणम् ॥ ५ ॥ द्वादश्यां सविता तिष्ठन्मध्यंदिनगतो नृप ॥ विजया नाम सा प्रोक्ता यस्यां जन्म विदुर्हरेः ॥ ६ ॥ शंखदुंदुभयो नेदुर्मृदंगपणवानकाः ॥ चित्रवादित्रतूर्याणां निर्घोषस्तुमुलोऽभवत् ॥ ७ ॥

मुहूर्ते प्रभुः प्रादुर्बभूवेत्यर्थः । किंच नक्षत्राण्यश्विन्यादीनि । ताराशब्देन ग्रहा गुरुशुक्रादयस्ते आद्या येषां ते सूर्यादयोऽपि सर्वे तस्य जन्म दक्षिणमुदारं चक्रुः । जन्ममुहूर्ते गुणा बहवो बभूवुरित्यर्थः ॥ ५ ॥ विशेषांतरमाह । यस्यां द्वादश्यां हरेर्जन्म तत्तस्यामहन्येव विदुः । तदा च मध्यंदिनगतः सविताऽतिष्ठत् । सा च द्वादशी विजया नाम प्रोक्तेत्यन्वयः ॥ ६ ॥ शंखादयो ये तेषामन्येषां च चित्रतूर्याणां निर्घोषोऽभवत् ॥ ७ ॥

झालीं, सर्व प्रजाजनांना हर्ष झाला, ऋतु आपापल्या पुष्पफलादि गुणांनीं युक्त झाले व स्वर्गलोक, अंतरिक्ष लोक, भूलोक, देव, गाई द्विज आणि पर्वत हे सर्व हर्ष युक्त झाले ॥ ४ ॥ आतां त्या भगवंताचा जन्मकाल सांगतो– हे राजा, श्रवणनक्षत्राचेठिकाणीं चंद्र असतांना श्रवणद्वादशीचेदिवशीं अभिजित् मुहूर्तावर प्रभूचा अवतार झाला, तेव्हां अश्विन्यादिक नक्षत्रें आणि गुरु, शुक्र, सूर्य, चंद्र इत्यादिक ग्रह ह्या सर्वांनीं त्याचें जन्म सुखकारक आहे असें सुचविलें ॥ ५ ॥ हे राजा, ज्या द्वादशीचेठिकाणीं श्रीहरीचा अवतार झाला त्या द्वादशीला विजया द्वादशी असें ह्मणतात, त्या द्वादशीचेठिकाणीं सूर्य मध्यान्हीं होता त्या मुहूर्ताला अभिजित् मुहूर्त असें ह्मणतात ॥ ६ ॥ असो. त्याकालीं शंख, दुंदुभि, मृदंग, पणव व आनक हीं वाद्यें वाजूं लागलीं, त्यावेळीं ह्या वाद्यांचा व इतरहि चौघडा डंकावगैरे वाद्यांचा तुमुल नाद होऊं लागला ॥ ७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्यावेळीं अप्सरा प्रसन्न होऊन नृत्य करूं लागल्या, गंधर्वश्रेष्ठ गायन करूं लागले, मुनि स्तुति करूं लागले व देव, मनु, पितर, अग्नि, सिद्धांचे व विद्याधरांचे गण, किंपुरुषासहवर्तमान किंनर, चारण, यक्ष, राक्षस, गरुडपक्षी, उत्तम भुजंग व देवांचे अनुयायी हे सर्व, यथायोग्य– स्तुति, गायन, प्रशंसा व नृत्य करीत होत्साते अदितीच्या आश्रमस्थानावर पुष्पांचा वर्षाव करूं लागले ॥ ८ ॥ ९ ॥ १० ॥ त्यावेळीं अदिति आपल्या गर्भापासून उत्पन्न झालेल्या त्या पुरुषोत्तमाला अवलोकन, करून विस्मयपूर्वक आनंद पावली. तेव्हां प्रजाधिपति कश्यपहि आपल्या योगमायेनें देहाचा स्वीकार केलेल्या त्या भगवंताला अवलोकन करून विस्मित होऊन त्याला 'विजयी हो' असें ह्मणाला ॥ ११ ॥ आतां दुसरेंहि त्यावेळीं आश्चर्य झालें कीं– हे राजा, स्वतः अव्यक्तचैतन्यरूपी हरीनें, कांति, भूषणें व आयुधें ह्यांच्या योगानें व्यक्त भासणारें

देवा मनव इत्यादीनां कुसुमैः समवाकिरन्निति तृतीयेनान्वयः ॥ ८ ॥ ९ ॥ १० ॥ ११ ॥ विस्मयांतरमाह । यत्तदिति । यत्तद्वपुर्हरिरधारयत्प्रकटितवांस्तेनैव वपुषा

प्रीताश्चाप्सरसोऽनृत्यन्गंधर्वप्रवरा जगुः ॥ तुष्टुवुर्मुनयो देवा मनवः पितरोऽग्नयः ॥ ८ ॥ सिद्धविद्याधरगणाः सकिंपुरुषकिन्नराः ॥ चारणा यक्षरक्षांसि सुपर्णा भुजगोत्तमाः ॥ ९ ॥ गायंतोऽतिप्रशंसंतो नृत्यंतो विबुधानुगाः ॥ अदित्या आश्रमपदं कुसुमैः समवाकिरन् ॥ १० ॥ दृष्ट्वाऽदितिस्तं निजगर्भसंभवं परं पुमांसं मुदमाप विस्मिता ॥ गृहीतदेहं निजयोगमायया प्रजापतिश्चाह जयेति विस्मितः ॥ ११ ॥ यत्तद्वपुर्भाति विभूषणायुधैरव्यक्तचिद्व्यक्तमधारयद्धरिः ॥ बभूव तेनैव स वामनो बटुः संपश्यतोर्दिव्यगतिर्यथा नटः ॥ १२ ॥ तं बटुं वामनं दृष्ट्वा मोदमाना महर्षयः ॥ कर्माणि कारयामासुः पुरस्कृत्य प्रजापतिम् ॥ १३ ॥ तस्योपनीयमानस्य सावित्रीं सविताऽब्रवीत् ॥ बृहस्पतिर्ब्रह्मसूत्रं मेखलां कश्यपोऽददात् ॥ १४ ॥ ददौ कृष्णाजिनं भूमिर्दंडं सोमो वनस्पतिः ॥ कौपीनाच्छादनं माता द्यौश्छत्रं जगतः पतेः ॥ १५ ॥ कमंडलुं वेदगर्भः कुशान्सप्तर्षयो ददुः ॥ अक्षमालां महाराज सरस्वत्यव्ययात्मनः ॥ १६ ॥ तस्मा इत्युपनीताय यक्षराट् पात्रिकामदात् ॥ भिक्षां भगवती साक्षादुमाऽदादंबिका सती ॥ १७ ॥

मातापित्रोः संपश्यतोरेव वामनो बटुर्बभूव । दिव्यगतिरद्भुतचेष्टितः । स्वयं कथंभूतः । अव्यक्तचिद्रूपः । कथमधारयत् । भातिर्दीप्तिर्विभूषणानि चायुधानि च तैर्व्यक्तं यथा भवति तथा ॥ १२ ॥ कर्माणि जातकर्मादीनि ॥ १३ ॥ १४ ॥ वनस्पतिर्वनानां पतिः सोमः ॥ १५ ॥ १६ ॥ पात्रिकां भिक्षापात्रीम् ॥ १७ ॥

जें पूर्वी सांगितलेलें मोठें शरीर धारण केलें होतें त्याच रूपानें तो अद्भुत लीला धारण करणारा श्रीहरि, मातापितर अवलोकन करीत असतांच बटु वामन झाला ॥ १२ ॥ तेव्हां बटु वामन झालेल्या त्या भगवंताला अवलोकन करून आनंदित झालेल्या महर्षींनीं, प्रजाधिपति कश्यपाला पुढें करून त्याचे जातकर्मादि संस्कार करविले ॥ १३ ॥ तदनंतर त्याचें उपनयन होऊं लागलें असतां, प्रत्यक्ष सूर्यानें त्याला गायत्रीमंत्राचा उपदेश केला, बृहस्पतीनें यज्ञोपवीत दिलें व कश्यपानें कटिसूत्र अर्पण केलें ॥ १४ ॥ तसेंच भूमीनें कृष्णाजिन, वनाधिपति चंद्रानें दंड, अदिति मातेनें कौपीनरूप आच्छादन आणि स्वर्गाभिमानि देवतेनें त्या जगत्पालक वामनाला छत्र अर्पण केलें ॥ १५ ॥ तसाच ब्रह्मदेवानें कमंडलु, सप्तर्षींनीं कुश आणि हे महाराजा, सरस्वतीनें त्या अविनाशिस्वरूपी वामनाला रुद्राक्षमाळा समर्पण केली ॥ १६ ॥ ह्याप्रमाणें उपनयन झालेल्या त्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वामनाला कुबेरानें भिक्षापात्र दिलें आणि साक्षात् षड्गुणैश्वर्यसंपन्न व जगन्माता अशी जी पतिव्रता उमा देवी तिनें, त्याला भिक्षा अर्पण केली ॥ १७ ॥ अशी; ह्याप्रमाणें
सत्कृत झालेला तो श्रेष्ठ बटु, आपल्या ब्रह्मतेजानें ब्रह्मर्षिगणांनीं सेवन केलेल्या त्या सभेपेक्षा हि अधिक शोभूं लागला ॥ १८ ॥ नंतर तो ब्राह्मणरूपी भगवान् वामन, स्था-
पन केलेल्या व प्रज्वलित झालेल्या त्या उपनयनाग्नीला सभोंवतीं परिषेक करून परिस्तरणें घालून व त्याची पूजा करून, समिधांनीं त्यामध्यें होम करूं लागला ॥ १९ ॥
आतां ज्या कार्याकरितां भगवंतानें बटुरूप धारण केलें तें कार्य सांगतो—हे राजा, नंतर त्या वामनानें भृगुवंशस्थ ब्राह्मणांकडून करविलेल्या अश्वमेधांनीं ईश्वराचें यजन
करणाऱ्या व धनादिकांच्या योगानें समृद्ध झालेल्या बलिराजाचें श्रवण करून, सर्व बलानें संपूर्ण असा तो भगवान् वामन, पदोपदीं आपल्या भारानें पृथ्वी नम्र करीत क-
रीत स्वस्थानापासून निघून त्या बलीच्या समीपभागीं गेला ॥ २० ॥ तेव्हां, नर्मदेच्या उत्तरतटाकीं भृगुकच्छसंज्ञक क्षेत्रामध्यें त्या बलीच्या श्रेष्ठ क्रतूंचें अनुष्ठान करीत

स एवं संभावितो मारिषः श्रेष्ठो बटुर्ब्रह्मवर्चसेन ब्रह्मर्षिगणसंजुष्टां तां सभामतिक्रम्यारोचत ॥ १८ ॥ १९ ॥ यदर्थं बटुर्बभूव तदाह । श्रुत्वेत्यादि यावत्समाप्ति । यजमानं
यजंतम् । भृगूणां भृगुभिः । उपकल्पितैः प्रवर्तितैः । अखिलेन सारेण बलेन संभृतः संपूर्णः ॥ २० ॥ नर्मदाया उत्तरे तटे भृगुकच्छसंज्ञके क्षेत्रे क्रतूत्तमं प्रवर्तयंतो ये बले-

स ब्रह्मवर्चसेनैवं सभां संभावितो बटुः ॥ ब्रह्मर्षिगणसंजुष्टामत्यरोचत मारिषः ॥ १८ ॥ समिद्धमाहितं वह्निं कृत्वा परिसमूहनम् ॥
परिस्तीर्य समभ्यर्च्य समिद्भिरजुहोद्द्विजः ॥ १९ ॥ श्रुत्वाऽश्वमेधैर्यजमानमूर्जितं बलिं भृगूणामुपकल्पितैस्ततः ॥ जगाम तत्राखि-
लसारसंभृतो भारेण गां सन्नमयन्पदे पदे ॥ २० ॥ तं नर्मदायास्तट उत्तरे बलेर्य ऋत्विजस्ते भृगुकच्छसंज्ञके ॥ प्रवर्तयंतो भृगवः
क्रतूत्तमं व्यचक्षतारादुदितं यथा रविम् ॥ २१ ॥ त ऋत्विजो यजमानः सदस्या हतत्विषो वामनतेजसा नृप ॥ सूर्यः किलाया-
त्युत वा विभावसुः सनत्कुमारोऽथ दिदृक्षया क्रतोः ॥ २२ ॥ इत्थं सशिष्येषु भृगुष्वनेकधा वितर्क्यमाणो भगवान्स वामनः ॥
छत्रं सदंडं सजलं कमंडलुं विवेश बिभ्रद्धयमेधवाटम् ॥ २३ ॥ मौंज्या मेखलया वीतमुपवीताजिनोत्तरम् ॥ जटिलं वामनं विप्रं
मायामाणवकं हरिम् ॥ २४ ॥ प्रविष्टं वीक्ष्य भृगवः सशिष्यास्ते सहाग्निभिः ॥ प्रत्यगृह्णन्समुत्थाय संक्षिप्तास्तस्य तेजसा ॥ २५ ॥

ऋत्विजो भृगवस्ते तं व्यचक्षतापश्यन् । आरात्समीप एवोदितं रविमिव ॥ २१ ॥ त ऋत्विगादयः सूर्यः किलेत्येवमादि व्यतर्कयन्निति शेषः ॥ २२ ॥ हयमेधवाटमश्वमे-
धमंडपं विवेश ॥ २३ ॥ उपवीताजिनमुपवीतवद्धृतमजिनमेवोत्तरमुत्तरीयं यस्य तम् ॥ २४ ॥ संक्षिप्ता अभिभूताः संतः ॥ २५ ॥

असलेल्या भृगुवंशस्थ ऋत्विजांनीं, आपल्या समीपभागींच उदयास आलेल्या सूर्याप्रमाणें त्या वामनाला अवलोकन केलें ॥ २१ ॥ नंतर हे राजा, वामनाच्या तेजानें नि-
स्तेज झालेले ते ऋत्विज यजमान व सदस्य (सभासद) हे सर्वहि खरोखर हा सूर्य अथवा अग्नि किंवा सनत्कुमार असून यज्ञाचें अवलोकन करण्याकरितां येत आहे कीं
काय असा तर्क करूं लागले ॥ २२ ॥ ह्याप्रमाणें शिष्यवर्गासहवर्तमान भृगुवंशस्थ ब्राह्मण नानाप्रकारचे तर्क करीत असतां, दंडासहवर्तमान छत्र व जलपूर्ण कमंडलु धारण करणाऱ्या
त्या भगवान् वामनानें, अश्वमेध यज्ञाच्या मंडपामध्यें प्रवेश केला ॥ २३ ॥ नंतर मुंजनांवाच्या तृणानें निर्माण केलेल्या मेखलेनें ज्याची कटि बद्ध झाली आहे, उपवीताप्रमाणें
ज्यानें कृष्णाजिनरूप उत्तरीय वस्त्र धारण केलें आहे, मायेच्या योगानें ज्यानें ब्रह्मचारिरूप धारण केलें आहे व ज्यानें जटा धारण केल्या आहेत त्या प्रविष्ट झालेल्या वि-
प्ररूपी श्रीहरीला अवलोकन करून त्याच्या तेजानें दिपून गेलेल्या त्या भृगुवंशस्थ सशिष्य ब्राह्मणांनीं अग्नीसहवर्तमान उत्थापनपूर्वक त्याचा सत्कार केला ॥ २४ ॥ २५ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आणि रूपाला योग्य अशा अवयवांनीं युक्त असलेल्या त्या मनोरंजक सुंदर वामनाला अवलोकन करून, अतिहर्षानें युक्त झालेल्या त्या यजमानानें (बळीनें) त्याला आसन दिलें ॥ २६ ॥ नंतर स्वागत वचनानें अभिवंदन करून व त्या भगवंताचें पादप्रक्षालन करून निःसंग व मनोरंजक अशा त्या वामनाचें बलीनें पूजन केलें ॥ २७ ॥ तदनंतर जनाच्या पापांचा नाश करणारें व अत्यंत मंगलकारक असें त्या भगवंताचें पादप्रक्षालनोदक धर्मवेत्त्या त्या बलीनें मस्तकीं धारण केलें. जें गंगारूपी भगवत्पादोदक, देवादिदेव ब्रह्मदेव आणि चंद्रशेखर शिव, यांनीं परम प्रेमानें मस्तकीं धारण केलें आहे ॥ २८ ॥ नंतर तो बलि असें म्हणाला कीं,– हे ब्रह्मनिष्ठा, तुझें आगमन फार चांगलें झालें, तुला नमस्कार असो, आम्हीं तुझें काय कार्य करावें ? ह्याची आह्मांला आज्ञा व्हावी. कारण, हे श्रेष्ठा, तूं साक्षात् ब्रह्मर्षींचें मूर्तिमंत तपच आहेस असें मी समजतों

रूपस्यानुरूपा अवयवा यस्य तम् । दृष्ट्वेति शेषः ॥ २६ ॥ २७ ॥ चंद्रमौलिश्चेत्यन्वयः । अप्यर्थे चकारः । चंद्रमौलिरपि गंगारूपं यन्मूर्ध्नां दधारेत्यर्थः ॥ २८ ॥ हे आर्य

यजमानः प्रमुदितो दर्शनीयं मनोरमम् ॥ रूपानुरूपावयवं तस्मा आसनमाहरत् ॥ २६ ॥ स्वागतेनाभिनंद्याथ पादौ भगवतो बलिः ॥ अवनिज्यार्चयामास मुक्तसंगं मनोरमम् ॥ २७ ॥ तत्पादशौचं जनकल्मषापहं स धर्मविन्मूर्ध्न्यदधात्सुमंगलम् ॥ यद्देवदेवो गिरिशश्चंद्रमोलिर्दधार मूर्ध्ना परया च भक्त्या ॥ २८ ॥ बलिरुवाच ॥ स्वागतं ते नमस्तुभ्यं ब्रह्मन्किं करवाम ते ॥ ब्रह्मर्षीणां तपः साक्षान्मन्ये त्वार्य वपुर्धरम् ॥ २९ ॥ अद्य नः पितरस्तृप्ता अद्य नः पावितं कुलम् ॥ अद्य स्विष्टः क्रतुरयं यद्भवानागतो गृहान् ॥ ३० ॥ अद्याग्नयो मे सुहुता यथाविधि द्विजात्मज त्वच्चरणावनेजनैः ॥ हतांहसो वार्भिरियं च भूरहो तथा पुनीता तनुभिः पदैस्तव ॥ ३१ ॥ यद्यद्बटो वांछसि तत्प्रतीच्छ मे त्वामर्थिनं विप्रसुतानुतर्कये ॥ गां कांचनं गुणवद्धाम मृष्टं तथाऽन्नपेयमुत वा विप्रकन्याम् ॥ ग्रामान्समृद्धांस्तुरगान्गजान्वा रथांस्तथाऽर्हत्तम संप्रतीच्छ ॥ ३२ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे अष्टमस्कंधे बलिवामनसंवादेऽष्टादशोऽध्यायः ॥ १८ ॥ ॥

त्वा त्वां साक्षात्प्रत्यक्षं ब्रह्मर्षीणां तप एव मन्ये । कथंभूतं तपः । वपुर्धरं मूर्तिधारि ॥ २९ ॥ ३० ॥ त्वच्चरणावनेजनैर्वार्भिर्हतमंहो यस्य तस्य मे । पुनीता पवित्रीकृता ॥ ३१ ॥ मे मत्तः प्रतीच्छ गृहाण । हे अर्हत्तम पूज्यतम ॥ ३२ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टमस्कंधे टीकायामष्टादशोऽध्यायः ॥ १८ ॥ ॥

॥ २९ ॥ अहाहा ! काय सांगावें ? ज्याअर्थीं आमच्या गृहांप्रत तुझें आगमन झालें त्याअर्थीं आज आमचे पितर तृप्त झाले, आज आमचें कुल पवित्र झालें व आज हा आमचा क्रतु खरोखर यथासांग अनुष्ठित झाला आहे ॥ ३० ॥ हे द्विजपुत्रा, तुझ्या पादप्रक्षालनोदकांनीं निष्पाप झालेल्या माझे अग्नि आज यथाविधि हुत झाले आहेत; काय हें आश्चर्य ! तशीच ही माझी भूमिसुद्धां तुझ्या लहानशा चरणांनीं पवित्र झाली आहे ॥ ३१ ॥ यास्तव हे बटो ब्राह्मणपुत्रा, तूं मजपासून कांहींतरी मागण्यासाठीं आला आहेस असा माझा तर्क आहे, यास्तव तूं जें जें इच्छित असशील तें तें मजपासून ग्रहण कर. हे परमपूज्या, धेनु, सुवर्ण, सोपस्कर गृह, शुद्ध असें अन्नपान, विवाहार्थ ब्राह्मणाची कन्या, समृद्ध गांव, अश्व, गज अथवा रथ ह्यांतून जें तुला अपेक्षित असेल तें तूं मजपासून ग्रहण कर ॥ ३२ ॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

महापुराणांतील अष्टमस्कंधामध्यें बलिवामनसंवादसंबंधीं हा अठरावा अध्याय समाप्त झाला ॥ १८ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या एकोणिसाव्या अध्यायामध्यें श्रीहरीनें त्रिपादभूमीची याचना केल्यावर बलीनें ती देण्याविषयीं त्याला वचन दिलें असतां तें जाणणाऱ्या भृगूनें त्याचा निषेध केला ही कथा वर्णन केलेली आहे ॥ १॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, ह्याप्रमाणें यथार्थ व मधुर असें तें विरोचन पुत्र बलीचें धर्मयुक्त भाषण श्रवण करून; प्रसन्न झालेल्या भगवंतानें प्रशंसापूर्वक असें भाषण केलें कीं– ॥ १ ॥ श्रीभगवान् ह्मणाला– हे लोकनाथा, ऐहिक व्यवहाराविषयीं भृगुकुलोत्पन्नशुक्रादिक ब्राह्मण ज्याला प्रमाणभूत आहेत व पारलौकिक धर्माविषयीं कुळामध्यें वृद्ध व अत्यंत शांत असा पितामह प्रऱ्हाद ज्याला प्रमाणभूत आहे त्या तुझें हें वचन सत्य, कुलोचित, धर्मयुक्त आणि यशस्कर आहे ॥ २ ॥ अहाहा ! ! या तुझ्या कुळामध्यें याचकाला “ देणार नाहीं ” असें ह्मणणारा कोणी निःसत्व (धैर्यरहित) पुरुष अथवा प्रथमतः देण्याचें अभिवचन देऊन नंतर न देणारा असा कोणी कृपण (लोभी) पुरुष आजपर्यंत झाला नाहीं, पुढें

ऊनविंशे तु हरिणा याचिते च पदत्रयम् ॥ प्रतिश्रुते च बलिना जानन्भृगुरवारयत् ॥ १ ॥१ ॥ दातुः स्तुतिः स्वयं तुष्टिरित्यादिप्रस्तुतोचितम्॥ वक्तव्यमिति भिक्षूंस्तु शिक्षयन्नाह वामनः ॥ वचस्तवैतदिति षोडशभिः । हे जनदेव सांपराये पारलौकिके धर्मे । पितामहश्च प्रह्रादः प्रमाणम् ॥ २ ॥ निःसत्त्वस्य लक्षणं यो द्विजातये याचकाय प्रत्याख्याता

श्रीशुक उवाच ॥ इति वैरोचनेर्वाक्यं धर्मयुक्तं ससूनृतम् ॥ निशम्य भगवान्प्रीतः प्रतिनंद्येदमब्रवीत् ॥ १ ॥ श्रीभगवानुवाच ॥ वचस्तवैतज्जनदेव सूनृतं कुलोचितं धर्मयुतं यशस्करम् ॥ यस्य प्रमाणं भृगवः सांपराये पितामहः कुलवृद्धः प्रशांतः ॥ २ ॥ नह्येतस्मिन् कुले कश्चिन्निःसत्त्वः कृपणः पुमान् ॥ प्रत्याख्याता प्रतिश्रुत्य यो वाऽदाता द्विजातये ॥ ३ ॥ न संति तीर्थे युधि चार्थिनार्थिताः पराङ्मुखा ये त्वमनस्विनो नृपाः ॥ युष्मत्कुले यद्यशसाऽमलेन प्रह्राद उद्भाति यथोडुपः खे ॥ ४ ॥ यतो जातो हिरण्याक्षश्चरन्नेक इमां महीम् ॥ प्रतिवीरं दिग्विजये नाविंदत गदायुधः ॥ ५ ॥ यं विनिर्जित्य कृच्छ्रेण विष्णुः क्ष्मोद्धार आगतम् ॥ नात्मानं जयिनं मेने तद्वीर्यं भूर्यनुस्मरन् ॥ ६ ॥ निशम्य तद्वधं भ्राता हिरण्यकशिपुः पुरा ॥ हंतुं भ्रातृहणं क्रुद्धो जगाम निलयं हरेः ॥ ७ ॥ तमायांतं समालोक्य शूलपाणिं कृतांतवत् ॥ चिंतयामास कालज्ञो विष्णुर्मायाविनां वरः ॥ ८ ॥

न ददामीति वक्ता । कृपणस्य लक्षणं प्रथमं प्रतिश्रुत्य यो वा न दातेति ॥ ३ ॥ तीर्थे दानावसरे । यद्यस्मिन्युष्मत्कुले ॥ ४ ॥ यतो यस्मिन् जातः ॥ ५ ॥ क्ष्मोद्धारे भूम्या उद्धरणे ॥ ६ ॥ ७ ॥ ८ ॥

होणार नाहीं व वर्तमानकाळीं झालेलाहि नाहीं ॥ ३ ॥ आणि जसा आकाशामध्यें चंद्र प्रकाशित होतो तसा जेथें प्रऱ्हाद, आपल्या निर्मळ यशाच्या योगानें प्रकाशमान होत आहे त्या तुमच्या कुळामध्यें दानसमयीं अथवा युद्धप्रसंगीं, याचकानें अथवा प्रतिवीरानें प्रार्थना केली असतां पराङ्मुख होणारे असे धैर्यरहित राजे मुळींच झाले नाहींत ॥ ४ ॥ कारण, त्या कुळामध्यें उत्पन्न झालेला हिरण्याक्ष, हातामध्यें गदा घेऊन दिग्विजयाकरितां ह्या पृथ्वीवर एकटाच पर्यटन करीत असतां त्याला कोणी प्रतिपक्षी वीर आढळला नाहीं ॥ ५ ॥ पुढें वराहरूप धारण करणाऱ्या विष्णूनें भूमीचा उद्धार करतेवेळीं आलेल्या त्या हिरण्याक्षाला मोठ्या प्रयासानें जिंकिलें असतांहि त्याच्या अतिशय पराक्रमाचें स्मरण करून आपणास विजयी असें मानिलें नाहीं ॥ ६ ॥ तसाच पूर्वी त्याचा वध झाला हें ऐकून त्याचा भ्राता हिरण्यकशिपु, क्रुद्ध होऊन आपल्या भावाला मारणाऱ्या विष्णूचा वध करण्याकरितां श्रीहरीच्या स्थानाप्रत गेला ॥ ७ ॥ तेव्हां हस्तामध्यें शूल धारण करून साक्षात् मृत्यूप्रमाणें येत असलेल्या त्या हिरण्यकशिपूला

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अवलोकन करून, मायाविजनांमध्यें श्रेष्ठ असा समय जाणणारा विष्णु, असें चिंतन करूं लागला कीं, ॥ ८ ॥ प्राणी जिकडे जिकडे जातील तिकडे तिकडे त्यांच्या मागो-माग जसा मृत्यु जात असतो त्याप्रमाणें, मी जेथें जेथें जाईन तेथें तेथें हा येणारच आहे ह्यास्तव ह्या बाह्यदृष्टि हिरण्यकशिपूच्या हृदयामध्येंच मी प्रवेश करितों ॥ ९ ॥ हे दैत्याधिपते, ह्याप्रमाणें निश्चय करून भीतीमुळें ज्याच्या हृदयाला अत्यंत कंप सुटला आहे अशा त्या विष्णूनें, श्वासवायूमध्येंहि गुप्त होण्यासारखा सूक्ष्मदेह धारण करून आपल्याकडे तो शत्रु धांवत येत असतांना त्याच्या नासिकाद्वारानें त्याच्या शरीरामध्यें प्रवेश केला ॥ १० ॥ नंतर त्या हिरण्यकशिपूनें, शून्य असें त्या विष्णूचें स्थान सर्व बाजूंनीं शोधिलें परंतु त्यानें त्याला कोठेंच अवलोकन केलें नाहीं, तेव्हां तो क्रुद्ध होऊन मी जिंकिलें अशी गर्जना करूं लागला आणि पुन्हा पृथ्वी, स्वर्ग, दिशा, अंतरिक्ष, सप्तपाताळें व सप्तसमुद्र ह्या सर्वठिकाणीं त्याचा शोध करीत असूनहि त्या वीरानें त्या विष्णूला अवलोकन केलें नाहीं ॥ ११ ॥ तेव्हां त्याला न पाहात

पराग्दृशो बहिर्दृष्टेः ॥ ९ ॥ अतो हृदये स्थितं मां न ज्ञास्यतीत्येवं निश्चित्य श्वासानिलेंऽतर्हितः सूक्ष्मो देहो यस्य । विविग्नमतिकंपितं चेतो यस्य । अकंपित-चित्त इति वास्तवोऽर्थः ॥ १० ॥ न ददर्श अंतःप्रविष्टत्वात् ॥ ११ ॥ पुमान्यतः सकाशान्नावर्तते तद्ब्रह्मैव नूनं गतो नित्यमुक्तत्वादिति वास्तवोऽर्थः ॥ १२ ॥

यतो यतोऽहं तत्रासौ मृत्युः प्राणभृतामिव ॥ अतोऽहमस्य हृदयं प्रवेक्ष्यामि पराग्दृशः ॥ ९ ॥ एवं स निश्चित्य रिपोः शरीरमाधा-वतो निर्विविशेऽसुरेंद्र ॥ श्वासानिलांतर्हितसूक्ष्मदेहस्तत्प्राणरंध्रेण विविग्नचेताः ॥ १० ॥ स तन्निकेतं परिमृश्य शून्यमपश्यमानः कुपितो ननाद ॥ क्ष्मां द्यां दिशः खं विवरान्समुद्रान्विष्णुं विचिन्वन्न ददर्श वीरः ॥ ११ ॥ अपश्यन्निति होवाच मयाऽन्विष्टमिदं जगत् ॥ भ्रातृहा मे गतो नूनं यतो नावर्तते पुमान् ॥ १२ ॥ वैरानुबंध एतावानामृत्योरिह देहिनाम् ॥ अज्ञानप्रभवो मन्युरहं-मानोपबृंहितः ॥ १३ ॥ पिता प्रह्लादपुत्रस्ते तद्विद्वान्द्विजवत्सलः ॥ स्वमायुर्द्विजलिंगेभ्यो देवेभ्योऽदात्स याचितः ॥ १४ ॥

कथं नामासौ शूरशिरोमणिर्जीवन्नेव कातरवद्वैरमुपेक्षितवानित्याशंक्याह । वैरानुबंध एतावानामृत्योर्भवति । देहिनां देहे निगूढाभिमानवतां शूराणां तथाऽहंमानेनोपबृंहितो मन्युश्च भवत्येव । यतोऽज्ञानप्रभवः अज्ञाननिवृत्तेः प्राक् पौरुषत्यागो मांचमेवेत्यर्थः ॥ १३ ॥ तदेवं पूर्वजान्स्तुत्वा तत्पितरं स्तौति । पितेति । द्विजवेषधारिणो मद्वैरि-

---

होत्साता तो असें ह्मणाला कीं,– मीं सर्व जगत् शोधिलें तथापि ज्याअर्थीं माझ्या भावाला मारणारा विष्णु कोठेंहि माझ्या दृष्टीस पडत नाहीं त्याअर्थीं ज्याठिकाणीं गेलेला पुरुष फिरून परत येत नाहीं त्या ब्रह्मस्वरूपाप्रतच तो प्राप्त झाला आहे यांत संशय नाहीं ॥ १२ ॥ आतां, जीवंत असतांनाच ह्या शूरशिरोमणीनें एकाद्या भित्र्याप्र-माणें वैऱ्याची उपेक्षा कशी केली ? ' असें ह्मणशील तर– हे दैत्याधिपते, देहाविषयीं अभिमान बाळगणाऱ्या शूरांचा वैरसंबंध इतकाच, ह्मणजे मरणपर्यंतच आहे. कारण, वैर हें क्रोधापासून होतें, क्रोध हा अज्ञानापासून उत्पन्न होऊन अहंकारानें वृद्धिंगत झालेला असतो तो मरणापर्यंतच राहतो ॥ १३ ॥ ह्याप्रमाणें पूर्वजांची प्रशंसा करून आतां त्याच्या पित्याची स्तुति करितो कीं,– हे दैत्यराजा, प्ऱ्हादाचा पुत्र व ब्राह्मणवत्सल असा तुझा पिता जो विरोचन त्यानें हे ब्राह्मणवेष धारण करणारे माझे वैरी देवच आहेत ब्राह्मण नव्हेत असें जाणूनहि द्विजवेषधारी देवांनीं त्याची याचना केली असतां त्यानें त्यांना आपलें आयुष्य अर्पण केलें ॥ १४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

व त्याप्रमाणें तूंहि महाकीर्तिमान् अशा गृहस्थाश्रम्यानीं, शुक्रादिक ब्राह्मणांनीं,विरोचनादिक पूर्वजांनीं आणि दुसऱ्याहि शूरपुरुषांनीं आचरण केलेल्या धर्मांचा स्वीकार केला आहेस ॥ १९ ॥ तस्मात् हे दैत्याधिपते, माझ्या पावलानें मोजिलेलीं अशीं तीन पावलें इतकी किंचित् भूमि, मी तुज वरदश्रेष्ठापासून मागून घेतों ॥१६॥ हे राजा, अत्यंत उदार अशा तुज जगदीश्वरापासून मी दुसऱ्या अधिक कशाचीहि इच्छा करीत नाहीं. कारण, गरज लागेल तेवढ्याचाच स्वीकार करणाऱ्या ज्ञानी पुरुषाला पातक लागत नाहीं. आपल्या गरजेपेक्षां जास्त वस्तूंचा स्वीकार केला असतां पातक लागतें ॥ १७ ॥ याप्रमाणें ईश्वराचाहि याचनाप्रकार सांगून 'बलीचें बंधन कां केलें' या प्रश्नाच्या उत्तरत्वेंकरून त्या बलीचा गर्वातिरेकानें निंदाप्रकार सांगतो– बलिराजा ह्मणाला– हे ब्राह्मणपुत्रा, तुझीं भाषणें वृद्धांना संमत आहेत आणि तूं तर बाल असून तुझी बुद्धिहि

णो देवा एते न तु द्विजा इति तद्विद्वानपि स याचितः सन्स्वीयमायुर्देवेभ्यो ददौ ॥ १४ ॥ १९ ॥ मम पदा संमितानीति त्रिविक्रमपदाभिप्रायेण । न चानृतवादः । तत्रापि स्वपदत्वानपगमात् ॥ १६ ॥ यावदर्थमेव परिग्रहो यस्य सः ॥ १७ ॥ ईश्वरस्यापि याच्ञाप्रकारं चोक्त्वा बलेर्बंधनप्रश्नोत्तरत्वेन तस्य गर्वातिरेकेणाधिक्षेपप्रकारमाह । अहो इति त्रिभिः । ते वाचो वृद्धानां संमतास्त्वं तु बालो बालिशमतिश्च । बालिशानामज्ञानामिव मतिर्यस्य । अतएव स्वार्थंप्रति यथावदबुधः । वस्तुतस्तु बाल इवाबालिश-

भवानाचरितान्धर्मानास्थितो गृहमेधिभिः ॥ ब्राह्मणैः पूर्वजैः शूरैरन्यैश्चोद्दामकीर्तिभिः ॥ १५ ॥ तस्मात्त्वत्तो महीमीषद्वृणेऽहं वरदर्षभात् ॥ पदानि त्रीणि दैत्येंद्र संमितानि पदा मम ॥ १६ ॥ नान्यत्ते कामये राजन्वदान्याज्जगदीश्वरात् ॥ नैनः प्राप्नोति वै विद्वान्यावदर्थपरिग्रहः ॥ १७ ॥ बलिरुवाच ॥ अहो ब्राह्मणदायाद वाचस्ते वृद्धसंमताः ॥ त्वं बालो बालिशमतिः स्वार्थं प्रत्यबुधो यथा ॥ १८ ॥ मां वचोभिः समाराध्य लोकानामेकमीश्वरम् ॥ पदत्रयं वृणीते योऽबुद्धिमान्द्वीपदाशुषम् ॥ १९ ॥ न पुमान्मामुपव्रज्य भूयो याचितुमर्हति ॥ तस्माद्वृत्तिकरीं भूमिं बटो कामं प्रतीच्छ मे ॥ २० ॥ श्रीभगवानुवाच ॥ यावंतो विषयाः प्रेष्ठास्त्रिलोक्यामजितेंद्रियम् ॥ न शक्नुवंति ते सर्वे प्रतिपूरयितुं नृप ॥ २१ ॥ त्रिभिः क्रमैरसंतुष्टो द्वीपेनापि न पूर्यते ॥ नववर्षसमेतेन सप्तद्वीपवरेच्छया ॥ २२ ॥

मतिश्चेति छेदः स्वार्थं प्रत्यबुध इति च भक्तानामेवार्थं बुध्यसे न स्वार्थम् । परिपूर्णस्य तव तद्व्यतिरेकेण स्वार्थाभावादित्यर्थः ॥ १८ ॥ अबुधत्वमेवाह । मामिति । द्वीपस्य दाशुषं दातारम् । अबुद्धिमान्वस्तुतस्तु बुद्धिमानित्येव छेदः ॥ १९ ॥ कामं यथेच्छं सम्यक् पादप्रसारणेनेत्यर्थः । अतएव तथा करिष्यति ॥ २० ॥ पुनरपि निःस्पृहत्वमेवाविष्कुर्वन्नाह । यावंत इति सप्तभिः ॥ २१ ॥ नववर्षसमेतेन द्वीपेनापि । सप्तानां द्वीपवराणामिच्छया ॥ २२ ॥

अज्ञजनासारिखी मूढ आहे. ह्यास्तव, स्वार्थाविषयीं तुला बरोबर ज्ञान नाहीं ॥ १८ ॥ कारण, त्रैलोक्याचा एकटाच स्वामी असल्यामुळें जंबूप्लक्षादिक द्वीपेंहि देण्यास समर्थ अशा मला भाषणांनीं प्रसन्न करून घेऊन, जो तूं आपल्या पावलानें त्रिपादभूमीची याचना करितोस तो तूं खरोखर अबुद्धिमान् आहेस ॥ १९ ॥ अरे, याचनेकरितां माझ्या समीप आलेला पुरुष पुनरपि दुसऱ्याजवळ याचना करण्यास योग्य नाहीं. तस्मात्, हे बटो, यथेच्छपणें चांगलीं पावलें पसरून उपजीविका चालविणारी पुष्कळ भूमि तूं मजपासून ग्रहण कर ॥ २० ॥ श्रीभगवान् ह्मणाला– हे राजा, त्रैलोक्यामध्यें जितके ह्मणून अत्यंत प्रिय विषय आहेत ते सर्वहि अजितेंद्रिय पुरुषाचे मनोरथ पूर्ण करण्यास समर्थ होत नाहींत ॥ २१ ॥ यास्तव त्रिपादभूमीनें जो असंतुष्ट असेल त्याला नऊखंडांसहित एक द्वीप जरी प्राप्त झालें तथापि तो संतुष्ट होणार नाहीं. कारण,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याला श्रेष्ठ अशा सप्तद्वीपांची इच्छा होणारच ॥ २२ ॥ तर सप्तद्वीपवती पृथिवी तूं मागून घे असें ह्मणशील तर वेनाचा पुत्र पृथु आणि गय इत्यादि राजे सप्तद्वीपांचे अधिपति असूनहि अर्थ व काम यांच्या योगेंकरून तृष्णेच्या अंतास पावले नाहींत असें आमच्या ऐकण्यांत आहे ॥ २३ ॥ आणि जो प्रारब्धवशेंकरून प्राप्त झालेल्या अन्नादिकें-करून संतुष्ट असतो तो सुखानें राहतो व जो अजितेंद्रिय असतो तो प्राप्त झालेल्या तिन्हीं लोकांनींहि असंतुष्ट होत्साता सुखानें राहत नाहीं ॥ २४ ॥ तस्मात्, अर्थ व काम ह्यांचा असंतोष हें पुरुषाच्या संसृतीचें कारण होय व यदृच्छालाभानें संतोष होणें हें पुरुषाच्या मुक्तीचें कारण असें ह्मटलें आहे ॥ २५ ॥ तसेंच दैवानें प्राप्त झालेल्या वस्तू-नें संतुष्ट होणाऱ्या ब्राह्मणाचें तेज वृद्धिंगत होतें व असंतोषानें तें तेज, जसा उदकाच्या योगानें अग्नि नाहींसा होतो त्याप्रमाणें नाहींसें होतें ॥ २६ ॥ तस्मात्, तुज वरद-श्रेष्ठापासून मी तीन पावलेंच भूमि मागतों, एवढ्यानेंच मी कृतार्थ आहें. कारण, द्रव्यतरी कार्यापुरतेंच असलें ह्मणजे तें सुखप्रद होतें ॥ २७ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—

तृष्णाया अंतं न गता इत्यस्माभिः श्रुतम् ॥ २३ ॥ असंतुष्टस्तु प्राप्तैस्त्रिभिर्लोकैरपि न सुखं वर्तते ॥ २४ ॥ २५ ॥ आशुशुक्षणिरग्निः ॥ २६ ॥ सिद्धोऽहं कृतार्थः एतावतैव

सप्तद्वीपाधिपतयो नृपा वैन्यगयादयः ॥ अर्थकामैर्गता नांतं तृष्णाया इति नः श्रुतम् ॥ २३ ॥ यदृच्छयोपपन्नेन संतुष्टो वर्तते सुखम् ॥ नासंतुष्टस्त्रिभिर्लोकैरजितात्मोपसादितैः ॥ २४ ॥ पुंसोऽयं संसृतेर्हेतुरसंतोषोऽर्थकामयोः ॥ यदृच्छयोपपन्नेन संतोषो मुक्त-ये स्मृतः ॥ २५ ॥ यदृच्छालाभतुष्टस्य तेजो विप्रस्य वर्धते ॥ तत्प्रशाम्यत्यसंतोषादंभसेवाशुशुक्षणिः ॥२६॥ तस्मात्रीणि पदान्येव वृणे त्वद्वरदर्षभात् ॥ एतावतैव सिद्धोऽहं वित्तं यावत्प्रयोजनम् ॥ २७ ॥ श्रीशुक उवाच ॥ इत्युक्तः स हसन्नाह वांछातः प्रतिगृह्य-ताम् ॥ वामनाय महीं दातुं जग्राह जलभाजनम् ॥ २८ ॥ विष्णवे क्ष्मां प्रदास्यंतमुशना असुरेश्वरम् ॥ जानंश्चिकीर्षितं विष्णोः शिष्यं प्राह विदांवरः ॥ २९ ॥ शुक्राचार्य उवाच ॥ एष वैरोचने साक्षाद्भगवान्विष्णुरव्ययः ॥ कश्यपाददितेर्जातो देवानां कार्य-साधकः ॥ ३० ॥ प्रतिश्रुतं त्वयैतस्मै यदनर्थमजानता ॥ न साधु मन्ये दैत्यानां महानुपगतोऽनयः ॥ ३१ ॥ एष ते स्थानमैश्वर्यं श्रियं तेजो यशः श्रुतम् ॥ दास्यत्याच्छिद्य शक्राय मायामाणवको हरिः ॥ ३२ ॥

सर्वस्वापहारसिद्धेरिति गूढोऽभिप्रायः । तदेवाह । वित्तं हि यावत्प्रयोजनमेव सुखम् । अधिकस्य क्लेशावहत्वादित्यर्थः ॥ २७ ॥ २८ ॥ २९ ॥ ३० ॥ अनयोऽन्यायः ॥ ३१ ॥ अन्यायमेवाह । एष इति ॥ ३२ ॥

हे राजा, ह्याप्रमाणें भगवंतानें बलीप्रत भाषण केलें असतां तो बलिराजा, हंसत हंसत ‘ इच्छेप्रमाणें प्रतिग्रह कर ’ असें ह्मणून त्यानें वामनाला पृथ्वी देण्याकरितां हस्तामध्यें जलपात्र घेतलें ॥ २८ ॥ तेव्हां ज्ञानिजनांमध्यें श्रेष्ठ अशा शुक्रचार्यानें विष्णूचा सर्वस्व हरण करण्याचा आशय जाणून, त्या वामनरूपी विष्णूला पृथ्वी देण्यास उद्युक्त झालेल्या दैत्याधिपति बलि शिष्याप्रत असें भाषण केलें कीं ॥ २९ ॥ शुक्राचार्य ह्मणाला— हे विरोचनपुत्रा, देवांचें कार्य साधण्याकरितां कश्यपापासून अदितीचेठिकाणीं हा प्रत्यक्ष अविनाशी भगवान् विष्णु अवतीर्ण झाला आहे ॥ ३० ॥ आणि पुढें होणारा अनर्थ न जाणणाऱ्या तूंतर ह्याला भूमिदान देण्याचें जें कबूल केलें आहेस तें मी चांगलें असें मानीत नाहीं. कारण, तुझें भूमिदान हा दैत्यांना मोठाच क्लेश प्राप्त झाला आहे ॥ ३१ ॥ आतां ह्यामध्यें मीं काय अन्याय केला आहे? असें ह्मणशील तर, — हे विरोचन-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुत्रा, मायेनें ब्राह्मणरूप धारण करून प्राप्त झालेला हा श्रीहरि, तुझें स्थान, ऐश्वर्य, श्री, तेज व प्रसिद्ध यश, हीं सर्व हरण करून इंद्राला अर्पण करील ॥ ३२ ॥ आतां मीं फक्त त्रिपादभूमि देण्याचेंच कबूल केलें आहे अधिक नाहीं, असें जर तूं समजत असशील तर– हे मूढा, हा विश्वरूप होऊन फक्त तीनच पावलांच्या योगानें ह्या लोकांना व्यापून टाकील. बरें टाकूंदे, असें ह्मणशील तर हे मूढा, विष्णूला सर्वस्व अर्पण करून तूं आपला निर्वाहतरी कसा करशील ? ॥ ३३ ॥ आतां सर्वस्वदानानेंहि दिलेलें अभिवचन पुरें कसवें असें ह्मणशील तर– हे दैत्याधिपते एका पायानें पृथ्वी दुसऱ्यानें स्वर्ग आणि आपल्या मोठ्या देहानें अंतरिक्ष व्याप्त करून टाकणाऱ्या ह्या सर्वव्यापी परमेश्वराच्या तिसऱ्या पावलास स्थान कोठून मिळणार? मिळावयाचेंच नाहीं ॥ ३४ ॥ आणि ह्याप्रमाणें वाचेनें दिलेल्या वस्तूला प्रत्यक्ष समर्पण करण्यास असमर्थ अशा तुझी

ननु मया पदत्रयमेव प्रतिश्रुतं नाधिकं तत्राह । त्रिभिरिति । क्रमतामिति चेत्तत्राह । सर्वस्वमिति ॥३३॥ तथाऽपि प्रतिश्रुतं संपादनीयमेवेति चेत्तत्राह। क्रमत इति द्वाभ्याम् । एकेन पदा पादन्यासेन भूमिं क्रममाणस्येत्यर्थः । तार्तीयस्य तृतीयपादन्यासस्य ॥ ३४ ॥ ३५ ॥ तथापि सर्वस्वदानात्कीर्तिस्तावद्भविष्यतीति चेत्तत्राह । न तद्दानमिति । तपश्चित्तैकाग्र्यम् । कर्म पूर्तम् ॥ ३६ ॥ ३७ ॥ ननु तर्हि प्रतिश्रुत्य नेति कथमनृतं वाच्यं तत्राह । अत्रापीति सार्धैः षड्भिः । अत्रापि सत्यानृतव्यवस्थायाम् । बह्वृचश्रुत्या

त्रिभिः क्रमैरिमाँल्लोकान्विश्वकायः क्रमिष्यति ॥ सर्वस्वं विष्णवे दत्त्वा मूढ वर्तिष्यसे कथम् ॥ ३३ ॥ क्रमतो गां पदैकेन द्वितीयेन दिवं विभोः ॥ खं च कायेन महता तार्तीयस्य कुतो गतिः ॥ ३४ ॥ निष्ठां ते नरके मन्ये ह्यप्रदातुः प्रतिश्रुतम् ॥ प्रतिश्रुतस्य योऽनीशः प्रतिपादयितुं भवान् ॥ ३५ ॥ न तद्दानं प्रशंसंति येन वृत्तिर्विपद्यते ॥ दानं यज्ञस्तपः कर्म लोके वृत्तिमतो यतः ॥ ३६ ॥ धर्माय यशसेऽर्थाय कामाय स्वजनाय च ॥ पंचधा विभजन्वित्तमिहामुत्र च मोदते ॥ ३७ ॥ अत्रापि बह्वृचैर्गीतं शृणु मेऽसुरसत्तम ॥ सत्यमोमिति यत्प्रोक्तं यन्नेत्याहानृतं हि तत् ॥ ३८ ॥

कर्मांनीं नानाप्रकारच्या कृमिकीटकादियोनींमध्यें संसार पावत असतां, केव्हां तरी पुण्यवशेंकरून पुरुषजन्माला पावतो ॥ २५ ॥ त्यामध्यें जन्म, कर्म, वय, रूप, विद्या, ऐश्वर्य व धन इत्यादिकांच्या योगानें याला जर गर्व न होईल तर हा माझा अनुग्रहच होय ॥ २६ ॥ तर मग ध्रुवादिकांना धनसंपत्ति कशाकरितां देतोस असें ह्मणशील तर— हे ब्रह्मदेवा, माझेठिकाणीं अनन्यशरण असलेला पुरुष, मान व उद्धटपणा यांना निमित्तभूत व सर्व पुरुषार्थांना सर्वप्रकारें प्रतिकूळ अशा जन्मादिकांच्या योगानें मोहित होत नाहीं ह्मणून भक्तांच्या इच्छेनें मी त्यांला संपत्ति देतों. परंतु, अभक्ताला मोह होतो ह्मणून त्याच्या सर्वस्वाचा अपहार करूनच मी त्याच्यावर अनुग्रह करितों ॥ २७ ॥ याला तर आतां माझेठिकाणीं तत्परत्व झालें आहे ह्मणून इतरांनीं दुष्प्राप असेंहि मी ह्याला देतों, असें सांगण्याकरितां त्याचा मोहाभाव सांगतो— हे ब्रह्मदेवा, दैत्य

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दानवांचा अधिपति व कीर्तिवर्धक असा हा बलि, क्लेश भोगित असूनहि मोह पावत नाहीं, ह्यावरून माझ्या अजिंक्य मायेला ह्यानें जिंकिलें आहे ॥ २८ ॥ अहो! ह्याचें द्रव्य क्षीण झालें, हा आपल्या स्थानापासून भ्रष्ट झाला, शत्रूंनीं ह्याचा तिरस्कार करून ह्याला बद्ध केलें, ज्ञातींनीं ह्याचा त्याग केला, ह्याला यातना भोगावयास लाविलें, गुरूनें ह्याची निर्भर्त्सना करून ह्याला शाप दिला; तथापि ह्याचा संकल्प दृढ असल्यामुळें ह्यानें सत्याचा त्याग केला नाहीं व छलाच्या योगानें मी ह्याला धर्म कथन केला असूनहि हा त्याचा त्याग करीत नाहीं. तस्मात् हा सत्यवक्ता आहे ॥ २९ ॥ ३० ॥ ह्यास्तव देवांनाहि प्राप्त होण्यास अशक्य असें स्थान मीं ह्याला प्राप्त करून दिलें आहे. तें स्थान कोणतें असें ह्मणशील तर हे ब्रह्मदेवा, सावर्णि मन्वंतरामध्यें हा माझ्या आश्रयानें इंद्र होईल ॥ ३१ ॥ तोंपर्यंत हा विश्वकर्म्यानें निर्माण केलेल्या सुतलामध्यें त्याचा अधिपति होऊन

तस्य मोहाभावमाह । एष इति त्रिभिः ॥ २८ ॥ २९ ॥ नह्येतस्मिन्कुले कश्चिन्निःसत्त्वः कृपणः पुमानित्यादिना छलैरेव मया धर्म उक्तस्तथाऽपि तं धर्ममयं न त्यजत्यतः सत्यत्वाक् ॥ ३० ॥ मे मया । अहमेवाश्रयः पालको यस्य सः ॥ ३१ ॥ स्थानं प्रापित इति यदुक्तं तदेव स्थानमाह । तावत्सावर्णिमन्वंतरपर्यंतं सुतलमध्यास्तामधिवसत्वि-

क्षीणरिक्थश्च्युतः स्थानात्क्षिप्तो बद्धश्च शत्रुभिः ॥ ज्ञातिभिश्च परित्यक्तो यातनामनु यापितः ॥ २९ ॥ गुरुणा भर्त्सितः शप्तो जहौ सत्यं न सुव्रतः ॥ छलैरुक्तो मया धर्मो नायं त्यजति सत्यवाक् ॥ ३० ॥ एष मे प्रापितः स्थानं दुष्प्रापममरैरपि ॥ सावर्णेरंतरस्यायं भवितेंद्रो मदाश्रयः ॥ ३१ ॥ तावत्सुतलमध्यास्तां विश्वकर्मविनिर्मितम् ॥ यत्राधयो व्याधयश्च क्लमस्तंद्रा पराभवः ॥ नोपसर्गा निवसतां संभवंति ममेक्षया ॥ ३२ ॥ इंद्रसेन महाराज याहि भो भद्रमस्तु ते ॥ सुतलं स्वर्गिभिः प्रार्थ्यं ज्ञातिभिः परिवारितः ॥ ३३ ॥ न त्वामभिभविष्यंति लोकेशाः किमुतापरे ॥ त्वच्छासनातिगान्दैत्यांश्चक्रं मे सूदयिष्यति ॥ ३४ ॥ रक्षिष्ये सर्वतोऽहं त्वां सानुगं सपरिच्छदम् ॥ सदा सन्निहितं वीर तत्र मां द्रक्ष्यते भवान् ॥ ३५ ॥

त्यर्थः । यद्यस्मिन्वसतां व्याध्यादयो ममेक्षया न संभवंति ॥ ३२ ॥ एवं ब्रह्माणं प्रत्युक्त्वा करुणापरवशः साक्षाद्बलिं प्रत्याह इंद्रसेनेति चतुर्भिः ॥ ३३ ॥ त्वच्छासनमतिगच्छंत्यतिवर्तंत इति तथा तान् ॥ ३४ ॥ तथाऽपि भगवद्वियोगाद्यदनिच्छंतं प्रत्याह । सदेति ॥ ३५ ॥

राहूंदे. ज्याठिकाणीं राहणाऱ्या लोकांना माझ्या अवलोकनानें आधि, व्याधि, ग्लानि, आळस, पराभव व इतर उपद्रव हे प्राप्त होत नाहींत ॥ ३२ ॥ ह्याप्रमाणें ब्रह्मदेवाला सांगून करुणावश झालेला भगवान् प्रत्यक्ष बलीला ह्मणाला कीं, हे महाराजा इंद्रसेना, ज्ञातींनीं परिवेष्टित असा तूं, देवादिकहि ज्याच्या प्राप्तीची इच्छा करितात त्या सुतलामध्यें प्रवेश कर, त्याठिकाणीं तुझें कल्याण असो ॥ ३३ ॥ तेथें वास करणाऱ्या तुझा, इंद्रादिक लोकपालहि पराभव करणार नाहींत ~~मग दुसरे पराभव करणार नाहींत हें काय सांगावें !~~ आणि तेथें जे तुझ्या आज्ञेबाहेर वागणारे दैत्य असतील त्यांना माझें सुदर्शन चक्र मारून टाकील ॥ ३४ ॥ ~~आतां इतकें सांगितलें असतांहि भगवंताचा वियोग होत असल्यामुळें सुतलाप्रत जाण्याची इच्छा न करणाऱ्या त्या बलीला~~ भगवान् ह्मणाला कीं, ~~—~~ हे वीरा, तेथें अनुचर व भोगसाधनें ह्यांसहवर्तमान असणाऱ्या तुझें मी सर्व उपद्रवांपासून रक्षण करीन आणि तूंहि त्याठिकाणीं सर्वदां सन्निहित असलेल्या मला अवलोकन करिशील ॥ ३५ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आणि त्याठिकाणीं दैत्यदानवांच्या संगानें प्राप्त झालेला तुझा असुरस्वभाव, माझा प्रभाव अवलोकन करून कुंठित होत्साता तत्काल नष्ट होईल ॥ ३६ ॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील अष्टमस्कंधामध्यें बलिवामनसंवादनामक हा बाविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २२ ॥ ॥ आतां ह्या तेविसाव्या अध्यायामध्यें प्रल्हादासहवर्तमान बलिराजा सुतलामध्यें गेला असतां वामनासहवर्तमान इंद्र स्वर्गावर जाऊन पूर्वींप्रमाणें आनंदांत राहूं लागला अशी कथा वर्णन केलेली आहे ॥१॥ श्रीशुकाचार्य ह्मणालाः– हे परिक्षित् राजा, याप्रमाणें भाषण करणाऱ्या पुराणपुरुष वामनाप्रत, महाप्रभावशाली, सर्वांना साधुपणानें मान्य व ज्याचे नेत्र अश्रुबिंदूंनीं भरून गेले आहेत आणि जो हात जोडून उभा राहिला आहे, तो बलि, प्रेमानें कंठ दाटून आल्यामुळें गद्गदवाणीनें असें ह्मणाला कीं, ॥ १ ॥ बलि ह्मणालाः– अहाहा! तुझ्या प्रणामाचा केवढा महिमा हा ! ज्याकरितां केलेला उद्योगच शरणागत भक्तांना

संगाच्च आसुरो भावः स विनंक्ष्यति ॥३६॥ इति श्रीमद्भागवतेऽष्टमस्कंधे टीकायां द्वाविंशोऽध्यायः ॥ २२ ॥ ॥ त्रयोविंशे बलौ याते सुतलं सपितामहे ॥ उपेंद्रेण दिवं गत्वा पूर्ववन्मोदते हरिः ॥ १ ॥ बाष्पस्य कलाभिर्बिंदुभिराकुले ईक्षणे यस्य । भक्त्या उद्गल उत्कंठः ॥ १ ॥ अहो त्वत्प्रणाममहिमा यदर्थं कृतः समुद्यम एव प्रपन्नानां भक्तानां

तत्र दानवदैत्यानां संगात्ते भाव आसुरः ॥ दृष्ट्वा मदनुभावं वै सद्यः कुंठो विनंक्ष्यति ॥ ३६ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टमस्कंधे बलिवामनसंवादो नाम द्वाविंशोऽध्यायः ॥ २२ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ इत्युक्तवंतं पुरुषं पुरातनं महानुभावोऽखिलसाधुसंमतः ॥ बद्धांजलिर्बाष्पकलाकुलेक्षणो भक्त्युद्गलो गद्गदया गिराऽब्रवीत् ॥ १ ॥ बलिरुवाच ॥ अहो प्रणामाय कृतः समुद्यमः प्रपन्नभक्तार्थविधौ समाहितः ॥ यल्लोकपालैस्त्वदनुग्रहोऽमरैरलब्धपूर्वोऽपसदेऽसुरेऽर्पितः ॥ २ ॥ श्रीशुक उवाच ॥ इत्युक्त्वा हरिमानम्य ब्रह्माणं सभवं ततः ॥ विवेश सुतलं प्रीतो बलिर्मुक्तः सहासुरैः ॥ ३ ॥ एवमिंद्राय भगवान्प्रत्यानीय त्रिविष्टपम् ॥ पूरयित्वाऽदितेः काममशासत्सकलं जगत् ॥ ४ ॥ लब्धप्रसादं निर्मुक्तं पौत्रं वंशधरं बलिम् ॥ निशाम्य भक्तिप्रवणः प्रह्राद इदमब्रवीत् ॥ ५ ॥

योऽर्थस्तस्य विधावभक्तेऽपि तस्य संपादने समाहितोऽप्रमत्तः स्थितः । कुतः । यद्येनोद्यमेन लोकपालैरमरैः सत्त्वप्रधानैरप्यलब्धपूर्वस्त्वदनुग्रहोऽपसदे नीचे राजसे मय्यर्पितः । अयं भावः । परमेश्वराय तुभ्यमहं वराकस्त्रिलोकीं दत्तवानित्येतदास्तां प्रणामोऽपि न सम्यक्कृतः किंतु तदर्थमुद्यममात्रं कृतं तेन च कर्मतपोदानादिकोटिभिरप्यलभ्यस्त्वदनुग्रहः संपादितः अहो त्वत्प्रणामप्रभावाश्चर्यमिति ॥ २ ॥ ३ ॥ अशासदुपेंद्रः सन्पालयामास ॥ ४ ॥ ५ ॥

अभिमत असलेला जो पुरुषार्थ तो अभक्तांचेठिकाणींहि संपादन करण्याविषयीं तत्पर होऊन राहिला आहे. कारण, ज्या नमस्काराच्या उद्योगानें लोकपाल अशा इंद्रादि देवांनींहि पूर्वीं कधीं न मिळविलेला तुझा अनुग्रह तूं, मज नीच असुराचेठिकाणीं समर्पण केला आहेस ॥ २ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणालाः– हे राजा, ह्याप्रमाणें भाषण करून श्रीहरीला व रुद्रासहवर्तमान ब्रह्मदेवाला नमस्कार करून वारुणपाशांतून मुक्त झाल्यामुळें प्रसन्न झालेला तो बलि, असुरांसहवर्तमान सुतलामध्यें प्रवेश करण्यास उद्युक्त झाला ॥ ३ ॥ असो. याप्रमाणें भगवंतानें बलीपासून घेतलेला स्वर्ग इंद्राला समर्पण करून त्याच्या योगानें अदितीचा मनोरथ परिपूर्ण केला आणि स्वतः उपेंद्र होऊन सर्व जगताचें पालन केलें ॥ ४ ॥ नंतर ईश्वराचा प्रसाद प्राप्त होऊन वारुणपाशांतून मुक्त झालेला अशा आपल्या बलिनामक वंशवर्धक पौत्राला अवलोकन करून भक्तीनें नम्र झालेला प्रल्हाद असें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्मणाला कीं, ॥ ५ ॥ प्रऱ्हाद ह्मणाला– हे भगवंता, जगत्पूज्य अशा ब्रह्मादिकांनींहि ज्याच्या चरणांचें वंदन केलें आहे असा तूं आह्मां असुरांचा दुर्गपाल झाला आहेस असा जो हा तुझा प्रसाद झाला, हा प्रसाद, ब्रह्मदेव लक्ष्मी अथवा रुद्र ह्यांनासुद्धां प्राप्त झाला नाहीं, मग दुसऱ्या लोकांना प्राप्त झाला नाहीं हें काय सांगावें ! ॥ ६ ॥ हे आश्रयदात्या, ज्याच्या चरणकमलांतील मकरंदाच्या सेवनेंकरून ब्रह्मादिकांनांहि सृष्टिसामर्थ्यादिक ऐश्वर्यें प्राप्त होतात, त्या तुज भगवंताच्या कृपादृष्टीला दुष्ट व खलयोनि असे आह्मी, कसे बरें पात्र झालों आहों? तेव्हां हें मोठें आश्चर्य आहे ॥ ७ ॥ मी भक्तप्रिय असल्यामुळें असें झालें असें ह्मणशील तर– हें तुझें चेष्टित आश्चर्यकारक आहे. तें कोणतें तर– ज्यानें अचिंत्य योगमायेच्या लीलेनें भुवनें उत्पन्न केलीं आहेत त्या सर्वात्म्यो, सर्वज्ञ व समदृष्टि अशा तुझा जो भक्तप्रियरूप विषम स्वभाव तें होय. तेंतरी वैषम्य तुझेठिकाणीं वास्तविक नाहीं. कारण, तूं कल्पतरूसारख्या स्वभावाचा आहेस. ह्मणजे जसा कल्पवृक्ष आश्रितांचे मनोरथ पूर्ण करित उसूनहि कोणाशींच विषम

दुर्गपालोऽसि रक्षिष्ये सर्वतोऽहं त्वामित्युक्तत्वात् ॥ ६ ॥ हे शरणदाश्रयप्रद । ये कुसृतयो दुर्वृत्ताः खलयोनय उग्रजातयश्च ते वयं तस्य भवतो दाक्षिण्यदृष्टेः पदवीं कस्माद्धेतोः प्रणीताः बहुमानेन चित्तानुवर्तनं दाक्षिण्यं तेन या दृष्टिस्तद्विषयतां प्रापिताः ॥ ७ ॥ भक्तप्रियत्वादिति चेत्तर्ह्येवं तवेहितमहो चित्रम् । किं तत् । सर्वात्मनः समदृशश्च स्वभावो वि-

प्रह्राद उवाच ॥ नेमं विरिंचो लभते प्रसादं न श्रीर्न शर्वः किमुतापरे ते ॥ यन्नोऽसुराणामसि दुर्गपालो विश्वाभिवंद्यैरपि वंदितांघ्रिः ॥ ६ ॥ यत्पादपद्ममकरंदनिषेवणेन ब्रह्मादयः शरणदाऽश्नुवते विभूतीः ॥ कस्माद्वयं कुसृतयः खलयोनयस्ते दाक्षिण्यदृष्टिपदवीं भवतः प्रणीताः ॥ ७ ॥ चित्रं तवेहितमहोऽमितयोगमायालीलाविसृष्टभुवनस्य विशारदस्य ॥ सर्वात्मनः समदृशो विषमः स्वभावो भक्तप्रियो यदसि कल्पतरुस्वभावः ॥ ८ ॥ श्रीभगवानुवाच ॥ वत्स प्रह्राद भद्रं ते प्रयाहि सुतलालयम् ॥ मोदमानः स्वपौत्रेण ज्ञातीनां सुखमावह ॥ ९ ॥ नित्यं द्रष्टासि मां तत्र गदापाणिमवस्थितम् ॥ मद्दर्शनमहाह्लादध्वस्तकर्मनिबंधनः ॥ १० ॥ श्रीशुक उवाच ॥ आज्ञां भगवतो राजन्प्रह्रादो बलिना सह ॥ बाढमित्यमलप्रज्ञो मूर्ध्न्याधाय कृतांजलिः ॥ ११ ॥ परिक्रम्यादिपुरुषं सर्वासुरचमूपतिः ॥ प्रणतस्तदनुज्ञातः प्रविवेश महाबिलम् ॥ १२ ॥

षम इति यत् । सर्वात्मत्वे चित्रचरितत्वे हेतुः । अमिताऽचिंत्या योगमाया तस्या या लीला तया विसृष्टानि विरचितानि भुवनानि येन तस्य । अहो इत्यत्र संधिरार्षः । समदृक्त्वे हेतुः । विशारदस्य सर्वज्ञस्य । अथवा भक्तप्रियत्वेऽपि तव वैषम्यं नास्त्येव यतः कल्पतरुस्वभावः सन् भक्तप्रियोऽसि । न हि कल्पतरुराश्रितानामेव कामान्पूरयन्नपि विषमो भवतीत्यर्थः ॥ ८ ॥ ९ ॥ मद्दर्शनेन यो महाह्लादस्तेन ध्वस्तं कर्मनिबंधनमज्ञानं यस्य ॥ १० ॥ ११ ॥ १२ ॥

असत नाहीं त्याप्रमाणें तूं आहेस ॥ ८ ॥ श्रीभगवान् ह्मणाला– बा वत्सा प्रऱ्हादा, तुझें कल्याण असो. तूं सुतलनामक स्थानाप्रत गमन कर आणि त्याठिकाणीं आपल्या बलिनामक पौत्रासहवर्तमान आनंदानें राहून ज्ञातींस सुख दे ॥ ९ ॥ त्याठिकाणीं हातामध्यें गदा घेऊन द्वाराचेठिकाणीं उभा राहिलेल्या मला तूं अवलोकन करिशील आणि माझ्या दर्शनानें जो तुला मोठा आनंद होईल त्याच्या योगानें तुझें अज्ञान नष्ट होईल ॥ १० ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, याप्रकारच्या भगवंताच्या आज्ञेला त्या निर्मलबुद्धि सर्वदैत्यसेनाधिपति प्रऱ्हादानें, मस्तकानें नमस्कारपूर्वक ठीक आहे अशा वचनानेंहि स्वीकारून हात जोडून त्या आदिपुरुषाला प्रदक्षिणा करून पुन्हा नमस्कार केला आणि त्याची अनुज्ञा घेऊन बलिराजासहवर्तमान सुतलनामक महाबिळामध्यें प्रवेश केला ॥ ११ ॥ १२ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नंतर हे राजा, ब्रह्मवेत्त्यांच्या सभेंत ऋत्विजांमध्यें आपल्या समीप बसलेल्या शुक्राचार्यांप्रत त्या नारायण हरी वामनानें भाषण केलें कीं,– ॥ १३ ॥ हे ब्रह्मन्, यज्ञकर्म करणाऱ्या आपल्या शिष्याचें त्या कर्मामध्यें जें कांहीं न्यून झालें असेल तें तूं पूर्ण कर. ~~आतां यजमानावांचून तें पूर्ण कसें करावें असें ह्मणशील तर,~~– कर्मामध्यें जें वैगुण्य असतें तें ब्राह्मणांनीं पाहिलें असतांच पूर्ण होतें, ~~मग अनुष्ठान केलें असतां पूर्ण होईल हें काय सांगावें~~ ! ॥ १४ ॥ तेव्हां शुक्राचार्य ह्मणाला–हे भगवन् ज्या बलीनें सर्वस्व अर्पण करून कर्मप्रवर्तक यज्ञफलदाता व यज्ञमूर्ति अशा तुज पुरुषाचें पूजन केलें त्याच्या कर्मामध्यें वैगुण्य कोठून असणार ? ~~असावयाचेंच नाहीं~~ ॥ १५ ॥ पूजा तर एकीकडेच राहूंदे. परंतु मंत्रानें (स्वरादिभ्रंशेंकरून) तंत्रानें (अनुष्ठान मागेंपुढें झाल्यावरून) देशानें व कालानें (देशकलांच्या उल्लंघनेंकरून) योग्यतेनें (सत्पात्रीं दान न झाल्यानें) व वस्तूच्या योगानें (दक्षिणादि वैषम्येंकरून) कर्मामध्यें जें न्यून झालें असेल तें सर्व तुझ्या नामसंकीर्तनानेंच परिपूर्ण होतें ॥ १६ ॥ तथापि हे सर्व-

---

॥ १३ ॥ कर्म वितन्वतः शिष्यस्य यच्छिद्रमंतरं न्यूनं जातं तत्संतनु विस्तारय संधत्स्व । यजमानं विना कथं संधातव्यमिति न वाच्यमित्याह । यत्तदिति । ब्रह्मदृष्टं ब्राह्मणैर्दृष्टमेव समं भवेत् । किं पुनरनुष्ठितमित्यर्थः ॥ १४ ॥ भवान्यस्य सर्वेणापि भावेन वस्तुमात्रेण पूजितस्तस्य कर्मसु कुतो वैषम्यम् । कथंभूतः । कर्मणामीश्वरः प्रवर्तकः यज्ञेशो यज्ञ-

अथाहोशनसं राजन्हरिर्नारायणोऽतिके ॥ आसीनमृत्विजां मध्ये सदसि ब्रह्मवादिनाम् ॥ १३ ॥ ब्रह्मन्संतनु शिष्यस्य कर्म छिद्रं वितन्वतः ॥ यत्तत्कर्मसु वैषम्यं ब्रह्मदृष्टं समं भवेत् ॥ १४ ॥ शुक्र उवाच ॥ कुतस्तत्कर्मवैषम्यं यस्य कर्मेश्वरो भवान् ॥ यज्ञेशो यज्ञपुरुषः सर्वभावेन पूजितः ॥ १५ ॥ मंत्रतस्तंत्रतश्छिद्रं देशकालार्हवस्तुतः ॥ सर्वं करोति निश्छिद्रमनुसंकीर्तनं तव ॥ १६ ॥ तथाऽपि वदतो भूमन्करिष्याम्यनुशासनम् ॥ एतच्छ्रेयः परं पुंसां यत्तवाज्ञाऽनुपालनम् ॥ १७ ॥ श्रीशुक उवाच ॥ अभिनंद्य हरेराज्ञामुशना भगवानिति ॥ यज्ञच्छिद्रं समाधत्त बलेर्विप्रर्षिभिः सह ॥ १८ ॥ एवं बलेर्महीं राजन्भिक्षित्वा वामनो हरिः ॥ ददौ भ्रात्रे महेंद्राय त्रिदिवं यत्परैर्हृतम् ॥ १९ ॥ प्रजापतिपतिर्ब्रह्मा देवर्षिपितृभूमिपैः ॥ दक्षभृग्वंगिरोमुख्यैः कुमारेण भवेन च ॥ २० ॥ कश्यपस्यादितेः प्रीत्यै सर्वभूतभवाय च ॥ लोकानां लोकपालानामकरोद्वामनं पतिम् ॥ २१ ॥

फलप्रदः । यज्ञमयश्च पुरुषः ॥ १५ ॥ आस्तां तावत्पूजा । यस्मान्मंत्रतः स्वरादिभ्रंशेन तंत्रतो व्युत्क्रमादिना । देशतः कालतश्च अर्हतः पात्रतः वस्तुतश्च दक्षिणादिना यच्छिद्रं न्यूनं तत्सर्वं तत्कीर्तनमात्रमेव निश्छिद्रं करोतीति ॥ १६ ॥ १७ ॥ हरेराज्ञां प्रतिनंद्य बलेर्यज्ञच्छिद्रं समाधत्त संदधे । पाठांतरे समाधाय तदाज्ञां संपादितवानिति शेषः ॥ १८ ॥ १९ ॥ देवाश्च ऋषयश्च भूमिपाश्च मनवस्तैः सहितः ॥ २० ॥ २१ ॥

व्यापका, ज्याअर्थीं तूं सांगतच आहेस त्याअर्थीं मी तुझी आज्ञा पालन करितों. कारण, तुझ्या आज्ञेचें परिपालन करणें हेंच पुरुषाच्या परम पुरुषार्थाचें साधन होय ॥ १७ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, याप्रमाणें श्रीहरीच्या आज्ञेचा अंगीकार करून भगवान् शुक्राचार्यांनें ब्रह्मर्षींसहवर्तमान बलीच्या यज्ञांतील न्यून असलेलें कर्म परिपूर्ण केलें ॥ १८ ॥ हे राजा, ह्याप्रमाणें वामनरूप धारण करणाऱ्या श्रीहरीनें बलीपासून याचना करून पूर्वीं शत्रूंनीं (असुरांनीं) हरण केलेलें स्वर्गस्थान आपल्या महेंद्र भ्रात्याला अर्पण केलें ॥ १९ ॥ तेव्हां प्रजाध्यक्षाचा अधिपति अशा ब्रह्मदेवानें, दक्ष, भृगु व अंगिरा हे ज्यांमध्यें मुख्य आहेत अशा देव, ऋषि, पितर, भूपति, सनत्कुमार आणि शंकर ह्यांसहवर्तमान कश्यप व अदिति ह्यांच्या प्रीत्यर्थ व सर्वभूतांच्या कल्याणार्थ लोक व लोकपाल ह्यांचें वामनाला आधिपत्य दिलें ॥ २० ॥ २१ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां लोकांदिकांचा अधिपति इंद्र आहे हें जरी खरें आहे तथापि वेद, सर्व देव, धर्म, यश, श्री, मंगलें,व्रतें, स्वर्ग व मोक्ष ह्यांचें पालन करण्याविषयीं समर्थ अशा वामनाला सर्वां च्या अभ्युदयाकरितां उपेंद्र असा अधिकार दिला. त्याकालीं हे राजा, सर्व भूतांना अत्यंत आनंद झाला ॥ २२ ॥ २३ ॥ तदनंतर ब्रह्मदेवाचें अनुमोदन घेऊन लोकपालांसह वर्तमान इंद्रानें वामनाला आपल्या अग्रभागीं असलेल्या देववाह्य विमानामध्यें बसवून स्वर्गाप्रत नेलें ॥ २४ ॥ याप्रमाणें उपेंद्राच्या बाहुबलानें रक्षण केलेला इंद्र, त्रिभुवन प्राप्त झालें असतां परम संपत्तीनें युक्त व निर्भय होऊन आनंदित झाला ॥ २५ ॥ हे राजा, नंतर ब्रह्मदेव, शंकर, सनत्कुमार, भृगुप्रभृति मुनि, पितर, सर्वभूतें, सिद्ध व विमानां-

---

ननु लोकादीनां पतिरिंद्रोऽस्त्येव सत्यं तथाऽपि वेदादीनां कल्पं पालने दक्षं वामनमुपेंद्रं कल्पयांचक्रे ॥ २२ ॥ २३ ॥ देवयानेन मार्गेण विमानेनेति वा ॥ २४ ॥ २५ ॥ ॥ २६ ॥ २७ ॥ एतच्चरितमाख्यातमिति विशेषोक्त्याऽन्यान्यपि संतीत्युक्तम् ॥ २८ ॥ तानि तर्हि निःशेषाणि वर्णनीयानीत्यपेक्षायामाह । पारमिति । उरु बहुधा विक्रमतो

वेदानां सर्वदेवानां धर्मस्य यशसः श्रियः ॥ मंगलानां व्रताना च कल्पं स्वर्गापवर्गयोः ॥ २२ ॥ उपेंद्रं कल्पयांचक्रे पतिं सर्ववि-भूतये ॥ तदा सर्वाणि भूतानि भृशं मुमुदिरे नृप ॥ २३ ॥ ततस्त्विंद्रः पुरस्कृत्य देवयानेन वामनम् ॥ लोकपालैर्दिवं निन्ये ब्र-ह्मणा चानुमोदितः ॥ २४ ॥ प्राप्य त्रिभुवनं चेंद्र उपेंद्रभुजपालितः ॥ श्रिया परमया जुष्टो मुमुदे गतसाध्वसः ॥ २५ ॥ ब्रह्मा शर्वः कुमारश्च भृग्वाद्या मुनयो नृप ॥ पितरः सर्वभूतानि सिद्धा वैमानिकाश्च ये ॥ २६ ॥ सुमहत्कर्म तद्विष्णोर्गायंतः परमाद्भु-तम् ॥ धिष्ण्यानि स्वानि ते जग्मुरदितिं च शशंसिरे ॥ २७ ॥ सर्वमेतन्मयाऽऽख्यातं भवतः कुलनंदन ॥ उरुक्रमस्य चरितं श्रो-तॄणामघमोचनम् ॥ २८ ॥ पारं महिम्न उरु विक्रमतो गृणानो यः पार्थिवानि विममे स रजांसि मर्त्यः ॥ किं जायमान उत जात उपैति मर्त्य इत्याह मंत्रदृगृषिः पुरुषस्य यस्य ॥ २९ ॥

विष्णोर्महिम्नः पारं यो गृणानो भवति स मर्त्यः पार्थिवानि रजांस्यपि विममे गणितवान् । यथा पार्थिवपरमाणुगणनमशक्यं तथा विष्णोर्गुणगणनमप्यशक्यमित्यर्थः । तथाच मंत्रः। विष्णोर्नुकं वीर्याणीति । एतदेव मंत्रांतरार्थं सूचयन्नाह । यस्य पुरुषस्य पूर्णमहिम्नः पारं मंत्रदृगृषिर्वसिष्ठ इति एवमाह । कथम् । किं जायमानो जातो वा उपैति न को-ऽपीति वदन्ननंतत्वेनैवाहेत्यर्थः । तथाच मंत्रः । न ते विष्णो जायमानो न जातो देवमहिम्नः परमं तमापेति ॥ २९ ॥

तून संचार करणारे इतरहि जे देव, ते फारच आश्चर्यकारक आशा त्या विष्णूच्या अत्यंत महत्कर्मांचें गायन करीत होत्साते आपआपल्या स्थानाप्रत निघून गेले आणि अदितीचीहि प्रशंसा करूं लागले ॥ २६ ॥ २७ ॥ असो. हे कुलनंदना, श्रोत्यादिकांच्या पातकाची निवृत्ति करणारें असें हें वामनाचें सर्व चरित्र, मीं तुला सांगितलें आहे ॥ २८ ॥ आतां हें चरित्र सर्व सांगितलें अशा विशेष उक्तीनें दुसरींहि चरित्रें आहेत असें सुचविलें, तीं सर्व चरित्रें तूं कथन करावींस असें ह्मणशील तर– हे राजा, नानाप्रका-रांनीं पराक्रम करणाऱ्या विष्णूच्या संपूर्ण महिम्याचें जो वर्णन करील तो मनुष्य पृथ्वीच्या परमाणूचीहि गणना करील. ह्मणजे जसें पृथिवीच्या परमाणूंचें गणना करणें अशक्य आहे तसेंच विष्णूच्या सर्व गुणांचें वर्णनहि अशक्य आहे. कारण, उत्पन्न होणारा अथवा उत्पन्न झालेला मनुष्य परिपूर्ण भगवंताच्या महिम्याचा अंत पावेल काय? नाहींच ॥ ५८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पावणार असें मंत्रद्रष्ट्या वसिष्ठ ऋषीनेंहि सांगितलें आहे ॥ २९ ॥ असो. अद्भुत कर्में करणाऱ्या देवाधिदेव श्रीहरीचें वामनावतारसंबंधीं चरित्र जो पुरुष श्रवण करितो तो सर्वोत्कृष्टगतीला पावतो ॥ ३० ॥ तसेंच यज्ञादिक, श्राद्धादिक व गुरुपूजादिक कर्म चाललें असतां जेथें जेथें ह्या वामनचरित्राचें कीर्तन केलें जातें, तें तें कर्म सांग होतें असें मोठमोठे ज्ञाते ह्मणतात ॥३१॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील अष्टमस्कंधापैकीं वामनावतारचरित्रकथनरूप हा तेविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २३ ॥ आतां ह्या चोविसाव्या अध्यायामध्यें ज्यापासून महासागरामध्यें सत्यव्रताचें रक्षण झालें त्या भगवंताच्या मत्स्यरूपाची लीला प्रसंगवशेंकरून वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ त्यामध्यें वामनावताराप्रमाणेंच मत्स्यरूपी भगवंतानें प्रथमतः स्वल्परूप दाखवून नंतर आपलें ऐश्वर्य प्रदर्शित केलें असल्यामुळें तें मत्स्यचरित्र श्रवण करण्याविषयीं इच्छा

य इदं शृण्वन् भवति स परां गतिं याति ॥ ३० ॥ सुकृतं यथावत्कृतं विदुः ॥ ३१ ॥ इति श्रीमद्भागवते अष्टमस्कंधे टीकायां त्रयोविंशतितमोऽध्यायः ॥ २३ ॥ ॥ चतुर्विंशे प्रसंगेन मत्स्यरूपस्य शार्ङ्गिणः ॥ लीलोच्यते यतः सत्यव्रतरक्षा महार्णवे ॥ १ ॥ तनुं तनुं विदर्श्यादौ निजैश्वर्यनिदर्शनात् ॥ मत्स्यं पृच्छति पृथ्वीशो लीलया वामनोपमम्

य इदं देवदेवस्य हरेरद्भुतकर्मणः ॥ अवतारानुचरितं शृण्वन्याति परां गतिम् ॥ ३० ॥ क्रियमाणे कर्मणीदं दैवे पित्र्येऽथ मानुषे ॥ यत्र यत्रानुकीर्त्येत तत्तेषां सुकृतं विदुः ॥ ३१ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे अष्टमस्कंधे वामनावतारचरिते त्रयोविंशतितमोऽध्यायः ॥ २३ ॥ ॥ राजोवाच ॥ भगवन् श्रोतुमिच्छामि हरेरद्भुतकर्मणः ॥ अवतारकथामाद्यां मायामत्स्यविडंबनम् ॥ १ ॥ यदर्थमदधाद्रूपं मात्स्यं लोकजुगुप्सितम् ॥ तमःप्रकृति दुर्मर्षं कर्मग्रस्त इवेश्वरः ॥ २ ॥ एतन्नो भगवन्सर्वं यथावद्वक्तुमर्हसि ॥ उत्तमश्लोकचरितं सर्वलोकसुखावहम् ॥ ३ ॥ सूत उवाच ॥ इत्युक्तो विष्णुरातेन भगवान्बादरायणिः ॥ उवाच चरितं विष्णोर्मत्स्यरूपेण यत्कृतम् ॥ ४ ॥

॥ २ ॥ मायया मत्स्यविडंबनं मत्स्यरूपानुकरणं यस्यां निरूप्यते ताम् ॥ १ ॥ ननु कस्मादकस्मादेव मत्स्यावतारश्रवणेच्छा श्रीवामनसादृश्यादित्याह । यदर्थमिति द्वाभ्याम् । दुर्मर्षं दुःसहम् ॥ २ ॥ बलेरनुग्रहाय जुगुप्सितमपि याचकरूपं धृतवानिति युक्तमुक्तं यदर्थं तु लोकजुगुप्सितं मात्स्यं रूपमधारयदेतन्नो यथावद्वक्तुमर्हसीत्यर्थः ॥ ३ ॥ ४ ॥

करण्यास्तव राजा ह्मणाला— हे भगवन्, मायेच्या योगानें मत्स्यरूपाचें अनुकरण जिच्यामध्यें निरूपण केलें आहे ती अद्भुत कर्में करणाऱ्या श्रीहरीची प्रथमावतारसंबंधीं कथा श्रवण करण्याची मला इच्छा आहे ॥ १ ॥ आतां अकस्मात्च मत्स्यावतार श्रवण करण्याविषयीं तुला कोठून इच्छा झाली? असें ह्मणशील तर— त्या अवतारामध्यें वामनावतारलीलेचें सादृश्य असल्यामुळें झाली असें सांगतो— हे भगवन्, स्वतः ईश्वर असूनहि त्यानें एखाद्या कर्मग्रस्त जनाप्रमाणें तमोगुणात्मक लोकनिंदित व दुःसह असें मत्स्यरूप ज्याकरितां धारण केलें असेल तें सर्व कारण आह्मांला यथास्थितपणें वर्णन करावें. कारण, श्रेष्ठकीर्ति परमेश्वराचें चरित्र सर्व लोकांना सुखावह आहे ॥ २ ॥ ३ ॥ सूत ह्मणाला— हे शौनका, परिक्षित् राजानें याप्रमाणें प्रश्न केलेल्या त्या भगवान् शुकाचार्यांनें, मत्स्यरूपानें केलेलें जें विष्णूचें चरित्र तें सांगण्यास आरंभ केला ॥ ४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां सामान्यतः अवतारप्रयोजन सांगतो– हे राजा, भगवान् स्वतंत्र असूनहि गाई, ब्राह्मण, देव, साधु, वेद, धर्म व अर्थ ह्यांचें रक्षण करण्याच्या इच्छेनें मत्स्यादिक अवतार धारण करितो ॥ ५ ॥ आतां भगवंताचा अवतार निंच नाहीं असें सांगतो– हे राजा, ज्याप्रमाणें वायु, सर्व उत्कृष्टनिकृष्ट जनांचेठिकाणीं संचार करीत असूनहि लिप्त होत नाहीं त्याप्रमाणें बुद्धिगुणांच्या योगानें उत्कृष्टनिकृष्ट भूतांचेठिकाणीं नियंतृरूपानें संचार करीत असणारा ईश्वरहि निर्गुण असल्यामुळें उत्कृष्टनिकृष्टत्व पावत नाहीं ॥ ६ ॥ आतां विशेषेंकरून मत्स्यावतार धारण करण्याचें प्रयोजन दर्शवितो कीं,– हे राजा, गेल्या कल्पाच्या अंतीं ब्राह्मनामक नैमित्तिक (ब्रह्मदेव निद्रिस्थ झाला या निमित्तानें प्राप्त झालेला) प्रलय झाला, त्यावेळीं भूरादिक लोक समुद्रामध्यें निमग्न झाले होते ॥ ७ ॥ त्याकालीं कालगतीनें निद्रा प्राप्त झाल्यामुळें शयन करण्याची इच्छा करणाऱ्या ब्रह्मदे-

---

सामान्येनावतारप्रयोजनमाह । गोविप्रेति ॥ ५ ॥ जुगुप्सितत्वं परिहरति । धियो गुणैर्यान्युच्चावचानि भूतानि तेषु नियंतृत्वेन चरन्नपीश्वरो नोच्चावचत्वं भजते निर्गुणत्वात् । कुतः पुनः शुद्धसत्त्वमयैर्मत्स्याद्याकारैरुच्चावचत्वशंकेति भावः ॥ ६ ॥ विशेषतो मत्स्यावतारप्रयोजनमाह । आसीदिति त्रिभिः । ब्रह्मणो निद्रायां भवो ब्राह्मस्तेनैव निमित्तेन

श्रीशुक उवाच ॥ गोविप्रसुरसाधूनां छंदसामपि चेश्वरः ॥ रक्षामिच्छंस्तनूर्धत्ते धर्मस्यार्थस्य चैव हि ॥ ५ ॥ उच्चावचेषु भूतेषु चरन्वायुरिवेश्वरः ॥ नोच्चावचत्वं भजते निर्गुणत्वाद्धियो गुणैः ॥ ६ ॥ आसीदतीतकल्पांते ब्राह्मो नैमित्तिको लयः ॥ समुद्रोपप्लुतास्तत्र लोका भूरादयो नृप ॥ ७ ॥ कालेनागतनिद्रस्य धातुः शिशयिषोर्बली ॥ मुखतो निःसृतान्वेदान्हयग्रीवोऽतिकेऽहरत् ॥ ८ ॥ ज्ञात्वा तद्दानवेंद्रस्य हयग्रीवस्य चेष्टितम् ॥ दधार शफरीरूपं भगवान्हरिरीश्वरः ॥ ९ ॥ तत्र राजऋषिः कश्चिन्नाम्ना सत्यव्रतो महान् ॥ नारायणपरोऽतप्यत्तपः स सलिलाशनः ॥ १० ॥ योऽसावस्मिन्महाकल्पे तनयः स विवस्वतः ॥ श्राद्धदेव इति ख्यातो मनुत्वे हरिणाऽर्पितः ॥ ११ ॥ एकदा कृतमालायां कुर्वतो जलतर्पणम् ॥ तस्यांजल्युदके काचिच्छफर्येकाऽभ्यपद्यत ॥ १२ ॥ सत्यव्रतोऽजलिगतां सह तोयेन भारत ॥ उत्ससर्ज नदीतोये शफरीं द्रविडेश्वरः ॥ १३ ॥ तमाह साऽतिकरुणं महाकारुणिकं नृपम् ॥ यादोभ्यो ज्ञातिघातिभ्यो दीनां मां दीनवत्सल ॥ कथं विसृजसे राजन्भीतामस्मिन्सरिज्जले ॥ १४ ॥

जातो नैमित्तिकः । समुद्रे उपप्लुता निमग्नाः ॥ ७ ॥ अंतिके निःसृतान् ॥ ८ ॥ शफरीरूपं मत्स्यरूपम् ॥ ९ ॥ प्रयोजनांतरं लीलाप्रकारं चाह । तत्र राजऋषिरित्यादि यावत्समाप्ति ॥ १० ॥ स एव श्राद्धदेव इति ख्यातः ॥ ११ ॥ कृतमालायां नद्याम् ॥ १२ ॥ १३ ॥ १४ ॥

वाच्या मुखांतून समीपभागीं बाहेर पडलेले वेद, हयग्रीवनामक दैत्यानें हरण केले ॥ ८ ॥ तेव्हां त्या दैत्याधिपति हयग्रीवाचें तें कर्म जाणून सर्वसमर्थ भगवान् श्रीहरीनें मत्स्यरूप धारण केलें ॥ ९ ॥ आतां मत्स्यरूप धारण करण्याचें दुसरें कारण व लीलेचा प्रकार कथन करितो कीं– हे राजा, त्याच गेलेल्या कल्पामध्यें नारायणाविषयीं तत्पर व केवळ उदकाचें प्राशन करून राहणारा असा कोणीएक महात्मा सत्यव्रतनामक राजर्षि तप करीत होता ॥ १० ॥ जो ह्या वाराहनामक महाकल्पामध्यें सूर्याचा पुत्र श्राद्धदेव ह्मणून प्रसिद्ध आहे व ज्याला श्रीहरीनें मनूचा अधिकार दिला आहे तोच त्या वेळचा सत्यव्रतराजा होय ॥ ११ ॥ असो एकेवेळीं तो सत्यव्रतराजा, कृतमालानामक नदीच्या तीरीं जलतर्पण करीत असतांना त्याच्या ओंजळींतील उदकामध्यें एक मासोळी प्राप्त झाली ॥ १२ ॥ नंतर हे भरतकुलोत्पन्ना राजा, तो द्रविडदेशाधिपति सत्यव्रत ओंजळीमध्यें आलेल्या त्या मासोळीला उदकासहवर्तमान नदीच्या जलामध्यें टाकण्यास उद्युक्त झाला ॥ १३ ॥ तेव्हां ती मासोळी राजाला ह्मणाली कीं,– हे दीनवत्सला राजा, ॥ ९९ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ज्ञातींचा घात करणाऱ्या जलचर प्राण्यांपासून भयभीत झाल्यामुळें दीन अशा मला ह्या नदीच्या जळामध्यें तूं कसा टाकित आहेस? ॥ १४ ॥ तेव्हां आपल्यावर अनुग्रह करण्याकरितां प्रीतीनें मत्स्यरूप धारण करणाऱ्या त्या भगवंताला न जाणून, त्या सत्यव्रतानें त्या मासोळीचें आपण रक्षण करावें असें मनांत आणिलें ॥ १५ ॥ आणि त्या मासोळीचें अति दीनवाक्य श्रवण करून त्या दयालु भूपतीनें, आपल्या कमंडलूंतील उदकामध्यें तिला घालून आपल्या आश्रमीं नेलें ॥ १६ ॥ ती मासोळी एक रात्रीनेंच त्या कमंडलूमध्यें आपल्याला अवकाश मिळत नाहीं अशा रीतीनें वाढूं लागली व त्या सत्यव्रत राजास ह्मणाली कीं,– ॥ १७ ॥ हे राजा, ह्या कमंडलूमध्यें मी दुःखानें राहण्यास उत्साह पावत नाहीं. ह्यास्तव, ज्याठिकाणीं मला सुखानें राहतां येईल अशा चांगल्या मोठ्या स्थानाची तूं तजवीज कर ॥ १८ ॥ त्याकालीं त्या राजानें तिला कमंडलूंतून बाहेर काढून रांजणांतील उदकामध्यें टाकिलें व त्याठिकाणीं टाकिलेली ती मासोळी एका मुहूर्तामध्यें तीन हात लांब वाढली आणि ह्मणाली कीं,– ॥ १९ ॥ हे राजा, हें उद-

॥ १५ ॥ १६ ॥ १७ ॥ यत्राहं सुखं निवसामि तदोकः स्थानं कल्पय ॥ १८ ॥ औदंचनोदके मणिकस्थे जले ॥ १९ ॥ २० ॥ २१ ॥ रक्षायोगेन रक्षाया योगेनोपायेन ।

तमात्मनोऽनुग्रहार्थं प्रीत्या मत्स्यवपुर्धरम् ॥ अजानन्रक्षणार्थाय शफर्याः स मनो दधे ॥ १५ ॥ तस्या दीनतरं वाक्यमाश्रुत्य स महीपतिः ॥ कलशाप्सु निधायैनां दयालुर्निन्य आश्रमम् ॥ १६ ॥ सा तु तत्रैकरात्रेण वर्धमाना कमंडलौ ॥ अलब्ध्वात्मावकाशं वा इदमाह महीपतिम् ॥ १७ ॥ नाहं कमंडलावस्मिन् कृच्छ्रं वस्तुमिहोत्सहे ॥ कल्पयौकः सुविपुलं यत्राहं निवसे सुखम् ॥ १८ ॥ स एनां तत आदाय न्यधादौदंचनोदके ॥ तत्र क्षिप्ता मुहूर्तेन हस्तत्रयमवर्धत ॥ १९ ॥ न म एतदलं राजन्सुखं वस्तुमुदंचनम् ॥ पृथु देहि पदं मह्यं यत्त्वाऽहं शरणं गता ॥ २० ॥ तत आदाय सा राज्ञा क्षिप्ता राजन्सरोवरे ॥ तदावृत्यात्मना तोयं महामीनोऽन्ववर्धत ॥ २१ ॥ नैतन्मे स्वस्तये राजन्नुदकं सलिलौकसः ॥ निधेहि रक्षायोगेन ह्रदे मामविदासिनि ॥ २२ ॥ इत्युक्तः सोऽनयन्मत्स्यं तत्र तत्राविदासिनि ॥ जलाशये संमितं तं समुद्रे प्राक्षिपज्झषम् ॥ २३ ॥ क्षिप्यमाणस्तमाहेदमिह मां मकरादयः ॥ अदंत्यतिबला वीर मां नेहोत्स्रष्टुमर्हसि ॥ २४ ॥

यथा महाह्रदप्राप्तेरर्वाक् जलं विना न शुष्येयं तेनोपायेन निधेहि । अविदासिनि अनुपक्षये ॥ २२ ॥ संमितं तत्तज्जलाशयपरिमितम् ॥ २३ ॥ २४ ॥

कपात्र मला सुखानें राहण्यास पुरत नाहीं ह्यास्तव ज्याअर्थीं मी तुला शरण आल्यें आहें त्याअर्थीं तूं मला राहण्यास मोठें स्थान दे ॥ २० ॥ हे परीक्षित् राजा, नंतर त्या राजानें तिला त्या रांजणांतून काढून सरोवरामध्यें टाकिलें. तेव्हां आपल्या देहाच्या योगानें तें सरोवरांतील उदकहि व्यापून तो महामत्स्य वृद्धिंगत झाला आणि पुनरपि असें ह्मणाला कीं,– ॥ २१ ॥ हें राजा, पाण्यामध्यें राहणाऱ्या मला हे सरोवरांतील उदकहि थोडें असल्यामुळें सुखावह होत नाहीं. ह्यास्तव, माझ्या रक्षणाच्या उपायानें, ह्मणजे मोठा डोह प्राप्त होण्याचे पूर्वीं पाण्यावांचून जसा मी वाळून जाणार नाहीं त्या उपायानें तूं मला मोठ्या अक्षय डोहामध्यें नेऊन ठेव ॥ २२ ॥ ह्याप्रमाणें त्यानें भाषण केलें असतां त्या सत्यव्रतराजानें त्या मत्स्याला उत्तरोत्तर मोठ्या अक्षय जलाशयामध्यें नेलें, तेव्हां त्या त्या जलाशयाएवढ्या वाढलेल्या त्या मत्स्याला शेवटीं राजानें समुद्रामध्यें टाकिलें ॥ २३ ॥ तेव्हां राजा त्यामत्स्याला समुद्रामध्यें टाकूं लागला असतां तो मत्स्य त्याला ह्मणाला कीं,– हे वीरा, तूं मला येथें सोडूं नकोस. कारण, ह्याठिकाणीं अति-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रबल असे मकरादिक जलचर मला भक्षण करितील ॥ २४ ॥ ह्याप्रमाणें सुंदर भाषण करणाऱ्या त्या मत्स्यानें अत्यंत मोहित करून टाकिलेला तो सत्यव्रत राजा, त्याला ह्मणाला कीं,—मत्स्यरूपानें आह्मांस मोह पाडणारा तूं कोण आहेस? ॥ २५ ॥ ज्या तूं एकदिवसानेंच शंभरयोजनें विस्तीर्ण असलेलें सरोवर व्यापून टाकिलेंस, अशा प्रकारचा प्रभाववान् कोणीहि जलचर प्राणी आह्मीं कधींच पाहिला नाहीं व ऐकिलाहि नाहीं ॥ २६ ॥ ह्यस्मात्, क्षयरहित व दुःखहर्ता असा साक्षात् भगवान् नारायण तूंच आमच्यासारख्या भूतांवर अनुग्रह करण्याकरितां, हें जलचरप्राण्यांचें रूप धारण केलें आहेस ह्यांत कांहीं संशय नाहीं ॥२७॥ ह्यास्तव हे उत्पत्तिस्थितिलयाधिपते पुरुषश्रेष्ठा, तुला नमस्कार असो. हे विभो, आह्मां शरणागत भक्तांचा मुख्य आत्मा व आश्रयहि तूंच आहेस ॥ २८ ॥ हे भगवन्, तुझे सर्वहि लीलावतार, प्राण्यांच्या अभ्युदयाला कारण आहेत असें जरी मी सामान्यतः जाणत

॥ २५ ॥ अभिव्यानशेऽभितो व्याप्तवान् ॥ २६ ॥ २७ ॥ मुख्यः सत्य आत्मा च गतिश्चाश्रयः ॥ २८ ॥ २९ ॥ हे अरविंदाक्ष पृथगात्मनां देहाद्यभिमानिनां सतामितरे

एवं विमोहितस्तेन वदता वल्गु भारतीम् ॥ तमाह को भवानस्मान्मत्स्यरूपेण मोहयन् ॥ २५ ॥ नैवंवीर्यो जलचरो दृष्टोऽस्माभिः श्रुतोऽपि च ॥ यो भवान्योजनशतमह्नाऽभिव्यानशे सरः ॥ २६ ॥ नूनं त्वं भगवान्साक्षाद्धरिर्नारायणोऽव्ययः ॥ अनुग्रहाय भूतानां धत्से रूपं जलौकसाम् ॥ २७ ॥ नमस्ते पुरुषश्रेष्ठ स्थित्युत्पत्त्यप्ययेश्वर ॥ भक्तानां नः प्रपन्नानां मुख्यो ह्यात्मगतिर्विभो ॥ २८ ॥ सर्वे लीलावतारास्ते भूतानां भूतिहेतवः ॥ ज्ञातुमिच्छाम्यदो रूपं यदर्थं भवता धृतम् ॥ २९ ॥ न तेऽरविंदाक्ष पदोपसर्पणं मृषा भवेत्सर्वसुहृत्प्रियात्मनः ॥ यथेतरेषां पृथगात्मनां सतामदीदृशो यद्वपुरद्भुतं हि नः ॥ ३० ॥ श्रीशुक उवाच ॥ इति ब्रुवाणं नृपतिं जगत्पतिः सत्यव्रतं मत्स्यवपुर्युगक्षये ॥ विहर्तुकामः प्रलयार्णवेऽब्रवीच्चिकीर्षुरेकांतजनप्रियः प्रियम् ॥ ३१ ॥ श्रीभगवानुवाच ॥ सप्तमेऽद्यतनादूर्ध्वमहन्येतदरिंदम ॥ निमंक्ष्यत्यप्ययांभोधौ त्रैलोक्यं भूर्भुवादिकम् ॥ ३२ ॥ त्रिलोक्यां लीयमानायां संवर्ताभसि वै तदा ॥ उपस्थास्यति नौः काचिद्विशाला त्वां मयेरिता ॥ ३३ ॥

षां पदोपसर्पणं यथा मृषा भवेत्तथा सर्वसुहृत्प्रियात्मनस्तव पदोपसर्पणं मृषा न भवेत् । यद्यस्मान्नो भक्तानामद्भुतं वपुरदीदृशो दर्शितवानसि । पाठांतरे पृथगात्मनो भेददर्शिनः पुंसः । असतां परिच्छिन्नानां पदोपसर्पणं यथा मृषेत्यर्थः ॥ ३० ॥ एकांतजनभक्ताः प्रिया यस्य ॥ ३१ ॥ अप्ययांभोधौ प्रलयार्णवे । भूर्भुव आदिकमित्यर्थः ॥ ३२ ॥ संवर्ताभसि

आहें तथापि ज्याकरितां तूं हें मत्स्यरूप धारण केलें आहेस तें कारण जाणण्याची मी इच्छा करितों ॥ २९ ॥ हे कमलनयना, ज्याअर्थी आह्मां भक्तजनांना तूं आपलें हें अद्भुतरूप दाखविलें आहेस त्याअर्थी, जसें तुझ्याहून इतर देहादिकांचा अभिमान बाळगणाऱ्या पुरुषांना शरण जाणें व्यर्थ होतें, तसें सर्वांचा सुहृद्, प्रिय व आत्मा अशा तुझ्या चरणांला शरण जाणें व्यर्थ होणार नाहीं ॥ ३० ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला— हे राजा, ज्याला एकनिष्ठ भक्त प्रिय आहेत आणि जो सत्यव्रताचें प्रिय करणारा आहे आणि ज्यानें कल्पक्षयसमयीं प्रलयसमुद्रामध्यें क्रीडाकरण्याकरितां मत्स्यरूप धारण केलें आहे, तो जगदीश्वर भगवान् याप्रमाणें भाषण करणाऱ्या त्या सत्यव्रत राजाला ह्मणाला कीं— ॥ ३१ ॥ श्रीभगवान् ह्मणाला— हे शत्रुदमना राजा, आजपासून सातवे दिवशीं हें भूर्भुवादिक त्रैलोक्य, प्रलयसमुद्रामध्यें बुडून जाणार आहे ॥ ३२ ॥ तेव्हां प्रलयोदकामध्यें त्रैलोक्य लीन होऊं लागलें ॥ ६० ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असतां त्याचवेळीं मी पाठविलेली अशी एक विस्तीर्ण नौका ~~निश्चयेंकरून~~ तुझ्यासमीप प्राप्त होईल ॥ ३३ ॥ त्याकालीं तूं सर्व ओषधि व उत्कृष्टनिकृष्ट बीजें ग्रहण करून, सप्त-
र्षींनीं परिवेष्टित ~~व सर्वप्राणिमात्रांनीं ज्याचें महत्त्व वाढविलें आहे~~ असा होत्साता त्या महानौकेमध्यें आरूढ होऊन, सूर्यादिकांच्या प्रकाशानें रहित अशा त्या महासागरामध्यें ऋषीं-
च्याच प्रकाशानें ~~दैन्यरहितपणें~~ संचार करिशील ॥ ३४ ॥ ३५ ॥ नंतर प्रबल वायूमुळें ती नाव डळमळूं लागली असतां तेथें प्राप्त झालेल्या माझ्या शिंगाचेठिकाणीं वासुकिनामक
महासर्पाच्या योगानें तिला तूं बंधन कर ॥ ३६ ॥ ह्मणजे हे प्रभो, जोंपर्यंत ब्रह्मदेवाची रात्र आहे तोंपर्यंत ऋषि व नौका ह्यांसहवर्तमान तुला मी त्या प्रलयसागरामध्यें आकर्षण करीत
संचार करीन ॥ ३७ ॥ नंतर परब्रह्म ह्मणून कथित असलेलें माझें स्वरूप, तूं केलेल्या उत्तम प्रश्नांच्या योगानें मी अनुग्रहानें उपदेशद्वारा तुला प्रकाशित केलें असतां, तूं तें

प्रलयोदके । त्वामुपस्थास्यति प्राप्स्यति ॥ ३३ ॥ ओषधीः आदायेति शेषः ॥ ३४ ॥ ऋषीणामेवालोकेन विचरिष्यसि ॥ ३५ ॥ महाहिना वासुकिना ॥ ३६ ॥ ३७ ॥ मे मया-

त्वं तावदोषधीः सर्वा बीजान्युच्चावचानि च ॥ सप्तर्षिभिः परिवृतः सर्वसत्वोपबृंहितः ॥ ३४ ॥ आरुह्य बृहतीं नावं विचरिष्यस्य-
विक्लवः ॥ एकार्णवे निरालोके ऋषीणामेव वर्चसा ॥ ३५ ॥ दोधूयमानां तां नावं समीरेण बलीयसा ॥ उपस्थितस्य मे शृंगे
निबध्नीहि महाहिना ॥ ३६ ॥ अहं त्वामृषिभिः साकं सहनावमुदन्वति ॥ विकर्षन्विचरिष्यामि यावद्ब्राह्मी निशा प्रभो ॥ ३७ ॥
मदीयं महिमानं च परं ब्रह्मेति शब्दितम् ॥ वेत्स्यस्यनुगृहीतं मे संप्रश्नैर्विवृतं हृदि ॥ ३८ ॥ इत्थमादिश्य राजानं हरिरंतरधीय-
त ॥ सोऽन्ववैक्षत तं कालं यं हृषीकेश आदिशत् ॥ ३९ ॥ आस्तीर्य दर्भान्प्राक्कूलान्राजर्षिः प्रागुदङ्मुखः ॥ निषसाद हरेः
पादौ चिंतयन्मत्स्यरूपिणः ॥ ४० ॥ ततः समुद्र उद्वेलः सर्वतः प्लावयन्महीम् ॥ वर्धमानो महामेघैर्वर्षद्भिः समदृश्यत ॥
॥ ४१ ॥ ध्यायन्भगवदादेशं ददृशे नावमागताम् ॥ तामारुरोह विप्रेंद्रैरादायौषधिवीरुधः ॥ ४२ ॥ तमूचुर्मुनयः प्रीता राजन्ध्या-
यस्व केशवम् ॥ स वै नः संकटादस्मादविता शं विधास्यति ॥ ४३ ॥ सोऽनुध्यातस्ततो राज्ञा प्रादुरासीन्महार्णवे ॥ एकशृं-
गधरो मत्स्यो हैमो नियुतयोजनः ॥ ४४ ॥

ऽनुगृहीतं प्रसादीकृतं हृदि अपरोक्षं वेत्स्यसि । त्वया कृतैः संप्रश्नैर्मया विवृतं प्रकाशितं संतम् ॥ ३८ ॥ ३९ ॥ ४० ॥ ४१ ॥ ४२ ॥ ४३ ॥ ४४ ॥

आपल्या हृदयांत प्रत्यक्ष जाणशील ॥ ३८ ॥ याप्रमाणें राजाला सांगून तो मत्स्यमूर्ति श्रीहरि तथेंच गुप्त झाला. नंतर तो सत्यव्रत राजर्षिहि जो काळ, आजपासून सातवे दिव
शीं असा, भगवंतानें सांगितला होता त्याची प्रतीक्षा करीत पूर्वेकडे अग्रें केलेले दर्भ आंथरून त्यांवर ईशान्यदिशेकडे मुख करून मत्स्यरूपी श्रीहरीच्या चरणांचें चिंतन करीत बस-
ला ॥ ३९ ॥ ४० ॥ नंतर वृष्टि करणाऱ्या महामेघांच्या योगानें वृद्धिंगत होणारा व मर्यादेचें उल्लंघन करणारा समुद्र, सर्वबाजूंनीं पृथ्वीला बुडवीतच आहे कीं काय असा दिसूं ला-
गला ॥ ४१ ॥ तेव्हां मत्स्यरूपी भगवंताच्या आज्ञेचें चिंतन करीत असलेल्या त्या सत्यव्रत राजानें आपल्या समीप आलेली नाव पाहिली आणि ओषधि व बीजें घेऊन सप्तर्षींसह-
वर्तमान तिच्यावर आरोहण केलें ॥ ४२ ॥ नंतर त्या सत्यव्रताला संतुष्ट झालेले सप्तऋषि ह्मणाले कीं– हेराजा, तूं केशवाचें ध्यान कर ह्मणजे तोच आमचें ह्या संकटापासून रक्षण
करून आह्मांस सुख देईल ॥ ४३ ॥ याप्रमाणें सांगितलेल्या राजानें ध्यान केलेला तो सुवर्णवर्णानें व लक्षयोजनविस्तीर्ण देहानें युक्त असा एक शिंग धारण करणारा मत्स्यरूपी भगवान्,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्या महासागरामध्यें प्रकट झाला ॥ ४४ ॥ नंतर पूर्वी श्रीहरीनें जसें त्याला सांगितलें होतें त्याप्रमाणें दोरकरूप वासुकीच्या योगानें त्याच्या शिंगाचेठिकाणीं ती नाव बांधून मनामध्यें संतुष्ट झालेला तो राजा, मधुसूदन भगवंताची स्तुति करूं लागला ॥ ४५ ॥ त्यामध्यें प्रथमतः अनेक योनींमध्यें संसार पावणाऱ्या आपणाला भगवत्कृपेनेंच त्याची प्राप्ति झाली आहे असें पाहून मुक्तीकरितां त्याचीच प्रार्थना करितोः– हे भगवन्, अनादि अविद्येनें ज्यांचें आत्मज्ञान आच्छादित झालें आहे असे अविद्यामूलक संसारपरिश्रमांनीं व्याकुळ झालेले जन, ह्या संसारामध्यें सहज प्राप्त झालेल्या ज्याच्या अनुग्रहेंकरून, ज्याचा आश्रय करून ज्याची प्राप्ति करून घेतात, तो साक्षात् मुक्तिदाता तूंच आमचा परम गुरु

वरत्रेण दोरकरूपेण ॥ ४५ ॥ सागरं तारयिष्यंतं तरिष्यन्निव सागरम् ॥ सत्यव्रतो गुरुत्वेन तुष्टाव हरिमष्टभिः ॥ अत्रेदं चिंत्यम् । किमयं महाप्रलयो दैनंदिनो वेति । तत्र तावत् ब्राह्मो लय इति योऽसावस्मिन्महाकल्पे इति चोक्तेर्महाप्रलय इति प्राप्तम् । नेति ब्रूमः । महाप्रलये पृथिव्यादीनामवशेषासंभवात् । यावद्ब्राह्मी निशेत्याद्युक्तिविरोधाच्च । अतो दैनंदिन इति युक्तम् । न चैतदपि संगच्छते सांवर्तकैरनावृष्ट्यादिभिर्विना अकस्मादेव सप्तमेऽहनि त्रैलोक्यं निमंक्ष्यतीति मत्स्योक्तेरनुपपत्तेः । यच्चोक्तं प्रथमस्कंधे । रूपं स जगृहे मात्स्यं चाक्षुषांऽतरसंप्लवे ॥ नाव्यारोप्य महीमय्यामपाद्वैवस्वतं मनुमिति । तदपि तदा दुर्घटम् । नहि प्रलयद्वयेऽपि महीमय्यां नाव्यारोहः संभवति । न च चाक्षुषमन्वंतरे प्रलयोऽस्ति तथा च सति सप्तमो मनुर्वैवस्वत इत्यपि दुर्घटं स्यात् । त्वं तावदोषधीः सर्वा इत्यादिनिर्देशोऽपि न संगच्छते । नहि तदा ओषध्यादीनां सत्त्वानां चावशेषः संभवति त-

निबद्ध्य नावं तच्छृंगे यथोक्तो हरिणा पुरा ॥ वरत्रेणाहिना तुष्टस्तुष्टाव मधुसूदनम् ॥ ४५ ॥ राजोवाच ॥ अनाद्यविद्योपहतात्मसंविदस्तन्मूलसंसारपरिश्रमातुराः ॥ यदृच्छयेहोपसृता यमाप्नुयुर्विमुक्तिदो नः परमो गुरुर्भवान् ॥ ४६ ॥ जनोऽबुधोऽयं निजकर्मबंधनः सुखेच्छया कर्मसमीहतेऽसुखम् ॥ यत्सेवया तां विधुनोत्यसन्मतिं ग्रंथिं स भिंद्याद्धृदयं स नो गुरुः ॥ ४७ ॥ यत्सेवयाऽग्नेरिव रुद्ररोदनं पुमान्विजह्यान्मलमात्मनस्तमः ॥ भजेत वर्णं निजमेष सोऽव्ययो भूयात्स ईशः परमो गुरोर्गुरुः ॥ ४८ ॥

स्मादन्यथा वर्ण्यते। नैवायं वास्तवः कोऽपि प्रलयः किंतु सत्यव्रतस्य ज्ञानोपदेशायाविर्भूतो भगवान्वैराग्यार्थमकस्मात्प्रलयमिव दर्शयामास । यथाऽस्मिन्नेव वैवस्वतमन्वंतरे मार्कंडेयाय दर्शितवान् । तदपेक्षयैव महाकल्पेऽस्मिन्निति विशेषणं संगच्छते । तथाच । ततः समुद्र उद्वेलः सर्वतः समदृश्यतेति तस्यैव तथा दर्शनमुक्तमित्येषा दिक् । प्रस्तुतं स्तोत्रं व्याख्यास्यामः । तत्र नानायोनिषु संसरतः स्वस्य भगवत्कृपयैव तत्प्राप्तिं दृष्ट्वा मुक्तये तमेव प्रार्थयते । अनादिर्याऽविद्या तयोपहता आवृताऽऽत्मनः संविदेषां तेऽत एवाविद्यामूलैः संसारपरिश्रमैरातुरा इह संसारे यदृच्छया यदनुग्रहादेवोपसृता आश्रिताः संतो यमाप्नुयुः प्राप्नुवंति स भवानेव साक्षान्नो गुरुः सन् ग्रंथिं भिंद्यादित्युत्तरेणान्वयः॥ ४६ ॥ ननु वैराग्यं विना कुतो मुक्तिस्तर्हि तस्य त्वत्सेवैकफलत्वात्सेवामादिशेत्याशयेनाह । जन इति । अबुधोऽयं जनः असुखं यथा भवति तथा कर्म समीहते तां सुखेच्छाम् । नो हृदयरूपं ग्रंथिं स भिंद्यात् । यतः स एव परमो गुरुः ॥ ४७ ॥ ननु यज्ञदानादिभिः सत्त्वशुद्धिं विना कथं ग्रंथिभेदः स्यात्तत्राह । यत्सेवयेति। यस्य सेवयैव पुमानात्मनो मनसो मलं तमो वि-

---

होऊन आमच्या हृदयरूप ग्रंथीचा भेद कर ॥ ४६ ॥ आतां वैराग्यावांचून मुक्ति कशी प्राप्त होईल असें ह्मणशील तर तें वैराग्यहि तुझ्याच सेवेचें फळ आहे ह्या करितां तूं आपली सेवा आह्मांला सांग अशा आशयानें ह्मणतो कीं,– हे भगवन्, आपल्या कर्मरूप बंधनांनीं बद्ध झालेला हा अज्ञानी जन, सुखाच्या इच्छेनें दुःख देणारें कर्म करीत असून, ज्याच्या सेवेनें त्या दुष्टमतिरूप इच्छेचा नाश करितो तो आमच्या हृदयरूप ग्रंथीचा भेद करो. कारण, तोच आमचा परम गुरु आहे ॥ ४७ ॥ आतां यज्ञदानादिकांनीं अंतःकरणशुद्धि झाल्यावांचून ग्रंथिभेद कसा होईल असें ह्मणशील तर– हे परमात्म्या, जसें सुवर्ण किंवा रूपें अग्नीच्या सेवेनेंच आपला सर्व मळ टाकून देतें आणि आपलें शुद्ध स्वरूप

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सेवन करितें त्याप्रमाणें मुमुक्षु पुरुष, ज्याच्या सेवेनेंच अज्ञानरूप आपला मळ टाकून देऊन स्वस्वरूपाची प्राप्ति करून घेतात तो व्ययरहित ईश्वरच आमचा गुरु होवो. कारण, गुरूपेक्षांहि परमगुरु तोच आहे ॥ ४८ ॥ आतां त्याचें परमेश्वरत्व व परमगुरुत्व सविस्तर कथन करितो— हे भगवन्, देव, गुरु व इतर जन हे सर्व एकत्र मिळाले असतांहि, ज्याच्या प्रसादाच्या दहाहजाराव्या अंशाच्या लेशाइतकाहि प्रसाद, एकाद्या पुरुषावर करण्यास स्वतः समर्थ होत नाहींत त्या तुज ईश्वराला मी शरण आलों आहें ॥ ४९ ॥ आतां हेंच पुनरपि दृष्टांतानें स्पष्ट करितो— हे ईश्वरा, नेत्रहीन पुरुषाला आंधळा पुढारी केला असतां जसा त्यापासून कांहींएक उपयोग होत नाहीं त्याप्रमाणें अज्ञानी जनाला अविद्वान् गुरु केला असतां व्यर्थ होतो. तूं तर सूर्याच्या प्रकाशाप्रमाणें स्वतःसिद्ध ज्ञानवान् असून सर्व इंद्रियांचा प्रकाशक आहेस; म्हणून, आत्मतत्त्व जाणण्याविषयीं इच्छा करणाऱ्या आम्हीं तुला गुरु म्हणून वरिलें

जह्यात् । एष हीनमलो निजं वर्णं च स्वरूपं भजेत् । स ईशो नो गुरुर्भूयात् । यतः स एव गुरोरपि परमो गुरुः । मलहाने दृष्टांतः । रुद्ररोदनं रुद्रस्य रोदनं रजतम् । यदरोदीत्तद्रुद्रस्य रुद्रत्वम् ॥ यदश्वशीर्यत तद्रजतं हिरण्यमभवदिति श्रुतेः । तद्यथाऽग्नेः संपर्कान्मलं जहाति स्वं वर्णं भजते न तु क्षालनादिभिस्तथा न यज्ञादिभिर्मलत्यागः किंतु त्वत्सेवयैव तेषां तु सेवांगत्वमिति भावः ॥ ४८ ॥ परमेश्वरत्वं परमगुरुत्वं च प्रपंचयन्नाह । नेति । यत्प्रसादस्यायुतभागस्तस्य लेशमात्रमप्यन्ये देवादयः सर्वे समेता अपि स्वयं तन्निरपेक्षाः संतः कर्तुं न प्रभवंति ॥ ४९ ॥ तदेव दृष्टांतेन स्पष्टयन्नाह । अचक्षुरिति । अविदुषो जनस्याबुधोऽविद्वान्गुरुस्तथैव । अर्कप्रकाशवत्स्वत एव दृग्ज्ञानं यस्य सोऽर्कदृक् । अतः सर्वदृ-

न यत्प्रसादायुतभागलेशमन्ये च देवा गुरवो जनाः स्वयम् ॥ कर्तुं समेताः प्रभवंति पुंसस्तमीश्वरं त्वां शरणं प्रपद्ये ॥ ४९ ॥ अचक्षुरंधस्य यथाऽग्रणीः कृतस्तथा जनस्याविदुषोऽबुधो गुरुः ॥ त्वमर्कदृक्सर्वदृशां समीक्षणो वृतो गुरुर्नः स्वगतिं बुभुत्सताम् ॥ ५० ॥ जनो जनस्यादिशतेऽसतीं मतिं यया प्रपद्येत दुरत्ययं तमः ॥ त्वं त्वव्ययं ज्ञानममोघमंजसा प्रपद्यते येन जनो निजं पदम् ॥ ५१ ॥ त्वं सर्वलोकस्य सुहृत्प्रियेश्वरो ह्यात्मा गुरुर्ज्ञानमभीष्टसिद्धिः ॥ तथापि लोको न भवंतमंधधीर्जानाति संतं हृदि बद्धकामः ॥ ५२ ॥ तं त्वामहं देववरं वरेण्यं प्रपद्य ईशं प्रतिबोधनाय ॥ छिंध्यर्थदीपैर्भगवन्वचोभिर्ग्रंथीन् हृदय्यान्विवृणु स्वमोकः ॥ ५३ ॥

शां सर्वेंद्रियाणां समीक्षणः प्रकाशकः अतएव सुगतिं बोद्धुमिच्छद्भिर्नोऽस्माभिर्गुरुर्वृतोऽसि ॥ ५० ॥ किंच प्राकृतो गुरुरनर्थहेतुरित्याह । जन इति । आदिशते उपदिशति । असतीं मतिमर्थकामादिमतिम् । तमः संसारम् ॥ ५१ ॥ ननु तर्हि सर्वोऽपि लोको मामेव किं नोपसरति अज्ञानादित्याह । त्वमिति । प्रियश्चासावीश्वरश्च ॥ ५२ ॥ अहं तु त्वामेव शरणं यामीत्याह । तं त्वामिति । प्रतिबोधनायोपदेशाय । अर्थदीपैः परमार्थप्रकाशकैः । हृदये भवान् ग्रंथीनहंकारादीन् । स्वमोकः स्वं रूपं विवृणु प्रकाशय ॥ ५३ ॥

आहे ॥ ५० ॥ आतां प्राकृतगुरु केला तर तो अनर्थाला कारण होतो असें सांगतो— आपणाला गुरु असें मानणारा अज्ञजन, दुसऱ्या अज्ञानी जनाला अर्थकामादि विषयक बुद्धीचा उपदेश करीतो, तिच्या योगानें तो जन दुस्तर अशा संसाराला पावतो. तूं तर अक्षय्य व अमोघ ज्ञानाचा उपदेश करितोस त्यामुळें जनाला अनायासानें स्वरूपप्राप्ति होतये ॥ ५१ ॥ आतां असें जर आहे तर सर्वहि लोक मलाच कां शरण येत नाहींत असें म्हणशील तर, अज्ञानामुळें येत नाहींत असें सांगतो— हे परमात्म्या, तूं सर्वलोकांचा हितकर्ता, प्रिय, ईश्वर, आत्मा, गुरु, अभीष्टफलरूपी व ज्ञानस्वरूपी असा जरी आहेस तथापि हृदयामध्यें असणाऱ्या तुला विवेकशून्य व विषयासक्त असलेला हा लोक जाणत नाहीं ॥ ५२ ॥ आतां मी तर तुलाच शरण आलों आहें असें सांगतो— हे भगवन्, देवांनाहि पूज्य अशा त्या तुज श्रेष्ठ ईश्वराला मी तत्त्वोपदेशाकरितां शरण आलों आहें. म्हणून तूं परमार्थप्रकाशक वाक्यांनीं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

माझ्या हृदयामध्यें असणाऱ्या अहंकारादि ग्रंथि छेदून टाकून, स्वस्वरूप प्रकाशित कर ॥ ५३ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, ह्याप्रमाणें प्रार्थना करणाऱ्या त्या सत्यव्रत राजाला, महासागरामध्यें मत्स्यरूपानें क्रीडा करणाऱ्या त्या भगवान् आदिपुरुषानें, तत्त्वाचा उपदेश केला ॥ ५४ ॥ तो कोणता असें ह्मणशील तर– हे परिक्षिते, सांख्ययोग व कर्म ह्यांचें जिच्यामध्यें प्रतिपादन केलेलें आहे अशी आत्मरहस्यरूप संपूर्ण दिव्य मत्स्यपुराणसंहिता, भगवंतानें सत्यव्रत राजर्षीला सांगितली आहे ॥ ५५ ॥ तेव्हां ऋषींसहवर्तमान नावेमध्यें बसलेल्या त्या सत्यव्रत राजर्षीनें, भगवंतानें कथन केलेलें तें सनातन ब्रह्मरूप आत्मतत्त्व संशयरहितपणानें श्रवण केलें ॥ ५६ ॥ नंतर त्या मत्स्यमूर्ति श्रीहरीनें पूर्वीच्या प्रलयाच्या शेवटीं निद्रेंतून उठलेल्या ब्रह्मदेवाला हयग्रीवनामक असुराचा वध करून, त्यापासून वेद आणून समर्पण केले ॥ ५७ ॥ असोः शास्त्रोक्त

नृपतिं प्रति ॥ ५४ ॥ पुराणसंहितां मत्स्यपुराणमशेषतोऽब्रवीदित्यनुषंगः ॥ ५५ ॥ ५६ ॥ अतीतः पूर्वो यः प्रलयस्तस्यापायेऽवसाने ॥ ५७ ॥ ५८ ॥ ५९ ॥

श्रीशुक उवाच ॥ इत्युक्तवंतं नृपतिं भगवानादिपूरुषः ॥ मत्स्यरूपी महांभोधौ विहरंस्तत्त्वमब्रवीत् ॥ ५४ ॥ पुराणसंहितां दिव्यां सांख्ययोगक्रियावतीम् ॥ सत्यव्रतस्य राजर्षेरात्मगुह्यमशेषतः ॥ ५५ ॥ अश्रौषीदृषिभिः साकमात्मतत्त्वमसंशयम् ॥ नाव्यासीनो भगवता प्रोक्तं ब्रह्म सनातनम् ॥ ५६ ॥ अतीतप्रलयापाय उत्थिताय स वेधसे ॥ हत्वाऽसुरं हयग्रीवं वेदान्प्रत्याहरद्धरिः ॥ ५७ ॥ स तु सत्यव्रतो राजा ज्ञानविज्ञानसंयुतः ॥ विष्णोः प्रसादात्कल्पेऽस्मिन्नासीद्वैवस्वतो मनुः ॥ ५८ ॥ सत्यव्रतस्य राजर्षेर्मायामत्स्यस्य शार्ङ्गिणः ॥ संवादं महदाख्यानं श्रुत्वा मुच्येत किल्बिषात् ॥ ५९ ॥ अवतारो हरेर्योऽयं कीर्तयेदन्वहं नरः ॥ संकल्पास्तस्य सिद्ध्यंति स याति परमां गतिम् ॥ ६० ॥ प्रलयपयसि धातुः सुप्तशक्तेर्मुखेभ्यः श्रुतिगणमपनीतं प्रत्युपादत्त हत्वा ॥ दितिजमकथयद्यो ब्रह्म सत्यव्रतानां तमहमखिलहेतुं जिह्ममीनं नतोऽस्मि ॥ ६१ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे अष्टादशसाहस्र्यां संहितायां वैय्यासक्यामष्टमस्कंधे मत्स्यावतारचरितानुवर्णनं नाम चतुर्विंशतितमोऽध्यायः ॥ २४ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ श्रीमज्जगदीश्वरार्पणमस्तु ॥ ॥

योऽयं हरेरवतारस्तं यः प्रकीर्तयेत् ॥ ६० ॥ सत्यव्रतानां सत्यव्रतस्य ऋषीणां च । छत्रिणो गच्छंतीतिवल्लिंगसमवायाद्बहुवचनम् । जिह्ममीनं मायामत्स्यम् ॥ ६१ ॥ इति श्रीमद्भागवतेऽष्टमस्कंधे श्रीधरस्वामिविरचितायां भावार्थदीपिकायां टीकायां चतुर्विंशोऽध्यायः ॥ २४ ॥ ॥ समाप्तोऽयमष्टमस्कंधः ॥ ॥ ॥

ज्ञान व अपरोक्षज्ञान ह्यांनीं युक्त झालेला तो सत्यव्रत राजा, विष्णूच्या प्रसादानें ह्या कल्पामध्यें श्राद्धदेवनामक वैवस्वत मनु झाला ॥ ५८ ॥ असो. मायेनें मत्स्यरूप धारण करणारा भगवान् व राजर्षी सत्यव्रत ह्यांच्या संवादात्मक या मोठ्या आख्यानाचें श्रवण करणारा पुरुष, पातकापासून मुक्त होईल ॥ ५९ ॥ तसाच, जो हा भगवंताचा अवतार झाला त्याचें जो प्रतिदिवशीं कीर्तन करील त्याचे सर्व मनोरथ सिद्धीस जातील व अंतीं त्याला परम गति (मुक्ति) प्राप्त होईल ॥ ६० ॥ असो. ज्यानें, प्रलयोदकामध्यें निद्रिस्थ असलेल्या ब्रह्मदेवाच्या मुखांतून हयग्रीवानें दूर नेलेले वेद, त्या हयग्रीवनामक दैत्याचा वध करून पुनरपि आणून त्या ब्रह्मदेवाला दिले व ज्यानें, सत्यव्रत आणि ऋषि ह्यांना ब्रह्मप्रतिपादक मत्स्यपुराण कथन केलें त्या मायेनें मत्स्यरूप धारण करणाऱ्या सर्वकारणभूत भगवंताला मी प्रणत आहें ॥ ६१ ॥ ह्याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील अष्टमस्कंधामध्यें मत्स्यावतारचरित्रवर्णननामक हा चोविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २४ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

इति श्रीमद्भागवते अष्टमस्कंधः
सटीकः सार्थश्च समाप्तः

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अथ श्रीमद्भागवते नवमस्कंध
सटीकः सार्थश्च प्रारभ्यते

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नवमस्कन्धः

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ श्रीगणेशाय नमः ॥ ॥ पूर्वीं अष्टमस्कंधामध्यें मनु, मनुपुत्र इत्यादिकांच्या निरूपणानें अंतःकरणाला शुद्ध करणारा सद्धर्म सांगितला आहे. आतां, या नवमस्कंधामध्यें सद्धर्मांच्या योगानें शुद्धचित्त झालेल्या पुरुषांना, सूर्य व सोम यांच्या वंशांतील आख्यानाच्या वर्णनेंकरून अंतर्यामी ईश्वराची कथा, सांगितली आहे. त्यांत पहिल्या तेरा अध्यायांनीं सूर्याचा वंश व पुढील अकरा अध्यायांनीं सोमाचा वंश वर्णन केला आहे. त्यांत पहिल्या अध्यायामध्यें तर वैवस्वत मनूच्या सुद्युम्ननामक पुत्राच्या वंशांत सोमवंशाचा प्रवेश झाला असें सांगण्याकरितां त्या सुद्युम्नाला स्त्रीत्व प्राप्त झालें असें वर्णन केलें आहे ॥ १ ॥ पूर्वीं सांगितलेल्या कथाभागाचा उच्चार करून राजा प्रश्न करितो कीं—हे शुकाचार्य, सर्व चवदाहि मन्वंतरें, 'मनु मनुपुत्र इत्यादि सहा विभागांसहित' तूं मला सांगितलीं आहेस, तशींच त्या मन्वंतरांमध्यें केलेलीं अनंतपराक्रमी हरीचीं चरित्रेंहि सांगितलीं आहेस व तीं मी श्रवणहि केलीं आहेत ॥ १ ॥ जो हा द्रविडदेशांचा अधिपति सत्यव्रतनामक राजर्षि कीं, ज्यानें मत्स्यरूपी भगवंताचें आराधन करून त्यापा-

---

॥ श्रीगणेशाय नमः ॥ गुणा यं गुणतावाप्त्यै वृणुते करुणानिधिम् ॥ तमहं शरणं यामि परमानंदमाधवम् ॥ १ ॥ त्रिगुणाष्टभिरध्यायैर्वैवस्वतसुतान्वयः ॥ नवमे कृष्णसत्कीर्तिप्रसंगाय वितन्यते ॥ २ ॥ एवमुक्तोऽष्टमस्कंधे सद्धर्मः सत्त्वशोधकः ॥ कर्तृपालकवक्त्रादिमन्वादीनां निरूपणैः ॥ ३ ॥ सद्धर्मशुद्धसत्त्वानामंतरंगेशसत्कथा ॥ सूर्यसोमान्वयाख्यानैरधुना संग-

॥ श्रीगणेशाय नमः ॥ ॥ राजोवाच ॥ मन्वंतराणि सर्वाणि त्वयोक्तानि श्रुतानि मे ॥ वीर्याण्यनंतवीर्यस्य हरेस्तत्र कृतानि च
॥ १ ॥ योऽसौ सत्यव्रतो नाम राजर्षिर्द्रविडेश्वरः ॥ ज्ञानं योऽतीतकल्पांते लेभे पुरुषसेवया ॥ २ ॥ स वै विवस्वतः पुत्रो मनुरासी-
दिति श्रुतम् ॥ त्वत्तस्तस्य सुताश्चोक्ता इक्ष्वाकुप्रमुखा नृपाः ॥ ३ ॥ तेषां वंशं पृथग्ब्रह्मन् वंश्यानुचरितानि च ॥ कीर्तयस्व
महाभाग नित्यं शुश्रूषतां हि नः ॥ ४ ॥ ये भूता ये भविष्याश्च भवंत्यद्यतनाश्च ये ॥ तेषां नः पुण्यकीर्तीनां सर्वेषां वद विक्र-
मान् ॥ ५ ॥ सूत उवाच ॥ एवं परीक्षिता राज्ञा सदसि ब्रह्मवादिनाम् ॥ पृष्टः प्रोवाच भगवान् शुकः परमधर्मवित् ॥ ६ ॥
॥ श्रीशुक उवाच ॥ श्रूयतां मानवो वंशः प्राचुर्येण परंतप ॥ न शक्यते विस्तरतो वक्तुं वर्षशतैरपि ॥ ७ ॥ परावरेषां भूताना-
मात्मा यः पुरुषः परः ॥ स एवासीदिदं विश्वं कल्पांतेऽन्यन्न किंचन ॥ ८ ॥

तोच्यते ॥ ४ ॥ तत्रच । त्रयोदशभिरध्यायैः सूर्यवंशोऽनुवर्ण्यते ॥ एकादशभिरध्यायैः सोमवंशस्ततः परैः ॥ ५ ॥ तत्र तु प्रथमेऽध्याये वैवस्वतसुतान्वये ॥ सोमवंशप्रवेशोक्त्यै सुद्युम्नस्त्रीत्वमुच्यते ॥ ६ ॥ उक्तानुवादपूर्वकं वैवस्वतमनोर्वंशं पृच्छति । मन्वंतराणीति पंचभिः ॥ १ ॥ २ ॥ ३ ॥ ४ ॥ ५ ॥ ६ ॥ ७ ॥ अनुक्तं वंशं वक्तुं पूर्वोक्तमेव तावद्वंशं तत्प्रवर्तकं

सून पूर्वीच्या कल्पामध्यें ज्ञान संपादन केलें ॥ २ ॥ तोच याकल्पामध्यें विवस्वानाचा पुत्र होऊन वैवस्वतनामक मनु झाला असें तुझ्यापासूनच मी ऐकिलें आहे. आणि जे त्या मनूचे इक्ष्वाकुप्रभृति पुत्र झाले तेहि तूं मला सांगितले आहेस ॥ ३ ॥ हे सर्वज्ञा महाभागा, आतां त्यांचा वंश आणि त्या वंशांत झालेल्या राजांचीं चरित्रें नित्य श्रवण करण्याची इच्छा करणाऱ्या आम्हांस तीं वर्णन कर ॥ ४ ॥ त्या मनूच्या वंशामध्यें जे राजे पूर्वीं होऊन गेले, जे पुढें होतील व जे वर्तमानकाळीं झाले आहेत त्या सर्व पुण्यकीर्ति राजांचीं चरित्रें आम्हांस कथन कर ॥ ५ ॥ सूत म्हणाला—हे ऋषिहो, याप्रमाणें परीक्षिति राजानें ब्रह्मवेत्त्या ऋषींच्या सभेमध्यें श्रीशुकाचार्याला प्रश्न केला असतां, परमधर्मवेत्ता तो सर्वज्ञ शुकाचार्य ह्मणाला कीं ॥ ६ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे शत्रुतापना राजा, वैवस्वत मनूचा वंश मी मुख्यत्वेंकरून तुला सांगतों तूं श्रवण कर. तो वंश, विस्तारानें वर्णन करण्यास शेंकडो वर्षांनींहि शक्य होणार नाहीं ॥ ७ ॥ जो लहानमोठ्या प्राणिमात्रांचा आत्मा परम पुरुष, श्रीनारायण तोच प्रळयाचे वेळीं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हें जग होता ह्मणजे त्याचेठिकाणींच हें सर्व जग लीन होतें. त्याच्याहून दुसरें कांहींच नव्हतें ॥ ८ ॥ त्या श्रीनारायणाच्या नाभीपासून प्रकाशमान असा एक कमळाचा कळा उत्पन्न झाला. हे महाराज परीक्षिते, त्या कमळाच्या कळ्यामध्यें चतुर्मुख ब्रह्मदेव उत्पन्न झाला ॥ ९ ॥ त्याच्या मनापासून मरीचि ऋषि उत्पन्न झाला, त्याचाहि पुत्र
॥ १ ॥ कश्यप ऋषि झाला. त्या कश्यपापासून दक्षकन्या अदितीच्या उदरीं विवस्वान्नामक पुत्र झाला ॥ १० ॥ हे राजा, त्या विवस्वानापासून संज्ञानामक भार्येच्या उदरीं श्राद्धदेवनामक मनु उत्पन्न झाला, त्या शुद्धचित्त मनूला संज्ञानामक पत्नीच्याठिकाणीं दहा पुत्र झाले ॥ ११ ॥ त्यांचीं नांवें– इक्ष्वाकु, नृग, शर्याति, दिष्ट, धृष्ट, करूषक, नरिष्यंत, पृषध्र, नभग आणि कवि अशीं होत ॥ १२ ॥ ~~आतां सूर्याचा नातु जो सुद्युम्न त्याला स्त्रीत्व प्राप्त झालें असतां, बुधापासून तिच्याठिकाणीं पुरूरवा इत्यादिक सोमवंशज राजांची प्रवृत्ति झाली हें सांगण्याकरितां प्रस्तावासहित इलेचें आख्यान सांगतात~~–इक्ष्वाकुवगैरे पुत्र होण्याच्या पूर्वीं पुत्ररहित अशा मनूला पुत्रप्राप्ति होण्यासाठींच

श्रीनारायणमारभ्यानुस्मारयति । परावरेषामिति पंचभिः ॥ ८ ॥ ९ ॥ १० ॥ ११ ॥ नाभागं चेति पाठेऽपि नभग एव नाभागः ॥ १२ ॥ सूर्यपौत्रस्य सुद्युम्नस्य स्त्रीत्वे सति बुधात्पुरूरवःप्रभृतिसोमवंशसंचारं वक्तुं सप्रस्तावमिलोपाख्यानमाह । अप्रजस्य मनोः पूर्वमित्यादिना यावदध्यायसमाप्ति । पूर्वमिक्ष्वाकुप्रभृतीनामुत्पत्तेः प्राक् ॥ १३ ॥ दुहि-

तस्य नाभेः समभवत्पद्मकोशो हिरण्मयः ॥ तस्मिन् जज्ञे महाराज स्वयंभूश्चतुराननः ॥ ९ ॥ मरीचिर्मनसस्तस्य जज्ञे तस्यापि कश्यपः ॥ दाक्षायण्यां ततोऽदित्यां विवस्वानभवत्सुतः ॥ १० ॥ ततो मनुः श्राद्धदेवः संज्ञायामास भारत ॥ श्रद्धायां जनयामास दश पुत्रान्स आत्मवान् ॥ ११ ॥ इक्ष्वाकुनृगशर्यातिदिष्टधृष्टकरूषकान् ॥ नरिष्यंतं पृषध्रं च नभगं च कविं विभुः ॥ १२ ॥ अप्रजस्य मनोः पूर्वं वसिष्ठो भगवान्किल ॥ मित्रावरुणयोरिष्टिं प्रजार्थमकरोत्प्रभुः ॥ १३ ॥ तत्र श्रद्धा मनोः पत्नी होतारं समयाचत ॥ दुहित्रर्थमुपागम्य प्रणिपत्य पयोव्रता ॥ १४ ॥ प्रेषितोऽध्वर्युणा होता ध्यायंस्तत्सुसमाहितः ॥ हविषि व्यचरत्तेन वषट्कारं गृणन् द्विजः ॥ १५ ॥ होतुस्तद्व्यभिचारेण कन्येला नाम साऽभवत् ॥ तां विलोक्य मनुः प्राह नातिहृष्टमना गुरुम् ॥ १६ ॥ भगवन्किमिदं जातं कर्म वो ब्रह्मवादिनाम् ॥ विपर्ययमहो कष्टं मैवं स्याद्ब्रह्मविक्रिया ॥ १७ ॥

त्रर्थं मम कन्या यथा भवेत्तथा यजेति होतारं सम्यगयाचत पय एव व्रतमाहारो नियतो यस्याः ॥ १४ ॥ अध्वर्युणा होतर्यजेति प्रेषितो होता तेन गृहीते हविषि सति तत्तया प्रार्थितं ध्यायन्व्यचरदयजत् । पाठांतरे तत् आध्यायत् वाचा वषट्कारं गृणन्वौषडित्युच्चारयन् ॥ १५ ॥ १६ ॥ ब्रह्म विक्रिया मंत्रान्यथात्वम् ॥ १७ ॥

त्या मनूचा आचार्य भगवान् समर्थ जो वसिष्ठ ऋषि त्यानें, मित्रावरुण देवांची एक इष्टि (पुत्रकामेष्टि) केली ॥ १३ ॥ ती चालली असतां, केवळ दुधाचा आहार करून राहणारी श्रद्धानामक मनूची पत्नी, होत्याजवळ जाऊन त्याला वंदन करून त्याची तिनें, प्रार्थना केली कीं,–हे ऋषे, मला कन्या जशी होईल त्याप्रमाणें तुह्मीं यजन करावें ॥ १४ ॥ नंतर अध्वर्यूनें होत्यास यजन कर, असा प्रेष देऊन हवनासाठीं होमद्रव्य घेतलें असतां तो होता ब्राह्मण एकाग्रचित्त होऊन, राणीनें प्रार्थना केलेल्या गोष्टीचें ध्यान करित होत्साता, त्यानें वाचेनें वषट् असा उच्चार करून मनानें वौषट् असें ध्यान करीत यजन केलें ॥ १५ ॥ यजमानसंकल्पाच्या विपरीत केलेल्या होत्याच्या त्या यजनानें ॥ १ ॥
तीं इला या नांवानें प्रसिद्ध अशी कन्या झाली. तिला पाहून अतिसंतुष्टचित्त न झालेला मनु, वसिष्ठगुरूला ह्मणाला कीं,–॥ १६ ॥ हेभगवन्, ब्रह्मवेत्त्या तुह्मी अनुष्ठान केलेलें हें कर्म, संकल्पित फलाहून विपरीत फल देणारें कसें झालें ? ही मोठी दुःखाची गोष्ट आहे कीं, मंत्राचें असें विपरीत फळ होऊं नये. असें झालें असतां वैदिककर्मावर व

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मंत्रांवर असलेल्या विश्वासाचा लोप होऊन सन्मार्ग नष्ट होईल ॥ १७ ॥ तुह्मीं मंत्रांचें स्वरूप, अर्थ व त्यांचा प्रयोग जाणणारे, इंद्रियांचा निग्रह करणारे व तपाच्या योगानें पातकाचें जळून भस्म झालेले असतां, तुमच्या संकल्पाचें विपरीत फळ कसें झालें? जसा देवांचेठिकाणीं खोटेपणा नाहीं तसें तुमचेठिकाणींहि संकल्पाचें विपरीत फळ होऊं नये ॥ १८ ॥ तें त्या मनूचें भाषण ऐकून तो भगवान् वसिष्ठ ऋषि, होत्याचा विपरीत संकल्प जाणून त्या श्राद्धदेव मनूला ह्मणाला कीं,– हेमनो, तुझ्या होत्याच्या विपरीत संकल्पामुळें जरी हें तुझ्या संकल्पाचें विरीत फळ झालें आहे तथापि मी आपल्या तपोबलाच्या योगानें तुझें सुपुत्रत्व साधीन, ह्मणजे कन्येचाच पुत्र होण्याची तजवीज करीन ॥ १९ ॥ २० ॥ हेपरीक्षिते राजा, त्या महायशस्वी भगवान् वसिष्ठ ऋषीनें, असा निश्चय करून, त्या इलानामक कन्येचें पुरुषत्व संपादन करण्याच्या इच्छेनें, आदिपुरुष भगवंताची स्तुति केली ॥ २१ ॥ नंतर तो भगवान् हरि ईश्वर, वसिष्ठानें केलेल्या स्तुतीनें संतुष्ट होऊन, त्यानें त्या वसिष्ठाला, इलानामक कन्येला पुरुषत्व प्राप्त हो-

---

॥१८॥ प्रपितामहो वसिष्ठः ॥ १९ ॥ २० ॥ २१ ॥ २२॥ २३ ॥ २४ ॥ २५ ॥ २६ ॥ २७ ॥ २८ ॥ विगतं तिमिरमाभासः प्रकाशश्चान्यस्य यासु तथाभूता दिशः कुर्वंतः ॥ २९ ॥

यूयं मंत्रविदो युक्तास्तपसा दग्धकिल्बिषाः ॥ कुतः संकल्पवैषम्यमनृतं विबुधेष्विव ॥ १८ ॥ तन्निशम्य वचस्तस्य भगवान्प्रपितामहः ॥ होतुर्व्यतिक्रमं ज्ञात्वा बभाषे रविनंदनम् ॥ १९ ॥ एतत्संकल्पवैषम्यं होतुस्ते व्यभिचारतः ॥ तथापि साधयिष्ये ते सुप्रजास्त्वं स्वतेजसा ॥ २० ॥ एवं व्यवसितो राजन्भगवान्सुमहायशाः ॥ अस्तौषीदादिपुरुषमिलायाः पुंस्त्वकाम्यया ॥ २१ ॥ तस्मै कामवरं तुष्टो भगवान्हरिरीश्वरः ॥ ददाविलाऽभवत्तेन सुद्युम्नः पुरुषर्षभः ॥ २२ ॥ स एकदा महाराज विचरन्मृगयां वने ॥ वृतः कतिपयामात्यैरश्वमारुह्य सैंधवम् ॥ २३ ॥ प्रगृह्य रुचिरं चापं शरांश्च परमाद्भुतान् ॥ दंशितोऽनुमृगं वीरो जगाम दिशमुत्तराम् ॥ २४ ॥ सकुमारो वनं मेरोरधस्तात्प्रविवेश ह ॥ यत्रास्ते भगवान्रुद्रो रममाणः सहोमया ॥ २५ ॥ तस्मिन्प्रविष्ट एवासौ सुद्युम्नः परवीरहा ॥ अपश्यत्स्त्रियमात्मानमश्वं च वडवां नृप ॥ २६ ॥ तथा तदनुगाः सर्वे आत्मलिंगविपर्ययम् ॥ दृष्ट्वा विमनसोऽभूवन्वीक्षमाणाः परस्परम् ॥२७॥ राजोवाच ॥ कथमेवंगुणो देशः केन वा भगवन्कृतः ॥ प्रश्नमेनं समाचक्ष्व परं कौतूहलं हि नः ॥२८॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ एकदा गिरिशं द्रष्टुमृषयस्तत्र सुव्रताः ॥ दिशो वितिमिराभासाः कुर्वंतः समुपागमन् ॥ २९ ॥

ण्याचा वर दिला· त्याच्या योगानें ती इलाच, सुद्युम्ननामक पुरुषश्रेष्ठ झाला ॥ २२ ॥ हेमहाराजा, तो वीर सुद्युम्न, एकेवेळीं वनामध्यें मृगया करण्याकरितां कवच धारण करून, कितीएक प्रधानांनीं युक्त होत्साता, सुंदर धनुष्य तसेंच परम तीक्ष्ण बाण घेऊन, सिंधुदेशांत उत्पन्न झालेल्या घोड्यावर बसून उत्तर दिशेकडे हरिणाच्या पाठीमागून निघून गेला ॥ २३ ॥ २४ ॥ तो सुद्युम्न पुत्र, जेथें भगवान् शंकर, पार्वतीसहवर्तमान रममाण होत असतो त्या मेरुपर्वताच्या पायथ्याशीं असलेल्या वनामध्यें प्रविष्ट झाला ॥ २५ ॥ हेराजा, शत्रूंचा नाश करणाऱ्या त्या सुद्युम्नपुत्रानें, त्या वनामध्यें प्रवेश करितांच त्यानें, आपण स्त्री झालों असें व आपल्या घोड्याची घोडी झाली असें पाहिलें ॥ २६ ॥ त्याप्रमाणें त्या सुद्युम्नाच्या अनुयायी सर्व लोकांनीं आपल्या पुरुषत्वाचें स्त्रीत्व झालें असें पाहून एकमेकांकडे पाहत होत्साते खिन्नचित्त झाले ॥२७॥ राजा ह्मणाला--हे भगवन् शुकाचार्य, असा प्रवेश होतांच स्त्रीत्वसंपादन करणारा तो देश कसा झाला होता? आपोआप तसा देश होण्याचा संभवच नाहीं· यास्तव कोणी त्याला शाप देऊन तसा केला होता कीं काय ? या माझ्या प्रश्नाचें समाधान करावें· कारण, याच्या श्रवणाविषयीं आह्मांस मोठा उत्साह वाटत आहे ॥ २८ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

गाईला धरिली असतां ती गाय भयानें विव्हळ होऊन मोठ्यानें ओरडूं लागली. तीचें तें ओरडणें ऐकून पृषध्र तिच्याजवळ धांवून गेला ॥ ५ ॥ आणि त्यानें हातांत तलवार घेऊन मोठ्या वेगानें जेथें मेघाच्या योगानें नक्षत्रें लोपून गेलीं आहेत अशा, रात्रीच्या वेळीं न जाणतां हा व्याघ्र आहे अशा बुद्धीनें कपिला गाईचें मस्तक तोडिलें ॥ ६ ॥ तेव्हां तलवारीच्या अग्रानें त्या व्याघ्राचाहि एक कान तुटला होता, ह्मणून तो अत्यंत भयभीत होऊन मार्गामध्यें रक्त सांडीत त्या गोठ्यांतून पळून गेला ॥ ७ ॥ नंतर शत्रूंना मारणारा तो पृषध्र रात्रीचेठिकाणीं व्याघ्र मरण पावला असें मानीत असूनहि पहांटेच्या वेळीं थोडथोडा प्रकाश पडूं लागला असतां, आपणच गाय मारली असें त्याच्या दृष्टोत्पत्तीस आलें तेव्हां तो फार दुःखित झाला ॥ ८ ॥ याप्रमाणें अज्ञानेंकरून गोवधरूप पाप करणाऱ्या त्या पृषध्राला, कुलाचार्य वसिष्ठगुरूनें शाप दिला कीं,— अरे, या कर्माच्या योगानें तूं क्षत्रियांमध्यें अधमसुद्धां होऊन राहणार नाहींस तर तूं शूद्रच होशील ॥ ९ ॥ असा कुलगुरु वसिष्ठानें शाप दिला असतांहि त्या पृषध्रानें, हात जोडून त्या शापाचा अंगीकार केला. नंतर त्या वीरानें जितेंद्रिय होऊन ऋषींना प्रिय असें भगवद्भजनरूप व्रत धारण केलें ॥ १० ॥ त्याच्या योगानें तो, सर्व भूतांचेठिकाणीं

प्रलीना उडुगणा यस्मिंस्तस्मिन्समये बभ्रोः कपिलाया गोः ॥ ६ ॥ गां कामतो न जघानेति ख्यापयितुंवृक्णश्रवण इत्याद्युक्तम् ॥ ७ ॥ व्युष्टायां प्रभातायाम् ॥ ८ ॥ क्षत्रबंधुरपि त्वं न

खड्गमादाय तरसा प्रलीनोडुगणे निशि ॥ अजानन्नहनद्बभ्रोः शिरः शार्दूलशंकया ॥ ६ ॥ व्याघ्रोऽपि वृक्णश्रवणो निस्त्रिंशाग्राह-
तस्ततः ॥ निश्चक्राम भृशं भीतो रक्तं पथि समुत्सृजन् ॥ ७ ॥ मन्यमानो हतं व्याघ्रं पृषध्रः परवीरहा ॥ अद्राक्षीत्स्वहतां बभ्रुं
व्युष्टायां निशि दुःखितः ॥ ८ ॥ तं शशाप कुलाचार्यः कृतागसमकामतः ॥ न क्षत्रबंधुः शूद्रस्त्वं कर्मणा भविताऽमुना ॥ ९ ॥
एवं शप्तस्तु गुरुणा प्रत्यगृह्णात्कृतांजलिः ॥ अधारयद्व्रतं वीर ऊर्ध्वरेता मुनिप्रियम् ॥ १० ॥ वासुदेवे भगवति सर्वात्मनि परेऽमले ॥
एकांतित्वं गतो भक्त्या सर्वभूतसुहृत्समः ॥ ११ ॥ विमुक्तसंगः शांतात्मा संयताक्षोऽपरिग्रहः ॥ यदृच्छयोपपन्नेन कल्पयन्वृत्ति-
मात्मनः ॥ १२ ॥ आत्मन्यात्मानमाधाय ज्ञानतृप्तः समाहितः ॥ विचचार महीमेतां जडांधबधिराकृतिः ॥ १३ ॥ एवं वृत्तो वनं
गत्वा दृष्ट्वा दावाग्निमुत्थितम् ॥ तेनोपयुक्तकरणो ब्रह्म प्राप परं मुनिः ॥ १४ ॥ कविः कनीयान्विषयेषु निःस्पृहो विसृज्य राज्यं
सह बंधुभिर्वनम् ॥ निवेश्य चित्ते पुरुषं स्वरोचिषं विवेश कैशोरवयाः परं गतः ॥ १५ ॥

भविताऽपितु शूद्रो भवितेति ॥ ९ ॥ १० ॥ ११ ॥ ॥ १२ ॥ १३ ॥ उपयुक्तकरणो दग्धदेहः ॥१४॥ कवेरपि वंशो नाभवदित्याह । कविरिति । बंधुभिः सह राज्यं विसृज्य ॥ १५ ॥

दयावान् व सुखदुःखादिकांचेठिकाणीं समदर्शी होऊन भक्तीच्या योगेंकरून मायातीत, सर्वात्मा व विकारशून्य अशा भगवान् वासुदेवाचेठिकाणीं चित्ताची एकाग्रता पावोन, ॥ ११ ॥ विषयांचेठिकाणीं आसक्तिरहित, शांतचित्त, इंद्रियांना स्वाधीन ठेवणारा, देहनिर्वाहापुरत्या अन्नाखेरीज सर्व परिग्रह सोडून देणारा, व प्रारब्धाच्या योगानेंच प्राप्त झालेल्या आहारादिकेंकरून देहाची वृत्ति चालविणारा होऊन, ॥ १२ ॥ परमात्म्याचेठिकाणीं आपलें मन निश्चळ स्थापन करून व त्या परमानंद स्वरूपाच्या अनुभवानें तृप्त होऊन समाधान पावत होत्साता, जड, अंध आणि बधिर (किंवडा) यांच्यासारखी आपली आकृति धारण करीत या पृथ्वीवर संचार करूं लागला ॥ १३ ॥ अशा प्रकारच्या वृत्तीनें युक्त असा तो मननशील पृषध्र, प्रारब्धकर्मांचा क्षय झाला असतां एकेवेळीं अरण्यांत जाऊन तेथें चोहोंकडून लागलेल्या वणव्याच्या अग्नींत सांपडून त्याच्या योगानें ज्याचे हस्तपादादिक अवयव जळून गेले आहेत असा होत्साता, परब्रह्मस्वरूपाला पावला ॥ १४ ॥ आतां मनूच्या कवितामक पुत्राचाहि वंश झाला नाहीं असें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सांमततात—वैवस्वत मनूच्या इक्ष्वाकुप्रभृति दहा पुत्रांमध्यें कनिष्ठ जो कवि तो दहा बारा वर्षांच्या वयामध्येंच विषयांचेठिकाणीं निःस्पृह होऊन व आपल्या बंधूंसहवर्तमान राज्याचा त्याग करून वनांत, प्रविष्ट झाला आणि त्यानें, आपल्या चित्तामध्यें स्वप्रकाश पुराणपुरुषाचें ध्यान करून त्याच्या स्वरूपाची प्राप्ति करून घेतली ॥ १५ ॥ करूषनामक मनूच्या पुत्रापासून उत्तरदेशांचे अधिपति, ब्राह्मण भक्ति करणारे व धर्मांचेठिकाणीं प्रीतियुक्त असे कारूषनामक राजे झाले ॥ १६ ॥ धृष्टनामक मनुपुत्रापासुन धार्ष्टनांवाचें क्षत्रियकुळ झालें व तें या भूमीवर बहुतकरून ब्राह्मणत्व पावलें. नृगनामक मनुपुत्राचा सुमतिनामक पुत्र झाला, त्यापासून भूतज्योति झाला व त्यापासून वसुनामक पुत्र झाला ॥ १७ ॥ वसूचा पुत्र प्रतीक झाला, त्याचा पुत्र ओघवान् झाला. त्यालाहि ओघवानच पुत्र व ओघवती नांवाची एक कन्या झाली. तिला सुदर्शन ऋषीनें वरिलें ॥ १८ ॥ नरिष्यंतनामक मनूच्या पुत्रापासून चित्रसेन नांवाचा पुत्र झाला. त्याला ऋक्ष नांवाचा पुत्र झाला, त्याला मीढ्वान्, त्यापासून कूर्च व त्याचा पुत्र इंद्रसेन झाला

॥ १६ ॥ ब्रह्मभूयं ब्राह्मणत्वम् । नृगस्य वंशः पुत्रः सुमतिस्ततो भूतज्योतिस्ततो वसुः ॥ १७ ॥ ओघवतः पिता तत्पुत्रोऽप्योघवानेवेत्यर्थः ॥ १८ ॥ तदेवं त्रिभिः श्लोकैः करूषधृष्टनृगाणां वंशा उक्ताः । नरिष्यंतस्य वंशमाह । चित्रसेन इति सार्धैस्त्रिभिः । तत इत्यादेर्यत्राधिक्यं स्यात्तत्रानंतर्ये तत इत्यादि पदं व्याख्येयम् । यत्र तु न्यूनत्वं

करूषान्मानवादासन्कारूषाः क्षत्रजातयः ॥ उत्तरापथगोप्तारो ब्रह्मण्या धर्मवत्सलाः ॥ १६ ॥ धृष्टाद्धार्ष्टमभूत्क्षत्रं ब्रह्मभूयंगतं क्षितौ ॥ नृगस्य वंशः सुमतिर्भूतज्योतिस्ततो वसुः ॥ १७ ॥ वसोः प्रतीकस्तत्पुत्र ओघवानोघवत्पिता ॥ कन्या चोघवती नाम सुदर्शन उवाह ताम् ॥ १८ ॥ चित्रसेनो नरिष्यंताद्दक्षस्तस्य सुतोऽभवत् ॥ तस्य मीढ्वांस्ततः कूर्च इंद्रसेनस्तु तत्सुतः ॥ १९ ॥ वीतिहोत्रस्त्विंद्रसेनात्तस्य सत्यश्रवा अभूत् ॥ उरुश्रवाः सुतस्तस्य देवदत्तस्ततोऽभवत् ॥ २० ॥ ततोऽग्निवेश्यो भगवानग्निः स्वयमभूत्सुतः ॥ कानीन इति विख्यातो जातूकर्ण्यो महानृषिः ॥ २१ ॥ ततो ब्रह्मकुलं जातमाग्निवेश्यायनं नृप ॥ नरिष्यंतान्वयः प्रोक्तो दिष्टवंशमतः शृणु ॥ २२ ॥ नाभागो दिष्टपुत्रोऽन्यः कर्मणा वैश्यतां गतः ॥ भलंदनः सुतस्तस्य वत्सप्रीतिर्भलंदनात् ॥ २३ ॥ वत्सप्रीतेः सुतः प्रांशुस्तत्सुतं प्रमतिं विदुः ॥ खनित्रः प्रमतेस्तस्माच्चाक्षुषोऽथ विविंशतिः ॥ २४ ॥ विविंशतिसुतो रंभः खनिनेत्रोऽस्य धार्मिकः ॥ करंधमो महाराज तस्यासीदात्मजो नृप ॥ २५ ॥

तत्र पूर्वस्य परस्य वाऽनुषंगादिभिर्व्याख्येयम् ॥ १९ ॥ २० ॥ अग्निवेश्य एव कानीन इति जातूकर्ण्य इति च विख्यातः ॥ २१ ॥ २२ ॥ दिष्टस्य पुत्रो नाभागो वक्ष्यमाणनाभागादन्य इति भ्रांतिव्युदासार्थमनुवादमात्रम् ॥ २३ ॥ २४ ॥ २५ ॥

॥ १९ ॥ इंद्रसेनापासून वीतिहोत्र होऊन त्याचा सत्यश्रवा झाला, त्याचा पुत्र उरुश्रवा होऊन त्यापासून देवदत्त झाला ॥ २० ॥ त्यापासून अग्निवेश्यनामक पुत्र झाला तो साक्षात् भगवान् अग्नीचा अवतार होता तोच अग्निवेश्य ऋषि, पुढें कानीन या नांवानें व जातूकर्ण्य या नांवानें प्रख्यात झाला ॥ २१ ॥ त्यापासून अग्निवेश्यायननामक गोत्राचें ब्राह्मणकुळ झालें. हे राजा, नरिष्यंताचा वंश तुला मी सांगितला, आतां मनूचा पुत्र जो दिष्ट त्याचा वंश श्रवण कर ॥ २२ ॥ दिष्टाला नाभाग नांवाचा पुत्र झाला तो पुढें सांगावयाच्या नाभागाहून दुसरा होय. तो कृषि करणें व गाई राखणें इत्यादि कर्मांच्या योगानें वैश्यत्व पावला. त्याचा पुत्र भलंदन होय. त्या भलंदनापासून वत्सप्रीति झाला ॥ २३ ॥ वत्सप्रीतीचा पुत्र प्रांशु, त्याचा पुत्र प्रमति होय त्या प्रमतीपासून खनित्र झाला त्यापासून चाक्षुष झाला त्यापासून विविंशति झाला ॥ २४ ॥ विविंशतीचा पुत्र रंभ, त्याचा पुत्र खनिनेत्र; तो मोठा धार्मिक झाला. हे राजा, त्या खनिनेत्राचा पुत्र करंधमनामक महाराजा झाला ॥ २५ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याचा आवीक्षित्नामक पुत्र होय, त्याला मरुत्त नांवाचा सार्वभौम पुत्र झाला. ज्या मरुत्तराजाकडून अंगिराऋषीचा पुत्र महायोगी जो संवर्तऋषि त्यानें यज्ञ करविला ॥ २६ ॥ मरुत्त राजाचा जसा यज्ञ झाला तसा कोणत्याहि दुसऱ्या राजाचा यज्ञ झाला नाहीं. कारण त्यानें केलेल्या यज्ञामध्यें यज्ञपात्रादिक जी सामुग्री होती ती सर्व सुवर्णमय होती ॥ २७ ॥ तसाच त्याच्या यज्ञामध्यें सोमरसाच्या प्राशनानें इंद्राला मोठा आनंद झाला व दक्षिणा यथेच्छ मिळाल्यामुळें ब्राह्मण हर्ष पावले. आणि त्या यज्ञामध्यें मरुत्नामक देवांचे गण, अन्नादिक वाढणारे (वाढपी) होते व विश्वेदेव सभासद होते ॥ २८ ॥ मरुत्ताला दम या नांवाचा पुत्र झाला, त्याचा पुत्र राज्यवर्धन, त्याचा पुत्र सुधृति, त्या सुधृतीला नरनामक पुत्र झाला ॥ २९ ॥ त्याचा पुत्र केवल, त्याच्यापासून बिंदुमान्, त्यापासून वेगवान्, त्याला बंधुनामक पुत्र झाला. त्याला पृथिवी-

---

अंगिरसः सुतो महायोगी संवर्तो यमयाजयत्स मरुत्तः ॥ २६ ॥ अस्य यत्किंचित्पात्रादिकमस्ति तत्तु सर्वं हिरण्मयं शोभनमासीत् ॥ २७ ॥ अमाद्यदहृष्यत् ॥ २८ ॥

तस्यावीक्षित्सुतो यस्य मरुत्तश्चक्रवर्त्यभूत् ॥ संवर्तोऽयाजयद्यं वै महायोग्यंगिरःसुतः ॥ २६ ॥ मरुत्तस्य यथा यज्ञो न तथाऽन्यस्य कश्चन ॥ सर्वं हिरण्मयं त्वासीद्यत्किंचिच्चास्य शोभनम् ॥ २७ ॥ अमाद्यदिंद्रः सोमेन दक्षिणाभिर्द्विजातयः ॥ मरुतः परिवेष्टारो विश्वेदेवाः सभासदः ॥ २८ ॥ मरुत्तस्य दमः पुत्रस्तस्यासीद्राज्यवर्धनः ॥ सुधृतिस्तत्सुतो जज्ञे सौधृतेयो नरः सुतः ॥२९॥ तत्सुतः केवलस्तस्माद्बंधुमान्वेगवांस्ततः ॥ बंधुस्तस्याभवद्यस्य तृणबिंदुर्महीपतिः ॥ ३० ॥ तं भेजेऽलंबुषा देवी भजनीयगुणालयम् ॥ वराऽप्सरा यतः पुत्राः कन्या चेडविडाऽभवत् ॥ ३१ ॥ तस्यामुत्पादयामास विश्रवा धनदं सुतम् ॥ प्रादाय विद्यां परमामृषिर्योगेश्वरात्पितुः ॥ ३२ ॥ विशालः शून्यबंधुश्च धूम्रकेतुश्च तत्सुताः ॥ विशालो वंशकृद्राजा वैशालीं निर्ममे पुरीम् ॥३३॥ हेमचंद्रः सुतस्तस्य धूम्राक्षस्तस्य चात्मजः ॥ तत्पुत्रात्संयमादासीत्कृशाश्वः सहदेवजः ॥ ३४ ॥ कृशाश्वात्सोमदत्तोऽभूद्योश्वमेधैरिडस्पतिम् ॥ इष्ट्वा पुरुषमापाग्र्यां गतिं योगेश्वराश्रितः ॥ ३५ ॥

॥ २९ ॥ ३० ॥ यतो यस्यां तृणबिंदोः पुत्रा अभवन् ॥ ३१ ॥ ३२ ॥ तानेवाह । विशाल इति । तस्य तृणबिंदोः सुताः ॥ ३३ ॥ सहदेवजः देवजेन सहितः । पाठांतरे नामान्यत्वमात्रमर्थस्तु स एव ॥ ३४ ॥ ३५ ॥

पति असा तृणबिंदु झाला ॥ ३० ॥ ~~दुसऱ्यांनीं स्वीकार करण्यास योग्य अशा गुणांचें स्थान अशा~~ त्या तृणबिंदूला, इंद्राच्या अलंबुषानामक श्रेष्ठ अप्सरेनें वरिलें. नंतर तिच्याठिकाणीं त्याला पुत्र झाले व इडविडानांवाची एक कन्या झाली ॥ ३१ ॥ तिच्याठिकाणीं विश्रव्या ऋषीला कुबेरनामक पुत्र झाला. त्या महाबुद्धिवान् कुबेरानें, योगेश्वर अशा त्या आपल्या पित्यापासून अंतर्धान पावण्याची उत्कृष्ट विद्या संपादन केली ॥ ३२ ॥ विशाल, शून्यबंधु आणि धूम्रकेतु हे तृणबिंदूचे पुत्र होत. त्यांमध्यें विशाल हा वंशवृद्धि करणारा राजा झाला, त्यानें वैशालीनामक एक नगरी निर्माण केली ॥ ३३ ॥ त्या विशालाचा पुत्र हेमचंद्र, त्याचा पुत्र धूम्राक्ष, त्याचा पुत्र संयम, त्याचा सहदेव, त्याचा पुत्र कृशाश्व झाला ॥ ३४ ॥ कृशाश्वापासून सोमदत्त झाला. ज्या सोमदत्तानें अश्वमेधांच्या योगेंकरून यज्ञफलदात्या पुराणपुरुषाचें आराधन ॥ ४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करून भगवंतास शरण जाऊन उत्तमप्रकारची गति (मुक्ति) मिळविली ॥ ३५ ॥ ॥ सोमदत्ताचा पुत्र सुमति, त्याचा पुत्र जनमेजय हे, विशाल राजाच्या वंशांत झालेले राजे तृणबिंदूचें यश वाढविणारे होत ॥ ३६ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील नवमस्कंधामध्यें करूषादिवंशनिरूपणनामक हा दुसरा अध्याय समाप्त झाला ॥ २ ॥ ॥ आतां तिसऱ्या अध्यायामध्यें स्वायंभुवमनूचा तिसरा पुत्र जो शर्याति राजा त्याचा वंश सांगितलेला असून त्यांत सुकन्येचें व रेवतीचें अशीं दोन आख्यानें परम आश्चर्यकारक सांगितलीं आहेत ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हेराजा, मनूचा पुत्र शर्यातिनामक जो राजा तो वेदार्थाचें तत्त्व जाणणारा झाला. ज्यानें आंगिरस ऋषींच्या सत्रामध्यें दुसरे दिवशीं करावयाचें कर्म सांगितलें आहे ॥ १ ॥ त्या शर्यातीची कमलपत्राक्षी सुकन्यानामक कन्या होती. एकेदिवशीं त्या कन्येला बरोबर घेऊन तो शर्याति राजा, वनशोभा पाहण्याकरितां वनांत जाऊन तेथें तो च्यवनऋषीच्या आश्रमांत सैन्यासहवर्तमान उतरला ॥ २ ॥ तेथें ती सुकन्या, सख्यांसहवर्तमान वनांतील वृक्षांची शोभा पाहत

वैशालभूपाला विशालस्यान्वये जाताः ॥ ३६ ॥ इति श्रीमद्भागवते नवमस्कंधे टीकायां द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥ ॥ तृतीये मनुपुत्रस्य शर्यातेः कीर्त्यतेऽन्वयः ॥ यत्र सौक-

सौमदत्तिस्तु सुमतिस्तत्सुतो जनमेजयः ॥ एते वैशालभूपालास्तृणबिंदोर्यशोधराः ॥ ३६ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे नवमस्कंधे द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ शर्यातिर्मानवो राजा ब्रह्मिष्ठः स बभूव ह ॥ यो वा अंगिरसां सत्रे द्वितीयमह ऊचिवान् ॥ १ ॥ सुकन्या नाम तस्यासीत्कन्या कमललोचना ॥ तया सार्धं वनगतो ह्यगमच्च्यवनाश्रमम् ॥ २ ॥ सा सखीभिः परिवृता विचिन्वत्यंघ्रिपान्वने ॥ वल्मीकरंध्रे ददृशे खद्योते इव ज्योतिषी ॥ ३ ॥ ते दैवचोदिता बाला ज्योतिषी कंटकेन वै ॥ अविध्यन्मुग्धभावेन सुस्रावासृक्ततो बहु ॥ ४ ॥ शकृन्मूत्रनिरोधोऽभूत्सैनिकानां च तत्क्षणात् ॥ राजर्षिस्तमुपालक्ष्य पुरुषान्विस्मितोऽब्रवीत् ॥ ५ ॥ अप्यभद्रं न युष्माभिर्भार्गवस्य विचेष्टितम् ॥ व्यक्तं केनापि नस्तस्य कृतमाश्रमदूषणम् ॥ ६ ॥ सुकन्या प्राह पितरं भीता किंचित्कृतं मया ॥ द्वे ज्योतिषी अजानंत्या निर्भिन्ने कंटकेन वै ॥ ७ ॥ दुहितुस्तद्वचः श्रुत्वा शर्यातिर्जातसाध्वसः ॥ मुनिं प्रसादयामास वल्मीकांतर्हितं शनैः ॥ ८ ॥

न्यमाख्यानं रैवतं च महाद्भुतम् ॥ १ ॥ ब्रह्मिष्ठो वेदार्थतत्त्वज्ञः । तदेवाह । यो वा इति । द्वितीयमहो द्वितीयेऽह्नि क्रियमाणं कर्म ऊचिवानुवाच । तस्य वंशमुत्तानबर्हिरानर्त इत्यादिना वक्ष्यति ॥ १ ॥ आदौ तावत्तत्कन्यावृत्तांतमाह । सुकन्या नामेत्यादिना ॥ २ ॥ ३ ॥ ४ ॥ ५ ॥ भार्गवस्य च्यवनस्य । अभद्रमपराधः ॥ ६ ॥ ७ ॥ ८ ॥

असतां तिनें एका वारुळाच्या बिळांत काजव्यासारखीं वारंवार प्रकाश पावणारीं दोन ज्योती अवलोकन केलीं ॥ ३ ॥ तेव्हां दैवानें प्रेरणा केलेल्या त्या सुकन्येनें, मूढपणामुळें एका कंटकाच्या योगानें त्या दोन्ही ज्योतींचा वेध केला (त्या टोंचल्या) तेव्हां त्या वारुळाच्या बिळांतून पुष्कळ रक्त स्रवूं लागलें ॥ ४ ॥ त्यावेळीं शर्यातिराजाच्या सेनेंतील लोकांचा मलमूत्रनिरोध झाला, तें पाहून विस्मय पावलेला तो राजर्षि (शर्याति) आपल्या लोकांना ह्मणाला कीं,– ॥ ५ ॥ अहो, तुह्मीं च्यवनभार्गवावातर कांहीं अपराध केलात नाहींना? मला तर असें खास वाटतें कीं,– आमच्या लोकांपैकीं कोणीतरी त्या ऋषीच्या आश्रमाचें दूषण केलें आहे, त्यावांचून असा सर्वांना एकदम उपद्रव होणार नाहीं ॥ ६ ॥ असा शर्याति राजानें प्रश्न केला असतां, भयाक्रांत झालेली सुकन्या, पित्याला ह्मणाली कीं,– बाबा, मी कांहीं केलें आहे. वारुळाच्या भोंकामध्यें माझ्या दृष्टीस पडलेल्या दोन ज्योती 'त्या काय होत्या तें' न जाणणाऱ्या मी, कांट्यानें टोंचल्या आहेत ॥ ७ ॥ असें त्या कन्येचें भाषण ऐकून, ज्याला भय प्राप्त झालें आहे

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अशा शर्यातिराजानें, वारुळामध्यें गुप्त असलेल्या च्यवनभार्गव ऋषीला, हळू हळू स्तुतिवगैरे करून प्रसन्न करून घेतलें ॥ ८ ॥ नंतर त्या च्यवनाचा अभिप्राय जाणून राजानें ती आपली कन्या त्या ऋषीला दिली. तेव्हां कन्येला वर पाहण्याच्या दैन्यादिक क्लेशांपासून व सैनिक लोकांच्या मलमूत्रनिरोधरूप क्लेशापासून मुक्त होऊन एकाग्र चित्तानें त्या ऋषीचा निरोप घेऊन, राजा आपल्या नगरास निघून गेला ॥ ९ ॥ इकडे ती सुकन्या परमकोपिष्ठ अशा त्या च्यवननामक पतीला पावोन सावधपणें त्याच्या अभिप्रायाला अनुसरून त्याप्रमाणें सेवेच्या योगेंकरून त्याला संतुष्ट करिती झाली ॥ १० ॥ पुढें कांहीं काल निघून गेला असतां, एकेदिवशीं त्या च्यवनभार्गवानें आपल्या आश्रमामध्यें प्राप्त झालेल्या अश्विनीकुमारांचें पूजन करून त्यांना ह्मणाला कीं,–हे अश्विनीकुमार हो, तुह्मी एखाद्यानें कांहीं प्रार्थना केली असतां तें संपादन करण्यास समर्थ आहां ह्मणून मीं तुमची प्रार्थना करितों कीं,– अतिशय वृद्धपणा प्राप्त झालेल्या मला, तुह्मी तारुण्य वय द्यावेंत, यज्ञामध्यें सोमपानरहित अशाहि तुह्मांला मी सोमरसाचा भाग

मुग्धेयं मम कन्या क्षंतव्यं त्वयेत्युच्यमाने कतिवर्षाण्यस्या विवाहः कृतो न वेत्यादिवाक्यैस्तदभिप्रायं ज्ञात्वा तस्मै तां दुहितरं प्रादात् ॥ ९ ॥ १० ॥ हे ईश्वरौ सद्वैद्यौ युवां मह्यं वयस्तारुण्यं दत्तं संपादयतम् ॥ ११ ॥ असोमपोः सोमपानरहितयोरपि वां युवयोः सोमस्य ग्रहं सोमपूर्णं पात्रं ग्रहीष्ये दास्यामीति । युवां सोमेन यक्ष्य-

तदभिप्रायमाज्ञाय प्रादाद्दुहितरं मुनेः ॥ कृच्छ्रान्मुक्तस्तमामंत्र्य पुरं प्रायात्समाहितः ॥ ९ ॥ सुकन्या च्यवनं प्राप्य पतिं परमकोपनम् ॥ प्रीणयामास चित्तज्ञा अप्रमत्ताऽनुवृत्तिभिः ॥ १० ॥ कस्यचित्त्वथ कालस्य नासत्यावाश्रमागतौ ॥ तौ पूजयित्वा प्रोवाच वयो मे दत्तमीश्वरौ ॥ ११ ॥ ग्रहं ग्रहीष्ये सोमस्य यज्ञे वामप्यसोमपोः ॥ क्रियतां मे वयो रूपं प्रमदानां यदीप्सितम् ॥ १२ ॥ बाढमित्यूचतुर्विप्रमभिनंद्य भिषक्तमौ ॥ निमज्जतां भवानस्मिन्ह्रदे सिद्धविनिर्मिते ॥ १३ ॥ इत्युक्त्वा जरया ग्रस्तदेहो धमनिसंततः ॥ ह्रदं प्रवेशितोऽश्विभ्यां वलीपलितविप्रियः ॥ १४ ॥ पुरुषास्त्रय उत्तस्थुरपीच्या वनिताप्रियाः ॥ पद्मस्रजः कुंडलिनस्तुल्यरूपाः सुवाससः ॥ १५ ॥ तान्निरीक्ष्य वरारोहा सरूपान्सूर्यवर्चसः ॥ अजानती पतिं साध्वी अश्विनौ शरणं ययौ ॥ १६ ॥

इत्यर्थः । ऐंद्रवायवं गृह्णातीत्यादिषु द्रव्यदेवतासंबंधानुपपत्त्या गृह्णातेर्यागपर्यवसायित्वात् ॥ १२ ॥ बाढमित्यभिनंद्य भवानस्मिन्निमज्जतामित्यूचतुः ॥ १३ ॥ ह्रदं प्रवेशितः । तावपि तमपि वृद्धं गृहीत्वा प्रविष्टावित्यर्थः ॥ १४ ॥ १५ ॥ अश्विनौ शरणं ययौ युवां पृथक् स्थित्वा मत्पतिं दर्शयतमिति प्रार्थयामासेत्यर्थः ॥ १६ ॥

देईन; कधीं चुकणार नाहीं. यास्तव उत्तम स्त्रियांनाहि मनोहर असें मला तारुण्य वय आणि स्वरूपसौंदर्य तुह्मीं संपादन करावेंत ॥ ११ ॥ १२ ॥ तेव्हां देवांचे वैद्य अशा त्या अश्विनीकुमारांनीं त्याच्या वचनाचा ‘ ठीक आहे असा ’ अंगीकार करून आपण, या सिद्धांनीं निर्माण केलेल्या डोहामध्यें बुडी मारावी ह्मणजे आपला हेतु पूर्ण होईल, असें सांगितलें, परंतु तो च्यवनभार्गव जरेच्या योगानें अतिवृद्ध, अंगावर दिसणाऱ्या शिरांनीं व्याप्त, आणि वळकुळ्या व अगदीं पिकून गेलेले केंस यांच्या योगानें विरूप दिसत असून डोहामध्यें स्वतः जाऊन बुडी मारण्यास असमर्थ होता ह्मणून अश्विनीकुमारांनींच त्याचा डोहांत प्रवेश करविला, ह्मणजे त्यांनीं त्याला दोहों बाजूंनीं धरून आपणसुद्धां डोहामध्यें बुडी मारिली ॥ १३ ॥ १४ ॥ नंतर त्या डोहांतून एकसारखे तीन पुरुष बाहेर पडले. ते अतिसुंदर असल्यामुळें स्त्रियांना फार आवडणारे, गळ्यांमध्यें कमळांच्या माळा व कानांमध्यें कुंडलें धारण करणारे उत्तम वस्त्रें परिधान करणारे व स्वरूपानें एकसारखे होते ॥ १५ ॥ सूर्यासारखे तेजःपुंज, तरुण व सारख्या वयाचे अशा त्या तीन पुरुषांना पाहून ती पतिव्रता सुकन्या, त्यांमध्यें आपला पति कोणता तें न जाणत होत्साती, अश्विनीकुमारांस शरण गेली ह्मणजे तुह्मींच निराळे राहून

१ ही माझी कन्या अज्ञानी आहे, क्षमा करावी, असें राजानें ह्मटलें असतां, हिला कितीवर्षें आहेत, हिचा विवाह केला किंवा नाहीं, इत्यादि भाषणांनीं त्याचा विवाह करण्याचा आशय जाणून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

माझा पति मला दाखवावा अशी तिनें अश्विनीकुमारांची प्रार्थना केली ॥ १६ ॥ तेव्हां तिच्या पातिव्रत्यानें संतुष्ट झालेल्या त्या अश्विनीकुमारांनीं, त्या सुकन्येला तिचा पति दाखविला आणि नंतर त्या च्यवनभार्गव ऋषीची आज्ञा घेऊन विमानाच्या योगानें स्वर्गलोकीं गमन केलें ॥ १७ ॥ नंतर एकेवेळीं यज्ञ करण्याची तयारी करणारा शर्याति राजा, यज्ञाकरितां च्यवन ऋषीला बोलावण्यासाठीं व सुकन्येलाहि आणण्यासाठीं च्यवनाच्या आश्रमीं प्राप्त झाला. त्यानें तेथें आपल्या कन्येच्या उजव्या बाजूला बसलेला सूर्यासारखा तेजःपुंज पुरुष पाहिला ॥ १८ ॥ शर्यातिराजाला पाहतांच सुकन्येनें उठून वंदन केलें त्या वेळीं व्यभिचारशंकेनें असंतुष्टचित्त झाल्यासारखा तो राजा, चरणांला वंदन करणाऱ्याहि त्या कन्येला आशीर्वाद न देतां ह्मणाला कीं,– ॥ १९ ॥ हे जारिणि, तूं हें काय केलेंस? फारच वाईट केलेंस. मननशील, तपस्वी व सर्वलोकांना पूज्य अशा आपल्या च्यवनभार्गव पतीला फसविलेंस. कारण, तो अतिवृद्ध असल्यामुळें आपणास योग्य नाहीं. असें मानून त्याचा त्याग करून ह्या कोणीएका रस्त्यानें जात अस-

---

॥ १७ ॥ १८ ॥ १९ ॥ प्रलंभितो वंचितः । हे असति । असंमतमनभीष्टम् ॥ २० ॥ हे सतां कुलप्रसूते तव मतिरन्यथा तद्विपर्ययेण कथमवगतावसन्नाऽध्यवसितेति वा ।

दर्शयित्वा पतिं तस्यै पातिव्रत्येन तोषितौ ॥ ऋषिमामंत्र्य ययतुर्विमानेन त्रिविष्टपम् ॥ १७ ॥ यक्ष्यमाणोऽथ शर्यातिश्च्यवनस्याश्रमं गतः ॥ ददर्श दुहितुः पार्श्वे पुरुषं सूर्यवर्चसम् ॥ १८ ॥ राजा दुहितरं प्राह कृतपादाभिवंदनाम् ॥ आशिषश्चाप्रयुंजानो नातिप्रीतमना इव ॥ १९ ॥ चिकीर्षितं ते किमिदं पतिस्त्वया प्रलंभितो लोकनमस्कृतो मुनिः ॥ यत्त्वं जराग्रस्तमसत्यसंमतं विहाय जारं भजसेऽमुमध्वगम् ॥ २० ॥ कथं मतिस्तेऽवगताऽन्यथा सतां कुलप्रसूते कुलदूषणं त्विदम् ॥ बिभर्षि जारं यदपत्रपा कुलं पितुश्च भर्तुश्च नयस्यधस्तमः ॥ २१ ॥ एवं ब्रुवाणं पितरं स्मयमाना शुचिस्मिता ॥ उवाच तात जामाता तवैष भृगुनंदनः ॥ २२ ॥ शशंस पित्रे तत्सर्वं वयोरूपाभिलंभनम् ॥ विस्मितः परमप्रीतस्तनयां परिषस्वजे ॥ २३ ॥ सोमेन याजयन्वीरं ग्रहं सोमस्य चाग्रहीत् ॥ असोमपोरप्यश्विनोश्च्यवनः स्वेन तेजसा ॥ २४ ॥ हंतुं तमाददे व्रजं सद्योमन्युरमर्षितः ॥ स वज्रं स्तंभयामास भुजमिंद्रस्य भार्गवः ॥ २५ ॥

तदेवाह । कुलदूषणं त्विदमित्यादि ॥ २१ ॥ २२ ॥ २३ ॥ २४ ॥ सद्यस्तत्क्षणमेव मन्युर्यस्य स इंद्रः ॥ २५ ॥

लेल्या जार पुरुषाला तूं सेवन करित्येस. हर हर! ॥ २० ॥ सत्पुरुषांच्या कुळामध्यें उत्पन्न झालेल्या तुला अशी ही विपरीत बुद्धि कशी आठवली! कारण, तूं निर्लज्ज होऊन जारपुरुषाचें सेवन करित्येस, हें कर्म कुळाला दूषण लावणारें आहे. या कर्माच्या योगेंकरून तूं, पित्याचें (माझें) आणि भर्त्याचें (च्यवनभार्गवाचें) कुळ नरकांत नेऊन लोटित आहेस! ! ॥ २१ ॥ याप्रमाणें भाषण करणाऱ्या पित्याला, त्याच्या शंकायुक्त वाक्यानें विस्मित झालेली व मंदहास्यानें युक्त अशी ती सुकन्या ह्मणाली कीं,– बाबा, हा माझ्याजवळ असणारा पुरुष तुझा जांवई च्यवनभार्गवच आहे दुसरा कोणी नाहीं ॥ २२ ॥ असें सांगून त्याला तारुण्य वय व मनोहर स्वरूप कसें प्राप्त झालें तें सर्व वृत्त तिनें राजाला कळविलें. तेव्हां तो राजा विस्मययुक्त होऊन अत्यंत संतोष पावला आणि त्यानें कन्येला आलिंगन दिलें ॥ २३ ॥ नंतर च्यवनभार्गवानें त्या वीर शर्यातिराजाकडून सोमयाग करविला. त्यामध्यें त्यानें आपल्या तपोबलाच्या योगेंकरून, सोमपानरहित अशाहि त्या अश्विनीकुमारांना, सोमरसाचा भाग दिला ह्मणजे त्यांना सोम भाग देण्यासाठीं राजाकडून यजन करविलें ॥ २४ ॥ त्यावेळीं तें सहन न होणाऱ्या शीघ्रकोपी इंद्रानें त्या यजन करणाऱ्या शर्यातीला मारण्यासाठीं हातांत वज्र घेतलें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असतां, त्या च्यवनभार्गवानें वज्रधारण केलेल्या इंद्राच्या बाहूचें स्तंभन केलें ॥ २५ ॥ तेव्हां तो इंद्राचा बाहु मोकळा होण्याकरितां, 'जे अश्विनीकुमार वैद्य असल्यामुळें पूर्वी सोमाहुतीनें बहिष्कृत होते ह्मणजे ज्यांना सोमाहुति नव्हती त्यांना ' त्या दिवसापासून सर्व देवांनीं सोमाहुति देण्याचें कबूल केलें तेव्हां इंद्राचा बाहू मोकळा झाला ॥ २६ ॥ पुढें शर्यातिराजाला उत्तानबर्हि, आनर्त आणि भूरिषेण, असे तीन पुत्र झाले. त्यांपैकीं आनर्तापासून रेवत झाला ॥ २७ ॥ त्यानें समुद्रामध्यें कुशस्थलीनामक नगरी (द्वारका) निर्माण करून तिच्यामध्यें राहून आनर्तादिक देशांच्या ऐश्वर्याचा उपभोग घेतला ॥ २८ ॥ हे शत्रुदमना राजा, त्या रेवताला ककुद्मी ज्यांमध्यें वडील आहे असे उत्तमप्रकारचे शंभर पुत्र झाले. तो ककुद्मी (रैवत) आपल्या रेवतीनामक कन्येला बरोबर घेऊन तिला योग्य वर ब्रह्मदेवाजवळ विचारण्याकरितां आपणास जाण्यास प्रतिबंध नसलेल्या ब्रह्मलोकास निघून गेला ॥ २९ ॥ तों तेथें गायन चाललें होतें ह्मणून विचारण्यास सवड न झाल्यामुळें क्षणभर उगीच राहिला ॥ ३० ॥ तें गाणें

॥ २६ ॥ २७ ॥ विषयान्देशानानर्तादीनभुंक्तापालयत् ॥ २८ ॥ ककुद्मी ज्येष्ठो यस्मिंस्तत् । विभुं ब्रह्माणम् ॥ २९ ॥ न लब्धः क्षणोऽवसरो येन ॥ ३० ॥ आद्यं ब्रह्माणम्

अन्वजानंस्ततः सर्वे ग्रहं सोमस्य चाश्विनोः ॥ भिषजाविति यत्पूर्वं सोमाहुत्या बहिष्कृतौ ॥ २६ ॥ उत्तानबर्हिरानर्तो भूरिषेण इति त्रयः ॥ शर्यातेरभवन्पुत्रा आनर्ताद्रेवतोऽभवत् ॥ २७ ॥ सोंऽतःसमुद्रे नगरीं विनिर्माय कुशस्थलीम् ॥ आस्थितोऽभुंक्त विषयानानर्तादीनरिंदम ॥ २८ ॥ तस्य पुत्रशतं जज्ञे ककुद्मिज्येष्ठमुत्तमम् ॥ ककुद्मी रेवतीं कन्यां स्वामादाय विभुं गतः ॥ २९ ॥ कन्यावरं परिप्रष्टुं ब्रह्मलोकमपावृतम् ॥ आवर्तमाने गांधर्वे स्थितोऽलब्धक्षणः क्षणम् ॥ ३० ॥ तदंत आद्यमानम्य स्वाभिप्रायं न्यवेदयत् ॥ तच्छ्रुत्वा भगवान्ब्रह्मा प्रहस्य तमुवाच ह ॥ ३१ ॥ अहो राजन्निरुद्धास्ते कालेन हृदि ये कृताः ॥ तत्पुत्रपौत्रनप्तॄणां गोत्राणि च न शृण्महे ॥ ३२ ॥ कालोऽभियातस्त्रिणवचतुर्युगविकल्पितः ॥ तद्गच्छ देवदेवांशो बलदेवो महाबलः ॥ कन्यारत्नमिदं राजन्नररत्नाय देहि भो ॥ ३३ ॥ भुवो भारावताराय भगवान्भूतभावनः ॥ अवतीर्णो निजांशेन पुण्यश्रवणकीर्तनः ॥ ३४ ॥ इत्यादिष्टोऽभिवंद्याजं नृपः स्वपुरमागतः ॥ त्यक्तं पुण्यजनत्रासाद्भ्रातृभिर्दिक्ष्ववस्थितैः ॥ ३५ ॥

॥ ३१ ॥ ते त्वया हृदये ये कृतास्ते सर्वे कालेन निरुद्धाः संहृताः ॥ ३२ ॥ त्रिणव सप्तविंशति चतुर्युगानि तैर्विकल्पितो विभक्तः । यो देवदेवस्यांशोऽस्ति तस्मै नररत्नाय देहि ॥ ३३ ॥ तदेवाह । भुव इति ॥ ३४ ॥ पुण्यजनत्रासाद्यक्षभयात्पूर्वमेव चिरं पुरं तद्भ्रातृभिस्त्यक्तम् ॥ ३५ ॥

संपल्यावर ब्रह्मदेवाला नमस्कार करून, हिला योग्य वर कोणता आहे तो सांगावा असा त्यानें प्रश्न केला. तें भाषण ऐकून भगवान् ब्रह्मदेवानें हास्य करून त्याला सांगितलें कीं,– ॥ ३१ ॥ हेराजा, इकडे येत्येवेळीं जे तूं हिला वर मनांत आणिले होतेस ते सर्वहि कालानें नाहींसे करून टाकिले आहेत, आतां त्यांचे पुत्र, नातु, पणतू किंवा गोत्रेंहि ऐकूं येत नाहींत ॥ ३२ ॥ कितीकाळ गेला? असें ह्मणशील तर– कृत, त्रेता, द्वपार आणि कलि हीं चार युगें सत्तावीस वेळां होऊन गेलीं. इतका काळ निघून गेला आहे, तर आतां ही कन्या कोणाला द्यावी असें ह्मणशील तर सांगतों ऐक. हेराजा, तूं भूमीवर जा. तेथें हल्लीं नारायणाचा अंश, महाबली बलराम अवतीर्ण झाला आहे, त्या नररत्नाला हें कन्यारत्न समर्पण कर ॥ ३३ ॥ पृथिवीचा भार दूर करण्याकरितां, ज्याचीं श्रवणकीर्तनें लोकांना पवित्र करणारीं आहेत असा भूतपालक भगवान् आपल्या त्या शेषरूपी अंशासहवर्तमान हल्लीं कृष्णरूपानें अवतीर्ण झाला आहे ॥ ३४ ॥ याप्रमाणें ब्रह्मदेवानें सांगितलें असतां ,तो रैवत राजा, ब्रह्मदेवाला नमस्कार करून, 'पूर्वीचें यक्षांच्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भयानें जिकडेतिकडे जाऊन राहिलेल्या भ्रात्यांनीं टाकलेल्या त्या' आपल्या नगराला परत आला ॥ ३५ ॥ तदनंतर सर्व अवयवांनीं सुंदर अशी आपली कन्या बळाच्या योगानें शोभणाऱ्या त्या बळरामास देऊन, तो रैवत राजा तपश्चर्या करण्यासाठीं नरनारायणाच्या बदरिकाश्रमास निघून गेला ॥ ३६ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील नवमस्कंधामध्यें हा तिसरा अध्याय समाप्त झाला ॥ ३ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां या चवथ्या अध्यायामध्यें वैवस्वतमनूचा नातु जो नाभाग व त्याचा पुत्र जो अंबरीष त्यांची कथा वर्णन केलेली आहे. ज्या अंबरीषापासून कृत्येचीसुद्धां शांतता झाली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– वैवस्वत मनूचा पुत्र जो नभग त्याचा पुत्र नाभागनामक झाला. तो बहुत कालपर्यंत ब्रह्मचर्यव्रत धारण करून गुरुकुलाचेठिकाणीं वास करित होता. तेव्हां हा नैष्ठिक ब्रह्मचारी आहे असें मानून विभागाचे वेळीं त्या-

---

॥ ३६ ॥ इति श्रीमद्भागवते नवमस्कंधे टीकायां तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥ ॥ चतुर्थे मनुपुत्रस्य नभगस्य कथोच्यते ॥ तत्सूनोश्चांबरीषस्य कृत्या प्रतिहता यतः ॥ १ ॥ नभगस्य वंशमाह । नभगस्यापत्यं नाभागः । नाभागादंबरीषो महाभागवतोऽभूदिति वक्ष्यंस्तद्धेतुत्वेन वंशप्रवर्तकस्य नभगस्य निष्कपटं चरितं तेन तु श्रीरुद्रप्रसादमाह । यं ततमित्यादिना । ब्रह्मचारिणं बहुकालं गुरुकुले वसंतं नैष्ठिकोऽसाविति मत्वा विभागसमये तस्मै भागमप्रकल्प्यैव भ्रातरः सर्वं दायं विभज्य गृहीत्वा पश्चाद्गुरुकुलादागतं यं भागार्थिनं कविं विद्वांसं यविष्ठं प्रति ततं तातं पितरं दायं व्यभजन्नित्यर्थः ॥ १ ॥ एतदेव प्रश्नोत्तराभ्यां दर्शयति । तत्र नाभागः पृच्छति । हे भ्रातरो मह्यं किमभा-

सुतां दत्वाऽनवद्यांगीं बलाय बलशालिने ॥ बदर्याख्यं गतो राजा तप्तुं नारायणाश्रमम् ॥ ३६ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे नवमस्कंधे तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ नाभागो नभगापत्यं यं ततं भ्रातरः कविम् ॥ यविष्ठं व्यभजन् दायं ब्रह्मचारिणमागतम् ॥ १ ॥ भ्रातरोऽभाक्त किं मह्यं भजाम पितरं तव ॥ त्वां ममार्यास्तताभाक्षुर्मा पुत्रक तदादृथाः ॥ २ ॥ इमे अंगिरसः सत्रमासतेऽद्य सुमेधसः ॥ षष्ठं षष्ठमुपेत्याहः कवे मुह्यंति कर्मणि ॥ ३ ॥

क्त व्यभजत कं भागं मदर्थं यूयं प्रकल्पितवंतः । भ्रातर आहुः । तदा विस्मृतमस्माभिरिदानीं तु तव पितरं विभजाम त्वं पितरं गृहाणेत्यर्थः । स च पितरं गत्वाऽऽह । तत हे तात आर्याः श्रेष्ठा मे मम त्वामभाक्षुर्भागं चक्रुः । मदीयो भागस्त्वमित्यर्थः । पाठांतरे हे तात किमिदं ममाभाक्षुः भजाम पितरं तवेत्युक्तवंत आर्यास्त्वां मह्यं किमर्थं ददुरित्यर्थः । पिताऽऽह । हे पुत्रक तत्तैरुक्तं मादृथाः प्रतारणमात्रं तैः कृतं तस्मिन्नादरं माकार्षीः । न ह्यहं दाय इव भोगसाधनमित्यर्थः ॥ २ ॥ तथाऽपि तैर्भागत्वेन दत्तोऽहं तव जीवनोपायमुपदेक्ष्यामीत्याह । इम इति सपादाभ्यां द्वाभ्याम् । अभिप्लवः षडहो भवति पृष्ठ्यः षडहो भवतीति विहितेषु षडहेष्वावर्त्यमानेषु षष्ठंषष्ठमहः कर्मोपेत्य प्राप्य कर्मणि तदनुष्ठाने ।

ला कांहींच विभाग न ठेवितां त्याच्या दुसऱ्या बंधूंनीं सर्व द्रव्याचे विभाग करून घेतले. नंतर गुरूपासून विद्या शिकून विद्वान् होऊन आलेल्या व आपला विभाग मागणाऱ्या त्या कनिष्ठ भ्रात्याला (नाभागाला) वडील बंधूंनीं तुझा विभाग पिता आहे असें सांगून पित्याला त्याच्या स्वाधीन केलें ॥ १ ॥ हेंच प्रश्नोत्तरांनीं दाखवितात– त्यांत नाभाग, भ्रात्यांना विचारतो कीं,– हेभ्राते हो, तुह्मी माझ्यासाठीं कोणता भाग ठेविला आहे! तेव्हां भ्राते ह्मणाले– त्यावेळीं आह्मी विसरलों परंतु आतां तुला तुझ्या वाटणीबद्दल पित्याला देतों ह्मणजे तूं पित्यालाच आपला भाग असें समजून ग्रहण कर. तेव्हां तो पित्याजवळ जाऊन ह्मणाला कीं, हेबाबा, वडील भ्रात्यांनीं माझ्या भागाबद्दल तुझी योजना केली आहे. तेव्हां पिता (नभग) ह्मणाला–हेपुत्रका, तें त्यांनीं तुला फसविण्याकरितां सांगितलें आहे; त्यावर तूं विश्वास ठेऊं नकोस. कारण, द्रव्यासारखा मी भोगाचें साधन नाहीं ॥ २ ॥ तथापि त्यांनीं भागत्वेंकरून जर मला दिलें आहे तर मी तुला जीविकेचा उपाय सांगतों ऐक. हे येथून जवळच आंगिरस ऋषि, आज द्वादशाहनामक

CC-0. In Public Domain. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सत्राला आरंभ करून बसले आहेत, त्यांमध्यें षडहांतील सहावें सहावें कर्म सुरू झालें असतां त्याच्या अनुष्ठानामध्यें, ते विद्वान् असूनहि विशेष सूक्तांच्या अज्ञानामुळें मोह पावतात. तूं तें जाणणारा आहेस ॥ ३ ॥ यास्तव त्या माहात्म्या ब्राह्मणांना तूं, विश्वेदेवांचा प्रकाश करणाऱ्या 'इदमित्था, ये यज्ञेन अशा' दोनसूक्तांचा त्यांच्याकडून पाठ करीव ह्मणजे ते कर्म संपल्यावर स्वर्गास जातांना आपल्या सत्रामध्यें शेष राहिलेलें धन तुला देतील ह्मणून तूं त्यांजकडे जा. तदनंतर त्या नाभागानें पित्यानें जसें सांगितलें होतें त्याप्रमाणें केलें. नंतर सत्र संपल्यावर ते आंगिरस ऋषि सत्रांमध्यें अवशेष राहिलेलें द्रव्य त्या नाभागाला देऊन स्वर्गास निघून गेले ॥ ४ ॥ ५ ॥ नंतर त्या द्रव्याचा नाभाग स्वीकार करूं लागला असतां, एकाएकीं काळा भोर दृष्टी पडणारा कोणी एक पुरुष (श्रीरुद्र) उत्तर दिशेकडून येऊन, हें यज्ञभूमीवर राहिलेलें द्रव्य माझें आहे असें ह्मणाला ॥ ६ ॥ त्यावेळीं नाभाग, हें द्रव्य ऋषींनीं मला दिलेलें असल्यामुळें माझें आहे असें ह्मणाला तेव्हां रुद्र ह्मणाला. कीं,—माझ्या आणि तुझ्या या द्रव्यनिमित्तक

सुमेधसोऽपि ते सूक्तविशेषाज्ञानेन मुह्यंति । कवे हे विद्वन् ॥ ३॥ तान्महात्मनोऽपि त्वमिदमित्थारौद्रमिति च ये यज्ञेन दक्षिणयेति च वैश्वदेवे द्वे सूक्ते संशय पाठय। ततः कर्मणि समाप्ते सति ते स्वर्यंतः स्वर्गं गच्छंतः स्वसत्रे परिशेषितमवशिष्टमात्मनो धनं तुभ्यं दास्यंति अथ तस्मात्तान्गच्छेति । तथेत्यादि शुकवाक्यम् । यथावत्कृतवान् सत्रपरिशेषितं

तांस्त्वं शंसय सूक्ते द्वे वैश्वदेवे महात्मनः ॥ ते स्वर्यंतो धनं सत्रपरिशेषितमात्मनः ॥ ४ ॥ दास्यंत्यथ ततो गच्छ तथा स कृतवान्यथा ॥ तस्मै दत्त्वा ययुः स्वर्गं ते सत्रपरिशेषितम् ॥ ५ ॥ तं कश्चित्स्वीकरिष्यंतं पुरुषः कृष्णदर्शनः ॥ उवाचोत्तरतोऽभ्येत्य ममेदं वास्तुकं वसु ॥ ६ ॥ ममेदमृषिभिर्दत्तमिति तर्हि स्म मानवः ॥ स्यान्नौ ते पितरि प्रश्नः पृष्टवान्पितरं तथा ॥ ७ ॥ यज्ञवास्तुगतं सर्वमुच्छिष्टमृषयः क्वचित् ॥ चक्रुर्विभागं रुद्राय स देवः सर्वमर्हति ॥ ८ ॥ नाभागस्तं प्रणम्याह तवेश किल वास्तुकम् ॥ इत्याह मे पिता ब्रह्मन् शिरसा त्वां प्रसादये ॥ ९ ॥ यत्ते पिताऽवदद्धर्मं त्वं तु सत्यं प्रभाषसे ॥ ददामि ते मंत्रदृशे ज्ञानं ब्रह्म सनातनम् ॥ १० ॥

सत्रावशिष्टं धनम् ॥ ४ ॥ ५ ॥ पुरुषः श्रीरुद्रः दृश्यत इति दर्शनं शरीरं कृष्णं दर्शनं यस्य सः वास्तुकं यज्ञभूमिगतं वसु धनं ममेत्युवाच ॥ ६ ॥ तर्हि स्म तदैव ममेदमिति मानवो नाभाग उवाच । पुनश्च रुद्र उवाच । नौ आवयोरस्मिन्विवादे ते पितरि प्रश्नः स्यादिति । पृष्टवानिति शुकोक्तिः ॥ ७ ॥ पृष्टस्य मनोर्वाक्यं यज्ञवास्तुगतमिति । उच्छिष्टमुर्वरितम् । क्वचिदिति दक्षाध्वरे । उच्छेषणभागो वै रुद्र इति श्रुतेश्च । किंच स देव ईश्वरः सर्वमप्यर्हति किं पुनर्यज्ञावशिष्टमित्यर्थः ॥ ८ ॥ ९ ॥ श्रीरुद्र आह । यत्ते इति ॥ १० ॥

विवादामध्यें तुझ्या पित्यालाच प्रश्न झाला पाहिजे. यास्तव तूं आपल्या पित्याला विचारूनच हें द्रव्य माझें किंवा तुझें याचा निश्चय करून ये. असें सांगितलेल्या नाभागानें पित्याजवळ जाऊन तें तसेंच (हें द्रव्य रुद्राचें किंवा माझें असें) विचारिलें ॥ ७ ॥ तेव्हां तो पिता ह्मणाला कीं,—यज्ञभूमीवर अवशेष राहिलेलें सर्व, दक्षाच्या यज्ञामध्यें ऋषींनीं रुद्राचा भाग असें ठरविलें आहे यास्तव तो रुद्र देव, सर्वच ग्रहण करण्याविषयीं योग्य आहे, ह्मणजे त्याचेंच तें सर्व आहे ॥ ८ ॥ याप्रमाणें पित्यानें सांगितलें असतां, नाभागानें त्या रुद्राला वंदन करून भाषण केलें कीं,— हे ईश्वरा, हें यज्ञभूमीवरचें सर्व द्रव्य तुझेंच आहे असें माझा पिता ह्मणाला, यास्तव हे ब्राह्मणा, मी मस्तकानें वंदन करून तुझी प्रार्थना करितों कीं,— तुझें द्रव्य घेण्यास प्रवृत्त झालेला जो मी त्याच्या अपराधांची क्षमा कर ॥ ९ ॥ तेव्हां रुद्र ह्मणालाः—ज्याअर्थीं तुझ्या पित्यानें तुझा पक्षपात सोडून देऊन खरा धर्म सांगितला आहे आणि तूंहि द्रव्याचा लोभ टाकून खरें सांगत आहेस, त्याअर्थीं वेदार्थ जाणणाऱ्याहि तुला मी सनातन ब्रह्माचें ज्ञान देतों,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्मणजे माझ्या अनुग्रहानें तुला ब्रह्मसाक्षात्कार होवो ॥ १० ॥ तसेंच जें हें सत्रामध्यें अवशिष्ट राहिलेलें द्रव्य आहे तेंहि मी तुला दिलें आहे, त्याचा तूं जीविका चालविण्या-करितां स्वीकार कर. असें बोलून तो सत्यवत्सल भगवान् रुद्र तेथेंच अंतर्धान पावला ॥ ११ ॥ जो पुरुष, एकाग्रचित्त होऊन या आख्यानाचें सायंकाळीं व प्रातःकाळीं स्मरण करितो तो मंत्रवेत्ता ज्ञानी होऊन परमात्मसंबंधी गतीला पावतो; पुन्हा संसार पावत नाहीं ॥ १२ ॥ आतां, अंबरीषाचें चरित्र सांगतो— नाभागापासून उपकारशील व महाभागवत असा अंबरीष राजा झाला. ज्या अंबरीषाला दुर्वास ऋषीनें 'याला हा अग्नि जाळून टाको असें बोलून' निर्माण केलेला कृत्यारूप अग्निहि स्पर्शसुद्धां करण्यास समर्थ झाला नाहीं ॥ १३ ॥ असें ऐकून राजा ह्मणालाः—हे सर्वज्ञा, ज्या अंबरीषावर प्रयोग केलेला दुर्निवारहि ब्रह्मदंड, आपला पराक्रम चालविण्यास समर्थ झाला नाहीं त्या बुद्धिमान् अंबरीष राजर्षीचें चरित्र श्रवण करण्याची इच्छा मी करीत आहें ॥ १४ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला— हे राजा, महाभाग्यवान् अशा त्या अंबरीष राजाला

इदमाख्यानं श्रुतिप्रसिद्धम् । तथाहि बह्वृचब्राह्मणम् । नाभानेदिष्ठं शंसति नाभानेदिष्ठं वै मानवं ब्रह्मचर्यं वसंतं भ्रातरो निरभजन्सोऽब्रवीदित्यादि ॥ ११ ॥ अस्याख्यानस्य स्मरणे फलमाह । य एतदिति । आत्मनो गतिं च प्राप्नोतीति शेषः ॥ १२ ॥ क्वचिदपि न प्रतिहतो ब्रह्मशापोऽपि ब्राह्मणेन दुर्वाससा निर्मितः कृत्यानलोऽपि यं नास्पृशत् अतोऽसौ महाभा-

गृहाण द्रविणं दत्तं मत्सत्रे परिशेषितम् ॥ इत्युक्त्वांऽतर्हितो रुद्रो भगवान्सत्यवत्सलः ॥ ११ ॥ य एतत्संस्मरेत्प्रातः सायं च सुसमाहितः ॥ कविर्भवति मंत्रज्ञो गतिं चैव तथात्मनः ॥ १२ ॥ नाभागादंबरीषोऽभून्महाभागवतः कृती ॥ नास्पृशद्ब्रह्मशापोऽपि यं न प्रतिहतः क्वचित् ॥ १३ ॥ राजोवाच ॥ भगवञ्छ्रोतुमिच्छामि राजर्षेस्तस्य धीमतः ॥ न प्राभूद्यत्र निर्मुक्तो ब्रह्मदंडो दुरत्ययः ॥ १४ ॥ श्रीशुक उवाच ॥ अंबरीषो महाभागः सप्तद्वीपवतीं महीम् ॥ अव्ययां च श्रियं लब्ध्वा विभवं चातुलं भुवि ॥ १५ ॥ मेनेऽतिदुर्लभं पुंसां सर्वं तत्स्वप्नसंस्तुतम् ॥ विद्वान्विभवनिर्वाणं तमो विशति यत्पुमान् ॥ १६ ॥ वासुदेवे भगवति तद्भक्तेषु च साधुषु ॥ प्राप्तो भावं परं विश्वं येनेदं लोष्टवत्स्मृतम् ॥ १७ ॥ स वै मनः कृष्णपदारविंदयोर्वचांसि वैकुंठगुणानुवर्णने ॥ करौ हरेर्मंदिरमार्जनादिषु श्रुतिं चकाराच्युतसत्कथोदये ॥ १८ ॥

गवतोऽतएव कृती पुण्यवान् ॥ १३ ॥ तस्य श्रोतुमिच्छामि । चरितमिति शेषः । ब्रह्मदंडः कृत्यानलो न प्राभून्न समर्थो बभूव ॥ १४ ॥ श्रियं संपदम् । विभवमैश्वर्यम् । अतुलं निरुपमम् ॥ १५ ॥ पुंसामतिदुर्लभमपि तत्सर्वं स्वप्नवत्संस्तुतं निरूपितमनुपादेयं मेने । तत्र हेतुः । विभवस्य निर्वाणं नाशं विद्वान् यद्येन विभवेन तन्नाशेन वा पुमांस्तमो विशति मोहे निमज्जति ॥ १६ ॥ नन्वेवं जानंतोऽपि विभवैषिणो दृश्यंते तत्राह । वासुदेव इति । भावं भक्तिं प्राप्तः येन भावेनेदं विश्वं लोष्टवदतितुच्छं स्मृतम् ॥ १७ ॥ भक्तिमेव सर्वेंद्रियाणां भगव-

---

सप्तद्वीपवती पृथिवी, उपद्रवरहित संपत्ति आणि या भूमीवरील पुरुषांना अतिदुर्लभ व निरुपम असें भोगसाहित्यरूप ऐश्वर्य प्राप्त झालें असतांहि तें सर्व त्यानें स्वप्नामध्यें दृष्टीपडलेल्या पदार्थांप्रमाणें मिथ्याभूत आहे असें मानिलें. कारण, तो राजा, ज्याच्या योगानें पुरुष मोहांत निमग्न होतो त्या ऐश्वर्यांचा नाश आहे असें जाणणारा होता ॥ १५ ॥ ॥ १६ ॥ आणि तो वासुदेव भगवंताचेठिकाणीं व त्याचे भक्त जे साधु त्यांचेठिकाणीं अशी उत्कृष्ट भक्ति पावला होता कीं,— जिच्या योगानें हें विश्व मातीच्या ढेंकळासारखें अतितुच्छ आहे असें दिसून येतें ॥ १७ ॥ त्या राजानें, आपलें मन, श्रीकृष्णाच्या चरणकमलचिंतनाविषयीं एकाग्र केलें होतें. त्यानें आपलीं भाषणें भगवंताच्या गुणानुवर्णनामध्यें योजिलीं होतीं. त्यानें आपले हस्त, हरीच्या मंदिराच्या संमार्जनादिक उद्योगांचेठिकाणीं योजिले होते. त्यानें आपलें कर्णेंद्रिय, भगवंताच्या संसारनिवर्तक

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कथांच्या श्रवणाविषयीं लाविलें होतें ॥ १८ ॥ त्यानें आपली दृष्टि, मुक्तिदात्या भगवंताच्या मूर्तींच्या व स्थानांच्या दर्शनाविषयीं योजिली होती. त्यानें आपलें त्वगिंद्रिय, भगवद्भक्तांच्या अंगस्पर्शाविषयीं योजिलें होतें. त्यानें आपलें घ्राणेंद्रिय, सुंदर अशा तुळशीला, त्या भगवंताच्या चरणकमलसंबंधानें प्राप्त झालेला जो सुगंध त्याचेठिकाणीं योजिलें होतें. त्यानें रसनेंद्रिय, भगवंताला निवेदन केलेल्या अन्नादिकांचा रस ग्रहण करण्याविषयीं योजिलें होतें ॥ १९ ॥ त्यानें आपले पाय हरीचीं जीं मथुरादिक क्षेत्रें व दुसरींहि स्थानें त्यांचेठिकाणीं वारंवार गमन करण्याविषयीं लावले होते. त्यानें आपलें मस्तक, हृषीकेशाच्या चरणवंदनाविषयीं योजिलें होतें. त्यानें आपलें स्रक्चंदनादिक विषयांचें सेवन करणेंहि, दास्यनिमित्तानें भगवंताचा प्रसाद घेण्याविषयीं ‘ जशी भगवद्भक्तांचा आश्रय करणारी प्रीति होईल तशा रीतीनें ’ चालविलें होतें, विषयभोगांच्या इच्छेनें नव्हतें ॥ २० ॥ त्याप्रमाणें तो अंबरीष राजा, प्रतिदिवशीं आपला कर्मसमूह, यज्ञाधिपति परमेश्वर अधोक्षज भगवंताचेठिकाणीं अर्पण करून, सर्वठिकाणीं आत्माच

त्परत्वकथनेन प्रपंचयति । स वा इति त्रिभिः । श्रुतिं श्रोत्रमच्युतस्य सत्कथानामुदये श्रवणे चकारेत्यस्य सर्वत्रान्वयः ॥१८॥ मुकुंदस्य लिंगानामालयानि स्थानानि तेषां दर्शने दृशौ नेत्रे । श्रीमत्यास्तुलस्यास्तत्पादसरोजेन यत्सौरभं तस्मिन् । तदर्पिते तस्मै निवेदितान्नादौ॥१९॥ कामं स्रक्चंदनादिसेवां दास्ये निमित्ते तत्प्रसादस्वीकाराय नतु कामकाम्यया विषयेच्छया । कथं चकार । उत्तमश्लोकजनाश्रया रतिर्यथा भवेत्तथा । अनेन तद्भक्तेषु च परं भावं प्राप्त इत्येतत्स्फुटीकृतम् ॥ २० ॥ सर्वत्रात्मेति भावो भावना यस्मिंस्तमात्मनः स्वस्य

मुकुंदलिंगालयदर्शने दृशौ तद्भृत्यगात्रस्पर्शेऽगसंगमम् ॥ घ्राणं च तत्पादसरोजसौरभे श्रीमत्तुलस्या रसनां तदर्पिते ॥ १९ ॥ पादौ हरेः क्षेत्रपदानुसर्पणे शिरो हृषीकेशपदाभिवंदने ॥ कामं च दास्ये न तु कामकाम्यया यथोत्तमश्लोकजनाश्रया रतिः ॥ २० ॥ एवं सदा कर्मकलापमात्मनः परेऽधियज्ञे भगवत्यधोक्षजे ॥ सर्वात्मभावं विदधन्महीमिमां तन्निष्ठविप्राभिहितः शशास ह ॥ २१ ॥ ईजेऽश्वमेधैरधियज्ञमीश्वरं महाविभूत्योपचितांगदक्षिणैः ॥ ततैर्वसिष्ठासितगौतमादिभिर्धन्वन्यभिस्रोतमसौ सरस्वतीम् ॥ २२ ॥ यस्य क्रतुषु गीर्वाणैः सदस्या ऋत्विजो जनाः ॥ तुल्यरूपाश्चानिमिषा व्यदृश्यंत सुवाससः ॥ २३ ॥

कर्मणां कलापं समूहं भगवति विदधत्समर्पयंस्तन्निष्ठैर्भागवतैर्विप्रैरभिहितः शिक्षितः सन् महीं शशास पालयामास । अनेनाधिकृतो धर्मोऽपि यथावद्दर्शितः ॥ २१ ॥ किंच । यज्ञाधिष्ठातारमीश्वरमश्वमेधैरीजे आराधयामास । महाविभूत्योपचितान्यंगानि दक्षिणाश्च येषु तैः वसिष्ठादिभिर्हेतुभूतैस्तैर्विस्तृतैः । धन्वनि धन्वदेशे निरुदके सरस्वतीमभिस्रोतम् । तस्याः प्रतिलोममित्यर्थः ॥ २२ ॥ किंच । यस्य क्रतुषु सदस्यादयो गीर्वाणैः सह भूषणादिभिस्तुल्यरूपा व्यदृश्यंत स इत्थमिति चतुर्थेनान्वयः । न च देवानां निमेषाभावाद्वैलक्षण्यं यतो

आहे अशी भावना करीत होत्साता, भगवत्परायण अशा वसिष्ठादिक ब्राह्मणांनीं सांगितल्याप्रमाणें या पृथिवीचें रक्षण करूं लागला ॥ २१ ॥ तसेंच त्या राजानें, आपल्या मोठ्या ऐश्वर्यानें वाढविलेल्या ‘ प्रयाजादिक ’ अंगांनीं व दक्षिणेंनीं युक्त, वसिष्ठ, असित व गौतम इत्यादिक ऋषींकडून करविलेल्या व धन्व (मारवाड) देशामध्यें सरस्वती नदीच्या प्रवाहाभिमुख (उगमाकडे) एका पुढें एक अशा क्रमानें विस्तृत केलेल्या पुष्कळ अश्वमेधांच्या योगेंकरून, यज्ञादिकांचें फळ देणाऱ्या भगवंताचें आराधन केलें ॥ २२ ॥ ज्याच्या अश्वमेध यज्ञामध्यें, वस्त्रभूषणादिक अलंकार धारण करणारे सभासद, ऋत्विज व इतर जन, हविर्भाग ग्रहण करण्यासाठीं प्राप्त झालेल्या देवांसारखेच सुंदर व निमेषरहित दिसत होते. त्यांत देव साहजिकच निमेषरहित होते आणि सदस्यादिक लोक आश्चर्य पाहण्याच्या उत्सुकतेनें निमेषरहित झाले होते ॥ २३ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ज्याचा आश्रय करून राहणाऱ्या मनुष्यांनीं देवांना प्रिय अशा स्वर्गलोकाचीहि मुळींच प्रार्थना केली नाहीं. कारण, त्यांना पुण्यकीर्ति भगवंताच्या चरित्राचें श्रवण व गायन घडत असे, तें देवलोकीं दुर्लभ आहे ॥ २४ ॥ स्वर्गप्रार्थनेची तर शंकाच राहूंदे, परंतु, आपल्या हृदयामध्यें मुक्तिदात्या भगवंताला प्रत्यक्ष पाहणारे जे लोक आहेत त्यांना, सिद्धांनाहि दुर्लभ अशी ऐश्वर्यें जरी प्राप्त झालीं तरी तीं स्वरूपसाक्षात्कारानें तिरस्कार केलेलीं असल्यामुळें हर्ष उत्पन्न करीत नाहींत ॥ २५ ॥ असो याप्रमाणें तो अंबरीष राजा, भक्तिप्रयोगानें आणि तपश्चर्येनें युक्त अशा स्वधर्माच्या योगानें हरीला संतुष्ट करीत असून त्यानें हळुहळू या लोकींचे व परलोकींचे विषयभोगसंबंधी सर्व अभिलाष सोडून दिले ॥ २६ ॥ ते असे कीं,– गृहें, स्त्रिया, पुत्र, बंधु, श्रेष्ठ गज, रथ, घोडे, शिपाई, अक्षय अशीं रत्नखचित भूषणें, आयुधें व अक्षय भांडारगृहें इत्यादिक सर्व वस्तूंचेठिकाणीं, त्यानें हीं नश्वर अ-

---

ऽनिमिषाश्च व्यदृश्यंत । न निमिषंतीति तथा । आश्चर्यदर्शनौत्सुक्येन तेषां निमेषोपरमादिति भावः ॥ २३ ॥ यस्य यदीयैर्मनुजैरपि स्वर्गो न प्रार्थितस्तस्य तु का वार्ता ॥ २४ ॥ आस्तां स्वर्गप्रार्थनशंकाऽपि यद्यतः मुकुंदं हृदि पश्यतस्तान् जनान्कामा विषया न समर्धयंति न हर्षयंति । कथंभूताः । स्वाराज्येन स्वरूपसुखेन परिभाविता अतिशायिताः अतएव सिद्धानामपि दुर्लभाः । यानिति पाठे यान्मनुजान् । स्वाराज्येत्यत्रापि द्वितीयांतपाठे मनुजानां विशेषणम् । यमिति पाठे यमंबरीषम् । पश्यतामिति पाठे सिद्धानां विशेषणम् ॥२५॥

स्वर्गो न प्रार्थितो यस्य मनुजैरमरप्रियः ॥ शृण्वद्भिरुपगायद्भिरुत्तमश्लोकचेष्टितम् ॥ २४ ॥ समर्धयंति तान्कामाः स्वाराज्यपरिभाविताः ॥ दुर्लभा नापि सिद्धानां मुकुंदं हृदि पश्यतः ॥ २५ ॥ स इत्थं भक्तियोगेन तपोयुक्तेन पार्थिवः ॥ स्वधर्मेण हरिं प्रीणन्संगान्सर्वान् शनैर्जहौ ॥ २६ ॥ गृहेषु दारेषु सुतेषु बंधुषु द्विपोत्तमस्यंदनवाजिपत्तिषु ॥ अक्षय्यरत्नाभरणायुधादिष्वनंतकोशेष्वकरोदसन्मतिम् ॥ २७ ॥ तस्मा अदाद्धरिश्चक्रं प्रत्यनीकभयावहम् ॥ एकांतभक्तिभावेन प्रीतो भृत्याभिरक्षणम् ॥ २८ ॥ आरिराधयिषुः कृष्णं महिष्या तुल्यशीलया ॥ युक्तः सांवत्सरं वीरो दधार द्वादशीव्रतम् ॥ २९ ॥ व्रतांते कार्तिके मासि त्रिरात्रं समुपोषितः ॥ स्नातः कदाचित्कालिंद्यां हरिं मधुवनेऽर्चयत् ॥ ३० ॥

एवं भगवदाराधनपरस्य कामाद्युपेक्षा नैव चित्रमित्युपसंहरति । स इत्थमिति द्वाभ्याम् ॥ २६ ॥ २७ ॥ नन्वेवंभूतोऽसौ कथं प्रतिपक्षान् जयेत्तत्राह । तस्मा इति ॥ २८ ॥ तदेवं तस्य वैराग्यादिकं हरिभक्तिं चोक्त्वा ब्रह्मदंडो यत्र न प्राभूदिति यदुक्तं तदेव द्वादशीव्रतनिष्ठां कथयन्नाह । आरिराधयिषुरित्यादिना यावदध्यायसमाप्ति ॥ २९ ॥ अर्चयत्

सत्यामुळें पुरुषार्थरूपी नाहींत असा आपल्या बुद्धीचा निश्चय केला होता ॥ २७ ॥ बरें ! अशा प्रकारच्या त्या राजानें शत्रु कसे जिंकिले ? व राज्यनिर्वाह कसा केला ? अशी शंका आली असतां सांगतो– त्या राजाच्या एकांतभक्तिभावानें संतुष्ट झालेल्या भगवंतानें, सर्व शत्रूंना भय उत्पन्न करणारें व आपल्या भक्तांचें सर्व बाजूंनीं रक्षण करणारें सुदर्शन चक्र त्याला दिलें होतें ॥ २८ ॥ त्याविषयीं प्रसंगानें प्राप्त झालेली कथा सांगतो,– एकेवेळीं श्रीकृष्णाचें आराधन करण्याची इच्छा करणाऱ्या त्या अंबरीष वीरानें, आपल्यासारख्याच भगवदसाधनरूप स्वभावाच्या भार्येसहवर्तमान, संवत्सरपर्यंत साधनद्वादशी व्रत आचरण करण्याचा नियम धारण केला ॥ २९ ॥ त्यानें व्रताच्या शेवटीं कार्तिकमासामध्यें शुद्ध दशमीच्या दिवशीं नक्त, एकादशीच्या दिवशीं उपोषण आणि द्वादशीच्या दिवशीं एकभुक्त करण्याचा नियम स्वीकारून, द्वादशीच्या दिवशीं यमु-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नेमध्यें स्नान करून मधुवनामध्यें श्रीहरीचें पूजन केलें ॥ ३० ॥ तें असें कीं,— चंदनपुष्पादिक सर्व उपचारांच्या समृद्धीनें युक्त अशा महाभिषेकविधीनें अभिषेक करून, वस्त्रें भूषणें, चंदन, पुष्पें, अर्घ्य, धूप, दीप इत्यादिक उपचारांनीं एकाग्रचित्तानें भगवंताचें पूजन केलें, तसेंच सर्व विषयांविषयीं निरपेक्ष अशा भगवद्भक्त ब्राह्मणांचेंहि पूजन केलें, ॥ ३१ ॥ ३२ ॥ आणि त्या दानयोग्य ब्राह्मणांना, ज्यांचीं शिंगें सुवर्णानें बांधविलेलीं आहेत, ज्यांचे खूर रुप्यानें मढविलेले आहेत, ज्यांच्यावर वस्त्रांच्या झुली घातलेल्या आहेत, पुष्कळ दूध देणाऱ्या, सुस्वभावाच्या, प्रथम प्रसूत झालेल्या, तरुण, शिंगें पुच्छ कान व डोळे वगैरे अवयवांनीं सुरेख, वत्ससहित, दोहन करण्याचीं भांडीं सुवर्णपुष्पांच्या माळा गोंडेवगैरे अलंकारांनीं युक्त अशा साठकोठि गाई, त्यांच्या घरीं पाठवून दिल्या आणि त्यांना प्रथम उत्तम रुचिकर अशा षड्रसान्नाचें यथेच्छ भोजन घालून— ॥ ३३ ॥ ३४ ॥ नंतर इच्छेप्रमाणें दक्षिणा दिली असतां, त्यांनीं आशीर्वाद देऊन राजाला भोजन करण्याची आज्ञा दिली. तेव्हां तो राजा, पारणा करण्याविषयीं उद्युक्त

आडागमाभाव आर्षः ॥ ३० ॥ ३१ ॥ ब्राह्मणांश्च पूजयामास । सिद्धार्थानाप्तकामान्पूजाऽनपेक्षानपि ॥ ३२ ॥ रूप्यांघ्रीणां रूप्यखुराणाम् । पयःशीलादिसंपदो यासां तासाम्

महाभिषेकविधिना सर्वोपस्करसंपदा ॥ अभिषिच्यांबराकल्पैर्गंधमाल्यार्हणादिभिः ॥ ३१ ॥ तद्गतांतरभावेन पूजयामास केशवम् ॥
ब्राह्मणांश्च महाभागान् सिद्धार्थानपि भक्तितः ॥ ३२ ॥ गवां रुक्मविषाणीनां रूप्यांघ्रीणां सुवाससाम् ॥ पयःशीलवयोरूपव-
त्सोपस्करसंपदाम् ॥ ३३ ॥ प्राहिणोत्साधुविप्रेभ्यो गृहेषु न्यर्बुदानि षट् ॥ भोजयित्वा द्विजानग्रे स्वाद्वन्नं गुणवत्तमम् ॥ ३४ ॥
लब्धकामैरनुज्ञातः पारणायोपचक्रमे ॥ तस्य तर्ह्यतिथिः साक्षाद्दुर्वासा भगवानभूत् ॥ ३५ ॥ तमानर्चातिथिं भूपः प्रत्युत्थाना-
सनार्हणैः ॥ ययाचेऽभ्यवहाराय पादमूलमुपागतः ॥ ३६ ॥ प्रतिनंद्य स तद्याच्ञां कर्तुमावश्यकं गतः ॥ निममज्ज बृहद्ध्यायन्का-
लिंदीसलिले शुभे ॥ ३७ ॥ मुहूर्तार्धावशिष्टायां द्वादश्यां पारणं प्रति ॥ चिंतयामास धर्मज्ञो द्विजैस्तद्धर्मसंकटे ॥ ३८ ॥ ब्राह्मणा-
तिक्रमे दोषो द्वादश्यां यदपारणे ॥ यत्कृत्वा साधु मे भूयादधर्मो वा न मां स्पृशेत् ॥ ३९ ॥

॥ ३३ ॥ न्यर्बुदानि षट्षष्टिकोटीः ॥ ३४ ॥ तर्हि तदैव दुर्वासा अतिथिः साक्षात्प्रत्यक्षोऽभूत् ॥ ३५ ॥ आनर्चार्चितवान् । अभ्यवहाराय भोजनाय ॥ ३६ ॥ आवश्यकं नैयमिकं माध्याह्निकं कर्म कर्तुं गतः । बृहद्ब्रह्म ॥ ३७ ॥ ३८ ॥ धर्मसंकटमेवाह । यद्यतो ब्राह्मणातिक्रमे दोषोऽधर्मः द्वादश्यामपारणेऽपि दोषो व्रतवैगुण्यम् । यत्कृत्वा यस्मिन्कृते ॥ ३९ ॥

झाला. त्याचवेळीं त्याच्याजवळ भगवान् दुर्वास ऋषि, साक्षात् अतिथिरूपानें प्राप्त झाला ॥ ३५ ॥ तेव्हां राजानें त्या आलेल्या अतिथीला उत्थापन देऊन, त्याची आसनपाद्यादिकांच्या योगेंकरून पूजा केली आणि पायांवर मस्तक ठेऊन आपण येथें भोजन करावें अशी प्रार्थना केली ॥ ३६ ॥ तेव्हां त्या ऋषीनें त्या राजाच्या प्रार्थनेचा अंगीकार करून तो माध्यान्हिक कृत्य करण्याकरितां निघून गेला. त्यानें यमुनेच्या शुद्ध उदकामध्यें ब्रह्मस्वरूपाचें ध्यान करीत करीत स्वस्थपणें स्नान केलें ॥ ३७ ॥ त्यावेळीं द्वादशी एक घटिकाच अवशेष राहिल्यामुळें धर्मसंकट प्राप्त झालें असतां, धर्मवेत्त्या त्या अंबरीष राजानें ब्राह्मणाबरोबर पारणेबद्दलचा विचार चालविला ॥ ३८ ॥ राजा ह्मणतोः—हे विप्रहो, अतिथिरूपानें आलेल्या व निमंत्रण केलेल्या ब्राह्मणास भोजन घातल्या खेरीज आपण भोजन केलें असतां मोठा दोष (अधर्म) आहे. तसाच द्वादशीमध्यें ॥ ९ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पारणा झाली नाहीं तर व्रतवैगुण्यरूप दोष प्राप्त होणार. तस्मात् जें केलें असतां माझें कल्याण होईल व अधर्महि मला स्पर्श करणार नाहीं तें मला सांगा ॥ ३९ ॥ याप्रमाणें ब्राह्मणांबरोबर विचार करून निश्चय करितो कीं– ज्याअर्थीं उदक प्राशन केलें असतां तें भोजन केल्यासारखें व भोजन न केल्यासारखेंहि वेदांनीं सांगितलें आहे त्याअर्थीं हे विप्रहो, केवळ उदकाच्या योगानें मी व्रताची पारणा (समाप्ति) करितों ॥ ४० ॥ याप्रमाणें निश्चय करून, त्या राजर्षि अंबरीषानें उदकाचें प्राशन केलें आणि हे कुरुश्रेष्ठा, तो राजा, मनानें भगवंताचें चिंतन करीत होत्साता, दुर्वास ऋषीच्या येण्याची मार्गप्रतीक्षा करीत राहिला ॥ ४१ ॥ नंतर माध्याह्निक कर्म करून दुर्वास ऋषि यमुनेच्या तीरापासून आला असतां, राजानें त्याचें अभिवंदन केलें; तत्रापि त्यानें योगसामर्थ्ययुक्त आपल्या बुद्धीनें, आपणास सोडून राजानें व्रताची पारणा केली असें जाणिलें ॥ ४२ ॥ तेव्हां तो अत्यंत बुभुक्षित झाला होता ह्मणून क्रोधाच्या आवेशानें ज्याचें शरीर थरथर कांपत आहे असा भ्रुकुटी चढविल्यामुळें वक्रमुख झालेला तो दुर्वास ऋषि,

---

एवं द्विजैः सह विचार्य निश्चिनोति । अंभसेति । व्रतस्य पारणं समाप्तिम् । तदशितमाहुरशितं नेति चाहुः । श्रुतिश्च । अपोऽश्नाति तन्नैवाशितं नैवानशितमिति ॥ ४० ॥

अंभसा केवलेनाथ करिष्ये व्रतपारणम् ॥ प्राहुरब्भक्षणं विप्रा ह्यशितं नाशितं च तत् ॥ ४० ॥ इत्यपः प्राश्य राजर्षिश्चिंतयन्मनसाऽच्युतम् ॥ प्रत्यचष्ट कुरुश्रेष्ठ द्विजागमनमेव सः ॥ ४१ ॥ दुर्वासा यमुनाकूलात्कृतावश्यक आगतः ॥ राज्ञाऽभिनंदितस्तस्य बुबुधे चेष्टितं धिया ॥ ४२ ॥ मन्युना प्रचलद्गात्रो भ्रुकूटीकुटिलाननः ॥ बुभुक्षितश्च सुतरां कृतांजलिमभाषत ॥ ४३ ॥ अहो अस्य नृशंसस्य श्रियोन्मत्तस्य पश्यत ॥ धर्मव्यतिक्रमं विष्णोरभक्तस्येशमानिनः ॥ ४४ ॥ यो मामतिथिमायातमातिथ्येन निमंत्र्य च ॥ अदत्वा भुक्तवांस्तस्य सद्यस्ते दर्शये फलम् ॥ ४५ ॥ एवं ब्रुवाण उत्कृत्य जटां रोषविदीपितः ॥ तया स निर्ममे तस्मै कृत्यां कालानलोपमाम् ॥ ४६ ॥ तामापतंतीं ज्वलतीमसिहस्तां पदा भुवम् ॥ वेपयंतीं समुद्वीक्ष्य न चचाल पदान्नृपः ॥ ४७ ॥ प्राग्दिष्टं भृत्यरक्षायां पुरुषेण महात्मना ॥ ददाह कृत्यां तां चक्रं क्रुद्धाहिमिव पावकः ॥ ४८ ॥

प्रत्यचष्ट प्रत्यैक्षत ॥ ४१ ॥ ४२ ॥ प्रचलत्कंपमानं गात्रं यस्य । भ्रुकुटीभ्यां कुटिलमाननं यस्य ॥ ४३ ॥ ४४ ॥ ४५ ॥ ४६ ॥ ४७ ॥ क्रुद्धमहिं पावको दावाग्निरिव ॥ ४८ ॥

हात जोडून उभा राहिलेल्या राजास ह्मणाला कीं– ॥ ४३ ॥ हे जनहो, आपणच स्वतंत्र असें मानणारा, संपत्तीच्या योगानें उन्मत्त झालेला, विष्णूचा अभक्त व स्वभावानें क्रूर अशा या अंबरीष राजाचा केवढा हा अन्याय पहा ! ॥ ४४ ॥ अरे, जो तूं अतिथिरूपानें आलेल्या मला सत्कारानें भोजनासाठीं निमंत्रण करून मला भोजन न देतां स्वतः भोजन केलेंस त्या तुला अन्यायाचें फळ आतांच मी दाखवितों ॥ ४५ ॥ असें बोलून रोषानें प्रदीप्त झालेल्या त्या दुर्वास ऋषीनें, आपली जटा उपटून जमिनीवर आपटली आणि तिच्या योगानें त्या अंबरीषाला मारण्याकरितां प्रळयकालच्या अग्नीसारखी एक कृत्या उत्पन्न केली ॥ ४६ ॥ त्या हातांत खड्ग घेऊन अंगावर चालून येणाऱ्या व येत असतांना पायांच्या योगानें भूमीला कांपविणाऱ्या व जाज्वल्यमान अशा अतिभयंकर कृत्येला पाहूनहि तो राजा, आपल्या स्थानापासून किंचित् सुद्धां चलन पावला नाहीं ॥ ४७ ॥ त्यावेळीं, पूर्वींच अंबरीषाच्या रक्षणाकरितां महात्म्या पुरुषानें योजिलेल्या सुदर्शननामक चक्रानें, त्या कृत्येला, जसा अग्नि क्रुद्ध झालेल्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सर्पाला जाळून टाकितो त्याप्रमाणें जाळून टाकिलें ॥ ४८ ॥ नंतर दुर्वास ऋषि, कृत्या उत्पन्न करण्याचा आपला प्रयत्न निष्फळ झाला असें पाहून आणि तें सुदर्शन चक्र आपल्या समोर धांवत येत आहे असें पाहून, भयभीत झाला आणि आपल्या प्राणाचें रक्षण करण्याच्या इच्छेनें दशदिशांकडे धांवूं लागला ॥ ४९ ॥ त्यावेळीं जसा सर्पाच्या मागें ऊर्ध्वभागीं ज्वाळा पसरलेला वनांतील प्रचंड अग्नि धांवतो त्याप्रमाणें त्या धांवणाऱ्या दुर्वास ऋषीच्या मागें भगवंताचें सुदर्शन चक्र धांवूं लागलें. तेव्हां आपल्या मागें लागलेल्या त्या चक्राला पाहून भयाभीत झालेला तो दुर्वास ऋषि, मेरुपर्वताच्या गुहेमध्यें प्रवेश करावा या हेतूनें धांवूं लागला ॥ ५० ॥ याप्रमाणें धांवणारा तो ऋषि, दिशा, आकाश, पृथ्वी, सप्तपाताळें, सप्तसमुद्र, पालकांसहित सर्वलोक व स्वर्ग इतक्याहिठिकाणीं यथाशक्ति धांवत गेला; परंतु जेथें जेथें तो धांवत जाई तेथें तेथें त्याला असह्यतेज असें सुदर्शन चक्र त्याच्या दृष्टीस पडे ॥ ५१ ॥ नंतर त्याला जेव्हां कोठेंच रक्षक मिळेना तेव्हां तो मनामध्यें फार भिऊन रक्षकाचा शोध करीत करीत ब्रह्मदेवाला शरण जा-

---

निष्फलमुद्वीक्ष्य ॥ ४९ ॥ अनुषक्तं पृष्ठतः संसक्तम् । मेरोर्गुहां विविक्षुरधावत् ॥ ५० ॥ ५१ ॥ अरणमेषमाणः शरणमिच्छन् । अजिततेजसो हरेश्चक्रात् ॥ ५२ ॥ एतत्सर्वं

तदभिद्रवदुद्वीक्ष्य स्वप्रयासं च निष्फलम् ॥ दुर्वासा दुद्रुवे भीतो दिक्षु प्राणपरीप्सया ॥ ४९ ॥ तमन्वधावद्भगवद्रथांगं दावाग्निरुद्भूतशिखो यथाऽहिम् ॥ तथानुषक्तं मुनिरीक्षमाणो गुहां विविक्षुः प्रससार मेरोः ॥ ५० ॥ दिशो नभः क्ष्मां विवरान्समुद्राँल्लोकान्सपालांस्त्रिदिवं गतः सः ॥ यतो यतो धावति तत्र तत्र सुदर्शनं दुष्प्रसहं ददर्श ॥ ५१ ॥ अलब्धनाथः स यदा कुतश्चित्संत्रस्तचित्तोऽरणमेषमाणः ॥ देवं विरिंचं समगाद्विधातस्त्राह्यात्मयोनेऽजिततेजसो माम् ॥ ५२ ॥ ब्रह्मोवाच ॥ स्थानं मदीयं सहविश्वमेतत्क्रीडावसाने द्विपरार्धसंज्ञे ॥ भ्रूभंगमात्रेण हि संदिधक्षोः कालात्मनो यस्य तिरो भविष्यति ॥ ५३ ॥ अहं भवो दक्षभृगुप्रधानाः प्रजेशभूतेशसुरेशमुख्याः ॥ सर्वे वयं यन्नियमं प्रपन्ना मूर्ध्न्यर्पितं लोकहितं वहामः ॥ ५४ ॥ प्रत्याख्यातो विरिंचेन विष्णुचक्रोपतापितः ॥ दुर्वासाः शरणं यातः शर्वं कैलासवासिनम् ॥ ५५ ॥ श्रीरुद्र उवाच ॥ वयं न तात प्रभवाम भूम्नि यस्मिन्परेऽन्येऽप्यजजीवकोशाः ॥ भवंति कालेन भवंति हीदृशाः सहस्रशो यत्र वयं भ्रमामः ॥ ५६ ॥

यस्य भ्रूभंगमात्रेण तिरोभविष्यति । कदा । क्रीडाया अवसाने । तदपि कदा । द्विपरार्धसंज्ञे काले ॥ ५३ ॥ अतो वयं सर्वे यस्य नियममाज्ञां प्रपन्नाः प्राप्ताः संतो लोकहितं यथा भवत्येवं तन्नियमं मूर्ध्न्यर्पितं वहामः । अतस्तद्भक्तद्रोहिणं त्वां रक्षितुं न समर्थोऽहमिति शेषः । यत्तदोर्नित्यसंबंधात् ॥५४॥५५॥ श्रीरुद्रोऽपि प्रत्याचष्टे । वयमिति चतुर्भिः ।

ऊन ह्मणाला कीं,– हे विधात्या, आत्मयोने, विष्णूच्या चक्ररूप तेजापासून तूं माझें रक्षण कर ॥ ५२ ॥ तें ऐकून ब्रह्मदेव ह्मणाला– हे मुने, ब्रह्मांडासहवर्तमान ह्या माझ्या स्थानाला (सत्यलोकाला) जाळण्याची इच्छा करणाऱ्या ज्या कालरूपी विष्णूच्या, भ्रुकुटिचालनेंकरूनच दोन परार्धसंज्ञक कालामध्यें होणाऱ्या जगताच्या जन्मादि व्यापाररूप क्रीडेच्या शेवटीं, हें माझें स्थान नाश पावतें ॥ ५३ ॥ मी ब्रह्मदेव, शंकर, दक्ष व भृगु इत्यादिक तसेंच मरीच्यादि प्रजापति, एकादश रुद्र, व इंद्रादिक देव हे ज्यांत मुख्य आहेत ते सर्वेहि आह्मी, ज्या भगवंताची आज्ञा पावोन, जसें लोकांचें हित होईल, तशाप्रकारें ती आज्ञा आपल्या मस्तकीं धारण करितों. यास्तव त्याच्या भक्ताचा द्रोह करणाऱ्या तुझें रक्षण करण्यास मी समर्थ नाहीं ॥ ५४ ॥ याप्रमाणें ब्रह्मदेवानें प्रत्याख्यान केलें असतां, विष्णूच्या चक्रानें संतापित झालेला तो दुर्वास ऋषि, कैलासवासी शंकराला शरण जाऊन, विष्णुचक्रापासून तूं माझें रक्षण कर अशी प्रार्थना करूं लागला ॥ ५५ ॥ तेव्हां श्रीशंकर ह्मणालाः–बा दुर्वास ऋषे, ज्या ब्रह्मां-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

डांमध्यें, लोकांचे अधिपति असा अभिमान बाळगणारे आह्मी भ्रमण पावतों व याच्यासारखे दुसरेहि हजारो ब्रह्मांडदेह, ज्या व्यापक परमेश्वराचेठिकाणीं सृष्टिकालीं उत्पन्न होतात व संहारकालीं नाश पावतात, त्याच्या चक्रापासून तुझें रक्षण करण्यास आह्मी खरोखर समर्थ नाहीं ॥ ५६ ॥ मी (रुद्र), सनत्कुमार, नारद, भगवान् ब्रह्मदेव, कपिल, अपांतरतम, देवल, धर्म, आसुरि,– ॥ ५७ ॥ मरीच्यादिक ऋषि व दुसरे विद्यातपोयोगनिष्ठ असे सर्व आह्मी, सर्वज्ञ असूनहि मायेनें वेष्टित असल्यामुळें ज्या भगवंताच्या मायेला जाणत नाहीं ॥ ५८ ॥ त्या विश्वेश्वर भगवंताचें हें सुदर्शननामक चक्र, आह्मां सर्वांनाहि सहन करण्यास मोठें कठिण आहे, यास्तव तूं त्या भगवंतालाच शरण जा ह्मणजे तो हरि तुझें कल्याण करील ॥ ५९ ॥ नंतर तो दुर्वास ऋषि, आपल्या रक्षणाविषयीं निराश होऊन, तेथून लक्ष्मीसहवर्तमान श्रीनिवास विष्णु जेथें राहतो त्या वैकुंठनामक भगवंताच्या स्थानास निघून गेला ॥ ६० ॥ तेथेंहि तो विष्णुचक्राच्या ज्वालेनें पोळत असल्यामुळें कंपयुक्त होऊन, त्या भगवंताच्या चरणमू-

---

भूम्नि महति । महत्त्वमेवाह । यस्मिन्परमेश्वरे अजा ब्रह्माणस्त एव जीवास्तेषां कोशा उपाधिभूता ब्रह्मांडविग्रहा ईदृशा दृश्यमानब्रह्मांडप्रमाणा अन्येऽपि भवंति जायंते नश्यंति च । यत्र येषु ब्रह्मांडेषु लोकेशाभिमानिनो वयं भ्रमामः ॥ ५६ ॥ ननु सर्वज्ञस्य तव भ्रमः कुतस्तत्राह । अहमिति ॥ ५७ ॥ पारदर्शनाः सर्वज्ञा अपि यस्य मायां न

अहं सनत्कुमारश्च नारदो भगवानजः ॥ कपिलोऽपांतरतमो देवलो धर्म आसुरिः ॥ ५७ ॥ मरीचिप्रमुखाश्चान्ये सिद्धेशाः पारदर्शनाः ॥ विदाम न वयं सर्वे यन्मायां माययाऽऽवृताः ॥ ५८ ॥ तस्य विश्वेश्वरस्येदं शस्त्रं दुर्विषहं हि नः ॥ तमेव शरणं याहि हरिस्ते शं विधास्यति ॥ ५९ ॥ ततो निराशो दुर्वासाः पदं भगवतो ययौ ॥ वैकुंठाख्यं यदध्यास्ते श्रीनिवासः श्रिया सह ॥ ६० ॥ संदह्यमानोऽजितशस्त्रवह्निना तत्पादमूले पतितः सवेपथुः ॥ आहाच्युतानंत सदीप्सित प्रभो कृतागसं माऽव हि विश्वभावन ॥ ६१ ॥ अजानता ते परमानुभावं कृतं मयाऽघं भवतः प्रियाणाम् ॥ विधेहि तस्यापचितिं विधातर्मुच्येत यन्नाम्न्युदिते नारकोऽपि ॥ ६२ ॥ श्रीभगवानुवाच ॥ अहं भक्तपराधीनो ह्यस्वतंत्र इव द्विज ॥ साधुभिर्ग्रस्तहृदयो भक्तैर्भक्तजनप्रियः ॥ ६३ ॥ नाहमात्मानमाशासे मद्भक्तैः साधुभिर्विना ॥ श्रियं चात्यंतिकीं ब्रह्मन्येषां गतिरहं परा ॥ ६४ ॥

विद्मः ॥ ५८ ॥ ५९ ॥ ६० ॥ हे सतामीप्सित मा मामव पाहि ॥ ६१ ॥ अपराधं निवेदयन्प्रार्थयते । अजानतेति । अघं दुःखम् । अपचितिं निष्कृतिम् । मद्भक्तद्रोहे निष्कृतिं न पश्यामीति चेत्तत्राह । यस्य तव नाम्नि कीर्तिते नरकस्थोऽपि मुच्यते तस्य तव किमशक्यमिति भावः ॥ ६२ ॥ ६३ ॥ न आशासे न स्पृहयामि ॥ ६४ ॥

लाचेठिकाणीं जाऊन पडला आणि ह्मणाला कीं,–हे विश्वरक्षका, प्रभो, अनंता, अच्युता, भक्तप्रिया, तूं आतां तुझ्या भक्ताचा अपराध करणाऱ्याहि माझें रक्षण कर ॥ ६१ ॥ हे विष्णो, तुझा निरतिशय प्रभाव न जाणणाऱ्या मी तुझ्या भक्तांचा (अंबरीषाचा व तदनुयायी लोकांचा) अपराध केला आहे, त्याची निष्कृति कर, ह्मणजे अपराधाचें सहन करून माझें रक्षण कर. आणि हेंच योग्य आहे. कारण, ज्या तुझें नांव उच्चारिलें असतां, नरकांतलाहि प्राणी नरकापासून मुक्त होतो त्या तुला अशक्य काय आहे ! कांहींच नाहीं ॥ ६२ ॥ भगवान् ह्मणाला.–हे ब्राह्मणा, मी भक्तपराधीन आहें यास्तव तुझ्या रक्षणाविषयीं स्वतंत्र असल्यासारखा नाहीं. कारण, निरपेक्ष भक्तांनीं प्रेमानें माझें हृदय अगदीं वश करून घेतलें आहे, ह्मणून ते भक्तजन मला सर्वांपेक्षांहि प्रिय आहेत ॥ ६३ ॥ हे ब्रह्मन्, ज्यांचा मी परम आश्रय आहें त्या परम विवेकी भक्तांवांचून मी आपल्या आत्म्याची आणि माझाच आश्रय करून स्थिर राहणाऱ्या लक्ष्मीचीसुद्धां इच्छा करीत नाहीं, मग दुसऱ्यांची कथा काय? ॥ ६४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ज्या भक्तानीं, स्त्रिया, घरें, पुत्र, आप्त, प्राण, द्रव्य, हा लोक व परलोक या सर्वांचा त्याग करून माझाच आश्रय केला आहे, त्यांचा त्याग कण्याविषयीं मी कसा बरें समर्थ होईन ! होणारच नाहीं ॥ ६५ ॥ माझेठिकाणीं आपलें चित्त स्थिर करणारे व सर्वठिकाणीं समदृष्टि ठेवणारे जे साधु, आहेत ते, जशा पतिव्रता स्त्रिया सत्पतीला वश करितात त्या प्रमाणें भक्तीच्या योगानें मला वश करितात ॥ ६६ ॥ जे माझे अनन्य भक्त आहेत ते, माझ्या सेवेनेंच पूर्ण मनोरथ होत्साते, त्या माझ्या सेवेनें प्राप्त झालेल्या, सलोकता समीपता इत्यादिक चार प्रकारच्या मुक्तींनाहि इच्छित नाहींत, मग कालाच्या योगानें नाश पावणाऱ्या इंद्रादि पदांला ते इच्छित नाहींत हें काय सांगावें ! ॥ ६७ ॥ अधिक तर काय परंतु, साधु हे माझें हृदय (फार आवडणारे) आहेत आणि मी साधूंचें हृदय (त्यांना फार आवडणारा) आहें. कारण, ते माझ्याहून दुसरें प्रियवस्तु कांहींच जाणत नाहींत तसाच मीहि त्यांच्याहून दुसरें स्वल्पहि प्रिय वस्तु जाणत नाहीं ॥ ६८ ॥ हे ब्राह्मणा, तुला एक उपाय सांगतों तो तूं श्रवण कर. हा, ' तूं कृत्या उत्पन्न केल्यामुळें,

---

इमं परं च लोकं हित्वा ॥ ६५ ॥ ६६ ॥ प्रतीतं प्राप्तमपि ॥ ६७ ॥ ६८ ॥ आत्मनस्तवैवाभिचारो हिंसा यतोऽभूत्तमेव यातु । अशिवमनर्थम् ॥ ६९ ॥ तपोविद्यासंपन्नस्य मम

ये दारागारपुत्राप्तान्प्राणान्वित्तमिमं परम् ॥ हित्वा मां शरणं याताः कथं तांस्त्यक्तुमुत्सहे ॥ ६५ ॥ मयि निर्बद्धहृदयाः साधवः समदर्शनाः ॥ वशे कुर्वंति मां भक्त्या सत्स्त्रियः सत्पतिं यथा ॥ ६६ ॥ मत्सेवया प्रतीतं च सालोक्यादिचतुष्टयम् ॥ नेच्छंति सेवया पूर्णाः कुतोऽन्यत्कालविद्रुतम् ॥ ६७ ॥ साधवो हृदयं मह्यं साधूनां हृदयं त्वहम् ॥ मदन्यत्ते न जानंति नाहं तेभ्यो मनागपि ॥ ६८ ॥ उपायं कथयिष्यामि तव विप्र शृणुष्व तत् ॥ अयं ह्यात्माभिचारस्ते यतस्तं यातु वै भवान् ॥ साधुषु प्रहितं तेजः प्रहर्तुः कुरुतेऽशिवम् ॥ ६९ ॥ तपो विद्या च विप्राणां निःश्रेयसकरे उभे ॥ ते एव दुर्विनीतस्य कल्पेते कर्तुरन्यथा ॥ ७० ॥ ब्रह्मंस्तद्गच्छ भद्रं ते नाभागतनयं नृपम् ॥ क्षमापय महाभागं ततः शांतिर्भविष्यति ॥ ७१ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे नवमस्कंधेंऽबरीषचरिते चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ एवं भगवताऽऽदिष्टो दुर्वासाश्चक्रतापितः ॥ अंबरीषमुपावृत्य तत्पादौ दुखितोऽग्रहीत् ॥ १ ॥

कथमनर्थः समजनीति मास्म विस्मयं कार्षीरित्याह । तप इति ॥ ७० ॥ ७१ ॥ इति नवमस्कंधे टीकायां चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥ ॥ पंचमे विष्णुचक्रं तु प्रसाद्य प्राणसंक-

---

तुलाच उलट पीडा देणारा'अभिचार ज्या अंबरीषापासून उत्पन्न झाला आहे, त्यालाच तूं शरण जा. कारण, साधूंचेठिकाणीं जें योजिलेलें तेज तें, योजना करणारावाच उलटा अनर्थ करितें ॥ ६९ ॥ हे ब्राह्मणा, तूं, तप व विद्या यांनीं संपन्न अशा मला, हा अनर्थ कसा उत्पन्न झाला असें आश्चर्य मानूं नकोस. कारण, ब्राह्मणांना तप व विद्या हीं दोन्हीं अत्यंत श्रेयस्कर आहेत खरीं परंतु, निरपराधी पुरुषांचेठिकाणीं अपराध करणाऱ्या ब्राह्मणाला तींच दोन्ही अनर्थकारक होतात ॥ ७० ॥ तस्मात् हेदुर्वास मुने, तुझें कल्याण असो. तूं महाभाग्यशाली अशा नाभागपुत्र अंबरीष राजाजवळ जा आणि त्याची अपराध क्षमा करण्याविषयीं व आपल्या रक्षणाविषयींहि प्रार्थना कर, म्हणजे त्यापासून तुझ्या दुःखाची निवृत्ति होईल ॥ ७१ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील नवमस्कंधामध्यें हा चवथा अध्याय समाप्त झाला ॥ ४ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ ११ ॥
आतां ह्या पांचव्या अध्यायामध्यें, त्या अंबरीषराजानें स्तुति करून विष्णुचक्राला प्रसन्न केलें आणि प्राणसंकटापासून दुर्वासऋषीचें रक्षण केलें असें त्याचें चरित्र वर्णन केलें आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य म्हणाला– याप्रमाणें भगवंतानें आज्ञा केली असतां, चक्रानें तप्त झाल्यामुळें दुःखित झालेल्या दुर्वासऋषीनें अंबरीषराजाजवळ येऊन, त्याचे पाय

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ग्रहण केले ॥ १ ॥ तेव्हां त्या अंबरीषराजानें त्या दुर्वासऋषींचा पाय धरण्याचा उद्योग पाहून, त्या ब्राह्मणानें केलेल्या पादस्पर्शानें लज्जित व त्याचें संकट पाहून कृपेनें अत्यंत पीडित होत्साता, त्याच्या मागें लागलेल्या त्या हरीच्या सुदर्शनचक्राची स्तुति करूं लागला ॥ २ ॥ अंबरीष ह्मणाला– हे सुदर्शनचक्रा, तूं अग्नि व तूंच भगवान् सूर्य असून नक्षत्राधिपति चंद्रहि तूंच आहेस. तसेंच उदक, पृथिवी, आकाश, वायु, शब्दादिक पांच विषय व त्यांचीं ग्राहक श्रोत्रादिक पांच इंद्रियेंहि तूंच आहेस. ह्मणजे तुझ्याशक्तीनेंच अग्नि इत्यादिक आपापलीं कार्यें करितात ॥ ३ ॥ हे सुदर्शना, तूं सहस्र अऱ्यांनीं युक्त, पृथिवीचें रक्षक, विष्णूला आवडणारें आणि सर्व शस्त्रांचा घात करणारें आहेस. तुला मी नमस्कार करितों. तूं या ब्राह्मणाचें कल्याण करणारें हो ॥ ४ ॥ कारण, तूं धर्म, ऋत, सत्य, यज्ञरूपी, सर्व यज्ञाचा भोक्ता, लोकांचा पालक व सर्वा-

टात् ॥ दुर्वासा रक्षितस्तेन तथा तद्वृत्तमीर्यते ॥ १ ॥ १ ॥ स उद्यमनमिति छेदः । सुलोपः पादपूरणार्थः ॥ २ ॥ ज्योतिषां नक्षत्राणां पतिः सोमस्त्वम् । मात्राणींद्रियाणि च । त्वच्छक्त्यैवाग्न्यादयः स्वं स्वं कार्यं कुर्वंतीत्यर्थः ॥ ३ ॥ सहस्रमरा यस्य हे सहस्रार । स्वस्ति शरणं भूयाः । इडस्पते पृथ्वीपते ॥ ४ ॥ ब्राह्मणरक्षणं तव युक्तमेवेत्याह । त्वं धर्म इति । न च तवेयमतिस्तुतिरित्याह । पौरुषं पुरुषस्येश्वरस्य परं तेजः सामर्थ्यं त्वम् । अयं भावः । स ऐक्षतेत्यादिश्रुतिप्रसिद्धं भगवतः शोभनं दर्शनं सुदर्शनं तत एव

तस्य सोद्यमनं वीक्ष्य पादस्पर्शविलज्जितः ॥ अस्तावीत्तद्धरेरस्त्रं कृपया पीडितो भृशम् ॥ २ ॥ अंबरीष उवाच ॥ त्वमग्निर्भगवा-न्सूर्यस्त्वं सोमो ज्योतिषां पतिः ॥ त्वमापस्त्वं क्षितिर्व्योम वायुर्मात्रेंद्रियाणि च ॥ ३ ॥ सुदर्शन नमस्तुभ्यं सहस्राराच्युतप्रिय ॥ सर्वास्त्रघातिन्विप्राय स्वस्ति भूया इडस्पते ॥ ४ ॥ त्वं धर्मस्त्वमृतं सत्यं त्वं यज्ञोऽखिलयज्ञभुक् ॥ त्वं लोकपालः सर्वात्मा त्वं तेजः पौरुषं परम् ॥ ५ ॥ नमः सुनाभाखिलधर्मसेतवे ह्यधर्मशीलासुरधूमकेतवे ॥ त्रैलोक्यगोपाय विशुद्धवर्चसे मनोजवायाद्भुत-कर्मणे गृणे ॥ ६ ॥ त्वत्तेजसा धर्ममयेन संहृतं तमः प्रकाशश्च धृतो महात्मनाम् ॥ दुरत्ययस्ते महिमा गिरांपते त्वद्रूपमेतत्सद-सत्परावरम् ॥ ७ ॥ यदा विसृष्टस्त्वमनंजनेन वै बलं प्रविष्टोऽजित दैत्यदानवम् ॥ बाहूदरोर्वंघ्रिशिरोधराणि वृक्णन्नजस्रं प्रधने विराजसे ॥ ८ ॥

सर्वं जातमतस्त्वमेव सर्वात्मेति ॥ ५ ॥ हे सुनाभ अद्भुतकर्माणं त्व। कः स्तोतुं समर्थोऽतस्तुभ्यं केवलं नमो गृण इत्यन्वयः । अद्भुतकर्मत्वमेवाह । अखिलानां धर्माणां सेतवे मर्यादारूपाय अतएवाधर्मशीलानामसुराणां धूमकेतवे दाहकाय । त्रैलोक्यं गोपायतीति तथा । विशुद्धमत्युज्ज्वलं वर्चस्तेजो यस्य तस्मै ॥ ६ ॥ तदेव प्रपंचयति । त्वत्तेजसेति । द्वाभ्याम् । सूर्यादीनां प्रकाशश्च त्वयैव रूप्यते प्रकाश्यत इति त्वद्रूपम् ॥ ७ ॥ हे अजितानंजनेन श्रीहरिणा यदा विसृष्टस्त्वं तदा दैत्यदानवानां बलं प्रविष्टः संस्तेषां बाह्वादी-

त्मरूपी असून तूंच भगवंताचें परमसामर्थ्यरूप तेज आहेस ॥ ५ ॥ हे उत्तम नाभियुक्ता चक्रा, तूं सर्व धर्माचें मर्यादारूप असून अधर्मशील दैत्यांचें अग्नीसारखें दाहक आहेस. तसेंच त्रैलोक्याचें रक्षण करणारें व अत्युज्ज्वल तेजानें युक्त असून तुझा मनासारखा वेग आहे. तूं अद्भुत कर्म करणारें असल्यामुळें तुझी स्तुति करण्यास कोणीहि समर्थ नाहीं, ह्मणून मी तुला केवळ वाणीनें नमस्काराचें उच्चारणमात्र करितों ॥ ६ ॥ हे वेदवाणीपालका, तुझ्या धर्ममय तेजानें भगवंताची उपासना करणाऱ्या पुरुषांच्या अज्ञानाचा नाश केला आहे आणि सूर्यादिकांनाहि प्रकाश अर्पण केला आहे, आणि कार्यकारणात्मक हें चराचर जगत् तूंच प्रकाशित केलेलें आहे, अशाप्रकारचा तुझा महिमा अपार आहे ॥ ७ ॥ हे अपराजिता सुदर्शना, श्रीहरि जेव्हां तुला सोडितो तेव्हां तूं दैत्यदानवांच्या सैन्यांत प्रविष्ट होऊन त्यांचे बाहु, उदरें, मांड्या, पाय व कंठ

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

यांचें छेदन करीत युद्धामध्यें शोभत असतेंस ॥ ८ ॥ हे जगद्रक्षका, युद्धामध्यें सर्वशत्रूंना सहन करणाऱ्या तुला दुष्टांच्याच नाशाकरितां भगवंतानें योजिलें आहे. यास्तव आमच्या कुळाला भाग्यलाभ होण्याकरितां या ब्राह्मणांचें प्राणरक्षणरूप कल्याण कर, ह्मणजे तोच आमच्यावर तुझा अनुग्रह होईल; नाहींतर ब्रह्महत्या झाल्यानें आमची लोकामध्यें अपकीर्ति व कुळाचा नाशवगैरे होतील ॥ ९ ॥ आतां सर्व पुण्यांच्या अर्पणानें ब्राह्मणाच्या रक्षणाची प्रार्थना करितो– आमचें जर कांहीं दान केलेलें पुण्य असेल, यज्ञादिकाचें किंवा स्वधर्माचरणाचें पुण्य असेल, तसेंच आमचें कुळ जर ब्राह्मणांस देवांसारखें पूज्यबुद्धीनें मानीत असेल, तर हा ब्राह्मण तापरहित होवो ॥ १० ॥ आणि आमचा सर्वभूतांचेठिकाणीं आत्मभाव असल्यामुळें आह्मांवर सर्वगुणांचा आश्रय असा एक भगवान् जर संतुष्ट असेल तर हा ब्राह्मण तापरहित होवो ॥ ११ ॥ श्रीशुकाचार्य

न्भिदन्विराजसे । पाठांतरे ऊर्जिता दैत्यदानवा यस्मिंस्तद्बलम् । पूर्वपदेन संधिरार्षः ॥ ८ ॥ किंच । त्वया भगवन्नियुक्तेन खलानामेव दंडः कार्यः साधवस्तु रक्षणीया अतो विप्रस्य रक्षणेनास्माननुगृहाणेत्याह । स त्वमिति । हे जगत्त्राण स एवंभूतस्त्वं खलानामेव प्रहारार्थं निरूपितो नियुक्तः अतोऽस्मत्कुलस्य दैवहेतवे भाग्यलाभाय विप्रस्य भद्रं

स त्वं जगत्त्राण खलप्रहाणये निरूपितः सर्वसहो गदाभृता ॥ विप्रस्य चास्मत्कुलदैवहेतवे विधेहि भद्रं तदनुग्रहो हि नः ॥ ९ ॥ यद्यस्ति दत्तमिष्टं वा स्वधर्मो वा स्वनुष्ठितः ॥ कुलं नो विप्रदैवं चेद्द्विजो भवतु विज्वरः ॥ १० ॥ यदि नो भगवान्प्रीत एकः सर्वगुणाश्रयः ॥ सर्वभूतात्मभावेन द्विजो भवतु विज्वरः ॥ ११ ॥ श्रीशुक उवाच ॥ इति संस्तुवतो राज्ञो विष्णुचक्रं सुदर्शनम् ॥ अशाम्यत्सर्वतो विप्रं प्रदहद्राजयाच्ञया ॥ १२ ॥ स मुक्तोऽस्त्राग्नितापेन दुर्वासाः स्वस्तिमांस्ततः ॥ प्रशशंस तमुर्वीशं युंजानः परमाशिषः ॥ १३ ॥ दुर्वासा उवाच ॥ अहो अनंतदासानां महत्त्वं दृष्टमद्य मे ॥ कृतागसोऽपि यद्राजन्मंगलानि समीहसे ॥ १४ ॥ दुष्करः को नु साधूनां दुस्त्यजो वा महात्मनाम् ॥ यैः संगृहीतो भगवान्सात्वतामृषभो हरिः ॥ १५ ॥ यन्नामश्रुतिमात्रेण पुमान्भवति निर्मलः ॥ तस्य तीर्थपदः किं वा दासानामवशिष्यते ॥ १६ ॥ राजन्ननुगृहीतोऽहं त्वयाऽतिकरुणात्मना ॥ मदघं पृष्ठतः कृत्वा प्राणा यन्मेऽभिरक्षिताः ॥ १७ ॥

विधेहि तदेव नोऽनुग्रहः ॥ ९ ॥ सर्वसुकृतार्पणेन विप्ररक्षां प्रार्थयते, यद्यस्तीति द्वाभ्याम् । विप्रो दैवं देवता यस्मिंस्तत् ॥ १० ॥ ११ ॥ राज्ञस्तस्यैव याच्ञया ॥ १२ ॥ १३ ॥ ॥ १४ ॥ १५ ॥ १६ ॥ १७ ॥

ह्मणाला– हे राजा, याप्रमाणें शपथपूर्वक अंबरीष राजा स्तुति करीत असतां, सर्वबाजूंनीं त्या दुर्वासऋषीला दाह उत्पन्न करणारें सुदर्शननामक विष्णुचक्र, राजाच्या याचनेनें शांत झालें ॥ १२ ॥ नंतर सुदर्शनाग्नीच्या तापानें युक्त झालेला तो दुर्वासऋषि, ताप रहित होत्साता, त्या राजाला उत्तम आशीर्वाद देऊन त्याची प्रशंसा करूं लागला ॥ १३ ॥ अहो भगवंताच्या दासांचें महत्त्व आज मी पाहिलें. कारण, हे राजा, मी तुझा अपराध केला असतांहि तूं मला सुखें प्राप्त होण्याची इच्छा करितोस ? ॥ १४ ॥ अहो ! ज्यांनीं भक्ताचें पालन करणारा भगवान् हरि, मोठ्या प्रेमानें हृदयामध्यें स्थापन केला आहे. त्या महात्म्या साधूंना करण्यास अशक्य असें काय आहे ? अथवा टाकण्यास अशक्य काय आहे ? कांहींच नाहीं ॥ १५ ॥ ज्या भगवंताच्या नांवाच्या श्रवणमात्रेंकरूनहि पुरुष, पापादिकांनीं रहित होतो त्या तीर्थपाद हरीच्या दासांचें कोणतें बरें कर्तव्य अवशिष्ट राहतें ? कोणतेंच राहत नाहीं ॥ १६ ॥ हे राजन्, ज्याचें चित्त अतिशय करुणेनें युक्त आहे अशा तूं माझ्यावर अनुग्रह केला आहेस. कारण, तूं माझ्या अपराधाला

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पृष्ठभागीं करून (त्याची गणना न करितां) माझ्या प्राणांचें रक्षण केलें आहेस ॥ १७ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला— हे राजा, ब्राह्मणाचें परत येणें होईल अशा इच्छेनें ज्यानें भोजन केलें नाहीं, अशा त्या राजानें, आलेल्या दुर्वासऋषीचे चरण ग्रहण करून त्याला प्रसन्न करून, मोठ्या प्रीतीनें भोजन घातलें ॥ १८ ॥ त्यावेळीं दुर्वासऋषीनें, सर्व मनोरथ पूर्ण करणारें असें राजानें आदरपूर्वक वाढिलेलें अन्न भोजन करून संतुष्टचित्त झाला आणि राजाला मोठ्या आदरानें ह्मणाला कीं,— 'हे राजा, तूं आतां भोजन कर' ॥ १९ ॥ आणि दुसरेंहि ह्मणाला कीं,— हे राजा, सुदर्शनाची स्तुति करून माझ्या प्राणांचें रक्षण केल्यानें तूं माझ्यावर अनुग्रह केला आहेस, तसाच भगवद्भक्त अशा तुझ्या दर्शन, स्पर्शन, स्पर्श, भाषण यांनीं आणि परमात्म्याचेठिकाणीं निष्ठा उत्पन्न करणाऱ्या तुझ्या आतिथ्यानें मी संतुष्ट झालों आहें ॥ २० ॥ हे राजा, हें तुझें शुद्ध कर्म, स्वर्गावर राहणाऱ्या स्त्रिया (देवांगना) वारंवार गायन करितील, तशीच तुझी परमपवित्र कीर्ति भूमीवर राहणारे सर्व लोक वर्णन करितील ॥ २१ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला— हे

राजेत्यादिश्लोकद्वयं शुकोक्तिः ॥ १८ ॥ १९ ॥ प्रीतोऽस्मीति श्लोकद्वयं पुनश्च विप्रोक्तिः । आत्मनि मेधा येन तेनातिथ्येन ॥ २० ॥ भूरियं तत्रस्थो जनः

राजा तमकृताहारः प्रत्यागमनकांक्षया ॥ चरणावुपसंगृह्य प्रसाद्य समभोजयत् ॥ १८ ॥ सोऽशित्वाऽऽदृतमानीतमातिथ्यं सार्वकामिकम् ॥ तृप्तात्मा नृपतिं प्राह भुज्यतामिति सादरम् ॥ १९ ॥ प्रीतोऽस्म्यनुगृहीतोऽस्मि तव भागवतस्य वै ॥ दर्शनस्पर्शनालापैरातिथ्येनात्ममेधसा ॥ २० ॥ कर्मावदातमेतत्ते गायंति स्वःस्त्रियो मुहुः ॥ कीर्तिं परमपुण्यां च कीर्तयिष्यति भूरियम् ॥ २१ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ एवं संकीर्त्य राजानं दुर्वासाः परितोषितः ॥ ययौ विहायसाऽऽमंत्र्य ब्रह्मलोकमहैतुकम् ॥ २२ ॥ संवत्सरोऽत्यगात्तावद्यावताऽनागतो गतः ॥ मुनिस्तद्दर्शनाकांक्षो राजाऽब्भक्षो बभूव ह ॥ २३ ॥ गते च दुर्वाससि सोंऽबरीषो द्विजोपयोगातिपवित्रमाहरत् ॥ ऋषेर्विमोक्षं व्यसनं च बुद्ध्वा मेने स्ववीर्यं च परानुभावम् ॥ २४ ॥ एवं विधानेकगुणः स राजा परात्मनि ब्रह्मणि वासुदेवे ॥ क्रियाकलापैः समुवाह भक्तिं ययाऽऽविरिंचान्निरयांश्चकार ॥ २५ ॥

कीर्तयिष्यति ॥ २१ ॥ २२ ॥ तस्य धैर्यातिशयमाह । गतो मुनिर्यावता नागतस्तावत्संवत्सरोऽतिक्रांत इति ॥ २३ ॥ द्विजस्योपयोगेन भोजनेनातिपवित्रमाहरद्बुभुजे । स्ववीर्यं च धैर्यादिलक्षणं परानुभावं भगवतः प्रभावं मेने ॥ २४ ॥ एवंविधा अनेके गुणा यस्य सः । आविरिंचान्विरिंचपदसहितान्भोगान्निरयप्रायानपश्यदित्यर्थः ॥ २५ ॥

राजा, याप्रमाणें अंबरीषराजानें संतुष्ट केलेला तो दुर्वासऋषि, राजाची प्रशंसा करून त्याचा निरोप घेऊन आकाशमार्गानें, निष्काम कर्मांच्या योगानें प्राप्त होणाऱ्या ब्रह्मलोकास निघून गेला ॥ २२ ॥ आतां, राजाच्या धैर्याचा अतिशय वर्णन करितो कीं,— सुदर्शनाच्या भीतीनें गेलेला तो दुर्वासऋषि जोंपर्यंत परत आला नाहीं, तोंपर्यंत एकसंवत्सर निघून गेला; तोंपर्यंत त्याच्या दर्शनाची इच्छा करणारा राजा, केवळ उदकाचें सेवन करून राहिला होता ॥ २३ ॥ नंतर दुर्वासऋषि, गेला असतां त्या अंबरीषानें ब्राह्मणाचें भोजन झाल्यामुळें अतिपवित्र झालेलें अवशिष्ट अन्न भोजन केलें आणि त्यानें, दुर्वास ऋषीला जें सुदर्शनापासून प्राणसंकट प्राप्त झालें होतें त्यापासून त्याची मुक्तता झाली व तो येईपर्यंत आपणाला धैर्य धरण्याचें सामर्थ्य प्राप्त झालें असें जाणून हें सर्व भगवंताच्या प्रभावानें घडून आलें असें जाणलें ॥ २४ ॥ याप्रकारच्या अनेक गुणांनीं संपन्न अशा त्या राजानें, परमात्म्या ब्रह्मरूप वासुदेवाचेठिकाणीं, आपल्या सर्वकर्मांचें अर्पण करून उत्तरोत्तर वृद्धिंगत होणारी भक्ति केली. कीं, जिच्यायोगानें प्राप्त झालेल्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वैराग्यानें, ब्रह्मपदासहित सर्व भोग.ना नरकतुल्य त्यानें मानिलें ॥ २५ ॥ नंतर जितेंद्रिय अशा त्या अंबरीषराजानें, आपल्यासारख्या स्वभावाच्या पुत्रांना यथाविभागानें राज्य देऊन, आत्मरूप वासुदेवाचेठिकाणीं मनाची धारणा करून वनांत प्रवेश केला आणि नंतर तो त्रिगुणात्मक संसारापासून मुक्त झाला ॥ २६ ॥ हे राजा, अशा ह्या अंबरीष राजाच्या पवित्र आख्यानाचें वर्णन करणारा किंवा चिंतन करणारा पुरुष, भगवंताचा भक्त होईल ॥ २७ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील नवमस्कंधामध्यें अंबरीषचरित्रकथनरूप हा पांचवा अध्याय समाप्त झाला ॥ ५ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां या सहाव्या अध्यायाच्या आरंभीं अंबरीषाचा वंश सांगून पुढें या अध्यायासहित आठ अध्यायांनीं इक्ष्वाकुराजाचा वंश सांगितला आहे ॥ १ ॥ त्यांत या सहाव्या अध्यायांत शशादराजापासून मांधाताराजापर्यंत वंश सांगितलेला असून मांधात्याचा जांवई जो सौभरि ऋषि त्याची कथा सांगितली आहे ॥ २ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला,–हे राजा, विरूप, केतुमान् आणि शंभु असे अंबरीषरा-

---

॥ २६ ॥ २७ ॥ इति नवमे टीकायां पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥ षष्ठारंभेंऽबरीषस्य वंशमुक्त्वा ततः परम् ॥ षष्ठाद्यष्टभिरध्यायैरिक्ष्वाकोर्वंश उच्यते ॥ १ ॥ तत्र षष्ठे शशादादिर्मांधात्रंतो निरूप्यते ॥ प्रसंगात्सौभरेराख्या मांधातृतनयापतेः ॥ २ ॥ १ ॥ तंतवे संतानार्थम् ॥ २ ॥ ये अंगिरसा जनिता एते रथीतरस्य क्षेत्रे प्रसूतत्वेन रथीतरगोत्राः संतों-

अथांबरीषस्तनयेषु राज्यं समानशीलेषु विसृज्य धीरः ॥ वनं विवेशात्मनि वासुदेवे मनो दधद्ध्वस्तगुणप्रवाहः ॥ २६ ॥ इत्येतत्पुण्यमाख्यानमंबरीषस्य भूपतेः ॥ संकीर्तयन्ननुध्यायन्भक्तो भगवतो भवेत् ॥ २७ ॥ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे नवमस्कंधे अंबरीषचरितं नाम पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ विरूपः केतुमाञ्शंभुरंबरीषसुतास्त्रयः ॥ विरूपात्पृषदश्वोऽभूत्तत्पुत्रस्तु रथीतरः ॥ १ ॥ रथीतरस्याप्रजस्य भार्यायां तंतवेऽर्थितः ॥ अंगिरा जनयामास ब्रह्मवर्चस्विनः सुतान् ॥ २ ॥ एते क्षेत्रे प्रसूता वै पुनस्त्वांगिरसाः स्मृताः ॥ रथीतराणां प्रवराः क्षत्रोपेता द्विजातयः ॥ ३ ॥ क्षुवतस्तु मनोर्जज्ञे इक्ष्वाकुर्घ्राणतः सुतः ॥ तस्य पुत्रशतज्येष्ठा विकुक्षिनिमिदंडकाः ॥ ४ ॥

ऽगिरसो वीर्येण प्रसूतत्वादांगिरसाश्च । पुनरपि रथीतराणामन्येषां जातानां प्रवरा मुख्याः स्मृताः । यतः क्षत्रोपेता ब्राह्मणा इत्यर्थः ॥ ३ ॥ तदेवं मनोर्दशसु पुत्रेषु पृषध्रश्च कविश्चो विरक्तत्वान्न वंशप्रवर्तकौ करूषादीनां च सप्तानां वंशास्तारतम्यक्रमेणोक्ताः । इदानीमतिविततमिक्ष्वाकोर्वंशमाह । क्षुवतस्त्वित्यादिना यावत्सोमवंशप्रस्तावः । क्षुतं कुर्वतो मनोर्घ्राणत

जाचे तीन पुत्र होते, त्यांपैकीं विरूपापासून पृषदश्वनामक पुत्र झाला, त्याला रथीतर पुत्र झाला ॥ १ ॥ तो रथीतर संततिरहित झाला असतां, त्याच्या भार्येच्याठिकाणीं संतति होण्यासाठीं प्रार्थना केलेल्या अंगिरा ऋषीनें ब्रह्मतेजानें युक्त असे तीन पुत्र उत्पन्न केले ॥ २ ॥ हे पुत्र, रथीतराच्या स्त्रीचेठिकाणीं उत्पन्न झाल्यामुळें रथीतरगोत्रानें युक्त असून अंगिरा ऋषीच्या वीर्यापासून झाल्यामुळें आंगिरस नामानें प्रसिद्ध होते· आणि ते पुढें, रथीतराला दुसऱ्या स्त्रीचेठिकाणीं झालेल्या पुत्रांमध्यें व त्यांच्या वंशजांमध्यें श्रेष्ठ असून क्षत्रियधर्मानें युक्त असे ब्राह्मण होते ॥ ३ ॥ आतां अतिविस्तृत असा इक्ष्वाकूचा वंश सांगतो– हे राजा, एकेवेळीं वैवस्वत मनूला शिंक आली असतां त्यावेळीं त्याच्या नासिकेपासून इक्ष्वाकुनामक पुत्र झाला· त्या इक्ष्वाकूला शंभर पुत्र झाले, त्यांमध्यें विकुक्षि, निमि आणि दंडक हे तीन ज्येष्ठ (वडील) होत ॥ ४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हे राजा, बाकीच्या त्या शंभर पुत्रांमध्यें पंचवीस पुत्र, हिमाचल व विंध्याचल या दोन्हीं पर्वतांच्या मधील आर्यावर्तदेशांमध्यें पूर्वेकडे समुद्रापर्यंत देशविभागानें राजे झाले; तसेच दुसरे पंचवीस पुत्र, त्याच देशांत पश्चिमदिशेकडे राजे झाले. मध्यभागीं ज्येष्ठ असलेले विकुक्षिवगैरे तीन पुत्र राजे झाले. बाकीच्या सत्तेचाळीस पुत्रांपैकीं कांहीं दक्षिणेकडे आणि कांहीं उत्तरेकडे असे राजे झाले अशी त्या शंभर पुत्रांची व्यवस्था होती ॥ ५ ॥ त्यांत ज्येष्ठ जो विकुक्षि त्यालाच शशाद असें नांव प्राप्त झालें. त्याचें कारण असें कीं.— एकेवेळीं तो इक्ष्वाकु राजा, अष्टकाश्राद्धाचें निमित्त प्राप्त झालें असतां, आपल्या विकुक्षि पुत्राला ह्मणाला कीं,— हे विकुक्षे, तूं अरण्यांत जा आणि श्राद्धाला योग्य असें मांस लवकर घेऊन ये, विलंब करूं नकोस ॥ ६ ॥ तेव्हां तो वीर, बरें आहे असें ह्मणून वनांत जाऊन श्राद्धाला योग्य अशा मृगांचा वध करून श्रांत व बुभुक्षित झाला. तेव्हां त्यानें, त्या पशूंतील एका सशाचें भक्षण केलें. त्यावेळीं त्याला अतिरिक्त क्षुधा लागलेली असल्यामुळें, श्राद्धाकरितां मारलेला पशु आपण भक्षण करूं नये

जज्ञे । श्रद्धायां जनयामास दश पुत्रानिति पूर्वोक्तं बाहुल्याभिप्रायेणेति द्रष्टव्यम् । पुत्राणां शते ज्येष्ठाः ॥ ४ ॥ आर्यावर्तः पुण्यभूमिर्मध्यं विंध्यहिमागयोः । तस्मिपुरस्तात्समुद्रपर्यंतं मंडलविभागेन पंचविंशतिर्नृपा अभवन् । हे नृप तथैव पश्चाच्च पंचविंशतिः । मध्ये तु ज्येष्ठास्त्रयः । अपरे त्वन्यतो दक्षिणोत्तरादिषु ॥ ५ ॥ विकुक्षिरेव । शशाद इति विश्रुत

तेषां पुरस्तादभवन्नार्यावर्ते नृपा नृप ॥ पंचविंशतिः पश्चाच्च त्रयो मध्ये परेऽन्यतः ॥ ५ ॥ स एकदाऽष्टकाश्राद्ध इक्ष्वाकुः सुतमादिशत् ॥ मांसमानीयतां मेध्यं विकुक्षे गच्छ मा चिरम् ॥ ६ ॥ तथेति स वनं गत्वा मृगान्हत्वा क्रियार्हणान् ॥ श्रांतो बुभुक्षितो वीरः शशं चाददपस्मृतिः ॥ ७ ॥ शेषं निवेदयामास पित्रे तेन च तद्गुरुः ॥ चोदितः प्रोक्षणायाह दुष्टमेतदकर्मकम् ॥ ८ ॥ ज्ञात्वा पुत्रस्य तत्कर्म गुरुणाऽभिहितं नृपः ॥ देशान्निःसारयामास सुतं त्यक्तविधिं रुषा ॥ ९ ॥ स तु विप्रेण संवादं जापकेन समाचरन् ॥ त्यक्त्वा कलेवरं योगी स तेनावाप यत्परम् ॥ १० ॥ पितर्युपरतेऽभ्येत्य विकुक्षिः पृथिवीमिमाम् ॥ शासदीजे हरिं यज्ञैः शशाद इति विश्रुतः ॥ ११ ॥ पुरंजयस्तस्य सुत इंद्रवाह इतीरितः ॥ ककुत्स्थ इति चाप्युक्तः शृणु नामानि कर्मभिः ॥१२॥

इति वक्ष्यति । तत्र हेतुमाह । स एकदेति चतुर्भिः ॥ ६ ॥ क्रियार्हणान् श्राद्धार्हान् । आददभक्षयत् ॥ ७ ॥ तद्गुरुर्वसिष्ठः । प्रोक्षणाय श्राद्धोचितसंस्काराय ॥ ८ ॥ त्यक्तो विधिः सदाचारो येन तम् ॥ ९ ॥ स त्विक्ष्वाकुः जापकेन वसिष्ठेन । राज्यभोगेन विरक्तो योगी संस्तेन योगेन कलेवरं त्यक्त्वा स यत्परं तत्त्वं तदवाप ॥ १० ॥ शासत्पालयन्हरिमीजे ॥ ११ ॥ दैत्यपुरस्य जयात्पुरंजयः इंद्रो वाहो यस्येतींद्रवाहः ककुदि स्थितत्वात्ककुत्स्थ इति च शशादसुतस्य त्रीणि नामानि तत्तत्कर्मनिमित्तानि ॥ १२ ॥

याची स्मृति राहिली नाहीं ॥ ७ ॥ नंतर बाकीचें मांस त्यानें पित्याला (इक्ष्वाकूला) आणून दिलें. नंतर त्या इक्ष्वाकूनें, मांसाचा श्राद्धोचित संस्कार करण्याकरितां प्रेरणा केलेला वसिष्ठ गुरु, हें मांस श्राद्धयोग्य नाहीं. कारण, यांतील थोडेंसें पूर्वीं भक्षण केल्यामुळें हें उच्छिष्टदोषानें युक्त झालें आहे असें ह्मणाला ॥ ८ ॥ नंतर गुरूनें सांगितलेलें तें पुत्राचें कर्म जाणून, इक्ष्वाकुराजानें, शास्त्रीयनियमाचा त्याग करणाऱ्या त्या विकुक्षिपुत्राला रोषानें देशांतून घालवून दिलें ॥ ९ ॥ पुढें तो इक्ष्वाकुराजा, वसिष्ठगुरु ब्राह्मणाबरोबर तत्त्वविचार करून, त्याच्या योगानें ज्ञाननिष्ठ होत्साता शेवटीं आपल्या देहाचा त्याग करून जें परब्रह्म, त्याला पावला ॥ १० ॥ याप्रमाणें इक्ष्वाकुराजा मरण पावला असतां, पुन्हा विकुक्षीनें घरीं येऊन पृथिवीचें पालन केलें आणि पुष्कळ यज्ञ करून हरीचें आराधन केलें. पुढें तो राजा शशाद या नांवानें प्रसिद्ध झाला ॥ ११ ॥ त्या विकुक्षीचा पुत्र पुरंजय. तोच इंद्रवाह आणि कुकुत्स्थ या नांवांनीं लोकामध्यें प्रसिद्ध झाला. त्याला तीं नांवें ज्या कर्मांनीं प्राप्त झालीं तीं कर्मे मी तुला सांगतों ऐक ॥१२॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

एकेवेळीं देवांचा दैत्यांसहवर्तमान लोकांचा लय करणारा मोठा संग्राम झाला. तेव्हां दैत्यांनीं जिंकलेल्या देवांनीं आपलें सहाह्य करण्याविषयीं त्या पुरंजय राजाची प्रार्थना केली ॥ १३ ॥ तेव्हां त्यानें, जर इंद्र माझें वाहन होईल तर मी त्याच्यावर बसून दैत्यांचा वध करीन असा, वाहन होण्याविषयीं त्यानें वरिलेला इंद्र तें राजाचें वाक्य अंगीकारीना, परंतु देवदेव, प्रभु, विश्वात्मा जो विष्णु त्याच्या सांगण्यावरून, इंद्र, त्या राजाचें वाहन होण्याविषयीं महावृषभ झाला ॥ १४ ॥ नंतर युद्ध करण्याची इच्छा करणारा तो पुरंजयराजा, कवच धारण करून दिव्य धनुष्य व तीक्ष्ण बाण ग्रहण करून, बंदिजनांनीं स्तूयमान व सर्वांतर्यामी परमात्मा विष्णूच्या तेजानें वृद्धिंगत होत्साता, त्या महावृषभावर चढून त्याच्या खांद्याजवळच्या कोळ्यावर बसला आणि त्यानें देवांना बरोबर घेऊन दैत्यांच्या नगराला पश्चिमेकडून वेढा घातला ॥ १५ ॥ १६ ॥ तेव्हां दैत्यांबरोबर त्या राजाचें, श्रवणमात्रेंकरून लोकांच्या आंगावर रोमांच उभे करणारें तुमुळ युद्ध झालें, त्या युद्धामध्यें त्याच्या समोर जे दैत्य प्राप्त झाले होते त्यांना,

तान्येव व्याचक्षाण आह। कृतांत इति सप्तभिः। कृतं विश्वमंतयतीति तथा। पार्ष्णिग्राहः सहायः ॥ १३ ॥ इंद्रो यदि मम वाहनं स्यात्तर्हि दैत्यान्हनिष्यामीति तेन वाहनत्वेन वृतः सन्निंद्रो

कृतांत आसीत्समरो देवानां सह दानवैः ॥ पार्ष्णिग्राहो वृतो वीरो देवैर्दैत्यपराजितैः ॥ १३ ॥ वचनाद्देवदेवस्य विष्णोर्विश्वात्मनः प्रभोः ॥ वाहनत्वे वृतस्तस्य बभूवेंद्रो महावृषः ॥ १४ ॥ स सन्नद्धो धनुर्दिव्यमादाय विशिखान् शितान् ॥ स्तूयमानः समारुह्य युयुत्सुः ककुदि स्थितः ॥ १५ ॥ तेजसाऽप्यायितो विष्णोः पुरुषस्य परात्मनः ॥ प्रतीच्यां दिशि दैत्यानां न्यरुणत्रिदशैः पुरम् ॥ १६ ॥ तैस्तस्य चाभूत्प्रधनं तुमुलं लोमहर्षणम् ॥ यमाय भल्लैरनयद्दैत्यान्येऽभिययुर्मृधे ॥ १७ ॥ तस्येषुपाताभिमुखं युगांताग्निमिवोल्बणम् ॥ विसृज्य दुद्रुवुर्दैत्या हन्यमानाः स्वमालयम् ॥ १८ ॥ जित्वा पुरं धनं सर्वं सश्रीकं वज्रपाणये ॥ प्रत्ययच्छत्स राजर्षिरिति नामभिराहृतः ॥ १९ ॥ पुरंजयस्य पुत्रोऽभूदनेनास्तत्सुतः पृथुः ॥ विश्वरंधिस्ततश्चंद्रो युवनाश्वश्च तत्सुतः ॥ २० ॥ शाबस्तस्तत्सुतो येन शाबस्ती निर्ममे पुरी ॥ बृहदश्वस्तु शाबस्तिस्ततः कुवलयाश्वकः ॥ २१ ॥

लज्जया तदनंगीकुर्वन्विष्णोर्वचनात्तस्य वाहनत्वाय महान्वृषो बभूवेत्यर्थः ॥ १४ ॥ १५ ॥ १६ ॥ येऽभिमुखं ययुस्तान् यमं दर्शयितुं सदेहानेव भल्लैरनयदित्यर्थः ॥ १७ ॥ तच्च दृष्ट्वाऽन्ये दुद्रुवुः। स्वमालयं पातालम् ॥ १८ ॥ इति एतैः कर्मभिः पुरंजयादिनामभिः आहृतो व्याहृतः। पाठांतरे आहत इत्यर्थः ॥ १९ ॥ २० ॥ शाबस्तिः शाबस्तस्य पुत्रः

यमाचें दर्शन करविण्याकरितां त्यानें बाणाच्या योगेंकरून सदेहच उडविलें ॥ १७ ॥ त्यानें बाणांच्या योगानें प्रहार केलेले कित्येक दैत्य, त्याच्या प्रलयकालीन अग्नीसारख्या दुःसह युद्धांगणांचा त्याग करून आपल्या पाताळ लोकांत पळून गेले ॥ १८ ॥ याप्रमाणें त्या राजर्षीनें दैत्यांचें शोभेसहित नगर, व धन जिंकून तें सर्व इंद्राला दिलें. तेव्हां पासून त्याला, दैत्यांचें पुर जिकल्यामुळें पुरंजय, इंद्राला वाहन केल्यामुळें इंद्रवाह आणि त्याच्या कोळ्यावर बसल्यामुळें ककुत्स्थ अशा तीन नांवांनीं लोक त्याचा उच्चार करूं लागले ॥ १९ ॥ पुरंजयाला अनेना या नांवाचा पुत्र झाला. त्याला पृथु पुत्र झाला. त्याला विश्वरंधि; त्यापासून चंद्र झाला आणि त्याचा पुत्र युवनाश्व झाला ॥ २० ॥ त्याचा पुत्र शाबस्त झाला, त्यानें शाबस्तीनांवाची नगरी निर्माण केली. पुढें शाबस्ताचा पुत्र बृहदश्व त्यापासून कुवलयाश्वक झाला ॥ २१ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ज्या बलाढ्य कुवलयाश्वकानें उत्तंकऋषीचें प्रिय करण्याकरितां आपल्या एकवीसहजार पुत्रांसहवर्तमान धुंधुनामक दैत्यावर स्वारी करून त्याचा वध केला, ह्मणून तो कुवलयाश्वकच धुंधुमार या नांवानें प्रख्यात झाला, आणि जे एकवीसहजार त्याचे पुत्र होते ते सर्व त्या धुंधुदैत्याच्या मुखापासून निघालेल्या अग्नीनें दग्ध झाले, त्यांमध्यें तीनच पुत्र अवशेष राहिले ॥ २२ ॥ २३ ॥ हे भारता, ते तीन पुत्र दृढाश्व, कपिलाश्व आणि भद्राश्व या नांवांचे होत. त्यांपैकीं दृढाश्वाचा पुत्र हर्यश्व, त्याचा पुत्र निकुंभ झाला ॥ २४ ॥ त्या निकुंभाचा बर्हणाश्व, त्याचा कृशाश्व, त्याचा सेनजित्, त्याचा पुत्र युवनाश्व झाला. त्याच्या शंभर स्त्रिया होत्या. तथापि त्यांचेठिकाणीं त्याला अपत्य झालें नाहीं ह्मणून तो संतानरहित असल्यामुळें खिन्नचित्त होऊन त्या शंभर स्त्रियांसहवर्तमान वनामध्यें ऋषींच्या आश्रमांत गेला. ते ऋषि, त्या राजाविषयीं कृपायुक्त होऊन,

---

कुवलयाश्वक एव धुंधुमार इति ख्यातः ॥ २१ ॥ तत्र कारणमाह । य इति । सुतानामेकविंशत्या सहस्रैर्वृतः सन्हतवान् ॥ २२ ॥ धुंधुमार इति चेति चकारस्यान्वयः ॥ २३ ॥ २४ ॥ अथ तस्मान्निकुंभात्कृशाश्वः ॥ २५ ॥ भार्याणां शतेन सह अस्य पुत्रार्थमिंद्रदेवत्यामिष्टिं वर्तयामासुः । स्मेत्याश्चर्ये ॥ २६ ॥ तदेवाह । राजेति षड्भिः । तर्षितस्तृषितः सन् जलार्थं प्रविष्टो

यः प्रियार्थमुतंकस्य धुंधुनामासुरं बली ॥ सुतानामेकविंशत्या सहस्रैरहनद्वृतः ॥ २२ ॥ धुंधुमार इति ख्यातस्तत्सुतास्ते च जज्वलुः ॥ धुंधोर्मुखाग्निना सर्वे त्रय एवावशेषिताः ॥ २३ ॥ दृढाश्वः कपिलाश्वश्च भद्राश्व इति भारत ॥ दृढाश्वपुत्रो हर्यश्वो निकुंभस्तत्सुतः स्मृतः ॥ २४ ॥ बर्हणाश्वो निकुंभस्य कृशाश्वोऽथास्य सेनजित् ॥ युवनाश्वोऽभवत्तस्य सोऽनपत्यो वनं गतः ॥ २५ ॥ भार्याशतेन निर्विण्ण ऋषयोऽस्य कृपालयः ॥ इष्टिं स्म वर्तयांचक्रुरैंद्रीं ते सुसमाहिताः ॥ २६ ॥ राजा तद्यज्ञसदनं प्रविष्टो निशि तर्षितः ॥ दृष्ट्वा शयानान्विप्रांस्तान्पपौ मंत्रजलं स्वयम् ॥ २७ ॥ उत्थितास्ते निशाम्याथ व्युदकं कलशं प्रभो ॥ पप्रच्छुः कस्य कर्मेदं पीतं पुंसवनं जलम् ॥ २८ ॥ राज्ञा पीतं विदित्वाऽथ ईश्वरप्रहितेन ते ॥ ईश्वराय नमश्चक्रुरहो दैवबलं बलम् ॥ २९ ॥ ततः काल उपावृत्ते कुक्षिं निर्भिद्य दक्षिणम् ॥ युवनाश्वस्य तनयश्चक्रवर्ती जजान ह ॥ ३० ॥

मंत्राभिमंत्रितं जलं पत्न्यै देयं स्वयं पपौ ॥ २७ ॥ व्युदकं निरुदकम् ॥ २८ ॥ अहो दैवबलमेव मुख्यं बलं पुरुषबलं तु न किंचिदिति वदंत ईश्वराय नमस्कारं चक्रुः ॥ २९ ॥ ३० ॥

देवाच्या आराधनाविषयीं एकाग्रचित्त होत्साते त्या राजाला पुत्र होण्यासाठीं राजाला (न कळवितां) त्यांनीं जिची देवता इंद्र आहे अशी पुत्रकामेष्टि केली ॥ २५ ॥ २६ ॥ राजा रात्रीचेवेळीं तृषाक्रांत होत्साता ऋषींच्या त्या यज्ञमंडपांत प्रविष्ट होऊन, तेथें निजलेल्या त्या ब्राह्मणांना पाहून त्या राजानें, त्यांना न विचारितांच, त्यांनीं राजपत्नीला पुत्रलाभासाठीं प्राशनार्थ देण्याकरितां मंत्रानें अभिमंत्रण केलेलें जळ, स्वतांच प्राशन केलें ॥ २७ ॥ नंतर उठलेल्या ब्राह्मणांनीं उदकाखेरीज असलेला कलश पाहून तेथें असलेल्या राजाला, ‘हे प्रभो, कोणाचें हें कर्म? पुत्रोत्पत्ति करणारें उदक कोणीं प्राशन केलें?’ असा प्रश्न केला ॥ २८ ॥ नंतर ईश्वरानें प्रेरणा केलेल्या राजानेंच तें उदक प्राशन केलें असें (त्याच्याकडूनच) जाणून त्या ऋषींनीं, अहो! देवाचें बळच मुख्य आहे, पुरुषाचा प्रयत्न कांहींच उपयोगी पडत नाहीं, असें भाषण करून ईश्वरालाच नमस्कार केला ॥ २९ ॥ नंतर पुत्रोत्पत्तिसमय प्राप्त झाला असतां, युवनाश्वाची उजवी कूश फाडून पुत्र झाला. केवढें हें आश्चर्य! आणि तो पुत्र पुढें सार्व-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भौमराजा झाला ॥ ३० ॥ हा पुत्र क्षुधाक्रांत होऊन स्तनपान करण्यासाठीं फारच रडत आहे, आतां हा कोणाचें दूध पिईल? असें दुःखित झालेल्या ब्राह्मणांनीं भाषण केलें असतां, त्या इष्टीमध्यें आराधन केलेला इंद्र, मां धाता (मला पिईल) असें ह्मणाला व हे वत्सा, तूं रडूं नकोस, असें त्या बालकाला सांगून त्या इंद्रानें, अमृताला स्रवणारी आपली तर्जनी त्या पुत्राच्या मुखांत घातली ॥ ३१ ॥ याप्रमाणें इंद्रानें 'मां धाता' असें ह्मटल्यामुळें तो पुत्र पुढें मांधाता या नांवानें प्रसिद्ध झाला. उजवी कूश फाटल्यामुळें मरणाची वेळ प्राप्त झाली असतांहि त्या बालकाचा पिता युवनाश्व ब्राह्मणांच्या व देवांच्या अनुग्रहानें मरण पावला नाहीं. तर तो पुढें त्या वनांतच कांहीं कालपर्यंत वास करून तपाच्या योगानें सिद्धि (मुक्ति) पावला ॥ ३२ ॥ हे राजा, इंद्रानें पुढें त्या पुत्राचें त्रसदस्यु असें नांव ठेविलें. कारण, त्या मांधात्यापासून मनामध्यें दचकून गेलेले दस्यु ह्मणजे दुसऱ्याला उपद्रव करणारे दुष्ट रावणादिक, फार भीत असत ॥ ३३ ॥ नंतर तो युवनाश्वाचा पुत्र सार्वभौम मांधाता, भगवंताच्या तेजानें

अयं कं धास्यति पास्यतीति दुःखितैर्विप्रैरुक्ते सति तस्यामिष्टयामाराधित इंद्रो मां धाता पाता हे वत्स मारोदीरिति ब्रुवन् देशिनीं तर्जनीमदादित्यर्थः ॥ ३१ ॥ तस्य पिता युवनाश्वो भिन्नकुक्षिरपि न ममार किंतु कालांतरे तपसा सिद्धिमन्वगात् ॥ ३२ ॥ मांधातुर्महिमानमाह। त्रसदस्युरिति षड्भिः। अंग हे राजन्यस्मान्मांधातुर्दस्यव उ-

कं धास्यति कुमारोऽयं स्तन्यं रोरूयते भृशम् ॥ मां धाता वत्स मा रोदीरितींद्रो देशिनीमदात् ॥ ३१ ॥ न ममार पिता तस्य विप्रदेवप्रसादतः ॥ युवनाश्वोऽथ तत्रैव तपसा सिद्धिमन्वगात् ॥ ३२ ॥ त्रसदस्युरितींद्रोऽग विदधे नाम तस्य वै ॥ यस्मात्त्रसंति ह्युद्विग्ना दस्यवो रावणादयः ॥ ३३ ॥ यौवनाश्वोऽथ मांधाता चक्रवर्त्यवनीं प्रभुः ॥ सप्तद्वीपवतीमेकः शशासाच्युततेजसा ॥ ३४ ॥ ईजे च यज्ञं क्रतुभिरात्मविद्भूरिदक्षिणैः ॥ सर्वदेवमयं देवं सर्वात्मकमतींद्रियम् ॥ ३५ ॥ द्रव्यं मंत्रो विधिर्यज्ञो यजमानस्तथर्त्विजः ॥ धर्मो देशश्च कालश्च सर्वमेतद्यदात्मकम् ॥ ३६ ॥ यावत्सूर्य उदेति स्म यावच्च प्रतितिष्ठति ॥ सर्वं तद्यौवनाश्वस्य मांधातुः क्षेत्रमुच्यते ॥ ३७ ॥ शशबिंदोर्दुहितरि बिंदुमत्यामधान्नृपः ॥ पुरुकुत्समंबरीषं मुचुकुंदं च योगिनम् ॥ ३८ ॥ तेषां स्वसारः पंचाशत्सौभरिं वव्रिरे पतिम् ॥ यमुनांतर्जले मग्नस्तप्यमानः परं तपः ॥ ३९ ॥

द्विग्नाः कंपिताः संतस्त्रसंत्यत इंद्रो यस्य त्रसदस्युरिति नाम विदधे स मांधाताऽवनीमेकः शशासेत्युत्तरेणान्वयः ॥ ३३ ॥ अच्युतस्य तेजसा। अप्रच्युततेजसेति वा ॥ ३४ ॥ आत्मविदपि स यज्ञं विष्णुमीजे। तमेव विशिनष्टि। सर्वदेवमयमिति सार्धेन ॥ ३५ ॥ ३६ ॥ प्रतितिष्ठत्यस्तं गच्छति ॥ ३७ ॥ ३८ ॥ प्रसंगात्सौभरेश्चरितमाह। तेषामिति यावत्स-

---

प्रजांच्या पालनाविषयीं समर्थ होऊन सप्तद्वीपवती पृथिवीवर राहणाऱ्या सर्व प्रजांचें एकटाच पालन करूं लागला ॥ ३४ ॥ तो आत्मवेत्ता असूनहि त्याणें पुष्कळ दक्षिणायुक्त यज्ञांनीं यज्ञरूपी भगवंताचें आराधन केलें. ~~तो भगवान् सर्वदेवमय, सर्वप्रकाशक, विश्वव्यापक व इंद्रियांना अगोचर असून, यज्ञांतील– चरुपुरोडाशादिक द्रव्यें, मंत्र, अनुष्ठानप्रकार, यज्ञ, यजमान, ऋत्विज, धर्म, देश व काल हीं सर्व– त्याचीं स्वरूपेंच होत असा होय~~ ॥ ३५ ॥ ३६ ॥ जेथें सूर्य उदय पावतो व जेथें अस्त पावतो तेथपर्यंत असलेलें सर्व हें भूमंडळ, यौवनाश्व मांधात्याचें पालन करण्याचें स्थळ असें ह्मटलें आहे ॥ ३७ ॥ त्या राजानें शशबिंदु राजाच्या बिंदुमतीनामक कन्येचेठिकाणीं पुरुकुत्स अंबरीष आणि भक्तियोगनिष्ठ असा मुचुकुंद हे तीन पुत्र उत्पन्न केले ॥ ३८ ॥ आणि त्या पुरुकुत्सादिकांच्या बहिणी पंन्नास होत्या. त्यांनीं सौभरिनामक ऋषीला पति वरिलें तो महातपस्वी सौभरि, एकेवेळीं यमुनेच्या उदकामध्यें योगसामर्थ्यानें निमग्न होऊन उत्कृष्ट तप करित असतां– ॥ ३९ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तेथें मैथुन करणाऱ्या एका श्रेष्ठ मत्स्याचें मैथुनसुख पाहून त्याला त्या सुखाची इच्छा झाली आणि त्या ब्राह्मणानें, मांधात्या राजाजवळ जाऊन एक कन्या मागितली ॥ ४० ॥ तेव्हां तो मांधाताहि याचें वृद्धत्व पाहून ह्मणाला कीं–हे ब्राह्मणा, तूं स्वयंवरामध्यें कन्येच्या इच्छेप्रमाणें कन्येचें ग्रहण कर, ह्मणजे तूं कन्यांच्या अंतःपुरांत जाऊन तेथें माझ्या पन्नास कन्या आहेत त्यांपैकीं जी कन्या तुला स्वतां वरील तिचा तूं स्वीकार कर. तेव्हां त्या सौभरीनें, आपण वृद्ध, अंगाला वळकुत्या पडलेला केंस पिकलेला व मस्तक कांपत असलेला आहें ह्मणून मी स्त्रियांना (आपल्या कन्यांना) आवडणार नाहीं, असें या राजानें मनांत आणून मला स्वयंवरमिषानें प्रत्युत्तर दिलें आहे ॥ ४१ ॥ बरें असो! आतां मी आपल्या देहाला तसा सुंदर तयार करितों कीं, मी जसा देवांच्या स्त्रियांनांहि आवडेन. मग राजांच्या स्त्रियांना आवडेन हें काय सांगावें? असा निश्चय करून त्यानें सुंदर देह धारण केला. कारण, तो योगी असल्यामुळें मनांत आणल्याप्रमाणें करण्यास समर्थ होता ॥ ४२ ॥ नंतर राजाच्या

माधि । तेषां स्वसारो मांधातुः कन्याः । ननु महातापसस्य कुतो विवाहप्रसंगः कथं वा जराजर्जरं तं राजकन्या वव्रिरे तदाह । यमुनांतर्जल इति षड्भिः ॥ ३९ ॥ नृपं मांधातारम् ॥ ४० ॥ सोऽपि मांधाता स्वयंवरे कामं गृह्यतामित्याह स विप्रः स्त्रीणामप्रियं मां विचिंत्यानेनाहं प्रत्युक्तोऽत आत्मानं तथा साधयिष्यामीति व्यवसितो निश्चितवानिति द्वयोरन्वयः । अप्रियत्वे हेतुः । जरठो वृद्धः वलिभिर्युक्तः पलितश्च । एजत्कः कंपमानशिराः । तापसत्वादिना वाऽसंमतोऽहमिति कृत्वा ॥ ४१ ॥ तथेत्यस्य प्रपंचः । सु-

निर्वृतिं मीनराजस्य वीक्ष्य मैथुनधर्मिणः ॥ जातस्पृहो नृपं विप्रः कन्यामेकामयाचत ॥ ४० ॥ सोऽप्याह गृह्यतां ब्रह्मन्कामं कन्या स्वयंवरे ॥ स विचिंत्याप्रियं स्त्रीणां जरठोऽयमसंमतः ॥ वलीपलित एजत्क इत्यहं प्रत्युदाहृतः ॥ ४१ ॥ साधयिष्ये तथाऽऽत्मानं सुरस्त्रीणामपीप्सितम् ॥ किं पुनर्मनुजेंद्राणामिति व्यवसितः प्रभुः ॥ ४२ ॥ मुनिः प्रवेशितः क्षत्रा कन्यांतःपुरमृद्धिमत् ॥ वृतश्च राजकन्याभिरेकः पंचाशता वरः ॥ ४३ ॥ तासां कलिरभूद्भूयांस्तदर्थेऽपोह्य सौहृदम् ॥ ममानुरूपो नायं व इति तद्गतचेतसाम् ॥ ४४ ॥ स बह्वृचस्ताभिरपारणीयतपःश्रियाऽनर्घ्यपरिच्छदेषु ॥ गृहेषु नानोपवनामलांभः सरस्सु सौगंधिककाननेषु ॥ ४५ ॥

रस्त्रीणामपीप्सितं किं पुनर्मनुजेंद्राणां याः स्त्रियस्तासामिति ॥ ४२ ॥ ततः किं वृत्तं तदाह । मुनिरिति द्वाभ्याम् । क्षत्रा प्रतीहारेण । पंचाशताऽपि राजकन्याभिः स एक एव वरो वृतः ॥ ४३ ॥ ४४ ॥ तस्य गार्हस्थ्यं वर्णयति । स इति चतुर्भिः । बह्वृच इति मंत्रसामर्थ्यमुक्तम् । ताभिः सह रेमे इत्युत्तरेणान्वयः । क्व रेमे । अपारणीयं दुरंतं यत्तपस्तस्य श्रिया समृद्ध्याऽनर्घ्याः परिच्छदा येषु तेषु गृहेषु तथा नानाविधेषूपवनेषु च अमलान्यंभांसि येषां तेषु सरस्सु च । कथंभूतेषु । सौगंधिकानां कह्लाराणां च कान-

---

आज्ञेनें द्वारपालानें त्या सौभरिऋषीला सर्वसमृद्धियुक्त अशा कन्यांच्या अंतःपुरामध्यें पोचविलें असतां तेथें असणाऱ्या पन्नासहि राजकन्यांनीं तो एकच वर वरिला ॥ ४३ ॥ त्यावेळीं त्या वराच्यानिमित्त बहीणपणाचा स्नेह टाकून, त्याचेठिकाणीं ज्यांचें चित्त आसक्त झालें आहे अशा त्या पन्नासहि कन्यांचा हा वर मलाच योग्य आहे तुह्मांला नाहीं, असा परस्पर मोठा कलह झाला ॥ ४४ ॥ आतां त्या सौभरीचा गृहस्थाश्रम वर्णन करितो कीं,– त्या ऋग्वेदी सौभरि ऋषीनें, बहुत मोलाच्या शय्या, आसनें, वस्त्रें, भूषणें सुगंधिपदार्थांच्या उट्या, भक्षणीय उत्कृष्ट पदार्थ, सुगंधि पुष्पांच्या माळा इत्यादिकांनीं अलंकृत होऊन, त्या स्त्रियांसहवर्तमान, ज्याचा अंत नाहीं अशा तपाच्या समृद्धीनें अमोल अशीं भांडींकुंडींवगैरे साहित्यें ज्यांमध्यें आहेत, उत्तम अलंकार धारण केलेल्या स्त्रिया व पुरुष ज्यांमध्यें आहेत, आणि मधुर गायन करणारे

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पक्षी, भ्रमर व स्तुतिपाठक ज्यांमध्यें आहेत अशा गृहांचेठिकाणीं, व नानाप्रकारच्या उपवनांचेठिकणीं आणि सुगंधयुक्त कमलांचे समुदाय ज्यांमध्यें आहेत अशा स्वच्छ उदकाच्या सरोवरांचेठिकाणीं निरंतर क्रीडा केली ॥ ४५ ॥ ४६ ॥ ज्याचें गृहस्थाश्रमसंबंधि सुख अवलोकन करून सप्तद्वीपवती पृथिवीचा अधिपति व सार्वभौम संपत्तीनें युक्त अशा त्या मांधाता राजानेंहि विस्मययुक्त होऊन गर्वाचा त्याग केला, ह्मणजे या ऋषीच्या ऐश्वर्यापुढें माझें ऐश्वर्य कांहींच नाहीं असें मानिलें ॥ ४७ ॥ याप्रमाणें गृहांचेठिकाणीं आसक्त झालेला तो सौभरि, विषयांकडे धांवणाऱ्या श्रोत्रादिक इंद्रियांनीं शब्दादिक विषयांचें सेवन करित असतांहि, जसा अग्नि तुपाच्या बिंदूनीं तृप्त होत नाहीं त्याप्रमाणें तृप्त झाला नाहीं ॥ ४८ ॥ तो ऋग्वेद्यांचा आचार्य सौभरि, एकेवेळीं बसला असतां, त्यानें, आपल्या मनापासूनच मत्स्यमैथुनाच्या दर्शनानें विवाहादिद्वारा उत्पन्न झालेली आपल्या तपाची हानि पाहिली ॥ ४९ ॥ आणि आपलेचठिकाणीं ह्मणाला कीं,– काय सांगावें ! हे लोक हो, तपोनिष्ठ व उत्तमप्रकारचीं व्रतें आचरण

नानि स्तोमा येषु ॥ ४५ ॥ कथंभूतेषु गृहादिषु । स्वलंकृताः स्त्रियः पुरुषाश्च येषु अनुगायंतो द्विजाश्च पक्षिणो भृंगाश्च बंदिनश्च येषु । कथंभूतः । महार्हशय्यादिभिरुपलक्षितः सन् ॥ ४६ ॥ स्तंभं गर्वम् ॥ ४७ ॥ आज्यस्तोकैर्घृतबिंदुभिः ॥ ४८ ॥ इदानीं तस्यानुतापपूर्वकं वानप्रस्थाश्रममाह । स कदाचिदिति सप्तभिः । आत्मनो मनसो हेतोरात्मनोऽपह्नवं तपो-

महार्हशय्यासनवस्त्रभूषणस्नानानुलेपाभ्यवहारमाल्यकैः ॥ स्वलंकृतस्त्रीपुरुषेषु नित्यदा रेमेऽनुगायद्द्विजभृंगबंदिषु ॥ ४६ ॥ यद्गार्हस्थ्यं तु संवीक्ष्य सप्तद्वीपवतीपतिः ॥ विस्मितः स्तंभमजहात्सार्वभौमश्रियान्वितः ॥ ४७ ॥ एवं गृहेष्वभिरतो विषयान्विविधैः सुखैः ॥ सेवमानो न चातुष्यदाज्यस्तोकैरिवानलः ॥ ४८ ॥ स कदाचिदुपासीन आत्मापह्नवमात्मनः ॥ ददर्श बह्वृचाचार्यो मीनसंगसमुत्थितम् ॥ ४९ ॥ अहो इमं पश्यत मे विनाशं तपस्विनः सच्चरितव्रतस्य ॥ अंतर्जले वारिचरप्रसंगात्प्रच्यावितं ब्रह्म चिरं धृतं यत् ॥ ५० ॥ संगं त्यजेत मिथुनव्रतिनां मुमुक्षुः सर्वात्मना न विसृजेद्बहिरिंद्रियाणि ॥ एकश्चरन्रहसि चित्तमनंत ईशे युंजीत तद्व्रतिषु साधुषु चेत्प्रसंगः ॥ ५१ ॥ एकस्तपस्व्यहमथांभसि मत्स्यसंगात्पंचाशदासमुत पंचसहस्रसर्गः ॥ नांतं व्रजाम्युभयकृत्यमनोरथानां मायागुणैर्हृतमतिर्विषयेऽर्थभावः ॥ ५२ ॥

हानिं ददर्श ॥ ४९ ॥ संश्चासौ चरितव्रतश्च योऽहं तस्य ब्रह्म तपः ॥ ५० ॥ मिथुनव्रतिनां दांपत्यधर्मवताम् । चेद्यदि प्रसंगस्तर्हि । तद्व्रतिषु ईश्वरार्थधर्मपरेष्वेव कार्य इति शेषः ॥ ५१ ॥ संगाज्जातं दोषं प्रपंचयति । एक इति । पंचाशता भार्याभिः संबंधात्पंचाशदासमभूवमित्यर्थः । ततश्च सुतैः पंचसहस्रसर्ग आसम् । प्रत्येकं तासु पुत्रशतरूपेणोत्पत्तेः ।

करणाऱ्या माझा केवढा हा नाश झाला पाहा ! पाण्यामध्यें मत्स्याचें मैथुन दृष्टी पडल्यानें मला विवाहादि प्रपंच प्राप्त होऊन बहुत काल अभ्यासानें मी ध्यानांत आणलेलें जें ब्रह्मस्वरूप होतें तें सर्व माझें विसरून गेलें ॥ ५० ॥ यास्तव मुमुक्षु पुरुषानें, सर्वप्रकारांनीं मनाचा निश्चय करून, मैथुनधर्म आचरण करणाऱ्या दंपत्यांचा सहवास सोडून द्यावा, शब्दादि विषयांचेठिकाणीं आपलीं इंद्रियें प्रवृत्त करूं नयेत, एकस्थानें संचार करून एकांतस्थलीं राहावें, अनंत भगवंताचेठिकाणीं आपलें चित्त लावावें आणि जर संगति करणें झालीच तर ती भगवंताची उपासना करणाऱ्या साधूंच्याचठिकाणीं करावी ॥ ५१ ॥ विषयसंगतीनें दोष असा होतो कीं,– मी पूर्वीं एकटाच तप करित होतों, नंतर उदकामध्यें मत्स्यमैथुन पाहण्याच्या प्रसंगानें पन्नास स्त्रिया वरिल्यामुळें त्यांची काळजी करणारा मी पन्नास स्वरूपांचा झालों. नंतर त्या प्रत्येक स्त्रीला शंभर शंभर पुत्र झाल्यामुळें पुत्ररूपानें पांचहजार स्वरूपांचा झालों. ~~आतां पुढें त्यांचीं संस्कारादिक कर्में करणारा मी या लोकीं व परलोकीं सुख देणाऱ्या कर्मांच्या मनोरथांचा~~ ॥ १६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अंत पावत नाहीं. कारण, मायेच्या गुणांनीं माझ्या बुद्धीवें आकर्षण केल्यामुळें मी विषयभोगावेचठिकाणीं पुरुषार्थबुद्धि मानणारा झालों ॥ ५२ ॥ याप्रमाणें बहुत कालपर्यंत घरामध्यें राहणाऱ्या त्या सौभरिऋषीनें, पुढें विरक्त होऊन काम्यकर्मांचा त्याग करून वनामध्यें प्रवेश केला; त्यावेळीं त्याच्या पतिव्रता स्त्रियांनींहि त्याच्या मागून वनांत गमन केलें ॥ ५३ ॥ तेथें आत्मविचार करणाऱ्या त्या सौभरीनें, शरीराला कृश करणारें तीव्र तप आचरण करून, आपल्या आहवनीयादिक अग्नींसहवर्तमान जीवात्म्याचा परमात्म्याचे ठिकाणीं लय केला, ह्मणजे तो मुक्त झाला ॥ ५४ ॥ हे महाराज परीक्षिते, त्या सौभरीच्या स्त्रियाहि आपल्या पतीची मोक्षप्राप्तिरूप गति पाहून त्याच्याच तपादिकांच्या सामर्थ्यानें, जशा शांत झालेल्या अग्नीमध्यें त्याच्या ज्वाळा लय पावतात त्याप्रमाणें त्या पतीबरोबर सहगमन करून मुक्त झाल्या ॥ ५५ ॥ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक

उभयकृत्यान्यैहिकपारत्रिकाणि कर्माणि तद्विषयाणां मनोरथानाम् । अर्थभावः पुरुषार्थबुद्धिमान् ॥ ५२ ॥ न्यासोऽत्र संगत्याग एव । वानप्रस्थधर्म इत्यर्थः ॥ ५३ ॥ ५४ ॥ आध्यात्मिकीं गतिं ब्रह्मणि लयम् ॥ ५५ ॥ इति नवमस्कंधे टीकायां षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥ ॥ मांधातुरन्वयः प्रोक्तः सप्तमे यत्र गीयते ॥ पुरुकुत्सस्य चाख्यानं हरिश्चंद्रस्य चोत्तमम् ॥ १ ॥ पुत्रप्रवरः पुत्रश्रेष्ठः । स पितामहेन युवनाश्वेन प्रवृतः पुत्रत्वेन स्वीकृतः अतएव तस्य मांधातृप्रवर्ग्यत्वम् । तत्सुतोंऽबरीषस्य सुतः । इमे यौवनाश्वांबरीषहारीता मांधातृ-

एवं वसन्गृहे कालं विरक्तो न्यासमास्थितः ॥ वनं जगामानुययुस्तत्पत्न्यः पतिदेवताः ॥ ५३ ॥ तत्र तप्त्वा तपस्तीक्ष्णमात्मकर्षणमात्मवान् ॥ सहैवाग्निभिरात्मानं युयोज परमात्मनि ॥ ५४ ॥ ताः स्वपत्युर्महाराज निरीक्ष्याध्यात्मिकीं गतिम् ॥ अन्वीयुस्तत्प्रभावेन अग्निं शांतमिवार्चिषः ॥ ५५ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे नवमस्कंधे सौभर्याख्याने षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ मांधातुः पुत्रप्रवरोऽयोंबरीषः प्रकीर्तितः ॥ पितामहेन प्रवृतो यौवनाश्वश्च तत्सुतः ॥ हारीतस्तस्य पुत्रोऽभून्मांधातृप्रवरा इमे ॥ १ ॥ नर्मदा भ्रातृभिर्दत्ता पुरुकुत्साय योरगैः ॥ तया रसातलं नीतो भुजगेंद्रप्रयुक्तया ॥ २ ॥

गोत्रस्य प्रवरा अवांतरविशेषप्रवर्तकाः । यद्वा यौवनाश्वविशेषणम् । पितामहेन मांधात्रा सह आर्षेयवरणे प्रवृतः मांधाता प्रवरो येषां ते इमे अंबरीषयौवनाश्वहारीताः । यथाऽऽहाश्वलायनः । हरितकुत्सपिंगदर्भभैमगवानामांगिसांबरीषयौवनाश्वेति ॥ मांधातारं हैके ब्रुवते । अतीत्यांगिरसं मांधात्रंबरीषयौवनाश्वेतीति ॥ १ ॥ पुरुकुत्सस्य वंशं कथयिष्यन्नादौ तावत्तस्य विवाहं प्रभावं चाह । उरगैर्भ्रातृभिर्या दत्ता नर्मदा तया ॥ २ ॥

महापुराणांतील नवमस्कंधामध्यें सौभरिचरित्रकथनरूप हा सहावा अध्याय समाप्त झाला ॥ ६ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या सातव्या अध्यायामध्यें, ज्यामध्यें पुरुकुत्साचें आणि हरिश्चंद्राचें उत्तम आख्यान वर्णन केलेलें आहे असा मांधात्या राजाचा वंश सांगितला आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला— हे राजा, मांधात्याच्या पुरुकुत्सादिक तीन पुत्रांमध्यें श्रेष्ठ जो अंबरीष पुत्र सांगितला, त्याला त्याच्या आजानें (युवनाश्वानें) पुत्रत्वानें स्वीकारिला होता. त्याला यौवनाश्वनांवाचा पुत्र झाला, त्याला हारीत पुत्र झाला. अंबरीष, यौवनाश्व आणि हारीत असे हे तिघेजण मांधात्याच्या प्रवराचे प्रवर्तक झाले ॥ १ ॥ आतां पुरुकुत्साचा वंश सांगण्याकरितां प्रथम त्याचा विवाह आणि पराक्रम सांगतो— नागरूपी बंधूंनीं जी आपली नर्मदानामक बहीण पुरुकुत्सराजाला दिली होती तिनें नागराजाच्या आज्ञेनें, नागांच्या गंधर्वरूपी शत्रूंना मारण्यासाठीं त्या पुरुकुत्साला रसातळांत नेलें होतें. तेव्हां, तेथें विष्णुशक्ति धारण करणाऱ्या त्या पुरुकुत्सानें वध करण्यास योग्य अशा पुष्कळ गंधर्वांचा वध केला असतां प्रसन्न

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

झालेल्या नागराजापासून त्या पुरुकुत्साला ' हें नर्मदेनें पुरुकुत्साला रसातळीं नेण्याचेंवगैरे आख्यान स्मरण करणाऱ्या पुरुषांस सर्पांपासून भय प्राप्त होणार नाहीं असा ' वर प्राप्त झाला ॥ २ ॥ ३ ॥ त्या पुरुकुत्साचा पुत्र त्रसद्दस्यु झाला, त्याला अनरण्यनांवाचा पुत्र झाला, त्याचा पुत्र हर्यश्व, त्यापासून अरुण, त्याचा निबंधन झाला ॥ ४ ॥ त्याचा पुत्र सत्यव्रत, तोच त्रिशंकु या नांवानें प्रसिद्ध असून त्यानें ब्राह्मणाच्या कन्येचा विवाह होत असतां तेथून तिचा अपहार केला ह्मणून क्रुद्ध झालेल्या पित्याच्या शापानें तो चांडालत्व पावला असतांहि पुन्हा विश्वामित्राच्या तपःसामर्थ्यानें तो देहासहवर्तमान स्वर्गास निघून गेला. नंतर तेथें असणाऱ्या देवांनीं त्याला खालीं डोकें व वर-

---

वध्यान्वधार्हान् । स च पुरुकुत्सो नागाल्लब्धवरोऽभूत् । वरमाह । इदं नर्मदया रसातलानयनादिकं स्मरतां सर्पादभयमिति ॥ ३ ॥ देहकृत्पिता । त्रसद्दस्योः सुतोऽनरण्य इत्यर्थ ॥ ४ ॥ त्रयः शंकव इव दुःखहेतवो दोषा यस्यासौ त्रिशंकुः । तदुक्तं हरिवंशे । पितुश्चापरितोषेण गुरोर्दोग्ध्रीवधेन च ॥ अप्रोक्षितोपयोगाच्च त्रिविधस्ते व्यतिक्रम इति । परिणीयमानविप्रकन्याऽपहरणात्क्रुद्धस्य गुरोः पितुः शापात् । कौशिकस्य विश्वामित्रस्य तेजसा प्रभावेन ॥ ५ ॥ तेनैव कौशिकेन ॥ ६ ॥ पक्षिणोराडीबकयोः । विश्वामित्रो राजसू-

गंधर्वानवधीत्तत्र वध्यान्वै विष्णुशक्तिधृक् ॥ नागाल्लब्धवरः सर्पादभयं स्मरतामिदम् ॥ ३ ॥ त्रसद्दस्युः पौरुकुत्सो योऽनरण्यस्य देहकृत् ॥ हर्यश्वस्तत्सुतस्तस्मादरुणोऽथ निबंधनः ॥ ४ ॥ तस्य सत्यव्रतः पुत्रस्त्रिशंकुरिति विश्रुतः ॥ प्राप्तश्चांडालतां शापाद्गुरोः कौशिकतेजसा ॥ ५ ॥ सशरीरो गतः स्वर्गमद्यापि दिवि दृश्यते ॥ पातितोऽवाग्शिरा देवैस्तेनैव स्तंभितो बलात् ॥ ६ ॥ त्रैशंकवो हरिश्चंद्रो विश्वामित्रवसिष्ठयोः ॥ यन्निमित्तमभूद्युद्धं पक्षिणोर्बहुवार्षिकम् ॥ ७ ॥ सोऽनपत्यो विषण्णात्मा नारदस्योपदेशतः ॥ वरुणं शरणं यातः पुत्रो मे जायतां प्रभो ॥ ८ ॥ यदि वीरो महाराज तेनैव त्वां यजे इति ॥ तथेति वरुणेनास्य पुत्रो जातस्तु रोहितः ॥ ९ ॥

यदक्षिणाच्छलेन हरिश्चंद्रसर्वस्वमपहृत्य यातयामास तच्छ्रुत्वा कुपितो वसिष्ठोऽपि विश्वामित्रं त्वमाडी भवेति शशाप सोऽपि त्वं बको भवेति वसिष्ठं शशाप तयोश्च युद्धमभूदिति प्रसिद्धम् ॥ ७ ॥ हरिश्चंद्रो ह वैधस ऐक्ष्वाको राजा पुत्र आसेत्यादिश्रुतिप्रसिद्धं हरिश्चंद्रस्य चरितमाह । सोऽनपत्य इत्यादि यावत्समाप्ति । कथं शरणं यातस्तदाह । पुत्रो मे जायताम् ॥ ८ ॥ यदि वीरः पुत्रो मे जायेत तर्हि तेनैव पुरुषपशुना त्वां यजे यजामीति भाषया तथेत्युक्तवता वरुणेन निमित्तेनास्य रोहितो नाम पुत्रो जातः ॥ ९ ॥

पाय करून ढकलून दिला असतां पुन्हां विश्वामित्रानें आपल्या तपोबलानें त्याचें तेथेंच स्तंभन केलें. तो अद्यापि आकाशांत दृष्टिगोचर होत आहे ॥ ५ ॥ ६ ॥ त्या त्रिशंकूचा पुत्र हरिश्चंद्र झाला. त्या हरिश्चंद्रानिमित्त परस्पर शापानें पक्षिरूप झालेल्या विश्वामित्रवसिष्ठांचें बहुत वर्षेंपर्यंत युद्ध झालें ॥ ७ ॥ तो हरिश्चंद्र राजा अपत्यरहित असल्यामुळें खिन्नचित्त होऊन नारदाच्या उपदेशानें वरुणाला शरण गेला कीं, हे प्रभो, मला पुत्र जसा होईल तसा अनुग्रह कर ॥ ८ ॥ हे महाराजा वरुणा, जर मला वीर

---

१ त्याला तीन शंकु (दोष) घडले होते. ते असे कीं— पित्याचा असंतोष, गुरूच्या गाईचा वध आणि प्रोक्षण केल्यावांचून असलेल्या पदार्थांचें भक्षण. २ पूर्वी विश्वामित्रानें राजसूययज्ञाच्या दक्षिणामिषानें हरिश्चंद्राचें सर्वस्व हरण करून त्याला दुःख दिलें तें ऐकून रागावलेल्या वसिष्ठानें विश्वामित्राला, तूं आडी नांवाचा पक्षी हो, असा शाप दिला. त्यानेंहि वसिष्ठाला तूं बक हो असा शाप दिला. नंतर त्या उभयतां ऋषींचें पक्षिरूपानें बहुत वर्षें युद्ध झालें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुत्र झाला तर त्याच पुत्ररूपी पुरुषपशूच्या योगानें मी तुझें यजन करीन. असा त्यानें नवस केला, तेव्हां वरुणानें 'बरें आहे' असें ह्मटल्यानंतर त्या हरिश्चंद्राला रोहित या नांवाचा पुत्र झाला ॥ ९ ॥ तेव्हां वरुण राजाजवळ येऊन त्यास ह्मणाला कीं, हे राजा, तुला पुत्र झाला आहे यास्तव त्याच्या योगानें तूं माझें यजन कर. तेव्हां हरिश्चंद्र ह्मणाला कीं, जेव्हां ह्या पशुरूप पुत्राला दहा दिवस होऊन जातील तेव्हां हा पवित्र होईल ॥ १० ॥ पुढें दहा दिवस गेल्यावर पुन्हा तो वरुण येऊन 'यजन कर' असें ह्मणाला. तेव्हां तो हरिश्चंद्र ह्मणाला– जेव्हां पुरुषपशूला दंत उत्पन्न होतील तेव्हां तो पवित्र होईल ॥ ११ ॥ नंतर त्या पुत्रास दंत प्राप्त झाले असतां पुन्हां तो वरुण येऊन, 'दंत उत्पन्न झाले, आतां यजन कर' असें ह्मणाला. नंतर हरिश्चंद्र, 'जेव्हां या पुरुषपशूचे प्रथम झालेले दांत पडतील तेव्हां हा पवित्र होईल' असें ह्मणाला ॥ १२ ॥ दांत पडले असतां पुन्हा वरुण येऊन 'पुरुषपशूचे दांत पडले, आतां माझें यजन कर' असें ह्मणाला. तेव्हां हरिश्चंद्र, जेव्हां पशूला पुन्हां दांत येतील तेव्हां तो पवित्र होईल असें ह्मणाला

जाते पुत्रे स वरुणो जातः सुतो मामनेन यजस्वेत्यब्रवीत् । यदा पशुर्निर्दशो निर्गतदशदिवसः स्यादित्यत्र स राजाऽब्रवीदित्यनुषंगः ॥ १० ॥ ११ ॥ १२ ॥ १३ ॥ राजन् हे वरुण राजन्यः पशुर्यदा सान्नाहिकः कवचसंबंधार्हः संग्रामसमर्थः अथ तदा शुचिः ॥ १४ ॥ इत्येवं तं तं कालं वंचयता राज्ञोक्तः प्रार्थितो देवो वरुणस्तं तं कालं प्रैत्यक्षतेत्यर्थः

जातः सुतो ह्यनेनांग मां यजस्वेति सोऽब्रवीत् ॥ यदा पशुर्निर्दशः स्यादथ मेध्यो भवेदिति ॥ १० ॥ निर्दशे च स आगत्य यजस्वेत्याह सोऽब्रवीत् ॥ दंताः पशोर्यज्जायेरन्नथ मेध्यो भवेदिति ॥ ११ ॥ जाता दंता यजस्वेति स प्रत्याहाथ सोऽब्रवीत् ॥ यदा पतंत्यस्य दंता अथ मेध्यो भवेदिति ॥ १२ ॥ पशोर्निपतिता दंता यजस्वेत्याह सोऽब्रवीत् ॥ यदा पशोः पुनर्दंता जायंतेऽथ पशुः शुचिः ॥ १३ ॥ पुनर्जाता यजस्वेति स प्रत्याहाथ सोऽब्रवीत् ॥ सान्नाहिको यदा राजन्राजन्योऽथ पशुः शुचिः ॥ १४ ॥ इति पुत्रानुरागेण स्नेहयंत्रितचेतसा ॥ कालं वंचयता तं तमुक्तो देवस्तमैक्षत ॥ १५ ॥ रोहितस्तदभिज्ञाय पितुः कर्म चिकीर्षितम् ॥ प्राणप्रेप्सुर्धनुःपाणिररण्यं प्रत्यपद्यत ॥ १६ ॥ पितरं वरुणग्रस्तं श्रुत्वा जातमहोदरम् ॥ रोहितो ग्राममेयाय तमिंद्रः प्रत्यषेधत ॥ १७ ॥ भूमेः पर्यटनं पुण्यं तीर्थक्षेत्रनिषेवणैः ॥ रोहितायादिशच्छक्रः सोऽप्यरण्येऽवसत्समाम् ॥ १८ ॥

॥ १५ ॥ चिकीर्षितमात्मना पशुना वरुणयजनम् ॥ १६ ॥ ततश्च कुपितेन वरुणेन ग्रस्तमत एव जातं महदुदरं यस्य तं पितरं श्रुत्वा ॥ १७ ॥ समां वर्षम् ॥ १८ ॥

॥ १३ ॥ पुन्हा दांत आले असतां तो वरुण येऊन 'पुन्हा दांत आले, आतां माझें यजन कर' असें राजाला ह्मणाला. तेव्हां पुन्हा तो हरिश्चंद्र, हे वरुणा, राजरूप पुरुषपशु जेव्हां कवचादिक धारण करून युद्ध करण्यास योग्य होईल तेव्हां तो यागाविषयीं योग्य होईल असें ह्मणाला ॥ १४ ॥ याप्रमाणें पुत्रावर स्नेह असलेल्या व स्नेहानें स्वाधीनचित्त करून घेतलेल्या त्या राजानें, तो तो काळ चुकविण्याकरितां वरुणदेवाची प्रार्थना केली व त्यानें त्या त्या काळाची वाट पाहिली ॥ १५ ॥ इकडे रोहितानें पित्याचें तें कर्तव्य (आपणास पशु कल्पून वरुणाचें यजन करणें) जाणून आपले प्राण वांचविण्याच्या इच्छेनें हातांत धनुष्य घेऊन तो अरण्यांत निघून गेला ॥ १६ ॥ तेव्हां यज्ञाविषयीं निराश झालेल्या वरुणानें हरिश्चंद्राला ग्रासिलें ह्मणजे त्याच्या पोटांत जळोदरनामक रोग उत्पन्न केला. हें वर्तमान त्या रोहितपुत्रानें अरण्यांत ऐकून तो आपल्या गांवांत येऊं लागला तेव्हां त्याचा इंद्रानें निषेध केला कीं,– ॥ १७ ॥ हे वत्सा रोहिता, तीर्थें व क्षेत्रें यांच्या सेवनानें भूमीवर पर्यटन करणें हेंच पुण्यकारक आहे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

घरीं जाऊन पशुरूपानें मरणें हें चांगलें नव्हे. असें इंद्रानें त्याला सांगितलें असतां तो आणखी एक वर्षपर्यंत अरण्यांतच राहिला ॥ १८ ॥ याप्रमाणें दुसऱ्या, तिसऱ्या, चवथ्या व पांचव्या वर्षीं तो रोहित घरीं येऊं लागला असतां, इंद्र वृद्धब्राह्मणाच्या वेषानें त्याच्याजवळ येऊन त्याला तीर्थाटनवगैरे करण्यास सांगत असे ॥ १९ ॥ नंतर पित्याच्या दयेनें परवश झालेल्या त्या रोहितानें, सहावें वर्ष पुरें होईपर्यंत अरण्यांत फिरून पुढें घरीं येण्याचा निश्चय केला आणि आपलें मरणभय चुकविण्याकरितां वरुणाच्या यज्ञासाठीं भार्गववंशांत उत्पन्न झालेल्या अजीगर्ताच्या तीन पुत्रांपैकीं मधल्या शुनःशेपनामक पुत्राला विकत घेऊन घरीं आला ॥ २० ॥ आणि त्यानें पित्याला आपल्या मोबदला यज्ञाकरितां तो शुनःशेपनामक पुरुषपशु निवेदन करून वंदन केलें. नंतर महायशस्वी अशा त्या हरिश्चंद्रराजानें पुरुषमेध यज्ञेंकरून वरुणादिक देवांचें यजन केलें. नंतर वरुणाच्या कृपेनें उदररोगापासून मुक्त झालेला तो हरिश्चंद्र, ज्याची कथा सत्पुरुषांमध्यें वर्णन केली आहे असा झाला. त्या पुरुषमेध यज्ञामध्यें विश्वामित्र-

---

द्वितीये च वर्षे वृत्रहा अभ्येत्याभ्येत्य तथैव तं प्रतिषेधन्किंचित्किंचिदाह ॥ १९ ॥ २० ॥ २१ ॥ वरुणेन मुक्तमुदरं यस्य । महत्सु कथा यस्य सः । आत्मवान् जमदग्निरध्वर्युरभूत् ॥ २२ ॥ अयास्यो मुनिः सामग उद्गाता अभूदित्यर्थः ॥२३॥ उपरिष्टाद्विश्वामित्रसुताख्यानप्रसंगेन ॥२४॥ अविहतां गतिं ज्ञानम् । तामेव गतिमाह । सार्धाभ्याम् । मनः पृथि-

एवं द्वितीये तृतीये चतुर्थे पंचमे तथा ॥ अभ्येत्याभ्येत्य स्थविरो विप्रो भूत्वा ह वृत्रहा ॥ १९ ॥ षष्ठं संवत्सरं तत्र चरित्वा रोहितः पुरीम् ॥ उपव्रजन्नजीगर्तादक्रीणान्मध्यमं सुतम् ॥ २० ॥ शुनःशेपं पशुं पित्रे प्रदाय समवंदत ॥ ततः पुरुषमेधेन हरिश्चंद्रो महायशाः ॥ २१ ॥ मुक्तोदरोऽयजद्देवान्वरुणादीन्महत्कथः ॥ विश्वामित्रोऽभवत्तस्मिन्होता चाध्वर्युरात्मवान् ॥ २२ ॥ जमदग्निरभूद्ब्रह्मा वसिष्ठोऽयास्यसामगः ॥ तस्मै तुष्टो ददाविंद्रः शातकौंभमयं रथम् ॥ २३ ॥ शुनःशेपस्य माहात्म्यमुपरिष्टात्प्रचक्ष्यते ॥ सत्यसारां धृतिं दृष्ट्वा सभार्यस्य च भूपतेः ॥ २४ ॥ विश्वामित्रो भृशं प्रीतो ददावविहतां गतिम् ॥ मनः पृथिव्यां तामद्भिस्तेजसापोऽनिलेन तत् ॥२५॥ खे वायुं धारयंस्तच्च भूतादौ तं महात्मनि ॥ तस्मिन् ज्ञानकलां ध्यात्वा तयाऽज्ञानं विनिर्दहन् ॥२६॥

व्यां धारयन्ज्ञानकलां ध्यात्वा तयाऽज्ञानं विनिर्दहंस्तां च हित्वा मुक्त्वा मुक्तबंधनस्तस्थावित्यन्वयः । मनोमूलो हि संसारः मनश्चान्नमयम् । अन्नमयं हि सौम्य मन इति श्रुतेः । अतोऽन्नशब्दवाच्यायां पृथिव्यां मनो धारयन्नेकीकुर्वंस्तां पृथिवीमद्भिरेकीकुर्वन्नपस्तेजसा तत्तेजोऽनिलेन ॥ २५ ॥ तं च खे आकाशे तच्च भूतादावहंकारे तंच भूतादिमहंकारं

ऋषि होता नांवाचा ऋत्विज झाला होता, आत्मतत्त्ववेत्ता जमदग्नि ऋषि अध्वर्यु झाला होता, वसिष्ठऋषि ब्रह्मा होता आणि अयास्यनामक ऋषि उद्गाता होता. याप्रमाणें पुरुषमेध यज्ञानें संतुष्ट झालेल्या इंद्रानें हरिश्चंद्राला एक सुवर्णमय रथ अर्पण केला ॥ २१ ॥ २२ ॥ २३ ॥ हे राजा, शुनःशेपाचा वध देवादिकांना कसा संमत झाला असें म्हणशील तर शुनःशेपाला त्या यज्ञामध्यें मारिलें नाहीं तर जिवंतच सोडून दिलें आहे. तें शुनःशेपाचें माहात्म्य पुढें विश्वामित्राच्या पुत्रांच्या आख्यानप्रसंगांत मी तुला सांगेन. असो पुढें भार्येसहित त्या हरिश्चंद्राचें सत्ययुक्त धैर्य पाहून ॥ २४ ॥ अत्यंत संतुष्ट झालेल्या विश्वामित्रानें त्या राजाला ज्ञानाचा उपदेश केला. त्या ज्ञानानें हरिश्चंद्राचा मोक्षप्रकार सांगतात–सर्व संसार मनोमूलक असून मन हें अन्नमय आहे म्हणून राजानें अन्नशब्दवाच्य पृथिवीच्याठिकाणीं आपल्या मनाचें ऐक्य करून त्या पृथिवीचें उदकाशीं ऐक्य केलें. त्या उदकाचें तेजाशीं ऐक्य करून त्या तेजाचें वायूशीं ऐक्य केलें. त्या वायूचा आकाशांत लय करून, आकाशाचा अहंकारांत व अहंकाराचा महत्तत्त्वांत लय केला. त्या महत्तत्वाचेठिकाणीं ज्ञानकलेचें चिंतन करून त्या ज्ञानकलेनें आत्मस्वरूपाला आवरण करणाऱ्या अज्ञानाचा निरास केला ॥ २५ ॥ २६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नंतर स्वरूपसुखाच्या अनुभवानें त्या ज्ञानकलेचाहि त्याग करून तो हरिश्चंद्र राजा संसारबंधापासून मुक्त होऊन, दाखवून देण्यास व तर्क करण्यास अशक्य अशा आपल्या सच्चिदानंदस्वरूपानें राहिला ॥ २७ ॥ यप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील नवमस्कंधामध्यें हरिश्चंद्रोपाख्याननामक हा सातवा अध्याय समाप्त झाला॥ ७ ॥ ॥ आतां ह्या आठव्या अध्यायामध्यें, ज्याचे पुत्र कपिलमहामुनींची निंदा केल्यामुळें दग्ध झाले तो सगरराजा ज्या वंशांत उत्पन्न झाला तो रोहिताचा वंश सांगितला आहे ॥ १॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, रोहिताचा पुत्र हरित, त्यापासून चंप झाला, त्यानें चंपानगरी उत्पन्न केली· त्या चंपापासून सुदेव, त्याचा पुत्र विजय झाला ॥ १ ॥ त्याचा पुत्र भरुक, त्यापासून वृक, त्याचा बाहुक झाला· त्या राजाची भूमि शत्रूंनीं हिरावून घेतली असतां तो आपल्या स्त्रीसहवर्तमान वनांत निघून गेला ॥ २ ॥ तो तेथेंच

महात्मनि महत्तत्त्वे तस्मिन्विषयाकारं व्यावर्त्य ज्ञानकलां ज्ञानांशमात्मत्वेन ध्यात्वा तया ध्यानवृत्तिरूपयाऽऽत्मावरकमज्ञानं विनिर्दहन् ॥ २६ ॥ निर्वाणसुखसंविदा तां च हित्वा मुक्तबंधः सन्निर्देश्येनाप्रतर्क्येण स्वेन भावेन स्वस्वरूपेण तस्थौ ॥ २७ ॥ इति श्रीमद्भागवते नवमस्कंधे टीकायां सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥ ॥ अष्टमे रोहितस्योक्तो वंशो यत्राभव-

हित्वा तां स्वेन भावेन निर्वाणसुखसंविदा ॥ अनिर्देश्याप्रतर्क्येण तस्थौ विध्वस्तबंधनः ॥ २७ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे नवमस्कंधे हरिश्चंद्रोपाख्यानं नाम सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ हरितो रोहितसुतश्चंपस्तस्माद्विनिर्मिता ॥ चंपा पुरी सुदेवोऽतो विजयो यस्य चात्मजः ॥ १ ॥ भरुकस्तत्सुतस्तस्माद्वृकस्तस्यापि बाहुकः॥सोऽरिभिर्हृतभू राजा सभार्यो वनमाविशत् ॥ २॥ वृद्धं तं पंचतां प्राप्तं महिष्यनुमरिष्यती ॥और्वेण जानताऽऽत्मानं प्रजावंतं निवारिता ॥ ३ ॥ आज्ञायास्यै सपत्नीभिर्गरो दत्तोंऽधसा सह ॥ सह तेनैव संजातः सगराख्यो महायशाः ॥ ४ ॥ सगरश्चक्रवर्त्यासीत्सागरो यत्सुतैः कृतः ॥ यस्तालजंघान्यवनान् शकान्हैहयबर्बरान् ॥ ५ ॥ नावधीद्गुरुवाक्येन चक्रे विकृतवेषिणः॥ मुंडान् श्मश्रुधरान्कांश्चिन्मुक्तकेशार्धमुंडितान् ॥ ६ ॥ अनंतर्वाससः कांश्चिदबहिर्वाससोऽपरान् ॥ सोऽश्वमेधैरयजत सर्ववेदसुरात्मकम् ॥ ७ ॥

न्नृपः ॥ सागरः कपिलाक्षेपान्निर्दग्धा यस्य सूनवः ॥ १ ॥ चंपस्तस्मादभूत् येन चंपा पुरी निर्मिता । अतश्चंपात्सुदेवः ॥ १ ॥ हृता भूर्यस्य ॥ २ ॥ और्वेण ऋषिणा । आत्मानं देहम् । प्राजावंतं सगर्भम् ॥ ३ ॥ गरो विषम् । तेन गरेण सहैव जातः ॥ ४ ॥ ५ ॥ गुरुवाक्यैनार्ववचनेन । कांश्चिदहत्वैव विकृतवेषिणश्चक्रे । तदेवाह । मुंडानिति । मुक्तकेशानर्धमुंडितांश्च ॥ ६ ॥ ७ ॥

वृद्ध होऊन मरण पावला असतां त्याची स्त्री त्याच्या बरोबर सहगमन करित होती परंतु ती गर्भिणी आहे असें ज्ञानमार्गानें समजणाऱ्या गुरु और्वऋषीनें, तिचें निवारण केलें ॥ ३ ॥ पुढें तिच्या सवतींनीं ती गर्भिणी आहे असें जाणून सापत्नद्वेषानें तिला अन्नाबरोबर विष घातलें· नंतर तो गर्भ, त्या विषासहवर्तमान उत्पन्न झाला ॥ ४ ॥ ह्मणून त्याचें सगर असें नांव पडलें· तो सगर पुढें महायशस्वी सार्वभौम राजा झाला, त्याच्या पुत्रांनीं समुद्र उत्पन्न केला· ज्या सगरानें, आपल्या और्वगुरूच्या आज्ञेनें कितीएक तालजंघनामक राजे, यवन (म्लेंछ) शक, हैहय व बर्बर यांना मारून टाकिलें, कितीएकांचे अवयव तोडून त्यांना विरूप केलें· कांहींएक मुंडित, कांहींएक श्मश्रु धारण करणारे, कितीएक मुक्तकेश व कित्येक अर्धमुंडित केले ॥ ५ ॥ ६ ॥ कित्येकांना नग्न करून प्रावरणवस्त्रानें युक्त आणि कित्येकांकडून लंगोट्या घालवून प्रावरणवस्त्र-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रहित केले त्या सगरराजानें औौर्वऋषीनें सांगितलेल्या प्रकारानें पुष्कळ अश्वमेधांच्या योगेंकरून सर्व वेदस्वरूपी व देवस्वरूपी जो आत्मा ईश्वर हरि त्याचें आराधन केलें. त्याच्या यज्ञामध्यें सोडलेला पशुरूपी अश्व इंद्रानें हरण केला ॥ ७ ॥ ८ ॥ सगर राजाच्या सुमति आणि केशिनी अशा दोन स्त्रिया होत्या. त्यांतील सुमतीचे पुत्र बलानें गर्वित असे साठ हजार होते त्यांनीं पित्याच्या आज्ञेनें घोड्याचा शोध करित असतां सर्व पृथिवी सभोंवार खणिली ॥ ९ ॥ त्यावेळीं त्यांनीं ईशान्य दिशेचेठिकाणीं कपिलमहामुनीच्या समोर घोडा पाहिला (तो तेथें इंद्रानें बांधून ठेविला होता). नंतर हा ऋषीच घोडा आणणारा, पापी चोर असून आतां डोळे झांकून बसला आहे, याला मारा, मारा असें बोलणारे ते साठ हजार, पुत्र हातांनीं आयुधें उचलून त्याला मारण्याकरितां धांवले. तेव्हां कपिल ऋषीनें डोळे उघडिले॥ १० ॥ ११ ॥ तेव्हां इंद्रानें आपल्या मायेनें मोहितचित्त केलेले व कपिलाच्या अपराधानेंच मृतप्राय झालेले ते साठ हजारहि पुत्र, ऋषीची दृष्टि पडतांच आपल्या शरीरांतील अग्नीनेंच एका क्षणामध्यें

औौर्वेणोपदिष्टो योग उपायस्तेन ॥ ८ ॥ तस्य द्वे भार्ये सुमतिः केशिनी च । तत्र सुमत्याः पुत्राणां प्रभावं मृत्युं चाह । सुमत्या इति षड्भिः ॥ ९ ॥ १० ॥ एष वाजिहर इति ब्रुवंतोऽभिययुः । षष्टिसहस्राणि परिच्छेदकतया संति येषाम् । उन्मिमेष लोचनोन्मीलनं चकार ॥ ११ ॥ १२ ॥ केचित्तु कपिलस्य कोपाग्निना दग्धा इति वर्णयंति

औौर्वोपदिष्टयोगेन हरिमात्मानमीश्वरम् ॥ तस्योत्सृष्टं पशुं यज्ञे जहाराश्वं पुरंदरः ॥ ८ ॥ सुमत्यास्तनया दृप्ताः पितुरादेशकारिणः ॥ हयमन्वेषमाणास्ते समंतान्न्यखनन्महीम् ॥ ९ ॥ प्रागुदीच्यां दिशि हयं ददृशुः कपिलांतिके ॥ एष वाजिहरश्चौर आस्ते मीलितलोचनः ॥ १० ॥ हन्यतां हन्यतां पाप इति षष्टिसहस्रिणः ॥ उदायुधा अभिययुरुन्मिमेष तदा मुनिः ॥ ११ ॥ स्वशरीराग्निना तावन्महेंद्रहृतचेतसः ॥ महद्व्यतिक्रमहता भस्मसादभवन्क्षणात् ॥ १२ ॥ न साधुवादो मुनिकोपभर्जिता नृपेंद्रपुत्रा इति सत्त्वधामनि ॥ कथं तमो रोषमयं विभाव्यते जगत्पवित्रात्मनि खे रजो भुवः ॥ १३ ॥ यस्येरिता सांख्यमयी दृढेह नौर्यया मुमुक्षुस्तरते दुरत्ययम् ॥ भवार्णवं मृत्युपथं विपश्चितः परात्मभूतस्य कथं पृथङ्मतिः ॥ १४ ॥ योऽसमंजस इत्युक्तः स केशिन्या नृपात्मजः ॥ तस्य पुत्रोंऽशुमान्नाम पितामहहिते रतः ॥ १५ ॥

तन्निराकरोति । नेति । कुत इत्यत आह । सत्त्वधामनि शुद्धसत्त्वमूर्तौ । जगतः पवित्रः शुद्धिकर आत्मा यस्य तस्मिन्कथं विभाव्यते संभाव्यते । असंभावनायां दृष्टांतः । भुवो रजः खे कथं संभाव्यते इति ॥ १३ ॥ किंच । यस्य येनेरिता प्रवर्तिता तस्य विपश्चितः सर्वज्ञस्य कथं पृथङ्मतिररिमित्रादिभेददृष्टिः ॥ १४ ॥ तदेवं सुमत्याः पुत्रेषु मृतेषु केशिन्याः

जळून भस्मरूप झाले ॥ १२ ॥ कोणी लोक, कपिलमहामुनीच्या कोपाग्नीनें राजपुत्र दग्ध झाले असें ह्मणतात त्याचें निराकरण करितो कीं, समरराजाचे पुत्र कपिलमुनीच्या कोपानें दग्ध झाले असें ह्मणणें चांगलें नव्हे, तर ते आपण केलेल्या अपराधानेंच नष्ट झाले असें ह्मटलें पाहिजे. कारण, ज्याचा देह जगाला पवित्र करणारा आहे अशा शुद्धसत्त्वमूर्ति कपिलमहामुनीच्याठिकाणीं क्रोधरूप तमोगुण, कसा संभवेल? तर जसा भूमिसंबंधी धुरळ्याचा संबंध निर्लेप आकाशाचेठिकाणीं संभवत नाहीं तसा त्याचेठिकाणीं क्रोध मुळींच संभवणार नाहीं ॥ १३ ॥ ज्या कपिलमहामुनीनें या लोकीं, सांख्यशास्त्ररूप दृढ नौका प्रवृत्त करून ठेविली आहे; ती अशी कीं, जिच्या योगानें मुमुक्षु पुरुष, मृत्यूचा मार्गभूत अशा दुस्तरहि भवसमुद्राला तरून जातो त्या सर्वज्ञ परमात्मरूप कपिलमहामुनीला शत्रुमित्रादिक भेदबुद्धि कशी बरें संभवेल ? संभवणारच नाहीं ॥ १४ ॥ असो. सगरराजाची दुसरी केशिनीनामक स्त्री होती, तिला जो पुत्र होता त्याला लोक असमंजस असें ह्मणत असत. त्या असमंजसाचा अंशुमान्नामक पुत्र असून तो सग-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रराजाच्या हिताविषयीं तत्पर होता ॥ १५ ॥ असमंजस ह्मणून जो सांगितला तो पूर्वजन्मामध्यें योगी असून दुष्टसंगतीमुळें योगमार्गापासून भ्रष्ट हाऊन राजजन्मास आला होता. व त्याला पूर्वजन्मांतील वर्तनाची स्मृति राहिली होती, ह्मणून तो या जन्मीं दुष्टसंगति न व्हावी याकरितां लोकामध्यें आपला असमंसजपणा (प्रतिकूळपणा) दाखवित असे, ह्मणजे ज्ञातींना न आवडणारें निंद्यकर्म आचरण करित असे. एकेवेळीं सर्वलोकांनीं आपला त्याग करावा असें मनांत आणून लोकांना भीति घालण्यासाठीं त्यानें सरयू-नदीच्या कांठीं लोकांचे बालक खेळत होते त्यांना नदीमध्यें बुडवून टाकिलें ॥ १६ ॥ १७ ॥ असें करणाऱ्या पुत्राची ममता सगरराजानें सोडून देऊन त्याला नगरांतून

पौत्रेणाश्वः। समानीतः पितृव्योद्धरणप्रयत्नश्च कृत इति दर्शयितुमाह। योऽसमंजस इत्युक्तः केवलमज्ञैर्वस्तुतस्तु समंजस एव। स तु केशिन्याः सुतः क्षेत्रजत्वमिव प्रतीतं वारयति। तस्यैव नृपस्यात्मनो देहाज्जातः ॥ १५ ॥ तस्य कथमाह चतुर्भिः। असमंजसः पुरा पूर्वजन्मनि योगी सन्संगाद्धेतोर्योगाद्विचालितोऽत इदानीं जातिस्मरः सन्संगपरिहाराय जनमुद्वेजयन् लोके गर्हितं ज्ञातीनां च विप्रियं कर्माचरन् क्रीडतो बालान्सरय्वां प्रास्यत्प्राक्षिपदिति द्वयोरन्वयः ॥ १६ ॥ १७ ॥ एवंविधं वृत्तं कर्म यस्य सः ॥ १८ ॥

असमंजस आत्मानं दर्शयन्नसमंजसम् ॥ जातिस्मरः पुरा संगाद्योगी योगाद्विचालितः ॥ १६ ॥ आचरन्गर्हितं लोके ज्ञातीनां कर्म विप्रियम् ॥ सरय्वां क्रीडतो बालान्प्रास्यदुद्वेजयन् जनम् ॥ १७ ॥ एवंवृत्तः परित्यक्तः पित्रा स्नेहमपोह्य वै ॥ योगैश्वर्येण बालांस्तान्दर्शयित्वा ततो ययौ ॥ १८ ॥ अयोध्यावासिनः सर्वे बालकान्पुनरागतान् ॥ दृष्ट्वा विसिस्मिरे राजन्राजा चाप्यन्वतप्यत ॥ १९ ॥ अंशुमांश्चोदितो राज्ञा तुरंगान्वेषणे ययौ ॥ पितृव्यखातानुपथं भस्मांति ददृशे हयम् ॥ २० ॥ तत्रासीनं मुनिं वीक्ष्य कपिलाख्यमधोक्षजम् ॥ अस्तौत्समाहितमनाः प्रांजलिः प्रणतो महान् ॥ २१ ॥ अंशुमानुवाच ॥ न पश्यति त्वां परमात्मनो जनो न बुद्ध्यतेऽद्यापि समाधियुक्तिभिः ॥ कुतोऽपरे तस्य मनःशरीरधीविसर्गसृष्टा वयमप्रकाशाः ॥ २२ ॥

॥ १९ ॥ पितृव्यखातमनु यः पंथास्तं ययौ भस्मांति भस्मसमीपे ॥ २० ॥ २१ ॥ अजानंतोऽवजानंतोऽप्यनुकंप्या वयं त्विति ॥ तुष्टाव षड्भिरीशानमंशुमानेवमाशयः ॥ अजनोऽजो ब्रह्माऽपि त्वामद्यापि न पश्यति न च बुध्यते। कथंभूतम्। आत्मनः स्वस्मात्परं परमेश्वरम्। कैर्हेतुभिः। समाधियुक्तिभिः समाधिनाऽप्यपरोक्षं न पश्यति युक्तिभिः। परोक्षमपि सम्यङ्न बुध्यत इत्यर्थः। अपरेऽर्वाचीनास्तु कुतस्त्वां पश्येयुः। अर्वाचीनत्वे हेतुः। तस्य ब्रह्मणो मनश्च शरीरं च धीश्च सत्त्वतमोरजःकार्याणि ताभिर्ये विविधा देवतिर्यङ्नराणां सर्गास्तेषु सृष्टास्तत्रापि वयमप्रकाशा अज्ञाः कुतः पश्यामेत्यर्थः ॥ २२ ॥

घालवून दिलें. त्यानें जात्येवेळीं आपल्या योगसामर्थ्यानें सरयूमध्यें बुडविलेल्या बालकांस पुन्हा ज्यांचे त्यांस जिवंत दाखवून तो नगरांतून निघून गेला ॥ १८ ॥ हे राजा, त्यावेळीं पुन्हां घरीं आलेल्या बालकांस पाहून त्या अयोध्यानगरांत राहणारे सर्वहि लोक आश्चर्य पावले आणि सगरराजाहि ते बालक आले असें ऐकून, 'अहो! अशा सामर्थ्याचा पुत्र मी व्यर्थ घालविला असा' पश्चात्ताप पावला ॥ १९ ॥ असो. त्या सगरराजानें आज्ञा केलेला असमंजसाचा पुत्र जो अंशुमान् तो घोड्याचा शोध करण्याकरितां निघाला. चुलत्यांनीं भूमी खणिलेल्या मार्गानें जातां जातां त्यानें भस्माच्या समीपभागीं घोडा पाहिला ॥ २० ॥ तेथेंच बसलेल्या भगवदवताररूपी कपिलनामक मुनीला पाहून त्याला नमस्कार करून हात जोडून, विवेकवान् व एकाग्रचित्त असा तो अंशुमान्, त्याची स्तुति करूं लागला ॥ २१ ॥ अंशुमान् ह्मणाला—हे भगवन्, ब्रह्मदेवहि आपणा-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हून श्रेष्ठ अशा तुज परमेश्वराला अर्जूनहि समाधीनें अपरोक्षत्वेंकरून पहात नाहीं आणि अनुमानादिक शास्त्रीय युक्तींनीं परोक्षत्वेंकरूनसुद्धां उत्तमप्रकारें जाणत नाहीं. मग त्याच्या आलीकडचे व त्याचीं जीं मन, शरीर, बुद्धि व सत्त्वादिक गुणांचीं कार्यें त्यांनीं नानाप्रकारच्या उत्पन्न केलेल्या देव तिर्यक् मनुष्यादिक सृष्टीमध्यें उत्पन्न केलेले जे अज्ञानी आम्ही ते तुला जाणण्यास समर्थ कसे होऊं? होणारच नाहीं ॥ २२ ॥ जे देहधारी प्राणी आहेत ते तुझ्या मायेनें मोहितचित्त व त्रिगुणात्मक बुद्धीच्या स्वाधीन होऊन बाह्यविषयांच्याच ज्ञानानें युक्त होत्साते जाग्रत्स्वप्नांतील विषयांना किंवा सुषुप्तींतील अज्ञानाला मात्र पाहतात परंतु आपलेठिकाणीं अंतर्यामिरूपानें असणाऱ्या तुला जाणत नाहींत ॥ २३ ॥ त्या तुझ्या मायेनें मूढ झालेला मी, ब्रह्मादिकांनीं दुर्ज्ञेय अशा तुझ्या स्वरूपाचा विचार कसा करूं ? कारण, तूं शुद्धज्ञानमूर्ति असल्यामुळें ज्ञानास

अपरे तर्हि किं पश्यंति तदाह । ये देहभाजस्ते स्वस्मिन्सम्यक् स्थितमपि त्वां न विदुः किंतु गुणानेव विपश्यंति । अथवा न गुणानपितु तम एव पश्यंति । यतस्त्रिगुणा बुद्धिरेव प्रधानं येषामतो बहिरेव प्रकाशो ज्ञानं येषाम् । बुद्धिपरतंत्रतया जाग्रत्स्वप्नयोर्विषयान्पश्यंति सुषुप्तौ तम एव केवलं न तु निर्गुणं त्वाम् । सर्वत्र हेतुः । यद्यतः यस्य तव मायेति वा मोहितं चेतो येषां ते ॥ २३ ॥ तथाऽप्यहं विचारेण ज्ञास्यामीति चेत्तत्राह । तं त्वामहं विमूढः कथं परिभावयामि विचारयामि । कथंभूतम् । ज्ञानघनं शुद्धज्ञानमूर्तिम् । स्वत एव प्रध्वस्तौ मायागुणनिमित्तौ भेदमोहौ येषां तैर्विभाव्यं विचिंत्यम् । अयं भावः । ज्ञानघनत्वान्न तावज्ज्ञानविषयत्वम् । विचारविषयत्वेऽपि मायागुणैरभिभूतोऽहं न विचा-

ये देहभाजस्त्रिगुणप्रधाना गुणान्विपश्यंत्युत वा तमश्च ॥ यन्मायया मोहितचेतसस्ते विदुः स्वसंस्थं न बहिःप्रकाशाः ॥ २३ ॥ तं त्वामहं ज्ञानघनं स्वभावप्रध्वस्तमायागुणभेदमोहैः ॥ सनंदनाद्यैर्मुनिभिर्विभाव्यं कथं विमूढः परिभावयामि ॥ २४ ॥ प्रशांतमायागुणकर्मलिंगमनामरूपं सदसद्विमुक्तम् ॥ ज्ञानोपदेशाय गृहीतदेहं नमाम हे त्वां पुरुषं पुराणम् ॥ २५ ॥ त्वन्मायारचिते लोके वस्तुबुद्ध्या गृहादिषु ॥ भ्रमंति कामलोभेर्ष्यामोहविभ्रांतचेतसः ॥ २६ ॥

रे समर्थ इति ॥ २४ ॥ हे प्रशांत तस्मात्त्वां पुरुषं पुराणं केवलं नमामेत्यन्वयः । पुराणपुरुषत्वे हेतुः । मायाया गुणाः कर्माणि च विश्वसृष्ट्यादीनि लिंगानि च ब्रह्मादिरूपाणि यस्य तम् । प्रशांतत्वे हेतुः । सदसद्भ्यां कार्यकारणाभ्यां पुण्यपापाभ्यां वा विमुक्तम् । अतोऽनामरूपं तत्तत्कृतनामरूपशून्यं किंतु ज्ञानोपदेशाय गृहीतः प्रकटितो देहः शुद्धसत्त्वमूर्तिर्येन तम् । यद्वा हे प्रशांतमायेति हे अगुणेति च संबोध्य कर्मभिः सृष्ट्यादिकार्यैर्लिंगानि यस्येति योज्यम् । यद्वा प्रशांता मायागुणादयो यस्मिन्नित्येकमेव पदम् ॥ २५ ॥ स्वभाग्यं श्लाघते । त्वन्मायेति द्वाभ्याम् । कामादिभिर्विभ्रांतानि चेतांसि येषां ते इमे सर्वे गृहादिषु भ्रमंति ॥ २६ ॥

विषय नाहींस आणि ज्यांचे मायागुणांपासून झालेले भेद आणि मोह हें स्वानुभवानेंच नाहींसे झाले आहेत अशा सनंदनादिक ऋषींनींच तुझें स्वरूप चिंतन करण्यास योग्य आहे, मग तुझ्या मायागुणांनीं पराभूत झालेला मी तुझें स्वरूप जाणण्यास कसा बरें समर्थ होईन ! होणारच नाहीं ॥ २४ ॥ प्रशस्तव हे अतिशांतस्वरूपा देवा, ज्या तुजपासून मायेचे सत्त्वादिक गुण, विश्वसृष्ट्यादिक कर्में व ब्रह्मादिक स्वरूपें उत्पन्न झालीं आहेत, त्या कार्यकारणरूप स्थूलसूक्ष्मोपाधींनीं रहित, देवमनुष्यादि नामरूपांनीं रहित, आणि ज्ञानोपदेशाकरितां शुद्धसत्त्वमूर्ति अवतार धारण करणाऱ्या तुज पुराणपुरुषाला केवळ आम्ही नमस्कार करितों ॥ २५ ॥ हे प्रभो, हे सर्व लोक, विषयाभिलाष, लोभ ईर्ष्या आणि अविवेक यांनीं मोहितचित्त होत्साते तुझ्या मायेनें रचिलेल्या या लोकामध्यें गृह स्त्री इत्यादिकांचेठिकाणीं हीं सत्य आहेत असें मानून आसक्त होतात ॥ २६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हे सर्वभूतात्मकरूपी भगवंता, आज तुझ्या कृपेनेंच घडून आलेल्या तुझ्या दर्शनानें विषयवासना, कर्मे आणि इंद्रियें यांचा आश्रयभूत असा आमचा मोहरूप दृढ पाश तुटून गेला आहे, ह्मणजे तुझ्या प्रसादानें मी कृतार्थ झालों आहें ॥ २७ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, याप्रमाणें ज्याचा प्रभाव वर्णन केला आहे असा तो सर्वज्ञ कपिल मुनि, त्या अंशुमंतावर बुद्धीनें अनुग्रह करून असें ह्मणाला कीं, ॥ २८ ॥ श्रीभगवान् ह्मणाला– हे वत्सा, हा घोडा तुझ्या पितामहाचा (सगरराजाचा) यज्ञपशु आहे, तो तूं घेऊन जा. हे दग्ध झालेले तुझे चुलते, गंगेच्या उदकालाच योग्य आहेत दुसऱ्या कशाला नाहींत. ह्मणजे येथें गंगा आली असतां तिच्या उदकानेंच यांचा उद्धार होईल दुसऱ्या कशानेंहि होणार नाहीं ॥ २९ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, याप्रमाणें सांगणाऱ्या त्या कपिलमहामुनीला प्रदक्षिणा करून मस्तकानें केलेल्या नमस्कारानें प्रसन्न करून, त्या अंशुमानानें घोडा परत आणिला. नंतर सगरराजानें त्या पशूच्या योगानें शेष राहिलेला यज्ञ समाप्त केला ॥ ३० ॥ नंतर प्राप्तलोकींच्या

हे सर्वभूतात्मन् नोऽस्माकं त्वत्कृपयैव घटितात्त्वद्दर्शनादतिदृढोऽपि मोहमयः पाशश्छिन्नः । कथंभूतः । कामादीनामाशय आश्रयः । त्वत्प्रसादेन कृतार्थोऽस्मीत्यर्थः ॥ २७ ॥ ॥ २८ ॥ अश्वं लब्ध्वाऽपि साकांक्षं प्रत्याह । इमे चेति ॥ २९ ॥ तं परिक्रम्येति शुकोक्तिः ॥ ३० ॥ ३१ ॥ इति श्रीमद्भागवते नवमस्कंधे टीकायामष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥ ॥

अद्य नः सर्वभूतात्मन्कामकर्मेंद्रियाशयः ॥ मोहपाशो दृढश्छिन्नो भगवंस्तव दर्शनात् ॥ २७ ॥ श्रीशुक उवाच ॥ इत्थं गीतानुभावस्तं भगवान्कपिलो मुनिः ॥ अंशुमंतमुवाचेदमनुगृह्य धिया नृप ॥ २८ ॥ श्रीभगवानुवाच ॥ अश्वोऽयं नीयतां वत्स पितामहपशुस्तव ॥ इमे च पितरो दग्धा गंगांभोऽर्हंति नेतरत् ॥ २९ ॥ तं परिक्रम्य शिरसा प्रसाद्य हयमानयत् ॥ सगरस्तेन पशुना क्रतुशेषं समापयत् ॥ ३० ॥ राज्यमंशुमति न्यस्य निःस्पृहो मुक्तबंधनः ॥ और्वोपदिष्टमार्गेण लेभे गतिमनुत्तमाम् ॥ ३१ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे नवमस्कंधे सगरोपाख्यानेऽष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ अंशुमांश्च तपस्तेपे गंगानयनकाम्यया ॥ कालं महांतं नाशक्नोत्ततः कालेन संस्थितः ॥ १ ॥ दिलीपस्तत्सुतस्तद्वदशक्तः कालमेयिवान् ॥ भगीरथस्तस्य पुत्रस्तेपे स सुमहत्तपः ॥ २ ॥

नवमेंऽशुमतो वंशः खट्वांगावधि वर्ण्यते ॥ गंगां भूतलमानिन्ये यस्य पौत्रो भगीरथः ॥ १ ॥ यथा सागरः पौत्राय राज्यं दत्त्वा तपस्तेपे तथांऽशुमांश्च स्वपुत्राय राज्यं दत्त्वा महांतं कालं तपस्तेपे इति चकारस्यार्थः । नाशक्नोत् गंगामानेतुमिति शेषः । संस्थितो मृतः ॥ १ ॥ कालं मृत्युमेयिवान्प्राप्तः ॥ २ ॥

व परलोकींच्या भोगेच्छांविषयीं निःस्पृह व अविद्यारूप बंधनरहित असा तो सगरराजा, अंशुमानाला राज्यावर स्थापन करून, और्वऋषीनें सांगितलेल्या योगमार्गानें सर्वोत्कृष्ट गतीला (मोक्षाला) पावला ॥ ३१ ॥ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील नवमस्कंधामध्यें सगरोपाख्यानरूप हा आठवा अध्याय समाप्त झाला ॥ ८ ॥ ॥
आतां या नवव्या अध्यायामध्यें, ज्याच्या भगीरथनामक नातवानें भागीरथीला पृथिवीवर आणिलें त्या अंशुमान् राजाचा वंश खट्वांगराजापर्यंत वर्णन केला आहे ॥ १ ॥
श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, जसें सगरराजानें नातवाला राज्य देऊन तप केलें त्याप्रमाणें अंशुमानानेंहि आपल्या पुत्राला राज्य देऊन पुष्कळ कालपर्यंत तप केलें तथापि तो गंगेला भूमीवर आणण्यास समर्थ झाला नाहीं. नंतर कालाच्या योगानें आपणच मरण पावला ॥ १ ॥ त्या अंशुमानाचा पुत्र दिलीप, तोहि, तसेंच आपल्या पुत्राला राज्य देऊन तप करित असतां, गंगेला आणण्याविषयीं असमर्थ होत्साता मृत्यु पावला. त्याचा पुत्र भगीरथ, त्यानेंहि पुत्राला राज्य देऊन गंगेला आणण्यासाठीं मोठें तप केलें ॥ २ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्या तपानें प्रसन्न झालेल्या गंगेनें राजाला आपलें दर्शन दिलें आणि तिनें मीं तुला दर्शन देण्यास प्राप्त झाल्यें आहें असें सांगितलें असतां, भगीरथ राजानें तिला वंदन करून माझ्या पूर्वजांच्या उद्धारासाठीं तूं भूमीवर यावेंस अशी प्रार्थना केली ॥ ३ ॥ तेव्हां गंगा ह्मणाली– हे राजा, स्वर्गावरून भूमीवर पडणाऱ्या माझा वेग कोण बरें धारण करील ? जर वेग धारण करणारा नसला तर मी भूमीला फोडून पाताळांत जाईन ॥ ४ ॥ आणि मी भूमीवर येणार नाहीं. कारण, भूमीवरचे लोक आपण केलेलें पाप माझ्यामध्यें स्नानादिसंबंधानें घालवितील. तें पाप मी कोठें घालवावें ? हे राजा, त्याबद्दल तूं विचार कर ॥ ५ ॥ भगीरथ ह्मणाला– हे माते, विषयवासना सोडून देणारे, शांत, ब्रह्मनिष्ठ व लोकांना पवित्र करणारे सत्पुरुष, तुझ्या प्रवाहांत स्नानादिक करून आपल्या अंगस्पर्शानें तुझें पाप हरण करितील. कारण, त्यांच्या हृदयांत पातकांचा

तं प्रत्यात्मानं दर्शयामास । ते वरदास्मीति गंगयोक्तः सन्स्वमभिप्रायं पूर्वजोद्धरणं शशंस कथयामास ॥ ३ ॥ आह गंगा । कोऽपि गगनात्पतंत्या मे वेगं धारयिता धारयिष्यति ॥ ४ ॥ किंच । आमृजंति क्षालयिष्यंति तत्रोपायो विचिंत्यताम् ॥ ५ ॥ अघं हरंति हरिष्यंति । अघं भिनत्तीत्यघभित् ॥ ६ ॥ आत्मा कथंभूतः यस्मिन्निदं विश्व-

दर्शयामास तं देवी प्रसन्ना वरदाऽस्मि ते ॥ इत्युक्तः स्वमभिप्रायं शशंसावनतो नृपः ॥ ३ ॥ कोऽपि धारयिता वेगं पतंत्या मे महीतले ॥ अन्यथा भूतलं भित्त्वा नृप यास्ये रसातलम् ॥ ४ ॥ किंचाहं न भुवं यास्ये नरा मय्यामृजंत्यघम् ॥ मृजामि तदघं कुत्र राजंस्तत्र विचिंत्यताम् ॥ ५ ॥ भगीरथ उवाच ॥ साधवो न्यासिनः शांता ब्रह्मिष्ठा लोकपावनाः ॥ हरंत्यघं तेंऽगसंगात्तेष्वास्ते ह्यघभिद्धरिः ॥ ६ ॥ धारयिष्यति ते वेगं रुद्रस्त्वात्मा शरीरिणाम् ॥ यस्मिन्नोतमिदं प्रोतं विश्वं शाटीव तंतुषु ॥ ७ ॥ इत्युक्त्वा स नृपो देवं तपसाऽतोषयच्छिवम् ॥ कालेनाल्पीयसा राजंस्तस्येशः समतुष्यत ॥ ८ ॥ तथेति राज्ञाऽभिहितं सर्वलोकहितः शिवः ॥ दधारावहितो गंगां पादपूतजलां हरेः ॥ ९ ॥ भगीरथः स राजर्षिर्निन्ये भुवनपावनीम् ॥ यत्र स्वपितृणां देहा भस्मीभूताः स्म शेरते ॥ १० ॥ रथेन वायुवेगेन प्रयांतमनुधावती ॥ देशान्पुनंती निर्दग्धानासिंचत्सगरात्मजान् ॥ ११ ॥

मोतं ग्रथितमूर्ध्वतंतुषु शाटीव पट इव प्रोतं च तिर्यक्तंतुषु पट इव । असौ सर्वाधारस्त्वद्वेगं धारयिष्यतीत्यर्थः ॥ ७ ॥ इत्येवं गंगामुक्त्वा । तच्छ्रुत्वेति पाठे श्रावयित्वेत्यर्थः ॥ ८ ॥ राज्ञाऽभिहितं तथेत्यंगीकृत्य । हरेः पादेन पूत जलं यस्याः ॥ ९ ॥ १० ॥ ११ ॥

नाश करणारा हरि जागरूक आहे ॥ ६ ॥ हे गंगे, ज्याचेठिकाणीं हें जग, उभ्या व आडव्या तंतूंमध्यें विणलेल्या पटासारखें ओतप्रोत आहे तो सर्व प्राणिमात्रांचा आत्मा रुद्र, तुझ्या वेगाचें धारण करील ॥ ७ ॥ असें भागीरथीला सांगून व तिचें संमत जाणून त्या राजानें तपेंकरून शिवदेवाला संतुष्ट केलें. हे राजा, त्याच्या तपाच्या योगानें थोडक्याच कालानें शंकर संतुष्ट झाला ॥ ८ ॥ तेव्हां भगीरथानें गंगावेग धारण करण्याविषयीं त्याची प्रार्थना केली असतां, सर्व लोकांचें हित करणाऱ्या त्या शिवानें, तथास्तु असें सांगून समाधानयुक्त चित्तानें, जिचें उदक हरीच्या चरणानें पवित्र झालें आहे अशा त्या गंगेला आपल्या मस्तकीं धारण केलें ॥ ९ ॥ नंतर, त्या राजर्षि भगीरथानें, आपल्या चुलत्यांचे देह ज्याठिकाणीं भस्मरूप होऊन पडले होते त्याठिकाणीं जगत्पावनी अशा त्या गंगेला नेलें ॥ १० ॥ त्यावेळीं, वायूसारखा वेग असलेल्या रथांत बसून जाणाऱ्या भगीरथाच्या मागून जाणाऱ्या व मार्गामध्यें असलेल्या देशांना पवित्र करणाऱ्या त्या गंगेनें, भस्मरूप झालेल्या सगरराजाच्या पुत्रांना भिजवून टाकिलें ॥ ११ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ज्या गंगेच्या जलस्पर्शमात्रेंकरून कपिलमहामुनीचेठिकाणीं केलेल्या अपराधानें जळून भस्म झालेलेहि सगराचे पुत्र, केवळ देहभस्माच्या संबंधानेंच जर स्वर्गाला निघून
गेले तर श्रद्धेनें तिचें निरंतर सेवन करणारांचें फळ काय सांगावें ? ॥ १२ ॥ ह्मणजे भस्मरूप झालेल्या देहाच्या संगानेंच जर सगराचे पुत्र स्वर्गास निघून गेले तर गंगेच्या
स्नानपानादिकांचे नियम धारण करणारे जे पुरुष गंगादेवीचें श्रद्धेनें पूजा स्तुति नमस्कारादिकेंकरून आराधन करितात ते स्वर्गाला जातील हें काय सांगावें ? ॥ १३ ॥
हे राजा, गंगेचें जें येथें स्वर्गास पोचविण्याचें माहात्म्य सांगितलें तें कांहीं परमाश्चर्यकारक नाहीं. कारण, ती गंगा अनंतरूपी भगवंताच्या चरणकमलापासून उत्पन्न झालेली
असल्यामुळें संसारबंधालासुद्धां तोडून टाकणारी आहे ॥ १४ ॥ तो अनंत असा आहे कीं, ज्याचेठिकाणीं श्रद्धेनें मन स्थापन करून शुद्धचित्त झालेले मुनि, टाकण्यास

प्रसंगाद्गंगामाहात्म्यमाह चतुर्भिः । यस्या जलस्पर्शमात्रेण तच्च केवलं देहभस्मभिरेव न साक्षात् । ब्रह्मणि स्वकृतेन दंडेन हता अपि तां श्रद्धया ये सेवंते इति शेषः ॥ १२ ॥
तत्प्रपंचयति । भस्मीभूतेनांगेन यः संगस्तेन ॥ १३ ॥ १४ ॥ अनंतस्य विशेषणं संनिवेश्येति त्रैगुण्यं देहसंबंधम् ॥ १५ ॥ १६ ॥ नलस्य सखा । अयात्प्राप्तः । तत्सुतः ऋ-

यज्जलस्पर्शमात्रेण ब्रह्मदंडहता अपि ॥ सगरात्मजा दिवं जग्मुः केवलं देहभस्मभिः ॥ १२ ॥ भस्मीभूतांगसंगेन स्वर्याताः सग-
रात्मजाः ॥ किं पुनः श्रद्धया देवीं ये सेवंते धृतव्रताः ॥ १३ ॥ न ह्येतत्परमाश्चर्यं स्वर्धुन्या यदिहोदितम् ॥ अनंतचरणांभोजप्र-
सूताया भवच्छिदः ॥ १४ ॥ सन्निवेश्य मनो यस्मिन् श्रद्धया मुनयोऽमलाः ॥ त्रैगुण्यं दुस्त्यजं हित्वा सद्यो यातास्तदात्मताम्
॥ १५ ॥ श्रुतो भगीरथाज्जज्ञे तस्य नाभोऽपरोऽभवत् ॥ सिंधुद्वीपस्ततस्तस्मादयुतायुस्ततोऽभवत् ॥ १६ ॥ ऋतुपर्णो नलसखो
योऽश्वविद्यामयान्नलात् ॥ दत्त्वाऽक्षहृदयं चास्मै सर्वकामस्तु तत्सुतः ॥ १७ ॥ ततः सुदासस्तत्पुत्रो मदयंतीपतिर्नृपः ॥ आहुर्मि-
त्रसहं यं वै कल्माषांघ्रिमुत क्वचित् ॥ वसिष्ठशापाद्रक्षोऽभूदनपत्यः स्वकर्मणा ॥ १८ ॥ राजोवाच ॥ किं निमित्तो गुरोः शापः
सौदासस्य महात्मनः ॥ एतद्वेदितुमिच्छामः कथ्यतां न रहो यदि ॥ १९ ॥ श्रीशुक उवाच ॥ सौदासो मृगयां कंचिच्चरन्रक्षो ज-
घान ह ॥ मुमोच भ्रातरं सोऽथ गतः प्रतिचिकीर्षया ॥ २० ॥

तुपर्णस्य सुतः ॥ १७ ॥ तत्पुत्रः सौदासः ॥ १८ ॥ न रहो न रहस्यम् ॥ १९ ॥ मृगयां चरन्कंचिद्राक्षसं जघान तस्य भ्रातरं मुमोच । स भ्राता पलाय्य गतः ॥ २० ॥

अशक्य अशाहि देहसंबंधाचा त्याग करून तत्काळ भगवंताच्या स्वरूपाला पावले आहेत ॥ १५ ॥ भगीरथापासून श्रुतनामक पुत्र झाला. त्या श्रुताला नाभनामक दुसरा पुत्र
झाला, नंतर त्यापासून सिंधुद्वीप झाला, त्यापासून अयुतायु झाला ॥ १६ ॥ त्यापासून ऋतुपर्ण झाला तो नलराजाचा मित्र होता. त्यानें नलराजाला द्यूतशास्त्राचें रहस्य
शिकवून त्यापासून अश्वशिक्षाप्रतिपादन करणारी विद्या संपादन केली. त्या ऋतुपर्णाचा पुत्र सर्वकाम झाला ॥ १७ ॥ हे राजा, त्या सर्वकामापासून सुदास झाला. त्याचा
पुत्र तर मदयंतीचा पति, ज्याला मित्रसह आणि कल्माषपाद असें लोक ह्मणतात तो झाला. तो एकेवेळीं वसिष्ठाच्या शापेंकरून बारा वर्षेंपर्यंत राक्षस झाला होता त्यावेळीं
त्यानें केलेल्या कर्माच्या योगानें पुढें तो औरसपुत्ररहित झाला ॥ १८ ॥ राजा ह्मणाला— त्या उदारचित्त सौदास राजाला गुरूचा शाप किंनिमित्तक झाला ? हें शापाचें
निमित्त जाणण्याची मी इच्छा करितों. तें जर गोप्य नसेल ह्मणजे सांगण्यास योग्य असेल तर सांगावें ॥ १९ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला— सौदासराजा एकेवेळीं मृगया कर-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ण्याकरितां वनांत फिरत असतां त्यानें एका राक्षसाचा वध केला आणि त्याच्या भावास सोडून दिलें तेव्हां तो भाऊ पळून गेला. नंतर राजानें आपल्या भावास मारिलें हें मनांत आणून राजाचें कांहींतरी वाईट करण्याच्या इच्छेनें स्वयंपाक करणाराचें रूप धारण करून तो राजाच्या घरीं गेला आणि त्यानें तेथें एकेवेळीं भोजनाची इच्छा करणाऱ्या वसिष्ठगुरूला नरमांस शिजवून वाढिलें ॥ २० ॥ २१ ॥ नंतर त्या सर्वज्ञ वसिष्ठानें, वाढलेलें नरमांस अभक्ष्य आहे असें तत्काल जाणिलें आणि क्रुद्ध होऊन, अशा नरमांस वाढविण्याच्या दोषानें तूं राक्षसच होशील असा राजाला शाप दिला ॥ २२ ॥ नंतर तें नरमांस वाढणें, स्वयंपाक्याचें रूप धारण करणाऱ्या राक्षसानें केलें, राजानें करविलें नाहीं, असें जाणून वसिष्ठानेंच आपलें वाक्य खोटें न होण्यासाठीं तो शाप बारावर्षांपर्यंतच चालेल अशी व्यवस्था केली; त्यावेळीं तो राजाहि ओंजळींत पाणी घेऊन वसिष्ठगुरूला शाप देण्यास उद्युक्त झाला ॥ २३ ॥ तेव्हां झालेला शाप न चुकतां गुरूच्या अपमानानें दुसरे अनर्थ होतील असें जाणणाऱ्या त्याच्या मदयंतीनामक

अधमनिष्टम् । सूदः पाचकस्तद्रूपधरः सन् राज्ञो गृहे वर्तमानः ॥ २१ ॥ अभक्ष्यमंजसा विलोक्य एवं नरमांसव्यवहारेण ॥ २२ ॥ वसिष्ठ एव तं शापं द्वादशवार्षिकं चक्रे ॥ २३ ॥ रुशतीस्तीक्ष्णा अपः स्वपादयोर्जहौ नान्यत्र । तत्र हेतुः । दिश इति । एवमनेन मित्रसहत्वमपि दर्शितम् । मित्रस्य कलत्रस्य वाचः सहनात् ॥ २४ ॥ तदेवं राक्ष-

स चिंतयन्नघं राज्ञः सूदरूपधरो गृहे ॥ गुरवे भोक्तुकामाय पक्त्वा निन्ये नरामिषम् ॥ २१ ॥ परिवेक्ष्यमाणं भागवान्विलोक्याभक्ष्यमंजसा ॥ राजानमशपत्क्रुद्धो रक्षो ह्येवं भविष्यसि ॥ २२ ॥ रक्षःकृतं तद्विदित्वा चक्रे द्वादशवार्षिकम् ॥ सोऽप्यपोंऽजलिनादाय गुरुं शप्तुं समुद्यतः ॥ २३ ॥ वारितो मदयंत्याऽपो रुशतीः पादयोर्जहौ ॥ दिशः खमवनीं सर्वं पश्यन् जीवमयं नृपः ॥ २४ ॥ राक्षसं भावमापन्नः पादे कल्मषतां गतः ॥ व्यवायकाले ददृशे वनौको दंपती द्विजौ ॥ २५ ॥ क्षुधार्तो जगृहे विप्रं तत्पत्न्याहाकृतार्थवत् ॥ न भवात्राक्षसः साक्षादिक्ष्वाकूणां महारथः ॥ २६ ॥ मदयंत्याः पतिर्वीर नाधर्मं कर्तुमर्हसि ॥ देहि मेऽपत्यकामाया अकृतार्थं पतिं द्विजम् ॥ २७ ॥

सत्वे कल्माषांघ्रित्वे च कारणमुक्त्वा स्वकर्मणाऽनपत्य इति यदुक्तं तत्प्रपंचयति । व्यवायकाल इत्यादिना कर्मणा अप्रजा इत्यंतेन । वनमोको निवासो ययोस्तौ वनौकसौ च तौ दंपती च । पृथक्पदत्वे सकारलोप आर्षः ॥ २५ ॥ अकृतार्थवद्दीनवत् ॥ २६ ॥ अकृतार्थमसमाप्तरतिम् ॥ २७ ॥

भार्येनें ‘ गुरूला शाप देऊं नका ’ असें राजाचें निवारण केलें असतां त्या राजानें ~~दिशा, आकाश, पृथ्वी इत्यादिक सर्व स्थळें जीवमय आहेत असें पाहून शापाकरितां घेतलेलें उदक तेथें टाकिलें असतां त्यांचा नाश होईल अशा शंकेनें~~ तें तीक्ष्ण उदक आपल्याच पायांवर टाकिलें ॥ २४ ॥ असो, याप्रमाणें मित्ररूपी स्त्रीचें वचन सहन केल्यामुळें मित्रसहनामक असा तो राजा पुढें गुरूच्या शापानें राक्षसधर्म पावोन, पायांचेठिकाणीं काळेपणा पावला. नंतर तो राक्षसासारखा वनांत फिरत असतां एकेवेळीं त्यानें, वनांत राहणारा एक ब्राह्मण व त्याची स्त्री हीं उभयतां मैथुन करित असतां त्यावेळीं त्यांना अवलोकन केलें ॥ २५ ॥ तेव्हांच क्षुधेनें पीडित झालेल्या त्या राक्षसरूपी राजानें, ब्राह्मणांस भक्षण करण्यासाठीं धरिलें तेव्हां त्या ब्राह्मणाची स्त्री, दीनासारखी ह्मणाली कीं,– हे राजा, तूं साक्षात् राक्षसकुलांत उत्पन्न झालेला नव्हेस तर तूं इक्ष्वाकूच्या कुळांत उत्पन्न झालेल्या राजांमध्यें श्रेष्ठ, महारथी मदयंती पतिव्रतेचा पति आहेस. यास्तव, हे वीरा, तूं ब्राह्मणवधरूप पाप करण्यास योग्य नाहींस ॥ २६ ॥ तर अपत्याची

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

इच्छा करणाऱ्या मला रति समाप्त न झालेला हा ब्राह्मण पति दे. राजा, हा मनुष्यदेह जीवाला सर्व पुरुषार्थ साध्य करून देणारा आहे ॥ २७ ॥ यास्तव हे वीरा, या ब्राह्मणदेहाचा वध करणें हें सर्व पुरुषार्थांचा वधच असें शास्त्रांत झटलें आहे. त्यामध्यें हा ब्राह्मण तर विद्वान, तप, शील व गुण यांनीं युक्त ॥ २८ ॥ आणि सर्वभूतांचे ठिकाणीं राहत असूनहि अहंकारादिक गुणकार्यांनीं आच्छादित झालेल्या महापुरुषसंज्ञक परब्रह्माचें, हा सर्वभूतांचा आत्मा आहे अशा भावनेनें आराधन करण्याची इच्छा करणारा आहे ॥ २९ ॥ हे धर्मज्ञा विभो, तो हा ब्रह्मर्षिश्रेष्ठ, तुज राजर्षिश्रेष्ठापासून वध पावण्यास कसा योग्य होईल ? तर जसा पित्यापासून पुत्र वध पावण्यास योग्य होत नाहीं त्याप्रमाणें हा तुजपासून वध पावण्यास योग्य होणार नाहीं ॥ ३० ॥ बरें साधूंना मान्य असा तूंतरी, मुक्तिसाधनाविषयीं तत्पर, अध्ययनादिसंपन्न व वेदार्थांचा उपदेश करण्यास समर्थ अशा या ब्राह्मणाचा वध करण्यांचें मनांत कसें आणितोस ? तर जसा गाईचा वध करण्याचें मनांत आणणेंसुद्धां अयोग्य आहे तसें हेंहि तुला

॥ २८ ॥ सर्वभूतानामात्मेति भावनयाऽऽराधयितुमिच्छुः । यद्वा सर्वभूतानामात्मभावेन भूतेषु स्थितमपि गुणैरंतर्हितं ब्रह्मेति संबंधः । पाठांतरे अंतर्हितः सोऽयमित्युत्तरेणान्वयः

देहोऽयं मानुषो राजन्पुरुषस्याखिलार्थदः ॥ तस्मादस्य वधो वीर सर्वार्थवध उच्यते ॥ २८ ॥ एष हि ब्राह्मणो विद्वास्तपःशीलगुणान्वितः ॥ आरिराधयिषुर्ब्रह्म महापुरुषसंज्ञितम् ॥ सर्वभूतात्मभावेन भूतेष्वंतर्हितं गुणैः ॥ २९ ॥ सोऽयं ब्रह्मर्षिवर्यस्ते राजर्षिप्रवराद्विभो ॥ कथमर्हति धर्मज्ञ वधं पितुरिवात्मजः ॥ ३० ॥ तस्य साधोरपापस्य भ्रूणस्य ब्रह्मवादिनः ॥ कथं वधं यथा बभ्रोर्मन्यते संमतो भवान् ॥ ३१ ॥ यद्ययं क्रियते भक्षस्तर्हि मां खाद पूर्वतः ॥ न जीविष्ये विना येन क्षणं च मृतकं यथा ॥ ३२ ॥ एवं करुणभाषिण्या विलपंत्या अनाथवत् ॥ व्याघ्रः पशुमिवाखादत्सौदासः शापमोहितः ॥ ३३ ॥ ब्राह्मणी वीक्ष्य दिधिषुं पुरुषादेन भक्षितम् ॥ शोचंत्यात्मानमुर्वीशमशपत्कुपिता सती ॥ ३४ ॥ यस्मान्मे भक्षितः पाप कामार्तायाः पतिस्त्वया ॥ तवापि मृत्युराधानादकृतप्रज्ञ दर्शितः ॥ ३५ ॥ एवं मित्रसहं शप्त्वा पतिलोकपरायणा ॥ तदस्थीनि समिद्धेऽग्नौ प्रास्य भर्तुर्गतिं गता ॥ ३६ ॥

॥ २९ ॥ ३० ॥ भ्रूणस्य श्रोत्रियस्य । गर्भस्य ऋत इति वा । बभ्रोर्गोः । सतां मतो भवान्वधं कथं साधु मन्यते इत्यर्थः ॥ ३१ ॥ क्षणमपि येन विना न जीविष्यामि सोऽयं यदि भक्षः क्रियते तर्हि मृतकं यथा मृतप्रायां मां पूर्वं भक्षय ॥ ३२ ॥ ३३ ॥ दिधिषुं गर्भाधानकर्तारम् ॥ ३४ ॥ आधानान्मैथुनात् । हे अकृतप्रज्ञ मृत्युर्मया दर्शितः ॥ ३५ ॥ ३६ ॥

अयोग्य आहे ॥ ३१ ॥ आतां ज्याच्या वांचून मी क्षणभरसुद्धां वांचण्याची इच्छा करित नाहीं तो हा ब्राह्मण, जर तुला भक्षणच करावयाचा असेल तर, मेल्यासारखी झालेल्या मला पूर्वी भक्षण कर ॥ ३२ ॥ याप्रमाणें ती स्त्री दीनपणानें भाषण करित असतां व अनाथाप्रमाणें रुदन करित असतां, शापानें मोहित झालेल्या सौदासराजानें जसें व्याघ्र पशूचें भक्षण करितो त्याप्रमाणें त्या ब्राह्मणाचें भक्षण केलें ॥ ३३ ॥ त्यावेळीं गर्भाधान करणारा आपला पति राक्षसानें भक्षण केला असें पाहून, आपणाबद्दल शोक करणाऱ्या त्या ब्राह्मणीनें क्रोधयुक्त होऊन, त्या राजाला असा शाप दिला कीं,– ॥ ३४ ॥ हे पापाचरण करणाऱ्या दुर्बुद्धे राजा, ज्याअर्थी कामार्त अशा माझा पति तूं भक्षण केलास त्याअर्थीं तुलाहि गर्भाधानापासूनच मी मृत्यु दर्शित केला आहे, ह्मणजे जेव्हां माझ्या पतीसारखा तूं आपल्या स्त्रीचेठिकाणीं गर्भाधान करण्यास उद्युक्त होशील तेव्हां तुला मृत्यु प्राप्त होईल ॥ ३५ ॥ याप्रमाणें मित्रसहराजाला शापून पतिलोकाला जाण्याची इच्छा करणारी ती स्त्री पतीच्या अस्थी, प्रदीप्त केलेल्या अग्नीमध्यें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

टाकून तेथें आपला देह पाडून सहगमनविधीनें पतीला प्राप्त झालेल्या लोकाला निघून गेली ॥ ३६ ॥ नंतर बारा वर्षें होतांच शापमुक्त झालेला तो सौदास राजा मैथुन करण्यास उद्युक्त झाला असतां, मदयंती स्त्रीनें ब्राह्मणस्त्रीचा शाप जाणून त्याचें निवारण केलें ॥ ३७ ॥ त्या दिवसापासून त्यानें स्त्रीसंभोगसुखाचा त्याग केला. याप्रमाणें ब्राह्मणभक्षणामुळें झालेल्या शापानें तो संततिरहित झाला. तेव्हां त्यानें प्रजा उत्पन्न करण्याकरितां प्रार्थना केलेल्या वसिष्ठानें मदयंतीचेठिकाणीं गर्भस्थापन केलें ॥ ३८ ॥ तिनें सात वर्षांपर्यंत गर्भाचें धारण केलें होतें तरी पुत्र झाला नाहीं, तेव्हां वसिष्ठानेंच तिचें पोट पाषाणाच्या योगानें ठेंचलें त्या निमित्तानें त्या झालेल्या पुत्राला अश्मक असें नांव पडलें ॥ ३९ ॥ अश्मकापासून मूलक झाला, त्याचें स्त्रियांनीं (परशुरामानें निःक्षत्रिय पृथिवी केली त्यावेळीं) कवचाप्रमाणें चोंहोंकडून रक्षण केलें, ह्मणून त्याला नारी-

---

॥ ३७ ॥ तदेवं कर्मणा अप्रजः ॥ ३८ ॥ अविभ्रद्दधारेत्यर्थः । न व्यजायत न प्रासूत अतो वसिष्ठ एव तस्या उदरमश्मना जघान । स उत्पन्नः सुतोऽश्मकः ॥ ३९ ॥ स्त्रीभिः संवेष्ट्य परशुरामात्परिरक्षितोऽतो नारीकवच इत्युक्तः । निःक्षत्रे सति क्षत्रवंशस्य मूलमभवदतो मूलक इति चोक्तः ॥ ४० ॥ ४१ ॥ प्रसन्नैर्देवैर्वरं वृणीष्वेत्युक्ते खट्वांगेनोक्तं

विशापो द्वादशाब्दांते मैथुनाय समुद्यतः ॥ विज्ञाय ब्राह्मणीशापं महिष्या स निवारितः ॥ ३७ ॥ तत उर्ध्वं स तत्याज स्त्रीसुखं कर्मणाऽप्रजः ॥ वशिष्ठस्तदनुज्ञातो मदयंत्यां प्रजामधात् ॥ ३८ ॥ सा वै सप्तसमा गर्भमबिभ्रन्न व्यजायत ॥ जघ्नेऽश्मनोदरं तस्याः सोऽश्मकस्तेन कथ्यते ॥ ३९ ॥ अश्मकान्मूलको जज्ञे यः स्त्रीभिः परिरक्षितः ॥ नारीकवच इत्युक्तो निःक्षत्रे मूलकोऽभवत् ॥ ४० ॥ ततो दशरथस्तस्मात्पुत्र ऐडविडस्ततः ॥ राजा विश्वसहो यस्य खट्वांगश्चक्रवर्त्यभूत् ॥ ४१ ॥ यो देवैरर्थितो दैत्यानवधीद्युधि दुर्जयः ॥ मुहूर्तमायुर्ज्ञात्वैत्य स्वपुरं संदधे मनः ॥ ४२ ॥ न मे ब्रह्मकुलात्प्राणाः कुलदैवान्न चात्मजाः ॥ न श्रियो न मही राज्यं न दाराश्चातिवल्लभाः ॥ ४३ ॥ न बाल्येऽपि मतिर्मह्यमधर्मे रमते क्वचित् ॥ न पश्याम्युत्तमश्लोकादन्यत्किंचन वस्त्वहम् ॥ ४४ ॥

प्रथमं तावन्ममायुः कथ्यतामिति । देवैश्चोक्तं मुहूर्तमात्रमिति । तज्ज्ञात्वा देवैर्दत्तेन विमानेन शीघ्रं स्वपुरमेत्य मनः परमेश्वरे संदधे ॥ ४२ ॥ एतदेव स्वसाधुवृत्तानुस्मरणपूर्वकं तत्कृतेन निश्चयेन दर्शयति । नेति सप्तभिः । कुलदैवाद्ब्रह्मकुलात्सकाशान्मे प्राणादयो नातिवल्लभा नातिप्रियाः ॥ ४३ ॥ मह्यं मम ॥ ४४ ॥

कवच असें नांव पडलें. पुढें तो क्षत्रियकुळाचें मूळ झाला ह्मणून तो मूलक या नांवानें प्रसिद्ध झाला ॥ ४० ॥ त्यापासून दशरथ झाला, त्यापासून ऐडविड पुत्र झाला, त्याच्यापासून राजा विश्वसह झाला. त्याच्यापासून सार्वभौम असा खट्वांग झाला ॥ ४१ ॥ तो खट्वांगराजा, युद्धांत शत्रूंना दुर्जय होता ह्मणून देवांनीं आपलें सहाय करण्याविषयीं त्याची प्रार्थना केली असतां, त्यानें दैत्यांचा वध केला. नंतर प्रसन्न झालेल्या देवांनीं ‘ वर माग ’ असें ह्मटल्यावर तो ह्मणाला कीं,– तुह्मीं आदीं माझें आयुष्य किती आहे तें सांगा, मग त्यासारखा वर मागेन. तेव्हां देव ह्मणाले– तें तुझें आयुष्य तर भूमिलोकावर दोन घटिका आहे. तें जाणून देवांनीं दिलेल्या विमानानें तो राजा, आपल्या नगरामध्यें आला आणि त्यानें मन परमेश्वराचेठिकाणीं लाविलें ॥ ४२ ॥ त्यावेळीं त्यानें असा निश्चय केला कीं,– कुलपूज्य अशा ब्राह्मणकुलापेक्षां मला पृथिवी, राज्य, संपत्ति, स्त्रिया, पुत्र हीं व प्राणसुद्धां अतिप्रिय वाटत नाहींत ॥ ४३ ॥ माझी बुद्धि बाल्यावस्थेमध्येंहि संकटाच्या वेळींसुद्धां अधर्माचेठिकाणीं कधीं रमलीच नाहीं. तसेंच ॥ २३ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

उत्तमकीर्ति भगवंतापेक्षां दुसरें कांहींच वस्तु खरें, आहे असें मी पाहिलें नाहीं ॥ ४४ ॥ जरीहि त्रिभुवनेश्वर अशा देवांनीं मला इच्छितवस्तु मागण्याचा वर दिला आहे तथापि भूतपालक अशा भगवंताचेठिकाणीं मन लावणारा मी, त्याला विघ्नरूप असलेल्या त्या वराला मागून घेत नाहीं ॥ ४५ ॥ कारण, सात्विक ह्मणून प्रसिद्ध असलेले जे देव तेहि, इंद्रियें व बुद्धि विषयासक्त झालेलीं असल्यामुळें आपल्या हृदयामध्यें निरंतर असणाऱ्या प्रिय आत्म्या भगवंताला जाणत नाहींत; मग दुसरे राजस व तामस स्वभावाचे मनुष्यादिक जाणत नाहींत हें काय सांगावें ? ॥ ४६ ॥ यास्तव स्वभावानें आपले ठिकाणीं चिकटलेला व ईश्वराच्या मायेनें रचिलेल्या गंधर्वनगरासारख्या विषयांचेठिकाणीं असलेला जो संग, त्याला विश्वकर्त्या भगवंताच्या भावनेनें टाकून त्याच भगवंताला मी शरण जातों ॥ ४७ ॥ याप्रमाणें नारायणानें आपलेठिकाणीं आकर्षण केलेल्या

भूतभावनो हरिस्तस्मिन्नेव भावना यस्य सोऽहं तं कामं न वृणे ॥ ४५ ॥ तत्र हेतुः । य इति । विक्षिप्तानींद्रियाणि धीश्च येषां ते देवा अपि ॥ ४६ ॥ अथ तस्मात्प्रकृत्या स्वभावेनात्मनि रूढं गुणेषु संगं विश्वकर्तुर्भावेन हित्वा तमेवाहं प्रपद्ये ॥ ४७ ॥ अन्यभावं देहाद्यभिमानरूपमज्ञानं हित्वा ॥ ४८ ॥ स्वं भावमेवाह । यत्तदिति । शून्यवत्कल्पितं

देवैः कामवरो दत्तो मह्यं त्रिभुवनेश्वरैः ॥ न वृणे तमहं कामं भूतभावनभावनः ॥ ४५ ॥ ये विक्षिप्तेंद्रियधियो देवास्ते स्वहृदि स्थितम् ॥ न विंदंति प्रियं शश्वदात्मानं किमुतापरे ॥ ४६ ॥ अथेशमायारचितेषु संगं गुणेषु गंधर्वपुरोपमेषु ॥ रूढं प्रकृत्यात्मनि विश्वकर्तुर्भावेन हित्वा तमहं प्रपद्ये ॥ ४७ ॥ इति व्यवसितो बुद्ध्या नारायणगृहीतया ॥ हित्वाऽन्यभावमज्ञानं ततः स्वं भावमाश्रितः ॥ ४८ ॥ यत्तद्ब्रह्म परं सूक्ष्ममशून्यं शून्यकल्पितम् ॥ भगवान्वासुदेवेति यं गृणंति हि सात्वताः ॥ ४९ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे नवमस्कंधे सूर्यवंशानुवर्णने नवमोऽध्यायः ॥ ९ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ खट्वांगाद्दीर्घबाहुश्च रघुस्तस्मात्पृथुश्रवाः ॥ अजस्ततो महाराज तस्माद्दशरथोऽभवत् ॥ १ ॥ तस्यापि भगवानेष साक्षाद्ब्रह्ममयो हरिः ॥ अंशांशेन चतुर्धाऽगात्पुत्रत्वं प्रार्थितः सुरैः ॥ २ ॥

वागाद्यविषयत्वात् । वासुदेव इति यं गृणंति । ब्रह्मण एव भक्तानुग्रहार्थमाविष्कृततनोर्वासुदेवत्वात् ॥ ४९ ॥ इति श्रीमद्भागवते नवमस्कंधे टीकायां नवमोऽध्यायः ॥ ९ ॥ ॥ दशमे माह खट्वांगवंशे श्रीरामसंभवम् ॥ तच्चरित्रं च लंकेशं हत्वाऽयोध्यागमावधि ॥ १ ॥ खट्वांगाच्च दीर्घबाहुः ॥ १ ॥ २ ॥

बुद्धीनें कृतनिश्चय झालेला तो खट्वांग राजा, देहादिकांचेठिकाणीं असलेल्या अभिमानरूप अज्ञानाचा त्याग करून आत्मस्वरूपाला पावला ॥ ४८ ॥ तें आत्मस्वरूप असें कीं,– वेदांताचेठिकाणीं जें परब्रह्म ह्मणून प्रसिद्ध आहे, इंद्रियांना अगोचर असल्यामुळें ज्याची शून्यासारखी कल्पना करितात परंतु वस्तुतः जें सत्स्वरूप आहे आणि भगवद्भक्त ज्याला भगवान् वासुदेव असें ह्मणतात त्या आत्मस्वरूपाला तो खट्वांगराजा पावला ॥ ४९ ॥ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील नवमस्कंधामध्यें गंगाप्राध्यादिवर्णननामक हा नववा अध्याय समाप्त झाला ॥ ९ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या दहाव्या अध्यायामध्यें खट्वांगराजाच्या वंशामध्यें श्रीरामाचा अवतार सांगितला आहे आणि त्याचें चरित्रहि, रावणाला मारून परत अयोध्येंत येईपर्यंत सांगितलें आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, खट्वांगापासून दीर्घबाहु झाला, त्याच्यापासून महाकीर्तिमान् रघु झाला, त्यापासून महाराजा अज झाला, त्यापासून दशरथ झाला ॥ १ ॥ त्या दशरथाचेंहि, देवांनीं प्रार्थना केलेला साक्षात् ब्रह्ममय असा हा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हरि भगवान्, आपल्या अंशांशेंकरून राम, लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न अशा नांवानीं चार प्रकारें पुत्रत्व पावला ॥ २ ॥ हे राजा, जरीहि त्या सीतापति रामाचें चरित्र परमार्थ जाणणाऱ्या वाल्मीकिआदिक ऋषींनीं तुला पुष्कळ वर्णन केलें आहे आणि तूंहि वारंवार श्रवण केलें आहेस तथापि मीहि संक्षेपानें सांगतों तें ऐक ॥ ३ ॥ ज्यानें दशरथ-वाक्याच्या सत्यत्वाचें रक्षण करण्याकरितां राज्याचा त्याग करून, ज्यांना सीतेचा हस्तस्पर्शहि कठिण लागत असे अशा कमळासारख्या अतिसुकुमार पायांनीं प्रत्येक वनो-मध्यें संचार केला· ज्याचा मार्ग चालतांना झालेला श्रम, सुग्रीव आणि लक्ष्मण यांनीं दूर केला आहे आणि शूर्पणखा राक्षसीचें कर्णनासिकाछेदनानें विरूपकरण केल्यामुळें क्रुद्ध

ऋषिभिर्वाल्मीकिमुख्यैर्भूरि वर्णितं त्वया मुहुः श्रुतं तथापि संक्षेपतः कथ्यमानं शृणु ॥ ३ ॥ ग्रंथकोटिभिराकीर्णमद्भुतं रामविक्रमम् ॥ अध्यायद्वयतो वक्ष्यन्नेकश्लोके समस्यति ॥ स कोशलेंद्रः श्रीरामो नोऽस्मानवतात्पातु । कथंभूतः । यो गुर्वर्थे पितुः सत्यस्य पालनार्थं त्यक्तराज्यः सन् । पद्मवदतिसुकुमाराभ्यां पद्भ्याम् । तदेवाह । प्रियायाः पाणिनाऽपि स्पर्शेनास्ति क्षमा ययोस्ताभ्यां प्रतिवनं व्यचरत् । हरींद्रो हनुमान्सुग्रीवो वाऽनुजो लक्ष्मणस्ताभ्यां मृजिताऽपनीता पथरुजा मार्गश्रमो यस्य । शूर्पणखया वैरूप्यात्कर्णनासि-

रामलक्ष्मणभरतशत्रुघ्ना इतिसंज्ञया ॥ तस्यानुचरितं राजन्नृषिभिस्तत्त्वदर्शिभिः ॥ श्रुतं हि वर्णितं भूरि त्वया सीतापतेर्मुहुः ॥ ॥ ३ ॥ गुर्वर्थे त्यक्तराज्यो व्यचरदनुवनं पद्मपद्भ्यां प्रियायाः पाणिस्पर्शाक्षमाभ्यां मृजितपथरुजो यो हरींद्रानुजाभ्याम् ॥ वैरूप्या-च्छूर्पणख्याः प्रियविरहरुषारोपितभ्रूविजंभत्रस्ताब्धिर्बद्धसेतुः खलदवदहनः कोशलेंद्रोऽवतान्नः ॥ ४ ॥ विश्वामित्राध्वरे येन मारीचा-द्या निशाचराः ॥ पश्यतो लक्ष्मणस्यैव हता नैर्ऋतपुंगवाः ॥ ५ ॥ यो लोकवीरसमितौ धनुरैशमुग्रं सीतास्वयंवरगृहे त्रिशतोपनी-तम् ॥ आदाय बालगजलील इवेक्षुयष्टिं सज्जीकृतं नृप विकृष्य बभंज मध्ये ॥ ६ ॥

काच्छेदाद्धेतोः तया प्रलोभितेन रावणेनापहारात्प्रियेण कलत्रेण विरहस्तेन रुट् तयाऽऽरोपितयोर्भ्रुवोर्विजृंभेणैव त्रस्तोऽब्धिर्यस्मात् । ततस्तद्विज्ञापनेन बद्धः सेतुर्येन । ततः खला रावणादय एव दवो वनं तस्य दहनः ॥ ४ ॥ संक्षेपतो वर्णितं रामचरितमादित आरभ्य विस्तरेणाह । विश्वामित्राध्वर इत्यादिना यावदुत्तराध्यायसमाप्ति । पश्यत एव लक्ष्म-णस्य । तमप्यनपेक्ष्यैव हता इत्यर्थः । यच्छब्दानां स कोशलेंद्रोऽवतादित्यनेनैवान्वयः ॥ ५ ॥ लोके ये वीरास्तेषां समितौ समाजे ऐशं त्रैयंबकं धनुरिक्षुयष्टिमिव लीलयैवादाय सज्जीकृतमारोपितं विकृष्य मध्ये बभंज । हे नृप । उग्रं कठिनं गरिष्ठम् । तदाह । वाहकानां त्रिभिः शतैरुपनीतम् । बालगजस्य लीलेव लीला यस्य सः ॥ ६ ॥

झालेल्या त्या शूर्पणखेनें सीतेविषयीं रावणाला लोभ उत्पन्न करून त्याजकडून सीतेचें हरण करविलें असतां, तिच्या वियोगामुळें प्राप्त झालेल्या क्रोधानें चढविलेल्या भृकुटीच्या आवेशेंकरूनच ज्यापासून समुद्र भिऊन गेला आहे; नंतर ज्यानें त्या समुद्राच्या प्रार्थनेनें समुद्रावर सेतु बांधिला आहे आणि जो रावणादि दुष्टरूपी अरण्याला जाळून टाकण्या-विषयीं अग्नीच झाला आहे तो कोसलदेशांचा राजा श्रीरामचंद्र, आमचें रक्षण करो ॥ ४ ॥ याप्रमाणें संक्षेपानें सांगितलेलें रामचरित्र विस्तरानें सांगतो– ज्यानें विश्वा-मित्रऋषीच्या यज्ञामध्यें लक्ष्मण पाहतच असतां, राक्षसांमध्यें श्रेष्ठ असे मारीचादिक राक्षस मारून टाकिले आहेत तो श्रीराम आमचें रक्षण करो ॥ ५ ॥ हे राजा, ज्या श्रीरामानें, सीतेच्या स्वयंवरगृहीं लोकांतील वीरांच्या समाजामध्यें तीनशें वाहकांनीं आणिलेलें फारच जड व अतिकठिण असें शंकराचें धनुष्य ग्रहण करून, सज्ज केलें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मध्येंच मोडून टाकिलें ॥ ६ ॥ नंतर, ज्या श्रीरामानें,
आणि आकर्षण करून, तें जसें बालगजाची लीला धारण करणाऱ्या हत्ती इक्षुदंडाला मध्येंच मोडून टाकितो त्याप्रमाणें
आपणास योग्य अशी गुण, स्वभाव, वय, शरीर आणि सौंदर्य यांनीं युक्त व जिनें पूर्वी समुद्रमंथनापासून उत्पन्न होत्येवेळींच वक्षस्थळाचेठिकाणीं सत्कारपूर्वक स्थळ मिळ-
विलें आहे त्या सीतानामक लक्ष्मीला धनुर्भंगाच्या योगानें स्वाधीन करून घेऊन, आपल्या अयोध्यानगरीमध्यें जातांना, 'ज्यानें पूर्वी एकवीसवेळ पृथिवी राजबीजरहित केली
होती तो' परशुराम, धनुर्भंगाचा नाद ऐकून क्षोभ पावून मार्गामध्यें प्राप्त झाला असतां त्याचा वृद्धिंगत झालेला दर्प घालविला आहे तो श्रीराम, आमचें रक्षण करो ॥ ७ ॥ एके
वेळीं कैकयीला प्रसन्न झालेल्या दशरथानें तुला इच्छित असतील ते दोन वर मी देईन असें सांगितलें होतें पुढें श्रीरामाला यौवराज्याभिषेक करत्ये वेळीं, तिनें भरताला

भृगुपतेर्दर्पं व्यनयदपनीतवान् । अनुरूपाणि स्वयोग्यानि गुणशीलादीनि यस्यास्तां सीतासंज्ञां पूर्वमुरस्यभिलब्धो मानो यया तां श्रियं जित्वा धनुर्भंगमहानादश्रवणक्षुभितस्य
कथंभूतस्य । त्रिःसप्तकृत्वो राजबीजशून्यां महीं योऽकरोत्तस्य ॥ ७ ॥ इदानीं गुर्वर्थे इति श्लोकं विवृण्वन्नाह । य इति । कदाचित्कैकेय्यास्तुष्टेन राज्ञा त्वदपेक्षितं दास्यामीति
प्रतिश्रुतम् । ततः श्रीरामस्य युवराज्याभिषेकसमये तया भरतस्य राज्यं रामस्य च वने वासः प्रार्थितस्तदा सत्यपाशेन परिवीतस्य पितुर्निदेशमाज्ञां शिरसा जगृहे । ततो राज्यादिकं

मार्गे व्रजन्भृगुपतेर्व्यनयत्प्ररूढं दर्पं महीमकृत य-
जित्वाऽनुरूपगुणशीलवयोंऽगरूपां सीताभिधां श्रियमुरस्यभिलब्धमानाम् ॥ राज्यं श्रियं प्रणयिनः सुहृदो नि-
स्त्रिरराजबीजाम् ॥ ७ ॥ यः सत्यपाशपरिवीत पितुर्निदेशं स्त्रैणस्य चापि शिरसा जगृहे सभार्यः ॥ जघ्ने च-
वासं त्यक्त्वा ययौ वनमसूनिव मुक्तसंगः ॥ ८ ॥ रक्षःस्वसुर्व्यकृत रूपमशुद्धबुद्धेस्तस्याः खरत्रिशिरदूषणमुख्यबंधून् ॥
तुर्दशसहस्रमपारणीयकोदंडपाणिरटमान उवाच कृच्छ्रम् ॥ ९ ॥ सीताकथाश्रवणदीपितहृच्छयेन सृष्टं विलोक्य नृपते दशकंधरेण ॥
जघ्नेऽद्भुतैणवपुषाऽऽश्रमतोऽपकृष्टो मारीचमाशु विशिखेन यथा कमुग्रः ॥ १० ॥

॥ ८ ॥ रक्षसो रावणस्य स्वसुः शुर्पणखाया अशुद्धबुद्धेः सीतां जिघृक्षो-
त्यक्त्वा सभार्यो वनं ययौ । दुस्त्यजस्यापि सहर्षत्यागे दृष्टांतः । मुक्तसंगो योगी असून्प्राणानिवेति
कामातुराया इति वा रूपं व्यकृत विकारमनयत् । तस्याः खरत्रिशिरदूषणमुख्या बंधवो येषु तांश्चतुर्दशसहस्रं जघान । अपारणीयमलंघ्यमसह्यं कोदंडं पाणौ यस्य सः ॥ ९ ॥
सीतायाः कथाश्रवणेन दीपितो हृच्छयो यस्य तेन सीतां हरिष्यता स्वस्माद्भीतेन स्वस्याश्रमादपकर्षणार्थं सृष्टं निसृष्टं मारीचं विलोक्य जघान । कथंभूतम् । अद्भुतैणवपुषा स्वर्ण-
हरिणदेहेनोपलक्षितम् । अतएव प्रलोभनेनाश्रमस्तेनापकृष्टः सन् । कं दक्षं यथा उग्रः श्रीरुद्रः ॥ १० ॥

पित्याची वनवासास जाण्याची आज्ञा ज्या रामानें बहु-
राज्य आणि रामाला वनवास असे दोन वर मागितले तेव्हां सत्यरूप पाशानें परिवेष्टित झालेल्या स्त्रीवश अशाहि त्या
मानपूर्वक स्वीकारिली आणि राज्याधिकार, राजसंपत्ति, प्रेमयुक्त असे मातावगैरे सुहृज्जन व अयोध्या नगरी, यांचा 'जसा विरक्त झालेला योगी, आपल्या प्राणांचासुद्धां
त्याग करितो त्याप्रमाणें' त्याग करून, सीतेसहवर्तमान वनामध्यें गमन केलें ॥ ८ ॥ नंतर कामातुरपणानें सीतेच्या तिरस्काराविषयीं प्राप्त झालेल्या शूर्पणखेचें स्वरूप
ज्यानें कर्णनासिकांच्या छेदनानें विरूप केलें, आणि तिनें पाठविलेले, तिचेच खर, त्रिशिर व दूषण हे बंधु ज्यांत मुख्य आहेत असे चवदा हजार राक्षस मारून टाकिले
तो श्रीराम, हातांमध्यें असह्य धनुष्य धारण करून संचार करित लोकशिक्षेकरितां मोठ्या कष्टानें वनामध्यें वास करिता झाला ॥ ९ ॥ हे राजा, नंतर त्या शूर्पणखेच्या मुखां-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ २० ॥ तस्य केशिध्वजस्य भानुमान् ॥ २१ ॥ २२ ॥ तत्तस्मात्सुपार्श्वकः ॥ २३ ॥ अग्निसंभवोऽग्नेरंशात्संभूतः ॥ २४ ॥ यद्यस्मात्सुभाषणः ॥ २५ ॥ २६ ॥ योगेश्वरा याज्ञवल्क्यादयस्तेषां प्रसादेन ॥ २७ ॥ इति श्रीमद्भागवते नवमस्कंधे टीकायां त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥ ॥ चतुर्दशादिभिः सोमवंशमाहासमाप्तितः ॥ यस्मिन्नैलादयो भूपाः कीर्त्यंते पुण्यकीर्त्यय: ॥ १ ॥ चतुर्दशे गुरोः पत्न्यां तारायां सोमजाद्बुधात् ॥ जातश्चैलः षडुर्वश्यामायुमुख्यानजीजनत् ॥ २ ॥ १ ॥

कृतध्वजात्केशिध्वजः खांडिक्यस्तु मितध्वजात् ॥ कृतध्वजसुतो राजन्नात्मविद्याविशारदः ॥ २० ॥ खांडिक्यः कर्मतत्त्वज्ञो भीतः केशिध्वजाद्द्रुतः ॥ भानुमांस्तस्य पुत्रोऽभूच्छतद्युम्नस्तु तत्सुतः ॥ २१ ॥ शुचिस्तत्तनयस्तस्मात्सनद्वाजस्ततोऽभवत् ॥ ऊर्ध्वकेतुः सनद्वाजादजोऽथ पुरुजित्सुतः ॥ २२ ॥ अरिष्टनेमिस्तस्यापि श्रुतायुस्तत्सुपार्श्वकः ॥ ततश्चित्ररथो यस्य क्षेमधिर्मिथिलाधिपः ॥ २३ ॥ तस्मात्समरथस्तस्य सुतः सत्यरथस्ततः ॥ आसीदुपगुरुस्तस्मादुपगुप्तोऽग्निसंभवः ॥ २४ ॥ वस्वनंतोऽथ तत्पुत्रो युयुधो यत्सुभाषणः ॥ श्रुतस्ततो जयस्तस्माद्विजयोऽस्माद्दतः सुतः ॥ २५ ॥ शुनकस्तत्सुतो जज्ञे वीतहव्यो धृतिस्ततः ॥ बहुलाश्वो धृतेस्तस्य कृतिरस्य महावशी ॥ २६ ॥ एते वै मिथिला राजन्नात्मविद्याविशारदाः ॥ योगेश्वरप्रसादेन द्वंद्वैर्मुक्ता गृहेष्वपि ॥ २७ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे नवमस्कंधे निमिवंशानुवर्णनं नाम त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ अथातः श्रूयतां राजन्वंशः सोमस्य पावनः ॥ यस्मिन्नैलादयो भूपाः कीर्त्यंते पुण्यकीर्तयः ॥ १ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वंश मी तुला सांगतों श्रवण कर ॥ १ ॥ सहस्रमस्तकांनीं युक्त अशा भगवान् नारायणाच्या नाभिरूप डोंहातून उत्पन्न झालेल्या कमळापासून ब्रह्मदेव उत्पन्न झाला, त्यापासून सत्य, शौच, सुशीलपणा इत्यादिक गुणांनीं त्या ब्रह्मदेवासारखाच अत्रिनामक पुत्र झाला ॥ २ ॥ त्याच्या नेत्रांतील आनंदाश्रूंपासून अमृतमय असा चंद्र पुत्र उत्पन्न झाला हें मोठें आश्चर्य आहे. त्याला ब्रह्मदेवानें ब्राह्मण, औषधि व नक्षत्रगण यांचें आधिपत्य दिलें ॥ ३ ॥ नंतर त्या चंद्रानें, त्रैलोक्यजिंकून राजसूयनामक यज्ञानें भगवंताचें यजन केलें आणि गर्वयुक्त होऊन बृहस्पतीची तारानामक पत्नी बलात्कारानें हरण केली ॥ ४ ॥ नंतर बृहस्पतीनें आपली पत्नी परत देण्याविषयीं त्याची वारंवार याचना केली असतांहि तो जेव्हां गर्वानें देईना, तेव्हां त्यानिमित्त देवांचा व दानवांचा मोठा संग्राम झाला ॥ ५ ॥ त्याचें कारण असें कीं,– बृहस्पतीच्या द्वे-

---

॥ २ ॥ दृग्भ्यः आनंदाश्रुभ्यः अतएवामृतमयः । किलेत्याश्चर्ये । पाठांतरे दृशो नेत्रात् । वक्ष्यमाणदर्पकारणमाह । विप्रेति ॥ ३ ॥ सोमस्य पुत्रो बुध इति कथाद्वारेणाह । पत्नीमिति सार्धैर्नवभिः ॥ ४ ॥ तत्कृते तन्निमित्तम् ॥ ५ ॥ सुराणां दानवानां च विग्रहे कारणमाह । शुक्र इति । असुरैः सहितः उडुपमग्रहीदित्यर्थः । संधिरार्षः । गुरोः सुतं

सहस्रशिरसः पुंसो नाभिह्रदसरोरुहात् ॥ जातस्यासीत्सुतो धातुरत्रिः पितृसमो गुणैः ॥ २ ॥ तस्य दृग्भ्योऽभवत्पुत्रः सोमोऽमृतमयः किल ॥ विप्रौषध्युडुगणानां ब्रह्मणा कल्पितः पतिः ॥ ३ ॥ सोऽयजद्राजसूयेन विजित्य भुवनत्रयम् ॥ पत्नीं बृहस्पतेर्दर्पात्तारां नामाहरद्बलात् ॥ ४ ॥ यदा स देवगुरुणा याचितोऽभीक्ष्णशो मदात् ॥ नात्यजत्तत्कृते जज्ञे सुरदानवविग्रहः ॥ ५ ॥ शुक्रो बृहस्पतेर्द्वेषादग्रहीत्सासुरोडुपम् ॥ हरो गुरुसुतं स्नेहात्सर्वभूतगणावृतः ॥ ६ ॥ सर्वदेवगणोपेतो महेंद्रो गुरुमन्वयात् ॥ सुरासुरविनाशोऽभूत्समरस्तारकामयः ॥ ७ ॥ निवेदितोऽथांगिरसा सोमं निर्भर्त्स्य विश्वकृत् ॥ तारां स्वभर्त्रे प्रायच्छदंतर्वत्नीमवैत्पतिः ॥ ८ ॥ त्यज त्यजाशु दुष्प्रज्ञे मत्क्षेत्रादाहितं परैः ॥ नाहं त्वां भस्मसात्कुर्यां स्त्रियं सांतानिकः सति ॥ ९ ॥

बृहस्पतिमग्रहीत् । अंगिरसः सकाशात्प्राप्तविद्यो हर इति प्रसिद्धिः ॥ ६ ॥ ७ ॥ निवेदितो विज्ञापितः । विश्वकृद्ब्रह्मा । अवैदबुध्यत ॥ ८ ॥ बृहस्पतिराह । त्यज त्यजेति परैराहितं गर्भम् । गर्भे त्यक्ते भस्मीकरिष्यतीति बिभ्यतीं प्रत्याह । नाहमिति । सांतानिकः संतानार्थी । संतानिके इति पाठे हे सत्पुत्रे इत्यर्थः ॥ ९ ॥

षामुळें शुक्राचार्यानें दैत्यांसहवर्तमान चंद्राचा पक्षपात स्वीकारिला; तसाच, शंकरानें पूर्वीं अंगिरा ऋषीपासून विद्या संपादन केली होती ह्मणून बृहस्पति हा त्याचा गुरुबंधु होता, त्याच्या स्नेहामुळें शंकरानें सर्वभूतगणांसहवर्तमान बृहस्पतीचा पक्ष स्वीकारिला ॥ ६ ॥ आणि इंद्रहि सर्वदेवगणासहवर्तमान गुरूला अनुसरला; असें झालें असतां त्यावेळीं त्या तारेनिमित्त झालेल्या संग्रामामध्यें देवांचा व असुरांचा पुष्कळ नाश झाला ॥ ७ ॥ तथापि तारेला चंद्र देईन, ह्मणून बृहस्पतीनें तो वृत्तांत ब्रह्मदेवाला कळविला असतां त्यानें चंद्राची निर्भर्त्सना करून त्याजकडून गुरूला तारा देववली; तेव्हां बृहस्पतीनें ती गर्भिणी आहे असें जाणून तिला ह्मटलें कीं,– ॥ ८ ॥ हे दुर्बुद्धियुक्ते तारे, तूं माझी स्त्री असून तुझेठिकाणीं शत्रूनें गर्भस्थापन केलें आहे, हें जर तूं पतिव्रता असून शत्रूनें केवळ बलात्कारानें केलें असेल तर याचवेळीं तूं आपल्या पातिव्रत्याच्या सामर्थ्यानें त्या गर्भाचा त्याग कर, त्याग कर; ह्मणजे हे सति मी तुझें शापानें भस्म करणार नाहीं. कारण, मी तुझेठिकाणीं संतानार्थी आहें ॥ ९ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नंतर लज्जित झालेल्या त्या तारेनें गर्भाचा त्याग केला तेव्हां त्या सुवर्णासारख्या कांतीनें युक्त असलेल्या पुत्राविषयीं, बृहस्पति व चंद्र या उभयतांनीं इच्छा धारण केली॥१०॥ आणि ते दोघेहि, 'हा पुत्र माझा आहे, तुझा नव्हे,' असे परस्पर उच्चस्वरानें वादविवाद करूं लागले असतां, देवांनीं व ऋषींनीं तिला 'हा पुत्र कोणाचा आहे ?' असा प्रश्न केला असतां लज्जित झालेली ती तारा काहींच उत्तर देईना ॥ ११ ॥ तेव्हां क्रोधयुक्त झालेला तो पुत्रच आईला ह्मणाला कीं,– हे असद्वृत्ते, ह्या व्यर्थ लज्जेनें तूं कां बोलत नाहींस? तर आपलें दुष्कर्म (कोणापासून गर्भ धारण झालें आहे तें) लवकर मला सांग ॥ १२ ॥ असें विचारिलें असतांहि ती जेव्हां बोलेना तेव्हां, ब्रह्मदेवानें तिला एकांतीं बोलावून, सामोपचारपूर्वक युक्तीनें प्रश्न केला, तेव्हां तिनें हळूच, 'हा पुत्र चंद्राचा आहे' असें सांगितलें. नंतर तो पुत्र चंद्रानें ग्रहण केला ॥ १३ ॥ हे राजा, नंतर त्या पुत्राचें ब्रह्मदेवानें बुध असें नांव ठेविलें. कारण, गंभीरबुद्धीनें युक्त असलेल्या त्या पुत्राच्या योगानें चंद्राला आनंद झाला होता ॥ १४ ॥ त्या बुधापासून इलेचेठिकाणीं

॥ १० ॥ ११ ॥ १२ ॥ रहः एकांते ॥ १३ ॥ पुरूरवस उर्वश्यामायुप्रमुखाः षट् पुत्रा जाता इति वक्तुं कथामाह । तस्येत्यादिना यावत्समाप्ति ॥ १४ ॥ १५ ॥ १६ ॥ ननु

तत्याज व्रीडिता तारा कुमारं कनकप्रभम् ॥ स्पृहामांगिरसश्चक्रे कुमारे सोम एव च ॥ १० ॥ ममायं न तवेत्युच्चैस्तस्मिन्विवदमानयोः ॥ पप्रच्छुर्ऋषयो देवा नैवोचे व्रीडिता तु सा ॥ ११ ॥ कुमारो मातरं प्राह कुपितोऽलीकलज्जया ॥ किं नावोचस्यसद्वृत्ते आत्माऽवद्यं वदाशु मे ॥ १२ ॥ ब्रह्मा तां रह आहूय समप्राक्षीच्च सांत्वयन् ॥ सोमस्येत्याह शनकैः सोमस्तं तावदग्रहीत् ॥ १३ ॥ तस्यात्मयोनिरकृत बुध इत्यभिधां नृप ॥ बुद्ध्या गंभीरया येन पुत्रेणापोडुराण्मुदम् ॥ १४ ॥ ततः पुरूरवा जज्ञे इलायां य उदाहृतः ॥ तस्य रूपगुणौदार्यशीलद्रविणविक्रमान् ॥ १५ ॥ श्रुत्वोर्वशींद्रभवने गीयमानान्सुरर्षिणा ॥ तदंतिकमुपेयाय देवी स्मरशरार्दिता ॥ १६ ॥ मित्रावरुणयोः शापादापन्ना नरलोकताम् ॥ निशम्य पुरुषश्रेष्ठं कंदर्पमिव रूपिणम् ॥ १७ ॥ धृतिं विष्टभ्य ललना उपतस्थे तदंतिके ॥ स तां विलोक्य नृपतिर्हर्षेणोत्फुल्ललोचनः ॥ उवाच श्लक्ष्णया वाचा देवीं हृष्टतनूरुहः ॥ १८ ॥ राजोवाच ॥ स्वागतं ते वरारोहे आस्यतां करवाम किम् ॥ संरमस्व मया साकं रतिर्नौ शाश्वतीः समाः ॥ १९ ॥

देवी कुतो मनुष्यस्यांतिकमुपागच्छेत्तत्राह । मित्रावरुणयोः शापान्नरलोकतां मनुष्यभावमापन्ना सती ॥ १७ ॥ १८ ॥ नौ आवयो रतिरस्त्विति ॥ १९ ॥

पुरूरवानामक पुत्र झाला; असें मी तुला पूर्वीं सांगितलेंच आहे. त्या पुरूरव्याचें रूप, गुण, औदार्य, शील, संपत्ति व पराक्रम यांचें इंद्राच्या सभेमध्यें, नारदानें गायन केलें असतां, तें देवांची अप्सरा जी उर्वशी, तिनें श्रवण करून, कामबाणांनीं पीडित होत्साती, त्या पुरूरव्याच्या समीपभागीं प्राप्त झाली ॥ १५ ॥ १६ ॥ ती उर्वशी देवी असून मनुष्याकडे कशी आली असें ह्मणशील तर सांगतों ऐक.– तिला, मित्र आणि वरुण या नांवाच्या दोन देवांचा 'तूं मनुष्यधर्मे पावशील असा' शाप झाला होता, ह्मणून त्या देवांगना उर्वशीनें, मदनासारखा सुंदर व पुरुषश्रेष्ठ अशा त्या पुरूरव्या राजाला पाहून, धैर्याचा आश्रय करून त्याच्या समीप येऊन उभी राहिली ॥ १७ ॥ तेव्हां तो राजा, त्या देवी उर्वशीला पाहून हर्षानें प्रफुल्लितनेत्र व अंगावर रोमांच धारण करीत होत्साता मधुर वाणीनें ह्मणाला कीं,– ॥ १८ ॥ राजा ह्मणाला– हे सुंदरी, तुझें येणें फार चांगलें झालें; तूं येथें बसावेंस, आह्मी तुझें कोणतें प्रिय करावें ? तूं माझ्या बरोबर

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रममाण हो, तुझी व माझी बहुत वर्षेंपर्यंत रतिक्रीडा होवो ॥ १९ ॥ असें राजाचें भाषण ऐकून उर्वशी म्हणाली– हे सुंदरा, कोणत्या बरें स्त्रीचें मन व दृष्टि तुझेठिकाणीं
आसक्त होणार नाहींत ? सर्वांचींहि होतीलच. कारण, ज्या तुझ्या दृष्टिगोचर झालेली स्त्री, तुझ्याशीं रममाण होण्याच्या इच्छेनें तुझ्या जवळून दुसरेठिकाणीं जात नाहीं हें
स्पष्ट आहे. अथवा ज्या तुझें वक्षःस्थळ पाहतांच तुझ्याबरावर रतिक्रीडेची इच्छा धारण करणाऱ्या स्त्रीचीं विवेकधैर्यादिक नाहींशीं होतात ॥ २० ॥ आतां शाप संपल्यानंतर
पुन्हा स्वर्गावर जाण्याची इच्छा करणाऱ्या त्या उर्वशीचा भाषाबंध (ठराव) सांगतात– हे सन्मान देणाऱ्या राजा, हे दोन मेंढे मी पुत्रांप्रमाणें पालन केलेले असून हे मी
रक्षणाकरितां तुझ्याजवळ ठेवित्यें, यांचें तूं रक्षण कर. जोपर्यंत तूं यांचें रक्षण करिशील तोंपर्यंच मी देवांगना असूनहि तुझ्याबरावर रममाण होईन; नाहीं तर तुला सोडून
जाईन. कारण, रूपौदार्यादिक गुणांनीं जो वर्णनीय असेल तोच आम्हां अप्सरांना पति सांगितला आहे ॥ २१ ॥ आणि हे वीरा, देवांचा आहार अमृत आहे व मनुष्यलोकीं

यस्य तवांगांतरं वक्ष आसाद्य रिरंसया रंतुमिच्छया ह स्फुटं न च्यवते नापयाति । यद्यस्मादितिवा ॥ २० ॥ शापावसाने भाषाभंगमिषेण जिगमिषोस्तस्या भाषाबंधमाह ।
एतावितिति द्वाभ्याम् । उरणकौ मेषौ न्यासौ निक्षेपरूपौ रक्षस्व । यः श्लाघ्यः स एव स्त्रीणां वरः स्मृतः । अतो विजातीयत्वं न दोष इति भावः ॥ २१ ॥ हे वीर घृतं मे भक्ष्यं

उर्वश्युवाच ॥ कस्यास्त्वयि न सज्जेत मनो दृष्टिश्च सुंदर ॥ यदंगांतरमासाद्य च्यवते ह रिरंसया ॥ २० ॥ एतावुरणकौ राजन्न्यासौ र-
क्षस्व मानद ॥ संरंस्ये भवता साकं श्लाघ्यः स्त्रीणां वरः स्मृतः ॥ २१ ॥ घृतं मे वीर भक्ष्यं स्यान्नेक्षे त्वाऽन्यत्र मैथुनात् ॥
विवाससं तत्तथेति प्रतिपेदे महामनाः ॥ २२ ॥ अहो रूपमहो भावो नरलोकविमोहनम् ॥ को न सेवेत मनुजो देवीं त्वां
स्वयमागताम् ॥ २३ ॥ तया स पुरुषश्रेष्ठो रमयंत्या यथार्हतः ॥ रेमे सुरविहारेषु कामं चैत्ररथादिषु ॥ २४ ॥ रममाणस्त-
या देव्या पद्मकिंजल्कगंधया ॥ तन्मुखामोदमुषितो मुमुदेऽहर्गणान्बहून् ॥ २५ ॥ अपश्यन्नुर्वशीमिंद्रो गंधर्वान्समनोदयत् ॥
उर्वशीरहितं मह्यमास्थानं नातिशोभते ॥ २६ ॥

स्यात् । अमृतं वा आज्यमिति श्रुतेः । देवानां चामृताशित्वात् । मैथुनादन्यत्र विवाससं त्वां नेक्षिष्ये । इति प्रतिपेदेंऽगीकृतवान् ॥ २२ ॥ तदेवाह । अहो इति ॥ २३ ॥ २४ ॥
पद्मकिंजल्कस्य गंध इव गंधो यस्यास्तस्या मुखामोदेन मुषितः प्रलोभितः सन् ॥ २५ ॥ मह्यं मम ॥ २६ ॥

घृत हेंच अमृत आहे, यास्तव मी घृताचेंच भक्षण करीन, अन्नाचें भक्षण करणार नाहीं आणि मैथुनाखेरीज दुसऱ्या वेळीं केव्हांहि तुला नग्न पाहणार नाहीं; पाहतांच निघून
जाईन. हे तिचे भाषाबंध (ठराव) ऐकून ते तसेच चालविण्याचा त्या उदारचित्त पुरूरव्यानें पत्कर घेतला ॥ २२ ॥ आणि तिच्याशीं असें भाषण केलें कीं,– मनुष्यलो-
काला मोह उत्पन्न करणारें काय हें तुझें सौंदर्य ! काय हें तुझें चातुर्य ! स्वतां होऊन प्राप्त झालेल्या देवभोग्य अशा तुज उर्वशीचें, कोण बरें मनुष्य सेवन करणार नाहीं ?
सर्वहि सेवन करतीलच ॥ २३ ॥ असें म्हणतांच ती उर्वशी त्याच्याशीं रममाण होण्याविषयीं सिद्ध झाली. नंतर यथायोग्य रीतीनें रमविण्याऱ्या त्या उर्वशीसहवर्त-
मान, तो पुरुषश्रेष्ठ पुरूरवा राजा, देवांचीं क्रीडास्थानें अशा चैत्ररथ, नंदन इत्यादिक उपवनांमध्यें यथेच्छपणें क्रीडा करूं लागला ॥ २४ ॥ कमलांतील मकरंदाप्रमाणें ॥ ३४ ॥
जिच्या अंगाचा सुवास येत आहे अशा त्या उर्वशीसहवर्तमान रममाण होणारा तो राजा, तिच्या मुखसंबंधी सुगंधानें मोहित होऊन बहुत दिवस आनंद पावला ॥ २५ ॥
नंतर एकेदिवशीं स्वर्गाचेठिकाणीं उर्वशीला न पाहणाऱ्या इंद्रानें, उर्वशीवांचून माझें स्थान अत्यंत शोभत नाहीं असें मानून, तिला आणण्याकरितां गंधर्वांस पाठविलें ॥ २६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ते गंधर्व, मध्यरात्रीच्या वेळीं पराकाष्ठेचा अंधकार पडला असतां भूमीवर येऊन, पुरूरव्याजवळ उर्वशीनें ठेविलेल्या उर्वशीच्या दोन्हीं मेंढ्यांस पळवून घेऊन चालले ॥ २७ ॥
तेव्हां नेत असलेल्या व पुत्रांप्रमाणें पालन केलेल्या त्या मेंढ्यांचें आक्रोशयुक्त रोदन श्रवण करून, ती उर्वशी पुरूरव्याला सोडून गेली. तेव्हां जाऊं इच्छिणाऱ्या तिचीं
कठोर भाषणें अशीं कीं– हे पुरूरव्या, नपुंसकासारखा पराक्रमरहित असून व्यर्थच आपणाला वीर असें मानणाऱ्या तूं निंद्य नाथानें माझा मोठा घात केला आहेस ॥ २८ ॥
ज्या तुझ्यावर ‘ हा वीर माझ्या पुत्रांचें रक्षण करील , असा ’ विश्वास ठेवून, मी नष्ट झाल्यें. कारण, माझे पुत्र चोरांनीं नेले; जो तूं, रात्रीच्या वेळीं स्त्रीसारखा अत्यंत
भिऊन निजतोस, दिवसा मात्र पुरुषासारखा व्यवहार करितोस त्या तुला नपुंसक ह्मणूं नये तर ह्मणावें तरी काय ? ॥ २९ ॥ अशा भाषणरूप बाणांनीं ‘ जसा अंकुशांनीं
हत्ती विद्ध होतो त्याप्रमाणें ’ विद्ध झालेला तो पुरूरवा, नग्न असतांच हातांत खड्ग घेऊन, क्रोधानें रात्रीच्या वेळीं गंधर्वांच्या पाठीमागून धांवला ॥ ३० ॥ तेव्हां

महारात्रे मध्यरात्रे । महानिशा द्वे घटिके रात्रौ मध्यमयामयोरिति स्मृतेः ॥ २७ ॥ जिगमिषोस्तस्याः परुषोक्तिमाह । हताऽस्मीति सार्धेन । नपुंसा नपुंसकेन ॥ २८ ॥ यथा
नारी तथा संत्रस्तः शेते ॥ २९ ॥ ३० ॥ विद्युतो विशिष्टद्युतिमंतो व्यद्योतंत दीप्तिमकुर्वत । यद्वा तदैव तडितः प्राकाशंतेत्यर्थः । नग्नमैक्षत । अतो भाषाभंगान्निर्जगामेति

त उपेत्य महारात्रे तमसि प्रत्युपस्थिते ॥ उर्वश्या उरणौ जह्रुर्न्यस्तौ राजनि जायया ॥ २७ ॥ निशम्याक्रंदितं देवी पुत्रयोर्नीयमा-
नयोः ॥ हताऽस्म्यहं कुनाथेन नपुंसा वीरमानिना ॥ २८ ॥ यद्विश्रंभादहं नष्टा हृतापत्या च दस्युभिः ॥ यः शेते निशि संत्रस्तो
यथा नारी दिवा पुमान् ॥ २९ ॥ इति वाक्सायकैर्विद्धः प्रतोत्रैरिव कुंजरः ॥ निशि निस्त्रिंशमादाय विवस्त्रोऽभ्यद्रवद्रुषा ॥ ३० ॥
ते विसृज्योरणौ तत्र व्यद्योतंत स्म विद्युतः ॥ आदाय मेषावायांतं नग्नमैक्षत सा पतिम् ॥ ३१ ॥ ऐलोऽपि शयने जायामपश्य-
न्विमना इव ॥ तच्चित्तो विह्वलः शोचन्बभ्रामोन्मत्तवन्महीम् ॥ ३२ ॥ स तां वीक्ष्य कुरुक्षेत्रे सरस्वत्यां च तत्सखीः ॥ पंच प्रहृ-
ष्टवदनाः प्राह सूक्तं पुरूरवाः ॥ ३३ ॥ अहो जाये तिष्ठ तिष्ठ घोरे न त्यक्तुमर्हसि ॥ मां त्वमद्याप्यनिर्वृत्य वचांसि कृणवावहै ॥ ३४ ॥

ज्ञेयम् ॥ ३१ ॥ ३२ ॥ तस्याः सखीश्च पंच वीक्ष्य । सूक्तं शोभनं वचनं । हये जाये इत्यादि ॥ ३३ ॥ तदेवार्थंत आह । अहो इति द्वाभ्याम् । अनिर्वृत्य मत्कृतां निर्वृति-
मप्राप्य । पाठांतरे मां निर्वृतिमगमयित्वा मंत्राननुक्त्वेति वा । वचांसि कृणवावहै गोष्ठीः करवावहै ॥ ३४ ॥

गंधर्वांनीं मेंढ्यांना तेथेंच टाकून ते विजेसारख्या विशिष्ट कांतीनें युक्त होऊन प्रकाश करूं लागले. तेव्हां मेंढ्यांना घेऊन येणाऱ्या पतीला (पुरूरव्याला) त्या उर्व-
शीनें नग्न अवलोकन केलें. तेव्हां ती उर्वशी ‘ बोली केलेल्या नियमांचा भंग झाल्यामुळें ’ तत्काल त्याचा त्याग करून निघून गेली ॥ ३१ ॥ नंतर पुरूरवा राजाहि
शयनावर उर्वशीला न पाहिल्यामुळें चित्तशून्य असल्यासारखा (वेड्यासारखा) झाला आणि तिच्यावर चित्त ठेऊन विव्हळ होत्साता, ‘ आतां ती उर्वशी मला प्राप्त
कशी होईल असा ’ शोक करीत उन्मत्तासारखा भूमीवर फिरूं लागला ॥ ३२ ॥ याप्रमाणें पृथिवीवर फिरतांफिरतां एकेवेळीं त्या पुरूरव्यानें कुरुक्षेत्रामध्यें सरस्वती
नदीच्या तीरीं, त्या उर्वशीला आणि हर्षयुक्तमुख असलेल्या तिच्या पांच सख्यांना अवलोकन करून, सूक्तरूपानें असें भाषण केलें कीं, ॥ ३३ ॥ अहो जाये,
तूं अजून माझ्यापासून उत्तम सुख न पावतां या घोर विरहदुःखामध्यें मला पाडण्यास योग्य नाहींस. यास्तव जाऊं नको. रहा रहा. तूं व मी मिळून परस्पर आनंद

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कारक गोष्टी सांगूं या ॥ ३४ ॥ हे देवि, हा माझा सुंदर देह, तूं फार लांब टाकला आहेस, याच्यावर तुझी कृपा झाली नाहीं तर हा आतां याठिकाणींच मरून पडेल आणि याला लांडगे व गिधाड भक्षण करितील, यास्तव माझ्यावर तूं प्रसन्न हो ॥ ३५ ॥ असें भाषण केलें असतां उर्वशी ह्मणाली– हे राजा, तूं मरूं नकोस. कारण, तूं पुरुष आहेस यास्तव धैर्य धारण कर. ~~याठिकाणीं असणारे लांडगे तुला भक्षण न करोत. मला असा बोध करिशील तर तूंच कृपा कां करित नाहींस, असें ह्मणशील तर सांगत्यें ऐक–~~ स्त्रियांचें सख्य कोठेंहि स्थिर नाहीं. जसें लांडग्यांचें हृदय क्रूर असतें तसेंच स्त्रियांचे हृदय असतें ॥ ३६ ॥ ह्मणजे स्त्रिया ह्या, क्रूरस्वभावाच्या, निर्दय व क्षमारहित असून आपल्या हिताकरितां साहस कृत्य करणाऱ्या असतात, ह्मणून त्या थोड्या कामाकरितांहि, विश्वास पावलेल्या पतीला किंवा भावालासुद्धां ठार मारतात; मग दुसऱ्यांना मारतील हें काय सांगावें ! ॥ ३७ ॥ आणि त्या स्त्रिया अज्ञपुरुषांचेठिकाणीं कपटानें विश्वास दाखवितात; परंतु स्वतः स्नेहशून्य असून व्यभिचार करणाऱ्या व न-

---

सुदेहोऽतिकमनीयोऽयं मम देहः ॥ ३५ ॥ पुरूरवो मामृथा इत्यादि तस्याः सूक्तं तदप्यर्थंत आह। मामृथा इति चतुर्भिः । मा म्रियस्व पुरुषोऽसि अतो धैर्यमावहेति भावः । इमे वृकाः प्रसिद्धा इंद्रियाणि वा त्वा इति त्वां मास्म अद्युर्भक्षयेयुः । इंद्रियवशो मा भवेत्यर्थः ॥ ३६ ॥ प्रिये निमित्ते साहसं यासाम् ॥ ३७ ॥ ३८ ॥ तं सांत्वयति ।

सुदेहोऽयं पतत्यत्र देवि दूरं हृतस्त्वया ॥ खादंत्येनं वृका गृध्रास्त्वत्प्रसादस्य नास्पदम् ॥ ३५ ॥ उर्वश्युवाच ॥ मामृथाः पुरुषोऽसि त्वं मास्म त्वाऽद्युर्वृका इमे ॥ क्वापि सख्यं न वै स्त्रीणां वृकाणां हृदयं यथा ॥ ३६ ॥ स्त्रियो ह्यकरुणाः क्रूरा दुर्मर्षाः प्रियसाहसाः ॥ घ्नंत्यल्पार्थेऽपि विश्रब्धं पतिं भ्रातरमप्युत ॥ ३७ ॥ विधायालीकविश्रंभमज्ञेषु त्यक्तसौहृदाः ॥ नवं नवमभीप्संत्यः पुंश्चल्यः स्वैरवृत्तयः ॥ ३८ ॥ संवत्सरांते हि भवानेकरात्रं मयेश्वर ॥ वत्स्यत्यपत्यानि च ते भविष्यंत्यपराणि भोः ॥ ३९ ॥ अंतर्वत्नीमुपालभ्य देवीं स प्रययौ पुरम् ॥ पुनस्तत्र गतोऽब्दांत उर्वशीं वीरमातरम् ॥ ४० ॥ उपलभ्य मुदा युक्तः समुवास तया निशाम् ॥ अथैनमुर्वशी प्राह कृपणं विरहातुरम् ॥ ४१ ॥ गंधर्वानुपधावेमांस्तुभ्यं दास्यंति मामिति ॥ तस्य संस्तुवतस्तुष्टा अग्निस्थालीं ददुर्नृप ॥ उर्वशीं मन्यमानस्तां सोऽबुद्ध्यत चरन्वने ॥ ४२ ॥

संवत्सरांत इति ॥ ३९ ॥ अपराणीति वचनादंतर्वत्नीमुपालभ्य ज्ञात्वा ॥ ४० ॥ ४१ ॥ अनेनाग्निना कर्म कृत्वा तद्वशादुर्वशीं प्राप्स्यतीत्यभिप्रायेणाग्निस्थालीं ददुः । स तु तां स्थालीमेवोर्वशीं मन्यमानस्तया सहितो वने विचरन्नेयमुर्वशी किंत्वग्निस्थालीत्यबुध्यत ॥ ४२ ॥

व्यानव्या पतीची इच्छा करणाऱ्या असल्यामुळें यथेच्छपणें वागतात ह्मणून तूं माझें सख्य सोडून दे ॥ ३८ ॥ असें सांगितलें असतांहि त्या राजाची शांतता होईना ह्मणून सांत्वन करित्ये कीं,– हे समर्था राजा, तूं धैर्य धर. आजपासून एका वर्षानंतर तूं एक रात्र माझ्यासहवर्तमान या स्थळीं वास करशील आणि तुला मजपासून दुसरीं मुलेंहि होतील. यावरून त्यावेळीं तिनें आपण गर्भिणी आहें असें सुचविलें ॥ ३९ ॥ नंतर ती उर्वशी गर्भिणी आहे असें जाणून तो पुरूरवा राजा, आपल्या नगरामध्यें निघून गेला. पुढें वर्ष झाल्यानंतर त्या कुरुक्षेत्रामध्यें त्यानें जाऊन तेथें पुत्रासहवर्तमान आलेली उर्वशी पाहिली आणि हर्षयुक्त होऊन तिच्या सहवर्तमान ती रात्र तेथेंच राहिला ॥ ४० ॥ दुसरेदिवशीं तेथून जातांना आपल्या वियोगानें व्याकुळ झालेल्या दीन अशा त्या पुरूरव्याला उर्वशी ह्मणाली कीं, तूं ह्या गंधर्वांना स्तुतिवगैरे साधनांनीं संतुष्ट कर ह्मणजे ते गंधर्व, तुजकारणें मला देतील ॥ ४१ ॥ हे राजा, नंतर त्या पुरूरव्यानें स्तुति केली असतां संतुष्ट झालेल्या गंधर्वांनीं त्या पुरूरव्याला, ' या अग्नीच्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

योगानेंच तूं उर्वशीलोकाच्या प्राप्तीचें साधन असें कर्म करून तेथें गेलास ह्मणजे तुला उर्वशी प्राप्त होईल, अशा अभिप्रायानें त्यांनीं त्याला' उर्वशीनांवाची एक अग्निस्थाली दिली.
नंतर तो राजा, त्या स्थालीलाच ही उर्वशी आहे असें मानून तिला आलिंगन करून थोडा वेळपर्यंत वनामध्यें फिरत होता. पुढें त्यानें, ही उर्वशी नव्हे तर अग्निस्थाली आहे
असें जाणलें ॥ ४२ ॥ नंतर त्या स्थालीला वनांमध्येंच ठेऊन त्यानें आपल्या घरीं गमन केलें आणि रात्रीचेवेळीं नित्य त्या उर्वशीचेंच चिंतन करणाऱ्या त्या राजाच्या
मनामध्यें, त्या त्रेतायुगाच्या आरंभीं कर्ममार्गाचे बोधक असे तीन वेद प्रकट झाले ॥ ४३ ॥ नंतर त्यानें स्थाली ठेवण्याच्या जागीं वनांत जाऊन तेथें शमीवृक्षाच्या
पोटीं झालेल्या अश्वत्थवृक्षाला पाहून व त्यावेठिकाणीं 'हा अग्नि आहे' असें विशेषेंकरून जाणून त्या अश्वत्थाच्या काष्ठांच्या दोन अरणि (अग्निमंथनाचीं काष्ठें)
करून आपणास उर्वशीलोकाची प्राप्ति व्हावी म्हणून अग्नीचें मंथन केलें ॥ ४४ ॥ त्यांत खालची अरणि ही उर्वशी आणि वरची अरणि हा आपण पुरूरवा

ततश्च तां स्थालीं वने स्थापयित्वा गृहान्गत्वा निशि नित्यं तामेव ध्यायतस्तस्य मनसि त्रेतायां त्रयी अवर्तत कर्मबोधकं वेदत्रयं प्रादुरभूत् ॥ ४३ ॥ ततः स्थालीस्थानं
गतः सन् शम्या गर्भे जातमश्वत्थं विलक्ष्यास्मिन्नसावग्निरस्तीति विशेषेण लक्षयित्वा तेनाश्वत्थेन द्वे अरणी कृत्वाऽग्निं ममंथेति शेषः । शमीगर्भादग्निं ममंथेति श्रुतिः
॥ ४४ ॥ मथनप्रकारमाह । अधरारणिमुर्वशीं ध्यायन्नुत्तरारणिमात्मानं ध्यायन्नुभयोर्मध्ये यत्काष्ठं तत्प्रजननं पुत्रं ध्यायन् । तथाच मंत्रः । उर्वश्यस्यायुरसि पुरुरवा इति

**स्थालीं न्यस्य वने गत्वा गृहांस्तां ध्यायतो निशि ॥ त्रेतायां संप्रवृत्तायां मनसि त्रय्यवर्तत ॥ ४३ ॥ स्थालीस्थानं गतोऽश्वत्थं
शमीगर्भं विलक्ष्य सः ॥ तेन द्वे अरणी कृत्वा उर्वशीलोककाम्यया ॥ ४४ ॥ उर्वशीं मंत्रतो ध्यायन्नधरारणिमुत्तराम् ॥ आत्मान-
मुभयोर्मध्ये यत्तत्प्रजननं प्रभुः ॥ ४५ ॥ तस्य निर्मंथनाज्जातो जातवेदा विभावसुः ॥ त्रय्या स विद्यया राज्ञा पुत्रत्वे कल्पितस्त्रि-
वृत् ॥ ४६ ॥ तेनायजत यज्ञेशं भगवंतमधोक्षजम् ॥ उर्वशीलोकमन्विच्छन्सर्वदेवमयं हरिम् ॥ ४७ ॥ एक एव पुरा वेदः प्रणवः
सर्ववाङ्मयः ॥ देवो नारायणो नान्य एकोऽग्निर्वर्ण एव च ॥ ४८ ॥**

॥ ४५ ॥ तेन तस्य कृतान्निर्मंथनाद्विभावसुरग्निर्जातः । कथंभूतः । जातं वेदो धनं भोग्यं यस्मात् । स च त्रय्या विद्यया विहितेनाधानसंस्कारेण । त्रिवृदाहवनीयादिरूपः स-
न्राज्ञा पुरूरवसा पुत्रत्वे कल्पितः पुण्यलोकप्रापकत्वात् ॥ ४६ ॥ तदाह । तेनेति ॥ ४७ ॥ नन्वनादिर्वेदत्रयबोधितो ब्राह्मणादीनामिंद्राद्यनेकदेवयजनेन स्वर्गप्राप्तिहेतुः कर्म-
मार्गः कथं सादिरिव वर्ण्यते तत्राह । एक एवेति द्वाभ्याम् । पुरा कृतयुगे सर्ववाङ्मयः सर्वासां वाचां बीजभूतः प्रणव एक एव । वेदः देवश्च नारायण एक एव । अग्निश्चैक एव
लौकिकः । वर्णश्चैक एव हंसो नाम ॥ ४८ ॥

असें चिंतन करण्याऱ्या व दोहोंच्या मध्यें असणाऱ्या काष्ठाचें पुत्रत्वेंकरून चिंतन करणाऱ्या त्या समर्थ पुरूरव्यानें, अग्निमंथनप्रकाशक मंत्रप्रयोगाच्या योगानें
अग्नीचें मंथन केलें ॥ ४५ ॥ त्यानें केलेल्या मंथनापासून जातवेदानामक अग्नि उत्पन्न झाला. तो वेदत्रयानें झालेल्या आधानसंस्कारानें आहवनीय, गार्ह-
पत्य आणि दक्षिणाग्नि या तीन नांवानीं प्रसिद्ध झाला. तो पुण्यलोकाला पोंचविणारा असल्यामुळें राजानें त्याला 'हा माझा पुत्र आहे' असें मानिलें ॥ ४६ ॥
नंतर उर्वशीलोकाची इच्छा करणाऱ्या त्या पुरूरव्यानें त्या साधनभूत अग्नीच्या योगानें, यज्ञाचें फळ देणारा, सर्व देवमय जो अधोक्षज भगवान् हरि त्याचें यजन केलें
॥ ४७ ॥ आतां, ब्राह्मणादिकांना इंद्रादिक अनेक देवांच्या आराधनानें स्वर्गप्राप्तीला कारण असा जो अनादि वेदमार्ग तो तुह्मी आधुनिक असल्यासारखा कसा वर्णन करितां

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असें ह्मणशील तर– हे राजा, पूर्वीं कृतयुगामध्यें सर्व वाणीचा बीजभूत जो ओंकार तोच एक वेद होता. देवहि नारायण एकच होता, दुसरा नव्हता. तसाच लौकिक अग्नि व हंसनामक वर्ण हेंहि एकेकच होते ॥ ४८ ॥ हे राजा, पुढें त्रेतायुगाच्या आरंभीं तीन वेद पुरूरव्यापासूनच प्रकट झाले. ह्मणजे कृतयुगामध्यें बहुतकरून सर्वहि लोक सत्वगुण-प्रधान ध्याननिष्ठ होते, त्रेतायुगामध्येंच तीन वेदांच्या विभागेंकरून यज्ञादिक कर्ममार्ग प्रकट झाला. असो. नंतर पुरूरवा राजा, पुत्रत्वानें स्वीकारिलेल्या अग्नीच्या योगानें गंधर्वलोकास निघून गेला ॥ ४९ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील नवमस्कंधामध्यें ऐलोपाख्यानरूप हा चवदावा अध्याय समाप्त झाला ॥ १४ ॥ ॥ आतां ह्या पंधराव्या अध्यायामध्यें, पुरूरव्याच्या वंशांत गाधिराजा उत्पन्न झाला व त्याच्या कन्येचा नातू जो परशुराम त्यानें क्रोधानें सहस्रार्जुनाचा वध केला ही कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, त्या पुरूरव्या राजाला उर्वशीपासून सहा पुत्र झाले. त्यांचीं नांवें– आयु, श्रुतायु, सत्यायु, रय, विजय आणि

वेदत्रयी तु पुरूरवसः सकाशादासीत् । एयिवान्प्राप । अयं भावः । कृतयुगे सत्त्वप्रधानाः प्रायशः सर्वेऽपि ध्याननिष्ठाः रजःप्रधाने तु त्रेतायुगे वेदादिविभागेन कर्ममार्गः प्रकटो बभूवेति ॥ ४९ ॥ इति श्रीमद्भागवते नवमस्कंधे टीकायां चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥ ॥ ततः पंचदशे गाधिरैलपुत्रान्वयेऽजनि ॥ यद्दौहित्रसुतो रामः कार्तवीर्यमहन् रुषा

पुरूरवस एवासीत्त्रयी त्रेतामुखे नृप ॥ अग्निना प्रजया राजा लोकं गांधर्वमेयिवान् ॥ ४९ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे नवमस्कंधे ऐलोपाख्याने चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ ऐलस्य चोर्वशीगर्भात्षडासन्नात्मजा नृप ॥ आयुः श्रुतायुः सत्यायु रयोऽथ विजयो जयः ॥१॥ श्रुतायोर्वसुमान्पुत्रः सत्यायोश्च श्रुतंजयः ॥ रयस्य सुत एकश्च जयस्य तनयोऽमितः ॥२॥ भीमस्तु विजयस्याथ कांचनो होत्रकस्ततः ॥ तस्य जह्नुः सुतो गंगां गंडूषीकृत्य योऽपिबत् ॥ जह्नोस्तु पूरुस्तत्पुत्रो बलाकश्चात्मजोऽजकः ॥ ३ ॥ ततः कुशः कुशस्यापि कुशांबुर्मूर्तयो वसुः ॥ कुशनाभश्च चत्वारो गाधिरासीत्कुशांबुजः ॥ ४ ॥ तस्य सत्यवतीं कन्यामृचीकोऽयाचत द्विजः ॥ वरं विसदृशं मत्वा गाधिर्भार्गवमब्रवीत् ॥ ५ ॥

॥ १ ॥ १ ॥ सुग्रहत्वायाल्पादिक्रमेण श्रुतायुप्रभृतिषण्णां वंशानाह । श्रुतायोरित्यादिना । एक एकसंज्ञः । अमितस्तत्संज्ञः ॥ २ ॥ जह्नोः पूरुस्तस्य बलाकस्तस्याजकः ॥ ३ ॥ ॥ ४ ॥ गाधेः पुत्रो विश्वामित्रो ब्रह्मर्षिरभूदित्युत्तराध्यायांते वक्ष्यति । गाधेरभून्महातेजा इत्यादिना । तत्र तावत्तदुपोद्घातत्वेन भृगुवंशसंभवस्य ऋचीकस्य चरित्रं प्रसक्तानुप्रसक्तेन च परशुरामावतारचरितमाह । तस्य सत्यवतीमित्यादिना । विसदृशमननुरूपम् । भार्गवमृचीकम् ॥ ५ ॥

जय हीं होत ॥ १ ॥ त्यांपैकीं श्रुतायूचा पुत्र वसुमान् झाला. सत्यायूपासून श्रुतंजय झाला. रयाला एक ह्या नांवाचा पुत्र झाला. जयाला अमित या नांवाचा पुत्र झाला ॥ २ ॥ विजयाला भीम या नांवाचा पुत्र झाला, त्यापासून कांचन झाला, त्यापासून होत्रक झाला, त्याला जन्हु ह्या नांवाचा पुत्र झाला, त्यानें सगळ्याच गंगेला ओंजळींत घेऊन प्राशन केली होती, ती पुढें त्याच्या मांडींतून बाहेर पडली ह्मणून तिला जान्हवी असें नांव पडलें आहे ॥ ३ ॥ जन्हूपासून पूरु ह्या नांवाचा पुत्र झाला, त्याचा पुत्र बलाक, त्याचा पुत्र अजक, त्यापासून कुश नांवाचा पुत्र झाला, त्या कुशाचेहि कुशांबु, मूर्तय, वसु आणि कुशनाभ असे चार पुत्र झाले, त्यांपैकीं, कुशांबूपासून गाधि ह्या नांवाचा पुत्र झाला ॥ ४ ॥ त्याला विश्वामित्रनामक ब्रह्मर्षि पुत्र झाला हें पुढील अध्यायांत येईल. आतां प्रस्तुत उपोद्घातरूपानें भृगुवंशांत झालेल्या ऋचीक ऋषीचें चरित्र व त्यावसंबंधानें झालेला परशुरामाचा अवतार व त्याचें चरित्र सांगतो– त्या गाधिराजाची सत्यवतीनामक कन्या, ऋचीक ऋषीनें विवाह करण्याकरितां

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मागितली असतां गाधिराजानें, आपल्या कन्येला तो वर योग्य नाहीं असें मानून त्या ऋचीकाला सांगितलें कीं– ॥ ५ ॥ हे ऋषे, डावा किंवा उजवा ह्या दोन्ही कानांपैकीं ज्यांचा एक कान श्यामवर्ण आहे व ज्यांच्या सर्व अंगाचेठिकाणीं चंद्रासारखें तेज आहे अशा घोड्यांचें एकसहस्र माझ्या कन्येचें शुल्क (विवाहाचे वेळीं द्यावयाचा नजराणा) द्यावें. तर मी कन्या देईन. हेंसुद्धां देणें अपुरेंच आहे. कारण, आह्मी अतिकुलीन आहों. ह्मणून आमची कन्या दुर्लभ आहे ॥ ६ ॥ असें सांगितलें असतां, त्या गाधिराजाचें मत, ‘ मी योग्य नाहीं ह्मणून दुर्लभ घोडे मागून ’ मला फसविण्याचें आहे असें जाणून, तो ऋषि, वरुणाजवळ गेला आणि त्याच्यापासून ते तशाप्रकारचे घोडे मागून आणून दिले आणि त्यानें त्या सत्यवती कन्येला वरिलें ॥ ७ ॥ पुढें एकेवेळीं सत्यवतीनें व तिच्या आईनें आपणास पुत्र व्हावा या इच्छेनें त्या ऋषीची, प्रार्थना केली असतां, पत्नीकरितां ब्रह्मतेजवृद्धिकारक व सासूकरितां क्षत्रियतेजवृद्धिकारक अशा दोन्हीप्रकारच्या मंत्रांनीं संस्कृत असा निरनिराळा चरु शिजवून, तो

दक्षिणवामयोरेकतः श्यामः कर्णो येषाम् । सर्वस्मिन्नंगे चंद्रस्येव वर्चो येषाम् । न चेदमपि पर्याप्तमस्मत्कन्यायाः । यतः कुशिकाः कौशिका वयम् ॥ ६ ॥ ७ ॥ उभयैर्मंत्रैः पत्न्यै ब्राह्मैर्मंत्रैः श्वश्वे तु क्षात्रैरित्यर्थः ॥ ८ ॥ यावत्स्नात्वा मुनिर्नागतस्तावद्भार्यायां भर्तृस्नेहाधिक्यात्पुत्र्याः सत्यवत्याश्चरुं श्रेष्ठं मत्वा तया मात्रा सत्यवती याचिता सती

एकतः श्यामकर्णानां हयानां चंद्रवर्चसाम् ॥ सहस्रं दीयतां शुल्कं कन्यायाः कुशिका वयम् ॥ ६ ॥ इत्युक्तस्तन्मतं ज्ञात्वा गतः स वरुणांतिकम् ॥ आनीय दत्त्वा तानश्वानुपयेमे वराननाम् ॥ ७ ॥ स ऋषिः प्रार्थितः पत्न्या श्वश्र्वा चापत्यकाम्यया ॥ श्रपयित्वोभयैर्मंत्रैश्चरुं स्नातुं गतो मुनिः ॥ ८ ॥ तावत्सत्यवती मात्रा स्वचरुं याचिता सती ॥ श्रेष्ठं मत्वा तयाऽयच्छन्मात्रे मातुरदत्स्वयम् ॥ ९ ॥ तद्विज्ञाय मुनिः प्राह पत्नीं कष्टमकारषीः ॥ घोरो दंडधरः पुत्रो भ्राता ते ब्रह्मवित्तमः ॥ १० ॥ प्रसादितः सत्यवत्या मैवं भूदिति भार्गवः ॥ अथ तर्हि भवेत्पौत्रो जमदग्निस्ततोऽभवत् ॥ ११ ॥ सा चाभूत्सुमहापुण्या कौशिकी लोकपावनी ॥ रेणोः सुतां रेणुकां वै जमदग्निरुवाह याम् ॥ १२ ॥

ब्राह्ममंत्राभिमंत्रितं स्वचरुं मात्रे अयच्छत्प्रादात् । मातुश्चरुं क्षात्रमंत्राभिमंत्रितं स्वयमददादत् ॥ ९ ॥ कष्टं जुगुप्सितम् । तदेवाह । ते पुत्रो घोरो भविष्यति भ्राता तु ब्रह्मवित्तमो भविष्यतीति ॥ १० ॥ एवं माभूदिति प्रसादितो भार्गव आह । अथ तर्हि पौत्रो घोरो भविष्यति । जमदग्निः पुत्रोऽभवदित्यर्थः ॥ ११ ॥ सा च सत्यवती कौशिकी नद्यभूत् ॥ १२ ॥

ऋषि स्नान करण्याकरितां नदीवर गेला. तो माघारा येण्याचे पूर्वींच ‘ भार्येवर नवऱ्याचा विशेष स्नेह असतो ह्मणून आपल्यापेक्षां कन्येचा चरु श्रेष्ठ आहे असें मानून ’ सत्यवतीच्या आईनें त्या पतिव्रता सत्यवतीची याचना केली असतां तिनें आपला ब्राह्ममंत्रांनीं अभिमंत्रण केलेला चरु आईला दिला व आईचा क्षत्रियमंत्रांनीं अभिमंत्रण केलेला चरु आपण भक्षण केला ॥ ८ ॥ ९ ॥ नंतर स्नान करून आलेल्या त्या ऋषीनें, आपल्या पत्नीनें व सासूनें चरु बदलून भक्षण केले हें जाणून पत्नीला ह्मणाला कीं,– हे स्त्रिये, तूं चरु बदललेस तें फार वाईट कर्म केलें आहेस, ह्मणून तुला पुत्र शस्त्रधारण करणारा क्रूरस्वभावाचा होईल आणि तुझा भ्राता ब्रह्मवेत्त्यांमध्यें श्रेष्ठ होईल ॥ १० ॥ नंतर असें न व्हावें ह्मणून सत्यवतीनें प्रार्थना केलेला तो ऋचीक ऋषि, ह्मणाला कीं,– असें तुझें ह्मणणें आहे तर तुझा नातु तसा (शस्त्रधारी व क्रूरस्वभावाचा) होईल. पुढें त्या सत्यवतीला जमदग्निनामक शांतस्वभावाचा पुत्र झाला ॥ ११ ॥ आणि ती सत्यवती, लोकांच्या पापाचा नाश करणारी महापुण्यकारक अशी कौशिकीनामक

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नदी झाली ह्मणजे नदीरूपानें परिणाम पावली. जमदग्निऋषीनें रेणुऋषीची रेणुकानामक कन्या वरिली. तिचेठिकाणीं त्या जमदग्नीपासून वसुमान् इत्यादिक पुत्र झाले, त्यांमध्यें जो कनिष्ठ पुत्र तो राम (परशुराम) या नांवानें प्रख्यात झाला ॥ १२ ॥ १३ ॥ ज्याला वासुदेव भगवंताचा अवतार व हैहयराजांच्या (सहस्रार्जुनादिकांच्या) कुळाचा अंत करणारा असें ह्मणतात. त्या परशुरामानें ही पृथिवी एकवीस वेळ क्षत्रियबीजरहित केली ॥ १४ ॥ त्यानें क्षत्रियांनीं थोडाहि अपराध केला असतां तें निमित्त करून, रजोगुण व तमोगुण यांनीं युक्त, अधार्मिक, ब्राह्मणभक्ति न करणारें व पृथिवीला भारभूत अशा त्या दर्पयुक्त क्षत्रियकुलाचा नाश करून टाकिला ॥ १५ ॥ राजा ह्मणाला– हे शुकाचार्य, ज्याच्या योगानें परशुरामापासून क्षत्रियांचें कुळ वारंवार नाश पावलें असा, मनांचा जय न करणाऱ्या राजांनीं त्या भगवंताचा (रामाचा) कोणता अपराध केला होता ? ॥ १६ ॥ असा प्रश्न केला असतां सहस्रार्जुनानें केलेला अपराध सांगण्यासाठीं त्याच्या दर्पाला कारण असलेल्या ऐश्वर्यादिकाचें वर्णन करीत

भार्गवऋषेर्जमदग्नेः सुताः ॥ १३ ॥ १४ ॥ अनीनशन्नाशयामास । तदेवाह । रजस्तमोवृतमिति । पाठांतरे सुगमम् ॥ १५ ॥ १६ ॥ कार्तवीर्यार्जुनेन कृतमपराधं वक्तुं तस्य दर्पहेतुमैश्वर्यादिकमाह । हैहयानामिति षड्भिः । परिकर्मभिः परिचर्याभिर्दत्तं दत्तात्रेयमाराध्य ॥ १७ ॥ अव्याहतमिंद्रियादिकं च लेभे ॥ १८ ॥ यत्र यस्मिन्नैश्वर्येऽणिमादयो

तस्यां वै भार्गवऋषेः सुता वसुमदादयः ॥ यवीयान् जज्ञ एतेषां राम इत्यभिविश्रुतः ॥ १२ ॥ यमाहुर्वासुदेवांशं हैहयानां कुलांतकम् ॥ त्रिःसप्तकृत्वो य इमां चक्रे निःक्षत्रियां महीम् ॥ १४ ॥ दुष्टं क्षत्रं भुवो भारमब्रह्मण्यमनीनशत् ॥ रजस्तमोवृतमहन्फल्गुन्यपि कृतेंऽहसि ॥ १५ ॥ राजोवाच ॥ किं तदंहो भगवतो राजन्यैरजितात्मभिः ॥ कृतं येन कुलं नष्टं क्षत्रियाणामभीक्ष्णशः ॥ ॥ १६ ॥ श्रीशुक उवाच ॥ हैहयानामधिपतिरर्जुनः क्षत्रियर्षभः ॥ दत्तं नारायणस्यांशमाराध्य परिकर्मभिः ॥ १७ ॥ बाहून्दशशतं लेभे दुर्धर्षत्वमरातिषु ॥ अव्याहतेंद्रियौजःश्रीतेजोवीर्ययशोबलम् ॥ १८ ॥ योगेश्वरत्वमैश्वर्यं गुणा यत्राणिमादयः ॥ चचाराव्याहतगतिर्लोकेषु पवनो यथा ॥ १९ ॥ स्त्रीरत्नैरावृतः क्रीडन्रेवांभसि मदोत्कटः ॥ वैजयंतीं स्रजं बिभ्रद्रुरोध सरितं भुजैः ॥ २० ॥ विप्लावितं स्वशिबिरं प्रतिस्रोतःसरिज्जलैः ॥ नामृष्यत्तस्य तद्वीर्यं वीरमानी दशाननः ॥ २१ ॥

गुणाः ॥ १९ ॥ रेवांभसि नर्मदाजले सरितं नर्मदाम् ॥ २० ॥ रावणदिग्विजये माहिष्मत्याः समीपे नर्मदायां देवपूजां कुर्वंस्तेन प्रवाहस्यावरोधात्प्रतिस्रोतसः सत्यास्तस्याः सरितो जलैर्विप्लावितं स्वशिबिरमालक्ष्य तस्य तद्वीर्यं न सेहे ॥ २१ ॥

श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, हैहयनामक राजांचा अथवा देशांचा अधिपति व क्षत्रियांमध्यें श्रेष्ठ अशा कार्तवीर्य अर्जुनानें परिचर्यादिकांनीं, नारायणाचा अवतार अशा दत्तात्रेयाचें आराधन करून, प्रसन्न झालेल्या त्यापासून, दहाहजार बाहु, शत्रूंचेठिकाणीं अजिंकपणा, अव्याहत अशीं इंद्रियबळ, धनसंपत्ति, शरीरकांति, बुद्धिबळ, कीर्ति आणि शारीर बळ हीं मिळविलीं होतीं ॥ १७ ॥ १८ ॥ तसेंच योगेश्वरत्व आणि ज्याचेठिकाणीं अणिमा महिमा इत्यादिक गुण आहेत असें ऐश्वर्यहि मिळवून, जसा वायुलोकांमध्यें अविच्छिन्नगति होत्साता संचार करितो त्याप्रमाणें सर्व लोकांमध्यें संचार करूं लागला ॥ १९ ॥ एकेवेळीं उत्कट मदानें युक्त असा तो सहस्रार्जुन कंठामध्यें रत्नखचित वैजयंती माळा धारण करून, उत्तम स्त्रियांनीं परिवेष्टित होत्साता नर्मदानदीच्या उदकामध्यें जलक्रीडा करित असतां त्यानें आपल्या सहस्र बाहूंनीं त्या नदीच्या प्रवाहाचा अवरोध करून पाणी फुगविलें ॥२०॥ त्यावेळीं दिग्विजयाकरितां निघालेला रावण, त्या अर्जुनाच्या नगरीच्या समीपभागीं नर्मदेच्या तीरीं सैन्यासह उतरून देवपूजा करित असतां, अर्जुनानें अवरोध केल्यामुळें मागें फुगत चाललेल्या उदकानें आपलें शिबिर (सैन्यवगैरे उतरण्याचें स्थळ) बुडून गेलें असें पाहून, त्या अर्जुनापेक्षांहि आपणासच

॥ ३७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वीर असें मानणाऱ्या त्या रावणानें, त्या अर्जुनाचें तें नदी फुगविण्याचें सामर्थ्य सहन केलें नाहीं ॥ २१ ॥ नंतर क्रीडा करणाऱ्या त्या अर्जुनाचा पराभव करण्यास प्रवृत्त झालेल्या त्या रावणाला, ज्या अर्जुनानें स्त्रियांच्या समक्ष अनायासानें धरून माहिष्मती नगरीमध्यें कांहींवेळपर्यंत माकडासारखें कोंडून ठेविलें होतें आणि नंतर अपमान करून सोडून दिलें, तो अर्जुन एकेवेळीं भयंकर अरण्यामध्यें मृगया करण्याकरितां संचार करित असतां, सहजगत्या जमदग्निऋषीच्या आश्रमस्थानांत प्रविष्ट झाला ॥ २२ ॥ २३ ॥ तेव्हां त्या तपोधन ऋषीनें, सैन्य प्रधानमंडळ व अश्वगजादिकांसहित प्राप्त झालेल्या त्या राजा अर्जुनाचा, कामधेनूच्या आश्रयानें मेजवानीवगैरे करून अलौकिक सत्कार केला ॥ २४ ॥ तेव्हां हैहयराजांसहित असलेल्या व आपणच वीर असा अभिमान धारण करणाऱ्या त्या अर्जुनानें, त्या आश्रमामध्यें आपल्या ऐश्वर्यापेक्षांहि अतिशयित असें तें कामधेनूनें निर्माण केलेलें ऋषीचें ऐश्वर्य पाहून, कामधेनूविषयीं अभिलाष धारण करणाऱ्या त्यानें, ऋषीच्या आतिथ्यापासून संतोष मानिला

ततश्च कृतल्बिषः क्रीडंतमभिभवितुं प्रवृत्तः सन्गृहीतो माहिष्मत्यां स्वपुर्यां कपिरिव सन्निरुद्धश्च पुनश्चावज्ञया येन मुक्तः ॥ २२ ॥ इदानीं तत्कृतमपराधं दर्शयन्नाह । स एकदेत्यादिना ॥ २३ ॥ अर्हणमातिथ्यादि । हविष्मत्या कामधेन्वा ॥ २४ ॥ तदर्हणं नाद्रियत तस्मिन्नातुष्यत् । यतोऽग्निहोत्र्यां होमधेनौ साभिलाषः सहैहयो

गृहीतो लीलया स्त्रीणां समक्षं कृतकिल्बिषः ॥ माहिष्मत्यां सन्निरुद्धो मुक्तो येन कपिर्यथा ॥ २२ ॥ स एकदा तु मृगयां विचरन्विपिने वने ॥ यदृच्छयाश्रमपदं जमदग्नेरुपाविशत् ॥ २३ ॥ तस्मै स नरदेवाय मुनिरर्हणमाहरत् ॥ स सैन्यामात्यवाहाय हविष्मत्या तपोधनः ॥ २४ ॥ स वीरस्तत्र तद्दृष्ट्वा आत्मैश्वर्यातिशायनम् ॥ तन्नाद्रियताग्निहोत्र्यां साभिलाषः सहैहयः ॥ २५ ॥ हविर्धानीमृषेर्दर्पान्नरान्हर्तुमचोदयत् ॥ ते च माहिष्मतीं निन्युः सवत्सां क्रंदतीं बलात् ॥ २६ ॥ अथ राजनि निर्याते राम आश्रम आगतः ॥ श्रुत्वा तत्तस्य दौरात्म्यं चुक्रोधाहिरिवाहतः ॥ २७ ॥ घोरमादाय परशुं सतूणं चर्म कार्मुकम् ॥ अन्वधावत दुर्धर्षो मृगेंद्र इव यूथपम् ॥ २८ ॥ तमापतंतं भृगुवर्यमोजसा धनुर्धरं बाणपरश्वधायुधम् ॥ ऐणेयचर्माबरमर्कधामभिर्युतं जटाभिर्ददृशे पुरीं विशन् ॥ २९ ॥

हैहयैः सह वर्तमानः ॥ २५ ॥ दर्पाद्धेतोः ऋषेर्हविर्धानीमग्निहोत्रधेनुं हर्तुं नरानचोदयत्प्रेरितवान् ॥ २६ ॥ २७ ॥ सतूणं कार्मुकं चर्म चादाय ॥ २८ ॥ ऐणेयं चर्म कृष्णाजिनमंबरं यस्य ॥ २९ ॥

नाहीं ॥ २५ ॥ आणि दर्पामुळें ऋषीची कामधेनु हरण करण्याकरितां मनुष्यांस आज्ञा केली· तेव्हां ते बलात्कारानें आक्रोश करणाऱ्या त्या सवत्स कामधेनूला माहिष्मती नगरीमध्यें घेऊन गेले ॥ २६ ॥ नंतर तो अर्जुनराजा निघून गेला असतां, पूर्वी दुसरेठिकाणीं गेलेला परशुराम पित्याच्या आश्रमांत प्राप्त झाला· त्यानें अर्जुनराजाचें तें गोहरणरूप दुर्जनत्व ऐकून, ~~ताडण केलेल्या सर्पाप्रमाणें~~ क्रुद्ध झाला ॥ २७ ॥ आणि भयंकर कुऱ्हाड व भात्यासहित ढाल व धनुष्य ग्रहण करून जिंकण्यास अशक्य असा तो, ~~सिंह जसा गजेंद्रावर धांवतो त्याप्रमाणें~~ त्या अर्जुनावर धांवला ॥ २८ ॥ त्यावेळीं धनुष्य धारण करणारा, बाण व परशु हीं आयुधें बाळगणारा, कृष्णाजिन वस्त्र धारण करणारा आणि सूर्यासारखें ज्यांचें तेज आहे अशा जटांनीं युक्त असा तो परशुराम, वेगानें धांवत येत आहे असें, नगरीमध्यें प्रवेश करणा-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ऱ्या त्या अर्जुनानें पाहिलें ॥ २९ ॥ आणि त्यानें, त्या परशुरामावर हत्ति, रथ, घोडेस्वार व पायदळ यांनीं व गदा, खड्ग, बाण, ऋष्टि, शतघ्नी आणि शक्ति या आयुधांनीं अतिभयंकर असें सतरा अक्षौहिणी सैन्य पाठविलें. तें त्या एकट्या भगवान् परशुरामानें मारून टाकिलें ॥ ३० ॥ त्या प्रसंगीं, ज्याचा परशु शत्रूंना प्रहार करीत आहे व ज्याचा वेग, मनासारखा व वायूसारखा आहे तो शत्रुसैन्याचा नाश करणारा राम, त्या रणभूमीचेठिकाणीं जिकडेजिकडे फिरत असे तिकडेतिकडे ज्यांचे भुज, मांड्या व कंठ तुटून पडले आहेत व ज्यांचे सारथि व घोडेस्वार सहवें मरण पावलीं आहेत असे हजारो वीर मरून पडत असत ॥ ३१ ॥ नंतर त्या अर्जुनानें, रामाच्या कुऱ्हाडीनें व बाणांनीं, ज्याच्या ढाला, ध्वज, धनुष्यें व देह तोडून टाकिले आहेत व जें रक्ताच्या प्रवाहानें कर्दमयुक्त झालेल्या युद्धांगणामध्यें पाडिलें आहे, असें

॥ ३० ॥ प्रहरन्परश्वधो यस्य । मनश्चानिलश्च तयोरिवौजो वीर्यं यस्य परेषां चक्रं सैन्यं सूदयतीति तथा । छिन्नाभुजा ऊरवः कंधराश्च येषाम् । हताः सूता वाहनानि च येषां ते वीरा निपेतुः ॥ ३१ ॥ विवृक्णाश्चर्मादयो यस्य ॥ ३२ ॥ पंचशतेषु धनुःषु सोऽर्जुनो रामाय संदधे । एकमेव धनुर्यस्य सः । पाठांतरे एक एव बंधः

अचोदयद्धस्तिरथाश्वपत्तिभिर्गदासिबाणर्ष्टिशतघ्निशक्तिभिः ॥ अक्षौहिणीः सप्तदशातिभीषणास्ता राम एको भगवानसूदयत् ॥ ३० ॥ यतो यतोऽसौ प्रहरत्परश्वधो मनोनिलौजाः परचक्रसूदनः ॥ ततस्ततश्छिन्नभुजोरुकंधरा निपेतुरुर्व्यां हतसूतवाहनाः ॥ ३१ ॥ दृष्ट्वा स्वसैन्यं रुधिरौघकर्दमे रणाजिरे रामकुठारसायकैः ॥ विवृक्णचर्मध्वजचापविग्रहं निपातितं हैहय आपतद्रुषा ॥ ३२ ॥ अथार्जुनः पंचशतेषु बाहुभिर्धनुःषु बाणान्युगपत्स संदधे ॥ रामाय रामोऽस्त्रभृतां समग्रणीस्तान्येकधन्वेषुभिराच्छिनत्समम् ॥ ३३ ॥ पुनः स्वहस्तैरचलान्मृधेऽङ्घ्रिपानुत्क्षिप्य वेगादभिधावतो युधि ॥ भुजान्कुठारेण कठोरनेमिना चिच्छेद रामः प्रसभं त्वहेरिव ॥ ३४ ॥ कृत्तबाहोः शिरस्तस्य गिरेः शृंगमिवाहरत् ॥ हते पितरि तत्पुत्रा अयुतं दुद्रुवुर्भयात् ॥ ३५ ॥ अग्निहोत्रीमुपावर्त्य सवत्सां परवीरहा ॥ समुपेत्याश्रमं पित्रे परिक्लिष्टां समर्पयत् ॥ ३६ ॥

संधानं येषां तैरिषुभिः । तानि धनूंषि समं सह तत्क्षणमेवाच्छिनत् ॥ ३३ ॥ मृधे साधनभूतानचलानंघ्रिपांश्चोत्क्षिप्याभिधावतस्तस्य भुजांश्चिच्छेद । अहेः फणा इवेत्यर्थः ॥ ३४ ॥ ३५ ॥ समर्पयत्समार्पयत् ॥ ३६ ॥

आपलें सैन्य अवलोकन करून, क्रोधानें आपणच युद्ध करण्याकरितां प्राप्त झाला ॥ ३२ ॥ नंतर हजार हस्तांनीं युक्त असलेल्या त्या अर्जुनानें, पांचशें धनुष्यांचेठिकाणीं पांचशें बाहूंनीं पांचशें बाण, रामाला मारण्याकरितां एकदम लाविले. त्यावेळीं ज्याला सहायभूत असें एक धनुष्यच आहे परंतु शस्त्रधाऱ्यांमध्यें मुख्य अशा त्या रामानें तीं पांचशें धनुष्यें आपण सोडलेल्या बाणांनीं तत्क्षणींच तोडून टाकिलीं ॥ ३३ ॥ पुन्हा आपल्या हातांनीं युद्धाविषयीं साधनभूत असे पर्वत व वृक्ष घेऊन वेगानें धांवणाऱ्या त्या अर्जुनाचे बाहु, रामानें बलात्कारानें आपल्या तीक्ष्ण धारेच्या कुऱ्हाडीनें, सर्पाच्या फड्या तोडून टाकल्यासारखे युद्धामध्यें तोडून टाकिले ॥ ३४ ॥ नंतर ज्याचे बाहु तोडिले आहेत अशा त्या अर्जुनाचें मस्तक, पर्वतापासून शिखर तोडून पाडिल्यासारिखें तोडून पाडिलें. याप्रमाणें त्या अर्जुनाचा वध केला असतां, त्याचे दहाहजार पुत्र होते ते भयानें युद्धस्थान सोडून पळून गेले ॥ ३५ ॥ नंतर शत्रुवीरांचा नाश करणाऱ्या रामानें, शत्रूनें आकर्षण केल्यामुळें फार दुःखित झालेल्या त्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सवत्स धेनूला माघारी फिरवून आपल्या आश्रमीं येऊन ती पित्याला (जमदग्नीला) समर्पण केली ॥ ३६ ॥ आणि रामानें तें अर्जुनवधादिक केलेलें आपलें कर्म, पित्याला
व बंधूंना वर्णन केलें. तें ऐकून जमदग्नि ह्मणाला कीं– ॥ ३७ ॥ हे रामा, हे रामा, हे महाबाहो, जो तूं सर्वदेवतामय अशा अर्जुनराजाचा व्यर्थ वध केलास तें मोठें पाप
केलें आहेस ॥ ३८ ॥ बा रामा, आह्मी ब्राह्मण खरोखरच क्षमेच्या योगानें पूज्यता पावलों आहों. त्या क्षमेच्या योगानेंच सर्व लोकांना पूज्य जो ब्रह्मदेव तोहि
सर्वोत्कृष्ट अशा ब्रह्मस्थानास पावला आहे ॥ ३९ ॥ क्षमेच्या योगानेंच ब्राह्मणकुलसंबंधी शमदमादिक तेज, सूर्याच्या कांतीसारखें प्रकाश पावत आहे; क्षमाशील पुरुषांनांच
षड्गुणैश्वर्यसंपन्न हरि ईश्वर प्रसन्न होतो ॥ ४० ॥ हे रामा, ज्याअर्थीं अभिषेकपूर्वक राज्यावर स्थापन केलेल्या राजाचा वध ब्राह्मणाच्या वधापेक्षांहि मोठें पाप उत्पन्न
करणारा आहे त्याअर्थीं, तूं भगवंताचेठिकाणीं आपलें चित्त ठेऊन, गंगादितीर्थांच्या सेवनानें अर्जुनवधसंबंधी पापाचा नाश कर ॥ ४१ ॥ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवत-

॥ ३७ ॥ ३८ ॥ अर्हणतां पूज्यताम् ॥ ३९ ॥ सौरी सूर्यस्य प्रभेव ॥ ४० ॥ तीर्थसंसेवया चकाराद्यमनियमैश्च । अच्युते चेतना चित्तं यस्य सः ॥ ४१ ॥ इति श्रीमद्भागवते

स्वकर्म तत्कृतं रामः पित्रे भ्रातृभ्य एव च ॥ वर्णयामास तच्छ्रुत्वा जमदग्निरभाषत ॥ ३७ ॥ राम राम महाबाहो भवान्पापमका-
रषीत् ॥ अवधीन्नरदेवं यत्सर्वदेवमयं वृथा ॥ ३८ ॥ वयं हि ब्राह्मणास्तात क्षमयाऽर्हणतां गताः ॥ यया लोकगुरुर्देवः पारमेष्ठ्य-
मियात्पदम् ॥ ३९ ॥ क्षमया रोचते लक्ष्मीर्ब्राह्मी सौरी यथा प्रभा ॥ क्षमिणामाशु भगवांस्तुष्यते हरिरीश्वरः ॥ ४० ॥ राज्ञो
मूर्धाभिषिक्तस्य वधो ब्रह्मवधाद्गुरुः ॥ तीर्थसंसेवया चांहो जह्यंगाच्युतचेतनः ॥ ४१ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे नवमस्कंधे
पंचदशोऽध्यायः ॥ १५ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ पित्रोपशिक्षितो रामस्तथेति कुरुनंदन ॥ संवत्सरं तीर्थयात्रां चरित्वाऽऽश्रममा-
व्रजत् ॥ १ ॥ कदाचिद्रेणुका याता गंगायां पद्ममालिनम् ॥ गंधर्वराजं क्रीडंतमप्सरोभिरपश्यत ॥ २ ॥ विलोकयंती क्रीडंतमुद-
कार्थं नदीं गता ॥ होमवेलां न सस्मार किंचिच्चित्ररथे स्पृहा ॥ ३ ॥ कालात्ययं तं विलोक्य मुनेः शापविशंकिता ॥ आगत्य क-
लशं तस्थौ पुरोधाय कृतांजलिः ॥ ४ ॥

नवमस्कंधे टीकायां पंचदशोऽध्यायः ॥ १५ ॥ ॥ षोडशेऽथार्जुनसुतैर्जमदग्नौ हते मुहुः ॥ रामात्क्षत्रवधः प्रोक्तो विश्वामित्रस्य चान्वयः ॥ १ ॥ १ ॥ २ ॥ किंचिदीषच्चित्ररथे
गंधर्वराजे स्पृहा यस्याः सा । किंचिन्न सस्मारेति वा ॥ ३ ॥ कलशं पुरोधायाग्रे निधाय ॥ ४ ॥

नामक महापुराणांतील नवमस्कंधामध्यें परशुरामचरित्तनिरूपणनामक हा पंधरावा अध्याय समाप्त झाला ॥ १५ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां या सोळाव्या अध्या-
यामध्यें, सहस्रार्जुनाच्या पुत्रांनीं जमदग्नीचा वध केला असतां, परशुरामापासून वारंवार झालेला क्षत्रियांचा वध सांगितला आहे आणि विश्वामित्राचा वंशहि वर्णन केला आहे
॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे कुरुनंदना राजा, याप्रमाणें पित्यानें आज्ञा केलेल्या त्या परशुरामानें पित्याच्या आज्ञेचा ‘ तथास्तु ’ असें ह्मणून अंगीकार करून, एक
संवत्सरपर्यंत तीर्थयात्रा करून पुन्हा आश्रमास प्राप्त झाला ॥ १ ॥ एकेवेळीं परशुरामाची माता रेणुका, पाणी आणण्याकरितां गंगेवर गेली असतां, तिनें त्या गंगेमध्यें
अप्सरांसहवर्तमान क्रीडा करणाऱ्या व कमलांची माळा धारण करणाऱ्या चित्ररथनामक गंधर्वास पाहिलें आणि त्याला पाहात उभी राहणाऱ्या त्या रेणुकेनें चित्ररथाविषयीं
कांहीं इच्छा धारण करून, होमाची वेळा निघून जात आहे हें लक्षांत ठेविलें नाहीं ॥ २ ॥ ३ ॥ नंतर होमकाळाची वेळ चुकली असें जाणून, जमदग्नीच्या शापापासून भ्या-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लेली ती रेणुका, त्वरेनें येऊन आणलेला पाण्याचा कलश जमदग्नीच्या पुढें ठेऊन हात जोडून उभी राहिली ॥ ४ ॥ नंतर तो जमदग्नि, योगसामर्थ्यानें पत्नी रेणुकेचा चित्ररथाबरोबर भोगेच्छारूप मानसिक व्यभिचार झाला असें जाणून, अतिक्रुद्ध होत्साता पुत्रांस ह्मणाला कीं,– हे पुत्रहो, परपुरुषाचेठिकाणीं चित्त ठेवणाऱ्या ह्या आपल्या मातेला तुह्मी मारून टाका. असें सांगितलेल्याहि त्या पुत्रांनीं आईचा वध केला नाहीं ॥ ५ ॥ तेव्हां त्या जमदग्नीनें, परशुरामास हाक मारून त्याला, आपल्या आज्ञेचें उल्लंघन करणाऱ्या भ्रात्यांच्या व मातेच्या वधाविषयीं प्रेरणा केली असतां, त्या परशुरामानें भ्रात्यांचा मातेसहवर्तमान वध केला. कारण, तो परशुराम, जमदग्नीचा जो समाधियोग व तप त्यांचा खरा प्रभाव जाणणारा होता ह्मणजे जर मी भ्रात्यांला व मातेला मारिलें नाहीं तर हा ऋषि कोपानें मला शाप देण्यास समर्थ आहे आणि जर मारिलें तर मी याची प्रार्थना केली असता त्या सर्वांनाहि जिवंत करण्यासहि हा समर्थ आहे असें जाणणारा होता ॥ ६ ॥ नंतर संतुष्ट झालेला जमदग्नि, परशुरामाला इच्छित

व्यभिचारं मानसं ज्ञात्वा ॥ ५ ॥ आज्ञाऽतिलंघिनां भ्रातॄणां मातुश्च वधे संचोदितः सन् मुनेर्यः समाधिस्तपश्च तयोः प्रभावज्ञः । यदि न हन्यां तर्हि मामपि शप्तुं समर्थः यदि

व्यभिचारं मुनिर्ज्ञात्वा पत्न्याः प्रकुपितोऽब्रवीत् ॥ घ्नतैनां पुत्रकाः पापामित्युक्तास्ते न चक्रिरे ॥ ५ ॥ रामः संबोधितः पित्रा भ्रातॄन्मात्रा सहावधीत् ॥ प्रभावज्ञो मुनेः सम्यक्समाधेस्तपसश्च सः ॥ ६ ॥ वरेण छंदयामास प्रीतः सत्यवतीसुतः ॥ वव्रे हतानां रामोऽपि जीवितं चास्मृतिं वधे ॥ ७ ॥ उत्तस्थुस्ते कुशलिनो निद्रापाय इवांजसा ॥ पितुर्विद्वांस्तपोवीर्यं रामश्चक्रे सुहृद्वधम् ॥ ८ ॥ येऽर्जुनस्य सुता राजन्स्मरंतः स्वपितुर्वधम् ॥ रामवीर्यपराभूता लेभिरे शर्म न क्वचित् ॥ ९ ॥ एकदाऽऽश्रमतो रामे सभ्रातरि वनं गते ॥ वैरं सिसाधयिषवो लब्धच्छिद्रा उपागमन् ॥ १० ॥ दृष्ट्वाऽग्न्यगार आसीनमावेशितधियं मुनिम् ॥ भगवत्युत्तमश्लोके जघ्नुस्ते पापनिश्चयाः ॥ ११ ॥ याच्यमानाः कृपणया राममात्राऽतिदारुणाः ॥ प्रसह्य शिर उत्कृत्य निन्युस्ते क्षत्रबंधवः ॥ १२ ॥

तु हन्यां तर्हि मयि संतुष्टः संस्तानपि जीवयितुं समर्थ इति जानन्नित्यर्थः ॥ ६ ॥ ७ ॥ नन्वतिनिंदितं तत्कथं कृतवांस्तत्राह । पितुर्विद्वानिति । पूर्वोक्त एवाभिप्रायः ॥ ८ ॥ सर्वक्षत्रियवधे कारणं वक्तुमाह । येऽर्जुनस्य सुता इत्यादिना ॥ ९ ॥ १० ॥ भगवत्यावेशिता धीर्येन तम् ॥ ११ ॥ १२ ॥

वर मागून घे असें ह्मणाला. तेव्हां परशुरामानेंहि मारलेल्या भ्रात्यांचें व मातेचें पुन्हा वाचणें घडावें व त्यांना आपल्या वधाविषयीं स्मरण राहूं नये असा वर मागून घेतला ॥ ७ ॥ नंतर ते भ्राते व माता हीं सर्व, निजून उठल्याप्रमाणें अनायासानें पुन्हा जिवंत होऊन उठलीं. याप्रमाणें पित्याचें तपःसामर्थ्य जाणणाऱ्या त्या परशुरामानें भ्रात्यादिकांचा वध केला ॥ ८ ॥ आतां सर्व क्षत्रियांचा वध करण्याचें कारण असें कीं, हे राजा, परशुरामाच्या सामर्थ्यानें पराभव पावून युद्धांतून पळून गेलेले जे अर्जुनाचे दाहाहजार पुत्र होते ते रामानें केलेल्या आपल्या पित्याच्या वधाचें स्मरण करित होत्साते कोठेंहि सुख पावेनांत ॥ ९ ॥ एकेवेळीं तो परशुराम आपल्या भ्रात्यांसहवर्तमान आश्रमांतून वनांत निघून गेला असतां, जमदग्नीचा वध करण्यास अवकाश मिळालेले ते अर्जुनाचे पुत्र, परशुरामानें केलेल्या आपल्या पित्याच्या वधाचें वैर, त्याच्या पित्याच्या वधानें साधावें असा हेतु धरून त्याच्या आश्रमास प्राप्त झाले ॥ १० ॥ तेव्हां अग्नीच्या होमशाळेमध्यें बसलेल्या आणि उत्तमकीर्ति भगवंताचेठिकाणीं ज्यानें आपली बुद्धि स्थिर केली आहे अशा त्या जमदग्नीला पाहून, त्याच्या वधरूप पापाचाच निश्चय करणाऱ्या त्यांनीं त्याचा वध केला ॥ ११ ॥ तेव्हां दीन अशा रेणुकेनें 'याला मारूं ॥ ३९ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नको अशी ’ त्यांची प्रार्थना केली असतांहि अतिक्रूरस्वभावाचे ते क्षत्रियाधम, बलात्कारानें त्याचें मस्तक तोडून आपल्या नगरींत घेऊन गेले ॥ १२ ॥ त्या प्रसंगीं प-
तीच्या वियोगापासून झालेल्या दुःखानें व पतीवांचून पुढें कसें चालेल या चिंतेनें पीडित झालेली व हस्तांनीं मस्तकादिकांवर प्रहार करून घेणारी ती पतिव्रता रेणुका,
हे रामा, हे रामा, हे ताता, लवकर ये, अशा प्रकारेंकरून उच्चस्वरानें रामाला हाका मारूं लागली ॥ १३ ॥ नंतर तिचा हाराम, असा दुःखितासारखा शब्द, दूर असलेल्या
रामानें श्रवण करून, त्वरेनें आश्रमास आला व त्यानें मृत झालेल्या पित्यास अवलोकन केलें ॥ १४ ॥ तेव्हां संताप, क्रोध, अपराध सहन न करणें, दैन्य व शोक यां-
च्या वेगानें मोहित झालेल्या त्या रामानें, हा तात, हे साधो, हे धर्मिष्ठा, आह्मांला टाकून तूं स्वर्गास गेलास असा विलाप करून, संरक्षणाकरितां त्या पित्याचा देह भ्रा-
त्यांच्या स्वाधीन केला आणि त्यानें हातांत परशु ग्रहण करून, क्षत्रियकुलाचा नाश करण्याचा संकल्प केला ॥ १५ ॥ १६ ॥ तदनंतर हे राजा, त्या रामानें ब्रह्मघा-

---

॥ १३ ॥ १४ ॥ दुःखादीनां वेगेन विमोहितः ॥ १५ ॥ १६ ॥ ब्रह्मघ्नैर्विहता श्रीर्यस्यास्ताम् । हे राजन्स रामस्तेषां शीर्षभिर्माहिष्मत्या मध्ये महांतं गिरिं चक्रे ॥ १७ ॥ तेषां

रेणुका दुःखशोकार्ता निघ्नंत्यात्मानमात्मना ॥ राम रामैहि तातेति विचुक्रोशोच्चकैः सती ॥ १३ ॥ तदुपश्रुत्य दूरस्थो हा रामे-
त्यार्तवत्स्वनम् ॥ त्वरयाऽऽश्रममासाद्य ददृशे पितरं हतम् ॥ १४ ॥ तद्दुःखरोषामर्षार्तिशोकवेगविमोहितः ॥ हा तात साधो ध-
र्मिष्ठ त्यक्त्वाऽस्मान्स्वर्गतो भवान् ॥ १५ ॥ विलप्यैवं पितुर्देहं निधाय भ्रातृषु स्वयम् ॥ प्रगृह्य परशुं रामः क्षत्रांताय मनो दधे
॥ १६ ॥ गत्वा माहिष्मतीं रामो ब्रह्मघ्नविहतश्रियम् ॥ तेषां स शीर्षभी राजन्मध्ये चक्रे महागिरिम् ॥ १७ ॥ तद्रक्तेन नदीं घो-
रामब्रह्मण्यभयावहाम् ॥ हेतुं कृत्वा पितृवधं क्षत्रेऽमंगलकारिणि ॥ १८ ॥ त्रिःसप्तकृत्वः पृथिवीं कृत्वा निःक्षत्रियां प्रभुः ॥ स्य-
मंतपंचके चक्रे शोणितोदान् ह्रदान्नव ॥ १९ ॥ पितुः कायेन संधाय शिर आदाय बर्हिषि ॥ सर्वदेवमयं देवमात्मानमयजन्मखैः
॥ २० ॥ ददौ प्राचीं दिशं होत्रे ब्रह्मणे दक्षिणां दिशम् ॥ अध्वर्यवे प्रतीचीं वै उद्गात्रे उत्तरां दिशम् ॥ २१ ॥

रक्तेनाब्रह्मण्यानां भयावहां घोरां नदीं चक्रे । तथाऽपि सर्वक्षत्रियवधे किं कारणं तदाह। हेतुं कृत्वेति सार्धेन । अमंगलकारिण्यन्यायवर्तिनि सति ॥ १८ ॥ त्रिःसप्तकृत्वो रेणुकया
दुःखावेशादुरस्ताडनं कृतं ततो रामस्तावत्कृत्वः क्षत्रमुत्सादितवानिति प्रसिद्धिः ॥ १९ ॥ २० ॥ २१ ॥

तकी राजे झाल्यामुळें ~~जिची शोभा नाहींशी झाली आहे अशा~~ त्या माहिष्मती नगरीमध्यें जाऊन, तिच्यामध्यें त्या अधम क्षत्रियांच्या तुटलेल्या मस्तकांनीं एक महापर्वत
रचिला ॥ १७ ॥ आणि त्या राजांच्या रक्तानें, ब्राह्मणभक्ति नसणाऱ्या लोकांना भय उत्पन्न करणारी अशी भयंकर एक नदी उत्पन्न केली. ~~आतां सर्व क्षत्रियांच्या व-~~
~~धाचें कारण असें कीं,~~ हे राजा, क्षत्रियांचें कुळ अन्यायानें वर्तणूक करूं लागलें असतां, पित्याच्या (जमदग्नीच्या) वधाचें निमित्त करून त्या समर्थ परशुरामानें एक-
वीसवेळ पृथिवी निःक्षत्रिय केली आणि स्यमंतपंचकनामक देशामध्यें रक्तरूप उदकाचे पांच ऱ्हद (डोह) केले ॥ १८ ॥ १९ ॥ नंतर पित्याचें तें मस्तक आणून
यज्ञामध्यें पित्याच्या देहाशीं संयुक्त करून, त्या परशुरामानें पुष्कळ यज्ञांच्यायोगानें सर्वांतरात्मा व सर्वदेवमय अशा विष्णूचें आराधन केलें ॥ २० ॥ ~~त्या यज्ञांमध्यें पर-~~
~~शुरामानें होत्याला पूर्वदिशेकडील पृथिवी दिली, ब्रह्म्याला दक्षिणदिशेकडील, अध्वर्यूला पश्चिमदिशेकडील व उद्गात्याला उत्तरदिशेकडील पृथिवी दिली~~ ॥ २१ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दुसऱ्या ऋत्विजांना आग्नेयादिक दिशांकडील भूमि देऊन कश्यपाला मधली भूमि दिली. उपद्रष्ट्याला आर्यावर्त (विंध्याचळ व हिमाचळ यांच्या मधला भूमिप्रदेश) दिला आणि सदस्यांना त्या आर्यावर्तदेशाच्या सभोंवार असलेला भूमिप्रदेश यथायोग्य विभागानें दिला ॥ २२ ॥ नंतर, ब्रह्मदैवत्य अशा सरस्वती नदीमध्यें अवभृथस्नान केल्यामुळें ज्याचीं सर्व पातकें निवृत्त झालीं आहेत असा तो परशुराम, मेघमंडळानें रहित झालेल्या सूर्याप्रमाणें शोभूं लागला ॥ २३ ॥ तो जमदग्नि तर, पूर्वस्मरणानें युक्त असा आपला देह पावोन, परशुरामानें पूजित होत्साता कश्यपादि ऋषींच्या मंडळामध्यें सातवा एक ऋषि झाला ॥ २४ ॥ हे राजा, तो जमदग्नीचा पुत्र कमलनेत्र भगवान् परशुरामहि, पुढें येणाऱ्या सावर्णिनामक मन्वंतरामध्यें वेदाची प्रवृत्ति करील, ह्मणजे वेदप्रवर्तक अशा सप्तर्षींमध्यें एक ऋषि होईल ॥ २५ ॥ तो परशुराम, क्षत्र-

---

॥ २२ ॥ २३ ॥ संज्ञानं स्मृतिस्तदेव लक्षणं चिह्नं यस्य तं स्वदेहं लब्ध्वा स ऋषीणां मंडले सप्तम ऋषिरभूत् ॥ २४ ॥ बृहद्ब्रह्म वेदम् । वेदप्रवर्तकेषु सप्तर्षिष्वेकतमो भविष्यतीत्यर्थः ॥ २५ ॥ २६ ॥ भुवो भारमहन् । भारमेवाह । नृपानिति ॥ २७ ॥ तदेवं प्रसक्तानुप्रसक्तं समाप्य प्रस्तुतमाह । गाधेरिति । महातेजा विश्वामित्रः ॥ २८ ॥ ते सर्वे लिंगसमवायन्यायेन प्राणभृत उपदधातीतिवन्मधुच्छंदस एवोच्यंते । तथाच श्रुतिः । तस्य ह विश्वामित्रस्यैकशतं पुत्रा आसुः पंचाशदेव ज्यायांसो मधुच्छंदसः पंचाशत्कनी-

अन्येभ्योऽवांतरदिशः कश्यपाय च मध्यतः ॥ आर्यावर्तमुपद्रष्ट्रे सदस्येभ्यस्ततः परम् ॥ २२ ॥ ततश्चावभृथस्नानविधूताशेषकिल्बिषः ॥ सरस्वत्यां ब्रह्मनद्यां रेजे व्यभ्र इवांशुमान् ॥ २३ ॥ स्वदेहं जमदग्निस्तु लब्ध्वा संज्ञानलक्षणम् ॥ ऋषीणां मंडले सोऽभूत्सप्तमो रामपूजितः ॥ २४ ॥ जामदग्न्योऽपि भगवान्रामः कमललोचनः ॥ आगामिन्यंतरे राजन्वर्तयिष्यति वै बृहत् ॥ २५ ॥ आस्तेऽद्यापि महेंद्राद्रौ न्यस्तदंडः प्रशांतधीः ॥ उपगीयमानचरितः सिद्धगंधर्वचारणैः ॥ २६ ॥ एवं भृगुषु विश्वात्मा भगवान्हरिरीश्वरः ॥ अवतीर्य परं भारं भुवोऽहन्बहुशो नृपान् ॥ २७ ॥ गाधेरभून्महातेजाः समिद्ध इव पावकः ॥ तपसा क्षात्रमुत्सृज्य यो लेभे ब्रह्मवर्चसम् ॥ २८ ॥ विश्वामित्रस्य चैवासन्पुत्रा एकशतं नृप ॥ मध्यमस्तु मधुच्छंदा मधुच्छंदस एव ते ॥ २९ ॥ पुत्रं कृत्वा शुनःशेपं देवरातं च भार्गवम् ॥ आजीगर्तं सुतानाह ज्येष्ठ एष प्रकल्प्यताम् ॥ ३० ॥

यांस इत्यादिः । तत्र च विश्वामित्रपुत्रेषु भार्गवस्याजीगर्तस्य देवरातस्य ज्येष्ठत्वमवगम्यते । तथा आश्वलायनबौधायनादिभिः कौशिकानां देवरातप्रवरत्वमुक्तम् । प्रवरश्च तस्मिन्नेव वंशेऽवांतरभेदो न तु वंशांतरम् । तथा च स्मृतिः । एक एव ऋषिर्यावत्प्रवरेष्वनुवर्तते ॥ तावत्समानगोत्रत्वं विना भृग्वंगिरोगणादिति ॥ २९ ॥ तत्कुतो भृगुवंशसंभवस्य देवरातस्य कौशिकप्रवरत्वमित्याशंक्य तदुपपादयन्नाह । पुत्रं कृत्वेत्यादि यावत्समाप्ति । पूर्वमजीगर्तसुतत्वे मध्यमत्वेन पितृभ्यां ममतां विहाय विक्रीतत्वात्तस्य कृपया सुता-

---

वधादिरूप दंडाचा परित्याग करून व अत्यंत शांतबुद्धीनें युक्त होत्साता सिद्धांनीं गंधर्वांनीं व चारणांनीं ज्याच्या चरित्राचें गायन केलें आहे असा होऊन, महेंद्रनामक पर्वतावर अजूनहि राहिला आहे ॥ २६ ॥ याप्रमाणें विश्वात्मा भगवान् हरि अशा ईश्वरानें, भृगूंच्या वंशामध्यें अवतार धारण करून, पृथिवीला अतिशय भाररूप अशा पुष्कळ राजांचा वध केला ॥ २७ ॥ आतां गाधीचा वंश सांगतो– हे राजा, गाधिराजापासून, प्रदीप्त झालेल्या अग्नीप्रमाणें महातेजस्वी असा विश्वामित्रनामक पुत्र झाला. त्यानें तपाच्या योगानें आपला क्षत्रियपणा टाकून ब्रह्मर्षिपणा मिळविला आहे ॥ २८ ॥ हे राजा, त्या विश्वामित्रालाहि एकशें पुत्र होते. त्यांत मधला पुत्र मधुच्छंदसनांवाचा होता, त्यामुळें त्या सर्वांनाहि मधुच्छंदस् असें ह्मणत असत ॥ २९ ॥ आतां विश्वामित्राचें चरित्र सांगतो– विश्वामित्रानें भृगुवंशांत उत्पन्न झालेल्या अजीगर्ताच्या देवरात

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्या (दुसऱ्या) नांवानें प्रसिद्ध असलेल्या शुनःशेपनामक पुत्राला आपला पुत्र अशा नात्यानें स्वीकारून, आपल्या शंभरहि पुत्रांना ह्मणाला कीं,– हे पुत्रहो, तुह्मी हा शुनःशेप आपला ज्येष्ठ भ्राता मधुच्छंदानामकच आहे असें माना ॥ ३० ॥ जो शुनःशेप हरिश्चंद्र राजाच्या यज्ञामध्यें पुरुषपशु मारण्याकरितां आईबापांनीं स्नेह टाकून विकला असतां यज्ञस्तंभाचेठिकाणीं बांधून ठेविला होता तो, आपणास जिवंत सोडावें ह्मणून विश्वामित्राला शरण गेला. तेव्हां त्यानें उपदेश केलेल्या मंत्रानें प्रजेशादिक देवांची स्तुति करून त्यांच्या कृपेनें पाशबंधापासून मुक्त झाला ॥ ३१ ॥ ज्याचें यज्ञामध्यें देवांनीं जिवंत सोडून, रक्षण केलें ह्मणून पुढें जो गाधिराजाच्या वंशजांमध्यें देवरात ह्या नांवानें प्रसिद्ध असा तपस्वी झाला. तोच भृगुकुलांत झालेला शुनःशेप होय ॥ ३२ ॥ असो. ज्येष्ठभ्राता ह्मणून माना असें सांगितलेले जे विश्वामित्राचे मधुच्छंदस् नामक शंभर पुत्र होते त्यांपैकीं एकुणपन्नास वडील पुत्रांनीं तें (पित्यानें सांगितलेलें) ज्येष्ठत्व अंगीकारिलें नाहीं. तेव्हां क्रुद्ध झालेल्या विश्वामित्र ऋषीनें, त्यांना, हे दुर्जन-

---

नाह । ज्येष्ठ एष प्रकल्प्यतामिति ॥ ३० ॥ एतदेव स्पष्टयितुं विशिनष्टि । य इति द्वाभ्याम् । मुमुचे अमुच्यत ॥ ३१ ॥ भार्गवोऽपि गाधिषु गाधेर्वंशजेषु देवरात इति ख्यातः ॥ ३२ ॥ तत्तस्य ज्येष्ठत्वं कुशलं न मेनिरे । मध्यमस्यानर्थावहत्वं दृष्ट्वा नांगीकृतवंतः । मुनिर्विश्वामित्रः ॥ ३३ ॥ पंचाशता कनिष्ठैः साकं स मध्यमो मधुच्छंदा उवाच । नोऽस्माकं यज्ज्येष्ठत्वं कनिष्ठत्वं वा भवान्पिता संजानीते मन्यते तस्मिन्वयं तिष्ठामेति ॥ ३४ ॥ एवमुक्त्वा मंत्रदृशं कस्य नूनं कतमस्यामृतानामित्यादिमंत्राणां द्रष्टारं शुनःशेपं

यो वै हरिश्चंद्रमखे विक्रीतः पुरुषः पशुः ॥ स्तुत्वा देवान्प्रजेशादीन्मुमुचे पाशबंधनात् ॥ ३१ ॥ यो रातो देवयजने देवैर्गाधिषु तापसः ॥ देवरात इति ख्यातः शुनःशेपः स भार्गवः ॥ ३२ ॥ ये मधुच्छंदसो ज्येष्ठाः कुशलं मेनिरे न तत् ॥ अशपत्तान्मुनिः क्रुद्धो म्लेच्छा भवत दुर्जनाः ॥ ३३ ॥ सहोवाच मधुच्छंदाः सार्धं पंचशता ततः ॥ यन्नो भवान्संजानीते तस्मिंस्तिष्ठामहे वयम् ॥ ३४ ॥ ज्येष्ठं मंत्रदृशं चक्रुस्त्वामन्वंचो वयं स्म हि ॥ विश्वामित्रः सुतानाह वीरवंतो भविष्यथ ॥ ये मानं मेऽनुगृह्णंतो वीरवंतमकर्त माम् ॥ ३५ ॥ एष वः कुशिका वीरो देवरातस्तमन्वित ॥ अन्ये चाष्टकहारीतजयक्रतुमदादयः ॥ ३६ ॥

ज्येष्ठं चक्रुः तदाह । वयं सर्वे त्वामन्वंचः स्म हि अनुगंतारः । कनिष्ठाः स्म इत्यर्थः । ततः प्रसन्नो विश्वामित्रस्तान्सुतानाह । वीरवंतः पुत्रवंतो भविष्यथ । ये यूयं मे मानं पूज्यत्वमनुगृह्णंतोऽनुवर्तमानाः संतो मां वीरवंतं पुत्रवंतमकर्त कृतवंत इत्यर्थः ॥ ३५ ॥ हे कुशिका एष देवरातो वो युष्मदीयः कौशिक एव । यतो वीरो मत्पुत्रस्तमेनमन्विता-नुगच्छत । अन्ये चाष्टकादयस्तस्य सुता आसन् ॥ ३६ ॥

हो, तुह्मी म्लेच्छ व्हा, असा शाप दिला ॥ ३३ ॥ नंतर पन्नास कनिष्ठबंधूंसहवर्तमान जो मधला (पन्नासावा) मधुच्छंदा होता तो विश्वामित्राला ह्मणाला कीं,– तूं पिता, आह्मांपुत्रांना जें (शुनःशेपाचें ज्येष्ठत्व) अंगीकार करण्यास सांगत आहेस त्या तुझ्या आज्ञेंत आह्मी राहतों ॥ ३४ ॥ असें ह्मणून त्यांनीं मंत्रद्रष्ट्या त्या देवराताला ज्येष्ठ केलें आणि ह्मणाले कीं, हे शुनःशेपा, आह्मी सर्व तुझे कनिष्ठ भ्राते होतों. तेव्हां प्रसन्न झालेला विश्वामित्र, त्यापुत्रांस ह्मणाला कीं,– हे पुत्रहो, ज्या तुह्मीं माझें पूज्यत्व स्वीकारिलेंत आणि मला पुत्रवान् केलात ते तुह्मी पुढें पुत्रवंत व्हा ॥ ३५ ॥ हे कुशिकहो, हा देवरात तुमचा कौशिकच आहे. ज्याअर्थीं हा माझा पुत्र आहे त्याअर्थीं आतां तुह्मी त्याला अनुसरून वागा. विश्वामित्राला त्यापुत्रांहून दुसरेहि अष्टक, हारीत, जय, क्रतुमान् इत्यादिक पुत्र होते ॥ ३६ ॥ याप्रमाणें कांहींएकांना शाप झाला, कित्येकांवर अनुग्रह झाला, व दुसराच एक पुत्रत्वानें स्वीकारला गेला, अशा प्रकारच्या विश्वामित्राच्या पुत्रांनीं तें कौशिकगोत्र नानाप्रकारचें झालें. कारण, देवराताला ज्येष्ठ मानिल्यामुळें त्यांची

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आत. या अठराव्या अध्यायामध्यें नहुषराजाचा पुत्र जो ययाति राजा त्याची कथा सांगितली आहे. ज्याच्या पांच पुत्रांमध्यें कनिष्ठ असलेल्या पुरूनें पित्याच्या जरेचें ग्रहण केलें आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, पूर्वीं सांगितलेल्या नहुषाला, यति, ययाति, संयाति, आयाति, वियति, आणि कृति हे सहा पुत्र होते; ते, जशीं चक्षुश्रोत्रादिक सहा इंद्रियें जीवाच्या स्वाधीन असतात त्यामगानें, त्या नहुषाच्या स्वाधीन होते ॥ १ ॥ त्यामध्यें यतिनामक ज्येष्ठ पुत्रानें, नहुषपित्यानें दिलेलें राज्य इच्छिलें नाहीं. कारण, तो राज्याचा परिणाम अनर्थकारक आहे असें जाणणारा होता. ज्या राज्यांत आसक्त झालेला पुरुष, अभिमानी होऊन आपली गति पुढें काय होईल तें जाणत नाहीं ॥ २ ॥ पुढें नहुषपित्याला, इंद्राणीच्या भोगाभिलाषामुळें अगस्त्यादिक ब्राह्मणांनीं स्वर्गावरच्या अधिकारापासून भ्रष्ट करून अजगरपणास पोंचविलें असतां, यया-

---

नवमस्कंधे टीकायां सप्तदशोऽध्यायः ॥ १७ ॥ ॥ अष्टादशे ययातेस्तु नाहुषस्य कथोच्यते ॥ यस्य पंचसु पुत्रेषु कनीयानग्रहीज्जराम् ॥ १ ॥ १ ॥ तस्य रास्यस्य परिणाममनर्थावहत्वं वेत्तीति तथा। तत्र हेतुः । यत्रेति ॥ २ ॥ स्थानात्स्वर्गात् । द्विजैरगस्त्यादिभिः ॥ ३ ॥ यवीयसो भ्रातॄनादिशत् । काव्यस्य शुक्रस्य

श्रीशुक उवाच ॥ यतिर्ययातिः संयातिरायतिर्वियतिः कृतिः ॥ षडिमे नहुषस्यासन्निंद्रियाणीव देहिनः ॥ १ ॥ राज्यं नैच्छद्यतिः पित्रा दत्तं तत्परिणामवित् ॥ यत्र प्रविष्टः पुरुष आत्मानं नावबुध्यते ॥ २ ॥ पितरि भ्रंशिते स्थानादिंद्राण्या धर्षणाद्विजैः ॥ प्रापितेऽजगरत्वं वै ययातिरभवन्नृपः ॥ ३ ॥ चतसृष्वादिशद्दिक्षु भ्रातॄन्भ्राता यवीयसः ॥ कृतदारो जुगोपोर्वीं काव्यस्य वृषपर्वणः ॥ ४ ॥ राजोवाच ॥ ब्रह्मर्षिर्भगवान्काव्यः क्षत्रबंधुश्च नाहुषः ॥ राजन्यविप्रयोः कस्माद्विवाहः प्रतिलोमकः ॥ ५ ॥ श्रीशुक उवाच ॥ एकदा दानवेंद्रस्य शर्मिष्ठा नाम कन्यका ॥ सखीसहस्रसंयुक्ता गुरुपुत्र्या च भामिनी ॥ ६ ॥

वृषपर्वणश्च कन्याभ्यां कृतदारः सन् ॥ ४ ॥ ५ ॥ नात्र प्रतिलोमतादोष ईश्वरघटानादिति दर्शयन्कथामाह । एकदेत्यादिना । प्रतिजग्राह तद्वच इत्यंतेन । गुरोः शुक्रस्य पुत्र्या देवयान्या च व्यचरदिति द्वयोरन्वयः ॥ ६ ॥

तीच राजा झाला ॥ ३ ॥ त्यानें, आपल्या संयातिप्रभृति चार कनिष्ठ भ्रात्यांना चार दिशांचेंठिकाणीं पृथिवीच्या रक्षणार्थ योजिलें आणि आपण, शुक्राचार्यांची व वृषपर्व्यां दानवाची अशा दोन कन्या आपल्या स्त्रिया करून घेऊन पृथिवीचें पालन केलें ॥ ४ ॥ राजा ह्मणाला– हे शुकाचार्य, शुक्राचार्य हा भगवान् ब्रह्मर्षि होय आणि ययाति राजा हा क्षत्रियश्रेष्ठ होय. असें असतां, राजा आणि ब्राह्मण यांचा हा उलटा विवाह कोणत्या कारणानें झाला ? ह्मणजे क्षत्रियाची कन्या कारणपरत्वें ब्राह्मणानें करावी, परंतु ब्राह्मणाची कन्या क्षत्रियानें मुळींच करूं नये असें असतां हें कसें झालें ? ॥ ५ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, हा प्रकार ईश्वरानें घडविलेला असल्यामुळें येथें प्रतिलोमता दोष नाहीं. याविषयीं कथा सांगतों ऐक. एकेवेळीं दानवश्रेष्ठ वृषपर्व्याची तारुण्यवयांत आलेली शर्मिष्ठानामक कन्या, हजार दासींसहवर्तमान व शुक्राचार्यांच्या देवयानीनामक कन्येसहवर्तमान, प्रफुल्लित झालेल्या वृक्षांनीं व्याप्त व ज्यामध्यें मधुर गायन करणारे भ्रमर आहेत अशा (स्थलविकासी कमळिणीच्या वाळवंटांनीं युक्त ॥ ४२ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असलेल्या) आरामबागेमध्यें क्रीडा करावयास गेली ॥ ६ ॥ ७ ॥ तेव्हां शर्मिष्ठादिक त्या कमललोचना कन्यांनीं तलावाजवळ येऊन, आपापलीं वस्त्रें कडेला ठेऊन त्यामध्यें प्रवेश केला आणि एकीमेकींच्या अंगावर पाणी उडवीत होत्सात्या क्रीडा करित होत्या॥ ८ ॥ तेव्हां त्या स्त्रियांनीं पार्वतीसहवर्तमान नंदिकेश्वरावर बसून गमन करणाऱ्या शंकरास अवलोकन करून लज्जित झाल्या आणि एकाएकीं कडेला येऊन आपापलीं वस्त्रें परिधान केलीं॥ ९ ॥ तेव्हां न जाणतां शर्मिष्ठेनें देवयानीचें वस्त्र 'आपलें असें मानून' परिधान केलें. नंतर देवयानी, शर्मिष्ठेनें धारण केलेलें वस्त्र आपलें असें मानून, मोठ्या क्रोधानें असें ह्मणाली कीं– ॥ १० ॥ अहो या दासीचें किती अयोग्यकर्म आहे तें पहा! जशी कुत्री यज्ञामध्यें हविर्भाग ग्रहण करण्यास अयोग्य आहे त्याप्रमाणें आह्मी धारण करावयाचें वस्त्र धारण करण्यास ही अयोग्य असून हिनें आमचें वस्त्र परिधान केलें आहे॥ ११ ॥

कलगीता अलयो येषु तानि नलिनीपुलिनानि यस्मिंस्तस्मिन्पुरोद्याने । अबला शर्मिष्ठा ॥ ७ ॥ सिंचतीः सिंचंत्यः ॥ ८ ॥ ९ ॥ अजानती स्वीयं मत्वा गुरुपुत्र्या वासः समव्ययत्पर्यधात् ॥ १० ॥ असांप्रतमन्याय्यम् ॥ ११ ॥ अन्यायमेव ब्राह्मणोत्कर्षवर्णनेन व्यनक्ति । यैरिति त्रिभिः । ये ब्राह्मणाः परस्य पुंसो मुखं मुखादुत्पन्नत्वेन तृप्ति-

देवयान्या पुरोद्याने पुष्पितद्रुमसंकुले ॥ व्यचरत्कलगीतालिनलिनीपुलिनेऽबला ॥ ७ ॥ ता जलाशयमासाद्य कन्याः कमललोचनाः ॥
तीरे न्यस्य दुकूलानि विजह्रुः सिंचतीर्मिथः ॥ ८ ॥ वीक्ष्य व्रजंतं गिरिशं सह देव्या वृषस्थितम् ॥ सहसोत्तीर्य वासांसि पर्यधुर्व्रीडि-
ताः स्त्रियः ॥ ९ ॥ शर्मिष्ठाऽजानती वासो गुरुपुत्र्याः समव्ययत् ॥ स्वीयं मत्वा प्रकुपिता देवयानीदमब्रवीत् ॥ १० ॥ अहो नि-
रीक्ष्यतामस्या दास्याः कर्म ह्यसांप्रतम् ॥ अस्मद्धार्यं धृतवती शुनीव हविरध्वरे ॥ ११ ॥ यैरिदं तपसा सृष्टं मुखं पुंसः परस्य ये ॥
धार्यते यैरिह ज्योतिः शिवः पंथाश्च दर्शितः ॥ १२ ॥ यान्वंदंत्युपतिष्ठंते लोकनाथाः सुरेश्वराः ॥ भगवानपि विश्वात्मा पावनः
श्रीनिकेतनः ॥ १३ ॥ वयं तत्रापि भृगवः शिष्योऽस्या नः पिताऽसुरः ॥ अस्मद्धार्यं धृतवती शूद्रो वेदमिवासती ॥ १४ ॥ ए-
वं शपंतीं शर्मिष्ठा गुरुपुत्रीमभाषत ॥ रुषा श्वसंत्युरंगीव धर्षिता दष्टदच्छदा ॥ १५ ॥

द्वारत्वेन श्रेष्ठा इत्यर्थः । ज्योतिर्ब्रह्म । पंथा वेदमार्गः ॥ १२ ॥ १३ ॥ तदेवं ब्राह्मणमात्रमेव तावत्पूज्यं तत्रापि भृगवः । अस्याश्च पिता नः शिष्यः । एवं सत्यप्यस्माभि-
र्धार्यं वास इयमसती धृतवती ॥ १४ ॥ १५ ॥

ज्या ब्राह्मणांनीं हें जग तपोबलानें उत्पन्न केलें आहे, जे परमपुरुष भगवंताच्या मुखापासून उत्पन्न झाल्यामुळें श्रेष्ठ आहेत, ज्यांनीं या संसारामध्यें आपल्या हृदयामध्यें स्वप्रकाशरूप परब्रह्माचें उपास्यत्वेंकरून धारण केलें आहे आणि ज्यांनीं कल्याणकारक असा वैदिकमार्ग प्रवृत्त केला आहे आणि ज्यांना इंद्रादिक लोकपाल नमस्कार करितात व स्तुति करतात. अधिकतर काय परंतु लक्ष्मीचा आश्रयभूत व जगत्पावन असा विश्वात्मा भगवान्हि ज्यांना वंदन करितो व स्तुति करितो ॥ १२ ॥ १३ ॥ त्या ब्राह्मणामध्येंहि आह्मी भृगुकुलांतील ह्मणजे ज्या भृगूचे पादताडणहि भगवंतानें सहन केलें आहे, त्याच्या वंशांतील श्रेष्ठ ब्राह्मण आहों. त्यांतूनहि हिचा पिता वृषपर्वा दैत्य, आमचा शिष्य आहे. एतावता सर्वप्रकारें हीन असलेल्या या शर्मिष्ठेनें, जसें त्रिवर्णहीन अनधिकारी शूद्रानें, ब्राह्मणांनीं अध्ययन करण्यास योग्य अशा वेदाचें अध्ययन करावें त्याप्रमाणें, आह्मी धारण करण्यास योग्य अशा वस्त्राचे हिनें धारण केलें ॥ १४ ॥ याप्रमाणें तिरस्कार करणाऱ्या देवयानीला, आपला अधरोष्ठ चावून सर्पानें तुडवि-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लेल्या सर्पिणीप्रमाणें क्रोधानें श्वासोच्छ्वास टाकणारी ती शर्मिष्ठा, ह्मणाली कीं– ॥ १५ ॥ हे भिक्षुकि, तूं आपलें वृत्त लक्षांत न आणितां पुष्कळच आपली स्तुति करून
घेत्येस. अगे, कावळ्यांप्रमाणें किंवा कुत्र्यांप्रमाणें तूं आपल्या पित्यासह पोट भरण्याकरितां आमच्या घराकडे टोंकावून पाहत राहत नाहींस का ? ॥ १६ ॥ अशाप्रकारच्या
दुसऱ्याहि कठोर भाषणांनीं, गुरुकन्या असल्यामुळें पूज्य अशा त्या देवयानीची निंदा करून, क्रोधानें तिनें परिधान केलेलें वस्त्र हिसकावून घेऊन, शर्मिष्ठेनें तिला कूपामध्यें
ढकलून दिली ॥ १७ ॥ नंतर ती शर्मिष्ठा आपल्या घरीं गेली असतां, मृगयेविषयीं अरण्यांत संचार करित असतां, तृषाक्रांत झालेला ययाति राजा, सहजगत्या त्या कूपा-
जवळ प्राप्त झाला आणि, त्यानें त्या कूपांत पडलेली नग्न देवयानी अवलोकन केली ॥ १८ ॥ आणि तृषायुक्त झालेल्या त्या राजानें, नग्न असलेल्या त्या देवयानीला, प-
रिधान करण्याकरितां आपलें उत्तरीय वस्त्र देऊन, हातानें तिचा हात धरून कूपांतून बाहेर काढिली ॥ १९ ॥ तेव्हां आपला उद्धार करणाऱ्या त्या ययाति राजाला,
शुक्राची कन्या ती देवयानी, प्रेमानें पूर्ण झालेल्या वाणीनें ह्मणाली कीं,– हे शत्रुसंतापना राजा, ज्याअर्थीं तूं माझा हात धरिला आहेस त्याअर्थीं, तूं ग्रहण केलेला माझा,

॥ १६ ॥ १७ ॥ १८ ॥ १९ ॥ २० ॥ निषिद्धोऽयं प्रतिलोमसंबंध इति चेत्तत्राह । एष इति ॥ २१ ॥ ब्राह्मणमेव त्वं वृणीहि किमनेनाग्रहेणेति चेत्तत्राह । न ब्राह्मण इति ।

आत्मवृत्तमविज्ञाय कत्थसे बहु भिक्षुकि ॥ किं न प्रतीक्षसेऽस्माकं गृहान्बलिभुजो यथा ॥ १६ ॥ एवंविधैः सुपरुषैः क्षिप्त्वा
ऽऽचार्यसुतां सतीम् ॥ शर्मिष्ठा प्राक्षिपत्कूपे वास आदाय मन्युना ॥ १७ ॥ तस्यां गतायां स्वगृहं ययातिर्मृगयां चरन् ॥ प्राप्तो य-
दृच्छया कूपे जलार्थी तां ददर्श ह ॥ १८ ॥ दत्त्वा स्वमुत्तरं वासस्तस्यै राजा विवाससे ॥ गृहीत्वा पाणिना पाणिमुज्जहार दयापरः
॥ १९ ॥ तं वीरमाहौशनसी प्रेमनिर्भरया गिरा ॥ राजंस्त्वया गृहीतो मे पाणिः परपुरंजय ॥ २० ॥ हस्तग्राहोऽपरो माभूद्गृहीता-
यास्त्वया हि मे ॥ एष ईशकृतो वीर संबंधो नौ न पौरुषः ॥ २१ ॥ यदिदं कूपलग्नाया भवतो दर्शनं मम ॥ न ब्राह्मणो मे भ-
विता हस्तग्राहो महाभुज ॥ कचस्य बार्हस्पत्यस्य शापाद्यमशपं पुरा ॥ २२ ॥

बृहस्पतेः सुतः कचः शुक्रान्मृतसंजीवनीं विद्यामध्यगात् तदा च देवयानी तं पतिं चकमे स च गुरुपुत्री मम पूज्येति न तामुदवहत् ततश्च कुपिता सती तवेयं विद्या
निष्फला भवत्विति तं शशाप स च तव ब्राह्मणः पतिर्न भवेदिति तां शशाप । तदेतदाह । यमहमशपं तस्य शापात् ॥ २२ ॥

हात ग्रहण करणारा तुझ्याहून दुसरा कोणीहि न व्हावा; ह्मणजे तूंच मला वरावेंस. आतां, तूं ब्राह्मणाची कन्या व मी राजा यास्तव आमचा हा उलटा विवाह कसा होईल ?
असें ह्मणशील तर– हे वीरा, आमचा हा भार्यापतिरूप संबंध ईश्वरानेंच केलेला आहे, पुरुषानें केलेला नव्हे ॥ २० ॥ २१ ॥ कारण, कूपामध्यें पडलेल्या मला असं-
भावित जें हें तुझें दर्शन झालें तें ईश्वराच्या इच्छेवांचून झालेलें नाहीं. बरें तूं एखाद्या ब्राह्मणालाच वरावेंस मला वरण्याचा आग्रह कां करित्येस असें ह्मणशील तर– हे म-
हापराक्रमी राजा, माझा पाणि ग्रहण करणारा (पति) ब्राह्मण होणार नाहीं. कारण, पूर्वीं मी ज्या बृहस्पतीच्या कचनामक पुत्राला, तुझी विद्या निष्फळ होवो असा, शाप दिला होता [1] ॥ ४३ ॥

१ बृहस्पतीच्या कचनामक पुत्रानें, शुक्रापासून मृतसंजीवनी, विद्या संपादन केली. तेव्हां देवयानीनें त्याला तूं माझा पति हो, असें सांगितलें असतां, त्यानें गुरूची कन्या तूं मला पूज्य आहेस ह्मणून मी तुला वरणार नाहीं असें सांगितलें. नंतर रागावलेल्या देवयानीनें त्याला ‘ तुझी विद्या निष्फळ होवो असा ’ शाप दिला व त्या कचानेंहि तिला ‘ तुला पति ब्राह्मण होणार नाहीं असा, ’ शाप दिला, अशी कथा आहे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याचा 'तुला ब्राह्मण पति होणार नाहीं, असा' मला शाप झाला आहे ॥ २२ ॥ नंतर ययाति राजानें, अशास्त्रीय असल्यामुळें आपणास न आवडणारें
परंतु दैवानें प्राप्त करून दिलेलें तें देवयानीचें भाषण ऐकून व तिचेठिकाणीं आसक्त झालेलें आपलें मन जाणून, माझें मन अधर्माचेठिकाणीं कधींच प्रवृत्त होत नाहीं, असा
निश्चय करून, तिच्या वचनाचा स्वीकार केला ह्मणजे तुझ्या पित्यानें जर मला दिली तर मी तुझा अंगीकार करीन असें सांगितलें ॥ २३ ॥ आतां शर्मिष्ठेचा संबंधहि
दैवयोगानेंच झाला असें दर्शवीत ह्मणतो– नंतर तो वीर राजा ययाति, तेथून निघून गेला असतां, त्या देवयानीनें तेथून रोदन करीत पित्याजवळ येऊन त्याला शर्मिष्ठेनें जें
भिक्षुकि इत्यादिक भाषण केलें होतें व जें कूपांत ढकलणेंवगैरे कर्म केलें होतें तें सर्व सांगितलें ॥ २४ ॥ तें ऐकून तो भगवान् शुक्राचार्य, दुःखितचित्त होऊन, पुरोहित
वृत्तीची निंदा करीत व उंछवृत्तीची स्तुति करित होत्साता, तो कन्येसहवर्तमान वृषपर्व्याच्या नगरांतून निघून गेला ॥ २५ ॥ नंतर शत्रूंना जय मिळवून द्यावा हें

अशास्त्रीयत्वादनभिप्रेतमपि दैवेनोपहृतं प्रापितं बुद्ध्वा तद्गतं तस्यां सकामं स्वं मनश्च बुद्ध्वा न ह्यधर्मे मदीयं मनः प्रविशेदिति तस्याः वचः प्रतिजग्राहांगीकृतवान् ॥ २३ ॥
शर्मिष्ठासंबंधोऽपि दैववशादेवाभवदिति दर्शयन्नाह । गते राजनीति नवभिः । उक्तं भिक्षुकीत्यादि । कृतं कूपे प्रक्षेपादि ॥ २४ ॥ कापोतीमुंछवृत्तिम् ॥ २५ ॥ प्रत्यनीका देवा-

ययातिरनभिप्रेतं दैवोपहृतमात्मनः ॥ मनस्तु तद्गतं बुद्ध्वा प्रतिजग्राह तद्वचः ॥ २३ ॥ गते राजनि सा वीरे तत्र स्म रुदती पि-
तुः ॥ न्यवेदयत्ततः सर्वमुक्तं शर्मिष्ठया कृतम् ॥ २४ ॥ दुर्मना भगवान्काव्यः पौरोहित्यं विगर्हयन् ॥ स्तुवन्वृत्तिं च कापोतीं दु-
हित्रा स ययौ पुरात् ॥ २५ ॥ वृषपर्वा तमाज्ञाय प्रत्यनीकविवक्षितम् ॥ गुरुं प्रसादयन्मूर्ध्ना पादयोः पतितः पथि ॥ २६ ॥ क्ष-
णार्धमन्युर्भगवान् शिष्यं व्याचष्ट भार्गवः ॥ कामोऽस्याः क्रियतां राजन्नैनां त्यक्तुमिहोत्सहे ॥ २७ ॥ तथेत्यवस्थिते प्राह देवया-
नी मनोगतम् ॥ पित्रा दत्ता यतो यास्ये सानुगा यातु मामनु ॥ ॥ २८ ॥ स्वानां तत्संकटं वीक्ष्य तदर्थस्य च गौरवम् ॥
देवयानीं पर्यचरत्स्त्रीसहस्रेण दासवत् ॥ २९ ॥ नाहुषाय सुतां दत्त्वा सह शर्मिष्ठयोशना ॥ तमाह राजन् शर्मिष्ठामाधास्त-
ल्पे न कर्हिचित् ॥ ३० ॥

स्ते विवक्षिता जयं प्रापणीया इत्यभिप्रेतं यस्य तथाभूतं ज्ञात्वा । प्रत्यनीकानां विवक्षितमिति वा ॥ २६ ॥ २७ ॥ सानुगा सखीसहिता शर्मिष्ठामामनुयात्विति ॥ २८ ॥ तत्त
स्मान्निर्गताच्छुक्रात्संकटं वीक्ष्य । तत्तस्मादवस्थितादर्थस्य प्रयोजनस्य गौरवं च वीक्ष्य ॥ २९ ॥ तल्पेनाधाः नोपगच्छेरित्यर्थः ॥ ३० ॥

शुक्राचार्याच्या मनांत आलें आहे असें वृषपर्व्यानें जाणून, मार्गामध्यें जात असलेल्या त्या शुक्राचार्याला प्रसन्न करण्याविषयीं तो मस्तकानें त्याच्या पायांवर पडला ॥ २६ ॥
तेव्हां अर्धाक्षण क्रोध राहणारा तो भगवान् शुक्राचार्य, आपल्या शिष्याला (वृषपर्व्याला) ह्मणाला कीं,– हे राजा, या देवयानीचा जो मनोरथ असेल तो तूं पूर्ण करा-
वास. हिला याठिकाणींच टाकण्यास (उदासीन करण्यास) मी इच्छीत नाहीं ॥ २७ ॥ तेव्हां तो बरें आहे, असें ह्मणून राहिला असतां, देवयानीनें आपलें मनोगत
सांगितलें कीं,– पित्यानें दिलेली मी जेथें (सासरीं) जाईन, तेथें ही शर्मिष्ठा, सख्यांसहवर्तमान माझें दास्य करण्याकरितां येवो ॥ २८ ॥ तेव्हां शर्मिष्ठेनें, शुक्राचार्य गेला अ-
सतां पितावगैरे सर्वांना तें महत्संकष्ट प्राप्त होणार असें पाहून आणि देवयानीचा संतोष केला असतां त्यांचा मोठा कार्यभाग आहे असें जाणून, हजार स्त्रियांसहवर्तमान
दासीप्रमाणें देवयानीची शुश्रूषा करण्याचें पतकरिलें ॥ २९ ॥ नंतर शुक्राचार्यानें, ययातिराजाला शर्मिष्ठादासीसहवर्तमान देवयानीस अर्पण करून, त्याला सांगितलें कीं,–

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हे राजा, शय्येचेठिकाणीं शर्मिष्ठेबरोबर तूं कधींच गमन करूं नकोस ॥ ३० ॥ पुढें हे राजा, एकेवेळीं शर्मिष्ठेनें, देवयानी पुत्रवती झाली असें अवलोकन करून, आपण ऋतुकाल प्राप्त झाला असतां, आपल्या सखीचा पति अशा त्या ययाति राजाचीच अपत्यप्राप्तीकरितां ~~संभोग करण्याविषयीं~~ प्रार्थना केली ॥ ३१ ॥ याप्रमाणें अपत्य प्राप्तीसाठीं राजकन्या शर्मिष्ठेनें प्रार्थना केलेल्या त्या ययाति राजानें, धर्म पाहून ह्मणजे, ऋतुकाळीं अपत्यप्राप्तीसाठीं प्रार्थना करणाऱ्या स्त्रीचें काम पूर्ण करणें हा धर्मच आहे असें मनांत आणून, शुक्राचार्यांच्या भाषणाचें स्मरण करित असतांहि ऋतुकालीं दैवानेंच प्राप्त झालेला तो संभोग आहे असें मानिलें ॥ ३२ ॥ असें असतां दोघींपासूनहि झालेलीं अपत्यें अशीं कीं, देवयानीला यदु व तुर्वसु हे दोन पुत्र झाले आणि वृषपर्व्याची कन्या जी शर्मिष्ठा तिला द्रुह्यु, अनु आणि पूरु असे तीन पुत्र झाले ॥ ३३ ॥

॥ ३१ ॥ अपत्यार्थमृतुकाले प्रार्थनात्तस्याः कामपरणं धर्ममवेक्ष्य शुक्रस्य वचश्च स्मरन् दिष्टं दैवप्रापितमेव तत्संगमभ्यपद्यत । न तु कामत इत्यर्थः ॥ ३२ ॥ ३३ ॥ आसुर्याः शर्मिष्ठायाः । भर्तुः सकाशात् ॥ ३४ ॥ उपमंत्रयन्प्रसादयन् ॥ ३५ ॥ विकृतं रूपं करोतीति तथा ॥ ३६ ॥ ते दुहितरि कामैरद्याप्यतृप्तोऽस्मि । कामानां भोगैरिति वा । शुक्र आह । तर्हि योऽभिधास्यत्यभितो धारयिष्यति तस्य वयसा यथाकामं व्यत्यस्यतां यथेच्छं जरा व्यत्ययं यातु । व्यत्ययं नीयतामिति वा । यद्वा व्यत्यस्येति छेदः । तां जरां व्यत्यस्य व्यत्यासंगमयेत्यर्थः ॥ ३७ ॥

विलोक्यौशनसीं राजन् शर्मिष्ठा सप्रजां क्वचित् ॥ तमेव वव्रे रहसि सख्याः पतिमृतौ सती ॥ ३१ ॥ राजपुत्र्याऽर्थितोऽपत्ये धर्मं चावेक्ष्य धर्मवित् ॥ स्मरन् शुक्रवचः काले दिष्टमेवाभ्यपद्यत ॥ ३२ ॥ यदुं च तुर्वसुं चैव देवयानी व्यजायत ॥ द्रुह्युं चानुं च पूरुं च शर्मिष्ठा वार्षपर्वणी ॥ ३३ ॥ गर्भसंभवमासुर्या भर्तुर्विज्ञाय मानिनी ॥ देवयानी पितुर्गेहं ययौ क्रोधविमूर्छिता ॥ ३४ ॥ प्रियामनुगतः कामी वचोभिरुपमंत्रयन् ॥ न प्रसादयितुं शेके पादसंवाहनादिभिः ॥ ३५ ॥ शुक्रस्तमाह कुपितः स्त्रीकामानृतपूरुष ॥ त्वां जरा विशतां मंद विरूपकरणी नृणाम् ॥ ३६ ॥ ययातिरुवाच ॥ अतृप्तोऽस्म्यद्य कामानां ब्रह्मन्दुहितरि स्म ते ॥ व्यत्यस्यतां यथाकामं वयसा योऽभिधास्यति ॥ ३७ ॥

तेव्हां देवयानीनें आपल्या पतीपासून शर्मिष्ठेला गर्भसंभव झाला असें जाणून, कोपिष्ठ अशी ती क्रोधानें व्याप्त होऊन, तें वर्तमान पित्याला कळविण्याकरितां पित्याच्या घरीं गेली ॥ ३४ ॥ तेव्हां तिची प्रसन्नता इच्छिणारा ययातिराजाहि, त्या देवयानीच्या मागून निघाला आणि मार्गामध्यें पादस्पर्शादिकेंकरून व उत्तम भाषणांनीं समजूत करूनहि तिला प्रसन्न करून घेण्यास तो समर्थ झाला नाहीं ॥ ३५ ॥ नंतर देवयानीनें पित्याच्या घरीं जाऊन तो वृत्तांत कळविला असतां, क्रुद्ध झालेला शुक्राचार्य, त्या ययातिराजाला ह्मणाला कीं,– हे मंदबुद्धे, स्त्रीलोभ्या, खोट्या पुरुषा, तुला मनुष्यांना विरूप करणारी जरा प्राप्त होवो ॥ ३६ ॥ असा शुक्राचार्यांचा शाप ऐकून ययाति राजा ह्मणाला कीं,– हे ब्राह्मणा, तुझ्या कन्येबरोबर विषयसेवन करून अजून मी तृप्त झालों नाहीं, तेव्हां तुझ्या शापानें तुझ्याच कन्येचें जन्मपर्यंत अनिष्ट झालें ना ? तेव्हां शुक्र ह्मणाला– असें जर आहे तर जो कोणी तुझा स्नेही किंवा पुत्र, तुला आपलें तारुण्य देऊन तुझी जरा घेईल त्याला तूं ती जरा यथेच्छपणें द्यावीस व ॥ ४४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्यावें तारुण्य घेऊन विषयभोग करावास ॥ ३७ ॥ अशी व्यवस्था प्राप्त झाली असतां, जराग्रस्त झालेला तो ययाति राजा, आपल्या नगरांत येऊन, यदुनामक आपल्या ज्येष्ठ पुत्रास ह्मणाला कीं,– बा यदो, ही तुझ्या मातामहानें केलेली जरा तूं ग्रहण कर आणि आपलें तारुण्य वय मला दे; हे वत्सा, अजून मी विषयसेवनाविषयीं तृप्त झालों नाहीं ह्मणून तुझ्या तारुण्यवयानें कांहीं संवत्सरपर्यंत विषयसुखाचा अनुभव घेईन ॥ ३८ ॥ ३९ ॥ तेव्हां यदु ह्मणाला– हे पित्या, मध्येंच प्राप्त होणाऱ्या तुझ्या जरेनें (ह्मातारपणानें) युक्त होऊन राहण्याविषयीं मी इच्छित नाहीं. कारण, विषयसुख कसें आहे तें जाणल्यावांचून त्याविषयीं पुरुष वैराग्य पावत नाहीं, ह्मणून वैराग्य झाल्याखेरीज मी आपलें तारुण्य वय देण्यास इच्छित नाहीं ॥ ४० ॥ हे भारता राजा, नंतर ययाति पित्यानें जरा घेण्याविषयीं प्रेरणा केलेल्या तुर्वसु, द्रुह्यु व अनु ह्या तीन पुत्रांनींहि त्यावें यदूसारखेंच प्रत्याख्यान केलें. कारण, ते पित्याच्या आज्ञेनुसार वागणें हा श्रेष्ठ धर्म आहे असें न जाणणारे असून अनित्य देहाचेठिकाणीं (यौवनादिकांचे-

---

इति लब्धं व्यवस्थानं जराया व्यवस्थितिर्येन सः ॥ ३८ ॥ ३९ ॥ ४० ॥ यतो न धर्मज्ञाः अनित्ये च यौवने नित्यबुद्धयः ॥ ४१ ॥ त्वं जरां किं ग्रहीष्यसीत्यपृच्छत् । प्र-

इतिलब्धव्यवस्थानः पुत्रं ज्येष्ठमवोचत ॥ यदो तात प्रतीच्छेमां जरां देहि निजं वयः ॥ ३८ ॥ मातामहकृतां वत्स न तृप्तो विषयेष्वहम् ॥ वयसा भवदीयेन रंस्ये कतिपयाः समाः ॥ ३९ ॥ यदुरुवाच ॥ नोत्सहे जरसा स्थातुमंतरा प्राप्तया तव ॥ अविदित्वा सुखं ग्राम्यं वैतृष्ण्यं नैति पूरुषः ॥ ४० ॥ तुर्वसुश्चोदितः पित्रा द्रुह्युश्चानुश्च भारत ॥ प्रत्याचख्युरधर्मज्ञा ह्यनित्ये नित्यबुद्धयः ॥ ४१ ॥ अपृच्छत्तनयं पूरुं वयसोनं गुणाधिकम् ॥ न त्वमग्रजवद्वत्स मां प्रत्याख्यातुमर्हसि ॥ ४२ ॥ पूरुरुवाच ॥ को नु लोके मनुष्येंद्र पितुरात्मकृतः पुमान् ॥ प्रतिकर्तुं क्षमो यस्य प्रसादाद्विंदते परम् ॥ ४३ ॥ उत्तमश्चिंतितं कुर्यात्प्रोक्तकारी तु मध्यमः ॥ अधमोऽश्रद्धया कुर्यादकर्तोच्चरितं पितुः ॥ ४४ ॥ इति प्रमुदितः पूरुः प्रत्यगृह्णाज्जरां पितुः ॥ सोऽपि तद्वयसा कामान्यथावज्जुजुषे नृप ॥ ४५ ॥

त्याख्यानं माकृथा इत्याह । न त्वमिति ॥ ४२ ॥ आत्मकृतः स्वदेहकर्तुः प्रत्युपकारं कर्तुं को नु क्षमः ॥ ४३ ॥ तथाऽपि पितुर्यच्चिंतितं कुर्यात्स उत्तमः । यस्तु प्रोक्तकारी स मध्यमः । यस्त्वश्रद्धया कुर्यात्सोऽधमः । अकर्ता पितुरुच्चरितं पुरीषप्रायः ॥ ४४ ॥ जुजुषे सेवितवान् ॥ ४५ ॥

ठिकाणीं) नित्य अशी बुद्धि धारण करणारे होते ॥ ४१ ॥ नंतर वयानें सर्वांपेक्षां लहान व विनयादिक गुणांनीं सर्वांपेक्षां अधिक अशा आपल्या पूरुनामक पुत्राला ययातीनें प्रश्न केला कीं,– हे वत्सा, माझी जरा घेऊन तूं आपलें तारुण्य मला देशील काय? वडील भावांप्रमाणें तूं माझें प्रत्याख्यान करण्यास योग्य नाहींस ॥ ४२ ॥ तें ऐकून पूरु ह्मणाला कीं,– हे मनुष्येंद्रा, ज्याच्या अनुग्रहानें, पुरुष ऐहिक व पारलौकिक पुरुषार्थाला पावतो, त्या आपल्या उत्पादक पित्याचा प्रत्युपकार करण्यास या लोकामध्यें कोण बरें पुरुष समर्थ आहे? कोणीच नाहीं ॥ ४३ ॥ त्यांतूनहि जो पुत्र, पित्याच्या मनांत असलेलें कार्य करितो तो उत्तम, जो सांगितलेलें करितो तो मध्यम, जो सांगितलेलें अश्रद्धेनें करितो तो अधम आणि जो पित्यानें सांगितलेलें कार्य अश्रद्धेनेंसुद्धां करित नाहीं तो विष्ठेसारखा होय ॥ ४४ ॥ असें बोलून हर्षयुक्त झालेल्या त्या पूरूनें आपलें तारुण्य वय देऊन पित्याची जरा ग्रहण केली. नंतर हे राजा, तो ययातिराजाहि पूरूनें दिलेल्या तारुण्याच्या योगेंकरून सुखानें विषयांचा उपभोग करूं लागला ॥ ४५ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ज्याचीं इंद्रियें कधींच श्रम न पावणारीं (दृढ) आहेत व जो सप्तद्वीपवती पृथिवीचा अधिपति आहे अशा त्या ययाति राजानें उत्तमप्रकारें पित्यासारखें स्नेहानें प्रजांचें पालन करून, जशी प्रीति वाटेल तशा रीतीनें विषयांचें सेवन केलें ॥ ४६ ॥ त्यावेळीं त्याला अत्यंत आवडणाऱ्या देवयानीनेंहि प्रतिदिवशीं अतिशय स्नेहानें, मधुर भाषणानें, शुश्रूषेनें व इष्टवस्तूंच्या समर्पणानें एकांतस्थलीं त्या आपल्या प्रियपतीची परम प्रसन्नता संपादन केली ॥ ४७ ॥ नंतर त्या राजानें, सर्ववेदांचें तात्पर्यभूत व सर्वदेवमय अशा यज्ञफलदात्या श्रीहरि देवाचें पुष्कळ दक्षिणायुक्त यज्ञांनीं आराधन केलें ॥ ४८ ॥ तो श्रीहरि असा कीं,– जशी आकाशाचेठिकाणीं उत्पन्न झालेली मेघांची पंक्ति, केव्हांतरी भासते व केव्हांतरी भासत नाहीं त्याप्रमाणें ज्याचेठिकाणीं हें जग, ज्यानें निर्माण केलें असतां व्यवहारस्थितीचेवेळीं जोंपर्यंत इंद्रियांची प्रवृत्ति आहे तोंपर्यंत, स्वप्न, माया व मनोरथ यांच्याप्रमाणें नानाप्रकारें भासतें व सुषुप्तीचेवेळीं इंद्रियवृत्तीचा उपराम झाला असतां मुळींच भासत नाहीं ॥ ४९ ॥ त्याच सर्वांतर्यामी अतिसूक्ष्म नारायण वासुदे-

यथोपजोषं यथाप्रीति जुजुषे ॥ ४६ ॥ ४७ ॥ ४८ ॥ नानेव भाति यावदिंद्रियप्रवृत्तिः । तदुपरमे नाभाति । स्वप्नमायाभ्यां सहितो मनोरथ इवेत्यर्थः ॥ ४९ ॥ ५० ॥ मनःसुखं कामभोगम् । कदिंद्रियैः कुत्सितैः पराङ्मुखैरिंद्रियैः ॥ ५१ ॥ इति श्रीमद्भागवते नवमस्कंधे टीकायामष्टादशोऽध्यायः ॥ १८ ॥ ॥ ऊनाविंशे ययातिः स्वं चेष्टितं नन्वजोपमम् ॥ देवयानीं

सप्तद्वीपपतिः सम्यक्पितृवत्पालयन्प्रजाः ॥ यथोपजोषं विषयान् जुजुषेऽव्याहतेंद्रियः ॥ ४६ ॥ देवयान्यप्यनुदिनं मनोवाग्देहवस्तुभिः ॥ प्रेयसः परमां प्रीतिमुवाह प्रेयसी रहः ॥ ४७ ॥ अयजद्यज्ञपुरुषं क्रतुभिर्भूरिदक्षिणैः ॥ सर्वदेवमयं देवं सर्ववेदमयं हरिम् ॥ ४८ ॥ यस्मिन्निदं विरचितं व्योम्नीव जलदावलिः ॥ नानेव भाति नाभाति स्वप्नमायामनोरथः ॥ ४९ ॥ तमेव हृदि विन्यस्य वासुदेवं गुहाशयम् ॥ नारायणमणीयांसं निराशीरयजत्प्रभुम् ॥ ५० ॥ एवं वर्षसहस्राणि मनःषष्ठैर्मनःसुखम् ॥ विदधानोऽपि नातृप्यत्सार्वभौमः कदिंद्रियैः ॥ ५१ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे नवमस्कंधेऽष्टादशोऽध्यायः ॥ १८ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ स इत्थमाचरन्कामान्स्त्रैणोपह्नवमात्मनः ॥ बुद्ध्वा प्रियायै निर्विण्णो गाथामेतामगायत ॥ १ ॥ शृणु भार्गव्यमूं गाथां मद्विधाचरितां भुवि ॥ धीरा यस्यानुशोचंति वने ग्रामनिवासिनः ॥ २ ॥

समाश्राव्य विरक्तो मुक्तिमाप्तवान् ॥ १ ॥ भुक्तभोगामजां हास्यन्नजवद्वृत्तमात्मनः ॥ विडंबयन्प्रियामाह निर्वेदयितुमात्मवान् ॥ २ ॥ कामानाचरन्नुपभुंजानः । गाथामितिहासम् ॥ १॥ मद्विधेन मत्सदृशेनाचरितामनुष्ठिताम् । मद्विधस्याचरितं यस्यामिति वा । यस्य ग्रामनिवासिनः कामिनो मद्विधस्याचरितं वने स्थिता धीराः शोचंति तस्य गाथां शृणु ॥ २ ॥

वाचें हृदेशाचेठिकाणीं ध्यान करून फलाकांक्षेनें रहित, अशा त्यानें भगवंताचें आराधन केलें ॥५०॥ याप्रमाणें ज्यांमध्यें मन सहावें आहे अशा विषयासक्त पांच इंद्रियांचीं विषयोपभोग करित असतांहि तो सार्वभौम ययाति राजा, तृप्त झाला नाहीं ॥ ५१ ॥ याप्रमाणें श्रीमद्भा०महापु० नवमस्कं० ययातिचरितेनिरूपणनामक हा अठरावा अध्याय समाप्त झाला ॥ १८ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या एकुणिसाव्या अध्यायामध्यें, ययातिराजानें आपलें आवरण बोकडाच्या रूपकानें देवयानीला ऐकवून विरक्त होत्सात्ता मुक्ति पावला अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, या प्रकारेंकरून स्त्रियेच्या वश असलेला तो ययाति राजा, विषयांचा उपभोग करीत असतां, भगवदाराधनाच्या प्रभावानें विषयभोगापासून विरक्त होऊन आपला विषयासक्तपणा जाणून त्यानें देवयानीला अशी कथा सांगितली कीं, ॥ १ ॥ हे देवयानि, या भूमीवर ज्या कामातुर गृहस्थाश्रम्याचा, वनांत राहणारे जितेंद्रिय पुरुष, 'अरेरे याचें कल्याण कसें होईल ह्मणून' शोक करित असतात, त्या माझ्यासारख्या पुरुषानें आचरण केलेली ही गाथा (गोष्ट)

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रवण कर ॥ २ ॥ कोणीएक बस्त (बोकड) वनामध्यें (संसारांत) आपलें प्रिय (विषयसेवन) कोठें होईल याचा शोध करीत फिरत असतां त्यानें, विहिरींत पडलेली आपल्या कर्माधीन असलेली एक बकरी पाहिली ॥ ३ ॥ तेव्हां त्या कामातुर बोकडानें, त्या बकरीला, विहिरींतून बाहेर काढण्याविषयीं विचार योजून विहिरीच्या काठीं असलेली मातीवगैरे आपल्या शिंगाच्या अग्रानें खणून तिला बाहेर पडण्याचा मार्ग केला ॥ ४ ॥ नंतर त्या सुंदर बकरीनें विहिरींतून बाहेर पडून त्याच बोकडाला पति वरिलें तेव्हां त्या बकरीनें वरिलेल्या त्या बोकडाला पाहून, पतीची इच्छा करणाऱ्या दुसऱ्याहि पुष्कळ बकऱ्यांनीं, ॥ ५ ॥ अतिप्रिय, रतिसुख देणारा, मैथुन करण्यामध्यें निपुण-मिशाळा व सर्व अवयवांनीं पुष्ट अशा त्याच बोकडाला वरिलें. तेव्हां तो एकटाच महाबस्त, त्या पुष्कळ बकऱ्यांना रतिसुखाची वृद्धि करित होत्साता, स्वतः कामरूप पिशा-

आत्मानमनुलक्ष्याह । बस्त इति । प्रियामनुलक्ष्याह । अजामिति । वने संसारे । प्रियं विषयम् ॥ ३ ॥ रोधसी तटे विषाणाग्रेण मृदादिकमुद्धृत्य तीर्थनिर्गमाय मार्गं व्यधत्त ॥ ४ ॥ बह्व्य इति शर्मिष्ठाप्रमुखाः कामयामासुः कांतं प्रति कामिनीः कामवत्यः ॥ ५ ॥ पीवानं पुष्टम् । श्मश्रुलं श्मश्रुबहुलं रतिसमर्थमित्यर्थः । मीढ्वांसं रेतःसेक्तारम् । याभे कोविदम-

बस्त एको वने कश्चिद्विचिन्वन्प्रियमात्मनः ॥ ददर्श कूपे पतितां स्वकर्मवशगामजाम् ॥ ३ ॥ तस्या उद्धरणोपायं बस्तः कामी विचिंतयन् ॥ व्यधत्त तीर्थमुद्धृत्य विषाणाग्रेण रोधसी ॥ ४ ॥ सोत्तीर्य कूपात्सुश्रोणी तमेव चकमे किल ॥ तया वृतं समुद्वीक्ष्य बह्व्योऽजाः कांतकामिनीः ॥ ५ ॥ पीवानं श्मश्रुलं प्रेष्ठं मीढ्वांसं याभकोविदम् ॥ स एकोऽजवृषस्तासां बह्वीनां रतिवर्धनः ॥ रेमे कामग्रहग्रस्त आत्मानं नावबुद्ध्यत ॥ ६ ॥ तमेव प्रेष्ठतमया रममाणमजान्यया ॥ विलोक्य कूपसंविग्ना नामृष्यद्बस्तकर्म तत् ॥ ७ ॥ तं दुर्हृदं सुहृद्रूपं कामिनं क्षणसौहृदम् ॥ इंद्रियाराममुत्सृज्य स्वामिनं दुःखिता ययौ ॥ ८ ॥ सोऽपि चानुगतः स्त्रैणः कृपणस्तां प्रसादितुम् ॥ कुर्वन्निडविडाकारं नाशक्नोत्पथि संधितुम् ॥ ९ ॥ तस्यास्तत्र द्विजः कश्चिदजास्वाम्यच्छिनद्रुषा ॥ लंबंतं वृषणं भूयः संदधेऽर्थाय योगवित् ॥ १० ॥

भिन्नमतएव प्रेष्ठम् । नावबुद्ध्यत नान्वबुद्ध्यत ॥ ६ ॥ ७ ॥ स्वामिनमिति शुक्राभिप्रायेणाह ॥ ८ ॥ इडविडाकारं बस्तजातिशब्दम् । संधितुं प्रसादयितुम् ॥ ९ ॥ वृषणमच्छिनज्जरया संभोगासमर्थमकरोत् । अर्थाय स्वपुत्र्याः कामोपभोगाय । योगविदुपायज्ञः । जराव्यत्ययेन रतिशक्तिं ददावित्यर्थः ॥ १० ॥

चानें ग्रस्त होऊन त्यांच्याबरोबर क्रीडा करूं लागला आणि त्यानें आपली स्थिति पुढें काय होणार हें मुळींच जाणलें नाहीं ॥ ६ ॥ त्याच बस्ताला, हा दुसऱ्या अतिप्रिय बकरीबरोबर क्रीडा करणारा आहे असें पाहून, कूपांत पडून भ्यालेल्या व बस्तानें बाहेर काढलेल्या त्या पहिल्या बकरीनें, तें बस्ताचें कर्म सहन केलें नाहीं ॥ ७ ॥ आणि तिनें कपट करणारा, वरकमीं प्रेमयुक्त भासणारा, क्षणिक सख्य धारण करणारा, कामातुर व इंद्रियांची मात्र तृप्तिकरणारा अशा त्या बस्ताचा त्याग करून, दुःखित होत्साती आपल्या पित्याकडे जावयास निघाली ॥ ८ ॥ तेव्हां स्त्रीवश असल्यामुळें दीन असा तो बस्तहि तिला प्रसन्न करण्याकरितां इडविडाकार (आपल्या जातीचा) शब्द करीत होत्साता तिच्या मागाहून निघाला तथापि मार्गामध्यें तिला प्रसन्न करून घेण्याविषयीं तो समर्थ झाला नाहीं ॥ ९ ॥ तेथें तिचा स्वामी कोणी एक ब्राह्मण होता, त्यानें रागानें त्या बोकडाचा लोंबत असणारा वृषण तोडून टाकिला, म्हणजे त्याला म्हातारपण देऊन स्त्रीसंभोग करण्यास असमर्थ केलें व पुन्हा आपल्या बकरीच्या कामोपभोगाक-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रितां उपाय योजणाऱ्या त्या ब्राह्मणानें तो वृषण सांधिला ह्मणजे जरेच्या मोबदला तारुण्य घेऊन, संभोग करण्याची शक्ति दिली ॥ १० ॥ पुढें सांधलेल्या वृषणाचा तो बोकडहि विहिरींत स.पडलेल्या त्या बकरीबरोबर बहुत दिवस विषयभोग करीत असून त्या विषयांनीं अजूनहि तृप्त होत नाहीं ॥ ११ ॥ हे सुंदरि देवयानि, त्या बोकडाप्रमाणें मीहि तुझ्या प्रेमानें वश केला जाऊन तुझ्या हावभावरूप मायेनें मोहित होत्साता अजूनहि आपला परमार्थ जाणत नाहीं ॥ १२ ॥ बरें तर पुनरपि पुष्कळ विषयसेवन करा ह्मणजे मन तृप्त झाल्यावर कामाची शांतता होऊन मोहनिवृत्ति होईल असें ह्मणशील तर– पृथ्वीवर जितके ह्मणून तांदुळ, गहूं, सोनें पशु स्त्रियावगैरे विषय आहेत ते, विषयवासनांनीं ग्रस्त झालेल्या पुरुषाच्या मनाचा संतोष करण्याकरितां कधींहि पुरे पडत नाहींत ॥ १३ ॥ कारण, विषयांच्या उपभोगानें विषयभोगाची तृष्णा कधींहि शांत होत नाहीं तर, तुपाच्या योगानें अग्नि जसा उत्तरोत्तर प्रदीप्तच होत जातो त्याप्रमाणें पुन्हा अधिकच वाढत जात्ये ॥ १४ ॥ तर केव्हां संतोषपूर्वक सुख होईल असें ह्मणशील

कूपलब्धया सह कामैः सेव्यमानैर्न तुष्यति ॥ ११ ॥ १२ ॥ ननु तर्हि पुनरपि बहवो विषयाः सेव्यंतां ततो मनसि प्रीते सति कामोपशांत्या मोहो निवर्तेतेति चेत्तत्राह । यदिति द्वाभ्याम् । न दुह्यंति न पूरयंति ॥ १३ ॥ हविषा घृतेन कृष्णवर्त्माऽग्निरिव ॥ १४ ॥ तर्हि कदा केनोपायेन वा मनसः संपूर्णा प्रीतिः स्याद्यया कामोपशमः स्यादित्यत

संबद्धवृषणः सोऽपि ह्यजया कूपलब्धया ॥ कालं बहुतिथं भद्रे कामैर्नाद्यापि तुष्यति ॥ ११ ॥ तथाऽहं कृपणः सुभ्रु भवत्याः प्रेमयंत्रितः ॥ आत्मानं नाभिजानामि मोहितस्तव मायया ॥ १२ ॥ यत्पृथिव्यां व्रीहियवं हिरण्यं पशवः स्त्रियः ॥ न दुह्यंति मनःप्रीतिं पुंसः कामहतस्य ते ॥ १३ ॥ न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति ॥ हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते ॥ १४ ॥ यदा न कुरुते भावं सर्वभूतेष्वमंगलम् ॥ समदृष्टेस्तदा पुंसः सर्वाः सुखमया दिशः १५ ॥ या दुस्त्यजा दुर्मतिभिर्जीर्यतो या न जीर्यते ॥ तां तृष्णां दुःखनिवहां शर्मकामो द्रुतं त्यजेत् ॥ १६ ॥ मात्रा स्वस्रा दुहित्रा वा नाविविक्तासनो भवेत् ॥ बलवानिंद्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति ॥ १७ ॥ पूर्णं वर्षसहस्रं मे विषयान्सेवतोऽसकृत् ॥ तथापि चानुसवनं तृष्णा तेषूपजायते ॥१८॥ तस्मादेतामहं त्यक्त्वा ब्रह्मण्याधाय मानसम् ॥ निर्द्वंद्वो निरहंकारश्चरिष्यामि मृगैः सह ॥ १९ ॥

आह । यदेति षड्भिः । अमंगलं भावं रागद्वेषादिवैम्भ्यम् ॥ १५ ॥ दुःखानि नितरां वहतीति तथा ताम् ॥ १६ ॥ स्त्रीसन्निधानं तु सर्वथा त्याज्यमित्याह । मात्रेति । अविविक्तं संकीर्णमासनं यस्य सः । कर्षत्याकर्षति ॥ १७ ॥ १८ ॥ १९ ॥

तर– जेव्हां पुरुष सर्वपदार्थांचेठिकाणीं ‘ हा चांगला व हा वाईट असा ’ भेदभाव करीत नाहींसा होतो, तेव्हां सर्वत्र समदृष्टी ठेवणाऱ्या त्या पुरुषाला सर्वहि दिशा सुखमय होतात ह्मणजे कोठेंहि गेला तरी त्याला सुखच मिळतें ॥ १५ ॥ जी तृष्णा अविवेकी पुरुषांनीं टाकण्यास अशक्य आहे, वयाची हानि पावणाऱ्याहि पुरुषाची जी तृष्णा जिरून जात नाहीं, त्या अत्यंत दुःखें देणाऱ्या तृष्णेचा सुखेच्छु पुरुषानें सत्वर त्याग करावा ॥ १६ ॥ आतां स्त्रीचें सांनिध्य तर सर्वथा वर्ज्य करावें. असें सांगतो–आई, बहीण व कन्या यांच्या बरोबरसुद्धां एका आसनावर पुरुषानें बसूं नये. कारण, बलवत्तर असा इंद्रियांचा समुदाय विवेकी पुरुषालाहि त्यांजकडे पाहणें स्पर्श करणें इत्यादिकांविषयीं प्रवृत्त करितो ॥ १७ ॥ वारंवार विषयांचें सेवन करणाऱ्याहि माझीं हजार वर्षें पुरीं झालीं तथापि त्यात्या विषयांच्या सेवनकालीं त्यात्या विषयांचेठिकाणीं तृष्णा उत्पन्न होत्ये ती शांत होत नाहीं ॥ १८ ॥ ह्मणून आतां मी ह्या तृष्णेचा (विषयभोगवासनेचा) त्याग करून व आपलें मन, ब्रह्मरूप भगवंताचेठिकाणीं स्थिर करून सुखदुःखादि द्वंद्व-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रहित व अहंकाररहित होऊन हरिणाप्रमाणें अरण्यांत संचार करितो ॥ १९ ॥ बरें, विषयवासना सोडणें हें फार दुष्कर असल्यामुळें ब्रह्माचेठिकाणीं मन कसें स्थिर करितां येईल असें म्हणशील तर– या लोकींचे पाहिलेले व परलोकींचे ऐकिलेले सर्व विषय, तुच्छ आहेत असें जाणून, त्या विषयांच्या चिंतनानेंच जन्ममरणरूप संसार प्राप्त होतो व सुखाचा नाश होतो असें जाणणारा जो पुरुष, त्या दृष्टश्रुत विषयांचें चिंतन करीत नाहीं व त्यांचा उपभोगहि करीत नाहीं तोच पुरुष, विषयवासनांचा त्याग करून आत्मद्रष्टा होतो ॥ २० ॥ या प्रकारेंकरून त्या ययातिराजानें, देवयानीला सांगून व स्वतां विषयभोगांविषयीं निरिच्छ होऊन, आपल्या पूरुनामक पुत्राला त्याचें तारुण्य वय देऊन त्यापासून आपली जरा स्वीकारिली ॥ २१ ॥ नंतर त्यानें आग्नेयदिशेचेठिकाणीं आपल्या द्रुह्युनामक पुत्राला, दक्षिणदिशेचेठिकाणीं यदुपुत्राला, पश्चिमदिशेचेठिकाणीं तुर्वसूला व उत्तरदिशेचेठिकाणीं अनूला राज्याधिकार दिला ॥ २२ ॥ आणि वयानें कनिष्ठ परंतु गुणांनीं मोठा व सर्व प्रजांना अति-

---

ननु तृष्णात्यागस्यातिदुष्करत्वात्कथं ब्रह्मणि मनस आधानं स्यात्तत्राह । दृष्टमिति । यो नानुध्यायेन्न संविशेन्न चोपभुंजीत । तत्र दृष्टश्रुतयोरनुध्यानादौ । स आत्मदृक् भवति ॥ २० ॥ २१ ॥ २२ ॥ तस्य पूरोर्वंशे स्थापयित्वा ॥ २३ ॥ विषयेषु शब्दादिष्वासेवितं षड्वर्गं षडिंद्रियसुखं मुमुचे तत्याज । यद्वा विषयेष्वासेवितं सेवां कारितं

दृष्टं श्रुतमसद्बुद्ध्वा नानुध्यायेन्न संविशेत् ॥ संसृतिं चात्मनाशं च तत्र विद्वान्स आत्मदृक् ॥ २० ॥ इत्युक्त्वा नाहुषो जायां तदीयं पूरवे वयः ॥ दत्त्वा स्वां जरसं तस्मादाददे विगतस्पृहः ॥ २१ ॥ दिशि दक्षिणपूर्वस्यां द्रुह्युं दक्षिणतो यदुम् ॥ प्रतीच्यां तुर्वसुं चक्र उदीच्यामनुमीश्वरम् ॥ २२ ॥ भूमंडलस्य सर्वस्य पूरुमर्हत्तमं विशाम् ॥ अभिषिच्याग्रजांस्तस्य वशे स्थाप्य वनं ययौ ॥ २३ ॥ आसेवितं वर्षपूगान्षड्वर्गं विषयेषु सः ॥ क्षणेन मुमुचे नीडं जातपक्ष इव द्विजः ॥ २४ ॥ स तत्र निर्मुक्तसमस्तसंग आत्मानुभूत्या विधुतत्रिलिंगः ॥ परेऽमले ब्रह्मणि वासुदेवे लेभे गतिं भागवतीं प्रतीतः ॥ २५ ॥ श्रुत्वा गाथां देवयानी मेने प्रस्तोभमात्मनः ॥ स्त्रीपुंसोः स्नेहवैक्लव्यात्परिहासमिवेरितम् ॥ २६ ॥ सा संनिवासं सुहृदां प्रपायामिव गच्छताम् ॥ विज्ञायेश्वरतंत्राणां मायाविरचितं प्रभोः ॥ २७ ॥

षण्णामिंद्रियाणां वर्गं मुमुचे उपैक्षतेत्यर्थः ॥ २४ ॥ विधुतं निरस्तं त्रिगुणात्मकं लिंगं येन । प्रतीतः प्रख्यातः ॥ २५ ॥ प्रस्तोभमेवाह । परिहासमिवेति । यद्वा प्रस्तोभं निवृत्तिमार्गे प्रोत्साहनं मेने ॥ २६ ॥ २७ ॥

मान्य अशा पूरूला, सर्व भूमंडळाच्या आधिपत्याविषयीं अभिषेक करून व यदुप्रभृति सर्व वडील बंधूंना त्याच्या स्वाधीन ठेऊन, तो राजा, आपण अरण्यांत निघून गेला ॥ २३ ॥ त्या ययातिराजानें, हजारों वर्षेंपर्यंत शब्दादि विषयांचेठिकाणीं सेवन केलेलें इंद्रियसुख एका क्षणांत, 'जसा पंख फुटलेला पक्षी, बहुत दिवस सेवन केलेलें आपलें घरटें सोडून देतो त्याप्रमाणें ' सोडून दिलें ॥ २४ ॥ हे राजा, तो प्रसिद्ध ययाति राजा, त्या वनामध्यें ज्यानें सर्व संग टाकला आहे व ज्यानें आत्मसाक्षात्कारानें त्रिगुणात्मक लिंगशरीराचा निरास केला आहे असा होऊन, सर्वदोषरहित अशा वासुदेवनामक परब्रह्माचेठिकाणीं भगवदुपासनेच्या योगानें प्राप्त होणाऱ्या मोक्षरूप गतीला पावला ॥ २५ ॥ देवयानीनें तर पतीनें सांगितलेली ती कथा ऐकून, तें सांगणें आपली थट्टाच केली आहे असें मानिलें म्हणजे स्त्रीपुरुषांना परस्पर असलेल्या स्नेहापासून परिणामीं एकमेकांच्या वियोगानें विव्हळपणा प्राप्त होतो म्हणून त्यांनीं तो स्नेह सोडून मोक्षमार्ग स्वीकारण्याबद्दल तें सुचविलेलें आहे असें मानिलें ॥ २६ ॥ नंतर त्या देव-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पानीनें, परमेश्वराधीन असलेल्या पति पुत्रादिकांचा सहवास, 'पाणशाळेचेठिकाणीं पडलेल्या पांथस्थांच्या सहवासाप्रमाणें' अस्थिर व प्रभूच्या मायेनें रचिलेला आहे असें जाणून, सर्व प्रपंच स्वप्नाप्रमाणें मिथ्या आहे असें समजून सर्वत्र असलेली आसक्ति सोडून दिली आणि श्रीकृष्णाचेठिकाणीं आपलें मन स्थापन करून, आपल्या लिंगशरीराचा त्याग केला, ह्मणजे तीहि मुक्त झाली ॥ २७ ॥ २८ ॥ तिनें श्रीकृष्णाचेठिकाणीं मन असें लाविलें कीं, हे प्रभो, षड्गुणैश्वर्यसंपन्न, जगाचें कारण, सर्वांतर्यामी, रागद्वेषादिरहित व सर्वव्यापक अशा तुज वासुदेवाला वारंवार नमस्कार असो ॥ २९ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील नवमस्कंधामध्यें ययातिचरित्रकथननामक हा एकुणिसावा अध्याय समाप्त झाला ॥ १९ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या विसाव्या अध्यायामध्यें, ययाति राजाच्या प्रसन्नतेनें ज्याला राज्यासन व

॥ २८ ॥ कथं समावेश्य तदाह । नम इति । नमनादिभिः समावेश्येत्यर्थः । शुको वा नमस्करोति ॥ २९ ॥ इति श्रीमद्भागवते नवमस्कंधे टीकायामेकोनविंशोऽध्यायः ॥ १९ ॥
विंशे पितृप्रसादाप्तराजासनमहोन्नतेः ॥ पूरोर्वंशे हि दौष्यंतेर्भरतस्येर्यते यशः ॥ १ ॥ १ ॥ २ ॥ तत्सुतः अहंयातेः सुतः ॥ ३ ॥ धर्मेयुश्च सत्येयुश्च व्रतेयुश्च धर्मसत्यव्रतेयवः ॥ ४ ॥ वनेयुश्चावमः स्मृतः । एवं दशैते ऋतेयुप्रमुखास्तस्य रौद्राश्वस्य घृताच्यामप्सरसि पुत्रा जाताः । अप्सरस इति षष्ठी सप्तम्यर्थे । वशवर्तित्वे दृष्टांतः । जगदात्मनो जगत आत्मभूतस्य मुख्यस्य प्राणस्येंद्रियाणीव ॥ ५ ॥ ६ ॥

सर्वत्र संगमुत्सृज्य स्वप्नौपम्येन भार्गवी ॥ कृष्णे मनः समावेश्य व्यधुनोल्लिंगमात्मनः ॥ २८ ॥ नमस्तुभ्यं भगवते वासुदेवाय वेधसे ॥ सर्वभूताधिवासाय शांताय बृहते नमः ॥ २९ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे नवमस्कंधे एकोनविंशोऽध्यायः ॥ १९ ॥
॥ श्रीशुक उवाच ॥ पूरोर्वंशं प्रवक्ष्यामि यत्र जातोऽसि भारत ॥ यत्र राजर्षयो वंश्या ब्रह्मवंश्याश्च जज्ञिरे ॥ १ ॥ जन्मेजयो ह्यभूत्पूरोः प्रचिन्वांस्तत्सुतस्ततः ॥ प्रवीरोऽथ नमस्युर्वै तस्माच्चारुपदोऽभवत् ॥ २ ॥ तस्य सुद्युरभूत्पुत्रस्तस्माद्बहुगवस्ततः ॥ संयातिस्तस्याहंयाती रौद्राश्वस्तत्सुतः स्मृतः ॥ ३ ॥ ऋतेयुस्तस्य कुक्षेयुः स्थंडिलेयुः कृतेयुकः ॥ जलेयुः संततेयुश्च धर्मसत्यव्रतेयवः ॥ ४ ॥ दशैतेऽप्सरसः पुत्रा वनेयुश्चावमः स्मृतः ॥ घृताच्यामिंद्रियाणीव मुख्यस्य जगदात्मनः ॥ ५ ॥ ऋतेयो रंतिभारोऽभूत्त्रयस्तस्यात्मजा नृप ॥ सुमतिर्ध्रुवोऽप्रतिरथः कण्वोऽप्रतिरथात्मजः ॥ ६ ॥

मोठेपणा प्राप्त झाला आहे त्या पूरूच्या वंशांत झालेल्या दुष्यंतपुत्र भरताचें यश वर्णन केलें आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला— हे राजा, ज्या वंशामध्यें तूं झाला आहेस व जेथें क्षत्रियवंशाचे प्रवर्तक राजर्षि व ब्राह्मणवंशाचे प्रवर्तक ब्राह्मणश्रेष्ठ उत्पन्न झाले आहेत, तो पूरूचा वंश मी तुला सांगतों श्रवण कर ॥ १ ॥ पूरूचा पुत्र जन्मेजय झाला, त्याचा पुत्र प्रचिन्वान्, त्यापासून प्रवीर झाला, त्यापासून नमस्यु झाला, त्यापासून चारुपद झाला ॥ २ ॥ त्याचा पुत्र सुद्यु झाला, त्यापासून बहुगव झाला, त्यापासून संयाति, त्याचा अहंयाति व त्या अहंयातीचा पुत्र रौद्राश्व झाला ॥ ३ ॥ त्या रौद्राश्वाला घृताचीनामक अप्सरेचेठिकाणीं, 'जशीं जगाचा आत्मभूत अशा मुख्य प्राणाच्या स्वाधीन दहा इंद्रियें असतात त्याप्रमाणें, त्याच्या स्वाधीन राहणारे— ऋतेयु, कुक्षेयु, स्थंडिलेयु, कृतेयु, जलेयु, संततेयु, धर्मेयु सत्येयु, व्रतेयु आणि सर्वांत कनिष्ठ वनेयु असे दहा पुत्र झाले ॥ ४ ॥ ५ ॥ त्यांमध्यें ऋतेयूपासून रंतिभार झाला. हे राजा, त्या रंतिभाराला—सुमति, ध्रुव आणि अ-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रतिरथ या नांवांचे तीन पुत्र झाले. त्यामध्यें अप्रतिरथाचा पुत्र कण्व झाला ॥ ६ ॥ त्याला मेधातिथि झाला, त्यापासून प्रस्कण्व इत्यादिक ब्राह्मण झाले. सुमतीचा रैभ्य पुत्र झाला, त्याचा पुत्र दुष्यंत ह्मणून प्रख्यात झाला ॥ ७ ॥ दुष्यंताला शकुंतलेचेठिकाणीं भरतपुत्र झाला असें सांगण्याकरितां त्याचा वृत्तांत सांगतो– एकेवेळीं दुष्यंतराजा, मृगयेविषयीं वनांत जाऊन सहज कण्वऋषीच्या आश्रमांत गेला. त्याणें तेथें बसलेली, आपल्या कांतीनें त्या आश्रमस्थानाला शोभविणारी देवाची मोहिनी शक्तिच कीं काय असी शकुंतलानामक एक स्त्री पाहिली आणि तो तत्काल काममोहित झाला, तेव्हां कितीएक वीरांनीं परिवेष्टित, तिच्या दर्शनानें हर्षयुक्त व ज्याचे मृगयासंबंधी श्रम निवृत्त झाले आहेत परंतु कामानें संतप्त झालेला असा तो दुष्यंतराजा, हास्य करीत मधुरवाणीनें त्या सुंदरीला ह्मणाला कीं, ॥ ८ ॥ ९ ॥ १० ॥ हे कमलपत्राक्षि,

---

॥ ७ ॥ दुष्यंतस्य शकुंतलायां भरतः पुत्रोऽभवदिति कथाद्वारेणाह। दुष्यंतो मृगयामिति पंचदशभिः। तमाश्रमं मंडयंतीम् ॥ ८ ॥ स्त्रियं विलोक्य मुमुहेऽमुह्यत् ॥ ९ ॥ तस्या दर्शनेन प्रमुदितोऽतएव सन्निवृत्तः परिश्रमो यस्य ॥ १० ॥ ११ ॥ पौरवाणां चेतो नह्यधर्मे रमते अतो मच्चेतसस्त्वयि रमणादेवाहं त्वां राजन्यतनयां वेद्मि

तस्य मेधातिथिस्तस्मात्प्रस्कण्वाद्या द्विजातयः ॥ पुत्रोऽभूत्सुमते रैभ्यो दुष्यंतस्तत्सुतो मतः ॥ ७ ॥ दुष्यंतो मृगयां यातः कण्वाश्रमपदं गतः ॥ तत्रासीनां स्वप्रभया मंडयंतीं रमामिव ॥ ८ ॥ विलोक्य सद्यो मुमुहे देवमायामिव स्त्रियम् ॥ बभाषे तां वरारोहां भटैः कतिपयैर्वृतः ॥ ९ ॥ तद्दर्शनप्रमुदितः सन्निवृत्तपरिश्रमः ॥ पप्रच्छ कामसंतप्तः प्रहसन् श्लक्ष्णया गिरा ॥ १० ॥ का त्वं कमलपत्राक्षि कस्यासि हृदयंगमे ॥ किंवा चिकीर्षितं त्वत्र भवत्या निर्जने वने ॥ ११ ॥ व्यक्तं राजन्यतनयां वेद्म्यहं त्वां सुमध्यमे ॥ नहि चेतः पौरवाणामधर्मे रमते क्वचित् ॥ १२ ॥ शकुंतलोवाच ॥ विश्वामित्रात्मजैवाहं त्यक्ता मेनकया वने ॥ वेदैतद्भगवान्कण्वो वीर किं करवाम ते ॥ १३ ॥ आस्यतां ह्यरविंदाक्ष गृह्यतामर्हणं च नः ॥ भुज्यतां संति नीवारा उष्यतां यदि रोचते ॥ १४ ॥ दुष्यंत उवाच ॥ उपपन्नमिदं सुभ्रु जातायाः कुशिकान्वये ॥ स्वयं हि वृणुते राज्ञां कन्यकाः सदृशं वरम् ॥ १५ ॥

॥ १२ ॥ विश्वामित्रस्यात्मजाऽहं मेनकायां जाता। तया च स्वर्गं गच्छंत्याऽत्र त्यक्ता। अतो राजकन्यैवाहमित्यर्थः ॥ १३ ॥ १४ ॥ किं करवामेत्यादिवाक्यात्तदभिप्रायं ज्ञात्वाऽऽह। उपपन्नमिति ॥ १५ ॥

हे मनोहरे, तूं कोणत्या जातीची कोणाची कन्या आहेस ? या निर्जन अरण्यामध्यें तूं काय करावयाचें योजिलें आहेस ? ॥ ११ ॥ हे सुमध्यमे, तूं राजकन्या आहेस असें मी स्पष्टरीतीनें जाणतों. कारण, पूरुवंशामध्यें झालेल्या राजांचें चित्त, अधर्माचेठिकाणीं केव्हांहि रमत नाहीं. माझें तर चित्त, तुझेठिकाणीं आसक्त झालें आहे, तेव्हां तूं राजकन्या आहेस यांत संशय नाहीं ॥ १२ ॥ शकुंतला ह्मणाली– विश्वामित्राची (क्षत्रियाचीच) कन्या मी मेनका अप्सरेचेठिकाणीं झालेली आहें. तिनें स्वर्गावर जातांना मला वनांत टाकिलें आहे, हें सर्व वर्तमान भगवान् कण्वऋषि जाणतो, त्यापासूनच मी ऐकिलें आहे. हे वीरा, तुझें आह्मी कोणतें काम करावें ? ॥ १३ ॥ हे कमलाक्षा, तूं सुखानें या आश्रमामध्यें बसावेंस, आह्मी केलेल्या आसनादि पूजेचा स्वीकार करावास. येथें नीवार (अरण्यांतील धान्यें) आहेत, त्या अन्नाचें भोजन करावें. जर मर्जी असेल तर वस्तीलाहि राहावें ॥ १४ ॥ दुष्यंत ह्मणाला– हे सुभ्रु, कुशिकाच्या वंशांत झालेल्या तुला हें, ‘ तुझें काय काम करावें ? ’ इत्यादिक बोलणें योग्यच आहे. कारण,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राजांच्या कन्या, आपणच योग्य अशा पतीला वरित असतात ॥ १९ ॥ नंतर तिनें, दुष्यंताचें भाषण 'ठीक आहे,' असें ह्मणून अंगीकारिलें असतां, देशकालांचे विभाग जाणणाऱ्या त्या दुष्यंत राजानें, गांधर्व–(परस्पर संकेतरूप) विधीनें, धर्माप्रमाणें शकुंतलेचा स्वीकार केला ॥ १६ ॥ नंतर अमोघवीर्य अशा त्या राजर्षीनें त्या शकुंतलेचे-ठिकाणीं वीर्य स्थापन केलें आणि दुसरे दिवशीं प्रातःकालीं तो आपल्या नगरास निघून गेला. पुढें प्रसूतिकालीं ती शकुंतला प्रसूत झाली असतां तिला भरतनांवाचा पुत्र झाला ॥ १७ ॥ तेव्हां त्या कुमाराचे जातकर्मादिक योग्य संस्कार कण्वऋषीनें वनामध्येंच केले. तो बालक, बलात्कारानें सिंहांना बंधन करून त्यांच्या बरोबर क्रीडा करित असे ॥ १८ ॥ याप्रमाणें बाल्यावस्थेपासूनच अपरिमित बलपराक्रमानें युक्त अशा हरीच्या अंशापासून उत्पन्न झालेल्या त्या कुमाराला ग्रहण करून, ती सुंदरी शकुंतला, भर्त्यांच्या (दुष्यंताच्या) समीप

गांधर्वविधिना मिथः समयपूर्वकेण ॥ १६ ॥ १७ ॥ १८ ॥ दुरत्ययं विक्रांतं विक्रमणं यस्य ॥ १९ ॥ २० ॥ भस्त्रा चर्मपात्रं तद्वन्माता आधारपात्रम्। पितुरेव तु पुत्रः तत्र हेतुः। येनेति। आत्मा वै पुत्रनामासीति श्रुतेः। भरस्व पुषाण। अनेन भरतनाम निरुक्तम् ॥ २१ ॥ किंच रेतोधा रेतःसेक्ता वंशकृत्पुत्रो यमक्षयात्पितरं नयति तारयति। तथाच श्रुतिः। पुन्नाम्नो नरकाद्यस्मात्पितरं त्रायते सुतः ॥ तस्मात्पुत्र इति प्रोक्तः स्वयमेव स्वयंभुवेति। पाठांतरे मातापित्रोः पुत्रंप्रति विवादे यमक्षयाद्धर्मनिर्णेतुर्यमस्य सभायाः

ओमित्युक्ते यथाधर्ममुपयेमे शकुंतलाम् ॥ गांधर्वविधिना राजा देशकालविभागवित् ॥ १६ ॥ अमोघवीर्यो राजर्षिर्महिष्यां वीर्य-मादधे ॥ श्वोभूते स्वपुरं यातः कालेनासूत सा सुतम् ॥ १७ ॥ कण्वः कुमारस्य वने चक्रे समुदिताः क्रियाः ॥ बध्वा मृगेंद्रांस्त-रसा क्रीडति स्म स बालकः ॥ १८ ॥ तं दुरत्ययविक्रांतमादाय प्रमदोत्तमा ॥ हरेरंशांशसंभूतं भर्तुरंतिकमागमत् ॥ १९ ॥ यदा न जगृहे राजा भार्यापुत्रावनिंदितौ ॥ शृण्वतां सर्वभूतानां खे वागाहाशरीरिणी ॥ २० ॥ माता भस्त्रा पितुः पुत्रो येन जातः स एव सः ॥ भरस्व पुत्रं दुष्यंतमावमंस्थाः शकुंतलाम् ॥ २१ ॥ रेतोधाः पुत्रो नयति नरदेव यमक्षयात् ॥ त्वं चास्य धाता गर्भस्य सत्यमाह शकुंतला ॥ २२ ॥ पितुर्युपरते सोऽपि चक्रवर्ती महायशाः ॥ महिमा गीयते तस्य हरेरंशभुवो भुवि ॥ २३ ॥ चक्रं दक्षि-णहस्तेऽस्य पद्मकोशोऽस्य पादयोः ॥ ईजे महाभिषेकेण सोऽभिषिक्तोऽधिराड्विभुः ॥ २४ ॥

सकाशाद्रेतोधा रेतःसेक्ता पितैव धर्मेण विजित्य पुत्रं नयति न तु मातेत्यर्थः। ततश्च भार्यापुत्रौ स्वीकृतवानिति ज्ञेयम् ॥ २२ ॥ चक्रवर्ती बभूवेति शेषः। तस्य महिमा गीयते तदप्येते श्लोका अभिगीता इत्यादिबह्वृचश्रुत्या। हरेरंशभुवोंऽशाज्जातस्य ॥ २३ ॥ तत्र लिंगमाह। चक्रमिति ॥ २४ ॥

भार्गीं प्राप्त झाली असतां ॥ १९ ॥ अनिंदित अशाहि त्या स्त्रीपुत्रांना, लोकापवादाच्या भयानें दुष्यंत राजा जेव्हां ग्रहण करीना, तेव्हां सर्वलोकानां ऐकूंयेण्यासारखी आकाशामध्यें '~~जिचा वक्ता दिसत नाहीं अशी~~' वाणी उत्पन्न झाली ॥ २० ॥ ती अशी कीं,–जसा भाता हा वायु उत्पन्न होण्याचें आधारपात्र आहे तशी माता हें पुत्र उत्पन्न होण्याचें आधारपात्रच आहे परंतु पुत्र हा पित्याचाच होय. कारण, जो पुत्र ज्या पित्यानें उत्पन्न केला तो त्या पित्याचेंच स्वरूप आहे. यास्तव हे दुष्यंता, तूं पुत्राचें पोषण कर. शकुं-तलेचा अवमान करूं नकोस ॥ २१ ॥ ~~रेतद्वारा वंशाची वृद्धि करणारा पुत्र,~~ यमाच्या स्थानापासून पित्याला तारितो व या गर्भाचें धारण करणारा तूंच आहेस असें जें शकुंतलेनें सांगितलें तें सत्य आहे. असें आकाशवाणीनें सांगितलें असतां, दुष्यंत राजानें त्या स्त्रीपुत्रांचा स्वीकार केला ॥ २२ ॥ पुढें दुष्यंतपिता मरण पावला असतां, तो महाकी-र्तिमान् भरतहि सप्तद्वीपवती पृथ्वीचा अधिपति झाला. भूमीवर भगवदंशापासून उत्पन्न झालेल्या त्या भरताचा महिमा ऋग्वेदांत वर्णन केला आहे ॥ २३ ॥ या भरताच्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

उजव्या हातावर चक्राकार रेषाचिन्ह असून याच्या दोन्हीं पायांचेठिकाणीं कमळाच्या कळ्यांचें रेखाकार चिन्ह होतें. महाभिषेकविधीनें राज्यावर अभिषेक केलेल्या त्या सार्वभौम महासमर्थ भरतराजानें ॥ २४ ॥ सामंतेयनामक ऋषीला पुरोहित करून, गंगेच्या तीरीं अनुलोम (एकापुढें एक अशाप्रकारें) पंचावन्न पवित्र अश्वमेधयज्ञ करून भगवंताचें आराधन केलें. तसेंच पुष्कळ द्रव्याचें दान देऊन यमुनेच्याकाठींहि एकापुढें एक अशाप्रकारें अठ्याहात्तर पवित्र अश्वांचें बंधन केलें ह्मणजे तितक्या अश्वमेधयज्ञांनीं भगवंताचें आराधन केलें. त्या दुष्यंतपुत्र भरताचा अग्नि उत्तमगुणयुक्त स्थलाचेठिकाणीं चित झाला. ज्या अग्निचयनाच्या स्थळाचेठिकाणीं हजार ब्राह्मणांनीं त्या भरतानें दिलेल्या

गंगायामनुलोमं पंचपंचाशता वाजिभिरीजे । पुरोधाय पुरोहितं कृत्वा । यमुनायामनु च यमुनायाश्चानुलोमम् ॥ २५ ॥ अष्टाधिकसप्तति मेध्यानश्वान्बबंध । किं कुर्वन् । वसु धनं प्रकर्षेण ददत् । साचीगुणे प्रकृष्टमगुणवति देशेऽग्निश्चितोऽभूत् । यस्मिन्नग्निचयने देशे वा सहस्रं ब्राह्मणा भरतेन भूरिदानेन दत्ता गा बद्वशः प्रत्येकं बद्वं बद्वं विभेजिरे विभज्य जगृहुः । चतुरशीत्यधिकैस्त्रयोदशसहस्रैरेकं बद्वं भवति । तथा हि । हिरण्येन परिवृतान्कृष्णान् शुक्लदतो मृगान् ॥ मष्णारे भरतोऽददाच्छतं बद्वानि सप्तचेति श्रुत्युक्तानि सप्ताधिकशतं बद्वानि श्रीशुकेनोत्तरश्लोके चतुर्दशलक्षत्वेन संग्रहीतानि अदात्कर्मणि मष्णारे नियुतानि चतुर्दशेति । एवं चतुर्दशलक्षाणां सप्ताधिकशतभागो बद्वमित्यु-

पंचपंचाशता मेध्यैर्गंगायामनु वाजिभिः ॥ सामंतेयं पुरोधाय यमुनायामनु प्रभुः ॥ २५ ॥ अष्टसप्ततिमेध्याश्वान्बबंध प्रददद्वसु ॥ भरतस्य हि दौष्यंतेरग्निः साचीगुणे चितः ॥ सहस्रं बद्वशो यस्मिन्ब्राह्मणा गा विभेजिरे ॥ २६ ॥ त्रयस्त्रिंशच्छतं ह्यश्वान्बद्ध्वा विस्मापयन्नृपान् ॥ दौष्यंतिरत्यगान्मायां देवानां गुरुमाययौ ॥ २७ ॥ मृगान् शुक्लदतः कृष्णान्हिरण्येन परीवृतान् ॥ अदात्कर्मणि मष्णारे नियुतानि चतुर्दश ॥ २८ ॥ भरतस्य महत्कर्म न पूर्वे नापरे नृपाः ॥ नैवापुर्नैव प्राप्स्यंति बाहुभ्यां त्रिदिवं यथा ॥ २९ ॥ किरातहूणान्यवनानंध्रान्कंकान्कशान् शकान् ॥ अब्रह्मण्यान्नृपांश्चाहन्म्लेच्छान्दिग्विजयेऽखिलान् ॥ ३० ॥

क्तम् । इयं च बद्वसंख्या श्लोकेन संगृह्यते । चतुर्दशानां लक्षाणां सप्ताधिकशतांशकः । बद्वं चतुरशीत्यग्रसहस्राणि त्रयोदश ॥ २६ ॥ देवानामपि माय। वैभवमत्यगादत्यशेत । यतः गुरुं पूज्यं हरिमाययौ प्राप्तः तदंशभवत्वात् । मायवत्तर इति पाठे ह्रस्वः श्रुत्यनुसारेण । मायावतां श्रेष्ठो हरिरेवासावित्यर्थः ॥ २७ ॥ मृगान् श्रेष्ठगजान् । भद्रमंद्रमृगादयो गजजातिभेदाः । मष्णारे इत्यस्य श्रुतपदस्य व्याख्यातं कर्मणीति कस्मिंश्चित्कर्मविशेषे केचित्तु मष्णारे तीर्थ इति व्याचक्षते ॥ २८ ॥ २९ ॥ ३० ॥

गाई, प्रत्येकानें एकेक बद्व (१३०८४) याप्रमाणें वांटून घेतल्या ॥ २५ ॥ २६ ॥ त्या दौष्यंति भरतानें, आपल्या रथाला तेत्तीसशें ३३०० घोडे जुंपून भूमीवर संचार केला आणि आपलें ऐश्वर्य दाखवून सर्वमांडलिक राजांना आश्चर्ययुक्त करून, देवांच्याहि वैभवाला मागें टाकिलें व पूज्य अशा भगवंताची प्राप्ति करून घेतली ॥ २७ ॥ त्यानें मष्णार नांवाच्या यज्ञकर्मामध्यें सुवर्णानें भूषित, पांढऱ्या दांतांच्या व काळ्यावर्णाच्या तेरालक्ष गजेंद्रांचें ब्राह्मणांस दान केलें ॥ २८ ॥ त्या भरताचें अद्भुत कर्म, पूर्वीं होऊन गेलेल्या राजांनीं केलें नाहीं, आणि वर्तमानकाळचे व पुढें होणारेहि राजे करणार नाहींत. जसे लोक पुण्यावांचून केवळ बाहुबळानें स्वर्ग मिळवूं शकत नाहींत त्याप्रमाणें भरताचें कर्म इतरांस दुर्लभ आहे ॥ २९ ॥ त्या भरतानें दिग्विजयाचेवेळीं ब्राह्मणादिकांविषयीं प्रतिकूळ अशा किरात, हूण, यवन, अंध, कंक, कश, शक व हीनजा-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तीचे राजे या सर्वांस मारून टाकिलें ॥ ३० ॥ आणि पूर्वीं जे असुर, देवांना जिंकून पाताळलोकीं जाऊन राहिलेले होते त्यांस जिंकून, त्या बलाढ्य असुरांनीं ज्या देवांच्या स्त्रिया पाताळांत नेल्या होत्या त्या पुन्हा परत आणिल्या ॥ ३१ ॥ तो भरत राज्य करित असतां त्याच्या राज्यांतील सर्व प्रजांना, स्वर्ग व भूमि यांनीं इच्छित पदार्थांचें समर्पण केलें. याप्रमाणें सत्तावीसहजार वर्षेंपर्यंत त्यानें आपली आज्ञा चालविली ॥ ३२ ॥ नंतर त्या सार्वभौम भरतराजानें, आपलें इंद्रादि लोकपालांचेठिकाणींहि प्रख्यात असलेलें ऐश्वर्य, सार्वभौम संपत्ति, अस्खलित आज्ञा व प्राण हीं सर्व मिथ्याभूत आहेत असा निश्चय करून त्यांपासून विरक्त होऊन भगवत्स्वरूपाच्या चिंतनानें त्याची प्राप्ति करून घेतली ॥ ३३ ॥ हे राजा, विदर्भराजाच्या तीन कन्या त्या भरतराजाच्या आवडत्या स्त्रिया होत्या त्यांनीं आपणांस झालेल्यापुत्रांस, हे पुत्र माझ्यासारखे नाहींत असें

अतिशयच भिऊन ज्यामघ ह्मणाला कीं,– हे प्रिये, तुला जो आतां पुत्र होईल त्याला स्त्री करण्याकरितां हिचा उपयोग होईल ॥ ३८ ॥ असें बोलून स्त्रीच्या भयानें कांपणाऱ्या व घामाघूम होणाऱ्या त्या राजाचें प्राणसंकट अवलोकन करून, त्यानें पूर्वी बहुतवेळां आराधन केलेले जे विश्वेदेव आणि पितर होते त्यांनीं दयायुक्त होऊन त्याच्या त्या भाषणालाच ' तथास्तु ' असें, अनुमोदन दिलें. नंतर त्या देवादिकांच्या प्रसादानें व ज्यामघानें दिलेल्या प्रतिवचनाच्या मुहूर्तगुणानें रजोनिवृत्ती झालेलीहि ती शैब्या गर्भिणी होऊन प्रसूतिकाळीं शुभलक्षणयुक्त पुत्र प्रसवली. तो विदर्भ या नांवानें प्रसिद्ध झाला, त्यानें थोडक्याच दिवसांमध्यें तरुण होऊन, शैब्येची सून ह्मणून बाळगलेली असलेल्या त्या कन्येला वरिलें ॥ ३९ ॥ ॥ ~~याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील नवमस्कंधामध्यें हा तेविसावा अध्याय समाप्त झाला~~ ॥ २३ ॥ ॥ ~~श्रीकृष्णार्पणमस्तु~~ ॥ ॥ ~~आतां ह्या चोविसाव्या अध्यायामध्यें, विदर्भाच्या तीन पुत्रांपासून झालेले पुष्कळ वंश श्रीकृष्णाच्या व बलरामाच्या जन्मापर्यंत सांगितले आहेत~~ ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, त्या शैब्येचे ठिकाणीं विदर्भराजाला कुश आणि क्रथ या नांवांचे दोन पुत्र व विदर्भकुळाला आनंद देणारा रोमपादनामक तिसरा पुत्र झाला ॥ १ ॥

कन्येचे

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रोमपादाचा पुत्र बभ्रु, त्या बभ्रूपासून कृति झाला, त्याचा पुत्र उशिक, त्यापासून चेदि झाला, त्यापासून दमघोषादिक पुत्र झाले ॥ २ ॥ क्रथाचा पुत्र कुंति झाला, त्याचा धृष्टि, त्याचा निर्वृति, त्यापासून दशार्हनामक पुत्र झाला, त्यापासून व्योम पुत्र झाला ॥ ३ ॥ त्याचा जीमूत, त्याचा विकृति, त्याचापुत्र भीमरथ, त्यापासून नवरथ पुत्र झाला, त्यापासून दशरथ झाला ॥ ४ ॥ त्यापासून शकुनि, शकुनीचा करंभि पुत्र झाला, त्याचा पुत्र देवरात, त्याचा देवक्षत्र, त्याचा मधु, त्यापासून कुरुवश, त्यापासून अनु झाला ॥ ५ ॥ अनूचा पुत्र पुरुहोत्र, त्याचा आयु, त्यापासून सात्वत; हे राजा, त्या सात्वताला भजमान, भजि, दिव्य, वृष्णि, देवावृध, अंधक आणि महाभोज असे सात पुत्र झाले ॥ ६ ॥ हे प्रभो, भजमानाला एकास्त्रीचेठिकाणीं निम्लोचि, किंकिण आणि धृष्टि असे तीन पुत्र झाले आणि दुसऱ्या स्त्रीचेठिकाणीं, श-

---

वैद्यादयो दमघोषादयः ॥ २॥ ३ ॥ ततो दशरथाच्छकुनिः । पुराणांतरादेवमादिविशेषो द्रष्टव्यः ॥ ४ ॥ ततः कुरुवंशादनुः । अनोः पुत्रः पुरुहोत्रः ॥ ५ ॥ ६॥ महाभोजश्चेत्येवं

रोमपादसुतो बभ्रुर्बभ्रोः कृतिरजायत ॥ उशिकस्तत्सुतस्तस्माच्चेदिश्चैद्यादयो नृप ॥ २ ॥ क्रथस्य कुंतिः पुत्रोऽभूद्धृष्टिस्तस्याथ निर्वृतिः ॥ ततो दशार्हो नाम्नाऽभूत्तस्य व्योमः सुतस्ततः ॥ ३ ॥ जीमूतो विकृतिस्तस्य यस्य भीमरथः सुतः ॥ ततो नवरथः पुत्रो जातो दशरथस्ततः ॥ ४ ॥ करंभिः शकुनेः पुत्रो देवरातस्तदात्मजः ॥ देवक्षत्रस्ततस्तस्य मधुः कुरुवशादनुः ॥ ५ ॥ पुरुहोत्रस्त्वनोः पुत्रस्तस्यायुः सात्वतस्ततः ॥ भजमानोभजिर्दिव्यो वृष्णिर्देवावृधोऽधकः ॥ सात्वतस्य सुताः सप्त महाभोजश्च मारिष ॥ ६ ॥ भजमानस्य निम्लोचिः किंकिणो धृष्टिरेव च ॥ एकस्यामात्मजाः पत्न्यामन्यस्यां च त्रयः सुताः ॥ शताजिच्च सहस्राजिदयुताजिदिति प्रभोः ॥ ७ ॥ बभ्रुर्देवावृधसुतस्तयोः श्लोकौ पठंत्यमू ॥ ८ ॥ यथैव शृणुमो दूरात्संपश्यामस्तथांऽतिकात् ॥ बभ्रुः श्रेष्ठो मनुष्याणां देवैर्देवावृधः समः ॥ ९ ॥ पुरुषाः पंचषष्टिश्च षट्सहस्राणि चाष्ट च ॥ येऽमृतत्वमनुप्राप्ता बभ्रोर्देवावृधादपि ॥ १० ॥ महाभोजोऽपि धर्मात्मा भोजा आसन् तदन्वये ॥ ११ ॥ वृष्णेः सुमित्रः पुत्रोऽभूद्युधाजिच्च परंतप ॥ शिनिस्तस्यानमित्रश्च निम्नोऽभूदनमित्रतः ॥१२॥ सत्राजितः प्रसेनश्च निम्नस्याप्यासतुः सुतौ ॥ अनमित्रसुतो योऽन्यः शिनिस्तस्याथ सत्यकः ॥१३॥

सप्त । मारिष हे आर्य ॥ ७ ॥ ८ ॥ ९ ॥ ततस्तदुपदेशेन ये पंचषष्ट्यादिसंख्याः पुरुषास्तेऽमृतत्वं मोक्षं प्राप्ताः ॥ १० ॥ ११ ॥ तस्य युधाजितः शिनिरनमित्रश्च ॥ १२ ॥ १३ ॥

ताजित् सहस्राजित् आणि अयुताजित् असे तीन पुत्र झाले ॥ ७ ॥ देवावृधाचा पुत्र बभ्रु झाला, त्या देवावृधबभ्रूंचे असे दोन श्लोक जन पठण करितात कीं– ॥ ८ ॥ देवावृध व बभ्रु हे उभयतां जशा गुणांनीं युक्त आहेत असें आह्मी दुरून ऐकिलें होतें तसेंच आतां प्रत्यक्षहि पहात आहों. तें असें कीं, मनुष्यांमध्यें बभ्रु हा श्रेष्ठ आहे आणि देवावृधतर देवांसारखा आहे ॥ ९ ॥ कारण, बभ्रु व देवावृध या दोघांपासून उपदेश पावोन, चवदाहजार पांसष्ट पुरुष मुक्ति पावले आहेत ॥ १० ॥ महाभोजहि मोठा धर्मात्मा होता, त्याच्या वंशामध्यें भोजनामक राजे उत्पन्न झाले ॥ ११ ॥ हे शत्रुसंतापना राजा, वृष्णीपासून सुमित्र, व युधाजित् असे दोन पुत्र झाले, त्यांपैकीं युधाजिताला शिनि आणि अनमित्र असे दोन पुत्र झाले, अनमित्रापासून निम्न झाला ॥ १२ ॥ निम्नालाहि, सत्राजित आणि प्रसेन असे दोन पुत्र झाले, अन-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याचा जय, त्याचा कुणि त्यापासून
मित्राला दुसरा एक शिनिनामक पुत्र झाला होता त्याला सत्यक झाला, त्या सत्यकाला युयुधाननामक (सात्यकि) पुत्र झाला, श्वफल्कापासून गांदिनीनामक स्त्रीचेठिकाणीं अक्रूरप्रमुख असे
युगंधर झाला· अनमित्राला तिसरा वृष्णिनामक पुत्र होता त्यापासून श्वफल्क आणि चित्ररथ असे दोन पुत्र झाले, धर्मवृद्ध, सुकर्मा, क्षेत्रोपेक्ष, अरिमर्दन,
दुसरे बारा ह्मणजे अक्रूरासहित तेरा प्रख्यात पुत्र झाले॥ १३ ॥ १४ ॥ १५ ॥ त्या बारांचीं नावें– आसंग, सारमेय, मृदुर, मृदुवित्, गिरी, विदूरथ इत्यादिक
शत्रुघ्न, गंधमाद आणि प्रतिबाहु अशीं होत व त्यांची बहीण सुचीरानामक होती· अक्रूराचे पुत्र–देववान् आणि उपदेव असे दोन झाले, तसेच चित्ररथाचे पुत्र पृथु, पुत्र वन्हिनामक झाला
झाले· हे सर्व राजे वृष्णीच्या कुळांत झाले॥ १६ ॥ १७ ॥ १८ ॥ अंधकाला–कुकुर, भजमान, शुचि आणि कंबलबर्हिष असे चार पुत्र झाले· त्यांपैकीं कुकुराचा

अक्रूरः प्रमुखो येषामित्यतद्गुणसंविज्ञानो बहुव्रीहिः ॥ १५ ॥
सत्यकस्य पुत्रो युयुधानस्तस्य जयस्तस्य कुणिस्ततः कुणेर्युगंधरः । अनमित्रस्यैवापरो वृष्णिर्नाम पुत्रः ॥ १४ ॥ शूरो विदू-
अतोऽक्रूरातिरिक्तान् द्वादश दर्शयति ।आसंग इति ॥ १६ ॥ १७ ॥ पृथुरेकः विदूरथाद्या अन्ये च बहवः । विपृथुधामा इति पाठे आद्यशब्देन विदूरथोऽप्युक्तस्ततश्च

श्वफल्कश्चित्ररथश्च गांदिन्यां
युयुधानः सात्यकिर्वै जयस्तस्य कुणिस्ततः ॥ युगंधरोऽनमित्रस्य वृष्णिः पुत्रोऽपरस्ततः ॥ १४ ॥ धर्मवृद्धः सुकर्मा
च श्वफल्कतः ॥ अक्रूरप्रमुखा आसन्पुत्रा द्वादश विश्रुताः ॥ १५ ॥ आसंगः सारमेयश्च मृदुरो मृदुविद्गिरिः ॥ १७ ॥
च क्षेत्रोपेक्षोऽरिमर्दनः ॥ १६ ॥ शत्रुघ्नो गंधमादश्च प्रतिबाहुश्च द्वादश ॥ तेषां स्वसा सुचीराख्या द्वावक्रूरसुतावपि
देववानुपदेवश्च तथा चित्ररथात्मजाः ॥ पृथुर्विदूरथाद्याश्च बहवो वृष्णिनंदनाः ॥ १८ ॥ कुकुरो भजमानश्च शुचिः कंबलबर्हिषः ॥
कुकुरस्य सुतो वह्निर्विलोमा तनयस्ततः ॥ १९ ॥ कपोतरोमा तस्यानुः सखा यस्य च तुंबुरुः ॥ अंधको दुंदुभिस्तस्मादरिद्योतः
पुनर्वसुः ॥ २० ॥ तस्याहुकश्चाहुकी च कन्या चैवाहुकात्मजौ ॥ देवकश्चोग्रसेनश्च चत्वारो देवकात्मजाः ॥ २१ ॥ देववानुपदे-
वश्च सुदेवो देववर्धनः ॥ तेषां स्वसारः सप्तासन्धृतदेवादयो नृप ॥ २२ ॥ शांतिदेवोपदेवा च श्रीदेवा देवरक्षिता ॥ सहदेवा
देवकी च वसुदेव उवाह ताः ॥ २३ ॥ कंसः सुनामा न्यग्रोधः कंकः शंकुः सुहूस्तथा ॥ राष्ट्रपालोऽथ सृष्टिश्च तुष्टिमानौग्रसेनयः
॥ २४ ॥ कंसा कंसवती कंका शूरभू राष्ट्रपालिका ॥ उग्रसेनदुहितरो वसुदेवानुजस्त्रियः ॥ २५ ॥

कुकुरभजमानशुचिकंबलबर्हिषाख्यास्तथांधकस्य पुत्रा इति
रथादासीदिति वक्ष्यमाणनिर्देशोपपत्तिः ॥ १८ ॥ कुकुरादयश्चत्वारोंऽधकस्य सुता इति ज्ञेयम् । तथाच पराशरः । ॥ औग्रसेनय
॥ १९ ॥ अनोरंधकोंऽधकाद्दुंदुभिरित्यपि तद्वचनादेव ज्ञेयम् ॥ २० ॥ २१ ॥ धृतदेवा आदिर्यासां शांतिदेवादीनां षण्णां ताः सप्त ॥ २२ ॥ ताः सप्त ॥ २३
उग्रसेनस्य सुताः ॥ २४ ॥ वसुदेवस्य येऽनुजा देवभागादयस्तेषां स्त्रियो भार्याः ॥ २५ ॥

अनूपासून अंधक झाला त्याचा दुंदुभि,
त्यापासून विलोमानामक पुत्र झाला ॥ १९ ॥ त्याचा कपोतरोमा, त्याचा अनु झाला· त्या अनूचा तुंबरुनामक गंधर्व मित्र होता· उग्रसेन असे दोन पुत्र
त्याचा अरिद्योत, त्याचा पुनर्वसु झाला ॥ २० ॥ त्याला आहुक पुत्र आणि आहुकी कन्या अशीं दोन मुलें झालीं, आहुकाला देवक आणि ॥ २१ ॥ २२ ॥
झाले, त्यांपैकीं, देवकाचे पुत्र– देववान्, उपदेव, सुदेव आणि देववर्धन असे चार झाले हे नृपा, त्या चौघांच्या धृतदेवा इत्यादिक सात बहिणी होत्या कंस, सुना-
त्यांचीं नांवें– धृतदेवा, शांतिदेवा, उपदेवा, श्रीदेवा, देवरक्षिता, सहदेवा आणि देवकी अशीं होत· त्या सर्वहि वसुदेवानें वरिल्या ॥ २३ ॥ उग्रसेनाचे पुत्र– कन्या होत,
मा, न्यग्रोध, कंक, शंकु, राष्ट्रपाल, सृष्टि आणि तुष्टिमान् हे नऊ होत ॥ २४ ॥ तशाच कंसा,–कंसवती, कंका, शूरभू, राष्ट्रपालिका ह्या पांच उग्रसेनाच्या

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्या वसुदेवाच्या देवभाग इत्यादिक कनिष्ठ बंधूंच्या स्त्रिया होत ॥ २५ ॥ पूर्वीं सांगितलेल्या विदूरथापासून शूर झाला, त्यापासून भजमान पुत्र झाला, त्यापासून शिनि झाला, त्यापासून स्वयंभोज झाला, त्याचा पुत्र हृदीक झाला तो मोठा मान्य होता ॥ २६ ॥ त्याचे पुत्र— देवबाहु, शतधनु, कृतवर्मा आणि देवमीढ असे चार होते. त्यांपैकीं देवमीढाला शूर झाला, त्याची मारिषानामक पत्नी होती ॥ २७ ॥ तिचेठिकाणीं त्यानें, खोटेपणा इत्यादि दोषांनीं रहित असे दहा पुत्र उत्पन्न केले; त्यांचीं नांवें— वसुदेव, देवभाग, देवश्रवस, आनक, सृंजय, श्यामक, कंक, शमीक, वत्सक आणि वृक अशीं होत. त्यांमध्यें ज्याच्या जन्मकाळीं देवांचे आनक (नोबदी) आणि दुंदुभि (नगारे) आपोआप वाजूं लागले ह्मणून श्रीकृष्णावताराचें योग्यस्थान अशा त्या वसुदेवाला आनकदुंदुभि असें ह्मणतात. पृथा, श्रुतदेवा, श्रुतकीर्ति, श्रुतश्रवा, आणि रा-

---

अंधकसुतानां चतुर्णां प्रथमस्य कुकुरस्य वंश उक्तो द्वितीयस्य भजमानस्य वंशमाह। शूरो विदूरथादिति। भजमानाच्च विदूरथः पुत्रोऽभूद्विदूरथाच्च शूर इति पराशरादिवचनात् यद्वा पृथुर्विदूरथाद्याश्चेति पूर्वोक्तचित्ररथात्मजाद्विदूरथात् ॥ २६ ॥ देवमीढस्य यः शूरो नाम पुत्रस्तस्य। देवमीढो हृदीकस्यैव सुतः। तथाह पराशरः। तस्यापि कृतवर्मशतधनुर्देवमीढुषाद्या बभूवुः देवमीढुषस्य शूरस्यापि मारिषानाम पत्न्यभवत्तस्यां चासौ दश पुत्रानजनयद्वसुदेवपूर्वानिति ॥ २७ ॥ २८ ॥ आनकाश्च नेदुः ॥ २९ ॥

शूरो विदूरथादासीद्भजमानः सुतस्ततः ॥ शिनिस्तस्मात्स्वयंभोजो हृदीकस्तत्सुतो मतः ॥ २६ ॥ देवबाहुः शतधनुः कृतवर्मेति तत्सुताः ॥ देवमढस्य शूरस्य मारिषानाम पत्न्यभूत् ॥ २७ ॥ तस्यां स जनयामास दश पुत्रानकल्मषान् ॥ वसुदेवं देवभागं देवश्रवसमानकम् ॥ २८ ॥ सृंजयं श्यामकं कंकं शमीकं वत्सकं वृकम् ॥ देवदुंदुभयो नेदुरानका यस्य जन्मनि ॥ २९ ॥ वसुदेवं हरेः स्थानं वदंत्यानकदुंदुभिम् ॥ पृथा च श्रुतदेवा च श्रुतकीर्तिः श्रुतश्रवाः ॥ ३० ॥ राजाधिदेवी चैतेषां भगिन्यः पंच कन्यकाः ॥ कुंतेः सख्युः पिता शूरो ह्यपुत्रस्य पृथामदात् ॥ ३१ ॥ साऽऽप दुर्वाससो विद्यां देवहूतीं प्रतोषितात् ॥ तस्या वीर्यपरीक्षार्थमाजुहाव रविं शुचिम् ॥ ३२ ॥ तदैवोपागतं देवं वीक्ष्य विस्मितमानसा ॥ प्रत्ययार्थं प्रयुक्ता मे याहि देव क्षमस्व मे ॥ ३३ ॥

हरेः प्रादुर्भावस्य स्थानम् ॥ ३० ॥ पृथायाः कन्यकावस्थायां कर्णोत्पत्तिप्रकारमाह। कुंतेरिति पंचभिः ॥ ३१ ॥ कदाचिद्गृहमागतं दुर्वाससं पृथा परिचर्यादिना तोषयामास ततश्च सा तस्माद्देवहूतिं देवाह्वानहेतुं विद्यामवाप। तदाह। साऽऽपेति ॥ ३२ ॥ देवमुपागतं वीक्ष्य सा प्राह। प्रत्ययार्थं परीक्षार्थं मया विद्या प्रयुक्ता न तु त्वया किंचित्कार्यमित्यभिसंधिनाऽतो याहीति ॥ ३३ ॥

जाधिदेवी ह्या शूराच्या पांच कन्या ह्या, वसुदेवादिकांच्या बहिणी होत. त्यांमध्यें पृथा ही, तिचा पिता जो शूर त्यानें आपल्या पुत्ररहित असलेल्या कुंतिनामक मित्राला दत्तक दिली होती ह्मणून तिचें कुंती असें दुसरें नांव पडलें आहे ॥ २८ ॥ २९ ॥ ३० ॥ ३१ ॥ त्या कुंतीनें, एकेवेळीं आपल्या घरीं आलेल्या दुर्वासऋषीला शुश्रूषादिकेंकरून संतुष्ट करून त्यापासून देवांना बोलावण्याची मंत्रविद्या संपादन केली होती, तिच्या सामर्थ्याच्या परीक्षेकरितां तिनें एका मंत्राचा प्रयोग करून शुद्ध अशा सूर्याला आपल्याजवळ बोलाविलें ॥ ३२ ॥ त्यावेळीं जवळ आलेल्या त्या सूर्याला पाहून विस्मितचित्त झालेल्या तिनें भाषण केलें कीं, खरेपणाच्या परीक्षेकरितां मी या विद्येचा प्रयोग केला होता परंतु तुझ्याकडून काहींच कार्य करून घ्यावयाचें नाहीं यास्तव तूं माघारें गमन करावेंस. व्यर्थ बोलाविल्याबद्दल माझ्या अपरा-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

धाची क्षमा कर ॥ ३३ ॥ तेव्हां सूर्य ह्मणाला कीं,– हे सुंदरि, माझें दर्शन सफल होणारें आहे करितां तुझेठिकाणीं पुत्ररूपी गर्भ स्थापन करितों. मी अजून कन्या आहें असें जर ह्मणशील तर– हे सुमध्यमे, ~~तुझी योनि जशी विदीर्ण होणार नाहीं तसें मी करीन,~~ ह्मणजे तो गर्भ तुला श्रम न होतां कानांतूनच बाहेर पडेल ॥ ३४ ॥ असें बोलून त्या सूर्यानें तिचेठिकाणीं गर्भस्थापन करून स्वर्गास गमन केलें. नंतर दुसरा सूर्यच कीं काय ! असा तेजस्वी कुमार तत्काल श्रमावांचून कर्णद्वारा उत्पन्न झाला ॥ ३५ ॥ तेव्हां लोकापवादापासून भिणाऱ्या त्या कुंतीनें दुःखानें त्या बालकाला पेटींत घालून नदीच्या पाण्यांत सोडून दिलें, पुढें त्या कुंतीला सत्यपराक्रमी अशा तुझ्या प्रपितामहानें (पणजानें) वरिलें ॥ ३६ ॥ श्रुतदेवेला करूष देशाचा अधिपति वृद्धशर्म्यानें वरिलें. तिचेठिकाणीं तर, पूर्वी सनकादिक ऋषींनीं शापलेला भगवंताचा विजयनामक द्वारपाळ जो दितीचा पुत्र हिरण्याक्ष झाला होता, तोच दंतवक्त्रनामक पुत्र उत्पन्न झाला ॥ ३७ ॥ श्रुतकीर्तीला कैकेय (केकयदेशाधिपति) धृष्टकेतूनें वरिलें

एवमुक्तो रविरुवाच । अमोघं दर्शनमिति । कन्याऽहमिति चेत्तत्राह । यथा योनिर्न दुष्येत तथाऽहं कर्ता करिष्यामि ॥ ३४ ॥ ३५ ॥ ३६ ॥ ३७ ॥ ३८ ॥ आवंत्यौ विंदानुविंदौ ॥ ३९ ॥ तदेवं वसुदेवस्य भगिनीनां पतीन्पुत्रांश्चोक्त्वा तद्भ्रातॄणां नवानां पत्नीः पुत्रांश्चाह । देवभागस्येति नवभिः श्लोकार्धैः ॥ ४० ॥ ४१ ॥ ४२ ॥ ४३ ॥

अमोघं दर्शनं देवि आधत्से त्वयि चात्मजम् ॥ योनिर्यथा न दुष्येत कर्ताऽहं ते सुमध्यमे ॥ ३४ ॥ इति तस्यां स आधाय गर्भं सूर्यो दिवं गतः ॥ सद्यः कुमारः संजज्ञे द्वितीय इव भास्करः ॥ ३५ ॥ तं सा त्यजन्नदीतोये कृच्छ्राल्लोकस्य बिभ्यती ॥ प्रपितामहस्तामुवाह पांडुर्वै सत्यविक्रमः ॥ ३६ ॥ श्रुतदेवां तु कारूषो वृद्धशर्मा समग्रहीत् ॥ यस्यामभूद्दंतवक्त्र ऋषिशप्तो दितेः सुतः ॥ ३७ ॥ कैकेयो धृष्टकेतुश्च श्रुतकीर्तिमविंदत ॥ संतर्दनादयस्तस्यां पंचासन्कैकयाः सुताः ॥ ३८ ॥ राजाधिदेव्यामावंत्यौ जयसेनोऽजनिष्ट ह ॥ दमघोषश्चेदिराजः श्रुतश्रवसमग्रहीत् ॥ ३९ ॥ शिशुपालः सुतस्तस्याः कथितस्तस्य संभवः ॥ देवभागस्य कंसायां चित्रकेतुबृहद्बलौ ॥ ४० ॥ कंसावत्यां देवश्रवसः सुवीर इषुमांस्तथा ॥ कंकायामानकाज्जातः सत्यजित्पुरुजित्तथा ॥ ४१ ॥ सृंजयो राष्ट्रपाल्यां च वृषदुर्मर्षणादिकान् ॥ हरिकेशहिरण्याक्षौ शूरभूम्यां च श्यामकः ॥ ४२ ॥ मिश्रकेश्यामप्सरसि वृकादीन्वत्सकस्तथा ॥ तक्षपुष्करशालादीन्दुर्वाक्ष्यां वृक आदधे ॥ ४३ ॥

तिचेठिकाणीं कैकेय संतर्दनादिक पांच पुत्र उत्पन्न झाले ॥ ३८ ॥ राजाधिदेवीचेठिकाणीं, जयसेन राजानें, अवंतिदेशाचे अधिपति विंद अनुविंदनामक दोन पुत्र उत्पन्न केले; चेदिदेशांचा राजा जो दमघोष त्यानें श्रुतश्रवेला वरिलें ॥ ३९ ॥ तिला शिशुपालनामक पुत्र झाला. त्याचा उत्पत्तिप्रकार सप्तमस्कंधांत तुला सांगितला आहे. असो; याप्रमाणें वसुदेवाच्या बहिणींचे पति व पुत्र सांगून आतां त्या वसुदेवाच्या नऊ भावांच्या स्त्रिया व पुत्र सांगतो– देवभागाला कंसानामक स्त्रीचेठिकाणीं चित्रकेतु आणि बृहद्बल असे दोन पुत्र झाले ॥ ४० ॥ तसेच देवश्रव्याला, कंसावती स्त्रीचेठिकाणीं सुवीर आणि इषुमान् असे दोन पुत्र झाले, त्याप्रमाणें आनकापासून कंकेचेठिकाणीं सत्यजित् आणि पुरुजित् असे दोन पुत्र झाले ॥ ४१ ॥ सृंजयाला, राष्ट्रपालीचेठिकाणीं वृष, दुर्मर्षण इत्यादिक पुत्र झाले. श्यामकानें शूरभूमीचेठिकाणीं हरिकेश आणि हिरण्याक्ष असे दोन पुत्र उत्पन्न केले ॥ ४२ ॥ तसेच वत्सकानें, मिश्रकेशीनामक अप्सरेचेठिकाणीं वृकादिक पुत्र उत्पन्न केले, वृकानें, दुर्वाक्षी स्त्रीचेठिकाणीं तक्ष, पुष्क-

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रशाल इत्यादिक पुत्र उत्पन्न केले ॥ ४३ ॥ शमीकापासून सुदामनी स्त्रीला सुमित्र, अर्जुनपाल इत्यादिक पुत्र झाले, कंकानें, कर्णिकेचेठिकाणीं ऋतधाम आणि जय हे पुत्र उत्पन्न केले ॥ ४४ ॥ आतां वसुदेवाच्या स्त्रिया व पुत्र सांगतो— पौरवी, रोहिणी, भद्रा, मदिरा, रोचना, इला व देवकी इत्यादिक वसुदेवाच्या अठरा स्त्रिया होत्या ॥ ४५ ॥ त्यांपैकीं रोहिणीचेठिकाणीं वसुदेवानें, बल, गद, सारण, दुर्मद, विपुल, ध्रुव या पुत्रांस व कृत इत्यादिक दुसऱ्याहि पुत्रांस उत्पन्न केलें ॥ ४६ ॥ वसुदेवापासून पौरवीला, सुभद्र, भद्रवाह, दुर्मद, भद्र आणि भूत इत्यादिक प्रसिद्ध असे बारा पुत्र झाले ॥ ४७ ॥ नंद, उपनंद, कृतक, शूर इत्यादिक मदिरेचे पुत्र होते, कौसल्यानामक वसुदेवाची स्त्रीतर— कुलनंदन असा केशीनामक एकच पुत्र प्रसवली ॥ ४८ ॥ रोचनेचेठिकाणीं वसुदेवापासून हस्त व हेमांगद इत्यादिक पुत्र झाले, तसेच वसुदेवानें इ-

॥ ४४ ॥ वसुदेवस्य पत्नीः पुत्रांश्चाह। पौरवीत्येकादशभिः ॥ ४५ ॥ ४६ ॥ ४७ ॥ कौशल्या भद्रा ॥ ४८ ॥ ४९ ॥ ५० ॥ ५१ ॥ ५२ ॥ ५३ ॥ ५४ ॥ अष्टमस्तु स्वय-

सुमित्राऽर्जुनपालादीन् शमीकात्तु सुदामिनी ॥ कंकश्च कर्णिकायां वै ऋतधामजयावपि ॥ ४४ ॥ पौरवी रोहिणी भद्रा मदिरा रोचना इला ॥ देवकीप्रमुखा आसन्पत्न्य आनकदुंदुभेः ॥ ४५ ॥ बलं गदं सारणं च दुर्मदं विपुलं ध्रुवम् ॥ वसुदेवस्तु रोहिण्यां कृतादीनुदपादयत् ॥ ४६ ॥ सुभद्रो भद्रवाहश्च दुर्मदो भद्र एव च ॥ पौरव्यास्तनया ह्येते भूताद्या द्वादशाभवन् ॥ ४७ ॥ नंदोपनंदकृतकशूराद्या मदिरात्मजाः ॥ कौशल्या केशिनं त्वेकमसूत कुलनंदनम् ॥ ४८ ॥ रोचनायामतो जाता हस्तहेमांगदादयः ॥ इलायामुरुवल्कादीन्यदुमुख्यानजीजनत् ॥ ४९ ॥ विपृष्टो धृतदेवायामेक आनकदुंदुभेः ॥ शांतिदेवात्मजा राजन् श्रमप्रतिश्रुतादयः ॥ ५० ॥ राजानः कल्पवर्षाद्या उपदेवसुता दश ॥ वसुहंससुवंशाद्याः श्रीदेवायास्तु षट् सुताः ॥ ५१ ॥ देवरक्षितया लब्धा नव चात्र गदादयः ॥ वसुदेवः सुतानष्टावादधे सहदेवया ॥ ५२ ॥ पुरुविश्रुतमुख्यांस्तु साक्षाद्धर्मो वसूनिव ॥ वसुदेवस्तु देवक्यामष्टपुत्रानजीजनत् ॥ ५३ ॥ कीर्तिमंतं सुषेणं च भद्रसेनमुदारधीः ॥ ऋजुं संमर्दनं भद्रं संकर्षणमहीश्वरम् ॥ ५४ ॥ अष्टमस्तु तयोरासीत्स्वयमेव हरिः किल ॥ सुभद्रा च महाभागा तव राजन्पितामही ॥ ५५ ॥ यदा यदेह धर्मस्य क्षयो वृद्धिश्च पाप्मनः ॥ तदा तु भगवानीश आत्मानं सृजते हरिः ॥ ५६ ॥

मेवासीन्न तु कर्मादिना हेतुना ताभ्यां जनितो वा। यतोऽसौ हरिः ॥ ५५ ॥ तदेवोपपादयति। यदेति त्रिभिः ॥ ५६ ॥

लानाम भार्येचेठिकाणीं यादवांमध्यें मुख्य असे उरु, वल्क इत्यादिक पुत्र उत्पन्न केले ॥ ४९ ॥ वसुदेवाला धृतदेवेचेठिकाणीं विपृष्ठनामक एकच पुत्र झाला. हे राजा, वसुदेवाच्या शांतिदेवानामक भार्येला तर— श्रम, प्रतिश्रुत इत्यादिक पुत्र झाले ॥ ५० ॥ कल्प, वर्ष इत्यादिक दहा राजेतर—वसुदेवाच्या उपदेवेचे पुत्र झाले, श्रीदेवेचे तर—वसु, हंस, सुवंश इत्यादिक सहा पुत्र झाले ॥ ५१ ॥ देवरक्षितानामक भार्येला तर—गद इत्यादिक नऊ पुत्र झाले,तसेच वसुदेवानें सहदेवानामक भार्येच्या योगानें पुरु, विश्रुत इत्यादिक आठ पुत्र, जसे साक्षात् धर्मानें अष्टवसु उत्पन्न केले तसे उत्पन्न केले. तसेच उदारबुद्धि अशा त्या वसुदेवानें देवकीचेठिकाणीं आठ पुत्र उत्पन्न केले ॥५२॥५३॥ ते—कीर्तिमान्, सुषेण, भद्रसेन, ऋजु, संमर्दन, भद्र आणि शेषाचा अवतार संकर्षण (बलराम) हे सात होत ॥ ५४ ॥ आणि त्या देवकीवसुदेवांचा आठवा पुत्रतर—स्वतः साक्षात् हरिच श्रीकृष्णरूपानें अवतीर्ण झाला आणि हे राजा, तुझी आजी महाभाग्यवती सुभद्रा ही कन्या झाली ॥ ५५ ॥ ज्याज्याकालीं यालोकीं खरोखर धर्माचा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विनाश आणि पापाची वृद्धि होत्ये, त्याकालीं कर्तुं अकर्तुं अन्यथाकर्तुं समर्थ असा भगवान् हरि, साधूंच्या रक्षणानें धर्मस्थापन करण्याकरितां आपला अवतार उत्पन्न करितो ॥ ५६ ॥ हे भूमिपते, मायानियंता, असंग, साक्षी व सर्वव्यापक अशा ह्या भगवंताला, आपल्या मायेच्या विनोदावांचून जन्माचें किंवा कर्माचें कारण मुळींच घडत नाहीं ॥ ५७ ॥ आणि इच्छामात्रानें केलेली ज्याची लीला, जीवाच्या उत्पत्तिस्थितिसंहारांकरितां होत असत्ये आणि ज्याचा अनुग्रह, प्राण्यांच्या, जन्मादि संसारनिवृत्तीनें मोक्षप्राप्तीकरितां होत असतो; त्याला अवतार घेण्याविषयीं इच्छेवांचून दुसरें काय कारण आहे ? कांहींच नाहीं ॥ ५८ ॥ आतां त्याची लीला ही भूमीवर अनुग्रह आहे असें सांगतो— राजांचें चिन्हमात्र धारण करणारे परंतु आसुरसंपत्तीनें युक्त असून अक्षौहिणीसंख्यांच्या सेनांचे अधिपति जे शिशुपाल जरासंध कंसइत्यादिक त्यांनीं पीडित केलेल्या

ईशस्य मायानियंतुः । परस्यासंगस्य । द्रष्टुः साक्षिणः । आत्मनः सर्वगस्य । नह्येवंभूतस्य मायाविनोदं विना जन्मनः कर्मणो वा हेतुः संभवतीत्यर्थः ॥ ५७ ॥ किंच यस्य मायाचेष्टितं पुंसो जीवस्यानुग्रहस्तस्य जीवानुग्राहकस्य कुतः कर्मादिपारतंत्र्येण जन्मादिसंभवः । अनुग्रहमेवाह । हि यस्मात्तदेव स्थित्यादये इष्यते । प्रलये लीनोपाधेर्जीवस्य धर्माद्यसंभवादुपाधिसृष्ट्यादिना धर्मादिसंपादनेनानुग्रहः । तथाऽऽत्मलाभाय मोक्षाय चेष्यते । तत्र हेतुः । तेनैव श्रूयमाणेन तस्य स्थित्यादेनार्वृत्तेः ॥ ५८ ॥ तस्य चेष्टितं भूमेरनुग्रह इत्याह । अक्षौहिणीनामिति द्वाभ्याम् । अभाराय भारपरिहाराय ॥ ५९ ॥ सुरेश्वरैरपि मनसाऽप्यपरिमेयाण्यवितर्क्याणि । संकर्षणसहितश्चक्रे ॥ ६० ॥ संकल्पमात्रेण भूभारहरणसमर्थस्यापि कर्मकरणं यशोविस्तारद्वारा भक्तानुग्रहार्थमित्याह कलाविति द्वाभ्याम् । दुःखशोकतमांसि नुदतीति तथा तद्यशो व्यतनोत् ॥ ६१ ॥ यस्मिन्सतां कर्णपीयूषे यशोरूपे तीर्थवरे श्रोत्रमेवांजलिः पानसाधनं यस्य स पुरुषः सकृदप्युपस्पृश्याचमनमात्रं कृत्वा तत्सौंदर्याकृष्टचित्तः कर्मवासनां धुनुते ॥ ६२ ॥ तदेवाह द्वाभ्याम् भोजादिभिः श्लाघनीयमीहितं यस्य ॥ ६३ ॥

नह्यस्य जन्मनो हेतुः कर्मणो वा महीपते ॥ आत्ममायां विनेशस्य परस्य द्रष्टुरात्मनः ॥ ५७ ॥ यन्मायाचेष्टितं पुंसः स्थित्युत्पत्त्यप्ययाय हि ॥ अनुग्रहस्तन्निवृत्तेरात्मलाभाय चेष्यते ॥ ५८ ॥ अक्षौहिणीनां पतिभिरसुरैर्नृपलांछनैः ॥ भुव आक्राम्यमाणाया अभाराय कृतोद्यमः ॥ ५९ ॥ कर्माण्यपरिमेयाणि मनसाऽपि सुरेश्वरैः ॥ सहसंकर्षणश्चक्रे भगवान्मधुसूदनः ॥ ६० ॥ कलौ जनिष्यमाणानां दुःखशोकतमोनुदम् ॥ अनुग्रहाय भक्तानां सुपुण्यं व्यतनोद्यशः ॥ ६१ ॥ यस्मिन्सत्कर्णपीयूषे यशस्तीर्थवरे सकृत् ॥ श्रोत्रांजलिरुपस्पृश्य धुनुते कर्मवासनाम् ॥ ६२ ॥ भोजवृष्ण्यंधकमधुशूरसेनदशार्हकैः ॥ श्लाघनीयेहितः शश्वत्कुरुसृंजयपांडुभिः ॥ ६३ ॥

भूमीचा भार उतरण्याकरितां उद्योग करणाऱ्या भगवान् श्रीकृष्णानें, बलरामासहवर्तमान, इंद्रादिदेवांनींहि मनानें संकल्प करण्यासुद्धां अशक्य अशीं पूतनाबककेशिवधादिक कर्में केलीं ॥ ५९ ॥ ६० ॥ आणि कलियुगामध्यें उत्पन्न होणाऱ्या भक्तांवर अनुग्रह करण्याकरितां दुःख शोक आणि अज्ञान यांचा नाश करणारें व धर्मादिक पुरुषार्थरूप पुण्य उत्पन्न करणारें यश विस्तृत केलें आहे ॥ ६१ ॥ साधूंच्या कर्णांना अमृतासारखें गोड लागणाऱ्या ज्या यशोरूप तीर्थश्रेष्ठाचेठिकाणीं, श्रोत्रेंद्रिय हेंच ज्याच्या जवळ पिण्याचें साधनपात्र आहे तो पुरुष, एकवारतरी आचमन करून म्हणजे थोडेंतरी श्रवण करून भगवंताच्या सौंदर्यानें आकृष्टचित्त झाला असतां तो, मोक्षाला प्रतिबंध करणाऱ्या कर्मवासनेचा त्याग करितो ॥ ६२ ॥ भोज, वृष्णि, अंधक, मधु, शूरसेन, दशार्हक तसेच कुरु, सृंजय आणि पांडव यांनीं, निरंतर ज्याच्या लीला स्तविल्या आहेत

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्या श्रीकृष्णानें, स्नेहपूर्वक व हास्ययुक्त जें आपलें अवलोकन त्याच्यायोगानें, भक्तांचे मनोरथ पूर्ण करणाऱ्या वाक्यांनीं, गोवर्धनोद्धरणादि पराक्रमयुक्त लीलेनें आणि सर्व अवयवांनीं सुंदर अशा आपल्या मूर्तीनें, मनुष्यलोकाला आनंदयुक्त केलें आहे ॥ ६३॥ ६४ ॥ तें दाखविण्याकरितां त्याच्या मुखाची शोभा सांगतो- मकराकार कुंडलांनीं सुंदर असे कर्ण व प्रकाश पावणारे गाल यांच्या योगानें सुंदर, ज्याचेठिकाणीं विलासयुक्त हास्य आहे व ज्याचेठिकाणीं निरंतर शोभातिशय अहे असें ज्या श्रीकृष्णाचें मुख, अनंत दृष्टीनीं आदरपूर्वक अवलोकन करणाऱ्या स्त्रिया व पुरुष, तृप्त झाले नाहींत. तर नेत्रांना निमेषउन्मेषरूप असलेलें व्यवधान सहन न करित होत्साते, तें व्यवधान करणाऱ्या निमीवर कुपित झाले ॥ ६५ ॥ आतां श्रीकृष्णाचें चरित्र संक्षेपानें वर्णन करितो- हे राजा, तो भगवान् श्रीकृष्ण, प्रथम मथुरेमध्यें आपल्या चतुर्भुजरूपानें झाला

सर्वैरंगै रम्यया मूर्त्या च ॥ ६४ ॥ तत्प्रदर्शनार्थं मुखशोभामाह । यस्याननं दृशिभिर्नेत्रैः पिबंत्यो नार्यो नराश्च न तत्तृपुर्न तृप्ताः । निमेषोन्मेषमात्रव्यवधानमप्यसहमानास्तत्कर्तुर्निमेः कुपिताश्च बभूवुः । कथंभूतमाननम् । मकरकुंडलाभ्यां चारू कर्णौ भ्राजंतौ कपोलौ च तैः सुभगम् । सविलासो हासो यस्मिन् । नित्यमुत्सवो यस्मिन् ॥ ६५ ॥ श्रीकृष्णस्य चरितं समासतो वर्णयति । जात इति द्वाभ्याम् । जातो निजेन रूपेण पश्चात्पुरुषो मनुष्याकारः सन् व्रजं गतः । व्रजवासिनामेधिता अर्था येन तेषु दारेषु सुतानां शतान्यु-

स्निग्धस्मितेक्षितोदारैर्वाक्यैर्विक्रमलीलया ॥ नृलोकं रमयामास मूर्त्या सर्वांगरम्यया ॥ ६४ ॥ यस्याननं मकरकुंडलचारुकर्णभ्राजत्कपोलसुभगं सविलासहासम् ॥ नित्योत्सवं न ततृपुर्दृशिभिः पिबंत्यो नार्यो नराश्च मुदिताः कुपिता निमेश्च ॥ ६५ ॥ जातो गतः पितृगृहाद्व्रजमेधितार्थो हत्वा रिपून्सुतशतानि कृतोरुदारः ॥ उत्पाद्य तेषु पुरुषः क्रतुभिः समीज आत्मानमात्मनिगमं प्रथयन् जनेषु ॥ ६६ ॥ पृथ्व्याः स वै गुरुभरं क्षपयन्कुरूणामतःसमुत्थकलिना युधि भूपचम्वः ॥ दृष्ट्या विधूय विजये जयमुद्विघोष्य प्रोच्योद्धवाय च परं समगात्स्वधाम ॥ ६७ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहंस्यां संहितायामष्टादशसाहस्र्यां नवमस्कंधे यदुवंशानुकीर्तनं नाम चतुर्विंशोऽध्यायः ॥ २४ ॥ ॥ समाप्तश्चायं नवमस्कंधः ॥ ९ ॥ ॥

त्पाद्य । आत्मनिगमं स्वकीयं वेदमार्गम् ॥ ६६ ॥ अंतःसमुत्थेन कलिना निमित्तेन गुरुभारं क्षपयन् दृष्ट्यैव भूपचमूर्विधूय विजये जयमर्जुनेन जितमित्येवमुद्घोषं कृत्वा परं तत्त्वमुद्धवायोपदिश्य स्वधाम सम्यक् स्वेनैव रूपेण जगामेति ॥ ६७ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे नवमस्कंधे श्रीधरस्वामिविरचितायां भावार्थदीपिकायां टीकायां चतुर्विंशोऽध्यायः ॥ २४ ॥ ॥ समाप्तश्चायं नवमस्कंधः ॥ ९ ॥ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ श्रीमज्जगदीश्वरार्पणमस्तु ॥ ॥ ॥ ॥ ॥

आणि नंतर त्या पित्याच्या कारागृहांतून गोकुळांत गेला; तेथें गोकुलवासी जनांचे धर्मादिक अर्थ वाढवीत होत्साता पूतनादिक शत्रूंना मारून, पुन्हा मथुरेंत आला आणि सोळाहजार एकशें आठ स्त्रिया करून त्या प्रत्येकीचेठिकाणीं दाहा दाहा असे शेंकडो पुत्र उत्पन्न करून आपला वेदमार्ग लोकामध्यें प्रसिद्ध करण्याकरितां त्यानें नानाप्रकारच्या यज्ञांनीं आपलेंच आराधन केलें ॥ ६६ ॥ आणि त्या श्रीकृष्णानें, कौरवांच्या व पांडवांच्या मध्यें उत्पन्न झालेल्या कलहाच्या निमित्तानें, पृथ्वीला अतिशय झालेला भार दूर करण्याकरितां युद्धांमध्यें राजांच्या सेना आपल्या दृष्टीनेंच नाहींशा करून, अर्जुनाला जय मिळवून दिला आणि उद्धवाला आत्मतत्त्वाचा उपदेश करून निजधामास गमन केलें ॥ ६७ ॥ ॥ याप्रमाणें श्रीमद्भाग० महापुराणांतील नवमस्कंधामध्यें यदुवंशानुकीर्तननामक हा चोविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २४ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

इति श्रीमद्भागवते नवमस्कंधः
सटीकः सार्थश्च समाप्तः

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ अथ श्रीमद्भागवते दशमस्कंधपूर्व।

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ श्रीगणेशाय नमः ॥ जगाच्या सर्गविसर्गादिक नऊ लक्षणांनीं लक्षित व जगाचें अधिष्ठान असें जें श्रीकृष्णनामक परब्रह्मस्वरूप त्याला आह्मी नमस्कार करितों ॥ १ ॥ दशमस्कंधामध्यें कृष्णकीर्तीच्या वर्णनासाठीं नव्वद अध्याय सांगितले आहेत, त्यांतील पहिल्या चार अध्यायांनीं ब्रह्मदेवाच्या प्रार्थनेनें पृथ्वीचा भार हरण करण्याकरितां प्रसंगासहित श्रीहरीचा अवतार निरूपण केला आहे, नंतर पंस्तीस अध्यायांनीं गोकुलामध्यें वास करणाऱ्या रामकृष्णांची वृंदावनादिकांचेठिकाणीं झालेली लीला वर्णन केली आहे, पुढें एका अध्यायानें यमुनेच्या उदकामध्यें अक्रूरानें केलेली स्तुति सांगितली आहे, नंतर अकरा अध्यायांनीं मधुवनामध्यें (मथुरेंत) राहणाऱ्या श्रीकृष्णानें केलेल्या कंसवधादिक व विद्याभ्यासादिक लीला वर्णन केलेल्या आहेत आणि बाकीच्या एकुणचाळीस अध्यायांनीं द्वारकेंतील लीला सांगितली आहे. याप्रमाणें नव्वद अध्यायांचा सारांश आहे. त्यांत पहिल्या अध्यायामध्यें तर - देवकीच्या आठव्या गर्भापासून, आपणास मृत्यु प्राप्त होणार अशी आकाशवाणी

॥ श्रीगणेशाय नमः ॥ ॥ विश्वसर्गविसर्गादिनवलक्षणलक्षितम् ॥ श्रीकृष्णाख्यं परं धाम जगद्धाम नमाम तत् ॥ १ ॥ दशमे दशमं लक्ष्यमाश्रिताश्रयविग्रहम् ॥ क्रीडद्यदुकुलांभोधौ परानंदमुदीर्यते ॥ २ ॥ दशमे कृष्णसत्कीर्तिवितानायानुवर्ण्यते ॥ धर्मग्लानिनिमित्तस्तु निरोधो दुष्टभूभुजाम् ॥ ३ ॥ प्राकृतादिश्चतुर्धा यो निरोधः स तु वर्णितः ॥ तत्तत्प्रसंगतः सृष्टिसंहारादिनिरूपणैः ॥ ४ ॥ कृता नवतिरध्याया दशमे कृष्णकीर्तये ॥ आद्यैश्चतुर्भिरध्यायैर्ब्रह्मप्रार्थनयाऽवनेः ॥ भारं हर्तुं हरेर्जन्म सप्रसंगं निरूप्यते ॥ ५ ॥ गोकुले मथुरायां च द्वारवत्यां ततः क्रमात् ॥ कृष्णलीला त्रिधा प्रोक्ता तत्तद्भेदैस्त्वनेकधा ॥ ६ ॥ सपंचत्रिंशताध्यायैर्बृहद्वृंदावनादिषु ॥ गोकुले वसतो लीला

॥ ॐनमो भगवते वासुदेवाय ॥ राजोवाच ॥ कथितो वंशविस्तारो भवता सोमसूर्ययोः ॥ राज्ञां चोभयवंश्यानां चरितं परमाद्भुतम् ॥ १ ॥ यदोश्च धर्मशीलस्य नितरां मुनिसत्तम ॥ तत्रांशेनावतीर्णस्य विष्णोर्वीर्याणि शंस नः ॥ २ ॥ अवतीर्य यदोर्वंशे भगवान्भूतभावनः ॥ कृतवान्यानि विश्वात्मा तानि नो वद विस्तरात् ॥ ३ ॥ निवृत्ततर्षैरुपगीयमानाद्भवौषधाच्छ्रोत्रमनोभिरामात् ॥ क उत्तमश्लोकगुणानुवादात्पुमान्विरज्येत विनाऽपशुघ्नात् ॥ ४ ॥

वर्ण्यते सुरदुष्करा ॥ ७ ॥ एकेन यमुनावारिण्यक्रूरेण कृता स्तुतिः ॥ एकादशभिराख्याता लीला मधुवने कृता ॥ ८ ॥ शेषैर्द्वारवतीलीला तन्निर्माणादि वर्ण्यते ॥ एवं नवतिरध्याया दशमे विशदार्थकाः ॥ ९ ॥ तत्र तु प्रथमे कंसः स्वमृत्युं देवकीसुतात् ॥ श्रुत्वा भीतोऽवधीत्तस्याः षड्गर्भानिति वर्ण्यते ॥ १० ॥ कृष्णावतारचरितश्रवणामृतनिर्वृतः ॥ उक्तानुवादेनौत्सुक्याद्राजा पृच्छति तत्पुनः ॥ ११ ॥ कथितो वंशविस्तार इति ॥ १ ॥ अंशेनेति प्रतीत्यभिप्रायेणोक्तम् ॥ २ ॥ ननूक्तानि ज्ञातो गतः पितृगृहाद्व्रजमेधितार्थ इत्यादिना सत्यं पुनर्विस्तरेण वदेत्याह । अवतीर्येति ॥ ३ ॥ अत्र लोके त्रिविधा जना मुक्ता मुमुक्षवो विषयिणश्च तेषां मध्येऽत्र न कस्याप्यलंप्रत्यय

श्रवण करून भय पावलेल्या कंसानें तिच्या सहा पुत्रांचा वध केला अशी कथा सांगितलेली आहे ॥ १ ॥ नवमस्कंधाच्या शेवटीं संक्षेपानें वर्णन केलेल्या कृष्णावतारचरित्राच्या श्रवणामृतानें तृप्त झालेला परीक्षित् राजा, तेंच चरित्र सविस्तर ऐकण्याच्या इच्छेनें उक्तानुवादपूर्वक प्रश्न करितो—राजा ह्मणाला—हे शुकाचार्य, सोमसूर्यांच्या वंशाचा विस्तार, तूं मला सांगितला आहेस आणि दोन्ही वंशांमध्यें उत्पन्न झालेल्या राजांचें विस्मयकारक चरित्रहि सांगितलें आहेस ॥ १ ॥ त्यांत सोमवंशामध्यें झालेला अत्यंत धर्मशील जो यदुराजा त्याचा वंशविस्तार व चरित्रहि सांगितलेंस. आतां त्या यदुवंशामध्यें अंशानें अवतीर्ण झालेल्या श्रीविष्णूचीं चरित्रें आह्मांस वर्णन कर ॥ २ ॥ आतां तीं नवमस्कंधामध्यें सांगितलींच आहेत असें ह्मणशील तर खरें परंतु जगदात्मा आणि भूतपालक अशा भगवंतानें यदूच्या वंशामध्यें अवतार धारण करून जीं कृत्यें केलीं आहेत तीं आह्मांला विस्तारानें सांग ॥ ३ ॥ या लोकामध्यें मुक्त, मुमुक्षु आणि विषयी असे तीनप्रकारचे जन आहेत त्यांमध्यें भगवच्चरित्राचा वर्णनालाहि कंटाळा नाहीं असें सांगतो—ज्यांची विषयभोगेच्छा

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

निवृत्त झाली आहे अशा जीवन्मुक्तांनींहि गायन केलेला, मुमुक्षूंना जन्म भवरोगाचें औषधरूप आणि विषयीलोकांच्या कानांला गोड लागणारा अशा श्रेष्ठकीर्ति भगवंताच्या गुणानुवादापासून, आत्मघातक्यावांचून दुसरा कोण बरें पुरुष कंटाळेल? कोणीच कंटाळणार नाहीं ॥ ४ ॥ आतां आपलें कुलदैवत श्रीकृष्ण आहे ह्मणून त्याची कथाच नित्य श्रवण करावी अशा आशयानें ह्मणतो- हे ब्रह्मनिष्ठा, माझे पितामह (युधिष्ठिरादिक), ज्या कृष्णरूप नौकेचा आश्रय करून, युद्धामध्यें देवांनाहि जिंकणाऱ्या भीष्मादिक अतिरथीरूपी तिमिंगिलनामक महामत्स्यांनीं दुस्तर अशा कौरवसैन्यरूपी समुद्राला वत्सपदासारखा अतितुच्छ करून तरले, ह्मणजे त्यांनीं अनायासानेंच कौरव-

इत्याह । निवृत्ततर्षैरिति । गततृष्णैर्मुक्तैरित्यर्थः । मुमुक्षूणामयमेवोपाय इत्याह । भवौषधादिति । विषयिणां परमो विषयोऽयमेवेत्याह । श्रोत्रमनोभिरामादिति । अपगता शुग्यस्मात्तमात्मानं हंतीत्यपशुघ्नस्तस्मात् । पशुघातिन इति वा ॥ ४ ॥ किंच अस्मत्कुलदैवतं कृष्णोऽतस्तत्कथैव नित्यं श्रोतव्येत्याशयेनाह । पितामहा इति । अमरान् जयंति ये तैर्देवव्रतो भीष्मस्तदाद्यैरतिरथैस्तिमिंगिलैस्तिमिंगिलतुल्यैर्दुरत्ययं वत्सपदमिवात्यल्पं कृत्वा तुच्छीकृत्यातरन्स्म । यः श्रीकृष्ण एव प्लवो येषां ते । तस्य वीर्याणि वदस्वेति तृतीयश्लोकगतेनान्वयः ॥ ५ ॥ न केवलं पांडवानेवारक्षदिदं मम शरीरमपि यो रक्षितवानित्याह । द्रौण्यस्त्रविप्लुष्टमिति । द्रौणेरश्वत्थाम्नो ब्रह्मास्त्रेण दग्धमिदं मच्छरीरं च कुरूणां पांडवानां च संतानस्य निदानं मम मातुः कुक्षौ प्रविष्टो धृतचक्रो यो जुगोपेति ॥ ६ ॥ अखिलदेहभाजां सर्वप्राणिनामंतश्च बहिश्च पुरुषरूपेण कालरूपैश्च । अंशाभिप्रायेण बहुवचनम् । मृत्युं संसारमुत अपि अमृतमपि प्रयच्छतो वीर्याणि वदस्व ब्रूहि । अयं भावः । अंतर्यामिरूपेणांतर्दृष्टीनां मुक्तिं बहिर्दृष्टीनां च कालरूपेण मृत्युं ददाति यतोऽतोंऽतर्दृष्ट्या तद्वीर्याण्येव श्रोतव्यानीति ॥ ७ ॥ ननु बलं गदं सारणं च दुर्मदं विपुलं ध्रुवम् ॥ वसुदेवस्तु रोहिण्यां कृतादीनुदपादयदिति रोहिण्यास्तनयो रामः प्रोक्तः । वसुदेवस्तु देवक्यामष्टपुत्रानजीजनत् ॥ कीर्तिमंतं सुषेणं च भद्रसेनमुदारधीः ॥ मृदुं संतर्दनं भद्रं संकर्षणमहीश्वरम् ॥ अष्टमस्तु तयोरासीत्स्वयमेव हरिः किलेति पुनर्देवक्या गर्भसंबंधस्तस्यैवोक्तः स कुतो घटत इत्याक्षेपः ॥ ८ ॥

पितामहा मे समरेऽमरंजयैर्देवव्रताद्यातिरथैस्तिमिंगिलैः ॥ दुरत्ययं कौरवसैन्यसागरं कृत्वातरन्वत्सपदं स्म यत्प्लवाः ॥ ५ ॥ द्रौण्यस्त्रविप्लुष्टमिदं मदंगं संतानबीजं कुरुपांडवानाम् ॥ जुगोप कुक्षिगत आत्तचक्रो मातुश्च मे यः शरणं गतायाः ॥ ६ ॥ वीर्याणि तस्याखिलदेहभाजामंतर्बहिः पूरुषकालरूपैः ॥ प्रयच्छतो मृत्युमुतामृतं च मायामनुष्यस्य वदस्व विद्वन् ॥ ७ ॥ रोहिण्यास्तनयः प्रोक्तो रामः संकर्षणस्त्वया ॥ देवक्या गर्भसंबंधः कुतो देहांतरं विना ॥ ८ ॥

सैन्य जिंकिलें त्या कृष्णाचीं चरित्रें मला सांग ॥ ५ ॥ श्रीकृष्णानें केवळ पांडवांचेंच रक्षण केलें असें नाहीं तर अश्वत्थाम्याच्या ब्रह्मास्त्रानें दग्ध झालेलें कौरव आणि पांडव यांच्या वंशाचें मूळबीज असें हें प्रत्यक्ष माझें शरीरहि, शरण गेलेल्या माझ्या मातेच्या (उत्तरेच्या) उदरामध्यें प्रविष्ट झालेल्या ज्यानें, हातामध्यें चक्र घेऊन रक्षण केलें आहे ॥ ६ ॥ आणि जो सर्व प्राणिमात्रांच्या आंत व बाहेर पुरुषरूपानें व कालरूपानें राहून अंतर्दृष्टि व बाह्यदृष्टि लोकांना मोक्ष आणि संसार देत असतो, त्या मायेनें मनुष्यावतार धारण करणाऱ्या श्रीकृष्णाचे पराक्रम मला वर्णन कर. एतावता जो अंतर्दृष्टि पुरुषांना अंतर्यामिरूपानें मुक्ति देतो व बहिर्दृष्टि पुरुषांना कालरूपानें जन्ममरणरूप संसारचक्रांत पाडतो त्याचीं चरित्रें अंतर्दृष्टीनेंच श्रवण केलीं पाहिजेत असें तात्पर्य ॥ ७ ॥ तसेंच तूं संकर्षण बलराम हा रोहिणीचा पुत्र ह्मणून सांगितलेंस आणि

१ चारशें कोस लांब असलेल्या माशाला तिमि ह्मणतात त्यालासुद्धां गिळून टाकणारे ते तिमिंगिल होत.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुन्हा तोच देवकीचा पुत्र ह्मणून सांगितलेंस, तो देहांतर झाल्यावांचून एकाच जन्मामध्यें दोघींचा पुत्र कसा झाला ? हें मला सांगावें ॥ ८ ॥ तसाच यादवांचा पति जो भगवान् श्रीकृष्ण, त्याला कंसादिकांचें भय नसतांहि तो पित्याचें (वसुदेवाचें) घर सोडून गोकुळामध्यें कोणत्या कारणास्तव गेला ? आणि त्यानें नंदादिक गोपांसहवर्तमान कोठें वास केला ? ॥ ९ ॥ तसेंच त्या कृष्णानें गोकुळामध्यें, मथुरेमध्यें व द्वारकेमध्यें राहून काय काय केलें ? व त्यानें देवकीचा भाऊ असल्यामुळें वध करण्यास अयोग्य अशा आपल्या कंसमामाला स्वतांच कसें मारिलें ? ॥ १० ॥ तसाच त्यानें मनुष्यदेहाचा अंगीकार करून यादवांसहवर्तमान द्वारकेमध्यें किती वर्षें वास केला ? त्या प्रभूला स्त्रिया किती होत्या ? ॥ ११ ॥ हे सर्वज्ञा मुने, हें मी विचारिलेलें व न विचारिलेलेंहि जें असेल तें सर्व श्रीकृष्णाचें चरित्र, श्रद्धापूर्वक श्रवण करणाऱ्या मला कृपा करून सविस्तर सांगावें ॥ १२ ॥ बरें क्षुधेनें व तृषेनें व्याकुळ झालेल्या तुला श्रवण करण्याविषयीं स्वस्थता कोठें आहे ? असें ह्मणशील तर– जी ही क्षुधा पूर्वी मला अति

नन्वित्यादि ॥ ९ ॥ मातुर्भ्रातरं कंसं तस्माद्वधानर्हमद्धा साक्षात्कस्मादवधीत् ॥ १० ॥ ११ ॥ १२ ॥ ननु क्षुत्तृड्भ्यां पीडितस्य-

कस्मादिति । भगवतः कंसभयशंकाया असंभवादित्यर्थः ॥ ९ ॥ मातुर्भ्रातरं कंसं तस्माद्वधानर्हमद्धा साक्षात्कस्मादवधीत् ॥ १० ॥ ११ ॥ १२ ॥ ननु क्षुत्तृड्भ्यां पीडितस्य-

कस्मान्मुकुंदो भगवान्पितुर्गेहाद्व्रजं गतः ॥ क्व वासं ज्ञातिभिः सार्धं कृतवान्सात्वतां पतिः ॥ ९ ॥ व्रजे वसन्किमकरोन्मधुपुर्यां च केशवः ॥ भ्रातरं चावधीत्कंसं मातुरद्धाऽतदर्हणम् ॥ १० ॥ देहं मानुषमाश्रित्य कति वर्षाणि वृष्णिभिः ॥ यदुपुर्यां सहावात्सीत्पत्न्यः कत्यभवन्प्रभोः ॥ ११ ॥ एतदन्यच्च सर्वं मे मुने कृष्णविचेष्टितम् ॥ वक्तुमर्हसि सर्वज्ञ श्रद्दधानाय विस्तृतम् ॥ १२ ॥ नैषाऽतिदुःसहा क्षुन्मां त्यक्तोदमपि बाधते ॥ पिबंतं त्वन्मुखांभोजच्युतं हरिकथामृतम् ॥ १३ ॥ सूत उवाच ॥ एवं निशम्य भृगुनंदन साधुवादं वैयासकिः स भगवानथ विष्णुरातम् ॥ प्रत्यर्च्य कृष्णचरितं कलिकल्मषघ्नं व्याहर्तुमारभत भागवतप्रधानः ॥ १४ ॥ श्रीशुक उवाच ॥ सम्यग्व्यवसिता बुद्धिस्तव राजर्षिसत्तम ॥ वासुदेवकथायां ते यज्जाता नैष्ठिकी रतिः ॥ १५ ॥ वासुदेवकथाप्रश्नः पुरुषांस्त्रीन्पुनाति हि ॥ वक्तारं पृच्छकं श्रोतॄंस्तत्पादसलिलं यथा ॥ १६ ॥

तव कुतः श्रवणावकाशस्तत्राह । नैषेति । त्यक्तोदकस्यापि मम जीवनं हरिकथामृतपाननिमित्तं तदुपरमे सद्य एव जीवितं न स्यादित्यर्थः ॥ १३ ॥ एवं साधुवादं समीचीनं प्रश्नम् । भागवतप्रधानो भागवतेषु श्रेष्ठः ॥ १४ ॥ व्यवसिता कृतनिश्चया । यद्यतो बुद्धेः ॥ १५ ॥ १६ ॥

दुःसह होती; ती क्षुधा आतां उदकाचाहि त्याग करणाऱ्या मला, 'मी तुझ्या मुखकमलापासून गळणाऱ्या हरिकथारूप अमृताचें प्राशन करीत असल्यामुळें ' बाधा करीत नाहीं. तें हरिकथामृताचें सेवन मात्र बंद झालें असतां माझें वांचणें होणार नाहीं ॥ १३ ॥ सूत ह्मणाला– हे शौनका, या प्रकारचा परीक्षितीचा उत्तम प्रश्न श्रवण करून भगवद्भक्तांमध्यें श्रेष्ठ अशा त्या भगवान् शुकाचार्यांनें राजाची प्रशंसा करून, कलिसंबंधी पातकांचा नाश करणारें श्रीकृष्णाचें चरित्र सांगण्यास आरंभ केला ॥ १४ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजर्षिश्रेष्ठा, तुझ्या बुद्धीनें चांगला निश्चय केला आहे. कारण, ज्या बुद्धीच्या योगानें तुला वासुदेवकथेचेठिकाणीं निश्चयुक्त प्रीति उत्पन्न झाली आहे ॥ १५ ॥ वासुदेवकथासंबंधी केलेला प्रश्नसुद्धां, जसें वासुदेवाचें पादोदक (गंगा), दर्शनस्पर्शवगैरे करणारांस पवित्र करितें त्याप्रमाणें वक्ता, प्रश्न करणारा व श्रोते जन

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अशा तीनप्रकारच्या पुरुषांना पवित्र करितो ॥ १६ ॥ आतां प्रथमतः भगवंताच्या अवताराचें कारण सांगतो– हे राजा, मदोन्मत्त होऊन राजांप्रमाणें वर्तन करणारे जे दैत्य त्यांच्या लक्षावधि सेनांच्या अतिशय भारानें पीडित झालेली भूमि, खेदानें व्याप्त झाल्यामुळें गाईचें स्वरूप धारण करून, करुणायुक्त आक्रोश करणारी व जिच्या मुखावर दुःखाश्रु प्राप्त झाले आहेत अशी होऊन, ब्रह्मदेवाला शरण गेली आणि त्याच्या समीपभागीं उभी राहून स्तुति करीत तिनें आपलें दुःख त्याला सांगितलें ॥ १७ ॥ ॥ १८ ॥ ब्रह्मदेवानें तें भूमीचें दुःख श्रवण करून तिच्या सहवर्तमान, देवांसह वर्तमान व महादेवासहवर्तमान क्षीरसमुद्राच्या तीरीं गमन केलें ॥ १९ ॥ तेथें जाऊन, त्यानें एकाग्रचित्त होऊन, जगतांचा नाथ, देवांचा देव, भक्तांचे मनोरथ पूर्ण करणारा व त्यांच्या दुःखाची निवृत्ति करणारा अशा भगवंताची पुरुषसूक्ताच्या योगानें स्तुति केली ॥ २० ॥ तेव्हां त्या ब्रह्मदेवानें समाधीच्यावेळीं आकाशामध्यें उच्चारिलेली देवाची वाणी ऐकून समाधीचें विसर्जन करून तो देवांस ह्मणाला कीं,– हे देवहो, समाधीच्याठिकाणीं

तत्र तावत्प्रथमं भगवदवतारकारणमाह । भूमिरित्यादिनवभिः श्लोकैः । दृप्तनृपव्याजा ये दैत्यास्तेषामनीकशतानामयुतैर्यो भूरिभारस्तेनाक्रांता ॥ १७ ॥ विभोरंतिके उपस्थिता

भूमिर्दृप्तनृपव्याजदैत्यानीकशतायुतैः ॥ आक्रांता भूरिभारेण ब्रह्माणं शरणं ययौ ॥ १७ ॥ गौर्भूत्वाऽश्रुमुखी खिन्ना क्रंदंती करुणं
विभोः ॥ उपस्थितांऽतिके तस्मै व्यसनं स्वमवोचत ॥ १८ ॥ ब्रह्मा तदुपधार्याथ सहदेवैस्तया सह ॥ जगाम सत्रिनयनस्तीरं
क्षीरपयोनिधेः ॥ १९ ॥ तत्र गत्वा जगन्नाथं देवदेवं वृषाकपिम् ॥ पुरुषं पुरुषसूक्तेन उपतस्थे समाहितः ॥ २० ॥ गिरं समाधौ
गगने समीरितां निशम्य वेधास्त्रिदशानुवाच ह ॥ गां पौरुषीं मे शृणुतामराः पुनर्विधीयतामाशु तथैव मा चिरम् ॥ २१ ॥ पुरैव
पुंसाऽवधृतो धराज्वरो भवद्भिरंशैर्यदुषूपजन्यताम् ॥ स यावदुर्व्या भरमीश्वरेश्वरः स्वकालशक्त्या क्षपयंश्चरेद्भुवि ॥ २२ ॥ वसुदेवगृहे
साक्षाद्भगवान्पुरुषः परः ॥ जनिष्यते तत्प्रियार्थं संभवंतु सुरस्त्रियः ॥ २३ ॥ वासुदेवकलाऽनंतः सहस्रवदनः स्वराट् ॥ अग्रतो भविता
देवो हरेः प्रियचिकीर्षया ॥ २४ ॥ विष्णोर्माया भगवती यया संमोहितं जगत् ॥ आदिष्टा प्रभुणांशेन कार्यार्थे संभविष्यति ॥ २५ ॥

सती ॥ १८ ॥ १९ ॥ २० ॥ पौरुषीं पुरुषस्य भगवत इयं पौरुषी तां गां वाचं मे मत्त आशु शृणुत । माचिरमविलंबितं तथैव विधीयतां चेति ॥ २१ ॥ विज्ञापनात्पुरैव पुंसा ईश्वरेण ज्वरस्तापोऽवधृतोऽवधारितः ॥ २२ ॥ २३ ॥ २४ ॥ देवकीगर्भसंकर्षणयशोदामोहनादिकार्यार्थे यशोदायां संभविष्यति ॥ २५ ॥

मी ऐकिलेली भगवंताची आज्ञारूप वाणी, तुह्मी माझ्यापासून लवकर ऐका आणि मोठ्या त्वरेनें त्याप्रमाणें आचरण करा ॥ २१ ॥ ईश्वरानें आह्मी प्रार्थना करण्याच्या पूर्वींच भूमीचा संताप जाणला आहे, ह्मणून तुह्मींहि आपआपल्या अंशांनीं यादवांमध्यें तो अवतार धारण करण्याच्या पूर्वींच अवतार धारण करावे आणि तो देवाधिदेव भगवान्, आपल्या कालशक्तीच्या योगानें पृथ्वीचा भार दूर करीत होत्साता जोंपर्यंत भूमीवर संचार करील तोंपर्यंत त्याच्या साहाय्याकरितां तुह्मींहि भूमीवर राहावें ॥ २२ ॥ वसुदेवाच्या घरीं साक्षात् भगवान् परमपुरुष, अवतार धारण करील त्याचें प्रिय करण्याकरितां तुमच्या स्त्रियांनींहि अवतार धारण करावेत ॥ २३ ॥ सहस्रमुखांनीं युक्त व आपल्याच तेजानें प्रकाशमान असा वासुदेवाचा अंश जो शेष देव तोहि हरीचें प्रिय करण्याच्या इच्छेनें त्याच्या पूर्वीं 'त्याच्या वडील भ्रात्याच्या नात्यानें' अवतार धारण करील ॥ २४ ॥ फार काय सांगावें परंतु जिनें सर्वहि जग अत्यंत मोहित केलें आहे ती ऐश्वर्यादिगुणयुक्त विष्णूची मायाहि भगवंतानें आज्ञा केली असतां, देवकीच्या ॥ २ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

गर्भाचें आकर्षण करणें व यशोदेला मोह करणें इत्यादिकार्यें करण्याकरितां यशोदेच्याठिकाणीं अवतार धारण करील ॥ २५ ॥ याप्रकारेंकरून मरीच्यादिक प्रजापतींचा अधिपति अशा समर्थ ब्रह्मदेवानें, देवगणांना आज्ञा करून व भूमीचें, 'तुझें भाग्य मोठें आहे. तूं भगवंताच्या चरणांनीं लवकरच भूषित होशील' अशा भाषणांनीं आश्वासन करून सर्वोत्कृष्ट अशा आपल्या स्थानाप्रत (सत्यलोकाप्रत) गमन केलें ॥ २६ ॥ आतां कंसाच्या बंदिग्रहामध्यें अवतार झाला हें सांगण्याकरितां प्रस्तावकथा सांगतो पूर्वी यादवांचा अधिपति शूरसेननामक राजा (सहस्रार्जुनाच्या उरलेल्या पांच पुत्रांपैकीं दुसरा) होता त्यानें मथुरानामक नगरीमध्यें वास करून माथुर व शूरसेन या नांवांच्या देशांचें राज्य केलें ॥ २७॥ त्या कालापासून यादवांतील सर्व राजांची ती मथुरा राजधानी (राहण्याचें मुख्य स्थान) झाली. ज्या मथुरेमध्यें भगवान् हरि, नित्य सान्निध्य पावतो ॥२८॥ त्या मथुरेमध्यें एकेवेळीं शूराचा पुत्र अशा वसुदेवानें विवाह करून नवीन पाणिग्रहण केलेल्या देवकीभार्येसहवर्तमान आपल्या घरीं जाण्याकरितां रथावर आरोहण केलें ॥ २९ ॥

॥ २६ ॥ भोजेंद्रबंधनागारेऽवताराय प्रस्तावकथामाह । शूरसेन इत्यादिना यावदध्यायसमाप्ति । मथुरामावसन्मथुरायां वसन् । विषयान् देशान् ॥ २७ ॥ २८ ॥ सूर्यया नवोढया । प्रयाणे प्रयाणार्थम् ॥ २९ ॥ रश्मीन्प्रग्रहान् ॥ ३० ॥ पारिबर्हमुपस्करम् ॥ ३१ ॥ ३२ ॥ ३३ ॥ आभाष्य रेरे कंसेति संबोध्य । हंता हनिष्यति ॥ ३४ ॥ कुलपांसनः कुलदूषणः । आरब्ध उद्युक्तः । कचे केशबंधे ॥ ३५ ॥

॥ श्रीशुक उवाच ॥ इत्यादिश्यामरगणान्प्रजापतिपतिर्विभुः ॥ आश्वास्य च महीं गीर्भिः स्वधाम परमं ययौ ॥ २६ ॥ शूरसेनो यदुपतिर्मथुरामावसन्पुरीम् ॥ माथुरान्शूरसेनांश्च विषयान्बुभुजे पुरा ॥ २७॥ राजधानी ततः साऽभूत्सर्वयादवभूभुजाम् ॥ मथुरा भगवान्यत्र नित्यं संनिहितो हरिः ॥ २८ ॥ तस्यां तु कर्हिचिच्छौरिर्वसुदेवः कृतोद्वहः ॥ देवक्या सूर्यया सार्धं प्रयाणे रथमारुहत् ॥ २९ ॥ उग्रसेनसुतः कंसः स्वसुः प्रियचिकीर्षया ॥ रश्मीन्हयानां जग्राह रौक्मै रथशतैर्वृतः ॥ ३० ॥ चतुःशतं पारिबर्हं गजानां हेममालिनाम् ॥ अश्वानामयुतं सार्धं रथानां च त्रिषट्शतम् ॥ ३१ ॥ दासीनां सुकुमारीणां द्वे शते समलंकृते ॥ दुहित्रे देवकः प्रादाद्याने दुहितृवत्सलः ॥ ३२ ॥ शंखतूर्यमृदंगाश्च नेदुर्दुंदुभयः समम् ॥ प्रयाणप्रक्रमे तावद्वरवध्वोः सुमंगलम् ॥ ३३ ॥ पथि प्रग्रहिणं कंसमाभाष्याहाशरीरवाक् ॥ अस्यास्त्वामष्टमो गर्भो हंता यां वहसेऽबुध ॥ ३४ ॥ इत्युक्तः स खलः पापो भोजानां कुलपांसनः ॥ भगिनीं हंतुमारब्धः खड्गपाणिः कचेऽग्रहीत् ॥ ३५ ॥ ×

त्यावेळीं उग्रसेनाचा पुत्र जो कंस त्यानें, आपल्या भगिनीचें सन्मानपूर्वक प्रिय करण्याच्या इच्छेनें, सुवर्णानें बांधविलेल्या शेंकडो रथांनीं परिवेष्टित होऊन वसुदेवाच्या रथावर बसून घोड्यांचे दोरे ग्रहण केले ह्मणजे देवकीवसुदेवांना मुख्यस्थानीं बसवून आपण सारथी झाला ॥ ३० ॥ तेव्हां प्रस्थानसमयीं कन्येवर प्रेम करणाऱ्या देवकानें, कन्येला (देवकीला) सुवर्णाच्या माळांनीं अलंकृत असे चारशें हत्ती, पंधरा हजार घोडे, अठराशें रथ आणि नूतन यौवन प्राप्त झालेल्या सालंकृत दोनशें दासी इतकें आंदण दिलें ॥ ३१ ॥ ३२ ॥ तेव्हां प्रयाणाच्या आरंभीं वरवधूंना मंगलकारक अशीं, शंख, शिंगें, मृदंग, नगारे इत्यादिक वाद्यें एकदम वाजूं लागलीं ॥ ३३ ॥ मार्गामध्यें घोड्यांचे दोरे ग्रहण करणाऱ्या कंसाला, ' रे रे कंसा असें ' संबोधन देऊन अदृश्यरूप वाणी ह्मणाली कीं,– हे मूर्खा कंसा, तूं ज्या आपल्या बहिणीला सन्मानपूर्वक पतीच्या घरीं पोचवीत आहेस त्या देवकीचा अष्टम गर्भ तुझा वध करील ॥ ३४ ॥ असें सांगितलें असतां भोजांच्या कुळांमध्यें कलंकरूप तो पापी खळ कंस, बहिणीला

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मारण्यास प्रवृत्त होऊन त्यानें एका हातामध्यें खड्ग घेऊन दुसऱ्या हातानें तिला वेणीचेठिकाणीं ग्रहण केलें ॥ ३५ ॥ तेव्हां निर्लज्ज घातकी व निंद्यकर्म करणारा अशा त्या कंसाचें स्तुति, युक्ति, साममार्ग व भेद (दृष्टादृष्टभय) यांच्या योगेंकरून सांत्वन करित होत्साता महाभाग्यवान् (मोठा धर्मनिष्ठ) वसुदेव ह्मणाला कीं, ॥ ३६ ॥ वसुदेव ह्मणाला– हे कंसा, जरासंधादिक शूरांनीं ज्या तुझे शौर्यादिक गुण वर्णन केले आहेत तो भोजकुळांत उत्पन्न झालेल्या लोकांचें यश वाढविणारा तूं, विवाहोत्साहामध्यें स्त्रीला त्यामध्यें बहिणीला कसा मारितोस ? ॥ ३७ ॥ मरणाच्या भयानें मारितों असें ह्मणशील तर– हे वीरा, जन्माला आलेल्या प्राण्यांना देहाबरोबरच मृत्यु उत्पन्न होतो, हें ब्रह्म-

---

नृशंसं क्रूरम् । महाभाग इति । अयं भावः । स्वजन्मनि हर्षेण देवैरानकदुंदुभिघोषणाद्भाविभगवदवतारेण शक्यप्रतीकारता संभवतीति सांत्वयन्स्तुत्या कृपाविषयत्वेनोपपत्तिमिश्र साममार्गेण संबोधयन् । किंच सामभेदाभ्यां संबोधयन् । तत्र साम पंचविधम् । भेदो द्विविधः । तदुक्तम् । संबंधलाभोपकृतिर्द्विभेदो गुणकीर्तनम् ॥ साम पंचविधं भेदो दृष्टादृष्टभयं वचः ॥ तत्र श्लाघनीयगुण इति गुणकीर्तनम् । भगिनीमिति संबंधकथनम् । पुत्रिकोपमेत्यभेदं वक्ष्यति । हन्यादिति स्त्रीवधनिवृत्त्या यशोलाभं दर्शयति । उद्वाहपर्वणीति संतानवृद्ध्योपकारं दर्शयति ॥ ३६ ॥ ३७ ॥ मरणभयेन हन्मीति चेत्तथापि मरणस्यापरिहरणीयत्वाद्देहांतरस्यावश्यंभावित्वात्तत्रापि च भोगप्रेमास्पदत्वादीनामवि-

तं जुगुप्सितकर्माणं नृशंसं निरपत्रपम् ॥ वसुदेवो महाभाग उवाच परिसांत्वयन् ॥ ३६ ॥ वसुदेव उवाच ॥ श्लाघनीयगुणः शूरैर्भवान्भोजयशस्करः ॥ स कथं भगिनीं हन्यात्स्त्रियमुद्वाहपर्वणि ॥ ३७ ॥ मृत्युर्जन्मवतां वीर देहेन सह जायते ॥ अद्य वाऽब्दशतांते वा मृत्युर्वै प्राणिनां ध्रुवः ॥ ३८ ॥ देहे पंचत्वमापन्ने देही कर्मानुगोऽवशः ॥ देहांतरमनुप्राप्य प्राक्तनं त्यजते वपुः ॥ ३९ ॥ व्रजंस्तिष्ठन्पदैकेन यथैवैकेन गच्छति ॥ यथा तृणजलूकैवं देही कर्मगतिं गतः ॥ ४० ॥

शेषात्तद्वयेन पापाचरणमयुक्तमित्यभिप्रेत्याह । मृत्युर्जन्मवतामित्यादि । देहेन सहेति विधात्रा ललाटे लिखितत्वादिति । तथापि कालविलंबनार्थं हन्मीति चेत्तत्राह । अद्य वेति । अवश्यंभाविनि मरणे विलंबमात्राय न पापाचरणं युक्तमिति भावः ॥ ३८ ॥ किंच । अस्मिन्देहे गते यदि देहांतरं न स्यात्तदा युज्येत पापेनापि तत्पालनं नतु तदस्तीत्याह । देहे पंचत्वमापन्न इति । आपन्ने आपन्नप्राये कर्मवशादयत्नत एव प्रथमं देहांतरं प्राप्य पश्चात्पूर्वं वपुस्त्यजति ॥ ३९ ॥ अत्र दृष्टांतः । व्रजन्निति । एकेनाग्रतो निहितेन पदा तिष्ठन्भुवमवष्टभ्य देहं बिभ्रत्पश्चादन्येन पूर्वप्रदेशादुत्थाप्य पुरोनिहितेन गच्छति तद्वत् । अत्र च स्वीकारपरित्यागौ नात्यंतभिन्नविषयाविति स्पष्टं दृष्टांतांतरमाह । यथा

देवानें ललाटीं लिहिलेलेंच आहे. तथापि कालविलंबाकरितां मारितों असें ह्मणशील तर– आज किंवा शंभरे वर्षांनीं प्राण्यांना मृत्यु खरोखरच प्राप्त होणार, तेव्हां कालविलंबाकरितां पापाचरण करणें योग्य नाहीं ॥ ३८ ॥ आणि हा देह गेला असतां जर दुसरा देह प्राप्त होणारच नाहीं तर पापाचरणानेंहि त्याचें रक्षण करणें योग्य होईल परंतु तसें नाहीं. हा देह मरण पावण्याची वेळ आली ह्मणजे तेथें असणारा कर्मानुसारी परतंत्र जीव, कर्मवशेंकरून यत्नावांचूनच प्राप्त झालेल्या देहांतराची प्राप्ति झाल्यावर नंतर पूर्वींच्या देहाचा त्याग करितो ॥ ३९ ॥ जसा चालणारा पुरुष, पुढें ठेवलेल्या एका पायानें भूमीला धरून त्या पायांवर देहाचा भार घालून उभा राहतो आणि नंतर मागचें पाऊल पुढें ठेऊन चालतो किंवा जशी गवतावरची कीड, आपल्या देहाच्या पुढील भागानें प्रथम दुसऱ्या तृणाला धरून नंतर मागच्या भागानें धरलेलें तृण सोडून देते त्याप्रमाणें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सो

कर्ममार्गांचेठिकाणीं प्राप्त झालेला जीवहि प्रथम देहांतरसला पावोन नंतर पूर्वदेहावा त्याग करितो ॥ ४० ॥ स्वीकार करणें किंवा परित्याग करणें हे धर्म देहविषयकच आहेत असें दर्शविण्याकरितां दुसरा दृष्टांत सांगतो– जाग्रदवस्थेंमध्यें पाहिलेलें (राजादि शरीर) व ऐकिलेलें (इंद्रादि शरीर) प्राप्त करून घेण्याकरितां, त्याचें मनानें चिंतन करणारा पुरुष, जसा स्वप्नामध्यें त्या राजादिशरीरांसारखेंच कांहींतरी शरीर पाहतो आणि लागलेंच तें मी आहें असें मानितो आणि नंतर त्याला जाग्या देहाची विस्मृति होत्ये, किंवा दुसरा दृष्टांत, जसा जाग्रदवस्थेमध्येंच दृष्टश्रुतविषयांचें मनानें चिंतन करणारा पुरुष, मनोरथाच्या योगानें बुद्धि गढून गेली ह्मणजे त्या दृष्टश्रुतांसारख्याच कोणत्यातरी देहाला पाहतो व तोच मी आहें असें मानितो व नंतर मूळच्या देहाचेठिकाणीं स्मृतिरहित होतो त्याप्रमाणें जीव या जन्मामध्येंच कर्मवशेंकरून दुसऱ्या देहाला पावोन पूर्वींच्या देहावा त्याग करितो ॥ ४१ ॥ आतां अनेकप्रकारचे देह उत्पन्न होण्यास कारण अशीं कर्में केलेलीं असल्यामुळें अमुकच देह प्राप्त होईल हें कसें समजावें

तृणजलूकेति । सा हि यथा तृणांतरमवष्टभ्य पूर्वं तृणं त्यजति । एवं कर्मपथे वर्तमानोऽन्यो जीवोऽपि ॥ ४० ॥ देहविषयावेव स्वीकारपरित्यागौ दर्शयितुं दृष्टांतांतरमाह । स्वप्न इति । दृष्टं राजादिदर्शनं श्रुतमिंद्रादिश्रवणं ताभ्यामाहितसंस्कारेण मनसा तदेवानुचिंतयन्नीदृशं जाग्रदृष्टश्रुतसदृशं देहं राजादिरूपं किमप्यनिरुक्तं पश्यति क्षणांतरे च तदेवाहमिति प्रपद्यते मन्यते ततश्च जाग्रद्देहादपगतस्मृतिर्भवति पुरुषो यथेति । जाग्रत्येव दर्शयितुं दृष्टांतांतरमाह । मनोरथेनेति । अत्रापि दृष्टश्रुताभ्यामित्यादि सर्वं योज्यम् । तथाच वक्ष्यति । जंतोर्वै कस्यचिद्धेतोर्मृत्युरत्यंतविस्मृतिः ॥ जन्मत्वात्मतया पुंसः सर्वभावेन भूरिद ॥ विषयस्वीकृतिं प्राहुर्यथा स्वप्नमनोरथः ॥ स्वप्नं मनोरथं

स्वप्ने यथा पश्यति देहमीदृशं मनोरथेनाभिनिविष्टचेतनः ॥ दृष्टश्रुताभ्यां मनसाऽनुचिंतयन्प्रपद्यते तत्किमपि ह्यपस्मृतिः ॥ ४१ ॥
यतो यतो धावति दैवचोदितं मनो विकारात्मकमाप पंचसु ॥ गुणेषु मायारचितेषु देह्यसौ प्रपद्यमानः सह तेन जायते ॥ ४२ ॥
ज्योतिर्यथैवोदकपार्थिवेष्वदः समीरवेगानुगतं विभाव्यते ॥ एवं स्वमायारचितेष्वसौ पुमान्गुणेषु रागानुगतो विमुह्यति ॥ ४३ ॥

चेत्थं प्राक्तनं न स्मरत्यसावित्यादि । तद्वदत्रापि कर्मवशाद्देहांतरं प्राप्य प्राक्तनं त्यजतीति ॥ ४१ ॥ ननु विचित्रदेहहेतूनां कर्मणां कृतत्वाद्देहविशेषप्राप्तौ किं कारणमत आह । यतो यत इति । देहस्य पंचत्वसमये पंचसु गुणेषु भूतेषु मायया नानादेहरूपेण रचितेषु दैवेन फलाभिमुखेन कर्मणा चोदितं नानाविकारात्मकं मनो यं यं देहं देवतिर्यगादिरूपं प्रति धावति धावच्च सद्यं यमापाभिनिवेशेन प्राप्तं तत्रतत्रासौ देही जायते । ननु मनसः कर्तृत्वात्तदेव जायतां नत्वकर्तात्मेत्यत आह । प्रपद्यमान इति । तदेवाहमिति मन्यमानस्तेन सह जायत इति ॥ ४२ ॥ ननु सत्यं भविष्यत्येव किमपि देहमात्रं तथाप्यस्यातिप्रियस्य राजदेहस्य रक्षणायाकृत्यमपि क्रियत इति चेत्तत्राह । ज्योतिरिति । अदश्चंद्रादिज्योतिः । उदकयुक्तेषु पार्थिवेषु घटादिषु । यद्वा उदकेषु पार्थिवेषु तैलघृतादिषु च प्रतिबिंबेन स्थितं समीरस्य वायोर्वेगमनुगतं कंपादियुक्तं प्रतीयते यथा

असें ह्मणशील तर सांगतों ऐक– देहाच्या मरणसमयीं, फलाभिमुख झालेल्या कर्मानें प्रेरणा केलेलें या जीवाचें संकल्पविकल्पात्मक मन, मायेनें देवमनुष्यादिक नानादेहरूपानें निर्माण केलेल्या गुणकार्यरूप पंचमहाभूतात्मक देहांमध्यें ज्या ज्या (देवादिक) देहाकडे धांवतें (त्याचें चिंतन करितें) आणि ज्याची ज्याची अभिमानानें प्राप्ति करून घेतें त्या त्या देहाचेठिकाणीं हा जीवात्मा, तोच मी आहें असें मानून त्याच्यासहवर्तमान उत्पन्न होतो (नानायोनींचेठिकाणीं संसार पावतो) ॥ ४२ ॥ आतां कोणता तरी देह प्राप्त होईल खरा तथापि या अतिप्रिय राजदेहाच्या रक्षणासाठीं, करूं नये तेंहि करितों असें ह्मणशील तर– हे कसें, जसें सूर्यचंद्रादिक ज्योति, उदकानें भरलेल्या घटादिकांचेठिकाणीं प्रतिबिंबित झाले असतां तें वायूच्या योगानें कंपादियुक्त आहेसें भासतें त्याप्रमाणें आपल्या अविद्येनें रचिलेल्या देहांचेठिकाणीं हा जीवात्मा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रेमानें प्रविष्ट झाला असतां त्याच्या अभिमान धारण करितो; एतावता देहाच्या अध्यासानें देहांचे कृशत्वादिक धर्म जसे आत्म्याचेठिकाणीं भासतात त्याप्रमाणें प्रेमास्पदत्वादिक आत्म्याचे धर्महि देहाचेठिकाणीं भासतात, मिळून राजाच्या किंवा श्वानसूकरादिकांच्या देहांमध्यें कांहीं विशेष नसल्यामुळें मृत्यूचा प्रतीकार करणें हें व्यर्थ आहे ॥ ४३ ॥ याप्रमाणें सांगितलेल्या सामोपायाचा उपसंहार करीत आतां भेद सांगतो– ज्याअर्थी दुसऱ्याचा द्रोह करणाऱ्या पुरुषाला यालोकीं त्याच्या संबंध्यांपासून व परलोकीं यमापासून भय प्राप्त होतें त्याअर्थी आपल्या कल्याणाची इच्छा करणाऱ्या पुरुषानें, आपण द्रोह करणारा होऊन, कोणाचा द्रोह करूं नये ॥ ४४ ॥ पुन्हां साम सांगतो– हे कंसा, ही देवकी तर, लांकडाच्या बाहुलीसारखी आपलें रक्षण करण्यास असमर्थ, दीन व लालन करण्याविषयीं योग्य अशी तुझी धाकटी बहीण आहे

एवं स्वाविचारचितेषु गुणेषु देहेष्वसौ रागेणानुगतः प्रविष्टो मुह्यत्यभिनिवेशं प्राप्नोति । अयं भावः । आत्मनस्तावद्देहाद्यध्यासाज्जन्मोक्तं सह तेन जायत इति ततश्चान्योन्यधर्माध्यासाद्यथा देहादिधर्माः कार्श्यादय आत्मनि प्रतीयंते एवमात्मधर्माः प्रेमास्पदत्वादयोऽपि देहादिष्विति राजसूकरदेहयोर्विशेषाभावाद्व्यर्थो मृत्युप्रतीकार इति ॥ ४३ ॥ एवमुक्तं सामोपायमुपसंहरन्भेदमाह । तस्मादिति । परत इति अभिद्रुह्यमाणात्तत्संबंधिनश्च यमादपीहामुत्र च भयमिति भेदो दर्शितः ॥ ४४ ॥ पुनः सामैवाह । एषेति । पुत्रिकोपमा दारुमयीवाचेतनप्राया ॥ ४५ ॥ बोध्यमान उपदिश्यमानः । स्वयं दारुणः पुनः पुरुषादान् दैत्याननुव्रतोऽनुसृत इति ॥ ४६ ॥ आनकदुंदुभिरिति पदं महाभाग इत्यत्रोक्ताभिप्रा-

तस्मान्न कस्यचिद्द्रोहमाचरेत्स तथाविधः ॥ आत्मनः क्षेममन्विच्छन्द्रोग्धुर्वै परतो भयम् ॥ ४४ ॥ एषा तवानुजा बाला कृपणा पुत्रिकोपमा ॥ हंतुं नार्हसि कल्याणीमिमां त्वं दीनवत्सलः ॥ ४५ ॥ श्रीशुक उवाच ॥ एवं स सामभिर्भेदैर्बोध्यमानोऽपि दारुणः ॥ न न्यवर्तत कौरव्य पुरुषादानुव्रतः ॥ ४६ ॥ निर्बंधं तस्य तं ज्ञात्वा विचिंत्यानकदुंदुभिः ॥ प्राप्तं कालं प्रतिव्योढुमिदं तत्रान्वपद्यत ॥ ४७ ॥ मृत्युर्बुद्धिमताऽपोह्यो यावद्बुद्धिबलोदयम् ॥ यद्यसौ न निवर्तेत नापराधोऽस्ति देहिनः ॥ ४८ ॥ प्रादाय मृत्यवे पुत्रान्मोचये कृपणामिमाम् ॥ सुता मे यदि जायेरन्मृत्युर्वा न म्रियेत चेत् ॥ ४९ ॥

यम् । प्रतिव्योढुं प्रतिकर्तुं वंचयितुमित्यर्थः । इदं वक्ष्यमाणमपत्यार्पणमन्वपद्यत ज्ञातवान् ॥ ४७ ॥ ननु खलोऽयमेतन्न मन्यते इत्याशंक्याह स्वयमेव । मृत्युरिति ॥ ४८ ॥ तस्मादुपेक्षादोषपरिहारायैवं करिष्यामीत्याह । प्रादायेति । मृत्यवे कंसाय । नन्विदमपि नैव न्याय्यमित्याशंक्याह । सुता इति । अस्यां यदि मे सुता जायेरंस्तदा यद्भावि तद्भवतु जीवितं तु तावद्भवेदेव तदंतरा यद्ययमेव म्रियेत तदा न किंचिदन्याय्यम् ॥ ४९ ॥

आणि तूं दीनवत्सल आहेस ह्मणून निरपराधी अशा हिचा तूं वध करण्यास योग्य नाहींस ॥ ४५ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा याप्रमाणें साममार्गांनीं व भेदांनीं देवकीच्या वधापासून निवृत्त होण्याविषयीं बोध केलेलाहि तो कंस, स्वतः क्रूरस्वभावाचा व त्यांतहि हिंसा करणाऱ्या राक्षसांना अनुसरणारा असल्यामुळें निवृत्त झाला नाहीं ॥ ४६ ॥ तेव्हां त्या कंसाचा तो आग्रह जाणून, देवकीला प्राप्त झालेला मृत्यु चुकविण्याकरितां विचार करून वसुदेवानें, असा उपाय मनांत आणिला कीं– ॥ ४७ ॥ बुद्धिमान् पुरुषानें आपल्या बुद्धीचा व बळाचा उत्कर्ष चालेल तोंपर्यंत आपल्याला किंवा दुसऱ्याला प्राप्त झालेला मृत्यु चुकवावा. असा प्रयत्न केला असतांहि जर तो चुकला नाहीं तर मग मात्र त्याचा अपराध (दोष) नाहीं; नाहीं तर आहे ॥ ४८ ॥ ह्मणून ह्या मृत्युरूपी कंसाला पुढें होणारे पुत्र देण्याचा ठराव करून आज दीन अशा ह्या देवकीला

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सोडवितो. आतां हेंहि न्यायाला योग्य नाहीं असें ह्मणावें तर ह्मणतो– हिचेठिकाणीं पुढें जर मला पुत्र झाले तर त्यावेळीं जें होणार तें होवो, परंतु आज हिचें वांचणें तर घडेल. बरें तोंपर्यंत जर हाच मरण पावला तर मग कांहींच अन्याय्य नाहीं आणि जर मला पुत्र होतील व तोंपर्यंत हा कंस मरणार नाहीं तर माझ्या पुत्रापासूनच याचें मरण असा विपरीतपणाहि कां होणार नाहीं? समयीं होईल. आतां मोठ्या कंसाला तुझ्या बालकापासून कसा मृत्यु घडेल अशी शंका आली असतां ह्मणतो कीं,–हिचा अष्टम गर्भ तुला मारील ' असें बोलणाऱ्या ईश्वराची शक्ति दुर्लंघ्य आहे, ह्मणून यावेळीं पुत्र अर्पण करण्याचा ठराव करणें हीच मसलत चांगली आहे आणि तसें झालें असतां आज प्राप्त झालेला हा मृत्यु निवृत्त होईल; निवृत्त झालेला पुन्हां कालांतरीं आला तर मग माझा अपराध नाहीं ॥ ४९ ॥ ५० ॥ आतां प्राण्यांचें दैवहि दुर्वितर्क्य आहे असें दृष्टांतपूर्वक सांगतो– जसा वनांत वृक्षांना किंवा गांवांत घरांना जाळणारा अग्नि, जवळच्याहि वृक्षांचा किंवा घरांचा त्याग करून दूर असलेल्याहि वृक्षांना

यदि च सुता भविष्यंति न चायं म्रियेत तदा मत्पुत्रादेवास्य मरणमिति विपर्ययो वा किं न स्यात् । ननु प्रौढस्य कंसस्य तव बालकात्कथं मृत्युः स्यात्तत्राह । गतिरिति । धातुरस्यास्त्वामष्टमो गर्भो हंतेत्युक्तवतः अत इदानीमपत्यार्पणप्रतिज्ञैव मंत्रः तथा सति उपस्थितो मृत्युरयं तावन्निवर्तेत निवृत्तः पुनः कालांतरे आपतेच्चेत्तदा नापराधो ममेत्यर्थः । अथवाऽस्य मत्पुत्रादुपस्थितो मृत्युरस्या वधाद्यो निवर्तेत स पुनरनेन सन्मंत्रेण भवेदेवेति । यद्वा । गतिर्धातुर्दुरत्ययेत्येतस्य प्रपंच उपस्थित इति ॥ ५० ॥ प्राणिनामदृष्टं च

विपर्ययो वा किं न स्याद्गतिर्धातुर्दुरत्यया ॥ उपस्थितो निवर्तेत निवृत्तः पुनरापतेत् ॥ ५० ॥ अग्नेर्यथा दारुवियोगयोगयोरदृष्टतोऽन्यत्र निमित्तमस्ति ॥ एवं हि जंतोरपि दुर्विभाव्यः शरीरसंयोगवियोगहेतुः ॥ ५१ ॥ एवं विमृश्य तं पापं यावदात्मनिदर्शनम् ॥ पूजयामास वै शौरिर्बहुमानपुरःसरम् ॥ ५२ ॥ प्रसन्नवदनांभोजो नृशंसं निरपत्रपम् ॥ मनसा दूयमानेन विहसन्निदमब्रवीत् ॥ ५३ ॥ वसुदेव उवाच ॥ न ह्यस्यास्ते भयं सौम्य यद्वै साऽऽहाशरीरवाक् ॥ पुत्रान्समर्पयिष्येऽस्या यतस्ते भयमुत्थितम् ॥ ५४ ॥

दुर्वितर्क्यमिति सदृष्टांतमाह । अग्नेरिति । वने वृक्षान्प्रदहन्नग्निः सन्निहितानपि वृक्षान्परित्यज्य कदाचिद्दूरस्थानपि दहति ग्रामे गृहान्वा । न ह्यस्य प्राण्यदृष्टव्यतिरेकेण किंचिन्नियामकमस्ति यथा । एवं जंतोर्जन्ममरणयोरपि हेतुर्दुर्विभाव्योऽचिंत्यः ॥ ५१ ॥ यावदात्मनिदर्शनं स्वप्रज्ञावधि विचार्य ॥ ५२ ॥ तस्य विश्वासाय विकसितमुखांभोजो विहसन्नब्रवीत् ॥ ५३ ॥ यद्यथा अशरीरिणी वागाह तथा हि निश्चितमस्याः सकाशात्ते भयं नास्ति । यतो येभ्यः पुत्रेभ्यस्ते भयमुत्थितम् । अष्टमो हंतेत्युक्तेऽन्योन्यापेक्षया सर्वे-

---

किंवा घरांना जाळतो त्याला काष्ठांच्या वियोगाविषयीं किंवा संयोगाविषयीं प्राण्यांच्या पुण्यपापरूप अदृष्टाखेरीज दुसरें कांहींच निमित्त नाहीं; याप्रमाणेंच जीवाच्याहि शरीराच्या जन्माचा किंवा मरणाचा हेतु अतर्क्य आहे ॥ ५१ ॥ याप्रमाणें वसुदेवानें आपल्या बुद्धीची कल्पना चालेल तितका विचार करून, पाप करण्यास उद्युक्त झालेल्या त्या कंसाचा अतिआदरपूर्वक 'स्तोत्र नमस्कारादिकेंकरून' सत्कार केला ॥ ५२ ॥ आणि भयानें कंपित झालेल्या मनानें युक्त असाहि तो वसुदेव, त्याच्या विश्वासाकरितां प्रसन्नमुखकमळ होत्साता हास्य करीत करीत, क्रूर व निर्लज्ज अशा त्या कंसाला ह्मणाला कीं ॥ ५३ ॥ वसुदेव ह्मणाला– हे सौम्या, त्या आकाशवाणीनें जसें तुला सांगितलें आहे तसाच मी निश्चय केला आहे, तो असा कीं, ह्या देवकीपासून तर तुला भय नाहीं, ज्या पुत्रापासून तुला भय उत्पन्न झालें आहे, ह्मणजे ' अष्टम पुत्र मारील ' असें आकाशवाणीनें सांगितल्यावरून परस्परांच्या अपेक्षेनें कदाचित् सर्वहि पुत्र अष्टम होण्याचा संभव आहे, यास्तव हिच्या सर्वच पुत्रांना मी तुला समर्पण करीन. मग

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तूं त्यांना मार किंवा मारूं नको, त्याबद्दल माझा आग्रह नाहीं ॥ ५४ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला— हे राजा, त्या वसुदेवाच्या वाक्यामध्यें असलेली जी युक्ति व सत्यत्व त्यांला जाणणारा तो कंस, तत्काल बहिणीच्या वधापासून निवृत्त झाला. नंतर मनोरथ सिद्ध झाल्यामुळें संतुष्ट झालेल्या वसुदेवानेंहि त्या कंसाची 'तूं महाविवेकी सारग्राही आहेस अशी' प्रशंसा करून देवकीस्त्रीसहवर्तमान आपल्या गृहामध्यें प्रवेश केला ॥ ५५ ॥ नंतर गर्भ धारण ाला व प्रसूतीला योग्य असा काळ प्राप्त झाला असतां, भगवानच जिची आराध्यदेवता आहे अशी ती देवकी, प्रत्येक वर्षास एक एक याप्रमाणें आठ पुत्र व एक कन्या अशा नऊ मुलांना प्रसवली ॥ ५६ ॥ त्यांत सत्यसंकल्पत्वेंकरून प्रसिद्ध व खोटेपणापासून अत्यंत भिणाऱ्या त्या वसुदेवानें, प्रथम झालेल्या कीर्तिमान्नामक पुत्राला, मोठ्या दुःखानें कंसाला अर्पण केलें ॥ ५७ ॥ आतां मृत्यूला पुत्र कसा दिला अशी आकांक्षा आली असतां ह्मणतो— सत्यप्रतिज्ञ अशा साधूंना कोणतें दुःख सहन करण्यास अशक्य आहे ? कोणतेंच नाहीं. पुत्रलालनसुखाची अपेक्षा

ऽप्यष्टमा भवेयुरित्युद्भूतं तेनास्याः पुत्रान्समर्पयिष्ये ॥ ५४ ॥ निववृते निवृत्तः । तद्वाक्ये सार उपपत्तिस्तद्वित् ॥ ५५ ॥ प्रसूतिकाले प्राप्ते । सर्वः सर्वात्मा भगवानेव देवता यस्याः सा तथा । सर्वदेवतामयीति वा । भगवदाश्रयत्वात् ॥ ५६ ॥ ५७ ॥ मृत्यवे पुत्रं कथमर्पितवानित्यपेक्षायामाह । किं दुःसहमिति । साधूनां सत्यसंधानाम् । पुत्रलालन-

॥ श्रीशुक उवाच ॥ स्वसुर्वधान्निववृते कंसस्तद्वाक्यसारवित् ॥ वसुदेवोऽपि तं प्रीतः प्रशस्य प्राविशद्गृहम् ॥ ५५ ॥ अथ काल उपावृत्ते देवकीसर्वदेवता ॥ पुत्रान्प्रसुषुवे चाष्टौ कन्यां चैवानुवत्सरम् ॥ ५६ ॥ कीर्तिमंतं प्रथमजं कंसायानकदुंदुभिः ॥ अर्पयामास कृच्छ्रेण सोऽनृतादतिविह्वलः ॥ ५७ ॥ किं दुःसहं नु साधूनां विदुषां किमपेक्षितम् ॥ किमकार्यं कदर्याणां दुस्त्यजं किं धृतात्मनाम् ॥ ५८ ॥ दृष्ट्वा समत्वं तच्छौरेः सत्ये चैव व्यवस्थितिम् ॥ कंसस्तुष्टमना राजन्प्रहसन्निदमब्रवीत् ॥ ५९ ॥ प्रतियातु कुमारोऽयं न ह्यस्मादस्ति मे भयम् ॥ अष्टमाद्युवयोर्गर्भान्मृत्युर्मे विहितः किल ॥ ६० ॥ तथेति सुतमादाय ययावानकदुंदुभिः ॥ नाभ्यनंदत तद्वाक्यमसतोऽविजितात्मनः ॥ ६१ ॥

सुखापेक्षा कथं त्यक्तेत्यत आह । विदुषामिति । भगवानेव तत्त्वं नान्यदिति जानतामित्यर्थः । ननु स्वयं नीते सति कंसो बालं न हन्यादिति मत्वा नीतवानिति किं न स्यादिति नेत्याह । किमकार्यमिति । ननु देवकी कथं पुत्रं तत्याजेत्यत आह । दुस्त्यजमिति । चित्ते धृत आत्मा हरिर्यैस्तेषाम् ॥ ५८ ॥ ५९ ॥ ६० ॥ ६१ ॥

कशी सोडली ? अशी आशंका आली असतां ह्मणतो— भगवान्च तत्त्व आहे दुसरें कांहीं नाहीं असें जाणणाऱ्या विवेकी पुरुषांना कशाची बरें अपेक्षा आहे ? कशाचीच नाहीं. आतां आपणच नेलेल्या बालकाचा कंस वध करणार नाहीं असें मानून नेला असें कां ह्मणूं नये तर ह्मणतो— आत्मा, धर्मकृत्य, पुत्र, स्त्री व सेवकजन यांना पीडा करणाऱ्या कदर्यपुरुषांना करण्यास अयोग्य असें काय आहे ? कांहींच नाहीं. बरें देवकीनें तरी पुत्राचा त्याग कसा केला ? तर सांगतो— ज्यांनीं आपल्या चित्तामध्यें हरीचें धारण केलें आहे त्यांना दुस्त्यज असें काय आहे ? कांहींच नाहीं ॥ ५८ ॥ असो, हे राजा, वसुदेवाचें तें पुत्र आणणें सुखदुःखांचेठिकाणीं समत्व व सत्यवचनाचेठिकाणीं राहणें हीं पाहून संतुष्टचित्त झालेला कंस, प्रसन्नता दर्शवून हास्य करीत त्याला असें ह्मणाला कीं,—॥५९॥ हे वसुदेवा, हा कुमार परत जाऊंदे; कारण, याच्यापासून मला भय नाहीं, तर तुमच्या आठव्याच गर्भापासून मला मृत्यु आहे असें आकाशवाणीनें सांगितलें आहे ॥ ६० ॥ तेव्हां वसुदेव बरें आहे असें ह्मणून पुत्र घेऊन आपल्या घरीं निघून गेला, परंतु त्यानें अस्थिर-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

चित्त अशा त्या दुष्ट कंसावें वाक्य खरें असें मानिलें नाहीं ॥ ६१ ॥ हे राजा, याप्रमाणें कंसाला प्राप्त झालेली शांति देवकार्याला अनुकूळ होणार नाहीं असें मानणाऱ्या भगवान्
नारदानें कंसाजवळ येऊन त्याला एकांतीं असें सांगितलें कीं,– हे कंसा, जे गोकुळांमध्यें नंदादिक गोप आहेत व ज्या त्यांच्या यशोदादिक स्त्रिया आहेत तसेच जे वसुदेवादिक
यादव आहेत आणि ज्या त्यांच्या देवक्यादिक स्त्रिया आहेत तसेच नंदाचे व वसुदेवाचे जे ज्ञाति (गोत्रज) संबंधी व मित्र आहेत आणि तुला अनुसरून राहिलेले जे अक्रूरा-
दिक आहेत ते सर्वहि बहुतकरून देवतारूपींच आहेत आणि त्यांनीं पृथ्वीला भार झाल्यासारख्या असलेल्या दैत्यांच्या वधाविषयीं ब्रह्मादिकांकडून भगवंताची प्रार्थना करण्याचा
उद्योग केला आहे ॥ ६२ ॥ ६३ ॥ ६४ ॥ असें कंसाला सांगून नारदऋषि निघून गेला असतां कंसानें, यादव हे देव आहेत असें मानून आणि आपल्या वधाकरितां देवकी-
च्या गर्भांचेठिकाणीं उत्पन्न झालेला विष्णूच आहे असें मानून ॥ ६५ ॥ देवकी आणि वसुदेव यांना, पायांत बेड्या घालून कारागृहांमध्यें कोंडून ठेविलें आणि विष्णूच्या

कंसस्य शांतिर्देवकार्यानुगुणा न भवतीति नारदस्य प्रत्यवस्थानं तदाह नंदाद्या इत्यादित्रयेण ॥ ६२ ॥ उभयोर्वसुदेवनंदकुलयोः ॥ ६३ ॥ वधोद्यमं देवकृतमिति शेषः ॥ ६४ ॥
॥ ६५ ॥ निगडैः शृंखलैः । अजनो विष्णुस्तच्छंकया ॥ ६६ ॥ ६७ ॥ ६८ ॥ ६९ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे टीकायां प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥ ॥

नंदाद्या ये व्रजे गोपा याश्चामीषां च योषितः ॥ वृष्णयो वसुदेवाद्या देवक्याद्या यदुस्त्रियः ॥ ६२ ॥ सर्वे वै देवताप्राया उभयो-
रपि भारत ॥ ज्ञातयो बंधुसुहृदो ये च कंसमनुव्रताः ॥ ६३ ॥ एतत्कंसाय भगवान् शशंसाभ्येत्य नारदः ॥ भूमेर्भारायमाणानां
दैत्यानां च वधोद्यमम् ॥ ६४ ॥ ऋषेर्विनिर्गमे कंसो यदून्मत्वा सुरानिति ॥ देवक्या गर्भसंभूतं विष्णुं च स्ववधं प्रति ॥ ६५ ॥
देवकीं वसुदेवं च निगृह्य निगडैर्गृहे ॥ जातं जातमहन्पुत्रं तयोरजनशंकया ॥ ६६ ॥ मातरं पितरं भ्रातॄन्सर्वांश्च सुहृदस्तथा ॥
घ्नंति ह्यसुतृपो लुब्धा राजानः प्रायशो भुवि ॥ ६७ ॥ आत्मानमिह संजातं जानन्प्राग्विष्णुना हतम् ॥ महासुरं कालनेमिं यदु-
भिः स व्यरुद्ध्यत ॥ ६८ ॥ उग्रसेनं च पितरं यदुभोजांधकाधिपम् ॥ स्वयं निगृह्य बुभुजे शूरसेनान्महाबलः ॥ ६९ ॥ इति
श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे श्रीकृष्णावतारोपक्रमे प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ प्रलंबबकचाणूरतृ-
णावर्तमहाशनैः ॥ मुष्टिकारिष्टद्विविदपूतनाकेशिधेनुकैः ॥ १ ॥

द्वितीये कंसघाताय देवक्यां गर्भगो हरिः ॥ ब्रह्मादिभिः स्तुतः सा च सांत्विततेति निरूप्यते ॥ १ ॥ यदुभिः स व्यरुध्यतेत्युक्तं तमेव विरोधं प्रपंचयति त्वरया देवकीगर्भस्या-
न्यत्र संचारेण भगवतः प्रवेशं वक्तुम् । प्रलंबेत्यादिसार्धश्लोकत्रयेण । महाशनोऽघासुरः ॥ १ ॥

शंकेनें त्यांच्या झालेल्या झालेल्या पुत्रांचा वध केला ॥ ६६ ॥ हे राजा, या भूमीवर आपल्या प्राणांची तृप्ति करणारे व विषयकामुक असे जे राजे होतात ते बहुतकरून आई,
बाप, भाऊ व तसेच सर्वहि मित्र यांचासुद्धां वध करितात मग इतरांची कथा काय ! ॥ ६७ ॥ पूर्वजन्मांमध्यें विष्णूनें मारलेला जो कालनेमिनामक दैत्य तोच या जन्मीं मी
झालों आहें असें जाणणारा तो कंस, यादव हे देव आहेत असें ऐकिल्यापासून त्यांच्याबरोबर विरोध करूं लागला ॥ ६८ ॥ आणि नंतर यादव भोज व अंधक यांचा अधिपति
अशा आपल्या उग्रसेन पित्यालासुद्धां बंदींत टाकून तो महाबली कंस शूरसेनदेशाचें राज्य स्वतां करूं लागला ॥ ६९ ॥ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापु० दशमस्कं-
धामध्यें कृष्णावतारोपक्रमनिरूपणनामक हा पहिला अध्याय समाप्त झाला ॥ १ ॥ ॥ आतां ह्या दुसऱ्या अध्यायामध्यें कंसाचा वध करण्याकरितां देवकीच्या गर्भामध्यें अस-
लेल्या श्रीहरीची ब्रह्मादिक देवांनीं स्तुति केली व त्या देवकीचेंहि सांत्वन केलें अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ कंस यादवांबरोबर विरोध करूं लागला असून

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

~~शमितलें तो विरोध सांगण्याकरितां, श्रीशुकाचार्य ह्मणाला~~– हे राजा, प्रलंब दैत्य, बक (पक्षिरूपी दैत्य), चाणूर (मल्ल), तृणावर्त (वावटळरूपी दैत्य,) अघासुर (अजगररूपी दैत्य), मुष्टिक (मल्ल), अरिष्ट (वृषभरूपी दैत्य), द्विविद (वानर), पूतना (राक्षसी), केशी (अश्वरूपी दैत्य) आणि धेनुक (गर्दभरूपी दैत्य) यांनीं

 व बाणासुर, नरकासुर इत्यादिक दुसऱ्याहि दैत्याकृति राजांनीं युक्त व जरासंधाचा आश्रय असलेला तो बलाढ्य कंस, यादवांना दुःख देऊं लागला ॥ १ ॥ २ ॥ त्यानें पीडा

दिलेले ते यादव, कांहीं कुरुदेशांत, कांहीं पांचालदेशांत, कांहीं कैकयदेशांत, कांहीं शाल्वदेशांत, कांहीं विदर्भदेशांत, कांहीं निषधदेशांत, कांहीं विदेहदेशांत व कांहीं कोशलदेशांत जाऊन राहिले ॥ ३ ॥ कितीएक अक्रूरादिक बांधव, त्या कंसाच्याच आज्ञेंत राहून त्याची सेवा करून राहिले. असो, कंसानें देवकीचे सहा पुत्र मारिले असतां, ज्याला

॥ २ ॥ ३ ॥ अनुरुंधाना अनुवर्तमानाः ॥ ४ ॥ धाम कला तदेव सप्तमो गर्भो बभूव । किं तद्धामेत्यत आह । यमनंतमिति । हर्षशोकविवर्धनः आनंदरूपस्यावतीर्णत्वाद्धर्षः पूर्वगर्भसाधारणदृष्ट्या शोक इति ॥ ५ ॥ ६ ॥ ननु सा गोकुले किमित्यास्तेऽत आह । अन्याश्चेति । न केवलं सैवान्या अपीति विवरेष्वलक्ष्यस्थानेषु ॥ ७ ॥ जठरे संतम् । ननु गर्भं आकृष्यमाणः कथं जीवेदित्यत आह । मामकं धामेति । तत्ततः ॥ ८ ॥ किमर्थमेवं कार्यमित्यत आह । अथेति । अनंतरमेवेत्यर्थः । अंशभागेनेति अंशैः शक्तिभिर्भ-

अन्यैश्चासुरभूपालैर्बाणभौमादिभिर्युतः ॥ यदूनां कदनं चक्रे बली मागधसंश्रयः ॥ २ ॥ ते पीडिता निविविशुः कुरुपांचालकेकयान् ॥
शाल्वान्विदर्भान्निषधान्विदेहान्कोसलानपि ॥ ३ ॥ एके तमनुरुंधाना ज्ञातयः पर्युपासते ॥ हतेषु षट्सु बालेषु देवक्या औग्रसेनिना
॥ ४ ॥ सप्तमो वैष्णवं धाम यमनंतं प्रचक्षते ॥ गर्भो बभूव देवक्या हर्षशोकविवर्धनः ॥ ५ ॥ भगवानपि विश्वात्मा विदित्वा कंसजं
भयम् ॥ यदूनां निजनाथानां योगमायां समादिशत् ॥ ६ ॥ गच्छ देवि व्रजं भद्रे गोपगोभिरलंकृतम् ॥ रोहिणी वसुदेवस्य भार्या-
ऽऽस्ते नंदगोकुले ॥ अन्याश्च कंससंविग्ना विवरेषु वसंति हि ॥ ७ ॥ देवक्या जठरे गर्भं शेषाख्यं धाम मामकम् ॥ तत्संनिकृष्य
रोहिण्या उदरे सन्निवेशय ॥ ८ ॥ अथाहमंशभागेन देवक्याः पुत्रतां शुभे ॥ प्राप्स्यामि त्वं यशोदायां नंदपत्न्यां भविष्यसि ॥ ९ ॥

जतेऽधितिष्ठति सर्वान्ब्रह्मादिस्तंबपर्यंतानित्यंशभागस्तेन परिपूर्णेन रूपेणेत्यर्थः । यद्वा अंशैर्ज्ञानैश्वर्यबलादिभिर्भाजयति योजयति स्वीयानिति तथा तेनेति । यद्वा अंशेन पुरुषरूपेण मायाया भागो भजनमीक्षणं यस्य तेन । यद्वा अंशेन मायया गुणावतारादिरूपा भागा भेदा यस्य तेन । यद्वा अंशा एव मत्स्यकूर्मादिरूपा भजनीया न तु साक्षात्स्वरूपं यस्य तेन । यद्वा अंशैर्ज्ञानबलादिभिर्भजनमनुवर्तनं भक्तेषु यस्य तेन सर्वथा परिपूर्णेन रूपेणेति विवक्षितम्। कृष्णस्तु भगवान्स्वयमित्युक्तत्वादिति। तां प्रोत्साहयति । त्वं

अनंत असें ह्मणतात तो विष्णूचा तेजोरूपी अंश देवकीचा सातवा गर्भ झाला, तो आनंदरूपीभगवंताचा अवतार असल्यामुळें देवकीच्या हर्षाला व पूर्वगर्भासारख्या दृष्टीनें शोकाला कारण झाला ॥ ४ ॥ ५ ॥ तेव्हां विश्वात्म्या भगवंतानेंहि, ~~आपणच ज्यांचा नाथ आहें अशा यादवांना कंसापासून भय उत्पन्न झालें आहे असें जाणून~~ आपल्या शक्तिरूप योगमायेला आज्ञा केली कीं,– ॥ ६ ॥ हे देवि, हे भद्रे, तूं गोप व गाई यांनीं अलंकृत अशा गोकुळामध्यें गमन कर. त्या नंदाच्या गोकुळामध्यें वसुदेवाची रोहिणी-
नामक भार्या आहे. ~~आतां ती गोकुळांत कां आहे असें ह्मणशील तर~~– तीच केवळ गोकुळांत आहे असें नाहीं तर दुसऱ्याहि वसुदेवाच्या स्त्रिया, कंसाच्या भीतीनें देशांतरांचे-
ठिकाणीं गुप्तरूपानें राहिल्या आहेत ॥ ७ ॥ ~~तेथें जाऊन काय करावें असें ह्मणशील तर~~– देवकीच्या उदरामध्यें शेषनामक माझा अंश गर्भ आहे त्याला तेथून युक्तीनें काढून रोहिणीच्या उदरामध्यें चांगल्याप्रकारें स्थापन कर ॥ ८ ॥ हे शुभे, नंतर लागलाच मी परिपूर्ण स्वरूपानें देवकीच्या पुत्रत्वाप्रत पावेन आणि तूं नंदपत्नी यशोदेचेठिकाणीं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

उत्पन्न होशील ॥ ९ ॥ याप्रमाणें माझ्या आज्ञेचें पालन केलेंस ह्मणजे पुत्रादिकामना धारण करणारांची श्रेष्ठ स्वामिनी व भक्तांना इच्छित वर देणारी अशा तुझें, धूप, नैवेद्य आणि बलिसमर्पण यांच्या योगेंकरून मनुष्यें पूजन करितील ॥ १० ॥ तसेंच भूमीचेठिकाणीं मनुष्य, तुझीं देवळें बांधितील आणि तुझीं दुर्गा, भद्रकाली, विजया, वैष्णवी, कुमुदा, चंडिका, कृष्णा, माधवी, कन्यका, माया, नारायणी, ईशानी, शारदा आणि अंबिका अशीं नांवें ठेवितील ॥ ११ ॥ १२ ॥ तूं गर्भाचें आकर्षण केलेंस ह्मणजे तेव-ढ्या कारणानें त्या रोहिणीपुत्राला, भूमीवर असणारे लोक संकर्षण असें ह्मणतील. तो लोकांना रमवील ह्मणून त्याला राम असें संबोधन देतील आणि तो बलवानांमध्यें श्रेष्ठ असल्यामुळें त्याला बल असें ह्मणतील ॥ १३ ॥ याप्रमाणें भगवंतानें आज्ञा केलेली ती माया, '~~तथास्तु~~' ~~याप्रमाणें व पुन्हां~~ '~~ॐम्~~' ~~असा आदरानें त्या भगवंताच्या वच-~~

यशोदायामिति त्र्यक्षरोनसार्धचतुष्टयेन ॥ ९ ॥ सर्वान्पुत्रादीन्कामयंते ये तेषां वरामीश्वरीं श्रेष्ठां नियंत्रीं अर्चकानां सर्वान्कामवरान्प्रददाति या ताम् ॥ १० ॥ ११ ॥ १२ ॥ त्वद्विक्रमेण च तस्य व्यपदेशा भविष्यंतीत्याह। गर्भसंकर्षणादित्यादिना। रामेति च संबोधनं करिष्यंति । त्वया संकृष्टेन तेन लोकस्य रमणाद्रत्युत्पादनात् ॥ १३ ॥ तथेति

अर्चिष्यंति मनुष्यास्त्वां सर्वकामवरेश्वरीम् ॥ धूपोपहारबलिभिः सर्वकामवरप्रदाम् ॥ १० ॥ नामधेयानि कुर्वंति स्थानानि च
नरा भुवि ॥ दुर्गेति भद्रकालीति विजया वैष्णवीति च ॥ ११ ॥ कुमुदा चंडिका कृष्णा माधवी कन्यकेति च ॥ माया नारायणी-
शानी शारदेत्यंबिकेति च ॥ १२ ॥ गर्भसंकर्षणात्तं वै प्राहुः संकर्षणं भुवि ॥ रामेति लोकरमणाद्बलं बलवदुच्छ्रयात्
॥ १३ ॥ संदिष्टैवं भगवता तथेत्योमिति तद्वचः ॥ प्रतिगृह्य परिक्रम्य गां गता तत्तथाऽकरोत् ॥ १४ ॥ गर्भे प्रणीते
देवक्या रोहिणीं योगनिद्रया ॥ अहो विस्रंसितो गर्भ इति पौरा विचुक्रुशुः ॥ १५ ॥ भगवानपि विश्वात्मा भक्तानामभयंकरः ॥
आविवेशांशभागेन मन आनकदुंदुभेः ॥ १६ ॥ स बिभ्रत्पौरुषं धाम भ्राजमानो यथा रविः ॥ दुरासदोऽतिदुर्धर्षो भूतानां संबभू-
व ह ॥ १७ ॥ ततो जगन्मंगलमच्युतांशं समाहितं शूरसुतेन देवी ॥ दधार सर्वात्मकमात्मभूतं काष्ठा यथाऽऽनंदकरं मनस्तः ॥ १८ ॥

पुनरप्योमित्यादरेण प्रतिगृह्य गां पृथ्वीम् ॥ १४ ॥ विस्रंसितो विभ्रष्टो विस्रस्त इत्यर्थः । इति विचुक्रुशुर्नतु तद्विदुरित्यर्थः ॥ १५ ॥ मन आविवेश मनस्याविर्बभूव । जीवाना-मिव न धातुसंबंध इत्यर्थः ॥ १६ ॥ धाम श्रीमूर्तिम् ॥ १७ ॥ जगन्मंगलं जगतो मूर्तिमन्मंगलम् । अच्युतांशमच्युता च्युतिरहिता अंशा ऐश्वर्यादयो यस्य तम् । यद्वा अच्युतस्यांश इवांशः भक्तानामनुग्रहार्थं परिच्छिन्नवपुरित्यर्थः । सम्यग्भूतमेवाहितं वैधदीक्षयाऽर्पितं देवी द्योतमाना शुद्धसत्वेत्यर्थः । सर्वात्मकं सर्वस्यात्मानम् । अतएवात्मभूतं

~~नाला स्वीकार करून,~~ ~~तसें करण्याचें सामर्थ्य येण्याकरितां त्याला~~ प्रदक्षिणा करून भूमीवर गेली आणि जसें भगवंतानें सांगितलें होतें त्याप्रमाणें तिनें केलें ॥ १४ ॥ तेव्हां त्या योगनिद्रेनें देवकीचा गर्भ रोहिणीच्या उदरांत नेला असतां 'अहो देवकीचा गर्भ पतन पावला' अशा खिन्न वाणीनें मथुरानगरींतील लोक आक्रोश करूं लागले परंतु त्याचें तत्त्व त्यांना कांहीं समजलें नाहीं ॥ १५ ॥ इकडे भक्तांना अभय करणारा असा विश्वात्मा भगवान् हरि, पूर्णानंदरूपानें वसुदेवाच्या मनामध्यें प्रविष्ट झाला. ~~यावरून त्याला जीवासारखा धातुसंबंध नाहीं असें सुचविलें~~ ॥ १६ ॥ तो वसुदेव, तें भगवत्संबंधीं तेज धारण करीत होत्साता सूर्यासारखा प्रकाश पावूं लागला ~~आणि कंसादिक लो-कांना समीप जाण्यास व पराभव करण्यास अशक्य असा वाटूं लागला~~ ॥ १७ ॥ नंतर वसुदेवानें, शुद्ध मनानें वैधदीक्षेनें[1] अर्पण केलेला, आपले (देवकीचे) ठिकाणीं पूर्वींच असलेला,

१ जसा कांसव, आपल्या बालकांचें ध्यानमात्रेंकरून पोषण करितो तसें तूं ध्यानमात्रेंकरून परमेश्वराचें धारण कर असा जो उपदेश करणें त्याला वैधदीक्षा ह्मणतात्, असें कुलार्णवांत सांगितलें आहे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जगाचें मूर्तिमंत मंगल अशा अखंडैश्वर्यरूपी भगवंताला त्या शुद्धसत्वमय देवकीनें मनानेंच, जसें पूर्वदिशेनें चंद्राला धारण करावें त्याप्रमाणें धारण केलें ॥ १८ ॥ तेव्हां जगन्निवास भगवंताचें निवासस्थान झालेली ती देवकी, कंसाच्या बंदिगृहामध्यें कोंडून ठेविलेली असल्यामुळें, जशी घटादिकांमध्यें कोंडून ठेविलेली दीपाची ज्वाळा सर्वजनांना प्रकाश करणारी होत नाहीं किंवा जशी आपलें ज्ञान दुसऱ्यास प्राप्त होऊं नये असें मानणाऱ्या ज्ञानवंचक पुरुषाचेठिकाणीं गुप्त असलेली वेदादिविद्या लोकांच्या उपयोगी पडत नाहीं त्याप्रमाणें ती सर्व जनांना आनंदकारकत्वेंकरून अत्यंत शोभली नाहीं, तर स्वतांच आनंदाचा अनुभव घेऊं लागली ॥ १९ ॥ त्यावेळीं जिच्या कुक्षीमध्यें भगवान् वास करीत आहे, जी आपल्या कांतीनें त्या घराला शोभा आणीत आहे व जिचें हास्य आनंदयुक्त आहे अशा त्या देवकीला पाहून कंस ह्मणाला कीं,– ज्याअर्थी ही

स्वस्मिन्नादावेव संतम् । मनस्तो मनसैव दधार धारणया धृतवती । अत्रानुरूपं दृष्टांतमाह । यथा काष्ठा प्राची दिगानंदकरं चंद्रमिति ॥ १८ ॥ सर्वजगन्निवासस्य श्रीहरेर्निवासभूता सत्यपि नितरां सर्वजनाह्लादकतया न रेजे किंतु स्वयमेवानंदमन्वभवत् । यतः कंसस्य गृहे रुद्धाऽन्यैर्न दृश्यते । घटादिषु रुद्धाऽग्निशिखा दीपकलिकेव तथा । सती शोभमाना सरस्वती ज्ञानखले ज्ञानवंचके रुद्धा यथाऽन्येषामनुपकारिणी न राजते तद्वत् ॥ १९ ॥ प्रभया भवनं विरोचयंतीम् । अजितोंऽतरा कुक्षिमध्ये यस्यास्ताम् । एष विरोचमानो ध्रुवं हरिरेव यद्यस्मादीदृशीयं पुरा पूर्वं नासीत् ॥ २० ॥ ननु संति सामादय उपायाः नेति स्वयमेवाह । अयमर्थतंत्रो देवकार्यप्रधानो विक्रमं न विहंति । मद्वधे पराक्रमं करि-

सा देवकी सर्वजगन्निवासनिवासभूता नितरां न रेजे ॥ भोजेंद्रगेहेऽग्निशिखेव रुद्धा सरस्वती ज्ञानखले यथा सती ॥ १९ ॥ तां वीक्ष्य कंसः प्रभयाजितांतरां विरोचयंतीं भवनं शुचिस्मिताम् ॥ आहैष मे प्राणहरो हरिर्गुहां ध्रुवं श्रितो यन्न पुरेयमीदृशी ॥ २० ॥ किमद्य तस्मिन्करणीयमाशु मे यदर्थतंत्रो न विहंति विक्रमम् ॥ स्त्रियाः स्वसुर्गुरुमत्या वधोयं यशः श्रियं हंत्यनुकालमायुः ॥ २१ ॥ स एव जीवन्खलु संपरेतो वर्तेत योऽत्यंतनृशंसितेन ॥ देहे मृते तं मनुजाः शपंति गंता तमोंऽधं तनुमानिनो ध्रुवम् ॥ २२ ॥ इति घोरतमाद्भावात्संनिवृत्तः स्वयं प्रभुः ॥ आस्ते प्रतीक्षंस्तज्जन्म हरेर्वैरानुबंधकृत् ॥ २३ ॥ +

ष्यत्येवेत्यर्थः । यद्वा तर्हिदानीमेवेयं हन्यतामिति विचिंत्याह । अर्थतंत्रोऽपि पुमान्स्वं विक्रमं न विहंति न नाशयति । स्त्रीवधे तन्नाशः स्यादिति भावः । तदेवाह । स्त्रिया इति । गुरुमत्या गुर्विण्याः ॥ २१ ॥ किंच । स एष जीवन्नपि मृतः स्यात् । नृशंसितेन क्रौर्येण यो वर्तेत तं जीवंतमेव मनुजाः शपंति दुर्वाक्यैर्धिक्कुर्वंति स च देहे मृते तनुमानिनः पापिनो नरकं गच्छति । अथवा शापप्रकारमेवाह । तनुमानिनोऽस्य देहे मृतेऽयं ध्रुवमंधं तमो गमिष्यतीति ॥ २२ ॥ २३ ॥

देवकी पूर्वीं अशी (कांतियुक्त) दिसत नव्हती त्याअर्थीं माझे (गजाचे) प्राण हरण करणारा हा हरीच (सिंहच) हिच्या कुशीमध्यें (गुहेमध्यें) खरोखर राहिला आहे ॥ २० ॥ तर आतां त्याविषयीं मी लवकर काय बरें केलें पाहिजे ? आतां सामादिक उपाय आहेत असें ह्मणावें तर, ज्याअर्थीं हा भगवान् देवाचें कार्य करण्यास उद्युक्त झाला आहे त्याअर्थीं आपला पराक्रम सोडणार नाहीं ह्मणजे माझ्या वधाविषयीं पराक्रम करीलच. बरें आतांच हिला मारावी असें ह्मणावें तर, कार्य साधण्याविषयीं तत्पर असलेलाहि पुरुष, आपल्या पराक्रमाचा नाश करीत नाहीं. कारण, स्त्रीचा त्यामध्यें बहिणीचा, त्यांत गर्भिणीचा हा वध केला असतां तो यश, संपत्ति व आयुष्य यांचा तत्काल नाश करील ॥ २१ ॥ आणि जो अतिक्रूरपणानें वर्तन करितो तो अतिप्रसिद्ध असलेलाहि पुरुष, जीवंत असून मेल्यासारखाच आहे. कारण, तो जिवंत असतांनांच लोक त्याचा धिक्कार करितात आणि त्यचा देह मरण पावल्यानंतर, तो निश्चयानें पाप्याला प्राप्त होणाऱ्या नरकांत जाऊन पडतो ॥ २२॥ याप्रमाणें विचार करून देवकीवधरूप अतिभयंकर ॥ ७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

संकल्पापासून तो स्वतंत्र कंस स्वतांच निवृत्त होऊन, हरीचा वैरानुबंध धारण करीत असल्यामुळें तो त्या हरीच्या जन्माची प्रतीक्षा करीत राहिला ॥ २३ ॥ नंतर बसला असतां, निजला असतां, उभा राहिला असतां, भोजन करीत असतां, व भूमीवर फिरत असतां, मिळून सर्व अवस्थांमध्यें वैरभावानें श्रीकृष्णाचें चिंतन करणारा तो कंस, सर्वहि जग तन्मय आहे असें पाहूं लागला ॥ २४ ॥ एकेवेळीं नारदादिक ऋषि, गंधर्वादिक अनुचर व इंद्रादिक देव यांसहवर्तमान ब्रह्मदेव व शंकर, हे त्या वसुदेवदेवकींच्या कारागृहामध्यें आले आणि सर्व मिळून सुंदर वाणींनीं मनोरथ पूर्ण करणाऱ्या त्या भगवंताची स्तुति करूं लागले ॥ २५ ॥ त्यांत प्रथमतः भगवंतानें सांगितलेलें सत्य केलें ह्मणून हर्षयुक्त झालेले ते देव त्याची सत्यत्वानें स्तुति करितात– ज्याचें व्रत (संकल्प) सत्य आहे, ज्याचेठिकाणीं सत्य हेंच श्रेष्ठ प्राप्तीचें साधन आहे, जो सृष्टीच्या पूर्वीं, प्रलयानंतर व स्थितिकाळीं सत्यत्वानें (कायमपणानें) राहतो; जो पृथिवी, उदक, तेज वायु व आकाश या पंचमहाभूतांचें कारण आहे, जो त्या पंचमहाभूतांचेठिकाणीं अंतर्यामि-

---

संविशन् शयानः ॥ २४ ॥ रम्याभिर्गीर्भिर्वृषणं कामवर्षिणमैडयंस्तुष्टुवुः ॥ २५ ॥ प्रतिश्रुतं सत्यं कृतमिति हृष्टाः संतः सत्यत्वेनैव प्रथमं स्तुवंति । सत्यव्रतमिति । सत्यं व्रतं संकल्पो यस्य तम् । सत्यं परं श्रेष्ठं प्राप्तिसाधनं यस्मिंस्तम् । त्रिसत्यं त्रिष्वपि कालेषु सृष्टेः पूर्वं प्रलयानंतरं च स्थितिसमये च सत्यमव्यभिचारेण वर्तमानम् । तदेवाहुः । सत्त्यस्य योनिमिति । सच्छब्देन पृथिव्यप्तेजांसि । त्यच्छब्देन वाय्वाकाशौ । एवं सच्च त्यच्च सत्यं भूतपंचकम् । तत्सत्त्यमित्याचक्षत इति श्रुतेः । तस्य योनिं कारणम् । अनेन पूर्वं वर्तमान-

आसीनः संविशंस्तिष्ठन्भुंजानः पर्यटन्महीम् ॥ चिंतयानो हृषीकेशमपश्यत्तन्मयं जगत् ॥ २४ ॥ ब्रह्मा भवश्च तत्रैत्य मुनिभिर्नारदादिभिः ॥ देवैः सानुचरैः साकं गीर्भिर्वृषणमैडयन् ॥ २५ ॥ सत्यव्रतं सत्यपरं त्रिसत्यं सत्त्यस्य योनिं निहितं च सत्ये ॥ सत्यस्य सत्यमृतसत्यनेत्रं सत्यात्मकं त्वां शरणं प्रपन्नाः ॥ २६ ॥ एकायनोऽसौ द्विफलस्त्रिमूलश्चतूरसः पंचविधः षडात्मा ॥ सप्तत्वगष्टविटपो नवाक्षो दशछदी द्विखगो ह्यादिवृक्षः ॥ २७ ॥

तोक्ता । तथा सत्ये तस्मिन्नेव निहितमंतर्यामितया स्थितम् । अनेन स्थितिसमयेऽपि सत्यत्वमुक्तम् । तथा सत्यस्य सत्यं तस्यैव सत्यस्य सत्यं पारमार्थिकं तन्नाशेऽप्यवशिष्यमाणरूपम् । अनेन प्रलयेष्ववधित्वेन सत्यत्वं दर्शितम् । एवं त्रिसत्यत्वमुपपादितम् । तथा ऋतसत्यनेत्रं ऋतं सूनृतावाणी सत्यं समदर्शनं तथा भगवता व्याख्यास्यमानत्वात् । सत्यं च समदर्शनम् ॥ ऋतं च सूनृतावाणी कविभिः परिकीर्तितेति । तयोर्नेत्रं नयनसाधनं नेतारं प्रवर्तकमिति यावत् । एवं सर्वप्रकारेण सत्यात्मकं त्वां भगवन्वयं शरणं प्रपन्नाः प्राप्ता इति ॥ २६ ॥ ननु भवंतोऽपि लोकेश्वरा मत्तुल्या एव किमिति मां शरणं प्रपद्यंते, नैवं वाच्यं, त्वमेवैकः सर्वेश्वरः सर्वसृष्ट्यादिकारणत्वात् वयं तु त्वदेकशरणा एव लोकादिरूपं

त्वेंकरून राहिला आहे व जो त्याचें लयस्थान आहे, तसाच जो मधुर वाणी आणि समदृष्टि यांचा प्रवर्तक आहे अशा सर्वप्रकारें सत्यरूपी तुज भगवंताला आह्मी शरण प्राप्त झालों आहों ॥ २६ ॥ आतां तुह्मीहि लोकाधिपति असल्यामुळें माझ्यासारखेच आहां. मग मला कां शरण येतां ? असें ह्मणूं नये. कारण, सर्व सृष्ट्यादिकांचें मूळ कारण तूं एक असा सर्वेश्वर तूंच आहेस, आह्मी तर तुझ्या आश्रयानेंच राहणारे आहों आणि लोकादिरूप द्वैत तुझ्याहून निराळें नाहीं, असें सांगण्याकरितां द्वैत प्रपंचाचें वृक्षरूपकानें निरूपण करितात– हे प्रभो, हा प्रपंच आदिवृक्षरूपी आहे, तो असा कीं,– ज्याचें प्रकृति हें एक अळें आहे, ज्याचीं सुखदुःखें हीं दोन फळें, सत्व रज व तम हीं तीन मुळें, धर्म अर्थ काम व मोक्ष हे चार रस, त्वचा चक्षु श्रोत्र जिव्हा व घ्राण हे पांच ज्ञानप्रकार, काम क्रोध लोभ मोह मद आणि मत्सर हे सहा स्वभाव, त्वचा, चर्म इत्यादिक प्रधातु ह्या सात साली, पंचमहाभूतें मन बुद्धि व अहंकार ह्या आठ शाखा, नऊ मुखादिक द्वारें ह्या नऊ ढोली व दहा प्राण हीं दहा पानें आहेत आणि ज्याच्यावर जीव आणि ईश्वर

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हे दोन पक्षी आहेत ॥ २७ ॥ अशा प्रकारच्या या संसारवृक्षरूप कार्याचा तूं एकच उत्पत्तिस्थान, तूंच लयस्थान व तूंच पालन करणारा आहेस. आतां अशाप्रकारचे ब्रह्म-विष्णुरुद्र प्रसिद्ध आहेत, मी नाहीं, असें ह्मणशील तर— तुझ्या मायेनें ज्यांचें ज्ञान आच्छादित झालें आहे ते तुलाच ब्रह्मादिरूपेंकरून नानाप्रकारचा पाहतात. जे तर
 मायामोहानें रहित असे विवेकी आहेत ते तसें पहात नाहींत, तर ब्रह्मादिरूपेंकरून स्थित अशा तुला एकलाच पाहतात ॥ २८ ॥ आतां मज देवकीपुत्राचें असें कसें वर्णन
करितां? असें ह्मणशील तर— ज्ञानैकस्वरूपी आत्मा तूंच स्थावरजंगमात्मक प्रपंचाच्या पालनाकरितां, धर्मानें वागणाऱ्या पुरुषांना सुखकारक व दुष्टांना नाशकारक अशीं

द्वैतं च सर्वं त्वद्व्यतिरेकेण नास्तीति वक्तुं द्वैतप्रपंचं वृक्षरूपकेण निरूपयंति । एकायन इति । असौ प्रपंच आदिवृक्षः । वृश्च्यत इति वृक्षः समष्टिव्यष्टिदेहरूपः । कथंभूतः । एकायनः एका प्रकृतिरयनमाश्रयो यस्य सः । द्वे सुखदुःखे फले यस्य स । त्रयो गुणा मूलानि यस्य सः । चतूरसो धर्मार्थकाममोक्षाश्चत्वारो रसा यस्य सः । पंचेंद्रियाणि विधा ज्ञानप्रकारा यस्य सः । षडूर्मयः कोशा वा आत्मानः स्वभावा यस्य सः । सप्त धातवस्त्वचो यस्य । पंचभूतानि मनोबुद्ध्यहंकाराश्चेत्यष्टौ विटपाः शाखाविस्तारा यस्य सः । नव द्वाराण्यक्षाश्छिद्राणि यस्य सः । दश प्राणाः छदाः पत्राणि विद्यंते यस्य स दशच्छदी । द्वौ जीवेश्वरौ खगौ यस्मिन्स द्विखगः ॥ २७ ॥ एवंरूपस्य संसारवृक्षस्य सतः कार्यस्य त्वमेक एव प्रसूतिः प्रकर्षेण सूतिर्जन्म यस्मात्स त्वं कारणमित्यर्थः । त्वमेव सन्निधानं सम्यङ्निधीयतेऽस्मिन्निति लयस्थानम् । त्वमेवानुग्रहश्चानुगृह्णातीति पालकः ।

त्वमेक एवास्य सतः प्रसूतिस्त्वं सन्निधानं त्वमनुग्रहश्च ॥ त्वन्मायया संवृतचेतसस्त्वां पश्यंति नाना न विपश्चितो ये ॥ २८ ॥
बिभर्षिरूपाण्यवबोध आत्मा क्षेमाय लोकस्य चराचरस्य ॥ सत्त्वोपपन्नानि सुखावहानि सतामभद्राणि मुहुः खलानाम् ॥ २९ ॥
त्वय्यंबुजाक्षाखिलसत्त्वधाम्नि समाधिनाऽऽवेशितचेतसैके ॥ त्वत्पादपोतेन महत्कृतेन कुर्वंति गोवत्सपदं भवाब्धिम् ॥ ३० ॥ स्वयं
समुत्तीर्य सुदुस्तरं द्युमन्भवार्णवं भीममदभ्रसौहृदाः ॥ भवत्पदांभोरुहनावमत्र ते निधाय याताः सदनुग्रहो भवान् ॥ ३१ ॥

ननु ब्रह्मविष्णुरुद्रा एवंभूताः प्रसिद्धाः कथमहमेवेति चेत्तत्राहुः । त्वन्माययेति । संवृतं पिहितं चेतो ज्ञानं येषां ते त्वामेव नाना पश्यंति । ये तु विपश्चितो विद्वांसस्ते तथा न पश्यंति ॥ २८ ॥ ननु देवकीपुत्रं मां कथमेवं वर्णयथेति चेत्तत्राहुः । बिभर्षीति । अवबोधैकस्वरूप आत्मा त्वमेव रूपाणि मूर्तीर्बिभर्षि धत्से । ननु त्वं कस्यापि पुत्र इत्यर्थः । क्षेमाय पालनाय । सतां धर्मवर्तिनां सुखकराणि । खलानामभद्राणि नाशकानि ॥ २९ ॥ न केवलमेतावद्भक्तानां मोक्षार्थमपीत्याहुः । त्वयीति । त्वयि समाधिना आवेशितचेतसा निमित्तेन त्वत्पादपोतेनाश्रितेन । एके मुख्या विवेकिनः । महद्भिः कृतेन सेव्यतया संपादितेन । यद्वा इदमपि मायामयमित्यनादरं परित्यज्येदमेव महत्सर्वोत्कृष्टमिति मनसि कृतेन बहुमतेनेत्यर्थः । भवाब्धिं तुच्छीकुर्वंति । अनायासेनैव भजनानुनिष्पादिनी तेषां मुक्तिरित्यर्थः ॥ ३० ॥ ननु तेन पोतेन पूर्वं चेत्पारं गता-

---

शुद्धसत्वगुणात्मक स्वरूपें धारण करितोस. तूं कोणाचाहि पुत्र नाहींस ॥ २९ ॥ आतां केवळ इतक्याकरितांच नाहीं तर भक्तांना मोक्ष प्राप्त होण्याकरितांहि तूं रूपें धारण
करितोस असें सांगतात— हे कमलनेत्रा, शुद्धसत्वमूर्ति अशा तुझेठिकाणीं, समाधीनें स्थापन केलेल्या चित्ताच्या योगेंकरून विवेकी पुरुष, साधूंनीं स्वीकारलेल्या तुझ्या चरणरूप नौकेचा आश्रय करून संसारसमुद्राला गोवत्सपदासारखा करितात ॥ ३० ॥ आतां चरणनौकेच्या योगानें पूर्वींचे लोक जर संसारसमुद्राला तरून गेले, तर आतांच्या लोकांनीं कसें तरून जावें ? असें ह्मणशील तर— हे स्वप्रकाशस्वरूपा, जसा सूर्याचा आश्रय करणाऱ्या लोकांना अंधकाराचें भय नाहीं त्याप्रमाणें तुझा आश्रय करणाऱ्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भक्तांना संसाराचें भय नाहीं ह्मणून सर्व भूतांचेठिकाणीं प्रीति करणारे ते तुझे भक्त, तुझ्या चरणनौकेजवळ जातांक्षणींच त्यांना भवसमुद्र वत्सपदासारखा झाला असतां, तुझ्या चरणकमलरूप नौकेला, दुसऱ्यांच्या उपयोगाकरितां तेथेंच ठेऊन ह्मणजे भक्तिमार्गसंप्रदाय प्रवृत्त करून, ते इतरांना भयंकर व दुस्तर अशा भवसमुद्राला स्वतांच अनायासानें तरून गेले. याचें मुख्य कारण, तूं भक्तांवर अनुग्रह करणारा आहेस ॥ ३१ ॥ आतां विवेकी पुरुषांना माझ्या भजनाचा काय उपयोग आहे ? कारण, ते मुक्तच आहेत, असें ह्मणशील तर—हे कमलनयना, जे दुसरे कित्येक लोक, स्वतांलाच मुक्त असें मानणारे, तुझ्या चरणाचा आदर न करणारे व तुझेठिकाणीं भक्ति नसल्यामुळें शुद्धबुद्धि न झालेले आहेत ते बहुत जन्मांमध्यें केलेल्या तपाच्या योगानें सत्कुलजन्म, तप व शास्त्राध्ययन इत्यादिक मोक्षाजवळच्या पदवीला पावूनहि तेथून खालीं (नरकामध्यें) पडतात

स्तर्हीदानींतनानां का गतिस्तत्राहुः । स्वयमिति । अयमर्थः । हे द्युमन्स्वप्रकाश त्वत्पादपोतसामीप्यमात्रेण भवांबुधौ वत्सपदमात्रे जाते अतस्तन्निरपेक्षं स्वयमेवान्येषां भीमं दुस्तरमपि भवार्णवं समुत्तीर्य भवत्पदांभोरुहरूपां नावमत्रैव निधाय । भक्तिमार्गसंप्रदायं प्रवर्त्येत्यर्थः । पारं याताः तत्किम् । यतोऽदभ्रसौहृदाः सर्वभूतेष्वतिप्रीतियुक्ताः अतस्तेऽन्येषां तरणाय निधायेति कथं मत्पादपोतश्रयणमात्रेण तीर्णा अत उक्तम् । भवान्सदनुग्रहः सतो भक्ताननुगृह्णातीति ॥ ३१ ॥ ननु विवेकिनां किं मद्भजनेन मुक्ता एव हि ते तत्राहुः । येऽन्य इति । विमुक्तमानिनो विमुक्ता वयमिति मन्यमानाः । त्वयि अस्तो निरस्तोऽतएवासन् यो भावस्तस्मात् । भक्तेरभावादित्यर्थः । न विशुद्धा

येऽन्येऽरविंदाक्ष विमुक्तमानिनस्त्वय्यस्तभावादविशुद्धबुद्धयः ॥ आरुह्य कृच्छ्रेण परं पदं ततः पतंत्यधोऽनादृतयुष्मदंघ्रयः ॥ ३२ ॥
तथा न ते माधव तावकाः क्वचिद्भ्रश्यंति मार्गात्त्वयि बद्धसौहृदाः ॥ त्वयाऽभिगुप्ता विचरंति निर्भया विनायकानीकपमूर्धसु प्रभो ॥ ३३ ॥
सत्त्वं विशुद्धं श्रयते भवान्स्थितौ शरीरिणां श्रेय उपायनं वपुः ॥ वेदक्रियायोगतपःसमाधिभिस्तवार्हणं येन जनः समीहते ॥ ३४ ॥

बुद्धिर्येषां ते तथा । यद्वा त्वयि अस्तभाः इति छेदः । अस्तमतयो वादेष्वेव विशुद्धबुद्धयः । कृच्छ्रेण बहुजन्मतपसा । परं पदं मोक्षसन्निहितं सत्कुलतपःश्रुतादि । पतंति विघ्नैरभिभूयंते । न आदृतौ युष्मदंघ्री यैस्ते ॥ ३२ ॥ त्वदीयास्तु न कदाचिदपि पतंतीत्याहुः । तथा नेति । विनायका विघ्नहेतवस्तेषामनीकानि स्तोमास्तानि पांति ये तेषां मूर्धसु विचरंति विघ्नान् जयंतीत्यर्थः ॥ ३३ ॥ सतां सुखावहानि रूपाणि धारयसीत्युक्तं बिभर्षि रूपाणीति । तत्केन प्रकारेण सुखावहत्वमित्यपेक्षायामाहुः । सत्त्वं विशुद्धमिति । सत्त्वं वपुः श्रयत इत्यन्वयः । श्रेय उपायनं कर्मफलदातृ । कथम् । येन वपुषा जनस्तवार्हणं पूजामीहते करोति । कैः । वेदाश्च क्रियायोगाश्च तपश्च समाधिश्च तैश्चतुराश्रमधर्मैरित्यर्थः । वपुषोऽनाश्रयणेऽर्हणासंभवान्न कर्मफलसिद्धिः स्यादिति ॥ ३४ ॥

ह्मणजे विघ्नाच्या योगानें पराभव पावतात ॥ ३२ ॥ हे माधवा, तुझे भक्त तर, तुझेठिकाणीं ज्यांनीं आपलें दृढ प्रेम ठेविलें आहे असे असल्यामुळें अभक्तांप्रमाणें कधींहि आपल्या भक्तिमार्गापासून भ्रष्ट होत नाहींत. तर हे प्रभो, तूं रक्षण केलेले ते भक्त, कालकर्मादिकांच्या भयानें रहित होत्साते हजारो विघ्नांचें सैन्य पदरीं बाळगणाऱ्या विघ्नसेनाधिपतींच्याहि मस्तकीं पाय देऊन फिरत असतात ह्मणजे ते सर्व विघ्नें जिंकून आपलें कार्य साधितात ॥ ३३ ॥ आतां साधूंना सुखकारक रूपें धारण करितोस असें सांगितलें तें कोणत्याप्रकारचें सुख देणें असें ह्मणशील तर—हे प्रभो, तूं, जगाच्या पालनाकरितां, प्राण्यांना कर्माचीं फलें प्राप्त करून देणारें शुद्धसत्वगुणात्मक शरीर धारण करितोस, ह्मणून त्या शरीरानें युक्त असलेल्या तुझें, चारहि आश्रमामध्यें असणारे हे जन, अनुक्रमानें वेदाध्ययन, कर्मानुष्ठान, वानप्रस्थधर्म व समाधि यांच्या योगानें पूजन

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करितात. तूं अवतारच धारण केले नाहींस तर तुझें पूजन होणार नाहीं व कर्मफलसिद्धिहि होणार नाहीं ॥ ३४ ॥ हे जगदाधारा, तुझें हें सत्वगुणात्मक शरीर, जर प्रकट होणार नाहीं तर अज्ञानाला आणि अज्ञानानें उत्पन्न झालेल्या द्वैतभेदाला नाहींसें करणारें अपरोक्षज्ञान मुळींच होणार नाहीं. आतां बुद्ध्यादि जडपदार्थांचा प्रकाश ज्यापासून होतो तें ब्रह्म असें ज्ञान होईलच असें ह्मणावें तर नाहीं. कारण, ज्याच्या संबंधी हे बाहेरचे घटादिपदार्थरूप गुण, बुद्धीमध्यें प्रतिबिंबित झालेल्या ज्याच्या योगानें प्रकाश पावतात व त्या प्रकाशांच्या योगेंकरून तूं सर्वसाक्षी परिपूर्ण आहेस असें जें केवळ अनुमान होतें तें काल्पनिक असल्यामुळें त्याला प्रत्यक्ष ज्ञान असें ह्मणतां येत नाहीं आणि शुद्धसत्वगुणात्मक तूं उत्पन्न झालास ह्मणजे तुझ्या सेवेनें तदाकार झालेल्या अंतःकरणामध्यें तुझ्या प्रसादानें तुझें साक्षात्काररूप प्रत्यक्ष ज्ञान होतें ॥ ३५ ॥ हे देवा

त्वय्यंबुजाक्षेत्यादिना श्लोकत्रयेण भगवद्भक्तानामेव मोक्षो नान्येषामित्युक्तं तत्र कर्मफलं भक्तिं विना माभून्मोक्षस्य तु ज्ञानैकसाध्यत्वात्किं भक्त्येति सानुशयान्प्रत्याहुः । सत्त्वं न चेदिति । हे धातरिदं सत्त्वं निजं तव वपुर्न भवेच्चेत्तर्हि विज्ञानं विशिष्टमपरोक्षं ज्ञानं न भवेदित्यनुषंगः । कथंभूतम् । अज्ञानभिदापमार्जनमज्ञानं च तत्कृता भिदा च तयोरपमार्जनं निवर्तकम् । यद्वा अज्ञानं भिनत्तीत्यज्ञानभिद्विज्ञानं मार्जनं नाशमाप प्राप्तमेवेति । ननु जडानां बुद्ध्यादीनां यतः प्रकाशस्तद्ब्रह्मेति ज्ञानं भवेदेवेति चेन्न । गुणप्रकाशैर्गुणावच्छिन्नैः प्रकाशैर्भवान्सर्वसाक्षी परिपूर्णः केवलमनुमीयते कल्प्यते नतु साक्षात्क्रियत इत्यर्थः । अनुमानप्रकारमाहुः । प्रकाशते यस्य च येन वा गुण इति । यस्य संबंधी अयं बुद्ध्या-

सत्त्वं न चेद्धातरिदं निजं भवेद्विज्ञानमज्ञानभिदापमार्जनम् ॥ गुणप्रकाशैरनुमीयते भवान्प्रकाशते यस्य च येन वा गुणः ॥ ३५ ॥
न नामरूपे गुणजन्मकर्मभिर्निरूपितव्ये तव तस्य साक्षिणः ॥ मनोवचोभ्यामनुमेयवर्त्मनो देव क्रियायां प्रतियंत्यथापि हि ॥३६॥
शृण्वन्गृणन्संस्मरयंश्च चिंतयन्नामानि रूपाणि च मंगलानि ते ॥ क्रियासु यस्त्वच्चरणारविंदयोराविष्टचेता न भवाय कल्पते ॥३७॥

दिगुणः प्रकाशते । यो गुणसाक्षीत्येवं येन वा बुद्ध्यारूढेन प्रमात्रा बुद्ध्यधिष्ठात्रा बाह्यो गुणः प्रकाशते इत्यनुमीयते इत्यर्थः । शुद्धसत्त्ववपुषि त्वयि सेव्यमाने तु तदाकारेंऽतःकरणे त्वत्प्रसादेन साक्षात्कारो भवेदिति भावः ॥ ३५ ॥ एवं तावद्भक्तानामभ्युदयापवार्गार्थं रूपाणि बिभर्षीत्युक्तं तान्यपि भजनीयानि केवलं नतु ज्ञातुं शक्यंते अनंतत्वादतर्क्यत्वाच्च मनोवचसोरगोचरत्वादित्याहुः । न नामरूपे इति । गुणाश्च जन्मानि च कर्माणि च तैर्निरूपितव्ये निरूपणार्हे न भवतः । कुतः । अनुमेयं वर्त्म मार्गो यस्य तवेति । तत्रापि हेतुः । तस्य साक्षिण इति । नहि साक्षिणस्तत्त्वं मनोवचोगोचरमित्यर्थः । हे देव बहुधाद्योतमान अथापि क्रियायामुपासनादिलक्षणायां त्वां प्रतियंत्युपासकाः साक्षात्पश्यंति हि प्रसिद्धम् ॥ ३६ ॥ तस्माद्भक्त्यैव मोक्ष इत्युपसंहरंति । शृण्वन्निति । अन्यानपि संस्मारयन् । क्रियासु देवार्चनादिकर्मसु ॥ ३७ ॥

जो मनइंद्रियादिकोंचा साक्षी व ज्याचा मार्ग अनुमानानेंच कळण्याजोगा आहे त्या तुझीं, भक्तवात्सल्यादिक गुण, रामकृष्णादिक जन्में आणि रावणवधादि कर्में यांच्या सहवर्तमान स्वीकारलेलीं जीं नामें व रूपें, तीं जरी अभक्तांना मनानें चिंतन करण्यास व वचनानें कीर्तन करण्यास अशक्य आहेत तथापि तुझी उपासना करणारे लोक, उपासनेमध्यें तुला प्रत्यक्ष पाहतात हें प्रसिद्ध आहे ॥ ३६ ॥ तस्मात् जो मनुष्य तुझ्या पुण्यकारक नांवांचें रूपांचें व कर्मांचें, श्रवण करीत, वर्णन करीत, चिंतन करीत व दुसऱ्यांकडून स्मरण करवीत होत्साता लौकिक कर्मांमध्येंहि तुझ्या चरणकमलांचेठिकाणीं चित्त स्थापन करितो तो पुन्हा संसार प्राप्त होण्याविषयीं योग्य होत नाहीं ॥ ३७ ॥ ॥ ९ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां विशेषेंकरून श्रीकृष्णावताराचें अभिनंदन करितात– हे हरे, तुज ईश्वराच्या जन्ममात्रेंकरून तुझ्या चरणरूपी ह्या भूमीचा भार दूर झाल्यासारखाच आहे हें फार चांगलें झालें. आतां तुझ्या वज्रांकुशादि शुभलक्षणयुक्त कोमल चरणांनीं चिन्हित झालेल्या ह्या पृथ्वीला व तूं कृपा केलेल्या स्वर्गालाहि आह्मी अवलोकन करूं, हेंहि आमचें भाग्यच उदयास येणार आहे ॥ ३८ ॥ आतां तुझ्या जन्मानें भार दूर झाल्यासारखाच आहे असें ह्मटल्यानें मलासुद्धां जीवाप्रमाणें संसार आहे असें सांगतां कीं काय? नाहीं नाहीं असें ह्मणतात– हे नित्यमुक्ता, ईश्वरा, जन्मरहित अशा तुला जन्म घेण्याचें कारण क्रीडेवांचून दुसरें कांहींच तर्क करितां येत नाहीं. तुला जन्माचें कारण नाहीं हें तर राहूंद्या परंतु जीवात्म्याचेठिकाणींहि उत्पत्ति, मरण व स्थिति हे प्रकार हि, तुझ्याविषयीं, देह इंद्रियें अंतःकरण इत्यादिकांचेठिकाणीं जी तादात्म्य अध्यासरूप अविद्या

विशेषतः श्रीकृष्णावतारमभिनंदंति । दिष्ट्येति । दिष्ट्या भद्रम् । तव पदः पादभूतायाः । ईश्वरस्य तव जन्ममात्रेणापनीत एव । किंच त्वत्पदकैः कोमलैः पदैः सुशोभनैर्व-ज्रांकुशादिशुभलक्षणैः । गां पृथ्वीं द्यां स्वर्गं च तव त्वयाऽनुकंपिताम् ॥ ३८ ॥ तव जन्मना भारोऽपनीत इत्युक्त्या ममापि किं जीववत्संसार उक्तो नहि नहीत्याहुः । नेति । बत हे ईशासंसारिणस्ते जन्मनः कारणं क्रीडां विना न तर्कयामः । किंच । हे अभयाश्रय न भयमाश्रयत इति तथा तत्संबोधनम् । हे नित्यमुक्तेत्यर्थः । तव जन्मकारणं नास्तीति किं वक्तव्यं यतो जीवात्मन्यपि भवादयस्त्वयि विषये या अविद्या तया कृता न परमार्थतः संतीति ॥ ३९ ॥ प्रस्तुतं प्रार्थयंते । मत्स्याश्वेति । नोऽस्मांस्त्रिभुवनं

दिष्ट्या हरेऽस्या भवतः पदो भुवो भारोऽपनीतस्तव जन्मनेशितुः ॥ दिष्ट्यांऽकितां त्वत्पदकैः सुशोभनैर्द्रक्ष्याम गां द्यां च तवानु-कंपिताम् ॥ ३८ ॥ न तेऽभवस्येश भवस्य कारणं विना विनोदं बत तर्कयामहे ॥ भवो निरोधः स्थितिरप्यविद्यया कृता यतस्त्व-य्यभयाश्रयात्मनि ॥ ३९ ॥ मत्स्याश्वकच्छपनृसिंहवराहहंसराजन्यविप्रविबुधेषु कृतावतारः ॥ त्वं पासि नस्त्रिभुवनं च यथाऽधुनेश भारं भुवो हर यदूत्तम वंदनं ते ॥ ४० ॥ दिष्ट्यांऽब ते कुक्षिगतः परः पुमानंशेन साक्षाद्भगवान्भवाय नः ॥ माभूद्भयं भोजपतेर्मु-मूर्षोर्गोप्ता यदूनां भविता तवात्मजः ॥ ४१ ॥ श्रीशुक उवाच ॥ इत्यभिष्टूय पुरुषं यद्रूपमनिदं यथा ॥ ब्रह्मेशानौ पुरोधाय देवाः प्रतिययुर्दिवम् ॥ ४२ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे गर्भगतविष्णोर्ब्रह्मादिकृतस्तुतिर्नाम द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥

चान्यदा यथा पासि तथाऽधुनाऽपि पाहीति वंदनं ते इति च वदंतः सर्वे शिरोभिः प्रणमंति ॥ ४० ॥ देवकीं प्रत्याहुः । दिष्ट्येति । नोऽस्माकं भवायोद्भवाय साक्षात्परः पुमांस्ते कुक्षिगतोऽतो भयं माभूदिति ॥ ४१ ॥ यस्य रूपमनिदं सर्वप्रत्यगभूतम् । यथा यथावत् । अस्मान्वंचयित्वा एताविह स्थास्येते इति मन्यमाना ब्रह्मेशानौ पुरोधाय पुरतः कृत्वा ययुरिति ॥ ४२ ॥ ॥ इति श्रीमद्भागवते दशमपूर्वार्धे टीकायां द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥ ॥

तिच्या योगानें केलेले आहेत, वस्तुतः खरे नाहींत ॥ ३९ ॥ आतां प्रस्तुतची प्रार्थना करितात– हे ईश्वरा, तूं जसे मत्स्य, हयग्रीव, कूर्म, वराह, नृसिंह, हंस, श्रीराम व वामन इत्यादिक अवतार धारण करून आमचें व त्रैलोक्याचें रक्षण करितोस त्याप्रमाणेंच सांप्रतकालीं पृथ्वीचा भार दूर कर. हे यादवश्रेष्ठा, तुला वंदन करितों, असें ह्मणून सर्वंहि देवांनीं मस्तकांनीं नमस्कार केले ॥ ४० ॥ नंतर ते देव देवकीला ह्मणाले कीं– हे मातोश्री, जो साक्षात् षड्गुणैश्वर्यसंपन्न परमपुरुष ईश्वर, आह्मां देवांच्या उत्कर्षासाठीं पूर्वीं रामरूपी झाला होता तोच आतां तुझ्या कुक्षीमध्यें प्राप्त झाला आहे, ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. आतां मरणोन्मुख झालेल्या कंसापासून तुला भय नसो. तुझ्या पुत्र यादवांचें रक्षण करणारा होईल ॥ ४१ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, याप्रकारेंकरून ज्याचें स्वरूप 'हें अमुक' असें दाखवितां येत नाहीं त्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सर्वांतर्यामी पुरुषाची स्तुति करून ब्रह्मदेव व शंकर यांना पुढें करून देव, स्वर्गाप्रत निघून गेले ॥ ४२ ॥ ॥ सप्तमार्णें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील दशमस्कंधाच्या पूर्वार्धांत गर्भस्तुतिनिरूपणनामक हा दुसरा अध्याय समाप्त झाला ॥ २ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या तिसऱ्या अध्याया-मध्यें श्रीहरि, स्वतां प्रकट झाला असतां, त्याची देवकीवसुदेवांनीं स्तुति केली आणि त्यास कंसापासून भ्यालेल्या वसुदेवानें गोकुळामध्यें पोंचविलें अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, ब्रह्मादिदेवांनीं गमन केल्यानंतर ज्यावेळीं भक्तजनांची अविद्या निवृत्त करणारा व कालकर्मादि-कांच्या स्वाधीन असलेल्या जन्मानें रहित असा तो स्वतंत्र भगवान् प्रकट होणार त्यावेळीं सर्वगुणांनीं संपन्न असा परम कल्याणकारक काल प्राप्त झाला. त्यावेळीं शांत अशा नक्षत्रांनीं ताऱ्यांनीं व ग्रहांनीं युक्त असें ब्रह्मदेवाचें रोहिणी नक्षत्र होतें ॥ १ ॥ त्यावेळीं सर्व दिशा—प्रसन्न झाल्या, आकाश—निर्मळ अशा नक्षत्रादिकांच्या उदयानें युक्त झालें,

---

तृतीये निजरूपेण संभूतस्तु हरिः स्वयम् ॥ पितृभ्यां संस्तुतो नीतः पित्रा भीतेन गोकुलम् ॥ १ ॥ अथेति मंगलार्थम् । यर्हि सर्वगुणोपेतः कालो बभूव तदा देवक्यां विष्णु-राविरासीदित्यष्टमश्लोकगतेनान्वयः । परमशोभनत्वमेवाह यर्हीत्यादिना । अजनान्नारायणाज्जन्म यस्य प्रजापतेस्तस्य ऋक्षं रोहिणीनक्षत्रम् । कथंभूतम् । शांतानि ऋक्षाण्य

॥ श्रीशुक उवाच ॥ अथ सर्वगुणोपेतः कालः परमशोभनः ॥ यर्ह्येवाजनजन्मर्क्षं शांतर्क्षग्रहतारकम् ॥ १ ॥ दिशः प्रसेदुर्गगनं नि-
र्मलोडुगणोदयम् ॥ मही मंगलभूयिष्ठपुरग्रामव्रजाकरा ॥ २ ॥ नद्यः प्रसन्नसलिला ह्रदा जलरुहश्रियः ॥ द्विजालिकुलसन्नादस्तब-
का वनराजयः ॥ ३ ॥ ववौ वायुः सुखस्पर्शः पुण्यगंधवहः शुचिः ॥ अग्नयश्च द्विजातीनां शांतास्तत्र समिंधत ॥ ४ ॥ मनांस्या-
सन्प्रसन्नानि साधूनामसुरद्रुहाम् ॥ जायमानेऽजने तस्मिन्नेदुर्दुंदुभयो दिवि ॥ ५ ॥ जगुः किन्नरगंधर्वास्तुष्टुवुः सिद्धचारणाः ॥ वि-
द्याधर्यश्च ननृतुरप्सरोभिः समं तदा ॥ ६ ॥ मुमुचुर्मुनयो देवाः सुमनांसि मुदान्विताः ॥ मंदंमंदं जलधरा जगर्जुरनुसागरम् ॥ ७ ॥

श्विन्यादीनि ग्रहाश्च तारकाश्च यस्मिंस्तत् । यर्हीति सर्वत्रानुषज्जते ॥ १ ॥ निर्मलानामुडुगणानामुदयो यस्मिंस्तत्तथा । मंगलभूयिष्ठाः पुरादयो यस्यां सा ॥ २ ॥ जलरुहैः श्रीः शोभा येषां ते । द्विजालिकुलानां सन्नादो येषु ते स्तबका यासु ताः ॥ ३ ॥ समिंधत आडागमोऽत्र द्रष्टव्यः समैंधतेति । सम्यग्दीप्ता बभूवुरित्यर्थः ॥ ४ ॥ असुरद्रुहां कंसा-दिव्यतिरिक्तानां सर्वप्राणिनां देवानां चेति । स्वर्गे तु विशेषमाह । जायमान इति । अजने जायमाने ॥ ५ ॥ तदा आसन्नप्रसवो यस्मिंस्तस्मिन्समये ॥ ६ ॥ ७ ॥

पृथिवी—ज्यांमध्यें पुत्रजन्मादिक पुष्कळ उत्साह आहेत अशा नगरांनीं, गांवांनीं, गौळवाड्यांनीं व रत्नादिकांच्या खाणींनीं युक्त झाली ॥ २ ॥ नद्या— स्वच्छ उदकानें युक्त झाल्या, मोठमोठे डोह—कमळांच्या शोभेनें युक्त झाले, वनांच्या रांगा—ज्यांवर पक्ष्यांच्या व भ्रमरांच्या समुदायांचा मनोहर शब्द होत आहे अशा पुष्पांच्या घोंसांनीं युक्त झाल्या ॥ ३ ॥ त्यावेळीं वारा—स्पर्श झाला असतां आनंद देणारा, पवित्र, सुगंधयुक्त व शुद्ध असा वाहूं लागला आणि ब्राह्मणांदिकांचे, कुंडांमध्यें शांत असलेले अग्नि, आपोआप प्रदीप्त झाले ॥ ४ ॥ कंसादिक असुर ज्यांचा द्वेष करितात त्या सांधूंचीं मनें प्रसन्न झालीं, त्या जन्मरहित परमेश्वराचा जन्मसमय अगदीं जवळ आला असतां स्वर्गामध्यें दुंदुभि वाजूं लागल्या ॥ ५ ॥ त्यावेळीं किन्नर आणि गंधर्व, भगवंताचे गुणानुवाद गाऊं लागले, सिद्ध व चारण स्तुति करूं लागले, विद्याधरांच्या स्त्रिया अप्सरां-सहवर्तमान नृत्य करूं लागल्या ॥ ६ ॥ हर्षानें पूर्ण झालेले ऋषि आणि देव पुष्पवृष्टि करूं लागले, समुद्राची गर्जना चाललीच होती त्याच्या मागून मेघहि मंद मंद गर्जना

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करूं लागले ॥ ७ ॥ मध्यरात्रीची वेळ झाली ह्मणजे आदींच लोकांना भय उत्पन्न करणारी, त्यांत ती मेघाच्या निबिड अंधकारानें व्याप्त झाली होती, त्यावेळीं जसा पूर्व दिशेचे ठिकाणीं षोडशकलात्मक पूर्णचंद्र उदय पावतो त्याप्रमाणें देवतारूपी त्या देवकीचेठिकाणीं, सर्वांच्या बुद्धीमध्यें अंतर्यामित्वेंकरून वास करणारा तो व्यापक विष्णु ईश्वर, चतुर्भुजस्वरूपानें प्रकट झाला ॥ ८ ॥ त्या अद्भुत बालकाला वसुदेवानें अवलोकन केलें. तो असा होता कीं, त्याचे डोळे कमळासारखे सुंदर होते, त्याला चार हात असून त्यांमध्यें त्यानें शंख, गदा, चक्र आणि कमळ हीं आयुधें धारण केलीं होतीं. त्याच्या वक्षस्थळावर श्रीवत्सलांछन असून त्याच्या गळ्यानें कौस्तुभरत्न शोभत होतें. त्यानें पिवळीं वस्त्रें परिधान केलेलीं असून त्याचें स्वरूपसौंदर्य पाण्यानें भरलेल्या काळ्या मेघासारखें होतें ॥ ९ ॥ त्याचे कुरळ केंस, बहुमोलाच्या वैडूर्यरत्नांनीं जडित

तमसोद्भूते घनतमसि निशीथे । यथा यथावदैश्वरेणैव रूपेण ॥ ८ ॥ तमद्भुतं बालकं वसुदेव ऐक्षतेति द्वितीयश्लोकेनान्वयः । अद्भुतत्वे हेतुगर्भाणि विशेषणान्यंबुजेक्षणमित्यादीनि । श्रीवत्सलक्ष्मं श्रीवत्सलक्ष्माणम् । गलेन शोभत इति गलशोभी स कौस्तुभो यस्मिन् ॥ ९ ॥ परिष्वक्तसहस्रकुंतलं किरीटकुंडलादीनां त्विषा स्फुरदपरिमितकेशमित्यर्थः ॥ १० ॥ विस्मयेनोत्फुल्ले विकसिते लोचने यस्य सः गवामयुतमस्पृशन्मनसा दत्तवान् कंसनिगृहीतस्य दानासंभवात् । स्पष्टौ हेतुः । कृष्णावतारेति । मुदा आप्लुतो व्याप्त

निशीथे तमउद्भूते जायमाने जनार्दने ॥ देवक्यां देवरूपिण्यां विष्णुः सर्वगुहाशयः ॥ आविरासीद्यथा प्राच्यां दिशींदुरिव पुष्कलः
॥ ८ ॥ तमद्भुतं बालकमंबुजेक्षणं चतुर्भुजं शंखगदार्युदायुधम् ॥ श्रीवत्सलक्ष्मं गलशोभिकौस्तुभं पीतांबरं सांद्रपयोदसौभगम्
॥ ९ ॥ महार्हवैदूर्यकिरीटकुंडलत्विषा परिष्वक्तसहस्रकुंतलम् ॥ उद्दामकांच्यंगदकंकणादिभिर्विरोचमानं वसुदेव ऐक्षत ॥ १० ॥
स विस्मयोत्फुल्लविलोचनो हरिं सुतं विलोक्यानकदुंदुभिस्तदा ॥ कृष्णावतारोत्सवसंभ्रमोऽस्पृशन्मुदा द्विजेभ्योऽयुतमाप्लुतो गवाम्
॥ ११ ॥ अथैनमस्तौदवधार्य पूरुषं परं नतांगः कृतधीः कृतांजलिः ॥ स्वरोचिषा भारत सूतिकागृहं विरोचयंतं गतभीः प्रभाववित्
॥ १२ ॥ वसुदेव उवाच ॥ विदितोऽसि भवान्साक्षात्पुरुषः प्रकृतेः परः ॥ केवलानुभवानंदस्वरूपः सर्वबुद्धिदृक् ॥ १३ ॥

स्नात इति वा ॥ ११ ॥ कृतधीः शुद्धबुद्धिः ॥ १२ ॥ वसुदेवः प्रथमं पुत्रबुद्ध्या पश्यंस्तां परित्यज्याह । विदितोऽसीति । कथं विदितोऽस्मि । भवान्प्रकृतेः परः पुरुष इति । ननु किमाश्चर्यं पुरुषस्य प्रकृतेरन्यत्वादेवेत्यत आह । साक्षादिति । प्रत्यक्षत इत्यर्थः । नन्वक्षिसन्निकृष्टं प्रत्यक्षत उपलभ्यते किं चित्रमित्यत आह । केवलेति । केवलश्चासावनुभवश्चानंदश्च तावेव स्वरूपं यस्य सः । किंच सर्वबुद्धिदृक नह्येवंभूतो दृश्यो भवतीत्यर्थः ॥ १३ ॥

असलेल्या किरीटाच्या व कानांतील कुंडलांच्या कांतीनें स्फुरण पावत असून तो उत्तमप्रकारचा कमरपट्टा, बाहुभूषणें कडींतोडेवगैरे अलंकारांनीं प्रकाश पावत होता. अशा त्या बालकाला वसुदेवानें पाहिलें ॥ १० ॥ तेव्हां तो वसुदेव, साक्षात् श्रीहरि आपला पुत्र झाला असें पाहून विस्मयानें प्रफुल्लितनेत्र ~~व कृष्णावतारनिमित्तक कर्तव्य उत्साहाच्या लगबगीनें युक्त होऊन~~ हर्षभरित झाला आणि त्यानें ब्राह्मणांना दहाहजार गाई मनानें अर्पण केल्या. कारण, कारागृहामध्यें तत्काळ प्रत्यक्ष गाई देण्यास असमर्थ असल्यामुळें त्यानें त्या देण्याचा मनानें संकल्प केला ॥ ११ ॥ हेराजा, नंतर शुद्धबुद्धि व भगवंताचा प्रभाव जाणणारा असल्यामुळें निर्भय असा तो वसुदेव, आपल्या कांतीच्या योगानें सूतिकागृहाला प्रकाशित करणाऱ्या त्या बालकाला हा परमेश्वर आहे असें जाणून, सांष्टांग नमस्कार घालून हात जोडून स्तुति करूं लागला ॥ १२ ॥ वसुदेव ह्मणाला—हे ईश्वरा, मी तुला जाणिलें आहे. तूं सध्या जरी माझ्या पुत्राप्रमाणें दिसत आहेस तथापि तूं वास्तविकपणें प्रकृतीहून पर पुरुष असून केवलानुभवानंद

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

स्वरूपी, सर्व प्राण्यांच्या बुद्धींना पाहणारा अंतर्यामी ईश्वर आहेस. अशा तुला मी प्रत्यक्ष पाहिलें तेव्हां हें माझें भाग्य होय ॥ १३ ॥ आतां देवकीच्या उदरामध्यें प्रविष्ट झालेल्या माझी काय ही अतिस्तुति करितोस ? असें ह्मणशील तर— तो सच्चिदानंदस्वरूपी तूं, सृष्टीच्या आरंभीं आपल्या मायेनें हें त्रिगुणात्मक जग उत्पन्न करून नंतर त्यामध्यें प्रविष्ट नसूनहि प्रत्यक्षपणानें किंवा सद्रूपानें प्रविष्ट झाल्यासारखा दिसतोस ॥ १४ ॥ या विषयीं दृष्टांत सांगतो—जशीं हीं निरनिराळ्या स्वभावाचीं महत्तत्वादिक तत्वें

ननु देवकीजठरे प्रविष्टस्य किमियमतिस्तुतिः क्रियतेऽत आह । स एवेति । स एव उक्तस्वरूप एव त्वं न देवकीजठरे प्रविष्ट इत्यर्थः । ननु विश्वं सृष्ट्वा तदनु प्रविष्टस्य किमेतद्द्भुत आह । स्वप्रकृत्येति । स्वमायया सृष्ट्वा तदनु त्वमप्रविष्ट एवेति । ननु तर्हि कथं श्रुत्योच्यते तत्सृष्ट्वा तदेवानुप्राविशदित्यत आह । प्रविष्ट इवेति । भाव्यसे निरूप्यसे प्रत्यक्षतो वा सद्रूपेण वा प्रविष्ट इव लक्ष्यसे ॥ १४ ॥ अत्र दृष्टांतः । यथेति । इमेऽविकृता भावा महदादयो यथा तथेति । दृष्टांतं विवृणोति ते विकृतैरिति । ते विकृतैः षोडशविकारैः सह संनिपत्य विराजं ब्रह्मांडं जनयंति । संनिपतने हेतुः । यतः पृथग्भूताः संतो नानावीर्या विशिष्टकार्यसमर्था न भवंति ॥ १५ ॥ अतः संनिपत्येति । एवं समुत्पाद्यानुगताः प्रविष्टा इव दृश्यंते न पुनः प्रविष्टाः । कुतः । उत्पत्तेः प्रागेव कारणतया विद्यमानत्वान्न तेषामिह सृष्टे कार्ये पश्चात्संभवः प्रवेश इति ॥ १६ ॥ दार्ष्टांतिकेऽर्तिदिशति । एवं भवानिति । ननु यद्यहमप्रच्युतस्वरूप एव कारणतया कार्येषु वर्ते तर्हि तैरिंद्रियैर्गृह्यमाणेषु मम ग्रहणं किं नास्ति तत्राह । बुद्ध्यनुमेयलक्षणैरिति । बुद्ध्या

स एव स्वप्रकृत्येदं सृष्ट्वाऽग्रे त्रिगुणात्मकम् ॥ तदनु त्वं ह्यप्रविष्टः प्रविष्ट इव भाव्यसे ॥ १४ ॥ यथेमेऽविकृता भावास्तथा ते विकृतैः सह ॥ नानावीर्याः पृथग्भूता विराजं जनयंति हि ॥ १५ ॥ सन्निपत्य समुत्पाद्य दृश्यंतेऽनुगता इव ॥ प्रागेव विद्यमानत्वान्न तेषामिह संभवः ॥ १६ ॥ एवं भवान्बुद्ध्यनुमेयलक्षणैर्ग्राह्यैर्गुणैः सन्नपि तद्गुणाग्रहः ॥ अनावृतत्वाद्बहिरंतरं न ते सर्वस्य सर्वात्मन आत्मवस्तुनः ॥ १७ ॥

रूपादिज्ञानेनानुमेयं लक्षणं स्वरूपं येषां तैर्गुणैरिंद्रियैर्ग्राह्यैर्गुणैः सह सन्नपि वर्तमानोऽपि तद्गुणाग्रहस्तैर्गुणैः सह न गृह्यते । अयं भावः । नहि ग्राह्यैः सभावमात्रं ग्रहणे कारणं किंत्विंद्रियाणां शक्तिः सा च कार्यैकसमधिगम्या यथा कार्यमेव कल्प्यते अतो यथा चक्षुषा रूपग्रहणे रसादिग्रहणं नास्ति तथैव विषयग्रहणे त्वद्ग्रहणमपीति अविषयत्वेन च ग्रहणानर्हत्वमुक्तमेव सर्वबुद्धिदृगित्यत्र । एवं तावत्प्रागेव विद्यमानत्वात्प्रवेशो नास्तीत्युक्तम् । किंच परिच्छिन्नस्य नीडे पक्ष्यादेरिव प्रवेशो भवेत्तव त्वनावृतत्वादपरिच्छिन्नत्वेन बहिरंतर्भेदो नास्ति । कुतः प्रवेश इत्याह । अनावृतत्वादिति । अनावृतत्वे हेतूनाह । सर्वस्येति । न हि सर्वरूपस्यान्यदावरकमस्ति । सर्वात्मनः न ह्येकेनावृतोऽन्यस्यात्मा भवेत् । आत्मवस्तुन इति आत्मनो वस्तुनश्चेति हेतुद्वयम् । अत सातत्यगमन इत्यस्मादतति व्याप्नोतीत्यात्मा । नहि व्यापकस्यावरणं घटते । तथा वस्तुनः परमार्थवस्तुन आवरणं न घटत इत्यर्थः । तस्मात्त्वांतर्यामितया प्रवेशो न मुख्योऽस्ति कुतस्तरां गर्भे प्रवेशः । अतः केवलानुभवानंदस्वरूप एव त्वं विदितोऽसीत्याश्चर्यं मम भाग्यमित्यर्थः ॥ १७ ॥

एकमेकांस सुटून असलीं ह्मणजे तीं सुटून असेपर्यंत कोणतेंच विशिष्ट कार्य उत्पन्न करूं शकत नाहींत आणि तींच शब्दादि पंचविषय आणि अकरा इंद्रियें अशो सोळा विकारांसहवर्तमान एकठिकाणीं मिळालीं ह्मणजे ब्रह्मांड उत्पन्न करितात व उत्पन्न केल्यावर त्यांत प्रविष्ट झाल्यासारखीं दिसतात परंतु त्यांत तीं प्रविष्ट होत नाहींत; कारण, कार्य उत्पन्न होण्याच्या पूर्वींच तीं तेथें असल्यामुळें कार्य उत्पन्न झाल्यानंतर त्यांचा तेथें प्रवेश होत नाहीं ॥ १५ ॥ १६ ॥ याप्रमाणें ज्यांचें स्वरूप, रूपादि

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विषयांच्या ज्ञानानें अनुमान करण्यास योग्य आहे अशीं इंद्रियें व त्यांनीं ग्रहण करावयावे घटादिक विषय यांसहवर्तमान तूं राहत असूनहि त्या विषयांबरोबर तुझें ज्ञान होत नाहीं. कारण, पदार्थांच्या बरोबर जेवढे गुण असतील तेवढ्यांचें प्रत्येक इंद्रियाला ज्ञान होतेंच असा कांहीं नियम नाहीं; तर ज्या इंद्रियामध्यें जो विषय ग्रहण करण्याची शक्ति असेल तेवढ्याचेंमात्र त्याला ज्ञान होतें. जसें पिकलेला पेरूवगैरे पदार्थ दुरून पाहिला तर चक्षुइंद्रियानें त्याचें पिंवळें रूपमात्र दिसेल पण त्याच्या बरोबर असलेले मधुररस किंवा मृदुस्पर्शवगैरे गुण कांहींच समजणार नाहींत, त्याप्रमाणें हे प्रभो, तूं विषयांबरोबर राहत असूनहि विषयांच्या ज्ञानाबरोबर तुझें ज्ञान होत नाहीं. याप्रमाणें पूर्वींच असलेल्यापदार्थांचा नंतर प्रवेश होत नाहीं हें सांगितलें. आतां तुझ्या स्वरूपाचें जर कांहीं प्रमाण असतें तर, जसा पक्ष्यादिकांचा घरट्यामध्यें प्रवेश संभवतो तसा तुझा प्रवेश संभवला असता; परंतु, तूं आवरणरहित सर्वरूपी, सर्वात्मा व्यापक व परमार्थवस्तु असल्यामुळें तुला बाहेरचा व आंतला भाग मुळींच नाहीं मग प्रवेश कसा घडणार ? घडतच नाहीं. एतावता तूं अंतर्यामिरूपानें सृष्टीमध्यें प्रवेश केलास हेंदेखील जर म्हणतां येत नाहीं तर मग देवकीच्या गर्भांत प्रविष्ट झालास

नन्वेतद्धेतुचतुष्टयं प्रपंचस्यावस्तुत्वे घटेत तत्तु न संभवति सत्यत्वेन प्रतीतेरित्याशंक्याह । य इति । आत्मनो दृश्येषु गुणेषु देहादिषु स्वव्यतिरेकत आत्मव्यतिरेकेण पृथक्सत्त्वं देहादिरिति व्यवस्यते निश्चिनोति यः पुमान्सोऽबुधोऽविद्वान् व्यतिरेकदर्शनात् । किंच मनीषितं विचारितं तद्देहादि सर्वं यतो विनानुवादं वाचारंभणमात्रं विना न सम्यग्भवति । अतोऽवस्तुत्वेन त्यक्तं बाधितमेव वस्तुबुद्ध्या उपाददत्स्वीकुर्वन्नबुध इत्यर्थः ॥ १८ ॥ एवं परमेश्वरदृश्यस्य तद्व्यतिरेकेणासत्त्वमुक्तं परमेश्वरोपादानत्वादपि तद्व्यतिरेकेणासत्त्वमित्याह । त्वत्तोऽस्येति । न चैवं सत्यपि विकारित्वमित्याह । अनीहादिति । अगुणत्वादनीहत्वं ततो विकारित्वमित्यर्थः । नन्वनीहत्वे कथं कर्तृत्वं कर्तृत्वे वा कुतो विकारित्वं तत्राह । त्वयीश्वर इति । ब्रह्मत्वादविकारित्वमीश्वरत्वात्कर्तृत्वमिति । नन्वेतदपि विरुद्धमेव नेत्याह । त्वदाश्रयत्वादिति।

य आत्मनो दृश्यगुणेषु सन्निति व्यवस्यते स्वव्यतिरेकतोऽबुधः ॥ विनाऽनुवादं न च तन्मनीषितं सम्यग्यतस्त्यक्तमुपाददत्पुमान् ॥ १८ ॥ त्वत्तोऽस्य जन्मस्थितिसंयमान्विभो वदंत्यनीहादगुणादविक्रियात् ॥ त्वयीश्वरे ब्रह्मणि नो विरुद्ध्यते त्वदाश्रयत्वादुपचर्यते गुणैः ॥ १९ ॥

हें कसें म्हणतां येईल ? म्हणून तूं आनंदानुभवरूपी आहेस असें तुझें ज्ञान मला झालें हें माझें मोठें भाग्य होय ! ॥ १७ ॥ जो पुरुष आत्म्यापासून प्रकाश पावणाऱ्या देहादिकांचेठिकाणीं, आत्म्याहून निराळेच हे देहादिक खरे आहेत असा निश्चय करितो तो मूढ होय. ज्याअर्थीं विचार केला असतां ते त्यानें स्वीकार केलेले देहादिक सर्व पदार्थ, वाचेनें उच्चारावयाचे मात्र आहेत, त्यावांचून त्यांत दुसरें तथ्य असें कांहीं नाहीं, त्याअर्थीं विचारी पुरुषांनीं अवस्तुत्वें करून टाकलेल्या देहादिकांचा वस्तुबद्धीनें स्वीकार करणारा जो पुरुष तो मूर्खच होय ॥ १८ ॥ हे सर्वव्यापका, सत्व, रज व तम ह्या तीन गुणांनीं रहित, कोणताहि व्यापार न करणारा व विकाररहित अशा तुझ्यापासूनच या जगाचे उत्पत्तिस्थितिसंहार होतात असें लोक व वेद वर्णन करितात. आतां निर्व्यापार अशा ग्राझेठिकाणीं कर्तृत्व कसें संभवेल ? आणि कर्तृत्व असलें तर निर्विकारित्व कसें घडेल? असें म्हणशील तर–तूं ब्रह्मस्वरूपी (सर्वव्यापक) ईश्वर (सर्वशक्तिमान्) आहेस म्हणून तुझेठिकाणीं निर्विकारित्व व कर्तृत्व हीं दोन्ही विरुद्ध होत नाहींत, तुझे ठिकाणीं कर्तृत्व सांगण्याचा आशय इतकाच कीं, तूं गुणाचा आश्रय आहेस म्हणून, जसें सेवकानें केलेल्या कर्माचें कर्तृत्व राजाचेठिकाणीं मानितात त्याप्रमाणें गुणांनीं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

केलेल्या सृष्ट्यादिकांचें कर्तृत्व तुझेठिकाणीं मानितात तथापि वस्तुतः तूं अकर्ता व निर्विकारीव आहेस ॥ १९ ॥ तोच तूं, त्रैलोक्याच्या संरक्षणाकरितां आपल्या मायेच्या योगानें आपला शुभ्र वर्ण (सत्वगुणात्मक विष्णुमूर्ति) धारण करितोस. तसाच त्रैलोक्याची उत्पत्ति करण्याकरितां रजोगुणानें वृद्धिंगत झालेला तांबडा वर्ण (रजोगुणात्मक ब्रह्ममूर्ति) धारण करितोस आणि सर्वजनांच्या नाशाविषयीं कृष्ण वर्ण (तमोगुणकार्ययुक्त रुद्रमूर्ति) धारण करितोस ॥ २० ॥ हे व्यापका, हे सर्वशक्तिमंता परमेश्वरा, सांप्रतकाळीं यालोकाचें रक्षण करण्याची इच्छा करणारा तूं, माझ्या गृहाचेठिकाणीं कृष्णवर्णानें अवतीर्ण झाला, आहेस ह्मणून साधूंच्या रक्षणाकरितां तूं राजांचें नांवमात्र धारण करणारे जे दैत्यांचे कोट्यावधि सेनाधिपति त्यांनीं इकडेतिकडे फिरविलेल्या त्यांच्या सेनांचा संहार करिशील ॥ २१ ॥ हे देवाधिदेवा, ह्या दुष्ट

गुणैः कुर्वद्भिस्त्वयि सृष्ट्यादिकर्तृत्वमुपचर्यते गुणाश्रयत्वात् । यथा भृत्यकृत्यं राजनीति ॥ १९ ॥ एवं तस्यैव तव यथा विश्वस्थितिसर्गप्रलयार्थं त्रिवर्णा गुणावतारा एवमयं भूभारापनयनार्थमिति ज्ञातमित्याह । स त्वमिति श्लोकद्वयेन ॥ २० ॥ रिरक्षिषुः रक्षितुमिच्छुरवतीर्णोऽसि कृष्णेन वर्णेन अतः साधूनां रक्षणार्थं राजन्यसंज्ञा येऽसुरकोटियूथपास्तैर्निर्व्यूह्यमाना इतस्ततश्चाल्यमानाश्चमूः सेना निहनिष्यसे संहरिष्यसि ॥ २१ ॥ किंतु तथाप्यप्रमत्तेन त्वया भाव्यमित्याह । अयं त्विति । असभ्यः खलः समर्पितं कथितम् । अभिसरत्यागमिष्यति ॥ २२ ॥ उपाधावदस्तौत् ॥ २३ ॥ त्वयि भयशंकैव तावन्नास्तीति श्लोकचतुष्टयेनाह देवकी किंचिद्विज्ञापयितुम् । रूपमि-

स त्वं त्रिलोकस्थितये स्वमायया बिभर्षि शुक्लं खलु वर्णमात्मनः ॥ सर्गाय रक्तं रजसोपबृंहितं कृष्णं च वर्णं तमसा जनात्यये
॥ २० ॥ त्वमस्य लोकस्य विभो रिरक्षिषुर्गृहेऽवतीर्णोऽसि ममाखिलेश्वर ॥ राजन्यसंज्ञाऽसुरकोटियूथपैर्निर्व्यूह्यमाना निहनिष्यसे चमूः ॥ २१ ॥ अयं त्वसभ्यस्तव जन्म नौ गृहे श्रुत्वाऽग्रजांस्ते न्यवधीत्सुरेश्वर ॥ स तेऽवतारं पुरुषैः समर्पितं श्रुत्वाऽद्यैवाभिसरत्युदायुधः ॥ २२ ॥ श्रीशुक उवाच ॥ अथैनमात्मजं वीक्ष्य महापुरुषलक्षणम् ॥ देवकी तमुपाधावत्कंसाद्भीता शुचिस्मिता ॥ २३ ॥ देवक्युवाच ॥ रूपं यत्तत्प्राहुरव्यक्तमाद्यं ब्रह्म ज्योतिर्निर्गुणं निर्विकारम् ॥ सत्तामात्रं निर्विशेषं निरीहं स त्वं साक्षाद्विष्णुरध्यात्मदीपः ॥ २४ ॥

ति । यत्तत्किमपि रूपं वस्तु प्राहुर्वेदाः । किं तद्वस्तु तदाह । अव्यक्तम् । अत्र हेतुः । आद्यं कारणम् । किं परमाणवः न ब्रह्म बृहत् । किं प्रधानं न ज्योतिश्चेतनम् । किं वैशेषिकाणामिव ज्ञानगुणं न निर्गुणम् । किं मीमांसकानामिव ज्ञानपरिणामि न निर्विकारम् । किं पुष्कराक्षादीनामिव शक्तिविक्षेपपरिणामि न सत्तामात्रम् । तर्हि किं सामान्यं न निर्विशेषम् । तर्हि किं कारणत्वात्सक्रियं न निरीहं सन्निधिमात्रेण कारणं एवंभूतं किमपि कार्यकल्प्यं यद्वस्तु स एव साक्षात्त्वं विष्णुरिति । अपरोक्षश्चेत्याह । अध्यात्मदीप

कंसानें तर, तुझें जन्म आमच्या घरीं होणार असें ऐकून तुझे वडील सहा भाऊ मारून टाकिले, तो आतांच आपल्या दूतांनीं कळविलेला तुझा अवतार ऐकून हातांत शस्त्र धारण करून इकडे धांवत येईल यास्तव तूं सावध असावेंस ॥ २२ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, नंतर कंसापासून भ्यालेली देवकी, भगवंताच्या चतुर्भुजादि लक्षणांनीं युक्त अशा ह्या, आपल्या पुत्राला अवलोकन करून आनंदानें हर्षयुक्तमुख होत्साती त्याची स्तुति करूं लागली ॥ २३ ॥ देवकी ह्मणाली–हे ईश्वरा, वेदांनीं जें परमार्थस्वरूप वर्णन केलें आहे तें बुद्धिप्रभृति इंद्रियांचा प्रकाश करणारा साक्षात् विष्णु तूंच आहेस. तें तुझें स्वरूप असें कीं,–जें अव्यक्त (न समजणारें) सर्वांचें आदिकारण, ब्रह्मरूपी, प्रकाशरूपी, निर्गुण, निर्विकार, सत्तामात्र, कोणत्याहि विशेष धर्मानें रहित व कोणत्याहि क्रियाधर्मानें रहित आहे. ह्मणून तुला दुसऱ्यापासून भय होण्या- ॥ १२ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ची शंकाच नाहीं ॥ २४ ॥ आतां महाप्रलयाचेठिकाणींहि अवशेष राहणाऱ्या तुला भय कोठून असणार असें सांगत्ये– हे प्रभो, ब्रह्मदेवाचें दोन परार्धें आयुष्य संपल्या-वर, महाप्रळयाचेवेळीं चराचर सर्वलोक नाहींसे होऊन ते महाभूतांत मिळून गेले असतां, व तीं महाभूतेंहि त्यांच्या कारणभूत सूक्ष्मभूतांत मिळून गेलीं असतां, आणि तें व्यक्त असलेलें सूक्ष्मभूतरूपी कारणहि काळाच्या वेगानें मायेमध्यें मिळून गेलें असतां, ‘ हें जग, माझ्यामध्यें अशाप्रकारें लय पावलें आहे, पुन्हा अशाप्रकारें उत्पन्न करावयाचें असें’ जाणणारा एक तूंच अवशेष राहतोस ॥ २५ ॥ हे मायेच्या चालका देवा, ज्याच्या योगानें हें जग चाललें आहे, जो निमेषापासून संवत्सरापर्यंत अवांतर भेदांनीं युक्त

इति । बुद्ध्यादिकरणसंघातप्रकाशक इत्यर्थः । अथवा अव्यक्तं न केनापि प्रकारेण व्यज्यत इत्यव्यक्तम् । कथं उपरत्या तावन्न व्यज्यत इत्याह । आद्यं सर्वस्य कार्यस्याद्य-म् । अनादीत्यर्थः । तथा ब्रह्म ज्योतिर्निर्गुणं निर्विकारमिति चतुर्भिः पदैर्देशेन प्रकाशेन च गुणेन च विकारेण च व्यक्तिं निराकरोति । तथा सत्तामात्रमिति विशेषेण निर्वि-शेषमिति सामान्येन निरीहमिति क्रियया च व्यक्तिं निराकरोति । अन्यत्समानम् । एवंभूतस्य तव न भयशंकेति भावः ॥ २४ ॥ किंच महाप्रलयेऽप्यवशिष्यमाणस्य कुतो भयमित्याह । नष्टे लोके इति । चराचरे लोके महाभूतेषु लीने तेष्वप्यादिभूतं भूतसूक्ष्मं प्रविष्टेषु तस्मिन्नपि व्यक्तेऽव्यक्तं प्रधानं प्राप्ते । अशेषात्मके प्रधाने संज्ञा प्रज्ञा यस्य

नष्टे लोके द्विपरार्धावसाने महाभूतेष्वादिभूतं गतेषु ॥ व्यक्तेऽव्यक्तं कालवेगेन याते भवानेकः शिष्यतेऽशेषसंज्ञः ॥ २५ ॥ योऽयं कालस्तस्य तेऽव्यक्तबंधो चेष्टामाहुश्चेष्टते येन विश्वम् ॥ निमेषादिर्वत्सरांतो महीयांस्तं त्वेशानं क्षेमधाम प्रपद्ये ॥ २६ ॥ मर्त्यो मृ-त्युव्यालभीतः पलायन् लोकान्सर्वान्निर्भयं नाध्यगच्छत् ॥ त्वत्पादाब्जं प्राप्य यदृच्छयाऽद्य स्वस्थः शेते मृत्युरस्मादपैति ॥२७॥ स त्वं घोरादुग्रसेनात्मजान्नस्त्राहि त्रस्तान्भृत्यवित्रासहाऽसि ॥ रूपं चेदं पौरुषं ध्यानधिष्ण्यं मा प्रत्यक्षं मांसदृशां कृषीष्ठाः ॥२८॥

एवं मयि लीनमिदमस्ति पश्चादेवमुद्बोधनीयमिति सोऽशेषसंज्ञः । शेषसंज्ञ इति वा ॥ २५ ॥ किंच एवं प्रलयहेतुर्योऽयं काल एनम् । अव्यक्तबंधो प्रकृतिप्रवर्तक । तस्य प्रलयावधिभूतस्य ते तव चेष्टां लीलां चेष्टते विपरिवर्तते पुनः पुनर्वत्सरावृत्त्या । महीयान् द्विपरार्धरूपः । यस्य चेष्टामाहुस्तं त्वा त्वां क्षेमधामाभयस्थानं प्रपद्ये शरणं व्रजामि ॥ २६ ॥ क्षेमधामत्वमेवाह । मर्त्य इति । लोकान्प्रति यदृच्छया केनापि भाग्योदयेन । हे आद्य ॥ २७ ॥ प्रस्तुतं विज्ञापयति । स त्वमिति । भृत्यानां वित्रासं हंतीति भृत्य-वित्रासहा भृत्यविदिति वा छेदः । पौरुषमैश्वरं ध्यानधिष्ण्यं ध्यानास्पदं मांसदृशां मांसचक्षुषां प्रत्यक्षं मा कृथाः ॥ २८ ॥

असून प्रळयाला कारण आहे, तो हा मोठा काळ, प्रळयाचेठिकाणीं अवधिभूत असलेल्या तुझीच लीला आहे असें ह्मणतात, त्या अभयस्थानरूपी तुज परमात्म्याला मी शरण आल्यें आहें ॥ २६ ॥ आतां त्याचा निर्भयस्थानपणा सांगत्ये–हे सृष्टिकर्त्या ईश्वरा, मृत्युरूपी सर्पापासून भ्यालेला हा मरणधर्मयुक्त संसारी जन, सर्वलोकांमध्यें पलायन करीत असतां तेथेंतेथेंहि मृत्यु असल्यामुळें हा निर्भयस्थान पावला नाहीं परंतु कांहीं एक सुदैवानें तो तुझ्या चरणकमलाजवळ प्राप्त झाला असतां निर्भयपणें राहतो. कारण, या जनापासून मृत्यु माघारा फिरतो ॥ २७ ॥ याप्रमाणें देवकी स्तुति करून आतां प्रस्तुत गोष्टीची प्रार्थना करित्ये कीं,–हे देवा, तो तूं भक्तांचें संकट दूर करणारा आहेस ह्मणून घोरकर्म करणाऱ्या ह्या कंसापासून भ्यालेल्या आमचें रक्षण कर आणि मुमुक्षूंना ध्यान करण्यास योग्य असें हें आपलें ईश्वरी स्वरूप, मांसदृष्टी लोकांना

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रत्यक्ष दाखवूं नकोस ॥ २८ ॥ याचें कारण हे मधुसूदना, हा पापी कंस, माझेठिकाणीं तुझें जन्म झालें असें न जाणों. कारण, अधीरबुद्धि असलेली मी, 'ज्याअर्थी माझे बहुत पुत्र कंसानें मारले आहेत त्याअर्थी' तुझ्यानिमित्त ह्या कंसापासून फारच भीत आहें ॥ २९ ॥ हे विश्वमूर्ते, शंख, चक्र, गदा व पद्म यांच्या शोभेनें सेवन केलेलें हें अलौकिक चतुर्भुज स्वरूप गुप्त कर ॥ ३० ॥ आतां हें काय ह्मणून गुप्त करावें ? अशा प्रकारच्या मजपुत्राच्या योगानें तुझी मोठी प्रशंसा होईल असें ह्मणशील तर जो परमपुरुष तूं मळयाच्या वेळेस हें सर्व जग, आपल्या शरीराचेठिकाणीं असंकोचितपणें धारण करितोस तोच तूं, माझ्या उदरीं जन्मास आलास असें जें ह्मणणें तें मनुष्यलोकाचेठिकाणीं असंभावित असल्यामुळें अतिशय उपहासाला (थट्टेला) पात्र होईल, ह्मणून या स्वरूपावा तूं उपसंहार कर ॥ ३१ ॥ तेव्हां श्रीभगवान् ह्मणाला—हे पतिव्रते

भवत एव हेतोर्निमित्तात्कंसात्समुद्विजे बिभेमि यतोऽधीरचित्ता ॥ २९ ॥ ३० ॥ किमित्युपसंहर्तव्यमेवंभूतेन मया पुत्रेण तव महती श्लाघा स्यादिति तत्राह । विश्वमिति । निशांते प्रलयावसाने । यथावकाशमसंकोचतः असंभावितत्वादुपहास्यतैव स्यादित्यर्थः ॥ ३१ ॥ चतुर्भुजेन रूपेणाविर्भावे कारणं तावदाह । त्वमेवेत्यादिचतुर्दशभिः । पूर्वसर्गे

जन्म ते मय्यसौ पापो मा विद्यान्मधुसूदन ॥ समुद्विजे भवद्धेतोः कंसादहमधीरधीः ॥ २९ ॥ उपसंहर विश्वात्मन्नदो रूपमलौकिकम् ॥ शंखचक्रगदापद्मश्रिया जुष्टं चतुर्भुजम् ॥ ३० ॥ विश्वं यदेतत्स्वतनौ निशांते यथावकाशं पुरुषः परो भवान् ॥ बिभर्ति सोऽयं मम गर्भगोऽभूदहो नृलोकस्य विडंबनं हि तत् ॥ ३१ ॥ श्रीभगवानुवाच ॥ त्वमेव पूर्वसर्गेऽभूः पृश्निः स्वायंभुवे सति ॥ तदाऽयं सुतपा नाम प्रजापतिरकल्मषः ॥ ३२ ॥ युवां वै ब्रह्मणाऽऽदिष्टौ प्रजासर्गे यदा ततः ॥ सन्नियम्येंद्रियग्रामं तेपाथे परमं तपः ॥ ३३ ॥ वर्षवातातपहिमघर्मकालगुणाननु ॥ सहमानौ श्वासरोधविनिर्धूतमनोमलौ ॥ ३४ ॥ शीर्णपर्णानिलाहारावुपशांतेन चेतसा ॥ मत्तः कामानभीप्संतौ मदाराधनमीहतुः ॥ ३५ ॥ एवं वां तप्यतोस्तीव्रं तपः परमदुष्करम् ॥ दिव्यवर्षसहस्राणि द्वादशेयुर्मदात्मनोः ॥ ३६ ॥ तदा वां परितुष्टोऽहममुना वपुषाऽनघे ॥ तपसा श्रद्धया नित्यं भक्त्या च हृदि भावितः ॥ ३७ ॥

प्रथमजन्मनि अभूः आसीः । पृश्निर्नाम । स्वायंभुवे मन्वंतरे । तदा अयं वसुदेवः ॥ ३२ ॥ तेपाथे तपः कृतवंतौ ॥ ३३ ॥ ३४ ॥ ३५ ॥ तप्यतोराचरतोः । ईयुर्गताः नि । मदात्मनोर्मच्चित्तयोः ॥ ३६ ॥ अमुना वपुषा प्रादुर्भूतोऽस्मि ॥ ३७ ॥

देवकि, तूं येथून पूर्वींच्या तिसऱ्या जन्मामध्यें स्वायंभुव मन्वंतरांत पृश्नि या नांवाची स्त्री होतीस, त्यावेळीं हा वसुदेव, सुतपा नांवाचा प्रजापति होता व याचें आवरण निर्दोष असे ॥ ३२ ॥ नंतर ज्यावेळीं ब्रह्मदेवानें तुह्मांला सृष्टि करण्याविषयीं आज्ञा केली त्यावेळीं तुह्मी दोघांनीं, आपल्या इंद्रियसमुदायाचें दमन करून परम उग्र तपश्चर्या केलीत ॥ ३३ ॥ ती अशी कीं,—वृष्टि, वारा, उन्हाळा, थंडी, पंचाग्निसाधनानें प्राप्त झालेला घाम व निरनिराळ्या ऋतुकालांचे धर्म यांचें वारंवार सहन करणाऱ्या, प्राणायामाच्या योगानें आपल्या अंतःकरणांतील पातकें अगदीं नाहींशीं करून टाकणाऱ्या, गलितपर्णाचें व वायूचें भक्षण करणाऱ्या आणि माझ्यापासून मनोरथ पूर्ण करून घेण्याची इच्छा करणाऱ्या अशा तुह्मी दोघांनीं, एकाग्रचित्तानें माझें आराधन केलेंत ॥ ३४ ॥ ३५ ॥ याप्रमाणें माझेंठिकाणीं अंतःकरण ठेऊन अत्यंत दुर्घट तीव्र तपश्चार्या करणाऱ्या तुह्मां दोघांचीं, दिव्यमानानें बारा हजार वर्षें निघून गेलीं ॥ ३६ ॥ हे पवित्रे देवकि, तेव्हां तपाच्या योगानें श्रद्धेनें व निश्चल भक्तीनें, हृदयामध्यें चिंतन केलेला ॥ १३ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वरदश्रेष्ठ असा मी तुह्मांवर संतुष्ट होऊन तुह्मांला वर देण्याच्या इच्छेनें या चतुर्भुज स्वरूपानें तुमच्या अग्रभागीं प्रकट झालों. नंतर ' मी तुह्मांला वर मागा असें ह्मटलें असतां, '
तुह्मी माझ्यासारखाच पुत्र वर मागून घेतला ॥ ३७ ॥ ३८ ॥ ~~त्यावेळपर्यंत तुह्मीं दोघांनीं विषयभोग (मैथुनादिक) मुळींच अनुभविलेले नव्हते व~~ तुह्मांला अपत्य प्राप्त झालें नव्हतें
ह्मणून तुह्मीं देवाच्या मायेनें मोहित होऊन, मजपासून मोक्ष मागून घेतला नाहीं ॥ ३९ ॥ असो. तथास्तु असें ह्मणून वर देऊन मी गेलों असतां, पुढें तुह्मी माझ्या
सारखा पुत्ररूपी वर पावोन, त्याच्या योगानें प्राप्तमनोरथ झालां आणि विषयभोगांचा उपभोग करूं लागलां ॥ ४० ॥ पुढें या लोकांमध्यें, स्वभावानें औदार्यानें व इतर
गुणांनीं आपल्यासारख्या योग्यतेचा दुसरा कोणीच नाहीं असें पाहून मीच पृश्निगर्भ या नांवानें प्रसिद्ध असा तुमचा पुत्र झालों होतों ॥ ४१ ॥ पुढें तींच तुह्मीं दोघें अदिति-

---

वरदराट् वरदेषु श्रेष्ठ इत्यर्थः । तेन सकृद्वरेण च वारंवारमाविर्भावे कारणमुक्तम् । कामस्य दित्सया दातुमिच्छया । मादृशो मया सदृशः ॥ ३८ ॥ मे मत्तोऽपि युवामपवर्गं न
वव्राथे न वृतवंतौ ॥ ३९ ॥ वरं दत्त्वा मयि गते ॥ ४० ॥ ४१ ॥ अदित्यां कश्यपाद्वामन आसेति यत्तदपि तद्रूपयोर्युवयोरहमेव पुनरासमित्यर्थः ॥ ४२ ॥ ४३ ॥ प्राक्प्र-

प्रादुरासं वरदराड्युवयोः कामदित्सया ॥ व्रियतां वर इत्युक्ते मादृशो वां वृतः सुतः ॥ ३८ ॥ अजुष्टग्राम्यविषयावनपत्यौ च
दंपती ॥ न वव्राथेऽपवर्गं मे मोहितौ देवमायया ॥ ३९ ॥ गते मयि युवां लब्ध्वा वरं मत्सदृशं सुतम् ॥ ग्राम्यान्भोगानभुंजाथां
युवां प्राप्तमनोरथौ ॥ ४० ॥ अदृष्ट्वाऽन्यतमं लोके शीलौदार्यगुणैः समम् ॥ अहं सुतो वामभवं पृश्निगर्भ इति श्रुतः ॥ ४१ ॥
तयोर्वां पुनरेवाहमदित्यामास कश्यपात् ॥ उपेंद्र इति विख्यातो वामनत्वाच्च वामनः ॥ ४२ ॥ तृतीयेऽस्मिन्भवेऽहं वै तेनैव वपु-
षाऽथ वाम् ॥ जातो भूयस्तयोरेव सत्यं मे व्याहृतं सति ॥ ४३ ॥ एतद्वां दर्शितं रूपं प्राग्जन्मस्मरणाय मे ॥ नान्यथा मद्भवं
ज्ञानं मर्त्यलिंगेन जायते ॥ ४४ ॥ युवां मां पुत्रभावेन ब्रह्मभावेन चासकृत् ॥ चिंतयंतौ कृतस्नेहौ यास्येथे मद्गतिं पराम् ॥ ४५ ॥

जन्मेति स्मरणाय ज्ञानाय दर्शितम् । मद्भवं मद्विषयम् । अनंतरं त्वदिच्छया बालोऽपि भविष्यामीति भावः ॥ ४४ ॥ ननु त्वयि प्रसन्नेऽपि कथमावयोः
थमं तावदेतद्रूपं मे जन्मेति स्मरणाय ज्ञानाय दर्शितम् । मद्भवं मद्विषयम् । अनंतरं त्वदिच्छया बालोऽपि भविष्यामीति भावः ॥ ४४ ॥ ननु त्वयि प्रसन्नेऽपि कथमावयोः
पुनः पुनर्जन्मेत्यतःपरं न भविष्यतीत्याह । युवामिति ॥ ४५ ॥

कश्यपरूपानें झालां असतां, जो कश्यपापासून अदितीचेठिकाणीं झालेला उपेंद्र या नांवानें मख्यात व ऱ्हस्वांग असल्यामुळें वामन या नांवानें प्रसिद्ध पुत्र झाला, तोहि
पुन्हा मीच झालों होतों ॥ ४२ ॥ हे पतिव्रते देवकि, आतां त्या कश्यपअदितिरूपीच तुमच्या ह्या तिसऱ्या जन्मामध्यें पूर्वी दाखविलेल्या त्या चतुर्भुजादिविशिष्ट स्वरूपानेंच
मी पुन्हा उत्पन्न झालों आहें. एतावता, तुह्मांला माझ्यासारखा पुत्र होईल ह्मणून जें मी सांगितलें होतें तें खरें झालें ॥ ४३ ॥ प्रथम माझें अशाप्रकारचें जन्म झालें होतें
याच्या स्मरणाकरितां हें चतुर्भुजादिविशिष्ट रूप मी तुह्मांला दाखविलें आहे. त्यावांचून मनुष्यासारख्या शरीरानें, माझ्या स्वरूपाचें ज्ञान होत नाहीं. आतां पुढें तुझ्या
इच्छेनें मी बालकहि होईन ॥ ४४ ॥ ~~आतां, तूं प्रसन्न झालास असून आह्मांला वारंवार जन्म कसें प्राप्त झालें ? असें ह्मणशील तर आतां पुढें होणार नाहीं.~~ आतां तुह्मीं या
जन्मामध्यें पुत्रभावानें किंवा ब्रह्मभावानें वारंवार माझें चिंतन करा किंवा माझेठिकाणीं प्रीति करा ह्मणजे तुह्मीं शेवटीं उत्कृष्ट अशा माझ्या मोक्षरूप गतीला पावाल ॥ ४५ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां हे वसुदेवा, जर तूं कंसापासून भीत असशील तर तूं मला गोकुळामध्यें नेऊन पोंचव आणि तेथें यशोदेच्या पोटीं माझी माया उत्पन्न झाली आहे तिला येथें लवकर घेऊन ये ॥ ४६ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, याप्रमाणें भगवान्‌ हरी भाषण करून स्वस्थ राहिला आणि तीं मातापितरें पाहत, असतां तत्काळ आपल्या योगमायेच्या योगानें लौकिक मुलाप्रमाणें लहान बालक झाला ॥ ४७ ॥ नंतर, भगवंतानें आज्ञा केलेल्या त्या वसुदेवानें, पुत्राला ग्रहण करून जेव्हां सूतिकागृहांतून बाहेर जाण्याची इच्छा केली त्याचवेळीं जन्मरहित अशी योगमायाहि नंदस्त्री यशोदेपासून उत्पन्न झाली ॥ ४८ ॥ त्या योगमायेनें, द्वारपालांच्या ज्ञानाला साधनभूत अशा इंद्रियांच्या सर्व वृत्ति हरण केल्या असतां, ह्मणजे द्वारपाल जागे असूनहि त्यांना चित्रासारखे स्तब्ध करून सोडिले असतां व नगरवासी सर्व लोक निद्रिस्थ करून टाकिले असतां, जे दरवाजे पूर्वीं

॥ ४६ ॥ यदि कंसाद्बिभेषि तर्हि मां गोकुलं नय यशोदायाश्च तां कन्यां मन्मायामानयेति प्रथममेव भगवता प्रचोदितो वसुदेवो यदा गंतुमैच्छत्तदैवाजाऽपि या योगमाया सा नंदजायया निमित्तमात्रभूतया अजनि जाता ॥ ४७ ॥ ४८ ॥ हृताः प्रत्ययार्थाः सर्वा वृत्तयो येषां अथवा हृताः प्रत्यया अन्याश्च सर्वा वृत्तयो येषां जाग्रतामपि । तथा-

यदि कंसाद्बिभेषि त्वं तर्हि मां गोकुलं नय ॥ मन्मायामानयाशु त्वं यशोदागर्भसंभवाम् ॥ ४६ ॥ श्रीशुक उवाच ॥ इत्युक्त्वा ऽऽसीद्धरिस्तूष्णीं भगवानात्ममायया ॥ पित्रोः संपश्यतोः सद्यो बभूव प्राकृतः शिशुः ॥ ४७ ॥ ततश्च शौरिर्भगवत्प्रचोदितः सुतं समादाय स सूतिकागृहात् ॥ यदा बहिर्गंतुमियेष तर्ह्यजा या योगमायाऽजनि नंदजायया ॥ ४८ ॥ तया हृतप्रत्ययसर्ववृत्तिषु द्वास्थेषु पौरेष्वपि शायितेष्वथ ॥ द्वारस्तु सर्वाः पिहिता दुरत्यया बृहत्कपाटायसकीलशृंखलैः ॥ ४९ ॥ ताः कृष्णवाहे वसुदेव आगते स्वयं व्यवर्यंत यथा तमो रवेः ॥ ववर्ष पर्जन्य उपांशुगर्जितः शेषोऽन्वगाद्वारि निवारयन्फणैः ॥ ५० ॥ मघोनि वर्षत्यसकृ-द्यमानुजा गंभीरतोयौघजवोर्मिफेनिला ॥ भयानकावर्तशताकुला नदी मार्गं ददौ सिंधुरिव श्रियः पतेः ॥ ५१ ॥ नंदव्रजं शौरिरुपेत्य तत्र तान्गोपान्प्रसुप्तानुपलभ्य निद्रया ॥ सुतं यशोदाशयने निधाय तत्सुतामुपादाय पुनर्गृहानगात् ॥ ५२ ॥

भूतेषु द्वारपालेषु सत्सु बृहत्सु कपाटेषु लोहकीलकयुक्तशृंखलैर्बृहद्भिः कपाटादिभिर्दुरत्यया इति वा ॥ ४९ ॥ स्वयमेव व्यवर्यंत विवृत्ता इत्यर्थः । व्यव्रियंतेति वक्तव्ये गुणश्छांदसः । रवेर्निमित्तात् ॥ ५० ॥ गंभीरो यस्तोयौघस्तस्य जवेन ये ऊर्मयस्तैः फेनिला फेनव्याप्ता । भयानकैरावर्तशतैर्व्याप्ताऽपि । श्रियः पतेः सीतापतेः ॥ ५१ ॥ निद्रया अजया ॥ ५२ ॥

कंसानें मोठमोठ्या फळ्यांचेठिकाणीं लोखंडी सांखळदंड लाऊन खिळे ठोकून बंद करून टाकिलेले व उघडण्यास अशक्य केलेले होते ते सर्वहि दरवाजे, श्रीकृष्णाला घेऊन वसुदेव आला असतां, ~~असें सूर्याचें आगमन झालें असतां अंधकाराचें विदारण होतें त्याप्रमाणें~~ आपोआप सपाट उघडले. मंदमंद गर्जना करणारा मेघ (मार्गामध्यें लोकांचें फिरणें बंद होण्यासाठीं) वृष्टि करूं लागला आणि आपल्या पसरलेल्या सहस्र फणांनीं उदकाचें निवारण करीत शेष सर्प, वसुदेवाच्या मागून जाऊं लागला ॥ ४९ ॥ ॥ ५० ॥ त्यावेळीं इंद्र वारंवार वृष्टि करीत असल्यामुळें, यमुनानदी अगाध जळपूराच्या वेगानें उठलेल्या लाटांनीं फेंसाळून गेली होती व भयंकर शेंकडो भोंवऱ्यांनीं व्याप्त झाली होती. तिनें पूर्वीं जशी सीतापति रामचंद्राला समुद्रानें वाट दिली त्याप्रमाणें कृष्णाला वाहणाऱ्या वसुदेवाला वाट दिली ॥ ५१ ॥ पुढें तो वसुदेव, नंदाच्या गोकुळांत जाऊन, तेथें निद्रारूप योगमायेनें गाढ निजलेल्या नंदादिक गोपांना पाहून, त्या पुत्राला यशोदेच्या शय्येवर ठेऊन आणि तिच्या कन्येला घेऊन पुन्हा आपल्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

घरीं निघून गेला ॥ ५२ ॥ नंतर त्या वसुदेवानें, देवकीच्या शय्येवर त्या कन्येला ठेऊन आपल्या पायांमध्यें लोखंडाच्या बेड्या बांधून घेऊन पूर्वीप्रमाणें बंदिगृहामध्यें राहिला ॥ ५३ ॥ इकडे गोकुळामध्यें नंदाची पत्नी जी यशोदा तिनें तर, आपणाला कांहींतरी मूल झालें इतकेंमात्र जाणिलें परंतु कन्या झाली किंवा पुत्र झाला हें कांहीं जाणिलें नाहीं. कारण, ती प्रसूतिवेदनेनें अगदीं व्याकुळ झालेली असून त्यांत योगनिद्रेनें शुद्धिरहित (बेशुद्ध) झाली होती ॥ ५४ ॥ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील दशमस्कंधाच्या पूर्वार्धामध्यें कृष्णावतारनिरूपणनामक हा तिसरा अध्याय समाप्त झाला ॥ ३ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ आतां ह्या चवथ्या अध्यायामध्यें ' हे मूढा, मला मारून काय उपयोग! तुला मारणारा शत्रु कोठें ना कोठेंतरी उत्पन्न झालाच आहे ' असें त्या योगमायेचें भाषण श्रवण करून कंस अगदीं भयाभीत झाला आणि त्याणें दुष्ट प्रधानांबरोबर मसलत करून लहान, बालकांचा वध करणें हेंच श्रेयस्कर आहे असें मानिलें; अशी कथा वर्णन केलेली

प्रतिमुच्य बद्ध्वा पदोः पादयोः लोहं निगडं आस्ते स्म ॥ ५३ ॥ जातं किंचिदिति केवलमबुध्यत नतु तल्लिंगं पुत्रः कन्या वेति । योगनिद्रया च

देवक्याः शयने न्यस्य वसुदेवोऽथ दारिकाम् ॥ प्रतिमुच्य पदोर्लोहमास्ते पूर्ववदावृतः ॥ ५३ ॥ यशोदा नंदपत्नी च जातं परमबुद्ध्यत ॥ न तल्लिंगं परिश्रांता निद्रयाऽपगतस्मृतिः ॥ ५४ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे कृष्णजन्मनि तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ बहिरंतःपुरद्वारः सर्वाः पूर्ववदावृताः ॥ ततो बालध्वनिं श्रुत्वा गृहपालाः समुत्थिताः ॥ १ ॥ ते तु तूर्णमुपव्रज्य देवक्या गर्भजन्म तत् ॥ आचख्युर्भोजराजाय यदुद्विग्नः प्रतीक्षते ॥ २ ॥ स तल्पात्तूर्णमुत्थाय कालोऽयमिति विह्वलः ॥ सूतीगृहमगात्तूर्णं प्रस्खलन्मुक्तमूर्धजः ॥ ३ ॥ तमाह भ्रातरं देवी कृपणा करुणं सती ॥ स्नुषेयं तव कल्याण स्त्रियं मा हंतुमर्हसि ॥ ४ ॥ बहवो हिंसिता भ्रातः शिशवः पावकोपमाः ॥ त्वया दैवनिसृष्टेन पुत्रिकैका प्रदीयताम् ॥ ५ ॥ नन्वहं ते ह्यवरजा दीना हतसुता प्रभो ॥ दातुमर्हसि मंदाया अंगेमां चरमां प्रजाम् ॥ ६ ॥

मोहितेति ॥ ५४ ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधपूर्वार्धे टीकायां तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥ ॥ चतुर्थे चंडिकावाक्यमाकर्ण्यातिभयाकुलः ॥ दुर्मंत्रिभिर्हितं मेने कंसो बालादिहिंसनम् ॥ १ ॥ १ ॥ तदष्टमं जन्म ॥ २ ॥ कालो मृत्युः ॥ ३ ॥ ४ ॥ ५ ॥ अंग हे भ्रातः ॥ ६ ॥

आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, वसुदेव कारागृहांत येऊन राहिल्यावर नगराच्या बाहेरचे व आंतले सर्व दरवाजे पूर्वीप्रमाणें बंद होऊन राहिले. नंतर बालकाचा ध्वनि श्रवण करून कारागृहाचे रक्षक जागृत होऊन उठले ॥ १ ॥ व त्यांनीं मोठ्या त्वरेनें कंसाकडे जाऊन त्या कंसाला, ' तो ज्याची उद्विग्नपणें वाट पाहत होता तें ' देवकीच्या अष्टमगर्भाचें जन्म कळविलें ॥२॥ तें ऐकून, हा आपला काळ उत्पन्न झाला आहे असें मानून व्याकुळ झालेला तो कंस, शय्येवरून धावरून उठून ठेंचकळत केंस सुटलेला तशावातसाच त्वरेनें बाळंतिणीच्या घरांत प्रविष्ट झाला ॥ ३ ॥ तेव्हां त्या भ्रात्याला, देवमाता देवकी, दीनपणानें असें ह्मणाली कीं,— हे कल्याणरूपा कंसा, ही कन्या तुझी सून होण्यासारखी आहे. या स्त्रीचा वध करणें हें तुज शूराला योग्य नाहीं ॥ ४ ॥ हे दादा, दैवानें प्रेरणा केलेल्या तूं, आमचे अग्नीसारखे तेजस्वी पुष्कळ पुत्र मारिले आहेस. आतां ही एक मुलगीतरी तूं मला (विश्रांतीसाठीं) दे ॥ ५ ॥ हे समर्था कंसा, मी तुझी धाकटी बहीण नव्हे बरें? तूं पुत्र मारिल्यामुळें मी अगदीं दीन

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

झाल्यें आहें. यास्तव मज हतभगिणीला ही शेवटची एक मुलगीतरी देण्याची कृपा करण्याविषयीं तूं योग्य आहेस ॥ ६ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, याप्रमाणें त्या देवकीनें याचना केली असतांहि, त्या कंसानें तिची निर्भर्त्सना करून मुलीला पोटाशीं धरून, दीनापेक्षांहि दीनें असल्याप्रमाणें रोदन करणाऱ्या त्या देवकीच्या हातांतून त्या खळानें मुलीला हिसकावून घेतलें ॥ ७ ॥ नंतर ~~आपले भाग वांचणें या स्वार्थाकडे लक्ष ठेऊन ज्यानें स्नेहरूप अंकुर मनांतून उपटूनच टाकिला आहे अशा~~ त्या कंसानें, नुकतीच उत्पन्न झालेल्या त्या बहिणीच्या कन्येला पायांचेठिकाणीं धरून, ~~आंगणामध्यें स्नानाकरितां स्थापन केलेल्या शिळेवर आपटिलें~~ ॥ ८ ॥ त्यावेळीं ती विष्णूची धाकटी बहीण, शिळेवर न पडतां त्याच्या हातांतून निसटून उडी मारून वर आकाशांत गेली आणि तेथें तत्काळ देवी होऊन आयुधें धारण केलेल्या आठ मोठ्या बाहूनीं युक्त दिसूं लागली ॥ ९ ॥ ती अशी कीं,– दिव्यपुष्पांच्या माळा, सुंदर वस्त्रें व उत्म्या व रत्नजडित भूषणें यांनीं अलंकृत, धनुष्य, शूल, बाण, ढाल, खड्ग, शंख,

दीनदीनवत् दीनादपि दीनवन्नतु तथा। पुत्रस्यान्यत्र नीतत्वात्सा च योगमायेति ज्ञातत्वात्। याचितोऽप्याचिच्छिदे हस्तादाकृष्य जग्राह ॥ ७ ॥ अपोथयद्बलेन चिक्षेप ॥ ८ ॥

॥ श्रीशुक उवाच ॥ उपगुह्यात्मजामेवं रुदंत्या दीनदीनवत् ॥ याचितस्तां विनिर्भर्त्स्य हस्तादाचिच्छिदे खलः ॥ ७ ॥ तां गृहीत्वा चरणयोर्जातमात्रां स्वसुः सुताम् ॥ अपोथयच्छिलापृष्ठे स्वार्थोन्मूलितसौहृदः ॥ ८ ॥ सा तद्धस्तात्समुत्पत्य सद्यो देव्यंबरं गता ॥ अदृश्यतानुजा विष्णोः सायुधाष्टमहाभुजा ॥ ९ ॥ दिव्यस्रगंबरालेपरत्नाभरणभूषिता ॥ धनुःशूलेषुचर्मासिशंखचक्रगदाधरा ॥ १० ॥ सिद्धचारणगंधर्वैरप्सरःकिन्नरोरगैः ॥ उपाहृतोरुबलिभिः स्तूयमानेदमब्रवीत् ॥ ११ ॥ किं मया हतया मंद जातः खलु तवांतकृत् ॥ यत्रक्वचा पूर्वशत्रुर्मा हिंसीः कृपणान्वृथा ॥ १२ ॥ इति प्रभाष्य तं देवी माया भगवती भुवि ॥ बहुनामनिकेतेषु बहुनामा बभूव ह ॥ १३ ॥ तयाऽभिहितमाकर्ण्य कंसः परमविस्मितः ॥ देवकीं वसुदेवं च विमुच्य प्रश्रितोऽब्रवीत् ॥ १४ ॥ अहो भगिन्यहो भाम मया वां बत पाप्मना ॥ पुरुषाद इवापत्यं बहवो हिंसिताः सुताः ॥ १५ ॥

सद्य एव देवी भूत्वा ॥ ९ ॥ १० ॥ ११ ॥ कृपणानिति अन्यान् शिशून्हनिष्यतीति ज्ञात्वा वारयति। पाठांतरे मा मां कृपणां वृथाऽहिंसीर्हिंसितवानसीति ॥ १२ ॥ बहुनामनिकेतेषु वाराणस्यादिस्थानेषु ॥ १३ ॥ परमविस्मितः कथं दैवी वागनृता जातेति ॥ १४ ॥ भाम हे भगिनीभर्तः। पुरुषादो राक्षसो यथा स्वापत्यमेव हिनस्ति तद्वत् ॥ १५ ॥

चक्र व गदा यांना धारण करणारी, ॥ १० ॥ आणि मोठमोठ्या पूजा अर्पण करणाऱ्या–सिद्ध चारण, गंधर्व, अप्सरा, किंनर व नाग यांनीं स्तविलेली अशी ती देवी, कंसाला असें ह्मणाली कीं,– ॥ ११ ॥ हे मूर्खा कंसा, मला तूं मारून काय साध्य करणार आहेस? कांहींच नाहीं. तुझा नाश करणारा पूर्वजन्मींचा शत्रु, आतांहि तुला मारण्यासाठीं कोठेंतरी खास उत्पन्न झाला आहे. आतां दुसऱ्या गरीब मुलांना व्यर्थ मारूं नकोस ॥ १२ ॥ याप्रमाणें ती भगवती माया देवी, त्या कंसाला सांगून या भूमीवर वाराणस्यादिक अनेक नांवांच्या क्षेत्रांमध्यें अनेक नांवांनीं प्रसिद्ध होऊन राहिली ॥ १३ ॥ त्या मायादेवीनें सांगितलेलें ऐकून तो कंस, आकाशवाणी अन्यथा कशी झाली! या आश्चर्यानें युक्त झाला आणि देवकीवसुदेवांना बंधांत ठेवणें हें व्यर्थ आहे असें मानून, त्यांना बंधापासून मुक्त करून नम्रतापूर्वक ह्मणाला कीं,– हे बहिणी (ताई) हे भगिनीपते (भावोजी) पापी, अशा मी, जसा राक्षस आपल्या मुलाचाच वध करितो त्याप्रमाणें तुमचे पुष्कळ पुत्र मारून टाकिले, ही फार वाईट गोष्ट झाली ॥ १४ ॥ १५ ॥

१ देवकी वस्तुतः दीन नव्हती. कारण, आपला पुत्र दुसरेठिकाणीं नेऊन ठेविला आहे व ती मुलगी प्रत्यक्ष योगमाया आहे हें तिला ठाऊक होतें ह्मणून तिनें तसा आविर्भाव मात्र दाखविला होता

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तो तुमचे पुत्र मारणारा, निर्दय झालेला, आपल्या कार्यासाठीं बांधव आणि मित्र यांचा त्याग करणारा, खळ व जीवंत असून मेल्यासारखा मी, ब्रह्मघातक्याप्रमाणें कोणत्या बरें (नरकादि) लोकांमध्यें जाईन ? तें कळत नाहीं ॥ १६ ॥ अहो ! देवतादेखील खोटें बोलतात, केवळ मनुष्यच बोलतात असें नाहीं. ज्या आकाशवाणीवर विश्वास ठेऊन म्या दुष्टानें, बहिणीचे बालक व्यर्थ मारिले ॥ १७ ॥ हे वसुदेवा, हे देवकि, तुह्मी महाभाग्यशाली आहां. यास्तव आपलें प्रारब्धकर्म भोगणाऱ्या आपल्या पुत्रांचा तुह्मी शोक करूं नका, सर्वहि प्राणी, दैवाधीन असल्यामुळें सदोदित जीवंत राहत नाहींत त्यांतूनहि एकेठिकाणीं राहत नाहींत, तर वियोग पावतात ॥ १८ ॥ जसे आधारभूत असलेल्या भूमीचेठिकाणीं घटादिक पदार्थ उत्पन्न होतात व नाश पावतात, तसे आधारभूत आत्म्याचेठिकाणीं देह उत्पन्न होतात व नाशहि पावतात आणि ते घटादि पदार्थ भिन्नवगैरे होऊन विकार पावले असतांहि जशी भूमि विकार पावत नाहीं त्याप्रमाणें जन्ममरणादिकेंकरून देह विकार पावले असतांहि आत्मा विकार पावत नाहीं, तर

॥ १६ ॥ १७ ॥ हे महाभागौ स्वकृतंभुजः स्वारब्धकर्मभोक्तॄन् स्वात्मजान्मा शोचतम् । किंच जंतवः प्राणिनः सदा नासते किंत्वल्पकालमेव तदाऽप्येकत्र नासते किंतु वियुज्यंते यतो दैवाधीनाः ॥ १८ ॥ सदा नासत इत्यनेन यदुक्तं जन्ममरणादि तदपि देहानामेव नात्मन इत्याह । भुवीति । भूतानि देहा एव यांत्यपयांति च । भवंति न भवंति चेत्यर्थः । यथा भुवि भौमानि घटादीनि तद्वत् । एतेषु भूतेषु जन्मादिभिर्विक्रियमाणेष्वयमपरोक्षतया प्रत्यभिज्ञायमानो न विपर्येति विपर्ययं न प्राप्नोति । एकरूप एव वर्तत

स त्वहं त्यक्तकारुण्यस्त्यक्तज्ञातिसुहृत्खलः ॥ काँल्लोकान्वै गमिष्यामि ब्रह्महेव मृतः श्वसन् ॥ १६ ॥ दैवमप्यनृतं वक्ति न मर्त्या एव केवलम् ॥ यद्विश्रंभादहं पापः स्वसुर्निहतवान् शिशून् ॥ १७ ॥ मा शोचतं महाभागावात्मजान्स्वकृतंभुजः ॥ जंतवो न सदैकत्र दैवाधीनास्तदाऽऽसते ॥ १८ ॥ भुवि भौमानि भूतानि यथा यांत्यपयांति च ॥ नायमात्मा तथैतेषु विपर्येति यथैव भूः ॥ १९ ॥ यथाऽनेवंविदो भेदो यत आत्मविपर्ययः ॥ देहयोगवियोगौ च संसृतिर्न निवर्तते ॥ २० ॥ तस्माद्भद्रे स्वतनयान्मया व्यापादितानपि ॥ माऽनुशोच यतः सर्वः स्वकृतं विंदतेऽवशः ॥ २१ ॥

इत्यर्थः । भौमेषु विक्रियमाणेषु यथा भूस्तथेति । एवं विचार्यमाणे सति न शोकाद्यवकाशः ॥ १९ ॥ अज्ञानतस्तु न निवर्तत इत्याह । यथेति । यथा यथावदनेवंविद एवमजानत आत्मविपर्ययो देहात्मबुद्धिर्भवति यतो विपर्ययाद्भेदो भवति । देहाहंकारेण ह्यात्मनि परिच्छिन्ने सतीदंकारास्पदं भिन्नं भवति यतो भेदात्पुत्रादिदेहैर्योगो वियोगश्च ततः संसृतिः सुखदुःखे इति यावदज्ञानं न निवर्तत इत्यर्थः ॥ २० ॥ एवमुक्तप्रकारेण नैते तव तनया अहं तु तावन्न घातितवांस्तथाप्यज्ञानदृष्ट्या स्वतनयान्मया व्यापादितानपि माऽनुशोचेति सांत्वयति । तस्मादिति । अज्ञानाश्रयमेव कर्मवादमाह । यत इति ॥ २१ ॥

एकरूपच राहतो असा विचार केला असतां शोकादिकांना अवकाशच राहत नाहीं ॥ १९ ॥ आतां अज्ञानेंकरून तर केव्हांहि संसाराची निवृत्ति होत नाहीं असें सांगतो– आत्मा विकाररहित आहे असें यथार्थरीतीनें न जाणणाऱ्या प्राण्याला देहादिकांचेठिकाणीं आत्मबुद्धि होत्ये आणि असें झालें ह्मणजे मी वेगळा व तो वेगळा इत्यादिक भेदबुद्धि उत्पन्न होत्ये. नंतर पुत्रकलत्रादि शरीरांचेठिकाणीं संयोग आणि वियोग अनुभवास येऊं लागतात. ह्मणून जन्ममरणादिरूप संसार निवृत्त होत नाहीं ॥ २० ॥ अशा प्रकारानें हे तुझे पुत्र नव्हत व मी मारिले असेंहि होत नाहीं. आतां अज्ञानदृष्टीनें तुझ्या पुत्रांना मी मारिलें असें जरी तुझ्या मनांत आलें असेल तथापि, हे भद्रे (देवकि,) ज्याअर्थी सर्वहि प्राणिवर्ग, कर्मपरवश असून आपण केलेल्या कर्मांचें जन्ममरणादिरूप फळ भोगित असतो, त्याअर्थी माझ्या व त्या पुत्रांच्या कर्माप्रमाणें घडलें असें मनांत

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आपून तूं त्यांचा शोक करूं नकोस ॥ २१ ॥ तर मग ब्राह्मणादिकांना मारणारास व मरणारास प्रायश्चित्त कसें सांगितलें आहे? असें ह्मणशील तर तें अज्ञानमूलकच आहे. कारण, जोंपर्यंत हा देहाभिमानी पुरुष, 'मी मारला गेलों आहें' व 'मी मारणारा आहें' असें मानून देहाचेठिकाणीं असलेलें कर्तृत्व आत्म्याचेठिकाणीं मानितो तों-पर्यंतच त्या मारण्याचावगैरे अभिमान धारण करणारा तो अज्ञानी पुरुष, त्यापासून झालेलें पाप व दुःख पावतो, दुसरें कांहीं नाहीं ॥ २२ ॥ आतां देहाभिमानानें मी पाप करून तुह्मांस दुःख दिलें असें मानीत असाल तर हे दीनवत्सल साधुहो, तुह्मी माझ्या दुष्टपणाबद्दल माझी क्षमा करा. असें बोलून नंतर मुखावर दुःखाश्रु गळूं लागले-ल्या त्या कंसानें, देवकीवसुदेवांचे चरण घट्ट धरिले ॥ २३ ॥ याप्रमाणें हातांतून सुटून गेलेल्या कन्येच्या भाषणानें, वसुदेवदेवकी निर्दोष आहेत असा विश्वास वाटलेल्या त्या

कथं तर्हि ब्राह्मणादिहंतुस्तद्वध्यस्य च प्रायश्चित्तश्रवणमज्ञानमूलमेवेत्याह । यावदिति । अस्वदृक् देहाभिमानी । तावत्तदभिमानी तस्य देहस्य हननमात्मन्यभिमन्यमान इ-त्यर्थः ॥ २२ ॥ श्यालः कंसः । स्वस्रोरिति स्वसृशब्देन द्विवचनानुपपत्त्या मिथुनगणनद्वारा मिथुनीलक्षणया स्वसृतत्पत्योरभिधानम् । लिंगसमवायन्यायेन प्राणभृत उपदधातीतिवद्देवकीवसुदेवयोः प्रत्येकं पादमग्रहीदित्यर्थः । श्यालशब्देन वा कथंचिद्वसुदेवाभिधानम् ॥ २३ ॥ आत्मसौहृदं प्रियवादादि दर्शयन् ॥ २४ ॥ २५ ॥

यावद्धतोऽस्मि हंताऽस्मीत्यात्मानं मन्यते स्वदृक् ॥ तावत्तदभिमान्यज्ञो बाध्यबाधकतामियात् ॥ २२ ॥ क्षमध्वं मम दौरात्म्यं साधवो दीनवत्सलाः ॥ इत्युक्त्वाऽश्रुमुखः पादौ श्यालः स्वस्रोरथाग्रहीत् ॥ २३ ॥ मोचयामास निगडाद्विश्रब्धः कन्यकागिरा ॥ देवकीं वसुदेवं च दर्शयन्नात्मसौहृदम् ॥ २४ ॥ भ्रातुः समनुतप्तस्य क्षांतरोषा च देवकी ॥ व्यसृजद्वसुदेवश्च प्रहस्य तमुवाच ह ॥ २५ ॥ एवमेतन्महाभाग यथा वदसि देहिनाम् ॥ अज्ञानप्रभवाऽहंधीः स्वपरेति भिदा यतः ॥ २६ ॥ शोकहर्षभयद्वेषलोभ-मोहमदान्विताः ॥ मिथो घ्नंतं न पश्यंति भावैर्भावं पृथग्दृशः ॥ २७ ॥ श्रीशुक उवाच ॥ कंस एवं प्रसन्नाभ्यां विशुद्धं प्रतिभा-षितः ॥ देवकीवसुदेवाभ्यामनुज्ञातोऽविशद्गृहम् ॥ २८ ॥

॥ २६ ॥ स्वपरभेददर्शने किं भवति तदाह । शोकहर्षेति । भावैरेव निमित्तभूतैर्मिथो भावान् घ्नंतं भावमीश्वरं पृथग्दृशस्ते न पश्यंति किं त्वहमेव हंता हतश्चेति मन्यंत इत्यर्थः ॥ २७ ॥ विशुद्धं यथा भवति ॥ २८ ॥

कंसानें, आपलें प्रेम दर्शवीत त्या देवकीवसुदेवांना शृंखलबंधनांतून मुक्त केलें ॥ २४ ॥ देवकीनेंहि, त्या भावाला पश्चात्ताप झाला आहे असें जाणून, आपला क्रोध शांत केला आणि त्याला आपल्या घरीं जाण्यास अनुमोदन दिलें. वसुदेवानेंहि आपला क्रोध शांत केला आणि भगवन्मायेचें माहात्म्य मनांत आणून हास्य करून त्याला ह्मणाला कीं,— ॥ २५ ॥ हे महाभाग्यवाना कंसा, तूं जसें ह्मणतोस हें असेंच आहे. ह्मणजे सर्व प्राण्यांना आत्म्याच्या अज्ञानापासून अहंबुद्धि उत्पन्न होत्ये आणि तिच्यापासून हा आपला व हा परकी अशी भेददृष्टि उत्पन्न होत्ये ॥ २६ ॥ नंतर भेददृष्टि धारण करणारे ते पुरुष, शोक, हर्ष, भय, द्वेष, लोभ, मोह आणि मद यांनीं युक्त होत्साते ॥ १६ ॥
देवदैत्यादिस्वरूपांनीं परस्परांना मारणाऱ्या देवदैत्यादिरूपी परमेश्वराला पाहत नाहींत तर मीच मारणारा व हा मरण पावला असें मानितात ॥ २७ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, याप्रमाणें प्रसन्नचित्त झालेल्या देवकीवसुदेवांनीं निष्कपटपणें भाषण केलेला व घरीं जाण्याविषयीं अनुज्ञा दिलेला तो कंस, आपल्या घरांत प्रविष्ट झाला ॥ २८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नंतर ती रात्र निघून गेली असतां, दुसरे दिवशीं प्रातःकाळीं कंसानें, सभेमध्यें प्रधानमंडळास बोलावून आणून योगनिद्रेनें जें सांगितलें होतें तें सर्व त्याला सांगितलें ॥ २९ ॥ तें कंसाचें भाषण ऐकून दूरवर दृष्टि नसलेले देवांचे शत्रु ते दैत्य, देवांविषयीं क्रोधाचा आविर्भाव दाखवून त्या कंसाला असें ह्मणाले कीं,– ॥ ३० ॥ हे भोजेंद्रा, असें जर आहे तर आजच नगरें, गांव व गोकुळें इत्यादिकांचेठिकाणीं दहा दिवसांच्या आंतल्या व दहा दिवस होऊन गेलेल्या सर्व बालकांना आह्मी मारून टाकितों, आह्मांला आज्ञामात्र दे ह्मणजे झालें ॥ ३१ ॥ हे कंसा, तुझ्या धनुष्याच्या दोरीच्या टणात्कारशब्दानेंच निरंतर भयाभीत होणारे व युद्धाच्या कामांत भिणारे देव, उद्योग करून काय करणार आहेत? त्यांच्या हातून कांहींच होणार नाहीं ॥ ३२ ॥ पूर्वी झालेल्या युद्धांमध्यें तूं बाण सोडूं लागलास तेव्हां तुझ्या बाणांनीं चोहोंकडून ताडित झालेले व वांचण्याची इच्छा धारण करणारे ते देव, पलायन करणें हेंच वांचण्याचें साधन आहे असें मानून पळून गेले ॥ ३३ ॥ कितीएक देव, हातांतील शस्त्रें टाकून

॥ २९ ॥ नातिकोविदा दृष्टमात्रमतयो न दीर्घदर्शनाः ॥ ३० ॥ न निर्गतानि दश दिनानि येषां तानन्यांश्च ॥ ३१ ॥ ३२ ॥ अस्यतो विध्यतः सतः । उत्सृज्य रणं त्यक्त्वा ॥ ३३ ॥ ३४ ॥ अन्यासक्तान्विमुखांश्चेति न हंसि न हिनत्सि ॥ ३५ ॥ क्षेमे निर्भयदेशे शूरैः संयुगादन्यत्र विकत्थनं प्रौढिवादो येषां तैः । ननु हरेर्बिभेमि शंभोश्चेति चेत्त-

तस्यां रात्र्यां व्यतीतायां कंस आहूय मंत्रिणः ॥ तेभ्य आचष्ट तत्सर्वं यदुक्तं योगनिद्रया ॥ २९ ॥ आकर्ण्य भर्तुर्गदितं तमूचुर्देवशत्रवः ॥ देवान्प्रतिकृतामर्षा दैतेया नातिकोविदाः ॥ ३० ॥ एवं चेत्तर्हि भोजेंद्र पुरग्रामव्रजादिषु ॥ अनिर्दशान्निर्दशांश्च हनिष्यामोऽद्य वै शिशून् ॥ ३१ ॥ किमुद्यमैः करिष्यंति देवाः समरभीरवः ॥ नित्यमुद्विग्नमनसो ज्याघोषैर्धनुषस्तव ॥ ३२ ॥ अस्यतस्ते शरव्रातैर्हन्यमानाः समंततः ॥ जिजीविषव उत्सृज्य पलायनपरा ययुः ॥ ३३ ॥ केचित्प्रांजलयो दीना न्यस्तशस्त्रा दिवौकसः ॥ मुक्तकच्छशिखाः केचिद्भीताः स्म इति वादिनः ॥ ३४ ॥ न त्वं विस्मृतशस्त्रास्त्रान्विरथान्भयसंवृतान् ॥ हंस्यन्यासक्तविमुखान्भग्नचापानयुद्ध्यतः ॥ ३५ ॥ किं क्षेमशूरैर्विबुधैरसंयुगविकत्थनैः ॥ रहोजुषा किं हरिणा शंभुना वा वनौकसा ॥ ३६ ॥ किमिंद्रेणाल्पवीर्येण ब्रह्मणा वा तपस्यता ॥ तथापि देवाः सापत्न्यान्नोपेक्ष्या इति मन्महे ॥ ततस्तन्मूलखनने नियुंक्ष्वास्माननुव्रतान् ॥ ३७ ॥

त्राहुः । रहोजुषेति । सर्वस्याप्यंतःप्रविष्टेन क्वचिदपि बहिरदृष्टेनेत्यर्थः । पुरुषप्रवृत्तिरहितमिलावृतवनमोको यस्य तेन शंभुना वा ॥ ३६ ॥ यद्यप्युद्यमैर्देवा न किंचिदपि कर्तुं समर्थास्तथापि नीतिरनुसर्तव्येत्याहुः । तथापीति ॥ ३७ ॥

देऊन दीनपणें तुझ्यापुढें हात जोडून उभे राहिले; कितीएकांचे पळतां पळतां कांसोटे सुटले व शेंड्या सुटल्या व ते 'आह्मी भयाभीत झालों आहों' असें ह्मणूं लागले ॥ ३४ ॥ तुझीतर अशी चाल आहे कीं,– शस्त्रास्त्रें विसरलेल्या, विरथी असलेल्या, भयानें व्याप्त झालेल्या, दुसऱ्याबराबर युद्ध करीत असलेल्या, विमुख झालेल्या, धनुष्य मोडलेल्या व युद्ध न करणाऱ्या शत्रूंना तूं प्रहार करीत नाहींस ॥ ३५ ॥ तेव्हां निर्भय स्थानाचेठिकाणीं शूर असणाऱ्या व युद्धावांचून दुसरेठिकाणीं आपली केवळ प्रौढि मिरविणाऱ्या अशा देवांनीं आतां उद्योग करून काय करावयाचें आहे ? कांहींच नाहीं. आतां हरीपासून व शंकरापासून मी भितों असें ह्मणशील तर– सर्व प्राण्यांच्या अंतर्यामीं प्रविष्ट होऊन बाहेर कोठेंच न दिसणाऱ्या हरीनें, किंवा जेथें पुरुष मुळींच जात नाहींत अशा इलावृतनामक अरण्यामध्यें राहणाऱ्या शंकरानें काय करावयाचें आहे ? तसेंच अल्पपराक्रमी इंद्रानें अथवा तपश्चर्या करणाऱ्या ब्रह्मदेवानेंतरी काय करावयाचें आहे ? कांहींच नाहीं ॥ ३६ ॥ तथापि देवांचें व आमचें शत्रुत्व असल्यामुळें आह्मी त्यांची उपेक्षा करितां कामा नये, तर नीतीलाच अनुसरलें पाहिजे, असें आह्मी मानितों. ह्मणून तुला अनुसरणाऱ्या आह्मांस त्यांचें मूळ उपटून टाकण्याविषयीं आज्ञा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कर ह्मणजे झालें ॥ ३७ ॥ जशी शरीरामध्यें उत्पन्न झालेल्या ज्वरादिक रोगाची स्नानपानादिकुपथ्य करणाऱ्या मनुष्यांनीं उपेक्षा केली असतां, एकदा तो रोग आंगांत भिनून गेला ह्मणजे मग औषधादिप्रयोगानें निवृत्त करण्यास शक्य होत नाहीं, किंवा जशीं इंद्रियें पहिल्यापासून आवरून न धरितां त्यांना हवेंतसें वागूं दिलें ह्मणजे मग तीं अनावर होतात त्याप्रमाणें शत्रूहि सैन्य जमवून मोठा प्रबळ झाला ह्मणजे मग त्याला जिंकून घालवून देतां येत नाहीं ॥ ३८ ॥ सर्व देवतांचा मूळ आधार विष्णु आहे तो तरी जेथें अनादिधर्म चालत असेल तेथें असतो. त्या धर्माचें तरी मूळ, वेद, गाई ब्राह्मण तप व दक्षिणांनीं युक्त यज्ञ, हेंच आहे ॥ ३९ ॥ यास्तव हे राजा, आह्मी सर्व प्रयत्नांनीं, वेदवेत्ते तपस्वी व यज्ञशील असे ब्राह्मण व दूध, दहीं, तूपवगैरे उत्पन्न करणाऱ्या गाई यांना मारून टाकितों ॥ ४० ॥ ब्राह्मण, गाई, वेद, तप, सत्य, इंद्रियनिग्रह, शांति, श्रद्धा, दया सहनशीलता आणि यज्ञ ह्या विष्णूच्या मूर्ति आहेत ॥ ४१ ॥ आणि तोच सर्व देवांचा अधिपति सर्वांचा अंतर्यामी आणि असुरांचा घात करणारा आहे. शंकर व

रूढपदो बद्धमूलः ॥ ३८ ॥ देवानां मूलं विष्णुः स च यत्र धर्मस्तत्रास्ते । धर्मस्य मूलं वेदादय इति ॥ ३९ ॥ ४० ॥ ४१ ॥ किंच विप्रादयो हरेरेव तनवो यस्मात्तस्मादयमे-

यथाऽऽमयोंऽगे समुपेक्षितो नृभिर्न शक्यते रूढपदश्चिकित्सितुम् ॥ यथेंद्रियग्राम उपेक्षितस्तथा रिपुर्महान्बद्धबलो न चाल्यते ॥ ३८ ॥ मूलं हि विष्णुर्देवानां यत्र धर्मः सनातनः ॥ तस्य च ब्रह्मगोविप्रास्तपोयज्ञाः सदक्षिणाः ॥ ३९ ॥ तस्मात्सर्वात्मना राजन्ब्राह्मणान्ब्रह्मवादिनः ॥ तपस्विनो यज्ञशीलान्गाश्च हन्मो हविर्दुघाः ॥ ४० ॥ विप्रा गावश्च वेदाश्च तपः सत्यं दमः शमः ॥ श्रद्धा दया तितिक्षा च क्रतवश्च हरेस्तनूः ॥ ४१ ॥ स हि सर्वसुराध्यक्षो ह्यसुरद्विड् गुहाशयः ॥ तन्मूला देवताः सर्वाः सेश्वराः सचतुर्मुखाः ॥ अयं वै तद्वधोपायो यदृषीणां विहिंसनम् ॥ ४२ ॥ श्रीशुक उवाच ॥ एवं दुर्मंत्रिभिः कंसः सह संमंत्र्य दुर्मतिः ॥ ब्रह्महिंसां हितं मेने कालपाशावृतोऽसुरः ॥ ४३ ॥ संदिश्य साधुलोकस्य कदने कदनप्रियान् ॥ कामरूपधरान्दिक्षु दानवान्गृहमाविशत् ॥ ४४ ॥ ते वै रजःप्रकृतयस्तमसा मूढचेतसः ॥ सतां विद्वेषमाचेरुरारादागतमृत्यवः ॥ ४५ ॥ आयुः श्रियं यशो धर्मं लोकानाशिष एव च ॥ हंति श्रेयांसि सर्वाणि पुंसो महदतिक्रमः ॥ ४६ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥ ॥

वोपाय इत्याहुः । अयमिति ॥ ४२ ॥ ४३ ॥ ४४ ॥ आरात्समीपमागतो मृत्युर्येषां ते ॥ ४५ ॥ सतां विद्वेषो न मृत्युमात्रहेतुः किंतु बह्वनर्थकारीत्याह । आयुःश्रियमिति ॥ ४६ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे टीकायां चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥ ॥

ब्रह्मदेव यांसह सर्व देवांना त्याचाच आधार आहे, तेव्हां त्याच्या वधाचा उपाय ह्मटला ह्मणजे ऋषींचा वध करणें हाच होय ॥ ४२ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला— हे राजा, याप्रमाणें मृत्यूच्या पाशांनीं वेष्टित झालेल्या दुष्टबुद्धि त्या असुर कंसानें, दुष्ट प्रधानमंडळाबरोबर विचार करून ' ब्राह्मणांची हिंसा करणें ' हेंच चांगलें हितकारक आहे असें मानिलें ॥ ४३ ॥ नंतर दुसऱ्यांना दुःख देणें हेंच ज्यांना प्रिय आहे अशा यथेच्छरूप धारण करणाऱ्या त्या राक्षसांना, साधुजनांना दुःख देण्याविषयीं दशदिशांकडे जाण्याची आज्ञा करून, त्या कंसानें आपल्या गृहामध्यें प्रवेश केला ॥ ४४ ॥ आधींच ज्यांचे स्वभाव रजोगुणमय आहेत आणि त्यांत तमोगुणानें (क्रोधाच्या आवेशानें) ज्यांच्या बुद्धीला भ्रंश झाला आहे व ज्यांचा मृत्यु जवळ आला आहे असे ते राक्षस, कंसाच्या आज्ञेनें साधुजनांचा द्वेष करूं लागले ॥ ४५ ॥ हे राजा, साधूंचा छळ केला असतां केवळ मृत्यूच प्राप्त होतो असें नाहीं, तर त्यापासून— पुरुषाचें आयुष्य, संपत्ति, यश, धर्म, उत्तमलोकप्राप्ति, लोकांनीं दिलेले ' पुत्रवान् हो, आयुष्यवान् हो इत्यादिक'

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आशीर्वाद व सर्व कल्याणें यांचा नाश होतो ॥ ४६ ॥ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील पूर्वार्धामध्यें कंसोद्योगनिरूपणनामक हा चवथा अध्याय समाप्त झाला ॥ ४ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या पांचव्या अध्यायामध्यें, मोठ्या उत्साहानें आपल्या पुत्राचा जातकर्म नामक संस्कार करून नंद, करभार देण्याकरितां मथुरेमध्यें गेला असतां, वसुदेवाच्या भेटीनें त्याला मोठा आनंद झाला, अशी कथा वर्णन केली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, इकडे गोकुळामध्यें उदारचित्त अशा नंदानें, पुत्र उत्पन्न झाला असतां आनंदयुक्त होऊन ज्योतिषी ब्राह्मणांना बोलावून स्वतः स्नान करून शुचिर्भूत होऊन अलंकार धारण केले आणि त्या ब्राह्मणांकडून पुण्याहवाचन करवून आपल्या पुत्राचा जातकर्मनामक संस्कार यथाशास्त्र करविला. तसेंच पितरांचें व देवांचें नांदीश्राद्धादिकेंकरून पूजन करविलें ॥ १ ॥ २ ॥

पंचमे जातकं नंदः सूनोः कृत्वा महोत्सवम् ॥ गत्वाऽथ मथुरां प्राप वसुदेवागमोत्सवम् ॥ १ ॥ महामना उदारचित्तः ॥ १ ॥ २ ॥ नियुते द्वे लक्षे । सप्त तिलपर्वतांश्च प्रादात् । कथंभूतान् । रत्नौघै रत्नसमूहैः शातकौंभांबरैः सुवर्णरसाक्तैरंबरैश्चावृतान् ॥ ३ ॥ द्रव्याणां गोहिरण्यादीनां मध्ये केषांचिद्दानैरेव शुद्धिर्यथा तथाऽन्नदानादियुक्तजातकर्मादिसंस्कारैरेव गर्भाणां शुद्धिरिति दर्शयितुं प्रतिनियतानि शोधकानि दृष्टांतत्वेनोदाहरति । कालेनेति । कालेन भूम्यादि । स्नानेन देहादि । शौचेनामेध्यलिप्तादि । संस्कारै-

श्रीशुक उवाच ॥ नंदस्त्वात्मज उत्पन्ने जाताह्लादो महामनाः ॥ आहूय विप्रान्दैवज्ञान्स्नातः शुचिरलंकृतः ॥ १ ॥ वाचयित्वा स्वस्त्ययनं जातकर्मात्मजस्य वै ॥ कारयामास विधिवत्पितृदेवार्चनं तथा ॥ २ ॥ धेनूनां नियुते प्रादाद्विप्रेभ्यः समलंकृते ॥ तिलाद्रीन्सप्त रत्नौघशातकौंभांबरावृतान् ॥ ३ ॥ कालेन स्नानशौचाभ्यां संस्कारैस्तपसेज्यया ॥ शुद्ध्यंति दानैः संतुष्ट्या द्रव्याण्यात्मात्मविद्यया ॥ ४ ॥ सौमंगल्यगिरो विप्राः सूतमागधबंदिनः ॥ गायकाश्च जगुर्नेदुर्भेर्यो दुंदुभयो मुहुः ॥ ५ ॥ व्रजः संमृष्टसंसिक्तद्वाराजिरगृहांतरः ॥ चित्रध्वजपताकास्रक्चैलपल्लवतोरणैः ॥ ६ ॥

र्गर्भादि । तपसा इंद्रियादि । इज्यया ब्राह्मणादि । दानैर्द्रव्याणि । संतुष्ट्या मनः । आत्मा आत्मविद्यया इति ॥ ४ ॥ सौमंगल्यगिरः स्वस्तिवाचका विप्रादयो बभूवुः । तत्र सूताः पौराणिकाः प्रोक्ता मागधा वंशशंसकाः ॥ बंदिनस्त्वमलप्रज्ञाः प्रस्तावसदृशोक्तयः ॥ ५ ॥ संमृष्टानि संसिक्तानि च द्वाराण्यजिराण्यंगणानि गृहांतराणि गृहमध्यानि च यस्मिन्स तथा । चित्रध्वजेषु पताकानां स्रजश्च चैलपल्लवतोरणानि च तैर्भूषितः ॥ ६ ॥

नंतर त्यानें अलंकारांनीं भूषित केलेल्या दोन लक्ष गाई ब्राह्मणांस दिल्या. तसेंच रत्नसमूहांनीं व सोन्याचा मुलामा दिलेल्या उंची वस्त्रांनीं आच्छादन केलेले सात तिळांचे पर्वत दिले ॥ ३ ॥ आतां गाई, सुवर्ण इत्यादिक द्रव्यांमध्यें जशी कितीएकांची दानेंकरूनच शुद्धि होत्ये तशीच अन्नदानादियुक्त जातकर्मादि संस्कारांनींच गर्भाची शुद्धि होत्ये असें दर्शविण्यांकरितां दृष्टांतरूपानें निरंतर शोधक असलेल्या वस्तूंचें प्रदर्शन करितो– काळानें अपवित्र झालेल्या भूमीवगैरे पदार्थांची शुद्धि होत्ये, स्नानानें देहाची, क्षाळनानें अपवित्र पदार्थ लागलेल्या वस्त्रपात्रादिकांची, संस्कारांनीं गर्भादिकांची, तपानें इंद्रियादिकांची, यज्ञांनीं ब्राह्मणादिकांची, दानांनीं धान्यादिद्रव्यांची, संतोषानें मनाची व ब्रह्मविद्येनें जीवात्म्याची शुद्धि होत्ये ॥ ४ ॥ असो. त्यावेळीं ब्राह्मण कल्याणकारक आशीर्वाद देऊं लागले; सूत, मागध व बंदी हे, स्तुतिपाठादि करूं लागले; गवयांनीं गायन केलें; चौघडे, नगारेवगैरे वाद्यें वाजूं लागलीं ॥ ५ ॥ त्यावेळीं केर काढून स्वच्छ केलेंलें तें गोकुळ, चंदनादिकांचे सडे घातलेल्या द्वारांनीं, आंगण्यांनीं,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

व आजवरांनीं युक्त होतें आणि उभारलेल्या चित्रविचित्र ध्वजांनीं, जयपताकांनीं, माळा, वस्त्रांच्या झालरी व पल्लवांचीं तोरणें यांनीं भूषित झालें होतें ॥ ६ ॥ हळद व तेल आंगाला लावून माखलेल्या गाई, वृषभ आणि लहान लहान खोंड हे, कावगैरे चित्रविचित्र धातु, मोरांचीं पंखें, पुष्पांचे हार, वस्त्रांच्या झुली, व सुवर्णपुष्पांच्या माळा यांनीं भूषित झाले ॥ ७ ॥ त्यावेळीं गोप, महामोल वस्त्रें, भूषणें, अंगरखे आणि पागोटीं घालून, हातामध्यें नानाप्रकारचे वस्त्रभूषणादिक नजराणे घेऊन, नंदाच्या घरीं येऊं लागले ॥ ८ ॥ गोपींनीं तर यशोदेला पुत्र झाला हें वर्तमान ऐकून आनंदित होऊन आपल्या देहांना वस्त्रें, भूषणें, काजळ इत्यादिकेंकरून भूषित करूं लागल्या ॥ ९ ॥ नूतन केशर खलून तें लाविल्यामुळें ज्यांच्या मुखकमळांना शोभा आली आहे व ज्यांचे कटिपश्चाद्भाग मोठे आहेत अशा त्या गोपी, ओंटी भरण्याचीं सामानें हातांत घेऊन नंदाच्या घरीं त्वरेनें निघाल्या. तेव्हां चालतांना त्यांचे स्तन हालत होते ॥ १० ॥ तेव्हां नंदाच्या घरीं जाणाऱ्या त्या गोपी, मार्गामध्यें फारच शोभूं लागल्या.

हरिद्रातैलै रूषिता लिप्ताः । विचित्रधातवश्च बर्हस्रजश्च वस्त्राणि च कांचनमालाश्चालंकारतया विद्यंते येषां ते तथाभूता गवादयो बभूवुरित्यर्थः ॥ ७ ॥ ८ ॥ आकल्पा अलंकाराः ॥ ९ ॥ नवकुंकुमकिंजल्कैर्मुखपंकजेषु भूतिः श्रीर्यासां ताः ॥ १० ॥ सुमृष्टान्युज्ज्वलितानि मणिमयानि कुंडलानि यासां निष्कानि पदकानि कंठेषु यासां ताश्च ।

गावो वृषा वत्सतरा हरिद्रातैलरूषिताः ॥ विचित्रधातुबर्हस्रग्वस्त्रकांचनमालिनः ॥ ७ ॥ महार्हवस्त्राभरणकंचुकोष्णीषभूषिताः ॥ गोपाः समाययू राजन्नानोपायनपाणयः ॥ ८ ॥ गोप्यश्चाकर्ण्य मुदिता यशोदायाः सुतोद्भवम् ॥ आत्मानं भूषयांचक्रुर्वस्त्राकल्पांजनादिभिः ॥ ९ ॥ नवकुंकुमकिंजल्कमुखपंकजभूतयः ॥ बलिभिस्त्वरितं जग्मुः पृथुश्रोण्यश्चलत्कुचाः ॥ १० ॥ गोप्यः सुमृष्टमणिकुंडलनिष्ककंठ्यश्चित्रांबराः पथि शिखाच्युतमाल्यवर्षाः ॥ नंदालयं सवलया व्रजतीर्विरेजुर्व्यालोलकुंडलपयोधरहारशोभाः ॥ ११ ॥ ता आशिषः प्रयुंजानाश्चिरं पाहीति बालके ॥ हरिद्राचूर्णतैलाद्भिः सिंचंत्योऽजनमुज्जगुः ॥ १२ ॥ अवाद्यंत विचित्राणि वादित्राणि महोत्सवे ॥ कृष्णे विश्वेश्वरेऽनंते नंदस्य व्रजमागते ॥ १३ ॥ गोपाः परस्परं हृष्टा दधिक्षीरघृतांबुभिः ॥ आसिंचंतो विलिंपंतो नवनीतैश्च चिक्षिपुः ॥ १४ ॥

शिखाभ्यश्च्युतानि माल्यवर्षाणि यासां ताः । नंदालयं व्रजतीर्व्रजंत्यः पथि विरेजुः । सवलयाः कंकणभूषिताः । व्यालोलैः कुंडलादिभिः शोभा यासां ताः ॥ ११ ॥ जनं सिंचंत्यः अजनमुज्जगुरिति वा ॥ १२ ॥ १३ ॥ १४ ॥

त्यांच्या कानांत कुंदलून निर्मळ केलेलीं रत्नखचित कुंडलें होतीं त्यांच्या कंठांमध्यें पदकनांवांचीं भूषणें होतीं, त्यांनीं चित्रविचित्ररंगांचीं वस्त्रें परिधान केलीं होतीं व हातांत जडावाचीं कांकणें घातलीं होतीं. त्यांच्या वेण्यांतून गळालेल्या फुलांचे वर्षाव वाटेंत होत होते व हालत असणारीं कुंडलें स्तन व हार यांच्या योगानें त्यांना फारच शोभा आली होती ॥ ११ ॥ त्या गोपी, नंदाचे घरीं जाऊन बालकाला (श्रीकृष्णाला) तूं गोकुळींचा राजा होऊन प्रजांचें चिरकाळ रक्षण कर, असे आशीर्वाद देऊन हळदीचें चूर्ण तेल व पाणी परस्परांच्या आंगावर उडवून उच्चस्वरानें गाणीं गाऊं लागल्या ॥ १२ ॥ असो; जगाचा अधिपति अनंत श्रीकृष्ण, नंदाच्या गोकुळांत आला असतां जो मोठा उत्साह झाला त्यावेळीं नानाप्रकारचीं वाद्यें वाजूं लागलीं ॥ १३ ॥ परमहर्ष पावलेले गोपहि परस्परांवर दहीं, दूध, तूप, व पाणी यांचें सेचन करीत एकमेकांच्या मुखांना लोणी सारवीत नृत्य करितांना दहीं, दूध, तूप, पाणी व लोणी यांच्या कर्दमांत एकमेकांना ढकलून पाडूं लागले ॥ १४ ॥ ॥ १८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्यावेळीं उदारमनाच्या नंदानें, त्या गोपांना, गोपींना सूतमागधबंदींना व जे दुसरे गीतनृत्यादिक विद्यांवर उपजीविका चालविणारे व अनाथ होते त्यांना, वस्त्रें, अलंकार, गोधनें व जे पदार्थ ज्यांना पाहिजे होते ते त्यांना, विष्णूचा संतोष व आपल्या पुत्राचा उत्कर्ष होण्याकरितां, उदार मनानें देऊन, योग्यतेनुसार सर्वांचा सत्कार केला ॥ १५ ॥ १६ ॥ तेव्हां महाभाग्यवती रोहिणीहि नंदगोपानें, (तूं येथें आलीस ह्मणून तुझ्या पायगुणानेंच मला पुत्र झाला, तूं मोठी भाग्यवती आहेस इत्यादि प्रकारांनीं) आपला आनंद प्रदर्शित करून संतोषविली असतां, ती उत्तम वस्त्रें माळा व कंठांतील अलंकार यांनीं भूषित होऊन, घरच्या मालकिणीसारखी त्या श्रीकृष्णजन्मोत्साहामध्यें आलेल्या अन्यस्त्रियांचा सत्कार करीत संचार करूं लागली ॥ १७ ॥ हे राजा, त्या श्रीकृष्णाच्या जन्मापासून तें नंदाचें गोकुळ, सर्व समृद्धींनीं युक्त व श्रीहरीच्या राहण्यानें सर्वप्रियत्वादिक आपल्या गुणांनीं युक्त होऊन लक्ष्मीचेंहि क्रीडास्थान झालें ॥ १८ ॥ हे राजा, याप्रमाणें श्रीकृष्णाचा जन्ममहोत्साह करून एकेवेळीं नंदराजा, गोकुळाच्या रक्षणाविषयीं गोपांना सांगून, कंसाचा वार्षिक कर देण्याकरितां मथुरेस निघून गेला ॥ १९ ॥ नंतर वसुदेवानें आप-

तेभ्यः प्रादात् ॥ १५ ॥ यथोचितमन्यानप्यपूजयत् ॥ १६ ॥ १७ ॥ हरेर्निवासेन ये आत्मनि गुणाः सर्वप्रियत्वादयस्तै रमाया आक्रीडं विहारस्थानम् ॥ १८ ॥ वार्षिक्यं प्रतिवर्षं देयम्

नंदो महामनास्तेभ्यो वासोऽलंकारगोधनम् ॥ सूतमागधबंदिभ्यो येऽन्ये विद्योपजीविनः ॥ १५ ॥ तैस्तैः कामैरदीनात्मा यथोचितमपूजयत् ॥ विष्णोराराधनार्थाय स्वपुत्रस्योदयाय च ॥ १६ ॥ रोहिणी च महाभागा नंदगोपाभिनंदिता ॥ व्यचरद्दिव्यवासःस्रक्कंठाभरणभूषिता ॥ १७ ॥ तत आरभ्य नंदस्य व्रजः सर्वसमृद्धिमान् ॥ हरेर्निवासात्मगुणै रमाक्रीडमभूनृप ॥ १८ ॥ गोपान्गोकुलरक्षायां निरूप्य मथुरां गतः ॥ नंदः कंसस्य वार्षिक्यं करं दातुं कुरूद्वह ॥ १९ ॥ वसुदेव उपश्रुत्य भ्रातरं नंदमागतम् ॥ ज्ञात्वा दत्तकरं राज्ञे ययौ तदवमोचनम् ॥ २० ॥ तं दृष्ट्वा सहसोत्थाय देहः प्राणमिवागतम् ॥ प्रीतः प्रियतमं दोर्भ्यां सस्वजे प्रेमविह्वलः ॥ २१ ॥ पूजितः सुखमासीनः पृष्ट्वाऽनामयमादृतः ॥ प्रसक्तधीः स्वात्मजयोरिदमाह विशांपते ॥ २२ ॥ दिष्ट्या भ्रातः प्रवयस इदानीमप्रजस्य ते ॥ प्रजाशाया निवृत्तस्य प्रजा यत्समपद्यत ॥ २३ ॥ दिष्ट्या संसारचक्रेऽस्मिन्वर्तमानः पुनर्भवः ॥ उपलब्धो भवानद्य दुर्लभं प्रियदर्शनम् ॥ २४ ॥

॥ १९ ॥ भ्रातरं सखायम् । तदवमोचनं तस्य नंदस्य वसतिस्थानम् ॥ २० ॥ २१ ॥ २२ ॥ २३ ॥ पुनर्भवः पुनर्जात इव । तत्र हेतुगर्भं विशेषणं संसारचक्रे वर्तमान इति ॥ २४ ॥

ल्या भावासारखा अत्यंत मित्र जो नंद तो आला आहे असें ऐकून व त्यानें कंसराजाला कर दिला असें जाणून, त्याच्या गाड्यांचा तळ दिलेल्या (वस्तीस उतरण्याच्या) जागीं त्याला भेटण्याकरितां गेला ॥ २० ॥ त्या आलेल्या अतिप्रिय वसुदेवाला पाहून, देहामध्यें प्राण आला ह्मणजे जसा तो देह धडपडून उठतो त्याप्रमाणें नंद एकाएकीं उठून संतुष्टचित्त व प्रेमानें व्याकुळ झाला आणि त्यानें त्या वसुदेवाला बाहूंनीं दृढ आलिंगन दिलें ॥ २१ ॥ हे राजा, नंतर नंदानें पाद्य आसन इत्यादिकेंकरून पूजा केलेला, कुशळप्रश्न करून आदर केलेला व आसनावर सुखानें बसलेला तो वसुदेव, आपल्या रामकृष्ण पुत्रांचेठिकाणीं आसक्तचित्त होऊन, नंदाला असें ह्मणाला कीं,–॥ २२ ॥ वसुदेव ह्मणाला– हेदादा (नंदा), वयोवृद्ध, पुत्ररहित व पुत्र होण्याची आशाहि निवृत्त झालेल्या तुला, हल्लींच पुत्र झाला ह्मणून ऐकिलें ती फार चांगली गोष्ट झाली ॥ २३ ॥ हे नंदा, जसें भोंवऱ्यांमध्यें सांपडलेल्या मुंग्यांचेंवगैरे वांचणेंच दुर्लभ आहे, मग त्यांना एकमेकींचें दर्शन

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होणें किंवा गांठ पडणें हें अशक्यच असून तें जर झालें तर तें जसें पुनर्जन्म झाल्यासारखें होतें त्याप्रमाणें या संसारचक्रामध्यें पडलेला तूं, पुनः जन्मास आल्यासारखा आज मला भेटलास ही फार चांगली गोष्ट झाली· कारण, प्रियमित्रांचे परस्पर दर्शन होणें हें दुर्मिळ आहे ॥ २४ ॥ तें असें कीं,— जशी उदकप्रवाहाच्या ओघानें वाहून जाणाऱ्या तृणकाष्ठादिकांची स्थिति एकेठिकाणीं घडत नाहीं त्याप्रमाणें चित्रविचित्र कर्में असणाऱ्या सुहृज्जनांचा प्रियकारक समागम एकेठिकाणीं घडत नाहीं ॥ २५ ॥ असो· ज्यामध्यें इष्टमित्रांसहवर्तमान तूं हल्लीं राहिला आहेस तें बृहद्वन (मोठें अरण्य) हल्लीं गाईवगैरे पशूंना हितकारक आहेना? तसेंच रोगरहित आणि पुष्कळ पाणी, गवत व वेली वगैरेंनीं युक्त आहेना? ॥ २६ ॥ हेदादा, माझा मुलगा (बलराम) आपल्या आईसह तुझ्या गोकुळांत असतो तो तुलाच आपला बाप असें मानीत असून त्याचें तुह्मी उभयतां लालनपालन करीत असतां तो खुशाल आहेना ? ॥ २७ ॥ आतां पुत्राच्या अदर्शनाचा क्लेश

दुर्लभत्वमेवाह । नैकत्रेति । प्रियश्चासौ संवासश्च प्रियसंवासः हे प्रियेति वा । स्रोतस ओघेन नीयमानानां प्लवंतीति प्लवास्तृणकाष्ठादयस्तेषां यथैकत्रस्थितिर्नास्ति तद्वत् ॥ २५ ॥ कच्चिदिति । पशव्यादिरूपे तस्मिन्वने निर्दोषगोपपयोदध्यादिप्रभूतगोपिकास्तन्यादिना पुत्रक्षेमविवक्षया पृच्छति । प्रसक्तधीः स्वात्मजयोरित्युक्तत्वात् ॥ २६ ॥ भवद्भ्यामुपलालितः सन्कच्चिद्वर्तत इति शेषः ॥ २७ ॥ पुत्रादर्शनक्लेशानाह । पुंस इति । सुहृदो बंधून्प्रत्यनुभावितः संपादितो यस्त्रिवर्गः स हि पुंसो विहितो युक्तः शास्त्रेण वा प्रोक्तो न स्व-

नैकत्र प्रियसंवासः सुहृदां चित्रकर्मणाम् ॥ ओघेन व्यूह्यमानानां प्लवानां स्रोतसो यथा ॥ २५ ॥ कच्चित्पशव्यं निरुजं भूर्यंबुतृणवीरुधम् ॥ बृहद्वनं तदधुना यत्रास्से त्वं सुहृद्वृतः ॥ २६ ॥ भ्रातर्मम सुतः कच्चिन्मात्रा सह भवद्व्रजे ॥ तातं भवंतं मन्वानो भवद्भ्यामुपलालितः ॥ २७ ॥ पुंसस्त्रिवर्गो विहितः सुहृदो ह्यनुभावितः ॥ न तेषु क्लिश्यमानेषु त्रिवर्गोऽर्थाय कल्पते ॥ २८ ॥ नंद उवाच ॥ अहो ते देवकीपुत्राः कंसेन बहवो हताः ॥ एकाऽवशिष्टाऽवरजा कन्या साऽपि दिवं गता ॥ २९ ॥ नूनं ह्यदृष्टनिष्ठोऽयमदृष्टपरमो जनः ॥ अदृष्टमात्मनस्तत्त्वं यो वेद न स मुह्यति ॥ ३० ॥

मात्रपर्यवसितः । अतस्तेषु क्लिश्यमानेषु सुखाय न भवतीत्यर्थः ॥ २८ ॥ नंदो वसुदेवं सांत्वयन्नाह । अहो इति ॥ २९ ॥ अदृष्टे एव निष्ठासमाप्तिर्यस्य सः । यदैव पुत्रादिसुखप्रदमदृष्टं हीयते तदैव ते पुत्रादयो न भवंतीत्यर्थः । अदृष्टपरमः तथा अदृष्टमेव परमं यस्य सः । यद्यपि पुत्रादयो वियुक्तास्तथाऽपि तानदृष्टमेव पुनः संगमयतीत्यर्थः। एवमदृष्टमात्मनस्तत्त्वमव्यभिचारिकारणं सुखदुःखयोर्यो वेद स न मुह्यति तस्मादिदानीं त्वया न दुःखं भावनीयं मृतानामपि वियुक्तानामपि च कालांतरे दर्शनयोगयोः संभवात् । अस्मदादिभिरपि कालांतरे तद्वियोगे सत्यपीति नंदस्य दैवी वागेषा भाविसूचिका ॥ ३० ॥

सांगतो-या पुरुषाला धर्मार्थकामरूपी जो त्रिवर्ग शास्त्रानें सांगितला आहे तो, त्याच्या इष्टमित्रांना सुख मिळण्याकरितांच प्रवृत्त झालेला आहे· तो त्रिवर्ग, ते इष्टमित्रादिक क्लेश पावत असतां सुखप्राप्तीला कारण होत नाहीं ॥ २८ ॥ असें वसुदेवाचें भाषण ऐकून नंद वसुदेवाचें सांत्वन करीत ह्मणाला कीं,— हे वसुदेवा, तुझे देवकीचे-ठिकाणीं झालेले पुष्कळ पुत्र कंसानें मारिले, ही गोष्ट मोठी वाईट झाली· धाकटी एक कन्या अवशेष राहिली होती तीहि स्वर्गाला निघून गेली ॥ २९ ॥ खरोखर या ॥ १९ ॥
प्राण्याची सर्व स्थिति, दैवावरच अवलंबून आहे, ह्मणजे जेव्हां याचें, पुत्रादिसुख देणारें दैव, क्षीण होतें तेव्हांच ते पुत्रादिक नाश पावतात आणि तें दैवच याला सुख देणारें झालें ह्मणजे जरी ह्याला पुत्रादिकांचा वियोग झाला असला तरी तें दैवच पुन्हां त्यांचा संयोग करून देतें· याप्रमाणें आपणाला सुखदुःखें प्राप्त होण्याचें कारण दैवच

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आहे असें जो जाणतो तो कधींच मोह पावत नाहीं ह्मणजे दैवाच्या योगानें मरण पावलेल्यांचेंहि कालांतरीं दर्शन व वियोग पावलेल्यांचाहि कालांतरीं संयोग होण्याचा संभव असल्यामुळें तूं कोणत्याच प्रकारचें दुःख मनांत आणूं नकोस ॥ ३० ॥ असें नंदाचें बोलणें ऐकून दुःखाचा त्याग करून नंदाला वसुदेव ह्मणाला कीं,–हे नंदा, तुह्मीं कंसाला जो वार्षिक कर द्यावयाचा तो दिला आहे व आमची तुमची भेटहि झाली आहे. आतां येथें उगीच फार दिवस राहूं नये. कारण, गोकुळामध्यें उत्पात होत आहेत, यास्तव तुह्मी लवकर परत चला ॥ ३१ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–याप्रमाणें वसुदेवानें सांगितलेले ते नंदादिक गोप, त्याचा निरोप घेऊन गाड्यांना बैल जुंपून गोकुळांत जाण्याकरितां निघाले ॥ ३२ ॥ याप्रमाणें श्रीमद्भा० महापुराणाच्या दशमस्कंधामध्यें० वसुदेवनंदसमागमरूप हा पांचवा अध्याय समाप्त झाला ॥ ५ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥

आतां ह्या सहाव्या अध्यायामध्यें, वसुदेवाच्या सांगण्यावरून नंद, गोकुळास जात असतां, मार्गामध्यें मरण पावलेल्या राक्षसीला पाहून व तिचा मृत्यु ऐकून विस्मित झाला

तां बुध्वा वसुदेवो दुःखं त्यक्त्वा नंदमाह । करो वै इति । वो युष्माभिः ॥ ३१ ॥ ३२ ॥ इति दशमे टीकायां पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥ ॥ षष्ठे सख्युर्गिरा नंदो व्रजं गच्छन्मृतां पथि ॥ दृष्ट्वा तु राक्षसीं तस्या मृत्युं श्रुत्वाऽथ विस्मितः ॥ १ ॥ १ ॥ २ ॥ कृष्णविषये शंकमानं राजानं मत्यविषये प्रवृत्ता सैव मरिष्यतीति सूचयन्नाह । न य-

वसुदेव उवाच ॥ करो वै वार्षिको दत्तो राज्ञे दृष्टा वयं च वः ॥ नेह स्थेयं बहुतिथं संत्युत्पाताश्च गोकुले ॥ ३१ ॥ श्रीशुक उवाच ॥ इति नंदादयो गोपाः प्रोक्तास्ते शौरिणा ययुः ॥ अनोभिरनडुद्युक्तैस्तमनुज्ञाप्य गोकुलम् ॥ ३२ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे नंदवसुदेवसंगमो नाम पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ नंदः पथि वचः शौरेर्न मृषेति विचिंतयन् ॥ हरिं जगाम शरणमुत्पातागमशंकितः ॥ १ ॥ कंसेन प्रहिता घोरा पूतना बालघातिनी ॥ शिशूंश्चचार निघ्नंती पुरग्रामव्रजादिषु ॥ २ ॥ न यत्र श्रवणादीनि रक्षोघ्नानि स्वकर्मसु ॥ कुर्वंति सात्वतां भर्तुर्यातुधान्यश्च तत्र हि ॥ ३ ॥ सा खेचर्येकदोपेत्य पूतना नंदगोकुलम् ॥ योषित्वा माययाऽऽत्मानं प्राविशत्कामचारिणी ॥ ४ ॥

त्रेति । यत्र श्रीकृष्णस्य श्रवणादीनि न संति तत्रैव तासां शक्तिः । साक्षात्तस्मिन्नेव सति का शंकेति भावः ॥ ३ ॥ योषित्वा वेषतो वरां नारीमिवात्मानं विधाय । ननु निर्लज्जा निर्विशंका च सती कथं परसद्मनि प्रविष्टाऽत आह । कामचारिणीति । नहि कामचारिणीष्विदं चित्रमित्यर्थः ॥ ४ ॥

अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, वसुदेवाचें भाषण असत्य व्हावयाचें नाहीं असें चिंतन करणारा तो नंद, आपल्या पुत्राला कांहींतरी भयंकर संकट प्राप्त झालें असेल कीं काय? अशी शंका मनांत आणून, मार्गामध्येंच सर्व दुःखें दूर करणाऱ्या श्रीहरीला शरण गेला ॥ १ ॥ इकडे कंसानें लहान मुलांना मारण्याकरितां पाठविलेली, बालकांचा घात करणारी पूतनानांवाची भयंकर राक्षसी, नगरें, गांव व गोकुळ वगैरेठिकाणीं बालकांचा वध करीत संचार करूं लागली ॥ २ ॥ आतां कृष्णाविषयीं शंका करणाऱ्या राजाला, भलत्याच कामाविषयीं प्रवृत्त झालेली तीच राक्षसी मरेल असें सुचवीत ह्मणतो कीं–, हे राजा, ज्या नगरादिकांमध्यें आपापल्या कर्मांचेठिकाणीं वर्तणूक करणारे लोक, भक्तपालक श्रीकृष्णाचीं राक्षसांचा नाश करणारीं श्रवणकीर्तनादिक करीत नाहींत, तेथेंच त्या राक्षसीवगैरे विघ्नें करितात. एतावता स्वधर्माचरणामध्यें भगवंताचें श्रवणादिक करणारे लोक जेथें असतात त्या गांवांतसुद्धां जर राक्षसांची शक्ति चालत नाहीं तर साक्षात् भगवंताचेठिकाणीं कशी चालेल? चालण्यास नाहीं ॥ ३ ॥ अशी आकाशमार्गानें संचार करणारी व यथेच्छरूप धारण करणारी ती पूतना राक्षसी, एकेवेळीं स्वतां मायेनें, सभ्यस्त्रीचा वेष धारण

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करून नंदाच्या गोकुळांत येऊन त्याच्या घरामध्यें प्रविष्ट झाली ॥ ४ ॥ त्या स्त्रीला, आपला पती पाहण्याकरितां हातांत कमळ घेऊन आलेली ही अतिरूपवती लक्ष्मीच आहे असें सर्व गोपींनीं मानिलें. तिचें सौंदर्य असें होतें कीं, तिच्या वेणीमध्यें मोगरीचीं फुलें गुंफिलीं होतीं, तिच्या स्थूळ कटिपश्चाद्भागानें व मोठ्या स्तनांनीं दोहींकडे आकर्षण केल्यामुळेंच कीं काय तिचा मध्यभाग कृश झालेला होता, तिनें उत्तम वस्त्रें परिधान केलीं होतीं, तिच्या हालत असलेल्या कर्णभूषणांच्या कांतीनें विशेष चमकणाऱ्या केसांनीं तिचें मुख सुशोभित दिसत होतें व ती सुंदर हास्ययुक्त कटाक्ष फेंकून गोकुळवासी पुरुषांचें मन आकर्षण करून घेत होती. म्हणून चित्तावें आकर्षण झालेल्या गोपांनीं तिचें निवारण केलें नाहीं; गोपींनातर ती लक्ष्मीच आली असें वाटलें म्हणून त्या उगीच राहिल्या. मिळून कोणींहि निवारण न केलेली ती, पूतना, नंदाच्या गृहामध्यें प्रविष्ट झाली ॥ ५ ॥ ६ ॥ आणि तेथें लहान मुलांचा शोध करणाऱ्या त्या पूतनेनें, प्रारब्धयोगानें, शय्येवर निजलेल्या, दुष्टांचा संहार करणाऱ्या परंतु भस्मामध्यें आच्छादून

तां वनितां पतिं द्रष्टुमागतामतिरूपवतीं श्रियमिव गोप्योऽमंसतेत्युत्तरश्लोकेनान्वयः । श्रीसाम्यार्थानि विशेषणानि । केशबंधव्यतिषक्तमल्लिकां धम्मिलसंसक्तमल्लिकाकुसुमाम् । बृहता नितंबेन स्तनाभ्यां चोभयत आक्रांतमिव कृच्छ्रं कृशं मध्यमुदरं यस्यास्ताम् । सुवाससं शोभने रमणीये वाससी यस्यास्ताम् । कंपितयोः कर्णभूषणयोस्त्विषोल्लसद्भिः कुंतलैर्मंडितमाननं यस्यास्ताम् ॥ ५ ॥ वल्गुस्मितापांगविसर्गवीक्षितैः वल्गु रम्यं स्मितं येषु ते तथाभूता अपांगविसर्गा येषु तैर्वीक्षितैर्व्रजौकसां मनो हरंतीम् । अतो

**तां केशबंधव्यतिषक्तमल्लिकां बृहन्नितंबस्तनकृच्छ्रमध्यमाम् ॥ सुवाससं कंपितकर्णभूषणत्विषोल्लसत्कुंतलमंडिताननाम् ॥ ५ ॥
वल्गुस्मितापांगविसर्गवीक्षितैर्मनो हरंतीं वनितां व्रजौकसाम् ॥ अमंसतांभोजकरेण रूपिणीं गोप्यः श्रियं द्रष्टुमिवागतां पतिम् ॥६॥
बालग्रहस्तत्र विचिन्वती शिशून्यदृच्छया नंदगृहेऽसदंतकम् ॥ बालं प्रतिच्छन्ननिजोरुतेजसं ददर्श तल्पेऽग्निमिवाहितं भसि ॥७॥
विबुध्य तां बालकमारिकाग्रहं चराचरात्मा स निमीलितेक्षणः ॥ अनंतमारोपयदंकमंतकं यथोरगं सुप्तमबुद्धिरज्जुधीः ॥ ८ ॥ तां तीक्ष्णचित्तामतिवामचेष्टितां वीक्ष्यांतरा कोशपरिच्छदासिवत् ॥ वरस्त्रियं तत्प्रभया च धर्षिते निरीक्षमाणे जननी ह्यतिष्ठताम् ॥ ९ ॥**

गोपा हृतमनस्त्वेन तां न निवारितवंत इत्युक्तं भवति । गोप्यश्च श्रियमिव मत्वा तूष्णीमासन् । अतः केनाप्यनिवारिता सती प्रविवेशेति भावः ॥ ६ ॥ बालग्रहः पूतना असदंतकं बालं ददर्श । असतामंतकं दृष्ट्वा कथं न बिभेति तत्राह । प्रतिच्छन्ननिजोरुतेजसं बालनाट्येन प्रतिच्छन्नं तिरोहितं निजमुरु तेजो येन तम् । कमिव । भसि भस्मन्याहितमग्निमिवेति ॥ ७ ॥ चराचरात्मत्वादेव तां विबुध्य निमीलितेक्षण आस । स्वयमनंतं दुष्टानामंतकं बालं मत्वा साऽकमारोपयत् । यथोरगं सुप्तमबुद्धिश्चासौ रज्जुधीश्च सोऽज्ञानतो रज्जुबुद्ध्या गृह्णाति तद्वत् ॥ ८ ॥ ननु यशोदारोहिण्यौ तां कथं न न्यवारयेतां तत्राह । तामिति । वामं वल्गु जनन्या इव चेष्टितं यस्यास्तां वरस्त्रियं च सहसैवांतरा गृहमध्ये

ठेवलेल्या अग्नीप्रमाणें ज्यानें आपलें प्रचंड तेज गुप्त राखिलें आहे अशा त्या श्रीकृष्ण बालकास अवलोकन केलें ॥ ७ ॥ तेव्हां चराचर जगताचा अंतरात्मा तो श्रीकृष्ण, त्या पूतनेला, हें लहान मुलांना मारणारें पिशाच आहे असें जाणूनहि आपले नेत्र झांकून स्वस्थ राहिला. तेव्हां जसा एखादा अज्ञानी मनुष्य, दोरी आहे असें समजून निजलेला साप उचलून घेतो त्याप्रमाणें श्रीकृष्णाचें स्वरूप न समजणाऱ्या त्या पूतना राक्षसीनें, दुष्टांचा नाश करणाऱ्या त्या अनंताला, 'हा बालक आहे असें मानून' उचलून आपल्या मांडीवर घेतलें ॥ ८ ॥ बरें यशोदा व रोहिणी या दोघींनीं तिचें कसें निवारण केलें नाहीं असें म्हणावें तर— त्या उभयतां (यशोदा व रोहिणी) माता, बाहेरून मऊ, चित्रविचित्र व सुंदर दिसणाऱ्या म्यानामध्यें असलेल्या प्रखर तलवारीप्रमाणें, बाहेरून आईसारखें प्रेमळ व मनोहर आचरण दिसत असलेल्या परंतु आंतून क्रूरस्वभावाच्या त्या सुंदर स्त्रीला एकाएकीं घरामध्यें अवलोकन करून तिच्या तेजानें अगदीं दिपून गेल्या आणि 'या मुलाची आई मी किंवा ही' अशाविषयींसुद्धां ॥ २० ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मोहित होऊन केवळ तिच्याकडे पाहत उभ्या राहिल्या, ह्मणजे तुह्मीं मुलाला काय ह्मणून उचलिलें असेंहि त्यांच्यानें तिला ह्मणवलें नाहीं ॥ ९ ॥ त्या भयंकर पूतनेनें, त्या
स्थळाचेठिकाणीं कृष्णाला मांडीवर घेऊन त्या बालकाला, पचन होण्यास फारच कठीण असें विष ज्यामध्यें भरलें आहे असा आपला भयंकर स्तन अर्पण केला. तेव्हां क्रोधयुक्त
झालेल्या भगवंतानें हातांनीं तो तिचा स्तन घट्ट आंवळून, ती प्रसूत झालेली नसल्यामुळें तिच्या स्तनांत दूध मुळींच नव्हतें, केवळ विष होतें, तें नुसतें बाधेल ह्मणूनचकीं
काय तिच्या प्राणाचें अनुपान करून त्यासहवर्तमान तें विष प्राशन केलें ॥ १० ॥ तेव्हां तिच्या जीवाच्या सर्व मर्मस्थानांचेठिकाणीं अत्यंत पीडा होऊं लागली असतां सोड
सोड, पुरे आतां ! असें ह्मणणारी ती पूतना राक्षसी, डोळे पांढरे करून हात व पाय वारंवार आपटणारी व सर्वांगाला घर्म सुटलेली ती मोठ्यानें रडूं लागली ॥ ११ ॥ अति-

---

वीक्ष्य । अंतस्तैक्ष्ण्ये बहिर्मार्दवे च दृष्टांतः । कोशपरिच्छदासिवत् मृदुचित्रचर्ममयः कोशः परिच्छद आवरणं यस्यासेः खड्गस्य तद्वत् । तत्प्रभया च धर्षिते ऽभिभूते ।
अहमस्य जननीयं वेति मोहिते च सत्यौ जननी जनन्यौ निरीक्षमाणे एव केवलमतिष्ठतां न तु निवारितवत्यौ ॥ ९ ॥ तस्मिन्स्थाने दुर्जरं वीर्यं विषं यस्मिंस्तं स्तनं श्रीकृष्णमं-
कमादाय तस्मै शिशवे ददौ अथानंतरमेव प्रपीड्य केवलं विषमपथ्यमिति मत्वेव तस्याः प्राणैः सहापिबत् ॥ १० ॥ चरणौ भुजौ च मुहुर्मुहुः क्षिपंती । प्रस्विन्नानि स्वेदयुक्ता-

तस्मिन्स्तनं दुर्जरवीर्यमुल्बणं घोरांकमादाय शिशोर्ददावथ ॥ गाढं कराभ्यां भगवान्प्रपीड्य तत्प्राणैः समं रोषसमन्वितोऽपिबत्
॥ १० ॥ सा मुंचमुंचालमिति प्रभाषिणी निष्पीड्यमानाऽखिलजीवमर्मणि ॥ विवृत्य नेत्रे चरणौ भुजौ मुहुः प्रस्विन्नगात्रा क्षिपती
रुरोद ह ॥ ११ ॥ तस्याः स्वनेनातिगभीररंहसा साद्रिर्मही द्यौश्च चचाल सग्रहा ॥ रसा दिशश्च प्रतिनेदिरे जनाः पेतुः क्षितौ
वज्रनिपातशंकया ॥ १२ ॥ निशाचरीत्थं व्यथितस्तना व्यसुर्व्यादाय केशांश्चरणौ भुजावपि ॥ प्रसार्य गोष्ठे निजरूपमास्थिता व-
ज्राहतो वृत्र इवापतन्नृप ॥ १३ ॥ पतमानोऽपि तद्देहस्त्रिगव्यूत्यंतरद्रुमान् ॥ चूर्णयामास राजेंद्र महदासीत्तदद्भुतम् ॥ १४ ॥ ईषा-
मात्रोग्रदंष्ट्रास्यं गिरिकंदरनासिकम् ॥ गंडशैलस्तनं रौद्रं प्रकीर्णारुणमूर्धजम् ॥ १५ ॥

नि गात्राणि यस्याः सा ॥ ११ ॥ रसाः रसातलानि च ॥ १२ ॥ व्यादाय मुखं विवृत्य । निजरूपमास्थिता । मरणसमये कपटमयुक्तमिति भावः । वृत्रो वज्राहत
इव ॥ १३ ॥ पतन्नपि तस्या देहः षट्क्रोशमध्यवर्तिनो द्रुमांश्चूर्णीचकार ॥ १४ ॥ ईषामात्रोग्रदंष्ट्रास्यं ईषा लांगलदंडस्तत्प्रमाणोग्रा दंष्ट्रा यस्मिंस्तत्तथाभूतमास्यं
यस्मिंस्तत्तस्याः कलेवरं वीक्ष्य गोपा गोप्यश्च संतत्रसुः । संत्रासहेतुत्वेन पुनरष्टभिः पदैर्विशिनष्टि । गिरिकंदरवन्नासिके यस्मिंस्तत् । गिरेश्च्युतौ स्थूलोपलौ

शय गंभीरस्वेमानें युक्त अशा तिच्या त्या शब्दानें, पर्वतांसहवर्तमान पृथिवी कांपूं लागली, ग्रहांसहवर्तमान स्वर्गलोक डळमळूं लागला, सप्त पाताळें व अष्ट दिशा यांचेठिकाणीं
प्रतिध्वनि झाला, वज्रपातच झाला कीं काय अशा भयानें लोक भूमीवर पडले ॥ १२ ॥ याप्रमाणें प्राणाचें आकर्षण करून स्तनपान करूं लागल्यामुळें, स्तनामध्यें प्राणघातक
वेदना उत्पन्न झाली असतां, मरणकाळीं मृत्युपीडेनें व्याकुळ झालेली ती पूतना, मायिक स्वरूप धारण करण्यास असमर्थ होऊन, तिनें आपलें मूळचें स्वरूप
धारण केलें आणि ती आपल्या मुखाचें विदारण करून व केंस, पाय व हात यांना पसरून गतप्राण होत्साती, वज्रानें प्रहार केलेल्या वृत्रासुराप्रमाणें गोकुळामध्यें पडली ॥ १३ ॥
हे राजश्रेष्ठा, तिच्या देहानें पडतां पडतांहि सहा कोसपर्यंत जमिनीवरील वृक्षांचें चूर्ण करून टाकिलें. तेव्हां गाई मनुष्यादिकांना वगळून जें वृक्षांचेंमात्र चूर्ण झालें तें
एक मोठेंच आश्चर्य झालें ॥ १४ ॥ हे राजा, ज्याच्या जबड्यामध्यें नांगराच्या फाळासारख्या भयंकर दाढा आहेत, ज्याच्या नाकपुड्या पर्वताच्या गुहेसारख्या आहेत,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

 ज्याच्यावर पर्वतावरून खालीं कोसळणाऱ्या मोठ्या खडकांसारखे स्तन आहेत, जें भयंकर असून पसरलेल्या तांबूसवर्णाच्या केंसांनीं युक्त आहे, ॥ १५ ॥ ज्याच्यावर आंधाऱ्या विहिरींसारखे खोल डोळे आहेत, जें वाळवेंच्या मैदानासारख्या असलेल्या कमरेच्या पुढील भागानें भयंकर आहे, जेथें पसरलेले हात मांड्या व पाय हे नदीला पूल बांधल्यासारखे लांबचलांब दिसत आहेत आणि ज्याचें पोट एखाद्या कोरड्या झालेल्या डोहासारखें खोल आहे, असें तें भयंकर शरीर अवलोकन करून, पूर्वीं त्याच्या मोठ्या ओरडण्यानें, ज्यांचीं हृदयें विदीर्ण झालीं होतीं, कानठळ्या बसल्या होत्या व मस्तकशूळ उत्पन्न झाला होता ते सर्व गोपाळ व गोपी अत्यंत भयभीत झाले ॥ १६ ॥ १७ ॥ आणि त्या पूतनेच्या वक्षस्थळावर निर्भयपणें क्रीडा करणाऱ्या (हस्तपादादिकांचें चालन करणाऱ्या) कृष्णबालकाला अवलोकन करून ज्यांना उत्कट स्नेहानें घाबरेपणा

ताविव स्तनौ यस्मिंस्तत् । रौद्रं घोरम् । प्रकीर्णा अरुणा मूर्धजा यस्मिंस्तत् ॥ १५ ॥ अंधकूपाविव गभीरे अक्षिणी यस्मिंस्तत् । पुलिनवदारोहौ जघने ताभ्यां भीषणम् । बद्धाः सेतव इव भुजौ ऊरू अंघ्री च यस्मिंस्तत् । शून्यतोयह्रद इवोदरं यस्मिंस्तत् ॥ १६ ॥ पूर्वमेव तस्याः शब्देन भीताः पुनर्दर्शनेनातितत्रसुरित्याह । पूर्वं त्विति । तस्या निःस्वनितं शब्दस्तेन निर्भिन्नानि हृत्कर्णमस्तकानि येषां ते ॥ १७ ॥ १८ ॥ १९ ॥ द्वादशांगेषु ललाटादिषु

अंधकूपगभीराक्षं पुलिनारोहभीषणम् ॥ बद्धसेतुभुजोर्वंघ्रि शून्यतोयह्रदोदरम् ॥ १६ ॥ संतत्रसुः स्म तद्वीक्ष्य गोपा गोप्यः कलेवरम् ॥ पूर्वं तु तन्निःस्वनितभिन्नहृत्कर्णमस्तकाः ॥ १७ ॥ बालं च तस्या उरसि क्रीडंतमकुतोभयम् ॥ गोप्यस्तूर्णं समभ्येत्य जगृहुर्जातसंभ्रमाः ॥ १८ ॥ यशोदारोहिणीभ्यां ताः समं बालस्य सर्वतः ॥ रक्षां विदधिरे सम्यग्गोपुच्छभ्रमणादिभिः ॥ १९ ॥ गोमूत्रेण स्नापयित्वा पुनर्गोरजसाऽर्भकम् ॥ रक्षां चक्रुश्च शकृता द्वादशांगेषु नामभिः ॥ २० ॥ गोप्यः संस्पृष्टसलिला अंगेषु करयोः पृथक् ॥ न्यस्यात्मन्यथ बालस्य बीजन्यासमकुर्वत ॥ २१ ॥

केशवादिद्वादशनामभिः ॥ २० ॥ अनाचांता एव प्रथममतिसंभ्रमेणैवं रक्षां कृत्वा किंचिल्लब्धश्वासाः पुनस्तात्पर्येण बीजन्यासमकुर्वतेत्याह । गोप्य इति । संस्पृष्टसलिला आचांताः आत्मनि प्रथममंगेषु करयोश्च पृथक् अजाद्येकादशबीजानां मध्ये करशुद्धौ त्रीणि करयोः संधिषु चत्वारि चत्वारि तथा अंघ्रयादावेकैकस्मिन्नंगे अजाद्येकैकं बीजं न्यस्य बालस्याप्यंगेषु तथैवाकुर्वत ॥ २१ ॥

प्राप्त झाला आहे अशा त्या गोपीनीं लगबगीनें त्याच्याजवळ जाऊन त्याला उचलून घेतलें ॥ १८ ॥ नंतर त्या गोपींनीं, यशोदारोहिणींसहवर्तमान त्या बालकाच्या सर्व अंगांचेठिकाणीं, गाईचें शेंपूट फिरविणें, दृष्ट काढणें, इत्यादिकेंकरून त्याचा उत्तमप्रकारचा रक्षणविधि केला ॥ १९ ॥ तो असा कीं, त्या बालकाला प्रथम गोमूत्रानें स्नान घालून पुनः गाईच्या पायांखालच्या धुळीनें व गाईच्या शेणानें त्याच्या ललाटादिक बारा अवयवांचेठिकाणीं केशवादिक बारा नांवांनीं तिलक लावून रक्षणविधि केला ॥ २० ॥ याप्रमाणें राक्षसीच्या वक्षःस्थळावर सांपडलेल्या त्या बालकाला भूतबाधा होईल ह्मणून प्रथम गडबडीनेंच आपण आचमनवगैरे न करतांच त्याचा रक्षणविधि करून, त्यांना जरासा धीर आल्यावर त्या गोपींनीं आपल्या हस्तपादांचें प्रक्षालन करून व आचमन करून, प्रथम आपल्या हस्तांचेठिकाणीं व अवयवांचेठिकाणीं निरनिराळ्या अजादिक अकरा बीजांचा न्यास करून, ह्मणजे करशुद्धीविषयीं तीन बीजें व दोन्हीं हातांच्या बोटांच्या संधींचेठिकाणीं चारचार बीजें तसेंच पुन्हा चरणादिक

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

एकेक अवयवांचेठिकाणीं अजादिक एकेक बीज याप्रमाणें न्यास करून त्यांनीं बालकाच्याहि अवयवांचेठिकाणीं तसाच बीजांचा न्यास केला ॥ २१ ॥ हे आमच्या पालका बालका, तुझ्या पायांचें अज (जन्मरहित ईश्वर) रक्षण करो. तसाच गुडघ्यांचें—मणिमान्, मांड्यांचे—यज्ञ, कमरेचें—अच्युत, उदराचें—हयग्रीव, हृदयाचें—केशव, तुझ्या वक्षस्थळाचें- ईश, कंठाचें— सूर्य, भुजांचें—विष्णु आणि तुझ्या मस्तकाचें—ईश्वर रक्षण करो॥२२॥ आतां दिशांचेठिकाणीं रक्षणविधि करितात— चक्रधारण करणारा हरि तुझ्या अग्रभागीं असो, गदा धारण करणारा हरि तुझ्या पाठीमागें असो. धनुर्धारी मधुसूदन आणि खड्गधारी अजन (जन्मरहित भगवान्) हे उभयतां तुझ्या दोन्ही बाजूंकडे असोत, शंखधारण करणारा उरुगाय (पुष्कळ गाइलेला) तुझ्या चारी कोपऱ्यांचेठिकाणीं असो, उपेंद्र (वामन) तुझ्या ऊर्ध्वभागीं असो. गरुड तुझ्या अधोभागीं असो. आणि नांगर धारण करणारा बलराम तुझ्या सभोंवतीं असो ॥ २३ ॥ याप्रमाणें बाहेरचें रक्षण करून आतां अंतरंग रक्षण करितात—हृषीकेश, तुझ्या इंद्रियांचें रक्षण करो.

अंघ्रि अंघ्री । जानु जानुनी । भुजं भुजौ । कं शिरः ॥ २२ ॥ तथा दिक्षु रक्षामकुर्वन्नित्याह । चक्र्यग्रत इति । चक्रसहितो हरिस्तवाग्रतोऽस्तु । सहगदो गदासहितो हरिस्तव

अव्यादजोंऽघ्रि मणिमांस्तव जान्वथोरू यज्ञोऽच्युतः कटितटं जठरं हयास्यः ॥ हृत्केशवस्त्वदुर ईश इनस्तु कंठं विष्णुर्भुजं मुखमुरुक्रम ईश्वरः कम् ॥ २२ ॥ चक्र्यग्रतः सहगदो हरिरस्तु पश्चात्त्वत्पार्श्वयोर्धनुरसी मधुहाऽजनश्च ॥ कोणेषु शंख उरुगाय उपर्युपेंद्रस्तार्क्ष्यः क्षितौ हलधरः पुरुषः समंतात् ॥ २३ ॥ इंद्रियाणि हृषीकेशः प्राणान्नारायणोऽवतु ॥ श्वेतद्वीपपतिश्चित्तं मनो योगेश्वरोऽवतु ॥ २४ ॥ पृश्निगर्भस्तु ते बुद्धिमात्मानं भगवान्परः ॥ क्रीडंतं पातु गोविंदः शयानं पातु माधवः ॥ २५ ॥ व्रजंतमव्याद्वैकुंठ आसीनं त्वां श्रियः पतिः ॥ भुंजानं यज्ञभुक्पातु सर्वग्रहभयंकरः ॥ २६ ॥ डाकिन्यो यातुधान्यश्च कूष्मांडा येऽर्भकग्रहाः ॥ भूतप्रेतपिशाचाश्च यक्षरक्षोविनायकाः ॥ २७ ॥ कोटरा रेवती ज्येष्ठा पूतना मातृकादयः ॥ उन्मादा ये ह्यपस्मारा देहप्राणेंद्रियद्रुहः ॥ २८ ॥ स्वप्नदृष्टा महोत्पाता वृद्धबालग्रहाश्चये ॥ सर्वे नश्यंतु ते विष्णोर्नामग्रहणभीरवः ॥ २९ ॥

पश्चादस्तु । त्वत्पार्श्वयोर्धनुर्धरो मधुहाऽसिधरोऽजनश्चैतावास्ताम् । शंखधर उरुगायश्चतुष्कोणेषु । क्षितावधस्तात् ॥ २३ ॥ एवं बही रक्षां कृत्वांऽतरंगामकुर्वन्नित्याह । इंद्रियाणीति ॥ २४ ॥ आत्मानमहंकारम् ॥ २५ ॥ २६ ॥ २७ ॥ २८ ॥ २९ ॥

नारायण, तुझ्या प्राणांचें रक्षण करो. श्वेतद्वीपाचा अधिपति, तुझ्या चित्ताचें आणि योगेश्वर, तुझ्या मनाचें रक्षण करो ॥ २४ ॥ पृश्निगर्भ, तुझ्या बुद्धीचें रक्षण करो, षड्गुणैश्वर्यसंपन्न परमेश्वर, तुझ्या अहंकाराचें रक्षण करो. तूं खेळत असतांना तुझें गोविंद रक्षण करो, निजलेल्या तुझें माधव रक्षण करो ॥ २५ ॥ वैकुंठाधिपतीनें तुझें चालतांना रक्षण करावें, लक्ष्मीपतीनें बसलेल्या तुझें रक्षण करावें, सर्व पिशाचांना भय उत्पन्न करणाऱ्या यज्ञभोक्त्या भगवंतानें, भोजनकालीं तुझें रक्षण करावें ॥ २६ ॥ डाकिनी (दुष्टस्त्रिया), राक्षसी, कूष्मांडनांवांचे रुद्रगण, तसेच जे बालग्रह, भूत, प्रेत, पिशाच, यक्ष, राक्षस व विनायक (विघ्न करणारे) आहेत ॥ २७ ॥ कोटरा, रेवती, ज्येष्ठा, पूतना, मातृका इत्यादिक जे उन्माद (वेड लावणारे) आहेत तसेच जे देह, प्राण व इंद्रियें यांना विस्मृति पाडणारे अपस्मार (फेंपरेंवगैरे ग्रह) आहेत ॥ २८ ॥ तसेच जे स्वप्नामध्यें दृष्टी पडून भेडसावणारे व पुढें दुःख सुचविणारे ग्रह आहेत आणि जे वृद्धांना व बालांना झपाटणारे ग्रह आतेह ते सर्वेहि विष्णूच्या नामग्रहणानेंच

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तील असतात म्हणून ते सर्वहि पूर्वी सांगितलेलीं नांवें ऐक्यिाबरोबर नष्ट होवोत ॥ २९ ॥ श्रीशुकाचार्य म्हणाला—हे राजा, याप्रमाणें कृष्णाचेठिकाणीं धारण केलेल्या अतिशय प्रेमानें युक्त अशा त्या गोपींनीं, ज्याचा रक्षणविधि केला आहे त्या बालकाला, यशोदा मातेनें स्तनपान करवून निजविलें ॥ ३० ॥ इतक्यांत मथुरेंतून गोकुळामध्यें प्राप्त झालेले नंदादिक गोप, तो मरून पडलेला पूतनेचा देह पाहून फारच विस्मित झाले ॥ ३१ ॥ त्यांचा विस्मय असा कीं,—अहो वसुदेव हा पूर्वजन्मीं मोठा तपस्वी ऋषि असून तो सांप्रतकालीं येथें जन्मास आला आहे, किंवा तो पूर्वजन्माचेठिकाणीं महाज्ञानी असावा. कारण, त्या वसुदेवानें 'गोकुळामध्यें उत्पात होत आहेत असें' जें सांगितलें होतें तोच हा उत्पात आमच्या दृष्टीस पडला ॥ ३२ ॥ नंतर गोकुळांत राहणाऱ्या त्या गोपालांनीं त्या पूतनेच्या देहाचे कुऱ्हाडींनीं प्रत्येक अवयव तोडून निरनिराळे

सन्यवेशयत् शाययामास ॥ ३० ॥ ३१ ॥ विस्मयमेवाह । नूनमिति । बत विस्मये । सांप्रतं स ऋषिस्तपःप्रभाववान् योगेशो ज्ञानी वा सम्यगास । यतः स

श्रीशुक उवाच ॥ इति प्रणयबद्धाभिर्गोपीभिः कृतरक्षणम् ॥ पाययित्वा स्तनं माता संन्यवेशयदात्मजम् ॥ ३० ॥ तावन्नंदादयो गोपा मथुराया व्रजं गताः ॥ विलोक्य पूतनादेहं बभूवुरतिविस्मिताः ॥ ३१ ॥ नूनं बतर्षिः संजातो योगेशो वा समास सः ॥ स एव दृष्टो ह्युत्पातो यदाहानकदुंदुभिः ॥ ३२ ॥ कलेवरं परशुभिश्छित्त्वा तत्ते व्रजौकसः ॥ दूरे क्षिप्त्वाऽवयवशो न्यदहन्काष्ठवेष्टितम् ॥ ३३ ॥ दह्यमानस्य देहस्य धूमश्चागुरुसौरभः ॥ उत्थितः कृष्णनिर्भुक्तसपद्याहतपाप्मनः ॥ ३४ ॥ पूतना लोकबालघ्नी राक्षसी रुधिराशना ॥ जिघांसयाऽपि हरये स्तनं दत्त्वाऽऽप सद्गतिम् ॥ ३५ ॥ किं पुनः श्रद्धया भक्त्या कृष्णाय परमात्मने ॥ यच्छन्प्रियतमं किं नु रक्तास्तन्मातरो यथा ॥ ३६ ॥ पद्भ्यां भक्तहृदिस्थाभ्यां वंद्याभ्यां लोकवंदितैः ॥ अंगं यस्याः समाक्रम्य भगवानपिबत्स्तनम् ॥ ३७ ॥

एव दृष्ट इति ॥ ३२ ॥ ३३ ॥ विस्मयांतरमाह । दह्यमानस्येति । कृष्णेन निर्भुक्तोऽत एव सपद्याहतः पाप्मा यस्य ॥ ३४ ॥ प्रसंगात्कैमुत्यन्यायेन भक्तिवैभवमाह । पूतनेति ॥ ३५ ॥ श्रद्धया आस्तिक्येन । भक्त्या प्रेम्णा । रक्ताः स्निग्धाः । तन्मातर इति वत्साहरणलीलाभिप्रायेण बहुवचनम् । गोगोपिकास्तदा मातरोऽभवन्निति ॥ ३६ ॥ ३७ ॥

कंडके केले व तो एकेक अवयव दुर्गंधाच्या भयानें दूर नेऊन काष्ठांवर ठेऊन जाळून टाकिला. याप्रमाणें सर्व शरीराचें दहन केलें ॥ ३३ ॥ दुसरें आश्चर्य असें झालें कीं,—श्रीकृष्णानें स्तनपान केल्यामुळें तत्काळ पापरहित झालेला तो त्या राक्षसीचा देह, जळूं लागला असतां, त्यापासून अगरूच्या सुगंधासारखा सुगंधयुक्त धूर उत्पन्न झाला ॥ ३४ ॥ असो; लोकांच्या बालकांना मारणारी व रक्तभक्षण करणारी राक्षसी जी पूतना ती, मारण्याच्या इच्छेनेंहि श्रीकृष्णाला स्तन देऊन (स्तनपान करवून) जर सद्गतीला पावली तर ज्या त्याच्या[1] माता (गाई व गोपी) त्याचेठिकाणीं अतिशय प्रीतीनें युक्त होऊन त्याचें प्रिय करीत असत त्याप्रमाणें, आस्तिक्य बुद्धीनें व प्रेमलक्षणभक्तीनें परमात्म्या कृष्णाला तुलसीवगैरे अतिप्रिय वस्तूंचें समर्पण करणारा भक्त, उत्तम गतीला पावेल हें काय पुन्हा सांगितलें पाहिजे? सांगावयासच नको ॥ ३५ ॥ ३६ ॥ भगवंतानें, लोकांनीं वंद्य अशा ब्रह्मादिकांनींहि वंदन करण्यास योग्य व भक्तांच्या हृदयामध्यें राहणारे

१ ब्रह्मदेवानें, गोपबालक आणि वत्स हे चोरून नेले तेव्हां श्रीकृष्णानें गोपबालकांचीं व वत्सांचीं स्वरूपें धारण केलीं होतीं म्हणून त्यावेळीं त्या वत्सवत्सपालरूपी भगवंताच्या माता गोपी व गाई झाल्या होत्या. त्या अभिप्रायानें येथें 'त्याच्या माता, असें बहुवचन घातलें आहे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अशा आपल्या पायांनीं जिच्या शरीरावें आक्रमण करून स्तनपान केलें ती पूतना राक्षसीहि जर देवकीयशोदांना प्राप्त होण्यास योग्य अशा गतीला पावली तर ज्यांचें स्तनसंबंधी दूध कृष्णानें प्राशन केलें आहे त्या गाई व गोपी, त्या गतीला पावतील हें काय सांगावें ! ॥ ३७ ॥ ३८ ॥ तर हे राजा, कैवल्यादिक सर्व पुरुषार्थ देणाऱ्या देवकीपुत्र भगवान् श्रीकृष्णानें, ज्यांचीं पुत्रस्नेहानें गलित झालेलीं दुग्धें संतोषपूर्वक प्राशन केलीं, त्या श्रीकृष्णाचेठिकाणीं निरंतर पुत्रदृष्टीनें स्नेह करणाऱ्या गाईगोपींना, अज्ञानापासून प्राप्त होणारा संसारच पुन्हा प्राप्त होण्यास योग्य नाहीं ॥ ३९ ॥ ४० ॥ असो. पूतनेचें प्रेत दहन केलें तेव्हां चितासंबंधी धुराचा सुटलेला अगरूसारखा वास, पूतना राक्षसी येण्याच्या पूर्वींच गाई चारण्याकरितां दूर गेलेल्या गोकुळवासी लोकांनीं घेऊन, 'काय हें आश्चर्य ! कोठून हा सुगंध येतो' असें बोलत बोलत ते गोकुळांत प्राप्त

॥ ३८ ॥ ३९ ॥ ४० ॥ ४१ ॥ ४२ ॥ ४३ ॥ एतदार्भकमर्भकचरितम् । किं तत् । पूतनामोक्षमिति ॥ ४४ ॥ अत्तुं दैत्यकुलानीशः पूतनायाः शिशुच्छलात् ॥ स्तन्यापोशनतः प्राणैः प्राणाहुतिमकल्पयत् ॥ १ ॥ इति श्रीमद्भागवते दशमपूर्वार्धे टीकायां षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥ ॥ उत्क्षिपन् शकटं व्योम्नि तृणावर्तमधः क्षिपन् ॥ दर्शयन्विश्वमास्ये

यातुधान्यपि सा स्वर्गमवाप जननीगतिम् ॥ कृष्णभुक्तस्तनक्षीराः किमु गावोऽनुमातरः ॥ ३८ ॥ पयांसि यासामपिबत्पुत्रस्नेहस्नुतान्यलम् ॥ भगवान्देवकीपुत्रः कैवल्याद्यखिलप्रदः ॥ ३९ ॥ तासामविरतं कृष्णे कुर्वतीनां सुतेक्षणम् ॥ न पुनः कल्पते राजन्संसारोऽज्ञानसंभवः ॥ ४० ॥ कटधूमस्य सौरभ्यमवघ्राय व्रजौकसः ॥ किमिदं कुत एवेति वदंतो व्रजमाययुः ॥ ४१ ॥ ते तत्र वर्णितं गोपैः पूतनागमनादिकम् ॥ श्रुत्वा तन्निधनं स्वस्ति शिशोश्चासन्सुविस्मिताः ॥ ४२ ॥ नंदः स्वपुत्रमादाय प्रेत्यागतमुदारधीः ॥ मूर्ध्न्युपाघ्राय परमां मुदं लेभे कुरूद्वह ॥ ४३ ॥ य एतत्पूतनामोक्षं कृष्णस्यार्भकमद्भुतम् ॥ शृणुयाच्छ्रद्धया मर्त्यो गोविंदे लभते रतिम् ॥ ४४ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥ ॥ राजोवाच ॥ येन येनावतारेण भगवान्हरिरीश्वरः ॥ करोति कर्णरम्याणि मनोज्ञानि च नः प्रभो ॥ १ ॥

च कृष्णः क्रीडति सप्तमे ॥ १ ॥ कृष्णार्भकसुधासिंधुसंप्लुवानंदनिर्भरः ॥ भूयस्तदेव संप्रष्टुं राजाऽन्यदभिनंदति ॥२॥ येनयेनेति । येन येन मत्स्याद्यवतारेणापि यानि यानि कर्माणि करोति तानि नः कर्णसुखावहानि मनःप्रीतिकराणि च भवंत्येव ॥ १ ॥

झाले ॥ ४१ ॥ आणि त्यांनीं तेथें गोपांनीं वर्णन केलेलीं– पूतनेचें आगमन, तिचें स्वरूपसौंदर्य, तिची कृति व तिचें मरण आणि बालकाचें कुशळ हीं श्रवण करून ते अत्यंत विस्मित झाले ॥ ४२ ॥ हे राजा, उदारबुद्धि अशा नंदानें तर, मरून वांचलेल्या अशा श्रीकृष्णपुत्राला मांडीवर घेऊन मस्तकाचेठिकाणीं अवघ्रहण केलें आणि तो परम आनंद पावला ॥ ४३ ॥ हे राजा, जो मनुष्य, हें श्रीकृष्णाचें अद्भुत बालचरित्र, भक्तिपुरःसर श्रवण करितो त्याला गोविंदाचेठिकाणीं परमप्रीति प्राप्त होते ॥ ४४ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील दशमस्कंधाच्या पूर्वार्धामध्यें पूतनामोक्षनिरूपणनामक हा सहावा अध्याय समाप्त झाला ॥ ६ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां या सातव्या अध्यायामध्यें, श्रीकृष्णानें शकटासुराला वर उडवून, तृणावर्त दैत्याला खालीं लोटून व आईला मुखामध्यें जग दाखवून क्रीडा केली, अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ श्रीकृष्णाची बाललीला श्रवण करून आनंद पावलेला राजा पुन्हा तेंच विचारण्याकरितां म्हणाला कीं,– हे समर्थ शुकाचार्य, भगवान् हरि ईश्वर, ज्या ज्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मत्स्यादिक अवतारांनीं, जीं जीं वेदोद्धरणादिक कर्में करितो तीं तीं सर्व कर्में आमच्या कानांला गोड लागणारीं व मनाला आनंद देणारींच आहेत ॥ १ ॥ तथापि जें चरित्र श्रवण करणाऱ्या पुरुषमात्राच्या मनाची ग्लानि व तिजपासून उत्पन्न होणारी नानाप्रकारची इच्छा तत्काल नाहींशी होत्ये, अंतःकरण शुद्ध होतें, हरीच्याठिकाणीं भक्ति उत्पन्न होत्ये आणि भगवद्भक्तांचेठिकाणीं सख्य होतें. तेंच हरीचें चरित्र, माझ्यावर अनुग्रह करावा असें मानीत असशील तर मला सांग ॥ २ ॥ आतां अतिउत्सुकतेनें पुनः विशेष प्रश्न करितो कीं,—आतां मनुष्यलोकीं प्राप्त होऊन मनुष्यजातीला अनुसरणाऱ्या त्या श्रीकृष्णाचें अद्भुत असें दुसरेंहि बालचरित्र मला वर्णन कर ॥ ३ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, एकेदिवशीं श्रीकृष्ण उपडा वळूं लागला ह्मणून त्याला कौतुकानें मंगलस्नान घालावयाचें होतें आणि त्याचदिवशीं श्रीकृष्णाचा जन्मनक्षत्राचा (रोहिणीचा) योग आला होता ह्मणून त्या दोन्ही उत्साहांच्या निमित्तानें गोकुळांतील सर्व सुवासिनी स्त्रिया मिळाल्या असतां, त्यांच्यामध्यें यशोदेनें, वाद्यांचा गजर, गोपींचीं गीतें व

तथापि तच्छृण्वतः पुंसः पुरुषमात्रस्यारतिर्मनोग्लानिस्तन्मूलभूता विविधा तृष्णा चापगच्छति । तथा सत्त्वशुद्धिहरिभक्तिहरिदाससख्यानि च भवंति तदेव हारं हरेश्चरितं मनोहरं वा वद । मन्यसे चेत् अनुग्रहं यदि करोषीति ॥ २ ॥ अत्यौत्सुक्येन पुनर्विशिनष्टि । अथेति । अनुरुंधतोऽनुकुर्वतः ॥ ३ ॥ उत्थानं शिशोरंगपरिवर्तनं तत्र करणीये कौतुकाप्लवे

यच्छृण्वतोऽपैत्यरतिर्वितृष्णा सत्त्वं च शुद्ध्यत्यचिरेण पुंसः ॥ भक्तिर्हरौ तत्पुरुषे च सख्यं तदेव हारं वद मन्यसे चेत् ॥ २ ॥
अथान्यदपि कृष्णस्य तोकाचरितमद्भुतम् ॥ मानुषं लोकमासाद्य तज्जातिमनुरुंधतः ॥ ३ ॥ श्रीशुक उवाच ॥ कदाचिदौत्थानि-
ककौतुकाप्लवे जन्मर्क्षयोगे समवेतयोषिताम् ॥ वादित्रगीतद्विजमंत्रवाचकैश्चकार सूनोरभिषेचनं सती ॥ ४ ॥ नंदस्य पत्नी कृतम-
ज्जनादिकं विप्रैः कृतस्वस्त्ययनं सुपूजितैः ॥ अन्नाद्यवासःस्रगभीष्टधेनुभिः संजातनिद्राक्षमशीशयच्छनैः ॥ ५ ॥ औत्थानिकौत्सुक्य-
मना मनस्विनी समागतान्पूजयती व्रजौकसः ॥ नैवाशृणोद्वै रुदितं सुतस्य सा रुदंस्तनार्थी चरणावुदक्षिपत् ॥ ६ ॥

उत्सवाभिषेके तथा तस्मिन्नेव दिने जन्मर्क्षस्यापि योगेऽतिमहोत्सवे समवेतयोषितां मिलितपुरंध्रीणां मध्ये वादित्रादिभिः शोभितमभिषेचनं सती यशोदा चकार ॥ ४ ॥ अन्नादिभिः सुपूजितैर्विप्रैः कृतमंगलम् । संजातनिद्रे अक्षिणी यस्य तमशीशयच्छायितवती । शकटस्याधस्तात्प्रेंखे ॥ ५ ॥ उदक्षिपदूर्ध्वं चालितवान् ॥ ६ ॥

ब्राह्मणांचा वेदघोष ह्यांच्यायोगानें सुशोभित असें श्रीकृष्णाला अभ्यंगपूर्वक मंगलस्नान घातलें ॥४॥ नंतर त्या नंदपत्नी यशोदेनें, ज्याचीं— आंगी टोपीवगैरे वस्त्रें लेवविणें, भूषणें घालणें, कस्तूरीचें गंध लावणें, गोरोचनाची तीट लावणें, डोळ्यांत काजळ घालणें, व आंगास उटी लावणें इत्यादिक कृत्यें केलीं आहेत व अन्न, पात्र, वस्त्रें, माळा, इच्छितपदार्थ व गाई देऊन उत्तम सत्कार केलेल्या ब्राह्मणांकडून पुण्याहवाचन करवून ज्याचें रक्षाबंधनादिक मंगलकृत्य केलें आहे अशा त्या झोंप येऊं लागलेल्या श्रीकृष्णाला, छकड्याच्या खालीं पाळण्यामध्यें हळूहळू झोंप्या काढून ओंव्या गातगात निजविलें ॥ ५ ॥ नंतर तो उपडा वळण्याचा उत्साह पुरा करण्याविषयीं उत्कंठित झालेली व उदारचित्त अशी ती यशोदा, आपल्या घरीं आलेल्या गोकुळांतील गोपीवगैरे मंडळीचा, हळदकुंकूं देणें, ओंव्या भरणें, वस्त्रभूषणादिक देणें इत्यादिकेंकरून सत्कार करीत असतां, तिनें त्या कृष्णाचें रोदन मुळींच ऐकिलें नाहीं. इकडे स्तपानाची इच्छा धरून रोदन करणारा तो श्रीकृष्ण, रडतांरडतां आपले पाय वर करून नाचवूं लागला ॥ ६ ॥ ॥ २३ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तेव्हां छकड्याच्या खालीं निजलेल्या त्या बालकाच्या विमुकल्या व पल्लवासारख्या कोमल चरणानें ताडण केलेलें तें गाडें, ज्याच्या वरचीं सोन्यारुप्याखेरीज कांशाचींवगैरे दूधदह्यादिकांनीं भरलेलीं भांडीं कोसळून पडलीं आहेत, ज्याचीं चाकें व आंस अस्ताव्यस्त होऊन पडले आहेत व ज्याच्या दांड्या मोडल्या आहेत असें होऊन उलथून पडलें ॥ ७ ॥ तेव्हां उपडा वळण्याच्या समारंभाविषयीं तेथें यशोदाप्रमुख गोकुलवासी स्त्रिया एकत्र जमल्याच होत्या, त्यांनीं व नंदादिक गोपालांनीं तो गाडा उलटलेला पाहून, त्या आश्चर्यकारक दर्शनानें ते सर्व घाबरून गेले आणि गाडें आपोआप कसें उलथून पडलें असें बोलतबोलत उत्पातादिकांच्या शंकेनें अनेक प्रकारच्या आशंका घेऊन, वादविवाद करीत असतां, शेवटीं मोहपावलेले ते सर्वजण घाबरेपणानें चोहोंकडून त्या गाड्याच्या व बालकाच्या सभोंवतीं जमले. तेव्हां हा काय उत्पात आहे? किंवा सहज आपोआपच

तदधःशयानस्य शिशोरल्पकश्चासौ प्रवालवन्मृदुश्च योंऽघ्रिस्तेन हतमनः शकटं व्यवर्तत विपरीतमपतत् । कथम् । विध्वस्तानि नानारसवंति कुप्यभाजनानि स्वर्णरजतातिरिक्तकांस्यादिमयानि यथा भवंति तथा । चक्रे च अक्षश्च चक्राक्षाः व्यत्यस्ताश्चक्राक्षा यस्मिन् विभिन्नः कूबरो युगंधरो यस्य तच्च तच्च यथा भवति तथा व्यवर्ततेति ॥ ७ ॥ अद्भुतदर्शनेनाकुला बभूवुः । तदेवाह । कथमिति । विपर्ययगाद्विपरीतमपतदिति ॥ ८ ॥ ९ ॥ न श्रद्दधिरे विश्वासं न जग्मुः । उत अपि । बालस्यैतन्न संभवति एते च बालाः किं

अधःशयानस्य शिशोरनोऽल्पकप्रवालमृद्वंघ्रिहतं व्यवर्तत ॥ विध्वस्तनानारसकुप्यभाजनं व्यत्यस्तचक्राक्षविभिन्नकूबरम् ॥ ७ ॥ दृष्ट्वा यशोदाप्रमुखा व्रजस्त्रिय औत्थानिके कर्मणि याः समागताः ॥ नंदादयश्चाद्भुतदर्शनाकुलाः कथं स्वयं वै शकटं विपर्यगात् इति ब्रुवंतोऽतिविवादमोहिता जनाः समंतात्परिवव्रुरार्तवत् ॥ ८ ॥ ऊचुरव्यवसितमतीन्गोपान्गोपीश्च बालकाः ॥ रुदताऽनेन पादेन क्षिप्तमेतन्न संशयः ॥ ९ ॥ न ते श्रद्दधिरे गोपा बालभाषितमित्युत ॥ अप्रमेयं बलं तस्य बालकस्य न ते विदुः ॥ १० ॥ रुदंतं सुतमादाय यशोदा ग्रहशंकिता ॥ कृतस्वस्त्ययनं विप्रैः सूक्तैः स्तनमपाययत् ॥ ११ ॥ पूर्ववत्स्थापितं गोपैर्बलिभिः सपरिच्छदम् ॥ विप्रा हुत्वाऽर्चयांचक्रुर्दध्यक्षतकुशांबुभिः ॥ १२ ॥

जानंतीति ॥ १० ॥ रक्षोघ्नैः सूक्तैः कृत्वा ॥ ११ ॥ भगवत्प्रभावानभिज्ञविप्रचेष्टितं विडंबयन्नाह । पूर्ववदित्यादिना । बलिभिः शक्तैः । यद्वा अष्टदिक्षु बलिभिः सहितं सपरिकरं यथा पूर्वं स्थापितं विप्राः दध्यादिभिरर्चयामासुः । हुत्वा ग्रहादिहोमं विधाय ॥ १२ ॥

हें गाडें उलथून पडलें अशा संशयांत पडेसेल्या त्या गोपांना व गोपींना, तेथें खेळत असलेल्या बालकांनीं असे संगितलें कीं, रडत असलेल्या या कृष्णानेंच आपल्या पायानें हें गाडें उलथून पाडलें आहे, ~~यांत संशय नाहीं~~ ॥ ८ ॥ ९ ॥ परंतु त्या नंदादिक गोपांनीं, हे बालक कांहींतरी सांगत आहेत असें समजून, त्यांचें बोलणें खरें मानिलें नाहीं. कारण, त्यांनीं त्या श्रीकृष्णबालकाचें अपरिमित बळ जाणिलें नव्हतें ॥ १० ॥ ~~असो.~~ रडणाऱ्या त्या मुलाला ग्रहण करून, याला कांहींतरी पिशाचबाधा झाली असावी अशी शंका मनांत आणणाऱ्या त्या यशोदेनें ब्राह्मणांकडून राक्षसांचा नाश करणाऱ्या मंत्रांनीं त्याला आंगारा लावून व आशीर्वाद देवून, मग त्याच्याकडून स्तनपान करविलें ॥ ११ ॥ ~~आतां भगवंताचें सामर्थ्य न जाणणाऱ्या ब्राह्मणाचें चेष्टित सांगतो~~—ब्राह्मणांनीं बलाढ्य गोपांकडून तो गाडा पूर्ववत् स्थापन करवून व कृष्णालाहि बाळलेण्यासह पाळण्यांत पूर्वींप्रमाणें ठेवून ग्रहशांत्यर्थ नवग्रहांचा यज्ञ करून, त्या कृष्णासहित असलेल्या गाड्यासभोंवतीं आठदिशांचेठिकाणीं आठ लोकपाळांना बलि

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अर्पण केले आणि त्या बालकाचें दहीं अक्षता व कुशोदक यांच्या योगानें पूजन केलें ॥ १२ ॥ निश्चययुक्त असा नंदगोपानेंहि, जे ब्राह्मण, गुणांवर दोषारोप, असत्य भाषण, दांभिकपणा, शांतीचा अभाव, हिंसा व अभिमान या दुर्गुणांनीं रहित असतात, त्या सत्यशील ब्राह्मणांनीं दिलेले आशीर्वाद निष्फळ होत नाहींत असें मनांत आणून, त्या बालकाला आपल्याजवळ घेऊन, त्या ब्राह्मणांकडून पुण्याहवाचन करवून, अरिष्टशांत्यर्थ होम करवून व सामवेद ऋग्वेद व यजुर्वेद यांनीं संस्कार केलेल्या व आंत पवित्र ओषधि टाकलेल्या उदकांनीं अभिषेक करवून त्या ब्राह्मणांना, षड्रसगुणयुक्त अन्नाचें समर्पण केलें ॥ १३ ॥ १४ ॥ १५ ॥ आणि त्यांना, आपल्या पुत्राचा अभ्युदय होण्याकरितां, सुशीलत्वादिक गुणांनीं युक्त आणि वस्त्रांच्या झुली, फुलांच्या माळा व सुवर्णपुष्पांच्या माळा घातलेल्या गाई अर्पण केल्या. त्यावेळीं त्या ब्राह्मणांनींहि आशीर्वाद दिले

असूया गुणे दोषाविष्करणम् । ईर्ष्या अक्षांतिः । तेषामाशिषः । कृतास्तैः प्रयुक्ताः ॥ १३ ॥ इत्येवमभिप्रेत्य सामर्ग्यजुर्भिरुपाकृतैः संस्कृतैः । पवित्रा ओषधयो येषु जलेषु तैः कृत्वा द्विजोत्तमैः कर्तृभिरभिषिच्याभिषेकं कारयित्वा ॥ १४ ॥ हुत्वा हावयित्वा ॥ १५ ॥ गावो गाश्च प्रादात् । अन्वयुंजत आशिषो युयुजः ॥ १६ ॥ तास्तथैव बभूवुरित्यर्थः

येऽसूयानृतदंभेर्ष्याहिंसामानविवर्जिताः ॥ न तेषां सत्यशीलानामाशिषो विफलाः कृताः ॥ १३ ॥ इति बालकमादाय सामर्ग्यजुरुपाकृतैः ॥ जलैः पवित्रौषधिभिरभिषिच्य द्विजोत्तमैः ॥ १४ ॥ वाचयित्वा स्वस्त्ययनं नंदगोपः समाहितः ॥ हुत्वा चाग्निं द्विजातिभ्यः प्रादादन्नं महागुणम् ॥ १५ ॥ गावः सर्वगुणोपेता वासः स्रग्रुक्ममालिनीः ॥ आत्मजाभ्युदयार्थाय प्रादात्ते चान्वयुंजत ॥ १६ ॥ विप्रा मंत्रविदो युक्तास्तैर्याः प्रोक्तास्तथाऽऽशिषः ॥ ता निष्फला भविष्यंति न कदाचिदपि स्फुटम् ॥ १७ ॥ एकदाऽऽरोहमारूढं लालयंती सुतं सती ॥ गरिमाणं शिशोर्वोढुं न सेहे गिरिकूटवत् ॥ १८॥ भूमौ निधाय तं गोपी विस्मिता भारपीडिता ॥ महापुरुषमादध्यौ जगतामास कर्मसु ॥ १९ ॥ दैत्यो नाम्ना तृणावर्तः कंसभृत्यः प्रणोदितः ॥ चक्रवातस्वरूपेण जहारासीनमर्भकम् ॥ २० ॥

॥ १७ ॥ उत्क्षिप्य मृदुपादेन शकटं व्योम्नि लीलया ॥ तृणावर्तं पदाऽऽपीड्य भुव्यपातयदर्भकः ॥ आरोहमुत्संगम् ॥ १८ ॥ तृणावर्तात्स्वमृत्युपरिहाराय कृष्णेनैवात्मनं उत्संगादुत्ताराय कृतं भारमजानत्युत्पातशंकया महापुरुषमादध्यौ । श्रीकृष्णोदरवर्तिनां जगतां भारेण पीडिता विस्मिता च सती । यद्वा जगतां मध्ये कर्मसु आस बभूव । न तु जगदुदरं तं वेदेत्यर्थः ॥ १९ ॥ २० ॥

॥ १६ ॥ हे राजा, जे ब्राह्मण मंत्रवेत्ते व योगाभ्यासी आहेत त्यांनीं जे आशीर्वाद उच्चारिले ते तसेच होणार, ते कधींहि निष्फळ होणार नाहींत हें स्पष्ट आहे ॥ १७ ॥ एके वेळीं ती साध्वी यशोदा, आपल्या मुलाला मांडीवर घेऊन त्याला कुरवाळीत व खेळवीत असतां, एकाएकीं पर्वताच्या शिखराप्रमाणें जड लागणाऱ्या त्या कृष्णाचा भार, सहन करण्यास ती समर्थ झाली नाहीं ॥ १८ ॥ तेव्हां श्रीकृष्णाच्या उदरीं असणाऱ्या जगतांच्या भारानें पीडित झाल्यामुळें विस्मित झालेल्या त्या यशोदेनें, त्याला भूमीवर ठेवून ' तृणावर्तापासून आपला (मातेचा) मृत्यु चुकविण्याकरितां आपणाला मांडीवरून खालीं ठेवावें ह्मणून कृष्णानेंच केलेला भार न जाणून' तिनें उत्पाताच्या शंकेनें महापुरुष भगवंताचें (परमेश्वरा , तूं दिलेल्या पुत्राचें तूंच रक्षण कर) असें ध्यान केलें व सृष्टिक्रमाप्रमाणें ती आपलीं कामें करूं लागली ॥ १९ ॥ इकडे लहानमुलांना मारण्याकरितां कंसानें पाठविलेला कंसाचा सेवक तृणावर्त नांवाचा दैत्य, चक्रवाताच्या (वावटळीच्या) स्वरूपानें गोकुळांत आला आणि त्यानें, धुळीच्या योगानें सर्व गोकुळ आच्छादन

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करून, सर्वांचे डोळे अगदीं धुळीनें झांकून टाकिले आणि भयंकर मोठ्या शब्दानें पूर्वादिक दिशा व आग्नेयादिक विदिशा नादित करून आंगणांत जमिनीवर बसलेल्या, कृष्णाला उचलून आकाशांत नेलें ॥ २० ॥ २१ ॥ त्यावेळीं दोन घटिकापर्यंत सर्व गोकुळ, धुळीनें व अंधकारानें व्यापून गेलें होतें. यशोदेनें जेथें आपला मुलगा ठेविला होता तेथें तो तिला दिसत नाहींसा झाला ॥ २२ ॥ तृणावर्तानें उत्पन्न केलेली वाळू डोळ्यांत शिरून घाबरलेला सर्वजन, कोणीच आपणास किंवा दुसऱ्यास पाहत नाहींसा झाला ॥ २३ ॥ याप्रमाणें भयंकर अशा वायुचक्रापासून धुळीचा गोकुळांत वर्षाव होऊं लागला असतां, मुलाचा मार्ग न पाहून तो पाहण्याच्या उपायाविषयीं असमर्थ झालेली ती माता यशोदा, वारंवार त्या मुलाच्या गुणांचें स्मरण करीत, जशी वासरूं मरण पावलेली गाय अतिदीनपणानें हंबरडे फोडते त्याप्रमाणें करुणस्वरानें शोक करूं लागली व शोकानें व्याकुळ होऊन भूमीवर मूर्छित पडली ॥ २४ ॥ नंतर धुळीच्या वर्षावाचा वेग कमी होऊन तो वावटळीचा वाराहि कमी झाला असतां, गोपींनीं यशोदेचें रुदन

ईरयन्निनादयन्नित्यर्थः ॥ २१ ॥ यतो यत्र न्यस्तवती तस्मिन्स्थाने नापश्यत् ॥ २२ ॥ २३ ॥ खरपवनचक्रात्पांसुवर्षे सति ॥ २४ ॥ उपारतः पांसुवर्षस्य वेगो यस्मिंस्तथा भूते

गोकुलं सर्वमावृण्वन्मुष्णंश्चक्षूंषि रेणुभिः ॥ ईरयन्सुमहाघोरशब्देन प्रदिशो दिशः ॥ २१ ॥ मुहूर्तमभवद्गोष्ठं रजसा तमसाऽऽवृतम् ॥ सुतं यशोदा नापश्यत्तस्मिन्न्यस्तवती यतः ॥ २२ ॥ नापश्यत्कश्चनात्मानं परं चापि विमोहितः ॥ तृणावर्तनिसृष्टाभिः शर्कराभिरुपद्रुतः ॥ २३ ॥ इति खरपवनचक्रपांसुवर्षे सुतपदवीमबला विलक्ष्य माता ॥ अतिकरुणमनुस्मरंत्यशोचद्भुवि पतिता मृतवत्सका यथा गौः ॥ २४ ॥ रुदितमनु निशम्य तत्र गोप्यो भृशमनुतप्तधियोऽश्रुपूर्णमुख्यः ॥ रुरुदुरनुपलभ्य नंदसूनुं पवन उपारतपांसुवर्षवेगे ॥ २५ ॥ तृणावर्तः शांतरयो वात्यारूपधरो हरन् ॥ कृष्णं नभोगतो गंतुं नाशक्नोद्भूरिभारभृत् ॥ २६ ॥ तमश्मानं मन्यमान आत्मनो गुरुमत्तया ॥ गले गृहीत उत्स्रष्टुं नाशक्नोदद्भुतार्भकम् ॥ २७ ॥ गलग्रहणनिश्चेष्टो दैत्यो निर्गतलोचनः ॥ अव्यक्तरावो न्यपतत्सहबालो व्यसुर्व्रजे ॥ २८ ॥

पवने सति तत्र तस्या रुदितमनु निशम्य गोप्यो रुरुदुः ॥ २५ ॥ वात्या चक्रवातस्तद्रूपधरः कृष्णं हरन् शांतरयः कथंचिन्नभोगतस्ततः परं गंतुं नाशक्नोदित्यर्थः ॥ २६ ॥ गुरुमत्तयाऽतिगौरवेण तं तथा अश्मानमश्मवंतं पर्वतप्रायं मन्यमानस्तेनैवात्मनो गले गृहीतत्वात्तं त्यक्तुमिच्छन्नपि नाशक्नोदित्यर्थः ॥ २७ ॥ २८ ॥

ऐकून तिच्याजवळ आल्या, आणि तेथें श्रीकृष्णाला न पाहोन त्या अत्यंत दुःखितचित्त व ज्यांच्या मुखांवरून दुःखाश्रु वाहत आहेत अशा होऊन, रुदन करूं लागल्या ॥ २५ ॥ इकडे, तृणावर्तहि वावटळीचें स्वरूप धारण करून कृष्णाचें हरण करीत असतां कसातरी वर आकाशांत गेला, परंतु भगवंतानें त्याला मारण्याकरितां पुन्हा जडत्व स्वीकारल्यामुळें तो कृष्णाला घेऊन पुढें (मथुरेस) जाण्यास समर्थ झाला नाहीं, तर कृष्णाच्या भारानें त्याचा जाण्याचा वेग बंद झाला ॥ २६ ॥ तेव्हां त्यानें दैत्यरूप धारण करून कृष्णाला मारण्याचें मनांत आणिलें असतां, श्रीकृष्णानें त्याला गळ्यास मिठी मारून धरिलें. त्यावेळीं गळ्याचेठिकाणीं धरिलेला तो दैत्य, आपल्यापेक्षांहि अतिशय जड असलेल्या त्या अद्भुत बालकाला (श्रीकृष्णाला) पर्वतप्राय मानीत होत्साता, त्याला गळ्यापासून सोडवून दूर करण्याविषयींसुद्धां समर्थ झाला नाहीं ॥ २७ ॥ तर गळा धरण्यानेंच निश्चेष्ट झालेला, डोळे बाहेर आलेला व शब्द बंद होऊन गतप्राण झालेला तो दैत्य, बालकासहवर्तमान गोकुळामध्यें गोपालांनीं दोहनादिकांचा विचार करा-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

 वयास बसण्याकरितां एक मोठी शिळा स्थापन केली होती तिच्यावर पडला ॥ २८ ॥ त्यावेळीं एकठिकाणीं जमून रुदन करीत असलेल्या स्त्रियांनीं, जसा रुद्राच्या बाणानें
॥ २९ ॥ विद्ध होऊन त्रिपुरासुर खालीं पडला त्याप्रमाणें आकाशांतून खालीं शिळेवर पडलेल्या व सर्व अवयव फुटून गेलेल्या त्या भयंकर दैत्याला अवलोकन केलें ॥ २९ ॥ आणि
त्याच्या वक्षस्थळावर लोंबत असलेल्या श्रीकृष्णाला अवलोकन करून, त्या गोपींनीं त्याला त्वरेनें उचलून घेऊन त्याच्या मातेपाशीं नेऊन दिलें आणि त्या सर्व विस्मित
झाल्या. याप्रमाणें आकाशमार्गानें राक्षसानें नेलेल्या तथापि मृत्यूच्या मुखांतून सुटून येऊन खुशाल असलेल्या त्या श्रीकृष्णाला पुनः पावोन, यशोदादिक गोपी व नंदादिक सर्व गोप अतिशयच हर्ष पावले ॥ ३० ॥ आणि परस्पर ह्मणूं लागले कीं, अहो केवढें मोठें हें आश्चर्य! असें आह्मी कोठेंच पाहिलें किंवा ऐकिलेंहि नाहीं; हा बालक, राक्षसानें मारून टाकिला असतांहि पुन्हा आपणच प्राप्त झाला. तेव्हां दुसरे त्यांस ह्मणाले कीं, – अहो ह्यांत काय आश्चर्य आहे? हें असेंच व्हावयाचें. कारण, हा दैत्य, क्रूरस्वभावाचा घातकी होता ह्मणून तो आपल्या पापानेंच मरण पावला. साधूची सर्वत्र समदृष्टि असल्ये ह्मणून तो भयापासून मुक्त होतो. आह्मी व आमच्या ह्या मुलानें कोणाचा घात-

॥ २९ ॥ तस्योरसि लंबमानं कृष्णमादाय मात्रे प्रतिहृत्य समर्प्य विस्मिताश्च बभूवुरिति। विहायसा गगनमार्गेण पुरुषादेन नीतं तथापि मृत्युमुखात्प्रमुक्तं पुनर्लब्ध्वा मोदं प्रापु-

तमंतरिक्षात्पतितं शिलायां विशीर्णसर्वावयवं करालम् ॥ पुरं यथा रुद्रशरेण विद्धं स्त्रियो रुदंत्यो ददृशुः समेताः ॥ २९ ॥ प्रादाय मात्रे प्रतिहृत्य विस्मिताः कृष्णं च तस्योरसि लंबमानम् ॥ तं स्वस्तिमंतं पुरुषादनीतं विहायसा मृत्युमुखात्प्रमुक्तम् ॥ गोप्यश्च गोपाः किल नंदमुख्या लब्ध्वा पुनः प्रापुरतीव मोदम् ॥ ३० ॥ अहो बतात्यद्भुतमेष रक्षसा बालो निवृत्तिं गमितोऽभ्यगात्पुनः ॥ हिंस्रः स्वपापेन विहिंसितः खलः साधुः समत्वेन भयाद्विमुच्यते ॥ ३१ ॥ किं नस्तपश्चीर्णमधोक्षजार्चनं पूर्तेष्टदत्तमुत भूतसौहृदम् ॥ यत्संपरेतः पुनरेव बालको दिष्ट्या स्वबंधून्प्रणयन्नुपस्थितः ॥ ३२ ॥ दृष्ट्वाऽद्भुतानि बहुशो नंदगोपो बृहद्वने ॥ वसुदेववचो भूयो मानयामास विस्मितः ॥ ३३ ॥ एकदाऽर्भकमादाय स्वांकमारोप्य भामिनी ॥ प्रस्नुतं पाययामास स्तनं स्नेहपरिप्लुता ॥ ३४ ॥

रिति ॥ ३० ॥ परस्परं हर्षकथामाहुः । अहो बतेति । निवृत्तिं गमितो मृत्युं प्रापितः । कोऽत्र विस्मयो युज्यत एवैतदिति । तेष्वेव केचिदाहुः । हिंस्र इति ॥ ३१ ॥ नोऽस्माभिः चीर्णं कृतम् । पूर्तं वापीकूपादिनिर्माणम् । इष्टं पंचयज्ञाग्निहोत्रादि । दत्तं दानम् । यद्यस्मात्तपआदेः । प्रणयन्हर्षयन् ॥ ३२ ॥ ३३ ॥ ३४ ॥

पात केलेला नाहीं ह्मणून हा मृत्यूपासूनहि सुटला आहे ॥ ३१ ॥ अहो, आह्मी जन्मांतरीं कृच्छ्रचांद्रायणादिक काय तप केलें होतें, किंवा भगवंताचें पूजन केलें होतें अथवा वापीकूपतडागादिक निर्माण केलीं होतीं, किंवा पंचमहायज्ञ आचरण केले होते यद्वा तुलापुरुषादिक दानें दिलीं होतीं, किंवा सर्व प्राणिमात्रांचा भगवद्बुद्धीनें सन्मान केला होता हें कांहींच आह्मी जाणत नाहीं. ज्या पुण्याच्या योगानें मरण पावलेलाहि हा बालक, आपले बंधु अशा आह्मांला हर्ष उत्पन्न करीत पुन्हा प्राप्त झाला आहे. एकंदरींत
हें फार चांगलें झालें ॥ ३२ ॥ असो. याप्रमाणें त्या बृहद्वननामक गोकुळामध्यें बहुत आश्चर्यकारक चमत्कार पाहून विस्मित झालेल्या नंदगोपानें, ‘ गोकुलांत उत्पात होत ॥ २८ ॥
आहेत, हें वसुदेवाचें वचनच वारंवार खरें होत आहे असें मानिलें ॥ ३३ ॥ आतां तृणावर्त दैत्य आला त्यावेळीं आपला जडपणा पाहून शंकायुक्त झालेल्या मातायशोदेला बोध करण्यासाठीं श्रीकृष्णानें आपल्या मुखामध्यें जांभईच्या वेळीं तिला ब्रह्मांड दाखविलें, तो प्रकार सांगतो– एकेवेळीं पुत्रस्नेहानें व्याप्त अशा परमसौभाग्ययुक्त यशोदेनें,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

खेळत असलेल्या कृष्णाला घेऊन आपल्या मांडीवर बसविलें आणि त्याला दूध स्रवत असलेला स्तन पाजविला ॥ ३४ ॥ हे राजा, तेव्हां स्तनपान बहुतेक होत आलेल्या त्या कृष्णाचें सुंदर हास्ययुक्त मुख, चुंबन घेऊन कुरवाळीत असणाऱ्या त्या माता यशोदेनें, अकस्मात जांभई देणाऱ्या त्याच्या मुखामध्यें हें बाहेर दिसत असलेलें सर्व जग अवलोकन केलें ॥ ३५ ॥ तें असें कीं,— आकाश, स्वर्ग, पृथ्वी, नक्षत्रमंडळ, दिशा, सूर्यचंद्र, अग्नि, वायु, सप्तसमुद्र, द्वीपें पर्वत व त्या पर्वतांपासून झालेल्या नद्या, वनें व स्थावरजंगमात्मक सर्व प्राणी ॥ ३६ ॥ असें हें सर्व जग अवलोकन करून हे राजा, ती मृगशावनयना यशोदा, एकाएकीं भयातीत होऊन थरथर कांपूं लागली आणि डोळे झांकून हें काय माझ्या दृष्टीस पडलें असें मानून आश्चर्ययुक्त झाली ॥ ३७ ॥ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील पूर्वार्धामध्यें शकटतृणावर्तदैत्यभंगकथनरूप हा सातवा अध्याय समाप्त झाला ॥ ७ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या आठव्या अध्यायामध्यें गर्गाचार्यांनें केलेलें श्रीकृष्णाचें

तृणावर्तागमे दृष्टगौरवाशंकिनीं प्रसूम् ॥ बोधयन् दर्शयामास जृंभमाणो मुखे जगत् ॥ १ ॥ पीतप्रायस्य पीतः प्रायः स्तनो येन तस्य ॥ ३५ ॥ नगान्गिरींस्तद्दुहितॄर्नदीः ॥ ३६ ॥ ३७ ॥ इति दशमे टीकायां सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥ ॥ अष्टमे नामकर्मास्य बालक्रीडाकुतूहले ॥ मृद्भक्षणाभियोगे च विश्वरूपं निरूप्यते ॥ १ ॥ विश्वरूपादिबालस्य नि-

पीतप्रायस्य जननी सा तस्य रुचिरस्मितम् ॥ मुखं लालयती राजन् जृंभतो ददृशे इदम् ॥ ३५ ॥ खं रोदसी ज्योतिरनीकमाशाः सूर्येंदुवह्निश्वसनांबुधींश्च ॥ द्वीपान्नगांस्तद्दुहितॄर्वनानि भूतानि यानि स्थिरजंगमानि ॥ ३६ ॥ सा वीक्ष्य विश्वं सहसा राजन्संजातवेपथुः ॥ संमील्य मृगशावाक्षी नेत्रे आसीत्सुविस्मिता ॥ ३७ ॥ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे तृणावर्तमोक्षो नाम सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ गर्गः पुरोहितो राजन्यदूनां सुमहातपाः ॥ व्रजं जगाम नंदस्य वसुदेवप्रचोदितः ॥ १ ॥ तं दृष्ट्वा परमप्रीतः प्रत्युत्थाय कृतांजलिः ॥ आनर्चाधोक्षजधिया प्रणिपातपुरःसरम् ॥ २ ॥ सूपविष्टं कृतातिथ्यं गिरा सूनृतया मुनिम् ॥ नंदयित्वाऽब्रवीद्ब्रह्मन्पूर्णस्य करवाम किम् ॥ ३ ॥ महद्विचलनं नृणां गृहिणां दीनचेतसाम् ॥ निःश्रेयसाय भगवन्कल्पते नान्यथा क्वचित् ॥ ४ ॥

शम्याशंकिनः पितुः ॥ नामकृद्गर्गवाक्येन निजं तत्त्वमसूसुचत् ॥ २ ॥ १ ॥ २ ॥ ३ ॥ पूर्णश्चेत्कथं धनिनां गृहमागतस्तत्राह । महद्विचलनमिति । महतां स्वाश्रमादन्यत्र विचलनं न स्वार्थं किंतु गृहिणां मंगलाय । ननु तर्हि त एव महद्दर्शनार्थं किमिति नागच्छंति तत्राह । दीनचेतसां कृपणानां क्षणमपि गृहं त्यक्तुमशक्नुवतामित्यर्थः ॥ ४ ॥

नामकरण व बाललीलारूप कौतुकामध्यें त्याच्यावर मृत्तिकाभक्षणाची आळ आली असतां त्याच्या मुखामध्यें यशोदेला झालेलें विश्वरूपाचें दर्शन हीं वर्णन केलीं आहेत ॥ १ ॥ नामकरण करणाऱ्या गर्गऋषीच्या वाक्यानें आपलें तत्त्व सुचविलें आहे ॥ २ ॥ आईनें आपलें विश्वरूप पाहिलें तें ऐकून मनांत शंका धारण करणाऱ्या पित्यालाहि (नंदाला) श्रीकृष्णानें ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला— हे राजा, महातपस्वी जो गर्गमुनि तो यादवांचा पुरोहित होता; ह्मणून पुत्रांच्या नामकरणाकरितां वसुदेवानें त्यास सुचविलें असतां, तो एकेवेळीं नंदाच्या गोकुळांत प्राप्त झाला ॥ १ ॥ त्याला पाहतांच अत्यंत संतुष्ट झालेल्या नंदानें, उठून उभें राहून त्यास हात जोडिले आणि हा मुनि साक्षात् विष्णूच आहे अशा बुद्धीनें नमस्कारपूर्वक त्याची पूजा केली ॥ २ ॥ नंतर आतिथ्य सत्कार केलेला तो मुनि आसनावर स्वस्थपणें बसला असतां, त्याला मधुर वाणीनें आनंद देऊन नंद ह्मणाला कीं,—हे ब्रह्मनिष्ठा, पूर्णमनोरथ अशा आपली, आह्मी कोणती शुश्रूषा करावी? ॥ ३ ॥ आतां मी जर पूर्णमनोरथ आहें तर तुझ्या घरीं कसा आलों? असें ह्मण-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शील तर–हे सर्वज्ञा, आपल्यासारख्या थोरांचें आपल्या आश्रमांतून दुसऱ्यांचे घरीं जाणें बहुशः घडतच नाहीं. जर कदाचित् घडलें तर तें त्या दीनचित्त गृहस्थाश्रमी लोकांचें कल्याण करण्यासाठींच असतें, त्याखेरीज आपल्या स्वार्थाकरितां नसतें ॥ ४ ॥ आतां त्याला मुलांचें नामकरण करण्यास सांगण्यासाठीं त्याच्या ज्ञानाचा अतिशय सांगतो–हे गर्गऋषे, इंद्रियांना होत नसलेलें ज्ञान ज्यापासून प्राप्त होतें तें ज्योतिःशास्त्र तूं स्वतः रचिलें आहेस. ज्या ज्योतिःशास्त्राच्या योगानें पुरुषाला, भूतभविष्य ज्ञान समजतें ॥ ५ ॥ असा तूं ज्योतिषी असून मंत्रवेत्त्यांमध्येंहि श्रेष्ठ आहेस, त्यापेक्षां या दोन्हीं बालकांचे नामकरणादिक संस्कार करण्याची कृपा करावीस. आतां हें गुरूचें कृत्य आहे असें म्हणणशील तर–ब्राह्मण हा जन्मतांच सर्व मनुष्यांचा गुरु आहे ॥ ६ ॥ याप्रमाणें भाषण करून अतिउत्साहयुक्त झालेल्या नंदाला ' हें गुप्तरीतीनें केलें पाहिजे अशा

त्वया बालयोर्नामकरणादि करणीयमिति वक्तुं तस्य ज्ञानातिशयमाह । ज्योतिषामयनमिति । यदतींद्रियज्ञानसाधनं ज्योतिषामयनं तत्प्रतिपादकं ज्योतिःशास्त्रमित्यर्थः । तत्साक्षाद्भगवता प्रणीतं येनान्योऽपि पुमान्परावरं परं कारणं पूर्वजन्मकृतं कर्म अवरं कार्यं तस्मिन् जन्मनि भाविफलं तद्वेद । उक्तं च जातके । यदुपचितमन्यजन्मनि शुभाशुभं तस्य कर्मणः प्राप्तिम् ॥ व्यंजयति शास्त्रमेतत्तमसि द्रव्याणि दीप इवेति ॥ ५ ॥ विवक्षितमाह । त्वं हीति । दैवज्ञो मंत्रविच्च त्वमतो नामकरणादिसंस्कारान्कर्तुमर्हसीत्यर्थः । नन्वेतद्गुरुणा करणीयमिति चेत्तत्राह । नृणामिति ॥ ६ ॥ अत्युत्साहिनं नंदंमति गुप्तमेतत्कार्यमित्यभिप्रायेण प्रत्याचक्षाण इवाह । यदूनामिति । भवतु तथापि त्वमत्रागत इति कोविद्यादिति चे-

ज्योतिषामयनं साक्षाद्यत्तज्ज्ञानमतींद्रियम् ॥ प्रणीतं भवता येन पुमान्वेद परावरम् ॥ ५ ॥ त्वं हि ब्रह्मविदां श्रेष्ठः संस्कारान्कर्तुमर्हसि ॥ बालयोरनयोर्नृणां जन्मना ब्राह्मणो गुरुः ॥ ६ ॥ गर्ग उवाच ॥ यदूनामहमाचार्यः ख्यातश्च भुवि सर्वदा ॥ सुतं मया संस्कृतं ते मन्यते देवकीसुतम् ॥ ७ ॥ कंसः पापमतिः सख्यं तव चानकदुंदुभेः ॥ देवक्या अष्टमो गर्भो न स्त्री भवितुमर्हति ॥ ८ ॥ इति संचिंतयन् श्रुत्वा देवक्या दारिकावचः ॥ अपि हंतागताशंकस्तर्हि तन्नोऽनयो भवेत् ॥ ९ ॥

दत आह । ख्यातश्चेति ततः किमत आह । सुतमिति । कंसो मन्यते मन्येत कल्पयेदित्यर्थः ॥ ७ ॥ ननु यदुकुमार इति कथंचिज्जानातु तत्र वसुदेवस्य सुत स्तत्रापि देवक्यां जात इति कुतो जानीयात्तत्राह । पापमतिरित्यादि ॥ ८ ॥ किं मया हतया मंदेत्यादि देवकीकन्यावचः श्रुत्वा देवक्या अष्टमो गर्भो न स्त्री भवितुमर्हतीति नित्यं संचिंतयन्सामान्येन क्वचिदस्तीति ज्ञात्वा युवयोश्च सख्यं संचिंतयंस्त्वद्गृहे भवेदिति संभाव्य मत्संस्कारलिंगेन चागताशंकः आगता आशंका यस्य सः अपि यदि हंता हनिष्यति तर्हि तत्तदा नो महाननयः स्यादिति ॥ ९ ॥

अभिप्रायानें ' निषेध करीत गर्ग म्हणाला–हे नंदा, मी यादवांचा आचार्य म्हणून सर्व काल पृथिवीवर प्रसिद्ध आहें. यास्तव मी संस्कार केलेल्या तुझ्या पुत्राविषयीं कंस आपल्या मनांत, हा देवकीचाच पुत्र आहे अशी कल्पना करील ॥ ७ ॥ आतां कदाचित् यादवांचा पुत्र आहे असें जाणो, परंतु हा वसुदेवाचाच त्यांत देवकीचेठिकाणींच झालेला असें कसें जाणेल? असें म्हणशील तर–तो पापबुद्धि कंस, ' तुझा शत्रु कोठेंतरी झाला आहे असें ' देवकीच्या कन्येचें भाषण ऐकून, देवकीचा आठवा गर्भ स्त्री ॥ २६ ॥
होण्यास योग्य नाहीं असें मनामध्यें नित्य चिंतन करून साधारणपणें देवकीचा पुत्र कोठेंतरी आहे असें जाणत आहे. त्यांत तुझें व वसुदेवाचें सख्य आहे असें मनांत आणून, तोच मुलगा तुझ्या घरीं आला असावा असा तर्क करीत आहे. त्यांत मी संस्कार केला यावरून तोच हा असा निश्चय करून त्याणें जर तुझ्या मुलास मारिलें तर तो आमचा मोठा अन्याय होईल ॥ ८ ॥ ९ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नंद ह्मणाला– हे ऋषिवर्या, असें जर आहे तर माझा जवळच्या पुरुषांनींहि न पाहिलेला तूं, या गोकुळामध्यें एकांतस्थळीं पुण्याहवाचनपूर्वक या रामकृष्णांचा, द्विजातींना (ब्राह्मणक्षत्रियवैश्यांना) आवश्यक असलेला संस्कारमात्र कर, मोठें विस्तृत अनुष्ठान करूं नकोस ॥ १० ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, याप्रमाणें प्रार्थना केलेल्या त्या गर्गमुनीनें, गुप्तपणें आपणास इच्छित असलेलेंच तें बालकांचें नामकरण, एकांतस्थळीं केलें ॥ ११ ॥ गर्ग ह्मणाला– हे नंदा, हा रोहिणीचा पुत्र, आपल्या पालनपोषणादिक गुणांनीं संबंधिजनांना रमवील ह्मणून हा आपणच राम या नांवानें प्रख्यात होईल. हा लोकांपेक्षां अधिक बली असल्यामुळें याला बल असें ह्मणतील. तसाच कांहींएक कारणानें यादवांमध्यें कलह उत्पन्न झाला असतां हा त्यांना सच्छिक्षण देऊन त्यांची एकी करील ह्मणून याला संकर्षण असें ह्मणती-

---

द्विजातिसंस्कारं द्विजातीनामवश्यं कर्तव्यं संस्कारमात्रं केवलं स्वस्तिवाचनपूर्वकं कुर्विति ॥ १० ॥ ११ ॥ यदूनामपृथग्भावात्कुतश्चिद्धेतोर्विप्रतिपद्यमानानां यदूनामपृथग्भावात् । भावो भावनं तस्मात् । अन्योन्यशिक्षया सर्वैकमत्यकरणादित्यर्थः । सम्यक्कर्षत्येकीकरोतीति संकर्षणमप्युशंति मन्यंते वक्ष्यंतीत्यर्थः । गर्भसंकर्षणं तु न प्रकाशयति ॥ १२ ॥

नंद उवाच ॥ अलक्षितोऽस्मिन्रहसि मामकैरपि गोव्रजे ॥ कुरु द्विजातिसंस्कारं स्वस्तिवाचनपूर्वकम् ॥ १० ॥ श्रीशुक उवाच ॥ एवं संप्रार्थितो विप्रः स्वचिकीर्षितमेव तत् ॥ चकार नामकरणं गूढो रहसि बालयोः ॥ ११ ॥ गर्ग उवाच ॥ अयं हि रोहिणीपुत्रो रमयन्सुहृदो गुणैः ॥ आख्यास्यते राम इति बलाधिक्याद्बलं विदुः ॥ यदूनामपृथग्भावात्संकर्षणमुशंत्युत ॥ १२ ॥ आसन्वर्णास्त्रयो ह्यस्य गृह्णतोऽनुयुगं तनूः ॥ शुक्लो रक्तस्तथा पीत इदानीं कृष्णतां गतः ॥ १३ ॥ प्रागयं वसुदेवस्य क्वचिज्जातस्तवात्मजः ॥ वासुदेव इति श्रीमानभिज्ञाः संप्रचक्षते ॥ १४ ॥ बहूनि संति नामानि रूपाणि च सुतस्य ते ॥ गुणकर्मानुरूपाणि तान्यहं वेद नो जनाः ॥ १५ ॥ एष वः श्रेय आधास्यद्गोपगोकुलनंदनः ॥ अनेन सर्वदुर्गाणि यूयमंजस्तरिष्यथ ॥ १६ ॥ पुरानेन व्रजपते साधवो दस्युपीडिताः ॥ अराजके रक्ष्यमाणा जिग्युर्दस्यून्समेधिताः ॥ १७ ॥

अस्य तव पुत्रस्य । अतः कृष्ण इत्येकं नाम भविष्यति ॥ १३ ॥ प्रागयमिति सामान्योक्त्या ऋषिरयं जन्मांतरगतं नाम कथयतीति नंदो मन्यते स्म । अत एवं वासुदेव इति संप्रचक्षत इति ॥ १४ ॥ गुणानुरूपाणि ईश्वरः सर्वज्ञ इत्यादीनि । कर्मानुरूपाणि गोपतिर्गोवर्धनोद्धरण इत्यादीनि । तानि सर्वाण्यहमपि नो वेद जना अपि नो विदुरिति ॥ १५ ॥ जातकफलमाह । एष इति । आधास्यदाधास्यति ॥ १६ ॥ अनेन रक्ष्यमाणाः समेधिताश्च दस्यून्विजिग्युरिति ॥ १७ ॥

ल ॥ १२ ॥ हे नंदा, युगयुगाचेठिकाणीं देहधारण करणाऱ्या ह्या तुझ्या मुलाचे पांढरा, तांबडा व पिंवळा असे तीन दुसरेहि वर्ण आहेत. आतां तर हा कृष्णत्व पावला आहे, ह्मणून याचें कृष्ण असें एक नांव पडेल ॥ १३ ॥ हा शोभायुक्त तुझा पुत्र, पूर्वीं केव्हांतरी वसुदेवाचा पुत्र झाला होता ह्मणून याचें दुसरें वासुदेव असें नांव पडेल ॥ १४ ॥ या तुझ्या पुत्राचीं गुणांना योग्य अशीं– ईश्वर, सर्वज्ञ इत्यादिक व कर्मांना योग्य अशीं गोवर्धनोद्धरण इत्यादिक पुष्कळ नावें आणि रूपें आहेत तीं सर्व मीहि जाणत नाहीं व लोकहि जाणत नाहींत ॥ १५ ॥ गोपांच्या व गाईच्या कुळाला आनंद उत्पन्न करणारा हा पुत्र तुमचें कल्याण करील. याच्या योगानें तुह्मी सर्व संकटें अनायासानें तरून जाल ॥ १६ ॥ हे गोकुलाधिपते नंदा, पूर्वीं जेव्हां वेनराजा मरण पावला तेव्हां चोरांनीं पीडित झालेले साधु, यानें प्रभुरूपानेंच रक्षण केले व वाढविले असल्यामुळें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्यांनीं त्या चोरांना जिंकून टाकिलें होतें ॥ १७ ॥ जे महाभाग्यवान् मनुष्य ह्याचेठिकाणीं प्रीति करितात त्यांचा शत्रु पराभव, जसे दैत्य, विष्णूनें रक्षण केलेल्या देवांचा पराभव करीत नाहींत त्याप्रमाणें करीत नाहींत ॥ १८ ॥ तस्मात् हेनंदा, हा तुझा पुत्र, गुणांनीं, ऐश्वर्यानें, कीर्तीनें व पराक्रमानें केवळ नारायणासारखा आहे ह्मणून तूं याचें सावधपणानें रक्षण कर ॥ १९ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, याप्रमाणें नंदाला सांगून गर्गमुनि, आपल्या घरीं निघून गेला असतां, परमसंतोष पावलेल्या त्या नंदानें आपले मनोरथ पूर्ण झाले असें मानिलें ॥ २० ॥ आतां बलरामासहित श्रीकृष्णानें, गोकुळामध्यें बालक्रीडासंबंधीं अनेकप्रकारचे चमत्कार करून नंदाला व यशोदेला जो परम आनंद उत्पन्न केला त्याचें वर्णन करितो—नामकरण झाल्यावर थोडाच काल निघून गेला असतां, राम आणि कृष्ण हे दोघेहि गोकुळांत हातांसह गुडघ्यांनीं रांगत रांगत विहार करूं

॥ १८ ॥ १९ ॥ इति चात्मानं प्रति समादिश्य । आत्मानं कृष्णं वा । आशिषामाशीर्भिः ॥ २० ॥ बालक्रीडाचमत्कारैः कृष्णो रामेण संयुतः ॥ परमानंदमाधत्त व्रजे नंदयशोदयोः ॥ १ ॥ पूर्णत्वमेव दर्शयन्नाह । कालेनेति ॥ २१ ॥ अनुकृष्य पुनःपुनराकृष्य । सरीसृपंतावतिशयेन चलंतौ । कथम् । घोषाः कटिपादभूषणाः किंकिण्यस्तेषां प्रघोषेण रुचिरं यथा तथा तेषां घोषाणां नादेन हृष्टं मनो ययोस्तौ । लोकमितस्ततो गच्छंतं जनमनुसृत्य त्रिचतुराणि पदान्यनुगम्य मुग्धवत्प्रभीतवन्मात्रोरंति समीपे उपेयतुरुपजग्मतुः ॥ २२ ॥ तदा च तन्मातरौ निजसुतौ दोर्भ्यामुपगुह्य प्रमोदं ययतुः । कथंभूते । घृणया कृपया स्नुवंत्यौ पयःपूर्णपयोधरे सत्यौ । पंकेनांगरागेण च रुचिरौ । कथंभूतं मुखं निरीक्ष्य । मुग्धं मंदं स्मितं यस्मिन् अल्पा दशनाश्च यस्मिंस्तच्च तच्च ॥ २३ ॥ यर्ह्यंगनानां दर्शनीया कुमारलीला ययोस्तथाभूतौ जातौ तदांतर्व्रजे व्रजस्य मध्ये तदबला

य एतस्मिन्महाभागाः प्रीतिं कुर्वंति मानवाः ॥ नारयोऽभिभवंत्येतान्विष्णुपक्षानिवासुराः ॥ १८ ॥ तस्मान्नंदात्मजोऽयं ते नारायणसमो गुणैः ॥ श्रिया कीर्त्याऽनुभावेन गोपायस्व समाहितः ॥ १९ ॥ इत्यात्मानं समादिश्य गर्गे च स्वगृहं गते ॥ नंदः प्रमुदितो मेन आत्मानं पूर्णमाशिषाम् ॥ २० ॥ कालेन व्रजताऽल्पेन गोकुले रामकेशवौ ॥ जानुभ्यां सहपाणिभ्यां रिंगमाणौ विजह्रतुः ॥ २१ ॥ तावंघ्रियुग्ममनुकृष्य सरीसृपंतौ घोषप्रघोषरुचिरं व्रजकर्दमेषु ॥ तन्नादहृष्टमनसावनुसृत्य लोकं मुग्धप्रभीतवदुपेयतुरंति मात्रोः ॥ २२ ॥ तन्मातरौ निजसुतौ घृणया स्नुवंत्यौ पंकांगरागरुचिरावुपगुह्य दोर्भ्याम् ॥ दत्वा स्तनं प्रपिबतोः स्म मुखं निरीक्ष्य मुग्धस्मिताल्पदशनं ययतुः प्रमोदम् ॥ २३ ॥ यर्ह्यंगनादर्शनीयकुमारलीलावंतर्व्रजे तदबलाः प्रगृहीतपुच्छैः ॥ वत्सैरितस्तत उभावनुकृष्यमाणौ प्रेक्षंत्य उज्झितगृहा जहृषुर्हसंत्यः ॥ २४ ॥

लागले ॥ २१ ॥ ते रामकृष्ण, पुढें हात टाकून रांगतांना दोन्हीं पाय ओढीत ओढीत गोकुळांतील गोमूत्रादिकांच्या कर्दमामध्यें, कंबरेंत व पायांत घातलेल्या भूषणांस लावलेल्या घागऱ्यांच्या स्पष्ट होणाऱ्या नादानें मनोहरपणें संचार करीत असून, त्या घागऱ्यांच्या नादानें ज्याचें मन हर्षयुक्त झालें आहे असे ते, मनुष्यलोकाला अनुसरून कोणी परकी मनुष्यादिक दृष्टी पडलें ह्मणजे अज्ञानाप्रमाणें भ्याल्यासारखे होऊन आपल्या मातांजवळ परत येत असत ॥ २२ ॥ त्यावेळीं त्यांच्या माता (रोहिणी व यशोदा) कृपेनें ज्यांचे स्तन दुधानें पूर्ण भरून गळूं लागले आहेत अशा होत्सात्या, चिखलाचीं उटी लागल्यामुळें सुंदर दिसणाऱ्या त्या आपल्या पुत्रांना बाहूंनीं कवटाळून घेऊन त्यांच्या मुखांत स्तन देऊन ते स्तनपान करीत असतां, मंदहास्यसहित व लहान लहान दंतांनीं युक्त असें त्याचें मुख अवलोकन करून मोठा आनंद पावत असत ॥ २३ ॥ पुढें ते रामकृष्ण, गावांतील स्त्रियांना बाललीला दृष्टीस पडण्याजोगे मोठे झाले. तेव्हां ते गोकुळांतील वांसरांचीं पुच्छें घट्ट धरीत असत; मग पुच्छें ग्रहण केलेल्या वासरांनीं जिकडे तिकडे ओढीत नेलेल्या ॥ २७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्या रामकृष्णांना पाहणाऱ्या गोकुळांतील स्त्रिया, आपापल्या घरांतील करावयाचीं कामें सोडून देऊन तो चमत्कार पाहून हंसत होत्सात्या फारच आनंद पावत असत ॥२४॥ त्या रामकृष्णाच्या माता (रोहिणी व यशोदा) जेव्हां गाईम्हशीवगैरे शिंगांच्या जनावरांपासून, अग्नीपासून, कुतरीं डुकरेंवगैरे दाढांच्या जनावरांपासून, तलवार कुऱ्हाडीवगैरे हत्यारांपासून, पाण्यापासून, कावळे गिधाडवगैरे पक्ष्यांपासून व कुपणाच्यावगैरे काट्यांपासून, अतिचपळ आणि खेळकर अशा आपल्या मुलांचें निवारण करण्याविषयीं व घरांतील कामें आटोपण्याविषयीं समर्थ होईनांत तेव्हां त्यांच्या मनांची अगदीं धांदल होऊन जात असे. राजा, घरच्या सौख्याची पराकाष्ठा कायती हीच होय ॥ २५ ॥ हे राजर्षे, पुढें थोड्याच काळानें गोकुळामध्यें राम आणि कृष्ण हे दोघेहि रांगावयाचें सोडून देऊन पायांनीं आधाराशिवाय सहज चालूं लागले ॥ २६ ॥ नंतर तो भगवान् श्रीकृष्ण, बलरामासहवर्तमान गोकुलांतील संवगड्या बालकांना बरोबर घेऊन गोकुलवासी स्त्रियांनां हर्ष उत्पन्न करित होत्साता क्रीडा करूं लागला ॥ २७ ॥ तो

व्रजांगनास्तौ प्रेक्षंत्यः प्रेक्षमाणा विस्मृतगृहकृत्या हसंत्यो जहृषुर्हृष्टा बभूवुः । कथंभूतौ । ताभ्यां प्रगृहीतानि पुच्छानि येषां तैर्वत्सैरितस्ततोऽनुकृष्यमाणौ ॥ २४ ॥ अतिचपलौ तौ शृंग्यादिभ्यो निवेद्धुं गृहोचितानि कर्माणि च कर्तुं यत्र यदा तज्जनन्यौ न शेकाते तदालं मनसोऽनवस्थामापतुरिति गृहसौख्यस्य पराकाष्ठा दर्शिता ॥ २५ ॥ ॥ २६ ॥ २७ ॥ २८ ॥ कृष्णचापलचौर्याणि सहैवाखिलसद्व्रतः ॥ प्रजल्पंत्यः समागत्य गोप्यो गोप्यै मुदं ददुः ॥ असमयेऽदोहकाले । क्रोशे संजातहासः । स्तेयं चौर्या-

शृंग्यग्निदंष्ट्र्यसिजलद्विजकंटकेभ्यः क्रीडापरावतिचलौ स्वसुतौ निषेद्धुम् ॥ गृह्याणि कर्तुमपि यत्र न तज्जनन्यौ शेकात आपतुरलं मनसोऽनवस्थाम् ॥ २५ ॥ कालेनाल्पेन राजर्षे रामः कृष्णश्च गोकुले ॥ अघृष्टजानुभिः पद्भिर्विचक्रमतुरंजसा ॥ २६ ॥ ततस्तु भगवान्कृष्णो वयस्यैर्व्रजबालकैः ॥ सहरामो व्रजस्त्रीणां चिक्रीडे जनयन्मुदम् ॥ २७ ॥ कृष्णस्य गोप्यो रुचिरं वीक्ष्य कौमारचापलम् ॥ शृण्वत्याः किल तन्मातुरिति होचुः समागताः ॥ २८ ॥ वत्सान्मुंचन्क्वचिदसमये क्रोशसंजातहासः स्तेयं स्वाद्वत्त्यथ दधिपयःकल्पितैः स्तेययोगैः ॥ मर्कान्भोक्ष्यन्विभजति स चेन्नात्ति भांडं भिनत्ति द्रव्यालाभे स गृहकुपितो यात्युपक्रोश्य तोकान् ॥ २९ ॥

र्जितं न तु दत्तं तत्रापि स्वादु नेतरत् दधि च पयश्चात्ति । किंच भोक्ष्यन्मर्कान्मर्कटान्प्रति विभज्य ददाति तेषां मध्ये तृप्तत्वेन कोऽपि नात्ति चेत्तर्हि भांडं भिनत्ति । क्वचिद्द्रव्यस्यालाभे सति स गृहाय धक्ष्यामीति कुपितो याति । यद्वा सगृहाद्गृहिणस्तेभ्यः कुपितस्तेषां तोकान्पर्यंकादिषु सुप्तानुपक्रोश्य रोदयित्वा यातीति ॥ २९ ॥

कृष्णाचा कुमारावस्थेसंबंधीं सुंदर चपलपणा (खोड्या) पाहून नंदाच्या घरीं आपआपल्या घराहून एकत्र मिळून आलेल्या गोपी, त्या कृष्णाची आई यशोदा श्रवणकरीत असतां असें तिला स्पष्ट सांगत असत कीं–, ॥२८॥ हे यशोदे, तुझा पुत्र, एखादेवेळीं दूध काढण्याची वेळ झाली नसतांहि आमचे वत्स सोडून देतो, त्याच्यायोगानें ते वत्स सर्व दूध पितात त्यामुळें आमची मोठी हानि होत्ये. बरें त्या सोडलेल्या वत्सांना धरण्याकरितां घरांतील लोक धाऊं लागले ह्मणजे रिकाम्या घरांत शिरून आमचें चांगलें असलेलें दहीं दूधवगैरे आह्मी न देतांच चोरून खातो. अरे, या कृष्णाला ताडण करा, बांधून ठेवा, असें भय दाखविण्याकरितां ओरडलें तर हसूं लागतो, भीत नाहीं. दहीं, दूध, लोणीवगैरे पदार्थ उंचावर ठेविले असतां ते चोरण्याचे उपाय करितो. आपणच खातो असें नाहीं तर आपण खाण्याच्या पूर्वी ते माकडांना वांटून देतो; बरें त्या माकडांमध्यें तृप्त झालेल्या एखाद्या माकडानें जर दहींवगैरे खाल्लें नाहीं तर तें त्याचें भरलेलें भांडें फोडून टाकितो. बरें घरांत दहींवगैरे ठेविलें नसल्यामुळें त्याला मिळालें नाहीं तर, मी यांचीं घरें जाळून टाकितों असें ह्मणून रागावून पर्यंकादिकांवर निजविलेल्या मुलांना चिमटे काढून उठवून रडवून जातो. तो कदाचित् घरें जाळील या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भयानें आह्मांस घरांतच दहींवगैरे ठेवावें लागतें ॥ २९ ॥ त्याचे चोरण्याचे उपाय असे कीं,–कोणत्या भांड्यांत कोणता चांगला पदार्थ ठेवलेला आहे तें जाणणारा तुझा मुलगा दहींवगैरे पदार्थ, उंच शिंक्यावर ठेवलेले असल्यामुळें हातास येण्यासारखे नसल्यास ते खालीं काढण्याकरितां त्यांच्याखालीं पाट उखळवगैरे रचण्याचा उपाय करितो. तथापि जर तीं भांडीं खालीं उतरण्यास अवघड असलीं तर कोयतीवगैरे घेऊन त्यांना छिद्रें पाडितो, तीं तरी धारा अचूक बाळकांच्या तोंडांत पडण्यासारखीं पाडतो; घरांत आंधेर असला तर अनेक तेजस्वी रत्नें धारण केलेलें आपलें शरीरच पदार्थांना प्रकाश करणारें करितो. मिळून ज्या कालीं गोपी आपल्या घरच्या कामांमध्यें चित्तें गढून गेलेल्या असतात त्यावेळीं तो असे उपद्रव करितो ॥ ३० ॥ आणि देवपूजा स्वयंपाकवगैरे करण्याकरितां चागलें सारवून झाडून ठेवलेल्या घरामध्यें मूत्रपुरी-

---

कल्पितैः स्तेययोगैरित्युक्तं तत्प्रपंचयति । हस्ताग्राह्य इति । तुंगशिक्यस्थभांडेष्वंतर्निहिते दध्यादौ वयुनं ज्ञानं यस्य स छिद्रं रचयति । तद्विच्छिद्ररचनादिवित् । ध्वांतयुक्ते गृहे स्वांगमेवार्थप्रदीपं रचयति विशेषतो धृतमणिगणम् । यर्हि यस्मिन्काले ॥ ३० ॥ रे रे चोरेत्याक्षिप्तः सन्नुशति जल्पति त्वमेव चोरोऽहं गृहस्वामीत्यादीनि धाष्टर्यानि प्रागल्भ्यानि । अथवा उशति हे कमनीये यशोदे । यद्वा उशति वास्तौ स्वर्चिते गृहे मेहनादीनि पुरीषोत्सर्गादीनि कुरुते । एवं स्तेयोपायैर्विरचिताकृतिः कर्म येन सः त्वत्समीपे सुप्र-

हस्ताग्राह्ये रचयति विधिं पीठकोलूखलाद्यैश्छिद्रं ह्यंतर्निहितवयुनः शिक्यभांडेषु तद्वित् ॥ ध्वांतागारे धृतमणिगणं स्वांगमर्थप्रदीपं काले गोप्यो यर्हि गृहकृत्येषु सुव्यग्रचित्ताः ॥ ३० ॥ एवं धाष्टर्यान्युशति कुरुते मेहनादीनि वास्तौ स्तेयोपायैर्विरचितकृतिः सुप्रतीको यथास्ते ॥ इत्थं स्त्रीभिः सभयनयनश्रीमुखालोकिनीभिर्व्याख्यातार्था प्रहसितमुखी नह्युपालब्धुमैच्छत् ॥ ३१ ॥ एकदा क्रीडमानास्ते रामाद्या गोपदारकाः ॥ कृष्णो मृदं भक्षितवानिति मात्रे न्यवेदयन् ॥ ३२ ॥ सा गृहीत्वा करे कृष्णमुपालभ्य हितैषिणी ॥ यशोदा भयसंभ्रांतप्रेक्षणाक्षमभाषत ॥ ३३ ॥ कस्मान्मृदमदांतात्मन्भवान्भक्षितवान्रहः ॥ वदंति तावका ह्येते कुमारास्तेऽग्रजोऽप्ययम् ॥ ३४ ॥

तीकः साधुरिवास्ते । सभये नयने यस्मिंस्तच्च तच्छ्रीयुक्तं मुखं च तदालोकिनीभिर्व्याख्यातार्था प्रख्यापितजन्मफला तत्तत्कर्मफला वा उपालब्धुमाक्षेप्तुं नैच्छत् ॥ ३१ ॥ कदाचिदपराधांतरे उपालभत तदा तु महदाश्चर्यमभूदिति कथयन्नाह । एकदेति ॥ ३२ ॥ उपालभ्य निर्भर्त्स्य । भयेन संभ्रांतप्रेक्षणे चपलनिरीक्षणे अक्षिणी यस्य तम् ॥ ३३ ॥ अदांतात्मन् चपलगात्र । रह एकांते ॥ ३४ ॥

षोत्सर्गादिक करितो. असेच अनेक दांडगेपणाचे प्रकार करितो. अशा प्रकारच्या चोरव्या उपायांनीं विलक्षण कर्में करूनहि तुझ्या जवळ येऊन बसला कीं जसा एखादा साधूच तसा राहतो. याप्रमाणें गाऱ्हाणीं सांगण्याच्या निमित्तानें भयाभीत झालेल्या नेत्रांनीं युक्त असल्यामुळें सुशोभित असलेल्या श्रीकृष्णाच्या मुखाचें अवलोकन करणाऱ्या त्या गोपींनीं गाऱ्हाणीं सांगितलेली ती यशोदा, हास्ययुक्त मुख झाली आणि तिनें कृष्णाची निंदावगैरे करावी असें मनांत आणिलें नाहीं ॥ ३१ ॥ एकेवेळीं कांहीं अपराधप्रसंगीं तिनें मनांत आणिलें होतें परंतु तेव्हां तर मोठेंच आश्चर्य झालें. तें असें कीं, खेळत असलेल्या त्या बळरामादिक गोपबाळकांनीं यशोदेजवळ येऊन तिला कृष्णानें मृत्तिका भक्षण केली असें कळविलें ॥ ३२ ॥ तेव्हां त्याच्या हिताची इच्छा करणाऱ्या त्या यशोदेनें कृष्णाला हातीं धरिलें आणि निर्भर्त्सना करून, भयानें चपळपणें पाहणाऱ्या नेत्रांनीं युक्त अशा त्याला ती ह्मणाली कीं,–॥ ३३ ॥ हे चपलगात्रा कृष्णा, तूं एकांतीं मृत्तिका काय ह्मणून भक्षण केलीस? तुझें हित इच्छिणारे हे बालक ॥ २८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सांगत आहेत पहा! तसाच तुझ्या पूर्वी झालेला हा रामहि सांगत आहे ॥ ३४ ॥ तेव्हां कृष्ण ह्मणाला—हे माते, मी मृत्तिका भक्षण केली नाहीं. हेतर सर्वजण खोटें सांगत आहेत. जर हे खरें सांगतात असें तुला वाटत असेल तर तूं माझें मुख प्रत्यक्ष पहा ॥ ३५ ॥ बरें, असें जर आहे तर आपलें मुख पसरून दाखीव. असें तिनें सांगितलें असतां क्रीडेकरितांच मनुष्यबालक झालेला परंतु अखंडितऐश्वर्य अशा त्या भगवान् श्रीकृष्णानें, आपलें मुख पसरिलें ॥ ३६ ॥ तेव्हां यशोदेनें त्या पसरलेल्या मुखामध्यें जग पाहिलें. तें असें कीं,—स्थावर, जंगम, अंतरिक्ष लोक, दिशा, पर्वत, द्वीपें व समुद्र ह्यांसहित भूलोक; प्रवहनामक वायु, विद्युद्रूपी अग्नि; चंद्र व तारे ह्यांसहवर्तमान स्वर्गलोक; उदक,

---

नाहं भक्षितवानिति । नहि बाह्यं किंचिन्मया भक्ष्यते मत्कुक्षावादावेव सर्वमस्तीति भावः । समक्षं प्रत्यक्षम् ॥ ३५ ॥ व्यादेहि मुखं प्रसारयेति । व्यादत्त प्रसारितवान् ॥३६॥ तत्र तस्मिन्मुखे विश्वं ददृशे ददर्श । तत्प्रपंचयति । जगज्जंगमं स्यास्नु स्थावरं खमंतरिक्षलोकं साद्रिद्वीपाब्धिगोलं पर्वतद्वीपसमुद्रसहितं भूगोलं भूर्लोकं वायुः प्रवहः अग्निर्वैद्युतः इंदुश्च तारकाश्च तत्सहितम् ॥ ३७ ॥ ज्योतिश्चक्रं स्वर्लोकं वैकारिकाणि देवाः मन इति वैकारिकशब्देन गृहीतमपि देववैलक्षण्यात्पुनरुक्तम् । इंद्रियाणि च तैजसानि मात्रास्तामसाः शब्दादयः ॥ ३८ ॥ एवमेतद्विचित्रं विश्वं सहैकदैव वीक्ष्य विचित्रतामाह । जीवश्च गुणक्षोभकः कालश्च परिणामहेतुः स्वभावश्च जन्महेतुः कर्म च तत्संस्कारः आशयश्च

नाहं भक्षितवानंब सर्वे मिथ्याभिशंसिनः ॥ यदि सत्यगिरस्तर्हि समक्षं पश्य मे मुखम् ॥ ३५ यद्येवं तर्हि व्यादेहीत्युक्तः स भगवान्हरिः ॥ व्यादत्ताव्याहतैश्वर्यः क्रीडामनुजबालकः ॥ ३६ ॥ सा तत्र ददृशे विश्वं जगत्स्थास्नु च खं दिशः ॥ साद्रिद्वीपाब्धिभूगोलं सवाय्वग्नींदुतारकम् ॥ ३७ ॥ ज्योतिश्चक्रं जलं तेजो नभस्वान्वियदेव च ॥ वैकारिकाणींद्रियाणि मनो मात्रा गुणास्त्रयः ॥३८॥ एतद्विचित्रं सहजीवकालस्वभावकर्माशयलिंगभेदम् ॥ सूनोस्तनौ वीक्ष्य विदारितास्ये व्रजं सहात्मानमवाप शंकाम् ॥ ३९ ॥ किं स्वप्न एतदुत देवमाया किंवा मदीयो बत बुद्धिमोहः ॥ अथो अमुष्यैव ममार्भकस्य यः कश्चनौत्पत्तिक आत्मयोगः ॥ ४० ॥ अथो यथावन्न वितर्कगोचरं चेतो मनः कर्मवचोभिरंजसा ॥ यदाश्रयं येन यतः प्रतीयते सुदुर्विभाव्यं प्रणतोऽस्मि तत्पदम् ॥ ४१ ॥

एतैर्लिंगानां चराचरशरीराणां भेदो यस्मिंस्तत् । तत्र व्रजं च सहात्मानं स्वसहितं क्वचिद्वीक्ष्य सूनोस्तनावल्पे विदारिते आस्ये शंकामवाप ॥ ३९ ॥ तामेवाह । किं स्वप्न इति । परितो विलोक्याह । नायं स्वप्नः । तर्हि किं देवस्य हरेर्माया । तथा चेदन्ये किं न पश्यंति । तर्हि किंवा मदीय एव कश्चिद्बुद्धिमोहो विपर्यासो दर्पणे मुखवत् । एवं तर्ह्ययं कृष्णोऽपि कथमंतः प्रतीयते अंतर्बहिश्चैकरूपेण च कथं जगत्प्रतीयते । तथा सति बिंबप्रतिबिंबयोरिव परस्परं वैपरीत्येन प्रतीतिः स्यादित्याशंक्यान्यथा वितर्कयति । अथो इति । अथवा ममामुष्यार्भकस्यापि सतो यः कश्चनाचिंत्य आत्मयोगः स्वीयमैश्वर्यम् । औत्पत्तिकः स्वाभाविकः ॥ ४० ॥ चरमं पक्षमाश्रित्यायमीश्वर इति निश्चित्याह । अथो इति ।

तेज, वायु, व आकाश, सात्विकाहंकारापासून झालेले देव आणि मन, राजसाहंकारापासून झालेलीं इंद्रियें, तामसाहंकारापासून झालेले शब्दादिक विषय व तीन गुण; याप्रमाणें मुलाच्या लहान शरीराचेठिकाणीं त्यामध्येंहि पसरलेल्या लहानशा मुखामध्यें, जीव, काल, स्वभाव, कर्म, व अंतःकरण, यांच्या योगानें स्थावरजंगमशरीरांच्या निरनिराळ्या भेदांनीं भरलेलें हें विचित्र जग एकदम पाहून, त्यांत एका प्रदेशामध्यें आपणासहित गोकुल पाहून ती यशोदा, मनामध्यें अशी शंका पावली कीं,— ॥ ३७ ॥ ॥ ३८ ॥ ३९ ॥ जें मी पाहिलें तें काय स्वप्न आहे! नंतर आपण जागृत आहें असें ठरवून ह्मणत्ये—ही हरीची माया आहे काय! किंवा हा माझ्याच बुद्धीला कांहीं मोह उत्पन्न झाला आहे काय! अथवा या माझ्या मुलाचेंच हें कांहींतरी अचिंत्य स्वाभाविक ऐश्वर्य आहे! ॥ ४० ~~॥ असे अनेक तर्क करून शेवटचा पक्ष स्वीकारून ह्मणत्ये—ज्या~~

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

परमेश्वरापासून, चित्त, मन, कर्म आणि वाणी यांच्यायोगानें अनायासानें तर्क करण्यास अशक्य असें, ज्याचा आश्रय असलेलें हें जग, ज्याच्या योगानें, ज्या बुद्धिवृत्ति-पासून प्रतीतीला येतें, त्या परमेश्वराच्या अत्यंत अचिंत्य अशा चरणामत मी नम्र (शरणागत) आहें ॥ ४१ ॥ मी यशोदा, ह्या नंदाच्या सर्वप्रकारच्या द्रव्याचें रक्षण करणारी भार्या आहें, हा नंद माझा पति आहे, हा कृष्ण माझा पुत्र आहे, गोधनासहित सर्व गोपी व गोप हे माझेच (परिवार) आहेत; याप्रमाणें ज्याच्या मायेनें मला कुत्सित बुद्धि उत्पन्न झाली आहे तोच भगवान् माझी गति (मायेपासून रक्षण करणारा) असो ॥ ४२ ॥ याप्रमाणें त्या यशोदा गोपीला तत्त्वज्ञान झालें असतां, ईश्वर व सर्वसमर्थ अशा त्या श्रीकृष्णानें तिच्यावर पुत्रस्नेहरूप आपली वैष्णवी माया पसरली ॥ ४३ ॥ तेव्हां तत्काल जिचें पूर्वींचें ज्ञान नष्ट झालें आहे अशी ती यशोदा, पुत्राला

चेतश्चित्तम् । वित्तादिभिर्न वितर्कगोचरम् । जगद्यदाश्रयं यदधिष्ठानम् । येन करणाधिष्ठात्रा । यतो बुद्धिवृत्त्यभिव्यक्तात् । नन्विदमवितर्क्यं भवतु तत्पदं कीदृगत आह । सुदुर्विभाव्यमिति । इदमत्यंतमचिंत्यमित्यर्थः ॥ ४१ ॥ एवं प्रपंचप्रतीत्योन्नीतं तत्त्वं पुनर्जीवसंसृतिहेतुमायाश्रयत्वेनोन्नयंत्याह । अहमिति । यशोदा नामाऽहमसौ मम पतिः । अमुष्य व्रजेश्वरस्याखिलवित्ताधिष्ठात्र्यहं सती जाया । एष कृष्णो मे सुतः । गोप्यादयश्च मदीया इतीत्थं कुमतिर्यन्मायया स एष मे शरणमिति ॥ ४२ ॥ वैष्णवीं स्वीयाम् ॥ ४३ ॥ प्रवृद्धेन स्नेहेन कलिलं व्याप्तं हृदयं यस्याः सा पुरेवासीत् ॥ ४४ ॥ मायाबलोद्रेकमाह । त्रय्येति । त्रय्या कर्मकांडरूपया इंद्रादिरूपेण । उपनिषद्भिर्ब्रह्मेति ।

अहं ममासौ पतिरेष मे सुतो व्रजेश्वरस्याखिलवित्तपा सती ॥ गोप्यश्च गोपाः सहगोधनाश्च मे यन्माययेत्थं कुमतिः स मे गतिः ॥ ४२ ॥ इत्थं विदिततत्त्वायां गोपिकायां स ईश्वरः ॥ वैष्णवीं व्यतनोन्मायां पुत्रस्नेहमयीं विभुः ॥ ४३ ॥ सद्यो नष्टस्मृतिर्गोपी साऽरोप्यारोहमात्मजम् ॥ प्रवृद्धस्नेहकलिलहृदयाऽऽसीद्यथा पुरा ॥ ४४ ॥ त्रय्या चोपनिषद्भिश्च सांख्ययोगैश्च सात्त्वतैः ॥ उपगीयमानमाहात्म्यं हरिं साऽमन्यतात्मजम् ॥ ४५॥ राजोवाच ॥ नंदः किमकरोद्ब्रह्मन् श्रेय एवं महोदयम् ॥ यशोदा च महाभागा पपौ यस्याः स्तनं हरिः ॥ ४६ ॥ पितरौ नान्वविंदेतां कृष्णोदारार्भकेहितम् ॥ गायंत्यद्यापि कवयो यल्लोकशमलापहम् ॥ ४७ ॥

सांख्यैः पुरुष इति । योगैः परमात्मेति । सात्वतैर्भगवानित्युपगीयमानं माहात्म्यं यस्य तम् ॥ ४५ ॥ अतिविस्मयेन पृच्छति । नंद इति । महोदयं महानुदय उद्भवो यस्य तत् ॥ ४६ ॥ ययोः प्रसन्नोऽवतीर्णस्तौ पितरावपि यन्नान्वविंदेतां न प्राप्नुताम् । कृष्णस्योदारं महदर्भकेहितं बाललीलाम् । यच्च कवयो गायंति तद्योऽविंदत्स किं श्रेयोऽकरोदिति ॥ ४७ ॥

मांडीवर घेऊन जशी पूर्वी स्नेह वृद्धिंगत झालेल्या चित्तानें व्याप्त होती त्याप्रमाणें पुन्हा झाली ॥ ४४ ॥ आतां मायाबळाचा उद्रेक सांगतो—कर्मकांडरूप असलेल्या ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद यांनीं इंद्रादिरूपानें, उपनिषद्ग्रंथांनीं ब्रह्मरूपानें, सांख्यशास्त्रांनीं पुरुषरूपानें, योगांनीं परमात्मरूपानें व पंचरात्रादि वैष्णवतंत्रांनीं भगवद्रूपानें ज्याचें माहात्म्य गायन केलें आहे त्या श्रीहरीला त्या यशोदेनें आपला पुत्र, आहे असें मानिलें ॥४५॥ राजा म्हणाला—हे ब्रह्मनिष्ठा, नंदानें भगवंताच्या बाललीलेचें अनुभवरूप मोठें फळ देणारें असें जन्मांतरीं कल्याणाचें साधन काय केलें होतें ? तसेंच ज्याच्या तृप्तीविषयीं यज्ञादिकहि समर्थ नाहींत, त्या हरीनें जिचें स्तनपान केलें आहे, त्या महाभाग्यवती यशोदेनेंहि कल्याणाचें साधन काय केलें होतें ? ॥ ४६ ॥ म्हणजे ज्यांना प्रसन्न झालेला भगवान् अवतीर्ण झाला त्या देवकीवसुदेवांनींहि कृष्णाच्या, ज्या उदार बालचरित्राचा अनुभव घेतला नाहीं, मोठमोठे ज्ञानी ज्याचें अजूनहि गायन करितात आणि जें श्रोतेवगैरे लोकांच्या पापांचें नाश करणारें आहे त्या बालचरित्राचा ज्या नंदानें व यशोदेनें अनु-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भव घेतला त्यांनीं पूर्वी पुण्य काय केलें होतें ? ॥ ४७ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, अष्टवसूंमध्यें परमश्रेष्ठ असा जो द्रोणनामक वसु, तो आपल्या धरानामक स्त्रीसहवर्तमान ब्रह्मदेवाच्या गोपालनादिरूप आज्ञांचा स्वीकार करित होत्साता त्यास ह्मणाला कीं, ॥ ४८ ॥ आह्मी उभयतां तुझी आज्ञा मान्य करितों परंतु भूमीवर झालेल्या आह्मां उभयतांना, देवाधिपति विश्वनियंत्या श्रीहरीचेठिकाणीं अशी उत्कृष्ट भक्ति प्राप्त व्हावी कीं, जिच्या योगानें संसारांत असलेल्या जनानें अनायासानें संसारदुःख तरून जावें (मुक्त व्हावें) ॥ ४९ ॥ नंतर ब्रह्मदेवानें बरें ' तसें असो ' असें ह्मटलें असतां तो द्रोणवसु, गोकुळांत उत्पन्न झाला, तोच ऐश्वर्यादिगुणयुक्त महायशस्वी नंद या नांवानें प्रसिद्ध झाला आणि त्याची पत्नी जी धरा ती यशोदा झाली ॥ ५० ॥ हे राजा, त्या ब्रह्मदेवाच्या आशीर्वादानें इतर गोपगोपींपेक्षां त्या

ब्रह्मण आदेशान्गोपालनादिलक्षणान् ॥ ४८ ॥ ४९ ॥ स एवेह द्रोणो जज्ञे सच नंद इति ख्यातः । सा च धरा यशोदाऽभवत् ॥ ५० ॥ गोपगोपीनामपि वस्तुस्वभावादस्त्येव भक्तिस्तयोः पुनर्नितरामिति ॥ ५१ ॥ स्वलीलया पुत्रभावानुकारिण्या ॥ ५२ ॥ इति दशमपूर्वार्धटीकायामष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥ ॥ नवमे पय उत्सिक्ते गत्वा

॥ श्रीशुक उवाच ॥ द्रोणो वसूनां प्रवरो धरया सह भार्यया ॥ करिष्यमाण आदेशान्ब्रह्मणस्तमुवाच ह ॥ ४८ ॥ जातयोर्नौ महादेवे भुवि विश्वेश्वरे हरौ ॥ भक्तिः स्यात्परमा लोके ययाऽजो दुर्गतिं तरेत् ॥ ४९ ॥ अस्त्वित्युक्तः स भगवान्व्रजे द्रोणो महायशाः ॥ जज्ञे नंद इति ख्यातो यशोदा सा धराऽभवत् ॥ ५० ॥ ततो भक्तिर्भगवति पुत्रीभूते जनार्दने ॥ दंपत्योर्नितरामासीद्गोपगोपीषु भारत ॥ ५१ ॥ कृष्णो ब्रह्मण आदेशं सत्यं कर्तुं व्रजे विभुः ॥ सहरामो वसंश्चक्रे तेषां प्रीतिं स्वलीलया ॥ ५२ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे विश्वरूपदर्शनेऽष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥ श्रीशुक उवाच ॥ एकदा गृहदासीषु यशोदा नंदगेहिनी ॥ कर्मांतरनियुक्तासु निर्ममंथ स्वयं दधि ॥ १ ॥ यानि यानीह गीतानि तद्बालचरितानि च ॥ दधिनिर्मंथने काले स्मरंती तान्यगायत ॥ २ ॥

गोप्यथ तत्कृतम ॥ विलोक्य भांडभंगादि कृष्णं दाम्ना बबंध तम् ॥ १ ॥ तनूदराश्रितं विश्वं दृष्ट्वा विस्मितचेतसः ॥ बंधनद्व्यंगुलापूर्त्या पूर्णतामन्वदर्शयत् ॥ २ ॥ स्वयं दधि निर्ममंथ ॥ १ ॥ तदा वागायतेति चकारान्वयः ॥ २ ॥

यशोदानंदांची पुत्रत्वानें उत्पन्न झालेल्या जनार्दन भगवंताचेठिकाणीं पराकाष्ठेची प्रीति होती ॥ ५१ ॥ समर्थ अशा श्रीकृष्णानेंहि, ब्रह्मदेवाचा वर सत्य करण्यासाठीं बलरामासहवर्तमान गोकुळांत वास करून पुत्रभावाला अनुसरणाऱ्या आपल्या लीलेनें त्या नंदादिकांना संतोष उत्पन्न केला ॥ ५२ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील दशमस्कंधाच्या पूर्वार्धांत विश्वरूपदर्शनकथननामक हा आठवा अध्याय समाप्त झाला ॥ ८ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या नवव्या अध्यायामध्यें दूध उतून जावूं लागलें तेव्हां यशोदामाता तिकडे गेली ह्मणून श्रीकृष्णानें रागानें दह्यांचें भांडें फोडून लोण्याची चोरी केली असतां, तें पाहून तिनें त्याला दाव्यानें बांधून ठेविलें अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, नंदाच्या घरीं दासी पुष्कळ होत्या, त्या एकेवेळीं निरनिराळ्या कामीं योजल्या गेल्या असतां नंदाची पत्नी यशोदा, स्वतांच दह्यांचें मंथन (ताक) करूं लागली ॥ १ ॥ तेव्हां दहीं घुसळण करत्येवेळीं त्या प्रसिद्ध श्रीकृष्ण बालकाचीं, या लोकीं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुराणादिकांमध्यें व गोकुळामध्यें जीं जीं गाइलेलीं चरित्रें तिला माहीत होतीं त्यांचें त्यांचें स्मरण करून ती गायन करूं लागली ॥ २ ॥ आणि जिच्या भ्रुकुटी सुंदर आहेत व जिच्या केशपाशांतून मोगरींचीं फुलें खालीं गळत आहेत अशी ती यशोदा, विस्तीर्ण कटितटाचेठिकाणीं कमरपट्ट्यानें बंधन केलेलें रेशमीवस्त्र, पुत्रस्नेहानें दूध स्रवणारें कुचयुग, रज्जूच्या ओढण्यानें श्रम पावलेल्या हातांमध्यें चंचळ कांकणें, कानांमध्यें कुंडलें व घर्मयुक्त मुख हीं पांच धारण करीत होत्साती दह्याचें मंथन करूं लागली ॥ ३ ॥ त्या दहीं मंथन करणाऱ्या आईजवळ स्तनसंबंधी दूध पिण्याची इच्छा करणारा श्रीहरि येऊन त्यानें, दहीं घुसळण्याची रवी धरून, जशी तिला प्रीति वाटेल तशा अंगचालनादिक चेष्टा करित करित मंथनाचा निषेध केला ॥ ४ ॥ तेव्हां ती यशोदा त्याचें हास्ययुक्त मुख अवलोकन करित करित मांडीवर बसलेल्या त्याला स्नेहानें स्रवणाऱ्या स्तनाचें पान करवूं लागली इतक्यांत चुलीवर ठेवलेलें दूध फार तापून उतास जाऊं लागलें तेव्हां तृप्त न झालेल्या त्या कृष्णाला तसाच टाकून ती लगबगीनें

सूत्रनद्धं कांचीबद्धम् । रज्जोराकर्षेण श्रमो ययोस्तयोर्भुजयोश्चलंतौ कंकणौ च । कबराद्विगलंत्यो मालत्यो यस्याः सा ॥ ३ ॥ ४ ॥ अधिश्रिते चुल्लीमारोपिते उत्सिच्यमाने अतितापेनोद्रिच्यमाने ॥ ५ ॥ दृषदश्मना शिलापुत्रेण । अंतरं गृहमध्यं गतः रह एकांते नवनीतमभक्षयत् ॥ ६ ॥ सुशृतं सुतप्तम् । दधिमंथनस्थानं प्रविश्य भिन्नं संदृश्य

क्षौमं वासः पृथुकटितटे बिभ्रती सूत्रनद्धं पुत्रस्नेहस्नुतकुचयुगं जातकंपं च सुभ्रूः ॥ रज्ज्वाकर्षश्रमभुजचलत्कंकणौ कुंडले च स्विन्नं वक्त्रं कबरविगलन्मालती निर्ममंथ ॥ ३ ॥ तां स्तन्यकाम आसाद्य मथ्नंतीं जननीं हरिः ॥ गृहीत्वा दधिमंथानं न्यपेधत्प्रीतिमावहन् ॥ ४ ॥ तमंकमारूढमपाययत्स्तनं स्नेहस्नुतं सस्मितमीक्षती मुखम् ॥ अतृप्तमुत्सृज्य जवेन सा ययावुत्सिच्यमाने पयसि त्वधिश्रिते ॥ ५ ॥ संजातकोपः स्फुरितारुणाधरं संदश्य दद्भिर्दधिमंथभाजनम् ॥ भित्त्वा मृषाश्रुर्दृषदश्मना रहो जघास हैयंगवमंतरं गतः ॥ ६ उत्तार्य गोपी सुशृतं पयः पुनः प्रविश्य संदृश्य च दध्यमत्रकम् ॥ भग्नं विलोक्य स्वसुतस्य कर्म तज्जहास तं चापि न तत्र पश्यती ॥ ७॥ उलूखलांघ्रेरुपरि व्यवस्थितं मर्काय कामं ददतं शिचि स्थितम् ॥ हैयंगवं चौर्यविशंकितेक्षणं निरीक्ष्य पश्चात्सुतमागमच्छनैः ॥ ८ ॥ तामात्तयष्टिं प्रसमीक्ष्य सत्वरस्ततोऽवरुह्यापससार भीतवत् ॥ गोप्यन्वधावन्न यमाप योगिनां क्षमं प्रवेष्टुं तपसेरितं मनः ॥ ९ ॥

दृष्ट्वा ॥ ७ ॥ उलूखलांघ्रेः परिवर्तितस्योलूखलस्योपरि । शिचि शिक्ये । चौर्येण विशंकितं चंचलमीक्षणं यस्य तं सुतम् ॥ ८ ॥ तपसा ऐकाग्र्येणेरितं तदाकारतां नीत-

---

तें दूध उतरण्याकरितां निघून गेली ॥ ५ ॥ तेव्हां आई पोटभर प्यावयास न देतां निघून गेली म्हणून क्रोध प्राप्त झालेल्या त्या श्रीकृष्णानें, कोपानें स्फुरण पावणाऱ्या आपल्या लाल अधरोष्ठाला दांतांनीं चावून वरवंट्याच्या दगडानें दह्यांचा डेरा फोडून रडण्याच्या ढोंगानें डोळ्यांत खोटींच आंसवें आणीत घरामध्यें जाऊन एकांतस्थळीं लोण्याचें भक्षण केलें ॥ ६ ॥ इकडे यशोदेनें चांगलें तापलेलें तें दूध उतरून पुनः ताक करण्याच्या जागीं गेली, तों तेथें दह्याचें भांडें फुटलेलें पाहून तें कर्म आपल्या मुलाचेंच आहे असें जाणिलें आणि त्यालाहि तेथें न पाहत होत्साती ती हसूं लागली ॥ ७ ॥ नंतर तिनें, पालथी घातलेल्या उखळीवर चढून शिंक्यावर असलेलें लोणी यथेच्छपणें माकडांस देणाऱ्या व ज्याचे नेत्र चौर्यकर्मानें 'आई येईल कीं काय म्हणून' कावरेबावरे झाले आहेत अशा त्या कृष्णाला दुरून पाहून, नंतर चालतांना होणारा पायांचा शब्द जसा त्याला ऐकूं येणार नाहीं तशी हळुहळू पाठीमागून त्याच्याजवळ गेली ॥ ८ ॥ तेव्हां जिनें हातांत काठी घेतली आहे अशा येणाऱ्या त्या मातेला पाहून, त्व- ॥ ३० ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रायुक्त असा तो श्रीकृष्ण, त्या उखळावरून खालीं उतरून भ्याल्यासारखा पळूं लागला. त्यावेळीं, एकाग्रतेनें तदाकारता पावविलेल्या व प्रवेश करण्यास योग्य झालेल्या योग्यांच्या मनालाहि ज्याची प्राप्ति होत नाहीं त्या कृष्णाला धरण्याकरितां यशोदा त्याच्या मागून धांवूं लागली ॥ ९ ॥ याप्रमाणें कृष्णाच्या मागून धांवणारी, जिची मति हालणाऱ्या मोठ्या कटिपश्चाद्भागाच्या भारानें स्तब्ध झाली आहे, जिचा कटिप्रदेश फार सुंदर आहे व जिच्या वेगानें सुटून गेलेल्या बुचड्यांतून गळलेलीं पुष्पें मागोमाग पडतजात आहेत अशा त्या यशोदेनें श्रीकृष्णास धरिलें ॥१०॥ आणि अपराध केलेला, रोदन करणारा, ज्यांच्यामध्यें असलेलें काजळ चोहींकडे पसरलें आहे अशा आपल्या डोळ्यांना हातानें चोळणारा, ताडणाच्या भीतीनें वर पाहणारा, आणि ज्याचे नेत्र भयानें कावरेबावरे झाले आहेत अशा त्या कृष्णाला हातीं धरून ती यशोदा 'रे रे चोरा, मी तुला असें काठीनें मारीन कीं, तूं पुनः अशा खोड्या कधींहि करणार नाहींस' असें भय उत्पन्न करीत रागें भरली ॥ ११ ॥ नंतर पुत्रावर प्रेम करणाला

मतएव क्षमं योग्यं प्रवेष्टुं योगिनां मनोऽपि यं नाप तम् । अथवा अन्वधावत्केवलं नत्वाप । यतो योगिनां मनोऽपि यं प्रवेष्टुं न क्षममिति ॥ ९ ॥ अन्वंचमाना एवं कृष्णमनुगच्छंती । बृहत्योश्चलंत्योः श्रोण्योर्भारेणाक्रांता स्तब्धा गतिर्यस्याः सा । विस्रंसितात्केशबंधाच्च्युतैः प्रसूनैरनुगतिरनुगमनं यस्याः सा । यद्वा जवेन कंपितात्केशबंधात्पुरः पतितानि प्रसूनान्यनु पश्चाद्गतिर्यस्याः सा परामृशद्धृतवती ॥ १० ॥ अंजन्मषिणी अंजंती सर्वतः प्रसरंती मषी ययोस्ते अक्षिणी स्वपाणिना कषंतं संमर्दयंतम् । भिषयंती

अन्वंचमाना जननी बृहच्चलच्छ्रोणीभराक्रांतगतिः सुमध्यमा ॥ जवेन विस्रंसितकेशबंधनच्युतप्रसूनानुगतिः परामृशत् ॥ १० ॥ कृतागसं तं प्ररुदंतमक्षिणी कषंतमंजन्मषिणी स्वपाणिना ॥ उद्वीक्षमाणं भयविह्वलेक्षणं हस्ते गृहीत्वा भिषयंत्यवागुरत् ॥ ११ ॥ त्यक्त्वा यष्टिं सुतं भीतं विज्ञायार्भकवत्सला ॥ इयेष किल तं बद्धुं दाम्नाऽतद्वीर्यकोविदा ॥ १२ ॥ न चांतर्न बहिर्यस्य न पूर्वं नापि चापरम् ॥ पूर्वापरं बहिश्चांतर्जगतो यो जगच्च यः ॥ १३ ॥ तं मत्वाऽऽत्मजमव्यक्तं मर्त्यलिंगमधोक्षजम् ॥ गोपिकोलूखले दाम्ना बबंध प्राकृतं यथा ॥ १४ ॥ तद्दाम बद्ध्यमानस्य स्वार्भकस्य कृतागसः ॥ द्व्यंगुलोनमभूत्तेन संदधेऽन्यच्च गोपिका ॥ १५ ॥

ह्रस्वश्छांदसः । भीषयंती भयमुत्पादयंती अवागुरदभर्त्सयत् ॥ ११ ॥ इयेष ऐच्छत् । अतद्वीर्यकोविदा तत्प्रभावानभिज्ञा ॥ १२ ॥ अकोविदत्वमाह । न चांतरिति पंचभिः । किंच बंधनं हि बहिःपरिवृतेन दाम्ना अंतरावृतस्य भवति । तथाच पूर्वापरविभागवतो वस्तुनः पूर्वतो दाम धृत्वा परितः परिवेष्टनेन भवति नत्वेतदस्तीत्याह । न चांतरिति । किंच व्यापकेन व्याप्यस्य बंधो भवति तच्च विपरीतमित्याह । पूर्वापरमिति । किंच तद्व्यतिरिक्तस्य चाभावान्न बंध इत्याह । जगच्च य इति ॥ १३ ॥ तं मर्त्यलिंगमधोक्षजमात्मजं मत्वा बबंधेति ॥ १४ ॥ द्व्यंगुलोनं द्वाभ्यामंगुलाभ्यामूनमपूर्णम् ॥ १५ ॥

णाऱ्या परंतु त्याचें सामर्थ्य न जाणणाऱ्या त्या यशोदेनें, मुलगा ताडणाच्या भयानें भ्याला आहे असें जाणून, हातांतील काठी टाकून देऊन त्याला दाव्यानें बांधून ठेवण्याचें मनांत आणिलें ॥ १२ ॥ तिचा अज्ञानीपणा असा कीं, बंधन म्हटलें म्हणजे बाहेरून वेष्टन केलेल्या दाव्यानें आंत सांपडणारावें घडतें, तसेंच पूर्वपश्चिमादिक विभाग असलेल्या वस्तूला पूर्वेकडून दावें धरून सभोंवार वेढा घातल्यानें होतें, तें येथें कांहींच नाहीं असें सांगतो-ज्या कृष्णाला अंतर्भाग नाहीं, बाह्यभाग नाहीं, पूर्वभाग नाहीं व पश्चिमभागहि नाहीं. बरें व्यापकानें व्याप्याचें बंधन घडतें तें पाहूं गेलें असतां, जगताचा पूर्व भाग, पश्चिम भाग (आदि व अंत) अंतर्भाग व बहिर्भाग हे सर्व जो आहे व जो जगद्रूपी आहे, त्या अव्यक्त असून मनुष्यरूप धारण केलेल्या अधोक्षज भगवान् श्रीकृष्णाला, आपला पुत्र असें मानून ती यशोदा, जशा एखाद्या साधारण बालकाला त्याची आई बंधन करिते त्याप्रमाणें उखळाशीं बांधूं लागली ॥ १३ ॥ १४ ॥ तेव्हां डेरा फोडणेंवगैरे अपराध केलेल्या त्या आपल्या बालकाला ती गोपिका बंधन करूं लागली

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असतां तें दांवें दोन आंगळें कमी येऊं लागलें, तेव्हां तिनें त्या दांव्याशीं दुसरें दावें सांधिलें ॥ १५ ॥ तेव्हां दोन दांवीं सांधून जें एक दांवें झालें तेंहि दोन आंगळें कमी येऊं लागलें तेव्हां त्याचाशीं तिनें तिसरें सांधलें, तेव्हां तेंहि दोन आंगळें कमी आलें. पुढें चवथें पांचवें असें जें जें दावें ती सांधित असे तें तेंहि दोन आंगळें कमी येत असे ॥ १६ ॥ याप्रमाणें आपल्या घरचीं सर्व दांवीं सांधणारीहि ती यशोदा, दोन आंगळें दांवें कमी आल्यामुळें जेव्हां कृष्णाचें बंधन करण्यास समर्थ झाली नाहीं, तेव्हां तिचा प्रयत्न निष्फळ झाला असें पाहून मंदहास्य करणाऱ्या सर्व गोपींमध्यें, ती आपणहि हास्य करीत होत्साती विस्मय पावली ॥ १७ ॥ तेव्हां कृष्णानें, शरीराला घाम सुटलेल्या व केसांच्या बुचड्यांतून पुष्पमाळा गळून पडलेल्या आपल्या आईला, आपणास बांधून ठेवण्यास फार श्रम झाले असें पाहून, कृपेनें जो आपल्या बंधनाविषयीं सोम्य झाला म्हणजे त्यानें यशोदेकडून आपलें बंधन करून घेतलें. त्यावेळीं नंद व रोहिणी हीं तेथें नव्हतीं, असतीं तर त्यांनीं यशोदेचें निवारण केलें असतें ॥१८॥ हे राजा,

॥ १६ ॥ स्मितं कुर्वंतीनां मध्ये स्वयमपि हसंती विस्मयमाप ॥ १७ ॥ १८ ॥ न चैवं स्वातंत्र्यभंग इत्याह । एवं संदर्शितेति । सेश्वरमिदं विश्वं यस्य वशे यदधीनमित्यर्थः

यदासीत्तदपि न्यूनं तेनान्यदपि संदधे ॥ तदपि द्व्यंगुलं न्यूनं यद्यदादत्त बंधनम् ॥ १६ ॥ एवं स्वगेहदामानि यशोदा संदधत्यपि ॥ गोपीनां सुस्मयंतीनां स्मयंती विस्मिताऽभवत् ॥ १७ ॥ स्वमातुः स्विन्नगात्राया विस्रस्तकबरस्रजः ॥ दृष्ट्वा परिश्रमं कृष्णः कृपयाऽऽसीत्स्वबंधने ॥ १८ ॥ एवं संदर्शिता ह्यंग हरिणा भृत्यवश्यता ॥ स्ववशेनापि कृष्णेन यस्येदं सेश्वरं वशे ॥ १९ ॥ नेमं विरिंचो न भवो न श्रीरप्यंगसंश्रया ॥ प्रसादं लेभिरे गोपी यत्तत्प्राप विमुक्तिदात् ॥ २० ॥ नायं सुखापो भगवान्देहिनां गोपिकासुतः ॥ ज्ञानिनां चात्मभूतानां यथा भक्तिमतामिह ॥ २१ ॥ कृष्णस्तु गृहकृत्येषु व्यग्रायां मातरि प्रभुः ॥ अद्राक्षीदर्जुनौ पूर्वं गुह्यकौ धनदात्मजौ ॥ २२ ॥

॥ १९ ॥ भगवत्प्रसादमन्येऽपि भक्ता लभंते इदं त्वतिचित्रमिति सरोमांचितमाह । नेममिति । विरिंचः पुत्रोऽपि । भवः स्वात्माऽपि । श्रीर्जायाऽपि ॥ २० ॥ फलितमाह । नायमिति । देहिनां देहाभिमानिनां तापसादीनां ज्ञानिनां निवृत्ताभिमानानामपि ॥ २१ ॥ भक्तैर्बद्धस्याप्यन्यमोचकत्वमाह । कृष्णस्त्विति ॥ २२ ॥

ब्रह्मादि पालकांसहित हें सर्व जग ज्याच्या स्वाधीन आहे, त्या स्वतंत्र व भक्तांचें संकट दूर करणाऱ्या श्रीकृष्णानें, याप्रमाणें आईकडून बंधन करून घेऊन भक्तवश्यता दाखविली आहे ॥ १९ ॥ आतां भगवंताचा प्रसाद दुसरेहि भक्त पावतात परंतु हेंतर अतिआश्चर्य आहे असें रोमांचसहित सांगतो–ब्रह्मदेव (पुत्र) शंकर (स्वात्मा) व हृदयावेठिकाणीं स्थान प्राप्त झालेली लक्ष्मी (पत्नी) हे तिघेहि ईश्वरत्वानें व कृपापात्रत्वानें प्रसिद्ध असल्यामुळें भगवंतापासून, प्रसाद पावले नाहींत असें नाहीं, पावले; परंतु मुक्ति देणाऱ्या भगवंतापासून, त्यालाच बंधन करण्याचा मनोरथ पूर्ण करून घेणें हा जो दुर्लभ प्रसाद, जाति आचार इत्यादिकांनीं हीन अशाहि गोपीला प्राप्त झाला तो त्या ब्रह्मादिकांना हि प्राप्त झाला नाहीं ॥ २० ॥ सारांश– हा यशोदानंदन भगवान् श्रीकृष्ण, या संसारामध्यें भक्तिमान् पुरुषांना जसा सुलभ आहे तसा देहाभिमानी तापसादिकांना किंवा भगवंताचा केवळ आत्माच अशा देहाभिमानरहित ज्ञान्यांनाहि सुलभ नाहीं ॥ २१ ॥ आतां भक्तांनीं बांधलेल्याहि भगवंताचें दुसऱ्याला मुक्त करण्याचें सामर्थ्य सांगतो–

॥ ३१ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

समर्थ अशा त्या श्रीकृष्णानें आपली माता यशोदा, आपणास उखळीला बांधून ठेऊन घरच्या कामांत आसक्त झाली असतां, आपणास नंदाकडून सोडवून घ्यावें असें मनांत आणून त्या नंदाला लवकर तेथें आणण्याकरितां तेथून जवळच असलेल्या अर्जुननामक जुळ्या वृक्षांकडे अवलोकन केलें. ते वृक्ष, पूर्वीं गुह्यकनांवाच्या देवयोनींत उत्पन्न झाले-ले, नलकूबर व मणिग्रीव या नांवांनीं प्रख्यात असे कुबेराचे पुत्र होते. ते संपत्तीनें युक्त असल्यामुळें मदांध झाले असतां, त्यांस नारदानें शाप देऊन वृक्षयोनींत आणिलें होतें ॥२२॥ २३ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील पूर्वार्धांत गोपीप्रसादकथनरूप हा नववा अध्याय समाप्त झाला ॥ ९ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ आतां ह्या दहाव्या अध्यायामध्यें श्रीकृष्णानें उखळाला ओढीत मधून रांगत जाऊन जुळ्या त्या अर्जुन वृक्षांस पाडिलें असतां, त्यांपासून उत्पन्न झालेल्या दोन देवांनीं श्रीकृष्णाची स्तुति केली, अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ राजा ह्मणाला—हे ज्ञानसंपन्ना, त्या नलकूबरमणिग्रीवांचें शापाला कारणभूत असें जें निंदित कर्म असेल कीं,

---

॥ २३ ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधे टीकायां नवमोऽध्यायः ॥ ९ ॥ ॥ दशमेऽपातयाद्दिंगवंतरा यमलार्जुनौ ॥ तत्रत्याभ्यां च देवाभ्यां कृष्णः स्तुत इतीर्यते ॥ १ ॥

पुरा नारदशापेन वृक्षतां प्रापितौ मदात् ॥ नलकूबरमणिग्रीवाविति ख्यातौ श्रियान्वितौ ॥ २३ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे गोपीप्रसादो नाम नवमोऽध्यायः ॥ ९ ॥ ॥ राजोवाच ॥ कथ्यतां भगवन्नेतत्तयोः शापस्य कारणम् ॥ यत्तद्विग-र्हितं कर्म येन वा देवर्षेस्तमः ॥ १ ॥ श्रीशुक उवाच ॥ रुद्रस्यानुचरौ भूत्वा सुदृप्तौ धनदात्मजौ ॥ कैलासोपवने रम्ये मंदाकिन्यां मदोत्कटौ ॥ २ ॥ वारुणीं मदिरां पीत्वा मदाघूर्णितलोचनौ ॥ स्त्रीजनैरनुगायद्भिश्चेरतुः पुष्पिते वने ॥ ३ ॥ अंतः प्रविश्य गंगा-यामंभोजवनराजिनि ॥ चिक्रीडतुर्युवतिभिर्गजाविव करेणुभिः ॥ ४ ॥ यदृच्छया च देवर्षिर्भगवांस्तत्र कौरव ॥ अपश्यन्नारदो देवौ क्षीबा-णौ समबुध्यत ॥ ५ ॥ तं दृष्ट्वा व्रीडिता देव्यो विवस्त्राः शापशंकिताः ॥ वासांसि पर्यधुः शीघ्रं विवस्त्रौ नैव गुह्यकौ ॥ ६ ॥

यद्विगर्हितं कर्म येन वा देवर्षेर्भगवतोत्तमस्यापि तमः क्रोधस्तदेतत्कथ्यतामिति ॥ १ ॥ २ ॥ ३ ॥ गंगायामंतर्मध्ये । कथंभूते । अंभोजानां वनानि तेषां राजयस्ता विद्यंते यस्मिंस्तस्मिन् ॥ ४ ॥ अपश्यत् दृष्ट्वा च क्षीबाणौ मत्तौ समबुद्ध्यत ॥ ५ ॥ कुत इत्यत आह । तं दृष्ट्वेति ॥ ६ ॥

ज्याच्या योगानें भगवद्भक्तांमध्यें श्रेष्ठ अशा नारदालाहि क्रोध उत्पन्न झाला व त्यांस शापदिला तें मला सांगावें ॥१॥ असा प्रश्न केला असतां श्रीशुकाचार्य ह्मणाला— कुबेर हा श्रीरुद्राचा सखा होय. त्याचे पुत्र जे नलकूबर व मणिग्रीव तेहि रुद्राचे सेवक होते, ते अतिशय गर्विष्ठ व मदोन्मत्त होऊन त्यांनीं रुद्रसेवेचा त्याग केला आणि एकेवेळीं ते, वरुणानें निर्माण केलेल्या, बुद्धिभ्रंश करणाऱ्या, मदिरेचें प्राशन करून ज्यांचे डोळे मदानें धुंद झाले आहेत असे होऊन, गंगेजवळच्या कैलासपर्वतावरील सुंदर पुष्पवाटिके-मध्यें, बरोबर गायन करणाऱ्या स्त्रीजनांसहवर्तमान क्रीडा करीत संचार करूं लागले ॥ २ ॥ ३ ॥ नंतर ते कुबेरपुत्र, स्त्रियांसहवर्तमान कमळांच्या वनपंक्ति प्रफुल्लित असलेल्या गंगेच्या मध्यभागीं प्रवेश करून, जसे हत्ती हत्तिणीसहवर्तमान क्रीडा करितात त्याप्रमाणें क्रीडा करूं लागले ॥ ४ ॥ हे राजा, तेथें सहजगतीनें प्राप्त झालेल्या भगवान् देवर्षि नारदानें ह्या देवांस पाहिलें आणि ते मत्त झाले आहेत असें जाणिलें ॥ ५ ॥ कारण, त्यावेळीं त्यांच्या बरोबर क्रीडा करणाऱ्या अप्सरा नग्न होत्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्यांनीं त्या नारदाला पाहतांच लज्जित होऊन हा कदाचित् शाप देईल अशा शंकेनें अतित्वरेनें आपापलीं वस्त्रें परिधान केलीं. परंतु नग्न असलेले ते गुह्यक वस्त्रें परिधान न करितां तसेच उभे राहिले ॥ ६ ॥ तेव्हां मदिरामाशनानें मत्त व श्रीमदानें अंध झालेल्या त्या कुबेरपुत्रांस पाहून नारद ऋषि त्यांच्यावर मदनाशपूर्वक श्रीकृष्णदर्शनरूप अनुग्रह करण्याकरितां शाप देत होत्साता असें ह्मणाला कीं, ॥ ७ ॥ नारद ह्मणाला- प्रियविषयांचें सेवन करणाऱ्या पुरुषाला जसा श्रीमद, बुद्धिभ्रंश (विवेकनाश) करणारा होतो तसा सत्कुळांत जन्म व विद्या इत्यादिक किंवा रजोगुणकार्यभूत हर्षादिक कोणताच मद बुद्धिभ्रंश करणारा होत नाहीं. कारण, ज्या श्रीमदामध्यें स्त्रिया द्यूत व मद्यमाशन या व्यसनाचा संबंध असतो ॥ ८ ॥ ज्या श्रीमदामध्यें नश्वर अशाहि या देहाला, हा जरामरणरहित आहे असें मानणारे व मनाचा निग्रह न करितां निर्दय झालेले लोक (भक्षण करण्याकरितां) पशूंचा वध करितात ॥ ९ ॥ पहा, हें शरीर, जीवंत असतां नरदेव (राजा) भूदेव (ब्राह्मण)

अनुग्रहार्थाय अनुग्रहश्च मदनाशोऽर्थश्च श्रीकृष्णदर्शनं तदर्थं इदं वक्ष्यमाणं न ह्यन्य इत्यादि ॥ ७ ॥ जोष्यान्प्रियान्विषयान् जुषतः सेवमानस्य पुंसः श्रीमदादन्य आभिजात्यादिः सत्कुलविद्यादिजनितो मदः । अन्यो वा रजोगुणो रजःकार्यहास्यहर्षादिरूपो नहि । तथा बुद्धिभ्रंशो बुद्धिं भ्रंशयतीति तथा किंतु श्रीमद एवेति । तदाह । यत्रेत्यादिचतुर्भिः । यत्र

तौ दृष्ट्वा मदिरामत्तौ श्रीमदांधौ सुरात्मजौ ॥ तयोरनुग्रहार्थाय शापं दास्यन्निदं जगौ ॥ ७ ॥ नारद उवाच ॥ न ह्यन्यो जुषतो जोष्यान्बुद्धिभ्रंशो रजोगुणः ॥ श्रीमदादाभिजात्यादिर्यत्र स्त्री द्यूतमासवः ॥ ८ ॥ हन्यंते पशवो यत्र निर्दयैरजितात्मभिः ॥ मन्यमानैरिमं देहमजरामृत्यु नश्वरम् ॥ ९ ॥ देवसंज्ञितमप्यंते कृमिविड्भस्मसंज्ञितम् ॥ भूतध्रुक् तत्कृते स्वार्थं किं वेद निरयो यतः ॥ १० ॥ देहः किमन्नदातुः स्वं निषेक्तुर्मातुरेव च ॥ मातुःपितुर्वा बलिनः क्रेतुरग्नेः शुनोऽपि वा ॥ ११ ॥ एवं साधारणं देहमव्यक्तप्रभवाप्ययम् ॥ को विद्वानात्मसात्कृत्वा हंति जंतूनृतेऽसतः ॥ १२ ॥

श्रीमदे ॥ ८ ॥ इमं नश्वरं देहमजरामृत्यु अजरश्च अमृत्युश्च यथा तथा मन्यमानैः ॥ ९ ॥ नरदेवभूदेवसंज्ञितमपि श्वादिभिर्भक्षितं विट्संज्ञितं दग्धं भस्मसंज्ञितमन्यदा कृमिसंज्ञितं तत्कृते तदर्थं यो भूतध्रुक् भूतद्रोग्धा । यतो भूतद्रोहान्निरयो भवति स किं स्वार्थं वेद नैव वेदेत्यर्थः ॥ १० ॥ इदानीं देहेऽहंभावोऽपि न घटत इत्याह । देह इति । निषेक्तुः पितुः मातुःपितुर्वा मातामहस्य पुत्रिकाकरणे ॥ ११ ॥ अव्यक्तप्रभवाप्ययमव्यक्तात्प्रभवस्तस्मिन्नेवाप्ययो यस्य तमात्मसात्कृत्वा आत्मेति मत्वा असतो मूढाद्दते ॥ १२ ॥

इत्यादिनामयुक्त असतें तरीहि मरणानंतर कुतरीं इत्यादिकांनीं भक्षण केलें असतां विष्ठारूप होतें, पुत्रादिकांनीं दग्ध केलें तर भस्मरूप होतें व तसेंच पडलें तर कृमिरूप होतें त्याच्या सुखाकरितां जो पुरुष, प्राणिमात्रांचा द्रोह करितो, कीं ज्या द्रोहापासून नरकपातना प्राप्त होत्ये तो पुरुष, आपला स्वार्थ जाणतो काय ? नाहींच जाणत ॥ १० ॥ आतां देहाचेठिकाणीं मीपणाहि घडत नाहीं असें सांगतो- हा देह काय स्वाधीनपणानें प्रसिद्ध असल्यामुळें आपला ह्मणावा, किंवा अन्नदात्याच्या अन्नानें रक्षण होत असल्यामुळें अन्नदात्याचा ह्मणावा, अथवा पित्याच्या रेतापासून झाल्यामुळें पित्याचा ह्मणावा, यद्वा आईच्या उदरांतून झाल्यामुळें आईचा ह्मणावा किंवा आईचा बाप, 'इला पुत्र होईल तो माझा अशा ठरावानें' कन्या देतो ह्मणून त्याचा ह्मणावा अथवा वेठीलावगैरे धरणाऱ्या बलाढ्य पुरुषाचा ह्मणावा किंवा विकणाराचा, अग्नीचा अथवा श्वानाचा ह्मणावा ? ॥ ११ ॥ याप्रमाणें साधारण व प्रकृतीपासून उत्पन्न होऊन तेथेंच लय पावणाऱ्या देहाला हा आपणच आहें असें मानून

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कोणीच करणार नाहीं ॥ १२ ॥ याप्रमाणें श्रीमदाचें चेष्टित सांगून आतां
त्याच्या सुखाकरितां मूर्खपुरुषाखेरीज कोण बरें ज्ञानी पुरुष, प्राण्याची हिंसा करील? कोणीच करणार नाहीं ॥ १२ ॥ याप्रमाणें श्रीमदाचें चेष्टित सांगून आतां
त्याच्या प्रतीकाराचा निश्चय करितो– श्रीमदानें अंध झाल्यामुळें कर्तव्याकर्तव्य न पाहणाऱ्या विवेकशून्य पुरुषाला दारिद्र्य हेंच श्रेष्ठ अंजन आहे. कसें ह्मणावें तर–
दरिद्री पुरुषच, आपल्या सारखीं सर्वभूतें आहेत असें पाहतो, ह्मणजे दारिद्र्यामुळें अनेक दुःखें भोगणारा दरिद्री, अशींच दुःखें सर्वांना प्राप्त होत असतील असें निश्चयानें
जाणतो ॥ १३ ॥ याविषयीं दृष्टांत सांगतो– जसा अंगांत कांटा मोडलेला पुरुष, मुखाची म्लानता इत्यादिक चिन्हांनीं सर्व जीवांना सुखदुःखें सारखीं होतात
असें जाणून, दुसऱ्या प्राण्याला कांटा मोडण्याची इच्छा करीत नाहीं व त्याच्या निवृत्तीविषयीं यत्न करितो, त्याप्रमाणें ज्याला कधींच कांटा लागला नाहीं तो
दुसऱ्याची व्यथा जाणत नाहीं व तिच्या निवृत्तीविषयीं यत्नहि करीत नाहीं ॥ १४ ॥ आणि दारिद्र्य हें मोक्षसुद्धां मिळवितें. कारण, या संसारांत दरिद्री पुरुषच

एवं श्रीमदविचेष्टितमुक्त्वा तत्प्रतीकारं निश्चिनोति । असत इति । परं श्रेष्ठं दारिद्र्यमेव । केवलमिति वा । कुत इत्यत आह । आत्मौपम्येनेति । ततो न द्रुह्यतीति
भावः ॥ १३ ॥ दृष्टांतमाह । यथेति । मुखम्लान्यादिलिंगैः सर्वेषां जीवानां सुखदुःखे समे इति ज्ञातवानित्यर्थः ॥ १४ ॥ किंच दारिद्र्यं मोक्षमपि साधयतीत्याह । दरिद्र-

असतः श्रीमदांधस्य दारिद्र्यं परमंजनम् ॥ आत्मौपम्येन भूतानि दरिद्रः परमीक्षते ॥ १३ ॥ यथा कंटकविद्धांगो जंतोर्नेच्छति तां
व्यथाम् ॥ जीवसाम्यं गतो लिंगैर्न तथा ऽविद्धकंटकः ॥ १४ ॥ दरिद्रो निरहंस्तंभो मुक्तः सर्वमदैरिह ॥ कृच्छ्रं यदृच्छयाऽऽप्नोति
तद्धि तस्य परं तपः ॥ १५ ॥ नित्यं क्षुत्क्षामदेहस्य दरिद्रस्यान्नकांक्षिणः ॥ इंद्रियाण्यनुशुष्यंति हिंसाऽपि विनिवर्तते ॥ १६ ॥ द-
रिद्रस्यैव युज्यंते साधवः समदर्शिनः ॥ सद्भिः क्षिणोति तं तर्षं तत आराद्विशुद्ध्यति ॥ १७ ॥ साधूनां समचित्तानां मुकुंदचरणैषि-
णाम् ॥ उपेक्ष्यैः किं धनस्तंभैरसद्भिरसदाश्रयैः ॥ १८ ॥ तदहं मत्तयोर्माध्व्या वारुण्या श्रीमदांधयोः ॥ तमोमदं हरि-
ष्यामि स्त्रैणयोरजितात्मनोः ॥ १९ ॥

इति श्लोकचतुष्टयेन । निरहंस्तंभो निर्गतोऽहंकाररूपः स्तंभो यस्मात्सः ॥ १५ ॥ १६ ॥ युज्यंते स्वत एव संगच्छंते । तर्षं तृष्णाम् ॥ १७ ॥ ननु साधूनामपि धनिकः प्रि-
यः स्यान्न दरिद्र इति तत्राह । साधूनामिति । धनेन स्तंभो गर्वो येषां तैः ॥ १८ ॥ तमोमदमज्ञानकृतमदम् ॥ १९ ॥

विद्या तप इत्यादिकांच्या मदांनीं व अहंकाराच्या उद्धटपणानें रहित होऊन प्रारब्धवशेंकरून जें कांहीं दुःख पावतो तेंच त्याचें परम तप होय ॥ १५ ॥ क्षुधेनें
कृशदेह होऊन नित्य अन्नाची इच्छा करणाऱ्या दरिद्र्याचीं इंद्रियें प्रतिक्षणीं शुष्क होत जातात व नरकादिदुःखाला हेतुभूत असलेली जी हिंसा तीहि निवृत्त होत्ये ॥ १६ ॥
आणि दरिद्र्यासच सर्वठिकाणीं ब्रह्मरूप पाहणाऱ्या साधूंची गांठ पडत्ये. नंतर त्या साधूंच्या समागमेंकरून तो दरिद्री, विषयवासनारूप तृष्णेचा क्षय करून टाकितो व
तो नंतर लवकरच जीवन्मुक्त होतो ॥ १७ ॥ आतां साधूंनांहि द्रव्यवानच प्रिय होईल, दरिद्री प्रिय होणार नाहीं असें ह्मणावें तर– ज्यांचें चित्त शत्रुमित्रादिभाव-
रहित आहे अशा मुकुंदचरणाची इच्छा करणाऱ्या साधूंना, धनाच्या योगानें गर्विष्ठ, उपेक्षा करण्यास योग्य व दुर्व्यसनी लोकांचा आश्रय करणाऱ्या दुर्जनांनीं
काय करावयाचें आहे? कांहींच नाहीं ॥ १८ ॥ यास्तव श्रीमदानें अंध व, वारुणी मदिरेनें मत्त होऊन स्त्रीजित झालेल्या आणि मनाचा निग्रह न करणाऱ्या ह्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नलकूबरमणिग्रीवांचा अज्ञानानें झालेला संपत्तिमद मी हरण करितों ॥ १९ ॥ ज्याअर्थीं हे लोकपाल कुबेराचे पुत्र असतांहि अज्ञानानें व्याप्त व अत्यंत दुष्टमदानें युक्त होऊन नग्न असलेल्या आपल्या देहालासुद्धां जाणत नाहींसे झाले आहेत त्याअर्थीं हे कांहींकाळपर्यंत वृक्षयोनि पावण्यास योग्य आहेत, ह्मणजे पुन्हा असे मदांध कधींहि होणार नाहींत. आणि त्या वृक्षयोनीमध्येंहि माझ्या प्रसादेंकरून, ह्यांना आपल्या वाईट कर्मांचें स्मरण राहील ॥ २० ॥ २१ ॥ नंतर देवांच्या मानानें शंभर वर्षें निघून गेल्यावर माझ्या अनुग्रहानें श्रीकृष्णाचें सान्निद्धय पावोन हे नलकूबरमणिग्रीव पुन्हा देवत्व पावतील आणि त्या श्रीकृष्णाचेठिकाणीं यांना भक्ति प्राप्त होईल ॥ २२ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला— हे राजा, त्या देवर्षि नारदानें असें भाषण करून नरनारायणाच्या आश्रमीं गमन केलें व नलकूबरमणिग्रीव हे गोकुळामध्यें यमलार्जुन वृक्ष होऊन राहिले ॥ २३ ॥ याप्रमाणें राजानें विचारिलेलें शापाचें कारण सांगून आतां प्रस्तुत सांगतो— भगवद्भक्तांमध्यें मुख्य अशा नारदऋषीचें भाषण सत्य करण्यासाठीं उखळा-

---

तमःप्लुतौ तमोव्याप्तौ ॥ २० ॥ शपति। अतोऽर्हत इति। अनुगृह्णाति। स्यातां नैवमित्यादिना। मत्प्रसादेन स्मृतिः स्यात् ॥ २१ ॥ स्वर्लोकतां देवत्वं पुनर्लब्ध्वा मदनुग्रहाल्लब्धभक्ती भविष्यत इति ॥ २२ ॥ २३ ॥ प्रस्तुतमाह। ऋषेरिति ॥ २४ ॥ किमिति सत्यं कर्तव्यं तत्राह। देवर्षिरिति। यद्यतः तत्ततः ॥ २५ ॥ यमयोर्यमलयोः सह-

यदिमौ लोकपालस्य पुत्रौ भूत्वा तमःप्लुतौ ॥ न विवाससमात्मानं विजानीतः सुदुर्मदौ ॥ २० ॥ अतोऽर्हतः स्थावरतां स्यातां नैवं यथा पुनः ॥ स्मृतिः स्यान्मत्प्रसादेन तत्रापि मदनुग्रहात् ॥ २१ ॥ वासुदेवस्य सान्निध्यं लब्ध्वा दिव्यशरच्छते ॥ वृत्ते स्वर्लोकतां भूयो लब्धभक्ती भविष्यतः ॥ २२ ॥ श्रीशुक उवाच ॥ एवमुक्त्वा स देवर्षिर्गतो नारायणाश्रमम् ॥ नलकूबरमणिग्रीवावासतुर्यमलार्जुनौ ॥ २३ ॥ ऋषेर्भागवतमुख्यस्य सत्यं कर्तुं वचो हरिः ॥ जगाम शनकैस्तत्र यत्रास्तां यमलार्जुनौ ॥ २४ ॥ देवर्षिर्मे प्रियतमो यदिमौ धनदात्मजौ ॥ तत्तथा साधयिष्यामि यद्गीतं तन्महात्मना ॥ २५ ॥ इत्यंतरेणार्जुनयोः कृष्णस्तु यमयोर्ययौ ॥ आत्मनिर्वेशमात्रेण तिर्यग्गतमुलूखलम् ॥ २६ ॥ बालेन निष्कर्षयताऽन्वगुलूखलं तद्दामोदरेण तरसोत्कलितांघ्रिबंधौ ॥ निष्पेततुः परमविक्रमितातिवेपस्कंधप्रवालविटपौ कृतचंडशब्दौ ॥ २७ ॥

जातयोः। आत्मनः कृष्णस्य तन्मध्यप्रवेशमात्रेण ॥ २६ ॥ अनु अंचतीत्यन्वक्। तत्र हेतुः। दामोदरेणेति। उत्कलित उत्पाटितोंऽघ्रिबंधो मूलबंधो ययोस्तौ। परमस्य श्रीकृष्णस्य विक्रमितं विक्रमस्तेनातिवेपः कंपो येषु ते स्कंधप्रवालविटपा ययोस्तौ ॥ २७ ॥

चेठिकाणीं बांधलेला श्रीकृष्ण, जेथें ते यमलार्जुन वृक्ष होते तेथें हळुहळू निघून गेला ॥ २४ ॥ याचा अभिप्राय असा कीं— ज्याअर्थीं नारद हा मला अतिप्रिय आहे व हे कुबेराचे पुत्र देव असून वृक्षत्व पावले आहेत त्याअर्थीं त्या महात्म्या नारदानें 'दिव्यमानानें शंभर वर्षांनंतर श्रीकृष्णदर्शनानें हे शापमुक्त होतील असें' जें गायन केलें आहे तें तसेंच साधितों ॥ २५ ॥ असें मनांत आणून तो श्रीकृष्ण जुळया त्या अर्जुनवृक्षांच्या मधून गेला. तेव्हां श्रीकृष्णाच्या प्रवेशमात्रानेंच तें त्यानें ओढिलेलें उखळहि वांकडें चालत गेलें ॥ २६ ॥ त्यावेळीं मागून गरंगळत जाणाऱ्या व वृक्षांस अडकलेल्या त्या उखळाला जोरानें ओढणाऱ्या व दाव्यानें बांधलेल्या त्या श्रीकृष्णबालकानें, ज्यांच्या मुळ्या उपटल्या आहेत व त्याच परमेश्वराच्या पराक्रमानें ज्यांचे खांदे, पल्लव व खांद्या हीं अतिशय कांपलीं आहेत असे ॥ ३३ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ते अर्जुनवृक्ष, मोठा भयंकर ' कडकडाट ' शब्द करून भूमीवर पडले ॥ २७ ॥ आणि जसा वृक्षांचे ठिकाणीं असलेला अग्नि तेथून मूर्तिमान् प्रकट होतो त्याप्रमाणें
त्यावृक्षांपासून प्रकट झालेले व परम कांतीनें दिशा प्रकाशयुक्त करणारे असे दोघे सिद्ध (नलकूबरमणिग्रीव) कृष्णाजवळ येऊन, श्रीमदरहित झालेल्या त्यांनीं सर्व लोकांचा नाथ
अशा श्रीकृष्णाला मस्तकानें वंदन करून हात जोडून असें भाषण केलें कीं,– ॥ २८ ॥ हे कृष्णा, हे कृष्णा, हे अचिंत्यप्रभावा, तूं गोपबालक नव्हेस तर सर्व
जगाला कारणभूत असा परमपुरुष आहेस. स्थूलसूक्ष्मात्मक हें सर्व विश्व, तुझेंच स्वरूप आहे असें ब्रह्मवेत्ते जाणत आहेत ॥ २९ ॥ जगाचा नियंताहि तूंच आहेस. कारण,
सर्व प्राण्याचीं जीं देह, प्राण, अहंकार व इंद्रियें आहेत त्या सर्वांचा रक्षण करणारा तूं एकच आहेस. आतां ह्या जगाचें काल हें निमित्तकारण आहे, प्रकृति उपादान

ककुभः प्रति सर्वतः स्फुरंतावित्यर्थः । यद्वा दिशः प्रकाशयंताविति कुजयोर्वृक्षयोः स्थितोऽग्निर्यथा मूर्तिमानुपैति तथोपेत्य । विरजसौ निर्मदौ निरहंकारिणौ नष्टगर्वाविति
यावत् ॥ २८ ॥ गोपालं मां युवां देवौ किमिति प्रणताविति चेत्तत्राहतुः । हे कृष्ण कृष्ण महायोगिन्नचिंत्यप्रभावस्त्वं न गोपालः किंतु परः पुरुषः । यतः आद्यः
कारणभूतः । तत्रापि न निमित्तमात्रं किंतूपादानमपि त्वमेवेत्याशयेन तुष्टुवतुः । व्यक्ताऽव्यक्तमिति । स्थूलसूक्ष्ममिदं रूपं ते तव ब्राह्मणा ब्रह्मविदो विदुरिति ॥ २९ ॥

तत्र श्रिया परमया ककुभः स्फुरंतौ सिद्धावुपेत्य कुजयोरिव जातवेदाः ॥ कृष्णं प्रणम्य शिरसाऽखिललोकनाथं बद्धांजली विरज-
साविदमूचतुः स्म ॥ २८ ॥ कृष्ण कृष्ण महायोगिंस्त्वमाद्यः पुरुषः परः ॥ व्यक्ताव्यक्तमिदं विश्वं रूपं ते ब्राह्मणा विदुः ॥ २९ ॥
त्वमेकः सर्वभूतानां देहास्वात्मेंद्रियेश्वरः ॥ त्वमेव कालो भगवान्विष्णुरव्यय ईश्वरः ॥ ३० ॥ त्वं महान्प्रकृतिः सूक्ष्मा रजःसत्व-
तमोमयी ॥ त्वमेव पुरुषोऽध्यक्षः सर्वक्षेत्रविकारवित् ॥ ३१ ॥ गृह्यमाणैस्त्वमग्राह्यो विकारैः प्राकृतैर्गुणैः ॥ को न्विहार्हति विज्ञा-
तुं प्राक्सिद्धं गुणसंवृतः ॥ ३२ ॥

नियंताऽपि त्वमेवेत्यूचतुः। त्वमेक इति । देहः असवः प्राणाः आत्माऽहंकारः इंद्रियाणि च तेषामीश्वरः । नन्वस्य कालो निमित्तं प्रकृतिरुपादानं प्रकृतेर्जातो महान् विश्वात्मतया
परिणमते । पुरुषः कर्ता नियंता च किमत्राहमत आहतुः । त्वमेव काल इत्यादिना सार्धेन । यतो भगवानीश्वरो विष्णुस्त्वमतः कालो नाम तव लीला ॥ ३० ॥ प्रकृतिः शक्तिः
पुरुषोंऽशः महान्कार्यं अतस्त्वमेव सर्वमित्यर्थः ॥ ३१ ॥ नन्वहमेव चेत्सर्वं तर्हि घटादिज्ञाने मज्ज्ञानं किं न भवति भवतीति चेत्सर्वोऽपि ब्रह्मवित्स्यादत आहतुः । गृह्यमाणैरि-
ति । दृश्यत्वेन वर्तमानैर्बुद्ध्यहंकारेंद्रियादिभिर्द्रष्टा त्वं न गृह्यस इति भावः । ननु तर्हि जीवो जानातु नैवेत्याहतुः । को न्विहेति । जीवाद्युत्पत्तेः प्रागेव स्वप्रकाशतया सिद्धं

कारण आहे, प्रकृतीपासून झालेलें महत्तत्त्व जगदाकारत्वेंकरून परिणाम पावतें, यावा कर्ता व नियंता पुरुष आहे, येथें मी कोण आहें ? असें ह्मणशील तर– ज्याअर्थी
भगवान् अविनाशी ईश्वर विष्णू तूंच आहेस त्याअर्थी कालहि तूंच आहेस ह्मणजे काल ही तुझी लीला आहे ॥ ३० ॥ महत्तत्त्व आणि रज, सत्व, तम ह्या तीन
गुणांनीं युक्त अशी प्रकृतिनांवाची सूक्ष्म शक्तिहि तूंच आहेस. तूंच सर्वसाक्षी पुरुष असून सर्वांचीं शरीरें, इंद्रियें व मन यांचे रोग, राग, व प्रीति इत्यादिक विकार जाण-
णारा मिळून सर्वहि तूंच आहेस ॥ ३१ ॥ आत, मीच जर सर्व आहें तर घटादि पदार्थांचें ज्ञान झालें असतां माझें ज्ञान कां होत नाहीं ? बरें, होतें ह्मणावें तर सर्व
जन ब्रह्मवेत्ते होतील, असें ह्मणशील तर– प्रकृतीचे गुणकार्यरूप बुद्धि, अहंकार, इंद्रियें इत्यादिक जे दृश्य विकार त्यांनीं तुज द्रष्टयाचें ग्रहण केलें जात नाहीं. तर
मग प्रकृतीचें कार्य नसल्यामुळें जीवच माझ्या स्वरूपाला जाणूंदे असें ह्मणशील तर– जीवादिकांची उत्पत्ति होण्याच्या पूर्वीच स्वप्रकाशत्वेंकरून सिद्ध असलेल्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तुला, या संसारामध्यें देहादिकांनीं वेष्टित असलेला कोण बरें जीव जाणण्यास समर्थ होईल ? कोणीच होणार नाहीं ॥ ३२ ॥ ग्रास्तव षड्गुणैश्वर्यसंपन्न, वसुदेवाचा पुत्र, जगतांचा स्रष्टा व आपल्यापासून प्रकाश पावणाऱ्या सत्त्वादिक गुणांनीं ज्याचा महिमा, मेघांनीं सूर्याच्या प्रकाशासारखा आच्छादित झाला आहे त्या तुज ब्रह्मरूपाला नमस्कार असो ॥ ३३ ॥ आतां मी अशाप्रकारचा ईश्वर आहें हें तुह्मांस कसें समजलें असें ह्मणशील तर- देहधारी जीवांचेठिकाणीं नसणाऱ्या व ज्यांच्या बरोबरीचे व ज्यांच्याहून अधिक कोणामध्येंच नाहींत अशा तुझ्या पराक्रमांनीं शरीररहित अशाहि ज्या तुझे अवतार प्राण्यामध्यें समजले जातात, तो चतुर्विध पुरुषार्थांचा स्वामी तूं; सर्व लोकांच्या उत्कर्षाकरितां व मोक्षाकरितां आपल्या परिपूर्णस्वरूपानें सांप्रतकालीं अवतीर्ण झाला आहेस॥३४॥३५॥ आतां भक्तीच्या उद्रेकेंकरून वारंवार नमस्कार करि-

त्वां को वा जानाति । गुणसंवृतो देहाद्यावृतः ॥ ३२ ॥ अतो दुर्ज्ञेयत्वात्केवलं प्रणमतः । तस्मै तुभ्यमिति । आत्मनः स्वस्मात् द्योतः प्रकाशो येषां तैर्गुणैश्छन्नो महिमा यस्य अभ्रैरिव रवेस्तस्मै ॥ ३३ ॥ अहोऽहमीश्वर इति कुतो ज्ञातं तत्राहतुः । यस्येति ॥ ३४ ॥ भवायोद्भवाय । विभवाय विगतो भवो यस्मिंतस्मै । कैवल्यायेत्यर्थः ॥ ३५ ॥

तस्मै तुभ्यं भगवते वासुदेवाय वेधसे ॥ आत्मद्योतगुणैश्छन्नमहिम्ने ब्रह्मणे नमः ॥ ३३ ॥ यस्यावतारा ज्ञायंते शरीरेष्वशरीरिणः ॥ तैस्तैरतुल्यातिशयैर्वीर्यैर्देहिष्वसंगतैः ॥ ३४ ॥ स भवान्सर्वलोकस्य भवाय विभवाय च ॥ अवतीर्णोऽशभागेन सांप्रतं पतिराशिषाम् ॥३५॥ नमः परमकल्याण नमः परममंगळ ॥ वासुदेवाय शांताय यदूनां पतये नमः ॥३६॥ अनुजानीहि नौ भूमंस्तवानुचरकिंकरौ ॥ दर्शनं नौ भगवत ऋषेरासीदनुग्रहात् ॥ ३७॥ वाणी गुणानुकथने श्रवणौ कथायां हस्तौ च कर्मसु मनस्तव पादयोर्नः ॥ स्मृत्यां शिरस्तव निवासजगत्प्रणामे दृष्टिः सतां दर्शनेऽस्तु भवत्तनूनाम् ॥ ३८ ॥ श्रीशुक उवाच ॥ इत्थं संकीर्तितस्ताभ्यां भगवान्गोकुलेश्वरः ॥ दाम्ना चोलूखले बद्धः प्रहसन्नाह गुह्यकौ ॥ ३९ ॥ श्रीभगवानुवाच ॥ ज्ञातं मम पुरैवैतदृषिणा करुणात्मना ॥ यच्छ्रीमदांधयोर्वाग्भिर्विभ्रंशोऽनुग्रहः कृतः ॥ ४० ॥

॥ ३६ ॥ नौ आवाम् । अनुचरः कुबेरो नारदो वा तस्य किंकरौ । भगवतस्तव दर्शनम् ॥ ३७ ॥ तत्र गतयोरावयोः पूर्वस्वभावो माऽभूत् किंतु वाणी गुणानुकथन इत्यादि । नः अस्मदो द्वयोश्चेति द्विवचनस्थाने बहुवचनम् । अस्मत्संगिनां सर्वेषामपीति बहुवचनं वा । तव निवासभूतं यज्जगत्तस्य प्रणामे । त्वन्निवासभूतमिति बहुमानेन जगतः प्रणामे शिरोऽस्त्वित्यर्थः । भवत्तनूनां भवतो मूर्तीनाम् ॥ ३८ ॥ संकीर्तितः संस्तुतः ॥ ३८ ॥ वाग्भिर्न ह्यन्यो जुषतो जोष्यानित्यादिभिः श्रीविभ्रंशरूपोऽनुग्रहः कृत इति ॥ ४० ॥

तात- हे परमकल्याणा, हे परममंगला, तुला वारंवार नमस्कार असो. सर्वांतयामी व शांत अशा तुज यादवांच्या पालकाला नमस्कार असो ॥ ३६ ॥ हे व्यापका, तुझा सेवक जो नारद त्याचे आह्मीं दास आहों आह्मांस स्वस्थानीं जाण्याची आज्ञा करावी. आह्मांला तुज भगवंताचें दर्शन, नारदऋषीच्या अनुग्रहेंकरूनच झालें आहे ॥३७॥ स्वस्थानीं गेलेल्याहि आह्मांस पूर्वीसारखा पुन्हा वाईट स्वभाव प्राप्त होऊं नये, तर आमची वाणी तुझ्या गुणकथनाविषयीं तत्पर असो, आमचे कान- तुझ्या कथाश्रवणाविषयीं, हात- तुझ्या पूजादिकर्माविषयीं मन- तुझ्या चरणांच्या स्मृतीविषयीं, मस्तक- तुझें राहण्याचें स्थान अशा जगाच्या नमस्काराविषयीं आणि दृष्टि- तुझ्या मूर्तिरूप सत्पुरुषांच्या दर्शनाविषयीं तत्पर असोत ॥ ३८ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला- हे राजा, याप्रमाणें त्या नलकूबरमणिग्रीवांनीं स्तुति केली असतां, दांव्यानें उखळाचेठिकाणीं बांधलेला तो गोकुलाधिपति भगवान् श्रीकृष्ण, हास्य करून त्या नलकूबरमणिग्रीवांस ह्मणाला कीं- ॥ ३९ ॥ श्रीभगवान् ह्मणाला- हे गुह्यकहो, ॥ ३४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रीमदानें अंध झालेल्या तुह्मांवर, कृपाळू झालेल्या नारदऋषिनें वाणीच्या योगानें लक्ष्मीनाशरूपी अनुग्रह केला हें मला पूर्वीच माहीत होतें ॥ ४० ॥ आणि हें योग्यच
आहे, आश्चर्य नव्हे. कारण, जसा सूर्याच्या दर्शनानें दृष्टीचा प्रतिबंध करणारा अंधकार निवृत्त होतो त्याप्रमाणें आत्मवेत्त्या साधूंच्या त्यांतहि विशेषेंकरून माझेठिका-
यीं चित्त अर्पण करणाऱ्या साधूंच्या दर्शनेंकरून बंध प्राप्त होत नाहीं ॥ ४१ ॥ यास्तव हे नलकूबरमणिग्रीव हो, तुह्मी माझ्या चिंतनादिकांविषयीं तत्पर होत्साते
आपल्या स्थानाप्रत गमन करा. तुह्मांला माझेठिकाणीं इच्छित असलेला परम प्रेमा प्राप्त झालाच आहे. हाच संसाराची निवृत्ति करणारा आहे ॥ ४२ ॥ श्रीशुकाचार्य
ह्मणाला– हे राजा, याप्रमाणें श्रीकृष्ण भगवंतानें सांगितलेले ते नलकूबरमणिग्रीव उखळाला बांधलेल्या त्या श्रीकृष्णाला वारंवार प्रदक्षिणा व नमस्कार करून त्याची

युक्तमेवैतदित्याह । साधूनां स्वधर्मवर्तिनां समचित्तानामात्मविदां सुतरां मत्कृतात्मनां मय्यर्पितचित्तानां तेषां कृपातिरेकात्सुतरामित्युक्तं सवितुर्दर्शनादक्ष्णोर्यथा बंधो न भवे-
त्तद्वत् ॥ ४१ ॥ प्राधान्यादेकस्य संबोधनम् । हे नलकूबर युवां तत्तस्मात्सादनं स्वनिकेतं मत्परमौ संतौ गच्छतम् । वां युवयोरपेक्षितो मयि प्रेमा जात एव । अभवः न

साधूनां समचित्तानां सुतरां मत्कृतात्मनाम् ॥ दर्शनान्नो भवेद्बंधः पुंसोऽक्ष्णोः सवितुर्यथा ॥ ४१ ॥ तद्गच्छतं मत्परमौ नलकू-
बर सादनम् ॥ संजातो मयि भावो वामीप्सितः परमोऽभवः ॥ ४२ ॥ श्रीशुक उवाच ॥ इत्युक्तौ तौ परिक्रम्य प्रणम्य च पुनः-
पुनः ॥ बद्धोलूखलमामंत्र्य जग्मतुर्दिशमुत्तराम् ॥ ४३ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे नारदशापो नाम
दशमोऽध्यायः ॥ १० ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ गोपा नंदादयः श्रुत्वा द्रुमयोः पततो रवम् ॥ तत्राजग्मुः कुरुश्रेष्ठ निर्घातभयशंकिताः
॥ १ ॥ भूम्यां निपतितौ तत्र ददृशुर्यमलार्जुनौ ॥ बभ्रमुस्तदविज्ञाय लक्ष्यं पतनकारणम् ॥ २ ॥ उलूखलं विकर्षंतं दाम्ना बद्धं च
बालकम् ॥ कस्येदं कुत आश्चर्यमुत्पात इति कातराः ॥ ३ ॥

भवो यस्मिन्सः ॥ ४२ ॥ बद्धोलूखलं बद्धमुलूखलं यस्मिंस्तम् ॥ ४३ ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधे पूर्वार्धे टीकायां दशमोऽध्यायः ॥ १० ॥ ॥ एकादशे समागत्य
वृंदावनमथार्भकैः ॥ वत्सान्पालयतानेन हतौ वत्सबकासुरौ ॥ १ ॥ निर्घातो वज्रपात इति भयेन शंकिताः ॥ १ ॥ तल्लक्ष्यं प्रत्यक्षतः पुरतो दृश्यमपि पतनकारणमविज्ञाय
बभ्रमुः ॥ २ ॥ लक्ष्यं कारणं दर्शयति । उलूखलमिति । भ्रमकारणमाह । कस्येदं राक्षसादेः कर्म कुतो वा कारणादाश्चर्यमुत्पात इति कातरा भीताः संतो बभ्रमुरित्यर्थः ॥ ३ ॥

आज्ञा घेऊन उत्तर दिशेकडे निघून गेले ॥ ४३ ॥ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील पूर्वार्धामध्यें नारदशापकथनरूप हा दहावा
अध्याय समाप्त झाला ॥ १० ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या अकराव्या अध्यायामध्यें वृंदावनांत येऊन नंतर बालकांसहवर्तमान वत्सांचें रक्षण करणाऱ्या
श्रीकृष्णानें, वत्सासुर व बकासुर या दोघांचाहि वध केला अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे कुरुश्रेष्ठा, राजा, नंदादिक गोपांनीं, पडणाऱ्या त्या
वृक्षांचा शब्द ऐकून वज्रपाताच्या भयानें शंकितचित्त होत्साते ते त्याठिकाणीं प्राप्त झाले ॥ १ ॥ आणि त्यांनीं तेथें भूमीवर पडलेले ते यमलार्जुन वृक्ष पाहिले परंतु ते
पडण्याचें कारण, प्रत्यक्ष पुढें दिसत असलेलेंहि तें लक्ष्य न जाणून भ्रम पावले ॥ २ ॥ ह्मणजे उखळाला ओढीत असलेल्या, दाव्यानें बांधलेल्या त्या श्रीकृष्ण बालकाला न जाणून
हें कोणा राक्षसादिकाचें कर्म असावें ! हें कोणत्या कारणास्तव झालें ! हें मोठें आश्चर्य आहे ! हा अरिष्टसूचक उत्पात आहे कीं काय ! असें बोलून भयानें व्याकुल होत्साते

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ते नंदादिक गोप भ्रम पावले; ह्मणजे त्यांचा कांहींच निश्चय होईना ॥ ३ ॥ तेव्हां त्यांना तेथें खेळत असलेले बालक ह्मणाले कीं,– वांकडें पडलेलें उखळ ओढणाऱ्या व
वृक्षांच्या मधून गेलेल्या ह्या कृष्णानेंच वृक्ष पाडिले असें आह्मीं पाहिलें आहे. केवळ इतकेंच नाहीं तर त्या वृक्षांपासून निघालेल्या दिव्य दोन पुरुषांनाहि आह्मीं पाहिलें
आहे ॥ ४ ॥ तेव्हां तेथें जे गोप केवळ तर्कनिष्ठ होते त्यांनीं त्या बालकाच्या हातून एवढ्या मोठ्या वृक्षांचें तें उपटणें घडणार नाहीं अशा तर्कानें त्या बालकांच्या
भाषणाचा अंगीकार केला नाहीं. कितीएक तर–पूतना, तृणावर्त, इत्यादिकांचा भंग प्रत्यक्ष पाहिलेला असल्यामुळें हेंहि त्याचेंच कर्म असेल किंवा नसेल असे संदिग्धचित्त
झाले ॥ ५ ॥ असो. दाव्यानें उखळाचेठिकाणीं बांधून ठेविलेला ह्मणून उखळाचें आकर्षण करणारा अशा आपल्या पुत्राला पाहून हास्य करणाऱ्या नंदानें त्याला लवकर
सोडविलें ॥ ६ ॥ पुढें भगवंतानें मला लोक जाणतील अशी शंका मनांत आणून अतिशयच बाळपणाचें अनुकरण केलें. तें असें कीं,– गोपींनीं तूं फार चांगलें नृत्य करि-

---

मध्यगेन वृक्षयोर्मध्यगतेन । न केवलमेतावत् । वृक्षाभ्यां निर्गतौ दिव्यौ पुरुषावप्यचक्ष्महि दृष्टवंतो वयमिति ॥ ४ ॥ केवलं तार्किका न जगृहुरेव अन्ये संदेहयुक्तचित्ता बभू-
वुरिति ॥ ५ ॥ भगवन्मायाविमोहितस्य नंदस्याचरितमाह । उलूखलमिति ॥ ६ ॥ ज्ञास्यंते मामिति शंकमानोऽतीव बाल्यमनुकरोति स्म तदाह । गोपीभिरिति । स्तोभितः

बाला ऊचुरनेनेति तिर्यग्गतमुलूखलम् ॥ विकर्षता मध्यगेन पुरुषावप्यचक्ष्महि ॥ ४ ॥ न ते तदुक्तं जगृहुर्न घटेतेति तस्य तत् ॥
बालस्योत्पाटनं तर्वोः केचित्संदिग्धचेतसः ॥ ५ ॥ उलूखलं विकर्षंतं दाम्ना बद्धं स्वमात्मजम् ॥ विलोक्य नंदः प्रहसद्वदनो विमुमो-
च ह ॥ ६ ॥ गोपीभिः स्तोभितोऽनृत्यद्भगवान्बालवत्क्वचित् ॥ उद्गायति क्वचिन्मुग्धस्तद्वशो दारुयंत्रवत् ॥ ७ ॥ बिभर्ति क्वचि-
दाज्ञप्तः पीठकोन्मानपादुकम् ॥ बाहुक्षेपं च कुरुते स्वानां च प्रीतिमावहन् ॥ ८ ॥ दर्शयंस्तद्विदां लोक आत्मनो भृ-
त्यवश्यताम् ॥ व्रजस्योवाह वै हर्षं भगवान्बालचेष्टितैः ॥ ९ ॥ क्रीणीहि भो फलानीति श्रुत्वा सत्वरमच्युतः ॥ फलार्थी
धान्यमादाय ययौ सर्वफलप्रदः ॥ १० ॥ फलविक्रयणी तस्य च्युतधान्यं करद्वयम् ॥ फलैरपूरयद्रत्नैः फलभांडमपूरि च ॥ ११ ॥

करतालादिना प्रोत्साहितः ॥ ७ ॥ इदमानयेत्याज्ञप्त आनेतुमसमर्थ इव बिभर्ति केवलं पीठादि । बाहुक्षेपं करचालनं च । तद्विदां चेति चकारान्वयः ॥ ८ ॥ तदैश्वर्यं विदंति ये
तेषाम् । एवं व्रजस्य हर्षमुवाहेति ॥ ९ ॥ १० ॥ ११ ॥

तोस अशी स्तुति केली असतां, भगवान् बालकाप्रमाणें नृत्य करीत असे. तसेंच केव्हांतरी गायन करण्याकरितां गोपींनीं त्याची प्रशंसा, केली असतां काष्ठाच्या बाहुली-
प्रमाणें त्यांच्या स्वाधीन होऊन अज्ञानी बालकासारखा, जसे त्यांना हर्षादिक प्राप्त होतील त्याप्रमाणें मोठ्यानें गायन करीत असे ॥ ७ ॥ केव्हांतरी गोपींनीं, पाट, अधोली व
पादुकावगैरे आणण्याविषयीं आज्ञा केली असतां, ते आणण्याविषयीं असमर्थ असल्यासारखा केवळ हातांनीं त्यांचें ग्रहण करीत असे. केव्हांतरी माझ्याबरोबर युद्ध कर असें
सांगितलें असतां, आपल्या गोकुलवासी भक्तांना व तें पाहणारांना प्रीति उत्पन्न करित होत्साता दंड थोपटणेंवगैरे करीत असे ॥ ८ ॥ याप्रमाणें या लोकामध्यें जे त्याचें
ऐश्वर्य जाणणारे ज्ञानी आहेत त्यांना आपली केवळ भक्तवश्यता आहे असें दाखवीत होत्साता तो भगवान् श्रीकृष्ण, बालकासारखे खेळ करून गोकुलवासीजनांला हर्ष
उत्पन्न करित असे ॥ ९ ॥ एकेवेळीं बोरेंवगैरे फळें विकणाऱ्या माळणीनें हे लोकहो, फळें विकत घ्या, असें वचन उच्चारिलें असतां तें ऐकून, सर्वफळें देणारा श्रीकृष्ण, फळें घेण्या-
करितां धान्य घेऊन सत्वर माळणीजवळ गेला ॥ १० ॥ तेव्हां त्वरेनें बाहेर जाणाऱ्या त्या कृष्णाचें ज्यापासून मार्गाचेठिकाणीं कांहीं धान्यकण गळून पडत आहेत असें हस्तद्व

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

य, फळें विकणाऱ्या माळ्यीनें फळांनीं भरून टाकिलें. तेव्हां श्रीकृष्णानें हातांत अवशेष राहिलेल्या धान्यानें तिचें फळांचें भांडें (टोपलें) माणकेंवगैरे रत्नांनीं परिपूर्ण केलें ॥ ११ ॥ नंतर एकेदिवशीं यमुनानदीच्या काठीं जाऊन बालकांसहवर्तमान अत्यंत क्रीडा करणाऱ्या अर्जुनवृक्षांना मोडणाऱ्या त्या कृष्णाला आणि रामाला, सौभाग्यादिगुणसंपन्न रोहिणीनें हाका मारिल्या ॥ १२ ॥ आपण हाका मारिल्या तरी ते रामकृष्ण, क्रीडेमध्यें निमग्न असल्यामुळें जेव्हां आले नाहींत तेव्हां त्यांना आणण्यासाठीं रोहिणीनें पुत्रवत्सल अशा यशोदेला पाठविलें ॥ १३ ॥ तेव्हां पुत्रस्नेहानें जिच्या स्तनांतून दूध स्रवत आहे अशी ती यशोदा, बालकांसहवर्तमान फार वेळ क्रीडा करणाऱ्या श्रीकृष्णपुत्राला हाका मारूं लागली कीं, ॥ १४ ॥ बा कमलनयना कृष्णा, कृष्णा, घरीं ये. खेळणें पुरे कर. हे पुत्रका, तूं खेळतां खेळतां फार श्रमला आहेस व क्षुधेनें व्याकुळ झाला आहेस ह्मणून स्तनपान कर ॥ १५ ॥ हे ताता, कुलनंदना रामा, तूं कृष्णासहवर्तमान लवकर घरीं ये. अरे तूं सकाळींच जेवला

॥ १२ ॥ १३ ॥ १४ ॥ १५ ॥ १६ ॥ १७ ॥ १८ ॥ १९ ॥ २० ॥ रंतुं वृंदावनं गंतुमंतः कृष्णेन यंत्रिताः ॥ स्वतंत्रा हव नंदाद्या मंत्रमेतममंत्रयन् ॥

सरित्तीरगतं कृष्णं भग्नार्जुनमथाह्वयत् ॥ रामं च रोहिणी देवी क्रीडंतं बालकैर्भृशम् ॥ १२ ॥ नोपेयातां यदाहूतौ क्रीडासंगेन पुत्रकौ ॥ यशोदां प्रेषयामास रोहिणी पुत्रवत्सलाम् ॥ १३ ॥ क्रीडंतं सा सुतं बालैरतिवेलं सहाग्रजम् ॥ यशोदाऽजोहवीत्कृष्णं पुत्रस्नेहस्नुतस्तनी ॥ १४ ॥ कृष्ण कृष्णारविंदाक्ष तात एहि स्तनं पिब ॥ अलं विहारैः क्षुत्क्षांतः क्रीडाश्रांतोऽसि पुत्रक ॥ १५ ॥ हे रामागच्छ ताताशु सानुजः कुलनंदनः ॥ प्रातरेव कृताहारस्तद्भवान्भोक्तुमर्हति ॥ १६ ॥ प्रतीक्षते त्वां दाशार्ह भोक्ष्यमाणो व्रजाधिपः ॥ एह्यावयोः प्रियं धेहि स्वगृहान्यात बालकाः ॥ १७ ॥ धूलिधूसरितांगस्त्वं पुत्र मज्जनमावह ॥ जन्मर्क्षमद्य भवतो विप्रेभ्यो देहि गाः शुचिः ॥ १८ ॥ पश्य पश्य वयस्यांस्ते मातृमृष्टान्स्वलंकृतान् ॥ त्वं च स्नातः कृताहारो विहरस्व स्वलंकृतः ॥ १९ ॥ इत्थं यशोदा तमशेषशेखरं मत्वा सुतं स्नेहनिबद्धधीर्नृप ॥ हस्ते गृहीत्वा सहराममच्युतं नीत्वा स्ववाटं कृतवत्यथोदयम् ॥ २० ॥ श्रीशुक उवाच ॥ गोपवृद्धा महोत्पाताननुभूय बृहद्वने ॥ नंदादयः समागम्य व्रजकार्यममंत्रयन् ॥ २१ ॥

व्रजकार्यं गोकुलस्य हितकृत्यम् ॥ २१ ॥

आहेस, तर आतां तूं लवकर भोजन करावेंस ॥ १६ ॥ हे कृष्णा, भोजन करण्यास उद्युक्त झालेला गोकुलाधिपति (नंद) तुझी वाट पाहत आहे ह्मणून लवकर घरीं ये, आह्मां उभयतांचें प्रिय कर. मुलांनों, तुह्मी आपापल्या घरीं चला ॥ १७ ॥ हे पुत्रा कृष्णा, तुझें सर्वांग धुळीनें मळकट होऊन गेलें आहे, यास्तव तूं चांगलें स्नान कर; आज तुझें जन्मनक्षत्र आहे ह्मणून तूं शुचिर्भूत होऊन ब्राह्मणांना गाईंचें दान कर ॥ १८ ॥ हे कृष्णा, पहा पहा, ते तुझे संवगडे बालक आईंनीं स्नानें घातलेले व अलंकार धारण केलेले आहेत. अरे तूंहि स्नान करून भोजन कर आणि अलंकार धारण करून खुशालपणीं खेळ ॥ १९ ॥ हे राजा, याप्रमाणें भाषण करणाऱ्या व स्नेहानें जिची बुद्धि श्रीकृष्णाचेठिकाणीं अगदीं आसक्त झाली आहे अशा त्या यशोदेनें, ब्रह्मादिकांचाहि चूडामणि (परम पूज्य) अशा त्या अच्युत भगवंताला आपला पुत्र असें मानून त्याला बलरामासहवर्तमान हातीं धरून आपल्या घरीं नेलें आणि त्या उभयतांना स्नान भोजन व अलंकारवगैरे घालून वाढदिवसाचा सण केला ॥ २० ॥ याप्रमाणें बृहद्वनामध्यें क्रीडा करून आतां वृंदावनांत जाण्याची इच्छा करणाऱ्या श्रीकृष्णानें प्रेरणा केलेल्या गोपांची मसलत सांगतो. नंदादिक

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

गोपवृद्धांनीं बृहद्वनामध्यें पूतना आली इत्यादि मोठमोठ्या उत्पातांचा अनुभव घेऊन, एकेवेळीं सर्व एकठिकाणीं मिळाले आणि गोकुळाच्या हिताविषयीं विचार करूं लागले ॥ २१ ॥ त्यांत उपनंद ह्या नांवाचा एक गोप, ज्ञानानें व वयानें अधिक असून, कोणत्या देशीं, कोणत्या काळीं कोणत्या स्थितीनें वागलें असतां आपला कार्यभाग सिद्ध होतो याचें तत्त्व जाणणारा व रामकृष्णाचें प्रिय करणारा होता तो ह्मणाला कीं– ॥ २२ ॥ गोकुळाचें हित इच्छिणाऱ्या आह्मीं, येथून उठून दुसरेठिकाणीं गेलें पाहिजे. कारण, येथें बालकांच्या नाशाला कारण असे मोठमोठे उत्पात प्राप्त होत आहेत ॥ २३ ॥ ते असे कीं–हा श्रीकृष्ण बालक, बालकांचा घात करणाऱ्या त्या पूतना राक्षसीपासून दैवयोगानेंच मुक्त झाला आहे. तसाच खरोखर हरीच्या अनुग्रहेंकरूनच याच्यावर छकडा पडला नाहीं ॥ २४ ॥ या बालकाला चक्रवातरूपी दैत्यानें पक्ष्यांचें विहारस्थान अशा आकाशामध्यें नेलें होतें तेथें आणि तेथून हा शिळेवर पडला होता तेथेंहि, आह्मी आराधन केलेल्या देवांनींच याचें संरक्षण केलें आहे

॥ २२ ॥ २३ ॥ २४ ॥ विपदं वीनां पक्षिणां पदं विहारस्थानम् । वियन्नभः । विगतप्रतिष्ठं वा ॥ २५ ॥ अन्यतमो वा कश्चिद्बालः अच्युतेनैव रक्षणमासीत् २६ ॥ अरिष्टोऽनर्थः । इतः स्थानात् ॥ २७ ॥ पशव्यं पशुभ्यो हितम् । नवानि काननान्यवांतराणि विद्यंते यस्मिंस्तत् ॥ २८ ॥ २९ ॥ एकधियो विप्रतिपत्तिरहिताः । व्रजान् शकटव्यूहान् । रूढाः शकटादिष्वारोपिताः परिच्छदा यैस्ते ॥ ३० ॥

तत्रोपनंदनामाऽऽह गोपो ज्ञानवयोधिकः ॥ देशकालार्थतत्त्वज्ञः प्रियकृद्रामकृष्णयोः ॥ २२ ॥ उत्थातव्यमितोऽस्माभिर्गोकुलस्य हितैषिभिः ॥ आयांत्यत्र महोत्पाता बालानां नाशहेतवः ॥ २३ ॥ मुक्तः कथंचिद्राक्षस्या बालघ्न्या बालको ह्यसौ ॥ हरेरनुग्रहान्नूनमनश्चोपरि नापतत् ॥ २४ ॥ चक्रवातेन नीतोऽयं दैत्येन विपदं वियत् ॥ शिलायां पतितस्तत्र परित्रातः सुरेश्वरैः ॥ २५ ॥ यन्न म्रियेत द्रुमयोरंतरं प्राप्य बालकः ॥ असावन्यतमो वापि तदप्यच्युतरक्षणम् ॥ २६ ॥ यावदौत्पातिकोऽरिष्टो व्रजं नाभिभवेदितः ॥ तावद्बालानुपादाय यास्यामोऽन्यत्र सानुगाः ॥ २७ ॥ वनं वृंदावनं नाम पशव्यं नवकाननम् ॥ गोपगोपीगवां सेव्यं पुण्याद्रितृणवीरुधम् ॥ २८ ॥ तत्तात्राद्यैव यास्यामः शकटान्युंक्त मा चिरम् ॥ गोधनान्यग्रतो यांतु भवतां यदि रोचते ॥ २९ ॥ तच्छ्रुत्वैकधियो गोपाः साधुसाध्विति वादिनः ॥ व्रजान्स्वान्स्वान्समायुज्य ययू रूढपरिच्छदाः ॥ ३० ॥

॥ २५ ॥ त्या दोन यमलार्जुन वृक्षांमध्यें सांपडून हा कृष्ण किंवा दुसरा कोणीहि बालक जो मरण पावला नाहीं तेंहि भगवंतानेंच केलेलें रक्षण होय ॥ २६ ॥ यास्तव जोंपर्यंत दुसऱ्या उत्पातापासून झालेल्या अनर्थानें गोकुलाला स्पर्श केला नाहीं तोंपर्यंत (त्याच्या पूर्वींच) बालकांना घेऊन, गोधन व सेवकादिकांसहवर्तमान आह्मी येथून दुसरेठिकाणीं जाऊंयां ॥ २७ ॥ कोठें जावें ? असें ह्मणाल तर–वृंदावन या नांवाचें वन आहे; तें पशूंना हितकारक, नवीं नवीं अंतर्गत वनें असलेलें, गोपाळ गोपी व गाई ह्यांना सेवन करण्यास योग्य व पवित्र अशा पर्वत, तृण आणि वेली ह्यांनीं युक्त आहे ॥ २८ ॥ तेथें जाण्याचें जर तुह्मां सर्वांना आवडत असेल तर आजच जाऊंयां, आपापल्या गाड्यांवर सामान भरून बैल जुंपा, उशीर करूं नका, गोधनें पुढें जाऊंद्या ॥ २९ ॥ तें उपनंदगोपाचें वचन श्रवण करून सर्व गोप एकबुद्धि होऊन, 'चांगलें आहे, चांगलें आहे' असें ह्मणत होत्साते, आपापले गाड्यांचे समूह जोडून त्यांच्यावर सामानसुमान घालून निघाले ॥ ३० ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हे राजा, ते गोपाळ, वृद्ध, बालक, स्त्रिया व भांडींकुंडींवगैरे सर्व सामान गाड्यांवर घालून आपण कमरा बांधून, सावधगिरीनें हातांत धनुष्यें घेऊन, गोधनें पुढें करून व सर्व बाजूंनीं शिंगें वाजवून मोठा वाद्यघोष करीत करीत पुरोहित ब्राह्मणांसहवर्तमान निघाले ॥ ३१ ॥ ३२ ॥ त्यावेळीं ज्यांच्या कंठांचेठिकाणीं पदकें आहेत म्हणजे सर्व भूषणांनीं भूषित झालेल्या व स्तनाचेठिकाणीं लाविलेल्या नव्या केशराच्या योगानें ज्यांना शोभा आली आहे व ज्यांनीं उत्तम वस्त्रें परिधान केलीं आहेत अशा रथांवर बसलेल्या गोपी, मोठ्या संतोषानें कृष्णलीला गाऊं लागल्या ॥ २३ ॥ तशाच त्या कृष्णरामाच्या कथाश्रवणाविषयीं उत्साहयुक्त असलेल्या यशोदा व रोहिणी, ह्यादि कृष्णरामांसहवर्तमान एका शकटावर बसून चालल्या असतां त्या शोभूं लागल्या ॥ ३४ ॥ याप्रमाणें

यत्ताः कृतप्रयत्नाः ॥ ३१ ॥ ३२ ॥ नूत्नैः कुचगतैः कुंकुमैः कांतिर्यासां ताः । नूत्नेषु कुचेषु यत्कुंकुमं तेन कांतिर्यासामिति वा ॥ ३३ ॥ ३४ ॥ व्रजावासं गोकुलवसतिस्थानम् ॥ ३५ ॥ ३६ ॥ स्वकालेन तद्योग्यकालेन ॥ ३७ ॥ कौमारलीलां निरूपयति । अविदूर इत्यादिना ॥ ३८ ॥ क्षेपणैर्बिल्वामलकादि क्षिपतो दूरे चालयतः । किंकिणीयुक्तैः

वृद्धान्बालान्स्त्रियो राजन्सर्वोपकरणानि च ॥ अनस्स्वारोप्य गोपाला यत्ता आत्तशरासनाः ॥ ३१ ॥ गोधनानि पुरस्कृत्य शृंगाण्यापूर्य सर्वतः ॥ तूर्यघोषेण महता ययुः सहपुरोहिताः ॥ ३२ ॥ गोप्यो रूढरथा नूत्नकुचकुंकुमकांतयः ॥ कृष्णलीला जगुः प्रीता निष्ककंठ्यः सुवाससः ॥ ३३ ॥ तथा यशोदारोहिण्यावेकं शकटमास्थिते ॥ रेजतुः कृष्णरामाभ्यां तत्कथाश्रवणोत्सुके ॥ ३४ ॥ वृंदावनं संप्रविश्य सर्वकालसुखावहम् ॥ तत्र चक्रुर्व्रजावासं शकटैरर्धचंद्रवत् ॥ ३५ ॥ वृंदावनं गोवर्धनं यमुनापुलिनानि च ॥ वीक्ष्यासीदुत्तमा प्रीती राममाधवयोर्नृप ॥ ३६ ॥ एवं व्रजौकसां प्रीतिं यच्छंतौ बालचेष्टितैः ॥ कलवाक्यैः स्वकालेन वत्सपालौ बभूवतुः ॥ ३७ ॥ अविदूरे व्रजभुवः सह गोपालदारकैः ॥ चारयामासतुर्वत्सान्नानाक्रीडापरिच्छदौ ॥ ३८ ॥ क्वचिद्वादयतो वेणुं क्षेपणैः क्षिपतः क्वचित् ॥ क्वचित्पादैः किंकिणीभिः क्वचित्कृत्रिमगोवृषैः ॥ ३९ ॥

पादैः क्षिपतस्ताडयतः । वत्सपाला एव द्वित्राः कंबलादिपिहिता वृषरूपमनुकुर्वंति तैः सह स्वयमपि तथैव वृषायमाणौ नर्दंतौ तदनुकारिशब्दान्कुर्वंतौ युयुधाते इत्यर्थः ॥ ३९ ॥

नंदादिक गोप, ग्रीष्मादिक सर्वकालांचेठिकाणींहि सुख देणाऱ्या त्या वृंदावनामध्यें प्रवेश करून, तेथें त्यांनीं शकटांच्या योगेंकरून अर्धचंद्राकार गोकुळाचें वसतिस्थान केलें ॥ ३५ ॥ हे राजा, रामकृष्णांनाहि वृंदावन गोवर्धन व यमुनेचीं वाळवंटें पाहून, हीं क्रीडावगैरे करण्यास योग्य स्थानें आहेत असें मनांत येऊन उत्तम संतोष झाला ॥ ३६ ॥ असो. याप्रमाणें बालचरित्रांनीं व मधुरभाषणांनीं गोकुलवासी लोकांना प्रीति करणारे ते रामकृष्ण, कांहीं कालानें वत्स चारण्यास योग्यवयाचे झाले ॥ ३७ ॥ आतां रामकृष्णांची कौमारलीला सांगतो— गोकुलापासून फार लांब नव्हे अशाठिकाणीं गोपालांच्या बालकांसहवर्तमान मुरल्या, वेत, काठ्या, शिंगें, वेंढूवगैरे खेळण्याचीं साहित्यें घेऊन क्रीडा करणारे ते रामकृष्ण, वत्सांना चारूं लागले ॥ ३८ ॥ ते केव्हांतरी मुरल्या, पावे व अलगुजें वाजवीत, असत, केव्हांतरी गोफणींनीं दगड मारीत असत, केव्हांतरी घागऱ्या बांधलेल्या पायांनीं नृत्य करीत असत, केव्हांतरी घोंगडीवगैरे पांघरून बैलांचीं सोंगें घेतलेल्या दुसऱ्या वत्सपालकांसहवर्तमान ते आपणहि तशींच बैलांचीं सोंगें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

घेऊन गर्जना करून परस्पर युद्ध करीत असत, केव्हांतरी त्या त्या जातींच्या शब्दांनीं हंसमयूरादिकांचें अनुकरण करून प्राकृत बालकांप्रमाणें क्रीडा करीत असत ॥ ३९ ॥ ४० ॥ एकेवेळीं यमुनेच्या तीरावेठिकाणीं आपल्या प्रीतियुक्त सख्यांसहवर्तमान वत्सांना चारणाऱ्या त्या रामकृष्णांना. मारण्याची इच्छा करणारा एक दैत्य प्राप्त झाला ॥ ४१ ॥ वत्सांच्या समुदायामध्यें आलेल्या त्या वत्सरूपी दैत्याला पाहून, भ्रूसंकेतानें बलरामाला दाखवीत दाखवीत न समजल्यासारखा तो अच्युत श्रीकृष्ण हळूच त्याच्याजवळ प्राप्त झाला ॥ ४२ ॥ आणि त्यानें मागचे पाय व शेंपूट यांसहवर्तमान त्याला धरून गरगर फिरविलें आणि फिरविण्यानेंच गतप्राण झालेल्या त्याला एका कंवठीच्या झाडावर फेंकून दिलें ॥ ४३ ॥ तेव्हां अंतकाळीं मायिक स्वरूप राहत नसल्यामुळें मोठा देह धारण करणारा तो दैत्य, पाडविलेल्या कपित्थफळांसहवर्तमान स्वतांहि भूमीवर पडला. त्या पडलेल्या दैत्याला पाहून विस्मित झालेले सर्वेहि बालक, कृष्णा, फार चांगलें केलेंस, फार चांगलें केलेंस, अशी श्रीकृष्णाची प्रशंसा करूं लागले

रुतैः शब्दैः । जंतून् हंसमयूरादीन् ॥ ४० ॥ ४१ ॥ मुग्ध इवाजानन्निवाऽऽसदत्तसमीपमागमत् ॥ ४२ ॥ अपरपादाभ्यां सहलांगूलं यथा भवति तथा गृहीत्वा ॥ ४३ ॥ ४४ ॥

वृषायमाणौ नर्दंतौ युयुधाते परस्परम् ॥ अनुकृत्य रुतैर्जंतूंश्चेरतुः प्राकृतौ यथा ॥ ४० ॥ कदाचिद्यमुनातीरे वत्सांश्चारयतोः स्व-
कैः ॥ वयस्यैः कृष्णबलयोर्जिघांसुर्दैत्य आगमत् ॥ ४१ ॥ तं वत्सरूपिणं वीक्ष्य वत्सयूथगतं हरिः ॥ दर्शयन्बलदेवाय शनैर्मुग्ध
इवासदत् ॥ ४२ ॥ गृहीत्वाऽपरपादाभ्यां सहलांगूलमच्युतः ॥ भ्रामयित्वा कपित्थाग्रे प्राहिणोद्गतजीवितम् ॥ स कपित्थैर्म-
हाकायः पात्यमानैः पपात ह ॥ ४३ ॥ तं वीक्ष्य विस्मिता बालाः शशंसुः साधुसाध्विति ॥ देवाश्च परिसंतुष्टा
बभूवुः पुष्पवर्षिणः ॥ ४४ ॥ तौ वत्सपालकौ भूत्वा सर्वलोकैकपालकौ ॥ सप्रातराशौ गोवत्सांश्चारयंतौ विचेरतुः ॥ ४५ ॥
स्वं स्वं वत्सकुलं सर्वे पाययिष्यंत एकदा ॥ गत्वा जलाशयाभ्याशं पाययित्वा पपुर्जलम् ॥ ४६ ॥ ते तत्र ददृशुर्बाला महासत्त्वम-
वस्थितम् ॥ तत्रसुर्वज्रनिर्भिन्नं गिरेः शृंगमिव च्युतम् ॥ ४७ ॥ स वै बकोनाम महानसुरो बकरूपधृक् ॥ आगत्य सहसा कृष्णं ती-
क्ष्णतुंडोऽग्रसद्बली ॥ ४८ ॥ कृष्णं महाबकग्रस्तं दृष्ट्वा रामादयोऽर्भकाः ॥ बभूवुरिंद्रियाणीव विना प्राणं विचेतसः ॥ ४९ ॥ तं तालुमूलं
प्रदहंतमग्निवद्गोपालसूनुं पितरं जगद्गुरोः ॥ चच्छर्द सद्योऽतिरुषाक्षतं बकस्तुंडेन हंतुं पुनरभ्यपद्यत ॥ ५० ॥

सर्वेषां लोकानामेकौ मुख्यौ पालकौ । प्रातराशः प्रातर्भोज्यमन्नं तत्सहितौ ॥ ४५ ॥ अभ्याशं समीपम् ॥ ४६ ॥ ४७ ॥ ४८ ॥ राम आदिर्येषां ते न तु रामः ॥ ४९ ॥ ५० ॥

त्यावेळीं अत्यंत संतुष्ट झालेले देवहि पुष्पवृष्टि करूं लागले ॥ ४४ ॥ याप्रमाणें सर्व लोकांचे मुख्य पालक असे ते रामकृष्ण, वत्सांचे पालक होऊन, बरोबर शिधोऱ्या घेऊन गाईंच्या वत्सांना चारीत होत्साते संचार करूं लागले ॥ ४५ ॥ एकेवेळीं त्या रामकृष्णादिक सर्वेहि गोपबालकांनीं आपापल्या वत्सांच्या समुदायाला, पाणी पाजण्याकरितां यमुनेच्या पाणवठ्यावर जाऊन पाणी पाजविलें व आपणहि प्राशन केलें ॥ ४६ ॥ नंतर त्या बालकांनीं त्या यमुनेच्या कांठीं असलेला, इंद्राच्या वज्रानें तुटून भूमीवर पड-लेलें पर्वताचें शिखरच कीं काय असा बकरूपी एक मोठा प्राणी पाहिला आणि ते भयाभीत झाले ॥ ४७ ॥ तो तीक्ष्णचोंचेचा, बकरूप धारण करणारा, बकनामक महा-बलाढ्य दैत्य होता. त्यानें एकाएकीं कृष्णाच्या आंगावर धाऊन येऊन कृष्णाला गिळून टाकिलें ॥ ४८ ॥ तेव्हां महाबकानें गिळिलेल्या कृष्णाला पाहून बलरामाखेरीज सर्व गोपबालक, जशीं प्राणांवाचून इंद्रियें निश्चेष्ट होतात त्याप्रमाणें मूर्छित झाले ॥ ४९ ॥ इकडे बकानें ताळूच्या मुळाशीं अग्नीप्रमाणें जाळणारा, ब्रह्मदेवाचाहि पिता परंतु

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नंदाचा बालक अशा त्या श्रीकृष्णाला कांहींच इजा न होतां तत्काळ वमन करून बाहेर टाकिलें आणि मोठ्या क्रोधानें त्याला चोंनेनें मारण्याकरितां पुन्हा त्याच्या अंगावर धांवला
॥ ५० ॥ तेव्हां भक्तांचा पालक व देवांना आनंद देणारा अशा त्या श्रीकृष्णानें, वेगानें येणाऱ्या त्या बकासुराच्या चोंचेचे 'खालचा व वरचा असे' दोन्ही भाग
आपल्या हातांनीं आंवळून धरून सर्व बालक पहात असतां, जशी लव्हाळ्याची काडी फाडून टाकावी त्याप्रमाणें अनायासानें त्याचें विदारण केलें॥ ५१ ॥ तेव्हां स्वर्गलोकाचे-
ठिकाणीं राहणाऱ्या देवांनीं नंदनवनांतील मोगऱ्यांच्यावगैरे पुष्पांनीं बकासुराच्या शत्रूवर (कृष्णावर) पुष्पवृष्टि केली व नगारे व शंख या वाद्यांसहित उत्तमप्रकारच्या
स्तवांनीं स्तुति केली; तें पाहून गोपालांचे पुत्र, आश्चर्य पावले ॥ ५२ ॥ तेव्हां रामादिक बालक, बकासुराच्या मुखांतून सुटलेल्या त्या श्रीकृष्णास पावोन व आप-
ल्या स्थानावर प्राप्त झालेल्या त्याला आलिंगन करून, जसा प्राणावांचून व्याकुळ झालेला इंद्रियांचा गण, पुन्हा आपल्या स्थानीं प्राप्त झालेल्या प्राणाचा संयोग पावला

तुंडयोश्चंच्वोः । वीरणवदग्रंथितृणविशेषवत् ॥ ५१ ॥ समीडिरे तुष्टुवुः । आनकैः शंखैरन्यैश्च संस्तवैः सह ॥ ५२ ॥ स्वस्थानमागतं प्राणमिव कृष्णं प्रणीय एकीकृत्य ॥ ५३ ॥
अतिप्रियेण प्रीत्या आदृताः सादराः । प्रेत्यागतमिव लोकांतरादागतमिव । तृषितान्यतृप्तान्यमृतं पिबंतीवेक्षणानि येषां ते ॥ ५४ ॥ अहो बतेत्यादिश्लोकत्रयस्य इति नंदादय

तदा तमापतंतं स निगृह्य तुंडयोर्दोर्भ्यां बकं कंससखं सतां पतिः ॥ पश्यत्सु बालेषु ददार लीलया मुदावहो वीरणवद्दिवौकसाम् ॥ ५१ ॥ तदा
बकारिं सुरलोकवासिनः समाकिरन्नंदनमल्लिकादिभिः ॥ समीडिरे चानकशंखसंस्तवैस्तद्वीक्ष्य गोपालसुता विसिस्मिरे ॥ ५२ ॥ मुक्तं बका-
स्यादुपलभ्य बालका रामादयः प्राणमिवेंद्रियो गणः ॥ स्थानागतं तं परिरभ्य निर्वृताः प्रणीय वत्सान्व्रजमेत्य तज्जगुः ॥ ५३ ॥ श्रुत्वा
तद्विस्मिता गोपा गोप्यश्चातिप्रियादृताः ॥ प्रेत्यागतमिवौत्सुक्यादैक्षंत तृषितेक्षणाः॥५४॥ अहो बतास्य बालस्य बहवो मृत्यवोऽभवन् ॥
अप्यासीद्विप्रियं तेषां कृतं पूर्वं यतो भयम् ॥ ५५ ॥ अथाप्यभिभवंत्येनं नैव ते घोरदर्शनाः ॥ जिघांसयैनमासाद्य नश्यंत्यग्नौ पतंग-
वत् ॥ ५६ ॥ अहो ब्रह्मविदां वाचो नासत्याः संति कर्हिचित् ॥ गर्गो यदाह भगवानन्वभावि तथैव तत् ॥ ५७ ॥

इत्यनेनान्वयः । अपि एवमपि तेषामेवानिष्टमासीत् यतस्तैः पूर्वमन्येषां भयं कृतम् ॥ ५५ ॥ अथ घोरदर्शना अपि नाभिभवंति न धर्षयंति ॥ ५६ ॥ गर्गो यदाह तस्मान्नंदा-
त्मजोऽयं ते नारायणसमो गुणैरित्यादि ॥ ५७ ॥

म्हणजे आनंद पावतो त्याप्रमाणें आनंद पावले आणि सायंकाळीं सर्व वत्सांना एकेठिकाणीं करून गोकुळांत येऊन तें बकवधादिक कृष्णचरित्र सांगूं लागले॥ ५३ ॥
गोपबालकांनीं वर्णन केलेलें तें कृष्णचरित्र ऐकून अतिप्रीतीनें आनंदयुक्त झालेल्या गोपी व गोप, मरूनच आलेल्यासारख्या त्या कृष्णाकडे तृप्त न झालेल्या व
अमृताचेंच प्राशन करतात कीं काय अशा नेत्रांनीं अवलोकन करूं लागले ॥ ५४ ॥ आणि म्हणाले कीं,—काय हो सांगावें ! या कृष्णबालकाला पुष्कळ मृत्यूचीं का-
रणें (दैत्यादिक) प्राप्त झालीं, तथापि, त्यांनीं पूर्वीं दुसऱ्यांना भय उत्पन्न केलें होतें म्हणून त्यांचेंच अनिष्ट झालें ॥ ५५ ॥ जेरीहि ते (दैत्य) दर्शनमात्रेंकरून प्राण
हरण करणारे होते तथापि ते, या बालकाचा पराभव करण्यास मुळींच समर्थ झाले नाहींत, तर मारण्याच्या इच्छेनें याच्याजवळ येऊन, ते जसे अग्नीचा नाश
करण्यास प्राप्त झालेले पतंग, आपणच नाश पावतात त्याप्रमाणें स्वतांच नाश पावले ॥ ५६ ॥ अहो ब्रह्मवेत्त्या ऋषींच्या वाणी, कधींहि खोट्या होत नाहींत. का-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रण, भगवान् गर्गऋषीनें, ‘ हे नंदा हा तुझा पुत्र गुणांनीं नारायणासारखा आहे ’ इत्यादिक जें सांगितलें होतें तें तसेंच आमच्या अनुभवास, आलें आहे ॥ ५७ ॥ याप्रमाणें भाषण करणारे नंदादिक गोप, हर्षानें कृष्णरामाची कथा वर्णन करीत, व त्यांचपासहवर्तमान रमत होत्साते, त्यापासून झालेल्या आनंदाच्या योगेंकरून त्यांनीं संसारसंबंधीं तापाचें अनुसंधान राखिलें नाहीं ॥ ५८ ॥ हे सांगितलेले व दुसरेहि, लपंडाव खेळणें, पूल बांधणें, माकडांसारख्या उड्या मारणेंवगैरे लहान मुलांचे खेळ खेळून रामकृष्णांनीं गोकुळामध्यें आपलें बाळपण घालविलें ॥ ५९ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील दशमस्कंधाच्या पूर्वार्धांत वत्सबकवधनिरूपणनामक हा अकरावा अध्याय समाप्त झाला ॥ ११ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या बाराव्या अध्यायामध्यें, अजगरसर्पाचा वेष धारण करणाऱ्या व वत्सांना व वत्सपालकांना गिळून टाकणाऱ्या अघासुराचा, क्रुद्ध झालेल्या श्रीकृष्णानें त्याच्या मळ्यामध्यें वृद्धिंगत होऊन वध केला अशी कथा वर्णन केली आहे ॥ १ ॥ पूर्वीं महा-

---

॥ ५८ ॥ ५९ ॥ वत्सयूथगतं हत्वा वत्सदंभासुरं हरिः ॥ मुनियूथगतं चाहन्नग्रण्यं दंभिनां बकम् ॥ ॥ इति श्रीमद्भागवते दशमपूर्वार्धटीकायामेकादशोऽध्यायः ॥ ११ ॥ ॥ द्वादशे तु महासर्पवपुर्धरमघासुरम् ॥ वत्सपालगिलं क्रुद्धो गलेऽहन्निति वर्ण्यते ॥ १ ॥ महाबकगलक्रीडा केवलस्य न कौतुकम् ॥ इतीवाघासुरमुखे ससखः प्राविशद्धरिः ॥ २ ॥

इति नंदादयो गोपाः कृष्णरामकथां मुदा ॥ कुर्वंतो रममाणाश्च नाविंदन्भववेदनाम् ॥ ५८ ॥ एवं विहारैः कौमारैः कौमारं जहतुर्व्रजे ॥ निलायनैः सेतुबंधैर्मर्कटोत्प्लवनादिभिः ५९ ॥ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे वत्सबकवधो नामैकादशोऽध्यायः ॥ ११ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ क्वचिद्वनाशाय मनो दधद्व्रजात्प्रातः समुत्थाय वयस्यवत्सपान् ॥ प्रबोधयन् शृंगरवेण चारुणा विनिर्गतो वत्सपुरःसरो हरिः ॥ १ ॥ तेनैव साकं पृथुकाः सहस्रशः स्निग्धाः सुशिग्वेत्रविषाणवेणवः ॥ स्वान्स्वान्सहस्रोपरिसंख्ययाऽन्वितान्वत्सान्पुरस्कृत्य विनिर्ययुर्मुदा ॥ २ ॥ कृष्णवत्सैरसंख्यातैर्यूथीकृत्य स्ववत्सकान् ॥ चारयंतोऽर्भलीलाभिर्विजह्रुस्तत्र तत्र ह ॥ ३ ॥ फलप्रवालस्तबकसुमनःपिच्छधातुभिः ॥ काचगुंजामणिस्वर्णभूषिता अप्यभूषयन् ॥ ४ ॥

क्वचित्कदाचिद्वनाशाय वने एव प्रथमं भोजनं कर्तुम् ॥ १ ॥ तेनैव शृंगरवेण श्रीकृष्णेन वा सह पृथुकाः बालाः । स्निग्धाः स्नेहयुक्ताः । शिक् शिक्यं रम्याः शिग्वेत्रादयो येषां ते । सहस्राधिकसंख्यायुक्तान्वत्सान् ॥ २ ॥ ३ ॥ काचादिभिः पूर्वं मातृभिर्भूषिता अपि फलादिभिरात्मानमभूषयन्नित्यर्थः ॥ ४ ॥

बकासुरच्या गळ्यामध्यें आपल्या एव त्याची क्रीडा झाली हें कांहीं आश्चर्य नाहीं असें दर्शविण्याकरितांच कीं काय श्रीकृष्णानें आतां आपल्या मित्रांसहवर्तमान अघासुराच्या मुखामध्यें प्रवेश केला आहे ॥ २ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, एकेवेळीं, वनामध्येंच प्रथम भोजन करण्याकरितां प्रातःकाळीं उठून मनोहर अशा शिंगाच्या शब्दानें संवगड्या वत्सपालकांना, ‘ मी वनांत जातों तुह्मींहि सर्वजण लवकर या ’ असें सुचविणारा श्रीकृष्ण, वत्सांना पुढें सोडून गोकुळांतून निघाला ॥ १ ॥ तेव्हां त्या श्रीकृष्णाबरोबरच त्याचे स्नेही हजारो गोपबालक, शिदोरीचें सुरेख शिंके, वेतकाठी, शिंग व मुरली हें सामान घेऊन हजारांपेक्षांहि अधिक संख्या असलेल्या आपापल्या वत्सांना पुढें चालवीत मोठ्या आनंदानें गोकुळांतून बाहेर निघाले ॥ २ ॥ नंतर ते बालक असंख्यात कृष्णाच्या वत्सांमध्यें आपापल्या वत्सांना मिळवून चारीत होत्साते त्या त्या वनांमध्यें लहानमुलांचे अनेकप्रकारचे खेळ मांडून खेळूं लागले ॥ ३ ॥ त्यांना त्यांच्या मातांनीं पूर्वीं कांचा, गुंजा, रत्नें व सुवर्ण यांच्या अलंकारांनीं भूषित केलें होतें तथापि अतिउ-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

यांनीं आपणास भूषित केलें ॥ ४ ॥ ते एकमेकांचीं शिंकीं शिंगेंवगैरे चोरून
त्सुकतेनें त्यांनीं पुन्हा फळांचे घड, पल्लव, फुलांचे घोंस, सुटीं फुलें, मोराचीं पंखें व कावगैरे धातु
लपवून ठेवीत असत व तीं आपणाजवळ आहेत असें त्यांना समजलें ह्मणजे दूर फेंकून देत, नंतर ते रडकुंडीस आले ह्मणजे पुनः फेंकलेल्याठिकाणीं जाऊन हंसत
हंसत ज्यांचीं त्यांला परत आणून देत असत ॥ ५ ॥ एखादे वेळीं, कृष्ण जर वनशोभा पाहण्याकरितां दूर गेला असला तर त्याला 'मी पूर्वीं स्पर्श करीन, मी पूर्वीं स्पर्श
करीन' अशा प्रतिज्ञा करून धांवत धावत जाऊन त्याला स्पर्श व आलिंगन करून मोठ्या आनंदानें रमत असत ॥ ६ ॥ कितीएक गोप, मुरल्या वाजवीत खेळत असत, कि-
तीएक शिंगें वाजवीत, कितीएक भ्रमरांबरोबर गायन करीत, कोणी कोकिळांबरोबर तसे शब्द करीत, दुसरे पक्ष्यांच्या छायांबरोबर धांवत असत, कोणी हंसांबरोबर
त्यांच्यासारख्या मनोहर गतीनें चालत असत, कितीएक बगळ्यांच्याजवळ त्यांच्यासारखें ध्यान करीत बसत, कोणी मोरांबरोबर त्यांच्यासारखे नाचते असत, किती-

॥ ५ ॥ यदि दूरं गतः कृष्णो भवति तर्हि ॥ ६ ॥ ध्मांतो वादयंतः । भृंगैः सह ॥ ७ ॥ विच्छायाभिः पक्षिच्छायाभिः । कलापिभिर्मयूरैः ॥ ८ ॥ कीश-
मुष्णंतश्चोरयंतः ॥ ९ ॥ यदि दूरं गतः कृष्णो भवति तर्हि ॥ ६ ॥ ध्मांतो वादयंतः । भृंगैः सह ॥ ७ ॥ विच्छायाभिः पक्षिच्छायाभिः । कलापिभिर्मयूरैः ॥ ८ ॥ कीश-
वालान् वृक्षशाखासु लंबमानानि वानरलांगूलान्याकर्षंतो लांगूलममुंचंतस्तैः सह द्रुमानारोहंतः । विकुर्वंतो दंतदर्शनभ्रूविजृंभादिभिस्तैः सह विकारान्कुर्वंतः । पलाशिषु वृक्षेषु

मुष्णंतोऽन्योन्यशिक्यादीन्ज्ञातानाराच्च चिक्षिपुः ॥ तत्रत्याश्च पुनर्दूराद्धसंतश्च पुनर्ददुः ॥ ५ ॥ यदि दूरं गतः कृष्णो वनशोभे-
क्षणाय तम् ॥ अहं पूर्वमहं पूर्वमिति संस्पृश्य रेमिरे ॥ ६ ॥ केचिद्वेणून्वादयंतो ध्मांतः शृंगाणि केचन ॥ केचिद्भृंगैः प्रगायंतः
कूजंतः कोकिलैः परे ॥ ७ ॥ विच्छायाभिः प्रधावंतो गच्छंतः साधु हंसकैः ॥ बकैरुपविशंतश्च नृत्यंतश्च कलापिभिः ॥ ८ ॥ विक-
र्षंतः कीशवालानारोहंतश्च तैर्द्रुमान् ॥ विकुर्वंतश्च तैः साकं प्लवंतश्च पलाशिषु ॥ ९ ॥ साकं भेकैर्विलंघंतः सरित्प्रस्रवसंप्लुताः ॥
विहसंतः प्रतिच्छायाः शपंतश्च प्रतिस्वनान् ॥ १० ॥ इत्थं सतां ब्रह्मसुखानुभूत्या दास्यंगतानां परदैवतेन ॥ मायाश्रितानां नर-
दारकेण साकं विजह्रुः कृतपुण्यपुंजाः ॥ ११ ॥

प्लवंतः शाखायाः शाखांतरमुद्गच्छंतः ॥ ९ ॥ प्रतिच्छायाः प्रतिबिंबानि ॥ १० ॥ तानति विस्मितः श्लोकद्वयेनाभिनंदति । इत्थमिति । सतां विदुषां ब्रह्म च तत्सुखं चानुभूतिश्च
तया । स्वप्रकाशपरमसुखेनेत्यर्थः । भक्तानां परदैवतेनात्मप्रदेन नाथेन मायाश्रितानां तु नरदारकतया प्रतीयमानेन सह विजह्रुः । कृतानां पुण्यानां पुंजा राशयो येषां ते ।
ब्रह्मविदां तदनुभव एव भक्तानामतिगौरवेणैव भजनं एते तु तेन सह सख्येन विजह्रुः । अहो भाग्यमिति भावः ॥ ११ ॥

एकजण, वृक्षांच्या शाखांवरून खालीं लोंबत असलेलीं वानरांचीं पुच्छें ओढीत व त्यांना धरून वृक्षांवर आपण आरोहण करीत, कोणीएक, वानरांबरोबर त्यांना वांकुल्या दाख-
वीत, कोणी वानरांबरोबर वृक्षांच्या या शाखेवरून त्या शाखेवर उड्या मारीत असत ॥ ७ ॥ ८ ॥ ९ ॥ कोणी नदीच्या कांठीं वाहत असलेल्या थोड्या पाण्यामध्यें स्ना-
न करून बेडकांबरोबर त्यांच्यासारखे उड्या मारीत मारीत पोंहत असत, कोणी नद्यांच्या पाण्यांत पडलेल्या आपल्या पडच्छायांना हंसत असत, दुसरे कित्येक आप-
ल्याच शब्दाचा प्रतिध्वनि निघाला असतां, तो दुसराच कोणी मनुष्य बोलत आहे असें समजून त्याला शिव्या देते असत ॥ १० ॥ याप्रमाणें गोपांच्या क्रीडा वर्णन करून
विस्मित झालेला त्यांचें अभिनंदन करितो- हे राजा, याप्रमाणें तत्त्ववेत्त्या पुरुषांना स्वप्रकाश परमसुखरूप, दास्य करणाऱ्या भक्तांना आत्मस्वरूप देणारा नाथ
आणि मायेचा आश्रय करणाऱ्या लोकांना मनुष्यपुत्ररूपानें भासणारा अशा त्या श्रीकृष्ण भगवंताबरोबर, ज्यांनीं पुण्यांच्या राशी केलेल्या आहेत अशा त्या गोपबालकां-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नीं क्रीडा केली तेव्हां त्यांचें भाग्य किती वर्णन करावें! ॥ ११ ॥ ज्या भगवंताचें चरणरज, बहुत जन्मांमध्यें अनुष्ठान केलेल्या तपानें व समाधिवगैरे कष्टांनीं ज्यांनीं आपलें मन स्वाधीन करून घेतलें आहे त्या योग्यांनासुद्धां दुर्लभ आहे तोच भगवान् स्वतः होऊन ज्यांचा दृष्टिगोचर संवगडी होऊन राहिला आहे त्यांचें भाग्य किती वर्णन करावें? तें वाणीला व मनालाहि अगोचर आहे ॥ १२ ॥ असो. याप्रमाणें रामकृष्णांबरोबर गोपबालकांची क्रीडा चालली असतां ती सुखानें चाललेली क्रीडा पाहण्याचें ज्याला सहन झालें नाहीं असा एक अघनामक महादैत्य त्या वृंदावनामध्यें अकस्मात् प्राप्त झाला. तो इतका प्रबळ होता कीं, अमृत प्राशन केल्यामुळें अमर झालेल्या देवांनींहि आपण ह्याच्या हातून जिवंत राहूं किंवा नाहीं अशी शंका घेऊन वांचण्याच्या इच्छेनें, ते हा दुष्ट दुरात्मा केव्हां कसा मरेल अशी निरंतर वाट पहात होते. किंवा यांतच दुसरा अर्थ होतो, तो असा कीं,— तें रामकृष्णादि-

---

बहुजन्मभिः कृच्छ्रेण धृत आत्मा मनो यैस्तैरपि ॥ १२ ॥ सुखक्रीडनवीक्षणे न क्षमा यस्य सः । कथंभूतः । यस्यांतरं छिद्रं पीतामृतैरपि ततो मृत्युभीतैरमरैः प्रतीक्ष्यते कथं मरिष्यति कदा वेति । यद्वा कथंभूतं सुखक्रीडनम् । यदंतर्हृदये अमरैः प्रतीक्ष्यते विचिंत्यते पीतामृतैरपि पुनर्निजजीवितेप्सुभिः । अयं भावः । नामृतपानमात्रेण जीवनं सफलं भवति किंतु भगवल्लीलानुस्मरणेनेति तदेव नित्यमंतश्चिंत्यत इति ॥ १३ ॥ कृष्णप्रमुखानर्भकान् दृष्ट्वा स इति व्यवस्य निश्चित्याजगरं वपुर्धृत्वा तेषां ग्रसना-

यत्पादपांसुबहुजन्मकृच्छ्रतो धृतात्मभिर्योगिभिरप्यगम्यः ॥ स एव यद्दृग्विषयः स्वयं स्थितः किं वर्ण्यते दिष्टमतो व्रजौकसाम् ॥ १२ ॥ अथाघनामाऽभ्यपतन्महासुरस्तेषां सुखक्रीडनवीक्षणाक्षमः ॥ नित्यं यदंतर्निजजीवितेप्सुभिः पीतामृतैरप्यमरैः प्रतीक्ष्यते ॥ १३ ॥ दृष्ट्वाऽर्भकान्कृष्णमुखानघासुरः कंसानुशिष्टः स बकीबकानुजः ॥ अयं तु मे सोदरनाशकृत्तयोर्द्वयोर्ममैनं सबलं हनिष्ये ॥ १४ ॥ एते यदा मत्सुहृदोस्तिलापः कृतास्तदा नष्टसमा व्रजौकसः ॥ प्राणे गते वर्ष्मसु काऽनुचिंता प्रजासवः प्राणभृतो हि ये ते ॥ १५ ॥

शया पथि व्यशेतेति तृतीयेनान्वयः । कंसेनानुशिष्टः प्रहितः । बकी पूतना । कथं व्यवस्य तदाह । अयं त्विति सार्धेन । मम तयोर्द्वयोः सोदरयोः स्थाने एनं कृष्णं सबलं ससैन्यं वत्सतत्पालसहितं हनिष्यामि ॥ १४ ॥ ननु तथापि व्रजस्थास्त्ववशिष्येरन्नित्याह । एत इति । तिलापः कृतास्तिलोदकतया कल्पिताः । वर्ष्मसु देहेषु । प्रजा एवासवो येषां ते तथा ॥ १५ ॥

कांचें खेळणें असें होतें कीं, अमृत पिऊन अमर झालेलेहि देव, आपल्या वांचण्याचें साफल्य व्हावें असें मनांत आणून ज्या खेळण्याचें मनांत चिंतन करित असत, म्हणजे केवळ अमृताच्या प्राशनानेंच वांचण्याचें साफल्य होत नाहीं तर भगवंताच्या लीलांच्या स्मरणानेंच होतें म्हणून त्याचेंच निरंतर चिंतन करित असत ॥ १३ ॥ असो, कंसानें आज्ञा केलेला, पूतनेचा व बकासुराचा धाकटा भाऊ असा तो अघासुर, कृष्ण आहे मुख्य ज्यामध्यें अशा बालकांस अवलोकन करून, हा कृष्णच माझ्या भावंडांचा (पूतनेचा व बकासुराचा) नाश करणारा आहे यास्तव त्या दोन्ही भावंडांच्या स्थानीं या कृष्णाला वत्सवत्सपालांसहवर्तमान मारून टाकीन ॥ १४ ॥ बरें यांना मारलें असतांहि गोकुळांतले गोपवगैरे अवशेष राहतील असें म्हणावें तर ह्या रामकृष्णादिक सर्व वत्सवत्सपालांनीं जेव्हां माझ्या भावंडांची तिळांजलि केली जाईल तेव्हां गोकुळांतील नंदादिक सर्व गोप मेल्यासारखेच होतील. कारण, प्राण गेला असतां शरीरांचेठिकाणीं चिंता कशाची आहे ? जे म्हणून प्राणी आहेत त्या सर्वांचेहि पुत्र हेच प्राण आहेत ॥ १५ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असा निश्चय करून त्यावेळीं त्या खल अघासुरानें, कृष्णरामादिकांना गिळून टाकण्याच्या इच्छेनें, चार कोसपर्यंत लांब, मोठ्या पर्वतासारखें पुष्ठ, गुहेसारख्या पसरलेल्या तोंडानें युक्त व आश्चर्यकारक असें एक मोठें अजगराचें स्वरूप धारण करून त्या वत्सवत्सपालकांच्या जाण्याच्या मार्गाचेठिकाणीं शयन केलें ॥ १६ ॥ त्यावेळीं तो दैत्य, ज्याचा खालचा ओंठ भूमीमध्यें शिरला आहे, वरचा ओंठ मेघमंडळांत गेला आहे, ज्याच्या जबड्याच्या दोन्ही बाजू पर्वताच्या दऱ्यांसारख्या असून दाढा पर्वताच्या शिखरांसारख्या आहेत, ज्याच्या तोंडांतला भाग अंधकारानें युक्त असून जीभ एखाद्या विस्तीर्ण मार्गासारखी आहे, ज्याच्या नाकांतून कठोर वायुसारखा श्वास चाललेला असून जो वणव्यासारख्या जाळणाऱ्या दृष्टीनीं युक्त आहे ॥ १७ ॥ तशा अजगरस्वरूप धारण केलेल्या त्या दैत्याला पाहून, सर्वहि गोपबालक, ही एकप्रकारची

सयोजनायामं योजनप्रमाणेन दैर्घ्येण युक्तं च तन्महाद्रिवत्पीवरं च । व्यात्तं प्रसारितं गुहातुल्याननं यस्मिंस्तत् ॥ १६ ॥ अद्भुतमिति यदुक्तं तद्दर्शयितुं विशिनष्टि । धरायामधरोष्ठो यस्य सः । जलदेषूत्तरोष्ठो यस्य सः । दर्याविवाननस्यांतौ सृक्किणी यस्य सः । गिरेः शृंगाणीव दंष्ट्रा यस्य सः । ध्वांतवदंतरास्यं यस्य सः । वितताध्ववज्जिव्हा यस्य सः । परुषानिलवच्छ्वासो यस्य सः । दववदीक्षणयोरुष्णः दाववद्दृष्टिरित्यर्थः । परुषानिलश्वासश्चासौ दवेक्षणोष्णश्च तथा ॥ १७ ॥ वस्तुतोऽजगरमेव व्यात्ततुंडं

इति व्यवस्याजगरं बृहद्वपुः सयोजनायाममहाद्रिपीवरम् ॥ धृत्वाऽद्भुतं व्यात्तगुहाननं तदा पथि व्यशेत ग्रसनाशया खलः ॥ १६ ॥ धराधरोष्ठो जलदोत्तरोष्ठो दर्याननांतो गिरिशृंगदंष्ट्रः ॥ ध्वांतांतरास्यो वितताध्वजिह्वः परुषानिलश्वासदवेक्षणोष्णः ॥ १७ ॥ दृष्ट्वा तं तादृशं सर्वे मत्वा वृंदावनश्रियम् ॥ व्यात्ताजगरतुंडेन ह्युत्प्रेक्षंते स्म लीलया ॥ १८ ॥ अहो मित्राणि गदत सत्त्वकूटं पुरः स्थितम् ॥ अस्मत्संग्रसनव्यात्तव्यालतुंडायते न वा ॥ १९ ॥ सत्यमर्ककरारक्तमुत्तराहनुवद्घनम् ॥ अधराहनुवद्रोधस्तत्प्रतिच्छायया‌ऽरुणम् ॥ २० ॥ प्रतिस्पर्धेते सृक्किभ्यां सव्यासव्ये नगोदरे ॥ तुंगशृंगालयोऽप्येतास्तद्दंष्ट्राभिश्च पश्यत ॥ २१ ॥ आस्तृतायामार्गोऽयं रसनां प्रतिगर्जति ॥ एषामंतर्गतं ध्वांतमेतदप्यंतराननम् ॥ २२ ॥

दृष्ट्वा वृंदावनस्य श्रीः संपदेषेति भ्रांत्या मत्वा विपरीतं व्यात्ताजगरतुंडसादृश्येनोत्प्रेक्षितवंतः ॥ १८ ॥ उत्प्रेक्षामेव प्रश्नोत्तराभ्यामाहुः । अहो इति । सत्वकूटं सत्त्वाभासमिदं वा न वा तत्राप्यस्मत्संग्रसनाय व्यात्तं यद्व्यालतुंडं तद्वदाचरति वा न वा ॥ १९ ॥ निश्चितं तथैवेत्याहुः । सत्यमिति । अर्ककरैरारक्तं घनमुत्तरोष्ठवत्पश्यत । तस्य घनस्य प्रतिच्छायया‌ऽरुणं रोधःस्थलमधरोष्ठवत्पश्यत । पश्यतेति सर्वत्रान्वेति ॥ २० ॥ सृक्किभ्यामोष्ठप्रांताभ्यां प्रतिस्पर्धेते तुल्यतया वर्तेते । नगोदरे गिरिदर्यौ । एतास्तुंगशृंगालयस्तस्य दंष्ट्राभिः स्पर्धमानाः ॥ २१ ॥ आस्तृतायाममार्गो विस्तृतो दैर्घ्यवान्मार्गः । प्रतिगर्जति प्रतिस्पर्धते । एषां शृंगाणामंतर्गतं मध्यगतं ध्वांतमेतदंत-

वृंदावनाची शोभाच आहे असें मानून, तिची पसरलेल्या अजगरमुखाच्या सारखेपणानें कौतुकानें उत्प्रेक्षा करूं लागले ॥ १८ ॥ ते म्हणाले कीं,–अहो मित्र हो, पुढें दिसत असलेलें हें वन, एखाद्या प्राण्यासारखें दिसतें कीं नाहीं? सांगा. त्यामध्येंहि आह्मांला गिळून टाकण्याकरितां पसरलेल्या अजगरसर्पाच्या मुखासारखें दिसते आहे कीं नाहीं? सांगा बरें ! ॥ १९ ॥ खरोखर तसेंच आहे. हा सूर्याच्या किरणांनीं तांबडा झालेला मेघ, त्याच्या वरच्या ओठासारखा दिसतो पहा. तसेंच त्या मेघाच्या पडच्छायेनें तांबूस वर्ण दिसणारें हें नदीचें तीर, त्याच्या खालच्या ओंठासारखें भासत आहे ॥ २० ॥ ह्या उजव्या व डाव्या बाजूंच्या पर्वतांच्या गुहा, दोन्हीं ओठांच्या प्रांतभागांच्या बरोबरीनें दिसत आहेत पहा ! ह्या उंच असलेल्या शिखरांच्या रांगाहि त्या अजगराच्या दाढांसारख्या दिसत आहेत पहा ! ॥ २१ ॥ हा लांब व रुंद असलेला मार्ग, त्याच्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जिव्हेसारखा भासत आहे, या शिखरांच्या आंत असलेला हा अंधकारहि, त्याच्या तोंडांतल्या मध्यभागासारखा वाटत आहे ॥ २२ ॥ अहो, वणव्यानें ऊन झालेला हा प्रखर वारा, त्याच्या श्वासासारखा भासतो पहा! त्या वणव्यानें जळलेल्या प्राण्यांचा जो हा दुर्गंध येत आहे तोहि, अजगराच्या पोटांत असलेल्या मांसाच्या दुर्गंधासारखा भासतो पहा ॥ २३ ॥ तेव्हां दुसरे गोपबालक ह्मणाले– खरें हा सर्पच आहे तथापि आह्मी येथें आंत शिरलों तर हा आह्मांला खाणार कीं काय? तसें झालें तर या श्रीकृष्णाच्या हातून हाहि बकासुराप्रमाणें एका क्षणांत नाश पावेल. असें परस्पर भाषण करून, ते सर्वहि बालक, बकासुराला मारणाऱ्या त्या श्रीकृष्णाच्या सुंदर मुखाकडे पाहून मोठ्यानें हास्य करित होत्साते टाळ्या वाजवीत वाजवीत वत्सांसहवर्तमान त्याच्या मुखांत शिरले

रानननमाननस्य मध्यं प्रतिगर्जति ॥ २२ ॥ दावेनोष्णः खरो वातोऽयं तेन दावाग्निना दग्धानां सत्त्वानां यो दुर्गंधः स एव सर्पांतर्गतामिषगंधवद्भाति ॥ २३ ॥ एवंसंतमेवाजगरमन्यथोत्प्रेक्ष्य निर्भया ययुः। किं ग्रसिता ग्रसिष्यति। अनेन श्रीकृष्णेन हंत्रा। बकारेरुशत्कमनीयं मुखम् ॥ २४ ॥ अमृषा वस्तुतः सर्पवपुरसुर एव मृषायते स्वानां सर्पसादृश्यगोचरत्वेन प्रतीयते इति तान्निरोद्धुं वारयितुं यावन्मनो दधे तावत्प्रविष्टा इत्युत्तरेणान्वयः ॥ २५ ॥ तावत्प्रविष्टा एव केवलं न तु तेन गीर्णा

दावोष्णखरवातोऽयं श्वासवद्भाति पश्यत ॥ तद्दग्धसत्त्वदुर्गंधोऽप्यंतरामिषगंधवत् ॥ २३ ॥ अस्मान्किमत्र ग्रसिता निविष्टानयं तथा चेद्बकवद्विनंक्ष्यति ॥ क्षणादनेनेति बकार्युशन्मुखं वीक्ष्योद्धसंतः करताडनैर्ययुः ॥ २४ ॥ इत्थं मिथो तथ्यमतज्ज्ञभाषितं श्रुत्वा विचिंत्ये-त्यमृषा मृषायते ॥ रक्षो विदित्वाऽखिलभूतहृत्स्थितः स्वानां निरोद्धुं भगवान्मनो दधे ॥ २५ ॥ तावत्प्रविष्टास्त्वसुरोदरांतरं परं न गीर्णाः शिशवः सवत्साः ॥ प्रतीक्षमाणेन बकारिवेशनं हतस्वकांतस्मरणेन रक्षसा ॥ २६ ॥ तान्वीक्ष्य कृष्णः सकलाभय-प्रदो ह्यनन्यनाथान्स्वकरादवच्युतान् ॥ दीनांश्च मृत्योर्जठराग्निघासान्घृणार्दितो दिष्टकृतेन विस्मितः ॥ २७ ॥

गिलिताः। जीर्णा इति पाठेऽपि स एवार्थः। कथंभूतेन। हतयोः स्वकयोरंतं स्मरत्यनुध्यायतीति तथा तेन अतएव बकारेः श्रीकृष्णस्य प्रवेशं प्रतीक्षमाणेन ॥ २६ ॥ स्वकरादवच्युतान्विनिःसृतान्। विस्मितः सन्कृत्यं किमत्रेत्यादि विचिंत्य तत्रोपायं ज्ञात्वा स्वयमप्यविशदित्यन्वयः ॥ २७ ॥

॥ २४ ॥ इकडे सर्वप्राण्यांच्या हृदयामध्यें राहणाऱ्या भगवान् श्रीकृष्णानें, 'हा अजगररूपी राक्षस आहे' असें न जाणणाऱ्या त्या बालकांचें, याप्रमाणें खोटेंच परस्पर झालेलें भाषण ऐकून, तो खराच राक्षस आहे असें जाणिलें आणि हा खरोखर राक्षस असून या बालकांना ही अजगरासारखी वृंदावनाची शोभा आहे असें वाटतें. असा विचार करून आपल्या सवंगड्यांना आंत जाण्यास प्रतिबंध करण्याचें जों मनांत आणितो ॥ २५ ॥ तोंपर्यंत ते वत्सांसह सर्व बालक, दैत्याच्या उदरांत प्रविष्ट झाले, परंतु मारलेल्या आपल्या पूतनाबकनामक भावंडांचें स्मरण बाळगणाऱ्या व ह्मणूनच बकारीचा (श्रीकृष्णाचा) आंत प्रवेश केव्हां होईल? अशी वाट पाहणाऱ्या त्यानें तोंड मिटून त्यांना गिळिलें नव्हतें. कारण, श्रीकृष्णासहवर्तमान सर्वांना गिळून टाकावें असें त्याच्यामनांत होतें ॥ २६ ॥ तेव्हां सर्वांना अभय देणारा श्रीकृष्ण, प्रारब्धानें घडलेल्या अघासुराच्या मुखप्र-वेशानें दीन झालेल्या, ज्यांना दुसरा कोणीच रक्षक नाहीं अशा, आपल्या हातांतून सुटलेल्या आणि मृत्युरूपी अघासुराच्या जठराग्नीला तृणासारख्या झालेल्या त्या वत्स-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वत्सपालकांना पाहून, विस्मित व कृपेनें पीडित झाला आणि त्या सर्वद्रष्ट्या हरीनें विचार केला कीं, ह्या दुष्ट दैत्याचें वांचणें व व्हावें व या माझ्या भक्तांची हिंसा न व्हावी, ह्या दोन्ही गोष्टी कशा घडतील ? व यांविषयीं मी काय कृत्य केलें पाहिजे ? यावद्दल विचार करून, त्या दोन्ही गोष्टी होण्याचा उपाय जाणून, नंतर त्यानें त्या अघासुराच्या मुखांत प्रवेश केला ॥ २७ ॥ २८ ॥ तेव्हां मेघाच्या आड राहणारे देव मोहानें भगवत्प्रभावाला विसरून आतां श्रीकृष्ण मरण पावेल असें मनांत आणून व अघासुराच्या मरणाविषयीं निराश होऊन हायहायशब्दाचा उच्चार करून आक्रोश करूं लागले आणि त्या अघासुराचे बांधव व कंसादिक राक्षस होते ते हर्ष पावले ॥ २९ ॥ तो देवांचा आक्रोश ऐकून, नाशशून्य असा भगवान् श्रीकृष्ण, बालक व वत्स यांसहवर्तमान आपलें चूर्ण करण्याची इच्छा करणाऱ्या त्या दैत्याच्या कंठामध्यें, त्यानें गिळण्याच्या पूर्वींच आपण

कथं विचिंत्य । अस्य जीवनममीषां च विहिंसनमिति द्वयं वै निश्चितं कथं न स्यादिति ॥ २८ ॥ घनच्छदा मेघांतरिताः । कुणपाशिनो राक्षसाः । कोणपो निर्ऋतिस्तदीया इति वा ॥ २९ ॥ चूर्णीकर्तुमिच्छोस्तस्य गले आदावेव तरसा ववृधे अवर्धत ॥ ३० ॥ निरुद्धो मुखादीनां मार्गभूतः कंठो यस्यास्ति तस्योद्गीर्णदृष्टेर्बहिर्निर्गतलो-

कृत्यं किमत्रास्य खलस्य जीवनं न वा अमीषां च सतां विहिंसनम् ॥ द्वयं कथं स्यादिति संविचिंत्य तज्ज्ञात्वाऽविशत्तुंडमशेषदृ-ग्घरिः ॥ २८ ॥ तदा घनच्छदा देवा भयाद्धाहेति चुक्रुशुः ॥ जहृषुर्ये च कंसाद्याः कौणपास्त्वघबांधवाः ॥ २९ ॥ तच्छ्रुत्वा भगवान्कृ-ष्णस्त्वव्ययः सार्भवत्सकम् ॥ चूर्णीचिकीर्षोरात्मानं तरसा ववृधे गले ॥ ३० ॥ ततोऽतिकायस्य निरुद्धमार्गिणो ह्युद्गीर्णदृष्टेर्भ्रमत-स्त्वितस्ततः ॥ पूर्णोऽतरंगे पवनो निरुद्धो मूर्धन्विनिष्पाट्य विनिर्गतो बहिः ॥ ३१ ॥ तेनैव सर्वेषु बहिर्गतेषु प्राणेषु वत्सान्सुहृदः परेतान् ॥ दृष्ट्या स्वयोत्थाप्य तदन्वितः पुनर्वक्त्रान्मुकुंदो भगवान्विनिर्ययौ ॥ ३२ ॥ पीनाहिभोगोत्थितमद्भुतं महज्ज्योतिः स्वधा-म्ना ज्वलयद्दिशो दश ॥ प्रतीक्ष्य खेऽवस्थितमीशनिर्गमं विवेश तस्मिन्मिषतां दिवौकसाम् ॥ ३३ ॥ ततोऽतिहृष्टाः स्वकृतो कृ-तार्हणं पुष्पैः सुरा अप्सरसश्च नर्तनैः ॥ गीतैः सुगा वाद्यधराश्च वाद्यकैः स्तवैश्च विप्रा जयनिःस्वनैर्गणाः ॥ ३४ ॥

चनस्यांतरंगे देहमध्ये पूर्णः परिभृतो मूर्धन् मूर्धनि ब्रह्मरंध्रं निर्भिद्य बहिर्विनिर्गतः ॥ ३१ ॥ प्राणेष्विंद्रियेषु । स्वयाऽमृतवर्षिण्या दृष्टचैव ॥ ३२ ॥ अहिदेहे स्थितं शुद्धसत्त्वमयं ज्योतिर्निर्गत्य खेऽवस्थितं तस्मिन्नीशे विवेश ॥ ३३ ॥ स्वकृतः स्वकार्यकृतः श्रीकृष्णस्यार्हणमकृताकुर्वत पूजामकुर्वन् । सुगाः सुष्ठु गायंतीति गंधर्वादयः ॥ ३४ ॥

वेगानें वाढला ॥ ३० ॥ त्या वाढण्यामुळें ज्याच्या मुखादिकांचा मार्गभूत कंठ रोधून गेला आहे, ज्याचे डोळे बाहेर आले आहेत व जो धडपडूं लागला आहे अशा त्या महादेहधारी अघासुराच्या देहामध्यें कोंडून राहिलेला प्राणवायु मस्तकांतील ब्रह्मरंध्राला फोडून त्या द्वारानें बाहेर निघून गेला ॥ ३१ ॥ त्या प्राणवायुबरोबरच सर्वहि इंद्रियें बाहेर निघून गेलीं असतां, नंतर लहान झालेला भगवान् श्रीकृष्णा त्या अजगराच्या पोटांत सांपडून मरण पावलेल्या मित्रांना व वत्सांना आपल्या अमृताचा वर्षाव करणाऱ्या दृष्टीनें उठवून, त्यांसहवर्तमान त्या अघासुराच्या मुखांतून पुन्हा बाहेर पडला ॥ ३२ ॥ तेव्हां पुष्ट अशा त्या अजगराच्या देहापासून निघालेलें आश्चर्यकारक मोठें शुद्धसत्वमय तेज, आपल्या प्रकाशानें दशदिशांना प्रकाश पाडीत होतसातें श्रीकृष्ण बाहेर पडण्याची वाट पहात आकाशामध्यें राहिलें होतें तें, कृष्ण बाहेर पडतांच त्याचेठिकाणीं सर्व देव पहात असतां प्रविष्ट झालें ॥ ३३ ॥ तदनंतर अघासुराच्या वधानें अतिहर्ष पावलेल्या देवादिकांनीं स्वकार्य करणाऱ्या श्रीकृष्णाचा सत्कार केला. त्यांत देवांनीं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याच्यावर पुष्पांचा वर्षाव केला, अप्सरांनीं नृत्य केलें, गंधर्वादिकांनीं गायन केलें, वाद्यें वाजविणाऱ्या विद्याधरादिकांनीं वाद्यांचा गजर केला, वसिष्ठादिक ब्राह्मणांनीं स्तव केले व पार्षदगणांनीं जयजयशब्दाच्या योगानें सत्कार केला ॥ ३४ ॥ ते आश्चर्यकारक, स्तव उत्तम वाद्यांचे गजर, गायनें, जयजयकारशब्द इत्यादिक अनेक उत्साहांपासून झालेल्या मंगलकारक शब्दांना, ब्रह्मदेवानें आपल्या सत्यलोकाच्या जवळ ऐकून तो त्या वृंदावनामध्यें आला आणि त्या ईश्वर श्रीकृष्णाचा महिमा पाहून विस्मय पावला ॥ ३५ ॥ हे राजा, अद्भुत असें तें अजगराचें चर्म (सांगाडा) वृंदावनामध्यें वाळलेलें असून गोकुळवासी लोकांना बहुत कालपर्यंत खेळण्याकरितां मोठें बिळ झालें होतें ॥ ३६ ॥ आतां दुसरेंहि एक मोठें आश्चर्य झालें तें असें कीं– विस्मित झालेल्या सर्व बालकांनीं, जें आपणांला श्रीकृष्णानें प्रसिद्ध

किंच तेषां यान्यद्भुतस्तोत्रादीनि तेषां नैकोत्सवा ये मंगलस्वनास्तान्स्वधाम्नोऽति समीपे श्रुत्वाऽजो ब्रह्माऽचिरादागत ईशस्य श्रीकृष्णस्य महि महिमानं दृष्ट्वा विस्मयं प्रापेति ॥ ३५ ॥ बहुतिथं बहुकालम् । आक्रीडगव्हरं क्रीडार्थं महाबिलम् ॥ ३६ ॥ अन्यच्चातिविचित्रं वृत्तमित्याह । एतदिति । कौमारं पंचमाब्दांतं पौगंडं दशमावधि ॥ कैशोरमापंचदशाद्यौवनं तु ततः परम् ॥ हरेः कौमारजं पंचमाब्दकृतं कर्म तदैव दृष्ट्वा पौगंडके षष्ठेऽब्दे बाला अद्यैतद्वृत्तमित्यूचुः । किं तत्कर्म । मृत्योः

तदद्भुतस्तोत्रसुवाद्यगीतिकाजयादिनैकोत्सवमंगलस्वनान् ॥ श्रुत्वा स्वधाम्नोऽत्यज आगतोऽचिराद्दृष्ट्वा महीशस्य जगाम विस्मयम् ॥ ३५ ॥ राजन्नाजगरं चर्म शुष्कं वृंदावनेऽद्भुतम् ॥ व्रजौकसां बहुतिथं बभूवाक्रीडगह्वरम् ॥ ३६ ॥ एतत्कौमारजं कर्म हरेरात्माहिमोक्षणम् ॥ मृत्योः पौगंडके बाला दृष्ट्वोचुर्विस्मिता व्रजे ॥ ३७ ॥ नैतद्विचित्रं मनुजार्भमायिनः परावराणां परमस्य वेधसः ॥ अघोऽपि यत्स्पर्शनधौतपातकः प्रापात्मसाम्यं त्वसतां सुदुर्लभम् ॥ ३८ ॥ सकृद्यदंगप्रतिमांतराहिता मनोमयी भागवतीं ददौ गतिम् ॥ स एव नित्यात्मसुखानुभूत्यभिव्युदस्तमायोऽतर्गतो हि किं पुनः ॥ ३९ ॥

सकाशादात्मनामहेश्च मोक्षणम् । आत्मनां प्रसिद्धान्मृत्योरहेस्तु संसारलक्षणात् । अघासुरस्य ज्योतिषः श्रीकृष्णे प्रवेशमपि तदा दृष्टं कथितवंत इत्यर्थः ॥ ३७ ॥ नैतद्विचित्रमिति । किंतदित्यपेक्षायामाह । अघोऽपीति । आत्मसाम्यं स्वसमानरूपताम् ॥ ३८ ॥ यस्यांगं मूर्तिस्तस्य प्रतिमा प्रतिकृतिस्तत्रापि केवलं मनोमयी साऽपि बलादंतराहिता सती भागवतीं गतिं ददौ प्रह्लादादिभ्यः स एव साक्षात्स्वयमंतर्गतः किं पुनः । नित्याचासावात्मसुखानुभूतिश्च तयाऽभितो व्युदस्ता माया येन सः ॥ ३९ ॥

मृत्यूपासून सोडविलें होतें व सर्परूपी अघासुराला, त्याच्या तेजाचा श्रीकृष्णाचेठिकाणीं झालेला प्रवेश दृष्टी पडला असल्यामुळें, जें संसारलक्षण मृत्यूपासून सोडविलें होतें तें श्रीकृष्णाचें कौमारावस्थेमध्यें (पांचवे वर्षीं) घडलेलें कर्म, त्याच वेळीं पाहून तें पौगंडावस्थेमध्यें (सहावे वर्षीं) आजच तें घडलें असें गोकुळांत वर्णन केलें ॥ ३७ ॥ हे राजा, ज्याच्या स्पर्शानें सर्व पातकांचें क्षालन होऊन तो अघासुर (पापरूपी दैत्यहि) असज्जनांना अत्यंत दुर्लभ अशी भगवंताची समानरूपता पावला, परंतु वस्तुतः त्या ब्रह्मादि स्थावरांत सर्व श्रेष्ठकनिष्ठवस्तूंना उत्पन्न करणाऱ्या व मायेनें मनुष्यपुत्रत्व स्वीकारणाऱ्या परमेश्वर श्रीकृष्णाचें हें मृत्यूपासून वत्सवत्सपालांना व अघासुराला मुक्त ॥ ४१ ॥
करणें आश्चर्यकारक नाहीं ॥ ३८ ॥ कारण, केवळ मनामध्यें चिंतन केलेल्या व एकवार मोठ्या बलात्कारानें हृदयामध्यें स्थापन केलेल्या ज्याच्या मूर्तीच्या प्रतिमेनेंहि प्रल्हादादिक कितीएक भक्तांना भगवत्स्वरूपप्राप्तिरूप मुक्ति दिली आहे, मग नित्य अशा स्वानंदानुभवानें मायेला दूर सारणारा तोच साक्षात् परमेश्वर, आपण होऊन ज्याच्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

देहामध्यें प्रविष्ट झाल्या त्याला मुक्ति प्राप्त झाली यांत आश्चर्य काय आहे ? काहींच नाहीं ॥ ३९ ॥ सूत ह्मणाला– हे शौनकादिक ऋषिहो, याप्रमाणें, श्रीकृष्णानें रक्षण करून धर्मराजादिकांस दिलेला जो परिक्षित् राजा त्यानें आपल्या रक्षणकर्त्या श्रीकृष्णाचें आश्चर्यकारक चरित्र श्रवण करून, त्या श्रवणाच्या योगानें ज्याचें मन अगदीं तत्पर झालें आहे अशा त्या राजानें, पुनरपि तेंच पुण्यकारक श्रीकृष्णचरित सांगण्याविषयीं व्यासपुत्र शुकाचार्याला प्रश्न केला ॥ ४० ॥ राजा ह्मणाला– हे ज्ञानसंपन्ना, पांच वर्षांच्या आंतल्या कौमारावस्थेमध्यें हरीनें केलेलें अघासुरवधरूप कर्म, दहा वर्षांच्या आंतल्या पौगंडावस्थेमध्यें बालकांनीं गोकुलामध्यें गायन केलें, असें जें तूं मला सांगितलेंस तें कालांतरीं (कौमारावस्थेंत) केलेलें कर्म, तत्कलीन (पौगंडावस्थेंत केलेलें) कसें होईल ? ह्मणजे पांचवे वर्षी केलेलें कर्म सहावे वर्षी तें आज केलें असें त्या बालकांस कसें वाटलें ? ॥ ४१ ॥ तें, हे त्रिकालज्ञानसंपन्ना गुरो, मला सांग. तें मला मोठें कौतुक वाटत आहे. आणि ही खरोखर हरीची मायाच असावी. तिच्यावांचून अशी गोष्ट घडावयाचीच नाहीं ॥ ४२ ॥ हे गुरो, आह्मी ब्राह्मणाचा अपराध करणारे असल्यामुळें जरी अधम क्षत्रिय आहों तरी, ज्याअर्थी तुजपासून पवित्र अशा कृष्णकथामृताचें

येन श्रवणन निगृहीतं वशीकृतं चेतो यस्य सः ॥ ४० ॥ कालांतरे कौमारे कृतं पौगंडके कथं ज्ञात्वोचुरित्यर्थः ॥ ४१ ॥ ४२ ॥ ४३ ॥ तेन यः स्मारितोऽनंतस्तेन हृतान्य-

सूत उवाच ॥ इत्थं द्विजा यादवदेवदत्तः श्रुत्वा स्वरातुश्चरितं विचित्रम् ॥ पप्रच्छ भूयोऽपि तदेव पुण्यं वैयासकिं यन्निगृहीतचेताः ॥ ४० ॥ राजोवाच ॥ ब्रह्मन्कालांतरकृतं तत्कालीनं कथं भवेत् ॥ यत्कौमारे हरिकृतं जगुः पौगंडकेऽर्भकाः ॥ ४१ ॥ तद्ब्रूहि मे महायोगिन्परं कौतूहलं गुरो ॥ नूनमेतद्धरेरेव माया भवति नान्यथा ॥ ४२ ॥ वयं धन्यतमा लोके गुरोऽपि क्षत्रबंधवः ॥ यत्पिबामो मुहुस्त्वत्तः पुण्यं कृष्णकथामृतम् ॥ ४३ ॥ सूत उवाच ॥ इत्थं स्म पृष्टः स तु बादरायणिस्तत्स्मारितानंतहृताखिलेंद्रियः ॥ कृच्छ्रात्पुनर्लब्धबहिर्दृशिः शनैः प्रत्याह तं भागवतोत्तमोत्तम ॥४४॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धेऽघासुरवधो नाम द्वादशोऽध्यायः॥१२॥ ॥श्रीशुक उवाच॥ साधु पृष्टं महाभाग त्वया भागवतोत्तम॥ यन्नूतनयसीशस्य शृण्वन्नपि कथां मुहुः॥१॥

खिलेंद्रियाणि यस्य सः तथाभूतोऽपि कथंचिल्लब्धबहिर्दृष्टिः । हे भागवतोत्तमोत्तम हे शौनक ॥ ४४ ॥ इति दशमपूर्वार्धे टीकायां द्वादशोऽध्यायः॥ १२॥ ॥त्रयोदशेऽहरद्ब्रह्मा वत्सान्पालांश्च मायया ॥ तदा तत्सर्वरूपोऽब्दं कृष्णः पूर्ववदाचरत् ॥ १ ॥ नूतनयसि नव्यवत्करोषि ॥ १ ॥

वारंवार प्राशन करितों त्याअर्थीं या मनुष्यलोकीं सर्वांहून धन्य आहों ॥ ४३ ॥ सूत ह्मणाला– हे भगवद्भक्तांमध्यें अतिउत्तमा शौनका, याप्रमाणें परीक्षित् राजानें प्रश्न केला असत. तो व्यासनंदन शुकाचार्य, त्या प्रश्नानें स्मरण करविलेल्या अनंत भगवंतानें ज्याचीं सर्व इंद्रियें आकर्षण केलीं आहेत असा एकाग्रचित्त होऊन समाधिस्थ झाला, तेव्हां पुन्हा जयजयकारादि शब्दश्रवणानें ज्याला पुनः बाह्यदृष्टि प्राप्त झाली आहे असा होत्साता, तो राजाप्रत भाषण करूं लागला कीं– ॥ ४४ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील पूर्वार्धामध्यें अघासुरमोक्षनिरूपणनामक हा बारावा अध्याय समाप्त झाला ॥ १२ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या तेराव्या अध्यायामध्यें वत्स व वत्सपाल यांना ब्रह्मदेवानें चोरून नेलें तेव्हां श्रीकृष्णानें आपल्या मायेनें त्या सर्व वत्सवत्सपालांचीं रूपें धारण करून एकवर्षपर्यंत पूर्वींप्रमाणें बाललीला आचरण केली, अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे महाभाग्यवंता भागवतोत्तमा राजा, तूं फार चांगलें विचारिलेंस

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कारण, तूं ईश्वराची कथा वारंवार श्रवण करीत असूनहि पुनः प्रश्न करून ती कथा नव्यानव्यासारखी करीत आहेस ॥ १ ॥ ज्याप्रमाणें स्त्रीलंपट पुरुषांना, स्त्रियांच्या विलासांची वार्ता पुष्कळवेळां अनुभविलेली असली तरी ती प्रतिक्षणीं नवनवीशी वाटत्ये त्याप्रमाणें भगवंताची वार्ताच ज्यांच्या वाणींचा कर्णांचा आणि अंतःकरणाचा विषय आहे अशा सारग्राही साधूंनां, अच्युत भगवंताची कथाच क्षणोक्षणीं नव्यानव्यासारखी वाटत्ये हा त्यांचा स्वभावच आहे ॥ २ ॥ हे राजा, तूं एकाग्रचित्त होऊन श्रवण कर; तूं विचारिलेलें भगवंताचें चरित्र जरी अतिगुप्त आहे तरी मी तुला सांगतों. कारण, आपलेठिकाणीं व भगवंताचेठिकाणीं स्नेहयुक्त असलेल्या शिष्याला गुरु गुह्य असलेंतरी सांगत असतात ॥ ३ ॥ असो. पूर्वीं सांगितल्याप्रमाणें अघासुराच्या मुखरूप मृत्यूपासून भगवंतानें वत्सांचें व बालकांचें रक्षण करून त्यांना यमुना-

---

तथाहि सारभृतां सारग्राहिणामयं निसर्गः स्वभावः । कोऽसौ । अच्युतस्य वार्ता प्रतिक्षणं साधु नव्यवद्भवतीति यत्सः । विटानां स्त्रैणानां स्त्रियाः कामिन्या वार्तेव । कथंभूतानामपि सताम् । या अच्युतवार्तैवार्थो येषां तानि वाणीश्रुतिचेतांसि येषां तथाभूतानामपि ॥ २ ॥ ३ ॥ ४ ॥ भोजनविधानाय पुलिनं स्तौति । अहो इति । स्वीयानां केलीनां संपदो विद्यंते यस्मिंस्तत् । मृदुला अच्छा वालुका यस्मिंस्तत् । किंच स्फुटद्विकसत्सरः सरोजबाहुल्येनोपचारतः सर एव विकसदित्युक्तम् । तस्य गंधस्तेन हृता आकृष्टा

संतामयं सारभृतां निसर्गो यदर्थवाणीश्रुतिचेतसामपि ॥ प्रतिक्षणं नव्यवदच्युतस्य यत्स्त्रिया विटानामिव साधु वार्ता ॥ २ ॥ शृणुष्वावहितो राजन्नपि गुह्यं वदामि ते ॥ ब्रूयुः स्निग्धस्य शिष्यस्य गुरवो गुह्यमप्युत ॥ ३ ॥ तथाऽघवदनान्मृत्यो रक्षित्वा वत्सपालकान् ॥ सरित्पुलिनमानीय भगवानिदमब्रवीत् ॥ ४ ॥ अहोऽतिरम्यं पुलिनं वयस्याः स्वकेलिसंपन्मृदुलाच्छवालुकम् ॥ स्फुटत्सरोगंधहृतालिपत्रिकध्वनिप्रतिध्वानलसद्द्रुमाकुलम् ॥ ५ ॥ अत्र भोक्तव्यमस्माभिर्दिवारूढं क्षुधार्दिताः ॥ वत्साः समीपेऽपः पीत्वा चरंतु शनकैस्तृणम् ॥ ६ ॥ तथेति पाययित्वांऽर्भा वत्सानारुद्ध्य शाद्वले ॥ मुक्त्वा शिक्यानि बुभुजुः समं भगवता मुदा ॥ ७ ॥ कृष्णस्य विष्वक्पुरुराजिमंडलैरभ्याननाः फुल्लदृशो व्रजार्भकाः ॥ सहोपविष्टा विपिने विरेजुश्छदा यथांभोरुहकर्णिकायाः ॥ ८ ॥

अलयः पत्रिणश्च ये तेषां के उदके ध्वनयस्तेषां प्रतिध्वानास्तैर्लसंतो द्रुमास्तैराकुलं व्याप्तम् ॥ ५ ॥ दिवारूढं वेलातीतेत्यर्थः ॥ ६ ॥ आरुद्ध्य संरुद्ध्य । शाद्वले हरिततृणे देशे ॥ ७ ॥ तदा ते विरेजुः । कृष्णस्य विष्वक् परितः पुरुराजिमंडलैर्बहुभिः पंक्तिमंडलैः सह नैरंतर्येणोपविष्टाः । श्रीकृष्णाभिमुखान्याननानि येषां ते । फुल्लदृशो विकसि

नदीच्या तीरीं आणून तो त्यांस असें ह्मणाला कीं,–॥ ४ ॥ अहो सवंगडेहो, हें यमुनेचें वाळवंट फारच मनोहर आहे. हें आपल्या क्रीडासाधनाच्या विपुलसंपत्तीनें युक्त असून मऊ व स्वच्छ अशा वाळवेनें युक्त आहे आणि प्रफुल्लित झालेल्या कमळांच्या सुगंधाला लुब्ध झालेल्या भ्रमरांच्या व पक्ष्यांच्या शब्दांच्या उदकामध्यें होणाऱ्या प्रतिध्वनींच्या योगेंकरून तीरावेठिकाणीं शोभणाऱ्या वृक्षांच्या दाट झाडीनें व्याप्त आहे ॥ ५ ॥ आमच्या भोजनाची तर वेळ होऊन गेली, ह्मणून आह्मीं क्षुधेनें फार व्याकुळ झालों आहों, तर आतां येथेंच आह्मी भोजन करावें. वत्स, पाणी पिऊन समीपभागीं कोंवळ्या गवतामवर सावकाशपणें चरूंदेत ॥ ६ ॥ असें भगवंताचें भाषण ऐकून त्या बालकांनीं बरें आहे असें ह्मणून, वत्सांना पाणी पाजिलें आणि त्यांना कोंवळ्या गवताच्या प्रदेशावर एकठिकाणीं लावून आपापल्या शिदोऱ्यांचीं शिंकीं सोडून मोठ्या हर्षानें भगवंतासहवर्तमान जेऊं लागले ॥ ७ ॥ तेव्हां त्या वनामध्यें श्रीकृष्णाच्या सभोंवार एकाबाहेर एक अशा क्रमानें बसलेल्या वाटोळ्या पुष्कळ पंक्तींनीं कृष्णाकडे तोंडें करून

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

व कृष्णदर्शनानें प्रफुल्लित नेत्र होऊन आंत लहान व बाहेर मोठे अशाक्रमानें एकाला एक चिकटून बसलेले ते गोपबालक, जशीं कमळांतील कार्णिकेच्या सभोंवार वाटोळ्या असलेल्या बाहेर बाहेरच्या रांगांत उत्तरोत्तर मोठमोठीं असलेलीं कमलपत्रें शोभतात त्याप्रमाणें शोभूं लागले. त्यावेळीं सभोंवारच्या सर्व बालकांना श्रीकृष्णाचें मुख, समोर दिसत होतें ॥ ८ ॥ तेव्हां त्या कितीएक बालकांनीं पुष्पांच्या योगानेंच आपलीं भोजनपात्रें केलीं, कितीएकांनीं पानांच्या योगानें, कांहींकांनीं पल्लव, अंकुर, फळें, शिंकीं, साली व दगड यांच्या योगानें भोजनपात्रें केलीं आणि भोजन करूं लागले ॥ ९ ॥ कृष्णासहवर्तमान ते सर्वहि बालक, आपापल्या घरांतून आणलेल्या भक्ष्यभोज्यादिकांची इतरांना रुचि निरनिराळी दाखवीत व 'तुझ्या आईनें चांगलें तोंडीं लावणें कांहींच दिलें नाहीं, इत्यादिक' थट्टेच्या भाषणांनीं दुसऱ्यांना

तनयनाः । कमलकर्णिकायाः परितः पत्राणि यथेति ॥ ८ ॥ पुष्पैस्तद्दलैः अन्यैश्च पत्रैः कृतानि भाजनानि यैस्ते ॥ ९ ॥ रुचिं स्वादविशेषम् । अभ्यवजह्रुर्बुभुजिरे । सहेश्वराः श्रीकृष्णसहिताः ॥ १० ॥ यज्ञभुगपि तेषु बुभुजे । बालानामिव केलिर्यस्य सः । तदाह । उदरवस्त्रयोर्मध्ये वेणुं बिभ्रद्दधदिति सर्वत्र संबद्ध्यते । वाम इति कक्षपाण्योर्विशेषणम् । मसृणं स्निग्धं दध्योदनकवलम् । तदुचितानि बिल्वादिफलान्यंगुलिसंधिषु । कर्णिकेव सर्वाभिमुखो मध्ये तिष्ठन् स्वस्य परित उपविष्टान् सुहृदः स्वैर्नर्मभिः परिहासवाक्यैः । स्वर्गे स्वर्गवासिनि जने मिषत्याश्चर्येण पश्यति सति लोके जनानां मध्ये बुभुजे ॥ ११ ॥ १२ ॥ भीभयं भयहेतुभ्यो भयमस्यापास्य । यद्वा अस्य विश्वस्य भियोऽपि भयं यः श्रीकृष्णः । आशाद्भोजनात् । अस्मिन्पादे अक्षराधिक्यमार्षम् ॥ १३ ॥

केचित्पुष्पैर्दलैः केचित्पल्लवैरंकुरैः फलैः ॥ शिग्भिस्त्वग्भिर्दृषद्भिश्च बुभुजुः कृतभाजनाः ॥ ९ ॥ सर्वे मिथो दर्शयंतः स्वस्वभोज्यरुचिं पृथक् ॥ हसंतो हासयंतश्चाभ्यवजह्रुः सहेश्वराः ॥ १० ॥ बिभ्रद्वेणुं जठरपटयोः शृंगवेत्रे च कक्षे वामे पाणौ मसृणकवलं तत्फलान्यंगुलीषु ॥ तिष्ठन्मध्ये स्वपरिसुहृदो हासयन्नर्मभिः स्वैः स्वर्गे लोके मिषति बुभुजे यज्ञभुग्बालकेलिः ॥ ११ ॥ भारतैवं वत्सपेषु भुंजानेष्वच्युतात्मसु ॥ वत्सास्त्वंतर्वने दूरं विविशुस्तृणलोभिताः ॥ १२ ॥ तान्दृष्ट्वा भयसंत्रस्तानूचे कृष्णोऽस्य भीभयम् ॥ मित्राण्याशान्मा विरमतेहानेष्ये वत्सकानहम् ॥ १३ ॥

हंसत व हंसवीत होत्साते भोजन करूं लागले ॥ १० ॥ त्यावेळीं नेसलेल्या वस्त्राच्या व पोटाच्या मध्यें मुरली (पांवा) खोंचून, डाव्या काखेमध्यें शिंग आणि वेतकाठी धारण करून, डाव्या हाताच्या तळव्यावर दहींभाताचा ग्रास व त्याच हाताच्या आंगळ्यांच्या पेरांवर लिंबूं, आलें, लोणचीं व चटण्यावगैरे घेऊन, सर्व बालकांच्या संमुखपणानें मध्यें उभा रहात व आपल्या सभोंवार बसलेल्या संवगड्यांना आपण केलेल्या मस्करीच्या भाषणांनीं हंसवीत होत्साता, स्वर्गलोकावर राहणारे देवहि तो चमत्कार आश्चर्यानें पाहत असतां, बालकांसारखी लीला करणारा तो यज्ञभोक्ता भगवान् श्रीकृष्ण भोजन करूं लागला ॥ ११ ॥ हे राजा, याप्रमाणें श्रीकृष्णाचेठिकाणीं मन गढून गेलेले ते गोपबालक भोजन करीत असतां, कोंवळ्या गवतावर लावलेले त्यांचे वत्स, तृणाच्या लोभानें दूर वनामध्यें प्रविष्ट झाले ॥ १२ ॥ तेव्हां वत्स दिसत नाहींसे झाल्यामुळें भयानें भिऊन गेलेल्या त्या बालकांस पाहून, श्रीकृष्ण ह्मणाला कीं,–हे मित्रहो, भयाला कारण अशा व्याघ्रादिकांपासूनहि वत्सांना भय प्राप्त होईल असें तुह्मी

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मनांत आणूं नका व भोजनापासून निवृत्त होऊं नका, मी वत्सांना येथें आणितों ॥ १३ ॥ असें सांगून पर्वत, पर्वतांच्या गुहा, वेली व झाल्या वगैरेंचीं कुंजवनें व खडकाळ
प्रदेश यांचेठिकाणीं आपल्या व मित्रांच्या वत्सांचा शोध लावण्याकरितां, तो भगवान् श्रीकृष्ण, हातावर दहींभाताचा ग्रास घेऊन फिरूं लागला ॥ १४ ॥ हे राजा, त्यावेळीं
जो (ब्रह्मदेव) पूर्वी आकाशामध्यें राहिला असून श्रीकृष्णापासून झालेल्या अघासुराच्या मोक्षाला पाहून परम विस्मय पावला होता. तो कमलोद्भव ब्रह्मदेव, आपल्या इच्छेनें
बालकरूप धारण करणाऱ्या त्या श्रीकृष्णपरमेश्वराचा दुसराहि एखादा मनाला आनंदकारक महिमा पाहण्याकरितां, श्रीकृष्ण भोजनास गुंतला व वत्सांचा शोध करण्याक-
रितां वनांत गेला ही ' वत्सांना व वत्सपालांना हरण करण्याविषयीं ' संधि पावोन, वनांतून त्याच्या वत्सांना व वाळवंटांतून भोजन करणाऱ्या वत्सपालांना दुसरेठिकाणीं

अद्रिषु तद्दरीषु । कुंजेषु लतादिपिहितोदरविवरेषु । गव्हरेषु संकटस्थानेषु ॥ १४ ॥ अंभोजन्मनः पद्माज्जनिर्यस्य स ब्रह्मा तदंतरे तस्मिन्नवसरे गत आगतस्तच्छिद्रं प्राप्तो
वा । मंजु मनोहरमन्यदपि महित्वं महिमानं द्रष्टुं तस्य वत्सानितःस्थानाद्वत्सपांश्चान्यत्र नीत्वा स्वयं तिरोबभूव । प्रभवतः श्रीकृष्णस्य ॥ १५ ॥ उभावपि वत्सान्वत्सपांश्च
विचिकायान्वीक्षितवान् ॥ १६ ॥ विधिकृतं ब्रह्मणा कृतम् ॥ १७ ॥ उभयायितं वत्सतरपालरूपेण वर्तमानमित्यर्थः । अयं भावः । यदि तूष्णीमासे तर्हि तन्मातॄणां विषादः

इत्युक्त्वाऽद्रिदरीकुंजगह्वरेष्वात्मवत्सकान् ॥ विचिन्वन्भगवान्कृष्णः सपाणिकवलो ययौ ॥ १४ ॥ अंभोजन्मजनिस्तदंतरगतो मा-
यार्भकस्येशितुर्द्रष्टुं मंजु महित्वमन्यदपि तद्वत्सानितो वत्सपान् ॥ नीत्वाऽन्यत्र कुरूद्वहांतरदधात्खेऽवस्थितो यः पुरा दृष्टाऽघासु-
रमोक्षणं प्रभवतः प्राप्तः परं विस्मयम् ॥ १५ ॥ ततो वत्सानदृष्ट्वैत्य पुलिनेऽपि च वत्सपान् ॥ उभावपि वने कृष्णो विचिकाय समं-
ततः ॥ १६ ॥ क्वाप्यदृष्ट्वांतर्विपिने वत्सान्पालांश्च विश्ववित् ॥ सर्वं विधिकृतं कृष्णः सहसाऽवजगाम ह ॥ १७ ॥ ततः कृष्णो मुदं कर्तुं
तन्मातॄणां च कस्य च ॥ उभयायितमात्मानं चक्रे विश्वकृदीश्वरः ॥ १८ ॥ यावद्वत्सपवत्सकाल्पकवपुर्यावत्कराङ्घ्र्यादिकं यावद्यष्टिविषाण-
वेणुदलशिग्यावद्विभूषांबरम् ॥ यावच्छीलगुणाभिधाकृतिवयो यावद्विहारादिकं सर्वं विष्णुमयं गिरोऽगवदजः सर्वस्वरूपो बभौ ॥ १९ ॥

स्याद्यदि च तानेवानयिष्यामि तर्हि ब्रह्मणो मोहो न स्यादिति तदुभयप्रीतये तथा चक्र इति ॥ १८ ॥ तदेव दर्शयति । यावदिति । वत्सपानां वत्सकानां चाल्पकं वपु
प्रमाणमनतिक्रम्य । एवमुपर्यपि योज्यम् । यद्वा यावद्वत्सपादिवपुस्तावत्सर्वस्वरूपोऽजः कृष्णो बभावित्यर्थः । उत्तरत्राप्येवम् । सर्वं विष्णुमयं जगदिति प्रसिद्धा या गीस्त-
स्या अंगवत्सा गीरेवार्थस्वरूपेण प्रत्यक्षा यथा तथा बभूवेत्यर्थः ॥ १९ ॥

मायाशयांमध्यें नेऊन निजवून ठेऊन आपण अंतर्धान पावला ॥ १५ ॥ इकडे श्रीकृष्ण, डोंगर व कुंजवन इत्यादिकांचेठिकाणीं वत्स कोठेंच नाहींत असें पाहून यमुनेच्या
वाळवंटावर आला तों तेथें वत्सपालहि नाहींत असें पाहिल्यावर त्यांचा वनामध्यें व वाळवंटावर शोध करूं लागला ॥ १६ ॥ तों वनामध्यें कोठेंहि वत्स व वाळवंटावर वत्सपाल
नाहींत असें पाहून त्या विश्ववेत्त्या कृष्णानें तत्काल तें सर्व वत्सवत्सपालाचें हरण करणें, ब्रह्मदेवाचें कृत्य आहे असें जाणिलें ॥ १७ ॥ नंतर त्या जगत्स्रष्ट्या ईश्वर श्रीकृष्णानें
मनांत आणिलें कीं, जर आपण स्वस्थ राहावें तर वत्सांच्या व वत्सपालांच्या मातांना (गाईगोपींना) दुःख होईल आणि ब्रह्मदेवानें नेलेल्या वत्सवत्सपालानांच जर माघारे
आणावे तर त्याला मोह होणार नाहीं व त्याचा प्रयास व्यर्थ झाल्यामुळें उलटा त्याला खेदमात्र होईल, तो न होतां त्याला व त्यांच्या मातांना आनंद होण्याकरितां आप-
णासच वत्सवत्सपालरूपानें उत्पन्न केलें ॥ १८ ॥ तें असें कीं, जितक्या संख्येचीं वत्सांचीं व वत्सपालांचीं–लहान, मोठीं, काळीं, गोरीं, नाजूक व रांठवगैरे शरीरें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होतीं, जितक्या प्रमाणाचे त्यांचे–हातपायवगैरे अवयव होते, ज्या प्रकारचीं त्यांचीं–काठ्या, शिंगें, पांवे, पानें व शिंकींवगैरे होतीं, जशा प्रकारचीं त्यांचीं–भूषणें व वस्त्रें होतीं, जशा प्रकारचीं त्यांचीं– स्वभाव, गुण, आकार, वयेंवगैरे होतीं व जशाप्रकारचे त्यांचे–चालणें, बोलणें, बुद्धि, स्मरणशक्तिवगैरे धर्म होते तितक्या सर्व स्वरूपांनीं वस्तुतः जन्मरहित असाहि भगवान् श्रीकृष्ण, ' सर्वं विष्णुमयं जगत् ' या श्रुतीच्या स्वरूपाप्रमाणें ह्मणजे ती वाणीच अर्थस्वरूपानें प्रत्यक्ष भासल्याप्रमाणें शोभूं लागला ॥१९॥ आणि स्वतः आपणच सांगणारा होऊन, आत्मस्वरूपी गोवत्सांना, आत्मरूप वत्सपालांच्या योगेंकरून माघारे फिरवून, चेंडू दांडू गोठ्यावगैरे आत्मरूप क्रीडासाहित्यांनीं क्रीडा करित होत्साता सर्वात्मा भगवान् गोकुळांत प्रविष्ट झाला ॥ २० ॥ आणि हे राजा, जेथेंजेथें ज्याज्या गोपबालकाचा रस्ता फुटला होता तेथें तेथें त्याच्यात्याच्या वत्सांना निरनिराळे करून त्यात्या गोठ्यामध्यें नेऊन घालून त्याच्या त्याच्या स्वरूपानें त्याच्या त्याच्या घरीं प्रविष्ट झाला. याप्रमाणें त्यावेंत्याचें स्वरूप धारण करणारा तो श्रीकृष्ण झाला

एवं सर्वात्मा सन्व्रजं प्राविशत् । कथं स्वयमात्मैव प्रयोजकः । आत्मरूपान् गोवत्सानिति कर्मापि स्वयमेवेत्युक्तम् । आत्मरूपैर्वत्सपैः प्रतिवार्य प्रयोज्यकर्ताऽपि स्वयमेव आत्मविहारैः क्रीडन्निति क्रियाऽपि कारकाण्यपि स्वयमेवेत्यर्थः ॥ २० ॥ तत्तदात्मा तत्तद्गोपबालरूपोऽभवत् । ततस्तत्तत्सद्म प्रविष्टः ॥ २१ ॥ गोपिकामोहमाह । तन्मातर इति । तन्मातरो वेणुरवेण त्वरयोत्थिताः सत्यः सुतान्मत्वा परं ब्रह्मैव दोर्भिरुत्थाप्योद्धृत्य पयःसुधासवं पय एव सुधावत्स्वादु आसववन्मादकं पाययामासुरि-

स्वयमात्माऽऽत्मगोवत्सान्प्रतिवार्यात्मवत्सपैः ॥ क्रीडन्नात्मविहारैश्च सर्वात्मा प्राविशद्व्रजम् ॥ २० ॥ तत्तद्वत्सान्पृथङ्नीत्वा तत्तद्गोष्ठे निवेश्य सः ॥ तत्तदात्माऽभवद्राजंस्तत्तत्सद्म प्रविष्टवान् ॥ २१ ॥ तन्मातरो वेणुरवत्वरोत्थिता उत्थाप्य दोर्भिः परिरभ्य निर्भरम् ॥ स्नेहस्नुतस्तन्यपयःसुधासवं मत्वा परं ब्रह्म सुतानपाययन् ॥ २२ ॥ ततो नृपोन्मर्दनमज्जलेपनालंकाररक्षातिलकाशनादिभिः ॥ संलालितः स्वाचरितैः प्रहर्षयन्सायं गतो यामयमेन माधवः ॥ २३ ॥ गावस्ततो गोष्ठमुपेत्य सत्वरं हुंकारघोषैः परिहूतसंगतान् ॥ स्वकान्स्वकान्वत्सतरानपाययन्मुहुर्लिहंत्यः स्रवदौधसं पयः ॥ २४ ॥

त्यर्थः ॥ २२ ॥ एवं यामयमेन तत्तत्कालक्रीडानियमेन सायं गतः प्राप्तः स्वाचरितैः स्वस्याचरितैः शोभनैराचरितैर्वा मातॄः प्रहर्षयंस्ततस्ताभिरुन्मर्दनादिभिरुपलालित इति ॥ २३ ॥ गवां मोहनमाह । गाव इति । परिहूता आहूताश्च ते संगताश्च तान् ॥ २४ ॥

॥ २१ ॥ आतां गोपींचा मोह सांगतो– त्या गोपबालकांच्या मातांनीं मुरलीचा शब्द ऐकिल्याबरोबर त्वरेनें उठून आपापले पुत्र आले असें मानून, त्या परब्रह्मरूपी श्रीकृष्णाला बाहूंनीं उचलून अतिशय स्नेहानें आलिंगन केलें आणि त्यांना अमृतासारखें गोड व मद्यासारखें मादक असें स्नेहाच्या योगानें स्रवूं लागलेलें स्तनांतील दूध, पाजिलें ॥ २२ ॥ हे राजा, याप्रकारें ज्याज्याकालीं जीजी क्रीडा व्हावयाची तीती करून दिवसाचे चारहि प्रहर गेल्यावर सायंकालीं मुरली वाजविणें इत्यादिक आपल्या आचरणांनीं मातांना हर्ष उत्पन्न करीत तो बालकरूपी श्रीकृष्ण त्यांच्यात्यांच्या घरीं गेला असतां, त्या मातांनीं त्याच्या आंगाला सुवासिक तेलें व अत्तरजेवगैरे लावणें, स्नान घालणें चंदनादिकांच्या उट्या लावणें, वस्त्रें नेसविणें भूषणें घालणें, रक्षाबंधन करणें तिलक लावणें, भोजन घालणें व बिछान्यावर निजविणें इत्यादिकेंकरून त्याचें लालन केलें ॥ २३ ॥ आतां गाईंचा मोह सांगतो– ज्या गाई चरण्याकरितां वनांत गेल्या होत्या त्या गाई, तेथून मोठ्या त्वरेनें गोठ्यांत येऊन, हुंकारयुक्त शब्दांनीं बोलाविलें असतां जवळ प्राप्त झालेल्या आपआपल्या स्तनपान सुटलेल्याहि पूर्वीच्या वत्सांना वारंवार चाटीत होत्सात्या, पान्हा फुटून गळूं लागलेलें स्तनसंबंधी दूध पाजूं लागल्या ॥ २४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां इतकेंतर वैषम्य श्रीकृष्णालाहि दुर्निवारच झालें, असें सांगतो– त्यावेळीं गाईंचा व गोपींचा ह्या पुत्ररूपी झालेल्या श्रीकृष्णावर लालनपालनादिरूप मातृधर्म, एका स्नेहाच्या अधिकपणाखेरीज पूर्वींप्रमाणेंच होता. स्नेहाचा अधिकपणामात्र जास्त झाला होता. तसाच या माईगोपींचेठिकाणीं श्रीकृष्णाचा बालकपणाहि एका मायेसेरीज पूर्वींप्रमाणेंच होता. त्याला माझी ही आई व मी इचा पुत्र असा मायासंबंधी मोहमात्र नव्हता ॥ २५ ॥ आतां स्नेहाचें आधिक्यच दाखवितो– जसी गोकुलवासी जनांची यशोदापुत्र श्रीकृष्णाचेठिकाणीं आपल्यापुत्रांपेक्षांहि पूर्वीं अधिक प्रीति होती तशीच आतां आपल्या पुत्रांचेठिकाणींहि एकवर्षपर्यंत स्नेहवल्ली पूर्वींपेक्षांहि अधिक प्रति-

एतावत्तु वैषम्यं कृष्णस्यापि दुर्निवारमासीदित्याह । गोगोपिनामिति । गवां गोपीनां चास्मिन्कृष्णे मातृता उपलालनादिरूपा पुरोवदेवासीत्किंतु स्नेहार्धिकां विना । स्नेहाधिक्यं त्विदानीं विशेष इत्यर्थः । आसु गोगोपीषु हरेस्तोकता च बालभावनादि पूर्ववदेवासीत्किंतु मायया विना । ममेयं माताऽहमस्याः पुत्र इति मोहं विनेत्यर्थः ॥ २५ ॥ स्नेहर्धिमेव दर्शयति । व्रजौकसामिति । यथा कृष्णे यशोदानंदने स्वपुत्रेभ्योऽपि स्नेहाधिक्यं पूर्वमासीत् । इदानीं स्वतोकेष्वपि तथैवावर्धतेत्यर्थः । आ अब्दं यावत्संवत्सरम् । निःसीम यथा भवति ॥ २६ ॥ एवमात्मा श्रीकृष्णो वत्सपो भूत्वा तत्रापि वत्सानां पालानां च मिषेणात्मानमात्मना पालयन् क्रीडितवानित्यर्थः ॥ २७ ॥ एतावत्पर्यंतं रामस्यापि मोह एवासीत्संवत्सरांते तु कथंचिज्ज्ञातवानिति दर्शयन्नाह । एकदेति । पंचषासु पंचसु वा षट्सु वा रात्रिषु हायनस्यापूरणीषु पूरकतयाऽवशिष्टास्वित्यर्थः ॥२८॥ ततो दूरत एव गोवर्धन-

गोगोपीनां मातृताऽस्मिन्सर्वा स्नेहर्धिकां विना ॥ पुरोवदास्वपि हरेस्तोकता मायया विना ॥ २५ ॥ व्रजौकसां स्वतोकेषु स्नेहवल्ल्याब्दमन्वहम् ॥ शनैर्निःसीम ववृधे यथा कृष्णे त्वपूर्ववत् ॥ २६ ॥ इत्थमात्माऽऽत्मनाऽऽत्मानं वत्सपालमिषेण सः ॥ पालयन्वत्सपो वर्षं चिक्रीडे वनगोष्ठयोः ॥ २७ ॥ एकदा चारयन्वत्सान्सरामो वनमाविशत् ॥ पंचषासु त्रियामासु हायनापूरणीष्वजः ॥ २८ ॥ ततो विदूराच्चरतो गावो वत्सानुपव्रजम् ॥ गोवर्धनाद्रिशिरसि चरंत्यो ददृशुस्तृणम् ॥ २९ ॥ दृष्ट्वाऽथ तत्स्नेहवशोऽस्मृतात्मा स गोव्रजोऽत्यात्मपदुर्गमार्गः ॥ द्विपात्ककुद्ग्रीव उदास्यपुच्छोऽगाद्धुंकृतैरास्रुपया जवेन ॥ ३० ॥

शिखरे चरंत्यो गावो व्रजसमीपे चरतो वत्सान् ददृशुः ॥ २९ ॥ तदैव स गोव्रजो गवां कलापस्तत्स्नेहवशस्तेषां वत्सानां स्नेहेनाकृष्टोऽतएव न स्मृत आत्मा येन स जवेनोपव्रजमगात् । कथंभूतः । अत्यात्मपदुर्गमार्गः अतिक्रांत आत्मपान् गोपालान्यः सोऽत्यात्मपः तथा दुर्गो दुर्गमो मार्गो यस्य सः स च स च । तथा युक्ताभ्यां पद्भ्यां धावन् द्विपादिव प्रतीयमानः । ककुदाकुंचिता ग्रीवा यस्य सः । उदास्यपुच्छः उन्नमितान्यास्यानि पुच्छानि च येन सः । आस्रुपयाः सर्वतः स्रवंति पयांसि यस्य सः । आस्नुपया इत्यपि पाठे स एवार्थः । गोव्रज इत्यनेन वृषभादयोऽप्यगुरित्युक्तम् ॥ ३० ॥

दिवशीं हळूहळू निःसीम वाढूं लागली ॥ २६ ॥ याप्रमाणें सर्वात्मा असा तो भगवान्, गोकुळामध्यें वत्सपालक होऊन व वत्सांच्या व वत्सपालांच्या मिषानें आपणच आपलें रक्षण करीत होत्साता एकवर्षपर्यंत वनामध्यें व गोकुलामध्यें क्रीडा करूं लागला ॥ २७ ॥ आतां इतकावेळपर्यंत (थोडें कमी वर्षपर्यंत) बलरामालाहि मोहच होता, पुढें त्यानें श्रीकृष्णाच्या सांगण्यावरून जाणलें असें सांगतो– एकेवेळीं वर्ष भरण्यास पांच सहा रात्री कमी होत्या तेव्हां रामासहवर्तमान श्रीकृष्ण, वत्सांना चारण्याकरितां वनांत गेला असतां त्यावेळीं गोवर्धनपर्वताच्या शिखरावर चरणाऱ्या गाईनीं तेथून दूरप्रदेशीं गोकुळाजवळच्या गवतावर चरणारे आपले वत्स पाहिले ॥ २८ ॥ २९ ॥ आणि पाहून तत्काल तो गाईंचा कळप, त्या वत्सांच्या स्नेहानें परवश होऊन ज्याला देहभान राहिलें नाहीं, ज्यानें आपल्या पालक गोपालांनासुद्धां न जुमानितां कांच्यांखुंच्यांत-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ला अवघडमार्ग स्वीकारिला आहे, ज्यानें आपल्या माना कोळर्यांचेठिकाणीं आकुंचित करून धरिल्या आहेत, ज्यानें तोंडें व पुच्छें उचलून धरिलीं आहेत, जो प्राय जुळून उड्या मारीत धांवत असल्यामुळें दोन पायांनींच धांवत आहे कीं काय असा दिसत आहे, आणि ज्याचें दूध ओंटींत प्रावत नसल्यामुळें स्तनांतून जिकडेतिकडे भूमिवर सांडत आहे असा तो गाईंचा कळप, हुंकारशब्द करीत मोठ्या वेगानें वत्सांजवळ निघून गेला ॥ ३० ॥ त्यांत विशेषेंकरून गाईंचें चेष्टित सांगतो– पुनः प्रसूत झालेल्याहि त्या गाई, गोवर्धनाच्या खालच्या प्रदेशीं वरत असणाऱ्या जुन्या वत्सांजवळ येऊन त्यांच्या अंगांना गिळतातच कीं काय अशा चाटीत होत्सात्या, त्या पूर्वीच्या वत्सांनाच आपल्या ओंटींतील दूध पाजूं लागल्या ॥ ३१ ॥ याप्रमाणें रामानें पाहिलेला वत्सांचेठिकाणीं गाईंचा अतिशय स्नेह सांगून आतां गोपांचाहि दाखविण्याकरितां सांगतो कीं,– ते गोपहि त्या गाईंना आवरून धरण्याविषयीं झालेले श्रम निष्फळ झाल्यामुळें लज्जेसहवर्तमान प्राप्त झालेल्या मोठ्या क्रोधानें

तत्र विशेषतो धेनूनां चेष्टितमाह । समेत्येति । गोवर्धनस्याधः । वत्सवत्यः पुनःप्रसूता अपि ॥ ३१ ॥ रामेण दृष्टं वत्सेषु गवां स्नेहातिशयमुक्त्वा गोपानामपि दर्शयितुमाह । गोपा इति । तासां गवां रोधने य आयासस्तस्य मौघ्येन मोघत्वेन लज्जया सहोरुमन्युना दुर्गमार्गजनितक्लेशेन चाभ्येत्य गोवत्सैः सह सुतान् ददृशुः॥ ३२ ॥ ततश्च तेषामीक्षणे-

समेत्य गावोऽधो वत्सान्वत्सवत्योऽप्यपाययन् ॥ गिलंत्य इव चांगानि लिहंत्यः स्वौधसं पयः ॥ ३१ ॥ गोपास्तद्रोधनायासमौ-
घ्यलज्जोरुमन्युना ॥ दुर्गाध्वकृच्छ्रतोऽभ्येत्य गोवत्सैर्ददृशुः सुतान् ॥ ३२ ॥ तदीक्षणोत्प्रेमरसाप्लुताशया जातानुरागा गतमन्यवो-
ऽर्भकान् ॥ उदुह्य दोर्भिः परिरभ्य मूर्धनि घ्राणैरवापुः परमां मुदं ते ॥ ३३ ॥ ततः प्रवयसो गोपास्तोकाश्लेषसुनिर्वृताः ॥ कृच्छ्रा-
च्छनैरुपगतास्तदनुस्मृत्युदश्रवः ॥ ३४ ॥ व्रजस्य रामः प्रेमर्धेर्वीक्ष्यौत्कंठ्यमनुक्षणम् ॥ मुक्तस्तनेष्वपत्येष्वप्यहेतुविदचिंतयत् ॥ ३५ ॥

नोद्गतो यः प्रेमरसस्तस्मिन्नाप्लुता निमग्ना आशया येषां ते । लज्जामन्युकृच्छ्रैस्तानपि ताडयितुमागताः संतोऽपि गतमन्यवः प्रत्युत जातोऽनुरागो येषां ते मूर्धनि घ्राणैरवघ्राणैः परमां मुदमवापुः ॥ ३३ ॥ कृच्छ्रात्ततोऽपगता निवृत्ताः । तेषां सुतानामनुस्मृत्योद्गच्छंत्यश्रूणि येषां ते ॥ ३४ ॥ प्रेमर्धेरौत्कंठ्यमतिशयम् । मुक्तस्तनेष्वपत्येषु वीक्ष्य हेतुमजानन्नचिंतयत् ॥ ३५ ॥

गोवर्धनावरून विकट मार्गानेंच मोठ्या क्लेशानें खालीं येऊन, त्यांनीं गोवत्सांबरोबर असलेल्या आपल्या पुत्रांस पाहिलें ॥ ३२ ॥ तेव्हां 'ह्या मुलांनींच गाईंच्या समोर वत्स आणिले ह्मणून गाईंनीं असा गोंधळ घातला, यास्तव ह्या मुलांनाच ताडण केलें पाहिजे अशा अभिप्रायानें ते गोपाळ आले होते, परंतु त्या मुलांच्या दर्शनानें उत्पन्न झालेल्या प्रेमरसामध्यें त्यांचीं अंतःकरणें निमग्न होऊन त्यांचा क्रोध गेला व त्यांना त्या मुलांविषयीं प्रीति उत्पन्न झाली, तेव्हां त्यांनीं त्या बालकांनीं आपल्या बाहूंनीं उचलून घेऊन आलिंगन केलें व त्यांच्या मस्तकाचेठिकाणीं अवघ्राण करून परमानंदाचा अनुभव घेतला ॥ ३३ ॥ नंतर बालकांच्या आलिंगनानें अत्यंत तृप्त झालेले ते वृद्ध गोप, तेथून मोठ्या कष्टानें सावकाशपणें पुन्हा गोवर्धनपर्वतावर निघून गेले, परंतु तेथेंहि त्यांना त्या मुलांच्या वारंवार स्मरणानें आनंदाश्रु प्राप्त होत असत ॥ ३४ ॥ याप्र-
माणें ज्यांचें स्तनपान सुटलें आहे अशा वत्सवत्सपाळांचेठिकाणीं गाईवृषभरूप व गोपी गोपरूप गोकुळाच्या प्रेमवृद्धीची उत्कंठता पाहून, त्याचें कारण काय असावें ? तें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

न जाणत होतों ? असा बलराम चिंतन करूं लागला कीं, ॥ ३५ ॥ सर्वात्म्या वासुदेवाचेठिकाणीं (श्रीकृष्णाचेठिकाणीं) जसें पूर्वी सर्वांचें प्रेम होतें तसें आतां माझ्यासहित सर्व गोकुलाचें ह्या वत्सवत्सपालांचेठिकाणींहि पूर्वी कधींच नसलेलें प्रेम वृद्धिंगत होत आहे, तेव्हां हें काय बरें आश्चर्य असावें ? ॥ ३६ ॥ ही माया ह्मणावी तर ही कोण आहे ? व कोठून आली आहे ? ही काय देवांनीं योजिलेली आहे ? किंवा मनुष्यांनीं किंवा असुरांनीं योजिलेली आहे ? परंतु ही बहुतकरून माझा स्वामी जो श्रीकृष्ण त्याचीच माया असली पाहिजे. कारण, ज्यापेक्षां ही मलासुद्धां मोहित करीत आहे त्यापेक्षां दुसरी कोणाचीच नव्हे ॥ ३७ ॥ याप्रमाणें तो बलराम चिंतन करून ज्ञानचक्षूनें पाहूं लागला तों, त्याला सर्व वत्स व समानवयाचे सर्व बालक हे कृष्णरूपीच दिसूं लागले ॥ ३८ ॥ तेव्हां तो राम श्रीकृष्णाला ह्मणाला कीं,— हे कृष्णा, आजपर्यंत

चिंतामेवाह । किमेतदिति द्वाभ्याम् । वासुदेवे यथा पुरा प्रेम तथा स्वतोकेष्वपि व्रजस्य प्रेम वर्धते किमेतदद्भुमिति । किंच सात्मनो मत्सहितस्य व्रजस्य । मम तेषु प्रेमकारणं किमिति भावः ॥ ३६ ॥ केयं माया देवानां वा नराणां वा असुराणां वा कुतो वा कस्मात्प्रयुक्ता तत्रान्यमाया न संभवति यतो ममापि मोहो वर्ततेऽतः प्रायशो मत्स्वामिनः श्रीकृष्णस्यैव मायेयमस्त्विवति संभावयति ॥ ३७ ॥ सवयसान्सखीनपि वयुनेन ज्ञानमयेन चक्षुषा वैकुंठं श्रीकृष्णमेवापश्यत् ॥ ३८ ॥ एवं कृष्णरूपान्सामान्यतो

किमेतदद्भुतमिव वासुदेवेऽखिलात्मनि ॥ व्रजस्य सात्मनस्तोकेष्वपूर्वं प्रेम वर्धते ॥ ३६ ॥ केयं वा कुत आयाता दैवी वा नार्युतासुरी ॥ प्रायो मायास्तु मे भर्तुर्नान्या मेऽपि विमोहिनी ॥ ३७ ॥ इति संचिंत्य दाशार्हो वत्सान्सवयसानपि ॥ सर्वानाचष्ट वैकुंठं चक्षुषा वयुनेन सः ॥ ३८ ॥ नैते सुरेशा ऋषयो न चैते त्वमेव भासीश भिदाश्रयेऽपि ॥ सर्वं पृथक्त्वं निगमात्कथं वदेत्युक्तेन वृत्तं प्रभुणा बलोऽवैत् ॥ ३९ ॥ तावदेत्यात्मभूरात्ममानेन त्र्युट्यनेहसा ॥ पुरोवदब्दं क्रीडंतं ददृशे सकलं हरिम् ॥ ४० ॥ यावंतो गोकुले बालाः सवत्साः सर्व एव हि ॥ मायाशये शयाना मे नाद्यापि पुनरुत्थिताः ॥ ४१ ॥

ज्ञात्वा कृष्णं पृष्ट्वा कृष्णोपदेशेन विशेषतो ज्ञातवानित्याह । नैत इति । अयमर्थः । पाल्यमानास्तावद्वत्सा ऋषीणामंशाः पालाश्च देवानामंशा इति तावदहं वेद्मि । इदानीं तु न तथा किं त्वस्मिन् भिदाश्रयेऽपि त्वमेव भासि अतस्त्वं सर्वं पृथक् विविच्य कथं वृत्तमिति वदेत्युक्तेन प्रभुणा वक्त्रा निगमात्संक्षेपत एवोक्तं वृत्तं बलोऽवैद्वेदितवानित्यर्थः ॥ ३९ ॥ ततः किं वृत्तमित्यपेक्षायामाह । तावदिति । वर्षे जाते आत्मनो मानेन त्रुट्यनेहसा त्रुटिमात्रेण कालेन । सकलं सानुचरं हरिं ददर्श ॥ ४० ॥ दृष्ट्वा च व्यतर्कयदित्याह । यावंत इति द्वाभ्याम् । मे मायाशये मायातल्पे ॥ ४१ ॥

मी असें समजत होतों कीं, पालन करावयाचे जे सर्व वत्स हे ऋषींचे अंश असून पालन करणारे सर्व बालक हे देवांचे अंश आहेत. आतां तर तसें नाहीं. तर लौकिकदृष्टीनें हा वत्सवत्सपालरूपी भेद भासत असतांहि तत्त्वदृष्टिनें हे ऋषि किंवा देव मुळींच भासत नाहींत, तर तूंच भासतोस. यास्तव हे ईश्वरा, हें सर्व कसें झालें आहे ? तें तूं मला फोड करून सांग. असा प्रश्न केलेल्या प्रभु श्रीकृष्णानें तें सर्व वृत्त संक्षेपानें सांगितलें असतां, तितक्यावरूनच बलरामानें जाणिलें ॥ ३९ ॥ इतक्यामध्यें ब्रह्मदेवानें आपल्या मानानें त्रुटिइतक्या कालानें तेथें येऊन पाहिलें तों, सर्व वत्स व वत्सपाल यांसहवर्तमान श्रीकृष्ण पूर्वीप्रमाणें एक वर्षपर्यंत क्रीडा करीत आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें ॥ ४० ॥ आणि तो विचार करूं लागला कीं,— गोकुळांत जितके ह्मणून बालक आहेत तितके सर्वहि वत्सांसहवर्तमान मी दुसरेठिकाणीं नेले आहेत, यांत संशय नाहीं. ते ॥ ४५ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मी मायाशयांत निजविले असल्यामुळें मोहित होऊन अजूनहि पुन्हा उठले नाहींत ॥ ४१ ॥ आणि येथें माझ्या मायेनें मोहित झालेल्यांखेरीज दुसरे तितकेच असून एक वर्षपर्यंत श्रीकृष्णाबरोबर क्रीडा करणारे हे वत्सवत्सपाल कोठून आले आहेत ? ॥ ४२ ॥ याप्रमाणें वत्सवत्सपालांमध्यें दोन दोन भेद झाले असतां, फार वेळपर्यंत विचार करणाराहि तो ब्रह्मदेव, खरे कोणते ? व खोटे, कोणते (मी नेलेले ते खरे किंवा येथें आहेत हे खरे) हें कोणत्याहि प्रकारें जाणण्यास समर्थ झाला नाहीं ॥ ४३ ॥ याप्रमाणें मोहरहित व जगाला मोह उत्पन्न करणाऱ्या विष्णूला मोह पाडण्यास प्रवृत्त झालेला तो ब्रह्मदेवहि आपल्याच मायेनें आपणच मोहित झाला ॥ ४४ ॥ आतां मायेचा आश्रय अशा त्या ब्रह्मदेवाला कसा मोह झाला असें म्हणशील तर– जसा थंडीच्या धुक्यापासून होणारा अंधकार, दिवसाचेवेळीं लोकांना दिङ्मोहादिक करणारा होतो परंतु तो रात्रिसंबंधी अंधकारामध्यें आपलें सामर्थ्य कांहींच चालवूं शकत नाहीं, तर त्यामध्यें आपणच लोपून जातो, अथवा जसें काजव्याचें तेज, रात्रीचेवेळीं प्रकाश पावत असून-

---

मन्मायामोहितेभ्य इतरे कुत्रत्याः ॥ ४२ ॥ इति वितर्कयन्नमुह्यदित्याह । एवमिति द्वाभ्याम् । एवमेतेषु भेदेषु चिरं ध्यात्वा स आत्मभूरिति पाठः ॥ ४३ ॥ ४४ ॥ ननु मायाश्रयस्य तस्य कुतो मोह इत्यत आह । तम्यामिति । महामायाविनि भगवत्यन्यमायाया आवरणविक्षेपकत्वाभावे दृष्टांतद्वयम् । तम्यां तमिस्रायां रात्र्यां नैहारं हिमकणप्रभवं तम इव । तद्धितार्थोपसर्जनस्यापि तमसो नैहारमिति विशेषणं छांदसम् । तत्तमो यथा पृथगावरणं न करोति किंतु तत्रैव लीयते यथा च खद्योतार्चिरहनि पृथक् प्रकाशं न

इत एतेऽत्र कुत्रत्या मन्मायामोहितेतरे ॥ तावंत एव तत्राब्दं क्रीडंतो विष्णुना समम् ॥ ४२ ॥ एवमेतेषु भेदेषु चिरं ध्यात्वा स आत्मभूः ॥ सत्याः के कतरे नेति ज्ञातुं नेष्टे कथंचन ॥ ४३ ॥ एवं संमोहयन्विष्णुं विमोहं विश्वमोहनम् ॥ स्वयैव माययाऽजोऽपि स्वयमेव विमोहितः ॥ ४४ ॥ तम्यां तमोवन्नैहारं खद्योतार्चिरिवाहनि ॥ महतीतरमायैश्यं निहंत्यात्मनि युंजतः ॥ ४५ ॥ तावत्सर्वे वत्सपालाः पश्यतोऽजस्य तत्क्षणात् ॥ व्यदृश्यंत घनश्यामाः पीतकौशेयवाससः ॥४६॥ चतुर्भुजाः शंखचक्रगदाराजीवपाणयः ॥ किरीटिनः कुंडलिनो हारिणो वनमालिनः ॥ ४७ ॥ श्रीवत्सांगददोरत्नकंबुकंकणपाणयः ॥ नूपुरैः कटकैर्भाताः कटिसूत्रांगुलीयकैः ॥४८॥

करोति । एवं महति पुरुषे युंजतः पुंस इतरा नीचा माया तत्र न किंचित्करोति किंत्वात्मनि स्वस्मिन्नेव ऐश्यं सामर्थ्यं निहंतीति ॥ ४५ ॥ अन्यदप्याश्चर्यमाह । तावदिति । वत्सपालाः वत्साः पालाश्च सर्वे यष्टिविषाणादयश्च ॥ ४६ ॥ ४७ ॥ श्रीवत्सप्रभायुक्तान्यंगदानि दोःषु येषां रत्नमयानि कंबुवत्रिधाराणि कंकणानि पाणिषु येषां ते च ते च ॥ ४८ ॥

हि दिवसाचेवेळीं तें समजतसुद्धां नाहीं तर तें सूर्याच्या तेजामध्यें लीन होऊन आपल्या आश्रयभूत काजव्यालाच निस्तेजपणा दर्शवितें त्याप्रमाणें थोर पुरुषाचेठिकाणीं आपली माया योजणाऱ्या नीच पुरुषाची ती नीच माया, तेथें कांहींच कार्य करण्यास समर्थ न होतां आपल्या धन्याचेठिकाणींच कांहीं सामर्थ्य नाहीं असें करून टाकित्ये एवंवत्ता महामायावी अशा श्रीकृष्णाचेठिकाणीं योजिलेली ब्रह्मदेवाची माया, तेथें आपलें कांहींच सामर्थ्य न चालवितां उलटी ब्रह्मदेवालाच मोह पाडण्यास कारण झाली ॥ ४५ ॥ असें दुसरेंहि आश्चर्य असें झालें कीं– जोंपर्यंत ब्रह्मदेव वत्सवत्सपाल, खरे कोणते व खोटे कोणते हा विचार करीत आहे तों इतक्यांत तो ब्रह्मदेव पहात असतां तत्क्षणींच वत्स, वत्सपाल, काठ्या, शिंगें इत्यादिक सर्वेहि भगवत्स्वरूपच दिसूं लागले. तेसरी मेघासारखे श्यामवर्ण, पिंवळीं भरजरीचीं वस्त्रें परिधान केलेले, चतुर्भुज, शंख चक्र गदा व पद्म यांस धारण करणारे, किरीट, कुंडलें, हार व वनमाला यांनीं भूषित होते ॥ ४६ ॥ ४७ ॥ त्यांच्या बाहूंचेठिकाणीं श्रीवत्सलांछनाच्या प्रभेनें युक्त अशीं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

बाहुभूषणें होतीं, त्यांच्या हातांमध्यें शंखासारख्या तीन धारांनीं युक्त रत्नमय कंकणें होतीं, ते- नूपुरें कडींतोडे, करगोटा व आंगठ्या या भूषणांनीं विराजमान होते ॥ ४८ ॥ तसेच सर्व अवयवांचेठिकाणीं, बहुत जन्में पुण्य संपादन करणाऱ्या भक्तजनांनीं अर्पण केलेल्या कोंवळ्या तुळशींच्या नव्या माळांनीं पायांपासून मस्तकापर्यंत भरून गेलेले होते ॥ ४९ ॥ ते आपल्या आरक्तवर्ण अशा कटाक्षावलोकनांनीं व चंद्रप्रकाशासारख्या स्वच्छ मंद हास्यांनीं, अनुक्रमानें रजोगुण व सत्वगुण यांच्या योगानें आपल्या भक्तांच्या मनोरथांचे उत्पन्न करणारे व पालन करणारेच आहेत कीं काय असे दिसत होते ॥ ५० ॥ आत्म्या (ब्रह्मदेवा) पासून तृणापर्यंत मूर्तिमंत असलेल्या चराचर प्राण्यांनीं आपापल्या अधिकाराप्रमाणें नृत्य, गायन इत्यादिक अनेक प्रकारच्या पूजासाधनांनीं निरनिराळ्या रीतीनें आराधन चालविलेले होते ॥ ५१ ॥ तसेच-

---

तथा भूरिबहुजन्मार्जितं पुण्यं तद्युक्तैर्जनैरर्पितैः ॥ ४९ ॥ चंद्रिकाविशदस्मितयुक्तैः । सहारुणगुणेन च वर्तमाना येऽपांगास्तैर्वीक्षितैः । स्वकार्थानां स्वभक्तमनोरथानां रजःसत्त्वाभ्यां स्रष्टृपालका इव व्यदृश्यंत । सत्त्ववद्विशदस्मितेन पालका इव । रजोवदरुणगुणेन च स्रष्टार इव । तादृक्कटाक्षैर्द्योतमाना इत्यर्थः ॥ ५० ॥ आत्मा ब्रह्मा तदादिस्तंबपर्यंतैः । अनेकार्हैरनेकार्हणैः ॥ ५१ ॥ अजाद्याभिर्मायाविद्यादिभिर्विभूतिभिः शक्तिभिः । महादादिभिरिति । महत्सूत्रयोः पृथक्त्वाविवक्षया चतुर्विंशतितत्त्वैर्जगत्कारणैः

आंघ्रिमस्तकमापूर्णास्तुलसीनवदामभिः ॥ कोमलैः सर्वगात्रेषु भूरिपुण्यवदर्पितैः ॥ ४९॥ चंद्रिकाविशदस्मेरैः सारुणापांगवीक्षितैः॥ स्वकार्थानामिव रजःसत्त्वाभ्यां स्रष्टृपालकाः ॥ ५० ॥ आत्मादिस्तंबपर्यंतैर्मूर्तिमद्भिश्चराचरैः ॥ नृत्यगीताद्यनेकार्हैः पृथक्पृथगुपासिताः ॥ ५१ ॥ अणिमाद्यैर्महिमभिरजाद्याभिर्विभूतिभिः ॥ चतुर्विंशतिभिस्तत्त्वैः परीता महदादिभिः ॥ ५२ ॥ कालस्वभावसंस्कारकामकर्मगुणादिभिः ॥ स्वमहिध्वस्तमहिभिर्मूर्तिमद्भिरुपासिताः ॥ ५३ ॥ सत्यज्ञानानंतानंदमात्रैकरसमूर्तयः ॥ अस्पृष्टभूरिमाहात्म्या अपि ह्युपनिषद्दृशाम् ॥ ५४ ॥ एवं सकृद्ददर्शाजः परब्रह्मात्मनोऽखिलान् ॥ यस्य भासा सर्वमिदं विभाति सचराचरम्॥५५॥

॥ ५२ ॥ कालादिभिश्च तत्सहकारिभिः । तत्र कालः क्षोभकः । स्वभावः परिणामहेतुः । संस्कारो वासनाया उद्बोधकः । स्वमहिध्वस्तमहिभिर्भगवन्महिम्ना तिरस्कृतस्वातंत्र्यैरुक्तैः सर्वैरणिमाद्यैः ॥५३॥ सर्वेषां मूर्तिमत्त्वेऽपि विशेषमाह । सत्यज्ञानेति । सत्याश्च ज्ञानरूपाश्चानंताश्चानंदरूपाश्च तत्रापि तदेकमात्रा विजातीयसंभेदरहितास्तत्रापि चैकरसाः सदैकरूपा मूर्तयो येषां ते । यद्वा सत्यज्ञानादिमात्रैकरसं यद्ब्रह्म तदेव मूर्तयो येषामिति । अतएवोपनिषदात्मज्ञानं सैव दृक् चक्षुर्येषां तेषामपि हिं निश्चितमस्पृष्टभूरिमाहात्म्या नस्पृष्टं स्पर्शयोग्यं भूरि माहात्म्यं येषां ते तथाभूताः संतो व्यदृश्यंतेति ॥ ५४ ॥ एवं सकृदेकदैव ददर्श । परब्रह्मणो विशेषणं यस्येति ॥ ५५ ॥

भगवंताच्या महिम्यानें ज्यांचा स्वतंत्रपणा नाहींसा झाला आहे अशा मूर्तिमंत अणिमा महिमादिक अष्टैश्वर्यांनीं, अजा अविद्या इत्यादिक शक्तींनीं, जगाला कारणभूत अशा महदादिक चोवीस तत्त्वांनीं व गुणांना क्षोभ करणारा काल, परिणामाला कारण स्वभाव, वासनेचा बोध करणारा संस्कार, भोगेच्छारूप काम, लौकिकवैदिकादि व्यापाररूप कर्म व सत्त्वादिक गुण यांनीं परिवेष्टित असून उपासना केलेले होते ॥५२॥ ५३ ॥ आतां ब्रह्मादिक सर्वांनाहि मूर्तिमंतपणा असतां त्या वत्सवत्सपालादिक उपास्यमूर्तींचा विशेष असा होता कीं, त्या मूर्ति-सत्य, ज्ञानरूप, अनंत व आनंदरूप असून आनंदमात्र (विजातीय भेदरहित) व निरंतर एकरसरूप होत्या म्हणून त्यांचें मोठें माहात्म्य, आत्मज्ञानरूप दृष्टि असणाऱ्या पुरुषांनाहि खरोखर समजण्यास योग्य नव्हतें अशा त्या (वत्सवत्सपालादिरूपी) भगवन्मूर्ति दिसूं लागल्या ॥ ५४ ॥ याप्रमाणें, त्या ब्रह्मदेवानें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सर्वहि वत्सवत्सपालांना, ज्याच्या तेजानें हें चराचर विश्व प्रकाश पावतें त्या परब्रह्माचीं स्वरूपेंच आहेत असें एकदम अवलोकन केलें ॥ ५५ ॥ नंतर अतिशय आश्चर्यांच्या योगानें चकित झाल्यामुळें आपल्या दृष्टि अंतर्मुख करून त्या भगवन्मूर्तींच्या तेजानें, ज्याचीं पंच ज्ञानेंद्रियें, पंच कर्मेंद्रियें व मन हीं अकराहि इंद्रियें स्तब्ध झालीं आहेत असा तो ब्रह्मदेव, निश्चळ उभा राहिला असतां तो, 'गोकुलग्रामदेवतेपुढें एक चार तोंडांची बाहुलीच उभी केली आहे कीं काय' असा दिसला ॥ ५६ ॥ याप्रमाणें सरस्वतीचा पति असा तो ब्रह्मदेव, तर्क करण्यास अशक्य, महामहिम्यानें युक्त, स्वयंप्रकाश असून सुखरूप, प्रकृतीपेक्षां पलीकडचें, ब्रह्मव्यतिरिक्त जड पदार्थांच्या निरासानें श्रुतिशिरोभागानीं (उपनिषदांनीं) ज्ञान होण्यास योग्य व ब्रह्मरूप अशा आपल्या स्वरूपाचे ठिकाणीं 'हें काय दिसत आहे' याप्रमाणें मोह पावोन पाहण्याविषयींसुद्धां स-

---

अतिकुतुकेनाश्चर्येणोद्वृत्य दृष्टीः परावृत्य हंसपृष्ठे निपत्येति वा। कुतुकशब्दे तृतीयायाश्छांदसो लुक्। यद्वा उद्वृत्यः इति च्छेदः। अतिकुतुकेन उद्वृत्यो विलोड्यो विपर्यस्तः स्वस्मिन्निति यावत्। पाठांतरे त्वतिकुतुकेनोद्वृत्तः क्षुभितः तेषां धाम्ना तेजसा स्तब्धसर्वेंद्रियो ब्रह्मा तूष्णीं निश्चलोऽभूत्। अत्र दृष्टांतः। पूर्देवी व्रजाधिष्ठात्री काचिद्देवता तस्या अंति समीपे पुत्रिका चतुर्मुखीकृतकप्रतिमेव ॥ ५६ ॥ एवं मोहमग्नमजमुज्जहारेत्याह। इतीति। इरेशे इरा सरस्वती तस्या इशे ब्रह्मणि किमिदमिति मुह्यति सति पश्चात्तद्द्रष्टुमप्यनीशे सति परमोऽजः श्रीकृष्णः सपद्यजाजवनिकां मायारूपां तिरस्करिणीं ययाऽद्भुतं दर्शितं तां चच्छाद तिरोधत्त। अपसारितवानित्यर्थः। अथवा अयं लोका-

ततोऽतिकुतुकोद्वृत्य स्तिमितैकादशेंद्रियः ॥ तद्धाम्नाऽभूदजस्तूष्णीं पूर्देव्यंतीव पुत्रिका ॥ ५६ ॥ इतीरेशेऽतर्क्ये निजमहिमनि स्वप्रमितिके परत्राजातोऽतन्निरसनमुखब्रह्मकमितौ ॥ अनीशेऽपि द्रष्टुं किमिदमिति वा मुह्यति सति चच्छादाजो ज्ञात्वा सपदि परमोऽजाजवनिकाम् ॥ ५७ ॥ ततोऽर्वाक्प्रतिलब्धाक्षः कः परेतवदुत्थितः ॥ कृच्छ्रादुन्मील्य वै दृष्टीराचष्टेदं सहात्मना ॥ ५८ ॥ सपद्येवाभितः पश्यन्दिशोऽपश्यत्पुरस्थितम् ॥ वृंदावनं जनाजीव्यद्रुमाकीर्णं समाप्रियम् ॥ ५९ ॥ यत्र नैसर्गदुर्वैराः सहासन्नृमृगादयः ॥ मित्राणीवाजितावासद्रुतरुट्तर्षकादिकम् ॥ ६० ॥

भिमानी ममैश्वर्यं द्रष्टुमयोग्य इति तस्योपरि मायां प्रसारितवानिति। क मुह्यति सति। अतर्क्ये तर्कागोचरे निजोऽसाधारणो महिमा यस्य तस्मिन्निति मोहे हेतुरुक्तः। दर्शनायोग्यत्वाय त्रीणि विशेषणानि। स्वप्रमितिके स्वप्रमिति स्वः प्रकाशं च तत्कं सुखं च यस्मिन् अतएवाजातः प्रकृतेः परत्र परस्मिन्। अतन्निरसनमुखेन ब्रह्म कैः श्रुतिशिरोभिर्मितिर्ज्ञानं यस्मिंस्तस्मिन्स्वरूपे ॥ ५७ ॥ अर्वाक् बहिः प्रतिलब्धान्यक्षीणि येन सः। परेतवन्मृतो यदि कथंचित्पुनरुत्तिष्ठति तथा दृष्टीर्नेत्राणि ॥ ५८ ॥ जनानामाजीव्यैर्द्रुमैराकीर्णम्। समाप्रियं संततान्यासमंतात्प्रियाणि यस्मिंस्तत् ॥ ५९ ॥ तदाह। यत्रेति। नैसर्गदुर्वैराः स्वाभाविकाप्रतिकार्यवैरवंतोऽपि नराः सिंहादयश्च

मर्थ झाला नसतां, श्रीकृष्णानें, त्याचे मोहादिक क्लेश जाणून तत्काल, 'जेणेंकरून आश्चर्य दाखविलें तो' आपला मायारूप पडदा एकीकडे सारला. अथवा लोकाभिमानी हा ब्रह्मदेव, माझें ऐश्वर्य पाहण्यास योग्य नाहीं असें जाणून त्याच्यावर मायापटळ पसरिलें ॥ ५७ ॥ तदनंतर ज्याचीं इंद्रियें बाह्यविषयांकडे प्रवृत्त झालीं आहेत असा तो ब्रह्मदेव, जसा मेलेला पुरुष क्वचित् उठतो त्याप्रमाणें उठून मोठ्या संकटानें ओथळे डोळे उघडून त्यानें आपल्या देहासहवर्तमान हें सर्व जग अवलोकन केलें ॥ ५८ ॥ नंतर तत्काल सर्व दिशांकडे पहात असतां त्यानें आपल्या अग्रभागीं असलेलें, ज्यामध्यें चोहोंकडे प्रिय पदार्थ आहेत व जें लोकांची जीविका चालविणाऱ्या वृक्षांनीं व्याप्त आहे असें वृंदावन अवलोकन केलें ॥ ५९ ॥ नंतर जेथून श्रीकृष्णाच्या राहण्यानें क्रोध, लोभ व भय इत्यादिक पळून गेले आहेत व जेथें स्वभावतःच परस्पर अतिशय वैर

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असणारे मनुष्य, व्याघ्र, मार्जार, व मूषक इत्यादिक प्राणी मित्रांप्रमाणें एकेठिकाणींच राहत आहेत, अशा त्या वृंदावनामध्यें ब्रह्मदेवानें, पूर्वीप्रमाणेंच नंदगोपाच्या पुत्रत्वाचें अनुकरण (नाट्य) करणाऱ्या, त्यामध्यें अद्वितीय (विजातीयभेदरहित) असतांहि विजातीय वत्सांचा शोध करणाऱ्या, एक (सजातीयभेदरहित) असतांहि सख्यांचा शोध करणाऱ्या, अगाधज्ञानस्वरूप असतांहि अज्ञासारखा शोध करणाऱ्या, अनंत असतांहि जिकडेतिकडे शोध करणाऱ्या, प्रकृतीपेक्षां पर असतांहि गोपबालत्व धारण करणाऱ्या आणि आकार व हस्तपादादिक अवयव यांहीं रहित असतांहि हातावर दहींभाताचा ग्रास घेऊन फिरणाऱ्या अशा श्रीकृष्णाला अवलोकन केलें ॥ ६० ॥ ६१ ॥ आणि पाहून त्वरेनें आपल्या हंसवाहनावरून खालीं उतरून पृथिवीवर सुवर्णाच्या दंडाप्रमाणें आपलें शरीर पाडून, चारहि मुकुटांच्या अग्रांनीं त्या कृष्णाच्या चरणद्वयाला स्पर्श करून

मित्राणीव यत्र सहैवासन् । अजितस्यावासेन द्रुताः पलायिता रुट्तर्षादयः क्रोधलोभादयो यस्मात्तथाभूतं वृंदावनमपश्यदिति ॥ ६० ॥ तत्र च परमेष्ठी ब्रह्मा पुरा पूर्ववदेव ब्रह्म अचष्टापश्यत् । कथंभूतम् । पशुपवंशशिशुत्वं नाट्यमुद्वहत् । नाट्यमित्यत्र हेतुः । अद्वयमित्यादि । अद्वयं च वत्सान्विचिन्वत् एकं च सखीन् । अगाधबोधं च विचिन्वत् । अनंतं च परितो विचिन्वत् परं च शिशुत्वमुद्वहत् । ब्रह्म च सपाणिकवलमिति नाट्यमेवोद्वहदित्यर्थः ॥ ६१ ॥ निजधोरणतः स्ववाहनात्त्वरेण वेगेनावतीर्य

तत्रोद्वहत्पशुपवंशशिशुत्वनाट्यं ब्रह्माद्वयं परमनंतमगाधबोधम् ॥ वत्सान्सखीनिव पुरा परितो विचिन्वदेकं सपाणिकवलं परमेष्ठ्य-
चष्ट ॥ ६१ ॥ दृष्ट्वा त्वरेण निजधोरणतोऽवतीर्य पृथ्व्यां वपुः कनकदंडमिवाभिपात्य ॥ स्पृष्ट्वा चतुर्मुकुटकोटिभिरंघ्रियुग्मं नत्वा
मुदश्रुसुजलैरकृताभिषेकम् ॥ ६२ ॥ उत्थायोत्थाय कृष्णस्य चिरस्य पादयोः पतन् ॥ आस्ते महित्वं प्राग्दृष्टं स्मृत्वा स्मृत्वा
पुनः पुनः ॥ ६३ ॥ शनैरथोत्थाय विमृज्य लोचने मुकुंदमुद्वीक्ष्य विनम्रकंधरः ॥ कृतांजलिः प्रश्रयवान्समाहितः सवेपथुर्गद्गदयैल-
तेलया ॥ ६४ ॥ इतिश्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥ ॥ ब्रह्मोवाच ॥ नौमीड्य तेऽभ्रव-
पुषे तडिदंबराय गुंजावतंसपरिपिच्छलसन्मुखाय ॥ वन्यस्रजे कवलवेत्रविषाणवेणुलक्ष्मश्रिये मृदुपदे पशुपांगजाय ॥ १ ॥

दंडवन्नत्वा चतुर्णां मुकुटानामग्रैरंघ्रियुग्मं स्पृष्ट्वा मुदश्रुसुजलैरानंदाश्रुरूपैः सुजलैरभिषेकमकरोदिति ॥ ६२ ॥ चिरस्य चिरं पादयोः पतन्नास्ते ॥ ६३ ॥ सवेपथुः सकंपः अतएव गद्गदया । अनुकरणमेतत् । इलया वाचा ऐलताऽस्तौत् ॥ ६४ ॥ इति दशमपूर्वार्धे टीकायां त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥ ॥ चतुर्दशेद्भुतं दृष्ट्वा पूर्वागंतुकनिश्चयम् ॥ अनीशः कर्तुमस्तौषीत्कृष्णं ब्रह्मा विमोहितः ॥ १ ॥ स्वकृतापराधेन भिया सकंपतया भगवन्महिमानमनवगाहमानो यथादृष्टस्वरूपमेव कीर्तयन्नाह । नौमीति । हे

व नमस्कार करून आनंदाश्रुरूप उदकांनीं त्याच्यावर अभिषेक केला ॥ ६२ ॥ नंतर पूर्वीं पाहिलेल्या श्रीकृष्णाच्या महिम्याचें वारंवार स्मरण करून व वारंवार उठून त्याला नमस्कार घालित होत्साता शेवटीं फार वेळपर्यंत श्रीकृष्णाच्या पायांवर पडून राहिला ॥ ६३ ॥ नंतर सावकाशपणें उठून, आनंदाश्रूंनीं भरून आलेले आपले दोन्हीं डोळे पुसून, श्रीकृष्णाकडे अवलोकन करून, लज्जेनें मान खालीं घालून, आदरानें अंजलि करून, नम्रतेनें युक्त, व भयानें थरथर कांपत होत्साता तो ब्रह्मदेव, एकाग्रचित्त होऊन गद्गदवाणीच्या योगेंकरून श्रीकृष्णाची स्तुति करूं लागला ॥ ६४ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुरा० दशमस्कंधाच्या पूर्वार्धांत ब्रह्ममोहनिरूपणनामक हा तेरावा अध्याय समाप्त झाला ॥ १३ ॥ ॥ आतां ह्या चवदाव्या अध्यायामध्यें भगवंताची आश्चर्यकारक लीला अवलोकन करून, पूर्वींचे वत्सवत्सपाल कोणते व नवे कोणते याचा निश्चय करण्यास असमर्थ असून मोहित झालेल्या ब्रह्मदेवानें, श्रीकृष्णाची स्तुति केली, अशी कथा वर्णन केली आहे ॥ १ ॥ त्यांत आपण केलेल्या अपराधाच्या भयानें थरथर कांपरा होऊन भगवंताच्या महिम्याचें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आकलन करण्यास असमर्थ झालेला ब्रह्मदेव, भगवंताच्या दिसत असलेल्याच स्वरूपाचें वर्णन करीत ह्मणाला कीं,– हे स्तुतियोग्य भगवंता, मी तुला प्रसन्न करण्याकरितां तुझीच स्तुति करितों. तूं मेघासारखा श्यामसुंदर मूर्ति, विजेसारखीं भरजरीचीं पिवळीं वस्त्रें परिधान करणारा, कानांत घातलेलीं गुंजेचीं कर्णभूषणें व मस्तकावर घातलेला मोरमुकुट यांच्या योगानें मुख शोभणारा, अरण्यांतील पुष्पांच्या माळा धारण करणारा, हातामध्यें घेतलेल्या–दहींभाताचा घांस, वेताची छडी, शिंग, व पांवा (मुरली) या चिन्हांनीं शोभायमान, व कोमळ चरणांनीं युक्त असा नंदगोपाचा पुत्र आहेस, तुला मी नमस्कार करितों ॥ १ ॥ आतां स्तुति करितों अशी प्रतिज्ञा करून केवळ पाहिलेल्या स्वरूपाचेंच वर्णन कां करितोस ? असें ह्मणशील तर–हे देवा, भक्तांच्या इच्छेनुरूप प्रगट झालेल्या व माझ्यावर अनुग्रह करणाऱ्या ह्या तुझ्या अतिसुलभ अवताराचाहि महिमा

ईड्य स्तुत्य ते तुभ्यं नौमि । द्वितीयार्थे चतुर्थ्यः । अथवा नौमीत्युक्त्वा प्रस्तुतस्य भगवतः कर्मत्वे ज्ञाते प्रयोजनापेक्षायामेवंभूतो भगवानेव प्रयोजनमिति तादर्थ्ये चतुर्थी । यद्वा तुभ्यं त्वामेव प्रसादयितुं त्वामेव स्तौमीत्यर्थः । अभ्रवद्वपुर्यस्य तस्मै । तडिद्वदंबरं यस्य तस्मै । गुंजाभिरवतंसौ कर्णभूषणे परिपिच्छं च बर्हापीडं तैर्लसन्मुखं यस्य तस्मै । वन्याः स्रजो यस्य तस्मै । कवलादिभिर्लक्ष्मभिः श्रीः शोभा यस्य तस्मै । मृदू पादौ यस्य तस्मै पशुपस्यांगजाय ॥ १ ॥ ननु नौमीति प्रतिज्ञाय किं स्वरूपानुवादमात्रं क्रियते अत आह । अस्यापीति । भो देव अस्यापि सुलभत्वेन प्रकाशितस्यापि तव वपुषोऽवतारस्य महि महिमानमवसितुं कोऽपि को ब्रह्मा अहमपि नेशे न शक्नोमि ।

अस्यापि देव वपुषो मदनुग्रहस्य स्वेच्छामयस्य न तु भूतमयस्य कोऽपि ॥ नेशे महि त्ववसितुं मनसांऽतरेण साक्षात्तवैव किमुतात्मसुखानुभूतेः ॥ २ ॥ ज्ञाने प्रयासमुदपास्य नमंत एव जीवंति सन्मुखरितां भवदीयवार्ताम् ॥ स्थाने स्थिताः श्रुतिगतां तनुवाङ्मनोभिर्ये प्रायशोऽजितजितोऽप्यसि तैस्त्रिलोक्याम् ॥ ३ ॥

यद्वा कश्चिदपि नेशे न समर्थ आसीत् । सुलभत्वाय विशेषणद्वयम् । मदनुग्रहस्य ममानुग्रहो यस्मात्तन्मदनुग्रहं तस्य । किंच स्वेच्छामयस्य स्वीयानां भक्तानां यथायथेच्छा तथातथा भवतः । तर्हि किमिति ज्ञातुं न शक्यतेऽत आह । नतु भूतमयस्याचिंत्यशुद्धसत्त्वात्मकस्य । यदाऽस्यैवं तदा कथं पुनः साक्षात्तव केवलस्यात्मसुखानुभूतेरेव स्वसुखानुभवमात्रस्यावतारिणो गुणातीतस्य महिमानमांतरेण निरुद्धेनापि मनसा को वा ज्ञातुं समर्थो भवेत् । अथवा भूतमयस्यापितु विराड्रूपस्य तव त्वन्नियम्यस्य वपुषो महिमानमेवावसितुं कोऽपि नेशे तदा साक्षात्तवैवासाधारणस्य नियम्यनियंतृभेदरहितस्योक्तलक्षणस्यास्य महिमानमवसितुं कोऽपि नेश इति किमु वक्तव्यमित्यर्थः ॥ २ ॥ तर्ह्यज्ञाः कथं संसारं तरेयुरत आह । ज्ञान इति । उदपास्य ईषदप्यकृत्वा सद्भिर्मुखरितां स्वत एव नित्यं प्रकटितां भवदीयवार्तां स्वस्वस्थान एव स्थितास्तत्सन्निधिमात्रेण स्वत

जाणण्यास मी ब्रह्मदेव किंवा दुसरा कोणीहि समर्थ नाहीं. कारण, हा अवतार अचिंत्य शुद्धसत्वात्मक आहे. ह्या अवताराचाच जर महिमा कळत नाहीं तर, केवळ आत्मसुखानुभावमात्र अशा तुझ्या गुणातीत स्वरूपाचा महिमा एकाग्र केलेल्याहि मनानें जाणण्यास कोणी समर्थ नाहीं हें काय सांगावें! ॥ २ ॥ तर अज्ञ लोक संसाराला कसे तरतील ? असें ह्मणशील तर– ज्ञानाविषयीं प्रयास मुळींच न करितां साधूंच्या सन्निधभागीं आपापल्या जाग्यावरच बसून साधूंनीं स्वभावतः नित्य वर्णन केलेल्या व स्वतःच कानांवर आलेल्या तुझ्या कथांचा जे पुरुष, कायावाचामनेंकरून सत्कार करीत केवळ वांचतात, दुसरें कांहींच करीत नाहींत, त्या पुरुषांनीं, हे अजिंक्या परमेश्वरा, तूं बहुशः त्रैलोक्यामध्यें दुसऱ्यांनीं जरी अजिंक्य आहेस तथापि त्यांनीं तुला जिंकिलें आहे, ह्मणजे तूं त्यांना प्राप्त झाला आहेस. मग ज्ञानाच्या श्रमानें काय करावयाचें आहे ?

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कांहींच नाहीं ॥३॥ आतां श्रवणादि भक्तीवांचून ज्ञान होतच नाहीं असें सांगतो– हे प्रभो, जसें सरोवर हे पुष्कळ झऱ्यांनां स्रवणारें असतें त्याप्रमाणें धर्मार्थकाममोक्षरूप चतुर्विध पुरुषार्थांना स्रवणाऱ्या तुझ्या भक्तीचा त्याग करून, जे पुरुष, केवल ज्ञानप्राप्तीकरितां शास्त्राभ्यासादिक क्लेश करितात त्यांना, ‘जसा बारीक दिसणाऱ्या कणयुक्त धान्याचा त्याग करून आंतून कणहीन असून बाहेरूनमात्र मोठ्या धान्यासारखें दिसणाऱ्या पोल्या धान्याचें कंडण करणारांस केवळ क्लेशच अवशेष राहतो· त्याप्रमाणें तो क्लेशच अवशिष्ट राहतो, दुसरें कांहींच फळ प्राप्त होत नाहीं ॥ ४ ॥ आतां भक्तीनेंच ज्ञान होतें, दुसऱ्या साधनांनीं होत नाहीं, याविषयीं सदाचार प्रमाण सांगतो– हे व्यापका अच्युता, या लोकीं पूर्वींचे पुष्कळहि योगी, योगसाधनांनीं ज्ञान प्राप्त झालें नाहीं म्हणून आपले लौकिक व्यापारहि तुझेठिकाणीं अर्पण करून, तुला अर्पण केलेल्या त्या कर्मांनींच

एव श्रुतिगतां श्रवणं प्राप्तां तनुवाङ्मनोभिर्नमंतः सत्कुर्वंतो ये जीवंति केवलं यद्यपि नान्यत्कुर्वंति तैः प्रायशस्त्रिलोक्यामन्यैरजितोऽपि त्वं जितः प्राप्तोऽसीति किं ज्ञानश्रमेणेत्यर्थः ॥ ३ ॥ भक्तिं विना ज्ञानं तु नैव सिद्ध्येदित्याह । श्रेयःस्रुतिमिति । श्रेयसामभ्युदयापवर्गलक्षणानां स्रुतिः स्रवणं यस्याः सरस इव निर्झराणां तां ते तव भक्तिमुदस्य त्यक्त्वा श्रेयसां मार्गभूतामिति वा । तेषां क्लेशलः क्लेश एवावशिष्यते । अयं भावः । यथा अल्पप्रमाणं धान्यं परित्यज्यांतःकणहीनान्स्थूलधान्याभासांस्तुषानेवावघ्नंति तेषां न किंचित्फलमेवं भक्तिं तुच्छीकृत्य ये केवलबोधाय प्रयतंते तेषामपीति ॥ ४ ॥ भक्त्यैव ज्ञानं नान्यथेत्यत्र सदाचारं प्रमाणयति । पुरेति । हे भूमन्नपरिच्छिन्न इह लोके पूर्वं

श्रेयःस्रुतिं भक्तिमुदस्य ते विभो क्लिश्यंति ये केवलबोधलब्धये ॥ तेषामसौ क्लेशल एव शिष्यते नान्यद्यथा स्थूलतुषावघातिनाम्
॥ ४ ॥ पुरेह भूमन्बहवोऽपि योगिनस्त्वदर्पितेहा निजकर्मलब्धया ॥ विबुद्ध्य भक्त्यैव कथोपनीतया प्रपेदिरेऽञ्जोऽच्युत ते गतिं
पराम् ॥ ५ ॥ तथापि भूमन्महिमाऽगुणस्य ते विबोद्धुमर्हत्यमलांतरात्मभिः ॥ अविक्रियात्स्वानुभवादरूपतो ह्यनन्यबोध्यात्मतया न चान्यथा ॥ ६ ॥

योगिनोऽपि संतो योगैर्ज्ञानमप्राप्य पश्चात्त्वदर्पितेहास्त्वय्यर्पिता लौकिक्यपीहा चेष्टा यैस्ते निजकर्मलब्धया त्वदर्पितैर्निजैः कर्मभिर्लब्धया । त्वय्यर्पिता ईहा निजानि कर्माणि च तैर्लब्धयेत्येकं पदं वा । कथोपनीतया कथया त्वत्समीपं प्रापितया भक्त्यैव विबुद्ध्यात्मानं ज्ञात्वा अंजः सुखेनैव ते परां गतिं प्राप्ताः ॥ ५ ॥ एवं तावत्सगुणनिर्गुणयोरुभयोरपि ज्ञानं दुर्घटमिति त्वत्कथाश्रवणादिनैव त्वत्प्राप्तिर्नान्यथेत्युक्तम् । इदानीं यद्यप्युभयोरविशेषेण दुर्ज्ञेयत्वमुक्तं तथापि गुणातीतस्य ज्ञानं कथंचिद्भवेन्न तु सगुणस्य तवाचिंत्यानंतगुणत्वादिति श्लोकद्वयेन स्तौति । तथाऽपीति । हे भूमन्नपरिच्छिन्नगुणस्य ते महिमा अमलैरंतरात्मभिः प्रत्याहृतेंद्रियैर्विबोद्धुं बोधगोचरीभवितुमर्हति योग्यो भवति । अथवा विबोद्धुं ज्ञातुमर्हति अर्ह्यते शक्यत इत्यर्थः । यद्वा । महिमेति महिमानं कश्चिद्बोद्धुमर्हतीत्यर्थः । कथम् । स्वानुभवादात्माकारांतःकरणसाक्षात्कारात् । नन्वंतःकरणमपि सविका-

---

चित्तशुद्धिद्वारा प्राप्त झालेल्या व कथाश्रवणादिकेंकरून वृद्धिंगत झालेल्या तुझ्या प्रेमलक्षण भक्तीनेंच आत्मस्वरूप जाणून आनायासानेंच तुझ्या परम गतीला (मोक्षाला) पावले आहेत ॥ ५ ॥ याप्रमाणें सगुण व निर्गुण ह्या दोन्हीं स्वरूपांचें ज्ञान दुर्घट असल्यामुळें तुझ्या कथाश्रवणादिकेंकरूनच तुझी प्राप्ति होत्ये अन्यथा होत नाहीं, असें सांगितलें· आतां जरी दोन्ही स्वरूपांचें ज्ञान दुर्घट म्हणून सांगितलें तथापि निर्गुण स्वरूपाचें ज्ञान कदाचित् होईल परंतु तूं अचिंत्य व अनंतगुण असल्यामुळें तुझ्या सगुण स्वरूपाचेंच ज्ञान होणार नाहीं असें सांगतो– हे व्यापका, विषयासक्त पुरुषांना जरी तुझा महिमा जाणण्यास अशक्य आहे तथापि इंद्रियनिग्रह केलेल्या पुरुषांना, गुणातीत अशा तुझा महिमा, इंद्रियांना विषय नसल्यामुळें त्यांच्या प्रवर्तकत्वेंकरून, विशेष आकार नसल्यामुळें जगाच्या अधिष्ठानत्वेंकरून व आत्माकार झालेल्या अंतःकरणामध्यें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याचा साक्षात्कार होत असल्यामुळें स्वप्रकाशत्वेंकरून जागण्यास योग्य होतो, विषयत्वेंकरून मात्र जाणतां येत नाहीं ॥ ६ ॥ हे प्रभो, ज्या अतिनिपुण लोकांनीं, पुष्कळ जन्मपरिमित काळानें, पृथिवीच्या रजःकणाची तशींच अंतरिक्षलोकांतील तुषारांच्या कणांची व स्वर्गांतील चंद्रसूर्यादिकांच्या किरणांच्या परमाणूंची गणना केली आहे असेहि ते कोण बरें पुरुष, या जगाच्या पालनाकरितां बहुत गुण प्रकट करून अवतीर्ण झालेल्या तुज गुणाधिष्ठात्या परमेश्वराच्या गुणांची (इतके आहेत अशी) गणना करावयास, समर्थ होतील ? कोणीच होणार नाहींत ॥ ७ ॥ एतावता तुझें ज्ञान दुर्घट आहे ह्मणून हे भगवंता, तुझी कृपा केव्हां होईल ? अशी प्रतीक्षा करणारा, आपण केलेल्या

रमेवविषयीकरोतीति कथमात्माकारता तस्येत्यत आह । अविक्रियादिति । विक्रिया विशेषाकारस्तद्रहितात् । विशेषपरित्याग एवात्माकारतेत्यर्थः । नन्वंतःकरणसाक्षात्कारविषयत्वेऽनात्मत्वप्रसंगः स्यादत आह । अरूपत इति । रूपं विषयः अविषयात् । वृत्तिविषयत्वमेवात्मनो न फलविषयत्वमतो नायं दोष इति भावः । कथं तर्हि स्फूर्तिः । अनन्यबोध्यात्मतया स्वप्रकाशत्वेनैव न त्वन्यथा । इदं तदिति विषयत्वेनेत्यर्थः । अथवा मा सर्वतोऽतरंगा लक्ष्मीरप्यगुणस्य ते महिमानममलैरंतर्वृत्तिभिरिंद्रियैरपि तथा यादृग्वस्तुतस्तेन रूपेण विबोद्धुं किमर्हति नार्हत्येवेत्यर्थः कथं तर्ह्यर्हति तदाह । स्वानुभवादित्यादिना । उक्तार्थमेवैतत् ॥ ६ ॥ गुणात्मनो गुणानामात्मनो गुणाधिष्ठातुस्ते तव पुनर्गुणान्विमातुमेतावंत इति गणयितुमपि के ईशिरे समर्था बभूवुर्दूरतस्तद्विशेषवार्ता । कथंभूतस्य तव । अस्य विश्वस्य हिताय पालनाय बहुगुणाविष्कारेणावतीर्णस्य । ननु कालेन निपुणैः किमशक्यमत आह । कालेनेति । वा शब्दो वितर्के । सुकल्पैरतिनिपुणैर्बहुजन्मना कालेन भूपरमाणवो विमिता

गुणात्मनस्तेऽपि गुणान्विमातुं हितावतीर्णस्य क ईशिरेऽस्य ॥ कालेन यैर्वा विमिताः सुकल्पैर्भूपांसवः खे मिहिका द्युभासः ॥ ७ ॥
तत्तेऽनुकंपां सुसमीक्षमाणो भुंजान एवात्मकृतं विपाकम् ॥ हृद्वाग्वपुर्भिर्विदधन्नमस्ते जीवेत यो मुक्तिपदे स दायभाक् ॥ ८ ॥
पश्येश मेऽनार्यमनंत आद्ये परात्मनि त्वय्यपि मायिमायिनि ॥ मायां वितत्येक्षितुमात्मवैभवं ह्यहं कियानैच्छमिवार्चिरग्नौ ॥ ९ ॥

विशेषेण गणिता भवेयुः । तथा खे मिहिका हिमकणा अपि तथा द्युभासो दिवि नक्षत्रादिकिरणपरमाणवोऽपि ॥ ७ ॥ तस्माद्भक्तिरेव संगच्छत इत्याह । तत्तेऽनुकंपामिति । सुसमीक्षमाणस्तव कृपा कदा भविष्यतीति बहुमन्यमानः स्वार्जितं च कर्मफलमनासक्तः सन् भुंजान एव नातीव तपआदिना क्लिश्यन्नेवं यो जीवेत स मुक्तौ दायभाग्भवति । भक्तस्य जीवनव्यतिरेकेण दायप्राप्ताविव मुक्तौ नान्यदुपयुज्यत इति भावः ॥ ८ ॥ तदेवं स्तुत्वा भगवंतं क्षमापयितुं स्वापराधं निवेदयति । पश्येति । हे ईश मेऽनार्यं दौर्जन्यं पश्य । यदहं मायिनामपि मायिनि विमोहके त्वय्यपि स्वमायां प्रसार्यात्मैश्वर्यमीक्षितुमैच्छमभिलषितवान् । अहो एवं कर्तुं त्वय्यहं कियान् किंचित् । यथाग्नेरुद्भूता ज्वाला अग्नौ न किंचित्तद्वदिति ॥ ९ ॥

कर्माचें फळ (सुख किंवा दुःख) आसक्त न होतां सेवन करणारा व कायावाचामनेंकरून तुझी वंदनादिक भक्ति करणारा जो पुरुष जीवंत राहतो तो पुरुष, ' जसा पित्याचें शुश्रूषण करणारा पुत्र, त्याच्या धनाचा विभागी होतो त्याप्रमाणें ' मुक्तिफलाविषयीं विभागी होतो ॥ ८ ॥ याप्रमाणें भगवंताची स्तुति करून आतां क्षमा करण्याकरितां आपल्या अपराधाचें निवेदन करितो— हे ईश्वरा, माझा हा मूढपणा पहा कीं, ज्या मी, मायावी लोकांनाहि मोह करणारा, सर्वांचें कारण, सर्वांचा नियंता व नाशरहित अशा तुझेठिकाणींहि आपली माया पसरून तुझें वैभव पाहण्याचा अभिलाष केला. असें करण्यास तुझेठिकाणीं मी कितीसा आहें ? कांहींच नाहीं. जशी अग्नीपासून उत्पन्न झालेली ज्वाळा, दुसऱ्याला जाळत्ये परंतु ती अग्नीचेठिकाणीं आपला कांहींच पराक्रम चालवूं शकत नाहीं त्याप्रमाणें तुझ्यापासून झालेला मी, इतरांना मोहित करितों परंतु

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तुझेठिकाणीं आपला काहींच पराक्रम चालविण्यास समर्थ नाहीं ॥ ९ ॥ वास्तव हे अच्युता, रजोगुणापासून उत्पन्न झालेला, तुझ्या प्रभावाला न जाणणारा, तुझ्याहून निराळा मीच ईश्वर आहें असा अभिमान धारण करणारा व जगावा कर्ता मी आहें अशा गर्वरूप गाढ अंधकारानें आंधळे नेत्र झालेला अशा माझ्या अपराधांची, 'मी याचा नाथ (रक्षक) असलों तरच यावें रक्षण होणार आहे, नाहींतर होणार नाहीं, ह्मणून या सेवकावर मी कृपा केली पाहिजे असें मानून' क्षमा कर ॥ १० ॥ आतां ब्रह्मांडरूप देह धारण करणारा तूंहि ईश्वरच आहेस असें ह्मणशील तर– हे देवा, प्रकृति, महत्तत्त्व, अहंकार, आकाश, वायु, अग्नि, उदक व पृथिवी, या आवरणांनीं वेष्टित असलेला जो ब्रह्मांडघट हाच ज्याचा 'आपल्या मानानें' सात विती देह आहे असा मी कोठें ! आणि असलीं जीं असंख्य ब्रह्मांडें, तेच जणु परमाणु, त्यांचा यथेच्छ संचार

रजोभुवो रजसो जातस्यातोऽजानतोऽतएवाजावलेपांधतमोंऽधचक्षुषः अजो जगत्कर्ताऽहमिति मदेन गाढतमोरूपेणांधीभूते नेत्रे यस्यातस्त्वत्तः पृथगीशमानिनः । अन्यत्र प्रभुत्वेन वर्तमानोऽपि मयि नाथे सति नाथवान्मद्भृत्य एवात एषोऽनुकंप्य इति मत्वा क्षमस्वेत्यर्थः ॥ १० ॥ ननु ब्रह्मांडविग्रहस्त्वमपीश्वर एवेति चेत्तत्राह । क्वाहमिति । तमः प्रकृतिर्महान् महत्तत्त्वं अहमहंकारः खमाकाशः चरो वायुः अग्निर्वार्जलं भूश्च प्रकृत्यादिपृथिव्यंतैरेतैः संवेष्टितो योंऽडघटः स एव तस्मिन्वा स्वमानेन सप्तवितस्तिः कायो यस्य सोऽहं क्व क्वच ते महित्वम् । कथंभूतस्य । ईदृग्विधानि यान्यविगणितान्यंडानि त एव परमाणवस्तेषां चर्या परिभ्रमणं तदर्थं वाताध्वानो गवाक्षा इव रोमविवराणि यस्य

अतः क्षमस्वाच्युत मे रजोभुवो ह्यजानतस्त्वत्पृथगीशमानिनः ॥ अजावलेपांधतमोंऽधचक्षुष एषोऽनुकंप्यो मयि नाथवानिति ॥१०॥
क्वाहं तमोमहदहंखचराग्निवार्भूसंवेष्टितांडघटसप्तवितस्तिकायः ॥ क्वेदृग्विधाविगणितांडपराणुचर्यावाताध्वरोमविवरस्य च ते महित्वम् ॥११॥ उत्क्षेपणं गर्भगतस्य पादयोः किं कल्पते मातुरधोक्षजागसे ॥ किमस्तिनास्तिव्यपदेशभूषितं तवास्ति कुक्षेः कियदप्यनंतः ॥१२॥
जगत्त्रयांतोदधिसंप्लवोदे नारायणस्योदरनाभिनालात् ॥ विनिर्गतोऽजस्त्विति वाङ् न वै मृषा किंत्वीश्वर त्वन्न विनिर्गतोऽस्मि ॥१३॥

तस्य तव । अतोऽतितुच्छत्वात्त्वयाऽनुकंप्योऽहमिति ॥ ११ ॥ अपिच । गर्भगतस्य शिशोः पादयोरुत्क्षेपणं मातुः किमपराधाय भवति लोके । अस्तिनास्तिव्यपदेशाभ्यां भावाभावशब्दाभ्यां स्थूलसूक्ष्मकार्यकारणशब्दैर्वा भूषितमभिहितम् । एतेषां शब्दानां भुवि विषये उषितं स्थितमिति वा । सर्वं वस्त्वित्यर्थः । हे अधोक्षज तव कुक्षेरनंतर्बहिः कियदपि किंचिन्मात्रमपि किमस्ति न किंचिदस्तीत्यर्थः । अतः सर्वस्य तव कुक्षिगतत्वेन ममापि तथात्वान्मातृवदपराधः सोढव्य इति भावः ॥ १२ ॥ किंच विशेषतोऽपि त्वत्तो मम जन्म प्रसिद्धमित्याह । जगत्त्रयेत्यादि । जगत्त्रयस्यांते प्रलये य उदधीनां संप्लवः संश्लेषस्तस्मिन्नुदे उदके नारायणस्योदरे नाभिस्तस्य नालादजो विनिर्गत इति

होण्या जोगीं गवाक्षांसारखीं ज्याची रोमरंध्रें आहेत त्या तुझें माहात्म्य कोठें ! वास्तव अतितुच्छ अशा मजवर तूं दया करून माझ्या अपराधांची क्षमा करावीस ॥ ११ ॥ आणि हे अधोक्षजा, गर्भांत असलेल्या बालकाच्या पायावें वर उचलणें (लाथ मारणें) मातेच्या अपराधाकारणें होतें काय ? नाहींच होत. मग आहे व नाहीं या शब्दांनीं उच्चारिलेलें कोणतेंहि वस्तु थोडेंतरी तुझ्या उदराच्या बाहेर आहे काय ? मुळींच नाहीं. वास्तव सर्वच जर तुझ्या उदरांत आहे तर माझाहि समावेश तेथेंच होतो, ह्मणून तूं माझ्या अपराधाचें मातेप्रमाणें सहन करावें ॥ १२ ॥ आणि विशेषेंकरून माझें जन्म तुझ्यापासूनच प्रसिद्ध आहे. पहा त्रैलोक्याच्या प्रलयकालीं सर्व समुद्र एक झाले असतां, त्या उदकांत नारायणाच्या उदरस्थ नाभिकमलांतून ब्रह्मदेव बाहेर पडला अशी जी वाणी आहे ती खरोखर खोटी नाहीं. हे ईश्वरा, तूंच सांग ॥ ४९ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कीं, मी तुझ्यापासून उत्पन्न झालों नाहीं काय ? तुझ्यापासूनच उत्पन्न झालों आहें ॥ १३ ॥ आतां नारायणाचा पुत्र तूं, त्याचें माझ्याकडे काय ? असें ह्मणशील तर– मी तुला विचारितों कीं, सर्व जीवसमूहाचा ज्याला आश्रय आहे तो नारायण तूं नव्हेस काय ? तूंच आहेस. पुन्हा विचारितों कीं, सर्व प्राण्यांचा अंतर्यामी, सर्वांना त्यांच्या त्यांच्या कार्यांचेठिकाणीं प्रवृत्त करणारा व सर्व लोकांचा प्रत्यक्ष पाहणारा असल्यामुळें तूं नारायण नव्हेस काय ? तूंच नारायण आहेस. आतां नारायणपदाच्या व्युत्पत्तीनें असा अर्थ होईल परंतु तूं ब्रह्मदेव ज्यापासून झालास तें नारायणस्वरूप निराळेंच आहे असें ह्मणशील तर– नरापासून (ईश्वरापासून) उत्पन्न झालेलें जें उदक तें नार होय

या वाक्सा तावन्मृषा न भवति । वै निश्चितम् । तथापि तु हे ईश्वर त्वत्तोऽहं किं न विनिर्गतो नोत्पन्नोऽस्मि । अपितु त्वत्त एवोत्पन्न इत्यर्थः ॥ १३ ॥ तर्हि नारायणस्य पुत्रः स्यास्त्वं मम किमायातं तत्राह । नारायणस्त्वमिति । नहीति काक्वा त्वमेव नारायण इत्यापादयति । कुतोऽहं नारायण इति चेदत आह । सर्वदेहिनामात्माऽसीति । एवमपि किं नारायणो न भवसि नारं जीवसमूहोऽयनमाश्रयो यस्य स तथेति त्वमेव सर्वदेहिनामात्मत्वान्नारायण इति भावः । हे अधीश त्वं नारायणो नहीति पुनः काकुः । अधीशः प्रवर्तकः । ततश्च नारस्यायनं प्रवृत्तिर्यस्मात्स तथेति पुनस्त्वमेवासाविति । किंच त्वमखिललोकसाक्षी अखिलं लोकं साक्षात्पश्यसि अतो नारमयसे जानासीति त्वमेव नारायण इत्यर्थः । नन्वेवं नारायणपदव्युत्पत्तौ भवेदेवं तत्त्वन्यथा प्रसिद्धमित्याशंक्याह । नारायणोंऽगमिति । नराद्दुद्भूता येऽर्थास्तथा नराज्जातं यज्जलं तदयनाचो नारायणः

नारायणस्त्वं न हि सर्वदेहिनामात्माऽस्यधीशाखिललोकसाक्षी ॥ नारायणोंऽगं नरभूजलायनात्तच्चापि सत्यं न तवैव माया ॥ १४ ॥
तच्चेज्जलस्थं तव सज्जगद्वपुः किं मे न दृष्टं भगवंस्तदैव ॥ किं वा सुदृष्टं हृदि मे तदैव किं नो सपद्येव पुनर्व्यदर्शि ॥ १५ ॥

प्रसिद्धः सोऽपि तवैवांगं मूर्तिः । तथाच स्मर्यते । नराज्जातानि तत्त्वानि नाराणीति विदुर्बुधाः ॥ तस्य तान्ययनं पूर्वं तेन नारायणः स्मृत इति । तथा । आपो नारा इति प्रोक्ता आपो वै नरसूनवः ॥ अयनं तस्य ताः पूर्वं तेन नारायणः स्मृतः इति च । ननु मन्मूर्तेरपरिच्छिन्नायाः कथं जलाश्रयत्वमत आह । तच्चापि सत्यं नेति ॥ १४ ॥ अपरिच्छेदमेवोपपादयति । तच्चेदिति जगदाश्रयभूतं तव तद्वपुर्जलस्थमित्येवं यदि सत्सत्यं स्यात्तर्हि तदैव कमलनालमार्गेणांतः प्रविश्य संवत्सरशतं विचिन्वताऽपि मया हे भगवन्नचिंत्यैश्वर्य तत्र किमिति न दृष्टम् । हृद्यपि किमिति नो व्यदर्शि न दृष्टम् । तदैव तपःकरणानंतरं सपद्येव सुदृष्टमतो मायैव । अतस्त्वन्मूर्तेर्देशविशेषपरिच्छेदः सत्यो न भवतीत्यर्थः ॥ १५ ॥

तें ज्याचें राहण्याचें स्थान आहे अशा अर्थानें प्रसिद्ध झालेला जो नारायण तोहि तुझीच मूर्ति आहे. आतां देशकालादिपरिच्छेदरहित असलेल्या माझ्या मूर्तीचें पाण्यांत राहणें कसें घडेल असें ह्मणशील तर– तेंहि तुझें नारायणस्वरूप खरें नव्हे, तर ती तुझी मायाच आहे; ह्मणजे लीलेकरितां तें तूं दाखविलेलें आहेस. वस्तुतः तूं व्यापक आहेस ॥ १४ ॥ हे अचिंत्यैश्वर्यसंपन्ना, जगाला आश्रयभूत असें तुझें तें पाण्यामध्यें राहणारें शरीर सत्य होतें, असें जर ह्मणावें तर– त्याचवेळीं कमळनालाच्या मार्गानें उदकांत प्रवेश करून शंभर वर्षेंपर्यंत शोध करणाऱ्याहि मी, तें तेथें पाण्यांत कां पाहिलें नाहीं ? व हृदयामध्येंहि तें माझ्या दृष्टीस कां पडलें नाहीं ? आणि तप केल्यानंतर लागलेंच

---

१ नरापासून (पुरुषापासून) उत्पन्न झालेल्या तत्त्वांना ‘ नार ’ असें विद्वान् लोक ह्मणतात. तीं तत्त्वें परमेश्वराचीं पूर्वीं अयनें (आश्रय किंवा राहण्याचीं स्थानें) होतीं ह्मणून तो नारायण होय.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुन्हां तें कां उत्तमप्रकारें दृष्टी पडलें ? वास्तव ती मायाच आहे ह्मणजे तुझ्या मूर्तीला जो देशादिपरिच्छेद भासतो तो खरा नव्हे ॥ १५ ॥ आतां जर जलादि प्रपंच खरा असेल तर त्याच्या योगानें तुझा परिच्छेद घडेल परंतु तो प्रपंच मायिक आहे असें तूंच दाखविलें आहेस असें सांगतो– हे मायेला दूर करणाऱ्या ईश्वरा, या अवतारामध्येंच बाहेर प्रत्यक्ष दिसत असलेला सर्व प्रपंच आपल्या उदरांमध्यें तूं यशोदामातेला दाखवून यावें खोटेपणच प्रकट केलें आहेस ॥ १६ ॥ आतां बाहेर असलेल्या प्रपंचाचें माझ्या मुखांत प्रतिबिंब पडलें असेल, मग तो प्रपंच सर्वथा मायामय कसा ? असें ह्मणशील तर–प्रतिबिंब दिसण्याचा नियम असा आहे कीं, तें बिंबाच्या उलट दिसतें, आरशाचें प्रतिबिंब त्याच आरशांत दिसत नाहीं, पण यशोदेला हें सगळें जग येथें (बाहेर) जसें भासत होतें तसेंच तें सर्व तुझ्या उदरांमध्येंहि तुझ्या सहवर्तमान भासलें. तेव्हां

अपिच यदि जलादिप्रपंचः सत्यः स्यात्तर्हि तेन तव परिच्छेदो भवेत् स तु मायाविलसित इति त्वयैव दर्शितमित्याह श्लोकत्रयेण । हे मायाधमन मायोपशमन अत्रैवावतारे बहिः स्फुटस्यापि स्वजठरमध्ये जनन्याः प्रदर्शनेन ॥ १६ ॥ ननु बहिः सत एवांतर्जठरे प्रतिबिंबोऽस्तु कुतः सर्वथा मायात्वं तत्राह । यस्येति । यस्य तव कुक्षौ सर्वमिदं यथा भाति तत्सर्वमिहापि बहिरपि तथैव भाति । किंच सात्मं त्वत्सहितं तदिदं सर्वं त्वयि मायया विना किं घटते । अयं भावः । त्वयि प्रतिबिंबश्चेद्बाह्याद्विलोमतया प्रतीयेत

अत्रैव मायाधमनावतारे ह्यस्य प्रपंचस्य बहिःस्फुटस्य ॥ कृत्स्नस्य चांतर्जठरे जनन्या मायात्वमेव प्रकटीकृतं ते ॥ १६ ॥ यस्य कुक्षाविदं सर्वं सात्मं भाति यथा तथा ॥ तत्त्वय्यपीह तत्सर्वं किमिदं मायया विना ॥ १७ ॥ अद्यैव त्वदृतेऽस्य किं मम न ते मायात्वमादर्शितमेकोऽसि प्रथमं ततो व्रजसुहृद्वत्साः समस्ता अपि ॥ तावंतोऽसि चतुर्भुजास्तदखिलैः साकं मयोपासितास्तावंत्येव जगंत्यभूस्तदमितं ब्रह्माद्वयं शिष्यते ॥ १८ ॥ अजानतां त्वत्पदवीमनात्मन्यात्मात्मना भासि वितत्य मायाम् ॥ सृष्टाविवाहं जगतो विधान इव त्वमेषोंऽत इव त्रिनेत्रः ॥ १९ ॥

न तु तदस्ति तव चादर्शस्थानीयस्य त्वयि प्रतीतिर्न स्यात् अतः सर्वथा मिथ्यात्वमेवेति ॥ १७ ॥ अपिच न केवलं जनन्या ममापि तथैव दर्शितमित्याह । अद्यैवेति । त्वदृते त्वां विना अस्य विश्वस्य मायात्वं त्वया ममैव च तदप्यद्यैव किं न दर्शितं किंतु दर्शितमेव । तथाहि एकोऽसीत्यादि । तत्ततो मया सहाखिलैस्तत्त्वादिभिरुपासितास्तावंतश्चतुर्भुजा असि । जगंति ब्रह्मांडानीति प्रागनुक्तमपि दृष्टमिति ज्ञातव्यम् ॥ १८ ॥ ननु ब्रह्मंस्तव मया दर्शितं शुद्धमेव चैतन्यं कथं प्रपंचवन्मायेत्युच्यते । सत्यम् ।

तुझेठिकाणीं तुझ्यासहवर्तमान बाहेरच्याप्रमाणें जग भासणें हें मायेशिवाय घडेल काय ? मुळींच घडणार नाहीं ॥ १७ ॥ आतां हें केवळ आईलाच दाखविलें असें नाहीं, तर मलाहि तसेंच दाखविलें आहेस, असें सांगतो– हे देवा, तुझ्याशिवाय असलेल्या या सर्व प्रपंचाचें मायिकपण तूं आजच मला दाखविलें नाहींस काय ? तर दाखविलेंच आहेस. तें असें कीं, मी वत्सवत्सपाल हरण करण्याच्या पूर्वी तूं एक श्रीकृष्ण होतास. नंतर गोकुळसंबंधी बालक, वत्स, शिंगें पांवेवगैरे सर्वहि तूंच झालास, नंतर माझ्या सहवर्तमान सर्व तत्त्वादिकांनीं सेवन केलेले तितक्या संख्येचे चतुर्भुज तूंच झालास. मग तितकी ब्रह्मांडें झालास, त्या प्रत्येक ब्रह्मांडामध्येंहि अस्मदादिकांनीं सेवित झालास. आतां शेवटीं पूर्वीप्रमाणें एक कृष्णच राहिला आहेस. वास्तव अपरिमित, परिपूर्ण असें एकच तुझें स्वरूप अवशेष राहतें ॥ १८ ॥ आतां ब्रह्मदेवा, तुला मी दाखविलें तें शुद्ध चैतन्यच असून त्याला तूं प्रपंचासारिखें मायिक कां ह्मणतोस? असें ह्मणशील तर–खरें, परंतु जसा अद्वितीयस्वरूपी तुझ्या मत्स्यादिक गुणावतारांचेठिकाणीं तुझ्या स्वाधीन

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असलेल्या मायेच्या योगानें अनेकपणा दिसून येतो त्याप्रमाणें हेंहि मायिकत्व संभवतें असें सांगतो–हे प्रभो, तुझें स्वरूप न जाणणाऱ्या पुरुषांनांच अनात्मरूप प्रकृतीचेठिकाणीं राहणारा आत्मा तूं, त्यांच्यावर स्वातंत्र्यानें आपली माया पसरून, जगाच्या सृष्टीविषयीं मज ब्रह्मदेवासारखा, पालनाविषयीं ह्या सध्या दिसणाऱ्या तुज विष्णूसारखा व संहाराविषयीं रुद्रासारखा भासतोस ॥ १९ ॥ हे रक्षणकर्त्या, प्रभो ईश्वरा, असज्जनांचा दुष्टमद घालविण्याकरितां व साधूंवर अनुग्रह करण्याकरितां जन्मरहित अशाहि तुझे–देवांमध्यें वामनादिक, ऋषींमध्यें परशुरामादिक, मनुष्यांमध्यें रामादिक तसेंच तिर्यग्योनींमध्यें वराहादिक व जलचरामध्यें मत्स्यादिक अवतार झाले आहेत ॥ २० ॥ आतां मला जर स्वातंत्र्य आहे तर मला मत्स्यादिक नीच योनींमध्यें अवतार कां घ्यावे लागले ? वामनादिक अवतारांमध्यें याचनावगैरे करण्याचें दैन्य कां प्राप्त झालें ?

किंत्वद्वितीये त्वयि नानात्वं गुणावतारमत्स्याद्यवतारेष्विव कार्यवशेन स्वतंत्रमायानिबंधनमित्याह श्लोकद्वयेन । अजानतामिति । त्वत्पदवीं तव स्वरूपमजानतामनात्मनि प्रकृतौ स्थित आत्मैव त्वमात्मनैव स्वातंत्र्येण मायां वितत्य भासि । कथम् । जगतः स्रष्टावहमिव ब्रह्मेव । विधाने पालने च एष त्वमिव । अंते त्रिनेत्र इवेति ॥ १९ ॥ सुरेषु उपेंद्रः । ऋषिषु परशुरामः । नृष्वपि रामः ॥ २० ॥ ननु च स्वातंत्र्ये कथं कुत्सितेषु मत्स्यादिषु जन्म कथं वा वामनाद्यवतारयाच्ञादिकार्पण्यं कथं वाऽस्मिन्नेव कदाचिद्भयपलायनादि अत आह । को वेत्तीति । अन्वर्थैः संबोधनैर्दुर्ज्ञेयत्वमेवाह । भूमन्नित्यादिभिः । भवत ऊतीर्लीलास्त्रिलोक्यां को वेत्ति क्व वा कथं वा कदा वा कति वेति

सुरेष्वृषिष्वीश तथैव नृष्वपि तिर्यक्षु यादस्स्वपि तेऽजनस्य ॥ जन्मासतां दुर्मदनिग्रहाय प्रभो विधातः सदनुग्रहाय च ॥ २० ॥
को वेत्ति भूमन्भगवन्परात्मन्योगेश्वरोतीर्भवतस्त्रिलोक्याम् ॥ क्व वा कथं वा कति वा कदेति विस्तारयन्क्रीडसि योगमायाम् ॥२१॥
तस्मादिदं जगदशेषमसत्स्वरूपं स्वप्नाभमस्तधिषणं पुरुदुःखदुःखम् ॥ त्वय्येव नित्यसुखबोधतनावनंते मायात उद्यदपि यत्सदिवावभाति ॥ २२ ॥ एकस्त्वमात्मा पुरुषः पुराणः सत्यः स्वयंज्योतिरनंत आद्यः ॥ नित्योऽक्षरोऽजस्रसुखो निरंजनः पूर्णोऽद्वयो मुक्त उपाधितोऽमृतः ॥ २३ ॥

अचिंत्यं तव योगमायावैभवमिति भावः ॥ २१ ॥ ननु भवत्ववताराणामचिंत्यो महिमा प्रपंचस्य ह्यसत्त्वे कथं सत्त्वप्रतीतिरितीमामाशंकां सपरिकरमुपसंहरन्परिहरति । तस्मादिति । अस्तधिषणं निरस्तप्रतिभासं त्वय्येवोद्यदुद्भवदपि यन्नश्यत् सदिवेत्युपलक्षणमेतत् । नित्यमिव सुखमिव चेतनमिव चाधिष्ठानभूतस्य तव गुणैस्तथा तथा भातीत्यर्थः ॥ २२ ॥ त्वमेव तु सत्य इत्याह । एकस्त्वं सत्यः । कुतः आत्मा । दृश्यमसत्यं दृष्टं न चात्मा दृश्योऽतः सत्यः । किंच यद्विकारवत्तदसत्यं न च त्वयि

व याच अवतारांमध्यें कधींकधीं भयानें कां पळावें लागलें, असें म्हणशील तर– हे व्यापका, भगवंता, परमात्म्या, योगेश्वरा, जेव्हां तूं आपली योगमाया पसरून क्रीडा करितोस तेव्हां तुझ्या लीला, या त्रैलोक्यामध्यें, कोठें, कशा, किती व केव्हां होतात हें कोण जाणत आहे ? कोणीच नाहीं. एतावता तुझ्या योगमायेचें वैभव अचिंत्य आहे ॥ २१ ॥ तस्मात् अनंत आणि सत्यज्ञानानंदरूपी अशा तुझेठिकाणीं प्रतीतीला येणारें हें सर्व जग, स्वप्नाप्रमाणें मिथ्याभूत, ज्ञानशून्य, बहुत दुःखांनीं युक्त असल्यामुळें उत्तरोत्तर दुःखरूप आणि मायेच्या योगानें उत्पन्न होऊन नाश पावणारें असल्यामुळें नश्वर आहे तथापि याला अधिष्ठानभूत असलेल्या तुझ्या सत्तेनें हें खोटें असून खऱ्यासारखें, अनित्य असून नित्यासारखें, दुःखरूप असून सुखासारखें व जड असून चेतनासारखें भासतें ॥ २२ ॥ हे परमेश्वरा, तूं मात्र एक आत्मा (द्रष्टा) असल्यामुळें परमार्थरूप सत्य आहेस. पुरातन व अंतर्यामी असल्यामुळें आद्य (प्रपंचाच्या पूर्वींहि असणारा) आहेस. नित्य असल्यामुळें अस्तित्वलक्षण

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विकारानें रहित आहेस. पूर्ण, नित्यानंदरूप, अक्षर व अमृत असल्यामुळें वृद्धि, विपरिणाम, अपक्षय व विनाश यांनीं रहित आहेस, अनंत व अद्वय असल्यामुळें देशादिपरिच्छेदरहित आहेस. तसाच स्वप्रकाश, निर्मल व उपाधिरहित असल्यामुळें उत्पत्ति, प्राप्ति, विकृति व संस्कार यांनीं रहित आहेस ॥ २३ ॥ अशाप्रकारच्या सर्व जीवांच्याहि स्वरूपभूत तुज भगवंताला जे पुरुष, गुरुरूपी सूर्यापासून प्राप्त झालेल्या उपनिषज्जन्य ज्ञानरूप उत्तम नेत्राच्या योगानें आपल्या अंतर्यामिस्वरूपानें पाहतात ते पुरुष, संसाररूप जो खोटा समुद्र त्याला तरल्यासारखे होतात ॥ २४ ॥ असें ह्मणण्याचें कारण कीं,—जे पुरुष आत्म्यालाच खऱ्या स्वरूपानें जाणत नाहींत

जन्मादयो विकाराः संतीत्याह । आद्यः कारणं अतो न जन्म । आद्यत्वे हेतुः । पुराणः पुरापि नवः कार्यात्पूर्वमपि वर्तमान इत्यर्थः । अत्र हेतुः पुरुष इति । तथाच श्रुतिः । पूर्वमेवाहमिहासमिति तत्पुरुषस्य पुरुषत्वमिति । जन्मानंतरास्तित्वलक्षणं विकारं वारयति । नित्य इति । सनातन इत्यर्थः । पूर्णोऽजस्रसुखोऽक्षरोऽमृत इति चतुर्भिः पदैः क्रमेण वृद्धिविपरिणामापक्षयविनाशान्वारयति । पूर्णत्वे हेतुः । अनंतोऽद्वय इति च । देशकालपरिच्छेदरहितो वस्तुपरिच्छेदरहितोऽपि । अमृतत्वोपपादनाय चतुर्विधक्रियाफलत्वं वारयति स्वयंज्योतिर्निरंजन उपाधितो मुक्त इति पदत्रयेण । अयं भावः । तत्रोत्पत्तिराद्य इत्यनेनैव निराकृता । प्राप्तिरपि क्रियया ज्ञानेन वा भवेत् क्रियया प्राप्तिरात्मपदेनैव निराकृता । ज्ञानतः प्राप्तिं वारयति । स्वयंज्योतिरिति । विकृतिरपि तुषापाकरेणेनावघातेन व्रीहीणामिवोपाध्यपाकरणेन भवेत्तत्त्वसंगत्वान्न संभवतीत्याह । मुक्त उपाधित इति । संस्कारोऽपि किमप्यतिशयाधानेन मलापाकरणेन वा तत्रातिशयाधानं पूर्णत्वेनैव निराकृतम् । मलापाकरणं निवारयति । निरंजन इति । निर्मल इत्यर्थः ॥ २३ ॥

एवंविधं त्वां सकलात्मनामपि स्वात्मानमात्मात्मतया विचक्षते ॥ गुर्वर्कलब्धोपनिषत्सुचक्षुषा ये ते तरंतीव भवानृतांबुधिम् ॥ २४॥
आत्मानमेवात्मतया विजानतां तेनैव जातं निखिलं प्रपंचितम् ॥ ज्ञानेन भूयोऽपि च तत्प्रलीयते रज्ज्वामहेर्भोगभवाभवौ यथा ॥२५॥
अज्ञानसंज्ञौ भवबंधमोक्षौ द्वौ नाम नान्यौ स्त ऋतज्ञभावात् ॥ अजस्रचित्यात्मनि केवले परे विचार्यमाणे तरणाविवाहनी ॥ २६ ॥

तस्मादेवंभूतज्ञानान्मुच्यंत इत्याह । एवंविधमिति । त्वां ये विचक्षते सम्यक् पश्यंति । कथम् । आत्मात्मतया आत्मा प्रत्यक् तस्य स्वरूपेण नचैतत्पुत्रादिष्विव गौणमित्याह । सकलात्मनामपि स्वात्मानम् । केन । गुरुरेवार्कस्तस्माल्लब्धा उपनिषज्ज्ञानं तदेव सुचक्षुस्तेन भव एवानृतांबुधिस्तं ते तरंतीव ॥ २४ ॥ तत्र च ज्ञानेन तरंतीति तच्च तरंतीवेति तच्चात्मात्मतया ज्ञानेनेत्यर्थत्रयं प्रतिज्ञातं क्रमेणोपपाद्यते । तत्रात्मानमेवात्मतयेत्यनेन श्लोकेन ज्ञानेन तरंतीत्युपपाद्यते । अज्ञानसंज्ञावित्यनेन तरंतीवेत्येतत् त्वामित्यादिश्लोकद्वयेन त्वात्मात्मतयेत्येतदुपपाद्यते । ननु ज्ञानेन कथं भवं तरंतीति तस्याज्ञानमूलत्वादित्याह । आत्मानमेवेति । तेनैवाज्ञानेनैव । प्रपंचितं प्रपंचः । रज्ज्वामहेर्भोगभवाभवौ सर्पशरीरस्याध्यासापवादौ यथेति ॥ २५ ॥ ननु ज्ञानेन तरंत्येव किमिदमुच्यते तरंतीवेति तत्राह । अज्ञानसंज्ञाविति । अज्ञानेन संज्ञा ययोस्तौ भवबंधमोक्षौ भवेन बंधस्तन्मोक्षश्च तौ द्वौ नाम प्रसिद्धौ । ऋतज्ञभावात् ऋतश्चासौ ज्ञश्च यो भावस्तस्मादन्यौ न स्तः । ननु कथं महानपलापः क्रियते परमार्थविचारादित्याह ।

त्यांना त्या अज्ञानेंकरूनच त्या आत्म्याचेठिकाणीं अहंताममतादिरूप सर्व प्रपंच प्राप्त झाला आहे, तो प्रपंच, पुनरपि त्या आत्मस्वरूपाच्या खऱ्या ज्ञानेंकरूनच, जसा दोरीच्या अज्ञानानें दोरीवर भासलेला सर्पदेह पुन्हा दोरीच्या खऱ्या ज्ञानानेंच नाहींसा होतो त्याप्रमाणें नाहींसा होतो ॥ २५ ॥ आतां ज्ञानानें तरतातच असें असतां तरल्यासारखे होतात असें कां ह्मटलें? तर—संसाराच्या योगानें जो बंध व त्यापासून जो मोक्ष हे दोन्हीहि, प्रसिद्धपणें अज्ञानानेंच त्या नांवांस पावले आहेत. ते—जसे सूर्याचेठिकाणीं रात्र आणि दिवस हे भेद मुळींच नाहींत त्याप्रमाणें अखंडानुभवरूप केवळ शुद्ध आत्म्याचा विचार केला असतां, त्या सत्यज्ञानस्वरूपाहून ॥ ५१ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

निराळे मुळींच नाहींत ॥ २६ ॥ आतां परमार्थाच्या ज्ञानानें अज्ञानापासून झालेला बंध निवृत्त होऊंदे; परमात्म्याचें स्वात्मत्वेंकरूनच ज्ञान झालें पाहिजे असा कां हा आग्रह ? असें ह्मणशील तर–देहाभिमानरूप भ्रमानें आपलें खरें स्वरूप भासत नाहींसें जेथें झालें आहे, त्या शरीरामध्येंच भ्रमनिरासपूर्वक आत्मज्ञान होणें योग्य आहे, हा अर्थ विस्मयानें आक्रोशपूर्वक ब्रह्मदेव सांगतो–हे प्रभो, तुज परमात्म्याचेठिकाणीं देहादिकांचा अध्यास करून व देहादिकांचेठिकाणीं आत्म्याचा अध्यास करून (तादात्म्य मानून), त्या अध्यासानें आत्मस्वरूप समजेनासें झालें ह्मणजे नष्ट झालेल्या आत्म्याचा पुन्हा बाहेर शोध करावयाचा ! तेव्हां अज्ञानीजनांचा किती हा मूढपणा ! ! घरांत सांडलेली वस्तु रानांत शोध करून सांपडत्ये काय ? नाहींच सांपडत ॥ २७ ॥ यास्तव हे अनंता, या चैतन्यजडात्मक शरीरामध्येंच जडाचा अपवाद करणारे विवेकी

अजस्रेति । अखंडानुभवरूपे परे शुद्धे आत्मन्यज्ञानं न च बंधः । अतएव न ज्ञानं न च मोक्षः तरणौ सूर्ये रात्र्यहनी इवेति ॥ २६ ॥ ननु परमार्थज्ञानादज्ञानकृतो बंधो निवर्ततामात्मात्मतयैव ज्ञानादिति कोऽयमाग्रह इत्याशंक्य यदध्यासादात्मनः पररूपास्फूर्तिस्तदपवादेन तत्रैव ज्ञानं युक्तमितीममर्थं विस्मयेनाक्रोशन्निवाह । त्वामिति । त्वामात्मानं परं देहादिं मत्वा आत्मनि देहादिमध्यस्य तथा परं देहादिमात्मानं मत्वा देहादावात्मानमध्यस्यात्र नष्ट आत्मा बहिर्मृग्य इति चित्रम् । न हि गृहे नष्टं वने मृग्यत इत्यर्थः ॥ २७ ॥ विवेकिनस्तु प्रत्यक्स्वरूपे एव परमात्मानं विचिन्वंतीत्याह । अंतर्भव इति । भवतीति भवश्चिज्जडात्मकं शरीरं तन्मध्य एव त्वां मृगयंति । अतज्जडं त्यजंतोऽपव-

त्वामात्मानं परं मत्वा परमात्मानमेव च ॥ आत्मा पुनर्बहिर्मृग्य अहोऽज्ञजनताज्ञता ॥ २७ ॥ अंतर्भवेऽनंत भवंतमेव ह्यतत्त्यजंतो मृगयंति संतः ॥ असंतमप्यंत्यहिमंतरेण संतं गुणं तं किमुयंति संतः ॥ २८ ॥ अथापि ते देव पदांबुजद्वयप्रसादलेशानुगृहीत एव हि ॥ जानाति तत्त्वं भगवन्महिम्नो न चान्य एकोऽपि चिरं विचिन्वन् ॥ २९ ॥

दंतः । ननु सतो ज्ञानेनालं किमसतोऽपवादेनेत्याशंक्याध्यस्तापवादं विनाऽधिष्ठानतत्त्वं न ज्ञायत इति सतां व्यवहारेणाह । असंतमिति । अंति समीपे असंतमप्यहिमंतरेण तन्निषेधं विनेत्यर्थः । संतं गुणं रज्जुं संतः किमुयंति जानंति । अंति संतमपि गुणमिति वा न जानंतीत्यर्थः । तस्मादात्मात्मतयैव ज्ञानान्मुक्तिरिति भावः ॥ २८ ॥ नन्वेवं ज्ञानैकसाध्ये मोक्षे किमिति भक्तिरुद्घोषिताऽत आह । अथापीति । यद्यपि हस्तप्राप्यमिव ज्ञानमुक्तं तथापि हे देव तव पादांबुजद्वयमध्ये एकदेशस्यापि यः प्रसादलेशोऽपि तेनानुगृहीत एव भगवतस्तव महिम्नस्तत्त्वं जानाति । हे भगवंस्ते महिम्नस्तत्त्वमिति वा । एकोऽपि कश्चिदपि चिरमपि विचिन्वन्नप्यतदंशापवादेन विचारयन्नपीत्यर्थः ॥ २९ ॥

पुरुष, तुझ्याशीं आपल्या अभिन्नपणानें तुझाच शोध करितात. आतां सत्स्वरूपाचें ज्ञान झालें ह्मणजे पुरे, जडपदार्थांचा अपवाद कशाला केला पाहिजे ? असें ह्मणशील तर–जवळ नसलेल्याहि सर्पाचा निषेध केल्याखेरीज जवळ असलेल्याहि रज्जूला, विवेकी पुरुष जाणतात काय ? नाहींच जाणत. तस्मात् अंतर्यामी आत्म्याशीं अभिन्नत्वेंकरूनच तुझें ज्ञान झालें असतां मुक्ति होत्ये; नाहीं तर होत नाहीं ॥ २८ ॥ तर मग अशा ज्ञानानेंच साध्य होणाऱ्या मोक्षाविषयीं भक्ति काय ह्मणून सांगितलीस असें ह्मणशील ? तर– हे देवा, जरीहि ज्ञान हस्तप्राप्य असल्यासारखें सांगितलें तथापि तुझ्या चरणकमलद्वयाच्या प्रसादलेशानें अनुग्रह केलेलाच पुरुष, तुजभगवंताच्या महिम्याचें तत्त्व जाणतो, दुसरा (तुझी भक्ति न करणारा) एकहि पुरुष, एकांतीं वास करून जडपदार्थांच्या अपवादानें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शास्त्रबलानें फारवेळपर्यंत विचार करीत असला तरी जाणत नाहींच ॥ २९ ॥ हे नाथा, यास्तव या ब्रह्मजन्मामध्यें किंवा कर्मवशेंकरून पश्वादियोनींमध्यें प्राप्त होणाऱ्या जन्मामध्यें, तेंच मला मोठें भाग्य प्राप्त होवो कीं,– ज्या भाग्याच्या योगानें, तुझ्या भक्तजनामध्यें कोणीतरी एखादा यःकश्चित् भक्त होऊन, तुझ्या चरणपल्लवाचें अत्यंत सेवन करीन ॥ ३० ॥ आतां देवादिकांच्या जन्मांपेक्षां कोठेंतरी तुझ्या भक्तीनें युक्त असलेलेंच जन्म श्रेष्ठ आहे, अशा उत्सुकतेनें सात श्लोकांनीं भक्तांच्या जन्माचें अभिनंदन करितो– अहो ! या गोकुलसंबंधी गाई व गोपी ह्या अतिधन्य (कृतार्थ) आहेत. कारण, हे सर्वव्यापका, ज्या तुझ्या तृप्तीविषयीं सर्वहि यज्ञ, अजूनहि शक्तिमान् झाले नाहींत त्या प्रतिक्षणीं तृप्त होणाऱ्या तूं, वत्सांच्या व वत्सपालांच्या स्वरूपानें ज्या गाईगोपींचें स्तनसंबंधी अमृतासारखें गोड दूध मोठ्या हर्षानें प्राशन केलें आहेस ॥ ३१ ॥ अहो ! नंदगोपाच्या गोकुळामध्यें राहणाऱ्या गाईगोपीवगैरे सर्वांचें केवढें तरी मोठें (अवर्णनीय) भाग्य हें ! ! कारण, जें परमानंदरूपी सनातन पूर्ण ब्रह्म

तत्तस्मात् भूरिभागो महद्भाग्यम् । अत्र भवे ब्रह्मजन्मनि तिरश्चामपि मध्ये यज्जन्म तस्मिन्वा येन भाग्येन भवदीयानां जनानामेकोऽपि यःकश्चिदपि भूत्वा निषेवेऽत्यर्थं सेवेय इति ॥ ३० ॥ देवादिजन्मनोऽपि यत्र कुत्रचित्त्वद्भक्तिमज्जन्मैव श्रेष्ठमित्यौत्सुक्येन सप्तभिः श्लोकैरभिनंदति । अहोऽतिधन्या इत्यादिभिः । व्रजगोरमण्यः व्रजस्था गावो रमण्यो गोप्यश्च । ते त्वया वत्सतरात्मजात्मना वत्सानामात्मजानां च रूपेण यस्य तव तृप्तये सर्वेऽपि यज्ञा अद्यापि न शक्तास्तेन त्वया प्रतिक्षणं तृप्यता यासां स्तन्यममृतरूपं पीत-

तदस्तु मे नाथ स भूरिभागो भवेऽत्र वाऽन्यत्र तु वा तिरश्चाम् ॥ येनाहमेकोऽपि भवज्जनानां भूत्वा निषेवे तव पादपल्लवम् ॥३०॥ अहोऽतिधन्या व्रजगोरमण्यः स्तन्यामृतं पीतमतीव ते मुदा ॥ यासां विभो वत्सतरात्मजात्मना यत्तृप्तयेऽद्यापि न चालमध्वराः ॥ ३१ ॥ अहो भाग्यमहो भाग्यं नंदगोपव्रजौकसाम् ॥ यन्मित्रं परमानंदं पूर्णं ब्रह्म सनातनम् ॥३२॥ एषां तु भाग्यमहिमाऽच्युत तावदास्तामेकादशैव हि वयं बत भूरिभागाः ॥ एतद्धृषीकचषकैरसकृत्पिबामः शर्वादयोऽङ्घ्र्युदजमध्वमृतासवं ते ॥ ३३ ॥

मिति ॥ ३१ ॥ अहो इति पुनरुक्त्या भाग्यस्य सर्वथापरिच्छिन्नत्वमुक्तम् ॥ ३२ ॥ किंच । एषां भाग्यस्य तावन्महिमा आस्तां कस्तं वक्तुं शक्नोति । शर्वादयः शर्वोऽहंकाराधिष्ठाता आदिर्येषां चंद्रादीनामेकादशानां ते तथा वयं च । वयमित्यात्मानमेव बहुमन्यमान आह । एवं मनोबुद्ध्यहंकारचक्षुराद्यधिष्ठातारस्त्रयोदश देवा एव तावद्धताहो भूरिभागाः यस्मादेतेषां हृषीकाणींद्रियाण्येव चषकाणि पानपात्राणि तैस्ते चतुर्दशस्य चित्ताधिष्ठातुरंघ्री एव उदजे वारिजे तयोर्मधु मकरंदस्तदेवामृतं स्वाद्वासवं मादकं पिबामः । एतदुक्तं भवति । यदा प्रत्येकमिंद्रियाभिमानिनो वयं कीर्तिसौंदर्यसौगंध्याद्येकदेशसेविनोऽपि कृतार्थास्तदा सर्वेंद्रियैः सर्वसेविनामेतेषां किं वर्ण्यते भाग्यमिति ॥ ३३ ॥

तें आपला मनवाणी इत्यादिकांना अगोचरपणावगैरे स्वभाव टाकून देऊन ज्यांचें मित्र झालें आहे, त्यांचें भाग्य जितकें वर्णन करावें तितकें थोडेंच आहे ॥ ३२ ॥ हे अच्युता, या गोकुळवासी लोकांच्या भाग्याचा महिमा आदीं असूंदे, कोण त्याचें वर्णन करूं शकेल ! परंतु अहंकार, बुद्धि, मन व दहा इंद्रियें या तेरांच्या अधिष्ठात्या रुद्रादिक तेरा देवतांपैकीं आह्मी अकराच[1] देवता मोठ्या भाग्यवंत आहों यांत संशय नाहीं. कारण, आह्मी, ह्या गोकुळवासी लोकांच्या इंद्रियरूप पानपात्रांच्या (पेल्यांच्या) योगेंकरून चित्ताधिष्ठात्या तुज वासुदेवाच्या अमृतासारख्या गोड व आसवासारख्या मादक अशा चरणकमलसंबंधीं मकरंदाचें वारंवार प्राशन करितों. यावरून जर प्रत्येक इंद्रियांच्या अभिमानी आह्मी देवता, तुझ्या– कीर्ति, सौंदर्य, सौगंध्य, इत्यादिक एकक गुणाचें सेवन केल्यानें कृतार्थ आहों, तर सर्व इंद्रियांनीं सर्वगुणाचें सेवन कर- ॥ ५२ ॥

---

१ दहा इंद्रियें, मन, बुद्धि व अहंकार यांच्या तेरा देवता असून त्यांतील पायु व उपस्थ या दोन इंद्रियांचा उपयोग सेवेविषयीं नसल्यामुळें त्यांच्या देवता सोडून मुळांत अकरा असें ह्मटलें आहे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

णाऱ्या ह्या व्रजवासी लोकांचें भाग्य काय वर्णन करावें ! ॥ ३३ ॥ यास्तव पूर्वी ज्याची मी प्रार्थना केली आहे तें बहुत भाग्यानें युक्त असें, या मनुष्यलोकीं, त्यामध्येंहि वृंदावनामध्यें, त्यांतहि गोकुळांत कृमिकीटादिक कोणतेंतरी जन्म मला प्राप्त होवो. ह्मणजे या गोकुळवासी लोकांतील कोणाच्या तरी चरणरजाचा अभिषेक मजवर होईल. आतां गोकुळवासी लोकच धन्य कां? असें ह्मणशील तर– ज्याच्या चरणरजाचा श्रुतिसुद्धां अजून शोध करीत आहेत तो तूं भगवान् श्रीकृष्ण, ज्या गोकुळवासी लोकांचें स्त्रीपुत्रगृहादिकांसहित आयुष्य हि झाला आहेस ह्मणून ते कृतार्थ आहेत ॥ ३४ ॥ आतां तें ह्या गोकुळवासी लोकांचें कृतार्थत्वतरी किती वर्णन करावें ! कीं, ज्यांच्या भक्तीनें षड्गुणैश्वर्यसंपन्नहि तूं, ऋण्यासारखा होऊन राहिला आहेस. आतां तूं ह्मणशील कीं, मी त्यांना हवें तें देण्यास समर्थ नाहीं काय ? कीं ज्याच्या

अतो मया प्रार्थितं तदस्तु मे नाथ स भूरिभाग इति यत्तदेतदेवेत्याह । तद्भूरिभाग्यमिति । किं तत् । इह मनुष्यलोके यत्किमपि जन्म तत्राप्यटव्यां यत्तत्रापि गोकुले यत् । अहो सत्यलोकं विहायात्र जन्मनि जाते को लाभोऽत आह । अपि कतमांघ्रिरजोऽभिषेकमिति । गोकुलवासिनां मध्येऽपि कतमस्य यस्यकस्याप्यंघ्रिरजसाऽभिषेको यस्मिंस्तत् । ननु कुतो गोकुलवासिन एव धन्यास्तत्राह । यदिति । येषां जीवितं निखिलं भगवान्मुकुंदः । मुकुंदपरमेव जीवनमित्यर्थः । दुर्लभतामाह । अद्यापीति । श्रुतिमृग्यं वेदैरपि मृग्यत एव न तु दृश्यत इत्यर्थः ॥ ३४ ॥ अपिच किं वर्ण्यते कृतार्थत्वमेतेषां येषां भक्त्या भवानपि ऋणीवास्ते । ननु किं दातुमसमर्थोऽहं येन ऋणी स्यामत आह । उत

तद्भूरिभाग्यमिह जन्म किमप्यटव्यां यद्गोकुलेऽपि कतमांघ्रिरजोभिषेकम् ॥ यज्जीवितं तु निखिलं भगवान्मुकुंदस्त्वद्यापि यत्पदरजः श्रुतिमृग्यमेव ॥ ३४ ॥ एषां घोषनिवासिनामुत भवान्किं देव रातेति नश्चेतो विश्वफलात्फलं त्वदपरं कुत्राप्ययन्मुह्यति ॥ सद्वेषादिव पूतनाऽपि सकुला त्वामेव देवापिता यद्धामार्थसुहृत्प्रियात्मतनयप्राणाशयास्त्वत्कृते ॥ ३५ ॥ तावद्रागादयः स्तेनास्तावत्कारागृहं गृहम् ॥ तावन्मोहोंऽघ्रिनिगडो यावत्कृष्ण न ते जनाः ॥ ३६ ॥

अपि भवानपि एषां कुत्रापि किं विश्वफलात्सर्वफलात्मकात्त्वत्त्वत्तः परं फलं राता दास्यतीति नश्चेतः अयत्सर्वत्र गच्छद्विचारयत् मुह्यति । ननु मामेव दत्त्वाऽनृणः स्यामिति चेन्नहि नहि । सद्वेषादिव सतां भक्तानां यो वेषस्तदनुकरणमात्रेण पापिष्ठा पूतनाऽपि त्वामेवापिता प्रापिता । तर्हि तत्संबंधिनामपि दास्यामीति चेत्तत्राह । सकुलेति । बकाघासुरसहिता एषामपि तावदेव चेदपर्याप्तमित्याह । यदिति । येषां धामादयस्त्वत्कृते त्वदर्थमेवेत्यर्थः ॥ ३५ ॥ ननु वीतरागादिदोषाणां संन्यासिनामपि न मत्तः परं किंचिदस्ति कथमेषामपर्याप्तमित्यत आह । तावदिति । हे कृष्ण रागादयस्तावदेव स्तेनाश्चोरा भवंति । तथा तावद्गृहमपि कारागृहं बंधनागारम् । मोहोऽपि तावदे-

योगानें त्यांचा ऋणीराहीन, तर– हे देवा, हवें तें देण्यास समर्थ असाहि तूं, ह्या गोकुळवासी लोकांना सर्वफलात्मक आत्मस्वरूपाहून दुसरें फळ काय देणार आहेस? याविषयीं आमचें चित्त सर्वठिकाणीं विचारानें संचार करीत असतांहि मोह पावतें. आतां माझें स्वरूपच देऊन मी त्यांचा अनृणी होईन असें ह्मणशील तर–नाहीं नाहीं. कारण, भक्तांच्या वेषाचा स्वीकारमात्र करणारी पापिष्ठ पूतना राक्षसीहि तूं आपल्या स्वरूपालाच पोंचविली आहेस. तर तेंच फळ यांच्या भक्तीला योग्य आहे काय ? नाहीं. आतां यांच्या संबंधी लोकांनाहि मी आत्मस्वरूप देईन असें ह्मणशील तर–त्या पूतनेला अघासुरबकासुरादिक कुळासहवर्तमानच तूं आत्मस्वरूप दिलें आहेस, तर यांनाहि जर तेंच फळ देणें आहे तर तें अपुरें आहे. कारण, ज्या गोकुळवासी लोकांचीं घरें, धनें, मित्र, स्त्री पति इत्यादिक, देह, पुत्र, प्राण व अंतःकरणें हीं सर्व तुझ्याकरितांच आहेत. तेव्हां अशा निःसीम भक्तांना, प्राणघातकी राक्षसांना दिलेलेंच फळ द्यावयाचें काय ? ॥ ३५ ॥ आतां वीतरागी अशा संन्याशांनाहि माझाहून दुसरें फळच

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नाहीं, मग यांनाच तें अपुरें कसें होईल ? असें ह्मणशील तर–हे कृष्णा, जोंपर्यंत तुला लोक अनन्यशरण झाले नाहींत तोंपर्यंतच त्यांच्या विवेकधैर्यादिक धनाची रागलोभादिक चोर चोरी करितात, तोंपर्यंतच त्यांना घर हें बंदिगृहासारखें होतें व तोंपर्यंतच मोह हा त्यांना पायांत घातलेल्या बेडीसारखा अवरोधक होतो. तुझ्या भक्तांचेतर रागमोहादिक शत्रुहि तुझ्या भजनाविषयीं विशेष साधन होतात, ह्मणून हे गोकुलवासी वीतरागी व संन्याशी यांच्यामध्यें कांहींच विशेष नसून यांचें भजन मात्र अधिक आहे ॥ ३६ ॥ ह्मणूनच मी यांचा पुत्रादिरूपी झालों आहें, असें ह्मणशील तर–हे प्रभो, प्रपंचातीत असाहि तूं आपणास शरण आलेल्या लोकांना उत्तरोत्तर आनंदच प्राप्त होतात असें प्रसिद्ध करण्याकरितां या भूमीवर पुत्रादिरूपी प्रपंचाचें अनुकरण करितोस. एतावता कपटानें स्वीकारलेल्या पुत्रत्वादिकेंकरून त्यांच्या खऱ्या निःसीम भक्तीचें आनृण्य होत नाहीं ॥ ३७ ॥ याप्रमाणें पहिल्यापासून आरंभ करून ‘ अनंत गुण असल्यामुळें ’ भगवंताचें आपणास दुर्ज्ञेयत्व सांगून, आतां जे कोणी

वांघ्रिनिगडः पादशृंखला । यावत्ते त्वदीया जना न भवंति । त्वदीयानां तु रागादयोऽपि त्वन्निष्ठा मोचका एवेति न यतिभ्यो विशेषो भजनं त्वधिकमिति भावः ॥ ३६ ॥ नन्वतएवाहमेषां पुत्रादिरूपेण वर्ते इति चेत्तत्राह । प्रपंचमिति । प्रपन्ना या जनता जनसमूहस्तस्या आनंदानां संदोहं समूहं प्रथयितुमिति । न हि कपटपुत्रत्वादिना तादृग्भक्तेरानृण्यं संपद्यत इत्यर्थः ॥ ३७ ॥ तदेवमादित आरभ्याचिंत्यानंतगुणत्वेन स्वयं दुर्ज्ञेयत्वमुक्तं केचित्तु जानीम इति स्थितास्तानुपहसन्निवाह । जानंत इति । न तु मे

प्रपंचं निष्प्रपंचोऽपि विडंबयसि भूतले ॥ प्रपन्नजनतानंदसंदोहं प्रथितुं प्रभो ॥ ३७ ॥ जानंत एव जानंतु किं बहूक्त्या न मे प्रभो ॥ मनसो वपुषो वाचो वैभवं तव गोचरः ॥ ३८ ॥ अनुजानीहि मां कृष्ण सर्वं त्वं वेत्सि सर्वदृक् ॥ त्वमेव जगतां नाथो जगदेतत्तवार्पितम् ॥ ३९ ॥ श्रीकृष्ण वृष्णिकुलपुष्करजोषदायिन्क्ष्मानिर्जरद्विजपशूदधिवृद्धिकारिन् ॥ उद्धर्मशार्वरहर क्षितिराक्षसध्रुगाकल्पमार्कमर्हन्भगवन्नमस्ते ॥ ४० ॥

मनआदीनां तव वैभवं विषय इति ॥ ३८ ॥ जगदीशत्वाद्यभिमानं परित्यज्याह । अनुजानीहीति । स्वमहिमानमस्मदादीनां च ज्ञानबलादि सर्वं त्वमेव वेत्सि । यतः सर्वदृक् जगतां नाथस्तु त्वमेवेत्येतावज्ज्ञातमतो ममतास्पदं जगदेतच्छरीरं च तवार्पितम् ॥ ३९ ॥ तदेवं किंकरं प्रस्थापयेत्यत्यादरेण नमस्करोति । श्रीकृष्णेति । वृष्णिकुलपद्मस्य प्रीतिदावृत्वेन हे सूर्योपम । क्ष्मा चावनिर्निर्जरा देवाश्च द्विजाश्च पशवश्च त एवोदधयस्तेषां वृद्धिकारित्वेन हे चंद्रोपम । उद्धर्मः पाखंडधर्मस्तदेव शार्वरं तमस्त-

---

आह्मी भगवंताला जाणितों असा अभिमान धारण करितात, त्यांचा उपहास केल्यासारखें सांगतो–हे प्रभो, तुझा महिमा आह्मी जाणतों असें जे ह्मणणारे आहेत तेच जाणोत. त्यांच्या पुष्कळ निंदेनें काय करावयाचें आहे ? माझ्या तर मनाला, देहाला, इंद्रियांना, व वाणीला तुझें वैभव विषय होत नाहीं, ह्मणजे तें वैभव चिंतनवगैरे करणाऱ्या माझ्या मनइत्यादिकांच्या अधिकाराबाहेरचें आहे ॥ ३८ ॥ आतां जगदीश्वरत्वादिक अभिमानांचा त्याग करून ह्मणतो कीं,– हे कृष्णा, तूं सर्वसाक्षी असल्यामुळें आपला महिमा व अस्मदादिकांचें ज्ञानबलादिक सर्वहि सामर्थ्य जाणत आहेस व अनंतकोटि ब्रह्मांडांचा स्वामीहि तूंच आहेस, इतकेंच मला समजतें, ह्मणून आतां ममतेचें स्थान असें हें जग व अहंपणाचें स्थान असें हें शरीरहि तुला अर्पण केलें आहे. आतां मला सत्यलोकीं जाण्यास आज्ञा दे ॥ ३९ ॥ याप्रकारेंकरून स्तुति करून ज्ञातांना अतिआदरानें बहुत संबोधनें देऊन नमस्कार करितो–यादवांचें कुळ हेंच जणूं सूर्यविकासी कमळ त्याला विकार देणाऱ्या हे सूर्योपमा, भूमि, देव, ब्राह्मण, व ॥ ५३॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

गाईवगैरे पशु हेच जणुं समुद्र त्यांना वृद्धि करणाऱ्या (भरतें आणणाऱ्या) हे चंद्रोपमा, पाखंडधर्म हाच जणुं रात्रिसंबंधी अंधकार त्याचा नाश करणाऱ्या हे चंद्र-सूर्योपमा आणि उदय पावतांच पृथ्वीवर असणाऱ्या कंसादिक राक्षसांचा द्रोह करणाऱ्या हे पुनरपि सूर्योपमा व हे सूर्यापर्यंत असलेल्या सर्वांनाहि पूज्य अशा षड्गुणैश्वर्यसंपन्ना श्रीकृष्णा, तुला कल्पपर्यंत नमस्कार असो ॥ ४० ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, जगत्स्रष्ट्या ब्रह्मदेवानें, याप्रमाणें सर्वव्यापक असूनहि जगाच्या हिताकरितां मनुष्यरूपानें विराजमान होणाऱ्या श्रीकृष्णाची स्तुति करून, तीन प्रदक्षिणा करून व त्याच्या चरणाचेठिकाणीं नमस्कार करून, सर्वलोकांनीं पूज्य अशा आपल्या सत्यलोकास गमन केलें ॥ ४१ ॥ श्रीकृष्णानेंहि आपला पुत्र अशा त्या ब्रह्मदेवाला सत्यलोकास जाण्याविषयीं आज्ञा देऊन, नंतर, पूर्वीच ब्रह्मदेवानें आणून

द्धरतीति तथा अनेन द्व्योपम। हे क्षितिराक्षसध्रुक् क्षितौ राक्षसाः कंसादयः उद्यन्नेव तेभ्यो द्रुह्यतीति पुनः सूर्योपम । सूर्याद्युपमाऽपि न्यूनेति मत्वाह । आर्कमर्कमभिव्याप्य सर्वेषामर्हन् पूज्य भगवन्नाकल्पं कल्पपर्यंतं ते तुभ्यं नम इति ॥ ४० ॥ ससखिवत्सकमोक्षणकौतुकद्रुतविलंबितपुत्रमुदेऽद्भुतम् ॥ निखिलरूपमतो दधदच्युतोऽवतु स वः कलयन् व्रजमंगलम् ॥ १ ॥ पादयोर्नत्वा । अभीष्टं सर्वतः पूजितमभिप्रेतं वा ॥ ४१ ॥ अनुज्ञाप्यानुज्ञां प्रदाप्य । पृष्टेत्यर्थः । स्वभुवं ब्रह्माणम् । यथा पूर्वं सखायो यस्मिंस्तत्स्वकं पुलिनम् ॥ ४२ ॥ नन्वेतावंतं कालं कथं तत्रैवोपविष्टाः कथं च क्षुत्पिपासादिविस्मरणमत आह । एकस्मिन्निति श्लोकद्वयेन । अब्देऽपि याते प्राणेशं कृष्णमं-

श्रीशुक उवाच ॥ इत्यभिष्टूय भूमानं त्रिः परिक्रम्य पादयोः ॥ नत्वाऽभीष्टं जगद्धाता स्वधाम प्रत्यपद्यत ॥ ४१ ॥ ततोऽनुज्ञाप्य भगवान्स्वभुवं प्रागवस्थितान् ॥ वत्सान्पुलिनमानिन्ये यथापूर्वसखं स्वकम् ॥ ४२ ॥ एकस्मिन्नपि यातेऽब्दे प्राणेशं चांतरात्मनः ॥ कृष्णमायाहता राजन्क्षणार्धं मेनिरेऽर्भकाः ॥ ४३ ॥ किं किं न विस्मरंतीह मायामोहितचेतसः ॥ यन्मोहितं जगत्सर्वमभीक्ष्णं विस्मृतात्मकम् ॥ ४४ ॥ ऊचुश्च सुहृदः कृष्णं स्वागतं तेऽतिरंहसा ॥ नैकोऽप्यभोजि कवल एहीतः साधु भुज्यताम् ॥ ४५ ॥ ततो हसन्हृषीकेशोऽभ्यवहृत्य सहार्भकैः ॥ दर्शयंश्चर्माजगरं न्यवर्तत वनाद्व्रजम् ॥ ४६ ॥

तरा च विनापि प्रियविरहे क्षणोऽपि वर्षाधिको भवति तथापि मायाहताः क्षणार्धं मेनिरे ॥ ४३ ॥ यया मायया मोहितं जगदभीक्ष्णं पुनःपुनर्विस्मृतात्मकं विस्मृत आत्मैव येन तत्तथा ॥ ४४ ॥ अतएवमूचुश्च ते त्वयाऽतिवेगेन स्वागतं सम्यगागतम् । एकोऽपि ग्रासस्त्वांविनाऽस्माभिर्नभोजि न भुक्तः । इत एहि साधु अविक्षेपेण भुज्यतामिति ॥ ४५ ॥ अभ्यवहृत्य भुक्त्वा ॥ ४६ ॥

ठेविल्यामुळें कोंवळ्या गवतावर चरत असलेल्या वत्सांना, पूर्वीप्रमाणें आपले सखे जेथें भोजन करित होते त्या आपल्या क्रीडासंपत्तियुक्त वाळवंटावर आणिलें ॥ ४२ ॥ आतां इतका वेळपर्यंत कसे तेथेंच राहिले होते ? व कसें त्यांना क्षुधातृषावगैरेंचें विस्मरण झालें ? असें ह्मणशील तर—हे राजा, कृष्णाच्या मायेनें मोहित झालेल्या त्या बालकांनीं, आपल्या प्राणापेक्षांहि प्रिय अशा त्या श्रीकृष्णावांचून एकवर्ष गेलें असतांहि तें अर्ध्या क्षणासारखें मानिलें ॥ ४३ ॥ हे राजा, मायेनें मोहित चित्त झालेले पुरुष, या जगामध्यें काय काय विसरणार नाहींत ? सर्वहि विसरतीलच. कारण, ज्या मायेनें मोहित झालेलें हें जग, शास्त्राचार्यांनीं बोध केला असतांहि वारंवार आपल्या स्वरूपाला विसरून जात आहे ॥ ४४ ॥ ह्मणूनच ते मित्र, श्रीकृष्णाला असें ह्मणाले कीं,— कृष्णा, तुझें अतित्वरेनें येणें झालें ही फार चांगली गोष्ट झाली. आह्मीतर तुझ्यावांचून अजून एकहि ग्रास भक्षण केला नाहीं. आतां ये आपल्या जाग्यावर, आणि स्वस्थपणें भोजन कर ॥ ४५ ॥ नंतर सर्वांतर्यामी तो श्रीकृष्ण हंसत हंसत त्या बालकांसहवर्तमान

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भोजन करून त्यांना अघासुराच्या शरीराचें कातडें दाखवीत दाखवीत त्यानें वनांतून गोकुलांत येण्याचा मार्ग धरिला ॥ ४६ ॥ नंतर, मोराचीं पिसें, पुष्पें व गेरू पिंवडीवगैरे नव्या धातूंच्या योगानें चित्रविचित्र अवयव दिसणारा, सुंदर मुरली, पानांचीं केलेलीं वाचें (पेपेरीं) व शिंगें यांच्या शब्दांनीं होणाऱ्या उत्साहानें युक्त, वत्सांना, लाडक्या लाडक्या ठेवलेल्या नांवांनीं बोलावणारा, अनुयायी बालकांनीं ज्याची पवित्र कीर्ति गाइली आहे व गोपींच्या दृष्टींना ज्याचें दर्शन आल्हादकारक होत आहे असा जो श्रीकृष्ण, गोकुलामध्यें प्रविष्ट झाला ॥ ४७ ॥ गोकुळांत गेल्यावर तेथें सर्व बालकांनीं असें सांगितलें कीं, यशोदानंदांचा पुत्र अशा या श्रीकृष्णानें वृंदावनामध्यें आज मोठा एक अजगर सर्प मारिला व त्यापासून आमचें रक्षण केलें ॥ ४८ ॥ राजा ह्मणाला– हे ब्रह्मनिष्ठा, गोकुळवासी लोकांचा एकवर्षपर्यंत आपल्या पुत्रां-

---

प्रोद्दामो वेण्वादिस्तस्य रवैरुत्सवस्तेनाढ्यः संपन्नः । गृणन्नुपलालनैराह्वयन् । गोपीदृशामुत्सवरूपा दृशिर्दर्शनं यस्य सः ॥ ४७ ॥ यशोदानंदसूनुनेति बहूनामुक्तिः सहैव दर्शिता । केचिदाहुर्यशोदासूनुना अपरे नंदसूनुनेति । यद्वा यशोदां नंदयतीति यशोदानंदः स चासौ सूनुश्चेति तथा तेन । अस्मान्महाव्यालाद्वयं चाविता रक्षिताः ॥ ४८ ॥ व्रजौकसां स्वतोकेषु स्नेहवल्ल्याब्दमन्वहम् ॥ शनैर्निःसीम ववृधे यथा कृष्णे त्वपूर्ववदित्यादिना स्वतोकेभ्योऽपि परपुत्रे कृष्णे प्रेमाधिक्यमुक्तं तत्र पृच्छति । ब्रह्मन्निति ॥ ४९ ॥

बर्हप्रसूनवनधातुविचित्रितांगः प्रोद्दामवेणुदलशृंगरवोत्सवाढ्यः ॥ वत्सान्गृणन्ननुगगीतपवित्रकीर्तिर्गोपीदृगुत्सवदृशिः प्रविवेश गोष्ठम्
॥ ४७ ॥ अद्यानेन महाव्यालो यशोदानंदसूनुना ॥ हतोऽविता वयं चास्मादिति बाला व्रजे जगुः ॥ ४८ ॥ राजोवाच ॥ ब्रह्मन्पराेद्भवे कृष्णे इयान्प्रेमा कथं भवेत् ॥ योऽभूतपूर्वस्तोकेषु स्वोद्भवेष्वपि कथ्यताम् ॥ ४९ ॥ श्रीशुक उवाच ॥ सर्वेषामपि भूतानां नृप स्वात्मैकवल्लभः ॥ इतरेऽपत्यवित्ताद्यास्तद्वल्लभतयैव हि ॥ ५० ॥ तद्राजेंद्र यथा स्नेहः स्वस्वकात्मनि देहिनाम् ॥ न तथा ममतालंबिपुत्रवित्तगृहादिषु ॥ ५१ ॥ देहात्मवादिनां पुंसामपि राजन्यसत्तम ॥ यथा देहः प्रियतमस्तथा न ह्यनु ये च तम् ॥ ५२ ॥

श्रीकृष्णस्य साक्षादात्मत्वात्तस्मिन्नात्मीयेभ्यः प्रेमाधिक्यं युज्यत इति वक्तुं प्रथमं तावदात्मनः स्वतः प्रेष्ठत्वमन्येषां तु तदुपाधिकमिति दर्शयति पंचभिः । सर्वेषामपीति ॥ ५० ॥ कुतः तथा दर्शनादित्याह । तदिति । तस्मादेव कारणात्स्वस्वकात्मन्यहंकारास्पदे देहे ॥ ५१ ॥ आत्माध्यासतारतम्येन प्रेमतारतम्यं दृश्यमानं तन्निबंधनमेवेति दर्शयितुं मूढामूढभेदेन विशेषमाह । देहात्मवादिनामिति द्वाभ्याम् । तं देहमनु भवंति ये पुत्रादयस्ते तु न तथा प्रियतमा इत्यर्थः ॥ ५२ ॥

पेक्षांहि, पुत्ररूपी झालेल्या श्रीकृष्णाचेठिकाणीं अपूर्व प्रेमा वाढला ह्मणून जें तुह्मीं सांगितलें त्याबद्दल अशी शंका येत्ये कीं,–लोकांमध्यें तर दुसऱ्याच्या अतिगुणवान्हि पुत्रांपेक्षां गुणहीन अशाहि आपल्या पुत्रांवर प्रेमा अधिक दिसतो, असें असतां गोकुळवासी लोकांना आपल्यापासून झालेल्या पुत्रांचेठिकाणींहि जो प्रेमा पूर्वीं झाला नाहीं, तो अनिर्वचनीय प्रेमा, दुसऱ्यापासून झालेल्या कृष्णाचेठिकाणीं कसा झाला? याचें कारण सांगावें ॥ ४९ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, सर्वहि प्राणिमात्रांना आपला आत्माच अतिप्रिय आहे. इतर पुत्रद्रव्यादिक तर त्या आत्म्याच्या सुखसाधनत्वेंकरूनच प्रिय आहेत स्वतः प्रिय नाहींत ॥ ५० ॥ यास्तव हे राजेंद्रा, प्राणिमात्रांना जशी आपापल्या अहंकारास्पद देहाचेठिकाणीं प्रीति असत्ये तशी ममतास्पद पुत्र, द्रव्य, गृह इत्यादिकांचेठिकाणीं असत नाहीं ॥ ५१ ॥ हे राजश्रेष्ठा, देह हाच आत्मा आहे असें बोलणाऱ्या ॥ ९४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुरुषांनाहि जसा देह अतिप्रिय आहे तसे त्या देहाला अनुसरून राहणारे जे पुत्रगृहादिक आहेत ते अतिप्रिय नाहींत ॥ ५२ ॥ आतां देहदेखील जड व अनात्मा असल्यामुळें गृहपुत्रादिकांप्रमाणेंच ममतेचा विषय आहे, मी आत्मा असें ह्मणण्याचा विषय नाहीं, असें जरी देहातीत आत्मदृष्टीनें ह्मटलें तरीहि हा (ममताविषयक) देह आत्म्यासारखा प्रिय नाहीं असेंच सिद्ध होतें. कारण, हा देह अगदीं मरणोन्मुख होऊन आतां वांचत नाहीं असा निश्चय झाला असतांहि, तेथें आत्म्याला वांचण्याची आशा बलवत्तर असते ह्मणजे त्या देहाचे-ठिकाणीं जें प्रेम आहे तें त्याहून निराळ्या आत्म्याचा अंश असून तो देहाशीं अध्यासानें संगत झाला आहे ह्मणून त्याचा देहाबरोबर होणारा अभाव कोणासहि आवडत नाहीं ॥ ५३ ॥ वास्तव सर्वेहि प्राण्यांनां आपापला आत्माच अतिप्रिय आहे आणि त्याच्या सुखाकरितांच चर (स्त्रीपुत्रादिक) अचर (गृहक्षेत्रादिक) हें सर्व जग प्रिय होत आहे

यद्यस्माज्जीर्यत्यप्यासन्नमरणेऽपि जीविताशा भवति । अयं भावः । न जीविष्यतीति निश्चितेऽपि देहे यत्प्रेमास्पदत्वं तदात्मगतमेव संगच्छत इति । अथवा यद्यस्मिन्देहे जीर्यत्यपि जीविताशा अविवेकदशायामासीत्साऽपि विवेकिनो यदा ममताभाग्भवति तदात्मवत्प्रियो न भवत्यतस्तत्र नातीवास्थेति ॥ ५३ ॥ तदर्थमेव सकलं प्रियमित्यर्थः ॥ ५४ ॥ प्रस्तुतमाह । कृष्णमेनमिति ॥ ५५ ॥ न केवलमात्मनामात्माऽपितु जडानामपीत्याह । वस्तुत इति । सर्वजगत्कारणमिति कृष्णं जानतां पुंसां स्थावरं

देहोऽपि ममताभाक्चेत्तर्ह्यसौ नात्मवत्प्रियः ॥ यज्जीर्यत्यपि देहेऽस्मिन् जीविताशा बलीयसी ॥ ५३ ॥ तस्मात्प्रियतमः स्वात्मा सर्वेषामपि देहिनाम् ॥ तदर्थमेव सकलं जगदेतच्चराचरम् ॥ ५४ ॥ कृष्णमेनमवेहि त्वमात्मानमखिलात्मनाम् ॥ जगद्धिताय सोऽप्यत्र देहीवाभाति मायया ॥ ५५ ॥ वस्तुतो जानतामत्र कृष्णं स्थास्नु चरिष्णु च ॥ भगवद्रूपमखिलं नान्यद्वस्त्विह किंचन ॥ ५६ ॥ सर्वेषामपि वस्तूनां भावार्थो भवति स्थितः ॥ तस्यापि भगवान्कृष्णः किमतद्वस्तु रूप्यताम् ॥ ५७ ॥ समाश्रिता ये पदपल्लवप्लवं महत्पदं पुण्ययशो मुरारेः ॥ भवांबुधिर्वत्सपदं परं पदं पदं पदं यद्विपदां न तेषाम् ॥ ५८ ॥

जंगमं च सर्वं भगवद्रूपं भगवानेव स्वरूपं यस्य तन्नान्यत् ॥ ५६ ॥ कुत इति तदाह । सर्वेषामिति । भावार्थः परमार्थः । भवतीति भवत्परिणामं प्राप्नुवत्कारणं तस्मिन् तस्यापि भवतः कारणस्यापि भगवान्कृष्णो भवत्कारणम् । अतः किमतत् श्रीकृष्णव्यतिरिक्तं वस्तु रूप्यताम् ॥ ५७ ॥ यस्माच्छ्रीकृष्णस्यैव परमार्थत्वात्तदेकशरणानामयत्नसिद्धो मोक्ष इति प्रकरणार्थमुपसंहरति । समाश्रिता इति । पुण्यं यशो यस्य स पुण्ययशाः स चासौ मुरारिश्च तस्य पदपल्लव एव प्लवस्तं ये सम्यगाश्रिताः । महत्पदं महतां-

---

॥ ५४ ॥ आतां आत्मा सर्वांना प्रिय होवो, कृष्ण कसा सर्वांना प्रिय झाला असें ह्मणशील तर– हे राजा, या कृष्णाला ' सर्व प्राणिमात्रांचा आत्मा आहे ' असें तूं जाण. तर तो इंद्रियगोचर कसा झाला ? असें ह्मणशील तर– तो सर्वात्माहि जगाच्या हिताकरितां आपल्या मायेनें या गोकुळांमध्यें मनुष्यरूपानें असल्यासारखा भासत आहे ॥ ५५ ॥ परंतु परमार्थदृष्टीनें श्रीकृष्णाला जाणणाऱ्या पुरुषांना, या संसारामध्यें स्थावरजंगमात्मक सर्वेहि जग, भगवद्रूपीच भासत असतें. त्याहून दुसरें या जगामध्यें काहींच भासत नाहीं ॥ ५६ ॥ कां ह्मटलें तर–सर्वेहि वस्तुमात्रांचा परमार्थ प्रकृतिरूप कारणाचेठिकाणीं असून त्या कारणाचेंहि कारण भगवान् श्रीकृष्ण आहे, वास्तव कृष्णाव्यतिरिक्त दुसरें वस्तु काय आहे सांग बरें ? ॥ ५७ ॥ ज्याअर्थीं श्रीकृष्णच परमार्थरूपी आहे त्याअर्थीं त्यालाच शरण जाणारांना यत्नांवांचून मोक्ष सिद्ध होतो असें सांगतो– सत्पुरुषांचा आश्रय अशा पवित्रकीर्ति श्रीकृष्णाच्या चरणपल्लवरूप नौकेचा ज्यांनीं आश्रय केला आहे त्यांना, भवसमुद्र वत्सपदासा-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रखा सुतर होतो, वैकुंठनांवाचें स्थान प्राप्त होतें, दुःखांचें स्थान जो संसार तो पुन्हा कधींहि प्राप्त होत नाहीं, ह्मणजे त्यांना पुनरावृत्ति होत नाहीं ॥ ५८ ॥ हे राजा, तूं भगवंताच्या लीलेविषयीं आश्चर्यानें जें कौमारावस्थेमध्यें भगवंतानें केलेलें अघासुराचें मोक्षण तें पौगंडावस्थेमध्यें बालकांनीं गोकुळांत कसें वर्णन केलें, याबद्दल जो प्रश्न मला केला होतास, त्याचें हें उत्तर सर्व मी तुला सांगितलें आहे ॥ ५९ ॥ राजा, जें हें श्रीकृष्णाचें मित्रांबरोबर खेळण्याचें चरित्र, अघासुराचें मोक्षण, वाळवंटामध्यें सख्यांबरोबर भोजन, जडप्रपंचाहून इतर असें शुद्धसत्त्वात्मक धारण केलेलें वत्सवत्सपालांचें स्वरूप व ब्रह्मदेवानें केलेलें स्तवन यांचें जो पुरुष, श्रवण किंवा पठण करितो तो पुरुष सर्वहि पुरुषार्थांना पावतो ॥ ६० ॥ याप्रमाणें कुमारावस्थेमध्यें योग्य अशा ‘ एकमेकांचीं शिंकीं चोरणेंवगैरे पूर्वीं सांगितलेल्या ’ विहारांनीं व दुसऱ्याहि

पदमाश्रयम् । यद्वा । महच्च तत्पदं चेति तथा । तेषां भवांबुधिर्वत्सपदमात्रं भवति किंच परं पदं श्रीवैकुंठाख्यं पदं स्थानं भवति । विपदां यत्पदं विषयस्तत्पुनः कदाचिदपि तेषां न भवति । न ततः पुनरावर्तंत इत्यर्थः ॥ ५८ ॥ ५९ ॥ सुहृद्भिश्चरितं मुष्णंतोऽन्योन्यशिक्यादीनित्यादिनोक्तम् । अघार्दनं च शाद्वले जेमनं भोजनं च व्यक्तेतरत् यक्ताज्जडप्रपंचादितरच्छुद्धसत्त्वात्मकं वत्सवत्सपालरूपम् । यद्वा व्यक्तेतरचिद्विलासस्तद्रूप्यत इति रूपम् । अजस्य उरुर्महानभिष्टवः स्तवस्तं ब्रह्मकृतां स्तुतिम् । एतच्छृण्वन्नृणन्गायन्नरः सर्वपुरुषार्थान्प्राप्नोति ॥ ६० ॥ ६१ ॥ इति श्रीपरमानंदनृसिंहपदषट्पदः ॥ व्याकरोच्छ्रीधरस्वामी यथामति विधिस्तुतिम् ॥ १ ॥ इति दशमपूर्वार्धटीकायां चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥ ॥ ततः पंचदशे धेनुपालनं धेनुकार्दनम् ॥ कालियक्ष्वेडतो गोपरक्षणं च निरूप्यते ॥ १ ॥ अहिवक्त्रप्रवेशेन वृथा खिन्नान्सखीनतः ॥ कृष्णः प्रावेशयत्पक्वफलं तालालिकाननम् ॥ २ ॥ पशुपालसंमतौ पशुपालने संमतौ पशुपालानां वा संमतौ । ईषद्वयोबलातिरेकमनुक्तवंतावित्यर्थः । अतीव चक्रतुः सर्वतः प्रसर्पणेन ॥ १ ॥

एतत्ते सर्वमाख्यातं यत्पृष्टोऽहमिहत्त्वया ॥ यत्कौमारे हरिकृतं पौगंडे परिकीर्तितम् ॥ ५९ ॥ एतत्सुहृद्भिश्चरितं मुरारेरघार्दनं शाद्वलजेमनं च ॥ व्यक्तेतरद्रूपमजोर्वभिष्टवं शृण्वन्गृणन्नेति नरोऽखिलार्थान् ॥ ६० ॥ एवं विहारैः कौमारैः कौमारं जहतुर्व्रजे ॥ निलायनैः सेतुबंधैर्मर्कटोत्प्लवनादिभिः ॥ ६१ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे ब्रह्मस्तुतिर्नाम चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ ततश्च पौगंडवयः श्रितौ व्रजे बभूवतुस्तौ पशुपालसंमतौ ॥ गाश्चारयंतौ सखिभिः समं पदैर्वृंदावनं पुण्यमतीव चक्रतुः ॥ १ ॥

लपनडाव खेळणें, वाळवेचे पूल बांधणें व मांकडांसारख्या उड्या मारणेंवगैरे विहारांनीं गोकुळांमध्यें त्या रामकृष्णांनीं आपलें कौमारवय घालविलें ॥ ६१ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील दशमस्कंधाच्या पूर्वार्धांत ब्रह्मस्तुतिनिरूपणनामक हा चवदावा अध्याय समाप्त झाला ॥ १४ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या पंधराव्या अध्यायामध्यें, श्रीकृष्णानें केलेलें जें गाईंचें रक्षण, धेनुकासुराचा नाश व कालियसर्पाच्या विषापासून गोपांचें रक्षण, ह्यांचें निरूपण केलें आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, कौमारावस्था निघून गेल्यानंतर पुढें जेव्हां त्या रामकृष्णांनीं पौगंडवयाचा आश्रय केला ह्मणजे सहा सात वर्षांचे झाले तेव्हां ते गाईंचें पालन करणें, बांधणें, सोडणें, इत्यादिकामाविषयीं नंदादिकांना संमत झाले. नंतर त्यांनीं सख्यांसहवर्तमान गाई चारीत असतां सर्वठिकाणीं उमटणाऱ्या आपल्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

चरणचिन्हांच्या योगेंकरून वृंदावनाला अतिशयच पवित्र केलें ॥ १ ॥ एके दिवशीं त्या वृंदावनामध्यें क्रीडा करण्याची इच्छा धारण करणारा श्रीकृष्ण, मुरली वाजवीत वाजवीत, आपल्या यशाचें गायन करणाऱ्या गोपांसहवर्तमान व बलरामासहवर्तमान गाईंना पुढें करून पशूंना हितावह व फुलांची केवळ खाणच अशा वृंदावनामध्यें प्रविष्ट झाला ॥ २ ॥ तेव्हां मधुर शब्द करणारे भ्रमर, हरिण व पक्षीयांनीं व्याप्त व जेथें साधूंच्या मनासारखें स्वच्छ उदक आहे अशा सरोवरावरून कमलांचा सुगंध हरण करून आलेल्या वाऱ्यानें सेवन केलेलें तें वृंदावन पाहून, त्या श्रीकृष्णानें तेथें क्रीडा करण्याचें मनांत आणिलें ॥ ३ ॥ व तो आदिपुरुष भगवान् श्रीकृष्ण, त्या त्या वनप्रदेशामध्यें लाल असलेल्या पल्लवांच्या शोभेसहित फळांच्या व फुलांच्या मोठ्या भारानें ज्यांच्या शाखा पायांना स्पर्श करित आहेत अशा वृक्षांना पाहून, हर्षानें हास्य करीत करीत

स्वयशो गृणद्भिर्गोपैर्वृतस्तद्वनं प्राविशत् ॥ २ ॥ तद्वनं निरीक्ष्य रंतुं मनोदधे । कथंभूतम् । मंजुघोषा येऽलिमृगद्विजा भ्रमरमृगपक्षिणस्तैराकुलं व्याप्तम् । महन्मनःप्रख्यपयःसरस्वता महतां मनसा प्रख्यं तुल्यं स्वच्छं पयो यस्मिंस्तत्सर आश्रयत्वेनास्ति यस्य तेन वातेनेति शैत्यमुक्तम् । शतपत्रगंधिनेति परिमलवत्त्वं जुष्टं वनमिति मांद्यं सूचितम् ॥ ३ ॥ अरुणपल्लवश्रिया सह । स्पृशंत्यः शिखाः शाखाग्राणि येषां तान् ॥ ४ ॥ तरुजन्म येन तमसा कृतं तस्य तमसः पापस्यापहत्यै नाशाय । अथवा येन त्वयेश्वरेण

तन्माधवो वेणुमुदीरयन्वृतो गोपैर्गृणद्भिः स्वयशो बलान्वितः ॥ पशून्पुरस्कृत्य पशव्यमाविशद्विहर्तुकामः कुसुमाकरं वनम् ॥ २ ॥
तन्मंजुघोषालिमृगद्विजाकुलं महन्मनःप्रख्यपयःसरस्वता ॥ वातेन जुष्टं शतपत्रगंधिना निरीक्ष्य रंतुं भगवान्मनोदधे ॥ ३ ॥ स
तत्रतत्रारुणपल्लवश्रिया फलप्रसूनोरुभरेण पादयोः ॥ स्पृशच्छिखान्वीक्ष्य वनस्पतीन्मुदा स्मयन्निवाहाग्रजमादिपूरुषः ॥ ४ ॥
श्रीभगवानुवाच ॥ अहो अमी देववरामरार्चितं पादांबुजं ते सुमनः फलार्हणम् ॥ नमंत्युपादाय शिखाभिरात्मनस्तमोऽपहत्यै
तरुजन्म यत्कृतम् ॥ ५ ॥ एतेऽलिनस्तव यशोऽखिललोकतीर्थं गायंत आदिपुरुषानुपदं भजंते ॥ प्रायो अमी मुनिगणा भवदी-
यमुख्या गूढं वनेऽपि न जहत्यनघात्मदैवम् ॥ ६ ॥

सर्वोपकारकं तरुजन्म कृतं तं त्वां नमंति । एवं श्लाघ्येऽपि जन्मनि यदज्ञानरूपं तमोऽस्ति तस्यापहत्यै ॥ ५ ॥ हेऽनघ वने गूढमपि त्वां न त्यजंति । त्वयि मनुष्यवेषेण निगूढे सति मुनयोऽप्यलिवेषेण निगूढास्त्वां भजंतीत्यर्थः ॥ ६ ॥

बलरामाला ह्मणाला कीं, ॥ ४ ॥ श्रीभगवान् ह्मणाला— हे देवश्रेष्ठा बलरामा, केवढें हें आश्चर्य पहा ! हे वृक्ष, आपल्या फांद्यांनीं फुलें फळेंवगैरे पूजासाहित्य तुझ्या पुढें ठेऊन, ब्रह्मादिक देवांनींहि पूजित अशा तुझ्या चरणकमळाला, ज्या अज्ञानानें आपणाला वृक्षजन्म प्राप्त झालें त्या अज्ञानाच्या नाशाकरितां नमस्कार करित आहेत अथवा ज्या तूं ईश्वरानें, सर्वांवर उपकार होणारें वृक्षजन्म आपणास दिलें आहेस त्या स्तुत्य अशाहि आपल्या जन्मामध्यें जें अज्ञानरूप तम आहे त्याच्या नाशाकरितां तुला नमस्कार करित आहेत ॥ ५ ॥ हे आदिपुरुषा, हे भ्रमर, लोकदृष्टीनें जरी गुंजारव करीत आहेत असें दिसतें तथापि ते वस्तुतः वक्त्यांना व श्रोत्यांना पवित्र करणारें तुझें यश गाऊन पावलोपावलीं तुझें सेवन करितात. हे पवित्रा बलरामा, बहुत करून हे भ्रमर, तुझ्या सेवकांमध्यें मुख्य असे ऋषिगणच आहेत, ते मनुष्यवेषानें वनामध्यें गुप्त असणारा व आपलें दैवत अशा तुझा त्याग करीत नाहींत, ह्मणजे तूं जर मनुष्यवेषानें गुप्त झालास तर ते

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ऋषिहि भ्रमरांच्या वेषानें गुप्त होऊन तुझें सेवन करितात ॥ ६ ॥ हे स्तुतियोग्या रामा, हे मोर, तुझ्या अग्रभागीं नृत्य करित आहेत, तशाच ह्या हरिणीहि, गोपींसारख्या प्रेमळ असून आपल्या घरीं (वनांत) आलेल्या तुझें अवलोकनाच्या योगेंकरून प्रिय करितात; तसेच हे कोकिळांचे समुदायहि घरीं आलेल्या तुझें स्तोत्ररूप मधुर शब्दांनीं प्रिय करितात, ह्मणून हे भ्रमरादिक सर्व निकृष्टजातीचे असूनहि कृतार्थ आहेत. कारण, आपल्याजवळ असेल तें घरीं आलेल्या सत्पुरुषाला अर्पण करावें हाच सज्जनांचा स्वभाव यांनीं स्वीकारला आहे ॥ ७ ॥ हे रामा, तुझ्या पादस्पर्शाच्या योगानें ही पृथिवी धन्य आहे, तुझ्या पायांना स्पर्श करणाऱ्या तृण व वल्ली धन्य आहेत, तुझ्या नखांनीं स्पर्श केलेले वृक्ष व त्यांजवरील लता ह्या धन्य आहेत, तुझ्या दयायुक्त अवलोकनांनीं नद्या, पर्वत, पक्षी व मृग हे धन्य आहेत. तशाच लक्ष्मीसुद्धां ज्या आलिंगनाची केवळ इच्छा करित्ये तें तुझ्या बाहूंच्या मध्यभागाचें (वक्षस्थळाचें) आलिंगन पावोन गोपी धन्य

इयान् हि सतां निसर्ग इति । यदस्ति स्वस्मिंस्तद्गृहमागताय महते महापुरुषाय समर्पयंतीति ॥ ७ ॥ तृणवीरुधश्च तव पादौ स्पृशंतीति तथा करजाभिमृष्टा नखैः स्पृष्टाः । सदयैरवलोकनैः । श्रीरपि यस्मै स्पृहयति केवलं तेन भुजयोरंतरेण वक्षसा गोप्यो धन्या इति ॥ ८ ॥ एवं श्रीमद्वृंदावनं प्रति प्रीतः सन्नद्रेः समीपवर्तिसरित्तटेषु पशून्संचारय-

नृत्यंत्यमी शिखिन ईड्य मुदा हरिण्यः कुर्वंति गोप्य इव ते प्रियमीक्षणेन ॥ सूक्तैश्च कोकिलगणा गृहमागताय धन्या वनौकस इयान्हि सतां निसर्गः ॥ ७ ॥ धन्येयमद्य धरणी तृणवीरुधस्त्वत्पादस्पृशो द्रुमलताः करजाभिमृष्टाः ॥ नद्योऽद्रयः खगमृगाः सदयावलोकैर्गोप्योंऽतरेण भुजयोरपि यत्स्पृहा श्रीः ॥ ८ ॥ श्रीशुक उवाच ॥ एवं वृंदावनं श्रीमत्कृष्णः प्रीतमनाः पशून् ॥ रेमे संचारयन्नद्रेः सरिद्रोधस्सु सानुगः ॥ ९ ॥ क्वचिद्गायति गायत्सु मदांधालिष्वनुव्रतैः ॥ उपगीयमानचरितः स्रग्वी संकर्षणान्वितः ॥ १० ॥ क्वचिच्च कलहंसानामनुकूजति कूजितम् ॥ अभिनृत्यति नृत्यंतं बर्हिणं हासयन्क्वचित् ॥ ११ ॥ मेघगंभीरया वाचा नामभिर्दूरगान्पशून् ॥ क्वचिदाह्वयति प्रीत्या गोगोपालमनोज्ञया ॥ १२ ॥ चकोरक्रौंचचक्राह्वभारद्वाजांश्च बर्हिणः ॥ अनुरौति स्म सत्त्वानां भीतवद्व्याघ्रसिंहयोः ॥ १३ ॥

न्सानुगो गोपैः सह वर्तमानः प्रीतमना रेमे ॥ ९ ॥ तामेव रतिमाह । क्वचिदित्यादिदशभिः ॥ १० ॥ बर्हिणं नृत्यंतमनु अभिनृत्यति बर्हिणमभिमुखो नृत्यतीति वा । सखीन्हासयन् ॥ ११ ॥ १२ ॥ चकोरादीननुकृत्य रौति । कदाचिच्च सत्त्वानां मध्ये व्याघ्रसिंहयोस्ताभ्यां भीतवद्भवति । सत्त्वेषु पलायमानेषु पलायत इत्यर्थः । तयोः

आहेत ॥ ८ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, याप्रमाणें शोभायुक्त असलेल्या वृंदावनाची स्तुति करून संतुष्टचित्त झालेला तो श्रीकृष्ण, गोवर्धनाच्या जवळ च्या भूमिप्रदेशांवर व यमुनानदीच्या काठींच्या प्रदेशांवर अनुयायांसहवर्तमान गाई चारित होत्साता क्रीडा करूं लागला ॥ ९ ॥ तो असा कीं,– केव्हांतरी अनुयायी गोपांनीं किंवा देवांनीं ज्याचें चरित्र गायन केलें आहे असा पुष्पमाला धारण करणारा बलरामासहवर्तमान तो श्रीकृष्ण, मदांध झालेले भ्रमर गायन करूं लागले असतां, आपणहि गायन करीत असे ॥ १० ॥ केव्हांतरी राजहंसांच्या शब्दांमागून आपण तसा शब्द करीत असे, केव्हांतरी आपल्या सख्यांना हंसवीत होत्साता नृत्य करणाऱ्या मोरांच्या समीपभागीं आपण नृत्य करीत असे ॥ ११ ॥ एखादेवेळीं गाईंना व गोपांना आवडणाऱ्या मेघासारख्या गंभीर वाणीनें, सांकेतिक नांवांनीं दूर गेलेल्या गाईंना प्रीतीनें जवळ बोलावीत असे ॥ १२ ॥ केव्हांतरी चकोर, क्रौंच, चक्रवाक, भारद्वाज व मोर या पक्ष्यांच्या शब्दांचें अनुकरण करीत असे, केव्हांतरी इतर

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्राणी व्याघ्रसिंहांचा शब्द ऐकून भिऊन पळत दूर जाऊं लागले म्हणजे आपणहि भ्याल्यासारखा होऊन पळून दूर जात असे ॥ १३ ॥ केव्हांतरी क्रीडेच्या श्रमानें श्रम पावून गोपांच्या मांडीचें उसें करून निजलेल्या आपल्या वडीलबंधु बलरामाला, तो कृष्ण स्वतांच चरणसंमर्दनादिकेंकरून श्रमरहित करीत असे ॥ १४ ॥ केव्हांतरी एकमेकांचे हात धरून उभे राहिलेले ते रामकृष्ण, एकमेकांबरोबर नृत्य करणाऱ्या, गायन करणाऱ्या व कुस्ती करणाऱ्या गोपांची तुह्मी नृत्याविषयीं विद्याधरांसारखे आहां, गायनाविषयीं गंधर्वांसारखे आहां व कुस्तीनें त्रैलोक्याला जिंकणारे आहां अशी प्रशंसा करीत असत ॥ १५ ॥ केव्हांतरी बाहुयुद्धाच्या श्रमानें श्रम पावलेला श्रीकृष्ण, झाडाखालीं कोंवळ्या पल्लवांच्या बिछान्यांवर गोपाच्या मांडीवर मस्तक ठेऊन शयन करीत असे ॥ १६ ॥ त्यावेळीं कितीएक गोप त्या महात्म्या श्रीकृष्णाची चरणशुश्रूषा करीत असत. दुसरे 'भगवंताबरोबर क्रीडा करूनच' निष्पाप झालेले कितीएक गोप, पल्लवादिकांच्या विंझण्यांनीं त्याला वारा घालीत असत ॥ १७ ॥ हे महाराजा, दुसरे कितीएक गोप, ज्यांच्या बुद्धीला स्नेहानें पाझर सुटला आहे असे होऊन, त्या महात्म्या श्रीकृष्णाच्या शयनादिक लीलांना

सत्त्वानां बलोद्रेकाणां भीतवद्द्रवतीति ॥ १३ ॥ आर्यमग्रजं विश्रमयति वा विगतश्रमं करोति ॥ १४ ॥ मिथो नृत्यादीन्कुर्वतो गोपान्प्रशशंसतुः ॥ १५ ॥ १६ ॥ व्यजनैः पल्ल-

क्वचित्क्रीडापरिश्रांतं गोपोत्संगोपबर्हणम् ॥ स्वयं विश्रमयत्यार्यं पादसंवाहनादिभिः ॥ १४ ॥ नृत्यतो गायतः क्वापि वल्गतो युद्ध्यतो मिथः ॥ गृहीतहस्तौ गोपालान्हसंतौ प्रशशंसतुः ॥ १५ ॥ क्वचित्पल्लवतल्पेषु नियुद्धश्रमकर्शितः ॥ वृक्षमूलाश्रयः शेते गोपोत्संगोपबर्हणः ॥ १६ ॥ पादसंवाहनं चक्रुः केचित्तस्य महात्मनः ॥ अपरे हतपाप्मानो व्यजनैः समवीजयन् ॥ १७ ॥ अन्ये तदनुरूपाणि मनोज्ञानि महात्मनः ॥ गायंति स्म महाराज स्नेहक्लिन्नधियः शनैः ॥ १८ ॥ एवं निगूढात्मगतिः स्वमायया गोपात्मजत्वं चरितैर्विडंबयन् ॥ रेमे रमालालितपादपल्लवो ग्राम्यैः समं ग्राम्यवदीशचेष्टितः ॥ १९ ॥ श्रीदामा नाम गोपालो रामकेशवयोः सखा ॥ सुबलस्तोककृष्णाद्या गोपाः प्रेम्णेदमब्रुवन् ॥ २० ॥ राम राम महाबाहो कृष्ण दुष्टनिबर्हण ॥ इतो विदूरे सुमहद्वनं तालालिसंकुलम् ॥ २१ ॥ फलानि तत्र भूरीणि पतितानि पतंति च ॥ संति किंत्ववरुद्धानि धेनुकेन दुरात्मना ॥ २२ ॥

वादिनिर्मितैः ॥ १७ ॥ १८ ॥ ईशचेष्टित इति । विगूढस्वभावत्वेऽप्यंतरांतरा ईशस्यैव चेष्टितानि दृश्यंतेऽस्मिन्सः ॥ १९ ॥ ईशचेष्टितत्वमेव दर्शयितुमाह । श्रीदामेति । स्तोककृष्णः कश्चित् ॥ २० ॥ तालालिसंकुलं तालपंक्तिभिर्व्याप्तम् ॥ २१ ॥ २२ ॥

योग्य असून त्याला सुखकारक अशीं गायनें हळुहळू 'त्याचा निद्राभंग जसा न होईल तशा रीतीनें' गात असत ॥ १८ ॥ याप्रमाणें, ज्याच्या चरणपल्लवाचें लक्ष्मीनें लालन केलें आहे त्या भगवंतानें, आपल्या मायेच्या योगानें आपल्या खऱ्या स्वरूपाचें आच्छादन करून, आपल्या आवरणांनीं गोपपुत्रत्वाचें अनुकरण करीत व मध्येंमध्यें ईश्वरासारखीं चरित्रें करून दाखवीत ग्राम्यगोपांबरोबर ग्राम्यगोपासारखें होऊन क्रीडा केली ॥ १९ ॥ आतां त्याचें ईश्वरचरित्र दाखविण्याकरितां सांगतो कीं,—रामकृष्णांचा एक परम मित्र श्रीदामानामक गोपाळ होता तो व सुबल, स्तोककृष्ण इत्यादिक गोप हे सर्व रामकृष्णाजवळ येऊन प्रेमानें असें ह्मणाले कीं,— ॥ २० ॥ हे महापराक्रम्या रामा रामा, हे दुष्टनाशका कृष्णा, या क्रीडास्थानापासून जवळच तालवृक्षांच्या रांगांनीं व्याप्त असें एक मोठें अरण्य आहे ॥ २१ ॥ तेथें पुष्कळ तालवृक्षांचीं फळें आहेत, तीं कितीएक खालीं पडलीं आहेत व कितीएक वर पिकून खालीं पडत आहेत परंतु काय करावें ! तीं दुरात्म्या धेनुकासुरानें दुसऱ्यानें घेण्यास अटकाव केलेलीं आहेत ॥ २२ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हे रामा, हे कृष्णा, गर्दभाचें रूप धारण करणारा तो महापराक्रमी असुर, आपल्यासारख्या बलवान् दुसऱ्याहि पुष्कळ ज्ञातींनीं परिवेष्टित आहे ॥ २३ ॥ हे शत्रुनाशका कृष्णा, तो मनुष्यांचें भक्षण करीत असतो ह्मणून त्यापासून भ्यालेले मनुष्य, त्या वनांत जात नाहींत. तें वन, गाईवगैरे पशूंनीं व पक्ष्यांच्या समुदायांनींहि वर्ज्य केलें आहे ॥ २४ ॥ पूर्वीं कधींच भक्षण केलेलीं नाहींत अशीं सुवासिक फळें तेथें आहेत. हा पहा जिकडेतिकडे पसरलेला सुवासिक गंध येत आहे ॥ २५ ॥ हे कृष्णा, सुगंधाच्या योगानें लोभाविष्टचित्त झालेल्या आह्मांला तीं फळें मिळवून दे. तीं फळें भक्षण करण्याची आह्मांला मोठी इच्छा झाली आहे, परंतु हे रामा, जर तुला आमचें सांगणें रुचत असेल तर तीं आणण्याकरितां चलावेंस ॥ २६ ॥ याप्रमाणें मित्र गोपांचें भाषण ऐकून हास्य करून त्या मित्रांचें प्रिय करण्याच्या इच्छेनें, समर्थ असे ते रामकृष्ण, गोपांनीं परिवेष्टित होऊन त्या तालवनामध्यें निघून गेले ॥ २७ ॥ बळरामानें तर त्या वनांत प्रवेश करून आपल्या बाहूंच्या बळानें, तालवृक्षांना, मदोन्मत्त हत्तीप्रमाणें

॥ २३ ॥ २४ ॥ विषूचीनः सर्वतः प्रसृतः ॥ २५ ॥ २६ ॥ २७ ॥ २८ ॥ सनगं सवृक्षम् ॥ २९ ॥ प्रत्यग्द्वाभ्यां पश्चिमाभ्याम् । काशब्दमिति गर्दभजातिशब्दानुकरणम् ।

सोऽतिवीर्योऽसुरो राम हे कृष्ण खररूपधृक् ॥ आत्मतुल्यबलैरन्यैर्ज्ञातिभिर्बहुभिर्वृतः ॥ २३ ॥ तस्मात्कृतनराहाराद्भीतैर्नृभिरमित्रहन् ॥ न सेव्यते पशुगणैः पक्षिसंघैर्विवर्जितम् ॥ २४ ॥ विद्यंतेऽभुक्तपूर्वाणि फलानि सुरभीणि च ॥ एष वै सुरभिर्गंधो विषूचीनोऽवगृह्यते ॥ २५ ॥ प्रयच्छ तानि नः कृष्ण गंधलोभितचेतसाम् ॥ वांछाऽस्ति महती राम गम्यतां यदि रोचते ॥ २६ ॥ एवं सुहृद्वचः श्रुत्वा सुहृत्प्रियचिकीर्षया ॥ प्रहस्य जग्मतुर्गोपैर्वृतौ तालवनं प्रभू ॥ २७ ॥ बलः प्रविश्य बाहुभ्यां तालान्संपरिकंपयन् ॥ फलानि पातयामास मतंगज इवौजसा ॥ २८ ॥ फलानां पततां शब्दं निशम्यासुररासभः ॥ अभ्यधावत्क्षितितलं सनगं परिकंपयन् ॥ २९ ॥ समेत्य तरसा प्रत्यग्द्वाभ्यां पद्भ्यां बलं बली ॥ निहत्योरसि काशब्दं मुंचन्पर्यसरत्खलः ॥ ३० ॥ पुनरासाद्य संरब्ध उपक्रोष्टा पराक् स्थितः ॥ चरणावपरौ राजन्बलाय प्राक्षिपद्रुषा ॥ ३१ ॥ स तं गृहीत्वा प्रपदोर्भ्रामयित्वैकपाणिना ॥ चिक्षेप तृणराजाग्रे भ्रामणत्यक्तजीवितम् ॥ ३२ ॥ तेनाहतो महातालो वेपमानो महाशिराः ॥ पार्श्वस्थं कंपयन्भग्नः स चान्यं सोऽपि चापरम् ॥ ३३ ॥

पर्यसरत्परितोऽधावदित्यर्थः ॥ ३० ॥ उपक्रोष्टा गर्दभः । पराक् प्रतिमुखः अपरौ पश्चिमौ । बलाय बलं हंतुम् ॥ ३१ ॥ तृणराजस्तालः ॥ ३२ ॥ ३३ ॥

कांपवून त्यांचीं फळें भूमीवर पाडिलीं ॥ २८ ॥ तेव्हां गर्दभरूप धारण करणारा तो धेनुकासुर, पडणाऱ्या फळांचा शब्द ऐकून वृक्षपर्वतांसहित पृथिवीतलाला कांपवीत होत्साता, बलरामाला मारण्याकरितां त्याच्यासमोर धांवून आला ॥ २९ ॥ आणि येऊन पाठीमागच्या दोन पायांनीं मोठ्या वेगानें बलरामाच्या वक्षःस्थळावर प्रहार करून गर्दभजातीचा शब्द करीत तो बळी व खळ धेनुकासुर, पुन्हा प्रहार करण्याकरितां बलरामाच्या सभोंवार धाऊं लागला ॥ ३० ॥ आणि अत्यंत क्रुद्ध झालेला तो धेनुकासुर, पुन्हा बलरामाजवळ येऊन त्याच्याकडे आपलें पुच्छ करून उभा राहिला आणि हे राजा, तो बलरामाला मारण्याकरितां आपले पाठीमागचे पाय झाडूं लागला ॥ ३१ ॥ तेव्हां बलरामानें त्या दैत्याला एकाच हातानें मागच्या पायांच्या अग्रभागीं धरून गरगर फिरवून, फिरविण्यानेंच मरण पावलेल्या त्याला एका तालवृक्षाच्या मूळावर फेंकिलें ॥ ३२ ॥ त्या बलरामानें टाकलेल्या गर्दभाच्या देहानें ताडित झाल्यामुळें कांपणारा, मोठ्या शेंड्याचा तो महाताल, आपल्या बाजूला असलेल्या दुसऱ्या ताल- ॥ ५७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वृक्षांला कांपवीत त्याच्यावर मोडून पडला. तोहि दुसऱ्या ताडाला कांपवीत त्याच्यावर मोडून पडला, तोहि दुसऱ्या ताडावर मोडून पडला ॥ ३३ ॥ याप्रमाणें बळरामानें लीलेनें टाकलेल्या गर्दभाच्या देहानें जो तालवृक्ष ताडित झाला होता त्याच्या योगानें दुसरा व त्याच्या योगानें तिसरा याप्रमाणें सर्वहि तालवृक्ष, मोठा वारा सुटला असतां जसे कंपित होतात त्यांप्रमाणें कंपित झाले ॥ ३४ ॥ हे राजा, ज्याचेठिकाणीं हें जग, उभ्या व आडव्या तंतूंचेठिकाणीं विणलेल्या पटाप्रमाणें ओतप्रोत रचिलेलें आहे, त्या जगदीश्वर भगवान् अनंताचेठिकाणीं हें धेनुकासुराला गरगरां फिरवून मारणेंवगैरे आश्चर्य नाहीं ॥ ३५ ॥ असो याप्रमाणें धेनुकासुर मरण पावल्यानंतर त्याचे ज्ञाति जे गर्दभ होते ते सर्वहि हतबंधु झाल्यामुळें क्रुद्ध होऊन, कृष्ण, राम व गोप यांना मारण्याकरितां त्यांच्या आंगांवर धांवून आले ॥ ३६ ॥ तेव्हां हे राजा, श्रीकृष्ण व बळराम

उत्सृष्टेन खरदेहेन हतैराहताः चकंपिरे अकंपंत ॥ ३४ ॥ यस्मिन्निदं विश्वमोतमूर्ध्वतंतुषु पट इव ग्रथितं प्रोतं तिर्यक्तंतुषु पटवदेव संग्रथितम् । सर्वतोऽनुस्यूतं वर्तत इत्यर्थः ॥ ३५ ॥ ३६ ॥ ३७ ॥ घनैर्नभ इव भुवस्तलं रराज । तत्र फलप्रकरसंकीर्णमिति दैत्यदेहैश्च सतालाग्रैः संकीर्णमित्यरुणश्वेतनीलघनसादृश्यसंपादनम् ॥ ३८ ॥ ३९ ॥

बलस्य लीलयोत्सृष्टखरदेहहताहताः ॥ तालाश्चकंपिरे सर्वे महावातेरिता इव ॥ ३४ ॥ नैतच्चित्रं भगवति ह्यनंते जगदीश्वरे ॥ ओतप्रोतमिदं यस्मिंस्तंतुष्वंग यथा पटः ॥ ३५ ॥ ततः कृष्णं च रामं च ज्ञातयो धेनुकस्य ये ॥ क्रोष्टारोऽभ्यद्रवन्सर्वे संरब्धा हतबांधवाः ॥ ३६ ॥ तांस्तानापततः कृष्णो रामश्च नृप लीलया ॥ गृहीतपश्चाच्चरणान्प्राहिणोत्तृणराजसु ॥ ३७ ॥ फलप्रकरसंकीर्णं दैत्यदेहैर्गतासुभिः ॥ रराज भूः सतालाग्रैर्घनैरिव नभस्तलम् ॥ ३८ ॥ तयोस्तत्सुमहत्कर्म निशम्य विबुधादयः ॥ मुमुचुः पुष्पवर्षाणि चक्रुर्वाद्यानि तुष्टुवुः ॥ ३९ ॥ अथ तालफलान्यादन्मनुष्या गतसाध्वसाः ॥ तृणं च पशवश्चेरुर्हतधेनुककानने ॥ ४० ॥ कृष्णः कमलपत्राक्षः पुण्यश्रवणकीर्तनः ॥ स्तूयमानोऽनुगैर्गोपैः साग्रजो व्रजमाव्रजत् ॥ ४१ ॥ तं गोरजश्छुरितकुंतलबद्धबर्हवन्यप्रसूनरुचिरेक्षणचारुहासम् ॥ वेणुं क्वणंतमनुगैरनुगीतकीर्तिं गोप्यो दिदृक्षितदृशोऽभ्यगमन्समेताः ॥ ४२ ॥

आदन्नभक्षयन् ॥ ४० ॥ ४१ ॥ गोरजोभिश्छुरितेषु कुंतलेषु बद्धं बर्हं वन्यानि प्रसूनानि च यस्य रुचिरमीक्षणं चारुहासश्च यस्य तं च तं च ॥ दिदृक्षितदृशो दिदृक्षिता दर्शनोत्कंठायुक्ता दृशो यासां ताः ॥ ४२ ॥

यांनीं आंगांवर धाऊन येणाऱ्या त्या गर्दभांना सहज लीलेनें मागच्या पायांचेठिकाणीं धरून गरगर फिरवून तालवृक्षांवर फेंकून दिलें ॥ ३७ ॥ त्यावेळीं फळांच्या समुदायांनीं व मोडलेल्या तालवृक्षांच्या शेंड्यांसह गतप्राण होऊन पडलेल्या दैत्यांच्या देहांनीं व्याप्त झालेलें तें भूतळ, जसें मेघांच्या योगानें आकाशतळ शोभतें त्याप्रमाणें शोभूं लागलें ॥ ३८ ॥ दुसऱ्यांना दुष्कर असें तें रामकृष्णाचें फार मोठें कर्म पाहून, देवादिकांनीं पुष्पवृष्टीवगैरे केलीं. त्यांत देवांनीं पुष्पवृष्टि केली, गंधर्वांनीं गायनपूर्वक वाद्यें वाजविलीं व ऋषींनीं स्तुति केली ॥ ३९ ॥ नंतर सर्वमनुष्य धेनुकासुर मरण पावलेल्या त्या वनामध्यें निर्भयपणें तालफलें भक्षण करूं लागले, तसेच गोमहिष्यादिक पशुहि तृण भक्षण करूं लागले ॥ ४० ॥ नंतर कमलपत्राक्ष, व श्रोत्यावक्त्यांना ज्याचीं श्रवण कीर्तनें पुण्यकारक आहेत असा तो बलरामासहित श्रीकृष्ण, देवऋष्यादिकांनीं व गोपांनीं स्तूयमान होत्साता गोकुळामध्यें परत आला ॥ ४१ ॥ त्यावेळीं त्याच्या दर्शनाविषयीं उत्कंठितदृष्टि होऊन एकत्र मिळालेल्या गोपी, वनांतून येणाऱ्या, गोरजानें व्याप्त झालेल्या,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कुरळकेशांचेठिकाणीं ज्यानें मोराचीं पिसें व वनांतील फुलें धारण केलीं आहेत, ज्याचें पाहणें मनमोहक आहे, ज्याचें हास्य मनोहर आहे, ज्याची कीर्ति अनुयायी गोप गायन करित आहेत अशा मुरली वाजविणाऱ्या त्या श्रीकृष्णाला पाहण्याकरितां, सामोऱ्या गेल्या ॥ ४२ ॥ त्या गोपींनीं, श्रीकृष्णाचा मुखसंबंधी मध नेत्ररूप भ्रमरांनीं प्राशन करून ह्मणजे मुखाचें सौंदर्य नेत्रांनीं पाहून दिवसास जो त्या कृष्णाचा विरह झाला होता तत्संबंधी तापाचा त्याग केला. श्रीकृष्णानेंहि, त्या गोपींनीं सलज्जहास्यपूर्वक नम्रता दर्शवून आपणाकडे जें कटाक्षांनीं अवलोकन केलें, त्याच सत्काराचा स्वीकार करून गोकुळांत प्रवेश केला ॥ ४३ ॥ तेव्हां वनांतून आलेल्या त्या रामकृष्णनामक पुत्रांना, पुत्रवत्सल अशा त्या यशोदारोहिणींनीं त्यांच्या इच्छेप्रमाणें त्यात्या काळीं योग्य असे भोजनवस्त्रादिक उत्कृष्ट भोग अर्पण केले ॥ ४४ ॥ तेव्हां ते रामकृष्ण, त्या नंदाच्या गृहाचेठिकाणीं स्नान, सुगंधि तैलादिकांचें उन्मर्दन, केशप्रसाधन इत्यादिकेंकरून मार्गसंबंधीं श्रम घालवून,

---

मुकुंदस्य मुखपद्मगतं सारघं मधु । अक्षि यो विरहस्तस्माज्जातं तापम् । स च तासां सत्कृतिं पूजाम् । कां सत्कृतिं कथं वा कृतां तामाह । सव्रीडेति । सव्रीडेन सलज्जेन

पीत्वा मुकुंदमुखसारघमक्षिभृंगैस्तापं जहुर्विरहजं व्रजयोषितोऽह्नि ॥ तत्सत्कृतिं समधिगम्य विवेश गोष्ठं सव्रीडहासविनयं यदपांगमोक्षम् ॥ ४३ ॥ तयोर्यशोदारोहिण्यौ पुत्रयोः पुत्रवत्सले ॥ यथाकामं यथाकालं व्यधत्तां परमाशिषः ॥ ४४ ॥ गताध्वानश्रमौ तत्र मज्जनोन्मर्दनादिभिः ॥ नीवीं वसित्वा रुचिरां दिव्यस्रग्गंधमंडितौ ॥ ४५ ॥ जनन्युपहृतं प्राश्य स्वाद्वन्नमुपलालितौ ॥ संविश्य वरशय्यायां सुखं सुषुपतुर्व्रजे ॥ ४६ ॥ एवं स भगवान्कृष्णो वृंदावनचरः क्वचित् ॥ ययौ राममृते राजन्कालिंदीं सखिभिर्वृतः ॥ ४७ ॥ अथ गावश्च गोपाश्च निदाघातपपीडिताः ॥ दुष्टं जलं पपुस्तस्यास्तृषार्ता विषदूषितम् ॥ ४८ ॥ विषांभस्तदुपस्पृश्य दैवोपहतचेतसः ॥ निपेतुर्व्यसवः सर्वे सलिलांते कुरूद्वह ॥ ४९ ॥ वीक्ष्य तान्वै तथाभूतान्कृष्णो योगेश्वरेश्वरः ॥ ईक्षयाऽमृतवर्षिण्या स्वनाथान्समजीवयत् ॥ ५० ॥

हासेन विनयो यथा भवति तथा यदेतत् । किं तत् । अपांगमोक्षं कटाक्षदर्शनम् । तथा तां सत्कृतिं प्राप्येति ॥ ४३ ॥ ४४ ॥ ४५ ॥ ४६ ॥ ४७ ॥ ४८ ॥ ४९ ॥ ५० ॥

सुंदर वस्त्रांचें परिधान करून दिव्य अशा पुष्पमालांनीं व चंदनादिकांच्या उट्यांनीं भूषित झाले ॥ ४५ ॥ नंतर ते रामकृष्ण, मातांनीं वाढलेलें स्वादिष्ट अन्न भोजन करून त्याच मातांनीं, तांबूल अर्पण करणें, वारा घालणें इत्यादिकेंकरून लालित होत्साते पर्यंकादिकांचेठिकाणीं पुष्पास्तरणादिकेंकरून रचिलेल्या उत्तम शय्येवर सुखानें निजले ॥ ४६ ॥ हे राजा, याप्रकारेंकरून तो भगवान् श्रीकृष्ण, वृंदावनामध्यें गाई चारित असतां, एकेदिवशीं बलरामावांचून इतर गोपांना बरोबर घेऊन कालिंदीनदीच्या ॥ ९८ ॥
कांठीं जलप्राशनार्थ गेला ॥ ४७ ॥ तों इतक्यांत उन्हाळ्यांतील उन्हानें पीडित होऊन तृषार्त झालेल्या कितीएक गाईगोपांनीं, मागाहून येणाऱ्या कृष्णाची वाट न पाहतां लवकर पुढें जाऊन कालीयसर्पाच्या विषानें दुष्ट झालेलें त्या यमुनेचें उदक प्राशन केलें ॥ ४८ ॥ हे राजा, ज्या कोणीं उदक प्राशन केलें नव्हतें त्यांनींसुद्धां त्या विषयुक्त उदकामध्यें स्नान किंवा त्याचें आचमन केलें असल्यामुळें दैवानें मोहितचित्त झालेले ते सर्वहि (गोप व पशु) पाण्याच्याकाठीं गतप्राण होऊन पडले ॥ ४९ ॥ तेव्हां योगेश्वरांचाहि ईश्वर अश

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रीकृष्णानें, आपणच यांचा रक्षक आहें असें मानून गतप्राग होऊन पडलेल्या त्या गाईगोपांना अमृताचा वर्षाव करणाऱ्या दृष्टीनें पाहून जिवंत केलें ॥ ५० ॥ तेव्हां तत्काल
स्मृति प्राप्त झालेले ते सर्वेहि गाईगोप, पाण्याजवळून उठून एकमेकांकडे पाहूं लागले व अत्यंत विस्मित झाले ॥ ५१ ॥ आणि हे राजा, त्यांनीं विषाचें प्राशन करून
मरण पावलेल्या आपल्या देहाचें जें पुन्हा उठणें तें श्रीकृष्णानें अनुग्रहदृष्टीनें अवलोकन केल्यामुळें झालें असें मानिलें ॥ ५२ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महा-
पुराणांतील दशमस्कंधाच्या पूर्वार्धांत धेनुकवधनिरूपणनामक हा पंधरावा अध्याय समाप्त झाला ॥ १५ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां या सोळाव्या अध्यायामध्यें,
यमुनेच्या डोहांत श्रीकृष्णानें कालीयसर्पाचा निग्रह केला असतां नागपत्न्यांनीं त्याची स्तुति केली व कृष्णानें त्या कालियावर अनुग्रह केला अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥
गर्दभरूपी दैत्यांना मारून व यथेच्छपणें तालफलें भक्षण करून संतुष्ट झालेल्या त्या सर्वकलानिधि भगवान् श्रीकृष्णानें कालियसर्पाच्या फणारूप रंगमंडपामध्यें नृत्य केलें

संप्रति सद्य एव इता प्राप्ता स्मृतिर्यैस्ते संप्रतीतस्मृतयः । यद्वा सम्यक्प्रतीता प्रतिप्राप्ता स्मृतिर्यैस्ते तथेति ॥ ५१ ॥ ५२ ॥ इति दशमे पूर्वार्धटीकायां पंचदशोऽध्यायः ॥ १५ ॥
षोडशे कालियस्योक्तो निग्रहो यमुनाह्रदे । तत्पत्नीभिः स्तुतेनाथ कृष्णेनानुग्रहः कृतः ॥ १ ॥ हत्वा रासभदैतेयान् जग्ध्वा तालफलान्यलम् ॥ प्रीतोऽनृत्यत्फणारंगे कालियस्य

ते संप्रतीतस्मृतयः समुत्थाय जलांतिकात् ॥ आसन्सुविस्मिताः सर्वे वीक्षमाणाः परस्परम् ॥ ५१ ॥ अन्वमंसत तद्राजन्गोविंदानु-
ग्रहेक्षितम् ॥ पीत्वा विषं परेतस्य पुनरुत्थानमात्मनः ॥ ५२ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे धेनुकवधो नाम
पंचदशोऽध्यायः ॥ १५ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ विलोक्य दूषितां कृष्णां कृष्णः कृष्णाहिना विभुः ॥ तस्या विशुद्धिमन्विच्छन्सर्प
तमुदवासयत् ॥ १ ॥ राजोवाच ॥ कथमंतर्जलेऽगाधे न्यगृह्णाद्भगवानहिम् ॥ स वै बहुयुगावासं यथाऽऽसीद्विप्र कथ्यताम् ॥ २ ॥
ब्रह्मन्भगवतस्तस्य भूम्नः स्वच्छंदवर्तिनः ॥ गोपालोदारचरितं कस्तृप्येतामृतं जुषन् ॥ ३ ॥ श्रीशुक उवाच ॥ कालिंद्यां कालिय-
स्यासीद्ध्रदः कश्चिद्विषाग्निना ॥ श्रप्यमाणपया यस्मिन्पतंत्युपरिगाः खगाः ॥ ४ ॥

कलानिधिः ॥ २ ॥ उदवासयत् निःसारितवान् ॥ १ ॥ बहूनि युगान्यावासो यस्य तमहिम् । स वै अहिरजलचरोऽपि तस्मिन्नंतर्जले यथा येन प्रकारेणासीत् अथवा बहूनि युगा-
न्यावासो यथा भवति तथा येन प्रकारेण स वै तत्रासीदिति कथ्यतामिति ॥ २ ॥ गोपालेन यदुदारं चरितमाचरितं तदेवामृतं अतः कथ्यतामिति ॥ ३ ॥ श्रप्यमाणं पच्यमानं
पयो यस्य सः । अत उपरि गच्छंतः खगा यस्मिन्पतंति ॥ ४ ॥

॥ २ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, कालीयसर्पानें यमुनानदी दूषित केली असें पाहून तिची शुद्धता होण्याची इच्छा करणाऱ्या समर्थ भगवान् श्रीकृष्णानें, त्या सर्पाला
तेथून घालवून दिलें ॥ १ ॥ राजा ह्मणाला–हे ब्रह्मन् षड्गुणैश्वर्यसंपन्न अशा भगवान् श्रीकृष्णानें, खोल पाण्यामध्यें बहुत युगेंपर्यंत राहणाऱ्या त्या कालियसर्पाचा निग्रह कोण-
त्या प्रकारानें केला? तसाच रमणकद्वीपामध्यें राहणारा तो कालियसर्पहि जळचर नसतां त्या पाण्यामध्यें कां येऊन राहिला होता ? तें मला सांगावें ॥ २ ॥ हे
ज्ञाननिष्ठा, आपल्या भक्तांच्या इच्छेनुसार वर्तन करणाऱ्या त्या सर्वव्यापक भगवान् श्रीकृष्णानें, गोपालरूपानें आचरण केलेल्या मोक्षप्रापक चरित्ररूप अमृताचें सेवन
करणारा कोण बरें पुरुष तृप्त होईल ? कोणीच होणार नाहीं; यास्तव तें सांगावें ॥ ३ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, यमुनानदीच्या पात्रामध्यें, कालियाच्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विषरूप अग्नीनें ज्याचें पाणी आंधणासारखें कढत होतें, ज्यामध्यें वरून जाणारे पक्षीहि मरून पडत असत आणि ज्याच्या विषयुक्त उदकाच्या तरंगांवरून, पाण्याचे कण घेऊन आलेल्या वाऱ्यानें स्पर्श केलेले तीरस्थ वृक्ष व पशुपक्ष्यादिक प्राणी मरून जात असत, असा एक कालिय सर्पाचा डोह होता ॥ ४ ॥ ५ ॥ त्या अपरिहार्यवेगयुक्त विषाच्या सामर्थ्यानें बलाढ्य असलेल्या कालियसर्पाला व त्यानें विषयुक्त केलेल्या यमुनानदीला पाहून, खलांच्या निग्रहाविषयीं अवतीर्ण झालेल्या त्या श्रीकृष्णानें, त्याला घालवून देण्याकरितां आपली कमर वस्त्रानें घट्ट बांधून व फार उंच असलेल्या कळंबाच्या वृक्षावर चढून, हातांनीं दंड थोपटिले आणि त्या कळंबावरून खालीं विषोदकानें भरलेल्या त्या डोहामध्यें उडी टाकिली ॥ ६ ॥ त्यावेळीं ज्याचें पाणी, त्या पुरुषोत्तम श्रीकृष्णाच्या उडी टाकण्याच्या वेगानें क्षोभ पावलेल्या अंतर्गत सर्पांच्या

किंच । विप्रुष्मता अंबुकणयुक्तेन विषोदतरंगस्पर्शिमारुतेन स्पृष्टा यस्य तीरगा म्रियंते स ह्रद आसीदिति ॥ ५ ॥ तं कालियम् । चंडो वेगो यस्य तद्विषमेव वीर्यं यस्य तम् । कदंबमिति भाविना श्रीकृष्णचरणस्पर्शभाग्येन स एकस्तत्तीरे न शुष्कः अमृतमाहरता गरुत्मताऽऽक्रांतत्वादिति च पुराणांतरम् । आस्फोट्य बाहू करतलेनाहत्य । गाढा दृढं बद्धा रशना कटिबंधनवस्त्रं येन सः ॥ ६ ॥ तदा सर्पस्य ह्रदः पुरुषश्रेष्ठस्य पतनभारेण संक्षोभितानामुरगाणां विषैरुच्छ्वसितोऽबुराशिर्यस्य सः । विषेण कषायीकृता भयंकरा

विप्रुष्मता विषोदोर्मिमारुतेनाभिमर्शिताः ॥ म्रियंते तीरगा यस्य प्राणिनः स्थिरजंगमाः ॥ ५ ॥ तं चंडवेगविषवीर्यमवेक्ष्य तेन दुष्टां
नदीं च खलसंयमनावतारः ॥ कृष्णः कदंबमधिरुह्य ततोऽतितुंगमास्फोट्य गाढरशनो न्यपतद्विषोदे ॥ ६ ॥ सर्पह्रदः पुरुषसारनि-
पातवेगसंक्षोभितोरगविषोच्छ्वसितांबुराशिः ॥ पर्यक्प्लुतो विषकषायविभीषणोर्मिर्धावन्धनुःशतमनंतबलस्य किं तत् ॥ ७ ॥ तस्य ह्रदे वि-
हरतो भुजदंडघूर्णवार्घोषमंग वरवारणविक्रमस्य ॥ आश्रुत्य तत्स्वसदनादिभवं निरीक्ष्य चक्षुःश्रवाः समसरत्तदमृष्यमाणः ॥ ८ ॥ तं प्रेक्ष-
णीयसुकुमारघनावदातं श्रीवत्सपीतवसनं स्मितसुंदरास्यम् ॥ क्रीडंतमप्रतिभयं कमलोदरांघ्रिं संदश्य मर्मसु रुषा भुजया चछाद ॥ ९ ॥

ऊर्मयो यस्य सः पर्यक् परितो धावन् धनुःशतं प्लुतः प्रसृतः । नैतच्चित्रमित्याह । अनंतबलस्येति ॥ ७ ॥ ह्रदे विहरतो भुजदंडाहतोदकघोषं श्रुत्वा ततः स्वसदनाभिभवं निरीक्ष्य तदसहमानः सर्पः समसरत् समाजगाम ॥ ८ ॥ प्रेक्षणीयश्च सुकुमारश्च घनवदुज्ज्वलश्च तं श्रीवत्सपीतवसनं ह्रदे विहरतः श्रीवत्सेन संयुक्तमुज्ज्वलत्पीतं वस्त्रं यस्य तं भुजया भोगेन चछादावेष्टयत् ॥ ९ ॥

विषानें युक्त होऊन वर उसळलें आहे व ज्याच्या लाटा, विषानें तांबड्या पिंवळ्यावगैरे वर्णाच्या भयंकर झाल्या आहेत, तो कालियसर्पाचा डोह, चोहोंकडे पसरत पसरत चारशें हातपर्यंत विस्तार पावला. हे राजा, अनंतबळी अशा त्या कृष्णाचें हें कांहीं आश्चर्य नाहीं ॥ ७ ॥ हे राजा, नंतर डोहामध्यें मोठ्या हत्तीप्रमाणें लीला करून विहार करणाऱ्या त्या श्रीकृष्णाच्या भुजदंडांनीं ताडण केलेल्या पाण्याचा नाद ऐकून, त्या कृष्णाच्या क्रीडेनें आपल्या घराचा नाश होणार असें पाहून तें सहन न करणारा तो
कालियसर्प, कृष्णाजवळ धांवून आला ॥ ८ ॥ आणि त्यानें, देखणा, सुकुमार मेघासारखा श्यामवर्ण, श्रीवत्सलांछन व पिंवळा पीतांबर धारण करणारा, मंद हास्यानें मनोहर मुख दिसणारा, निर्भयपणें क्रीडा करणारा व कमळगर्भासारख्या कोमळचरणांनीं युक्त अशा त्या श्रीकृष्णाला क्रोधानें मर्मांमर्मांचेठिकाणीं दंश करून आपल्या देहानें

---

१ तेथें तो एक कळंब वृक्षमात्र, पूर्वी त्याच्यावर अमृत आणणारा गरुड बसला होता म्हणून, पुढें घडणाऱ्या श्रीकृष्णाच्या चरणस्पर्शभाग्यानें वांचला होता.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वेष्टित केलें ॥ ९ ॥ तेव्हां सर्पाच्या देहानें वेष्टित झालेल्या व हालचाल बंद पडलेल्या त्या कृष्णाला पाहून, ज्यांनीं आपले देह, मित्र, संपत्ति, स्त्रिया व इहलोकींचे व परलोकींचे भोग कृष्णाला अर्पण केले आहेत व ज्यांना तो कृष्णच प्रिय आहे असे त्याचे संवगडे गोप, अत्यंत दुःखित व दुःखानंतर अतिशय झालेल्या शोकानें व भयानें ज्यांची बुद्धि विवेकशून्य झाली आहे असे ते मूर्छित होऊन पडले ॥ १० ॥ तशाच गाई, वृषभ व कालवडी ह्या सर्वहि श्रीकृष्णाकडे आपल्या दृष्टि लावून, तो कृष्ण सर्पानें वेष्टित झाल्यामुळें निश्चेष्ट झाला आहे असें पाहून, अत्यंत दुःखित व भयाभीत होऊन, आक्रंदन करीत रडतच आहेत कीं काय अशा उभ्या राहिल्या ॥ ११ ॥ त्याच वेळीं गोकुळामध्यें पुढें लवकरच भय सुचविणारे भूमीवर भूकंपादिक, आकाशामध्यें उल्कापातादिक व देहाचेठिकाणीं वामनेत्रस्फुरणादिक असे तीन प्रकारचे अतिभयंकर महोत्पात होऊं लागले ॥ १२ ॥ हे राजा, त्यांना पाहून, नंदप्रभृति सर्व गोप, बलरामावांचून कृष्ण गाई चारण्याकरितां वनांत गेला आहे असें जाणून नंतर त्या झालेल्या उत्पातांनीं कृष्ण मरण पावला असें मनांत आणून भयानें व्याकुळ झाले आणि 'कृष्णाच्या वियोगानें, झालेलें' दुःख, 'पुढें निर्वाह

स प्रियो येषां ते तत्प्रियास्ते च ते सखायश्चेति तथा॥ १० ॥ ११ ॥ भुवि भूकंपादयः । दिवि उल्कापातादयः । आत्मनि वामनेत्रस्फुरणादयः । आसन्नं भयं शंसितुं शीलं येषां

तन्नागभोगपरिवीतमदृष्टचेष्टमालोक्य तत्प्रियसखाः पशुपा भृशार्ताः ॥ कृष्णेऽर्पितात्मसुहृदर्थकलत्रकामा दुःखानुशोकभयमूढधियो निपेतुः ॥ १० ॥ गावो वृषा वत्सतर्यः क्रंदमानाः सुदुःखिताः ॥ कृष्णे न्यस्तेक्षणा भीता रुदंत्य इव तस्थिरे ॥ ११ ॥ अथ व्रजे महोत्पातास्त्रिविधा ह्यतिदारुणाः ॥ उत्पेतुर्भुवि दिव्यात्मन्यासन्नभयशंसिनः ॥ १२ ॥ तानालक्ष्य भयोद्विग्ना गोपा नंदपुरोगमाः ॥ विना रामेण गाः कृष्णं ज्ञात्वा चारयितुं गतम् ॥ १३ ॥ तैर्दुर्निमित्तैर्निधनं मत्वा प्राप्तमतद्विदः ॥ तत्प्राणास्तन्मनस्कास्ते दुःखशोकभयातुराः ॥ १४ ॥ आबालवृद्धवनिताः सर्वेऽग पशुवृत्तयः ॥ निर्जग्मुर्गोकुलाद्दीनाः कृष्णदर्शनलालसाः ॥ १५ ॥ तांस्तथा कातरान्वीक्ष्य भगवान्माधवो बलः ॥ प्रहस्य किंचिन्नोवाच प्रभावज्ञोऽनुजस्य सः ॥ १६ ॥ तेऽन्वेषमाणा दयितं कृष्णं सूचितया पदैः ॥ भगवल्लक्षणैर्जग्मुः पदव्या यमुनातटम् ॥ १७ ॥

ते ॥ १२ ॥ तानालक्ष्य गोकुलान्निर्जग्मुरिति तृतीयेनान्वयः । भयोद्विग्ना भयहेतुभ्यो भीताः । भयेन कंपमाना इति वा ॥ १३ ॥ न तं विदंतीत्यतद्विदः ॥ १४ ॥ पशुवृत्तयोऽतिवत्सलाः ॥ १५ ॥ कातरान् भीतान् ॥ १६ ॥ भगवंतं लक्षयंति । यानि पदानि तैः पदैः सूचितया पदव्या मार्गेण ॥ १७ ॥

कसा होईल याबद्दलचा चिंतारूप' शोक व 'आतां कृष्णवियोगानें आह्मांस मरण प्राप्त होईल असें' भय यांच्या योगानें ते अगदीं गडबडून गेले. कारण ते कृष्णाचा खरा प्रभाव जाणणारे नव्हते व त्यांचे पंचप्राण व मन हीं कृष्णाचेठिकाणीं अगदीं गढून गेलीं होतीं ॥ १३ ॥ १४ ॥ नंतर दीन व वत्सांचा वियोग झालेल्या माईप्रमाणें आक्रोश करणारे ते सर्व गोप, बाल वृद्ध व स्त्रिया यांसहित कृष्णाच्या दर्शनाविषयीं उत्कंठित होऊन कृष्णाचा शोध करण्यास जाण्याकरितां गोकुळांतून निघाले ॥ १५ ॥ ते नंदादिक गोप, तशाप्रकारें व्याकुळ झाले असें पाहून, मधुकुलामध्यें उत्पन्न झालेल्या व ज्ञानैश्वर्यादिगुणांनीं पूर्ण अशा त्या बलरामानें हास्य करून कांहींच भाषण केलें नाहीं. कारण, तो श्रीकृष्णाचा प्रभाव जाणणारा होता म्हणजे कृष्णाला कालियाचें भय नसून, त्याच्या मनांत कालियमर्दन पाहण्याकरितां नंदादिकांनीं यमुनेच्याकाठीं यावें असें आहे हें जाणत होता ॥ १६ ॥ असो, ते नंदादिक गोप, भगवंताला जाणविणाऱ्या लक्षणांनीं युक्त अशा पावलांनीं सुचविलेल्या मार्गानें प्रिय श्रीकृष्णाचा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शोध करित करीत यमुनेच्या कांठीं गेले ॥ १७ ॥ ह्मणजे हे राजा, त्या गोपांनीं, गाई जाण्याच्या मार्गावर तेथें तेथें दुसऱ्या गोपादिकांच्या पावलांच्या मध्येंमध्यें, कमळ, यव, अंकुश, वज्र, ध्वज या चिन्हांनीं युक्त अशीं गोपाधिपति श्रीकृष्णाचीं पावलें पाहून, मोठ्या त्वरेनें यमुनेच्या कांठीं गमन केलें ॥ १८ ॥ आणि ते दुरूनच डोहामध्यें कालियसर्पाच्या देहानें वेष्टित होऊन निश्चेष्ट झालेल्या कृष्णाला, तसेंच डोहाच्या कांठीं मूर्छा येऊन पडलेल्या गोपांना आणि आसमंताद्भागीं आक्रंदन करणाऱ्या गाई वगैरे पशूंना पाहून, अतिदुःखित होऊन मोठी मूर्छा पावले ॥ १९ ॥ त्यावेळीं कृष्णाचें प्रेम, मंदहास्य, अवलोकन व प्रियवचनें यांचें स्मरण करणाऱ्या व त्या अनंत भगवंताचेठिकाणीं अनुरक्तचित्त असलेल्या सर्व गोपी, प्रिय श्रीकृष्णाला कालियसर्पानें वेढून टाकिलें असें पाहतांच अत्यंत दुःखानें संतप्त झाल्या व प्रिय कृष्णानें रहित अशा त्रैलो-

---

पदैर्मार्गज्ञानप्रकारमाह । त इति । विश्पतेः श्रीकृष्णस्यान्येषां पदानामंतरांतरे मध्ये मध्ये तत्तदपोहेन गवां श्रुतीनां मार्गे सत्वरा अप्रमत्ता योगिनस्तत्तदुपाध्यपवादेन यथा परं तत्त्वं मृगयंते तद्वदिति भावः ॥ १८ ॥ ततश्च सर्पशरीरवेष्टितं कृष्णं दूरान्निरीक्ष्य गोपांश्च पशूंश्च तथा निरीक्ष्यार्ताः परमकश्मलं परं मोहं प्रापुः ॥ १९ ॥

ते तत्र तत्राब्जयवांकुशाशनिध्वजोपपन्नानि पदानि विश्पतेः ॥ मार्गे गवामन्यपदांतरांतरे निरीक्षमाणा ययुरंग सत्वराः ॥ १८ ॥
अंतर्ह्रदे भुजगभोगपरीतमारात्कृष्णं निरीहमुपलभ्य जलाशयांते ॥ गोपांश्च मूढधिषणान्परितः पशूंश्च संक्रंदतः परमकश्मलमापुरा-
र्ताः ॥ १९ ॥ गोप्योऽनुरक्तमनसो भगवत्यनंते तत्सौहृदस्मितविलोकगिरः स्मरंत्यः ॥ ग्रस्तेऽहिना प्रियतमे भृशदुःखतप्ताः शून्यं
प्रियव्यतिहृतं ददृशुस्त्रिलोकम् ॥ २० ॥ ताः कृष्णमातरमपत्यमनुप्रविष्टां तुल्यव्यथाः समनुगृह्य शुचः स्रवंत्यः ॥ तास्ता व्रजप्रिय-
कथाः कथयंत्य आसन्कृष्णाननेऽर्पितदृशो मृतकप्रतीकाः ॥ २१ ॥ कृष्णप्राणान्निर्विशतो नंदादीन्वीक्ष्य तं ह्रदम् ॥ प्रत्यषेधत्स
भगवान्रामः कृष्णानुभाववित् ॥ २२ ॥ इत्थं स्वगोकुलमनन्यगतिं निरीक्ष्य सस्त्रीकुमारमतिदुःखितमात्महेतोः ॥ आज्ञाय मर्त्यप-
दवीमनुवर्तमानः स्थित्वा मुहूर्तमुदतिष्ठदुरंगबंधात् ॥ २३ ॥

प्रियेण श्रीकृष्णेन व्यतिहृतं विरहितं त्रैलोक्यं शून्यं ददृशुः ॥ २० ॥ २१ ॥ २२ ॥ अनन्यगतिमात्मानमित्थं निरीक्ष्यातएवात्महेतोः स्वगोकुलमतिदुःखितमाज्ञायोरगबंधादुदतिष्ठदित्यन्वयः ॥ २३ ॥

क्याला शून्य पाहूं लागल्या ॥ २० ॥ आणि त्यावेळीं कृष्णाची माता (यशोदा) कृष्णाजवळ जाण्यासाठीं कालियाच्या डोहांत प्रवेश करूं लागली असतां, तिला हातानें धरून तिच्यासारख्याच दुःखानें युक्त व दुःखाश्रु ढाळणाऱ्या त्या गोपी, तिला बोध होण्यासाठीं गोकुलप्रिय श्रीकृष्णाच्या त्या त्या पूतनावधादिक कथा वर्णन करित होत्सात्या शेवटीं त्याहि कृष्णाच्या मुखाकडे आपल्या दृष्टि लावून शवतुल्य (मूर्छित) झाल्या ॥ २१ ॥ त्यावेळीं ज्यांचे पंचप्राण इंद्रियें व अंतःकरणें कृष्णाकडेच लागले आहेत ते नंदादिक गोपहि कालियाच्या डोहांत प्रवेश करूं लागले असें पाहून, कृष्णाचा पराक्रम जाणणाऱ्या त्या भगवान् रामानें, त्यांना 'आतां कृष्ण कालियाचा निग्रह करून बाहेर येईल' तुह्मी डोहांत प्रवेश करूं नका असें सांगितलें ॥ २२ ॥ यामप्रमाणें मनुष्यलीलेला अनुसरणाऱ्या त्या श्रीकृष्णानें, दोन घटिकापर्यंत ॥ ६० ॥
कालियसर्पाच्या वेष्टनामध्यें सहून आपल्या वियोगानें बायकामुलांसुद्धां सर्व गोकुळ अतिदुःखित झालें आहे असें पाहून व यांचा रक्षक मीच आहें दुसरा कोणी

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

~~नाहीं असें जाणून,~~ कालियसर्पानें केलेल्या वेष्टनरूप बंधनापासून बाहेर पडण्याकरितां आपला देह फुगविला ॥ २३ ॥ तेव्हां त्या कृष्णाच्या फुगविलेल्या शरीरानें देहांत कळा लागलेला तो कालियसर्प, कृष्णाला घातलेला वेढा काढून श्वासोच्छ्वास टाकीत रागानें आपल्या फड्या उचलून, ज्याच्या नाकपुड्यांतून श्वासोच्छ्वासाबरोबर विष बाहेर पडत आहे, ज्याचे वटारलेले डोळे, मांडे भाजण्याच्या तापलेल्या खापरासारखे लाल दिसत आहेत व ज्याच्या मुखांमध्यें गरगर फिरविलेल्या कोलतीसारख्या लळलळीत जिव्हा हालत आहेत असा तो सर्प, कृष्णाला पाहात ताठ उभा राहिला ॥ २४ ॥ तेव्हां तो कृष्णहि क्रीडा करित होतसाता, प्रत्येक मुखांमध्यें दोन अग्रें असलेल्या जिभेनें दोन्ही ओठांचे प्रांत चाटणाऱ्या व अतिभयंकर विषाग्नियुक्त दृष्टीनें युक्त असलेल्या त्या कालियसर्पाच्या सभोंवार त्याच्या फड्यांवर उडी मारण्याचा

तस्य प्रथ्यमानेन वपुषा व्यथितात्मशरीरो भुजंगः कुंडलीमुन्मुच्य तं त्यक्त्वा कुपितः स्वफणानुन्नमय्य श्वसन्केवलमीक्षमाणस्तस्थौ । कथंभूतः । श्वसनरंध्रेषु नासाविवरेषु विषं यस्य स तथा अंबरीषो मंडकपाकभाजनं तद्वत्संतप्तानि स्तब्धानीक्षणानि यस्य स तथा उल्मुकानि मुखेषु यस्य स च स च स च ॥ २४ ॥ हरिश्च क्रीडंस्तममुं सर्पं परिससार परितो बभ्राम । अतिकरालविषाग्नियुक्ता दृष्टिर्यस्य तम् । जिह्वया द्विशिखयेति प्रतिमुखम् ॥ २५ ॥ एवं परिभ्रमेणैव हतमोजो यस्य तम् । उन्नतांसौ यस्य तम् । तस्य

तत्प्रथ्यमानवपुषा व्यथितात्मभोगस्त्यक्त्वोन्नमय्य कुपितः स्वफणान्भुजंगः ॥ तस्थौ श्वसन् श्वसनरंध्रविषांबरीषस्तब्धेक्षणोल्मुकमुखो हरिमीक्षमाणः ॥ २४ ॥ तं जिह्वया द्विशिखया परिलेलिहानं द्वे सृक्किणी ह्यतिकरालविषाग्निदृष्टिम् ॥ क्रीडन्नमुं परिससार यथा खगेंद्रो बभ्राम सोऽप्यवसरं प्रसमीक्षमाणः ॥ २५ ॥ एवं परिभ्रमहतौजसमुन्नतांसमानम्य तत्पृथुशिरःस्वधिरूढ आद्यः ॥ तन्मूर्धरत्ननिकरस्पर्शातिताम्रपादांबुजोऽखिलकलादिगुरुर्ननर्त ॥ २६ ॥ तं नर्तुमुद्यतमवेक्ष्य तदा तदीयगंधर्वसिद्धसुरचारणदेववध्वः ॥ प्रीत्या मृदंगपणवानकवाद्यगीतपुष्पोपहारनुतिभिः सहसोपसेदुः ॥ २७ ॥ यद्यच्छिरो न नमतेऽग शतैकशीर्ष्णस्तत्तन्ममर्द खलदंडधरोंऽघ्रिपातैः ॥ क्षीणायुषो भ्रमत उल्बणमास्यतोऽसृङ्नस्तो वमन्परमकश्मलमाप नागः ॥ २८ ॥

मूर्धसु ये रत्ननिकरास्तेषां स्पर्शेनात्यरुणं पादांबुजं यस्य सः । ननु कथं चंचलेषु शिरस्सु ननर्त तत्राह । अखिलकलानामादिगुरुः ॥ २६ ॥ उपसेदुः प्राप्ताः ॥ २७ ॥ शतैकशीर्ष्णः शतमेकानि मुख्यानि शीर्षाणि यस्य तस्य क्षीणायुषोऽपि पुनर्भ्रमतो यद्यच्छिरो न नमते स्तब्धतां न जहाति । नृत्यच्छलेनांघ्रिपातैस्तत्तन्ममर्द तदा चास्यतो मुखेभ्यो नस्तो नासाविवरेभ्यश्चासृग्वमन् ॥ २८ ॥

संधि साधण्यासाठीं, गरुडासारखा निर्भयपणें फिरूं लागला आणि तो सर्पहि कृष्णाला दंश करण्याचा संधि साधण्याकरितां आपल्याच सभोंवार गरगर फिरूं लागला ॥ २५ ॥ याप्रमाणें आपल्या सभोंवार फिरण्यानेंच शक्तिक्षीण झालेल्या परंतु वर फड्या उचलणाऱ्या त्या कालियाला खालीं वांकवून त्याच्या मोठ्या फड्यांवर आरूढ झालेला व नृत्यादि कौशल्यांचा आदिगुरु असा तो आदिपुरुष भगवान् श्रीकृष्ण, तेथें नृत्य करूं लागला. त्यावेळीं त्याचें चरणकमळ, मूळचेंच तांबडें असून तें त्या कालियाच्या फड्यांवर असलेले जे रत्नसमूह त्यांच्या स्पर्शानें विशेष तांबडें झालें ॥ २६ ॥ तेव्हां गंधर्व, सिद्ध, देव, चारण व अप्सरा, ही त्याची सेवक मंडळी, तो आपला स्वामी श्रीकृष्ण, नृत्य करण्यास उद्युक्त झाला असें जाणून, त्वरेनें तेथें (आकाशांत) येऊन मृदंग, पणव, आनकवगैरे वाद्यें, गायनें, पुष्पवृष्टि, नैवेद्य व स्तुति यांच्या योगेंकरून त्याचें सेवन करूं लागली ॥ २७ ॥ हे राजा, ~~त्यावेळीं खलांना दंड धारण करणाऱ्या~~ त्या श्रीकृष्णानें, ज्याला शंभर मुख्य मस्तकें आहेत व जो क्षीणबळ

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होऊन मेल्यासारखा झाला असूनहि क्रोधवश असल्यामुळें पुनःपुनः मस्मर फिरत असे त्या कालियाचें, जें जें मस्तक, आपला ताठपणा टाकून नम्र होईना तें तें मस्तक, नृत्याच्या छलानें पायांचे प्रहार करून मर्दन केलें. तेव्हां तो सर्प, मुखांतून व नाकपुड्यांतून विषानें मिश्र असें भयंकर रक्त वमन करीत होत्साता मोठी मूर्छा पावला ॥ २८ ॥ तथापि पुन्हा क्रोधानें मोठ्यानें श्वासोच्छ्वास टाकणाऱ्या व नेत्रांतून विषाचें वमन करणाऱ्या त्या कालियसर्पाच्या मस्तकांपैकीं जें जें मस्तक वर फडी करीत असे तें तें श्रीकृष्णानें, आपल्या नृत्य करणाऱ्या पायांच्या प्रहारानें वांकवून दमवून टाकिलें. यावेळीं हर्ष पावलेल्या गंधर्वादिकांनीं तो श्रीकृष्ण, शेषासन अशा पुराण पुरुषासारखा (श्रीनारायणासारखा) पुष्पांनीं पूजन केला किंवा गंधर्वादिकांनीं पुष्पांनीं पूजा केलेला तो श्रीकृष्ण, सर्व गोपांनीं शेषासन श्रीनारायणासारखा पाहिला ॥ २९ ॥ हे राजा, त्या श्रीकृष्णाच्या अलौकिक तांडवनृत्यानें ज्याच्या छत्र्यांसारख्या मोठ्या फड्या फाटून गेल्या आहेत व पूर्वी फुगणाऱ्या त्या श्रीकृ-

---

पुनरपि रुषा उच्चैर्निःश्वसतो यद्यत्समुन्नमति तत्तत्पदाघातेनानुनमयन्विहास्मिन्नवसरे हृष्टैर्गंधर्वादिभिः शेषासनः पुराणः पुरुष इव यशोदानंदनः पुष्पैः प्रपूजितः । यद्वा तदा गंधर्वादिभिः पुष्पैः प्रपूजितो गोपैः पुराणः पुमानिव दृष्ट इति । यद्वा पुष्पैः प्रपूजित इव प्रसन्नः सन्दमयांबभूव । द्विवं कृतवानित्यर्थः ॥ २९ ॥ शरणं शरणम् ॥ ३० ॥

तस्याक्षिभिर्गरलमुद्वमतः शिरस्सु यद्यत्समुन्नमति निःश्वसतो रुषोच्चैः ॥ नृत्यन्पदानुनमयन्दमयांबभूव पुष्पैः प्रपूजित इवेह पुमान्पुराणः ॥ २९ ॥ तच्चित्रतांडवविरुग्णफणातपत्रो रक्तं मुखैरुरु वमन्नृप भग्नगात्रः ॥ स्मृत्वा चराचरगुरुं पुरुषं पुराणं नारायणं तमरणं मनसा जगाम ॥ ३० ॥ कृष्णस्य गर्भजगतोऽतिभरावसन्नं पार्ष्णिप्रहारपरिरुग्णफणातपत्रम् ॥ दृष्ट्वाऽहिमाद्यमुपसेदुरमुष्य पत्न्य आर्ताः श्लथद्वसनभूषणकेशबंधाः ॥ ३१ ॥ तास्तं सुविग्नमनसोऽथ पुरस्कृतार्भाः कायं निधाय भुवि भूतपतिं प्रणेमुः ॥ साध्व्यः कृतांजलिपुटाः शमलस्य भर्तुर्मोक्षेप्सवः शरणदं शरणं प्रपन्नाः ॥ ३२ ॥

गर्भे जगंति यस्य तस्यातिभारेणावसन्नमाक्रांतम् । पार्ष्णिः पादपृष्ठम् । आद्यं श्रीकृष्णम् । श्लथंतो विस्रंसमाना वसनादयो यासां ताः ॥ ३१ ॥ ताः शरणं प्रपन्नाः सत्यस्तं प्रणेमुः । सुविग्नमनसोऽतिविह्वलचित्ताः । भुवीति तस्मिन्स्थाने जलाधस्ताद्वा तीरे वा । शमलस्य पापात्मनोऽपि भर्तुर्मोक्षेप्सवः भर्तुर्यच्छमलं तस्य वा । भूतपतिं प्राणिमात्रस्य पतिम् । शरणदमाश्रयप्रदम् ॥ ३२ ॥

ष्णाच्या शरीरानें ज्याचें शरीर हाडें चुरून खिळखिळें झालें आहे तो कालियसर्प, मुखानें पुष्कळ रक्ताचें वमन करित होत्साता, त्या श्रीकृष्णाला, हा चराचराचा गुरु पुराणपुरुष भगवान् नारायण आहे असें जाणून, मनानेंच शरण गेला ॥ ३० ॥ त्यावेळीं, ज्याच्या उदराचेठिकाणीं अनंत ब्रह्मांडें आहेत त्या श्रीकृष्णाच्या अतिशय भारानें व्याप्त झालेल्या व त्याच्या खोटांच्या प्रहारानें ज्याचीं फणारूप छत्रें फाटून (चिरून) गेलीं आहेत अशा त्या कालियसर्पाला पाहून, दुःखित झालेल्या त्याच्या स्त्रिया (नागपत्नी) शरण जाण्याच्या गडबडीनें ज्यांचीं वस्त्रें, भूषणें व केशांचीं बंधनें सैल झालीं आहेत अशा होऊन श्रीकृष्णाजवळ प्राप्त झाल्या ॥ ३१ ॥ आणि आपल्या अपराधी पतीची मुक्तता होण्याची इच्छा करणाऱ्या व अतिशय खिन्नचित्त झालेल्या त्या साध्वी नागिणी, आपल्या बालकांना पुढें करून भूमिवर (पाण्याचे खालीं त्याचठिकाणीं) आपलें शरीर दंडासारखें पाडून हात जोडून प्राणिमात्रांचा पालक व शरणागतांना आश्रय देणारा अशा त्या श्रीकृष्णाला शरण गेल्या आणि

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्यांनीं त्याला नमस्कार केले ॥ ३२ ॥ आणि त्या नागपत्नी, प्रथमतः कुपित झालेल्या भगवंताची, दंडानुमोदनानें शांतवा करीत होत्सात्या स्तुति करीत ह्मणाल्या कीं, –हे देवा, दंश करणें व वेढा घालणेंवगैरे अपराध करणाऱ्या या सर्पाविठिकाणीं तूं केलेला हा दंड योग्यच आहे. कारण, शत्रूवर आणि पुत्रांवरहि सारखी दृष्टि ठेवणाऱ्या तुझा हा अवतार खळांच्या निग्रहाकरितां व साधूंच्या रक्षणाकरितां आहे. यास्तव तूं दुष्टांना पापनिवृत्तिवगैरे फल प्राप्त होणार हें सुचवीत होत्साताच दंड करित असतोस ॥ ३३ ॥ आतां हा दंड नव्हे तर अनुग्रहच आहे असें सांगतात– हे प्रभो, तूं हा आह्मांला जो दंड केलास हा अनुग्रहच केला आहेस. कारण, तूं केलेला दंड खरोखर दुष्टांचे सर्व दोष घालविणारा होतो. ज्याअर्थीं देहधारी अशा या कालियाला जन्मांतरच्या पातकानें हें सर्पयोनित्व दिसत आहे त्याअर्थीं त्या सर्पयोनीला कारणभूत असलेल्या पापाची निवृत्तिकरणारा व क्रोधत्वेंकरून भासणारा हा तुझा दंडहि 'क्रोधोऽपि देवस्य वरेण तुल्यः' इत्यादि-

---

प्रथमं तावत्कुपितं भगवंतं दंडानुमोदनेनोपशमयंत्यः स्तुवंति । न्याय्यो हीति । तत्र । दंडानुमोदनं षड्भिर्दशभिश्च हरेर्नेतिः ॥ प्रार्थनं पंचभिः श्लोकैस्ततः पन्नगयोषिताम् ॥ न च निग्रहानुग्रहलक्षणं वैषम्यं तवास्तीत्याहुः । धत्से दममिति । अनुशंसन्नालोचयन् ॥ ३३ ॥ निग्रहोऽप्यनुग्रहायेत्युक्तमिदानीमनुग्रह एवायं न निग्रह इत्याहुः । अनुग्रह

नागपत्न्य ऊचुः ॥ न्याय्यो हि दंडः कृतकिल्बिषेऽस्मिंस्तवावतारः खलनिग्रहाय ॥ रिपोः सुतानामपि तुल्यदृष्टेर्धत्से दमं फलमेवानुशंसन् ॥ ३३ ॥ अनुग्रहोऽयं भवता कृतो हि नो दंडोऽसतां ते खलु कल्मषापहः ॥ यद्दंदशूकत्वममुष्य देहिनः क्रोधोऽपि तेऽनुग्रह एव संमतः ॥ ३४ ॥ तपः सुतप्तं किमनेन पूर्वं निरस्तमानेन च मानदेन ॥ धर्मोऽथवा सर्वजनानुकंपया यतो भवांस्तुष्यति सर्वजीवः ॥ ३५ ॥ कस्यानुभावोऽस्य न देव विद्महे तवांघ्रिरेणुस्पर्शाधिकारः ॥ यद्वांछया श्रीर्ललनाऽचरत्तपो विहाय कामान्सुचिरं धृतव्रता ॥ ३६ ॥

इति । नोऽस्माकं यस्मादमुष्य सर्पत्वं दृश्यतेऽतस्तन्मूलपापनिवर्तको दंडोऽनुग्रह एव क्रोधत्वेन प्रतीयमानोऽपीत्यर्थः ॥ ३४ ॥ महांश्चायमनुग्रह इति तस्य पूर्वपुण्यमभिनंदंति । तप इति । स्वयं मानरहितेनान्येभ्यो मानदेन च । सर्वं जीवयतीति सर्वजीवः ॥ ३५ ॥ न तपआदिनिमित्त एष भाग्योदयः किंत्वचिंत्यं तव कृपावैभवमित्याहुः श्लोकत्रयेण । कस्यानुभाव इति । तपआदिना ब्रह्मादयोऽपि यस्याः श्रियः प्रसादमिच्छंति सा श्रीर्ललना उत्तमा स्त्री यस्य त्वदंघ्रिस्पर्शाधिकारस्य वांछया

क वाक्यें प्रमाण असल्यामुळें 'अनुग्रहच आहे असें सत्पुरुषांना मान्य आहे ॥ ३४ ॥ आतां कालियाच्या पूर्वपुण्याचें अभिनंदन करित ह्मणतात– हे देवा, सर्वांची जीविका चालविणारा तूं ज्या तपाच्या अथवा धर्माच्या योगानें संतुष्ट होत आहेस तसें तप ह्यानें पूर्वजन्मीं स्वतां मानरहित राहून व दुसऱ्यांना मान देऊन काय आचरण केलें होतें ? अथवा सर्वभूतांचेठिकाणीं दया करून धर्म तरी कोणता आचरण केला होता ? ॥ ३५ ॥ आतां हा याचा भाग्योदय, तप व धर्म इत्यादिकेंकरून संपादन केलेला नव्हे, तर हें तुझ्या कृपेचें अचिंत्य वैभवच आहे असें सांगतात–हे देवा, ब्रह्मादिक देवहि तपादिकांच्या योगेंकरून जिच्या प्रसादाची इच्छा करितात त्या सर्व स्त्रियांमध्यें श्रेष्ठ, अशा लक्ष्मीनेंहि ज्या चरणरजाच्या स्पर्शाधिकाराची प्राप्ती होण्याच्या इच्छेनें सर्व उपभोग सोडून देऊन व आहारनियमादिक अनेक व्रतें धारण करून बहुत काळपर्यंत निरंतर तपश्चर्या केली, त्या तुझ्या चरणरजाच्या स्पर्शाचा अधिकार या नीच कालियाला प्राप्त झाला हा याच्या कोणत्या तपाचा किंवा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुण्याचा प्रभाव तें आह्मी जाणत नाहीं ॥ ३६ ॥ ज्या तुझ्या चरणरजाप्रत प्राप्त झालेले भक्तजन, स्वर्गस्थान, सर्वभूमीचें राज्य, ब्रह्मपद, पाताळादिबिळस्वर्गाचें राज्य, अणिमादिक ऐश्वर्यें किंवा मोक्ष यांचीदेखील मुळींच इच्छा करीत नाहींत, तर त्यांना तुच्छ मानतात ॥ ३७ ॥ व जें चरणरज मला सेव्य होवो. अशी इच्छा धरून जन्ममरणादि संसारचक्रामध्यें भ्रमण पावणाऱ्याहि प्राण्याला आपोआप इच्छितसंपत्ति प्राप्त होत्ये, हे नाथा, तें लक्ष्मी इत्यादिकांनांहि दुर्लभ असें तुझें चरणरज, हा तमोगुणापासून उत्पन्न झालेला व क्रोधाच्या स्वाधीन असणाराहि आमचा पति नागराज (कालिय) पावला. तेव्हां ह्याचें भाग्य किती वर्णन करावें ! ॥ ३८ ॥ यास्तव

तप आचरत् । अस्य सर्पस्य । स किं कृतवानिति कोऽवेत्तीत्यर्थः ॥ ३६ ॥ यत्तव पादरजः प्रपन्नाः प्राप्ताः पारमेष्ठ्याद्यपि तुच्छं मन्यंते ॥ ३७ ॥ अहो तदेषः अप्त्नत एव प्राप । अन्यैः श्र्यादिभिरपि । कथंभूतं पादरजः । यदिच्छतः सेव्यं मे भवत्विति प्रार्थयमानस्यैव समक्षः प्रत्यक्ष एव विभवोऽपेक्षिता संपद्भवति ॥ ३८ ॥ नमस्तुभ्यं भगवतेऽचिंत्यैश्वर्यादिगुणाय । तदुपपादनाय दशभिः श्लोकैर्विशेषणानि । पुरुषाय पूर्ष्वंतर्यामिरूपेण वर्तमानाय । महात्मने एवमपि नातिपरिच्छिन्नाय । कुतः । भूतावासाय आकाशाश्रयाय । एतदपि कुतः । भूताय पूर्वमपि सते । कुतः । पराय कारणाय । किंच परमात्मने कारणातीताय ॥ ३९ ॥ कारणत्वं

न नाकपृष्ठं न च सार्वभौमं न पारमेष्ठ्यं न रसाधिपत्यम् ॥ न योगसिद्धीरपुनर्भवं वा वांछंति यत्पादरजः प्रपन्नाः ॥ ३७ ॥ तदेष नाथाप दुरापमन्यैस्तमोजनिः क्रोधवशोऽप्यहीशः ॥ संसारचक्रे भ्रमतः शरीरिणो यदिच्छतः स्याद्विभवः समक्षः ॥ ३८ ॥ नमस्तुभ्यं भगवते पुरुषाय महात्मने ॥ भूतावासाय भूताय पराय परमात्मने ॥ ३९ ॥ ज्ञानविज्ञाननिधये ब्रह्मणेऽनंतशक्तये ॥ अगुणायाविकाराय नमस्ते प्राकृताय च ॥ ४० ॥ कालाय कालनाभाय कालावयवसाक्षिणे ॥ विश्वाय तदुपद्रष्ट्रे तत्कर्त्रे विश्वहेतवे ॥ ४१ ॥

कारणातीतत्वं च समर्थयितुमाहुः । ज्ञानविज्ञाननिधये ज्ञानं ज्ञप्तिः विज्ञानं चिच्छक्तिः उभयोर्निधये ताभ्यां पूर्णाय । कथं तथा त्वमत उक्तं ब्रह्मणेऽनंतशक्तये । कथंभूताय ब्रह्मणे । अगुणायाविकाराय । कथंभूतायानंतशक्तये । प्राकृताय प्रकृतिप्रवर्तकाय । अप्राकृतायेति वा अप्राकृतानंतशक्तियुक्ताय । अयमर्थः । अगुणत्वादविकारं ब्रह्म ज्ञप्तिमात्रत्कारणातीतं प्रकृतिप्रवर्तकोऽनंतशक्तिर्विज्ञाननिधित्वादीश्वरः कारणं तदुभयात्मने नम इति ॥ ४० ॥ अनंतशक्तित्वात्कालशक्त्या विश्वस्रष्ट्त्वादिरूपेण नमस्यंति । कालाय कालस्वरूपाय । कालनाभाय कालशक्त्याश्रयाय । कालावयवानां सृष्ट्यादिसमयानां साक्षिणे । ततश्च विश्वाय विश्वरूपाय । तर्हि किं जडोऽहं नहि तदुपद्रष्ट्रे । न च द्रष्टृमात्राय । किंतु तत्कर्त्रे नच कर्तृमात्राय । विश्वहेतवे सर्वकारकरूपाय ॥ ४१ ॥

अचिंत्य ऐश्वर्यादि गुणरूप, अंतर्यामी, इयत्तारहित, पंचमहाभूतांचा आश्रय, त्यांच्या पूर्वींहि असणारा व कारणरूपी असून कारणाहून निराळा अशा तुजकारणें आमचा नमस्कार असो ॥ ३९ ॥ आतां एकच कारण व कारणातीत कसा ? तें सांगत नमस्कार करितात-तूं अनंतशक्तींनीं युक्त, प्रकृतीचा प्रवर्तक व चैतन्यशक्तीनें पूर्ण असा ईश्वर असल्यामुळें कारणरूपी आहेस आणि गुणरहित, निर्विकारी व ज्ञानपूर्ण असा ब्रह्मरूपी असल्यामुळें कारणातीत आहेस, त्या उभयस्वरूपी तुला नमस्कार असो ॥ ४० ॥ आतां अनंतशक्ति असल्यामुळें कालशक्तीनें विश्वसृष्ट्यादिरूपी अशा त्या भगवंताला नमस्कार करितात-काळस्वरूपी, कालशक्तीचा आश्रय, सृष्टिकाल प्रळ- ॥ ६२ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

यकाल इत्यादिक कालांच्या अवयवांचा साक्षी, जगद्रूपी, जगाचा साक्षी, जगाचा कर्ता, जगाचें कारण, सूक्ष्मभूतें, इंद्रियें, प्राण, मन, बुद्धि व चित्त एतत्स्वरूपी व त्रिगुणात्मक अभिमानाच्या योगानें ज्यानें स्वतांच्या अंशभूत जीवांवा स्वानुभव गुप्त ठेवला आहे त्या तुला नमस्कार असो ॥ ४१ ॥ ४२ ॥ अनंत, सूक्ष्म, निर्विकार, सर्वज्ञ, अनेकप्रकारच्या अस्ति, नास्ति, सर्वज्ञ, किंचिज्ज्ञ, बद्ध, मुक्त, एक, अनेक इत्यादिक वादांना मायेच्या योगानें अनुसरणारा व नांवें आणि नावांचें वाच्य या शक्तिभेदांनीं नानाप्रकारें भासणारा अशा तुला नमस्कार असो ॥ ४३ ॥ प्रत्यक्षादि प्रमाणांचा आधार (नेत्रादि इंद्रियरूपी), स्वतःसिद्ध ज्ञानवान्, वेदरूप श्वासोच्छ्वासांनीं युक्त, व अ

तदेवाहुः । भूतमात्रेंद्रियप्राणमनोबुद्ध्याशयात्मने । आशयश्चित्तं भूतादिरूपाय । अतः सर्वकारकरूपायेति । अहंकारात्मतया नमस्यंति । त्रिगुणेनेति । एवं सृष्टे कार्ये यस्त्रिगुणोऽभिमानस्तेन गूढा स्वांशभूतानामात्मनां जीवानामनुभूतिर्येन तस्मै ॥ ४२ ॥ त्वं त्वहंकारानावृत इति स्तुवंति । नमोऽनंतायाहंकारापरिच्छेदात् । अतः सूक्ष्मायादृश्यत्वात् । अतएव कूटस्थायोपाधिकृतविकाराभावात् । अतएव विपश्चिते सर्वज्ञाय । एवं वस्तुतः स्तुत्वाऽचिंत्यमायात्वेन स्तुवंति । नानावादानुरोधाय अस्ति नास्ति सर्वज्ञः किंचिज्ज्ञो बद्धो मुक्त एकोऽनेक इत्यादिनानावादाननुरुणद्धि माययाऽनुवर्तते यस्तस्मै । किंच । वाच्यवाचकशक्तये । अभिधानाभिधेयशक्तिभेदादपि नानात्वेन प्रतीयमानायेत्यर्थः ॥ ४३ ॥ अनावृतमेव हेत्वंतरेणापि सूचयंत्यः स्तुवंति । नमः प्रमाणमूलाय चक्षुरादीनां चक्षुरादिरूपाय । अतएव कवये स्वयं तन्निरपेक्षज्ञानाय । कुतः । शास्त्रयोनये वेदात्मकनिःश्वासाय

भूतमात्रेंद्रियप्राणमनोबुद्ध्याशयात्मने ॥ त्रिगुणेनाभिमानेन गूढस्वात्मानुभूतये ॥ ४२ ॥ नमोऽनंताय सूक्ष्माय कूटस्थाय विपश्चिते ॥ नानावादानुरोधाय वाच्यवाचकशक्तये ॥ ४३ ॥ नमः प्रमाणमूलाय कवये शास्त्रयोनये ॥ प्रवृत्ताय निवृत्ताय निगमाय नमो नमः ॥ ४४ ॥ नमः कृष्णाय रामाय वसुदेवसुताय च ॥ प्रद्युम्नायानिरुद्धाय सात्वतां पतये नमः ॥ ४५ ॥ नमो गुणप्रदीपाय गुणात्मच्छादनाय च ॥ गुणवृत्त्युपलक्ष्याय गुणद्रष्ट्रे स्वसंविदे ॥ ४६ ॥

किंच प्रवृत्ताय निवृत्ताय निगमाय नमो नमः ॥ ४४ ॥ किंच अनावृतैश्वर्यत्वादेव चतुर्मूर्तिरूपेण सर्वोपास्यत्वेन नमंति । नमःकृष्णायेति श्लोकेन । रामाय संकर्षणाय वसुदेवसुताय च वसुदेवशब्दितं शुद्धं सत्त्वं तत्र प्रकाशमानाय वासुदेवायेत्यर्थः । सात्वतामुपासकानां पतये सालोक्यादिना पालकाय । एवं चतुर्मूर्तये कृष्णाय तुभ्यं नम इति ॥ ४५ ॥ कथं चतुर्मूर्तितेति तदाहुः । नमो गुणप्रदीपायेति । गुणा अंतःकरणानि तानि प्रदीपयति प्रकाशयतीति तथा तस्मै । चित्ताद्यधिष्ठातृत्वेन चतुर्मूर्तितेत्यर्थः । ननु तथाऽप्येकस्यैव कथं चतुष्ट्वमत आहुः । गुणात्मच्छादनाय तैरेव गुणैरुपासकानां फलवैचित्र्यायात्मानमाच्छाद्य नानात्वेन प्रकाशमानायेत्यर्थः । ननु तर्हि कथं प्रतीतिरत उक्तं गुणवृत्त्युपलक्ष्याय चित्तादीनां चेतनाद्यध्यवसायादिवृत्तिभिरुपलक्ष्याय । उपलक्षणमेवाहुः । गुणद्रष्ट्रे तत्साक्षिणे कथंचिदुपलक्ष्य एव न ज्ञेय इत्याहुः । स्वसंविदे । अगोचरायेत्यर्थः ॥ ४६ ॥

नेकप्रकारचे विधिनिषेध दाखविणारा अशा वेदरूपी तुज भगवंताला वारंवार नमस्कार असो ॥ ४४ ॥ आतां चतुर्व्यूहमूर्तिरूपानें सर्वोपास्यत्व दर्शवून नमस्कार करितात हे प्रभो, संकर्षण, वासुदेव, प्रद्युम्न व अनिरुद्ध अशा चार मूर्तींनीं उपासकांचा पालक अशा तुज कृष्णाला वारंवार नमस्कार असो ॥ ४५ ॥ आतां एकाला चतुर्मूर्तिपण कसा तें दर्शवीत नमस्कार करितात—मन, बुद्धि, अहंकार व चित्त ह्या अंतःकरणांच्या चार भेदांना प्रकाशित करणारा, त्याच भेदांनीं उपासकांना वेगवेगळीं फळें प्राप्त होण्यासाठीं गुणांच्या योगेंकरून आपलेंच आच्छादन करून घेऊन नानाप्रकारें प्रकाशमान होणारा, चित्तादिकांच्या चेतना निश्चय इत्यादिक वृत्तींनीं उपलक्षित, त्यांचा साक्षी व स्वतःसिद्ध ज्ञानवान् ह्मणजे चित्तादिक, ज्याचा शोधमात्र करितात परंतु त्यांना जो समजत नाहीं अशा तुला नमस्कार असो ॥ ४६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हे इंद्रियप्रवर्तका, अतर्क्य महिम्यानें युक्त, सर्वप्रकारच्या ज्ञानाचें मूळकारण, स्वस्वरूपीं रममाण होणारा व त्याच स्वभावाचा अशा तुला नमस्कार असो ॥ ४७ ॥ स्थूल व सूक्ष्म अशा सर्व तत्त्वांच्या गति जाणणारा, सर्वांचा अधिष्ठाता, जगाच्या निषेधाचा अवधि, जग भासण्याचा आधार, जगाचा अध्यास व अपवाद यांचा साक्षी, आणि ते जगाचा अध्यास व अपवाद हे होण्याचें अविद्या आणि विद्या यांच्या योगानें कारण अशा तुला नमस्कार असो ॥ ४८ ॥ याप्रमाणें दंडाच्या अनुमोदनानें व नमस्कारांनीं भगवंताला प्रसन्न करून घेऊन, आतां तुझ्या स्वाधीन असणाऱ्या प्राण्यांचा काय अपराध आहे ? अशा आशयानें प्रार्थना करितात– हे प्रभो, तूं वस्तुतः

अगोचरत्वमुपलक्ष्यत्वं च दर्शयंतो नमंति। अव्याकृतविहाराय अतर्क्यमहिम्न इत्यर्थः। सर्वव्याकृतसिद्धये सर्वकार्योत्पत्तिप्रकाशहेतुत्वेनोपलक्षणयोग्यायेत्यर्थः। उपलक्षणांतरमाहुः। हे हृषीकेश करणप्रवर्तक किं विषयलिप्सया न मुनये आत्मारामाय। किं साधनवशेन वा नहि मौनशीलिने मौनमात्मारामता तत्स्वभावाय ॥ ४७ ॥ कुतः। परावरगतिज्ञाय स्थूलसूक्ष्माणां गतिज्ञत्वेन न क्वापि सज्जमानायेत्यर्थः। अपि च सर्वाध्यक्षाय सर्वस्याधिष्ठात्रे। कुत एतत्। अविश्वाय न विश्वं यस्मिंस्तन्निषेधावधये। विश्वाय च तद्विवर्ताधिष्ठानायेत्यर्थः। किंच तद्द्रष्ट्रे अध्यासापवादसाक्षिणे। अपिच अस्य विश्वाध्यासस्य तदपवादस्य चाविद्याविद्याभ्यां हेतवे। यद्वा अविश्वाय विश्वतैजसाद्यवस्थारहिताय विश्वाय च मायया

अव्याकृतविहाराय सर्वव्याकृतसिद्धये ॥ हृषीकेश नमस्तेऽस्तु मुनये मौनशीलिने ॥ ४७ ॥ परावरगतिज्ञाय सर्वाध्यक्षाय ते नमः अविश्वाय च विश्वाय तद्द्रष्ट्रेऽस्य च हेतवे ॥ ४८ ॥ त्वं ह्यस्य जन्मस्थितिसंयमान्प्रभो गुणैरनीहोऽकृत कालशक्तिधृक् ॥ तत्तत्स्वभावान्प्रतिबोधयन्सतः समीक्षयामोघविहार ईहसे ॥ ४९ ॥ तस्यैव तेऽमूस्तनवस्त्रिलोक्यां शांता अशांता उत मूढयोनयः ॥ शांताः प्रियास्ते ह्यधुनाऽवितुं सतां स्थातुश्च ते धर्मपरीप्सयेहतः ॥ ५० ॥

स्वांशैस्तत्तदवस्थाय। तद्द्रष्ट्रे तासामवस्थानां भावाभावसाक्षिणे। अन्यत्समानम्। तस्मात्सर्वगतिज्ञत्वसर्वाधिष्ठातृत्वात्मारामत्वादिभिर्निरतिशयैश्वर्याय तुभ्यं नम इति। विशेषणैरसंकीर्णैः पंचपंचाशता नतः ॥ अहिस्त्रीभिः प्रसन्नो वस्तासामिव भवेद्धरिः ॥ ४८ ॥ एवं तावद्दंडानुमोदनेन नमस्कारैश्च भगवंतं प्रसाद्येदानीं त्वदधीनानां प्राणिनां कोऽपराध इत्याशयवत्यः प्रार्थयंते। त्वं हीति। अस्य लोकस्य जन्मादि त्वमेव अकृत अकरोः ततश्च तांस्तान्संस्काररूपेण सतः स्वभावान्घोरत्वादीन्प्रतिबोधयन्नीहसे क्रीडसि। यद्वा अस्य जन्मादींस्त्वमीहस इत्यन्वयः। कथंभूतः। अकृताऽनादिर्या कालशक्तिस्तां धारयतीति तथा। अन्यत्समानम् ॥ ४९ ॥ अतस्तस्य तवैवामूस्तनवस्तन्यंत इति क्रीडोपस्कराः तथापि तवाधुना शांताः प्रियाः। कुतः। सतां धर्मपरिपालनेच्छया ईहतः प्रवर्तमानस्यातस्तानवितुं स्थातुः स्थितस्य ॥ ५० ॥

निरिच्छ असूनहि अनादिसिद्ध अशा कालशक्तीचा स्वीकार करून जीवांना चतुर्विध पुरुषार्थ देणारी सृष्टयादि लीला करित होत्साता, केवळ अवलोकनमात्रेंकरून संस्काररूपानें असलेल्या, प्राण्यांच्या त्या त्या शांतघोरादिक स्वभावांना जागृत करीत गुणांच्या योगानें या जगाचे उत्पत्तिस्थितिसंहार करितोस ॥ ४९ ॥ त्या तुझ्याच त्रैलोक्यामध्यें ह्या अनेकप्रकारच्या कांहीं शांत (सात्विक) काहीं अशांत (राजस) व कांहीं मूढ (तामस) अशा मूर्ति आहेत. त्यांपैकीं सांप्रतकाळीं साधूंच्या धर्मरक्षणासाठीं प्रवृत्त होऊन अवतार धारण करणाऱ्या व तें (धर्मरक्षण) करीत असलेल्या तुला शांत (सात्विक) मूर्तीच प्रिय आहेत; इतर (रासज किंवा तामस) प्रिय नाहींत ॥ ५० ॥ ॥ ६३ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ ५० ॥ तथापि ज्याअर्थी आपल्या प्रजेनें केलेला अपराध स्वामीनें एकवार सहन करावा असें आहे त्याअर्थी हे शांतचित्ता कृष्णा, तामस असल्यामुळें तुला न जाणणाऱ्या ह्या मूढ कालियसर्पाचा अपराध तूं क्षमा करण्यास योग्य आहेस ॥ ५१ ॥ हे भगवन्, ज्याअर्थी हा कालियसर्प, प्राण टाकीत आहे हा त्याअर्थी आतां याच्यावर अनुग्रह कर आणि पराधीन असल्यामुळें साधूंनाहि शोक करण्यास योग्य अशा आह्मां स्त्रियांना हा पतिरूप प्राण अर्पण कर ॥ ५२ ॥ आतां तुमच्यावर अनुग्रह केला असतां इतरांना मृत्यु प्राप्त होईल असें ह्मणशील तर– तुझी आज्ञा करणाऱ्या आह्मां दासींनां, आह्मीं काय करावें ? तें सांग. कारण, तुझी आज्ञा पालन करणारा पुरुष, सर्वप्रकारच्या भयांनीं युक्त अशा संसारापासूनहि मुक्त होतो ॥ ५३ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, याप्रमाणें नागपत्न्यांनीं स्तुतिनमस्कारादिकेंकरून प्रार्थना केलेल्या त्या भगवान् श्रीकृष्णानें, पायांच्या प्रहारांनीं फड्या फाटून गेलेल्या व मूर्छित झालेल्या त्या कालियसर्पाला सोडून दिलें व त्याच्या पुढें आपण उभा राहिला ॥ ५४ ॥ नंतर हळुहळू

एवं तवाप्रियाचरणाद्यपराधस्तर्हि सोढव्य इति ॥ ५१ ॥ ५२ ॥ युष्मदनुग्रहेऽन्येषां मृत्युरेवेति चेत्तत्रेत्याहुः । विधेहीति । त्वदाज्ञया प्राणिनो नाद्यामेति भावः ॥ ५३ ॥ ५४ ॥ ॥ ५५ ॥ यदसद्ग्रह इति । यतः स्वभावोऽसद्रूपः । यद्वा यतः स्वभावादस्मति देहादौ ग्रहः स दुस्त्यज इति ॥ ५६ ॥ गुणैर्विविधतया युज्यत इति गुणविसर्जनम् । तत्रापि

अपराधः सकृद्भर्त्रा सोढव्यः स्वप्रजाकृतः ॥ क्षंतुमर्हसि शांतात्मन्मूढस्य त्वामजानतः ॥ ५१ ॥ अनुगृह्णीष्व भगवन्प्राणांस्त्यजति पन्नगः ॥ स्त्रीणां नः साधु शोच्यानां पतिः प्राणः प्रदीयताम् ॥ ५२ ॥ विधेहि ते किंकरीणामनुष्ठेयं तवाज्ञया ॥ यच्छ्रद्धयाऽनुतिष्ठन्वै मुच्यते सर्वतो भयात् ॥ ५३ ॥ श्रीशुक उवाच ॥ इत्थं स नागपत्नीभिर्भगवान्समभिष्टुतः ॥ मूर्छितं भग्नशिरसं विससर्जांघ्रिकुट्टनैः ॥ ५४ ॥ प्रतिलब्धेंद्रियप्राणः कालियः शनकैर्हरिम् ॥ कृच्छ्रात्समुच्छ्वसन्दीनः कृष्णं प्राह कृतांजलिः ॥ ५५ ॥ वयं खलाः सहोत्पत्त्या तामसा दीर्घमन्यवः ॥ स्वभावो दुस्त्यजो नाथ लोकानां यदसद्ग्रहः ॥ ५६ ॥ त्वया सृष्टमिदं विश्वं धातर्गुणविसर्जनम् ॥ नानास्वभाववीर्यौजोयोनिबीजाशयाकृति ॥ ५७ ॥ वयं च तत्र भगवन्सर्पा जात्युरुमन्यवः ॥ कथं त्यजामस्त्वन्मायां दुस्त्यजां मोहिताः स्वयम् ॥ ५८ ॥ भवान्हि कारणं तत्र सर्वज्ञो जगदीश्वरः ॥ अनुग्रहं निग्रहं वा मन्यसे तद्विधेहि नः ॥ ५९ ॥

नानास्वभावादयो यस्य तत् ॥ ५७ ॥ जात्या जन्मनैवोरुर्मन्युर्येषां ते वयं स्वयं कथं त्यजामः ॥ ५८ ॥ हि यस्मात्तत्र त्वन्मायात्यागे भवानेव कारणमित्यनुग्रहं विधेहि ममाज्ञया खादंतीति ईश्वरत्वान्निग्रहं वा विधेहीति ॥ ५९ ॥

इंद्रियें व प्राण प्राप्त झालेला तो दीन कालियसर्प, मोठ्या कष्टानें श्वासोच्छ्वास टाकीत हात जोडून त्या श्रीकृष्णाला ह्मणाला कीं,– ॥ ५५ ॥ कालिय ह्मणाला– हे देवा, आह्मीं जन्मतःच दुसऱ्यांना दुःख देणारे दुष्ट, तामसी व दीर्घकोपी आहों. हे नाथा, सर्वप्राण्यांना आपला स्वभाव टाकणें हें मोठें कठीण आहे. कारण, ज्या स्वभावाच्या योगानें प्राण्यांना देहादिकांचेठिकाणीं अहंताममतादिरूप दुराग्रह प्राप्त होतो ॥ ५६ ॥ हे सृष्टि करणाऱ्या देवा, गुणाच्या योगानें नानाप्रकारें निर्मिलेलें हें जग, तूंच उत्पन्न केलें आहेस. यामध्यें नानाप्रकारचे शांत, घोर इत्यादिक स्वभाव, देहशक्ति, इंद्रियशक्ति, मातृशक्ति, पितृशक्ति, वासना व स्वरूप हे प्रकार आहेत ॥ ५७ ॥ हे भगवन्, त्या सृष्टीमध्यें आह्मी जातीनेंच मोठे रागीट सर्प आहों. यास्तव ब्रह्मादिकांनींहि दुर्जय अशा तुझ्या मायेला, तिच्या योगानें मोहित झालेले आह्मी तुझ्या अनुग्रहावांचून तिला कसे बरें टाकूं ? टाकणारच नाहीं ॥ ५८ ॥ यास्तव ते शांतघोरादिक स्वभाव उत्पन्न होण्याविषयीं तूं सर्वज्ञ जगदीश्वरच कारण आहेस ह्मणून आमच्यावर अनुग्रह किंवा आमचा निग्रह जें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करण्यास इच्छित असशील तें कर ॥ ५९ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, असें कालियाचें भाषण ऐकून यमुनेची शुद्धता, व भक्तांचें रक्षण इत्यादिक कार्यें करण्याकरितां मनुष्यावतार धारण करणारा तो भगवान् श्रीकृष्ण, त्याला ह्मणाला कीं,–हे सर्पा, तूं या डोहांत राहूं नकोस. लवकरच आपले ज्ञाति, अपत्यें व स्त्रिया यांसहवर्तमान समुद्रामध्यें असलेल्या आपल्या रमणकद्वीपांत निघून जा. ही यमुना नदी, गाई व मनुष्य यांनीं पाणी प्यावयाची आहे ही आजपासून निर्विषोदक होऊं दे ॥ ६० ॥ जो मनुष्य तुला मी सांगितलेल्या ह्या आज्ञेचें सकाळीं किंवा संध्याकाळीं स्मरण करील किंवा कीर्तन करील त्याला तुझी कधींहि भय उत्पन्न करूं नये ॥ ६१ ॥ जो मनुष्य, मी क्रीडा केलेल्या या डोहामध्यें स्नान करून येथील उदकांनीं देवादिकांचें तर्पण करील व उपोषण करून माझें ध्यानपूर्वक पूजन करील तो सर्व पापांपासून मुक्त होईल ॥ ६२ ॥ हे कालिया, तूं ज्याच्या भयानें आपल्या रमणक द्वीपाचा त्याग करून ह्या डोहाचा आश्रय करून राहिला आहेस, तो गरुड तुला आतां कधींच खाणार

यतो गोभिर्नृभिश्च नदी भुज्यत इति ॥ ६० ॥ न युष्मत्तो भयमाप्नुयात् तस्य युष्माभिर्भयं नोत्पादनीयमित्याज्ञा ॥ ६१ ॥ इतोऽपि त्वया निर्गंतव्यमित्याह ।

श्रीशुक उवाच ॥ इत्याकर्ण्य वचः प्राह भगवान्कार्यमानुषः ॥ नात्र स्थेयं त्वया सर्प समुद्रं याहि मा चिरम् ॥ स्वज्ञात्यपत्यदाराढ्यो गोनृभिर्भुज्यते नदी ॥ ६० ॥ य एतत्संस्मरेन्मर्त्यस्तुभ्यं मदनुशासनम् ॥ कीर्तयन्नुभयोः संध्योर्न युष्मद्भयमाप्नुयात् ॥ ६१ ॥ योऽस्मिन्स्नात्वा मदाक्रीडे देवादींस्तर्पयेज्जलैः ॥ उपोष्य मां स्मरन्नर्चेन्सर्वपापैः प्रमुच्यते ॥ ६२ ॥ द्वीपं रमणकं हित्वा ह्रदमेतमुपाश्रितः ॥ यद्भयात्स सुपर्णस्त्वां नाद्यान्मत्पादलांच्छितम् ॥ ६३ ॥ श्रीशुक उवाच ॥ एवमुक्तो भगवता कृष्णेनाद्भुतकर्मणा ॥ तं पूजयामास मुदा नागपत्न्यश्च सादरम् ॥ ६४ ॥ दिव्यांबरस्रङ्मणिभिः परार्ध्यैरपि भूषणैः ॥ दिव्यगंधानुलेपैश्च महत्योत्पलमालया ॥ ६५ ॥ पूजयित्वा जगन्नाथं प्रसाद्य गरुडध्वजम् ॥ ततः प्रीतोऽभ्यनुज्ञातः परिक्रम्याभिवंद्य तम् ॥ ६६ ॥ सकलत्रसुहृत्पुत्रो द्वीपमब्धेर्जगाम ह ॥ तदैव साऽमृतजला यमुना निर्विषाऽभवत् ॥ अनुग्रहाद्भगवतः क्रीडामानुषरूपिणः ॥ ६७ ॥ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमपूर्वार्धे कालियनिर्यापणं नाम षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥ ॥

योऽस्मिन्निति । त्वयि स्थिते तन्न संभवतीति भावः ॥ ६२ ॥ नच तव गरुडभयं भवेदित्याह । द्वीपमिति ॥ ६३ ॥ ६४ ॥ ६५ ॥ ६६ ॥ ६७ ॥ इति दशमस्कंधे पूर्वार्धटीकायां षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥ ॥

नाहीं. कारण, तुझ्या फड्यांवर माझ्या चरणाचीं चिन्हें उमटलीं आहेत ॥ ६३ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, याप्रमाणें अद्भुतकर्म करणाऱ्या भगवान् श्रीकृष्णानें सांगितलेल्या त्या कालियसर्पानें, हर्षानें आदरपूर्वक त्या श्रीकृष्णाचें, दिव्यवस्त्रें, माळा, मणि, बहुत मोलाचीं भूषणें, दिव्यचंदनाच्या उट्या आणि कमळांची मोठी माळा अर्पण करून पूजन केलें, तसेंच नागपत्न्यांनींहि पूजन केलें ॥ ६४ ॥ ६५ ॥ याप्रमाणें स्त्रीपुत्रसुहृदांसहवर्तमान त्या कालियसर्पानें, जगन्नाथ गरुडध्वज श्रीकृष्णाचें पूजन करून त्याला प्रसन्न करून घेतलें असतां, त्यानें मुखानें 'जा' अशी आज्ञा केल्यावर तो कालिय, स्वतां संतुष्ट होऊन त्याला प्रदक्षिणा व नमस्कार करून समुद्रामध्यें असलेल्या आपल्या रमणकद्वीपाप्रत निघून गेला. त्याचवेळीं ती यमुना, क्रीडा करण्याकरितां मनुष्यरूपानें अवतीर्ण झालेल्या भगवान् श्रीकृष्णाच्या अनुग्रहेंकरून विषसंबंधरहित व अमृतासारख्या गोड पाण्याची झाली ॥ ६६ ॥ ६७ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील दशमस्कंधाच्या पूर्वार्धामध्यें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कालियनिर्याणम्नामक हा सोळावा अध्याय समाप्त झाला ॥ १६ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या सतराव्या अध्यायामध्यें त्या कालियसर्पाला रमणक द्वीपामध्यें घालवून दिलें असतां, आपल्या दुःखानें श्रम पावलेल्या व तेथेंच निजलेल्या नंदादिक बंधूंचें श्रीकृष्णानें वणव्यापासून रक्षण केलें; अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ राजा ह्मणाला– हे शुकाचार्य, कालियसर्पानें, रमणक नांवाचें आपलें द्वीपस्थान कोणत्या कारणानें टाकिलें होतें? गरुडाच्या भयानें असें ह्मणावें तर–त्या एका कालियसर्पानेंच गरुडाचें अप्रिय काय केलें होतें? ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे महापराक्रम्या राजा, गरुडाचें भक्ष्य अशा सर्पांनीं, आपली बाधा निवृत्त होण्याकरितां रमणकद्वीपामध्यें पूर्वी एका वृक्षाखालीं गरुडाला जो एक बळी प्रत्येक महिन्याच्या अमावास्येच्यादिवशीं अर्पण करण्याचा ठराव केला होता त्याप्रमाणें दर अमावास्येस सर्व सर्प आपल्या रक्षणाकरितां आपापला भाग महापराक्रमी गरुडाला देत असत ॥ २ ॥ ३ ॥ विष व पराक्रम

हरून नेलीं होतीं ॥ ४५ ॥ जसे ईश्वराराधनरूप कर्मयोग, ईश्वराच्या संबंधानें धर्मादि पुरुषार्थरूप फळांनीं युक्त होऊन सर्व भोग उत्पन्न करणारे होतात त्याप्रमाणें गाई, पक्षिणी व स्त्रिया ह्या, शरदृतूच्या निमित्तानें आपापल्या पतींनीं बलात्कारानें अनुगमन केलेल्या होऊन गर्भिणी झाल्या ॥ ४६ ॥ हे राजा, जसे चोरांवांचून सर्वलोक धार्मिक राजाच्या योगानें निर्भय व हर्षयुक्त होतात त्याप्रमाणें चंद्रविकासिनी कमळिणीवांचून सर्व कमळें सूर्योदयाच्या योगानें प्रफुल्लित झालीं ॥ ४७ ॥ त्यावेळीं जिकडेतिकडे धान्यें पिकून संपन्न झालेली भूमि, नगरें व गांव यांमध्यें सर्वठिकाणीं प्रवृत्त झालेल्या नवान्नप्राशनादिक वैदिक महोत्साहानें व दिपवाळीवगैरे इंद्रिय-प्रीतिजनक उत्सवांनीं शोभूं लागली. त्यामध्यें, हरीच्या रामकृष्णरूप अवतारांच्या योगानें त्यांच्या दर्शनादिक उत्साहांनीं अत्यंत शोभूं लागली ॥ ४८ ॥ यज्ञादिक कर्में, योगसाधनें, मंत्रसिद्धि, भगवद्भक्ति इत्यादिक साधनांनीं सिद्ध झालेले पुरुष, जसे प्रारब्धानें आयुष्य अवशिष्ट असेल तोंपर्यंत अडकून राहून तें प्रारब्ध संपलें ॥ ७२ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्मणजे मृत्युकाल प्राप्त होतांच आपण यज्ञादिकांनीं संपादन केलेल्या देवादि शरीरांस पावतात त्याप्रमाणें वाणी (व्यापारी) संन्यासी, राजे व ब्रह्मचारी हे वर्षाऋतूमध्यें पावसाच्यावगैरे कारणानें एकठिकाणीं राहून ते शरदृतु प्राप्त होतांच आपापल्या स्थानापासून निघून आपापले-व्यापार, स्वच्छंदता, दिग्विजय व विद्याभ्यासवगैरे कार्यभाग करूं लागले ॥ ४९ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील पूर्वार्धामध्यें वर्षाशरदृतुवर्णननामक हा विसावा अध्याय समाप्त झाला ॥ २० ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या एकविसाव्या अध्यायामध्यें, शरदृतूच्या योगानें सुंदर असलेल्या वृंदावनामध्यें श्रीकृष्ण गेला असतां, त्याच्या वेणुगीताचा नाद श्रवण करून, गोपींनीं गाइलेलें गीत वर्णन केलें आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, याप्रमाणें शरदृतूच्या योगानें जेथें पाणी स्वच्छ झालें आहे व जेथें कमळसमूहांवरून आलेला वारा वाहत आहे अशा त्या वृंदावनामध्यें एकेदिवशीं गाईगोपाळांसहवर्तमान श्रीकृष्ण

एकविंशे शरद्रम्यवृंदावनगते हरौ ॥ तद्वेणुस्वनमाकर्ण्य गोपीभिर्गीतमीर्यते ॥ १ ॥ इत्थमेवंभूतं वनम् । तदेवाह । शरदा स्वच्छानि जलानि यस्मिंस्तत् । वायुना वातमनुगतं तदेकव्याप्तमित्यर्थः ॥ १ ॥ ततश्च कुसुमितवनराजिषु शुष्मिणो मत्ता भृंगा द्विजाः खगाश्च तेषां कुलानि तैर्घुष्टाः सरांसि सरितो महीध्राश्च यस्मिंस्तद्वनं कृष्णोऽवगाह्य प्रविश्य वेणुमवादयत् ॥ २ ॥ तत्कृष्णवेणुगीतं स्मरस्योदयो यस्मात्तदाश्रुत्य श्रुत्वा परोक्षं यथा भवति तथा व्रजे स्थितत्वात् ॥ ३ ॥ विक्षिप्तमनसो व्याकुलचित्ताः ॥ ४ ॥

॥ श्रीशुक उवाच ॥ इत्थं शरत्स्वच्छजलं पद्माकरसुगंधिना ॥ न्यविशद्वायुना वातं सगोगोपालकोऽच्युतः ॥ १ ॥ कुसुमितवनराजिशुष्मिभृंगद्विजकुलघुष्टसरःसरिन्महीध्रम् ॥ मधुपतिरवगाह्य चारयन्गाः सहपशुपालबलश्चुकूज वेणुम् ॥ २ ॥ तद्व्रजस्त्रिय आश्रुत्य वेणुगीतं स्मरोदयम् ॥ काश्चित्परोक्षं कृष्णस्य स्वसखीभ्योऽन्ववर्णयन् ॥ ३ ॥ तद्वर्णयितुमारब्धाः स्मरंत्यः कृष्णचेष्टितम् ॥ नाशकन्स्मरवेगेन विक्षिप्तमनसो नृप ॥ ४ ॥ बर्हापीडं नटवरवपुः कर्णयोः कर्णिकारं बिभ्रद्वासः कनककपिशं वैजयंतीं च मालाम् ॥ रंध्रान्वेणोरधरसुधया पूरयन्गोपवृंदैर्वृंदारण्यं स्वपदरमणं प्राविशद्गीतकीर्तिः ॥ ५ ॥

यादृशं कृष्णस्मरणं तासां मनसः क्षोभकं जातं तदाह । बर्हापीडमिति । नटवद्वरं वपुर्बिभ्रद्वृंदावनं प्राविशत् । कथंभूतं वनम् । स्वपदैरंकितै रमणं रतिजनकम् । गोपवृंदैर्गीतकीर्तिः तथा बर्हमयमापीडं शिरोभूषणं बिभ्रत् । बर्हमापीडो यस्मिन्निति वपुषो विशेषणं वा । वेणुवादनमुत्प्रेक्षते । रंध्रान्वेणोरिति । अतो नूनमधरसुधैव पूर्णाद्वेणोरुच्चलंती गीतवत्प्रसर्पितुमर्हतीति भावः ॥ ५ ॥

प्रविष्ट झाला ॥ १ ॥ तेव्हां, जेथें प्रफुल्लित झालेल्या वनपंक्तींमध्यें मत्त झालेल्या भ्रमरांच्या व पक्ष्यांच्या कुजनांनीं सरोवरें, नद्या व पर्वत हीं नादित झालीं आहेत अशा त्या वनामध्यें गाई, गोपाळ व बलराम यांसह श्रीकृष्णानें प्रवेश करून गाई चारीत असतां वेणू वाजविला ॥ २ ॥ तें मदनाला प्रदीप्त करणारें वेणुगीत ऐकून त्या वनांत जाऊन तेथील वृत्त अनुभवून आलेल्या कितीएक गोकुळांतील स्त्रिया, आपल्या सख्यांना वर्णन करूं लागल्या ॥ ३ ॥ हे राजा, त्यांनीं तें कृष्णचरित्र वर्णन करण्यास आरंभ केला परंतु, कृष्णमूर्ति ध्यानांत येतांच मदनाच्या वेगानें व्याकुलचित्त झालेल्या त्या गोपी, वर्णन करण्यास समर्थ झाल्या नाहींत ॥ ४ ॥ आतां ज्याप्रकारचें कृष्णस्मरण त्यांच्या मनाला क्षोभ करणारें झालें तें सांगतो– मस्तकावर मोरांच्या पिसांचा टोप, नटासारखें सुंदर शरीर, कानांवर कर्णिकारवृक्षाचीं फुलें, सुवर्णासारखा पिंवळा भरजरीचा पीतांबर व वैजयंती (पांच वर्णांच्या सुवासिक फुलांनीं गुंफलेली) माळा धारण करणारा व गोपांच्या समूहांनीं ज्याची

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कीर्ति गायन केली आहे असा तो श्रीकृष्ण, वेणूचीं छिद्रें अधरामृतानें (मुखवायूनें) पूर्ण करित (मुरली वाजवीत) होत्साता, जेथेंतेथें भूमीवर उमटलेल्या आपल्या पावलांनीं सर्वांना प्रीति उत्पन्न करणाऱ्या त्या वृंदावनामध्यें प्रविष्ट झाला ॥ ५ ॥ हे राजा, याप्रकारें स्मरण करणाऱ्या त्या सर्व गोकुळवासी स्त्रिया, सर्वप्राणिमात्रांचें मन हरण करणारा वेणुनाद श्रवण करून श्रीकृष्णस्वरूपाच्या माधुर्यादिकांचें वर्णन करित होत्सात्या पदोपदीं परमानंदमूर्ति कृष्णाला मनानें आलिंगन करूं लागल्या ॥ ६ ॥ गोपी म्हणाल्या– हे सखीहो, नेत्र धारण करणाऱ्या लोकांच्या नेत्रांचें फळ म्हटलें म्हणजे हेंच मुख्य आहे, याहून दुसरें उत्कृष्ट फळ आम्ही जाणत नाहीं. तें फळ कोणतें ? असें म्हणाल तर– समवयाच्या मित्रांसहवर्तमान गाईंना या वनांतून त्या वनांत प्रवेश करविणाऱ्या नंदसुत रामकृष्णाचें वेणु वाजविणारें व

अभिरेभिरे वर्णयंत्यः । पदे पदे परमानंदमूर्तिं कृष्णं परिरब्धवत्यः ॥ ६ ॥ अनुवर्णनमेवाह । अक्षण्वतामिति त्रयोदशभिः । अक्षण्वतां चक्षुष्मतां तावदिदमेव फलं प्रियदर्शनं परमन्यत्र विदामो न विद्म इत्यर्थः । तच्च फलं सखिभिः सह पशून्वनं प्रवेशयतो रामकृष्णयोर्वक्त्रं यैर्निपीतं तैरेव जुष्टं सेवितं नान्यैरित्यर्थः । कथंभूतं वक्त्रम् । अनुवेणु वेणुमनु वर्तमानं तं वादयत् । तथाऽनुरक्तकटाक्षमोक्षं स्निग्धकटाक्षविसर्गम् । अथवा यैर्निपीतं तयोर्वक्त्रं तैर्यज्जुष्टमिदमेवाक्षण्वतामक्ष्णोः फलमिति ॥ ७ ॥ अन्या आहुः । चूतेति । चूतप्रवालादीनां

इति वेणुरवं राजन्सर्वभूतमनोहरम् ॥ श्रुत्वा व्रजस्त्रियः सर्वा वर्णयंत्योऽभिरेभिरे ॥ ६ ॥ गोप्य ऊचुः ॥ अक्षण्वतां फलमिदं न परं विदामः सख्यः पशूननुविवेशयतोर्वयस्यैः ॥ वक्त्रं व्रजेशसुतयोरनुवेणु जुष्टं यैर्वा निपीतमनुरक्तकटाक्षमोक्षम् ॥ ७ ॥ चूतप्रवालबर्हस्तबकोत्पलाब्जमालानुपृक्तपरिधानविचित्रवेषौ ॥ मध्ये विरेजतुरलं पशुपालगोष्ठ्यां रंगे यथा नटवरौ क्व च गायमानौ ॥ ८ ॥ गोप्यः किमाचरदयं कुशलं स्म वेणुर्दामोदराधरसुधामपि गोपिकानाम् ॥ भुंक्ते स्वयं यदवशिष्टरसं ह्रदिन्यो हृष्यत्त्वचोऽश्रु मुमुचुस्तरवो यथाऽर्याः ॥ ९ ॥

चित्राभिर्मालाभिरनुपृक्ते ईषदंतरांतरतः संयुक्ते परिधाने नीलपीतांबरे ताभ्यां विचित्रो वेषो ययोस्तौ क्व च कदाचित्पशुपालगोष्ठ्यां गोपालसभायां मध्ये अलमत्यर्थं विरेजतुः । अहो गोपानां पुण्यमिति भावः ॥ ८ ॥ अन्या ऊचुः । हे गोप्यः अयं वेणुः किं स्म पुण्यमाचरत्कृतवान् । कथम् । यद्यस्माद्गोपिकानामेव भोग्यां सतीमपि दामोदराधरसुधां स्वयं स्वातंत्र्येण यथेष्टं भुंक्ते । कथम् । अवशिष्टरसं केवलमवशिष्टं रसमात्रं यथा भवति तथा । यतो यासां ह्रदिनीनां पयसा पुष्टस्ता मातृतुल्या ह्रदिन्यो हृष्यत्त्वचो विकसितकमलव्याजेन मिषेण रोमांचिता लक्ष्यंते । येषां वंशे जातस्ते तरवो मधुधारामिषेणानंदाश्रु मुमुचुः । यथा आर्याः कुलवृद्धाः स्ववंशे भगवत्सेवकं दृष्ट्वा हृष्यत्त्वचोऽश्रु मुंचंति तद्वदिति ॥ ९ ॥

स्नेहयुक्त कटाक्ष फेंकणारें मुख ज्यांनीं प्राशन केलें आहे म्हणजे नेत्ररूप भ्रमरांनीं त्याच्या माधुर्याचा अनुभव घेतला आहे त्यांनींच तें फळ मिळविलें आहे, दुसऱ्या कोणीहि मिळविलें नाहीं ॥ ७ ॥ दुसऱ्या गोपी म्हणाल्या– आंब्याचे कोंवळे पल्लव, मोराचीं पिसें, फुलांचे घोंस व भूमीवर व पाण्यांत उगवणारीं कमळें, यांच्या चित्रविचित्र बनविलेल्या माळांनीं मध्येंमध्यें संयुक्त झालेल्या काळ्या व पिंवळ्या पितांबरांच्या योगानें ज्यांचा वेष विचित्र दिसत आहे असे हे रामकृष्ण, गोपाळांच्या सभेमध्यें जेव्हां केव्हांतरी गायन करूं लागतात, तेव्हां ते जसे रंगभूमीवर गायन करणारे उत्तम नट शोभतात त्याप्रमाणें शोभतात. केवढें हें त्या गोपांचें भाग्य ! ! ॥ ८ ॥
दुसऱ्या म्हणाल्या– हे गोपीहो, ह्या वेणूनें पुण्य तरी काय करून ठेविलें आहे ? न जाणो. कारण,–हा वेणु, गोपिकांनाच उपभोग्य असलेल्याहि श्रीकृष्णाच्या अधरसुधेचा स्वातंत्र्यानें यथेष्ट उपभोग करितो आणि इतरांच्या वांट्यालामात्र आपल्या उच्छिष्टरसाचा अंश अवशेष ठेवितो. हें कशावरून असें म्हणाल तर– त्या-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विषयीं सूचक चिन्ह असें कीं,– जसे कुलवृद्ध पुरुष, आपल्या वंशांत भगवद्भक्त पुरुष उत्पन्न होऊन त्यानें भगवंताचा प्रसाद मिळविला असें ऐकून, रोमांचयुक्त होऊन आनंदाश्रु ढाळतात त्याप्रमाणें हा ज्यांच्या पाण्यानें पुष्ट झाला त्या आईसारख्या नद्या, आपल्यामध्यें प्रफुल्लित झालेल्या कमळसमुदायाच्या रूपानें रोमांचयुक्त झाल्यासारख्या दिसतात; तसेच हा ज्यांच्या वंशांत उत्पन्न झाला आहे ते वृक्षहि मधाच्या धारांच्या रूपानें आनंदाश्रु ढाळल्यासारखे दिसतात ॥ ९ ॥ दुसऱ्या गोपी ह्मणाल्या– हे सखीनों, हें वृंदावन, भूमीची कीर्ति, स्वर्गापेक्षांहि अधिकच पसरीत आहे. कारण–ह्या वृंदावनानें, जेथेंतेथें उमटलेल्या श्रीकृष्णाच्या चरणकमलांनीं शोभासंपत्ति मिळविली आहे. येथें गोविंदाचा मुरलीनाद ऐकिल्याबरोबर मत्त झालेले मोर, त्या गोविंदाला, हा मंदगर्जना करणारा काळा मेघच आहे असें मानून, आनंदानें नृत्य करीत असतात व तें नृत्य पाहून पर्वताच्या खोऱ्यांतून फिरणारीं सर्व श्वापदें, थव्याथव्यांनीं जमून तें नृत्य पाहण्याकरितां व मुरलीचा नाद ऐकण्याकरितां स्तब्ध

काश्चिदाहुः । हे सखि वृंदावनं भुवः कीर्तिं स्वर्गादपि विशेषेण वितनोति । कथंभूतम् । यद्देवकीसुतस्य पदांबुजाभ्यां लब्धा लक्ष्मीः शोभा संपच्चेन तत् । किंच गोविंदस्य वेणुमनु वेणुनिनादं श्रुत्वाऽनंतरं मंदगर्जितं नीलमेघं तं मत्वा मत्ता ये मयूरास्तेषां नृत्यं प्रेक्ष्य संघशस्तत्र तत्राद्रिसानुष्वपरतान्युपरतक्रियाण्यन्यानि समस्तानि सत्त्वानि यस्मिंस्तत् । नैतदन्येषु लोकेषु विद्यतेऽतो भुवः कीर्तिं वितनोतीत्यर्थः ॥ १० ॥ अपरा आहुः । हे सखि मूढमतयस्तिर्यग्जातयोऽप्येता हरिण्यो धन्याः कृतार्थाः या वेणुर-

वृंदावनं सखि भुवो वितनोति कीर्तिं यद्देवकीसुतपदांबुजलब्धलक्ष्मि ॥ गोविंदवेणुमनु मत्तमयूरनृत्यं प्रेक्ष्याद्रिसान्वपरतान्यसमस्तसत्त्वम् ॥ १० ॥ धन्याः स्म मूढमतयोऽपि हरिण्य एता या नंदनंदनमुपात्तविचित्रवेषम् ॥ आकर्ण्य वेणुरणितं सहकृष्णसाराः पूजां दधुर्विरचितां प्रणयावलोकैः ॥ ११ ॥ कृष्णं निरीक्ष्य वनितोत्सवरूपशीलं श्रुत्वा च तत्क्वणितवेणुविचित्रगीतम् ॥ देव्यो विमानगतयः स्मरनुन्नसारा भ्रश्यत्प्रसूनकबरा मुमुहुर्विनीव्यः ॥ १२ ॥

णितं वेणुनादमाकर्ण्य नंदनंदनं प्रति प्रणयसहितैरवलोकनैर्विरचितां पूजां संमानं दधुः कृतवत्यः । किंच कृष्णसारैः स्वपतिभिः सहिता एव दधुः । अस्मत्पतयस्तु गोपाः क्षुद्राः समक्षं तत्र सहंत इति भावः ॥ ११ ॥ अन्या ऊचुः । गोप्यः आश्चर्यं शृणुत वनितानामुत्सवो यस्मात्तद्रूपं शीलं च यस्य तं कृष्णं निरीक्ष्य तेन वादितवेणोरसंकीर्णं गीतं च श्रुत्वा विमानैर्गच्छंत्यो देव्यो देवानामंकेषु स्थिता अपि स्मरेण नुन्नसाराः परिक्षिप्तधैर्या मुमुहुः । मोहे लिंगमाहुः । भ्रश्यत्प्रसूनाः कबराश्चूडा यासां ताः । विगता नीव्यो यासां ताः । अत्र सर्वत्र वक्तृभेदान्नातीव संगतिर्वक्तव्या ॥ १२ ॥

झालेलीं असतात. हा चमत्कार दुसऱ्या लोकांचेठिकाणीं नाहीं ह्मणून हें वृंदावन भूमीची कीर्ति पसरीत आहे ॥ १० ॥ दुसऱ्या ह्मणाल्या–हे सखीनों, तिर्यक्योनीमध्यें उत्पन्न झाल्यामुळें विवेकहीन असलेल्याहि ह्या हरिणी कृतार्थच आहेत. कारण,–ज्या हरिणी, वेणुनाद श्रवण करून विचित्रवेष धारण करणाऱ्या नंदकुमाराची प्रेमयुक्त, कटाक्षांनीं रचिलेली पूजा (सन्मान) करितात आणि त्यातरी आपल्या पति काळवीट हरिणांसहवर्तमान करितात. आमचे पति तर आह्मी कृष्णाकडे पाहिलें असतां तेंसुद्धां सहन करीत नाहींत ! ॥ ११ ॥ दुसऱ्या गोपी ह्मणाल्या–हे गोपीहो, आह्मी एक आश्चर्य सांगतों तें ऐका–ज्याचें रूप व शील स्त्रियांना रत्युत्साह उत्पन्न करणारें आहे त्या श्रीकृष्णाला पाहून व त्यानें वाजविलेल्या मुरलीचें विचित्र गायन ऐकून, विमानांत बसून गमन करणाऱ्या देवांगना, आपापल्या पतींच्या अंकांवर बसलेल्या असतांहि मदनानें त्यांचें धैर्य नाहींसें होऊन त्या मोहित होतात; तेव्हां व्याकुळ व अस्ताव्यस्त झालेल्या त्यांच्या बुचड्यांतून फुलें गळूं लागून त्यांच्या निऱ्या सुटतात. एतावता देवांग-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नंदनादेखील मोह झालेला दिसतो मग आम्हांला होतो यांत नवल काय ! ॥ १२ ॥ त्यावेळीं गाईहि कृष्णाच्या मुखांतून निघालेलें वेणुगीतरूप अमृत खालीं न गळावें ह्मणून आपल्या ताठ उभे केलेल्या कर्णरूप ओंजळींनीं तें प्राशन करीत, व श्रीकृष्णाला नेत्रद्वारा मनामध्यें घेऊन त्याला दृढ आलिंगन देत आणि नेत्रांतून आनंदाश्रु ढाळीत स्तब्ध उभ्या राहतात. तसेच लहान लहान वत्सहि, स्तनपान करित असतां, कृष्णाच्या मुरलीचा शब्द कानीं पडतांच देहभान विसरून स्तनांतून ओढून घेतलेल्या दुधाचे ग्रास (घोट) गालफड्यांतून खालीं गळत होत्साते स्तब्ध उभे राहतात ॥ १३ ॥ एक गोपी ह्मणाली कीं,– आई, ह्या वनामध्यें जे पक्षी आहेत ते बहुतकरून मोठे मननशील ऋषिच असावेत. कारण, जसे मननशील ऋषि श्रीकृष्णाचें दर्शन होईल तशा रीतीनें वेदोक्त कर्मफलांचा त्याग करून, वेदवृक्षांच्या शाखांचा आश्रय करून व

क्षरणशंकयैवोत्तभितैरुन्नमितैः कर्णपुटैः पिबंत्यः सत्यः तथा शावाश्च वत्साश्च स्तनपाने प्रवृत्ताः समनंतरमेव गीतं श्रुत्वा तदेव पीयूषमुत्तंभितकर्णपुटैः पिबंतः स्नुतस्तनपयःकवलाः केवलं स्तनेभ्यः क्षरितक्षीरग्रासा मुखेषु येषां ते तस्थुर्विस्मृतक्रिया बभूवुरित्यर्थः । तत्र हेतुः । गोविंदं दृशा मार्गेणात्मनि मनसि स्पृशंत्य आलिंगंत्यः अतएवाश्रूणां कला लेशा लोचनयोर्यासां ता गावस्ते च शावाः ॥ १३ ॥ भो अंब मातरस्मिन्वने ये विहगाः पक्षिणस्ते प्रायेण मुनयो भवितुमर्हंति । कुतः । कृष्णेक्षितं कृष्णदर्शनं पुष्पफलाद्यंतरं विना यथा भवति तथा रुचिराः प्रवाला येषां तान्द्रुमभुजान्वृक्षाणां शाखा आरुह्य तेन श्रीकृष्णेनोदितं प्रकटितं कलवेणुगीतं केनापि सुखेनामीलितदृशस्त्यक्तान्यवाचश्च

गावश्च कृष्णमुखनिर्गतवेणुगीतपीयूषमुत्तभितकर्णपुटैः पिबंत्यः ॥ शावाः स्नुतस्तनपयःकवलाः स्म तस्थुर्गोविंदमात्मनि दृशाश्रुकलाः स्पृशंत्यः ॥ १३ ॥ प्रायो बतांब विहगा मुनयो वनेऽस्मिन्कृष्णेक्षितं तदुदितं कलवेणुगीतम् ॥ आरुह्य ये द्रुमभुजान् रुचिरप्रवालान् शृण्वंत्यमीलितदृशो विगतान्यवाचः ॥ १४ ॥ नद्यस्तदा तदुपधार्य मुकुंदगीतमावर्तलक्षितमनोभवभग्नवेगाः ॥ आलिंगनस्थगितमूर्मिभुजैर्मुरारेर्गृह्णंति पादयुगलं कमलोपहाराः ॥ १५ ॥

संतो ये शृण्वंतीति । तथाहि । मुनयः श्रीकृष्णदर्शनं यथा भवति तथा वेदोक्तकर्मफलपरित्यागेन वेदद्रुमशाखारूढा रुचिरप्रवालस्थानीयानि कर्माण्येवोपाददानाः सुखिनः संतः श्रीकृष्णगीतमेव शृण्वंति । अतस्त एवैते भवितुमर्हंतीति भावः ॥ १४ ॥ आस्तां चेतनानां कथा नद्योऽप्यावर्तैः परिभ्रमैर्लक्षितेन सूचितेन मनोभवेन कामेन भग्नो वेगो यासां ता आलिंगनेन स्थगितमाच्छादितं यथा भवति तथा ऊर्मय एव भुजास्तैः कमलोपहाराः कमलान्युपहरंत्यो मुरारेः पादयुगुलं गृह्णंति धारयंति ॥ १५ ॥

सुंदर पल्लवस्थानीय कर्मांचा मात्र स्वीकार करून श्रीकृष्णकथांचें गायन व श्रवण करितात तसे हे पक्षीसुद्धां कृष्णाचें दर्शन होईल तशा रीतीनें फलपुष्पादिकांनीं रहित व सुंदर वृक्षांच्या पल्लवांनीं युक्त अशा फांद्यांवर बसून कृष्णानें प्रकट केलेलें मधुर वेणुगीत, कांहींएक अवर्णनीय सुखानें डोळे न मिटतां व आपल्या जातीचे कलकलाट शब्दहि न करितां श्रवण करितात ॥ १४ ॥ दुसऱ्या गोपी ह्मणाल्या–अहो, जिवंत प्राण्यांच्या गोष्टीतर एकीकडे राहूं द्या, परंतु ह्या निर्जीव असलेल्याहि नद्या, तें कृष्णाचें वेणुगीत ऐकून भोंवऱ्यांच्या रूपानें सूचित होणाऱ्या मदनानें ह्यांच्या प्रवाहाचा वेग स्तब्ध होतो आणि ह्या, कृष्णाला कमलरूपी नजराणा अर्पण करीत होत्सात्या आपल्या तरंगरूपी भुजांनीं कृष्णाच्या चरणयुगुलाचें, त्याला घट्ट आलिंगन होईल अशा रीतीनें ग्रहण करितात ॥ १५ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दुसऱ्या ह्मणाल्या– मेघ हा श्रीकृष्णाला आपला मित्र असें मानितो आणि उन्हाळ्यामध्यें बलराम व गोप ह्यांसहवर्तमान गोकुलांतील गाईंना चारणाऱ्या व गाईंच्या मागून जातांना मुरली वाजविणाऱ्या त्या श्रीकृष्णाला पाहून प्रथम त्याच्या मस्तकावर आपण उगवतो आणि नंतर प्रेमाच्या योगानें वृद्धिंगत होऊन पुष्पवृष्टीसहवर्तमान स्वतांच्या शरीरानें त्या मित्रावर (कृष्णावर) आपल्या देहाचें छत्र धारण करितो (छाया पाडितो) येथें देवांनीं केलेली पुष्पवृष्टि मेघांनींच केली असें सांगितलें आहे ॥ १६ ॥ दुसऱ्या अहंकारयुक्त गोपी ह्मणाल्या– हे मैत्रिणींनो, वनांत राहणाऱ्या भिल्लिणी खरोखर कृतार्थ (धन्य) आहेत. दुसरा ह्मणाल तर– ज्या भिल्लिणी, प्रथम कृष्णाच्या स्त्रियांच्या स्तनांचेठिकाणीं लेपन झालेलें, नंतर रतिकालीं श्रीकृष्णाच्या चरणकमलांना लागल्यामुळें

लोकार्तिहरणशीलत्वादिसाम्यात्सख्युः श्रीकृष्णस्यांबुदस्तदुपर्युदितः पुनः प्रेम्णा प्रवृद्धः सन्कुसुमावलीभिः पुष्पसमूहैस्तत्तुल्यैस्तुषारैर्वा सह स्ववपुषा छत्रं विहितवान् ॥ १६ ॥ साहंकारमाहुः । पूर्णाः कृतार्थाः पुलिंद्यः शबरांगनाः । कथमित्यत आहुः । प्रथमं दयितानां स्तनेषु मंडितेनानुलिप्तेन पुनश्च रतिसमये उरुगायस्य श्रीकृष्णस्य पदाब्जयोरागेणारुण्येन श्रीः कांतिर्यस्य तेन कुंकुमेन । पुनस्तस्य वनस्थलीषु चंक्रमणेन तृणेषु रूषितेन लग्नेन तद्दर्शनेन तथाभूतस्य कुंकुमस्य दर्शनेन स्मरकृता रुक् तापो यासां तास्तेन कुंकुमेनाननेषु कुचेषु च कामतप्तेषु लिंपंत्यस्तदाधिं कामव्यथां जहुः । अतस्ताः कृतार्थाः धिगन्या माहश्यो या एवंभूतमप्याधिशमनं न लभंत इति भावः ॥ १७ ॥ हंतेति

दृष्ट्वाऽऽतपे व्रजपशून्सह रामगोपैः संचारयंतमनुवेणुमुदीरयंतम् ॥ प्रेमप्रवृद्ध उदितः कुसुमावलीभिः सख्युर्व्यधात्स्ववपुषाऽम्बुद आतपत्रम् ॥ १६ ॥ पूर्णाः पुलिंद्य उरुगायपदाब्जरागश्रीकुंकुमेन दयितास्तनमंडितेन॥ तद्दर्शनस्मररुजस्तृणरूषितेन लिंपंत्य आननकुचेषु जहुस्तदाधिम् ॥ १७ ॥ हंतायमद्रिरबला हरिदासवर्यो यद्रामकृष्णचरणस्पर्शप्रमोदः ॥ मानं तनोति सह गोगणयोस्तयोर्यत्पानीयसूयवसकंदरकंदमूलैः ॥ १८ ॥ गा गोपकैरनुवनं नयतोरुदारवेणुस्वनैः कलपदैस्तनुभृत्सु सख्यः ॥ अस्पंदनं गतिमतां पुलकस्तरूणां निर्योगपाशकृतलक्षणयोर्विचित्रम् ॥ १९ ॥

हर्षे । हे सख्यः अयमद्रिर्गोवर्धनो ध्रुवं हरिदासेषु श्रेष्ठः । कुत इत्यत आहुः । यस्माद्रामकृष्णयोश्चरणस्पर्शेन प्रमोदो यस्य सः । तृणाद्युद्गमनिभेन रोमहर्षदर्शनात् । किंच यद्यस्मान्मानं तनोति सह गोभिर्गणेन सखिसमूहेन च वर्तमानयोस्तयोः । कैः । पानीयैः सूयवसैः शोभनतृणैः कंदरैश्च कंदमूलैश्च यथोचितम् । अतोऽयमतिधन्य इत्यर्थः ॥ १८ ॥ हे सख्यः इदं त्वतिचित्रम् । गोपैः सह वने वने गाः संचारयतोस्तयो रामकृष्णयोर्मधुरपदैर्महावेणुनादैः । शरीरिषु ये गतिमंतस्तेषामस्पंदनं

त्या चरणांच्या तांबडेपणानें विशेष शोभा आलेलें, आणि त्या कृष्णाच्या वनांत घडलेल्या फिरण्यानें तृणाला लागलेलें केंशर पाहतांच त्याच्या दर्शनानें कामपीडा पावोन, तें (गवताला लागलेलें) केंशर घेऊन, कामानें तप्त झालेल्या आपल्या मुखांचेठिकाणीं व स्तनांचेठिकाणीं लेपन करून कामपीडेचें निरसन करितात, ह्मणून त्याच धन्य होत. ज्यांना अरण्यांत जातां येत नाहीं व तें केंशर मिळवून स्वतांची कामपीडा शांत करितां येत नाहीं, त्या आह्मांसारख्या स्त्रियांना धिक्कार असो ॥ १७ ॥ दुसऱ्या ह्मणाल्या–हे स्त्रिया हो, काय सांगावें ! हा गोवर्धन पर्वत तर भगवद्भक्तांचा शिरोमणि आहे. कारण, हा राम आणि कृष्ण यांच्या चरणस्पर्शानें आनंद युक्त व उगवलेल्या तृणाच्या रूपानें रोमांच धारण करित होत्सातां, गाईंगोपाळांसहित आपल्यावर आलेल्या त्या रामकृष्णांचा, पाणी, कोवळें गवत, गुहा, कंद व मुळें यांच्या योगानें सन्मान करितो ॥ १८ ॥ दुसऱ्या ह्मणाल्या–हे सख्यांनो, गोपाळांसह प्रत्येक वनामध्यें गाईंना चारणाऱ्या व दूध काढतेवेळीं गाईंचे पाय बांधण्यास उपयोगी

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पडणाऱ्या दोऱ्या मस्तकाला गुंडाळून व खोडकर गाईंना दूध काढत्येवेळीं ओढून धरण्यासाठीं केलेले फांस खांद्यावर धारण करून श्रेष्ठ गोपांच्या शोभेनें विराजमान होणाऱ्या रामकृष्णांच्या, मधुरशब्दांनीं युक्त अशा महामुरल्यांच्या ध्वनींनीं, शरीर धारण करणाऱ्या गाई मोरवगैरे जंगमप्राण्यांना जो चालणें बंद पडण्याचा स्थावरधर्म दिसतो व वृक्षवगैरे निर्जीव प्राण्यांच्या शरीरांवर रोमांच उभे राहून त्यांना जो जंगमप्राण्यांचा धर्म दिसतो हें मोठेंच आश्चर्य आहे ॥ १९ ॥ हे राजा, याप्रकारें करून वृंदावनामध्यें संचार करणाऱ्या भगवान् श्रीकृष्णाच्या ज्या अनेक क्रीडा त्याचें वर्णन करणाऱ्या त्या गोपी, शेवटीं तन्मयता पावत असत ॥ २० ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील पूर्वार्धांत वेणुगीतवर्णननामक हा एकविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २१ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या बाविसाव्या अध्यायामध्यें श्रीकृष्णानें, वस्त्राहरणरूप लीलेनें गोपांच्या कन्यांना वर देऊन यज्ञशाळेमध्यें गमन केलें, अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य

स्थावरधर्मस्तरूणां पुलको जंगमधर्म इति । निर्युज्यंते गाव आभिरिति निर्योगाः पादबंधनरज्जवोऽधृष्यगवां कर्षणार्थाः पाशाश्च तैः कृतं लक्षणं चिह्नं ययोः । शिरसि नियोगवेष्टनेन स्कंधस्थपाशेन च गोपपरिवृढश्रिया विराजमानयोरित्यर्थः ॥ १९ ॥ २० ॥ इति दशमस्कंधे पूर्वार्धे एकविंशोऽध्यायः ॥ २१ ॥ ॥ गोपीनां

एवंविधा भगवतो या वृंदावनचारिणः ॥ वर्णयंत्यो मिथो गोप्यः क्रीडास्तन्मयतां ययुः ॥ २० ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे एकविंशतितमोऽध्यायः ॥ २१ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ हेमंते प्रथमे मासि नंदव्रजकुमारिकाः ॥ चेरुर्हविष्यं भुंजानाः कात्यायन्यर्चनव्रतम् ॥ १ ॥ आप्लुत्यांभसि कालिंद्या जलांते चोदितेऽरुणे ॥ कृत्वा प्रतिकृतिं देवीमानर्चुर्नृप सैकतीम् ॥ २ ॥ गंधैर्माल्यैः सुरभिभिर्बलिभिर्धूपदीपकैः ॥ उच्चावचैश्चोपहारैः प्रवालफलतंडुलैः ॥ ३ ॥ कात्यायनि महामाये महायोगिन्यधीश्वरि ॥ नंदगोपसुतं देवि पतिं मे कुरु ते नमः ॥ इति मंत्रं जपंत्यस्ताः पूजां चक्रुः कुमारिकाः ॥ ४ ॥ एवं मासं व्रतं चेरुः कुमार्यः कृष्णचेतसः ॥ भद्रकालीं समानर्चुर्भूयान्नंदसुतः पतिः ॥ ५ ॥

कामतः कृष्णे निःसीमप्रेमसंगमः ॥ कात्यायन्यर्चनोद्भूततत्प्रसादमहोदयः ॥ १ ॥ द्वाविंशे गोपकन्यानां वस्त्राहरणलीलया ॥ वरं दत्वा गतः कृष्णो यज्ञशालामितीर्यते ॥ २ ॥ प्रथमे मासि मार्गशीर्षे ॥ १ ॥ २ ॥ ३ ॥ महामाये इत्यादिसंबोधनैस्तव न किंचिदशक्यमिति सूचयंत्यः प्रत्येकं प्रार्थयंते ॥ ४ ॥ कृष्णचेतस्त्वमाह । भूयान्नंदसुतः पतिरित्यानर्चुरिति ॥ ५ ॥

म्हणाले–हे राजा, हेमंतऋतूमध्यें त्यांतहि पहिल्या मार्गशीर्ष महिन्यामध्यें नंदाच्या गोकुळांतील कन्यांनीं, हविष्यान्नभोजन करण्याचा नियम स्वीकारून, कात्यायनी देवीचें पूजनरूप-व्रत आचरण केलें, म्हणजे श्रीकृष्णप्राप्तीकरितां एक महिनापर्यंत दररोज कात्यायनी देवीचें पूजन करावें असा नियम केला ॥ १ ॥ त्याचा प्रकार सांगतो–हे राजा, त्या कन्यांनीं, अरुणोदयाच्या वेळीं यमुनेच्या उदकामध्यें स्नान करून, त्या उदकाच्या तीरीं वाळूची कात्यायनी देवीची प्रतिमा करून त्या देवीची–चंदनें, सुगंधयुक्त पुष्पें, पल्लव, फळें, तांदूळ, धूप, दीप, लहानमोठे भक्ष्यादिकांचे नैवेद्य व दहींभाताचेवगैरे बळि समर्पण करून पूजा केली ॥ २ ॥ ३ ॥ त्यांत– हे कात्यायनि, हे महामाये, हे महायोगिनि, हे सर्वेश्वरि, देवि, नंदगोपाचा पुत्र जो श्रीकृष्ण त्याला माझा पति कर, तुला नमस्कार असो. याप्रमाणें प्रार्थनापूर्वक नमस्काररूपी मंत्राचा आपआपल्या मनामध्यें जप करून त्या कन्यांनीं देवीची पूजा केली ॥ ४ ॥ याप्रमाणें श्रीकृष्णाकडे चित्त असलेल्या त्या कन्यांनीं एकमहिनापर्यंत हविष्यान्नव्रत

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आचरण करून नंदपुत्र आपला पति होवो अशा इच्छेनें भद्रकालीनामक कात्यायनी देवीचें पूजन चालविलें ॥ ५ ॥ आतां व्रताचें पूर्वांग सांगतो—प्रतिदिवशीं उ-
षःकालीं (पहांटेच्या वेळीं) त्या कन्या उठून त्या त्या नांवांनीं दुसऱ्या कन्यांना जाग्या करून एकीमेकींचे हात धरून यमुनेमध्यें स्नानाकरितां जाऊं लागल्या ह्मणजे
उच्चस्वरानें श्रीकृष्णाचें गायन करीत असत ॥ ६ ॥ त्या कन्या, एकेदिवशीं यमुनेच्या कांठीं जाऊन तेथें आपापलीं वस्त्रें पूर्वींप्रमाणें फेडून ठेऊन, मोठ्या हर्षानें श्री-
कृष्णाचें गायन करीत उदकामध्यें ‘ एकीमेकींच्या अंगावर पाणी उडवून ’ खेळत होत्या ॥ ७ ॥ इतक्यामध्यें योगेश्वरांचाहि ईश्वर असा भगवान् श्रीकृष्ण, तें त्यांचें
व्रताचरण आपल्या प्राप्तीकरितां आहे असें जाणून त्यांच्या कर्माचें फळ देण्याकरितां मित्रांसहवर्तमान तेथें प्राप्त झाला ॥ ८ ॥ आणि त्यांचीं वस्त्रें ग्रहण करून मोठ्या त्वरेनें
कदंबवृक्षावर आरोहण करून, हंसणाऱ्या बालकांसहवर्तमान आपणहि हंसत होत्साता तो कृष्ण, थट्टेनें त्यांस ह्मणाला कीं, ॥ ९ ॥ हे स्त्रियः हो, येथें (कळंबाच्या झाडा-

---

व्रतस्य पूर्वांगमाह । उषसीति । गोत्रैर्नामभिः । अन्योन्याबद्धबाहवः परस्परं गृहीतपाणयः ॥ ६ ॥ ७ ॥ योगेश्वराणामीश्वर इति प्रत्येकं तादृङ्मनोरथपूरणसामर्थ्यं दर्शयति ।
तासां कर्मणः सिद्धये फलदानायेति ॥ ८ ॥ नीपं कदंबम् । बालैः सह ॥ ९ ॥ हे अबलाः नो नर्म न परिहासः । यस्माद्यूयं व्रतश्रांताः ॥ १० ॥ एकैकशो वा आगत्य स्वी-

उषस्युत्थाय गोत्रैः स्वैरन्योन्याबद्धबाहवः ॥ कृष्णमुच्चैर्जगुर्यांत्यः कालिंद्यां स्नातुमन्वहम् ॥ ६ ॥ नद्यां कदाचिदागत्य तीरे नि-
क्षिप्य पूर्ववत् ॥ वासांसि कृष्णं गायंत्यो विजह्रुः सलिले मुदा ॥ ७ ॥ भगवांस्तदभिप्रेत्य कृष्णो योगेश्वरेश्वरः ॥ वयस्यैरावृतस्त-
त्र गतस्तत्कर्मसिद्धये ॥ ८ ॥ तासां वासांस्युपादाय नीपमारुह्य सत्वरः ॥ हसद्भिः प्रहसन्बालैः परिहासमुवाच ह ॥ ९ ॥ अत्रा-
गत्याबलाः कामं स्वं स्वं वासः प्रगृह्यताम् ॥ सत्यं ब्रवाणि नो नर्म यद्यूयं व्रतकर्शिताः ॥ १० ॥ न मयोदितपूर्वं वा अनृतं त-
दिमे विदुः ॥ एकैकशः प्रतीच्छध्वं सहैवोत सुमध्यमाः ॥ ११ ॥ तस्य तत्क्ष्वेलितं दृष्ट्वा गोप्यः प्रेमपरिप्लुताः ॥ व्रीडिताः प्रेक्ष्य चा-
न्योन्यं जातहासा न निर्ययुः ॥ १२ ॥ एवं ब्रुवति गोविंदे नर्मणाक्षिप्तचेतसः ॥ आकंठमग्नाः शीतोदे वेपमानास्तमब्रुवन् ॥ १३ ॥
माऽनयं भोः कृतास्त्वां तु नंदगोपसुतं प्रियम् ॥ जानीमोऽग व्रजश्लाघ्यं देहि वासांसि वेपिताः ॥ १४ ॥

कुरुत सहैव वा । न तत्रास्माकमाग्रह इत्यर्थः ॥ ११ ॥ क्ष्वेलितं परिहासः । प्रेमपरिप्लुताः प्रेमरसनिमग्नाः ॥ १२ ॥ १३ ॥ तत्र मुग्धा ऊचुः । अंग भोः कृष्ण अनय-
मन्याय्यं मा कृथाः ॥ १४ ॥

खालीं) येऊन यथेष्टपणें आपापलें वस्त्र ग्रहण करा. हें खरेंच सांगतों, मस्करी नव्हे; कारण, तुह्मी व्रत करून श्रम पावलां आहां, तेव्हां तुमची मस्करी करणें योग्य
नाहीं ॥ १० ॥ मी आजपर्यंत खोटें भाषण कधींच केलें नाहीं, तें हे गोप जाणत आहेत; यास्तव हे सुंदरकटी हो, तुह्मी एकेकजणीनें येथें येऊन किंवा सर्वजणींनीं
बरोबरच येऊन आपापलीं वस्त्रें परिधान करावीं. एकेकीनेंच. आलें पाहिजे असा आमचा आग्रह नाहीं ॥ ११ ॥ तेव्हां तें त्या कृष्णाचें वस्त्राहरणादिरूप थट्टा करणें पाहून
प्रेमानें व्याप्त झालेल्या, व एकीमेकींकडे पाहून लज्जेनें हसूं लागलेल्या त्या गोपी, पाण्यांतून बाहेर निघाल्या नाहींत ॥ १२ ॥ तर श्रीकृष्ण असें बोलत असतां थट्टे-
च्या योगानें ज्यांचें चित्त कृष्णाकडे जडलें आहे अशा गारपाण्यामध्यें कंठापर्यंत निमग्न झालेल्या व थरथर कांपणाऱ्या त्या गोपी, वस्त्रें हरण करणाऱ्या त्या कृष्णाला
ह्मणाल्या कीं,— ॥ १३ ॥ तन्मध्यें मोहित झालेल्या ह्मणतात—हे कृष्णा, तूं अन्याय करूं नकोस. बहुत गोपांसहवर्तमान कुलस्त्रियांना नग्न पाहण्याची इच्छा करणें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हा तुझा अन्याय आहे. तूं नंदगोपाचा पुत्र सर्वांना प्रिय व गोकुळाला स्तुत्य आहेस हें आह्मी जाणत आहों. अन्याय केलास तर तें गोकुळांत समजलें ह्मणजे तुझी अपकीर्ति होईल व आह्मांस वाईट वाटेल, यास्तव आमचीं वस्त्रें दे. आह्मी थंडीनें फार कांकडलों आहों ॥ १४ ॥ दुसऱ्या ह्मणाल्या–हे श्यामसुंदरा, आह्मी तुझ्या दासी आहों यास्तव तूं सांगितलेलें सर्व करितों. दुसऱ्या प्रौढ स्त्रिया ह्मणाल्या–हे धर्मज्ञा, नग्नस्त्रीला पाहूं नये हा धर्म तूं जाणणारा आहेस यास्तव आमचीं वस्त्रें दे. न देशील तर हें तुझें वर्तन आह्मी नंदराजाला सांगूं बरें ! ॥ १५ ॥ श्रीभगवान् ह्मणाला–हे मंदहास्य करणाऱ्या स्त्रिया हो, तुह्मी जर माझ्या दासी असून मी सांगितलेलें करीत आहां तर कमजास्ती कांहींच न बोलतां येथें येऊन आपापलीं वस्त्रें ग्रहण करा ॥ १६ ॥ नंतर भगवदाज्ञेचें उल्लंघन करणें हें योग्य नव्हे असा निश्चय करून थंडीनें बाहेरून कांपणाऱ्या व आंतून क्लेश पावलेल्या त्या सर्वेहि कन्या, हातांनीं योनीचें आच्छादन करून यमुनेच्या पाण्यांतून बाहेर निघाल्या ॥ १७ ॥ नंतर त्यांनीं

प्रौढा ऊचुः । नो चेद्राज्ञे नंदाय कंसाय वा ब्रुवाम ब्रवाम । हे कृष्णेति ॥ १५ ॥ १६ ॥ प्रोत्तेरुर्निर्गताः ॥ १७ ॥ आहताः ईषदक्षतयोनीर्वीक्ष्य ॥ १८ ॥ धृतव्रताः सत्यो विवस्त्रा अपो व्यगाहतास्सु स्नाता इति यत्तदेतत् उ एव देवहेलनमपराध एवेत्यर्थः । व्रतवैगुण्यभीतानां प्रायश्चित्तमिवाह । अस्यांहसः पापस्य निवृत्तये मूर्ध्न्यंजलिं बध्वाऽधो

श्यामसुंदर ते दास्यः करवाम तवोदितम् ॥ देहि वासांसि धर्मज्ञ नोचेद्राज्ञे ब्रुवामहे ॥ १५ ॥ श्रीभगवानुवाच॥ भवत्यो यदि मे दास्यो मयोक्तं वा करिष्यथ ॥ अत्रागत्य स्ववासांसि प्रतीच्छंतु शुचिस्मिताः ॥ १६ ॥ ततो जलाशयात्सर्वा दारिकाः शीतवेपिताः ॥ पाणिभ्यां योनिमाच्छाद्य प्रोत्तेरुः शीतकर्शिताः ॥ १७ ॥ भगवानाहता वीक्ष्य शुद्धभावप्रसादितः ॥ स्कंधे निधाय वासांसि प्रीतः प्रोवाच सस्मितम् ॥ १८ ॥ यूयं विवस्त्रा यदपो धृतव्रता व्यगाहतैतत्तदु देवहेलनम् ॥ बध्वांजलिं मूर्ध्न्यपनुत्तयेंऽहसः कृत्वा नमोऽधो वसनं प्रगृह्यताम् ॥ १९ ॥ इत्यच्युतेनाभिहितं व्रजाबला मत्वा विवस्त्राप्लवनं व्रतच्युतिम् ॥ तत्पूर्तिकामास्तदशेषकर्मणां साक्षात्कृतं नेमुरवद्यमृग्यतः ॥ २० ॥ तास्तथाऽवनता दृष्ट्वा भगवान्देवकीसुतः ॥ वासांसि ताभ्यः प्रायच्छत्करुणस्तेन तोषितः ॥ २१ ॥

नमः प्रणामं कृत्वेति ॥ १९ ॥ इति दोषत्वेनाच्युतेनाभिहितं विवस्त्राप्लवनं व्रतस्य च्युतिहेतुं मत्वा तस्य पूर्तिकामास्तदशेषकर्मणां तस्य व्रतस्यान्येषामशेषकर्मणां च साक्षात्कृतं फलभूतं तमेव नेमुः । स एवावद्यमृक् पापमार्जकः ॥ २० ॥ २१ ॥

प्रेमलक्षणभक्तीनें प्रसन्न केल्यामुळें संतुष्ट झालेला तो भगवान् श्रीकृष्ण, ऋतुसंपर्क न होणाऱ्या वयांत असलेल्या त्या कन्यांना पाहून कदंबवृक्षाच्या खांद्यावर त्यांचीं वस्त्रें ठेऊन मंदहास्य करीत त्यांना ह्मणाला कीं,– ॥ १८ ॥ हे स्त्रियाहो, तुह्मी व्रत धारण करणाऱ्या असूनहि नग्नपणें जें उदकामध्यें स्नान केलेंत तें ‘ उदकामध्यें अग्नि व देवता राहतात इत्यादिक अर्थाच्या श्रुति असल्यामुळें ’ व्रताचें वैगुण्य करणारें देवांचें हेळणच (अपराधच) झालें आहे. यास्तव त्या पापाच्या निवृत्तिकरितां मस्तकाचेठिकाणीं आपला अंजलि करून खालीं वांकून नमस्कार करा आणि आपापलें वस्त्र घ्या ॥ १९ ॥ याप्रमाणें श्रीकृष्णानें सांगितलेलें भाषण ऐकून, नग्नपणें केलेलें स्नान, व्रताच्या नाशाविषयीं कारण होतें असें मानून, त्या व्रताची पूर्णता व्हावी अशी इच्छा करणाऱ्या त्या कन्यांनीं त्या व्रताचा व दुसऱ्याहि सर्व कर्मांचा साक्षात् फलभूत अशा त्या श्रीकृष्णालाच नमस्कार केला–कारण, तोच सर्वपापांची निवृत्ति करणारा आहे ॥ २० ॥ तेव्हां आपण सांगितल्याप्रमाणें नमस्कार कर-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

णाऱ्या त्या कन्यांना पाहून त्यांच्या नमस्काररूप कर्मानें संतुष्ट झालेल्या त्या करुणामूर्ति देवकीपुत्र भगवान् श्रीकृष्णानें, त्यांना वस्त्रें दिलीं ॥ २१ ॥ हेराजा, याप्रमाणें श्रीकृष्णानें, त्या कन्यांना जरी, 'तुह्मी नग्नपणें जें स्नान केलेंत इत्यादिक सांगून' अत्यंत फसविलें, 'येथें येऊनच आपापलीं वस्त्रें घ्या अशा आग्रहानें' त्यांच्याकडून लज्जा टाकविली, 'मी खरें बोलतों खोटें बोलत नाहीं इत्यादिकेंकरून' त्यांची थट्टा केली, 'मस्तकीं अंजलि करून खालीं नमस्कार करून आपापलें वस्त्र घ्या असें सांगून खेळण्याच्या पदार्थांसारख्या खेळविल्या व त्यांचीं वस्त्रें हरण केलीं तथापि त्या कन्यांनीं ह्या श्रीकृष्णाची निंदा किंवा त्याच्याकडे दोषदृष्टीनें अवलोकनसुद्धां केलें नाहीं. कारण, त्या कन्या, त्या प्रिय श्रीकृष्णाच्या समागमानेंच आनंदयुक्त झाल्या होत्या ॥ २२ ॥ नंतर आपापलीं वस्त्रें परिधान करून

दृढमत्यर्थं प्रलब्धा वंचिता यूयं विवस्त्रा इत्यादिना । त्रपया लज्जया हापितास्त्याजिता अत्रागत्य स्ववासांसीत्याग्रहेण । प्रस्तोभिता उपहसिताः सत्यं ब्रवाणि नो नर्मेत्यादिना । क्रीडनवत्कारिताश्च बध्वांजलिमित्यादिमायश्चित्तछलेन । ता नाभ्यसूयन् दोषदृष्ट्या नापश्यन् ॥ २२ ॥ प्रेष्ठसंगमेन सज्जिता वशीकृता अतो गृहीतचित्ताः सत्यो नोचेलुः । गृहीतचित्तत्वमाह । तस्मिन्कृष्णे लज्जायितेक्षणा लज्जाविलसितमीक्षणं यासां ता इत्यर्थः ॥ २३ ॥ दामोदर इति भक्तवात्सल्यं दर्शयति । अबलाः प्रति ॥ २४ ॥ भोः साध्व्यो

दृढं प्रलब्धास्त्रपया च हापिताः प्रस्तोभिताः क्रीडनवच्चकारिताः ॥ वस्त्राणि चैवापहृतान्यथाऽप्यमुं ता नाभ्यसूयन्प्रियसंगनिर्वृताः ॥ २२ ॥ परिधाय स्ववासांसि प्रेष्ठसंगमसज्जिताः ॥ गृहीतचित्ता नोचेलुस्तस्मिँल्लज्जायितेक्षणाः ॥ २३ ॥ तासां विज्ञाय भगवान्स्वपादस्पर्शकाम्यया ॥ धृतव्रतानां संकल्पमाह दामोदरोऽबलाः ॥ २४ ॥ संकल्पो विदितः साध्व्यो भवतीनां मदर्चनम् ॥ मयाऽनुमोदितः सोऽसौ सत्यो भवितुमर्हति ॥ २५ ॥ न मय्यावेशितधियां कामः कामाय कल्पते ॥ भर्जिता क्वथिता धाना प्रायो बीजाय नेष्यते ॥ २६ ॥

भवतीनां मदर्चनमेव संकल्पो मनोरथः स च लज्जया युष्माभिरकथितोऽपि मया विदितः स मयाऽनुमोदितोऽतः सत्यो भवितुमर्हति । अर्हतीति संभावनोक्त्या आत्यंतिको न भविष्यतीति सूचितम् ॥ २५ ॥ तत्कुत इत्यत आह । न मयीति । कामाय पुनः कामभोगाय । विषयमहिम्ना कामस्यापि शांतिहेतुत्वादिति भावः । कामाप्ररोहे दृष्टांतः । भर्जिता दग्धा क्वथिता पक्का धाना यवादि । बीजायांकुरोद्गमाय । प्राय इति स्वेच्छया पुनः प्ररोहमपि सूचयति ध्रुवादीनां तथा दर्शनात् ॥ २६ ॥

त्या प्रिय श्रीकृष्णाच्या समागमानें त्याला वश झालेल्या व त्यानें चित्त हरण केलेल्या त्या कन्या, त्या कृष्णाचेठिकाणीं लज्जेनें विलासयुक्त अवलोकन करीत तेथेंच स्तब्धपणें उभ्या राहिल्या ॥ २३ ॥ तेव्हां पतिभावानें आपल्या चरणस्पर्शाची इच्छा धरून कात्यायनीपूजनरूप व्रत आचरण करणाऱ्या त्या कन्यांचा आपल्याशीं संभोगविषयक संकल्प आहे असें जाणून, तो भक्तवत्सल भगवान् श्रीकृष्ण, त्या स्त्रियांप्रत ह्मणाला कीं,– ॥ २४ ॥ हे पतिव्रता स्त्रियाहो, तुमचा मनोरथ माझें सेवन करण्याचा माझ्याशीं क्रीडाविषयक आहे तो लज्जेनें तुह्मी जरी मला सांगितला नाहींत तथापि मी जाणिला आहे, आणि त्याचा मी स्वीकारहि केला आहे. तो हा मनोरथ थोडा बहुत सत्य होण्यास योग्य आहे ॥ २५ ॥ कारण, जसें भाजलेलें किंवा शिजविलेलें यवादिक धान्य, बहुतकरून पुन्हा अंकुर उत्पन्न होण्यास योग्य होत नाहीं. केवळ भक्षण करण्यासच उपयोगी पडतें त्याप्रमाणें माझेठिकाणीं ज्यांनीं आपली बुद्धि लावली आहे त्यांचा विषयभोगसंकल्प, वारंवार जन्ममरणरूप संसारांत विषय-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भोग संपादन करण्यास योग्य होत नाहीं, तर कांहींवेळ भोग भोगून शेवटीं तो त्यांना मुक्ति देण्यास योग्य होतो ॥ २६ ॥ ह्मणून हे अबलाहो, तुह्मी पूर्णमनोरथ झालां, आतां गोकुळांत गमन करा. हे सतीहो, ज्याअर्थीं तुह्मी माझ्याबरोबर रतिक्रीडा करण्याचा संकल्प करून हें कात्यायनीपूजनरूप व्रत आचरण केलें आहे त्याअर्थीं पुढें येणाऱ्या ह्या शरदृतूंतील रात्रींमध्यें तुह्मी माझ्याबरोबर रतिक्रीडा कराल ॥ २७ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हेराजा, याप्रमाणें भगवंतानें आज्ञा केलेल्या व वरप्राप्ती झाल्यामुळें पूर्णमनोरथ झालेल्या त्या कुमारिका, भगवंताच्या पदकमलाचा त्याग करण्याचें कठीण असल्यामुळें मोठ्या कष्टानें त्याच्या चरणकमलाचें ध्यान करीत होत्सात्या तेथून गोकुळामध्यें निघून गेल्या ॥ २८ ॥ इकडे गोपांनीं परिवेष्टित असा तो देवकीनंदन भगवान् श्रीकृष्ण, बलरामासहवर्तमान गाई चारीत चारीत

सिद्धाः पूर्णमनोरथाः । तदाह । इमा आगामिनी रात्रीर्मया रंस्यतेति । आर्या कात्यायनी । सतीः सत्यः ॥ २७ ॥ २८ ॥ २९ ॥ ३० ॥ ३१ ॥ भक्त्याऽनुकंप्य कन्यास्तास्त-द्विवर्जितयज्वनाम् ॥ पत्न्यनुग्रहतस्तेषामहन्कर्ममहामदम् ॥ विप्रभार्यानुग्रहाय यज्ञवाटं गच्छन्विप्राणां काठिन्यमभिप्रेत्य तेभ्योऽपि द्रुमाः श्रेष्ठा इति तानभिनंदति चतुर्भिः ।

यातावला व्रजं सिद्धा मयेमा रंस्यथ क्षपाः ॥ यदुद्दिश्य व्रतमिदं चेरुरार्यार्चनं सतीः ॥ २७ ॥ श्रीशुक उवाच ॥ इत्यादिष्टा भगवता लब्धकामाः कुमारिकाः ॥ ध्यायंत्यस्तत्पदांभोजं कृच्छ्रान्निर्विविशुर्व्रजम् ॥ २८ ॥ अथ गोपैः परिवृतो भगवान्देवकीसुतः ॥ वृंदावनाद्गतो दूरं चारयन्गाः सहाग्रजः ॥ २९ ॥ निदाघार्कातपे तिग्मे छायाभिः स्वाभिरात्मनः ॥ आतपत्रायितान्वीक्ष्य द्रुमानाह व्रजौकसः ॥ ३० ॥ हे स्तोककृष्ण हे अंशो श्रीदामन्सुबलार्जुन ॥ विशालर्षभ तेजस्विन्देवप्रस्थ वरूथप ॥ ३१ ॥ पश्यतैतान्महाभागान्परार्थैकांतजीवितान् ॥ वातवर्षातपहिमान्सहंतो वारयंति नः ॥ ३२ ॥ अहो एषां वरं जन्म सर्वप्राण्युपजीवनम् ॥ सुजनस्येव येषां वै विमुखा यांति नार्थिनः ॥ ३३ ॥ पत्रपुष्पफलच्छायामूलवल्कलदारुभिः ॥ गंधनिर्यासभस्मास्थितोक्मैः कामान्वितन्वते ॥ ३४ ॥

पश्यतेति । हे स्तोककृष्णादयो गोपाः एतान् द्रुमान्पश्यत । परार्थमेवैकांतेन जीवितं येषां तान् । तदाह । वातवर्षादीन्स्वयं सहंतः सहमाना अस्माकं वारयंति ॥ ३२ ॥ सुजनस्य कृपालोरर्थिन इव ॥ ३३ ॥ निर्यासो घनरसः । तोक्माः पल्लवाद्यंकुराः ॥ ३४ ॥

वृंदावनांतून दूर गेला ॥ २९ ॥ नंतर प्रखर अशा उन्हाळ्यांतील उन्हामध्यें आपल्या छायांनीं आपणास छत्रासारखे असलेल्या वृक्षांना पाहून तो भगवान् श्रीकृष्ण, गोकुळवासी गोपांस ह्मणाला कीं, ॥ ३० ॥ आतां ब्राह्मणांच्या स्त्रियांवर अनुग्रह करण्याकरितां यज्ञमंडपाकडे जाणारा भगवान् ब्राह्मणांचा कठिणपणा मनांत आणून त्यांच्या पेक्षांहि हे वृक्ष श्रेष्ठ आहेत अशा आशयानें त्यांचें अभिनंदन करितो कीं,—हेस्तोककृष्णा, हे अंशो, हे श्रीदामन, हे सुबला, हे अर्जुना, हे विशाला, हे ऋषभा, हे तेजस्विन्, हे देवप्रस्था व हे वरूथपा, ॥ ३१ ॥ दुसऱ्याकरितांच केवळ वांचणाऱ्या ह्या महाभाग्यशाली वृक्षांना तुह्मी पहा, हे स्वतां, वारा, वृष्टि, ऊन व थंडी यांचें सहन करीत असून आमचीं तीं सर्व निवारण करितात ॥ ३२ ॥ अहो सर्व प्राण्यांची उपजीविका चालण्याचें साधन असा यांचा जन्म, सत्पुरुषांच्या जन्मासारखा श्रेष्ठ आहे, पहा—ज्या वृक्षांचे याचक (त्यांच्याजवळ आलेले लोक) कधींहि विमुख जात नाहींत ॥ ३३ ॥ —हे वृक्ष, आपल्या—पत्रें, पुष्पें, फळें, छाया, मुळें, साली, काष्ठें,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सुगंध, डिंक, भस्म, साल व पल्लवादिक अंकुर यांच्या योगानें दुसऱ्यांचे मनोरथ, पूर्ण करितात ॥ ३४ ॥ या संसारामध्यें असलेल्या प्राण्यांच्या जन्माचें इतकेंच साफल्य आहे कीं, आपल्या प्राणांनीं, धनादिकांनीं, हितचिंतनानें व हितोपदेशानें निरंतर दुसऱ्याचें कल्याणच करीत असावें ॥ ३५ ॥ याप्रमाणें वृक्षांची प्रशंसा करीत तो भगवान् श्रीकृष्ण, पल्लव, फुलांचे गुच्छ, फळें, पुष्पें व पत्रें यांच्या समुदायांनीं शाखा नम्र झालेल्या वृक्षांच्या मधून असलेल्या मार्गानें यमुनेच्या तीरीं गेला ॥ ३६ ॥ हेराजा, तेथें त्या सर्व गोपांनीं, स्वच्छ व आरोग्यकारक असें यमुनेचें गार पाणी गाईंना पाजून, नंतर तें मधुर उदक आपणहि यथेच्छ प्राशन केलें ॥ ३७ ॥ नंतर हे राजा, त्या यमुनेच्या उपवनामध्यें यथेच्छपणें गाई चारणारे परंतु क्षुधेनें व्याकुळ झालेले ते गोप, कृष्णरामांजवळ येऊन असें ह्मणाले कीं,– ॥ ३८ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील दशमस्कंधाच्या पूर्वार्धांत गोपकन्यावस्त्रहरणनामक हा बाविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २२ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ शुभंभवतु ॥

॥ ३५ ॥ इत्यभिनंदन् प्रवालादिसमूहैर्नतशाखानां तरूणां मध्येन यमुनां प्राप्तः ॥ ३६ ॥ ३७ ॥ कुमारिकाभ्यः पूर्वमेव तन्नर्माकुलतया अगृहीतभोज्यानामेव निर्गमात्क्षुधार्ता-इत्युक्तम् ॥ ३८ ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधे पूर्वार्धे टीकायां द्वाविंशोऽध्यायः ॥ २२ ॥ ॥ त्रयोविंशे ततो गोपैरन्नयाच्ञापदेशतः ॥ तत्पत्न्यनुग्रहात्कृष्णो दीक्षितानन्व

एतावज्जन्मसाफल्यं देहिनामिह देहिषु ॥ प्राणैरर्थैर्धिया वाचा श्रेय एवाचरेत्सदा ॥ ३५ ॥ इति प्रवालस्तबकफलपुष्पदलोत्करैः ॥ तरूणां नम्रशाखानां मध्येन यमुनां गतः ॥ ३६ ॥ तत्र गाः पाययित्वाऽपः सुमृष्टाः शीतलाः शिवाः ॥ ततो नृप स्वयं गोपाः कामं स्वादु पपुर्जलम् ॥ ३७ ॥ तस्या उपवने कामं चारयंतः पशून्नृप ॥ कृष्णरामावुपागम्य क्षुधार्ता इदमब्रुवन् ॥ ३८ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे द्वाविंशोऽध्यायः ॥ २२ ॥ ॥ गोपा ऊचुः ॥ राम राम महावीर्य कृष्ण दुष्टनिबर्हण ॥ एषा वै बाधते क्षुन्नस्तच्छांतिं कर्तुमर्हथः ॥ १ ॥ श्रीशुक उवाच ॥ इति विज्ञापितो गोपैर्भगवान्देवकीसुतः ॥ भक्ताया विप्रभार्यायाः प्रसीदन्निदमब्रवीत् ॥ २ ॥ प्रयात देवयजनं ब्राह्मणा ब्रह्मवादिनः ॥ सत्रमांगिरसं नाम ह्यासते स्वर्गकाम्यया ॥ ३ ॥ तत्र गत्वौदनं गोपा याचतास्मद्विसर्जिताः ॥ कीर्तयंतो भगवत आर्यस्य मम चाभिधाम् ॥ ४ ॥

तापयत् ॥ १ ॥ १ ॥ भक्तायाः इत्येकवचनं सद्यः सायुज्याभिप्रायेण ॥ २ ॥ ३ ॥ अस्मद्विसर्जिता आवाभ्यां प्रहिताः संतो याचध्वम् । युष्माकं का तत्र लज्जा । ननु तथाऽप्यपात्रत्वादस्मभ्यं किमिति दास्यंतीति चेत्तत्राह । कीर्तयंत इति ॥ ४ ॥

आतां तेविसाव्या अध्यायामध्यें श्रीकृष्णानें गोपांकडून अन्नयाचनेच्या मिषानें यज्ञकरणाऱ्या दीक्षितांच्या स्त्रियांवर अनुग्रह करून त्या दीक्षितांना अनुताप उत्पन्न केला अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ गोप ह्मणाले– हे महापराक्रम्या रामा, रामा, हे दुष्टनाशका श्रीकृष्णा, ही अतिशय क्षुधा आह्मांला पीडा करीत आहे यास्तव तिची निवृत्ति करण्यास तुह्मी समर्थ आहां ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, याप्रमाणें गोपांनीं क्षुधेच्या निवृत्तीकरितां प्रार्थना केलेला तो देवकीपुत्र भगवान् श्रीकृष्ण, आपल्या भक्त अशा ब्राह्मणाच्या स्त्रीवर प्रसन्न होत्साता असें ह्मणाला कीं,– ॥ २ ॥ हे गोपहो, येथून जवळच वेदार्थाचा उपदेश करणारे ब्राह्मण, स्वर्गप्राप्तीच्या इच्छेनें आंगिरसनामक सत्राचें अनुष्ठान करीत आहेत त्या यज्ञमंडपामध्यें तुह्मी जा ॥ ३ ॥ आणि तेथें जाऊन त्यांना, भगवान् बळरामाचें व माझें नांव सांगून, आह्मी पाठविलेल्या तुह्मी

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आमच्या करितां त्यांच्याजवळ अन्न मागावें ह्मणजे तुमच्या क्षुधेची निवृत्ति होईल ॥ ४ ॥ याप्रमाणें भगवंतानें आज्ञा केलेले ते गोप तेथें जाऊन त्या ब्राह्मणांना हात जोडून प्रथम भूमीवर दंडासारखे पडले आणि नंतर भगवंतानें सांगितल्याप्रमाणें त्यांच्याजवळ अन्नाची याचना केली ॥ ५ ॥ त्यांत प्रथम त्यांचें महत्त्व व आपलें दैन्य सुचवीत ह्मणाले कीं,—हे ब्राह्मणहो, तुमचें कल्याण असो. आह्मी विनंति करितों इकडे लक्ष द्या. श्रीकृष्णानें सांगितलेली आज्ञा करणारे व बलरामानें तुमच्याकडे पाठविलेले आह्मी गोप आहों, असें तुह्मी जाणा ॥ ६ ॥ येथून जवळच गाई चारीत आलेले रामकृष्ण, फार क्षुधाक्रांत झाले आहेत ते यावेळीं तुमच्याकडून अन्न मिळावें अशी इच्छा करीत आहेत. यास्तव धर्मवेत्त्यांमध्यें श्रेष्ठ अशा ब्राह्मण हो, जर तुमच्याजवळ अन्न व तें देण्याची तुह्मांला श्रद्धा असेल तर अन्नार्थी अशा त्या रामकृष्णांना अन्न द्या ॥ ७ ॥ आतां आह्मी दीक्षित असल्यामुळें आमच्या जवळचें अन्न भक्षण करणारा दोषी होतो असें ह्मणाल तर— पशुयागदीक्षेमध्यें अग्नीच्या व सोमाच्या उद्देशानें पशूचें आलंभन

॥ ५ ॥ ६ ॥ अविदूरे वर्तमानौ संतौ वो यदन्नं तल्लषतोऽभिलषतः । वः ओदनं श्रद्धा च यद्यस्ति तर्हि यच्छतेति ॥ ७ ॥ दीक्षिता वयमभोज्यान्ना इति वदिष्यंतीति स्वयमेवाशंक्याहुः । दीक्षाया आरभ्याग्नीषोमीयपश्वालंभनात्पूर्वं दोषः न ततोऽन्यत्र । तथा सौत्रामण्याश्चान्यत्रान्यदा ॥ ८ ॥ क्षुद्रे स्वर्गादावाशामात्रं येषाम् । भूरीणि क्लेशाधिकानि कर्माणि

इत्यादिष्टा भगवता गत्वा याचंत ते तथा ॥ कृतांजलिपुटा विप्रान्दंडवत्पतिता भुवि ॥ ५ ॥ हे भूमिदेवाः शृणुत कृष्णस्यादेशकारिणः ॥ प्राप्तान् जानीत भद्रं वो गोपान्नो रामचोदितान् ॥ ६ ॥ गाश्चारयंताववितूर ओदनं रामाच्युतौ वो लषतो बुभुक्षितौ ॥ तयोर्द्विजा ओदनमर्थिनोर्यदि श्रद्धा च वो यच्छत धर्मवित्तमाः ॥ ७ ॥ दीक्षायाः पशुसंस्थायाः सौत्रामण्याश्च सत्तमाः ॥ अन्यत्र दीक्षितस्यापि नान्नमश्नन्हि दुष्यति ॥ ८ ॥ इति ते भगवद्याच्ञां शृण्वंतोऽपि न शुश्रुवुः ॥ क्षुद्राशा भूरिकर्माणो बालिशा वृद्धमानिनः ॥ ९ ॥ देशः कालः पृथग्द्रव्यं मंत्रतंत्रर्त्विजोऽग्नयः ॥ देवता यजमानश्च क्रतुर्धर्मश्च यन्मयः ॥ १० ॥ तं ब्रह्म परमं साक्षाद्भगवंतमधोक्षजम् ॥ मनुष्यदृष्ट्या दुष्प्रज्ञा मर्त्यात्मानो न मेनिरे ॥ ११ ॥

येषां अतोऽज्ञा वृथाज्ञानवृद्धा इति मानवंतः ॥ ९ ॥ ननु कर्मक्रममुल्लंघ्यादेशकालेऽन्यार्थमन्नमन्यस्मै कथं देयं तत्राह । पृथक् चरुपुरोडाशादि द्रव्यम् । तंत्रं प्रयोगः । धर्मोऽपूर्वम् ॥ १० ॥ मनुष्योऽयमिति दृष्ट्या मर्त्यात्मानो ब्राह्मणा वयं महांत इति मन्यमानाः ॥ ११ ॥

(हिंसा) होण्याच्या पूर्वीं त्या दीक्षितांचें अन्न भक्षण करणारा व सौत्रामणी इष्टीमध्यें अन्न भक्षण करणारा पुरुषमात्र दोषी होतो, त्यांखेरीज दुसऱ्यावेळीं दीक्षितांचेंहि अन्न भक्षण करणारा पुरुष दोषी होत नाहीं; असें शास्त्रप्रसिद्ध आहे ॥ ८ ॥ याप्रमाणें गोपांच्या मुखानें भगवंतानें केलेली याचना श्रवण करणाऱ्याहि त्या ब्राह्मणांनीं ती श्रवण केलीच नाहीं, ह्मणजे तिजकडे चित्त दिलेंच नाहीं. कारण, ते ब्राह्मण, स्वर्गादिकांविषयीं आशामात्र धारण करणारे, बहुत क्लेशांनीं होणाऱ्या कर्मांचेठिकाणीं श्रद्धा धारण करणारे, अज्ञानी व आह्मी ज्ञानवृद्ध आहों असा व्यर्थ अभिमान धारण करणारे होते ॥ ९ ॥ आतां कर्मांच्या क्रमाचें उल्लंघन करून, देवतांच्या उद्देशानें केलेलें अन्न भलत्याच वेळीं दुसऱ्याला कसें द्यावें ? असें कोणी ह्मणेल तर सांगतो— देश, काल, चरुपुरोडाशादिक, निरनिराळीं द्रव्यें, मंत्र, तंत्र (प्रयोग), ऋत्विज, अग्नि, देवता यजमान, यज्ञ व फल उत्पन्न करणारा धर्म हे सर्वहि ज्याचें स्वरूप आहेत ॥ १० ॥ त्या साक्षात् परब्रह्म अधोक्षज भगवान् श्रीकृष्णाचा, मनुष्यदेहावर ‘ आह्मी ॥ ७८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ब्राह्मण थोर आहों असा अभिमान धारण करणाऱ्या त्या दुर्बुद्धि दीक्षितांनीं, 'हा मनुष्य आहे अशा दृष्टीनें' आदर केला नाहीं ॥ ११ ॥ हे राजा, जेव्हां ते ब्राह्मण अन्न देतों असें किंवा देत नाहीं असेंहि ह्मणाले नाहीं, तेव्हां अन्नलाभाविषयीं निराश झालेल्या त्या गोपांनीं रामकृष्णाजवळ येऊन त्यांना झालेलें वर्तमान सांगितलें ॥ १२ ॥ तें गोपांनीं सांगितलेलें ब्राह्मणांचें वर्तन ऐकून, तो जगदीश्वर भगवान्, हास्य करून त्या गोपांना ह्मणाला कीं, कार्यार्थी पुरुषांनीं कंटाळूं नये, कोणत्या वरें याचकाचा अपमान होत नाहीं? भक्तिहीन असणारे पंडितहि मोह पावतात अशी लोकांची स्थिति आहे ॥ १३ ॥ गोपहो, आतां तुह्मी मी येथें येऊन बळरामासहित क्षुधित आहें हें वर्तमान त्या ब्राह्मणांच्या पत्नींना जाऊन कळवा. त्या तुह्मांला पाहिजे तितकें अन्न देतील. कारण, त्या देहानें मात्र तेथें (यज्ञशाळेंत) राहतात परंतु बुद्धीनें माझ्याजवळ राहून माझ्यावर अतिशय स्नेह करणाऱ्या आहेत ॥ १४ ॥ नंतर त्या गोपांनीं पुन्हा यज्ञमंडपांत जाऊन तेथें पत्नीशाळेमध्यें बसलेल्या व अलं

॥ १२ ॥ लौकिकीं गतिं नहि कार्यार्थिनो निर्विंद्यंते को वा याचको न पराभूयत इत्यादिलोकस्थितिं दर्शयन् ॥ १३ ॥ केवलं देहेन गृहे वसंति धिया च मय्येवोषिता यतो मयि स्निग्धा अतो दास्यंतीति ॥ १४ ॥ १५ ॥ ईषिताः प्रेरिताः ॥ १६ ॥ स कृष्णो गोपालैः सह ॥ १७ ॥ तत्कथाक्षिप्तमनस्त्वात्तद्दर्शनोत्सुकाः अतएव तमुपागतं श्रुत्वा जातसंभ्र-

न ते यदोमिति प्रोचुर्न नेति च परंतप ॥ गोपा निराशाः प्रत्येत्य तथोचुः कृष्णरामयोः ॥ १२ ॥ तदुपाकर्ण्य भगवान्प्रहस्य जगदीश्वरः ॥ व्याजहार पुनर्गोपान् दर्शयँल्लौकिकीं गतिम् ॥ १३ ॥ मां ज्ञापयत पत्नीभ्यः ससंकर्षणमागतम् ॥ दास्यंति काममन्नं वः स्निग्धा मय्युषिता धिया ॥ १४ ॥ गत्वाऽथ पत्नीशालाया दृष्ट्वाऽऽसीनाः स्वलंकृताः ॥ नत्वा द्विजसतीर्गोपाः प्रश्रिता इदमब्रुवन् ॥ १५ ॥ नमो वो विप्रपत्नीभ्यो निबोधत वचांसि नः ॥ इतो विदूरे चरता कृष्णेनेहेषिता वयम् ॥ १६ ॥ गाश्चारयन्स गोपालैः सरामो दूरमागतः ॥ बुभुक्षितस्य तस्यान्नं सानुगस्य प्रदीयताम् ॥ १७ ॥ श्रुत्वाऽच्युतमुपायातं नित्यं तद्दर्शनोत्सुकाः ॥ तत्कथाक्षिप्तमनसो बभूवुर्जातसंभ्रमाः ॥ १८ ॥ चतुर्विधं बहुगुणमन्नमादाय भाजनैः ॥ अभिसस्रुः प्रियं सर्वाः समुद्रमिव निम्नगाः ॥ १९ ॥

मा बभूवुः ॥ १८ ॥ भक्ष्यभोज्यलेह्यचोष्यभेदैश्चतुर्विधम् । बहुगुणं संस्कारविशेषैर्बहवो गुणा रससौरभ्यादयो यस्मिंस्तत् । भाजनैरमत्रैर्भांडैर्वा । पत्यादिभिर्वार्यमाणा अपि प्रियं श्रीकृष्णमभिसस्रुरभिजग्मुः । अप्रतिबंधे दृष्टांतः । समुद्रं निम्नगा नद्य इवेति ॥ १९ ॥

कार धारण केलेल्या ऋषिपत्नींना पाहून नमस्कार करून लीनपणें असें भाषण केलें कीं,– ॥ १५ ॥ हे विप्रपत्नीहो, तुह्मांला आह्मी (गोप) नमस्कार करितों. तुह्मी आमचीं भाषणें ऐकून घ्यावीं. येथून जवळच फिरत येणाऱ्या श्रीकृष्णानें आह्मांस येथें (तुमच्या समोर) पाठविलें आहे ॥ १६ ॥ क्रमाकरितां ह्मणाल तर–गोप व बलराम यांसहवर्तमान तो कृष्ण, गाई चारित चारीत घराहून फार दूरप्रदेशीं येथें आला आहे, त्याला क्षुधा लागली आहे, यास्तव त्याच्या बरोबर असणाऱ्या आह्मां गोपांसह क्षुधित असलेल्या त्याला तुह्मी अन्न द्यावें ॥ १७ ॥ तेव्हां, श्रीकृष्ण जवळ आला आहे असें ऐकून, त्याला लवकर अन्नें वाढून नेण्याच्या कामीं त्या अगदीं गडबडून गेल्या. कारण त्या, कृष्णाच्या कथांनीं आकर्षितचित्त असून नित्य त्याच्या दर्शनाविषयीं उत्कंठित होत्या ॥ १८ ॥ व फारकाळापासून, यशश्रवणानें, उत्तमकीर्ति भगवंताचेठिकाणीं चित्त स्थापन केलेल्या त्या सर्व स्त्रिया, फोडण्यावगैरे घातल्यामुळें रस, सुगंध इत्यादिक बहुत गुणांनीं युक्त झालेलें–भक्ष्य, भोज्य, लेह्य व चोष्य असें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

चार प्रकारचें अन्न निरनिराळ्या पात्रांनीं ग्रहण करून पति, भ्राते, बंधु व पुत्र यांनीं निवारण केलें असतांहि त्यांना न जुमानितां, जशा समुद्राकडे नद्या जातात त्याप्रमाणें श्रीकृष्णाकडे जावयास निघाल्या ॥ १९ ॥ २० ॥ त्या स्त्रियांनीं अशोकवृक्षांच्या नूतन पल्लवांनीं सुशोभित अशा यमुनेच्या उपवनामध्यें गोपांना बरोबर घेऊन बलरामासहवर्तमान संचार करणाऱ्या श्रीकृष्णाला अवलोकन केलें ॥ २१ ॥ तो श्रीकृष्ण,—मेघासारखा श्यामवर्ण, पीतांबरधारी, कंठामध्यें घातलेल्या पुष्पांच्या माळा, मस्तकावर धारण केलेलीं मोरांचीं पिसें, अंगाला लावलेली काव आणि कानांवर खोंवलेले कोंवळे पल्लव यांच्या योगानें नटासारखा वेष धारण करणारा, मित्राच्या खांद्यावर हात ठेवलेला, दुसऱ्या हातानें कमळ नाचविणारा, कानांमध्यें कमळांच्या कुडक्या घातलेला, गालांवर कुरळकेश आलेला व मंदहास्यानें युक्त

अत्र हेतुः । भगवतीति । दीर्घं बहुकालं श्रुतेन श्रवणेन धृत आशयो याभिस्ताः ॥ २० ॥ तथागताः सत्यो ददृशुः ॥ २१ ॥ हिरण्यवत्परिधिः परिधानं यस्य तं पीतांबरमित्यर्थः । वनमालैर्बर्हैर्धातुभिः प्रवालैश्च नटवद्वेषो यस्य तम् । अनुव्रतस्य सख्युरंसे विन्यस्तो निहितो हस्तो येन तम् । इतरेण हस्तेन लीलयाऽब्जं धुनानं भ्रामयंतम् । कर्णयोरुत्पले यस्य अलकाः कपोलयोर्यस्य मुखाब्जे हासो यस्य तं च तं च तं च ॥ २२ ॥ वृत्तेरपि लयेन सामरस्यमाह । प्राय इति । बहुशः श्रुता ये प्रियतमस्योदय

निषिद्ध्यमानाः पतिभिर्भ्रातृभिर्बंधुभिः सुतैः ॥ भगवत्युत्तमश्लोके दीर्घश्रुतधृताशयाः ॥ २० ॥ यमुनोपवनेऽशोकनवपल्लवमंडिते ॥ विचरंतं वृतं गोपैः साग्रजं ददृशुः स्त्रियः ॥ २१ ॥ श्यामं हिरण्यपरिधिं वनमाल्यबर्हधातुप्रवालनटवेषमनुव्रतांसे ॥ विन्यस्तहस्तमितरेण धुनानमब्जं कर्णोत्पलालककपोलमुखाब्जहासम् ॥ २२ ॥ प्रायःश्रुतप्रियतमोदयकर्णपूरैर्यस्मिन्निमग्नमनसस्तमथाक्षिरंध्रैः ॥ अंतः प्रवेश्य सुचिरं परिरभ्य तापं प्राज्ञं यथाऽभिमतयो विजहुर्नरेंद्र ॥ २३ ॥ तास्तथा त्यक्तसर्वाशाः प्राप्ता आत्मदिदृक्षया ॥ विज्ञायाखिलदृग्द्रष्टा प्राह प्रहसिताननः ॥ २४ ॥ स्वागतं वो महाभागा आस्यतां करवाम किम् ॥ यन्नो दिदृक्षया प्राप्ता उपपन्नमिदं हि वः ॥ २५ ॥

उत्कर्षास्त एव कर्णपूराः कर्णौ पूरयंति कृतार्थौ कुर्वंतीति तथा तैः कर्णाभरणैरिति वा । यस्मिन्कृष्णे निमग्नमनस आविष्टचेतसस्तं लोचनद्वारैरंतः प्रवेश्य सुचिरमुपगुह्य तापं जहुः । अभिमतयोऽहंवृत्तयः प्राज्ञं सुषुप्तिसाक्षिणं परिरभ्य तस्मिन् लयं प्राप्य यथेति ॥ २३ ॥ अखिलदृग्द्रष्टा सर्वबुद्धिसाक्षी । तास्तथा प्राप्ता विज्ञायापि । तथेत्येतद्विणोति । त्यक्तसर्वाशास्त्यक्ताः सर्वा आशा याभिस्ताः केवलमात्मनः स्वस्यैव दिदृक्षयेति ॥ २४ ॥ हे महाभागाः वः स्वागतं शुभमागमनम् । तदेवाह । यद्यस्मात्प्रतिबंधतिरस्कारेणास्माकं दिदृक्षया प्राप्ता इति । इदं व उपपन्नं संपन्नं युक्तमिति वा ॥ २५ ॥

मुखकमळ असलेला होता ॥ २२ ॥ हे राजा, ज्या स्त्रिया, पूर्वीं बहुतवेळां ऐकिलेले जे प्रियतम श्रीकृष्णाचे उत्कर्ष त्याच जणुं कानांला कृतार्थ करणाऱ्या कर्णभूषणांनीं, कृष्णाचेठिकाणीं निमग्नचित्त झाल्या होत्या, त्यांनीं आतां त्याच श्रीकृष्णाचा नेत्रद्वारा अंतःकरणामध्यें प्रवेश करवून त्याच्यापाशीं फारवेळपर्यंत आलिंगन करून, जसा अहंकाराच्या वृत्तींनीं सुषुप्तीच्या साक्षी प्राज्ञाला आलिंगन करून (त्याचेठिकाणीं लय पावोन) तापाचा त्याग करितात त्याप्रमाणें संसारसंबंधी तापाचा त्याग केला ॥ २३ ॥ असो. त्यावेळीं घरें पतिवगैरे सर्वांच्या आशा सोडून देऊन केवळ आपल्या दर्शनाच्या इच्छेनें तशारीतीनें प्राप्त झालेल्या त्या स्त्रियांना, सर्वबुद्धिसाक्षी त्या भगवंतानें जाणून हास्ययुक्त मुखानें भाषण केलें कीं— ॥ २४ ॥ हे महाभाग्यवतींहो, तुमचें आगमन झालें ही फार चांगली गोष्ट झाली. बसावें, तुमचें कार्य आम्ही

॥ ७९ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कोणतें करावें ? कारण, तुह्मांला येण्याचा प्रतिबंध झाला असतांहि त्याचा तिरस्कार करून तुह्मीं आह्मांला पाहण्याच्या इच्छेनें प्राप्त झालां, हें तुह्मांला योग्य आहे ॥ २५॥ खरोखर असें आहे कीं, आपला पुरुषार्थ पाहणारे विवेकी पुरुष, आत्मा व सर्वांहून प्रिय अशा माझेठिकाणीं स्वतांच फलेच्छारहित अखंडभक्ति उत्तमप्रकारें करीत असतात ॥ २६ ॥ मी सर्वांहून प्रिय कसा असें ह्मणाल तर–ज्या माझ्या संपर्कानेंच प्राण, बुद्धि, मन, ज्ञाति, देह, स्त्री, पुत्र, धन इत्यादिक प्रिय झाले आहेत त्या मजहून दुसरा कोण बरें प्रिय आहे ? कोणीच नाहीं ॥ २७ ॥ यास्तव माझ्या दर्शनानें कृतार्थ झालेल्या तुह्मीं आतां परत यज्ञमंडपामध्यें गमन करावें. कारण, तुमचे पति, गृहस्थाश्रमी ब्राह्मण आहेत ते तुह्मी तेथें गेलां ह्मणजे तुमच्यासहवर्तमान आपलें सत्र संपवितील, ह्मणून पतींवर अनुग्रह करण्याकरितां माघाऱ्या चला ॥ २८ ॥ असें सांगितलेल्या त्या यज्ञपत्नी ह्मणाल्या कीं,–हे विभो, अशाप्रकारचें कठोर भाषण तूं बोलण्याविषयीं योग्य नाहींस. तर, तूं आपलें प्रतिज्ञारूप 'माझा भक्त नाश पावत नाहीं' 'त्याला पुनरावृत्ति होत नाहीं'

युक्तत्वमाह । नन्विति । आत्मप्रिये आत्मा च प्रियश्च तस्मिन्मयि कुशला विवेकिनोऽतएव स्वस्यात्मनोऽर्थं पश्यंति ये ते यथा यथावद्भक्तिं कुर्वंति । यथावत्त्वमाह । अद्धा साक्षात् । अत्र हेतुः । अहैतुक्यव्यवहितां फलाभिसंधिरहितामतएवाव्यवहितां निरंतराम् ॥ २६ ॥ आत्मनः सर्वतः प्रेष्ठत्वमुपपादयति । प्राणेति । स्वा ज्ञातयः आत्मा देहः एते सर्वे यत्संपर्कात्प्रियाः स्युस्तस्याध्यासेनोपकरणत्वेन वा ॥ २७ ॥ तत्तस्मात्कृतार्था यूयं देवयजनं यज्ञवाटं यात गच्छत । ननु कृतार्थाः किमिति यास्याम इति चेदत आह । पतय इति । पार-

नन्वद्धा मयि कुर्वंति कुशलाः स्वार्थदर्शिनाः ॥ अहैतुक्यव्यवहितां भक्तिमात्मप्रिये यथा ॥ २६ ॥ प्राणबुद्धिमनःस्वात्मदारापत्यधनादयः ॥ यत्संपर्कात्प्रिया आसंस्ततः को न्वपरः प्रियः ॥ २७ ॥ तद्यात देवयजनं पतयो वो द्विजातयः ॥ स्वसत्रं पारयिष्यंति युष्माभिर्गृहमेधिनः ॥ २८ ॥ पत्न्य ऊचुः ॥ मैवं विभोऽर्हति भवान्गदितुं नृशंसं सत्यं कुरुष्व निगमं तव पादमूलम् ॥ प्राप्ता वयं तुलसिदाम पदावसृष्टं केशैर्निवोढुमतिलंघ्य समस्तबंधून् ॥ २९ ॥ गृह्णंति नो न पतयः पितरौ सुता वा न भ्रातृबंधुसुहृदः कुत एव चान्ये ॥ तस्माद्भवत्प्रपदयोः पतितात्मनां नो नान्या भवेद्गतिररिंदम तद्विधेहि ॥ ३० ॥ श्रीभगवानुवाच ॥ पतयो नाभ्यसूयेरन् पितृभ्रातृसुतादयः ॥ लोकाश्च वो मयोपेता देवा अप्यनुमन्वते ॥ ३१ ॥

यिष्यंति समापयिष्यंति । पतीनामनुग्रहायेत्यर्थः ॥ २८ ॥ नृशंसं परुषम् । निगमं प्रतिज्ञां न मे भक्तः प्रणश्यतीति वेदं वा न स पुनरावर्तत इति । पदावसृष्टमवज्ञयाऽपि दत्तम् । बहुमानेन केशैर्निर्वोढुं दासीभवितुम् ॥ २९ ॥ किंच । न गृह्णंति नोऽस्मान् । हे अरिंदम कामलोभपापादिदमन भवतः प्रपदयोः पादाग्रयोः पतितदेहानामन्या स्वर्गादिगतिरपि न भवेन्माभूत्तत्तस्मादास्यमेव विधेहीति ॥ ३० ॥ मयोपेता अनुज्ञाताः । प्रत्यक्षं देवान् प्रदर्शयाह । देवा अपीति ॥ ३१ ॥

असें वाक्य आहे तें सत्य कर. आह्मीतर पतिपुत्रादिक सर्वबंधूंचा तिरस्कार करून, तूं आपल्या पायानें अवज्ञेनेंहि दिलेल्या तुळशीच्या माळेला बहुमानपूर्वक मस्तकीं धारण करण्याकरितां (तुझ्या दासी होण्याकरितां) तुझ्या चरणाजवळ प्राप्त झालों आहों; ह्मणून आतां आह्मांला परत जाणें योग्य नाहीं ॥ २९ ॥ आणि आतां घरांतून न ऐकतां निघून गेलेल्या आह्मांला आमचे पति, आईबाप, किंवा पुत्र, हेसुद्धां घरांत घेणार नाहींत मग भ्राते, ज्ञाति, मित्र इत्यादिक जन आह्मांला घरांत घेणार नाहींत हें काय सांगावें. अस्मात् हे कामलोभादिनाशका, तुझ्या पायांच्या अग्रभागीं देह पडलेल्या आह्मांला आतां तुझ्याहून दुसरी स्वर्गादिकहि गति न होवो. असें तूं आपलें दास्यच आह्मांस सांग ह्मणजे झालें ॥ ३० ॥ याप्रमाणें प्रार्थना केलेला श्रीभगवान् पुन्हा ह्मणाला कीं,–हे स्त्रियाहो, मी भक्तत्वानें स्वीकारून घरीं जाण्यास आज्ञा केलेल्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तुमची तुमचे पति, आईबाप, भाऊ, पुत्र इत्यादिक तसेच दुसरे जे सर्व लोक आहेत ते कोणीहि निंदा करणार नाहींत. असें सांगून प्रत्यक्ष देवांना दाखवून म्हणाला कीं, पहा–हे देवसुद्धां तुम्हांला घरीं जाण्यास अनुमोदन देत आहेत ॥ ३१ ॥ आतां तुझा त्याग करण्यास आह्मी समर्थ नाहीं, असें म्हणाल तर हे यज्ञपत्नींहो, ज्याअर्थी या संसारामध्यें माझ्यापाशीं जो आलिंगनादिक व्यवहार असणें तो मनुष्यांच्या सुखाकरितां व उत्तरोत्तर स्नेहवृद्धीकरितां होत नाहीं, त्याअर्थीं माझेठिकाणीं मनाचें स्थापन करणाऱ्याच तुह्मी लवकर माझ्या स्वरूपाप्रत पावाल ॥ ३२ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, याप्रमाणें भगवंतानें सांगितलेल्या त्या यज्ञपत्नी, पुन्हां यज्ञमंडपामध्यें निघून गेल्या, व त्या ऋषींनींहि स्त्रियांवर दोषारोप न ठेवितां आपापल्या स्त्रियांच्या साहाय्यानें सत्राची समाप्ति केली ॥ २३ ॥ त्या यज्ञमंडपामध्यें पूर्वी स्त्रिया अन्न घेऊन निघत्येवेळीं एक स्त्री पतीनें धरून कोंडून ठेविली होती, तिनें पूर्वी भगवंताचें जसें श्रवण केलें होतें त्याप्रमाणें मनांत आणिलेल्या त्या भगवं-

तथापि त्वां त्यक्तुं न शक्नुम इति चेत्तत्राह । नेति । प्रीतये सुखाय । अनुरागाय स्नेहवृद्धये । अंगसंगोऽङ्गाभ्यां संगः ॥ ३२ ॥ अनसूयवः अदोषदृष्टयः ॥ ३३ ॥ देहमिति । तदीयं देहं तत्र विहाय चैतन्येन भगवंतं प्रापेत्यर्थः ॥ ३४ ॥ ३५ ॥ अनुशीलयन्ननुकुर्वन् । गोगोपगोपीनामिति कर्मणि षष्ठी । रूपवाक्कृतैः रूपेण वाचा कृतैश्चरित्रैश्च रमयन् ।

न प्रीतयेऽनुरागाय ह्यंगसंगो नृणामिह ॥ तन्मनो मयि युंजाना अचिरान्मामवाप्स्यथ ॥ ३२ ॥ श्रीशुक उवाच ॥ इत्युक्ता मुनिपत्न्यस्ता यज्ञवाटं पुनर्गताः ॥ ते चानसूयवः स्वाभिः स्त्रीभिः सत्रमपारयन् ॥ ३३ ॥ तत्रैका विधृता भर्त्रा भगवंतं यथा श्रुतम् ॥ हृदोपगुह्य विजहौ देहं कर्मानुबंधनम् ॥ ३४ ॥ भगवानपि गोविंदस्तेनैवान्नेन गोपकान् ॥ चतुर्विधेनाशयित्वा स्वयं च बुभुजे प्रभुः ॥ ३५ ॥ एवं लीलानरवपुर्नृलोकमनुशीलयन् ॥ रेमे गोगोपगोपीनां रमयन् रूपवाक्कृतैः ॥ ३६ ॥ अथानुस्मृत्य विप्रास्ते अन्वतप्यन्कृतागसः ॥ यद्विश्वेश्वरयोर्याच्ञामहन्म नृविडंबयोः ॥ ३७ ॥ दृष्ट्वा स्त्रीणां भगवति कृष्णे भक्तिमलौकिकीम् ॥ आत्मानं च तया हीनमनुतप्ता व्यगर्हयन् ॥ ३८ ॥ धिग्जन्म नस्त्रिवृद्विद्यां धिग्व्रतं धिग्बहुज्ञताम् ॥ धिक्कुलं धिक् क्रिया दाक्ष्यं विमुखा ये त्वधोक्षजे ॥ ३९ ॥

तान् रमयितुं रेम इत्यर्थः ॥ ३६ ॥ अनुस्मृतिप्रकारमाह । नरानुकरणवतोर्विश्वेश्वरयोर्याच्ञां यदहन्म हतवंतस्तत्कृतागसो वयमित्यनुस्मृत्येति ॥ ३७ ॥ तदा च भार्या गुरूनिव मानयंतो भगवद्भक्तिरहितमात्मानं व्यनिंदन्नित्याह । दृष्ट्वेति । अलौकिकीं लोकातीताम् ॥ ३८ ॥ त्रिवृत् शौक्रं सावित्रं दैक्षमिति त्रिगुणितं जन्म । व्रतं ब्रह्मचर्यम् । क्रिया

तावरोबर मनानें आलिंगन करून, कर्मसंबंधानें प्राप्त असलेल्या देहाचा त्याग केला ह्मणजे तो, आपला देह पतीजवळच ठेऊन आपण चैतन्यानें भगवत्स्वरूपास जाऊन पोंचली (मुक्त झाली) ॥ ३४ ॥ इकडे भगवान् प्रभु श्रीकृष्णानेंहि, स्त्रियांनीं आणून दिलेल्या त्या चतुर्विध अन्नानें गोपांना भोजन घालून आपणहि भोजन केलें ॥ ३५ ॥ याप्रमाणें लीलेकरितां मनुष्यशरीराचा स्वीकार करणारा तो श्रीकृष्ण, मनुष्यलोकाचें अनुकरण करीत होत्साता आपल्या स्वरूपसौंदर्यानें, वाङ्माधुर्यानें व नानाप्रकारच्या चरित्रांनीं गाई, गोप आणि गोपी यांना रमविण्याकरितां स्वतांहि रमूं लागला ॥ ३६ ॥ तिकडे यज्ञमंडपांतील ते ब्राह्मण. ज्याअर्थी मनुष्यांचें अनुकरण करणाऱ्या विश्वेश्वर रामकृष्णाच्या याचनेचा आह्मी भंग केला आहे, त्याअर्थी आह्मी अपराधी आहों असें मनांत आणून पश्चात्ताप पावले ॥ ३७ ॥ त्यांनीं ॥ ८० ॥ स्त्रियांची कृष्णाचेठिकाणीं अतिउत्कट भक्ति पाहून आणि आपण त्या भक्तीनें रहित आहों असें जाणून पश्चात्ताप पावले आणि आपलीच निंदा करून घेऊं लागले कीं,– ॥ ३८ ॥ जे आह्मी अधोक्षज भगवान् श्रीकृष्णाचेठिकाणीं विमुख आहों त्या आमच्या शौक्र (उत्पत्तीनें झालेल्या) सावित्र (गायत्रीच्या उपदेशानें झालेल्या) व दैक्ष

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

(यज्ञदीक्षा ग्रहण केल्यानें झालेल्या) अशा तीनप्रकारच्या जन्माला व वेदविद्येला धिक्कार असो. तसाच ब्रह्मचर्यव्रताला धिक्कार असो. बहुज्ञतेला धिक्कार असो. कुळाला धिक्कार असो. व यज्ञकर्मांतील आमच्या चातुर्यालाहि धिक्कार असो ॥ ३९ ॥ ज्याअर्थीं आह्मी लोकांचे उपदेशकर्ते, गुरु व ब्राह्मण असूनहि स्वार्थाविषयीं मोह पावतों त्याअर्थीं भगवंताची माया योग्यांनासुद्धां मोह करणारी आहे असें खरोखर वाटतें ॥ ४० ॥ अहो, स्त्रियांनासुद्धां जगद्गुरु कृष्णाचेठिकाणीं आह्मी प्रतिरोध केला असतांहि अनावर असलेली केवढीहि भक्ति पहा! जिनें गृहनामक मृत्युपाश तोडून टाकिले आहेत ॥ ४१ ॥ या स्त्रियांना, ब्राह्मणांचा उपनयनादिक संस्कार नाहीं, गुरुगृहाचेठिकाणीं वासपूर्वक वेदाध्ययनादिक नाहींत, तप-नाहीं, आत्मविचार नाहीं, शुचिर्भूतपणा नाहीं, तशींच शुभकारक स्नानसंध्यादिक कर्में नाहींत ॥ ४२ ॥ तथापि योगेश्वरांचाहि ईश्वर अशा उत्तमकीर्ति श्रीकृष्णाचेठिकाणीं दृढभक्ति असून ती भक्ति, उपनयनादि संस्कारयुक्त अशाहि आह्मांला नाहीं, तेव्हां हें केवढें आश्चर्य! ॥ ४३ ॥

कर्माणि दाक्ष्यं च। क्रियादाक्ष्यमित्येकं वा पदम्। धिगित्यधिक्षेपे। ये वयं त्वधोक्षजे विमुखास्तेषां जन्मादि तत्सर्वं धिगिति व्यगर्हन्नित्यर्थः ॥ ३९ ॥ ४० ॥ योऽविध्यद-

नूनं भगवतो माया योगिनामपि मोहिनी ॥ यद्वयं गुरवो नृणां स्वार्थे मुह्यामहे द्विजाः ॥ ४० ॥ अहो पश्यत नारीणामपि कृष्णे जगद्गुरौ ॥ दुरंतभावं योऽविध्यन्मृत्युपाशान्गृहाभिधान् ॥ ४१ ॥ नासां द्विजातिसंस्कारो न निवासो गुरावपि ॥ न तपो नात्ममीमांसा न शौचं न क्रियाः शुभाः ॥ ४२ ॥ अथापि ह्युत्तमश्लोके कृष्णे योगेश्वरेश्वरे ॥ भक्तिर्दृढा न चास्माकं संस्कारादिमतामपि ॥ ४३ ॥ ननु स्वार्थविमूढानां प्रमत्तानां गृहेहया ॥ अहो नः स्मारयामास गोपवाक्यैः सतांगतिः ॥ ४४ ॥ अन्यथा पूर्णकामस्य कैवल्याद्याशिषां पतेः ॥ ईशितव्यैः किमस्माभिरीशस्यैतद्विडंबनम् ॥ ४५ ॥ हित्वाऽन्यान्भजते यं श्रीः पादस्पर्शाशयाऽसकृत् ॥ आत्मदोषापवर्गेण तद्याच्ञा जनमोहिनी ॥ ४६ ॥ देशः कालः पृथग्द्रव्यं मंत्रतंत्रर्त्विजोऽग्नयः ॥ देवता यजमानश्च क्रतुर्धर्मश्च यन्मयः ॥ ४७ ॥ स एष भगवान्साक्षाद्विष्णुर्योगेश्वरेश्वरः ॥ जातो यदुष्वित्यशृण्म ह्यपि मूढा न विद्महे ॥ ४८ ॥

च्छिनत्तं दुरंतं भावं भक्तिं पश्यतेति ॥ ४१ ॥ द्विजातिसंस्कार उपनयनम्। क्रियाः संध्योपासनादयः ॥ ४२ ॥ ४३ ॥ ४४ ॥ ४५ ॥ आत्मनो दोषापवर्गेण चांचल्यगर्वादित्यागेन ॥ ४६ ॥ ४७ ॥ इत्यशृण्म एवं सर्वत्र श्रुतवंतो वयं हि तथापीति ॥ ४८ ॥

ह्मणूनच साधूंची गति अशा त्या भगवंतानें आह्मी स्वार्थाविषयीं अज्ञानी आणि घरच्या कामामध्यें निमग्न असल्यामुळें विचाराविषयीं असमर्थ आहों, असें गोपांच्या वाक्यांनीं आह्मांस सुचविलें आहे, केवढा हा त्याचा अनुग्रह? ॥ ४४ ॥ अन्यथा चतुर्विध पुरुषार्थ देणाऱ्या व स्वतों पूर्णमनोरथ अशा त्या श्रीकृष्णाला आज्ञा करण्यास योग्य अशा आमच्या योगानें काय करावयाचें होतें? कांहींच नाहीं. तथापि त्या समर्थाचें, हें अन्न मागणेंवगैरे केवळ आमच्यावर अनुग्रह करण्याकरितां मनुष्याचें अनुकरण आहे ॥ ४५ ॥ पहा-लक्ष्मीसुद्धां, दुसऱ्या (सेवन करणाऱ्या) ब्रह्मादिकांचाहि त्याग करून तसाच आपल्या चांचल्यगर्वादिक दोषांचा त्याग करून केवळ चरणसेवेच्या मनोरथानें ज्याचें वारंवार सेवन करिते त्याची जी दुसऱ्यांजवळ अन्नाविषयींची याचना ती केवळ लोकांना मोह करणारी आहे ॥ ४६ ॥ देश, काळ, निरनिराळीं चरुपुरोडाशादिक द्रव्यें, मंत्र, तंत्र, ऋत्विज, अग्नि, देवता, यजमान, यज्ञ व धर्म हे सर्वहि ज्याच्या मूर्ति आहेत ॥ ४७ ॥ तोच हा योगेश्वर साक्षात् भगवान् विष्णु, यादवांमध्यें उत्पन्न झाला आहे, असें जरी आह्मी पुष्कळठिकाणीं ऐकिलें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आहे तथापि मूर्ख असल्यामुळें त्याचें अनुसंधान राखत नाहीं ॥ ४८ ॥ याप्रमाणें आपली निंदा करून, आतां भगवद्भक्तस्त्रियांच्या संगतीनें आपली कृतार्थता सांगतात– अहो ! आह्मी या लोकांमध्यें अतिधन्य आहों. कारण, ज्या आमच्या तशा स्त्रिया आहेत. ह्मणजे ज्यांच्या भक्तिसामर्थ्यानें आह्मांलाहि श्रीहरीचेठिकाणीं निश्चळ बुद्धि प्राप्त झाली आहे ॥ ४९ ॥ असें भाषण करून भगवंताजवळ क्षमा मागतात–हेप्रभो, सर्वठिकाणीं अकुंठितबुद्धि असणाऱ्या तुज अंतर्यामी षड्गुणैश्वर्यसंपन्न श्रीकृष्णाला नमस्कार असो. ज्याच्या मायेनें मोहितबुद्धि झालेले आह्मी कर्ममार्गांमध्यें भ्रमण पावत आहों ॥ ५० ॥ तोच सर्व कारणभूत सर्वांतर्यामी श्रीकृष्ण, आपल्या मायेनें मोहितचित्त झाल्यामुळें आपला प्रभाव न जाणणाऱ्या आमच्या अपराधाची क्षमा करण्याविषयीं समर्थ आहे ॥ ५१ ॥ याप्रमाणें श्रीकृष्णाची अवज्ञा करणारे ते दीक्षित ब्राह्मण, आपल्या अपराधाचें स्मरण करून त्या रामकृष्णांच्या दर्शनाची इच्छा करित होते परंतु कंसापासून भिऊन ' ह्मणजे आह्मी दर्शनाकरितां गेलोंतर, कंसानें आपला शत्रु विष्णु हाच आहे असें जाणून जर कदाचित् गोकुळाचा नाश केला तर तो आमचा दुसरा अपराध होईल असें मनांत आणून ' त्याच्या दर्शनाकरितां गेले नाहींत, तर

॥ ४९ ॥ ५० ॥ ५१ ॥ न चाचलन् तयोर्दर्शनाय न जग्मुः ॥ ५२ ॥ इति दशमस्कंधे पूर्वार्धे टीकायां त्रयोविंशोऽध्यायः ॥ २३ ॥ ॥ चतुर्विंशे महेंद्रस्य मखं व्यावर्त्य हेतुभि

अहो वयं धन्यतमा येषां नस्तादृशीः स्त्रियः ॥ भक्त्या यासां मतिर्जाता अस्माकं निश्चला हरौ ॥ ४९ ॥ नमस्तुभ्यं भगवते कृष्णायाकुंठमेधसे ॥ यन्मायामोहितधियो भ्रमामः कर्मवर्त्मसु ॥ ५० ॥ स वै न आद्यः पुरुषः स्वमायामोहितात्मनाम् ॥ अविज्ञातानुभावानां क्षंतुमर्हत्यतिक्रमम् ॥ ५१ ॥ इति स्वाघमनुस्मृत्य कृष्णे ते कृतहेलनाः ॥ दिदृक्षवोऽप्यच्युतयोः कंसाद्भीता न चाचलन् ॥ ५२ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे यज्ञपत्न्युद्धरणं नाम त्रयोविंशोऽध्यायः ॥ २३ ॥ श्रीशुक उवाच ॥ भगवानपि तत्रैव बलदेवेन संयुतः ॥ अपश्यन्निवसन्गोपानिंद्रयागकृतोद्यमान् ॥ १ ॥ तदभिज्ञोऽपि भगवान्सर्वात्मा सर्वदर्शनः ॥ प्रश्रयावनतोऽपृच्छद्वृद्धान्नंदपुरोगमान् ॥ २ ॥

कृष्णः प्रवर्तयामास गोवर्धनमखोत्सवम् ॥ १ ॥ भूसुराणां क्रियागर्वं निरस्य स्वः सुरेषु च ॥ मघवन्मदभंगाय तन्मखं समवारयत् ॥ २ ॥ ब्राह्मणाः कंसाद्भीताः स्वाश्रमस्था एव भगवंतमभजन् भगवानपि तत्रैव निवसन्निंद्रयागकृतोद्यमान्गोपानपश्यदिति संबंधः ॥ १ ॥ २ ॥

आपल्या आश्रमांतच त्याची भक्ति करीत राहिले ॥ ५२ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील उत्तरार्धांत यज्ञपत्नीप्रसादनिरूपणनामक हा तेविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २३ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या चोविसाव्या अध्यायामध्यें श्रीकृष्णानें अनेकप्रकारच्या कारणांनीं इंद्राचा यज्ञ मोडून गोवर्धनाच्या यज्ञाचा उत्साह प्रवृत्त केला अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ भूमीवर ब्राह्मणांना झालेला कर्मांचा गर्व घालवून, स्वर्गावर देवांमध्यें इंद्राला झालेल्या मदाचा भंग करण्याकरितां श्रीकृष्णानें त्याच्या यज्ञाचें निवारण केलें ॥ २ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, ते दीक्षित कंसाच्या भीतीनें कृष्णाच्या दर्शनास न जातां आपल्या आश्रमामध्येंच भगवंताची भक्ति करीत राहिले. इकडे बलदेवासहवर्तमान भगवान् श्रीकृष्णानेंहि त्या गोकुळामध्यें वास करित असतां ऐकेवेळीं इंद्राच्या यज्ञाकरित ां उद्योग करणाऱ्या गोपांस पाहिलें ॥ १ ॥ आणि सर्वसाक्षी व सर्वात्मा असा तो भगवान् श्रीकृष्ण, इंद्राच्या यज्ञाकरितां हा उद्योग चालला आहे असें जाणत असूनहि

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नम्रतेनें लीनपणानें नंदादिक वृद्धगोपांस प्रश्न करूं लागला कीं,– ॥ २ ॥ हे बाबा, तुह्मांला हा मोठ्या गडबडीचा विशेष उत्सव काय प्राप्त झाला आहे ? तो मला सांगा. हा याग विशेष आहे असें ह्मणाल तर, याचें फळ काय ? कोणत्या देवाच्या उद्देशानें हें कर्म प्रवृत्त झालें आहे ? व कोणत्या अधिकाऱ्यानें हा यज्ञ साधावयाचा ? ॥ ३ ॥ हे ताता, मला, ऐकण्याविषयीं मोठी इच्छा आहे, यास्तव श्रवणाची इच्छा करणाऱ्या मला हें सर्व सांग. आतां हें गोप्य आहे असें ह्मणशील तर, या व्यवहारामध्यें, जे सर्वठिकाणीं आत्मदृष्टि ठेवणारे साधु आहेत, ज्यांना स्वकीय व परकीय दृष्टि नाहीं व ज्यांना मित्र, उदासीन व शत्रु हे नाहींत त्या साधूंचें कोणतेंहि कर्म गोप्य नसतें. आतां साधूंच्या व आमच्यामध्यें थोडासा भेद आहे असें ह्मणाल तरी, विचाराच्या कामांत शत्रूप्रमाणें उदासीनहि वर्ज्य करावा परंतु मित्र असेल

वृथा संभ्रमो न भवति मखोऽयमित्येवं चेत् किमत्र फलं का देवता केनाधिकारिणा केन वा साधनेन साध्यते ॥ ३ ॥ एतद्ब्रूहि महान्कामो मम श्रवणे वर्तते । यद्वा तव महान्कामो दृश्यत इति । तूष्णीं स्थितं प्रत्याह । नेति । सर्वात्मनां सर्वत्रात्मदृष्टीनाम् ॥ ४ ॥ अतएव न विद्यते स्वः पर इति दृष्टिर्येषामिति स्वपरदृष्ट्यभावादेव तत्तद्भेदा अमित्रादयोऽपि तेषां न संतीत्याह । अमित्रेति न मित्रमुदास्त उदासीनो विद्विड्द्वेष्टा तेषां कृत्यं सर्वं कर्म न गोपनीयं किंचिदस्तीत्यर्थः । सत्यपि भेददर्शने उदासीनः श-

कथ्यतां मे पितः कोऽयं संभ्रमो व उपागतः ॥ किं फलं कस्य चोद्देशः केन वा साध्यते मखः ॥ ३ ॥ एतद्ब्रूहि महान्कामो मह्यं शुश्रूषवे पितः ॥ नहि गोप्यं हि साधूनां कृत्यं सर्वात्मनामिह ॥ ४ ॥ अस्त्यस्वपरदृष्टीनाममित्रोदास्तविद्विषाम् ॥ उदासीनोऽरिवद्वर्ज्य आत्मवत्सुहृदुच्यते ॥ ५ ॥ ज्ञात्वाऽज्ञात्वा च कर्माणि जनोऽयमनुतिष्ठति ॥ विदुषः कर्मसिद्धिः स्यात्तथा नाविदुषो भवेत् ॥ ६ ॥ तत्र तावत्क्रियायोगो भवतां किं विचारितः ॥ अथवा लौकिकस्तन्मे पृच्छतः साधु भण्यताम् ॥ ७ ॥ नंद उवाच ॥ पर्जन्यो भगवानिंद्रो मेघास्तस्यात्ममूर्तयः ॥ तेऽभिवर्षंति भूतानां प्रीणनं जीवनं पयः ॥ ८ ॥ तं तात वयमन्ये च वार्मुचां पतिमीश्वरम् ॥ द्रव्यैस्तद्रेतसा सिद्धैर्यजंते क्रतुभिर्नराः ॥ ९ ॥

त्रुवद्वर्ज्य आत्मतुल्यत्वात् । सुहृन्मंत्रेषु न वर्जनीय इत्याह । उदासीन इति ॥ ५ ॥ किंच सुहृद्भिः सह विचार्य ज्ञात्वैव कर्म कर्तव्यं न तु गतानुगतिकत्वमात्रेणेत्याह । ज्ञात्वेति । अज्ञात्वा च तत्र विदुषो यथा तत्कर्मफलं स्यात्तथा नाविदुषः ॥ ६ ॥ भवतामयं क्रियायोगः शास्त्रतोऽपि किं विचारितः प्रवृत्तो लौकिकाचारप्राप्तो वेति साधु सोपपत्तिकं भण्यतां कथ्यतामिति ॥ ७ ॥ आचारप्राप्त एवेति सहेतुकमाह । पर्जन्य इति । आत्ममूर्तयः प्रियमूर्तयः ॥ ८ ॥ ततः किमित्यत आह । तमिति । तमिंद्रं वार्मुचां मेघानां पतिं स्वामिनमीश्वरं नियंतारम् । तद्रेतसा तद्वृष्टिपयसा ॥ ९ ॥

तो आपणासारखाच मानिला पाहिजे ॥ ४ ॥ ५ ॥ आणि मित्रांबरोबर विचार करून कोणतेंहि कर्म करावें, गतानुगतिकपणानें करूं नये. कारण, हा जन, जाणून व न जाणूनहि कर्में करितो त्यांत जाणून करणाराला त्या कर्माचें फळ जसें प्राप्त होतें तसें नजाणून करणाराला प्राप्त होत नाहीं ॥ ६ ॥ असें असतां हा तुमचा याग करण्याचा उद्योग मित्रांसहवर्तमान शास्त्रानें विचार केलेला आहे अथवा लोकव्यवहारानेंच प्राप्त झाला आहे, तें विचारणाऱ्या मला सविस्तर सत्य सांगा ॥ ७ ॥ तें ऐकून नंद ह्मणाला–हेकृष्णा, भगवान् इंद्र हा - वृष्टीचा अधिपति आहे, मेघ हे त्याच्या प्रियमूर्ति आहेत. ते मेघ, सर्व प्राणिमात्रांना तृप्ति करणारें व वांचण्याचें साधन अशा पाण्याची वृष्टि करितात ॥ ८ ॥ यास्तव बा कृष्णा, आह्मी वैश्य व दुसरेहि ब्राह्मणक्षत्रियादिक मनुष्य, मेघांचा पति अशा त्या ईश्वर इंद्राचें, त्यानें केलेल्याच

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वृष्टीनें सिद्ध झालेल्या अन्नादिक द्रव्यांनीं यज्ञ करून आराधन करितात ॥ ९ ॥ आणि ते यज्ञ होऊन अवशेष राहिलेल्या अन्नादिकेंकरून धर्मार्थकामांची सिद्धि होण्याकरितां आपली जीविका चालवितात. आतां कृष्यादिकेंकरून अन्नादिकांची सिद्धि होत असल्यामुळें इंद्राच्या आराधनानें काय करावयाचें आहे ? असें ह्मणशील तर– कोणताहि कृषीवगैरे उद्योग करणाऱ्या पुरुषांना इंद्रच वृष्टिद्वारा फलसाधक आहे, वृष्टीवांचून कांहींच सिद्ध होणार नाहीं ॥ १० ॥ – प्रास्तव वृद्धाचारपरंपरेनें प्राप्त झालेल्या धर्मरूप या यागाचा जो पुरुष, कामानें, लोभानें, भयानें किंवा द्वेषानें त्याग करील तो कधींहि सुख पावणार नाहीं ॥ ११ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, असें नंदाचें व दुसऱ्याहि गोकुळवासी गोपांचें भाषण ऐकून इंद्राला क्रोध उत्पन्न करण्याकरितां ह्मणजे कोप उत्पन्न करण्याच्या द्वारानें इंद्राला गर्वपर्वतावरून खालीं

उपजीवंत्युपजीविकां कल्पयंति धर्मार्थकामसिद्धये । ननु कृष्यादिभिर्जीवंति किमिंद्रेण तत्राह । पुंसामिति । फलभावनः फलसाधकः । पर्जन्यं विना कृष्यादिवैफल्यादित्यर्थः ॥ १० ॥ ॥ ११ ॥ इंद्राय मन्युं जनयन्निति कोपजननद्वारा गर्वपर्वतादिंद्रमवतारयितुं देवतानिराकरणं न त्वयमेवाभिप्राय इत्यर्थः ॥ १२ ॥ प्रथमं तावत्कर्मवादेन देवान्निराकरोति । कर्मणेति । ननु जडात्कर्मणः केवलात्कथं फलसिद्धिः स्यादिति चेत् अहो अशीलितमीमांसानां स्वमतिविलसिता श्रद्धा कर्मणां फलकारणत्वे वचनतोऽवगते किं ततो

तच्छेषेणोपजीवंति त्रिवर्गफलहेतवे ॥ पुंसां पुरुषकाराणां पर्जन्यः फलभावनः ॥ १० ॥ य एवं विसृजेद्धर्मं पारंपर्यागतं नरः ॥ कामाल्लोभाद्भयाद्द्वेषात्स वै नाप्नोति शोभनम् ॥ ११ ॥ श्रीशुक उवाच ॥ वचो निशम्य नंदस्य तथाऽन्येषां व्रजौकसाम् ॥ इंद्राय मन्युं जनयन्पितरं प्राह केशवः ॥ १२ ॥ श्रीभगवानुवाच ॥ कर्मणा जायते जंतुः कर्मणैव विलीयते ॥ सुखं दुःखं भयं क्षेमं कर्मणैवाभिपद्यते ॥ १३ ॥ अस्ति चेदीश्वरः कश्चित्फलरूप्यन्यकर्मणाम् ॥ कर्तारं भजते सोऽपि न ह्यकर्तुः प्रभुर्हि सः ॥ १४ ॥ किमिंद्रेणेह भूतानां स्वस्वकर्मानुवर्तिनाम् ॥ अनीशे नान्यथा कर्तुं स्वभावविहितं नृणाम् ॥ १५ ॥

नुपपन्नं नाम ॥ १३ ॥ केचित्पुनरतिसाहसभीताः कर्मपरतंत्रमीश्वरं मन्यंते तन्मतमनूद्य निराकरोति । अस्ति चेदिति । स्वयं कर्मभिरलिप्तोऽन्येषां जीवानां कर्मणां फलरूपी फलदाता कर्तारं भजते तत्तत्कर्मफलदानेन ॥ १४ ॥ अतः कर्मण एव फलसिद्धेस्तत्पारतंत्र्ये चाजागलस्तनतुल्यत्वान्न देवतया कृत्यमित्याह । किमिंद्रेणेति । ननु कर्मणोऽपि प्रवृत्तिरंतर्याम्यपेक्षैव कथं सर्वथा देवताया अनुपयोग इत्याशंक्याह । स्वभावविहितमिति । स्वभावेन प्राक्तनसंस्कारेणैव विहितं यत्कर्म तदन्यथा कर्तुमनीशेन ॥ १५ ॥

उतरण्याकरितां तो श्रीकृष्ण नंदपित्याला असें ह्मणाला कीं, ॥ १२ ॥ प्रथम कर्मवादानें देवांचें निराकरण करीत श्रीभगवान् ह्मणाला– हे ताता, सर्व प्राणी, जन्मांतरीं केलेल्या कर्मानें उत्पन्न होतो; कर्मानेंच लय पावतो; सुख, दुःख, भय, किंवा कल्याण हीं सर्वेहि कर्माच्याच योगानें पावतो ॥ १३ ॥ आतां कांहीं लोक, कर्माला कारण मानणें हें अतिसाहस आहे असें मानून, कर्मपरतंत्र अशा ईश्वराला कारण मानितात, त्या मताचें दूषण करितो– स्वतः कर्मांनीं अलिप्त असून दुसऱ्याच्या कर्मांचें फळ देणारा असा जर कोणी ईश्वर आहे असें ह्मणावें तर तो– जो जें कर्म करितो त्यालाच त्या कर्माचें फळ देतो; कर्म न करणाराला देत नाहीं ॥ १४ ॥ प्रास्तव कर्मापासूनच फलसिद्धि होत असून त्याच्या स्वाधीन मानलेला तो इंद्र, अजागलस्तनतुल्य असून प्राक्तनसंस्कारांनीच मनुष्यांना घडणारें कर्म किंवा त्यावें सुखदुःखादिक फळ अन्यथा करण्यास असमर्थ आहे. त्या इंद्राचा यज्ञ करून, आपापल्या कर्माला अ-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नुसरणाऱ्या लोकांना काय उपयोग आहे ? कांहींच नाहीं ॥ १९ ॥ हा सर्वजन प्राक्तनसंस्काराच्याच स्वाधीन आहे. तो आपल्या त्या स्वभावालाच अनुसरून धर्म अधर्म इत्यादिक कर्मांचेठिकाणीं प्रवृत्त होतो. एतावता देव, असुर, मनुष्यांसहवर्तमान हें सर्व जग, स्वभावाचेचठिकाणीं राहिलेलें आहे ॥ १६ ॥ तस्मात् स्वभावानें उत्पन्न होणाऱ्या कर्मानेंच हा प्राणी मोठे लहान (देव मनुष्यादिक) देह पावोन कर्मसमाप्ति होतांच त्यांचा त्याग करितो व शत्रु, मित्र, उदासीन, गुरु व ईश्वर हीं सर्व कर्मांच्या योगानेंच घडतात ॥ १७ ॥ ह्मणून आपापल्या प्राक्तनसंस्काराला अनुसरून आपापल्या वर्णाश्रमादि कर्में करणाऱ्या पुरुषानें कर्मांचाच सन्मान करावा. आतां कर्म ह्मटलें ह्मणजे देवतांच्या उद्देशानें अन्नादिक समर्पण करणें हें होय; त्याची सिद्धि देवतांवांचून कशी होईल ? असें ह्मणाल तर–हा प्राणी ज्याच्या योगानें सुखानें वर्ततो तेंच याचें दैवत होय, ह्मणजे त्याच्याच उद्देशानें त्यानें कर्में करावीं ॥ १८ ॥ जो पुरुष, एका देवतेचें जीवनोपायत्वेंकरून सेवन करून तिला न मानितां दुसऱ्याच

एतद्विवृणोति । स्वभावतंत्र इति । प्रवृत्तेः संस्काराधीनत्वात्किमंतर्यामिणेत्यर्थः ॥ १६ ॥ तस्मात्स्वभावतो निष्पन्नस्य कर्मण एव सर्वकारणत्वात् कर्मैव पूज्यमित्याह । देहानिति सार्धेन ॥ १७ ॥ संपूजयेत्संमानयेत् । ननु देवतोद्देशेन द्रव्यत्यागात्मकत्वात्कर्मणः कथं देवतां विना सिद्धिरित्याशंक्य कर्मांगमात्रं देवतेति पक्षमुपसंहरन्निव हेतुवादमाश्रित्यान्या-

स्वभावतंत्रो हि जनः स्वभावमनुवर्तते ॥ स्वभावस्थमिदं सर्वं सदेवासुरमानुषम् ॥ १६ ॥ देहानुच्चावचान् जंतुः प्राप्योत्सृजति कर्मणा ॥ शत्रुर्मित्रमुदासीनः कर्मैव गुरुरीश्वरः ॥ १७ ॥ तस्मात्संपूजयेत्कर्म स्वभावस्थः स्वकर्मकृत् ॥ अंजसा येन वर्तेत तदेवास्य हि दैवतम् ॥ १८ ॥ आजीव्यैकतरं भावं यस्त्वन्यमुपजीवति ॥ न तस्माद्विंदते क्षेमं जारं नार्यसती यथा ॥ १९ ॥ वर्तेत ब्रह्मणा विप्रो राजन्यो रक्षया भुवः ॥ वैश्यस्तु वार्तया जीवेच्छूद्रस्तु द्विजसेवया ॥ २० ॥ कृषिवाणिज्यगोरक्षा कुसीदं तुर्यमुच्यते ॥ वार्ता चतुर्विधा तत्र वयं गोवृत्तयोऽनिशम् ॥ २१ ॥ सत्त्वं रजस्तम इति स्थित्युत्पत्त्यंतहेतवः ॥ रजसोत्पद्यते विश्वमन्योन्यं विविधं जगत् ॥ २२ ॥ रजसा चोदिता मेघा वर्षंत्यबूनि सर्वतः ॥ प्रजास्तैरेव सिद्ध्यंति महेंद्रः किं करिष्यति ॥ २३ ॥

मेव देवतां समर्थयते । अंजसेति ॥ १८ ॥ हेतुबलेनैव विपक्षे दोषमाह । आजीव्येति । उपजीवति सेवते ॥ १९ ॥ स्ववृत्तिं वक्तुं दृष्टांतत्वेन वर्णानां वृत्तिभेदमाह । वर्तेतेति । ब्रह्मणा वेदाध्यापनादिना ॥ २० ॥ वैश्यवृत्तेश्चातुर्विध्यमाह । कृषीति । कृषिवाणिज्यसहिता गोरक्षा एवं त्रयम् । कुसीदं वृद्धिजीवनं चतुर्थम् ॥ २१ ॥ ननु गवामपि वृत्तिर्महेंद्राधीनैवेत्याशंक्य निरीश्वरसांख्यमताश्रयेण निराकरोति । सत्त्वमिति श्लोकद्वयेन । अन्योन्यं स्त्रीपुरुषयोगेन ॥ २२ ॥ सर्वत इति । समुद्रशिलोषरादि-

देवतेची सेवा करितो तो पुरुष, त्या देवतेपासून, जशी जारिणी स्त्री पतीचा त्याग करून जारपुरुषापासून कल्याण पावत नाहीं त्याप्रमाणें कल्याण पावत नाहीं ॥ १९ ॥ आतां आपली वृत्ति सांगण्याकरितां वर्णांच्या वृत्तींचा भेद सांगतो– ब्राह्मणानें वेदाध्ययनादिकेंकरून आपली वृत्ति संपादन करावी. राजानें भूमीच्या रक्षणानें, वैश्यानें वार्तेच्या योगानें व शूद्रानें ब्राह्मणाच्या सेवेच्या योगानें आपली वृत्ति चालवावी ॥ २० ॥ त्यांत वैश्याची जी वार्तावृत्ति ती शेती, व्यापार, गाईंचें रक्षण आणि चवथें वाढीदिढी करणें अशी चार प्रकारची सांगितली आहे. त्यांमध्यें आह्मी (गोपाळ) निरंतर गाईंची सेवा करून वृत्ति चालविणारे आहों ॥ २१ ॥ आतां गाईंचीहि वृत्ति इंद्राच्या स्वाधीनच आहे असें ह्मणाल तर–सत्व, रज आणि तम असे हे तीन गुण अनुक्रमानें जगाच्या स्थिति, उत्पत्ति आणि लय यांचें कारण आहेत. त्यांमध्यें रजोगुणाच्या योगानें स्त्रीपुरुषसंभोग होऊन हें नानाप्रकारचें देवमनुष्यादिरूप जग उत्पन्न होतें ॥ २२ ॥ रजोगुणाच्याच योगानें प्रेरणा केलेले मेघ, सर्वत्र नदीसमुद्रादि-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

काचेंठिकाणींहि उदकाची वृष्टि करितात, त्या उदकांनींच प्रजांची अन्नसंपादनादिक कार्यसिद्धि होत्ये; असें असतां इंद्र काय करितो ? काहींच करीत नाहीं ॥ २३ ॥ तथापि आपले योगक्षेम चालण्याकरितां देवतेची अपेक्षा आहे असें ह्मणाल तर—हे ताता, कीं ज्यांच्या रक्षणाकरितां इंद्र देव पाहिजे तीं आमचीं नगरें नाहींत, देश नाहींत, गांव नाहींत व घरेंहि नाहींत तर आह्मी निरंतर अरण्यरूप घरवाले असल्यामुळें वनामध्यें पर्वतावर राहणारे आहों ॥ २४ ॥ ह्मणून तुह्मी जीवनाला कारण अशा गाईंचा व भूमीवरचे प्रत्यक्ष देव अशा ब्राह्मणांचा आणि कंद, मुळें, जळ, तृण, इत्यादिकेंकरून योगक्षेम चालविणाऱ्या गोवर्धन पर्वताचा यज्ञ आजपासून आरंभा. इंद्राच्या यज्ञाचीं जीं साहित्यें आहेत त्यांनींच हा यज्ञ साधावा ॥ २५ ॥ पायस (क्षीर) आदिकरून मुगांच्या वरणापर्यंत नानाप्रकारचे स्वयंपाक करा; मल्हांच्या रव्याचा सांजा, तुपांत

ष्वपि वृष्टिदर्शनान्नप्रेक्षावत्पूर्वकत्वं वृष्टेरिति भावः । तैरेव मेघैरेव सिद्ध्यंति जीवंति ॥ २३ ॥ तथापि योगक्षेमार्थं देवतापेक्षेति चेदत आह । न नः पुर इति । पुरः पत्तनानि जनपदा देशाः । अस्माकं योगक्षेमहेतुर्वनशैलादय एवेति भावः ॥ २४ ॥ ब्राह्मणानपि संगृह्णन्निगमयति । तस्मादिति । स्वयमुत्प्रेक्षितयागप्रयोगकल्पनामाह । य इंद्रयागसंभारा

न नः पुरो जनपदा न ग्रामा न गृहा वयम् ॥ नित्यं वनौकसस्तात वनशैलनिवासिनः ॥ २४ ॥ तस्माद्गवां ब्राह्मणानामद्रेश्चारभ्य-तां मखः ॥ य इंद्रयागसंभारास्तैरयं साध्यतां मखः ॥ २५ ॥ पच्यंतां विविधाः पाकाः सूपांताः पायसादयः ॥ संयावापूपश-ष्कुल्यः सर्वदोहश्च गृह्यताम् ॥ २६ ॥ हूयंतामग्नयः सम्यग्ब्राह्मणैर्ब्रह्मवादिभिः ॥ अन्नं बहुविधं तेभ्यो देयं वो धेनुदक्षिणाः ॥ २७॥ अन्येभ्यश्चाश्वचांडालपतितेभ्यो यथार्हतः ॥ यवसं च गवां दत्वा गिरये दीयतां बलिः ॥ २८॥ स्वलंकृता भुक्तवंतः स्वनुलिप्ताः सुवाससः ॥ प्रदक्षिणां च कुरुत गोविप्रानलपर्वतान्॥२९॥ एतन्मम मतं तात क्रियतां यदि रोचते ॥ अयं गोब्राह्मणाद्रीणां मह्यं च दयितो मखः ॥ ३० ॥ श्रीशुक उवाच ॥ कालात्मना भगवता शक्रदर्पं जिघांसता ॥ प्रोक्तं निशम्यनंदाद्याः साध्वगृह्णंत तद्वचः ॥ ३१ ॥

इति सार्धपंचभिः । संभाराः साधनानि ॥ २५ ॥ सूपं मौद्गम् । पायसं केवले पयसि पक्कम् । संयावादयो गोधूमादिविक्रियाः । क्रमश्च सूपपायसयोः श्रुत्या दोहस्यार्थतोऽन्येषां पाठतः ॥ २६ ॥ यागशोभार्थं श्रद्धोत्पादनार्थं चाह । हूयंतामिति । धेनुदक्षिणाः धेनुसहिता दक्षिणाः ता एव वा दक्षिणाः । वो युष्माभिः ॥ २७ ॥ यवसं तृणम् ॥ २८ ॥ ॥ २९ ॥ सर्वान् शिरःकंपेनानुमोदयन्नाह । गोब्राह्मणाद्रीणामिति । मह्यं मम च ॥ ३० ॥ ३१ ॥

तळलेले घारगे, जिलब्या व सर्व गोरस ग्रहण करा ॥ २६ ॥ वेदवेत्त्या ब्राह्मणांकडून आहवनीयादिक अग्नीमध्यें घृतादिकांचें हवन करा; तुह्मी त्या ब्राह्मणांना षड्रसयुक्त अन्न द्यावेंत व धेनुसहित दक्षिणा द्याव्यात ॥ २७ ॥ दुसऱ्याहि श्वान चांडाळ पतितांपर्यंत सर्व मोरक्करीबांना त्यांच्या योग्यतेप्रमाणें अन्नादिक द्यावें. आणि गाईंना कोंवळें तृण देऊन गोवर्धनपर्वताला पक्वान्नादिकांचा मोठा बलि (नैवेद्य) अर्पण करा ॥ २८ ॥ आणि तुह्मी अलंकार धारण करून, भोजन करून, आंगाला उटणेंवगैरे लाऊन व उत्तम वस्त्रें परिधान करून, गाई, ब्राह्मण, अग्नि व गोवर्धनपर्वत यांना प्रदक्षिणा घाला ॥ २९ ॥ हे तात, अशाप्रकारचें कर्म करावें हें मला मान्य आहे. तुह्मांला जर आवडत असेल तर करा. एकंदरींत हा मी सांगितलेला यज्ञ, गाई, ब्राह्मण, पर्वत व मी या सर्वांना आवडणारा होणार आहे ॥ ३० ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, इंद्राचा गर्व हरण करणाऱ्या कालरूपी भगवान् श्रीकृष्णानें सांगितलेलें वचन ऐकून, नंदादिक गोपांनीं त्याचा आदरपूर्वक अंगीकार केला ॥ ३१ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आणि जसें श्रीकृष्णानें सांगितलें होतें तसेंच सर्व केलें. ~~तें असें कीं,~~–ब्राह्मणाकडून मोठ्या आदरानें पुण्याहवाचन करवून इंद्रयागाकरितां संपादन केलेल्या पक्वान्नादिसाहित्यानें गोवर्धनपर्वताला बळी अर्पण करून ब्राह्मणांना भोजन घालून व इतरहि सर्वांना अन्न अर्पण करून गाईंना कोंवळें गवत यथेच्छ घातलें आणि ब्राह्मणाचे आशीर्वाद घेऊन त्या नंदादिक गोपांनीं, ~~व अलंकार धारण केलेल्या व कृष्णचरित्रें गायन करणाऱ्या~~ गोपींनीं सर्व गोधनें पुढें करून, बैल जुंपलेल्या छकड्यांवर बसून गोवर्धन पर्वताला प्रदक्षणा केली ॥ ३२ ॥ ३३ ॥ ३४ ॥ श्रीकृष्णानें तर गोपांना गोवर्धनाचेठिकाणीं ‘ ही देवता आहे असा ’ विश्वास उत्पन्न करणारें दुसरेंच एक स्वरूप धारण करून भव्यस्वरूपी होत्साता गोवर्धनपर्वताच्या शिखरावर राहिला आणि त्यानें मी पर्वताभिमानी देव आहें असें ह्मणून गोपांनीं अर्पण केलेला मोठा बलि भक्षण केल

तद्द्रव्येण तेन महेंद्रमखद्रव्येण । गिरिं द्विजान्प्रति यथायथम् ॥ ३२ ॥ बलीनुपहृत्य दत्वा । आदृताः सादराः ॥ ३३ ॥ अनडुद्युक्तानि उत्तमानडुद्भिर्युक्तानि । सद्विजाशिषो द्विजाशीर्भिः सहिताः ॥ ३४ ॥ गोपविश्रंभणं गोपानां विश्वासजनकं रूपं गतः प्राप्तः सन् बलिमुपहारमाददभक्षयत् ॥ ३५ ॥ तस्मै आत्मने आत्मना स्वयं व्रजजनैः सह नम-

तथा च व्यदधुः सर्वं यथाह मधुसूदनः ॥ वाचयित्वा स्वस्त्ययनं तद्द्रव्येण गिरिद्विजान् ॥ ३२ ॥ उपहृत्य बलीन्सर्वानादृता यवसं गवाम् ॥ गोधनानि पुरस्कृत्य गिरिं चक्रुः प्रदक्षिणम् ॥ ३३ ॥ अनांस्यनडुद्युक्तानि ते चारुह्य स्वलंकृताः ॥ गोप्यश्च कृष्णवीर्याणि गायंत्यः सद्विजाशिषः ॥ ३४ ॥ कृष्णस्त्वन्यतमं रूपं गोपविश्रंभणं गतः ॥ शैलोऽस्मीति ब्रुवन्भूरि बलिमादद्बृहद्वपुः ॥ ३५ ॥ तस्मै नमो व्रजजनैः स चक्रे आत्मनात्मने ॥ अहो पश्यत शैलोऽसौ रूपी नोऽनुग्रहं व्यधात् ॥ ३६ ॥ एषोऽवजानतो मर्त्यान्कामरूपी वनौकसः ॥ हंति ह्यस्मै नमस्यामः शर्मणे आत्मनो गवाम् ॥ ३७ ॥ इत्यद्रिगोद्विजमखं वासुदेवप्रणोदिताः ॥ यथा विधाय ते गोपाः सहकृष्णा व्रजं ययुः ॥ ३८ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे चतुर्विंशतितमोऽध्यायः ॥ २४ ॥ ॥

श्चक्रे अहो इति सार्धश्लोकं पठन् ॥ ३६ ॥ कामरूपी सर्पादिरूपः । अस्मै अद्रये शर्मणे क्षेमाय ॥ ३७ ॥ कर्मैवालं प्राक्स्वभावो गुणो वा कर्मांगं वा तद्वशो वा महेशः ॥ वार्ता कर्त्री देवतेतीयमुक्ता देवक्षोभे षण्मती नत्वभीष्टा ॥ ३८ ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधे पूर्वार्धटीकायां चतुर्विंशोऽध्यायः ॥ २४ ॥ ॥

॥ ३५ ॥ इकडे कृष्णानें गोपांना सांगितलें कीं,–अहो आश्चर्य पहा ! तुह्मी बहुतवेळ इंद्राची पूजा केली परंतु तो असा मूर्तिमंत कधींच दृष्टीस पडला नाहीं. ह्या गोवर्धनपर्वतानें तर आपलें प्रत्यक्षरूप दाखवून आमच्यावर अनुग्रह केला आणि आह्मी दिलेला बळि भक्षण केला. ~~हा पर्वत इच्छित रूपें धारण करून आपली अवज्ञा करणाऱ्या वनांतील मनुष्यांना सिंहव्याघ्रसर्पादिरूपानें मारितो; यास्तव~~ आपल्या व गाईंच्या कल्याणाकरितां याला आह्मी नमस्कार करूंया. असें ह्मणून गोकुळवासी जनासहवर्तमान त्या कृष्णानें आपणच त्या नवें स्वरूप धारण केलेल्या आपणास नमस्कार केला ॥ ३६ ॥ ३७ ॥ याप्रमाणें श्रीकृष्णानें प्रेरणा केलेले ते नंदादिक गोप, गोवर्धन पर्वत, गाई व ब्राह्मण यांचा यज्ञ यथाविधि करून कृष्णासहवर्तमान गोकुळांत प्रविष्ट झाले ॥ ३८ ॥ ~~याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील दशमस्कंधाच्या पूर्वार्धांत गोवर्धनमखनिरूपणनामक हा चोविसावा अध्याय समाप्त झाला~~ ॥ २४ ॥ ॥ ~~श्रीकृष्णार्पणमस्तु~~ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां ह्या पंचविसाव्या अध्यायामध्यें गोकुळाच्या नाशाकरितां क्रोधानें इंद्र वृष्टि करूं लागला असतां, प्रभु श्रीकृष्णानें गोवर्धन पर्वत उचलून त्या धारावृष्टीपासून गोकुळाचें रक्षण केलें अशी कथा आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, त्यावेळीं गोपांनीं आपली पूजा करावयाची टाकली असें जाणून, देवांचा राजा इंद्र; श्रीकृष्ण ज्यांचा रक्षक आहे त्या नंदादि गोपांवर क्रुद्ध झाला ॥ १ ॥ आणि क्रुद्ध झालेल्या व मीच ईश्वर आहें असा गर्व धारण करणाऱ्या त्या इंद्रानें, प्रळय करणाऱ्या मेघांच्या सांवर्तकनामक गणाला गोकुळाचा नाश करण्याविषयीं आज्ञा करून विशेष असें सांगितलें कीं,– ॥ २ ॥ अहो अरण्यामध्यें राहणाऱ्या गोपांच्या धनसंपत्तीच्या गर्वाचें

पंचविंशे रुषा शक्रे व्रजनाशाय वर्षति ॥ उद्धृत्य गिरिमासारादरक्षद्गोकुलं प्रभुः ॥ १ ॥ कृष्णो नाथो येषां तेभ्यः ॥ १ ॥ क्रुद्धः सन्निंद्रः सांवर्तकं नाम संवर्तः प्रलयस्तत्कर्तारं मेघानां प्रसिद्धं गणं प्राचोदयत्प्रेषयामास । ननु कृष्णनाथानां घाते कथं प्रवृत्त इत्याशंक्यात्मसंभावनया निरस्तविवेकत्वादित्याशयेनाह । वाक्यं चाहेत्यादिपंचभिः । ईशमान्यहमेवेश्वर इति गर्ववान् ॥ २ ॥ देवहेलनं देवस्य ममावज्ञाम् ॥ ३ ॥ अदृढैरसमर्थैः कर्ममयैः क्रियानिर्वर्त्यैरतएव नाममात्रनौनिभैर्नाममात्रेण या नौरिति व्यवह्रियते तत्सदृशैः ।

श्रीशुक उवाच ॥ इंद्रस्तदात्मनः पूजां विज्ञाय विहतां नृप ॥ गोपेभ्यः कृष्णनाथेभ्यो नंदादिभ्यश्चुकोप सः ॥ १ ॥ गणं सांवर्तकं नाम मेघानां चांतकारिणाम् ॥ इंद्रः प्राचोदयत्क्रुद्धो वाक्यं चाहेशमान्युत ॥ २ ॥ अहो श्रीमदमाहात्म्यं गोपानां काननौकसाम् ॥ कृष्णं मर्त्यमुपाश्रित्य ये चक्रुर्देवहेलनम् ॥ ३ ॥ यथाऽदृढैः कर्ममयैः क्रतुभिर्नामनौनिभैः ॥ विद्यामान्वीक्षिकीं हित्वा तितीर्षंति भवार्णवम् ॥ ४ ॥ वाचालं बालिशं स्तब्धमज्ञं पंडितमानिनम् ॥ कृष्णं मर्त्यमुपाश्रित्य गोपा मे चक्रुरप्रियम् ॥ ५ ॥ एषां श्रियावलिप्तानां कृष्णेनाध्मायितात्मनाम् ॥ धुनुत श्रीमदस्तंभं पशून्नयत संक्षयम् ॥ ६ ॥ अहं चैरावतं नागमारुह्यानुव्रजे व्रजम् ॥ मरुद्गणैर्महावीर्यैर्नंदगोष्ठजिघांसया ॥ ७ ॥

आन्वीक्षिकीमात्मानुस्मृतिरूपाम् ॥ ४ ॥ तथा वाचालं बहुभाषिणं बालिशं शिशुं पंडितमानिनं पंडितंमन्यमतः स्तब्धमविनीतमिति निंदायां योजिताऽपींद्रस्य भारती कृष्णं स्तौति । तथाहि । वाचालं शास्त्रयोनिम् । बालिशमेवमपि शिशुवन्निरभिमानिनम् स्तब्धमन्यस्य वंद्यस्याभावादनम्रम् । अज्ञं नास्ति ज्ञो यस्मात्तं सर्वज्ञमित्यर्थः । पंडितमानिनं ब्रह्मविदां बहुमाननीयम् । कृष्णं सदानंदरूपं परं ब्रह्म मर्त्यं तथापि भक्तवात्सल्येन मनुष्यतया प्रतीयमानमिति ॥ ५ ॥ अवलिप्तानां मत्तानां आध्मायितात्मनां बृंहितदेहानां धुनुतापनयत । श्रीमदेन यः स्तंभो गर्वस्तम् ॥ ६ ॥ बिभ्यतस्तान्प्रत्याह । अहं चेति । अनुव्रजे अन्वनंतरमेवागमिष्यामि । मरुद्गणैर्देवगणैः सह ॥ ७ ॥

वैभव किती आश्चर्यकारक आहे पहा ! ज्या गोपांनीं मर्त्य (मरणधर्मानें युक्त) अशा कृष्णाचा आश्रय करून अमर अशा मज देवाची अवज्ञा केली आहे ! ॥ ३ ॥ जसे कोणी अज्ञानी पुरुष, आत्मानुस्मरणरूप विद्येचा त्याग करून, तारण्यास असमर्थ असून नाममात्रानें नौकेसारख्या भासणाऱ्या कर्ममय यज्ञांनीं संसारसमुद्राला तरून जाण्याची इच्छा करितात त्याप्रमाणें पुष्कळ बोलणारा, बालक, उद्धट, व अज्ञानी असून आपणासच पंडित असें मानणारा अशा ह्या मनुष्य असलेल्या कृष्णाचा आश्रय करून गोपांनीं मज देवाचा अपमान केला आहे ॥ ४ ॥ ५ ॥ ह्या संपत्तीनें मत्त झालेल्या व कृष्णानें ज्यांचे देह फुगविले आहेत अशा गोपांचा संपत्तिमदयुक्त गर्व तुह्मी घालवून टाका; यांच्या गाईवगैरे पशूंचा संहार करा ॥ ६ ॥ तेव्हां भिणाऱ्या त्या मेघांना पुन्हा ह्मणाला कीं,– मीहि ऐरावत गजावर बसून महापराक्रमी देवगणांसह- ॥ ८४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वर्तमान नंदाच्या गोकुळाचा नाश करण्याकरितां गोकुळांत येतों ॥ ७ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, याप्रमाणें इंद्रानें आज्ञा केलेले व 'प्रळय करण्याकरितां जे बांधून ठेविले होते' ते बंधनें सोडून टाकलेले मेघ, नंदाच्या गोकुळाला धारांच्या वृष्टींनीं जोरानें पीडा करूं लागले ॥ ८ ॥ विजांच्या योगानें प्रकाश पावणारे, वज्रपातांसह गर्जना करणारे, तीव्र अशा आवह प्रवह इत्यादिक प्रळयकारक वायूंनीं प्रेरित झालेले ते मेघ, पाण्याच्या गारांची वृष्टि करूं लागले ॥ ९ ॥ ते मेघ, एकसारख्या खांबाएवढ्या मोठ्या वृष्टीच्या धारा सोडूं लागले असतां, पाण्याच्या ओघांनीं बुडून गेलेली भूमि, उंच किंवा सखल मुळींच दिसत नाहींशीं झाली ॥ १० ॥ त्यावेळीं गाई-वगैरे पशु, गोप व गोपी हीं अतिवृष्टीनें, अतिवायूनें व थंडीनें थरथर कांपत होत्सातीं गोविंदाला शरण गेलीं ॥ ११ ॥ वृष्टीनें पीडित झालेल्या व थरथर कांपणाऱ्या गाई तर

मघवता इंद्रेण निर्मुक्तं बंधनं येषां ते । प्रलयाभिप्रायेण बद्धा आसन् तदा निर्मुक्तबंधनाः संतः आसारैर्धारासंपातैः पीडयामासुः ॥ ८ ॥ स्तनयित्नुभिरशनिभिः । स्तनंतो गर्जंतः । मरुद्गणैरावहप्रवहादिवायुसमूहैर्नुन्नाः प्रेरिताः । जलशर्करा जलोपलान् ॥ ९ ॥ स्थूणावत्स्थूलाः । अभ्रेषु मुंचत्सु सत्सु । नतोन्नतं नतं निम्नमुन्नतं तद्विपरीतं यथा भवति तथा भूर्नादृश्यत ॥ १० ॥ जातवेपना जातकंपाः ॥ ११ ॥ तत्र पशूनां यानं विशिनष्टि । शिर इति ॥ १२ ॥ गोपगोपीनां प्रार्थनामाह । कृष्ण कृष्णेति । त्वमेव नाथो

श्रीशुक उवाच ॥ इत्थं मघवताज्ञप्ता मेघा निर्मुक्तबंधनाः ॥ नंदगोकुलमासारैः पीडयामासुरोजसा ॥ ८ ॥ विद्योतमाना विद्युद्भिः स्तनंतः स्तनयित्नुभिः ॥ तीव्रैर्मरुद्गणैर्नुन्ना ववृषुर्जलशर्कराः ॥ ९ ॥ स्थूणास्थूला वर्षधारा मुंचत्स्वभ्रेष्वभीक्ष्णशः ॥ जलौघैः प्लाव्यमाना भूर्नादृश्यत नतोन्नतम् ॥ १० ॥ अत्यासारातिवातेन पशवो जातवेपनाः ॥ गोपा गोप्यश्च शीतार्ता गोविंदं शरणं ययुः ॥ ११ ॥ शिरः सुतांश्च कायेन प्रच्छाद्यासारपीडिताः ॥ वेपमाना भगवतः पादमूलमुपाययुः ॥ १२ ॥ कृष्ण कृष्ण महाभाग त्वन्नाथं गोकुलं प्रभो ॥ त्रातुमर्हसि देवान्नः कुपिताद्भक्तवत्सल ॥ १३ ॥ शिलावर्षनिपातेन हन्यमानमचेतनम् ॥ निरीक्ष्य भगवान्मेने कुपितेंद्रकृतं हरिः ॥ १४ ॥ अपर्त्वत्युल्बणं वर्षमतिवातं शिलामयम् ॥ स्वयागे निहतेऽस्माभिरिंद्रो नाशाय वर्षति ॥ १५ ॥ तत्र प्रतिविधिं सम्यगात्मयोगेन साधये ॥ लोकेशमानिनां मौढ्याद्धरिष्ये श्रीमदं तमः ॥ १६ ॥

यस्य तद्गोकुलं गवां कुलं वंशं नोऽस्मांश्च देवादिंद्रात्त्रातुं रक्षितुमर्हसि ॥ १३ ॥ विज्ञापनात्पूर्वमेव कुपितेनेंद्रेण कृतं तद्वर्षं मेने ॥ १४ ॥ कथं मेने तदाह । अपर्त्विति । अपगतऋतुर्यस्य तद्वर्षम् । अतिशयितो वातो यस्मिंस्तदतिवातम् । शिलामयं शिलाप्रचुरम् ॥ १५ ॥ तत्र प्रतिज्ञापूर्वं गोवर्धनोद्धरणमाह । तत्रेति । तत्र प्रतिविधिं प्रतीकारं स्वसामर्थ्येन साधयिष्यामि तेन च मौढ्याल्लोकेशमानिनां श्रीमदलक्षणं तमो हरिष्यामि । बहुवचनेन वरुणादीनभिप्रैति ॥ १६ ॥

आपलीं मस्तकें व वत्स यांना देहानें आच्छादन करून भगवंताच्या पायांजवळ प्राप्त झाल्या ॥ १२ ॥ गोप व गोपी ह्मणाल्या कीं,–हे कृष्णा, हे कृष्णा, हे महाभाग्यवंता, प्रभो, भक्तवत्सला, ज्यांचा नाथ तूंच आहेस अशा गाईंच्या कुळांचें व आमचें, क्रोधयुक्त झालेल्या ह्या देवापासून रक्षण करण्यास तूं योग्य आहेस ॥ १३ ॥ तेव्हां प्रार्थना करण्याच्या पूर्वींच शिळायुक्त वृष्टीच्या पडण्यानें ताडित झाल्यामुळें अचेतनप्राय झालेलें गोकुळ जाणून भगवान् श्रीहरीनें, तें रागावलेल्या इंद्राचें कर्म आहे असें जाणिलें ॥ १४ ॥ तें असें कीं,– वृष्टि होण्याचा काळ नसतां अतिभयंकर, मोठ्या वाऱ्यानें युक्त व जिच्यामध्यें शिळाच पुष्कळ आहेत अशी वृष्टि, आपला याग आह्मीं मोडिला ह्मणून गोकुळाच्या नाशाकरितां इंद्र करीत आहे ॥ १५ ॥ असो. आतां तिचा प्रतीकार मी आपल्या सामर्थ्यानें उत्तमप्रकारें साधितों आणि मूर्खपणामुळें लोकांचे अधि-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पति आह्मींच आहों असा अभिमान धारण करणाऱ्या इंद्रादि लोकपाळांचें श्रीमद्रूप अज्ञान घालवितों ॥ १६ ॥ आतां देव सात्त्विक असून भक्त आहेत त्यांना अज्ञान कसें? असें ह्मणावें तर—ज्याअर्थीं सत्वगुण किंवा भक्ति असणाऱ्यादि देवांना आह्मींच ईश्वर असा गर्व होण्यास योग्य नाहीं त्याअर्थीं ते हल्लीं दुष्ट झाले आहेत तेव्हां मजपासून त्या दुष्टांचा मानभंग झाला असतां हा त्यांच्यावर अनुग्रहच होणार आहे ॥ १७ ॥ प्रास्तव मी आपल्या सामर्थ्यानें, ज्याचा रक्षक मीच आहें व ज्याला मी आपलें असें ह्मटलें आहे त्या मला शरण आलेल्या गोकुळाचें रक्षण करितों; ह्मच मी आतां संकल्प केला आहे ॥ १८ ॥ असें ह्मणून त्या श्रीकृष्णानें सहज लीलेनें एका हातानें गोवर्धन पर्वत उपटून, जसा लहान बालक छत्राक (अळंबें) धारण करितो त्याप्रमाणें डाव्या हातावर धारण केला ॥ १९ ॥ नंतर तो भगवान् गोपांस ह्मणाला कीं,—हे माते,

---

ननु देवाः सात्विकास्त्वद्भक्ताश्च कुतस्तेषां तमस्तत्राह । नहीति । सद्भावः सत्त्वं मद्भक्तिर्वा तद्युक्तानां सुराणामीशा वयमिति विस्मयो गर्वो हि यस्मान्न घटतेऽतोऽसंतस्त्वे । किंच तेषां मानभंगोऽनुग्रह एवेत्याह । मत्त इति ॥ १७ ॥ गोपाये रक्षिष्यामि किंच सोऽयं मे मया व्रतो नियमः संकल्पो वा आहितो धृत इत्यर्थः ॥ १८ ॥

न हि सद्भावयुक्तानां सुराणामीशविस्मयः ॥ मत्तोऽसतां मानभंगः प्रशमायोपकल्पते ॥ १७ ॥ तस्मान्मच्छरणं गोष्ठं मन्नाथं म-
त्परिग्रहम् ॥ गोपाये स्वात्मयोगेन सोऽयं मे व्रत आहितः ॥ १८ ॥ इत्युक्त्वैकेन हस्तेन कृत्वा गोवर्धनाचलम् ॥ दधार लीलया
कृष्णश्छत्राकमिव बालकः ॥ १९ ॥ अथाह भगवान्गोपान्हेंऽब तात व्रजौकसः ॥ यथोपजोषं विशत गिरिगर्तं सगोधनाः ॥ २० ॥
न त्रास इह वः कार्यो मद्धस्ताद्रिनिपातने ॥ वातवर्षभयेनालं तत्त्राणं विहितं हि वः ॥ २१ ॥ तथा निर्विविशुर्गर्तं कृष्णाश्वासित-
मानसाः ॥ यथावकाशं सधनाः सव्रजाः सोपजीविनः ॥ २२ ॥ क्षुत्तृड्व्यथां सुखापेक्षां हित्वा तैर्व्रजवासिभिः ॥ वीक्ष्यमाणो दधा-
वद्रिं सप्ताहं नाचलत्पदात् ॥ २३ ॥ कृष्णयोगानुभावं तं निशाम्येंद्रोऽतिविस्मितः ॥ निस्तंभो भ्रष्टसंकल्पः स्वान्मेघान्संन्यवारय-
त् ॥ २४ ॥ खं व्यभ्रमुदितादित्यं वातवर्षं च दारुणम् ॥ निशाम्योपरतं गोपान्गोवर्धनधरोऽब्रवीत् ॥ २५ ॥

कृत्वा उत्कृत्य । छत्राकमुच्छिलींध्रम् ॥ १९ ॥ यथोपजोषं यथासुखम् ॥ २० ॥ २१ ॥ सव्रजाः शकटमंडलसहिताः । सोपजीविनो भृत्यपुरोहितादिसहिताः ॥ २२ ॥ पदात्स्थानात् ॥ २३ ॥ २४ ॥ २५ ॥

हे ताता, हे गोकुळवासी लोक हो, तुह्मीं सर्वांनीं आपापल्या गोधनासहवर्तमान सुखानें अडचण न करितां चार कोस लांब असलेल्या पर्वताच्या ह्या खळग्यामध्यें प्रवेश करा ॥ २० ॥ ह्या खळग्यामध्यें राहणाऱ्या तुह्मी माझ्या हातावरून पर्वत खालीं पडेल अशी शंका मनामध्यें मुळींच आणूं नका. वाऱ्याचें व वृष्टीचें जें भय तेंसुद्धां आतां तुह्मीं मनांत आणूं नये. कारण, त्यापासून तुमचें रक्षण मी योजिलें आहे ॥ २१ ॥ असें सांगून मनाला विश्वास पावविलेले ते गोप, भगवंतानें सांगितल्याप्रमाणें आपापलें सामान गाड्यांवर घालून गोधनासहवर्तमान व सेवकपुरोहितादिकांसहवर्तमान दाटी न होईल तशा रीतीनें पर्वताच्या त्या खळग्यामध्यें प्रविष्ट झाले ॥ २२ ॥ नंतर कृष्णदर्शनाच्या आनंदानें, क्षुधेचें व तृषेचें दुःख आणि सुखाची इच्छा यांचा त्याग करून त्या गोकुळवासी लोकांनीं अवलोकन केलेला तो श्रीकृष्ण, पर्वताचें धारण करून राहिला. तो सात दिवसपर्यंत त्या स्थानावरून हाललासुद्धां नाहीं ॥ २३ ॥ कृष्णाचें तें सामर्थ्य पाहून अतिविस्मित, गर्वरहित व भ्रष्टसंकल्प झालेल्या इंद्रानें, आपल्या मेघांचें निवारण केलें ॥ २४ ॥ तेव्हां, आकाश मेघरहित व सूर्याच्या उदयानें युक्त झालें आणि भयंकर वारा व वृष्टि हीं शांत झालीं, असें पाहून गोव

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

र्धनधारी श्रीकृष्ण सर्व गोपांना ह्मणाला कीं,– ॥ २९ ॥ गोप हो, आतां वारा व वृष्टि शांत झाली. नद्यांचें पाणीहि अगदीं थोडें झालें, यास्तव तुह्मी आतां आपापल्या स्त्रिया, गोधनें व बालक यांसहवर्तमान या खळग्यांतून बाहेर पडा. पुन्हा आपणास भीति प्राप्त होईल असें मनांत मुळींच आणूं नका ॥ २६ ॥ नंतर ते सर्व गोप, आपापलें सामान गाड्यांवर घालून आपापलें गोधन ग्रहणकरून स्त्रिया बालक व वृद्ध यांसहवर्तमान हळुहळु बाहेर पडले ॥ २७ ॥ नंतर भगवान् प्रभु श्रीकृष्णानेंहि सर्व लोक पाहत असतां सहजलीलेनें त्या पर्वताला त्याच्या स्थानीं पूर्वीप्रमाणें ठेविलें ॥ २८ ॥ नंतर त्या रक्षण करणाऱ्या श्रीकृष्णाला प्रेमाच्या वेगानें पूर्ण झालेले गोकुळवासी सर्व लोक, यथायोग्य आलिंगनादिकेंकरून भेटले तशाच गोपीहि स्नेहयुक्त आनंदानें दहीं, अक्षता व पाणी यांच्या योगेंकरून पूजन करून उत्तम आशीर्वाद देऊं लागल्या.

व्युदप्राया विगतोदकप्रायाः । स्वल्पजला इत्यर्थः ॥ २६ ॥ शकटोढोपकरणं शकटैरूढमुपकरणं यथा भवति तथा ॥ २७ ॥ २८ ॥ निभृताः पूर्णाः । यथा यथोचितं परिरंभणादिभिः समीयुरुपजग्मुः । सदाशिषः श्रेष्ठानाशीर्वादान् ॥ २९ ॥ ३० ॥ ३१ ॥ ३२ ॥ ततो गोवर्धनस्थानात् । अस्य श्रीकृष्णस्य तथाविधानि गोवर्धनोद्धरणादिरूपाणि

निर्यात त्यजत त्रासं गोपाः सस्त्रीधनार्भकाः ॥ उपारतं वातवर्षं व्युदप्रायाश्च निम्नगाः ॥ २६ ॥ ततस्ते निर्ययुर्गोपाः स्वं स्वमादाय गोधनम् ॥ शकटोढोपकरणं स्त्रीबालस्थविराः शनैः ॥ २७ ॥ भगवानपि तं शैलं स्वस्थाने पूर्ववत्प्रभुः ॥ पश्यतां सर्वभूतानां स्थापयामास लीलया ॥ २८ ॥ तं प्रेमवेगान्निभृता व्रजौकसो यथा समीयुः परिरंभणादिभिः ॥ गोप्यश्च सस्नेहमपूजयन्मुदा दध्यक्षताद्भिर्युयुजुः सदाशिषः ॥ २९ ॥ यशोदा रोहिणी नंदो रामश्च बलिनां वरः ॥ कृष्णमालिंग्य युयुजुराशिषः स्नेहकातराः ॥ ३० ॥ दिवि देवगणाः साध्याः सिद्धगंधर्वचारणाः ॥ तुष्टुवुर्मुमुचुस्तुष्टाः पुष्पवर्षाणि पार्थिव ॥ ३१ ॥ शंखदुंदुभयो नेदुर्दिवि देवप्रणोदिताः ॥ जगुर्गंधर्वपतयस्तुंबुरुप्रमुखा नृप ॥ ३२ ॥ ततोऽनुरक्तैः पशुपैः परिश्रितो राजन्स गोष्ठं सबलोऽव्रजद्धरिः ॥ तथाविधान्यस्य कृतानि गोपिका गायंत्य ईयुर्मुदिता हृदिस्पृशः ॥ ३३ ॥ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे पंचविंशोऽध्यायः ॥ २५ ॥ ॥

कृतानि कर्माणि गायंत्य ईयुर्ययुः । कथंभूताः । एवं प्रेम्णा हृदि स्पृशंतीति हृदि स्पृशस्ताः । यद्वा कथंभूतस्य । प्रेष्ठत्वेन तासां हृदि स्पृशतीति हृदिस्पृक् तस्य ॥ ३३ ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधे पूर्वार्धे टीकायां पंचविंशोऽध्यायः ॥ २५ ॥

॥ २९ ॥ यशोदा, रोहिणी, नंद व बलवानामध्यें श्रेष्ठ असा राम, हे स्नेहानें व्याकुळचित्त होत्साते कृष्णाला आलिंगन देऊन आशीर्वाद देऊं लागले ॥ ३० ॥ त्यावेळीं श्रीकृष्णानें इंद्राचा निग्रह करूनहि गोकुळाचें संरक्षण केलें असतां स्वर्गलोकाचेठिकाणीं असणारे देवगण, साध्य, सिद्ध, गंधर्व व चारण हे, खिन्न झाले नाहींत तर, मनामध्यें संतुष्ट झाले आणि वाणीनें स्तुति करून देहानें पुष्पवृष्टि, करूं लागले ॥ ३१ ॥ हे राजा, तसेच त्यावेळीं स्वर्गावर देवांनीं वाजविलेले शंख व दुंदुभि वाजूं लागले, नारद तुंबुरु इत्यादिक गंधर्वाधिपति गायन करूं लागले ॥ ३२ ॥ हे राजा, तदनंतर प्रेमानें युक्त अशा गोपांनीं परिवेष्टित असा तो श्रीकृष्ण, बलरामासहवर्तमान त्या स्थानापासून गोकुळांत प्रविष्ट झाला. त्यावेळीं प्रेमभावामुळें श्रीकृष्णाला मनांतून आवडणाऱ्या त्या गोपीहि कृष्णाचीं त्या गोवर्धनोद्धरणासारखीं दुसरींहि चरित्रें गायन करीत करीत आनंदयुक्त होऊन गोकुळांत जावयास निघाल्या ॥ ३३ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील दशमस्कंधाच्या पूर्वार्धांत गोवर्धनोद्धरणवर्णननामक हा पंचविसावा अध्याय

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

समाप्त झाला ॥ २५ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ आतां या सव्विसाव्या अध्यायामध्यें श्रीकृष्णाचीं अद्भुत कर्में पाहून विस्मित झालेल्या गोपांना, नंदानें गर्गऋषीचें भाषण सांगून कृष्णाचें ऐश्वर्य वर्णन केलें अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, ह्या गोवर्धनोद्धारणासारखीं दुसरींहि श्रीकृष्णाचीं अमानुष कर्में पाहून त्या कृष्णाचा प्रभाव न जाणत असल्यामुळें आश्चर्ययुक्त झालेले गोप, नंदाजवळ जाऊन ह्मणाले कीं,– ॥ १ ॥ हे नंदराजा, ज्याअर्थीं, या कृष्णबालकाचीं हीं सर्वेहि कर्में आश्चर्यकारक आहेत त्याअर्थीं हा ग्राम्य अशा आह्मां गोपांमध्यें आपल्याला अयोग्य असें जन्म पावण्यास कसा योग्य होईल ? होणारच नाहीं ॥ २ ॥ जो सात वर्षांच्या वयाचा बालक (कोणतेंहि मोठें कर्म करण्यास असमर्थ) असून त्यानें, जसा गजेंद्र, सोंडेनें कमळ उपटून धारण करून उभा राहतो त्याप्रमाणें एका हातानें ली-

षड्विंशे विस्मितान्गोपान् कृष्णस्याद्भुतकर्मभिः ॥ नंदो गर्गोक्तिमाश्राव्य तदैश्वर्यमवर्णयत् ॥ १ ॥ समभ्येत्य नंदमभिगम्य ॥१ ॥ यदूचुस्तदाह । बालकस्येति । यद्यस्मादद्भुतानि कर्माणि तस्माद्ग्राम्येषु गोपालेषु कथं जन्मार्हति । आत्मजुगुप्सितमात्मानर्हम् ॥ २॥ अद्भुतानि कर्माण्याहुः । यः सप्तहायन इति । कथं बिभ्रत्स्थित इति । पुष्करं पद्मं गज-

श्रीशुक उवाच ॥ एवंविधानि कर्माणि गोपाः कृष्णस्य वीक्ष्य ते ॥ अतद्वीर्यविदः प्रोचुः समभ्येत्य सुविस्मिताः ॥ १ ॥ बालकस्य यदेतानि कर्माण्यत्यद्भुतानि वै ॥ कथमर्हत्यसौ जन्म ग्राम्येष्वात्मजुगुप्सितम् ॥ २ ॥ यः सप्तहायनो बालः करेणैकेन लीलया ॥ कथं बिभ्रद्गिरिवरं पुष्करं गजराडिव ॥ ३ ॥ तोकेनामीलिताक्षेण पूतनाया महौजसः ॥ पीतः स्तनः सह प्राणैः कालेनेव वयस्तनोः ॥ ४ ॥ हिन्वतोऽधः शयानस्य मास्यस्य चरणावुदक् ॥ अनोऽपतद्विपर्यस्तं रुदतः प्रपदा हतम् ॥ ५ ॥ एकहायन आसीनो ह्रियमाणो विहायसा ॥ दैत्येन यस्तृणावर्तमहन्कंठग्रहातुरम् ॥ ६ ॥ क्वचिद्धैयंगवस्तैन्ये मात्रा बद्ध उलूखले ॥ गच्छन्नर्जुनयोर्मध्ये बाहुभ्यां तावपातयत् ॥ ७ ॥ वने संचारयन्वत्सान्सरामो बालकैर्वृतः ॥ हंतुकामं बकं दोर्भ्यां मुखतोऽरिमपाटयत् ॥ ८ ॥

राण्महागज इव ॥ ३ ॥ महौजसो महाबलायाः । तनोर्वय आयुर्यौवनं वा कालेन यथा पीयते तद्वत् । कथमित्यनुवर्तते ॥ ४ ॥ अनसोऽधः शयानस्य मास्यस्य मासत्रयः परिच्छेदका यस्य उदगूर्ध्वं चरणौ हिन्वतश्चालयतः प्रपदेन पादाग्रेण हतं विपर्यस्तमनः कथमपतत् ॥ ५ ॥ यः कृष्णो दैत्येन ह्रियमाणः संस्तं तृणावर्तं दैत्यं कथमहन्नित्यर्थः ॥ ६ ॥ हैयंगवस्तैन्ये नवनीतचौर्ये । बाहुभ्यां गच्छन् रिंगन्नित्यर्थः ॥ ७ ॥ मुखतो हंतुं कामो यस्य तं बकवेषमरिं बाहुभ्यां मुखतः कथमपाटयत् ॥ ८ ॥

लेनें, गोवर्धन पर्वत उपटून कसा बरें धारण केला ! ॥ ३ ॥ अगदीं डोळे मिटून राहिलेल्या (अगदींच लहान) अशा ह्यानें महाबळी पूतनेचा स्तन, प्राणासहवर्तमान जसें काळानें देहाचें आयुष्य शोषण करावें त्याप्रमाणें कसा बरें शोषण केला ? ॥ ४ ॥ गाड्याच्या खालीं निजून वर पाय करणाऱ्या व तीन महिन्याचा असून रडत असलेल्या या कृष्णाच्या पायांच्या आंगठ्यानें ढकलून दिलेला गाडा कसा बरें उलटा होऊन, पडला ? ॥ ५ ॥ एकवर्षाचा आंगणांत बसलेला (चालण्यासहि असमर्थ) व तृणावर्त दैत्यानें आकाशांत नेलेला अशा ह्या कृष्णानें, गळा दाबल्यानेंच कासावीस झालेल्या त्या तृणावर्ताला कसें बरें मारिलें! ॥ ६ ॥ एकेवेळीं लोण्याची चोरी केली असतां रागावलेल्या यशोदामातेनें उखळाचेठिकाणीं बांधिलेल्या व हातांनीं व गुडघ्यांनीं रांगत रांगत अर्जुनवृक्षांच्या मधून जाणाऱ्या यानें, ते अर्जुनवृक्ष कसे बरें पाडिले ॥ ७ ॥ एकेवेळीं बळरामासहित व बालकांनीं परिवेष्टित असलेल्या यानें, वनांमध्यें वासरें चारित असतां, आपणाला चोंचेनें मारण्याकरितां, बकाच्या ॥ ८६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वेषानें प्राप्त झालेल्या शत्रूच्या (दैत्याच्या) तोंडाची खालची व वरची अशा दोन्हीं चंचुपुटांना हातांनीं धरून कसें बरें फाडून टाकिलें ? ॥ ८ ॥ तसेंच आपणाला मारण्याच्या इच्छेनें वत्सामध्यें वत्साच्या रूपानें प्रवेश करणाऱ्या वत्सासुराला सहज लीलेनें मारून, त्याचा देह कंवठींच्या झाडांवर फेंकून त्याच्या योगानें कंवठें कशीं बरें पाडिलीं ? ॥ ९ ॥ तसेंच बलरामासहित असलेल्या यानें, धेनुकासुराला व त्याच्या बंधूंना मारून पिकलेल्या ताडफळांनीं युक्त व इतरांनीं प्रवेश करण्यास निर्भय असें तालवन कसें बरें केलें ? ॥ १० ॥ बळाच्या योगानें शोभणाऱ्या बळरामाकडून प्रलंबासुराला मारवून स्वतां गोकुळसंबंधी पशूंना व गोपांना अरण्यांतील वणव्यांतून कसें बरें सोडविलें ॥ ११ ॥ आणि अतिक्रूर विषानें युक्त अशा कालियसर्पाला बलात्कारानें दमवून, गर्वरहित झालेल्या त्याला यमुनेच्या डोहांतून घालवून देऊन या कृष्णानें यमुनानदी निर्विष उदकाची कशी बरें केली ? ॥ १२ ॥ हे नंदा, पशुपक्ष्यादिकांसहित आम्हां सर्व गोकुळवासी लोकांचा ह्या तुझ्या पुत्राचेठिकाणीं

॥ ९ ॥ १० ॥ ११ ॥ आशीविषतमोऽतिक्रूरविषश्चासावहींद्रश्च तम् ॥ १२ ॥ औत्पत्तिकः स्वाभाविकः कथमिति किं सर्वेषामात्माऽयं स्यादिति शंका ॥ १३ ॥ उक्तमप्यतिवि-

वत्सेषु वत्सरूपेण प्रविशंतं जिघांसया ॥ हत्वा न्यपातयत्तेन कपित्थानि च लीलया ॥ ९ ॥ हत्वा रासभदैतेयं तद्बंधूंश्च बलान्वितः ॥ चक्रे तालवनं क्षेमं परिपक्कफलान्वितम् ॥ १० ॥ प्रलंबं घातयित्वोग्रं बलेन बलशालिना ॥ अमोचयद्व्रजपशून्गोपांश्चारण्यवह्नितः ॥ ११ ॥ आशीविषतमाहींद्रं दमित्वा विमदं ह्रदात् ॥ प्रसह्योद्वास्य यमुनां चक्रेऽसौ निर्विषोदकाम् ॥ १२ ॥ दुस्त्यजश्चानुरागोऽस्मिन्सर्वेषां नो व्रजौकसाम् ॥ नंद ते तनयेऽस्मासु तस्याप्यौत्पत्तिकः कथम् ॥ १३ ॥ क्व सप्तहायनो बालः क्व महाद्रिविधारणम् ॥ ततो नो जायते शंका व्रजनाथ तवात्मजे ॥ १४ ॥ नंद उवाच ॥ श्रूयतां मे वचो गोपा व्येतु शंका च वोऽर्भके ॥ एनं कुमारमुद्दिश्य गर्गो मे यदुवाच ह ॥ १५ ॥ वर्णास्त्रयः किलास्यासन्गृह्णतोऽनुयुगं तनूः ॥ शुक्लो रक्तस्तथा पीत इदानीं कृष्णतां गतः ॥ १६ ॥ प्रागयं वसुदेवस्य क्वचिज्जातस्तवात्मजः ॥ वासुदेव इति श्रीमानभिज्ञाः संप्रचक्षते ॥ १७ ॥ बहूनि संति नामानि रूपाणि च सुतस्य ते ॥ गुणकर्मानुरूपाणि तान्यहं वेद नो जनाः ॥ १८ ॥

स्मयेनाभिनयेन वदंति । क्व सप्तहायन इति ॥ १४ ॥ प्राक्श्रुतमेव गर्गाचार्यवाक्यं तच्चरितपरिशीलनेन निवृत्तासंभावनस्य नंदस्य कृष्णतत्त्वावबोधकं जातं स इदानीं तेनैव वाक्येन गोपानुपदिशति । श्रूयतामिति ॥ १५ ॥ १६ ॥ १७ ॥ १८ ॥

वाढलेला प्रेमा सोडण्यास मोठा कठीण आहे, तसाच त्याचाहि प्रेमा आमचेठिकाणीं स्वाभाविकच आहे, तेव्हां हाच आम्हां सर्वांचा आत्मा आहे कीं काय ? ॥ १३ ॥ हे गोकुळाधिपते नंदा, सात वर्षांचा बालक कोठें ! व महापर्वताचें धारण कोठें ! यास्तव ईश्वरावांचून हें कर्म घडणें कठीण आहे ह्मणून तुझ्या पुत्राविषयीं आह्मांला हा परमेश्वर आहे अशी शंका उत्पन्न होत्ये ॥ १४ ॥ असें गोपांचें भाषण ऐकून नंद ह्मणाला–गोपहो, माझें भाषण ऐका, आणि त्याच्या योगानें माझ्या बालकाविषयीं जी तुह्मांला शंका प्राप्त झाली आहे ती दूर होऊंद्या. या पुत्राला उद्देशून गर्गाचार्यानें जें मला सांगितलें आहे तें तुह्मांला सांगतों ॥ १५ ॥ प्रत्येक युगामध्यें अवतार ग्रहण करणाऱ्या या तुझ्या पुत्राचे पांढरा, तांबडा व पिंवळा असे तीन वर्ण असून आतां हा कृष्णपणा पावला आहे ॥ १६ ॥ हा श्रीमान् तुझा पुत्र, पूर्वीं एकेवेळीं वसुदेवाचा पुत्र झाला होता ह्मणून तें जाणणारे सत्पुरुष, याला वासुदेव असें ह्मणतात ॥ १७ ॥ हे नंदा, तुझ्या पुत्राचीं, गुणांना व कर्मांना अनुसरून राहणारीं नांवें व स्वरूपें पुष्कळ आहेत.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तें मी जाणत आहें इतर कोणी जाणत नाहींत ॥ १८ ॥ हा पुत्र तुह्मांला परलोकीं सुख उत्पन्न करील व या लोकींहि तुह्मां सर्व गोपांना व गाईंना हा आनंद करणारा होईल. याच्या योगानें तुह्मी, इतरांनीं दुर्निवार्य अशीं सर्व दुःखें अनायासानें तरून जाल ॥ १९ ॥ हे गोकुळाधिपते, पूर्वीं भूमीवर कोणीच राजा नाहींसा झाला होता तेव्हां चोरांनीं पीडित झालेल्या व या श्रीकृष्णानें रक्षण केलेल्या साधूंनीं बलादिकांच्या योगानें वृद्धिंगत होऊन अनायासानें चोरांना जिंकिलें होतें ॥ २० ॥ जे अनेक जन्मांमध्यें पुण्य संपादन केलेले महाभाग्यवंत मानव, याच्यावर प्रीति करितात त्यांचा पराभव शत्रु, जसा विष्णूनें रक्षण केलेल्या देवांचा पराभव दैत्य कधींच करीत नाहींत तसा करीत नाहींत ॥ २१ ॥ यास्तव हे नंदा, हा तुझा पुत्र गुणांनीं, संपत्तीनें, कीर्तीनें व पराक्रमानें नारायणासारखा आहे. नंद ह्मणतो गोप हो, असें गर्गाचार्यांनें मला सांगितलें आहे ह्मणून याच्या कर्मांविषयीं कोणतेंच आश्चर्य मानण्यासारखें नाहीं ॥ २२ ॥ असो. असें मला सांगून गर्गऋषि, आपल्या घरीं निघून गेला असतां

॥ १९ ॥ २० ॥ २१ ॥ तस्मात्तस्य कर्मसु विस्मयो नास्तीति नंदस्योक्तिः ॥ २२ ॥ इत्यद्धा साक्षान्मां प्रति समादिश्य गर्गे च स्वगृहं गते सति तदानीं तथा मन्यमानोऽपि

एष वः श्रेय आधास्यद्गोपगोकुलनंदनः ॥ अनेन सर्वदुर्गाणि यूयमंजस्तरिष्यथ ॥ १९ ॥ पुराऽनेन व्रजपते साधवो दस्युपीडिताः ॥ अराजके रक्ष्यमाणा जिग्युर्दस्यून्समेधिताः ॥ २० ॥ य एतस्मिन्महाभागाः प्रीतिं कुर्वंति मानवाः ॥ नारयोऽभिभवंत्येतान्विष्णुपक्षानिवासुराः ॥ २१ ॥ तस्मान्नंद कुमारोऽयं नारायणसमो गुणैः॥ श्रिया कीर्त्याऽनुभावेन तत्कर्मसु न विस्मयः ॥ २२ ॥ इत्यद्धा मां समादिश्य गर्गे च स्वगृहं गते ॥ मन्ये नारायणस्यांशं कृष्णमक्लिष्टकारिणम् ॥ २३ ॥ इति नंदवचः श्रुत्वा गर्गगीतं व्रजौकसः ॥ दृष्टश्रुतानुभावास्ते कृष्णस्यामिततेजसः ॥ मुदिता नंदमानर्चुः कृष्णं च गतविस्मयाः ॥ २४ ॥ देवे वर्षति यज्ञविप्लवरुषा वज्राश्मपर्षानिलैः सीदत्पालपशुस्त्रि आत्मशरणं दृष्ट्वाऽनुकंप्युत्स्मयन् ॥ उत्पाट्यैककरेण शैलमबलो लीलोच्छिलींध्रं यथा बिभ्रद्गोष्ठमपान्महेंद्रमदभित्प्रीयान्न इंद्रो गवाम् ॥ २५ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे षड्विंशतितमोऽध्यायः ॥ २६ ॥ ॥

इदानीं कृष्णं नारायणस्यांशं मन्ये । अत्र हेतुः । अक्लिष्टकारिणमिति ॥ २३ ॥ २४ ॥ गोवर्धनोद्धरणं सपरिकरमनुस्मरन्प्रकटितैश्वर्यस्य श्रीकृष्णस्य प्रीतिं प्रार्थयते । देव इति । यज्ञविप्लवेन या रुट् तया देवे इंद्रे वर्षति सति वज्राश्मपर्षानिलैः अशनिजलशर्करातीव्रवायुभिः सीदत्पालपशुस्त्रि आत्मशरणं सीदंतः पालाः पशवः स्त्रियश्च यस्मिंस्त-

त्यावेळीं मी तसें (मोठा गुणी होईल असें) मानीत होतों परंतु आतां भक्तजनांचीं दुःखें घालविणारीं कर्में करणाऱ्या याला, हा साक्षात् नारायणाचा अंश आहे असें मानितों ॥ २३ ॥ याप्रमाणें गर्गगीतरूप नंदाचें भाषण ऐकून, अचिंत्यपराक्रमी अशा त्या श्रीकृष्णाचा प्रभाव ज्यांनीं पाहिला व ऐकिला आहे असे ते गोप, नंदाचा व कृष्णाचा सत्कार करून आनंदयुक्त व आश्चर्यरहित झाले ॥ २४ ॥ आतां सर्वेहि गोवर्धनोद्धरणरूप चरित्राचें स्मरण करीत, ऐश्वर्य प्रकट करणाऱ्या श्रीकृष्णाच्या प्रीतीची प्रार्थना करितो-आपला यज्ञ बंद केला ह्मणून रागानें गोकुळाच्या नाशाकरितां इंद्र वृष्टि करूं लागला असतां, वज्रपात, गारांची वृष्टि व तीव्रवायु यांच्या योगानें ज्यांतील गोपाळ, पशु व स्त्रिया दुःखित झाल्या आहेत व ज्याचा रक्षक आपणच आहे अशा गोकुळाला पाहून दया उत्पन्न झालेल्या व हंसून गोवर्धनोद्धारणाची प्रौढि धारण करणाऱ्या ज्या श्रीकृष्णानें एका हातानें गोवर्धन पर्वत उपटून, जसा लहान बालक लीलेनें अळंबें उपटून धारण करितो त्याप्रमाणें धारण करून गोकु- ॥ ८७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ळाचें रक्षण केलें तो इंद्राचा गर्व हरण करणारा व गाईंचा अधिपति श्रीकृष्ण, आह्मां वक्त्यांश्रोत्यांवर संतुष्ट होवो ॥ २५ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील दशमस्कंधाच्या पूर्वार्धांत गर्वगीतनिरूपणनामक हा सव्विसावा अध्याय समाप्त झाला ॥ २६ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां या सत्ताविसाव्या अध्यायामध्यें श्रीकृष्णाचा मोठा प्रभाव अवलोकन करून, कामधेनु व इंद्र यांनीं, श्रीकृष्णाला गाईंच्या व गोकुळाच्या आधिपत्याविषयीं जो अभिषेक केला त्या उत्सवाचें वर्णन केलें आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, श्रीकृष्णानें गोवर्धन पर्वत धारण केला असतां व धारांच्या वृष्टीपासून गोकुळाचें रक्षण केलें असतां, स्वर्गावरून इंद्र व गो-

---

व्यक्तं भवान् व्रजभयार्तिहरोऽभिजातो देवो यथादिपुरुषः सुरलोकगोप्ता ॥ तन्नो निधेहि करपंकजमार्तबंधो तप्तस्तनेषु च शिरस्सु च किंकरीणाम् ॥ ४१ ॥ श्रीशुक उवाच ॥ इति विक्लवितं तासां श्रुत्वा योगेश्वरेश्वरः ॥ प्रहस्य सदयं गोपीरात्मारामोऽप्यरीरमत् ॥ ४२ ॥ ताभिः समेताभिरुदारचेष्टितः प्रियेक्षणोत्फुल्लमुखीभिरच्युतः ॥ उदारहासद्विजकुंददीधितिर्व्यरोचतैणांक इवोडुभिर्वृतः ॥ ४३ ॥ उपगीयमान उद्गायन्वनिताशतयूथपः ॥ मालां बिभ्रद्वैजयंतीं व्यचरन्मंडयन्वनम् ॥ ४४ ॥ नद्याः पुलिनमाविश्य गोपीभिर्हिमवालुकम् ॥ रेमे तत्तरलानंदकुमुदामोदवायुना ॥ ४५ ॥ बाहुप्रसारपरिरंभकरालकोरुनीवीस्तनालभननर्मनखाग्रपातैः ॥ क्ष्वेल्याऽवलोकहसितैर्व्रजसुंदरीणामुत्तंभयन्रतिपतिं रमयांचकार ॥ ४६ ॥

मवद्दीधितिर्यस्य सः । एणांकश्चंद्रः ॥ ४३ ॥ ४४ ॥ ४५ ॥ बाहुप्रसारश्च परिरंभश्च करादीनामालभनं स्पर्शश्च नर्म परिहासश्च नखाग्रपातश्च तैः क्ष्वेल्या क्रीडया अवलोकैश्च हसितैश्च कामं तासामुद्दीपयंस्ता रमयामास ॥ ४६ ॥

त्या गोपींनीं परिवेष्टित झाला असून ज्याची लीला गोपींचे मनोरथ पूर्ण करणारी आहे व ज्याच्या उदारहास्याचेठिकाणीं व दांतांचेठिकाणीं कुंदाच्या पुष्पांसारखी कांति झळकत आहे असा तो श्रीकृष्ण, नक्षत्रांनीं वेष्टित असलेल्या चंद्राप्रमाणें शोभूं लागला ॥ ४३ ॥ स्त्रियांच्या समुदायाचें रक्षण करणारा तो श्रीकृष्ण, गोपींनीं त्याचें उच्चस्वरानें गायन चालविलें असतां आपणहि उच्चस्वरानें गायन करीत व पांचप्रकारच्या फुलांनीं गुंफलेली माळा धारण करून त्या वृंदावनाला शोभवीत त्यामध्यें संचार करूं लागला ॥ ४४ ॥ नंतर त्यानें यमुनेच्या वाळवंटामध्यें त्या गोपींसहवर्तमान प्रवेश करून क्रीडा केली. तें वाळवंट, त्या यमुनेच्या थंडपणामुळें आनंदकारक व चंद्रविकासी कमळांचा सुगंध हरण करणाऱ्या वायूनें, वाळू गार झालेलें होतें ॥ ४५ ॥ आतां त्या क्रीडेचा प्रकार सांगतात–दूर असलेलीच्या ग्रहणाकरितां बाहु पसरणें, बलात्कारानें आकर्षण करून आलिंगन करणें, हात, केंस, मांड्या, वस्त्रांच्या निऱ्या व स्तन यांना घट्ट धरणें व स्पर्श करणें, थट्टेचीं भाषणें करणें, नखाग्रांनीं टोंचणें, क्रीडेनें ॥ ९९ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अवलोकन करणें व हास्य करणें यांच्या योगेंकरून त्या व्रजसुंदरींच्या मदनाला प्रदीप्त करीत श्रीकृष्णानें त्यांना रमविलें ॥ ४६ ॥ याप्रमाणें विमुक्तचित्त अशा भगवान् श्रीकृष्णापासून प्राप्तमनोरथ झालेल्या त्या गोपींनीं भूमीवर असलेल्या सर्वस्त्रियांमध्यें आपणच अतिश्रेष्ठ आहों असें मानून गर्विष्ठ झाल्या ॥ ४७ ॥ त्यांचा तो सौंदर्यमद (अस्वाधीनपणा) व गर्व पाहून, ब्रह्मदेव व शंकर यांनाहि वश करणारा तो श्रीकृष्ण, त्यांच्या गर्वाच्या नाशाकरितां व नंतर त्यांच्यावर प्रसाद करण्याकरितां त्या वाळवंटामध्येंच अंतर्धान पावला ॥ ४८ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापु० दशमस्कं० पूर्वार्धामध्यें रासक्रीडानिरूपणांतील हा एकुणतिसावा अध्याय समाप्त झाला ॥ २९ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या तिसाव्या अध्यायामध्यें कृष्णविरहानें तप्त झालेल्या गोपींनीं, उन्मत्तासारखें अव्यवस्थितपणें वनांतील प्रत्येक स्थळीं फिरून श्रीकृष्णाचा शोध केला; अशी कथा

महात्मनो विमुक्तचित्तात् ॥ ४७ ॥ तत्सौभगमदमस्वाधीनताम् । मानं गर्वम् । केशवः कश्च ईशश्च तौ वशयतीति तथा सः ॥ ४८ ॥ इति दशमस्कंधे पूर्वार्धे टीकायामेकोनत्रिंशोऽध्यायः ॥ २९ ॥ ॥ त्रिंशे विरहसंतप्तगोपीभिः कृष्णमार्गणम् ॥ उन्मत्तवन्न नियतं भ्रमंतीभिर्वनेवने ॥ १ ॥ अचक्षाणा अपश्यंत्यः ॥ १ ॥ गत्या चानुरागस्मिताभ्यां वि-

एवं भगवतः कृष्णाल्लब्धमाना महात्मनः ॥ आत्मानं मेनिरे स्त्रीणां मानिन्योऽभ्यधिकं भुवि ॥ ४७ ॥ तासां तत्सौभगमदं वीक्ष्य मानं च केशवः ॥ प्रशमाय प्रसादाय तत्रैवांतरधीयत ॥ ४८ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे भगवतो रासक्रीडावर्णनं नामैकोनत्रिंशोऽध्यायः ॥ २९ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ अंतर्हिते भगवति सहसैव व्रजांगनाः ॥ अतप्यंस्तमचक्षाणाः करिण्य इव यूथपम् ॥ १ ॥ गत्यानुरागस्मितविभ्रमेक्षितैर्मनोरमालापविहारविभ्रमैः ॥ आक्षिप्तचित्ताः प्रमदा रमापतेस्तास्ता विचेष्टा जगृहुस्तदात्मिकाः ॥ २ ॥ गतिस्मितप्रेक्षणभाषणादिषु प्रियाः प्रियस्य प्रतिरूढमूर्तयः ॥ असावहं त्वित्यबलास्तदात्मिका न्यवेदिषुः कृष्णविहारविभ्रमाः ॥ ३ ॥

भ्रमेक्षितानि सविलासनिरीक्षणानि तैश्च मनोरमा आलापाश्च विहाराः क्रीडाश्च विभ्रमा अन्ये च विलासास्तैश्च रमापतेर्गत्यादिभिरेतैराक्षिप्तान्याकृष्टानि चित्तानि यासां ता अतस्तस्मिन्नेवात्मा यासां तास्तस्य विविधाश्चेष्टा जगृहुस्तदनुकरणेनाक्रीडन् ॥ २ ॥ अपिच गतिस्मितेति । प्रियस्य गत्यादिषु प्रतिरूढा आविष्टा मूर्तयो यासां ताः । अतः कृष्णविहारविभ्रमाः कृष्णस्येव विहारविभ्रमाः क्रीडाविलासा यासां ताः । अहमेव कृष्ण इति परस्परं निवेदितवत्यः ॥ ३ ॥

वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य म्हणाला– हे राजा, याप्रमाणें श्रीकृष्ण भगवान् अकस्मात् अंतर्धान पावला असतां त्याला न पाहणाऱ्या त्या गोकुळसंबंधी स्त्रिया, ‘जशा कामातुर झालेल्या हत्तिणी गजेंद्राला न पाहतां पश्चात्ताप पावतात त्याप्रमाणें’ पश्चात्ताप पावल्या ॥ १ ॥ आणि लक्ष्मीपति श्रीकृष्णाच्या गतींनीं प्रेमहास्यसहित विलासयुक्त अवलोकनांनीं, मनोरम भाषणांनीं क्रीडांनीं व दुसऱ्याहि नानाप्रकारच्या विलासांनीं चित्तावें आकर्षण पावोन तन्मय झालेल्या त्या गोपींनीं, त्यावेळीं कृष्णाच्या त्यात्या ‘ पूतनेचें स्तनपान करणें ’ इत्यादिक लीलांचें अनुकरण करून (त्या त्या लीला स्वीकारून) खेळूं लागल्या ॥ २ ॥ याचेंच स्पष्टीकरण करितो– त्या प्रिय श्रीकृष्णाची गति, हास्य, अवलोकन, भाषण इत्यादिकांचेठिकाणीं ज्यांचीं केवळ मनेंच जडलीं आहेत असें नाहीं, तर देहसुद्धां ऐक्य पावले आहेत, व कृष्णासारखेच ज्यांचे क्रीडाविलास सुरू झाले आहेत, त्या कृष्णाशीं ऐक्य पावलेल्या, त्याच्या आवडत्या गोपी, ‘हा कृष्ण मीच आहें असें’ परस्पर निवेदन करूं लागल्या ॥ ३ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

व एकठिकाणीं मिळून उच्चस्वरानें कृष्णाचें गायन करीत व उन्मत्ताप्रमाणें या वनांतून त्या वनांत व त्या वनांतून दुसऱ्या वनांत फिरत श्रीकृष्णाचा शोध करूं लागल्या आणि त्यावेळीं, आकाशाप्रमाणें चराचर प्राणिमात्रांच्या आंत व बाहेर व्यापून राहणाऱ्या त्या पुराणपुरुष श्रीकृष्णाचा पत्ता वृक्षांना विचारूं लागल्या ॥ ४ ॥ त्यामध्यें थोरपणामुळें यांनीं कृष्णास पाहिलें असेल अशा आशेनें त्या गोपी, अश्वत्थादिकांस ह्मणाल्या कीं,– हे अश्वत्था, हे प्लक्षा, हे वटवृक्षा, तुह्मीं कोठें कृष्णाला पाहिलें काय ? कां विचारतां? असें ह्मणाल तर– प्रेमयुक्त हास्यविलसित नेत्रकटाक्षांनीं आमचें मन हरण करून तो चोरासारखा कोठें गेला आहे ॥ ५ ॥ आतां थोर असून आपल्या पुष्पांनीं पुष्कळांवर उपकार करणाऱ्या वृक्षांस विचारितात– हे कुरबक, अशोक, नाग, पुन्नाग, चंपक हो, या मार्गानें गेलेला कृष्ण तुह्मीं पाहिला काय ? तो मानवती स्त्रियांचा

किंच गायंत्य इति । वनाद्वनांतरं गच्छंत्यो विचिक्युरमृगयन् । उन्मत्तस्य तुल्यत्वमाह । वनस्पतीन्पप्रच्छुः । भूतेष्वंतरं मध्ये संतं पुरुषं बहिश्च संतमिति ॥ ४ ॥ तत्प्रपंचयति नवभिः । तत्र महत्त्वादेते पश्येयुरित्याशयाऽश्वत्थादीन्पृच्छंति । दृष्ट इति । प्रेमहासविलसितैरवलोकनैरस्माकं मनो हृत्वा चोर इव गतो वो युष्माभिः किं दृष्ट इति ॥ ५ ॥ महांतः स्वपुष्पैर्बहूपकारिणश्चेति कुरबकादीन्पृच्छंति । कच्चिदिति । हे कुरबकादयः दर्पहरं स्मितं यस्य सः इतो गतः कच्चिद्दृष्ट इति ॥ ६ ॥ अलिकुलैः सह त्वा त्वां बिभ्रत्त्वातिप्रियस्त्वया किं दृष्ट इति ॥ ७ ॥ गुणातिरेकेऽपि नम्रत्वादिमाः पश्येयुरिति पृच्छंति । मालतीति । हे मालति मल्लिके जातियूथिके वो युष्माभिः किमदर्शि दृष्टः । करस्पर्शेन वः

गायंत्य उच्चैरमुमेव संहता विचिक्युरुन्मत्तकवद्वनाद्वनम् ॥ पप्रच्छुराकाशवदंतरं बहिर्भूतेषु संतं पुरुषं वनस्पतीन् ॥ ४ ॥ दृष्टो वः कश्चिदश्वत्थ प्लक्ष न्यग्रोध नो मनः ॥ नंदसूनुर्गतो हृत्वा प्रेमहासावलोकनैः ॥ ५ ॥ कच्चित्कुरबकाशोकनागपुन्नागचंपकाः ॥ रामानुजो मानिनीनामितो दर्पहरस्मितः ॥ ६ ॥ कच्चित्तुलसि कल्याणि गोविंदचरणप्रिये ॥ सह त्वाऽलिकुलैर्बिभ्रद्दृष्टस्तेऽतिप्रियोऽच्युतः ॥ ७ ॥ मालत्यदर्शि वः कच्चिन्मल्लिके जातियूथिके ॥ प्रीतिं वो जनयन्यातः करस्पर्शेन माधवः ॥ ८ ॥ चूतप्रियालपनसासनकोविदारजंब्वर्कबिल्वबकुलाम्रकदंबनीपाः ॥ येऽन्ये परार्थभवका यमुनोपकूलाः शंसंतु कृष्णपदवीं रहितात्मनां नः ॥ ९ ॥

प्रीतिं जनयन् किं यात इति । अत्र मालतीजात्योरवांतरविशेषो द्रष्टव्यः ॥ ८ ॥ फलादिभिः सर्वप्राणिनां संतर्पका एते पश्येयुरिति पृच्छंति । चूतेति । चूताम्रयोरवांतरजातिभेदः कदंबनीपयोश्च । हे चूतादयः येऽन्ये च परार्थभवकाः परार्थमेव भवो जन्म येषां ते । यमुनोपकूलास्तस्याः कूलसमीपे वर्तमानाः । तीर्थवासिन इत्यर्थः । ते भवंतो रहितात्मनां शून्यचेतसां नः कृष्णपदवीं कृष्णस्य मार्गं शंसंतु कथयंतु ॥ ९ ॥

गर्व हरण करणारें हास्य करणारा आहे, ह्मणजे त्यानें आपल्या हास्यानें आमचा गर्व चोरून नेला आहे ॥ ६ ॥ हे गोविंदचरणप्रिये कल्याणरूपे तुळशि, भ्रमरकुळांसहवर्तमान तुला धारण करणारा श्रीकृष्ण, तूं पाहिला आहेस काय ? कारण, तुला तो फारच आवडणारा आहे ह्मणून तूं पाहिला असशील ! ॥ ७ ॥ तिच्याकडून उत्तर मिळालें नाहीं तेव्हां मोठ्या गुणी असून नम्र असल्यामुळें या वल्लींनीं पाहिलें असेल, असें मनांत आणून दुसऱ्या वल्लींना विचारितात कीं,– हे मालति, हे बटमोगऱ्ये, हे जाई व हे जुई, तुह्मी श्रीकृष्णाला पाहिलें काय ? तो फुलें घेण्याकरितां हाताच्या स्पर्शानें तुह्मांला प्रीति उत्पन्न करीत कदाचित् गेला असेल ! ॥ ८ ॥ त्यांच्याकडूनहि उत्तर मिळालें नसतां, फलादिकांनीं प्राण्यांची तृप्ति करणारे हे वृक्ष सांगतील ह्मणून दुसऱ्या वृक्षांना विचारितात– हे चूत, प्रियाल, पनस, असन, कोविदार, जंबु, अर्क, बिल्व, बकुल, आम्र, कदंब, नीप हो, व दुसऱ्याकरितां उत्पन्न होऊन यमुनेच्या कांठीं राहणाऱ्या इतरहि हे सर्व वृक्षहो, तुह्मीं कृष्णानें चित्त आकर्षण केल्यामुळें शून्य-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

चित्त झालेल्या आह्मांस कृष्णप्राप्तीचा मार्ग सांगा ॥ ९ ॥ त्यांच्याकडूनहि उत्तर मिळालें नसतां, कृष्ण कोठें कां असेना परंतु, त्याचा पृथिवीबरोबर वियोग कधींहि घडत नाहीं ह्मणून हिला विचारावें अशा आशयानें विचारितात कीं,–हे पृथिवि, तूं काय बरें तप केलें आहेस? कारण कीं, जी तूं, श्रीकृष्णाच्या चरणस्पर्शानें उत्साहयुक्त होऊन व कोंवळ्या तृणादिकांच्या स्वरूपानें अंगावर रोमांच उठलेली शोभत आहेस. हा तुझा उत्साह काय आतां झालेल्या कृष्णाच्या चरणस्पर्शानें उत्पन्न झाला आहे? किंवा पूर्वीं वामनरूपी भगवंतानें आपल्या पायांनें तुझें आक्रमण केलें होतें ह्मणून झाला आहे? अथवा त्याच्याहि पूर्वीं झालेल्या वराहरूपी भगवंताच्या आलिंगनानें झाला आहे? एतावता तूं त्याला खरोखर पाहिलें आहेस यास्तव आह्मांस दाखीव ॥ १० ॥ पुढें हरिणींचे डोळे टवटवीत

हे क्षिति क्षिते त्वया किं तपः कृतं या त्वं केशवांघ्रिस्पर्शोत्सवा केशवस्यांघ्रिस्पर्शेनोत्सवो यस्याः सा । कुतः । अंगरुहैरुत्पुलकिता रोमांचिता विभासि शोभसे । तत्र विशेषं पृच्छंति । अपि किमयमुत्सवोंऽघ्रिसंभवोऽधुना तवैकदेशांघ्रिस्पर्शसंभूतः । यद्वा नैतावत्किंतु उरुक्रमात्पूर्वमेव त्रिविक्रमस्य पदा सर्वाक्रमणात् । आहो अथवा नैतावदेवापितु ततोऽपि पूर्वं वराहस्य वपुषः परिरंभणेति । अतस्त्वया नूनं दृष्टस्तं दर्शयेति ॥ १० ॥ हरिण्या दृष्टिप्रत्यासत्त्या कृष्णदर्शनं संभाव्याहुः । अपीति । हे सखि एणपत्नि अपि किमुपगतः समीपं गतः । गात्रैः सुंदरैर्मुखबाह्वादिभिः । प्रियया सहेति यदुक्तं तत्र द्योतकं कांतया अंगसंगस्तेन तत्कुचकुंकुमेन रंजितायाः कुंदकुसुमस्रजो गंधः कुलपतेः

किं ते कृतं क्षिति तपो बत केशवांघ्रिस्पर्शोत्सवोत्पुलकितांगरुहैर्विभासि॥ अप्यंघ्रिसंभव उरुक्रमविक्रमाद्वा आहो वराहवपुषः परिरंभणेन ॥ १० ॥ अप्येणपत्न्युपगतः प्रिययेह गात्रैस्तन्वन्दृशां सखि सुनिर्वृतिमच्युतो वः ॥ कांतांगसंगकुचकुंकुमरंजितायाः कुंदस्रजः कुलपतेरिह वाति गंधः ॥ ११ ॥ बाहुं प्रियांस उपधाय गृहीतपद्मो रामानुजस्तुलसिकालिकुलैर्मदांधैः ॥ अन्वीयमान इह वस्तरवः प्रणामं किं वाऽभिनंदति चरन्प्रणयावलोकैः ॥ १२ ॥ पृच्छतेमा लता बाहूनप्याश्लिष्टा वनस्पतेः ॥ नूनं तत्करजस्पृष्टा बिभ्रत्युत्पुलकान्यहो ॥ १३ ॥

श्रीकृष्णस्य वात्यागच्छति ॥ ११ ॥ फलभारेण नतांस्तरून्कृष्णं दृष्ट्वा प्रणता इति मत्वा प्रियया सह तस्य गतिविलासं संभावयंत्यः पृच्छंति । बाहुमिति । तुलसिकाया अलिकुलैरतस्तदामोदमदांधैरन्वीयमानोऽनुगम्यमान इह चरन्निति ॥ १२ ॥ काश्चिदाहुः । हे सख्य इमा लताः कृष्णेन संगता नूनमत इमाः पृच्छत । ननु स्वपतिसंगतौ तत्संगतिर्दुर्घटा न वनस्पतेः पत्युर्बाहुनाऽऽश्लिष्टा अपि अहो भाग्यं नूनं तन्नखैः स्पृष्टा यत उत्पुलकानि बिभ्रति । नहि स्वपतिसंगतावीदृक् पुलकसंभव इति भावः ॥ १३ ॥

पाहून तिला कृष्णदर्शन झालें असेल अशा संभावनेनें प्रश्न करितात कीं,–हे सखि हरिणांगने, तुमच्या दृष्टींना, आपल्या मनोहर मुख बाहु वगैरे अवयवांनीं सुख उत्पन्न करणारा श्रीकृष्ण, प्रियस्त्रीसहवर्तमान या वाटेनें गेला काय? कारण, येथें स्त्रीच्या आलिंगनानें तिच्या कुचसंबंधी केशरानें लिप्त झालेल्या त्या श्रीकृष्णाच्या कुंदपुष्पांच्या माळेचा सुगंध येत आहे ॥ ११ ॥ पुढें फळभारानें नम्र झालेल्या वृक्षांना, हे कृष्णाला पाहून नम्र झाले आहेत असें मानून स्त्रीसहवर्तमान त्याचे गतिविलास मनांत आणीत होत्सात्या प्रश्न करितात कीं,–हे वृक्षहो, उजव्या हातानें लीलेकरितां कमळ धारण करणारा व ज्याच्या मागून तुळशीच्या सुगंधानें मदांध झालेल्या भ्रमरांचे समुदाय जात आहेत असा श्रीकृष्ण, स्त्रियेच्या खांद्यावर डावा बाहु ठेऊन येथें फिरत असतां, आपल्या सप्रेम अवलोकनांनीं तुमच्या नमस्कारावें अभिनंदन करितो काय? ॥ १२ ॥ दुसऱ्या गोपी ह्मणाल्या–हे सख्यांनो, या वल्लींना विचारा. यांना काय ठाऊक असें ह्मणाल तर–ह्या वल्लींनीं आपल्या वृक्षरूप पतींच्या खांद्यांना आलिंगन केलेलें असूनहि

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्या स्तनेवर फुलें तोडण्याकरितां जवळ येणाऱ्या कृष्णाच्या नखांनीं स्पर्श केलेल्या आहेत. कारण, ह्या अंगांवर कंटकादिरूपानें रोमांच धारण करीत आहेत. काय त्यांचें भाग्य हें ! ॥ १३ ॥ याप्रमाणें कृष्णाचा शोध करण्याविषयीं अतिविव्हल व तन्मय होऊन उन्मत्तासारखें भाषण करणाऱ्या त्या गोपी, भगवंताच्या पूतनास्तनपानादिक लीलांचें अनुकरण करूं लागल्या ॥ १४ ॥ तें असें कीं,–पूतनेसारखें आचरण करणाऱ्या एका गोपीचें, कृष्णासारखें आचरण करणारी एक गोपी स्तनपान करूं लागली. लहान मुलासारखें आचरण करून रडणाऱ्या दुसऱ्या एका गोपीनें शकटासारखें आचरण करणाऱ्या गोपीला पायानें प्रहार केला ॥ १५ ॥ एका गोपीनें तृणावर्तदैत्यासारखें आपणास करून कृष्णासारखी बाल्यस्थिति स्वीकारणाऱ्या दुसरी उचलून नेलें. दुसरी एक गोपी, घागऱ्यांच्या शब्दांनीं युक्त अशा आपल्या पायांना ओढीत ओढीत रांगूं लागली ॥ १६ ॥ दोन गोपी कृष्णासारख्या व रामासारख्या झाल्या व किती एक गोपी गोपांच्या बालकांसारख्या झाल्या. आणि वत्सासारखें आचरण

उन्मत्तवत्पप्रच्छुरित्येतत्प्रपंचितमिदानीं रमापतेस्तास्ता विचेष्टा जगृहुस्तदात्मिका इति यदुक्तं तत्प्रपंचयति । इतीति । उन्मत्तवचो गोप्यः उन्मत्तवचसश्च ता गोप्यश्च कृष्णान्वेषणेन कातरा अतिविह्वलाः । अनुचक्रुरनुकृतवत्यः ॥ १४ ॥ कस्याश्चिदित्यादिभिश्चतुर्भिरनुकरणं प्रपंच्यते ततश्चतुर्भिस्तन्मयत्वं पुनरेकेनानुकरणमिति विवेकः । पूतना-

इत्युन्मत्तचो गोप्यः कृष्णान्वेषणकातराः ॥ लीलाभगवतस्तास्ता ह्यनुचक्रुस्तदात्मिकाः ॥ १४ ॥ कस्याश्चित्पूतनायंत्याः कृष्णायंत्यपिबत्स्तनम् ॥ तोकायित्वा रुदंत्यन्या पदाऽहन् शकटायतीम् ॥ १५ ॥ दैत्यायित्वा जहारान्यामेका कृष्णार्भभावनाम् ॥ रिंगयामास काप्यंघ्री कर्षती घोषनिःस्वनैः ॥ १६ ॥ कृष्णरामायिते द्वे तु गोपायंत्यश्च काश्चन ॥ वत्सायतीं हंति चान्या तत्रैका तु बकायतीम् ॥ १७ ॥ आहूय दूरगा यद्वत्कृष्णस्तमनुवर्ततीम् ॥ वेणुं क्वणंतीं क्रीडंतीमन्याः शंसंति साध्विति ॥ १८ ॥ कस्यांचित्स्वभुजं न्यस्य चलंत्याहापराननु ॥ कृष्णोऽहं पश्यत गतिं ललितामिति तन्मनाः ॥ १९ ॥ मा भैष्ट वातवर्षाभ्यां तत्त्राणं विहितं मया ॥ इत्युक्त्वैकेन हस्तेन यतंत्युन्निदधेंऽबरम् ॥ २० ॥

यंत्याः पूतनावदाचरंत्याः कृष्णवदाचरंती स्तनमपिबत् । तोकायित्वा तोकवदात्मानं कृत्वा ॥ १५ ॥ दैत्यायित्वा दैत्यवत्तृणावर्तवदात्मानं कृत्वा एका कृष्णार्भभावनां कृष्णस्यार्भं बाल्यं भावयति या तामन्यां जहार ॥ १६ ॥ १७ ॥ दूरगा दूरे वर्तमाना गाः यद्वद्यथा कृष्णस्तथाऽऽहूय तं कृष्णमनुवर्ततीमनुवर्तमानाम् । अनुकुर्वतीमिति वा पाठः ॥ १८ ॥ १९ ॥ यतंती प्रयत्नं कुर्वती अंबरमुत्तरीयं वस्त्रमुन्निदधे उर्ध्वं धृतवती ॥ २० ॥

करणाऱ्या एका गोपीला कृष्णासारखें आचरण करणाऱ्या गोपीनें मारून टाकिलें, तशीच दुसरी एक आपणच कृष्ण असें मानणारी गोपी, बकासारखें आचरण करणाऱ्या गोपीला मारणारी झाली ॥ १७ ॥ जसा कृष्ण गाईंना बोलावितो त्याप्रमाणें दूर गेलेल्या गाईंना बोलावून त्या कृष्णाचें अनुकरण करून मुरली वाजविणाऱ्या व क्रीडा करणाऱ्या एका गोपीची, गोपबालकांची भावना करणाऱ्या दुसऱ्या गोपी प्रशंसा करूं लागल्या ॥ १८ ॥ कृष्णाकडे मनाचा लय लागलेली एक गोपी, दुसऱ्या गोपीच्या खांद्यावर आपला हात ठेऊन चालत होत्साती ह्मणाली कीं–हे सख्यांनो, मी कृष्ण आहें माझें हें सुंदर चालणें पहा ॥ १९ ॥ दुसरी एक गोपी–तुह्मी वारा व पर्जन्य यांपासून भय मानूं नका. त्यांपासून तुमचें रक्षण करण्याचें मी योजिलें आहे. असें ह्मणून गोवर्धनपर्वत उचलण्याचा आविर्भाव करून तिनें एका हातानें पांघरण्याचें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वस्त्र पसरून वर उचलून धरिलें ॥ २० ॥ हे राजा, कृष्णासारखें आचरण करणारी दुसरी एक गोपी, कालियसर्पासारख्या आचरणकरणाऱ्या दुसऱ्या गोपीला पायानें दाबून व तिच्या मस्तकावर चढून ह्मणाली कीं,— हे दुष्टसर्पा, तूं ह्या डोहांतून निघून जा, मी खलांना दंड धारण करण्याकरितां उत्पन्न झालों आहें ॥ २१ ॥ त्या गोपीं-मध्यें कृष्णासारखें वर्तन करणारी एक गोपी, गोपांसारखें वर्तन करणाऱ्या दुसऱ्या गोपींना ह्मणाली कीं,— गोपहो, हा भयंकर प्राप्त झालेला वणवा पहा आणि लवकर आपले डोळे झांका, तुह्मांला मी अनायासानेंच निर्भय करीन ॥ २२ ॥ त्या गोपींमध्यें कृष्णासारखें आचरण करणाऱ्या एका सुकुमार गोपीला, यशोदेसारखें वर्तन करणाऱ्या दुसऱ्या गोपीनें फुलांच्या माळेनें, लोणी चोरल्याच्या निमित्तानें उखळाला बांधिली असतां, भ्यालेल्या तिनें, सुंदर नेत्रांनीं युक्त असें आपलें मुख हातांनीं आच्छादन करून भयाचें अनुकरण केलें ॥ २३ ॥ याप्रमाणें कृष्णलीलांचें अनुकरण करणाऱ्या व वारंवार वृंदावनांतील वल्लींना व वृक्षांना कृष्णाचा प्रश्न करणाऱ्या त्या गोपीं

अपिदध्वं निमीलयत ॥ २२ ॥ सुदृक् सुनयनमास्यं पिधाय । सुदृक् वराक्षीति वा । भीतिविडंबनं भयानुकरणम् ॥ २३ ॥ एवं पुनरपि वृंदावने लतास्तरूंश्च कृष्णं पृच्छंत्यो

आरुह्यैका पदाक्रम्य शिरस्याहापरां नृप ॥ दुष्टाहे गच्छ जातोऽहं खलानां ननु दंडधृक् ॥ २१ ॥ तत्रैकोवाच हे गोपा दावाग्निं पश्यतोल्बणम् ॥ चक्षूंष्याश्वपिदध्वं वो विधास्ये क्षेममंजसा ॥ २२ ॥ बद्धाऽन्यया स्रजा काचित्तन्वी तत्र उलूखले ॥ भीता सुदृक्पिधायास्यं भेजे भीतिविडंबनम् ॥ २३ ॥ एवं कृष्णं पृच्छमाना वृंदावनलतास्तरून् ॥ व्यचक्षत वनोद्देशे पदानि परमात्मनः ॥ २४ ॥ पदानि व्यक्तमेतानि नंदसूनोर्महात्मनः ॥ लक्ष्यंते हि ध्वजांभोजवज्रांकुशयवादिभिः ॥ २५ ॥ तैस्तैः पदैस्तत्पदवीमन्विच्छंत्योऽग्रतो बलाः ॥ वध्वाः पदैः सुपृक्तानि विलोक्यार्ताः समब्रुवन् ॥ २६ ॥ कस्याः पदानि चैतानि याताया नंदसूनुना ॥ अंसन्यस्तप्रकोष्ठायाः करेणोः करिणा यथा ॥ २७ ॥ अनयाऽऽराधितो नूनं भगवान्हरिरीश्वरः ॥ यन्नो विहाय गोविंदः प्रीतो यामनयद्रहः ॥ २८ ॥ धन्या अहो अमी आल्यो गोविंदांघ्र्यब्जरेणवः ॥ यान्ब्रह्मेशो रमा देवी दधुर्मूर्ध्न्यघनुत्तये ॥ २९ ॥

वनोद्देशे वनप्रदेशे व्यचक्षतापश्यन् ॥ २४ ॥ २५ ॥ सुपृक्तानि संमिश्राणि ॥ २६ ॥ तेनांसे न्यस्तः प्रकोष्ठो यस्याः । करेणोर्हस्तिन्याः ॥ २७ ॥ रह एकांतस्थानम् ॥ २८ ॥ हे आल्यः सख्यः अहो धन्या अतिपुण्या गोविंदांघ्र्यब्जरेणवः । तत्र हेतुः । यानिति । अस्माभिरप्येतद्रेण्वभिषेकेण तथैव कृष्णः प्राप्तुं शक्य इति भावः ॥ ॥ २९ ॥

नीं, एका वनप्रदेशामध्यें श्रीकृष्णाचीं भूमीवरील धुरळ्यांत उमटलेलीं चरणचिन्हें पाहिलीं ॥ २४ ॥ आणि परस्पर ह्मणाल्या कीं, उदारचित्त अशा श्रीकृष्णाचीं हीं खरोखर चरणचिन्हें आहेत. कारण, हीं ध्वज, कमळ, वज्र, अंकुश, यव इत्यादिक चिन्हांनीं चिन्हित असलेलीं दिसत आहेत ॥ २५ ॥ नंतर त्या त्या पावलांनीं श्रीकृष्णाचा शोध करणाऱ्या त्या गोपींनीं, पुढें तीं कृष्णाचीं पावलें एका स्त्रीच्या पावलांनीं मिश्र असलेलीं पाहिलीं आणि दुःखित होऊन ह्मणाल्या कीं,— ॥ २६ ॥ हत्तीबरोबर जाणाऱ्या हत्तिणीप्रमाणें कृष्णाबरोबर गेलेल्या व त्यानें खांद्यावर हात ठेवलेल्या कोणा स्त्रीचीं हीं पावलें आहेत ? ॥ २७ ॥ कृष्णाबरोबर गेलेल्या ह्या स्त्रीनेंच (राधेनेंच) खरोखर हरीचें आराधन केलें आहे. कारण, आह्मां सर्व गोपींचा त्याग करून जिच्या आराधनानें संतुष्ट झालेल्या गोविंदानें तिला एकांतस्थळीं नेलें आहे ॥ २८ ॥ दुसऱ्या गोपी ह्मणाल्या— हे सख्यांनो, अहो हे गोविंदाचे चरणकमलरेणु मोठे धन्य आहेत. ज्यांना सर्वदोषांच्या निवृत्तीकरितां— ब्रह्मदेव, शंकर व लक्ष्मी देवीसुद्धां, आपल्या मस्तकीं धारण करितात ह्मणून

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

यांच्या अभिषेकानें आह्मांलाहि कृष्णाची प्राप्ति होण्याचा संभव आहे ॥ २९ ॥ दुसऱ्या ह्मणाल्या–असें असो, परंतु सर्व गोपींचें सर्वस्व अशा श्रीकृष्णाला जी एकटीच हरण करून एकांतीं त्याच्या अधरामृताचें सेवन करीत आहे तिचीं जीं हीं उठलेलीं पावलें तीं आमच्या मनाला फारच क्षोभ उत्पन्न करीत आहेत ॥ ३० ॥ याप्रमाणें कृष्णाचा शोध करणाऱ्या त्या गोपी, पुढें केवळ श्रीकृष्णाच्याच चरणरेणूंना पाहून अत्यंत संताप पावून ह्मणाल्या कीं,–येथें त्या स्त्रीचीं पावलें दिसत नाहींत तेव्हां सुकुमार अशा तिच्या पायांच्या तळव्यांना तृणाचे अंकुर टोंचून दुःख होऊं लागलें असेल ह्मणून त्या प्रियस्त्रीला, प्रिय श्रीकृष्णानें उचलून खरोखर खांद्यावर घेतलें असेल ॥ ३१ ॥ सख्यांनो, उंच असलेलीं फुलें काढून घेण्यासाठीं पायांच्या अग्रांनीं भूमितलाचें संमर्दन झालेलीं ह्मणूनच अर्धीं उठलेलीं हीं कृष्णाचीं पावलें पहा. येथें प्रिय श्री-

---

अन्या आहुः । तस्या इति । गोपीनां सर्वस्वम् । अयं भावः । भवेदेवं यदि तस्याः पदानि संपृक्तानि न भवेयुस्तानि तु नो दुःखं कुर्वंतीति ॥ ३० ॥ तदसंपृक्तान्केवलं कृष्णपादरेणूनेव विचिन्वत्यस्तान्दृष्ट्वा पुनरत्यंतं समतपन् । तदाह श्लोकत्रयेण । न लक्ष्यंत इति । खिद्यती सुजाते सुकुमारे अंघ्रितले यस्यास्तामुन्निन्ये स्कंधमारोपितवान् ॥ ३१ ॥ प्रपदाभ्यामाक्रमणं क्षोणीमर्दनं ययोः । अतएवासकले पदे पश्यतेति ॥ ३२ ॥ तस्याः कृष्णजान्वंतरुपविष्टायाश्चिह्नं दृष्ट्वाऽऽहुः । केशप्रसाधनमिति । कांतामधिकृत्य तानि

तस्या अमूनि नः क्षोभं कुर्वंत्युच्चैः पदानि यत् ॥ यैकापहृत्य गोपीनां रहो भुंक्तेऽच्युताधरम् ॥ ३० ॥ न लक्ष्यंते पदाऽन्यत्र तस्या नूनं तृणांकुरैः ॥ खिद्यत्सुजातांघ्रितलामुन्निन्ये प्रेयसीं प्रियः ॥ ३१ ॥ अत्र प्रसूनावचयः प्रियार्थे प्रेयसा कृतः ॥ प्रपदाक्रमणे एते पश्यतासकले पदे ॥ ३२ ॥ केशप्रसाधनं त्वत्र कामिन्याः कामिना कृतम् ॥ तानि चूडयता कातामुपविष्टमिह ध्रुवम् ॥ ३३ ॥ रेमे तया चात्मरत आत्मारामोऽप्यखंडितः ॥ कामिनां दर्शयन्दैन्यं स्त्रीणां चैव दुरात्मताम् ॥ ३४ ॥ इत्येवं दर्शयंत्यस्ताश्चेरुर्गोप्यो विचेतसः ॥ यां गोपीमनयत्कृष्णो विहायान्याः स्त्रियो वने ॥ ३५ ॥ सा च मेने तदात्मानं वरिष्ठं सर्वयोषिताम् ॥ हित्वा गोपीः कामयाना मामसौ भजते प्रियः ॥ ३६ ॥

प्रसूनानि चूडयता चूडानुकारेण बध्नता ध्रुवमुपविष्टम् ॥ ३३ ॥ रेमे इत्यादि शुकोक्तिः । आत्मरतः स्वतस्तुष्टः । आत्मारामः स्वक्रीडः । अखंडितः स्त्रीविभ्रमैरनाकृष्टोऽपि । तथा चेत्किमिति रेमेऽत आह । कामिनामिति ॥ ३४ ॥ ३५ ॥ स्त्रीणां दुरात्मतामाह । साचेति द्वाभ्याम् । कामो यानमागमनसाधनं यासां ता गोपीर्हित्वा मां भजत इति हेतोरात्मानं वरिष्ठं मेने इति ॥ ३६ ॥

कृष्णानें त्या प्रियस्त्रीच्या केशांमध्यें घालण्याकरितां फुलें काढून त्यांचा संचय केला आहे ॥ ३२ ॥ दुसऱ्या गोपी, कृष्णाच्या गुडघ्यांमध्यें बसलेल्या स्त्रीचें भूमिवर उठलेलें चिन्ह पाहून ह्मणाल्या कीं,–येथें त्या कामी कृष्णानें त्या कामिनी स्त्रीचे केंस विंचरून बुचडावगैरे बांधण्याचें काम केलें आहे. कारण, तीं काढलेलीं फुलें त्या स्त्रीच्या केंसांत शोभतील तशा रीतीनें माळण्याकरितां श्रीकृष्ण येथें खरोखर बसला होता ॥ ३३ ॥ हे राजा, याप्रमाणें गोपींनीं केलेल्या भावनेप्रमाणेंच स्वतांच संतुष्ट, आत्माराम व स्त्रियांच्या विलासांनीं मोहित न होणारा अशाहि श्रीकृष्णानें त्या स्त्रीसहवर्तमान, विषयासक्त पुरुषांचा दीनपणा व स्त्रियांचा उद्धटपणा दाखविण्याकरितां क्रीडा केली होती ॥ ३४ ॥ असो. याप्रमाणें निरर्थक भाषणें करणाऱ्या व उन्मत्तांसारख्या झालेल्या त्या गोपी, वनामध्यें फिरत होत्या. बरें इतर स्त्रियांना वनांत टाकून, ज्या गोपीला कृष्णानें एकांतीं नेलें होतें तिनेंहि त्यावेळीं, कामातुर असलेल्या सर्व गोपींना सोडून हा प्रिय श्रीकृष्ण, माझ्या सांगण्याप्रमाणें माझें सेवन करीत आहे ॥ ९८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्यापक्षीं आपणच सर्व स्त्रियांमध्यें श्रेष्ठ आहें असें मानिलें ॥ ३५ ॥ ३६ ॥ आणि श्रीकृष्णाबरोबर कांहीं दूरपर्यंत वनप्रदेशांत जाऊन ती गर्वित होऊन श्रीकृष्णाला ह्मणाली कीं,– कृष्णा, येथून पुढें माझ्यानें चालवत नाहीं यास्तव मला खांद्यावर बसवून, जेथें तुझ्या मनांत जावयाचें असेल तेथें ने ॥ ३७ ॥ असा स्त्रियांच्या उद्धटपणा दाखवून आतां कामीपुरुषांचा दीनपणा दाखवितो असें सांगितलें असतां भगवंतानें, असें असेल तर तूं खांद्यावर बसावेंस असें त्या प्रियस्त्रीला सांगितलें. आतां भगवंताचें अखंडितत्व सांगतो नंतर ती स्त्री खांद्यावर बसण्याविषयीं उद्युक्त झाली असतां तो श्रीकृष्ण अकस्मात् अंतर्धान पावला. तेव्हां ती स्त्री पश्चात्ताप पावली ॥ ३८ ॥ ती अशी कीं,– हा नाथा, रमणा, अतिप्रिया, महापराक्रम्या, सख्या, तूं कोठें आहेस कोठें आहेस? तुझ्या वियोगानें अतिदीन झालेल्या मज दासीला तूं आपलें सान्निध्य दाखीव ॥ ३९ ॥ याप्रमाणें प्रिय श्रीकृष्णाच्या वियोगानें मोहित होऊन दुःखित झालेल्या

॥ ३७ ॥ कामिनां दैन्यं दर्शयति । एवमुक्त इति । अखंडितत्वमाह । ततश्चेति । तस्यां स्कंधारोहोद्यतायामंतर्हित इत्यर्थः ॥ ३८ ॥ अनुतापमाह । हा नाथेति ॥ ३९ ॥ अन्विच्छंत्यो मृगयमाणाः । अविदूरतः समीपे ॥ ४० ॥ ४१ ॥ ततस्तयाऽपि सहिताः कृष्णान्वेषणाय वनमविशन् । ततो हरेरन्वेषणान्निवृत्ताः ॥ ४२ ॥ एवं तमप्राप्ता अपि स्वगृ-

ततो गत्वा वनोद्देशं दृप्ता केशवमब्रवीत् ॥ न पारयेऽहं चलितुं नय मां यत्र ते मनः ॥ ३७ ॥ एवमुक्तः प्रियामाह स्कंध आरुह्यता-
मिति ॥ ततश्चांतर्दधे कृष्णः सा वधूरन्वतप्यत ॥ ३८ ॥ हा नाथ रमण प्रेष्ठ क्वासि क्वासि महाभुज ॥ दास्यास्ते कृपणाया मे सखे
दर्शय सन्निधिम् ॥ ३९ ॥ अन्विच्छंत्यो भगवतो मार्गं गोप्योऽविदूरतः ॥ ददृशुः प्रियविश्लेषमोहितां दुःखितां सखीम् ॥ ४० ॥
तया कथितमाकर्ण्य मानप्राप्तिं च माधवात् ॥ अवमानं च दौरात्म्याद्विस्मयं परमं ययुः ॥ ४१ ॥ ततोऽविशन्वनं चंद्रज्योत्स्ना
यावद्विभाव्यते ॥ तमः प्रविष्टमालक्ष्य ततो निववृतुः स्त्रियः ॥ ४२ ॥ तन्मनस्कास्तदालापास्तद्विचेष्टास्तदात्मिकाः ॥ तद्गुणानेव
गायंत्यो नात्मागाराणि सस्मरुः ॥ ४३ ॥ पुनः पुलिनमागत्य कालिंद्याः कृष्णभावनाः ॥ समवेता जगुः कृष्णं तदागमनकांक्षिताः ॥
॥ ४४ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे रासक्रीडायां कृष्णान्वेषणं नाम त्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३० ॥ ॥

हान्नैव स्मृतवत्यः तदात्मिकाः स एवात्मा यासां ताः । तन्मय्य इत्यर्थः ॥ ४३ ॥ किंतु पूर्वं यत्र श्रीकृष्णेन संमतिरासीत्तदेव कालिंद्याः पुलिनमागत्य कृष्णं भावयंति ध्यायंतीति तथा ताः कृष्णस्यागमनं कांक्षितं यासां ता मिलिताः सत्यः कृष्णमेव जगुरिति ॥ ४४ ॥ इति श्रीमद्भागवते दशमपूर्वार्धटीकायां त्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३० ॥ ॥

सखीला, भगवंताच्या मार्गाचें शोधन करणाऱ्या त्या गोपींनीं समीपभागीं अवलोकन केलें ॥ ४० ॥ नंतर, तिनें त्या गोपींना, कृष्णापासून आपणास झालेली सन्मानाची प्राप्ति व आपल्या दुष्टस्वभावामुळें (अंतर्धान पावून आपला त्यागरूप) झालेली अपमानाची प्राप्ति सांगितली असतां, तें ऐकून त्यानां मोठें आश्चर्य वाटलें ॥ ४१ ॥ नंतर तिच्यासहवर्तमान त्या गोपी, कृष्णाचा शोध करण्याकरितां जेथपर्यंत चंद्राचा प्रकाश पडला होता तेथपर्यंत वनांत पुढें गेल्या. नंतर दाट झाडीच्या छायेनें पडलेल्या अंधकारानें व्याप्त झालेलें तें वन पाहून तेथून माघाऱ्या फिरल्या ॥ ४२ ॥ याप्रमाणें कृष्णच ज्यांचा आत्मा आहे अशा त्या गोपींनीं कृष्णप्राप्ति झाली नसतांहि कृष्णाकडेच मन ठेऊन कृष्णाच्याच गोष्टी परस्पर वर्णन करीत, कृष्णाच्याच लीला स्वीकारीत व कृष्णाच्याच गुणांचें गायन करीत आपल्या घरांचें स्मरणसुद्धां केलें नाहीं ॥ ४३ ॥ तर कृष्णाच्या आगमनाची इच्छा करणाऱ्या त्या सर्व गोपी, एकठिकाणीं जमून, जेथें पूर्वीं कृष्णाशीं संगत

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

झाल्या होत्या त्याच यमुनेच्या वाळवंटावर पुन्हा येऊन कृष्णाचें ध्यान करीत होत्सात्या कृष्णाचेंच गायन करूं लागल्या ॥ ४४ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील पूर्वार्धांत कृष्णशोधवर्णनरूप हा तिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३० ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या एकतिसाव्या अध्यायामध्यें कृष्णदर्शनाविषयीं निराश होऊन पुन्हा यमुनेच्या वाळवंटावर आलेल्या गोपींनीं, कृष्णाचेंच वारंवार गायन करीत त्याच्या येण्याची प्रार्थना केली; अशी कथा वर्णन केली आहे ॥ १ ॥ गोपी ह्मणाल्या– हे प्राणप्रिया कृष्णा, तुझ्या जन्माच्या निमित्तानें हें गोकुळ, वैकुंठापेक्षांहि अधिकच उत्कर्ष पावत आहे. कारण, येथें तुझें जन्म झाल्यामुळें तुला अनुसरणारी लक्ष्मीहि या गोकुळाला निरंतर शोभवून राहत्ये. याप्रमाणें सर्व गोकुळ आनंदयुक्त झालें असतां, येथें तुझ्या दासी आह्मी गोपीमात्र

एकत्रिंशे निराशास्ताः पुनः पुलिनमागताः ॥ कृष्णमेवानुगायंत्यः प्रार्थयंते तदागमम् ॥ १ ॥ जयतीति । हे दयित ते जन्मना व्रजोऽधिकं यथा भवति तथा जयत्युत्कर्षेण वर्तते । यस्मात्त्वमत्र जातस्तस्मादिंदिरा लक्ष्मीरत्र हि श्रयते व्रजमलंकृत्य वर्तते । एवं व्रजे सर्वस्मिन्मोदमानेऽत्र तु तावकास्त्वदीया गोपीजनास्त्वयि त्वदर्थमेव कथंचिद्धृता असवो यैस्ते त्वां विचिन्वतेऽतस्त्वया दृश्यतां प्रत्यक्षीभूयतामिति । यद्वा अस्माभिर्भवान् दृश्यताम् । यद्वा एवं त्वया दृश्यतामेते विचिन्वत इति ॥ १ ॥ अत्र स्वतंत्राणां बहूनां वक्तृत्वादपरा आहुरिति सर्वश्लोकेष्ववतारणा । तथापि संगतिरुच्यते । तत्र विचिन्वंतु मम किमिति चेत्तत्राहुः । शरदिति । शरदुदाशये शरत्कालीने सरसि साधुजातं सम्यक्जातं यत्सरसिजं विकसितं पद्मं तस्योदरे गर्भे या श्रीस्तां मुष्णाति हरतीति तथा तया दृशा नेत्रेण हे सुरतनाथ संभोगपते वरदाभीष्टप्रद अशुल्कदासिका अमूल्यदासीर्नो

गोप्य ऊचुः ॥ जयति तेऽधिकं जन्मना व्रजः श्रयत इंदिरा शश्वदत्र हि ॥ दयित दृश्यतां दिक्षु तावकास्त्वयि धृतासवस्त्वां विचिन्वते ॥ १ ॥ शरदुदाशये साधुजातसत्सरसिजोदरश्रीमुषा दृशा ॥ सुरतनाथ तेऽशुल्कदासिका वरद निघ्नतो नेह किं वधः ॥ २ ॥ विषजलाप्ययाद्व्यालराक्षसाद्वर्षमारुताद्वैद्युतानलात् ॥ वृषमयात्मजाद्विश्वतो भयादृषभ ते वयं रक्षिता मुहुः ॥ ३ ॥

निघ्नतो मारयतस्ते तव त्वया क्रियमाण इह लोकेऽयं वधो न भवति किम् । शस्त्रेणैव वधो वधः किं दृशावधो न भवति किंतु भवत्येव । अतस्तव दृशाऽपहृतप्राणप्रत्यर्पणाय त्वया दृश्यतामिति भावः । त्वयादृश्यतामिति यथासंभवं सर्वत्र वाक्यशेषः ॥ २ ॥ किंच बहुभ्यो मृत्युभ्यः कृपया रक्षित्वा किमितीदानीं दृशा मन्मथं प्रेष्य घातयसीत्याहुः । विषेति । हे ऋषभ श्रेष्ठ विषमयाज्जलाद्योऽप्ययो नाशस्तस्मात्तथा व्यालराक्षसादघासुराद्वर्षान्मारुताद्वैद्युतानलादशनिपाताद्वृषोऽरिष्टस्तस्मान्मयात्मजाद्व्योमाद्विश्वतोऽन्यस्मादपि सर्वतो भयाच्च कालियदमनादिना रक्षिताः । किमिदानीमुपेक्षस इति भावः ॥ ३ ॥

तुझ्या प्राप्तिकरितांच कसेंतरी प्राणाचें धारण करून दशदिशांकडे तुझा शोध करीत हिंडत आहों. यास्तव तूं आह्मांला प्रत्यक्ष दिसावेंस ॥ १ ॥ आतां तुह्मी शोधानां वापुड्या, मला दिसण्याचें कारण काय आहे ? असें ह्मणसील तर– हे इच्छितवर देणाऱ्या, संभोगपते, शरदृतूंत सरोवरामध्यें उत्पन्न होऊन प्रफुल्लित झालेल्या कमळाच्या गाभ्यांतील शोभेचा तिरस्कार करणाऱ्या आपल्या दृष्टीनें, मोलाखेरीज दास्य करणाऱ्या आह्मां दासींना ठार मारणाऱ्या तूं केलेला हा वध या लोकीं होत नाहीं काय ? ह्मणजे शस्त्रानेंच केलेला वध, वध होतो ? दृष्टीनें केलेला वध, वध होत नाहीं काय ? तर होतोच. यास्तव दृष्टीनें अपहार केलेल्या प्राणाचें प्रत्यर्पण करण्याकरितां तूं आमच्या दृष्टी पडावेंस ॥ २ ॥ हे सर्वोत्तमा, कालियाच्या डोहांतील विषोदकाच्या प्राशनानें प्राप्त झालेल्या मृत्यूपासून, अघासुर दैत्यापासून, इंद्रानें केलेल्या वृष्टीपासून, वायूपासून व विजा पडून उत्पन्न झालेल्या अग्नीपासून, वृषभरूपी अरिष्टासुरापासून, व्योमासुरापासून व दुसऱ्याहि सर्वप्रकारच्या भयां- ॥९९॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पासून कालियदमनादिकेंकरून तूं वारंवार आमचें रक्षण केलें आहेस आणि आतां काय ह्मणून दृष्टीनें मदनाला पाठवून त्याजकडून आमचा घात करवितोस ? ॥ ३ ॥ हे सख्या, तूं खरोखर यशोदेचा पुत्र नाहींस तर सर्वप्राण्यांच्या बुद्धींचा साक्षी परमेश्वरच आहेस. आतां तो परमात्मा मनुष्यांसारखा दिसतो काय ? असें ह्मणशील तर– तोच परमात्मा तूं ब्रह्मदेवानें प्रार्थना केली असतां जगाच्या रक्षणाकरितां यादवांच्या कुळांमध्यें अवतीर्ण झाला आहेस. यास्तव आतां तुला भक्तांची उपेक्षा करणें हें अत्यंत अनुचित आहे ह्मणून तूं आमच्या दृष्टी पडावेंस ॥ ४ ॥ आणि तुझ्या भक्त अशा आमच्या ह्या चार प्रार्थना संपादन कर. त्या कोणत्या असें ह्मणशील तर–हे सुंदरा यादवश्रेष्ठा, जन्ममरणरूप संसारापासून भिऊन तुझ्या चरणांस शरण आलेल्या भक्तांना अभय देणारें, ब्रह्मादिकांचेंहि मनोरथ पूर्ण करणारें व साक्षात् लक्ष्मीचेंहि पाणिग्रहण

अपि च विश्वपालनायावतीर्णस्य तव भक्तोपेक्षाऽत्यंतमनुचितेत्याशयेनाहुः । न खल्विति । हे सखे भवान्खलु निश्चितं यशोदासुतो न भवति किंतु सर्वप्राणिनां बुद्धिसाक्षी । ननु स किं दृश्यो भवति तत्राहुः । विखनसा ब्रह्मणा विश्वपालनाय प्रार्थितः सन्सात्वतां कुले उदेयिवानुदित इति ॥ ४ ॥ तस्मात्त्वद्भक्तानामस्माकमेतत्प्रार्थनाचतुष्टयं संपादयेत्याहुः । विरचिताभयमित्यादिचतुर्भिः । हे वृष्णिधुर्य संसृतेर्भयात्ते चरणमीयुषः शरणं प्राप्तानां प्राणिनां विरचितं दत्तमभयं येन तत्तथा हे कांत कामदं वरदं तथा श्रियः करं

न खलु गोपिकानंदनो भवानखिलदेहिनामंतरात्मदृक् ॥ विखनसाऽर्थितो विश्वगुप्तये सख उदेयिवान्सात्वतां कुले ॥ ४ ॥ विरचिताभयं वृष्णिधुर्य ते चरणमीयुषां संसृतेर्भयात् ॥ करसरोरुहं कांत कामदं शिरसि धेहि नः श्रीकरग्रहम् ॥ ५ ॥ व्रजजनार्तिहन्वीर योषितां निजजनस्मयध्वंसनस्मित ॥ भज सखे भवत्किंकरीः स्म नो जलरुहाननं चारु दर्शय ॥ ६ ॥ प्रणतदेहिनां पापकर्शनं तृणचरानुगं श्रीनिकेतनम् ॥ फणिफणार्पितं ते पदांबुजं कृणु कुचेषु नः कृंधि हृच्छयम् ॥ ७ ॥ मधुरया गिरा वल्गुवाक्यया बुधमनोज्ञया पुष्करेक्षण ॥ विधिकरीरिमा वीर मुह्यतीरधरसीधुनाऽऽप्याययस्व नः ॥ ८ ॥

गृह्णातीति तथा तद्भवत्करसरोरुहं नः शिरसि धेहि ॥ ५ ॥ हे व्रजजनार्तिहन्हे वीर निजजनानां यः स्मयो गर्वस्तस्य ध्वंसनं नाशकं स्मितं यस्य तथाभूत हे सखे भवत्किंकरीर्नोऽस्मान् भज आश्रय । स्मेति निश्चितम् । प्रथमं तावज्जलरुहाननं चारु योषितां नो दर्शय ॥ ६ ॥ अविशेषेण प्रणतानां देहिनां पापकर्शनं पापहंतृ तृणचरान्पशूनप्यनुगच्छति कृपयेति तथा सौभाग्येन श्रियो निकेतनं वीर्यातिरेकेण फणिनः फणास्वर्पितं ते पदांबुजं नः कुचेषु कृणु कुरु । किमर्थम् । हृच्छयं कामं कृंधि छिंधि ॥ ७ ॥ हे पुष्करेक्षण तवैव मधुरया गिरा वल्गूनि वाक्यानि यस्यां तया बुधानां मनोज्ञया हृद्यया गंभीरयेत्यर्थः । मुह्यतीरिमा नो विधिकरीः

करणारें असें जें तुझें हस्तकमळ तें तूं आमच्या मस्तकीं स्थापन कर ॥ ५ ॥ हे वीरा, तूं गोकुळवासी जनांच्या सर्व पीडा दूर करणारा असून तुझें हास्य, भक्तजनांचा गर्व नाहींसें करणारें आहे. यास्तव हे प्राणसख्या, खरोखर तुझ्या दासी अशा आमचा स्वीकार कर आणि आह्मां स्त्रियांना आपलें कमळासारखें सुंदर मुख दाखीव ॥ ६ ॥ हे कृष्णा, अनन्यभावानें नम्र झालेल्या प्राण्यांच्या पापाचें नाश करणारें, गाईवगैरे पशूंचें रक्षण करण्याकरितां दयेनें त्यांच्या मागून चालणारें, अतिसुंदर असल्यामुळें लक्ष्मीचेंहि राहण्याचें अचळ स्थान व अतिपराक्रमी असल्यामुळें कालियसर्पाच्या फड्यांवर अर्पण केलेलें असें तुझें चरणकमळ, आमच्या कुचांवर स्थापन कर आणि आमच्या मदनाचा नाश कर ॥ ७ ॥ आणि हे कमलनेत्रा वीरा, ज्ञानिजनांनासुद्धां आवडणाऱ्या व मनोहरवाक्यांनीं युक्त अशा तुझ्या मधुरवाणीनें मोह पावणाऱ्या ह्या आह्मां दासींना तूं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आपलें अधरामृत पाजून सावध कर ॥ ८ ॥ तुझा विरह प्राप्त झालेल्या आह्मांला मरणच प्राप्त झालें असतें परंतु तें मरण, तुझें कथामृत पाजविणाऱ्या पुण्यवान पुरुषांनीं हा वेळपर्यंत चुकविलें आहे. ह्मणून तापत्रयानें तप्त झालेल्या जनांना शांत करणारें, ब्रह्मादिकांनीं स्तुत्य, काम्यकर्मांचें निसरन करणारें, श्रवणमात्रेंकरून मंगलकारक व अत्यंत शांत असें तुझें कथामृत, विस्तृतपणें जे पुरुष या भूमीवर गायन करितात ते मोठेच दाते होत. ह्मणजे जे केवळ कथामृताचें वर्णन करितात तेसुद्धां जर अतिधन्य आहेत तर मग जे तुला पाहतात ते धन्य होतील हें काय सांगावें ! यास्तव आह्मी प्रार्थना करितों कीं तूं आमच्या दृष्टी पडावेंस ॥ ९ ॥ आतां माझ्या कथाश्रवणेंकरूनच

किंकरीरधरसीधुना आप्यायस्व संजीवयेति ॥ ८ ॥ किंच अस्माकं त्वद्विरहे प्राप्तमेव मरणं किंतु त्वत्कथामृतं पाययद्भिः सुकृतिभिर्वंचितमित्याहुः । तवेति । कथैवामृतम् । अत्र हेतुः । तप्तजीवनम् । प्रसिद्धामृतादुत्कर्षमाहुः । कविभिर्ब्रह्मविद्भिरपीडितं स्तुतम् । देवभोग्यं त्वमृतं तैस्तुच्छीकृतम् । किंच कल्मषापहं कामकर्मनिरसनं तत्त्वमृतं नैवंभूतम् । किंच श्रवणमंगलं श्रवणमात्रेण मंगलप्रदम् । तत्त्वनुष्ठानापेक्षम् । किंच श्रीमत्सुशांतं तत्तु मादकम् । एवंभूतं त्वत्कथामृतमाततं यथा भवति तथा ये भुवि गृणंति निरूपयंति ते जना भूरिदा बहुदातारः । जीवितं ददतीत्यर्थः । यद्वा एवंभूतं त्वत्कथामृतं ये भुवि गृणंति ते भूरिदाः पूर्वजन्मसु बहुदत्तवंतः । सुकृतिन इत्यर्थः । एतदुक्तं भवति । ये केवलं कथामृतं गृणंति तेऽपि तावदतिधन्याः किं पुनर्ये त्वां पश्यंत्यतः प्रार्थयामहे

तव कथामृतं तप्तजीवनं कविभिरीडितं कल्मषापहम् ॥ श्रवणमंगलं श्रीमदाततं भुवि गृणंति ते भूरिदा जनाः ॥ ९ ॥ प्रहसितं प्रिय प्रेमवीक्षणं विहरणं च ते ध्यानमंगलम् ॥ रहसि संविदो या हृदिस्पृशः कुहक नो मनः क्षोभयंति हि ॥ १० ॥ चलसि यद्व्रजाच्चारयन्पशून्नलिनसुंदरं नाथ ते पदम् ॥ शिलतृणांकुरैः सिदतीति नः कलिलतां मनः कांत गच्छति ॥ ११ ॥

त्वया दृश्यतामिति ॥ ९ ॥ ननु मत्कथाश्रवणेनैव निर्वृता भवत किं मद्दर्शनेन न त्वद्विलासक्षुभितचित्ता वयं तत्रापि शांतिं न विंदाम इत्याहुः । प्रहसितमिति । हे प्रिय कुहक कपट । संविदः संकेतनर्माणि ॥ १० ॥ किंच त्वयि वयमतिप्रेमार्द्रचित्तास्त्वं पुनरस्मासु केन हेतुना कपटमाचरसीत्याहुः श्लोकद्वयेन । चलसीति । हे नाथ हे कांत यद्यदा व्रजाच्चलसि पशूंश्चारयंस्तदा तन्नलिनसुंदरं कोमलं ते पदं शिलैः कणिशैस्तृणैरंकुरैश्च सीदति क्लिश्येदिति नो मनः कलिलतामस्वास्थ्यं गच्छति प्राप्नोति । एवंभूतास्त्वद्दुःखशंकितचित्ता वयम् ॥ ११ ॥

जर तुह्मीं संतुष्ट आहां तर माझ्या दर्शनाचें तुह्मांस कारण काय आहे ? असें ह्मणशील तर– तुझ्या विलासानें क्षुभितचित्त झालेल्या आमची केवळ तुझ्या कथाश्रवणमात्रेंकरून शांतता होत नाहीं तर तुझी प्राप्तीच झाली पाहिजे. कारण, हे प्रिया, ध्यानमात्रेंकरूनच मंगलकारक असें तुझें जें अतिसुंदर मंदहास्य, प्रेमपूर्वक नेत्रकटाक्षांनीं केलेलें अवलोकन व खेळणें तशींच हृदयाला आवडणारीं जीं सांकेतिक विनोदभाषणें ह्या सर्व गोष्टी, हे कपट्या, आमच्या मनाला क्षोभ करीत आहेत ॥ १० ॥ आतां आह्मी तुझ्याठिकाणीं अतिप्रेमानें आर्द्रचित्त असून तूं आमचेठिकाणीं काय ह्मणून कपट आचरण करितोस असें दोन श्लोकांनीं सांगतात– हे नाथा, हे सुंदरा, ज्यावेळीं गाईंना चारणारा तूं, गोकुळांतून बाहेर जातोस त्यावेळीं तुझे कमळासारखे कोमळ पाय, कणसें, गवताचे बुडखे व दर्भादिकांचे अंकुर टोंचून क्लेश पावत असतील ह्मणून आमचें मन, काळजीनें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अस्वस्थपणा पावतें. अशाप्रकारच्या (तुझ्या दुःखानें शंकितचित्त झालेल्या) आह्मी आहों आणि हे वीरा, तूं तर—सायंकाळीं काळ्या कुरळकेंसांनीं वेष्टित व गाईंचा धुरळा बसलेलें आपलें कमळासारखें मुख धारण करीत व तें वारंवार आह्मांला दाखवीत आमच्या मनामध्यें केवळ मदनालामात्र उत्पन्न करितोस पण आपला संग देत नाहींस ह्मणून तूं मोठा कपटी आहेस ॥ ११ ॥ १२ ॥ यास्तव आतां तूं आपलें कपट टाकून देऊन असें कर कीं,– हे रमणा, हे संतापहारका, शरणागतांचे मनोरथ पूर्ण करणारें, ब्रह्मदेवानें पूजित, पृथ्वीचें भूषण, ध्यानमात्रेंकरून आपत्ति घालविणारें व सेवा करत्येवेळींसुद्धां परम आनंद देणारें असें तुझें चरणकमळ, कामसंताप दूर होण्याकरितां आमच्या स्तनांवर अर्पण कर ॥ १३ ॥ आणि हे वीरा, सुरताची वृद्धि करणारें, शोकाचा नाश करणारें, सुस्वरनाद करणाऱ्या मुरलीनें उत्तमप्रकारें चुंबन केलेलें आणि

त्वं तु दिनपरिक्षये सायंकाले नीलकुंतलैरावृतं घनरजस्वलं गोरजश्छुरितं वनरुहाननमलिमालाकुलपरागछुरितपद्मतुल्यमाननं बिभ्रत्तच्च मुहुर्मुहुर्दर्शयन्नो मनसि केवलं स्मरं यच्छस्यर्पयसि । न तु संगं ददासीति कपटस्त्वमिति भावः ॥ १२ ॥ अतोऽधुना कपटं विहायैवं कुर्विति प्रार्थयंति श्लोकद्वयेन । प्रणतकामदमिति । हे आधिहन्हे रमण पद्मजेन ब्रह्मणाऽर्चितमापदि ध्येयं ध्यानमात्रेणापन्निवर्तकं शंतमं च सेवासमयेऽपि सुखतमं ते चरणपंकजं कामतापशांतये नः स्तनेष्वर्पयेति ॥ १३ ॥ अपि च हे वीर तेऽधरामृतं नो वितर देहि । स्वरितेन नादितेन वेणुना सुष्ठु चुंबितमिति नादामृतवासितमिति भावः । इतररागविस्मारणं नृणामितरेषु सार्वभौमादिसुखेषु रागमिच्छां विस्मार-

दिनपरिक्षये नीलकुंतलैर्वनरुहाननं बिभ्रदावृतम् ॥ घनरजस्वलं दर्शयन्मुहुर्मनसि नः स्मरं वीर यच्छसि ॥ १२ ॥ प्रणतकामदं पद्मजार्चितं धरणिमंडनं ध्येयमापदि ॥ चरणपंकजं शंतमं च ते रमण नः स्तनेष्वर्पयाधिहन् ॥ १३ ॥ सुरतवर्धनं शोकनाशनं स्वरितवेणुना सुष्ठु चुंबितम् ॥ इतररागविस्मारणं नृणां वितर वीर नस्तेऽधरामृतम् ॥ १४ ॥ अटति यद्भवानह्नि काननं त्रुटिर्युगायते त्वामपश्यताम् ॥ कुटिलकुंतलं श्रीमुखं च ते जड उदीक्षतां पक्ष्मकृद्दृशाम् ॥ १५ ॥ पतिसुतान्वयभ्रातृबांधवानतिविलंघ्य तेंऽत्यच्युतागताः ॥ गतिविदस्तवोद्गीतमोहिताः कितव योषितः कस्त्यजेन्निशि ॥ १६ ॥

यति विलापयतीति तथा तत् ॥ १४ ॥ किंच क्षणमपि त्वददर्शने दुःखं दर्शने च सुखं दृष्ट्वा सर्वसंगपरित्यागेन यतय इव वयं त्वामुपागतास्त्वं तु कथमस्मांस्त्यक्तुमुत्सहसे इति सकरुणमूचुः । अटतीति द्वयेन । यद्यदा भवान् काननं वृंदावनं प्रत्यटति गच्छति तदा त्वामपश्यतां प्राणिनां त्रुटिः क्षणार्धमपि युगवद्भवति । एवमदर्शने दुःखमुक्तम् । पुनश्च कथंचिद्दिनांते तव श्रीमन्मुखमुच्चैरीक्षमाणानां तेषां दृशां पक्ष्मकृद्ब्रह्मा जडो मंद एव निमेषमात्रमप्यंतरमसह्यमिति दर्शने सुखमुक्तम् ॥ १५ ॥ तस्मात् हे अच्युत पतीन्सुतानन्वयांस्तत्संबंधिनो भ्रातॄन्बांधवांश्चातिविलंघ्य तव समीपमागता वयम् । कथंभूतस्य । गतिविदोऽस्मदागमनं जानतः । गीतगतीर्वा जानतः । गतिविदो वयं वा

ज्यांना त्याची प्राप्ति होत्ये त्या मनुष्यांना सार्वभौमादि सुखांचाहि विसर पाडणारें असें तुझें अधरामृत तूं आह्मांला अर्पण कर ॥ १४ ॥ कृष्णा, तूं जेव्हां दिवसा वनामध्यें फिरत असतोस तेव्हां तुला न पाहणाऱ्या प्राण्यांना एका त्रुटिइतका स्वल्पहि काळ, युगासारखा होतो ह्मणजे तितका वेळ फार दुःख होतें आणि जेव्हां संध्याकाळीं तूं परत येतोस तेव्हां कुरळ केंसांनीं युक्त व अतिसुंदर असें तुझें मुख मोठ्या प्रेमानें अवलोकन करणाऱ्या प्राण्यांना, डोळ्यांना पापण्या करणारा ब्रह्मदेवहि केवळ मूर्ख आहे असें वाटूं लागतें; ह्मणजे दर्शनांत निमेषमात्रहि अंतर सोसवत नाहीं. मिळून तुझ्या दर्शनानें अतिसुख होतें ॥ १५ ॥ ह्मणून हे अच्युता, आह्मी, गायनाच्या सर्व गति जाणणाऱ्या तुझ्या मधुरगायनानें मोहित होऊन आपल्या पति, पुत्र, कुळ, भाऊ, बंधुजन या सर्वांचा त्याग करून तुझ्याजवळ प्राप्त झालों आहों. यास्तव हे धूर्ता, अशा रीतीनें स्वतां

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होऊन रात्रीच्या वेळीं चालून आलेल्या बायकांना तुझ्याशिवाय दुसरा कोण बरें पुरुष टाकील ? कोणीच टाकणार नाहीं ॥ १६ ॥ यास्तव मदनाला उत्पन्न करणारें तुझें एकांतांतील भाषण, हास्ययुक्त मुख, प्रेमयुक्त अवलोकन आणि लक्ष्मीचें राहण्याचें स्थान असें विशाळ वक्षःस्थळ हीं पाहून तुझ्या संबंधाविषयीं आह्मांला अतिशय इच्छा उत्पन्न होत्ये आणि वारंवार मन मोहित होतें ॥ १७ ॥ आणि हे कृष्णा, तुझा अवतार, गोकुळांत व वृंदावनांत राहणाऱ्या सर्व प्राण्यांचीं दुःखें निरसन करणारा असून सर्व जगाला मंगलरूप आहे. यास्तव तुझ्या संबंधाची मनांत इच्छा धारण करणाऱ्या आह्मांस, स्वजनांचा हृद्रोग नाहींसा करणारें जें अतिगुप्त औषध असेल तें तूंच जाणत आहेस, तें तूं, कृपणपणा न धरितां अम्हांस अर्पण कर ॥१८॥ याप्रमाणें भाषण करून अतिप्रेमानें व्याकुळ झालेल्या त्या गोपी, शेवटीं रुदन करीत म्हणाल्या कीं, हे प्रिया, सुकुलो-

तवोद्गीतेनोच्चैर्गीतेन मोहिताः हे कितव शठ एवंभूता योषितो निशि स्वयमागतास्त्वामृते कस्त्यजेन्न कोऽपीत्यर्थः ॥ १६ ॥ अतस्त्वया त्यक्तानामस्माकं प्राक्तनत्वद्दर्शननिदानहृद्रोगस्य त्वत्संगत्यैव चिकित्सां कुर्वित्याशयेनाहुर्द्वयेन । रहसीति । श्रियो धाम ते बृहद्विशालमुरश्च वीक्ष्यातिस्पृहा भवति तथाच मुहुर्मुहुर्मनो मुह्यति ॥ १७ ॥ तव च व्यक्तिरभिव्यक्तिर्व्रजवनौकसां सर्वेषामविशेषेण वृजिनहंत्री दुःखनिरसनीति । विश्वमंगलं सर्वमंगलरूपा चातस्त्वत्स्पृहात्मनां त्वत्स्पृहारूढमनसां नो मनागीषत्किमपि त्यज मुंच । का पेण्यमकुर्वन्देहीत्यर्थः । किं तत् । स्वजनहृद्रोगाणां यदतिगोप्यं निषूदनं निवर्तकमौषधं तत्त्वमेव वेत्सीति गूढाभिप्रायम् ॥ १८ ॥ अतिप्रेमधर्षिता रुदत्य आहुः । यदिति ।

रहसि संविदं हृच्छयोदयं प्रहसिताननं प्रेमवीक्षणम् ॥ बृहदुरः श्रियो वीक्ष्य धाम ते मुहुरतिस्पृहा मुह्यते मनः ॥ १७ ॥ व्रजवनौकसां व्यक्तिरंग ते वृजिनहंत्र्यलं विश्वमंगलम् ॥ त्यज मनाक्चनस्त्वत्स्पृहात्मनां स्वजनहृद्रुजां यन्निषूदनम् ॥ १८ ॥ यत्ते सुजातचरणांबुरुहं स्तनेषु भीताः शनैः प्रिय दधीमहि कर्कशेषु ॥ तेनाटवीमटसि तद्व्यथते न किंस्वित्कूर्पादिभिर्भ्रमति धीर्भवदायुषां नः ॥ १९ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे रासक्रीडायां गोपिगीतं नाम एकत्रिंशोऽध्यायः ॥ ३१ ॥
॥ श्रीशुक उवाच ॥ इति गोप्यः प्रगायंत्यः प्रलपंत्यश्च चित्रधा ॥ रुरुदुः सुस्वरं राजन्कृष्णदर्शनलालसाः ॥ १ ॥

हे प्रिय यत्ते तव सुकुमारं पदाब्जं कठिनेषु कुचेषु संमर्दनशंकिताः शनैर्दधीमहि धारयेम वयम् । त्वं तु तेनाटवीमटसि । नयसीति पाठे पशून्वा कांचिदन्यां वा आत्मानमेव वा नयसि प्रापयसि तत्ततः तत्पदांबुजं वा कूर्पादिभिः सूक्ष्मपाषाणादिभिः किंस्विन्न व्यथते कथं नु नाम न व्यथेतेति भवानेवायुर्जीवनं यासां तासां नो धीर्भ्रमति मुह्यतीति ॥ १९ ॥ इति दशमे पूर्वार्धे टीकायामेकत्रिंशोऽध्यायः ॥ ३१ ॥ ॥ द्वात्रिंशे विरहालापविक्लिन्नहृदयो हरिः ॥ तत्राविर्भूय गोपीस्ताः सांत्वयामास मानयन् ॥ १ ॥ स्वप्रेमामृतकल्लोलविह्वलीकृतचेतसः ॥ सदयं नंदयन् गोपीरुद्गतो नंदनंदनः ॥ २ ॥ इति गोप्य इति । इत्येवं प्रभृति चित्रधा अनेकधा । सुस्वरमुच्चैः । कृष्णदर्शने

द्भवा, जें तुझें सुकुमार चरणकमळ, आम्ही आपल्या कठिण स्तनावर भीतभीत (त्याला इजा होईल ह्मणून) हळुहळू धारण करीत होतों, त्या चरणकमळानेंच तूं सांप्रत अरण्यांत फिरत आहेस तेव्हां तें पदकमळ, दगडाचीं करपें व कांटेवगैरे लागून क्लेश पावत नसेल काय? याप्रमाणें ज्याचें आयुष्य तूंच आहेस अशा आमची बुद्धि आतां मोह पावत्ये. तूं भेटशील ह्मणून हावेळपर्यंत आह्मी जीवंत राहिलों पुढें राहण्याचा नेम नाहीं यास्तव लवकर भेट दे ॥१९॥ याप्रमाणें श्रीमद्भाग० महापु० दशम० गोपिगीतवर्णननामक हा एकतिसावा अ० स० ॥ ३१ ॥ ॥ आतां ह्या बत्तिसाव्या अध्यायामध्यें, गोपींच्या विरहालापांनीं सद्गदितचित्त झालेल्या त्या श्रीकृष्णानें तेथें प्रकट होऊन त्या गोपींचें सन्मानपूर्वक सांत्वन केलें; अशी कथा वर्णन केली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, श्रीकृष्णाच्या दर्शनाविषयीं अतिशय उत्सुक होऊन असें अनेकप्रकारें गायन करणाऱ्या व प्रलाप

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करणाऱ्या त्या गोपी; शेवटीं उच्चस्वरानें सुस्वर रडूं लागल्या ॥ १ ॥ तेव्हां त्या गोपींमध्यें, ज्याचें मुखकमळ हास्ययुक्त आहे असा पीतांबरधारी, फुलांच्या माळा धारण करणारा आणि जगन्मोहक असा साक्षात् मदनालाहि मोहित करणारा तो श्रीकृष्ण प्रकट झाला ॥ २ ॥ त्या आलेल्या प्रियतम श्रीकृष्णाला पाहून संतोषानें प्रफुल्लितनेत्र झालेल्या त्या सर्व गोपी, जसे अचेतन शरीरामध्यें प्राण आला म्हणजे त्याचे करचरणादिक अवयव, एकदम चलनवलन करूं लागतात त्याप्रमाणें एकदम उठून उभ्या राहिल्या ॥ ३ ॥ आतां उठलेल्या त्यांचीं कर्मे सांगतो— एकीनें मोठ्या आनंदानें श्रीकृष्णाचें हस्तकमळ आपल्या दोन्हीं हातांनीं धरिलें. दुसरीनें, चंदनाची उटी लाऊन भूषित केलेला त्याचा बाहु आपल्या खांद्यावर घेतला ॥ ४ ॥ एका सुंदरीनें, त्याचें चर्वण केलेलें तांबूल, आपल्या ओंजळीनें ग्रहण केलें, त्याच्या

लालसाऽतिस्पृहा यासां ताः ॥ १ ॥ साक्षान्मन्मथमन्मथो जगन्मोहनस्य कामस्यापि मनस्युद्भूतः कामः साक्षात्तस्यापि मोहक इत्यर्थः ॥ २ ॥ तन्वः करचरणादयः ॥ ३ ॥ ॥ ४ ॥ अंजलिना संहतहस्तद्वयेन ॥ ५ ॥ भ्रुकुटिं भ्रुवमाबद्धच कुटिलीकृत्य प्रेमसंरंभेण प्रणयकोपावेशेन विह्वला विवशा दष्टाधरोष्ठा कटाः कटाक्षास्तैर्ये आक्षेपाः परिभवास्तैस्ता-

तासामाविरभूच्छौरिः स्मयमानमुखांबुजः ॥ पीतांबरधरः स्रग्वी साक्षान्मन्मथमन्मथः ॥ २ ॥ तं विलोक्यागतं प्रेष्ठं प्रीत्युत्फुल्लदृशोऽबलाः ॥ उत्तस्थुर्युगपत्सर्वास्तन्वः प्राणमिवागतम् ॥ ३ ॥ काचित्करांबुजं शौरेर्जगृहेंऽजलिना मुदा ॥ काचिद्दधार तद्बाहुमंसे चंदनभूषितम् ॥ ४ ॥ काचिदंजलिना गृह्णात्तन्वी तांबूलचर्वितम् ॥ एका तदंघ्रिकमलं संतप्ता स्तनयोरधात् ॥ ५ ॥ एका भ्रुकुटिमाबद्धच प्रेमसंरंभविह्वला ॥ घ्नंतीवैक्षत्कटाक्षेपैः संदष्टदशनच्छदा ॥ ६ ॥ अपराऽनिमिषद्दृग्भ्यां जुषाणा तन्मुखांबुजम् ॥ आपीतमपि नातृप्यत्संतस्तच्चरणं यथा ॥ ७ ॥ तं काचिन्नेत्ररंध्रेण हृदि कृत्य निमील्य च ॥ पुलकांग्युपगुह्यास्ते योगीवानंदसंप्लुता ॥ ८ ॥ सर्वास्ताः केशवालोकपरमोत्सवनिर्वृताः ॥ जहुर्विरहजं तापं प्राज्ञं प्राप्य यथा जनाः ॥ ९ ॥

ध्नंतीवैक्षत ॥ ६ ॥ अनिमिषंतीभ्यामनिमीलंतीभ्यां दृग्भ्यामापीतमपि सम्यगदृष्टमपि पुनः पुनर्जुषाणा नातृप्यत् ॥ ७ ॥ हृदिकृत्य हृदयं नीत्वेत्यर्थः ॥ ८ ॥ प्राज्ञमीश्वरं प्राप्य यथा मुमुक्षवो जनाः । यद्वा प्राज्ञं ब्रह्मज्ञं प्राप्य यथा संसारिणः । यद्वा प्राज्ञं सौषुप्तं प्राप्य यथा विश्वतैजसावस्था जीवाः ॥ ९ ॥

विरहानें संतप्त झालेल्या तिसऱ्या गोपीनें, त्याचें सुकुमार चरणकमळ आपल्या स्तनावर धारण केलें ॥ ५ ॥ प्रणयकोपाच्या आवेशानें विव्हल झालेली एक गोपी तर— आपला अधरोष्ठ चावून व भ्रुकुटी वक्र करून नेत्रकटाक्षांच्या संपातांनीं श्रीकृष्णाला प्रहारच करित्ये कीं काय अशी त्याकडे टक लाऊन पाहूं लागली ॥ ६ ॥ दुसरी एक गोपी, आपल्या डोळ्यांच्या पापण्यासुद्धां न हालवितां प्रेमपूर्वक पाहिलेलेंहि त्याचें मुख पुन्हा पुन्हा प्रीतीनें पाहत होत्साती, जसे सत्पुरुष त्याच्या चरणाचें वारंवार सेवन करीत असतांहि तृप्त होत नाहींत त्याप्रमाणें तृप्त झाली नाहीं ॥ ७ ॥ कोणी एकीनें तर— आपल्या नेत्रछिद्रद्वारा त्या श्रीकृष्णाला हृदयांत नेऊन व त्याला आलिंगन करून पुन्हा तो बाहेर पडूं नये म्हणून डोळे झांकून, जिच्या अंगावर रोमांच उभे राहिले आहेत अशी ती गोपी, आनंदांत निमग्न होऊन योग्यासारखी स्तब्ध राहिली ॥ ८ ॥ असो. त्या सर्व गोपींनीं, श्रीकृष्णाच्या दर्शनरूप परमोत्साहानें आनंदित होऊन, त्याच्या विरहापासून झालेल्या तापाचा, जसे मुमुक्षु जन ईश्वराला

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करून संसारतापाचा त्याग करितात त्याप्रमाणें त्याग केला ॥ ९ ॥ बा परीक्षित् राजा, श्रीकृष्णाच्या दर्शनादिकेंकरून ज्यांचा विरहजन्य शोक निवृत्त झाला आहे असा त्या गोपींनीं वेष्टित झालेला तो भगवान् श्रीकृष्ण, जसा प्रकृत्यादिक उपाधींनीं युक्त झालेला अंतर्यामी पुरुष, अधिकच शोभतो त्याप्रमाणें शोभूं लागला ॥ १० ॥ नंतर त्या गोपींना आपल्याबरोबर घेऊन, जेथें प्रफुल्लित झालेल्या कुंद व मंदार वृक्षांवरून आलेला सुगंधवायु वाहत असल्यामुळें त्या गंधाला लुब्ध झालेले भ्रमर फिरत आहेत, जेथें शरदृतूंतील चंद्राच्या किरणसमूहांनीं रात्रिसंबंधी अंधकार नाहींसा झाला आहे व जेथें यमुनानदीच्या हस्तरूप तरंगांनीं, अतिशय मऊ वाळू पसरून ठेविली आहे, अशा यमुनेच्या सुखकारक वाळवंटांत प्रवेश करून, त्यांनीं युक्त झालेला तो प्रभु श्रीकृष्ण, अतिशय शोभूं लागला ॥ ११ ॥ १२ ॥ तेव्हां जशा श्रुति, कर्मकांडा-

---

पुरुषः परमात्मा शक्तिभिः सत्त्वादिभिर्यथा । यद्वा उपासकः पुरुषो ज्ञानबलवीर्यादिभिः । यद्वा पुरुषोऽनुशायी प्रकृत्याद्युपाधिभिर्वृतो यथाऽधिकं विरोचते तद्वत् ॥ १० ॥ विकसत्कुंदमंदारैः सुरभिर्योऽनिलस्तस्मात्षट्पदा यस्मिंस्तत् ॥ ११ ॥ शरच्चंद्रांशूनां संदोहैः समूहैर्ध्वस्तं दोषातमो रात्रिगतं तमो यस्मिंस्तत् अतः शिवं सुखकरम् । हस्तरूपैस्तरलैस्तरंगैराचिता आस्तृता कोमला वालुका यस्मिन् एवंभूतं पुलिनं ताः समादाय निर्विश्य ताभिर्वृतोऽधिकं व्यरोचतेति पूर्वेणान्वयः ॥ १२ ॥ ताश्च मनोरथानामंतं

ताभिर्विधूतशोकाभिर्भगवानच्युतो वृतः ॥ व्यरोचताधिकं तात पुरुषः शक्तिभिर्यथा ॥ १० ॥ ताः समादाय कालिंद्या निर्विश्य पुलिनं विभुः ॥ विकसत्कुंदमंदारसुरभ्यनिलषट्पदम् ॥ ११ ॥ शरच्चंद्रांशुसंदोहध्वस्तदोषातमः शिवम् ॥ कृष्णायाहस्ततरलाचितकोमलवालुकम् ॥ १२ ॥ तद्दर्शनाह्लादविधूतहृद्रुजो मनोरथांतं श्रुतयो यथा ययुः ॥ स्वैरुत्तरीयैः कुचकुंकुमांकितैरचीक्लृपन्नासनमात्मबंधवे ॥ १३ ॥ तत्रोपविष्टो भगवान्स ईश्वरो योगेश्वरांतर्हृदि कल्पितासनः ॥ चकास गोपीपरिषद्गतोऽर्चितस्त्रैलोक्यलक्ष्म्येकपदं वपुर्दधत् ॥ १४ ॥ सभाजयित्वा तमनंगदीपनं सहासलीलेक्षणविभ्रमभ्रुवा ॥ संस्पर्शनेनांककृतांघ्रिहस्तयोः संस्तुत्य ईषत्कुपिता बभाषिरे ॥ १५ ॥

ययुः पूर्णकामा बभूवुः । श्रुतयो यथेति । अयमर्थः । यथा कर्मकांडे श्रुतयः परमेश्वरमपश्यंत्यस्तत्तत्कामानुबंधैरपूर्णा इव भवंति ज्ञानकांडे तु परमेश्वरं दृष्ट्वा तदाह्लादपूर्णाः कामानुबंधं जहति तद्वदिति । आप्तकामा अपि प्रेम्णा तमभजन्नित्याह । स्वैरिति । अचीक्लृपन् रचयामासुः आत्मबंधवेंऽतर्यामिणे ॥ १३ ॥ गोपीसभागतस्ताभिः संमानितः संश्चकास शुशुभे । त्रैलोक्ये या लक्ष्मीः शोभा तस्य एकमेव पदं स्थानं तद्वपुर्दधद्दर्शयन् ॥ १४ ॥ सहासलीलेक्षणेन विभ्रमो विलासो यस्यां तया भ्रुवोपलक्षिताः । संस्पर्शनेन संमर्दनेन ॥ १५ ॥

मध्यें परमेश्वराला न पाहतां काम्यकर्मांचें प्रतिपादन करित होत्सात्या अपूर्णमनोरथ असल्यासारख्या होतात आणि त्याच श्रुति, ज्ञानकांडामध्यें ईश्वराला पाहून त्याचें प्रतिपादन करित होत्सात्या पूर्णमनोरथ होतात त्याप्रमाणें त्या भगवंताच्या दर्शनानंदानें विरहजन्य शोक दूर झालेल्या त्या गोपी, आपल्या मनोरथांचा अंत पावल्या ह्मणजे पूर्णमनोरथ झाल्या व तशास्थितीमध्येंहि त्यांनीं भगवंताचें प्रेमानें सेवन केलें. तें असें कीं,—त्या गोपींनीं, स्तनसंबंधी केशर लागलेल्या आपल्या प्रावरणवस्त्रांनीं सर्वजीवांचा अंतर्यामी अशा त्या श्रीकृष्णाला बसावयास आसन कल्पिलें ॥ १३ ॥ तेव्हां सिद्धयोग्यांच्या हृदयकमळामध्यें ज्याच्या आसनाची कल्पना आहे तो षड्गुणैश्वर्यसंपन्न ईश्वर, गोपींच्या सभेमध्यें त्या उत्तरीय वस्त्रांच्या आसनावर बसला. तेव्हां त्या गोपींनीं त्याचें प्रीतीनें पूजन केलें असतां त्यांना त्रैलोक्यांतील शोभेचें एकच स्थान असें आपलें शरीर दाखवीत होत्साता शोभूं लागला ॥ १४ ॥ नंतर हास्ययुक्त लीलावलोकनानें कटाक्ष फेंकणाऱ्या भ्रुकुटीनें युक्त अशा त्या गोपी, मद- ॥१०२॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नाला प्रदीप्त करणाऱ्या त्या श्रीकृष्णाचा ' आपल्या मांड्यांवर घेतलेल्या त्याच्या पायांच्या व हातांच्या संमर्दनानें ' सत्कार करून व ' कितीतरी सुंदर व सुकुमार शरीर हें ' इत्यादिप्रकारेंकरून त्याची स्तुति करून ' तो कृष्ण अंतर्धान पावला होता ह्मणून किंचित् कुपित झालेल्या त्या गोपी, त्याचा अपराध त्याच्या मुखानें वदविण्याकरितां भाषण करूं लागल्या कीं,– ॥ १५ ॥ हे कृष्णा, या जगामध्यें कितीएक लोक, आपली सेवा करणाऱ्या लोकांनांच अनुसरून त्याच्या सेवेनुसार त्यांची प्रतिसेवा करितात; कित्येक, आपली उलट सेवा होण्याची अपेक्षा न धरितां सेवा न करणारांचीहि सेवा करितात, कित्येक तर प्रत्युपकार करणारांची किंवा न करणारांचीहि सेवा मुळींच करीत नाहींत. तेव्हां ह्या तीन पक्षांमध्यें कोणांकोणांला गुणदोषांचें फळ कसकसें मिळतें? तें तूं आह्मांस स्पष्टरीतीनें सांग ॥ १६ ॥ याप्रमाणें प्रश्न केला असतां गोपींचा अभिप्राय जाणून भगवान् ह्मणाला कीं;–हे सख्यांनो, जे पुरुष, परस्परांच्या उपकारांची फेड

तत्र भगवतोऽकृतज्ञतां तद्वचनेनैवापादयितुकामा गूढाभिप्राया लोकवृत्तांतमिव पृच्छंति । भजत इति । भजतः प्राणिनः अनु अनंतरम् । केचिद्भजनानुसारेण भजंति । केचिदेतद्विपर्ययं यथा भवति तथा । तद्भजनानपेक्षमभजतोऽपि भजंति । अन्ये तु नोभयानिति ॥ १६ ॥ विदिताभिप्राय उत्तरमाह । मिथ इति । हे सख्यः उपकारप्रत्युपकारतया ये मिथो भजंति तेऽन्यं न भजंति किंत्वात्मानमेव । कुतः । हि यस्मात्स्वार्थ एवैकांत उद्यमो येषां ते । तत्र च न सौहृदमतो न सुखं न च धर्मो दृष्टोद्देशाद्द्रोमहिष्यादिभजन-

गोप्य ऊचुः ॥ भजतोऽनुभजंत्येक एक एतद्विपर्ययम् ॥ नोभयांश्च भजंत्येक एतन्नो ब्रूहि साधु भोः ॥ १६ ॥ श्रीभगवानुवाच ॥ मिथो भजंति ये सख्यः स्वार्थैकांतोद्यमा हि ते ॥ न तत्र सौहृदं धर्मः स्वार्थार्थं तद्धि नान्यथा ॥ १७ ॥ भजंत्यभजतो ये वै करुणाः पितरो यथा ॥ धर्मो निरपवादोऽत्र सौहृदं च सुमध्यमाः ॥ १८ ॥ भजतोऽपि न वै केचिद्भजंत्यभजतः कुतः ॥ आत्मारामा ह्याप्तकामा अकृतज्ञा गुरुद्रुहः ॥ १९ ॥

वदित्यर्थः ॥ १७ ॥ ये त्वभजतो भजंति ते द्विविधाः करुणाः स्निग्धाश्च । तत्र तु तथाक्रमं धर्मकामौ भवत इत्याह । भजंत्यभजत इति ॥ १८ ॥ तृतीयप्रश्नोत्तरं भजतोऽपीति । अयमर्थः । ते तु चतुर्विधाः । एके आत्मारामा अपराग्दृशः । केचिदाप्तकामा विषयदर्शिनोऽपि पूर्णकामत्वेन भोगेच्छारहिताः । अन्येऽकृतज्ञा मूढाः । अन्ये तु गुरुद्रुहोऽतिकठिनाः । स पिता यस्तु पोषक इति न्यायादुपकर्ता गुरुतुल्यस्तस्मै द्रुह्यंतीति तथा ते ॥ १९ ॥

करण्याकरितां परस्परांची सेवा करितात ते केवळ स्वार्थाकरितांच तो धंदा करणारे होत. ह्मणजे त्याचें तें भजन केवळ स्वार्थाकरितांच असतें दुसऱ्याकरितां नसतें. ह्मणून त्यामध्यें खरें प्रेम व त्यापासून होणारें सुख किंवा धर्म हे मुळींच नाहींत ॥ १७ ॥ आतां हे कृशकटींनो, जे पुरुष, निरपेक्षपणें आपणावर प्रत्युपकार न करणारांची सेवा करितात ते दोन प्रकारचे आहेत, एक दयाळू (साधु) व दुसरे–जसे आईबापे केवळ स्नेहानें पुत्रांचें संगोपन करितात तसे स्नेही होत. त्यांमध्यें दयाळू पुरुषांना त्यांच्या निरपेक्ष उपदेशादिक करण्यापासून निर्विवाद धर्म घडतो व दुसऱ्या स्निग्ध पुरुषांना सौहृद (प्रेम) व त्यापासून सुख प्राप्त होतें ॥ १८ ॥ आतां कितीएक तर–प्रत्युपकार करणारांचीहि सेवा करीत नाहींत मग प्रत्युपकार न करणारांची कोठून करणार ! करीतच नाहींत. ते पुरुष, चार प्रकारचे आहेत. एक–स्वस्वरूपीं रममाण असणारे, दुसरे विषयांना पाहत असतांहि पूर्णकाम असल्यामुळें भोगेच्छा न धरणारे, तिसरे दुसऱ्यानें केलेल्या उपकाराचें अनुसंधान न राखणारे (मूर्ख) व चवथे गुरुद्रोही ह्मणजे दुष्टचित्त असल्यामुळें, जो आपल्यावर उपकार करितो तो गुरुतुल्य पूज्य असूनहि त्याचा सत्कार न करितां उलटा त्याचा द्रोह करणारे (नि-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

र्दय) असे होत ॥ १९ ॥ असें भगवंताचें वचन ऐकून, हा कृष्ण, बहिर्दृष्टि असल्यामुळें आत्माराम नव्हे, गायनानें आह्मांस बोलाविल्यामुळें पूर्णकाम नव्हे व चतुर असल्यामुळें कृतोपकार न जाणणारा (मूर्ख) हि नव्हे, तर श्रेष्ठच्या पक्षांतला गुरुद्रोही (निर्दय) आहे, असें मनांत आणून नेत्रसंकेतांनीं परस्पर गुप्तहास्य करणाऱ्या त्या गोपींना पाहून तो श्रीकृष्ण ह्मणाला कीं,–हे सख्यांनो, मी तर यांच्यापैकीं कोणीच नसून परमकारुणिक व परममित्र आहें. कसा ह्मणाल तर–मी, माझी सेवा करणाऱ्या प्राण्यांचें, 'त्यांना निरंतर माझें ध्यान व्हावें ह्मणून' सेवन करित नाहीं. जसा निर्धन पुरुष, कदाचित् प्राप्त झालेलें द्रव्य नष्ट झालें ह्मणजे त्याच्या चिंतेनें अगदीं व्याप्त होऊन दुसरें क्षुधातृषावगैरे काहींच जाणत नाहीं त्याप्रमाणें माझा भक्तहि कदाचित् मला प्रत्यक्ष पाहून पुन्हा मी गुप्त झालों असतां, माझ्या चिंतेंत निमग्न होऊन आपल्या देहाचेंसुद्धां अनुसंधान राखीत नाहीं, तर माझेंच निरंतर चिंतन करीत राहतो ॥ २० ॥ याप्रमाणें हे स्त्रियांनो, माझ्या प्राप्तीकरितां ज्या तुह्मी योग्यायोग्य

अत्र चरमकोटिगतमात्मानं मत्वाऽक्षिसंकोचैः परस्परं गूढस्मितमुखीस्ता दृष्ट्वा आह । नाहं त्विति । हे सख्यः अहं तेषां मध्ये न कोऽपि किंतु परमकारुणिकः परमसुहृच्च । कथम् । अमीषां भजतामनुवृत्तिवृत्तये निरंतरध्यानप्रवृत्त्यर्थं तान्न भजामि । एतत्सदृष्टांतमाह । यथेति । तस्य धनस्यैव चिंतया निभृतः पूर्णो व्याप्त इति यावत् । अन्यत्क्षुत्पिपासाद्यपि न वेद ॥ २० ॥ एवं मदर्थोज्झितलोकवेदस्वानां मदर्थे उज्झितो लोको युक्तायुक्ताप्रतीक्षणात् वेदश्च धर्माधर्माप्रतीक्षणात् स्वा ज्ञातयश्च स्नेहत्यागात् याभि-

नाहं तु सख्यो भजतोऽपि जंतून्भजाम्यमीषामनुवृत्तिवृत्तये ॥ यथाऽधनो लब्धधने विनष्टे तच्चिंतयाऽन्यन्निभृतो न वेद ॥ २० ॥ एवं मदर्थोज्झितलोकवेदस्वानां हि वो मय्यनुवृत्तयेऽबलाः ॥ मया परोक्षं भजता तिरोहितं मा सूयितुं माऽर्हथ तत्प्रियं प्रियाः ॥ २१ ॥ न पारयेऽहं निरवद्यसंयुजां स्वसाधुकृत्यं विबुधायुषाऽपि वः ॥ या माऽभजन्दुर्जरगेहशृंखलाः संवृश्च्य तद्वः प्रतियातु साधुना ॥ २२ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे रासक्रीडायां गोपीसांत्वनं नाम द्वात्रिंशोऽध्यायः ॥ ३२ ॥ ॥

स्तासां वो युष्माकं परोक्षमदर्शनं यथा भवति तथा भजता युष्मत्प्रेमालापान् शृण्वतैव तिरोहितमंतर्धानेन स्थितम् । तत्तस्मात् हे अबला हे प्रिया मा मामसूयितुं दोषारोपेण द्रष्टुं यूयं माऽर्हथ न योग्याः स्थ ॥ २१ ॥ आस्तामिदं परमार्थं तु शृणुतेत्याह । नेति । निरवद्या संयुक् संयोगो यासां तासां वो विबुधानामायुषाऽपि चिरकालेनापि स्वीयं साधुकृत्यं प्रत्युपकारं कर्तुं न पारये न शक्नोमि । कथंभूतानाम् । या भवत्यो दुर्जरा अजरा या गेहशृंखलास्ताः संवृश्च्य निशेषं छित्वा मा मामभजंस्तासाम् । मच्चित्तं तु बहुषु प्रेमयुक्ततया नैकनिष्ठम् । तस्माद्वो युष्माकमेव साधुना साधुकृत्येन तद्युष्मत्साधुकृत्यं प्रतियातु प्रतिकृतं भवतु । युष्मत्सौशील्येनैव ममानृण्यं न तु मत्कृतप्रत्युपकारेणे-

---

विचार, धर्माधर्मविचार व बांधवांचा स्नेह हे सर्व टाकिले आहेत त्या तुमची निश्चळ वृत्ति माझेठिकाणीं रहावी ह्मणून तुमचे प्रेमआलाप गुप्तरीतीनें श्रवण करणाऱ्या मी अंतर्धान केलें होतें, यास्तव हे प्रिय सख्यांनो, तुह्मी, तुमचें प्रिय करणाऱ्या मजवर दोषारोप ठेवण्यास योग्य नाहीं ॥ २१ ॥ असो, आतां अगदीं खरा प्रकार सांगतों ऐका–निष्कपटपणें माझें सेवन करणाऱ्या तुमच्या चांगल्या आचरणाचा मी आपल्या चांगल्या आचरणानें प्रत्युपकार करण्याविषयीं देवांच्या आयुष्यानेंहि समर्थ होणार नाहीं. कारण, ज्या तुह्मी तोडून टाकण्यास कठीण अशा गृहरूपी शृंखळा (बेड्या) अगदीं तोडून टाकून माझें सेवन केलें आहेत, त्या तुमच्या सत्कृत्याचा तुमच्या सुस्वभावानेंच प्रत्युपकार घडो. माझें चित्त पुष्कळ भक्तांवर प्रेमयुक्त असल्यामुळें एकनिष्ठ नाहीं, ह्मणून माझ्या हातून तुमचा प्रत्युपकार होणें अशक्य आहे ॥ २२ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधाच्या पूर्वार्धांत गोपीसांत्वननामक हा बत्तिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३२ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां ह्या तेहेतिसाव्या अध्यायामध्यें गोपींच्या मंडळामध्यें प्राप्त झालेल्या श्रीकृष्णानें, रासक्रीडा, जलक्रीडा व वनक्रीडा यांच्या योगानें त्या गोपींना रमविलें अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाले- हे राजा, याप्रमाणें भगवंताच्या मनोहर वाणी ऐकून त्याच्या करचरणादिक अवयवांच्या स्पर्शानें पूर्णमनोरथ झालेल्या त्या गोपींनीं, विरहापासून झालेल्या आपल्या तापाचा त्याग केला ॥ १ ॥ त्या यमुनेच्या वाळवंटामध्यें, हर्षयुक्त झालेल्या व आपल्या सांगण्याप्रमाणें वागणाऱ्या आणि एकीमेकींचे हात धरून उभ्या राहिलेल्या त्या स्त्रीरत्नांसहवर्तमान श्रीकृष्णानें, रासक्रीडा (नांचणाऱ्या बहुत स्त्रियांनीं युक्त अशी एक नृत्यक्रीडा) आरंभिली ॥ २ ॥ ती रासक्रीडा,- मंडळरूपानें उभ्या राहिलेल्या त्या दोन दोन गोपींच्या मध्यें एकेक स्वरूपानें प्रवेश केलेल्या, व ज्या कृष्णाला सर्वहि स्त्रिया, आपापल्याजवळ उभा राहून हा मलाच

त्यर्थः ॥ २२ ॥ इति दशमे पूर्वार्धे टीकायां द्वात्रिंशोऽध्यायः ॥ ३२ ॥ त्रयस्त्रिंशे ततो गोपीमंडलीमध्यगो हरिः ॥ प्रियास्ता रमयामास हृदिनीवनकेलिभिः ॥ १ ॥ तत्तदा अंग हे राजन् । यद्वा तस्य भगवतोऽगेन वपुषा करचरणाद्यवयवैर्वोपचिताः समृद्धा आशिषो यासां ताः ॥ १ ॥ रासक्रीडां रासो नाम बहुनर्तकीयुक्तो नृत्यविशेषस्तां क्रीडाम् । अन्योन्यमाबद्धाः संग्रथिता बाहवो यैस्तैः सह ॥ २ ॥ तत्साहित्यमभिनयेन दर्शयति । रासोत्सव इत्यक्षरचतुष्टयाधिकेन सार्धेन । तासां मंडलरूपेणाव-

श्रीशुक उवाच ॥ इत्थं भगवतो गोप्यः श्रुत्वा वाचः सुपेशलाः ॥ जहुर्विरहजं तापं तदंगोपचिताशिषः ॥ १ ॥ तत्रारभत गोविंदो रासक्रीडामनुव्रतैः ॥ स्त्रीरत्नैरन्वितः प्रीतैरन्योन्याबद्धबाहुभिः ॥ २ ॥ रासोत्सवः संप्रवृत्तो गोपीमंडलमंडितः ॥ योगेश्वरेण कृष्णेन तासां मध्ये द्वयोर्द्वयोः ॥ प्रविष्टेन गृहीतानां कंठे स्वनिकटं स्त्रियः ॥ ३ ॥ यं मन्येरन्नभस्तावद्विमानशतसंकुलम् ॥ दिवौकसां सदाराणामौत्सुक्यापहृतात्मनाम् ॥ ४ ॥ ततो दुंदुभयो नेदुर्निपेतुः पुष्पवृष्टयः ॥ जगुर्गंधर्वपतयः सस्त्रीकास्तद्यशोऽमलम् ॥ ५ ॥ वलयानां नूपुराणां किंकिणीनां च योषिताम् ॥ सप्रियाणामभूच्छब्दस्तुमुलो रासमंडले ॥ ६ ॥ तत्रातिशुशुभे ताभिर्भगवान्देवकीसुतः ॥ मध्ये मणीनां हैमानां महामरकतो यथा ॥ ७ ॥

स्थितानां द्वयोर्द्वयोर्मध्ये प्रविष्टेन तेनैव कंठे गृहीतानामुभयत आलिंगितानाम् । कथंभूतेन । यं सर्वाः स्त्रियः स्वनिकटं मामेवाश्लिष्टवानिति मन्येरंस्तेन । एतदर्थं द्वयोर्द्वयोर्मध्ये प्रविष्टेनेत्यर्थः । नन्वेकस्य कथं तथा प्रवेशः सर्वसन्निहितत्वे वा कुतः स्वैकनिकटत्वाभिमानस्तासामित्यत उक्तम् । योगेश्वरेणेति । अचिंत्यशक्तिनेत्यर्थः ॥ ३ ॥ तावत्तत्क्षणमेवौत्सुक्यव्याप्तमनसां सस्त्रीकाणां देवानां विमानशतैः संकुलं संकीर्णं नभो बभूव ॥ ४ ॥ तत्तस्य भगवतः श्रीकृष्णस्यामलं निर्मलं यशो जगुरिति ॥ ५ ॥ सप्रियाणां कृष्णसहितानाम् । तुमुलः संकीर्णः ॥ ६ ॥ महामरकतो नीलमणिरिव हैमानां मणीनां मध्ये मध्ये ताभिः स्वर्णवर्णाभिराश्लिष्टाभिः शुशुभे । गोपीदृष्ट्यभिप्रायेण वा

आलिंगन करीत आहे असें मानीत असत, अशा त्या अचिंत्यशक्ति श्रीकृष्णानें कंठाचेठिकाणीं ग्रहण केलेल्या गोपींच्या मंडळानें (घेरानें) सुशोभित अशी, जों सुरू झाली तों इतक्यांत, तो चमत्कार पाहण्याच्या उत्सुकतेनें व्याकुळचित्त झालेल्या स्त्रियांसहित देवांच्या शेंकडो विमानांनीं आकाश भरून गेलें ॥ ३ ॥ ४ ॥ त्या रासारंभीं, देवांनीं वाजविलेले दुंदुभि नाद पावूं लागले. त्यांनीं केलेल्या अनेकप्रकारच्या पुष्पांच्या बहुत पुष्पवृष्टि खालीं पडूं लागल्या व स्त्रियांसहित विश्वावसुप्रभृति गंधर्वश्रेष्ठ त्या भगवंताचें निर्मळ यश गाऊं लागले ॥ ५ ॥ याप्रमाणें बाहेरची गीतवाद्यादि संपत्ति सांगून आतां रासक्रीडेमध्येंच गीतवाद्यादिकांचा प्रकार वर्णन करितो-श्रीकृष्णासहवर्तमान नृत्य करणाऱ्या त्या गोपींच्या हातांतील कांकणांचा, पायांतील भूषणांचा व कमरपट्ट्यांना लावलेल्या घागऱ्यांचा एकच मोठा शब्द झाला ॥ ६ ॥ त्या रासमंडळाचेठिकाणीं, जशा सुव

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

र्णांच्या दोन दोन मण्यांमध्यें नीळरत्नमणि विशेष शोभतो त्याप्रमाणें सुवर्णवर्णांच्या आलिंगन केलेल्या त्या दोन दोन गोपींमध्यें श्यामवर्ण भगवान् श्रीकृष्ण, अतिशयच शोभूं लागला ॥ ७ ॥ तशाच पाय मार्गेपुढें ठेवणें, हात नाचविणें, मंदहास्ययुक्त भ्रुकुटींचें चालन करणें, कमरा लववणें, पदर व कुच हालणें, व गालांचेठिकाणीं कुंडलें वारंवार चमकणें या लक्षणांनीं युक्त, अम्लान मुखांवर घर्मबिंदु प्राप्त झालेल्या, केंसांचेठिकाणीं व कमरपट्ट्यांचेठिकाणीं दृढ ग्रंथि असलेल्या व कृष्णाचें गायन करणाऱ्या त्या कृष्णस्त्रिया (गोपी)हि जशा मेघमंडळाचेठिकाणीं विजा चमकत शोभतात तशा कृष्णाच्या योगानें शोभूं लागल्या. येथें नानामूर्ति धारण करणारा कृष्ण मेघचक्रासारखा, त्या गोपी, अनेक विजांसारख्या, घर्मबिंदु तुषारांसारखे व गायन गर्जनांसारखें जाणावें ॥ ८ ॥ त्यावेळीं नृत्य करणाऱ्या, कंठांतून नानाप्रकारचे राग

विनैव मध्यपदावृत्तिमेकवचनम् ॥ ७ ॥ स यथा ताभिः शुशुभे तथा ता अपि तेन विरेजुरित्याह । पादन्यासैरिति । भुजविधुतिभिः करचालनैर्भज्यमानैर्मध्यैश्चलद्भिः कुचैश्च पटैश्च गंडलोलैर्गंडेषु चंचलैः । स्विद्यन्मुख्यः स्विद्यंति स्वेदमुद्गिरंति मुखानि यासां ताः । कबरेषु रशनासु च ग्रंथयो दृढा यासाम् । यद्वा तेषु तासु चाग्रंथयः शिथिलग्रंथय इत्यर्थः । तत्र नानामूर्तिः कृष्णो मेघचक्रमिव तास्तु बहुविधास्तडित इव स्वेदस्तुषार इव गीतं गर्जितमिवेति यथासंभवमूह्यम् ॥ ८ ॥ नृत्यमाना नृत्यंत्यः । रक्तकंठ्यो

पादन्यासैर्भुजविधुतिभिः सस्मितैर्भ्रूविलासैर्भज्यन्मध्यैश्चलकुचपटैः कुंडलैर्गंडलोलैः ॥ स्विद्यन्मुख्यः कबररशनाग्रंथयः कृष्णवध्वो गायंत्यस्तं तडित इव ता मेघचक्रे विरेजुः ॥ ८ ॥ उच्चैर्जगुर्नृत्यमाना रक्तकंठ्यो रतिप्रियाः ॥ कृष्णाभिमर्शमुदिता यद्गीतेनेदमावृतम् ॥ ९ ॥ काचित्समं मुकुंदेन स्वरजातीरमिश्रिताः ॥ उन्निन्ये पूजिता तेन प्रीयता साधुसाध्विति ॥ तदेव ध्रुवमुन्निन्ये तस्यै मानं च बह्वदात् ॥ १० ॥ काचिद्रासपरिश्रांता पार्श्वस्थस्य गदाभृतः ॥ जग्राह बाहुना स्कंधं श्लथद्वलयमल्लिका ॥ ११ ॥ तत्रैकांसगतं बाहुं कृष्णस्योत्पलसौरभम् ॥ चंदनालिप्तमाघ्राय हृष्टरोमा चुचुंब ह ॥ १२ ॥

नानारागैरनुरंजितकंठ्यः । कृष्णस्याभिमर्शेन संस्पर्शेन मुदिताः । इदं विश्वम् ॥ ९ ॥ मुकुंदेन सह स्वरजातीः षड्जादिस्वरालापगतीः । अमिश्रिताः कृष्णोन्नीताभिरसंकीर्णाः । प्रीयमाणेन संमानिता तज्जातयुन्नयनमेव ध्रुवं ध्रुवाख्यं तालविशेषं कृत्वा उन्निन्ये उन्नीतवती ॥ १० ॥ एवं नृत्यगीतादिना श्रीकृष्णसंमानितानां तासामतिप्रीतिविलसितं वृत्तमाह । काचिदिति । श्लथंति वलयानि मल्लिकाश्च यस्याः सा ॥ ११ ॥ उत्पलस्य सौरभमिव सौरभं यस्य तं बाहुम् ॥ १२ ॥

उच्चारणाऱ्या, कृष्णाच्या स्पर्शानें आनंदित झालेल्या व कृष्णाची प्रीतिच आवडत असणाऱ्या त्या गोपी, उच्चस्वरानें असें गाऊं लागल्या कीं, त्या गायनाच्या योगानें हें जग भरून गेलें ॥ ९ ॥ कोणीएक गोपी, कृष्णाबरोबर षड्जादिस्वरांचे आलाप करीत असतां, श्रीकृष्णानें चढविलेल्या आलापांमध्यें न मिसळणारे नवेनवेच आलाप घेऊं लागली तेव्हां तें ऐकून कृष्णानें ' वाहवा, वाहवा ' असें म्हणून तिचा सत्कार केला असतां, तिनें तेंच आलाप घेणें, ध्रुवनामक तालावर उंच चढविलें, तेव्हांतर तिला कृष्णानें मोठाच मान दिला ॥ १० ॥ याप्रमाणें नृत्यगीतादिकेंकरून कृष्णापासून मान मिळालेल्या त्या गोपींचें अतिप्रीतीनें विलसित असें वर्तन झालें कीं,– कोणीएक अतिसुकुमार गोपीला रासक्रीडेच्या योगानें श्रम होऊन कृशपणा प्राप्त झाला असतां, तिच्या हातांतून कांकणें व केंसांच्या बुचड्यांतून मोगरीचीं फुलें गळूं लागलीं, तेव्हां तिनें आपल्या पार्श्वबाजूला असणाऱ्या श्रीकृष्णाच्या खांद्याला बाहूनें घट्ट धरिलें ॥ ११ ॥ त्या गोपींमध्यें एका गोपीनें तर–आपल्या खांद्यावर ठेवलेल्या, कमलासारखा सुगंध येत अस-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लेल्या व चंदनाची उटी लावलेल्या कृष्णाच्या बाहूला हुंगून अंगावर रोमाच धारण केले आणि त्या बाहूचें चुंबन करूं लागली ॥ १२ ॥ त्यावेळीं नृत्याच्या योगानें हालत असलेल्या कुंडलांच्या कांतीनें शोभणारा आपला गाल कृष्णाच्या गालाशीं मिळविणाऱ्या एका दुसऱ्या गोपीला, श्रीकृष्णानें, आपण चर्वण केलेलें तांबूल दिलें ॥ १३ ॥ जिच्या पायांतील पैंजण व कमरपट्ट्याच्या घागऱ्या शब्द करित आहेत अशा नृत्य व गायन करणाऱ्या एका गोपीनें, आपणास श्रम झाले असतां, त्या श्रमांची निवृत्ति करून सुख देणारें असें पार्श्वबाजूला असणाऱ्या श्रीकृष्णाचें हस्तकमल आपल्या स्तनावर धारण केलें ॥ १४ ॥ हे राजा, याप्रमाणें लक्ष्मीचा प्रियपति अशा श्रीकृष्णाला पति पावोन, त्याच्या बाहूंनीं कंठांचेठिकाणीं आलिंगन केलेल्या त्या सर्व गोपींनीं त्याचेंच गायन करीत करीत यथेष्ट क्रीडा केली ॥ १५ ॥ त्यावेळीं वाद्यें वाजविणारे

नाट्येन नृत्येन विक्षिप्तयोश्चंचलयोः कुंडलयोस्त्विषेण त्विषा मंडितं गंडं कपोलं तथाभूते स्वगंडे संदधत्याः संयोजयंत्याः ॥ १३ ॥ कूजती नूपुरे मेखला च यस्याः सा ॥ १४ ॥ एवमन्या अपि गोप्यो यथायथं नानाविभ्रमैर्विजह्रुरित्याह । गोप्य इति ॥ १५ ॥ तत्र वादकेषु गायकेषु गंधर्वकिन्नरादिषु रसावेशेन मुह्यत्सु नृत्यत्सु चान्यामेव वाद्यादिसंपत्तिं दर्शयत्रासंसंभ्रममाह । कर्णोत्पलेति । कर्णोत्पलैश्चालकविटंकैरलकालंकृतैः कपोलैश्च घर्मैश्च वक्त्रेषु श्रीः शोभा यासां ताः । घोषाः किंकिण्यः । वलयनूपुरघोषैर्वादित्रैः ।

कस्याश्चिन्नाट्यविक्षिप्तकुंडलत्विषमंडितम् ॥ गंडं गंडे संदधत्या अदात्तांबूलचर्वितम् ॥ १३ ॥ नृत्यंती गायती काचित्कूजन्नूपुरमेखला ॥ पार्श्वस्थाऽच्युतहस्ताब्जं श्रांताऽधात्स्तनयोः शिवम् ॥ १४ ॥ गोप्यो लब्ध्वाऽच्युतं कांतं श्रिय एकांतवल्लभम् ॥ गृहीतकंठ्यस्तद्दोर्भ्यां गायंत्यस्तं विजह्रिरे ॥ १५ ॥ कर्णोत्पलालकविटंककपोलघर्मवक्त्रश्रियो वलयनूपुरघोषवाद्यैः ॥ गोप्यः समं भगवता ननृतुः स्वकेशस्रस्तस्रजो भ्रमरगायकरासगोष्ठ्याम् ॥ १६ ॥ एवं परिष्वंगकराभिमर्शस्निग्धेक्षणोद्दामविलासहासैः ॥ रेमे रमेशो व्रजसुंदरीभिर्यथाऽर्भकः स्वप्रतिबिंबविभ्रमः ॥ १७ ॥

स्वकेशेभ्यः स्रस्ताः स्रजो यासां ताः । एतेन तालगतिसंतुष्टाः केशाः सशिरःकंपं पादेषु पुष्पवृष्टिमिवाकुर्वन्नित्युत्प्रेक्षितम् । भगवता सह ननृतुः । क । भ्रमरा एव गायका यस्यां रासभायाम् ॥ १६ ॥ यथा गोप्यो नानाविभ्रमैर्भगवता सह विजह्रुरेवं भगवानपि स्वविलासैस्ताभिः सह रेम इत्याह । एवमिति । तद्विलासानभिभूतस्यैव रतौ दृष्टांतः । यथाऽर्भक इति । स्वप्रतिबिंबैर्विभ्रमः क्रीडा यस्य स इव । अनेनैतद्दर्शितम् । स्वीयमेव सर्वकलाकौशलं सौगंध्यलावण्यमाधुर्यादि च तासु संचार्य ताभिः सह रेमे यथाऽर्भकः स्वप्रतिबिंबैरिति ॥ १७ ॥

व गायन करणारे गंधर्वकिंनरादिक रसावेशानें मोह पावून ते स्वतांच नाचूं लागले असतां, दुसरीच वाद्यादिसंपत्ति दर्शवीत रासक्रीडेचा संभ्रम वर्णन करितो कानावर खोवलेलीं कमळें व कुरळ केंस यांच्या योगानें शोभणाऱ्या गालांनीं व घामाच्या बिंदूनीं, ज्या गोपींच्या मुखांवर शोभा आली आहे व ज्यांच्या केसांतून फुलांच्या माळा खालीं पडत आहेत, त्या गोपी, हातांतील कांकणें व पायांतील नूपुरें ह्याच वाद्यांच्या गजरासहवर्तमान, भ्रमर हेच जेथें गायक आहेत अशा रासमभेमध्यें भगवंताबरोबर नृत्य करूं लागल्या ॥ १६ ॥ ज्याशी गोपींनीं, अनेक विलासांनीं भगवंतासहवर्तमान क्रीडा केली त्याप्रमाणेंच श्रीकृष्णानेंहि, त्या गोपींबरोबर—जशी लहानबालकानें, आरशांत पडलेल्या आपल्या प्रतिबिंबांबरोबर क्रीडा करावी त्याप्रमाणें आलिंगन, करणें, हातानें स्तन, व मांड्या इत्यादिकांना स्पर्श करणें, सप्रेम अवलोकन करणें, चुंबनादिक

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विलास करणें व हास्य करणें यांच्या योगेंकरून क्रीडा केली ॥ १७ ॥ हे राजा, त्यावेळीं, त्या भगवंताच्या अंगसंगानें प्राप्त झालेल्या मोठ्या हर्षानें, ज्यांचीं इंद्रियें पर-
वश झालीं आहेत व ज्यांच्या अंगावरील माळा व भूषणें गळून खालीं पडलीं आहेत अशा त्या गोकुळांतील स्त्रिया, बंध सुटून अस्ताव्यस्त झालेल्या आपल्या केसांना, ने-
सलेल्या वस्त्रांना व स्तनावरील कंचुक्यांना, सहजगत्या पूर्वीप्रमाणें व्यवस्थितपणें धारण करण्यास समर्थ झाल्या नाहींत ॥ १८ ॥ केवळ त्या गोपीच व्याकुलेंद्रिय
झाल्या असें नाहीं, तर अशाप्रकारची कृष्णाची क्रीडा पाहून कामानें पीडित झालेल्या देवांच्या स्त्रियाहि मोहित (मूर्छित) झाल्या. तसाच शुक्र मंगळवगैरे ग्रह-
गणासहवर्तमान चंद्रहि तें पाहून आश्चर्ययुक्त झाला. यावरून आश्चर्य पावलेल्या चंद्रानें आपली गति विसरली असतां, त्याच्या मागचे सर्वहि ग्रह त्यात्याठिकाणींच रा-

तास्तु भगवद्विलासैराकुला बभूवुरित्याह । तदंगेति । तस्यांगसंगेन प्रकृष्टा मुत्प्रीतिस्तया आकुलान्यवशानींद्रियाणि यासां ताः । विश्लथबंधान्केशादीनंजसा प्रतिव्योढुं यथा-
पूर्वं धर्तुं नालं न समर्था बभूवुः । विस्रस्ता माला आभरणानि च यासां ताः ॥ १८ ॥ न केवलं ता एवाकुलेंद्रियाः किंतु देव्योऽपीत्याह । कृष्णविक्रीडितमिति । किंच श-
शांकश्चेति । अनेनैतत्सूचितम् । शशांकेन विस्मितेन गतौ विस्मृतायां ततः प्राक्तनाः सर्वेऽपि ग्रहास्तत्रतत्रैव तस्थुस्ततश्चातिदीर्घासु रात्रिषु यथासुखं विजहुरिति ॥ १९ ॥

**तदंगसंगप्रमुदाकुलेंद्रियाः केशान्दुकूलं कुचपट्टिकां वा ॥ नांजः प्रतिव्योढुमलं व्रजस्त्रियो विस्रस्तमालाभरणाः कुरूद्वह ॥ १८ ॥ कृष्ण-
विक्रीडितं वीक्ष्य मुमुहुः खेचरस्त्रियः ॥ कामार्दिताः शशांकश्च सगणो विस्मितोऽभवत् ॥ १९ ॥ कृत्वा तावंतमात्मानं यावतीर्गोपयोषि-
तः ॥ रेमे स भगवांस्ताभिरात्मारामोऽपि लीलया ॥ २० ॥ तासामतिविहारेण श्रांतानां वदनानि सः ॥ प्रामृजत्करुणः प्रेम्णा शंत-
मेनांग पाणिना ॥ २१ ॥ गोप्यः स्फुरत्पुरटकुंडलकुंतलत्विड्गंडश्रिया सुधितहासनिरीक्षणेन ॥ मानं दधत्य ऋषभस्य जगुः कृतानि
पुण्यानि तत्कररुहस्पर्शप्रमोदाः ॥ २२ ॥**

किंच कृत्वेति । अयं भावः । कात्यायनि महामाये महायोगिन्यधीश्वरि ॥ नंदगोपसुतं देवि पतिं मे कुरु ते नम इति प्रत्येकं ताभिः प्रार्थनाद्भगवताऽपि यातावला व्रजं सिद्धा
मयेमा रंस्यथ क्षपा इति तथैव प्रतिश्रुतत्वात्तावंतमात्मानं कृत्वा रेमे इति । यावतीर्यावत्यः ॥ २० ॥ कृपातिशयमाह । तासामिति ॥ २१ ॥ ततोऽतिहृष्टानां गोपीनां
चरितमाह । गोप्य इति । स्फुरतां स्वर्णकुंडलानां कुंतलानां च त्विषा गंडेषु या श्रीस्तया सुधितेनामृतायितेन हाससहितेन निरीक्षणेन च ऋषभस्य पत्युः कृष्णस्य मानं
दधत्यः पूजां कुर्वत्यस्तत्कर्माणि जगुः । तस्य कररुहैर्नखैः स्पर्शेन प्रमोदो यासां ताः ॥ २२ ॥

हिले. नंतर फार मोठ्या झालेल्या रात्रींमध्यें गोपींनीं सुखानें क्रीडा केली असें सूचित होतें ॥ १९ ॥ आणि त्या भगवान् श्रीकृष्णानें, आपण स्वस्वरूपीं रममाण
असूनहि पूर्वीं कात्यायनीव्रताच्या वेळीं गोपकन्यांना सांगितलें होतें त्याप्रमाणें सर्वांचे मनोरथ पूर्ण होण्याकरितां, जितक्या गोपस्त्रिया होत्या तितकीं आपलीं स्वरूपें लीलेनें ॥१०५॥
धारण करून, त्यांच्याबरोबर क्रीडा केली ॥ २० ॥ आतां कृष्णाचा कृपातिशय सांगतो- हे राजा, अतिविहाराच्या योगानें श्रम पावलेल्या त्या गोपींचीं घर्मयुक्त
झालेलीं मुखें दयाळु अशा त्या, श्रीकृष्णानें, निरतिशय सुखकारक आपल्या हस्तानें प्रेमानें पुसिलीं ॥ २१ ॥ नंतर कृष्णाच्या नखस्पर्शांनीं अतिहर्ष पावलेल्या त्या गोपी,
झळकणाऱ्या सुवर्णकुंडलांची व कुरळ केसांची कांति गालांवर पडून प्राप्त झालेल्या विशेष शोभेनें व अमृतासारख्या हास्ययुक्त अवलोकनानें त्या कृष्णपतीचा स-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

न्मान करीत होत्सात्या त्याच्या पवित्रकर्मांचें गायन करूं लागल्या ॥ २२ ॥ आतां त्या कृष्णाची गोपींसहवर्तमान जलक्रीडा सांगतो– नंतर त्या गोपींनीं युक्त असा तो श्रीकृष्ण, त्या गोपींच्या अंगसंगानें संमर्दित झालेल्या व त्यांचें कुचसंबंधी केंशर लागून रंगलेल्या आपल्या गळ्यांतील माळेच्या संबंधानें, गंधर्वपतींसारखें गायन (गुंजारव) करीत येणाऱ्या भ्रमरांनीं अनुगम्यमान होत्साता, विहारानें प्राप्त झालेला श्रम घालविण्याकरितां 'जसा नदीच्या तीराशीं टक्कर खेळून तें फोडून टाकणारा एखादा गजेंद्र, झालेले श्रम घालविण्यासाठीं हत्तिणींसहवर्तमान जलामध्यें प्रविष्ट होतो त्याप्रमाणें उदकामध्यें प्रविष्ट झाला ॥ २३ ॥ हे राजा, हास्य करणाऱ्या तरुणी स्त्रियांनीं चोंहोंकडून अतिशय पाणी उडविलेला, प्रेमानें पाहिलेला व पुष्पवृष्टि करणाऱ्या देवांनीं स्तुति केलेला तो भगवान् श्रीकृष्ण, स्वतां आत्मा-

---

अथ जलकेलिमाह । ताभिरिति । तासामंगसंगेन घृष्टा संमर्दिता या स्रक् तस्या अतएव तासां कुचकुंकुमेन रंजितायाः संबंधिभिर्गंधर्वपालिभिर्गंधर्वपा गंधर्वपतय इव गायंतो येऽलयस्तैरनुद्रुतोऽनुगतः स कृष्णो वाः उदकमाविशत् । भिन्नसेतुर्विदारितवप्रः । स्वयं चातिक्रांतलोकवेदमर्यादः ॥ २३ ॥ स्वरतिरात्मारामोऽपि । अत्र गोपीमंडलेंऽभसि वा ॥ २४ ॥ स्थलजलक्रीडे दर्शिते वनक्रीडां दर्शयति । ततश्चेति । यमुनाया उपवने जलस्थलप्रसूनानां गंधो यस्मिंस्तेनानिलेन जुष्टानि दिशां तटान्यंता यस्मिन् । यद्वा दिशश्च

ताभिर्युतः श्रममपोहितुमंगसंगघृष्टस्रजः स कुचकुंकुमरंजितायाः ॥ गंधर्वपालिभिरनुद्रुत आविशद्वाः श्रांतो गजीभिरिभराडिव भिन्नसेतुः ॥ २३ ॥ सोंऽभस्यलं युवतिभिः परिषिच्यमानः प्रेम्णेक्षितः प्रहसतीभिरितस्ततोंऽग ॥ वैमानिकैः कुसुमवर्षिभिरिड्यमानो रेमे स्वयं स्वरतिरत्र गजेंद्रलीलः ॥ २४ ॥ ततश्च कृष्णोपवने जलस्थलप्रसूनगंधानिलजुष्टदिक्तटे ॥ चचार भृंगप्रमदागणावृतो यथा मदच्युद्द्विरदः करेणुभिः ॥ २५ ॥ एवं शशांकांशुविराजिता निशाः स सत्यकामोऽनुरताबलागणः ॥ सिषेव आत्मन्यवरुद्धसौरतः सर्वाः शरत्काव्यकथारसाश्रयाः ॥ २६ ॥ राजोवाच ॥ संस्थापनाय धर्मस्य प्रशमायेतरस्य च ॥ अवतीर्णो हि भगवानंशेन जगदीश्वरः ॥ २७ ॥

तटं स्थलं च यस्मिन्नुपवने । भृंगाणां प्रमदानां च गणैरावृतः ॥ २५ ॥ रासक्रीडां निगमयति । एवमिति । स कृष्णः सत्यसंकल्पोऽनुरागिस्त्रीकदंबस्थ एवं सर्वा निशाः सेवितवान् । शरत्काव्यकथारसाश्रयाः शरदि भवाः काव्येषु कथ्यमाना ये रसास्तेषामाश्रयभूता निशाः । यद्वा निशा इति द्वितीयाऽत्यंतसंयोगे । शृंगाररसाश्रयाः शरदि प्रसिद्धाः काव्येषु याः कथास्ताः सिषेव इति । एवमप्यात्मन्येवावरुद्धः सौरतश्चरमधातुर्नतु स्खलितो यस्येति कामजयोक्तिः ॥ २६ ॥ २७ ॥

राम असूनहि गजेंद्रासारखी लीला करीत होत्साता उदकामध्यें स्त्रियांबरोबर रममाण झाला ॥ २४ ॥ आतां वनक्रीडा दाखवितो– नंतर त्या कृष्णानें, पाण्यांतील व स्थळावरील पुष्पांचा सुगंध वाहणाऱ्या वायूनें जेथील सर्वहि दिक्प्रदेश व्याप्त केले आहेत अशा यमुनेच्या उपवनामध्यें भ्रमरांच्या व गोपींच्या समुदायांनीं परिवेष्टित होऊन, जसा मदस्रावी गजेंद्रानें हत्तिणींच्या समुदायांनीं परिवेष्टित होऊन क्रीडा करीत वनांत संचार करावा त्याप्रमाणें क्रीडा करीत संचार केला ॥ २५ ॥ याप्रमाणें प्रेम करणाऱ्या स्त्रियांच्या समुदायांत राहणारा सत्यसंकल्प व आपलेठिकाणींच वीर्याचा निरोध करून ठेवणारा (अस्खलितवीर्य) अशा त्या श्रीकृष्णानें, चंद्राच्या किरणांनीं प्रकाशयुक्त झालेल्या व शरदृतूंमध्यें होणारे असून काव्यांत सांगितलेले जे रस त्यांना आश्रयभूत असलेल्या त्या सर्वहि रात्रींचें सेवन केलें म्हणजे त्या सर्व रात्रींमध्यें याप्रमाणेंच क्रीडा केली ॥ २६ ॥ राजा म्हणाला– हे शुकाचार्य, धर्माच्या संस्थापनेकरितां व अधर्माच्या निवृत्तीकरितांच आपल्या अंशरूप बळरामासहवर्तमान

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तो भगवान् जगदीश्वर अवतीर्ण झाला. असें असून– ॥ २७ ॥ हे ब्रह्मनिष्ठा, उपदेशानें धर्ममर्यादांची दुसऱ्यांकडून प्रवृत्ति करणारा, स्वतां आचरण करून दाखविणारा व विरोध्यांच्या निरासानें सर्वप्रकारें धर्माचें रक्षण करणारा अशा त्या कृष्णानेंच परस्त्रीसंभोगरूप हें मोठें धर्मविरुद्ध कर्म कसें केलें ?॥ २८ ॥ पूर्ण मनोरथांना हा अधर्म नाहीं असें ह्मणावें तर पूर्णकाम आहेत तेसुद्धां निंद्यकर्म करीतच नाहींत असें असतां, पूर्णमनोरथ अशा श्रीकृष्णानें कोणत्या अभिप्रायानें हें परस्त्रीसंभोगात्मक निंद्यकर्म आचरण केलें ? हे आचारसंपन्ना, हा आमचा संशय तूं छेदन कर ॥२९॥ परमेश्वराचेठिकाणीं याचा दोष नाहीं हें सिद्ध करण्याकरितां सामान्यपणें थोर पुरुषांचें वर्तन सांगत श्रीशुकाचार्य ह्मणाला कीं,–हे राजा, ब्रह्मदेव, इंद्र, चंद्र, विश्वामित्र इत्यादिकांचेठिकाणींहि धर्ममर्यादांचें उल्लंघन व परस्त्रीसेवनाविषयीं हटानें प्रवृत्त झाल्याचें साहसहि दिसून येतें परंतु तें कर्म तेजस्वी पुरुषांना ‘ जसें विष्ठादिक सर्व अमंगल पदार्थ जाळणाऱ्याहि अग्नीला तें कर्म मुळींच दोष लावण्यास समर्थ होत नाहीं त्याप्रमाणें ’ पाप लावण्यास

प्रतीपं प्रतिकूलमधर्ममित्यर्थः । आचरत्कृतवान् । न चेदमधर्ममात्रं कलंजभक्षणादिवत् किंतु महासाहसमित्याह । परदाराभिमर्शनमिति । २८ ॥ आप्तकामस्य नायमधर्म इति चेद्य-द्येवं कामाभावान्निंदितं केनाभिप्रायेण कृतवानिति पृच्छति । आप्तकाम इति ॥ २९ ॥ परमेश्वरे कैमुतिकन्यायेन परिहर्तुं सामान्यतो महतां वृत्तमाह । धर्मव्यतिक्रम इति । साहसं च दृष्टं प्रजापतींद्रसोमविश्वामित्रादीनां तच्च तेषां तेजस्विनां दोषाय न भवतीति । ३० ॥ तर्हि यद्यदाचरति श्रेष्ठ इति न्यायेनान्योऽपि कुर्यादित्याशंक्याह । नैतदिति ।

स कथं धर्मसेतूनां वक्ता कर्ताऽभिरक्षिता ॥ प्रतीपमाचरद्ब्रह्मन्परदाराभिमर्शनम् ॥ २८ ॥ आप्तकामो यदुपतिः कृतवान्वै जुगुप्सि-तम् ॥ किमभिप्राय एतं नः संशयं छिंधि सुव्रत ॥ २९ ॥ श्रीशुक उवाच ॥ धर्मव्यतिक्रमो दृष्ट ईश्वराणां च साहसम् ॥ तेजीय-सां न दोषाय वह्नेः सर्वभुजो यथा ॥ ३० ॥ नैतत्समाचरेज्जातु मनसाऽपि ह्यनीश्वरः ॥ विनश्यत्याचरन्मौढ्याद्यथाऽरुद्रोऽब्धिजं वि-षम् ॥ ३१ ॥ ईश्वराणां वचः सत्यं तथैवाचरितं क्वचित् ॥ तेषां यत्स्ववचोयुक्तं बुद्धिमांस्तत्समाचरेत् ॥ ३२ ॥ कुशलाचरितेनैषामि-ह स्वार्थो न विद्यते ॥ विपर्ययेण वाऽनर्थो निरहंकारिणां प्रभो ॥ ३३ ॥

अनीश्वरो देहादिपरतंत्रः । यथा रुद्रव्यतिरिक्तो विषमाचरन् भक्षयन् ॥ ३१ ॥ कथं तर्हि सदाचारस्य प्रामाण्यमत आह । ईश्वराणामिति । तेषां वचः सत्यमतस्तदुक्तमाचरेदेव आचरितं तु क्वचित्सत्यमतः स्ववचोयुक्तं तेषां वचसा यद्युक्तमविरुद्धं तत्तदेवाचरेत् ॥ ३२ ॥ ननु तर्हि तेऽपि किमेवं साहसमाचरंति तत्राह । कुशलेति । प्रारब्धकर्मक्षपण-मात्रमेव तेषां कृत्यं नान्यदित्यर्थः ॥ ३३ ॥

समर्थ होत नाहीं ॥ ३० ॥ तर मग थोरांचें पाहून दुसरेहि तसेंच करतील असें ह्मणशील तर– देहादिपरतंत्र असल्यामुळें तेजोहीन असलेल्या पुरुषानें कधींहि हें शास्त्रविरुद्ध कर्म मनानेंहि आचरण करूं नये. जर मूर्खपणामुळें आचरण करील तर तो ‘ जसा रुद्राखेरीज दुसऱ्या पुरुषानें समुद्रापासून झालेलें कालकूट विष भक्षण केलें असतां नाश पावतो त्याप्रमाणें ’ नाश पावेल ॥ ३१ ॥ तर मग सदाचाराचें प्रमाण कसें ? असें ह्मणशील तर– ज्ञानवैराग्यादिकांच्या वेगानें संपन्न झालेल्या तेजस्वी पुरुषांचें आज्ञारूप भाषण सत्य आहे, ह्मणून तें त्यांनीं जसें केलें असेल तसेंच आचरण करावें. आणि त्यांचें आचरण केव्हांतरी सत्य असतें ह्मणून बुद्धिमान् पुरुषानें त्यांचें आचरण, त्यांच्या भाषणांशीं जें जुळत असेल तेवढेंमात्र आचरण करावें ॥ ३२ ॥ आतां ते तरी, काय ह्मणून असें साहस कर्म करितात, असें ह्मणशील तर– हे समर्था राजा, त्या निरहंकारी पुरुषांना धर्मानुष्ठानानें या लोकीं किंवा परलोकीं कांहीं फळ किंवा सुख मिळवावयाचें नाहीं आणि अधर्मानुष्ठानानें अनर्थ किंवा ॥१०६॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दुःखहि प्राप्त होणारें नाहीं. तर त्यांचें कृत्य केवळ प्रारब्धकर्मांचा क्षय होण्यापुरतेंच असतें ॥ ३३ ॥ ही तर ईश्वराखेरीज इतर ज्ञानीपुरुषांची गोष्ट झाली, यावरून नियमन करण्यास (वागविण्यास) योग्य अशा तिर्यग्योनि, मनुष्य, देव इत्यादिक सर्वप्राण्यांना वागविणाऱ्या श्रीकृष्णाला धर्माचरणानें पुण्याचा व अधर्माचरणानें पापाचा संबंध नाहीं हें काय सांगितलें पाहिजे ?॥३४॥ ज्याच्या चरणकमलसंबंधी परमांची सेवा करून तृप्त झालेले भगवद्भक्त, तसेच ज्याच्या ध्यानरूप योगाच्या सामर्थ्यानें सर्व कर्मबंध निवृत्त झालेले योगी व ज्याचें ऐक्यरूप चिंतन करणारे ज्ञानीहि कोणत्याच कर्मानें बंध न पावतां यथेच्छपणें संचार करितात, त्या आपल्या इच्छेनें कृष्णावतार धारण करणाऱ्या भगवंताला विरुद्ध आचरणानें बंध कोठून होणार ! ! ॥ ३५ ॥ याप्रमाणें गोपींना परदारत्व स्वीकारून उत्तर सांगितलें. आतां सर्वांतर्यामी भगवंताची ही परदारसेवा मुळींच नाहीं, असें सांगतो– जो गोपींच्या, त्यांच्या पतींच्या व सर्वहि प्राण्यांच्या अंतरीं बुद्ध्यादिकांच्या साक्षित्वेंकरून संचार

प्रस्तुतमाह । किमुतेति । कुशलाकुशलान्वयो न विद्यत इति किं पुनर्वक्तव्यमित्यर्थः ॥ ३४ ॥ एतदेव स्फुटीकरोति । यस्य पादपंकजपरागस्य निषेवणेन तृप्ताः । यद्वा । यस्य पादपंकजपरागे निषेवा येषां ते च ते तृप्ताश्चेति भक्ता इत्यर्थः । तथा ज्ञानिनश्च ननह्यमाना बंधनमप्राप्नुवंतः ॥ ३५ ॥ परदारत्वं गोपीनामंगीकृत्य परिहृतमिदानीं भगवतः सर्वां

किमुताखिलसत्वानां तिर्यङ्मर्त्यदिवौकसाम् ॥ ईशितुश्चेशितव्यानां कुशलाकुशलान्वयः ॥ ३४ ॥ यत्पादपंकजपरागनिषेवतृप्ता यो-गप्रभावविधुताखिलकर्मबंधाः ॥ स्वैरं चरंति मुनयोऽपि ननह्यमानास्तस्येच्छयात्तवपुषः कुत एव बंधः ॥ ३५ ॥ गोपीनां तत्पतीनां च सर्वेषामेव देहिनाम् ॥ योंऽतश्चरति सोऽध्यक्षः क्रीडनेनेह देहभाक् ॥ ३६ ॥ अनुग्रहाय भूतानां मानुषं देहमास्थितः ॥ भजते तादृशीः क्रीडा याः श्रुत्वा तत्परो भवेत् ॥ ३७ ॥ नासूयन्खलु कृष्णाय मोहितातस्य मायया ॥ मन्यमानाः स्वपार्श्वस्थान्स्वान्स्वा-न्दारान्व्रजौकसः ॥ ३८ ॥ ब्रह्मरात्र उपावृत्ते वासुदेवानुमोदिताः ॥ अनिच्छंत्यो ययुर्गोप्यः स्वगृहान्भगवत्प्रियाः ॥ ३९ ॥

तर्यामिणः परदारसेवा नाम न काचिदित्याह । गोपीनामिति । योंऽतश्चरत्यध्यक्षो बुद्ध्यादिसाक्षी स एव क्रीडनेन देहभाङ्नत्वस्मदादितुल्यो येन दोषः स्यादिति ॥ ३६ ॥ नन्वेवं चेदाप्तकामस्य निंदिते कुतः प्रवृत्तिरित्यत आह । अनुग्रहायेति । शृंगाररसाकृष्टचेतसोऽतिबहिर्मुखानपि स्वपरान्कर्तुमिति भावः ॥ ३७ ॥ नन्वन्येऽपि भिन्नाचाराः स्वचे-ष्टितमेवमेवेति वदंति तत्राह । नासूयन्निति । एवंभूतैश्वर्याभावे तथा कुर्वंतः पापा ज्ञेया इति भावः ॥ ३८ ॥ ब्रह्मरात्रे ब्राह्मे मुहूर्ते उपावृत्ते प्राप्ते ॥ ३९ ॥

करितो तोच भगवान् लीलेच्या योगानें येथें देहधारी झाला आहे. ज्याला देहाच्या योगानें दोष लागेल असा आह्मांतुह्मांसारखा देहधारी तो नव्हे ॥ ३६ ॥ तर मग त्या पूर्णकाम भगवंताची निंद्यकर्माचेठिकाणीं प्रवृत्ति कां झाली ? असें ह्मणशील तर– पूर्णकाम अशाहि भगवंतानें, प्राणिमात्रांवर अनुग्रह करण्याकरितां मनुष्यदेहाचा स्वीकार करून, अशा क्रीडा केल्या कीं, ज्यांचें श्रवण करून शृंगाररसानें आकृष्टचित्त असे अतिबहिर्मुख असलेलेहि लोक तत्पर होतील ॥ ३७ ॥ आतां दुसरेहि आचारभ्रष्ट कोणी पुरुष आमचें आचरण असेंच आहे असें ह्मणतील तर– गोकुळांत राहणाऱ्या गोपींच्या पतींनीं श्रीकृष्णाची मुळींच निंदा केली नाहीं. कारण, ते त्याच्या मायेनें मोहित होऊन आपापल्या स्त्रिया आपापल्या जवळच आहेत असें मानीत होते. अशाप्रकारचें ऐश्वर्य नसतां उगीच कृष्णासारखा परदारसंभोग करणारे पुरुष पापी होत असें जाणावें ॥ ३८ ॥ असो. ब्राह्ममुहूर्त (पहांटेची वेळ) प्राप्त झाली असतां कृष्णानें घरीं ज ण्यास अनुमोदन दिलेल्या त्या भगवत्प्रिया गोपी, घरीं जाण्याची इच्छा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नसतांहि मोठ्या कष्टानें आपापल्या घरीं निघून गेल्या ॥ ३९ ॥ हे राजा, जो श्रद्धायुक्त पुरुष, गोकुलसंबंधीं स्त्रियांसहवर्तमान कृष्णाच्या ह्या क्रीडेचें अनुक्रमानें श्रवण करील किंवा पठण करील तो, त्या भगवान् श्रीकृष्णाचेठिकाणीं उत्कृष्ट भक्ति पावोन थोड्याच काळामध्यें जितेंद्रिय होत्साता हृदयामध्यें राहून रोगासारखा अनर्थ करणाऱ्या कामाचा अगदीं निरास करील ॥ ४० ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील पूर्वार्धांत रासक्रीडानिरूपणनामक हा तेत्तिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३३ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या चवतिसाव्या अध्यायामध्यें, श्रीकृष्णानें, अजगरानें गिळिलेल्या नंदास सोडविलें आणि त्या अजगररूपी सुदर्शननामक विद्याधरासहि आंगिरस ऋषींच्या शापापासून मुक्त केलें तसाच शंखचूडनामक यक्षाचा वध केला, ही कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, एकेवेळीं महादेवाच्या यात्रेस जाण्याविषयीं मनांत कौतुक उत्पन्न झालेले नंदादिक गोपाळ, बैल जोडलेल्या गाड्यांवर बसून मथुरे-

---

भगवतः कामविजयरूपरासक्रीडाश्रवणादेः कामविजयमेव फलमाह । विक्रीडितमिति । अचिरेण धीरः सन्हृद्रोगं काममाशु अपहिनोति परित्यजतीति ॥ ४० ॥ सेयं श्रीपरमानंदसेवि श्रीधरनिर्मिता ॥ श्रीभागवतभावार्थदीपिका दशमाश्रया ॥ १ ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधे पूर्वार्धे टीकायां त्रयस्त्रिंशोऽध्यायः ॥ ३३ ॥ ॥ चतुस्त्रिंशेऽहिना ग्रस्तं

विक्रीडितं व्रजवधूभिरिदं च विष्णोः श्रद्धान्वितोऽनुश्रृणुयादथ वर्णयेद्यः ॥ भक्तिं परां भगवति प्रतिलभ्य कामं हृद्रोगमाश्वपहिनोत्यचिरेण धीरः ॥ ४० ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे रासक्रीडायां त्रयस्त्रिंशोऽध्यायः ॥ ३३ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ एकदा देवयात्रायां गोपाला जातकौतुकाः ॥ अनोभिरनडुद्युक्तैः प्रययुस्तेंऽबिकावनम् ॥ १ ॥ तत्र स्नात्वा सरस्वत्यां देवं पशुपतिं विभुम् ॥ आनर्चुरर्हणैर्भक्त्या देवीं च नृप तेंऽबिकाम् ॥ २ ॥ गावो हिरण्यं वासांसि मधु मध्वन्नमादृताः ॥ ब्राह्मणेभ्यो ददुः सर्वे देवो नः प्रीयतामिति ॥ ३ ॥ ऊषुः सरस्वतीतीरे जलं प्राश्य धृतव्रताः ॥ रजनीं तां महाभागा नंदसुनंदकादयः ॥ ४ ॥ कश्चिन्महानहिस्तस्मिन्विपिनेऽतिबुभुक्षितः ॥ यदृच्छयाऽऽगतो नंदं शयानमुरगोऽग्रसीत् ॥ ५ ॥ स चुक्रोशाहिना ग्रस्तः कृष्ण कृष्ण महानयम् ॥ सर्पो मां ग्रसते तात प्रपन्नं परिमोचय ॥ ६ ॥

नंदं हरिरमूमुचत् ॥ विद्याध्रं चांगिरःशापाच्छंखचूडं तथावधीत् ॥ १ ॥ रासापदेशतः कामं किंकरीकृत्य कामतः ॥ अनुगृह्णन्वशं निन्ये तथा विद्याधराधिपम् ॥ २ ॥ तदेवं कामानुग्रहमुखेन कामजयं प्रतिपाद्य तथैव विद्याधरजयं प्रतिपादयितुं तत्प्रसंगं दर्शयति । एकदेति ॥ १ ॥ २ ॥ गावो गाः । मधु मधुरम् । मध्वन्नं मधुना सहितमन्नम् ॥ ३ ॥ जलमात्रं प्राश्योपोषितास्तां निशां तत्र ऊषुर्न्यवसन् ॥ ४ ॥ महानहिरजगरः । उरगः उरसा गच्छन्नित्यलक्षिततत्वमुक्तम् । अग्रसीज्जग्रास ॥ ५ ॥ ६ ॥

च्या पश्चिमेस सरस्वतीनदीच्या कांठीं असलेल्या अंबिकावनामध्यें निघून गेले ॥ १ ॥ हे राजा, तेथें त्यांनीं सरस्वतीनदीमध्यें स्नान करून गंधपुष्पादिक पूजासाधनांनीं भक्तमनोरथपूरक अशा रुद्रदेवाची व अंबिकादेवीची भक्तिपुरःसर पूजा केली ॥ २ ॥ आणि तो महादेव आपल्यावर संतुष्ट व्हावा ह्मणून त्या सर्वगोपांनीं, आदरपूर्वक गाई, सुवर्ण, वस्त्रें व मधुसहित मधुर अन्नें ब्राह्मणांस अर्पण केलीं ॥ ३ ॥ नंतर ते महाभाग्यशाली नंदसुनंदकादिक गोप, केवळ उदकाच्या प्राशनानें उपोषण करून ब्रह्मचर्यादि नियम धारण करीत होत्साते त्या रात्रीं त्या सरस्वतीनदीच्या कांठींच वस्तीस राहिले ॥ ४ ॥ त्या अरण्यांत कोणीएक मोठा अजगर सर्प अतिबुभुक्षित होता, तो रात्रीं सहज फिरत फिरत हळु हळू उरानें चालत तेथें येऊन निजलेल्या नंदास गिळूं लागला ॥ ५ ॥ तेव्हां सर्पानें पायांकडून गिळिलेला तो नंद, असा आक्रोश करूं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लागला कीं, बा कृष्णा कृष्णा, हा मोठा आजगर सर्प मला गिळीत आहे, यास्तव शरण आलेल्या मला यापासून तूं सोडीव ॥ ६ ॥ असें त्याचें दीन भाषण व रोदन श्रवण करून, जागृत होऊन त्वरेनें उठलेले गोपाळ, नंदाला सर्पानें गिळिलें असें पाहून जळक्या काष्ठांनीं त्या सर्पाला ताडण करूं लागले ॥ ७ ॥ जळक्या काष्ठांनीं आंग भाजलेलाहि तो अजगर जेव्हां नंदाला सोडीना तेव्हां, भक्तपालक अशा भगवान् श्रीकृष्णानें तेथें येऊन सर्पाला पायानें स्पर्श केला ॥ ८ ॥ तेव्हां तो सर्प, भगवंताच्या भक्तमनोरथपूरक चरणाच्या स्पर्शानें ज्याचें शापरूप पातक नाहींसें झालें आहे असा होऊन सर्प शरीराचा त्याग करून विद्याधरांनीं पूजित अशा आपल्या विद्याधरस्वरूपास पावला ॥ ९ ॥ तेव्हां सुवर्णपुष्पांची माळा धारण करून देदीप्यमान शरीरानें आपल्या अग्रभागीं नमस्कार करून उभा राहिलेल्या त्या पुरुषाला पाहून, इंद्रियांचा साक्षी असाहि तो भगवान् श्रीकृष्ण, गोपांमध्यें आपलें ऐश्वर्य प्रसिद्ध करण्याकरितां माहीत नसल्यसारखा त्याला प्रश्न करूं लागला कीं, ॥ १० ॥ जो आतां अद्भुत दिसणारा

विव्यधुस्ताडयामासुः । उल्मुकैर्ज्वलत्काष्ठैः ॥ ७ ॥ अलातैस्तैरेवोल्मुकैः ॥ ८ ॥ विद्याधरेष्वर्चितं पूजितम् ॥ ९ ॥ गोपेष्वात्मन ऐश्वर्यं प्रकाशयितुमविद्वानिव तमपृच्छत् । दी-

तस्य चाक्रंदितं श्रुत्वा गोपालाः सहसोत्थिताः ॥ ग्रस्तं च दृष्ट्वा विभ्रांताः सर्पं विव्यधुरुल्मुकैः ॥ ७ ॥ अलातैर्दह्यमानोऽपि नामुंचत्तमुरंगमः ॥ तमस्पृशत्पदाभ्येत्य भगवान्सात्वतांपतिः ॥ ८ ॥ स वै भगवतः श्रीमत्पादस्पर्शहताशुभः ॥ भेजे सर्पवपुर्हित्वा रूपं विद्याधरार्चितम् ॥ ९ ॥ तमपृच्छद्धृषीकेशः प्रणतं समुपस्थितम् ॥ दीप्यमानेन वपुषा पुरुषं हेममालिनम् ॥ १० ॥ को भवान्परया लक्ष्म्या रोचतेऽद्भुतदर्शनः ॥ कथं जुगुप्सितामेतां गतिं वा प्रापितोऽवशः ॥ ११ ॥ सर्प उवाच ॥ अहं विद्याधरः कश्चित्सुदर्शन इति श्रुतः ॥ श्रिया स्वरूपसंपत्त्या विमानेनाचरन्दिशः ॥ १२ ॥ ऋषीन्विरूपानंगिरसः प्राहसं रूपदर्पितः ॥ तैरिमां प्रापितो योनिं प्रलब्धैः स्वेन पाप्मना ॥ १३ ॥ शापो मेऽनुग्रहायैव कृतस्तैः करुणात्मभिः ॥ यदहं लोकगुरुणा पदा स्पृष्टो हताशुभः ॥ १४ ॥ तं त्वाऽहं भवभीतानां प्रपन्नानां भयापहम् ॥ आपृच्छे शापनिर्मुक्तः पादस्पर्शादमीवहन् ॥ १५ ॥

प्यमानेन वपुषा समवस्थितम् ॥ १० ॥ यः परया शोभया प्रकाशते स भवान्क इति ॥ ११ ॥ १२ ॥ प्राहसमुपहसितवानस्मि प्रलब्धैरुपहसितैः । मदीयेनैव पापेन निमित्तेन ॥ १३ ॥ यद्यतः शापात् ॥ १४ ॥ आपृच्छे स्वं लोकं गंतुमनुज्ञां याचे । हे अमीवहन्दुःखनाशन ॥ १५ ॥

तूं परमशोभेनें प्रकाश पावत आहेस तो तूं कोण आहेस ? तुज उत्तमाला पराधीनपणा प्राप्त झाल्याखेरीज ही सर्पयोनि प्राप्त झाली नसावी. तेव्हां तुला ह्या निंद्य सर्पयोनींत कोणी कसें पाडिलें आहे ? तें मला सांग ॥ ११ ॥ तेव्हां सर्प ह्मणाला–हे प्रभो, सुदर्शन या नांवानें प्रसिद्ध असा मी एक देवविशेष विद्याधर आहें. तो मी पूर्वी कांतीनें व स्वरूपसमृद्धीनें युक्त असून विमानांत बसून दशदिशांकडे फिरत असतां– ॥ १२ ॥ एकेवेळीं कुरूपी अशा अंगिरस् ऋषींना पाहिलें आणि आपल्या रूपसौंदर्यानें गर्वित होऊन त्यांस हंसलों. तेव्हां मी उपहास केलेल्या त्या ऋषींनीं, मी केलेल्या अपराधाच्या निमित्तानें मला शाप देऊन ह्या सर्पयोनीस पोंचविलें होतें ॥ १३ ॥ त्या दयाळू असलेल्या ऋषींनीं माझ्यावर अनुग्रह करण्याकरितांच हा अजगरहोण्याचा शाप दिला होता ह्मणून आतां सर्वपूज्य अशा तूं मला पायानें स्पर्श केलास त्याच्यायोगानें मी शापमुक्त झालों आहें ॥ १४ ॥ हे सर्वपापनिवारका, संसारापासून भिऊन तुला शरण आलेल्या लोकांचें पाप दूर-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करणारा अशा तुज भगवंताजवळ तुझ्या पादस्पर्शानें शापनिर्मुक्त झालेला मी, आपल्या लोकीं जाण्याविषयीं आज्ञा मागतों ॥ १५ ॥ हे भक्तपालका, महापुरुषा, सर्वलोकेश्वरेश्वरा, महायोगिन् मीहि तुला शरण आलों आहें, पास्तव मला स्वलोकीं जाण्याविषयीं आज्ञा दे ॥ १६ ॥ हे अच्युता, तुझ्या दर्शनेंकरून तत्काल ब्रह्मशापापासून मी मुक्त झालों ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. कसें ह्मणशील तर–ज्या तुझ्या केवळ नांवांचा उच्चार करणारा पुरुष, सर्व श्रोत्यांना व आपणाला तत्काळ पवित्र करितो त्या तुझ्या पायानें स्पर्श केलेला मी पवित्र झालों ह्यांत आश्चर्य काय ? ॥ १७ ॥ याप्रमाणें सुदर्शन विद्याधर श्रीकृष्णाचा निरोप घेऊन व त्याला प्रदक्षिणा व नमस्कार करून स्वर्गाप्रत निघून गेला आणि श्रीकृष्णानें नंदालाहि संकटांतून सोडविलें ॥ १८ ॥ हेराजा, गोकुळवासी गोप, चरणस्पर्शमात्रेंकरून अजगरसर्पापासून नंदाचें व शापापासून सुदर्शन विद्याधराचें मोक्षणरूप तें श्रीकृष्णाचें मोठें वैभव पाहून विस्मितचित्त झाले आणि त्या अंबिकावनामध्यें करावयाचा जो नियम होता तो सर्व संपवून मोठ्या

॥१६॥१७॥१८॥१९॥ अहिदेहं निहत्यैवं प्रागुन्मत्तं सुदर्शनम् ॥ तद्वदुन्मादिनं कृष्णः शंखचूडमताडयत् ॥ तत्प्रसंगमाह । कदाचिदिति ॥ २० ॥ विरजोंबराविति । विरजसी नि-

प्रपन्नोऽस्मि महायोगिन्महापुरुष सत्पते ॥ अनुजानीहि मां देव सर्वलोकेश्वरेश्वर ॥ १६ ॥ ब्रह्मदंडाद्विमुक्तोऽहं सद्यस्तेऽच्युत दर्शनात् ॥ यन्नाम गृह्णन्नखिलान् श्रोतॄनात्मानमेव च ॥ सद्यः पुनाति किं भूयस्तस्य स्पृष्टः पदा हि ते ॥ १७ ॥ इत्यनुज्ञाप्य दाशार्हं परिक्रम्याभिवंद्य च ॥ सुदर्शनो दिवं यातः कृच्छ्रान्नंदश्च मोचितः ॥ १८ ॥ निशाम्य कृष्णस्य तदात्मवैभवं व्रजौकसो विस्मितचेतसस्ततः ॥ समाप्य तस्मिन्नियमं पुनर्व्रजं नृपाययुस्तत्कथयंत आदृताः ॥ १९ ॥ कदाचिदथ गोविंदो रामश्चाद्भुतविक्रमः ॥ विजह्रतुर्वने रात्र्यां मध्यगौ व्रजयोषिताम् ॥ २० ॥ उपगीयमानौ ललितं स्त्रीजनैर्बद्धसौहृदैः ॥ स्वलंकृतानुलिप्तांगौ स्रग्विणौ विरजोंऽबरौ ॥ २१ ॥ निशामुखं मानयंतावुदितोडुपतारकम् ॥ मल्लिकागंधमत्तालिजुष्टं कुमुदवायुना ॥ २२ ॥ जगतुः सर्वभूतानां मनःश्रवणमंगलम् ॥ तौ कल्पयंतौ युगपत्स्वरमंडलमूर्छितम् ॥ २३ ॥ गोप्यस्तद्गीतमाकर्ण्य मूर्छिता नाविदन्नृप ॥ स्रंसद्दुकूलमात्मानं स्रस्तकेशस्रजं ततः ॥ २४ ॥

मैले अंबरे ययोस्तौ ॥ २१॥ किंच । निशाप्रवेशं सत्कुर्वंतौ उदित उडुपस्तारकाश्च यस्मिंस्तत् । मल्लिकागंधेन मत्ता अलयो यस्मिंस्तत् ॥ २२ ॥ अनिबद्धत्वादन्यैर्युगपत्कल्पयितुमशक्यमपि तौ स्वरमंडलस्य मूर्छितं युगपत्कल्पयंतौ । मनःश्रवणयोर्मंगलं यथा भवति तथा जगतुरगायतामिति ॥ २३ ॥ मूर्छितास्तद्गीतलीनचित्ताः स्रंसद्भ्रश्यद्दुकूलं

आदरानें, कृष्णाच्या त्याच वैभवाचें परस्पर कथन करीत, त्या अंबिकावनांतून पुन्हा गोकुळांत परत आले ॥ १९ ॥ नंतर एकेवेळीं श्रीकृष्ण व अद्भुतपराक्रमी बळराम हे उभयतां, वनामध्यें रात्रीच्यावेळीं गोकुळसंबंधीं स्त्रियांमध्यें प्राप्त होऊन क्रीडा करीत होते ॥ २० ॥ ते प्रेम धारण करणाऱ्या स्त्रीजनांनीं सुस्वरपणें गायन केलेले, अलंकार धारण केलेले , अंगाला चंदनादिकांची उटी लावलेले, वनमाला धारण केलेले व निर्मळ वस्त्रें परिधान केलेले असून जेथें चंद्र व नक्षत्रें उदय पावलीं आहेत त्या मोगऱ्यांच्या सुगंधानें मत्त झालेले भ्रमर फिरत असलेल्या व चंद्रविकासी कमळांचा सुगंध वाहणाऱ्या वाऱ्यानें सेवन केलेल्या रात्रीच्या प्रवेशाचा सत्कार करीत होते ॥ २१ ॥ २२ ॥ ते रामकृष्ण, दुसऱ्यांनीं एकदम कल्पनाहि करण्यास अशक्य असे स्वरसमुदायांचे चढउतार करून आलाप करीत होत्साते श्रवण करणाऱ्या सर्व लोकांच्या मनांला व कर्णांला सुखकारक होईल तशारीतीनें गायन करूं लागले ॥ २३ ॥ हे राजा, त्यांचें तें गायन ऐकून मोह पावलेल्या गोपी, त्या मोहाच्या योगानें, ॥१०८॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्या देहापासून वस्त्र गलित झालें आहे व ज्याच्या केशांतून पुष्पमाळा गलित झाल्या आहेत, त्या आपल्या देहाचेंसुद्धां भान विसरून गेल्या ॥ २४ ॥ याप्रमाणें यथेष्टपणें अत्यंत मत्त असल्यासारखे ते रामकृष्ण क्रीडा करीत असतां, तेथें शंखचूड या नांवानें प्रख्यात असलेला एक कुबेराचा सेवक प्राप्त झाला ॥ २५ ॥ आणि हे राजा, भयाची शंकासुद्धां मनांत न आणणारा तो शंखचूड, ते रामकृष्ण पहात असतां, त्यांचा अनादर करून, ते ज्याचे रक्षक आहेत अशा आक्रोश करणाऱ्या स्त्रीसमुदायाला तो उत्तरदिशेकडे बलात्कारानें वळवून घेऊन चालला ॥ २६ ॥ तेव्हां, वाघानें धरलेल्या गाई जशा आक्रोश करितात त्याप्रमाणें 'हे रामा, हे कृष्णा,' अशा हाका मारीत असलेल्या व आपल्या म्हणून स्वीकारिलेल्या त्या गोपींना त्यापासून सोडवून घेण्याकरितां ते दोघेहि भ्राते (रामकृष्ण) धांवले ॥ २७ ॥ आणि गोपींचें भय घालविणारे 'भिऊं नका असा' शब्द उच्चारणारे, हातांत शालवृक्ष उपटून घेतलेले व वेगानें धांवणारे ते रामकृष्ण, वेगानें त्वरितपणें गुह्यकांमध्यें अधम अशा त्या शंखचूडा-

---

य स्मात्तमात्मानं देहम् । स्रस्ता केशेभ्यः स्रजो यस्य तं च ततो नाविदन् ॥ २४ ॥ २५ ॥ निरीक्षतोर्निरीक्षमाणयोः । तौ नाथौ यस्य तं प्रमदाजनं कालयामास हठात्प्रेरया-

एवं विक्रीडितोः स्वैरं गायतोः संप्रमत्तवत् ॥ शंखचूड इति ख्यातो धनदानुचरोऽभ्यगात् ॥ २५ ॥ तयोर्निरीक्षतो राजंस्तन्नाथं प्रमदाजनम् ॥ क्रोशंतं कालयामास दिश्युदीच्यामशंकितः ॥ २६ ॥ क्रोशंतं कृष्णरामेति विलोक्य स्वपरिग्रहम् ॥ यथा गा दस्युना ग्रस्ता भ्रातरावन्वधावताम् ॥ २७ ॥ माभैष्टेत्यभयारावौ शालहस्तौ तरस्विनौ ॥ आसेदतुस्तं तरसा त्वरितं गुह्यकाधमम् ॥२८॥ स वीक्ष्य तावनुप्राप्तौ कालमृत्यू इवोद्विजन् ॥ विसृज्य स्त्रीजनं मूढः प्राद्रवज्जीवितेच्छया ॥ २९ ॥ तमन्वधावद्गोविंदो यत्र यत्र स धावति ॥ जिहीर्षुस्तच्छिरोरत्नं तस्थौ रक्षन्स्त्रियो बलः ॥ ३० ॥ अविदूर इवाभ्येत्य शिरस्तस्य दुरात्मनः ॥ जहार मुष्टिनैवांग सहचूडामणिं विभुः ॥ ३१ ॥ शंखचूडं निहत्यैवं मणिमादाय भास्वरम् ॥ अग्रजायाददत्प्रीत्या पश्यंतीनां च योषिताम् ॥ ३२ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे शंखचूडवधो नाम चतुस्त्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३४ ॥ ॥

मास ॥ २६ ॥ दस्युना व्याघ्रेण ॥ २७ ॥ मा भैष्ट भयं न प्राप्नुतेत्यभयरावौ ॥ २८ ॥ २९ ॥ ३० ॥ शिरसा सह चूडामणिं जहारेत्यर्थः ॥ ३१ ॥ ३२ ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधे पूर्वार्धे टीकायां चतुस्त्रिंशोऽध्यायः ॥ ३४ ॥ ॥

जवळ प्राप्त झाले ॥ २८ ॥ तेव्हां तो मूढ शंखचूड, एक मूर्तिमंत मरणकाळ व एक मूर्तिमंत मृत्यु अशा भयंकर प्राप्त झालेल्या त्या रामकृष्णांना पाहून भयभीत झाला आणि वांचण्याच्या इच्छेनें स्त्रीजनांचा त्याग करून पलायन करूं लागला ॥ १९ ॥ त्यावेळीं तो जिकडेजिकडे धांवेल तिकडेतिकडे श्रीकृष्णहि, त्याच्या मस्तकीं असलेलें रत्न हरण करण्याच्या इच्छेनें धाऊं लागला. इकडे बलराम तर स्त्रियांचें रक्षण करीत तेथेंच राहिला ॥ ३० ॥ हे राजा, नंतर सर्व करण्यास समर्थ अशा श्रीकृष्णानें, जवळच त्याच्या समोरून येऊन आपल्या केवळ मुष्टीनेंच मस्तकांतील मण्यासह त्या दुरात्म्या शंखचूडाचें मस्तक हरण केलें ॥ ३१ ॥ याप्रमाणें शंखचूडाला मारून तेजोयुक्त असा त्याच्या मस्तकीं असलेला मणि ग्रहण करून श्रीकृष्ण बळरामाजवळ आला आणि त्यानें मोठ्या प्रीतीनें तो मणि, सर्व स्त्रिया पाहत असतां बळरामास अर्पण केला ॥ ३२ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील पूर्वार्धामध्यें शंखचूडवधकथननामक हा चवतिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३४ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां ह्या पस्तिसाव्या अध्यायामध्यें दिवसा श्रीकृष्ण वनामध्यें गेला असतां गोकुळांतील स्त्रियांनीं दोन दोन श्लोकांचें एकेक अशा युग्मगीतांनीं दुःखानें दिवस घालविले अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ आतां रात्रीं कृष्णानें यथेच्छपणें रमविलेल्या व दिवसा त्याचा विरह झालेल्या गोपींचा, वारंवार गायनानें दिवस घालविण्याचा प्रकार सांगत—श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, दिवसा श्रीकृष्ण वनांत गेला असतां त्याचे ठिकाणीं आसक्तचित्त असलेल्या त्या गोपी, कृष्णाच्या लीलांचेंच उत्तमप्रकारें गायन करीत मोठ्या कष्टानें दिवस घालवीत असत ॥ १ ॥ त्यांच्या गायनाचा प्रकार असा कीं,— कांहीं गोपी दुसऱ्या गोपींना ह्मणाल्या—गोपीहो, डाव्या बाहूच्या मुळावर ज्यानें आपला डावा गाल टेंकला आहे व ज्यानें आपल्या भ्रुकुटी नाचविल्या आहेत असा तो श्रीकृष्ण, आपल्या हातांच्या कोमळ अंगुलींनीं ज्याच्या सप्तस्वरच्छिद्रांचा

पंचत्रिंशे वनं याते कृष्णे गोकुलयोषितः ॥ युग्मश्लोकानुगीतेन निन्युर्दुःखेन वासरान् ॥ १ ॥ एवं रात्रिषु कृष्णेन स्वैरमभिरमितानां दिवा तद्विरहितानामनुगीतेन दिननिस्तारप्रकारमाह । गोप्य इति । दुःखेन कृच्छ्रेण ॥ १ ॥ वामबाहुकृतवामकपोल इत्यादीनि द्वादश युगलानि । हे गोप्यो वामे बाहौ तन्मूले कृतोऽर्पितो वामकपालो येन सः वल्गिते नर्तिते भ्रुवौ येन स वल्गितभ्रूर्मुकुंदः । अधरे अर्पितं वेणुं कोमलाभिरंगुलिभिराश्रिता मार्गाः सप्तस्वरच्छिद्राणि यस्य तं यत्र यदा ईरयति वादयति ॥ २ ॥ तदा-

श्रीशुक उवाच ॥ गोप्यः कृष्णे वनं याते तमनुद्रुतचेतसः ॥ कृष्णलीलाः प्रगायंत्यो निन्युर्दुःखेन वासरान् ॥ १ ॥ गोप्य ऊचुः ॥ वामबाहुकृतवामकपोलो वल्गितभ्रुरधरार्पितवेणुम् ॥ कोमलांगुलिभिराश्रितमार्गं गोप्य ईरयति यत्र मुकुंदः ॥ २ ॥ व्योमयानवनिताः सहसिद्धैर्विस्मितास्तदुपधार्य सलज्जाः ॥ काममार्गणसमर्पितचित्ताः कश्मलं ययुरपस्मृतनीव्यः ॥ ३ ॥ हंत चित्रमबलाः शृणुतेदं हारहास उरसि स्थिरविद्युत् ॥ नंदसूनुरयमार्तजनानां नर्मदो यर्हि कूजितवेणुः ॥ ४ ॥

व्योमयानानां सिद्धानां वनिताः सिद्धैः स्वपतिभिः सह वर्तमाना अपि तद्वेण्वीरणमुपधार्याकर्ण्य प्रथमं विस्मितास्ततः काममार्गणेभ्यः समर्पितानि चित्तानि याभिस्तास्तत्परवशा इत्यर्थः । सलज्जाः सत्यः कश्मलं मोहं ययुः । अत्र लिंगम् । अपस्मृता विस्मृता नीव्यो याभिरिति । अत एवंभूतस्य कृष्णस्य विरहं कथं सहाम इति सर्वत्र वाक्यशेषः ॥ ३ ॥ हंत हे अबला इदं चित्रं शृणुत हारहासो हारवद्विशदो हासो यस्य सः । यद्वा वेणुवादनेनाधोवदनेन हसतो हारेषु स्फुरन्हासो यस्य सः । यद्वा हारवद्वक्षसि शोभमानो हासो यस्य सः । यद्वा हाराणां हास इव विशदा स्फूर्तिर्यस्मिन्नुरसीति । उरसि स्थिरा विद्युदिव लक्ष्मीर्यस्य सः । यर्हि यदा कूजितवेणुर्नादितवेणुर्भवति ॥ ४ ॥

आश्रय केला आहे तो अधरोष्ठाचे ठिकाणीं लावलेला वेणु जेव्हां वाजवितो— ॥ २ ॥ तेव्हां विमानांत आपल्या पतींना आलिंगन करून बसलेल्याहि सिद्धांच्या स्त्रिया, तें वेणुगीत ऐकून प्रथम आश्चर्य पावतात, नंतर ज्यांनीं आपलीं चित्तें मदनाच्या बाणांना अर्पण केलीं आहेत अशा (कामातुर) व लज्जायुक्त होऊन इतक्या मोहित होतात कीं, ज्यांना कामपीडेनें प्राप्त झालेल्या त्या तळमळींत, निऱ्या सुटून गलित झालेल्या नेसलेल्या वस्त्रांचें हि भान राहत नाहीं, वास्तव अशाप्रकारच्या कृष्णाचा विरह आह्मीं कसा सहन करावा ! ॥ ३ ॥ दुसऱ्या ह्मणाल्या—गोपीहो, हें मोठें आश्चर्य ऐका. ज्याचें हास्य हारासारखें पांढरें आहे व ज्याच्या वक्षस्थळावर विजेसारखी देदीप्यमान लक्ष्मी स्थिर राहत आहे, असा हा नंदपुत्र श्रीकृष्ण, त्याच्या विरहानें दुःखित झालेल्या आह्मांसारख्यांना सुख उत्पन्न करण्याकरितां जेव्हां मुरली वाजवितो— ॥ ४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तेव्हां गोकुळांतील वृषभ, गाई व वनांतील हरिण यांचे थव्यांचेथवे, दुरूनच वेणुनादश्रवणानें हृतचित्त होत्साते, दांतांनीं तोडलेले ग्रास चघळल्याखेरीज तोंडांत तसेच धरून कान टवकारून डोळे झांकून निद्रिस्थ असल्यासारखे व लिहिलेल्या चित्रांसारखे स्तब्ध होऊन रहतात ॥ ५ ॥ दुसऱ्या गोपी तर असें ह्मणाल्या कीं,– हे सखि, मोरांच्या पिसांचे झुबके, गेरूवगैरे धातु व कोंवळे पल्लव यांच्या योगेंकरून मल्लांसारख्या जाम्यानिम्याचें अनुकरण करणारा, बलरामासहित व गोपांसहित असलेला श्रीकृष्ण, जेव्हां केव्हांतरी वेणूच्या नादानें गाईंना बोलावितो– ॥ ६ ॥ तेव्हां तो वेणुनाद ऐकून, जशा आह्मीं (गोपी) पुष्कळ पुण्य नसल्यामुळें, वाऱ्यानें उडवून आणिलेल्या त्याच्या चरणकमळसंबंधीं धुळीची इच्छा करीत होत्सात्या कुंठितगति होऊन उभ्या राहतों व आमचे बाहु प्रेमानें कांपूं लागतात व आमच्या डोळ्यांतील पाणी

तदा व्रजे वृषा मृगा गावश्च वेणुवाद्येन हृतानि चेतांसि येषां ते । आराद्दूरादेव दंतैर्दष्टाः कवला ग्रासा यैस्ते धृता उत्तंभिताः कर्णा यैस्ते निद्रिता इव लिखितचित्रमिव चासन् । अविदुषां तिरश्चामिदमतिचित्रमित्यर्थः ॥ ५ ॥ किंच अचेतनाश्च सरित्सु तदतीव चित्रमित्याहुः । हे आलि सखि बर्हिणो मयूरस्तस्य स्तबका मयूरपिच्छा धातवो गैरिकादयश्च पलाशानि पल्लवाश्च तैर्बद्धश्चासौ मल्लानां परिबर्हः परिकरस्तं विडंबयत्यनुकरोतीति तथा स मुकुंदो गोपैः सह । वेणुनेत्युपरितनमत्रापि ज्ञातव्यम् । यत्र यदा गाः सम्यगाह्वयति ॥ ६ ॥ तर्हि तदा । तद्ध्वनिश्रवणात् अनिलेनानीतं तस्य पदांबुजरजः स्पृहयंत्य इव भग्नगतयः सरितो वै निश्चितं वयमिव ता अप्यबहुपुण्या यतो न प्राप्नुवंति ।

वृंदशो व्रजवृषा मृगगावो वेणुवाद्यहृतचेतस आरात् ॥ दंतदष्टकवला धृतकर्णा निद्रिता लिखितचित्रमिवासन् ॥ ५ ॥ बर्हिणस्तबकधातुपलाशैर्बद्धमल्लपरिबर्हविडंबः ॥ कर्हिचित्सबल आलि स गोपैर्गाः समाह्वयति यत्र मुकुंदः ॥ ६ ॥ तर्हि भग्नगतयः सरितो वै तत्पदांबुजरजोऽनिलनीतम् ॥ स्पृहयतीर्वयमिवाबहुपुण्याः प्रेमवेपितभुजाः स्तिमितापः ॥ ७ ॥ अनुचरैः समनुवर्णितवीर्य आदिपूरुष इवाचलभूतिः ॥ वनचरो गिरितटेषु चरंतीर्वेणुनाऽऽह्वयति गाः स यदा हि ॥ ८ ॥ वनलतास्तरव आत्मनि विष्णुं व्यंजयंत्य इव पुष्पफलाढ्याः ॥ प्रणतभारविटपा मधुधाराः प्रेमहृष्टतनवः ससृजुः स्म ॥ ९ ॥

केवलं प्रेम्णा वेपिता भुजास्तरंगा यासां ताः । स्तिमिता निश्चला आपो यासां ताः । गोप्योऽपि लोचनयोस्तिमितजला भवंतीति ॥ ७ ॥ स्थावरेष्वप्यतिचित्रं दृश्यत इत्याहुः । अनुचरैर्गोपैर्देवादिभिर्वा । मुग्धानां वाक्यमादिपुरुष इवेति । अचलभूतिर्निश्चलश्रीः । वेणुना तत्तन्नाम्ना गानेन ॥ ८ ॥ तदा प्रणता भारेण विटपाः शाखा यासां ता वनगता लताः स्वस्मिन्विष्णुं प्रकाशमानं सूचयंत्य इव मधुधारा ववृषुः । स्मेति विस्मये । तरवश्च तथा तत्पतीनामपि तथैवानंद इति भावः । एतानि विष्णुव्यक्तिलक्षणानि ॥ ९ ॥

स्तब्ध राहतें, त्याप्रमाणें नद्याहि पुढें जाण्याचे वेग बंद पडून स्तब्ध होतात त्यांचीं उदकें निश्चळ होतात व त्यांचे तरंगरूप भुज प्रेमानें कांपूं लागतात ॥ ७ ॥ अन्य गोपी ह्मणाल्या कीं,–सख्यांनो, निश्चलसंपत्तीनें युक्त अशा आदिपुरुष भगवंतासारखा व अनुचरांनीं (सेवक देवांनीं किंवा गोपांनीं) ज्याचा पराक्रम वर्णन केला आहे असा वनांत संचार करणारा तो कृष्ण, गोवर्धनपर्वताच्या आसमंतात् संचार करणाऱ्या गाईंना, जेव्हां त्यांच्या नांवांनीं युक्त असलेल्या वेणुगीतानें बोलावितो– ॥ ८ ॥ तेव्हां आपलेठिकाणीं विष्णु प्रकाश पावत आहे असें सुचवीतच कीं काय पुष्पांनीं व फळांनीं संपन्न असून ज्यांच्या शाखा भारानें लवल्या आहेत व ज्यांच्या अंगावर प्रेमानें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कंटकरूपी रोमांच उठले आहेत अशा वनांतील वल्ली व तशीच स्थिति पावलेले वृक्ष, आपल्यापासून मधाच्या धारा उत्पन्न करीत असतात ॥ ९ ॥ दुसऱ्या गोपी ह्मणाल्या— सुंदर पुरुषांमध्यें मुख्य व वनमाळांमध्यें दिव्यगंधानें युक्त असलेल्या तुळशीच्या मधानें मत्त झालेल्या भ्रमरसमूहांनीं मोठ्यानें गाइलेलें अनुकूळ गायन, आदरानें श्रवणकरणारा तो श्रीकृष्ण, जेव्हां वेणु वाजवूं लागतो— ॥ १० ॥ तेव्हां सरोवरांचेठिकाणीं राहणारे सारस, राजहंस व इतर पक्षी, त्या सुंदर गीतानें मोहित होऊन एकाग्रचित्तपणें कृष्णा-जवळ येऊन, मौनव्रत धारण करित, व श्रवणसुखानें डोळे मिटीत होत्साते हरीची उपासना करितात, केवढें हें आश्चर्य ! ॥ ११ ॥ कांहीं गोपी ह्मणाल्या— हे गोपीहो, कानांवर खोंवलेल्या पुष्पमाळांच्या तुऱ्यांनीं शोभणारा तो श्रीकृष्ण, बळरामासहित, गोवर्धनपर्वताच्या आसमंताद्भागीं फिरत असतां, स्वतां हर्षयुक्त होऊन जगाला हर्ष

किंच सरसि कमलवनेषु विहरतां पक्षिणामपि मन आकर्षणं तद्गीतं किं पुनरन्येषामित्याहुः । दर्शनीयतिलक इति । दर्शनीयस्तिलको यस्य । दर्शनीयानां सुंदराणां मध्ये मुख्य इति वा । वनमालासु या दिव्यगंधा तुलसी तस्या मधुना मत्तैरलिकुलैरलघु उच्चैरभीष्टमनुकूलं गीतमाद्रियन्नादरेण गृह्णन् यर्ह्यधरे संधितवेणुर्भवति ॥ १० ॥ तर्हि ये सरसि सारसा हंसा अन्ये च विहंगास्ते चारुणा गीतेन हृतचेतस एत्य तत आगत्य हरिमुपासताभजंत । तत्समीपे उपविविशुर्वा । हंतेति विषादे ॥ ११ ॥ मेघोऽपि हरिं सेवत इत्याहुः । सहबल इति । भो व्रजदेव्यो गोप्यः सहबलः सरामः कृष्णः स्रग्भिर्निर्मिताभ्यामवतंसाभ्यां कर्णभूषणाभ्यां विलासो यस्य । यद्वा मुक्ताफलस्रगापीडेन विलासो यस्येति । क्षिति-

दर्शनीयतिलको वनमालादिव्यगंधतुलसीमधुमत्तैः ॥ अलिकुलैरलघुगीतमभीष्टमाद्रियन्यर्हि संधितवेणुः ॥ १० ॥ सरसि सारसहंसविहंगाश्चारुगीतहृतचेतस एत्य ॥ हरिमुपासत ते यतचित्ता हंत मीलितदृशो धृतमौनाः ॥ ११ ॥ सहबलः स्रगवतंसविलासः सानुषु क्षितिभृतो व्रजदेव्यः ॥ हर्षयन्यर्हि वेणुरवेण जातहर्ष उपरंभति विश्वम् ॥ १२ ॥ महदतिक्रमणशंकितचेता मंदमंदमनुगर्जति मेघः ॥ सुहृदमभ्यवर्षत्सुमनोभिश्छायया च विदधत्प्रतपत्रम् ॥ १३ ॥ विविधगोपचरणेषु विदग्धो वेणुवाद्य उरुधा निजशिक्षाः ॥ तव सुतः सति यदाऽधरबिंबे दत्तवेणुरनयत्स्वरजातीः ॥ १४ ॥

भृतः सानुषु गिरेस्तटेषु वर्तमानः स्वयं जातहर्षो विश्वं हर्षयन्यदा वेणुरवेणोपरंभति निनादयति नादयति । नादेन पूरयतीत्यर्थः ॥ १२ ॥ तदा मेघो महतः कृष्णस्यातिक्रमणे शंकितं चेतो यस्य स न पुरतो याति न चोच्चैर्गर्जति किंतु तत्रैव स्थितः सन्वेणुरवमनु मंदं मदं गर्जति । किंच सुहृदं विश्वार्तिहरणादिसाम्यात्सुहृत्कृष्णस्तं सुमनोभिरभ्यवर्षत् । अदृश्यैर्देवैः क्रियमाणं कुसुमवर्षं मेघे कल्पयित्वोक्तम् । तुषारो वा कुसुमतया कल्पितः स एव वा देवतारूपोऽभ्यवर्षदिति । प्रतपादातपात्त्रायत इति प्रतपत्रं छत्रं तच्छायय कुर्वन्निति ॥ १३ ॥ अपि च महदेतदाश्चर्यमित्याहुः । विविधेति । हे सति यशोदे तव सुतो नानागोपक्रीडासु विदग्धो निपुणो वेणुवाद्ये विषये निजैव शिक्षा यासु ताः ।

उत्पन्न करीत होत्साता वेणूच्या नादानें जेव्हां तें जग भरून टाकितो— ॥१२॥ तेव्हां पूज्य अशा त्या श्रीकृष्णाला ओघल्या मोठ्या गर्जनेनें कटकट होईल अशी शंका मनांत आणणारा मेघ, कृष्णाजवळ येत नाहीं व मोठ्यांनीं गर्जनाहि करीत नाहीं, तर दुरूनच वेणुनादाच्या मागून मंदमंद गर्जना करितो आणि जगाचा ताप दूर करण्याच्या व श्याम-त्वादिक गुणांच्या साम्यत्वामुळें त्या आपल्या सख्या श्रीकृष्णावर छायेनें छत्र धारण करीत होत्सता पुष्पांची वृष्टि करितो. येथें मेघांच्या आड राहून देवांनीं केलेल्या पुष्प वृष्टीचीच मेघावर कल्पना करून ती मेघ करितो असें वर्णन केलें आहे ॥ १३ ॥ दुसऱ्या गोपी मोठें आश्चर्य करीत ह्मणाल्या कीं,— हे पतिव्रते यशोदे, नानाप्रकारच्या गोप-क्रीडांमध्यें निपुण असा तुझा पुत्र कृष्ण, पिकलेल्या तोंडल्यासारख्या तांबड्या आपल्या अधरोष्ठाला वेणु लावून धरून, वेणुवाद्याविषयीं अनेकप्रकारच्या आपल्या कल्प-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नेच्याच शिक्षा ज्यांमध्यें आहेत अशा निषाद, ऋषभ इत्यादिक स्वरांच्या आलापभेदांना जेव्हां वाजवून दाखवितो– ॥ १४ ॥ तेव्हां गायनाचें तत्त्व जाणणारे इंद्र, शंकर, ब्रह्मदेव इत्यादिक देवांचे अधिपतिहि, जिकडून गायनाचा ध्वनि येत होता तिकडे आपली मान वांकवून व चित्त देऊन मंद्र, मध्यम व अतिउच्च या क्रमानीं नीटपणें तें गायन ऐकून त्यांतील भेदांचें तत्त्व न समजल्यामुळें मोह पावतात ॥१५॥ आमच्या तर मोहाची गोष्ट काय सांगूं? हे यशोदे, ध्वज, वज्र, कमळ व अंकुश इत्यादिक अनेकप्रकारच्या चिन्हांनीं युक्त अशा आपल्या चरणरूप कमळपत्रांनीं गोकुळसंबंधी भूमीला गाईंच्या खुरांनीं आक्रमण केल्यामुळें प्राप्त झालेलें दुःख घालवीत होतसाता, हत्तीसारखी गति असणारा

स्वोत्प्रेक्षिता नत्वन्यतः श्रुता इत्यर्थः । स्वरजातीर्निषादऋषभादिस्वरालापभेदाननयदुन्नीतवान् ॥ १४ ॥ तत्ताः स्वरजातीः सवनशो मंद्रमध्यमतारभेदेन यतो गीतध्वनिरागतस्ततश्चानता कंधरा चित्तं च येषां ते उपधार्य समाकर्ण्य कवयः कोविदा अपि न निश्चितं तत्त्वं तद्भेदो यैस्ते कश्मलं मोहं ययुरिति ॥ १५ ॥ अस्माकं तु मोहं किं ब्रूम इत्याहुः । निजपदाब्जदलैरिति । ध्वजादीनि विचित्राणि ललामानि चिह्नानि येषां तैर्निजानि पदान्येवाब्जदलानि तैर्व्रजभुवः खुरतोदं खुराक्रमणव्यथां शमयन्वर्ष्मणा देहेन धुर्यो गजस्तद्वद्गतिर्यस्य स कृष्णो वादितवेणुः सन्यद्व्रजति ॥ १६ ॥ तेन निमित्तेन सविलासवीक्षणेनार्पितो मनोभववेगो यासु ता वयम् । कुजा वृक्षास्तेषां गतिं गमिताः सत्यो

सवनशस्तदुपधार्य सुरेशाः शक्रशर्वपरमेष्ठिपुरोगाः ॥ कवय आनतकंधरचित्ताः कश्मलं ययुरनिश्चिततत्त्वाः ॥ १५ ॥ निजपदाब्जदलैर्ध्वजवज्रनीरजांकुशविचित्रललामैः ॥ व्रजभुवः शमयन्खुरतोदं वर्ष्मधुर्यगतिरीडितवेणुः ॥ १६ ॥ व्रजति तेन वयं सविलासवीक्षणार्पितमनोभववेगाः ॥ कुजगतिं गमिता न विदामः कश्मलेन कबरं वसनं वा ॥ १७ ॥ मणिधरः क्वचिदागणयन्गा मालया दयितगंधतुलस्याः ॥ प्रणयिनोऽनुचरस्य कदांसे प्रक्षिपन्भुजमगायत यत्र ॥ १८ ॥ क्वणितवेणुरववंचितचित्ताः कृष्णमन्वसत कृष्णगृहिण्यः ॥ गुणगणार्णमनुगत्य हरिण्यो गोपिका इव विमुक्तगृहाशाः ॥ १९ ॥

मोहेन न विदामः कबरं वा वसनं वेति ॥ १७ ॥ किंच । मणिधरो मणीन् ग्रथितान्गोगणनार्थं धरतीति मणिधरः क्वचिद्देशे एतैर्मणिभिर्गा आसमंताद्गणयन् । तथा दयितगंधया तुलसी तस्या मालया सह वर्तमानः प्रणयिनः प्रियस्यानुचरस्यांसे भुजं प्रक्षिपन् यत्र यदा कदाचिदगायत ॥ १८ ॥ तदा क्वणितवेणुरवेण वंचितान्यपहृतानि चित्तानि यासां ताः कृष्णस्य हरिणस्य गृहिण्यो भार्या गुणगणार्णं गुणगणसमुद्रं कृष्णमनुगत्य प्राप्य ताः कृष्णमेवान्वसतान्वासत न न्यवर्ततेत्यर्थः । कुतः । यतो विमुक्ता गृहाशा याभिस्ता गोपिका इव ता अपि ह्येवमेवान्वासतेति ॥ १९ ॥

तो कृष्ण, वेणु वाजवीत जेव्हां चालतो व विलासयुक्त अवलोकन करितो तेव्हां त्याच्या चालण्याच्या व विलासयुक्त अवलोकनाच्या योगानें मदनाचा वेग अर्पण केलेल्या व वृक्षां सारख्या निश्चेष्ट स्थितीला पोंचविलेल्या आम्ही (गोपी) मोहित होऊन आपल्या नेसलेल्या वस्त्राला व सुटलेल्या केशबंधाला जाणत नाहींशा होतों ॥ १६ ॥ ॥ १७ ॥ गाईंच्या गणनेकरितां माळेंत ओंवलेले मणि धारण करणारा, तसाच जिचा सुगंध प्रिय आहे अशा तुळशीच्या माळेनें उपलक्षित असा श्रीकृष्ण, एखाद्या प्रदेशीं मण्यांच्या योगानें गाईंची आसमंतात् गणना करीत आवडत्या मित्राच्या खांद्यावर आपला बाहु ठेऊन जेव्हां केव्हांतरी वेणु वाजवितो– ॥ १८ ॥ तेव्हां त्या वाजविलेल्या वेणूच्या शब्दानें आकर्षितचित्त झालेल्या काळवीट हरिणाच्या स्त्रिया (हरिणी), आम्हां गोपींसारख्याच घरांदारांची आशा सोडून, माधुर्यादिक गुणसमूहांचा समुद्र अशा कृष्णाच्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आसमंताद्भागीं स्तब्ध उभ्या राहतात ॥१९॥ दुसऱ्या गोपी ह्मणाल्या– हे पवित्रे यशोदे, तुझा वत्स, इतक्यांत दुसऱ्या ह्मणाल्या– नंदाचा पुत्र श्रीकृष्ण, वृंदावनांत क्रीडा करून गोपींना आनंद वाटण्याकरितां कुंदपुष्पांच्या माळांचे वेष कौतुकानें धारण करून संध्याकाळीं गोप व गोधनें यांसहवर्तमान यमुनेमध्यें, आपणावर प्रेम करणाऱ्या गोपांना हर्ष देत होत्साता जेव्हां क्रीडा करितो– ॥ २० ॥ तेव्हां चंदनासारख्या सुगंधयुक्त गार स्पर्शानें त्याकृष्णाचा सत्कार करणारा मंदवायु, अनुकूळ वाहूं लागतो. व त्यावेळीं स्तुतिपाठकांसारखे स्तुतिवगैरे करणारे गंधर्वादिक उपदेवांचे गण वाद्यें गायनें व पुष्पवृष्टि यांच्या योगानें त्याचें सेवन करितात ॥२१॥ नंतर येणाऱ्या कृष्णाला पाहून त्या

तदेवं वृंदावनप्रदेशेषु क्रीडित्वा सायाह्ने गोधनानि परावर्त्य यमुनायां क्रीडतस्तस्य सौभाग्यमनुवर्णयंति । कुंददामकृतकौतुकवेष इति । गोपीनामुत्सवाय कुंददामभिः कृतः कौतुकेनोत्सवेन वेषोऽलंकारो येन सः । हे अनघे यशोदे तव वत्सः पुत्रो नंदसूनुः कृष्णः । यद्वा सहैव बह्व्यः कथयंत्यः काश्चित्तव वत्स इति काश्चिन्नंदसूनुरिति चाहुः । नर्मदो हर्षदः सन्यदा विजहार क्रीडति स्म ॥ २० ॥ तदा मलयजस्पर्शेन मलयजस्य चंदनस्येव सुरभिः शीतश्च यः स्पर्शस्तेन तं कृष्णं मानयन्ननुकूलं यथा तथोपवाति वीजयति । यद्वा मलयजो दक्षिणो वायुः । यद्वा मलयजस्य कृष्णेन स्वांगेऽनुलिप्तस्य स्पर्शेन मानयन्निति । किंच बंदिन इव स्तावकाः संतो गंधर्वादिगणा वाद्यगीतपुष्पवर्षादिभिः परिवव्रुः परित उपासत ॥ २१ ॥ आयांतमालोक्य हृष्यंत्यः परस्परमूचुः । वत्सल इति । व्रजस्य गवां च यद्वा व्रजे निबद्धानां गवामनुकंप्यानामस्माकमित्यर्थः । वत्सलो हितकृत् ।

कुंददामकृतकौतुकवेषो गोपगोधनवृतो यमुनायाम् ॥ नंदसूनुरनघे तव वत्सो नर्मदः प्रणयिनां विजहार ॥ २० ॥ मंदवायुरुपवात्यनुकूलं मानयन्मलयजस्पर्शेन ॥ बंदिनस्तमुपदेवगणा ये वाद्यगीतबलिभिः परिवव्रुः ॥ २१ ॥ वत्सलो व्रजगवां यदगध्रो वंद्यमानचरणः पथि वृद्धैः ॥ कृत्स्नगोधनमुपोह्य दिनांते गीतवेणुरनुगेडितकीर्तिः ॥ २२ ॥ उत्सवं श्रमरुचाऽपि दृशीनामुन्नयन्खुररजश्छुरितस्रक् ॥ दित्सयैति सुहृदाशिष एष देवकीजठरभूरुडुराजः ॥ २३ ॥ मदविघूर्णितलोचन ईषन्मानदः स्वसुहृदां वनमाली ॥ बदरपांडुवदनो मृदुगंडं मंडयन्कनककुंडललक्ष्म्या ॥ २४ ॥

कुतः । यद्यस्मादगध्रः अगं धरतीति गोवर्धनोद्धरणः । बहुशो रक्षणस्योपलक्षणमेतत् । वृद्धैर्ब्रह्मादिभिः पथि वंद्यमानचरण इति । ते सेर्ष्यं सायं शीघ्रमागंतुं न ददतीत्यर्थः । उपोह्य एकीकृत्य । गीतयुक्तो वेणुर्यस्य सः ॥ २२ ॥ श्रमयुक्तयाऽपि कांत्या नेत्राणां हर्षमुन्नयन्नुच्चैः प्रापयन् । खुररजोभिश्छुरिता व्याप्ताः स्रजो यस्य । सुहृदामस्माकमाशिषो मनोरथस्य दित्सया दातुमिच्छया देवक्या जठरे भवतीति तथा स एवोडुराजश्चंद्रो निर्वृतिहेतुत्वेन स एष एतीति ॥ २३ ॥ अतिसंभ्रमेण काश्चित्समीपमायांतं कथयंति ईषन्मदेन विघूर्णिते विह्वलिते लोचने यस्य सः । बदरपांडुवदनः ईषत्पक्वबदरवत्पांडुरं वदनं यस्य सः । अत्र हेतुः । कनककुंडलयोर्लक्ष्म्या कांत्या मृदू

गोपी हर्षानें परस्पर ह्मणाल्या कीं,– हे सख्यांनो, हा पहा देवकीच्या उदरीं उत्पन्न झालेला कृष्णरूपी चंद्र, सुहृद् अशा आमचे मनोरथ पूर्ण करण्याकरितां येत आहे. हा सर्वगोकुळाचा व गाईंचा हितकर्ता आहे; कारण यानें गोवर्धन पर्वताचें धारण केलें होतें हा सांयंकाळीं सर्व गोधनें एकत्र करून वेणु वाजवीत गोकुळांत परत येऊं लागला-ह्मणजे मार्गाचेठिकाणीं ब्रह्मादिक देवहि याच्या चरणांना वंदन करितात, गोप याच्या कीर्तीचें वर्णन करितात, ह्याच्या गळ्यांतल्या माळा गाईंच्या पावलांपासून उठलेल्या धुरळ्यानें मळिण झाल्या आहेत, हा श्रमयुक्त झालेल्याहि आपल्या देहाच्या कांतीनें आमच्या नेत्रांना मोठा हर्ष उत्पन्न करीत येत आहे ॥ २२ ॥ २३ ॥ कितीएक गोपी, जवळ आलेल्या कृष्णाला पाहून मोठ्या गडबडीनें ह्मणाल्या कीं,– गोपीहो, ज्याचे नेत्र थोड्याशा मदानें विव्हळ झाले आहेत, ज्याचें मुख पिकूं लागलेल्या बोरासारखें पांढरें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दिसत आहे, ज्यानें वनपुष्पांची माळा धारण केली आहे, जो आपल्या प्रेमळभक्तांचा सन्मान करणारा आहे, ज्याचें चालणें गजराजासारखें आहे व ज्याचें मुख आनंदयुक्त आहे असा हा यदुपति श्रीकृष्ण, आपल्या सुवर्णकुंडलांच्या कांतीनें सुकुमार गालांना शोभवीत, जसा दिवसाचे वेळीं लोकांना झालेल्या तापाला घालवीत सायंकाळीं चंद्र उदय पावतो त्याप्रमाणें गोकुळांतील गाईंचा व आमचा दुर्निवार विरहताप घालवीत अगदीं जवळ येत आहे पहा ॥ २४ ॥ २५ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, याप्रमाणें ज्यांचें निश्चयात्मक चित्त व संकल्पविकल्पात्मक मन कृष्णाचेठिकाणीं गढून गेलें आहे, त्या उत्सवयुक्त झालेल्या गोपी, दिवसाचे वेळींहि विरहदुःखानेंहि कृष्णलीलांचेंच गायन करीत होत्सात्या रमत असत ॥ २६ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील पूर्वार्धामध्यें युग्मगीतवर्णननामक हा पस्तिसावा

कोमलौ गंडौ यस्मिंस्तद्वदनं मंडयन्निति कोमलगंडस्थलं वा शोभयन्निति ॥ २४ ॥ यदुपतिरिति देवकीजठरभूरिति च प्रागयं वसुदेवस्य क्वचिज्जातस्तवात्मज इत्यादि गर्गवाक्यप्रसिद्धयोक्तं यद्वा सख उदेयिवान्सात्वतां कुल इतिवज्ज्ञात्वा काश्चिद्वदंतीति । गजेंद्रगतिश्चंद्र इव प्रसन्नवक्त्रो व्रजगवामस्माकमनंतं दिनतपं च शयमन्नुपयाति एष समीपमायातीति ॥ २५ ॥ एवं विरहदुःखेनापि तु अहो कृष्णलीला एव गायंत्यस्तस्मिंश्चित्तं चेतना जीवितं यासां तास्तस्मिन्नेव मनः संकल्परूपं यासां ता अतो महानुदय उत्सवो यासां ता अहःस्वपि रेमिरे ॥ २६ ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधे पूर्वार्धे टीकायां पंचत्रिंशोऽध्यायः ॥ ३५ ॥ ॥ षट्त्रिंशे तु हतेऽरिष्टे नारदोक्त्या बलाच्युतौ ॥ वसुदेवसुतौ

यदुपतिर्द्विरदराजविहारो यामिनीपतिरिवैष दिनांते ॥ मुदितवक्त्र उपयाति दुरंतं मोचयन्व्रजगवां दिनतापम् ॥ २५ ॥ श्रीशुक उवाच ॥ एवं व्रजस्त्रियो राजन्कृष्णलीलानुगायतीः ॥ रेमिरेऽहस्सु तच्चित्तास्तन्मनस्का महोदयाः ॥ २६ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे वृंदावनक्रीडायां गोपिकायुगलगीतं नाम पंचत्रिंशोऽध्यायः ॥३५॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ अथ तर्ह्यागतो गोष्ठमरिष्टो वृषभासुरः ॥ महीं महाककुत्कायः कंपयन्खुरविक्षताम् ॥ १ ॥ रंभमाणः खरतरं पदा च विलिखन्महीम् ॥ उद्यम्य पुच्छं वप्राणि विषाणाग्रेण चोद्धरन् ॥ २ ॥ किंचित्किंचिच्छकृन्मुंचन्मूत्रयन्स्तब्धलोचनः ॥ यस्य निर्ह्रादितेनांग निष्ठुरेण गवां नृणाम् ॥ ३ ॥

ज्ञात्वा कंसोऽक्रूरं समादिशत् ॥ १ ॥ गोपीरासांतरायांतं शंखचूडं निहत्य सः ॥ अहन् गोपीमहानंदासहं दुष्टमरिष्टकम् ॥ २ ॥ एवं देवगंधर्वादिगीतनृत्यवाद्यकुसुमवर्षादिभिः कृष्णं प्राप्तं दृष्ट्वा व्रजस्य परमोत्सवे वर्तमाने तद्विरुद्धार्थांतराधिकारार्थमथशब्दः । तर्हि तदा । वृषभाकृतिरसुरः । तं वर्णयति सार्धत्रयेण । महांतौ ककुत्कायौ यस्य । खुरैर्विदारितां महीं कंपयन् ॥ १ ॥ रंभमाणो वृषभजातिशब्दं कुर्वन् । विलिखन् विदारयन् । उद्यम्योर्ध्वं कृत्वा । वप्राणि तटान्युत्क्षिपन् ॥ २ ॥ किंचित्किंचिच्छकृन्मध्ये मध्ये ईषदीषत्पुरीषं मुंचन् । तथा मूत्रयन्मूत्रमुत्सृजन् । स्तब्धलोचनोऽनिमिषलोचनः । यस्य ध्वनिना गवां नारीणां च ॥ ३ ॥

अध्याय समाप्त झाला ॥ ३५ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या छत्तिसाव्या अध्यायामध्यें, कृष्णानें अरिष्टासुराला मारिलें व कंसानें नारदमुखापासून बळराम व श्रीकृष्ण हे वसुदेवाचे पुत्र आहेत असें जाणून, त्यांना मथुरेंत आणण्याची अक्रूरास आज्ञा केली अशी कथा वर्णन केली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, याप्रमाणें देवगंधर्वादिकांनीं केलेल्या गायन, नृत्य, वाद्य, पुष्पवृष्टि इत्यादिकांसहवर्तमान प्राप्त झालेल्या कृष्णाला पाहून गोकुळामध्यें मोठा उत्साह प्रवृत्त झाला असतां, तें सहन न करणारा व ज्याचें कोळें व देह हीं मोठीं आहेत असा एक वृषभाकृति अरिष्टनामक दैत्य, आपल्या खुरांनीं विदारण केलेल्या भूमीला कांपवीत गोकुळामध्यें प्राप्त झाला ॥ १ ॥ २ ॥ तो लोकांना कर्कश लागणारा वृषभजातीचा शब्द करीत पायांनीं भूमीचें विदारण करीत, पुच्छ वर उचलून शिंगांच्या अग्रभागांनीं नदीच्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कांठांना खणून टाकीत व थोडें थोडें शेण टाकीत तसाच थोडा थोडा मूत्रोत्सर्ग करीत डोळे वटारून गोकुळामध्यें आला होता. हे राजा, ज्याच्या भयंकर शब्दानें गाईंच्या व स्त्रियांच्या गर्भांचे स्रावं व पात्त अकालींच होत असत, ज्याच्या कोळ्याच्या आड, 'हा पर्वतच आहे कीं काय अशा बुद्धीनें' मेघ लपत असत ॥ ३ ॥ ४ ॥ त्या भयंकर शिंगांच्या वृषभासुराला पाहून गोपी व गोप फार त्रास पावले. हे राजा, सर्व पशूहि त्याला पाहून भयानें गोकुळाचा त्याग करून पळून गेलें ॥ ५ ॥ नंतर, ते गोपादिक सर्वहि हे कृष्णा, हे कृष्णा, रक्षण कर. रक्षण कर याप्रमाणें भाषण करीत गोविंदाला शरण गेले. तेव्हां भगवान् श्रीकृष्णानें, भयानें व्याकुळ झालेलें तें गोकुळ पाहून– ॥ ६ ॥ तुह्मी भिऊं नका, असें वाणीनें गोपांचें आश्वासन करून, त्या वृषभासुराला आपल्या समोर बोलाविलें. तें असें कीं–हे मंदबुद्धे दुष्टा, गोपालांना व

तत्र । आचतुर्थाद्भवेत्स्रावः पातः पंचमषष्ठयोः ॥ अतऊर्ध्वं प्रसूतिः स्यादिति विभागः । कुकुदि गलपृष्ठशृंगे ॥ ४ ॥ ५ ॥ कृष्ण कृष्ण रक्षेति ॥ ६ ॥ ७ ॥ इत्येवं वदन् । आस्फोव्य करतलेन बाहुमाहत्य तेन तलशब्देन कोपयन् ॥ ८ ॥ भुजाभोगं भुजा भुजः स एव भोगः सर्पदेहस्तं सर्पदेहाकारं भुजमित्यर्थः । स्वयमच्युतः अन्यान्दुष्टान्हरतीति ह-

पतंत्यकालतो गर्भाः स्रवंति स्म भयेन वै ॥ निर्विशंति घना यस्य ककुद्यचलशंकया ॥ ४ ॥ तं तीक्ष्णशृंगमुद्वीक्ष्य गोप्यो गोपाश्च तत्रसुः ॥ पशवो दुद्रुवुर्भीता राजन्संत्यज्य गोकुलम् ॥ ५ ॥ कृष्ण कृष्णेति ते सर्वे गोविंदं शरणं ययुः ॥ भगवानपि तद्वीक्ष्य गोकुलं भयविद्रुतम् ॥ ६ ॥ मा भैष्टेति गिराऽऽश्वास्य वृषासुरमुपाह्वयत् ॥ गोपालैः पशुभिर्मंद त्रासितैः किमसत्तम ॥ ७ ॥ बलदर्पहाऽहं दुष्टानां त्वद्विधानां दुरात्मनाम् ॥ इत्यास्फोव्याच्युतोऽरिष्टं तलशब्देन कोपयन् ॥ ८ ॥ सख्युरंसे भुजाभोगं प्रसार्यावस्थितो हरिः ॥ सोऽप्येवं कोपितोऽरिष्टः खुरेणावनिमुल्लिखन् ॥ उद्यत्पुच्छभ्रमन्मेघः क्रुद्धः कृष्णमुपाद्रवत् ॥ ९ ॥ अग्रन्यस्तविषाणाग्रः स्तब्धासृग्लोचनोऽच्युतम् ॥ कटाक्षिप्याद्रवत्तूर्णमिंद्रमुक्तोऽशनिर्यथा ॥ १० ॥ गृहीत्वा शृंगयोस्तं वा अष्टादशपदानि सः ॥ प्रत्यपोवाह भगवान्गजः प्रतिगजं यथा ॥ ११ ॥ सोऽपविद्धो भगवता पुनरुत्थाय सत्वरः ॥ आपतत्स्विन्नसर्वांगो निःश्वसन्क्रोधमूर्छितः ॥ १२ ॥

रिः । उद्यता ऊर्ध्वं गच्छता पुच्छेन भ्रमंतो मेघा यस्मिन् ॥ ९ ॥ अग्रे न्यस्ते विषणाग्रे येन सः । स्तब्धे असृक्कुल्ये लोचने यस्य सः । कटाक्षिप्य कटाक्षेण तिर्यङ्निरीक्ष्या ॥ १० ॥ प्रत्यपोवाह प्रतिलोमं व्यनुदत् ॥ ११ ॥ अपविद्धोऽपक्षिप्तः । आपतदाद्रवत् खिन्नानि स्वेदयुक्तानि सर्वांगानि यस्य सः । क्रोधमूर्छितः क्रोधेन व्याप्तः ॥ १२ ॥

पशूंना त्रास देऊन तुला काय फळ मिळणार आहे? कांहींच नाहीं ॥ ७ ॥ कारण, तुझ्यासारख्या दुर्बुद्धि दुष्टांच्या बळयुक्त गर्वाचा नाश करणारा मी आहें, तूं माझ्या समीप ये. असें भाषण करून तो श्रीकृष्ण, हातांच्या तळव्यांनीं आपले बाहू थोपटून त्या अरिष्टासुराला क्रोध आणित होत्साता– ॥ ८ ॥ सख्याच्या खांद्यावर सर्पदेहासारखा सुकुमार आपला हात पसरून उभा राहिला. याप्रमाणें कोप आणविल्यामुळें क्रुद्ध झालेला व ज्याचे डोळे वटारलेले असून रक्तासारखे लाल आहेत व ज्यानें आपल्या शिंगांचीं अग्रें पुढें केलीं आहेत असा तो अरिष्टासुर, आपल्या खुरानें भूमी उकरीत कृष्णाकडे कटाक्षानें वांकडें अवलोकन करून, वेगानें, इंद्रानें टाकलेल्या वज्राप्रमाणें कृष्णाच्या अंगावर धांऊन आला ॥ ९ ॥ १० ॥ तेव्हां त्या भगवंतानें त्याला शिंगांचेठिकाणीं धरून, जसा महागज दुसऱ्या गजाला मागें लोटितो त्याप्रमाणें त्याला अठरा पावलें मागें लोटून दिलें ॥ ११ ॥ त्यावेळीं भगवंतानें मागें लोटल्यामुळें भूमीवर पडलेला तो अरिष्टासुर, पुन्हा उठून ज्याच्या सर्व अवयवांना ॥११२॥

---

१ चार महिन्यांच्या आंत गर्भ पडतो त्यास गर्भस्राव व पांचव्या किंवा सहाव्या महिन्यांत पडतो त्यास गर्भपात असें ह्मणतात.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ग्राम सुटला आहे व ज्याला मोठा क्रोध आला आहे असा होत्साता कृष्णाच्या आंगावर धाऊन आला ॥ १२ ॥ तेव्हां कृष्णानें, येणाऱ्या त्या अरिष्टासुराला शिंगांच- ठिकाणीं धरून भूमिवर पाडून पायानें दाबून ' जसा एखादा परीट ओलें वस्त्र पायानें दाबून हातानें पिळतो व त्यांतून पाणी बाहेर काढितो त्याप्रमाणें त्याला पिळून त्याच्या रोमरंध्रांतून रक्त बाहेर काढिलें आणि त्याचें शिंग उपटून त्याच्यायोगानें त्याला ताडण केलें. तेव्हां तो भूमिवर पडून– ॥ १३ ॥ मुखांतून रक्ताचें वमन करीत, मूत्र व शेण यांचा त्याग करीत व आपले पाय धडपडावीत डोळे फिरवून मोठ्या कष्टदशेला पावला व शेवटीं मृत्यूच्या घरीं निघून गेला. तेव्हां सर्व देवांनीं, श्रीकृष्णावर पुष्पवृष्टि करीत व त्याचें स्तवन केलें ॥ १४ ॥ याप्रमाणें वृषभासुराला मारून गोपांनीं स्तूयमान व गोपींच्या नेत्रांचा मूर्तिमान् उत्सवच असा तो श्रीकृष्ण, बळरामासहवर्तमान गोकुळांत प्रविष्ट झाला ॥ १५ ॥ याप्रमाणें अद्भुत कर्म करणाऱ्या श्रीकृष्णानें अरिष्टासुराला मारिलें असतां, नंतर, ज्याचें दर्शन देवासारखें आहे असा भग-

---

कृत्वा विषाणमुत्पाट्य तेनैव जघान स चापतत् ॥ १३ ॥ मूत्रं च शकृच्च मूत्रशकृत् एकवद्भावः । तदुभयं समुत्सृजन्नित्यर्थः । पादांश्च क्षिपन्नितस्ततश्चालयन् अनवस्थितेक्षणः प्रचलितनेत्रः । कृच्छ्रं कष्टं जगाम । अथ निर्ऋतेर्मृत्योः क्षयं निवासं जगाम । कृच्छ्रं यथा भवति तथा मृत इति वा ॥ १४ ॥ नयनोत्सवो नयनानां मूर्तिमानुत्सवः ॥ १६ ॥ कामं व्रजे वसंतं तं कृष्णं तेन तु विस्मृतम् ॥ नारदः स्मारयामास कंसं दूतगिरेव तु ॥ तदाह । अरिष्ट इति । देवदर्शनो देवर्षिः । यद्वा एवं कथिते एवं भविष्यतीति साक्षा-

तमापतंतं स निगृह्य शृंगयोः पदा समाक्रम्य निपात्य भूतले ॥ निष्पीडयामास यथार्द्रमंबरं कृत्वा विषाणेन जघान सोऽपतत्
॥ १३ ॥ असृग्वमन्मूत्रशकृत्समुत्सृजन्क्षिपंश्च पादाननवस्थितेक्षणः ॥ जगाम कृच्छ्रं निर्ऋतेरथ क्षयं पुष्पैः किरंतो हरिमीडिरे सुराः
॥ १४ ॥ एवं ककुद्मिनं हत्वा स्तूयमानः स्वजातिभिः ॥ विवेश गोष्ठं सबलो गोपीनां नयनोत्सवः ॥ १५ ॥ अरिष्टे निहते दैत्ये कृ-
ष्णेनाद्भुतकर्मणा ॥ कंसायाथाह भगवान्नारदो देवदर्शनः ॥ १६ ॥ यशोदायाः सुतां कन्यां देवक्याः कृष्णमेव च ॥ रामं च रो-
हिणीपुत्रं वसुदेवेन बिभ्यता ॥ न्यस्तौ स्वमित्रे नंदे वै याभ्यां ते पुरुषा हताः ॥ १७ ॥ निशम्य तद्भोजपतिः कोपात्प्रचलितेंद्रियः ॥ नि-
शातमसिमादत्त वसुदेवजिघांसया ॥ १८ ॥ निवारितो नारदेन तत्सुतौ मृत्युमात्मनः ॥ ज्ञात्वा लोहमयैः पाशैर्बबंध सह भार्यया ॥ १९ ॥

देववद्दर्शनं ज्ञानं यस्य सः ॥ १६ ॥ आप्तेनेव नारदेनोक्तमाह । यशोदाया इति । देवक्याः अष्टमगर्भत्वेन प्रसिद्धां कन्यां यशोदायाः सुतामाह । यशोदायाः सुतत्वेन प्रसिद्धं कृष्णं देवक्याः सुतमाह । रोहिणीपुत्रं रामं च देवक्याः सप्तमं सुतमाह । यद्वा नंदसुतत्वेन प्रसिद्धं रामं च वसुदेवभार्याया रोहिण्याः पुत्रमाह । तौ वसुदेवसुतौ चेत्कथं व्रजं गतौ तत्राह । वसुदेवेनेति ॥ १७ ॥ १८ ॥ निवारित इति । हते वसुदेवे तौ पलायेतामतो बध्यतामिति मंत्रं वदता नारदेन निवारित इति ॥ १९ ॥

वान् नारद ऋषि, मथुरेमध्यें कंसाला भेटून ह्मणाला कीं,– ॥ १६ ॥ हे कंसा, देवकीचा अष्टम गर्भ ह्मणून प्रसिद्ध असलेली तुझ्या हातून सुटून गेलेली जी कन्या ती, यशोदेची कन्या होय, तसाच यशोदेचा पुत्र ह्मणून प्रसिद्ध जो कृष्ण तो देवकीचा आठवा पुत्र होय आणि रोहिणीचा पुत्र जो राम तो देवकीचा सातवा पुत्र होय, हे दोन्हीं वसुदेवाचे पुत्र असून ते तुजपासून भिणाऱ्या वसुदेवानें आपला मित्र जो नंद त्याच्याजवळ गुप्तपणें ठेविले आहेत व त्या रामकृष्णांनींच तुझे पूतनादिक दैत्य मारिले आहेत ॥ १७ ॥ तें नारदाचें भाषण ऐकून कोपानें ज्याचीं इंद्रियें खवळलीं आहेत अशा त्या भोजपति कंसानें, वसुदेवाला मारण्याकरितां हातामध्यें तीक्ष्ण धारेचें गड्ग ग्रहण केलें ॥ १८ ॥ तेव्हां, वसुदेवाला मारिलेंस तर– तें ऐकून रामकृष्ण गोकुळांतून पळून जातील, मग त्या शत्रूंचा वध तुझ्या हातून होणार नाहीं, ह्मणून तूर्त तूं वसुदेवाचें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

बंधन करून प्रथम त्या आपल्या शत्रूंच्या वधाचा उपाय कर. अशी मसलत सांगणाऱ्या नारदानें त्या कंसाचें निवारण केलें. तेव्हां वसुदेवाचे पुत्र जे रामकृष्ण ते आपले मृत्युरूपी आहेत असें जाणून त्या कंसानें लोखंडाच्या पाशांनीं (बेड्यांनीं) देवकीसह वसुदेवाचें बंधन केलें ॥ १९ ॥ पुढें नारद ऋषि निघून गेल्यावर कंसानें केशी दैत्याला बोलावून आणून, हे केशिन्, तूं गोकुळांत जाऊन रामकृष्णांचा वध कर, अशी आज्ञा करून त्यास गोकुळांत पाठविलें ॥ २० ॥ नंतर तो भोजराज कंस, मुष्टिक, चाणूर, शल, तोशलक इत्यादिक मल्लांना, महातांना व प्रधानांना बोलावून आणून ह्मणाला कीं,– ॥ २१ ॥ भो भो वीरहो, हे चाणूर मुष्टिक हो, तुह्मीं हें माझें आज्ञारूप भाषण ऐका. नंदाच्या गोकुळामध्यें खरोखर वसुदेवाचे पुत्र रामकृष्ण आहेत, त्यांच्यापासून मला मृत्यु निश्चयानें प्राप्त होणार असें आकाशवाणीनें सांगितलें आहे. यास्तव येथें प्राप्त झालेल्या त्यांना तुह्मीं (चाणूरमुष्टिकांनीं) मल्ललीलेनें मारून टाकावें ॥ २२ ॥ २३ ॥ हे सेवक जनहो, मल्लांचें युद्ध व्हावयाच्या जाग्याच्या सर्व बाजूंनीं एकमेकांना चिकटलेलीं उंच अशीं बसावयाचीं स्थानें करावींत, ह्मणजे पुरवासी व देशवासी सर्वलोक त्यांच्यावर बसून यथेष्टपणें मल्लयुद्ध पहातील ॥ २४ ॥ हे कल्याणकारका महाम्हाता, तूं कुवलयापीड नांवाचा हत्ती, रंगमंडपाच्या दरवाज्यामध्यें न्यावास आणि त्याच्या योगानें रंगमंडपांत येणारे माझे शत्रु असे जे रामकृष्ण त्यांचा वध करावास ॥ २५ ॥ हे शिवभक्त हो, आतां येणाऱ्या चतुर्दशी तिथीस तुह्मीं शैवतत्रांत सांगितल्याप्रमाणें धनुर्यागाचा (धनुष्याचेठिकाणीं शिवाचें आवाहन करून पूजन करण्याच्या यज्ञाचा) आरंभ करावा आणि त्यामध्यें भक्तांचे मनोरथ पूर्ण करणाऱ्या त्या शिवाला प्रसन्न करून घेण्याकरितां त्याला योग्य अशा शुद्ध पशूंचीं हिंसा करावी ॥ २६ ॥ याप्रमाणें उपाय करण्याकरितां लोकांना आज्ञा करून, आपल्या कार्यभागाचा सिद्धांत जाणणाऱ्या त्या कंसानें, यादवश्रेष्ठ अशा अक्रूराला बोलावून आणून, त्याच्या सन्मानाकरितां आपल्या हातानें त्याचा हात धरून, मोठा आनंद दर्शवीत त्याला ह्मणाला कीं ॥ २७ ॥ हे हे दानपते अक्रूरा, तूं माझें मित्रकृत्य करावेंस. कारण, या भोज व वृष्णिनामक सर्व यादवांमध्यें माझें आदरपूर्वक उत्तम हित करणारा तुझ्याहून दुसरा कोणी नाहीं ॥ २८ ॥

॥ २० ॥ २१ ॥ २२ ॥ मह्यं मम निदर्शितो विधात्रा नारदेन वा । व्रजं गंतुमुद्यतौ तावाह । भवद्भ्यामिति ॥ २३ ॥ मंचा उत्तुंगस्तंभादिरचितस्थानानि ॥ २४ ॥ अहितौ शत्रू ॥ २५ ॥ मीढुषे वरदाय ॥ २६ ॥ अर्थतंत्रज्ञोऽर्थसिद्धांतमेव जानातीति ॥ २७ ॥ हे दानपते अक्रूर मैत्रं मित्रकृत्यं त्वया क्रियताम् । त्वत्तोऽन्य आदृतः सादरो हिततमश्च न विद्यत इति ॥ २८ ॥

प्रतियाते तु देवर्षौ कंस आभाष्य केशिनम् ॥ प्रेषयामास हन्येतां भवता रामकेशवौ ॥ २० ॥ ततो मुष्टिकचाणूरशलतोशलकादिकान् ॥ अमात्यान्हस्तिपांश्चैव समाहूयाह भोजराट् ॥ २१ ॥ भो भो निशम्यतामेतद्वीरचाणूरमुष्टिकौ ॥ नंदव्रजे किलासाते सुतावानकदुंदुभेः ॥ २२ ॥ रामकृष्णौ ततो मह्यं मृत्युः किल निदर्शितः ॥ भवद्भ्यामिह संप्राप्तौ हन्येतां मल्ललीलया ॥ २३ ॥ मंचाः क्रियंतां विविधा मल्लरंगपरिश्रिताः ॥ पौरा जानपदाः सर्वे पश्यंतु स्वैरसंयुगम् ॥ २४ ॥ महामात्र त्वया भद्र रंगद्वार्युपनीयताम् ॥ द्विपः कुवलयापीडो जहि तेन ममाहितौ ॥ २५ ॥ आरभ्यतां धनुर्यागश्चतुर्दश्यां यथाविधि ॥ विशसंतु पशून्मेध्यान्भूतराजाय मीढुषे ॥ २६ ॥ इत्याज्ञाप्यार्थतंत्रज्ञ आहूय यदुपुंगवम् ॥ गृहीत्वा पाणिना पाणिं ततोऽक्रूरमुवाच ह ॥ २७ ॥ भो भो दानपते मह्यं क्रियतां मैत्रमादृतः ॥ नान्यस्त्वत्तो हिततमो विद्यते भोजवृष्णिषु ॥ २८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

यास्तव हे प्रियकारका, 'जशी वयानें मोठा असलेल्या इंद्रानें, वयानें कनिष्ठ असलेल्याहि वामनरूपी विष्णूचा आश्रय करून, बलिराजानें हरण केलेली त्रैलोक्यसंपत्ति पुन्हा प्राप्त करून घेतली त्याप्रमाणें' मी आपलें मोठें कार्य साधून घेण्याविषयीं तुझा आश्रय केला आहे ॥ २९ ॥ यास्तव तूं नंदाच्या गोकुळांत जा आणि तेथें वसुदेवाचे पुत्र रामकृष्ण आहेत त्यांना ह्या माझ्या रथावर बसवून घेऊन ये. ह्या कामास विलंब करूं नकोस ॥ ३० ॥ ~~विष्णूचा आश्रय करणाऱ्या देवांनीं, त्या रामकृष्णांपासून मला मृत्यु प्राप्त होणार असें निश्चयानें ठरविलें आहे,~~ यास्तव त्यांना मारविण्याचा माझा अभिप्राय तूं गुप्त ठेऊन ' धनुर्याग पाहण्याकरितां, तुह्मी दूध दहीं वगैरे भेटी घेऊन राजाच्या आज्ञेनें चलावें असें सांगून ' नंदादिक गोपांसहवर्तमान त्या रामकृष्णांना येथें घेऊन ये ॥ ३१ ॥ ह्मणजे येथें आणलेल्या त्यांना, मी मृत्युतुल्य अशा कुवलयापीड हत्तीकडून मारवीन, जर कदाचित् त्याच्यापासून ते सुटले तर वज्रासारख्या दृढशरीरी चाणूरमुष्टिकादिक मल्लांकडून मारवीन ॥ ३२ ॥

॥ २९ ॥ ३० ॥ तौ मे मृत्युर्निंतरां सृष्टः । वैकुंठसंश्रयैर्विष्णुसंश्रयैर्देवैः ॥ ३१ ॥ किं ततस्तत्राह । घातयिष्य इति । कालकल्पेन मृत्युतुल्येन । वैद्युतोपमैरशनितुल्यैः ॥ ३२ ॥

अतस्त्वामाश्रितः सौम्य कार्यगौरवसाधनम् ॥ यथेंद्रो विष्णुमाश्रित्य स्वार्थमध्यगमद्विभुः ॥ २९ ॥ गच्छ नंदव्रजं तत्र सुतावानकदुंदुभेः ॥ आसाते ताविहानेन रथेनानय मा चिरम् ॥ ३० ॥ निसृष्टः किल मे मृत्युर्देवैर्वैकुंठसंश्रयैः ॥ तावानय समं गोपैर्नंदाद्यैः साभ्युपायनैः ॥ ३१ ॥ घातयिष्य इहानीतौ कालकल्पेन हस्तिना ॥ यदि मुक्तौ ततो मल्लैर्घातये वैद्युतोपमैः ॥ ३२ ॥ तयोर्निहतयोस्तप्तान्वसुदेवपुरोगमान् ॥ तद्बंधून्निहष्यामि वृष्णिभोजदशार्हकान् ॥ ३३ ॥ उग्रसेनं च पितरं स्थविरं राज्यकामुकम् ॥ तद्भ्रातरं देवकं च ये चान्ये विद्विषो मम ॥ ३४ ॥ ततश्चैषा मही मित्र भवित्री नष्टकंटका ॥ जरासंधो मम गुरुर्द्विविदो दयितः सखा ॥ ३५ ॥ शंबरो नरको बाणो मय्येव कृतसौहृदाः ॥ तैरहं सुरपक्षीयान्हत्वा भोक्ष्ये महीं नृपान् ॥ ३६ ॥ एतज्ज्ञात्वाऽऽनय क्षिप्रं रामकृष्णाविहार्भकौ ॥ धनुर्मखनिरीक्षार्थं द्रष्टुं यदुपुरश्रियम् ॥ ३७ ॥ अक्रूर उवाच ॥ राजन्मनीषितं सध्र्यक् तव स्वावद्यमार्जनम् ॥ सिद्ध्यसिद्ध्योः समं कुर्याद्दैवं हि फलसाधनम् ॥ ३८ ॥

॥ ३३ ॥ ३४ ॥ नष्टकंटका नष्टशत्रुः । ननु कतिपया सुहृद्द्वयेन नष्टकंटका कथं स्यादिति तत्राह । जरासंध इति ॥ ३५ ॥ ३६ ॥ यदुपुरश्रियं द्रष्टुं चेति ॥ ३७ ॥ तत्र स्वमनीषितं विचारितम् । सध्र्यक् । सम्यक् स्वावद्यं मरणं तन्मार्जनम् । तथाऽप्येतावानभिनिवेशो न कार्य इति भविष्यत्सूचयन्नाह । सिद्ध्यसिद्ध्योरिति ॥ ३८ ॥

ते मरण पावले ह्मणजे शोकानें तप्त झालेल्या त्यांच्या वसुदेवादिक बंधूंना व वृष्णि, भोज व दशार्हक यांना मीच मारून टाकीन ॥ ३३ ॥ नंतर वृद्ध असूनहि राज्यची इच्छा करणाऱ्या उग्रसेन पित्याला व त्याच्या भ्रात्या देवकाला आणि जे दुसरे माझे शत्रु आहेत त्या सर्वांना मारून टाकीन ॥ ३४ ॥ हे मित्रा, नंतर ही पृथिवी, शत्रुरहित होईल; कारण कीं, जरासंध राजा माझा सासरा असल्यामुळें तो मला पूज्यच आहे, द्विविदनामक वानर माझा मित्र आहे; शंबरासुर, नरकासुर व बाणासुर यांनीं माझेंच सख्य केलें आहे, यास्तव आतां त्या जरासंधादिकांच्या मदतीनें मी देवांचा पक्षपात धरणाऱ्या सर्व राजांना मारून पृथिवीचें राज्य करीन ॥ ३५ ॥ ३६ ॥ हें माझ्या मनांतलें जाणून तूं धनुर्याग पाहण्याकरितां व मथुरानगरीची शोभा पाहण्याकरितां ' राजानें तुह्मांस बोलाविलें आहे असें सांगून ' तूर्त लहान असलेल्या त्या रामकृष्णांना लवकर घेऊन ये ॥ ३७ ॥ अक्रूर ह्मणाला— महाराज, आपला हा विचार, आपल्या मरणास चुकविणारा असल्यामुळें फार चांगला आहे. तथापि मनुष्यानें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कोणत्याहि कामांत आग्रह न धरितां फळाची सिद्धि किंवा असिद्धि यांविषयीं मनाची समता ठेवावी- कारण, फळ उत्पन्न करणारें दैव (ईश्वर) आहे ॥ ३८ ॥ हा प्राणी दैवानें विपरीत योजिलेलेहि मनोरथ करून त्यांच्या सिद्धीविषयीं पराकाष्ठेचे यत्न करीत असतो परंतु त्या मनोरथांची सिद्धि झाली तर हर्षानें आणि नाहीं झाली तर शोकानें युक्त होतो, असा जरी व्यवहार आहे तथापि मी सेवक असल्यामुळें तुझी आज्ञा करतों, म्हणजे रामकृष्णांना आणण्याकरितां गोकुळांत जातों ॥ ३९ ॥ श्रीशुकाचार्य म्हणाला– हे राजा, याप्रमाणें त्या कंसानें अक्रूराला सांगून नंतर सर्व प्रधानांचें विसर्जन करून आपल्या मंदिरांत प्रविष्ट झाला, तसाच अक्रूरहि आपल्या घरीं निघून गेला ॥ ४० ॥ याप्रमाणें श्रीमद्भा० महापुराणाच्या दशमस्कंधांतील पूर्वार्धामध्यें अरिष्टासुरवधनिरूपणनामक हा छत्तिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३६ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

पुरुषकारस्य व्यभिचारमाह । मनोरथानिति ॥ ३९ ॥ ४० ॥ इति दशमस्कंधे पूर्वार्धे टीकायां षट्त्रिंशोऽध्यायः ॥ ३६ ॥ ॥ सप्तत्रिंशे हते केशिन्यच्युतो भाविकर्मभिः॥ नारदेन स्तुतः क्रीडन् व्योमासुरमथावधीत् ॥ १ ॥ वृषवेषासुरं यद्वत्केशिनं हयवेषिणम् ॥ कंसप्राणसखं हत्वा कंसं व्यसुमिवाकरोत् ॥ २ ॥ केशी त्विति । प्रथमश्लोकेन य एवंभूत केशीत्यनूद्य तं भगवानुपाह्वयदिति द्वितीयेनान्वयः । महाहयः सन्महीं निर्जरयन् श्लथयन्विदारयन्नित्यर्थः । सटाभिः केसरैरवधूतानीतस्ततः क्षिप्तान्यभ्राणि विमानानि च तै

मनोरथान्करोत्युच्चैर्जनो दैवहतानपि ॥ युज्यते हर्षशोकाभ्यां तथाऽप्याज्ञां करोमि ते ॥ ३९ ॥ श्रीशुक उवाच ॥ एवमादिश्य चाक्रूरं मंत्रिणश्च विसृज्य सः ॥ प्रविवेश गृहं कंसस्तथाऽक्रूरः स्वमालयम् ॥ ४० ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे अक्रूरसंप्रेषणं नाम षट्त्रिंशोऽध्यायः ॥ ३६ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ केशी तु कंसप्रहितः खुरैर्महीं महाहयो निर्जरयन्मनोजवः ॥ सटावधूताभ्रविमानसंकुलं कुर्वन्नभो हेषितभीषिताखिलः ॥ १ ॥ "विशालनेत्रो विकटास्यकोटरो बृहद्गलो नीलमहांबुदोपमः ॥ दुराशयः कंसहितं चिकीर्षुर्व्रजं स नंदस्य जगाम कंपयन् ॥ १ ॥" तं त्रासयंतं भगवान्स्वगोकुलं तद्धेषितैर्वालविघूर्णितांबुदम् ॥ आत्मानमाजौ मृगयंतमग्रणरुपाह्वयत्स व्यनदन्मृगेंद्रवत् ॥ २ ॥

संकीर्णं नभः कुर्वन् हेषितैरश्वजातिशब्दैर्भीषितमखिलं विश्वं येन सः ॥ १ ॥ तद्धेषितैस्तैरतिनिष्ठुरैर्हेषितैः । वालैः पुच्छलोमभिर्विघूर्णिताः परिभ्रामिता अंबुदा येन तम् । आजौ संग्रामार्थम् । आत्मानं कृष्णम् । अग्रणीः पुरतो निर्गतः सन्नुपाह्वयत्स्वसमीपमाजुहाव । स च केशी तन्निशम्य मृगेंद्रवन्नादमकरोत् ॥ २ ॥

आतां ह्या सदतिसाव्या अध्यायामध्यें श्रीकृष्णानें केशिदैत्याचा वध केला असतां, नारदानें पुढें होणाऱ्या कर्मांची सूचना करून त्या श्रीकृष्णाची स्तुति केली, नंतर क्रीडा करणाऱ्या कृष्णानें व्योमासुराचा वध केला अशी कथा वर्णन केली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य म्हणाला–हे राजा, कंसानें पाठविलेला केशी दैत्य तर, मोठ्या घोड्याचें स्वरूप धारण करून, मानेवरच्या केंसांच्या सपाट्यानें जिकडेतिकडे उडवून दिलेल्या मेघांनीं व देवांच्या विमानांनीं आकाश व्याप्त करीत व पायांनीं भूमीचें विदारण करीत, ज्याचा वेग मनाच्या वेगासारखा तीव्र आहे, ज्यानें आपल्या अश्वजातीच्या शब्दांनीं सर्व जगाला भीति उत्पन्न केली आहे ॥ १ ॥ "ज्याचे नेत्र विशाळ आहेत, ज्याच्या तोंडाचा जबडा भयंकर आहे, ज्याचा कंठ पुष्ट आहे, जो काळ्या मोठ्या मेघासारखा लठ्ठ आहे, ज्याचें चित्त दुष्ट आहे, तो केशी दैत्य कंसाचें हित करण्याची इच्छा धरून भूमीला कांपवीत नंदाच्या गोकुळांत प्राप्त झाला ॥ १ ॥ तेव्हां आपल्या गोकुळाला घोड्यासारख्या खिंकाळण्यानें त्रास देणाऱ्या व पुच्छाच्या केसांनीं मेघांना

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शोधीत असणाऱ्या त्या केशी दैत्याला, पुढें सरसावणाऱ्या त्या भगवान् श्रीकृष्णानें, आपल्या समोर
विसकटून टाकणाऱ्या आणि युद्धाकरितां आपणाला (कृष्णाला) बोलाविलें, तेव्हां त्या दैत्यानें सिंहासारखी मोठी गर्जना केली ॥ २ ॥ आणि दुसऱ्यांनीं पराभव करण्यास व पुढेंहि जाण्यास अशक्यच अतिक्रुद्ध असा तो महावेगवान्
दैत्य, मुखानें आकाश पिऊनच टाकतो कीं काय ! असा होत्साता, आपलें तोंड पसरून कृष्णाच्या समोर धांवला आणि त्यानें आपल्या पाठीमागच्या पायांनीं त्या कमलनयन
श्रीकृष्णाला ताडण केलें ॥ ३ ॥ तेव्हां श्रीकृष्ण भगवंतानें, तें त्याचें ताडण चुकवून, त्यानें आपणास मारण्याकरितां क्रोधानें पसरलेल्या पायांचेठिकाणीं त्याला हातांनीं
धरून रगगर फिरविलें आणि चारशें हातांच्या अंतरावर अवज्ञापूर्वक फेंकून दिलें आणि जसा गरुड, अनायासानेंच सर्पाला फेंकून देऊन निर्भयपणें राहतो त्याप्रमाणें तो

ततः केशी तं कृष्णं दृष्ट्वा मुखेन खं पिबन्निव मुखं विवृत्याभिमुखः सन्नभिजगाम । किंच । अत्यमर्षणोऽतिकुपितोऽत्यंतमसहमानो वा । प्रत्यक्पद्भ्यां जघान । दुरासदोऽन्यै-
रभिभवितुमशक्यः । दुरत्यय उद्यतः सन् दुरतिक्रमः । अत्र हेतुः । चंडजवश्चंडस्तीव्रो जवो वेगो धावनं यस्य ॥ ३ ॥ तद्धननं वंचयित्वा तं च हननाय प्रसारितयोः पादयो-
र्हस्ताभ्यां गृहीत्वा । परिविध्य भ्रामयित्वा । व्यवस्थितस्तथैव स्थितो बभूव ॥ ४ ॥ व्यादाय मुखं प्रसार्य वेगेन प्रत्याद्रवत् । सोऽपि हरिर्हसन्नुत्तरं सव्यं भुजम् । निर्भयत्वे

स तं निशाम्याभिमुखो मुखेन खं पिबन्निवाभ्यद्रवदत्यमर्षणः ॥ जघान पद्भ्यामरविंदलोचनं दुरासदश्चंडजवो दुरत्ययः ॥ ३ ॥ तद्वं-
चयित्वा तमधोक्षजो रुषा प्रगृह्य दोर्भ्यां परिविध्य पादयोः ॥ सावज्ञमुत्सृज्य धनुःशतांतरे यथोरगं तार्क्ष्यसुतो व्यवस्थितः ॥ ४ ॥
स लब्धसंज्ञः पुनरुत्थितो रुषा व्यादाय केशी तरसाऽऽपतद्धरिम् ॥ सोऽप्यस्य वक्त्रे भुजमुत्तरं स्मयन्प्रवेशयामास यथोरगं बिले
॥ ५ ॥ दंता निपेतुर्भगवद्भुजस्पृशस्ते केशिनस्तप्तमयस्पृशो यथा ॥ बाहुश्च तद्देहगतो महात्मनो यथामयः संववृधे उपेक्षितः ॥ ६ ॥
समेधमानेन सकृष्णबाहुना निरुद्धवायुश्चरणांश्च विक्षिपन् ॥ प्रस्विन्नगात्रः परिवृत्तलोचनः पपात लेंडं विसृजन्क्षितौ व्यसुः ॥ ७ ॥
तद्देहतः कर्कटिकाफलोपमाद्व्यसोरपाकृष्य भुजं महाभुजः ॥ अविस्मितोऽयत्नहतारिरुत्स्मयैः प्रसूनवर्षैर्दिविषद्भिरीडितः ॥ ८ ॥

दृष्टांतः । यथोरगं बिल इति ॥ ५ ॥ ततः किं तदाह । दंता इति । चर्वणाय भगवद्भुजं स्पृशंतीति तथा ते व्यादानेन ये विवृताः । अयो लोहं स्पृशंतीति स्पृशः । यद्वा तप्तम-
यमतितप्तं लोहादि स्पृशंतो यथेति आमयो जलोदरम् ॥ ६ ॥ लेंडं पुरीषमुत्सृजन् ॥ ७ ॥ कर्कटिकाफलं हि पक्वं सार्धतं विदीर्णं भवति तद्वद्विदीर्णात्तस्य देहात् । व्यसोर्विगत
प्राणात् । अविस्मितो गर्वरहितः । अयत्नेन हतोऽरिर्येन सः ॥ ८ ॥

श्रीकृष्ण निर्भय उभा राहिला ॥ ४ ॥ याप्रमाणें भगवंतानें फेंकून दिलेला तो केशी दैत्य, प्रथम मूर्छित होऊन नंतर पुन्हा सावध होऊन उठला आणि क्रोधानें आपलें मुख
पसरून वेगानें श्रीकृष्णाला गिळून टाकण्याकरितां त्याच्या अंगावर धांवला, तेव्हां त्या श्रीकृष्णानेंहि हास्य करीत करीतच त्याच्या मुखामध्यें आपल्या डाव्या हाताचा,
'जसा मूषकाला धरण्याकरितां त्यांच्या बिळांत गारुडी सर्पाचा प्रवेश करवितो त्याप्रमाणें' प्रवेश करविला ॥ ५ ॥ तेव्हां, जसे तापलेल्या लोखंडाचा स्पर्श झालेले दांत
पडतात त्याप्रमाणें भगवंताच्या हाताचा स्पर्श झालेले ते केशी दैत्याचे सर्व दांत पडले आणि त्याच्या देहांत प्रविष्ट झालेला भगवंताचा हात, जसा औषध न पोंचलेला जलोदरा-
दिक रोग वाढतो त्याप्रमाणें वाढूं लागला ॥ ६ ॥ त्यावेळीं अतिशयच वाढणाऱ्या त्या कृष्णाच्या हातानें प्राणवायु कोंडलेला, अंगाला घाम सुटलेला वडोळे फिरलेला तो केशी
दैत्य, पाय धडपडावीत व मलोत्सर्ग करीत भूमीवर मरून पडला ॥ ७ ॥ तेव्हां गतप्राण झालेल्या त्या केशी दैत्याच्या पिकलेल्या चिबुडाप्रमाणें विदीर्ण झालेल्या देहांतून

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्या महापराक्रमी श्रीकृष्णानें आपला हात काढून घेतला. तेव्हां प्रयत्नावांचून शत्रूला मारणाऱ्या व गर्वरहित अशा त्या श्रीकृष्णावर, विस्मित झालेल्या देवांनीं पुष्पवृष्टि करून त्याची स्तुति केली ॥ ८ ॥ हे राजा, नंतर एकेवेळीं भगवद्भक्तांमध्यें अतिश्रेष्ठ असा नारद ऋषि, स्तुत्य कर्मे करणाऱ्या त्या कृष्णाजवळ एकांतीं येऊन ह्मणाला कीं, ॥ ९ ॥
हे कृष्णा कृष्णा, हे अपरिच्छिन्नस्वरूपा, हे योगेशा, हे जगदीश्वरा, हे वासुदेवा, हे जगन्निवासा, हे यादवश्रेष्ठा हे प्रभो, तूं पृथिवीला भारभूत असलेल्या दैत्यांचा संहार करण्याकरितां भूमीवर अवतीर्ण झाला आहेस, यास्तव त्या अवताराला योग्य असें आचरण करून जगाचें रक्षण कर. हे कृष्णा, जसा अग्नि काष्ठामध्यें गुप्तरूपानें

कंसाय कृष्णमादिश्य तद्रहस्यादिपैशुनैः ॥ कंसघातादि कृष्णस्य कार्यमावेदयन्मुनिः ॥ तदाह । देवर्षिरित्यादिना । न चायं सूचकः किंतु सर्वसुहृदित्याह । भागवतप्रवर इति ॥ ९ ॥ अस्मद्रहस्यं वैरिणि कंसे सूचितवानिति मा शंकीरित्याह । कृष्णकृष्णेत्यादिना । अयं भावः । त्वमीश्वरो भूभारदैत्यसंहारायावतीर्णोऽस्यतस्तदनुरूपाचरणेन विश्वं परिपालयेति । तत्र त्वयि तावद्भयशंकैव नास्तीत्याह । अप्रमेयात्मन्नपरिच्छिन्नरूप । योगेशाचिंत्यप्रभाव । जगदीश्वर विश्वनियंतः । वासुदेव सर्वभूतेषु वर्तमान । अखिलावास सर्वस्याश्रय । संप्रति सात्वतां प्रवर श्रेष्ठ । प्रभो सर्वशक्ते ॥ १० ॥ कथमेवंरूपोऽहमिति चेदत आह । त्वमात्मेति । नहि त्वं जीववत्परिच्छिन्नः किंतु सर्वभूतानामांतर एकोऽनुस्यूत आत्मा । अंतरस्यूतत्वे दृष्टांतः । एधसां काष्ठानामंतर्ज्योतिरिवेति । भूतेषु स्थितोऽपि तैर्न दृश्यस इत्याह । गूढ इति । अत्र हेतवः । गुहाशयो बुद्धेरप्यांतरः । किंच

देवर्षिरुपसंगम्य भागवतप्रवरो नृप ॥ कृष्णमक्लिष्टकर्माणं रहस्येतदभाषत ॥ ९ ॥ कृष्ण कृष्णाप्रमेयात्मन्योगेश जगदीश्वर ॥ वासुदेवाखिलावास सात्वतां प्रवर प्रभो ॥ १० ॥ त्वमात्मा सर्वभूतानामेको ज्योतिरिवैधसाम् ॥ गूढो गुहाशयः साक्षी महापुरुष ईश्वरः ॥ ११ ॥ आत्मनात्माश्रयः पूर्वं मायया सस्रजे गुणान् ॥ तैरिदं सत्यसंकल्पः सृजस्यत्स्यवसीश्वरः ॥ १२ ॥ स त्वं भूधरभूतानां दैत्यप्रमथरक्षसाम् ॥ अवतीर्णो विनाशाय सेतूनां रक्षणाय च ॥ १३ ॥

साक्षी नहि साक्षी दृश्यत इत्यर्थः । अपि च महापुरुषः अतः परिच्छिन्नमतिभिर्न ज्ञायस इत्यर्थः । तर्हि सर्वांतरत्वे किं प्रमाणमत आह । ईश्वर इति । नहीश्वरं विना परतंत्राणां जीवानां प्रवृत्तिर्घटत इत्यर्थः ॥ ११ ॥ अहमीश्वरोऽन्यत्सर्वमीशितव्यमित्येतदेव कुत इत्यत आह । आत्मनेति । साधनांतरनिरपेक्ष एवात्माश्रयः स्वतंत्रः मायया शक्त्या भवान् गुणान्सस्रजे सृष्टवान् । तैः सृष्टैर्गुणैरिदं विश्वं सृजसि अत्सि संहरस्यवसि पालयसि । ननु सृष्ट्यादिक्रिया षट्कारकसाध्यैव दृष्टेत्याह । सत्यसंकल्प इति । नहि संकल्पैकसाध्ये बहिःसाधनापेक्षेति भावः । अतस्त्वमीश्वर इत्युपसंहारः ॥ १२ ॥ प्रस्तुतमाह । स त्वमिति । भूधरभूतानां भुवं धरतीति भूधरा राजानस्तद्रूपाणाम् ॥ १३ ॥

सत्वो त्याप्रमाणें तूं एकच सर्वभूतांच्या बुद्धीच्या आंत राहणारा, आत्मा साक्षी, महापुरुष, ईश्वर आहेस, यास्तव परतंत्र असलेल्या जीवांची तुझ्या प्रेरणेवांचून कोणत्याहि कार्याचेठिकाणीं प्रवृत्ति घडत नाहीं. तूं स्वतंत्र आहेस; ह्मणून तुला साधनाची अपेक्षा नाहीं. तूं आपणच आपल्या मायाशक्तीच्या योगानें सत्त्व, रज आणि तम हे तीन गुण उत्पन्न केले आहेस आणि त्यांच्या योगेंकरून, सत्यसंकल्प असा ईश्वर तूं, हें जग उत्पन्न करितोस, पालन करितोस व याचा संहारहि करितोस, ते तूं आतां राजांच्या स्वरूपानें प्रगट झालेल्या दैत्य, प्रमथ व राक्षस यांच्या नाशाकरितां आणि धर्ममर्यादांच्या रक्षणाकरितां प्रकट झाला आहेस ॥ १० ॥ ११ ॥ १२ ॥ १३ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हा घोड्याचें रूप धारण करणारा दैत्य तूं लीलेनें मारिलास त्याच्या योगानें सर्वांचें कल्याण झालें आहे. ज्याच्या शब्दमात्रेंकरून भयाभीत झालेले देव, स्वर्गलोकाला सोडून पळून जात असत ॥ १४ ॥ हे समर्था, आजच येथें अक्रूर येईल, उद्यां तूं मथुरेंत जाशील आणि परवांचेदिवशीं चाणूर, मुष्टिक तसेच दुसरेहि मल्ल, कुवलयापीड हत्ति आणि कंस, यांना मारशील तें मी पाहीन ॥ १५ ॥ त्यानंतर–पंचजनाचा पुत्र, शंखासुर, कालयवन, मुर दैत्य व नरकासुर यांचा वध, पारिजात वृक्षाचें आणणें, इंद्राचा पराजय ॥ १६ ॥ व पराक्रम दाखविणें, हेंच ज्यांचें मोलवगैरे आहे अशा राजकन्याचा विवाह आणि हे जगत्पते, द्वारकेमध्यें असतानां,

---

परश्वोऽहनीति । अद्यैवाक्रूर एष्यति श्वो मथुरां गंताऽसि परश्वश्चाणूरादींश्च त्वया निहतान् द्रक्ष्यामीति सिद्धवन्निर्देशो विज्ञापनप्रकारविशेषः ॥ १५ ॥ तस्यानु तदनंतरम् । शंखादीनाम् । शंखः पंचजनः । वधं द्रक्ष्यामीति शेषः । भाविनिर्देशमात्रमेतन्न त्वानंतर्यं विविक्षितम् ॥ १६ ॥ १७ ॥ भार्यया जांबवत्या सह । स्वधामतो महाकालपुरात् ॥ १८ ॥ १९ ॥ द्वारकामावसन् द्वारकायां वसन् । कर्ता करिष्यति ॥ २० ॥ अमुष्य विश्वस्य भूभारय्य वा ॥ २१ ॥ एवं विज्ञाप्य कृताभिनंदनं भगवंतं नमस्यति

दिष्ट्या ते निहतो दैत्यो लीलयाऽयं हयाकृतिः ॥ यस्य हेषितसंत्रस्तास्त्यजंत्यनिमिषा दिवम् ॥ १४ ॥ चाणूरं मुष्टिकं चैव मल्लानन्यांश्च हस्तिनम् ॥ कंसं च निहतं द्रक्ष्ये परश्वोऽहनि ते विभो ॥ १५ ॥ तस्यानुशंखयवनमुराणां नरकस्य च ॥ पारिजातापहरणमिंद्रस्य च पराजयम् ॥ १६ ॥ उद्वाहं वीरकन्यानां वीर्यशुल्कादिलक्षणम् ॥ नृगस्य मोक्षणं पापाद्द्वारकायां जगत्पते ॥ १७ ॥ स्यमंतकस्य च मणेरादानं सह भार्यया ॥ मृतपुत्रप्रदानं च ब्राह्मणस्य स्वधामतः ॥ १८ ॥ पौंड्रकस्य वधं पश्चात्काशिपुर्याश्च दीपनम् ॥ दंतवक्रस्य निधनं चैद्यस्य च महाक्रतौ ॥ १९ ॥ यानि चान्यानि वीर्याणि द्वारकामावसन्भवान् ॥ कर्ता द्रक्ष्याम्यहं तानि गेयानि कविभिर्भुवि ॥ २० ॥ अथ ते कालरूपस्य क्षपयिष्णोरमुष्य वै ॥ अक्षौहिणीनां निधनं द्रक्ष्याम्यर्जुनसारथेः ॥ २१ ॥ विशुद्धविज्ञानघनं स्वसंस्थया समाप्तसर्वार्थममोघवांछितम् ॥ स्वतेजसा नित्यनिवृत्तमायागुणप्रवाहं भगवंतमीमहि ॥ २२ ॥

द्वयेन । विशुद्धविज्ञानघनमिति । केवलं ज्ञानैकमूर्तिम् । अतएव स्वसंस्थया स्वरूपसम्यक्स्थित्यैव परमानंदरूपया सम्यगाप्ताः सर्वेऽर्था येन तम् । आप्तकामतोक्ता सत्यसंकल्पतामाह । अमोघवांछितमिति । ननु वांछा चेदस्ति तर्हि दुर्निवारा संसृतिरत आह । स्वतेजसेति चिच्छक्त्या नित्यनिवृत्तो मायाकार्यरूपो गुणप्रवाहो यस्मात्तम् । अतो भगवंत निरतिशयैश्वर्यमीमहि शरणं व्रजेमेति ॥ २२ ॥

ब्राह्मणाच्या गाईचें हरण केल्यामुळें सरठयोनि पावलेल्या नृगराजाचें त्या पापापासून मुक्त करणें, जांबवतीसहवर्तमान स्यमंतकमण्याचें परत आणणें, ब्राह्मणाच्या मरण पावलेल्या पुत्रांचें महाकालपुरापासून परत आणून देणें, ॥ १७ ॥ १८ ॥ पौंड्रकाचा वध, काशिपुरीचें जाळणें, दंतवक्राचा वध व धर्मराजाच्या राजसूययज्ञामध्यें शिशुपाळाचा वध ॥ १९ ॥ हीं व अणखीहि द्वारकेमध्यें वास करणारा तूं, भूमीवर कवींनीं गायन करण्यास योग्य अशीं जीं दुसरीं चरित्रें करिशील तीं सर्व मी पाहीन ॥ २० ॥ नंतर भूभार घालविण्याची इच्छा करणारा तूं अर्जुनसारथी होऊन जें अक्षौहिणीसंख्यांच्या सेनांचें संहाररूप कर्म करिशील तेंहि मी अवलोकन करीन ॥ २१ ॥ हे कृष्णा, केवल ज्ञानैकमूर्ते, आपल्या परमानंदस्वरूपस्थितीनेंच सर्वमनोरथ पूर्ण झालेला, सत्यसंकल्प आणि चैतन्यशक्तीनें निर्माण केलेला मायेचा कार्य-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रूप संसारप्रवाह ज्यापासून नित्य निवृत्त झाला आहे अशा निरतिशयैश्वर्यसंपन्न तुज भगवंताला मी शरण आलों आहें ॥ २२ ॥ ईश्वर, स्वतंत्र आपल्या स्वाधीन असलेल्या मायेच्या योगानें महत्तत्त्वादिक सर्वप्रकारच्या विशेषांची कल्पना करणारा परंतु आतां क्रीडेकरितां मनुष्यदेह धारण करणारा, अशा यादव, वृष्णि व सात्वत यांमध्यें अग्रगण्य असलेल्या तुज भगवंताला मी नमस्कार करितों ॥ २३ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, याप्रमाणें श्रीकृष्णाच्या दर्शनानें आनंदयुक्त झालेला तो भागवतश्रेष्ठ नारद ऋषि, यादवपति श्रीकृष्णाला नमस्कार करून त्यानें जाण्याची आज्ञा दिली असतां निघून गेला ॥ २४ ॥ भगवान् श्रीकृष्णहि, युद्धामध्यें केशिदैत्याला मारून गोकुळाला सुख उत्पन्न करीत होत्साता संतुष्ट झालेल्या गोपाळांसहवर्तमान पशूंचें रक्षण करूं लागला ॥ २५ ॥ एकेवेळीं ते रामकृष्णादिक गोपाळ, गोवर्धनपर्वता-

---

ननु त्रिकालज्ञस्त्वं कथं मत्प्रपंचं न जानासि जानासि चेत्कथमगुणप्रवाहं ब्रवीषि तत्राह । त्वामिति । ईश्वरमन्यस्य वशयितारं स्वाश्रयमन्यस्यावशमत आत्ममायया आत्माधीनया मायया विनिर्मिता अशेषविशेषा महदाद्या यादवादिरूपा वा कल्पना येन तं धुर्यं श्रेष्ठं नतोऽस्मीति ॥ २३ ॥ २४ ॥ २५ ॥ ननु नारदेन व्योमवधो न दृष्टस्तत्कथं व्योमवध-

त्वामीश्वरं स्वाश्रयमात्ममायया विनिर्मिताशेषविशेषकल्पनम् ॥ क्रीडार्थमद्यात्तमनुष्यविग्रहं नतोऽस्मि धुर्यं यदुवृष्णिसात्वताम् ॥ २३ ॥ श्रीशुक उवाच ॥ एवं यदुपतिं कृष्णं भागवतप्रवरो मुनिः ॥ प्रणिपत्याभ्यनुज्ञातो ययौ तद्दर्शनोत्सवः ॥ २४ ॥ भगवानपि गोविंदो हत्वा केशिनमाहवे ॥ पशूनपालयत्पालैः प्रीतैर्व्रजसुखावहः ॥ २५ ॥ एकदा ते पशून्पालाश्चारयंतोऽद्रिसानुषु ॥ चक्रुर्निलायनक्रीडाश्चोरपालापदेशतः ॥ २६ ॥ तत्रासन्कतिचिच्चोराः पालाश्च कतिचिन्नृप ॥ मेषायिताश्च तत्रैके विजह्रुरकुतोभयाः ॥ २७ ॥ मयपुत्रो महामायो व्योमो गोपालवेषधृक् ॥ मेषायितानपोवाह प्रायश्चोरायितो बहून् ॥ २८ ॥ गिरिदर्यां विनिक्षिप्य नीतं नीतं महासुरः ॥ शिलया पिदधे द्वारं चतुःपंचावशेषिताः ॥ २९ ॥ तस्य तत्कर्म विज्ञाय कृष्णः शरणदः सताम् ॥ गोपान्नयंतं जग्राह वृकं हरिरिवौजसा ॥ ३० ॥

प्रसक्तिरिति तत्रोच्यते । प्रातरेव केशिवधानंतरं नारदेनोक्तमंगीकृत्य पुनस्तथैव पशून्पालयता व्योमो हतः । यद्वा व्योमवधः पूर्वमेव वृत्तोऽपि वेषधारिवधप्रसंगादत्रोच्यत इति द्रष्टव्यम् । केचित्पुनः शंखचूडवधात्पूर्वमेव पठंति च । तमाह । एकदेति ॥ २६ ॥ २७ ॥ मेषायितान्मेषवदाचरितान्स्वयं चोरवदाचरितः सन्नपोवाहापकृष्य निनाय ॥ २८ ॥ पिदधे छादितवान् ॥ २९ ॥ शरणदः आश्रयप्रदः । हरिः सिंह इव ॥ ३० ॥

च्या आसमंताद्भागीं गाईंना चारीत होत्साते कांहीं चोर व कांहीं पालक होऊन, चोरून लपवून ठेवण्याचे खेळ खेळूं लागले ॥ २६ ॥ हे राजा, त्या गोपांमध्यें कितीएक चोर झाले व कितीएक (रामकृष्णादिक) त्यांचे रक्षक झाले आणि कितीएक मेंढे झाले. त्यांत चोरांनीं मेंढ्यांस चोरून लपवून ठेवावें व पालकांनीं त्यांना शोधून काढावें याप्रमाणें सर्व गोपाळ निर्भयपणें क्रीडा करूं लागले ॥ २७ ॥ तेव्हां मयासुराचा पुत्र महामायावी व्योमनामक असुर, गोपाळांचा वेष धारण करून आपण चोर झाला आणि मेंढे होणाऱ्या पुष्कळ गोपाळांना वारंवार घेऊन जाऊं लागला ॥ २८ ॥ तो महादैत्य, नेलेल्या नेलेल्या गोपाळांना पर्वताच्या गुहेंत घालून तिचें द्वार, शिळेनें आच्छादन करून घेत असे, असें होतां होतां शेवटीं मेंढे झालेले गोपाळ पांच चार अवशेष राहिले ॥ २९ ॥ तेव्हां सत्पुरुषांना आश्रय देणाऱ्या श्रीकृष्णानें, त्याचें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तें कर्म जाणून, गोपांना नेणाऱ्या त्या व्योमासुराला, जसा सिंह, बळानें लांडग्याला धरितो त्याप्रमाणें एकाएकीं धरिलें ॥ ३० ॥ तेव्हां त्या बलवान् दैत्यानें गोपस्वरूपाचा त्याग करून महापर्वतासारखें आपलें स्वरूप धारण केलें आणि आपणास सोडवून घेण्याकरितां पुष्कळ प्रयत्न केला परंतु कृष्णानें धरल्यामुळें व्याकुल झालेला तो आपणास सोडवून घेण्यास समर्थ झाला नाहीं ॥ ३१ ॥ भगवंतानें त्याला दोन्ही हातांनीं धरून भूमीवर पाडिलें आणि अंतरिक्षामध्यें उभे राहिलेले सर्व देव पहात असतां, यज्ञांतील पशूला जसें मारितात त्याप्रमाणें श्वास कोंडून बुक्कयांनीं मारिलें ॥ ३२ ॥ नंतर गुहेचें द्वार ज्या शिळेनें बंद केलें होतें ती शिळा, फोडून दूर केली आणि त्या संकटांतून गोपांना मोकळे करून, देवांनीं व गोपांनीं स्तुति केलेला तो श्रीकृष्ण, आपल्या गोकुळांत प्रविष्ट झाला ॥ ३३ ॥ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवत-नामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील पूर्वार्धामध्यें व्योमासुरवधकथनरूप हा सदतिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३७ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥

॥ ३१ ॥ पशुमारं पशुमारो यथा भवति तथा । अनिःश्वासमित्यर्थः ॥ ३२ ॥ भुवि गोपैस्तूयमान उपरिवैमानिकैर्देवैरिति ॥ ३३ ॥ इति दशमे सप्तत्रिंशोऽध्यायः ॥ ३७ ॥ ॥ अष्टत्रिंशे यथा ध्यायन्नक्रूरो गोकुलं गतः ॥ तथैव रामकृष्णाभ्यां गृहं नीत्वा सुसत्कृतः ॥ १ ॥ प्रातः केशिवधे वृत्ते द्वादश्यां निर्गते मुनौ ॥ ततो व्योमे हतेऽक्रूरः सायं

स निजं रूपमास्थाय गिरिंद्रसदृशं बली ॥ इच्छन्विमोक्तुमात्मानं नाशक्नोद्ग्रहणातुरः ॥ ३१ ॥ तं निगृह्याच्युतो दोर्भ्यां पातयित्वा महीतले ॥ पश्यतां दिवि देवानां पशुमारममारयत् ॥ ३२ ॥ गुहापिधानं निर्भिद्य गोपान्निःसार्य कृच्छ्रतः ॥ स्तूयमानः सुरैर्गोपैः प्रविवेश स्वगोकुलम् ॥ ३३ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे व्योमासुरवधोनाम सप्तत्रिंशोऽध्यायः ॥ ३७ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ अक्रूरोऽपि च तां रात्रिं मधुपुर्यां महामतिः ॥ उषित्वा रथमास्थाय प्रययौ नंदगोकुलम् ॥ १ ॥ गच्छन्पथि महाभागो भगवत्यंबुजेक्षणे ॥ भक्तिं परामुपगत एवमेतदचिंतयत् ॥ २ ॥ किं मयाचरितं भद्रं किं तप्तं परमं तपः ॥ किं वाऽथाप्यर्हते दत्तं यद्द्रक्ष्याम्यद्य केशवम् ॥ ३ ॥

गोकुलमागमत् ॥ २ ॥ तदेवं नारदेन कंसवधादिकार्ये विज्ञापिते श्रीकृष्णो मथुरां गंतुमुद्यतो वर्तते तदाऽक्रूरोऽपि गोकुलमागमदित्याह । अक्रूरोऽपीति ॥ १ ॥ २ ॥ अपिः संभावनायाम् । अर्हते योग्याय ॥ ३ ॥

आतां ह्या अडतिसाव्या अध्यायामध्यें अक्रूर जसे मनोरथ करीत गोकुळांत गेला त्याप्रमाणें रामकृष्णांनीं त्याला घरीं नेऊन त्याचा सत्कार केला अशी कथा वर्णन केली आहे ॥ १ ॥ चतुर्दशीस होणारा धनुर्याग पाहण्यासाठीं एकादशीच्या दिवशीं रामकृष्णास आणण्याबद्दलची कंसाची आज्ञा अक्रूरास झाली. द्वादशीच्या दिवशीं सकाळीं केशिदैत्याचा वध झाला. नंतर नारदऋषि कृष्णाची स्तुति करून गेल्यावर तिसरे प्रहरीं व्योमासुराचा वध झाला व सायंकाळीं अक्रूर गोकुळांत गेला असा कथेचा क्रम आहे ॥ २ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, महाबुद्धिमान् असा तो अक्रूरहि ज्या रात्रीं कंसानें आज्ञा केली होती ती रात्र मथुरेमध्यें राहून प्रातःकाळीं रथावर बसून नंदराजाच्या गोकुळांत जावयास निघाला ॥ १ ॥ तो महाभाग्यवान् अक्रूर, मार्गाचेठिकाणीं जात असतां, कमलनेत्र भगवंताविषयीं परमभक्ति प्राप्त होत्साता असें हें मनांत चिंतन करूं लागला कीं,– ॥ २ ॥ मी असें कल्याणकारक कर्म (यज्ञादिक) काय केलें होतें ? किंवा कोणतें परम तप (व्रतोपवासादिक) केलें होतें ? अथवा सत्पात्र

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ब्राह्मणाला कोणतें दान दिलें होतें ? कीं, ज्याच्या योगानें आज मला भगवंताचें दर्शन होईल ॥ ३ ॥ मी असें मानितों कीं, शूद्राच्या जातींत उत्पन्न झालेल्या पुरुषाला जसें वेदाचें अध्ययनादिक दुर्लभ आहे, त्याप्रमाणें विषयासक्तचित्त असलेल्या मला हें उत्तमकीर्ति भगवंताचें दर्शन होणें दुर्लभ आहे ॥ ४ ॥ अथवा असें नाहीं, तर मज अधमालाहि भगवंताचें दर्शन होईलच. कारण, जसा नदीच्या प्रवाहानें वाहविलेल्या तृणकाष्ठादिक पदार्थांमध्यें एखादा पदार्थ, एकाद्वेळीं कडेला लागतो त्याप्रमाणें काळरूप नदीनें वाहविलेल्या जीवांमधूनहि कोणी एखादा जीव तरून कर्मबळानें कडेला जातो ॥ ५ ॥ ह्मणून आज ह्या गोकुळांत जाण्याच्या प्रवृत्तीनेंच माझें पाप खरोखर नष्ट झालें आहे व माझा जन्म सफळ झाला आहे असा निश्चय होतो; कारण, आज मी, योग्यांनीं ध्यान करण्यास योग्य अशा भगवंताच्या चरणकमळास नमस्कार करीन ॥ ६ ॥ अहो !

स्वस्य कृष्णस्य दर्शनेऽसंभवमाशंक्य पुनः संभावयति । ममैतदिति द्वयेन । विषयात्मनो विषयाविष्टचित्तस्य । शूद्राज्जन्म यस्य तस्य ब्रह्मकीर्तनं वेदोच्चारणं यथेति ॥ ४॥ यद्वा मैवं किं त्वधमस्य नीचस्यापि मम स्यादेव । कुत इत्यत आह । ह्रियमाणः कालनद्येति । अयं भावः । यथा नद्या ह्रियमाणानां तृणादीनां मध्ये किंचित्कदाचित्तरति कूलं प्राप्नोति तथा कर्मवशेन कालेन ह्रियमाणानां जीवानामपि मध्ये कश्चित्तरेदिति संभवतीति ॥ ५ ॥ अतोऽनया प्रवृत्त्यैव ममामंगलं ध्रुवं नष्टमेवेति ज्ञायते । भवो जन्म च सफलं जातमिति । यद्यतो नमस्करिष्यामि ॥ ६ ॥ अमंगलनाशे सूचकांतरमाह । कंस इति । बतेत्याश्चर्ये । अतिखलः कंसोऽपि ममात्यंतमनुग्रहं कृतवान् । यतोऽमुना कंसेन प्रहितो

ममैतद्दुर्लभं मन्य उत्तमश्लोकदर्शनम् ॥ विषयात्मनो यथा ब्रह्मकीर्तनं शूद्रजन्मनः ॥ ४ ॥ मैवं ममाधमस्यापि स्यादेवाच्युतदर्शनम् ॥ ह्रियमाणः कालनद्या क्वचित्तरति कश्चन ॥ ५ ॥ ममाद्यामंगलं नष्टं फलवांश्चैव मे भवः ॥ यन्नमस्ये भगवतो योगिध्येयांघ्रिपंकजम् ॥ ६ ॥ कंसो बताद्याकृत मेऽत्यनुग्रहं द्रक्ष्येंऽघ्रिपद्मं प्रहितोऽमुना हरेः ॥ कृतावतारस्य दुरत्ययं तमः पूर्वेऽतरन्यन्नखमंडलत्विषा ॥७॥ यदर्चितं ब्रह्मभवादिभिः सुरैः श्रिया च देव्या मुनिभिः ससात्वतैः ॥ गोचारणायानुचरैश्चरद्वने यद्गोपिकानां कुचकुंकुमांकितम् ॥८॥ द्रक्ष्यामि नूनं सुकपोलनासिकं स्मितावलोकारुणकंजलोचनम् ॥ मुखं मुकुंदस्य गुडालकावृतं प्रदक्षिणं मे प्रचरंति वै मृगाः ॥ ९ ॥

हरेरंघ्रिपद्मं द्रक्ष्ये द्रक्ष्यामीति । पूर्वेंऽबरीषादयस्तमः संसारमतरंस्तीर्णाः ॥ ७ ॥ अंघ्रिपद्मं विभावयति । यदिति । ब्रह्मादिभिरर्चितमिति परमैश्वर्यमाह । श्रिया चेति सौभाग्यातिशयम् । मुनिभिर्भक्तसहितैरिति परमपुरुषार्थत्वम् । गोचारणायेति कृपालुत्वम् । यद्गोपिकानामिति प्रेममात्रसुलभत्वम् ॥ ८ ॥ मनोरथांतरं करोति । द्रक्ष्यामीति । शोभमानौ कपोलौ नासिका च यस्मिंस्तत् । स्मितसहितोऽवलोको यस्मिन् अरुणकंजवल्लोचने यस्मिन् तच्च तच्च मुखम् । गुडालकावृतं वक्रकेशावृतम् । तदानीमेव शुभसूचकं दृष्ट्वाऽतिहृष्यन्नाह । प्रदक्षिणमिति ॥ ९ ॥

भगवद्भक्तांचा द्रोह करणाऱ्याहि कंसानें आज माझ्यावर मोठाच अनुग्रह केला आहे. कारण, ज्यानें पाठविलेला मी, अवतार धारण करणाऱ्या श्रीहरीचें चरणकमल पाहीन. हृदयामध्यें ध्यान केलेल्या ज्या चरणकमळाच्या नखसमूहाच्या कांतीनें, पूर्वीचे ध्यान करणारे अंबरीषादिक भक्त, दुस्तर अशाहि संसाररूप अंधकाराला तरून गेले आहेत ॥ ७ ॥ आणि ज्या चरणकमळाची, ब्रह्मदेव, शंकर, इत्यादिक देव, लक्ष्मी देवी व भक्तांसहित ऋषिगण पूजा करीत आहेत. येणेंकरून जें परम ऐश्वर्यरूप, परमसौभाग्यरूप व परमपुरुषार्थरूप आहे. तसेंच जें गाई चारण्याकरितां सख्यांसहवर्तमान वनांत संचार करीत आहे (अतिकृपाळु आहे) आणि जें गोपिकांच्या कुचसंबंधी केशरानें रंजित आहे (प्रेमळभक्तांना अतिसुलभ आहे) ॥ ८ ॥ दुसरा मनोरथ करितो कीं,—ज्याअर्थीं हरिणे, मला उजवा घालून गमन करित आहेत त्याअर्थीं मी आज भगवंताचें ॥११७॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मुख पाहीन यांत संशय नाहीं. तें मुख असें आहे कीं,—ज्याचेठिकाणीं सुंदर गाल व नासिका शोभत आहेत, जेथें तांबड्या कमळासारखे नेत्र आहेत व हास्यसहित अवलोकन आहे व जें कुरळ केसांनीं वेष्टित आहे ॥ ९ ॥ आणि पृथिवीचा भार दूर करण्याकरितां आपल्या इच्छेनें मनुष्यनाख्य स्वीकारणाऱ्या व अतिशय सौंदर्याचा आश्रय अशा विष्णूचें जर मला दर्शन होईल तर माझ्या नेत्रांचें अनायासानें साफल्य होणार नाहीं काय ? तर होईलच ॥ १० ॥ जो ईश्वर, आपल्या अवलोकनमात्रेंकरून कार्यांना तसाच कारणांना उत्पन्न करणारा असूनहि अहंकाररहित आहे आणि आपल्या तेजानें (सच्चिदानंदस्वरूपसाक्षात्कारानें) अज्ञान, भेद व भ्रम (अनात्मवस्तूचेठिकाणीं

पुनरप्यन्याच्चिंतयति । अप्यद्येति । ईयुषः प्राप्तवतः लावण्यस्य धामाश्रयस्तस्य विष्णोः । यद्वा विष्णोर्लावण्ययुक्तं यद्धाम वपुस्तस्य उपलंभनं दर्शनं भविता भविष्यति । अपि यद्येवं स्यात्तर्हि मह्यं मम दृशो लोचनस्य फलं न स्यादिति न । अपितु स्यादेवेत्यर्थः ॥ १० ॥ य ईक्षितेत्यादिचतुर्भिः कालापकम्[1] । तत्रैवं शंका । नन्वस्मदादिव देवभोक्तृत्व-कर्तृत्वादिधर्मैस्तत्र तत्र प्रतीयमानस्य कथं विष्णुत्वमितीमां शंकां श्लोकत्रयेणापाकुर्वंश्च तुर्थेन तमहं द्रक्ष्यामीति मनोरथं करोति । तथाहि य ईक्षितेति । असत्सतोः कार्यकारण-योरीक्षितापीक्षणमात्रकर्ताऽप्यहंरहितोऽहंकारहीनः । तथाऽपास्ततमोभिदाभ्रमः तमः स्वाज्ञानं ततो भिदा भेदस्ततो भ्रमोऽभिनिवेशादिः अपास्ता अपाकृतास्तमआदयो यस्मिन्सः । कुत एतत्तत्राह । स्वतेजसा चिच्छक्त्या नित्यस्वरूपसाक्षात्कारेण । तथापि स्वमायया स्वाधीनया मायया तदीक्षया तस्यैवेक्षया प्राणाक्षधीभिः सहि-

अप्यद्य विष्णोर्मनुजत्वमीयुषो भारावताराय भुवो निजेच्छया ॥ लावण्यधाम्नो भवितोपलंभनं मह्यं न न स्यात्फलमंजसा दृशः ॥ १० ॥ य ईक्षिताऽहंरहितोऽप्यसत्सतोः स्वतेजसाऽपास्ततमोभिदाभ्रमः ॥ स्वमाययाऽऽत्मन्रचितस्तदीक्षया प्रणाक्षधीभिः सद-नेष्वभीयते ॥ ११ ॥ यस्याखिलामीवहभिः सुमंगलैर्वाचो विमिश्रा गुणकर्मजन्मभिः ॥ प्राणंति शुंभंति पुनंति वै जगद्या-स्तद्विरक्ताः शवशोभनाः मताः ॥ १२ ॥

तैरात्मन्नात्मनि स्वस्मिन्नेव रचितैर्जीवैः सदनेषु वृंदावनतरुषु गोपीगृहेषु च लीलया कर्माणि कुर्वन्सक्तवदभीयते आभिमुख्येन प्रतीयते ॥ ११ ॥ ननु सर्वथाऽहंकारादिरहित-स्यात्मारामस्य लीलाऽपि कुत इत्याशंक्य परानुग्रहार्थैत्याशयेनाह । यस्येति । अखिलान्यखिलस्य वा अमीवानि पापानि घ्नंतीत्यखिलामीवहानि तैः । तथा सुमंगलैः शोभनानि मंगलानि येभ्यस्तैः । गुणाः करुणादयः कर्माणि जन्मानि,च तैर्विमिश्रा युक्ता वाचो जगत्प्राणंति जीवयंति शुंभंति शोभयंति पुनंति पवित्रयंति । व्यतिरेकमाह । या इति । तैर्विरक्ता रहितास्तास्तु स्वलंकृता अपि वस्त्राद्यलंकृतशववच्छोभमाना मताः सतां संमताः ॥ १२ ॥

आत्मबुद्धि) यांनीं रहित आहे. तथापि तो ईश्वर स्वाधीन असलेल्या मायेच्या योगानें केवळ अवलोकनमात्रेंकरून प्राण, इंद्रियें व बुद्धि यांसहित आपल्याठिकाणीं रचिलेल्या जीवांसहवर्तमान वृंदावनामध्यें व गोपींच्या गृहांमध्यें लीलेनें क्रीडा करूं लागला म्हणजे कर्म करणाऱ्यासारखा व आसक्त असल्यासारखा प्रतीतीस येतो ॥ ११ ॥ ज्या भगवंता-च्या, सर्वलोकांच्या पापांचा नाश करणाऱ्या व महामंगलरूप अशा भक्तावत्सल्यादिके गुणांनीं, गोवर्धनोद्धरणादिक कर्मांनीं व रामकृष्णादिक जन्मांनीं मिश्र असलेल्या म्हणजे त्या गुणादिकांचें प्रतिपादन करणाऱ्या कथारूप वाणी, वक्ता श्रोता इत्यादिक सर्वांच्या जन्माचें सार्थक करितात, सज्जनांच्या सभांना शोभवितात व जगाला पवित्र करितात आणि ज्या वाणी, भगवद्गुणादिकांच्या प्रतिपादनाखेरीज आहेत त्या, पदलालित्यादिक अलंकारांनीं अलंकृत असल्या तरी, वस्त्रादिकांनीं अलंकृत

---

1 दोन श्लोकांचा एक अन्वय असतो त्यास 'युग्म,' तीन श्लोकांच्यास 'विशेषक,' चार श्लोकांच्यास 'कालापक' आणि त्यांहून जास्ती श्लोकांच्या अन्वयास 'कुलक' असें म्हणतात.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असलेल्या शवांसारख्याच सज्जनांना मान्य आहेत ॥ १२ ॥ तोच भगवान् ईश्वर, खरोखर आपण केलेल्या वर्णाश्रमधर्ममर्यादांचें पालन करणाऱ्या इंद्रादिलोकांना सुख देण्याकरितां यादवांच्या कुळामध्यें श्रीकृष्णरूपानें अवतार धारण करून यशाचा विस्तार करित होत्साता गोकुळामध्यें राहिला आहे. ज्याचें सर्वांना मंगलकारक यश देव गात आहेत ॥ १३ ॥ सत्पुरुषांचा गुरु व गतिरूप, त्रैलोक्यामध्यें सुंदर, नेत्रवंतांना परम आनंद देणारा व लक्ष्मीचेंहि आवडतें स्थान असें स्वरूप धारण करणारा, अशा त्या श्रीकृष्ण भगवंताला आज मी निश्चयानें पाहीन. कारण, आज मला पहाटेच्यावेळा, शुभसूचक शकुन दाखविणाऱ्या झाल्या आहेत ॥ १४ ॥ भगवंताचें दर्शन झाल्यानंतर तत्काळ

स्वयंरचितान्सेतून्वर्णाश्रमधर्मान्पालयताममरवर्याणां सुखकर्ता सन्नवतीर्णः यद्यशः ॥ १३ ॥ त्रैलोक्ये एकमेव कांतम् । दृशिर्दृष्टिस्तद्वतां महानुत्सवो यस्मात् । यद्वा महानुत्सव एव । अतएव श्रिय ईप्सितमास्पदमेवंभूतं रूपं श्रीमूर्तिं दधानं तमीश्वरं द्रक्ष्यामीति । अत्र लिंगम् । उषसः प्रभातसमयाः । शुदर्शनाः सुभदर्शनाः । सुखं प्रभाता रजन्यः शुभसूचिका बभूवुरित्यर्थः ॥ १४ ॥ किंच । अथ दर्शनानंतरं सपदि तत्क्षणमेव रथादवतीर्णः सन्प्रधानयोः पुरुषयो रामकृष्णयोश्चरणं योगिभिरप्यात्म-

स चावतीर्णः किल सात्वतान्वये स्वसेतुपालामरवर्यशर्मकृत् ॥ यशो वितन्वन्व्रज आस्त ईश्वरो गायंति देवा यदशेषमंगलम्
॥ १३ ॥ तं त्वद्य नूनं महतां गतिं गुरुं त्रैलोक्यकांतं दृशिमन्महोत्सवम् ॥ रूपं दधानं श्रिय ईप्सितास्पदं द्रक्ष्ये ममासन्नुषसः सुदर्शनाः ॥ १४ ॥ अथावरूढः सपदीशयो रथात्प्रधानपुंसोश्चरणं स्वलब्धये ॥ धिया धृतं योगिभिरप्यहं ध्रुवं नमस्य आभ्यां च सखीन्वनौकसः ॥ १५ ॥ अप्यंघ्रिमूले पतितस्य मे विभुः शिरस्यधास्यन्निजहस्तपंकजम् ॥ दत्ताभयं कालभुजंगरंहसा प्रोद्वेजितानां शरणैषिणां नृणाम् ॥ १६ ॥ समर्हणं यत्र निधाय कौशिकस्तथा बलिश्चाप जगत्त्रयेंद्रताम् ॥ यद्वा विहारे व्रजयोषितां श्रमं स्पर्शेन सौगंधिकगंध्यपानुदत् ॥ १७ ॥

लाभाय केवलं धियैव धृतं साक्षादहं नमस्यामि । आभ्यां सहानयोः सखीन् गोपांश्च नमस्यामिति ॥ १५ ॥ किंच अपीति । अधास्यत् धास्यति तद्विभावयति दत्ताभयमिति सार्धेन ॥ १६ ॥ बलिना तावत्पदत्रयपरिमितभूदानसमये तस्य हस्ते उदकं निहितम् । कौशिक इंद्रस्तेनापि कदाचित्किंचिन्निहितमिति ज्ञातव्यम् । मुमुक्षूणां संसारभयनिवर्तकं सकामानामभ्युदयप्रदं चेत्युक्तमनुरक्तानां परमसुखदं चेत्याह । यद्वा वाशब्दो वितर्के । विहारे रासक्रीडायाम् । सौगंधिकस्य गंध इव गंधो यस्य तत्सौगंधिकगंधि ॥ १७ ॥

रथावरून खालीं उतरून मी, प्रधानपुरुष अशा त्या रामकृष्णांच्या चरणांना, कीं ज्यांचें योगिजनांनींहि स्वरूपसाक्षात्कार होण्यासाठीं केवळ बुद्धीनें ध्यान केलें आहे त्यांना, साक्षात् नमस्कार करीन आणि त्यांच्याबरोबर असणाऱ्या त्यांच्या सख्या गोपांनाहि नमस्कार करीन ॥ १५ ॥ आणि त्यावेळीं चरणमूळाचेठिकाणीं नमस्कार करून पडलेल्या माझ्या मस्तकावर तो समर्थ श्रीकृष्ण, आपलें हस्तकमळ ठेवील. जें काळरूप सर्पाच्या वेगानें अत्यंत भय पावणाऱ्या व शरण जाणाऱ्या मनुष्यांना अभय देणारें आहे ॥ १६ ॥ ज्या हस्तकमळावर इंद्रानें तसेंच बळिराजानें पूजन व दानसंबंधी उदक समर्पण करून, त्रैलोक्याचें इंद्रपद मिळविलें आहे आणि सौगंधिकनांवाच्या कमळासारखा सुगंध असलेल्या ज्या हस्तकमळानें, आपल्या स्पर्शानें रासक्रीडेमध्यें गोकुळवासी स्त्रियांचा श्रम दूर केला आहे. केवढें ॥११८॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हें आश्चर्य ! ॥ १७ ॥ जरी मी कंसानें पाठविलेला त्याचा दूत आहें तथापि भगवान् श्रीकृष्ण, माझ्यावर हा शत्रूकडचा आहे अशी बुद्धि करणार नाहीं. कारण, तो सर्वज्ञ व सर्वांचा अंतर्यामी असल्यामुळें आपल्या 'खरें ग्रहण करण्यास समर्थ असलेल्या' ज्ञानचक्षूनें माझ्या मनाच्या बाहेरच्या व आंतल्या सर्व चेष्टा जाणत आहे. ह्मणजे मी जरी बाहेरून कंसाला अनुसरणारा असलों तरी आंतून आपणाला अनुसरणारा आहें, हें त्याला ठाऊक आहे ॥ १८ ॥ आणखीहि जर तो भगवान्, चरणाच्या समीपभागीं एकाग्रतेनें हात जोडून उभा राहिलेल्या मजकडे, आपल्या हास्यसहित कृपामृतानें आर्द्र झालेल्या दृष्टीनें पाहील तर, तत्काल मी सर्व पापांपासून व पुनर्जन्मादि आशंकां

एवं परमानुग्रहं संभाव्य पुनरप्यसंभवमाशंक्य परिहरति । न मयीति । यद्यप्यहं कंसेन प्रहितोऽतस्तस्य दूतस्तथापि मय्यरेरयमिति बुद्धिं नोपैष्यति न करिष्यतीत्यर्थः । यतो विश्वदृक् सर्वज्ञोऽतो मम चेतसोंऽतश्च बहिश्च यदीहितं चेष्टितमेतच्चः क्षेत्रज्ञोंऽतर्यामी नित्यज्ञानेनेक्षते । अयं भावः । चेतसो बहिरेवं कंसमनुवर्तेऽतस्तु कृष्णमेव तदेतदसौ हृदि स्थितो जानातीति । यद्वा एतस्य जगत ईहितमिति ॥ १८ ॥ अपि यदंघ्रिमूले चरणोपांतेऽवहितं संयतं कृपामृतेनार्द्रया दृशा मामीक्षिता द्रक्ष्यति तर्हि सपद्येव विनष्टाखिलकल्मषः परां मुदं वोढा प्राप्स्यामीति ॥ १९ ॥ अथ मां परिरप्स्यते आलिंगिष्यति यदा तदैव मे आत्मा देहस्तीर्थीक्रियतेऽतिपवित्रीकरिष्यते । उच्छ्वसिति श्लथो भविष्यति । अ-

न मय्युपैष्यत्यरिबुद्धिमच्युतः कंसस्य दूतः प्रहितोऽपि विश्वदृक् ॥ योंऽतर्बहिश्चेतस एतदीहितं क्षेत्रज्ञ ईक्षत्यमलेन चक्षुषा ॥ १८ ॥ अप्यंघ्रिमूलेऽवहितं कृतांजलिं मामीक्षिता सस्मितमार्द्रया दृशा ॥ सपद्यपध्वस्तसमस्तकिल्बिषो वोढा मुदं वीतविशंक ऊर्जिताम् ॥ १९ ॥ सुहृत्तमं ज्ञातिमनन्यदैवतं दोर्भ्यां बृहद्भ्यां परिरप्स्यतेऽथ माम् ॥ आत्मा हि तीर्थीक्रियते तदैव मे बंधश्च कर्मात्मक उच्छ्वसित्यतः ॥ २० ॥ लब्धांगसंगं प्रणतं कृतांजलिं मां वक्ष्यतेऽक्रूर ततेत्युरुश्रवाः ॥ तदा वयं जन्मभृतो महीयसा नैवादृतो यो धिगमुष्य जन्म तत् ॥ २१ ॥ न तस्य कश्चिद्दयितः सुहृत्तमो न चाप्रियो द्वेष्य उपेक्ष्य एव वा ॥ तथापि भक्तान्भजते यथा तथा सुरद्रुमो यद्वदुपाश्रितोऽर्थदः ॥ २२ ॥

तो देहात् ॥ २० ॥ तत भोस्तातेति । तदा जन्मभृतः सफलजन्मानः । अन्यथा तज्जन्मैव न भवतीत्याह । महीयसेति । महीयसा श्रीकृष्णेन योऽनादृतोऽमुष्य तस्य जंतोस्तज्जन्म धिक् ॥ २१ ॥ ननु सुहृदादिषु परिष्वंगसंप्रश्नादयो जीवधर्माः कथमीश्वरे संगच्छंतेऽत आह । न तस्येति । दयितः प्रियस्तद्विपरीतोऽप्रियः सुहृत्तमो हिततमस्तद्विपरीतो द्वेष्य एतत्सर्वव्यतिरिक्त उपेक्ष्य इति । दयितादयो न संतीति सत्यं तथापि भक्तान्भजते तत्र यथा ये भक्तास्तांस्तथा भजते । ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहमिति भगवद्वचनात् । अविषमत्वेऽपि भक्तेभ्य एव फलं ददातीत्यत्र दृष्टांतः । यद्वत्सुरद्रुम इति ॥ २२ ॥

पासून मुक्त होऊन मोठ्या आनंदास पावेन ॥ १९ ॥ आणि दर्शनानंतर तो भगवान्, जर आपले बाहु लांब पसरून त्यांनीं, 'ज्याला भगवंताशिवाय दुसरा कोणीच इष्ट देव नाहीं अशा' अतिस्नेही मज चुलत्याला आलिंगन करील, तर त्याचवेळीं माझा देह अतिपवित्र होईल आणि त्या आलिंगनाच्या योगानें देहाचा कर्मात्मक बंधहि सुटून जाईल ॥ २० ॥ नंतर भगवंताबरोबर आलिंगन मिळालेल्या व नमस्कार करून हात जोडून उभा राहिलेल्या मला, तो महाकीर्तिमान् श्रीकृष्ण, हे अक्रूरा, काका, इत्यादिक संबोधनें देऊन जेव्हां भाषण करूं लागेल. तेव्हां आमच्या जन्माचें सार्थक होईल. सर्वपूज्य अशा भगवंतानें, ज्याचा आदर मुळींच केला नाहीं, त्या पुरुषाच्या जन्माला धिक्कार असो ॥ २१ ॥ यद्यपि त्या भगवंताला कोणीहि पुरुष प्रिय नाहीं, अप्रिय नाहीं, अत्यंत मित्र नाहीं, द्वेष्य नाहीं व उदासीनहि नाहीं तथापि जसा कल्पवृक्ष आपल्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आश्रय करणारांसच फळ देतो इतरांना देत नाहीं त्याप्रमाणें तो परमात्मा, भक्तांचेच मनोरथ पूर्ण करणारा होतो, इतरांचे पूर्ण करणारा होत नाहीं ॥ २२ ॥ असो, यादवश्रेष्ठ असा त्या कृष्णाचा वडीलबंधु जो बळराम तोहि, हर्षयुक्त होऊन नमस्कार करणाऱ्या मला आलिंगन देईल व त्यावेळीं जो मी अंजलि करीन त्याचेठिकाणींच मला धरून घरांत घेऊन जाईल आणि तेथें अर्घ्यपाद्यादिकेंकरून माझा सत्कार करून, नंतर मला कंसानें आपल्या बंधूंचेठिकाणीं केलेलें अपकारादिक विचारील ॥ २३ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–याप्रमाणें श्वफल्काचा पुत्र तो अक्रूर, मार्गामध्यें कृष्णाचें चिंतन करीत होत्साता, रथाच्या वेगानेंच गोकुळांत जाऊन पोंचला, तों सूर्यनारायणहि अस्ताचलास पोंचला ॥ २४ ॥ त्यावेळीं त्या अक्रूरानें, ज्याचे चरणरेणु सर्वलोकपालांनीं आपल्या किरीटांचेठिकाणीं धारण केले आहेत त्या भगवान् श्रीकृष्णाचीं,

यो मयांजलिः करिष्यते तस्मिन्नेवांजलौ गृहीतं माम् । आप्तानि समस्तान्यर्घादिसत्कृतानि येन तं माम् ॥ २३ ॥ स तु मार्गमपि न वेद तथापि रथेन प्राप्त इति ॥ २४ ॥ अखिलैर्लोकपालैः किरीटेषु जुष्टाः अमलाः पादरेणवो यस्य तस्य । क्षितिकौतुकानि क्षितेरलंकाररूपाणि ॥ २५ ॥ तद्दर्शनेन य आह्लादस्तेन विवृद्धः संभ्रमो यस्य सः । प्रेम्णा ऊर्ध्वाणि रोमाणि यस्य सः । अश्रूणां कलाभिर्लेशैराकुले ईक्षणे यस्य सः । अवस्कंद्यावप्लुत्य तेषु पदेषु सोऽक्रूरः अचेष्टत व्यलुठत् । अहो इति दुर्लभतां भावयन् ॥ २६ ॥ ननु

किंचाग्रजोमाऽवनतं यदूत्तमः स्मयन्परिष्वज्य गृहीतमंजलौ ॥ गृहं प्रवेश्याप्तसमस्तसत्कृतं संप्रक्ष्यते कंसकृतं स्वबंधुषु ॥ २३ ॥ श्रीशुक उवाच ॥ इति संचिंतयन्कृष्णं श्वफल्कतनयोऽध्वनि ॥ रथेन गोकुलं प्राप्तः सूर्यश्चास्तगिरिं नृप ॥ २४ ॥ पदानि तस्याखिललोकपालकिरीटजुष्टामलपादरेणोः ॥ ददर्श गोष्ठे क्षितिकौतुकानि विलक्षितान्यब्जयवांकुशाद्यैः ॥ २५ ॥ तद्दर्शनाह्लादविवृद्धसंभ्रमः प्रेम्णोर्ध्वरोमाऽश्रुकलाकुलेक्षणः ॥ रथादवस्कंद्य स तेष्वचेष्टत प्रभोरमून्यंघ्रिरजांस्यहो इति ॥ २६ ॥ देहंभृतामियानर्थो हित्वा दंभं भियं शुचम् ॥ संदेशाद्यो हरेर्लिंगदर्शनश्रवणादिभिः ॥ २७ ॥ ददर्श कृष्णं रामं च व्रजे गोदोहनं गतौ ॥ पीतनीलांबरधरौ शरदंबुरुहेक्षणौ ॥ २८ ॥

किमर्थमेवं व्यलुठत नास्ति प्रेमसंभ्रमे फलोद्देश इत्याह । देहंभृतामिति । देहभाजामेतावानेव पुरुषार्थः कंसस्य संदेशादारभ्य हरेर्लिंगदर्शनश्रवणादिभिर्योऽयमक्रूरस्य वर्णित इति संदेश आद्यो यस्यार्थस्य स यावानक्रूरस्य जात इति वा ॥ २७ ॥ ततः कृष्णं रामं च ददर्श । गावो दुह्यंतेऽस्मिन्निति गोदोहनं तत्स्थानं गतौ प्राप्तौ ॥ २८ ॥

पृथिवीला अलंकाररूप असून कमल, यव, अंकुश, इत्यादिक चिन्हांनीं चिन्हित अशीं धुरळ्यांत उमटलेलीं पावलें अवलोकन केलीं ॥ २५ ॥ तेव्हां त्या पावलांच्या दर्शनापासून झालेल्या आनंदानें अगदीं व्याकुल झालेला, प्रेमानें आंगावर रोमांच उठलेला व आनंदानें प्राप्त झालेल्या अश्रूंनीं डोळे भरून आलेला तो अक्रूर, अहो ब्रह्मादिकांनाहि दुर्लभ अशीं हीं श्रीकृष्णाचीं चरणरजें आहेत असें मनांत आणून, रथावरून खालीं उडी टाकून त्याचरणरजामध्यें लोळूं लागला ॥ २६ ॥ हे राजा, कंसाची आज्ञा झाल्यापासून येथपर्यंत जो हा हरीच्या चिन्हांच्या दर्शनादिकेंकरून झालेला अक्रूराचा प्रकार वर्णन केला, इतकाच हा पुरुषार्थ, देहधारी प्राण्यांना, गुरूच्या उपदेशानें दांभिकपणा, भय व शोक यांचा त्याग करून, हरीच्या मूर्तींच्या दर्शनश्रवणादिकेंकरून प्राप्त व्हावयाचा आहे. याहून दुसरा कांहींच प्राप्त व्हावयाचा नाहीं ॥ २७ ॥ असो. नंतर त्या अक्रूरानें, कृष्णाला व रामाला अवलोकन केलें. ते रामकृष्ण–गाईंचें दूध काढण्याच्या स्थानीं गेलेले होते. पिंवळा व काळा पीतांबर धारण

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करणारे, शरदृतूंतील कमळासारखे नेत्र असलेले, ॥ २८ ॥ अकरा वर्षांच्या वयाचे, श्याम व श्वेतवर्ण, लक्ष्मीचें आश्रयस्थान, पुष्ट व वाटोळ्या बाहूंनीं युक्त, सुमुख, फारच सुंदर, हत्तीच्या छाव्यासारखी गति असणारे, ॥ २९ ॥ ध्वज, वज्र, अंकुश व कमळ यांच्या रेखाचिन्हांनीं युक्त असलेल्या आपल्या चरणांनीं गोकुळाला शोभविणारे, उदारचित्त, कृपाविलसित व हास्ययुक्त अवलोकन करणारे ॥ ३० ॥ वक्ता, श्रोता वगैरे जनांना इच्छित फल देणाऱ्या मनोहर क्रीडा करणारे, रत्नादिकांच्या व वनपुष्पांच्या माळा धारण करणारे, अंगाला सुगंधयुक्त चंदनाची उटी लावलेले, स्नान केलेले, निर्मळ वस्त्र परिधान केलेले, ॥ ३१ ॥ प्रधानपुरुष, सृष्टीच्या पूर्वींहि असणारे, जगाचें कारण, जगाचे पालक, जगाच्या रक्षणाकरितां आपल्या मूर्तिभेदानें रामकृष्णरूपानें अवतार धारण करणारे, ॥ ३२ ॥ तसेच हे राजा, आपल्या कांतीनें दशदिशा

॥ २९ ॥ अनुक्रोशोऽनुकंपा तद्विलसितस्मितयुक्तमीक्षणं ययोस्तौ ॥ ३० ॥ उदारा रुचिरा क्रीडा ययोस्तौ । स्रग्विणौ रत्नस्रग्भिरलंकृतौ ॥ ३१ ॥ प्रधानभूतौ पुरुषौ प्रकृतिपुरुषात्मकौ वा । कुतः आद्यौ । तदपि कुतः जगद्धेतू । अतएव जगत्पती । विपरीतौ वा चतुर्णां पदानां हेतुहेतुमद्भावः । जगत्यर्थे पृथिव्या भारापनयनाय स्वांशेन मूर्तिभेदेन बलकेशवौ संतावत्तीर्णौ ॥ ३२ ॥ स्वप्रभया विगततिमिरा दिशः कुर्वाणौ । कनकाचितौ सुवर्णव्याप्ताविति सालंकारयोः शैलसादृश्यार्थमुक्तम् ॥ ३३ ॥ ३४ ॥ भगवद्दर्शनाल्हा-

किशोरौ श्यामलश्वेतौ श्रीनिकेतौ बृहद्भुजौ ॥ सुमुखौ सुंदरवरौ बालद्विरदविक्रमौ ॥ २९ ॥ ध्वजवज्रांकुशांभोजैश्चिह्नितैरंघ्रिभिर्व्रजम् ॥ शोभयंतौ महात्मानावनुक्रोशस्मितेक्षणौ ॥ ३० ॥ उदाररुचिरक्रीडौ स्रग्विणौ वनमालिनौ ॥ पुण्यगंधानुलिप्तांगौ स्नातौ विरजवाससौ ॥ ३१ ॥ प्रधानपुरुषावाद्यौ जगद्धेतू जगत्पती ॥ अवतीर्णौ जगत्यर्थे स्वांशेन बलकेशवौ ॥ ३२ ॥ दिशो वितिमिरा राजन्कुर्वाणौ प्रभया स्वया ॥ यथा मारकतः शैलो रौप्यश्च कनकाचितौ ॥ ३३ ॥ रथात्तूर्णमवप्लुत्य सोऽक्रूरः स्नेहविह्वलः पपात चरणोपांते दंडवद्रामकृष्णयोः ॥३४॥ भगवद्दर्शनाह्लादबाष्पपर्याकुलेक्षणः ॥ पुलकाचितांग औत्कंठ्यात्स्वाख्याने नाशकन्नृप ॥ ३५ ॥ भगवांस्तमभिप्रेत्य रथांगांकितपाणिना ॥ परिरेभेऽभ्युपाकृष्य प्रीतः प्रणतवत्सलः ॥ ३६ ॥ संकर्षणश्च प्रणतमुपगुह्य महामनाः ॥ गृहीत्वा पाणिना पाणी अनयत्सानुजो गृहम् ॥ ३७ ॥

देन यद्बाष्पं तेन पर्याकुले ईक्षणे यस्य सः । पुलकैराचितं व्याप्तमंगं यस्य सः । स्वाख्यानेऽक्रूरोऽहं नमस्करोमीति कथने नाशक्नोत् ॥ ३५ ॥ अभिप्रेत्याक्रूरोऽयमेतदर्थमागत इति ज्ञात्वा कंसहननसामर्थ्यं द्योतयन्निव रथांगेन चक्रेणांकितो यः पाणिस्तेनाभ्युपाकृष्य तमालिंगितवान् ॥ ३६ ॥ पाणी अंजलिरूपेण संहतावेव गृहीत्वा ॥ ३७ ॥

प्रकाशित करणारे आणि जसे सुवर्णानें मढविलेले पाचेचा व रुप्याचा हे पर्वत दिसतात त्याप्रमाणें दिसत होते ॥ ३३ ॥ त्यावेळीं स्नेहानें विव्हल झालेला तो अक्रूर, त्वरेनें रथावरून खालीं उतरून रामकृष्णाच्या चरणांच्या समीपभागीं दंडासारखा पडला ॥ ३४ ॥ हे राजा, भगवंताच्या दर्शनापासून झालेल्या आनंदानें प्राप्त झालेल्या अश्रूंनीं ज्याचे नेत्र भरून आले आहेत व ज्याच्या अंगावर रोमांच उभे राहिले आहेत, असा तो अक्रूर, कंठ दाटून आल्यामुळें मी अक्रूर नमस्कार करितों असेंहि सांगण्यास समर्थ झाला नाहीं ॥ ३५ ॥ त्यावेळीं शरणागतवत्सल अशा भगवंतानेंच, आह्मांला नेण्याकरितां हा अक्रूर आला आहे असें जाणून संतुष्ट होऊन, आपणास कंसास मारण्याचें सामर्थ्य आहे असें दर्शवीतच कीं काय चक्राच्या चिन्हानें चिन्हित अशा आपल्या हातानें, त्याला समीपभागीं उचलून घेऊन दृढ आलिंगन दिलें ॥ ३६ ॥ नंतर उदारचित्त अशा बळरामानेंहि नमस्कार करणाऱ्या त्या अक्रूराला आलिंगन देऊन आपल्या हा-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तानें त्याचे जोडलेले हात धरून कृष्णासहवर्तमान त्याला घरांत नेलें ॥ ३७ ॥ नंतर कुशल प्रश्न करून व श्रेष्ठ आसन अर्पण करून, चरणांचें यथाविधि प्रक्षालन केलें आणि मधुपर्कपूजा अर्पण केली ॥ ३८ ॥ नंतर मोठ्या आदरानें समर्थ अशा बळरामानें त्या अतिथि अक्रूराच्या संतोषार्थ गवोत्सर्ग करून व चरण शुश्रूषावगैरेंनीं त्याचे श्रम घालवून त्याला मोठ्या प्रीतीनें शुद्ध व षड्रसयुक्त अन्नाचें भोजन घातलें ॥ ३९ ॥ नंतर भोजन झालेल्या त्याला पुन्हा परम धर्मवेत्त्या त्या बळरामानें, तांबूल, चंदनादिकांच्या उट्या व सुवासिक पुष्पांच्या माळा अर्पण करून परम संतोष उत्पन्न केला ॥ ४० ॥ याप्रमाणें सत्कार केलेल्या त्या अक्रूराला नंदराजानें प्रश्न केला कीं,—हे यादवश्रेष्ठा अक्रूरा, अतिक्रूर असा कंस जिवंत असतां 'जसें खाटकीच रक्षक असलेल्या मेंढ्यांना सुख मिळण्याचें नांवच नको परंतु वांचणें

मधुपर्कं एवार्हणं तस्मिन्वा यद्वुचितमर्हणमाहरत् आनीय समर्पितवानित्यर्थः ॥ ३८ ॥ ३९ ॥ ३० ॥ सत्कृतं संमानितम् । निरनुग्रहेऽक्रूरे कथं केन प्रकारेण स्थ जीवथेत्यर्थः । सौनः पशुघाती स एव पालको येषामवीनां मेषाणां त इव तत्तुल्या इत्यर्थः ॥ ४१ ॥ निरनुग्रहतामाह । योऽवधीदिति । तोकान् तोकानि । असुतृप् असूनेव तर्पयति यः

पृष्ट्वाऽथ स्वागतं तस्मै निवेद्य च वरासनम् ॥ प्रक्षाल्य विधिवत्पादौ मधुपर्कार्हणमाहरत् ॥ ३८ ॥ निवेद्य गां चातिथये संवाह्य श्रांतमादृतः ॥ अन्नं बहुगुणं मेध्यं श्रद्धयोपाहरद्विभुः ॥ ३९ ॥ तस्मै भुक्तवते प्रीत्या रामः परमधर्मवित् ॥ मुखवासैर्गंधमाल्यैः परां प्रीतिं व्यधात्पुनः ॥ ४० ॥ पप्रच्छ सत्कृतं नंदः कथं स्थ निरनुग्रहे ॥ कंसे जीवति दाशार्ह सौनपाला इवावयः ॥ ४१ ॥ योऽवधीत्स्वस्वसुस्तोकान्क्रोशंत्या असुतृप्खलः ॥ किं नु स्वित्तत्प्रजानां वः कुशलं विमृशामहे ॥ ४२ ॥ इत्थं सूनृतया वाचा नंदेन सुसभाजितः ॥ अक्रूरः परिपृष्टेन जहावध्वपरिश्रमम् ॥ ४३ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे अक्रूरागमनं नामाष्टत्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३८ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ सुखोपविष्टः पर्यंके रामकृष्णोरुमानितः ॥ लेभे मनोरथान्सर्वान्पथि यान्स चकार ह ॥ १ ॥

अतः खलः । तस्य कंसस्य प्रजानाम् । हे अक्रूर येषां जीवनमात्रमपि दुर्लभं तेषां वः किं नु कुशलं विचारयाम इति ॥ ४२ ॥ मधुरया वाचा इत्थं सत्कृतः । तथैव वाचापरिपृष्टेन प्रश्नेन । अध्वपरिश्रमं संसारश्रमम् ॥ ४३ ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधे पूर्वार्धे टीकायामष्टत्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३८ ॥ ॥ नवत्रिंशे पुरीं गच्छत्यच्युते गोपिकोक्तयः ॥ अक्रूरेणाथ कालिंद्यां विष्णुलोकस्य दर्शनम् ॥ १ ॥ भक्तानां मनोरथाः सत्या भवंतीति द्योतयन्नाह । सुखोपविष्ट इति । रामकृष्णाभ्यामुरु अधिकं मानित. ॥ १ ॥

सुद्धां घडण्याचें कठीण असतें त्याप्रमाणें तुह्मी कोणत्याप्रकारें वांचतां आहां ? ह्मणजे ज्यांना वांचणें घडण्याचेंसुद्धां दुर्लभ आहे त्यांना दुसरा कुशळप्रश्नच करितां येत नाहीं ॥ ४१ ॥ केवळ प्राणाची तृप्ति करणाऱ्या ज्या खळ कंसानें, आक्रोश करणाऱ्या आपल्या बहिणीच्या अगदीं लहानमुलांचीहि हिंसा केली, त्याच्या प्रजा असलेल्या तुमचें काय बरें कुशळ विचारावें ? ॥ ४२ ॥ याप्रमाणें प्रथम अक्रूरानें कुशळ विचारलेल्या नंदानें, मधुरवाणीनें व सत्कार केलेल्या त्या अक्रूरानें, मार्गामध्यें झालेल्या सर्व परिश्रमाचा त्याग केला ॥ ४३ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील पूर्वार्धांत अक्रूरगोकुळगमनवर्णननामक हा अडतिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३८ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ आतां ह्या एकुणचाळिसाव्या अध्यायामध्यें श्रीकृष्ण मथुरेंत जाऊं लागला असतां, गोपींच्या झालेल्या भाषणांचें व यमुनेंमध्यें अक्रूरानें पाहिलेल्या विष्णुलोकाचें वर्णन केलें आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, नंतर पर्यंकाचेठिकाणीं सुखानें बसलेल्या व रामकृष्णांनीं बहुत आदरसत्कार केले-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्या त्या अक्रूराचे, त्यानें जे मर्मामध्यें केले होते ते सर्व मनोरथ परिपूर्ण झाले ॥ १ ॥ हे राजा, लक्ष्मीपति भगवान् प्रसन्न झाला असतां, दुर्लभ असें काय आहे? कांहींच नाहीं. तथापि जे भगवद्भक्त आहेत ते कशाचीच इच्छा धरीत नाहींत ॥ २ ॥ तेव्हां देवकीपुत्र भगवान् श्रीकृष्णानें, संध्याकाळचें भोजनवगैरे आटोपल्यावर स्वस्थपणें त्या अक्रूराला, कंसाची यादवांचेठिकाणीं वर्तणूक कशी आहे ? हें व दुसरेंहि कांहीं विचारावयाचें होतें तें सर्व विचारिलें ॥ ३ ॥ श्रीभगवान् ह्मणाला– हे ताता, हे सौम्या, तुझें येणें निर्विघ्नपणें झालें आहेना ? कारण, तेंच आह्मांस इष्ट आहे. तुमचें कल्याण होवो. आमच्या मित्रांचें ज्ञातीचें व बांधवांचें दुःखरहित आरोग्य आहेना ? ॥ ४ ॥ हे अक्रूरा, या वेळीं असें विचारणेंहि मला योग्य होत नाहीं; कारण, नावांनें मात्र आमचा मामा परंतु वस्तुतः आमच्या कुळाला रोगतुल्य असा कंस, वृद्धिंगत

॥२ ॥ ३ ॥ हे तात हे सौम्य स्वागतं यथा तथा आगतः स्वज्ञातिबंधूनां स्वे सुहृदः ज्ञातयः सपिंडा बंधवोऽसपिंडाः संबंधिनः तेषामपि किमनमीवमपापमदुःखं सुखमिति यावत् । अनामयमारोग्यम् ॥ ४ ॥ एवं प्रश्नोऽपि मम नातिसंगत इत्याह । किंन्विति । अंग हे अक्रूर पृच्छे पृच्छामि । नोऽस्माकं कुलस्यामये रोगे नो मातुल इति नाम यस्य तस्मिन् । नः स्वानां ज्ञातीनां तस्य प्रजासु च ॥ ५ ॥ अस्मदस्मन्निमित्तम् । वृजिनं दुःखम् । आर्ययोर्निरपराधयोः । यद्धेतोर्योऽहमेव हेतुस्तस्मात् ॥ ६ ॥ हे सौम्य

किमलभ्यं भगवति प्रसन्ने श्रीनिकेतने ॥ तथाऽपि तत्परा राजन्न हि वांछंति किंचन ॥ २ ॥ सायंतनाशनं कृत्वा भगवान्देवकीसुतः ॥ सुहृत्सु वृत्तं कंसस्य पप्रच्छान्यच्चिकीर्षितम् ॥ ३ ॥ श्रीभगवानुवाच ॥ तात सौम्यागतः कच्चित्स्वागतं भद्रमस्तु वः ॥ अपि स्वज्ञातिबंधूनामनमीवमनामयम् ॥ ४ ॥ किं नु नः कुशलं पृच्छे एधमाने कुलामये ॥ कंसे मातुलनाम्न्यंग स्वानां नस्तत्प्रजासु च ॥ ५ ॥ अहो अस्मदभूद्भूरि पित्रोर्वृजिनमार्ययोः ॥ यद्धेतोः पुत्रमरणं यद्धेतोर्बंधनं तयोः ॥ ६ ॥ दिष्ट्याऽद्य दर्शनं स्वानां मह्यं वः सौम्य कांक्षितम् ॥ संजातं वर्ण्यतां तात तवागमनकारणम् ॥ ७ ॥ श्रीशुक उवाच ॥ पृष्टो भगवता सर्वं वर्णयामास माधवः ॥ वैरानुबंधं यदुषु वसुदेववधोद्यमम् ॥ ८ ॥ यत्संदेशो यदर्थं वा दूतः संप्रेषितः स्वयम् ॥ यदुक्तं नारदेनास्य स्वजन्मानकदुंदुभेः ॥ ९ ॥

स्वानां वो दर्शनमद्य मम संजातं तद्दिष्ट्या भद्रम् ॥ ७ ॥ माधवो मधोर्वंशजः ॥ ८ ॥ यो धनुर्मखच्छद्मसंदेशो यस्य । यदर्थं चाणूरादिभिर्घातनार्थम् । अस्य कृष्णस्य पुरतो वर्णयामास । स्वजन्म कृष्णजन्म । आनकदुंदुभे सकाशात् ॥ ९ ॥

होत असतां, आमच्या ज्ञातींचें व त्यांच्या मुलांबाळांचें काय बरें कुशळ विचारावें ? ॥ ५ ॥ ही मोठी दुःखाची गोष्ट आहे कीं, आमच्या निमित्तानें पूज्य अशा मातापितर देवकीवसुदेवांना फारच दुःख झालें. ज्या आमच्या निमित्त त्यांचे पुत्र मरण पावले व त्यांना कैद प्राप्त झाली ! ॥ ६ ॥ असो, हे प्रिया अक्रूरा, मला, स्वकीय अशा तुमचें दर्शन, 'तेथील लोकांचा वृत्तांत समजण्याकरितां' फारदिवस इच्छित होतें तें आज झालें, ह्याच्या योगानें मला मोठा आनंद झाला–यास्तव बा अक्रूरा, तुझ्या येण्याचें कारण काय असेल तें सविस्तर सांगावें ॥ ७ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, याप्रमाणें भगवंतानें प्रश्न केला असतां अक्रूरानें, यादवांचेठिकाणीं असलेला कंसाचा वैरभाव व वसुदेवाच्या वधाचा प्रयत्न इत्यादिक सर्व वर्णन केलें ॥ ८ ॥ जो धनुर्याग पाहण्याचा त्याचा कपटाचा निरोप व ज्याकरितां (चाणूरादिकांकडून मारविण्यासाठीं भेटींसह आणण्याकरितां) आपणास दूताचें काम सांगून कंसानें पाठविलें होतें व जें नारदानें वसुदेवापासून याचें (कृष्णाचें) जन्म कंसास सांगितलें होतें तें सर्व त्या अक्रूरानें कृष्णास वर्णन

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

केलें ॥ ९ ॥ असें अक्रूराचें भाषण-शत्रुरूपी वीसना मारणाऱ्या त्या कृष्णानें व रामानें ऐकून; हास्य केलें व ' आपणास मारण्याचा कंसराजाचा अभिप्राय गुप्त ठेऊन, धनुर्याग पाहण्याकरितां राजानें आह्मांस बोलाविलें आहे असें नंदराजास कळविलें ॥ १० ॥ तेव्हां त्या नंदगोपानेंहि आपल्या गोकुळामध्यें दवंडीवाल्याकडून थाळी पिटवून सर्व गोपांना असें कळविलें कीं,--गोपहो, तुह्मी सर्वांनीं कंसराजास नजराणा देण्याकरितां दहीं दूधवगैरे सर्वप्रकारचा गोरस व संग्रहीं असलेल्या उत्तम वस्तु ग्रहण करा, छकड्यांना बैल जुंपा, उद्यां सकाळीं आह्मी सर्व मथुरेंत जाऊं, कंसराजाला गोरस अर्पण करूं, मोठा होणारा धनुर्यागमहोत्साह पाहूं. हा उत्साह पाहण्याकरितां सर्व देशांतील लोक चालले आहेत ॥ ११ ॥ १२ ॥ तेव्हां कृष्ण हेंच ज्यांचें जीवन आहे अशा गोपी, रामकृष्णांना मथुरानगरींत नेण्याकरितां गोकुळांत अक्रूर आला आहे, असें वर्तमा-

---

विजज्ञतुर्विशेषेण ज्ञापयामासतुः ॥ १० ॥ सोऽपि नंदो गोपान्समादिशत् । तदेव दर्शयति । गृह्यतामित्यादिना । गोरसः क्षीरादिः उपायनान्युत्तमवस्तूनि ॥ ११ ॥ रसान्घृतादीन् । शब्दच्छलेनेदं सूचयति अचिकित्स्यस्य रोगस्य चिकित्सार्थं रसान्दास्याम इति । क्षत्रा व्रजरक्षाधिकृतेन । आघोषयत्सर्वतो घोषितवान् ॥ १२ ॥ ताः कृष्णैकजीवना गोप्यस्तत्तदाऽक्रूरमागतमुपश्रुत्येति ॥ १३ ॥ व्यथालिंगान्याह पंचभिः । काश्चिदिति । तेन श्रवणेन कृतो यो हृत्तापस्तेन यः श्वासस्तेन म्लाना मुखश्रीर्यासां ता बभूवुरिति ।

श्रुत्वाऽक्रूरवचः कृष्णो बलश्च परवीरहा ॥ प्रहस्य नंदं पितरं राज्ञादिष्टं विजज्ञतुः ॥ १० ॥ गोपान्समादिशत्सोऽपि गृह्यतां सर्वगोरसः ॥ उपायनानि गृह्णीध्वं युज्यंतां शकटानि च ॥ ११ ॥ यास्यामः श्वो मधुपुरीं दास्यामो नृपते रसान् ॥ द्रक्ष्यामः सुमहत्पर्व यांति जानपदाः किल ॥ एवमाघोषयत्क्षत्रा नंदगोपः स्वगोकुले ॥ १२ ॥ गोप्यस्तास्तदुपश्रुत्य बभूवुर्व्यथिता भृशम् ॥ रामकृष्णौ पुरीं नेतुमक्रूरं व्रजमागतम् ॥ १३ ॥ काश्चित्तत्कृतहृत्तापश्वासम्लानमुखश्रियः ॥ स्रंसद्दुकूलवलयकेशग्रंथ्यश्च काश्चन ॥ १४ ॥ अन्याश्च तदनुध्याननिवृत्ताशेषवृत्तयः ॥ नाभ्यजानन्निमं लोकमात्मलोकं गता इव ॥ १५ ॥ स्मरंत्यश्चापराः शौरेरनुरागस्मितेरिताः ॥ हृदिस्पृशश्चित्रपदा गिरः संमुमुहुः स्त्रियः ॥ १६ ॥ गतिं सुललितां चेष्टां स्निग्धहासावलोकनम् ॥ शोकापहानि नर्माणि प्रोद्दामचरितानि च ॥ १७ ॥

दुकूलानि च वलयानि च केशग्रंथयश्च स्रंसंतो दुकूलादयो यासां तथाभूताः काश्चन बभूवुरिति ॥ १४ ॥ तस्य श्रीकृष्णस्यानुध्यानेन निवृत्ता अशेषाश्चक्षुरादिवृत्तयो यासां ता इमं लोकं देहमपि न जानंति स्म मुक्ता इवेति ॥ १५ ॥ अपराः स्त्रियः शौरेर्गिरः स्मरंत्यः संमुमुहुः । कथंभूताः । अनुरागेण यत्स्मितं तेनेरिताः । हृदि स्पृशंतीति हृदिस्पृशो मनोज्ञाः । चित्राणि पदानि यासु ताः ॥ १६ ॥ १७ ॥

न ऐकून अत्यंत दुःखित झाल्या ॥ १३ ॥ त्यांच्या दुःखाचीं चिन्हें सांगतो- कितीएक गोपींच्या तर-मुखाची कांति, त्या श्रवणानें केलेल्या हृत्तापापासून प्रखर झालेल्या श्वासवायूनें म्लान होऊन गेली, कितीएक गोपी, दुःखानें कृश झाल्यामुळें त्यांचीं नेसलेलीं वस्त्रें व हातांतील कांकणें गळून पडूं लागलीं व बुचड्यांचे बंध सुटून त्यांतून फुलें गळूं लागलीं ॥ १४ ॥ त्या भगवंताच्या निरंतर ध्यानानें, दुसऱ्या कितीएक गोपींच्या, संपूर्ण चित्तवृत्ति निवृत्त होऊन, जसें मुक्त झालेल्या पुरुषांना त्याच्या देहाचेंसुद्धां अनुसंधान राहत नाहीं तसें त्या गोपींना त्यांच्या देहाचेंसुद्धां भान राहिलें नाहीं ॥ १५ ॥ दुसऱ्या कितीएक गोपी, सप्रेम हास्यानें प्रेरित केलेल्या मनोहर व चित्रविचित्र पदांनीं युक्त अशा कृष्णाच्या वाणीचें स्मरण करून मोह पावल्या ॥ १६ ॥ त्यावेळीं कृष्णाच्या अतिसुंदर गति, रासक्रीडादिक चेष्टा, सप्रेम हास्ययुक्त अवलो- ॥१२१॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कन, शोक घालविणारीं थट्टेचीं भाषणें व मोठीं उदार गोवर्धनोद्धारण्यादिक चरित्रें, यांचें चिंतन करणाऱ्या, त्याचा वियोग होईल ह्मणून भ्यालेल्या, विरहानें व्याकुल झालेल्या, कृष्णाकडे चित्त लागलेल्या व नेत्रांतून दुःखाश्रु ढाळणाऱ्या अशा कित्येक गोपी, थव्याथव्यांनीं एकत्र जमून बोलूं लागल्या कीं, ॥ १७ ॥ १८ ॥ गोपी ह्मणाल्या— हे ब्रह्मदेवा, तुला कोणत्याहि अंशीं दया नाहीं. कशी ह्मणशील तर— तूं प्राणिमात्रांना परस्पर मित्रभावानें व स्नेहानें एकत्र करून, त्यांना सुखभोग प्राप्त होण्याच्या पूर्वींच त्यांचा वियोग करून टाकितोस, ह्मणून तुझें खेळणें लहानमुलाच्या खेळण्यासारखें निरर्थक आहे ॥ १९ ॥ जो तूं, काळ्या कुरळ केंसांनीं वेष्टित, सुंदर गालांनीं व उंच नासिकेनें युक्त व शोक घालविणाऱ्या गूढहास्यानें सुंदर असें भगवंताचें मुखकमळ आह्मांला दाखवून पुन्हा तें अदृश्य करितोस ह्मणून तुझें कर्म

विरहेण कातरा विह्वलाः । अच्युते आशयश्चित्तं यासां ताः ॥ १८ ॥ कृष्णसंगतिं विधाय विघट्टयतीति विधातारं प्रत्येकमाक्रोशंत्य आहुः । अहो इति । मैत्र्या हिताचरणेन प्रणयेन स्नेहेन च अकृतार्थानप्राप्तभोगानपि तान्वियुनंक्षि वियोजयसि तस्मान्न तव दया । बालिशोऽपि त्वमित्याहुः । अपार्थकमिति ॥ १९ ॥ विगर्हितं तवेदं कर्मेत्याहुः । यस्त्वमिति । शोकमपनुदतीति शोकापनोदः स चासौ स्मितलेशश्च गूढहासस्तेन सुंदरं मुकुंदस्य वक्त्रं सकृत्प्रदर्श्य पुनस्तस्य पारोक्ष्यमदृश्यतां करोष्यतस्तव कृतं कर्मासाधु निंद्यमित्यर्थः ॥ २० ॥ किंच दत्तापहारित्वेनातिक्रूरस्त्वमित्याहुः । क्रूरस्त्वमिति । नन्वक्रूरो हरति नाहमिति चेदत आहुः । अक्रूरसमाख्ययेति । न ह्येवं कर्तुमन्यः

चिंतयंत्यो मुकुंदस्य भीता विरहकातराः ॥ समेताः संघशः प्रोचुरश्रुमुख्योऽच्युताशयाः ॥ १८ ॥ गोप्य ऊचुः ॥ अहो विधातस्तव न क्वचिद्दया संयोज्य मैत्र्या प्रणयेन देहिनः ॥ तांश्चाकृतार्थान्वियुनंक्ष्यपार्थकं विक्रीडितं तेऽर्भकचेष्टितं यथा ॥ १९ ॥ यस्त्वं प्रदर्श्यासितकुंतलावृतं मुकुंदवक्त्रं सुकपोलमुन्नसम् ॥ शोकापनोदस्मितलेशसुंदरं करोषि पारोक्ष्यमसाधु ते कृतम् ॥ २० ॥ क्रूर-स्त्वमक्रूरसमाख्यया स्म नश्चक्षुर्हि दत्तं हरसे बताज्ञवत् ॥ येनैकदेशेऽखिलसर्गसौष्ठवं त्वदीयमद्राक्ष्म वयं मधुद्विषः ॥ २१ ॥ न नंद-सूनुः क्षणभंगसौहृदः समीक्षसे नः स्वकृतातुरा बत ॥ विहाय गेहान्स्वजनान्सुतान्पतींस्तद्दास्यमद्धोपगता नवप्रियः ॥ २२ ॥

प्रभवत्यतो नामांतरेण स्म ध्रुवं त्वमेवागऽतोसि । कृष्णं हरामि न युष्मच्चक्षुरिति चेन्न । येन त्वद्दत्तेन चक्षुषा मधुद्विष एकदेशे नेत्रवक्त्रादौ त्वदीयं समग्रं सृष्टिनैपुणमद्राक्ष्म दृष्टवत्यो वयं तच्चक्षुः । अयं भावः । मम सर्वं रहस्यमाभिर्ज्ञातमित्यमर्षेणैव कृष्णं वियोजयन्नस्मानंधीकरोषीति ॥ २१ ॥ विधातारं विहाय । परस्परमूचुः । न नंदसूनु रिति बतेति खेदे । क्षणभंगमस्थिरं सौहृदं यस्य सः । गृहादीन्विहायाद्धा साक्षात्तस्यैव दास्यमुपगताः स्वकृतातुरास्तत्कृतेनैव स्मितादिना परवशा अपि नोऽस्मान्न समीक्षते । नवं नवं प्रियं यस्य सः । अत एनं निवारयाम इति भावः ॥ २२ ॥

अगदीं निंद्य आहे ॥ २० ॥ तूं ज्याअर्थीं आपणच दिलेलें आमचें चक्षु कांहीं विचार न करितां मूर्खासारखें हरण करितोस त्याअर्थीं तूं मोठा क्रूर आहेस. आतां तुमचें चक्षु अक्रूर हरण करितो, मी नाहीं, असें ह्मणशील तर—जो क्रूर नसेल तो अक्रूर, तो असें करण्यास कधींहि समर्थ होणार नाहीं, ह्मणून या अक्रूरनांवानें खरोखर तूंच येथें आला आहेस. आतां मी कृष्णाला नेतों तुमच्या चक्षूला नेत नाहीं असें ह्मणशील तर—ज्या तूं दिलेल्या चक्षूनें कृष्णाच्या नेत्रमुखादिक एकाच्या अवयवावरे-सुद्धां, तुझें सर्व सृष्टीचें चातुर्य आह्मी पाहत होतों, त्या कृष्णाचा वियोग झाल्यावर दुसरें कांहींच पाहण्यासारखें नसल्यामुळें, यांनीं आपलें सर्व चातुर्यरहस्य जाणिलें अशा रागानें तूं कृष्णाचा वियोग करून आह्मांला आंधळ्या करीत आहेस ॥ २१ ॥ आतां ब्रह्मदेवाला सोडून आपणामध्येंच ह्मणतात कीं, अरेरे ! श्रीकृष्णहि एका क्षणामध्यें स्नेह तोडून

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

द्रावणारा व नव्या वध्या स्त्रिया मिय असणारा आहे. पहा–आम्ही घरें, स्वजन, पुत्र व पति या सर्वांचा त्याग करून, साक्षात् त्याच्याच दास्यत्वाप्रत पावलों व त्यानें केलेल्याच मंदहास्यादिकेंकरून परवश झालों. असें असतांहि आतां हा कृष्ण आम्हांकडे पहातसुद्धां नाहीं॥२२॥ ईर्ष्येनें म्हणतात कीं,–मथुरानगरींतील स्त्रियांना ही येणारी रात्र मोठी सुप्रभात (सुखसूचक शकुन होणाऱ्या प्रातःकाळानें युक्त) होणार आहे. तसेच त्यांचे मनोरथहि खरोखर सत्य होणार आहेत. कारण, ज्या पुरवासी स्त्रिया, नगरीमध्यें प्रवेश करणाऱ्या श्रीकृष्णाचें कटाक्ष अवलोकनानें वृद्धिंगत झालेल्या हास्यरसानें युक्त असें मुख, आदरानें अवलोकन करतील ॥ २३ ॥ आतां दोनतीन दिवस तसें होऊ, परंतु पुढें आमच्या स्नेहानें आकर्षण केलेला व नंदादिकांनीं मागें फिरविलेला तो कृष्ण गोकुळांत परत येईल, असें म्हणाल तर– हे स्त्रियाहो, श्रीकृष्ण हा स्वतां जरी धैर्यवान् आहे व

सेर्ष्यमूचुः । सुखं प्रभातेति । व्रजस्पतेः श्रीकृष्णस्य मुखं पास्यंत्यादरेण द्रक्ष्यंति । कथंभूतम् । अपांगेन नेत्रप्रांतेनोत्कलितमुज्जृंभितं स्मितमेवासवो रसो यस्मिंस्तत् । यद्वा अपांगोत्कलितस्मितेनासवरूपं यन्मुखम् । ततश्च पानं मुख्यमेव संभावयंति ॥ २३ ॥ ननु द्वित्राणि दिनानि तथा भवतु नाम तथाऽप्यस्मत्स्नेहाकृष्टः पित्रादिभिश्च परावर्तित आगमिष्यतीत्याशंक्याहुः । हे अबलास्तासां मधुवन्मंजुभिर्भाषितैर्वशीकृतचित्तस्तथा तासां सलज्जस्मितैर्विभ्रमैर्भ्रमन्परवान्पित्रादिपरतंत्रोऽपि । यद्वा व्रजे परेऽन्ये बंधवः संति यस्य तथा मनस्वी धीरोऽपि ग्राम्या अविदग्धा नः कथं प्रतियास्यते प्रत्येष्यति न कथं चिदित्यर्थः ॥ २४ ॥ किंच । अस्मदुत्सवभाजोऽन्य एवाद्य भविष्यंतीत्याहुः । अद्येति

सुखं प्रभाता रजनी यमाशिषः सत्या बभूवुः पुरयोषितां ध्रुवम् ॥ याः संप्रविष्टस्य मुखं व्रजस्पतेः पास्यंत्यपांगोत्कलितस्मितासवम् ॥ २३ ॥ तासां मुकुंदो मधु मंजु भाषितैर्गृहीतचित्तः परवान्मनस्व्यपि ॥ कथं पुनर्नः प्रतियास्यतेऽबला ग्राम्याः सलज्जस्मितविभ्रमैर्भ्रमन् ॥ २४ ॥ अद्य ध्रुवं तत्र दृशो भविष्यते दाशार्हभोजांधकवृष्णिसात्वताम् ॥ महोत्सवः श्रीरमणं गुणास्पदं द्रक्ष्यंति ये चाध्वनि देवकीसुतम् ॥ २५ ॥ मैतद्विधस्याकरुणस्य नाम भूदक्रूर इत्येतदतीव दारुणः ॥ योऽसावनाश्वास्य सुदुःखितं जनं प्रियात्प्रियं नेष्यति पारमध्वनः ॥ २६ ॥

तत्र पुरे दाशार्हादीनां दृशो दृष्टेर्महानुत्सवो भविष्यते भविष्यति । ये देवकीसुतं द्रक्ष्यंति तथा ये चाध्वनि गच्छंतं द्रक्ष्यंति तेषामपि दृशो भविष्यतीति । यद्वा दृश इति द्वितीया । तेषां दृशो नेत्राणि महोत्सवो भविष्यते प्राप्स्यति प्राप्त्यर्थस्य भवतेरात्मनेपदित्वात् ॥ २५ ॥ अक्रूरं शपंत्य आहुः । मैतद्विधस्येति । एषा विधा विधानं कर्म यस्य अतएव निष्कृपस्याक्रूर इति शोभनं नाम माभूत् । तत्र हेतुः । अतीव दारुण इत्यादि । प्रियात्प्राणादपि प्रियतरं कृष्णमध्वनः पारमस्मद्दृग्गोचरत्वादतिदूरं देशं नेष्यति ॥ २६ ॥

नंदादिकांच्या आज्ञेमध्येंहि आहे तथापि त्या पुरस्त्रियांच्या मधासारख्या गोड मंजुळ भाषणांनीं आकृष्टचित्त होऊन व त्यांच्या लज्जायुक्त हास्यांनीं व सुंदरविलासांनीं, त्यांच्याच ठिकाणीं आसक्त झाला म्हणजे मग गांवढळ (चातुर्यरहित) अशा आम्हांकडे पुन्हा कशाला येईल ? येणारच नाहीं ॥ २४ ॥ आणि आतां आमच्या उत्साहाचें सेवन करणारे दुसरेच होतील. कारण, आज त्या मथुरेमध्यें, लक्ष्मीचा पति व सौंदर्यादिक गुणांचा आश्रयभूत अशा देवकीपुत्राला जे पाहतील त्या–दाशार्ह, भोज, अंधक, वृष्णि व सात्वत इत्यादिक यादवांच्या आणि मार्गामध्यें गमन करणाऱ्या त्या श्रीकृष्णाला पाहणाऱ्या इतरहि लोकांच्या दृष्टींना आज अवश्य मोठाच आनंद प्राप्त होईल ॥ २५ ॥ ॥१२२॥
आतां चडफडत अक्रूराला म्हणतात कीं,– असें दुष्टकर्म करणाऱ्या निर्दय पुरुषाला अक्रूर असें हें चांगलें नांवच योग्य नाहीं. कारण, हा अतिशयच क्रूर आहे. कसा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

म्हणाल तर– जो हा अक्रूर, अत्यंत दुःखित झालेल्या आम्हां लोकांचें सांत्वन न करितां, प्राणापेक्षांहि अतिप्रिय अशा श्रीकृष्णाला, आमच्या दृष्टिमार्गास अगोचरस्थळीं घेऊन जाणार आहे ॥ २६ ॥ अरे ! कठोरचित्त असा हा श्रीकृष्ण जाण्याकरितां रथावर बसला आहे आणि त्याच्या मागून हे मदोन्मत्त गोपहि छकड्यांवर बसून जाण्याची त्वरा करीत आहेत. बरें, त्यांचा अन्याय पाहून उपनंदादिक वृद्ध गोपहि त्यांचें निवारण करीत नाहींत, त्यापेक्षां आमचें दैवच प्रतिकूळ होऊन हीं अशीं कृत्यें करीत आहे. जर आमचें दैव अनुकूळ असतें तर यांच्यामध्यें एखाद्यालातरी कांहीं विघ्न झालें असतें, किंवा अकस्मात् वज्रपात झाला असता, अथवा दुसरेंच कांहींतरी अनिष्ट झालें असतें, तें कांहींच होत नाहीं. तेव्हां प्रतिकूळ दैव असलेल्या आमच्या वांचण्यालाच धिक्कार असो ॥ २७ ॥ आतां साहसकृत्याचा निश्चय करितात– आह्मी सर्व एकत्र जमून कृष्णा-

---

अहो धिगस्मज्जीवितमित्याहुः । अनार्द्रधीरिति । अनार्द्रा कठिना धीर्यस्य स तावदेष कृष्णो रथमधिरूढः । अस्याविनयमालक्ष्य स्थविरैश्चोपेक्षितम् । तेन निवारितवंत इत्यर्थः । किंच दैवं चेति । अयं भावः । यदि दैवमस्माकमनुकूलं भवेत्तर्हि विघ्नैः कश्चिदेषां मध्ये प्रतिहन्येत अकस्माद्वज्रपातो वा भवेत् । अन्यद्वा किंचिदनिष्टं स्यान्नतु तत्किंचिदस्तीति ॥ २७ ॥ परस्परं संमंत्र्य साहसमधिरुह्याहुः । निवारयाम इति । अकरिष्यन्करिष्यंति । निमिषार्धदुस्त्यजान्मुकुंदसंगाद्धि ध्वंसितानि वियोजितान्यतएव दीनानि चेतांसि यासाम् । एवंभूतानामस्माकं न मृत्योरपि भयमित्यर्थः ॥ २८ ॥ इतोऽपि कारणादवश्यं साहसमेवावलंबनीयमित्याहुः । हे गोप्यो यस्य ललितं स्मितं च वल्गु मंत्रश्च

अनार्द्रधीरेष समस्थितो रथं तमन्वमी च त्वरयंति दुर्मदाः ॥ गोपा अनोभिः स्थविरैरुपेक्षितं दैवं च नोऽद्य प्रतिकूलमीहते ॥२७॥ निवारयामः समुपेत्य माधवं किं नोऽकरिष्यन्कुलवृद्धबांधवाः ॥ मुकुंदसंगान्निमिषार्धदुस्त्यजाद्दैवेन विध्वंसितदीनचेतसाम् ॥ २८ ॥ यस्यानुरागललितस्मितवल्गुमंत्रलीलावलोकपरिरंभणरासगोष्ठ्याम् ॥ नीताः स्म नः क्षणमिव क्षणदा विना तं गोप्यः कथं न्वतितरेम तमो दुरंतम् ॥ २९ ॥ योऽह्नः क्षये व्रजमनंत सखः परीतो गोपैर्विशन्खुररजश्छुरितालकस्रक् ॥ वेणुं क्वणन्स्मितकटाक्षनिरीक्षणेन चित्तं क्षिणोत्यमुमृते नु कथं भवेम ॥ ३० ॥

लीलावलोकश्च परिरंभणं चानुरागेणैतानि यस्यां रासगोष्ठ्यां रासक्रीडासभायां नोऽस्माभिः क्षणदा रात्रयः क्षणमिव नीतास्तममुं कृष्णं विना दुरंतं तमो विरहदुःखं कथं नु अतितरेम । न कथंचिदित्यर्थः ॥ २९ ॥ किंच आस्तां तावत्तमोऽतितरणं जीवनमेव कथं स्यादित्याहुः । य इति । अह्नः क्षये दिनावसाने खुररजोभिश्छुरिता धूसरा अलकाः स्रजश्च यस्य स व्रजं विशन् स्मितेन यत्कटाक्षनिरीक्षणं तेन नश्चित्तं क्षिणोति हरति । अमुं कृष्णं विना कथं भवेम जीवेम ॥ ३० ॥

जवळ जाऊन मथुरेस जाण्याविषयीं त्याचा निषेध करूंया. असें केल्यानें वृद्धपुरुषांचा कोप होईल असें म्हणाल तर– अर्धनिमेषसुद्धां टाकण्यास कठीण अशा कृष्णाच्या संगतीपासून दैवानें वियोग झाल्यामुळें दीनचित्त झालेल्या आमचें, कुळांतील वृद्ध पुरुष व बांधव काय बरें करणार आहेत? अशाप्रकारच्या आह्मांला यावेळीं मृत्यूचेंसुद्धां भय नाहीं ॥ २८ ॥ या दुसऱ्या कारणानेंहि आह्मी साहसकर्मच केलें पाहिजे असें सांगतात–हे गोपीहो, ज्या कृष्णाच्या स्नेहानें घडलेल्या सुंदर हास्य, मनोहर भाषण, लीलापूर्वक कटाक्षावलोकन व आलिंगन यांनीं युक्त असलेल्या रासक्रीडारूप सभेमध्यें, आह्मी पुष्कळ रात्री एकाक्षणासारख्या घालविल्या आहेत, त्या ह्या कृष्णावांचून आतां दुःसह असें विरहदुःख कसें बरें सहन करावें ? तें सहन करणें फारच कठीण आहे ॥ २९ ॥ आतां असो तें दुःख सहन करणें, परंतु आमचें वांचणेंच घडणें कठीण आहे, असें सांगतात– जो श्रीकृष्ण, दररोज सायंकाळीं बळरामासहवर्तमान गोपांनीं वेष्टित व गाईंच्या खुररजानें ज्याच्या गळ्यांतील माळा व कुरळ केंस मळिन झाले आहेत असा होऊन गोकुळा-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मध्यें प्रवेश करितो व मुरली वाजवीत मंदहास्यपूर्वक कटाक्षावलोकनानें आमचें चित्त हरण करितो, त्या कृष्णावांचून आतां आम्हीं वांचावें तरी कसें ? ॥ ३० ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, याप्रमाणें बोलणाऱ्या, कृष्णाचेठिकाणीं अत्यंत आसक्तचित्त झालेल्या व पुढें होणाऱ्या श्रीकृष्णाच्या विरहानें घाबरलेल्या त्या सर्व गोपी, लज्जा सोडून मोठ्यानें स्वर काढून हे गोविंदा, हे दामोदरा, हे माधवा, याप्रमाणें संबोधनें देत रुदन करूं लागल्या ॥ ३१ ॥ याप्रमाणें स्त्रिया रुदन करीत असतां, सूर्योदय झाल्यावर स्नानसंध्यादिक नित्यकर्मं आटोपलेल्या त्या अक्रूरानें, रामकृष्ण आंत बसलेला तो रथ, मथुरेकडे चालविला ॥ ३२ ॥ तदनंतर कंसराजाला द्यावयाच्या पुष्कळ भेटी व गोरसानें तोंडोतोंड भरलेले कुंभ घेऊन, नंदादिक गोप, आपापल्या गाड्यांवर बसून त्या रथाच्या मागून निघाले ॥ ३३ ॥ त्यावेळीं

कृष्णे विषक्तानि मानसानि यासाम् । सुस्वरमुच्चैः ॥ ३१ ॥ क्रूरमक्रूरतः श्रुत्वा कंसं कंसनिषूदनः ॥ गोपीमनोरथारामः सरामः स्वपुरं ययौ ॥ स्त्रीणामिति ता अनादृत्य कृतमैत्रादिको मैत्रं मित्रदैवतं संध्योपासनं तदादिकर्म कृतं येन सः ॥ ३२ ॥ अन्वसज्जंतान्वगच्छन् ॥ ३३ ॥ अनुरंजिताः परावृत्य निरीक्षणादिभिः किंचिदानंदिताः । प्रत्यादेशं

श्रीशुक उवाच ॥ एवं ब्रुवाणा विरहातुरा भृशं व्रजस्त्रियः कृष्णविषक्तमानसाः ॥ विसृज्य लज्जां रुरुदुः स्म सुस्वरं गोविंद दामो-
दर माधवेति ॥ ३१ ॥ स्त्रीणामेवं रुदंतीनामुदिते सवितर्यथ ॥ अक्रूरश्चोदयामास कृतमैत्रादिको रथम् ॥ ३२ ॥ गोपा-
स्तमन्वसज्जंत नंदाद्याः शकटैस्ततः ॥ आदायोपायनं भूरि कुंभान्गोरससंभृतान् ॥ ३३ ॥ गोप्यश्च दयितं कृष्णमनुव्रज्यानुरंजि-
ताः ॥ प्रत्यादेशं भगवतः कांक्षंत्यश्चावतस्थिरे ॥ ३४ ॥ तास्तथा तप्यतीर्वीक्ष्य स्वप्रस्थाने यदूत्तमः ॥ सांत्वयामास सप्रेमैरायास्य
इति दौत्यकैः ॥ ३५ ॥ यावदालक्ष्यते केतुर्यावद्रेणू रथस्य च ॥ अनुप्रस्थापितात्मानो लेख्यानीवोपलक्षिताः ॥ ३६ ॥ ता
निराशा निववृतुर्गोविंदविनिवर्तने ॥ विशोका अहनी निन्युर्गायंत्यः प्रियचेष्टितम् ॥ ३७॥ भगवानपि संप्राप्तो रामाक्रूरयुतो नृप ॥
रथेन वायुवेगेन कालिंदीमघनाशिनीम् ॥ ३८ ॥

प्रत्याख्यानम् ॥ ३४ ॥ तप्यतीः संतप्यमानाः । आयास्ये शीघ्रमागमिष्यामीति दूतवाक्यैः ॥ ३५ ॥ कृष्णमनु प्रस्थापिता आत्मानश्चित्तानि याभिस्ताः । लेख्यमयपुत्तिका इव निश्चलाः ॥ ३६ ॥ ३७ ॥ ३८ ॥

सर्व गोपीहि त्या प्रिय श्रीकृष्णाच्या मागून चालल्या असतां, त्यानें रथांतून मागें फिरून पाहिल्यामुळें त्या किंचित् आनंद पावल्या आणि आपणास परत जाण्याविषयीं भगवंताची आज्ञा होण्याची वाट पाहत तेथेंच उभ्या राहिल्या ॥ ३४ ॥ तेव्हां यादवश्रेष्ठ श्रीकृष्णानें, आपल्या मथुरेंत जाण्याच्या निमित्तानें अतिशय ताप पावलेल्या त्या गोपींना पाहून ‘ मी लवकरच येईन, अशा ’ दूतांजवळ सांगून पाठविलेल्या प्रेमयुक्त भाषणांनीं त्यांचें सांत्वन केलें ॥ ३५ ॥ तेव्हां ज्यांनीं आपलीं मनें कृष्णाबरोबर पाठविलीं आहेत अशा त्या गोपी, कृष्णाच्या रथाचा ध्वज जोंपर्यंत दिसत होता व नंतर आकाशांत उडालेला त्या रथाचा धुरळा जोंपर्यंत दिसत होता, तोंपर्यंत चित्ररूपी स्त्रिया जशा निश्चळ राहतात त्याप्रमाणें निश्चळ राहून ॥ ३६ ॥ नंतर दूर गेलेला श्रीकृष्ण माघारा फिरण्याविषयीं निराश झालेल्या त्या गोपी, तेथून माघाऱ्या फिरल्या आणि प्रिय कृष्णाचें चेष्टित गायन करून शोकरहित होत्सात्या एकेक रात्र व एकेक दिवस घालवूं लागल्या ॥ ३७ ॥ हे राजा, इकडे, बळराम

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

व अक्रूर यांसहित श्रीकृष्णहि, ~~वायूसारखा वेग असलेल्या~~ रथानें ~~पापांचा नाश करणाऱ्या~~ यमुनेच्या काठीं प्राप्त झाला ॥ ३८ ॥ तेथें वृक्षांच्या झाडीमध्यें रथ उभा करून त्यावरून बळरामासह श्रीकृष्ण खालीं उतरला आणि त्या यमुनेच्या निर्मळ व इंद्रनीळ मण्यासारख्या श्यामवर्ण उदकानें हस्तपादमुखांचें प्रक्षालन करून व तें उदक प्राशन करून पुन्हा वृक्षांच्या झाडींत येऊन तो बळरामासह श्रीकृष्ण रथावर बसला ॥ ३९ ॥ तेव्हां ~~शत्रूंपासून शंका उत्पन्न झालेल्या त्या~~ अक्रूरानेंहि, रामकृष्णांना रथावर बसवून मग त्यांना विचारून तो माध्यान्हिक कृत्य करण्याकरितां यमुनेच्या डोहामध्यें प्रविष्ट झाला आणि तेथें त्यानें यथाविधि स्नान करण्यास आरंभ केला ॥ ४० ॥ आणि त्या उदकामध्यें बुडी मारून सनातन ब्रह्मरूप प्रणवादिक मंत्रांचा जप करूं लागला त्यावेळीं त्या अक्रूरानें तेथें एकत्र असलेल्या त्या रामकृष्णांसच अवलोकन केलें ॥ ४१ ॥ तेव्हां तो अक्रूर, ते रथावर असलेले वसुदेवाचे पुत्र येथें कसे आले? जर रथावरून उतरून येथें आले असतील तर रथावर नसतील असा तर्क करून त्यानें वर मस्तक करून

वृक्षाणां षंडं समूहमुपव्रज्य ॥ ३९ ॥ शत्रुभ्यः शंकितः सन् रथोपरि निवेश्य ॥ ४० ॥ ब्रह्म वेदं जपन् । केमौ बालौ क्व तौ मद्धावितिं शंकितचेतसे ॥ अक्रूराय जले रूपमत्याश्चर्यं व्यदर्शयत् ॥ ४१ ॥ ४२ ॥ ४३ ॥ सिद्धादिभिः स्तूयमानम् ॥ ४४ ॥ सहस्रं शिरांसि यस्य तम् । सहस्रफणेषु मौलयो यस्य संतीति तथा तम् । नीले अंबरे यस्य-

तत्रोपस्पृश्य पानीयं पीत्वा मृष्टं मणिप्रभम् ॥ वृक्षषंडमुपव्रज्य सरामो रथमाविशत् ॥ ३९ ॥ अक्रूरस्तावुपामंत्र्य निवेश्य च र-
थोपरि ॥ कालिंद्या ह्रदमागत्य स्नानं विधिवदाचरत् ॥ ४० ॥ निमज्ज्य तस्मिन्सलिले जपन्ब्रह्म सनातनम् ॥ तावेव ददृशेऽक्रूरो
रामकृष्णौ समन्वितौ ॥ ४१ ॥ तौ रथस्थौ कथमिह सुतावानकदुंदुभेः ॥ तर्हि स्वित्स्यंदने न स्त इत्युन्मज्ज्य व्यचष्ट सः ॥ ४२ ॥
तत्रापि च यथापूर्वमासीनौ पुनरेव सः ॥ न्यमज्जद्दर्शनं यन्मे मृषा किं सलिले तयोः ॥ ४३ ॥ भूयस्तत्रापि सोऽद्राक्षीत्स्तूयमा-
नमहीश्वरम् ॥ सिद्धचारणगंधर्वैरसुरैर्नतकंधरैः ॥ ४४ ॥ सहस्रशिरसं देवं सहस्रफणमौलिनम् ॥ नीलांबरं बिसश्वेतं शृंगैः श्वेत-
मिव स्थितम् ॥ ४५ ॥ तस्योत्संगे घनश्यामं पीतकौशेयवाससम् ॥ पुरुषं चतुर्भुजं शांतं पद्मपत्रारुणेक्षणम् ॥ ४६ ॥ चारुप्रसन्न-
वदनं चारुहासनिरीक्षणम् ॥ सुभ्रून्नसं चारुकर्णं सुकपोलारुणाधरम् ॥ ४७ ॥

तम् । बिसवत्कमलनालवच्छ्वेतम् । शृंगैः शिखरैः श्वेतं कैलासमिव स्थितम् ॥ ४५ ॥ तस्योत्संगे कुंडलीकृतदेहार्धे विलोक्येत्येकादेशने श्लोकेनान्वयः ॥ ४६ ॥ शोभने भ्रुवौ यस्य उन्नता नासिका यस्य तं च तं च । शोभनौ कपोलौ यस्य अरुणावधरौ यस्य तं च तं च ॥ ४७ ॥

रथाकडे पाहिलें ॥ ४२ ॥ तों तेथें ते पूर्वीप्रमाणें बसलेले आहेत असें त्याच्या दृष्टीस पडलें. तेव्हां पाण्यामध्यें जें त्यांचें मला दर्शन झालें तें खोटें किंवा खरें, याची खातरी करून घेण्याकरितां त्या अक्रूरानें पुन्हा पाण्यामध्यें बुडी मारिली ॥ ४३ ॥ तों तेथेंहि पुन्हा त्यानें, नम्रमस्तक अशा सिद्धचारणगंधर्वांनीं व असुरांनीं स्तुति केलेला, हजार मस्तकांनीं युक्त, हजार फड्यांवर किरीट धारण करणारा, दैदीप्यमान, काळें वस्त्र धारण करणारा, कमळाच्या कंदासारखा श्वेतवर्ण व जसा रुप्याचा कैलासपर्वत सुवर्णमय शिखरांनीं शोभतो त्याप्रमाणें फड्यांवरील किरीटांनीं शोभणारा अशा शेषाला अवलोकन केलें ॥ ४४ ॥ ४५ ॥ त्याच्या कुंडलाकार केलेल्या अर्ध्या देहावर निजलेला मेघासारखा श्यामवर्ण, पिंवळा भरजरीचा पीतांबर नेसलेला, चार बाहूंनीं युक्त, शांत, कमळपत्रांसारख्या आरक्त नेत्रानीं युक्त, ॥ ४६ ॥ सुंदर व प्रसन्न मुख असलेला,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सुंदर हास्यसहित अवलोकन करणारा, सुरेख भ्रुकुटि, उंच नासिका, सुंदर कर्ण, मनोहर गाल व आरक्त अधरोष्ठ असलेला, ॥ ४७ ॥ गुडघ्यांपर्यंत लांब व पुष्ट अशा भुजा उंचखांदे व वक्ष स्थळावर लक्ष्मी असलेला, शंखासारखा तीन रेखांनीं युक्त कंठ, खोल नाभि, व वळकुट्यांनीं युक्त असें अश्वत्थाच्या पर्णासारखें पोट असलेला, ॥ ४८ ॥ विस्तीर्ण असलेल्या कमरेच्या मागच्या भागानें व हत्तीच्या सोंडेसारख्या सुंदर अशा दोन मांड्यांनीं युक्त, सुंदर गुडघ्यांनीं व सुरेख पायांच्या पोट्यांनीं युक्त ॥ ४९ ॥ थोडेसे उंच जे घोंटे व अरुणवर्ण जो नखांचा समुदाय त्यांच्या कांतींनीं युक्त, नव्या ज्या अंगुळी व आंगठे त्याच जणुं पाकळ्या त्यांच्या योगानें शोभत असलेल्या चरणकमळांनीं युक्त, ॥ ५० ॥ बहुत मोलाच्या रत्नसमुदायांनीं जडित असलेल्या किरीट, कडीं तोडे, बाहुभूषणें, कमरपट्टा, यज्ञोपवीत, हार नूपुरें आणि कुंडलें

तुंगावंसौ यस्य उरस्थले श्रीर्यस्य तं च तं च । वलिमत्पल्लवोदरं वलयस्तिर्यङ्निम्नरेखा यस्य संति तद्वलिमत्तच्च तत्पल्लववदश्वत्थदलसदृशमुदरं यस्य तम् ॥ ४८ ॥ कटितटं च श्रोणिश्च करभसदृशमूरुद्वयं च बृहच्च तत्कटितटश्रोणिकरभोरुद्वयं च तेनान्वितम् । येद्वा बृहद्भ्यां कटितटश्रोणिभ्यां करभोरुद्वयेन चान्वितम् ॥ ४९ ॥ तुंगावीषदुन्नतौ गुल्फावरुणनखव्रातश्च तेषां दीधितिभिः । तथा नवाः कोमला अंगुल्योऽगुष्ठौ च तान्येव दलानि तैश्च विलसच्छोभमानं पादपंकजं यस्य तम् ॥ ५० ॥ सुमहार्हा मणिव्राता येषु

प्रलंबपीवरभुजं तुंगांसोरस्थलश्रियम् ॥ कंबुकंठं निम्ननाभिं वलिमत्पल्लवोदरम् ॥ ४८ ॥ बृहत्कटितटश्रोणिकरभोरुद्वयान्वितम् ॥ चारुजानुयुगं चारुजंघायुगलसंयुतम् ॥ ४९ ॥ तुंगगुल्फारुणनखव्रातदीधितिभिर्वृतम् ॥ नवांगुल्यंगुष्ठदलैर्विलसत्पादपंकजम् ॥ ५० ॥ सुमहार्हमणिव्रातकिरीटकटकांगदैः ॥ कटिसूत्रब्रह्मसूत्रहारनूपुरकुंडलैः ॥ ५१ ॥ भ्राजमानं पद्मकरं शंखचक्रगदाधरम् ॥ श्रीवत्सवक्षसं भ्राजत्कौस्तुभं वनमालिनम् ॥ ५२ ॥ सुनंदनंदप्रमुखैः पार्षदैः सनकादिभिः ॥ सुरेशैर्ब्रह्मरुद्राद्यैर्नवभिश्च द्विजोत्तमैः ॥ ५३ ॥ प्रह्लादनारदवसुप्रमुखैर्भागवतोत्तमैः ॥ स्तूयमानं पृथग्भावैर्वचोभिरमलात्मभिः ॥ ५४ ॥ श्रिया पुष्ट्या गिरा कांत्या कीर्त्या तुष्ट्येलयोर्जया ॥ विद्ययाऽविद्यया शक्त्या मायया च निषेवितम् ॥ ५५ ॥ विलोक्य सुभृशं प्रीतो भक्त्या परमया युतः ॥ हृष्यत्तनूरुहो भावपरिक्लिन्नात्मलोचनः ॥ ५६ ॥

तैः किरीटादिभिः ॥ ५१ ॥ ५२ ॥ पृथक् पृथक् भावोऽभिप्रायो येषां तैः । तत्र पार्षदैः स्वामीति स्तूयमानम् । सनकादिभिर्ब्रह्मेति । ब्रह्माद्यैर्महेश्वर इति । मरीच्यादिभिर्द्विजोत्तमैः परः प्रजापतिरिति । वसुरुपरिचरः । प्रह्लादनारदवसवः प्रमुखा मुख्या येषां तैः परं दैवतमिति च । श्रेष्ठैर्वचोभिः पृथग्भावैर्वचोभिरिति वा ॥ ५३ ॥ ५४ ॥ विद्याविद्ये जीवानां मुक्तिसंसृतिहेतू माया तयोः कारणम् । शक्तिर्ह्लादिनी संविज्ज्ञानमाभिरन्याभिश्च निषेवितम् ॥ ५५ ॥ विलोक्य सुभृशं प्रीतोऽस्मत्कृष्णोऽसावेवंभूतः परमे-

---

यांच्या योगानें प्रकाशमान, उजव्या हातांत कमळ धारण करणारा व बाकीच्या तीन हातांनीं शंख, चक्र व गदा हीं धारण करणारा, वक्षस्थळाचेठिकाणीं श्रीवत्स लांछन व कंठामध्यें कौस्तुभ आणि वनमाळा असलेला, ॥ ५१ ॥ ५२ ॥ तसाच निर्मळचित्त अशा सुनंदनंदादिक पार्षदांनीं आपला स्वामी अशा बुद्धीनें, सनकादिक ऋषींनीं, ब्रह्मबुद्धीनें, ब्रह्मरुद्रादिक देवेश्वरांनीं महेश्वरबुद्धीनें, मरीच्यादिक नऊ ब्राह्मणश्रेष्ठांनीं प्रजापतिबुद्धीनें, आणि प्रल्हाद, नारद, वसु इत्यादिक उत्तम भगवद्भक्तांनीं भगवान् अशा बुद्धीनें, मिळून सर्वभक्तांनीं निरनिराळ्या अभिप्रायानें स्तुति केलेला ॥ ५३ ॥ ५४ ॥ व लक्ष्मी, पुष्टि, सरस्वती, कांति, कीर्ति, तुष्टि, इळा, ऊर्जा, विद्या, अविद्या, शक्ति आणि माया ह्या बारा शक्तींनीं सेवन केलेला, ॥ ५५ ॥ अशा देवाला अवलोकन करून अत्यंत संतुष्ट झालेला, उत्तम भक्तीनें युक्त, आंगावर रोमांच उठलेला व

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रीतीच्या अतिशयानें सद्गदितचित्त होऊन आनंदाश्रूंनीं डोळे भरून आलेला तो अक्रूर, हळुहळू धैर्याचा आश्रय करून, मस्तकानें भगवंताला नमस्कार करून व हात जोडून एकाग्रचित्त होत्साता, सद्गदित झालेल्या वाणीनें त्या भगवंताची स्तुति करूं लागला ॥ ५६ ॥ ५७ ॥ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील दशमस्कंधामध्यें भगवत्प्रमाणनिरूपणनामक हा एकुणचाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३९ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या चाळिसाव्या अध्यायामध्यें अक्रूरानें, श्रीकृष्ण हा ब्रह्मादिकांचाहि ईश्वर आहे असें जाणून भक्तीनें नमस्कार करून त्याचें सगुणनिर्गुणभेदांनीं स्तवन केलें; अशी कथा वर्णन केली आहे ॥ १ ॥ अक्रूर ह्मणाला–

श्वर इति ज्ञात्वेति ॥ ५६ ॥ ५७ ॥ इति दशमे पूर्वार्धे टीकायामेकोनचत्वारिंशोऽध्यायः ॥ ३९ ॥ ॥ चत्वारिंशे ततोऽक्रूरः कृष्णं मत्वेश्वरेश्वरम् ॥ प्रणम्य भक्त्या तुष्टाव सगुणागुणभेदतः ॥ १ ॥ श्रीकृष्णं प्रणमति । नतोऽस्मीति । हे कृष्ण त्वा त्वां नतोऽस्मि । त्वमस्मत्पितृव्यः कुतो मां बालं नतोऽसि तत्राह । आद्यं पुरुषमव्ययं चानादिनिधनमित्यर्थः । कुत एतत् । अखिलहेतूनां हेतुम् । स तु नारायणो नाहमिति चेत्तत्राह । नारायणं त्वाम् । किं नारायण इति मां स्तौषि काऽत्र स्तुतिः सत्यमेवेत्याह । यन्नाभिजातादिति । यतो ब्रह्मणः ॥ १ ॥ अखिलहेतुत्वं प्रपंचयति । भूरिति । खस्यादिरहंकारः । अजा माया तस्या आदिः पुरुषः । एते ये जगतो हेतवस्ते सर्वे तवांगभूता अंगाच्छ्रीमूर्तेर्भूताः । उपसर्जनभूता वा ॥ २ ॥ नन्वतिस्तुतिः कथं क्रियतेऽहमेवान्यत उत्पन्नस्ततपरतंत्रश्चेत्याशंक्य तवैषा माया त्वत्पारमार्थ्यं तु न कोऽपि वेदेत्याह । नैत

गिरा गद्गदयाऽस्तौषीत्सत्त्वमालंब्य सात्वतः ॥ प्रणम्य मूर्ध्नाऽवहितः कृतांजलिपुटः शनैः ॥ ५७ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे अक्रूरप्रतियाने एकोनचत्वारिंशोऽध्यायः ॥ ३९ ॥ ॥ अक्रूर उवाच ॥ नतोऽस्म्यहं त्वाऽखिलहेतुहेतुं नारायणं पूरुषमाद्यमव्ययम् ॥ यन्नाभिजातादरविंदकोशाद्ब्रह्माऽऽविरासीद्यत एष लोकः ॥ १ ॥ भूस्तोयमग्निः पवनः खमादिर्महानजादिर्मन इंद्रियाणि ॥ सर्वेंद्रियार्था विबुधाश्च सर्वे ये हेतवस्ते जगतोंऽगभूताः ॥ २ ॥ नैते स्वरूपं विदुरात्मनस्ते ह्यजादयोऽनात्मतया गृहीताः ॥ अजोऽनुबद्धः स गुणैरजाया गुणात्परं वेद न ते स्वरूपम् ॥ ३ ॥

इति । एते अज आदिर्येषां ते आत्मनस्ते स्वरूपं न विदुः । अनात्मतया जडत्वेन कारणेन । जडत्वे हेतुः । गृहीताः प्रत्यक्षादिभिर्दृष्टाः । न ह्यजडो दृग्गोचर इति भावः । ननु जडा मां मा जानंतु जीवस्तु ज्ञास्यतीत्यत आह । अज इति । सोऽजो ब्रह्माऽप्यजाया गुणैरनुबद्ध आवृतो गुणातीतं ते तव स्वरूपं न वेदान्यः कुतो ज्ञास्यतीति । यद्वा प्रकृत्यादय आत्मनः स्वरूपं तव स्वरूपं च न विदुः जडत्वादेव, जीवस्तु तानात्मानं च वेत्ति न पुनस्त्वत्स्वरूपमिति । यथोक्तं हंसगुह्ये । देहोऽसवोऽक्षा मनवोऽभूतमात्रा नात्मानमन्यं च विदुः परं यत् ॥ सर्वं पुमान्वेद गुणांश्च तज्ज्ञो न वेद सर्वज्ञमनंतमीड इति ॥ ३ ॥

हे कृष्णा, सर्व कारणांचें कारण, आद्य, पुरुष व अविनाशी, अशा तुज नारायणाला मी नमस्कार करितों. ज्या तुझ्या नाभीपासून प्रकट झालेल्या कमळकोशांतून ब्रह्मदेव उत्पन्न झाला आहे व पुढें त्या ब्रह्मदेवापासून हा सृष्टिरूप सर्व लोक प्रकट झाला आहे ॥ १ ॥ पृथिवी, जळ, अग्नि, वायु, आकाश, अहंकार, महत्तत्त्व, माया, पुरुष, मन, इंद्रियें, विषय व देव हे जे प्रकार जगाला कारण आहेत ते सर्वेहि तुझ्याच श्रीमूर्तीपासून उत्पन्न झाले आहेत ॥ २ ॥ हे मायादिक सर्वेहि पदार्थ, सर्वांचा आत्मा अशा तुझ्या स्वरूपाला जाणत नाहींत. कारण, हे प्रत्यक्षादिक कारणांनीं जडत्वेंकरून ग्रहण केलेले आहेत. आतां हे पदार्थ, जड असल्यामुळें मला न जाणोत, परंतु ह्या सर्वांना व आपणालाहि जाणणारा जो जीव तो तरी, मला जाणत असेल, असें ह्मणशील तर–तो उत्तम कोटींतला जीव–(ब्रह्मदेव) हि, मायेच्या गुणांनीं बद्ध झाला असल्यामुळें त्या गुणां-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हून पर अशा तुझ्या स्वरूपाला जाणत नाहीं, मग दुसरा जीव कोठून जाणेल ? ॥ ३ ॥ आतां जर कोणी जाणत नाहींत तर जीवांच्या संसाराची निवृत्ति कशी होईल ? असें ह्मणशील तर, साक्षात् अगोचर अशाहि तुझें कोणत्यातरी मार्गानें भजन करणारांस तूं प्राप्त होतोस असें सांगतो– योगसाधन करणारे कितीएक योगी, साक्षात् महापुरुष आणि अंतर्यामी ईश्वररूप अशा तुझें आराधन करितात. दुसरे कितीएक आत्मनिष्ठ पुरुष, शरीराच्या नेत्रहृदयादिक अवयवांचा, सर्व प्राणिमात्रांचा व सर्व देवतांचा साक्षी अशा तुझें आराधन करितात ॥ ४ ॥ कितीएक यज्ञयागादिक कर्म करणारे ब्राह्मण, ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद यांत सविस्तर सांगितलेल्या यज्ञानुष्ठानप्रकारांनीं

ननु यदि केऽपि न जानंति कथं तर्हि संसारनिवृत्तिर्जीवानामित्याशंक्य साक्षादगोचरत्वेऽपि येन केनापि मार्गेण भजतां त्वं गम्योऽसीत्याह । त्वां योगिन इति । हैरण्यगर्भादयोऽध्यात्माधिभूताधिदैवसाक्षिणं महापुरुषं तदंतर्यामिस्वरूपमीश्वरं नियंतारं च यजंति ॥ ४ ॥ तदेवं सांख्ययोगावेकीकृत्योक्तौ त्रयीमार्गं कर्मज्ञानभेदेन दर्शयति । त्रय्या चेति श्लोकद्वयेन । वैतानिकाः कर्मयोगिनस्त्वां वै त्वामेव यजंते । ननु ते इंद्रवरुणवाय्वादीन्यजंते नतु मामित्यत आह । नाना वज्रहस्तादीनि रूपाणि येषां ते येऽमरास्तेषामाख्यया नाम्ना त्वामेव यजंत इति । अयं भावः । ऐंद्रवारुणादिसूक्तैरिंद्रादयः सर्वैश्वर्येण प्रकाश्यंते न च सर्वेश्वरा बहवः संभवंत्यतो नामभेदेन त्वामेव यजंत इति । तथाच श्रुतिः । स प्रथमः स प्रकृतिर्विश्वकर्मा स प्रथमो मित्रावरुणोऽग्निः स प्रथमो बृहस्पतिश्चिकित्वांस्तस्मा इंद्राय हविराजुहोतीति ॥ ५ ॥ ज्ञानयज्ञेन समाधिना ॥ ६ ॥ सांख्ययोगत्रयीमार्गा

त्वां योगिनो यजंत्यद्धा महापुरुषमीश्वरम् ॥ साध्यात्मं साधिभूतं च साधिदैवं च साधवः ॥ ४ ॥ त्रय्या च विद्यया केचित्त्वां वै वैतानिका द्विजाः ॥ यजंते विततैर्यज्ञैर्नानारूपामराख्यया ॥ ५ ॥ एके त्वाऽखिलकर्माणि संन्यस्योपशमं गताः ॥ ज्ञानिनो ज्ञानयज्ञेन यजंति ज्ञानविग्रहम् ॥ ६ ॥ अन्ये च संस्कृतात्मानो विधिनाऽभिहितेन ते ॥ यजंति त्वन्मयास्त्वां वै बहुमूर्त्येकमूर्तिकम् ॥ ७ ॥ त्वामेवान्ये शिवोक्तेन मार्गेण शिवरूपिणम् ॥ बह्वाचार्यविभेदेन भगवन्समुपासते ॥ ८ ॥ सर्व एव यंजति त्वां सर्वदेवमयेश्वरम् ॥ येऽप्यन्यदेवताभक्ता यद्यप्यन्यधियः प्रभो ॥ ९ ॥

उक्ता वैष्णवशैवमार्गावाह द्वयेन । अन्येचेति । संस्कृतात्मानो वैष्णवशैवदीक्षया दीक्षिताः संत स्ते त्वयाऽभिहितेन पंचरात्रादिविधिना त्वन्मयास्त्वन्मयत्वेनात्मानं चिंतयंतस्त्वदेकप्रधाना इति वा । वासुदेवसंकर्षणप्रद्युम्नानिरुद्धभेदेन बहुमूर्तिं नारायणरूपेणैकमूर्तिकं च त्वामेव यजंति ॥ ७ ॥ बह्वाचार्यविभेदेनेति नानाभेदशैवपाशुपतादिमार्गेण ॥ ८ ॥ येऽपि क्षुद्रदेवताभक्तास्तेऽपि त्वामेव यजंतीत्याह । सर्व एवेति । हे सर्वदेवमय । नन्वेते परस्परदेवताधिक्षेपकलहव्याकुलचित्ताः कथमेकमेव यजंतीत्युच्यते तत्राह । यद्यप्यन्यधिय इति बुद्धिमात्रभेदो न वस्तुभेद इत्यर्थः ॥ ९ ॥

इंद्रवरुणादिक अनेक देवतांच्या नांवांनीं तुझेंच यजन करितात ॥ ५ ॥ कितीएक ज्ञानी लोक, सर्वकर्मांचा त्याग करून व शांततेचा आश्रय करून ज्ञानमूर्ति अशा तुझेंच समाधीच्या योगानें आराधन करितात ॥ ६ ॥ दुसरे जे कितीएक, पंचरात्रांत सांगितलेल्या विधीनें वैष्णवदीक्षेचा संस्कार पावले आहेत, ते– तुझ्या स्वरूपत्वेंकरून स्वात्म्याचें चिंतन करीत होत्साते, वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न व अनिरुद्ध या भेदांनीं बहुमूर्तिरूपी व नारायणरूपानें एकमूर्ति अशा तुझें उपासन करितात ॥ ७ ॥ हे भगवन्च, दुसरे कितीएक उपासक, शिवानें सांगितलेल्या पाशुपतादिक मार्गानें व बहुत आचार्यांनीं सांगितलेल्या त्यांतील नानाप्रकारच्या भेदांनीं, शिवरूपी तुझेंच उपासन करितात ॥ ८ ॥ हे प्रभो, जे कोणी दुसऱ्या क्षुद्रदेवतांचे भक्त आहेत तेसुद्धां, जरी त्या त्या देवतांच्याठिकाणीं परमेश्वरबुद्धि धारण करणारे असले तथापि ते सर्वहि सर्वदेवांचा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अंतर्यामी अशा तुज परमेश्वराचेंच आराधन करितात ॥ ९ ॥ हे समर्था, जशा पर्वतांपासून उत्पन्न झालेल्या नद्या, पर्जन्योदकानें भरून जाऊं लागल्या म्हणजे त्या चारहि दिशांकडून समुद्रामध्येंच प्रवेश करितात त्याप्रमाणें नानाप्रकारचे भजनमार्गहि त्यात्या देवतेच्या द्वारानें शेवटीं तुझीच प्राप्ति करून देणारे होतात ॥ १० ॥ कारण—सत्त्व, रज आणि तम हे तुझ्या शक्तिरूप प्रकृतीचे गुण असल्यामुळें त्यांचेठिकाणींच प्रकृतिकार्योपाधिक ब्रह्मादिक स्थावरपर्यंत सर्व जीव आपल्या उपाधिद्वारा ओतप्रोत आहेत, ते गुण प्रकृतीमध्यें व ती प्रकृति तुझ्यामध्यें प्रविष्ट होत असल्यामुळें अनुक्रमानें सर्वहि तुझ्यामध्येंच प्रविष्ट होतात ॥ ११ ॥ आतां मलासुद्धां प्रकृतीचा

श्रीशुक उवाच ॥ अथ कृष्णश्च रामश्च कृतशौचौ परंतप ॥ मल्लदुंदुभिनिर्घोषं श्रुत्वा द्रष्टुमुपेयतुः ॥ १ ॥ रंगद्वारं समासाद्य तस्मिन्नागमवस्थितम् ॥ अपश्यत्कुवलयापीडं कृष्णोंऽबष्ठप्रचोदितम् ॥ २ ॥ बद्ध्वापरिकरं शौरिः समुह्य कुटिलालकान् ॥ उवाच हस्तिपं वाचा मेघनादगभीरया ॥ ३ ॥ अंबष्ठांबष्ठ मार्गं नौ देह्यपक्रम मा चिरम् ॥ नोचेत्सकुंजरं त्वाऽद्य नयामि यमसादनम् ॥ ४ ॥ एवं निर्भर्त्सितोंऽबष्ठः कुपितः कोपितं गजम् ॥ चोदयामास कृष्णाय कालांतकयमोपमम् ॥ ५ ॥ करींद्रस्तमभिद्रुत्य करेण तरसाऽग्रहीत् ॥ कराद्विगलितः सोऽमुं निहत्यांघ्रिष्वलीयत ॥ ६ ॥ संक्रुद्धस्तमचक्षाणो घ्राणदृष्टिः स केशवम् ॥ परामृशत्पुष्करेण स प्रसह्य विनिर्गतः ॥ ७ ॥

मल्लतालदुंदुभिनिर्घोषं वा ॥ १ ॥ अंबष्ठो हस्तिपस्तेन चोदितम् ॥ २ ॥ परिकरं युद्धोचितपरिधानं कृत्वा । समुह्य निबध्य ॥ ३ ॥ ४ ॥ अंतको मृत्युः कालस्तन्निमित्तं यमस्तन्नियंता तैरुपमा यस्य तम् ॥ ५ ॥ विगलितो विच्युतः मुष्टिना निहत्यालीयतादृश्यो बभूव ॥ ६ ॥ अचक्षाणोऽपश्यन् । घ्राणमवघ्राणं तेन दृष्टिर्दर्शनं यस्य सः । लोचनागोचरमपि हि पशवो घ्राणेन जानंतीति प्रसिद्धम् । परामृशद्धृतवान् । पुष्करेण शुंडाग्रेण । स कृष्णः । प्रसह्य बलेन ॥ ७ ॥

असें त्याच्या दृष्टीस पडलें ॥ २ ॥ तेव्हां कृष्णानें कमर बांधून व आपले कुरळे केंस हातानें मागें सारून मेघाच्या नादासारख्या गंभीरवाणीनें त्या ह्माताला ह्मटलें कीं,–॥ ३ ॥ हे ह्माता, हे ह्माता, आह्मांला मार्ग दे, रस्त्यावरून एकीकडे हो, विलंब करूं नकोस. तूं मार्ग न देशील तर आजच हत्तीसहवर्तमान तुला यमाच्या घरीं पाठवून देईन ॥ ४ ॥ याप्रमाणें निर्भर्त्सना केली असतां क्रुद्ध झालेल्या त्या ह्मातानें, अंकुशादिकेंकरून कोपविलेला व अंत करणारा मृत्यु, त्याचें निमित्त काळ व त्याचा नियंता यम या तिघांचेंहि काम एकदम करणारा अशा त्या कुवलयापीड हत्तीला, कृष्णाला मारण्याकरितां त्याच्या अंगावर चालविलें ॥ ५ ॥ नंतर त्या हत्तीनें मोठ्या वेगानें कृष्णासमोर जाऊन आपल्या सोंडेनें त्यास धरिलें, तेव्हां तो कृष्णहि त्याच्या सोंडेंतून खालीं पडून त्या हत्तीला मुष्टीनें प्रहार करून त्याच्या पायांमध्यें गुप्त झाला ॥ ६ ॥ तेव्हां कृष्ण दिसत नाहींसा झाल्यामुळें अत्यंत क्रुद्ध झालेल्या, घ्राणेंद्रियानें वास काढून सांडलेली वस्तु शोधून काढणाऱ्या त्या हत्तीनें, आपल्या शुंडेनें कृष्णाचा ॥१३३॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शोध करून त्यास धरिलें. पुन्हा तो कृष्ण, बलात्कारानें त्याच्या सोंडेंतून सुटून पाठीमागें गेला ॥ ७ ॥ आणि त्यानें अतिबलिष्ठ अशाहि त्या गजाला पुच्छाचे-
ठिकाणीं ग्रहण करून, जसा गरुड सर्पाला धरून आकर्षण करितो त्याप्रमाणें सहज लीलेनें पंचवीस धनुष्यें (१०० हात) मागें आकर्षण केलें ॥ ८ ॥ नंतर तो श्रीकृष्ण,
पुच्छ धरणाऱ्या आपणाला धरण्याकरितां जर तो हत्ती, उजवेकडून वळूं लागला तर त्याला डावेकडे ओढीत असे आणि जर तो डावेकडून वळूं लागला तर त्याला बलात्का-
रानें उजवेकडे फिरवीत असे. याप्रमाणें डावेउजवेकडे फिरविलेल्या त्या हत्तीबरोबर, जसा पुच्छ धरून फिरविलेल्या गोवत्साबरोबर लहान बालक भ्रमण करितो
त्याप्रमाणें भ्रमण करूं लागला ॥ ९ ॥ नंतर भगवंतानें त्या हत्तीचें पुच्छ सोडून देऊन त्याच्या समोर येऊन, आपल्या हातानें त्याला प्रहार केला आणि त्याच्या सभोंवार

धनुषो धनुषां पंचविंशतिर्यावत्तावंतं देशं विचकर्ष आकृष्य नीतवान् । कं क इवा विचकर्ष । यथा नागं सर्पवद्वर्तमानं गजं सुपर्णवत्स्वयमिति । आविरासीद्यथा प्राच्यां दिशींदुरिव पुष्कल इतिवत् ॥ ८ ॥ सपर्यावर्तमानेनेति । पुच्छग्राहिणं श्रीकृष्णं ग्रहीतुं यदि दक्षिणतः परिवर्तते गजस्तर्हि सव्यतो भ्रामयति यदा सव्यतः परिवर्तते तदा दक्षिणतो

पुच्छे प्रगृह्यातिबलं धनुषः पंचविंशतिम् ॥ विचकर्ष यथा नागं सुपर्ण इव लीलया ॥ ८ ॥ सपर्यावर्तमानेन सव्यदक्षिणतोऽच्यु-
तः ॥ बभ्राम भ्राम्यमाणेन गोवत्सेनेव बालकः ॥ ९ ॥ ततोऽभिमुखमभ्येत्य पाणिनाऽऽहत्य वारणम् ॥ प्राद्रवन्पातयामास स्पृ-
श्यमानः पदे पदे ॥ १० ॥ स धावन्क्रीडया भूमौ पतित्वा सहसोत्थितः ॥ तं मत्वा पतितं क्रुद्धो दंताभ्यां सोऽहनत्क्षितिम्
॥ ११ ॥ स्वविक्रमे प्रतिहते कुंजरेंद्रोऽत्यमर्षितः ॥ चोद्यमानो महामात्रैः कृष्णमभ्यद्रवद्रुषा ॥ १२ ॥ तमापतंतमासाद्य
भगवान्मधुसूदनः ॥ निगृह्य पाणिना हस्तं पातयामास भूतले ॥ १३ ॥ पतितस्य पदाक्रम्य मृगेंद्र इव लीलया ॥ दंतमुत्पा-
ट्य तेनेभं हस्तिपांश्चाहनद्धरिः ॥ १४ ॥ मृतकं द्विपमुत्सृज्य दंतपाणिः समाविशत् ॥ अंसन्यस्तविषाणोऽसृङ्मदबिंदुभिरं-
कितः ॥ विरूढस्वेदकणिकावदनांबुरुहो बभौ ॥ १५ ॥

भ्रामयंस्तेन सह बभ्राम । गोवत्सेन भ्राम्यमाणेन बालकः स एव कृष्णो यथाऽन्यो वा बालक इवेति ॥ ९ ॥ वारणं गजं प्राद्रवन्प्रकर्षेणासमंततो धावन्पातयामास । यथा पतति तथा तं वंचयन्प्राद्रवदित्यर्थः ॥ १० ॥ किंच स धावन्निति अहनदहन् ॥ ११ ॥ १२ ॥ १३ ॥ १४ ॥ रंगं समाविशत्तदा वीरश्रिया बभौ । कथंभूतः । अंसे न्यस्तं विषाणं गजदंतो येन सः । असृजो रक्तस्य मदस्य च बिंदुभिः परितोऽंकितः । विरूढा उद्गताः स्वेदकणिकास्ताभिरुपलक्षितं वदनांबुरुहं यस्य सः ॥ १५ ॥

चोहोंकडे धांवतांना पावलोपावलीं त्याला आपणास स्पर्श करूं देऊन, खालीं बसून उठून धांवणाऱ्या आपल्या चलाखीनें त्याला वारंवार भूमीवर ठेंचकळून पाडिलें ॥ १० ॥
नंतर तो भगवान् धांवण्याच्या लीलेनें हत्तीला फसविण्यासाठीं भूमीवर पडून, तत्काळ त्याला न दिसतांच उठून एकीकडे झाला, तेव्हां क्रुद्ध झालेल्या त्या हत्तीनें, कृष्ण भूमीवर पडला असें जाणून गुडघेमिटीला येऊन दांतांनीं भूमीवर प्रहार केला ॥ ११ ॥ तेव्हां आपला पराक्रम व्यर्थ झाला असतां अतिक्रुद्ध झालेला व त्यांत झातांनीं अंकुश लावून खिजावलेला तो हत्ती क्रोधानें कृष्णाच्या अंगावर धांवला ॥ १२ ॥ मधुसूदन भगवंतानें, येणाऱ्या त्या हत्तीला पाहून हातानें त्याची सोंड धरिली आणि त्यास भूमीवर पाडिलें ॥ १३ ॥ व पाडिलेल्या त्याचें शरीर पायानें दाबून धरून, जसा सिंह हत्तीला दाबून धरून त्याचे दांत उपटतो त्याप्रमाणें सहज लीलेनें त्याचा दांत उपटून त्या दांतानेंच हत्तीचा व झातांचा वध केला ॥ १४ ॥ नंतर मेलेल्या हत्तीचा त्याग करून हातांत दंत असलेला तो भगवान् रंगमंडपांत जाव-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

यास निघाला, त्यावेळीं खांद्यावर हत्तीचा दांत ठेवणारा, रक्ताच्या व मदाच्या बिंदूंचा सर्व बाजूंनीं शरीरावर शिडकावा उठलेला व घर्मबिंदु उठलेलें मुखकमळ धारण करणारा तो कृष्ण शोभूं लागला ॥ १५ ॥ हे राजा, त्या एकट्या कृष्णानेंच रंगमंडपांत प्रवेश केला नाहीं तर- कितीएक गोपांनीं परिवेष्टित असे ते उभयतां बंधू रामकृष्ण, हत्तीचे दांत हींच श्रेष्ठ आयुधें धारण करून रंगमंडपांत प्रविष्ट झाले ॥ १६ ॥ त्यावेळीं शृंगारादिक सर्व रसांची केवळ मूर्तिच असा तो भगवान् श्रीकृष्ण, मंडपांत असलेल्या सर्वलोकांना त्यांच्यात्यांच्या अभिप्रायानुरूप निरनिराळा भासला. तो असा कीं,- चाणूरमुष्टिकादिक मल्लांना वज्रासारखा (रौद्ररसरूप), मनुष्यांना राजासारखा (अद्भुतरसरूप), स्त्रियांना मूर्तिमान् मदनासारखा (शृंगाररसरूप), नंदादिक गोपांना स्वजनासारखा (हास्यरसरूप), दुष्टराजांना शिक्षण करणारा (वीररसरूप), देवकीवसुदेवांना बालकासारखा (करुणारसरूप), कंसाला मृत्यूसारखा (भयानकरसरूप), त्याचा प्रभाव न जाणणाऱ्या अज्ञलोकांस मोठाच पराक्रम

न केवलं स एकः समाविशत्किंतु वृतौ गोपैरिति ॥१६॥ तत्र शृंगारादिसर्वरसकदंबमूर्तिर्भगवांस्तत्तदभिप्रायानुसारेण बभौ न साकल्येन सर्वेषामित्याह । मल्लानामिति । मल्लादीनामज्ञानां द्रष्टॄणामशन्यादिरूपेण दशधा विदितः सन्साग्रजो रंगं गत इत्यन्वयः । मल्लादिष्वभिव्यक्ता रसाः क्रमेण श्लोकेन निबद्ध्यंते । रौद्रोऽद्भुतश्च शृंगारो हास्यं वीरो दया

वृतौ गोपैः कतिपयैर्बलदेवजनार्दनौ ॥ रंगं विविशतू राजन्गजदंतवरायुधौ ॥ १६ ॥ मल्लानामशनिर्नृणां नरवरः स्त्रीणां स्मरो मूर्तिमान्गोपानां स्वजनोऽसतां क्षितिभुजां शास्ता स्वपित्रोः शिशुः ॥ मृत्युर्भोजपतेर्विराडविदुषां तत्त्वं परं योगिनां वृष्णीनां परदेवतेति विदितो रंगं गतः साग्रजः ॥ १७ ॥ हतं कुवलयापीडं दृष्ट्वा तावपि दुर्जयौ ॥ कंसो मनस्व्यपि तदा भृशमुद्विविजे नृप ॥ १८ ॥ तौ रेजतू रंगगतौ महाभुजौ विचित्रवेषाभरणस्रगंबरौ ॥ यथा नटावुत्तमवेषधारिणौ मनः क्षिपंतौ प्रभया निरीक्षताम् ॥ १९ ॥ निरीक्ष्य तावुत्तमपूरुषौ जना मंचस्थिता नागरराष्ट्रका नृप ॥ प्रहर्षवेगोत्कलितेक्षणाननाः पपुर्न तृप्ता नयनैस्तदाननम् ॥ २० ॥ पिबंत इव चक्षुर्भ्यां लिहंत इव जिह्वया ॥ जिघ्रंत इव नासाभ्यां श्लिष्यंत इव बाहुभिः ॥ २१ ॥

तथा ॥ भयानकश्च बीभत्सः शांतः सप्रेमभक्तिकः ॥ अविदुषां विराट् विकलः अपर्याप्तो राजत इति तथा । अनेन बीभत्सरस उक्तः । विकलत्वं च क वज्रसारसर्वांगावित्यादिना वक्ष्यते ॥ १७ ॥ उद्विविजे भीतो बभूव ॥ १८ ॥ यथा नटाविति निर्भयत्वं दर्शितम् ॥ १९ ॥ प्रहर्षवेगेनोत्कलितान्युज्जृंभितानीक्षणान्याननानि च येषाम् । तयोराननं पपुः परं न तृप्ताः । निराकांक्षा न बभूवुरित्यर्थः ॥ २० ॥ तदेवाह । पिबंत इवेति । श्लिष्यंतः परिष्वंगं कुर्वंत इव लक्षिता इत्यर्थः ॥ २१ ॥

करणाऱ्यासारखा (बीभत्सरसरूप), योग्यांना परमतत्त्वासारखा (शांतरसरूप) आणि यादवांना परमदेवतेसारखा (भक्तिरसरूप) विदित झालेला तो श्रीकृष्ण, बळरामासहवर्तमान रंगमंडपांत प्रविष्ट झाला ॥ १७ ॥ हे राजा, कुवलयापीडनामक हत्ती मारला गेला असें व ते रामकृष्णहि दुर्जय आहेत असें पाहून, त्यावेळीं धैर्यवान् असाहि तो कंस अत्यंत भयभीत झाला ॥ १८ ॥ ते दोघां विचित्र वेष, अलंकार, माळा व उत्तमवस्त्रें धारण करून, रंगमंडपांत प्रविष्ट झालेले ते महापराक्रमी रामकृष्ण, आपल्या कांतीनें पहाणाऱ्या लोकांचें मन आकर्षण करीत होत्साते, जसे सभेमध्यें उत्तमवेष धारण करणारे नट शोभतात तसे शोभूं लागले ॥ १९ ॥ हे राजा, त्या दोघां उत्तमपुरुषांना अवलोकन करून, मंचांवर बसलेले नगरवासी व देशवासी लोक, उत्तम हर्षाच्या वेगानें ज्यांचीं नेत्रें व मुखें प्रफुल्लित झालीं आहेत असे होऊन, ते आपल्या नेत्रांनीं त्यांचें मुख आदरानें पाहत असतांहि तृप्त झाले नाहींत ॥ २० ॥ ते लोक, नेत्रांनीं जणुं रामकृष्णमूर्तींचें प्राशनच करितात कीं काय, जिव्हेनें जणुं चाटतातच

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कीं, काय! नाकपुड्यांनीं जणुं हुंगतात कीं काय व बाहूंनीं जणुं त्यांना आलिंगन करितातच कीं काय? असे दिसूं लागले ॥ २१ ॥ आणि ते लोक, दृष्टि पडलेलें त्यांचें रूप, शौर्यादिक गुण, सप्रेमहास्यादिक माधुर्य व प्रौढपणा यांच्या योगानें त्यांच्या पराक्रमाचें स्मरणच करविल्यासारखे होऊन पाहिलेल्या व ऐकिलेल्या त्यांच्या लीलांचें परस्पर वर्णन करूं लागले ॥२२॥ तें असें कीं—हे रामकृष्ण, साक्षात् हरि नारायणाचेच अंश असून येथें वसुदेवाच्या घरीं अवताररूपानें प्रकट झाले आहेत ॥ २३ ॥ हा श्रीकृष्ण, देवकीचेठिकाणीं उत्पन्न झाला व यास वसुदेवानें गोकुळांत नेऊन ठेविलें. तो इतकाकाळपर्यंत दुसऱ्या कोणास न समजतां नंदाच्या घरीं वृद्धिंगत झाला ॥ २४ ॥ यानेंच पूतना राक्षसी मारिली आहे; व चक्रवात दैत्यहि मारिला आहे; यमलार्जुन वृक्ष पाडिले आहेत; शंखचूड, केशी, धेनुक, व तसेच दुसरेहि पुष्कळ दैत्य, मारिले आहेत ॥ २५ ॥ यानेंच

यथादृष्टं धनुर्भंगादि यथाश्रुतं गोवर्धनोद्धरणादि तत्तदनतिक्रम्य तदनुरूपमित्यर्थः । प्रत्यक्षं च तयो रूपं गजदंतादियुक्तं गुणाः शौर्यादयो माधुर्यं हसितालापादि प्रागल्भ्यं धाष्टर्यं तैः स्मारिता इव स्मरणं प्रापिता इव ॥ २२ ॥ विस्मितानां वाक्यान्याह । अष्टभिरेतावित्यादिभिः ॥ २३ ॥ किलेति सर्वत्रान्वयः ॥ २४ ॥ गुह्यकः शंखचूडः अन्ये

ऊचुः परस्परं ते वै यथादृष्टं यथाश्रुतम् ॥ तद्रूपगुणमाधुर्यप्रागल्भ्यस्मारिता इव ॥ २२ ॥ एतौ भगवतः साक्षाद्धरेर्नारायणस्य हि ॥ अवतीर्णाविहांशेन वसुदेवस्य वेश्मनि ॥ २३ ॥ एष वै किल देवक्यां जातो नीतश्च गोकुलम् ॥ कालमेतं वसन्गूढो ववृधे नंदवेश्मनि ॥ २४ ॥ पूतनाऽनेन नीताऽतं चक्रवातश्च दानवः ॥ अर्जुनौ गुह्यकः केशी धेनुकोऽन्ये च तद्विधाः ॥ २५ ॥ गावः सपाला एतेन दावाग्नेः परिमोचिताः ॥ कालियो दमितः सर्प इंद्रश्च विमदः कृतः ॥ २६ ॥ सप्ताहमेकहस्तेन धृतोऽद्रिप्रवरोऽमुना ॥ वर्षवाताशनिभ्यश्च परित्रातं च गोकुलम् ॥ २७ ॥ गोप्योऽस्य नित्यमुदितहसितप्रेक्षणं मुखम् ॥ पश्यंत्यो विविधांस्तापांस्तरंति स्माश्रमं मुदा ॥ २८ ॥ वदंत्यनेन वंशोऽयं यदोः सुबहुविश्रुतः ॥ श्रियं यशो महत्त्वं च लप्स्यते परिरक्षितः ॥ २९ ॥ अयं चास्याग्रजः श्रीमान् रामः कमललोचनः ॥ प्रलंबो निहतो येन वत्सको ये बकादयः ॥ ३० ॥ जनेष्वेवं ब्रुवाणेषु तूर्येषु निनदत्सु च ॥ कृष्णरामौ समाभाष्य चाणूरो वाक्यमब्रवीत् ॥ ३१ ॥

चाघासुरादयः ॥ २५ ॥ २६ ॥ २७ ॥ आश्रममीषच्छ्रमयुक्तं मुखम् । अश्रमं मुखमिति वा । यद्वा अश्रमं यथा भवति तथा तरंति स्मेति ॥ २८ ॥ अनेन परिरक्षितो यदोर्वंशः सुबहु विश्रुतः सन् श्र्यादि लप्स्यत इति वदंतीति ॥ २९ ॥ धेनुकबकनुवत्सासुरेषु विपर्ययोक्तिर्जनवादेष्वनिश्चयात् ॥ ३० ॥ जनेष्वेवं ब्रुवाणेषु सत्सु तदसहमानश्चाणुरोऽब्रवीदिति ॥ ३१ ॥

गोपांसह गाई वणव्यांतून सोडविल्या आहेत, कालिय सर्प दमविला व इंद्रहि गर्वरहित केला आहे ॥ २६ ॥ या कृष्णानें सात दिवसपर्यंत एका हातानें गोवर्धनपर्वत धारण करून वृष्टि, वारा व विजा यांपासून गोकुळाचें रक्षण केलें आहे ॥ २७ ॥ नित्य आनंदित व सहास्य अवलोकन असलेलें याचें मुख पाहणाऱ्या गोपी, श्रमवांचून अनेकप्रकारचे ताप आनंदानें तरून गेल्या आहेत ॥ २८ ॥ यानें रक्षण केलेला हा यदुराजाचा वंश, पुष्कळ प्रख्यात होऊन, संपत्ति कीर्ति व महत्त्व यांस पावेल ॥ २९ ॥ आणि हा कमलनेत्र व सौंदर्यातिशयानें युक्त असा बळराम, या कृष्णाचाच वडिल बंधु आहे. यानें प्रलंबासुर, वत्सासुर व जे बकादिक दैत्य ते मारून टाकिले आहेत ॥ ३० ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला— हे राजा, याप्रमाणें लोक आपआपल्यामध्यें भाषण करीत असतां, व वाद्यें वाजत असतां, तें लोकांचें भाषण सहन न कर-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

णारा चाणूरमल्ल, कृष्ण व राम यांना संबोधनें देऊन वाक्य बोलिला कीं– ॥ ३१ ॥ हे नंदपुत्रा कृष्णा, हे रामा, तुह्मीं दोघेहि वीरपुरुषांना मान्य व मल्लयुद्धामध्यें कुशळ आहां असें ऐकून तुमचें मल्लयुद्ध पाहण्याची इच्छा धारण करणाऱ्या या कंसराजानें, तुह्मांस येथें बोलाविलें आहे ॥ ३२ ॥ मनानें कर्मानें व वाणीनें राजाचें प्रिय करणाऱ्या प्रजा, राजापासून बक्षिसेंवगैरे मिळवून कल्याण पावतात, आणि त्या प्रजा, राज्याच्या मर्जीच्या उलट वागल्या तर राजापासून दंध व मृत्युवगैरे विपरीत फळें पावतात ॥ ३३ ॥ आह्मीं मल्लयुद्धांत कुशळ नाहीं असें ह्मणाल तर– वत्सांचें पालन करणारे गोपबालक व गाई चारणारे गोप, आनंदयुक्त होऊन नित्य मल्लयुद्धानें क्रीडा करीतच वत्स व गाई चारीत असतात असें लोकांमध्यें प्रसिद्ध आहे ह्मणून तुह्मीं मल्लयुद्धामध्यें कुशळ आहां यांत संशय नाहीं ॥३४॥ यास्तव तुह्मीं व आह्मीं मिळून राजाला प्रिय असलेलें मल्लयुद्ध करूंया. राजा संतुष्ट झाला असतां आह्मांवर सर्वलोक प्रसन्न होतील कारण, राजा हा सर्वभूतमय आहे ॥ ३५ ॥ असें तें चाणूराचें भाषण ऐकून मल्लयुद्ध आप-

॥ ३२ ॥ ३३ ॥ ३४ ॥ हे कृष्ण प्रियं करवामेति । राज्ञि प्रीते भूतानि च प्रसीदेयुः ॥ ३५ ॥ ३६ ॥ ३७ ॥ यथोचितं नियुद्धं बाहुयुद्धं भवेत् । मल्लसभासदो मल्लसभाधि-

हे नंदसूनो हे राम भवंतौ वीरसंमतौ ॥ नियुद्धकुशलौ श्रुत्वा राज्ञाऽऽहूतौ दिदृक्षुणा ॥ ३२ ॥ प्रियं राज्ञः प्रकुर्वत्यः श्रेयो विंदंति वै प्रजाः ॥ मनसा कर्मणा वाचा विपरीतमतोऽन्यथा ॥ ३३ ॥ नित्यं प्रमुदिता गोपा वत्सपाला यथा स्फुटम् ॥ वनेषु मल्लयुद्धेन क्रीडंतश्चारयंति गाः ॥ ३४ ॥ तस्माद्राज्ञः प्रियं यूयं वयं च करवामहे ॥ भूतानि नः प्रसीदंति सर्वभूतमयो नृपः ॥ ३५ ॥ तन्निशम्याब्रवीत्कृष्णो देशकालोचितं वचः ॥ नियुद्धमात्मनोऽभीष्टं मन्यमानोऽभिनंद्य च ॥ ३६ ॥ प्रजा भोजपतेरस्य वयं चापि वनेचराः ॥ करवाम प्रियं नित्यं तन्नः परमनुग्रहः ॥ ३७ ॥ बाला वयं तुल्यबलैः क्रीडिष्यामो यथोचितम् ॥ भवेन्नियुद्धं माऽधर्मः स्पृशेन्मल्लसभासदः ॥ ३८ ॥ चाणूर उवाच ॥ न बालो न किशोरस्त्वं बलश्च बलिनां वरः ॥ लीलयेभो हतो येन सहस्रद्विपसत्त्वभृत् ॥ ३९ ॥ तस्माद्भवद्भ्यां बलिभिर्योद्धव्यं नानयोऽत्र वै ॥ मयि विक्रम वार्ष्णेय बलेन सह मुष्टिकः ॥ ४० ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे कुवलयापीडवधो नाम त्रिचत्वारिंशोऽध्यायः ॥ ४३ ॥ ॥

कृतान्न जनानधर्मो मा स्पृशेन्न स्पृशेदित्यर्थः । हे मल्लेति वा ॥ ३८ ॥ सहस्रद्विपानां सत्त्वं बलं बिभर्तीति तथा ॥ ३९ ॥ बलिभिर्मादृशैः सह अनयोऽधर्मः । विक्रम पराक्रमं कुरु । मुष्टिको विक्रमतादित्यनुषंगः ॥ ४० ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधे पूर्वार्धे टीकायां त्रिचत्वारिंशोऽध्यायः ॥ ४३ ॥

णास इष्ट आहे असें मानून श्रीकृष्णानें त्या भाषणाचा सत्कार केला आणि त्या स्थळीं व त्याकाळीं योग्य असें भाषण केलें कीं–॥३६॥अरण्यांत राहणारे आह्मी व नगरांत राहणारे तुह्मी सर्व, या कंस राजाच्या प्रजा असून निरंतर त्याचें प्रिय करीत आहों, ह्मणून तो आह्मांस जी आज्ञा करील तो आमच्यावर मोठा अनुग्रहच आहे ॥ ३७ ॥ तथापि आह्मी बालक आहों ह्मणून आमची समबली बालकांबरोबरच क्रीडा व्हावी, अधिकबळी मल्लांबरोबर होऊं नये. ह्मणजे तें यथायोग्य मल्लयुद्ध होईल. आणि मल्लांच्या सभेंत बसणाऱ्या सभासदांना अधर्माचा स्पर्शसुद्धां होणार नाहीं ॥३८॥ तें ऐकून चाणूर पुन्हा ह्मणाला कीं कृष्णा, ज्या तूं, हजार हत्तींचें बळ असलेला हत्ती सहज लीलेनें मारिलास तो तूं, बालक किंवा किशोर मुळींच नाहींस, तसाच बळरामहि बाल किंवा किशोर नाहीं. ह्मणून तुमच्याबरोबर बलाढ्य मल्लांनीं युद्ध करावें, यांत मुळींच अन्याय नाहीं. यास्तव तूं माझ्यावर आपला पराक्रम चालीव. मुष्टिक, बळरामाबरोबर मल्लयुद्ध करूंदे ॥४०॥ याप्रमाणें श्रीम० महापु० द० स्कं० पूर्वार्धामध्यें रंगभूमिप्रवेशनिरू० हा त्रेचाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ४३ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ १ ॥
आतां ह्या चव्वेचाळिसाव्या अध्यायांत, रामकृष्णांनीं केलेलें मल्लांचें व कंसादिकांचें मर्दन, कंसाच्या स्त्रियांचें सांत्वन व आईबापांचें घेतलेलें दर्शन वर्णन केलें आहे
श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, याप्रमाणें चाणूरादिकांच्या वधाचा निश्चय करणारा भगवान् मधुसूदन श्रीकृष्ण, चाणूराबरोबर युद्ध करण्याकरितां सिद्ध झाला.
तसाच बळरामहि मुष्टिकाबरोबर युद्ध करण्यास तयार झाला. तेव्हां ते कृष्णचाणूर व बलमुष्टिक, हातांनीं हातांना धरून व पायांनीं पायांना विळखे घालून एकमेकांना
जिंकण्यासाठीं बलात्कारानें एकमेकांचें आकर्षण करूं लागले ॥ २ ॥ आपल्या अरत्नींनीं (एका कनिष्ठांगुलीवांचून मूठ केलेल्या हातांनीं) दोन्हीं अरत्नींना, गुडघ्यां-
नीं गुडघ्यांना व मस्तकानें मस्तकाला परस्पर प्रहार करूं लागले ॥ ३ ॥ हातांत धरून सभोंवार फिरविणें, दूर लोटून देणें, बाहूंनीं आंवळणें, खालीं पाडणें, दुस

॥ चतुश्चत्वारिंशके तु मल्लकंसादिमर्दनम् ॥ कंसयोषित्समाश्वासस्ताभ्यां पित्रोश्च दर्शनम् ॥ १ ॥ चर्वितो निश्चित एव संकल्पो यस्य सः ॥ १ ॥ २ ॥
बाहुमध्यात्कनिष्ठांगुलिव्यतिरेकेण कृतमुष्टिर्हस्तोऽरत्निः ॥ ३ ॥ परिभ्रामणं हस्तादिषु गृहीत्वा परितश्चालनं विक्षेपो नोदनं परिरंभो बाहुभ्यां निष्पीडनं अवपातनमधःक्षेपः
उत्सर्पणमुत्सृज्य पुरतो गमनं अपसर्पणं पृष्ठतो गमनं एतैः प्रत्यरुंधतां प्रत्यावृतवंतौ ॥ ४ ॥ उत्थापनं जानुनी पादौ च पिंडीकृत्य पतितस्योच्चाटनम् । उन्नयनं हस्ताभ्यामुद्धृत्य

श्रीशुक उवाच ॥ एवं चर्चितसंकल्पो भगवान्मधुसूदनः ॥ आससादाथ चाणूरं मुष्टिकं रोहिणीसुतः ॥ १ ॥ हस्ताभ्यां हस्तयोर्ब-
द्ध्वा पद्भ्यामेव च पादयोः ॥ विचकर्षतुरन्योऽन्यं प्रसह्य विजिगीषया ॥ २ ॥ अरत्नी द्वे अरत्निभ्यां जानुभ्यां चैव जानुनी ॥ शिरशीर्ष्णो-
रसोरस्तावन्योन्यमभिजघ्नतुः ॥ ३ ॥ परिभ्रमणविक्षेपपरिरंभावपातनैः ॥ उत्सर्पणापसर्पणैश्चान्योन्यं प्रत्यरुंधताम् ॥ ४ ॥ उत्थाप-
नैरुन्नयनैश्चालनैः स्थापनैरपि ॥ परस्परं जिगीषंतावपचक्रतुरात्मनः ॥ ५ ॥ तद्बलाबलवद्युद्धं समेताः सर्वयोषितः ॥ ऊचुः परस्परं
राजन्सानुकंपा वरूथशः ॥ ६ ॥ महानयं बताधर्म एषां राजसभासदाम् ॥ ये बलाबलवद्युद्धं राज्ञोऽन्विच्छंति पश्यतः ॥ ७ ॥
क्व वज्रसारसर्वांगौ मल्लौ शैलेंद्रसन्निभौ ॥ क्व चातिसुकुमारांगौ किशोरौ नाप्तयोवनौ ॥ ८ ॥

नयनम् । चालनं कंठादिलग्नस्य निःसारणम् । स्थापनं पादादिपिंडीकरणम् । एवं परस्परमात्मनो देहस्यापचक्रतुरपकारं कृतवंतौ ॥ ५ ॥ तद्युद्धं बलाबलवदेकतो बलम-
न्यतोऽबलम् । तद्युद्धं विषममित्यूचुरित्यर्थः ॥ ६ ॥ तदेव दर्शयति । महानिति । यद्वा बलाबलवतोर्युद्धं दृष्ट्वा महानयमधर्म इत्यूचुरित्यन्वयः । बालयोर्बलवतोश्च युद्धं
राजा चेत्पश्येत्स्वयं वारणीयः एते तु राज्ञः पश्यतः स्वयमन्विच्छंत्यनुमन्यंत इति महानधर्म इत्यर्थः ॥ ७ ॥ बलाबलवद्युद्धतां प्रपंचयति पंचभिः । क्वेति । वज्रसाराणि

ऱ्याला मागें टाकून आपण पुढें जाणें, व मागाहून जाणें याप्रकारांनीं ते कृष्णचाणूर व राममुष्टिक परस्पर मल्लयुद्ध करूं लागले ॥ ४ ॥ पाय व गुडघे एकठिकाणीं
करून पडलेल्याला वर उचलणें, हातांनीं उचलून नेणें, गळ्याला मिठी घातलेल्यास दूर लोटून देणें आणि पाय व हात एकठिकाणीं आंवळून धरणें, याप्रमाणें जय
मिळविण्याची इच्छा करणारे ते एकमेकांच्या देहांना अपकार करूं लागले ॥ ५ ॥ हे राजा, त्यावेळीं थव्याथव्यांनीं जमलेल्या व कृष्णविषयक दयेनें युक्त अशा सर्व स्त्रियांनीं,
एकीकडून बळयुक्त व दुसरीकडून बळहीन असलेलें तें युद्ध पाहून, परस्पर ह्मणाल्या कीं,– ॥ ६ ॥ या राजाच्या सभासदांचा हा मोठा अधर्म आहे. ज्या सभासदांनीं
कमी व जास्ती बळांनीं युक्त असलेलें युद्ध, राजा जर पाहील तर त्याचें निवारण करावें; तें न करितां हेच सभासद तें युद्ध, राजा पाहत असतां आपणहि पाहण्याची
इच्छा करितात ॥ ७ ॥ ज्यांचे सर्व अवयव वज्रासारखे कठिण आहेत असे हे मेरुपर्वतासारखे मोठे चाणूर व मुष्टिक मल्ल कोठें ! आणि अतिसुकुमार अवयव असलेले व

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

यौवनावस्थासुद्धां प्राप्त न झालेले रामकृष्ण कोठें ! ! ॥ ८ ॥ यावरून या सभेच्या हातून हें धर्माचें उल्लंघन खरोखर होणार आहे. ज्या सभेमध्यें अधर्म प्रवृत्त होतो तेथें शहाण्या मनुष्यानें कधींहि बसूं नये ॥ ९ ॥ सभासदांचे दोष जाणणाऱ्या बुद्धिमान् पुरुषानें आदीं सभेमध्येंच जाऊं नये. कारण, तो मनुष्य जर सभासदांचे दोष जाणूनहि न बोलेल किंवा सभासदांच्या संतोषार्थ धर्मपक्षाच्या उलट बोलेल, अथवा विचारिलें असतांहि मी जाणत नाहीं असें ह्मणेल तर त्याला पाप लागतें ॥ १० ॥ दुसऱ्या ह्मणाल्या कीं,–शत्रूच्या चोहोंकडून धांवणाऱ्या श्रीकृष्णाचें मुखकमळ, 'जसा उदकाच्या बिंदूनीं व्याप्त झालेला कमळाचा कळा दिसतो त्याप्रमाणें' श्रमोदकांनीं व्याप्त झालेलें दिसत आहे पहा ! ॥ ११ ॥ अन्य ह्मणाल्या– अहो ! थोड्या लाल झालेल्या नेत्रांनीं युक्त, मुष्टिकावर क्रोधयुक्त झालेलें परंतु हास्याच्या

वज्रवत्कठिनानि सर्वाण्यंगानि ययोस्तौ ॥ ८ ॥ समाजस्य सभायाः ॥ ९ ॥ अपरा ऊचुः । सभामिति । अब्रुवन् ज्ञात्वाऽपि तूष्णीं तिष्ठन् । विब्रुवन्विपरीतं ब्रुवन् । अज्ञो न जानामीति ब्रुवन् । अतः प्राज्ञो न सभां प्रविशेदिति ॥ १० ॥ वल्गतः शत्रुमभित इति शत्रोः सर्वतो धावतः कृष्णस्य श्रमवारिणा उप्तं व्याप्तं मुखांबुजं दृश्यताम् ॥ ११ ॥ अन्या ऊचुः । किं न पश्यतेति । सामर्षं सक्रोधम् । हासेन संरंभ आवेशस्तेन शोभितम् ॥ १२ ॥ अन्या ऊचुः । पुण्या बतेति । नृलिंगेन मनुष्यदेहेन गूढः । वनस्थानि

धर्मव्यतिक्रमो ह्यस्य समाजस्य ध्रुवं भवेत् ॥ यत्राधर्मः समुत्तिष्ठेन्न स्थेयं तत्र कर्हिचित् ॥ ९ ॥ न सभां प्रविशेत्प्राज्ञः सभ्यदोषाननुस्मरन् ॥ अब्रुवन्विब्रुवन्नज्ञो नरः किल्बिषमश्नुते ॥ १० ॥ वल्गतः शत्रुमभितः कृष्णस्य वदनांबुजम् ॥ वीक्ष्यतां श्रमवार्युप्तं पद्मकोशमिवांबुभिः ॥ ११ ॥ किं न पश्यत रामस्य मुखमाताम्रलोचनम् ॥ मुष्टिकंप्रति सामर्षं हाससंरंभशोभितम् ॥ १२ ॥ पुण्या बत व्रजभुवो यदयं नृलिंगगूढः पुराणपुरुषो वनचित्रमाल्यः ॥ गाः पालयन्सहबलः क्वणयंश्च वेणुं विक्रीडयांऽचति गिरित्ररमार्चितांघ्रिः ॥ १३ ॥ गोप्यस्तपः किमचरन्यदमुष्य रूपं लावण्यसारमसमोर्ध्वमनन्यसिद्धम् ॥ दृग्भिः पिबंत्यनुसवाभिनवं दुरापमेकांतधाम यशसः श्रिय ऐश्वरस्य ॥ १४ ॥

चित्राणि माल्यानि यस्य सः । गिरित्रः शिवो रमा च ताभ्यामर्चितावंघ्री यस्य सः । अयं भावः । धिगिमां सभां यस्यामयं पराभूयते तास्तु व्रजभुवो धन्याः यत्रास्वयं कृष्णो विविधक्रीडयांऽचति गच्छतीति ॥ १३ ॥ अहो कष्टमल्पपुण्या वयं यतोऽस्माभिरनवसरे दृष्टोऽयम् । गोप्यस्तु बहुपुण्या इत्याहुस्त्रिभिः । गोप्य इति । अमुष्य श्रीकृष्णस्य रूपमंगं लावण्येन सारं श्रेष्ठम् । किंच असमोर्ध्वं न विद्यते सममूर्ध्वमधिकं च यस्य तत् यदपि नान्येनाभरणादिना सिद्धं किंतु स्वत एव ऐश्वरस्यैश्वर्यस्य चैकांतधामाव्यभिचारि स्थानम् । पाठांतरे अमुष्य ईश्वरस्येत्यन्वयः । एवंभूतं नित्यं नवीनं रूपं या नेत्रैः पश्यंतीति ॥ १४ ॥

आवेशानें शोभायमान दिसणारें तें बळरामाचें मुख तुमच्या दृष्टीस पडत नाहीं काय ? पडतच आहे ॥ १२ ॥ दुसऱ्या ह्मणाल्या– या सभेला धिक्कार असो, ज्या सभेमध्यें या श्रीकृष्णाचा पराभव होत आहे, गोकुळसंबंधी भूमि धन्य आहेत. ज्यांचेठिकाणीं शंकर व लक्ष्मी यांनींसुद्धां, ज्याच्या चरणाचें पूजन केलें आहे असा हा श्रीकृष्ण, मनुष्यशरीरानें गुप्त असा साक्षात् पुराणपुरुष असतांहि वनांतील तरतऱ्हेच्या रंगाचीं फुलें धारण करून बळरामासहवर्तमान गाई रक्षण करीत, मुरली वाजवीत व अनेकप्रकारच्या क्रीडा करीत संचार करितो ॥ १३ ॥ हीं मोठी दुःखाची गोष्ट कीं, आह्मी अगदीं अल्पपुण्य आहों, ह्मणून या कृष्णाच्या दुःखस्थितीच्या वेळीं याचें आह्मांस दर्शन झालें. अहो ! त्या गोपींनीं जन्मांतरीं काय बरें तप केलें होतें ? ज्या गोपी, या श्रीकृष्णाचें स्वरूप कीं, ज्याच्यासारखें किंवा अधिक जगतामध्यें दुसऱ्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कोणाचेंच सौंदर्य नाहीं असें सौंदर्याचें सार, स्वतःसिद्ध, यश, लक्ष्मी आणि ऐश्वर्य यांचें एकांतस्थान, पुण्यवंतांखेरीज पाहण्यासमुद्धां दुर्लभ व दररोज नव्यासारखें वाटणारें तें स्वरूप, नेत्रांनीं जणुं प्राशन करितात कीं काय ! अशा अतिशय आसक्तीनें पाहतात ॥ १४ ॥ ज्या गोपी, गाईंचें दूध काढतांना, तांदूळवगैरे कांडतांना, दह्याचें मंथन करितांना, सारवितांना, मुलांना झोंप्या काढतांना, रडत असलेल्या मुलांचें सांत्वन करितांना व सडासंमार्जनवगैरे करितांना अनुरक्तचित्त व सद्गदित-कंठ होऊन या कृष्णाचें गायन करितात. तेव्हां घरचीं सर्व कामें करीत असतांहि श्रीकृष्णाकडे चित्त असलेल्या त्या गोकुळवासी स्त्रिया धन्य होत ॥ १५ ॥ आणि ज्या गोपी, गाईंसहवर्तमान प्रातःकाळीं अरण्यांत जाणाऱ्या व सायंकाळीं मुरली वाजवीत गोकुळांत येणाऱ्या या श्रीकृष्णाचा वेणुनाद श्रवण करून घरांतून त्वरेनें बाहेर

किंच । या दोहनादिष्वेनं गायंति ता व्रजस्त्रियो धन्याः । प्रेंखेंखनं दोलांदोलनम् । उक्षणं सेचनम् । कथंभूताः । उरुक्रमे चित्तमुरुक्रमवित्तं तेनैव यानं सर्वविषयप्राप्तियासां ताः । पाठांतरे उरुक्रमं चिंतयंत्य इत्यर्थः । कुतः । अनुरक्तधियः । तत्र लिंगमश्रुकंठचः ॥ १५ ॥ प्रातरिति । या अबला अस्य वेणुं निशम्य गृहात्तूर्णं निर्गम्य पथि सस्मितमुखं

या दोहनेऽवहनने मथनोपलेपप्रेंखेंखनार्भरुदितोक्षणमार्जनादौ ॥ गायंति चैनमनुरक्तधियोऽश्रुकंठ्यो धन्या व्रजस्त्रिय उरुक्रमचित्तया-नाः ॥ १५ ॥ प्रातर्व्रजाद्व्रजत आविशतश्च सायं गोभिः समं क्वणयतोऽस्य निशम्य वेणुम् ॥ निर्गम्य तूर्णमबलाः पथि भूरिपु-ण्याः पश्यंति सस्मितमुखं सदयावलोकम् ॥ १६ ॥ एवं प्रभाषमाणासु स्त्रीषु योगेश्वरो हरिः ॥ शत्रुं हंतुं मनश्चक्रे भगवान्भरत-र्षभ ॥ १७ ॥ सभयाः स्त्रीगिरः श्रुत्वा पुत्रस्नेहशुचातुरौ ॥ पितरावन्वतप्येतां पुत्रयोरबुधौ बलम् ॥ १८ ॥ तैस्तैर्नियुद्धविधिभिर्वि-विधैरच्युतेतरौ ॥ युयुधाते यथाऽन्योन्यं तथैव बलमुष्टिकौ ॥ १९ ॥ भगवद्गात्रनिष्पातैर्वज्रनिष्पेषनिष्ठुरैः ॥ चाणूरो भज्यमानां-गो मुहुर्ग्लानिमवाप ह ॥ २० ॥ स श्येनवेग उत्पत्य मुष्टीकृत्य करावुभौ ॥ भगवंतं वासुदेवं क्रुद्धो वक्षस्यबाधत ॥ २१ ॥

पश्यंति ता भूरिपुण्या इति ॥ १६ ॥ एवं सभयं ब्रुवाणासु स्त्रीषु तासां भयनिवृत्तये कृष्णः शत्रुं हंतुं मनश्चक्रे ॥ १७ ॥ सभयाः स्त्रीणां गिरः श्रुत्वा पुत्रयोः स्नेहेन या शुक् तया आतुरौ विह्वलौ पुत्रयोर्बलमजानंतौ पितरावनुतापं प्रापाविति ॥ १८ ॥ १९ ॥ तदा भगवतो गात्राणामरत्निजान्वादीनां निष्पातैः प्रहारैर्वज्रस्य निष्पेषस्तीव्रप्रपातस्तद्व-न्निष्ठुरैः । भज्यमानांगः श्लथद्गात्रः ॥ २० ॥ श्येनस्येव वेगो यस्य स चाणूरः अबाधतताडयत् ॥ २१ ॥

निघून मार्गांचेठिकाणीं या श्रीकृष्णाचें दयादृष्टियुक्त व मंदहास्यसहित मुख अवलोकन करितात ॥ १६ ॥ हे राजा, याप्रमाणें स्त्रिया भाषण करीत असतां, भक्तांचें दुःख हरण करणाऱ्या त्या भगवान् श्रीकृष्णानें, शत्रूचा वध करण्याचें मनांत आणिलें ॥ १७ ॥ तेव्हां भयसहित अशीं तीं स्त्रियांचीं भाषणें ऐकून, पुत्रांचें सामर्थ्य न जाणणारे देवकीवसुदेव, पुत्रस्नेहाचें झालेल्या शोकानें व्याकुळ होऊन ताप पावले ॥ १८ ॥ असो. याप्रमाणें जसे कृष्णचाणूर एकमेकांना फिरविणें वगैरे त्या त्या नानाप्रकारच्या युद्धप्रकारांनीं परस्पर युद्ध करीत होते तसेच बळराम व मुष्टिक हेहि परस्पर युद्ध करीत होते ॥ १९ ॥ तेव्हां वज्राच्या प्रहारासारखे असह्य जे भग-वंताच्या अवयवांचे प्रहार त्यांच्यायोगानें अवयवांच्या खिळखिळ्या होऊं लागलेला तो चाणूर वारंवार ग्लानता पावूं लागला ॥ २० ॥ त्यावेळीं क्रुद्ध झालेल्या व श्येन पक्ष्यासारखा वेग असलेल्या त्या चाणूरानें, आपल्या दोन्ही हातांच्या मुठी करून त्यांनीं एकदम उडी टाकून, भगवान् वासुदेवाच्या वक्षःस्थळावर प्रहार केला ॥ २१ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

याप्रमाणें त्यानें ताडण केलें असतांहि त्याच्या प्रहारानें तो श्रीकृष्ण, जसा माळेनें ताडण केलेला हत्ती, हालतसुद्धां नाहीं त्याप्रमाणें हाललासुद्धां नाहीं, तर त्यानें झटकर त्या चाणूराला बाहूंचेठिकाणीं धरून बहुतवेळ गरगर फिरवून त्या फिरविण्यानेंच क्षीणायुषी झालेल्या त्याला भूमितळावर आपटिलें; तेव्हां तो चाणूर, अंगावरील भूषणें व केंस अस्ताव्यस्त होऊन, जसा गौडदेशामध्यें एका उत्सवांत ध्वजपताकादिकांनीं अलंकृत असा एक पुरुषाकृति मोठा ध्वज, उभारितात तो कांहीं कारणानें एकाएकीं पडतो त्याप्रमाणें भूमीवर पडला ॥ २२ ॥ २३ ॥ तसाच मुष्टिकमल्लहि, ज्यानें आपल्या मुष्टीनें प्रथम बळरामाला ताडण केलें होतें त्यास, त्याच बलाढ्य बळरामानें हाताच्या चपाटीनें ताडण केलें असतां तो अत्यंत पीडित व कंपित होऊन मुखांतून रक्ताच्या गुळण्या टाकीत, जसा प्रचंड वाऱ्यानें उपटलेला वृक्ष पडतो त्याप्रमाणें भूमीवर गतप्राण होऊन पडला ॥ २४ ॥ २५ ॥ हे राजा, नंतर आंगावर आलेल्या कूटनामक मल्लाला, योद्ध्यांमध्यें श्रेष्ठ अशा त्या बळरामानें अवज्ञापूर्वक सहज लीलेनें डाव्या मुठीनें मारून टा-

॥ २२ ॥ भूपृष्ठे भुव उपरि । पोथयामासास्फालयत् । इंद्रध्वजो वज्रम् । यद्वा इंद्रध्वजो गौडेषु प्रसिद्धः कस्मिंश्चिदुत्सवे महान्स्तंभो ध्वजपताकाद्यलंकृतः पुरुषाकृतिरुच्छ्रीयते स

नाचलत्तत्प्रहारेण मालाहत इव द्विपः ॥ बाह्वोर्निगृह्य चाणूरं बहुशो भ्रामयन्हरिः ॥ २२ ॥ भूपृष्ठे पोथयामास तरसा क्षीणजीवितम् ॥ विस्रस्ताकल्पकेशस्रगिंद्रध्वज इवापतत् ॥ २३ ॥ तथैव मुष्टिकः पूर्वं स्वमुष्ट्याऽभिहतेन वै ॥ बलभद्रेण बलिना तलेनाभिहतो भृशम् ॥ २४ ॥ प्रवेपितः स रुधिरमुद्वमन्मुखतोऽर्दितः ॥ व्यसुः पपातोर्व्युपस्थे वाताहत इवांघ्रिपः ॥ २५ ॥ ततः कूटमनुप्राप्तं रामः प्रहरतां वरः ॥ अवधीह्लीलया राजन्सावज्ञं वाममुष्टिना ॥ २६ ॥ तर्ह्येव हि शलः कृष्णपदाऽपहतशीर्षकः ॥ द्विधा विदीर्णस्तोशलक उभावपि निपेततुः ॥ २७ ॥ चाणूरे मुष्टिके कूटे शले तोशलके हते ॥ शेषाः प्रदुद्रुवुर्मल्लाः सर्वे प्राणपरीप्सवः ॥ २८ ॥ गोपान्वयस्यानाकृष्य तैः संसृज्य विजह्रतुः ॥ वाद्यमानेषु तूर्येषु वल्गंतौ रुतनूपुरौ ॥ २९ ॥ जनाः प्रजहृषुः सर्वे कर्मणा रामकृष्णयोः ॥ ऋते कंसं विप्रमुख्याः साधवः साधु साध्विति ॥ ३० ॥ हतेषु मल्लवर्येषु विद्रुतेषु च भोजराट् ॥ न्यवारयत्स्वतूर्याणि वाक्यं चेदमुवाच ह ॥ ३१ ॥

यथा पतति तद्वदपतदिति ॥ २३ ॥ २४ ॥ अर्दितः पीडितः । उर्व्युपस्थे भूतले ॥ २५ ॥ २६ ॥ २७ ॥ २८ ॥ वल्गंतौ नृत्यादि कुर्वंतौ ॥ २९ ॥ साधु साधु इति वदंतः ॥ ३० ॥ ३१ ॥

किलें ॥ २६ ॥ त्याचवेळीं श्रीकृष्णाच्या पायांच्या प्रहारानें शलनामक मल्लाचें मस्तक फुटून गेलें व तोशलक मल्लाचीं कृष्णानें चिरून दोन शकलें केलीं. अशाप्रकारें ते दोघेहि मल्ल मरून पडले ॥ २७ ॥ याप्रमाणें चाणूर, मुष्टिक, कूट, शल आणि तोशलक हे मुख्य मल्ल मरण पावले असतां, शेष राहिलेले सर्व मल्ल आपले प्राण वांचण्याची इच्छा धरून पळून गेले ॥ २८ ॥ नंतर ते रामकृष्ण, समवयांच्या गोपांना त्या आखाड्यावर बोलावून, त्यांचे हात धरून त्यांचें आकर्षण व आलिंगनवगैरे करून वाद्यें वाजत होतीं त्यांच्या तालाप्रमाणें नृत्यादिक करून पायांतील नूपुरांचा शब्द करीत होत्साते त्यांच्याशीं मल्लयुद्धक्रीडा करूं लागले ॥ २९ ॥ त्यावेळीं एका कंसावांचून जे ब्राह्मणादिक सर्वजन तेथें होते ते चांगलें झालें, चांगलें झालें असें म्हणत त्या रामकृष्णाच्या युद्धकर्मानें हर्ष पावले ॥ ३० ॥ याप्रमाणें मल्लांतील मुख्य जे चाणूर मुष्टिकादिक ते मरण पावले असतां व शेष राहिलेले पळून गेले असतां, भोजराज कंसानें, वाजविण्यास सांगितलेलीं आपलीं वाद्यें बंद करून, आप-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ल्या सेवकांस असें वाक्य सांगितलें कीं,– ॥ ३१ ॥ ह्या दुराचारी रामकृष्णांना नगरांतून बाहेर घालवून द्या; गोपांचें धन हरण करा; माझ्या वैऱ्यांचें संगोपन करणाऱ्या दुर्मति नंदाला कैद करा ॥ ३२ ॥ तसेंच पुत्रांना चोरून दुसरेठिकाणीं नेऊन ठेविल्यामुळें अतिदुष्ट व दुर्बुद्धि अशा वसुदेवाला, तुम्हीं लवकरच मारून टाकावें तसाच शत्रुपक्षाला अनुसरणारा पिता उग्रसेनहि अनुचरांसहवर्तमान मारून टाकावा ॥ ३३ ॥ याप्रमाणें कंस बडबडूं लागला असतां, अत्यंत क्रुद्ध झालेला अविनाशी तो श्रीकृष्ण, लघिमासिद्धीच्या आश्रयानें उडी मारून त्वरेनें उंच असलेल्या त्याच्या मंचकावर आरूढ झाला ॥ ३४ ॥ त्या आरोहण करणाऱ्या आपल्या मृत्युरूपी श्रीकृष्णाला पाहून त्या धैर्यवान् कंसानें, आसनावरून त्वरेनें उठून हातामध्यें ढाल व तलवार ग्रहण केली ॥ ३५ ॥ त्यावेळीं असह्य व उग्र तेज असलेल्या त्या

॥ ३२ ॥ ३३ ॥ अव्ययोऽश्रमः । लघिम्ना लाघवेन ॥ ३४ ॥ ३५ ॥ दुर्विषहमविषह्यमुग्रं तेजो यस्य स श्रीकृष्णः ॥ ३६ ॥ गरिष्ठत्वाय विश्वाश्रयत्वमुक्तम् । तत्र हेतुः । अब्ज-

निःसारयत दुर्वृत्तौ वसुदेवात्मजौ पुरात् ॥ धनं हरत गोपानां नंदं बध्नीत दुर्मतिम् ॥ ३२ ॥ वसुदेवस्तु दुर्मेधा हन्यतामाश्वसत्तमः॥ उग्रसेनः पिता चापि सानुगः परपक्षगः ॥३३॥ एवं विकत्थमाने वै कंसे प्रकुपितोऽव्ययः॥ लघिम्नोत्पत्य तरसा मंचमुत्तुंगमारुहत् ॥ ३४॥ तमाविशंतमालोक्य मृत्युमात्मन आसनात् ॥ मनस्वी सहसोत्थाय जगृहे सोऽसिचर्मणी ॥ ३५ ॥ तं खड्गपाणिं विचरंतमाशु श्येनो यथा दक्षिणसव्यमंबरे ॥ समग्रहीद्दुर्विषहोग्रतेजा यथोरगं तार्क्ष्यसुतः प्रसह्य ॥ ३६॥ प्रगृह्य केशेषु चलत्किरीटं निपात्य रंगोपरि तुंगमचात् ॥ तस्योपरिष्टात्स्वयमब्जनाभः पपात विश्वाश्रय आत्मतंत्रः ॥ ३७ ॥ तं संपरेतं विचकर्ष भूमौ हरिर्यथेभं जगतो विपश्यतः ॥ हाहेति शब्दः सुमहांस्तदाऽभूदुदीरितः सर्वजनैर्नरेंद्र ॥ ३८ ॥ स नित्यदोद्विग्नधिया तमीश्वरं पिबन्वदन्वा विचरन्स्वपन् श्वसन् ॥ ददर्श चक्रायुधमग्रतो यतस्तदेव रूपं दुरवापमाप ॥ ३९ ॥ तस्यानुजा भ्रातरोऽष्टौ कंकन्यग्रोधकादयः ॥ अभ्यधावन्नभिक्रुद्धा भ्रातुर्निर्वेशकारिणः ॥ ४० ॥

नाभः । कुतस्तस्योपर्येव पपात । यत आत्मतंत्रः स्वतंत्रः ॥ ३७ ॥ ३८ ॥ ३९ ॥ निर्वेशो निष्कृतिरानृण्यमित्यर्थः । तत्कारिणः संतस्तेऽभ्यधावन् ॥ ४० ॥

भगवान् श्रीकृष्णानें, हातांत तलवार घेऊन उजवीकडे, डावीकडे व वर आकाशामध्यें श्येनपक्ष्याप्रमाणें त्वरेनें भ्रमण करणाऱ्या त्या कंसाला, जसा गरुड बलात्कारानें सर्पाला धरितो त्याप्रमाणें धरिलें ॥ ३६ ॥ तेव्हां धरण्याच्या योगानेंच किरीट एकीकडे पडलेल्या त्या कंसाला केंसाचे ठिकाणीं धरून, त्या उंच मंचकावरून खालीं रंगमंडपावर पाडिलें आणि त्याच्यावर सर्व जगाचा आश्रय व स्वतंत्र असा तो भगवान् स्वतां पडला ॥ ३७ ॥ नंतर श्रीकृष्णानें मरण पावलेल्या कंसाचें सर्वलोकांच्या देखत भूमीवर, जसें सिंहानें हत्तीचें आकर्षण करावें त्याप्रमाणें आकर्षण केलें. हे राजा, त्यावेळीं सर्व लोकांनीं उच्चारिलेला मोठा हाहाकार शब्द झाला ॥ ३८ ॥ तो कंस, प्रतिदिवशीं आठहि प्रहर भयभीत झालेल्या बुद्धीनें; त्याच चक्रधारी ईश्वरावें खातांना, पितांना, बोलतांना, चालतांना, निजतांना व श्वासोच्छ्वास टाकतांना, अग्रभागीं अवलोकन करीत असल्यामुळें शेवटीं त्याच्याच दुर्लभ स्वरूपाप्रत पावला ॥ ३९ ॥ त्या कंसाचे कंक, न्यग्रोध इत्यादिक आठ कनिष्ठ भाऊ होते ते अतिक्रुद्ध होऊन, भ्रात्या कंसाचे

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

उतराइ होण्याकरितां कृष्णाच्या अंगावर धांवून आले ॥ ४० ॥ तेव्हां तशा अतिवेगानें युद्ध करण्याकरितां उद्युक्त होऊन आलेल्या त्या कंसबंधूंना, बळरामानें तेथें असलेला एक परिघ उचलून त्याच्या योगानें, जसा सिंह पशूंना मारून टाकितो त्याप्रमाणें मारून टाकिलें ॥ ४१ ॥ त्यावेळीं स्वर्गलोकीं, देवांनीं वाजविलेले दुंदुभि वाजूं लागले, तशाच ब्रह्मदेवशंकरप्रभृति ईश्वराच्या विभूति, संतोषानें कृष्णरामावर पुष्पवृष्टि करून प्रशंसा करूं लागल्या व अप्सरा नृत्य करूं लागल्या ॥ ४२ ॥ हे महाराजा, त्या कंसादिकांच्या स्त्रिया आपल्या पतींच्या मरणानें दुःखित होऊन आपलीं मस्तकें बडवून घेत व नेत्रांतून दुःखाश्रु ढाळीत तेथें प्राप्त झाल्या ॥ ४३ ॥ आणि वीरशय्येवर निजलेल्या आपापल्या पतींना आलिंगन करून शोक करणाऱ्या त्या स्त्रिया, वारंवार दुःखाश्रु ढाळीत सुस्वर विलाप करूं लागल्या कीं– ॥ ४४ ॥ हा नाथा!

तथा तादृगतिरभसो वेगो येषां तान् । संयत्तानुद्युक्तान् ॥ ४१ ॥ ४२ ॥ ४३ ॥ शोचंत्यो विलापांश्चक्रुः । शुचः अश्रूणि ॥ ४४ ॥ धर्मज्ञ इत्यादीनि विलापे प्रेमसंबोधनानि

तथातिरभसांस्तांस्तु संयत्तान् रोहिणीसुतः ॥ अहन्परिघमुद्यम्य पशूनिव मृगाधिपः ॥ ४१ ॥ नेदुर्दुंदुभयो व्योम्नि ब्रह्मेशाद्या विभूतयः ॥ पुष्पैः किरंतस्तं प्रीताः शशंसुर्ननृतुः स्त्रियः ॥ ४२ ॥ तेषां स्त्रियो महाराज सुहृन्मरणदुःखिताः ॥ तत्राभीयुर्विनिघ्नंत्यः शीर्षाण्यश्रुविलोचनाः ॥ ४३ ॥ शयानान्वीरशय्यायां पतीनालिंग्य शोचतीः ॥ विलेपुः सुस्वरं नार्यो विसृजंत्यो मुहुः शुचः ॥ ४४ ॥ हा नाथ प्रिय धर्मज्ञ करुणानाथ वत्सल ॥ त्वया हतेन निहता वयं ते सगृहप्रजाः ॥ ४५ ॥ त्वया विरहिता पत्या पुरीयं पुरुषर्षभ ॥ न शोभते वयमिव निवृत्तोत्सवमंगला ॥ ४६ ॥ अनागसां त्वं भूतानां कृतवान्द्रोहमुल्बणम् ॥ तेनेमां भो दशां नीतो भूतध्रुक्को लभेत शम् ॥ ४७ ॥ सर्वेषामिह भूतानामेष हि प्रभवाप्ययः ॥ गोप्ता च तदवध्यायी न क्वचित्सुखमेधते ॥ ४८ ॥ श्रीशुक उवाच ॥ राजयोषित आश्वास्य भगवाँल्लोकभावनः ॥ यामाहुर्लौकिकीं संस्थां हतानां समकारयत् ॥ ४९ ॥ मातरं पितरं चैव मोचयित्वाऽथ बंधनात् ॥ कृष्णरामौ ववंदाते शिरसा स्पृश्य पादयोः ॥ ५० ॥

ते त्वदीया वयम् ॥ ४५ ॥ त्वया पत्या विरहिता पुरीयं न शोभत इति स्वदृष्टयाभिधानम् ॥ ४६ ॥ अनागसामिति तु परमार्थाभिधानम् ॥ ४७ ॥ एष कृष्णः प्रभवंत्यस्मादिति प्रभवः अपियंत्यस्मिन्नित्यप्ययः स च स च । तदवध्यानं तदवज्ञा तत्कर्तुं शीलं यस्य सः ॥ ४८ ॥ ४९ ॥ आस्पृश्य ईषत्स्पृष्ट्वा ॥ ५० ॥

हा प्रिया! हा धर्मज्ञा! हा दयाळो! हा अनाथवत्सला! तूं मरण पावलास त्याच्या योगानें आम्हीं घरें व पुत्रादिकांसहवर्तमान मेल्यासारख्या झालों आहों ॥ ४५ ॥ हे पुरुषश्रेष्ठा, तुज पतीवांचून जशा आम्ही उत्साह व मंगलरहित झालों आहों त्याप्रमाणेंच ही मथुरा नगरीहि उत्साह व मंगलरहित होऊन शोभत नाहींशी झाली आहे ॥ ४६ ॥ हे प्राणप्रिया, तूं निरपराधी प्राण्यांचा मोठा भयंकर जो द्रोह केलास त्याच्या योगानें ही अशी दशा पावला आहेस. प्राणिमात्रांचा द्रोह करणारा कोण बरें पुरुष सुख पावणार आहे? कोणीच पावणार नाहीं ॥ ४७ ॥ हा श्रीकृष्ण, संपूर्ण प्राणिमात्रांना उत्पन्न करणारा, संहार करणारा व रक्षण करणारा आहे, त्याच्याशीं द्रोह करणारा पुरुष कोठेंहि सुखानें वृद्धिंगत होणार नाहीं ॥ ४८ ॥ श्रीशुकाचार्य म्हणाला–हे राजा, याप्रमाणें भाषण करणाऱ्या त्या राजस्त्रियांचें, लोकांचें पालन करणाऱ्या भगवान् श्रीकृष्णानें, आश्वासन करून, नंतर हत झालेल्या त्या कंसादिकांची जी और्ध्वदैहिक क्रिया सांगितलेली आहे ती सर्व करविली ॥ ४९ ॥ नंतर त्या रामकृष्णांनीं देवकी-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मातेला व वसुदेव पित्याला बंधनांतून मुक्त करून त्यांच्या पायांवर मस्तक ठेवून त्यांना वंदन केले ॥ ५० ॥ तेव्हां त्या देवकी वसुदेवांनीं, वंदन करणाऱ्या त्या रामकृष्ण पुत्रांना पुत्रभ्रांति टाकून हे जगदीश्वर आहेत असें मानिलें आणि त्यांस आलिंगन केलें नाहीं, तर शंकायुक्त होऊन त्यांच्या पुढें तीं उभयतां हात जोडून उभीं राहिलीं ॥ ५१ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील पूर्वार्धांत कंसवधनिरूपणनामक हा चव्वेचाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ४४ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या पंचेचाळिसाव्या अध्यायामध्यें श्रीकृष्णानें देवकी वसुदेव आणि नंदादिक गोप यांचें सांत्वन करून, उग्रसेनाला राज्याभिषेक केला; तसाच गुरूच्या घरीं वास करून सर्व विद्या शिकून पुन्हा मथुरेमध्यें आगमन केलें, अशी कथा वर्णन केली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, पुरुषोत्तम भगवंतानें, देवकीवसुदेवांनां,

---

पुत्रभ्रांतिं विहाय जगदीश्वराविति ज्ञात्वा शंकितौ न सस्वजाते नालिंगितवंतौ । किंतु बद्धांजली तस्थतुरित्यर्थः ॥ ५१ ॥ प्रसह्य हत्वा हस्तींद्रं मल्लेंद्रान्मल्ललीलया ॥ बीभत्स-चरितं कंसं स बीभत्समममारयत् ॥ १ ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधे पूर्वार्धे टीकायां चतुश्चत्वारिंशोऽध्यायः ॥ ४४ ॥ ॥ पंचचत्वारिंशकेऽथ पितृनंदादिसांत्वनम् ॥ उग्र-सेनाभिषेकश्च गुरौ वासात्पुरागमः ॥ १ ॥ उपलब्धार्थौ विदित्वेति । अयमर्थः । उप समीपे आवयोः पुत्रबुद्ध्या सांसारिकपरमसुखभोगात्पूर्वमेव लब्धार्थावावामीश्वराविति लब्धः

देवकी वसुदेवश्च विज्ञाय जगदीश्वरौ ॥ कृतसंवंदनौ पुत्रौ सस्वजाते न शंकितौ ॥ ५१ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे कंसवधो नाम चतुश्चत्वारिंशोऽध्यायः ॥ ४४ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ पितरावुपलब्धार्थौ विदित्वा पुरुषोत्तमः ॥ माभूदिति निजां मायां ततान जनमोहिनीम् ॥ १ ॥ उवाच पितरावेत्य साग्रजः सात्वतर्षभः ॥ प्रश्रयावनतः प्रीणन्नंब तातेति सादरम् ॥ २ ॥ नास्मत्तो युवयोस्तात नित्योत्कंठितयोरपि ॥ बाल्यपौगंडकैशोराः पुत्राभ्यामभवन् क्वचित् ॥ ३ ॥ न लब्धो दैवहतयोर्वासो नौ भवदंतिके ॥ यां बालाः पितृगेहस्था विंदंते लालिता मुदम् ॥ ४ ॥

प्राप्तः परमज्ञानरूपोऽर्थो याभ्यां तौ तथाभूतौ ज्ञात्वा मयि प्रसन्ने सत्यनयोर्ज्ञानं नाम किं दुर्लभं स्यात् दुर्लभं तु मयि पुत्रतया प्रेम अत इदानीमेव तज्ज्ञानं नाभूदिति निजां स्वाधीनां मायां तयोः प्रसारितवानिति ॥ १ ॥ तदेव दर्शयति उवाचेत्यादिभिरष्टभिः । प्रीणन्प्रीणयन्सादरं ब्रुवन् ॥ २ ॥ अस्मत्तोऽस्मन्निमित्तं नित्यमुत्कंठितयोरपि युवयोः पुत्राभ्यामावाभ्यां कृत्वा बाल्यपौगंडकैशोरास्तत्तदवस्थानुभवसुखानीत्यर्थः । नाभवन्निति अस्मत्तः पुत्राभ्यामिति सामानाधिकरण्यं वा ॥ ३ ॥ किंच । आवामेव दैवहीनावित्याह । न लब्ध इति । पितृगेहस्था बाला यां मुदं विंदंते सा च न लब्धेति ॥ ४ ॥

आपल्यावर पुत्रबुद्धि असल्यानें प्राप्त होणाऱ्या सांसारिक परमसुखभोगाच्या पूर्वींच, आह्मी दोघेहि सर्वेश्वर आहों असें ज्ञान झालें हें पाहून, व मी प्रसन्न असतां यांना ज्ञान ह्मणजे काय दुर्लभ आहे नाहीं? तर माझ्येठिकाणीं पुत्रभावानें प्रेमच दुर्लभ आहे. असें जाणून आतांच त्यांना तें ज्ञान होऊं नये ह्मणून सर्वजनांना मोह करणारी आपली माया त्यांच्यावर पसरली ॥ १ ॥ ती अशी कीं,– बळरामासहित यादवश्रेष्ठ तो श्रीकृष्ण, मोहित झालेल्या त्या देवकीवसुदेवांजवळ जाऊन, विनयानें नम्र होऊन मोठ्या आदरानें–हे माते, हे ताता, अशीं संबोधनें देऊन ह्मणाला कीं,– ॥ २ ॥ हे ताता, तुह्मीं उभयतां आह्मां पुत्रांकरितां निरंतर उत्कंठित असूनहि तुह्मांला आह्मां-कडून बाल्य, पौगंड व कैशोर या अवस्थांमध्यें प्राप्त होणारीं सुखें मुळींच प्राप्त झालीं नाहींत ॥ ३ ॥ केवळ तुमच्याच सुखाची हानि झाली असें नाहीं, तर प्रारब्धहीन अशा आमचाहि तुमच्याजवळ वास घडला नाहीं, त्यामुळें आईबापांच्या घरीं राहणारे व त्यांनीं लालनपालन केलेले बालक, जो आनंद पावतात तो तुमच्यापासून

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आह्मांला मिळाला नाहीं ॥ ४ ॥ आणि तुमच्या शुश्रूषेच्या लोपानें आमची धर्महानिहि झाली आहे. कारण, सर्व पुरुषार्थांना संपादन करणारा देह ज्यांनीं उत्पन्न केला व पोषण केला त्या मातापितरांचें ऋण फेडणें हें मनुष्याच्या हातून शंभरवर्षें वांचूनहि घडत नाहीं ॥ ५ ॥ त्यामध्यें, जो पुत्र, समर्थ असूनहि आपल्या देहानें व धनानें त्या आईबापांची अन्नवस्त्रादिकेंकरून जीविका चालवीत नाहीं, त्यापुत्राकडून परलोकीं यमाचे दूत त्याचेंच मांस खाववितात ॥ ६ ॥ आणि जो पुत्र, समर्थ असून वृद्ध अशा आईबापांचें, पतिव्रता स्त्रीचें, लहान पुत्रांचें, गुरूचें, ब्राह्मणांचें व शरणागताचें रक्षण करीत नाहीं तो जीवंत असून मेल्यासारखाच होय ॥ ७ ॥ यास्तव, तुह्मां उभयतांचा सत्कार न करणाऱ्या आमचे, हे अकरा वर्षांचे दिवस व्यर्थच निघून गेले आहेत. यावें कारण, आजपर्यंत आह्मी कंसापासून नित्य उद्विग्नचित्त

तच्छ्लोकद्वयेन युवयोरावयोश्च कामहानिर्जातेत्युक्तमावयोः पुनर्युष्मत्परिचर्यालोपेन धर्महानिरपि जातेत्याह । सर्वार्थसंभव इति । सर्वेषां धर्माद्यर्थानां संभवो यस्मिन्स देहो यतो याभ्यां जनितः पोषितश्च तयोः पित्रोर्निर्वेशं निष्कृतिमानृण्यं मर्त्यः शतसंवत्सरमात्रेणायुषा न प्राप्नोति ॥ ५ ॥ तन्मध्येऽपि तु यः पुत्रः कल्पः समर्थः सन्नपि देहेन

सर्वार्थसंभवो देहो जनितः पोषितो यतः ॥ न तयोर्याति निर्वेशं पित्रोर्मर्त्यः शतायुषा ॥ ५ ॥ यस्तयोरात्मजः कल्प आत्मना च धनेन च ॥ वृत्तिं न दद्यात्तं प्रेत्य स्वमांसं खादयंति हि ॥ ६ ॥ मातरं पितरं वृद्धं भार्यां साध्वीं सुतं शिशुम् ॥ गुरुं विप्रं प्रपन्नं च कल्पोऽबिभ्रच्छ्वसन्मृतः ॥ ७ ॥ तन्नावकल्पयोः कंसान्नित्यमुद्विग्नचेतसोः ॥ मोघमेते व्यतिक्रांता दिवसा वामनर्चतोः ॥ ८ ॥ तत्क्षंतुमर्हथस्तात मातर्नौ परतंत्रयोः ॥ अकुर्वतोर्वां शुश्रूषां क्लिष्टयोर्दुर्हृदा भृशम् ॥ ९ ॥ श्रीशुक उवाच ॥ इति मायामनुष्यस्य हरेर्विश्वात्मनो गिरा ॥ मोहितावंकमारोप्य परिष्वज्यापतुर्मुदम् ॥ १० ॥ सिंचंतावश्रुधाराभिः स्नेहपाशेन चावृतौ ॥ न किंचिदूचतू राजन्बाष्पकंठौ विमोहितौ ॥ ११ ॥ एवमाश्वास्य पितरौ भगवान्देवकीसुतः ॥ मातामहं तूग्रसेनं यदूनामकरोन्नृपम् ॥ १२ ॥

धनेन च पित्रोर्वृत्तिं जीविकां न संपादयेत्तं प्रेत्य लोकांतरे यमदूताः स्वस्यैव मांसं खादयंतीति ॥ ६ ॥ किंच मात्रादिशुश्रूषामकुर्वन्विफलजीवितश्च भवतीत्याह । मातरमिति । अबिभ्रदपुष्णन्श्वसन्नपि मृततुल्य एवेति ॥ ७ ॥ तत्तस्मान्नौ आवयोः मोघं व्यर्थम् । अनर्चतोरपूजयतोः ॥ ८ ॥ दुर्हृदा कंसेन कृत्वा ॥ ९ ॥ १० ॥ ११ ॥ आश्वास्य सांत्वयित्वा ॥ १२ ॥

असल्यामुळें तुमचें रक्षण करण्यास समर्थ झालों नाहीं ॥ ८ ॥ हे ताता, हे माते, दुष्टबुद्धि कंसानें दुःख दिलेल्या व बंदिगृहांत कोंडून ठेवलेल्या तुमची शुश्रूषा करण्याच्या वेळींहि शुश्रूषा न करणाऱ्या आमच्या अपराधांची आतां तुह्मी 'आईबाप असल्यामुळें' क्षमा केली पाहिजे ॥ ९ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, मायेनें मनुष्यरूपी परंतु जगाचा अंतर्यामी अशा श्रीकृष्णाच्या याप्रकारच्या वाणीनें मोहित झालेले ते देवकीवसुदेव, त्या रामकृष्णांना मांडीवर बसवून घेऊन व आलिंगन करून आनंद पावले ॥ १० ॥ आणि त्यावेळीं हे राजा, अश्रूंच्या धारांनीं त्यांचें सेवन करणाऱ्या, त्याच्या मायेनें मोहित झालेल्या, स्नेहरूप पाशानें बंध पावलेल्या व सद्गदितकंठ झालेल्या त्या देवकीवसुदेवांनीं, कांहींच भाषण केलें नाहीं ॥ ११ ॥ याप्रमाणें भगवान् श्रीकृष्णानें देवकीवसुदेवांचें सांत्वन करून, नंतर मातामह उग्रसेनाला यादवांच्या ॥१३२॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मुख्य गादीवर अभिषेक केला ॥ १२ ॥ आणि त्याप्रत भाषण केलें कीं,– हे महाराज, आपण आह्मां सेवकांना व सर्वप्रजांना आज्ञा करण्यास समर्थ आहां. आतां तूंच प्रजांना आज्ञा कर असें ह्मणाल तर– ययातिराजाच्या शापानें यदूच्या वंशांतील लोकांनीं सिंहासनावर बसतां कामा नये, तुह्मांला तर यादवत्व असलें तरी माझ्या आज्ञेनें दोष नाहीं ॥ १३ ॥ मला तशी शक्ति नाहीं असें ह्मणाल तर– मी सेवक आपली सेवा करीत असतां देवादिकसुद्धां नम्र होऊन आपणास पूजा समर्पण करितील, मग दुसरे राजे करभार समर्पण करतील यांत नवल काय ! ॥ १४ ॥ नंतर, त्या विश्वकर्त्या भगवंतानें, कंसाच्या भयानें व्याकुळ होऊन सर्वदिशांकडे पळून गेलेल्या आपल्या–यादव, वृष्णि, अंधक, मधु, दाशार्ह, कुकुर इत्यादिक सर्व ज्ञातींना व संबंध्यांना त्या त्या दिशांकडून आणवून प्रवासामध्यें वास केल्यामुळें कृश झालेल्या त्यांचें

त्वमेवाज्ञापयेति मा वदेत्याह । ययातिशापादिति । तव तु यादवत्वेऽपि मदाज्ञया न दोष इति भावः ॥ १३ ॥ मम तादृशी शक्तिर्नास्तीति चेत्तत्राह । मयीति । मत्प्रसादेन सर्वं भविष्यतीत्यर्थः ॥ १४ ॥ स्वान्ज्ञातीन्संबंधांश्च दिग्भ्य आनाय्येति ॥ १५ ॥ १६ ॥ सिद्धाः पूर्णाः । कृष्णरामाभ्यां गतो निवृत्तो ज्वरस्तापो येषां ते ॥ १७ ॥ सदयस्मितं

आह चास्मान्महाराज प्रजाश्चाज्ञप्तुमर्हसि ॥ ययातिशापाद्यदुभिर्नासितव्यं नृपासने ॥ १३ ॥ मयिभृत्य उपासिने भवतो विबुधादयः ॥ बलिं हरंत्यवनताः किमुतान्ये नराधिपाः ॥ १४ ॥ सर्वान्स्वान्ज्ञातिसंबंधान्दिग्भ्यः कंसभयाकुलान् ॥ यदुवृष्ण्यंधकमधुदाशार्हकुकुरादिकान् ॥ १५ ॥ सभाजितान्समाश्वास्य विदेशावासकर्शितान् ॥ न्यवासयत्स्वगेहेषु वित्तैः संतर्प्य विश्वकृत् ॥ १६ ॥ कृष्णसंकर्षणभुजैर्गुप्ता लब्धमनोरथाः ॥ गृहेषु रेमिरे सिद्धाः कृष्णरामगतज्वराः ॥ १७ ॥ वीक्षंतोऽहरहः प्रीता मुकुंदवदनांबुजम् ॥ नित्यं प्रमुदितं श्रीमत्सदयस्मितवीक्षणम् ॥ १८ ॥ तत्र प्रवयसोऽप्यासन्युवानोऽतिबलौजसः ॥ पिबंतोऽक्षैर्मुकुंदस्य मुखांबुजसुधां मुहुः ॥ १९ ॥ अथ नंदं समासाद्य भगवान्देवकीसुतः ॥ संकर्षणश्च राजेंद्र परिष्वज्येदमूचतुः ॥ २० ॥ पितर्युवाभ्यां स्निग्धाभ्यां पोषितौ लालितौ भृशम् ॥ पित्रोरभ्यधिका प्रीतिरात्मजेष्वात्मनोऽपि हि ॥ २१ ॥

वीक्षणं यस्मिंस्तत् ॥ १८ ॥ प्रवयसो वृद्धा अप्यतिशयितं बलमोजश्च येषां ते ॥ १९ ॥ २० ॥ भृशमात्मनोऽप्याधिक्येन पोषितौ । न चाश्चर्यमेतदित्याह । पित्रोरिति । आत्मनो देहादप्यात्मजेष्वभ्यधिका हि प्रीतिरिति ॥ २१ ॥

सांत्वन करून, सत्कार करून व वस्त्रपात्रद्रव्यादिकांच्या दानानें संतुष्ट करून त्यांना आपापल्या गृहांमध्यें राहविलें ॥ १५ ॥ १६ ॥ तेव्हां, कृष्ण व बळराम यांच्या बाहूंनीं शत्रूंपासून रक्षण केलेले व रामकृष्णांच्याच योगानें दुःख निवृत्त होऊन पूर्णमनोरथ झालेले ते यादव, कृतार्थ होत्साते आपापल्या गृहांचेठिकाणीं रममाण झाले ॥ १७ ॥ त्या मथुरेमध्यें राहणारे वृद्ध पुरुषहि, नित्य आनंदानें भरलेलें, शोभायुक्त, व दयायुक्त हास्यसहित अवलोकनानें युक्त असें श्रीकृष्णाचें मुखकमळ प्रतिदिवशीं पाहत असल्यामुळें श्रीकृष्णाच्या मुखकमळामृताचें वारंवार सेवन करीत होत्साते तरुणासारखे अतिबलिष्ठ व पराक्रमी झाले ॥ १८ ॥ १९ ॥ हे महाराज, नंतर देवकीपुत्र भगवान् श्रीकृष्ण व बळराम हे उभयतां, नंदाजवळ येऊन व त्याला आलिंगन देऊन असें ह्मणाले कीं,– ॥ २० ॥ हे ताता, स्नेहयुक्त अशा तुह्मी उभयतांनीं आपल्या देहापेक्षांहि अत्यंत अधिकपणानें आमचें पोषण व लालन केलें आहे. आणि हें तरी आश्चर्य नव्हे. कारण, लोकामध्यें आपल्या देहापेक्षांहि पुत्रांवर आईबापांची

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रीति अधिक असल्ये असें प्रसिद्ध आहे ॥ २१ ॥ आतां देवकीवसुदेवांचे पुत्र तुह्मी आहां, आमचे नव्हे, असें तुह्मी कधींहि बोलूं नये. कारण, पोषणाविषयीं व रक्षणाविषयीं असमर्थ अशा आईबापादिकांनीं टाकलेल्या लहान आह्मां पुत्रांचें ज्या तुह्मीं (यशोदानंदांनीं) आपल्या पुत्रांप्रमाणें पोषण केलें आहे, तीं तुह्मी आमचीं मातापितरें आहां यांत संशय नाहीं ॥ २२ ॥ असो. हे ताता नंदा, आतां तुह्मी सर्व गोपांनीं गोकुळामध्यें चलावें. आह्मीहि येथें असलेल्या आपल्या सर्व सुहृदांना; सुख उत्पन्न करून नंतर, आमच्या स्नेहानें दुःखित झालेल्या तुह्मां ज्ञातींना पाहण्याकरितां येऊं ॥ २३ ॥ याप्रमाणें व्रजवासी गोपांसह नंदाचें भगवान् श्रीकृष्णानें सांत्वन करून, नंतर वस्त्रें अलंकार आणि सोन्यारुप्यासेरीज कांशाचीं पितळेचींवगैरे भांडीं देऊन त्यांचा मोठ्या आदरानें सत्कार केला ॥ २४ ॥ असो. याप्रमाणें कृष्णानें सांगितलेला तो

देवकीवसुदेवयोः पुत्रौ युवां नास्मत्पुत्रावित्यपि न वाच्यमित्याह । स पितेति ॥ २२ ॥ २३ ॥ सव्रजं व्रजवासिभिः सहितम् । कुप्यानि स्वर्णरजतादिव्यतिरिक्तकांस्यपात्रादीनि तत्प्रभृतिभिः ॥ २४ ॥ २५ ॥ पुरोधसा गर्गाचार्येण द्विजसंस्कृतिमुपनयनम् ॥ २६ ॥ गावो गाः । रुक्मस्य माला विद्यंते यासां ताः । क्षौमवस्त्रमालावतीः ॥ २७ ॥ याः

स पिता सा च जननी यौ पुष्णीतां स्वपुत्रवत् ॥ शिशून्बंधुभिरुत्सृष्टानकल्पैः पोषरक्षणे ॥ २२ ॥ यात यूयं व्रजं तात वयं च स्नेहदुःखितान् ॥ ज्ञातीन्वो द्रष्टुमेष्यामो विधाय सुहृदां सुखम् ॥ २३ ॥ एवं सांत्वय्य भगवान्नंदं सव्रजमच्युतः ॥ वासोऽलंकारकुप्याद्यैरर्हयामास सादरम् ॥ २४ ॥ इत्युक्तस्तौ परिष्वज्य नंदः प्रणयविह्वलः ॥ पूरयन्नश्रुभिर्नेत्रे सह गोपैर्व्रजं ययौ ॥ २५ ॥ अथ शूरसुतो राजन्पुत्रयोः समकारयत् ॥ पुरोधसा ब्राह्मणैश्च यथावद्द्विजसंस्कृतिम् ॥ २६ ॥ तेभ्योऽदाद्दक्षिणा गावो रुक्ममालाः स्वलंकृताः ॥ स्वलंकृतेभ्यः संपूज्य सवत्साः क्षौममालिनीः ॥ २७ ॥ याः कृष्णरामजन्मर्क्षे मनोदत्ता महामतिः ॥ ताश्चाददादनुस्मृत्य कंसेनाधर्मतो हृताः ॥ २८ ॥ ततश्च लब्धसंस्कारौ द्विजत्वं प्राप्य सुव्रतौ ॥ गर्गाद्यदुकुलाचार्याद्गायत्रं व्रतमास्थितौ ॥ २९ ॥ प्रभवौ सर्वविद्यानां सर्वज्ञौ जगदीश्वरौ ॥ नान्यसिद्धामलज्ञानं गूहमानौ नरेहितैः ॥ ३० ॥

पूर्वं मनोदत्ता आसंस्ता एवाददात् । ननु ताः कंसेनापहृताः सत्यं राजगोष्ठादाच्छिद्य दत्ता इत्याह । कंसेनाधर्मत इति ॥ २८ ॥ गायत्रं व्रतं ब्रह्मचर्यम् ॥ २९ ॥ प्रकर्षेण भवंत्याभ्यामिति प्रभवौ । अतएव सर्वज्ञौ स्वतः सिद्धममलं ज्ञानं प्रच्छादयंतौ नरचेष्टितैः ॥ ३० ॥

नंदराजा, स्नेहानें विव्हळ झाला आणि त्या रामकृष्णांना आलिंगन करून, अश्रूंनीं नेत्र पूर्ण करीत होत्साता गोपांसहवर्तमान गोकुळामध्यें निघून गेला ॥ २५ ॥ हे राजा, नंतर वसुदेवानें आपल्या पुरोहित गर्गाचार्याकडून व ब्राह्मणांकडून यथाविधीनें रामकृष्णांचा उपनयनसंस्कार करविला ॥ २६ ॥ आणि त्या ब्राह्मणांची पूजा करून त्या उत्तम अलंकृत ब्राह्मणांना, दक्षिणा आणि सुवर्णपुष्पांच्या माळा धारण करणाऱ्या, चांगल्या अलंकृत व रेशमी उंची वस्त्रांच्या झुली घातलेल्या सवत्स गाई दान दिल्या ॥ २७ ॥ तशाच त्या महाबुद्धिमान् वसुदेवानें, रामकृष्णांच्या जन्मनक्षत्रीं ज्या गाई मनानें संकल्प करून दिल्या होत्या, परंतु कंसानें अधर्मानें हरण केल्या होत्या त्यांचेंहि स्मरणपूर्वक दान केलें ॥ २८ ॥ याप्रमाणें उपनयनसंस्कार पावोन द्विजत्व पावलेल्या व उत्तम नियम धारण करणाऱ्या त्या रामकृष्णांनीं, यदुकुलाचा आचार्य अशा गर्गऋषीपासून ब्रह्मचर्यव्रताचा स्वीकार केला ॥ २९ ॥ जरी ते दोघेहि जगदीश्वर, सर्व विद्यांचें उत्पत्तिस्थान व सर्वज्ञ होते तथापि ते मनुष्यचेष्टांनीं आपलें स्वतःसिद्ध निर्मळ

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ज्ञान गुप्त राखीत होते ह्मणून लोकसंग्रहाकरितां विद्या ग्रहणासाठीं ते गुरुगृहीं वास करण्याची इच्छा धरून काशगोत्रांत उत्पन्न झालेल्या, अवंतीनगरांत राहणाऱ्या सांदीपनिनामक गुरूकडे निघून गेले ॥ ३० ॥ ३१ ॥ योग्यरीतीनें गुरूजवळ जाऊन इंद्रियनिग्रह करून राहणारे व गुरूनेंहि आदर ठेवलेले ते, गुरूची उत्कृष्ट सेवा कशी करावी यांचें इतर लोकांना शिक्षण देत होत्साते, देवासारख्या भक्तीनें गुरूची सेवा करूं लागले ॥ ३२ ॥ तेव्हां निष्कपट स्नेहानें युक्त अशा त्यांच्या सेवेनें त्यांच्यावर संतुष्ट झालेल्या ब्राह्मणश्रेष्ठ त्या सांदीपनि गुरूनें, रामकृष्णांना, शिक्षा, कल्प (सूत्र), व्याकरण इत्यादिक वेदाच्या सहा अंगांचें व ईश केन, कठ, प्रश्न इत्यादिक दहा उपनिष-

---

॥ ३१ ॥ यथा यथावत् । उपसाद्य प्राप्य गुरौ वृत्तिमन्यान् ग्राहयंतौ । गुरुमुपेतावुपगतौ । सेवितवंतावित्यर्थः ॥ ३२ ॥ शुद्धो भावो यासु ताभिरनुवृत्तिभिः । सांगोपनिषदः अंगानि षडंगानि शिक्षादीनि तैरुपनिषद्भिश्च सहितान् ॥ ३३ ॥ सरहस्यं मंत्रदेवताज्ञानसहितम् । धर्मान्मन्वादिधर्मशास्त्राणि । न्यायपथान्मीमांसादीन् । आन्वीक्षिकीं तर्कविद्याम् । षड्विधां संधिश्च विग्रहो यानमासनंद्वैधमाश्रयः इत्येवं षड्विधां राजनीतिम् ॥ ३४ ॥ सकृन्निगदमात्रेणैकवारं गुरोरुच्चारणमात्रेण ॥ ३५ ॥ तावती-

अथो गुरुकुले वासमिच्छंतावुपजग्मतुः ॥ काश्यं सांदीपनिं नाम ह्यवंतिपुरवासिनम् ॥ ३१ ॥ यथोपसाद्य तौ दांतौ गुरौ वृत्तिम-निंदिताम् ॥ ग्राहयंतावुपेतौ स्म भक्त्या देवमिवादृतौ ॥ ३२ ॥ तयोर्द्विजवरस्तुष्टः शुद्धभावानुवृत्तिभिः ॥ प्रोवाच वेदानखिला-न्सांगोपनिषदो गुरुः ॥ ३३ ॥ सरहस्यं धनुर्वेदं धर्मान्न्यायपथांस्तथा ॥ तथा चान्वीक्षिकीं विद्यां राजनीतिं च षड्विधाम् ॥ ३४ ॥ सर्वं नरवरश्रेष्ठौ सर्वविद्याप्रवर्तकौ ॥ सकृन्निगदमात्रेण तौ संजगृहतुर्नृप ॥ ३५ ॥ अहोरात्रैश्चतुःषष्ट्या संयत्तौ तावतीः कलाः ॥ गुरुदक्षिणयाऽऽचार्यं छंदयामासतुर्नृप ॥ ३६ ॥

श्चतुःषष्टिकलाः । ताश्च शैवतंत्रोक्ता लिख्यंते । यथा । गीतम् १ । वाद्यम् २ । नृत्यम् ३ । नाट्यम् ४ । आलेख्यम् ५ । विशेषकच्छेद्यम् ६ । तंडुलकुसुमबलिविकाराः ७ । पुष्पास्तरणम् ८ । दशनवसनांगरागाः ९ । मणिभूमिकाकर्म १० । शयनरचनम् ११ । उदकवाद्यमुदकघातः १२ । चित्रयोगाः १३ । माल्यग्रथनविकल्पाः १४ । शेखरापी-डयोजनम् १५ । नेपथ्ययोगाः १६ । कर्णपत्रभंगाः १७ । सुगंधयुक्तिः १८ । भूषणयोजनम् १९ । ऐंद्रजालम् २० । कौतुमारयोगाः २१ । हस्तलाघवम् २२ । चित्रशाका-

---

दासहित ऋग्वेदादिक चारंहि वेदांचें यथास्थित अध्ययन सांगितलें ॥ ३३ ॥ मंत्रांच्या व देवतांच्या ज्ञानासहित धनुर्वेद, मन्वादिक धर्मशास्त्रें, तसेच मीमांसादिक न्यायमार्ग, तर्कविद्या, आणि सहाप्रकारची राजनीति सांगितली ॥ ३४ ॥ हे राजा, मनुष्यश्रेष्ठांमध्येंहि श्रेष्ठ व सर्वविद्यांचे प्रवर्तक अशा त्या रामकृष्णांनीं, गुरूनें एकवार उद्देश केला असतां तितक्या योगानेंच तें वेदादिक सर्वहि शिकून पाठ केलें ॥ ३५ ॥ नंतर जितेंद्रिय अशा त्या दोघांनीं, चौसष्ठ अहोरात्रांमध्यें गायन करणें,

---

१. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद हे चार वेद होत. शिक्षा, कल्प (सूत्र) व्याकरण, निरुक्त, ज्योतिष आणि छंद हीं सहा वेदाचीं अंगें होत. त्यांत छंद हा वेदाचे पाय, सूत्र हें हात, ज्योतिष हे डोळे, निरुक्त हे कान, शिक्षा हें नाक आणि व्याकरण हें मुख असें सांगितलें आहे. मीमांसा, न्यायशास्त्र, व पुराणें या चारींना उपांगें असें ह्मणतात. चार वेद सहा अंगें आणि चार उपांगे ह्या चवदांना चवदा विद्या असें ह्मणतात. २. १-संधि-(बलिष्ठाशीं तह करणें), २-विग्रह-(लूटवैगेरे करून दंगा करणें), ३-यान-(शत्रुवर स्वारी करणें), ४-आसन-(किल्याचावैगेरे आश्रय करून राहणें), ५- द्वैध-(फितुरी करणें), आणि ६- आश्रय-(बलाढ्य पुरुषाचा आश्रय करणें), हे सहा राजनीतीचे प्रकार होत.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वाचें वाजविणें इत्यादिक चौसष्ट कला शिकून घेतल्या आणि इच्छित गुरुदक्षिणा मागण्याविषयीं गुरूची प्रार्थना केली ॥ ३६ ॥ तेव्हां हे राजा, त्या सांदीपनि ब्राह्मणानें त्या रामकृष्णांचा तो अद्भुत महिमा व मनुष्यांमध्यें असंभावित असलेली बुद्धि पहून, आपल्या स्त्रीबरोबर विचार केला आणि प्रभास क्षेत्रामध्यें समुद्रांत बुडून मरण पावलेला आपला पुत्र आणून देण्याची गुरुदक्षिणा मागितली ॥ ३७ ॥ तेव्हां बरें आहे असें म्हणून अपार पराक्रमी असे ते दोन्ही महारथी रामकृष्ण, बसून प्रभास क्षेत्रांत गेले आणि तेथें समुद्राच्या कांठीं जाऊन क्षणभर बसले. तेव्हां समुद्रानें हे परमेश्वर आहेत असें जाणून मनुष्याच्या वेषानें पूजासाहित्य घेऊन त्यांच्या जवळ येऊन

पूपभक्ष्यविकारक्रियाः २३ । पानकरसरागासवयोजनम् २४ । सूचीवायकर्म २५ । सूत्रक्रीडा २६ । वीणाडमरुकवाद्यानि २७ । प्रहेलिका २८ । प्रतिमाला २९ । दुर्वचकयोगाः ३० । पुस्तकवाचनम् ३१ । नाटकाख्यायिकादर्शनम् ३२ । काव्यसमस्यापूरणम् ३३ । पट्टिकावेत्रबाणविकल्पाः ३४ । तर्ककर्माणि ३५ । तक्षणम् ३६ । वास्तुविद्या ३७ । रूप्यरत्नपरीक्षा ३८ । धातुवादः ३९ । मणिरागज्ञानम् ४० । आकरज्ञानम् ४१ । वृक्षायुर्वेदयोगाः ४२ । मेषकुक्कुटलावकयुद्धविधिः ४३ । शुकसारिकाप्रलापनम् ४४ । उत्सादनम् ४५ । केशमार्जनकौशलम् ४६ । अक्षरमुष्टिकाकथनम् ४७ । म्लेच्छितकुतर्कविकल्पाः ४८ । देशभाषाज्ञानम् ४९ । पुष्पशकटिकानिर्मितिज्ञानम् ५० । यंत्रमातृ-

द्विजस्तयोस्तं महिमानमद्भुतं संलक्ष्य राजन्नतिमानुषीं मतिम् ॥ संमंत्र्य पत्न्या स महार्णवे मृतं बालं प्रभासे वरयांबभूव ह ॥३७॥ तथेत्यथारुह्य महारथौ रथं प्रभासमासाद्य दुरंतविक्रमौ ॥ वेलामुपव्रज्य निषीदतुः क्षणं सिंधुर्विदित्वाऽर्हणमाहरत्तयोः ॥ ३८ ॥ तमाह भगवानाशु गुरुपुत्रः प्रदीयताम् ॥ योऽसाविह त्वया ग्रस्तो बालको महतोर्मिणा ॥ ३९ ॥ समुद्र उवाच ॥ नैवाहार्षमहं देव दैत्यः पंचजनो महान् ॥ अंतर्जलचरः कृष्ण शंखरूपधरोऽसुरः ॥ ४० ॥ आस्ते तेनाहृतो नूनं तच्छ्रुत्वा सत्वरं प्रभुः ॥ जलमाविश्य तं हत्वा नापश्यदुदरेऽर्भकम् ॥ ४१ ॥ तदंगप्रभवं शंखमादाय रथमागमत् ॥ ततः संयमनीं नाम यमस्य दयितां पुरीम् ॥ ४२ ॥ गत्वा जनार्दनः शंखं प्रदध्मौ सहलायुधः ॥ शंखनिर्ह्रादमाकर्ण्य प्रजासंयमनो यमः ॥४३॥

काधारणमातृका ५१ । संवाच्यम् ५२ । मानसी काव्यक्रिया ५३ । अभिधानकोशः ५४ । छंदोज्ञानम् ५५ । क्रियाविकल्पाः ५६ । छलितकयोगाः ५७ । वस्त्रगोपनानि ५८ । द्यूतविशेषः ५९ । आकर्षक्रीडा ६० । बालक्रीडनकानि ६१ । वैनायिकीनाम् ६२ । वैजयिकीनाम् ६३ । वैतालिकीनां च विद्यानां ज्ञानम् ६४ । इति चतुःषष्टिकलाः ॥ छंदयामासतुरुपलोभितवंतौ ॥ ३६ ॥ प्रभासे क्षेत्रे महार्णवे मृतं बालं वरयामास ॥ ३७ ॥ ईश्वराविति विदित्वा समुद्रस्तयोरर्हणमाजहार ॥ ३८ ॥ ३९ ॥ पंचजनस्त्वसुरोऽहार्षीत् । स च महान्ममासाध्य इत्यर्थः ॥ ४० ॥ ४१ ॥ ४२ ॥ ४३ ॥

त्यांची पूजा केली ॥ ३८ ॥ त्यावेळीं भगवान् त्यास म्हणाला कीं–हे सागरा, येथें मोठ्या लाटेनें जो तूं बालक, पूर्वीं बुडविला आहेस तो आमच्या गुरूचा पुत्र आहे, म्हणून तो लवकर आणून दे ॥ ३९ ॥ समुद्र म्हणाला–हे देवा कृष्णा, तो गुरुपुत्र मी हरण केला नाहीं, तर माझ्या पाण्यांत राहाणारा व शंखाचें रूप धारण करणारा मोठा एक दैत्य असुर आहे त्यानें तुमच्या गुरूचा पुत्र निःसंशय आणिला आहे, तें ऐकून त्या समर्थ श्रीकृष्णानें, सत्वर जळांत प्रवेश करून त्याला मारून पोट फाडून पाहूं लागला तों तेथें गुरूचा पुत्र दृष्टीस पडला नाहीं ॥ ४० ॥ ४१ ॥ नंतर त्या पंचजनाच्या देहापासून झालेला पांचजन्यनामक शंख घेऊन तो रथावर माघारा आला नंतर त्या श्रीकृष्णानें, बळरामासहवर्तमान यमाच्या आवडत्या संयमिनीनामक नगरीमध्यें जाऊन शंख वाजविला, तेव्हां शंखाचा शब्द ऐकून प्रजांचा निग्रह करणाऱ्या त्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

यमानें—॥ ४२ ॥ ४३ ॥ त्यांची भक्तीनें युक्त अशी मोठी पूजा केली आणि तो नम्र होऊन, सर्व प्राणिमात्रांचा अंतर्यामी अशा त्या कृष्णाला म्हणाला कीं, लीलेकरितां मनुष्य-देह धारण करणाऱ्या हे विष्णो, तुमचें कोणतें काम मी करावें ? तें सांगावें ॥ ४४ ॥ श्रीभगवान् म्हणाला—हे महाराजा यमा, आपल्या कर्मांच्या योगानें बांधला गेलेल्या गुरुपुत्राला, तुझ्या दूतांनीं येथें आणिलें आहे, त्याला तूं माझी आज्ञा प्रमाण मानून आणून मला समर्पण कर, माझ्या आज्ञेनें आणून देण्याऱ्या तुला कांहीं दोष लागणार नाहीं ॥ ४५ ॥ नंतर बरें आहे असें ह्मणून त्या यमानें आणून दिलेल्या गुरुपुत्राला घेऊन येऊन रामकृष्णांनीं तो आपल्या गुरूला अर्पण केला आणि पुन्हा दुसरा वर मागावा अशी प्रार्थना केली ॥ ४६ ॥ तेव्हां गुरु ह्मणाला— हे वत्सा कृष्णा, तुह्मीं उभयतांनीं मला गुरुदक्षिणा उत्तमप्रकारची दिली आहे. तुमच्या सारख्यांचा गुरु अशा माझ्या

सपर्यां पूजाम् । सर्वेषां भूतानामाशया अंतःकरणानि तान्यालयो निवासो यस्य तम् ॥ ४४ ॥ निजं कर्मैव निबंधनं यस्य तथाभूतमपि मदाज्ञा पुरस्कारेणानयतस्ते न दोष इत्यर्थः ॥ ४५ ॥ ४६ ॥ वत्सेति प्राधन्येनैकस्य संबोधनम् । गुरोर्निष्क्रयो गुरुदक्षिणा । युष्मद्विधयोर्गुरोर्मम कामानां मध्ये को नु कामोऽवशिष्यते न कोऽपीति ॥ ४७ ॥

तयोः सपर्यां महतीं चक्रे भक्त्युपबृंहिताम् ॥ उवाचावनतः कृष्णं सर्वभूताशयालयम् ॥ लीलामनुष्य हे विष्णो युवयोः करवाम किम् ॥ ४४ ॥ श्रीभगवानुवाच ॥ गुरुपुत्रमिहानीतं निजकर्मनिबंधनम् ॥ आनयस्व महाराज मच्छासनपुरस्कृतः ॥ ४५ ॥ तथेति तेनोपानीतं गुरुपुत्रं यदूत्तमौ ॥ दत्वा स्वगुरवे भूयो वृणीष्वेति तमूचतुः ॥ ४६ ॥ गुरुरुवाच ॥ सम्यक्संपादितो वत्स भवद्भ्यां गुरुनिष्क्रयः ॥ को नु युष्मद्विधगुरोः कामो नामावशिष्यते ॥ ४७ ॥ गच्छतं स्वगृहं वीरौ कीर्तिर्वामस्तु पावनी ॥ छंदांस्ययातयामानि भवंत्विह परत्र च ॥ ४८ ॥ गुरुणैवमनुज्ञातौ रथेनानिलरंहसा ॥ आयातौ स्वपुरं तात पर्जन्यनिनदेन वै ॥ ४९ ॥ समनंदन्प्रजाः सर्वा दृष्ट्वा रामजनार्दनौ ॥ अपश्यंत्यो बह्वहानि नष्टलब्धधना इव ॥ ५० ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे गुरुपुत्रानयनं नाम पंचचत्वारिंशोऽध्यायः ॥ ४५ ॥ ॥

हे वीरौ ॥ ४८ ॥ अनिलवद्रंहो वेगो यस्य तेन । पर्जन्यो मेघस्तद्वन्निनदो यस्य तेन ॥ ४९ ॥ नष्टमदृष्टं तत्पुनर्लब्धं धनं याभिस्ता इवेति ॥ ५० ॥ इति दशमस्कंधे पूर्वार्धे टीकायां पंचचत्वारिंशोऽध्यायः ॥ ४५ ॥ ॥

मनोरथांपैकीं कोणता बरें मनोरथ अवशेष राहणार आहे ? कोणताच राहणार नाहीं, ह्मणून मला आतां कांहींच मागण्याची इच्छा नाहीं ॥ ४७ ॥ हे वीरहो, आतां तुह्मी आपल्या घरीं जावें. तुमची कीर्ति लोकांना पवित्र करणारी असो; तसेच तुह्मीं अध्ययन केलेले वेद या लोकीं व परलोकीं सफळ होवोत ॥ ४८ ॥ बा राजा, याप्रमाणें गुरूनें आज्ञा केली असतां ते रामकृष्ण, वायूसारखा वेग व मेघासारखा नाद असलेल्या रथानें आपल्या नगरामध्यें येऊन पोंचले ॥ ४९ ॥ तेव्हां बहुत दिवस रामकृष्णांना न पाहणाऱ्या सर्व प्रजा, त्यांना पाहून, जसे द्रव्य सांडलेले पुरुष, तें द्रव्य पुन्हा प्राप्त झालें असतां आनंदयुक्त होतात त्याप्रमाणें अत्यंत आनंदित झाल्या ॥ ५० ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील पूर्वार्धांत गुरुपुत्रानयननामक हा पंचेचाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ४५ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां ह्या शेचाळिसाव्या अध्यायामध्यें श्रीकृष्णानें, उद्धवाला गोकुळांत पाठवून त्याच्या वाणीनें यशोदानंदांचा शोक घालविला, अशीकथा वर्णन केली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, वृष्णींच्या वंशजांमध्यें श्रेष्ठ, साक्षात् बृहस्पतीचा शिष्य, बुद्धीनें अतिश्रेष्ठ व श्रीकृष्णाचा अतिप्रिय मित्र, असा उद्धव या नांवाचा एक मुख्य प्रधान होता ॥ १ ॥ शरणागतांचें दुःख हरण करणाऱ्या भगवान् श्रीकृष्णानें, एकेवेळीं एकांतस्थळीं आपल्या हातानें त्या अनन्यभक्त प्रिय उद्धवाचे हात ग्रहण करून, भाषण केलें कीं,—॥ २ ॥ हे सौम्या उद्धवा, तूं गोकुळामध्यें जा आणि आमच्या आईबापांना (यशोदानंदांना) आमच्या वियोगापासून दुःख झालें आहे तें घालवून हर्ष उत्पन्न कर. तसेंच गोपींनांहि माझ्या वियोगापासून झालेलें मनोदुःख माझे निरोप सांगून दूर कर ॥ ३ ॥ गोपींना विशेष निरोप सांगण्याचें कारण कीं, त्या गोपी, माझ्या

षट्चत्वारिंशके घोषमुद्धवं प्रेष्य तद्गिरा ॥ यशोदानंदयोश्चक्रे कृष्णः शोकापनोदनम् ॥ १ ॥ कामवारं द्विजातिः सन्परित्यज्यातिसंयतः ॥ गुरोर्ज्ञानमनुप्राप्य सख्या गोपीरुपादिशत् ॥ २ ॥ गोपीनां सांत्वनमपि रहस्यं सन्मंत्रिसाध्यमिति तदर्थमुद्धवं विशिनष्टि । वृष्णीनामिति । बुद्धिसत्तमो बुद्ध्याऽतिश्रेष्ठः ॥ १ ॥ २ ॥ ३ ॥ गोपीनां विशेषतः संदेशे कारणमाह । ता इति । मय्येव संकल्पात्मकं मनो यासां ताः । अहमेव प्राणो यासां ताः । मदर्थे त्यक्ता दैहिकाः पतिपुत्रादयो याभिस्ताः । ततः किमत आह ये

श्रीशुक उवाच ॥ ॥ वृष्णीनां प्रवरो मंत्री कृष्णस्य दयितः सखा ॥ शिष्यो बृहस्पतेः साक्षादुद्धवो बुद्धिसत्तमः ॥ १ ॥ तमाह भगवान्प्रेष्ठं भक्तमेकांतिनं क्वचित् ॥ गृहीत्वा पाणिना पाणिं प्रपन्नार्तिहरो हरिः ॥ २ ॥ गच्छोद्धव व्रजं सौम्य पित्रोर्नौ प्रीतिमावह गोपीनां मद्वियोगाधिं मत्संदेशैर्विमोचय ॥ ३ ॥ ता मन्मनस्का मत्प्राणा मदर्थे त्यक्तदैहिकाः ॥ ये त्यक्तलोकधर्माश्च मदर्थे तान्बिभर्म्यहम् ॥ ४ ॥ मयि ताः प्रेयसां प्रेष्ठे दूरस्थे गोकुलस्त्रियः ॥ स्मरंत्योऽग विमुह्यंति विरहौत्कंठ्यविह्वलाः ॥ ५ ॥ धारयंत्यतिकृच्छ्रेण प्रायः प्राणान्कथंचन ॥ प्रत्यागमनसंदेशैर्बल्लव्यो मे मदात्मिकाः ॥ ६ ॥

त्यक्तलोकधर्मा इति । मन्निमित्तं त्यक्तौ लोकधर्मौविहामुत्रसुखे तत्साधनानि च यैस्तान् बिभर्मि पोषयामि संवर्धयामि सुखयामीत्यर्थः ॥ ४ ॥ तासां वियोगाधिं दर्शयति द्वयेन मयि ता इति । विरहेणौत्कंठ्यं तेन विव्हलाः परवशाः ॥ ५ ॥ गोकुलान्निर्गमनसमये शीघ्रमागमिष्यामीति ये प्रत्यागमनसंदेशास्तैः । मे मदीया बल्लव्यो गोप्यः । मदात्मिका इति तासामात्मा यदि स्वदेहे स्यात्तर्हि विरहतापेन दह्येतैव तस्य मयि वर्तमानत्वात्कथं चिज्जीवंतीति भावः ॥ ६ ॥

ठिकाणींच मन लावणाऱ्या, माझ्याकरितांच प्राण धारण करणाऱ्या व माझ्या प्राप्तीसाठींच पतिपुत्रादिकांचा त्याग करणाऱ्या असून दयावंत व अतिप्रिय अशा मजप्रतच मनानें प्राप्त झालेल्या आहेत. जे लोक, माझ्या निमित्त इहपरलोकीं प्राप्त होणाऱ्या सुखांचा व त्यांच्या साधनांचा त्याग करून राहतात त्यांचें मी पोषण करितों व त्यांना सुख देतों ॥ ४ ॥ हे उद्धवा, प्रिय पदार्थांपेक्षांहि अतिप्रिय असलेला मी, दूर राहिल्यामुळें त्या गोकुळांतील स्त्रिया, माझें स्मरण करून विरहानें झालेल्या माझ्या उत्कंठेनें विव्हळ होऊन मोह पावत आहेत बरें ! ॥ ५ ॥ आणि बहुतकरून त्या माझ्या आवडत्या गौळणी, मी गोकुळांतून मथुरेंत येतवेळीं 'मी लवकरच माघारा येईन असे जे' निरोप सांगितले होते त्यांवरून माझ्यावर आपला अंतर्यामी आत्मा ठेऊन कशातरी संकटानें प्राण धारण करीत आहेत. तात्पर्य त्यांचा आत्मा जर त्यांच्या देहांत असता तर तो विरह

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तप्पानें जळालाव असता, तो माझेठिकाणीं असल्यामुळें त्या कशातरी वांचत आहेत॥६॥श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, याप्रमाणें भगवंतानें सांगून सत्कार केलेला तो उद्धव आपल्या स्वामी श्रीकृष्णाचा ‘ तुमचा व माझा वियोग कधींच नाहीं ’ इत्यादिप्रकारचा निरोप शिरसा ग्रहण करून रथावर बसून नंदाच्या गोकुळांत निघून गेला ॥ ७ ॥ तो श्रीमान् उद्धव, सूर्यास्त होण्याच्या वेळीं, पुढें प्रवेश करणाऱ्या पशूंच्या खुररजांनीं ज्याचा रथ आच्छादित झाला आहे असा होऊन नंदाच्या गोकुळामध्यें प्राप्त झाला ॥ ८ ॥ तें गोकुळ, ऋतुमती झालेल्या गाईंकरितां परस्पर युद्ध करणाऱ्या मदोन्मत्त वृषभांच्या गर्जनांनीं युक्त असून ओंट्यांच्या भारानें युक्त अशा आपापल्या वत्सांकडे धांवणाऱ्या दुभत्या गाईंनीं भूषित होतें ॥ ९ ॥ तसेंच जिकडेतिकडे उड्या मारणाऱ्या पांढऱ्या गोवत्सांनीं सुशोभित असून गाईंच्या धार काढण्यांच्या शब्दांसहित ‘ वत्साला सोड, नको

संदेशं भवतीनां वियोगो मे न हि सर्वात्मना क्वचिदित्यादिकम् ॥ ७ ॥ निम्लोचत्यस्तं गच्छति सति । छन्नं यानं यस्येति तदा गोपीभिरज्ञातत्वेन नंदसंगं लब्धवानिति सूचयति ॥ ८ ॥ व्रजं वर्णयति पंचभिर्वासितार्थ इत्यादिना । वासिताः पुष्पवत्यो गावस्तन्निमित्तमभितो युद्धयद्भिः शुष्मिभिर्मत्तैर्वृषैर्नादितम् । वास्राभिर्धेनुभिः ।

प्राप्तो नंदव्रजं श्रीमा-
श्रीशुक उवाच ॥ इत्युक्त उद्धवो राजन्संदेशं भर्तुराहृतः ॥ आदाय रथमारुह्य प्रययौ नंदगोकुलम् ॥ ७ ॥
न्निम्लोचति विभावसौ ॥ छन्नयानः प्रविशतां पशूनां खुररेणुभिः ॥ ८ ॥ वासितार्थेऽभियुद्ध्यद्भिर्नादितं शुष्मिभिर्वृषैः ॥ धावंती-
भिश्च वास्राभिरूधोभारैः स्ववत्सकान् ॥ ९ ॥ इतस्ततो विलंघद्भिर्गोवत्सैर्मंडितं सितैः ॥ गोदोहशब्दाभिरवं वेणूनां निःस्वनेन च
॥ १० ॥ गायंतीभिश्च कर्माणि शुभानि बलकृष्णयोः ॥ स्वलंकृताभिर्गोपीभिर्गोपैश्च सुविराजितम् ॥ ११ ॥ अग्न्यर्कातिथिगोविप्रपि-
तृदेवार्चनान्वितैः ॥ धूपदीपैश्च माल्यैश्च गोपावासैर्मनोरमम् ॥ १२ ॥ सर्वतः पुष्पितवनं द्विजालिकुलनादितम् ॥ हंसकारंडवाकी-
र्णैः पद्मषंडैश्च मंडितम् ॥ १३ ॥ तमागतं समागम्य कृष्णस्यानुचरं प्रियम् ॥ नंदः प्रीतः परिष्वज्य वासुदेवधियाऽऽर्चयत् ॥ १४ ॥
भोजितं परमान्नेन संविष्टं कशिपौ सुखम् ॥ गतश्रमं पर्यपृच्छत्पादसंवाहनादिभिः ॥ १५ ॥

स्ववत्सकान्प्रति ॥ ९ ॥ विलंघद्भिरुत्पतद्भिः गोदोहशब्दैः सहाभितो रवाः मुंच मा मुंच नय आनय देहि गृहाणेत्यादयो यस्मिंस्तम् । वेणूनां निःस्वनेन च मंडितम् ॥ १० ॥ गायंतीभिर्गोपीभिर्गोपैश्च सुविराजितम् ॥ ११ ॥ अग्न्याद्यर्चनान्वितैर्गोपगृहैर्धूपादिभिश्च मनोरमम् ॥ १२ ॥ षंडैः समूहैः ॥ १३ ॥ आर्चयत्पूजयामास ॥ १४ ॥ कशिपौ शय्यायां संविष्टम् ॥ १५ ॥

सोडूं, त्याला ने, दुसऱ्याल्या आण, तें भांडें दे, हें घे इत्यादिक ’ गोपांच्या शब्दांनीं व मुरल्यांच्या नादानें भूषित होतें ॥ १० ॥ रामकृष्णांच्या पापनाशक कर्मांचें गायन करणाऱ्या व उत्तम अलंकार धारण करणाऱ्या गोपींनीं व गोपांनीं अत्यंत सुशोभित होतें ॥ ११ ॥ अग्नि, सूर्य, अतिथि, गाई, ब्राह्मण, पितर व देव यांच्या पूजनांनीं युक्त असलेल्या गोपांच्या घरांनीं व जेथें तेथें लावलेल्या धूपांनीं व दीपांनीं युक्त होतें ॥ १२ ॥ आणि तें गोकुळ, हंस, कारंडव, पाणकोंबडे इत्यादिकांनीं व्याप्त अशा कमळांच्या समुदायांनीं शोभित असलेल्या सरोवरांच्या काठीं राहणाऱ्या पक्ष्यांच्या व भ्रमरांच्या नादांनीं युक्त अशा प्रफुल्लित वनांनीं चारी बाजूंनीं भूषित होतें ॥ १३ ॥ तो कृष्णाचा प्रियसेवक उद्धव प्राप्त झाला असें ऐकून संतुष्ट झालेल्या नंदानें, सामोरें जाऊन त्याला आलिंगन करून वासुदेवबुद्धीनें (हा कृष्णच आला आहे अशा बुद्धीनें) त्याचा सत्कार केला ॥ १४ ॥ नंतर पायसादिक उत्तम अन्नानें भोजन केलेल्या, पलंगावरती मऊ बिछान्यावर सुखानें बसलेल्या व चरणशुश्रूषा-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दिकेंकरून श्रमरहित झालेल्या त्या उद्धवाला नंदानें प्रश्न केला कीं– ॥ १५ ॥ हे मित्रा, हे महाभाग्यवंता उद्धवा, आह्मां गोकुळवासी लोकांचा सखा वसुदेव, बंधांतून मुक्त होऊन, बांधवांनीं व मित्रांनीं युक्त होत्साता आपल्या पुत्रादिकांसहवर्तमान सुखानें राहतोना? तेंच आह्मांस इष्ट आहे ॥ १६ ॥ पापी कंस आपल्याच पापानें कनिष्ठ बंधूंसहवर्तमान व चाणूरादिक मल्लांसहवर्तमान मरण पावला, ही गोष्ट मोठी आनंदाची झाली. कारण, तो, धर्मशील व दुसऱ्याचें कार्य साधणाऱ्या यादवांचा निरंतर द्वेष करीत असे ॥ १७ ॥ बरें, श्रीकृष्ण केव्हांतरी सुहृद् अशा आमचें व माता यशोदा, सखे गोप, आपणच रक्षक असलेलें गोकुळ, गाई, वृंदावन व गोवर्धन पर्वत यांचें स्मरण करितो काय? ॥ १८ ॥ बरें, श्रीकृष्ण, स्वजनांना पाहण्याकरितां एकवार तरी इकडे येईल काय? आला तर सुंदरनासिकेनें व मंदहास्य

॥ १६ ॥ साधूनामिति । कर्मणि षष्ठ्यः ॥ १७ ॥ गावो गाः । गिरिं गोवर्धनम् ॥ १८ ॥ अप्यायास्यत्यागमिष्यति किम् ॥ १९ ॥ श्रीकृष्णोपकारस्मरणादिभिरतुपमानंदेनाभिभूयमान आह दावाग्नेरित्यादिना । वाताद्वर्षाचेति वृषात्सर्पाचेति अन्येभ्यश्च दुरतिक्रमेभ्यो मृत्युभ्यः श्रीकृष्णेन रक्षिताः स्म ॥ २० ॥ किंच । स्मरतामिति । लीलयाऽपांगेन

कच्चिदंग महाभाग सखा नः शूरनंदनः ॥ आस्ते कुशल्यपत्याद्यैर्युक्तो मुक्तः सुहृद्वृतः ॥ १६ ॥ दिष्ट्या कंसो हतः पापः सानुगः स्वेन पाप्मना ॥ साधूनां धर्मशीलानां यदूनां द्वेष्टि यः सदा ॥ १७ ॥ अपि स्मरति नः कृष्णो मातरं सुहृदः सखीन् ॥ गोपान् व्रजं चात्मनाथं गावो वृंदावनं गिरिम् ॥ १८ ॥ अप्यायास्यति गोविंदः स्वजनान्सकृदीक्षितुम् ॥ तर्हि द्रक्ष्याम तद्वक्त्रं सुनसं सुस्मितेक्षणम् ॥ १९ ॥ दावाग्नेर्वातवर्षाच्च वृषसर्पाच्च रक्षिताः ॥ दुरत्ययेभ्यो मृत्युभ्यः कृष्णेन सुमहात्मना ॥ २० ॥ स्मरतां कृष्णवीर्याणि लीलाऽपांगनिरीक्षितम् ॥ हसितं भाषितं चांग सर्वा नः शिथिलाः क्रियाः ॥ २१ ॥ सरिच्छैलवनोद्देशान्मुकुंदपदभूषितान् ॥ आक्रीडानीक्षमाणानां मनो याति तदात्मताम् ॥ २२ ॥ मन्ये कृष्णं च रामं च प्राप्ताविह सुरोत्तमौ ॥ सुराणां महदर्थाय गर्गस्य वचनं यथा ॥ २३ ॥

निरीक्षितम् । अंग हे उद्धव ॥ २१ ॥ न केवलं शिथिला एव किंतु शनैरुपरमंतीत्याह । सरिच्छैलेति । सरितश्च शैलाश्च वनोद्देशाश्च तान् । आक्रीडान् क्रीडास्थानानि ॥ २२ ॥ सुराणामर्थाय महद्गंभीरं गर्गस्य वचनं यथा ॥ २३ ॥

सहित अवलोकनानें युक्त असें त्याचें मुख आह्मी पाहूं ॥ १९ ॥ नंतर कृष्णानें केलेल्या उपकारांच्या स्मरणादिकेंकरून निरुपम आनंदानें गहिंवरून ह्मणाला कीं,– उद्धवा, महात्म्या श्रीकृष्णानें, वणवा, वाऱ्यासहित वृष्टि, अरिष्टासुर व अघासुर, यांपासून व दुसऱ्याहि अनेकप्रकारच्या दुस्तर मृत्यूंपासून आमचें रक्षण केलें आहे ॥ २० ॥ हे मित्रा, कृष्णाचीं गोवर्धनोद्धरणादिक चरित्रें, लीलेनें युक्त कटाक्षसहित अवलोकन, हास्य व भाषण यांचें स्मरण करणाऱ्या आमचे सर्वहि व्यापार शिथिल होऊन गेले आहेत ॥ २१ ॥ केवळ शिथिलच झाले असें नाहीं तर, कांहीं दिवसांनीं मुळींच नाहींसेहि होतील. कारण, कालियदमनादिक क्रीडा झालेली यमुनानदी, श्रीकृष्णांच्या चरणचिन्हांनीं अलंकृत असा गोवर्धन पर्वत, वनांतील प्रदेश व त्याचीं क्रीडा करण्याचीं स्थानें हीं अवलोकन करणाऱ्या आमचें मन निरंतर कृष्णरूप होऊन जातें ॥ २२ ॥ मीतर गर्गाचार्यांच्या गंभीर अर्थाच्या भाषणावरून राम आणि कृष्ण हे दोघे, देवश्रेष्ठ (वासुदेव व संकर्षण) असून देवांच्या दैत्यवधादिक कार्याकरितां

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भूमीवर अवतीर्ण झाले आहेत असें मानितों ॥ २३ ॥ अहो, ज्यांनीं, दहाहजार हत्तींचें बळ असलेला कंस, चाणूर व मुष्टिक या नांवांचे महाबळी मल्ल व दहाहजार हत्तींचें बळ असलेला कुवलयापीड गज यांना, जसें ल्हानसा सिंह, मोठ्याहि हत्तीवगैरे पशूंना मारून टाकितो त्याप्रमाणें मारून टाकिलें ॥ २४ ॥ तसेंच ज्या कृष्णानें, तीन ताड (९०० हात) लांब व अतिशय घट्ट, असें धनुष्य, जसा हत्ती काठी मोडून टाकितो त्याप्रमाणें मोडून टाकिलें व सात दिवसपर्यंत एका हातानें गोवर्धन पर्वत धारण केला ॥ २५ ॥ तसेंच गोकुळांमध्यें देवदैत्यांना जिंकणारे– प्रलंबासुर, धेनुकासुर, अरिष्टासुर, तृणावर्त, व बकासुर इत्यादिक दैत्य सहज लीलेनें मारून टाकिले ॥ २६ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, याप्रमाणें श्रीकृष्णाचें वारंवार स्मरण करून श्रीकृष्णाचेठिकाणीं

न केवलं तद्वचनानुसारेणैव व्यवहारसंवादादपीत्याह । कंसमिति ॥ २४ ॥ इभराड्यष्टिमिव तालत्रयप्रमाणं धनुर्बभंज ॥ २५ ॥ २६ ॥ २७ ॥ २८ ॥ २९ ॥ ३० ॥ अखिलगुरुत्वमेव जनकत्वेन नियंतृत्वेन चाह । एताविति । रामो मुकुंदश्चेत्येतौ विश्वस्य बीजयोनी निमित्तोपादाने । ननु पुरुषप्रधानयोर्बीजयोनित्वं प्रसिद्धमत आह । पुरुषः प्रधानमिति ।

कंसं नागायुतप्राणं मल्लौ गजपतिं तथा ॥ अवधिष्टां लीलयैव पशूनिव मृगाधिपः ॥ २४ ॥ तालत्रयं महासारं धनुर्यष्टिमिवेभराट् ॥ बभंजैकेन हस्तेन सप्ताहमदधाद्गिरिम् ॥ २५ ॥ प्रलंबो धेनुकोऽरिष्टस्तृणावर्तो बकादयः ॥ दैत्याः सुरासुरजितो हता येनेह लीलया ॥ २६ ॥ श्रीशुक उवाच ॥ इति संस्मृत्य संस्मृत्य नंदः कृष्णानुरक्तधीः ॥ अत्युत्कंठोऽभवत्तूष्णीं प्रेमप्रसरविह्वलः ॥ २७ ॥ यशोदा वर्ण्यमानानि पुत्रस्य चरितानि च ॥ शृण्वंत्यश्रूण्यवास्राक्षीत्स्नेहस्नुतपयोधरा ॥ २८ ॥ तयोरित्थं भगवति कृष्णे नंदयशोदयोः ॥ वीक्ष्यानुरागं परमं नंदमाहोद्धवो मुदा ॥ २९ ॥ उद्धव उवाच ॥ युवां श्लाघ्यतमौ नूनं देहिनामिह मानद ॥ नारायणेऽखिलगुरौ यत्कृता मतिरीदृशी ॥ ३० ॥ एतौ हि विश्वस्य च बीजयोनी रामो मुकुंदः पुरुषः प्रधानम् ॥ अन्वीय भूतेषु विलक्षणस्य ज्ञानस्य चेशात इमौ पुराणौ ॥ ३१ ॥

पुरुषोंऽशः प्रधानं शक्तिः अतः प्रधानपुरुषावप्येतावेवेत्यर्थः । एवं जनकत्वमुक्तम् । किंच । अन्वीय भूतेषु भूतेष्वनुप्रविश्य भूतानां तदुपहितस्य विलक्षणस्य नानाभेदस्य ज्ञानस्य जीवस्य चेशाते ईश्वरौ नियंतारौ भवतः कुतः । पुराणावनादी । अनादित्वात्कारणत्वं ततश्च नियंतृत्वमित्यर्थः ॥ ३१ ॥

प्रेमबुद्धि असलेला तो नंद, प्रेमाच्या पूरानें व्याकुळ होऊन, कंठ दाटून आल्यामुळें उगीच राहिला ह्मणजे पुढें कांहींच बोलण्यास समर्थ झाला नाहीं ॥ २७ ॥ तेव्हां नंदराजानें वर्णन केलेलीं पुत्राचीं चरित्रें श्रवण करणारी यशोदा तर स्नेहानें जिच्या स्तनांतून दूध गळत आहे अशी होऊन नेत्रांतून टपटप दुःखाश्रु ढाळूं लागली ॥ २८ ॥ याप्रकारेंकरून भगवान् श्रीकृष्णाचेठिकाणीं त्या नंदयशोदांची परमप्रीति अवलोकन करून, मोठ्या हर्षानें उद्धव नंदाला ह्मणाला कीं, ॥ २९ ॥ उद्धव ह्मणाला–हे मान देणाऱ्या नंदा, तुह्मी उभयतां खरोखर या लोकांतील सर्व प्राण्यांमध्यें अतिशयच प्रशंसा करण्यास योग्य आहां. कारण, ज्या तुह्मी सर्व जगाचा गुरु अशा नारायणरूप कृष्णाचेठिकाणीं अशी प्रेमयुक्त बुद्धि धारण केली आहेत ॥ ३० ॥ कारण, हे रामकृष्ण, दोघेहि सर्वजगाचे पुरुष व प्रधानरूप बीज कारण आहेत. आणि हेच सर्व प्राण्यां-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मध्यें प्रवेश करून त्या प्राण्यांचे व त्या त्या उपाधींनीं भिन्न भिन्न वाटणाऱ्या जीवांचे नियंते पुरुषपुरुष आहेत ॥ ३१ ॥ हे नंदा,ज्याचेठिकाणीं कोणताहि प्राणी, प्राणोत्क्रमणाच्या वेळीं क्षणमात्रहि आपलें शुद्ध केलेलें मन स्थापन करून व त्याच्यायोगानें कर्मवासनांचा त्याग करून, ब्रह्ममय व सूर्यासारखा प्रकाशमात्र होत्साता तत्काल परमगति पावतो, त्या सर्वांचा आत्मा, कारण व भूभारहरण करण्याकरितां मनुष्यावतार धारण करणाऱ्या परिपूर्ण नारायणाचेठिकाणीं तुम्ही उभयतां भक्ति करीत आहां तेव्हां तुमचें आतां कोणतें चांगलें कर्तव्य कर्म अवशेष राहिलें आहे? कोणतेंच नाहीं ॥ ३२ ॥ ३३ ॥ तो भक्तांचा पति भगवान् श्रीकृष्ण, थोड्याच काळानें गोकुळामध्यें येईल

ननु सृष्ट्यादिकमविशेषान्मनुष्यादिजन्मदर्शनाच्च तस्यान्येभ्यः को विशेष इत्याशंक्याह । यस्मिन्निति द्वाभ्याम् । कर्माशयं कर्मवासनां निर्हृत्य त्यक्त्वा ब्रह्ममयः स्वरूपज्ञानवानर्कवर्णः शुद्धसत्वमूर्तिः सन्परां गतिं तत्पदं याति ॥ ३२ ॥ अखिलस्यात्मा च हेतुश्च तस्मिन् कारणेन मनुष्याकृतौ महात्मन्महात्मनि परिपूर्णे भवंतौ भक्तिं कुरुतः । अतः कृतकृत्यावित्यर्थः ॥ ३३ ॥ प्रस्तुतमाह । आगमिष्यतीति । पित्रोर्युवयोः ॥ ३४ ॥ यात यूयं व्रजं तात वयं च स्नेहदुःखितान् ॥ ज्ञातीन्वो द्रष्टुमेष्यामो

यस्मिन् जनः प्राणवियोगकाले क्षणं समावेश्य मनो विशुद्धम् ॥ निर्हृत्य कर्माशयमाशु याति परां गतिं ब्रह्ममयोऽर्कवर्णः
॥ ३२ ॥ तस्मिन्भवंतावखिलात्महेतौ नारायणे कारणमर्त्यमूर्तौ ॥ भावं विधत्तां नितरां महात्मन्किंवाऽवशिष्टं युवयोः सुकृत्यम्
॥ ३३ ॥ आगमिष्यत्यदीर्घेण कालेन व्रजमच्युतः ॥ प्रियं विधास्यते पित्रोर्भगवान्सात्वतां पतिः ॥ ३४ ॥ हत्वा कंसं रंगमध्ये
प्रतीपं सर्वसात्वताम् ॥ यदाह वः समागत्य कृष्णः सत्यं करोति तत् ॥ ३५ ॥ मा खिद्यतं महाभागौ द्रक्ष्यथः कृष्णमंतिके ॥
अंतर्हृदि स भूतानामास्ते ज्योतिरिवैधसि ॥ ३६ ॥ न ह्यस्यास्ति प्रियः कश्चिन्नाप्रियो वाऽस्त्यमानिनः ॥ नोत्तमो नाधमो वापि
समानस्यासमोऽपि वा ॥ ३७ ॥ न माता न पिता तस्य न भार्या न सुतादयः ॥ नात्मीयो न परश्चापि न देहो जन्म एव च ॥ ३८ ॥

विधाय सुहृदां सुखमिति यदाह कृष्णस्तत्सत्यं करिष्यतीति ॥ ३५ ॥ कालविलंबनमसहमानौ प्रत्याह । मा खिद्यतमिति । हे महाभागौ । अंतिके इदानीमेव समीपे वा । कुत इत्यत आह । अंतर्हृदीति । तर्हि सर्वैः किमिति न दृश्यते तत्राह । ज्योतिरिवैधसीति । तद्यथा मथनं विना न दृश्यते तथा भक्तिं विना कृष्णोऽपीति भावः ॥ ३६ ॥ अहो आस्तामेतत्तस्य त्विहागमनं स्वस्यातिप्रियान्पित्रादीन्विहाय न संगच्छत इति मन्येत तत्राह । ह्यस्येति । अस्य प्रियादयो न हि संति । तत्रहेतू । अमानिनः समानस्येति च ॥ ३७ ॥ ३८ ॥

आणि तुम्हां मातापितरांचा दर्शनादिक मनोरथ पूर्ण करील ॥ ३४ ॥ सर्व यादवांचा शत्रु अशा कंसाला रंगमंडपामध्यें मारून नंतर, श्रीकृष्णानें तुमच्याजवळ येऊन जें तुम्हांस सांगितलें आहे कीं, "तुम्ही गोकुळांत चला; आम्ही यादवांना सुख उत्पन्न करून मग येऊं" तें सत्य करील ॥ ३५ ॥ हे महाभाग्यवंतहो, तुम्ही खेद करूं नका, आपल्या समीपभागींच कृष्ण आहे असें पहा. तो सर्वप्राण्यांच्या हृदयामध्यें राहतो परंतु जसा काष्ठामध्यें असलेला अग्नि, मंथनादिक उपायांवांचून दिसत नाहीं त्याप्रमाणें सर्वत्र असलेलाहि तो भगवान्, भक्तीवांचून प्राप्त होत नाहीं ॥ ३६ ॥ अहंतारहित व सर्वत्र समदृष्टि असणाऱ्या ह्या परमेश्वराला, कोणी प्रिय नाहीं, कोणी अप्रियहि नाहीं, कोणी उत्तम नाहीं व कोणी अधम किंवा विषमहि नाहीं ॥ ३७ ॥ ह्याला माता नाहीं, पिता नाहीं, भार्या नाहीं व पुत्रादिकहि नाहींत. कोणी आपला

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नाहीं व कोणी परकीयहि नाहीं, ह्याला देह नाहीं, जन्म नाहीं व कर्महि नाहीं; तथापि तो भगवान्, या लोकामध्यें साधूंच्या रक्षणाकरितां व क्रीडा करण्याकरितां सात्विक, राजस व तामस अशा देवतिर्यङ्मनुष्यादिकांमध्यें अवतार धारण करितो ॥ ३८ ॥ ३९ ॥ तो वस्तुतः निर्गुण असतांहि आपल्या क्रीडासाधनत्वेंकरून सत्व, रज आणि तम या तीन गुणांचा स्वीकार करितो आणि जन्मरहित व क्रीडारहित असूनहि स्वेच्छेनें क्रीडा करूं लागला ह्मणजे गुणांच्या योगानें जगाचे उत्पत्तिस्थिति-संहार करितो ॥ ४० ॥ जसें आपल्या सभोंवार गरगर फिरणाऱ्या मनुष्याला, भ्रमण पावलेल्या दृष्टीनें, पृथिवी वाटोळी फिरत आहे असें वाटतें, तसें चित्त, कर्म करूं लागलें ह्मणजे तेथें अहंकारबुद्धीनें भ्रम पावलेल्या जनाचा आत्माहि कर्माधीन असल्यासारखा भासतो ॥ ४१ ॥ हा भगवान् हरि श्रीकृष्ण, तुह्मां उभयतांचाच पुत्र आहे असें

सोऽपि जन्मकर्मादिरहितोऽपि क्रीडाप्रयोजनः सन्स साधूनां परिपालनाय सदसन्मिश्रयोनिषु सात्विकराजसतामसयोनिषु यद्वा देवादिमत्स्यादिनृसिंहादियोनिषु कल्पते आविर्भवतीत्यर्थः ॥ ३९ ॥ ननु जन्मकर्मादिरहितस्य कुत एतदित्यत आह । सत्वमिति । क्रीडामतीतोऽपि क्रीडन् । तथापि मायागुणैर्घटत इत्यर्थः ॥ ४० ॥ अत्राविद्योपाधेर्जीवस्य कर्तृत्वं दृष्टांतीकुर्वंस्तस्याविद्ययैव कर्तृत्वमिति सदृष्टांतमाह । यथेति । भ्रमरिका परिभ्रमणं तयोपलक्षितया दृष्ट्या भूरपि भ्राम्यतीति तथा प्रतीयते एवं चित्ते

न चास्य कर्म वा लोके सदसन्मिश्रयोनिषु ॥ क्रीडार्थः सोऽपि साधूनां परित्राणाय कल्पते ॥ ३९ ॥ सत्वं रजस्तम इति भजते निर्गुणो गुणान् ॥ क्रीडन्नतीतोऽत्र गुणैः सृजत्यवति हंत्यजः ॥ ४० ॥ यथा भ्रमरिकादृष्ट्या भ्राम्यतीव महीयते ॥ चित्ते कर्तरि तत्रात्मा कर्तेवाहंधिया स्मृतः ॥ ४१ ॥ युवयोरेव नैवायमात्मजो भगवान्हरिः ॥ सर्वेषामात्मजो ह्यात्मा पिता माता स ईश्वरः ॥ ४२ ॥ दृष्टं श्रुतं भूतभवद्भविष्यत्स्थास्नुश्चरिष्णुर्महदल्पकं च ॥ विनाऽच्युताद्वस्तु तरां न वाच्यं स एव सर्वं परमार्थभूतः ॥ ४३ ॥ एवं निशा सा ब्रुवतोर्व्यतीता नंदस्य कृष्णानुचरस्य राजन् ॥ गोप्यः समुत्थाय निरूप्य दीपान्वास्तून्समभ्यर्च्य दधीन्यमंथन् ॥ ४४ ॥ ता दीपदीप्तैर्मणिभिर्विरेजू रज्जूर्विकर्षद्भुजकंकणस्रजः ॥ चलन्नितंबस्तनहारकुंडलत्विषत्कपोलारुणकुंकुमाननाः ॥ ४५ ॥

कर्तरि सति तत्र चित्तेऽहंधिया आत्माध्यासेनात्मा कर्ता स्मृतो यथा तद्वदिति ॥ ४१ ॥ किंच युवयोरेव नायमात्मजः किंतु सर्वेषामपि तत्रापि नात्मज एव किंतु शत्रुमित्रादिरूपोऽपीति सर्वात्मत्वनिरूपणेन मोहनिवृत्तये संबंधमनैकांतिकीकरोति । युवयोरेवेति द्वाभ्याम् ॥ ४२ ॥ अच्युताद्विना तरां नितरां तत्त्वतो वाच्यं निर्वचनार्हं वस्तु नास्तीति ॥ ४३ ॥ दीपान्निरूप्य प्रज्वाल्य । वास्तून्देहल्यादीन् ॥ ४४ ॥ मणिभिः कांच्यादिषु स्थितैः रज्जूर्विकर्षत्सु भुजेषु कंकणानां स्रजो यासां ताः । चलंतो नितंबाः स्तना हाराश्च यासां ताः कुंडलैस्त्विषंतः स्फुरंतः कपोला यासां ताः अरुणानि कुंकुमानि येषु तान्याननानि यासां ता एव ताश्च ताश्च ॥ ४५ ॥

नाहीं, तर सर्वांचाहि पुत्र, आत्मा पिता, व माता तो ईश्वरच आहे ॥ ४२ ॥ पहाण्यांत किंवा ऐकण्यांत येणारा, जो भूत, भविष्य, वर्तमान, स्थावर, जंगम, लहान किंवा मोठा जो कोणताहि पदार्थ उच्चारण्यांत येतो तो भगवंताखेरीज मुळींच नाहीं, तर तो भगवानच सर्वरूप व सर्वांचा परमार्थरूप आहे ॥ ४३ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला— हे राजा, याप्रमाणें तो उद्धव आणि नंद हे परस्पर भाषण करीत असतां, ती सर्व रात्र निघून गेली. तेव्हां गोपी, उठून दिवे लावून घरांचें सडासंमार्जनादिक करून व चंदनादिकेंकरून, तीं पूजित करून, दह्याचें मंथन करूं लागल्या ॥ ४४ ॥ तेव्हां ज्यांच्या रज्जूंचें आकर्षण करणाऱ्या हातांमध्यें कांकणांच्या माळा आहेत, ज्यांचे नितंब, स्तन, व हार हे हालत आहेत, ज्यांचे गाल कुंडलांच्या योगानें स्फुरण पावत आहेत व ज्यांचीं मुखें तांबडे केशर लावलेलीं आहेत अशा त्या गोपी, दीपांच्या तेजानें झळकणा-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्या मेखलादिकांवर असलेल्या रत्नांच्या योगेंकरून शोभूं लागल्या ॥ ४५ ॥ तेव्हां श्रीकृष्णाचें यश उच्चस्वरानें गायन करणाऱ्या गोपींचा, दह्यांच्या घुसळण्याच्या शब्दानें मिश्र झालेला तो मोठा शब्द स्वर्गापर्यंत जाऊन पोंचला. ज्या ध्वनीच्या योगानें सर्व दिशांचें पाप नष्ट होऊन जात आहे ॥ ४६ ॥ नंतर भगवान् सूर्याचा उदय झाल्या असतां, गोकुळवासी स्त्रियांनीं, नंदाच्या दरवाज्यापुढें सुवर्णाचा रथ पाहून, त्या, हा रथ कोणाचा 'आहे इत्यादिक भाषण करूं लागल्या ॥ ४७ ॥ त्या क्रोधानें ह्मणाल्या कीं,– अहो ज्यानें कमलनयन श्रीकृष्णाला मथुरेंत नेलें तो कंसाचा कार्यभाग साधणारा अक्रूर तर आला नाहींना ? ॥ ४८ ॥ कंसाला मारवून पुन्हा कशाकरितां येईल ? अशी शंका आली असतां आपणच ह्मणतात कीं,–तेव्हां केलेल्या कामानें संतुष्ट झालेल्या आपल्या धन्याचें (कंसाचें) और्ध्वदेहिक कृत्य, आतां आमच्या योगानें

॥ ४६ ॥ तदा व्रजौकसो गोप्यः ॥ ४७ ॥ सक्रोधमाहुः। अक्रूर इति । अर्थं साधितवानित्यर्थसाधकः । तदाहुः । येन नीत इति ॥ ४८ ॥ कंसं घातयित्वा पुनः किमर्थमागत इत्याशंक्य स्वयमेव कारणं संभावयंति। किमिति। तदा साधितेन कार्येण प्रतिस्य तुष्टस्य भर्तुः। पाठांतरे प्रेतस्य मृतस्य कंसस्य निष्कृतिमौर्ध्वदेहिकमस्माभिः कृत्वा साधयि-

उद्गायतीनामरविंदलोचनं व्रजांगनानां दिवमस्पृशद्ध्वनिः ॥ दध्नश्च निमर्थनशब्दमिश्रितो निरस्यते येन दिशाममंगलम् ॥ ४६ ॥ भगवत्युदिते सूर्ये नंदद्वारि व्रजौकसः ॥ दृष्ट्वा रथं शातकौंभं कस्यायमिति चाब्रुवन् ॥ ४७ ॥ अक्रूर आगतः किंवा यः कंसस्यार्थसाधकः ॥ येन नीतो मधुपुरीं कृष्णः कमललोचनः ॥ ४८ ॥ किं साधयिष्यत्यस्माभिर्भर्तुः प्रीतस्य निष्कृतिम् ॥ इति स्त्रीणां वदंतीनामुद्धवोऽगात्कृताह्निकः ॥ ४९ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे नंदशोकापनयनं नाम षट्चत्वारिंशोऽध्यायः ॥ ४६ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ तं वीक्ष्य कृष्णानुचरं व्रजस्त्रियः प्रलंबबाहुं नवकंजलोचनम् ॥ पीतांबरं पुष्करमालिनं लसन्मुखारविंदं मणिमृष्टकुंडलम् ॥ १ ॥

ष्यते किम् । अस्मन्मांसैः पिंडान्कृत्वा दास्यतीत्यर्थः । इत्येवं वदंतीनां स्त्रीणां ततस्तस्मिन्नवसरे कृताह्निकः कृतस्नानादिनियम उद्धव आगत इति ॥ १९ ॥ इति दशमस्कंधे पूर्वार्धे टीकायां षट्चत्वारिंशोऽध्यायः ॥ ४६ ॥ ॥ सप्तचत्वारिंशकेऽथ कृष्णादेशेन गोपिकाः ॥ बोधयित्वोद्धवस्तत्त्वमनुज्ञाप्यागमत्पुरीम् ॥ १ ॥ १ ॥

साधणार आहे काय ? ह्मणजे आमच्या मांसाचे पिंड करून त्याला देणार आहे काय ? असें त्या स्त्रिया बोलत असतां, इतक्यांत यमुनेवरून स्नानसंध्यादिक कर्में आटोपून उद्धव तेथें प्राप्त झाला ॥ ४९ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील दशमस्कंधाच्या पूर्वार्धांत नंदशोकापनयननामक हा शेचाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ४६ ॥ ॥ आतां ह्या सत्तेचाळिसाव्या अध्यायामध्यें, उद्धवानें श्रीकृष्णाच्या आज्ञेप्रमाणें गोकुळांत असणाऱ्या गोपींना श्रीकृष्णाचे निरोप सांगून तत्त्वाचा बोध केला. नंतर नंदादिक सर्वांचा निरोप घेऊन पुन्हा तो मथुरेंत परत आला अशी कथा वर्णन केली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य म्हणाला–हे राजा, ज्याच्या भुजा, गुडघ्यापर्यंत लांब आहेत, ज्याचे नेत्र नवीन-कमळासारखे सुरेख आहेत, ज्यानें पीतांबर व कमळांची माळा धारण केली आहे, ज्याचें मुखकमळ सुशोभित आहे व ज्याचीं कुंडलें मणिखचित देदीप्यमान आहेत अशा त्या कृष्णसेवक उद्धवाला पाहून, शुद्धहास्य करणाऱ्या गोकुळसंबंधी सर्व स्त्रिया, स्त्रियांना फारच मनोहर दिसणारा व कृष्णासारखा पीतांबरादिक वेष व भूषणें धारण करणारा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हा कोणाचा कोण आहे) कोणत्या देशांतून येथें आला आहे ? असा तर्क करणाऱ्या व त्याला जाणण्याविषयीं उत्कंठा धारण करणाऱ्या त्या सर्वगोपी, उत्तमकीर्ति भगवंताच्या चरणकमलांचा आश्रय करणाऱ्या त्या उद्धवाच्या सभोंवार जमल्या ॥ १ ॥ २ ॥ नंतर तो श्रीकृष्णाचा निरोप घेऊन आला आहे असें जाणून त्याला गोपींनीं एकांतीं बोलावून नेलें आणि सलज्ज हास्ययुक्त अवलोकन व मधुर भाषण, इत्यादिकेंकरून त्याचा सत्कार करून, आसनावर बसलेल्या त्याला नमस्कार करून, नम्रतेनें विचारूं लागल्या कीं- ॥ ३ ॥ आम्ही तुला श्रीकृष्णाचा सेवक 'येथें प्राप्त झाला आहेस' असें जाणतों. श्रीकृष्णानें आपल्या आईबापांचें (यशोदानंदांचें) प्रिय करण्याच्या इच्छेनें तुला येथें पाठविलें असावें ॥ ४ ॥ कारण, आईबापवगैरे बंधूंच्या स्नेहाचा संबंध सोडून देणें हें मननशील ऋषिलासुद्धां कठिन असतें, नाहींतर कंसाला मारून

अपीच्यं सुंदरं दर्शनं यस्य सः । अच्युतस्येव वेषो भूषणानि च यस्य सः । कोऽयं कुतो वा कस्य चेति वदंत्यस्तं परिवव्रुः ॥ २ ॥ ३ ॥ पार्षदं सेवकम् ॥ ४ ॥ पित्रोः प्रियचिकीर्षयेत्यत्र हेतुः । स्नेहानुबंध इति ॥ ५ ॥ अन्यथा गोव्रजे तस्येत्यत्र हेतुः । अन्येष्विति । अर्थकृता कार्यनिमित्ता । विडंबनमनुकरणमात्रं नतु तात्त्विकी मैत्रि । पुंभिरिति

शुचिस्मिताः कोऽयमपीच्यदर्शनः कुतश्च कस्याच्युतवेषभूषणः ॥ इति स्म सर्वाः परिवव्रुरुत्सुकास्तमुत्तमश्लोकपदांबुजाश्रयम् ॥ २ ॥ तं प्रश्रयेणावनताः सुसत्कृतं सव्रीडहासेक्षणसूनृतादिभिः ॥ रहस्यपृच्छन्नुपविष्टमासने विज्ञाय संदेशहरं रमापतेः ॥ ३ ॥ जानीमस्त्वां यदुपतेः पार्षदं समुपागतम् ॥ भर्त्रेह प्रेषितः पित्रोर्भवान्प्रियचिकीर्षया ॥ ४ ॥ अन्यथा गोव्रजे तस्य स्मरणीयं न चक्ष्महे ॥ स्नेहानुबंधो बंधूनां मुनेरपि सुदुस्त्यजः ॥ ५ ॥ अन्येष्वर्थकृता मैत्री यावदर्थविडंबनम् ॥ पुंभिः स्त्रीषु कृता यद्वत्सुमनस्स्विव षट्पदैः ॥ ६ ॥ निःस्वं त्यजंति गणिका अकल्पं नृपतिं प्रजाः ॥ अधीतविद्या आचार्यमृत्विजो दत्तदक्षिणम् ॥ ७ ॥ खगा वीतफलं वृक्षं भुक्त्वा चातिथयो गृहम् ॥ दग्धं मृगास्तथाऽरण्यं जारो भुक्त्वा रतां स्त्रियम् ॥ ८ ॥ इति गोप्यो हि गोविंदे गतवाक्कायमानसाः ॥ कृष्णदूते व्रजं याते उद्धवे त्यक्तलौकिकाः ॥ ९ ॥

दृष्टांतौ ॥ ६ ॥ अस्यैवान्यार्थनिदर्शनैः प्रपंचः निःस्वमित्यादिना । दत्ता दक्षिणा येन तं याज्यम् ॥ ७ ॥ पक्षिणो विगतफलं वृक्षम् । रतामनुरक्तामतृप्तामित्यर्थः ॥ ८ ॥ त्यक्तलौकिकास्त्यक्तलोकव्यवहाराः ॥ ९ ॥

राज्य मिळविणाऱ्या त्या श्रीकृष्णाला गोकुळांत स्मरण करण्यास योग्य असें आम्ही कांहींच पाहत नाहीं ॥ ५ ॥ बंधूंखेरीज दुसऱ्यावर जी प्रीति असत्ये ती केवळ आपलें कार्य साधण्यापुरतीच असून मैत्रीचें अनुकरणमात्र करणारी असत्ये, खरी नसत्ये; ती मैत्री, जशी पुरुषांनीं स्त्रियांचेठिकाणीं कामनिमित्तक केलेली मैत्री असत्ये ती कामाची निवृत्ति होतांच निवृत्त होत्ये किंवा जशी भ्रमरांनीं फुलांवर त्यांच्या परागनिमित्तक केलेली मैत्री परागांची निवृत्ति होतांच निवृत्त होत्ये, तशी समजली पाहिजे ॥ ६ ॥ जशा वेश्या, निर्धन झालेल्या पुरुषाचा त्याग करितात, किंवा जशा प्रजा, पालनपोषणादिक करण्यास असमर्थ असलेल्या राजाचा; विद्या पढलेले शिष्य, गुरूचा; ऋत्विज, दक्षिणा दिलेल्या यजमानाचा; पक्षी, फळहीन झालेल्या वृक्षाचा; अतिथि, भोजन केलेल्या घराचा व हरिण, वणव्यानें जळूं लागलेल्या अरण्याचा त्याग करितात त्याप्रमाणें जार पुरुष, प्रीतीनें रत झालेल्या स्त्रीचा भोग झाल्यावर लागलाच त्याग करितो ॥ ७ ॥ ८ ॥ श्रीशुकाचार्य म्हणाला-हे राजा, याप्रमाणें कृष्णाचा दूत असा तो उद्धव,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

गोकुळांत गेला असतां लोकव्यवहार सुटून कृष्णाकडे देह वाणी व मन लागलेल्या त्या गोपी, प्रिय श्रीकृष्णाचीं कैशोर व बाल्यावस्थांमध्यें झालेलीं जीं कर्मे त्यांचें वारंवार स्मरण करून गायन करीत व निर्लज्जपणें रुदन करीत होत्सात्या उद्धवाला विचारूं लागल्या ॥ ९ ॥ १० ॥ त्यांमध्यें कोणीएक गोपी श्रीकृष्णाच्या समागमाचें ध्यान करीत असतां एका भ्रमराला पाहून त्याच्यावर, श्रीकृष्णानें आपली प्रसन्नता करण्याकरितां हा दूत पाठविला आहे अशी कल्पना करून असें म्हणाली कीं ॥ ११ ॥ गोपी ह्मणाली–हे भ्रमरा, हे कपट्याच्या मित्रा, तूं आमच्या पायांना स्पर्श करून नमस्कारानें आमची प्रार्थना करूं नकोस. तुझ्या मिशा, सवतीच्या स्तनांनीं संमर्दन झालेल्या भगवंताच्या वनमालासंबंधीं केशरानें रंगून गेल्या आहेत. ज्यावा तूं असला (मिशा रंगलेला) दूत आहेस त्या यादवपति श्रीकृष्णानें यादवांच्या सभेमध्यें

प्रियस्य कर्माणि गायंत्यस्तथा तस्य बाल्यकैशोरयोर्यानि कर्माणि तानि संस्मृत्य संस्मृत्य गतह्रियः सत्यो रुदत्यश्च तमपृच्छन्निति पूर्वक्रिययैव संबंधः ॥ १० ॥ प्रियेण श्रीकृष्णेन मां प्रसादयितुं प्रस्थापितोऽयं दूत इति कल्पयित्वाऽब्रवीत् । यद्वा तस्मिन्नप्युद्धवे प्रियप्रस्थापितं दूतमिति दूतदृष्टिं कृत्वा मधुकरापदेशेनोद्धवमेवाब्रवीदित्यर्थः॥११॥ हे मधुप कितवस्य धूर्तस्य बंधो नोऽस्माकमंघ्रिं मा स्पृश । मा मां नमस्कारेण प्रार्थयस्वेत्यर्थः । तत्किमित्यपेक्षायां कृष्णवर्णस्य तस्य श्मश्रूणां लोहितत्वे कारणमुत्प्रेक्ष-

गायंत्यः प्रियकर्माणि रुदत्यश्च गतह्रियः ॥ तस्य संस्मृत्य संस्मृत्य यानि कैशोरबाल्ययोः ॥१०॥ काचिन्मधुकरं दृष्ट्वा ध्यायंती कृष्णसंगमम् ॥ प्रियप्रस्थापितं दूतं कल्पयित्वेदमब्रवीत् ॥ ११ ॥ गोप्युवाच ॥ मधुप कितवबंधो मा स्पृशांघ्रिं सपत्न्याः कुचविलुलितमालाकुंकुमश्मश्रुभिर्नः ॥ वहतु मधुपतिस्तन्मानिनीनां प्रसादं यदुसदसि विडंब्यं यस्य दूतस्त्वमीदृक् ॥ १२ ॥ सकृदधरसुधां स्वां मोहिनीं पाययित्वा सुमनस इव सद्यस्तत्यजेऽस्मान्भवादृक् ॥ परिचरति कथं तत्पादपद्मं तु पद्मा ह्यपि बत हृतचेता उत्तमश्लोकजल्पैः ॥ १३ ॥ किमिह बहु षडंघ्रे गायसि त्वं यदूनामधिपतिमगृहाणामग्रतो नः पुराणम् ॥ विजयसखसखीनां गीयतां तत्प्रसंगः क्षपितकुचरुजस्ते कल्पयंतीष्टमिष्टाः ॥ १४ ॥

माणाह । सपत्न्याः कुचाभ्यां लुलिता संमर्दिता कृष्णस्य वनमाला अतएव तस्याः कुंकुमं येषु तैः श्मश्रुभिरुपलक्षितः । किंतु तासामेव मानिनीनां प्रसादं मधुपतिर्वहतु किमस्मत्प्रसादनेन तस्य । यदुसदसि विडंब्यमुपहासास्पदम् । कुतः । यस्य दूतस्त्वमीदृगीदृशः ॥ १२ ॥ ननु क्रिमित्येवं तमवजानीथ किं वस्तेनापकृतमत आह । सकृदिति । भवादृक् त्वादृशो दुर्मनाः सुमनसः कुसुमानि यथा त्यजति तद्वत् । अहो बताविज्ञस्य तस्य पादपद्मं श्रीः कथं सेवते । विदितं मयेत्याह । अपीति । बतेति खेदे । उत्तमश्लोकस्य जल्पैर्मिथ्याकथाभिः प्रलापैः प्रायो हृतचेताः वयं तु न लक्ष्मीवदविचक्षणा इति भावः ॥ १३ ॥ झंकारान्बहुधा कुर्वंतमस्मत्प्रसादलाभाय कृष्णं

निंदा होण्यास पात्र अशी त्या मानवती नगरवासी स्त्रियांचीच प्रसन्नता संपादन करावी ॥ १२ ॥ जसा तूं दुष्टचित्त आहेस तसाच तुझा धनी श्रीकृष्णहि आहे; जसा तूं फुलांचा सुगंध घेऊन लागलाच त्यांचा त्याग करितोस त्याप्रमाणेंच श्रीकृष्णानेंहि मोहित करणारें आपलें अधरामृत एकवारच आह्मांस पाजून आमचा तत्काळ त्याग केला आहे. अहो लक्ष्मीतरी त्या कृतघ्नाच्या चरणकमळाची सेवा कशी करित्ये ! मी समजलें कीं, उत्तमकीर्ती भगवंताच्या खोट्याच कथांनीं त्या लक्ष्मीचें मन आकर्षित झालें आहे. आह्मी कांहीं त्या लक्ष्मीसारख्या फसावयाच्या नाहीं ॥ १३ ॥ नंतर अनेकप्रकारचे गुंजारव शब्द करणाऱ्या त्याला, हा आमच्या प्रसन्नतेकरितां कृष्णाचें गायन करीत आहे असें मानून ह्मणाली कीं,– हे भ्रमरा, तूं येथें आह्मां वनचर स्त्रियांच्या पुढें त्या पुराणपुरुष यादवपति श्रीकृष्णाचें फारसें गायन कशाकरितां करितोस ? श्रीकृष्णा-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

च्या सांप्रतकालीं ज्या सख्या आहेत त्यांच्यापुढें त्याची कथा गायन कर. कारण, ज्यांचा कामज्वर श्रीकृष्णानें शांत केला आहे, त्या श्रीकृष्णाच्या आवडत्या स्त्रियाच तुला इच्छित असेल तें देतील ॥ १४ ॥ हे मातें, असें बोलूं नकोस. तुझें स्मरण करून मदनानें विव्हळ झालेल्या त्या कृष्णानें, तुला प्रसन्न करण्याकरितां मला पाठविलें आहे असें ह्मणशील तर– हे कपट्या, सुंदरहास्ययुक्त भ्रूसंकेत करणाऱ्या त्या श्रीकृष्णाला स्वर्ग, भूमि व पाताळ यांमध्यें जितक्या ह्मणून स्त्रिया आहेत त्यांपैकीं कोणत्या बरें दुर्लभ आहेत? कोणत्याच नाहींत. अरे लक्ष्मीसुद्धां ज्याच्या चरणरजाची सेवा करित्ये त्याच्याजवळ आमची योग्यता काय आहे? तथापि तूं कृष्णाजवळ जाऊन असें कळीव कीं, दीनावर दया करणाऱ्या पुरुषालाच मोठा यशस्वी असें ह्मणतात ॥ १५ ॥ नंतर पायांवर बसावयास आलेल्या त्या भ्रमराला, हा कृष्णाकडून आपणाजवळ क्षमा

गायतीति मत्वाऽऽह । किमिहेति । पुराणं पुरातनं बहुशोऽनुभूतम् । विजयसखस्य श्रीकृष्णस्य सांप्रतं याः सख्यस्तासामग्रतस्तत्प्रसंगो गीयताम् । इष्टाः कृष्णस्य प्रियाः तेन पूजिता इति वा तेनालिंगितेन क्षपिता कुचरुग्यासां तास्तवेष्टमपेक्षितं दास्यंतीति ॥ १४ ॥ भो मातर्मैवं वोचस्त्वामनुस्मृत्यानंगविक्लवस्त्वां प्रसादयितुं मामादिष्टवानित्यत आह । दिवीति । दिवि भुवि रसातले च याः स्त्रियः स्युस्ताः का नाम दुरापा न काश्चन । तदित्यव्ययम् । तस्येत्यर्थः । कपटेन रुचिरेण हासेन भ्रूविजृंभो यस्य तस्य । हे कपट इति वा । किंच । यस्य चरणरजः श्रीः सेवते तत्र वयं काः अपिच यद्यप्येवं तथापि कृपणपक्षे कृपणानुकंपिनि पुंस्युत्तमश्लोकशब्दो भवतीति तथा कथनीयं त्वयेति

दिवि भुवि च रसायां काः स्त्रियस्तद्दुरापाः कपटरुचिरहासभ्रूविजृंभस्य याः स्युः ॥ चरणरज उपास्ते यस्य भूतिर्वयं का अपि च कृपणपक्षे ह्युत्तमश्लोकशब्दः ॥ १५ ॥ विसृज शिरसि पादं वेद्म्यहं चाटुकारैरनुनयविदुषस्तेऽभ्येत्य दौत्यैर्मुकुंदात् ॥ स्वकृत इह विसृष्टापत्यपत्यन्यलोका व्यसृजदकृतचेताः किं नु संधेयमस्मिन् ॥ १६ ॥ मृगयुरिव कपींद्रं विव्यधे लुब्धधर्मा स्त्रियमकृत विरूपां स्त्रीजितः कामयानाम् ॥ बलिमपि बलिमत्त्वाऽवेष्टयद्ध्वांक्षवद्यस्तदलमसितसख्यैर्दुस्त्यजस्तत्कथार्थः ॥ १७ ॥

भावः ॥ १५ ॥ पादमूले प्रविशंतं क्षमापयिष्यंतमिव मत्वाऽऽह । विसृजेति । शिरसि न्यस्तं पादं विसृज । तथाऽप्यमुंचंतमाह । वेद्मीति । मुकुंदादभ्येत्य ततः शिक्षित्वेत्यर्थः । दौत्यैर्दूतकर्मभिश्चाटुकारैः प्रियोक्तिरचनाभिरनुनयविदुषः प्रार्थनाचतुरस्य ते तव सर्वमहं वेद्मि । मुकुंदवत्त्वमप्यविश्वसनीय इति भावः । ननु तेन किमपराद्धं तत्राह । स्वकृत इति । स्वकृते तदर्थमेव विसृष्टा अपत्यपत्यन्यलोकाः अपत्यानि पतयश्चेतीहलोकोऽन्यलोको धर्मसाध्यश्च याभिस्ता नः । अकृतचेता असंयतचित्तो यो व्यसृजदस्मिन्किं नु संधातव्यमिति ॥ १६ ॥ किंच कृष्णस्य पूर्वाणि कर्माण्यनुसंदधाना बिभेम्यहमस्मादित्याह । मृगयुरिवेति । मृगयुर्लुब्धक इव यः कपींद्रं वालिनं विव्यधे

करविण्याकरितां आला आहे असें मानून ह्मणाली कीं,– भ्रमरा, तूं माझ्या पायांवर मस्तक ठेवूं नकोस. कृष्णाकडून शिकून आलेल्या व दूतकर्मांनीं व प्रियकर भाषणांनीं दुसऱ्याची प्रार्थना करण्यास चतुर झालेल्या तुझें सर्व कपट मी जाणत्यें. कृष्णासारखा तूंहि अविश्वसनीय आहेस. बरें, तूं अशी तिरस्कार करित्येस तेव्हां त्या कृष्णानें तुझा काय अपराध केला आहे? असें ह्मणशील तर– त्या कृतघ्न श्रीकृष्णानें, त्याच्याकरितांच ज्या आह्मीं, पुत्र, पति व स्वर्गादिक परलोक यांचा त्याग केला आहे त्या आह्मांला टाकून दिलें, हा अपराध केला आहे. तेव्हां आतां त्याच्याबरोबर एकी करून काय करावयाचें आहे? कांहींच नाहीं ॥ १६ ॥ आणि कृष्णाचीं पूर्वींचीं कर्में मनांत आणून मी त्यापासून फारच भित्यें,–ज्यानें, रामावतारीं व्याधासारखा क्रूरपणा स्वीकारून वाळीचा वध केला आणि सीतेच्या अंकितपणें कामातुर होऊन आलेल्या शूर्पणखेच्या कर्णनासिकांचें छेदन करून तिला विद्रूप केलें. तसेंच त्याच्याहि पूर्वीं वामनावतारीं, जसा कावळा एखाद्याचा पदार्थ थोडासा भक्षण

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करूनहि पुन्हा त्याला वेढा घालितो त्याप्रमाणें ज्यानें बळिराजाकडून पूजा ग्रहण करूनहि त्याचें वारुणपाशांनीं बंधन केलें. त्या कृष्णाचीं सख्यें जोडून आतां पुरे झालें. असें जर आहे तर तुह्मी काय ह्मणून त्याचें निरंतर गायन करितां, असें ह्मणशील तर– त्याचा कथारूप अर्थ टाकावयाचा मोठा कठीण आहे ॥ १७ ॥ आणि त्याची कथाहि धर्मार्थकामरूप वेलीला उपटून टाकणारी आहे, असें आह्मी जरी जाणतों तथापि तिचा त्याग करण्यास आह्मी शक्त होत नाहीं, काय करावें! ज्या भगवच्चरित्ररूप कर्णामृताच्या एका कणाच्या एकवारहि सेवनानें, ज्यांचे रागद्वेषादिक धर्म नाहींसे झाले आहेत असे पुष्कळ लोक, असून नसल्याप्रमाणें होऊन दुःखित झालेलें

अविध्यत् । लुब्धधर्मा क्रौर्यवान् । अलुब्धधर्मेति वा । लुब्धको हि तन्मांसमत्तुकामो विध्यत्ययं तु न तथाऽतो वृथा कठिन इत्यर्थः । तथा स्त्रियं शूर्पणखां स्त्रीजितः सीतापरतंत्रः काम एव यानं प्राप्तिसाधनं यस्यास्तां विरूपां छिन्नकर्णनासिकामकरोद्दाशरथिरूपेण । तथा बलिमपि तद्दत्तं बलिमत्त्वा भक्षयित्वा ध्वांक्षवत्काकवदवेष्टयद्बबंध वामनरूपेण । बलिमत्त्वाऽधोऽक्षिपद्विष्टपाद्य इति पाठे बलिं पूजां गृहीत्वा विष्टपात्स्वर्गादधोऽक्षिपदित्यर्थः । तत्तस्मादसितस्य कृष्णस्य सख्यैरलम् । एवं चेत्किमिति तं नित्यं गायथ तत्राह । दुस्त्यजस्तु तस्य कथारूपोऽर्थ इति ॥ १७ ॥ अपिच । जानीम एव तत्कथाऽपि त्रिवर्गलतामूलोन्मूलनीति तथापि न त्यक्तुं शक्नुमः किं कुर्म इत्याह । यदनुचरितेति । यस्यानुचरितमेव लीला तदेव कर्णपीयूषं तस्य विप्रुट् कणिका तस्याः सकृददनं सेवनं तेन विधूता निरस्ता द्वंद्वधर्मा रागादयो येषां तेऽतएव विनष्टा असत्तुल्या दीनं दुःखितं गृहकुटुंबं विहाय दीना भोगहीना विहंगा अपि भिक्षुचर्यां प्राणवृत्तिमात्रं चरंत्यतस्त्याज्यस्तथापि त्यक्तुं न शक्नुम इति निंदापरत्वेऽयं ताव-

यदनुचरितलीलाकर्णपीयूषविप्रुट्सकृददनविधूतद्वंद्वधर्माविनष्टाः ॥ सपदि गृहकुटुंबं दीनमुत्सृज्य दीना बहव इह विहंगा भिक्षुचर्यां चरंति ॥ १८ ॥ वयमृतमिव जिह्मव्याहृतं श्रद्दधानाः कुलिकरुतमिवाज्ञाः कृष्णवध्वो हरिण्यः ॥ ददृशुरसकृदेतत्तन्नखस्पर्शतीव्रस्मररुज उपमंत्रिन्भण्यतामन्यवार्ता ॥ १९ ॥

च्छ्रौतोऽर्थः । दुस्त्यजत्वेऽपि पारमार्थिकोऽयमर्थः । विधूतद्वंद्वधर्मा इत्यंतः समासः पूर्ववत् । ततस्ते च ते अविनष्टाश्चेति समासः । इतरे पुनर्द्वंद्वधर्माणो विनष्टा एव । सपदि तत्क्षणमेव दीनं तुच्छं गृहसहितं कुटुंबं विहाय दीना इवाकिंचनाः । धीरा इति वा पाठः । बहवो विहंगा हंसा इव सारासारविवेकचतुरा भिक्षुचर्यां पारमहंस्यं चरंति तस्मादेवं परमपुरुषार्थरूपत्वाद्दुस्त्यज एव तत्कथार्थ इति ॥ १८ ॥ ननु किमेवं ब्रूषे पूर्वं त्वयैव साकं रहसि किमेवं नावोचदित्यत आह । वयमिति । हे उपमंत्रिन् दूत आस्तामियं वार्ता । यतः कुलिकस्य मृगयोः रुतं गीतमज्ञा यथा ऋतं सत्यमिति श्रद्दधानाः कृष्णस्य हरिणस्य वध्वो भार्या हरिण्यः शरैः क्षताः सत्यो रुजो ददृशुः । एवं जिह्मस्य कुटिलस्य तस्य व्याहृतमृतमिव श्रद्दधानाः स्पृहयंत्यो वयमसकृदेतद्ददृशिम । किं तत् । तस्य नखैः स्पर्शस्तेन तीव्रः स्मरस्तेन रुजः पीडाः तस्मादन्या वार्ता भण्यतां कथ्यतामिति ॥ १९ ॥

आपलें घरांतील स्त्रीपुत्रादिक कुटुंब तत्काळ सोडून देऊन आपणहि भोगरहित होत्साते पक्ष्यांसारखे पोट भरण्याकरितां भिक्षा मागत हिंडत असतात. ह्मणजे ‘ज्यांच्या कथारूप अमृताच्या एकेवेळहि श्रवणानें रागद्वेषादिदोषरहित झाल्यामुळें संसारी लोकांसारखा नाश न पावणारे कितीएक परमहंस योगी, तुच्छ अशा गृहासहित कुटुंबाचा तत्काल त्याग करून सर्वसंगरहित होत्साते परमहंसधर्माचें आचरण करितात’ ह्मणून त्या श्रीकृष्णाचा कथारूप अर्थ परमपुरुषार्थरूपी असल्यामुळें दुस्त्यज आहे ॥१८॥ बरें अशा शाहण्या जर तुह्मी आहां तर पूर्वीं कृष्णाबरोबर सख्य करून त्याच्या स्वाधीन कशा झाल्यां होतां? असें ह्मणशील तर– जशा, काळवीट हरिणाच्या भोळ्या स्त्रिया, ॥१४७॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हरिणी, व्याधाचें मधुर गायन ऐकून तें सत्य आहे असें मानीत होत्सात्या त्याच्याजवळ जाऊन बाणांनीं विद्ध झाल्या ह्मणजे दुःखाचा अनुभव घेतात त्याप्रमाणें श्रीकृष्णाच्या अज्ञानी स्त्रिया आह्मी, त्याच कपटी श्रीकृष्णाचें 'मी कधींच खोटें भाषण केलेलें नाहीं इत्यादिक' भाषण खरें आहे असें मानीत होत्सात्या त्या कृष्णाच्या नखस्पर्शानें अतिशय वृद्धिंगत झालेल्या मदनाच्या पीडेनें युक्त होऊन वारंवार हें दुःख पहात आहों. यास्तव हे दूता, स्मरणमात्रेंकरून मनाला क्षोभ उत्पन्न करणारी ती कृष्णकथा राहूंदे, तूं दुसरीच कथा सांग ॥ १९ ॥ परत जाऊन पुन्हा आलेल्या त्याला ह्मणाली कीं,– हे प्राणसख्याचा मित्रा, श्रीकृष्णानें पाठविलें ह्मणून तूं पुन्हा आला आहेस काय? हे दूता, तूं मला पूज्य आहेस, तुला काय पाहिजे? जें पाहिजे असेल तें मागून घे. मी तुह्मांला कृष्णाजवळ नेणार आहें, असें ह्मणत असशील तर– ज्याचा समागम सोडणें फार कठीण आहे त्या कृष्णाजवळ, येथें असणाऱ्या आह्मांला तूं कसा नेशील? नेण्यास कोणती अडचण आहे असें ह्मणशी

परावृत्य गत्वा पुनरागतं प्रत्याह । प्रियसखेति । हे प्रियस्य सखे प्रेयसा कृष्णेन पुनः प्रेषितः किं त्वमागतोऽसि । अंग हे दूत मे माननीयः पूज्योऽसि । अतो भवान् किमनुरुंधे प्राप्तुमिच्छतीत्यर्थः । तद्वरय वृणीष्व । संमानितं प्रत्याह । नयसीति । इह सतीः अस्मान् दुस्त्यजं द्वंद्वं मिथुनीभावो यस्य तस्य पार्श्वं समीपं कथं नयसि नेष्यसि ।

प्रियसख पुनरागाः प्रेयसा प्रेषितः किं वरय किमनुरुंधे माननीयोऽसि मेंऽग ॥ नयसि कथमिहास्मान्दुस्त्यजद्वंद्वपार्श्वं सततमुरसि सौम्य श्रीर्वधूः साकमास्ते ॥ २० ॥ अपि बत मधुपुर्यामार्यपुत्रोऽधुनाऽऽस्ते स्मरति स पितृगेहान्सौम्यं बधूंश्च गोपान् ॥ क्वचिदपि स कथा नः किंकरीणां गृणीते भुजमगुरुगंधं मूर्ध्न्यधास्यत्कदा नु ॥ २१ ॥ श्रीशुक उवाच ॥ अथोद्धवो निशम्यैवं कृष्णदर्शनलाल साः ॥ सांत्वयन्प्रियसंदेशैर्गोपीरिदमभाषत ॥ २२ ॥ उद्धव उवाच ॥ अहो यूयं स्म पूर्णार्था भवत्यो लोकपूजिताः ॥ वासुदेवे भगवति यासामित्यर्पितं मनः ॥ २३ ॥ दानव्रततपोहोमजपस्वाध्यायसंयमैः ॥ श्रेयोभिर्विविधैश्चान्यैः कृष्णे भक्तिर्हि साध्यते ॥ २४ ॥

तथाहि । हे सौम्य श्रीर्नाम वधूः साकं सहैव सततमास्ते । तत्राप्युरसि वक्षस्येव ॥ २० ॥ तेन संमंत्रिता सती ब्रूते । अपि बतेति । बत हर्षे । हे सौम्य गुरुकुलादागत्यार्यपुत्रः कृष्णोऽधुना किं मधुपुर्यां वर्तते । कदाचिदपि नोऽस्माकं वार्ताः किं ब्रूते । अगुरुवत्सुगंधं भुजं नो मूर्ध्नि कदा नु धास्यतीति ॥ २१ ॥ श्रीकृष्णदर्शनोत्सुका गोपीः प्रियस्य संदेशैः सांत्वयन् प्रथमं तावदिदमभाषत ॥ २२ ॥ तदाह षड्भिः । अहो इति । स्म नूनं यूयं पूर्णार्थाः कृतार्थाः ॥ २३ ॥ श्रेयोभिः श्रेयःसाधनैः ॥ २४ ॥

ल तर– हे सौम्या, ज्याच्या वक्षःस्थळाचेठिकाणींच लक्ष्मीनामक स्त्री निरंतर सहवास करीत आहे, त्याला आमची काय गरज आहे? ॥ २० ॥ त्यानें कांहीं गुप्त मजकूर सांगितलेली ती गोपी त्याला पुन्हा ह्मणत्ये कीं,– हे सौम्या, मी तुला असें विचारित्यें कीं, नंदराजाचा पुत्र श्रीकृष्ण, व्रतबंध झाल्यावर विद्या शिकण्याकरितां गुरूच्या घरीं गेला होता तो तेथून येऊन आतां मथुरेमध्यें खुशाल आहेना? बरें, तो यशोदानंदांसहित आपल्या घराचें व बांधव गोपांचें स्मरण करितो काय? बरें, तो केव्हांतरी आह्मां दासींच्या कथावार्ता बोलतो काय? बरें, केव्हांतरी अगरूसारखा सुगंधयुक्त आपला हात आमच्या मस्तकीं ठेवील काय? ॥ २१ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, याप्रमाणें श्रीकृष्णाच्या दर्शनाविषयीं उत्कंठित झालेल्या त्या गोपींना पाहून तो उद्धव, प्रिय श्रीकृष्णाच्या निरोपांनीं त्यांचें सांत्वन करीत होत्साता असें ह्मणाला कीं, ॥ २२ ॥ उद्धव ह्मणाला– अहो गोपीहो, तुह्मी कृतार्थ असून सर्व लोकांना पूज्य आहां. कारण, ज्या तुमचें मन षड्गुणैश्वर्यसंपन्न वासुदेव श्रीकृष्णाचेठिकाणीं याप्रमाणें अर्पित असून स्थिर झालें आहे ॥ २३ ॥ दान, व्रत, तप, होम, मंत्रादिकांचा जप वेदपाठ, इंद्रियांचा निग्रह, तशींच नानाप्रकारचीं दुसरींहि

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कल्याणाचीं साधनें यांच्या योगेंकरून श्रीकृष्णाचेठिकाणीं भक्तिच साधली जात्ये ॥ २४ ॥ हे गोपीहो, तुह्मीं उत्तमश्लोक भगवंताचेठिकाणीं जी सर्वोत्कृष्ट भक्ति केलीत ही फार चांगली गोष्ट झाली. कारण, ही भक्ति मननशील ऋषींनांहि अतिदुर्लभ आहे ॥ २५ ॥ आणि तुह्मीं आपले पुत्र, पति, देह, स्वजन व घरेंदारेंवगैरे टाकून जो श्रीकृष्णनामक परपुरुषाचा स्वीकार केलात हीहि फार चांगली गोष्ट झाली ॥ २६ ॥ हे महाभाग्यवतीहो, तुह्मांला विरहानें भगवान् श्रीकृष्णाचेठिकाणीं जी प्रेमलक्षण एकांतभक्ति प्राप्त झाली ती तुह्मीं मला सहज दाखविलीत, त्याच्या योगानें तुह्मीं माझ्यावरसुद्धां मोठा अनुग्रह केला आहेत, ह्मणजे ती पाहून मीहि कृतार्थ झालों आहें ॥ २७ ॥ यास्तव हे कल्याणीहो, मी श्रीकृष्णाचें गुप्तकार्य करणारा दूत आहें तो मी त्या प्रिय श्रीकृष्णाचा तुह्मांला सुखकारक असा सांगावयाचा जो निरोप घेऊन

अनुत्तमा अतिश्रेष्ठा ॥ २५ ॥ अवृणीत वृतवृत्यः ॥ २६ ॥ सर्वात्मभाव एकांतभक्तिः । अधिकृतः प्राप्तः । भगवत्प्रेमसुखप्रदर्शनेन ममैव महाननुग्रहः कृत इति ॥ २७ ॥ भर्तुः कृष्णस्य रहस्करो रहस्यकार्यकर्ता ॥ २८ ॥ भवतीनां मे मया सह वियोगो नास्ति । कुतः । सर्वात्मना सर्वस्योपादानकारणेन । अतएव सर्वेषु मनआदिकार्येष्वहमनुगतत्वेन स्थित इति सदृष्टांतमाह । यथेति । भूतेषु चराचरेषु महाभूतानि । वाय्वग्निर्वायुसहितोऽग्निः वायुश्चाग्निश्चेत्यर्थः । यथा तथाऽहं चेति । मनआदीनि कार्याणि गुणाः कारणं

भगवत्युत्तमश्लोके भवतीभिरनुत्तमा ॥ भक्तिः प्रवर्तिता दिष्ट्या मुनीनामपि दुर्लभा ॥ २५ ॥ दिष्ट्या पुत्रान्पतीन्देहान्स्वजनान्भवनानि च ॥ हित्वा वृणीत यूयं यत्कृष्णाख्यं पुरुषं परम् ॥ २६ ॥ सर्वात्मभावोऽधिकृतो भवतीनामधोक्षजे ॥ विरहेण महाभागा महान्मेऽनुग्रहः कृतः ॥ २७ ॥ श्रूयतां प्रियसंदेशो भवतीनां सुखावहः ॥ यमादायागतो भद्रा अहं भर्तू रहस्करः ॥ २८ ॥ श्रीभगवानुवाच ॥ भवतीनां वियोगो मे नहि सर्वात्मना क्वचित् ॥ यथा भूतानि भूतेषु खं वाय्वग्निर्जलं मही ॥ तथाऽहं च मनःप्राणभूतेंद्रियगुणाश्रयः ॥ २९ ॥ आत्मन्येवात्मनाऽऽत्मानं सृजे हन्म्यनुपालये ॥ आत्ममायानुभावेन भूतेंद्रियगुणात्मना ॥ ३० ॥ आत्मा ज्ञानमयः शुद्धो व्यतिरिक्तोऽगुणान्वयः ॥ सुषुप्तिस्वप्नजाग्रद्भिर्मायावृत्तिभिरीयते ॥ ३१ ॥

तेषामाश्रयत्वेनानुगत इत्यर्थः ॥ २९ ॥ ननु कारणत्वे सर्वानुगतत्वे च कार्यकारणभेदः स्यादत आह । आत्मन्येवेति । ननु नित्यसिद्धस्य कुतः सृष्ट्यादिरूपता अत आह । भूतेंद्रियगुणात्मना बुद्धींद्रियेति वा पाठः । तद्रूपेणेति । ननु निर्विकारस्य कुतस्तद्रूपतेति तत्राह । आत्ममायानुभावेनेति ॥ ३० ॥ नन्वात्मनो भूतादिरूपत्वे तद्दोषप्रसंगः स्यात्तत्राह । आत्मेति । आत्मा तु शुद्धः । कुतः अगुणान्वयः न गुणेष्वन्वेतीति तथा । तत्कुतः व्यतिरिक्तः । तदपि कुतः ज्ञानमयो ज्ञानस्वरूपः । नन्वहं प्रत्यये स्वसंवेद्यमेवात्मनो नानावस्थावत्त्वमिति कुतः शुद्धतेति तत्राह । सुषुप्तीति । मायाकार्यमनोवृत्तिभिर्विश्वतैजसप्राज्ञरूपेण प्रतीयते । न स्वत इत्यर्थः ॥ ३१ ॥

आलों आहें तो आतां सांगतों ऐका ॥ २८ ॥ श्रीभगवंतानें तुह्मांला असें सांगितलें आहे कीं, तुमचा व माझा कोणत्याहि देशीं किंवा कोणत्याहि कालीं वियोग मुळींच नाहीं. कारण, मी सर्वांचा आत्मा आहें., जशीं आकाश, वायु, तेज, जळ व पृथिवी हीं पंचमहाभूतें स्थावरजंगमात्मक सर्व पदार्थांमध्यें राहत आहेत त्याप्रमाणें मीहि, मन, प्राण, भूतें, इंद्रियें आणि गुण यांच्या अधिष्ठानरूपत्वेंकरून सर्वांमध्यें व्यापून राहिलों आहें ॥ २९ ॥ आणि मी आपल्या मायेच्या सामर्थ्यानें आपल्या स्वरूपाचेचठिकाणीं, भूतें इंद्रियें आणि गुण यांच्या रूपानें आपणच आपणास उत्पन्न करितों, संहार करितों व पालन करितों ॥ ३० ॥ कारण, आत्मा,– शुद्ध व गुणांत न सांपडलेला असल्यामुळें गुणांहून निराळा, ज्ञानरूप आहे. तो मायाकार्यभूत मनाच्या सुषुप्ति, स्वप्न व जाग्रतिरूप वृत्तींनीं विश्वतैजसप्राज्ञरूपांनीं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रतीतीला येत असतो स्वतां प्रतीतीला येत नाहीं ॥ ३१ ॥ जसा जागा झालेला पुरुष, स्वप्नांत पाहिलेले पदार्थ मिथ्या आहेत असें मानितो त्याप्रमाणें ज्ञानी लोक ज्यांस खोटे मानितात, त्या शब्दादिक विषयांचें ज्या मनाच्या योगानें चिंतन घडतें व चिंतन होत असतां ज्याच्या योगानें इंद्रियांना व इंद्रिययुक्त देहाला अध्यासानें तीं सर्व इंद्रियादिक मीच आहें असें प्राणी मानितो, त्या मनाचा निरोध आळस न करितां केला पाहिजे ॥ ३२ ॥ वेद (वेदांतील साधनांचा समुदाय), अष्टांगयोग, विचारवान् पुरुषांचा आत्मानात्मविवेक, संन्यास, स्वधर्म, इंद्रियनिग्रह व सत्य हे सर्वहि प्रकार, 'जशा सर्व नद्या अखेर समुद्रामध्येंच जाऊन मिळतात त्याप्रमाणें' मनोनिग्रहामध्येंच पर्यवसान पावतात, ह्मणजे मनोनिग्रह हेंच त्यांचें शेवटचें फळ होय ॥ ३३ ॥ आतां, कृष्णा, तूं इतर भक्तांसारखा आह्मांलाहि आत्मज्ञानाचा उपदेश

कुतः । मनोनिरोधे तदभावादितिव्यतिरेकं दर्शयितुं मनोनिरोधं विधत्ते । येनेति । उत्थितः पुमान्यथा मिथ्याभूतमेव स्वप्नं ध्यात्येवं बाधितानपींद्रियार्थान् शब्दादीन्येन मनसा ध्यायेच्चिंतयेत् । ध्यायंश्च येनेंद्रियाणि प्रत्यपद्यत प्राप तन्मनो विनिद्रोऽनलसः सन्निरुंध्यान्नियच्छेदिति ॥ ३२ ॥ तावता च कृतार्थो भवतीत्याह । एतदंत इति । एष मनोनिरोधः अंतः समाप्तिः फलं यस्य सः । समाम्नायो वेदः । स तत्र पर्यवस्यतीत्यर्थः । योगोऽष्टांगः । सांख्यमात्मानात्मविवेकः । त्यागः संन्यासः । तपः स्वधर्मः ।

येनेंद्रियार्थान्ध्यायेत मृषा स्वप्नवदुत्थितः ॥ तन्निरुंध्यादिंद्रियाणि विनिद्रः प्रत्यपद्यत ॥ ३२ ॥ एतदंतः समाम्नायो योगः सांख्यं मनीषिणाम् ॥ त्यागस्तपो दमः सत्यं समुद्रांता इवापगाः ॥ ३३ ॥ यत्त्वहं भवतीनां वै दूरे वर्ते प्रियो दृशाम् ॥ मनसः सन्निकर्षार्थं मदनुध्यानकाम्यया ॥ ३४ ॥ यथा दूरचरे प्रेष्ठे मन आविश्य वर्तते ॥ स्त्रीणां च न तथा चेतः सन्निकृष्टेऽक्षगोचरे ॥ ३५ ॥ मय्यावेश्य मनः कृत्स्नं विमुक्ताशेषवृत्ति यत् ॥ अनुस्मरंत्यो मां नित्यमचिरान्मामुपैष्यथ ॥ ३६ ॥ या मया क्रीडता रात्र्यां वनेऽस्मिन्व्रज आस्थिताः ॥ अलब्धरासाः कल्याण्यो माऽऽपुर्मद्वीर्यचिंतया ॥ ३७ ॥

दम इंद्रियदमनम् । मार्गभेदेऽप्येकत्र पर्यवसाने दृष्टांतः । समुद्रांता आपगा नद्य इवेति ॥ ३३ ॥ ननु किमन्यानिवास्मानात्मविद्यया प्रलोभयसि वयं तु सर्वसुंदरसकलगुणगणालंकृतेन त्वया विरहं नैव सहाम इति चेदत आह । यत्त्वहमिति । दृशां दूरे यद्वर्ते तन्मदनुध्यानार्थम् । तच्च ध्यानं मनसः सन्निकर्षार्थमिति ॥ ३४ ॥ एतदुपपादयति त्रयेण । यथा दूरचर इति ॥ ३५ ॥ ३६ ॥ उपैष्यथेति माधुर्यमात्रमिति चेदत आह । या इति । हे कल्याण्यः स्वभर्तृभिः प्रतिबद्धा या वने क्रीडता मया सहालब्धक्रीडास्तास्तदैव मामापुः प्रापुः ॥ ३७ ॥

करून नाहीं लावतोस कीं काय ? आह्मीं तर सर्वांमध्यें सुंदर व सर्वगुणसमुदायानें भूषित अशा तुझा विरह मुळींच सहन करीत नाहीं, असें ह्मणाल तर– तुह्मांला अत्यंत प्रिय असा मी, जो तुमच्या दृष्टीच्या दूर राहतों तो तुह्मांला वारंवार माझें चिंतन व्हावें व तुमचें मन माझ्येठिकाणींच लागून राहावें याकरितां राहतों ॥ ३४ ॥ जसें स्त्रियांचें व इतरहि स्नेह्यांचें मन, परदेशीं असलेल्या पति व मित्रवगैरेंचेठिकाणीं प्रविष्ट होऊन निश्चळ राहतें तसें जवळ (डोळ्यासमोर) असलेल्यांवर निश्चळ राहत नाहीं ॥ ३५ ॥ यास्तव तुह्मीं, सर्ववृत्तींचे व्यापार सुटलेलें आपलें जें मन असेल तें पूर्णपणें माझ्येठिकाणींच स्थिर करून माझेंच क्षणोक्षणीं चिंतन करा ह्मणजे लवकरच माझ्या स्वरूपाप्रत पावाल ॥ ३६ ॥ हें माझें सांगणें केवळ मधुर वाटण्यासारखें आहे असें समजूं नका. कारण, हे कल्याणीहो, ह्या वृंदावनामध्यें रात्रीच्या वेळीं क्रीडा करणाऱ्या माझ्याबरोबर ज्यांना रासक्रीडा घडली नाहीं त्या पतींनीं अटकावून ठेविल्यामुळें गोकुळांत राहिलेल्या गोपी, माझ्या लीलांचें चिंतन

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करूनच माझ्या स्वरूपाप्रत पावल्या आहेत. ह्मणून तुह्मीहि माझ्या चिंतनानेंच माझ्या स्वरूपाप्रत पावाल यांत संशय नाहीं ॥ ३७ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, याप्रमाणें श्रीकृष्णानें सांगितलेला निरोप ऐकून कृष्णलीलांचें स्मरण झालेल्या व तृप्त झालेल्या त्या गोपी, उद्धवाला ह्मणाल्या कीं, ॥ ३८ ॥ गोपी ह्मणाल्या– हे उद्धवा, यादवांना दुःख देणारा कृष्णाचा शत्रु कंस, आपल्या भ्रात्यांसहवर्तमान जो मरण पावला त्याच्यायोगानें आह्मांस मोठा आनंद झाला आणि पूर्वीप्रमाणें धनादिक सर्व संपत्ति प्राप्त झालेल्या वसुदेवादिक आप्तांसहवर्तमान श्रीकृष्ण आतां खुशाल आहे, हीहि गोष्ट मोठी आनंदाची झाली ॥ ३९ ॥ बरें, हे सौम्या उद्धवा, तुला असें विचारितों कीं, आमच्या पूर्वी स्नेहयुक्त व लज्जासहित हास्यानें व उदार अवलोकनानें सत्कार केलेला तो भगवान् श्रीकृष्ण, आमच्यावर करावयाची प्रीति, हल्लीं मथुरावासी स्त्रियांवर करीत आहे काय ? ॥ ४० ॥ दुसऱ्या ह्मणाल्या– अहो हें काय विचारितां ! रतिसुखाचे सर्वप्रकार जाणणारा, उत्तम स्त्रियांना आवडणारा आणि त्या उत्तमस्त्रियांनीं आ-

तस्य संदेशेनागता स्मृतिर्यासां ताः । प्रथमार्थे द्वितीया ॥ ३८ ॥ यदूनामहितः शत्रुः अघकृद्दुःखदः । दिष्ट्येत्यानंदे । आप्तैः प्राप्तैर्हितैर्वा सह ॥ ३९ ॥ अन्या ऊचुः । कच्चिदिति । नोऽस्माकं करणीयां प्रीतिं कच्चित्पुरयोषितां करोति । स्निग्धं च तत्सव्रीडहासेनोदारमीक्षणं तेनार्चितस्ताभिरस्माभिर्वा ॥ ४० ॥ अन्या ऊचुः । कथमिति । तासां वाक्यैर्विभ्रमै-

श्रीशुक उवाच ॥ एवं प्रियतमादिष्टमाकर्ण्य व्रजयोषितः ॥ ता ऊचुरुद्धवं प्रीतास्तत्संदेशागतस्मृतीः ॥ ३८ ॥ गोप्य ऊचुः ॥ दिष्ट्याऽहितो हतः कंसो यदूनां सानुगोऽघकृत् ॥ दिष्ट्याऽऽप्तैर्लब्धसर्वार्थैः कुशल्यास्तेऽच्युतोऽधुना ॥ ३९ ॥ कच्चिद्गदाग्रजः सौम्य करोति पुरयोषिताम् ॥ प्रीतिं नः स्निग्धसव्रीडहासोदारेक्षणार्चितः ॥ ४० ॥ कथं रतिविशेषज्ञः प्रियश्च वरयोषिताम् ॥ नानुबद्ध्येत तद्वाक्यैर्विभ्रमैश्चानुभाजितः ॥ ४१ ॥ अपि स्मरति नः साधो गोविंदः प्रस्तुते क्वचित् ॥ गोष्ठीमध्ये पुरस्त्रीणां ग्राम्याः स्वैरकथांतरे ॥ ४२ ॥ ताः किं निशाः स्मरति यासु तदा प्रियाभिर्वृंदावने कुमुदकुंदशशांकरम्ये ॥ रेमे क्वणच्चरणनूपुररासगोष्ठ्यामस्माभिरीडितमनोज्ञकथः कदाचित् ॥ ४३ ॥ अप्येष्यतीह दाशार्हस्तप्ताः स्वकृतया शुचा ॥ संजीवयन्नु नो गात्रैर्यथेंद्रो वनमंबुदैः ॥ ४४ ॥

श्चानुभाजितः पूजितः ॥ ४१ ॥ पुनरन्या ऊचुः । किमनया चिंतयाऽस्मान् क्वचित्प्रस्तुते प्रसंगे स्मरति किम् । ग्राम्या अविदग्धाः ॥ ४२ ॥ अन्या ऊचुः । ताः किमिति । कुमुदैः कुंदैः शशांकेन च रम्ये वृंदावने क्वणंति चरणनूपुराणि यस्यां तस्यां रासगोष्ठ्यामस्माभिः प्रियाभिरीडिता मनोज्ञाः कथा यस्य स तदा यासु निशासु रेमे ताः कदाचित्किं नु स्मरति वा न वेति ॥ ४३ ॥ स्वनिमित्तेन शोकेन तप्ता नोऽस्मान्गात्रैः करस्पर्शादिभिः संजीवयन्किं नु इहैष्यतीति ॥ ४४ ॥

पल्या भाषणांनीं व नानाप्रकारच्या विलासांनीं सत्कार केलेला तो श्रीकृष्ण, त्यांचेठिकाणीं कसा बरें आसक्त होणार नाहीं ? होईलच ॥ ४१ ॥ पुन्हां अन्य गोपी ह्मणाल्या– ह्या चिंतेनें आह्मांला काय करावयाचें आहे ! हे साधो, पुरवासी स्त्रियांच्या सभेंत यथेष्ट क्रीडा करण्याच्या गोष्टी निघाल्या ह्मणजे त्यांत तो श्रीकृष्ण, आह्मां भोळ्या गौळणींचें केव्हांतरी स्मरण करितो काय ? ॥ ४२ ॥ दुसऱ्या ह्मणाल्या– गोकुळांत असत्येवेळीं चंद्रविकासी कमळें, कुंदपुष्पें आणि चंद्र यांच्या योगानें रम्य अशा वृंदावनांत, चरणांतील नूपुरांचा नाद होत असलेल्या रासमभेमध्यें आह्मां स्त्रियांसहवर्तमान, भगवान् ज्या रात्रींमध्यें रममाण झाला आणि आह्मीं त्याच्या मनोहर कथांची स्तुति केली. त्या रात्रींचें तो कृष्ण आतां कदाचित् स्मरण करितो काय ? ॥ ४३ ॥ बरें, जसा इंद्र मेघांकडून वृष्टि करून शुष्क झालेल्या वनांचें संजीवन करितो त्याप्रमाणें आपल्या मुखहस्तादिक अवयवांच्या दर्शनस्पर्शनादिकेंकरून, आपल्या विरहाग्नीनें करपून गेलेल्या आमचें संजीवन करीत होत्साता ॥१४९॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तो श्रीकृष्ण आतां या गोकुळांमध्यें कधींतरी येईल काय ? ॥ ४४ ॥ दुसऱ्या ह्मणाल्या– कृष्ण येथें कशाकरितां येईल ? पूर्वीं निरुपाय असल्यामुळें तो येथें राहिला होता, आतां त्यानें राज्य मिळविलें; शत्रूंचा संहार केला. आतां तो राजांच्या कन्यांना वरून स्त्रियांनीं युक्त व पितापुत्र इत्यादिक सर्व सुहृदांनीं युक्त झाला ॥ ४५ ॥ तेव्हां कितीएक गोपी तर परमार्थ सांगत ह्मणाल्या कीं,– लक्ष्मीचा पति, पूर्णमनोरथ, व निरंतर पूर्णरूप अशा त्या महात्म्या भगवंताला अरण्यांत राहणाऱ्या आमच्या योगानें किंवा दुसऱ्या राजकन्यांच्या योगानें कोणता कार्यभाग साधून घ्यावयाचा आहे ? कोणताच नाहीं ॥ ४६ ॥ जारकर्म करणाऱ्या पिंगलानामक वेश्येनेंहि असें सांगितलें आहे कीं, आशा न धरणें हेंच परम सुख आहे व आशा धरणें हेंच परम दुःख आहे. पहा, ही गोष्ट आह्मी जाणत आहों तथापि आह्मांला त्या कृष्णा-

अन्या ऊचुः । कस्मादिति । अनन्यगतित्वेन पूर्वमत्रावसत्संप्रति महदैश्वर्यं प्राप्तः कस्मादिहागमिष्यतीति ॥ ४५ ॥ अन्यास्तु परमार्थमूचुः । किमस्माभिरिति । वनचरीभिरस्माभिरन्याभिर्वा राजकन्याभिर्महात्मनो धीरस्य किंच श्रीपतेः । तदपि आस्ताम् । स्वत एवाप्तकामस्यातएव कृतात्मनः पूर्णस्य किं कोऽप्यर्थः क्रियेत न कश्चिदिति

कस्मात्कृष्ण इहायाति प्राप्तराजो हताहितः ॥ नरेंद्रकन्या उद्वाह्य प्रीतः सर्वसुहृद्वृतः ॥ ४५ ॥ किमस्माभिर्वनौकोभिरन्याभिर्वा महात्मनः ॥ श्रीपतेराप्तकामस्य क्रियेतार्थः कृतात्मनः ॥ ४६ ॥ परं सौख्यं हि नैराश्यं स्वैरिण्यप्याह पिंगला ॥ तज्जानतीनां नः कृष्णे तथाऽप्याशा दुरत्यया ॥ ४७ ॥ क उत्सहेत संत्यक्तुमुत्तमश्लोकसंविदम् ॥ अनिच्छतोऽपि यस्य श्रीरंगान्न च्यवते क्वचित् ॥ ४८ ॥ सरिच्छैलवनोद्देशा गावो वेणुरवा इमे ॥ संकर्षणसहायेन कृष्णेनाचरिताः प्रभो ॥ ४९ ॥ पुनः पुनः स्मारयंति नंदगोपसुतं बत ॥ श्रीनिकेतैस्तत्पदकैर्विस्मर्तुं नैव शक्नुमः ॥ ५० ॥ गत्या ललितयोदारहासलीलाऽवलोकनैः ॥ माध्व्या गिरा हृतधियः कथं तं विस्मराम हे ॥ ५१ ॥ हे नाथ हे रमानाथ व्रजनाथार्तिनाशन ॥ मग्नमुद्धर गोविंद गोकुलं वृजिनार्णवात् ॥ ५२ ॥

॥ ४६ ॥ यतोऽघटमाना या कृष्णस्य संगतिः सैवास्मान्व्याकुलयत्यतो नैराश्यमेव परमं सुखं तच्चातिदुष्करमित्याहुः । परं सौख्यमिति । स्वैरिणी कामचारिणी ॥ ४७ ॥ संविदमेकांतवार्ताम् ॥ ४८ ॥ किंच तद्विस्मृतौ न तावद्दुःखमस्ति साऽपि नास्माकं संभवतीत्याहुः । सरिच्छैलेति त्रिभिः । आचरिताः सेविताः ॥ ४९ ॥ ५० ॥ हे उद्धव तं कथं विस्मरामेति ॥ ५१ ॥ ५२ ॥

विषयीं आशा अनिवार आहे ॥ ४७ ॥ याचें कारण, त्या उत्तमश्लोक भगवंताची एकांतीं झालेली वार्ता सोडून देण्याविषयीं कोण पुरुष समर्थ होईल ? कोणीच होणार नाहीं. पहा, तो भगवान् लक्ष्मीची इच्छा मुळींच करीत नसतांहि त्याच्या वक्षःस्थळरूप अंगापासून ती लक्ष्मी कधींहि एकीकडे होत नाहीं ॥ ४८ ॥ आणि कृष्णाची विस्मृति होईल तर आह्मांस दुःख होणार नाहीं परंतु ती विस्मृतीच होत नाहीं. कारण, हे प्रभो उद्धवा, बळरामासहित श्रीकृष्णानें सेवन केलेले व सौंदर्यसंपत्तीचीं आश्रयस्थानें अशा कृष्णाच्या चरणचिन्हांनीं चिन्हित झालेले हे– नद्या, पर्वत व वनप्रदेश, तशाच गाई व वेणुनाद, वारंवार आह्मांला त्या नंदकुमाराचें स्मरण करवितात ह्मणून त्या कृष्णास विसरण्यास आह्मी समर्थ होत नाहीं ॥ ४९ ॥ ५० ॥ श्रीकृष्णाची सुंदरगति, उदारहास्य, लीलासहित अवलोकन व मधुरवाणी, यांच्या योगानें आकर्षितबुद्धि झालेल्या त्या आह्मांला आतां त्याचा विसर कसा बरें पडेल ? मुळींच पडणार नाहीं ॥ ५१ ॥ असें बोलून भगवंताच्या विरहानें झालेलें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दुःख, भगवानच निवृत्त करण्यास समर्थ आहे असा निश्चय करून ह्मणाल्या कीं,–हे नाथा, हे रमानाथा, हे व्रजनाथा, हे दुःखनाशका, हे गोविंदा, दुःखसमुद्रांत निमग्न झाले-ल्या ह्या गोकुळाचा तूंच उद्धार कर ॥ ५२ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, नंतर त्यांना उद्धवानें पुन्हा पूर्वीं सांगितलेलेच श्रीकृष्णाचे निरोप सांगितले असतां, श्रीकृष्ण हा आपला आत्मा आहे असें जाणून, विरहानें झालेला संताप दूर झालेल्या त्या गोपींनीं, उद्धवाची गुरुबुद्धीनें पूजा केली ॥ ५३ ॥ नंतर तो उद्धव, गोपींचे शोक घालविण्याकरितां कितीएक महिने गोकुळांत राहिला होता. तोंपर्यंत त्यानें कृष्णाच्या लीलायुक्त कथांचें गायन करून सर्व गोकुळास रमविलें ॥ ५४ ॥ तो उद्धव, जितके दिवस नंदाच्या गोकुळांत राहिला होता तितके गोकुळवासी लोकांचे दिवस, श्रीकृष्णाच्या कथेनें क्षणप्राय होऊन गेले ॥ ५५ ॥ त्या भगवद्भक्त

श्रीकृष्णमधोक्षजं ज्ञात्वा तं च स्वात्मानं ज्ञात्वा ॥ ५३ ॥ विनुदन्नपनयन् ॥ ५४ ॥ ५५ ॥ सरिद्वनगिरिदर्यादिषु प्रत्येकं श्रीकृष्णं लीलासंप्रश्नादिभिः संस्मारयन्नेमे ॥ ५६ ॥ कृष्णावेशे नात्मनो मनसो विक्लवं वैक्लव्यम् । ता गोपीर्नमस्यन्नमस्करिष्यन् । उत्तमस्यात्मनो गोपस्त्रीनमस्कृतिरन्याय्या न भवतीति दर्शयितुं तासां महत्त्वं पंचभिर्जगौ उवाच

श्रीशुक उवाच ॥ ततस्ताः कृष्णसंदेशैर्व्यपेतविरहज्वराः ॥ उद्धवं पूजयांचक्रुर्ज्ञात्वाऽऽत्मानमधोक्षजम् ॥ ५३ ॥ उवास कतिचिन्मासान्गोपीनां विनुदन् शुचः ॥ कृष्णलीलाकथां गायन्नमयामास गोकुलम् ॥ ५४ ॥ यावंत्यहानि नंदस्य व्रजेऽवात्सीत्स उद्धवः ॥ व्रजौकसां क्षणप्रायाण्यासन्कृष्णस्य वार्तया ॥ ५५ ॥ सरिद्वनगिरिद्रोणीर्वीक्षन्कुसुमितान्द्रुमान् ॥ कृष्णं संस्मारयन्नेमे हरिदासो व्रजौकसाम् ॥५६॥ दृष्ट्वैवमादिगोपीनां कृष्णावेशात्मविक्लवम् ॥ उद्धवः परमप्रीतस्ता नमस्यन्निदं जगौ ॥ ५७ ॥ एताः परं तनुभृतो भुवि गोपवध्वो गोविंद एव निखिलात्मनि रूढभावाः ॥ वांछंति यद्भवभियो मुनयो वयं च किं ब्रह्मजन्मभिरनंतकथारसस्य ॥ ५८ ॥

॥ ५७ ॥ एता इति । एताः परं केवलं तनुभृतः सफलजन्मानः रूढभावाः परमप्रेमवत्यः । यदिति यं रूढं भावं भवभियो मुमुक्षवो मुनयो मुक्ता अपि वांछंति वयं च भक्ता अपि । अतोऽनंतस्य कथासु रसो रागो यस्य तस्य ब्रह्मजन्मभिर्विप्रसंबंधिभिः शौक्लसावित्रयाज्ञिकैस्त्रिभिर्जन्मभिः किं कोऽतिशयः । यत्र जातः स एव सर्वोत्तम इत्यर्थः । यद्वा अनंतकथासु रसो यस्य तस्य ब्रह्मजन्मभिश्चतुर्मुखजन्मभिरपि किमित्यर्थः ॥ ५८ ॥

उद्धवानें नद्या, वनें, पर्वत, पर्वताच्या गुहा व प्रफुल्लित झालेले वृक्ष पाहून, तेथें तेथें कृष्णलीलांच्या प्रश्नादिकेंकरून गोकुळवासी लोकांना कृष्णाचें स्मरण करवून आपणहि आनंदाचा अनुभव घेतला ॥ ५६ ॥ असो; पूर्वीं सांगितल्याप्रमाणें कृष्णाचेठिकाणीं मनाचा लय होत असल्यामुळें गोपींना प्राप्त झालेला विह्वळपणा पाहून परम संतुष्ट झालेला तो उद्धव, त्या गोपींना नमस्कार करित होत्साता त्यांचें महत्त्व असें गायन करूं लागला कीं,– ॥ ५७ ॥ अहो! या भूमीवर केवळ ह्या गोपींनींच आपल्या जन्माची सार्थकता करून घेतली आहे. कारण, ह्या गोपी, सर्वांत्म्या भगवान् श्रीकृष्णाचेठिकाणींच परम प्रेमयुक्त झाल्या आहेत; जें परमप्रेम, संसारापासून भिणारे मुमुक्षु, मुक्त व आह्मीं भक्तहि इच्छित आहों. कारण, भगवत्कथांचेठिकाणीं प्रीति असणाऱ्या प्राण्याला ब्राह्मण कुळांत उत्पन्न झाल्यानें, गायत्रीच्या उपदेशानें व यज्ञदीक्षा ग्रहण केल्यानें प्राप्त होणाऱ्या शौक्ल, सावित्र व याज्ञिक नांवाच्या तीनप्रकारच्याहि जन्मांनीं किंवा ब्रह्मदेवाच्या जन्मांनींतरी कोणता विशेष आहे? कोणताच ॥१९०॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नाहीं ह्मणजे कोणत्याहि जातीमध्यें झाला तरी भगवद्भक्तिमान्च श्रेष्ठ होय ॥ ५८ ॥ आणि ईश्वराचा प्रसाद होणें हेंच महत्त्वाचें कारण आहे आणि तो प्रसाद तरी, जाति आचार किंवा ज्ञान यांच्या योगानें होत नाहीं तर केवळ भजनानेंच होतो. पहा– जंगलांत फिरणाऱ्या व व्यभिचाराच्या दोषानें दूषित झालेल्या अशा ह्या गौळणी कोणीकडे ! आणि परमात्म्या कृष्णाचेठिकाणीं जडलेला हा निश्चळ प्रेमा कोणीकडे ! ! यावरून असें सिद्ध होतें कीं, जसें अमृत सेवन केलें असतां तें, आपलें सामर्थ्य न जाणणाऱ्या प्राण्यालाहि अमर करितें त्याप्रमाणें सर्व करण्यास समर्थ असा ईश्वरहि, आपलें निरंतर भजन करणाऱ्या अज्ञानी जनांचेंहि स्वतःच कल्याण करितो; ह्मणजे त्याला सर्वोत्कृष्ट फळ देतो ॥ ५९ ॥ आणि हा गोपींवर झालेला भगवंताचा प्रसाद तर अत्यंत अपूर्व आहे. कारण, रासक्रीडेमध्यें या कृष्णाच्या बाहुदंडांनीं कंठांचेठि-

किंच ईश्वरप्रसादो महत्त्वे कारणं तस्य च न जातिराचारो ज्ञानं वा कारणं किंतु केवलं भजनमेवेत्याह । क्वेमा इति । साक्षाद्भजतः पुंसः । ननु अहो उपयुक्तः सेवितः अगदराजोऽमृतं यथेति ॥ ५९ ॥ अत्यंतापूर्वश्चायं गोपीषु भगवतः प्रसाद इत्याह । नायमिति । अंगे वक्षसि उ अहो नितांतरतेरेकांतरतिमत्याः श्रियोऽपि नायं प्रसादोऽनुग्रहोऽस्ति । नलिनस्येव गंधो रुक्कांतिश्च यासां तासां स्वर्गांगनानामप्सरसामपि नास्ति । अन्याः पुनर्दूरतो निरस्ताः । रासोत्सवे कृष्णभुजदंडाभ्यां गृहीत आलिंगितः कंठस्तेन

क्वेमाः स्त्रियो वनचरीर्व्यभिचारदुष्टाः कृष्णे क्व चैष परमात्मनि रूढभावः ॥ नन्वीश्वरोऽनुभजतोऽविदुषोऽपि साक्षाच्छ्रेयस्तनोत्यगदराज इवोपयुक्तः ॥ ५९ ॥ नायं श्रियोऽग उ नितांतरतेः प्रसादः स्वर्योषितां नलिनगंधरुचां कुतोऽन्याः ॥ रासोत्सवेऽस्य भुजदंडगृहीतकंठलब्धाशिषां य उदगाद्व्रजबल्लवीनाम् ॥ ६० ॥ आसामहो चरणरेणुजुषामहं स्यां वृंदावने किमपि गुल्मलतौषधीनाम् ॥ या दुस्त्यजं स्वजनमार्यपथं च हित्वा भेजुर्मुकुंदवीं श्रुतिभिर्विमृग्याम् ॥ ६१ ॥ या वै श्रियाऽर्चितमजादिभिराप्तकामैर्योगेश्वरैरपि यदात्मनि रासगोष्ठ्याम् ॥ कृष्णस्य तद्भगवतश्चरणारविंदं न्यस्तं स्तनेषु विजहुः परिरभ्य तापम् ॥ ६२ ॥

लब्धा आशिषो याभिस्तासां गोपीनां य उदगादाविर्बभूव ॥ ६० ॥ किंच आस्तां तावद्गोपीनां भाग्यं मम त्वेतावत्प्रार्थ्यमित्याह । आसामिति । गोपीनां चरणरेणुभाजां गुल्मादीनां मध्ये यत्किमप्यहं स्यामित्याशंसा । कथंभूतानाम् । या इत्यादि । आर्याणां मार्गं धर्मं च हित्वा ॥ ६१ ॥ पुनस्ता एव विशिनष्टि । या वा इति । योगेश्वरैरप्यात्मन्येवार्जितं स्तनेषु न्यस्तं परिरभ्य तापं जहुरिति ॥ ६२ ॥

काणीं आलिंगन केल्यामुळें मनोरथ पूर्ण झालेल्या ह्या गोपींना जो हा भगवत्प्रसाद मिळाला आहे तो, कमळासारखा सुगंध व कांति असणाऱ्या उर्वश्यादिक अप्सरांना सुद्धां मिळाला नाहीं. अधिक तर काय परंतु, वक्षःस्थळाचेठिकाणीं अनन्यभावानें रमत असलेल्या लक्ष्मीलाहि प्राप्त झाला नाहीं. मग दुसऱ्या स्त्रिया, याला मिळविण्यास समर्थ नाहींत हें काय सांगावें ! ॥ ६० ॥ अहो त्या गोपींचें भाग्य तर राहूंद्या, परंतु माझी त्या प्रभूजवळ अशी प्रार्थना आहे कीं– ह्या गोपींचा चरणरेणु सेवन करणाऱ्या वृंदावनांतील झाडी, वेली व ओषधि ह्यांमधील एखादी तरी मी व्हावें. कारण, ज्या गोपींनीं, टाकण्यास कठीण असा आपला स्वजन व धर्ममार्ग टाकून देऊन, श्रुतींनींसुद्धां प्राप्त करून घेण्यास दुर्लभ असा कृष्णप्राप्तीचा मार्ग स्वीकारिला आहे, ह्मणजे भगवत्परायण झाल्या आहेत. आणि ज्यांनीं, लक्ष्मीनें पूजन केलेलें तसेंच ब्रह्मादि कांनीं व पूर्णमनोरथ असलेल्या योगेश्वरांनींहि आपल्या हृदयांमध्यें चिंतन केलेलें जें भगवंताचें चरणकमळ तें रासमेमध्यें आपल्या स्तनांवर धारण करून व

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याला आलिंगन करून आपला ताप निवृत्त करून घेतला आहे ॥ ६१ ॥ ६२ ॥ असो, आतां ज्या गोपींचें भगवत्कथासंबंधीं गायन, त्रैलोक्याला पवित्र करित आहे, त्या नंदगोकुळांतील स्त्रियांच्या चरणरेणूला मी वारंवार नमस्कार करितों ॥ ६३ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, नंतर तो उद्धव, गोपींचा, यशोदेचा, नंदाचा व गोपांचा निरोप घेऊन मथुरेंत जाण्याकरितां रथावर बसला ॥ ६४ ॥ तेव्हां तो जावयास निघाला असें जाणून, नंदादिक सर्व गोप, रामकृष्णांना अर्पण करावयाच्या नानाप्रकारच्या भेटी हातांत घेऊन मोठ्या प्रेमानें डोळ्यांतून अश्रू ढाळित होत्साते ह्मणाले कीं– ॥ ६५ ॥ उद्धवा, तूं आमचा कृष्णतत्त्वोपदेष्टा गुरु आहेस, ह्मणून तुझ्याजवळ आमची एवढीच प्रार्थना आहे कीं,– आमच्या मनाच्या वृत्ति, निरंतर श्रीकृष्णाच्या चरणकमळाचा आश्रय करणाऱ्या असोत; आमच्या वाणी, कृष्णाच्या

एवं महत्त्वं प्रतिपाद्य नमस्करोति । वंद इति ॥ ६३ ॥ अनुज्ञाप्यानुज्ञां याचित्वा । आमंत्र्य पृष्ट्वा ॥ ६४ ॥ ६५ ॥ नोऽस्माकं मनसो वृत्तयः कृष्णपादांबुजाश्रयाः स्युः ।

वंदे नंदव्रजस्त्रीणां पादरेणुमभीक्ष्णशः ॥ यासां हरिकथोद्गीतं पुनाति भुवनत्रयम् ॥ ६३ ॥ श्रीशुक उवाच ॥ अथ गोपीरनुज्ञाप्य यशोदां नंदमेव च ॥ गोपानामंत्र्य दाशार्हो यास्यन्नारुरुहे रथम् ॥ ६४ ॥ तं निर्गतं समासाद्य नानोपायनपाणयः ॥ नंदादयोऽनुरागेण प्रावोचन्नश्रुलोचनाः ॥ ६५ ॥ मनसो वृत्तयो नः स्युः कृष्णपादांबुजाश्रयाः ॥ वाचोऽभिधायिनीर्नाम्नां कायस्तत्प्रह्वणादिषु ॥ ६६ ॥ कर्मभिर्भ्राम्यमाणानां यत्र क्वापीश्वरेच्छया ॥ मंगलाचरितैर्दानै रतिर्नः कृष्ण ईश्वरे ॥ ६७ ॥ एवं सभाजितो गोपैः कृष्णभक्त्या नराधिप ॥ उद्धवः पुनरागच्छन्मथुरां कृष्णपालिताम् ॥ ६८ ॥ कृष्णाय प्रणिपत्याह भक्त्युद्रेकं व्रजौकसाम् ॥ वसुदेवाय रामाय राज्ञे चोपायनान्यदात् ॥ ६९ ॥ इति श्रीमद्भगवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे उद्धवप्रतियाने सप्तचत्वारिंशोऽध्यायः ॥ ४७ ॥ ॥

अभिधायिनीरभिधायिन्यः ॥ ६६ ॥ कृष्णे रतिः स्यादिति ॥ ६७ ॥ ६८ ॥ कृष्णादिभ्यो भक्त्युद्रेकमाह । उपायनानि चाददिति ॥ ६९ ॥ इति दशमस्कंधे पूर्वार्धे टीकायां सप्तचत्वारिंशोऽध्यायः ॥ ४७ ॥ ॥

नांवांचा उच्चार करणाऱ्या असोत; आणि आमचा देह, कृष्णाच्या नमस्कारादिक कर्मांमध्यें तत्पर असो ॥ ६६ ॥ आह्मी ईश्वराच्या इच्छेनें कर्मांच्या योगानें देवमनुष्यादिक कोणत्याहि योनींमध्यें भ्रमण करीत असलों तरी, आमच्या जन्मांतरीं व ह्या जन्मीं केलेल्या मंगलकारक कृत्यांच्या व दानाच्या योगानें आमची प्रीति कृष्णरूप ईश्वराचेठिकाणीं असो ॥ ६७ ॥ हे राजा, याप्रमाणें कृष्णाच्या भक्तीनें गोकुळवासी लोकांनीं पूजा केलेला तो उद्धव, पुन्हा श्रीकृष्णानें रक्षण केलेल्या त्या मथुरानगरीमध्यें परत आला ॥ ६८ ॥ नंतर श्रीकृष्णाला, वसुदेवाला, बळरामाला व उग्रसेन राजाला, यथायोग्य नमस्कार करून, त्यानें, त्यांना गोकुळवासी लोकांच्या भक्तीचा उद्रेक वर्णन केला व नंदादिकांनीं दिलेल्या सर्व भेटी अर्पण केल्या ॥ ६९ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील पूर्वार्धामध्यें भ्रमरगीतादिनिरूपणनामक हा सत्तेचाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ४७ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आर्तां ह्या अठ्ठेचाळिसाव्या अध्यायामध्यें, श्रीकृष्णानें कुब्जेबरोबर क्रीडा केली आणि अक्रूराच्या घरीं जाऊन त्याला हस्तिनापुरास पाठविलें अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला-हे राजा, नंतर सर्वात्मा व सर्वदर्शी अशा त्या भगवान् श्रीकृष्णानें, कामतप्त झालेल्या कुब्जेचा कामसंताप जाणून, तिचें प्रिय करण्याकरितां तिच्या घरीं गमन केलें ॥ १ ॥ तें तिचें घर-बहुत मोलाच्या पात्रादिकांनीं युक्त, कामशास्त्रांत सांगितलेल्या कामोद्दीपक पदार्थांनीं समृद्ध आणि मोत्यांच्या माळा ध्वज, चांदवे, शय्या, परांच्या गाद्या विकटिवलेलीं मोठमोठीं खुर्च्यावगैरे आसनें, अगुरुचे धूप, मणिमय दीप, फुलांच्या माळा व चंदनादिकांच्या उट्या यांनीं अलंकृत होतें ॥ २ ॥ घरीं येणाऱ्या त्या श्रीकृष्णाला पाहतांच गडबडून गेलेली ती कुब्जा, आसनावरून उठून, सख्यांसहवर्तमान यथायोग्य रीतिनें सामोरी जाऊन तिनें

अष्टचत्वारिंशकेऽथ कृष्णः कुब्जामरीरमत् ॥ अक्रूरस्य गृहं गत्वा तं गजाह्वयमादिशत् ॥ १ ॥ सैरंध्रीकाममापूर्य पूरयित्वा मनोरथान् ॥ अक्रूरस्य ततः कृष्णस्तेन पार्थानसांत्वयत् ॥ २ ॥ १ ॥ महार्हैरनर्घ्यैरुपस्करैर्गृहोपकरणैरन्वितम् । कामोपायैस्तदुद्दीपकैः सुरतबंधादिलेख्यैरुपबृंहितम् ॥ २ ॥ यथा यथोचितम् ॥ ३ ॥ ४ ॥ प्रसाधितो

श्रीशुक उवाच ॥ अथ विज्ञाय भगवान्सर्वात्मा सर्वदर्शनः ॥ सैरंध्र्याः कामतप्तायाः प्रियमिच्छन्गृहं ययौ ॥ १ ॥ महार्होपस्करैराढ्यं कामोपायोपबृंहितम् ॥ मुक्तादामपताकाभिर्वितानशयनासनैः ॥ धूपैः सुरभिभिर्दीपैः स्रग्गंधैरपि मंडितम् ॥ २ ॥ गृहं तमायांतमवेक्ष्य साऽऽसनात्सद्यः समुत्थाय हि जातसंभ्रमा ॥ यथोपसंगम्य सखीभिरच्युतं सभाजयामास सदासनादिभिः ॥ ३ ॥ तथोद्धवः साधुतयाऽभिपूजितो न्यषीददुर्व्यामभिमृश्य चासनम् ॥ कृष्णोऽपि तूर्णं शयनं महाधनं विवेश लोकाचरितान्यनुव्रतः ॥ ४ ॥ सा मज्जनालेपदुकूलभूषणस्रग्गंधतांबूलसुधासवादिभिः ॥ प्रसाधितात्मोपससार माधवं सव्रीडलीलोत्स्मितविभ्रमेक्षितैः ॥ ५ ॥ आहूय कांतां नवसंगमह्रिया विशंकितां कंकणभूषिते करे ॥ प्रगृह्य शय्यामधिवेश्य रामया रेमेऽनुलेपार्पणपुण्यलेशया ॥ ६ ॥

योग्यतामापादित आत्मा देहो यया सा । सव्रीडं यल्लीलयोद्गतं स्मितं तद्येषु विभ्रमेषु तद्युक्तैरीक्षितैरुपलक्षिता ॥ ५ ॥ अनुलेपार्पणादन्यत्तस्याः पुण्यं नास्तीति दर्शयितुं पुण्यलेशयेत्युक्तं न तु पुण्यस्याल्पत्वविवक्षया ॥ ६ ॥

श्रीकृष्णाची, उत्तमप्रकारचे आसन पाद्य इत्यादिक उपचार अर्पण करून पूजा केली ॥ ३ ॥ तसेंच उद्धवाचेंहि तिनें उत्तमप्रकारेंकरून पूजन केलें असतां, तो आसनाला स्पर्श करून भूमीवरच बसला. नंतर लोकरीतीला अनुसरणाऱ्या श्रीकृष्णानेंहि नव्या (ज्याच्यावर कोणीहि पूर्वी शयन केलेलें नाहीं अशा) बहुत मोलाच्या पर्यंकावर प्रवेश केला ॥ ४ ॥ तेव्हां ती कुब्जाहि स्नान करणें, अंगाला उट्या लावणें, उंची वस्त्रें परिधान करणें, भूषणें व माळा धारण करणें, तांबूल व अमृतासारख्या गोड मादकपदार्थांचें सेवन करणें इत्यादिकेंकरून भगवंताबरोबर रमण्यास आपल्या देहाची योग्यता संपादन करून, सलज्ज मंदहास्य व विलासयुक्त अवलोकन करीत श्रीकृष्णाजवळ प्राप्त झाली ॥ ५ ॥ कृष्णाच्या नूतन समागमविषयक लज्जेनें स्वतां जवळ येण्यास शंकायुक्त असलेल्या त्या कुब्जेला श्रीकृष्णानें, आपल्याजवळ बोलावून तिला कंकणांनीं भूषित अशा तिच्या हस्ताचेठिकाणीं धरून शय्येवर नेली आणि तिच्यासहवर्तमान क्रीडा केली; चंदनाची उटी अर्पण करण्याशिवाय जिचें दुसरें कांहींच पुण्य नव्हतें त्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कुब्जेचें केवढें हें भाग्य तें पहा!! ॥ ६ ॥ नंतर, अनंतशक्ति श्रीकृष्णाच्या चरणांचा वास्तव घेत्ये कीं काय अशा त्या कुब्जेनें, मदनानें तप्त झालेल्या आपल्या स्तन, वक्षःस्थळ व नेत्र यांचेठिकाणीं त्याच्या चरणाचें स्थापन करून, त्याच्या योगानें आपल्या स्तनादिकांची कामपीडा घालवून, स्तनांच्या मध्यभागीं प्राप्त झालेल्या त्या आनंदमूर्तीचें अतिप्रिय श्रीकृष्णाचें बाहूंनीं आलिंगन करून, आपला बहुत दिवसांचा ताप घालविला ॥ ७ ॥ अहो ! ती कुब्जा, याप्रमाणें उटीच्या अर्पणानेंच दुष्प्राप्य अशाहि त्या मोक्षाधिपति श्रीकृष्णाला पावोन भाग्यहीन अशी ती, त्याच्याजवळ अशी याचना करूं लागली कीं– ॥ ८ ॥ हे अतिप्रिया कमलनयना, तुझा संग सोडून देण्यास मी उत्साह पावत नाहीं. यास्तव तूं माझ्याबरोबर कांहीं दिवसपर्यंत रममाण हो व ह्या माझ्या घरींच रहा ॥ ९ ॥ याप्रमाणें याचना केलेला, भक्तांचा सन्मान करणारा तो सर्वेश्वर श्रीकृष्ण, तिला इच्छित वर देऊन कांहीं दिवसपर्यंत तिच्या घरीं राहून, वस्त्रभूषणादिकांच्या दानानें तिचा मनोरथ पूर्ण करून नंतर उद्धवासहवर्तमात सर्वसंपत्तीनीं समृद्ध

कुचादीनां रुजो मृजंती । जिघ्रंती च चरणम् ॥ ७ ॥ काममेव प्राकृतदृष्ट्या अयाचत । न च गोप्य इव सा तन्निष्ठेति दुर्भगेत्युक्तम् । कृतार्थत्वे तु तस्या न संदेहः ॥ ८ ॥

साऽनंगतप्तकुचयोरुरसस्तथाऽक्ष्णोर्जिघ्रंत्यनंतचरणेन रुजो मृजंती ॥ दोर्भ्यां स्तनांतरगतं परिरभ्य कांतमानंदमूर्तिमजहादतिदीर्घता-
पम् ॥ ७ ॥ सैवं कैवल्यनाथं तं प्राप्य दुष्प्रापमीश्वरम् ॥ अंगरागार्पणेनाहो दुर्भगेदमयाचत ॥ ८ ॥ आहोष्यतामिह प्रेष्ठ दि-
नानि कतिचिन्मया ॥ रमस्व नोत्सहे त्यक्तुं संगं तेंऽबुरुहेक्षण ॥ ९ ॥ तस्यै कामवरं दत्वा मानयित्वा च मानदः ॥ सहोद्धवेन
सर्वेशः स्वधामागमदर्चितम् ॥ १० ॥ दुराराध्यं समाराध्य विष्णुं सर्वेश्वरेश्वरम् ॥ यो वृणीते मनोग्राह्यमसत्त्वात्कुमनीष्यसौ
॥ ११ ॥ अक्रूरभवनं कृष्णः सहरामोद्धवः प्रभुः ॥ किंचिच्चिकीर्षयन्प्रागादक्रूरप्रियकाम्यया ॥ १२ ॥ स तान्नरवरश्रेष्ठानाराद्वीक्ष्य
स्वबांधवान् ॥ प्रत्युत्थाय प्रमुदितः परिष्वज्याभिनंद्य च ॥ १३ ॥ ननाम कृष्णं रामं च स तैरप्यभिवादितः ॥ पूजयामास विधि-
वत्कृतासनपरिग्रहान् ॥ १४ ॥ पादावनेजनीरापो धारयन् शिरसा नृप ॥ अर्हणेनांबरैर्दिव्यैर्गंधस्रग्भूषणोत्तमैः ॥ १५ ॥

॥ ९ ॥ काम एव वरस्तं दत्वा । मानयित्वा चालंकारादिदानैः ॥ १० ॥ मनोग्राह्यं विषयसुखम् । असत्त्वात्तुच्छत्वात् ॥ ११ ॥ किंचिच्चिकीर्षयन् हस्तिनापुरप्रस्थापनं कारयितुमिच्छन्नित्यर्थः । अक्रूरप्रियकाम्यया च ॥ १२ ॥ आराद्दूरादेव ॥ १३ ॥ १४ ॥ आ अप इति च्छेदः । अप आ सर्वतो धारयन्नित्यन्वय ॥ १५ ॥

अशा आपल्या घरीं निघून गेला ॥ १० ॥ त्या कुब्जेची तर काय कथा परंतु दुसराहि जो कोणी पुरुष, भक्तीवांचून हजारो उपायांनींहि आराधन करण्यास अशक्य व ब्रह्मादिकांचाहि ईश्वर अशा त्या सर्वेश्वर विष्णूचें आराधन करून, त्यापासून मिथ्याभूत व तुच्छ असें विषयसुख मागतो तो कुबुद्धीच समजला पाहिजे ॥ ११ ॥ नंतर एकेदिवशीं अक्रूराला हस्तिनापुरामध्यें पाठविण्याकरितां व अक्रूराचेंहि प्रिय करण्याकरितां तो प्रभु श्रीकृष्ण, बळराम व उद्धव यांसहवर्तमान अक्रूराच्या घरीं गेला ॥ १२ ॥ तेव्हां मनुष्यश्रेष्ठामध्येंहि श्रेष्ठ अशा त्या आलेल्या आपल्या बांधवरूपी रामकृष्णोद्धवांना दुरून पाहून, हर्षयुक्त झालेल्या त्या अक्रूरानें मोठ्या त्वरेनें उठून त्यांस आलिंगन केलें व त्यांच्या येण्याचें अभिनंदन करून त्या रामकृष्णोद्धवांना प्रणाम केला. नंतर त्या तिघांनीं हि उलट त्या अक्रूराला अभिवंदन केलें असतां, त्या अक्रूरानें, आसनावर बसविलेल्या त्यांची यथाविधि पूजा केली ॥ १३ ॥ १४ ॥ हे राजा, नंतर त्यांचे पाय धुतलेलीं उदकें, मस्तकीं धारण करणाऱ्या त्या अक्रूरानें त्यांचें अर्घ्यादिक

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

उपचार, दिव्य वस्त्रें, गंध, माळा व उत्तम भूषणें यांनीं पूजन करून व मस्तकानें नमस्कार करून मांडीवर घेतलेल्या त्यांच्या पायांचें शुश्रूषण करणारा व नम्रतेनें युक्त असा तो अक्रूर, कृष्णरामांना ह्मणाला कीं– ॥ १५ ॥ १६ ॥ तुम्हीं मल्लादिकांसहवर्तमान पापी कंस मारलात ही फार चांगली गोष्ट झाली. हें तुमचें कुळ, तुम्ही अपार दुःखांतून बाहेर काढलेंत म्हणून वृद्धिंगत झालें आहे ॥ १७ ॥ तुम्ही जगावे कारण व जगन्मय असे प्रकृतिपुरुषरूपी आहां. तुह्मावांचून दुसरें कारण किंवा कार्य कांहींच नाहीं ॥ १८ ॥ हे ब्रह्मस्वरूपा, आपल्या रजोगुणादिक शक्तींनीं, आपणच उत्पन्न केलेल्या या जगामध्यें तूं कारणत्वानें असल्यामुळें प्रविष्ट नसूनहि प्रवेश केल्यासारखा

॥ १६ ॥ वां युवयोरिदं कुलमुद्धृतं समेधितं च ॥ १७ ॥ वामिदं कुलमित्यादिव्यवहारदृष्ट्योक्त्वा परमार्थमाह । युवामिति । जगन्मयौ युवाम् । कुतः । जगद्धेतू । तदपि कुतः । प्रधानपुरुषौ तदात्मकौ । अतो भवद्भ्यां विना परं कारणमपरं कार्यं च नास्तीति ॥ १८ ॥ ननु प्रत्यक्षादिसिद्धं कथं नास्तीत्युच्यतेऽत आह । आत्मसृष्टमिति । हे ब्रह्मन्परमेश्वर । ब्रह्मेति वा पाठः । रजआदिस्वशक्तिभिरात्मनैव सृष्टमिदं विश्वमन्वाविश्य कारणत्वादननुप्रविष्टोऽप्यनुप्रविश्येव स्थितः श्रुतप्रत्यक्षगोचरं यथा भवति तथा बहुधा भवानेव प्रतीयते ॥ १९ ॥ एकस्यैव बहुधा प्रतीतिं सदृष्टांतामाह । यथा हीति । योनिषु स्वस्यैव रूपांतरेणाभिव्यक्तिस्थानेषु चराचरेषु यथा महीप्रमुखानि कारणान्येव नाना

अर्चित्वा शिरसाऽऽनम्य पादावंकगतौ मृजन् ॥ प्रश्रयावनतोऽक्रूरः कृष्णरामावभाषत ॥ १६ ॥ दिष्ट्या पापो हतः कंसः सानुगो
वामिदं कुलम् ॥ भवद्भ्यामुद्धृतं कृच्छ्राद्दुरंताच्च समेधितम् ॥ १७ ॥ युवां प्रधानपुरुषौ जगद्धेतू जगन्मयौ ॥ भवद्भ्यां न विना किं-
चित्परमस्ति न चापरम् ॥ १८ ॥ आत्मसृष्टमिदं विश्वमन्वाविश्य स्वशक्तिभिः ॥ ईयते बहुधा ब्रह्मन् श्रुतप्रत्यक्षगोचरम् ॥ १९ ॥
यथा हि भूतेषु चराचरेषु मह्यादयो योनिषु भांति नाना ॥ एवं भवान्केवल आत्मयोनिष्वात्माऽऽत्मतंत्रो बहुधा विभाति ॥ २० ॥
सृजस्यथो लुंपसि पासि विश्वं रजस्तमःसत्वगुणैः स्वशक्तिभिः ॥ न बद्ध्यसे तद्गुणकर्मभिर्वा ज्ञानात्मनस्ते क्व च बंधहेतुः ॥ २१ ॥ दे-
हाद्युपाधेरनिरूपितत्वाद्भवो न साक्षान्न भिदात्मनः स्यात् ॥ अतो न बंधस्तव नैव मोक्षः स्यातां निकामस्त्वयि नोऽविवेकः ॥ २२ ॥

भांति आत्मयोनिषु स्वकारणेषु भूतभौतिकेषु । जीवोऽपि नरमृगादिशरीरेषु बाल्युवाद्यवस्थासु च तथा तथा प्रतीयत इति तद्व्यवच्छेदार्थमात्मतंत्रग्रहणम् ॥ २० ॥ ननु सृष्ट्यादिकर्तृत्वेन च मम किं जीववद्बंध उक्तो नहि नहीत्याह । सृजसीति । तद्गुणकर्मभिर्वा तैर्गुणैः कर्मभिर्वेत्यर्थः । यतः क्व कदाचिदपि बंधहेतुरविद्या तव नैवास्ति । कुत इत्यत आह । ज्ञानात्मन इति मायाया आश्रयानावरकत्वादिति भावः ॥ २१ ॥ किंच आस्तां तावद्बंधशंका यतोऽविद्योपाधेर्जीवात्मनोऽपि न वस्तुतो बंधोऽस्तीत्याह । देहाद्युपाधेरिति । भवो जन्म तन्मूला भिदा च साक्षात्स्वरूपतो न स्यादिति । ननु मम बंधाभावं वदता त्वया किं मोक्षोऽङ्गीक्रियते ओमिति चेत्तर्हि बंधाभावे मोक्षासंभवा-

---

भासून, पाहाण्यांत व ऐकण्यांत येणाऱ्या पदार्थांच्या स्वरूपानें नानाप्रकारें भासत असतोस ॥ १९ ॥ जशीं पृथिव्यादिक कारणें, रूपांतरानें आपलींच प्रकट होण्याचीं स्थानें अशा चराचरप्राणिमात्रांमध्यें, कारणरूपानें पूर्वीं असूनहि नंतर प्रविष्ट झाल्यासारखीं होऊन कार्यरूपानें अनेकप्रकारें भासतात तसा एकच स्वतंत्र आत्मा तूं, आपण कारण असलेल्या सर्व भूतभौतिक कार्यांचेमध्यें त्या त्या स्वरूपानें भासतोस ॥ २० ॥ तूंच आपल्या शक्तिरूप रजःसत्वतमोगुणांनीं जगावे उत्पत्तिस्थितिसंहार करितोस तथापि त्या गुणांच्या व कर्मांच्या योगानें बद्ध होत नाहींस. कारण, ज्ञानरूपी तुझ्या बंधाला कारण होणारी अविद्या कोठें आहे ? मुळींच नाहीं ॥ २१ ॥ तुला बंधाची शंकासुद्धां नाहीं हें तर राहूंदेच परंतु अविद्योपाधिक जीवात्म्यालाहि वस्तुतः जन्म आणि जन्ममूलक भेद हे मुळींच नाहींत. कारण, देहादिक उपाधींचें कोणत्याहि तऱ्हेनें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

निरूपण करितां येत नाहीं. आतां बंध नाहीं असें म्हणणारा तूं, मोक्षाचा अंगीकार करितोस काय ? होय म्हणशील तर–बंधावाचून मोक्ष कसा ? तेव्हां बंध प्राप्त झालाच पाहिजे असें ह्मणशील तर–तुला अविद्या नसल्यामुळें बंध किंवा मोक्ष हे दोन्हीहि नाहींत. आतां उखळाचेठिकाणीं मला बांधलेला तूं ऐकिला आहेस व यमुनेच्या डोहांत मुक्त असलेला पाहिला आहेस तेव्हां बंधमोक्ष नाहींत हें कसें ? कसें ह्मणशील तर–आमच्या समजुतीनें तुला बंधमोक्ष आहेत असें वाटतें परंतु तें केवळ आमचें अज्ञानच आहे ॥ २२ ॥ तर माझे अवतार व चरित्रें हीं सर्व अज्ञानकल्पितच आहेत काय ? नाहीं नाहीं; ही तर तुझी लीला आहे. कारण, जगाच्या हिताकरितां तूं सांगितलेला जो हा पुरातन वेद-मार्ग, तो जेव्हां जेव्हां दुष्ट पाखंडमार्गांनीं बाधित होतो तेव्हां तेव्हां तूं आपला शुद्धसत्वात्मक अवतार धारण करितोस ॥ २३ ॥ हे प्रभो, तोच तूं आतां

दापन्नो बंधोऽपीत्याशंक्याह । अत इति । यतो नाविद्या अतो न बंधो मोक्षश्च । एवमुभौ न स्यातामित्यर्थः। ननु उलूखले मां बद्धं श्रुतवान्यमुनाह्रदे मुक्तं दृष्टवानस्यतः कथमुभयं नास्त्यत आह । निकाम इति । स्वाभिप्रायानुरूपस्त्वयि नोऽस्माकमविवेक एव परमेवंभूत इति । यद्वा नोऽविवेक एव तवोभौ स्यातामिति ॥ २२ ॥ ननु तर्हि ममावतारास्तच्चरित्राणि च शुक्तिरजतवदविद्याकल्पितान्येव किं नहि नहि इयं तु तव लीलेत्याह द्वयेन । त्वयोदित इति ॥ २३ ॥ सुरेतरांशा ये राजानस्तेषामक्षौहिणीशतानां

त्वयोदितोऽयं जगतो हिताय यदा यदा वेदपथः पुराणः ॥ बाध्येत पांखंडपथैरसद्भिस्तदा भवान्सत्वगुणं बिभर्ति ॥ २३ ॥ स त्वं प्रभोऽद्य वसुदेवगृहेऽवतीर्णः स्वांशेन भारमपनेतुमिहासि भूमेः ॥ अक्षौहिणीशतवधेन सुरेतरांशराज्ञाममुष्य च कुलस्य यशो वितन्वन् ॥ २४ ॥ अद्येश नो वसतयः खलु भूरिभागा यः सर्वदेवपितृभूतनृदेवमूर्तिः ॥ यत्पादशौचसलिलं त्रिजगत्पुनाति स त्वं जगद्गुरुरधोक्षज याः प्रविष्टः ॥ २५ ॥ कः पंडितस्त्वदपरं शरणं समीयाद्भक्तप्रियादृतगिरः सुहृदः कृतज्ञात् ॥ सर्वान्ददाति सुहृदो भजतोऽभिकामानात्मानमप्युपचयापचयौ न यस्य ॥ २६ ॥

वधेन भूमेर्भारमपनेतुं स्वांशेन रामेण सहावतीर्णोऽसि ॥ २४ ॥ अत एवंभूतस्य तवागमनेन कृतार्थोऽस्मीत्याह त्रयेण । अद्येति । हे ईशाद्य नो वसतयो गृहास्तपोवनादपि बहुपुण्याः । कुतः । या वसतीस्त्वं साक्षात्प्रविष्टः । कथंभूतः । यस्य तव पादसलिलमेव गंगा त्रिजगत्पुनाति यश्च त्वं पंचयज्ञदेवतामूर्तिः स त्वं जगद्गुरुरिति ॥ २५ ॥स्वमनोरथः परिपूरित इति तुष्यन्नाह । कः पंडित इति । ऋतगिरः सत्यवाचः । त्वत्तो परं शरणं कः समीयाद्गच्छेत् यतो भवान् भजतः सर्वानभितः कामांश्च ददात्यात्मानमपीति ॥ २६ ॥

दैत्यांचे अंशभूत अशा कंसादिक राजांच्या शेंकडो अक्षौहिणी सैन्याच्या वधानें भूमीचा भार दूर करण्याकरितां व या यादवकुळाच्या यशाचा विस्तार करण्याकरितां या भूलोकीं वसुदेवाच्या घरामध्यें आपल्या अंशभूत बळरामावहवर्तमान अवतीर्ण झाला आहेस ॥ २४ ॥ हे अधोक्षजा ईश्वरा, जो तूं पंचमहायज्ञाच्या देवता, पितर, भूतें व राजे ह्या रूपांनीं बनला आहेस व ज्याच्या चरणाचें क्षालनोदक (गंगा) त्रैलोक्याला पवित्र करितें तो जगद्गुरु तूं, ज्यांमध्यें प्रविष्ट झाला आहेस तीं आमचीं घरें आज तपोवनापेक्षांहि मोठीं भाग्यवंत आहेत, ह्मणजे अत्यंत पवित्र झालीं आहेत ॥ २५ ॥ आतां आपला मनोरथ पूर्ण झाला असा संतोष मानीत ह्मणतो कीं, हे प्रभो, भक्तप्रिय, सत्यवक्ता, सर्वांचा हितकर्ता व भक्तांनीं केलेली भक्ति जाणणारा, अशा तुजवांचून दुसऱ्याला कोण बुद्धिमान् पुरुष शरण जाईल ? कोणीच जाणार नाहीं. कारण, तूं भक्ति करणाऱ्या भक्ताला त्यानें इच्छिलेले सर्वहि पुरुषार्थ देतोस. अधिक तर काय परंतु तूं आपणालाहि त्याच्या स्वाधीन करितोस. असें करण्याचें ॥१५३॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वें कारण, ज्या तुला उत्कर्ष किंवा अपकर्ष हे मुळींच नाहींत ॥ २६ ॥ हे जनार्दना, सनकादिक योगेश्वरांना व इंद्रादिक देवेश्वरांनाहि ज्याच्या स्वरूपाचें ज्ञान दुर्लभ
आहे तो तूं, आज येथें अविवेकी अशा आमच्या घरीं प्रत्यक्ष प्राप्त झाला आहेस, तेणेंकरून मला मोठा आनंद झाला. आतां पुत्र, स्त्री, धन, मातापितर, घर व देह
इत्यादिकांवर मला असलेली ही मोहपाशरूप तुझी माया तूं लवकर नाहींशी कर ॥ २७ ॥ याप्रकारें भक्त अक्रूरानें पूजा केलेला व स्तुति केलेला तो भगवान् श्रीकृष्ण,
मंदहास्य करून भाषणांनीं अक्रूराला मोह उत्पन्न करितच कीं काय ह्मणाला कीं,–॥ २८ ॥ श्रीभगवान् ह्मणाला– तूं आमचा निरंतर हित करणारा व काका अस-
ल्यामुळें आह्मांस प्रशंसा करण्यास योग्य आहेस. आह्मीं तर– तुमचीं मुलें असल्यामुळें तुह्मांस शत्रूवगैरेंपासून रक्षण करण्यास, पोषण करण्यास व दया करण्यास

नोऽविवेकिनाम् । तत्रापीह गृह एव ॥ २७॥ २८ ॥ वो युष्माकं प्रजाः पुत्रा हि वयमिति ॥ २९ ॥ ननु नृभिर्देवाः सेव्या इति प्रसिद्धं तत्राह । देवा इति । स्वार्थाः स्वकार्यसाधन-
पराः । साधवस्तु केवलं परानुग्रहपराः । परमार्थतस्तु साधव एव देवा इति । त एव सेव्या इत्यर्थः ॥ ३० ॥ तर्हि मृच्छिलादिमयाः किं देवादयो नैवेत्यत आह । न हीति ।

दिष्ट्या जनार्दन भवानिह नः प्रतीतो योगेश्वरैरपि दुरापगतिः सुरेशैः ॥ छिंध्याशु नः सुतकलत्रधनाप्तगेहदेहादिमोहरशना भवदी-
यमायाम् ॥ २७ ॥ इत्यर्चितः संस्तुतश्च भक्तेन भगवान्हरिः ॥ अक्रूरं सस्मितं प्राह गीर्भिः संमोहयन्निव ॥ २८ ॥ श्रीभगवानुवाच ॥
त्वं नो गुरुः पितृव्यश्च श्लाघ्यो बंधुश्च नित्यदा ॥ वयं तु रक्ष्याः पोष्याश्च अनुकंप्याः प्रजा हि वः ॥ २९ ॥ भवद्विधा
महाभागा निषेव्या अर्हसत्तमाः ॥ श्रेयस्कामैर्नृभिर्नित्यं देवाः स्वार्था न साधवः ॥ ३० ॥ न ह्यम्मयानि तीर्थानि न देवा
मृच्छिलामयाः ॥ ते पुनंत्युरुकालेन दर्शनादेव साधवः ॥ ३१ ॥ स भवान्सुहृदां वै नः श्रेयान् श्रेयश्चिकीर्षया ॥
जिज्ञासार्थं पांडवानां गच्छस्व त्वं गजाह्वयम् ॥ ३२ ॥

अम्मयानि तीर्थानि मृन्मयाः शिलामयाश्च देवा न भवंतीति न अपितु भवंत्येव । तथाऽपि साधूनां तेषां च महदंतरमित्याह । ते पुनंतीति ॥ ३१ ॥ किंचिच्चिकीर्षन्प्रागा-
दिति यदुक्तं तत्कार्यमादिशति । स इति । नः सुहृदां मध्ये भवान् श्रेष्ठोऽतः पांडवानां श्रेयश्चिकीर्षया गजाह्वयं गच्छस्व गच्छेति । यद्वा स्वेति पृथक्पदम् ।
हे स्व आत्मीयेत्यर्थः ॥ ३२॥

योग्य आहों ॥ २९ ॥ तुह्मांसारखे महाभाग्यवंत जे अतिउत्तम पुरुष आहेत तेच कल्याणाची इच्छा करणाऱ्या मनुष्यांनीं सेवन करण्यास योग्य आहेत. आतां
मनुष्यांनीं देवांचीच सेवा करण्याचें प्रसिद्ध आहे, असें ह्मणाल तर–देव स्वार्थपर आहेत तसे साधु नाहींत. साधुतर केवळ दुसऱ्यांवर अनुग्रह करणारे आहेत परमार्थदृ-
ष्टीनें पाहूं गेलें असतां, साधू हेच देव असल्यामुळें त्यांचीच सेवा करावी ॥ ३० ॥ तर पाषाणादिकांनीं निर्माण केलेले काय देवच नव्हेत ? असें ह्मणशील तर– उदक-
मय तीर्थें हीं तीर्थें व मृत्तिकापाषाणमय देव हे देव नव्हेत असें नाहीं, तर तीं तीर्थें व ते देव आहेत खरे परंतु त्यांच्या व साधूंच्या मध्यें पुष्कळ फरक आहे. तीं
तीर्थें व ते देव, पुष्कळ काळपर्यंत सेवा केली असतां पवित्र करितात आणि साधुलोक दर्शनमात्रेंकरूनच पवित्र करितात ॥ ३१ ॥ तो तशाप्रकारचा साधु व आमच्या
सर्वहि सुहृदांमध्यें श्रेष्ठ असा तूं आहेस; यास्तव पांडवांचें कल्याण करण्याच्या इच्छेनें त्यांचा वृत्तांत जाणण्याकरितां हस्तिनापुरांत जाऊन ये ॥ ३२ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पिता (पंडुराजा) मरण पावला असतां ते युधिष्ठिरादिक बाळक, राजा धृतराष्ट्रानें आपल्या हस्तिनापुरांमध्यें आणिलेले असून ते तेथें आपल्या कुंतीमातेसहवर्तमान अतिदुःखानें राहत आहेत असें आह्मीं ऐकिलें आहे ॥ ३३ ॥ कारण, तो धृतराष्ट्र आंधळा, कृपणबुद्धि आणि आपल्या दुर्योधनादिक कुपुत्रांच्या स्वाधीन असल्यामुळें त्या पांडवांचेठिकाणीं आपल्या मुलांसारखी खरोखर वर्तणूक ठेवीत नाहीं ॥ ३४ ॥ ह्मणून तूं हस्तिनापुरामध्यें जाऊन सांप्रतकाळीं त्या धृतराष्ट्राचें पांडवांचेठिकाणीं वर्तन चांगल्या रीतीचें किंवा वाईटरीतीचें आहे तें जाणून ये, ह्मणजे तें समजल्यावर जसें त्या सुहृदांना सुख होईल तसें करितां येईल ॥ ३५ ॥ याप्रमाणें तो भगवान् ईश्वर श्रीकृष्ण, अक्रूराला आज्ञा करून, नंतर उद्धव आणि बळराम यांसहवर्तमान आपल्या घरीं प्रविष्ट झाला ॥ ३६ ॥ ~~याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक~~

राज्ञा धृतराष्ट्रेण । वसंते निवसंति । शुश्रुम श्रुतवंतो वयम् ॥ ३३ ॥ दुष्टा ये स्वपुत्रा दुर्योधनादयस्तद्वशेन गच्छतीति तथा । यतोऽधदृगंधनेत्रः ॥ ३४ ॥ ३५ ॥ ३६ ॥ इति श्रीमद्भागवते दशमे पूर्वार्धे टीकायामष्टचत्वारिंशोऽध्यायः ॥ ४८ ॥ ॥ ऊनपंचाशत्तमे तु गत्वाऽक्रूरो जगाह्वयम् ॥ राज्ञः स्वभ्रातृपुत्रेषु बुद्धा वैषम्यमागमत् ॥ १ ॥

पितर्युपरते बालाः सह मात्रा सुदुःखिताः ॥ आनीताः स्वपुरं राज्ञा वसंत इति शुश्रुम ॥ ३३ ॥ तेषु राजाऽंबिकापुत्रो भ्रातृपुत्रेषु दीनधीः ॥ समो न वर्तते नूनं दुष्पुत्रवशगोंऽधदृक् ॥ ३४ ॥ गच्छ जानीहि तद्वृत्तमधुना साध्वसाधु वा ॥ विज्ञाय तद्विधास्यामो यथा शं सुहृदां भवेत् ॥ ३५ ॥ इत्यक्रूरं समादिश्य भगवान्हरिरीश्वरः ॥ संकर्षणोद्धवाभ्यां वै ततः स्वभवनं ययौ ॥ ३६ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे अष्टचत्वारिंशोऽध्यायः ॥ ४८ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ स गत्वा हास्तिनपुरं पौरवेंद्रयशोंऽकितम् ॥ ददर्श तत्रांबिकेयं सभीष्मं विदुरं पृथाम् ॥ १ ॥ सहपुत्रं च बाल्हीकं भारद्वाजं सगौतमम् ॥ कर्णं सुयोधनं द्रौणिं पांडवान्सुहृदोऽपरान् ॥ २ ॥ यथावदुपसंगम्य बंधुभिर्गांदिनीसुतः ॥ संपृष्टस्तैः सुहृद्वार्तां स्वयं चापृच्छदव्ययम् ॥ ३ ॥ उवास कतिचिन्मासान्राज्ञो वृत्तविवित्सया ॥ दुष्प्रजस्याल्पसारस्य खलच्छंदानुवर्तिनः ॥ ४ ॥

पौरवेंद्राणां यशोभिस्तत्कृतदेवब्राह्मणायतनादिभिरंकितम् ॥ १ ॥ बाल्हीकपुत्रः सोमदत्तः । भारद्वाजो द्रोणः । गौतमः कृपः ॥ २ ॥ अव्ययं कुशलम् ॥ ३ ॥ दुष्प्रजस्यासत्पुत्रस्याल्पसारस्य मंदधृतेः खलानां कर्णादीनां छंदमिच्छामनुवर्तितुं शीलं यस्येति तथा तस्य ॥ ४ ॥

~~महापुराणाच्या दशमस्कंधांतील पूर्वार्धामध्यें कुब्जानुग्रहादिनिरूपणनामक हा अठ्ठेचाळिसावा अध्याय समाप्त झाला~~ ॥ ४८ ॥ ॥ ~~श्रीकृष्णार्पणमस्तु~~ ॥ ॥ ~~आतां, ह्या एकुणपन्नासाव्या अध्यायामध्यें, अक्रूर हस्तिनापुरांत जाऊन राजा धृतराष्ट्राची आपल्या भावाच्या (पंडूच्या) पुत्रांवर विषमबुद्धि आहे असें पाहून पुन्हां मथुरेंत परत आला, अशी कथा वर्णन केलेली आहे~~ ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, नंतर तो अक्रूर ~~कुरुकुळांत श्रेष्ठ असलेल्या राजांच्या यशांनीं ह्मणजे त्यांनीं बांधविलेल्या देवांच्या व ब्राह्मणांच्या गृहादिकांनीं चिन्हित असा~~ त्या हस्तिनापुरांत जाऊन, तेथें धृतराष्ट्र, भीष्माचार्य, विदुर व कुंती यांस भेटला ॥ १ ॥ तसाच बाल्हीक, सोमदत्त, द्रोणाचार्य, कृपाचार्य, कर्ण, दुर्योधन, अश्वत्थामा, पांडव व दुसऱ्याहि सुहृदांना यथायोग्य रीतीनें भेटून त्या बंधूंनीं त्याला बंधूंचा (यादवांचा) कुशलप्रश्न केला असतां, त्यानें स्वतांहि त्यांना आरोग्यप्रश्न केला ॥ २ ॥ ३ ॥ नंतर त्या हस्तिनापुरामध्यें तो अक्रूर, धृतराष्ट्राचें वर्तन जाणण्याच्या इच्छेनें कांहीं मास

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पर्यंत राहिला. कारण, तो धृतराष्ट्र- दुष्टपुत्रानें युक्त, अल्पधिरी व कर्णादिक खळांच्या इच्छेप्रमाणें वागणारा होता ॥४॥ अक्रूर तेथें फार दिवस राहिल्यामुळें पांडवांचें शत्रु जिंकण्याचें सामर्थ्य, इंद्रियशक्ति, शारीर बळ, शूरपणा व नम्रतावगैरे असलेल्या उत्तमगुणांचें व त्यांवर असलेल्या प्रजाजनांच्या प्रेमाचें सहन न करणाऱ्या दुर्योधनादिकांनीं विषप्रयोगादिक दुष्ट कर्म केलें होतें व जें त्यांच्या मनांत पांडवांना लाखेच्या घरांत घालून मारावयाचें होतें तें सर्वहि या अक्रूराला कुंतीनें व विदुरानें स्पष्टपणें सांगितलें ॥ ५ ॥ ६ ॥ तें सांगण्याच्या पूर्वींचा कुंतीचा वृत्तांत असा कीं,- कुंतीनें आपला भाऊ अक्रूर आला आहे असें ऐकून त्याच्याजवळ जाऊन ती आपल्या जन्मभूमीचें स्मरण करीत होत्साती नेत्रांमध्यें दुःखाश्रु आणून असें ह्मणाली कीं,- ॥ ७ ॥ हे सौम्या अक्रूरा, माझी- माता, पिता, भाऊ, बहिणी, भावांचे

तेजः प्रभावः । ओजः शस्त्रादिनैपुणम् । वीर्यं शौर्यम् । नसहद्भिरसहमानैः । चिकीर्षितमित उपरि कर्तुमिष्टम् ॥ ५ ॥ गरस्य विषस्य दानादि । अपेशलमन्याय्यम् । तेज ओज इत्यादि सर्वं कथयामास ॥ ६ ॥ तत्कथनात्पूर्वतरं पृथाया वृत्तमाह । पृथा त्विति । अश्रूणां कला लेशा ययोस्ते ईक्षणे यस्याः सा ॥ ७ ॥ अपि किम् । जामयः कुल-

तेज ओजो बलं वीर्यं प्रश्रयादींश्च सद्गुणान् ॥ प्रजानुरागं पार्थेषु नसहद्भिश्चिकीर्षितम् ॥ ५ ॥ कृतं च धार्तराष्ट्रैर्यद्गरदानाद्यपेशलम् ॥ आचख्यौ सर्वमेवास्मै पृथा विदुर एव च ॥ ६ ॥ पृथा तु भ्रातरं प्राप्तमक्रूरमुपसृत्य तम् ॥ उवाच जन्मनिलयं स्मरंत्यश्रुकलेक्षणा ॥ ७ ॥ अपि स्मरंति नः सौम्य पितरौ भ्रातरश्च मे ॥ भगिन्यो भ्रातृपुत्राश्च जामयः सख्य एव च ॥ ८ ॥ भ्रात्रेयो भगवान्कृष्णः शरण्यो भक्तवत्सलः ॥ पैतृष्वस्रेयान्स्मरति रामश्चांबुरुहेक्षणः ॥ ९ ॥ सपत्नमध्ये शोचंतीं वृकाणां हरिणीमिव ॥ सांत्वयिष्यति मां वाक्यैः पितृहीनांश्च बालकान् ॥ १० ॥ कृष्ण कृष्ण महायोगिन्विश्वात्मन्विश्वभावन ॥ प्रपन्नां पाहि गोविंद शिशुभिश्चावसीदतीम् ॥ ११ ॥ नान्यत्तव पदांभोजात्पश्यामि शरणं नृणाम् ॥ बिभ्यतां मृत्युसंसारादीश्वरस्यापवर्गिकात् ॥ १२ ॥ नमः कृष्णाय शुद्धाय ब्रह्मणे परमात्मने ॥ योगेश्वराय योगाय त्वामहं शरणं गता ॥ १३ ॥

स्त्रियः ॥ ८ ॥ पैतृष्वस्रेयान्मत्पुत्रान् ॥ ९ ॥ शोचंतीं मां वाक्यैः सांत्वयिष्यति किम् ॥ १० ॥ हे महायोगिन्महान्योग उपायो मायाख्योऽस्यास्तीति । हे विश्वात्मन् सर्वांतर्यामिन् । हे विश्वभावन विश्वपालक । प्रपन्नां शरणागताम् । अवसीदतीं क्लिश्यंतीम् ॥ ११ ॥ आपवर्गिकात् मोक्षप्रदात् ॥ १२ ॥ शुद्धाय धर्मात्मने । ब्रह्मणेऽपरिच्छिन्नाय । परमात्मने जीवसखाय । योगेश्वरायाणिमादियुक्ताय । योगाय ज्ञानात्मने ॥ १३ ॥

पुत्र, कुळांतील स्त्रिया व मैत्रिणी हीं सर्व माझें स्मरण करितात काय ? ॥ ८ ॥ तसाच भक्तांवर दया करणारा व शरण जाण्यास योग्य असा माझ्या भावाचा मुलगा भगवान् श्रीकृष्ण व कमळनेत्र बळराम, हे उभयतां आपल्या आतेचे पुत्र असलेल्या धर्मादिकांचें स्मरण करितात काय ? ॥ ९ ॥ मी तर- जशी लांडग्यांमध्यें हरिणी सांपडून शोकाक्रांत होत्ये त्याप्रमाणें या शत्रूंमध्यें सांपडून शोक करीत आहें; यास्तव तो श्रीकृष्ण माझें व या पितृहीन झालेल्या बालकांचें सांत्वन करील काय ? ॥ १० ॥ याप्रमाणें अक्रूराप्रत बोलून, प्रेमवेगानें भगवान् आपल्याजवळच आला आहे असें मानून त्याची प्रार्थना करित्ये कीं,- हे कृष्णा, हे कृष्णा, हे महायोगिन्, हे जगदात्म्या, हे जगत्पालका, हे गोविंदा, बालकांसहवर्तमान क्लेश पावणाऱ्या व तुला शरण आलेल्या माझें तूं रक्षण कर ॥ ११ ॥ हे प्रभो, मृत्युसंसारापासून भिणाऱ्या प्राण्यांना मोक्षप्रद असा तुज ईश्वराच्या चरणकमळाहून दुसरें रक्षण करणारें कोणीहि मी पाहत नाहीं ॥ १२ ॥ यास्तव धर्ममूर्ति, अप-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रिच्छिद्रूपी जीवांचा सखा, अणिमादि संपत्तियुक्त व ज्ञानात्मा अशा तुज कृष्णाला नमस्कार करीत मी शरण आल्यें आहें ॥ १३ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, याप्रमाणें स्वजनांचें व जगदीश्वरकृष्णाचें स्मरण करून त्याच्या वियोगादिकेंकरून दुःखित झालेली ती तुमची पणजी कुंती, शेवटीं रुदन करूं लागली ॥ १४ ॥ तेव्हां त्या कुंतीसारखेंच ज्याचें दुःख व सुख आहे असा अक्रूर व महायशस्वी विदुर ह्या उभयतांनीं, तुझे व माद्रीचे हे पुत्र– धर्म, वायु, इंद्र व अश्विनीकुमार यांपासून झालेले असून महापराक्रमी आहेत यास्तव तूं खेद मुळींच करूं नयेस. असें सांगून त्या कुंतीचें सांत्वन केलें ॥ १५ ॥ नंतर त्या अक्रूरानें मथुरेंत जातेवेळीं, भीष्मादिक बंधूंच्या मध्यें सभेंत बसलेल्या व आपल्या पुत्रांवर आसक्त असून पांडवांचेठिकाणीं विषमबुद्धि धारण करणाऱ्या त्या धृतराष्ट्र राजाजवळ जाऊन, त्याला कृष्णरामादिक बंधूंनीं जें प्रेमानें सांगितलें होतें तें सांगितलें ॥ १६ ॥ अक्रूर ह्मणाला– हे कौरवांची कीर्ति वाढविणाऱ्या विचित्रवीर्यनंदना, धृतराष्ट्रा, तूं पंडुराजा (भाऊ) मरण पाव-

प्रपितामही प्रपितामहः पांडुस्तस्य भार्या रुरोद ॥ १४ ॥ पृथया सह समं दुःखं सुखं च यस्य सः । तस्याः पुत्राणामुत्पत्तिहेतुभिर्जनकैर्धर्मानिलेंद्रादिभिस्तत्कथनैरित्यर्थः ॥ १५ ॥ बंधुभिः रामकृष्णादिभिः । सौहृदेनोदितमुक्तं यत्तदवददिति ॥ १६ ॥ भ्रातर्युपरत इति । पांडोः पुत्रेषु सत्सु राजासनं त्वमास्थित इति कटाक्षः ॥ १७ ॥ भवतु

श्रीशुक उवाच ॥ इत्यनुस्मृत्य स्वजनं कृष्णं च जगदीश्वरम् ॥ प्रारुदद्दुःखिता राजन् भवतां प्रपितामही ॥ १४ ॥ समदुःखसुखोऽक्रूरो विदुरश्च महायशाः ॥ सांत्वयामासतुः कुंतीं तत्पुत्रोत्पत्तिहेतुभिः ॥ १५ ॥ यास्यन्राजानमभ्येत्य विषमं पुत्रलालसम् ॥ अवदत्सुहृदां मध्ये बंधुभिः सौहृदोदितम् ॥ १६ ॥ अक्रूर उवाच ॥ भो भो वैचित्रवीर्य त्वं कुरूणां कीर्तिवर्धन ॥ भ्रातर्युपरते पांडावधुनाऽऽसनमास्थितः ॥ १७ ॥ धर्मेण पालयन्नुर्वीं प्रजाः शीलेन रंजयन् ॥ वर्तमानः समः स्वेषु श्रेयः कीर्तिमवाप्स्यसि ॥ १८ ॥ अन्यथा त्वाचरँल्लोके गर्हितो यास्यसे तमः ॥ तस्मात्समत्वे वर्तस्व पांडवेष्वात्मजेषु च ॥ १९ ॥ नेह चात्यंतसंवासः कर्हिचित्केनचित्सह ॥ राजन्स्वेनापि देहेन किमु जायात्मजादिभिः ॥ २० ॥ एकः प्रसूयते जंतुरेक एव प्रलीयते ॥ एकोऽनुभुंक्ते सुकृतमेक एव च दुष्कृतम् ॥ २१ ॥

तथाप्येवं वर्तमानः श्रेयोऽवाप्स्यसीत्याह । धर्मेणेति ॥ १८ ॥ तमो नरकमिहैव महद्दुःखमिति भावः ॥ १९ ॥ नन्वात्मजानात्मजादिषु कथं समत्वं स्यात्तत्राह । नेह चेति । अत्यंतं नित्यं संवासः सम्यक् स्थितिः ॥ २० ॥ तत्र तावदुत्पत्तिमरणयोः सुखदुःखयोश्च केनापि साहित्यं नास्तीत्याह । एक इति ॥ २१ ॥

ला ह्मणून त्याचे पुत्र असतांहि आतां ह्या सिंहासनावर बसला आहेस ॥ १७ ॥ तो तूं, धर्मानें पृथिवीचें पालन करीत, व आपल्या सुस्वभावानें प्रजांना रमवीत पंडूचे पुत्र व आपले पुत्र यांचेठिकाणीं समत्वानें वर्तणूक ठेवशील तर कल्याण व कीर्ति पावशील ॥ १८ ॥ नाहींतर (याच्या विपरीत आचरण करशील तर) यालोकीं लोक तुझी निंदा करतील, परलोकीं नरकास जाशील ह्मणून तूं पांडव व आपले पुत्र यांच्याविषयीं सारखें वर्तन ठेव ॥ १९ ॥ आतां आपले पुत्र व दुसऱ्याचे पुत्र यांच्यावर समत्व कसें होईल ? असें ह्मणशील तर– हे राजा, यालोकीं कोणत्याहि जीवात्म्याचा कोणाहि पुत्रादिकांबरोबर निरंतर एकत्र सहवास घडत नाहीं; आपल्या ह्या अतिप्रिय देहाबरोबरसुद्धां 'निरंतर सहवास' घडत नाहीं, मग स्त्रीपुत्रादिकांबरोबर घडत नाहीं हें काय सांगावें ! ॥ २० ॥ पहा ! हा जीव एकटाच जन्मास येतो, स्त्रीपुत्रादिकांसह जन्मास येत नाहीं व एकटाच मरण पावतो, स्त्रीपुत्रादिकांसह मरण पावत नाहीं, तसाच पुण्याचें फळ सुख एकटाच भोगतो व पापाचें फळ ॥१९९॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दुःखहि एकटाच भोगतो ॥ २१ ॥ आणि ज्यावेळीं स्त्रीपुत्रादिक याच्याबरोबर असतात त्यावेळींहि विचार केला असतां ते स्त्रीपुत्रादिक शत्रूच आहेत. कारण, ते, आह्मी पोषण करण्यास योग्य आहों असें मिष दाखवून ह्या मूढबुद्धि पुरुषाचें अधर्मानें मिळविलेलें द्रव्य, जसें मत्स्याला वांचण्यास साधनभूत असलेलें पाणी, त्याचे स्त्रीपुत्रादिक हरण करितात त्याप्रमाणें हरण करितात ॥ २२ ॥ आणि हे आपले आहेत असें मानून, ज्यांचें अधर्मानें पोषण करितो ते प्राण, द्रव्यें व पुत्रकलत्रादि-कहि, पूर्णमनोरथ न झालेल्या त्याला (मेलेल्याला किंवा जीवंतालाच) सोडून देतात ॥ २३ ॥ मग स्वार्थाविषयीं मूढ, स्वधर्मापासून भ्रष्ट, व पूर्णम-नोरथ होण्याच्या पूर्वींच स्त्रीपुत्रादिकांनीं टाकलेला तो पुरुष, स्वतां त्यांच्या पोषणासाठीं केलेलें पापमात्र घेऊन अंधतामिस्रादि नरकांमध्यें प्रवेश करितो ॥ २४ ॥

किंच यदा च सहसंवसंति तदाऽपि क्लेशोपार्जितवित्तापहारितया पुत्रानाम शत्रव एव ज्ञेया इत्याह । अधर्मेति । संभोजनीयाः पोष्याः पुत्रादय इति व्यपदेशैरल्पमेधसो मूढस्य वित्तं हरंति । जलौकसो मत्स्यस्य जीवनभूतानि जलानि यथा तत्पुत्रा हरंति तद्वदिति ॥ २२ ॥ किंच यानेवं पुष्णाति ते धनमादाय मृता जीवंतोऽपि वा तं परित्यजंतीत्याह । पुष्णातीति । स्वबुद्ध्या स्वीया इत्यभिमानेन । रायोऽर्थाः । अकृतार्थमप्राप्तभोगम् ॥ २३ ॥ स पुनः पापैकपाथेयो नरकं विशतीत्याह । स्वयमिति । असिद्धार्थोऽपूर्णमनोरथः

अधर्मोपचितं वित्तं हरंत्यन्येऽल्पमेधसः ॥ संभोजनीयापदेशैर्जलानीव जलौकसः ॥ २२ ॥ पुष्णाति यानधर्मेण स्वबुद्ध्या तमपंडितम् ॥ तेऽकृतार्थं प्रहिण्वंति प्राणा रायः सुतादयः ॥ २३ ॥ स्वयं किल्बिषमादाय तैस्त्यक्तो नार्थकोविदः ॥ असिद्धार्थो विशत्यंधं स्वधर्मविमुखस्तमः ॥ २४ ॥ तस्माल्लोकमिमं राजन्स्वप्नमायामनोरथम् ॥ वीक्ष्यायम्यात्मनात्मानं समः शांतो भव प्रभो ॥ २५ ॥ त-धृतराष्ट्र उवाच ॥ यथा वदति कल्याणीं वाचं दानपते भवान् ॥ तथाऽनया न तृप्यामि मर्त्यः प्राप्य यथाऽमृतम् ॥ २६ ॥ त-थाऽपि सूनृता सौम्य हृदि न स्थीयते चले ॥ पुत्रानुरागविषमे विद्युत्सौदामनी यथा ॥ २७ ॥ ईश्वरस्य विधिं को नु विधुनोत्यन्यथा पुमान् ॥ भूमेर्भारावताराय योऽवतीर्णो यदोः कुले ॥ २८ ॥

॥ २४ ॥ स्वप्नश्च माया च मनोरथश्च तत्तेन तुल्यं आयम्य नियम्य शांतः सन्समो भवेति ॥ २५ ॥ हे दानपते अक्रूर । न तृप्याम्यलमिति न मन्ये ॥ २६ ॥ सूनृता प्रिया वाक् चलेऽस्थिरे हृदि न स्थीयते न तिष्ठतीत्यर्थः । सुदामा पर्वतस्तत्र भवा विद्युदिव । तस्मिन्स्फटिकशिलामये सहसैवातिस्फुरिता विद्युद्यथा लीयते तद्वदित्यर्थः । यद्वा सुदामा माला तस्या इव सौदामनी मालाकारेत्यर्थः ॥ २७ ॥ नन्वेवं जानतोऽपि कथमयं मोह इति चेदत आह । ईश्वरस्येति । विधिं विधानं मायामिति यावत् ॥ २८ ॥

यास्तव हे विचारसमर्था राजा, पुत्रादिकांवर आसक्त होणें हें अनर्थाला कारण आहे ह्मणून धनपुत्रादिकांसहित हा लोक, स्वप्न, माया किंवा मनोरथ यांसारखा अनित्य आहे असें पाहून, आपल्या बुद्धीनेंच आपल्या मनाचें नियमन करून, तूं शांत व सर्वठिकाणीं समानबुद्धि धारण करणारा हो ॥ २५ ॥ धृतराष्ट्र ह्मणाला— हे दानपते अक्रूरा, तूं जी कल्याणकारक वाणी बोलत आहेस त्या ह्या वाणीच्या योगानें, जसा मरणारा प्राणी, अमृत भक्षण करूनहि तृप्त होत नाहीं त्याप्रमाणें मी तृप्त होत नाहीं; ह्मणजे तूं ही वाणी आतां पुरी करावीस असें मानीत नाहीं ॥ २६ ॥ तथापि हे सौम्या, तुझी मधुर व हितकारक अशी ही वाणी, पुत्रांच्या प्रेमानें विषम होऊन चंचल झालेल्या मा-झ्या हृदयांमध्यें, जशी स्फटिकमय सुदाम्या पर्वतावर चमकलेली वीज स्थिर रहात नाहीं तर तत्काल नष्ट होत्ये त्याप्रमाणें स्थिर न राहतां व्यर्थ होत्ये ॥ २७ ॥ बरें असें जाणणाऱ्याहि तुला कसा हा मोह प्राप्त होतो? असें ह्मणशील तर ईश्वराच्या मनांत जें कर्तव्य असेल तें अन्यथा करण्यास कोण बरें पुरुष समर्थ होईल? कोणीच होणार

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नाहीं. जो ईश्वर, भूमीचा भार उतरून टाकण्याकरितां यदूच्या कुळामध्यें श्रीकृष्णरूपानें अवतीर्ण झाला आहे ॥ २८ ॥ जो अतर्क्यमार्ग असलेल्या आपल्या मायेनें हें सर्व जग उत्पन्न करून त्यांत अंतर्यामिरूपानें प्रविष्ट होत्साता, सर्व प्राण्यांना कर्मे व त्या कर्मांचीं निरनिराळीं फळें देत असतो व जो समजण्यांत न येणाऱ्या आपल्या क्रीडेपासूनच उत्पन्न झालेल्या संसारचक्राला फिरवीत असतो, त्या परमेश्वराला नमस्कार असो ॥ २९ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, याप्रमाणें त्या अक्रूरानें, धृतराष्ट्र

अतस्तमेव नमस्यति । य इति । दुर्विमर्शपथया अवितर्क्यमार्गया । गुणान्कर्माणि तत्फलानि च विभजते विविच्य ददाति । दुरवबोधो यो विहारस्तस्य क्रीडा स एव तंत्रं

यो दुर्विमर्शपथया निजमाययेदं सृष्ट्वा गुणान्विभजते तदनुप्रविष्टः ॥ तस्मै नमो दुरवबोधविहारतंत्रसंसारचक्रगतये परमेश्वराय ॥२९॥
श्रीशुक उवाच ॥ इत्यभिप्रेत्य नृपतेरभिप्रायं स यादवः ॥ सुहृद्भिः समनुज्ञातः पुनर्यदुपुरीमगात् ॥ ३० ॥ शशंस रामकृष्णा-
भ्यां धृतराष्ट्रविचेष्टितम् ॥ पांडवान्प्रति कौरव्य यदर्थं प्रेषितः स्वयम् ॥ ३१ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे पूर्वार्धे
एकोनपंचाशत्तमोऽध्यायः ॥ ४९ ॥ ॥

प्रधानं मुख्यं कारणं यस्य संसारचक्रस्यातएव तस्य गतिर्यस्मात्तस्मै नम इति ॥ २९ ॥ अभिप्रेत्य ज्ञात्वा ॥ ३० ॥ ३१ ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधपूर्वार्धे भावार्थदीपिकायां टीकायामेकोनपंचाशत्तमोऽध्यायः ॥ ४९ ॥ ॥

राजाचा अभिप्राय जाणून, पांडवादिकांनीं मथुरेस जाण्याविषयीं अनुज्ञा दिली असतां, पुन्हा मथुरेमध्यें गमन केलें ॥ ३० ॥ हे राजा, नंतर ज्याकरितां (धृतराष्ट्राचें वर्तन जाणण्याकरितां) भगवंतानें स्वतां त्या अक्रूराला पाठविलें होतें तें पांडवांविषयीं धृतराष्ट्राचें विषदानादिक सर्व वर्तन त्यानें रामकृष्णांना सांगितलें ॥ ३१ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील पूर्वार्धांत धृतराष्ट्रवृत्तपरिज्ञाननामक हा एकुणपन्नासावा अध्याय समाप्त झाला ॥ ४९ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥१९६॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

इति श्रीमद्भागवते दशमस्कंधे
पूर्वार्धः सटीकः सार्थश्च समाप्तः

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अथ श्रीमद्भागवते दशमस्कंधे
उत्तरार्धः सटीकः सार्थश्च प्रारभ्यते

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शत्रुमारणादिक व धर्मादिक सर्वविषयांचा त्याग करून, ज्ञानस्वरूपी, निर्गुण, निरंजन, व अद्वय अशा तुज परम ईश्वराला मी शरण आलों आहें ॥ ५८ ॥ अरे, आदी विषयांचा उपभोग कर, कैवल्यतर हस्तगतच आहे. असा वरांच्या योगानें पुन्हा लोभ उत्पन्न करणाऱ्या श्रीकृष्णाची पाय धरून प्रार्थना करितो कीं,—हे आश्रय देणाऱ्या परमात्म्या, ईश्वरा, या संसारामध्यें कर्मफलरूप पापांनीं पीडित, त्यांच्या वासनारूप तापांनीं तापलेला, आणि ज्यावे इंद्रियरूप सहा शत्रु आशारहित झाले नाहींत असा मी, कथंचित् दैवयोगानें, सत्य अभय व शोकरहित अशा तुझ्या चरणकमळाला शरण आलों आहें, यास्तव त्या आपत्तीनें व्याप्त असलेल्या माझें संसार-दुःखापासून तूं रक्षण कर ॥ ५९ ॥ श्रीभगवान् ह्मणाला—हे सार्वभौमा, हे महाराजा, ज्याअर्थीं मी वरांनीं प्रलोभित केलेल्याहि तुझी बुद्धि, विषयांनीं आकृष्ट झाली

घनम् । कुतः । निरंजनम् । तत्कुतः । निर्गुणम् । तदपि कुतः । अद्वयम् । अतएव अक्षरं त्वां शरणं व्रजामीति ॥ ५८ ॥ भुंक्ष्व तावद्भोगान्कैवल्यं तु करस्थमेवेति पुनर्वरैः प्रलोभयंतं श्रीकृष्णं पादोपग्रहणेन प्रार्थयते । चिरमिति । वृजिनैः कर्मफलैरार्तः पुनस्तद्वासनाभिस्तप्यमानस्तथाऽप्यवितृषषडमित्रः तृडेव तृषा तृष्णा न विगततृषाः षड-मित्राः शत्रव इंद्रियलक्षणा यस्य सः । अतएवालब्धशांतिः कथंचिद्दैववशेन लब्धशांतिरिति वा । शरणं स्वज्ञानं तद्ददातीति तथा हे शरणद । समुपेतः प्राप्तोऽहम् । अशोकत्वे

चिरमिह वृजिनार्तस्तप्यमानोऽनुतापैरवितृषषडमित्रोऽलब्धशांतिः कथंचित् ॥ शरणद समुपेतस्त्वत्पदाब्जं परात्मन्नभयमृतमशोकं पाहि मापन्नमीश ॥ ५९ ॥ श्रीभगवानुवाच ॥ सार्वभौम महाराज मतिस्ते विमलोर्जिता ॥ वरैः प्रलोभितस्यापि न कामैर्विहता यतः ॥ ६० ॥ प्रलोभितो वरैर्यत्त्वमप्रमादाय विद्धि तत् ॥ न धीर्मय्येकभक्तानामाशीर्भिर्भिद्यते क्वचित् ॥ ६१ ॥ युंजानानामभक्तानां प्राणायामादिभिर्मनः ॥ अक्षीणवासनं राजन्दृश्यते पुनरुत्थितम् ॥ ६२ ॥ विचरस्व महीं कामं मय्यावेशितमानसः ॥ अस्त्वेवं नित्यदा तुभ्यं भक्तिर्मय्यनपायिनी ॥ ६३ ॥ क्षात्रधर्मस्थितो जंतून्न्यवधीर्मृगयादिभिः ॥ समाहितस्तत्तपसा जह्यघं मदुपाश्रितः ॥ ६४ ॥

हेतुः । अभयम् । तत्रापि हेतुः । ऋतं सत्यम् । आपन्नमापदा व्याप्तं पाहीति ॥ ५९ ॥ ६० ॥ अप्रमादाय प्रमादाय न भवत्येव । कुत इत्यत आह । न धीरिति । एकांतभक्तानां धीराशीर्भिः प्रार्थनाभिरपि न भिद्यते नासज्जत इत्यर्थः ॥ ६१ ॥ व्यतिरेकमाह । युंजानानामिति । उत्थितं विषयाभिमुखम् ॥ ६२ ॥ तुभ्यं तव ॥ ६३ ॥ युक्त्याभासेन भीषयंस्तपसि लोकसंग्रहे प्रवर्तयति । क्षात्रधर्मेति ॥ ६४ ॥

नाहीं त्याअर्थीं ती तुझी बुद्धि, रागलोभादि मलरहित होऊन परमार्थदर्शनाविषयीं योग्य झाली आहे ॥ ६० ॥ जें तुला मी वरांनीं प्रलोभित केलें आहे तें लोकामध्यें भक्तांच्या बुद्धीला आसक्ति होत नाहीं हें दाखविण्याकरितांच केलें आहे असें तूं समज. कां ह्मणशीलतर, माझेठिकाणीं एकांतभक्त असलेल्या पुरुषांची बुद्धि, विषयभोग प्राप्त झाले असतांहि त्यांच्या योगानें माझ्याहून निराळी विषयासक्त होत नाहीं ॥ ६१ ॥ आणि हे राजा, प्राणायामादिकेंकरून निरोध करण्याविषयीं प्रयत्न करणाऱ्याहि अभक्तांचें मन, वासनाक्षय पावलेलें नसल्यामुळें पुन्हा विषयाभिमुख झालेलें दिसून येतें ॥ ६२ ॥ तुलातर माझेठिकाणीं एकांतभक्ति सर्वदा आहेच ह्मणून तूं आपल्या चित्ताचें माझेठिकाणीं स्थापन करून यथेच्छपणें पृथिवीवर संचार कर ॥ ६३ ॥ तूं राज्यावर होतास त्यावेळीं तूं लोकसंरक्षणाच्या उपयोगीं न पडणाऱ्या मृगयादिक व्यापारांनीं प्राण्यांचा वध केला आहेस ह्मणून आतां तपाच्या योगानें जितेंद्रिय व माझाच आश्रय करणारा होऊन त्या पापाचा नाश कर ॥ ६४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हे राजा, तूं, आतां असें केलेंस ह्मणजे पुढच्या जन्मांत तूं सर्वभूतांचा अत्यंत मित्र असा श्रेष्ठ ब्राह्मण होऊन परमानंदरूपी मजप्रतच पावशील ॥ ६५ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील उत्तरार्धामध्यें मुचुकुंदस्तुत्यादिनिरूपणनामक हा एकावन्नावा अध्याय समाप्त झाला ॥ ५१ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या बावन्नाव्या अध्यायामध्यें जरासंधाच्या भयानेंच कीं काय धांवणाऱ्या भगवान् श्रीकृष्णानें, द्वारकेंत येऊन नंतर सुदेवब्राह्मणानें वर्णन केलेल्या रुक्मिणीच्या निरोपाला अनुमोदन दिलें, अशी कथा वर्णन केली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, याप्रमाणें इक्ष्वाकुकुळांत उत्पन्न झालेल्या त्या मुचुकुंद राजावर श्रीकृष्णानें अनुग्रह केला असतां, तो राजा, कृष्णाला प्रदक्षिणा व नमस्कार करून, गुहेच्या मुखांतून बाहेर निघाला ॥ १ ॥ नंतर त्यानें लहान लहान झालेले मनुष्य, पशु, वल्ली व वृक्ष पाहून कलियुग प्राप्त झालें असें जाणून, तप करण्याकरितां उत्तरदिशेकडे गमन केलें ॥ २ ॥ तपाविषयीं श्रद्धेनें युक्त, धैर्यवान्, कोठेंहि आसक्तिरहित,

॥ ६५ ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधोत्तरार्धे एकपंचाशत्तमोऽध्यायः ॥ ५१ ॥ ॥द्विपंचाशत्तमे धावन्भयादिव गतः पुरीम् ॥ अन्वमोदत संदेशं रुक्मिण्या द्विजवर्णितम्

जन्मन्यनंतरे राजन्सर्वभूतसुहृत्तमः ॥ भूत्वा द्विजवरस्त्वं वै मामुपैष्यसि केवलम् ॥ ६५ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे उत्तरार्धे मुचुकुंदस्तुतिर्नामैकपंचाशत्तमोऽध्यायः ॥ ५१ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ इत्थं सोऽनुगृहीतोंऽग कृष्णेनेक्ष्वाकुनंदनः ॥ तं परिक्रम्य संनम्य निश्चक्राम गुहामुखात् ॥ १ ॥ स वीक्ष्य क्षुल्लकान्मर्त्यान्पशून्वीरुद्वनस्पतीन् ॥ मत्वा कलियुगं प्राप्तं जगाम दिशमुत्तराम् ॥ २ ॥ तपःश्रद्धायुतो धीरो निःसंगो मुक्तसंशयः ॥ समाधाय मनः कृष्णे प्राविशद्गंधमादनम् ॥ ३ ॥ बदर्याश्रममासाद्य नरनारायणालयम् ॥ सर्वद्वंद्वसहः शांतस्तपसाऽऽराधयद्धरिम् ॥ ४ ॥ भगवान्पुनराव्रज्य पुरीं यवनवेष्टिताम् ॥ हत्वा म्लेच्छबलं निन्ये तदीयं द्वारकां धनम् ॥ ५ ॥ नीयमाने धने गोभिर्नृभिश्चाच्युतचोदितैः ॥ आजगाम जरासंधस्त्रयोविंशत्यनीकपः ॥ ६ ॥ विलोक्य वेगरभसं रिपुसैन्यस्य माधवौ ॥ मनुष्यचेष्टामापन्नौ राजन्दुद्रुवतुर्द्रुतम् ॥ ७ ॥ विहाय वित्तं प्रचुरमभीतौ भीरुभीतवत् ॥ पद्भ्यां पद्मपलाशाभ्यां चेलतुर्बहुयोजनम् ॥ ८ ॥

॥ १ ॥ १ ॥ क्षुल्लकानल्पप्रमाणान् ॥ २ ॥ तपसि श्रद्धायुतः ॥ ३ ॥ तत्र च बदर्याश्रमम् ॥ ४ ॥ निन्ये नयन्मार्गे चलति स्म ॥ ५ ॥ ६ ॥ वेगरभसं वेगोद्रेकम् ॥ ७ ॥ भीरुभीतवद्धीरोरपि भीतवत् । अतिभीतवदित्यर्थः । चेलतुः पलायेताम् । बहुयोजनं देशम् ॥ ८ ॥

व संशयरहित अशा त्या राजानें, आपलें मन श्रीकृष्णाचेठिकाणीं स्थिर करून, गंधमादनपर्वतावर प्रवेश केला ॥ ३ ॥ तेथेंहि तो बदरिकाश्रमामध्यें नरनारायणाच्या स्थानाप्रत पावोन, सुखदुःख, शीतउष्ण, इत्यादिक सर्वद्वंद्वांचें सहन करून व कामक्रोधादिकांनीं रहित होऊन, तपाच्या योगानें हरीचें आराधन करूं लागला ॥ ४ ॥ इकडे भगवान् श्रीकृष्ण, यवनांनीं वेढा घातलेल्या मथुरानगरीमध्यें पुन्हा येऊन, म्लेच्छांचें सर्व सैन्य मारून त्यांचें भूषणादिक धन द्वारकेंत नेण्याविषयीं उद्युक्त झाला ॥ ५ ॥ तेव्हां श्रीकृष्णानें आज्ञा केलेले मनुष्य व त्यांनीं पाठीवर गोण्या घातलेले बैल, धन नेऊं लागले असतां, तेवीस अक्षौहिणी सैन्याचा अधिपति जरासंध, प्राप्त झाला ॥ ६ ॥ त्यावेळीं हे राजा, शत्रुसैन्याचा अतिशय वेग पाहून, मनुष्यलीलेचा स्वीकार करणारे ते रामकृष्ण, अतित्वरेनें पलायन करूं लागले ॥ ७ ॥ आणि नेत असलेलें यवनसैन्यसंबंधी पुष्कळ द्रव्यहि तेथेंच टाकून, ते वस्तुतः निर्भय होते तथापि भित्र्यापेक्षांहि, भ्याल्यासारखे होऊन, कमलपत्रासारख्या आपल्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पायांनींच बहुत योजनेंपर्यंत पळून गेले ॥ ८ ॥ ईश्वराची इयत्ता न जाणणारा जरासंधहि पळत असलेल्या त्यांना पाहून, हास्य करीत करीत त्यांना धरण्याकरितां रथ्यांच्या सैन्यासहवर्तमान त्यांच्या मागून धावूं लागला ॥ ९ ॥ ते रामकृष्ण, दूरपर्यंत पळून श्रम पावले आणि अकरा योजनें उंच अशा एका प्रवर्षणनामक पर्वतावर चढले. ज्या पर्वतावर भगवान् इंद्र बाराहि महिने वृष्टि करीत असतो ॥ १० ॥ हे राजा, तेव्हां जरासंधानें, ते पर्वतावर दडून राहिले असें जाणून शोध करीत असतांहि त्यांचें दडण्याचें स्थान त्याला मिळालें नसल्यामुळें त्यांना जाळण्याकरितां पर्वताला सभोंवार काष्ठांनीं वेष्टित केलें आणि अग्नि लावून त्या पर्वताला जाळून टाकिलें ॥ ११ ॥ त्यावेळीं ज्याचें तट जळूं लागलें आहे, अशा अकरा योजनें उंच असलेल्या त्या पर्वतावरून, रामकृष्ण वेगानें उडी मारून, जरासंधानें वेढा घातलेल्या

अप्रमाणवित् प्रमाणमियत्ता तत्र वेत्तीति तथा ॥ ९ ॥ तुंगमेकादशयोजनोन्नतम् । प्रकर्षेण वर्षत्यस्मिन्निति प्रवर्षण इत्याख्या यस्य तम् । तदाह । भगवानिति । भगवानिंद्रः ॥ १० ॥ तत्र विचिन्वन्नपि तयोः पदं निलयस्थानमनधिगम्य ॥ ११ ॥ ततो गिरेः दश चैकं च योजनानि तावदुत्तुंगान्मागधसंरोधदेशमतिक्रम्य परतोऽधो निपेततुः ॥ १२ ॥

पलायमानौ तौ दृष्ट्वा मागधः प्रहसन्बली ॥ अन्वधावद्रथानीकैरीशयोरप्रमाणवित् ॥ ९ ॥ प्रद्रुत्य दूरं संश्रांतौ तुंगमारुहतां गिरिम् ॥ प्रवर्षणाख्यं भगवान्नित्यदा यत्र वर्षति ॥ १० ॥ गिरौ निलीनावाज्ञाय नाधिगम्य पदं नृप ॥ ददाह गिरिमेधोभिः समंतादग्निमुत्सृजन् ॥ ११ ॥ तत उत्पत्य तरसा दह्यमानतटादुभौ ॥ दशैकयोजनोत्तुंगान्निपेततुरधो भुवि ॥ १२ ॥ अलक्ष्यमाणौ रिपुणा सानुगेन यदूत्तमौ ॥ स्वपुरं पुनरायातौ समुद्रपरिखां नृप ॥ १३ ॥ सोऽपि दग्धाविति मृषा मन्वानो बलकेशवौ ॥ बलमाकृष्य सुमहन्मगधान्मागधो ययौ ॥ १४ ॥ आनर्ताधिपतिः श्रीमान्रैवतो रेवतीं सुताम् ॥ ब्रह्मणा चोदितः प्रादाद्बलायेति पुरोदितम् ॥ १५ ॥ भगवानपि गोविंद उपयेमे कुरूद्वह ॥ वैदर्भीं भीष्मकसुतां श्रियो मात्रां स्वयंवरे ॥ १६ ॥ प्रमथ्य तरसा राज्ञः शाल्वादींश्चैद्यपक्षगान् ॥ पश्यतां सर्वलोकानां तार्क्ष्यपुत्रः सुधामिव ॥ १७ ॥

॥ १३ ॥ १४ ॥ श्रीकृष्णस्य विवाहान्निरूपयितुं बलदेवविवाहं नवमस्कंधोक्तमनुस्मारयति । आनर्तेति ॥ १५ ॥ मात्रां कलाम् ॥ १५ ॥ १६ ॥ गरुडो यथा देवान्प्रमथ्य सुधामहरत्तथेति ॥ १७ ॥

प्रदेशाच्या पलीकडे भूमीवर खालीं उतरले ॥ १२ ॥ हे राजा, तेव्हां सैन्यासहित असलेल्या जरासंध शत्रूनें न पाहिलेले ते रामकृष्ण, समुद्रच जिचा खंदक आहे अशा आपल्या द्वारकानगरीमध्यें पुन्हां प्राप्त झाले ॥ १३ ॥ तो जरासंधहि रामकृष्ण दग्ध झाले असें व्यर्थच मानीत होत्साता, आपलें मोठें सैन्य घेऊन मगधदेशांप्रत निघून गेला ॥ १४ ॥ आतां, श्रीकृष्णाचे विवाह सांगण्याकरितां नवमस्कंधांत सांगितलेल्या बलदेवाच्या विवाहाचें स्मरण करवितो– आनर्तदेशांचा अधिपति श्रीमान् जो रैवत राजा त्यानें, ब्रह्मदेवाच्या आज्ञेवरून आपली रेवतीनामक कन्या बलदेवाला अर्पण केली, असें पूर्वी नवमस्कंधामध्यें मी तुला सांगितलें आहे ॥ १५ ॥ हेकुरुश्रेष्ठा, भगवान् श्रीकृष्णानेंहि, सर्वलोक पाहात असतां, शिशुपालाच्या पक्षपातानें प्राप्त झालेल्या शाल्वादिक राजांचा पराभव करून, विदर्भदेशांत उत्पन्न झालेली लक्ष्मीची कला जी भीष्मकराजाची रुक्मिणीनामक कन्या तिचें, जसें गरुडानें देवांचा पराभव करून सुधेचें हरण केलें त्याप्रमाणें हरण करून वरून घेतली ॥ १६ ॥ १७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राजा ह्मणाला—हे भगवन्, जिचें मुख सुंदर आहे त्या भीष्मकराजाच्या रुक्मिणीनामक कन्येला, श्रीकृष्ण भगवंतानें ' युद्धांतून हरण करण्याचा जो राक्षसविधि त्याच्या योगानें ' वरिलें असें मी ऐकिलें ॥ १८ ॥ तर हे सर्वज्ञा, जशा प्रकारानें श्रीकृष्णानें, जरासंधशाल्वादिकांना जिंकून रुक्मिणी हरण केली असेल तसें तें महापराक्रमी श्रीकृष्णाचें चरित्र, मी श्रवण करण्याची इच्छा करितों. यास्तव तें मला सांग ॥ १९ ॥ हे ब्रह्मनिष्ठा, श्रवण व पठण करणारांना पुण्यकारक, कर्णांना गोड लागणाऱ्या, लोकांचें पाप घालविणाऱ्या आणि प्रतिक्षणीं आश्चर्यासारख्या भासत असून नव्या नव्यासारख्या वाटणाऱ्या अशा त्या श्रीकृष्णकथांच्या श्रवणाचें सार जाणणारा कोण बरें श्रोता, तृप्ति पावेल ? कोणीच पावणार नाहीं ॥ २० ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, विदर्भदेशांचा अधिपति, गुणांनीं थोर असा भीष्मक नांवाचा एक राजा होता.

राक्षसो युद्धहरणादिति स्मृतेः राज्ञः प्रमथ्येति च त्वदुक्त्या राक्षसेन विधानेनोपयेमे परिणीतवानिति श्रुतं पूर्वमेव वा ॥ १८ ॥ सामान्यत एव श्रुतम् । विशेषं तु श्रोतुमिच्छामि ॥ १९ ॥ श्रवणौत्सुक्यमाविष्करोति । ब्रह्मन्निति । पुण्या महाफला माध्वीः श्रुतिसुखाः लोकस्य मलापहाश्च शृण्वानः शृण्वन्नित्यर्थः । श्रुतज्ञः श्रुतसारवित् । नित्य-

राजोवाच ॥ भगवान् भीष्मकसुतां रुक्मिणीं रुचिराननाम्॥ राक्षसेन विधानेन उपयेम इति श्रुतम्॥ १८॥ भगवन् श्रोतुमिच्छामि कृष्णस्यामिततेजसः ॥ यथा मागधशाल्वादीन् जित्वा कन्यामुपाहरत् ॥ १९ ॥ ब्रह्मन्कृष्णकथाः पुण्या माध्वीर्लोकमलापहाः॥ को नु तृप्येत शृण्वानः श्रुतज्ञो नित्यनूतनाः ॥ २० ॥ श्रीशुक उवाच ॥ राजाऽऽसीद्भीष्मको नाम विदर्भाधिपतिर्महान् ॥ तस्य पंचाभवन्पुत्राः कन्यैका च वरानना ॥ २१ ॥ रुक्म्यग्रजो रुक्मरथो रुक्मबाहुरनंतरः ॥ रुक्मकेशो रुक्ममाली रुक्मिण्येषां स्वसा सती ॥ २२ ॥ सोपश्रुत्य मुकुंदस्य रूपवीर्यगुणश्रियः ॥ गृहागतैर्गीयमानास्तं मेने सदृशं पतिम् ॥ २३ ॥ तां बुद्धिलक्षणौदार्यरूपशीलगुणाश्रयाम् ॥ कृष्णश्च सदृशीं भार्यां समुद्वोढुं मनो दधे ॥ २४ ॥ बंधूनामिच्छतां दातुं कृष्णाय भगिनीं नृप ॥ ततो निवार्य कृष्णद्विड्रुक्मी चैद्यममन्यत ॥ २५ ॥ तदवेत्यासितापांगी वैदर्भी दुर्मना भृशम् ॥ विचिंत्याप्तं द्विजं कंचित्कृष्णाय प्राहिणोद्द्रुतम् ॥ २६ ॥

नूतनाः प्रतिक्षणमाश्चर्यवत्प्रतीयमानाः ॥ २० ॥ २१ ॥ २२ ॥ २३ ॥ २४ ॥ चैद्यममन्यत तस्या वरमित्यर्थः ॥ २५ ॥ अवेत्य ज्ञात्वा । असितापांगी सुनीलकटाक्षा । कृष्णय कृष्णमानेतुं प्रेषयामास ॥ २६ ॥

त्याला पांच पुत्र आणि सर्वावयवांनीं सुंदर अशी एक कन्या झाली ॥ २१ ॥ त्यांचीं नांवें—सर्वांत ज्येष्ठ तो रुक्मी, रुक्मरथ, रुक्मबाहु, रुक्मकेश, रुक्ममाली आणि यांची बहीण सद्गुणसंपन्न रुक्मिणी होय ॥ २२ ॥ तिनें आपल्या घरीं आलेल्या लोकांनीं वर्णन केलेल्या श्रीकृष्णाचे सौंदर्य, पराक्रम, गांभीर्य, औदार्य, इत्यादिक गुण आणि संपत्ति यांचें श्रवण करून, तो श्रीकृष्णच आपणास योग्यपति आहे असें मानिलें ॥ २३ ॥ इकडे द्वारकेमध्यें श्रीकृष्णानेंहि आपल्या घरीं आलेल्या लोकांच्या मुखांतून, बुद्धि, लक्षणें, औदार्य, स्वरूप, सुस्वभाव यांचा आश्रयभूत असलेल्या त्या रुक्मिणीचें श्रवण करून, हीच आपणाला योग्य स्त्री आहे असें मानून तिला वरण्याचें मनांत आणिलें ॥ २४ ॥ असें असतां व तिचे इतर बंधु त्या बहिणीला श्रीकृष्णास देण्याची इच्छा करित असतां, हे राजा, त्यांचें निवारण करून रुक्म्यानें, तिला, शिशुपालास देण्याचा निश्चय केला ॥ २५ ॥ तो भावाचा निश्चय जाणून, जिचे श्यामवर्ण नेत्रकटाक्ष आहेत अशा त्या रुक्मिणीनें, अत्यंत दुःखितचित्त होऊन श्रीकृष्णप्राप्तीच्या उपायाचा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विचार केला आणि तेथें प्राप्त झालेल्या कोणीएक सुशील ब्राह्मणाजवळ पत्र देऊन त्याला त्वरित श्रीकृष्णास आणण्याकरितां पाठविलें ॥ २६ ॥ नंतर, तो ब्राह्मण द्वारके-मध्यें प्राप्त होऊन तेथें असलेल्या द्वारपालांनीं त्याचा आंत प्रवेश करविला असतां, त्यानें सुवर्णमय सिंहासनावर बसलेल्या जगत्कारणभूत पुराणपुरुष अशा श्रीकृष्णाला अवलोकन केलें ॥ २७ ॥ इकडे ब्राह्मणाचा कैवारी अशा श्रीकृष्णदेवानें, त्या ब्राह्मणास अवलोकन करितांच आपल्या आसनावरून खालीं उतरून, त्या ब्राह्मणाला त्या आसनावर बसविलें आणि, जसे देव आपली (श्रीकृष्णाची) पूजा करितात त्याप्रमाणें त्याची पूजा केली ॥ २८ ॥ त्यानें मार्गांतील श्रम घालविण्यासाठीं थोडावेळ विश्रांति घेऊन भोजन केल्यानंतर एकांतस्थळीं सुखासनावर बसलेल्या त्या ब्राह्मणाजवळ भक्तपालक अशा श्रीकृष्णानें जाऊन, आपल्या हातानें त्याच्या चरणाचें हळुहळू मर्दन करीत स्वस्थपणानें त्यास विचारिलें कीं– ॥ २९ ॥ हे द्विजवरश्रेष्ठा, संतुष्टचित्त अशा तुझा, वृद्धपुरुषांना मान्य असा धर्म, अनायासानें निरंतर चालला आहेना ? तेंच मला

प्रतीहारैर्द्वारपालैः ॥ २७ ॥ आत्मानं श्रीकृष्णम् ॥ २८ ॥ अभिमृशन् शनैः संमर्दयन् ॥ २९ ॥ ३० ॥ स धर्मोऽस्य ब्राह्मणस्याखिलकामदोग्धा भवति । यद्वा स ब्राह्मणोऽस्य विश्वस्याखिलकामधुगिति ॥ ३१ ॥ लोकानाप्नोति लोकाल्लोकांतरं पर्यटति । नैकत्र निर्वृतस्तिष्ठतीत्यर्थः । नाप्नोतीति पाठे सुरेश्वरोऽपि भूत्वा लोकानाप्नोत्युत्तमलोकान्प्राप्तो-

द्वारकां स समभ्येत्य प्रतीहारैः प्रवेशितः ॥ अपश्यदाद्यं पुरुषमासीनं कांचनासने ॥ २७ ॥ दृष्ट्वा ब्रह्मण्यदेवस्तमवरुह्य निजास-नात् ॥ उपवेश्यार्हयांचक्रे यथात्मानं दिवौकसः ॥ २८ ॥ तं भुक्तवंतं विश्रांतमुपगम्य सतां गतिः ॥ पाणिनाऽभिमृशन्पादावव्य-ग्रस्तमपृच्छत ॥ २९ ॥ कच्चिद्द्विजवरश्रेष्ठ धर्मस्ते वृद्धसंमतः ॥ वर्तते नातिकृच्छ्रेण संतुष्टमनसः सदा ॥ ३० ॥ संतुष्टो यर्हि वर्तेत ब्राह्मणो येनकेनचित् ॥ अहीयमानः स्वाद्धर्मात्स ह्यस्याखिलकामधुक् ॥ ३१ ॥ असंतुष्टोऽसकृल्लोकानाप्नोत्यपि सुरेश्वरः ॥ अकिंचनोऽपि संतुष्टः शेते सर्वांगविज्वरः ॥ ३२ ॥ विप्रान्स्वलाभसंतुष्टान्साधून्भूतसुहृत्तमान् ॥ निरहंकारिणः शातान्नमस्ये शिर-साऽसकृत् ॥ ३३ ॥ कच्चिद्वः कुशलं ब्रह्मन्राजतो यस्य हि प्रजाः ॥ सुखं वसंति विषये पाल्यमानाः स मे प्रियः ॥ ३४ ॥

ऽप्यप्राप्त इव क्लिश्यतीत्यर्थः । शेते सुखमास्त इत्यर्थः । तदेवाह सर्वेष्वंगेषु वाक्पाण्यादिषु विज्वरस्तापरहितः ॥ ३२ ॥ स्वलाभः स्वत एव प्राप्तो लाभ आत्मलाभो वा तेन संतुष्टान्पूर्णान्साधून्स्वधर्मनिष्ठान् ॥ ३३ ॥ यस्य राज्ञो विषये देशे ॥ ३४ ॥

फार आवडतें ॥ ३० ॥ जेव्हां यत्नांवांचून प्राप्त झालेल्या देहधारणापुरत्या धान्यादिकानें संतुष्ट असणारा हो ब्राह्मण, आपल्या वर्णाश्रमधर्मापासून भ्रष्ट न होतां चांगल्या रीतीनें वागूं लागतो, तेव्हांच त्याचा तो संतोषपूर्वक आचरण केलेला धर्म, त्याचे सर्व मनोरथ पूर्ण करणारा होतो ॥ ३१ ॥ इंद्र असूनहि जर असंतुष्ट असेल तर, तो या लोकांतून त्या लोकीं व त्या लोकांतून दुसऱ्या लोकीं सुखप्राप्तीकरितां फिरत असून एकेठिकाणीं स्वस्थपणें राहत नाहीं, आणि संतुष्ट जर असेल तर तो, भोजन आच्छादन इत्यादिकांपुरत्याहि धनादिकानें रहित असला तथापि वाणी हस्त इत्यादिक अवयवांचेठिकाणीं तापरहित होत्साता सुखानें राहतो ॥ ३२ ॥
यास्तव दैववशात् प्राप्त झालेल्या अन्नवस्त्रादिकांच्या योगानें संतुष्ट, साधु (आचारनिष्ठ), प्राणिमात्रांचे मित्र, निरभिमानी व शांत असा ब्राह्मणांना मी, वारंवार आपलें मस्तक नम्र करून नमस्कार करितों ॥ ३३ ॥ यास्तव हे ब्राह्मणा, तुमचें राजापासून कुशल आहे ना ? ज्या राजाच्या देशाचेठिकाणीं रक्षण केलेल्या ॥१६६॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रजा सुखानें राहतात तो, राजा, मला प्रिय होतो ॥ ३४ ॥ साम्प्रत ज्या स्थानापासून ज्या कार्याच्या इच्छेनें दुर्गम अशा समुद्राला तरून या द्वारकेमध्यें तूं आला आहेस, तें गुप्त नसेल तर सर्व आम्हांस सांग आणि आम्ही तुझें कोणतें कार्य करावें तें सांग ॥ ३५ ॥ याप्रमाणें लीला करण्याकरितां मनुष्याअवतार धारण केलेल्या त्या परमेश्वर श्रीकृष्णानें, ज्याला विचारावयावा अर्थ विचारिला आहे अशा त्या ब्राह्मणानें, त्या कृष्णाला, बंधूंच्या मनांतून रुक्मिणी तुला द्यावयाची असून ज्येष्ठबंधु रुक्म्यानें शिशुपाळाला द्यावयाची केली आहे इत्यादिक सर्व वर्णन केलें ॥ ३६ ॥ आणि रुक्मिणीनें स्वतां एकांतीं लिहून दिलेली पत्रिका, त्यानें किनखापी उंची कपड्याच्या थैलींतून बाहेर काढिली आणि रुक्मिणीनें प्रेमचिन्हाचा शिक्का केलेली ती पत्रिका श्रीकृष्णाला दाखविली. नंतर तो ब्राह्मणच श्रीकृष्णाच्या आज्ञेनें पत्रिका

यतः स्थानात् । यदिच्छया यत्कार्येच्छया दुर्गं समुद्रम् ॥ ३५ ॥ संपृष्टः संप्रश्नः प्रष्टव्योऽर्थो यं सः । परमेष्ठिना परमेश्वरेण । बंधूनामनभिप्रेतं रुक्मिणश्चेष्टितमित्यादि सर्वम् ॥ ३६ ॥ रुक्मिण्या स्वयमेकांते लिखित्वा दत्तपत्रिकाम् ॥ मुद्रामुन्मुच्य कृष्णाय प्रेमचिह्नाप्रदर्शयत् ॥ ब्राह्मणः श्रीकृष्णानुज्ञया वाचयति । श्रुत्वेति । अयमर्थः । हे अच्युत हे भुवनसुंदरेत्यौत्सुक्यं द्योतयति । क तव महिमा क चाहं रूपकुलशीलादियुक्ताऽपि तथाऽप्यपगता त्रपा यस्मात्तन्मे चित्तं त्वय्याविशत्यासज्जते । तत्कुतस्तत्राह ।

यतस्त्वमागतो दुर्गं निस्तीर्येह यदिच्छया ॥ सर्वं नो ब्रूह्यगुह्यं चेत्किं कार्यं करवाम ते ॥ ३५ ॥ एवं संपृष्टसंप्रश्नो ब्राह्मणः परमेष्ठिना ॥ लीलागृहीतदेहेन तस्मै सर्वमवर्णयत् ॥ ३६ ॥ रुक्मिण्युवाच ॥ श्रुत्वा गुणान्भुवनसुंदर शृण्वतां ते निर्विश्य कर्णविवरैर्हरतोंऽगतापम् ॥ रूपं दृशां दृशिमतामखिलार्थलाभं त्वय्यच्युताविशति चित्तमपत्रपं मे ॥ ३७ ॥ का त्वा मुकुंद महती कुलशीलरूपविद्यावयोद्रविणधामभिरात्मतुल्यम् ॥ धीरा पतिं कुलवती न वृणीत कन्या काले नृसिंह नरलोकमनोऽभिरामम् ॥ ३८ ॥

शृण्वतां कर्णविवरैरंतः प्रविश्यांगतापम् । अंगेति पृथक् संबोधनं वा । हरतस्तव गुणान् श्रुत्वा तथा दृशिमतां चक्षुष्मतां दृशामखिलार्थलाभात्मकं रूपं च श्रुत्वेति ॥ ३७ ॥ अहो कुलकन्यानामिदमतिधाष्टर्चमिति मा शंकीरित्याह । का त्वेति । हे मुकुंद हे नृसिंह नरश्रेष्ठ का नाम कन्या कुलवती तथा महती पुरुगुणोदारा तथा धीरा धृतिमती त्वा त्वां पतिं न वृणीत । मय्येव केयं दोषशंकेति भावः । कथंभूतम् । कुलशीलादिभिरात्मनैव तुल्यं निरुपममित्यर्थः । द्रविणं द्रव्यसंपत् । धाम प्रभावः । तथा नरलोकस्य मनसामभिरामोऽभिरमणं यस्मात्तम् । किंच काले विवाहावसरे ॥ ३८ ॥

वाचतो कीं, रुक्मिणी ह्मणत्ये–हे भुवनसुंदरा अच्युता, श्रवण करणाऱ्या लोकांच्या कर्णविवरांनीं हृदयामध्यें प्रवेश करून आध्यात्मिकादिक तापांचें हरण करणाऱ्या तुझ्या गुणाचें श्रवण करून तसेंच डोळे असणाऱ्या लोकांच्या डोळ्यांना पाहावयाच्या सर्व विषयांचा लाभ करून देणारें तुझें स्वरूप ऐकून, निर्लज्ज झालेलें माझें चित्त तुझेठिकाणीं आसक्त झालें आहे ॥ ३७ ॥ आतां कुलीन कन्या असलेल्या तुला हा उद्धटपणा योग्य नाहीं असें ह्मणशील तर ही शंका मनामध्यें आणूं नये. कारण, हे मुक्तिदात्या मनुष्यश्रेष्ठा, कुलीन, गुणांनीं उदार व धैर्ययुक्त अशी कोण बरें कन्या, सत्कुळामध्यें जन्म, सुस्वभाव, सौंदर्य, चवदा विद्या व चौसष्ट कळा, तारुण्य, धनसंचय व तेज यांच्या योगानें निरुपम तसाच मनुष्यलोकांच्या मनांला रमविणारा अशा तुला, विवाहाला योग्य अशा समयीं पति वरणार नाहीं? तर सर्वेहि वरतीलच ॥ ३८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

म्हणून हे विभो, मी तुला पति वरिलें आहे आणि आपला आत्माहि तुला अर्पण केला आहे. यास्तव तूं येथें येऊन मला आपली भार्या करून घे. हे कमलाक्षा, जसा सिंहाच्या भागाला कोल्हयानें स्पर्श करूं नये त्याप्रमाणें वीर अशा तुझा भाग जी मी तिला शिशुपाळानें शीघ्र येऊन स्पर्श न करावा. तूं आला नाहींस किंवा विलंब लागला तर तसें होण्याचा संभव आहे ॥ ३९ ॥ आतां, अनेक जन्मामध्यें केलेल्या सुकृतांच्या योगानें हेंच घडो अशी प्रार्थना करित्ये-मी जन्मांतराचेठिकाणीं पूर्त (वापीकूपादिक), इष्ट (अग्निहोत्रादिक), दान (सुवर्णदानादिक), नियम (तीर्थयात्रादिक), व्रत (कृच्छ्रचांद्रायणादिक) यांच्या योगेंकरून तसाच देव, ब्राह्मण, गुरु इत्यादिकांच्या पूजनादिकेंकरून ब्रह्मादिकांचा नियंता भगवान् जर यथाशक्ति आराधन केला असेल, तर त्याच्या योगानें प्रसन्न झालेला तो भगवान् श्रीकृष्णच, येऊन

हे विभो तत्तस्मान्मे मया भवान्खलु पतिर्वृतः आत्मा च भवतोऽर्पितोऽतस्त्वमत्रागत्य मां भवतो जायां विधेहि । विपक्षे बाधकं द्योतयंत्याह । मा वीरभागमिति । वीरस्य तव भागं मामाराच्छीघ्रमेत्यागत्य चैद्यो माभिमर्शतु मास्पृशतु । मृगपतेर्बलिं गोमायुवत् गोमायुः सृगाल इवेति ॥ ३९ ॥ अनेकजन्मकृतैः सुकृतैरिदमेव भूयादिति प्रार्थयते । पूर्तेति । पूर्तं कूपादि । इष्टमग्निहोत्रादि । दत्तं हिरण्यादिदानम् । नियमस्तीर्थाटनादिः । व्रतं कृच्छ्रादि ॥ ४० ॥ ननु चैद्याय बंधुभिरर्पितायां त्वयि किमधुना करणीयमित्यपेक्षायामाह ।

तन्मे भवान्खलु वृतः पतिरंग जायामात्मार्पितश्च भवतोऽत्र विभो विधेहि ॥ मा वीरभागमभिमर्शतु चैद्य आराद्गोमायुवन्मृगपतेर्बलिमंबुजाक्ष ॥ ३९ ॥ पूर्तेष्टदत्तनियमव्रतदेवविप्रगुर्वर्चनादिभिरलं भगवान्परेशः ॥ आराधितो यदि गदाग्रज एत्य पाणिं गृह्णातु मे न दमघोषसुतादयोऽन्ये ॥ ४० ॥ श्वोभाविनि त्वमजितोद्वहने विदर्भान्गुप्तः समेत्य पृतनापतिभिः परीतः ॥ निर्मथ्य चैद्यमगधेंद्रबलं प्रसह्य मां राक्षसेन विधिनोद्वह वीर्यशुल्काम् ॥ ४१ ॥ अंतःपुरांतरचरीमनिहत्य बंधूंस्त्वामुद्वहे कथमिति प्रवदाम्युपायम् ॥ पूर्वेद्युरस्ति महती कुलदेवियात्रा यस्यां बहिर्नववधूर्गिरिजामुपेयात् ॥ ४२ ॥ यस्यांघ्रिपंकजरजःस्नपनं महांतो वांछत्युमापतिरिवात्मतमोपहत्यै ॥ यर्ह्यंबुजाक्ष न लभेय भवत्प्रसादं जह्यामसून्व्रतकृशान् शतजन्मभिः स्यात् ॥ ४३ ॥

श्वोभाविनीति । हे अजित श्वोभाविनि उद्वहने विवाहे प्रथमं गुप्तोऽलक्षित एवागत्य पश्चात्पृतनापतिभिः परिवृतः संश्चैद्यादिबलं निर्मथ्य प्रसह्य बलाद्वीर्यं प्रभावदर्शनमेव शुल्कं वैवाहिकं देयं यस्यास्तां माम् । अनेन राक्षसविधिनोद्वहेत्युपदेशरहस्यम् ॥ ४१ ॥ ननु भवतु शिशुपालादिबलप्रमथनमंतःपुरमध्यगतायास्तव हरणे त्वद्बंधुवधोऽपि प्रसज्येतेत्यत आह । अंतःपुरेति । पुराद्बहिर्वर्तमानां गिरिजामंबिकाम् । अंबिकागृहादेव मम हरणं सुकरमिति भावः ॥ ४२ ॥ ननु किमनेनानर्थकारिणा निर्बंधेन चैद्योऽपि

माझें पाणिग्रहण करो. दुसरे शिशुपाळादिक न करोत ॥ ४० ॥ आतां तुझ्या बंधूंनीं तुला शिशुपाळाला दिली असतां तेथें आह्मी येऊन काय करावें ? असें ह्मणाल तर त्याविषयीं उपाय सांगत्यें-हे अजित, दुसरे दिवशीं विवाह व्हावयाचा असतां तूं प्रथम गुप्तरूपानेंच विदर्भदेशामध्यें येऊन, नंतर सेनापतींनीं परिवेष्टित होऊन आणि शिशुपाळ जरासंध इत्यादिक राजांच्या सैन्याचा पराभव करून बलात्कारानें राक्षसविधीनें, पराक्रम दाखविणें हेंच जिचें मोल आहे अशा मला वरून घ्यावी ॥ ४१ ॥ आतां अंतःपुरामध्यें राहणाऱ्या तुझ्या हरणामध्यें तुझ्या बंधूंचाहि वध करण्याचा प्रसंग येईल, त्यांना न मारितां तुला कशी वरावी असें ह्मणाल तर उपाय सांगत्यें-या कुळांत विवाहाच्या पूर्वदिवशीं कुळदेवतेच्या दर्शनाची मोठी यात्रा आहे. ज्या यात्रेमध्यें नवी कन्या, नगराच्या बाहेर असलेल्या पार्वतीच्या दर्शनाकरितां जात असत्ये. तेव्हां अंबिकेच्या देवळांतूनच माझें हरण करणें सुकर आहे ॥ ४२ ॥ याप्रमाणें आपल्या स्वीकाराविषयीं भगवंताची प्रार्थना करून, असें झालें नाहींतर आपला निश्चय

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सांगत्ये–हे कमळाक्षा, शंकर व त्याच्यासारखे दुसरे ब्रह्मादिकहि आपल्या अज्ञानाची निवृत्ति होण्याकरितां ज्या तुझ्या चरणकमळाच्या रजःकणांनीं स्नान होण्याची इच्छा करितात त्या तुझा स्वीकाररूप प्रसाद जर मी पावल्यें नाहीं तर, उपवासादिक व्रतांनीं देह झिजवून व्याकुळ झालेल्या प्राणांचा त्याग करीन. याप्रमाणेंच वारंवार करीन, ह्मणजे शेंकडो जन्मांनींतरी तुझा प्रसाद होईलच ॥ ४३ ॥ ब्राह्मण ह्मणाला–हे यादवश्रेष्ठा असे हे रुक्मिणीचे गुप्त निरोप मी आणिले आहेत. याबद्दल तुला जें करण्यास योग्य असेल त्याचा विचार करून त्वरितच करावें ॥ ४४ ॥ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील दशमस्कंधाच्या उत्तरार्धांत रुक्मिणीप्रार्थनानिरूपणनामक हा बावन्नावा अध्याय समाप्त झाला ॥ ५२ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या त्रेपन्नाव्या अध्यायांत, अद्भुतलीला धारण करणाऱ्या श्रीकृष्णानें, विदर्भदेशामध्यें

तावत्प्रख्यातगुणकर्मा योग्य एव वर इति तत्राह । यस्येति । हे अंबुजाक्ष यस्य भवतोऽङ्घ्रिपंकजरजोभिः स्नपनमात्मनस्तमसोऽपहत्यै उमापतिरिव महांतो वांछंति तस्य भवतः प्रसादं यर्ह्यहं न लभेय न प्राप्नुयां तर्हि व्रतैरुपवासादिभिः कृशानसून्प्राणान् जह्यां त्यजेयम् । ततः किमित्यत आह । शतजन्मभिरिति । एवमेव वारंवारं जह्यां यावच्छतजन्मभिरपि तव प्रसादः स्यादिति ॥ ४३ ॥ अत्र यत्कर्तुं करणीयं तद्विमृश्य क्रियतामिति ॥ ४४ ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधे उत्तरार्धे द्विपंचाशत्तमोऽध्यायः ॥ ५२ ॥ ॥

ब्राह्मण उवाच ॥ इत्येते गुह्यसंदेशा यदुदेव मयाहृताः ॥ विमृश्य कर्तुं यच्चात्र क्रियतां तदनंतरम् ॥ ४४ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे उत्तरार्धे रुक्मिण्युद्वाहे द्विपंचाशत्तमोऽध्यायः ॥ ५२ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ वैदर्भ्याः स तु संदेशं निशम्य यदुनंदनः ॥ प्रगृह्य पाणिना पाणिं प्रहसन्निदमब्रवीत् ॥ १ ॥ श्रीभगवानुवाच ॥ तथाहमपि तच्चित्तो निद्रां च न लभे निशि ॥ वेदाहं रुक्मिणा द्वेषान्ममोद्वाहो निवारितः ॥ २ ॥ तामानयिष्य उन्मथ्य राजन्यापसदान्मृधे ॥ मत्परामनवद्यांगीमेधसोऽग्निशिखामिव ॥ ३ ॥ श्रीशुक उवाच ॥ उद्वाहर्क्षं च विज्ञाय रुक्मिण्या मधुसूदनः ॥ रथः संयुज्यतामाशु दारुकेत्याह सारथिम् ॥ ४ ॥

त्रिपंचाशत्तमे गत्वा विदर्भानद्भुतेहितः ॥ रुक्मिणीमहरत्कृष्णो मिषतां द्विषतां बलात् ॥ १ ॥ १ ॥ निद्राया अलाभे कारणांतरम् । वेदेति । तया अकथितमप्यहं जानामीति ॥ २ ॥ आनयिष्ये आनेष्यामि । राजन्यापसदान्राजसु हीनान् उन्मथ्यानयने दृष्टांतः । एधस इति ॥ ३ ॥ उद्वाहर्क्षमिति । परश्वो रात्रौ विवाहनक्षत्रमिति विज्ञाय तस्यां रात्र्यां प्रस्थाय प्रातर्विदर्भदेशानगमत् । श्वोभाविनि त्वमजितोद्वहने विदर्भान् गुप्तः समेत्येति रुक्मिणीसंदेशात् ॥ ४ ॥

जाऊन, सर्व शत्रु पहात असतां, बलात्कारानें रुक्मिणीचें हरण केलें, अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, त्या श्रीकृष्णानें रुक्मिणीचा निरोप श्रवण करून, आपल्या हातानें त्या ब्राह्मणाचा हात ग्रहण करून हास्य करीत करीत असें भाषण केलें कीं ॥ १ ॥ श्रीभगवान् ह्मणाला–हे ब्राह्मणश्रेष्ठा, जशी ती वैदर्भी व्याकुळचित्त झाली आहे त्याप्रमाणें मीहि व्याकुळ झाल्यामुळें रात्रीची झोंपसुद्धां पावत नाहीं. कारण, माझ्या द्वेषानेंच रुक्म्यानें माझा विवाह निवारण केला आहे, असें तूं न सांगितलेलेंहि मी जाणत आहें ॥ २ ॥ ह्मणून राजांमध्यें अधम अशा त्या शिशुपाळादिकांचा युद्धामध्यें पराभव करून, जिला मीच पतित्वेंकरून मान्य आहें व जिचे सर्व अवयव सुरेख आहेत अशा त्या रुक्मिणीला, मी, जसा, वारा जळत असलेल्या काष्ठापासून अग्नीच्या ज्वाळेला हरण करितो त्याप्रमाणें हरण करितों ॥ ३ ॥ असें भाषण करून नंतर त्या श्रीकृष्णानें रुक्मिणीचें विवाहनक्षत्र ‘ परवांचे दिवशीं रात्रीं आहे असें ’ जाणून, सारथ्याला,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हे दारुका, लवकर रथाला घोडे जोडून घेऊन ये असें सांगितलें ॥ ४ ॥ त्या दारुकानेंहि शैब्य, सुग्रीव, मेघपुष्प आणि बलाहक या नांवांचे चार घोडे जोडलेला रथ श्रीकृष्णाचे समीपभागीं आणून तो हात जोडून उभा राहिला ॥ ५ ॥ नंतर श्रीकृष्णानें, त्या ब्राह्मणाला रथावर बसवून व स्वतांहि आरोहण करून शीघ्रगमन करणाऱ्या त्या घोड्यांच्या योगेंकरून, आनर्तदेशांतून एका रात्रींनेंच विदर्भ देशांमध्यें गमन केलें ॥ ६ ॥ इकडे विदर्भ देशांचा अधिपति पुत्राच्या स्नेहानें त्याच्या स्वाधीनपणानें वागणारा तो भीष्मक राजा, आपली कन्या रुक्मिणी शिशुपाळाला देण्याकरितां नगराला अलंकार करविणें, व देवांच्या महापूजा बांधविणें इत्यादिक कर्में करवूं लागला ॥ ७ ॥ त्यावेळीं ज्यामध्यें, झाडलेले व सेचन केलेले मार्ग गल्ल्या व चव्हाटे आहेत असें तें नगर, चित्रविचित्र ध्व-

शैब्येत्यादीनि चत्वार्यश्वनामानि ॥ ५ ॥ ६ ॥ पुत्रस्य रुक्मिणः स्नेहेन तद्वशमनुगच्छतीति तथा । अनेन शिशुपालेऽनभिरुचिं द्योतयति । कर्माणि पुरालंकारपितृदेवार्चनादीनि ॥ ७ ॥ तान्येवाह । पुरमित्यादिचतुर्भिः । संमृष्टाः संसिक्ताश्च मार्गादयो यस्मिंस्तत् । चित्रा ध्वजेषु पताकास्ताभिः समलंकृतमकारयत् ॥ ८ ॥ स्रग्गंधमाल्याभरणैरित्यत्र

स चाश्वैः शैब्यसुग्रीवमेघपुष्पबलाहकैः ॥ युक्तं रथमुपानीय तस्थौ प्रांजलिरग्रतः ॥ ५ ॥ आरुह्य स्यंदनं शौरिर्द्विजमारोप्य तूर्णगैः ॥ आनर्तादेकरात्रेण विदर्भानगमद्धयैः ॥ ६ ॥ राजा स कुंडिनपतिः पुत्रस्नेहवशंगतः ॥ शिशुपालाय स्वां कन्यां दास्यन्कर्माण्यकारयत् ॥ ७ ॥ पुरं संमृष्टसंसिक्तमार्गरथ्याचतुष्पथम् ॥ चित्रध्वजपताकाभिस्तोरणैः समलंकृतम् ॥ ८ ॥ स्रग्गंधमाल्याभरणैर्विरजोंऽबरभूषितैः ॥ जुष्टं स्त्रीपुरुषैः श्रीमद्गृहैरगुरुधूपितैः ॥ ९ ॥ पितॄन्देवान्समभ्यर्च्य विप्रांश्च विधिवन्नृप ॥ भोजयित्वा यथान्यायं वाचयामास मंगलम् ॥ १० ॥ सुस्नातां सुदतीं कन्यां कृतकौतुकमंगलाम् ॥ अहतांशुकयुग्मेन भूषितां भूषणोत्तमैः ॥ ११ ॥ चक्रुः सामर्ग्यजुर्मंत्रैर्वध्वा रक्षां द्विजोत्तमाः ॥ पुरोहितोऽथर्वविद्वै जुहाव ग्रहशांतये ॥ १२ ॥ हिरण्यरूप्यवासांसि तिलांश्च गुडमिश्रितान् ॥ प्रादाद्धेनूश्च विप्रेभ्यो राजा विधिविदां वरः ॥ १३ ॥

मत्वर्थो द्रष्टव्यः । यद्वा स्रग्गंधमाल्यान्याबिभ्रतीति तथा तैः । तथा विरजोंऽबरैर्भूषितैश्च स्त्रीपुरुषैर्जुष्टम् । तथा श्रीमद्भिर्गृहैश्च जुष्टम् ॥ ९ ॥ यथान्यायमन्यांश्च कन्यां प्रति मंगलं वाचयामास ॥ १० ॥ कृतं कौतुकेन विवाहसूत्रेण मंगलं यस्यास्ताम् । अहतं नवीनम् । भूषणोत्तमैश्च भूषिताम् ॥ ११ ॥ वध्वास्तस्याः कन्यायाः अथर्वविदथर्वणमंत्रवित् ॥ १२ ॥ १३ ॥

जांचेठिकाणीं उभारलेल्या पताकांनीं व जागोजागीं बांधलेल्या तोरणांनीं उत्तमरीतीनें अलंकृत करविलें होतें ॥ ८ ॥ तसेंच माळा, गंध, पुष्पें, भूषणें व स्वच्छ वस्त्रें यानीं भूषित झालेल्या स्त्रीपुरुषांनीं सेवन केलेलें व अगुरूच्या योगानें सुगंधयुक्त झालेल्या संपत्तियुक्त घरांनीं युक्त होतें ॥ ९ ॥ हे राजा, भीष्मक राजानें, पितर, देव आणि ब्राह्मण यांचें विध्युक्तप्रकारें पूजन करून तसेंच ब्राह्मणांना उत्तमप्रकारें भोजन घालून, ब्राह्मणांकडून कन्येचें पुण्याहवाचन करविलें ॥ १० ॥ तसेंच विवाहसूत्र बंधन करून, जिचें मंगल केलें आहे व जिला उत्तमप्रकारें स्नान घातलें आहे अशा त्या सुंदरदंतयुक्त कन्येला कोरें वस्त्र नेसवून दुसरें पांघरवून उत्तम भूषणांनीं भूषित केलें ॥ ११ ॥ आणि त्यावेळीं तिला श्रेष्ठ ब्राह्मणांनीं सामवेद, ऋग्वेद व यजुर्वेद यांच्या मंत्रांनीं अभिमंत्रण केलेला आंगारा लावून त्या कन्येचा रक्षणविधि केला. अथर्वणवेदांतील शांतिकल्प जाणणाऱ्या पुरोहितानें, प्रतिकूळ असलेल्या ग्रहांच्या शांतीकरितां अग्नीमध्यें ग्रहमख केला ॥ १२ ॥ त्यावेळीं शास्त्रोक्तप्रकार जाणणारांमध्यें श्रेष्ठ असा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्या भीष्मकराजानें, ब्राह्मणांना, सुवर्ण, रुपें, वस्त्रें व गूळ मिसळलेले तीळ, आणि गाई यांचीं दानें केलीं ॥ १३ ॥ त्याप्रमाणें चेदिदेशांचा अधिपति जो दमघोषनामक राजा त्यानें, आपला पुत्र जो शिशुपाळ त्याच्याहि विवाहाविषयीं योग्य असें जें कर्म तें सर्व मंत्रवेत्त्या ब्राह्मणांकडून करविलें ॥ १४ ॥ तदनंतर सुवर्णपुष्पांच्या माळा धारण करणाऱ्या व मदाचा स्राव होणाऱ्या हत्तींच्या समुदायांनीं, रथांनीं, पदातींनीं व घोडेस्वारांनीं व्याप्त असलेल्या सैन्यांनीं परिवेष्टित असा तो शिशुपाळ, आपल्या नगरांतून कुंडिनपुराप्रत जावयास निघाला ॥ १५ ॥ नंतर, तो आपल्या नगराजवळ आला असें ऐकून विदर्भदेशाधिपति भीष्मक राजानें, त्या शिशुपाळाला सामोरें जाऊन व त्याची सीमांतपूजा करून, वरास उतरण्यास योग्य जें दुसरें स्थान केलेलें होतें तेथें त्यास उतरविलें ॥ १६ ॥ त्या कुंडिनपुरामध्यें शिशुपाळाचे पक्षपाती, रामकृष्णाचे द्वेष्टे—शाल्व, जरासंध, दंतवक्र, विदूरथ आणि पौंड्रकादिक हजारो राजे, जर बळरामादिक यादवांनीं युक्त असा श्रीकृष्ण, येऊन कन्या हरण करील तर सर्व आम्हीं

अभ्युदये उचितम् ॥ १४ ॥ ततश्चतुरंगसैन्यैः परीतः परिवृतः कुंडिनं भीष्मकस्य पुरं ययौ । मदं च्यवंते इति मदच्युतस्तैः स्यंदनैः रथैः हेमरचिता माला विचंते येषु तैः

एवं चेदिपती राजा दमघोषः सुताय वै ॥ कारयामास मंत्रज्ञैः सर्वमभ्युदयोचितम् ॥ १४ ॥ मदच्युद्भिर्गजानीकैः स्यंदनैर्हेममा-
लिभिः ॥ पत्त्यश्वसंकुलैः सैन्यैः परीतः कुंडिनं ययौ ॥ १५ ॥ तं वै विदर्भाधिपतिः समभ्येत्याभिपूज्य च ॥ निवेशयामास मुदा क-
ल्पितान्यनिवेशने ॥ १६ ॥ तत्र शाल्वो जरासंधो दंतवक्रो विदूरथः ॥ आजग्मुश्चैद्यपक्षीयाः पौंड्रकाद्याः सहस्रशः ॥ १७ ॥ कृ-
ष्णरामद्विषो यत्ताः कन्यां चैद्याय साधितुम् ॥ यद्यागत्य हरेत्कृष्णो रामाद्यैर्यदुभिर्वृतः ॥ १८ ॥ योत्स्यामः संहतास्तेन इति नि-
श्चितमानसाः ॥ आजग्मुर्भूभुजः सर्वे समग्रबलवाहनाः ॥ १९ ॥ श्रुत्वैतद्भगवान्रामो विपक्षीयनृपोद्यमम् ॥ कृष्णं चैकं गतं हर्तुं क-
न्यां कलहशंकितः ॥ २० ॥ बलेन महता सार्धं भ्रातृस्नेहपरिप्लुतः ॥ त्वरितः कुंडिनं प्रागाद्गजाश्वरथपत्तिभिः ॥ २१ ॥ भीष्म-
कन्यावरारोहा कांक्षंत्यागमनं हरेः ॥ प्रत्यापत्तिमपश्यंती द्विजस्याचिंतयत्तदा ॥ २२ ॥ अहो त्रियामांतरित उद्वाहो मेऽल्पराधसः ॥
नागच्छत्यरविंदाक्षो नाहं वेद्म्यत्र कारणम् ॥ २३ ॥

॥ १५ ॥ कल्पितं निर्मितं यदन्यनिवेशनं तस्मिन् ॥ १६ ॥ १७ ॥ यदि श्रीकृष्णो हरेदिति शंकिताः । कन्यां साधयितुमित्यर्थः ॥ १८ ॥ १९ ॥ २० ॥ २१ ॥ सूर्योदयात्पूर्वमेवौत्सुक्येन रुक्मिण्यचिंतयदित्याह । भीष्मकन्येति । प्रत्यापत्तिं प्रत्यागमनम् ॥ २२ ॥ त्रियामा रात्रिस्तावन्मात्रेणांतरितः । अल्पराधसो मंदभाग्यायाः ॥ २३ ॥

एकत्र मिळून त्याच्याबरोबर युद्ध करूं, असा मनांत निश्चय केलेले ते सावधपणें आपापल्या सर्व सैन्यांनीं व वाहनांनीं युक्त होत्साते, शिशुपाळाला कन्या साधून देण्याकरितां प्राप्त झाले हो. ॥ १७ ॥ १८ ॥ १९ ॥ इकडे द्वारकेमध्यें भगवान् बळरामानें शत्रुपक्षपाती राजांचा हा प्रयत्न ऐकून, तसेंच सहाय्यावांचून एकटाच श्रीकृष्ण कन्या हरण करण्याकरितां गेला आहे असें ऐकून, आणि तेथें कृष्णाचा व त्या राजांचा कलह होईल अशी शंका मनांत आणून, भ्रात्या–श्रीकृष्णाचेठिकाणीं जो स्नेह त्यानें व्याप्त होत्साता, तो गज, अश्व, रथ व पदाति यांनीं युक्त अशा मोठ्या सैन्यासहवर्तमान कुंडिननगराप्रत निघून गेला ॥ २० ॥ २१ ॥ इकडे जिचा कटिप्रदेश सुंदर आहे अशी रुक्मिणी सूर्योदयाचे पूर्वींच श्रीहरीच्या आगमनाची इच्छा करित होत्साती, ब्राह्मणाचें माघारें येणें अजून कां झालें नाहीं असें जाणून, त्यावेळीं मनांत चिंतन करूं लागली कीं– ॥ २२ ॥ अहो, मंदभाग्य अशा माझ्या विवाहाला एकरात्रच मध्यें राहिली आहे, अजूनहि भगवान् श्रीकृष्ण कां येत नाहीं याचें कारण काय आहे? तें मी जाणत

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नाहीं ॥ २३ ॥ बरें माझा निरोप घेऊन गेलेला जो ब्राह्मण तोहि अजून येत नाहीं, त्यापेक्षां असा तर्क होतो कीं, —स्तुत्यस्वरूपी त्या भगवंतानें प्रथम इकडे येण्यासाठीं कांहीं उद्योग चालविला होता ह्मणून त्या ब्राह्मणासहि परत पाठविलें नाहीं. नंतर प्रस्थानाच्या वेळीं कृष्णानें माझेठिकाणीं कांहीं उद्धटपणाचा दोष मनांत आणून तो, माझ्या पाणिग्रहणाविषयीं येत नाहीं व त्यानें ब्राह्मणास परत पाठविलें ह्मणून त्यासहि येण्यास विलंब लागला ॥ २४ ॥ अथवा भाग्यहीन अशा मला, ब्रह्मदेव व महादेव हे अनुकूळ (कार्यसाधक) नाहींत ! तशीच हिमाचलाची कन्या, पतिव्रता रुद्राणी गौरी देवीहि प्रतिकूळ झाली आहे ! ॥ २५ ॥ ती बाळी रुक्मिणी याप्रमाणें चिंतन करीत असतां, अजूनहि कृष्ण येण्याचा काळ झाला नाहीं असें मानून, जिचें चित्त गोविंदानें हरण केलें आहे अशी ती, दुःखाश्रूनीं भरलेले नेत्र मिटून स्तब्ध राहिली ॥ २६ ॥

जुगुप्सितं धाष्टर्यादि । अपीति शंकायाम् । नायाति हि कृतोद्यम इति । अयमर्थः । आदौ कृतोद्यमत्वात्तं न प्रस्थापितवान् । प्रस्थानावसरे च किंचिन्मयि जुगुप्सितं मत्वा प्रत्याचष्ट । अतः सोऽपि द्विजो नूनं नायातीति ॥ २४ ॥ यद्वा । ततो निर्गतोऽपि श्रीकृष्णो मद्दैववैमुख्यात्क्वचित्प्रतिबद्धो भवेदित्याह । दुर्भगाया इति ॥ २५ ॥ कालज्ञा नाऽधुनापि गोविंदागमनकाल इति मन्वाना किंचिदाश्वस्तचित्ता सती चिंतास्तब्धे लोचने निमीलितवतीत्यर्थः ॥ २६ ॥ प्रियभाषिणः प्रियसूचकाः ॥ २७ ॥ पुरोपवनं

सोऽपि नावर्ततेऽद्यापि मत्संदेशहरो द्विजः ॥ अपि मय्यनवद्यात्मा दृष्ट्वा किंचिज्जुगुप्सितम् ॥ मत्पाणिग्रहणे नूनं नायाति हि कृतोद्यमः ॥ २४ ॥ दुर्भगाया न मे धाता नानुकूलो महेश्वरः ॥ देवी वा विमुखा गौरी रुद्राणी गिरिजा सती ॥ २५ ॥ एवं चिंतयती बाला गोविंदहृतमानसा ॥ न्यमीलयत कालज्ञा नेत्रे चाश्रुकलाकुले ॥ २६ ॥ एवं वध्वाः प्रतीक्षंत्या गोविंदागमनं नृप ॥ वाम ऊरुर्भुजो नेत्रमस्फुरन्प्रियभाषिणः ॥ २७ ॥ अथ कृष्णविनिर्दिष्टः स एव द्विजसत्तमः ॥ अंतःपुरचरीं देवीं राजपुत्रीं ददर्श ह ॥ २८ ॥ सा तं प्रहृष्टवदनमव्यग्रात्मगतिं सती ॥ आलक्ष्य लक्षणाभिज्ञा समपृच्छच्छुचिस्मिता ॥ २९ ॥ तस्या आवेदयत्प्राप्तं शशंस यदुनंदनम् ॥ उक्तं च सत्यवचनमात्मोपनयनं प्रति ॥ ३० ॥

प्राप्तेन श्रीकृष्णेन विनिर्दिष्टः प्राप्तं मां कथयेत्यादिष्टः ॥ २८ ॥ न व्यग्रा आत्मनो देहस्य गतिर्यस्य तम् । लक्षणाभिज्ञा दूतस्य लक्षणं तत्तत्कार्यसूचकमभिजानातीति तथा ॥ २९ ॥ तस्यै प्राप्तं यदुनंदनमावेदितवान् । तं च शशंस । आत्मोपनयनं प्रति आत्मना स्वयं श्रीकृष्णस्यानयनं प्रति तेन द्विजेन सत्यवचनं प्रोक्तमिति । आत्मनः प्राणेश्वरस्येति वा । यद्वा आत्मनस्तस्या उपनयनं प्रति श्रीकृष्णेन यदुक्तं सत्यवचनं तामानयिष्य इत्यादि तच्च शशंसावर्णयदित्यर्थः ॥ ३० ॥

हे राजा, याप्रमाणें गोविंदाच्या येण्याची प्रतीक्षा करणाऱ्या त्या रुक्मिणीला प्रियसूचक अशीं, डावी मांडी, डावा भुज व डावा नेत्र हीं तिचीं अंगें स्फुरण पावूं लागलीं ॥ २७ ॥ नंतर, श्रीकृष्णानें मी प्राप्त झालों असें रुक्मिणीला कळीव असें सांगून पाठविलेल्या त्याच ब्राह्मणश्रेष्ठानें अंतःपुरांत राहणाऱ्या प्रकाशमान अशा त्या रुक्मिणीला अवलोकन केलें ॥ २८ ॥ तेव्हां, ती रुक्मिणी ज्याच्या देहाची स्थिति व्यग्र नसून शांत आहे अशा हर्षयुक्त मुख असलेल्या त्या ब्राह्मणाला अवलोकन करून भगवत्परायण व कृतकार्य झालेल्या दूताचें लक्षण जाणणारी, शुद्ध हास्ययुक्त अशी ती ' कार्य करून आलांना ? ह्मणून ' विचारूं लागली ॥ २९ ॥ तेव्हां त्या रुक्मिणीला, त्या ब्राह्मणानें, श्रीकृष्ण प्राप्त झाला आहे असें कळविलें आणि त्या श्रीकृष्णाचीहि तिच्याजवळ प्रशंसा केली, आणि रुक्मिणीला घेऊन जाणार अशाबद्दल ' युद्धामध्यें दुष्ट राजांना

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जिंकून तिला मी आणितों असें ' जें भगवंतानें सत्य भाषण केलें होतें तेंहि तिला त्या ब्राह्मणानें कळविलें ॥ ३० ॥ तो श्रीकृष्ण आला असें जाणून जिवें मन हर्षयुक्त झालें आहे अशी ती रुक्मिणी, परमानंदरूप श्रीकृष्णाला आणून समर्पण करणाऱ्या या ब्राह्मणाला काय बक्षीस द्यावें ? असा विचार करीत असतां या कार्याबद्दल नमस्काराहून अन्य सर्वस्व जरी अर्पण केलें तथापि तें पुरें नसून कमीच आहे असें पाहत होत्साती, तिनें त्यावेळीं केवळ त्याला नमस्कारच केला आणि नंतर पुष्कळ द्रव्यहि दिलें ॥ ३१ ॥ त्यावेळीं आपल्या कन्येचा विवाह पाहण्याविषयीं उत्सुक असे रामकृष्ण प्राप्त झाले आहेत असें ऐकून भीष्मकराजा, वाद्यघोष व पूजासाहित्यें यांसहवर्तमान सामोरा गेला ॥ ३२ ॥ नंतर, त्या भीष्मकानें त्यांना मधुपर्क, नवीं उंची वस्त्रें व फार प्रिय असे उत्तम उत्तम वस्तूंचे नजराणे अर्पण करून, तो महाबुद्धिमान् होता ह्मणून श्रीकृष्ण खरोखर कन्येला वरण्याकरितांच आला आहे असें जाणून त्यानें, वरपूजेच्या विधीनें त्याचें पूजन केलें आणि सैन्यासहित व भृत्यादिकांसहित

तं श्रीकृष्णम् । अस्मिन्कार्ये सर्वस्वार्पणमप्यपर्याप्तमिति तदुचितं प्रियमपश्यंती तदा केवलं ननाम । पश्चाद्बहु ददावित्यर्थः । यद्वा मां श्रियं ये नमंति ते तावत्सर्वसंपदामास्पदं भवंति किं पुनर्मयि प्रणतायामिति ततोऽधिकमन्यत्प्रियमपश्यंती ननामेति ॥ ३१ ॥ ३२ ॥ ३३ ॥ महामतिरित्यनेन श्रीकृष्णो बाढं कन्यामुद्वोढुमेवागतः स्यादिति

तमागतं समाज्ञाय वैदर्भी हृष्टमानसा ॥ न पश्यंती ब्राह्मणाय प्रियमन्यन्ननाम सा ॥ ३१ ॥ प्राप्तौ श्रुत्वा स्वदुहितुरुद्वाहप्रेक्षणोत्सुकौ ॥ अभ्ययात्तूर्यघोषेण रामकृष्णौ समर्हणैः ॥ ३२ ॥ मधुपर्कमुपानीय वासांसि विरजांसि सः ॥ उपायनान्यभीष्टानि विधिवत्समपूजयत् ॥ ३४ ॥ तयोर्निवेशनं श्रीमदुपकल्प्य महामतिः ॥ ससैन्ययोः सानुगयोरातिथ्यं विदधे यथा ॥ ३४ ॥ एवं राज्ञां समेतानां यथा वीर्यं यथा वयः ॥ यथा बलं यथा वित्तं सर्वैः कामैः समर्हयत् ॥ ३५ ॥ कृष्णमागतमाकर्ण्य विदर्भपुरवासिनः ॥ आगत्य नेत्रांजलिभिः पपुस्तन्मुखपंकजम् ॥ ३६ ॥ अस्यैव भार्या भवितुं रुक्मिण्यर्हति नापरा ॥ असावप्यनवद्यात्मा भैष्म्याः समुचितः पतिः ॥ ३७ ॥ किंचित्सुचरितं यन्नस्तेन तुष्टस्त्रिलोककृत् ॥ अनुगृह्णातु गृह्णातु वैदर्भ्याः पाणिमच्युतः ॥ ३८ ॥

वरोचितेन विधिना समपूजयदिति सूचितम् । यथा यथावत् ॥ ३४ ॥ समेतानां राज्ञां मध्ये वीर्याद्यनतिक्रम्य तं तं समर्हितवानित्यर्थः ॥ ३५ ॥ श्रीकृष्णे भाविकर्मसूचकं जनानुरागं दर्शयति । कृष्णमागतमिति त्रिभिः ॥ ३६ ॥ अस्यैव रुक्मिण्येवार्हत्येव असावेव भैष्म्या एव समुचित एवेति षडवधारणानि । तत्रैकस्मिन्व्यतिरेकप्रदर्शनमुपलक्षणार्थं नापरेति नच वाक्यभेददोषः । अनूद्यविधेयभेदेन विभिन्नानामेव वाक्यानां सह प्रयोगात् । ग्रहं संमार्ष्टीत्यादिवदिति ॥ ३७ ॥ अयमेवानुग्रह इति निर्दिशंति । गृह्णात्विति ॥ ३८ ॥

त्या रामकृष्णांना, भोगसाहित्यादि समृद्धीनें युक्त असें राहावयास स्थान निवेदन करून त्यांचा उत्तमप्रकारें सत्कार केला ॥ ३३ ॥ ३४ ॥ याप्रमाणें अन्यहि सर्व आलेल्या राजांना त्यांचा जसा पराक्रम, जसें वय, जसें बळ व जसें ऐश्वर्य होतें त्याप्रमाणें सर्वभोग अर्पण करून भीष्मकानें त्यांचा सत्कार केला ॥ ३५ ॥ आतां, श्रीकृष्णाचेठिकाणीं, पुढील कर्माचा सूचक असा लोकांचा प्रेमा दाखवितो—श्रीकृष्ण प्राप्त झाला असें ऐकून त्या विदर्भपुरांतील लोकांनीं जिकडूनतिकडून श्रीकृष्णाजवळ येऊन आपल्या नेत्ररूप ओंजळींनीं त्याचें मुखकमळसंबंधी अमृत प्राशन केलें ॥ ३६ ॥ आणि आपणामध्येंच परस्पर असें भाषण केलें कीं,—या श्रीकृष्णाची स्त्री होण्यास रुक्मिणीच योग्य आहे; दुसरी कोणी नाहीं. आणि रुक्मिणीलाहि ज्याचा देह स्तुत्य आहे असा हा श्रीकृष्णच पति होण्यास योग्य आहे ॥ ३७ ॥ यास्तव आमचें जन्मांतरीं केलेलें जर कांहीं पुण्य असलें तर त्याच्या योगानें हा त्रैलोक्याधिपति भगवान् श्रीकृष्ण, संतुष्ट होऊन आह्मांवर अनुग्रह करो आणि रुक्मिणीचें पाणिग्रहण करो ॥ ३८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

याप्रमाणें प्रेमाच्या अशानें तत्पर झालेले पुरवासी लोक आपआपणामध्यें भाषण करूं लागले. इकडे ती कन्या, अंतःपुरांतून शूरपुरुषांनीं रक्षित होत्साती अंबिकादेवीच्या देवळांत जाण्याकरितां निघाली ॥ ३९ ॥ ती उत्तमप्रकारें श्रीकृष्णाच्या चरणकमळाचें वारंवार ध्यान करीत चरणचालीनेंच भवानीदेवीचे चरणपल्लव पाहण्याकरितां निघाली ॥ ४० ॥ ती मौनव्रत धारण करणारी व मातृगणांनीं व सख्यांनीं परिवेष्टित होती, कवचादिक धारण करणाऱ्या व आयुधें उचलून धारण करणाऱ्या शूर योद्ध्यांनीं रक्षित होती ॥ ४१ ॥ त्यावेळीं मृदंग, शंख, पणव, डंके व दुंदुभि हीं वाद्यें वाजूं लागलीं. नानाप्रकारच्यीं पूजासाहित्यें पक्वान्नादिकांचे नैवेद्य, फळफळावळी यांचीं ताटें भरून घेऊन हजारो वारांगना, माळा, गंध वस्त्रें व भूषणें यांनीं अलंकृत अशा ब्राह्मणांच्या स्त्रिया, गायन करणारे गायक व वाद्यें वाजविणारे

प्रेम्णः कलालेशस्तेन बद्धा वदंति स्म । संपूर्णं प्रेम तेषां हृद्येवावर्तत इत्यर्थः॥ ३९ ॥ गमनं विशिनष्टि द्वयेन । पद्भ्यामिति ॥ ४० ॥ अपिच मृदंगेत्यादि जघ्निरे आहताः । वादिता इत्यर्थः ॥ ४१ ॥ वारमुख्या गणिकोत्तमाः ॥ ४२ ॥ ४३ ॥ उपस्पृश्याचम्य ॥ ४४ ॥ प्रवयसो वृद्धाः । भवान्वितामिति भवस्यौपसर्जनत्वं स्त्रीकर्मोचितमुक्तम् ॥ ४५ ॥

एवं प्रमेकलाबद्धा वदंति स्म पुरौकसः ॥ कन्या चांतःपुरात्प्रागाद्भटैर्गुप्तांऽबिकालयम् ॥ ३९ ॥ पद्भ्यां विनिर्ययौ द्रष्टुं भवान्याः पादपल्लवम् ॥ सा चानुध्यायती सम्यङ् मुकुंदचरणांबुजम् ॥ ४० ॥ यतवाङ्मातृभिः सार्धं सखीभिः परिवारिता ॥ गुप्ता राजभटैः शूरैः सन्नद्धैरुद्यतायुधैः ॥ मृदंगशंखपणवास्तूर्यभेर्यश्च जघ्निरे ॥ ४१ ॥ नानोपहारबलिभिर्वारमुख्याः सहस्रशः ॥ स्रग्गंधवस्त्राभरणैर्द्विजपत्न्यः स्वलंकृताः ॥ ४२ ॥ गायंतश्च स्तुवंतश्च गायका वाद्यवादकाः ॥ परिवार्य वधूं जग्मुः सूतमागधबंदिनः ॥ ४३ ॥ आसाद्य देवीसदनं धौतपादकरांबुजा ॥ उपस्पृश्य शुचिः शांता प्रविवेशांबिकांतिकम् ॥ ४४ ॥ तां वै प्रवयसो बालां विधिज्ञा विप्रयोषितः ॥ भवानीं वंदयांचक्रुर्भवपत्नीं भवान्विताम् ॥ ४५ ॥ नमस्ये त्वांऽबिकेऽभीक्ष्णं स्वसंतानयुतां शिवाम् ॥ भूयात्पतिर्मे भगवान्कृष्णस्तदनुमोदताम् ॥ ४६ ॥ अद्भिर्गंधाक्षतैर्धूपैर्वासःस्रङ्माल्यभूषणैः ॥ नानोपहारबलिभिः प्रदीपावलिभिः पृथक् ॥ ४७ ॥

नमस्य इति । रुक्मिण्या तदैव दृष्टोऽयं मंत्रः । स्वसंतानयुतां गणेशादिसहिताम् । आत्मारामोऽसौ कथं त्वत्पतिर्भवेदिति चेदत आह । तदनुमोदतामिति । भवती श्रीकृष्ण एव वा ॥ ४६ ॥ वासःस्रग्गंधादिभिरंबिकां समपूजयत् ॥ ४७ ॥

वाद्यवादक व स्तुतिवगैरे करणारे सूत, मागध व बंदी हे सर्व त्या कन्येला सभोंवार परिवेष्टित करून निघाले ॥ ४२ ॥ ४३ ॥ ती रुक्मिणी, देवीच्या मंदिराजवळ येऊन तेथें तिनें हस्तपादकमळांचें प्रक्षालन करून व उदकाचें आचमन करून शुचिर्भूत व शांत होऊन नंतर अंबिकादेवीजवळ प्रविष्ट झाली ॥ ४४ ॥ त्यावेळीं वयानें वृद्ध व देवीचा पूजाप्रकार जाणणाऱ्या अशा सुवासिनी पुरोहितस्त्रियांनीं शंकराच्या अर्धांगी असलेल्या भवानीदेवीला त्या रुक्मिणीकडून वंदन करविलें ॥ ४५ ॥ त्यावेळीं रुक्मिणीला आपोआप स्फुरण पावलेल्या मंत्राचा अर्थ असा कीं, हे अंबिके, आपल्या गणेशादि संततीनें युक्त व मंगलरूप अशा तुला मी वारंवार नमस्कार करित्यें. भगवान् श्रीकृष्ण माझा पति व्हावा अशाविषयीं तूं अनुग्रह करावा ॥ ४६ ॥ याप्रमाणें नमस्कारपूर्वक वराची प्रार्थना करून नंतर शुद्ध उदक, गंध, अक्षता, धूप, वस्त्रें, पुष्पांच्या माळा, पुष्पें, भूषणें, नानाप्रकारचे नैवेद्य व दुसरींहि नारळवगैरे पूजासाधनें आरार्तिक्य इत्यादिक निरनिराळे पदार्थ अर्पण करून रुक्मिणीनें देवीचें पूजन केलें ॥ ४७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तसेंच त्या पदार्थांनीं आणि मीठ, अपूप, तांबूल, कंठसूत्र, फळ व ऊंस यांनीं युक्त असलेल्या वायनाच्या समर्पणानें सुवासिनी अशा ब्राह्मणस्त्रियांचें पूजन केलें ॥ ४८ ॥ नंतर, त्या स्त्रियांनीं त्या रुक्मिणीला, देवीचा निर्माल्यादि प्रसाद देऊन आशीर्वादहि दिले. तेव्हां रुक्मिणीनें, देवीला व सुवासिनींना नमस्कार करून त्या निर्माल्यप्रसादादिकांचा स्वीकार केला ॥ ४९ ॥ नंतर मौनव्रताचा त्याग करून रत्नांच्या मुद्रिकांनीं सुशोभित अशा आपल्या हातानें सखीचा हात ग्रहण करून ती रुक्मिणी, त्या अंबिकेच्या देवालयांतून बाहेर निघाली ॥ ५० ॥ तेव्हां तिला पाहून तेथें प्राप्त झालेले ते यशस्वी वीर, त्या रुक्मिणीच्या दर्शनापासून उत्पन्न झालेल्या मदनानें पीडित होऊन मोह पावले. ती अशी होती कीं,- देवाची (भगवंताची) मायाच कीं काय ? अशी वीरांना मोह उत्पन्न करणारी, जिचा कटिप्रदेश कृश आहे, जिचें मुख कर्णांतील कुंडलांनीं सुशोभित आहे, जिला अजून रजोदर्शन प्राप्त झालें नाहीं, जिच्या कमरेचेठिकाणीं रत्नाचा कमरपट्टा घातलेला आहे, जिचे यौवनप्रादुर्भावसूचक स्तन व्यक्त दिसूं लागले

तथा विप्रस्त्रियोऽपि तैर्द्रव्यैर्लवणादिभिश्च समपूजयदिति ॥ ४८ ॥ शेषां निर्माल्यम् ॥ ४९ ॥ मुनिव्रतं मौनम् । भृत्यां सखीम् ॥ ५० ॥ तां विलोक्य वीरा मुमुहुरिति तृतीयेनान्वयः । श्यामामजातरजस्काम् । कुंतलेभ्यः शंकिते इव चपले ईक्षणे यस्यास्ताम् ॥ ५१ ॥ द्विजा एव कुंदानां कुड्मलानि मुकुलानि बिंबफलवचोऽधरस्तस्य द्युतिभिः शोणा-

विप्रस्त्रियः पतिमतीस्तथा तैः समपूजयत् ॥ लवणापूपतांबूलकंठसूत्रफलेक्षुभिः ॥ ४८ ॥ तस्यै स्त्रियस्ताः प्रददुः शेषां युयुजुरा-
शिषः ॥ ताभ्यो देव्यै नमश्चक्रे शेषां च जगृहे वधूः ॥ ४९ ॥ मुनिव्रतमथ त्यक्त्वा निश्चक्रामांबिकागृहात् ॥ प्रगृह्य पाणिना भृत्यां
रत्नमुद्रोपशोभिना ॥ ५० ॥ तां देवमायामिव वीरमोहिनीं सुमध्यमां कुंडलमंडिताननाम् ॥ श्यामां नितंबार्पितरत्नमेखलां व्यं-
जत्स्तनीं कुंतलशंकितेक्षणाम् ॥ ५१ ॥ शुचिस्मितां बिंबफलाधरद्युतिशोणायमानद्विजकुंदकुड्मलाम् ॥ पदा चलंतीं कलहंसगामि-
नीं सिंजत्कलानूपुरधामशोभिना ॥ ५२ ॥ विलोक्य वीरा मुमुहुः समागता यशस्विनस्तत्कृतहृच्छयार्दिताः ॥ ५३ ॥
यां वीक्ष्य ते नृपतयस्तदुदारहासव्रीडावलोकहृतचेतस उज्झितास्त्राः ॥ पेतुः क्षितौ गजरथाश्वगता विमूढा यात्राछलेन हरयेऽर्पय-
तीं स्वशोभाम् ॥ ५४ ॥

यमानानि तानि यस्यास्ताम् । कला शोभा तद्युक्तं नूपुरं सिंजच्च तत्कलानूपुरं च तस्य धाम दीप्तिस्तेन शोभितुं शीलमस्य तेन पदा चलंतीम् ॥ ५२ ॥ ५३ ॥ न केवलं मुमुहुः पेतुश्चेत्याह । यामिति । यात्रामिषेण हरये स्वलावण्यं समर्पयंतीं यां वीक्ष्य क्षितौ पेतुः सा तान्प्राप्तान् ह्रिया ऐक्षत् तदैवाच्युतं च ददर्शेत्युत्तरेणान्वयः ॥ ५४ ॥

आहेत, जिचे नेत्र कुरळकेशांपासून शंका पावूनच कीं काय चंचळ झाले आहेत ॥ ५१ ॥ जिचें हास्य शुद्ध आहे, जिचे दांत पिकलेल्या तोंडल्यासारख्या अधरोष्ठाच्या कांतींनीं आरक्तवर्ण होऊन कुंदाच्या कळ्यांसारखे भासत आहेत, जी राजहंसासारखें गमन करणारी असून शब्द करणाऱ्या शोभायुक्त नूपुरांच्या कांतीनें शोभत असलेल्या पावलांनीं चालत आहे, अशा त्या रुक्मिणीला पाहून ते वीर मोहित झाले ॥ ५२ ॥ ५३ ॥ ते केवळ मोहित झाले इतकेंच नाहीं तर वाहनावरून खालींसुद्धां पडले असें सांगतो- तेथें प्राप्त झालेल्या हरीला गमनमिषेंकरून आपली शोभा दाखविणाऱ्या त्या रुक्मिणीला अवलोकन करून, हत्ती, रथ, आणि अश्व यांच्यावर आरूढ झालेले ते जरासंधादिक राजे, तिच्या सुखप्रद हास्यानें व लज्जापूर्वक अवलोकनानें ज्यांचीं चित्तें आकृष्ट झालीं आहेत असे मूर्छित होऊन भूमीवर पडले ॥ ५४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

याप्रमाणें ती रुक्मिणी, भगवंताची प्राप्ती केव्हां होईल अशी प्रतीक्षा करीत कमळांच्या कळ्यांसारखीं आपलीं पावलें हळूहळू टाकीत असून डाव्या हाताच्या नखांनीं आपले कुरळे केश मागें सारून, प्राप्त झालेल्या राजांकडे लज्जेनें नेत्रकटाक्षांनीं पाहणाऱ्या तिनें अकस्मात् श्रीकृष्णाला पाहिलें आणि त्याच्या रथाकडे जाण्यास वळली ॥ ५५ ॥ तेव्हां श्रीकृष्णानें, रथावर चढूं इच्छिणाऱ्या त्या राजकन्येला, शिशुपाळादिक सर्व शत्रु पहात असतां, रथ उभा करून तिला हात देऊन आपल्या गरुडध्वजचिन्हयुक्त रथावर घेतलें आणि सर्व राजमंडळाला न जुमानितां बळराम आहे अग्रगण्य ज्यामध्यें अशा यादवांसहवर्तमान, जसा सिंह कोल्ह्यांच्या समुदायांतून आपला भाग हरण करून निर्भयपणें सावकाश निघून जातो त्याप्रमाणें श्रीकृष्ण सावकाश निघून चालला ॥ ५६ ॥ तेव्हां दुरभिमान धारण करणाऱ्या व जरासंधाच्या स्वाधीन असलेल्या शत्रूंनीं, कन्याहरणाच्या योगानें आपला पराभव व आपल्या यशाचा नाश झाला असें मानून त्याचें सहन केलें नाहीं आणि आक्रोश करूं लागले कीं, अहो ! केवढें आश्चर्य हें ! ज्याअर्थीं धनुर्धारी अशाहि

चलत्पद्मकोशतुल्यौ चरणौ चालयंती ॥ ५५ ॥ सुपर्णलक्षणं गरुडध्वजम्। हरिः सिंहः ॥ ५६ ॥ असहमानानां तेषामाक्रोशमाह । अहो धिगस्मान् यतोऽस्माकं यशो गोपैर्हृतमिति ॥ ५७॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधे उत्तरार्धे टीकायां त्रिपंचाशत्तमोऽध्यायः ॥ ५३ ॥ ॥ चतुष्पंचाशत्तमे तु जित्वा राज्ञोऽरिपक्षगान् ॥ रुक्मिणं च विरूप्याथ भैष्म्याः

सैवं शनैश्चलयती चलपद्मकोशौ प्राप्तिं तदा भगवतः प्रसमीक्षमाणा ॥ उत्सार्य वामकरजैरलकानपांगैः प्राप्तान्ह्रियैक्षत नृपान्ददृशेऽच्युतं सा ॥ ५५ ॥ तां राजकन्यां रथमारुरुक्षतीं जहार कृष्णो द्विषतां समीक्षताम् ॥ रथं समारोप्य सुपर्णलक्षणं राजन्यचक्रं परिभूय माधवः ॥ ततो ययौ रामपुरोगमैः शनैः सृगालमध्यादिव भागहृद्धरिः ॥ ५६ ॥ तं मानिनः स्वाभिभवं यशःक्षयं परे जरासंधवशा न सेहिरे ॥ अहो धिगस्मान्यश आत्तधन्वनां गोपैर्हृतं केसरिणां मृगैरिव ॥ ५७ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे उत्तरार्धे रुक्मिणीहरणं नाम त्रिपंचाशत्तमोऽध्यायः ॥ ५३ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ इति सर्वे सुसंरब्धा वाहानारुह्य दंशिताः ॥ स्वैः स्वैर्बलैः परिक्रांता अन्वीयुर्धृतकार्मुकाः ॥ १ ॥ तानापतत आलोक्य यादवानीकयूथपाः ॥ तस्थुस्तत्संमुखा राजन्विस्फूर्ज्य स्वधनूंषि ते ॥ २ ॥ अश्वपृष्ठे गजस्कंधे रथोपस्थे च कोविदाः ॥ मुमुचुः शरवर्षाणि मेघा अद्रिष्वपो यथा ॥ ३ ॥

पाणिं पुरेऽग्रहीत् ॥ १ ॥ इतीति । अहो धिगस्मानित्येवं वदंतः । सुसंरब्धाः क्रोधाविष्टाः । दंशिताः कृतसन्नाहाः । परिक्रांताः परिवृताः । अन्वीयुरन्वधावन् ॥ १ ॥ विस्फूर्ज्य टंकारयित्वा ॥ २ ॥ परेषां शराणां बाहुल्ये यादवानामचलत्वे दृष्टांतः । मेघा इति ॥ ३ ॥

आमचें यश, गोपांनीं, जसें सिंहाचें यश हरिणांनीं घेऊन जावें त्याप्रमाणें हरण केलें ॥ ५७ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील दशमस्कंधाच्या उत्तरार्धामध्यें रुक्मिणीहरणनिरूपणनामक हा त्रेपन्नावा अध्याय समाप्त झाला ॥ ५३ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या चौपन्नाव्या अध्यायामध्यें, श्रीकृष्णानें शत्रुपक्षपाती राजांना जिंकून व रुक्म्याचें विरूपकरण करून द्वारकेमध्यें रुक्मिणीचें पाणिग्रहण केलें अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, असें भाषण करणारे ते सर्व राजे, अत्यंत क्रोधाविष्ट झाले आणि कवचें घालून, धनुष्यें धारण करून व आपापल्या वाहनांवर बसून आपापल्या सैन्यांनीं परिवेष्टित होत्साते श्रीकृष्णाच्या मागाहून धाऊं लागले ॥ १ ॥ नंतर हे राजा, ते शत्रु मागाहून येत आहेत असें पाहून ते यादवसैन्याचे अधिपति, आपापल्या धनुष्यांचे टणत्कारशब्द करून त्यांच्या संमुख उभे राहिले ॥ २ ॥ तेव्हां युद्धामध्यें निपुण असे ते जरासंधादिक वीर, अश्वाच्या पृष्ठभागीं गजाच्या स्कंधावर व रथाच्या पुढील बाजूचेठिकाणीं बसून जसे मेघ पर्वत

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ठिकाणीं पाण्याच्या धारा सोडितात त्याप्रमाणें बाणांचे वर्षाव करूं लागले ॥ ३ ॥ तेव्हां कोमळचित्त अशी ती रुक्मिणी, पतीचें (श्रीकृष्णाचें) सैन्य, बाणांच्या वृष्टींनीं आच्छादित झालें असें पाहून, जिचे नेत्र भयानें विव्हळ झाले आहेत अशी होऊन सलज्जपणें त्या श्रीकृष्णाच्या मुखाकडे पाहूं लागली ॥ ४ ॥ तेव्हां भगवान् हास्य करून ह्मणाला कीं,– हे सुंदरनेत्रे, तूं भिऊं नकोस. तुझ्या सेनेंतील लोकांनीं शत्रूंच्या या सैन्याचा आतांच नाश केला जाईल ॥ ५ ॥ तों इतक्यांत जरासंधादिकांच्या त्या पराक्रमाला न सहन करणारे गदसंकर्षणादिक वीर, बाणांच्या योगेंकरून त्यांचे घोडे, हत्ती व रथ यांचा संहार करूं लागले ॥ ६ ॥ त्यावेळीं रथ्यांचीं, घोडेस्वारांचीं व महातांचीं कुंडलकिरीटांसहित व मंदिल शिरपेंचवगैरे शिरोवेष्टनांसहित कोट्यावधि मस्तकें बाणादिकांनीं तुटून पडलीं ॥ ७ ॥ खड्ग, गदा व धनुष्यें यांसहवर्त-

ऐक्षदैक्षत ॥ ४ ॥ मास्मभैः मा भयं कुरु । हे वामलोचने वराक्षि । तावकैस्त्वदीयैः कृत्वा ॥ ५ ॥ स चासौ विक्रमश्च तम् ॥ ६ ॥ उष्णीषाणि शिरोवतंसवस्त्राणि तत्सहितानि शिरांसि ॥ ७ ॥ करभाः प्रकोष्ठा ऊरुविशेषणं वा ॥ ८ ॥ ९ ॥ अप्राप्तदारमेव तं हृतदारमिवातुरम् ॥ १० ॥ निष्ठा स्थैर्यम् ॥ ११ ॥ कुहको नर्तयिता तस्ये-

पत्युर्बलं शरासारैश्छन्नं वीक्ष्य सुमध्यमा ॥ सव्रीडमैक्षत्तद्वक्त्रं भयविह्वललोचना ॥ ४ ॥ प्रहस्य भगवानाह मास्म भैर्वामलोचने ॥ विनंक्ष्यत्यधुनैवैतत्तावकैः शात्रवं बलम् ॥ ५ ॥ तेषां तद्विक्रमं वीरा गदसंकर्षणादयः ॥ अमृष्यमाणा नाराचैर्जघ्नुर्हयगजान्रथान् ॥ ६ ॥ पेतुः शिरांसि रथिनामश्विनां गजिनां भुवि ॥ सकुंडलकिरीटानि सोष्णीषाणि च कोटिशः ॥ ७ ॥ हस्ताः सासिगदेष्वासाः करभा उरवोऽङ्घ्रयः ॥ अश्वाश्वतरनागोष्ट्रखरमर्त्यशिरांसि च ॥ ८ ॥ हन्यमानबलानीका वृष्णिभिर्जयकांक्षिभिः ॥ राजानो विमुखा जग्मुर्जरासंधपुरःसराः ॥ ९ ॥ शिशुपालं समभ्येत्य हृतदारमिवातुरम् ॥ नष्टत्विषं गतोत्साहं शुष्यद्वदनमब्रुवन् ॥ १० ॥ भो भोः पुरुषशार्दूल दौर्मनस्यमिदं त्यज ॥ न प्रियाप्रिययो राजन्निष्ठा देहिषु दृश्यते ॥ ११ ॥ यथा दारुमयी योषिन्नृत्यते कुहकेच्छया ॥ एवमीश्वरतंत्रोऽयमीहते सुखदुःखयोः ॥ १२ ॥ शौरेः सप्तदशाहं वै संयुगानि पराजितः ॥ त्रयोविंशतिभिः सैन्यैर्जिग्य एकमहं परम् ॥ १३ ॥

च्छया दुःखेऽपीहमानत्वेन पारवश्यं व्यक्तं दर्शितम् ॥ १२ ॥ अत्र चाहमेव दृष्टांत इत्याह जरासंधः । शौरेरिति । कृष्णात्सकाशात् । एकं संयुगम् । परं केवलमंतिमं वा । जिग्ये जितवानहम् ॥ १३ ॥

मान हात, हातांचे पंजे, मांड्या व पाय हे तुटून पडले. तसेंच घोडे, खेचर, हत्ती, उंट गर्दभ आणि वीर यांचीं मस्तकें तुटून पडलीं ॥ ८ ॥ त्यावेळीं जयाची इच्छा करणाऱ्या यादवांनीं, ज्यांच्या सैन्यांचे समुदाय मारून टाकिले आहेत असे ते जरासंधादिक राजे, युद्धापासून पराङ्मुख होऊन पळून गेले ॥ ९ ॥ ते राजे, स्त्री हिरावून नेल्यासारखा व्याकुळ झालेल्या, तेजरहित, उत्साहशून्य व मुख वाळून गेलेल्या अशा शिशुपाळाजवळ जाऊन ह्मणाले कीं, ॥ १० ॥ हे पुरुषश्रेष्ठा, आपला विवाह मोडल्यामुळें प्राप्त झालेल्या या खेदाचा तूं त्याग कर. कारण हे राजा, सुख व दुःख यांचा स्थिरपणा प्राण्यांचेठिकाणीं कधींच दिसून येत नाहीं ॥ ११ ॥ जशी काष्ठाची बाहुली नाचविणाराच्या इच्छेप्रमाणें नाचते त्याप्रमाणें ईश्वराच्या स्वाधीन असलेला हा जीवही, आपल्या सुखदुःखांची खटपट करितो ह्मणजे सुखप्राप्तीविषयीं यत्न करीत असूनहि कदाचित दुःख पावतो ॥ १२ ॥ जरासंध ह्मणतो–सत्रावेळ युद्धांमध्यें तेवीस तेवीस अक्षौहिणी सैन्यासह युद्ध करणाराही मी, श्रीकृष्णापासून पराभव पावलों. परंतु

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुढील अठरावें एक युद्ध, मी जिंकिलें आहे. ह्मणजे त्यावेळीं मी श्रीकृष्णास पळविलें ॥ १३ ॥ तथापि (पराजय किंवा जय प्राप्त झाला असतांहि) मी परमेश्वरानें प्रेरणा केलेल्या काळानें सर्वजग उपद्रवयुक्त केलेलें आहे असें जाणून कधींहि, शोक करीत नाहीं व हर्षेंहि पावत नाहीं. आतां वीरसमुदायांच्या समुदायांचे अधिपति असेहि आह्मी सर्वजण, स्वल्पसैन्यांनीं युक्त अशाहि श्रीकृष्णानें रक्षण केलेल्या यादवांकडून पराभव पावलों आहों ॥ १५ ॥ तेव्हां शत्रूंनीं आपणास काळ अनुकूळ झाला ह्मणून यावेळीं आह्मांस जिंकिलें आहे परंतु जेव्हां आह्मांला काळ अनुकूळ होईल तेव्हां आह्मींहि यांना जिंकून टाकूं ॥ १६ ॥ याप्रमाणें जरासंधादिक मित्रांनीं सांत्वन केलेला तो शिशुपाळ, मरून शिल्लक राहिलेल्या आपल्या भृत्यादिकांसहवर्तमान नगरांत प्रविष्ट झाला आणि युद्धांत अवशेष राहिलेले ते जरासंधादिक राजेहि, पुन्हा आपापल्या नगराप्रत निघून गेले ॥ १७ ॥ इकडे बळी व कृष्णाचा द्वेष्टा असा रुक्मी तर आपल्या बहिणीचें श्रीकृष्णानें राक्षसविधीनें हरण केलें तें न सहन करित होत्साता एक अक्षौहिणी सेनेनें परिवेष्टित

दैवमदृष्टं तद्युक्तेन ॥ १४ ॥ फल्गुतंत्रैः स्वल्पसैन्येः ॥ १५ ॥ प्रदक्षिणोऽनुकूलः स्यात् ॥ १६ ॥ १७ ॥ १८ ॥ १९ ॥ २० ॥ २१ ॥ गोपालस्य वेदपालकस्येति वास्तवोऽर्थः

तथाऽप्यहं न शोचामि न प्रहृष्यामि कर्हिचित् ॥ कालेन दैवयुक्तेन जानन्विद्रावितं जगत् ॥ १४ ॥ अधुनापि वयं सर्वे वीरयूथपयूथपाः ॥ पराजिताः फल्गुतंत्रैर्यदुभिः कृष्णपालितैः ॥ १५ ॥ रिपवो जिग्युरधुना काल आत्मानुसारिणि ॥ तदा वयं विजेष्यामो यदा कालः प्रदक्षिणः ॥ १६ ॥ एवं प्रबोधितो मित्रैश्चैद्योऽगात्सानुगः पुरम् ॥ हतशेषाः पुनस्तेऽपि ययुः स्वं स्वं पुरं नृपाः ॥ १७ ॥ रुक्मी तु राक्षसोद्वाहं कृष्णद्विडसहन्स्वसुः ॥ पृष्ठतोऽन्वगमत्कृष्णमक्षौहिण्या वृतो बली ॥ १८ ॥ रुक्म्यमर्षी सुसंरब्धः शृण्वतां सर्वभूभुजाम् ॥ प्रतिजज्ञे महाबाहुर्दंशितः सशरासनः ॥ १९ ॥ अहत्वा समरे कृष्णमप्रत्यूह्य च रुक्मिणीम् ॥ कुंडिनं न प्रवेक्ष्यामि सत्यमेतद्ब्रवीमि वः ॥ २० ॥ इत्युक्त्वा रथमारुह्य सारथिं प्राह सत्वरः ॥ चोदयाश्वान्यतः कृष्णस्तस्य मे संयुगं भवेत् ॥ २१ ॥ अद्याहं निशितैर्बाणैर्गोपालस्य सुदुर्मतेः ॥ नेष्ये वीर्यमदं येन स्वसा मे प्रसभं हृता ॥ २२ ॥ विकत्थमानः कुमतिरीश्वरस्याप्रमाणवित् ॥ रथेनैकेन गोविंदं तिष्ठतिष्ठेत्यथाह्वयत् ॥ २३ ॥

तथा सुदुर्मतेरिति शोभनानुग्रहवती दुष्टेष्वपि मतिर्यस्य तस्येति ॥ २२ ॥ २३ ॥

होऊन, श्रीकृष्णाच्या मागून त्याला जिंकण्याकरितां धांवला ॥ १८ ॥ त्या धांवण्याच्या पूर्वीं रुक्मिणीचें हरण सहन न झाल्यामुळें अतिक्रुद्ध झालेल्या, कवच घातलेल्या व धनुष्य धारण केलेल्या त्या महाबळी रुक्म्यानें, सर्व राजे श्रवण करीत असतां अशी प्रतिज्ञा केली कीं, ॥ १९ ॥ हे राजे हो, मी युद्धामध्यें श्रीकृष्णाला मारल्यावांचून व आपली कनिष्ठ बहीण जी रुक्मिणी तिला माघारी आणल्या वांचून, आपल्या कुंडिनपुरामध्येंच प्रवेश करणार नाहीं, हें तुह्मांला सत्य सांगतों ॥ २० ॥ असें बोलून तो रथावर बसला आणि त्वरेनें युक्त होत्साता सारथ्यास ह्मणाला कीं, ज्याठिकाणीं श्रीकृष्ण आहे त्याठिकाणीं लवकर घोडे चालीव ह्मणजे त्या कृष्णाबरोबर माझें युद्ध होईल ॥ २१ ॥ आज मी, तीक्ष्ण बाणांच्या योगेंकरून, ज्यानें माझी बहीण बलात्कारानें हरण केली आहे त्या सुदुर्मति गोपाळाचा (श्रीकृष्णाचा) वीर्यप्रयुक्त मद घालवून टाकीन ॥ २२ ॥ अशी बडबड करणारा, कुत्सितबुद्धि व त्या श्रीकृष्णाच्या बळादिकांची इयत्ता न जाणणारा तो रुक्मि, एकाच रथाच्या योगेंकरून

१ वास्तविक अर्थ तर असा कीं–१दुष्टांचे ठिकाणींहि ज्याची बुद्धि चांगली (अनुग्रहयुक्त) आहे अशा. २ वेदपाळकाचा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कृष्णाच्या मागून धांवत होत्साता रहा रहा असें म्हणून त्या गोविंदाला हाका मारूं लागला ॥ २३ ॥ त्यानें सुदृढ अशा धनुष्याचें आकर्षण करून त्याचेठिकाणीं बाण लावून तीन बाणांनीं कृष्णाला प्रहार केला आणि तो म्हणाला कीं,–हे यादवांच्या कुलपांसना[1] (कुलदूषणा), तूं माझ्या अग्रभागीं क्षणभर उभा रहा ॥ २४ ॥ हे मंदा[2], जसा ध्वांक्ष (कावळा) यज्ञामध्यें होमद्रव्य घेऊन जातो त्याप्रमाणें माझी बहिण चोरून तूं कोठें चाललास? कपटयुद्ध करणारा व मायावी अशा तुझा गर्व मी आतां घालवितों ॥ २५ ॥ जोंपर्यंत माझ्या बाणांनीं ताडित होऊन भूमीवर मरून पडला नाहींस तोंपर्यंत कन्या रुक्मिणीला तूं सोडून दे. तेव्हां श्रीकृष्णानेंहि हास्य करून त्याचें धनुष्य तोडून त्या रुक्म्याला सहा बाणांनीं वेधून टाकिलें ॥ २६ ॥ आठ बाणांनीं चार घोडे मारिले, दोन बाणांनीं सारथि मारिला व तीन बाणांनीं ध्वज तोडिला. तेव्हां त्या रुक्म्यानें दुसरें धनुष्य ग्रहण करून पांच बाणांनीं श्रीकृष्णाला वेधिलें ॥ २७ ॥ तेव्हां पांच बाणांनीं ताडण केलेल्याहि त्या श्रीष्णानें तेंहि धनुष्य तोडिलें. नंतर

यदूनां कुलपांसन कुलदूषण । वस्तुतस्तु यदूनां कुलस्य पते हे अंसन स्वयं च रिपुहननचतुर । अंससमाघात इत्यस्माद्धातोः कर्तरि ल्युट् प्रत्ययो नंद्यादिविहितः ॥२४॥ ध्वांक्षः काकः

धनुर्विकृष्य सुदृढं जघ्ने कृष्णं त्रिभिः शरैः ॥ आह चात्र क्षणं तिष्ठ यदूनां कुलपांसन ॥ २४ ॥ कुत्र यासि स्वसारं मे मुषित्वा ध्वांक्षवद्धविः ॥ हरिष्येऽद्य मदं मंद मायिनः कूटयोधिनः ॥ २५ ॥ यावन्न मे हतो बाणैः शयीथा मुंच दारिकाम् ॥ स्मयन्कृष्णो धनुश्छित्त्वा षड्भिर्विव्याध रुक्मिणम् ॥ २६ ॥ अष्टभिश्चतुरो वाहान्द्वाभ्यां सूतं ध्वजं त्रिभिः ॥ स चान्यद्धनुरादाय कृष्णं विव्याध पंचभिः ॥ २७ ॥ तैस्ताडितः शरौघैस्तु चिच्छेद धनुरच्युतः ॥ पुनरन्यदुपादत्त तदप्यच्छिनदव्ययः ॥ २८ ॥ परिघं पट्टिशं शूलं चर्मासी शक्तितोमरौ ॥ यद्यदायुधमादत्त तत्सर्वं सोऽच्छिनद्धरिः ॥ २९ ॥ ततो रथादवप्लुत्य खड्गपाणिर्जिघांसया ॥ कृष्णमभ्यद्रवत्क्रुद्धः पतंग इव पावकम् ॥ ३० ॥ तस्य चापततः खड्गं तिलशश्चर्मचेषुभिः ॥ छित्त्वाऽसिमाददे तिग्मं रुक्मिणं हंतुमुद्यतः ॥ ३१ ॥ दृष्ट्वा भ्रातृवधोद्योगं रुक्मिणी भयविह्वला ॥ पतित्वा पादयोर्भर्तुरुवाच करुणं सती ॥ ३२ ॥ योगेश्वराप्रमेयात्मन्देवदेव जगत्पते ॥ हंतुं नार्हसि कल्याण भ्रातरं मे महाभुज ॥ ३३ ॥

स यथा हविर्मुष्णाति तद्वत् । वस्तुतस्तु अध्वांक्षवदिति च्छेदः । सहस्राक्षवदित्यर्थः । हे मंद स्थिरेत्यर्थः ॥ २५ ॥ २६ ॥ २७ ॥ २८ ॥ २९ ॥ ३० ॥ ३१ ॥ ३२ ॥ ३३ ॥

त्यानें पुन्हां दुसरें धनुष्य घेतलें तेंही श्रीकृष्णानें तोडून टाकिलें ॥ २८ ॥ नंतर त्या रुक्म्यानें कृष्णाला मारण्याकरितां–परिघ पट्टिश, शूळ, ढाल, तलवार, शक्ति, तोमर इत्यादिक जें जें आयुध ग्रहण केलें तें तें सर्व तत्काळ श्रीकृष्णानें तोडून टाकिलें ॥ २९ ॥ नंतर क्रुद्ध झालेला तो रुक्मी, रथावरून खालीं उडी टाकून व हातांत खड्ग घेऊन श्रीकृष्णाला मारण्याकरितां, त्याच्या आंगावर, जसा पतंग अग्नीचा नाश करण्याकरितां त्याच्यावर धांवतो त्याप्रमाणें धांवला ॥ ३० ॥ तेव्हां धांवून येणाऱ्या त्या रुक्म्याच्या खड्गाचे व ढालेचे तिलप्राय तुकडे करून, तो श्रीकृष्ण, स्वतां हातांमध्यें तीक्ष्ण खड्ग ग्रहण करून, त्या रुक्म्यास मारण्याविषयीं उद्युक्त झाला ॥ ३१ ॥ तेव्हां आपल्या भावाच्या वधाचा प्रयत्न पाहून भयानें विव्हळ झालेली ती सती रुक्मिणी, पतीच्या पायांवर पडून मोठ्या करुणेनें भाषण करूं लागली कीं– ॥ ३२ ॥ हे योगेश्वरा, हे अप्रमेयस्वरूपा, हे देवदेवा, हे जगत्पते, हे कल्याणा, आणि हे महापराक्रम्या, तूं माझ्या भ्रात्याला न मारण्याबद्दल माझी क्षमा करावीस ॥ ३३ ॥

१ कुलप आणि अंसन असे दोन शब्द करून त्यांचा–कुळाचें रक्षण करणारा व शत्रूंचा घात करणारा असा अर्थ करावा. २ हे स्थिरा, असा अर्थ करावा. ३ येथें अध्वांक्षवत् असें पद काढून त्याचा अर्थ इंद्राप्रमाणें असा करावा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हे राजा, याप्रमाणें भाषण करून, अत्यंत भयानें जिचे करचरणादिक अवयव थरथर कांपूं लागले आहेत, जिचें मुख शोकानें वाळून गेलें आहे व जिचा कंठ दाटून आला आहे आणि विव्हळपणामुळें नमस्कार करत्येवेळीं जिच्या कंठांतील सुवर्णपुष्पांची माळा खालीं गळून पडली आहे अशा त्या रुक्मिणीनें पाय धरिलेला तो करुणामूर्ति श्रीकृष्ण, त्या रुक्म्याच्या वधापासून निवृत्त झाला ॥ ३४ ॥ नंतर वाईट कर्म करणाऱ्या त्या रुक्म्याला श्रीकृष्णानें त्याचाच वस्त्रानें बंधन करून ठिकठिकाणीं मिशा व केंस अवशेष राहतील अशा रीतीनें त्यावें खड्गानें मुंडन करून त्याला विरूप केलें. इतक्यामध्यें हत्ती घोडे इत्यादिकांनीं अद्भुत असें त्या शत्रूचें सैन्य, यादववीरांनीं, जसें हत्तींनीं कमळिणींचें मर्दन करावें त्याप्रमाणें मर्दन केलें ॥ ३५ ॥ आणि त्यांनीं कृष्णाजवळ येऊन तेथें विरूप केल्यामुळें हतप्राय झालेल्या त्या रुक्म्याला पाहिलें. आणि बळरामानेंहि बांधलेल्या व तशाप्रकारच्या मुंडनाच्या योगानें हतप्राय झालेल्या त्या रुक्म्याला पाहून त्याला बंधनापासून मुक्त केलें व तो समर्थ

परित्रासेन विकंपितान्यंगानि यस्यास्तया शुचा शोकेनावशुष्यन्मुखं यस्याः रुद्धः कंठो यस्याः सा च सा च । तथा कातर्येण वैक्लव्येन विस्रंसिता हेममयी माला यस्यास्तया गृहीतौ पादौ यस्य सः ॥ ३४ ॥ सश्मश्रुकेशं सहितानि स्थाने स्थानेऽवशिष्टानि श्मश्रूणि केशाश्च यथा भवंति तथा। तेनैवासिना प्रवपन्मुंडयन्व्यरूपयद्विरूपमकरोत् ॥ ३५ ॥

श्रीशुक उवाच ॥ तया परित्रासविकंपितांगया शुचाऽवशुष्यन्मुखरुद्धकंठया ॥ कातर्यविस्रंसितहेममालया गृहीतपादः करुणो न्यवर्तत ॥ ३४ ॥ चैलेन बध्वा तमसाधुकारिणं सश्मश्रुकेशं प्रवपन्व्यरूपयत् ॥ तावन्ममर्दुः परसैन्यमद्भुतं यदुप्रवीरा नलिनीं यथा गजाः ॥३५॥ कृष्णांतिकमुपव्रज्य ददृशुस्तत्र रुक्मिणम् ॥ तथाभूतं हतप्रायं दृष्ट्वा संकर्षणो विभुः ॥ विमुच्य बद्धं करुणो भगवान्कृष्णमब्रवीत् ॥ ३६ ॥ असाध्विदं त्वया कृष्ण कृतमस्मज्जुगुप्सितम् ॥ वपनं श्मश्रुकेशानां वैरूप्यं सुहृदो वधः ॥ ३७ ॥ मैवास्मान्साध्व्यसुयेथा भ्रातुर्वैरूप्यचिंतया ॥ सुखदुःखदो न चान्योऽस्ति यतः स्वकृतभुक्पुमान् ॥ ३८ ॥ बंधुर्वधार्हदोषोऽपि न बंधोर्वधमर्हति ॥ त्याज्यः स्वेनैव दोषेण हतः किं हन्यते पुनः ॥ ३९ ॥ क्षत्रियाणामयं धर्मः प्रजापतिविनिर्मितः ॥ भ्राताऽपि भ्रातरं हन्याद्येन घोरतरस्ततः ॥ ४० ॥

तथाभूतं हतप्रायमित्युत्तरवाक्येऽप्यनुषंगः ॥ ३६ ॥ ३७ ॥ रुक्मिणीं सांत्वयति । मैवास्मानिति ॥ ३८ ॥ पुनः कृष्णमाक्षिपति। बंधुरिति ॥ ३९ ॥ पुनर्देवीं प्रत्याह । क्षत्रियाणामिति । येन धर्मेण भ्रातापि भ्रातरं हन्यात् । ततस्तस्माद्घोरतरोऽतिदारुणो धर्मश्च । अतः कोऽस्माकमपराध इति भावः ॥ ४० ॥

दयाळू भगवान् बळराम श्रीकृष्णास ह्मणाला कीं–॥ ३६ ॥ हे कृष्णा, रुक्म्याच्या श्मश्रुकेशांचें वपन तूं जें केलेंस हें वाईट कर्म केलेंस. कारण, हें करणें आह्मांला फार निंद्य आहे आणि संबंधिपुरुषांच्या श्मश्रुकेशांचें वपन करून जें विरूप करणें हा त्यांचा वध केल्यासारखाच आहे ॥ ३७ ॥ असें ह्मणून रुक्मिणीचें सांत्वन करितो कीं–हे साध्वि रुक्मिणि, भ्रात्याचें विरूपकरण झालें हें मनांत आणून तूं आह्मांवर दोषारोप ठेऊं नकोस. कारण, पुरुषाला सुख किंवा दुःख देणारा दुसरा कोणी नाहीं, तर तोच आपण केलेल्या कर्मानेंच सुखदुःखांचा उपभोग घेत असतो ॥ ३८ ॥ पुन्हा श्रीकृष्णास ह्मणतो कीं,–वधाविषयीं योग्य दोष करणाराहि बंधु, आपल्या बंधूपासून वध पावण्यास योग्य नाहीं. तर तो त्याग करण्यासच योग्य आहे. कारण, आपण केलेल्या दोषानेंच जो हतप्राय झाला त्याला पुन्हा मारावें कीं काय ? छे छे. त्याला मारिलें असतां अपकीर्ति मात्र होत्ये ॥ ३९ ॥ पुन्हा रुक्मिणीला ह्मणतो कीं,– ज्या धर्मानें युद्धामध्यें भाऊहि आपल्या भावाला मारितो त्यामुळें अतिदारुण असा हा क्षत्रियांचा ॥१७३॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

धर्म, ब्रह्मदेवानेंच निर्माण केलेला आहे यास्तव तेथें आमचा कोणता अपराध आहे? कोणताच नाहीं ॥ ४० ॥ पुन्हा कृष्णाला ह्मणतो—हे कृष्णा, श्रीमदानें अंध (विवेकरहित) झालेले जनमात्र, राज्याच्या, भूमीच्या, द्रव्याच्या, स्त्रीच्या, मानाच्या, तेजाच्या किंवा दुसऱ्या कोणत्यातरी निमित्तानें आपल्या बंधूंचा तिरस्कार करितात पण तसें करणें आह्मांस योग्य नाहीं ॥ ४१ ॥ पुन्हा रुक्मिणीला ह्मणतो—सर्वभूतांचें अहित करणाऱ्या आपल्या भावांचें जें तूं अज्ञलोकांप्रमाणें निरंतर कल्याण इच्छित्येस ती ही तुझी बुद्धि, विषम आहे (चांगली नाहीं). कारण, त्यांत त्या बंध्वादिकांचेंच अकल्याण आहे ॥ ४२ ॥ कसें ह्मणशील तर—देहच आत्मा आहे असा अभिमान धारण

पुनः श्रीकृष्णं प्रत्याह । राज्यस्येति । तथाऽप्यस्माकमेतदनुचितमिति भावः ॥ ४१ ॥ पुनर्देवीं प्रत्याह । तवेयमिति । सर्वभूतेषु दुर्हृदामहितानां भ्रातॄणामज्ञवच्चद्भद्रं मन्यसे इच्छसि इयं तव विषमा असमीचीना बुद्धिः । कुतः । यतस्तदेव सुहृदामभद्रमिति । यद्वा सर्वभूतेषु दुर्हृदामपि स्वसुहृदां भद्रमेव दंडरूपं मुंडनमभद्रं यन्मन्यसे तवेयं विषमा बुद्धिरिति । अथवा सर्वभूतेषु मध्ये दुर्हृदां शिशुपालादीनामभद्रं सुहृदां भद्रं च यन्मन्यसे तवेयं विषमा बुद्धिः समा न भवति अज्ञवदज्ञानामिव ॥ ४२ ॥ कुत इत्यत आह । आत्ममोह इति ॥ ४३ ॥ परमार्थमाह । एक एवेति । परः शुद्धः ज्योतिश्चंद्रादिर्यथोदकेषु । नभो यथा घटादिष्विति ॥ ४४ ॥ कुतस्तर्हि न चंद्रादिवदात्मानमेकं शुद्धं

राज्यस्य भूमेर्वित्तस्य स्त्रियो मानस्य तेजसः ॥ मानिनोऽन्यस्य वा हेतोः श्रीमदांधाः क्षिपंति हि ॥ ४१ ॥ तवेयं विषमा बुद्धिः सर्वभूतेषु दुर्हृदाम् ॥ यन्मन्यसे सदाऽभद्रं सुहृदां भद्रमज्ञवत् ॥ ४२ ॥ आत्ममोहो नृणामेष कल्प्यते देवमायया ॥ सुहृद्दुर्हृदुदासीन इति देहात्ममानिनाम् ॥ ४३ ॥ एक एव परो ह्यात्मा सर्वेषामपि देहिनाम् ॥ नानेव गृह्यते मूढैर्यथा ज्योतिर्यथा नभः ॥ ४४ ॥ देह आद्यंतवानेष द्रव्यप्राणगुणात्मकः ॥ आत्मन्यविद्यया कॢप्तः संसारयति देहिनम् ॥ ४५ ॥ नात्मनोऽन्येन संयोगो वियोगश्चासतः सति ॥ तद्धेतुत्वात्तत्प्रसिद्धेर्दृग्रूपाभ्यां यथा रवेः ॥ ४६ ॥

प्रतीमस्तत्राह । देह इति । द्रव्यमधिभूतम् । प्राणा इंद्रियाण्यध्यात्मम् । गुणशब्देनाधिदैवं तत्त्रितयात्मकः । देहोपाधिना शुद्धो न प्रतीयत इत्यर्थः ॥ ४५ ॥ ननु देहसंबंधेनापि संसारे सति शुद्धत्वं गतमेव तत्राह । नात्मन इति । हे सति अन्येनाधिभूतादिनाऽऽत्मनः संयोगवियोगौ नस्तः । कुतः असतः । असत्त्वादन्यस्येत्यर्थः । कुतो भूतऽसत्त्वं तत्राह । तद्धेतुत्वादिति । तस्यान्यस्य भूतेंद्रियादेः प्रसिद्धेः प्रकाशस्य तद्धेतुत्वादात्महेतुत्वात् । ननु देवैरधिष्ठितेभ्य इंद्रियेभ्यो भूतानां प्रतीतिः प्रसिद्धा । भूतप्रतीत्या च तत्प्रसिद्धिर्नात्मन इत्यत आह । दृग्रूपाभ्यां यथा रवेः यथा प्रकाश्यप्रकाशकत्वेन वर्तमानयोरपि चक्षूरूपयोः रवेः सकाशात्प्रसिद्धिर्द्वयोरपि तैजसत्वात्तदभेदश्च तथा भूतेंद्रियादीनां परस्परं सिद्धानामपि चैतन्याधीन एव प्रकाशस्तत्कार्यत्वाच्च तद्व्यतिरेकेणासत्त्वं चेत्यर्थः । तथा च द्वादशे वक्ष्यति । दीपश्चक्षुश्च रूपं च ज्योतिषो न पृथक्

करणाऱ्या पुरुषांना, मित्र शत्रु आणि उदासीन अशाप्रकारचा जो हा बुद्धिमोह झाला आहे तो भगवंताच्या मायेनें कल्पिलेला आहे ॥ ४३ ॥ ह्मणजे सर्वहि प्राण्यांचा आत्मा एक व देहादिकांहून निराळा असून त्याला, ते मायेनें मूढ झालेले जन, शत्रुमित्रादिभावेंकरून, शत्रुमित्रादिरूपी नानाप्रकारचा मानितात. जसे अज्ञानी लोक उदकाचेठिकाणीं प्रतिबिंबित झालेल्या चंद्रादिकांच्या तेजाला किंवा घटमठादिकांमध्यें असलेल्या आकाशाला नानाप्रकारचें मानितात त्याप्रमाणें ॥ ४४ ॥ मिळून आत्मस्वरूपाचेठिकाणीं अविचेनें कल्पिलेला हा अधिभूत अध्यात्म आणि अधिदैवरूप आद्यंतवान् असलेला देहाभिमानच, संसाररहित अशाहि प्राण्याला संसारांत पाडितो ह्मणजे त्यांचें शुद्धस्वरूप प्रतीतीला येत नाहींसें होतें ॥ ४५ ॥ आतां देहसंबंधानेंहि संसार प्राप्त झाला असतां आत्म्याचें शुद्धत्व गेलेंच असें ह्मणावें तर सांगतो कीं,—हे पतिव्रते, सत्तारहित

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अशा दुसऱ्या अधिभूतादिकांशीं आत्म्याचा संयोग किंवा वियोग हे मुळींच नाहींत. आतां, आत्म्याहून निराळ्या देहादिकांचें असत्त्व तरी कसें? अशी शंका येईल तर सांगतो– त्या भूतेंद्रियादिकांच्या उत्पत्तीला व प्रकाशाला कारण आत्माच असल्यामुळें जशी–प्रकाश्य व प्रकाशकत्वेंकरून प्रसिद्ध असलेल्याहि चक्षुइंद्रियाची व रूपाची प्रसिद्धि सूर्यापासूनच होत्ये व त्या इंद्रियाला व रूपाला राजसत्व असल्यामुळें त्यांचा परस्पर अभेद असतो त्याप्रमाणें प्रकाश्य व प्रकाशकभावानें परस्पर प्रसिद्ध असलेल्याहि देहेंद्रियादिकांचा प्रकाश चैतन्याच्या स्वाधीन आहे आणि तीं देहेंद्रियादिक चैतन्याचीं कार्यें असल्यामुळें त्या चैतन्यावांचून त्यांचें असत्त्व आहे ॥ ४६ ॥ आतां, आत्म्याला देहसंबंध नसल्यामुळेंच जन्मादिकहि नाहींत असें सांगण्याकरितां, जन्मादिक हे देहाचे धर्म आहेत असें सांगतो–जन्मादिक विकार हे देहाचेच आहेत देहाचेठिकाणीं स्थित असलेल्याहि आत्म्याचे नाहींत. तर मग मी झालों, मी बालक आहें, मी वृद्ध आहें अशी आत्म्याचेठिकाणीं जन्मादिकांची प्रतीति कशी घडत्ये? असें ह्मणशील तर–देहाच्या जन्मा-

---

भवेत् ॥ एवं धीः खानि मात्राश्च न स्युरन्यतमाहतादिति । यद्वा रवेः प्रसिद्धाभ्यामेव दृग्रूपाभ्यां परस्परं प्रसिद्धिर्यथा भवति तद्वदिति ॥ ४६ ॥ देहसंबंधाभावादेव नात्मनो जन्मादयोऽपीति वक्तुं जन्मादीनां देहधर्मत्वमाह । जन्मादयस्त्विति । कथं तर्हि जातोऽहं बालोऽहं वृद्धोऽहमित्यात्मनि जन्मादिप्रतीतिः देहजन्मादिनैवेति सदृष्टांतमाह ।

जन्मादयस्तु देहस्य विक्रिया नात्मनः क्वचित् ॥ कलानामिव नैवेंदोर्मृतिर्ह्यस्य कुहूरिव ॥ ४७ ॥ यथा शयान आत्मानं विषयान्फलमेव च ॥ अनुभुंक्तेऽप्यसत्यर्थे तथाऽऽप्नोत्यबुधो भवम् ॥ ४८ ॥ तस्मादज्ञानजं शोकमात्मशोषविमोहनम् ॥ तत्त्वज्ञानेन निर्हृत्य स्वस्था भव शुचिस्मिते ॥ ४९ ॥ श्रीशुक उवाच ॥ एवं भगवता तन्वी रामेण प्रतिबोधिता ॥ वैमनस्यं परित्यज्य मनो बुद्ध्या समादधे ॥ ५० ॥

कलानामिवेति । इंदोः कलानामेव जन्मादयो नैवेंदोर्यथा तद्वत् । यथा च कलानाशादेव कुहूरमावास्या इंदुक्षय उच्यते तद्वदस्यात्मनो देहनाशादेव मृतिव्यवहार इत्यर्थः ॥ ४७ ॥ नन्वात्मनो देहादिसंबंधाभावे कथं भोक्तृभोग्यभोगप्रतीतिरित्याशंक्य स्वप्नदृष्टांतेन समर्थयति । यथा शयान इति । आत्मानं भोक्तारं विषयान् भोग्यान्फलं भोगमसत्यप्यर्थेऽनुभुंक्ते तथाऽबुधः संसारं प्राप्नोति ॥ ४८ ॥ आत्मानं शोषयति विमोहयति चेति तथा तम् । निर्हृत्यापाकृत्य ॥ ४९ ॥ समादधे समाहितमकरोत् ॥ ५० ॥

दिकेंकरूनच ती घडत्ये असें दृष्टांतपूर्वक सांगतो–जसा, कळांच्या उत्पत्तिवृद्ध्यादिकेंकरूनच चंद्राच्या जन्मादिकांचा व्यवहार घडतो परंतु ते निराळे जन्मादिक चंद्राला नाहींत त्याप्रमाणें देहांच्या जन्मादिकेंकरून आत्म्यालाहि जन्मादिकांचा व्यवहार घडतो परंतु ते त्याला वास्तविकपणें प्राप्त होत नाहींत. तसेंच ह्या जीवात्म्याचें मरणहि जसा अमावास्येचे दिवशीं चंद्राच्या कळांचा नाश झाला ह्मणजे चंद्राचाच क्षय झाला असें ह्मणतात त्याप्रमाणें देहाचा नाश झाला ह्मणजे जीवात्म्याचाच नाश झाला असें ह्मणतात परंतु तसें वस्तुतः घडत नाहीं ॥ ४७ ॥ आतां आत्म्याला देहसंबंधाचा जर अभाव आहे तर भोक्ता, भोग्य व भोग यांची प्रतीति कशी घडत्ये असें ह्मणशील तर–जसा निजलेला पुरुष, देहादिसंबंधरूप अर्थ नसतांहि, देहादिरूपी भोक्ता बनलेल्या आपला, शब्दादिक विषयांचा व भोगरूप फळाचा अनुभव घेतो त्याप्रमाणें अज्ञानी जीवात्मा जन्मादिरूप संसार पावतो ॥ ४८ ॥ ह्मणून हे शुचिस्मिते रुक्मिणी, आत्म्याला शोषण करणाऱ्या व विशेषेंकरून मोह उत्पन्न करणाऱ्या ह्या अज्ञानमूलक शोकाला तत्त्वज्ञानेंकरून घालवून तूं स्वस्थचित्त हो ॥ ४९ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, याप्रमाणें भगवान् बळरामानें बोध केलेल्या त्या सुकुमारांगी रुक्मिणीनें रुक्म्याच्या विरूप- ॥१७४॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करणानि मित्त झालेल्या शोकाचा त्याग करून विचारयुक्त बुद्धीनें आपल्या मनाचें समाधान करून घेतलें ॥ ५० ॥ आतां असें श्रवण करणाऱ्याहि रुक्म्याचें अज्ञान निवृत्त झालें नाहीं असें दर्शवीत ह्मणतो कीं,–श्रीकृष्णप्रभृति शत्रूंनीं, ज्याचें सैन्य व तेज हीं नाहींशीं करून टाकून ज्याचे प्राणमात्र अवशेष ठेविले आहेत असा वश करून सोडून दिलेला तो रुक्मी, अपूर्णमनोरथ होत्साता कृष्णानें केलेलें आपलें विरूपकरण स्मरण करीत ‘ दुर्मति कृष्णाला न मारितां व रुक्मिणीला माघारी न आणितां कुंडिनपुरामध्यें प्रवेश करणार नाहीं अशा केलेल्या आपल्या प्रतिज्ञेचें पालन करण्याकरितां ’ जेथें विरूपित झाला तेथेंच रागानें राहिला, ह्मणून पुढें तेथें भोजकटनामक मोठें नगर वसलें ॥ ५१ ॥ ५२ ॥ हे राजा, भगवान् श्रीकृष्णानें, याप्रमाणें युद्धामध्यें राजांना जिंकून भीष्मकाची कन्या जी रुक्मिणी तिला आपल्या द्वारकानगरींत आणून यथाविधीनें तिच्याशीं विवाह करून घेतला ॥ ५३ ॥ त्या दिवशीं हे राजा, त्या द्वारकेमध्यें, यादवपति कृष्णाचेठिकाणीं निरुपाधिक स्नेह धारण करणाऱ्या

रुक्मिणस्त्वेवं श्रुतवतो नाज्ञानं निवृत्तमिति दर्शयन्नाह । प्राणावशेष इति ॥ ५१ ॥ अहत्वा अज्ञात्वाऽदुर्मतिमिति च सत्योऽर्थः । अप्रत्यूह्यानावर्त्य । अप्रतिबुध्येति तु सत्यम् । यवीयसीं स्वसारम् । यत्र विरूपितस्तत्रैवावसत् । तत्र च भोजकटं नाम पुरमभवत् ॥ ५२ ॥ ५३ ॥ ५४ ॥ वरयोर्वरवध्वोः । पारिबर्हं देयमुपस्करम् ॥ ५५ ॥ उत्त-

प्राणावशेष उत्सृष्टो द्विड्भिर्हतबलप्रभः ॥ स्मरन्विरूपकरणं वितथाऽऽत्ममनोरथः ॥ ५१ ॥ अहत्वा दुर्मतिं कृष्णमप्रत्यूह्य यवीयसीम् ॥ कुंडिनं न प्रवेक्ष्यामीत्युक्त्वा तत्रावसद्रुषा ॥ ५२ ॥ भगवान्भीष्मकसुतामेवं निर्जित्य भूमिपान् ॥ पुरमानीय विधिवदुपयेमे कुरूद्वह ॥ ५३ ॥ तदा महोत्सवो नृणां यदुपुर्यां गृहे गृहे ॥ अभूदनन्यभावानां कृष्णे यदुपतौ नृप ॥ ५४ ॥ नरा नार्यश्च मुदिताः प्रमृष्टमणिकुंडलाः ॥ पारिबर्हमुपाजह्रुर्वरयोश्चित्रवाससोः ॥ ५५ ॥ सा वृष्णिपुर्युत्तभितेंद्रकेतुभिर्विचित्रमाल्यांबररत्नतोरणैः ॥ बभौ प्रतिद्वार्युपक्लृप्तमंगलैरापूर्णकुंभागुरुधूपदीपकैः ॥ ५६ ॥ सिक्तमार्गा मदच्युद्भिराहूतप्रेष्ठभूभुजाम् ॥ गजैर्द्वास्सु परामृष्टरंभापूगोपशोभिता ॥ ५७ ॥ कुरुसृंजयकैकेयविदर्भयदुकुंतयः ॥ मिथो मुमुदिरे तस्मिन्संभ्रमात्परिधावताम् ॥ ५८ ॥ रुक्मिण्या हरणं श्रुत्वा गीयमानं ततस्ततः ॥ राजानो राजकन्याश्च बभूवुर्भृशविस्मिताः ॥ ५९ ॥

भितैरिंद्रकेतुभिर्ध्वजविशेषैः । उपक्लृप्तानि मंगलानि लाजांकुरपुष्पप्रकरादीनि तैः ॥ ५६ ॥ आहूताः प्रेष्ठा भूभुजस्तेषां गजैः परामृष्टा उच्छ्रिता रंभाश्च पूगाश्च तैरुपशोभिता । यद्वा तैरेव गजैः परामृष्टाः संस्पृष्टा रंभाश्च पूगाश्च तैरुपशोभिता ॥ ५७ ॥ संभ्रमादौत्सुक्यात्परिधावतां बंधूनां मध्ये मिथः । समेत्य मुदं प्रापुः ॥ ५८ ॥ ५९ ॥

लोकांच्या घरोघर मोठा उत्साह झाला ॥ ५४ ॥ त्यावेळीं निर्मळ मणिमय कुंडलें धारण करून आनंदयुक्त झालेले पुरुष व स्त्रिया, विचित्र वस्त्रें परिधान करणाऱ्या त्या वरवधूंना, विवाहकालीं द्यावयाचे जे अलंकारादिक नजराणे ते अर्पण करूं लागल्या ॥ ५५ ॥ तेव्हां ती द्वारका नगरी, उभारिलेल्या उंच ध्वजांनीं, अनेक रंगाचीं पुष्पें, वस्त्रें व रत्नें यांनीं युक्त असलेल्या तोरणांनीं, आणि प्रत्येक घरांच्या दरवाज्यांमध्यें स्थापन केलेल्या मंगलकारक–लाह्या, अंकुर, पुष्पें, पूर्णकुंभे, अगरुधूप व दीप यांच्या योगानें शोभूं लागली ॥ ५६ ॥ तशीच जिच्यांतील मार्ग भिजविले आहेत अशी ती नगरी, समारंभास बोलावलेल्या अतिप्रिय राजांच्या मदस्रावी हत्तींनीं आणि दरवाज्यांमध्यें उभारिलेल्या केळींनीं व पोंफळींनीं अलंकृत झाली होती ॥ ५७ ॥ त्या नगरीमध्यें उत्सुकपणानें जिकडेतिकडे धांवत असलेल्या बंधूंमध्यें, कुरु, सृंजय, कैकेय, विदर्भ, यादव व कुंति हे परस्पर भेटून आनंद पावले ॥ ५८ ॥ असो त्या त्या देशांमध्यें सूत मागध व बंदी यांनीं गायन केलेलें हें रुक्मिणीहरणरूप

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भगवंताचें चरित्र श्रवण करून राजे व राजकन्या अतिविस्मित झाल्या ॥ ५९ ॥ हे राजा, त्या द्वारकेमध्यें लक्ष्मीचा अवताररूप अशा रुक्मिणीसहित श्रीकृष्णाला पाहून पुरवासी लोकांना मोठा आनंद झाला ॥ ६० ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील दशमस्कंधाच्या उत्तरार्धामध्यें रुक्मिणीविवाहोत्साहकथनरूप हा चौपन्नावा अध्याय समाप्त झाला ॥ ५४ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या पंचावन्नाव्या अध्यायामध्यें श्रीकृष्णापासून प्रद्युम्न झाला असतां त्याचें शंबरासुरानें हरण केलें. नंतर त्यानें त्या शंबरासुराला मारून स्त्रीसहवर्तमान द्वारकेमध्यें आगमन केलें अशी, कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ शंबरासुरानें नेल्यामुळें झालेली जी प्रद्युम्नाची हानि व तो पुन्हा आल्यामुळें झालेला जो लाभ इत्यादिकांच्या योगेंकरून श्रीकृष्णानें, कुटुंबी लोकांना अपत्यादिकांपासून सुखदुःखादिक कशीं प्राप्त होतात तें सुचविलें आहे ॥ २ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, वासुदेवानें आश्रय केलेल्या चित्तापासून उत्पन्न झाल्यामुळें व सृष्टीला कारण असल्यामुळें वासुदेवाचा अंश असा जो

॥ ६० ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधोत्तरार्धे टीकायां चतुःपंचाशत्तमोऽध्यायः ॥ ५४ ॥ ॥ पंच पंचाशत्तमे तु प्रद्युम्नोऽजनि कृष्णतः ॥ शंबरेण हृतः सोऽथ हत्वा तं कांतयाऽगमत् ॥ १ ॥ प्रद्युम्नहानिलाभाद्यैः शंबराहरणादिना ॥ कुटुंबिनामपत्यादिसुखदुःखमसूसुचत् ॥ २ ॥ जांबवत्यादिविवाहेभ्यः प्रागेव प्रद्युम्नजन्म ततो विवाहास्ततः

द्वारकायामभूद्राजन्महामोदः पुरौकसाम् ॥ रुक्मिण्या रमयोपेतं दृष्ट्वा कृष्णं श्रियः पतिम् ॥ ६० ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे उत्तरार्धे रुक्मिण्युद्वाहोत्सवे चतुःपंचाशत्तमोऽध्यायः ॥ ५४ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ कामस्तु वासुदेवांशो दग्धः प्राग्रुद्रमन्युना ॥ देहोपपत्तये भूयस्तमेव प्रत्यपद्यत ॥ १ ॥ स एव जातो वैदर्भ्यां कृष्णवीर्यसमुद्भवः ॥ प्रद्युम्न इति विख्यातः सर्वतोऽनवमः पितुः ॥ २ ॥ तं शंबरः कामरूपी हृत्वा तोकमनिर्दशम् ॥ स विदित्वाऽऽत्मनः शत्रुं प्रास्योदन्वत्यगाद्गृहम् ॥ ३ ॥ तं निर्जगार बलवान्मीनः सोऽप्यपरैः सह ॥ वृतो जालेन महता गृहीतो मत्स्यजीविभिः ॥ ४ ॥ तं शंबराय कैवर्ता उपाजह्रुरुपायनम् ॥ सूदा महानसं नीत्वाऽवद्यन्स्वधितिनाऽद्भुतम् ॥ ५ ॥

शंबरागारात्प्रद्युम्नप्रत्यागमनं अतः पुत्रकथनप्रस्तावेऽपि प्रथमं प्रद्युम्नस्य जातमात्रस्य शंबरेण हरणं निरूप्यते प्रत्यागमनं तूत्तरकालीनमपि कथापर्यवसानायात्रोक्तमिति । वासुदेवाधिष्ठितचित्तप्रभवत्वाद्वासुदेवांशः सृष्टिहेतुत्वाच्च । देहोपपत्तये देहप्राप्तये ॥ १ ॥ अनवमोऽन्यूनः ॥ २ ॥ स प्रसिद्धः कामशत्रुः शंबरस्तमात्मनः शत्रुं विदित्वा हृत्वा समुद्रे प्रास्य प्रक्षिप्य गृहमगादिति ॥ ३ ॥ निर्जगार गिलितवान् ॥ ४ ॥ स्वधितिना शस्त्रिकया । अवद्यन्नवाद्यन्खंडितवंतः ॥ ५ ॥

काम, तो पूर्वजन्मीं रुद्राच्या क्रोधानें दग्ध झाला होता ह्मणून तोच पुन्हा देह प्राप्त होण्यासाठीं त्या वासुदेवरूपी श्रीकृष्णामध्यें प्रविष्ट होऊन राहिला ॥ १ ॥ तोच काम, कृष्णाच्या वीर्यामध्यें प्रविष्ट होत्साता, रुक्मिणीच्या उदरीं उत्पन्न होऊन प्रद्युम्न या नांवानें प्रख्यात झाला. तो सौंदर्य, आकृति, भाषण इत्यादिक सर्वगुणांनीं श्रीकृष्णासारखाच होता ॥ २ ॥ तेव्हां कामाच्या शत्रुत्वेंकरून प्रसिद्ध असलेल्या शंबरासुरानें त्या प्रद्युम्नाला ' हा आपला शत्रु काम आहे असें, ' नारदाच्या मुखांतून ऐकून गुप्तरूपानें त्या बालकाला दहा दिवस होण्याच्या पूर्वींच चोरून नेलें आणि समुद्रामध्यें टाकून तो शंबरासुर आपल्या घरीं निघून गेला ॥ ३ ॥ त्या बालकाला कोणीएका बलवान् मत्स्यानें गिळून टाकिलें. नंतर मत्स्य मारून जीविका चालविणाऱ्या कोळ्यांनीं दुसऱ्या मत्स्यांसहवर्तमान मोठ्या जाळ्यानें त्याहि मत्स्याला अडकावून धरिलें ॥ ४ ॥ नंतर त्या कोळ्यांनीं तो महामत्स्य शंबरासुराला नजराणा ह्मणून अर्पण केला. नंतर स्वयंपाक्यांनीं त्या अद्भुत मत्स्याला पाकगृहामध्यें नेऊन आपल्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शस्त्रानें चिरिलें ॥ ५ ॥ तेव्हां त्याच्या उदरामध्यें अद्भुत बालक पाहून त्यांनीं तो मायावतीच्या स्वाधीन केला. तेव्हां हा बालक कोण आहे ? अशा शंकितचित्त झालेल्या त्या मायावतीला, नारदानें त्या बालकाचें कामदेवस्वरूपत्व, कृष्णापासून रुक्मिणीचेठिकाणीं उत्पत्ति, शंबरानें केलेलें हरण व मत्स्याच्या उदरामध्यें प्रवेश हीं सर्व कथन केलीं ॥ ६ ॥ ती मायावती खरोखर कामाची पत्नी रतिनामक असून रुद्राच्या क्रोधानें देह जळून गेलेल्या आपल्या पतीच्या देहोत्पत्तीची वाट पाहणारी पतिव्रता होती ॥ ७ ॥ तिला शंबरासुरानें स्वयंपाक करण्याच्या कामीं योजिलें होतें. तिनें नारदाच्या मुखांतून, तो बालक कामदेव आहे असें जाणून त्याचेठिकाणीं स्नेह केला ॥ ८ ॥ पुढें थोड्याच काळानें तो कृष्णपुत्र, तारुण्यदशेला पावला आणि आपल्या सौंदर्यादिक गुणांनीं आपणाकडे पाहणाऱ्या स्त्रियांना अत्यंत मोह उत्पन्न करूं लागला ॥ ९ ॥ तेव्हां हे राजा, कमलपत्रासारखे लांबोडे ज्याचे नेत्र आहेत, आजानुपर्यंत लांब ज्याचे बाहु आहेत, व मनुष्यलोकामध्यें जो सुंदर आहे, अशा त्या

तत्त्वं कामोऽयं तव भर्तेति । उत्पत्तिं श्रीकृष्णाद्रुक्मिण्यामुत्पन्न इति ॥ ६ ॥ यशस्विनी पतिव्रता । भर्तृदेहप्राप्तिं प्रतीक्षमाणा ॥ ७ ॥ तं शिशुं कामदेवं बुद्ध्वा विज्ञाय ॥ ८ ॥

दृष्ट्वा तदुदरे बालं मायावत्यै न्यवेदयन् ॥ नारदोऽकथयत्सर्वं तस्याः शंकितचेतसः ॥ बालस्य तत्त्वमुत्पत्तिं मत्स्योदरनिवेशनम् ॥ ६ ॥ सा च कामस्य वै पत्नी रतिर्नाम यशस्विनी ॥ पत्युर्निर्दग्धदेहस्य देहोत्पत्तिं प्रतीक्षती ॥ ७ ॥ निरूपिता शंबरेण सा सूपौदनसाधने ॥ कामदेवं शिशुं बुद्ध्वा चक्रे स्नेहं तदाऽर्भके ॥ ८ ॥ नातिदीर्घेण कालेन स कार्ष्णी रूढयौवनः ॥ जनयामास नारीणां वीक्षंतीनां च विभ्रमम् ॥ ९ ॥ सा तं पतिं पद्मदलायतेक्षणं प्रलंबबाहुं नरलोकसुंदरम् ॥ सव्रीडहासोत्तभितभ्रुवेक्षती प्रीत्योपतस्थे रतिरंग सौरतैः ॥ १० ॥ तामाह भगवान्कार्ष्णिर्मातस्ते मतिरन्यथा ॥ मातृभावमतिक्रम्य वर्तसे कामिनी यथा ॥ ११ ॥ रतिरुवाच ॥ भवान्नारायणसुतः शंबरेणाहृतो गृहात् ॥ अहं तेऽधिकृता पत्नी रतिः कामो भवान्प्रभो ॥ १२ ॥ एष त्वाऽनिर्दशं सिंधावक्षिपच्छंबरोऽसुरः ॥ मत्स्योऽग्रसीत्तदुदरादितः प्राप्तो भवान्प्रभो ॥ १३ ॥ तमिमं जहि दुर्धर्षं दुर्जयं शत्रुमात्मनः ॥ मायाशतविदं त्वं च मायाभिर्मोहनादिभिः ॥ १४ ॥

विभ्रमं संमोहम् ॥ ९ ॥ अंग हे राजन् । सौरतैर्भावैरुपतस्थेऽभजत् ॥ १० ॥ ११ ॥ अधिकृता पत्नीत्यत्र हेतुः । रतिरहं भवान्काम इति ॥ १२ ॥ १३ ॥ दुर्जयत्वे हेतुः । मायाशतविदमिति । कथं तर्हि हंतव्यस्तत्राह । मायाभिरिति ॥ १४ ॥

आपल्या पतीला, लज्जायुक्त हास्याच्या योगानें कटाक्षयुक्त वक्रदृष्टीनें अवलोकन करणारी ती मायावतीनामक रति, सुरतसंबंधी अभिप्रायांनीं त्याचें सेवन करूं लागली ॥ १० ॥ तेव्हां तो भगवान् कृष्णपुत्र, तिला ह्मणाला कीं–हे माते, तुझी बुद्धि विपरीत दिसत्ये, ह्मणजे तूं हल्लीं आपला मातेचा धर्म टाकून कामातुर स्त्रीसारखी वर्तणूक करित्येस हें काय ? ॥ ११ ॥ तेव्हां रति ह्मणाली–तूं नारायणाचा (श्रीकृष्णाचा) पुत्र असून शंबरासुरानें त्याच्या घरांतून आणिलेला आहेस, हे प्रभो, मी तुझी अधिकारानें प्राप्त झालेली पत्नी रति आहें आणि तूं माझा पति काम आहेस ॥ १२ ॥ हे प्रभो, ह्या शंबरनामक दैत्यानें, तुला जन्मास येऊन दहा दिवस होण्याच्यापूर्वींच नेऊन समुद्रामध्यें टाकिलें होतें, तेथें तुला एका मत्स्यानें गिळिलें असून तो मत्स्य कोळ्यांनीं मारून येथें शंबरासुराला नजराणा आणला होता. त्याच्या उदरांतून तूं येथें प्राप्त झाला आहेस ॥ १३ ॥ यास्तव त्या ह्या आपल्या शेंकडो माया जाणणाऱ्या व पराभव करण्यास अशक्य अशा दुर्जय शत्रूला, आपल्या मोहनादिक मायांनीं मो-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हित करून मारून टाक ॥ १४ ॥ याविषयीं विलंब मात्र करूं नये. कारण, तुझी माता रुक्मिणी, पुत्र नाहींसा झाल्यामुळें दीन व पुत्रस्नेहानें व्याकुळ होऊन, वत्स नाहींसा होऊन शोकातुर झालेल्या गाईप्रमाणें व आक्रोश करणाऱ्या टिट्वीप्रमाणें रोदन करीत आहे ॥ १५ ॥ याप्रमाणें सांगून त्या मायावतीनें, महापराक्रमी अशाहि त्या प्रद्युम्नाला शत्रूच्या सर्वमायांचा नाश करणारी आपली महामायानामक विद्या सांगितली ॥ १६ ॥ तेव्हां तो प्रद्युम्नहि शंबरासुराच्या समीप जाऊन, सहन करण्यास अशक्य अशा तिरस्कारवचनांनीं त्याची भर्त्सना करून कलह उत्पन्न करीत होत्साता युद्ध करण्याकरितां त्यास बोलावूं लागला ॥ १७ ॥ त्यावेळीं दुर्भाषणांनीं निंदा केलेला तो शंबरासुर, पायानें ताडण केलेल्या सर्पाप्रमाणें क्रोधानें नेत्र लाल करून व हातामध्यें गदा ग्रहण करून युद्ध करण्याकरितां घरांतून बाहेर निघाला ॥ १८ ॥ आणि वेगानें गदा फिरवून महात्म्या प्रद्युम्नाला मारण्याकरितां ती त्याच्या आंगावर फेंकिली आणि वज्रपात झाला असतां जसा तीव्र नाद होतो त्याप्रमाणें त्यानें मोठ्यानें गर्जना केली ॥ १९ ॥

न चात्र विलंबः कार्य इत्याह । परिशोचति रोदितीत्यर्थः ॥ १५ ॥ १६ ॥ १७ ॥ १८ ॥ वज्रस्य निष्पेषे निर्घाते यथा निष्ठुरस्तीव्रो नादो भवति तथाभूतं नादं व्यनदत् ।

परिशोचति ते माता कुररीव गतप्रजा ॥ पुत्रस्नेहाकुला दीना विवत्सा गौरिवातुरा ॥ १५ ॥ प्रभाष्यैवं ददौ विद्यां प्रद्युम्नाय महात्मने ॥ मायावती महामायां सर्वमायाविनाशिनीम् ॥ १६ ॥ स च शंबरमभ्येत्य संयुगाय समाह्वयत् ॥ अविषह्यैस्तमाक्षेपैः क्षिपन्संजनयन्कलिम् ॥ १७ ॥ सोऽधिक्षिप्तो दुर्वचोभिः पदाऽऽहत इवोरगः ॥ निश्चक्राम गदापाणिरमर्षात्ताम्रलोचनः ॥ १८ ॥ गदामाविध्य तरसा प्रद्युम्नाय महात्मने ॥ प्रक्षिप्य व्यनदन्नादं वज्रनिष्पेषनिष्ठुरम् ॥ १९ ॥ तामापतंतीं भगवान्प्रद्युम्नो गदया गदाम् ॥ अपास्य शत्रवे क्रुद्धः प्राहिणोत्स्वगदां नृप ॥ २० ॥ स च मायां समाश्रित्य दैतेयीं मयदर्शिताम् ॥ मुमुचेऽस्त्रमयं वर्षं कार्ष्णौ वैहायसोऽसुरः ॥ २१ ॥ बाध्यमानोऽस्त्रवर्षेण रौक्मिणेयो महारथः ॥ सत्वात्मिकां महाविद्यां सर्वमायोपमर्दिनीम् ॥ २२ ॥ ततो गौह्यकगांधर्वपैशाचोरगराक्षसीः ॥ प्रायुंक्त शतशो दैत्यः कार्ष्णिर्व्यधमयत्स ताः ॥ २३ ॥ निशातमसिमुद्यम्य सकिरीटं सकुंडलम् ॥ शंबरस्य शिरः कायात्ताम्रश्मश्र्वोजसाऽहरत् ॥ २४ ॥

सामान्यविशेषतया व्याप्यव्यापकत्वमोदनं पाकं पचतीति वत् । अतिनिष्ठुरं नादमकरोदित्यर्थः ॥ १९ ॥ २० ॥ वैहायस आकाशे स्थितः ॥ २१ ॥ सत्वात्मिकां सत्वगुणमयीं प्रायुंक्तेत्युत्तरस्यानुषंगः ॥ २२ ॥ ता मायाः व्यधमयद्व्यनाशयत् ॥ २३ ॥ ताम्राणि श्मश्रूणि यस्मिंस्तत् । ओजसा बलेन ॥ २४ ॥

भगवान् प्रद्युम्नानेंहि येणाऱ्या त्या गदेचा आपल्या गदेनें चुराडा करून, हे राजा, क्रुद्ध झालेल्या त्यानें, शंबरासुराला मारण्याकरितां आपली गदा फेंकिली ॥ २० ॥ त्या शंबरासुरानेंहि मयासुरानें उपदेश केलेल्या अंतर्धानादिरूप मायेचा आश्रय करून, आकाशामध्यें स्थित होऊन, प्रद्युम्नावर शस्त्रमय वृष्टि केली ॥ २१ ॥ तेव्हां शस्त्रवृष्टीनें पीडा पावलेलाहि तो रुक्मिणीचा पुत्र महारथी प्रद्युम्न, सर्वदैत्यमायांचा उपमर्द करणाऱ्या आपल्या सत्वगुणात्मक महाविद्येचा प्रयोग करूं लागला ॥ २२ ॥ नंतर पुन्हा त्या दैत्यानें, गुह्यकांच्या, गंधर्वांच्या, पिशाचांच्या, सर्पांच्या व राक्षसांच्या शेंकडो मायांचा प्रद्युम्नावर प्रयोग केला. तेव्हां त्या कृष्णपुत्र प्रद्युम्नानें त्या सर्वमायांचा नाश केला ॥ २३ ॥ नंतर त्या प्रद्युम्नानें, तीक्ष्ण खड्ग उचलून त्याच्यायोगानें तांबड्या मिशा ज्याचेवर आहेत असें तें किरीटासहित व कुंडलांसहित शंबरासुराचें मस्तक, बलात्कारानें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तोडून पाडिलें ॥ २४ ॥ तेव्हां स्तुति करणाऱ्या देवांनीं पुष्पांजलींनीं आच्छादित केलेल्या त्या प्रद्युम्न पतीला, आकाशमार्गानें स्वतां गमन करणाऱ्या व दुसऱ्या-कडूनहि गमन करविणाऱ्या त्या मायावती भार्येनें आकाशमार्गानें द्वारकानगरींत नेलें ॥ २५ ॥ तेव्हां हे राजा, जसा विजेसहवर्तमान काळा मेघच आकाशांतून खालीं उतरला कीं काय असा तो प्रद्युम्न, पत्नीसहवर्तमान खालीं उतरून शेंकडो उत्तम स्त्रियांनीं व्याप्त अशा श्रीकृष्णाच्या श्रेष्ठ अंतःपुरामध्यें प्रविष्ट झाला ॥ २६ ॥ तेव्हां त्या मेघासारख्या श्यामवर्ण, पिंवळीं भरजरीचीं रेशमी वस्त्रें परिधान करणाऱ्या, आजानुबाहु, आरक्तनेत्र, मंदहास्ययुक्त, सुंदरमुख, आणि ज्याचें मुखकमळ काळ्या कुरळ केशरूप भ्रमरांनीं उत्तम अलंकृत आहे अशा त्या प्रद्युम्नाला अवलोकन करून, हा श्रीकृष्णच आहे असें मानून लज्जित झालेल्या स्त्रिया, त्यात्याठिकाणीं लपूं लागल्या ॥ २७॥

॥ २५ ॥ विद्युता सह बलाहको मेघ इव ॥ २६ ॥ नीलाश्च वक्राश्च येऽलकास्त एवालयस्तैः ह्रीता लज्जिताः ॥ २८ ॥ श्रीकृष्णो न भवतीत्यवधार्य स्त्रीषु रत्नं श्रेष्ठा रति-

आकीर्यमाणो दिविजैः स्तुवद्भिः कुसुमोत्करैः ॥ भार्ययांऽबरचारिण्या पुरं नीतो विहायसा ॥ २५ ॥ अंतःपुरवरं राजँल्ललनाशत-संकुलम् ॥ विवेश पत्न्या गगनाद्विद्युतेव बलाहकः ॥ २६ ॥ तं दृष्ट्वा जलदश्यामं पीतकौशेयवाससम् ॥ प्रलंबबाहुं ताम्राक्षं सु-स्मितं रुचिराननम् ॥ २७ ॥ स्वलंकृतमुखांभोजं नीलवक्रालकालिभिः ॥ कृष्णं मत्वा स्त्रियो ह्रीता निलिल्युस्तत्र तत्र ह ॥ २८ ॥ अवधार्य शनैरीषद्वैलक्षण्येन योषितः ॥ उपजग्मुः प्रमुदिताः सस्त्रीरत्नं सुविस्मिताः ॥ २९ ॥ अथ तत्रासितापांगी वैदर्भी वल्गुभा-षिणी ॥ अस्मरत्स्वसुतं नष्टं स्नेहस्नुतपयोधरा ॥ ३० ॥ को न्वयं नरवैदूर्यः कस्य वा कमलेक्षणः ॥ धृतः कया वा जठरे केयं लब्धा त्वनेन वा ॥ ३१ ॥ मम चाप्यात्मजो नष्टो नीतो यः सूतिकागृहात् ॥ एतत्तुल्यवयोरूपो यदि जीवति कुत्रचित् ॥ ३२ ॥ कथं त्वनेन संप्राप्तं सारूप्यं शार्ङ्गधन्वनः ॥ आकृत्याऽवयवैर्गत्या स्वरहासावलोकनैः ॥ ३३ ॥

स्तत्सहितम् ॥ २९ ॥ ३० ॥ सुतं स्मरंत्याह । को न्वयमिति । नरवैदूर्यः पुरुषश्रेष्ठः ॥ ३१ ॥ एतेन तुल्यं वयो रूपं च यस्य स भवेदिति ॥ ३२ ॥ तस्य स्वपुत्रत्वं संभावयं-त्याह । कथं त्विति ॥ ३३ ॥

॥ २८ ॥ नंतर त्या स्त्रिया, सावकाशपणें श्रीकृष्णाहून थोड्या विलक्षणपणानें ह्मणजे याचेठिकाणीं श्रीवत्सकौस्तुभादिक नसल्यामुळें हा कृष्ण नव्हे असा निश्चय करून हर्षयुक्त व विस्मित होत्सात्या स्त्रीरत्नासहित आलेल्या त्या प्रद्युम्नाजवळ प्राप्त झाल्या ॥ २९ ॥ पुढें त्याला पाहिल्यावर त्या अंतःपुरामध्यें, नीलकटाक्षवती व मधुर भाषण करणारी रुक्मिणी, स्नेहानें स्तनामध्यें पान्हा फुटल्यामुळें नष्ट झालेल्या आपल्या पुत्राचें स्मरण करूं लागली ॥ ३० ॥ आणि ह्मणाली कीं,— हा कमलेक्षण मनुष्यश्रेष्ठ कोण बरें आहे ? कोणाचा बरें पुत्र आहे ? कोणत्या मातेनें याला आपल्या उदरीं धारण केलें आहे ? आणि यानें मिळविलेली ही स्त्रीतरी कोण आहे ? ॥ ३१ ॥ माझाहि जो पुत्र बाळंतिणीच्या घरांतून कोणी चोरून नेल्यामुळें नाहींसा झाला आहे तो जर कोठें वांचत असेल तर याच्यासारखाच वयानें व रूपानें असेल ! ॥ ३२ ॥ आतां हाच आपला पुत्र असावा अशी भावना करीत ह्मणत्ये–बरें यानें आकृति, अवयव, गति, स्वर हास्य, व अवलोकन यांच्या योगेंकरून श्रीकृष्णाचा सारखेपणा कसा बरें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मिळविला आहे? ॥ ३३ ॥ तेव्हां जो बालक मीगर्भाचे ठिकाणीं धारण केला होता तोच हा असेल यांत संशय नाहीं. आणि याचेठिकाणीं माझें प्रेम वाढत आहे तसाच माझा डावा बाहु स्फुरण पावत आहे म्हणून हें खोटें होणार नाहीं ॥ ३४ ॥ याप्रमाणें रुक्मिणी तर्क करीत असतां, देवकीवसुदेवांसहवर्तमान पुण्यकीर्ति श्रीकृष्णहि, तेथें प्राप्त झाला ॥ ३५ ॥ तेव्हां प्रद्युम्नाला शंबरासुरानें नेलें इत्यादि प्रकार ठाऊक असलेलाहि तो भगवान् श्रीकृष्ण, उगीच राहिला. त्यावेळींच प्राप्त झालेल्या नारदानें, प्रद्युम्नाला शंबरासुरानें नेला होता इत्यादिक सर्व वृत्तांत त्या वसुदेवादिकांना सांगितला ॥ ३६ ॥ तें नारदानें सांगितलेलें मोठें आश्चर्य ऐकून कृष्णाच्या अंतःपुरांतील स्त्रिया, बहुत वर्षेंपर्यंत नष्ट झालेला असल्यामुळें मेलेलाच पुन्हा प्राप्त झाला कीं काय? अशा त्या प्रद्युम्नाला पाहून आनंद पावल्या ॥ ३७ ॥ आणि देवकी, वसुदेव श्रीकृष्ण, बळराम, रुक्मिणी व स्त्रिया हीं सर्व त्या प्रद्युम्नरतिरूप दंपतींना आलिंगन करून आनंद पावलीं ॥ ३८ ॥ द्वारकावासी लोकांनीं नाहींसा झालेला प्रद्युम्न पुन्हा आला हें वर्तमान श्रवण करून, अहो! हा बालक, जसा एखादा मरण पावलेला पुन्हा यावा त्याप्रमाणें आला ही फार चांगली गोष्ट झाली असें भाषण केलें ॥ ३९ ॥ आतां सौंदर्यातिशयानें प्रद्युम्नाचें वर्णन करितो—स्वरूपानें हुबेहुब श्रीकृष्णासारख्या ज्या प्रद्युम्नाचेठिकाणीं हाच आपला भर्ता आहे अशी वारंवार भावना उत्पन्न झालेल्या त्याच्या माता (कृष्णपत्नी) हि कामातुर होऊन त्याचें एकांतस्थलीं सेवन करण्याचें मनांत आणीत असत, किंवा कामातुर झाल्या म्हणचे एकांतीं लपून राहत असत असें जें झालें तें कांहीं, स्मरणमात्रानेंच क्षोभ करणाऱ्या व त्यांतूनहि श्रीकृष्णाच्या श्रीमूर्तिचें प्रतिबिंब (पुत्र) अशा प्रत्यक्ष दृष्टिगोचर होणाऱ्या त्या कामरूपी प्रद्युम्नाचेठिकाणीं खरोखर आश्चर्य नाहीं. जर त्याच्या मातांची अशी अवस्था तर अन्यस्त्रिया त्याला पाहून मोहित होतील हें काय सांगावें ॥ ४० ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवते ॥१७७॥

तदेवाधिकं संभावयति। स एवेति ॥ ३४ ॥ देवक्यानकदुदुभ्यां देवक्यानकदुंदुभिभ्यामित्यर्थः ॥ ३५ ॥ ३६ ॥ ३७ ॥ ३८ ॥ ३९ ॥ अतिसौंदर्येण प्रद्युम्नं वर्णयति। यमिति। पिता श्रीकृष्णस्तत्सरूपे तत्सदृशे प्रद्युम्ने निज आत्मीय ईशो भर्तेति भावो भावना यासां तास्तन्मातरः कृष्णपत्न्योऽपि रहसि निरूढभावाः सत्यो यमभजन्निति यत्तत्र खलु चित्रम्।

स एव वा भवेन्नूनं यो मे गर्भे धृतोऽर्भकः ॥ अमुष्मिन्प्रीतिरधिका वामः स्फुरति मे भुजः ॥ ३४ ॥ एवं मीमांसमानायां वैदर्भ्यां देवकीसुतः ॥ देवक्यानकदुंदुभ्यामुत्तमश्लोक आगमत् ॥ ३५ ॥ विज्ञातार्थोऽपि भगवांस्तूष्णीमास जनार्दनः ॥ नारदोऽकथयत्सर्वं शंबराहरणादिकम् ॥ ३६ ॥ तच्छ्रुत्वा महदाश्चर्यं कृष्णांतःपुरयोषितः ॥ अभ्यनंदन्बहूनब्दान्नष्टं मृतमिवागतम् ॥ ३७ ॥ देवकी वसुदेवश्च कृष्णरामौ तथा स्त्रियः ॥ दंपती तौ परिष्वज्य रुक्मिणी च ययुर्मुदम् ॥ ३८ ॥ नष्टं प्रद्युम्नमायातमाकर्ण्य द्वारकौकसः ॥ अहो मृत इवायातो बालो दिष्ट्येति हाब्रुवन् ॥ ३९ ॥ यं वै मुहुः पितृसरूपनिजेशभावास्तन्मातरो यदभजन्रहरूढभावाः ॥ चित्रं न तत्खलु रमास्पदबिंबबिंबे कामे स्मरेऽक्षिविषये किमुतान्यनार्यः ॥ ४० ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे प्रद्युम्नोत्पत्तिनिरूपणं नाम पंचपंचाशत्तमोऽध्यायः ॥ ५५ ॥

कथं सति। स्मरे स्मर्यमाणत्वेनैव क्षोभके कामेऽक्षिविषये सति किंच रमास्पदं श्रीकृष्णस्तस्य बिंबं श्रीमूर्तिस्तस्य बिंबे प्रतिबिंबे पुत्रे तदा किं नु वक्तव्यमन्यनार्यो भेजुरिति ॥ ४० ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधे उत्तरार्धे टीकायां पंचपंचाशत्तमोऽध्यायः ॥ ५५ ॥ ॥

१ बिंबासारखीच प्रतिबिंबाचेठिकाणीं बुद्धि होत्ये यांत कांहीं दोष नाहीं.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नामकमहा पुराणांतील दशमस्कंधाच्या उत्तरार्धामध्यें प्रद्युम्नोत्पत्तिनिरूपणनामक हा पंचावन्नावा अध्याय समाप्त झाला ॥ ५५ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ आतां ह्या छप्पन्नाव्या अध्यायामध्यें तर श्रीकृष्णानें, आपणावर मिथ्याभियोग (खोटी आळ) प्राप्त झाली असतां ती घालविण्याकरितां स्यमंतक मणि जांबवानाकडून आणिला त्या प्रकरणांत श्रीकृष्णाला, जांबवानाची कन्या जांबवती व सत्राजिताची कन्या सत्यभामा ह्या दोन स्त्रिया प्राप्त झाल्या अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ पुत्रादिक विषयसौख्याची अतिचंचल स्थिति सांगून आतां स्यमंतमण्याच्या हरणादिकेंकरून अर्थाला अनर्थपणा आहे असें सांगतो ॥ २ ॥ सत्यभामाजांबवतींच्या विवाहाच्या प्रस्तावाकरितां स्यमंतकाख्यान सांगत श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, श्रीकृष्णाचा अपराध करणाऱ्या सत्राजितानें त्या अपराधाच्या शांतीकरितां आपणच उद्योग करून स्यमंतकमण्यासहवर्तमान आपली कन्या सत्यभामा श्रीकृष्णाला अर्पण केली ॥ १ ॥ राजा ह्मणाला–हे ब्रह्मनिष्ठा, सत्राजितानें श्रीकृष्णाचा कोणता अपराध केला होता?

षट्पंचाशत्तमे मिथ्याऽभियोगे मणिमाहरत् ॥ कन्यां जांबवतः प्राप कृष्णः सत्राजितस्ततः ॥ १ ॥ पुत्रादिकामसौख्यस्य निष्ठामुक्त्वाऽतिचंचलाम् ॥ अर्थस्यानर्थतामाह स्यमंतहरणादिना ॥ २ ॥ सत्यभामाजांबवत्योर्विवाहप्रस्तावाय स्यमंतकाख्यानमाह । सत्रा जित इति सत्राजित इत्यकारांतः क्वचिच्च तकारांतोऽप्यन्वयानुसारेण द्रष्टव्यः । कृतापराधस्तच्छांतये

॥ श्रीशुक उवाच ॥ सत्राजितः स्वतनयां कृष्णाय कृतकिल्बिषः ॥ स्यमंतकेन मणिना स्वयमुद्यम्य दत्तवान् ॥ १ ॥ राजोवाच ॥ सत्राजितः किमकरोद्ब्रह्मन्कृष्णस्य किल्बिषम् ॥ स्यमंतकः कुतस्तस्य कस्माद्दत्ता सुता हरेः ॥ २ ॥ श्रीशुक उवाच ॥ आसीत्सत्राजितः सूर्यो भक्तस्य परमः सखा ॥ प्रीतस्तस्मै मणिं प्रादात्सूर्यस्तुष्टः स्यमंतकम् ॥ ३ ॥ स तं बिभ्रन्मणिं कंठे भ्राजमानो यथा रविः ॥ प्रविष्टो द्वारकां राजंस्तेजसा नोपलक्षितः ॥ ४ ॥ तं विलोक्य जना दूरात्तेजसा मुष्टदृष्टयः ॥ दीव्यतेऽक्षैर्भगवते शशंसुः सूर्यशंकिताः ५ ॥ नारायण नमस्तेऽस्तु शंखचक्रगदाधर ॥ दामोदरारविंदाक्ष गोविंद यदुनंदन ॥ ६ ॥ एष आयाति सविता त्वां दिदृक्षुर्जगत्पते ॥ मुष्णन्गभस्तिचक्रेण नृणां चक्षूंषि तिग्मगुः ॥ ७ ॥

स्वयमेवोद्यमं कृत्वा मणिना सह प्रादादिति ॥ १ ॥ २ ॥ भक्तस्य सत्राजितः । सूर्यः स्वाम्यपि सखेवासीदित्यर्थः । स च तुष्टस्तस्मै स्यमंतकं नाम मणिं प्रादात् । प्रीतः स्निग्धः ॥ ३ ॥ नोपलक्षितः सत्राजितोऽसावित्यविज्ञातः ॥ ४ ॥ दीव्यते क्रीडते सूर्योऽयमिति शंकिताः संतः कथयामासुरिति ॥ ५ ॥ सूर्यं नमस्कारार्थमागतं कल्पयित्वोद्रिक्तभक्तीनां संबोधनानि नारायणेत्यादीनि ॥ ६ ॥ गभस्तिचक्रेण रश्मिजालेन मुष्णन्प्रतिघ्नन् । तिग्मास्तीक्ष्णा गावो रश्मयो यस्य सः ॥ ७ ॥

त्याला स्यमंतकमणि कोठून प्राप्त झाला होता? आणि त्यानें श्रीकृष्णाला कोणत्या कारणानें कन्या दिली तें मला सांग ॥ २ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–सत्राजितानें अरण्यांत जाऊन सूर्याची भक्ति केली, तिच्या योगानें त्याचा पूज्य व स्वामी असाहि तो सूर्य त्याला मित्रासारखा झाला होता. त्या सूर्यानें त्या सत्राजिताच्या भक्तीनें संतुष्ट व त्याच्यावर स्नेहयुक्त होऊन त्याला स्यमंतकनामक एक मणि दिला ॥ ३ ॥ तेव्हां हे राजा, तो सत्राजित त्या मण्याला कंठामध्यें धारण करून त्याच्या तेजानें सूर्यासारखा प्रकाशमान होत असल्यामुळें कोणीहि 'हा सत्राजित आहे असें, न जाणलेला तो द्वारकेमध्यें प्रविष्ट झाला ॥ ४ ॥ त्या सत्राजिताला द्वारकावासी लोकांनीं दुरून अवलोकन करून त्याच्या तेजानें, ज्यांच्या दृष्टि दिपावून गेल्या आहेत असे ते लोक, हा सूर्य आहे अशी शंका धारण करून, फांशांनीं क्रीडा करीत असणाऱ्या श्रीकृष्णाला सांगूं लागले कीं ॥ ५ ॥ हे नारायणा, हे शंखचक्रगदाधरा, हे दामोदरा, हे कमलाक्षा, हे गोविंदा, हे यादवांना आनंदकारका, तुला नमस्कार असो ॥ ६ ॥ हे जगत्पते, तुला पाहण्याची इच्छा धारण

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करणारा हा तीक्ष्ण किरणांचा सूर्य, आपल्या किरणांच्या समुदायानें मनुष्यांच्या नेत्रांना दिपवीत होत्साता येत आहे ॥ ७ ॥ हें कांहीं अघटित नव्हे कारण, खरोखरच ब्रह्मादिक देवश्रेष्ठहि त्रैलोक्यामध्यें तुझ्या मार्गाचा शोध करित असतात ह्मणून सांप्रतकाळीं यादवांमध्यें मनुष्यावतार धारण करणाऱ्या तुला जाणून हे प्रभो, सूर्य तुझें दर्शन घेण्याकरितां येत आहे ॥ ८ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा तो येणारा कोण आहे हें तत्त्व न जाणणाऱ्या अज्ञ लोकांचें तें भाषण श्रवण करून, श्रीकृष्ण ह्मणाला कीं, हा सूर्यदेव नव्हे तर स्यमंतकमण्याच्या योगानें प्रकाशमान होणारा सत्राजित आहे ॥ ९ ॥ इकडे सत्राजितानें कौतुकाच्या योगानें जेथें तोरणें बांधणें वगैरे मंगलें केलीं आहेत अशा शोभायुक्त केलेल्या आपल्या घरामध्यें प्रवेश करून ब्राह्मणांकडून देवघरामध्यें त्या मण्याचें स्थापन करविलें ॥ १० ॥ हे राजा, तो मणि दररोज सुवर्णाचे आठ भार[1] उत्पन्न करीत असे आणि ज्याठिकाणीं पूजा केलेला तो मणि असेल तेथें दुर्भिक्ष (महागाई) महामारी, ग्रहपीडा, सर्पभीति, मनोदुःख, रोग

नचेदमघटमानमित्याहुः । नन्विति । अन्विच्छंति मृगयंते । अजः सूर्यः ॥ ८ ॥ बालानामज्ञानां वचनम् । ज्वलन् विद्योतमानः ॥ ९ ॥ कृतानि कौतुकेनोत्सवेन मंगलानि यस्मिंस्तत् । विप्रैः कृत्वा ॥ १० ॥ भारप्रमाणं च । चतुर्भिर्व्रीहिभिर्गुंजं गुंजान्पंच पणं पणान् ॥ अष्टौ धरणमष्टौ च कर्षं तांश्चतुरः पलम् ॥ तुलां पलशतं प्राहुर्भारः स्याद्विं-

नन्वन्विच्छंति ते मार्गं त्रिलोक्यां विबुधर्षभाः ॥ ज्ञात्वाऽद्य गूढं यदुषु द्रष्टुं त्वां यात्यजः प्रभो ॥ ८ ॥ श्रीशुक उवाच ॥ निश-
म्य बालवचनं प्रहस्यांबुजलोचनः ॥ प्राह नासौ रविर्देवः सत्राजिन्मणिना ज्वलन् ॥ ९ ॥ सत्राजित्स्वगृहं श्रीमत्कृतकौतुकमं-
गलम् ॥ प्रविश्य देवसदने मणिं विप्रैर्न्यवेशयत् ॥ १० ॥ दिने दिने स्वर्णभारानष्टौ स सृजति प्रभो ॥ दुर्भिक्षमार्यरिष्टानि सर्पा-
धिव्याधयोऽशुभाः ॥ न संति मायिनस्तत्र यत्रास्तेऽभ्यर्चितो मणिः ॥ ११ ॥ स याचितो मणिं क्वापि यदुराजाय शौरिणा ॥ नै-
वार्थकामुकः प्रादाद्याच्ञाभंगमतर्कयन् ॥ १२ ॥ तमेकदा मणिं कंठे प्रतिमुच्य महाप्रभम् ॥ प्रसेनो हयमारुह्य मृगयां व्यचरद्वने
॥ १३ ॥ प्रसेनं सहयं हत्वा मणिमाच्छिद्य केसरी ॥ गिरिं विशन् जांबवता निहतो मणिमिच्छता ॥ १४ ॥

शतिस्तुला इति । मारीनामाकालमृत्युः । अरिष्टमभद्रम् । अशुभा दुःखहेतवः ॥ ११ ॥ क्वापि कदाचित् । अनेन भगवत्यसमर्प्य स्वयमग्रभोजिनः सर्वानिष्टनिवर्तकमप्यनिष्टहे-तुरेव भवतीति सूचितम् ॥ १२ ॥ तदेव दर्शयितुमाह । तमेकदेति । प्रतिमुच्य बद्ध्वा । प्रसेनः सत्राजिद्भ्राता ॥ १३ ॥ आच्छिद्य आकृष्य गृहीत्वा ॥ १४ ॥

आणि मायावी दैत्य इत्यादिक दुःखाचीं कारणें राहत नसत ॥ ११ ॥ एकेवेळीं श्रीकृष्णानें अशा प्रभावाचा मणि राजाजवळ असावा हें योग्य आहे असें मनांत आणून, उग्रसेन राजाकरितां मण्याची त्या सत्राजिताजवळ याचना केली असतां, द्रव्यलोभी अशा त्यानें, भगवंताच्या याचनेचा भंग होतो हें मनांत न आणितां मणि दिला नाहीं यावरून भगवंताला अर्पण न करितां स्वतःच उपभोग घेतलेली सर्वानिष्टनिवर्तकहि वस्तु अनिष्टाला कारण होत्ये असें सुचविलें ॥ १२ ॥ तेंच दाखविण्याकरितां ह्मणतो– मोठ्या कांतीनें युक्त अशा त्या मण्याला एकेवेळीं सत्राजिताचा भाऊ जो प्रसेन होता त्यानें आपल्या कंठामध्यें बांधून तो घोड्यावर बसून वनामध्यें मृगया करण्याकरितां निघून गेला ॥ १३ ॥ तेव्हां एका सिंहानें घोड्यासहित त्या प्रसेनाला मारून मणि घेऊन पर्वतावर फिरत असतां मण्याची इच्छा करणाऱ्या जांबवानानें,

१ भाराचें प्रमाण असें आहे कीं,– चार व्रीहि ह्मणजे एक गुंज, पांच गुंजा ह्म० एक पण, आठ पण ह्म० एक धरण, आठ धरण ह्म० एक कर्ष, चार कर्ष ह्म० एक पल, शंभर पलें ह्म० एक तुला आणि वीस तुला ह्मणजे एक भार होय. असे आठभार ह्मणजे व्यवहारी ११ खंडी २ मण ८ शेर २१ तोळे व ३२ गुंजा इतकें सोनें होतें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्या सिंहास मारिलें ॥ १४ ॥ त्या जांबवंतानेंहि, आपलें राहण्याचें स्थान अशा पर्वताच्या गुहेमध्यें त्या मण्याला आपल्या मुलाचें खेळण्याचें साधन करून ठेविलें. इकडे सत्राजित आपल्या भावाला (प्रसेनाला) न पाहात होत्साता संताप पावून ह्मणाला कीं,– ॥ १५ ॥ माझा भाऊ प्रसेन, कंठामध्यें मणि धारण करून वनामध्यें गेला होता तो बहुतकरून मण्याच्या लोभानें श्रीकृष्णानेंच मारिला आहे. कारण पूर्वीं कृष्णानें मण्याची याचना केली असतां, तो मी दिला नव्हता ह्मणून त्याला ही संधि सांपडली आहे अशा प्रकारचें तें भाषण ऐकून द्वारकावासी लोक एकमेकांच्या कानांत हळूहळू बोलूं लागले ॥ १६ ॥ नंतर भगवंतानेंहि तें वचन ऐकून, आपले-ठिकाणीं चिकटलेलें अपयश घालविण्याकरितां नगरवासी लोकांसहवर्तमान प्रसेनाच्या मार्गाचा पत्ता पाडण्याकरितां वनांत गमन केलें ॥ १७ ॥ तेव्हां वनामध्यें सिंहानें मारिलेल्या प्रसेनाला व अश्वाला अवलोकन करून त्या सिंहालाहि पर्वताच्या पृष्ठभागीं जांबवंतानें मारिलेला सर्व लोकांनीं पाहिला ॥ १८ ॥ नंतर, बिळाच्या द्वा-

॥ १५ ॥ अजपन्नुपांशु अवोचन् ॥ १६ ॥ १७ ॥ १८ ॥ १९ ॥ २० ॥ २१ ॥ २२ ॥ क्रव्यार्थे आमिषार्थे ॥ २३ ॥ अष्टाविंशाहं अष्ट च विंशतिश्चाहानि दिनानि यस्मिं-

सोऽपि चक्रे कुमारस्य मणिं क्रीडनकं बिले ॥ अपश्यन् भ्रातरं भ्राता सत्राजित्पर्यतप्यत ॥ १५ ॥ प्रायः कृष्णेन निहतो मणि-
ग्रीवो वनं गतः ॥ भ्राता ममेति तच्छ्रुत्वा कर्णे कर्णेऽजपन् जनाः ॥ १६ ॥ भगवांस्तदुपश्रुत्य दुर्यशो लिप्तमात्मनि ॥ मार्ष्टुं
प्रसेनपदवीमन्वपद्यत नागरैः ॥ १७ ॥ हतं प्रसेनमश्वं च वीक्ष्य केसरिणा वने ॥ तं चाद्रिपृष्ठे निहतमृक्षेण ददृशुर्जनाः ॥ १८ ॥
ऋक्षराजबिलं भीममंधेन तमसावृतम् ॥ एको विवेश भगवानवस्थाप्य बहिः प्रजाः ॥ १९ ॥ तत्र दृष्ट्वा मणिश्रेष्ठं बालक्रीडनकं
कृतम् ॥ हर्तुं कृतमतिस्तस्मिन्नवतस्थेऽर्भकांतिके ॥ २० ॥ तमपूर्वं नरं दृष्ट्वा धात्री चुक्रोश भीतवत् ॥ तच्छ्रुत्वाऽभ्यद्रवत्क्रुद्धो
जांबवान्बलिनां वरः ॥ २१ ॥ स वै भगवता तेन युयुधे स्वामिनाऽऽत्मनः ॥ पुरुषं प्राकृतं मत्वा कुपितो नानुभाववित्
॥ २२ ॥ द्वंद्वयुद्धं सुतुमुलमुभयोर्विजिगीषतोः ॥ आयुधाश्मद्रुमैर्दोर्भिः क्रव्यार्थे श्येनयोरिव ॥ २३ ॥ आसीत्तदष्टाविंशाहमितरे-
तरमुष्टिभिः ॥ वज्रनिष्पेषपरुषैरविश्रममहर्निशम् ॥ २४ ॥

स्तदष्टाविंशाहम् । विंशतिशब्देति लोप आर्षः । वज्रस्य निष्पेषो निर्घातस्तद्वत्परुषैर्निष्ठुरैः ॥ २४ ॥

राबाहेर नागरिक लोकांना ठेऊन, एकटाच भगवान् गाढ अंधकारानें व्याप्त व भयंकर अशा त्या जांबवानाच्या बिळामध्यें प्रविष्ट झाला ॥ १९ ॥ आणि त्या बिळामध्यें बाळकाचें खेळणें केलेला श्रेष्ठमणि स्यमंतक पाहून, तो हरण करण्याच्या इच्छेनें त्या बाळकाच्या जवळ जाऊन उभा राहिला ॥ २० ॥ तेव्हां पूर्वीं कधींच न पाहिलेल्या मनुष्यरूपी श्रीकृष्णास पाहून त्या मुलाची आई भ्याल्यासारखी ओरडली. तें ऐकून क्रुद्ध झालेला अतिबली जांबवान् तेथें धांवून आला ॥ २१ ॥ भगवंताचें सामर्थ्य न जाणणाऱ्या त्या जांबवानानें, त्याला हा प्राकृत पुरुष आहे असें मानून व क्रुद्ध होऊन पूर्वीं (रामावतारीं) आपला स्वामी असलेल्या त्या श्रीकृष्ण भगवंताबरोबरच युद्ध केलें ॥ २२ ॥ परस्परांस जिंकण्याची इच्छा करणाऱ्या त्या उभयतांचें त्या मण्याकरितां गदादिक आयुधांनीं, पाषाणांनीं, बाहूंनीं आणि वज्रपातासारख्या निष्ठुर अशा परस्पर मुष्टिप्रहारांनीं अत्यंत भयंकर द्वंद्वयुद्ध, झालें; तें, जसें मांसाकरितां श्येनपक्ष्यांचें परस्पर युद्ध होतें त्याप्रमाणें रात्रंदिवस विश्रांतिरहित अठ्ठावीस

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दिवसपर्यंत सारखें झालें ॥ २३ ॥ २४ ॥ तेव्हां श्रीकृष्णाच्या मुष्टिपातांनीं ज्याचे करचरणादिक अवयव व संधिबंधनें चुरून गेलीं आहेत, ज्याचें धैर्य व बळ हीं क्षणि झालीं आहेत, व ज्याच्या अंगाला घर्म सुटला आहे असा तो जांबवान्, लोकांमध्यें कोण बरें हा माझ्यापेक्षां बलवत्तर आहे असें मानून विस्मित होऊन त्या श्रीकृष्णास ह्मणाला कीं,– ॥ २५ ॥ सर्वभूतांचा जो प्राण त्याचेठिकाणीं जें इंद्रियबल, अंतःकरणबल व शारीर बल तें सर्व तूं आहेस असें मी जाणतों. तसें कसें होईल असें ह्मणशील तर–विष्णु, पुराणपुरुष, पराक्रमशाली व सर्वांचा नियंता तूंच आहेस असें जाणतों ॥ २६ ॥ तूंच विश्वस्रष्ट्या ब्रह्मादिकांचें निमित्त असून महदादिक सृज्य पदार्थांचें उपादान कारणहि तूंच आहेस. नाश करणाऱ्या सर्वांचा नियंता काळ व तसाच सर्वजीवांचा परमात्मा तूं आहेस ॥ २७ ॥ ज्याअर्थीं तूं अशाप्रकारचा आहेस

श्रीकृष्णस्य मुष्टीनां विनिष्पातैराघातैर्निष्पिष्टानि श्लथान्यंगानामुरूणि बंधनानि संधिस्थानानि यस्य सः ॥ २५ ॥ लोके को वाऽयं मत्तो बलीयानिति विस्मितः सन्विमृश्याह। जाने इति । सर्वभूतानां यः प्राणस्तत्र यदोजः सहो बलं च इंद्रियहृदयदेहबलानि तत्सर्वं त्वमित्यहं जाने । कथं तथात्वमत आह । विष्णुमित्यादि ॥ २६ ॥ पुराणत्वे हेतुः । त्वं हीति । स्रष्टा निमित्तम् । यच्च सदुपादानम् । अतः पुराणम् । प्रभविष्णुत्वे हेतुः । काल इति । अधीश्वरस्त्वमप्यत एवेत्याह ईशः पर इति न च तटस्थ इत्याह । आत्मना-

कृष्णमुष्टिविनिष्पातनिष्पिष्टांगोरुबंधनः ॥ क्षीणसत्वः स्विन्नगात्रस्तमाहातीव विस्मितः ॥ २५ ॥ जाने त्वां सर्वभूतानां प्राण ओजः सहो बलम् ॥ विष्णुं पुराणपुरुषं प्रभविष्णुमधीश्वरम् ॥ २६ ॥ त्वं हि विश्वसृजां स्रष्टा सृज्यानामपि यच्च सत् ॥ कालः कलयतामीशः पर आत्मा तथाऽऽत्मनाम् ॥ २७ ॥ यस्येषदुत्कलितरोषकटाक्षमोक्षैर्वर्त्मादिशत्क्षुभितनक्रतिमिंगिलोऽब्धिः ॥ सेतुः कृतः स्वयश उज्ज्वलिता च लंका रक्षःशिरांसि भुवि पेतुरिषुक्षतानि ॥ २८ ॥ इति विज्ञातविज्ञानमृक्षराजानमच्युतः ॥ व्याजहार महाराज भगवान्देवकीसुतः ॥ २९ ॥ अभिमृश्यारविंदाक्षः पाणिना शंकरेण तम् ॥ कृपया परया भक्तं प्रेमगंभीरया गिरा ॥ ॥ ३० ॥ मणिहेतोरिह प्राप्ता वयमृक्षपते बिलम् ॥ मिथ्याऽभिशापं प्रमृजन्नात्मनो मणिनाऽमुना ॥ ३१ ॥

गदया निर्बिभेदाद्रीन् शस्त्रदुर्गाणि सायकैः ॥ चक्रेणाग्निं जलं वायुं मुरपाशांस्तथाऽसिना ॥ ४ ॥ शंखनादेन यंत्राणि हृदयानि मनस्विनाम् ॥ प्राकारं गदया गुर्व्या निर्बिभेद गदाधरः ॥ ५ ॥ पांचजन्यध्वनिं श्रुत्वा युगांताशनिभीषणम् ॥ मुरः शयान उत्तस्थौ दैत्यः पंचशिरा जलात् ॥ ६ ॥ त्रिशूलमुद्यम्य सुदुर्निरीक्षणो युगांतसूर्यानलरोचिरुल्बणः ॥ ग्रसंस्त्रिलोकीमिव पंचभिर्मुखैरभ्यद्रवत्तार्क्ष्यसुतं यथोरगः ॥ ७ ॥ आविध्य शूलं तरसा गरुत्मते निरस्य वक्त्रैर्व्यनदत्स पंचभिः ॥ स रोदसीसर्वदिशोंऽबरं महानापूरयन्नंडकटाहमावृणोत् ॥ ८ ॥ तदाऽपतद्वै त्रिशिखं गरुत्मते हरिः शराभ्यामभिनत्त्रिधौजसा ॥ मुखेषु तं चापि शरैरताडयत्तस्मै गदां सोऽपि रुषा व्यमुंचत ॥ ९ ॥ तामापतंतीं गदया गदां मृधे गदाग्रजो निर्बिभिदे सहस्रधा ॥ उद्यम्य बाहूनभिधावतोऽजितः शिरांसि चक्रेण जहार लीलया ॥ १० ॥ व्यसुः पपातांभसि कृत्तशीर्षो निकृत्तशृंगोऽद्रिरिवेंद्रतेजसा ॥ तस्यात्मजाः सप्त पितुर्वधातुराः प्रतिक्रियामर्षजुषः समुद्यताः ॥ ११ ॥

॥ ९ ॥ १० ॥ इंद्रतेजसा वज्रेण । प्रतिक्रियया हेतुभूतया अमर्षजुषः ॥ ११ ॥

॥ ७ ॥ आणि त्यानें आपला त्रिशूळ गरगर फिरवून वेगानें गरुडावर फेंकिला आणि आपल्या पांच मुखांनीं गर्जना करून त्या नादानें स्वर्ग, भूमि, आकाश व सर्वदिशा
यांना भरून टाकीत ब्रह्मकटाहाला सुद्धां व्यापून टाकिलें ॥ ८ ॥ तो त्रिशूळ गरुडाला मारण्यासाठीं येत आहे असें पाहून श्रीकृष्णानें अतिवेगानें दोन बाणांनीं त्याचे
तीन तुकडे करून पाडिले आणि त्या मुरदैत्यालाहि पांच मुखांचेठिकाणीं पांच बाणांनीं प्रहार केला. तेव्हां त्या मुरानेंहि क्रोधानें कृष्णावर गदा टाकिली ॥ ९ ॥ यु-
द्धामध्यें ती मुरानें टाकलेली गदा येत असतां श्रीकृष्णानें आपल्या गदेनें तिचे हजारो तुकडे करून पाडिले. नंतर बाहु उचलून समोर धांवत येणाऱ्या त्या मुरदैत्याचीं ॥१८७॥
पांचहि मस्तकें श्रीकृष्णानें लीलेनें चक्राच्या योगानें तोडून टाकिलीं ॥ १० ॥ तेव्हां मस्तकें तुटल्यामुळें गतप्राण झालेला तो मुरदैत्य, जसा इंद्राच्या वज्रानें शिखरें
तुटलेला पर्वत भूमीवर पडतो त्याप्रमाणें खंदकांतील पाण्यांत पडला. नंतर त्याचे सात पुत्र, पित्याच्या वधानें दुःखित व उसनें फेडण्याविषयीं क्रोधयुक्त होऊन युद्ध

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करण्यास सिद्ध झाले ॥ ११ ॥ त्यांचीं नांवें–ताम्र, अंतरिक्ष, पवन, विभावसु, वसु, नभस्वान् आणि सातवा अरुण हीं होत. ते भौमासुरानें आज्ञापित होत्साते आयुधें घेऊन युद्धाविषयीं पीठनांवाच्या सेनाधिपतीला पुढें करून नगरांतून निघाले ॥ १२ ॥ भयंकर अशा त्यांनीं समोर येऊन श्रीकृष्णावर बाण, खड्गें, गदा, शक्ति, ऋष्टि व शूळ हीं आयुधें टाकिलीं. तेव्हां अमोघपराक्रमी श्रीकृष्णानें आपल्या बाणांनीं त्यांच्या शस्त्रसमूहाचे तोडून तिलप्राय तुकडे केले ॥ १३ ॥ आणि मस्तकें मांड्या हात पाय व कवचें तोडून टाकलेल्या त्या पीठादिकांना यमलोकास पाठवून दिलें. तेव्हां आपले सेनाधिपति श्रीकृष्णाच्या चक्रानें व बाणांनीं मरण पावले असें पाहून, तें सहन न करणारा भूमिपुत्र, नरकासुर, गंडस्थळांतून मदस्राव होणारे व ऐरावताच्या कुळांत उत्पन्न झालेले हत्ती बरोबर घेऊन युद्ध करण्यास निघाला ॥ १४ ॥ तेव्हां त्या भौमासुरानें, जसा सूर्यावर विजेसहित काळा मेघ दिसावा त्याप्रमाणें गरुडावर सत्यभामेसहित बसलेल्या श्रीकृष्णाला अवलोकन करून, त्याच्यावर शतघ्नीनांवाची शक्ति

पीठं पठिनामानम् । निरगन्निरगमन् ॥ १२ ॥ १३ ॥ कृत्तानि शीर्षादीनि येषां तान् ॥ १४ ॥ शतघ्नीं शक्तिविशेषम् ॥ १५ ॥ विचित्रा वाजाः पत्राणि येषां तैर्बाणैर्निकृत्ता बाहव ऊरवः शिरोधाः कंधरा विग्रहा देहाश्च यस्मिंस्तत् । तत्रैव तं यदा विव्यधुस्तस्मिन्नेव क्षणे ॥ १६ ॥ अत्याश्चर्ये कुरूद्वहेति संबोधनम् । तथा हि । तैर्यानि प्रयुक्तानि

ताम्रोऽन्तरिक्षः श्रवणो विभावसुर्वसुर्नभस्वानरुणश्च सप्तमः ॥ पीठं पुरस्कृत्य चमूपतिं मृधे भौमप्रयुक्ता निरगन्धृतायुधाः ॥ १२ ॥ प्रायुंजतासाद्य शरानसीन्गदाः शक्त्यृष्टिशूलान्यजिते रुषोल्बणाः ॥ तच्छस्त्रकूटं भगवान्स्वमार्गणैरमोघवीर्यस्तिलशश्चकर्त ह ॥ १३ ॥ तान्पीठमुख्याननयद्यमालयं निकृत्तशीर्षोरुभुजांघ्रिवर्मणः ॥ स्वानीकपानच्युतचक्रसायकैस्तथा निरस्तान्नरको धरासुतः ॥ निरीक्ष्य दुर्मर्षण आस्रवन्मदैर्गजैः पयोधिप्रभवैर्निराक्रमत् ॥ १४ ॥ दृष्ट्वा सभार्यं गरुडोपरि स्थितं सूर्योपरिष्टात्सतडिद्घनं यथा ॥ कृष्णं स तस्मै व्यसृजच्छतघ्नीं योधाश्च सर्वे युगपत्स्म विव्यधुः ॥ १५ ॥ तद्भौमसैन्यं भगवान्गदाग्रजो विचित्रवाजैर्निशितैः शिलीमुखैः ॥ निकृत्तबाहूरुशिरोध्रविग्रहं चकार तत्रैव हताश्वकुंजरम् ॥ १६ ॥ यानि योधैः प्रयुक्तानि शस्त्रास्त्राणि कुरूद्वह ॥ हरिस्तान्यच्छिनत्तीक्ष्णैः शरैरेकैकशस्त्रिभिः ॥ १७ ॥ उह्यमानः सुपर्णेन पक्षाभ्यां निघ्नता गजान् ॥ गरुत्मता हन्यमानास्तुंडपक्षनखैर्गजाः ॥ १८ ॥ पुरमेवाविशन्नार्ता नरको युध्ययुध्यत ॥ दृष्ट्वा विद्रावितं सैन्यं गरुडेनार्दितं स्वकम् ॥ १९ ॥

शस्त्रास्त्राणि तत्प्राप्तेः पूर्वमेव तत्सर्वं सैन्यं हत्वा पश्चात्तानि शस्त्राण्यस्त्राणि च चिच्छेद । तत्राप्येकैकं शस्त्रमस्त्रं च त्रिभिः शरैरित्याश्चर्यम् ॥ १७ ॥ किंच गरुत्मतेति ॥ १८ ॥ १९ ॥

टाकिली, तसाच त्या भौमासुराच्या योद्ध्यांनींहि आपापल्या आयुधांनीं श्रीकृष्णाला एकदम प्रहार केला ॥ १५ ॥ त्यावेळीं श्रीकृष्ण भगवंतानें, चित्रविचित्र पिसारे असलेल्या तीक्ष्ण बाणांनीं तें भौमासुराचें सैन्य, ज्याचे बाहु, मांड्या, कंठ व देह तुटून गेले आहेत व ज्यामध्यें हत्ती व घोडे मरण पावले आहेत असें केलें ॥ १६ ॥ हे राजा, त्या सैन्यवधाच्या पूर्वींच जीं योद्ध्यांनीं शस्त्रास्त्रें टाकिलीं होतीं तीं, श्रीकृष्णानें तीन तीन तीक्ष्ण बाणांनीं एकेक याप्रमाणें सर्वहि तोडून टाकिलीं, म्हणजे त्यांनीं टाकलेलीं शस्त्रास्त्रें प्राप्त होण्याच्या पूर्वींच तें सर्व सैन्य मारून नंतर तीं शस्त्रास्त्रें एकेकावर तीन तीन बाण सोडून तोडिलीं; हें आश्चर्य ॥ १७ ॥ असें त्वरित युद्ध करण्यास गरुडाचा वेगहि हेतु होता असें सुचवितो–तो भगवान्, आपल्या पक्षांनीं हत्तींना मारणाऱ्या गरुडानें वाहिलेला होता. त्या युद्धाचे वेळीं गरुडानें आपली चोंच पक्ष व नखें यांनीं ताडण केलेले कितीएक हत्ती, अतिपीडित झाल्यामुळें नगरामध्येंच पळून गेले. त्यावेळीं एकटा नरकासुरच युद्धामध्यें युद्ध करूं लागला, त्या भौमासुरानें, गरुडानें पीडित करून पळविलेलें आपलें सैन्य पाहून त्या गरुडाला, ज्या शक्तीनें वज्रालासुद्धां मागें फिरविलें होतें त्या शक्तीनें प्रहार केला. तिनें ताडण केलेलाहि तो

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

गरुड, मल्लेनें ताडण केलेला हत्ती जसा हालतसुद्धां नाहीं त्याप्रमाणें हाललासुद्धां नाहीं ॥ १८ ॥ १९ ॥ २० ॥ याप्रमाणें गरुडाचेठिकाणीं व्यर्थ प्रयत्न झालेल्या त्या भौमासुरानें, श्रीकृष्णाला मारण्याकरितां त्रिशूळ ग्रहण केला तो टाकण्याच्या पूर्वींच हरीनें तीक्ष्णधारेच्या वज्रानें हत्तीवर बसलेल्या त्या नरकासुराचें मस्तक छेदन केलें ॥ २१ ॥ तेव्हां कुंडलांसहित, सुंदर किरीटानें व भूषणांनीं युक्त असें प्रकाश पावणारें तें नरकासुराचें मस्तक, भूमीवर पडलें असतां शोभूं लागलें. त्यावेळीं नरकासुराच्या संबंधी-लोकांनीं हाहाकार शब्द उच्चारिला, ऋषींनीं साधुशब्द उच्चारिला, देवश्रेष्ठ तर श्रीकृष्णावर पुष्पवृष्टि करित होत्साते स्तुति करूं लागले ॥ २२ ॥ नंतर, नरकासुराची माता मूर्तिमती भूमि, श्रीकृष्णाजवळ येऊन तिनें, श्रीकृष्णाला रत्नमिश्रित उत्तमपुष्पांनीं गुंफिलेल्या वनमालेसहवर्तमान, तापलेल्या सुवर्णाचेठिकाणीं कोंदण करून

यतो यया शक्त्या वज्रः प्रतिहत आस गरुडस्तु नाकंपत ॥ २० ॥ गरुडे वितथोद्यमः सन् शूलं त्रिशूलमाददे धृतवान् ॥ २१ ॥ २२ ॥ प्रतप्ते जांबूनदे यानि रत्नानि तैर्भास्वरे । मेर्वंशभूतं मंदरशिखरं महामणिं चार्पयदिति ॥ २३ ॥ २४ ॥ ऐश्वर्यं ज्ञात्वा भूमिः स्तौति । नमस्त इति । परमात्मन् देवाद्यंतर्यामिन् ॥ २५ ॥ येन मंत्रेण कुंत्याः प्रसन्नः पूर्वमासीत्तेन मंत्रेण नमस्यति । नम इति । पंकजं नाभौ यस्य तस्मै । जगत्कारणायेत्यर्थः । अतएव सत्कीर्तिमयी पंकजमाला विद्यते यस्य तस्मै । एवंभूतं ध्यायतां

तं भौमः प्राहरच्छक्त्या वज्रः प्रतिहतो यतः ॥ नाकंपत तया विद्धो मालाहत इव द्विपः ॥ २० ॥ शूलं भौमोऽच्युतं हंतुमाददे वितथोद्यमः ॥ तद्विसर्गात्पूर्वमेव नरकस्य शिरो हरिः ॥ अपाहरद्गजस्थस्य चक्रेण क्षुरनेमिना ॥ २१ ॥ सकुंडलं चारुकिरीटभूषणं बभौ पृथिव्यां पतितं समुज्ज्वलत् ॥ हाहेति साध्विन्यृषयः सुरेश्वरा माल्यैर्मुकुंदं विकिरंत ईडिरे ॥ २२ ॥ ततश्च भूः कृष्णमुपेत्य कुंडले प्रतप्तजांबूनदरत्नभास्वरे ॥ सवैजयंत्या वनमालयाऽर्पयत्प्राचेतसं छत्रमथो महामणिम् ॥ २३ ॥ अस्तौषीदथ विश्वेशं देवी देववरार्चितम् ॥ प्रांजलिः प्रणता राजन्भक्तिप्रवणया धिया ॥ २४ ॥ भूमिरुवाच ॥ नमस्ते देवदेवेश शंखचक्रगदाधर ॥ भक्तेच्छोपात्तरूपाय परमात्मन्नमोऽस्तु ते ॥ २५ ॥ नमः पंकजनाभाय नमः पंकजमालिने ॥ नमः पंकजनेत्राय नमस्ते पंकजांघ्रये ॥ २६ ॥ नमो भगवते तुभ्यं वासुदेवाय विष्णवे ॥ पुरुषायादिबीजाय पूर्णबोधाय ते नमः ॥ २७ ॥

पंकजवत्सुप्रसन्ने तापोपशमने नेत्रे यस्य तस्मै । पंकजवत्सुसेव्यौ पंकजांकितौ वांघ्री यस्य तस्मै नम इति ॥ २६ ॥ किंच भगवते निरतिशयैश्वर्याय वासुदेवाय सर्वभूताश्रयायातएव विष्णवे व्यापिने । नहि सर्वभूताश्रयत्वं परिच्छिन्नस्य संभवतीति कुतः सर्वाश्रयत्वं तत्राह । पुरुषाय सर्वस्मात्कार्यात्पूर्वमेव सते पूर्वमेवाहमिहासमिति तत्पुरुषस्य

बसविलेल्या रत्नांच्या शोभानें देदीप्यमान अशीं अदितीचीं कुंडलें, वरुणाचें छत्र आणि मेरुपर्वतावरील मणिपर्वतरूप स्थानाचा अधिकार हीं सर्व अर्पण केलीं ॥ २३ ॥ नंतर, हे राजा, हात जोडून नम्रमस्तक झालेली ती भूमि, भक्तीनें एकाग्र झालेल्या बुद्धीनें ब्रह्मादिकांनीं पूजित अशा त्या श्रीकृष्णाची स्तुति करूं लागली ॥ २४ ॥ भूमि ह्मणाली–हे देवदेवेशा, हे शंखचक्रगदाधरा, तुला नमस्कार असो. हे परमात्मन्, भक्तांच्या इच्छेनुरूप स्वरूपाचा स्वीकार करणाऱ्या तुला नमस्कार असो ॥ २५ ॥ आतां ज्या मंत्रानें कुंतीला पूर्वीं श्रीकृष्ण प्रसन्न झाला होता त्या मंत्रानें नमस्कार करित्ये– ज्याच्या नाभीचेठिकाणीं जगत्कारणभूत कमळ आहे, त्याला नमस्कार असो. ज्याच्या कंठामध्यें सत्कीर्तिमय कमळांची माळा आहे त्याला नमस्कार असो. ज्याचे नेत्र, कमळाप्रमाणें तापशांति करणारे आहेत त्याला नमस्कार असो. ज्याचे चरण, कमळाप्रमाणें सुसेव्य आहेत त्या तुला नमस्कार असो ॥ २६ ॥ निरतिशय ऐश्वर्यानें युक्त, सर्वभूतांचा आश्रय आणि व्यापक अशा तुजकारणें नमस्कार असो. जगद्रूप, सर्वका-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

यांच्या पूर्वीच असणारा, जगताला कारण जी माया तिचेंहि कारण आणि पूर्णज्ञानरूपी अशा तुजकारणें नमस्कार असो ॥ २७ ॥ स्वतां जन्मरहित असून या जगाला उत्पन्न करणारा अशा ब्रह्मरूपी व अनंतशक्ति अशा तुजकारणें नमस्कार असो. हे स्थावरजंगमाच्या उत्पादका, हे पंचभूतांच्या उत्पादका, हे परमात्म्या तुजकारणें नमस्कार असो ॥ २८ ॥ आतां जगाच्या उत्पत्त्यादिकांचें कारण–गुण, त्याचें कारण, प्रधान (प्रकृति) त्याचा क्षोभक–पुरुष व तेथें निमित्त काळ असें प्रसिद्ध आहे. मी येथें काय आहें ? असें ह्मणशील तर सांगत्यें–हे प्रभो, जगत्पते, तूंच सृष्टि करण्याची इच्छा धारण केलीस ह्मणजे सृष्टिकार्याविषयीं उन्मुख अशा रजोगुणाचें धारण करितोस, ह्मणजे रजोगुणप्रधान ब्रह्मदेव होऊन सृष्टि उत्पन्न करितोस. तसाच जगाच्या नाशाविषयीं उत्कट अशा तमोगुणांचें धारण करितोस

पुरुषत्वमिति श्रुतेः । एतदपि कुतः । आदिबीजाय आदेर्जगत्कारणस्यापि कारणाय । एवमपि न मृदादिवज्जाड्यमित्याह । पूर्णबोधायेति ॥ २७ ॥ नन्वेवमपि स्वस्य कारणात्पूर्वं सत्त्वं न स्यादत आह । अजायेति । स्वयमजाय अस्य च जगतो जनयित्रे । उभयत्रापि क्रमेण हेतुद्वयम् । ब्रह्मणे बृहते अनंतशक्तय इति च । बृहत्वादजत्वमनंतशक्तित्वात्तज्जनयितृत्वमित्यर्थः । ननु पित्रादयः पुत्रादीनां जनकास्तेषां च तत्पूर्वे तेषां च भूतानि तेषां च स्वकर्मद्वारेण जीवाः किमत्राहं तत्राह । परावरात्मन्नित्यादि पुत्राद्यात्मकत्वात्त्वमेव जनक इत्यर्थः ॥ २८ ॥ ननु गुणा विश्वोत्पत्त्यादिहेतवस्ते च प्रधानस्यैव तस्य च पुरुषः क्षोभकस्तत्र च कालो निमित्तमिति प्रसिद्धं किमत्राहं तत्राह

अजाय जनयित्रेऽस्य ब्रह्मणेऽनंतशक्तये ॥ परावरात्मन्भूतात्मन्परमात्मन्नमोऽस्तु ते ॥ २८ ॥ त्वं वै सिसृक्षू रज उत्कटं प्रभो तमोनिरोधाय बिभर्ष्यसंवृतः ॥ स्थानाय सत्त्वं जगतो जगत्पते कालः प्रधानं पुरुषो भवान्परः ॥ २९ ॥ अहं पयो ज्योतिरथानिलो नभो मात्राणि देवा मन इंद्रियाणि ॥ कर्ता महानित्यखिलं चराचरं त्वय्यद्वितीये भगवन्नयं भ्रमः ॥ ३० ॥ तस्यात्मजोऽयं तव पादपंकजं भीतः प्रपन्नार्तिहरोपसादितः ॥ तत्पालयैनं कुरु हस्तपंकजं शिरस्यमुष्याखिलकल्मषापहम् ॥ ३१ ॥

त्वं वा इति । तमसो धारणेऽप्यसंवृत एव । स्थानाय पालनाय । जगतः सृष्ट्याद्यर्थमुत्कटं रजआदि त्वमेव बिभर्षि सृजसीत्यर्थः । कालप्रधानपुरुषाश्च त्वद्व्यतिरिक्ता न संति त्वं तु परः सर्वव्यतिरिक्तः । अतस्त्वमेव जतयितेत्यर्थः ॥ २९ ॥ कार्यकारणप्रपंचस्य तदव्यतिरेकं तस्य च सर्वव्यतिरेकमुपपादयति । अहमिति । अहं भूमिः । मात्राणीति देवा मन इंद्रियाणीति च त्रिविधाहंकारकार्याणि । कर्ताऽहंकारः ॥ ३० ॥ एवं स्तुत्वा प्रार्थयते । तस्येति । हे प्रपन्नार्तिहर । तस्य नरकस्य । अयं भगदत्तो नाम भीतोऽतएव मया तव पादपंकजमुपसादितः ॥ ३१ ॥

ह्मणजे तमोगुणप्रधान रुद्रादिरूपी होऊन संहार करितोस. त्याप्रमाणेंच जगाच्या पालनाकरितां उत्कट अशा सत्वगुणाचा स्वीकार करितोस ह्मणजे सत्वगुणप्रधान विष्ण्वादिरूपी होऊन पालन करितोस. इतकें करूनहि त्या गुणांनीं तूं अलिप्त आहेस. तसाच तूं काळ प्रधान व पुरुषरूपी असूनहि वस्तुतः त्यांहून निराळाच आहेस ॥ २९ ॥ आतां, कार्यकारणात्मक प्रपंचाला तद्रूपपणा व त्याला सर्वप्रपंचाहून निराळेपणा सांगत्ये– हे भगवन्, मी भूमि, उदक, तेज, वायु, आकाश, शब्दस्पर्शरूपरसगंध, इंद्रियांच्या देवता, मन, चक्षुरादिक इंद्रियें, अहंकार आणि महत्तत्व (बुद्धि) अशाप्रकारचें जें चराचर जग, अद्वितीय ब्रह्मरूप तुझेठिकाणीं प्रतीतीला येतें, तो हा लोकांचा भ्रम (बुद्धिमोहच) आहे ॥ ३० ॥ याप्रमाणें भगवंताची स्तुति करून प्रार्थना करित्ये कीं, हे शरण्यागतदुःखनाशका, हा भगदत्तनामक त्या भौमासुराचा पुत्र, मी तुझ्या पायांवर घातला आहे, परंतु हा भ्याला आहे ह्मणून तूं यांचें रक्षण कर आणि सर्वदोषांची निवृत्ति करणारें आपलें हस्तकमळ याच्या मस्तकीं स्थापन कर ॥ ३१ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, याप्रमाणें भक्तीनें नम्र झालेल्या भूमीनें वाणींनीं प्रार्थना केलेला भगवान् श्रीकृष्ण, भगदत्ताला अभय देऊन, सर्व भोगसमृद्धींनीं युक्त अशा त्या भौमासुराच्या गृहामध्यें प्रविष्ट झाला ॥ ३२ ॥ तेथें, पराक्रम करून भौमासुरानें राजांपासून व देवसिद्धादिकांपासून आणिलेल्या सोळाहजार एकशें कन्या होत्या त्या भगवंतानें अवलोकन केल्या ॥ ३३ ॥ तेव्हां दैवानें आपल्यासमीप आणून दिलेल्या व घरामध्यें प्रविष्ट झालेल्या मनुष्यश्रेष्ठ अशा त्या श्रीकृष्णाला पाहून अत्यंत मोहित झालेल्या त्या स्त्रियांनीं अति आवडणाऱ्या त्या पतीला मनानें वरिलें ॥ ३४ ॥ तें असें कीं,– हा मजकारणें पति होवो. हें माझें इच्छित ब्रह्मदेवानें सत्य करावें. अशाप्रकारच्या अभिप्रायानें प्रत्येक त्या सर्वकन्यांनीं श्रीकृष्णाचेठिकाणीं आपलें हृदय स्थापन केलें ॥ ३५ ॥ नंतर, स्नान घालविलेल्या

अभयं दत्वा ॥ ३२ ॥ शताधिकमित्यपि ज्ञातव्यम् । यथाह श्रीपराशरः । कन्यापुरे स कन्यानां षोडशातुलविक्रमः ॥ शताधिकानि ददृशे सहस्राणि महामते इति । राजभ्य इत्युपलक्षणं सिद्धादिभ्यश्चेति । तथाच तेनैवोक्तम् । देवसिद्धासुरादीनां नृपाणां च जनार्दन ॥ हृत्वा हि सोऽसुरः कन्या रुरोध निजमंदिर इति ॥ ३३ ॥ ३४ ॥ ३५ ॥ प्राहि-

श्रीशुक उवाच ॥ इति भूम्याऽर्थितो वाग्भिर्भगवान्भक्तिनम्रया ॥ दत्वाऽभयं भौमगृहं प्राविशत्सकलर्धिमत् ॥ ३२ ॥ तत्र राजन्यकन्यानां षट्सहस्राधिकायुतम् ॥ भौमाहृतानां विक्रम्य राजभ्यो ददृशे हरिः ॥ ३३ ॥ तं प्रविष्टं स्त्रियो वीक्ष्य नरवीरं विमोहिताः ॥ मनसा वव्रिरेऽभीष्टं पतिं दैवोपसादितम् ॥ ३४ ॥ भूयात्पतिरयं मह्यं धाता तदनुमोदताम् ॥ इति सर्वाः पृथक्कृष्णे भावेन हृदयं दधुः ॥ ३५ ॥ ताः प्राहिणोद्द्वारवतीं सुमृष्टविरजोंऽबराः ॥ नरयानैर्महाकोशान्रथाश्वान्द्रविणं महत् ॥ ३६ ॥ ऐरावतकुलेभांश्च चतुर्दंतांस्तरस्विनः ॥ पांडुरांश्च चतुःषष्टिं प्रेषयामास केशवः ॥ ३७ ॥ गत्वा सुरेंद्रभवनं दत्वाऽदित्यै च कुंडले ॥ पूजितस्त्रिदशेंद्रेण सहेंद्राण्या च सप्रियः ॥ ३८ ॥ चोदितो भार्ययोत्पाट्य परिजातं गरुत्मति ॥ आरोप्य सेंद्रान्विबुधान्निर्जित्योपानयत्पुरम् ॥ ३९ ॥ स्थापितः सत्यभामाया गृहोद्यानोपशोभनः ॥ अन्वगुर्भ्रमराः स्वर्गात्तद्गंधासवलंपटाः ॥ ४० ॥ ययाच आनम्य किरीटकोटिभिः पादौ स्पृशन्नच्युतमर्थसाधनम् ॥ सिद्धार्थ एतेन विगृह्यते महानहो सुराणां च तमो धिगाढ्यताम् ॥ ४१ ॥

णोत् प्रस्थापयामास । सुमृष्टाः कमनीयाश्च ता विरजोंऽबराश्च ताः । नरयानैः शिबिकाभिः अपिच महाकोशानिति ॥ ३६ ॥ ३७ ॥ सप्रियः सत्यभामासहितः ॥ ३८ ॥ ३९ ॥ गृहोद्यानं निष्कुटं तदुपशोभयति यः ॥ ४० ॥ सेंद्रान्विबुधान्निर्जित्येतींद्रकृष्णयोः संग्राम उक्तस्तत्र ननु कथं प्रसाधितस्वमनोरथेन श्रीकृष्णेन महेंद्रस्य संग्राम इत्याह । ययाच

व स्वच्छ वस्त्रें परिधान करविलेल्या त्या कन्यांना, भगवंतानें पालख्यांत बसवून द्वारकेंत पाठविल्या, तशाच रत्नादिकांनीं भरलेल्या तिजोऱ्या, रथ, घोडे व पुष्कळ द्रव्य हीं पाठविलीं ॥ ३६ ॥ आणि श्रीकृष्णानें, ज्यांना चार चार दांत आहेत व जे अतिवेगवान् व पांढरे असून ऐरावताच्या वंशांत झालेले आहेत असे चौसष्ट हत्ती पाठविले ॥ ३७ ॥ नंतर श्रीकृष्णानें, इंद्राच्या घरीं जाऊन अदितीला कुंडलें दिलीं असतां, इंद्राणीसहवर्तमान इंद्रानें, सत्यभामेसहित त्या श्रीकृष्णाची पूजा केली ॥ ३८ ॥ नंतर परत येतांना सत्यभामेनें सूचना केली असतां श्रीकृष्णानें तेथें असलेल्या पारिजातनामक वृक्षाला उपटून, गरुडावर स्थापन करून, व इंद्रासहित सर्व देवांना जिंकून तो वृक्ष द्वारकेंत आणिला ॥ ३९ ॥ सत्यभामेच्या मंदिराजवळच्या बागेला अत्यंत शोभविणारा तो पारिजातक वृक्ष त्याच बागेंत स्थापन केला. त्याच्या सुगंधाच्या आसवाविषयीं लंपट असलेले भ्रमर, स्वर्गावरून त्याच्याबरोबरच द्वारकेंत प्राप्त झाले ॥४० ॥ 'इंद्रासहित सर्व देवांना जिंकून' असें सांगितलें त्यावरून इंद्राचा व श्रीकृष्णा-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

चा संग्राम सांगितला. तेथें आपला मनोरथ पूर्ण करणाऱ्या श्रीकृष्णाबरोबर इंद्राचा कसा संग्राम झाला ?–अशी शंका आली असतां ह्मणतो कीं,–ज्या इंद्रानें प्रथम आपलें मस्तक नम्र करून किरीटाच्या अग्रांनीं चरणांना स्पर्श करून भक्तांचे मनोरथ पूर्ण करणाऱ्या त्या श्रीकृष्णाची प्रार्थना केली. पश्चात् कार्यभाग झालेला तोच इंद्र, ह्या दुःसाध्य कार्य करणाऱ्या स्वामीबरोबर विरोध करितो. अहो ! देवांनाहि केवढा क्रोध हा ! तेव्हां धनिकपणाला धिक्कार असो ॥ ४१ ॥ आतां, त्यांचे विवाह सांगतो– पुढें द्वारकेमध्यें गेल्यानंतर एकाच मुहूर्तावेठिकाणीं जितक्या (१६१००) त्या स्त्रिया होत्या तितक्या गृहांचेठिकाणीं तितकीं रूपें धारण करणाऱ्या व तित-क्या देवक्यादिक बंधुजनांनीं युक्त अशा श्रीकृष्णानें, त्या सर्वस्त्रियांचें पाणिग्रहण केलें ॥ ४२ ॥ आतां, केवढें हें त्या स्त्रियांचें भाग्य असें सांगतो– भोग्यपदार्था-च्या समृद्धीनें ज्यांच्यासारखीं किंवा ज्यांच्याहून अधिक उत्तम अशीं दुसरीं कोणाचींच गृहें नाहींत अशा त्या सोळाहजार एकशें आठ स्त्रियांच्या गृहांमध्यें, वियोग–

इति । अच्युतमर्थसाधनमिति च कर्मद्वयं याचतिधातोः । विगृह्यते विग्रहं करोति महानपि तमः क्रोधः । आढ्यतां धनिकतां धिगिति ॥ ४१ ॥ यथा यथावत् । अनेन देवक्या-दिबंधुजनसमागमोऽपि प्रतिगृहं यौगपद्येन सूचितः । अव्ययः सर्वत्रापि संपूर्ण एव ॥ ४२ ॥ अहो भाग्यं नारीणामित्याह त्रिभिः । गृहेष्विति । अतर्क्याणि कर्माणि करोति तथा सः । निरस्तं साम्यमतिशयश्च यैरन्येषां तेषु गृहेष्वनपाय्यवस्थितः रमाभिर्लक्ष्म्या अंशभूताभिः । निजकामसंप्लुतः स्वानंदपरिपूर्णः । गार्हकमेधिकान् गृहस्थधर्मान् ॥ ४३ ॥

अथो मुहूर्त एकस्मिन्नानागारेषु ताः स्त्रियः ॥ यथोपयेमे भगवांस्तावद्रूपधरोऽव्ययः ॥ ४२ ॥ गृहेषु तासामनपाय्यतर्क्यकृन्निरस्त-साम्यातिशयेष्ववस्थितः ॥ रेमे रमाभिर्निजकामसंप्लुतो यथेतरो गार्हकमेधिकांश्चरन् ॥ ४३ ॥ इत्थं रमापतिमवाप्य पतिं स्त्रियस्ता ब्रह्मादयोऽपि न विदुः पदवीं यदीयाम् ॥ भेजुर्मुदाऽविरतमेधितयाऽनुरागहासावलोकनवसंगमजल्पलज्जाः ॥ ४४ ॥ प्रत्युद्गमासनव-रार्हणपादशौचतांबूलविश्रमणवीजनगंधमाल्यैः ॥ केशप्रसारशयनस्नपनोपहार्यैर्दासीशता अपि विभोर्विदधुः स्म दास्यम् ॥ ४५ ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे उत्तरार्धे पारिजातहरणनरकवधो नाम एकोनषष्टितमोऽध्यायः ॥ ५९ ॥ ॥

अनुरागहाससहितमवलोकं च तत्पूर्वकं नवसंगमं च तद्गतं जल्पं च तस्मिन् लज्जा च भेजुः ॥ ४४ ॥ विश्रमणं पादसंवाहनम् । केशप्रसारः केशप्रसाधनम् । दासीनां शतानि विद्यंते यासां तथाभूता अपि स्वयं विभोर्दास्यं विदधुः ॥ ४५ ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधे उत्तरार्धे टीकायामेकोनषष्टितमोऽध्यायः ॥ ५९ ॥ ॥

राहित्यानें राहणारा, अतर्क्य कर्में करणारा व स्वानंदानें परिपूर्ण असा तो श्रीकृष्ण, जसा एखादा प्राकृतजन, गृहस्थाश्रमधर्मांचें आचरण करीत स्त्रियांसहवर्तमान रम-माण होतो त्याप्रमाणें लक्ष्मीच्या अंशभूत असलेल्या त्या स्त्रियांसहवर्तमान रममाण झाला ॥ ४३ ॥ याप्रकारेंकरून ब्रह्मादिक देवहि ज्याची प्राप्ति होण्याचा मार्ग जाणत नाहींत तो लक्ष्मीपति श्रीकृष्ण, विवाह संबंधानें पति प्राप्त झाला असतां, प्रेमहास्यसहित अवलोकनपूर्वक जो नवा नवा समागम त्याचेठिकाणीं जीं विनोदाचीं भाषणें त्यामध्यें ज्यांना लज्जा प्राप्त होत आहेत अशा त्या स्त्रिया, निरंतर वृद्धिंगत होणाऱ्या प्रीतीनें त्याचेंच सेवन करूं लागल्या ॥ ४४ ॥ तें असें कीं,– शेंकडो दासी ज्यांच्या आहेत अशाहि त्या स्त्रिया, बाहेरून आलेल्या श्रीकृष्णाला पाहून सामोरें जाणें, आसन देणें, अर्घ्यदानादिकेंकरून पूजा करणें, पाय धुणें, तांबूल अर्पण करणें, चरणाची शुश्रूषावगैरे करून श्रम घालविणें, चंवरी पंखा इत्यादिकांचा वारा घालणें, गंधपुष्पादिकांचें अर्पण करणें, केंसांना सुवासिक तेलें लाऊन विंचरणें, शय्या हातरणें व भक्ष्यभोज्यादिक पदार्थांचें समर्पण करणें, इत्यादिकेंकरून त्या समर्थ पतीचें स्वतां दास्य करीत असत ॥ ४५ ॥ याप्रमाणें

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील उत्तरार्धामध्यें भौमासुरवधादिनिरूपणनामक हा एकुणसाठावा अध्याय समाप्त झाला ॥ ५९ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥
आतां ह्या साठाव्या अध्यायामध्यें श्रीकृष्णानें प्रेमकलहामध्यें विनोदाच्या भाषणांनीं रुक्मिणीला राग आणून मग तिचें सांत्वन केलें. अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, एकेवेळीं मंदिरामध्यें, आपल्या पर्यंकाचेठिकाणीं सुखानें बसलेल्या जगद्गुरु श्रीकृष्णपतीचें सखीजनांनीं परिवेष्टित अशी रुक्मिणी पंख्यानें वारा घालून सेवन करूं लागली ॥ १ ॥ आतां त्या रुक्मिणीचें श्रीकृष्णाचेठिकाणीं परमप्रेम सांगण्याकरितां त्याच्या सांगितलेल्या खऱ्या स्वरूपाचें स्मरण करवितो– जो तर ईश्वर, लीलेनें हें जग उत्पन्न करितो, पालन करितो व संहार करितो तोच स्वतः जन्मरहित असूनहि आपण केलेल्या धर्ममर्यादांच्या रक्षणाकरितां यादवांमध्यें उत्पन्न झाला आहे ॥२॥ आतां श्रीकृष्णाचें मंदिर कसें होतें तें सांगतो– तें मंदिर चकाकणाऱ्या मोत्यांचे घोंस लोंबत असलेल्या झालरीच्या छतानें

अथ षष्टितमे कृष्णः परिहासेन रुक्मिणीम् ॥ कोपयित्वा ततः प्रेमकलहे तामसांत्वयत् ॥ १ ॥ रामारामजनानंदमहोदयविडंबनैः ॥ रुक्मिण्या प्रेमकलहच्छद्मनैश्वर्यमीर्यते ॥ २ ॥ स्वतल्पस्थं स्वपर्यंकस्थम् ॥ १ ॥ वक्ष्यमाणं रुक्मिण्याः श्रीकृष्णे परमप्रेम संभावयितुं तस्योक्तमेव तत्त्वमनुस्मारयति । यस्त्विति ॥ २ ॥ आदौ तावत्त्रिभिः श्लोकैर्मंदिरमनुव-

श्रीशुक उवाच ॥ कार्हिचित्सुखमासीनं स्वतल्पस्थं जगद्गुरुम् ॥ पतिं पर्यचरद्भैष्मी व्यजनेन सखीजनैः ॥ १ ॥ यस्त्वेतल्लीलया विश्वं सृजत्यत्त्यवतीश्वरः ॥ स हि जातः स्वसेतूनां गोपीथाय यदुष्वजः ॥ २ ॥ तस्मिन्नंतर्गृहे भ्राजन्मुक्तादामविलंबिना ॥ विराजिते वितानेन दीपैर्मणिमयैरपि ॥ ३ ॥ मल्लिकादामभिः पुष्पैर्द्विरेफकुलनादिते ॥ जालरंध्रप्रविष्टैश्च गोभिश्चंद्रमसोऽमलैः ॥ ४ ॥ पारिजातवनामोदवायुनोद्यानशालिना ॥ धूपैरगुरुजै राजन् जालरंध्रविनिर्गतैः ॥ ५ ॥ पयःफेननिभे शुभ्रे पर्यंके कशिपूत्तमे ॥ उपतस्थे सुखासीनं जगतामीश्वरं पतिम् ॥ ६ ॥ वालव्यजनमादाय रत्नदंडं सखीकरात् ॥ तेन वीजयती देवी उपासांचक्र ईश्वरम् ॥ ७ ॥

र्णयति । तस्मिन्निति । तच्छब्देनातिप्रसिद्धमाह । भ्राजंति मुक्तादामानि तेषां विलंबाः संति यस्मिंस्तेन वितानेन विराजिते । तृतीयांतानां विराजितपदेनान्वयः ॥ ३ ॥ सुगंधितया द्विरेफकुलैर्नादिते । प्रविशद्भिश्चंद्ररश्मिभिः ॥ ४ ॥ निर्गच्छद्भिरगुरुसंभवैर्धूपैश्चातिमनोहरत्वं दर्शितम् ॥ ५ ॥ पयसः क्षीरस्य फेन इव मृदूनि पर्यंकस्थे । कशिपूत्तमे हंसतूलिकायाम् । उपतस्थे असेवत ॥ ६ ॥ तदेवाभिनयति । वालव्यजनमिति ॥ ७ ॥

सुशोभित असून, रत्नमय दीपांनीं प्रकाशमान होतें ॥ ३ ॥ बटमोगऱ्यांच्या माळांनीं व दुसऱ्याहि अनेकप्रकारच्या सुगंधिपुष्पांनीं युक्त व भ्रमरांच्या समुदायानें नादयुक्त होतें, गवाक्षांच्या छिद्रांतून आंत प्रविष्ट झालेल्या स्वच्छ चंद्रकिरणांनीं सुशोभित होतें ॥ ४ ॥ आरामबागांमध्यें शोभत असलेल्या पारिजातक वृक्षावरून आलेल्या सुगंधकारक वायूनें तसेंच गवाक्षांतून बाहेर जात असलेल्या आंतील अगरूच्या धूपांनीं अतिमनोहर होतें ॥ ५ ॥ हे राजा, अशा त्या प्रसिद्ध अंतर्गृहामध्यें पर्यंकावर स्थापन केलेल्या दुधाच्या फेण्यासारख्या मृदु व शुभ्र अशा परांच्या उत्तम गादीवर आनंदानें बसलेल्या जगन्नियंत्या पतीचें रुक्मिणी सेवन करूं लागली ॥ ६ ॥ तें असें कीं,– आपल्या सखीच्या हातांतून रत्नदंडाची चंवरी घेऊन तिच्या योगानें जगत्पालक अशा आपल्या पतीची वारा घालून शुश्रूषा करूं लागली. श्रीकृष्णाच्या समीपभागीं, जिच्या अग्रहस्तामध्यें कंकणें, रत्नमुद्रिका व चंवरी आहे, जिच्या पायांतील मणिमय नूपुरांचा शब्द होत आहे आणि जी स्वतांच अत्यंत प्रकाशमान

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होत आहे ती रुक्मिणी, मणिखचित नूपुरांच्या योगानें व पदराच्या कांठानें झांकून घेतलेल्या स्तनांना लावलेल्या केशरानें लाल झालेल्या हाराच्या कांतीनें आणि कमरेचे ठिकाणीं धारण केलेल्या बहुतमोलाच्या मेखलेनें विशेष शोभूं लागली ॥ ७ ॥ ८ ॥ जी लक्ष्मीच मनुष्यावतार धारण करणाऱ्या भगवंताला योग्य असें आपलें स्वरूप धारण करीत असत्ये, जी कधींहि भगवंताचा वियोग पावत नाहीं, आणि मागें कुरळे केंस, दोहोंबाजूंनीं कर्णामध्यें मकराकार कुंडलें, पुढें कंठामध्यें धारण केलेलीं पदकादिक भूषणें, याप्रमाणें चारी दिशांकडे सुशोभित असलेल्या जिच्या मुखावर मंदहास्यरूप अमृत विलास करीत आहे अशा त्या मूर्तिमंत लक्ष्मीला पाहून संतुष्ट झालेला भगवान् श्रीकृष्ण, किंचित् हास्य करून भाषण करूं लागला कीं, ॥ ९ ॥ श्रीभगवान् ह्मणाला– हे राजकन्ये, इंद्रादिलोकपालांसारख्या ऐश्वर्यांनीं युक्त महापराक्रमी,

---

उपाच्युतमच्युतस्य समीपे सा मणिनूपुराभ्यां रेजे । क्वणयती मणिमयौ नूपुरौ कूजयंती तथा अंगुलीयवलयव्यजनान्यग्रहस्ते हस्ताग्रे यस्याः सा । वस्त्रांतेन गूढौ स्थगितौ कुचौ तयोः कुंकुमं तेन शोणो हारस्तस्य भासा तथा नितंबे धृता या परार्ध्या अमूल्या कांची तया च रेजे ॥ ८ ॥ तां निरीक्ष्य प्रीतः सन्स्मयमानो हरिराबभाषे । कथंभूताम् । या लीलया धृतनरतनोस्तस्यानुरूपरूपा अनुरूपं रूपं यस्यास्ताम् । यथोक्तं श्रीपराशरेण । देवत्वे देवदेहेयं मनुष्यत्वे च मानुषी ॥ विष्णोर्देहानुरूपां वै

सोपाच्युतं क्वणयती मणिनूपुराभ्यां रेजेंऽगुलीयवलयव्यजनाग्रहस्ता ॥ वस्त्रांतगूढकुचकुंकुमशोणहारभासा नितंबधृतया च परार्ध्यकांच्या ॥ ८ ॥ तां रूपिणीं श्रियमनन्यगतिं निरीक्ष्य या लीलया धृततनोरनुरूपरूपा ॥ प्रीतः स्मयन्नलककुंडलनिष्ककंठवक्त्रोल्लसत्स्मितसुधां हरिराबभाषे ॥ ९ ॥ श्रीभगवानुवाच ॥ राजपुत्रीप्सिता भूपैर्लोकपालविभूतिभिः ॥ महानुभावैः श्रीमद्भी रूपौदार्यबलोर्जितैः ॥ १० ॥ तान्प्राप्तानर्थिनो हित्वा चैद्यादीन्स्मरदुर्मदान् ॥ दत्ता भ्रात्रा स्वपित्रा च कस्मान्नो ववृषेऽसमान् ॥ ११ ॥ राजभ्यो बिभ्यतः सुभ्रूः समुद्रं शरणं गतान् ॥ बलवद्भिः कृतद्वेषान्प्रायस्त्यक्तनृपासनान् ॥ १२ ॥ अस्पष्टवर्त्मनां पुंसामलोकपथमीयुषाम् ॥ आस्थिताः पदवीं सुभ्रूः प्रायः सीदंति योषितः ॥ १३ ॥

करोत्येषाऽऽत्मनस्तनुमिति । किंचालकैः कुंडलाभ्यां निष्केण पदकेनालंकृतकंठेन च चतुर्दिक्षु शोभिते वक्त्रे उल्लसंती स्मितसुधा यस्यास्ताम् ॥ ९ ॥ सर्वगुणयुक्ताऽपि तव बुद्धिर्मंदेत्याशयेनाह । राजपुत्रीत्याद्येकादशभिः । हे राजपुत्रि लोकपालानामिव विभूतिरैश्वर्यं येषां तैस्तथा महाप्रभावैराढ्यै रूपादिभिरूर्जितैश्च पूर्वमीप्सिताऽसि ॥ १० ॥ तान्हित्वा नोऽस्मानसमानान्कस्माद्ववृषे वृतवती त्वम् ॥ ११ ॥ किंच । प्रायशो राजभ्यो जरासंधादिभ्यो बिभ्यतो भयं प्राप्नुवतः ॥ १२ ॥ अस्पष्टवर्त्मनामविज्ञाताचाराणाम् । अलोकपथमस्त्रीपारतंत्र्यम् । पदवीं मार्गम् । आस्थिता अनुसृताः ॥ १३ ॥

धनाढ्य व सौंदर्य, औदार्य व बळ यांनीं उत्कृष्ट असल्यामुळें वरावयास योग्य अशा राजांनीं पूर्वीं तुझी इच्छा केली आहे आणि भावानें व पित्यानेंहि त्यांना तूं दिली आहेस. यास्तव याचना करणाऱ्या, व मदनाच्या योगानें दुर्मद असलेल्या (कामातुर पुरुष स्त्रियांचे सर्व मनोरथ पूर्ण करितात), आणि स्वतां प्राप्त झालेल्या त्या शिशुपाळादिक राजांना सोडून, अयोग्य अशा आह्मांला तूं काय ह्मणून वरिलेंस ? ॥ १० ॥ ११ ॥ हे सुंदर भ्रुकुटियुक्ते, आह्मी तर–प्रायशः जरासंधादिक राजांपासून भिणारे, समुद्राला शरण गेलेले (समुद्रांतील बेटांत राहणारे) बलवान् राजांबरोबर द्वेष संपादन केलेले आणि ययातीच्या शापानें राज्याधिकार नसलेले आहों ॥ १२ ॥ हे सुभ्रु, ज्यांचा आचार स्पष्टरीतीनें समजून येत नाहीं अशा व स्त्रियांच्या अंकितपणानें न वागणाऱ्या पुरुषांच्या मार्गाला अनुसरणाऱ्या स्त्रिया, बहुतकरून क्लेश पावतात ॥ १३ ॥

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आह्मी निरंतर धनादिसंपत्तिरहित व निष्किंचन (दरिद्री) पुरुषांना आवडणारे किंवा दरिद्री जनाची आवड असणारे आहों. ह्मणून हे सुमध्यमे, धनादिकेंकरून संपन्न असलेले पुरुष, बहुतकरून माझें सेवन करीत नाहींत, हें निश्चित आहे ॥ १४ ॥ ज्या दोन्ही पुरुषांचीं परस्परांना योग्य अशीं, जातकुळी, वैभव, स्वरूपसौंदर्य आणि धनादिकांची प्राप्ति हीं सारखीं असतात त्यांचाच परस्पर विवाह आणि मैत्री हीं योग्य आहेत, उत्तमाचीं व अधमाचीं परस्पर विवाह व मैत्री हीं कधींच योग्य नाहींत ॥ १५ ॥ हे रुक्मिणि, हें वर सांगितलेलें आमचें अयोग्यत्व न जाणतां दूरवर विचार न करणाऱ्या तूं, नारदादिक भिक्षुकांनीं व्यर्थ स्तुति केलेल्या परंतु गुणहीन अशा आह्मांला व्यर्थ वरिलें आहेस ॥ १६ ॥ यास्तव, अजूनहि ज्याचें सेवन करून या लोकीं व परलोकीं तूं आपणास इच्छित असलेल्या विषयांना पावशील त्या आप-

किंच। निष्किंचना इति ॥ १४॥ आत्मसमं परस्परमनुरूपम् । जन्मैश्वर्याभ्यां सहिता आकृतिः रूपं जातिर्वा समा । भव आयतिः ॥ १५ ॥ न दीर्घा समीक्षा विचारो यस्यास्तया ॥ १६ ॥ अथ इदानीमपि ॥ १७ ॥ तर्हि किमित्यानीताऽहमिति चेत्तत्राह । चैद्यशाल्वजरासंधेति । मम मां द्विषंति ॥ १८ ॥ स्मयनुत्तये गर्वापनयनाय ॥ १९ ॥

निष्किंचना वयं शश्वन्निष्किंचनजनप्रियाः ॥ तस्मात्प्रायेण नह्याढ्या मां भजंति सुमध्यमे ॥ १४ ॥ ययोरात्मसमं वित्तं जन्मैश्वर्याकृतिर्भवः ॥ तयोर्विवाहो मैत्री च नोत्तमाधमयोः क्वचित् ॥ १५ ॥ वैदर्भ्येतदविज्ञाय त्वयाऽदीर्घसमीक्षया ॥ वृता वयं गुणैर्हीना भिक्षुभिः श्लाघिता मुधा ॥ १६ ॥ अथात्मनोऽनुरूपं वै भजस्व क्षत्रियर्षभम् ॥ येन त्वमाशिषः सत्या इहामुत्र च लप्स्यसे॥१७॥ चैद्यशाल्वजरासंधदंतवक्रादयो नृपाः ॥ मम द्विषंति वामोरु रुक्मी चापि तवाग्रजः ॥ १८ ॥ तेषां वीर्यमदांधानां दृप्तानां स्मयनुत्तये ॥ आनीतासि मया भद्रे तेजोऽपहरता सताम् ॥ १९ ॥ उदासीना वयं नूनं न स्त्र्यपत्यार्थकामुकाः॥ आत्मलब्ध्यास्महे पूर्णा गेहयोर्ज्योतिरक्रियाः ॥ २० ॥ श्रीशुक उवाच ॥ एतावदुक्त्वा भगवानात्मानं वल्लभामिव ॥ मन्यमानामविश्लेषात्तद्दर्पघ्न उपारमत् ॥ २१ ॥ इति त्रिलोकेशपतेस्तदात्मनः प्रियस्य देव्यश्रुतपूर्वमप्रियम् ॥ आश्रुत्य भीता हृदि जातवेपथुश्चिंतां दुरंतां रुदती जगाम ह ॥ २२ ॥

स्त्रीणामतिदुःसहमौदासीन्यकामत्वं चाह । उदासीना इति । गेहयोर्देहगेहयोरुदासीना अतएव ज्योतिरक्रिया ज्योतिः प्रदीपादि तद्वत्साक्षिमात्रतया क्रियारहिता आस्महे वर्तामह इति ॥ २० ॥ अविश्लेषाद्धेतोः आत्मानमेव वल्लभामित्येवार्थे इवशब्दः ॥ २१ ॥ २२ ॥

णास योग्य अशा एखाद्या श्रेष्ठ क्षत्रियाचें सेवन करावेंस ॥ १७ ॥ तर काय ह्मणून तूं मला आणिली आहेस? असें ह्मणशील तर–शिशुपाळ, शाल्व, जरासंध, दंतवक्र इत्यादिक राजे, तसाच तुझा वडील भाऊ रुक्मी हे सर्व, माझा द्वेष करीत आहेत ॥ १८ ॥ ह्मणून पराक्रमाच्या योगानें मदांध व गर्विष्ठ अशा त्या शिशुपाळादिकांचा गर्व घालविण्याकरितां, दुष्टांचें तेज हरण करणाऱ्या मी तुला आणिलें आहे ॥ १९ ॥ परंतु आह्मी निजानंदानुभवलाभानेंच पूर्ण असल्यामुळें स्त्रिया, पुत्र व संपत्ति यांची इच्छा करीत नाहीं, तर जशी उत्तमदिव्याची ज्योति केवळ प्रकाश करून साक्षिमात्र असते त्याप्रमाणें आह्मी साक्षिमात्रत्वेंकरून सर्वक्रियाशून्य आणि देह व घर यांचेठिकाणींहि निरंतर आसक्तिरहित असतों ॥ २० ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– याप्रमाणें वियोग होत नसल्यामुळें, आपणच आवडती स्त्री आहें असें मानून गर्विष्ठ असलेल्या त्या रुक्मिणीला, तिचा गर्व घालविणारा भगवान्, असें भाषण करून निवांत राहिला ॥ २१ ॥ याप्रकारचें ब्रह्मादिकांचा पालक अशा आपल्या पतीचें पूर्वीं कधींहि न

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ऐकिलेलें तें अप्रियवचन श्रवण करून, भगवान् आपला त्याग करील अशा संभावनेनें भ्यालेली ह्मणूनच हृदयाचेठिकाणीं कंप उत्पन्न झालेली व रोदन करणारी अशी ती देवी रुक्मिणी त्यावेळीं अपार चिंता पावली ॥ २२ ॥ आतां चिंतेचें लक्षण सांगतो— त्यावेळीं ज्याची कांति नखांच्या योगानें आरक्तवर्ण आहे अशा आपल्या कमळासारख्या अत्यंत कोमळ पावलानें (डाव्या पावलाच्या अंगुष्ठानें) भूमीला खरवडणारी, तशीच काजळाच्या योगानें काळ्या झालेल्या दुःखाश्रूंनीं केशर लावलेल्या स्तनाचें सेचन करणारी व अतिदुःखानें कंठ दाटून आलेली ती रुक्मिणी, खालीं मुख करून स्तब्ध राहिली ॥ २३ ॥ तेव्हां, अप्रिय भाषणाच्या श्रवणापासून झालेलें अतिदुःख, त्यागसंभावनेनें झालेलें भय आणि आतां पुढें कसें होईल असा प्राप्त झालेला शोक यांच्या योगानें जिच्या बुद्धीला कांहींच सुचत नाहींसें झालें आहे अशा त्या रुक्मिणीच्या, तात्कालिक दुःखापासून झालेल्या कृशपणानें, ज्यापासून कांकणें खालीं गळून पडलीं आहेत अशा हातांतून चंवरी खालीं पडली. आणि विव्हळबुद्धि झालेल्या

चिंतालक्षणमाह । पदेति । नखैररुणा श्रीः कांतिर्यस्य तेन सुजातेन सुकोमलेन पदा ॥ २३ ॥ सुदुःखमप्रियश्रवणात् । भयं त्यागशंकया शोकोऽनुतापः तैर्विनष्टा बुद्धिर्यस्यास्तस्याः । श्लथंति पतंति वलयानि यस्माद्धस्तात् । देहश्च पपात । विक्लवा अवशा धीर्यस्यास्तस्याः ॥ २४ ॥ हास्यस्य प्रौढिं गांभीर्यम् ॥ २५ ॥ चतुर्भुज इति उत्थापनाश्लेष-

पदा सुजातेन नखारुणश्रिया भुवं लिखंत्यश्रुभिरंजनासितैः ॥ आसिंचती कुंकुमरूषितौ स्तनौ तस्थावधोमुख्यतिदुःखरुद्धवाक् ॥ २३ ॥ तस्याः सुदुःखभयशोकविनष्टबुद्धेर्हस्ताच्छ्लथद्वलयतो व्यजनं पपात ॥ देहश्च विक्लवधियः सहसैव मुह्यन्रंभेव वायुविहता प्रविकीर्य केशान् ॥ २४ ॥ तद्दृष्ट्वा भगवान्कृष्णः प्रियायाः प्रेमबंधनम् ॥ हास्यप्रौढिमजानंत्याः करुणः सोऽन्वकंपत ॥ २५ ॥ पर्यंकादवरुह्याशु तामुत्थाप्य चतुर्भुजः ॥ केशान्समुह्य तद्वक्त्रं प्रामृजत्पद्मपाणिना ॥ २६ ॥ प्रमृज्याश्रुकले नेत्रे स्तनौ चोपहतौ शुचा ॥ आश्लिष्य बाहुना राजन्ननन्यविषयां सतीम् ॥ २७॥ सांत्वयामास सांत्वज्ञः कृपया कृपणां प्रभुः ॥ हास्यप्रौढिभ्रमच्चित्तामतदर्हां सतां गतिः ॥ २८ ॥ श्रीभगवानुवाच ॥ मा मा वैदर्भ्यसूयेथा जाने त्वां मत्परायणाम् ॥ त्वद्वचः श्रोतुकामेन क्ष्वेल्याऽऽचरितमंगने ॥ २९ ॥

णवक्त्रपरिमार्जनाद्यर्थमाविष्कृतचतुर्भुज इत्यर्थः । समुह्य निबध्य ॥ २६ ॥ अश्रुकले अश्रुभिः शोभिते । शुचा शोकाश्रुभिः ॥ २७ ॥ सांत्वयामासानुनीतवान् ॥ २८ ॥ मा माम् । त्वद्वचः किं नु वदिष्यसीति श्रोतुकामेन श्रोतुमिच्छता क्ष्वेल्या नर्मणा एवमाचरितमुक्तं न तत्त्वतः । हे अंगने सुंदरि ॥ २९ ॥

तिचा देहहि एकाएकीं मूर्च्छना पावोन, जशी वाऱ्यानें उपटलेली केळ पडते त्याप्रमाणें केशपाश सुटल्यामुळें त्यांतील केंस अस्ताव्यस्त पसरून भूमीवर पडली ॥ २४ ॥ तेव्हां तें पडणें व विनोदाचें गांभीर्य न जाणणाऱ्या रुक्मिणीचें आपलेठिकाणीं असलेलें प्रेमबंधन पाहून, करुणायुक्त झालेल्या त्या भगवान् श्रीकृष्णानें, तिच्यावर कृपा केली ॥ २५ ॥ ती अशी कीं— तिला उठविणें आलिंगन करणें, व मुख पुसणें इत्यादिक कृत्यें एकदम करण्याकरितां चतुर्भुज झालेल्या भगवंतानें, त्वरेनें पर्यंकावरून खालीं उतरून पडलेल्या तिला उठविलें, आणि तिच्या केसांचें बंधन करून कमळासारख्या कोमळ हस्तानें तिचें मुख पुशिलें ॥ २६ ॥ नंतर, अश्रूंच्या बिंदूनीं सुशोभित असे तिचे नेत्र पुसून तसेच शोकाश्रूंनीं भिजलेले स्तन पुसून, बाहूनें तिला आलिंगन करून, हे राजा, सांत्वनाचे उपाय जाणणाऱ्या त्या भक्तपालक समर्थ श्रीकृष्णानें, थट्टेच्या बोलण्यानें चित्ताला भ्रम झालेल्या, दीनदशा पावलेल्या, व थट्टा करण्यास अयोग्य अशा त्या एकांतनिष्ठ पतिव्रता रुक्मिणीचें कृपेनें सांत्वन केलें ॥ २७ ॥ ॥ २८ ॥ श्रीभगवान् ह्मणाला—हे रुक्मिणि, तूं माझ्यावर, विनाकारण दुःख दिलें असा दोषारोप करूं नकोस. कारण, तूं माझ्याच आश्रयानें राहणारी आहेस असें मी सम-

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जतों. तथापि हे सुंदरि, माझ्या वचनानें रागावलेली तूं काय बोलत्येस तें ऐकूं इच्छिणाऱ्या मी (हें) हें असें भाषण केलें आहे, खरेपणानें नव्हे, ॥ २९ ॥ आणि जेथें तुझा अधरोष्ठ प्रणयकोपानें स्फुरण पावत आहे, जेथें तुझे वक्रदृष्टीनें युक्त व आरक्त झालेले नेत्रप्रांत आहेत आणि जेथें तुझें सुंदर (वांकडें) भ्रुकुटीतट आहे असें तुझें मुख अवलोकन करण्याकरितां मी हें भाषण केलें आहे ॥ ३० ॥ आतां कलहामध्यें कौतुक किंवा सुख काय आहे ? असें झणशील तर- हे भित्र्ये स्त्रिये, स्त्रीसहवर्तमान थट्टामस्करीच्या भाषणांनीं जो काळ घालविणें हाच दुःखरूप गृहामध्यें राहणाऱ्या गृहस्थांना परम लाभ (सुखरूप फळ देणारा) आहे; बाकी सर्व

प्रेमसंरंभेण प्रणयकोपेन स्फुरितः कंपितोऽधरो यस्मिंस्तत् । कटाशब्देन कटाक्षास्तैराक्षेपैररुणावपांगौ यस्मिंस्तत् । अतएव सुंदरं कुटिलं भ्रुकुटीतटं यस्मिंस्तत् ॥ ३० ॥ ननु कलहे किं कौतुकं सुखं वाऽत आह । अयं हीति । नर्मैर्नर्मभिः । यामः कालः ॥ ३१ ॥ ३२ ॥ भगवतस्तस्य ऐश्वर्ययुक्तं मुखं सव्रीडेन हासेन रुचिरेण स्निग्धेनापांगेन वीक्षमाणा ॥ ३३ ॥ असमत्वं भयं दुर्गाश्रयणं प्रबलैः कलिः ॥ अराजत्वमविज्ञाता लौकिकेहावसादनम् ॥ निष्किंचनत्वं तत्प्रीतिराढ्यानादरणीयता ॥ अनौचित्यं निर्गुणत्वं वृथाश्लाघा च भिक्षुभिः ॥ औदासीन्यमकामत्वं स्वदोषान्षोडशाऽसतः ॥ अज्ञत्वादीर्यदर्शित्वे भैम्या राज्ञां बहून् गुणान् ॥ कृष्णनर्मोदितान् भैष्मी न्यषेधत्तद्गुणस्तवैः ॥ भगवता

मुखं च प्रेमसरंभस्फुरिताधरमीक्षितुम् ॥ कटाक्षेपारुणापांगं सुंदरभ्रुकुटीतटम् ॥ ३० ॥ अयं हि परमो लाभो गृहेषु गृहमेधिनाम् ॥ यन्नर्मैर्नीयते यामः प्रियया भीरु भामिनि ॥ ३१ ॥ श्रीशुक उवाच ॥ सैवं भगवता राजन्वैदर्भी परिसांत्विता ॥ ज्ञात्वा तत्परिहासोक्ति प्रियत्यागभयं जहौ ॥ ३२ ॥ बभाष ऋषभं पुंसां वीक्षंती भगवन्मुखम् ॥ सव्रीडहासरुचिरस्निग्धापांगेन भारत ॥ ३३ ॥ रुक्मिण्युवाच ॥ नन्वेवमेतदरविंदविलोचनाह यद्वै भवान्भगवतोऽसदृशी विभूम्नः ॥ क्व स्वे महिम्न्यभिरतो भगवांस्त्र्यधीशः क्वाहं गुणप्रकृतिरज्ञगृहीतपादा ॥ ३४ ॥

स्वनिंदापराणीव यानि वचनान्युक्तानि तानि सर्वोत्कर्षपरतया व्याचक्षाणा प्रतिभाषते स्म । तत्र यदुक्तं कस्मान्नो वव्रषेऽसमानिति तत्रासाम्यं सत्यमेवेत्याह । नन्वेवमिति । हे अरविंदविलोचन त्र्यधीशस्त्रयाणां ब्रह्मादीनामप्यधीशो नियंता त्वं क्व क्वाहं गुणप्रकृतिस्त्रिगुणस्वभावा प्राकृता गुणमयी प्रकृतिर्वा । ननु त्वमेवाधीश्वरी श्रीः सर्वैरुपास्यत्वादिति चेदत आह । अज्ञैः सकामैर्गृहीतौ पादौ यस्याः सा ॥ ३४ ॥

दुःखच आहे ॥ ३१ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला- हे राजा, याप्रमाणें भगवंतानें सांत्वन केलेल्या त्या रुक्मिणीनें, भगवंताचें हें विनोदानें केलेलें भाषण आहे असें जाणून, तिनें पति आपला त्याग करील कीं काय असें असलेलें भय सोडून दिलें ॥ ३२ ॥ आणि हे राजा, नंतर लज्जायुक्त हास्यानें सुंदर अशा सप्रेम कटाक्षानें भगवंताचें ऐश्वर्ययुक्त मुख अवलोकन करणारी ती रुक्मिणी, पुरुषामध्यें श्रेष्ठ अशा त्या श्रीकृष्णाप्रत ह्मणाली कीं- ॥ ३३ ॥ त्यामध्यें कृष्णानें जें भाषण केलें होतें कीं ' असमान अशा आह्मांला तूं काय ह्मणून वरिलेंस ? ' तें असाम्य खरेंच आहे असें सांगत्ये- हे कमळनेत्रा, व्यापक व ऐश्वर्यादि गुणांनीं परिपूर्ण अशा तुला मी समान नाहीं असें जें तूं भाषण केलेंस तें अगदीं खरेंच आहे. पहा- निजानंदस्वरूपाचे ठिकाणीं रममाण होणारा, वैराग्यादिगुणपूर्ण आणि ब्रह्मादिकांचा नियंता असा तूं कोठें ? आणि सत्वरजतमोगुण-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

स्वभावाची आणि सकाम पुरुषांनीं आराधन केलेली मी कोठें ? ह्मणजे तुझ्यामध्यें व माझ्यामध्यें पुष्कळच फकर आहे ॥ ३४ ॥ आतां, ‘ राजांपासून भिणारे व समुद्राला शरण गेलेले ’ असें जें भाषण केलें त्याविषयीं ह्मणत्ये– हे उरुक्रमा (आपल्या पावलांनीं त्रैलोक्य व्यापणाऱ्या), शब्दादिक गुण हेच, ‘प्रकाश पावणारे असल्यामुळें’ राजे होत त्यांपासून भयानेंच कीं काय समुद्रासारख्या खोल असलेल्या अंतर्हृदयामध्यें चैतन्यघनरूप आत्मा तूं शयन करितोस (निश्चलत्वेंकरून प्रकाश पावतोस). आतां, ‘ बलवान् पुरुषांबरोबर द्वेष संपादन केलेले आह्मीं आहों’ असें जें सांगितलेंस तेंहि खरेंच आहेस. कारण, बहिर्मुख असलेल्या इंद्रियसमुदायाबरोबर अथवा ज्यांचा इंद्रियसमुदाय विषयासक्त आहे त्यांजबरोबर तूं नित्य कलह करणारा आहेस. ह्मणजे त्यांचेठिकाणीं तुझी प्रतीतीच होत नाहीं. आतां ‘ राज्यासनाचा त्याग केलेले आह्मीं आहों ’ असें जें सांगितलेंस तेंहि योग्यच आहे. राजाचें आसन ह्मटलें ह्मणजे केवळ अविवेकविशिष्ट असल्यामुळें गाढतमच आहे तें तुझ्या सेवकांनींच टाकिलें आहे, मग तूं

यदुक्तं राजभ्यो विभ्यतः सुभ्रूः समुद्रं शरणं गतानिति तत्राह । सत्यमिति । हे उरुक्रमेति भयाभावं दर्शयति । गुणाः शब्दादय एव राजंत इति राजानस्तेभ्यो भयादिवेति अंतर्हृदये समुद्रे तद्वदगाधे विषयाकारैरपरिच्छिन्न इत्यर्थः । शेते निश्चलतया प्रकाशते । उपलंभनमात्रश्चैतन्यघन आत्मा भवानिति । बलवद्भिः कृतद्वेषानिति यदुक्तं तदपि सत्यमित्याह । नित्यमिति । कदिंद्रियगणैः कुत्सितैर्बहिर्मुखैरिंद्रियगणैः । वृत्त्यभिप्रायेण बहुवचनम् । कुत्सित इंद्रियगणो येषामिति वा । तैस्त्वं नित्यं कृतविग्रहः तेषु

सत्यं भयादिव गुणेभ्य उरुक्रमांतः शेते समुद्र उपलंभनमात्र आत्मा ॥ नित्यं कदिंद्रियगणैः कृतविग्रहस्त्वं त्वत्सेवकैर्नृपपदं विधुतं तमोऽधम् ॥ ३५ ॥ त्वत्पादपद्ममकरंदजुषां मुनीनां वर्त्मास्फुटं नृपशुभिर्ननु दुर्विभाव्यम् ॥ यस्मादलौकिकमिवेहितमीश्वरस्य भूमंस्तवेहितमथो अनु ये भवंतम् ॥ ३६ ॥ निष्किंचनो ननु भवान्न यतोऽस्ति किंचिद्यस्मै बलिं बलिभुजोऽपि हरंत्यजाद्याः ॥ न त्वा विंदत्यसुतृपोंऽतकमाढ्यतांधाः प्रेष्ठो भवान्बलिभुजामपि तेऽपि तुभ्यम् ॥ ३७ ॥

तवाप्रतीतेः । यदुक्तं त्यक्तनृपासनानिति तदपि युक्तमेवेत्याह । त्वत्सेवकैरिति । नृपाणां पदमासनमंधं गाढं तम एव तत् । अविवेकबहुलत्वात् । त्वत्सेवकैरेव तत्त्यक्तं किं पुनर्वक्तव्यं त्वया त्यक्तमिति ॥ ३५ ॥ अस्पष्टवर्त्मनां पुंसामलोकपथमीयुषामिति यदुक्तं तदपि तथैवेत्याह । त्वत्पादेति । नृपशुभिर्नराकारैः पशुभिः । किं पुनर्वक्तव्यं तव वर्त्मास्फुटमिति । किंच यस्माद्ये भवंतमनु वर्तंते तेषामपीहितमलौकिकमिव । अथो अतः किमु वक्तव्यं तवेश्वरस्येहितमलौकिकमित्यर्थः । आस्थिताः पदवीं सुभ्रूः प्रायः सीदंति योषित इत्यस्य परिहारं वक्ष्यति । यद्वांछयेति पंचमश्लोके ॥ ३६ ॥ निष्किंचना वयं शश्वन्निष्किंचनजनप्रियाः ॥ तस्मात्प्रायेण न ह्याढ्या मां भजंति सुमध्यमे

टाकिलेंस हें काय सांगावें ! ॥ ३५ ॥ आतां, ‘ अस्पष्ट मार्ग असलेल्या व लोकमार्गाला न अनुसरणाऱ्या’ असें जें ह्मटलेंस तेंहि खरेंच आहे. ज्याअर्थीं तुझ्या चरणकमलांच्या मकरंदाचें (परमानंदात्मक रसाचें) सेवन करणाऱ्या मननशील विवेकी पुरुषांचाच मार्ग स्पष्टपणें समजत नसून तो मनुष्याकार पशूंनीं खरोखर तर्क करण्यासहि अशक्य आहे त्याअर्थीं तुझा मार्ग स्पष्ट समजत नाहीं हें काय सांगावें ! आणि हे व्यापका, जे तुला अनुसरणारे लोक आहेत त्यांचेंच करणें अलौकिक असल्यासारखें आहे मग तुज ईश्वराचें करणें अलौकिक आहे हें काय सांगावें ॥ ३६ ॥ आतां ‘ आह्मी निष्किंचन (दरिद्री) व निष्किंचनांना आवडणारे किंवा निष्किंचनजनांची आवड असणारे असल्यामुळें धनाढ्य पुरुष आमचें सेवन करीत नाहींत ’ असें जें सांगितलें होतें त्याचा परिहार करित्ये– हे प्रभो, ज्यापासून कांहीं दुर्लभ नाहीं अशाप्रकारचा तूं निष्किंचन (षड्गुणैश्वर्यसंपन्न) आहेस. कारण, दुसऱ्यांकडून पूजेचा स्वीकार करणारे असे ब्रह्मादिकहि ज्या तुला पूजा समर्पण करितात, त्या तुज सर्वेश्वराला दुसरें दारि-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

यपणाचें निष्किंचनत्व मुळींच घडत नाहीं. दुसऱ्याकडून पूजेचा स्वीकार करणाऱ्या ब्रह्मादिक लोकेश्वरांना तूं आवडणारा आहेस आणि तेहि तुला आवडतात. धनादि
संपत्तीच्या अभिमानानें आंधळे (विवेकशून्य) झालेले लोक, आयुष्य हरण करणाऱ्या काळरूपी तुला जाणत नाहींत म्हणून ते केवळ आपल्या प्राणाचीमात्र तृप्ति करितात
 तुझें सेवन करीत नाहींत ॥ ३७ ॥ आतां ‘ ज्या दोघांचें सारखें द्रव्य असतें ’ इत्यादिकें करून सांगितलेल्या अयोग्यपणाचा परिहार करित्ये– तूं धर्मादि सर्वपुरुषार्थमय
परमानंदरूप आहेस. ज्या आनंदरूपी तुझी प्राप्ति होणाऱ्या इच्छेनें सुबुद्धि पुरुष, सर्वप्रकारच्या व्यवहाराचा त्याग करितात. हे विभो, त्या विवेकी पुरुषांनाच तुझा सेव्य-
सेवकलक्षण संबंध आवडतो, पुरुष व स्त्री मिळून परस्पर रममाण होणाऱ्या व त्याच्यायोगानें प्राप्त झालेल्या सुखदुःखांनीं व्याकुळ झालेल्या त्या स्त्रीपुरुषांना, तुझा

इत्येतच्छ्लोकोक्तं दोषत्रयं परिहरति । निष्किंचन इति । दरिद्रतालक्षणं निष्किंचनत्वं तु तव न घटत इत्याह । यस्मा इति । अन्यतो बलिभुजः पूज्या अपि ब्रह्मादयो यस्मै भवते बलिं हरंति तस्य सर्वेश्वरस्य भवतो दरिद्रता न घटत इत्यर्थः । निष्किंचनजनप्रिया इत्यत्र तत्पुरुषेण बहुव्रीहिणा वा निंदा स्यादिति स्वयमप्युभयथा स्तौति । प्रेष्ठो भवानिति । बलिभुजां ब्रह्मादीनां लोकेश्वराणां त्वं प्रेष्ठस्तेऽपि तुभ्यं तवेति । तस्मात्प्रायेण न ह्याढ्या मां भजंतीति तस्योत्तरम् । न त्वा विदंतीति । आढ्यतयांऽधास्त्वा त्वामंतकं न विदंति । अतस्ते असुतृपः असूनेव तर्पयंति न त्वां भजंतीत्यर्थः ॥ ३७ ॥ बलिबुजामपि भवान्प्रेष्ठ इत्यत्र हेतुं वदंती ययोरेव समं वित्तमित्यनेनोक्त-

त्वं वै समस्तपुरुषार्थमयः फलात्मा यद्वांछया सुमतयो विसृजंति कृत्स्नम् ॥ तेषां विभो समुचितो भवतः समाजः पुंसः स्त्रियाश्च रतयोः सुखदुःखिनोर्न ॥ ३८ ॥ त्वं न्यस्तदंडमुनिभिर्गदितानुभाव आत्मात्मदश्च जगतामिति मे वृतोऽसि ॥ हित्वा भवद्भ्रुव उदीरितकालवेगध्वस्ताशिषोऽब्जभवनाकपतीन्कुतोऽन्ये ॥ ३९ ॥ जाड्यं वचस्तव गदाग्रज यस्तु भूपान्विद्राव्य शार्ङ्गनिनदेन जहर्थ मां त्वम् ॥ सिंहो यथा स्वबलिमीश पशून्स्वभागं तेभ्यो भयाद्यदुदधिं शरणं प्रपन्नः ॥ ४० ॥

मनौचित्यं परिहरति । त्वं वा इति । फलात्मा परमानंदरूपः । एतस्यैवानंदस्यान्यानि भूतानि मात्रामुपजीवंतीति श्रुतेः । समाजः सेव्यसेवकलक्षणसंबंधो न तु पुंसः स्त्रियाश्च मिथोरतयोः अतएव तत्कृतसुखदुःखिनोः । तदाकुलयोरित्यर्थः ॥ ३८ ॥ भिक्षुभिः श्लाघिता मुधेत्यस्य परिहारः त्वमिति । भिक्षुपदव्याख्यानं न्यस्तदंडैर्मुनिभिरिति । मुधेत्यस्य परिहारः आत्मेति । यदर्थं सर्वं प्रियं भवति तस्य जगतामात्मनस्तव वरणं न वृथेत्यर्थः । किंच आत्मद इति । वैदर्भ्यैतदविज्ञाय त्वयाऽदीर्घसमीक्षयेति स्वस्मिन्नुक्तं दोषद्वयं परिहरति । इतीति । इति ज्ञात्वैव मे मया वृतोऽसीत्यज्ञानपरिहारः । हित्वेत्यदीर्घसमीक्षापरिहारः । भवतो भ्रुवः सकाशादुदीरितो यः कालस्तस्य वेगस्तेन ध्वस्ता आशिषो येषां तान्ब्रह्मादीनपि विहाय । कुतोऽन्ये वराका इत्यर्थः ॥ ३९ ॥ स्वाज्ञानं परिहृत्य पुरुषांतरगुणवर्णनप्रदीप्तकोपसंरंभेण तस्मिन्नेवाज्ञानमापादयति । जा-

---

संबंध आवडत नाहीं ॥ ३८ ॥ ‘ नारदादि भिक्षुकांनीं व्यर्थ स्तुति केलेले ’ असें जें म्हटलें त्याचा परिहार करित्ये– ज्यांनीं प्राण्यांचा पीडारूप दंड टाकिला आहे अशा मननशील
पुरुषांनीं ज्याचा प्रभाव वर्णन केला आहे असा तूं सर्व जगताचा आत्मा व भक्तांना आत्मस्वरूप देणारा आहेस असें जाणूनच मी तुला वरिलें आहे. याच्या योगानें तूं दूर-
वर दृष्टि न ठेवितां मला वरिलेंस असें म्हटलें होतें त्याचाहि परिहार झाला. आतां जें मी तुला वरिलें तें तरी– तुझ्या भ्रुकुटिचालनापासून उत्पन्न झालेल्या काळाच्या वेगानें
ज्यांचे विषयभोग नाहींसे होतात त्या ब्रह्मदेव शंकर व इंद्रादिकांचाहि त्याग करून तुला बुद्धिपूर्वकच वरिलें आहे, मग दुसऱ्या तुच्छ पुरुषांचा त्याग करून वरिलें हें काय
सांगावें ॥ ३९ ॥ याप्रमाणें आपल्या अज्ञानाचा परिहार करून, आतां दुसऱ्या पुरुषांच्या वर्णनापासून प्रदीप्त झालेल्या कोपावेशानें भगवंतावरच अज्ञानाचें स्था-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पन करित्ये– हे गदाग्रजा, ईश्वरा, जसा सिंह, महिषादिक पशूंना पळवून आपला भाग हरण करितो त्याप्रमाणें ज्या तूं शार्ङ्ग धनुष्याच्या नादानेंच जरासंधादिक राजांना पळवून आपला भाग अशा माझें हरण केलेंस त्या तुझें, त्या राज्यांच्या भयानें समुद्राला शरण गेलों असें जें भाषण तें मात्र जाड्य (अनन्वित) आहे ह्मणजे घडत नाहीं ॥ ४० ॥ आतां आणखीहि दुसरें जें 'अस्पष्ट मार्गवगैरे असणाऱ्या पुरुषांच्या पदवीला अनुसरणाऱ्या स्त्रिया दुःख पावतात, 'असें सांगितलें, तेंहि मंदच आहे असें सांगत्ये– हे कमलाक्षा, ज्या तुझ्या प्राप्तीच्या इच्छेनें, अंग, पृथु, भरत, ययाति व गय इत्यादि राजांचे शिखामणि, ज्यामध्यें एकच अधिपति आहे अशा आपल्या राज्याचा त्याग करून, तुझ्या प्राप्तीला साधन असें तुझें आराधन करण्याकरितां वनामध्यें प्रविष्ट झाले. ते तुझ्या मार्गाचा आश्रय करणारे राजे, या संसारामध्यें इतर लोकांसारखे क्लेश

ड्यमिति । सिंहो यथा पशून्विद्राव्य स्वबलिं हरति तथा शार्ङ्गधनुर्निनादेनैव जरासंधादीन्विद्राव्य मां स्वभागं श्रियं यस्त्वं हृतवानसि तस्य तव राजभ्यो भयादुदधिं प्रपन्न इति यद्वचो भाषणं तज्जाड्यं मांद्यम् । न घटत इत्यर्थः ॥ ४० ॥ यच्चान्यदस्पष्टवर्त्मनामित्यादिना अर्थात्त्वां भजंतः सीदंतीत्यवसादनं श्रमावहत्वमुक्तं तदपि मंदमेवेत्याह । यद्वांछयेति । यस्य तव भजनवांछया नृपोत्तमाः । अंगो वेनस्य पिता वैन्यः पृथुः जायंतो भरतः नाहुषो ययातिः गयश्चादिर्येषां ते ये एते तव पदवीं मार्गमाश्रितास्ते किं सीदंति न सीदंत्येव । अपितु त्वत्पदं प्राप्ता इत्यर्थः । एवं कोपावेशेनावसादनस्य परिहारादस्पष्टवर्त्मनामित्येतदानंतर्यं विहायात्रोत्कर्षः ॥ ४१ ॥ यच्चोक्तम-

यद्वांछया नृपशिखामणयोऽगवैन्यजायंतनाहुषगयादय ऐकपत्यम् ॥ राज्यं विसृज्य विविशुर्वनमंबुजाक्ष सीदंति तेऽनुपदवीं त इहास्थिताः किम् ॥ ४१ ॥ काऽन्यं श्रयेत तव पादसरोजगंधमाघ्राय सन्मुखरितं जनताऽपवर्गम् ॥ लक्ष्म्यालयं त्वविगणय्य गुणालयस्य मर्त्या सदोरुभयमर्थविविक्तदृष्टिः ॥ ४२ ॥ तं त्वाऽनुरूपमभजं जगतामधीशमात्मानमत्र च परत्र च कामपूरम् ॥ स्यान्मे तवांघ्रिररणं सृतिभिर्भ्रमंत्या यो वै भजंतमुपयात्यनृतापवर्गः ॥ ४३ ॥

थात्मनोऽनुरूपमिति तत्राह। काऽन्यमिति श्लोकद्वयेन । गुणानामालयस्य तव पादसरोजगंधं जनताया अपवर्गं मोक्षरूपं लक्ष्म्या आलयं तत्सेव्यं सद्भिर्मुखरितं वर्णितमाघ्राय तमविगणय्य मर्त्या मरणधर्मिका सदा उरुभयं यस्य तमन्यं का स्त्री श्रयेत सेवेत । अर्थे विविक्ता दृष्टिर्यस्याः सा । गुणालयस्येत्यनेन गुणैर्हीना इति यदुक्तं तदपास्तम् ॥ ४२ ॥ अतस्त्वामेवाहमभजमित्याह । तं त्वेति । किंच प्रार्थयते । स्यादिति । अरणं शरणम् । सृतिभिर्देवतिर्यगादिभिर्जन्मभिः । पाठांतरे त्वर्थवादबहुलकर्मश्रवणैरित्यर्थः । कथंभूतस्य तव । यस्त्वमनृतस्य संसारस्यापवर्गो नाशो यस्मात्स भजंतमुपयात्यात्मसात्करोति तस्य तवांघ्रिरिति । भीतस्य हि शरणमेवानुरूपं भजनयोग्यमतस्त्वामहमभजमित्यर्थः ॥ ४३ ॥

पावतात काय ? नाहींच पावत. तर तुझ्या स्वरूपालाच पावले आहेत ॥ ४१ ॥ आतां आपणास योग्य असा दुसरा पति वर ह्मणून जें सांगितलें होतें त्याचें उत्तर असें सांगत्ये कीं,–आपल्या चांगल्यावाइटाचें विवेचन करण्याविषयीं कुशळ व मरणधर्मानें युक्त अशी स्वयंवर करणारी कोणती बरें चतुर स्त्री, सर्वगुणांचें स्थान अशा तुझ्या, जनसमुदायाला मोक्ष देणाऱ्या, लक्ष्मीचें स्थान आणि सत्पुरुषांनीं वर्णन केलेल्या अशा चरणकमळाचा सुगंध घेऊन (चरणकमळाचा प्रभाव एकदा श्रवण करून) व मग त्याचा अनादर करून, ज्याला निरंतर अधिकच भीति आहे अशा तुझ्याहून दुसऱ्या पुरुषाचें सेवन करील ? कोणीच करणार नाहीं ॥ ४२ ॥ यास्तव जगाचा अधिपति, सर्वांचा आत्मा आणि या लोकीं व परलोकीं सर्व मनोरथ पूर्ण करणारा अशा त्या योग्य तुज वराला मी वरिलें आहे. यास्तव

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

संसाराची निवृत्ति करणारा जो तूं, भक्ताला आत्मस्वरूपी करितोस त्या तुज भगवंताचे चरण, देवतिर्यगादिरूप जन्मांच्या योगेंकरून, भ्रमण पावणाऱ्या मला सेव्यत्वें-करून आश्रय असोत ॥ ४३ ॥ आतां राजांचे जे पुष्कळ गुण सांगितले होते त्यांविषयीं ईर्ष्येनें शाप देत व बोंट्या मोडीत ह्मणत्ये कीं,–हे अच्युता, हे शत्रुनाशका, शंकर व ब्रह्मदेव यांनीं अनेक सभांमध्यें वर्णन केलेली तुझी कथा जिच्या कर्णमार्गाचेठिकाणीं मुळींच प्राप्त झाली नसेल त्या हतभागिणीला, तूं गुणांचें वर्णन करून सांगितलेले परंतु स्त्रियांच्या गृहांमध्यें गर्दभांसारखे त्यांचे भारवाहक, वृषभांसारखे सर्वदा क्लेश पावणारे, श्वानांसारखे अवज्ञा पावणारे व गृहादिकांच्या रक्षणाविषयीं तत्पर, मार्जारांसारखे कृपण व हिंसक व सेवकांसारखे किंकर असे राजे पति असोत, मला तर ते वरण्यास योग्य नाहींत ॥ ४४ ॥ ज्या स्त्रीनें, तुझ्या चरणकमळाच्या मकरंदाचा सुगंध मुळींच घेतला नाहीं, ह्मणजे तुझ्या चरणाचें माहात्म्य कथेमध्यें मुळींच श्रवण केलें नाहीं तीच स्त्री, हा पुरुष सुंदर आहे असें मानून अत्यंत मोहित होत्साती,

ये चोक्ता राज्ञां बहवो गुणाः राजपुत्रीप्सिता भूपैर्लोकपालविभूतिभिरित्यादिना तत्र सेर्ष्यं सशापं सांगुलिभंगं चाह द्वाभ्याम् । तस्याः स्युरिति । खरा इव केवलं भारवाहा गावो बलीवर्दा इव नित्यं व्यापारक्लिष्टाः श्वान इवावमता बिडाला इव कृपणा हिंस्राश्च भृत्या इव किंकरा नृपास्तस्या दुर्भगायाः पतयः स्युः यस्याः कर्णपथं त्वत्कथा न प्रायप्नुयादिति ॥ ४४ ॥ तथाहि । ते पदाब्जमकरंदमजिघ्रती सती या स्त्री विमूढा सा कांतोऽयमिति मतिर्यस्याः सा कांतमतिर्जीवच्छवं भजति । त्वगादिभिर्बहिः पिनद्धं

तस्याः स्युरच्युत नृपा भवतोपदिष्टाः स्त्रीणां गृहेषु खरगोश्वबिडालभृत्याः ॥ यत्कर्णमूलमरिकर्षण नोपयायाद्युष्मत्कथा मृडविरिंचसभासु गीता ॥ ४४ ॥ त्वक्श्मश्रुरोमनखकेशपिनद्धमंतर्मांसास्थिरक्तकृमिविट्कफपित्तवातम् ॥ जीवच्छवं भजति कांतमतिर्विमूढा या ते पदाब्जमकरंदमजिघ्रती स्त्री ॥ ४५ ॥ अस्त्वंबुजाक्ष मम ते चरणानुराग आत्मन्रतस्य मयि चानतिरिक्तदृष्टेः ॥ यर्ह्यस्य वृद्धय उपात्तरजोऽतिमात्रो मामीक्षसे तदु ह नः परमाऽनुकंपा ॥ ४६ ॥ नैवालीकमहं मन्ये वचस्ते मधुसूदन ॥ अंबाया इव हि प्रायः कन्यायाः स्याद्रतिः क्वचित् ॥ ४७ ॥

छन्नमंतर्मांसादिमयमिति ॥ ४५ ॥ यदुक्तमुदासीना वयमित्यादिना तत्राह । अस्त्विति । यद्यपि त्वं निरपेक्षस्तथाऽपि मम ते चरणानुरागोऽस्तु मयि च मय्यपि नातिरिक्ता अतिशयवती दृष्टिर्यस्य तस्य ते । आत्मन् आत्मन्येव रतस्य । तर्हि तव तेन को लाभः । त्वच्चरणानुराग एव महाँल्लाभः । किंच । यर्ह्यस्य विश्वस्य वृद्धये उपात्ता रजसोऽतिमात्रा औत्कंठ्यं येन स तथाभूतः सन्मामीक्षसे । स एवार्थे । ह हर्षे । तदेव नः परमानुकंपा अत्यनुग्रह इति ॥ ४६ ॥ तदेवं सर्वं तदुक्तं प्रतिव्याख्याय प्रसन्नचित्ता मंत्रमुपदिशंत्याह द्वाभ्याम् । नैवेति । अथात्मनोऽनुरूपमित्यादि ते वचोऽलीकं मिथ्येति नैव मन्ये यतो लोके कन्याया एव क्वचिद्रतिर्भवति । यथा काशिराजकन्यानामं-

बाहेरून त्वचा, श्मश्रु, रोम, नखें व केंस यांनीं आच्छादित असलेल्या व आंत मांस, अस्थि, रक्त, कृमि, विष्ठा, कफ, पित्त आणि वात यांनीं परिपूर्ण असलेल्या अशा-जीवंत असून शवतुल्य पुरुषाला सेवन करित्ये ॥ ४५ ॥ आतां आह्मी उदासीन आहों इत्यादिक जें सांगितलें त्याचें उत्तर सांगत्ये–हे कमलनयना, निजानंद स्वरूपाचे ठिकाणीं रममाण असल्यामुळें माझेठिकाणीं आसक्तदृष्टि नसणाऱ्याहि तुझ्या चरणाचेठिकाणीं मला प्रीति असो. आतां त्या प्रीतीनें तुला कोणता लाभ आहे ? असें ह्मणशील तर–ज्यावेळीं या जगाच्या वृद्धीकरितां रजोगुणाच्या उत्कंठेचा स्वीकार करणारा तूं, मजकडे (मायेकडे) अवलोकन करितोस तें तुझें अवलोकनच आह्मां सर्व शक्तींवर तुझी मोठी कृपा होय ॥ ४६ ॥ याप्रमाणें श्रीकृष्णाच्या सर्व भाषणाचें उलट व्याख्यान करून प्रसन्नचित्त होत्साती, मसलतीचा उपदेश करीत ह्मणत्ये कीं–

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हे मधुसूदना, तुझें भाषण मिथ्या आहे असें मी मानीत नाहीं. कारण, या लोकामध्यें, जशी काशिराजाच्या अंबा, अंबालिका व अंबिका या नांवांच्या तीन कन्यांमध्यें
अंबेला बाल्यावस्थेंतच शाल्वराजाविषयीं प्रीति उत्पन्न झाली त्याप्रमाणें बहुतकरून एखाद्या कन्येलाच एखाद्या पुरुषाचेठिकाणीं प्रीति उत्पन्न होत्ये ॥ ४७ ॥
तसेंच, विवाह केलेल्याहि जारिणीचें मन नव्या नव्या पुरुषांकडे जातें. असा व्यवहार असतांहि विवेकी पुरुषानें जारिणी स्त्रींचा स्वीकार करूं नये. जारिणीचें पोषण
करणारा पुरुष या लोकापासून व परलोकापासून भ्रष्ट होतो; ह्मणजे कोठेंच त्याला सुख होत नाहीं ॥ ४८ ॥ श्रीभगवान् ह्मणाला–हे साध्वि, हे राजकन्ये, हें तुझें
भाषणच ऐकण्याची इच्छा करणाऱ्या आह्मी तुझा उपहास (मस्करी) केला आहे. माझ्या भाषणाचें जें तूं व्याख्यान केलें आहेस तें सर्व खरेंच आहे ॥ ४९ ॥ हे
भामिनि, हे कल्याणि, विषयवासना सुटण्याकरितां ‘ तुझे चरण मला शरण असोत, तुझ्या चरणांवर माझी प्रीति असो ’ इत्यादिक जे जे मनोरथ मजपासून प्राप्त

बांबालिकांऽबिकानां तिसृणां मध्ये अंबायाः कन्याया एव शाल्वे रतिर्जाता तद्वत् ॥ ४७ ॥ व्यूढायाः परिणीताया अपीति । उभयस्मादिहपरलोकद्वयाच्च्युतो भ्रष्ट इति
॥ ४८ ॥ प्रलंभिता उपहसिता । अन्वात्थान्वाख्यातवती ॥ ४९ ॥ मयि एकांतभक्तायास्ते कामाः संत्येव । अकामाय कामनिवृत्तये मोक्षपर्यवसायिन इत्यर्थः ॥ ५० ॥
अनुवादेन वरान् दत्वा तामभिनंदति । उपलब्धमिति । यद्यस्मान्मयि वर्तमाना धीर्नापकर्षिता नान्यविषया जाता ॥ ५१ ॥ एकांतभक्तिमभिनद्य तामेव दृढीकर्तुं सकामान्

व्यूढायाश्चापि पुंश्चल्या मनोऽभ्येति नवं नवम् ॥ बुधोऽसतीं न बिभृयात्तां बिभ्रदुभयच्युतः ॥ ४८ ॥ श्रीभगवानुवाच ॥ सा-
ध्व्येतच्छ्रोतुकामैस्त्वं राजपुत्रि प्रलंभिता ॥ मयोदितं यदन्वात्थ सर्वं तत्सत्यमेव हि ॥ ४९ ॥ याऽन्यान्कामयसे कामान्मय्यका-
माय भामिनि ॥ संति ह्येकांतभक्तायास्तव कल्याणि नित्यदा ॥ ५० ॥ उपलब्धं पतिप्रेम पातिव्रत्यं च तेऽनघे ॥ यद्वाक्यैश्चाल्यमा-
नाया न धीर्मय्यपकर्षिता ॥ ५१ ॥ ये मां भजंति दांपत्ये तपसा व्रतचर्यया ॥ कामात्मानोऽपवर्गेशं मोहिता मम मायया ॥ ५२ ॥
मां प्राप्य मानिन्यपवर्गसंपदं वांछंति ये संपद एव तत्पतिम् ॥ ते मंदभाग्या निरयेऽपि ये नृणां मात्रात्मकत्वान्निरयः सुसंगमः ॥ ५३ ॥

भक्तान्निंदति । ये मामिति । दांपत्ये दंपत्युपभोग्यसुखार्थम् ॥ ५२ ॥ मायामोहितत्वमेवोपपादयति । मां प्राप्येति । अपवर्गेण सह संपदो यस्मिंस्तं मां प्राप्य प्रसाद्य ये केवलं
संपद एव विषयान्वांछंति न तु माम् । तत्पतिं तासां संपदामपि योऽहमेव पतिस्तम् । तथा ये विषया निरयेऽप्यतिनिकृष्टयोनावपि स्युस्तान् । किंच तेषां पुंसां मात्रात्मक-
त्वाद्विषयात्मकत्वान्निरयः सुसंगमः शोभनसंगम एव स्यादतो मंदभाग्या एव ते इत्यर्थः ॥ ५३ ॥

होण्याची इच्छा करित्येस ते सर्वेहि अनन्यभक्त अशा तुला सर्वकाळीं आहेतच, ह्मणजे त्यांची तूं प्रार्थना करावयाची व मी द्यावयाचे असें नाहीं ॥ ५० ॥ आतां अनुवा-
दपूर्वक वर देऊन तिचें अभिनंदन करितो–हे दोषरहिते, ज्याअर्थीं मी वाक्यांच्या योगानें चलित केलेल्याहि तुझी बुद्धि माझेठिकाणीं कमीपणा पाहून दुसरेठिकाणीं मु-
ळींच आसक्त झाली नाहीं त्याअर्थीं तुझें मज पतीवर असलेलें निरतिशय प्रेम व पातिव्रत्य मी पाहिलें आहे ॥ ५१ ॥ याप्रमाणें तिच्या एकांतभक्तीचें अभिनंदन
करून आतां तिच्याच दृढीकरणाकरितां सकामभक्तांची निंदा करितो–जे पुरुष, विषयकामुक होत्साते, पंचाग्निसाधनादिक तपाच्या योगानें व एकादश्यादिक व्रताचर-
णाच्या योगानें, मोक्ष देणाऱ्याहि माझें दंपत्यानें उपभोग करण्यास योग्य अशा सुखाकरितां सेवन करितात, ते माझ्या मायेनें मोहित आहेत असें जाणावें ॥ ५२ ॥ कारण,
हे भामिनि, ज्या मजपासून मोक्ष व संपत्ति प्राप्त होतात त्या मोक्षाचा व संपत्तीचा पति अशा मला प्रसन्न करून जे केवळ संपत्तीच प्राप्त होण्याची इच्छा करितात, माझ्या

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्राप्तीची इच्छा करीत नाहींत ते मंदभाग्यच होत. जे मनुष्यसंबंधी विषय, नरकतुल्य अशा श्वानसूकरादि योनीमध्येंहि सुलभ आहेत तेच जर मोक्षाचें साधन अशा माझ्या भजनाचा अधिकार असलेले पुरुष इच्छितील तर त्या पुरुषांना विषयात्मके असल्यामुळें नरकहि चांगला असें मान्य होईल. यास्तव आपणच आपला अनर्थ संपादन करणारे ते पुरुष मंदभाग्य होत ॥ ५३ ॥ तस्मात् हे गृहस्वामिणि, तूं वारंवार माझी जी निष्काम सेवा केलीस हें फार चांगलें झालें. हिच्या योगानें मला मोठा संतोष झाला. ही निष्कामसेवा खळपुरुषांनीं दुःखानेंहि करण्यास अशक्य असून दुष्टवासना धारण करणाऱ्या, केवळ इंद्रियतृप्ति करण्यासाठीं तत्पर असणाऱ्या व दुसऱ्याचें वंचन करणाऱ्या स्त्रीला तर अत्यंत दुष्कर आहे ॥ ५४ ॥ आतां, माझेठिकाणीं निष्कामप्रेमानें अनुसरणाऱ्या पुष्कळ स्त्रिया आहेत परंतु तुझ्यासारखी मी कोठेंच

तस्मात् हे गृहेश्वरि त्वया मयि भवमोचनी निष्कामानुवृत्तिः कृता एतद्दिष्ट्या भद्रम् । कथंभूता । खलैः सुदुष्करा । दुराशिषो दुरभिप्रायाया अतएव असुंभरायाः प्राणतर्पणपराया निकृतिंजुषो वंचनपरायाः स्त्रियाः सुतरामसावनुवृत्तिर्दुष्करेति ॥ ५४ ॥ किंच संति निष्कामाः प्रेम्णैव मय्यनुवर्तमाना बह्व्यः किंतु त्वया सदृशीं क्वापि न पश्यामीति तस्या भक्तिं बहुमानेनाभिनंदति । न त्वादृशीमिति त्रिभिः । उपश्रुताः सत्यः कथा यस्य मे ॥ ५५ ॥ प्रोद्वाहपर्वण्यनिरुद्धविवाहे । अक्षगोष्ठ्यां द्यूतसभायाम् ।

दिष्ट्या गृहेश्वर्यसकृन्मयि त्वया कृताऽनुवृत्तिर्भवमोचनी खलैः ॥ सुदुष्कराऽसौ सुतरां दुराशिषो ह्यसुंभराया निकृतिंजुषः स्त्रियाः ॥ ५४ ॥ न त्वादृशीं प्रणयिनीं गृहिणीं गृहेषु पश्यामि मानिनि यया स्वविवाहकाले ॥ प्राप्तान्नृपानवगणय्य रहोहरो मे प्रस्थापितो द्विज उपश्रुतसत्कथस्य ॥ ५५ ॥ भ्रातुर्विरूपकरणं युधि निर्जितस्य प्रोद्वाहपर्वणि च तद्वधमक्षगोष्ठ्याम् ॥ दुःखं समुत्थमसहोऽस्मदयोगभीत्या नैवाब्रवीः किमपि तेन वयं जितास्ते ॥ ५६ ॥ दूतस्त्वयाऽऽत्मलभने सुविविक्तमंत्रः प्रस्थापितो मयि चिरायति शून्यमेतत् ॥ मत्वा जिहास इदमंगमनन्ययोग्यं तिष्ठेत तत्त्वयि वयं प्रतिनंदयामः ॥ ५७ ॥

तस्य भ्रातुर्वधम् । तस्मिन्काले कालांतरे वा तदनुस्मरणतः पुनः पुनः समुत्थं दुःखमस्माभिरयोगो वियोगस्तद्भीत्या असहः सोढवत्यसि । अनेनैवानिरुद्धविवाहानंतर्यमस्य ज्ञातव्यम् ॥ ५६ ॥ अपिच दूत इति । आत्मलभने मत्प्राप्त्यर्थम् । मयि चिरायति श्वो भाविनि विवाहे आगंतव्यमिति कृते समये कथंचिदप्राप्तवति सत्येतद्विश्वं शून्यं मत्वेदमनन्ययोग्यमंगं जिहासेत्यक्तुमिच्छामि त्यक्ष्यामीत्येवं दूतः प्रस्थापितः । तथा ह्युक्तं त्वया । यर्ह्यंबुजाक्ष न लभेय भवत्प्रसादं जह्यामसून् व्रतकृशान् शतजन्मभिः

पाहत नाहीं, असें सांगून तिच्या भक्तीचें अभिनंदन करितो—हे मानवति, ज्या तूं आपल्या विवाहाच्या वेळीं आपणास वरण्याकरितां प्राप्त झालेल्या राजांचा अनादर करून, ज्याच्या सत्कथा ऐकिल्या आहेत अशा मजकडे गुप्त निरोप पोंचविणारा ब्राह्मण पाठविला आहेस, त्या तुझ्यासारखी प्रेमवती दुसरी स्त्री, या गृहस्थाश्रमामध्यें मी मुळींच पाहत नाहीं ॥ ५५ ॥ आणि युद्धामध्यें मी जिंकलेल्या रुक्मी भ्रात्याचें विरूपकरण तसाच अनिरुद्धविवाहोत्साहांतील द्यूतसभेमध्यें झालेला त्याचा वध या उत्पन्न झालेल्या दुःखाचें, आमच्याबरोबर वियोग होईल या भयानें तूं सहन केलें आहेस. त्याबद्दल तूं कांहींच कठोर भाषण केलें नाहींस. त्याच्या योगानें तूं आम्हां बळरामादिक सर्वांना वश केलें आहेस ॥ ५६ ॥ आणि माझ्या प्राप्तीकरितां, निश्चय ठरविलेला निरोप सांगून दूत (ब्राह्मण) तूं मजकडे पाठविला आहेस आणि केलेल्या संकेतापर्यंत मी न प्राप्त झालों असतां, हें जग शून्य मानून, दुसऱ्या कोणालाच योग्य नाहीं अशा ह्या आपल्या शरीराचा त्याग करण्याची इच्छा करितें असा ॥१९९॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जो निश्चय केलास तें तुझें कृत्य तुझेठिकाणीं राहो. आम्ही तर त्याचें उत्तराई होण्यास असमर्थ असून केवळ तें तुला सुचवून हर्षमात्र उत्पन्न करितों ॥ ५७ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—याप्रमाणें सुरतसंबंधी मस्करीच्या गोष्टी सांगून स्वस्वरूपीं रममाण असणाऱ्याहि त्या भगवान् श्रीकृष्णानें, मनुष्यलोकाचें अनुकरण करीत लक्ष्मीचा अवतारभूत अशा त्या रुक्मिणीसहवर्तमान क्रीडा केली ॥ ५८ ॥ त्याचप्रमाणें दुसऱ्याहि स्त्रियांच्या गृहांमध्यें तितकीं रूपें धारण करून राहणाऱ्या सर्वलोकांचा गुरु अशा श्रीहरीनें, गृहस्थाश्रम्यासारखें, गृहस्थाश्रमाला योग्य असलेल्या धर्मांचें आचरण करीत त्या स्त्रियांबरोबर क्रीडा केली ॥ ५९ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील उत्तरार्धामध्यें कृष्णरुक्मिणीसंवादकथननामक हा साठावा अध्याय समाप्त झाला ॥ ६० ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां

स्यादिति । यद्वा अजिहास इति च्छेदः । त्यक्तुमैच्छ इत्यर्थः । तत्तव कर्म त्वय्येव तिष्ठेत् । न तत्प्रतिकर्तुं शक्यमित्यर्थः । किंतु केवलं त्वां प्रतिनंदयामो हर्षयाम इति ॥५७॥ सौरतसंलापैः सुरतनर्मगोष्ठीभिः ॥ ५८ ॥ ५९ ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधे उत्तरार्धे टीकायां षष्टितमोऽध्यायः ॥ ६० ॥ ॥ एकषष्टितमे शौरेः पुत्रपौत्रादिसंततिः ॥ अनिरुद्धविवाहे च रुक्मिणो रामतो वधः ॥ १ ॥ अष्टाधिकशतद्व्यष्टसहस्रस्त्रीसमुद्भवान् ॥ कोटिशः पुत्रपौत्रादीन्हरिर्दारैरयोजयत् ॥ २ ॥ तदेतद्वक्तुमाह । एकैकश इति । कृष्ण-

श्रीशुक उवाच ॥ एवं सौरतसंलापैर्भगवान् जगदीश्वरः ॥ स्वरतो रमया रेमे नरलोकं विडंबयन् ॥ ५८ ॥ तथाऽन्यासामपि विभुर्गृहेषु गृहवानिव ॥ आस्थितो गृहमेधीयान्धर्माँल्लोकगुरुर्हरिः ॥ ५९ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे उत्तरार्धे कृष्णरुक्मिणीसंवादो नाम षष्टितमोऽध्यायः ॥ ६० ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ एकैकशस्ताः कृष्णस्य पुत्रान्दशदशाबलाः ॥ अजीजनन्ननवमान्पितुः सर्वात्मसंपदा ॥ १ ॥ गृहादनपगं वीक्ष्य राजपुत्र्योऽच्युतं स्थितम् ॥ प्रेष्ठं न्यमंसत स्वं स्वं न तत्तत्त्वविदः स्त्रियः ॥ २ ॥ चार्वब्जकोशवदनायतबाहुनेत्रसप्रेमहासरसवीक्षितवल्गुजल्पैः ॥ संमोहिता भगवतो न मनो विजेतुं स्वैर्विभ्रमैः समशकन्वनिता विभूम्नः ॥ ३ ॥

स्यावला भार्याः सर्वा या आत्मनि संपत्तया पितुः सकाशादनवमानन्यूनान् ॥ १ ॥ प्रेष्ठं न्यमंसत अच्युतस्य प्रियतमं प्रत्येकं स्वं स्वं मेनिरे । न तस्य तत्त्वमात्मारामत्वं विदंति ताः ॥ २ ॥ आत्मारामत्वं व्यनक्ति द्वयेन । चार्विति । चार्वब्जकोशवद्वदनं च आयतानि बाहुनेत्राणि च सप्रेम्णा हासरसेन वीक्षितानि च वल्गुजल्पाश्च भगवतः एतैः संमोहिता वनिताः स्वैः स्वैरनेकैर्विभ्रमैस्तस्य श्रीकृष्णस्य मनो विजेतुं हर्तुं न समशकन् शक्ता बभूवुः । विभूम्नः परिपूर्णस्य ॥ ३ ॥

ह्या एकसष्टाव्या अध्यायामध्यें श्रीकृष्णाची पुत्रपौत्रादिक संतति सांगितली आहे आणि अनिरुद्धाच्या विवाहसमारंभांत बळरामापासून झालेल्या रुक्म्याच्या वधाचें वर्णन केलें आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, पूर्वीं सांगितलेल्या त्या श्रीकृष्णाच्या रुक्मिण्यादिक स्त्रियांना प्रत्येकीला, स्वरूपाचेठिकाणीं असलेल्या सौंदर्यादिक सर्वसंपत्तीनें केवळ श्रीकृष्णासारखे असे दहा दहा पुत्र झाले ॥ १ ॥ त्या प्रत्येक स्त्रियांनीं आपापल्या घरांतून कधींहि दुसरेठिकाणीं न जातां, सर्वदा घरींच राहणाऱ्या व संभोगादिकांविषयीं तत्पर असलेल्या श्रीकृष्णाला पाहून, आपआपला देहच श्रीकृष्णाला अत्यंत प्रिय आहे असें मानिलें. कारण, त्या स्त्रिया, श्रीकृष्ण आत्माराम आहे हें तत्त्व जाणणाऱ्या नव्हत्या ॥ २ ॥ आतां, त्याचें आत्मारामत्व स्पष्ट करितो—भगवंताचें कमळाच्या कळ्यासारखें सुंदर जें मुख, विस्तीर्ण जे बाहु व नेत्र, सप्रेम जीं हास्यरसयुक्त अवलोकनें व मनोहर जीं भाषणें त्यांच्या योगेंकरून अत्यंत मोहित झालेल्या त्या स्त्रिया, आपल्या अनेक विलासांनीं, त्या निजानंदपरिपूर्ण श्री-

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कृष्णाचें मन स्वाधीन करून घेण्यास समर्थ झाल्या नाहींत ॥ ३ ॥ आतां, त्यांचे विलास दर्शवितो—गुप्तहास्ययुक्त कटाक्षावलोकनानें सूचित जो अभिप्राय त्यानें मनोहरणशाल असलेल्या भ्रुकुटिमंडळानें फेंकलेल्या व सुरतसंबंधी मंत्रांविषयीं चतुर असून कामशास्त्रांत प्रसिद्ध अशा अनेकप्रकारच्या मदनबाणांनीं ज्याच्या मनाला क्षोभ करण्याविषयीं सोळाहजार एकशें आठ स्त्रियाहि समर्थ झाल्या नाहींत ॥ ४ ॥ याप्रमाणें ब्रह्मादिक देवहि ज्याची प्राप्ति होण्याचा मार्ग जाणत नाहींत तो लक्ष्मीपति श्रीकृष्ण, पति प्राप्त झाली असतां, निरंतर वृद्धिंगत झालेल्या प्रीतीनें, त्या स्त्रियांनीं, ज्यामध्यें प्रेमपूर्वक हास्य, अवलोकन, व नूतनसंगमाविषयीं उत्सुकता हीं मुख्य आहेत अशा अनेक विलासांचें जरी सेवन केलें तरी त्याचें मन वश करून घेण्यास समर्थ झाल्या नाहींत ॥ ५ ॥ तर शेंकडो दासींनीं युक्त अशाहि त्या स्त्रिया, बाहेरून आलेल्या कृष्णाला पाहून सा-

तासां विभ्रमान्वर्णयन्नेतद्विवृणोति । स्मायेति । स्मायो गूढहसितं तद्युक्तोऽवलोकलवः कटाक्षस्तेन दर्शितः सूचितो भावोऽभिप्रायस्तेन हारि मनोहरणशीलं यद्भ्रूमंडलं तेन प्रहिताः प्रस्थापिता ये सौरता मंत्रास्तेषु शौंडैः प्रगल्भैरनंगस्य बाणैः शरैरन्यैश्च करणैः कामशास्त्रप्रसिद्धैर्यस्येंद्रियं मनो विमथितुं क्षोभयितुं षोडशसहस्रमपि पत्न्यो न शेकुरिति ॥ ४ ॥ अनुरागेण हासोऽवलोकश्च नवसंगमे लालसमौत्सुक्यं च ते आद्या यस्य विभ्रमकदंबस्य तं भेजुः । अनुरागहासावलोकनवसंगमलालसाद्यं भेजुस्तस्य

स्मायावलोकलवदर्शितभावहारिभ्रूमंडलप्रहितसौरतमंत्रशौंडैः ॥ पत्न्यस्तु षोडशसहस्रमनंगबाणैर्यस्येंद्रियं विमथितुं करणैर्न शेकुः ॥ ४ ॥ इत्थं रमापतिमवाप्य पतिं स्त्रियस्ता ब्रह्मादयोऽपि न विदुः पदवीं यदीयाम् ॥ भेजुर्मुदाऽविरतमेधितयाऽनुरागहासावलोकनवसंगमलालसाद्यम् ॥ ५ ॥ प्रत्युद्गमासनवरार्हणपादशौचतांबूलविश्रमणवीजनगंधमाल्यैः ॥ केशप्रसारशयनस्नपनोपहार्यैर्दासीशता अपि विभोर्विदधुः स्म दास्यम् ॥ ६ ॥ तासां या दशपुत्राणां कृष्णस्त्रीणां पुरोदिताः ॥ अष्टौ महिष्यस्तत्पुत्रान्प्रद्युम्नादीन्गृणामि ते ॥ ७ ॥ चारुदेष्णः सुदेष्णश्च चारुदेहश्च वीर्यवान् ॥ सुचारुश्चारुगुप्तश्च भद्रचारुस्तथाऽपरः ॥ ८ ॥ चारुचंद्रो विचारुश्च चारुश्च दशमो हरेः ॥ प्रद्युम्नप्रमुखा जाता रुक्मिण्यां नावमाः पितुः ॥ ९ ॥

मनो विजेतुं न शेकुरिति वा ॥ ५ ॥ किंतु प्रत्युद्गमादिभिर्विभोस्तस्य दास्यं नित्यं विदधुरिति । प्रौढभावेऽपि नवसंगमाद्यभिधानमगतसारत्वेनौत्सुक्येन च तथा प्रतीतेः । तेषामेव श्लोकानां प्रस्तावांतरे पुनः पुनरावृत्तिरतिसौंदर्यात् ॥ ६ ॥ प्रासंगिकमुक्त्वा प्रस्तुतमाह । तासामिति । दशदश पुत्रा यासां तासां मध्येऽष्टौ महिष्यो याः प्रागुक्तास्तत्पुत्रानिति ॥ ७ ॥ ८ ॥ ९ ॥

मोरें जाणें, आसन देणें, अर्घ्यदानादिकेंकरून पूजा करणें, पाय धुणें, तांबूल अर्पण करणें, चरणाची शुश्रूषावगैरे करून श्रम घालविणें, चंवरी पंखा इत्यादिकांचा वारा घालणें, गंधपुष्पादिकांचें अर्पण करणें, केंसांना सुवासिक तेलें लाऊन विंचरणें, शय्या हातरणें व भक्ष्यभोज्यादिक पदार्थांचें समर्पण करणें इत्यादिकेंकरून त्या समर्थ पतीचें स्वतां दास्य करीत असत ॥ ६ ॥ असो. दहा दहा पुत्र असलेल्या श्रीकृष्णांच्या त्या सर्व स्त्रियांमध्यें पूर्वीं सांगितलेल्या ज्या रुक्मिण्यादिक आठ पट्टराण्या त्यांचे ॥१९
प्रद्युम्नादिक पुत्र मी तुला सांगतों श्रवण कर– ॥ ७ ॥ श्रीकृष्णाला रुक्मिणीचेठिकाणीं, प्रद्युम्न आहे मुख्य ज्यांमध्यें असे चारुदेष्ण, सुदेष्ण, चारुदेह, सुचारु, चारुगुप्त, भद्रचारु, तसाच चारुचंद्र, विचारु आणि दहावा चारु असे पराक्रमी पुत्र झाले; ते सौंदर्यादिक गुणांनीं पित्या–(श्रीकृष्णा)सारखेच होते ॥ ८ ॥ ९ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भानु, सुभानु, स्वर्भानु, प्रभानु, तसाच भानुमान्, चंद्रभानु, बृहद्भानु, तसाच आठवा अभिभानु,–॥ १० ॥ श्रीभानु आणि प्रतिभानु हे दहा सत्यभामेचे पुत्र होत. सांब, सुमित्र, पुरुजित्, शतजित्, सहस्रजित्, विजय, चित्रकेतु, वसुमान्, द्रविड आणि क्रतु हे जांबवतीचे दहा पुत्र होत. हे सांबादिक दहाहि पराक्रमादिकेंकरून पित्याला मान्य होते ॥ ११ ॥ १२ ॥ वीर, चंद्र, अश्वसेन, चित्रगु, वेगवान्, वृष, आम, शंकु, वसु आणि तेजानें युक्त असा कुंति हे दहा नाग्नजितीचे (सत्येचे) पुत्र होत ॥ १३ ॥ श्रुत, कवि, वृष, वीर, सुबाहु, भद्र, एकल, शांति, दर्श, पूर्णमास आणि सर्वांत ल्हान सोमक हे दहा कालिंदीचे पुत्र होत ॥ १४ ॥ प्रघोष, गात्रवान्, सिंह, बल,

॥ १० ॥ ११ ॥ १२ ॥ श्रीमानिति वसोः कुंतेर्वा विशेषणम् ॥ १३ ॥ भद्रो नाम एकल एकः । सोमकोऽवरः कनीयान् । एते कालिंद्याः सुता इति ॥ १४ ॥ माद्या लक्ष्मणायाः ॥ १५ ॥ क्षुधिश्च दशमः । एते मित्रविंदात्मजाः ॥ १६ ॥ संग्रामजित्प्रमुखाः सत्यकांता भद्रायाः सुताः । शैब्यानाम्न्यपि सैव ॥ १७ ॥ रोहिण्याः सुतानामु-

भानुः सुभानुः स्वर्भानुः प्रभानुर्भानुमांस्तथा ॥ चंद्रभानुर्बृहद्भानुरतिभानुस्तथाष्टमः ॥ १० ॥ श्रीभानुः प्रतिभानुश्च सत्यभामात्मजा दश ॥ सांबः सुमित्रः पुरुजिच्छतजिच्च सहस्रजित् ॥ ११ ॥ विजयश्चित्रकेतुश्च वसुमान्द्रविडः क्रतुः ॥ जांबवत्याः सुता ह्येते सांबाद्याः पितृसंमताः ॥ १२ ॥ वीरश्चंद्रोऽश्वसेनश्च चित्रगुर्वेगवान्वृषः ॥ आमः शंकुर्वसुः श्रीमान्कुंतिर्नाग्नजितेः सुताः ॥ १३ ॥ श्रुतः कविर्वृषो वीरः सुबाहुर्भद्र एकलः ॥ शांतिर्दर्शः पूर्णमासः कालिंद्याः सोमकोऽवरः ॥ १४ ॥ प्रघोषो गात्रवान् सिंहो बलः प्रबल ऊर्ध्वगः ॥ माद्याः पुत्रा महाशक्तिः सह ओजोऽपराजितः ॥ १५ ॥ वृको हर्षोऽनिलो गृध्रो वर्धनोऽन्नाद एव च ॥ महाशः पावनो वह्निर्मित्रविंदात्मजाः क्षुधिः ॥ १६ ॥ संग्रामजिद्बृहत्सेनः शूरः प्रहरणोऽरिजित् ॥ जयः सुभद्रो भद्राया वाम आयुश्च सत्यकः ॥ १७ ॥ दीप्तिमांस्ताम्रतप्ताद्या रोहिण्यास्तनया हरेः ॥ प्रद्युम्नाच्चानिरुद्धोऽभूद्रुक्मवत्यां महाबलः ॥ १८ ॥ पुत्र्यां तु रुक्मिणो राजन्नाम्ना भोजकटे पुरे ॥ एतेषां पुत्रपौत्राश्च बभूवुः कोटिशो नृप ॥ मातरः कृष्णजातानां सहस्राणि च षोडश ॥ १९ ॥

क्तिरन्यासामुपलक्षणार्थम् ॥ १८ ॥ एतेषामिति । अन्येषामपि श्रीकृष्णपुत्राणां शतसंख्यस्त्रीषु पुत्राः पौत्राश्च कोटिशो बभूवुः । तत्र हेतुत्वेन श्रीकृष्णपत्नीनां बाहुल्यमनुस्मारयति । मातरः कृष्णजातानामिति । चशब्देनाधिकाश्चेत्युक्तम् ॥ १९ ॥

प्रबल, ऊर्ध्वग, महाशक्ति, सह, ओज आणि अपराजित हे दहा लक्ष्मणेचे पुत्र होत ॥ १५ ॥ वृक, हर्ष, अनिल, गृध्र, वर्धन, उन्नाद, महाश, पावन, वह्नि आणि क्षुधि हे दहा मित्रविंदेचे पुत्र होत ॥ १६ ॥ संग्रामजित्, बृहत्सेन, शूर, प्रहरण, अरिजित्, जय, सुभद्र, वाम, आयु आणि सत्यक हे दहा भद्रेचे पुत्र होत ॥ १७ ॥ दीप्तिमान् व ताम्रतप्त इत्यादिक दहा रोहिणीचे पुत्र होते; याप्रमाणें दुसऱ्याहि सर्व स्त्रियांचे पुत्र होते. हे राजा, प्रद्युम्नापासून रुक्मवतीभार्येचेठिकाणीं महाबळी असा अनिरुद्धनामक पुत्र झाला, ती रुक्मवती, भोजकटनामक नगरामध्यें वास करणाऱ्या रुक्म्याची कन्या होय. असो, दुसऱ्याहि श्रीकृष्णपुत्रांना शेंकडो स्त्रियांचेठिकाणीं पुत्र व नातु कोट्यावधि झाले. कारण, कृष्णपुत्रांच्याच माता जर सोळा हजार एकशें आठ होत्या तर मग त्यांची संतति फार होईल हें काय सांगावें ! ॥ १८ ॥ १९ ॥

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राजा ह्मणाला—हे शुकाचार्य, त्या रुक्म्यानें, शत्रूच्या (श्रीकृष्णाच्या) पुत्राला (प्रद्युम्नाला) आपली कन्या कशी दिली ? कारण, त्या रुक्म्याबरोबर झालेल्या युद्धामध्यें श्रीकृष्णानें पराभव केलेला तो रुक्मी, त्या कृष्णाला मारण्याविषयीं संधि पाहत होता, तेव्हां त्याच्याकडून कन्या देण्याचा असंभव आहे, वास्तव परस्पर द्वेष करणाऱ्या त्या कृष्णरुक्म्यांचा परस्पर विवाहसंबंध कसा झाला हें मला सांग ॥ २० ॥ आतां रुक्म्याचा अभिप्राय आह्मी कसा जाणावा ? असें ह्मणशील तर—आपल्यासारखे योगी आहेत ते, पुढें होणाऱ्या, पूर्वीं झालेल्या आणि वर्तमान काळीं इंद्रियांना अगोचर असलेल्या दूर असलेल्या, व मध्यें भिंतवगैरे व्यवधान असलेल्या सर्व वस्तुमात्रांला प्रत्यक्ष पाहतात. वास्तव तुला न समजणारें असें कांहींच नाहीं ह्मणून सांगावें ॥ २१ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, त्या रुक्मवतीनें स्वयंवरामध्यें साक्षात् मूर्तिमान् मदनच अशा त्या प्रद्युम्नाला वरिलें असतां, तेथें कन्या प्राप्त होण्याच्या लोभानें आलेल्या व बलात्कारानें कन्या हिरावून घेण्यासाठीं युद्ध करण्यास प्रवृत्त झालेल्या

यः कृष्णं हंतुं रंध्रं प्रतीक्षते स कथं प्रादादिति । वैवाहिकं विवाहनिमित्तम् ॥ २० ॥ रुक्मिणोऽभिप्रायं कथं जानीम इति चेदत आह । अनागतमिति । अतींद्रियमस्मदादींद्रियागोचरम् । विप्रकृष्टं दूरस्थम् । व्यवहितं कुड्याद्यंतरितम् ॥ २१ ॥ तत्रोत्तरम् । स्वयंवरे रुक्मवत्या वृतः सन् राज्ञो निर्जित्य जहारेति ॥ २२ ॥ यद्यपि श्रीकृष्णावमा-

राजोवाच ॥ कथं रुक्म्यरिपुत्राय प्रादाद्दुहितरं युधि ॥ कृष्णेन परिभूतस्तं हंतुं रंध्रं प्रतीक्षते ॥ एतदाख्याहि मे विद्वन्द्विषोर्वैवाहिकं मिथः ॥ २० ॥ अनागतमतीतं च वर्तमानमतींद्रियम् ॥ विप्रकृष्टं व्यवहितं सम्यक्पश्यंति योगिनः ॥ २१ ॥ श्रीशुक उवाच ॥ वृतः स्वयंवरे साक्षादनंगोऽगयुतस्तथा ॥ राज्ञः समेतान्निर्जित्य जहारैकरथो युधि ॥ २२ ॥ यद्यप्यनुस्मरन्वैरं रुक्मी कृष्णावमानितः ॥ व्यतरद्भागिनेयाय सुतां कुर्वन्स्वसुः प्रियम् ॥ २३ ॥ रुक्मिण्यास्तनयां राजन्कृतवर्मसुतो बली ॥ उपयेमे विशालाक्षीं कन्यां चारुमतीं किल ॥ २४ ॥ दौहित्रायानिरुद्धाय पौत्रीं रुक्म्यददाद्धरेः ॥ रोचनां बद्धवैरोऽपि स्वसुः प्रियचिकीर्षया ॥ जानन्नधर्मं तद्यौनं स्नेहपाशानुबंधनः ॥ २५ ॥

नितस्तथापि वैरमनुस्मरन्नपि व्यतरत्प्रादात् । अन्वमोदतेत्यर्थः ॥ २३ ॥ सर्वासामपि एकैका कन्या तत्सर्वविवाहोपलक्षणार्थं ज्येष्ठकन्याविवाहमाह । रुक्मिण्या इति ॥ २४ ॥ यौनं विवाहः । तद्यौनमधर्मं जानन्निति । द्विषदन्नं न भोक्तव्यं द्विषंतं नैव भोजयेदिति लोकविरोधात् । अस्वर्ग्यं लोकविद्विष्टं धर्ममप्याचरेन्न त्विति निषेधाच्चेत्यर्थः ॥ २५ ॥

सर्वेहि राजांना त्या एकट्या रथी प्रद्युम्नानें जिंकून तिचें हरण केलें ॥ २२ ॥ त्यावेळीं जरीहि रुक्मी, श्रीकृष्णानें अवमान केलेला व त्याच्या वैराचें वारंवार स्मरण करणारा होता तथापि आपल्या बहिणीचें (रुक्मिणीचें) प्रिय करावें ह्मणून त्यानें, बहिणीचा पुत्र अशा त्या प्रद्युम्नाला कन्या दिली ह्मणजे अनुमोदन दिलें ॥ २३ ॥ आतां, कृष्णाच्या सर्वेहि स्त्रियांना एकेक कन्या झाली व त्यांचे विवाह झाले हें सूचविण्याकरितां ज्येष्ठ कन्येचा विवाह सांगतो—हे राजा, कृतवर्म्याचा बलीनामक जो पुत्र त्यानें नेत्रादिसौंदर्ययुक्त अशा चारुमतीनामक रुक्मिणीच्या कन्येला वरिलें ॥ २४ ॥ पुढें त्या रुक्म्यानें, ‘शत्रूंचें अन्न भक्षण करूं नये व शत्रूला भोजन घालूं नये’ इत्यादि प्रकारानें लोकविरुद्ध असलेल्या शत्रूंबरोबरच्या विवाहसंबंधरूप अधर्माला जाणत असूनहि व श्रीकृष्णाबरोबर वैरभाव धारण करीत असूनहि, आपल्या बहिणीचें (रुक्मिणीचें) प्रिय करण्याच्या इच्छेनें स्नेहरूप पाशानें बद्ध होऊन आपल्या कन्येचा पुत्र व श्रीकृष्णाचा नातु असा जो अनिरुद्ध त्यालाच रोचनानांवाची ॥१९७॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आपली नांत दिली ॥ २५ ॥ आतां, त्या लोकविरुद्ध आचरणाचें फळ सांगण्याकरितां ह्मणतो कीं,–हे राजा, तें अनिरुद्धाचा विवाहोत्सवरूप निमित्त प्राप्त झालें असतां, रुक्मिणी, बळराम, श्रीकृष्ण, सांब, प्रद्युम्न इत्यादिक लोक, भोजकटनामक नगरामध्यें गेले होते ॥ २६ ॥ तो विवाहसमारंभ झाल्यावर त्या समारंभास प्राप्त झालेले जे कालिंगादिक राजे होते, ते दर्पयुक्त होऊन, एकेदिवशीं रुक्म्याला असें ह्मणाले कीं–तुझ्या मनांत जर यादवांना जिंकावयाचें आहे तर तूं द्यूताला साधनभूत अशा फांशांनीं बळरामाला जिंक ॥ २७ ॥ कारण, हे राजा, हा बळराम, द्यूताचें कौशल जाणणारा नसूनहि याला द्यूत खेळण्याचें व्यसन मोठें आहे. असें राजांनीं सांगितलें असतां, रुक्म्यानें बळरामाला बोलावून आणून त्याच्याबरोबर फांशांनीं खेळूं लागला ॥ २८ ॥ त्या द्यूतामध्यें प्रथमतः बळरामानें सुवर्णाच्या शंभर मुद्रिकांचा नंतर हजार मुद्रिकांचा नंतर दहाहजार मुद्रिकांचा पण लावला. तो तिन्हीं संख्येंचाहि पण, अनुक्रमानें कुशळपणानें फांसे टाकून रुक्म्यानें जिंकिला. तेव्हां आपले दांत

॥ २६ ॥ लोकविरुद्धाचरणफलं वक्तुमाह । तस्मिन्निति ॥ २७ ॥ अदीव्यत् क्रीडितवान् ॥ २८ ॥ २९ ॥ निष्काणां लक्षं ग्लहं पणं कृतवान् । कैतवं कपटम् ॥ ३० ॥

तस्मिन्नभ्युदये राजन् रुक्मिणी रामकेशवौ ॥ पुरं भोजकटं जग्मुः सांबप्रद्युम्नकादयः ॥ २६ ॥ तस्मिन्निवृत्त उद्वाहे कालिंगप्रमुखा नृपाः ॥ दृप्तास्ते रुक्मिणं प्रोचुर्बलमक्षैर्विनिर्जय ॥ २७ ॥ अनक्षज्ञो ह्ययं राजन्नपि तद्व्यसनं महत् ॥ इत्युक्तो बलमाहूय तेनाक्षै रुक्म्यदीव्यत ॥ २८ ॥ शतं सहस्रमयुतं रामस्तत्राददे पणम् ॥ तं तु रुक्म्यजयत्तत्र कालिंगः प्राहसद्बलम् ॥ दंतान्संदर्शयन्नुच्चैर्नामृष्यत्तद्धलायुधः ॥ २९ ॥ ततो लक्षं रुक्म्यगृह्णाद्ग्लहं तत्राजयद्बलः ॥ जितवानहमित्याह रुक्मी कैतवमाश्रितः ॥ ३० ॥ मन्युना क्षुभितः श्रीमान्समुद्र इव पर्वणि ॥ जात्यारुणाक्षोऽतिरुषा न्यर्बुदं ग्लहमाददे ॥ ३१ ॥ तं चापि जितवान्रामो धर्मेण छलमाश्रितः ॥ रुक्मी जितं मयाऽत्रेमे वदंतु प्राश्निका इति ॥ ३२ ॥ तदाऽब्रवीन्नभोवाणी बलेनैव जितो ग्लहः ॥ धर्मतो वचनेनैव रुक्मी वदति वै मृषा ॥ ३३ ॥ तामनादृत्य वैदर्भो दुष्टराजन्यचोदितः ॥ संकर्षणं परिहसन्बभाषे कालचोदितः ॥ ३४ ॥ नैवाक्षकोविदा यूयं गोपाला वनगोचराः ॥ अक्षैर्दीव्यंति राजानो बाणैश्च न भवादृशाः ॥ ३५ ॥

न्यर्बुदं दशकोटीर्ग्लहं क्षुभितो राम आददे ॥ ३१ ॥ छलमाश्रितो रुक्मी मया जितमित्याह ॥ ३२ ॥ ३३ ॥ ३४ ॥ ३५ ॥

दाखवून कालिंगराजा बळरामाला मोठ्यानें हंसला. तें त्याचें हंसणें बळरामानें सहन केलें नाहीं ॥ २९ ॥ नंतर, रुक्म्यानें लक्ष सुवर्णमुद्रिकांचा पण लाविला त्यावेळीं तो पण बळरामानें जिंकिला असतां, कपटाचा आश्रय करणाऱ्या त्या रुक्म्यानें, मीच हा पण जिंकिला असें भाषण केलें आणि तो पण ग्रहण केला ॥ ३० ॥ तेव्हां, परिपूर्णधन व स्वभावानेंच आरक्तनेत्र असा त्या बळरामानें खोटें वचन ऐकिल्यानें जसा समुद्र पूर्णिमेचे दिवशीं क्षुब्ध होतो त्याप्रमाणें क्रोधानें क्षुब्ध होऊन क्रोधाच्या आवेशानें दहाकोटि सुवर्णमुद्रिकांचा पण लाविला ॥ ३१ ॥ तोहि पण फांसे पाडण्याच्या क्रमानें बळरामानेंच जिंकिला. तेव्हां कपटाचा अश्रय करणाऱ्या रुक्म्यानें, हें द्रव्य मीच जिंकिलें आहे, याविषयीं हे जवळ असणारे कालिंगादिक राजे साक्षी देतील असें ह्मणाला ॥ ३२ ॥ त्यावेळीं आकाशवाणी झाली कीं, हा पण फांसे पाडण्याच्या धर्मानें बळरामानेंच जिंकिला आहे. रुक्मीतर–वचनमात्रानेंच ' मी जिंकिलें असें,' खोटें बोलत आहे ॥ ३३ ॥ त्या आकाशवाणीचा अनादर करून मृत्युकालानें प्रेरित व कालिंगादि दुष्ट राजांनीं सुचविलेला तो रुक्मी त्या बळरामाचा उपहास करीत ह्मणाला कीं,– ॥ ३४ ॥ तुह्मीं फांशांनीं द्यूत करण्याविषयीं कुशळ नसून अरण्यांत राहणारे गोपाळ

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आहां. माझ्यासारखे राजेच फांशांनीं क्रीडा व बाणांनीं युद्ध करीत असतात, तुमच्यासारखे जे पशुपाळ आहेत ते करीत नाहींत ॥३५॥ अशा भाषणांनीं रुक्म्यानें तिरस्कार केले-ल्या व कालिंगादिक राजांनीं उपहास केलेल्या त्या बळरामानें क्रुद्ध होऊन, एक लोखंडाचा दंड उचलून त्याच्या योगानें त्या मंगलसभेमध्येंच त्या रुक्म्याचा वध केला ॥ ३६ ॥ आणि जो दांत प्रकाशित करून बळरामाला हंसला होता त्या, त्वरेनें पलायन करणाऱ्या कलिंगराजाला दहाव्याच पावलाचे ठिकाणीं धरून क्रुद्ध झालेल्या त्या बळरामानें त्याचे दांत पाडिले ॥ ३७ ॥ दुसरेहि रुक्म्याच्या पक्षाचे जे कितीएक राजे होते त्यांनांहि बळरामानें त्याच परिघानें ताडण केलें असतां, ज्यांचे बाहु मांड्या व मस्तकें छिन्नभिन्न झालीं आहेत असे ते, रक्तानें भिजून व भयाभीत होऊन पळून गेले ॥ ३८ ॥ हे राजा, याप्रमाणें बळरामानें मेहुण्या रुक्म्याचा वध केला असतां, श्रीकृष्णानें, रुक्मिणी व बळराम यांच्या स्नेहाचा भंग होईल या भयानें चांगलें किंवा वाईट काहींच भाषण केलें नाहीं, ह्मणजे चांगलें केलें असें ह्मटलें असतां रुक्मिणीला वाईट वाटेल

नृम्णसंसदि मंगलसभायाम् ॥ ३६ ॥ ३७ ॥ ३८ ॥ ३९ ॥ सूर्यया नवोढया । सिद्धा अखिला अर्था अभ्युदयशत्रुवधादयो येषां ते ॥ ४० ॥ इति दशमस्कंधे उत्तरार्धे

रुक्मिणैवमधिक्षिप्तो राजभिश्चोपहासितः ॥ क्रुद्धः परिघमुद्यम्य जघ्ने तं नृम्णसंसदि ॥ ३६ ॥ कलिंगराजं तरसा गृहीत्वा दशमे पदे ॥ दंतानपातयत्क्रुद्धो योऽहसद्विवृतैर्द्विजैः ॥ ३७ ॥ अन्ये निर्भिन्नबाहूरुशिरसो रुधिरोक्षिताः ॥ राजानो दुद्रुवुर्भीता बलेन परिघार्दिताः ॥ ३८ ॥ निहते रुक्मिणि श्याले नाब्रवीत्साध्वसाधु वा ॥ रुक्मिणीबलयो राजन् स्नेहभंगभयाद्धरिः ॥ ३९ ॥ ततोऽनिरुद्धं सह सूर्यया वरं रथं समारोप्य ययुः कुशस्थलीम् ॥ रामादयो भोजकटाद्दशार्हाः सिद्धाखिलार्था मधुसूदनाश्रयाः ॥ ४० ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे उत्तरार्धे अनिरुद्धविवाहे रुक्मिवधो नामैकषष्टितमोऽध्यायः ॥ ६१ ॥ ॥ राजोवाच ॥ बाणस्य तनयामूषामुपयेमे यदूत्तमः ॥ तत्र युद्धमभूद्घोरं हरिशंकरयोर्महत् ॥ एतत्सर्वं महायोगिन्समाख्यातुं त्वमर्हसि ॥ १ ॥ श्रीशुक उवाच ॥ बाणः पुत्रशतज्येष्ठो बलेरासीन्महात्मनः ॥ येन वामनरूपाय हरयेऽदायि मेदिनी ॥ २ ॥

टीकायामेकषष्टितमोऽध्यायः ॥ ६१ ॥ ॥ द्वियुक्षष्टितमे प्रोक्तमनिरुद्धस्य रोधनम् ॥ कन्यया रममाणस्य बाणेन बहुबाहुना ॥ १ ॥ अनिरुद्धोद्वहेऽन्यस्मिन् बाणयादवसं-युगे ॥ श्रीकृष्णः श्रीहरं जित्वा बाणबाहूनथाच्छिनत् ॥ २ ॥ १ ॥ २ ॥

व वाईट केलें असें ह्मटलें असतां बळरामाला वाईट वाटेल ह्मणून कांहींच भाषण केलें नाहीं ॥ ३९ ॥ नंतर श्रीकृष्णाचा आश्रय असलेल्या व ज्यांचे अनिरुद्धविवाह व शत्रुवध इत्यादिक कार्यभाग सिद्ध झाले आहेत अशा त्या बळरामादिक सर्व यादवांनीं, नूतन वरलेल्या चारुमतीनामक स्त्रीसहवर्तमान अनिरुद्धाला श्रेष्ठ रथांत बसवून, त्या भोजकटनामक नगरांतून द्वारकेमध्यें गमन केलें ॥ ४० ॥ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील उत्तरार्धामध्यें कृष्णपुत्रादि निरूपणनामक हा एकसष्टावा अध्याय समाप्त झाला ॥ ६१ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या बासष्टाव्या अध्यायामध्यें हजार बाहूंनीं युक्त अशा बाणासुरानें, आपल्या कन्येबरोबर रममाण होणाऱ्या अनिरुद्धाला प्रतिबंधांत ठेविलें अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ राजा ह्मणाला—हे महायोगिन्, यादवश्रेष्ठ अशा अनिरुद्धानें बाणा-सुराच्या ऊषानामक कन्येला वरिलें. त्याप्रसंगीं हरि आणि शंकर यांचें परस्पर भयंकर युद्ध झालें असें आह्मी ऐकिलें आहे. हें सर्व चरित्र सविस्तर सांगावयास तूं समर्थ आहेस, यास्तव सांगण्याची कृपा करावी ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, ज्यानें वामनरूपी श्रीहरीला भूमीचें दान केलें त्या अतिउदारचित्त बळिराजाचा शंभर

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुत्रांमध्यें वडील असा बाणासुरनामक पुत्र होता ॥ २ ॥ बळीचा औरस[1] पुत्र तो बाणासुर, निरंतर शिवभक्तीविषयीं तत्पर, लोकामध्यें सन्मान पावण्यास योग्य,
अतिउदारचित्त, सत्यप्रतिज्ञ आणि शंकराच्या उपासनेवें दृढ व्रत धारण करणारा होता ॥ ३ ॥ तो पूर्वी शोणितनामक नगरामध्यें राज्य करीत असे. त्याला शंकरा-
पासून वर प्राप्त झाल्यामुळें, लोकामध्यें आराध्यत्वेंकरून प्रसिद्ध असे जे देव ते सर्वेहि त्याच्या किंकरांसारखे होऊन राहिले होते. त्याचें कारण, तो हजार बाहु असल्यामुळें
एकेवेळीं त्यानें, शंकर तांडव नृत्य करीत असतां, आपल्या हजार बाहूंनीं एकदम पुष्कळ वाद्यें वाजवून त्याला संतुष्ट केलें ॥ ४ ॥ तेव्हां सर्वभूतांचा अधिपति, शरण
जाण्यास योग्य व भक्तवत्सल असा त्या भगवान् शंकरानें, त्याला इच्छित वर मागून घे असें सांगितलें असतां, त्यानें त्या शंकराजवळ, तूं निरंतर माझ्या नगरीचें रक्षण
करीत रहा, असा वर मागून घेतला व तो त्यानें त्याला दिला ॥ ५ ॥ एकेवेळीं पराक्रमाच्या योगानें दुर्मद झालेल्या त्या बाणासुरानें, आपल्या पार्श्वभागाचेठिकाणीं

॥ ३ ॥ ४ ॥ पुराधिपं पुरपालकम् ॥ ५ ॥ ६ ॥ कामान्पूरयतीति कामपूरः स चासावमरांघ्रिपः कल्पतरुस्तं त्वाम् ॥ ७ ॥ ८ ॥ हे आद्य । निभृतैर्भरितैर्दोर्भिरद्रींश्चूर्णयन्

तस्यौरसः सुतो बाणः शिवभक्तिरतः सदा ॥ मान्यो वदान्यो धीमांश्च सत्यसंधो दृढव्रतः ॥ ३ ॥ शोणिताख्ये पुरे रम्ये स रा-
ज्यमकरोत्पुरा ॥ तस्य शंभोः प्रसादेन किंकरा इव तेऽमराः ॥ सहस्रबाहुर्वाद्येन तांडवेऽतोषयन्मृडम् ॥ ४ ॥ भगवान् सर्वभूतेशः
शरण्यो भक्तवत्सलः ॥ वरेण छंदयामास स तं वव्रे पुराधिपम् ॥ ५ ॥ स एकदाऽऽह गिरिशं पार्श्वस्थं वीर्यदुर्मदः ॥ किरीटेना-
र्कवर्णेन संस्पृशंस्तत्पदांबुजम् ॥ ६ ॥ नमस्ये त्वां महादेव लोकानां गुरुमीश्वरम् ॥ पुंसामपूर्णकामानां कामपूरामरांघ्रिपम् ॥ ७ ॥
दोःसहस्रं त्वया दत्तं परं भाराय मेऽभवत् ॥ त्रिलोक्यां प्रतियोद्धारं न लभे त्वदृते समम् ॥ ८ ॥ कंडूत्या निभृतैर्दोर्भिर्युयुत्सु-
र्दिग्गजानहम् ॥ आद्यायां चूर्णयन्नद्रीन्भीतास्तेऽपि प्रदुद्रुवुः ॥ ९ ॥ तच्छ्रुत्वा भगवान्क्रुद्धः केतुस्ते भज्यते यदा ॥ त्वद्दर्पघ्नं
भवेन्मूढ संयुगं मत्समेन ते ॥ १० ॥ इत्युक्तः कुमतिर्हृष्टः स्वगृहं प्रविशन्नृप ॥ प्रतीक्षन्गिरिशादेशं स्ववीर्यनयनं कुधीः ॥ ११ ॥

अयामगच्छम् ॥ ९ ॥ १० ॥ स्ववीर्यस्य नशनं नाशनं केतुभंगं प्रतीक्षमाणः ॥ ११ ॥

सूर्यासारख्या वर्णाच्या आपल्या किरीटानें स्पर्श करून म्हणाला कीं,— ॥ ६ ॥ हे महादेवा, सर्वप्राणिमात्रांचा गुरु आणि अपूर्ण-
असलेल्या त्या शंकराच्या चरणकमळाला मनोरथ असलेल्या पुरुषांचे मनोरथ पूर्ण करणारा कल्पवृक्षच अशा तुज ईश्वराला मी नमस्कार करितों ॥ ७ ॥ तूं वरत्वेंकरून जे मला हजार बाहु दिले आहेस ते केवळ
मला भाराकरितांच झाले आहेत; कारण, हजार बाहु धारण करणें हें युद्धाकरितां असून त्या युद्धाविषयीं तर तुझ्यावांचून दुसरा माझ्याबरोबर युद्ध करणारा व बळानें
माझ्यासारखा योद्धा त्रैलोक्यामध्येंहि मला मिळत नाहीं ॥ ८ ॥ हे आद्या परमेश्वरा, युद्ध करण्याची इच्छा करणारा मी, कंडूनें भरलेल्या बाहूंनीं पर्वतांचें चूर्ण करीत करीत
दिग्गजांकडे गेलों होतों, परंतु मला पाहतांच भयभीत झालेले तेहि दूर पळून गेले ॥ ९ ॥ तें बाणासुराचें भाषण श्रवण करून क्रुद्ध झालेला भगवान् शंकर म्हणाला कीं—
हे मूढा, जेव्हां तुझा ध्वज आपोआप मोडून पडेल तेव्हां तुझ्या गर्वाचा नाश करणारें माझ्यासारख्या योद्ध्याबरोबर तुझें युद्ध होईल ॥ १० ॥ हे राजा, याप्रमाणें
शंकरानें सांगितलें असतां तो कुबुद्धि (बाणासुर) हर्षयुक्त होऊन, महादेवानें सांगितलेला आपल्या पराक्रमाचा नाशकारक ध्वजाचा भंग केव्हां होईल अशी वाट पहात

१ दत्तक, पालन केलेला, विकत घेतलेलावगैरे पुत्र असतात त्यांची शंका निवृत्त होण्याकरितां ‘ औरस ’ असें म्हटलें आहे.

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होत्साता तो कुबुद्धि आपल्या गृहामध्यें प्रविष्ट झाला ॥ ११ ॥ त्याची ऊषानांवाची कन्या होती; तिला, विवाह होण्याच्या पूर्वीच, तिनें कधींहि न पाहिलेल्या व न ऐकिलेल्या सुंदर अशा अनिरुद्धाबरोबर स्वप्नामध्यें रतिसुखाचा लाभ झाला ॥ १२ ॥ नंतर ती ऊषा, त्या स्वप्नामध्यें अनिरुद्धाला न पाहत होत्साती, विव्हळ होऊन, हे कांत, तूं कोठें गेला आहेस ? असें बोलत सख्यांच्या मध्यें जागृत होऊन उठून उभी राहिली आणि अत्यंत लज्जित झाली ॥ १३ ॥ बाणासुराचा कुंभांडनामक प्रधान होता व त्याची चित्रलेखानामक कन्या असून ती ऊषेची सखी होती. ती आश्चर्यानें युक्त होऊन त्या आपल्या सखीला विचारूं लागली कीं,– ॥ १४ ॥ हे सुभ्रु, हे राजकन्ये, तुझें पाणिग्रहण करणारा पति मी अजून पाहिला नाहीं असें असून तूं येथें ‘ हे कांत ’ असें ह्मणून, कोणचा शोध करित्येस ? आणि तुझा मनोरथ तरी कोणत्याप्रकारचा आहे ? ॥ १५ ॥ तेव्हां ऊषा ह्मणाली–हे सखि चित्रलेखे, मी स्वप्नामध्यें, श्यामवर्ण, कमलनयन, पिंवळा पीतांबर नेसलेला, पराक्रमानें शोभणाऱ्या अशा बाहूंनीं युक्त व

श्रीमहेशादिष्टसंग्रामस्य प्रसंगमाह । तस्योषेति । प्राद्युम्निनाऽनिरुद्धेन । तत्रापि स्वप्ने ॥ १२ ॥ तं कांतमपश्यंती सा उत्तस्थौ ॥ १३ ॥ ततः किं वृत्तं तत्राह । बाणस्येति

तस्योषा नाम दुहिता स्वप्ने प्राद्युम्निना रतिम् ॥ कन्याऽलभत कांतेन प्रागदृष्टश्रुतेन सा ॥ १२ ॥ सा तत्र तमपश्यंती क्वासि कांतेति वादिनी ॥ सखीनां मध्य उत्तस्थौ विह्वला व्रीडिता भृशम् ॥ १३ ॥ बाणस्य मंत्री कुंभांडश्चित्रलेखा च तत्सुता ॥ सख्यपृच्छत्सखीमूषां कौतूहलसमन्विता ॥ १४ ॥ कं त्वं मृगयसे सुभ्रूः कीदृशस्ते मनोरथः ॥ हस्तग्राहं न तेऽद्यापि राजपुत्र्युपलक्षये ॥ १५ ॥ ऊषोवाच ॥ दृष्टः कश्चिन्नरः स्वप्ने श्यामः कमललोचनः ॥ पीतवासा बृहद्बाहुर्योषितां हृदयंगमः ॥ १६ ॥ तमहं मृगये कांतं पाययित्वाऽधरं मधु ॥ क्वापि यातः स्पृहयतीं क्षिप्त्वा मां वृजिनार्णवे ॥ १७ ॥ चित्रलेखोवाच ॥ व्यसनं तेऽपकर्षामि त्रिलोक्यां यदि भाव्यते ॥ तमानेष्ये नरं यस्ते मनोहर्ता तमादिश ॥ १८ ॥ इत्युक्त्वा देवगंधर्वसिद्धचारणपन्नगान् ॥ दैत्यविद्याधरान्यक्षान्मनुजांश्च यथाऽलिखत् ॥ १९ ॥ मनुजेषु च सा वृष्णीन् शूरमानकदुंदुभिम् ॥ व्यलिखद्रामकृष्णौ च प्रद्युम्नं वीक्ष्य लज्जिता ॥ २० ॥

॥ १४ ॥ हस्तग्राहं भर्तारम् ॥ १५ ॥ १६ ॥ १७ ॥ १८ ॥ स्वप्ने त्वया दृष्ट एषां मध्ये को वा भवेदिति देवादीन्यथावत्पटेऽलिखत् ॥ १९ ॥ प्रद्युम्नं लिखितं वीक्ष्य श्वशुरोऽयमिति लज्जिता ॥ २० ॥

स्त्रियांच्या मनाला फार आवडणारा असा कोणीएक पुरुष अवलोकन केला ॥ १६ ॥ त्यानें मला अधरसंबंधी अमृताचें एकवेळ पान करवून पुन्हा त्याची इच्छा करणाऱ्या मला विरहदुःखसमुद्रांत लोटून देऊन तो कोठें गेला आहे. त्या सुंदर पतीचा मी शोध करीत आहें ॥ १७ ॥ तेव्हां चित्रलेखा ह्मणाली–हे सखि ऊषे, तुझें दुःख मी घालवीन परंतु तो पुरुष, त्रैलोक्यामध्यें असलामात्र पाहिजे ह्मणजे त्या पुरुषाला मी तुझ्याजवळ आणीन. मी चित्रें काढित्यें त्यांत तूं स्वप्नामध्यें पाहिलेला तुझ्या मनाचें हरण करणारा पुरुष कोणता तेवढें मला खुणेनें सांग ह्मणजे झालें ॥१८॥ असें बोलून तिनें, देव, गंधर्व, सिद्ध, चारण, पन्नग, दैत्य, विद्याधर, यक्ष आणि मनुष्य या सर्वांचीं हुबेहूब चित्रें काढिलीं ॥१९॥ आणि तिनें मनुष्यांमध्यें यादवांचीं त्यांत शूराचें, वसुदेवाचें व रामकृष्णांचीं चित्रें लिहिलीं आणि प्रद्युम्नाचें चित्र लिहितांच त्याला पाहून ‘ हा सासरा आहे अशा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

बुद्धीनें, ऊषा लज्जित झाली ॥ २० ॥ नंतर लिहिलेल्या अनिरुद्धाला पाहून, हे राजा, त्या ऊषेनें लज्जेनें खालीं मुख केलें, आणि प्रीतीनें हास्ययुक्तमुख होऊन जो मी स्वप्नांत पाहिला तो हाच हाच असें सांगितलें ॥ २१ ॥ हे राजा, चित्रलेखेनें, ऊषेनें दाखविलेला तो कृष्णाचा नातु अनिरुद्ध आहे असें जाणून, ती योगिनी होती ह्मणून त्याला आणण्याकरितां आकाशमार्गानें श्रीकृष्णानें रक्षण केलेल्या द्वारकेस निघून गेली ॥ २२ ॥ तेथें सुंदरपर्यंकावर निजलेल्या अनिरुद्धाला योगसिद्धीच्या आश्रयानें उचलून घेऊन पुन्हा शोणितनगरांत आली आणि तिनें ऊषा सखीला तिचा प्रियपति दाखविला ॥ २३ ॥ त्या ऊषेनेंहि अतिसुंदर अशा त्या अनिरुद्धाला पाहून हर्षमुखी होऊन, ती इतर पुरुषांनीं पाहण्याससुद्धां अशक्य अशा आपल्या गृहामध्यें—त्याच्यासहवर्तमान क्रीडा करूं लागली ॥ २४ ॥ नित्य जिचा स्नेह वृद्धिंगत होत आहे त्या ऊषेनें, त्याला कन्यापुरामध्यें गुप्त राखून अमोलिक वस्त्रें, माळा, सुगंधी उट्या, धूप, दीप, आसनें, सरबतांचीं पानें, पक्वान्नाचीं भोजनें व अनेक

॥ २१ ॥ २२ ॥ शोणितपुरं नीत्वा ॥ २३ ॥ पुंभिर्दुष्प्रेक्ष्ये प्रेक्षितुमशक्ये ॥ २४ ॥ स च परार्ध्यैरमूल्यैर्वासःस्रगादिभिः शुश्रूषणपूर्वकमर्चितः सन् ॥ २५ ॥ तया ऊषया-

अनिरुद्धं विलिखितं वीक्ष्योषा वाङ्मुखी ह्रिया ॥ सोऽसावसाविति प्राह स्मयमाना महीपते ॥ २१ ॥ चित्रलेखा तमाज्ञाय पौत्रं कृष्णस्य योगिनी ॥ ययौ विहायसा राजन्द्वारकां कृष्णपालिताम् ॥ २२ ॥ तत्र सुप्तं सुपर्यंके प्राद्युम्निं योगमास्थिता ॥ गृहीत्वा शोणितपुरं सख्यै प्रियमदर्शयत् ॥ २३ ॥ सा च तं सुंदरवरं विलोक्य मुदितानना ॥ दुष्प्रेक्ष्ये स्वगृहे पुंभी रेमे प्राद्युम्निना समम् ॥ २४ ॥ परार्ध्यवासःस्रग्गंधधूपदीपासनादिभिः ॥ पानभोजनभक्ष्यैश्च वाक्यैः शुश्रूषयाऽर्चितः ॥ २५ ॥ गूढः कन्यापुरे शश्वत्प्रवृद्धस्नेहया तया ॥ नाहर्गणान्स बुबुधे ऊषयाऽपहृतेंद्रियः ॥ २६ ॥ तां तथा यदुवीरेण भुज्यमानां हतव्रताम् ॥ हेतुभिर्लक्षयांचक्रुराप्रीतां दुरवच्छदैः ॥ २७ ॥ भटा आवेदयांचक्रू राजंस्ते दुहितुर्वयम् ॥ विचेष्टितं लक्षयामः कन्यायाः कुलदूषणम् ॥ २८ ॥ अनपायिभिरस्माभिर्गुप्तायाश्च गृहे प्रभो ॥ कन्याया दूषणं पुंभिर्दुष्प्रेक्षाया न विद्महे ॥ २९ ॥ ततः प्रव्यथितो बाणो दुहितुः श्रुतदूषणः ॥ त्वरितः कन्यकागारं प्राप्तोऽद्राक्षीद्यदूद्वहम्॥ ३० ॥

ऽपहृतेंद्रियोऽहर्गणान् दिनसमूहान्न बुबुधे ॥ २६ ॥ आप्रीतामतिहृष्टाम् । दुरवच्छदैश्छादयितुमशक्यैः ॥ २७ ॥ विचेष्टितं विरुद्धाचरणम् ॥ २८ ॥ अनपायिभिः अपायोऽपसर्पणं प्रमादो वा तद्रहितैः । पाठांतरे दुष्टा प्रेष्या सखी यस्यास्तस्याः पुंभिर्दूषणं कुतो वेति न जानीम इत्यर्थः ॥ २९ ॥ ३० ॥

प्रकारचीं भक्ष्यें समर्पण करून मधुर भाषणपूर्वक शुश्रूषेनें त्याचा सत्कार केला असतां मोहितचित्त झालेल्या त्या अनिरुद्धानें आपले पुष्कळ दिवस निघून गेले हें मुळींच जाणिलें नाहीं ॥ २५ ॥ २६ ॥ असो; अनिरुद्धानें तशाप्रकारें गुप्तपणानें भोगिलेल्या, अत्यंत हर्षित असलेल्या व आच्छादन करण्यास अशक्य अशा गर्भधारण्यादिक हेतूंनीं पुरुषसंपर्कसाहित्यरूप कन्याव्रत नष्ट झालेल्या त्या ऊषेला, द्वारपालांनीं पाहिलें ॥ २७ ॥ आणि त्यांनीं तें वर्तमान बाणासुर राजाला कळविलें. तें असें कीं, हेराजा, विवाह न झालेल्या तुझ्या कन्येचें कुळाला दूषण लावणारें परपुरुषसंबंधरूप विरुद्ध आचरण आमच्या पाहण्यांत येत आहे ॥ २८ ॥ हे प्रभो, दुसरेठिकाणीं कोठेंहि न जातां सावधान असणाऱ्या आह्मीं घरामध्यें रक्षण केलेल्या व परपुरुषांनीं अवलोकन करण्याससुद्धां अशक्य अशाहि तुझ्या कन्येचें त्या परपुरुषांकडून दूषण कसें झालें तें आह्मी जाणत नाहीं ॥ २९ ॥ नंतर कन्येचें दूषण झालें हें वर्तमान श्रवण करून फार दुःखित झालेला तो बाणासुर, त्या स्थानापासून

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्वरेनें कन्येच्या घरीं प्राप्त होऊन तेथें त्यानें अनिरुद्धाला अवलोकन केलें ॥ ३० ॥ तो-कामावताररूपी प्रद्युम्नाचा पुत्र सर्व भुवनांमध्यें एकच सुंदर, श्यामवर्ण, पीतांबर नेसलेला, कमलनयन, बलाढ्य असलेल्या बाहूंनीं युक्त, कुंडलांच्या व कुरळ केंसांच्या कांतीनें व मंदहास्यसहित अवलोकनानें ज्याचें मुख शोभत आहे असा, सौभाग्य चिन्हें व बहुमूल्य अलंकारवगैरे धारण करून सर्वप्रकारें प्रकाश पावणाऱ्या त्या आवडत्या ऊषेसहवर्तमान क्रीडा करणारा, अंगसंगाचे वेळीं तिच्या स्तनसंबंधी केशर लागलेली बटमोगरीच्या फुलांची मोठी माळ वक्षस्थळावर धारण करणारा आणि तिच्या समोर बसलेला अशा त्या अनिरुद्धाला पाहून तो बाणासुर विस्मित झाला ॥ ३१ ॥ ३२ ॥ तेव्हां शस्त्रें उचलून धारण करणाऱ्या वीरांनीं परिवेष्टित अशा आपल्याजवळ प्रवेश करणाऱ्या त्या बाणासुराला अवलोकन करून, त्या अनिरुद्धानें, लोखंडाचा एक मोठा परिघ घेऊन मारण्याच्या इच्छेनें, तो जसा दंड धारण करणारा यम उभा राहतो त्याप्रमाणें त्याच्या अग्रभागीं उभा राहिला ॥ ३३ ॥ आणि धर-

---

कामस्यात्मनो देहाज्जातम् ॥ ३१ ॥ अभिनृम्णया सर्वमंगलया तस्पा अंगसंगेन स्तनकुंकुमं यस्यां स्रजि तां बाह्वोर्मध्ये वक्षसि दधानम् । मधुमल्लिका वसंतभवा मल्लिकास्तदाश्रिताम् । तस्याग्र इत्यार्षः संधिः । तस्या अग्र इत्यर्थः ॥ ३२ ॥ आततायिभिरुद्यतशस्त्रैः । माधवोऽनिरुद्धः । मौर्वं मुरुर्लोहविशेषस्तन्निर्मितम् ॥ ३३ ॥ ३४ ॥ शोक-

कामात्मजं तं भुवनैकसुंदरं श्यामं पिशंगांबरमंबुजेक्षणम् ॥ बृहद्भुजं कुंडलकुंतलत्विषा स्मितावलोकेन च मंडिताननम् ॥ ३१ ॥
दीव्यंतमक्षैः प्रिययाऽभिनृम्णया तदंगसंगस्तनकुंकुमस्रजम् ॥ बाह्वोर्दधानं मधुमल्लिकाश्रितां तस्याग्र आसीनमवेक्ष्य विस्मितः
॥ ३२ ॥ स तं प्रविष्टं वृतमाततायिभिर्भटैरनीकैरवलोक्य माधवः ॥ उद्यम्य मौर्वं परिघं व्यवस्थितो यथांतको दंडधरो जिघांस-
या ॥ ३३ ॥ जिघृक्षया तान्परितः प्रसर्पतः शुनो यथा सूकरयूथपोऽहनत् ॥ ते हन्यमाना भवनाद्विनिर्गता निर्भिन्नमूर्धोरुभुजाः
प्रदुद्रुवुः ॥ ३४ ॥ तं नागपाशैर्बलिनंदनो बली घ्नंतं स्वसैन्यं कुपितो बबंध ह ॥ ऊषा भृशं शोकविषादविह्वला बद्धं निशम्या-
श्रुकलाक्ष्यरौदिषीत् ॥ ३५ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे अनिरुद्धबंधो नाम द्विषष्टितमोऽध्यायः ॥ ६२ ॥
श्रीशुक उवाच ॥ अपश्यतां चानिरुद्धं तद्बंधूनां च भारत ॥ चत्वारो वार्षिका मासा व्यतीयुरनुशोचताम् ॥ १ ॥

विषादाभ्यां विह्वला अवशा । अश्रूणां कला बिंदवो ययोस्ते अक्षिणी यस्याः सा ॥ ३५ ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधे उत्तरार्धे टीकायां द्विषष्टितमोऽध्यायः ॥ ६२ ॥ ॥ त्रियुक्षष्टितमे चाथ बाणयादवसंगरे ॥ स्तुतिर्ज्वरेण रुद्रेण बाणबाहुभिदो हरेः ॥ १ ॥ १ ॥

ण्याच्या इच्छेनें आपल्या सभोंवार येणाऱ्या त्या शस्त्रपाणी वीरांना, जसा डुकरांचा राजा, आपणास धरावयास येणाऱ्या कुतऱ्यांना मारितो त्याप्रमाणें ताडण करूं लागला. तेव्हां ताडित झालेले व मस्तकें, मांड्या व बाहु फुटून गेलेले ते वीर, त्या घरांतून बाहेर पडून जीव घेऊन पळून गेले ॥ ३४ ॥ तेव्हां कुपित झालेल्या त्या महाबळी बाणासुरानें, आपलें सैन्य मारणाऱ्या त्या अनिरुद्धाला नागपाशांच्या योगेंकरून बांधून ठेविलें, तेव्हां बद्ध झालेल्या अनिरुद्धाला पाहून शोक व खेद यांच्या योगानें विव्हळ झालेली ऊषा, जिच्या डोळ्यांत दुःखाश्रु प्राप्त झाले आहेत अशी होऊन रुदन करूं लागली ॥ ३५ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील उत्तरार्धामध्यें अनिरुद्धबंधकथनरूप हा बासष्टावा अध्याय समाप्त झाला ॥ ६२ ॥ ॥ आतां ह्या त्रेसष्टाव्या अध्यायामध्यें बाणासुर व यादव यांच्या युद्धामध्यें बाणासुराच्या बाहूंचें छेदन करणाऱ्या श्रीकृष्णाची ज्वरानें व श्रीरुद्रानें स्तुति केली अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य म्हणाला—हे राजा, इकडे द्वारकेमध्यें अनिरुद्धाला न पाहणाऱ्या व निरंतर

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याचा शोक करणाऱ्या त्याच्या बांधवांचे (यादवांचे) आषाढ, श्रावण, भाद्रपद व आश्विन हे चार महिने निघून गेले ॥ १ ॥ नंतर, नारदापासून, बाणासुरानें बद्ध केलेल्या त्या अनिरुद्धाची वार्ता, व त्याचें युद्धादिरूप कर्म (चित्रलेखेनें त्यास शोणितपुरांत नेलें, त्याणें ऊषेबरोबर क्रीडा केली, ऊषा गर्भिणी आहे इत्यादिक), श्रवण करून, त्याला सोडवून आणण्याकरितां, राम व कृष्ण हे ज्यांत पुरःसर आहेत व कृष्णच ज्यांची देवता आहे असे प्रद्युम्न, युयुधान, गद, सांब, सारण, नंद, उपनंद व भद्र इत्यादिक यादव, बारा अक्षौहिणी सैन्य बरोबर घेऊन शोणितनामक नगराप्रत निघून गेले. आणि त्या यादवश्रेष्ठांनीं बाहेरून सर्व दिशांकडून त्या बाणासुराच्या नगराला वेढा घातला ॥ २ ॥ ३ ॥ ४ ॥ तेव्हां, शत्रूंनीं मोडून टाकलेल्या आरामबागांनीं व फोडून टाकलेल्या बुरुजांनीं, उप्परमाड्यांनीं व गोपुरांनीं विध्वस्त झालेलें तें आपलें नगर अवलोकन करून, क्रोधानें व्याप्त झालेला बाणासुर, बाराच अक्षौहिणी सैन्य घेऊन युद्ध करण्याकरितां नगरांतून बाहेर निघाला ॥ ५ ॥ बाणासुराच्या साहाय्याकरितां

कर्म च युद्धादिकम् ॥ २ ॥ रामकृष्णानुवर्तिन इति । तौ पुरतो निर्गताविर्त्यर्थः ॥ ३ ॥ सर्वतोदिशमित्यस्योत्तरेणान्वयः ॥ ४ ॥ भज्यमानानि पुरोद्यानादीनि । द्वंद्वै-

नारदात्तदुपाकर्ण्य वार्तां बद्धस्य कर्म च ॥ प्रययुः शोणितपुरं वृष्णयः कृष्णदेवताः ॥ २ ॥ प्रद्युम्नो युयुधानश्च गदः सांबोऽथ सारणः ॥ नंदोपनंदभद्राद्या रामकृष्णानुवर्तिनः ॥ ३ ॥ अक्षौहिणीभिर्द्वादशभिः समेताः सर्वतो दिशम् ॥ रुरुधुर्बाणनगरं समंतात्सात्वतर्षभाः ॥ ४ ॥ भज्यमानपुरोद्यानप्राकाराट्टालगोपुरम् ॥ प्रेक्षमाणो रुषाविष्टस्तुल्यसैन्योऽभिनिर्ययौ ॥ ५ ॥ बाणार्थे भगवान् रुद्रः ससुतैः प्रमथैर्वृतः ॥ आरुह्य नंदिवृषभं युयुधे रामकृष्णयोः ॥ ६ ॥ आसीत्सुतुमुलं युद्धमद्भुतं रोमहर्षणम् ॥ कृष्णशंकरयो राजन्प्रद्युम्नगुहयोरपि ॥ ७ ॥ कुंभांडकूपकर्णाभ्यां बलेन सह संयुगः ॥ सांबस्य बाणपुत्रेण बाणेन सहसात्यकेः ॥ ८ ॥ ब्रह्मादयः सुराधीशा मुनयः सिद्धचारणाः ॥ गंधर्वाप्सरसो यक्षा विमानैर्द्रष्टुमागमन् ॥ ९ ॥ शंकरानुचरान् शौरिर्भूतप्रमथगुह्यकान् ॥ डाकिनीर्यातुधानांश्च वेतालान्सविनायकान् ॥ १० ॥ प्रेतमातृपिशाचांश्च कूश्मांडान्ब्रह्मराक्षसान् ॥ द्रावयामास तीक्ष्णाग्रैः शरैः शार्ङ्गधनुश्च्युतैः ॥ ११ ॥ पृथग्विधानि प्रायुंक्त पिनाक्यस्त्राणि शार्ङ्गिणे ॥ प्रत्यस्त्रैः शमयामास शार्ङ्गपाणिरविस्मितः ॥ १२ ॥

कवद्वावः । अट्टालाः प्राकारादुपरितनान्युन्नतस्थानानि । अभिनिर्ययौ बाणः ॥ ५ ॥ सुतः स्कंदस्तत्सहितैः प्रमथैर्गणैः । रामकृष्णाभ्यां युयुधे ॥ ६ ॥ ७ ॥ ॥ ८ ॥ ९ ॥ १० ॥ ११ ॥ १२ ॥

स्कंदादिक पुत्रांसहित व प्रमथादि गणासहित भगवान् रुद्र, नंदिकेश्वरावर बसून रामकृष्णाबरोबर युद्ध करूं लागला ॥ ६ ॥ त्यावेळीं कृष्णाचें व शंकराचें आश्चर्यकारक, पाहणारांच्या अंगावर रोमांच उठविणारें व निरंतर शस्त्रपात होत असलेलें तुमुल युद्ध झालें. तसेंच प्रद्युम्न आणि स्कंद यांचें झालें. कुभांड आणि कूपकर्ण या बाणासुराच्या दोन प्रधानांचें बळरामाबरोबर युद्ध झालें, सांबाचें बाणपुत्राबरोबर आणि सात्यकीचें बाणासुराबरोबर युद्ध झालें ॥ ७ ॥ ८ ॥ त्यावेळीं देवांचे अधिपति ब्रह्मादिक, ऋषि, सिद्ध, चारण, गंधर्व, अप्सरा व यक्ष हे सर्वेहि विमानांत बसून तें युद्ध पाहण्याकरितां प्राप्त झाले ॥ ९ ॥ तेव्हां, श्रीकृष्णानें शार्ङ्गधनुष्यापासून सोडलेल्या तीक्ष्ण अग्रांच्या बाणांनीं, भूत, प्रमथ, गुह्यक, डाकिनी, राक्षस, वेताळ, विनायक, प्रेतगण, मातृगण, पिशाच, कूश्मांड आणि ब्रह्मराक्षस या नांवांच्या शंकराच्या सेवकगणांस पळवून लाविलें ॥ १० ॥ ११ ॥ तेव्हां पिनाकपाणि शंकरानें, शार्ङ्गपाणि श्रीकृष्णावर नानाप्रकारचीं अस्त्रें सोडिलीं असतां, विस्मयरहित अशा त्या श्रीकृष्णानें त्या अस्त्रांचें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

उलट अस्त्रांनीं उपशमन केलें ॥ १२ ॥ तें असें कीं-ब्रह्मास्त्रावर ब्रह्मास्त्र, वायव्यास्त्रावर पर्वतास्त्र, अग्न्यस्त्रावर पर्जन्यास्त्र आणि पाशुपतास्त्रावर नारायणास्त्र सोडिलें ॥ १३ ॥ नंतर श्रीकृष्णानें जृंभणास्त्र सोडून शंकराला जांभया देत बसण्याजोगें मोहित करून, खड्ग, गदा आणि बाण यांच्या योगानें बाणासुराच्या सेनेचा संहार केला ॥ १४ ॥ इकडे स्कंद (षडानन), प्रद्युम्नाच्या बाणसमूहांनीं चोहोंकडून पीडित झाला असतां, आपल्या करचरणादिक अवयवांपासून रक्तस्राव करीत मयूरवाहनाच्या योगानें युद्धस्थानापासून पळून गेला ॥ १५ ॥ बळरामाच्या मुसळानें ताडण केलेले कुंभांड आणि कूपकर्ण हे दोघेहि प्रधान मरण पावले, तेव्हां हतनाथ झालेलीं त्यांचीं सैन्यें सर्व बाजूंकडे पळूं लागलीं ॥ १६ ॥ याप्रमाणें आपलें सैन्य जिकडेतिकडे पळत सुटलें आहे असें पाहून अतिक्रुद्ध झालेला बाणासुर, समरांगणांत आपल्या बरोबर युद्ध करणाऱ्या सात्यकीचा त्याग करून, श्रीकृ-

---

प्रत्यस्त्राण्येवाह । ब्रह्मास्त्रस्येति । नैजं नारायणास्त्रम् ॥ १३ ॥ १४ ॥ शिखिना मयूरेण वाहनेन ॥ १५ ॥ तयोरनीकानि । हतौ नाथौ येषां तानि ॥ १६ ॥ १७ ॥ १८ ॥

ब्रह्मास्त्रस्य च ब्रह्मास्त्रं वायव्यस्य च पार्वतम् ॥ आग्नेयस्य च पार्जन्यं नैजं पाशुपतस्य च ॥ १३ ॥ मोहयित्वा तु गिरिशं जृंभणास्त्रेण जृंभितम् ॥ बाणस्य पृतनां शौरिर्जघानासिगदेषुभिः ॥ १४ ॥ स्कंदः प्रद्युम्नबाणौघैरर्द्यमानः समंततः ॥ असृग्विमुंचन्गात्रेभ्यः शिखिनाऽपाक्रमद्रणात् ॥ १५ ॥ कुंभांडः कूपकर्णश्च पेततुर्मुसलार्दितौ ॥ दुद्रुवुस्तदनीकानि हतनाथानि सर्वतः ॥ १६ ॥ विशीर्यमाणं स्वबलं दृष्ट्वा बाणोऽत्यमर्षणः ॥ कृष्णमभ्यद्रवत्संख्ये रथी हित्वैव सात्यकिम् ॥ १७ ॥ धनूंष्याकृष्य युगपद्बाणः पंचशतानि वै ॥ एकैकस्मिन् शरौ द्वौ द्वौ संदधे रणदुर्मदः ॥ १८ ॥ तानि चिच्छेद भगवान्धनूंषि युगपद्धरिः ॥ सारथिं रथमश्वांश्च हत्वा शंखमपूरयत् ॥ १९ ॥ तन्माता कोटरा नाम नग्ना मुक्तशिरोरुहा ॥ पुरोऽवतस्थे कृष्णस्य पुत्रप्राणरिरक्षया ॥ २० ॥ ततस्तिर्यङ्मुखो नग्नामनिरीक्षन्गदाग्रजः ॥ बाणश्च तावद्विरथश्छिन्नधन्वाऽविशत्पुरम् ॥ २१ ॥ विद्राविते भूतगणे ज्वरस्तु त्रिशिरास्त्रिपात् ॥ अभ्यधावत दाशार्हं दहन्निव दिशो दश ॥ २२ ॥

॥ १९ ॥ २० ॥ अनिरीक्षमाणस्तिर्यङ्मुखो बभूवेति ॥ २१ ॥ ज्वरस्तु योद्धुमभ्यधावदिति ॥ २२ ॥

ष्णाच्या अंगावर धावून गेला ॥ १७ ॥ आणि युद्धामध्यें अतिगर्विष्ठ अशा त्या बाणासुरानें, एकदम आपल्या पांचशें हातांनीं पांचशें धनुष्यें घेऊन, दुसऱ्या पांचशें हातांनीं प्रत्येक धनुष्यास दोन दोन याप्रमाणें हजार बाणांचें संधान केलें ॥ १८ ॥ ते बाण सोडण्याच्या पूर्वींच भगवान् श्रीकृष्णानें, तीं सर्व धनुष्यें तोडून टाकिलीं आणि सारथि, रथ व अश्व यांना मारून जयशंख वाजविला ॥ १९ ॥ त्यावेळीं त्या बाणासुराची कोटरानामक माता होती ती त्या पुत्राच्या प्राणाचें रक्षण करण्याच्या इच्छेनें आपले केंस मोकळे टाकून व नग्न होऊन कृष्णाच्या पुढें उभी राहिली ॥ २० ॥ तेव्हां श्रीकृष्ण त्या नग्न स्त्रीला न पाहतां तिर्यङ्मुख होऊन दुसरीकडे वळला इतक्यामध्यें विरथी झालेला व धनुष्यें तुटलेला तो बाणासुर, आपल्या शोणितनगरांत प्रविष्ट झाला ॥ २१ ॥ इकडे श्रीकृष्णानें शंकराचा भूतगण पळविला असतां, तीन मस्तकें व तीन पाय असलेला माहेश्वर ज्वर, आपल्या तापानें दहाहि दिशांना जाळीत होत्साता, युद्ध करण्याकरितां श्रीकृष्णाच्या अंगावर धांवून ॥२०१॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आला ॥ २२ ॥ नंतर नारायणदेवानें (श्रीकृष्णानें) त्याला पाहून त्याच्यावर आपला शीतज्वर सोडिला, तेव्हां माहेश्वर आणि वैष्णव असे दोघेहि ज्वर युद्ध करूं लागले ॥ २३ ॥ त्यांमध्यें वैष्णवज्वरानें बळात्कारानें पीडित केलेला महेश्वर ज्वर, मोठ्यांनीं आक्रोश करित होत्साता, श्रीकृष्णाहून दुसरें अभयस्थान मिळेना तेव्हां भयाभीत व रक्षणाची इच्छा करणारा तो (माहेश्वर ज्वर) हात जोडून श्रीकृष्णाची स्तुति करूं लागला ॥ २४ ॥ तो आपणालाच मोठा शक्तिवान् असें मानून श्रीकृष्णास ताप देण्यास प्रवृत्त झाला असतां जेव्हां आपणच ताप पावला, तेव्हां त्या कृष्णाला परमेश्वर असें जाणून स्तुति करीत ह्मणाला कीं,–ज्वर ह्मणाला –हे प्रभो, ब्रह्मादिकांचा नियंता, सर्वप्राणिमात्रांना अंतर्यामित्वेंकरून प्रकाश करणारा, शुद्ध, चैतन्यघन अशा अनंतशक्ति तुज परमेश्वराला मी नमस्कार करितों· जगाच्या उत्पत्ति-

---

श्रीनारायणः शीतज्वरमसृजत् ॥ २३ ॥ माहेश्वरः समाक्रंदन्युयुधे ॥ २४ ॥ आत्मानं परमशक्तिमंतं मन्यमानः श्रीकृष्णं तापयितुं प्रवृत्तः स्वयमेव तप्तः संस्तं परमेश्वरं ज्ञात्वा स्तुवन्नमस्करोति । नमामीति । त्वा त्वामनंतशक्तिं नमामि । कुतः । परेशं ब्रह्मादीनामीशम् । तत्र हेतुः । सर्वात्मानं सर्वस्यात्मानं चेतयितारम् । तत्कुतः । केवलं शुद्धं ज्ञप्तिमात्रं चैतन्यघनम् । तदेवं सर्वचेतयितृत्वेन परमेश्वरत्वमुक्तम् । किंच विश्वसृष्ट्यादिहेतुत्वादपीत्याह । विश्वोत्पत्तीति । नन्वेवंभूतं ब्रह्म प्रसिद्धं नाहमिति तत्राह । यत्तद्ब्रह्मेति । यद्ब्रह्म तदेव त्वमित्यर्थः । किं तद्ब्रह्मेत्यत आह । ब्रह्मलिंगं ब्रह्मणा वेदेन लिंग्यते द्योत्यत इति । तत्कुतः । प्रशांतम् । सर्वविक्रियारहितत्वान्न साक्षाद्वाच्यमिति भावः ॥ २५ ॥

अथ नारायणो देवस्तं दृष्ट्वा व्यसृजज्ज्वरम् ॥ माहेश्वरो वैष्णवश्च युयुधाते ज्वरावुभौ ॥ २३ ॥ माहेश्वरः समाक्रंदन्वैष्णवेन बला-
र्दितः ॥ अलब्ध्वाऽभयमन्यत्र भीतो माहेश्वरो ज्वरः ॥ शरणार्थी हृषीकेशं तुष्टाव प्रयतांजलिः ॥ २४ ॥ ज्वर उवाच ॥ नमामि
त्वाऽनंतशक्तिं परेशं सर्वात्मानं केवलं ज्ञप्तिमात्रम् ॥ विश्वोत्पत्तिस्थानसंरोधहेतुं यत्तद्ब्रह्म ब्रह्मलिंगं प्रशांतम् ॥ २५ ॥ कालो दैवं
कर्म जीवः स्वभावो द्रव्यं क्षेत्रं प्राण आत्मा विकारः ॥ तत्संघातो बीजरोहप्रवाहस्त्वन्मायैषा तन्निषेधं प्रपद्ये ॥ २६ ॥

किंच । यत्सविशेषं वस्तु तत्र वयं प्रभवामस्त्वयि तु सर्वविशेषातीते न कस्यापि प्रभुत्वं किंतु त्वमेव सर्वप्रभुरिति ज्ञप्तिमात्रत्वं विवृण्वन्स्तौति । काल इति । कालः क्षोभकः । कर्म निमित्तम् । तदेव फलाभिमुखमभिव्यक्तं दैवं सः । स्वभावस्तत्संस्कारः । जीवस्तद्वान् । द्रव्यं भूतसूक्ष्माणि । क्षेत्रं शरीरम् । प्राणः सूत्रम् । आत्मा अहंकारः । विकार एकादशेंद्रियाणि महाभूतानि चेति षोडशकः तत्संघातो लिंगदेहः । एतस्य च बीजरोहवत्प्रवाहः रोहोंऽकुरो देहाद्बीजरूपं कर्म ततोंऽकुररूपो देहस्ततः पुनरेवमिति प्रवाहः । एषा त्वन्माया । तस्या निषेधः अपोहो यस्मिंस्तं त्वां निषेधावधिभूतं प्रपद्ये भज इति ॥ २६ ॥

स्थितिसंहारांविषयीं कारण , व वेदानें तात्पर्यवृत्तीनें प्रकाशित केलेलें असें सर्व क्रियारहित जें ब्रह्म तें तूंच आहेस ॥ २५ ॥ आतां, जितके ह्मणून साकार पदार्थ आहेत त्यांठिकाणीं आह्मी पराक्रम चालवितों परंतु निराकार अशा तुझेठिकाणीं कोणाचेंच प्रभुत्व चालत नाहीं, तर तूंच सर्वांचा प्रभु आहेस असें स्पष्ट करीत स्तुति करितो–गुणांचा क्षोभ करणारा काळ, त्याचें निमित्त कर्म, तेंच फलाभिमुख होऊन प्रकट झालें ह्मणजे दैव, त्याचा संस्कार तो स्वभाव, त्याणें युक्त असल्यामुळें सुखदुःखांचा भोक्ता जीव, शब्दादिसूक्ष्मभूतरूपी द्रव्य, शरीर, प्राण, अहंकार, अकरा इंद्रियें व पंचमहाभूतें मिळून सोळा प्रकारचा विकार, त्या पृथिव्यादिकांचा समुदायरूप लिंग देह आणि त्या लिंगदेहाचा बीजांकुरांसारखा प्रवाह ह्मणजे जसा बीजापासून अंकुर उत्पन्न होतो व अंकुरापासून पुन्हा बीज उत्पन्न होतें त्याप्रमाणें देहापासून कर्म व कर्मापासून पुन्हा देह होतो· ही सर्वप्रकारची तुझी मायाच आहे तिचा निषेध (निरास) ज्याच्या स्वरूपीं घडतो त्या तुज परमात्म्याला मी शरण आलों आहें ॥ २६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां, मज देवकीपुत्राचा असा प्रकार कोठून घडणार असें ह्मणशील तर–सर्व उपाधींनीं रहित असाहि तूं, जशा लीलेनें स्वीकार केलेल्या मत्स्यादिक अनेक अवतारांनीं देवांचें पालन करितोस, त्याकरितां वर्णाश्रमधर्मांचें रक्षण करितोस, त्याकरितां त्या धर्मांचें आचरण करणाऱ्या साधूंचें रक्षण करितोस व त्याच्या अंगत्वेंकरून धर्ममार्गांचा त्याग करून हिंसाधर्मानें वागणाऱ्या दैत्यादिकांचा संहार करितोस. याप्रमाणेंच हाहि तुझा अवतार भूमीचा भार दूर करण्याकरितां आहे, तूं कोणाचाहि पुत्र नाहींस ॥ २७ ॥ ह्मणून अज्ञानेंकरून तुझ्या पराभवाविषयीं प्रवृत्त होऊन संताप पावलेल्या माझें तूं रक्षण कर. प्रथम थंडी वाजून येऊन नंतर दाह करणारा, भयंकर व दुःसह अशा तुझ्या शक्तिरूप ज्वरानें मी तप्त झालों आहें, यास्तव शरण आलेल्या माझें त्यापासून तूं रक्षण कर. आतां दुसऱ्याला ताप देणाऱ्या तुला तापच योग्य आहे असें ह्मणशील तर–जोंपर्यंत विषयप्राप्तीच्या आशेनें बद्ध होऊन तुझ्या चरणमूलाची सेवा करीत नाहींत तोंपर्यंतच त्या प्राण्यांना ताप होणें योग्य आहे. तुझ्या सेवेविषयीं प्रवृत्त झाले-

ननु देवकीतनयस्य मे कथमेवंभूतत्वं तत्राह । नानाभावैरिति । सर्वोपाधिविनिर्मुक्त एव त्वं यथा लीलया स्वीकृतैर्मत्स्याद्यवतारैर्देवान् बिभर्षि पालयसि । तदर्थं लोकसेतून्वर्णाश्रमधर्मान् । तदर्थं तदनुष्ठातॄन्साधून् तदंगत्वेनोन्मार्गान् दैत्यादीन्हंसि संहरति । एवमेतदपि तव जन्म भूमेर्भारहरणाय । लीलावतारोऽयं न कस्यापि त्वं तनय इत्यर्थः

नानाभावैर्लीलयैवोपपन्नैर्देवान्साधूँल्लोकसेतून्बिभर्षि ॥ हंस्युन्मार्गान्हिंसया वर्तमानान् जन्मैतत्ते भारहाराय भूमेः ॥ २७ ॥ तप्तोऽहं ते तेजसा दुःसहेन शांतोग्रेणात्युल्बणेन ज्वरेण ॥ तावत्तापो देहिनां तेंऽघ्रिमूलं नो सेवेरन्यावदाशानुबद्धाः ॥ २८॥ श्रीभगवानुवाच ॥ त्रिशिरस्ते प्रसन्नोऽस्मि व्येतु ते मज्ज्वराद्भयम् ॥ यो नौ स्मरति संवादं तस्य त्वन्न भवेद्भयम् ॥ २९ ॥ इत्युक्तोऽच्युतमानम्य गतो माहेश्वरो ज्वरः ॥ बाणस्तु रथमारूढः प्रागाद्योत्स्यन् जनार्दनम् ॥ ३० ॥ ततो बाहुसहस्रेण नानायुधधरोऽसुरः ॥ मुमोच परमक्रुद्धो बाणांश्चक्रायुधे नृप ॥ ३१ ॥ तस्यास्यतोऽस्त्राण्यसकृच्चक्रेण क्षुरनेमिना ॥ चिच्छेद भगवान्बाहून् शाखा इव वनस्पतेः ॥ ३२ ॥ बाहुषु छिद्यमानेषु बाणस्य भगवान्भवः ॥ भक्तानुकंप्युपव्रज्य चक्रायुधमभाषत ॥ ३३ ॥

॥ २७ ॥ अतोऽज्ञानतस्त्वदभिभवे प्रवृत्तं मां तप्तं रक्षेत्याशयेनाह । तप्तोऽहमिति । ते तेजसा त्वत्सृष्टेन ज्वरेण शांतोग्रेण शीतज्वरेण । परसंतापकस्य युक्त एव ताप इति चेदत आह । तावदिति । सेवायां प्रवृत्तानामनुचित इति भावः ॥ २८ ॥ हे त्रिशिरः । व्येतु अपयातु । मदाज्ञापालकः सन्सुखं विचर । काऽसावाज्ञा तामाह । य इति । नौ आवयोरिमं संवादं यः स्मरेत्तस्य त्वत् त्वत्तो न भयं भवेत् । त्वया भयं नोत्पादनीयमित्यर्थः ॥ २९ ॥ ३० ॥ ३१ ॥ ३२ ॥ ३३ ॥

ल्यांना तो ताप योग्य नाहीं ॥ २८ ॥ श्रीभगवान् ह्मणाला– हे त्रिशिरा, तुला मी प्रसन्न झालों आहें, ह्मणून माझ्या ज्वरापासून तुला प्राप्त झालेलें भय नाहींसे होवो. जो पुरुष, तुझ्या व माझ्या या संवादाचें स्मरण करील त्याला तुजपासून भय प्राप्त होऊं नये ॥ २९ ॥ याप्रमाणें श्रीकृष्णानें सांगितलें असतां, तो माहेश्वर ज्वर, श्रीकृष्णाला नमस्कार करून तेथून निघून गेला. इकडे बाणासुरहि रथावर बसून युद्ध करण्याकरितां श्रीकृष्णाच्या अंगावर चालून गेला ॥ ३० ॥ तदनंतर हे राजा, परम क्रुद्ध होऊन हजार बाहूंनीं नानाप्रकारचीं आयुधें धारण करणारा तो बाणासुर, चक्र आयुध धारण करणाऱ्या श्रीकृष्णावर बाण सोडूं लागला ॥ ३१ ॥ तेव्हां वारंवार अस्त्रांचा प्रयोग करणाऱ्या त्याचे बाहु, श्रीकृष्ण भगवंतानें तीक्ष्णधारेच्या चक्रानें, जशा वृक्षाच्या शाखा तोडून टाकितात त्याप्रमाणें तोडून टाकिले ॥ ३२ ॥ याप्रमाणें बाणासुराचे बाहु तोडून टाकिले असतां, भक्तांवर दया करणारा भगवान् शंकर, पुढें होऊन चक्र धारण करणाऱ्या त्या श्रीकृष्णास, असें ह्मणाला कीं,–॥ ३३ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रीरुद्र म्हणाला–हे श्रीकृष्णा, तुला न जाणतां हा तुझ्यावरोबर युद्ध करितो हें कांहीं आश्चर्य नाहीं. कारण, जें शब्दरूप वेदामध्यें, वाणीला अगोचर म्हणून प्रतिपादन केलेलें व सूर्यादिकांचेंहि प्रकाशक असें ब्रह्म तेंच तूं आहेस. ज्या तुला शुद्धचित्त झालेले पुरुष, आकाशासारखा व्यापून राहिलेला व सर्वदोषरहित आहेस असें पाहतात ॥ ३४ ॥ आतां, निर्गुण अशा तुझें ज्ञान तर राहूं दे, परंतु तूं लीलेनें स्वीकारलेल्या ह्या ब्रह्मांडदेहाचेंहि ज्ञान होत नाहीं, असें सांगण्याकरितां विराट्स्वरूपानें स्तुति करितो–ज्या तुझी नाभि आकाश आहे, मुख अग्नि आहे, रेत उदक आहे, मस्तक स्वर्ग आहे, कर्ण दिशा आहेत, चरण भूमि आहे, मन चंद्र आहे, दृष्टि सूर्य आहे, अहंकार मी

भक्तरक्षणार्थं श्रीरुद्रो भगवंतं स्तौति । त्वं हीति । अयमर्थः । त्वामज्ञात्वाऽयं युद्ध्यत इति न चित्रम् । यतस्त्वं वाङ्मये ब्रह्मण्यपि गूढं ब्रह्म अभिधाऽविषयत्वात् । कुतः । परं ज्योतिः ज्योतिषामपि प्रकाशकत्वादविषय इत्यर्थः । कथं तर्हि प्रतीतिरत आह । यमिति । अमलात्मनां स्वतः प्रकाशस इत्यर्थः ॥ ३४ ॥ आस्तां तावन्निर्गुणस्य तव ज्ञानं लीलयाऽधिष्ठितस्त्वया यो विराड्विग्रहः सोऽपि न ज्ञायते उदुंबरफलांतर्वर्तिमशकैरिवोदुंबरफलमित्याशयेन विराड्रूपेण स्तौति द्वाभ्याम् । नाभिरिति । यस्य नभआदयो नाभ्याद्यवयवाः स भवान् लोककल्पः पुरुष इत्युत्तरेणान्वयः । नभो यस्य नाभिः । अग्निर्मुखम् । अंबु रेतः । द्यौः शीर्षम् । आशा दिशः । श्रुतिः श्रवणेंद्रियम् । उर्वी अंघ्रिः । चंद्रो

श्रीरुद्र उवाच ॥ त्वं हि ब्रह्म परं ज्योतिर्गूढं ब्रह्मणि वाङ्मये ॥ यं पश्यंत्यमलात्मान आकाशमिव केवलम् ॥ ३४ ॥ नाभिर्नभोऽग्निर्मुखमंबु रेतो द्यौः शीर्षमाशाः श्रुतिरंघ्रिरुर्वी ॥ चंद्रो मनो यस्य दृगर्क आत्मा अहं समुद्रो जठरं भुजेंद्रः ॥ ३५ ॥ रोमाणि यस्यौषधयोऽबुवाहाः केशा विरिंचो धिषणा विसर्गः ॥ प्रजापतिर्हृदयं यस्य धर्मः स वै भवान्पुरुषो लोककल्पः ॥ ३६ ॥ तवावतारोऽयमकुंठधामन्धर्मस्य गुप्त्यै जगतो भवाय ॥ वयं च सर्वे भवताऽनुभाविता विभावयामो भुवनानि सप्त ॥ ३७ ॥ त्वमेक आद्यः पुरुषोऽद्वितीयस्तुर्यः स्वदृग्घेतुरहेतुरीशः ॥ प्रतीयसेऽथापि यथा विकारं स्वमायया सर्वगुणप्रसिद्ध्यै ॥ ३८ ॥

मनः । अर्को दृक् । अहं शिव आत्मा अहंकारः । समुद्रो जठरम् । इंद्रो भुजा बाहुः । इंद्रादयो लोकपाला बाहव इत्यर्थः ॥ ३५ ॥ ओषधयो रोमाणि । यच्छब्दावृत्तिः स्पष्टार्था । अंबुवाहाः केशाः । विरिंचो धिषणा बुद्धिः । प्रजापतिर्विसर्गो मेढ्रम् । धर्मो हृदयम् । लोकैः कल्प्यतेऽवकल्प्यत इति लोककल्पः ॥ ३६ ॥ ननु तत्त्वतः प्रादेशिकशरीरस्य कथं नभो नाभित्वादीत्यत आह । तवेति । हे अकुंठधामन्नप्रच्युतस्वरूप । भवायाभ्युदयाय । न केवलमेतावत्किंत्वस्मदनुग्रहार्थमपीत्याह । वयं चेति । सर्वे लोकपालास्त्वया पालिताः सप्तापि भुवनानि पालयाम इति ॥ ३७ ॥ ननु यदि विभावयितारो यूयं विभाव्यानि च भुवनानि संति तर्हि कथमुक्तं त्वं हि ब्रह्मेति नहि ब्रह्मत्वे मम

शिव आहें, पोट समुद्र आहेत, बाहु इंद्र आहे ॥ ३५ ॥ ज्याचीं रोमें ओषधि आहेत, केंस मेघ आहेत, बुद्धि ब्रह्मदेव आहे, शिश्न प्रजापति आहे व ज्याचें हृदय धर्म आहे. तो तूं सर्वलोकांनीं प्रतिपादन केलेला विराड्रूपी आहेस ॥ ३६ ॥ आतां सातवितीं देह असलेल्या माझे नाभिवगैरे अवयव आकाशादिरूपी कसे होतील ? असें म्हणशील तर सांगतों–हे अप्रच्युतस्वरूपा, हा तुझा श्रीकृष्णावतार, धर्मांच्या रक्षणाकरितां, जगाच्या अभ्युदयाकरितां व आमच्यावरहि अनुग्रह करण्याकरितां झाला आहे. कारण, आम्ही सर्वहि लोकपाळ, तूं आमचें रक्षण केलेंस तरच भूलोकादिक भुवनांचें रक्षण करितों, नाहींतर आम्ही स्वतंत्र नाहीं ॥ ३७ ॥ स्वतंत्र ईश्वर तर तूंच आहेस. कारण, तूंच एक जाग्रत्स्वप्नसुषुप्तिरूप तीन अवस्थांनीं युक्त असलेल्या जीवांचा प्रकृतिभूत पुरुष, शुद्ध, स्वप्रकाशज्ञानरूप, अद्वितीय, सर्वांचें कारण व वस्तुतः कारणरहित,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हित असा ईश्वर आहेस. तथापि सर्वविषयांचा प्रकाश होण्याकरितां आपल्या मायेनें देवतिर्यक्मनुष्यादिस्वरूपेंकरून प्रतीतीला येतोस ॥ ३८ ॥ तर मग मी संसारी आहें असें ह्मणतोस काय ? नाहीं नाहीं, तर–हे व्यापका, जसा सूर्य आपल्या मेघरूप छायेनें लोकदृष्टीनें आच्छादित झाल्यासारखा दिसतो परंतु तो त्या मेघाला व मेघाच्या आड असलेल्या घटादिपदार्थांना प्रकाशित करितो. याप्रमाणें जीवांना आवरण करणाऱ्या कार्यरूप अहंकारानें जीवांच्या दृष्टीनें आच्छादित असल्यासारखा दिसणाराहि तूं, स्वप्रकाश असल्यामुळें त्या देहेंद्रियादिक गुणांना व त्यांनीं युक्त असलेल्या जीवांना प्रकाशित करितोस ॥ ३९ ॥ ज्या तुझ्या मायेनें मोहितबुद्धि झालेले पुरुष,

---

सजातीयविजातीयभेदः संभवतीत्यत आह । त्वमिति । एकः सजातीयभेदरहितः । कुतः । आद्यः पुरुषः पुरुषाणामवस्थात्रयवतामाद्यः प्रकृतिभूतः पुरुषः । कुतः । तुरीयः शुद्ध इत्यर्थः । तदपि कुतः । स्वदृक् स्वप्रकाशज्ञानरूपः । शुद्धादेव उपाधियोगाज्जीवा जायंते । यथाऽग्नेः क्षुद्रा विस्फुलिंगा व्युच्चरंत्येवमेवास्मादात्मनः सर्व एव आत्मानो व्युच्चरंतीति श्रुतेः । अतः सजातीयरहितः किंच अद्वितीयो विजातीयरहितोऽपि । कुतः । हेतुः सर्वस्य तथा स्वयं हेतुरहितश्चेति । कथं तर्हि प्रतिशरीरं जीवभेदः प्रतीयतेऽत आह । प्रतीयस इति । सर्वगुणप्रसिद्ध्यै सर्वविषयप्रकाशनाय ॥ ३८ ॥ तर्हि किमहमेवं संसारीत्युच्यते नहिनहीति सदृष्टांतमाह । यथैवेति । हे भूमन्स्वया छायया मेघलक्षणया परदृष्ट्या पिहितश्छादितोऽपि सूर्यश्छायां मेघं च रूपाणि च मेघांतरितान्घटादीनपि संचकास्ति प्रकाशयति एवं गुणेनाहंकारेण स्वकार्येण जीवावरकेण तद्दृष्ट्या पिहितोऽपि

यथैव सूर्यः पिहितश्छायया स्वया छायां च रूपाणि च संचकास्ति ॥ एवं गुणेनापिहितो गुणांस्त्वमात्मप्रदीपो गुणिनश्च भूमन् ॥ ३९ ॥ यन्मायामोहितधियः पुत्रदारगृहादिषु ॥ उन्मज्जंति निमज्जंति प्रसक्ता वृजिनार्णवे ॥ ४० ॥ देवदत्तमिमं लब्ध्वा नृलोकमजितेंद्रियः ॥ यो नाद्रियेत त्वत्पादौ स शोच्यो ह्यात्मवंचकः ॥ ४१ ॥ यस्त्वां विसृजते मर्त्य आत्मानं प्रियमीश्वरम् ॥ विपर्ययेंद्रियार्थार्थे विषमत्त्यमृतं त्यजन् ॥ ४२ ॥ अहं ब्रह्माऽथ विबुधा मुनयश्चामलाशयाः ॥ सर्वात्मना प्रपन्नास्त्वामात्मानं प्रेष्ठमीश्वरम् ॥ ४३ ॥

गुणान्सत्वादीनुपाधीन्गुणिनश्चोपहितान् जीवानपि चकास्ति । आत्मप्रदीपः स्वप्रकाशः । अतः सर्वसाक्षिणस्तव न संसार इत्यर्थः ॥ ३९ ॥ किंच मामाश्रयस्यान्यान्मोहयतस्तव कुतः संसृतिरित्याशयेनाह । यन्मायेति । पुत्रादिषु प्रसक्ताः । वृजिनार्णवे दुःखसागरे । उन्मज्जंति देवादियोनिषु निमज्जंति स्थावरादिषु । तदुक्तं वायवीये । विपर्ययश्च भवति ब्रह्मत्वस्थावरत्वयोरिति ॥ ४० ॥ एवं जीवेश्वरव्यवस्थां निरूप्येदानीमभजंतं निंदति द्वाभ्याम् । देवेति । देवेन त्वया कर्माध्यक्षेण दत्तं नृदेहमिमं लब्ध्वापीऽति ॥ ४१ ॥ शोच्यत्वे हेतुः । यस्त्वामिति विपर्यया विपरीता अनात्माप्रियाऽनीश्वरा ये इंद्रियार्थाः पुत्रादयस्तदर्थम् ॥ ४२ ॥ अहमन्ये च शुद्धमनसस्त्वामेव प्राप्ता इत्याह । अहमिति ॥ ४३ ॥

पुत्र, स्त्री, गृह इत्यादिकांचेठिकाणीं आसक्त होऊन, दुःखसमुद्रामध्यें केव्हांतरी देवादियोनींत व केव्हांतरी स्थावरादियोनींत उत्पन्न होतात ॥ ४० ॥ यास्तव कर्माध्यक्ष अशा तूं दिलेला हा मनुष्यदेह प्राप्त झाला असतांहि, रात्रंदिवस विषयासक्त असलेला जो पुरुष, तुझ्या चरणाची सेवा करीत नाहीं, तो आपणालाच फसवून घेणारा असल्यामुळें शोक करण्यास योग्य आहे ॥ ४१ ॥ कारण, जो मनुष्य, तुझ्याहून निराळ्या पुत्रादिक विषयांकरितां, आत्मा, प्रिय व समर्थ अशा तुझा त्याग करितो (सेवा करीत नाहीं) तो जसा एखादा पुरुष अमृत टाकून विष भक्षण करितो त्याप्रमाणें समजला पाहिजे ॥ ४२ ॥ ह्मणून मी, ब्रह्मदेव, इतरदेव व शुद्धचित्त झालेले सर्व

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ऋषि, हे सर्वहि आह्मी, आपला आत्मा, अतिप्रिय व ईश्वर अशा तुला सर्वप्रकारें शरण आहों ॥ ४३ ॥ आणि संसाराचा नाश होण्याकरितां, जगताच्या उत्पत्तिस्थितिसंहारांचें कारण, सर्वठिकाणीं सम, अत्यंतशांत, समानादि भेदरहित, एक, जगाचें व जीवांचें अधिष्ठान, बुद्धिप्रवर्तक, सर्वात्मा व ईश्वर अशा तुझेंच सेवन करितों ॥ ४४ ॥ याप्रमाणें आपण भक्ति राहण्याची प्रार्थना करून, आतां आपल्या भक्ताचें (बाणासुराचेंहि) कल्याण होण्याची इच्छा करितो-हा बाणासुर माझा सेवक असल्यामुळें मला प्रिय व आवडणारा आहे, ह्मणून हे देवा, मी याला अभय दिलें आहे, यास्तव, जसा प्रल्हादाचेठिकाणीं तूं प्रसाद केला आहेस त्याप्रमाणें याच्यावरहि तूं आपला प्रसाद कर, ह्मणजे मी याला दिलेलें अभयवचन सत्य होईल ॥ ४५ ॥ याप्रमाणें प्रार्थना केली असतां, प्रसन्न झालेला श्रीभगवान् ह्मणाला-हे भगवन् (शंकरा), मला तूं

भगवतो भजनीयत्वे हेतूनवदंस्तद्भक्तिं प्रार्थयते । तं त्वेति । समत्वे हेतुः । प्रशांतमिति । सुसेव्यत्वमाह । सुहृदात्मदैवं सुहृद्बुद्धिप्रवर्तकत्वात् । आत्मा च सर्वात्मकत्वात् । एवंभूतं देवमीश्वरं त्वाम् । न चान्यो भजनीयोऽस्तीत्याह । अनन्यमेकं समानासमानजातीयरहितम् । तत्कुतः । जगतामात्मनां च केतमधिष्ठानम् ॥ ४४ ॥ स्वयं भक्तिमाशा-

तं त्वा जगत्स्थित्युदयांतहेतुं समं प्रशांतं सुहृदात्मदैवम् ॥ अनन्यमेकं जगदात्मकेतं भवापवर्गाय भजाम देवम् ॥ ४४ ॥ अयं ममेष्टो दयितोऽनुवर्ती मयाऽभयं दत्तममुष्य देव ॥ संपाद्यतां तद्भवतः प्रसादो यथा हि ते दैत्यपतौ प्रसादः ॥ ४५ ॥ श्रीभगवानुवाच ॥ यदात्थ भगवंस्त्वन्नः करवाम प्रियं तव ॥ भवतो यद्व्यवसितं तन्मे साध्वनुमोदितम् ॥ ४६ ॥ अवध्योऽयं ममाप्येष वैरोचनिसुतोऽसुरः ॥ प्रह्लादाय वरो दत्तो न वध्यो मे तवान्वयः ॥ ४७ ॥ दर्पोपशमनायास्य प्रवृक्णा बाहवो मया ॥ सूदितं च बलं भूरि यच्च भारायितं भुवः ॥ ४८ ॥ चत्वारोऽस्य भुजाः शिष्टा भविष्यंत्यजरामराः ॥ पार्षदमुख्यो भवतो न कुतश्चिद्भयोऽसुरः ॥ ४९ ॥ इति लब्ध्वाऽभयं कृष्णं प्रणम्य शिरसाऽसुरः ॥ प्राद्युम्निं रथमारोप्य सवध्वा समुपानयत् ॥ ५० ॥

स्य स्वभक्तस्याभीष्टमाशास्ते । अयमिति । दैत्यपतौ प्रह्लादे ॥ ४५ ॥ ४६ ॥ वैरोचनिर्बलिर्मद्भक्तस्तत्सुतत्वादवध्यस्तावत् । किंच । प्रह्लादायेति । अन्वयो वंशः ॥ ४७ ॥ तर्हि किमित्येवं कृतं तत्राह । दर्पोपशमनायेति ॥ ४८ ॥ अनुगृह्णाति । चत्वार इति ॥ ४९ ॥ सह वध्वा ऊषया ॥ ५० ॥

जें सांगितलेंस तें तसेंच तुझें प्रिय मी करितों. आतां बाहुच्छेदन केलें हेंहि तूं जें ' निश्चयानें माझ्यासारख्याबरोबर तुझा दर्प घालविणारें युद्ध होईल असें ' सांगितलें होतेंस त्याला मी तशा रीतीनेंच चांगलें अनुमोदन दिलें आहे. त्यांत तुझें कांहींच अनिष्ट केलें नाहीं ॥ ४६ ॥ बळिराजा, माझा भक्त असल्यामुळें त्याचा पुत्र हा असुर, मलाहि मारावयाचा नाहीं; कारण, मी प्रल्हादाला तुझ्या वंशांतील पुरुषांचा वध करणार नाहीं असा वर दिला आहे ॥ ४७ ॥ दर्प घालविण्याकरितांच याचे बाहु मी तोडिले आहेत. आणि पृथिवीला भारभूत असें जें पुष्कळ सैन्य होतें तेंहि मारून टाकिलें आहे ॥ ४८ ॥ आतां याचे चार भुज अवशिष्ट राहिले आहेत हे अजरामर होतील. तसाच हा दैत्य असूनहि ज्याअर्थीं तुला प्रिय झाला आहे, त्याअर्थीं हा तुझ्या पार्षदांमध्यें मुख्य व कोठूनहि याला भय नाहीं असा (निर्भय) होईल ॥ ४९ ॥ याप्रमाणें भगवंताच्या वचनानें अभय प्राप्त झालें असतां, त्या बाणासुरानें मस्तकानें श्रीकृष्णाला नमस्कार करून, त्यानें ऊषा स्त्रीसहवर्तमान अनिरुद्धाला रथावर बसवून

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याठिकाणीं आणिलें ॥ ५० ॥ नंतर, श्रीरुद्रानें द्वारकेंत जाण्याविषयीं अनुमोदन दिलेला श्रीकृष्ण, आंदण दिलेल्या एक अक्षौहिणी सेनेनें परिवेष्टित व उत्तम वस्त्रादिकांनीं भूषित अशा त्या सपत्नीक अनिरुद्धाला पुढें करून निघाला ॥ ५१ ॥ नंतर द्वारकेंतील लोक, सुहृद् व ब्राह्मण यांनीं सामोरें येऊन सत्कार केलेल्या त्या श्रीकृष्णानें, शंख, नगारे, दुंदुभि इत्यादिक वाद्यांच्या गजरासहवर्तमान, तोरणांसहित ध्वजांनीं अलंकृत व जिच्यामध्यें मार्गांचें व आंगण्यांचें सेचनवगैरे केलेलें आहे अशा त्या आपल्या द्वारकाराजधानींत प्रवेश केला ॥ ५२ ॥ हे राजा, अशाप्रकारच्या श्रीकृष्णाच्या विजयाचें व शंकराबरोबर झालेल्या युद्धाचें, जो पुरुष प्रातःकाळीं उठून स्मरण करील त्याला शत्रूंपासून पराजय कधींहि प्राप्त होणार नाहीं ॥ ५३ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील उत्तरार्धामध्यें अनिरुद्धान-

---

रुद्रानुमोदित इति तदभिप्रेतस्यैव बाणभुजभंगस्य कृतत्वात् ॥ ५१ ॥ पौरादिभिरभ्युद्यतोऽभिमुखमागत्य सत्कृतः ॥ ५२ ॥ ५३ ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधोत्तरार्धे टीकायां त्रिषष्टितमोऽध्यायः ॥ ६३ ॥ ॥ चतुःषष्टितमे कृष्णो नृगं पापादमोचयत् ॥ ब्रह्मस्वहारिदोषोक्त्या राज्ञो दृष्टानशिक्षयत् ॥ १ ॥ विभूतिभाग्यभोगादिमदोन्नद्धमनोरथान् ॥

अक्षौहिण्या परिवृतं सुवासःसमलंकृतम् ॥ सपत्नीकं पुरस्कृत्य ययौ रुद्रानुमोदितः ॥ ५१॥ स्वराजधानीं समलंकृतां ध्वजैः सतो-
रणैरुक्षितमार्गचत्वराम् ॥ विवेश शंखानकदुंदुभिस्वनैरभ्युद्यतः पौरसुहृद्द्विजातिभिः ॥ ५२ ॥ य एवं कृष्णविजयं शंकरेण च संयु-
गम् ॥ संस्मरेत्प्रातरुत्थाय न तस्य स्यात्पराजयः ॥ ५३ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे उत्तरार्धेऽनिरुद्धानयनं नाम
त्रिषष्टितमोऽध्यायः ॥ ६३ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ एकदोपवनं राजन् जग्मुर्यदुकुमारकाः ॥ विहर्तुं सांबप्रद्युम्नचारुभानुगदादयः
॥ १ ॥ क्रीडित्वा सुचिरं तत्र विचिन्वंतः पिपासिताः ॥ जलं निरुदके कूपे ददृशुः सत्वमद्भुतम् ॥ २॥ कृकलासं गिरिनिभं वीक्ष्य
विस्मितमानसाः ॥ तस्य चोद्धरणे यत्नं चक्रुस्ते कृपयाऽन्विताः ॥ ३ ॥ चर्मजैस्तांतवैः पाशैर्बद्ध्वा पतितमर्भकाः ॥ नाशक्नुवन्समु-
द्धर्तुं कृष्णायाचख्युरुत्सुकाः ॥ ४ ॥

अन्वशासद्यदून्कृष्णो नृगोद्धारप्रसंगतः ॥ २ ॥ १ ॥ पिपासितास्तृषिता जलं विचिन्वंतः । सत्वं जीवम् ॥ २ ॥ तं च कृकलासं वीक्ष्य ॥ ३ ॥ चर्मजैश्चर्ममयैः पाशैस्तांतवैस्तंतुमयैश्च ॥ ४ ॥

यननामक हा त्रेसष्टावा अध्याय समाप्त झाला ॥ ६३ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां, ह्या चौसष्टाव्या अध्यायामध्यें श्रीकृष्णानें नृगराजाला पापापासून मुक्त केलें आणि दर्पयुक्त राजांना ब्रह्मस्वहरण करणारांचे दोष सांगून शिक्षण केलें अशी कथा सांगितलेली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, एकेवेळीं सांब, प्रद्युम्न, चारु, भानु, गद इत्यादिक यादवकुमार, क्रीडा करण्याकरितां उपवनामध्यें निघून गेले ॥ १ ॥ आणि त्या उपवनामध्यें फारवेळपर्यंत क्रीडा करून तृषाक्रांत झालेले ते, पाण्याचा शोध करित असतां एकेठिकाणीं निर्जळकूपामध्यें पडून राहिलेला एक अद्भुत प्राणी त्यांच्या दृष्टीस पडला ॥ २ ॥ त्या पर्वतासारख्या मोठ्या सरड्याला ॥२०४॥
पाहून विस्मतचित्त व कृपायुक्त झालेले ते कुमार, त्याला कूपांतून बाहेर काढण्याविषयीं यत्न करूं लागले ॥ ३ ॥ ते बालक, कूपांत पडलेल्या त्या सरड्याला कातड्याच्या व सुताच्या फांसांनीं बांधून बाहेर काढूं लागले परंतु त्याला कूपांतून बाहेर काढण्याविषयीं ते समर्थ झाले नाहींत. तेव्हां त्याला बाहेर काढण्याविषयीं उत्कंठित झालेल्या त्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

बालकांनीं तें वर्तमान श्रीकृष्णाला कळविलें ॥ ४ ॥ तेंव्हां विश्वपालक असा तो भगवान् श्रीकृष्ण, तेथें येऊन त्याला पाहून त्यानें त्या सरड्याला डाव्या हातानें अनायासानेंच कूपांतून बाहेर काढिलें ॥ ५ ॥ तेंव्हां उत्तमश्लोक भगवंताच्या हातानें स्पर्श केलेला तो प्राणी, तत्काळ सरड्याचें स्वरूप टाकून, ज्याचा तापलेल्या सुवर्णासारखा सुंदर वर्ण आहे व ज्यानें अद्भुत अलंकार, वस्त्रें व माळा धारण केल्या आहेत असा तो देवरूपी झाला ॥ ६ ॥ त्याचें सरठजन्म प्राप्त होण्याचें कारण जाणत असणाऱ्याहि श्रीकृष्णानें, तें लोकामध्यें प्रसिद्ध करण्यासाठीं त्याला विचारिलें कीं,—हे महाभाग्यवंता, अतिसुंदरस्वरूपी असा तूं कोण आहेस ? मी तर तुला देवश्रेष्ठ आहेस असें मानितों ॥ ७ ॥ हे कल्याणमूर्ते, ही, सरठयोनि प्राप्त होण्यास योग्य नसणाराहि तूं, ह्या दशेला कोणत्या कर्मानें प्राप्त झाला आहेस ! तसाच पूर्वीं तूं कोण होतास ? हें सर्व तुझ्या मुखांतून ऐकण्याची इच्छा करणाऱ्या आह्मांला, सांगण्यास योग्य आहे असें जर तुला वाटत असेल तर तूं आपला वृत्तांत आह्मांस सांग

॥ ५ ॥ संतप्तं चामीकरं सुवर्णं तद्वद्वर्णो यस्य सः । अद्भुता अलंकारांबरस्रजो यस्य सः । स्वर्गी देवो बभूवेति ॥ ६ ॥ ७ ॥ यद्यदि । क्षमं योग्यम् ॥ ८ ॥ ९ ॥ यदि ते

तत्रागत्यारविंदाक्षो भगवान्विश्वभावनः ॥ वीक्ष्योज्जहार वामेन तं करेण स लीलया ॥ ५ ॥ स उत्तमश्लोककराभिमृष्टो विहाय सद्यः कृकलासरूपम् ॥ संतप्तचामीकरचारुवर्णः स्वर्ग्यद्भुतालंकरणांबरस्रक् ॥ ६ ॥ पप्रच्छ विद्वानपि तन्निदानं जनेषु विख्यापयितुं मुकुंदः ॥ कस्त्वं महाभाग वरेण्यरूपो देवोत्तमं त्वां गणयामि नूनम् ॥ ७ ॥ दशामिमां वा कतमेन कर्मणा संप्रापितोऽस्यतदर्हः सुभद्र ॥ आत्मानमाख्याहि विवित्सतां नो यन्मन्यसे नः क्षममत्र वक्तुम् ॥ ८ ॥ श्रीशुक उवाच ॥ इति स्म राजा संपृष्टः कृष्णेनानंतमूर्तिना ॥ माधवं प्रणिपत्याह किरीटेनार्कवर्चसा ॥ ९ ॥ नृग उवाच ॥ नृगो नाम नरेंद्रोऽहमिक्ष्वाकुतनयः प्रभो ॥ दानिष्वाख्यायमानेषु यदि ते कर्णमस्पृशम् ॥ १० ॥ किं नु तेऽविदितं नाथ सर्वभूतात्मसाक्षिणः ॥ कालेनाव्याहतदृशो वक्ष्येऽथापि तवाज्ञया ॥ ११ ॥ यावंत्यः सिकता भूमेर्यावंत्यो दिवि तारकाः ॥ यावंत्यो वर्षधाराश्च तावतीरददं स्म गाः ॥ १२ ॥ पयस्विनीस्तरुणीः शीलरूपगुणोपपन्नाः कपिला हेमशृंगीः ॥ न्यायार्जिता रूप्यखुराः सवत्सा दुकूलमालाभरणा ददावहम् ॥ १३ ॥

कर्णमस्पृशमित्यसंदेहे संदेहवचनं यदि वेदाः प्रमाणं स्युरितिवत् । कर्णपथं नूनं प्राप्तः स्यामित्यर्थः ॥ १० ॥ किंच । किं न्विति । सर्वेषां भूतानामात्मनो बुद्धेः साक्षिणस्तेऽविदितं किं नु न किंचित् ॥ ११ ॥ १२ ॥ १३ ॥

॥ ८ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, याप्रमाणें अनंतमूर्ति श्रीकृष्णानें प्रश्न केलेला तो नृगराजा, सूर्यासारख्या वर्णाचा किरीट धारण केलेल्या आपल्या मस्तकानें श्रीकृष्णाला नमस्कार करून ह्मणाला कीं,—॥ ९ ॥ नृग ह्मणाला—हे प्रभो, मी इक्ष्वाकु राजाचा पुत्र नृगनामक राजा आहें. दान करणाऱ्या लोकांच्या कथा निघाल्या असतां माझी गोष्टहि तुझ्या कानांवर केव्हांतरी प्राप्त झालीच असेल ॥ १० ॥ हे नाथा, सर्व प्राण्याच्या बुद्धींचा साक्षी आणि काळाच्या योगानें ज्याचें ज्ञान कधींच लोप पावत नाहीं अशा तुला न समजलेलें काय बरें आहे ? काहींच नाहीं. तथापि तुझ्या आज्ञेनें तूं विचारलेल्याचें उत्तर मी सांगतों ॥ ११ ॥ भूमीवर जितके ह्मणून वाळवेचे कण आहेत किंवा आकाशामध्यें जितके तारागण आहेत अथवा वृष्टि होऊं लागली असतां जितक्या उदकाच्या धारा पडतात तितक्या (असंख्यात) गाई मी दान दिल्या आहेत ॥ १२ ॥ त्या तरी गाई, पुष्कळ दूध देणाऱ्या, प्रथम प्रसूत झालेल्या, सुस्वभाव सुंदर रूप व पुष्कळ तूप होण्याच्यावगैरे गुणांनीं युक्त, कपिलवर्ण, सुवर्णानें शिंगें बांधविलेल्या, न्यायानें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

संपादन केलेल्या, रुप्यानें खुर बांधविलेल्या, झुली, सुवर्णपुष्पांच्या माळा व अलंकार घातलेल्या व सवत्स अशा मी दिल्या आहेत ॥ १३ ॥ आणि त्यातरी वैराग्यादिक गुणांनीं व शांत्यादिक स्वभावांनीं युक्त, कुटुंबवत्सल, सदाचारसंपन्न, तपाच्या योगानें प्रख्यात, शिष्यांना वेदांचें अध्ययन करविण्याविषयीं अतिउदार, समवित्त, तरुण व अलंकारांनीं पूजित अशा ब्राह्मणश्रेष्ठानांच दिल्या आहेत ॥ १४ ॥ केवळ गाईच दिल्या असें नाहीं तर, भूमि, सुवर्ण, घरें, अश्व, हत्ती, दासींसहित कन्या, तिल-पर्वत, रौप्य, शय्या, वस्त्रें, रत्नें, भांडींकुंडीं व रथ हींहि दिलीं आहेत, अग्निष्टोमादि यज्ञ केले, वापी कूप तळीं व देवालयें बांधिलीं, तसेंच अन्नसंतर्पणहि केलें आहे ॥ १५ ॥ असें चाललें असतां मला एक संकट प्राप्त झालें तें असें कीं– प्रतिग्रह न करणाऱ्या कोणी एका ब्राह्मणाची गाय, बांधलेल्या जाग्यावरून वत्सासह सुटून जाऊन माझ्या गोधनांत मिसळली. आणि ती ‘ ही ब्राह्मणाची आहे असें ’ न जाणणाऱ्या मी, दुसऱ्या ब्राह्मणास दिली ॥ १६ ॥ ती दिलेली गाय ब्राह्मण घेऊन जात असतां,

ऋतव्रतेभ्योऽदंभाचारेभ्यः । तपसा श्रुताः प्रख्याताश्च ते ब्रह्मणि वदान्या अत्युदारा अध्यापनशीलाश्च ते संतश्च तेभ्यः ॥ १४ ॥ पूर्तं वापीकूपादि चरितं कृतम् ॥ १५ ॥ एवं वर्तमानस्य मम संकटं किंचिदापन्नं शृण्वित्याह । कस्यचिदिति । द्विजमुख्यस्य प्रतिग्रहनिवृत्तस्य । संपृक्ता मिलिता । अविदुषा ब्राह्मणस्येयमित्यजानता ॥ १६ ॥ १७ ॥

स्वलंकृतेभ्यो गुणशीलवद्भ्यः सीदत्कुटुंबेभ्य ऋतव्रतेभ्यः ॥ तपःश्रुतब्रह्मवदान्यसद्भ्यः प्रादां युवभ्यो द्विजपुंगवेभ्यः ॥ १४ ॥ गोभूहिरण्यायतनाश्वहस्तिनः कन्याः सदासीस्तिलरूप्यशय्याः ॥ वासांसि रत्नानि परिच्छदान्रथानिष्टं च यज्ञैश्चरितं च पूर्तम् ॥१५॥ कस्यचिद्द्विजमुख्यस्य भ्रष्टा गौर्मम गोधने ॥ संपृक्ताऽविदुषा सा च मया दत्ता द्विजातये ॥ १६ ॥ तां नीयमानां तत्स्वामी दृष्ट्वोवाच ममेति तम् ॥ ममेति प्रतिग्राह्याह नृगो मे दत्तवानिति ॥ १७ ॥ विप्रौ विवदमानौ मामूचतुः स्वार्थसाधकौ ॥ भवान्दाताऽपहर्तेति तच्छ्रुत्वा मेऽभवद्भ्रमः ॥ १८ ॥ अनुनीतावुभौ विप्रौ धर्मकृच्छ्रगतेन वै ॥ गवां लक्षं प्रकृष्टानां दास्याम्येषा प्रदीयताम् ॥ १९ ॥

प्रतिग्राहिणोक्तं दातेति स्वामिनोक्तमपहर्तेति । अभवद्भ्रमः व्याकुलोऽभवमित्यर्थः ॥ १८ ॥ तदोभावपि प्रत्येकमनुनीतौ प्रार्थितौ । कथं तदाह । गवामिति सार्धेन ॥ १९ ॥

तिच्या धन्यानें पाहून तो ‘ ही गाय माझी आहे असें ’ त्या ब्राह्मणास ह्मणाला. त्या प्रतिग्राही ब्राह्मणानेंहि त्याला ‘ ही गाय माझी आहे असें ’ ह्मणून मला आतांच नृगराजानें दिली असें सांगितलें ॥ १७ ॥ याप्रमाणें परस्पर विवाद करणारे व स्वार्थसाधक (माझ्या मुखांतून निर्णय होऊन गाय घेण्याविषयीं उत्सुक) ते दोन्ही ब्राह्मण, माझ्याजवळ येऊन मला ह्मणाले–त्यांत प्रतिग्रह करणारा ह्मणतो–राजा, तूं आतांच ही गाय मला दिली आहेस ह्मणून ही माझी आहे, असें असतां, हा ब्राह्मण माझी ह्मणतो. गाईचा धनी ह्मणतो–‘ ही गाय माझी हें लोकांत प्रसिद्ध आहे, तिचा तूं अपहार करून ब्राह्मणास दिलीस. ’ तें दोघांचें भाषण ऐकून मी व्याकुळ झालों ॥ १८ ॥ आणि तेव्हां दुसऱ्याची गाय दुसऱ्यास देणें हा अपहार होय. बरें आतां ज्याची त्यास द्यावी तरी प्रतिग्राह्याकडून अपहार होणार अशा दोन्हींकडून धर्मसंकटांत पडलेल्या मी त्या दोन्ही ब्राह्मणाची प्रार्थना केली कीं,–दुसऱ्या उत्कृष्ट लक्ष गाई तुम्हां दोघांपैकीं एकाला देतों, त्यानें ही गाय दुसऱ्यास (धन्यानें प्रतिग्राह्यास ॥२०५॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

किंवा प्रतिग्राह्यानें घ्यास) द्यावी ॥ १९ ॥ तुम्ही उभयतांनीं, न जाणणारा व किंकर असा मजवर अनुग्रह करावा. गाईच्या अपहाररूप दोषानें अमंगल नरकामध्यें पडणाऱ्या माझा या निष्कृतिग्रहणरूप अनुग्रहानें उद्धार करावा ॥ २० ॥ तेव्हां गाईचा धनी ह्मणाला–' हे राजा, जरी तूं लक्ष गाई देण्यास समर्थ आहेस तथापि गोविक्रय करणें हें निषिद्ध असल्यामुळें निष्कृतित्वेंकरून तूं दिलेलें गाईचें लक्षसुद्धां मी इच्छीत नाहीं, असें ह्मणून तो आपली गाय घेऊन निघून गेला ' आणि प्रतिग्राहीसुद्धां, ' राजा लक्षवर काय परंतु त्यावर दुसऱ्या दहा हजार गाई जरी तूं दिल्यास तथापि या गाईवांचून त्यांची मी इच्छा करीत नाहीं ' असें ह्मणून तोहि निघून गेला ॥ २१ ॥ हे नृपते इतकें धर्मांमध्यें अंतर घडल्यामुळें मरण पावल्यावर मला यमदूतांनीं यमलोकीं नेलें. हे देवदेवा, जगत्पते, तेथें मला यमानें विचारिलें कीं– ॥ २२ ॥ हे नृपते

॥ २० ॥ अपरः प्रतिग्राही । दुराग्रहो यल्लक्षं त्वयोक्तमन्यदपि गवामयुतं यदि तदपीमां विहाय नेच्छामीत्युक्त्वा गां त्यक्त्वा ययावित्यर्थः ॥ २१ ॥ एतस्मिन्नंतर इति । इतः पूर्वं पापाभावान्नेतुमसमर्था इति भावः ॥ २२ ॥ उताहो इत्येकं पदम् । अथवा पूर्वं शुभमिति । नांतमिति यमस्य स्वस्य वा वाक्यम् । पश्ये पश्यामि ॥ २३ ॥ हे देव यम पूर्वमशुभं भुंज इति मयोक्ते स यमः पतेति प्राह ॥ २४ ॥ २५ ॥ दुर्घटेन श्रीकृष्णदर्शनेन विस्मितः सन्नात्मनो भाग्यमभिनंदति । स त्वमिति । हे विभो स त्वं

भवंतावनुगृह्णीतां किंकरस्याविजानतः ॥ समुद्धरतं मां कृच्छ्रात्पतंतं निरयेऽशुचौ ॥ २० ॥ नाहं प्रतीच्छे वै राजन्नित्युक्त्वा स्वाम्यपाक्रमत् ॥ नान्यद्गवामप्ययुतमिच्छामीत्यपरो ययौ ॥ २१ ॥ एतस्मिन्नंतरे याम्यैर्दूतैर्नीतो यमक्षयम् ॥ यमेन पृष्टस्तत्राहं देवदेव जगत्पते ॥ २२ ॥ पूर्वं त्वमशुभं भुंक्षे उताहो नृपते शुभम् ॥ नांतं दानस्य धर्मस्य पश्ये लोकस्य भास्वतः ॥ २३ ॥ पूर्वं देवाशुभं भुंज इति प्राह पतेति सः ॥ तावदद्राक्षमात्मानं कृकलासं पतन्प्रभो ॥ २४ ॥ ब्रह्मण्यस्य वदान्यस्य तव दासस्य केशव ॥ स्मृतिर्नाद्यापि विध्वस्ता भवत्संदर्शनार्थिनः ॥ २५ ॥ स त्वं कथं मम विभोऽक्षिपथः परात्मा योगेश्वरैः श्रुतिदृशाऽमलहृद्विभाव्यः ॥ साक्षादधोक्षज उरुव्यसनांधबुद्धेः स्यान्मेऽनुदृश्य इह यस्य भवापवर्गः ॥ २६ ॥

ममाक्षिपथो लोचनगोचरः सन्कथं साक्षात्प्रत्यक्षोऽसीत्यर्थः । किमत्राश्चर्यं तदाह । पर आत्मा अतएव योगेश्वरैरपि श्रुतिदृशा उपनिषच्चक्षुषाऽमले हृदि विभाव्यश्चिंत्यः । यतोऽधोक्षजः अक्षजमैंद्रियकज्ञानं तदधोऽर्वागेव यस्मात्सः । यस्येह भवापवर्गो भवेत्तस्य भवाननुदृश्यः स्यात् । उरुव्यसनेन कृकलासभवदुःखेनांधबुद्धेस्तु ममैतच्चित्रमित्यर्थः ॥ २६ ॥

प्रथमतः तूं काय पापाचें फळ भोगितोस ? किंवा पुण्यकर्माचें फळ भोगितोस ? तुझ्या दानपुण्याचा धर्मपुण्याचा व स्वर्गादि लोकप्राप्तीच्या प्रकाश पावणाऱ्या पुण्यफळाचा अंत मी पाहत नाहीं ॥ २३ ॥ तेव्हां मी बोलिलों कीं,–हे यमा, मी प्रथम पापकर्माचें फळ भोगितों, तेव्हां त्या यमानें सांगितलें कीं, जा तर नीचयोनीमध्यें. हे प्रभो इतक्यांत नीच योनींमध्यें जाणाऱ्या मी आपणास सरठरूपी पाहिलें ॥ २४ ॥ हे केशवा, ब्राह्मणाचा भक्त, दानशूर, तुझा दास व तुझ्या दर्शनानेंच पापमुक्त झालेला अशा माझी स्मृति अजूनहि नष्ट झाली नाहीं ॥ २५ ॥ आतां दुर्घट अशा झालेल्या श्रीकृष्णदर्शनानें विस्मित होऊन आपल्या भाग्याचें अभिनंदन करितो–हे विभो, जो तूं, योगेश्वरांनींहि उपनिषद्रूप चक्षूनें निर्मळ असलेल्या हृदयामध्यें केवळ चिंतन करण्यास योग्य असा साक्षात् अधोक्षज परमात्मा आहेस तो तूं, अनेक व्यसनांनीं अंधबुद्धि झालेल्या माझ्या दृष्टिमार्गाला गोचर कोणत्या भाग्योदयानें झालास ? कारण, या संसारामध्यें ज्या पुरुषाच्या संसाराची समाप्ति होईल त्यालाच तूं दृश्य

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होतोस बाकीच्यांना दृश्य होत नाहींस ॥ २६ ॥ आतां भक्तिपरवश होऊन बहुत संबोधनें देऊन ह्मणतो—हे देवदेवा, हे जगन्नाथा, हे गोविंदा, हे पुरुषोत्तमा, हे नारायणा, हे हृषीकेशा, हे पुण्यकीर्ते, हे अच्युता, हे अविनाशिस्वरूपा, हे प्रभो, हे कृष्णा, आतां स्वर्गलोकीं गमन करणाऱ्या मला जाण्याची आज्ञा दे. कर्मवशेंकरून कोठेंहि असणाऱ्या माझें चित्त, तुझे चरणच ज्याचा विषय (स्मरणीयत्वेंकरून आश्रय) आहेत असें होवो ॥ २७ ॥ २८ ॥ जातांना नमस्कार करितो—ज्याच्या योगानें सर्वजगाची उत्पत्ति झाली आहे, जो कर्ता असूनहि अविकारी आहे, ज्याची अनंत अशी मायानामक शक्ति आहे, जो सर्वभूतांचा आश्रय आहे व जो इष्टापूर्तादिक कर्मांचा फलदाता आहे त्या तुज कृष्णाला (सदानंदरूपाला) नमस्कार असो ॥ २९ ॥ याप्रमाणें भाषण करून त्या कृष्णाला प्रदक्षिणा करून आपल्या मस्त-

उद्रिक्तभक्तिर्बहुधा संबोधयन्नाह । देवदेवेति ॥ २७ ॥ अनुज्ञापयति । अनुजानीहीति । देवलोकेऽपि सतो वर्तमानस्यात्मनो मनसः सन्निधिं प्रार्थयते । यत्र क्वापीति । त्वत्पदमास्पदं विषयो यस्य तथाभूतं भूयादिति ॥ २८ ॥ यास्यन्नमस्यति । नम इति । सर्वभावाय सर्वस्य भावो जन्म येन तस्मै ब्रह्मणे कर्तृत्वेऽप्यविकाराय । कुतः । अनंतशक्तये अनंता मायाख्या शक्तिर्यस्य तस्मै वासुदेवाय सर्वभूताश्रयायेत्युपादानत्वमुक्तम् । श्रीकृष्णाय सदानंदरूपायेति पुरुषार्थत्वमुक्तम् । कृषिर्भूवाचकः शब्दो णश्च निर्वृतिवाचकः ॥

देवदेव जगन्नाथ गोविंद पुरुषोत्तम ॥ नारायण हृषीकेश पुण्यश्लोकाच्युताव्यय ॥ २७ ॥ अनुजानीहि मां कृष्ण यांतं देवगतिं प्रभो ॥ यत्र क्वापि सतश्चेतो भूयान्मे त्वत्पदास्पदम् ॥ २८ ॥ नमस्ते सर्वभावाय ब्रह्मणेऽनंतशक्तये ॥ कृष्णाय वासुदेवाय योगानां पतये नमः ॥ २९ ॥ इत्युक्त्वा तं परिक्रम्य पादौ स्पृष्ट्वा स्वमौलिना ॥ अनुज्ञातो विमानाग्र्यमारुहत्पश्यतां नृणाम् ॥ ३० ॥ कृष्णः परिजनं प्राह भगवान्देवकीसुतः ॥ ब्रह्मण्यदेवो धर्मात्मा राजन्याननुशिक्षयन् ॥ ३१ ॥ दुर्जरं बत ब्रह्मस्वं भुक्तमग्नेर्मनागपि ॥ तेजीयसोऽपि किमुत राज्ञामीश्वरमानिनाम् ॥ ३२ ॥ नाहं हालाहलं मन्ये विषं यस्य प्रतिक्रिया ॥ ब्रह्मस्वं हि विषं प्रोक्तं नास्य प्रतिविधिर्भुवि ॥३३॥ हिनस्ति विषमत्तारं वह्निरद्भिः प्रशाम्यति ॥ कुलं समूलं दहति ब्रह्मस्वारणिपावकः ॥३४॥

तयोरैक्यं परं ब्रह्म कृष्ण इत्यभिधीयत इति स्मृतेः ॥ किंच योगानामिष्टापूर्तादिकर्मणां पतये फलदात्रे । अयं भावः । एवंभूतं त्वां विहाय गंतुमनिच्छुरपि गमिष्यामि त्वद्दत्तकर्मफलभोगायेति ॥ २९ ॥ ३० ॥ ३१ ॥ मनागीषदपि भुक्तं सदग्नेरग्निसदृशस्य तेजीयसोऽतितेजस्विनोऽपि दुर्जरम् ॥ ३२॥ ३३॥ किंच विषादपि घोरमित्याह । हिनस्तीति । संसर्गिसंसर्गेण मारकत्वादग्नितुल्यता स्यात्तदपि नेत्याह । वह्निरिति । अपिच समूलमिति । वह्निर्मूलान्यवशेषयति । ब्रह्मस्वलक्षणारणिजः पापपावकस्तु कुलं तदपि समूलमिति ॥ ३४ ॥

कानें त्याच्या चरणांना स्पर्शपूर्वक नमस्कार करून, त्यानें आज्ञा दिली असतां, सर्व मनुष्यांच्या देखत प्राप्त झालेल्या श्रेष्ठ विमानांमध्यें त्यानें आरोहण केलें ॥ ३० ॥ नंतर ब्राह्मणाचा कैवारी देव, धर्मात्मा, भगवान् श्रीकृष्ण, राजांना शिक्षण देत होत्साता तेथें असलेल्या लोकांना ह्मणाला कीं— ॥ ३१ ॥ हे जनहो, काय आश्चर्य सांगावें ! थोड्याहि ब्रह्मस्वाचा उपभोग केला असतां तें अग्नीसारख्या तेजस्वी पुरुषालाहि कोणत्याहि उपायानें जिरलें जात नाहीं. मग आह्मी समर्थ आहों असा व्यर्थ अभिमान धारण करणाऱ्या राजांना जिरलें जाणार नाहीं हें काय सांगावें ! ॥ ३२ ॥ ज्याचा इतर ज्याला निवृत्तीचा उपाय आहे त्या, लोकांना जाळणाऱ्या हालाहलनामक विषाला हि विष असें मानीत नाहीं. तर ब्राह्मणाचें द्रव्य हेंच विष आहे असें मानितों कारण, ज्याच्या निवृत्तीचा उपायच नाहीं ॥ ३३ ॥ आतां विषापेक्षां व अग्नीपेक्षांहि ब्रह्मस्व

१ याच्या योगानें असें सुचविलें कीं, परमानंदरूपी तुझा त्याग करून जाण्याची इच्छा न करणाराहि मी, तूं दिलेल्या कर्मफलाचा भोग करण्याकरितां जातों.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भयंकर आहे असें सांगतो–विष, भक्षण करणारालाच मारितें, दुसऱ्यानां मारीत नाहीं, अग्नि उदकांनीं शांत होतो. कदाचित् त्याणें वनवगैरे जाळलें तर तो मुळें अवशेष ठेवितो. ब्रह्मस्वरूप अरणीपासून उत्पन्न झालेला पापरूप अग्नीतर कुळाला समूळ जाळून टाकितो ॥ ३४ ॥ ठेव ठेवलेल्या ब्राह्मणाच्या द्रव्याचा, मालकाच्या आज्ञेवांचून उपभोग केला असतां तें, तीन पुरुषांपर्यंत कुळाला अधोगतीस पोंचवितें आणि हटानें बलात्कार करून उपभोग केलेलें द्रव्य, हरण करणाराच्या पूर्वींचे दहा, पुढचे दहा व तो एकविसावा, इतक्या पुरुषांना अधोगतीस पोंचवितें ॥ ३५ ॥ यास्तव राज्यलक्ष्मीनें अंध झालेले जे मूर्ख राजे, नरकाला पोंचविणाऱ्या ब्रह्मस्वाची अपेक्षा करितात ते, आपणास नरकपात होणार हें पहात नाहींत ॥ ३६ ॥ वेदांचें दान (अध्यापन) करणारे, कुटुंबवत्सळ आणि वृत्तिहरण झाल्यामुळें रडणारे अशा ब्राह्मणांच्या नेत्रांतून पडलेले अश्रुबिंदु जितक्या पृथिवीच्या रजः कणांना भिजवितात तितकीं वर्षेंपर्यंत त्या ब्राह्मणांची वृत्ति हरण करणारे निरंकुश राजे किंवा त्या राजकुळाचा आश्रय करणारे

दुरनुज्ञातं यथावदननुज्ञातम् । त्रिपूरुषं कुलं स्वयं पुत्रं पौत्रं च । प्रसह्य हठात् । बलाद्राजाद्याश्रयतः ॥ ३५ ॥ ये ब्रह्मस्वमभिमन्यंते इच्छंति ते निरयमेवाभिमन्यंते । अतो बालिशा

ब्रह्मस्वं दुरनुज्ञातं भुक्तं हंति त्रिपूरुषम् ॥ प्रसह्य तु बलाद्भुक्तं दश पूर्वान् दशापरान् ॥ ३५ ॥ राजानो राजलक्ष्म्यंधा नात्मपातं विचक्षते ॥ निरयं येऽभिमन्यंते ब्रह्मस्वं साधु बालिशाः ॥ ३६ ॥ गृह्णंति यावतः पांसून्क्रंदतामश्रुबिंदवः ॥ विप्राणां हृतवृत्तीनां वदान्यानां कुटुंबिनाम् ॥ ३७ ॥ राजानो राजकुल्याश्च तावतोऽब्दान्निरंकुशाः ॥ कुंभीपाकेषु पच्यंते ब्रह्मदायापहारिणः ॥ ३८ ॥ स्वदत्तां परदत्तां वा ब्रह्मवृत्तिं हरेच्च यः ॥ षष्टिवर्षसहस्राणि विष्ठायां जायते कृमिः ॥ ३९ ॥ न मे ब्रह्मधनं भूयाद्यद्गृद्ध्वाऽल्पायुषो नृपाः ॥ पराजिताश्च्युता राज्याद्भवंत्युद्वेजिनोऽहयः ॥ ४० ॥ विप्रं कृतागसमपि नैव द्रुह्यत मामकाः ॥ घ्नंतं बहुशपंतं वा नमस्कुरुत नित्यशः ॥ ४१ ॥ यथाऽहं प्रणमे विप्राननुकालं समाहितः ॥ तथा नमत यूयं च योऽन्यथा मे स दंडभाक् ॥ ४२ ॥ ब्राह्मणार्थो ह्यपहृतो हर्तारं पातयत्यधः ॥ अजानंतमपि ह्येनं नृगं ब्राह्मणगौरिव ॥ ४३ ॥

न केवलमर्थवादबिभीषिकेयं ... आत्मपातं न विचक्षत इति ॥ ३६ ॥ अपिच गृह्णंतीति ॥ ३७ ॥ ३८ ॥ ३९ ॥ गृद्ध्वा अभिकांक्ष्य ॥ ४० ॥ ४१ ॥ प्रणमे नमामि ॥ ४२ ॥ न केवलमर्थवादबिभीषि

अज्ञा आत्मपातं न विचक्षत इति ॥ ३६ ॥

प्रधानादिक, कुंभीपाक नरकामध्यें क्लेश भोगितात ॥ ३७ ॥ ३८ ॥ आपण दिलेल्या किंवा दुसऱ्यानें दिलेल्या ब्राह्मणाच्या वृत्तीचें जो पुरुष हरण करितो तो, साठ-हजार वर्षेंपर्यंत विष्ठेमध्यें कृमि होतो, म्हणून मला ब्राह्मणाचें द्रव्य ग्रहण करण्याची इच्छा कधींच होऊंनये. ज्या धनाची इच्छा करणारे पुरुष, अल्पायुषी व राज्यापासून भ्रष्ट होतात आणि मेल्यानंतर ते दुसऱ्यांना दुःख देणारे सर्प होतात ॥ ४० ॥ यास्तव हे जनहो, तुम्ही माझे आहां म्हणून तुम्हांस सांगतों एका-अपराध-करणाऱ्या, बहुत शाप वगैरे देणाऱ्या किंवा प्रसंगीं ताडणहि करणाऱ्या ब्राह्मणाचा तुम्ही द्रोह कधींच करूं नका. तर त्याला निरंतर नमस्कारच करीत जा ॥ ४१ ॥ जसा मी, सकाळीं दुपारीं व सायंकाळीं व दुसऱ्या कोणत्याहि वेळीं एकाग्र चित्तानें ब्राह्मणांना नमस्कार करितों त्याप्रमाणें तुम्हीहि नमस्कार करा. याप्रमाणें जो न करील तो माझ्यापासून दंड पावेल ॥ ४२ ॥ ब्राह्मणांचें द्रव्य हरण केलें असतां तें त्या हरण करणाराला नरकांत पाडितें हें केवळ भयप्रदर्शन आहे असें नाहीं, तर प्रत्यक्ष आहे पहा– ती ब्राह्मणाची धेनु न जाणणाऱ्याहि या महादात्या नृगराजाला अधःपातास कारण झाली. मग जाणूनबुजून हरण केलेलें ब्रह्मस्व त्याच्या अधःपातास कारण

CC-0. In Public Domain. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होईल हें काय सांगावें ? ॥ ४३ ॥ याप्रमाणें सर्व लोकांना पवित्र करणारा व मुक्तिदाता भगवान् श्रीकृष्ण, द्वारकावासी लोकांना धर्मरहस्य ऐकवून नंतर आपल्या मंदिरांत विष्ट झाला ॥ ४४ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील उत्तरार्धांत नृगमोक्षनिरूपणनामक हा चौसष्टावा अध्याय समाप्त झाला ॥ ६४ ॥ आतां ह्या पांसष्टाव्या अध्यायामध्यें, गोकुळांत प्राप्त झालेल्या बळरामानें, गोपींसहवर्तमान क्रीडा करित असतां, यमुनानदीचें आकर्षण केलें, अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, एकेवेळीं नंदादिक बंधूनां पाहण्याची इच्छा करणारा व त्यांचेठिकाणीं प्रेमयुक्त असा भगवान् बळराम, रथावर बसून नंदाच्या गोकुळामध्यें निघून गेला ॥ १ ॥ तेव्हां बहु काळपर्यंत दर्शनादिकांच्या इच्छेनें युक्त असलेल्या गोपांनीं व गोपींनीं त्याला आलिंगन केलें व त्या रामानें यशोदा व नंद या

केयं किंतु प्रत्यक्षमित्याह । ब्राह्मणार्थ इति ॥ ४३ ॥ ४४ ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधे उत्तरार्धे टीकायां चतुःषष्टितमोऽध्यायः ॥ ६४ ॥ पंचषष्टितमे रामश्चक्रे गोकुलमागतः ॥ रममाणस्तु गोपीभिः कालिंद्याः कर्षणं मदात् ॥ १ ॥ रामस्य चरितं चित्रं कालिंद्याकर्षणादि यत् ॥ पौंड्रकांतादि कृष्णस्य पृथगुक्तमतः परम् ॥ २ ॥ १ ॥

एवं विश्राव्य भगवान्मुकुंदो द्वारकौकसः ॥ पावनः सर्वलोकानां विवेश निजमंदिरम् ॥ ४४ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे उत्तरार्धे नृगोपाख्यानं नाम चतुःषष्टितमोऽध्यायः ॥ ६४ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ बलभद्रः कुरुश्रेष्ठ भगवान्रथमास्थितः ॥ सुहृद्दिदृक्षुरुत्कंठः प्रययौ नंदगोकुलम् ॥ १ ॥ परिष्वक्तश्चिरोत्कंठैर्गोपैर्गोपीभिरेव च ॥ रामोऽभिवाद्य पितरावाशीर्भिरभिनंदितः ॥ ॥ २ ॥ चिरं नः पाहि दाशार्ह सानुजो जगदीश्वरः ॥ इत्यारोप्यांकमालिंग्य नेत्रैः सिषिचतुर्जलैः ॥ ३ ॥ गोपवृद्धांश्च विधिवद्यविष्ठैरभिवंदितः ॥ यथा वयो यथा सख्यं यथा संबंधमात्मनः ॥ ४ ॥ समुपेत्याथ गोपालान्हास्यहस्तग्रहादिभिः ॥ विश्रांतं सुखमासीनं पप्रच्छुः पर्युपागताः ॥ ५ ॥ पृष्टाश्चानामयं स्वेषु प्रेमगद्गदया गिरा ॥ कृष्णे कमलपत्राक्षे संन्यस्ताखिलराधसः ॥ ६ ॥ कच्चिन्नो बांधवा राम सर्वे कुशलमासते ॥ कच्चित्स्मरथ नो राम यूयं दारसुतान्विताः ॥ ७ ॥

आशीर्भिरभिनंदितो बभूव ॥ २ ॥ तदाह । चिरमिति ॥ ३ ॥ गोपवृद्धांश्च विधिवदभिवंद्य यविष्ठैरभिवंदितो बभूवेत्यर्थः । अपिच यथा वय इति ॥ ४ ॥ ते सर्वे स्वेषु यादवेषु तं राममनामयमारोग्यं पप्रच्छुः ते च तेन पृष्टा इति ॥ ५ ॥ कृष्णे कृष्णप्राप्त्यर्थं संन्यस्ताखिलराधसस्त्यक्तसर्वविषयाः ॥ ६ ॥ ७ ॥

उभयतां मातापितरांना वंदन केलें असतां त्यांनीं आशीर्वाद देऊन त्याचें अभिनंदन केलें ॥ २ ॥ तें असें कीं, हे बळरामा, तूं जगदीश्वर आहेस यास्तव श्रीकृष्णासहवर्तमान तूं आमचें चिरकाळपर्यंत रक्षण कर. असें भाषण करून त्या यशोदानंदांनीं, त्याला मांडीवर बसवून आलिंगन करून आनंदाश्रूंनीं त्याला अभिषेक केला ॥ ३ ॥ नंतर त्यानें गोपवृद्धांनाहि यथाविधि वंदन केलें असतां, लहान वयाच्या गोपांनीं त्यास वंदन केलें. नंतर जसें आपलें वय, सख्य व संबंध होता त्याप्रमाणें तो सर्व गोपालांना हास्य, हस्तग्रहण, आलिंगन इत्यादिकेंकरून भेटून, सुखानें आसनावर बसून श्रमरहित झाला असतां, त्याच्या सभोवार प्राप्त झालेले, त्यानें कुशळ प्रश्न केलेले आणि कमलपत्राक्ष श्रीकृष्णाच्या प्राप्तीकरितां सर्व विषयांचा त्याग करणारे सर्व गोप, त्याला प्रेमानें सद्गदित झालेल्या वाणीनें यादवांचा कुशळ प्रश्न करूं लागले कीं ॥ ४ ॥ ५ ॥ ६ ॥ हे रामा, वसुदेवादिक सर्व आमचे बांधव खुशाल आहेतना ? बरें हे रामा, आतां स्त्रिया व पुत्र यांनीं युक्त झालेले तुह्मी, केव्हांतरी आमचें स्मरण करितां काय ? ॥ ७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दुसचारी कंस मरण पावला ही मोठी आनंदाची गोष्ट झाली, व आमचे वसुदेवादिक सुहृज्जनहि त्याच्या उपद्रवापासून मुक्त झाले हेंहि चांगलें झालें, आणि कालयवनाला व जरासंधादिक शत्रूंना मारून व जिंकून तुह्मी द्वारकारूप किल्ल्यांत जाऊन राहिलां हेंहि फार चांगलें झालें ॥ ८ ॥ त्यावेळीं रामाच्या प्रेमपूर्वक अवलोकनानें आदर प्राप्त झालेल्या गोपी, आनंदानें हास्य करित त्याला विचारूं लागल्या कीं, आतां नगरांतील स्त्रिया आवडत असलेला तो श्रीकृष्ण, द्वारकेंत सुखानें वास करीत आहेना ? ॥ ९ ॥ बरें तो आपल्या गोपबांधवांचें, पित्या नंदाचें व माता यशोदेचें केव्हांतरी स्मरण करितो काय ? बरें, तो आपल्या आईला पाहण्याकरितां एकदांतरी येईल काय ? बरें तो महापराक्रमी श्रीकृष्ण, आह्मी तत्परत्वेंकरून केलेल्या सेवेचें केव्हांतरी स्मरण करितो काय ? ॥ १० ॥ हे दाशार्हा, प्रभो, टाकण्यास कठीण अशा—माता, पिता, भाऊ पति, पुत्र, बहिणी इत्यादिक स्वजनांचा, ज्याच्या प्रीतीकरितां आह्मी त्याग केला आहे, त्या आमचा तत्काल त्याग करून, तो प्रेमबंधन अगदीं तोडून टाकून निघून

॥ ८ ॥ रामस्य संदर्शनेनाहृताः सादराः ॥ ९ ॥ १० ॥ ११ ॥ तर्हिं तद्गमने युष्माभिः प्रतिबंधः किं न कृतः । तद्वाक्यविश्वासादिति चेत् । ननु विश्वासः किमिति कृतस्तत्राहुः । कथंन्विति । वक्तृबहुत्वान्नानाविधानि वाक्यानि ॥ १२ ॥ तत्रान्या ऊचुः । कथं नु गृह्णंतीति । अन्या ऊचुः । गृह्णंति वा इति चित्रकथस्य चित्रकथाकथनकोविदस्य ।

दिष्ट्या कंसो हतः पापो दिष्ट्या मुक्ताः सुहृज्जनाः ॥ निहत्य निर्जित्य रिपून्दिष्ट्या दुर्गं समाश्रिताः ॥ ८ ॥ गोप्यो हसंत्यः पप्रच्छू रामसंदर्शनादृताः ॥ कच्चिदास्ते सुखं कृष्णः पुरस्त्रीजनवल्लभः ॥ ९ ॥ कच्चित्स्मरति वा बंधून्पितरं मातरं च सः ॥ अप्यसौ मातरं द्रष्टुं सकृदप्यागमिष्यति ॥ अपि वा स्मरतेऽस्माकमनुसेवां महाभुजः ॥ १० ॥ मातरं पितरं भ्रातॄन्पतीन्पुत्रान्स्वसॄरपि ॥ यदर्थे जहिम दाशार्ह दुस्त्यजान्स्वजनान्प्रभो ॥ ११ ॥ ता नः सद्यः परित्यज्य गतः संच्छिन्नसौहृदः ॥ कथं नु तादृशं स्त्रीभिर्न श्रद्धीयेत भाषितम् ॥ १२ ॥ कथं नु गृह्णंत्यनवस्थितात्मनो वचः कृतघ्नस्य बुधाः पुरस्त्रियः ॥ गृह्णंति वै चित्रकथस्य सुंदरस्मितावलोकोच्छ्वसितस्मरातुराः ॥ १३ ॥ किं नस्तत्कथया गोप्यः कथाः कथयतापराः ॥ यात्यस्माभिर्विना कालो यदि तस्य तथैव नः ॥ १४ ॥

किंच सुंदरं स्मितं यस्मिंस्तेनावलोकनेनोच्छ्वसितः क्षुभितो यः स्मरस्तेनातुराः ॥ १३ ॥ अन्या ऊचुः । किं न इति । कालस्तावत्तस्य चास्माकं च यात्येव किंतु तस्य सुखेनास्माकं तु दुःखेनेत्येतावानेव विशेष इति ध्वनितम् ॥ १४ ॥

गेला. तर तो जात असतां तुह्मी त्याला प्रतिबंध कां केला नाहींत ? इत्यादिक ह्मणशील तर— ‘ मी तुमचे उपकार फेडण्यास कधींहि समर्थ होणार नाहीं इत्यादिक ’ तें तसलें मनोहर भाषण, स्त्रियांनीं कसें बरें विश्वसनीय मानूं नये ? तर मानावेंच. ह्मणून त्यानें विश्वासानेंच आह्मांस फसविलें ॥ ११ ॥ १२ ॥ दुसऱ्या गोपी ह्मणाल्या—आह्मीं तर रानटी असल्यामुळें चतुर नव्हे परंतु आतां चतुर अशा पुरस्त्रिया, चंचलप्रेमयुक्त व कृतघ्न अशा त्या कृष्णाचें भाषण विश्वासानें कसें बरें ग्रहण करीत असतील ? दुसऱ्या ह्मणाल्या आमच्या सारख्याच त्याच्या चित्रविचित्र कथाश्रवणानें मोहित होऊन व त्याच्या सुंदर हास्ययुक्त अवलोकनानें प्रदीप्त झालेल्या कामानें परवश होऊन त्याचें भाषण ग्रहण करीत असतील यांत संशय नाहीं ॥ १३ ॥ दुसऱ्या ह्मणाल्या—हे गोपी हो, त्या कृष्णाच्या कथेनें आह्मांला काय फळ प्राप्त होत आहे ? त्याच्या स्मरणानें दुःख मात्र वाढतें, यास्तव दुसऱ्याच कथा वर्णन करा. जर त्याचा आमच्यावांचून काळ जातो तर त्याच्या वांचून आमचाहि जातच आहे. परंतु त्याचा सुखानें व आमचा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दुःखानें इतकाच काय तो विशेष आहे ॥ १४ ॥ याप्रमाणें भाषण करणाऱ्या च श्रीकृष्णाचें– हास्य, भाषण, सुंदर अवलोकन, गति व प्रेमयुक्त आलिंगन यांचें स्मरण करित होत्सात्या त्या स्त्रिया, रुदन करूं लागल्या ॥ १५ ॥ त्यावेळीं नानाप्रकारच्या सांत्वन प्रकारांमध्यें निपुण अशा त्या भगवान् बळरामानें, मनोहर व विश्वासजनक असे श्रीकृष्णाचे निरोप सांगून त्या गोपींचें सांत्वन केलें ॥ १६ ॥ नंतर तो भगवान् राम, रात्रींचेठिकाणीं, कृष्णाबरोबर झालेल्या रासक्रीडेच्यावेळीं लहान असलेल्या व उत्पन्न न झालेल्याहि गोपींना रतिसुख देत होत्साता, चैत्र व वैशाख असे दोन महिनेपर्यंत त्या गोकुलामध्यें राहिला ॥ १७ ॥ तेव्हां पूर्णचंद्राच्या किरणांनीं प्रकाशमान झालेल्या व चंद्रविकासी कमळिणींच्या सुगंधवायूनें सेवन केलेल्या यमुनेच्या उपवनामध्यें, स्त्रीगणांनीं वेष्टित असा तो राम, त्यांच्या बरोबर रममाण झाला ॥ १८ ॥ आतां त्याचा प्रभाव सांगतो–

॥ १५ ॥ नानाविधेष्वनुनयेषु कोविदः ॥ १६ ॥ मधुं चैत्रम् । माधवं वैशाखं । गोपीनां रतिमिति । श्रीकृष्णक्रीडासमयेऽनुत्पन्नानामतिबालानामन्यासामित्यभियुक्तप्रसिद्धिः ॥ १७ ॥

इति प्रहसितं शौरेर्जल्पितं चारुवीक्षितम् ॥ गतिं प्रेमपरिष्वंगं स्मरंत्यो रुरुदुः स्त्रियः ॥ १५ ॥ संकर्षणस्ताः कृष्णस्य संदेशैर्हृदयंगमैः ॥ सांत्वयामास भगवान्नानानुनयकोविदः ॥ १६ ॥ द्वौ मासौ तत्र चावात्सीन्मधुं माधवमेव च ॥ रामः क्षपासु भगवान्गोपीनां रतिमावहन् ॥ १७ ॥ पूर्णचंद्रकलामृष्टे कौमुदीगंधवायुना ॥ यमुनोपवने रेमे सेविते स्त्रीगणैर्वृतः ॥ १८ ॥ वरुणप्रेषिता देवी वारुणी वृक्षकोटरात् ॥ पतंती तद्वनं सर्वं स्वगंधेनाह्यवासयत् ॥ १९ ॥ तं गधं मधुधाराया वायुनोपहृतं बलः ॥ आघ्रायोपगतस्तत्र ललनाभिः समं पपौ ॥ २० ॥ उपगीयमानचरितो वनिताभिर्हलायुधः ॥ वनेषु व्यचरत्क्षीबो मदविह्वललोचनः ॥ २१ ॥ स्रग्व्येककुंडलोमत्तो वैजयंत्या च मालया ॥ बिभ्रत्स्मितमुखांभोजं स्वेदप्रालेयभूषितम् ॥ २२ ॥ स आजुहाव यमुनां जलक्रीडार्थमीश्वरः ॥ निजं वाक्यमनादृत्य मत्त इत्यापगां बलः ॥ अनागतां हलाग्रेण कुपितो विचकर्ष ह ॥ २३ ॥

पूर्णचंद्रस्य कलाभिर्मरीचिभिरामृष्टे उज्ज्वलेकौमुदीगंधवायुना कुमुद्वतीनां गंधवातेन सेविते । यद्वा कौमुदीशब्देन तद्विकासितानि कुमुदानि लक्ष्यंते । कुमुदगंधवातेनेत्यर्थः ॥ १८ ॥ वारुणी सुधया सहोत्पन्ना मदिरा ॥ १९ ॥ २० ॥ क्षीबो मत्तः ॥ २१ ॥ स्वेद एव प्रालेयं हिमं तेन भूषितम् ॥ २२ ॥ मत्तोऽयमित्यनादृत्यानागतामापगां नदीम् ॥ २३ ॥

वरुणानें रामाच्या सेवेकरितां पाठविलेली, अमृताबरोबर उत्पन्न झालेली वारुणी नांवाची मदिरा, वृक्षांच्या ढोलींतून खालीं स्रवून आपल्या वासानें तें सर्व वन सुगंधयुक्त करूं लागली ॥ १९ ॥ तेव्हां वाऱ्यानें आपल्या घ्राणेंद्रियाजवळ आणून पोंचविलेल्या मधुधारेच्या तो सुगंध ग्रहण करून, बळरामानें तेथें जाऊन स्त्रियांसहवर्तमान त्या मदिरेचें प्राशन केलें ॥ २० ॥ आणि देवगंधर्वादिकांनीं ज्याचें चरित्र गायन केलें आहे असा, मत्त, व मदानें विह्वळनेत्र झालेला तो बळराम, स्त्रियांसहवर्तमान क्रीडा करीत वनांमध्यें संचार करूं लागला ॥ २१ ॥ कंठामध्यें पुष्पमाळा व एकाच कानांत कुंडल धारण करणारा, स्वभावानेंच मत्त असल्या सारखा दिसणारा, नवरत्नखचित व पायांपर्यंत लोंबणाऱ्या वैजयंतीनामक माळेनें अलंकृत, घर्मरूप तुषारकणांनीं भूषित व हास्ययुक्त असें मुखकमळ धारण करणारा तो समर्थ बळराम, आपण होता तेथें जळक्रीडा करण्याकरितां यमुनानदीस बोलावूं लागला. तेव्हां हा मत्त आहे असें जाणून, आपल्या वाक्याचा अनादर करून तेथें न आलेल्या यमुनेला त्यानें कुपित होऊन

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नांगराच्या अग्रानें (फाळानें) आकर्षण केलें ॥ २२ ॥ २३ ॥ आणि ह्मणाला कीं, हे दुष्टे, ज्याअर्थी मी बोलाविली असतां तूं माझा अनादर करून येत नाहींस, त्याअर्थी तूं जशी माझ्या इच्छेप्रमाणें जाशील तशी तुला नांगराच्या अग्रानें शेकडो प्रवाहांनीं नेईन ॥ २४ ॥ हे राजा, याप्रमाणें भर्त्सना केल्यामुळें भिऊन चकित झालेली ती यमुना नदी, देवतारूपानें पायांवर पडून त्या बळरामाप्रत असें ह्मणाली कीं, ॥ २५ ॥ हे रामा, हे रामा, हे महाबाहो, मी तुझ्या पराक्रमाला विसरल्यें आहें. हे जगत्पते, ज्या तुझ्या हजार मस्तकांपैकीं एका मस्तकानेंच ही पृथ्वी धारण केलेली आहे ॥ २६ ॥ हे भगवन्, विश्वात्मन्, भक्तवत्सला, तुज भगवंताचें परम सामर्थ्य न जाणणाऱ्या परंतु आतां शरण आलेल्या मला, ‘ अज्ञानेंकरून झालेल्या अपराधाचें सहन करून ’ तूं सोडून देण्याची कृपा करावीस ॥ २७ ॥ याप्रमाणें प्रार्थना केलेल्या त्या भगवान्

आहुता आहूता यचस्मान्नागच्छसि तस्मात् नेष्ये गमयिष्यामि ॥ २४ ॥ चकिता कंपिता ॥ २५ ॥ एकांशेन शेषाख्येन ॥ २६ ॥ २७ ॥ विजगाहावगाहनं कृतवान् ॥ २८ ॥ उत्तीर्णाय निर्गतायासितांबरादीनि कांतिर्ददौ । कांतिर्लक्ष्मीः यथोक्तं वैष्णवे । वरुणप्रहिता चास्मै मालामम्लानपंकजाम् । समुद्राभे तथा वस्त्रे नीले लक्ष्मीरयच्छतेति ॥ हरिवंशे च बलं प्रति लक्ष्मीवाक्यम् । जातरूपमयं चैकं कुंडलं वज्रभूषणम् ॥ आदिपद्मं च पद्माख्यं दिव्यं श्रवणभूषणम् ॥ देवेमां प्रतिगृह्णीष्व पौराणीं भूषणक्रिया-

पापे त्वं मामवज्ञाय यन्नायासि मयाऽऽहुता ॥ नेष्ये त्वां लांगलाग्रेण शतधा कामचारिणीम् ॥ २४ ॥ एवं निर्भर्त्सिता भीता यमुना यदुनंदनम् ॥ उवाच चकिता वाचं पतिता पादयोर्नृप ॥ २५ ॥ राम राम महाबाहो न जाने तव विक्रमम् ॥ यस्यैकांशेन विधृता जगती जगतः पते ॥ २६ ॥ परं भावं भगवतो भगवन्मामजानतीम् ॥ मोक्तुमर्हसि विश्वात्मन्प्रपन्नां भक्तवत्सल ॥ २७ ॥ ततो व्यमुंचद्यमुनां याचितो भगवान्बलः ॥ विजगाह जलं स्त्रीभिः करेणुभिरिवेभराट् ॥ २८ ॥ कामं विहृत्य सलिलादुत्तीर्णायासितांबरे ॥ भूषणानि महार्हाणि ददौ कांतिः शुभां स्रजम् ॥ २९ ॥ वसित्वा वाससी नीले मालामामुच्य कांचनीम् ॥ रेजे स्वलंकृतो लिप्तो माहेंद्र इव वारणः ॥ ३० ॥ अद्यापि दृश्यते राजन्यमुनाकृष्टवर्त्मना ॥ बलस्यानंतवीर्यस्य वीर्यं सूचयतीव हि ॥ ३१ ॥ एवं सर्वा निशा याता एकेव रमतो व्रजे ॥ रामस्याक्षिप्तचित्तस्य माधुर्यैर्व्रजयोषिताम् ॥ ३२ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे उत्तरार्धे बलदेवविजये यमुनाकर्षणं नाम पंचषष्टितमोऽध्यायः ॥ ६५ ॥

मित्यादि ॥ २९ ॥ वसित्वा परिधाय । आमुच्य कंठे निधाय । चंदनादिभिरालिप्तः ॥ ३० ॥ ३१ ॥ एकेव एकैव निशा यथा ॥ तथा माधुर्यैर्विलासैः ॥ ३२ ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधे उत्तरार्धे टीकायां पंचषष्टितमोऽध्यायः ॥ ६५ ॥

बळरामानें यमुनेला सोडून दिलें. नंतर त्यानें स्त्रियांसहवर्तमान तिच्या उदकामध्यें प्रवेश करून, जसा गजेंद्र, हत्तिणीसहवर्तमान क्रीडा करितो त्याप्रमाणें क्रीडा केली ॥ २८ ॥ यथेच्छ क्रीडा करून जळांतून बाहेर पडणाऱ्या त्या बळरामाला, काळ्या वर्णाचीं वस्त्रें, बहुत मोलाचीं भूषणें व सुवर्णकमळांची माळा हीं, साक्षात् लक्ष्मीनें तेथें प्रकट होऊन दिलीं ॥ २९ ॥ तेव्हां निळीं वस्त्रें परिधान करून व सुवर्णकमळांची माळा गळ्यांत घालून दुसऱ्याहि भूषणांनीं अलंकृत व चंदनादिकांच्या उट्या लावलेला तो राम, इंद्राच्या ऐरावत गजासारखा शोभूं लागला ॥ ३० ॥ हे राजा, अनंतपराक्रमी बळरामाच्या सामर्थ्याचें सूचन करणारी ती यमुना नदी, अद्यापि नांगरानें ओढलेल्या मार्गानें वहात असलेली खरोखरच दिसत आहे ॥ ३१ ॥ याप्रमाणें गोकुळसंबंधी स्त्रियांच्या विलासांनीं ज्याचें चित्त, रतिक्रीडेविषयीं तत्पर झालें आहे अशा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

गोकुळामध्यें रममाण होणाऱ्या त्या बळरामाच्या चैत्र व वैशाख ह्या दोन महिन्यांतील सर्वेहि रात्री एका रात्रीसारख्या निघून गेल्या ॥ ३२ ॥ ॥इत्यममार्गें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील उत्तरार्धांत यमुनाकर्षणनामक हा पांसष्ठावा अध्याय समाप्त झाला ॥ ६५ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

आतां ह्या सासष्ठाव्या अध्यायामध्यें श्रीकृष्णानें, काशीमध्यें जाऊन पौंड्रकाचा व त्याचा मित्र जो काशिराजा त्याचा वध केला. नंतर सुदर्शनाचा वधवैगेरे वृत्त झालें असें वर्णन केलेलें आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, याप्रमाणें बळराम नंदाच्या गोकुळामध्यें गेला असतां इकडे द्वारकेमध्यें, करूषदेशांचा अधिपति अज्ञ जो पौंड्रक राजा त्यानें, वासुदेव मी आहें असें मानून कृष्णाकडे दूत पाठविला ॥ १ ॥ याचेंच स्पष्टीकरण करितो—जगत्पालक भगवान् वासुदेव तूंच अवतीर्ण झाला आहेस याप्रमाणें अज्ञ लोकांनीं प्रशंसा केलेल्या त्या पौंड्रकानें आपण ऐश्वर्यादिगुणपूर्ण भगवान् वासुदेव आहें असें मानिलें ॥ २ ॥ आणि असें एखाद्या अज्ञानी बालकास खेळांत दुसऱ्या बालकांनीं राजा केले असतां तो, आपणासच राजा मानितो त्याप्रमाणें आपणच वासुदेव आहें असें मानणाऱ्या त्या मंद बुद्धि पौंड्रकानें, ज्याचें माहात्म्य ठाऊक

षड्युक्षष्टितमे काशीं गत्वाऽहन् पौंड्रकं हरिः ॥ तन्मित्रं च ततो वृत्तं सुदक्षिणवधादिकम् ॥ १ ॥ १ ॥ प्रस्तोभितः प्रोत्साहितः । स्तुत्या बालैरज्ञैः ॥ २ ॥ बालकृतो नृपो

श्रीशुक उवाच ॥ नंदव्रजं गते रामे करूषाधिपतिर्नृप ॥ वासुदेवोऽहमित्यज्ञो दूतं कृष्णाय प्राहिणोत् ॥ १ ॥ त्वं वासुदेवो भगवानवतीर्णो जगत्पतिः ॥ इति प्रस्तोभितो बालैर्मेन आत्मानमच्युतम् ॥ २ ॥ दूतं च प्राहिणोन्मंदः कृष्णायाव्यक्तवर्त्मने ॥ द्वारकायां यथा बालो नृपो बालकृतोऽबुधः ॥ ३ ॥ दूतस्तु द्वारकामेत्य सभायामास्थितं प्रभुम् ॥ कृष्णं कमलपत्राक्षं राजसंदेशमब्रवीत् ॥ ४ ॥ वासुदेवोऽवतीर्णोऽहमेक एव न चापरः ॥ भूतानामनुकंपार्थं त्वं तु मिथ्याऽभिधां त्यज ॥ ५ ॥ यानि त्वमस्मच्चिह्नानि मौढ्याद्बिभर्षि सात्वत ॥ त्यक्त्वैहि मां त्वं शरणं नोचेद्देहि ममाहवम् ॥ ६ ॥ श्रीशुक उवाच ॥ कत्थनं तदुपाकर्ण्य पौंड्रकस्याल्पमेधसः ॥ उग्रसेनादयः सभ्या उच्चकैर्जहसुस्तदा ॥ ७ ॥ उवाच दूतं भगवान्परिहासकथामनु ॥ उत्स्रक्ष्ये मूढ चिह्नानि यैस्त्वमेवं विकत्थसे ॥ ८ ॥

बालैर्नृपत्वेन क्रीडायां परिकल्पितः ॥ ३ ॥ ४ ॥ ५ ॥ ६ ॥ ७ ॥ हे मूढ उत्स्रक्ष्ये त्वयि प्रक्षेप्स्यामि । यैः सह त्वमेवं विकत्थसे तेष्वपीत्यर्थः । यद्वा यैः कृत्रिमैः सुदर्शनादिभिस्त्वमेवं श्लाघसे तान्युत्स्रक्ष्ये त्याजयिष्यामीत्यर्थः ॥ ८ ॥

नाहीं त्या श्रीकृष्णाकडे द्वारकेंत दूत पाठविला ॥ ३ ॥ तो दूत, द्वारकेंत येऊन, सुधर्मा सभेमध्यें बसलेल्या समर्थ कमलपत्राक्ष श्रीकृष्णाला पौंड्रकाचा निरोप सांगूं लागला कीं, ॥ ४ ॥ पौंड्रकाचें वचन दूत सांगतो—भगवान् वासुदेव मी एकच असून प्राण्यांवर दया करण्याकरितां अवतीर्ण झालों आहें, दुसरा कोणी वासुदेव नाहीं. तूं तर खोटेंच वासुदेव हें नांव धारण करितोस, यास्तव तूं त्या नांवाचा त्याग कर ॥ ५ ॥ आणि हे कृष्णा, तूं मूढपणामुळें जीं आमचीं शंखचक्रादिक चिन्हें धारण करित आहेस तीं टाकून मला शरण ये, नाहींतर माझ्याबरोबर युद्ध करण्यास सिद्ध हो ॥६॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, मंदभाग्य अशा पौंड्रकाचें दूतानें सांगितलेलें तें दुर्वचन श्रवण करून, त्यावेळीं सभेंत बसलेले उग्रसेनादिक लोक मोठ्यानें हसूं लागले ॥ ७ ॥ नंतर सभेमध्यें त्या पौंड्रकाची बराच वेळपर्यंत थट्टा चालल्यावर भगवान् श्रीकृष्ण दूताला ह्मणाला—तूं पौंड्रकाला माझें वाक्य असें सांग कीं, हे मूर्खा, ज्या धारण केलेल्या कृतीच्या चिन्हांनीं तूं आपली प्रशंसा करून घेतोस तीं चिन्हें मी तुजकडून

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

टाकवितों किंवा तीं मी आपलीं चक्रादिक चिन्हें युद्धामध्यें तुझ्यावर व तूं ज्यांच्यासहवर्तमान आपली प्रशंसा करून घेतोस त्या चिन्हांवर टाकितों ॥ ८ ॥ मला शरण ये असें म्हटलेंस त्याचें उत्तर हें कीं,– हे मूढा, ज्या मुखानें तूं अशी बडबड करितोस तो तूं, मी मारिला असतां आपलें मुख पसरून कंक, गृध्र आणि वट या पक्ष्यांनीं वेष्टित होत्साता जेव्हां रणभूमीवर शयन करिशील तेव्हां तेथें फिरणाऱ्या श्वानादिकांना शरण जाशील, म्हणजे ते तुला तोडून तोडून खातील ॥ ९ ॥ याप्रमाणें भगवंतानें सांगितलें तें निंदावचन ऐकून त्या दूतानें आपल्या स्वामी पौंड्रकाकडे येऊन तें सर्व निवेदन केलें. त्यावेळीं पौंड्रक राजा, आपल्या मित्राच्या काशीनामक नगरामध्यें होता म्हणून श्रीकृष्णानेंहि रथावर बसून त्या काशीनगरावर स्वारी केली ॥ १० ॥ महारथी पौंड्रकानेंहि श्रीकृष्णाचा युद्धोद्योग पाहून, दोन अक्षौहिणी सैन्य बरोबर घेऊन युद्ध करण्याकरितां त्वरेनें नगरांतून बाहेर निघाला ॥ ११ ॥ हे राजा, त्या पौंड्रकाचा काशिराजा मित्र होता म्हणून तो त्याला सहायभूत होण्याकरितां आपल्या तीन

मां शरणमेहीत्यस्योत्तरम् । मुखमिति । वटाः कंकादिवत्पक्षिविशेषाः । तत्र तदा श्वनां शरणमाश्रयो भविताऽसि ॥ ९ ॥ काशीमिति । पौंड्रकस्यापि तदा मित्रपुरेऽवस्था

मुखं तदपिधायाज्ञ कंकगृध्रवटैर्वृतः ॥ शयिष्यसे हतस्तत्र भविता शरणं शुनाम् ॥ ९ ॥ इति दूतस्तदाक्षेपं स्वामिने सर्वमाहरत् ॥ कृष्णोऽपि रथमास्थाय काशीमुपजगाम ह ॥ १० ॥ पौंड्रकोऽपि तदुद्योगमुपलभ्य महारथः ॥ अक्षौहिणीभ्यां संयुक्तो निश्चक्राम पुराद्द्रुतम् ॥ ११ ॥ तस्य काशीपतिर्मित्रं पार्ष्णिग्राहोऽन्वयान्नृप ॥ अक्षौहिणीभिस्तिसृभिरपश्यत्पौंड्रकं हरिः ॥ १२ ॥ शंखार्यसिगदाशार्ङ्गश्रीवत्साद्युपलक्षितम् ॥ बिभ्राणं कौस्तुभमणिं वनमालाविभूषितम् ॥ १३ ॥ कौशेयवाससी पीते वसानं गरुडध्वजम् ॥ अमूल्यमौल्याभरणं स्फुरन्मकरकुंडलम् ॥ १४ ॥ दृष्ट्वा तमात्मनस्तुल्यवेषं कृत्रिममास्थितम् ॥ यथा नटं रंगगतं विजहास भृशं हरिः ॥ १५ ॥ शूलैर्गदाभिः परिघैः शक्त्यृष्टिप्रासतोमरैः ॥ असिभिः पट्टिशैर्बाणैः प्राहरन्नरयो हरिम् ॥ १६ ॥ कृष्णस्तु तत्पौंड्रककाशिराजयोर्बलं गजस्यंदनवाजिपत्तिमत् ॥ गदासिचक्रेषुभिरार्दयद्भृशं यथा युगांते हुतभुक्पृथक्प्रजाः ॥ १७ ॥

नात् ॥ १० ॥ ११ ॥ पार्ष्णिग्राहः पृष्ठतो रक्षकः ॥ १२ ॥ १३ ॥ गरुडः कृत्रिमो ध्वजे यस्य तम् । अमूल्योऽनर्घ्यो मौलिराभरणं च यस्य तम् ॥ १४ ॥ १५ ॥ १६ ॥ गजस्यंदनादिचतुरंगबलमर्दितवान् । पृथक् प्रजाश्चतुर्विधं भूतग्रामं यथा युगांताग्निरिति ॥ १७ ॥

अक्षौहिणी सैन्यासहवर्तमान त्याला सहाय करण्यास गेला. तेव्हां श्रीकृष्णानें पौंड्रकाला पाहिलें ॥ १२ ॥ तें असें कीं, शंख, चक्र, खड्ग, गदा, शार्ङ्ग श्रीवत्स इत्यादिक चिन्हांनीं उपलक्षित, कौस्तुभमणि धारण करणारा, वनमालेनें भूषित, रेशमी पिंवळीं वस्त्रें धारण करणारा, ध्वजावर कृतीचा गरुड करून बसविलेला, अमोलिक किरीट व अन्यहि भूषणें धारण करणारा, कर्णवेष्ठिकाणीं मकराकार कुंडलें स्फुरण पावणारा ॥ १३ ॥ १४ ॥ आणि जसा नृत्यस्थानाचेठिकाणीं रामादिकांचा वेष धारण करणारा नट असतो त्याप्रमाणें कृतीच आपल्यासारख्या वेष स्वीकारणारा अशा त्या पौंड्रकाला अवलोकन करून, श्रीकृष्णानें मोठ्यानें हास्य केलें ॥ १५ ॥ नंतर ते शत्रु शूल, गदा, परिघ, शक्ति, ऋष्टि, प्रास, तोमर, खड्ग, पट्टिश व बाण यांच्या योगानें श्रीकृष्णावर प्रहार करूं लागले ॥ १६ ॥ श्रीकृष्णानें तर, हत्ति, रथ, घोडे व पायदळ यांनीं युक्त अशा त्या पौंड्रककाशिराजांच्या सैन्यास गदा, खड्ग, चक्र व बाण यांच्या योगेंकरून, जसा प्रळयकालीं अग्नि, जरायुजादि चतुर्विध प्राणि

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

समूहांना पीडित करितो त्याप्रमाणें पीडित करून मारून टाकिलें ॥ १७ ॥ त्यावेळीं चक्राच्या योगानें चुराडा करून टाकिलेल्या रथ, घोडे, हत्ति, शिपाई, गर्दभ व उंट यांनीं व्याप्त झालेलें तें युद्धस्थळ, शूरपुरुषांना हर्ष करित होत्सातें, कल्पांतीं भयंकर असलेल्या श्रीरुद्राच्या क्रीडास्थानासारखें शोभूं लागलें ॥ १८ ॥ नंतर श्रीकृष्ण पौंड्रकाला ह्मणाला कीं, हे हे पौंड्रका 'जीं आमचीं अस्त्रें धारण करितोस तीं टाकून दे असें' जें तूं दूतमुखानें मला ह्मणाला होतास तीं अस्त्रें आतां तुझ्या वधाकरितां तुझ्यावर मी टाकितों ॥ १९ ॥ आणि हे मूर्खा, वासुदेव असें जें माझें नांव खोटेंच तूं धारण केलें आहेस तें तुझ्या कडून टाकवितों आणि जर युद्ध इच्छित नसेन ह्मणजे युद्धापासून भ्यालों असेन तर आतां तुला शरण येईन ॥ २० ॥ याप्रमाणें भाषणाच्या योगानें त्याचा धिक्कार करून

आयोधनं रणस्थानम् । अरिणा चक्रेण चित्रमाकीर्णम् । आक्रीडनमिव कल्पांतरुद्रस्य क्रीडास्थानमिव ॥ १८ ॥ १९ ॥ २० ॥ गिरेः शृंगं यथेति ॥ २१ ॥ २२ ॥ २३ ॥

कृष्णास पाहिलें ॥ ३० ॥ ३१ ॥ दुसरेजागीं त्यात्यासमयीं पुत्रांचे त्यांना योग्य अशा स्त्रियांबरोबर व कन्यांचे त्यांना योग्य अशा वरांबरोबर शास्त्रोक्तप्रकारेंकरून विवाह जमविण्याचे ठराव करणाऱ्या व विवाह झालेल्यांना ऐश्वर्यवगैरे देऊन संपन्न करणाऱ्या, कोठें कन्यांना सासरीं पाठविणें, व जांवयांना घरीं आणणें हीं करणाऱ्या, आणि कोठें मुलांचें जातकर्मादिक संस्कारमहोत्साह करणाऱ्या श्रीकृष्णास पाहिलें. योगेश्वरांचा ईश्वर अशा श्रीकृष्णाच्या ज्या मुलांच्या महोत्सवांना पाहून सर्वहि लोक विस्मय पावले आहेत ॥ ३२ ॥ ३३ ॥ कोठें आपलेच अंशभूत अशा सर्व देवांचें बहुदक्षिणादियुक्त यज्ञांनीं आराधन करणाऱ्या, कोठें विहिरी बांधणें, आरामबागा तयार करणें व मठवगैरे बांधणें इत्यादिकेंकरून पूर्तनामक स्मार्तधर्माचें आचरण करणाऱ्या, कोठें श्रेष्ठ श्रेष्ठ यादवांसहवर्तमान सिंधुदेशांतल्या

काले तत्तत्समये विधिना उपयापनं प्रापणं विवाहमित्यर्थः । कल्पयंतं घटयंतम् । विभूतिभिर्विभवैः ॥३२॥ प्रस्थापनं दुहितृजामात्रादीनां स्वगृहात्तत्तद्गृहंप्रति नयनम् । उपानयन तत्तद्गृहात्पुनरानयनम् । तैर्महोत्सवान्कल्पयंतम् । योगेश्वरेशस्य तेषामपत्यानां महोत्सवान्वीक्ष्य लोकाः सर्वे विसिस्मिरे विस्मयं चक्रुः । तथाभूतान् कल्पयंतम् ॥ ३३ ॥ ३४ ॥

पुत्राणां दुहितॄणां च काले विध्युपयापनम् ॥ दारैर्वरैस्तत्सदृशैः कल्पयंतं विभूतिभिः ॥ ३२ ॥ प्रस्थापनोपानयनैरपत्यानां महोत्सवान् ॥ वीक्ष्य योगेश्वरेशस्य येषां लोका विसिस्मिरे ॥ ३३ ॥ यजंतं सकलान्देवान्कापि क्रतुभिरूर्जितैः ॥ पूर्तयंतं क्वचिद्धर्मं कूपाराममठादिभिः ॥ ३४ ॥ चरंतं मृगयां क्वापि हयमारुह्य सैंधवम् ॥ घ्नंतं ततः पशून्मेध्यान्परीतं यदुपुंगवैः ॥ ३५ ॥ अव्यक्तलिंगं प्रकृतिष्वंतःपुरगृहादिषु ॥ क्वचिच्चरंतं योगेशं तत्तद्भावबुभुत्सया ॥ ३६ ॥ अथोवाच हृषीकेशं नारदः प्रहसन्निव ॥ योगमायोदयं वीक्ष्य मानुषीमीयुषो गतिम् ॥ ३७ ॥ विदाम योगमायास्ते दुर्दर्शा अपि मायिनाम् ॥ योगेश्वरात्मन्निर्भाता भवत्पादनिषेवया ॥ ३८ ॥ अनुजानीहि मां देव लोकांस्ते यशसाप्लुतान् ॥ पर्यटामि तवोद्गायँल्लीलां भुवनपावनीम् ॥ ३९ ॥

॥ ३५ ॥ अव्यक्तलिंगं वेषांतरेण छन्नम् ॥ ३६ ॥ ३७ ॥ हे योगेश्वर आत्मन् आत्मनि मम मनसि तव स्वरूपे वा निर्भाताः प्रतीतास्तव योगमायाः केवलं विदाम विद्मः । नतु त्वत्परमार्थमिति भावः ॥ ३८ ॥ त्वन्मानुष्यनाट्येन मुह्याम्यतो मां प्रस्थापयेत्याह । अनुजानीहीति ॥ ३९ ॥

घोड्यावर बसून मृगया करणाऱ्या व त्या मृगयेमध्यें श्राद्धादिकांस योग्य अशा पशूंचा वध करणाऱ्या श्रीकृष्णास पाहिलें ॥ ३४ ॥ ३५ ॥ कोठें प्रधानांचे व अंतःपुरादिकांमध्यें असणाऱ्या त्या त्या लोकांचे अभिप्राय जाणण्याच्या इच्छेनें वेषांतरानें आपलें चिन्ह आच्छादित करून संचार करणाऱ्या त्या योगेश्वर कृष्णास अवलोकन केलें ॥ ३६ ॥ याप्रमाणें मनुष्याची चेष्टा ग्रहण करणाऱ्या भगवंताचें आचिंत्यशक्तिवैभव पाहून तो नारद हास्य करित होत्साता त्या श्रीकृष्णाला ह्मणाला कीं- ॥ ३६ ॥ हे योगेश्वरा, हे आत्मस्वरूपा, तुझ्या योगमाया, मायावी असलेल्या ब्रह्मादिकांनाहि जाणण्यास अशक्य आहेत खऱ्या परंतु तुझ्या चरणसेवेच्या प्रभावानें तुझ्यास्वरूपींच स्फुरण पावत आहेत असें आम्हीं जाणतों. तुझें खरें तत्त्व कांहीं आम्हांस समजत नाहीं ॥३८॥ आतां तुझ्या मनुष्यनाट्यानें मी मोह पावलों आहें, यास्तव तूं माझी पाठवणूक कर असें सांगतो-हे देवा, ब्रह्मांडाला पवित्र करणाऱ्या तुझ्या लीलेचें गायन करीत तुझ्या यशानें व्याप्त झालेल्या लोकांमध्यें मी जसा संचार करीन तशी तूं मला आज्ञा ॥२१८॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

चावीस ॥ ३९ ॥ असें नारदाचें भाषण ऐकून श्रीभगवान् ह्मणाला–हे नारदऋषे, मी शास्त्रद्वारा धर्माचा उपदेश करणारा, स्वतः आचरण करणारा, व दुसऱ्याला अनुमोदन देणारा आहें यास्तव लोकांना शिक्षण मिळण्याकरितांच मी हें धर्माचें आचरण करीत आहें. ह्मणून हे पुत्रा नारदा, माझें उलटें भगवंतानें पादप्रक्षालनवगैरे केलें असें मनांत आणून खेद पावूं नकोस ॥ ४० ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, याप्रमाणें अनुग्रह केलेला तो नारद, गृहस्थाश्रम्यांना पवित्र करणाऱ्या व सद्धर्माचें आचरण करून दाखविणाऱ्या त्या कृष्णाला हा सर्व घरांमध्यें एकच आहे असें पाहूं लागला ॥ ४१ ॥ आणि त्यावेळीं अनंतपराक्रमी श्रीकृष्णाच्या अचिंत्यशक्तीच्या बळाचें सामर्थ्य वारंवार पाहून तो नारदऋषि, कौतुकयुक्त व विस्मित झाला ॥ ४२ ॥ असो. याप्रकारेंकरून धर्म, अर्थ व काम यांचेठिकाणीं श्रद्धायुक्तचित्त अशा श्रीकृष्णानें उत्तम सत्कार

तत्तस्माल्लोकं शिक्षयन्निमं धर्ममास्थितो न तु तत्त्वतः। हे पुत्र मा खिदः मोहं मा प्राप्नुहीति ॥ ४० ॥ इत्येवमनुगृहीतस्तमेकमेव संतं ददर्शेति ॥ ४१ ॥ मुहुर्मुहुर्दृष्ट्वा जातकौतुको मुनिर्विस्मितोऽभूदिति ॥ ४२ ॥ श्रद्धितः श्रद्धया युक्त आत्मा यस्य तेन ॥ ४३ ॥ नारददृष्टां श्रीकृष्णलीलां निगमयति । एवमिति । अखिलस्य भवायोद्भवाय गृहीताः शक्त-

श्रीभगवानुवाच ॥ ब्रह्मन्धर्मस्य वक्ताऽहं कर्ता तदनुमोदिता ॥ तच्छिक्षयँल्लोकमिममास्थितः पुत्र मा खिदः ॥ ४० ॥ श्रीशुक उवाच ॥ इत्याचरंतं सद्धर्मान्पावनान्गृहमेधिनाम् ॥ तमेव सर्वगेहेषु संतमेकं ददर्श ह ॥ ४१ ॥ कृष्णस्यानंतवीर्यस्य योगमाया-महोदयम् ॥ मुहुर्दृष्ट्वा ऋषिरभूद्विस्मितो जातकौतुकः ॥ ४२ ॥ इत्यर्थकामधर्मेषु कृष्णेन श्रद्धितात्मना ॥ सम्यक्सभाजितः प्रीत-स्तमेवानुस्मरन्ययौ ॥ ४३ ॥ एवं मनुष्यपदवीमनुवर्तमानो नारायणोऽखिलभवाय गृहीतशक्तिः॥ रेमेंऽग षोडशसहस्रवरांगनानां सव्रीडसौहृदनिरीक्षणहासजुष्टः ॥ ४४ ॥ यानीह विश्वविलयोद्भववृत्तिहेतुः कर्माण्यनन्यविषयाणि हरिश्चकार ॥ यस्त्वंग गायति शृणोत्यनुमोदते वा भक्तिर्भवेद्भगवति ह्यपवर्गमार्गे ॥ ४५ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे उत्तरार्धे कृष्णगार्हस्थ्यदर्शनं नामैकोनसप्ततितमोऽध्यायः ॥ ६९ ॥ ॥

यो नानामूर्तयो येन सः सव्रीडं च तत्सौहृदं च तेन निरीक्षणं हासश्च ताभ्यां जुष्टः ॥ ४४ ॥ अनन्यविषयाण्यसाधारणानि । अपवर्गमार्गे मोक्षप्रदे ॥ ४५ ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधे उत्तरार्धे टीकायामेकोनसप्ततितमोऽध्यायः ॥ ६९ ॥ ॥

केल्यामुळें संतुष्ट झालेला तो नारद, त्याच श्रीकृष्णाचें वारंवार स्मरण करीत करीत निघून गेला ॥ ४३ ॥ आतां, नारदानें पाहिलेल्या श्रीकृष्णलीलेचा संक्षेप सांगतो–हे राजा, याप्रमाणें मनुष्यरीतीला अनुसरणारा, व सर्व प्राणिमात्रांच्या उत्कर्षाकरितां नानाप्रकारच्या शक्ति ग्रहण करणारा तो नारायण श्रीकृष्ण, सोळाहजार एकशें आठ सुंदर स्त्रियांच्या सलज्ज प्रेमपूर्वक अवलोकनानें व हास्यानें सेवित होत्साता त्यांच्यासहवर्तमान रममाण झाला ॥ ४४ ॥ हे राजा, जगाच्या उत्पत्तिस्थितिसंहारांविषयीं कारण अशा भगवान् हरीनें, या श्रीकृष्णवतारामध्यें दुसऱ्या पुरुषांनीं करण्यास अशक्य अशीं जीं कर्में केलीं आहेत, त्यांचें जो पुरुष गायन करितो, श्रवण करितो किंवा दुसऱ्यानें गायन केलीं असतां त्यांची प्रशंसा करितो, त्या पुरुषाला मोक्षप्रापक अशा त्या भगवंताचेठिकाणीं भक्ति प्राप्त होते ॥ ४५ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील दशमस्कंधाच्या उत्तरार्धांत नारददृष्टकृष्णचरितनिरूपणनामक हा एकुणसत्तरावा अध्याय समाप्त झाला ॥ ६९ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां ह्या सत्तराव्या अध्यायामध्यें, श्रीकृष्णाच्या आन्हिक कर्माचें अनुक्रमानें निरूपण असून राजदूतानें व नारदानें कळविलेल्या कार्यांच्या सिद्धतेविषयीं श्रीकृष्णानें विचार केला, अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, आतां श्रीकृष्णाच्या आन्हिककृत्याचा प्रकार सांगतों ऐक– प्रभातकाळ जवळ आला असतां, अनेक कृष्णमूर्तींनीं कंठाचेठिकाणीं आलिंगन केलेल्या कृष्णस्त्रिया, पुढें होणाऱ्या कृष्णविरहानें दुःखित होत्सात्या प्रभातकाळसूचक शब्द करून निजलेल्या कृष्णाला जागे करणाऱ्या कुकुटांना, तुह्मी लवकर मरानांकां असा शाप देऊं लागल्या ॥ १ ॥ त्यावेळीं मंदारवनसंबंधी वाऱ्यांनीं पुष्पांचा रस ग्रहण करण्याविषयीं आसक्त झालेले भ्रमर, गुंजारवशब्द करूं लागले असतां जागृत झालेले पक्षी, स्तुतिपाठकांसारखे निजलेल्या श्रीकृष्णाला जागृत करीत होत्साते अतिशयेंकरून शब्द करूं लागले

ततस्तु सप्ततितमे कृष्णस्याह्निककर्मणि ॥ दूतनारदयोः कार्ये कार्यमंत्रविचारणम् ॥ १ ॥ जगन्मंगलचारित्रमाह्निकं जगदीशितुः ॥ नारदेन कविर्तिकिंचिद्दृष्टमाह यथाक्रमम् ॥ २ ॥ अथेति । इत्यर्थकामधर्मेषु कृष्णेन श्रद्धितात्मनेति प्रस्तुतस्य श्रीकृष्णस्याह्निकस्यधिकारेऽथशब्दः । उपवृत्तायामासन्नायाम् । पतिभिः श्रीकृष्णैः । माधव्यो माधवस्य भार्याः ॥ १ ॥ बंदिन इव श्रीकृष्णं बोधयंति संति वयांसि पक्षिणोऽरूरुवन्नतिशयेनाकूजन् । मंदारवनवायुभिर्गायत्स्वलिष्वनिद्राणि निद्रारहितानि वयांसि ॥ २ ॥ वैदर्भीत्युपलक्षणम् । परिरंभणविश्लेषार्त्तं पर्यालोच्य ॥ ३ ॥ ४ ॥ एकमखंडम् । तत्र हेतुः । अनन्यं निरुपाधिं अतएवाव्ययं नित्यम् । स्वयंज्योतिष्ट्वे हेतुः । नित्यनिरस्तं

श्रीशुक उवाच ॥ अथोषस्युपवृत्तायां कुक्कुटान्कूजतोऽशपन् ॥ गृहीतकंठ्यः पतिभिर्माधव्यो विरहातुराः ॥ १ ॥ वयांस्यरूरुवन्कृष्णं बोधयंतीव बंदिनः ॥ गायत्स्वलिष्वनिद्राणि मंदारवनवायुभिः ॥ २ ॥ मुहूर्तं तं तु वैदर्भी नामृष्यदतिशोभनम् ॥ परिरंभणविश्लेषात्प्रियबाह्वंतरं गता ॥ ३ ॥ ब्राह्मे मुहूर्त उत्थाय वार्युपस्पृश्य माधवः ॥ दध्यौ प्रसन्नकरण आत्मानं तमसः परम् ॥ ४ ॥ एकं स्वयंज्योतिरनन्यमव्ययं स्वसंस्थया नित्यनिरस्तकल्मषम् ॥ ब्रह्माख्यमस्योद्भवनाशहेतुभिः स्वशक्तिभिर्लक्षितभावनिर्वृतिम् ॥ ५ ॥ अथाप्लुतोंऽभस्यमले यथाविधि क्रियाकलापं परिधाय वाससी ॥ चकार संध्योपगमादि सत्तमो हुतानलो ब्रह्म जजाप वाग्यतः ॥ ६ ॥

नित्यनिवृत्तं कल्मषमविद्या यस्मात्तम् । उपलक्षणमाह । अस्येति । अस्य विश्वस्य लक्षितभावश्चासौ निर्वृतिश्च । भावः सत्ता । निर्वृतिरानंदः । तथाहि । गुणक्षोभात्पूर्वं सत्तामात्रं यः सदेव सोम्येदमग्र आसीदित्यादिश्रुतेः । स एवानंदश्च विज्ञानमानंदमित्यादि श्रुतेः । तं सदानंदमित्यर्थः ॥ ५ ॥ आप्लुतः स्नातः संध्याया उपगम उपासनमादिर्यथा भवति तथा क्रियाकलापं चकार । काण्वत्वादुदयात्पूर्वमेव हुतानलः ब्रह्म गायत्रीं जजाप ॥ ६ ॥

॥ २ ॥ त्यावेळीं प्रिय श्रीकृष्णाच्या बाहूंमध्यें असलेल्या (कृष्णानें आलिंगन केलेल्या) रुक्मिणीवगैरे सर्व स्त्रियांनीं, आलिंगनापासून वियोग होत असल्यामुळें, स्नान पूजनादिकांस योग्य ह्मणून अतिपवित्र अशाहि त्या ब्राह्ममुहूर्ताला चांगला असें मानिलें नाहीं ॥ ३ ॥ श्रीकृष्णानें तर त्या ब्राह्ममुहूर्ताचे वेळीं उठून हस्तपादादिकांचें प्रक्षालनपूर्वक उदकाचें आचमन करून, प्रसन्न इंद्रियांनीं युक्त होऊन प्रकृतीहून पर अशा आत्म्याचें चिंतन केलें ॥ ४ ॥ तें असें कीं,–अखंड, स्वप्रकाश, निरुपाधिक, नित्य, ज्यापासून निरंतर अविद्यादिदोष स्वरूपस्थितीनें निवृत्त झाले आहेत अशा आणि ज्याचे सत्ता आणि आनंद हे धर्म, या जगाच्या उत्पत्तिनाशांना कारणीभूत असलेल्या रजःसत्वादिक शक्तींनीं समजण्यांत येत आहेत अशा ब्रह्मनामक आपल्या स्वरूपाचें चिंतन केलें ॥ ५ ॥ नंतर, सत्पुरुषांमध्यें श्रेष्ठ अशा त्या श्रीकृष्णानें, शुद्ध उदकामध्यें स्नान करून व वस्त्रें परिधान करून संध्योपासनादिक कर्मसमूहाचें यथाशास्त्र आचरण केलें. त्यांत श्रीकृष्णाची काण्वशाखा असल्यामुळें त्यानें सूर्योदयाच्या पूर्वींच अग्नी- ॥२१९॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मध्यें होम करून मौनव्रतानें गायत्रीमंत्राचा जप केला ॥ ६ ॥ नंतर, उदय पावणाऱ्या सूर्याचें उपस्थान करून, आपलेच अंशभूत अशा देव, ऋषि व पितर यांचें तर्पण करून, स्वरूपसाक्षात्कारानें युक्त अशा त्यानें, वृद्धांचें व ब्राह्मणांचें पूजन केलें आणि अलंकार अर्पण केलेल्या त्या ब्राह्मणांना, ज्यांचीं शिंगें सुवर्णानें बांधविलेलीं आहेत, ज्यांच्या गळ्यांत मोंत्याच्या माळा घातलेल्या आहेत, ज्यांना उत्तम वस्त्रांच्या झुली घातलेल्या आहेत व ज्यांचे खुर रुप्यानें मढविलेले आहेत अशा पुष्कळ दूध देणाऱ्या, स्वभावानें गरीब, प्रथमच प्रसूत व सवत्स अशा गाईंचे एकेक बद्व १३०८४ दररोज प्रत्येक घरीं, रेशमी पाटावें, कृष्णाजिनें व तिळ यांसहवर्तमान दान केलें ॥ ७ ॥ ८ ॥

कला अंशान्देवान् ऋषीन्पितृंश्च तर्पयित्वा ॥ ७ ॥ गृष्टीनां प्रथमप्रसूतानाम् ॥ ८ ॥ बद्वमिति । हिरण्येन परीवृतान् कृष्णान् शुक्लदतो मृगान् ॥ मष्णारे भरतोऽददाच्छतं बद्वानि सप्त चेति श्रुत्युक्तानि सप्तोत्तरशतं बद्वान्येकीकृत्य पुराणे चतुर्दशलक्षत्वेन गणितानि । यथोक्तं भरतमेवाधिकृत्य नवमस्कंधे । मृगान् शुक्लदतः कृष्णान्सुवर्णेन परिष्कृतात् ॥ अदात्कर्मणि मष्णारे नियुतानि चतुर्दशेति । ततश्चेयं बद्वसंख्याश्लोकेन संगृह्यते । चतुर्दशानां लक्षाणां सप्ताधिकशतांशकः ॥ बद्वं चतुरशीत्यग्रसहस्राणि त्रयोदशेति ।

उपस्थायार्कमुद्यंतं तर्पयित्वाऽऽत्मनः कलाः ॥ देवानृषीन्पितॄन्वृद्धान्विप्रानभ्यर्च्य चात्मवान् ॥ ७ ॥ धेनूनां रुक्मशृंगीणां साध्वीनां मौक्तिकस्रजाम् ॥ पयस्विनीनां गृष्टीनां सवत्सानां सुवाससाम् ॥ ८ ॥ ददौ रूप्यखुराग्राणां क्षौमाजिनतिलैः सह ॥ अलंकृतेभ्यो विप्रेभ्यो बद्वं बद्वं दिनेदिने ॥ ९ ॥ गोविप्रदेवतावृद्धगुरून्भूतानि सर्वशः ॥ नमस्कृत्यात्मसंभूतीर्मंगलानि समस्पृशत् ॥ १० ॥ आत्मानं भूषयामास नरलोकविभूषणम् ॥ वासोभिर्भूषणैः स्वीयैर्दिव्यस्रगनुलेपनैः ॥ ११ ॥ अवेक्ष्याज्यं तथाऽऽदर्शं गोवृषद्विजदेवताः ॥ कामांश्च सर्ववर्णानां पौरांतःपुरचारिणाम् ॥ प्रदाप्य प्रकृतीः कामैः प्रतोष्य प्रत्यनंदत ॥ १२ ॥ संविभज्याग्रतो विप्रान्स्रक्तांबूलानुलेपनैः ॥ सुहृदः प्रकृतीर्दारानुपायुंक्त ततः स्वयम् ॥ १३ ॥ तावत्सूत उपानीय स्यंदनं परमाद्भुतम् ॥ सुग्रीवाद्यैर्हयैर्युक्तं प्रणम्यावस्थितोऽग्रतः ॥ १४ ॥

दिने दिने च प्रतिगृहं चेति ॥ ९ ॥ आत्मसंभूतीः स्वविभूतीः । मंगलानि कपिलादीनि ॥ १० ॥ नरलोकस्य विभूषणरूपमात्मानम् । स्वीयैः पीतांबरकौस्तुभादिभिः ॥ ११ ॥ कामानभिलषितानर्थान् ॥ १२ ॥ वि प्रादीन्स्रगादिभिः संविभज्य । तेभ्यस्तानि दत्वेत्यर्थः । उपायुंक्त भोगार्थमग्रहीत् ॥ १३ ॥ १४ ॥

॥ ९ ॥ नंतर, त्यानें आपल्या विभूतिरूप गाई ब्राह्मण, देवता, वृद्ध, गुरु आणि सर्वभूतें यांना नमस्कार करून, कपिला गाईवगैरे मंगल द्रव्यांस स्पर्श केला ॥ १० ॥ नंतर, मनुष्यलोकाला विशेषेंकरून भूषणभूत अशा आपणाला आपल्या पीतांबरादिक वस्त्रांनीं, कौस्तुभादिक भूषणांनीं व दिव्य अशा माळांनीं व अनुलेपनांनीं भूषित केलें ॥ ११ ॥ नंतर, मंगलाकरितां घृतामध्यें व आरशामध्यें आपलें प्रतिबिंब पाहून, तशाच गाई, वृषभ, ब्राह्मण व देवता यांचें दर्शन घेऊन नगरामध्यें राहणाऱ्या सर्ववर्णांना व अंतःपुरांतील सर्वजनांना इच्छित पदार्थ देववून व अमात्यादिकांना इच्छित विषयांनीं संतुष्ट करून अभिनंदन केलें ॥ १२ ॥ नंतर, श्रीकृष्णानें प्रथमतः ब्राह्मण, मित्र, प्रधान व स्त्रिया यांना माळा तांबूल व उट्यावगैरे उपभोग्य पदार्थांचा विभाग देऊन नंतर त्यांचा भोगाकरितां आपण स्वीकार केला ॥ १३ ॥ इतक्यामध्यें दारुक सारथी, सुग्रीवादिक नांवांचे

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

घोडे जोडलेला परमाश्चर्यकारक रथ जवळ आणून उभा करून आपण अग्रभागीं प्रणाम (मुजरा) करून उभा राहिला असतां ॥ १४ ॥ श्रीकृष्णानें, आपल्या हातानें त्याचे जोडलेले हात धरून, सात्यकि व उद्धव यांच्यासहवर्तमान त्या रथावर, जसा उदयपर्वतावर सूर्य आरोहण करितो त्याप्रमाणें आरोहण केलें ॥ १५ ॥ त्यावेळीं लज्जा व प्रेम यांसहित अंतःपुरांतील स्त्रियांच्या दृष्टींनीं अवलोकित होत्साता, क्षणभर हळूहळू चालविलेल्या रथांत स्थित होऊन, नंतर त्या स्त्रियांनींच अवलोकनद्वारा मोठ्या दुःखानें जावयास आज्ञा दिली असतां, किंचित् हास्य करून, त्यांचें मन हरण करित होत्साता निघून गेला ॥ १६ ॥ याप्रमाणें सर्व घरांतून निरनिराळ्या रूपानें निघून नंतर एकाच रूपानें, सर्व यादवांनीं परिवेष्टित होऊन तो श्रीकृष्ण, सुधर्मानामक सभेमध्यें प्रविष्ट झाला. हे राजा, ज्या सभेमध्यें प्रविष्ट झालेल्या पुरुषांना क्षुधा, तृषा, शोक, मोह, जरा व मृत्यु हे सहा विकार प्राप्त होत नाहींत ॥ १७ ॥ त्या सभेमध्यें उत्तम आसनावर बसलेला व मनुष्यश्रेष्ठ अशा यादवांनीं परिवेष्टित झालेला तो समर्थ भगवान् श्रीकृष्ण, आपल्या कांतीनें दिशांना प्रकाशयुक्त करित होत्साता, जसा आकाशामध्यें नक्षत्रगणांनीं परिवेष्टित असलेला चंद्र, सर्वदिशांना प्रकाशयुक्त करीत शोभ-

---

पाणी कृतेंऽजलौ गृहीत्वा ॥ १५ ॥ सव्रीडप्रेमवीक्षितैरीक्षितः क्षणं स्थितस्ताभिरेव वीक्षितैः कृच्छ्राद्विसृष्टो निरागादिति ॥ १६ ॥ एवं सर्वगृहेभ्यः पृथक् पृथङ्निर्गत्यानंतर-

गृहीत्वा पाणिना पाणी सारथेस्तमथारुहत् ॥ सात्यक्युद्धवसंयुक्तः पूर्वाद्रिमिव भास्करः ॥ १५ ॥ ईक्षितोऽतःपुरस्त्रीणां सव्रीडप्रेमवीक्षितैः ॥ कृच्छ्राद्विसृष्टो निरगाज्जातहासो हरन्मनः ॥ १६ ॥ सुधर्माख्यां सभां सर्वैर्वृष्णिभिः परिवारितः ॥ प्राविशद्यन्निविष्टानां न संत्यंग षडूर्मयः ॥ १७ ॥ तत्रोपविष्टः परमासने विभुर्बभौ स्वभासा ककुभोऽवभासयन् ॥ वृतो नृसिंहैर्यदुभिर्यदूत्तमो यथोडुराजो दिवि तारकागणैः ॥ १८ ॥ तत्रोपमंत्रिणो राजन्नानाहास्यरसैर्विभुम् ॥ उपतस्थुर्नटाचार्या नर्तक्यस्तांडवैः पृथक् ॥ १९ ॥ मृदंगवीणामुरजवेणुतालदरस्वनैः ॥ ननृतुर्जगुस्तुष्टुवुश्च सूतमागधबंदिनः ॥ २० ॥ तत्राहुर्ब्राह्मणाः केचिदासीना ब्रह्मवादिनः ॥ पूर्वेषां पुण्ययशसां राज्ञां चाकथयन्कथाः ॥ २१ ॥ तत्रैकः पुरुषो राजन्नागतोऽपूर्वदर्शनः ॥ विज्ञापितो भगवते प्रतीहारैः प्रवेशितः ॥ २२ ॥

मेक एव सन्सुधर्मां प्राविशत् । यन्निविष्टानां यत्र प्रविष्टानाम् ॥ १७ ॥ नृसिंहैर्नृषु श्रेष्ठैः ॥ १८ ॥ उपमंत्रिणः परिहासकाः । पृथक् पृथक् स्वस्वसमुदायैः ॥ १९ ॥ मृदंगादयः प्रसिद्धाः । दरः शंखः । सूतादयस्तुष्टुवुः ॥ २० ॥ ब्राह्मणा ब्रह्म वेदमाहुर्मंत्रान्व्याचक्षतेत्यर्थः । वादिनो वदनचतुराः ॥ २१ ॥ २२ ॥

तो त्याप्रमाणें शोभूं लागला ॥ १८ ॥ हे राजा, त्या सभेमध्यें मौजेनें थट्टेचीं भाषणें करणारे लोक, नानाप्रकारच्या हास्यरसांनीं त्या समर्थ कृष्णाला प्रसन्न करूं लागले. तसेच नटांचे आचार्य, मृदंग, वीणा, तबले, सारंग्या, मुरल्या, झांजा व शंख यांच्या शब्दांसहवर्तमान निरनिराळ्या आपापल्या समुदायांनीं तांडवनृत्याच्या योगेंकरून त्या भगवंताची सेवा करूं लागले, तशाच नृत्य व गायन करणाऱ्या वारांगना, आपापल्या थव्यांनीं मृदंगादिक वाद्यांसहवर्तमान नृत्य व गायन करूं लागल्या, तसेच सूत, मागध व बंदी हे, भगवंताची स्तुति करूं लागले ॥ १९ ॥ २० ॥ त्या सभेमध्यें बसलेले कितीएक ब्राह्मण, वेदमंत्रांचें व्याख्यान करूं लागले, कितीएक बोलण्यामध्यें चतुर असलेले पौराणिक, पुण्ययशस्वी अशा पूर्वींच्या राजांच्या कथा कथन करूं लागले ॥ २१ ॥ याप्रमाणें प्रतिदिवशीं चालत असतां, हे राजा, एके दिवशीं कधींहि कोणी न पाहिलेला असा एक पुरुष, सभाद्वारांत प्राप्त झाला तेव्हां, द्वारपालांनीं भगवंताला कळवून त्याच्या आज्ञेनें त्या पुरुषाचा त्या सभेमध्यें प्रवेश करविला ॥ २२ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तेव्हां त्यानें हात जोडून कालकर्मांचाहि नियंता अशा श्रीकृष्णाला नमस्कार करून हात जोडून जरासंधानें बंदींत घातल्यामुळें राजांना जें दुःख प्राप्त झालें होतें तें निवेदन केलें ॥ २३ ॥ ह्मणजे त्या जरासंधाच्या दिग्विजयाचेवेळीं जे राजे नम्रता पावले नाहींत त्या वीस हजार आठशें राजांना गिरिव्रजनामक किल्ल्यामध्यें त्या जरासंधानें बलात्कारानें रोधून ठेविलें होतें, त्यांचें दुःख निवेदन केलें ॥ २४ ॥ आतां दूतानें कळविलेली राजांची विज्ञप्ति सांगतो—हे कृष्णा, हे कृष्णा, हे अप्रमेयस्वरूपा, हे शरणागतभयनाशका, जन्ममरणादिरूप संसारापासून भ्यालेले व भेदबुद्धि धारण करणारे आह्मीं तुला शरण आलों आहों ॥ २५ ॥ आतां, भेद पाहणाऱ्या पुरुषाला संसारभय कसें प्राप्त होतें त्याचें विवरण करीत नमस्कार करितात—या संसारामध्यें असलेला हा लोक, जोंपर्यंत काम्य व निषिद्ध कर्मामध्यें अत्यंत रममाण होऊन, तूं सांगि-

॥ २३ ॥ गिरिव्रजे तत्संज्ञके दुर्गे रुद्धा आसन् । तेषां च दुःखमावेदयदित्यन्वयः ॥ २४ ॥ कृष्णकृष्णेति षट्श्लोकी राज्ञां विज्ञप्तिस्तत्र प्रथमेन शरणाश्रयणं त्रिभिर्भयानुवादो द्वाभ्यां प्रार्थनमिति ॥ २५ ॥ पृथग्दर्शिनो लोकस्य भवभयं विवृण्वंतो नमंति । लोक इति । विकर्म निषिद्धं काम्यं च तस्मिन्नितरां रतः । स्वे कुशले धर्मे । भवतोऽर्चने त्वयोदिते पंचरात्रे । सामान्यतश्च गीतासु । यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ॥ यत्तपस्यसि कौंतेय तत्कुरुष्व मदर्पणमिति । प्रमत्तोऽनवहितो यावदयं लोकस्ताव-

स नमस्कृत्य कृष्णाय परेशाय कृतांजलिः ॥ राज्ञामावेदयद्दुःखं जरासंधनिरोधजम् ॥ २३ ॥ ये च दिग्विजये तस्य सन्नतिं न युयुर्नृपाः ॥ प्रसह्य रुद्धास्तेनासन्नयुते द्वे गिरिव्रजे ॥ २४ ॥ कृष्ण कृष्णाप्रमेयात्मन्प्रपन्नभयभंजन ॥ वयं त्वां शरणं यामो भवभीताः पृथग्धियः ॥ २५ ॥ लोको विकर्मनिरतः कुशले प्रमत्तः कर्मण्ययं त्वदुदिते भवदर्चने स्वे ॥ यस्तावदस्य बलवानिह जीविताशां सद्यश्छिनत्त्यनिमिषाय नमोऽस्तु तस्मै ॥ २६ ॥ लोके भवान् जगदिनः कलयाऽवतीर्णः सद्रक्षणाय खलनिग्रहणाय चान्यः ॥ कश्चित्त्वदीयमतियाति निदेशमीश किं वा जनः स्वकृतमृच्छति तन्न विद्मः ॥ २७ ॥ स्वप्नायितं नृपसुखं परतंत्रमीश शश्वद्भयेन मृतकेन धुरं वहामः ॥ हित्वा तदात्मनि सुखं त्वदनीहलभ्यं क्लिश्यामहेऽतिकृपणास्तव माययेह ॥ २८ ॥

देवास्य लोकस्य यः सद्यो जीविताशां छिनत्ति तस्मै तुभ्यमनिमिषाय कालात्मने नम इति ॥ २६ ॥ सेयं लोकस्य गतिर्वयं तु त्वद्भक्ता अतोऽस्माकं कुत एतद्दुःखमापन्नमित्याश्चर्येणाहुः । लोक इति । भो ईश । जगत इन ईश्वरः । त्वयि सद्रक्षणार्थमवतीर्णेऽपि चेदस्माकं दुःखं स्यात्तर्हि किमन्यः कश्चिज्जरासंधादिस्त्वदाज्ञामपि लंघयति । किंच त्वया रक्ष्यमाणोऽपि जनः स्वकर्मजं दुःखं प्राप्नोत्येवेति न विद्मः । न चैतदुभयमपि युक्तमिति भावः ॥ २७ ॥ किं दुःखं तदाहुः । स्वाप्नायितमिति । स्वप्नवज्जातं नृपसुखं

तलेल्या तुझ्या पूजनरूप आपल्या कल्याणकारक धर्मामध्यें सावध राहत नाहीं, तोंपर्यंत जो कालरूपी बलवान् तूं, याच्या वांचण्याच्या आशेलाच तत्काळ तोडून टाकितोस, त्या निरंतर सावध असणाऱ्या कालरूपी तुज भगवंताला नमस्कार असो ॥ २६ ॥ हीतर लोकांची गति झाली, आह्मीतर तुझे भक्त असतां आह्मांला हें दुःख कां भोगावें लागतें याचें आश्चर्य वाटतें. कारण, हे ईश्वरा, आपल्या भक्तांच्या रक्षणाकरितां व दुष्टांच्या निग्रहाकरितां, आपल्या संकर्षणरूप अंशासहवर्तमान तूं जगदीश्वर उत्पन्न झाला आहेस असें असतां, दुसरा कोणी एखादा (जरासंधादिक) जर आह्मांला दुःख देत आहे, तर तो काय ‘ माझा भक्त नाश पावत नाहीं, मी भक्तांचे योगक्षेम चालवितों इत्यादिक ’ तुझ्या आज्ञेचें उल्लंघन करीत आहे किंवा तूं रक्षण केलेलाहि आमच्यासारखा जन, आपल्या कर्मापासून झालेलें दुःख पावतोच तें आह्मी जाणत नाहीं, ह्मणजे हे दोनहि प्रकार आह्मांस योग्य वाटत नाहींत ॥ २७ ॥ कोणतें तें दुःख असें ह्मणशील तर हे ईश्वरा, तुझ्या अनुग्रहानें निष्काम पुरु-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

र्यांना मिळणारें व आपल्याचठिकाणीं असलेलें जें स्वरूपसुख त्याचा त्याग करून, आह्मी स्वप्नांतील सुखासारखें व स्त्रीपुत्रादिकांच्यास्वाधीन असणारें राजसुख प्राप्त होण्याची इच्छा करितों आणि त्याकरितां जेथें निरंतर भय आहे अशा प्रेतासारख्या शरीरानें पुत्रदारादिकांची चिंताच केवळ धारण करितों; याप्रमाणें या संसारामध्यें तुझ्या मायेनें अतिदीन (विषयासक्त) होऊन क्लेश पावत आहों ॥ २८ ॥ यास्तव, तुझ्या मायेनें केलेला कर्मबंध तूंच निवृत्त कर. ज्याअर्थीं तुझे चरण, शरणागतांचा शोक घालविणारे आहेत त्याअर्थीं, तूंच जरासंधनामक कर्मशापानें बद्ध झालेल्या आह्मांस त्यापासून सोडीव. आतां तुह्मीच पराक्रम करून तेथून सुटा, असें ह्मणशीलतर– दहा हजार मदोन्मत्त गजांचें बळ धारण करणाऱ्या ज्या एकट्या जरासंधानें, आह्मां राजांना, जसें सिंहानें मेंढ्यांना कोंडून ठेवावें त्याप्रमाणें कोंडून ठेविलें आहे. ह्मणूनच

नृपोचितं सुखम् । यतः परतंत्रं विषयसाध्यम् । किंच संप्रति शश्वद्भयं यस्मिंस्तेन मृतकतुल्येन शरीरेण धुरं पुत्रदारादिचिंतां केवलं वहामः । अहो कष्टं नः ये वयमितः पूर्वमेव निष्कामाः संतस्त्वां नाश्रिता इत्याहुः । हित्वेति । त्वत् त्वत्तो यदनीहैर्निष्कामैर्लभ्यमात्मनि स्वतःसिद्धं सुखं तद्धित्वा क्लिश्याम इति ॥ २८ ॥ त्वन्मायाकृतं कर्मबंधं त्वमेव निवर्तयेति प्रार्थयंते । तन्न इति । वियुंक्ष्व मोचय । मगधो जरासंधस्तत्संज्ञकात्कर्मपाशात् । भवद्भिरेव विक्रम्य ततो निर्गम्यतामिति चेदत आहुः । य इति । एक

तन्नो भवान्प्रणतशोकहरांघ्रियुग्मो बद्धान्वियुंक्ष्व मगधाह्वयकर्मपाशात् ॥ यो भूभुजोऽयुतमतंगजवीर्यमेको बिभ्रद्रुरोध भवने मृगराडिवावीः ॥ २९ ॥ यो वै त्वया द्विनवकृत्व उदात्तचक्र भग्नो मृधे खलु भवंतमनंतवीर्यम् ॥ जित्वा नृलोकनिरतं सकृदूढदर्पो युष्मत्प्रजा रुजति नोऽजित तद्विधेहि ॥ ३० ॥ दूत उवाच ॥ इति मागधसंरुद्धा भवद्दर्शनकांक्षिणः ॥ प्रपन्नाः पादमूलं ते दीनानां शं विधीयताम् ॥ ३१ ॥ श्रीशुक उवाच ॥ राजदूते ब्रुवत्येवं देवर्षिः परमद्युतिः ॥ बिभ्रत्पिंगजटाभारं प्रादुरासीद्यथा रविः ॥ ३२ ॥ तं दृष्ट्वा भगवान्कृष्णः सर्वलोकेश्वरेश्वरः ॥ ववंद उत्थितः शीर्ष्णा ससभ्यः सानुगो मुदा ॥ ३३ ॥

एवायुतमतंगजानां वीर्यं बिभ्रत्सन्स्वभवने भूभुजोऽस्मान् रुरोध । सिंहो मेषीरिव ॥ २९ ॥ किंच । युष्मदीया वयमित्यस्मानधिकं बाधत इत्याहुः । यो वा इति । हे उदात्तचक्र उद्यतसुदर्शन यो वै द्विनवकृत्वोऽष्टादशवारांस्त्वया सह मृधे वर्तमाने तत्र सप्तदशकृत्वस्त्वया खलु भग्नः पराजितः पश्चादनंतवीर्यमपि नृलोके निरतं नरशरीरविनोदं भवंतं सकृज्जित्वोढदर्पः प्राप्तगर्वो युष्मत्प्रजा नो रुजति पीडयति तत्तत्र यद्युक्तं तद्विधेहीत्यर्थः ॥ ३० ॥ दूत आह । इतीति ॥ ३१ ॥ ३२ ॥ ३३ ॥

आह्मी प्रयत्न करून त्यापासून मुक्त होण्यास समर्थ नाहीं ॥ २९ ॥ हे अजिता, हे चक्र उचलून धरणाऱ्या देवा, जो जरासंध, अठरा वेळ तुझ्या बरोबर युद्ध झालें त्यांत सतरावेळ युद्धामध्यें तूं खरोखर त्याचा पराभव केला असतांहि, अठरावे वेळीं मनुष्यचेष्टेचा विनोद करणाऱ्या अनंतपराक्रमी तुज भगवंताला एकवार जिंकून गर्वयुक्त झाला आहे तो, तुझे आह्मी या नात्यानें आह्मांस फारच दुःख देत आहे, यास्तव त्याबद्दल जें योग्य असेल तें करावें ॥ ३० ॥ राजदूत ह्मणाला–हे प्रभो, याप्रमाणें जरासंधानें कोंडलेले व तुझ्या दर्शनाची इच्छा करणारे राजे, तुझ्या चरणमूलाप्रत शरण आले आहेत, यास्तव त्या दीनांना सुख होईल तशी तजवीज करावी ॥ ३१ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–राजा, याप्रमाणें राजांचा दूत बोलत असतां, तेथें सूर्यासारख्या परमकांतीनें युक्त व पिंगटवर्ण जटाभार धारण करणारा नारदऋषि अकस्मात् प्राप्त झाला ॥ ३२ ॥ त्याला पाहतांच, ब्रह्मादिक सर्व लोकेश्वरांचाहि पालक अशा त्या भगवान् श्रीकृष्णानें, मोठ्या त्वरेनें सभासदांसहवर्तमान व सेव- ॥२२१॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कांसहवर्तमान उठून हर्षपूर्वक मस्तकानें वंदन केलें ॥ ३३ ॥ नंतर, यथाशास्त्र त्याचें पूजन करून आसनाचा स्वीकार करणाऱ्या त्या नारदाला, श्रद्धेनें व मधुरभाषणांनीं संतुष्ट करीत भाषण केलें कीं,– ॥ ३४ ॥ हे नारदा, सांप्रतकाळीं तिन्ही लोकांची निर्भयस्थिति आहेना ? अहो ! लोकांमध्यें पर्यटन करणाऱ्या तुजपासून आह्मांला सर्व लोकांतील वृत्तांत समजतो हा मोठाच लाभ आहे ॥ ३५ ॥ कारण, ज्यांचा कर्ता ईश्वर आहे अशा सर्वलोकांमध्यें तुला न समजलेलें असें कांहींच नाहीं; यास्तव हल्लीं पांडवांच्या मनांत काय आहे तें तुह्मांला आह्मी विचारितों ॥ ३६ ॥ याप्रमाणें सर्वज्ञानेंहि अज्ञान्यासारखा जरासंधाच्या वधाकरितांच पांडवांचा आशय विचारिला असतां नारद, ही देवाची माया आहे, असें जाणून ह्मणाला कीं,– हे समर्था सर्वव्यापका, विश्वस्रष्ट्या ब्रह्मदेवालाहि मोह उत्पन्न करणारा, आपल्या विद्यादिक श क्तींच्य

॥ ३४ ॥ भूयान्महान्गुणो लाभोऽयमस्माकं यत्सर्वलोकवृत्तांतज्ञानमिति ॥ ३५ ॥ ईश्वरः कर्ता येषां तेषु ॥ ३६ ॥ एवमविदुषेव सर्वज्ञेन जरासंधवधार्थमेव पांडवचिकीर्षितं पृष्टो नारदो मायेयमिति ज्ञात्वाह । दृष्टा इति त्रिभिः । विश्वसृजश्च ब्रह्मणोऽपि मायिनो मोहकस्य ते स्वशक्तिभिर्विद्यादिभिर्भूतेष्वंतर्यामितया चरतो वर्तमानस्य यद्यहं भूतेषु वर्ते तर्हि भूतानि मां किं न पश्यंति तत्राह । वह्नेरिव छन्नरुच इति । स्वशक्तिभिरेव छन्ना रुक् प्रकाशो यस्य तस्य अतस्तवेदं प्रश्नादि न मेऽद्भुतम् ॥ ३७ ॥ इदं जगत् । कथंभूतम् ।

सभाजयित्वा विधिवत्कृतासनपरिग्रहम् ॥ बभाषे सूनृतैर्वाक्यैः श्रद्धया तर्पयन्मुनिम् ॥ ३४ ॥ अपिस्विदद्य लोकानां त्रयाणामकुतोभयम् ॥ ननु भूयान्भगवतो लोकान्पर्यटतो गुणः ॥ ३५ ॥ नहि तेऽविदितं किंचिल्लोकेष्वीश्वरकर्तृषु ॥ अथ पृच्छामहे युष्मान्पांडवानां चिकीर्षितम् ॥ ३६ ॥ श्रीनारद उवाच ॥ दृष्टा मया ते बहुशो दुरत्यया माया विभो विश्वसृजश्च मायिनः ॥ भूतेषु भूमंश्चरतः स्वशक्तिभिर्वह्नेरिव छन्नरुचो न मेऽद्भुतम् ॥ ३७ ॥ तवेहितं कोऽर्हति साधु वेदितुं स्वमाययेदं सृजतो नियच्छतः ॥ यद्विद्यमानात्मतयाऽवभासते तस्मै नमस्ते स्वविलक्षणात्मने ॥ ३८ ॥ जीवस्य यः संसरतो विमोक्षणं न जानतोऽनर्थवहाच्छरीरतः ॥ लीलावतारैः स्वयशः प्रदीपकं प्राज्वालयत्त्वा तमहं प्रपद्ये ॥ ३९ ॥

असदेव यत्तव मायया विद्यमानात्मतया भासते तज्जगत्सृजतः किंतु केवलं तुभ्यं नमनमेव शक्यमित्याह । तस्मै नम इति । कुतः । स्वेन रूपेण सर्वतो विलक्षणात्मने अचिंत्यायेत्यर्थः ॥ ३८ ॥ नन्वेवंभूतस्य किं मायाचेष्टितैरित्यत आह । जीवस्येति । अविद्या तमसावृतत्वेनानर्थप्रापकाच्छरीरात्संसरतः । तेनैव तपसा तस्माच्छरीराद्विमोक्षोपायमजानतः । प्राज्वालयत्प्रदीपितवान् । तं त्वा त्वाम् । यशःश्रवणादिभिर्जीवस्य मोक्षार्थमित्यर्थः ॥ ३९ ॥

योगानें, सर्व प्राणिमात्रांमध्यें अंतर्यामित्वेंकरून राहणारा असून भस्मानें आच्छादित झालेल्या अग्नीप्रमाणें आपल्या शक्तींनींच आपल्या तेजाचें आच्छादन करून राहिलेला अशा तुज भगवंताच्या, उल्लंघन करण्यास किंवा जाणण्यास अशक्य अशा पुष्कळ माया, मी पाहिल्या आहेत, ह्मणून तूं सर्वज्ञ असून मनुष्यनाऱ्यानें, अज्ञान्यासारखा प्रश्न करितोस हें मला आश्चर्य वाटत नाहीं ॥ ३७ ॥ हे देवा, मिथ्याभूत असलेलें हें जग, ज्या तुझ्या मायेनें सर्व खरें आहे असें भासतें, त्या स्वेच्छामात्रेंकरून जगाला उत्पन्न करणाऱ्या व संहार करणाऱ्या तुझ्या मनांतील अभिप्राय चांगल्यारीतीनें जाणण्यास कोण पुरुष समर्थ आहे ? कोणीच नाहीं. यास्तव सर्वप्रकारें आपल्या अचिंत्यस्वरूपानें असणाऱ्या त्या तुज भगवंताला केवळ नमस्कार असो ॥ ३८ ॥ अज्ञानतमानें वेष्टित असल्यामुळें, दुःख देणाऱ्या शरीराच्या योगानें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

संसार पावणाऱ्या व त्याच अज्ञानानें त्या शरीरापासून मोक्षाचा उपाय न जाणणाऱ्या जीवाला, श्रवणादिकेंकरून मोक्ष प्राप्त होण्यासाठीं, ज्या तूं, लीलावतारांनीं आपला यशोरूप दीप प्रदीप्त करून ठेविला आहेस, त्या तुज भगवंताला मी शरण आलों आहें ॥ ३९ ॥ आतां, सर्वसाक्षी अशा तुला जरी न समजलेलें काहींच नाहीं तथापि मनुष्यलोकाला अनुसरणाऱ्या तुला, तुझ्या आतेचा पुत्र व भक्त अशा धर्मराजाच्या मनांत इच्छित असलेलें मी कळवितों ॥ ४० ॥ सार्वभौमपणा प्राप्त होण्याची इच्छा करणारा तो पांडुपुत्र धर्मराजा, यज्ञश्रेष्ठ अशा राजसूययज्ञाच्या योगानें तुझें आराधन करण्याची इच्छा करीत आहे, त्याला तूं अनुमोदन द्यावेंस ॥ ४१ ॥ येथूनच अनुमोदन द्यावें असें नाहीं, तर तेथें जावें. कारण, हे देवा, त्या श्रेष्ठ यज्ञामध्यें तुझ्या दर्शनाची इच्छा करणारे इंद्रादिक देव व यशस्वी राजे, अवश्य प्राप्त होतील ॥ ४२॥ आणि ते सर्वहि

आश्रावये श्रावयिष्यामि । नरलोकविडंबनं ब्रह्म त्वाम् । ब्रह्मन्निति पाठेऽपि हे ब्रह्मन्परमात्मन्नरलोकानुकारिणं त्वां श्रावयिष्यामीति ॥ ४० ॥ ४१ ॥ न चात्रैवानुमोदनं कार्यं किंतु तत्रागंतव्यमित्याशयेनाह । तस्मिन्निति ॥ ४२ ॥ तत्रागताश्च सर्वे त्वद्दर्शनादिना पूता भविष्यंतीत्याह । श्रवणादिति । अंतेऽवसायिनः श्वपचा अपि । ब्रह्ममयस्य ब्रह्मघनमूर्तेः । ईक्षा च अभिमर्शः स्पर्शनं च तौ विद्येते येषाम् ॥ ४३ ॥ कैमुत्यमतिशयेनाह । यस्येति । हे भुवनानां मंगलरूप दिवि पाताले भूमौ च प्रथितं यस्य यशो विश्वं

अथाप्याश्रावये ब्रह्म नरलोकविडंबनम् ॥ राज्ञः पैतृष्वस्रेयस्य भक्तस्य च चिकीर्षितम् ॥ ४० ॥ यक्ष्यति त्वां मखेंद्रेण राजसूयेन पांडवः ॥ पारमेष्ठ्यकामो नृपतिस्तद्भवाननुमोदताम् ॥ ४१ ॥ तस्मिन्देव क्रतुवरे भवंतं वै सुरादयः ॥ दिदृक्षवः समेष्यंति राजानश्च यशस्विनः ॥ ४२ ॥ श्रवणात्कीर्तनाद्ध्यानात्पूयंतेंऽतेवसायिनः ॥ तव ब्रह्ममयस्येश किमुतेक्षाऽभिमर्शिनः ॥ ४३ ॥ यस्यामलं दिवि यशः प्रथितं रसायां भूमौ च ते भुवनमंगल दिग्वितानम् ॥ मंदाकिनीति दिवि भोगवतीति चाधो गंगेति चेह चरणांबु पुनाति विश्वम् ॥ ४४ ॥ श्रीशुक उवाच ॥ तत्र तेष्वात्मपक्षेष्वगृह्णत्सु विजिगीषया ॥ वाचःपेशैः स्मयन्भृत्यमुद्धवं प्राह केशवः ॥ ४५ ॥

पुनाति । कथम् । प्रथितं दिग्वितानं दिग्भवनानां वितानवदलंकरणम् । तथा चरणांबु च प्रथितं पुनाति । कथं तत्प्रथितम् । दिवि मंदाकिनीति अधश्च भोगवतीति इह च भूमौ गंगेति । तस्य तवागमनात्सर्वं मंगलं पवित्रं च भविष्यतीति भावः ॥ ४४ ॥ तत्रैवं नारदोक्तं तेषु वर्तमानेष्वात्मीयपक्षेषु यादवेषु जरासंधस्य विजिगीषया अगृह्णत्स्वमन्यमानेषु । वाचःपेशैः पेशलवाग्भिरित्यर्थः ॥ ४५ ॥

तुझ्या दर्शनादिकेंकरून पवित्र होतील. कारण, हे ईश्वरा, मनुष्याकृति ब्रह्मरूप अशा तुझ्या कथेच्या श्रवणेंकरून कीर्तनेंकरून व ध्यानेंकरून चांडाळहि पवित्र होतात, मग अवलोकन व स्पर्शवगैरे करणारे पुरुष, दर्शनस्पर्शादिकेंकरून पवित्र होतील हें काय सांगावें ! ॥ ४३ ॥ हे सर्वजगांच्या मंगलरूपा, ज्या तुझें, सर्वदिशांना छतासारखें भूषणरूप, व निर्मळ असें यश, स्वर्ग, पाताळ व भूमि यांचेठिकाणीं प्रख्यात असून जगाला पवित्र करितें, तसेंच ज्या तुझें चरणोदक, स्वर्गावर मंदाकिनीरूपानें पाताळामध्यें भोगवतीरूपानें व या भूलोकीं गंगारूपानें प्रसिद्ध होत्सातें त्रैलोक्याला पवित्र करितें, त्या तुझ्या प्रत्यक्ष आगमनानें सर्व मंगळ व पवित्र होईल हें काय सांगावें ! ॥ ४४ ॥ ॥२२२॥
श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, त्या सभेमध्यें नारदानें सांगितलेला धर्मराजाकडील वृत्तांत श्रवण करणारे यादव, जरासंधाला जिंकण्याच्या इच्छेनें, हस्तिनापुरांत जाण्याबद्दल नारदाच्या भाषणाचें मान्यतेनें ग्रहण करीत नसतां, श्रीकृष्णानें किंचित् हास्य करून, मधुरवाणीनें आपला भक्त अशा उद्धवाप्रत भाषण केलें कीं,– ॥ ४५ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रीभगवान् ह्मणाला—हे उद्धवा, ज्याअर्थी तूं आमचा उत्तम चक्षुरिंद्रियासारखा अर्थप्रकाशक असून विचारानें साधावयाच्या फळांचें तत्त्व जाणणारा मित्र आहेस त्याअर्थी यावेळीं न.रदानें व दूतानें कळविलेल्या दोन्ही गोष्टींमध्यें जें आह्मीं करावें तें सांग. त्या तुझ्या सांगण्यावरच आह्मी विश्वास ठेऊं व त्याप्रमाणें करूं ॥ ४६ ॥ याप्रमाणें सर्वज्ञ अशाहि भगवंतानें अज्ञान्याप्रमाणें विचाराकरितां प्रेरणा केलेला उद्धव, भगवंताची आज्ञा मस्तकानें स्वीकारून प्रत्युत्तर देऊं लागला ॥ ४७ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवत-नामक महापुराणांतील दशमस्कंधाच्या उत्तरार्धांत कृष्णान्हिककर्मनिरूपणनामक हा सत्तरावा अध्याय समाप्त झाला ॥ ७० ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या एकाहत्तराव्या अध्यायामध्यें, उद्धवानें सांगितलेल्या विचाराप्रमाणें श्रीकृष्णानें इंद्रप्रस्थामध्यें गमन केलें असतां, पांडवांना परमानंद झाला, ही कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ राजसूय-

चक्षुष्ट्वे हेतुः । मंत्रार्थानां मंत्रसाध्यानां तत्त्ववित्परिपाकवेदिता ॥ ४६ ॥ ४७ ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधे उत्तरार्धे टीकायां सप्ततितमोऽध्यायः ॥ ७० ॥ ॥ अथैकसप्ततितम उद्धवस्य तु मंत्रतः ॥ इंद्रप्रस्थं गते कृष्णे पार्थानां परमोत्सवः ॥ १ ॥ राजसूयमिषं कृत्वा भीमदुर्योधनादिषु ॥ कलिमुत्पाद्य तद्द्वारा भूभारमहरत्प्रभुः ॥ २ ॥ देवर्षेर्मतं राजसूयग-

श्रीभगवानुवाच ॥ त्वं हि नः परमं चक्षुः सुहृन्मंत्रार्थतत्त्ववित् ॥ तथाऽत्र ब्रूह्यनुष्ठेयं श्रद्दध्मः करवाम तत् ॥ ४६ ॥ इत्युपामंत्रि-तो भर्त्रा सर्वज्ञेनापि मुग्धवत् ॥ निदेशं शिरसाधाय उद्धवः प्रत्यभाषत ॥ ४७ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे उत्त-रार्धे भगवद्याने सप्ततितमोऽध्यायः ॥ ७० ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ इत्युदीरितमाकर्ण्य देवर्षेरुद्धवोऽब्रवीत् ॥ सभ्यानां मतमा-ज्ञाय कृष्णस्य च महामतिः ॥ १ ॥ उद्धव उवाच ॥ यदुक्तमृषिणा देव साचिव्यं यक्ष्यतस्त्वया ॥ कार्यं पैतृष्वस्रेयस्य रक्षा च श-रणैषिणाम् ॥ २ ॥ यष्टव्यं राजसूयेन दिक्चक्रजयिना विभो ॥ अतो जरासुतजय उभयार्थो मतो मम ॥ ३ ॥ अस्माकं च महा-नर्थो ह्येतेनैव भविष्यति ॥ यशश्च तव गोविंद राज्ञो बद्धान्विमुंचतः ॥ ४ ॥

मनम् । सभ्यानां मतं राजरक्षा । कृष्णस्य तूभयम् ॥ १ ॥ यक्ष्यतो यागं करिष्यतः पैतृष्वस्रेयस्य पितृष्वसुः पुत्रस्य साचिव्यं साहाय्यं तच्च कार्यम् । तथा शरणार्थिनां राज्ञां रक्षा च कार्या ॥ २ ॥ तत्र प्रथमं राजसूयार्थं गंतव्यं ततो राजरक्षा कर्तव्येत्याह । यष्टव्यमित्यष्टभिः । अतो दिग्विजयहेतोः । उभयार्थो राजसूयार्थः शरणागतरक्षार्थश्च ॥ ३ ॥ ४ ॥

यज्ञाचें निमित्त करून, भीम व दुर्योधन इत्यादिकांमध्यें कलह उत्पन्न करून, त्या द्वारानें प्रभूनें भूमीचा भार हरण केला ॥ २ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, पूर्वीं सांगि-तल्याप्रमाणें राजसूयाकरितां गमन करावें असें नारदाचें मत, जरासंधाला जिंकून राजांचें रक्षण करावें असें सभासदांचें मत व दोन्हीं करावीं असें श्रीकृष्णाचें मत जाणून तो महाबुद्धिमान् उद्धव ह्मणाला कीं,— हे देवा, यज्ञ करणाऱ्या आतेबंधु धर्मराजाचें सहाय्य करावें असें जें नारदानें सांगितलें आहे तें तूं करावेंस, तसेंच शरण आलेल्या राजांचें रक्षणहि करावेंस ॥ १ ॥ २ ॥ त्यांत प्रथम राजसूयाकरितां गमन करावें व नंतर राजांचें रक्षण करावें असें सांगतो—सर्वदिशा जिंकणाऱ्या पुरुषानें, राजसूययज्ञा-च्या योगेंकरून यजन करावें असा विधि असल्यामुळें दिग्विजयाच्या प्रसंगानें होणारा जो जरासंधाचा जय तो राजसूयाकरितां व शरणागतांच्या रक्षणाकरितांहि होईल असें माझ्या विचारास येतें ॥ ३ ॥ ह्या जरासंधाच्या वधानें आमचाहि मोठाच निर्भयरूप कार्यभाग होईल आणि हे गोविंदा, बंदींत पडलेल्या राजांना सोडविणाऱ्या तुझें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

यशहि प्रसिद्ध होईल ॥४॥ असतां, अतिउत्कंठितपणानें लवकर जरासंधाला मारण्याची इच्छा करणाऱ्या यादवांना ह्मणतो कीं,– तो प्रसिद्ध जरासंध राजा, बलाविषयीं दहाहजार हत्तींच्या बरोबरीचा आहे. तो त्याच्या इतक्याच बळानें युक्त असलेल्या भीमावांचून, दुसऱ्या त्याच्याहून जास्ती बलाढ्य असणारांनाहि मोठ्या कष्टांनेंसुद्धां जिंकण्यास अशक्य आहे. कारण, भीमापासूनच त्याला मृत्यु सांगितलेला आहे ॥ ५ ॥ तो जरासंध, द्वंद्वयुद्धामध्येंच जिंकिला पाहिजे, शेंकडो अक्षौहिणी सैन्यानेंहि वेढा घालून जिंकिता कामा नये. आतां तो आपलें सैन्यच युद्धाला पाठवील मग त्याच्याबरोबर द्वंद्वयुद्ध कसें होणार असें ह्मणावें तर– तो ब्राह्मणभक्त आहे ह्मणून ब्राह्मणांनीं याचना केली असतां तो त्यांना कधींहि नाहीं ह्मणणार नाहीं ॥ ६ ॥ यास्तव, ब्राह्मणाचा वेष धारण करणाऱ्या भीमसेनानें त्याच्याजवळ जाऊन द्वंद्वयुद्धाची भिक्षा मागावी, ह्मणजे तो

अत्युत्सुकतया सद्य एव जरासंधं हंतुमिच्छतो यादवानालक्ष्याह । स वा इति । अन्येषां ततो बलिनामपि । यद्यपि समबल एव भीमस्तथापि तं विना । भीमादेव तस्य मृत्युर्विहित इति भावः ॥ ५ ॥ ननु स्वबलसाम्येऽपि सेनाबलं तस्याधिकमिति चेदत आह । द्वैरथ इति । द्वंद्वयुद्धे शतेनाक्षौहिणीभिर्युतो मागधो मा न जेतव्य इत्यर्थः । नन्वसौ स्वसैन्यमेव युद्धाय नियुंजीत कुतस्तेन द्वैरथमिति तत्राह । ब्रह्मण्य इति । न प्रत्याख्याति न निराकरोति ॥ ६ ॥ भिक्षेत् द्वंद्वयुद्धं याचताम् । तथाऽपि समबलत्वात्साम्यमेव स्यादत आह । तव सन्निधाविति ॥ ७ ॥ नन्वकिंचित्कुर्वतो मम सन्निधानात्किं स्यादत आह । निमित्तमिति । अयमर्थः । यथा तवारूपस्य कालात्मनो विश्वसर्गे

स वै दुर्विषहो राजा नागायुतसमो बले ॥ बलिनामपि चान्येषां भीमं समबलं विना ॥ ५ ॥ द्वैरथे स तु जेतव्यो मा शताक्षौहिणीयुतः ॥ ब्रह्मण्योऽभ्यर्थितो विप्रैर्न प्रत्याख्याति कर्हिचित् ॥ ६ ॥ ब्रह्मवेषधरो गत्वा तं भिक्षेत वृकोदरः ॥ हनिष्यति न संदेहो द्वैरथे तव सन्निधौ ॥ ७ ॥ निमित्तं परमीशस्य विश्वसर्गनिरोधयोः ॥ हिरण्यगर्भः शर्वश्च कालस्यारूपिणस्तव ॥ ८ ॥ गायंति ते विशदकर्म गृहेषु देव्यो राज्ञां स्वशत्रुवधमात्मविमोक्षणं च ॥ गोप्यश्च कुंजरपतेर्जनकात्मजायाः पित्रोश्च लब्धशरणा मुनयो वयं च ॥९॥

निमित्तं केवलं हिरण्यगर्भस्तथा शर्वश्च तन्निरोधे तथाऽत्र त्वमेव संनिधिमात्रेण हंता भीमो निमित्तमात्रमिति ॥ ८ ॥ अतोऽनेनोपायेन त्वया स शीघ्रं हंतव्य इत्याशयेनाह । गायंतीति । जरासंधधृतानां राज्ञां देव्यः पत्न्यस्ते विशदं कर्म स्वगृहेषु बालकलालनादौ गायंति । किं तत्कर्म । स्वशत्रोर्जरासंधस्य वधमात्मनां पतीनां विमोक्षणं च । वत्स मा रोदीः श्रीकृष्ण एवं करिष्यतीति । अत्र दृष्टांताः । गोप्यश्चेत्यादयः । यथा गोप्यः शंखचूडवधं स्वमोक्षं च गायंति । अवतारांतरगतं कुंजरपतेर्नक्रात् । जनकात्मजायाश्च रावणात् । पित्रोश्च कंसगृहान्मोक्षम् । अत एवंभूतानां तासां कृपया त्वया तथैव कर्तव्यमिति भावः ॥ ९ ॥

भीमसेन, समबली असला तरी तुझ्या सन्निधभागीं त्याला मारील, यांत संदेह नाहीं ॥ ७ ॥ आतां, माझ्या सांनिध्यानें काय होणार असें ह्मणशील तर–रूपरहित कालस्वरूपी तुज ईश्वराचे जसे ब्रह्मदेव आणि शंकर हे, जगाच्या उत्पत्तिसंहारांविषयीं केवळ निमित्तमात्र आहेत, वस्तुतः कर्तृत्व तुझेचठिकाणीं आहे, त्याप्रमाणें येथें तूंच सान्निध्यमात्रेंकरून मारणारा असून भीम हा केवळ निमित्तमात्र आहे ॥ ८ ॥ ह्मणून या उपायानें तूं त्याला लवकर मारविलें असतां, जरासंधानें बंदींत टाकलेल्या राजांच्या स्त्रिया, आपल्या घरांमध्यें बालकांच्या सांत्वनादिकांचेवेळीं ‘ हे वत्सा, तूं रडूं नकोस; श्रीकृष्ण आतां असें करील बरें ! असें सांगून ’ आपल्या शत्रूचा (जरासंधाचा) वध आणि प्राणप्रियपतींचें सोडविणें ह्या तुझ्या कीर्तिकारक कर्माचें गायन करीत आहेत, तें तरी जशा गोपी, शंखचूडनामक तुझ्या शत्रूच्या वधाचें व त्यापासून आपल्या सोडविण्याचें गायन करितात किंवा तुझा आश्रय मिळालेले ऋषि, जसें तुझ्या पूर्वअवतारीं घडलेल्या नक्रवधाचें व गजेंद्रमोक्षाचें, व रावणवधाचें व सीतामोक्षाचें गायन करितात, अथवा आह्मी यादव, जसें कंसाच्या वधाचें व

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

देवकीवसुदेवांच्या मोक्षाचें गायन करीतों त्याप्रमाणें गायन करीत आहेत; तें सर्व खरें होईल ॥ ९ ॥ आणि हे कृष्णा, जरासंधाचा वध हा, शरणागतांचें रक्षण, राजसूययज्ञ, तुझी सत्कीर्ति व भूभारनिवृत्ति इत्यादिक पुष्कळ कार्यभाग घडण्यास साधनभूत होईल व याच्या योगानें पुढें शिशुपालवधादिकहि सुखसाध्य होतील. व कर्मफळाच्या परिपक्‍पणानें ह्मणजे राजांच्या पुण्यविपाकानें व जरासंधाच्या पापविपाकानें तुलाहि हा आवडलेलाच आहे. एतावता तूं राजसूयास गेलास ह्मणजे ह्या सर्व गोष्टी घडून येतील ॥ १० ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, याप्रकारचें, सर्वप्रकारें कल्याणकारक व युक्तींनीं योग्यपणा असलेलें तें उद्धवाचें भाषण, नारदऋषि, यादवांतील प्रौढपुरुष व श्रीकृष्ण यांनीं अत्यंत

किंच । जरासंधवध इति । भूर्यर्थायेति । ततः शिशुपालवधादयोऽपि सुखसाध्या भविष्यंतीति भावः । एकत्र सर्वं भविष्यत्येवेति संभावयन्नाह । प्राय इति । पच्यत इति पाकः कर्म तस्य विपाकः फलं तेन राज्ञां पुण्यविपाकेन जरासंधादीनां पापविपाकेनेति । पाठांतरे जरासंधस्य पापविपाकेनेति । तेनायं क्रतुस्तवाभिप्रेतस्तत्र गते त्वयि सर्वं भविष्यतीत्यर्थः ॥ १० ॥ अच्युतमुपपत्त्या वृद्धम् । यदुवृद्धा इति वदता अनिरुद्धादयस्तथा नापूजयन्निति सूचितम् ॥ ११ ॥ अनुज्ञाप्यानुज्ञां प्राथ्य । गुरून्वसुदेवादीन् ॥ १२ ॥

जरासंधवधः कृष्ण भूर्यर्थायोपकल्पते ॥ प्रायः पाकविपाकेन तव चाभिमतः क्रतुः ॥ १० ॥ श्रीशुक उवाच ॥ इत्युद्धववचो राजन्सर्वतो भद्रमच्युतम् ॥ देवर्षिर्यदुवृद्धाश्च कृष्णश्च प्रत्यपूजयन् ॥ ११ ॥ अथादिशत्प्रयाणाय भगवान्देवकीसुतः ॥ भृत्यान्दारुकजैत्रादीननुज्ञाप्य गुरून्विभुः ॥ १२ ॥ निर्गमय्यावरोधान्स्वान्ससुतान्सपरिच्छदान् ॥ संकर्षणमनुज्ञाप्य यदुराजं च शत्रुहन् ॥ सूतोपनीतं स्वरथमारुहद्गरुडध्वजम् ॥ १३ ॥ ततो रथद्विपभटसादिनायकैः करालया परिवृत आत्मसेनया ॥ मृदंगभेर्यानकशंखगोमुखैः प्रघोषघोषितककुभो निराक्रमत् ॥ १४ ॥ नृवाजिकांचनशिबिकाभिरच्युतं सहात्मजाः पतिमनु सुव्रता ययुः ॥ वरांबराभरणविलेपनस्रजः सुसंवृता नृभिरसिचर्मपाणिभिः ॥ १५ ॥

अवरोधान्स्वान्दारान् । निर्गमय्य प्रयाणं कारयित्वा ॥ १३ ॥ भटाः पदातयः । सादिनोऽश्वारोहाः । रथादिनायकैः करालया तीव्रयाऽऽत्मसेनया परिवृतो निराक्रमन्निरगात् । कुतः सकाशात् । मृदंगादिभिर्वाद्यैः प्रघोषेण घोषितायाः ककुभः ॥ १४ ॥ नृवाजीति । नृवाजिभिर्नरयानैरश्वैश्च कांचनशिबिकाभिश्चाच्युतं पतिमनु ययुः । सुव्रताः पतिव्रताः । वराण्यंबरादीनि यासां ताः ॥ १५ ॥

मान्य केलें ॥ ११ ॥ नंतर हे राजा, देवकीपुत्र भगवान् श्रीकृष्णानें, वसुदेवादिक गुरूंची आज्ञा घेऊन व बळरामाची व उग्रसेनराजाचीहि आज्ञा घेऊन जयशील अशा दारुकादिक सेवकांना राजसूय यज्ञास जाण्याकरितां तयारी करण्याची आज्ञा केली आणि पुत्रांसहित व सामानासहित आपल्या स्त्रियांचीहि रवानगी करवून नंतर त्या गरुडध्वज श्रीकृष्णानें, सारथ्यानें आणलेल्या आपल्या रथावर आरोहण केलें ॥ १२ ॥ १३ ॥ तदनंतर, रथ, गज, पायदळ व घोडेस्वार यांनीं भयंकर असलेल्या आपल्या सेनेनें परिवेष्टित असा तो श्रीकृष्ण, मृदंग, नोबदी, डंके, शंख व गोमुख या वाद्यांच्या गजरानें नादित झालेल्या त्या पश्चिमदिशेकडून निघाला ॥ १४ ॥ तेव्हां, त्या श्रीकृष्णपतीच्या मागून आपल्या पुत्रांसहवर्तमान, श्रेष्ठ अशीं वस्त्रें, भूषणें, उट्या व माळा धारण करणाऱ्या व ढाल तलवारी धारण करणाऱ्या मनुष्यांनीं संरक्षित असा त्या पतिव्रता रुक्मिण्यादिक कृष्णस्त्रिया,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मेण्यांत, रथांत व सुवर्णानें बांधविलेल्या पालख्यांत बसून निघाल्या॥ १५ ॥ त्यावेळीं ज्यांच्या झोंपड्या, वाळा मोळवगैरे तृणाच्या व बांबूंच्या तट्ट्यांच्या निर्माण केलेल्या आहेत व ज्यांचें सामान, कांबळे, पासोड्या व बांबूंचे कूडवगैरे आहे, त्या सेवकलोकांच्या स्त्रिया व वारांगना, आपापलें सर्व सामान, बैलांवर व खटाऱ्यांवर चोंहोंबाजूंनीं घट्ट बांधून स्वतः अलंकार धारण करून, डोल्या, उंटें, बैल, टोणगे, गर्दभ, खेचर, गाडे व हत्तिणी यांच्यावर बसून निघाल्या ॥ १६ ॥ तेव्हां रथांचे घडघडाट व घोड्यांचें खिंकाळणेंवगैरे तुमुळशब्दांनीं युक्त असें तें सैन्य, मोठे ध्वज, पताका, छत्रें, चामरें, उत्तमप्रकारचीं आयुधें, भूषणें, किरीट व कवचें यांच्या योगानें, जसा समुद्र, दिवसाचेवेळीं सूर्याच्या किरणांनीं व क्षोभ पावलेल्या मत्स्यनक्रादिकांच्या व लहरीच्या योगानें शोभतो त्याप्रमाणें शोभूं लागलें॥ १७ ॥ याप्रमाणें जाण्यास निघाल्यानंतर श्रीकृष्णानें सत्कार करून पूजा समर्पण केलेला व श्रीकृष्णाच्या दर्शनानें सर्व इंद्रियें तृप्त झालेला तो नारदमुनि, त्या कृष्णाचा राजसूययज्ञास जाण्याचा निश्चय जाणून त्याला नमस्कार करून,

---

नरोष्ट्रादिभिर्यानैः । अश्वतरी गर्दभ्यामश्वाज्जाता । अनः शकटम् । करेणुर्गजी । परिजनयोषितो वारयोषितश्च । कटकुट्य उशीरादितृणनिर्मितगृहाः कंबलांबरादयश्चोपस्कराः कुड्यादिरूपा यासां ताः । अधियुज्य बलीवर्दादिषु तानुपस्करान् दृढं सन्नह्य ॥ १६ ॥ स्वैरंशुभिश्च तद्बलं दिवा बभौ । कथंभूतम् । तुमुलरवमाकुलस्वनम् । क्षुभितैस्ति-

नरोष्ट्रगोमहिषखराश्वतर्यनःकरेणुभिः परिजनवारयोषितः ॥ स्वलंकृताः कटकुटिकंबलांबराद्युपस्करा ययुरधियुज्य सर्वतः ॥ १६ ॥
बलं बृहद्ध्वजपटछत्रचामरैर्वरायुधाभरणकिरीटवर्मभिः ॥ दिवांऽशुभिस्तुमुलरवं बभौ रवेर्यथाऽर्णवः क्षुभिततिमिंगिलोर्मिभिः ॥ १७ ॥
अथो मुनिर्यदुपतिना सभाजितः प्रणम्य तं हृदि विदधद्विहायसा ॥ निशम्य तद्व्यवसितमाहृतार्हणो मुकुंदसंदर्शननिर्वृतेंद्रियः ॥ १८ ॥ राजदूतमुवाचेदं भगवान्प्रीणयन्गिरा ॥ माभैष्ट दूत भद्रं वो घातयिष्यामि मागधम् ॥ १९ ॥ इत्युक्तः प्रस्थितो दूतो यथावदवदन्नृपान् ॥ तेऽपि संदर्शनं शौरेः प्रत्यैक्षन्यन्मुमुक्षवः ॥ २० ॥ आनर्तसौवीरमरूंस्तीर्त्वा विनशनं हरिः ॥ गिरीन्नदीरतीयाय पुरग्रामव्रजाकरान् ॥ २१ ॥ ततो दृषद्वतीं तीर्त्वा मुकुंदोऽथ सरस्वतीम् ॥ पंचालानथ मत्स्यांश्च शक्रप्रस्थमथागमत् ॥ २२ ॥ तमुपागतमाकर्ण्य प्रीतो दुर्दर्शनं नृणाम् ॥ अजातशत्रुर्निरगात्सोपाध्यायः सुहृद्वृतः ॥ २३ ॥

मिंगिलैरूर्मिभिश्च ॥ १७ ॥ मुनिर्नारदो विहायसा ययाविति शेषः ॥ १८ ॥ मा भैष्टेति बहुत्वं राजाभिप्रायेण ॥ १९ ॥ प्रत्यैक्षन्प्रत्यैक्षंत । यद्यस्मान्मुमुक्षवः ॥ २० ॥ आनर्तादयो मार्गस्थदेशास्तांस्तीर्त्वाऽतिक्रम्य विनशनं कुरुक्षेत्रम् । अतीयायातिक्रम्य ययौ ॥ २१ ॥ शक्रप्रस्थमिंद्रप्रस्थम् ॥ २२ ॥ २३ ॥

त्यावेंच हृदयामध्यें धारण करित होत्साता आकाशमार्गानें निघून गेला॥१८॥नंतर भगवान् राजदूताला मधुरवाणीनें संतुष्ट करीत ह्मणाला कीं, तूं राजांस असें कळीव कीं,— तुह्मी भिऊं नका, तुमचें कल्याण होईल, मी जरासंधाला लवकरच मारवितों ॥१९ ॥ याप्रमाणें भगवंतानें सांगितलें असतां त्या दूतानें तेथून जाऊन राजांना भगवंतानें सांगितल्याप्रमाणें सर्व कळविलें. ते राजेहि जरासंधापासून मुक्त होण्याची इच्छा करित होत्साते, भगवंताच्या दर्शनाची मार्गप्रतीक्षा करीत राहिले ॥ २० ॥इकडे श्रीकृष्णानें, आनर्त, सौवीर व मारवाड या देशांचें व कुरुक्षेत्राचें उल्लंघन करून, कितीएक नद्या तरून, पर्वत, नगरें, गांव, गौळवाडे व मोठमोठ्या खाणींचीं स्थानें उल्लंघन केलीं ॥ २१ ॥ नंतर, दृषद्वती व सरस्वती या नद्या तरून पुढें पांचालदेश तसेच मत्स्यदेश यांचें उल्लंघन करून इंद्रप्रस्थामध्यें गमन केलें ॥ २२ ॥ तेव्हां मनुष्यांना दृष्टी पडण्यास दुर्लभ असा तो श्री कृष्ण जवळ आला असें ऐकून, प्रसन्नचित्त झालेला धर्मराजा, उपाध्यायासहवर्तमान व मित्रमंडळीसहवर्तमान त्याला आणण्याकरितां नगरांतून बाहेर सामोरा ॥२२४॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

निघाला ॥ २३ ॥ तो, गायनांच्या व वाद्यांच्या घोषासहवर्तमान व मोठ्या वेदघोषासहवर्तमान हृषीकेश भगवंताला, जशीं इंद्रियें मोठ्या आदरानें मुख्यप्राणाला सामोरीं
जातात त्याप्रमाणें सामोरा गेला ॥ २४ ॥ नंतर, स्नेहानें आर्द्रचित्त झालेल्या त्या धर्मराजानें, फारवेळानें दृष्टी पडलेल्या अतिप्रिय श्रीकृष्णाला पाहून, वारंवार आलिंगन
केलें ॥ २५ ॥ लक्ष्मीचें निर्मळ स्थान अशा श्रीकृष्णाच्या शरीराला बाहूंनीं आलिंगन करून, ज्याचें पाप नष्ट झालें आहे, ज्याच्या नेत्रांमध्यें आनंदाश्रु प्राप्त झाले आहेत,
ज्याच्या अंगावर रोमांच उभे राहिले आहेत व ज्याला लोकव्यवहाराचा विसर पडला आहे असा तो धर्मराजा, परमसंतोष पावला ॥ २६ ॥ तसाच भीम, मातुळपुत्र अशा
त्या श्रीकृष्णाला आलिंगन करून हास्य करीत प्रेमाच्या वेगानें आनंदाश्रूंनीं पूर्णनेत्र होऊन परमानंदांत निमग्न झाला; तसेंच नकुळ, सहदेव आणि अर्जुन यांनींहि आनंदाश्रूंनीं

प्राणा इंद्रियाणि प्राणं मुख्यं प्राणमिव ॥ २४ ॥ सस्वजे परिरेभे ॥ २५ ॥ रमाया अमलं निर्दोषमालयम् । विस्मृतो लोकव्यवहारो येन सः ॥ २६ ॥ २७ ॥ अर्जुनेन समत्वात्परिष्वक्त

गीतवादित्रघोषेण ब्रह्मघोषेण भूयसा ॥ अभ्ययात्स हृषीकेशं प्राणाः प्राणमिवादृतः ॥ २४ ॥ दृष्ट्वा विक्लिन्नहृदयः कृष्णं स्नेहेन पां-
डवः ॥ चिराददृष्टं प्रियतमं सस्वजेऽथ पुनः पुनः ॥ २५ ॥ दोर्भ्यां परिष्वज्य रमामलालयं मुकुंदगात्रं नृपतिर्हताशुभः ॥ लेभे परां
निर्वृतिमश्रुलोचनो हृष्यत्तनुर्विस्मृतलोकविभ्रमः ॥ २६ ॥ तं मातुलेयं परिरभ्य निर्वृतो भीमः स्मयन्प्रेमजवाकुलेंद्रियः ॥ यमौ कि-
रीटी च सुहृत्तमं मुदा प्रवृद्धबाष्पाः परिरेभिरेऽच्युतम् ॥ २७ ॥ अर्जुनेन परिष्वक्तो यमाभ्यामभिवादितः ॥ ब्राह्मणेभ्यो नमस्कृत्य
वृद्धेभ्यश्च यथाऽर्हतः ॥ २८ ॥ मानितो मानयामास कुरुसृंजयकैकयान् ॥ सूतमागधगंधर्वा बंदिनश्चोपमंत्रिणः ॥ २९ ॥ मृदंग-
शंखपटहवीणापणवगोमुखैः ॥ ब्राह्मणाश्चारविंदाक्षं तुष्टुवुर्ननृतुर्जगुः ॥ ३० ॥ एवं सुहृद्भिः पर्यस्तः पुण्यश्लोकशिखामणिः ॥ सं-
स्तूयमानो भगवान्विवेशालंकृतं पुरम् ॥ ३१ ॥ संसिक्तवर्त्म करिणां मदगंधतोयैश्चित्रध्वजैः कनकतोरणपूर्णकुंभैः ॥ मृष्टात्मभिर्नव-
दुकूलविभूषणस्रग्गंधैर्नृभिर्युवतिभिश्च विराजमानम् ॥ ३२ ॥

एव केवलं पादौ नमस्कुर्वन्नर्जुनः कृष्णेन भुजाभ्यां धृत इति भावः । यमाभ्यां त्वभिवादितश्चेति ॥ २८ ॥ २९ ॥ ३० ॥ ३१ ॥ चित्रध्वजादिभिर्विराजमानम् ॥ ३२ ॥

पूर्णनेत्र होऊन अत्यंत मित्र अशा श्रीकृष्णास आलिंगन केलें ॥ २७ ॥ त्यांत समवयस्क असल्यामुळें अर्जुनानें त्याला केवळ आलिंगन केलें, नकुळसहदेवांनीं आलिंगन-
पूर्वक वंदन केलें. श्रीकृष्णानेंहि ब्राह्मणांना वंदन करून, वयानें अधिक असलेल्या धर्मराजादिकांस यथायोग्य वंदन केलें ॥ २८ ॥ त्यांनीं सन्मान केलेल्या श्रीकृष्णानें, सामोरे
आलेल्या कुरु संजय आणि कैकय यांचा सन्मान केला; नंतर सूत, मागध, गंधर्व, बंदी, खुशामती लोक, व ब्राह्मण हे सर्व एकदम मृदंग, शंख, पटह, वीणा, पणव, गोमुख
इत्यादिक वाद्यांच्या गजरासहवर्तमान श्रीकृष्णाचें स्तवन व गायन करूं लागले व वारांगना नृत्य करूं लागल्या ॥ २९ ॥ ३० ॥ याप्रमाणें पांडवांबरोबर भेट झालेला तो पुण्यश्लोक-
शिखामणि भगवान् श्रीकृष्ण, पांडवांनीं परिवेष्टित व सूतादिकांनीं स्तूयमान होत्साता अलंकृत झालेल्या हस्तिनापुरांत प्रविष्ट झाला ॥ ३१ ॥ तें नगर, हत्तींच्या मदगंध-
युक्त उदकांनीं रस्ते भिजविलेलें होतें; तसेंच चित्रविचित्र ध्वजांनीं, सुवर्णपुष्पांच्या तोरणांनीं, तसेंच उदकानें तोंडोतोंड भरलेल्या व पुष्पमाळादिकांनीं अलंकृत केलेल्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कुंभांनीं, स्नानेंवगैरे करून नवीं वस्त्रें, भूषणें, माळा व चंदनाच्या उट्यावगैरे धारण केलेल्या पुरुषांनीं व स्त्रियांनीं सुशोभित होतें ॥ ३२ ॥ प्रत्येक घरामध्यें लाऊन ठेवलेल्या उत्तम दीपांनीं व मांडून ठेवलेल्या पुष्पफळादिक पदार्थांनीं युक्त होतें, गवाक्षांतून बाहेर निघणाऱ्या अगरुधूपांनीं मनोहर व झळकणाऱ्या पताकांनीं युक्त असून मस्तकांवर सुवर्णकलश असलेल्या रुप्याच्या मोठमोठ्या शिखरांनीं सुशोभित असलेल्या घरांनीं दाट भरलेलें होतें. असें तें धर्मराजाचें नगर भगवंतानें अवलोकन केलें ॥ ३३ ॥ तेव्हां, पुरुषांच्या नेत्रांचा आदरपूर्वक पाहाण्याचा विषय असा तो श्रीकृष्ण प्राप्त झाला, हें ऐकून उत्कंठेनें उठून धांवतांना ज्यांच्या केशांच्या व नेसलेल्या वस्त्रांच्या गांठी सईल झाल्या आहेत अशा तरुणी स्त्रिया, तत्काळ घरचीं कामें व शय्येवर निजलेले पति टाकून राजमार्गानें जाणाऱ्या त्या कृष्णाला पाहाण्याकरितां निघाल्या ॥ ३४ ॥ नंतर, घरांच्या उपरमाड्यांवर चढलेल्या त्या स्त्रियांनीं, हत्ती, घोडे, रथ व शिपाय अशा चतुरंगसैन्यानें अगदीं भरून गेलेल्या त्या राजमार्गामध्यें स्त्रियांसहवर्तमान

प्रतिसद्म उद्दीप्तैर्दीपैर्बलिभिः पुष्पादिप्रकरैश्च जुष्टम् । जालेभ्यो गवाक्षेभ्यो निर्गतैर्धूपै रुचिरम् । विलसंत्यः पताका यस्मिंस्तत् । मूर्धन्या मूर्ध्नि भवा हेमकलशा येषां तैः रजतमयानि रूप्यमयान्युरूणि स्थूलानि शृंगाणि कलशाधस्तनभूमिका येषां तैर्भवनैर्जुष्टं कुरुराजस्य धाम पुरं ददर्श ॥ ३३ ॥ नराणां लोचनानि तेषां पानस्य सादरवीक्ष-

उद्दीप्तदीपबलिभिः प्रतिसद्मजालनिर्यातधूपरुचिरं विलसत्पताकम् ॥ मूर्धन्यहेमकलशै रजतोरुशृंगैर्जुष्टं ददर्श भवनैः कुरुराजधाम ॥ ३३ ॥ प्राप्तं निशम्य नरलोचनपानपात्रमौत्सुक्यविश्लथितकेशदुकूलबंधाः ॥ सद्यो विसृज्य गृहकर्म पतींश्च तल्पे द्रष्टुं ययुर्युवतयः स्म नरेंद्र मार्गे ॥ ३४ ॥ तस्मिन्सुसंकुल इभाश्वरथद्विपद्भिः कृष्णं सभार्यमुपलभ्य गृहाधिरूढाः ॥ नार्यो विकीर्य कुसुमैर्मनसोपगुह्य सुस्वागतं विदधुरुत्स्मयवीक्षितेन ॥ ३५ ॥ ऊचुः स्त्रियः पथि निरीक्ष्य मुकुंदपत्नीस्तारा यथोडुपसहाः किमकार्यमूभिः ॥ यच्चक्षुषां पुरुषमौलिरुदारहासलीलावलोककलयोत्सवमातनोति ॥ ३६ ॥ तत्रतत्रोपसंगम्य पौरा मंगलपाणयः ॥ चक्रुः सपर्यां कृष्णाय श्रेणीमुख्या हतैनसः ॥ ३७ ॥ अंतःपुरजनैः प्रीत्या मुकुंदः फुल्ललोचनैः ॥ ससंभ्रमैरभ्युपेतः प्राविशद्राजमंदिरम् ॥ ३८ ॥ पृथा विलोक्य भ्रात्रेयं कृष्णं त्रिभुवनेश्वरम् ॥ प्रीतात्मोत्थाय पर्यंकात्सस्नुषा परिषस्वजे ॥ ३९ ॥

णस्य पात्रं विषयम् । किं पुनर्नारीणामित्यर्थः ॥ ३४ ॥ सुष्ठु स्वागतं तत्प्रश्नादिकं प्रियमुत्स्मयवीक्षितेनैव विदधुः ॥ ३५ ॥ उडुपसहाः चंद्रसहचरा इत्यर्थः । अमूभिः किं पुण्यमकारि ॥ ३६ ॥ श्रेण्य एकशिल्पोपजीविनां संघास्तेषु मुख्याश्च ॥ ३७ ॥ अभ्युपेतोऽभिगमनेन सत्कृतः ॥ ३८ ॥ सस्नुषा द्रौपदीसहिता ॥ ३९ ॥

प्राप्त झालेल्या त्या श्रीकृष्णाला पाहून, त्याच्यावर पुष्पवृष्टि केली व मनानें त्याला आलिंगन करून आनंदयुक्त अवलोकनानेंच त्याला स्वागतप्रश्न केला ॥ ३५ ॥ त्यावेळीं, चंद्रासहवर्तमान स्थित असलेल्या तारागणासारख्या, कृष्णासहवर्तमान स्थित असलेल्या त्या कृष्णपत्नींना मार्गामध्यें पाहून स्त्रिया म्हणाल्या कीं,—ज्यांच्या नेत्रांना, सर्वमनोरथ पूर्ण करणारा हा पुरुषोत्तम, उदारहास्ययुक्त लीलावलोकनाच्या लेशानें सुख देत आहे, त्या ह्या कृष्णपत्नींनीं जन्मांतरीं काय बरें पुण्य केलें होतें ! ॥ ३६ ॥ असो. त्यावेळीं त्यात्या मार्गांचेठिकाणीं नगरवासी मोठमोठे शेटसावकार लोक, गंधपुष्पतांबूलादिक शुभद्रव्यें हातांत घेऊन श्रीकृष्णाला समोरे जाऊन त्याची पूजा करून निष्पाप झाले ॥ ३७ ॥ नंतर घाई झालेल्या व प्रफुल्लितनेत्र अशा अंतःपुरांतील जनांनीं प्रीतीनें पुढें जाऊन सत्कार केलेला तो श्रीकृष्ण, राजमंदिरांत प्रविष्ट झाला ॥ ३८ ॥ तेव्हां, आपल्या भावाचा पुत्र त्रिभुवनेश्वर श्रीकृष्ण प्राप्त झाला असें ऐकून संतुष्टचित्त झालेल्या कुंतीनें पर्यंकावरून उठून, द्रौपदीसहित पुढें जाऊन, त्याला आलिंगन

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

केलें ॥ ३९ ॥ तेव्हां, आदरयुक्त अशा त्या धर्मराजानें देवदेवांचाहि नियंता अशा श्रीकृष्णाला घरीं आणिलें असतां, आनंदानें अत्यंत व्यापून गेलेल्या त्या धर्माला, श्रीकृष्णाच्या पूजेच्याहि क्रमाची विस्मृति पडूं लागली ॥ ४० ॥ त्यावेळीं श्रीकृष्णानें, पितृभगिनी अशा कुंतीला व गुरुस्त्रियांना वंदन केलें आणि स्वतांहि द्रौपदीनें व सुभद्रेनें अभिवंदित झाला ॥ ४१ ॥ तेव्हां कुंतीनें प्रेरणा केलेल्या द्रौपदीनें, पतिव्रता अशी रुक्मिणी, सत्यभामा, भद्रा, जांबवती, कालिंदी, मित्रविंदा, लक्ष्मणा व नाग्नजिती यांचें व दुसऱ्याहि ज्या कृष्णस्त्रिया प्राप्त झाल्या होत्या त्या सर्वांचें वस्त्रें, माळा व कुंकुमादि सौभाग्यद्रव्यें यांच्या योगेंकरून पूजन केलें ॥ ४२ ॥ ४३ ॥ नंतर, धर्मराजानें सैन्य, सेवक व प्रधान यांसहित व स्त्रियांसहित श्रीकृष्णाला प्रतिदिवशीं नव्यानव्या सत्कारांनीं, त्याला जसें सुख वाटेल तशारीतीनें ठेऊन घेतलें ॥ ४४ ॥ एकेवेळीं अर्जुनाबरोबर अस-

---

कृत्यं प्रकारविशेषम् । प्रमोदेनोपहतोऽभिभूतः ॥ ४० ॥ गुरुस्त्रीणां च कृष्णया द्रौपद्या च । भगिन्या सुभद्रया ॥ ४१ ॥ आनर्चार्चितवती ॥ ४२ ॥ अन्याश्च याः कृष्णपत्न्योऽभ्यागतास्ता अपि ॥ ४३ ॥ प्रत्यहं नवं नवं यथा भवति तथा सुखं निवासयामास ॥ ४४ ॥ कथंभूतम् । यः प्रेम्णा नित्यं फाल्गुनेन संयुतः । अतएव तस्य सहायेन सता

लपंतीति कुलपाः पाखंडास्तान् अंसते समाघातयतीति तथा सः । अकाकः कं च अकं च काके सुखदुःखे ते न विद्येते यस्य सोऽकाकः आप्तकाम इत्यर्थः । स यथा आप्तकामो देवयोग्यं केवलं पुरोडाशमात्रं नार्हत्यपितु सर्वस्वमपि तथाऽयं श्रीकृष्णोऽपि ब्रह्मर्षियोग्यं सपर्यामात्रं कथमर्हति किंत्वात्मसमर्पणमप्यर्हतीत्यर्थः ॥ ३४ ॥

न भगवंताकडून कठोर वचनें ऐकवीत होत्साता असें ह्मणाला कीं,– ॥ ३० ॥ काल हा सर्व करण्यास समर्थ व कोणींहि उल्लंघन करण्यास अशक्य आहे, असें कालमाहात्म्य सांगणारी जी श्रुति आहे ती यथार्थ आहे. कारण, कालपरत्वें ज्ञानवयोवृद्धांचीहि बुद्धि बालकाच्या वाक्यांनीं भ्रम पावत्ये ॥ ३१ ॥ हे सभापति हो, तुम्ही सर्वहि पूजापात्र जाणणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ आहां ह्मणून पूजेविषयीं कृष्ण संमत आहे असें जें बालकाचें (सहदेवाचें) भाषण तें खरें आहे असें मानूं नका ॥ ३२ ॥ कारण, तप, विद्या, व व्रतें धारण करणाऱ्या, ज्ञानाच्या प्रतापानें पापरहित झालेल्या, ब्रह्मनिष्ठ व लोकपालांनीं पूज्य अशा मोठमोठ्या सभापति ऋषींचा अनादर करून गोपाळ व क्षत्रियकुळामध्यें दूषणभूत असा हा कृष्ण पूजेविषयीं कसा योग्य होईल ? तर जसा कावळा देवांना योग्य अशा पुरोडाला योग्य होणार नाहीं तसा योग्य होणार नाहीं ॥३३॥३४॥

---

१ याचाच वास्तविक अर्थ—वेदादिकांचें रक्षण करणारा व पाखंडी लोकांचा नाश करणारा इत्यादिक आहे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वर्ण आश्रम व कुळ यांनीं भ्रष्ट, सर्वधर्मांनीं बहिष्कृत, स्वच्छंद आचरण करणारा, व गुणहीन असा हा कृष्ण अग्रपूजेला कसा योग्य होईल ? ॥ ३५ ॥ ययाति राजानें यांच्या कुळाला शाप दिला आहे ह्मणून तें सत्पुरुषांनीं बहिष्कृत केलें आहे. आणि निरंतर तें व्यर्थ मद्यपान करण्यांत तत्पर आहे, तें पूजेला कसें योग्य होईल? ॥ ३६ ॥ हे चोर यादव, ब्रह्मर्षीनीं सेवन केलेल्या मथुरादि देशांचा त्याग करून वेदाध्ययनाच्या तेजानें रहित व दुर्गम अशा समुद्राचा (त्यांतील द्वारका नगरीचा) आश्रय करून

वर्णाश्रमकुलेभ्योऽपेतो ब्रह्मत्वात् । अनामगोत्रमिति श्रुतेः । अतएवानधिकारित्वात्सर्वैर्धर्मैर्बहिष्कृतः । स्वैरत्वात् । अतएव निर्गुणस्तमआदिरहितः । एवंभूतो जीवानां योग्यं तुच्छं सपर्यामात्रं कथमर्हतीत्यर्थः ॥ ३५ ॥ अपि च कथं वर्णनीयो माहशैरेषां यदूनां महिमा यस्मादेषां कुलं ययातिना शप्तमपि किं सद्भिर्बहिष्कृतमपितु शिरसा धृतम् । किंचास्मदादिकुलवत्किं वृथा पानरतमपि त्वतिनियताचारमित्यर्थः । अहो यदूनामेव तावदीदृशं माहात्म्यम् । यदुकुलवृद्धस्य ययातेः शापो न प्राभूदित्यादि । अयं तु साक्षादीश्वरोऽतः सपर्यामात्रं कथमर्हतीत्यर्थः ॥ ३६ ॥ किंच । ये राजानो दुष्टानुच्चाटयंति तदर्थं कीकटादिदेशानप्याश्रयंति एते तु ब्रह्म-

वर्णाश्रमकुलापेतः सर्वधर्मबहिष्कृतः ॥ स्वैरवर्ती गुणैर्हीनः सपर्यां कथमर्हति ॥ ३५ ॥ ययातिनैषां हि कुलं शप्तं सद्भिर्बहिष्कृतम् ॥ वृथापानरतं शश्वत्सपर्यां कथमर्हति ॥ ३६ ॥ ब्रह्मर्षिसेवितान्देशान्हित्वैते ब्रह्मवर्चसम् ॥ समुद्रं दुर्गमाश्रित्य बाधंते दस्यवः प्रजाः ॥ ३७ ॥ एवमादीन्यभद्राणि बभाषे नष्टमंगलः ॥ नोवाच किंचिद्भगवान्यथा सिंहः शिवारुतम् ॥ ३८ ॥ भगवन्निंदनं श्रुत्वा दुःसहं तत्सभासदः ॥ कर्णौ पिधाय निर्जग्मुः शपंतश्चेदिपं रुषा ॥ ३९ ॥

र्षिसेवितानेव देशानाश्रित्याब्रह्मवर्चसं समुद्रं दुर्गमपि हित्वा हापयित्वेत्यर्थः । बाधंते तथा या दस्यवः प्रजास्ताश्च । अयमर्थः । वेदतदर्थाभियोगो ब्रह्मवर्चसं तद्विरुद्धमब्रह्मवर्चसं समुद्रं मुद्राऽत्र लिंगं तत्सहितं समुद्रम् । वेदविरुद्धलिंगधारिणं पाखंडमित्यर्थः । तल्लिंगं त्याजयित्वा बाधंते दंडयंति । कथंभूतम् । दुर्गम् । धर्मवत्प्रतीतेरधर्मतया दुर्ज्ञेयमित्यर्थः । तथा दस्यवो दस्यूनपि प्रजावेषेण वर्तमानान् दंडयंति । अतो यदुभ्योऽन्यः को नाम धार्मिकोऽस्तीति । पारुष्यं तूक्तार्थमेव ॥ ३७ ॥ शिवा फेरुस्तस्या रुतं श्रुत्वा यथा सिंहो न किंचिद्ब्रूते तद्वत् ॥ ३८ ॥ ३९ ॥

प्रजांना पीडा देतात ॥ ३७ ॥ हे राजा, इत्यादिक दुसरीं पुष्कळ अभद्रभाषणें क्षीणपुण्य झालेला तो शिशुपाळ बोलूं लागला. तेव्हां, भालवेचें अमंगळ ओरडणें ऐकून जसा सिंह कांहींच बोलत नाहीं त्याप्रमाणें भगवान् श्रीकृष्णानें कांहींच भाषण केलें नाहीं ॥ ३८ ॥ तेव्हां भगवंताची ती दुःसह निंदा ऐकून, सभासद लोक, क्रोधानें

---

१ हा कृष्ण, ब्रह्मरूप असल्यामुळें वर्णाश्रमकुलांनीं रहित, अनधिकारी असल्यामुळें सर्वधर्मबहिष्कृत, स्वच्छंद असल्यामुळें यथेच्छाचारी व तमआदिक गुणांनीं रहित असल्यामुळें निर्गुण आहे म्हणून जीवांना योग्य अशा केवळ पूजेलाच कसा योग्य होईल ? २ यांच्या कुळाला ययाति राजानें शाप दिला ह्मणून तें साधूंनीं बहिष्कृत केलें आहे काय ? नाहीं; तर शिरसा वंद्य केलें आहे. आणि आमच्यावगैरे कुळांसारखें तें व्यर्थ मद्यपान करणारें आहे काय ? नाहीं; तर आचारसंपन्न आहे. ३ हे यादव, ब्रह्मर्षींनीं सेवन केलेल्या मथुरादिक देशांचा आश्रय करून वेदविरुद्ध व दुर्ज्ञेय असें पाखंडचिन्ह धारण करणाऱ्या लोकांना, त्यांच्याकडून तें चिन्ह टाकवून दंड करितात व चोरी करणाऱ्या प्रजारूपी लोकांना दंड करितात. तेव्हां यादवांपेक्षां दुसरा कोण धार्मिक आहे ? कोणीच नाहीं.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शिशुपाळाला 'हा दुष्ट, दुरात्मा मरूंदे असा' शाप देत होत्साते आपापले कान झांकून त्या सभेंतून निघून गेले ॥ ३९ ॥ कारण, भगवंताची किंवा भगवद्भक्ताची निंदा ऐकून जो मनुष्य, तेथून निघून जात नाहीं तो पुण्यापासून भ्रष्ट होऊन नरकांत जाऊन पडतो ॥ ४० ॥ असो, सभासद निघून गेल्यानंतर पांडव, मत्स्य, कैकेय व सृंजय हे राजे क्रुद्ध होऊन हातांत अस्त्रें घेऊन शिशुपाळाला मारण्याची इच्छा करित होत्साते उठून उभे राहिले ॥ ४१ ॥ हे राजा, तदनंतर निर्भय असा तो शिशुपाळहि सभेमध्यें कृष्णपक्षीय अशा त्या धर्मराजादिकांची भर्त्सना करित होत्साता, त्यांना मारण्याकरितां हातांत ढाल तलवार घेऊन उभा राहिला ॥ ४२ ॥ इतक्यामध्यें भगवंतानें विचार केला कीं,—हा माझा पार्षद माझ्यासारखा बळी आहे, याला जर मी मारिलें नाहीं तर हा या सर्वांना मारून टाकील असा विचार करून स्वतःच आसनावरून उठून आपल्या त्या पांडवादिकांचें निवारण करून क्रोधानें, वस्तऱ्यासारखी धारा असलेल्या चक्राच्या योगानें, स्वतांच अंगावर धांवून येणाऱ्या त्या शत्रूचें मस्तक

॥ ४० ॥ ४१ ॥ ४२ ॥ तावदुत्थायेत्यस्यायमभिप्रायः । एष मत्पार्षदो मत्तुल्यबलः सर्वानेतान्हन्यादतो मयैव शीघ्रं हंतव्य इति तत्क्षणमेवोत्थाय शिरो जहारेति ॥ ४३ ॥

निंदां भगवतः शृण्वंस्तत्परस्य जनस्य वा ॥ ततो नापैति यः सोऽपि यात्यधः सुकृताच्च्युतः ॥ ४० ॥ ततः पांडुसुताः क्रुद्धा मत्स्यकैकेयसृंजयाः ॥ उदायुधाः समुत्तस्थुः शिशुपालजिघांसवः ॥ ४१ ॥ ततश्चैद्यस्त्वसंभ्रांतो जगृहे खड्गचर्मणी ॥ भर्त्सयन्कृष्णपक्षीयान्राज्ञः सदसि भारत ॥ ४२ ॥ तावदुत्थाय भगवान्स्वान्निवार्य स्वयं रुषा ॥ शिरः क्षुरांतचक्रेण जहारापततो रिपोः ॥ ४३ ॥ शब्दः कोलाहलोऽप्यासीच्छिशुपाले हते महान् ॥ तस्यानुयायिनो भूपा दुद्रुवुर्जीवितैषिणः ॥ ४४ ॥ चैद्यदेहोत्थितं ज्योतिर्वासुदेवमुपाविशत् ॥ पश्यतां सर्वभूतानामुल्केव भुवि खाच्च्युता ॥ ४५ ॥ जन्मत्रयानुगुणितवैरसंरब्धया धिया ॥ ध्यायंस्तन्मयतां यातो भावो हि भवकारणम् ॥ ४६ ॥ ऋत्विग्भ्यः ससदस्येभ्यो दक्षिणां विपुलामदात् ॥ सर्वान्संपूज्य विधिवच्चक्रेऽवभृथमेकराट् ॥ ४७ ॥

॥ ४४ ॥ ४५ ॥ नन्वेवं निंदकस्य कथं वासुदेवे प्रवेशस्तत्राह । जन्मत्रयेति । जन्मत्रयेऽनुगुणितमनुवर्तितं यद्वैरं तेन संरब्धयाऽऽविष्टया । तन्मयतां तत्स्वरूपतां यातः । पुनः पार्षदो बभूवेत्यर्थः । अत्र हेतुः । भावो हीति । भावो भावना अनुध्यानं भवस्य ध्येयाकारजन्मनः कारणम् । पेशस्कारिध्यानेन कीटादौ तथा दृष्टत्वादित्यर्थः ॥ ४६ ॥ ४७ ॥

तोडून टाकिलें ॥ ४३ ॥ याप्रमाणें शिशुपाळ मारला असतां त्याठिकाणीं मोठा कलकलाट शब्द प्रवृत्त झाला आणि त्याचे अनुयायी राजेहि आपले प्राण वांचण्याची इच्छा धरून जिकडे तिकडे पळून गेले ॥ ४४ ॥ त्यावेळीं शिशुपाळाच्या देहांतून निघालेलें जें जीवरूपी तेज तें, सर्वलोक पहात असतां, 'जसें आकाशांतून खालीं पडलेलें उल्कारूप तेज, भूमीमध्यें प्रविष्ट होतें त्याप्रमाणें' श्रीकृष्णाच्या देहामध्यें प्रविष्ट झालें, म्हणजे त्याची सायुज्यता पावलें ॥ ४५ ॥ आतां, अशा निंदकाचा वासुदेवामध्यें प्रवेश कसा झाला? असें कोणी म्हणेल तर—हिरण्यकशिपु, रावण, व शिशुपाळ या तीन जन्मांमध्यें अनुवर्तित झालेल्या द्वेषानें खवळून गेलेल्या बुद्धीच्या योगानें भगवंताचें ध्यान करण्यास तो शिशुपाळ, तन्मयता पावला म्हणजे पुन्हा वैकुंठाचेठिकाणीं भगवत्पार्षद होऊन राहिला. एतावता निरंतर चिंतन असणें हेंच ध्येयरूपाचा आकार उत्पन्न होण्यास कारण होतें ॥ ४६ ॥ नंतर, सार्वभौम अशा त्या युधिष्ठिरानें, सभासदांस हित ऋत्विजांना मोठी दक्षिणा दिली आणि पूजा करण्यास योग्य असलेल्या इतरहि सर्वांचें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पूजन करून यथाविधि अवभृथस्नान केलें ॥ ४७ ॥ याप्रमाणें धर्मराजाचा राजसूय यज्ञ साधून, कुंती व पांडव यांनीं राहण्याविषयीं प्रार्थना केलेला तो योगेश्वरांचा ईश्वर भगवान् श्रीकृष्ण, कितीएक महिनेपर्यंत तेथेंच राहिला होता ॥ ४८ ॥ नंतर,आपल्या जाण्याची इच्छा न करणाऱ्याहि धर्मराजाचा निरोप घेऊन तो देवकीपुत्र श्रीकृष्ण, स्त्रियांसहवर्तमान व प्रधानासहवर्तमान आपल्या द्वारकेमध्यें निघून गेला ॥ ४९ ॥ हे राजा, वैकुंठवासी जयविजयांना सनकादिकांच्या शापानें वारंवार जें जन्म झालें तद्विषयक हें आख्यान मी तुला बहुत विस्तरानें सांगितलें आहे ॥ ५० ॥ असो. राजसूययज्ञसंबंधी अवभृथस्थान केलेला तो धर्मराजा, ब्राह्मणांनीं व क्षत्रियांनीं युक्त अशा सभेमध्यें इंद्रासारखा शोभूं लागला ॥ ५१ ॥ धर्मराजानें पूजा केलेले सर्वहि देव, मनुष्य व प्रमथादिक गण, श्रीकृष्णाची व यज्ञाची प्रशंसा करीत, आपापल्या स्थानीं निघून गेले ॥ ५२॥ त्यावेळीं, ज्यानें सर्वांना आनंद करणारी व समृद्ध अशी ती युधिष्ठिराची संपत्ति पाहून सहन केली नव्हती, त्या एका कलीच्या अंशरूपी, पापाचारी, व कुरुकुलनाशक अशा

॥ ४८ ॥ ४९ ॥ ५० ॥ ५१ ॥ सुरा मानवाः खेचराः प्रमथाश्च ॥ ५२ ॥ पापं धर्मद्विषम् । अत्र हेतुः । कलिं कलेरंशम् । अतएव कुरुकुलस्यामयं व्याधिवन्नाशकम् ॥ ५३ ॥

साधयित्वा क्रतुं राज्ञः कृष्णो योगेश्वरेश्वरः ॥ उवास कतिचिन्मासान्सुहृद्भिरभियाचितः ॥ ४८ ॥ ततोऽनुज्ञाप्य राजानमनिच्छंतमपीश्वरः ॥ ययौ सभार्यः सामात्यः स्वपुरं देवकीसुतः ॥ ४९ ॥ वर्णितं तदुपाख्यानं मया ते बहुविस्तरम् ॥ वैकुंठवासिनोर्जन्म विप्रशापात्पुनः पुनः ॥ ५० ॥ राजसूयावभृथ्येन स्नातो राजा युधिष्ठिरः ॥ ब्रह्मक्षत्रसभामध्ये शुशुभे सुरराडिव ॥ ५१ ॥ राज्ञा सभाजिताः सर्वे सुरमानवखेचराः ॥ कृष्णं क्रतुं च शंसंतः स्वधामानि ययुर्मुदा ॥ ५२ ॥ दुर्योधनमृते पापं कलिं कुरुकुलामयम् ॥ यो न सेहे श्रियं स्फीतां दृष्ट्वा पांडुसुतस्य ताम् ॥ ५३ ॥ य इदं कीर्तयेद्विष्णोः कर्म चैद्यवधादिकम् ॥ राजमोक्षं वितानं च सर्वपापैः प्रमुच्यते ॥ ५४ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे उत्तरार्धे शिशुपालवधो नाम चतुःसप्ततितमोऽध्यायः ॥ ७४ ॥ ॥ राजोवाच ॥ अजातशत्रोस्तं दृष्ट्वा राजसूयमहोदयम् ॥ सर्वे मुमुदिरे ब्रह्मन्नृदेवा ये समागताः ॥ १ ॥ दुर्योधनं वर्जयित्वा राजानः सर्षयः सुराः ॥ इति श्रुतं नो भगवंस्तत्र कारणमुच्यताम् ॥ २ ॥

वितानं यज्ञं च ॥ ५४ ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधे उत्तरार्धे टीकायां चतुःसप्ततितमोऽध्यायः ॥ ७४ ॥ ॥ पंचयुक्सप्ततितमे यज्ञावभृथसंभ्रमः ॥ सुयोधनस्य चाक्षांत्या मानभंगो दृशि भ्रमात् ॥ १ ॥ दुर्योधनस्यैकस्यैव दुःखे कारणं प्रष्टुमुक्तमनुवदति । अजातशत्रोरिति ॥ १ ॥ इति श्रुतम् । त्वन्मुखादेवेत्यर्थः ॥ २ ॥

दुर्योधनाखेरीज सर्वांना तो यज्ञ पाहून आनंद झाला ॥ ५३ ॥ जो पुरुष, हें शिशुपालवधादिक विष्णूचें कर्म, जरासंधानें कोंडून ठेवलेल्या राजांचा मोक्ष व यज्ञाचा महोत्साह यांचें कीर्तन, श्रवण व स्मरण करील तो सर्व पापांपासून मुक्त होईल ॥ ५४ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील उत्तरार्धांत राजसूययज्ञनिरूपणनामक हा चौऱ्याहत्तरावा अध्याय समाप्त झाला ॥ ७४ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां पंचाहत्तराव्या अध्यायामध्यें राजसूययज्ञाच्या अवभृथस्नानाचा उत्साह आणि दृष्टीचे ठिकाणीं भ्रम झाला असतांहि, क्षमा नसल्यामुळें दुर्योधनाचा झालेला मानभंग यांचें वर्णन केलें आहे ॥ १ ॥ एका दुर्योधनालाच दुःख होण्याचें कारण विचारण्यासाठीं राजा ह्मणाला— हे ब्रह्मन्, शुकाचार्य, एक दुर्योधन वर्ज्य करून, जे तेथें मनुष्यश्रेष्ठ, राजे, ऋषि व देव प्राप्त झाले होते ते सर्वहि धर्मराजाचा तो राजसूय महोत्साह पाहून आनंद पावले, असें मी तुझ्यापासून ऐकिलें त्यांत एका दुर्योधनालाच असंतोष होण्याचें कारण काय तें सांगावें ॥ १ ॥ २ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शुकाचार्य ह्मणाला– हे राजा, तुझा आजा जो महात्मा युधिष्ठिर त्याच्या राजसूय यज्ञामध्यें प्रेमानें बांधले गेलेले त्याचे सर्वेहि बांधव, यज्ञसंबंधी तीं तीं कामें करीत होते ॥ ३ ॥ ते असे कीं,–भीमसेन, पाकशाळेचा अध्यक्ष होता, सुयोधन धनाध्यक्ष (खजीनदार) होता, सहदेव, लोकांच्या पूजा सन्मानवगैरे करणारा होता, नकुळ अनेकप्रकारच्या वस्तु संपादन करणारा होता ॥ ४ ॥ पूज्यलोकांच्या चंदनलेपनादिक शुश्रूषेविषयीं अर्जुन होता, श्रीकृष्ण, पादप्रक्षालनाच्या कामावर होता, भक्ष्यभोज्यादिक पदार्थांच्या वाढण्याकडे द्रौपदी होती, अतिउदारचित्त असा कर्ण दानाध्यक्ष होता ॥ ५ ॥ तसेच, हे राजेंद्रा सात्यकि, विकर्ण, हार्दिक्य, विदुरादिक, बाल्हीकराजाचे पुत्र भूरि आदिक तसेच संतर्दनादिक बांधव ते सर्वेहि त्या महायज्ञांत अनेक कर्मांमध्यें मुखत्यार नेमिलेले असल्यामुळें, धर्मराजाचें प्रिय होण्याच्या इच्छेनें सांगितल्याप्रमाणें ते आपापले

दुर्योधनस्यासहनकारणत्वेन यागमहोत्सवमेव पुनः सिंहावलोकनेन निरूपयति। पितामहस्येत्यादिना ।एकदांऽतःपुरे तस्येत्यतः प्राक्तनेन ग्रंथेन । प्रेमबंधनाः प्रेमयंत्रिताः ॥ ३ ॥ पूजायां संमानने । द्रव्यसाधने नानावस्तुसंपादने ॥ ४ ॥ गुरूणां शुश्रूषणे चंदनालेपनादौ ॥ ५ ॥ ६ ॥ निरूपिता नियुक्ताः संतो नानाकर्मसु प्रवर्तंते स्म ॥ ७ ॥ ऋत्वि-

ऋषिरुवाच ॥ पितामहस्य ते यज्ञे राजसूये महात्मनः ॥ बांधवाः परिचर्यायां यस्यासन्प्रेमबंधनाः ॥ ३ ॥ भीमो महानसाध्यक्षो धनाध्यक्षः सुयोधनः ॥ सहदेवस्तु पूजायां नकुलो द्रव्यसाधने ॥ ४ ॥ गुरुशुश्रूषणे जिष्णुः कृष्णः पादावनेजने ॥ परिवेषणे द्रुपदजा कर्णो दाने महामनाः ॥ ५ ॥ युयुधानो विकर्णश्च हार्दिक्यो विदुरादयः ॥ बाह्लीकपुत्रा भूर्याद्या ये च संतर्दनादयः ॥ ६ ॥ निरूपिता महायज्ञे नानाकर्मसु ते तदा ॥ प्रवर्तंते स्म राजेंद्र राज्ञः प्रियचिकीर्षवः ॥ ७ ॥ ऋत्विक्सदस्यबहुवित्सु सुहृत्तमेषु स्विष्टेषु सूनृतसमर्हणदक्षिणाभिः ॥ चैद्ये च सात्वतपतेश्चरणं प्रविष्टे चक्रुस्ततस्त्ववभृथस्नपनं द्युनद्याम् ॥ ८ ॥ मृदंगशंखपणवधुंधुर्यानकगोमुखाः ॥ वादित्राणि विचित्राणि नेदुरावभृथोत्सवे ॥ ९ ॥ नर्तक्यो नन्नृतुर्हृष्टा गायका यूथशो जगुः ॥ वीणावेणुतलोन्नादस्तेषां स दिवमस्पृशत् ॥ १० ॥ चित्रध्वजपताकाग्रैरिभेंद्रस्यंदनार्वभिः ॥ स्वलंकृतैर्भटैर्भूपा निर्ययू रुक्ममालिनः ॥ ११ ॥ यदुसृंजयकांबोजकुरुकेकयकोसलाः ॥ कंपयंतो भुवं सैन्यैर्यजमानपुरःसराः ॥ १२ ॥

जश्च सदस्याश्च सभासदो बहुविदश्च तेषु । स्विष्टेषु सम्यक् पूजितेषु । सूनृतं प्रियवाक् समर्हणमलंकारादि दक्षिणाश्च प्रसिद्धास्ताभिः । द्युनद्यां गंगायाम् ॥ ८ ॥ ९ ॥ १० ॥ चित्राणि ध्वजपताकाग्राणि येषु तैरिभेंद्रैः स्यंदनैरर्वभिरश्वैर्भटैश्च । एवं चतुरंगैः सैन्यैर्निर्ययुः ॥ ११ ॥ यजमानो युधिष्ठिरः पुरःसरो येषां ते ॥ १२ ॥

अधिकार करीत होते ॥ ६ ॥ ७ ॥ ऋत्विज, सभासद, मोठमोठे ज्ञानी व मित्र इत्यादिकांचा मधुरभाषणें अलंकार व दक्षिणा इत्यादिकेंकरून सत्कार झाला असतां, तसाच शिशुपाळहि भक्तपालक श्रीकृष्णाच्या चरणामध्यें प्रविष्ट झाला असतां, नंतर सर्वांनीं भागिरथीमध्यें अवभृथ स्नान केलें ॥ ८ ॥ त्या अवभृथ स्नानाच्या उत्सवामध्यें मृदंग, शंख, पणव, नोबदी, नगारे, गोमुख इत्यादिक नानाप्रकारचीं चित्रविचित्र वाद्यें वाजूं लागलीं ॥ ९ ॥ त्यावेळीं हर्ष पावलेल्या वारांगना नृत्य करूं लागल्या गायकांचे समुदाय गाऊं लागले. त्यावेळीं त्यांच्या त्या वीणा, मुरल्या व टाळांच्या मोठ्या झालेल्या ध्वनीनें आकाश व्यापून टाकिलें ॥ १० ॥ त्याप्रसंगीं सुवर्णपुष्पांच्या माळा धारण करणारे राजे, ज्यांच्या ध्वजांचीं व पताकांचीं अग्रें चित्रविचित्र रंगांचीं आहेत अशा आपल्या हत्ती, रथ, घोडे, व उत्तम अलंकार धारण केलेले शिपाई अशा चतुरंग सैन्यांनीं वेष्टित होऊन नगराच्या बाहेर निघाले ॥ ११ ॥ तसेच यदु, सृंजय, कांबोज, कुरु, केकय, व कोसल या वंशांतील क्षत्रिय, हे सर्व, धर्मराजाला पुढें करून

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सैन्यांनीं पृथिवीला कांपवीत होत्साते निघाले ॥ १२ ॥ तसेंच सदस्य, ऋत्विज, व दुसरेहि श्रेष्ठ ब्राह्मण मोठ्यानें वेदघोष करीत निघाले, त्यावेळीं देव, ऋषि, पितर व गांधर्व हे पुष्पवृष्टि करीत स्तुति करूं लागले ॥ १३ ॥ नगरांतील पुरुष व स्त्रिया चंदनाच्या उट्या, पुष्पांच्या माळा, भूषणें व वस्त्रें यांच्या योगानें उत्तम अलंकृत होऊन अनेकप्रकारच्या रसांनीं परस्पर लेपन करीत व अभिषेक करीत होत्सात्या, क्रीडा करूं लागल्या ॥ १४ ॥ त्यावेळीं, तैल, गोरस, सुगंधी जळ, हळद व दाट केंशर इत्यादिकांच्या योगानें पुरुषांनीं लेपन केलेल्या वारांगना उलट त्या पुरुषांला लेपन करित होत्सात्या, क्रीडा करूं लागल्या ॥ १५ ॥ त्यावेळीं तो उत्साह पाहण्याकरितां जशा देवांगना, उत्तम विमानामध्यें बसून आल्या होत्या तशाच राजांच्या स्त्रियाहि, योद्धयांनीं सुरक्षित होत्सात्या अवभृथ स्नान करण्याकरितां रथांदिकांमध्यें बसून

सदस्या ऋत्विजोऽन्ये च द्विजश्रेष्ठा निर्ययुः ॥ १३ ॥ किंच । गंधादिभिः स्वलंकृता नरा नार्यश्च मियो विजन्हुः ॥ १४ ॥ रसानेवाह । तैलेति । किंच सांद्रकुंकुमादिभिः पुंभिर्लिप्तास्तान्प्रलिंपंत्यो वारयोषितश्च विजन्हुः ॥ १५॥ नृभिर्गुप्ता रथादियानैर्नृदेव्यो राजपत्न्यो निरगमन्निरगुः । एतदुपलब्धुं विमानवरैर्देव्यो यथा तद्वत् । मातुलेयैः सखिभिश्च परितः सिच्यमानाः । सव्रीडेन हासेन विकसंति वदनानि यासां ताः ॥ १६ ॥ देवरान्पतिभ्रातॄन् उत सखीन्सखीनपि । दृतीभिरुदकनोदनचर्मयंत्रैः सेचनपात्रैश्च ।

सदस्यर्त्विग्द्विजश्रेष्ठा ब्रह्मघोषेण भूयसा ॥ देवर्षिपितृगंधर्वास्तुष्टुवुः पुष्पवर्षिणः ॥ १३ ॥ स्वलंकृता नरा नार्यो गंधस्रग्भूषणांबरैः ॥ विलिंपंत्योऽभिषिंचंत्यो विजह्रुर्विविधै रसैः ॥ १४ ॥ तैलगोरसगंधोदहरिद्रासांद्रकुंकुमैः ॥ पुंभिर्लिप्ताः प्रलिंपंत्यो विजह्रुर्वारयोषितः ॥ १५ ॥ गुप्ता नृभिर्निरगमन्नुपलब्धुमेतद्देव्यो यथा दिवि विमानवरैर्नृदेव्यः ॥ ता मातुलेयसखिभिः परिषिच्यमानाः सव्रीडहासविकसद्वदना विरेजुः ॥ १६ ॥ ता देवरानुत सखीन्सिषिचुर्दृतीभिः क्लिन्नांबरा विवृतगात्रकुचोरुमध्याः ॥ औत्सुक्यमुक्तकबराच्च्यवमानमाल्याः क्षोभं दधुर्मलधियां रुचिरैर्विहारैः ॥ १७ ॥ स सम्राड्रथमारूढः सदश्वं रुक्ममालिनम् ॥ व्यरोचत स्वपत्नीभिः क्रियाभिः क्रतुराडिव ॥ १८ ॥ पत्नी संयाजावभृथ्यैश्चरित्वा ते तमृत्विजः ॥ आचांतं स्नापयांचक्रुर्गंगायां सह कृष्णया ॥ १९ ॥

मलधियां कामिनाम् ॥ १७ ॥ क्रियाभिरंगक्रियाभिः । क्रतुराट् सशरीरो राजसूय इव ॥ १८ ॥ पत्नीसंयाजो यागविशेषः । अवभृथसंबंधि आवभृथ्यं च । तैश्चरित्वाताननुष्ठायेत्यर्थः ॥ १९ ॥

नगरांतून बाहेर भोगीरथीच्या कांठीं आल्या, त्या मामेभाऊ व सख्या यांनीं अंगावर पाणी व गोरसादिक उडवून भिजविल्या असतां, लज्जायुक्त हास्यानें प्रफुल्लितमुख होऊन शोभूं लागल्या ॥ १६ ॥ त्या राजस्त्रिया, जेव्हां पाणी उडविण्याच्या चर्मयंत्रांनीं व तोट्यांनीं ओषल्या दिरांच्या व सख्यांच्या अंगावर पाणी उडवूं लागल्या तेव्हां त्यांचीं बारीक वस्त्रें अगदीं भिजून गेलीं होतीं, ह्मणून त्यांचीं शरीरें, कुच मांड्या व मध्यप्रदेश हे व्यक्त दिसत होते आणि त्यांच्या त्या जलक्रीडेच्या अतिशय उत्सुकतेनें बंध सुटून गेलेल्या केंसांच्या बुचड्यांतून फुलें गळून पडत होतीं, अशा प्रकारच्या सुंदर विहारांनीं त्या राजस्त्रिया, कामीजनांच्या कामवासनायुक्त मनाला क्षोभ उत्पन्न करूं लागल्या ॥ १७ ॥ त्यावेळीं तो सार्वभौम राजा युधिष्ठिर, सुवर्णपुष्पांच्या माळांनीं युक्त व उत्तम घोडे जुंपलेल्या आपल्या रथावर पत्न्यांसह आरूढ झाला असतां, तो, प्रयाज अनुयाज इत्यादिक अंगक्रियांसह मूर्तिमान् प्रगट झालेला राजसूय यज्ञच कीं काय असा शोभूं लागला ॥ १८ ॥ त्या ऋत्विजांनीं पत्नीसंयाजनामक याग

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

व अवभृथसंबंधी कर्मांचें अनुष्ठान करून आचमन केलेल्या द्रौपदीसहित त्या धर्मराजाला गंगेमध्यें मोठ्या समारंभानें स्नान घातलें ॥ १९ ॥ त्यावेळीं मनुष्यांच्या दुंदुभीं-सहवर्तमान देवांचेहि दुंदुभि वाजूं लागले आणि देवता, ऋषि, पितर व मनुष्य हे त्या युधिष्ठिरावर पुष्पवृष्टि करूं लागले ॥ २० ॥ याप्रमाणें यजमानाचें स्नान झाल्यावर ब्राह्मणादिक चारी वर्णांच्या व ब्रह्मचाऱ्यादिक चारी आश्रमाच्या सर्वलोकांनीं त्या गंगेमध्यें स्नान केलें. कारण, हें अवभृथ स्नान घडलें असतां, ब्रह्महत्यादि महापातकें करणाराहि पुरुष त्या पापांपासून तत्काळ मुक्त होतो ॥ २१ ॥ नंतर त्या धर्मराजानें, नवीं रेशमी वस्त्रें परिधान करून इतरहि अलंकार धारण केले आणि भूषणें वस्त्रेंवगैरे देऊन ऋत्विज, सभासद व ब्राह्मण इत्यादिकांचा सत्कार केला ॥ २२ ॥ तो युधिष्ठिर नारायणपरायण होता म्हणून त्या सर्वात्मक नारायणाच्या प्रीत्यर्थ त्यानें बंधु, ज्ञाति, राजे, मित्र व सुहृद् यांचे तसेच इतरहि सर्व लोकांचे वारंवार सत्कार केले ॥ २३ ॥ त्यावेळीं सर्व पुरुष मणिखचित कुंडलें, माळा, पागोटीं,

॥ २० ॥ २१ ॥ अहते नूतने । आनर्चार्चितवान् ॥ २२ ॥ २३ ॥ सुराणामिव रुक् कांतिर्येषाम् । मणिकुंडलैः सहिताः स्रगुष्णीषादयो येषां ते । कुंडलयुगेनालकवृंदेन च

देवदुंदुभयो नेदुर्नरदुंदुभिभिः समम् ॥ मुमुचुः पुष्पवर्षाणि देवर्षिपितृमानवाः ॥ २० ॥ सस्नुस्तत्र ततः सर्वे वर्णाश्रमयुता नराः ॥ महापातक्यपि यतः सद्यो मुच्येत किल्बिषात् ॥ २१ ॥ अथ राजाऽहते क्षौमे परिधाय स्वलंकृतः ॥ ऋत्विक्सदस्यविप्रादीनानर्चाभरणांबरैः ॥ २२ ॥ बंधुज्ञातिनृपान्मित्रसुहृदोऽन्यांश्च सर्वशः ॥ अभीक्ष्णं पूजयामास नारायणपरो नृपः ॥ २३ ॥ सर्वे जनाः सुररुचो मणिकुंडलस्रगुष्णीषकंचुकदुकूलमहार्घ्यहाराः ॥ नार्यश्च कुंडलयुगालकवृंदजुष्टवक्त्रश्रियः कनकमेखलया विरेजुः ॥ २४ ॥ अथर्त्विजो महाशीलाः सदस्या ब्रह्मवादिनः ॥ ब्रह्मक्षत्रियविट्शूद्रा राजानो ये समागताः ॥ २५ ॥ देवर्षिपितृभूतानि लोकपालाः सहानुगाः ॥ पूजितास्तमनुज्ञाप्य स्वधामानि ययुर्नृप ॥ २६ ॥ हरिदासस्य राजर्षे राजसूयमहोदयम् ॥ नैवातृप्यन्प्रशंसंतः पिबन्मर्त्योऽमृतं यथा ॥ २७ ॥ ततो युधिष्ठिरो राजा सुहृत्संबंधिबांधवान् ॥ प्रेम्णा निवासयामास कृष्णं च त्यागकातरः ॥ २८ ॥ भगवानपि तत्रांग न्यवात्सीत्तत्प्रियंकरः ॥ प्रस्थाप्य यदुवीरांश्च सांबादींश्च कुशस्थलीम् ॥ २९ ॥

जुष्टा वक्त्रश्रीर्यासां ताः ॥ २४ ॥ २५ ॥ २६ ॥ २७ ॥ २८ ॥ २९ ॥

अंगरखे, रेशीमकाठी वस्त्रें व बहुत मोलाचे हार धारण करून देवांसारखे देदीप्यमान झाले. तशाच सर्व स्त्रियाहि, दोन्ही कानांतील कुंडलांनीं व कुरळ केंसांच्या समुदायानें मुखांवर तेजयुक्त होत्सात्या कमरेचेठिकाणीं धारण केलेल्या सुवर्णमेखलेनें शोभूं लागल्यास ॥ २४ ॥ हे राजा, नंतर उत्तम स्वभावाचे ऋत्विज, ब्रह्मवेत्ते सभासद, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र व तेथें जे राजे आले होते ते ॥ २५ ॥ तसेच देव, ऋषि, पितर, भूतें, व अनुचरांसहवर्तमान लोकपाळ हे सर्व, दानमानांच्या योगानें धर्मराजानें सत्कृत होत्साते आपापल्या स्थळीं निघून गेले ॥ २६ ॥ हरिभक्त अशा राजर्षि युधिष्ठिराच्या त्या राजसूयाच्या महोत्साहाची प्रशंसा करणारे लोक, जसा अमृताचें प्राशन करणारा मनुष्य, तृप्त होत नाहीं त्याप्रमाणें तृप्त झाले नाहींत ॥ २७ ॥ त्यावेळीं वियोगाचें सहन न करणाऱ्या धर्मराजानें, आपले मित्र, संबंधी, बांधव आणि श्रीकृष्ण यांस प्रेमानें राहवून घेतलें ॥ २८ ॥ हे राजा, त्या धर्मराजाचें प्रिय करणाऱ्या भगवान् श्रीकृष्णानेंहि, सांबादिक यादववीरांना द्वारकेंत पाठवून देऊन, आपण तेथेंच

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राहिला ॥ २९ ॥ याप्रमाणें धर्मपुत्र राजा युधिष्ठिर, इतरांनीं दुस्तर अशाहि राजसूय यज्ञाच्या समाप्तीच्छारूप महासमुद्राला, कृष्णरूप नावाड्याच्या आश्रयानें तरून जाऊन निश्चिंत झाला ॥ ३० ऐकेवेळीं भगवद्भक्त अशा त्या युधिष्ठिराच्या अंतःपुरामध्यें संपत्ति तसेंच राजसूय यज्ञाचें महत्त्व पाहून, आपणास तें नसल्यामुळें दुर्योधन मनांत संतापयुक्त झाला ॥ ३१ ॥ कारण, हे राजा, धर्मराजाच्या ज्या अंतःपुरामध्यें विश्वस्रष्ट्या मयासुरानें रचलेल्या नरपति, दैत्यपति, व देवपति यांच्या अनेकप्रकारच्या संपत्ति शोभत होत्या त्यांसहवर्तमान द्रौपदी आपल्या युधिष्ठिरादिक पतींची सेवा करीत होती, त्या संपत्तियुक्त द्रौपदीवर आसक्तचित्त झालेला तो दुर्योधन, आपल्या अंतःकरणामध्यें संताप पावत असे ॥ ३२ ॥ आणि ज्या अंतःपुरामध्यें त्यावेळीं (दुर्योधनाची थट्टा करत्येवेळीं) नितंबाच्या भारानें हळूहळू चालत असल्यामुळें भूषणांच्या योगानें शब्द करीत असलेल्या पायांनीं, शोभा आलेल्या कुचसंबंधी केशरानें तांबडे झालेले हार धारण करणाऱ्या, हालत असलेल्या कुंडलांनीं व केशपाशानें

गतज्वरो निश्चिंत आसीत् ॥ ३० ॥ अच्युते आत्मा यस्य तस्य ॥ ३१ ॥ नरेंद्रादीनां लक्ष्मीर्लक्ष्म्यो विभूतयो विश्वसृजा मयेनोपक्लृप्ता विरचिताः ताभिः सह कुरुराड् दुर्योधनोऽतप्यत् ॥ ३२ ॥ महिषीसहस्रमिति बहुत्वोपलक्षणम् । क्वणद्भिरंघ्रिभिः शोभा यस्य । मध्ये सुचारु सुचारुमध्यमित्यर्थः । कुंचकुकुमैः शोणा हारा यस्य तत् । श्रीमंति

इत्थं राजा धर्मसुतो मनोरथमहार्णवम् ॥ सुदुस्तरं समुत्तीर्य कृष्णेनासीद्गतज्वरः ॥ ३० ॥ एकदांऽतःपुरे तस्य वीक्ष्य दुर्योधनः श्रियम् ॥ अतप्यद्राजसूयस्य महित्वं चाच्युतात्मनः ॥ ३१ ॥ यस्मिन्नरेंद्रदितिजेंद्रसुरेंद्रलक्ष्मीर्नाना विभांति किल विश्वसृजोपक्लृप्ताः ॥ ताभिः पतीन्द्रुपदराजसुतोपतस्थे यस्यां विषक्तहृदयः कुरुराडतप्यत् ॥ ३२ ॥ यस्मिंस्तदा मधुपतेर्महिषीसहस्रं श्रोणीभरेण शनकैः क्वणदंघ्रिशोभम् ॥ मध्ये सुचारु कुचकुंकुमशोणहारं श्रीमन्मुखं प्रचलकुंडलकुंतलाढ्यम् ॥ ३३ ॥ सभायां मयक्लृप्तायां क्वापि धर्मसुतोऽधिराट् ॥ वृतोऽनुजैर्बंधुभिश्च कृष्णेनापि स्वचक्षुषा ॥ ३४ ॥ आसीनः कांचने साक्षादासने मघवानिव ॥ पारमेष्ठ्यश्रिया जुष्टः स्तूयमानश्च बंदिभिः ॥ ३५ ॥ तत्र दुर्योधनो मानी परीतो भ्रातृभिर्नृप ॥ किरीटमाली न्यविशदसिहस्तः क्षिपन्रुषा ॥ ३६ ॥ स्थलेऽभ्यगृह्णाद्वस्त्रांतं जलं मत्वा स्थलेऽपतत् ॥ जले च स्थलवद्भ्रांत्या मयमायाविमोहितः ॥ ३७ ॥

मुखानि यस्य तत् । चलैः कुंडलैः कुंतलैश्चाढ्यं संपन्नमशोभतेति शेषः ॥ ३३ ॥ क्वापि कदाचित्स विरेज इति शेषः । स्वस्य चक्षुषा हिताहितज्ञापकेन ॥ ३४ ॥ ३५ ॥ मानी साहंकारः । किरीटं च माला च विद्येते यस्य सः । न्यविशद्विवेश । क्षिपन् द्वास्थादीनधिक्षिपन् ॥ ३६ ॥ तत्र स्थले वस्त्रांतमभ्यगृह्णादाकुंचितवान् । कुतः । तस्मिन्स्थले एव भ्रांत्या जलं मत्वा जले चापतत् । कुतः । स्थलवद्भ्रांत्या ॥ ३७ ॥

शोभायुक्त मुखें धारण करणाऱ्या व कृशकटि अशा श्रीकृष्णाच्या हजारो स्त्रिया शोभत होत्या ॥ ३३ ॥ त्या अंतःपुरामध्यें, मयासुरानें निर्माण केलेल्या सभेमध्यें एकेवेळीं आपल्या कनिष्ठ बंधूंसहवर्तमान व हिताहित सुचविणाऱ्या श्रीकृष्णासहवर्तमान तो सार्वभौम धर्मराजा, सुवर्णाच्या सिंहासनावर साक्षात् इंद्रासारखा विराजमान होऊन, छत्रचामरादिक शोभेनें सेवित झाला असतां, बंदिजनांनीं त्याची स्तुति आरंभिली ॥ ३४ ॥ ३५ ॥ हे राजा, त्यावेळीं त्या सभेमध्यें, अभिमानी दुर्योधन, आपल्या दुःशासनादिक बंधूंसहित हातामध्यें खड्ग, मस्तकीं किरीट व कंठामध्यें माळा धारण करून, क्रोधानें द्वारपाळांना धमक्या देत प्रविष्ट झाला ॥ ३६ ॥ तेव्हां त्यानें मयासुराच्या मायेनें मोहित होऊन, स्थळाचेठिकाणीं हेंजळ आहे असें मानून नेसलेल्या वस्त्राच्या शेवटच्या निऱ्या पायघोळ सोडलेल्या होत्या त्या वर उचलून धरिल्या; तसाच तो जळामध्यें हें स्थळ

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आहे अशा भ्रमानें एकाएकीं ठेंचकळून पडला ॥ ३७ ॥ त्याला पाहून भीम हंसला तशाच स्त्रिया व दुसरे राजेहि,धर्मराजानें निवारण केलें असतांहि श्रीकृष्णानें कटाक्षानें अनुमोदित झाल्यामुळें हसूं लागले ॥ ३८ ॥ तेंव्हां तो दुर्योधन, त्या उपहासाच्या योगानें लज्जित झाला व खालीं तोंड करून क्रोधाग्नीनें जळत होत्साता, आपल्या घरीं जाण्याबद्दल राजाला आज्ञा न विचारितां सभेंतून उठून हस्तिनापुरांतील आपल्या घरीं निघून गेला. त्यावेळीं सत्पुरुषांमध्यें, पुढें होणाऱ्या अनर्थाचा सूचक असा मोठा हाहाकारशब्द झाला, आणि धर्मराजाहि, खिन्न असल्यासारखा झाला, तसाच ज्याच्या दृष्टिमात्रानें दुर्योधन भ्रांति पावला तो पृथिवीचा भार हरण करण्याची इच्छा करणारा भगवान् श्रीकृष्णहि उगीच राहिला ॥ ३९ ॥ हे राजा, तूं जें मला ह्या राजसूय महायज्ञामध्यें दुर्योधनाच्या असंतोषाचें कारण विचारिलें होतेंस, तें हें

॥ ३८ ॥ भुवो भरं भारं जिहीर्षुरिति । अद्य संपादितेन कलहबीजेन कुरूणां संहारं करिष्यामीति मत्वेति । किंच यस्य दृशा दृष्टिमात्रेण दुर्योधनो भ्रमति स्म भ्रांतिं प्राप मयमाया तु निमित्तमात्रम् । स भूभारहरणबीजं दुर्योधनस्य भ्रमं भीमादिहास्येन च तस्य पराभवं विधाय तूष्णीमासीदित्यर्थः ॥ ३९ ॥ ४० ॥ ॥ इति श्रीमद्भागवते दश-

जहास भीमस्तं दृष्ट्वा स्त्रियो नृपतयोऽपरे ॥ निवार्यमाणा अप्यंग राज्ञा कृष्णानुमोदिताः ॥ ३८ ॥ स व्रीडितोऽवाग्वदनो रुषा ज्वलन्निष्क्रम्य तूष्णीं प्रययौ गजाह्वयम् ॥ हाहेति शब्दः सुमहानभूत्सतामजातशत्रुर्विमना इवाभवत् ॥ बभूव तूष्णीं भगवान्भुवो भरं समुज्जिहीर्षुर्भ्रमति स्म यद्दृशा ॥ ३९ ॥ एतत्तेऽभिहितं राजन्यत्पृष्टोऽहमिह त्वया ॥ सुयोधनस्य दौरात्म्यं राजसूये महाक्रतौ ॥ ४० ॥ इतिश्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे उत्तरार्धे दुर्योधनमानभंगो नाम पंचसप्ततितमोऽध्यायः ॥ ७५ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ अथान्यदपि कृष्णस्य शृणु कर्माद्भुतं नृप ॥ क्रीडानरशरीरस्य यथा सौभपतिर्हतः ॥ १ ॥ शिशुपालसखः शाल्वो रुक्मिण्युद्वाह आगतः ॥ यदुभिर्निर्जितः संख्ये जरासंधादयस्तथा ॥ २ ॥ शाल्वः प्रतिज्ञामकरोच्छृण्वतां सर्वभूभुजाम् ॥ अयादवीं क्ष्मां करिष्ये पौरुषं मम पश्यत ॥ ३ ॥

मस्कंधे उत्तरार्धे पंचसप्ततितमोऽध्यायः ॥ ७५ ॥ ॥ ततः षट्सप्ततितमे वृष्णिशाल्वमहामृधे ॥ द्युमद्गदाप्रहारेण रणात्प्रद्युम्ननिर्गमः ॥ १ ॥ संपाद्य धर्मराजस्य राजसूयमहोदयम् ॥ निहत्य सौभराजादीनथोपारमदच्युतः ॥ २ ॥ १ ॥ २ ॥ ३ ॥

दुर्योधनाचें दुष्टचित्तत्व मी तुला सांगितलें आहे ॥ ४० ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील दशमस्कंधाच्या उत्तरार्धांत दुर्योधनमानभंगनिरूपणनामक हा पंचाहत्तरावा अध्याय समाप्त झाला ॥ ७५ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या शाहात्तराव्या अध्यायामध्यें, यादवांच्या व शाल्वाच्या महायुद्धांत शाल्वाच्या द्युमान् प्रधानाच्या गदाप्रहारानें युद्धांतून प्रद्युम्न निघून गेला असें वर्णन केलें आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, आतां, क्रीडेकरितां मनुष्यशरीर धारण करणाऱ्या श्रीकृष्णाचें दुसरेंहि अद्भुतकर्म श्रवण कर कीं, ज्याप्रकारें त्यानें शाल्वाचा वध केला आहे ॥ १ ॥ शिशुपाळाचा मित्र शाल्व, रुक्मिणीच्या विवाहामध्यें आला होता, तेंव्हां यादवांबरोबर जें युद्ध झालें त्यामध्यें तो शाल्व, तसेच जरासंधादिक दुसरेहि राजे यादवांनीं जिंकले होते ॥ २ ॥ तेंव्हां सर्व राजे श्रवण करित असतां शाल्वानें प्रतिज्ञा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

केली कीं, हे राजेहो, मीही पृथिवी यदुकुलरहित करीन, माझा पराक्रम पहा ॥ ३ ॥ हे राजा, तो मूढ शाल्व, याप्रमाणें प्रतिज्ञा करून, प्रतिदिवशीं एकवेळ मूठभर धूळ भक्षण करीत होत्साता, प्रभु देव, शंकराचें आराधन करूं लागला ॥ ४ ॥ भगवान् शंकर, त्वरित प्रसन्न होणारा असूनही त्यानें, कृष्णाचा द्वेष करणाऱ्या शाल्वापाशीं आपला वर व्यर्थ होणार असें मानून प्रथमतः त्याची उपेक्षा केली. पुढें एक वर्षानंतर, शरण आलेल्या त्या शाल्वाला, तूं वर मागून घे असें सांगितलें ॥ ५ ॥ तेव्हां त्या शाल्वानें, देव, दैत्य, मनुष्य, गंधर्व, सर्प व राक्षस यांना भेद करण्यास अशक्य, आपल्या इच्छेप्रमाणें जाणारें व यादवांना भय उत्पन्न करणारें असें एक विमान मागून घेतलें ॥ ६ ॥ तेव्हां तथास्तु असें ह्मणून शंकरानें शत्रूंचीं नगरें जिंकणाऱ्या मयासुराला आज्ञा केली आणि त्याजकडून केवळ पोलादाचें सौभनामक विमान निर्माण करून शाल्वास

प्रत्यहं सकृत्पांसुमुष्टिमेकां ग्रसन् भक्षयन् ॥ ४ ॥ संवत्सरांत इति आशुतोषोऽपि भगवानुमापतिः श्रीकृष्णविद्विषि शाल्वे वरस्य वैफल्यं मन्यमानो न शीघ्रं प्रादुरभूत् । तस्यातिनिर्बंधमालक्ष्य संवत्सरांते च वरेण छंदयामासेच्छां कारितवान्वरं वृणीष्वेत्युवाचेत्यर्थः ॥ ५ ॥ ६ ॥ तथेति प्रतिज्ञाय गिरिशेनादिष्टोऽयस्मयं लोहमयं पुरं सौभसंज्ञं निर्माय

इति मूढः प्रतिज्ञाय देवं पशुपतिं प्रभुम् ॥ आराधयामास नृप पांसुमुष्टिं सकृद्ग्रसन् ॥ ४ ॥ संवत्सरांते भगवानाशुतोष उमापतिः ॥ वरेण छंदयामास शाल्वं शरणमागतम् ॥ ५ ॥ देवासुरमनुष्याणां गंधर्वोरगरक्षसाम् ॥ अभेद्यं कामगं वव्रे स यानं वृष्णिभीषणम् ॥ ६ ॥ तथेतिगिरिशादिष्टो मयः परपुरंजयः ॥ पुरं निर्माय शाल्वाय प्रादात्सौभमयस्मयम् ॥ ७ ॥ स लब्ध्वा कामगं यानं तमोधाम दुरासदम् ॥ ययौ द्वारवतीं शाल्वो वैरं वृष्णिकृतं स्मरन् ॥ ८ ॥ निरुध्य सेनया शाल्वो महत्या भरतर्षभ ॥ पुरीं बभंजोपवनान्युद्यानानि च सर्वशः ॥ ९ ॥ सगोपुराणि द्वाराणि प्रासादाट्टालतोलिकाः ॥ विहारान्सविमानाग्र्यान्निपेतुः शस्त्रवृष्टयः ॥ १० ॥ शिला द्रुमाश्चाशनयः सर्पा आसारशर्कराः ॥ प्रचंडश्चक्रवातोऽभूद्रजसाऽऽच्छादिता दिशः ॥ ११ ॥ इत्यर्द्यमाना सौभेन कृष्णस्य नगरी भृशम् ॥ नाभ्यपद्यत शं राजंस्त्रिपुरेण यथा मही ॥ १२ ॥ प्रद्युम्नो भगवान्वीक्ष्य बाध्यमाना निजाः प्रजाः ॥ मा भैष्टेत्यभ्यधाद्वीरो रथारूढो महायशाः ॥ १३ ॥

रचयित्वा प्रादात् ॥ ७ ॥ तमसोंऽधकारस्य धामाश्रयम् । अन्यैर्दुरासदं दुष्प्राप्यम् ॥ ८ ॥ ९ ॥ प्रासादा गृहा अट्टालास्तदुपरिगृहास्तोलिकास्तत्पर्यंतकुड्यानि ताः । विहारान् क्रीडास्थानानि च स बभंज । किंच विमानाग्र्यात्तस्माच्छस्त्रवृष्ट्यादयः पेतुः ॥ १० ॥ आसारशर्करा धारासंपातवज्जलोपलाः ॥ ११ ॥ शं सुखं नाभ्यपद्यत ॥ १२ ॥ १३ ॥

देवविलें ॥ ७ ॥ तेव्हां तो शाल्व, ~~अंधकाराचें केवळ स्थान, शत्रूंनीं प्राप्त करून घेण्यास अशक्य व यथेच्छ~~ गमन करणारें असें विमान मिळालें असतां, त्यांत बसून ~~यादवांनीं केलेल्या वैराचें स्मरण करीत होत्साता त्यांच्या~~ द्वारकानगरीवर हल्ला करण्याकरितां निघाला ॥ ८ ॥ हे राजा, तो शाल्व आपल्या, मोठ्या सेनेनें द्वारकानगरी चोंहोंकडून रोधून, फळांचीं उपवनें व फुलांच्या सर्व बागा मोडून टाकूं लागला ॥ ९ ॥ तसाच नगराच्या वेशी, घरांचे दरवाजे, राजमंदिरें, उप्परमाड्या, आवारांच्या भिंती व क्रीडास्थानें मोडून टाकूं लागला, आणि त्या श्रेष्ठ सौभविमानांतून शस्त्रांच्या वृष्टिहि पडूं लागल्या ॥ १० ॥ शिळा, वृक्ष, वज्रपात, सर्प, पाण्याच्या धारा व वाळू यांची वृष्टि होऊं लागली; प्रचंड असा वावटळीचा वारा सुटला, सर्वदिशा धुरळ्यानें आच्छादित झाल्या ॥ ११ ॥ ~~हे राजा, याप्रमाणें सौभविमानानें~~ अत्यंत पीडित ~~झालेली ती~~ श्रीकृष्णाची द्वारका नगरी, ~~जशी त्रिपुरासुरानें पीडित केलेली पृथ्वी सुख पावेनाशी झाली होती त्याप्रमाणें सुख पावेनाशी झाली~~ ॥ १२ ॥ त्यावेळीं भगवान्

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रद्युम्नानें आपल्या सर्व प्रजा पीडित झाल्या असें पाहून, सर्वांना भिऊंनका असें सांगितलें आणि तो महायशस्वी प्रद्युम्न, रथारूढ होऊन युद्धप्रदेशावर निघाला ॥ १३ ॥ तसेच दुसरेहि महाधनुर्धारी रथसमूहांच्या रक्षकांचे अधिपति-सात्यकि, चारुदेष्ण, सांब, कनिष्ठ बंधूंसहित अक्रूर, हार्दिक्य, भानुविंद, गद, शुक व सारण, हे सर्वहि, रथ, हत्ति, घोडे व पायदळ या चतुरंग सैन्यानें रक्षित होत्साते, कवचें धारण करून युद्धाकरितां बाहेर निघाले ॥ १४ ॥ १५ ॥ नंतर शाल्वाच्या लोकांचें यादवांबरोबर, जसें पूर्वी असुरांचें देवांबरोबर युद्ध झालें होतें त्याप्रमाणें तुमुळ व ऐकणाऱ्या व पाहणाऱ्या लोकांच्या अंगावर रोमांच उत्पन्न करणारें युद्ध सुरू झालें ॥१६॥ तेव्हां प्रद्युम्नानें आपल्या दिव्यास्त्रांच्या योगानें, शाल्वाच्या त्या शस्त्रवृष्टिरूप माया एका क्षणमात्रांत, जसा सूर्य, रात्रिसंबंधी अंधकाराचा नाश करितो त्याप्रमाणें नाहींशा करून

॥ १४ ॥ १५ ॥ तुमुलं व्याकुलम् । लोमहर्षणं रौद्रम् ॥ १६ ॥ नैशं निशि भवं तम उष्णगुः सूर्य इव ॥ १७ ॥ किंच विव्याधेति । स्वर्णमयानि पुंखानि पृष्ठप्रांता येषां तैः । अयो लोहं तन्मयानि मुखान्यग्राणि येषां तैः । ध्वजिनीपालं सेनान्यम् । सन्नतानि निम्नानि पर्वाणि ग्रंथयो येषां तैः ॥ १८ ॥ सैनिकान्भटान् । नेतॄन्सारथीन् ॥ १९॥

सात्यकिश्चारुदेष्णश्च सांबोऽक्रूरः सहानुजः ॥ हार्दिक्यो भानुविंदश्च गदश्च शुकसारणौ ॥ १४ ॥ अपरे च महेष्वासा रथयूथपयूथपाः ॥ निर्ययुर्दंशिता गुप्ता रथेभाश्वपदातिभिः ॥ १५ ॥ ततः प्रववृते युद्धं शाल्वानां यदुभिः सह ॥ यथा सुराणा विबुधैस्तुमुलं लोमहर्षणम् ॥ १६ ॥ ताश्च सौभपतेर्माया दिव्यास्त्रै रुक्मिणीसुतः ॥ क्षणेन नाशयामास नैशं तम इवोष्णगुः ॥ १७ ॥ विव्याध पंचविंशत्या स्वर्णपुंखैरयोमुखैः ॥ शाल्वस्य ध्वजिनीपालं शरैः सन्नतपर्वभिः ॥ १८ ॥ शतेनाताडयच्छाल्वमेकैकेनास्य सैनिकान् ॥ दशभिर्दशभिर्नेतॄन्वाहनानि त्रिभिस्त्रिभिः ॥ १९ ॥ तदद्भुतं महत्कर्म प्रद्युम्नस्य महात्मनः ॥ दृष्ट्वा तं पूजयामासुः सर्वे स्वपरसैनिकाः ॥ २० ॥ बहुरूपैकरूपं तद्दृश्यते न च दृश्यते ॥ मायामयं मयकृतं दुर्विभाव्यं परैरभूत् ॥ २१ ॥ क्वचिद्भूमौ क्वचिद्व्योम्नि गिरिमूर्ध्नि जले क्वचित् ॥ अलातचक्रवद्भ्राम्यत्सौभं तद्दुरवस्थितम् ॥ २२ ॥ यत्रयत्रोपलक्ष्येत स सौभः सहसैनिकः ॥ शाल्वस्ततस्ततोऽमुंचन् शरान्सात्वतयूथपाः ॥ २३ ॥

स्वपरसेनयोर्वर्तमानाः सर्वे पूजयामासुः संमानितवंतः ॥ २० ॥ कदाचिद्बहुरूपं कदाचिदेकरूपं क्वचिद्दृश्यते क्वचिन्न दृश्यते एवं दुर्विभाव्यं दुर्वितर्क्यमभूत् ॥ २१ ॥ किंच क्वचिदिति एवं तद्दुरवस्थितमनवस्थितं चाभूत् ॥ २२ ॥ २३ ॥

टाकिल्या ॥ १७ ॥ आणि शाल्वाचा जो सेनाधिपति होता त्याला, सुवर्णाचे पिसारे व लोखंडाचीं अग्रें असलेल्या व ज्यांची पेरें वांकविलेलीं आहेत अशा पंचवीस बाणांनीं वेधून टाकिलें ॥ १८ ॥ नंतर शंभर बाणांनीं शाल्वाला, एकेक बाणानें त्याच्या योद्ध्यांना, दहादहा बाणांनीं सारथ्यांना आणि तीन तीन बाणांनीं त्याच्या गजाश्वरथादिकांना ताडण केलें ॥ १९ ॥ महात्म्या प्रद्युम्नाचें तें मोठें अद्भुत कर्म पाहून यादवांच्या व शाल्वाच्या सैन्यांत राहणाऱ्या सर्व वीरांनीं त्या प्रद्युम्नाची प्रशंसा केली ॥ २० ॥ मयासुरानें निर्माण केलेलें तें मायामय सौभविमान, केव्हांतरी बहुत रूपांनीं व केव्हांतरी एकारूपानें दिसत असे व केव्हांतरी मुळींच दिसत नसे, असें शत्रूंनीं तर्क करण्यास अशक्य झालें ॥ २१ ॥ केव्हांतरी भूमीवर, केव्हां आकाशामध्यें, केव्हां पर्वताच्या शिखरावर व केव्हां पाण्यामध्यें, फिरणारें तें सौभविमान, अलातचक्रासारखें एकाजागीं स्थिर रहात नाहींसें झालें ॥ २२ ॥ ह्मणून तें विमान व सैनिकलोक यांसह तो शाल्व, जेथें जेथें दिसत असे तेथें तेथें यादवांचे प्रद्युम्नादिक सेनाधिपति बाण सोडीत

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असत ॥ २३ ॥ ज्यांचा स्पर्श अग्नीसारखा दाहक व सूर्यप्रकाशासारखा सर्वव्यापक आहे व जे सर्पासारखे एकदेशीं स्पर्श झाला असतां मारक आहेत अशा यादवांनीं सोडिलेल्या दुःसह बाणांनीं ज्याचें सौभ विमान व सैन्य पीडित झालें आहे असा तो शाल्व धावरून गेला ॥ २४ ॥ शाल्वाच्या सेनाधिपतींच्या शस्त्रसमूहांनीं अत्यंत पीडित झालेल्याहि यादववीरांनीं, पालोकीं यश व परलोकीं सुख प्राप्त होण्याची इच्छा धारण करून, आपापलें युद्धाचें ठाण सोडिलें नाहीं ॥ २५ ॥ शाल्वाचा प्रधान द्युमान्नामक, 'ज्याला पूर्वी प्रद्युम्नानें पीडित केलें होतें' त्या बलवान् प्रधानानें, प्रद्युम्नाजवळ येऊन त्याला लोखंडाच्या गदेनें ताडण केलें आणि जिंकिलें रे जिंकिलें, म्हणून मोठ्यानें शब्द केला ॥ २६ ॥ तेव्हां शत्रूंना दमविणारा परंतु ज्याचें वक्षःस्थळ गदेनें भग्न झालें आहे अशा त्या प्रद्युम्नाला, दारुकाचा (कृष्णसारथ्याचा) पुत्र धर्मवेत्ता जो सारथि त्यानें,

अग्निवद्दाहकोऽर्कवद्युगपत्सर्वतः संस्पर्शो येषां तैः । आशीविषवदेकदेशस्पर्शमात्रेण मारकत्वाद्दुरासदैर्दुःसहैः । पीड्यमानं पुरमनीकानि च यस्य सः । परैर्यदुभिरीरितैर्मुक्तैः ॥२४॥ भृशार्दिता अपि स्वं स्वं रणं स्वां स्वां युद्धभूमिम् ॥ २५ ॥ मौर्व्या कार्ष्णायसमय्या व्याहत्य प्रहृत्य ॥ २६ ॥ अपोवाहान्यतो निनाय ॥ २७ ॥ २८ ॥ मत् मत्तो विना

शरैरग्न्यर्कसंस्पर्शैराशीविषदुरासदैः ॥ पीड्यमानपुरानीकः शाल्वोऽमुह्यत्परेरितैः ॥ २४ ॥ शाल्वानीकपशस्त्रौघैर्वृष्णिवीरा भृशार्दिताः ॥ न तत्यजू रणं स्वं स्वं लोकद्वयजिगीषवः ॥ २५ ॥ शाल्वामात्यो द्युमान्नाम प्रद्युम्नं प्राक्प्रपीडितः ॥ आसाद्य गदया मौर्व्या व्याहत्य व्यनदद्बली ॥ २६ ॥ प्रद्युम्नं गदया शीर्णवक्षस्थलमरिंदमम्॥ अपोवाह रणात्सूतो धर्मविद्दारुकात्मजः ॥ २७ ॥ लब्धसंज्ञो मुहूर्तेन कार्ष्णिः सारथिमब्रवीत् ॥ अहो असाध्विदं सूत यद्रणान्मेऽपसर्पणम् ॥ २८ ॥ न यदूनां कुले जातः श्रूयते रणविच्युतः ॥ विना मत्क्लीबचित्तेन सूतेन प्राप्तकिल्बिषात् ॥ २९ ॥ किं नु वक्ष्येऽभिसंगम्य पितरौ रामकेशवौ ॥ युद्धात्सम्यगपक्रांतः पृष्टस्तत्रात्मनः क्षमम् ॥ ३० ॥ व्यक्तं मे कथयिष्यंति हसंत्यो भ्रातृजामयः ॥ क्लैब्यं कथं कथं वीर तवान्यैः कथ्यतां मृधे ॥ ३१ ॥ सारथिरुवाच ॥ धर्मं विजानतायुष्मन्कृतमेतन्मया विभो ॥ सूतः कृच्छ्रगतं रक्षेद्रथिनं सारथिं रथी ॥ ३२ ॥

क्लीबं चित्तं यस्य तेन । त्वया सूतेन ॥ २९ ॥ पितरौ रामकृष्णावभिसंगम्य तत्पार्श्वं गत्वा ताभ्यां पृष्टः स्वयोग्यं किं नु वक्ष्यामीति ॥ ३० ॥ भ्रातृजामयो भ्रातृभार्याः व्यक्तं निश्चितं मत्क्लैब्यं कथयिष्यंति । तत्कथनमनुकरोति । कथं कथमिति ॥ ३१ ॥ विभो हे समर्थ । एतदपसर्पणम् । धर्ममाह । सूत इति ॥ ३२ ॥

लवकर युद्धभूमीच्या बाहेर काढून नेलें ॥ २७ ॥ तो प्रद्युम्न प्रथम मूर्छित झाला होता, नंतर दोन घटिकांनीं सावध होऊन सारथ्यास ह्मणाला कीं,—हे सूता, तूं जें मला युद्धभूमीवरून एकीकडे काढिलेंस हें कर्म तूं फार वाईट केलेंस ॥ २८ ॥ कारण, नपुंसकासारखें (धैर्यरहित) चित्त असलेल्या त्वां सारथ्यानें, अपयश पावविलेल्या एका मजवांचून दुसरा, यादवांच्या कुळांत झालेला कोणीहि पुरुष, युद्धांतून पळून गेलेला ऐकूं येत नाहीं ॥ २९ ॥ तेव्हां आतां युद्धांतून प्रसिद्धपणें पलायन केलेला मी, रामकृष्ण पित्यांच्या जवळ गेलों ह्मणजे त्यांनीं विचारिलें असतां तेथें आपणास योग्य असें उत्तर काय बरें सांगूं ? ॥ ३० ॥ आणि माझ्या भावजई हंसत हंसत मला स्पष्ट विचारितील कीं,— हे वीरा, युद्धांत शत्रूंबरोबर युद्ध करितांना तुझा व्याकुळपणा कसा कसा झाला ? कीं ज्याच्या योगानें तूं पळून गेलास तें सांग ॥ ३१ ॥ सारथि ह्मणाला—हे आयुष्यवंता प्रभो, मी तर माझा धर्म जाणून हें काम केलें आहे; कारण, सारथ्यानें संकटांत पडलेल्या रथ्याचें रक्षण करावें आणि रथ्यानें सारथ्याचें रक्षण

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करावें ॥ ३२ ॥ हें जाणूनच मी आपणाला युद्धांतून एकीकडे नेलें आहे. याचें कारण, शत्रूनें गदेच्या योगानें ताडण केल्यामुळें मूर्च्छा प्राप्त होऊन आपणाला प्राणसंकट प्राप्त झालें होतें ॥ ३३ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील उत्तरार्धामध्यें शाल्वयादवयुद्धनिरूपणनामक हा शाहात्तरावा अध्याय समाप्त झाला ॥ ७६ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ आतां ह्या सत्याहात्तराव्या अध्यायामध्यें, श्रीकृष्णानें हस्तिनापुरांतून येऊन, अनेक माया जाणणाऱ्या शाल्वाला मारिलें आणि त्याच्या सौभविमानाचेंहि चूर्ण केलें, अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, त्या प्रद्युम्नानें उदकाचें आचमन करून, कवच धारण केलें व हातांत धनुष्य घेतलें आणि सारथ्यास असें सांगितलें कीं, त्या द्युमान् वीराच्या जवळ मला ने ॥ १ ॥ नंतर त्याच्याजवळ नेलेल्या त्या प्रद्युम्नानें, आपल्या सैन्याचा नाश

अपोवाहितोऽपनीतः । उपसृष्ट उपसर्गं पीडां प्राप्त इति कृत्वा । यतः परेण शत्रुणा गदया हतः सन्मूर्छितो निःसंज्ञतां गतो भवानिति ॥ ३३ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे षट्सप्ततितमोऽध्यायः ॥ ७६ ॥ ॥ सप्तयुक्सप्ततितमे नानामायाविचक्षणः ॥ कृष्णेनागत्य शाल्वस्तु हतः सौभं च चूर्णितम् ॥ १ ॥ दंशितः सन्नद्धः ॥ १ ॥ विधमंतं

एतद्विदित्वा तु भवान्मयाऽपोवाहितो रणात् ॥ उपसृष्टः परेणेति मूर्छितो गदया हतः ॥ ३३ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे उत्तरार्धे शाल्वयुद्धे षट्सप्ततितमोऽध्यायः ॥ ७६ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ स उपस्पृश्य सलिलं दंशितो धृतकार्मुकः ॥ नय मां द्युमतः पार्श्वं वीरस्येत्याह सारथिम् ॥ १ ॥ विधमंतं स्वसैन्यानि द्युमंतं रुक्मिणीसुतः ॥ प्रतिहत्य प्रत्यविध्यन्नाराचैरष्टभिः स्मयन् ॥ २ ॥ चतुर्भिश्चतुरो वाहान्सूतमेकेन चाहनत् ॥ द्वाभ्यां धनुश्च केतुं च शरेणान्येन वै शिरः ॥ ३ ॥ गदसात्यकिसांबाद्या जघ्नुः सौभपतेर्बलम् ॥ पेतुः समुद्रे सौभेयाः सर्वे संछिन्नकंधराः ॥ ४ ॥ एवं यदूनां शाल्वानां निघ्नतामितरेतरम् ॥ युद्धं त्रिणवरात्रं तदभूत्तुमुलमुल्बणम् ॥ ५ ॥ इंद्रप्रस्थं गतः कृष्ण आहूतो धर्मसूनुना ॥ राजसूयेऽथ निर्वृत्ते शिशुपाले च संस्थिते ॥ ६ ॥ कुरुवृद्धाननुज्ञाप्य मुनींश्च ससुतां पृथाम् ॥ निमित्तान्यतिघोराणि पश्यन्द्वारवतीं ययौ ॥ ७ ॥

क्षपयंतम् । प्रतिहत्य प्रतिरुध्य ॥ २ ॥ अष्टानां विनियोगमाह । चतुर्भिरिति ॥ ३ ॥ सौभेयाः सौभस्थाः ॥ ४ ॥ नवानां रात्रीणां समाहारो नवरात्रम् । त्रयाणां नवरात्राणां समाहारस्त्रिणवरात्रम् । सप्तविंशतिमहोरात्राणीत्यर्थः । तुमुलमाकुलम् । उल्बणं घोरम् ॥ ५ ॥ परमतमुपन्यस्यति । इंद्रप्रस्थं गत इत्यादिना ॥ ६ ॥ ७ ॥

करणाऱ्या त्या द्युमानाला आडवून हास्य करीतकरीत आठ बाणांनीं वेधिलें ॥ २ ॥ तें असें कीं,—चार बाणांनीं चार घोड्यांस व एका बाणानें सारथ्यास मारून, दोन बाणांनीं धनुष्य व ध्वज हीं तोडिलीं व एका बाणानें मस्तक तोडून पाडिलें ॥ ३ ॥ तसेंच गद, सात्यकि व सांब इत्यादिक यादवहि शाल्वाचें तें सैन्य मारूं लागले तेव्हां सौभविमानांत राहणारे सर्वहि वीर मस्तकें तुटून समुद्रांत पडूं लागले ॥ ४ ॥ याप्रमाणें यादव आणि शाल्वाचे वीर हे परस्पर युद्ध करीत असतां, तें त्यांचें युद्ध, सत्तावीस दिवसपर्यंत तुमुळ व भयंकर झालें ॥ ५ ॥ आतां दुसऱ्या ऋषींचें मत सांगतो—धर्मराजानें बोलाविल्यामुळें इंद्रप्रस्थामध्यें गेलेला श्रीकृष्ण, राजसूय यज्ञ झाला असतां व शिशुपाळहि मरण पावला असतां, कांहीं दिवसपर्यंत तेथेंच राहिला होता ॥ ६ ॥ त्यानें तेथें अतिभयंकर निमित्तें पाहून, बळरामासहवर्तमान मी येथें ॥२३९॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आलों आहें, तेव्हां शिशुपाळाच्या पक्षपाती राजांनीं माझ्या द्वारकानगरीचा खरोखर घात केला असेल, असें मनांत आणून भीष्मादिक कुरुवृद्धांची, पुत्रांसहित कुंतीची व सर्व ऋषींची आज्ञा घेऊन द्वारकेस गमन केलें ॥ ७ ॥ ८ ॥ आणि तेथें जाऊन त्या कृष्णानें, आपल्या प्रजांना शाल्वानें दिलेली ती पीडा पाहून, तसेंच सौभविमान व शाल्वराजा यांस पाहून, नगराच्या रक्षणाविषयीं बळरामाची योजना केली आणि दारुकास सांगितलें कीं– ॥ ९ ॥ हे सारथ्या, माझा रथ, शाल्वाच्या जवळ लवकर पोंचीव; हा शाल्वराजा मोठा मायावी आहे, तथापि तूं कोणत्याहि प्रकारचें भय मनांत आणूं नकोस ॥ १० ॥ याप्रमाणें सांगितलेल्या त्या दारुकानें रथावर बसून घोडे चालविले, तेव्हां यादवांच्या व शाल्वाच्या सेनांतील वीरांनीं युद्धांत प्रवेश करणाऱ्या कृष्णरथाच्या ध्वजावर असलेल्या गरुडास पाहिलें ॥ ११ ॥ तेव्हां बहुशः मृत

आह चेति । स्वगतमेव पथि चिंताविजृंभितभाषणम् । आर्यमिश्राभिसंगतो बलभद्रसहितः ॥ ८ ॥ दुर्निमित्तदर्शनाकुलचित्त एवं चिंतयन् द्वारकामागत्य स्वानां कदनं वीक्ष्य सौभं च शाल्वराजं च वीक्ष्य रामं पुररक्षणं प्रति निरूप्य नियुज्य दारुकं प्राहेत्यन्वयः ॥ ९ ॥ ते त्वया ॥ १० ॥ आस्थाय सम्यगधिष्ठायारुणानुजं ध्वजे वर्तमानं गरुडम्

आह चाहमिहायात आर्यमिश्राभिसंगतः ॥ राजन्याश्चैद्यपक्षीया नूनं हन्युः पुरीं मम ॥ ८ ॥ वीक्ष्य तत्कदनं स्वानां निरूप्य पुररक्षणम् ॥ सौभं च शाल्वराजं च दारुकं प्राह केशवः ॥ ९ ॥ रथं प्रापय मे सूत शाल्वस्यांतिकमाशु वै ॥ संभ्रमस्ते न कर्तव्यो मायावी सौभराडयम् ॥ १० ॥ इत्युक्तश्चोदयामास रथमास्थाय दारुकः ॥ विशंतं ददृशुः सर्वे स्वे परे चारुणानुजम् ॥ ११ ॥ शाल्वश्च कृष्णमालोक्य हतप्रायबलेश्वरः ॥ प्राहरत्कृष्णसूताय शक्तिं भीमरवां मृधे ॥ १२ ॥ तामापतंतीं नभसि महोल्कामिव रंहसा ॥ भासयंतीं दिशः शौरिः सायकैः शतधाऽच्छिनत् ॥ १३ ॥ तं च षोडशभिर्विध्वा बाणैः सौभं च खे भ्रमत् ॥ अविध्यच्छरसंदोहैः खं सूर्य इव रश्मिभिः ॥ १४ ॥ शाल्वः शौरेस्तु दोः सव्यं सशार्ङ्गं शार्ङ्गधन्वनः ॥ बिभेद न्यपतद्धस्ताच्छार्ङ्गमासीत्तदद्भुतम् ॥ १५ ॥ हाहाकारो महानासीद्भूतानां तत्र पश्यताम् ॥ विनद्य सौभराडुच्चैरिदमाह जनार्दनम् ॥ १६ ॥

॥ ११ ॥ हतप्रायस्य बलस्य सैन्यस्येश्वरः ॥ १२ ॥ १३ ॥ तं च शाल्वम् । शरसंदोहैः शरजालैः । खं सूर्य इव रश्मिभिरिति सुनीलत्वविपुलत्वादिभिराकाशोपमा सौभस्य । अचिंत्यवेगबाहुल्यादिभिः शराणां रश्मिसादृश्यम् । अयत्नेनैव रश्मिवच्छरजालप्रसारणात्सूर्यतुल्यः श्रीकृष्ण इति ॥ १४ ॥ दोर्बाहुम् ॥ १५ ॥ १६ ॥

झालेल्या सैन्याचा अधिपति असा त्या शाल्वानें युद्धामध्यें श्रीकृष्णास पाहून त्याच्या सारथ्यावर, भयंकर नाद करणारी शक्ति सोडिली ॥ १२ ॥ तेव्हां आकाशांत उत्पन्न झालेल्या उल्केप्रमाणें सर्वदिशा प्रकाश करीत वेगानें येणाऱ्या त्या शक्तीचे, श्रीकृष्णानें बाणांच्या योगेंकरून शेंकडो तुकडे करून पाडिले ॥ १३ ॥ आणि त्या शाल्वाला सोळा बाणांनीं वेधून, आकाशांत भ्रमण पावणाऱ्या त्याच्या सौभविमानालाहि बाणसमूहांनीं, जसा सूर्य किरणांनीं आकाशाला सहज वेधितो त्याप्रमाणें वेधिलें ॥ १४ ॥ शाल्वानेंहि शार्ङ्गधन्व्या श्रीकृष्णाच्या शार्ङ्गधनुष्यसहित डाव्या हाताला बाणानें वेधिलें असतां त्या कृष्णाच्या हातांतून शार्ङ्ग धनुष्य खालीं पडलें, तें मोठें आश्चर्यकारक झालें ॥ १५ ॥ तेथें तें आश्चर्य पाहणाऱ्या सर्वलोकांमध्यें मोठा हाहाकार शब्द झाला तेव्हां सौभ विमानांत बसून शोभणारा शाल्वराजा, मोठी गर्जना

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करून श्रीकृष्णाला असें ह्मणाला कीं– ॥ १६ ॥ हे मूढा, ज्या तूं आमच्या देखत आमच्या सख्या शिशुपाळाची स्त्री (रुक्मिणी) हरण केली आहेस; तसाच तो आमचा सखा सभेमध्यें असावध असतां, मारून टाकिला आहेस, त्या आपणास कोणीच जिंकणारा नाहीं असें मानणाऱ्या तुला, जर माझ्यासमोर थोडा वेळ उभा राहशील तर आतांच तीक्ष्ण बाणांच्या योगानें मृत्युदशेला पोंचवीन ॥ १७ ॥ १८ ॥ याप्रमाणें सांगितलें असतां, श्रीभगवान् ह्मणाला कीं,–हे मंदा, तूं व्यर्थच बडबड करीत आहेस, जवळ आलेला आपला मृत्यु पाहत नाहींस. जे शूर आहेत ते युद्धामध्यें पुष्कळ बोलून न दाखवितां आपला पराक्रमच दाखवितात ॥ १९ ॥ याप्रमाणें भगवंतानें भाषण करून व क्रोधाविष्ट होऊन, भयंकर वेगानें युक्त अशा गदेनें कंठमूळावर त्या शाल्वास ताडण केलें, तेव्हां तो रक्ताचें वमन करीत होत्साता, कंपित झाला ॥ २० ॥ तेव्हां गदा माघारी घेतल्यावर तो शाल्व अकस्मात् अंतर्धान पावला, नंतर दोन घटिकांनीं शाल्वानें पाठविलेला एक पुरुष येऊन, श्रीकृष्णाला मस्तकानें वंदन

सख्युः शिशुपालस्य । ईक्षतामस्माकम् । प्रमत्तोऽनवहितः । व्यापादितो निहतः ॥ १७ ॥ अपराजितोऽहमिति मानिनं मानवंतम् । अपुनरावृत्तिं मृत्युम् । तिष्ठेः स्थास्यसि

यत्त्वया मूढ नः सख्युर्भ्रातुर्भार्या हृतेक्षताम् ॥ प्रमत्तः स सभामध्ये त्वया व्यापादितः सखा ॥ १७ ॥ तं त्वाऽद्य निशितैर्बाणैरपराजितमानिनम् ॥ न याम्यपुनरावृत्तिं यदि तिष्ठेर्ममाग्रतः ॥ १८ ॥ श्रीभगवानुवाच ॥ वृथा त्वं कत्थसे मंद न पश्यस्यंतिकेंऽतकम् ॥ पौरुषं दर्शयंति स्म शूरा न बहुभाषिणः॥१९ ॥ इत्युक्त्वा भगवान् शाल्वं गदया भीमवेगया ॥ तताड जत्रौ संरब्धः स चकंपे वमन्नसृक् ॥ २० ॥ गदायां सन्निवृत्तायां शाल्वस्त्वंतरधीयत ॥ ततो मुहूर्त आगत्य पुरुषः शिरसाऽच्युतम् ॥ देवक्या प्रहितोऽस्मीति नत्वा प्राह वचो रुदन् ॥ २१ ॥ कृष्ण कृष्ण महाबाहो पिता ते पितृवत्सल ॥ बध्वाऽपनीतः शाल्वेन सौनिकेन यथा पशुः ॥ २२ ॥ निशम्य विप्रियं कृष्णो मानुषीं प्रकृतिं गतः ॥ विमनस्को घृणी स्नेहाद्बभाषे प्राकृतो यथा ॥ २३ ॥ कथं राममसंभ्रांतं जित्वाऽजेयं सुरासुरैः ॥ शाल्वेनाल्पीयसा नीतः पिता मे बलवान्विधिः ॥ २४ ॥ इति ब्रुवाणे गोविंदे सौभराट् प्रत्युपस्थितः ॥ वसुदेवमिवानीय कृष्णं चेदमुवाच सः ॥ २५ ॥ एष ते जनिता तातो यदर्थमिह जीवसि ॥ वधिष्ये वीक्षतस्तेऽमुमीशश्चेत्पाहि बालिश ॥ २६ ॥

॥ १८ ॥ १९ ॥ २० ॥ २१ ॥ २२ ॥ घृणी दयावान् ॥ २३ ॥ २४ ॥ २५ ॥ जनिता जनयिता । ईशश्चेच्छक्तश्चेत् ॥ २६ ॥

करून रडत रडत, मला देवकीनें पाठविलें आहे असें वाक्य बोलिला ॥ २१ ॥ कशाकरीतां पाठविलें ? तर हे कृष्णा, हेकृष्णा, हे महापराक्रम्या, हे पितृवत्सला, जसा खाटकी (कसाई) पशूला मारण्याकरितां बांधून नेतो, त्याप्रमाणें तुझा पिता वसुदेव, शाल्वानें बांधून नेला ॥ २२ ॥ हें त्याचें विप्रिय भाषण ऐकून मनुष्यस्वभावाला अनुसरणारा तो श्रीकृष्ण, प्राकृत पुरुषासारखा वसुदेवविषयक स्नेहानें दयायुक्त व खिन्नचित्त होऊन ह्मणाला कीं, ॥ २३ ॥ देवांनीं व दैत्यांनींहि जिंकण्यास अशक्य, नगराच्या रक्षणाविषयीं नेमलेला आणि सावध राहाणारा अशा बळरामाला जिंकून, अतितुच्छ अशा शाल्वानें माझा पिता वसुदेव कसाबरें नेला ! तेव्हां दैव मोठें बलवत्तर आहे २४ ॥ याप्रमाणें श्रीकृष्ण भाषण करित आहे तों इतक्यांत तेथें, वसुदेवच कीं काय अशा एका (मायिक) पुरुषाला घेऊन शाल्व आला आणि तो श्रीकृष्णास असें ह्मणाला कीं, ॥ २५ ॥ हे मूर्खा कृष्णा, ज्याकरितां या संसारांत तूं जिवंत राहिला आहेस, तो हा तुझा जन्म देणारा पिता वसुदेव आहे. पहा आतां तुझ्या ॥२४०॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

देखत याचा मी वध करितों, जर तूं समर्थ असशील तर यार्चे संरक्षण कर ॥ २६ ॥ याप्रमाणें मायावी शाल्वानें श्रीकृष्णाची निर्भर्त्सना करून, त्या वसुदेवाचें मस्तक खड्गानें तोडिलें आणि तें घेऊन आकाशांतील सौभविमानांत आरोहण केलें ॥ २७ ॥ त्यावेळीं स्वतःसिद्धज्ञानवान् असाहि तो भगवान् श्रीकृष्ण, वसुदेवादिक स्वजनाच्या संबंधानें दोन घटिकापर्यंत मनुष्यस्वभावरूप शोकामध्यें निमग्न होऊन, नंतर त्यानें, तें वसुदेवादिक सर्वहि, ही मयासुरानें शिकविलेली, शाल्वानें पसरलेली आसुरी माया आहे असें जाणिलें ॥ २८ ॥ जेव्हां जसा जागृत झालेला पुरुष, स्वप्नामध्यें पाहिलेले पदार्थ पहात नाहीं त्याप्रमाणें, त्या युद्धामध्यें श्रीकृष्णानें दूत पाहिला नाहीं व वसुदेवाचें शरीरहि पाहिलें नाहीं, तर सौभविमानांत बसून आकाशांत फिरणाऱ्या शत्रूला (शाल्वाला) मात्र पाहिलें आणि तो श्रीकृष्ण त्याला मारण्यास उद्युक्त झाला

॥ २७ ॥ स्वबोधः स्वतःसिद्धज्ञानवानपि स्वजनस्नेहतः प्रकृतौ मनुष्यस्वभावे उपप्लुतो निमग्न आस्ते अतिष्ठत्। ततस्तत्सर्वमासुरीं मायामबुध्यत्। मायेयमिति ज्ञातवान् ॥ २८॥ स्वाप्नं स्वप्नप्रपंचं यथा ॥ २९॥ एवं परमतमुपन्यस्तं निराकरोति। एवमिति। केच केचन। नान्विता अनन्विताः पूर्वापरानुसंधानरहिताः। तदाह। यत्स्ववाच इति। तन्नानुस्मरंतीत्यर्थः। अयमभिप्रायः। न तावद्राजसूयार्थं रामेण सह गतः श्रीकृष्णः संकर्षणमनुज्ञाप्येति पूर्वमुक्तत्वात् ॥ ३० ॥ असंभावितं चेत्याह। क्व शोकमोहाविति । भयं वा दुर्निमित्तदर्शनकृतं नूनं हन्युः पुरीं ममेति यदुक्तं यच्च हस्ताच्छार्ङ्गं न्यपतदित्युक्तं तद्वयं वा क्वेति। अज्ञेषु संभवो येषां ते। अखंडितानि विज्ञानज्ञानैश्वर्याणि यस्य सः। तत्र

एवं निर्भर्त्स्य मायावी खड्गेनानकदुंदुभेः ॥ उत्कृत्य शिर आदाय खस्थं सौभं समाविशत् ॥ २७ ॥ ततो मुहूर्तं प्रकृतावुपप्लुतः स्वबोध आस्ते स्वजनानुषंगतः ॥ महानुभावस्तदबुध्यदासुरीं मायां स शाल्वप्रसृतां मयोदिताम् ॥ २८ ॥ न तत्र दूतं न पितुः कलेवरं प्रबुद्ध आजौ समपश्यदच्युतः ॥ स्वाप्नं यथा चांबरचारिणं रिपुं सौभस्थमालोक्य निहंतुमुद्यतः ॥ २९ ॥ एवं वदंति राजर्षे ऋषयः केच नान्विताः ॥ यत्स्ववाचो विरुध्येत नूनं ते न स्मरंत्युत ॥ ३० ॥ क्व शोकमोहौ स्नेहो वा भयं वा येऽज्ञसंभवाः ॥ क्व चाखंडितविज्ञानज्ञानैश्वर्यस्त्वखंडितः ॥ ३१ ॥ यत्पादसेवोर्जितयाऽऽत्मविद्यया हिन्वंत्यनाद्यात्मविपर्ययग्रहम् ॥ लभंत आत्मीयमनंतमैश्वरं कुतो नु मोहः परमस्य सद्गतेः ॥ ३२ ॥

विज्ञानं स्वरूपविषयम्। ज्ञानं बाह्यविषयम् ॥ ३१ ॥ किंच। यस्य पादसेवया ऊर्जिता पुष्कला या आत्मविद्या तया अनादिश्चासावात्मविपर्ययग्रहश्च अहं कृशः सुखी दुःखीत्यादिलक्षणस्तं हिन्वंति नाशयंति संतः। ऐश्वरं पदं च। तस्य सतां गतेः कुतो नु मोह इति। अतो नैतद्वचनं सत्यमित्यर्थः ॥ ३२ ॥

॥ २९ ॥ याप्रमाणें सांगितलेल्या परमताचें आतां निराकरण करितो— हे राजर्षे, याप्रमाणें कितीएक पूर्वपरानुसंधान न राखणारे ऋषि बोलतात परंतु तें बोलणें ते आपल्याच वचनाला विरुद्ध होतें त्याचें खरोखर स्मरण राखीत नाहींत; म्हणजे पूर्वीच्या वचनांत श्रीकृष्ण राजसूयाकरितां बळरामासहवर्तमान गेलाच नव्हता. तर बळरामाची आज्ञा घेऊन गेला होता असें आहे आणि येथें श्रीकृष्ण, बळरामासहवर्तमान इंद्रप्रस्थांतून येऊन त्याला नगराचें रक्षण करण्यास सांगितलें असा त्यांच्या वचनांत विरोध आहे ॥ ३० ॥ आणि हें बोलणें संभवतहि नाहीं. कारण, अज्ञानी पुरुषांचेठिकाणीं संभवणारे शोक, मोह, भय व स्नेह हे कोठें ? आणि ज्याचीं ज्ञान, विज्ञान व ऐश्वर्यें कधींच खंडित होत नाहींत असा पूर्णानंदरूपी भगवान् कोठें ? ॥ ३१ ॥ आणि ज्याच्या चरणसेवेनें वृद्धिंगत झालेल्या आत्मसाक्षात्काररूप विद्येनें सत्पुरुष, अनादिकाळापासून असलेल्या देहात्मबुद्धीचा त्याग करून अनंत असें आत्मस्वरूपी ईश्वराचें पद पावतात त्या सर्वोत्कृष्ट व सत्पुरुषांची गति अशा भगवंताला मोह कोठून होणार ?

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मुळींच होणार नाहीं, ह्मणून हें केचिन्मत खरें नव्हे ॥ ३२ ॥ तर खरें इतकेंच कीं, अनेक शस्त्रांनीं प्रहार करणाऱ्या त्या शाल्वाला, त्या अमोघपराक्रमी श्रीकृष्णानें, वेगानें सोडिलेल्या बाणांनीं वेधून, त्याचें कवच धनुष्य व मस्तकावरील मणि हीं छेदन केलीं आणि शत्रूचें सौभनामक विमानहि गदेनें फोडून टाकिलें ॥ ३३ ॥ तेव्हां कृष्णाच्या हस्तानें प्रेरणा केलेल्या गदेनें हजारो तुकडे होऊन चूर्ण झालेलें तें सौभविमान समुद्राच्या पाण्यांत पडलें. तेव्हां शाल्व त्या सौभविमानाचा त्याग करून भूमीवर उतरला आणि गदा उचलून मोठ्या त्वरेनें कृष्णाच्या अंगावर धांवला ॥ ३४ ॥ तेव्हां श्रीकृष्णानें आपल्या अंगावर धांऊन येणाऱ्या त्या शाल्वाचा गदेसहित बाहु बाणानें तोडून टाकून, त्याच्या वधाकरितां प्रलयकालीन सूर्यासारखें अद्भुत चक्र धारण केलें असतां त्यावेळीं तो श्रीकृष्ण, जसा सूर्यसहित उदयपर्वत शोभतो त्याप्रमाणें शोभूं लागला ॥ ३५ ॥ नंतर त्याच चक्राच्या योगानें श्रीकृष्णानें, बहुत माया जाणणाऱ्या त्या शाल्वाचें कुंडलकिरीटांसहित मस्तक, जसें पूर्वीं इंद्रानें वज्राच्या

किं तर्हि सत्यं तदाह । तं शस्त्रपूगैरिति । वर्म कवचम् । रुरोज बभंज ॥ ३३ ॥ ३४ ॥ लयार्कसंनिभं प्रलयकालीनसूर्यसदृशम् ॥ ३५ ॥ ३६ ॥ देवगणैरीरिता वादिताः ।

तं शस्त्रपूगैः प्रहरंतमोजसा शाल्वं शरैः शौरिरमोघविक्रमः ॥ विध्वाऽच्छिनद्वर्म धनुः शिरोमणिं सौभं च शत्रोर्गदया रुरोज ह ॥ ३३ ॥ तत्कृष्णहस्तेरितया विचूर्णितं पपात तोये गदया सहस्रधा ॥ विसृज्य तद्भूतलमास्थितो गदामुद्यम्य शाल्वोऽच्युतमभ्यगाद्द्रुतम् ॥ ३४ ॥ आधावतः सगदं तस्य बाहुं भल्लेन छित्वाऽथ रथांगमद्भुतम् ॥ वधाय शाल्वस्य लयार्कसन्निभं बिभ्रद्बभौ सार्क इवोदयाचलः ॥ ३५ ॥ जहार तेनैव शिरः सकुंडलं किरीटयुक्तं पुरुमायिनो हरिः ॥ वज्रेण वृत्रस्य यथा पुरंदरो बभूव हाहेति वचस्तदा नृणाम् ॥ ३६ ॥ तस्मिन्निपतिते पापे सौभे च गदया हते ॥ नेदुर्दुंदुभयो राजन्दिवि देवगणेरिताः ॥ सखीनामपचितिं कुर्वन्दंतवक्रो रुषाऽभ्ययात् ॥ ३७ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे उत्तरार्धे सौभवधो नाम सप्तसप्ततितमोऽध्यायः ॥ ७७ ॥ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ शिशुपालस्य शाल्वस्य पौंड्रकस्यापि दुर्मतिः ॥ परलोकगतानां च कुर्वन्पारोक्ष्यसौहृदम् ॥ १ ॥

किंच सखीनामिति ॥ ३७ ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधे उत्तरार्धे टीकायां सप्तसप्ततितमोऽध्यायः ॥ ७७ ॥ ॥ ततोऽष्टसप्ततितमे दंतवक्रविदूरथौ ॥ हत्वा हरिः पुरे रेमे रामः सूतं ततोऽवधीत् ॥ १ ॥ सखीनामपचितिं कुर्वन्नित्युक्तं तदेवाह । शिशुपालस्येति । पारोक्ष्यसौहृदं परोक्षे करणीयं सुहृत्कृत्यम् ॥ १ ॥

योगानें वृत्रासुराचें मस्तक तोडून पाडिलें त्याप्रमाणें तोडून पाडिलें. तेव्हां तें कृत्य पहाणाऱ्या शाल्वपक्षांतील मनुष्यांचा मोठा हाहाकार शब्द झाला ॥ ३६ ॥ हे राजा, तो पापी शाल्व मरण पावला असतां व तें सौभनामक विमानहि गदेनें चूर्ण झालें असतां, स्वर्गांवर हर्षानें देवगणांनीं वाजविलेले दुंदुभि नाद पावूं लागले. तेव्हां मरण पावलेल्या शाल्वादिक मित्रांचा उपकार त्यांच्या पश्चात् फेडण्याकरितां क्रोधानें दंतवक्र श्रीकृष्णाबराबर युद्ध करण्यास प्राप्त झाला ॥ ३७ ॥ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील दशमस्कंधाच्या उत्तरार्धांत शाल्ववधनिरूपणनामक हा सत्याहात्तरावा अध्याय समाप्त झाला ॥ ७७ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या अठ्याहात्तराव्या अध्यायामध्यें, श्रीकृष्णानें, दंतवक्रविदूरथांचा वध करून, तो द्वारका नगरींत रममाण झाला आणि बळरामानें सूताचा (रोमहर्षणाचा) वध केला, अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, परलोकीं गेलेल्या–शिशुपाळ, शाल्व आणि पौंड्रक यांचें परोक्ष करावयाचें मित्रकृत्य

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करण्याकरितां एकटा, पादचारी, महाबळी हातांत गदा घेऊन चालतांना पायांनीं ह्या पृथिवीला कांपविणारा व अत्यंत क्रुद्ध असा तो दुर्मति दंतवक्र, कृष्णाबरोबर युद्ध करण्यास प्राप्त झाला ॥ १ ॥ २ ॥ त्या तशा क्रोधानें येणाऱ्या दंतवक्राला पाहून, श्रीकृष्णानें आपणहि हातांत गदा घेऊन त्वरेनें रथावरून खालीं उडी टाकिली आणि मर्यादा जशी समुद्राचा प्रतिरोध करिते त्याप्रमाणें त्याचा प्रतिरोध केला ॥ ३ ॥ त्यावेळीं मदोन्मत्त अशा त्या दंतवक्रानें हातांत गदा उचलून श्रीकृष्णास सांगितलें कीं, तूं आज माझ्या दृष्टिमार्गाला प्राप्त झालास ही मोठी आनंदाची गोष्ट झाली ॥ ४ ॥ हे कृष्णा, तूं जरी आमच्या मामाचा पुत्र असल्यामुळें मारण्यास योग्य नाहींस, तथापि

॥ २ ॥ प्रत्यधात्प्रतिरुरोध ॥ ३ ॥ मुकुंदं प्राह दुर्मद इत्यादेरधिक्षेपपरता स्फुटैव । परमार्थस्तु दुर्मदो गतमदः प्राह । मुकुंदं तृतीये जन्मनि मुक्तिदानार्थमागतम् । अद्येति जन्मत्रयेऽन्विष्यमाणोऽद्य ब्रह्मशापावसाने भवान्मम स्वामी दृष्टिपथं गतः प्राप्तः एतद्दिष्ट्या दिष्ट्या भद्रं भद्रम् । अतिहर्षे वीप्सा ॥ ४ ॥ किंच । हे कृष्ण त्वमस्माकं मातुलेयो बंधुः । एवमपि मित्रध्रुक् मित्राणि घातितवान्मां च जिघांससि तस्मादस्माकं त्वत्तो मृत्युः सनकाद्यनुग्रहप्राप्तो नूनं दुर्वारः । अतस्त्वामेतावन्मात्रमहं याचे । किं तदाह ।

एकः पदातिः संक्रुद्धो गदापाणिः प्रकंपयन् ॥ पद्भ्यामिमां महाराज महासत्त्वो व्यदृश्यत ॥ २ ॥ तं तथाऽऽयांतमालोक्य गदामादाय सत्वरः ॥ अवप्लुत्य रथात्कृष्णः सिंधुं वेलेव प्रत्यधात् ॥ ३ ॥ गदामुद्यम्य कारूषो मुकुंदं प्राह दुर्मदः ॥ दिष्ट्या दिष्ट्या भवानद्य मम दृष्टिपथं गतः ॥ ४ ॥ त्वं मातुलेयो नः कृष्ण मित्रध्रुङ् मां जिघांससि ॥ अतस्त्वां गदया मंद हनिष्ये वज्रकल्पया ॥ ५ ॥ तर्ह्यानृण्यमुपैम्यज्ञ मित्राणां मित्रवत्सलः ॥ बंधुरूपमरिं हत्वा व्याधिं देहचरं यथा ॥ ६ ॥ एवं रूक्षैस्तुदन्वाक्यैः कृष्णं तोत्रैरिव द्विपम् ॥ गदयाऽताडयन्मूर्ध्नि सिंहवद्व्यनदच्च सः ॥ ७ ॥ गदयाऽभिहतोऽप्याजौ न चचाल यदूद्वहः ॥ कृष्णोऽपि तमहन्गुर्व्या कौमोदक्या स्तनांतरे ॥ ८ ॥

अमंद सर्वसहनसमर्थ । क्षात्रधर्मेण सेवितुं गदया त्वां हनिष्ये प्रहरिष्यामि । तामेकवारं सहस्वेति । ननु वज्रतुल्यां त्वद्गदां को वा सहेत नैवमित्याह । अवज्रकल्पया उत्पलमालावदतिकोमलयेत्यर्थः ॥ ५ ॥ नन्वेवं हनने कस्तव पुरुषार्थस्तमाह । तर्हीति । अज्ञ न विद्यते ज्ञो यस्मात् हे सर्वज्ञेत्यर्थः परमार्थतः । स्वामिनमेतद्देहसंबंधेन बंधुरूपमरिं ब्रह्मशापेन शत्रुत्वेन प्रतीतं त्वां हत्वा मित्राणामानृण्यमुपैम्युपैष्यामि । विशेषेणाधीयते मनसि चिंत्यत इति व्याधिः । देहेंऽतर्यामितया चरतीति तथा तमीश्वरं हत्वा क्षात्रधर्मेणाराध्य । हंतेर्गत्यर्थस्य ज्ञानार्थत्वाज्ज्ञात्वेति वा । तेन यथा पित्रादीनामानृण्यमुपयंति तद्वदिति ॥ ६ ॥ रूक्षैरित्यादिप्रतीत्यभिप्रायेण । तोत्रैरंकुशादिभिः ॥ ७ ॥ ८ ॥

तूं ज्याअर्थीं आमच्या शिशुपाळवगैरे मित्रांचा वध केलास व मलाहि मारूं इच्छितोस त्याअर्थीं हे मंदा आतां मी ह्या वज्रासारख्या गदेनें तुला मारितों ॥ ५ ॥ हे अज्ञा, देहामध्यें संचार करणाऱ्या व्याधीचा जसा नाश करितात त्याप्रमाणें, मित्रवत्सल असा मी, जेव्हां तुज बंधुरूपी शत्रूला मारीन तेव्हां आपल्या मित्रांच्या ऋणापासून मुक्त होईन ॥ ६ ॥ याप्रमाणें कठोर भाषणांनीं जसा अंकुशादिकेंकरून हत्तीला पीडित करितात त्याप्रमाणें श्रीकृष्णाला पीडित करून, त्याच्या मस्तकावर गदेनें ताडण केलें आणि त्यानें सिंहासारखा नाद केला ॥ ७ ॥ गदेनें ताडण केलेंलाहि तो यादवश्रेष्ठ श्रीकृष्ण, युद्धामध्यें हालला सुद्धां नाहीं तर त्यानें आपल्या मोठ्या कौमोदकीनामक

---

१ हे अमंदा (सर्वसहनसमर्था). २ अवज्रकल्पया (कमळांच्या माळेसारखी अतिकोमळ अशा). ३ हे अज्ञ (ज्याहून दुसरा ज्ञाता नाहीं अशा हे सर्वज्ञा). ४ देहामध्यें अंतर्यामित्वेंकरून राहणाऱ्या. ५ विशेषेंकरून चिंतन करण्यास योग्य अशा ईश्वराचा. ६ विचार करितात. ७ ब्रह्मशापानें शत्रुत्वानें भासणाऱ्या तुझें क्षत्रियधर्मानें आराधन करीन.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

गदेनें त्या दंतवक्राला हृदयाचेठिकाणीं ताडण केलें ॥ ८ ॥ तेव्हां गदेच्या प्रहारानें ज्याचें हृदय फुटून गेलें आहे असा तो दंतवक्र, मुखांतून रक्ताचें वमन करीत केंस व हातपाय पसरून, गतप्राण होऊन भूमीवर पडला ॥ ९ ॥ हे राजा, जसें पूर्वी शिशुपाळाच्या वधाच्यावेळीं त्याचें तेज भगवत्स्वरूपामध्यें प्रविष्ट झालें होतें तसेंच दंतवक्राच्या शरीरापासून बाहेर पडलेलें आश्चर्यकारक अतिसूक्ष्म जीवरूपी तेजहि, सर्वलोक पहात असतां, कृष्णस्वरूपांत प्रविष्ट झालें ॥ १० ॥ नंतर त्या दंतवक्राचा भाऊ विदूरथ, भावाच्या शोकानें व्याप्त होऊन, त्या कृष्णाला मारण्याच्या इराद्यानें हातांत ढालतलवार घेऊन क्रोधानें सुसकारे टाकीत कृष्णाच्या अंगावर धांवला ॥ ११ ॥ हे राजेंद्रा, तो येत आहे इतक्यांत श्रीकृष्णानें वस्तऱ्यासारख्या धारेच्या आपल्या चक्रानें, त्याचें किरीटकुंडलांसहित मस्तक छेदन केलें ॥ १२ ॥ याप्रमाणें दुसऱ्यांनीं अजेय अशा सौभविमान, शाल्वराजा, दंतवक्र व त्याचा भाऊ विदूरथ यांस मारून, देव आणि मनुष्य यांनीं स्तुति केलेला ॥ १३ ॥ मुनि, सिद्ध, गंधर्व, विद्याधर, महानाग,

॥ ९ ॥ १० ॥ ११ ॥ १२ ॥ १३ ॥ १४ ॥ १५ ॥ एवं श्रीकृष्णो महाबलवानपि लीलया जयत्येवेति कृत्वा स कदाचिज्जरासंधादिभिर्निर्जित इति पशुदृष्टीना-

गदानिर्भिन्नहृदय उद्वमन्रुधिरं मुखात् ॥ प्रसार्य केशबाह्वङ्घ्रीन्धरण्यां न्यपतद्व्यसुः ॥ ९ ॥ ततः सूक्ष्मतरं ज्योतिः कृष्णमाविशदद्भुतम् ॥ पश्यतां सर्वभूतानां यथा चैद्यवधे नृप ॥ १० ॥ विदूरथस्तु तद्भ्राता भ्रातृशोकपरिप्लुतः ॥ आगच्छदसिचर्मभ्यामुच्छ्वसंस्तज्जिघांसया ॥ ११ ॥ तस्य चापततः कृष्णश्चक्रेण क्षुरनेमिना ॥ शिरो जहार राजेंद्र सकिरीटं सकुंडलम् ॥ १२ ॥ एवं सौभं च शाल्वं च दंतवक्रं सहानुजम् ॥ हत्वा दुर्विषहानन्यैरीडितः सुरमानवैः ॥ १३ ॥ मुनिभिः सिद्धगंधर्वैर्विद्याधरमहोरगैः ॥ अप्सरोभिः पितृगणैर्यक्षैः किन्नरचारणैः ॥ १४ ॥ उपगीयमानविजयः कुसुमैरभिवर्षितः ॥ वृतश्च वृष्णिप्रवरैर्विवेशालंकृतां पुरीम् ॥ १५ ॥ एवं योगेश्वरः कृष्णो भगवान् जगदीश्वरः ॥ ईयते पशुदृष्टीनां निर्जितो जयतीति सः ॥ १६ ॥ श्रुत्वा युद्धोद्यमं रामः कुरूणां सह पांडवैः ॥ तीर्थाभिषेकव्याजेन मध्यस्थः प्रययौ किल ॥ १७ ॥ स्नात्वा प्रभासे संतर्प्य देवर्षिपितृमानवान् ॥ सरस्वतीं प्रतिस्रोतं ययौ ब्राह्मणसंवृतः ॥ १८ ॥

मीयते । नित्यजये हेतवः । योगेश्वरो भगवान् जगदीश्वर इति ॥ १६ ॥ विदूरथांतमामथ्य पूतनादिदनोः कुलम् ॥ कृष्णस्तूपारमन्नाराद्रामोऽहन्स्नुतबल्वलौ ॥ तत्प्रसंग-माह । श्रुत्वेति ॥ १७ ॥ प्रतिस्रोतं प्रतिलोमम् ॥ १८ ॥

अप्सरा, पितृगण, यक्ष किंनर व चारण यांनीं विजय वर्णन केलेला आणि पुष्पवृष्टीनें आच्छादित केलेला असा तो श्रीकृष्ण, यादवश्रेष्ठांनीं परिवेष्टित होऊन, ध्वजपताका-दिक उभारून सुशोभित केलेल्या द्वारकानगरीमध्यें प्रविष्ट झाला ॥ १४ ॥ १५ ॥ याप्रमाणें योगेश्वर व जगदीश्वर असा तो भगवान् श्रीकृष्ण, अनायासानें महाबलिष्ठांनाहि निरंतर जिंकितोच परंतु अविवेकी पुरुषांनामात्र एखादेवेळीं जरासंधादिकांनीं त्यास जिंकिलें आहे असें वाटतें ॥ १६ ॥ याप्रमाणें श्रीकृष्णानें पूतना राक्षसीपासून विदूरथापर्यंत दानवकुळाचा संहार करून, नंतर तो युद्धकृत्यापासून उपराम पावला. आतां कांहीं बळरामाचें चरित्र सांगतो–बळरामानें, कौरवांचा पांडवांबरोबर युद्ध करण्याचा उद्योग चालला आहे असें ऐकून, आपण द्वारकेंत राहवें तर कोणाचातरी पक्षपात स्वीकारावा लागणार, तो न स्वीकारण्याचें मनांत आणून तो तीर्थयात्रेच्या मिषानें, द्वारकेंतून निघाला ॥ १७ ॥ त्यानें आपणाबरोबर ब्राह्मणांस घेऊन प्रभासतीर्थामध्यें स्नान करून तेथें तर्पण, ब्राह्मणभोजनवगैरे करून देव, ऋषि, ॥२४२॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पितर व मनुष्य यांना तृप्त केलें आणि तो सरस्वतीनदीच्या उगमाकडे जावयास निघाला ॥ १८ ॥ त्यानें पृथूदक, बिंदुसर, त्रितकूप, सुदर्शन, विशाल, ब्रह्मतीर्थ, चक्रतीर्थ व पश्चिमवाहिनी सरस्वती यांची यात्रा केली ॥ १९ ॥ नंतर हे राजा, यमुनेच्या कांठीं व गंगेच्या कांठीं जीं तीर्थें आहेत त्यांची यात्रा करून, नंतर त्यानें जेथें शौनकादिक ऋषि सत्र करीत होते त्या नैमिषारण्यांत गमन केलें ॥ २० ॥ तो बळराम आला असें जाणून सहस्रसंवत्सरात्मक सत्राचें अनुष्ठान करणाऱ्या त्या शौनकादिक ऋषींनीं, आसनांवरून उठून सामोरें जाऊन त्याला नमस्कार केला आणि 'आपलें येणें झालें ही फार चांगली गोष्ट झाली असें' अभिनंदन करून त्याचें यथाविधि पूजन केलें ॥ २१ ॥ तेव्हां, परिवारासहवर्तमान पूजा केलेल्या व आसनाचा स्वीकार केलेल्या त्या बळरामानें तेथें बसलेल्या व्यासशिष्य रोमहर्षणास पाहिलें ॥ २२ ॥

सुदर्शनं तीर्थम् । चक्रं चक्रतीर्थम् ॥ १९ ॥ यमुनामनु यानि तीर्थानि गंगामनु च यानि तानि सर्वाणि गत्वा नैमिषमरण्यं जगाम ॥ २० ॥ अभिप्रेत्य श्रीराम इति ज्ञात्वा ॥ २१ ॥ महर्षेर्व्यासस्य ॥ २२ ॥ सूतं प्रतिलोमजम् । न कृतं प्रह्वणमंजलिश्च येन तम् । अध्यासीनं च तान् तेभ्योऽप्युच्चैरासीनमित्यर्थः ॥ २३ ॥ २४ ॥ अजानन्न-

पृथूदकं बिंदुसरस्त्रितकूपं सुदर्शनम् ॥ विशालं ब्रह्मतीर्थं च चक्रं प्राचीं सरस्वतीम् ॥ १९ ॥ यमनामनु यान्येव गंगामनु च भारत ॥ जगाम नैमिषं यत्र ऋषयः सत्रमासते ॥ २० ॥ तमागतमभिप्रेत्य मुनयो दीर्घसत्रिणः ॥ अभिनंद्य यथान्यायं प्रणम्योत्थाय चार्चयन् ॥ २१ ॥ सोऽर्चितः सपरीवारः कृतासनपरिग्रहः ॥ रोमहर्षणमासीनं महर्षेः शिष्यमैक्षत ॥२२ ॥ अप्रत्युत्थायिनं सूतम-कृतप्रह्वणांजलिम् ॥ अध्यासीनं च तान्विप्रांश्चुकोपोद्वीक्ष्य माधवः ॥ २३ ॥ कस्मादसाविमान्विप्रानध्यास्ते प्रतिलोमजः ॥ धर्म-पालांस्तथैवास्मान्वधमर्हति दुर्मतिः ॥ २४ ॥ ऋषेर्भगवतो भूत्वा शिष्योऽधीत्य बहूनि च ॥ सेतिहासपुराणानि धर्मशास्त्राणि सर्वशः ॥ २५ ॥ अदांतस्याविनीतस्य वृथा पंडितमानिनः ॥ न गुणाय भवंति स्म नटस्येवाजितात्मनः ॥ २६ ॥ एतदर्थो हि लोके ऽस्मिन्नवतारो मया कृतः ॥ वध्या मे धर्मध्वजिनस्ते हि पातकिनोऽधिकाः ॥ २७ ॥

ध्यास्त इति चेन्नैवमित्याह । ऋषेरिति ॥ २५ ॥ ननु बहुज्ञः कथमेवं कुर्यात्तत्राह । अदांतस्येति । गुणाय यथोचितानुष्ठानाय ॥ २६ ॥ विप्रानध्यास्तामन्यद्वा किंचित्करोतु किं तवेति चेत्तत्राह । एतदर्थ इति । धर्मध्वजिन उत्तमलिंगधारिणः ॥ २७ ॥

आणि ज्यानें आपणास उत्थापन दिलें नाहीं, वांकून नमस्कार केला नाहीं किंवा हातहि जोडिले नाहींत आणि जो प्रतिलोमज असून त्या सर्व ब्राह्मणापेक्षांहि उंच आसनावर बसला आहे अशा त्या सूताला पाहून तो बळराम क्रुद्ध झाला ॥ २३ ॥ आणि आपल्याचठिकाणीं असें ह्मणाला कीं,– हा सूत प्रतिलोमज असूनहि ह्या सर्व ब्राह्मणांपेक्षां व धर्मरक्षक अशा आमच्याहिपेक्षां उंच आसनावर काय ह्मणून बसला आहे !! या अपराधानें हा दुर्बुद्धि वध करण्यास योग्य आहे ॥ २४ ॥ हा, भगवान् वेद-व्यासाचा शिष्य होऊन त्यापासून इतिहासांसहित पुष्कळ पुराणें अध्ययन करून तशींच सर्व धर्मशास्त्रेंहि अध्ययन करून उंच आसनावर बसला आहे ॥ २५ ॥ खरें आहे कीं,– जो नटासारखा दुसऱ्यांस फसविण्याकरितां संभाविताचा वेष धारण करणारा अजितेंद्रिय, अजितचित्त, विनयरहित व व्यर्थ पंडिताभिमानी असतो त्याला ते शास्त्रादिकांचे अभ्यासहि गुणकारक होत नाहींत ॥ २६ ॥ ह्मणून अशा दुष्टांच्या वधाकरितांच यालोकीं मीं अवतार धारण केला आहे. सास्तव, उत्तम वेष धारण करून

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

धर्मिष्ठत्व दाखविणारे व वस्तुतः धर्ममर्यादांचा भंग करणारे जे लोक आहेत ते मला वध्य आहेत. कारण, ते अधर्मिष्ठांपेक्षांहि प्रसिद्धपणें अधिक पाप करणारे आहेत ॥ २७॥ असें तो भगवान् प्रभु बळराम भाषण करून, दुष्टांच्या वधापासून निवृत्त झालेल्याहि त्यानें, 'अवश्य होणारी गोष्ट अपरिहार्य असल्यामुळें' त्या रोमहर्षणाला हातांत असलेल्या दर्भानेंच प्रहार केला ॥ २८ ॥ त्यावेळीं हाहाकार उच्चारणारे व खिन्नचित्त झालेले ते सर्वहि ऋषि, त्या संकर्षण देवाला असें ह्मणाले कीं,–हें प्रभो, तूं हा अधर्म केला आहेस ॥ २९ ॥ आतां, अधार्मिक प्रतिलोमजाचा वध केला हा अधर्म कसा ? असें ह्मणशील तर– हे यदुनंदना, जोंपर्यंत हें (सहस्रसंवत्सरात्मक) सत्र समाप्त होईल तोंपर्यंत आम्हांला पुराणकथा सांगण्याकरितां या रोमहर्षणाला आह्मीं ब्रह्मासन दिलें होतें आणि याच्या देहाला क्लेश न होतील असें आयुष्यहि दिलें होतें ॥ ३० ॥

भावित्वादिति । नहि भवितव्यं केनापि परिहर्तुं शक्यत इत्यर्थः । अहनत् अहन् ॥ २८ ॥ ते त्वया ॥ २९ ॥ अधार्मिकप्रतिलोमजवधः कोऽयमधर्म इति चेत्तत्राहुः । अस्येति । पुराणप्रवचनायात्मनः शरीरस्य नास्ति क्लमो यस्मिंस्तदायुश्च दत्तमिति ॥ ३० ॥ ब्रह्मवधेऽपि किं ममेश्वरस्येति चेत्सत्यमेव तथापि प्रायश्चित्तं कर्तव्यमित्याशयेनाहुः । योगेश्वरस्येति सार्धेन । आम्नायो ब्राह्मणो न हंतव्य इत्यादिलक्षणः ॥ ३१ ॥ तथाऽप्येतस्या ब्रह्महत्यायाः पावनं प्रायश्चित्तं हे लोकपावनानन्यचोदितः स्वयमेव

एतावदुक्त्वा भगवान्निवृत्तोऽसद्वधादपि ॥ भावित्वात्तं कुशाग्रेण करस्थेनाहनत्प्रभुः ॥ २८॥ हाहेति वादिनः सर्वे मुनयः खिन्नमानसाः ॥ ऊचुः संकर्षणं देवमधर्मस्ते कृतः प्रभो ॥२९॥ अस्य ब्रह्मासनं दत्तमस्माभिर्यदुनंदन ॥ आयुश्चात्मक्लमं तावद्यावत्सत्रं समाप्यते ॥ ३० ॥ अजानतैवाचरितस्त्वया ब्रह्मवधो यथा ॥ योगेश्वरस्य भवतो नाम्ना योऽपि नियामकः ॥ ३१॥ यद्येतद्ब्रह्महत्यायाः पावनं लोकपावन ॥ चरिष्यति भवांल्लोकसंग्रहोऽनन्यचोदितः ॥ ३२ ॥ श्रीभगवानुवाच ॥ करिष्ये वधनिर्वेशं लोकानुग्रहकाम्यया ॥ नियमः प्रथमे कल्पे यावान्स तु विधीयताम् ॥ ३३ ॥ दीर्घमायुर्बतैतस्य सत्वमिंद्रियमेव च ॥ आशासितं यत्तद्ब्रूत साधये योगमायया ॥ ३४ ॥ ऋषय ऊचुः ॥ अस्त्रस्य तव वीर्यस्य मृत्योरस्माकमेव च ॥ यथा भवेद्वचः सत्यं तथा राम विधीयताम् ॥ ३५ ॥

भवान्यदि करिष्यति तर्हि लोकसंग्रहो भविष्यति नान्यथेति ॥ ३२ ॥ वधस्य निर्वेशं प्रायश्चितम् । प्रथमे कल्पे मुख्यकल्पे । विधीयतामुपदिश्यताम् ॥ ३३ ॥ किंच बत हे मुनयः एतस्य दीर्घमायुः सत्वं बलमिंद्रियं तत्पाटवं च अन्यच्च यद्भवद्भिराशासितमपेक्षितं तदब्रूत सर्वम् ॥ ३४ ॥ अस्त्रादीनां यथा सत्यता भवेदस्माकं च वचः सत्यं यथा भवेत्तथा विधीयतामित्यर्थः ॥ ३५ ॥

ह्मणून हें सर्व न जाणणाऱ्याच तूं, ब्रह्मवधासारिखा याचा वध आचरण केला आहेस. हे लोकपावना, योगेश्वर अशा तुला, 'ब्राह्मणाचा वध करूं नये असा' वेदहि जरी प्रायश्चित्त देण्यास समर्थ नाहीं तथापि तूं दुसऱ्यानें न सांगतां आपण होऊनच जर ह्या ब्रह्महत्येच्या पापाचें प्रायश्चित्त करिशील तर लोकांची प्रायश्चित्ताविषयीं प्रवृत्ति घडेल, अन्यथा घडणार नाहीं ॥ ३१ ॥ ३२ ॥ श्रीभगवान् ह्मणाला–ऋषिहो, लोकसंग्रहाच्या इच्छेनें मी या घडलेल्या वधाचें प्रायश्चित्त करितों. यास्तव अगदीं मुख्यपक्षीं जें प्रायश्चित्त असेल तें तुह्मी मला सांगा ॥ ३३ ॥ आणि हे ऋषिहो, या रोमहर्षणाला–दीर्घ आयुष्य, बळ, इंद्रियपटुत्व व दुसरें जें कांहीं तुह्मांस अपेक्षित असेल तें सर्व मला सांगा. मी आपल्या अचिंत्यशक्तीच्या योगानें तें सर्व संपादन करीन ॥ ३४ ॥ तें ऐकून ऋषि ह्मणाले–हे रामा, तूं सोडलेल्या शस्त्राची, तुझ्या पराक्रमाची व रोमहर्षणाच्या मरणाची ज्याप्रकारें सत्यता होईल व 'जोंपर्यंत हें सत्र आहे तोंपर्यंत तूं दीर्घायुषी व पुराणवक्ता हो असें आमचें वचनहि ॥२४३॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जसें सत्य होईल तसें करावें ॥ ३५ ॥ श्रीभगवान् ह्मणाला– पित्याचा आत्मा हाच पुत्ररूपानें उत्पन्न होतो असें वेदाचें सांगणें आहे, ह्मणून या रोमहर्षणाचा पुत्र जो उग्रश्रवा आहे तो हाच आहे असें समजा. तोच तुह्मांला पुराण सांगणारा होईल आणि आयुष्य, इंद्रियशक्ति व शरीरसंबंधी बळ यांनीं तो संपन्न होईल, मिळून तो साक्षात् न वांचल्यामुळें माझ्या अस्त्राची, मृत्यूची व आयुष्यादिकांच्या सिद्धीनें तुमच्या वचनाचीहि सत्यता होईल ॥ ३६ ॥ हे ऋषिश्रेष्ठहो, तुमचा दुसरा कोणता मनोरथ आहे तो मला सांगा ह्मणजे मी तो पूर्ण करितों. नंतर, मजकडून ब्रह्मदंड घेऊन सूतहत्येचें प्रायश्चित्त न जाणणाऱ्या मला, तुह्मी सर्वज्ञ आहां ह्मणून, जें प्रायश्चित्त यथायोग्य असेल तें विचार करून सांगा ॥ ३७ ॥ ऋषि ह्मणाले– इल्वलाचा पुत्र बल्वलनामक एक मोठा भयंकर दानव आहे, तो दर पूर्णिमेस

तथा संपादयन्नाह । आत्मा वा इति । अंगादंगात्संभवसि हृदयादभिजायसे ॥ आत्मा वै पुत्रनामासि स जीव शरदः शतमित्यादि वेदानुशासनं वेदवचनम् । तस्मादस्य रोमहर्षणस्य पुत्र उग्रश्रवा भवतां पुराणप्रवक्ता भवेत्स चायुरादिमांश्च भवेत् । अतः साक्षादजीवनादस्त्रस्य मृत्योश्च सत्यता पुत्ररूपेण चायुरादिसिद्धेर्युष्मद्वचनस्यापि सत्यता स्यादिति भावः ॥ ३६ ॥ प्रथमं तावदपेक्षितं कथय तदहं करिष्यामीत्याह । किं वः काम इति । किंविषयो वः कामो वर्तते तद्ब्रूतेति । अथानंतरं ब्रह्मदंडं गृहीत्वाऽपचितिं निष्कृतिमजानतो

श्रीभगवानुवाच ॥ आत्मा वै पुत्र उत्पन्न इति वेदानुशासनम् ॥ तस्मादस्य भवेद्वक्ता आयुरिंद्रियसत्ववान् ॥ ३६ ॥ किं वः कामो मुनिश्रेष्ठा ब्रूताहं करवाण्यथ ॥ अजानतस्त्वपचितिं यथा मे चिंत्यतां बुधाः ॥ ३७ ॥ ऋषयः ऊचुः ॥ इल्वलस्य सुतो घोरो बल्वलो नाम दानवः ॥ स दूषयति नः सत्रमेत्य पर्वणि पर्वणि ॥ ३८ ॥ तं पापं जहि दाशार्ह तन्नः शुश्रूषणं परम् ॥ पूयशोणितविण्मूत्रसुरामांसाभिवर्षिणम् ॥ ३९ ॥ ततश्च भारतं वर्षं परीत्य सुसमाहितः ॥ चरित्वा द्वादशमासांस्तीर्थस्नायी विशुद्ध्यसे ॥ ४० ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे उत्तरार्धे बलदेवचरित्रे बल्वलवधोपक्रमो नामाष्टसप्ततितमोऽध्यायः ॥ ७८ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ ततः पर्वण्युपावृत्ते प्रचंडः पांसुवर्षणः ॥ भीमो वायुरभूद्राजन्पूयगंधस्तु सर्वशः ॥ १ ॥

मे हे बुधा यथावच्चिंत्यतामपचितिरिति ॥ ३७ ॥ प्रथमं तावदपेक्षितं कर्तव्यं कथयंति इल्वलस्येति द्वाभ्याम् ॥ ३८ ॥ ३९ ॥ प्रायश्चित्तमाहुः । ततश्चेति । परीत्य प्रदक्षिणीकृत्य । सुसमाधानादिगुणविशेषादेकाब्दमात्रमुक्तमित्यविरोधः । सुसमाहितः कामक्रोधादिरहितः । चरित्वा कृच्छ्राणि ॥ ४० ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधे उत्तरार्धे टीकायामष्टसप्ततितमोऽध्यायः ॥ ७८ ॥ ॥ ऊनाशीतितमे रामो बल्वलं द्विजतुष्टये ॥ निहत्य तीर्थस्नानाद्यैः सूतहत्यामपानुदत् ॥ १ ॥ उपावृत्ते प्राप्ते ॥ १ ॥

येऊन आमच्या सत्राला दूषित करितो ॥ ३८ ॥ हे रामा, त्या पापी दानवाला तूं मारून टाक, ह्मणजे तेंच आमचें उत्तम शुश्रूषण होईल. कारण, तो आमच्या यज्ञाच्या जागीं येऊन पू, रक्त, विष्ठा, मूत्र, सुरा व मांस यांचा सर्वबाजूंनीं वर्षाव करीत असतो ॥ ३९ ॥ तदनंतर, तूं एकवर्ष (बारामहिनेपर्यंत) एकाग्रचित्तानें भरतखंडाला प्रदक्षिणा करून तीर्थांचें स्नान करीत कृच्छ्रांचें सेवन केलेंस ह्मणजे सूतवधाच्या पापापासून शुद्ध होशील ॥ ४० ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील उत्तरार्धांत सूतवधनिरूपणनामक हा अठ्याहात्तरावा अध्याय समाप्त झाला ॥ ७८ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां, ह्या एकुणऐंशीव्या अध्यायामध्यें, बळरामानें ब्राह्मणाच्या संतोषाकरितां बल्वलनामक दानवाचा वध करून तीर्थस्नानादिकेंकरून सूताच्या हत्येचें प्रायश्चित्त केलें, अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, तदनंतर पूर्णिमा पर्व प्राप्त झालें असतां त्या दिवशीं धुळीचा वर्षाव करणारा असा प्रचंड व भयंकर वारा वाहूं लागला आणि जिकडेतिकडे पुवाचा दुर्गंध

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

फुटला ॥ १ ॥ नंतर बल्वलानें निर्माण केलेली विष्ठामूत्रादिकांची अमंगळ वृष्टि यज्ञशाळेमध्यें होऊं लागली. नंतर शूल धारण करणारा तो बल्वल दानव दिसूं लागला ॥ २॥ तेव्हां विस्घळलेल्या काजळाच्या पर्वतासारखा काळा, मोठा देह धारण करणारा, तापलेल्या तांब्यासारखी लाल शिखा व मिशा धारण करणारा, दाढांच्या योगानें भयंकर व भ्रुकुटींनीं युक्त असें मुख असलेल्या त्या बल्वलास पाहून बळरामानें शत्रुसैन्याचें विदारण व दैत्यांचें दमन करणाऱ्या आपल्या मुसळाचें व नागराचें स्मरण केलें. तेव्हां तीं तत्काळ प्राप्त झालीं ॥ ३ ॥ ४ ॥ तेव्हां, बळरामानें क्रुद्ध होऊन आकाशांत असलेल्या त्या ब्रह्मद्रोही बल्वलाला, नांगराच्या अग्रानें ओढून मुसळानें मस्तकावर प्रहार केला ॥ ५ ॥ तेव्हां मस्तक फुटून गेलेला तो बल्वल, रक्ताचें वमन करीत व पीडित झाल्यामुळें ओरडत, जसा इंद्राच्या वज्रानें फुटलेला व कावेनें लाल झालेला पर्वत पडतो त्याप्रमाणें भूमीवर पडला ॥ ६ ॥ याप्रमाणें त्याचा वध केला असतां संतुष्ट झालेल्या त्या महाभाग्यवंत ऋषींनीं, रामाची स्तुति करून व खरे आशीर्वाद देऊन

॥ २ ॥ भिन्नो विदीर्णोंऽजनचय उपमा यस्य तमतिकृष्णमित्यर्थः । तप्तताम्रवच्छिखा श्मश्रूणि च यस्य तम् । दंष्ट्राभिरुग्रं भ्रुकुटीयुतं मुखं यस्य तम् ॥ ३ ॥ ४ ॥ ५ ॥

ततोऽमेध्यमयं वर्षं बल्वलेन विनिर्मितम् ॥ अभवद्यज्ञशालायां सोऽन्वदृश्यत शूलधृक् ॥ २ ॥ तं विलोक्य बृहत्कायं भिन्नांजनचयोपमम् ॥ तप्तताम्रशिखाश्मश्रुं दंष्ट्रोग्रभ्रुकुटीमुखम् ॥ ३ ॥ सस्मार मुसलं रामः परसैन्यविदारणम् ॥ हलं च दैत्यदमनं ते तूर्णमुपतस्थतुः ॥ ४ ॥ तमाकृष्य हलाग्रेण बल्वलं गगनेचरम् ॥ मुसलेनाहनत्क्रुद्धो मूर्ध्नि ब्रह्मद्रुहं बलः ॥ ५ ॥ सोऽपतद्भुवि निर्भिन्नललाटोऽसृक्समुत्सृजन् ॥ मुंचन्नार्तस्वरं शैलो यथा वज्रहतोऽरुणः ॥ ६ ॥ संस्तुत्य मुनयो रामं प्रयुज्यावितथाशिषः ॥ अभ्यर्षिचन्महाभागा वृत्रघ्नं विबुधा यथा ॥ ७ ॥ वैजयंतीं ददुर्मालां श्रीधामाम्लानपंकजाम् ॥ रामाय वाससी दिव्ये दिव्यान्याभरणानि च ॥ ८ ॥ अथ तैरभ्यनुज्ञातः कौशिकीमेत्य ब्राह्मणैः ॥ स्नात्वा सरोवरमगाद्यतः सरयुरास्रवत् ॥ ९ ॥ अनुस्रोतेन सरयूं प्रयागमुपगम्य सः ॥ स्नात्वा संतर्प्य देवादीन् जगाम पुलहाश्रमम् ॥ १० ॥ गोमतीं गंडकीं स्नात्वा विपाशां शोण आप्लुतः ॥ गयां गत्वा पितॄनिष्ट्वा गंगासागरसंगमे ॥ ११ ॥

अरुणो रुधिरेण दैत्यः । शैलो धातुभिर्यथेति ॥ ६ ॥ ७ ॥ श्रियो धामान्यम्लानानि पंकजानि यस्यां ताम् ॥ ८ ॥ किं तत्सरः । यत इति । आस्रवदुद्गात् ॥ ९ ॥ अनुस्रोतेनानुलोमतः पुलहाश्रमं हरिक्षेत्रम् ॥ १० ॥ गोमत्यां गंडक्यां विपाशायां च स्नात्वा शोणे च आप्लुतः इष्ट्वा संपूज्य ॥ ११ ॥

त्याला, जसा वृत्राच्या वधानें संतुष्ट झालेल्या देवांनीं इंद्राला अभिषेक केला होता त्याप्रमाणें अभिषेक केला ॥ ७ ॥ आणि त्यांनीं त्या रामाला दिव्य वस्त्रें दिव्य भूषणें व शोभेचें स्थान व कधींच म्लान न होणारीं जिचीं कमळें आहेत अशी वैजयंती माळा अर्पण केली ॥ ८ ॥ नंतर त्या ऋषींनीं आज्ञा केलेला तो बळराम, ब्राह्मणांसहर्तमान कौशिकी नदीजवळ येऊन तेथें स्नान करून, नंतर जेथून सरयू नदी उत्पन्न झाली आहे त्या सरोवराजवळ आला ॥ ९ ॥ नंतर तो बळराम सरयूच्या कांठाकांठानें प्रयागास जाऊन तेथें स्नान व देवादिकांचें तर्पण करून पुढें हरिद्वारास गेला ॥ १० ॥ नंतर त्यानें गोमती, गंडकी व विपाशा या नद्यांमध्यें स्नान करून शोणनामक नदामध्यें स्नान केलें. नंतर गयेमध्यें जाऊन तेथें पितरांचें 'जीवत्पितृक असल्यामुळें' ब्राह्मणभोजनादिकेंकरून, आराधन करून नंतर गंगेच्या व समुद्राच्या संगमांत

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

स्नान केलें ॥ ११ ॥ नंतर, महेंद्रपर्वतावर परशुरामाचें दर्शन घेऊन व त्याला नमस्कार करून पुढें सप्तगोदावरी, वेणा, पंपा व भीमरथी या नद्यांमध्यें स्नान केलें ॥ १२ ॥ नंतर, त्या रामानें कार्तिकस्वामीचें दर्शन घेऊन शंकराचें स्थान अशा श्रीशैलपर्वतावर गमन केलें. तेथून त्या प्रभूनें द्रविडदेशांत असलेला महापवित्र वेंकट पर्वत पाहून कामकोष्णी नदीचें स्नान करून कांचीनगरीमध्यें गमन केलें. नंतर नद्यांत श्रेष्ठ अशा कावेरीमध्यें स्नान करून पुढें, जेथें श्रीहरि सन्निहित असतो अशा महापवित्र श्रीरंगक्षेत्रास गमन केलें ॥ १३ ॥ १४ ॥ नंतर, हरीचें क्षेत्र अशा ऋषभपर्वताची तशीच दक्षिणमथुरेची यात्रा करून महापातकांचा नाश करणाऱ्या समुद्रसंबंधी सेतुबंधास गमन केलें ॥ १५ ॥ तेथें त्या बळरामानें ब्राह्मणांस दहाहजार गाई दान दिल्या. पुढें तो कृतमाला व ताम्रपर्णी या नद्यांमध्यें स्नान करून कुलाचल अशा मलयपर्वतावर गेला ॥ १६ ॥ तेथें असलेल्या अगस्त्य ऋषीला त्यानें नमस्कार करून त्याची पूजा केल्यावर त्या ऋषीनें आशीर्वाद देऊन पुढें जाण्या-

---

॥ १२ ॥ श्रीशैलं श्रीपर्वतम् ॥ १३ ॥ कांचीं पुरीम् ॥ १४ ॥ १५ ॥ १६ ॥ दक्षिणमर्णवम् ॥ १७ ॥ फाल्गुनमनंतपुरम् । पंचाप्सरसं सरः । अस्पर्शदस्पृशत् ॥ १८ ॥

उपस्पृश्य महेंद्राद्रौ रामं दृष्ट्वाऽभिवाद्य च ॥ सप्तगोदावरीं वेणां पंपां भीमरथीं ततः ॥ १२ ॥ स्कंदं दृष्ट्वा ययौ रामः श्रीशैलं गिरिशालयम् ॥ द्रविडेषु महापुण्यं दृष्ट्वाऽद्रिं वेंकटं प्रभुः ॥ १३ ॥ कामकोष्णीं पुरीं कांचीं कावेरीं च सरिद्वराम् ॥ श्रीरंगाख्यं महापुण्यं यत्र सन्निहितो हरिः ॥ १४ ॥ ऋषभाद्रिं हरेः क्षेत्रं दक्षिणां मथुरां तथा ॥ सामुद्रं सेतुमगमन्महापातकनाशनम् ॥ १५ ॥ तत्रायुतमदाद्धेनूर्ब्राह्मणेभ्यो हलायुधः ॥ कृतमालां ताम्रपर्णीं मलयं च कुलाचलम् ॥ १६ ॥ तत्रागस्त्यं समासीनं नमस्कृत्याभिवाद्य च ॥ योजितस्तेन चाशीर्भिरनुज्ञातो गतोऽर्णवम् ॥ दक्षिणं तत्र कन्याख्यां दुर्गां देवीं ददर्श सः ॥ १७ ॥ ततः फाल्गुनमासाद्य पंचाप्सरसमुत्तमम् ॥ विष्णुः सन्निहितो यत्र स्नात्वाऽस्पर्शद्गवायुतम् ॥ १८ ॥ ततोऽभिव्रज्य भगवान्केरलांस्तु त्रिगर्तकान् ॥ गोकर्णाख्यं शिवक्षेत्रं सान्निध्यं यत्र धूर्जटेः ॥ १९ ॥ आर्यां द्वैपायनीं दृष्ट्वा शूर्पारकमगाद्बलः ॥ तापीं पयोष्णीं निर्विंध्यामुपस्पृश्याथ दंडकम् ॥ २० ॥ प्रविश्य रेवामगमद्यत्र माहिष्मती पुरी ॥ मनुतीर्थमुपस्पृश्य प्रभासं पुनरागमत् ॥ २१ ॥ श्रुत्वा द्विजैः कथ्यमानं कुरुपांडवसंयुगे ॥ सर्वराजन्यनिधनं भारं मेने हृतं भुवः ॥ २२ ॥

केरलादीन्देशान् ॥ १९ ॥ द्वीपमयनं यस्यास्ताम् ॥ २० ॥ २१ ॥ २२ ॥

स आज्ञा दिली असतां, दक्षिणसमुद्राच्या तीरीं गमन केलें ॥ १७ ॥ तेथें त्यानें कन्यानामक दुर्गादेवीचें दर्शन घेतलें. नंतर अनंतपुरास जाऊन पुढें पंचाप्सरसनामक सरोवरास गमन केलें. जेथें विष्णु सन्निहित आहे अशा त्या सरोवरांत स्नान करून ब्राह्मणांस दहाहजार गाई दिल्या ॥ १८ ॥ नंतर तो भगवान् राम, केरलदेशांत व त्रिगर्तदेशांत जाऊन जेथें शंकराचें सांनिध्य आहे अशा गोकर्णनामक शिवक्षेत्रास गेला ॥ १९ ॥ नंतर, द्वीपाचा आश्रय करून राहणाऱ्या आर्यादेवीचें दर्शन घेऊन तो बळराम शूर्पारकनामक क्षेत्रास गेला. पुढें तापी, पयोष्णी व निर्विंध्या या नद्यांत स्नान करून दंडकारण्यामध्यें जाऊन, जिच्यातीरीं माहिष्मतीनामक नगरी आहे अशा नर्मदानदीजवळ गेला. तेथें स्नान करून नंतर मनुतीर्थांत स्नान करून पुन्हा प्रभासक्षेत्रास प्राप्त झाला ॥ २० ॥ २१ ॥ तेथें ब्राह्मणांच्या सांगण्यावरून कौरवपांडवां-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

च्या युद्धांत सर्व राजे मरण पावले असें ऐकून त्यानें पृथ्वीचा भार उतरला असें मानिलें ॥ २२ ॥ नंतर तो बळराम, संग्राममध्यें भीमसेन व दुर्योधन हे गदांनीं परस्पर युद्ध करीत आहेत असें ऐकून, त्यांचें निवारण करण्याकरितां कुरुक्षेत्रांत गेला ॥ २३ ॥ तेव्हां युधिष्ठिर, नकुळ, सहदेव, कृष्ण व अर्जुन यांनीं त्यास पाहून, नमस्कार केले आणि हा बळराम, काय सांगण्याकरितां येथें आला आहे ? असा विचार करीत उगीच राहिले ॥ २४ ॥ तो बळराम, क्रोधयुक्त झालेल्या, जयाची इच्छा करणाऱ्या व हातांत गदा घेऊन चित्रविचित्र मंडळें फिरणाऱ्या त्या उभयतां भीमदुर्योधनांस पाहून असें ह्मणाला कीं,– ॥ २५ ॥ हे राजा दुर्योधना, हे वृकोदरा भीमसेना, तुह्मी उभयतां समबळी वीर आहां. तुह्मांमध्यें एकाला (भीमाला) हा 'दुर्योधनापेक्षां' बळानें अधिक आहे असें मी समजतों आणि एकाला (दुर्योधनाला) 'भीमापेक्षां' हा गदाप्रहार करण्याच्या शिक्षाचातुर्यानें अधिक आहे असें समजतों ॥ २६ ॥ ह्मणून समबळी अशा तुम्हां दोघांपैकीं एकाचा या

विनशनं कुरुक्षेत्रम् ॥ २३ ॥ विवक्षुर्वक्तुमिच्छुः । किं वदिष्यतीति भिया तूष्णीमासन्निति ॥ २४ ॥ २५ ॥ २६ ॥ अन्यः पराजयो वा । रणः संग्रामः ॥ २७ ॥ अर्थवद्वा-

स भीमदुर्योधनयोर्गदाभ्यां युद्ध्यतोर्मृधे ॥ वारयिष्यन्विनशनं जगाम यदुनंदनः ॥ २३ ॥ युधिष्ठिरस्तु तं दृष्ट्वा यमौ कृष्णार्जुनावपि ॥ अभिवाद्याभवंस्तूष्णीं किं विवक्षुरिहागतः ॥ २४ ॥ गदापाणी उभौ दृष्ट्वा संरब्धौ विजयैषिणौ ॥ मंडलानि विचित्राणि चरंताविदमब्रवीत् ॥ २५ ॥ युवां तुल्यबलौ वीरौ हे राजन्हे वृकोदर ॥ एकं प्राणाधिकं मन्य उतैकं शिक्षयाऽधिकम् ॥ २६ ॥ तस्मादेकतरस्येह युवयोः समवीर्ययोः ॥ न लक्ष्यते जयोऽन्यो वा विरमत्वफलो रणः ॥ २७ ॥ न तद्वाक्यं जगृहतुर्बद्धवैरौ नृपार्थवत् ॥ अनुस्मरंतावन्योऽन्यं दुरुक्तं दुष्कृतानि च ॥ २८ ॥ दिष्टं तदनुमन्वानो रामो द्वारवतीं ययौ ॥ उग्रसेनादिभिः प्रीतैर्ज्ञातिभिः समुपागतः ॥ २९ ॥ तं पुनर्नैमिषं प्राप्तमृषयोऽयाजयन्मुदा ॥ क्रत्वंगं क्रतुभिः सर्वैर्निवृत्ताखिलविग्रहम् ॥ ३० ॥ तेभ्यो विशुद्धविज्ञानं भगवान्व्यतरद्विभुः ॥ येनैवात्मन्यदो विश्वमात्मानं विश्वगं विदुः ॥ ३१ ॥ स्वपत्न्यावभृथस्नातो ज्ञातिबंधुसुहृद्वृतः ॥ रेजे स्वज्योत्स्नयेवेंदुः सुवासाः सुष्ठ्वलंकृतः ॥ ३२ ॥

क्यम् ॥ २८ ॥ दिष्टं प्राचीनं कर्म । समुपागतः संगतः ॥ २९ ॥ क्रत्वंगं यज्ञमूर्तिम् ॥ ३० ॥ आत्मन्यधिष्ठाने विश्वगं सर्वानुस्यूतं येनैव विदुः पश्यंति तद्विशुद्धं विज्ञानं व्यतरददात् ॥ ३१ ॥ ३२ ॥

युद्धांत जय किंवा पराजय होईल असें दिसत नाहीं. यास्तव निष्फळ असें हें तुमचें युद्ध बंद होवो ॥ २७ ॥ हे राजा, जरीहि तें बळरामाचें वाक्य दोघांच्याहि क्लेशांचें निवर्तक होतें तथापि तें त्यानीं ग्रहण केलें नाहीं. कारण, ते एकमेकांचीं दुष्ट भाषणें व दुष्कर्में वारंवार आठवून बद्धवैर झाले होते ॥ २८ ॥ तेव्हां बळराम, तें आपलें वाक्य त्यांनीं ग्रहण केलें नाहीं असें जाणून, त्यांचें दैव असें मानून पुन्हा द्वारकेस गेला; तेव्हां संतुष्ट झालेले उग्रसेनादिक ज्ञाति यादव, सामोरे जाऊन त्याला भेटले ॥ २९ ॥ याप्रमाणें तीर्थस्नानादिकेंकरून सूतवधसंबंधी दोष घालवून पुन्हा नैमिषारण्यामध्यें प्राप्त झालेल्या त्या यज्ञमूर्ति बळरामाकडून, ऋषींनीं आनंदानें सर्वप्रकारचे यज्ञ करवून परमेश्वराचें यजन करविलें ॥ ३० ॥ तेव्हां, त्या समर्थ भगवान् बळरामानें, त्या ऋषींना, संशयविपर्यासादिरहित असें शुद्ध ज्ञान सांगितलें तें असें कीं– ज्याच्या योगानें त्या ऋषींनीं आत्म्याचेठिकाणीं हें जग राहिलें आहे, आणि जगामध्यें आत्मा व्यापून राहिला आहे, असें साक्षात् अनुभवानें जाणिलें ॥ ३१ ॥ नंतर आपल्या रेवती-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नामक पत्नीसहवर्तमान अवभृथस्नान केलेला, उत्तम वस्त्रें परिधान करून उत्तम अलंकार धारण केलेला व ज्ञाति बंधु व सुहृद् यांनीं युक्त असा तो बळराम, जसा आपल्या चंद्रिकेसहवर्तमान चंद्र शोभतो त्याप्रमाणें शोभूं लागला ॥ ३२ ॥ हे राजा, महाबळी, अनंत, अप्रमेय व मायेनें मनुष्यरूपी अशा त्या बळरामाचीं अशाप्रकारचीं दुसरींहि अनंत चरित्रें आहेत ॥ ३३ ॥ असो; आश्चर्यकारक कर्में करणाऱ्या शेषावताररूपी बळरामाच्या कर्मांचें जो पुरुष, सायंकाळीं व प्रातःकाळीं स्मरण करील तो भगवान् विष्णूला अत्यंत प्रिय होईल ॥ ३४ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील उत्तरार्धामध्यें बलदेवकृततीर्थयात्रानिरूपणनामक हा एकुणऐशींवा अध्याय समाप्त झाला ॥ ७९ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या ऐशींव्या अध्यायामध्यें श्रीकृष्णानें द्रव्याची इच्छा धरून आपल्या घरीं आलेल्या सुदाम-

॥ ३३ ॥ ३४ ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधे उत्तरार्धे टीकायामेकोनाशीतितमोऽध्यायः ॥ ७९ ॥ ॥ अथाशीतितमे कृष्णः श्रीदामानं गृहागतम् ॥ संपूज्यापृच्छदर्थेप्सुं गुरुवासकथां मुदा ॥ १ ॥ सुरारिमारको हरिः पुरा चकार शंसताम् ॥ अतःपरं विनैव तन्निजोपकारमावरत् ॥ २ ॥ रामचरितानि श्रुत्वा पुनर्मुकुंदवीर्याणि पृच्छति । हे भगवन् श्रोतुमिच्छामेत्यन्वयः ॥ १ ॥ उत्तमश्लोकस्य श्रीकृष्णस्य । सत्यो मनोहरा विषयवैतृष्ण्यजनिकाः कथाः । विशेषज्ञः सारवित् । विषण्णो विषादं प्राप्तः ॥ २ ॥ कथा-

ईदृग्विधान्यसंख्यानि बलस्य बलशालिनः ॥ अनंतस्याप्रमेयस्य मायामर्त्यस्य संति हि ॥ ३३ ॥ योऽनुस्मरेत रामस्य कर्माण्यद्भुतकर्मणः ॥ सायं प्रातरनंतस्य विष्णोः स दयितो भवेत् ॥ ३४ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे उत्तरार्धे बलदेवतीर्थयात्रानिरूपणं नामैकोनाशीतितमोऽध्यायः ॥ ७९ ॥ ॥ राजोवाच ॥ भगवन्यानि चान्यानि मुकुंदस्य महात्मनः ॥ वीर्याण्यनंतवीर्यस्य श्रोतुमिच्छामहे प्रभो ॥ १ ॥ को नु श्रुत्वा सकृद्ब्रह्मन्नुत्तमश्लोकसत्कथाः ॥ विरमेत विशेषज्ञो विषण्णः काममार्गणैः ॥ २ ॥ सा वाग्यया तस्य गुणान्गृणीते करौ च तत्कर्मकरौ मनश्च ॥ स्मरेद्वसंतं स्थिरजंगमेषु शृणोति तत्पुण्यकथाः स कर्णः ॥३॥ शिरस्तु तस्योभयलिंगमानमेत्तदेव यत्पश्यति तद्धि चक्षुः ॥ अंगानि विष्णोरथ तज्जनानां पादोदकं यानि भजंति नित्यम् ॥४॥

श्रवणं स्तुवन् दृष्टांततयाऽन्यार्थानाह । सा वागिति तावेव करौ यौ तत्कर्मकर्तारौ । तदेव मनो यत्स्थिरजंगमेषु वसंतं स्मरेत् । यस्तस्य पुण्याः कथाः शृणोति स एव कर्णः ॥ ३ ॥ उभयलिंगं स्थिरं जंगमं च तस्यैव लिंगमिति मत्वा आनमेत्तदेव शिरः । तदेव तस्य लिंगमित्येव यत्पश्यति तदेव चक्षुः । तान्येवांगानि यानि पादोदकं भजंतीति ॥ ४ ॥

देवाची पूजा करून त्याला, गुरूच्या घरीं तो व आपण वास करीत असत्येवेळची कथा विचारिली; अशी कथा आहे ॥ १ ॥ बळरामाचीं चरित्रें ऐकून पुन्हा श्रीकृष्णांचींच चरित्रें विचारण्याकरितां राजा ह्मणाला–हे भगवन् प्रभो शुकाचार्य, मोक्ष देणाऱ्या अनंतपराक्रमी महात्म्या श्रीकृष्णाचीं जीं दुसरीं चरित्रें असतील तीं, आह्मी श्रवण करण्याची इच्छा करितों ॥ १ ॥ हे भगवन्, उत्तमकीर्ति श्रीकृष्णाच्या मनोहर कथा एकवारहि ऐकून त्यांपासून सारग्राही व विषयांचा शोध करितां करितां खेद पावलेला कोण बरें पुरुष, विराम पावेल ? कोणीच पावणार नाहीं ॥ २ ॥ ज्या वाणीनें त्या भगवंताच्या ऐश्वर्यादिक गुणांचें, पुरुष उच्चारण करितो तीच वाणी सफळ होय; जे भगवंताचें सेवारूप कर्म करितात तेच हात सफळ होत; जें स्थावरजंगमामध्यें राहणाऱ्या भगवंताचें स्मरण करील तेंच मन सफळ होय; जो त्याच्या पवित्रकथा श्रवण करितो तोच कान सफळ होय ॥ ३ ॥ जें स्थावरजंगमरूप भगवन्मूर्तीला नमस्कार करितें तेंच मस्तक सफळ होय, जें भगवंताचें दर्शन

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

घेतें तेंच चक्षु सफळ होय; जे भगवंताच्या अथवा भगवद्भक्ताच्या चरणोदकांचें नित्य सेवन करितात तेच अवयव सफळ होत ॥ ४ ॥ सूत ह्मणाला—याप्रमाणें परीक्षित् राजानें प्रश्न केलेला भगवान् शुकाचार्य, भगवान् वासुदेवाचेठिकाणीं निमग्नचित्त होऊन ह्मणाला कीं, ॥ ५ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, श्रीकृष्णाचा कोणीएक ब्राह्मण सखा होता, तो मोठा ब्रह्मवेत्ता, विषयांचेठिकाणीं विरक्त, अत्यंत शांतचित्त, व जितेंद्रिय होता ॥ ६ ॥ तो प्रारब्धवशेंकरून प्राप्त झालेल्या अन्नादिकानें जीविका चालवून गृहस्थाश्रमधर्मांचें आचरण करीत असे. त्या मळिण वस्त्र धारण करणाऱ्या ब्राह्मणाची स्त्रीहि मळिण वस्त्र धारण करणारी पतिव्रता असून क्षुधेनें कृश असलेल्या त्या पतीला जें कांहीं अन्नादिक प्राप्त होईल तें वाढून आपण क्षुधेनें जीर्ण झालेली होती ॥ ७ ॥ एकेवेळीं शुष्कमुख झालेली, दारिद्र्यानें पीडित, पतीचे भोग संपादन करण्यास अशक्त असल्यामुळें दुःख पावणारी व भयानें कांपणारी ती पतिव्रता स्त्री, पतीजवळ जाऊन ह्मणाली कीं,—॥८॥ हे ब्रह्मन्, वैराग्यादिगुणसंपन्न अशाहि

॥ ५ ॥ ६ ॥ तथाविधा कुचैला । किंच क्षुत्क्षामा यत्किंचित्संपन्नमन्नं तस्मै परिविष्य स्वयं क्षुधा जीर्णा ॥ ७ ॥ पतिव्रता सती । म्लायता शुष्यता वदनेन । सीदमाना

सूत उवाच ॥ विष्णुरातेन संपृष्टो भगवान्बादरायणिः ॥ वासुदेवे भगवति निमग्नहृदयोऽब्रवीत् ॥ ५ ॥ श्रीशुक उवाच ॥ कृष्णस्यासीत्सखा कश्चिद्ब्राह्मणो ब्रह्मवित्तमः ॥ विरक्त इंद्रियार्थेषु प्रशांतात्मा जितेंद्रियः ॥ ६ ॥ यदृच्छयोपपन्नेन वर्तमानो गृहाश्रमी ॥ तस्य भार्या कुचैलस्य क्षुत्क्षामा च तथाविधा ॥ ७ ॥ पतिव्रता पतिं प्राह म्लायता वदनेन सा ॥ दरिद्रा सीदमाना सा वेपमानाऽभिगम्य च ॥ ८ ॥ ननु ब्रह्मन्भगवतः सखा साक्षाच्छ्रियः पतिः ॥ ब्रह्मण्यश्च शरण्यश्च भगवान्सात्वतर्षभः ॥ ९ ॥ तमुपैहि महाभाग साधूनां च परायणम् ॥ दास्यति द्रविणं भूरि सीदते ते कुटुंबिने ॥ १० ॥ आस्तेऽधुना द्वारवत्यां भोजवृष्ण्यंधकेश्वरः ॥ स्मरतः पादकमलमात्मानमपि यच्छति ॥ किंन्वर्थकामान्भजतो नात्यभीष्टान् जगद्गुरुः ॥ ११ ॥ स एवं भार्यया विप्रो बहुशः प्रार्थितो मृदु ॥ अयं हि परमो लाभ उत्तमश्लोकदर्शनम् ॥ १२ ॥ इति संचिंत्य मनसा गमनाय मतिं दधे ॥ अप्यस्त्युपायनं किंचिद्गृहे कल्याणि दीयताम् ॥ १३ ॥

भर्तुर्भोगसंपादनाशक्त्याऽवसीदंती । वेपमाना भयेन कंपमाना ॥ ८ ॥ ९ ॥ १० ॥ भोजवृष्ण्यंधकेश्वर इति तत्स्वीकारमात्रेण सर्वे ते दास्यंतीति भावः । नात्यभीष्टान्परिपाकविरसत्वात् ॥ ११ ॥ १२ ॥ अप्यस्ति किमस्तीति प्रश्नः ॥ १३ ॥

तुझा, साक्षात् लक्ष्मीपति, ब्राह्मणांचा कैवारी, शरणागतवत्सल व यादवश्रेष्ठ असा भगवान् श्रीकृष्ण, सखा आहे हें मला ठाऊक आहे ॥ ९ ॥ यास्तव हे महाभाग्यवंता, साधूंची परमगति अशा त्या श्रीकृष्णाच्या भेटीला तूं जा ह्मणजे दारिद्र्यानें क्लेश पावणाऱ्या व कुटुंबवत्सळ अशा तुला तो पुष्कळ धन देईल ॥ १० ॥ भोजांचा वृष्णींचा व अंधकांचा अधिपति तो श्रीकृष्ण हल्लीं द्वारकेमध्यें आहे. त्यानें तुझा सत्कार केला ह्मणजे ते भोजादिकसुद्धां तुला द्रव्य देतील. तो भगवान् द्रव्य देईल किंवा नाहीं याबद्दल संशय धरूं नये. कारण, तो चरणकमलाचें स्मरण करणाऱ्या पुरुषाला आपल्या स्वरूपानंदासहि देतो ॥ ११ ॥ मग तो जगद्गुरु, आपली भक्ति करणाऱ्या पुरुषाला फारसे न आवडणारे अर्थकाम देतो हें काय सांगावें! अशी स्त्रीनें त्या ब्राह्मणाची बहुत कोमळतेनें वारंवार प्रार्थना केली असतां त्यानें उत्तमकीर्ति भगवंताचें दर्शन होईल हाच मोठा लाभ आहे ॥ १२ ॥ असा मनांत विचार करून, कृष्णदर्शनास जाण्याचा निश्चय ठरविला आणि स्त्रीला ह्मणाला कीं, हे कल्याणि, घरांत कांहीं कृष्णाला भेट ने- ॥२४६॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ण्यासारखा पदार्थ असला तर दे ॥ १३ ॥ तेव्हां त्या स्त्रीनें ब्राह्मणांच्या घरांतून चार मुठी पोह्यांचे तांदूळ मागून आणून, वस्त्राच्या चिंधीनें त्यांची गांठोळी बांधून ती प्रभूला भेट दिली ॥१४ ॥ तेव्हां, तो ब्राह्मणश्रेष्ठ (सुदामा) ते पोहे घेऊन द्वारकेस निघाला आणि मला श्रीकृष्णाचें दर्शन कसें बरें होईल ? असा विचार करीत करीत, द्वारकेच्या रक्षणाकरितां सैन्याच्या ठेवलेल्या तीन छावण्या व त्यांच्या पुढें लागलेल्या तीन चवक्या उल्लंघन करून, इतर ब्राह्मणांसहवर्तमान तो ब्राह्मण, श्रीकृष्णभक्ति न करणाऱ्या लोकांनीं प्रवेश करण्यास अशक्य अशा अंधकांच्या व वृष्णींच्या घरांमध्यें, असलेल्या श्रीकृष्णाच्या सोळा हजार एकशें आठ घरांतील एका सुशोभित घरामध्यें प्रविष्ट झाला, तेव्हां तो

॥ १४ ॥ मह्यं मम ॥ १५ ॥ गुल्मानि रक्षार्थं सैन्यस्थानानि । कक्षाः प्रतोलीः । अतीयायातिक्रम्य जगाम । सद्विजः द्विजैः सहितः । ततश्च आगम्या दुर्गमा येंऽधका वृष्णयश्च तेषां गृहेषु ॥ १६ ॥ तथा हरेर्द्व्यष्टसहस्राणां महिषीणां च ये गृहास्तेषु मध्ये श्रीमदेकतमं गृहं विवेश । तदा च स द्विजो ब्रह्मानंदं

याचित्वा चतुरो मुष्टीन्विप्रान्पृथुकतंडुलान् ॥ चैलखंडेन तान्बध्वा भर्त्रे प्रादादुपायनम् ॥ १४ ॥ स तानादाय विप्राग्र्यः प्रययौ द्वारकां किल ॥ कृष्णसंदर्शनं मह्यं कथं स्यादिति चिंतयन् ॥ १५ ॥ त्रीणि गुल्मान्यतीयाय तिस्रः कक्षाश्च सद्विजः ॥ विप्रोऽगम्यांधकवृष्णीनां गृहेष्वच्युतधर्मिणाम् ॥ १६ ॥ गृहं द्व्यष्टसहस्राणां महिषीणां हरेर्द्विजः ॥ विवेशैकतमं श्रीमद्ब्रह्मानंदं गतो यथा ॥ १७ ॥ तं विलोक्याच्युतो दूरात्प्रियापर्यंकमास्थितः ॥ सहसोत्थाय चाभ्येत्य दोर्भ्यां पर्यग्रहीन्मुदा ॥ १८ ॥ सख्युः प्रियस्य विप्रर्षेरंगसंगातिनिर्वृतः ॥ प्रीतो व्यमुंचदब्बिंदून्नेत्राभ्यां पुष्करेक्षणः ॥ १९ ॥ अथोपवेश्य पर्यंके स्वयं सख्युः समर्हणम् ॥ उपहृत्यावनिज्यास्य पादौ पादावनेजनीः ॥ २० ॥ अग्रहीच्छिरसा राजन्भगवाँल्लोकपावनः ॥ व्यलिंपद्दिव्यगंधेन चंदनागुरुकुंकुमैः ॥ २१ ॥ धूपैः सुरभिभिर्मित्रं प्रदीपावलिभिर्मुदा ॥ अर्चित्वाऽऽवेद्य तांबूलं गां च स्वागतमब्रवीत् ॥ २२ ॥ कुचैलं मलिनं क्षामं द्विजं धमनिसंततम् ॥ देवी पर्यचरत्साक्षाच्चामरव्यजनेन वै ॥ २३ ॥

गतो यथा तथा बभूवेति शेषः ॥ १७ ॥ पर्यग्रहीत्पर्यरंभत ॥ १८ ॥ अब्बिंदूनानंदाश्रूणि ॥ १९ ॥ समर्हणमुपायनमुपहृत्य समर्प्य । पादावनेजनीरपः ॥ २० ॥ २१ ॥ २२ ॥ धमनिभिः शिराभिः संततं व्याप्तम् ॥ २३ ॥

ब्राह्मण, ब्रह्मानंद पावल्यासारखा आनंदित झाला ॥ १५ ॥ १६ ॥ १७ ॥ त्या ब्राह्मणाला, दुरूनच पाहून प्रियेच्या पर्यंकावर बसलेल्या भगवान् श्रीकृष्णानें, त्वरित उठून व सामोरा जाऊन हर्षानें आलिंगन केलें ॥ १८ ॥ तेव्हां, आपला प्रियमित्र अशा त्या विप्रर्षीच्या अंगस्पर्शानें अतिआनंदयुक्त व तृप्त झालेल्या त्या कमलनयन भगवंतानें, आपल्या नेत्रांतून आनंदाश्रु ढाळिले ॥ १९ ॥ हे राजा, नंतर त्या प्रिय व मित्र अशा ब्राह्मणाला, पलंगावर बसवून आपणच पूजासाहित्य आणून, त्या सख्याचे पाय धुऊन, तीं उदकें श्रीकृष्णानें आपण लोकपावन असतांहि मस्तकीं धारण केलीं आणि दिव्य गंध, चंदन, अगरु व केशर यांनीं त्याच्या अंगाचें लेपन केलें ॥ २० ॥ २१ ॥ नंतर सुगंधयुक्त धूप व दिव्यांच्या रांगा यांनीं त्या मित्राचें पूजन करून, तशींच तांबूल व गाय अर्पण करून स्वागतप्रश्न केला ॥ २२ ॥ त्यावेळीं जीर्णवस्त्र धारण करणारा, मळिण, दुबळी, व शिरांनीं व्याप्त अशा त्या ब्राह्मणाचें, साक्षात् देवी रुक्मिणीनें, चंवरीचा व पंख्याचा वारा घालून शुश्रूषण केलें ॥ २३ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तेव्हां अमलकीर्ति अशा श्रीकृष्णानें, त्या मळीण ब्राह्मणाचा अतिप्रीतीनें सत्कार केला असें पाहून, अंतःपुरांतील लोक असा विस्मय करूं लागले कीं, ॥ २४ ॥ लक्ष्मीहीन, निंदित व अधम अशा ह्या अवधूत भिक्षुकानें, पालोकीं असें काय पुण्य केलें होतें ? कीं– ॥ २५ ॥ ज्याच्या योगानें लक्ष्मीनिवास व त्रैलोक्यगुरु अशा श्रीकृष्णानें, पर्यंकावर असलेल्या लक्ष्मीचासुद्धां त्याग करून झाला वडील भावासारखें आलिंगन दिलें व ह्याचा उत्तम सन्मान केला ॥ २६ ॥ नंतर हे राजा, ते सुदामा व श्रीकृष्ण उभयतां, एकमेकांचे हात धरून पूर्वींच्या गुरुगृहीं राहात्येवेळच्या आपल्या मनोहर कथा सांगूं लागले ॥ २७ ॥ श्रीभगवान् ह्मणाला–हे धर्मज्ञा ब्राह्मणा, गुरूला गुरुदक्षिणा देऊन, गुरुगृहापासून घरीं येऊन समावर्तन करणाऱ्या तूं, आपणास योग्य अशी स्त्री वरिलीस कीं नाहीं ? ॥ २८ ॥ हे विद्वाना, तुझें चित्त, इतर लोकांच्या चित्तासारखें बहु-

अवधूतं मलिनम् ॥ २४ ॥ विस्मयमाह । किमनेनेति द्वाभ्याम् ॥ २५ ॥ संभृतः संमानितः ॥ २६ ॥ सतोर्वसतोः गृह्य गृहीत्वा ॥ २७ ॥ भार्या ऊढा परिणीता न वेति गृहस्थलिंगदर्शनाद्भोगादर्शनाच्च संशयादिव प्रश्नः ॥ २८ ॥ अप्रतिषेधादुद्वाहमनुमतं मत्वाऽऽह । प्राय इति । तर्हि ते चित्तं नूनमकामविहतं कामैर्विहतं न भवतीति मे विदितम् । तथाहि धनेषु वस्त्रादिषु नैवातिप्रीयसे । हे विद्वन्निति । विदुषस्तवैतद्युक्तमिति भावः ॥ २९ ॥ कामहतत्वाभावे किं गृहधर्मक्लेशेनेत्याशंक्याह । केचिदिति । दैवीरी-

अंतःपुरजनो दृष्ट्वा कृष्णेनामलकीर्तिना ॥ विस्मितोऽभूदतिप्रीत्या अवधूतं सभाजितम् ॥ २४ ॥ किमनेन कृतं पुण्यमवधूतेन भिक्षुणा ॥ श्रिया हीनेन लोकेऽस्मिन्गर्हितेनाधमेन च ॥ २५ ॥ योऽसौ त्रिलोकगुरुणा श्रीनिवासेन संभृतः ॥ पर्यंकस्थां श्रियं हित्वा परिष्वक्तोऽग्रजो यथा ॥ २६ ॥ कथयांचक्रतुर्गाथाः पूर्वा गुरुकुले सतोः ॥ आत्मनो ललिता राजन्करौ गृह्य परस्परम् ॥ २७ ॥ श्रीभगवानुवाच ॥ अपि ब्रह्मन्गुरुकुलाद्भवता लब्धदक्षिणात् ॥ समावृत्तेन धर्मज्ञ भार्योढा सदृशी न वा ॥ २८ ॥ प्रायो गृहेषु ते चित्तमकामविहतं तथा ॥ नैवातिप्रीयसे विद्वन्धनेषु विदितं हि मे ॥ २९ ॥ केचित्कुर्वंति कर्माणि कामैरहतचेतसः ॥ त्यजंतः प्रकृतीर्दैवीर्यथाऽहं लोकसंग्रहम् ॥ ३० ॥ कच्चिद्गुरुकुले वासं ब्रह्मन्स्मरसि नौ यतः ॥ द्विजो विज्ञाय विज्ञेयं तमसः पारमश्नुते ॥ ३१ ॥ स वै सत्कर्मणां साक्षाद्द्विजातेरिह संभवः ॥ आद्योंऽग यत्राश्रमिणां यथाऽहं ज्ञानदो गुरुः ॥ ३२ ॥

श्वरमायारचिताः प्रकृतीर्विषयवासनास्त्यजंतः । कामैरनाकृष्टचेतसामपि । कर्मकरणे दृष्टांतः । यथाऽहमिति । लोकसंग्रहं लोकस्य संग्रहो ग्रहणं यथा भवति तथाऽहमीश्वरोऽपि कर्माणि यथा करोमि तद्वत् ॥ ३० ॥ नौ आवयोः । यतो गुरोः विज्ञेयं परमात्मतत्त्वम् । तमसः संसारस्य ॥ ३१ ॥ तत्रात्मज्ञानप्रदस्य गुरोरत्यंतं पूज्यत्वं वक्तुं

तकरून घरामध्यें, तसेंच गाई, भूमि, सुवर्ण इत्यादिक धनांचेठिकाणीं, विषयांनीं आपणाकडे ओढून घेतलेलें दिसत नाहीं, ह्मणून तूं विषयांवर फारसा लंपट नाहींस असें मला पूर्वींच समजलें आहे आणि हेंच विद्वान् अशा तुला योग्य आहे ॥ २९ ॥ ईश्वराच्या मायेनें रचिलेल्या विषयवासनांचा त्याग करणारे कितीएक लोक, विषयांमध्यें आसक्त नसूनहि जसा मी लोकसंग्रहाकरितां कर्में करितों तसे लोकमर्यादांसाठीं कर्में करीत आहेत ॥ ३० ॥ हे ब्राह्मणा, तुझा व माझा गुरुगृहाचेठिकाणीं एका जागीं वास घडला होता त्याचें तूं स्मरण करितोस काय ! ज्या गुरूपासून परमात्मतत्त्व जाणणारा ब्राह्मण, संसाराचा अंत पावतो ॥ ३१ ॥ त्यांत आत्मज्ञान देणाऱ्या गुरूचें अत्यंत पूज्यत्व सांगण्याकरितां, पुरुषाला तीन गुरु आहेत असें सांगतो–हे ब्राह्मणा, या संसारामध्यें पुरुषाची ज्यापासून उत्पत्ति झाली तो ‘ पिता ’ पहिला गुरु होय, नंतर ब्राह्मण झालेल्या पुरुषाला सत्कर्मांचा जेथून लाभ होतो ह्मणजे जो उपनयन करून वेदाध्ययन सांगतो तो दुसरा गुरु होय. तो त्याला मज ईश्वरासारखा पहिल्या गुरूपेक्षांहि

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पूज्य आहे आणि सर्वांहि आश्रम्यांना जो ज्ञान देणारा तो तिसरा गुरु होय. तो साक्षात् मीच आहें ॥ ३२ ॥ हे ब्राह्मणा, या मनुष्यजन्मांत वर्णाश्रमवंतांमध्यें जे पुरुष साक्षात् मत्स्वरूपी अशा ज्ञान देणाऱ्या गुरूच्या उपदेशानें अनायासानें संसाररूप समुद्र तरून जातात तेच आपला कार्यभाग साधण्याविषयीं मोठे बुद्धिमंत होत ॥ ३३ ॥ सर्वभूतांचा आत्मा असलेलाहि मी, जसा गुरूच्या सेवेनें संतुष्ट होतों तसा ब्रह्मचर्य, यज्ञादिक गृहस्थधर्म, तपवगैरे वानप्रस्थधर्म व उपशमवगैरे संन्यासधर्म यांच्या योगानें संतुष्ट होत नाहीं, ह्मणून गुरुशुश्रूषेपेक्षां मोठा दुसरा धर्मच नाहीं ॥ ३४ ॥ हे ब्राह्मणा, आपण गुरूच्या घरीं राहिलों होतों तेव्हां, एकेवेळीं गुरूच्या स्त्रीनें काष्ठें आणण्याकरितां

पुरुषस्य त्रीन् गुरूनाह । स वा इति । इह संसारे यत्र संभवो जन्ममात्रं स पिता तावदाद्यः प्रथमो गुरुः पूज्यः । कर्मविद्याप्रदं गुरुमाह । द्विजातेः सतः पुंसः सत्कर्मणां यत्र संभवः उपनीय वेदाध्यापक इत्यर्थः । स द्वितीयो गुरुर्यथाऽहमीश्वरस्तथा प्रथमादपि पूज्य इत्यर्थः । ब्रह्मविद्याप्रदं गुरुमाह । आश्रमिणां सर्वेषामपि ज्ञानदो यः स तु साक्षादहमेवेति ॥ ३२ ॥ अतो ज्ञानप्रदं गुरुरूपं मामाश्रित्य ये संसारं तरंति ते बुद्धिमंत इत्याह । नन्विति । हे ब्रह्मंस्ते ननु वर्णाश्रमवतां मध्येऽर्थकोविदाः । इह मनुष्यजन्मनि तत्रापि वर्णाश्रमवत्त्वे सति ये मया गुरुणा गुरुरूपेण वक्त्रा वाचा उपदेशमात्रेणांजः सुखेनैव भवार्णवं तरंतीति ज्ञानप्रदाद्गुरोरधिकः सेव्यो नास्तीत्युक्तम् ॥ ३३ ॥

नन्वर्थकोविदा ब्रह्मन्वर्णाश्रमवतामिह ॥ ये मया गुरुणा वाचा तरत्यंजो भवार्णवम् ॥ ३३ ॥ नाहमिज्याप्रजातिभ्यां तपसोपशमेन वा ॥ तुष्येयं सर्वभूतात्मा गुरुशुश्रूषया यथा ॥ ३४ ॥ अपि नः स्मर्यते ब्रह्मन्वृत्तं निवसतां गुरौ ॥ गुरुदारैश्चोदितानामिंधनानयने क्वचित् ॥ ३५ ॥ प्रविष्टानां महारण्यमपर्तौ समुहद्द्विज ॥ वातवर्षमभूत्तीव्रं निष्ठुराःस्तनयित्नवः ॥ ३६ ॥ सूर्यश्चास्तंगतस्तावत्तमसा चावृता दिशः ॥ निम्नं कूलं जलमयं न प्राज्ञायत किंचन ॥ ३७ ॥ वयं भृशं तत्र महानिलांबुभिर्निहन्यमाना मुहुरंबुसंप्लवे ॥ दिशोऽविदंतोऽथ परस्परं वने गृहीतहस्ताः परिबभ्रिमातुराः ॥ ३८ ॥

अतएव तद्भजनादधिको धर्मश्च नास्तीत्याह । नाहमिति । इज्या गृहस्थधर्मः प्रजातिः प्रकृष्टं जन्म उपनयनं तेन ब्रह्मचारिधर्म उपलक्ष्यते । ताभ्यां तथा तपसा वनस्थधर्मेण उपशमेन यतिधर्मेण वा अहं परमेश्वरस्तथा न तुष्येयं यथा सर्वभूतात्माऽपि गुरुशुश्रूषयेति ॥ ३४ ॥ किंच अस्माकं गुरुशुश्रूषणं किमपि दैवादेव संपन्नं तत्किं त्वया स्मर्यत इति पृच्छति । अपि न इति । गुरौ निवसतामस्माकं यत्किमपि वृत्तं तत् । क्वचित्कदाचित् ॥ ३५ ॥ अपर्तौ अपगते ऋतौ अकाल इत्यर्थः । वातश्च वर्षं च तयोः समाहारः । स्तनयित्नवो गर्जितानि चाभवन् ॥ ३६ ॥ निम्नं कूलं नतमुन्नतं च स्थानम् ॥ ३७ ॥ अंबूनां संप्लवो व्यामिश्रणं यस्मिन्नेकोदके तस्मिन्वन इत्यर्थः । परिबभ्रिम भ्रस्ज् भरण इति धातो रूपम् । परि परितो बभ्रिम इडागमश्छांदसः । भारान् धृतवंत इत्यर्थः ॥ ३८ ॥

वनांत पाठविलेल्या आम्हांस दैवगतीनें जो प्रसंग आला होता त्याचें तुला स्मरण आहे काय ? ॥ ३५ ॥ हे द्विजा, त्यावेळीं मोठ्या अरण्यांत आह्मी शिरलों असतां, पाऊस पडण्याचा काळ नव्हता तरी एकदम मोठें वादळ होऊन भारी पाऊस पडला, भयंकर गर्जना होऊन विजा पडूं लागल्या ॥ ३६ ॥ इतक्यांत सूर्य अस्तास पावून दिशा अंधकारानें आच्छादित झाल्या. त्यावेळीं सर्व स्थळ, जलमय होऊन, सखल किंवा उंच हें कांहींच समजत नाहींसें झालें ॥ ३७ ॥ त्या जलमय झालेल्या वनामध्यें अतिशय वाऱ्यानें व पावसानें अत्यंत पीडित झालेले व दिशासुद्धां न जाणणारे आह्मी, व्याकुळचित्त होऊन एकामेकांचे हात धरून व मस्तकांवर लांकडांचे भारे घेऊन, जिकडे

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तिकडे फिरत होतों ॥ ३८ ॥ सूर्योदय झाल्यावर सांदीपनि गुरु आह्मी काष्ठें आणावयास गेलों हें जाणून, आम्हां शिष्यांचा शोध करीत करीत आम्हांजवळ आला आणि त्यानें थंडीनें कांकडलेल्या आम्हांस पाहून भाषण केलें कीं,–॥ ३९ ॥ अहो हे पुत्रकहो, तुह्मी आमच्याकरितां फार दुःख पावलां. प्राण्यांना देह हा सर्वांपेक्षां प्रिय आहे परंतु तुह्मी त्याचाहि अनादर करून माझी सेवा केलीत ॥ ४० ॥ उत्तम शिष्यांनीं गुरूचा प्रत्युपकार हाच करावा कीं, ज्यापासून सर्व पुरुषार्थ प्राप्त होतात त्या देहाचेंसुद्धां शुद्ध भक्तीनें गुरूला अर्पण करावें ॥ ४१ ॥ हे द्विजश्रेष्ठहो, मी तुमच्यावर प्रसन्न झालों आहें, तुमचे मनोरथ सफळ होवोत, तुह्मी अध्ययन केलेले वेद यालोकीं व परलाकीं तुम्हांस

॥ ३९ ॥ उवाच कृपया श्लोकत्रयीम् । यया वयं कृतार्था इत्याह । अहो इति । आत्मा देहः ॥ ४० ॥ गुरोर्निष्कृतं प्रत्युपकारः । सर्वे अर्था यस्मात्स आत्मा देहस्तस्यार्पणं विनियोगः ॥ ४१ ॥ अयातयामानि यातो यामो यस्य पक्कस्यान्नस्य तद्गतसारं भवति तद्वदन्यदपि गतसारं गौण्या वृत्त्या यातयाममित्युच्यते । अगत साराणि छंदांसि मत्तोऽधीयमानानि भवंत्वित्यर्थः ॥ ४२ ॥ इत्थंविधान्येवंप्रकाराण्यनेकानि वृत्तानि किं त्वया स्मर्यंत इति शेषः । फलितमुपसंहरति । गुरोरिति ॥ ४३ ॥ अस्माभिः किमनिर्वृत्तमसंपन्नं

एतद्विदित्वा उदिते रवौ सांदीपनिर्गुरुः ॥ अन्वेषमाणो नः शिष्यानाचार्योऽपश्यदातुरान् ॥ ३९ ॥ अहो हे पुत्रका यूयमस्मदर्थेऽतिदुःखिताः ॥ आत्मा वै प्राणिनां प्रेष्ठस्तमनादृत्य मत्पराः ॥ ४० ॥ एतदेव हि सच्छिष्यैः कर्तव्यं गुरुनिष्कृतम् ॥ यद्वै विशुद्धभावेन सर्वार्थात्मार्पणं गुरौ ॥ ४१ ॥ तुष्टोऽहं भो द्विजश्रेष्ठाः सत्याः संतु मनोरथाः ॥ छंदांस्ययातयामानि भवंत्विह परत्र च ॥ ४२ ॥ इत्थंविधान्यनेकानि वसतां गुरुवेश्मसु ॥ गुरोरनुग्रहेणैव पुमान्पूर्णः प्रशांतये ॥ ४३ ॥ ब्राह्मण उवाच ॥ किमस्माभिरनिर्वृत्तं देवदेव जगद्गुरो ॥ भवता सत्यकामेन येषां वासो गुरावभूत ॥ ४४ ॥ यस्य छंदोमयं ब्रह्म देह आवपनं विभो ॥ श्रेयसां तस्य गुरुषु वासोऽत्यंतविडंबनम् ॥ ४५ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे उत्तरार्धे श्रीदामचरितेऽशीतितमोऽध्यायः ॥ ८० ॥ ॥

येषामस्माकं भवता सह वासोऽभूत् ॥ ४४ ॥ भवतस्तु सर्वमेतद्विडंबनमात्रमित्याह । यस्येति । छंदोमयं वेदाख्यं ब्रह्म तथा श्रेयसामावपनं तदुद्भवस्थानं देहो मूर्तिर्यस्य तस्य तव ॥ ४५ ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधे उत्तरार्धे टीकायामशीतितमोऽध्यायः ॥ ८० ॥ ॥

अपेक्षित फळ देण्यास समर्थ असोत ॥ ४२ ॥ हे ब्राह्मणा, आह्मी गुरूच्या घरीं होतों तेव्हां अशाप्रकारचे पुष्कळ वृत्तांत झाले त्यांचें तुला स्मरण आहे काय ? गुरूच्या अनुग्रहेंकरूनच मनुष्य पूर्णमनोरथ होऊन उत्तमप्रकारची शांतता पावण्यास योग्य होतो ॥ ४३ ॥ ब्राह्मण ह्मणाला कीं,– हे देवदेवा, हे जगद्गुरो, सत्यसंकल्प अशा तुजबरोबर ज्या आम्हांला गुरुगृहाचेठिकाणीं वास घडला, त्या आह्मीं कोणतें बरें फळ मिळविलें नाहीं ? सर्वेहि मिळविलीं आहेत ॥ ४४ ॥ हे प्रभो, कल्याणांचे उत्पत्तिक्षेत्र जें वेदमयब्रह्म, तें ज्या तुझा देह आहे, त्या तुझा जो गुरुगृहाचेठिकाणीं वास तें इतर लोकांना शिक्षण देण्याकरितां अत्यंत अनुकरणमात्र आहे ॥ ४५ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील उत्तरार्धांत श्रीकृष्णसुदामसंवादनिरूपणनामक हा ऐशींवा अध्याय समाप्त झाला ॥ ८० ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां ह्या एक्याऐशींव्या अध्यायामध्यें श्रीकृष्णानें सख्या सुदाम्याचे पोहे भक्षण करून, त्याच्या आश्रमीं इंद्रालाहि दुर्लभ अशी संपत्ति निर्माण केली, अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, याप्रमाणें तो हरि, त्या ब्राह्मणश्रेष्ठ सुदाम्याबरोबर सुखकारक गोष्टी बोलत असून, सर्व प्राण्यांच्या मनांचा साक्षी असल्यामुळें 'भार्येच्या सांगण्यानें हा धन मागण्याकरितां आला आहे,' यानें माझ्याकरितां पोहे आणून ते हा लाजेनें मला देत नाहीं असें जाणून ब्राह्मणांचा कैवारी व साधूंची गति असा तो भगवान् श्रीकृष्ण, त्या प्रिय ब्राह्मणाकडे सप्रेमदृष्टीनें पहात पहात व मोठ्या आनंदानें वारंवार हास्य करीत करीत, त्या ब्राह्मणास असें ह्मणाला कीं,– ॥ १ ॥ २ ॥ श्रीभगवान् ह्मणाला– हे ब्राह्मणा, तूं माझ्याकरितां आपल्या घराहून काय भेट आणली आहेस ? भक्तांनीं प्रेमानें अर्पण केलेलें अगदीं थोडेंहि वस्तु असेल तरी तें मला पुष्कळ होतें आणि अभक्तांनीं दिलेलें पुष्कळ असलें तरी तें माझ्या संतोषाकारणें होत नाहीं ॥ ३ ॥ जो पुरुष, मला– पत्र असो, पुष्प असो, फळ असो, किंवा पाणी असो, भक्तीनें

एकाशीतितमे सख्युर्जग्ध्वा पृथुकतंडुलान् ॥ श्रियं निर्मितवानिंद्रदुर्लभां तु तदाश्रमे ॥ १ ॥ संकथयन्सुखगोष्ठीः कुर्वन् । सर्वभूतानां मनसोऽभिज्ञः मदर्थं पृथुकानानीय दातुं

॥ श्रीशुक उवाच ॥ स इत्थं द्विजमुख्येन सह संकथयन्हरिः ॥ सर्वभूतमनोऽभिज्ञः स्मयमान उवाच तम् ॥ १ ॥ ब्रह्मण्यो ब्राह्मणं कृष्णो भगवान्प्रहसन्प्रियम् ॥ प्रेम्णा निरीक्षणेनैव प्रेक्षन् खलु सतां गतिः ॥ २ ॥ श्रीभगवानुवाच ॥ किमुपायनमानीतं ब्रह्मन्मे भवता गृहात् ॥ अण्वप्युपाहृतं भक्तैः प्रेम्णा भूर्येव मे भवेत् ॥ भूर्यप्यभक्तोपहृतं न मे तोषाय कल्पते ॥ ३ ॥ पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ॥ तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ॥ ४ ॥ इत्युक्तोऽपि द्विजस्तस्मै व्रीडितः पतये श्रियः ॥ पृथुकप्रसृतिं राजन्न प्रायच्छदवाङ्मुखः ॥ ५ ॥ सर्वभूतात्मदृक्साक्षात्तस्यागमनकारणम् ॥ विज्ञायाचिंतयन्नायं श्रीकामो माऽभजत्पुरा ॥ ६ ॥ पत्न्याः प्रतिव्रतायास्तु सखा प्रियचिकीर्षया ॥ प्राप्तो मामस्य दास्यामि संपदोऽमर्त्यदुर्लभाः ॥ ७ ॥ इत्थं विचिंत्य वसनाच्चीरबद्धान्द्विजन्मनः ॥ स्वयं जहार किमिदमिति पृथुकतंडुलान् ॥ ८ ॥

लज्जित इति जानन्नित्यर्थः ॥ १ ॥ प्रहसन् क्ष्वेलीं कुर्वन् ॥ २ ॥ लज्जया त्वकथयतस्तामपनुदन्नाह । अण्वपीति द्वाभ्याम् ॥ ३ ॥ ४ ॥ ५ ॥ सर्वभूतानामात्मदृगंतःकरणसाक्षी ॥ ६ ॥ अमर्त्यानां देवानामपि दुर्लभाः ॥ ७ ॥ अतिजीर्णत्वाद्वसनस्य पुनस्तन्मध्ये चीरेण बद्धान् ॥ ८ ॥

अर्पण करितो तें त्या शांतचित्त पुरुषाचें भक्तीनें अर्पण केलेलें पत्रादिक मी भक्षण करितों ॥ ४ ॥ हे राजा, याप्रमाणें भगवंतानें सांगितलें असतांहि, त्या सुदाम्या ब्राह्मणानें लज्जित होऊन व खालीं मुख घालून, सारे पसाभर आणलेले पोहे लक्ष्मीपति भगवंतास दिले नाहींत ॥ ५ ॥ तेव्हां सर्वभूतांच्या मनांतलें जाणणाऱ्या त्या साक्षात् भगवंतानें त्याच्या येण्याचें कारण जाणून, आपण जें करावयाचें त्याचें चिंतन केलें कीं, यानें पूर्वीं संपत्तींची कामना धरून माझें सेवन केलें नाहीं, ह्मणून पोहे आणले असतांहि हा देत नाहीं व माझ्याजवळ कांहींच मागत नाहीं ॥ ६ ॥ असो हा माझा सखा आपल्या पतिव्रता स्त्रीचें प्रिय करण्याकरितांच माझ्याजवळ आला आहे, यास्तव मी याला देवांनाहि दुर्लभ अशा भोग्यसंपत्ति देतों ॥ ७ ॥ असा विचार करून, श्रीकृष्णानें त्या ब्राह्मणाच्या वस्त्रामध्यें बांधलेले पोह्यांचे तांदूळ होते ते 'हें काय

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आहे ? ' असें ह्मणून आपणच काढून घेतले ॥ ८ ॥ आणि मोठ्या आदरानें ह्मणाला कीं,—हे सख्या, मी खरोखर सांगतों कीं, ही आणलेली पोहयांची भेट, माझी अत्यंत तृप्ति करणारी आहे. हे मित्रा, हे पोहयांचे तांदूळ, मला व माझ्या आश्रयानें असलेल्या सर्व जगालाहि तृप्त करितील ॥ ९ ॥ असें बोलून श्रीकृष्णानें त्यांतील एक मूठ भक्षण करून दुसरी भक्षण करण्यास ग्रहण केली; तों ती भक्षण करण्याच्या पूर्वींच भगवत्पर अशा लक्ष्मीचा अंशभूत रुक्मिणीनें, त्या परमात्म्या श्रीकृष्णाचा हात धरिला आणि ती ह्मणाली कीं,—॥ १० ॥ हे परमात्म्या, एक मूठ भक्षण केलीस हेंच, या ब्राह्मणाला यालोकीं अथवा परलोकीं असलेल्या माझ्या कटाक्षविलासभूत सर्व संपत्तींच्या समृद्धि प्राप्त होण्याचें तुझ्या संतोषाचें कारण पुरे झालें. आतां दुसरी मूठ भक्षण करून मलाही ह्याच्या स्वाधीन करूं नकोस ॥ ११ ॥ इकडे ब्राह्मणानें तर, ती रात्र श्रीकृष्णाच्या घरीं राहून

अंग हे सखे । मां विश्वं विश्वात्मानं माम् ॥ ९ ॥ इति वदन्नेकां मुष्टिं जग्ध्वा । तत्परेति । अयं भावः । एतावता पुंस इहामुत्र च मत्कटाक्षविलासभूतानां सर्वसंपदां समृद्धयेऽलम् । अतःपरं द्वितीयमुष्टयदनेन मा मामेतदधीनां कुर्विति ॥ १० ॥ त्वत्तोषकारणं तव तोषस्य कारणं यथा भवेत्तथा सर्वसंपत्समृद्धये । यां भक्तस्य समृद्धिं दृष्ट्वा त्वं तुष्येरित्यर्थः ॥ ११ ॥ स्वर्गतं स्वर्गवासिनम् ॥ १२ ॥ श्वोभूते उदिते रवौ । विश्वं भावयतीति विश्वभावस्तेनेति पुरतो भाविनामिंद्रदुर्लभं विभवं सूचयति । स्वसुखेन स्वानंद-

नन्वेतदुपनीतं मे परमप्रीणनं सखे ॥ तर्पयंत्यंग मां विश्वमेते पृथुकतंडुलाः ॥ ९ ॥ इति मुष्टिं सकृज्जग्ध्वा द्वितीयां जग्धुमाददे ॥ तावच्छ्रीर्जगृहे हस्तं तत्परा परमेष्ठिनः ॥ १० ॥ एतावताऽलं विश्वात्मन्सर्वसंपत्समृद्धये ॥ अस्मिँल्लोकेऽथवाऽमुष्मिन्पुंसस्त्वत्तोषकारणम् ॥ ११ ॥ ब्राह्मणस्तां तु रजनीमुषित्वाऽच्युतमंदिरे ॥ भुक्त्वा पीत्वा सुखं मेन आत्मनं स्वर्गतं यथा ॥ १२ ॥ श्वोभूते विश्वभावेन स्वसुखेनाभिवंदितः ॥ जगाम स्वालयं तात पथ्यनुव्रज्य नंदितः ॥ १३ ॥ स चालब्ध्वा धनं कृष्णान्न तु याचितवान्स्वयम् ॥ स्वगृहान्व्रीडितोऽगच्छन्महद्दर्शननिर्वृतः ॥ १४ ॥ अहो ब्रह्मण्यदेवस्य दृष्टा ब्रह्मण्यता मया ॥ यद्दरिद्रतमो लक्ष्मीमाश्लिष्टो बिभ्रतोरसि ॥ १५ ॥ क्वाहं दरिद्रः पापीयान्क्व कृष्णः श्रीनिकेतनः ॥ ब्रह्मबंधुरिति स्माहं बाहुभ्यां परिरंभितः ॥ १६ ॥

पूर्णेनेति दानेऽदीनतां दर्शयति । नंदितो विनयोक्तिभिः ॥ १३ ॥ व्रीडितः स्ववित्तकार्पण्येन लज्जितः । महतः श्रीकृष्णस्य दर्शनेन निर्वृतः सुखं प्राप्तः ॥ १४ ॥ निर्वृतिमेवाह । अहो इति चतुर्भिः । यद्यतः लक्ष्मीमुरसि बिभ्रता आश्लिष्टोऽहम् ॥ १५ ॥ पापीयान्नीचः ॥ १६ ॥

स्वादिष्ट अन्नाचें भोजन करून व स्वादिष्ट पेयाचें प्राशन करून, मोठ्या सुखानें आपण स्वर्गलोकावरच आहें कीं काय असें मानिलें ॥ १२ ॥ हे राजा, दुसरे दिवशीं सूर्योदय झाल्यावर ~~जगद्रक्षक व स्वानंदमूर्ति अशा~~ श्रीकृष्णानें, वंदन केलेला व मार्गामध्यें दूरपर्यंत पोंचवावयास जाऊन ' आतां जावें व पुन्हा कृपा करून लवकर यावें अशा ' विनयोक्तीनें अभिनंदन केलेला तो सुदामा ब्राह्मण, आपल्या घरीं जावयास निघाला ॥ १३ ॥ तेव्हां कृष्णापासून धन मिळालें नसतांहि आपल्या मनाच्या कृपणपणामुळें लज्जित होऊन, त्या ब्राह्मणानें स्वतां श्रीकृष्णाजवळ कांहींच मागितलें नाहीं, तर भगवंताच्या दर्शनानेंच आनंदयुक्त होऊन आपल्या घरीं गेला ॥ १४ ॥ जात्येवेळीं आनंदानें मनांत विचार करूं लागला कीं,—अहो, ब्राह्मणांचा कैवारी अशा भगवंताची ब्राह्मणभक्ति आज मी पाहिली. पहा, वक्षस्थळावर लक्ष्मीला धारण करणाऱ्याहि त्या श्रीकृष्णानें, मज महादरिद्र्याला दृढ आलिंगन दिलें ॥ १५ ॥ मी पापी दरिद्री कोणीकडे ! आणि लक्ष्मीचा आश्रय असा श्रीकृष्ण कोणीकडे ! ~~तथापि, हा जातीचा~~

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ब्राह्मण आहे असें जाणून त्यानें मला बाहूंनीं किंहो आलिंगन केलें ! ॥ १६ ॥ आणि प्रियेनें सेवन केलेल्या पलंगावर, जसें भावांना बसवावें तसें मला बसविलें. मार्गांत मला श्रम झाले होते म्हणून त्या कृष्णाच्या पट्टराणीनें हातांत केसांची चंवरी घेऊन मला वारा घातला ॥ १७ ॥ तेव्हां उत्तमप्रकारची चरणशुश्रूषा, व चंदनादिकांच्या उट्या इत्यादिकेंकरून, ब्राह्मणासच देव असें मानणाऱ्या परंतु देवांचाहि देव अशा त्या श्रीकृष्णानें, माझी पूजा केली ॥ १८ ॥ आतां श्रीकृष्णानें आपणास धन न देण्याचें कारण मनांत आणितो—जरीहि सर्वपुरुषांना त्या भगवंताची चरणपूजाच पाताळांत व भूमीवर असलेल्या सर्व संपत्तींचें, अणिमादिक सर्व सिद्धींचें, स्वर्गप्राप्तीचें व मोक्षाचें-हि कारण आहे ॥ १९ ॥ तथापि महादयाळु अशा त्या श्रीकृष्णानें, हा दरिद्री सुदामा ब्राह्मण, धन पावला असतां गर्विष्ठ होऊन माझें स्मरण करणार नाहीं असें मनांत आणून, मला पुष्कळ किंवा थोडेंसुद्धां द्रव्य मुळींच दिलें नाहीं ॥ २० ॥ याप्रमाणें चिंतन करीत होत्साता तो ब्राह्मण, आपल्या घराच्या समीपभागीं गेला आणि पाहतो

॥ १७ ॥ पूजितश्चंदनलेपनादिभिः ॥ १८ ॥ एवं संपूज्यापि धनस्यादाने कारणं कल्पयति । स्वर्गापवर्गयोरिति द्वाभ्याम् ॥ १९ ॥ स्वर्गादीनां यद्यपि तस्य चरणार्चनमेव कारणं तथाऽपि कारुणिकत्वादभूर्यपि स्वल्पमपि धनं मह्यं नाददात् ॥ २० ॥ इत्येवं चिंतयन्निजगृहस्यांतिकं तत्प्रांतम् । तस्य विशेषणं सूर्येति ॥ २१ ॥ विचित्रोपवना दि-

निवासितः प्रियाजुष्टे पर्यंके भ्रातरो यथा ॥ महिष्या वीजितः श्रांतो वालव्यजनहस्तया ॥ १७ ॥ शुश्रूषया परमया पादसंवा-हनादिभिः ॥ पूजितो देवदेवेन विप्रदेवेन देववत् ॥ १८ ॥ स्वर्गापवर्गयोः पुंसां रसायां भुवि संपदाम् ॥ सर्वासामपि सिद्धीनां मूलं तच्चरणार्चनम् ॥ १९ ॥ अधनोऽयं धनं प्राप्य माद्यन्नुच्चैर्न मां स्मरेत् ॥ इति कारुणिको नूनं धनं मेऽभूरि नाददात् ॥ २० ॥ इति तच्चिंतयन्नंतः प्राप्तो निजगृहांतिकम् ॥ सूर्यानलेंदुसंकाशैर्विमानैः सर्वतो वृतम् ॥ २१ ॥ विचित्रोपवनोद्यानैः कूजद्द्विजकुला-कुलैः ॥ प्रोत्फुल्लकुमुदांभोजकह्लारोत्पलवारिभिः ॥ २२ ॥ जुष्टं स्वलंकृतैः पुंभिः स्त्रीभिश्च हरिणाक्षिभिः ॥ किमिदं कस्य वा स्थानं कथं तदिदमित्यभूत् ॥ २३ ॥ एवं मीमांसमानं तं नरा नार्योऽमरप्रभाः ॥ प्रत्यगृह्णन्महाभागं गीतवाद्येन भूयसा ॥ २४ ॥

भिर्वृतम् । कथंभूतैः । कूजद्भिर्द्विजकुलैः पक्षिसमूहैराकुलैर्व्याप्तैः । तथा प्रोत्फुल्लानि कुमुदादीनि येषु तानि वारीणि येषु तानि तथा तैः ॥ २२ ॥ किंच जुष्टमिति । हरिणीना-मिवाक्षीणि यासां ताभिः । तदैश्वर्यं दृष्ट्वा वितर्कितवांस्तदाह । किमिदमिति । प्रथमं तेजःपुंजं दृष्ट्वा किमिदमिति पश्चाद्विमानानि दृष्ट्वा कस्य चेति स्थानं स्वीयमिति ज्ञात्वा कथं तदिदं स्थानमित्येवंरूपमभूदिति ॥ २३ ॥ अमरप्रभास्तत्तुल्यकांतयः प्रत्यगृह्णन्नुपायनादिभिरादृतवंतः ॥ २४ ॥

तों तें स्थान त्याला—सूर्य, अग्नि व चंद्र यांच्यासारखा प्रकाश पावणाऱ्या विमानांनीं चोंहोंकडून वेष्टित झालेलें, ॥ २१ ॥ शब्द करणाऱ्या पक्ष्यांच्या समुदायांनीं व्याप्त अशा चित्रविचित्र बागबगीचांनीं व जेथें सूर्यविकासी चंद्रविकासीवगैरे तांबडीं, पांढरीं व काळीं कमळें प्रफुल्लित झालीं आहेत अशा तलावांतील उदकांनीं युक्त, ॥ २२ ॥ व अलंकार धारण केलेल्या पुरुषांनीं व हरिणीसारखीं नेत्रें असलेल्या स्त्रियांनीं युक्त असें दृष्टीस पडलें. तें ऐश्वर्य पाहून तो सुदामा ब्राह्मण प्रथम, अरे ! हें तेजःपुंज काय दिसत आहे ? नंतर विमानें पाहून, अरे ! हें कोणाचें स्थान आहे ? पुढें तें स्थान आपलेंच आहे असें जाणून, अरे ! तें असें कसें झालें? इत्यादिक तर्क करूं लागला ॥ २३ ॥ या प्रमाणें विचार करणाऱ्या त्या महाभाग्यशाली सुदाम्याला, देवांसारखी कांति असलेले पुरुष व स्त्रिया, हातांत नजराणे घेऊन उच्चस्वरानें चाललेल्या गीतवाद्यांच्या गजरांसह

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सामोऱ्या गेल्या ॥ २४ ॥ पति आला हें वर्तमान ऐकून हर्षित व त्याच्या दर्शनाविषयीं आदरयुक्त झालेली त्याची स्त्री, जशी आपल्या स्थानांतून (कमलवनांतून) लक्ष्मी बाहेर पडत्ये त्याप्रमाणें आपल्या घरांतून त्वरेनें बाहेर निघाली; तेथें भगवंतानें स्वर्गच आणिला होता ह्मणून त्या उभयतांचें स्वरूपहि देवांसारखें दिव्य झालें होतें ॥ २५ ॥ ती पतिव्रता स्त्री, पतीला पाहून, जिच्या नेत्रांत प्रेमानें व उत्कंठेनें आनंदाश्रु आले आहेत अशी होऊन, तिनें आपले नेत्र झांकून प्रेमभावानें त्या पतीला नमस्कार करून मनानें आलिंगन केलें ॥ २६ ॥ त्यावेळीं, तो ब्राह्मण, विमानामध्यें बसलेल्या देवांगनेप्रमाणें प्रकाश पावणाऱ्या व पदकादिक भूषणें कंठामध्यें धारण करणाऱ्या दासींच्या मध्यें झळकणाऱ्या त्या आपल्या पत्नीला पाहून विस्मित झाला ॥ २७ ॥ आणि संतुष्ट झालेला तो ब्राह्मण, त्या पत्नीसहवर्तमान स्वतां आपल्या घरामध्यें प्रविष्ट झाला. तें

उद्भूतो हर्षो यस्याः सा अतिसंभ्रम आदरो यस्याः सा । आलयात्कमलवनाद्रूपधारिणी श्रीरिव । स्वर्गस्य तत्र भगवता आनीतत्वात्स्वर्गिंगामिव तयो रूपं च बभूवेति भावः ॥ २५ ॥ बुद्ध्या अयमेव वंद्य इति निश्चयेन । मनसा संकल्पेन ॥ २६ ॥ २७ ॥ २८ ॥ यत्र मंदिरे पयःफेननिभाः शय्या आस्तरणानीत्यादिसंपदस्तत्र सर्वसंपदां समृद्धी-

पतिमागतमाकर्ण्य पत्न्युद्धर्षाऽतिसंभ्रमा ॥ निश्चक्राम गृहात्तूर्णं रूपिणी श्रीरिवालयात् ॥ २५ ॥ पतिव्रता पतिं दृष्ट्वा प्रेमोत्कंठाऽश्रुलोचना ॥ मीलिताक्ष्यनमद्बुद्ध्या मनसा परिषस्वजे ॥ २६ ॥ पत्नीं वीक्ष्य विस्फुरंतीं देवीं वैमानिकीमिव ॥ दासीनां निष्ककंठीनां मध्ये भांतीं स विस्मितः ॥ २७ ॥ प्रीतः स्वयं तया युक्तः प्रविष्टो निजमंदिरम् ॥ मणिस्तंभशतोपेतं महेंद्रभवनं यथा ॥ २८ ॥ पयःफेननिभाः शय्या दांता रुक्मपरिच्छदाः ॥ पर्यंका हेमदंडानि चामरव्यजनानि च ॥ २९ ॥ आसनानि च हैमानि मृदूपस्तरणानि च ॥ मुक्तादामविलंबीनि वितानानि द्युमंति च ॥ ३० ॥ स्वच्छस्फटिककुड्येषु महामारकतेषु च ॥ रत्नदीपान्भ्राजमानाँल्ललनारत्नसंयुतान् ॥ ३१ ॥ विलोक्य ब्राह्मणस्तत्र समृद्धीः सर्वसंपदाम् ॥ तर्कयामास निर्व्यग्रः स्वसमृद्धिमहेतुकीम् ॥ ३२ ॥ नूनं बतैतन्मम दुर्भगस्य शश्वद्दरिद्रस्य समृद्धिहेतुः ॥ महाविभूतेरवलोकतोऽन्यो नैवोपपद्येत यदूत्तमस्य ॥ ३३ ॥

र्विलोक्य तर्कयामासेति चतुर्थेनान्वयः । यत्र च दांता गजदंतमयाः पर्यंकाः ॥ २९ ॥ यत्रासनानि च मृदून्युपस्तरणानि तूलादिमयानि येषु तानि । यत्र मुक्तादाम विलंबवंति द्युमंति च वितानानि ॥ ३० ॥ ३१ ॥ स ब्राह्मणो निर्व्यग्रः सन् स्थिरः सन्नहैतुकीमाकस्मिकीं स्वस्य समृद्धिं तर्कयामास कुत एषा समृद्धिरागतेति ॥ ३२ ॥ निश्चिनोति । नूनमिति । एतन्ममेति एष वासावहं च तस्यैतन्मम । महती विभूतिर्यस्य तस्यावलोकादन्यः ॥ ३३ ॥

घर-मणिमय शेंकडों खांबांनीं युक्त असून इंद्राच्या घरासारखें सुशोभित होतें ॥ २८ ॥ तेथें दुधाच्या फेणासारख्या शय्या, सुवर्णाच्या पल्यावगैरे लावलेले हस्तिदंती पलंग, सुवर्णाचे दंड असलेल्या चंवऱ्या व पंखे होते ॥ २९ ॥ तशींच मऊ आस्तरणें घातलेलीं सुवर्णाचीं आसनें, व मोत्यांच्या जाळ्या लोंबत असलेलीं प्रकाश पावणारीं छतें होतीं ॥ ३० ॥ स्फटिकमण्यांच्या भिंती व इंद्रनीलमण्याच्या भूमि असलेल्या ज्या घरामध्यें स्त्रीरत्नें शोभत असून रत्नाचे दीप प्रकाश पावत होते ॥ ३१ ॥ त्या घरांमध्यें सर्वसंपत्तींच्या समृद्धि पाहून सावधानचित्त असा तो ब्राह्मण, अकस्मात् प्राप्त झालेल्या त्या आपल्या समृद्धीबद्दल, ही कोठून प्राप्त झाली? असा विचार करूं लागला ॥ ३२ ॥ तो ह्मणाला कीं,- अहो! मला खरोखर वाटतें कीं,-भाग्यहीन व जन्मांपासून दरिद्री अशा ह्या मला हें समृद्धि प्राप्त होण्याचें कारण, महाविभूति

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भगवान् श्रीकृष्णाच्या कृपादृष्टीवांचून दुसरें कांहींच नसावें ॥ ३३ ॥ आतां त्या श्रीकृष्णानें जर अवलोकनमात्रेंकरून हें मोठें ऐश्वर्य दिलें आहे तर, हें मी तुला दिलें असें कां सांगितलें नाहीं, अशी शंका येईल तर आपणच ह्मणतो–यादवांचा अधिपति माझा सखा श्रीकृष्ण, खरोखर भक्तानें दिलेलें थोडें असलें तरी तें पुष्कळ मानणारा व आपण पुष्कळ दिलें तरी तें पर्जन्याप्रमाणें फार थोडें पाहणारा आहे, ह्मणून तो याचना करणाऱ्या भक्ताला सांगितल्यावांचूनच पुष्कळ संपत्ति देतो; ह्मणजे 'जसा समुद्रालासुद्धां भरून टाकणारा महाउदार मेघ, आपण केलेल्या मोठ्या वृष्टीलाहि फार थोडी मानून लोकांच्या समक्ष वृष्टि न करितां, रात्रीं सर्वलोक निजले ह्मणजे त्यांचीं शेतें पाण्यानें पूर्ण करून टाकितो त्याप्रमाणें माझा सखा पूर्ण काम भगवान् श्रीकृष्णहि, भक्तांस देण्यासाठीं इंद्रपदालासुद्धां तुच्छ आणि त्यांनीं केलेली भक्ति अधिक मानून समक्ष

ननु स चेदवलोकनमात्रेण महदैश्वर्यं दत्तवांस्तर्हीदं तुभ्यं मया दत्तमिति किं नावोचदत आह । नन्विति । ननु मे सखा समक्षमब्रुवाण एव याचिष्णवे याचकाय भूरि बह्वपि दिशते ददाति । अत्र हेतुः । भूरिभोजः स्वयं तद्देयं पर्जन्यवदीक्षमाण इति । अयमर्थः । स्वयं तावद्भूरिभोजो बहुभोज आप्तकामत्वाल्लक्ष्मीपतित्वाच्च अतो यथा पारावारपरिपूरकोऽतिवदान्यः पर्जन्यः कदाचिद्बह्वपि वर्षमल्पमेव च मन्यमानो लज्जयेव समक्षमवर्षन्रात्रौ निद्राणे कर्षके तत्क्षेत्रमाप्लावयत्येवं श्रीकृष्णोऽपि स्वभोगापेक्षया तद्देयमिंद्रादिपदमप्यतितुच्छं मन्वानस्तस्य च भजनं बहुमन्यमानः समक्षमब्रुवाण एव ददातीति ॥ ३४ ॥ तदेवाह । किंचिदिति । उरु बह्वपि स्वदत्तं यत्किंचित्करोत्यल्पं मन्यते । सुहृत्कृ-

नन्वब्रुवाणो दिशते समक्षं याचिष्णवे भूर्यपि भूरिभोजः ॥ पर्जन्यवत्तत्स्वयमीक्षमाणो दाशार्हकाणामृषभः सखा मे ॥ ३४ ॥
किंचित्करोत्युर्वपि यत्स्वदत्तं सुहृत्कृतं फल्ग्वपि भूरिकारी ॥ मयोपनीतां पृथुकैकमुष्टिं प्रत्यग्रहीत्प्रीतियुतो महात्मा ॥ ३५ ॥ तस्यैव
मे सौहृदसख्यमैत्री दास्यं पुनर्जन्मनि जन्मनि स्यात् ॥ महानुभावेन गुणालयेन विषज्जतस्तत्पुरुषप्रसंगः ॥ ३६ ॥ भक्ताय
चित्रा भगवान्हि संपदो राज्यं विभूतीर्न समर्धयत्यजः ॥ अदीर्घबोधाय विचक्षणः स्वयं पश्यन्निपातं धनिनां मदोद्भवम् ॥ ३७ ॥

तं फल्ग्वतितुच्छमपि भूरिकारी बहु मन्यत इत्यर्थः । अतएव मयोपनीतां समीपं नीतां प्रीतियुतः स्वयमेव प्रतिगृहीतवान् ॥ ३५ ॥ श्रीकृष्णस्य भक्तवात्सल्यं दृष्ट्वा तद्भक्तिं प्रार्थयते । तस्यैति । सौहृदं प्रेम सख्यं हिताशंसनं च मैत्री उपकारकत्वं च दास्यं सेवकत्वं तत्समाहारैकवचनम् । तस्य तत्संबंधिनो मे मम स्यान्न तु विभूतिः । किंच महानुभावेन तेनैव विषज्जतो विशेषेण संगं प्राप्नुवतस्तद्भक्तेषु प्रकृष्टः संगः स्यादिति ॥ ३६ ॥ ननु भक्तेः फलं संपदं प्राप्य पुनर्भक्तिं किमिति प्रार्थयसेऽत आह । भक्तायेति । संपदः कोशादीन्राज्यमैश्वर्यं विभूतीः कलत्रपुत्रादीन्न समर्धयति न ददात्यपितु दृढां भक्तिमेव । कुतः । अदीर्घबोधाय । अविवेकिनो मम तु भक्त्यभावादेवं जातमतस्तद्भक्तिरेव स्यादिति भावः ॥ ३७ ॥

न सांमतां सर्वसंपत्ति देत असतो' ॥ ३४ ॥ तो भगवान् आपण दिलेल्या पुष्कळहि ऐश्वर्यादिकाला थोडें मानितो आणि प्रेमयुक्त भक्तानें केलेल्या थोड्याहि भजनाला पुष्कळ मानितो याविषयीं प्रमाण माझेंच उदाहरण कीं, मी अर्पण केलेली पोह्यांची सारी एक मूठ होती तरी ती, त्या महात्म्यानें प्रीतियुक्त होऊन पुष्कळ मानून स्वीकारिली ॥ ३५ ॥ असें बोलून व श्रीकृष्णाची भक्तवत्सलता पाहून त्या ब्राह्मणानें, मनांत प्रार्थना केली कीं, मला आतां पुढें जन्मजन्मांचेठायीं त्या कृष्णाचें प्रेम, सख्य, मैत्री, आणि सेवकत्व हींच प्राप्त होवोत आणि महानुभाव आणि ऐश्वर्यादिगुणांचें स्थान अशा त्याच श्रीकृष्णाबरोबर विशेषेंकरून संगति पावणाऱ्या मला त्याच्या भक्तांची उत्कृष्ट संगति घडो ॥ ३६ ॥ आतां, भक्तीचें फळ संपत्ति प्राप्त झाली असतां पुन्हा भक्तीची कां प्रार्थना करितोस असें कोणी ह्मणेल तर ह्मणतो कीं,–धनसंपन्न पुरुषांना मदोन्मत्त

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पणा होऊन पुढें अधोगति प्राप्त होत्ये असें स्वतां पाहणारा विचारशील भगवान्, आपल्या अपूर्ण भक्ताला अनेकप्रकारच्या संपत्ति ऐश्वर्यें व पुत्रपौत्रादि समृद्धि, हीं मुळींच देत नाहीं, तर दृढभक्तीच देतो. मला त्या भक्ति नसल्यामुळें ही संपत्ति मिळाली. यास्तव आतां ती भक्तीच प्राप्त होवो ॥ ३७ ॥ भगवंताचा परमभक्त अशा त्या ब्राह्मणानें याप्रमाणें बुद्धीनें निश्चय करून, तो विषयांचा हळूहळू त्याग करित होत्साता अतिआसक्त न होतां स्त्रीसहवर्तमान विषयांचें सेवन करूं लागला ॥ ३८ ॥ आतां, श्रीकृष्णाला अशाप्रकारची ब्राह्मणभक्ति असणें हें आश्चर्य नाहीं. कारण, देवांचा देव, यज्ञपति, अशा त्या प्रभु हरीचे, ब्राह्मण हेच प्रभु व इष्ट दैवत होत. त्यांच्याहून त्याला मोठें श्रेष्ठ दुसरें कांहींच नाहीं ॥ ३९ ॥ याप्रमाणें भगवंताचा मित्र असा तो ब्राह्मण, त्या संपत्तिभोगाच्या वेळींहि, अजित अशाहि भगवंताला भक्तांनीं आपल्या स्वाधीन करून घेतलें आहे, असें जाणून त्याच्याच तीव्र ध्यानानें आपलें अविद्यारूप बंधन सोडून टाकून (देहाभिमान सोडून) थोड्याच काळानें ब्रह्मवेत्त्या पुरुषांना प्राप्त होणाऱ्या त्याच्या

त्यक्ष्यन् शनैः शनैस्त्यागमभ्यस्यन् । जायया सह बुभुजे ॥ ३८ ॥ श्रीकृष्णस्यैवं ब्रह्मण्यता नातिचित्रमित्याह । तस्येति ॥ ३९ ॥ अन्यैरजितमपि स्वभृत्यैः पराजितं दृष्ट्वा तस्य ध्यानं तस्य वेगस्तेनोद्ग्रथितमात्मबंधनमहंकारो यस्य सः । गतिमित्याविष्टलिंगं धामविशेषणम् । सतां ब्रह्मविदां प्राप्यमित्यर्थः ॥ ४० ॥ एतत्पृथुकोपाख्यानं

इत्थं व्यवसितो बुद्ध्या भक्तोऽतीव जनार्दने ॥ विषयान् जायया त्यक्ष्यन्बुभुजे नातिलंपटः ॥ ३८ ॥ तस्य वै देवदेवस्य हरेर्यज्ञपतेः प्रभोः ॥ ब्राह्मणाः प्रभवो दैवं न तेभ्यो विद्यते परम् ॥ ३९ ॥ एवं स विप्रो भगवत्सुहृत्तदा दृष्ट्वा स्वभृत्यैरजितं पराजितम् ॥ तद्ध्यानवेगोद्ग्रथितात्मबंधनस्तद्धाम लेभेऽचिरतः सतां गतिम् ॥ ४० ॥ एतद्ब्रह्मण्यदेवस्य श्रुत्वा ब्रह्मण्यतां नरः ॥ लब्धभावो भगवति कर्मबंधाद्विमुच्यते ॥ ४१ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे उत्तरार्धे पृथुकोपाख्यानं नामैकाशीतितमोऽध्यायः ॥ ८१ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ अथैकदा द्वारवत्यां वसतो रामकृष्णयोः ॥ सूर्योपरागः सुमहानासीत्कल्पक्षये यथा ॥ १ ॥ तं ज्ञात्वा मनुजा राजन्पुरस्तादेव सर्वतः ॥ स्यमंतपंचकं क्षेत्रं ययुः श्रेयोविधित्सया ॥ २ ॥

श्रुत्वा तत्र ब्रह्मण्यतां विशेषतः श्रुत्वेति ॥ ४१ ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधे उत्तरार्धे एकाशीतितमोऽध्यायः ॥ ८१ ॥ ॥ द्व्यशीतितम आगत्य कुरुक्षेत्रं रविग्रहे ॥ वृष्णीन् दृष्ट्वा मुदा भूपाश्चक्रुः कृष्णकथा मिथः ॥ १ ॥ श्रीदामसुहृदे कृष्णः प्रकल्प्यैंद्रं पदं भुवि ॥ नंदादिसुहृदानंदी कुरुक्षेत्रं जगाम सः ॥ २ ॥ कल्पक्षये यथा सर्वग्रास इत्यर्थः ॥ १ ॥ ज्योतिर्विद्भिः कथ्यमानमादावेव ज्ञात्वा । स्यमंतपंचकं क्षेत्रं कुरुक्षेत्रम् ॥ २ ॥

स्वरूपास पावला ॥ ४० ॥ हे राजा, हें पृथुकाख्यान व यांतील ब्राह्मणाचा कैवारी अशा श्रीकृष्णाची ब्राह्मणभक्ति, जो पुरुष श्रवण करितो तो, भगवंताचेठिकाणीं भक्ति पावून कर्मबंधापासून मुक्त होतो ॥ ४१ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील उत्तरार्धांत सुदामचरित्रकथनरूप हा एक्याऐशींवा अध्याय समाप्त झाला ॥ ८१ ॥ ॥ आतां ह्या ब्याऐशींव्या अध्यायामध्यें सूर्यग्रहणपर्वाचेवेळीं चोहोंकडून कुरुक्षेत्रांत जमलेल्या राजांनीं यादवांच्या भेटी घेतल्या आणि परस्परांत कृष्णकथा वर्णन केल्या, अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ श्रीकृष्णानें सुदामामित्राला भूमीवरच इंद्रपदाची कल्पना करून पुढें नंदादिक सुहृदांस आनंद देण्याकरितां कुरुक्षेत्रास गमन केलें ॥ २ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, नंतर ते रामकृष्ण, द्वारकेमध्यें राहत असतां एकेवेळीं, जसा कल्पक्षयाच्यावेळीं सूर्याचा लय होऊन अंधकार पडतो त्याप्रमाणें सर्वग्रासानें अंधकार पाडणारें फारच मोठें सूर्यग्रहणपर्व प्राप्त झालें ॥ १ ॥ हे राजा, ज्योतिष्यांनीं सांगितलेलें तें सूर्यग्रहण, तें प्राप्त होण्याच्या पूर्वींच ऐकून सर्वदेशांतून मनुष्य, पुण्य-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

संपादन करण्याच्या इच्छेनें स्यमंतपंचकनामक कुरुक्षेत्रांत निघून गेले ॥ २ ॥ ज्या कुरुक्षेत्रांत शस्त्रधाऱ्यांमध्यें श्रेष्ठ अशा परशुरामानें, पृथिवी निःक्षत्रिय केली त्यावेळीं सर्वांच्या रक्तप्रवाहानें मोठे नऊ ऱ्हद उत्पन्न केले आहेत ॥ ३ ॥ आणि जेथें, राजवधप्रयुक्त पापानें अलिप्त अशाहि त्या भगवान् समर्थ रामानें, लोकांनीं असें करावें असें त्यांस शिक्षण देण्याकरितां, जसा प्राकृत पुरुष आपलें पाप घालविण्याकरितां प्रायश्चित्तवगैरे करितो त्याप्रमाणें पुष्कळ यज्ञ करून भगवंताचें यजन केलें ॥ ४ ॥ असो, अतिशय पुण्यकारक त्या तीर्थयात्रेमध्यें त्या कुरुक्षेत्रांत भरतखंडांतील पुष्कळ प्रजा गेल्या होत्या. तसेच हे राजा, अक्रूर, वसुदेव, आहुक, गद, प्रद्युम्न, सांब इत्यादिक यादवहि आपलें पाप घालविण्याची इच्छा धरून त्या क्षेत्रांत गेले होते. त्यावेळीं अनिरुद्ध व सेनाधिपति कृतवर्मा हे उभयतां, सुचंद्र शुक व सारण यांसहवर्तमान द्वारकेच्या रक्षणाकरितां राहिले होते

अब्रह्मण्यक्षत्रियवधस्थानत्वेन परशुरामस्याघापनुत्तिस्थानत्वेन च क्षेत्रस्य पापनिरासकत्वमाह । निःक्षत्रियामिति द्वाभ्याम् ॥ ३ ॥ अन्यो ऽविद्वान्यथा ॥ ४ ॥ आगन्नाजग्मुः । भारतीर्भारत्यः ॥ ५ ॥ ६ ॥ सुचंद्रशुकसारणैः सहानिरुद्धो द्वारकारक्षायामास्ते । तथा कृतवर्मा च यूथपतिः सेनानीः । देवधिष्ण्याभैर्विमानसंकाशैः । तरलास्तरं-

निःक्षत्रियां महीं कुर्वन्रामः शस्त्रभृतां वरः ॥ नृपाणां रुधिरौघेण यत्र चक्रे महाह्रदान् ॥ ३ ॥ ईजे च भगवान्रामो यत्रास्पृष्टोऽपि कर्मणा ॥ लोकस्य ग्राहयन्नीशो यथाऽन्योऽघापनुत्तये ॥ ४ ॥ महत्यां तीर्थयात्रायां तत्रागन्भारतीः प्रजाः ॥ वृष्णयश्च तथाऽक्रूरवसुदेवाहुकादयः ॥ ५ ॥ ययुर्भारत तत्क्षेत्रं स्वमघं क्षपयिष्णवः ॥ गदप्रद्युम्नसांबाद्याः सुचंद्रशुकसारणैः ॥ आस्तेऽनिरुद्धो रक्षायां कृतवर्मा च यूथपः ॥ ६ ॥ ते रथैर्देवधिष्ण्याभैर्हयैश्च तरलप्लवैः ॥ गजैर्नदद्भिरभ्राभैर्नृभिर्विद्याधरद्युभिः ॥ ७ ॥ व्यरोचंत महातेजाः पथि कांचनमालिनः ॥ दिव्यस्रग्वस्त्रसन्नाहाः कलत्रैः खेचरा इव ॥ ८ ॥ तत्र स्नात्वा महाभागा उपोष्य सुसमाहिताः ॥ ब्राह्मणेभ्यो ददुर्धेनूर्वासःस्रग्रुक्ममालिनीः ॥ ९ ॥ रामह्रदेषु विधिवत्पुनराप्लुत्य वृष्णयः ॥ ददुः स्वन्नं द्विजाग्र्येभ्यः कृष्णे नो भक्तिरस्त्विति ॥ १० ॥ स्वयं च तदनुज्ञाता वृष्णयः कृष्णदेवताः ॥ भुक्त्वोपविविशुः कामं स्निग्धच्छायांघ्रिपांघ्रिषु ॥ ११ ॥

गास्तद्वत् । प्लवो गतिर्येषां तैः ॥ ७ ॥ विद्याधरद्युभिर्विद्याधराणामिव द्युतिर्येषां तैः । महातेजा महातेजसः ॥ ८ ॥ दिव्या अत्युत्तमाः स्रग्वस्त्रसन्नाहा येषाम् ॥ ९ ॥ पुनरन्येद्युराप्लुत्य । यद्वा तस्मिन्नेवाहनि मुक्तिस्नानं कृत्वा ॥ १० ॥ ११ ॥

॥ ५ ॥ ६ ॥ तेव्हां सुवर्णपुष्पांच्या माळा गळ्यांत घालणारे, दिव्यमाळा वस्त्रें कवचें कुंडलें इत्यादिक धारण करणारे, व स्त्रियांसहवर्तमान यात्रेला निघालेले ते महातेजस्वी यादव, मार्गामध्यें विमानासारख्या रथांनीं, तरंगांसारखी चंचळ गति असणाऱ्या घोड्यांनीं, शब्द करणाऱ्या मेघांसारख्या हत्तींनीं व विद्याधरांसारखें तेज असलेल्या शिपाईवगैरे मनुष्यांनीं, देवांगनासहवर्तमान विमानांत बसून जाणाऱ्या देवांसारखे शोभूं लागले ॥ ७ ॥ ८ ॥ त्या महाभाग्यशाली यादवांनीं, एकाग्रचित्तपणें त्या तीर्थामध्यें स्नान करून उपोषण केलें आणि ब्राह्मणांना वस्त्रें व माळा देऊन सुवर्णपुष्पांच्या माळा घातलेल्या गाईहि दान दिल्या ॥ ९ ॥ नंतर त्यांनीं, परशुरामानें निर्माण केलेल्या डोहांमध्यें पुन्हा यथाविधि मोक्षस्नान करून, कृष्णाविषयीं आम्हांस भक्ति असो अशा अभिप्रायानें ब्राह्मणांस उत्तम अन्नाचें भोजन घातलें ॥ १० ॥ नंतर ज्यांची देवता श्रीकृष्णच आहे अशा त्या यादवांनीं, ब्राह्मणांची आज्ञा घेऊन आपणहि भोजन केल्यावर दाट व थंड छाया असलेल्या वृक्षांखालीं यथेच्छपणें डेरे राहुट्यावगैरे देऊन, कांहीं दिवस तेथेंच राहण्याच्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वेतानें राहिले ॥ ११ ॥ नंतर, हे राजा त्या यादवांनीं तेथें आलेल्या सुहृत्संबंधी राजांस पाहिलें; तसेंच मत्स्य, उशीनर, कौसल्य, विदर्भ, कुरु सृंजय, कांबोज, कैकय, मद्र, कुंती, आनर्त, केरल, या देशांत राहणाऱ्या लोकांस व दुसऱ्याहि आपल्या पक्षाकडील व शत्रुपक्षाकडील शेंकडो लोकांस पाहून अत्यंत स्नेही अशा नंदादिक गोपांस व दर्शनाची फार दिवस उत्कंठा धारण करणाऱ्या गोपींसहि पाहिलें ॥ १२ ॥ १३ ॥ १४ ॥ तेव्हां परस्परांच्या दर्शनानें उत्पन्न झालेल्या आनंदाच्या वेगानें अतिशय प्रफुल्लित झालेल्या हृदयांनीं व मुखकमळांनीं ज्यांना शोभा आली आहे, ज्यांच्या नेत्रांतून आनंदाश्रु स्रवत आहेत, ज्यांच्या वाणी प्रेमाच्या योगानें सद्गदित झाल्या आहेत व ज्यांच्या अंगांवर हर्षातिशयानें रोमांच उभे राहिले आहेत असे ते सर्व लोक, परस्पर दृढ आलिंगन करून आनंदांत निमग्न झाले ॥ १५ ॥ तशाच सर्व स्त्रियाहि परस्पर

स्निग्धा शीतला छाया येषामंघ्रिपानामंघ्रिषु मूलेषु ॥ १२ ॥ १३ ॥ १४ ॥ प्रोत्फुल्लैर्हृद्वक्त्रसरोरुहैः श्रीः शोभा येषां ते ॥ १५ ॥ अतिसौहृदेन यत् स्मितं तेनामला अपांगैर्दृशो दृष्टयो यासां ताः । मिथः परस्परं संवीक्ष्य दोर्भिरभिरेभिरे आलिंगनं कृतवत्यः ॥ १६ ॥ १७ ॥ संकथया मिथः सप्रेमगोष्ठ्या ॥ १८ ॥ तामेव वसुदेवपृथयोः

तत्रागतांस्ते ददृशुः सुहृत्संबंधिनो नृपान् ॥ मत्स्योशीनरकौसल्यविदर्भकुरुसृंजयान् ॥ १२ ॥ कांबोजकैकयान्मद्रान्कुंतीनानर्तके-
रलान् ॥ १३ ॥ अन्यांश्चैवात्मपक्षीयान्परांश्च शतशो नृप ॥ नंदादीन्सुहृदो गोपान्गोपीश्चोत्कंठिताश्चिरम् ॥ १४ ॥ अन्योऽन्यसं-
दर्शनहर्षरंहसा प्रोत्फुल्लहृद्वक्त्रसरोरुहश्रियः ॥ आश्लिष्य गाढं नयनैः स्रवज्जला हृष्यत्त्वचो रुद्धगिरो ययुर्मुदम् ॥ १५ ॥ स्त्रियश्च
संवीक्ष्य मिथोऽतिसौहृदस्मितामलापांगदृशोऽभिरेभिरे ॥ स्तनैः स्तनान्कुंकुमपंकरूषितान्निहत्य दोर्भिः प्रणयाश्रुलोचनाः ॥ १६ ॥
ततोऽभिवाद्य ते वृद्धान्यविष्ठैरभिवादिताः ॥ स्वागतं कुशलं पृष्ट्वा चक्रुः कृष्णकथा मिथः ॥ १७ ॥ पृथा भ्रातॄन्स्वसॄर्वीक्ष्य तत्पुत्रा-
न्पितरावपि ॥ भ्रातृपत्नीर्मुकुंदं च जहौ संकथया शुचः ॥ १८ ॥ कुंत्युवाच ॥ आर्य भ्रातरहं मन्ये आत्मानमकृताशिषम् ॥ यद्वा
आपत्सु मद्वार्तां नानुस्मरथ सत्तमाः ॥ १९ ॥ सुहृदो ज्ञातयः पुत्रा भ्रातरः पितरावपि ॥ नानुस्मरंति स्वजनं यस्य दैवमदक्षिणम् ॥ २० ॥

संकथामाह । आर्येत्यादिचतुर्भिः । अकृताशिषमपूर्णमनोरथम् ॥ १९ ॥ यस्य दैवमदक्षिणमननुकूलं तं स्वजनमपि संतं सुहृदादयो नानुस्मरंति । अतो मम दैवं प्रतिकूलं युष्माकं कोऽपराध इति भावः ॥ २० ॥

एकीमेकींना पाहून अतिप्रेमानें ज्यांच्या दृष्टि मंदहास्ययुक्त व निर्मळ कटाक्षयुक्त झाल्या आहेत आणि ज्यांच्या नेत्रांत आनंदाश्रु प्राप्त झाले आहेत अशा होत्सात्या केशराचें लेपन केलेल्या स्तनांना, तशाप्रकारच्याच आपल्या स्तनांनीं पीडन करून आलिंगन करूं लागल्या ॥ १६ ॥ नंतर लहान वयाच्या लोकांनीं अभिवंदन केलेले ते सर्व लोक, वयानें अधिक असलेल्या वृद्धांस वंदन करून व स्वागताचा व कुशळाचा प्रश्न करून परस्परांमध्यें कृष्णकथा वर्णन करूं लागले ॥ १७ ॥ कुंती तर—आपले भाऊ, बहिणी, त्यांचे पुत्र, आईबाप, भावजई व श्रीकृष्ण यांना अवलोकन करून, त्यांच्याबरोबर प्रेमकथा वर्णन करित असतां सर्व दुःखें विसरली ॥ १८ ॥ ती कुंती, वसुदेवाला ह्मणाली कीं,—हे आर्या, दादा, मी तर आपले मनोरथ पूर्ण झाले नाहींत असें मानित्यें. कारण, तुह्मी समर्थ असूनहि मला आपत्ति प्राप्त झाल्या त्यावेळीं माझें स्मरणसुद्धां केलें नाहींत ॥ १९ ॥
सुहृद असोत, ज्ञाति असोत, पुत्र असोत, भाऊ असोत किंवा आईबापहि असोत ते ज्याचें दैव प्रतिकूळ आहे त्या स्वजनाचेंहि स्मरण करीत नाहींत ॥ २० ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तेव्हां वसुदेव ह्मणाला—हे माई, दैवाचीं खेळणीं अशा आह्मां मनुष्यांना तूं दोष मुळींच लाऊं नकोस; कारण, सर्व लोक ईश्वराच्या स्वाधीन आहे तो त्याच्या प्रेरणेनेंच कायतें करतो किंवा दुसऱ्याकडून करवितो ॥ २१ ॥ हे ताई, प्रथमतः कंसानें अतिशय दुःख दिलेले सर्व आह्मी, दिशोदिशेकडे पळून गेलों होतों. ते आतांच पुन्हा दैवानें आपल्या स्थानीं प्राप्त झालों आहों ॥ २२ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला— हे राजा, त्या प्राप्त झालेल्या कुरुमत्स्यादिक राजांचा, वसुदेव उग्रसेन इत्यादिक यादवांनीं सत्कार केला असतां, ते परमानंदमूर्ति श्रीकृष्णाच्या दर्शनानंदानें अत्यंत सुख पावले ॥ २३ ॥ भीष्म, द्रोण, धृतराष्ट्र, तशीच पुत्रांसहित गांधारी, स्त्रीसहित पांडव, कुंती, सृंजय, विदुर, कृपाचार्य ॥ २४ ॥ कुंतिभोज, विराट, भीष्मक, नग्नजित्, पुरुजित्, द्रुपद, शल्य, धृष्टकेतु, काशिराजा, ॥ २५ ॥ दमघोष, विशालाक्ष, मिथिलानगरीचा राजा, मद्रदेशांचा राजा,

॥ २१ ॥ ईशवशत्वमेवाह । कंसप्रतापिता इति । हे स्वसः । एतर्ह्येव संप्रत्येव ॥ २२ ॥ २३ ॥ २४ ॥ २५ ॥ २६ ॥ युधिष्ठिरं येऽनुव्रतास्ते राजसूये जितत्वात् ॥ २७ ॥ ॥ २८ ॥ जन्मभाजो नृणां मध्ये सफलजन्मानः ॥ २९ ॥ किंच न केवलं तस्य दर्शनमेवापित्वत्यंतदुर्लभं बहु युष्माकं स्वतः संपन्नमित्याहुः । यद्विश्रुतिरिति द्वाभ्याम् ।

वसुदेव उवाच ॥ अंब मास्मानसूयेथा दैवक्रीडनकान्नरान् ॥ ईशस्य हि वशे लोकः कुरुते कार्यतेऽथवा ॥ २१ ॥ कंसप्रतापिताः सर्वे वयं याता दिशंदिशम् ॥ एतर्ह्येव पुनः स्थानं दैवेनासादिताः स्वसः ॥ २२ ॥ श्रीशुक उवाच ॥ वसुदेवोग्रसेनाद्यैर्यदुभिस्तेऽर्चिता नृपाः ॥ आसन्नच्युतसंदर्शपरमानंदनिर्वृताः ॥ २३ ॥ भीष्मो द्रोणोंऽबिकापुत्रो गांधारी ससुता तथा ॥ सदाराः पांडवाः कुंती सृंजयो विदुरः कृपः ॥ २४ ॥ कुंतिभोजो विराटश्च भीष्मको नग्नजिन्महान् ॥ पुरुजिद्द्रुपदः शल्यो धृष्टकेतुः सकाशिराट् ॥ २५ ॥ दमघोषो विशालाक्षो मैथिलो मद्रकेकयौ ॥ युधामन्युः सुशर्मा च ससुता बाह्लिकादयः ॥ २६ ॥ राजानो ये च राजेंद्र युधिष्ठिरमनुव्रताः ॥ श्रीनिकेतं वपुः शौरेः सस्त्रीकं वीक्ष्य विस्मिताः ॥ २७ ॥ अथ ते रामकृष्णाभ्यां सम्यक्प्राप्तसमर्हणाः ॥ प्रशशंसुर्मुदा युक्ता वृष्णीन्कृष्णपरिग्रहान् ॥ २८ ॥ अहो भोजपते यूयं जन्मभाजो नृणामिह ॥ यत्पश्यथासकृत्कृष्णं दुर्दर्शमपि योगिनाम् ॥ २९ ॥ यद्विश्रुतिः श्रुतिनुतेदमलं पुनाति पादावनेजनपयश्च वचश्च शास्त्रम् ॥ भूः कालभर्जितभगाऽपि यदंघ्रिपद्मस्पर्शोत्थशक्तिरभिवर्षति नोऽखिलार्थान् ॥ ३० ॥

यदिति पृथक् पदम् । यस्येत्यर्थः । विश्रुतिः कीर्तिः श्रुतिभिर्नुता वेदैः स्तुता इदं विश्वमलमत्यर्थं पुनाति । यद्विश्रुतिश्रुतिरमीवमलमिति पाठे श्रुतिः श्रवणममीवं पापमिति । यस्य पादावनेजनपयो गंगा च यस्य वचो वाक्यरूपं शास्त्रं च वेदाख्यं विश्वं पुनाति । किंच कालेन भर्जितं दग्धं भगं माहात्म्यं यस्याः सा तथाविधाऽपि भूर्यस्यांऽघ्रि-

केकयदेशांचा राजा, युधामन्यु, सुशर्मा व पुत्रांसहित बाल्हिकादिक जे राजे तेथें आले होते तसेच हे राजेंद्रा, राजसूययज्ञामध्यें जिंकिलेले असल्यामुळें युधिष्ठिराला अनुसरणारे जे राजे तेथें आले होते ते, लक्ष्मीचें व शोभेचें केवळ राहण्याचें स्थान असें श्रीकृष्णाचें शरीर व त्याच्या स्त्रिया पाहून, त्यांच्या सौंदर्यातिशयानें विस्मित झाले ॥ २६ ॥ २७ ॥ नंतर रामकृष्णांनीं उत्तम सत्कार केलेले ते राजे, हर्षयुक्त होऊन भगवंतानें अंगीकार केलेल्या यादवांची प्रशंसा करूं लागले कीं,— ॥ २८ ॥ हे भोजपते उग्रसेन राजा, या मनुष्यलोकीं तुह्मींच आपल्या जन्माचें सार्थक करून घेतलें आहे. कारण, ज्याचें दर्शन योगिजनांनाहि दुर्लभ आहे अशा भगवान् श्रीकृष्णाला तुह्मी निरंतर पहात आहां ॥ २९ ॥ केवळ त्याचें दर्शनच तुह्मांस घडत आहे असें नाहीं तर अत्यंत दुर्लभ असे दुसरेहि पुष्कळ लाभ होत आहेत. ज्याची वेदांनीं वर्णन केलेली

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कीर्ति, ज्याचें चरणक्षालनोदक (गंगा) व ज्याचें वचनरूप शास्त्र (वेदादिक) हीं या सर्व जगाला अत्यंत पवित्र करीत आहेत आणि कालगतीनें भाग्यहीन झालेलीहि भूमि, ज्याच्या चरणारविंदाच्या स्पर्शानें उत्तम शक्ति पावोन आह्मांला सर्व पदार्थ जिकडूनतिकडून देत आहे ॥ ३० ॥ त्या भगवंताबरोबर दर्शन, स्पर्शन, अनुगमन, गोष्टी, शय्या, आसन, भोजन, विवाहसंबंध व गोत्रसंबंध हे ज्यांचे आहेत ते तुह्मी, जरी नरकाचा मार्गच अशा घरांमध्यें सहत आहां तथापि त्या तुमच्या घरांमध्यें स्वर्गाची व मोक्षाचीहि इच्छा निवृत्त करणारा भगवान् विष्णु स्वतः प्रगट झाला आहे, ह्मणून तुमचें जन्म सफळ झालें आहे ॥ ३१ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला— हे राजा, नंदराजातर तेथें श्रीकृष्ण आदिक यादव प्राप्त झाले आहेत असें ऐकून कृष्णादिकांच्या दर्शनाच्या इच्छेनें गोपांसहवर्तमान, त्या यादवांजवळच वास करण्याच्या इच्छेनें भा-

---

पद्मस्पर्शेनोत्था आविर्भूता शक्तिर्यस्याः सा नोऽस्माकमखिलानर्थानभितो वर्षति ॥ ३० ॥ दर्शनं च स्पर्शनं चानुपथोऽनुगतिश्च प्रजल्पो गोष्ठी च शय्या शयनं चासनं चाशनं भोजनं च यौनं विवाहसंबंधस्तेन सह वर्तमानः सपिंडबंधो दैहिकसंबंधः । तेन श्रीकृष्णेन सह दर्शनाद्युपलक्षितः सयौनः सपिंडबंधो येषां वो ऽस्ति । किंच येषां वो गृहे विष्णुः स्वयमास आविरभूत् । निरयवर्त्मनि प्रवृत्तिमार्गे वर्तमानानां स्वर्गापवर्गाभ्यां विरमयति वितृष्णान्करोतीति तथा सः । ते यूयं जन्मभाज इति । यद्वा तदिति

तद्दर्शनस्पर्शनानुपथप्रजल्पशय्यासनाशनसयौनसपिंडबंधः ॥ येषां गृहे निरयवर्त्मनि वर्ततां वः स्वर्गापवर्गविरमः स्वयमास विष्णुः ॥ ३१ ॥ श्रीशुक उवाच ॥ नंदस्तत्र यदून्प्राप्तान्ज्ञात्वा कृष्णपुरोगमान् ॥ तत्रागमद्वृतो गोपैरनस्थार्थैर्दिदृक्षया ॥ ३२ ॥ तं दृष्ट्वा वृष्णयो हृष्टास्तन्वः प्राणमिवोत्थिताः ॥ परिषस्वजिरे गाढं चिरदर्शनकातराः ॥ ३३ ॥ वसुदेवः परिष्वज्य संप्रीतः प्रेमविह्वलः ॥ स्मरन्कंसकृतान्क्लेशान्पुत्रन्यासं च गोकुले ॥ ३४ ॥ कृष्णरामौ परिष्वज्य पितरावभिवाद्य च ॥ न किंचनोचतुः प्रेम्णा साश्रुकंठौ कुरूद्वह ॥ ३५ ॥ तावात्मासनमारोप्य बाहुभ्यां परिरभ्य च ॥ यशोदा च महाभागा सुतौ विजहतुः शुचः ॥ ३६ ॥

सामान्यनिर्देशः स इत्यर्थः । स विष्णुः स्वयं येषां वो निरयवर्त्मनि संसारकारणे गृहे वर्तमानानामपि बध्यते संबध्यत इति बंधो दर्शनादिभिः संबद्धः सन्स्वर्गापवर्गविरम आस परमसुखप्रदो बभूवेत्यर्थः ॥ ३१ ॥ अनस्थार्थैरिति । तत्रैव वासचिकीर्षया शकटेषु स्थापितैरर्थैः सहागत इत्यर्थः ॥ ३२ ॥ ३३ ॥ वसुदेवस्तं परिष्वज्य प्रेमविह्वलो बभूवेति शेषः ॥ ३४ ॥ ३५ ॥ तौ सुतौ परिरभ्य नंदो यशोदा च विरहशोकान्विजहतुस्तत्यजतुः । यद्वा शुचोऽश्रूणि विजहतुर्मुमुचतुरित्यर्थः ॥ ३६ ॥

ड्यांवर घातलेल्या सामानासुमानासहवर्तमानच तेथें प्राप्त झाला ॥ ३२ ॥ त्या नंदाला पाहून हर्ष पावलेले यादव, जसा प्राण आला असतां इंद्रियें उठून त्याला सामोरीं जातात त्याप्रमाणें सामोरे जाऊन, बहुतकाळानें दर्शन झाल्यामुळें भेटण्याविषयीं त्वरा झालेल्या त्यांनीं, त्या नंदाला दृढ आलिंगन केलें ॥ ३३ ॥ वसुदेव तर नंदाला आलिंगन करून संतुष्ट होऊन, कंसानें दिलेल्या क्लेशांचें व आपण पुत्र गोकुळांत ठेविले होते त्याचें स्मरण करित होत्साता, प्रेमानें अतिशय विव्हळ झाला ॥ ३४ ॥ हे राजा, कृष्णराम तर आपले मातापिता अशा त्या यशोदानंदांना नमस्कार व आलिंगन करून, प्रेमाच्या योगानें कंठ दाटून आल्यामुळें कांहींच बोलण्यास समर्थ झाले नाहींत स्तब्धच राहिले ॥ ३५ ॥ तेव्हां नंदराजानें व महाभाग्यवती यशोदेनें त्या दोन्हीं पुत्रांना आपल्या मांडीवर बसवून घेऊन त्यांना बाहूंनीं आलिंगन केलें आणि विरहशो- ॥२५३॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

काचा त्याग करून नेत्रांतून आनंदाश्रु ढाळिले ॥ ३६ ॥ नंतर, रोहिणी व देवकी ह्या दोघीजणी, यशोदेला आलिंगन करून, त्या यशोदेनें केलेल्या पुत्रलालनादिक मैत्रीचें स्मरण करून सद्गदितकंठ झालेल्या त्या ह्मणाल्या कीं,– ॥ ३७ ॥ हे व्रजेश्वरि, यशोदे, सुटण्याचें कारण झालें असतांहि न सुटणाऱ्या तुह्मां उभयतांच्या मैत्रीला कोण बरें विसरणार आहे ? कोणींच नाहीं. कारण, इंद्राचें ऐश्वर्य प्राप्त झालें असतांहि या लोकीं ज्या मैत्रीचा प्रत्युपकार करितां येणार नाहीं ॥ ३८ ॥ ती मैत्री अशी कीं,– हे यशोदे, ज्यांनीं आईबाप पाहिलेसुद्धां नाहींत अशा ह्या आमच्या रामकृष्णपुत्रांस तुह्मांजवळ ठेविलें असतां, जशा पापण्या नेत्रांचें रक्षण करितात त्याप्रमाणें तुह्मी यांचें रक्षण केलें आहेत हे तुह्मां आईबापांपासूनच इच्छित असलेला खाऊ, खेळणीं, वाढदिवसवगैरे उत्साह, लालन (चुंबनादिक) व पालन (न्हाणें, खाणें व पिणेंवगैरे)

व्रजेश्वरीं यशोदाम् ॥ ३७ ॥ अनिवृत्तां निवृत्तिकारणे सत्यप्यनुवर्तमानाम् । ऐंद्रमैश्वर्यं प्राप्यापि यस्याः प्रतिक्रिया कर्तुं न शक्यत इत्यर्थः ॥ ३८ ॥ तत्कृतां मैत्रीमाहतुः । एताविति न दृष्टौ पितरौ याभ्यां तौ वस्तुतस्त्वजन्मत्वादेवादृष्टपितरौ । हे भवति युवयोः पित्रोर्न्यस्तावेतौ संप्रीणनादीनि प्राप्याकुत्रचभयौ क्वचिदपि भयरहितौ

रोहिणी देवकी चाथ परिष्वज्य व्रजेश्वरीम् ॥ स्मरंत्यौ तत्कृतां मैत्रीं बाष्पकंठ्यौ समूचतुः ॥ ३७ ॥ का विस्मरेत वां मैत्रीमनिवृत्तां व्रजेश्वरि ॥ अवाप्याप्यैंद्रमैश्वर्यं यस्या नेह प्रतिक्रिया ॥ ३८ ॥ एतावदृष्टपितरौ युवयोः स्म पित्रोः संप्रीणनाभ्युदयपोषणपालनानि ॥ प्राप्योषतुर्भवति पक्ष्म ह यद्वदक्ष्णोर्न्यस्तावकुत्रचभयौ न सतां परः स्वः ॥ ३९ ॥ श्रीशुक उवाच ॥ गोप्यश्च कृष्णमुपलभ्य चिरादभीष्टं यत्प्रेक्षणे दृशिषु पक्ष्मकृतं शपंति ॥ दृग्भिर्हृदीकृतमलं परिरभ्य सर्वास्तद्भावमापुरपि नित्ययुजां दुरापम् ॥ ४० ॥ भगवांस्तास्तथाभूता विविक्त उपसंगतः ॥ आश्लिष्यानामयं पृष्ट्वा प्रहसन्निदमब्रवीत् ॥ ४१ ॥ अपिस्मरथ नः सख्यः स्वानामर्थचिकीर्षया ॥ गतांश्चिरायितान् शत्रुपक्षक्षपणचेतसः ॥ ४२ ॥

भूत्वोषतुर्वासं चक्रतुः । कथंभूतयोः । अक्ष्णोर्नेत्रयो रक्षकं पक्ष्म यद्वत्तथा रक्षकयोः । युक्तं युवयोरेतद्यतः सतां परः स्व इति नास्ति वैषम्यम् ॥ ३९ ॥ अभीष्टत्वे लिंगम् । यच्यस्य श्रीकृष्णस्य प्रेक्षणे दृशिषु नेत्रेषु व्यवधायकं पक्ष्मकृतं विधातारं शपंति । दृग्भिर्नेत्रद्वारैर्हृदि कृतं हृदये प्रवेशितं परिरभ्य तद्भावं तदात्मतां प्रापुः । अपि नित्ययुजामारूढयोगिनामपि ॥ ४० ॥ ४१ ॥ चिरायितान्विलंबितान् । अत्र हेतुः । शत्रूणां पक्षस्य क्षपणे चेतो येषां तान् ॥ ४२ ॥

पावोन निर्भयपणें गोकुळांत राहिले आहेत. खरें आहे कीं,– सत्पुरुषांना हा आपला व परकीय असा भेदबुद्धि मुळींच नाहीं ॥ ३९ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, ज्या गोपी कृष्णाला पाहण्याविषयीं प्रवृत्त झालेल्या आपल्या दृष्टींना व्यवधायक पापण्या करणाऱ्या ब्रह्मदेवाला शिव्या देत असत, त्या सर्व गोपीहि बहुत काळानंतर भेटलेल्या आवडत्या श्रीकृष्णाला पाहून नेत्रद्वारा हृदयामध्यें प्रवेशित केलेल्या त्याला दृढ आलिंगन करून, नित्य एकाग्रचित्त करणाऱ्या योग्यानांहि दुर्लभ अशा भगवद्रूपतेला पावल्या ॥ ४० ॥ भगवान् श्रीकृष्णानेंहि आत्मभाव पावलेल्या त्या गोपींना एकीकडे भेटून दृढ आलिंगन करून व कुशलप्रश्न विचारून, हास्य करीत असें भाषण केलें कीं,– ॥ ४१ ॥ हे सख्यांनो, आपल्या आईबापांचेंवगैरे कार्य करण्याच्या इच्छेनें गोकुळांतून मथुरेंत गेलेल्या व तेथें शत्रुपक्षाच्या नाशाविषयीं आसक्तचित्त होऊन फार दिव-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सपर्यंत राहिलेल्या आमचें तुह्मी स्मरण करितां काय ? ॥ ४२ ॥ बरें, आह्मी अकृतज्ञ (केलेले उपकार स्मरण न करणारे आहों) अशी थोडी शंका मनांत आणून तुह्मी आमची निंदा तर करीत नाहींना ? काय करावें ! भगवान् प्राणिमात्रांचे संयोग व वियोग करितो ही गोष्ट खरी आहे ॥ ४३ ॥ जसा वारा, मेघपटळ, तृण, कापूस व धुरळा यांचे एकत्र संयोग करून लागलेच वियोग करितो तसेच ईश्वर प्राणिमात्रांचे करितो ॥ ४४ ॥ अशा स्थितींत तुह्मांला माझ्या वियोगानें माझा अतिशय प्रेमा उत्पन्न झाला ही एक मात्र मोठी चांगली गोष्ट झाली; कारण, माझ्या विषयींची केवळ भक्तिच उत्पन्न झाली तरी ती, प्राण्यांना मोक्ष देण्यास समर्थ होत्ये, मग माझी प्राप्ति करून देणारा माझा स्नेह तुह्मांस प्राप्त झाला ही किती चांगली गोष्ट आहे ? ॥ ४५ ॥ आतां, तूं कसा आहेस? कीं ज्याला आह्मी स्नेहानेंच पावूं असें ह्मणाल तर- श्रिया हो, जशी-

---

अपि स्वित् अस्मानवध्यायथाऽवजानीथ । अकृतज्ञा एत इत्याविशंकया ईषच्छंकया न शंकामात्रं निश्चितमेवैतत्परित्यज्य गतत्वादित्यत आह । नूनमिति ॥ ४३ ॥ एतत्सदृष्टांतमाह । वायुरिति । आक्षिपते पृथक्करोतीत्यर्थः ॥ ४४ ॥ अपिच अतिभद्रमिदं यद्गुत भवतीनां मद्वियोगेन मत्प्रेमातिशयो जात इत्याह । मयीति । मयि भक्तिमात्रमेव तावदमृतत्वाय कल्पत इति । यद्गुत भवतीनां मत्स्नेह आसीत्तद्दिष्ट्याऽतिभद्रम् । कुतः । मदापनो मत्प्रापण इति ॥ ४५ ॥ कीदृशस्त्वं यं वयं स्नेहेन प्राप्स्याम

अप्यवध्यायथाऽस्मान्स्विदकृतज्ञा विशंकया ॥ नूनं भूतानि भगवान्युनक्ति वियुनक्ति च ॥ ४३ ॥ वायुर्यथा घनानीकं तृणं तूलं रजांसि च ॥ संयोज्याक्षिपते भूयस्तथा भूतानि भूतकृत् ॥ ४४ ॥ मयि भक्तिर्हि भूतानाममृतत्वाय कल्पते ॥ दिष्ट्या यदासीन्मत्स्नेहो भवतीनां मदापनः ॥ ४५ ॥ अहं हि सर्वभूतानामादिरंतोऽतरं बहिः ॥ भौतिकानां यथा खं वार्भूर्वायुर्ज्योतिरंगनाः ॥ ४६ ॥ एवं ह्येतानि भूतानि भूतेष्वात्मात्मना ततः ॥ उभयं मय्यथ परे पश्यताभातमक्षरे ॥ ४७ ॥

इत्यपेक्षायामात्मस्वरूपमाह । अहं हीति । हे अंगनाः भौतिकानां शरावसैंधवादीनां यथाऽकाशादीनि पंचमहाभूतान्याद्यंतादिरूपाण्येवं सर्वभूतानां जरायुजादीनामहम् । अतो व्यापकं मां भवत्यः प्राप्ता एवेति ॥ ४६ ॥ ननु चतुर्विधभूतग्रामाणां तद्भोक्ता आत्मैवाद्यंतादिरूपस्तस्मिंश्च सर्वव्यापके सर्वभूतानि वर्तंत इति कुतस्त्वत्प्राप्तिरस्माकमित्यत आह । एवं हीति । अयमर्थः । शरावादीनां यथा भौतिकानां महाभूतान्याद्यंतादिरूपाण्येवमेवैतानि चतुर्विधानि भूतान्यपि भौतिकत्वाविशेषात्स्वकारणेषु भूतेष्वेव वर्तंते न तु भोक्तर्यात्मनि । आत्मा तु तेषु भूतेष्वात्मना भोक्तृरूपेण ततो व्याप्तो न कारणत्वेन । अथैतदुभयं भूतभौतिकरूपं भोग्यं च भोक्तारं चात्मानं मय्यक्षरे परिपूर्णे आभातं पश्यतेति॥४७॥

पृथिवी, उदक, तेज, वायु व आकाश हीं पंचमहाभूतें, घट, सैंधव इत्यादिक पदार्थांच्या आदि, अंतीं, बाहेर व आंत सर्व रूपांनीं आहेत त्याप्रमाणें मीहि सर्व पदार्थांच्या आदि, अंतीं, बाहेर व आंत सर्वरूपांनीं आहें ॥ ४६ ॥ आतां, चतुर्विध भूतग्रामांमध्यें, त्यांचा भोक्ता आत्माच आद्यंतादिरूपी आहे व त्याच सर्वव्यापकाचेठिकाणीं सर्व भूतें राहतात असें असतां, आह्मांला तुह्मी प्राप्ति कोठून होणार असें ह्मणाल तर- जशीं घटादिक कार्यें पृथिव्यादिरूपींच आहेत त्याप्रमाणें जरायुज, स्वेदज, अंडज व उद्भिज्ज हीं चारप्रकारचींहि शरीरें आपल्या कारणरूप पंचमहाभूतांमध्येंच राहतात, भोक्त्या आत्म्याचेठिकाणीं राहत नाहींत; आत्मा मात्र, त्या भूतांमध्यें भोक्तृरूपानें व्यापून आहे कारणरूपानें नाहीं. यास्तव भूतभौतिकरूप भोग्य व भोक्ता आत्मा हीं दोन्हीं परिपूर्णरूप मज परब्रह्माचेठिकाणीं भासत आहेत, खरीं नाहींत. असें तुह्मी पहा ह्मणजे झालें ॥ ४७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, याप्रमाणें श्रीकृष्णानें आत्मतत्त्वाचा उपदेश करून बोध केलेल्या त्या गोपी, आत्मतत्त्वाच्या वारंवार चिंतनानें लिंगशरीराचा नाश होऊन त्या कृष्णस्वरूपाप्रतच पावल्या ॥ ४८ ॥ आणि ह्मणाल्या कीं,– हे कमलनाभा, अगाधबोध अशा योगेश्वरांनींहि हृदयामध्यें चिंतन केलेलें आणि संसाररूप कूपांत पडलेल्या पुरुषांना त्यांतून निघण्याविषयीं आश्रयरूप असें तुझें चरणकमळ, घरादाराचें सेवन करणाऱ्याहि आमच्या मनांत निरंतर प्रकट राहो; ह्मणजे तुझ्या कृपेनें आह्मांस प्राप्त झालेला हा तुझा साक्षात्कार पुन्हा घरच्या व्यासंगानें कधींहि नाहींसा होऊं नये ॥ ४९ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील उत्तरार्धांत वृष्णिगोपसंगमनामक हा ब्याऐशींवा अध्याय समाप्त झाला ॥ ८२ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या त्र्याऐशींव्या अध्यायामध्यें, स्त्रियांमध्यें कृष्णकथोत्साह प्रवृत्त झाला

अध्यात्मशिक्षया स्वरूपोपदेशेन शिक्षिता बोधितास्तस्यानुस्मरणेन ध्वस्तो जीवकोशो लिंगं यासां तास्तमेवाध्यगन् प्रापुः ॥ ४८ ॥ एवं प्राप्तोऽपि कृष्णः पुनर्गृहव्यासंगेन माऽपयात्विति तच्चरणस्मरणं प्रार्थयामासुरित्याह । आहुश्चेति । हे नलिननाभ ते पदारविंदं गेहंजुषां गृहसेविनीनामपि नो मनसि सदा उदियादाविर्भवेत् ॥ ४९ ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधे उत्तरार्धे द्व्यशीतितमोऽध्यायः ॥ ८२ ॥ ॥ त्र्यशीतितम एवं च स्त्रीणां कृष्णकथोत्सवे ॥ द्रौपद्यै कृष्णभार्याभिरुक्ताः स्वस्वकरग्रहाः ॥ १ ॥

श्रीशुक उवाच ॥ अध्यात्मशिक्षया गोप्य एवं कृष्णेन शिक्षिताः ॥ तदनुस्मरणध्वस्तजीवकोशास्तमध्यगन् ॥ ४८ ॥ आहुश्च ते नलिननाभ पदारविंदं योगेश्वरैर्हृदि विचिंत्यमगाधबोधैः ॥ संसारकूपपतितोत्तरणावलंबं गेहंजुषामपि मनस्युदियात्सदा नः ॥४९॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे उत्तरार्धे वृष्णिगोपसंगमो नाम द्व्यशीतितमोऽध्यायः ॥ ८२ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ तथाऽनुगृह्य भगवान्गोपीनां स गुरुर्गतिः ॥ युधिष्ठिरमथापृच्छत्सर्वांश्च सुहृदोऽव्ययम् ॥ १ ॥ त एवं लोकनाथेन परिपृष्टाः सुसत्कृताः ॥ प्रत्यूचुर्हृष्टमनसस्तत्पादेक्षाहतांहसः ॥ २ ॥ कुतोऽशिवं त्वच्चरणांबुजासवं महन्मनस्तो मुखनिःसृतं क्वचित् ॥ पिबंति ये कर्णपुटैरलं प्रभो देहंभृतां देहकृदस्मृतिच्छिदम् ॥ ३ ॥ हि त्वाऽऽत्मधामविधुतात्मकृतत्र्यवस्थमानंदसंप्लवमखंडमकुंठबोधम् ॥ कालोपसृष्टनिगमावन आत्तयोगमायाकृतिं परमहंसगतिं नताः स्म ॥ ४ ॥

अव्ययं कुशलम् ॥ १ ॥ तत्पादेक्षया हतमंहो येषां ते ॥ २ ॥ महतां मनस्तः सकाशान्मुखद्वारतो निःसृतं क्वचित्कदाचिद्देहंभृतां देहधारिणां देहकृच्चासावस्मृतिश्चाविद्या तां छिनत्तीति तथा तम् । देहकृदीश्वरस्तद्विषयाज्ञानच्छिदं वा ॥ ३ ॥ हि त्वेति पदद्वयम् । त्वा त्वां हि एव त्वामेव नताः स्मेत्यर्थः । कथंभूतम् । आत्मधाम्ना स्वरूपप्रकाशेन

असतां, श्रीकृष्णाच्या स्त्रियांनीं, द्रौपदीला आपआपले विवाह सांगितले, अशी कथा वर्णन केली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, गोपींना आत्मतत्त्वाचा उपदेश करणारा गुरु व त्यांची गति अशा त्या श्रीकृष्णानें, त्यांनीं प्रार्थना केलेल्या प्रकाराला 'तथास्तु' असें ह्मणून त्यांच्यावर अनुग्रह करून, नंतर त्यानें धर्मराजावगैरे सर्वांहि सुहृदांना कुशलप्रश्न केले ॥ १ ॥ याप्रमाणें लोकनाथ श्रीकृष्णानें सत्कारपूर्वक प्रश्न केलेले ते पांडवादिक, त्याच्या चरणाच्या दर्शनानें निष्पाप व हर्षितचित्त होऊन त्या श्रीकृष्णास ह्मणाले कीं,– ॥ २ ॥ हे प्रभो, देहधाऱ्यांना देहाभिमान उत्पन्न करणारी जी अविद्या तिचा नाश करणाऱ्या व व्यासादिक सत्पुरुषांच्या मनापासून मुखद्वारा बाहेर प्रकट झालेल्या तुझ्या चरणकमळसंबंधी कथामृताचें एखादेवेळींतरी जे पुरुष आपल्या कर्णरूप पात्रांनीं यथेच्छ प्राशन करितात त्यांचें अकल्याण कसें बरें होईल? मुळींच होणार नाहीं ॥ ३ ॥ यास्तव आपल्या स्वरूपप्रकाशानें ज्याचेठिकाणीं बुद्धीनें केलेल्या जाग्रत्स्वप्नसुषुप्तिरूप तिन्ही अवस्था नाहींशा झाल्या आहेत असा सर्व आनंदांचा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

समुदायरूप, अपरिच्छिन्न, कुंठित न होणाऱ्या चैतन्यशक्तीनें युक्त, काळाच्या योगानें नाश पावूं लागलेल्या वेदांच्या रक्षणाकरितां योगमायेनें मनुष्यावतार धारण करणारा आणि परमहंसांची गति अशा तुला आह्मी नमस्कार करितों ॥ ४ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, याप्रमाणें पवित्रकीर्ति पुरुषांचा मुकुटमणि, अशा त्या श्रीकृष्णाची लोक स्तुति करित असतां, त्यावेळीं यादवांच्या व कौरवांच्या स्त्रिया एकत्र जमून, त्रैलोक्यामध्यें वर्णन केलेल्या श्रीकृष्णाच्या कथा परस्पर सांगूं लागल्या–त्या मी तुला वर्णन करितों श्रवण कर ॥ ५ ॥ द्रौपदी ह्मणाली–हे रुक्मिणि, हे भद्रे, हे जांबवति, हे कौसले, हे सत्यभामे, हे कालिंदि, हे मित्रविंदे, हे रोहिणि, हे लक्ष्मणे हे कृष्णपत्निहो, तुह्मी हें मला सांगा कीं,–आपल्या मायेनें लोकांचें अनुकरण करणाऱ्या अच्युत भगवान श्रीकृष्णानें, स्वतां तुमचें पाणिग्रहण कसें केलें ? ॥ ६ ॥ ७ ॥

विधुता निरस्ता आत्मकृता बुद्धिनिमित्तास्तिस्रोऽवस्था यस्मिंस्तम् । अतएवानंदसंप्लुवं सर्वानंदकदंबरूपम् । अखंडं चापरिच्छिन्नम् । यतो न कुंठः कुंठितो बोधश्चिच्छक्तिर्यस्य तम् । नन्वेवंरूपता श्रीकृष्णस्य कुतः अस्मदादिवत्प्रतीतेरत आहुः । कालोपसृष्टेति । कालेनोपसृष्टा विप्लुताश्च ते निगमाश्च तेषामवने रक्षार्थमात्ता उपात्ता योगमायया आकृतिर्नराकारमूर्तिर्येन तम् । परमहंसानां गतिं त्वाम् । अतस्तवैवंरूपत्वादस्माकं च त्वन्माययैतत्सर्वंवैपरीत्यात्त्वामेव नताः स्मेति । यद्वा त्वामिति प्रकरणाज्ज्ञातव्यम् । त्वां नताः स्मः । किं कृत्वा हित्वा । किम् । आत्मधाम आत्मा शरीरं धाम गृहं तच्च तच्च । देहदैहिकसंगं परित्यज्येत्यर्थः । समानमन्यत् ॥ ४ ॥ त्रिषु लोकेषु गीताः ॥ ५ ॥

ऋषिरुवाच ॥ इत्युत्तमश्लोकशिखामणिं जनेष्वभिष्टुवत्स्वंधककौरवस्त्रियः ॥ समेत्य गोविंदकथा मिथोऽगृणंस्त्रिलोकगीताः शृणु वर्णयामि ते ॥ ५ ॥ द्रौपद्युवाच ॥ हे वैदर्भ्यच्युतो भद्रे हे जांबवति कौसले ॥ हे सत्यभामे कालिंदि शैब्ये रोहिणि लक्ष्मणे ॥ ६ ॥ हे कृष्णपत्न्य एतन्नो ब्रूत वो भगवान्स्वयम् ॥ उपयेमे यथा लोकमनुकुर्वन्स्वमायया ॥ ७ ॥ रुक्मिण्युवाच ॥ चैद्याय माऽर्पयितुमुद्यतकार्मुकेषु राजस्वजेयभटशेखरितांघ्रिरेणुः ॥ निन्ये मृगेंद्र इव भागमजावियूथात्तच्छ्रीनिकेतचरणोऽस्तु ममार्चनाय ॥ ८ ॥ सत्यभामोवाच ॥ यो मे सनाभिवधतप्तहृदा ततेन लिप्ताभिशापमपमार्ष्टुमुपाजहार ॥ जित्वर्क्षराजमथ रत्नमदात्स तेन भीतः पिताऽदिशत मां प्रभवेऽपि दत्ताम् ॥ ९ ॥

कौसले हे सत्ये शैब्ये हे मित्रविंदे । रोहिणी नाम काचित्पट्टमहिषीतुल्या ॥ ६ ॥ हे अन्याः श्रीकृष्णस्य पत्न्यः ॥ ७ ॥ मा मामर्पयितुं संपादयितुं राजसु जरासंधादिषूद्यतकार्मुकेषु सत्स्वजेया ये भटास्तेषां शेखरिता मुकुटवत्कृता अंघ्रिरेणवो येन । तेषां मूर्ध्नि पदं दधदित्यर्थः । तस्य श्रीनिकेतस्य चरणो ममार्चनायास्तु ॥ ८ ॥ सनाभेर्भ्रातुर्वधेन सिंहकृतेन तप्तं हृद्यस्य तेन मे ततेन तातेन लिप्तमभिशापं दुर्यशोऽपमार्ष्टुं परिहर्तुमृक्षराजं जित्वा रत्नं स्यमंतकमुपाजहारानीतवान् । अथानंतरं मत्पित्रे रत्नमदात् । तेन स्वापराधेन भीतः स मे पिता प्रभवे श्रीकृष्णाय मामदिशत ददौ । दत्तामक्रूरादिभ्यः प्रतिश्रुतामपीत्यर्थः ॥ ९ ॥

तेव्हां रुक्मिणी ह्मणाली–मला, शिशुपाळास मिळवून देण्याकरितां जरासंधादिक राजे, हातांत धनुष्यें धारण करून सिद्ध झाले असतां, त्यावेळीं अजेय अशा वीरांच्या मस्तकांवर मुकुटासारखे ज्याच्या चरणाचे रजःकण आहेत, ह्मणजे ज्यानें त्यांच्या मस्तकीं पाय दिले आहेत अशा श्रीकृष्णानें, सिंह जसा बकऱ्यांच्या समुदायांतून आपला भाग घेऊन जातो त्याप्रमाणें, आपला भाग अशा मला आणिलें आहे. त्या श्रीनिवासरूप भगवंताच्या चरणाची पूजा मला निरंतर घडो ॥ ८ ॥ सत्यभामा ह्मणाली कीं,–आपल्या प्रसेनबंधूचा वध झाला ह्मणून संतप्तहृदय झालेल्या माझ्या पित्या सत्राजितानें, आंगीं चिकटविलेलें अपयश घालविण्याकरितां जेव्हां श्रीकृष्णानें, जांबवंताला जिंकून स्यमंतक रत्न आणून दिलें तेव्हां त्याच्यावर खोटी आळ घातलेल्या अपराधानें भ्यालेल्या त्या माझ्या पित्यानें, दुसऱ्यांस देऊं केलेल्याहि मला त्या प्रभु श्रीकृष्णास अर्पण केलें आहे ॥ ९ ॥ ॥२६९॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जांबवती म्हणाली–माझ्या पित्या जाबवंतानें, हा प्रभु श्रीकृष्ण, आपला स्वामी व कुळदैवत राम आहे असें न जाणितां, याच्याबरोबर सत्तावीस दिवसपर्यंत युद्ध केलें. नंतर परीक्षा झालेल्या त्यानें, हा रामच आहे असें जाणून त्याचे पाय धरिले आणि त्याला प्रसन्न करून घेऊन मण्यासहवर्तमान मला पूजनरूपत्वेंकरून समर्पण केलें आहे, ती मी या भगवंताची दासी आहें ॥ १० ॥ कालिंदी म्हणाली–मला, आपल्या चरणस्पर्शाच्या इच्छेनें, ही तप करीत आहे असें जाणून, ज्यानें आपल्या मित्र अर्जुनाबरोबर माझ्याजवळ येऊन माझें पाणिग्रहण केलें, त्या भगवंताची घरांतील केर काढणारी दासी मी आहें ॥ ११ ॥ मित्रविंदा म्हणाली–ज्या लक्ष्मीनिवास भगवंतानें, माझ्या स्वयं-

देहकृत्पिता अमुं श्रीकृष्णं निजनाथं स्वामिनं देवमीश्वरं सीतापतिं प्राज्ञायाविज्ञाय त्रिणवहानि त्रिनवाहानि। ह्रस्वश्छंदोऽनुरोधेन । सप्तविंशतिदिनान्यमुनाऽभ्ययुध्यत् । परीक्षितः संजाता परीक्षा यस्य स परीक्षितस्तं साक्षात्सीतापतिरेवासाविति ज्ञात्वा पादौ प्रगृह्य मणिना सह मामहर्णमुपाहरदर्हणतया समर्पितवान् । अहो तर्हि त्वमतिश्रेष्ठाऽसि नेत्याह । अमुष्याहं दासीति ॥ १० ॥ सख्या अर्जुनेन तस्य गृहमार्जनी गृहसंमार्जनकर्त्री ॥ ११ ॥ शुनां यूथगतं स्वबलिं द्विपारिः सिंह इवेति मे भ्रातुश्चापकुरुतोऽपकारं कुर्वतो विजित्य । श्रियौको लक्ष्मीनिवासः । तस्यांघ्र्यवनेजनत्वं चरणक्षालनकर्तृत्वमनुभवं प्रतिजन्म मेऽस्तु ॥ १२ ॥ सप्तोक्ष्णो वृषभान् । बलं च वीर्यं च सुतीक्ष्णशृंगाणि

जांबवत्युवाच ॥ प्राज्ञाय देहकृदमुं निजनाथदेवं सीतापतिं त्रिणवहान्यमुनाऽभ्ययुध्यत् ॥ ज्ञात्वा परीक्षित उपाहरदर्हणं मां पादौ प्रगृह्य मणिनाऽहममुष्य दासी ॥ १० ॥ कालिंद्युवाच ॥ तपश्चरंतीमाज्ञाय स्वपादस्पर्शनाशया ॥ सख्योपेत्याग्रहीत्पाणिं योऽहं तद्गृहमार्जनी ॥ ११ ॥ भद्रोवाच ॥ यो मां स्वयंवर उपेत्य विजित्य भूपान्निन्ये श्वयूथगमिवात्मबलिं द्विपारिः ॥ भ्रातृंश्च मेऽपकुरुतः स्वपुरं श्रियौकस्तस्यास्तु मेऽनुभवमंघ्र्यवनेजनत्वम् ॥ १२ ॥ सत्योवाच ॥ सप्तोक्षणोऽतिबलवीर्यसुतीक्ष्णशृंगान्पित्रा कृतान्क्षितिपवीर्यपरीक्षणाय ॥ तान्वीरदुर्मदहनस्तरसा निगृह्य क्रीडन्बबंध ह यथा शिशवोऽजतोकान् ॥ १३ ॥ य इत्थं वीर्यशुल्कां मां दासीभिश्चतुरंगिणीम् ॥ पथि निर्जित्य राजन्यान्निन्ये तद्दास्यमस्तु मे ॥ १४ ॥ मित्रविंदोवाच ॥ पिता मे मातुलेयाय स्वयमाहूय दत्तवान् ॥ कृष्णे कृष्णाय तच्चित्तामक्षौहिण्या सखीजनैः ॥ १५ ॥

चातिशयितानि येषां तान्मे पित्रा कृतान्संपादितान्बलीयसे मां दातुं क्षितिपानां वीर्यस्य बलस्य परीक्षणाय ताननतिप्रसिद्धान्वीराणां दुर्मदं घ्नंति ये तांस्तरसा शीघ्रमेव निगृह्य दमयित्वा क्रीडन्नानायासेनैव बबंध । अजतोकानजापत्यानि ॥ १३ ॥ वीर्यमेव शुल्कं देयं यस्यास्ताम् । दासीभिः सह चतुरंगिणीं गजाश्वादिसेनायुक्तां पुरं निन्ये ॥ १४ ॥ हे कृष्णे हे द्रौपदि तस्मिन्नेव चित्तं यस्यास्तां मां अक्षौहिण्या सेनया सह सखीजनैश्च सह ॥ १५ ॥

वरांत येऊन राजांना तशाच अपकार करणाऱ्या माझ्या भावांना जिंकून, 'जसा सिंह श्वानाच्या झुंडींतून आपला भाग घेऊन जातो त्याप्रमाणें' मला आपल्या द्वारका नगरींत नेलें; त्या भगवंताच्या चरणाचें क्षालन करण्याचें काम मला जन्मोजन्मीं घडो ॥ १२ ॥ सत्या म्हणाली,– माझ्या पित्यानें राजांच्या बळाची परीक्षा करण्याकरितां अतिशयित बळी, पराक्रमी व तीक्ष्णशिंगें धारण करणारे व वीरपुरुषांचा दुरभिमान घालविणारे असे जे सात वृषभ बाळगिले होते, त्यांना या भगवंतानें मोठ्या त्वरेनें दमवून, जसे बालक शेळीच्या कोंकरांना बांधून ठेवितात तसे बांधून ठेविले॥ १३॥ याप्रमाणें पराक्रम दाखविणें हेंच जिचें मोल्य आहे अशा मला, ज्या भगवंतानें, माझ्या पित्यानें दासींसहित चतुरंग सैन्य आंदण दिलें तें घेऊन, मार्गांत निरोध करणाऱ्या राजांस जिंकून द्वारकेस आणिलें, त्याचें दास्य मला घडो ॥ १४ ॥ भद्रा म्हणाली–माझ्या पित्यानें, माझें चित्त श्रीकृष्णाचेठिकाणीं आसक्त आहे असें जाणून आपल्या मामाचा पुत्र अशा त्या श्रीकृष्णाला, आपणच बोलावून आणून त्यास अक्षौहिणी सेना व

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सख्या यांसहवर्तमान मला अर्पण केलें आहे ॥ १५ ॥ आतां, कर्मांच्या योगेंकरून कोठेंहि भ्रमण करीत असणाऱ्या मला जन्मजन्मांचेठिकाणीं या भगवंताची चरणशुश्रूषाच घडो. कारण, जन्माला आलेल्या जीवात्म्याचें कल्याण होण्याचें साधन मुख्य तेंच आहे ॥ १६ ॥ लक्ष्मणा म्हणाली–हे द्रौपदि, नारदानें वारंवार गायन केलेलें श्रीकृष्णाचें जन्म व कर्म ऐकून, अहो ! लक्ष्मीनेंहि इंद्रादिलोकपालांना सोडून भगवंतालाच वरिलें आहे, असा पुष्कळ विचार करून, या लक्ष्मणेसारखें माझेंहि चित्त श्रीकृष्णाचेठिकाणीं आसक्त झालें होतें ॥ १७ ॥ हे साध्वि, केव्हां कन्येविषयीं दयाळु असा बृहत्सेननामक माझ्या पित्यानें, माझा अभिप्राय जाणून, श्रीकृष्णाची प्राप्ति होण्याकरितां उपाय केला ॥१८ ॥ तो असा कीं,–हे द्रौपदि, जसा तुझ्या स्वयंवरामध्यें तुझ्या पित्यानें तुला अर्जुनास देण्याच्या इच्छेनें मत्स्य केला होता, तसाच माझ्या पित्यानेंहि मत्स्य

येन पादसंस्पर्शेनात्मनो मे तत्कैवल्याख्यं श्रेयो भवेत्सः। यद्वा येन कारणेनात्मनो जीवस्य तच्छ्रेयः स एव पुरुषार्थ इति ॥ १६ ॥ राज्ञि हे द्रौपदि यथा मित्रविंदादयास्तथैव ममापि चित्तं मुकुंदविषयमासीत् । सुसंमृश्य सुविचार्य पद्महस्तया श्रिया वृतः किलातोऽपि मम चित्तं श्रीमुकुंदे आसेति ॥ १७ ॥ तत्र श्रीकृष्णप्राप्तावुपायमचीकरत्कारयामास ॥ १८ ॥ यथा राज्ञि तव स्वयंवरे पार्थस्येप्सया आप्तुमिच्छया कृतस्तथा मत्स्यं कारितवान् । पाठांतरे पार्थस्येषुणाऽपाकृतः । तर्हीममप्यर्जुन एव किं नाविध्यत्तत्राह ।

अस्य मे पादसंस्पर्शो भवेज्जन्मनि जन्मनि ॥ कर्मभिर्भ्राम्यमाणाया येन तच्छ्रेय आत्मनः ॥ १६ ॥ लक्ष्मणोवाच ॥ ममापि राज्यच्युतजन्म कर्म श्रुत्वा मुहुर्नारदगीतमास ह ॥ चित्तं मुकुंदे किल पद्महस्तया वृतः सुसंमृश्य विहाय लोकपान् ॥ १७ ॥ ज्ञात्वा मम मतं साध्वि पिता दुहितृवत्सलः ॥ बृहत्सेन इति ख्यातस्तत्रोपायमचीकरत् ॥ १८ ॥ यथा स्वयंवरे राज्ञि मत्स्यः पार्थेप्सया कृतः ॥ अयं तु बहिराच्छन्नो दृश्यते स जले परम् ॥ १९ ॥ श्रुत्वैतत्सर्वतो भूपा आययुर्मत्पितुः पु म् ॥ सर्वास्त्रशस्त्रतत्त्वज्ञाः सोपाध्यायाः सहस्रशः ॥ २० ॥ पित्रा संपूजिताः सर्वे यथावीर्यं यथावयः ॥ आददुः सशरं चापं वेद्धुं पर्षदि मद्धियः ॥ २१ ॥ आदाय व्यसृजन्केचित्सज्यं कर्तुमनीश्वराः ॥ आकोष्ठं ज्यां समुत्कृष्य पेतुरेकेऽमुना हताः ॥ २२ ॥

अयं त्विति । स मत्स्यो बहिरेवाच्छन्नो नांतरतः स्तंभलग्नयोर्ध्वदृष्ट्या संलक्ष्यतेऽयं तु न तथा किंतु स्तंभमूले निहितकलशजले केवलं दृश्यतेऽतो दृष्टिरधस्तादुपरि च लक्ष्यमिति श्रीकृष्णव्यतिरेकेण न कस्यापि भेद्य इति भावः ॥ १९ ॥ २० ॥ मत्स्यं वेद्धुम् । पर्षदि संसदि । मद्धियो मय्येव धीर्येषामिति । अन्यचित्ता न वेद्धुं शक्ता इति भावः ॥ २१ ॥ तदेवाह । आदायेति । अमुना चापेन ॥ २२ ॥

केला होता. परंतु तुमचा मत्स्य केवळ बाहेरूनच आच्छादित होता, आंतून नव्हता. म्हणून आंतून खांबाजवळून वर दृष्टि केली असतां दिसत असे. आणि हा आमचा मत्स्य तर तसा नसून खांबाच्या मुळांत ठेवलेल्या कलशांतील उदकांत मात्र दिसत असे, म्हणून खालीं दृष्टि आणि वर लक्ष्य असें असल्यामुळें श्रीकृष्णावांचून दुसऱ्या कोणासहि भेदन करण्यास येण्यासारखा नव्हता ॥ १९ ॥ हें मत्स्ययंत्राचें करणें ऐकून, सर्व शस्त्रअस्त्रांचें तत्त्व जाणणारे हजारो राजे, आपल्या उपाध्यायांसहवर्तमान सर्वदिशांकडून माझ्या पित्याच्या नगरास प्राप्त झाले ॥ २० ॥ त्या सर्वांचे, त्यांच्या पराक्रमाप्रमाणें व योग्यतेप्रमाणें माझ्या पित्यानें सत्कार केले असतां, माझ्यावर चित्त ठेवणाऱ्या त्यांनीं, सभेमध्यें मत्स्ययंत्राचा भेद करण्याकरितां बाणासहित धनुष्य ग्रहण केलें ॥ २१ ॥ त्यांत कितीएकांनीं धनुष्य हातांत घेऊन तें सज्य करण्यास असमर्थ झाल्यामुळें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तसेंच टाकून दिलें. कितीएक तर धनुष्य सज्य करून व त्याची दोरी मनगटापर्यंत ओढूनहि पुढें सामर्थ्य नसल्यामुळें हातांतून निसटलेल्या त्याच धनुष्यानें ताडित होत्साते खालीं पडले ॥ २२ ॥ दुसऱ्या जरासंध, अंबष्ठ, शिशुपाळ, भीम, दुर्योधन आणि कर्ण ह्या वीरांनीं, धनुष्य उचलून त्यास गुण चढविला परंतु त्या लक्ष्याची स्थिति त्यांस समजेना ह्मणून त्यांचा प्रयत्न फुकट गेला ॥ २३ ॥ यत्न करणाऱ्या अर्जुनानें तर, पाण्यांत घडलेलें मत्स्याचें प्रतिबिंब पाहून, त्याची स्थिति व जागा जाणून, बाणहि सोडिला परंतु त्या बाणानें त्याचा भेद केला नाहीं, केवळ त्यास स्पर्श मात्र केला ॥ २४ ॥ याप्रमाणें ते अभिमानी सर्व राजे, मानभंग पावून यंत्रभेद करण्यापासून निवृत्त झाले असतां, भगवान् श्रीकृष्णानें धनुष्य घेऊन त्याला गुण चढवून, नंतर सहजलीलेनें त्याचेठिकाणीं बाणांचें संधान करून, सूर्य मध्यान्हकाळीं

नाविंदंस्तदवस्थितिमिति मागधादीनां क्रियाशक्तिरेव न तु लक्ष्याभिज्ञतेत्यर्थः ॥ २३ ॥ यत्तो यत्नवान् । असृजन्मुमोच । स बाणो मत्स्यं नाच्छिनत्परं केवलं पस्पर्श । ज्ञानवानप्यर्जुनो बलेनापूर्ण इत्यर्थः ॥ २४ ॥ २५ ॥ अभिजिति सर्वार्थसाधके मुहूर्ते ॥ २६ ॥ २७ ॥ भगवत्प्राप्तिहर्षनिर्भरेणात्मानमेवानुवर्णयंत्याह द्वाभ्याम् । तद्रंगमिति । तत्तदा कलौ कलस्वनौ नूपुरौ ययोस्ताभ्यां पद्भ्यां रंगं प्राविशम् । कनकेनोज्ज्वलां रत्नमालाम् । निवीय प्रावृत्य परिधाय च नीवीबंधेन च कौशिकाग्र्ये उत्तमकौशेयवस्त्रे ।

सज्यं कृत्वाऽपरे वीरा मागधांबष्ठचेदिपाः ॥ भीमो दुर्योधनः कर्णो नाविंदंस्तदवस्थितिम् ॥ २३ ॥ मत्स्याभासं जले वीक्ष्य ज्ञात्वा च तदवस्थितिम् ॥ पार्थो यत्तोऽसृजद्बाणं नाच्छिनत्पस्पृशे परम् ॥ २४ ॥ राजन्येषु निवृत्तेषु भग्नमानेषु मानिषु ॥ भगवान्धनुरादाय सज्यं कृत्वाऽथ लीलया ॥ २५ ॥ तस्मिन्संधाय विशिखं मत्स्यं वीक्ष्य सकृज्जले ॥ छित्वेषुणाऽपातयत्तं सूर्ये चाभिजिति स्थिते ॥ २६ ॥ दिवि दुंदुभयो नेदुर्जयशब्दयुता भुवि ॥ देवाश्च कुसुमासारान्मुमुचुर्हर्षविह्वलाः ॥ २७ ॥ तद्रंगमाविशमहं कलनूपुराभ्यां पद्भ्यां प्रगृह्य कनकोज्वलरत्नमालाम् ॥ नूत्ने निवीय परिधाय च कौशिकाग्र्ये स व्रीडहासवदना कबरीधृतस्रक् ॥ २८ ॥ उन्नीय वक्त्रमुरुकुंतलकुंडलत्विड्गंडस्थलं शिशिरहासकटाक्षमोक्षैः ॥ राज्ञो निरीक्ष्य परितः शनकैर्मुरारेरंसेऽनुरक्तहृदया निदधे स्वमालाम् ॥ २९ ॥

सव्रीडो हासो यस्मिंस्तद्वदनं यस्याः सा । कबर्यां धृताः स्रजो यया सा ॥ २८ ॥ उरवः कुंतला यस्मिन् । कुंडलयोस्त्विषो ययोस्ते गंडस्थले यस्मिंस्तच्च तच्च । शिशिरः संतापहरो हासो येषु तैः कटाक्षमोक्षैरपांगमोक्षणविलासैः अनुरक्तं हृदयं यस्याः साऽहम् ॥ २९ ॥

आला असतां, सर्वार्थसाधक अशा अभिजित् मुहूर्तावर, पाण्यांत प्रतिबिंबित झालेल्या मत्स्याला एकवार पाहून, बाणाच्या योगानें तें यंत्र तोडून पाडिलें ॥ २५ ॥ २६ ॥ त्यावेळीं स्वर्गावर व भूमीवर दुंदुभि वाजूं लागले. जयजयकारशब्दानें युक्त व हर्षानें विव्हळ झालेले देव, भूमीवर पुष्पवृष्टि करूं लागले ॥ २७ ॥ त्यावेळीं नवीं भरजरीचीं रेशमी दोन उत्कृष्ट वस्त्रें एक नेसून व एक पांघरून वेणीवर फुलांच्या माळा घातलेली व सलज्ज हास्ययुक्त मुख असलेली मी, सुवर्णानें देदीप्यमान अशी रत्नाची माळ हातांत घेऊन, मधुरशब्द करणारीं नूपुरें घातलेल्या पायांनींच चालत त्या रंगसभास्थानामध्यें प्रविष्ट झाल्यें ॥ २८ ॥ आणि कृष्णाचेठिकाणीं आसक्तचित्त असलेल्या त्या मीं, ज्याचेठिकाणीं उत्कृष्ट केशभार व कुंडलांच्या कांतीनें युक्त असलेले गाल चमकत आहेत असें आपलें मुख वर करून, संताप घालविणाऱ्या हास्ययुक्त कटाक्षपातांनीं चारी बाजूंनीं बसलेल्या राजांकडे सावकाशपणें पाहात पाहात श्रीकृष्णाजवळ जाऊन आपल्या हातांतील माळ त्या श्रीकृष्णाच्या गळयांत घातली ॥ २९ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तों इतक्यांत मृदंग, पटह, शंख, भेरी व चौघडे इत्यादिक वाद्यें वाजूं लागलीं; नट व नर्तकी नृत्य करूं लागल्या व गवईलोक गाऊं लागले ॥ ३० ॥ हे द्रौपदि, याप्रकारें भगवान् समर्थ श्रीकृष्णाला मी वरिलें असतां, कामातुर झालेल्या व श्रीकृष्णाशीं स्पर्धा करणाऱ्या मोठमोठ्या राजांनीं, तें सहन केलें नाहीं ॥ ३१ ॥ इतक्यांत भगवंतानें, उत्कृष्ट चार घोडे जुंपलेल्या रथावर मला बसवून, आपण कवचादिक धारण केलीं आणि चतुर्भुज होऊन, दोन हातांनीं मला आलिंगन करून व दुसऱ्या दोन हातांनीं धनुष्यबाण ग्रहण करून युद्धाविषयीं तयार राहिला ॥ ३२ ॥ हे द्रौपदि, त्यावेळीं सुवर्णानें बांधविलेला तो रथ, दारुक सारथ्यानें चालविला असतां, जसा हरिणांच्या देखत सिंह आपला भाग घेऊन जातो त्याप्रमाणें सर्व राजांच्या देखत श्रीकृष्ण मला घेऊन निघाला ॥ ३३ ॥ तेव्हां धनुष्यें उचलून युद्ध करण्यास तयार

॥ ३० ॥ याज्ञसेनि हे द्रौपदि ईशे श्रीकृष्णे मया वृते सति स्पर्धंतः स्पर्धमानाः । नन्वेवं परमैश्वर्यं दृष्टवतां कुतः स्पर्धाऽवसरस्तत्राह । हृच्छयातुरा इति । हृच्छयेन कामेनातुरा विवशाः । कामविजृंभिता स्पर्धेति भावः ॥ ३१ ॥ हयरत्नानां चतुष्टयं यस्मिंस्तं रथम् । द्वाभ्यां मामालिंग्य द्वाभ्यां धनुर्बाणौ गृहीत्वा चतुर्भुजस्तस्थौ ॥ ३२ ॥ मृगाणां मिषतां मृगराडिव तदा हरिर्जगामेति शेषो ज्ञातव्यः दारुकस्यैव वा मृगराजोपमा ॥ ३३ ॥ अन्वसज्जंत पृष्ठतः सक्ता बभूवुः । निषेद्धुं प्रतिबंधं कर्तुं केचन पुरतो

तावन्मृदंगपटहाः शंखभेर्यानकादयः ॥ निनेदुर्नटनर्तक्यो ननृतुर्गायका जगुः ॥ ३० ॥ एवं वृते भगवति मयेशे नृपयूथपाः ॥ न सेहिरे याज्ञसेनि स्पर्धंतो हृच्छयातुराः ॥ ३१ ॥ मां तावद्रथमारोप्य हयरत्नचतुष्टयम् ॥ शार्ङ्गमुद्यम्य संनद्धस्तस्थावाजौ चतुर्भुजः ॥ ३२ ॥ दारुकश्चोदयामास कांचनोपस्करं रथम् ॥ मिषतां भूभुजां राज्ञि मृगाणां मृगराडिव ॥ ३३ ॥ तेऽन्वसज्जंत राजन्या निषेद्धुं पथि केचन ॥ संयत्ता उद्धृतेष्वासा ग्रामसिंहा यथा हरिम् ॥ ३४ ॥ ते शार्ङ्गच्युतबाणौघैः कृत्तबाह्वंघ्रिकंधराः ॥ निपेतुः प्रधने केचिदेके संत्यज्य दुद्रुवुः ॥ ३५ ॥ ततः पुरीं यदुपतिरत्यलंकृतां रविच्छदध्वजपटचित्रतोरणाम् ॥ कुशस्थलीं दिवि भुवि चाभिसंस्तुतां समाविशत्तरणिरिव स्वकेतनम् ॥ ३६ ॥ पिता मे पूजयामास सुहृत्संबंधिबांधवान् ॥ महार्हवासोऽलंकारैः शय्यासनपरिच्छदैः ॥ ३७ ॥ दासीभिः सर्वसंपद्भिर्भटेभरथवाजिभिः ॥ आयुधानि महार्हाणि ददौ पूर्णस्य भक्तितः ॥ ३८ ॥

गत्वा पथि संयत्ता बभूवुरित्यर्थः । उद्धृतेष्वासा ऊर्ध्वकृतचापाः । ग्रामसिंहाः श्वानो हरिं सिंहं यथेति ॥ ३४ ॥ ३५ ॥ रविं छादयंति ते रविच्छदा ध्वजेषु पटा यस्यां चित्राणि तोरणानि यस्यां सा च सा च । तां कुशस्थलीं पुरीं यदुपतिः समाविशत् । स्वकेतनं मंडलमस्ताचलं वा ॥ ३६ ॥ महार्हवासःप्रभृतिभिः सुहृदादीन्पूजयामास ॥ ३७ ॥ दास्यादिभिः सहायुधानि पूर्णायापि ददौ ॥ ३८ ॥

झालेले ते कितीएक राजे, जसे कुतरे सिंहाचा निषेध करण्याकरितां त्याच्या मागून धांवतात त्याप्रमाणें मार्गामध्यें श्रीकृष्णाचा रोध करण्याकरितां त्याच्या मागून धावूं लागले ॥ ३४ ॥ त्यांपैकीं कितीएक राजे, युद्धांत श्रीकृष्णाच्या शार्ङ्गधनुष्यापासून सुटलेल्या बाणसमूहांनीं हात, पाय व कंठ तुटून मरूनच पडले. बाकीच्या कांहीं एकांनीं युद्ध करावयाचें सोडून देऊन पलायन केलें ॥ ३५ ॥ नंतर, जसा सूर्य अस्ताचलास जातो त्याप्रमाणें श्रीकृष्ण द्वारकेस गेला. ती द्वारका सूर्याला आच्छादन करणाऱ्या ध्वजा उभारून आणि विचित्र तोरणें बांधून अतिशयेंकरून अलंकृत केलेली असून सगळ्या पृथिवीवर व स्वर्गावर नावाजलेली होती ॥ ३६ ॥ माझ्या पित्यानें, अमोलिक वस्त्रें अलंकार, शय्या, आसनें व भांडींवगैरे साहित्यें देऊन, मित्र, संबंधी व बांधव यांचा सत्कार केला ॥ ३७ ॥ आणि पूर्णकाम अशाहि त्या भग- ॥२५७॥

CC-0. In Public Domain:Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वंताला, दासी, सर्वसंपत्ति, हत्ती, घोडे, रथ, शिपाई व नानाप्रकारचीं आयुधें भक्तिपुरःसर अर्पण केलीं ॥ ३८ ॥ हे द्रौपदि, ह्या रुक्मिण्यादिक आह्मी आठहि जणींनीं, जन्मांतरीं सर्वसंगनिवृत्ति, वैराग्य व तप हीं आचरण केलीं होतीं, ह्मणून या जन्मीं, आह्मी त्या आत्माराम साक्षात् भगवान् श्रीकृष्णाच्या घरच्या दासी झालों आहों ॥ ३९ ॥ सोळा हजार एकशें स्त्रिया ह्मणाल्या–भौमासुरानें, दिग्विजयाचेवेळीं जिंकलेल्या राजांच्या आह्मां कन्यांना कोंडून ठेविलें आहे असें जाणून, पूर्णकाम अशाहि ज्या श्रीकृष्णानें, त्या भौमासुराला सैन्यासहवर्तमान युद्धांत मारून आह्मांस बंदिगृहांतून सोडविलें आणि संसारापासून मुक्त करविणाऱ्या आपल्या चरणकमलाचें वारंवार स्मरण करणाऱ्या त्या आमचें पाणिग्रहण केलें ॥ ४० ॥ हे साध्वि, आह्मी सार्वभौमपद, इंद्रपद, त्या दोन्ही पदांचें भोगवैभव, अणिमादि सिद्धि, ब्रह्मपद, मोक्ष

इमा अष्टौ वयं सर्वसंगनिवृत्त्या तपसा स्वधर्मेणाद्धा साक्षात्तस्य गृहदासिका बभूविम ॥ ३९ ॥ क्षितिजये दिग्विजये जितानां राज्ञां कन्या नोऽस्मांस्तेन रुद्धा ज्ञात्वा ततो निर्मुच्य संसृतेर्विमोक्षो यस्मात्तत्पादांबुजमनुस्मरंतीर्नः परिणिनायोदवहत् । आप्तकामोऽपि यः ॥ ४० ॥ न वयमिति । साम्राज्यादि न कामयामहे किंतु एतस्य श्रीमत्पादरजो मूर्ध्ना वोढुं कामयामह इति । ननु तस्य गृहिण्यो यूयं सर्वसंपद्भ्राजः किमेवं कामयध्वमत आहुः । हे साध्वि । साम्राज्यं सार्वभौमपदम् । स्वाराज्यमैंद्रं पदम् । भौज्यं तदुभयभोगभाक्त्वम् । विविधं राजत इति विराट् तस्य भावो वैराज्यमणिमादिसिद्धिभाक्त्वमित्यर्थः । पारमेष्ठ्यं ब्रह्मपदम् । आनंत्यं मोक्षम् । हरेः पदं तत्सालोक्यादि न तु

आत्मारामस्य तस्येमा वयं वै गृहदासिकाः ॥ सर्वसंगनिवृत्त्याऽद्धा तपसा च बभूविम ॥ ३९ ॥ महिष्य ऊचुः ॥ भौमं निहत्य सगणं युधि तेन रुद्धा ज्ञात्वाऽथ नः क्षितिजये जितराजकन्याः ॥ निर्मुच्य संसृतिविमोक्षमनुस्मरंतीः पादांबुजं परिणिनाय य आप्तकामः ॥ ४० ॥ न वयं साध्वि साम्राज्यं स्वाराज्यं भौज्यमप्युत ॥ वैराज्यं पारमेष्ठ्यं च आनंत्यं वा हरेः पदम् ॥ ४१ ॥ कामयामह एतस्य श्रीमत्पादरजः श्रियः ॥ कुचकुंकुमगंधाढ्यं मूर्ध्ना वोढुं गदाभृतः ॥ ४२ ॥ व्रजस्त्रियो यद्वांछंति पुलिंद्यस्तृणवीरुधः ॥ गावश्चारयतो गोपाः पादस्पर्शं महात्मनः ॥४३॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे उत्तरार्धे त्र्यशीतितमोऽध्यायः ॥८३॥ ॥

कामयामह इति । यद्वा बह्वृचब्राह्मणोक्तक्रमेण प्रागादिदिक्चतुष्टयाधिपत्यानि साम्राज्यभौज्यस्वाराज्यवैराज्यानि व्याख्येयानि ॥ ४१ ॥ तत्किं तत्पादरज एव काम्यतेऽत आहुः । श्रियः कुचकुंकुमगंधाढ्यमिति । ब्रह्मादिसेव्या लक्ष्म्याऽपि सेवितत्वादिति भावः ॥ ४२ ॥ ननु तर्ह्यतिदुर्लभत्वात्किं तद्वांछयाऽत आहुः । व्रजस्त्रिय इति । यद्यथा गावो गाः महात्मनोऽपि गाश्चारयतः पादस्पर्शं च गोपा यथा वाछंति तद्वत् । तत्पराणां सुलभ इति भावः ॥ ४३ ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधे उत्तरार्धे टीकायां त्र्यशीतितमोऽध्यायः ॥ ८३ ॥ ॥

किंवा सलोकता इत्यादिक मुक्ति यांची मुळींच इच्छा करीत नाहीं; तर त्या भगवंताचें ब्रह्मादिकांनीं सेव्य अशा लक्ष्मीच्या स्तनसंबंधी केशरानें सुगंधयुक्त झालेलें जें सर्वोत्कृष्ट चरणरज तेंच मस्तकानें धारण करण्याची इच्छा करितों ॥ ४१ ॥ ४२ ॥ आतां, अतिदुर्लभ असें तें चरणरज तुह्मी कां इच्छितां असें ह्मणसील तर भक्तवात्सल्यामुळें गाई चारणाऱ्या त्या महात्म्या भगवंताच्या चरणरजाला व पादस्पर्शाला, जसे गोप, गोपी, भिल्लिणी, तृण व वल्लीसुद्धां इच्छितात त्याप्रमाणें आह्मीहि इच्छितों. येणेंकरून भगत्पर असणारांना तें चरणरज अतिसुलभ आहे असें सुचविलें ॥ ४३ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील उत्तरार्धांत कृष्णवि-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वाहनिरूपणनामक हा त्र्यायशींवा अध्याय समाप्त झाला ॥ ८३ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या चवऱ्याऐशींव्या अध्यायामध्यें ऋषींचा समागम झाल्यावर वसुदेवाच्या यज्ञाचा उत्साह व संबंधिलोकांची पाठवणूकवगैरे कथा वर्णन केली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, याप्रमाणें कुंती, गांधारी, द्रौपदी, सुभद्रा तशाच राजांच्या स्त्रिया व कृष्णाच्या भक्त अशा गोपी, यांनीं, रुक्मिणीवगैरे कृष्णस्त्रियांचें सर्वात्मा हरि श्रीकृष्णाचेठिकाणीं प्रेमानें पारतंत्र्य असलेलें भाषण श्रवण करून, त्या सर्वहि आनंदाश्रूंनीं पूर्णनेत्र होऊन विस्मय पावल्या ॥ १ ॥ याप्रमाणें स्त्रियांबराबर स्त्रिया व पुरुषांबरोबर पुरुष भाषण करीत असतां, त्या कुरुक्षेत्रामध्यें रामकृष्णांना पाहण्याच्या इच्छेनें ऋषि प्राप्त झाले ॥ २ ॥ त्यांचीं नांवें–वेदव्यास, नारद, च्यवन, देवल, असित, विश्वामित्र, शतानंद, भरद्वाज, गौतम, ॥ ३ ॥ शिष्यांसहित भगवान् परशुराम, वसिष्ठ, गालव, भृगु, पुलस्त्य, कश्यप, अत्रि, मार्कंडेय, बृहस्पति, ॥ ४ ॥ द्वित, त्रित, एकत, सनकादिक ब्रह्मपुत्र, अंगिरा,

---

चतुर्भिरधिकाशीतितमे मुनिसमागमे ॥ वसुदेवमखोत्साहबंधुप्रस्थापनादिकम् ॥ १ ॥ सुबलपुत्री गांधारी । माधवी सुभद्रा । क्षितिपानां राज्ञां पत्न्यः । स्वगोप्यः कृष्णभक्त

श्रीशुक उवाच ॥ श्रुत्वा पृथा सुबलपुत्र्यथ याज्ञसेनी माधव्यथ क्षितिपपत्न्य उत स्वगोप्यः ॥ कृष्णेऽखिलात्मनि हरौ प्रणयानुबंधं सर्वा विसिस्म्युरलमश्रुकलाकुलाक्ष्यः ॥ १ ॥ इति संभाषमाणासु स्त्रीभिः स्त्रीषु नृभिर्नृषु ॥ आययुर्मुनय स्तत्र कृष्णरामदिदृक्षया ॥ २ ॥ द्वैपायनो नारदश्च च्यवनो देवलोऽसितः ॥ विश्वामित्रः शतानंदो भरद्वाजोऽथ गौतमः ॥ ३ ॥ रामः सशिष्यो भगवान्वसिष्ठो गालवो भृगुः ॥ पुलस्त्यः कश्यपोऽत्रिश्च मार्कंडेयो बृहस्पतिः ॥ ४ ॥ द्वितस्त्रितश्चैकतश्च ब्रह्मपुत्रास्तथांऽगिराः ॥ अगस्त्यो याज्ञवल्क्यश्च वामदेवादयोऽपरे ॥ ५ ॥ तान्दृष्ट्वा सहसोत्थाय प्रागासीना नृपादयः ॥ पांडवाः कृष्णरामौ च प्रणेमुर्विश्ववंदितान् ॥ ६ ॥ तानानर्चुर्यथा सर्वे सहरामोऽच्युतोऽर्चयत् ॥ स्वागतासनपाद्यार्घ्यमाल्यधूपानुलेपनैः ॥ ७ ॥ उवाच सुखमासीनान्भगवान्धर्मगुप्तनुः ॥ सदसस्तस्य महतो यतवाचोऽनुशृण्वतः ॥ ८ ॥ श्रीभगवानुवाच ॥ अहो वयं जन्मभृतो लब्धं कार्त्स्न्येन तत्फलम् ॥ देवानामपि दुष्प्रापं यद्योगेश्वरदर्शनम् ॥ ९ ॥

गोप्यः । विसिस्म्युर्विस्मयं चक्रुः ॥ १ ॥ २ ॥ ३ ॥ ४ ॥ ५ ॥ ६ ॥ आनर्चुरर्चितवंतः ॥ ७ ॥ धर्मगोप्त्री तनुर्यस्य स धर्मगुप्तनुः । यता नियता वाग्यस्य तस्य सदसः ॥ ८ ॥ जन्मभृतः सफलजन्मानः । तत्फलं जन्मफलम् । किं तत् । यद्योगेश्वरदर्शनम् ॥ ९ ॥

अगस्त्य, याज्ञवल्क्य तसेच वामदेवादिक दुसरेहि ऋषि; हीं होतीं ॥ ५ ॥ त्या ऋषींना पाहतांच पांडव, श्रीकृष्ण, बळराम व जे तेथें पूर्वीं बसलेले राजेवगैरे लोक होते ते सर्वहि एकदम उठून त्यांनीं, जगद्वंद्य अशा त्या ऋषींना नमस्कार केला ॥ ६ ॥ त्यावेळीं पांडवादिक सर्वराजांनीं त्यांचें, स्वागतप्रश्न, आसन, पाद्य, अर्घ्य, पुष्पें, धूप व चंदनादिकांच्या उट्या इत्यादिकेंकरून पूजन केलें; तसेंच बळरामासहित श्रीकृष्णानेंहि त्यांचें यथायोग्य पूजन केलें ॥ ७ ॥ नंतर सुखानें बसलेल्या त्या व्यासादिक मुनींप्रत धर्मरक्षणाकरितां अवतार धारण केलेला तो श्रीकृष्ण, ती मोठी सभा मुकाट्यानें ऐकत असतां ह्मणाला कीं,– ॥ ८ ॥ श्रीभगवान् ह्मणाला–अहो ! आज आह्मी सफळजन्मे झालों आहों. कारण, त्या जन्माचें फळ पूर्णपणें आह्मी मिळविलें आहे. तें कोणतें ? ह्मणाल तर–देवांनाहि दुर्लभ असें जें तुम्हां योगेश्वरांचें दर्शन

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तें आह्मी मिळविलें आहे ॥ ९ ॥ केवळ दर्शनच नाहीं तर स्पर्शादिकसुद्धां आम्हांस घडले आहेत. अहो ! केवळ तीर्थस्नानादिकांनाच तप असें मानणाऱ्या व प्रतिमेवरच ही देवता आहे अशी दृष्टी ठेवणाऱ्या मनुष्यांना, आपलें (योगेश्वरावें) दर्शन, स्पर्शन, स्वागतप्रश्न, नमस्कार व चरणपूजा इत्यादिक घडतात काय ? नाहींच घडत ॥ १० ॥ उदकमय तीर्थें हीं तीर्थें नव्हेत व मृत्तिकापाषाणमय देव हे देव नव्हेत असें नाहीं, तर तीं तीर्थें व ते देव आहेत खरे परंतु त्यांच्या व साधूंच्यामध्यें पुष्कळ फरक आहे. तीं तीर्थें व ते देव, पुष्कळ काळपर्यंत सेवा केली असतां पवित्र करितात आणि साधुलोक दर्शनमात्रेंकरूनच पवित्र करितात ॥ ११ ॥ अग्नि, सूर्य, चंद्र, तारे, भूमि, जळ, आकाश, वायु, वाणी व मन यांच्या अभिमानी देवतांची उपासना केली असतांहि त्या, ' तूं तुझें व मी माझें अशी ' भेदबुद्धि धारण करणाऱ्या पुरुषाचें, पाप-

---

किंच युष्माकं दर्शनमेव तावद्देवानामपि दुष्प्रापमस्माकं तु स्पर्शनादिकमपि कथं नु घटितमिति विस्मयेनाह । किमिति । स्वल्पतपसां तीर्थस्नानादिमात्रे तपोबुद्धिर्येषां तथाऽर्चायां प्रतिमायां देव इति चक्षुर्दृष्टिर्येषां तेषां योगेश्वरदर्शनादिकमिदं किमसंभावितमित्यर्थः ॥ १० ॥ एतत्प्रपंचयति । नह्यम्मयानीति । त्रिभिः ॥ ११ ॥ वाङ्मनसयोरप्युपासनाविषयत्वम् । यो वाचं ब्रह्मेत्युपास्ते मनो ब्रह्मेत्युपास्त इति श्रुतेः । अघं तन्मूलमज्ञानं न हरंति । अत्र हेतुः । भेदकृतो भेदकर्तारः । यद्वा भेदबुद्धिं कुर्वतः पुंसः । विपश्चितो

किं स्वल्पतपसां नृणामर्चायां देवचक्षुषाम् ॥ दर्शनस्पर्शनप्रश्नप्रह्वपादार्चनादिकम् ॥ १० ॥ न ह्यम्मयानि तीर्थानि न देवा मृच्छिलामयाः ॥ ते पुनंत्युरुकालेन दर्शनादेव साधवः ॥ ११ ॥ नाग्निर्न सूर्यो न च चंद्रतारका न भूर्जलं खं श्वसनोऽथ वाङ्मनः ॥ उपासिता भेदकृतो हरंत्यघं विपश्चितो घ्नंति मुहूर्तसेवया ॥ १२ ॥ यस्यात्मबुद्धिः कुणपे त्रिधातुके स्वधीः कलत्रादिषु भौम इज्यधीः ॥ यत्तीर्थबुद्धिः सलिले न कर्हिचिज्जनेष्वभिज्ञेषु स एव गोखरः ॥ १३ ॥ श्रीशुक उवाच ॥ निशम्येत्थं भगवतः कृष्णस्याकुंठमेधसः ॥ वचो दुरन्वयं विप्रास्तूष्णीमासन्भ्रमद्धियः ॥ १४ ॥ चिरं विमृश्य मुनय ईश्वरस्येशितव्यताम् ॥ जनसंग्रह इत्यूचुः स्मयंतस्तं जगद्गुरुम् ॥ १५ ॥

निरस्तभेदाः । ते तु मुहूर्तमात्रसेवयैवाघं घ्नंतीति ॥ १२ ॥ अतः साधून्विहायान्यत्रात्मादिबुद्ध्या सज्जमानोऽतिमंद इत्याह । यस्येति । आत्मबुद्धिरहमिति बुद्धिः । त्रयो धातवो वातपित्तश्लेष्माणः प्रकृतयो यस्य तस्मिन्कुणपे शरीरे स्वधीः स्वीया इति बुद्धिः । भौमे भूविकारे इज्यधीर्देवताबुद्धिः । यच्चस्य तीर्थबुद्धिस्तीर्थमिति बुद्धिः । अभिज्ञेषु तत्त्ववित्सु यस्य ता बुद्धयो न संति स एव गोष्वपि खरो दारुणोऽत्यविवेकी । यद्वा गवां तृणादिभारवाहः खरो गर्दभ इति ॥ १३ ॥ दुरन्वयमननुरूपम् । भ्रमंत्यनवस्थिता बुद्धिर्येषां ते ॥ १४ ॥ ईशितव्यतामनीश्वरतां कर्माधिकारितां जनसंग्रहमात्रमेतदित्यूचुः । स्मयंतो हसंतः ॥ १५ ॥

मूलक अज्ञान नाहींसें करीत नाहींत आणि विवेकी पुरुष तर मुहूर्तमात्र सेवेच्याच योगानें भक्तिज्ञानादिकांचा उपदेश करून तें अज्ञान नाहींसें करितात ॥ १२ ॥ यास्तव ज्या पुरुषाला, वातपित्तकफरूप तीन धातूंनीं युक्त अशा शवतुल्य जड शरीराचेठिकाणींच ' हा मी अशी ' आत्मबुद्धि आहे, स्त्रीपुत्रादिकांचेठिकाणीं ' हे माझे अशी ' स्वकीयबुद्धि आहे, मृत्पाषाणादिरूप मूर्तींचेठिकाणींच पूज्यबुद्धि आहे व उदकाचेठिकाणींच तीर्थबुद्धि आहे परंतु तत्त्ववेत्त्या साधूंचेठिकाणीं त्या सर्वबुद्धि नाहींत, तो गाईंच्या तृणादिकांचीं ओझीं वाहणाऱ्या गर्दभासारखा (पशुतुल्य) होय ॥ १३ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, या प्रकारचें अकुंठबुद्धि भगवान् श्रीकृष्णाचें दीनपणाचें भाषण ऐकून, ते ब्राह्मण त्या भाषणाचा आशय न समजल्यामुळें चकितबुद्धि होऊन स्तब्ध (निरुत्तर) राहिले ॥ १४ ॥ नंतर त्या ऋषींनीं बराच वेळ विचार करून हास्य करीत त्या-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जगद्गुरु श्रीकृष्णाला ह्मणाले कीं,—कृष्णा, तूं ईश्वर असून ‘ मी तुमच्या आज्ञेनुसार वागणारा आहें असें ’ जें ह्मणतोस तें केवळ जनसंग्रहाकरितां (सर्वलोकांनीं त्याप्रमाणें वागावें हें दर्शविण्याकरितां) आहे ॥ १९ ॥ ऋषि ह्मणाले—हे प्रभो, ज्या तुझ्या मायेनें विश्वस्रष्ट्यांचे अधिपति मरीच्यादिकं ऋषि व तत्त्ववेत्त्यांमध्यें उत्तम असे आह्मींहि अत्यंत मोहित झालों आहों. ह्मणजे तुझा अभिप्राय काय आहे तें जाणत नाहीं. कारण, जो तूं मनुष्यचेष्टेनें गुप्त होऊन स्वतां ईश्वर असतांहि दुसऱ्याच्या सेवकासारखें आचरण करितोस, त्या तुज भगवंताचें चरित्र मोठें आश्चर्यकारक (जाणावयास फार कठिण) आहे ॥ १६ ॥ आतां त्याचें भगवत्त्व सांगतात—जो तूं आसक्तिरहित व एकाठा असूनहि, जशी भूमि वस्तुतः एक असूनहि आपुल्या कार्यरूप घटादिक पदार्थांच्या योगानें बहुत नांवें व रूपें धारण करणारी होत्ये त्याप्रमाणें तूंहि आपल्या स्वरूपमात्रें-

---

अनन्वयं विवृण्वंत आहुर्द्वाभ्याम् । यन्माययेति । तत्त्ववित्सूत्तमा अपि वयम् । काऽसौ माया ययाविमोहिता इति तामाहुः । यदिति । यद्यस्मादीहया नरचेष्टितेन गूढः सन्नीशितव्यायत्यनीश्वरवदाचरति भवान् । नन्वहमीश्वरश्चेत्किमित्येवमाचरेयं तत्राहुः । अहो इति । भगवतस्तव विचेष्टितं विचित्रमतर्क्यम् ॥ १६ ॥ भगवत्त्वमेवाहुः । अनीह इति । अनीहोऽक्रिय एव । आत्मना स्वरूपमात्रेण । बहुधेत्यत्र दृष्टांतः । यथा भौमैरिति । भौमैर्घटादिविकारैरुपलक्षिता । वाचारंभणं विकारो नामधेयं मृत्तिकेत्येव सत्यमिति श्रुतेः । ननु कथमहं जगत्सृष्ट्यादिकर्ता वसुदेवपुत्रत्वादिति तत्राहुः । अहो इति । विभून्नः परिपूर्णस्य तवेदं जन्मादिचरितं विडंबनमनुकरणमात्रं न तु तत्त्वमिति ॥ १७ ॥

यन्मायया तत्त्वविदुत्तमा वयं विमोहिता विश्वसृजामधीश्वराः ॥ यदीशितव्यायति गूढ ईहया अहो विचित्रं भगवद्विचेष्टितम् ॥ १६ ॥ अनीह एतद्बहुधैक आत्मना सृजत्यवत्यत्ति न बध्यते यथा ॥ भौमैर्हि भूमिर्बहुनामरूपिणी अहो विभून्नश्चरितं विडंबनम् ॥ १७ ॥ अथापि काले स्वजनाभिगुप्तये बिभर्षि सत्वं खलनिग्रहाय च ॥ स्वलीलया वेदपथं सनातनं वर्णाश्रमात्मा पुरुषः परो भवान् ॥ १८ ॥ ब्रह्म ते हृदयं शुक्लं तपःस्वाध्यायसंयमैः ॥ यत्रोपलब्धं सद्व्यक्तमव्यक्तं च ततः परम् ॥ १९ ॥ तस्माद्ब्रह्मकुलं ब्रह्मन् शास्त्रयोनेस्त्वमात्मनः ॥ सभाजयसि सद्धाम तद्ब्रह्मण्याग्रणीर्भवान् ॥ २० ॥

जनसंग्रहमाहुः । अथापीति त्रिभिः । सत्वं शुद्धसत्वात्मकं रूपं बिभर्षि । स्वलीलया आचारेण वेदपथं च बिभर्षि ॥ १८ ॥ अतएव ब्राह्मणेषु बहुमानमपि करोषीति सहेतुकमाहुः । ब्रह्मेति । ब्रह्म वेदाख्यं शुक्लं शुद्धं ते हृदयमंतरंगं रूपम् । कुत इत्यत आहुः । यत्रेति । यत्र ब्रह्मणि व्यक्तं कार्यमव्यक्तं कारणं ततः परं सत्सन्मात्रं ब्रह्म च तपआदिभिरुपलब्धं तद्ब्रह्म ॥ १९ ॥ तस्माद्वेदहृदयत्वाद्वेदप्रवर्तकं ब्राह्मणकुलं शास्त्रयोनेर्वेदप्रमाणकस्य तव सद्धाम श्रेष्ठमुपलब्धिस्थानं सभाजयसि संपूजयसि तत्तस्मादेव कारणात्त्वं ब्रह्मण्यानामग्रणी-

---

करून हें जग बहुतप्रकारांनीं उत्पन्न करितोस, रक्षण करितोस व संहार करितोस; तथापि ‘ मी केलेलें हें माझें, अशा अहंकारानें ’ बद्ध होत नाहींस. त्या तुज परिपूर्णाचें, ‘ मनुष्यत्व स्वीकारून ब्राह्मणांचा सन्मानवगैरे करण्याचें ’ चरित्र केवळ अनुकरण करून दाखविलेलें आहे ॥ १७ ॥ आतां, त्याचा जनसंग्रह सांगतात—हे प्रभो, तूं जरी वस्तुतः प्रकृतीहून पर पुरुषोत्तम आहेस व तुला जन्मादिक विकार नाहींत तथापि तूं, भक्तांच्या रक्षणाकरितां व दुष्टांच्या निग्रहाकरितां त्यात्यावेळीं आपलें शुद्धसत्वात्मक स्वरूप धारण करितोस आणि वर्णाश्रमधर्मांच्या अभिमानानें युक्त होत्साता लोकशिक्षेकरितां आपल्या आचरणानें सनातन वेदमार्गाचें रक्षण करितोस ॥ १८ ॥ वेद हें तुझें शुद्ध अंतरंग स्वरूप आहे. ज्यावेदांत—तप, स्वाध्याय व इंद्रियनिग्रह यांच्या योगानें कार्यरूप, कारणरूप, व त्या दोन्हींहून निराळें असें सन्मात्र परब्रह्म उपलब्ध होत आहे ॥ १९ ॥ तस्मात् हे ब्रह्मरूपा कृष्णा, तुझ्या हृदयाचें प्रवर्तक जें ब्राह्मणकुळ तें तूं, वेदप्रमाणक अशा आपल्या प्राप्तीचें स्थान आहे असें जाणून, त्याचा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सन्मान करितोस म्हणूनच तूं ब्राह्मणभक्तांमध्यें श्रेष्ठ गणला आहेस ॥ २० ॥ असो. सत्पुरुषांची गति अशा तुझ्याबरोबर समागम पावोन आज आमच्या विद्येचें, तपाचें,
ज्ञानाचें व जन्माचें साफल्य झालें आहे. कारण, तूं सर्व कल्याणाचा परम अवधि आहेस ॥ २१ ॥ त्या षड्गुणैश्वर्यसंपन्न, अकुंठितबुद्धि, व योगमायेच्या योगानें महिमा
आच्छादित असलेल्या तुज परमात्म्या श्रीकृष्णाला नमस्कार असो ॥ २२ ॥ सर्वांचा आत्मा, सृष्ट्यादिकांचें कारण, सर्वांचा नियंता व मायारूप पडद्यानें आच्छादित
अशा तुला, हे येथें असलेले राजे व तुझ्याबरोबर एकठिकाणीं भोजनशयनादिक करणारे यादवहि जाणत नाहींत ॥ २३ ॥ जसा निजलेला पुरुष, स्वप्नामध्यें, स्वप्नांतील
पदार्थांना सत्य मानीत असून मिथ्याभूत इंद्रियांचें (मनानें) भासलेल्या सिंहादिक स्वरूपालाच ' तें मी आहें असें ' मानितो, परंतु त्याहून रहित दुसऱ्या जाग्रदवस्थेंतील

मुख्यस्तत्प्रवर्तकः सन्कर्माचरसीत्यर्थः ॥ २० ॥ तस्मादीश्वरस्य तवेदं जनसंग्रहमात्रं वयं तु तव संगत्या कृतार्था इत्याहुः । अद्येति षड्भिः । सतां गत्या त्वया संगम्य
संगं प्राप्य । यद्यस्मात्त्वं श्रेयसां परोऽवधिः ॥ २१ ॥ २२ ॥ एकस्मिन्नेव स्थाने आरामो येषां तेऽपि । कालं सृष्ट्यादिकारणम् । ईश्वरं नियंतारम् ॥ २३ ॥
एतत्सदृष्टांतमाहुः । यथेति । शयानः स्वप्नान्पश्यन् । गुणतत्त्वदृक् स्वप्नविषयेषु तत्त्वदृष्टिः । नाममात्रमिंद्रियेण मनसा आभातं सिंहव्याघ्रादिरूपमात्मानं वेद तद्रहितं देवदत्ता-

अद्य नो जन्मसाफल्यं विद्यायास्तपसो दृशः ॥ त्वया संगम्य सद्गत्या यदंतः श्रेयसां परः ॥ २१ ॥ नमस्तस्मै भगवते कृष्णा-
याकुंठमेधसे ॥ स्वयोगमायया छन्नमहिम्ने परमात्मने ॥ २२ ॥ न यं विदंत्यमी भूपा एकारामाश्च वृष्णयः ॥ मायाजवनिकाछन्न-
मात्मानं कालमीश्वरम् ॥ २३ ॥ यथा शयानः पुरुष आत्मानं गुणतत्त्वदृक् ॥ नाममात्रेंद्रियाभातं न वेद रहितं परम् ॥ २४ ॥
एवं त्वा नाममात्रेषु विषयेष्विंद्रियेहया ॥ मायया विभ्रमच्चित्तो न वेद स्मृत्युपप्लवात् ॥ २५ ॥ तस्याद्य ते ददृशिमांघ्रिमघौघमर्ष-
तीर्थास्पदं हृदि कृतं सुविपक्वयोगैः ॥ उत्सिक्तभक्त्युपहताशयजीवकोशा आपुर्भवद्गतिमथोऽनुगृहाण भक्तान् ॥ २६ ॥

दिरूपमात्मानं न वेद यथा ॥ २४ ॥ एवं त्वा त्वां नाममात्रेषु स्वप्नादितुल्येषु विषयेष्विंद्रियैर्या ईहा प्रवृत्तिः सैव माया तया विभ्रमच्चित्तो न वेद । स्मृतेर्विवेकस्योपप्लवा-
न्नाशात् ॥ २५ ॥ अघौघस्य मर्षं नाशं करोति यद्गंगाख्यं तीर्थं तस्यास्पदमाश्रयं तेंऽघ्रिं सुविपक्वयोगैरपि हृदि कृतं केवलं नतु दृष्टं तस्य तेंऽघ्रिं ददृशिम दृष्टवंतो वयं
बहुभिः पुण्यैरतोऽस्मान् भक्ताननुगृहाण । भक्तान् कृत्वाऽनुग्रहं कुर्वित्यर्थः । ननु किं भक्त्या यथा पूर्वं तप एव तप्यतामिति नेत्याहुः । उत्सिक्ता उद्रिक्ता या भक्तिस्तयोपहत
आशयलक्षणो जीवकोशो येषां त एव पूर्वे भवद्गतिमापुर्नान्य इति ॥ २६ ॥

मायेच्या योगानें आत्मस्मृतीचा नाश होत अस-
देवदत्तादिरूप आपणास जाणत नाहीं ॥ २४ ॥ याप्रमाणें जाग्रदवस्थेमध्येंहि शब्दादिक विषयांचेठिकाणीं इंद्रियप्रवृत्तिरूप
ल्यामुळें भ्रांतचित्त झालेला पुरुष, स्वप्नादि पदार्थांसारख्या मिथ्याभूत देहादिकांमध्यें असणाऱ्याहि तुज स्वात्म्याला जाणत नाहीं, तर देहालाच आत्मा असें जाणतो ॥ २५ ॥
त्या तुझ्या ' पापसमूहाचा नाश करणाऱ्या गंगेचाहि आश्रय व परिपक्व योग झालेल्या योगिजनांनींहि हृदयांमध्यें केवळ चिंतन केलेला परंतु न पाहिलेला अशा ' चरणाला आज
आह्मीं पुष्कळ पुंण्याच्या योगानें पाहिलें आहे, यास्तव आतां तूं आह्मांला भक्त करून आमच्यावर अनुग्रह कर. आतां, भक्ति कशाला पाहिजे तुह्मी पूर्वीप्रमाणें तपच करा;
असें ह्मणशील तर–वृद्धिंगत झालेल्या भक्तीनेंच ज्यांच्या अंतःकरणरूप जीवकोशा (लिंगशरीरा) ची निवृत्ति झाली आहे तेच पूर्वीचे पुरुष तुझ्या गतीला पावले आहेत, दुसरे

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पावले नाहींत ॥ २६ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, याप्रमाणें त्या ऋषींनीं स्तुति करून, श्रीकृष्ण धृतराष्ट्र व युधिष्ठिर यांस, जाण्याची आज्ञा विचारून आपल्या आश्रमीं जाण्याचें मनांत आणिलें ॥ २७ ॥ तो ऋषींचा जाण्याचा विचार पाहून महायशस्वी वसुदेव, त्यांच्याजवळ जाऊन त्यांना नमस्कार करून व हातांनीं त्यांचे पाय धरून एकाग्र चित्तानें त्यांस असें ह्मणाला कीं, ॥ २८ ॥ वसुदेव ह्मणाला—हे ऋषिहो, सर्व देवांचें राहण्याचें स्थान अशा तुह्मांला नमस्कार असो. माझें वचन ऐकण्यास आपण समर्थ आहां. ज्या कोणत्याहि यथाविधि केलेल्या कर्मानें मोक्षाला प्रतिबंधक असलेल्या कर्मांचा निरास होतो तें कर्म आम्हांस सांगा ॥ २९ ॥ याप्रमाणें वसुदेवानें प्रश्न केला असतां, सर्वज्ञ श्रीकृष्णाला सोडून हा आम्हांस प्रश्न करितो असें मनांत आणून विस्मित झालेल्या त्या ऋषींना, नारद ह्मणाला कीं—हे विप्रहो, आपल्या कृष्णपुत्राला

॥ २७ ॥ उपसंगृह्य चरणौ पाणिभ्यां धृत्वा । बभाषे इदमिति संधिरार्षः ॥ २८ ॥ सर्वे देवा येषु तेभ्यः । यावती वैं देवतास्ताः सर्वा वेदविदि ब्राह्मणे वसंतीति श्रुतेः । येन कर्मणा तथा कृतेन वा कर्मणा निर्हारो निरासो भवति तदुच्यताम् ॥ २९ ॥ श्रीकृष्णं हित्वाऽस्मान्पृच्छतीति विस्मितान्प्रत्याह । नातीति । बुभुत्सया बोद्धुमिच्छया ॥ ३० ॥ तत्रत्यो गंगातीरवासी ॥ ३१ ॥ श्रीकृष्णेऽर्भकत्वमानोऽविद्याविजृंभित इत्याह । यस्येति द्वाभ्याम् । अनुभूतिर्ज्ञानं कुतश्चिदपि न रिष्यति न नश्यति । तदेवाह । कालेन

श्रीशुक उवाच ॥ इत्यनुज्ञाप्य दाशार्हं धृतराष्ट्रं युधिष्ठिरम् ॥ राजर्षे स्वाश्रमान्गंतुं मुनयो दधिरे मनः ॥ २७ ॥ तद्वीक्ष्य तानुपव्रज्य वसुदेवो महायशाः ॥ प्रणम्य चोपसंगृह्य बभाषेदं सुयंत्रितः ॥ २८ ॥ वसुदेव उवाच ॥ नमो वः सर्वदेवेभ्य ऋषयः श्रोतुमर्हथ ॥ कर्मणा कर्मनिर्हारो यथा स्यान्नस्तदुच्यताम् ॥ २९ ॥ श्रीनारद उवाच ॥ नातिचित्रमिदं विप्रा वसुदेवो बुभुत्सया ॥ कृष्णं मत्वाऽर्भकं यन्नः पृच्छति श्रेय आत्मनः ॥ ३० ॥ सन्निकर्षोऽत्र मर्त्यानामनादरणकारणम् ॥ गांगं हित्वा यथाऽन्यांभस्तत्रत्यो याति शुद्धये ॥ ३१ ॥ यस्यानुभूतिः कालेन लयोत्पत्त्यादिनाऽस्य वै ॥ स्वतोऽन्यस्माच्च गुणतो न कुतश्च न रिष्यति ॥ ३२ ॥ तं क्लेशकर्मपरिपाकगुणप्रवाहैरव्याहतानुभवमीश्वरमद्वितीयम् ॥ प्राणादिभिः स्वविभवैरुपगूढमन्यो मन्येत सूर्यमिव मेघहिमोपरागैः ॥ ३३ ॥

कर्कटिकाफलवत् । अस्य विश्वस्य लयोत्पत्त्यादिनाऽपि । स्वतश्च विद्युदादिवत् । अन्यस्माच्च मुद्गरादेर्घटादिवत् । गुणतो रूपाद्यंतरोत्पतेः पूर्वरूपादिना देहादिवत् ॥ ३२ ॥ तमेव कुतश्चिदप्यव्याहतानुभवमत एवेश्वरम् । किंच अद्वितीयं कृष्णमन्यः प्राकृत उपगूढमाच्छन्नं मनुष्यं मन्येत । कैः । क्लेशकर्मादिभिः । तत्र क्लेशा रागादयश्च तत्पूर्वकाणि कर्माणि च तत्परिपाके सुखदुःखे च सत्वादीनां गुणानां पुनः प्रवाहश्च तैः प्राणादिभिश्च स्वैर्विभवैः स्वकार्यैः । अत्र दृष्टांतः । मेघहिमोपरागैरभ्रतु-

---

अर्भक (अज्ञानी) असें मानून त्याला सोडून वसुदेव, आपल्या कल्याणाचें साधन जाणण्याच्या इच्छेनें जें आम्हांस विचारीत आहे तें मोठेंसें आश्चर्य नाहीं ॥ ३० ॥ कारण, या जगामध्यें निरंतर सहवास असणें हें मनुष्यांच्या अविश्वासाला कारण होतें. यास दृष्टांत—गंगेच्या तीरीं राहाणारा जन, गंगोदकाचा त्याग करून आपली शुद्धि होण्याकरितां दुसऱ्या तीर्थांच्या उदकाकडे जात असतो ॥ ३१ ॥ ज्याचें ज्ञान, काळानें, तसेंच या जगाच्या उत्पत्तिस्थितिसंहारांनीं, स्वतःपासून, दुसऱ्यापासून व रूपांतरवगैरे होण्याच्या योगानें कधींहि नाश पावत नाहीं ॥ ३२ ॥ त्या विषयासक्ति, कर्में, सुखें, दुःखें व सत्वादिक गुणांचा वारंवार प्रादुर्भाव यांच्या योगानें अखंडित ज्ञानस्वरूपी अद्वितीय ईश्वराला, त्याहून इतर हा प्राकृतजन, जसा सूर्याला—मेघ, धुकें व राहू यांनीं आच्छादित झाला असें मानितो त्याप्रमाणें त्या ईश्वराच्या कार्यरूप प्राण ॥२६०॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

देह, इंद्रियें व अंतःकरण इत्यादिकांनीं तो ईश्वर, आच्छादित आहे असें मानितो यांत कांहीं आश्चर्य ह्मणण्यासारखें नाहीं ॥ ३३ ॥ हे राजा, असें नारदानें सांगितल्यानंतर ते ऋषि, वसुदेवाला संबोधन देऊन तेथें जमलेले सर्व राजे व रामकृष्णहि श्रवण करीत असतां असें ह्मणाले कीं,– ॥ ३४ ॥ जें श्रद्धेनें यज्ञेंकरून, सर्वयज्ञाचीं फळें देणाऱ्या विष्णूचें आराधन करणें हाच कर्माच्या योगानें कर्मांचा निरास होण्याचा उत्तम प्रकार सांगितला आहे ॥ ३५ ॥ विद्वान् लोकांनीं शास्त्ररूप दृष्टीनें अंतःकरणाच्या शांततेचा व मोक्षाचा सुलभ उपाय हाच दाखविला आहे. तसाच क्षत्रियांच्या मनाला हर्ष उत्पन्न करणारा आवश्यक धर्महि हाच सांगितला आहे ॥ ३६ ॥ शुद्ध न्यायानें

पाररहुभिः स्वविभवैः सूर्यमिवेति ॥ ३३ ॥ ३४ ॥ ३५ ॥ चित्तस्योपशम उपशमहेतुः । योगो मोक्षोपायश्च । शनैरात्ममुदमावहतीति तथा सुगमः प्रवृत्त्याश्रयत्वात् । धर्मश्चावश्यकः । अन्यथा विहिताकरणेन मालिन्यप्रसंगात् ॥ ३६ ॥ ननु न कर्मणा न प्रजया धनेन त्यागेनैके अमृतत्वमानशुरित्यादिना त्यागस्यैव विहितत्वात्कथं कर्म मोक्षोपाय इत्याशंक्याह्दावेव त्यागस्याशक्यत्वादित्याशयेनाहुः । अयमिति सार्धचतुर्भिः । स्वस्त्ययनः स्वस्ति क्षेममीयतेऽनेनेति तथा । श्रद्धया निष्कामतया शुक्लेन शुद्धेनाप्तेन वित्तेन पुरुष ईश्वर इज्येतेति यदेष पंथाः ॥ ३७ ॥ स्वस्त्ययनमाहुः । वित्तैषणामिति । वित्तफलभूतैर्यज्ञैर्दानैश्च वित्तैषणां वित्तेच्छां विसृजेत् । गृहैर्गृहोचितैर्भोगैर्दारसुतैषणां विसृजेत् । तदनुभवेनैव

अथोचुर्मुनयो राजन्नाभाष्यानकदुंदुभिम् ॥ सर्वेषां शृण्वतां राज्ञां तथैवाच्युतरामयोः ॥ ३४ ॥ कर्मणा कर्मनिर्हार एष साधु निरूपितः ॥ यच्छ्रद्धया यजेद्विष्णुं सर्वयज्ञेश्वरं मखैः ॥ ३५ ॥ चित्तस्योपशमोऽयं वै कविभिः शास्त्रचक्षुषा ॥ दर्शितः सुगमो योगो धर्मश्चात्ममुदावहः ॥ ३६ ॥ अयं स्वस्त्ययनः पंथा द्विजातेर्गृहमेधिनः ॥ यच्छ्रद्धयाऽऽप्तवित्तेन शुक्लेनेज्येत पूरुषः ॥ ३७ ॥ वित्तैषणां यज्ञदानैर्गृहैर्दारसुतैषणाम् ॥ आत्मलोकैषणां देव कालेन विसृजेद्बुधः ॥ ग्रामे त्यक्तैषणाः सर्वे ययुर्धीरास्तपोवनम् ॥ ३८ ॥ ऋणैस्त्रिभिर्द्विजो जातो देवर्षिपितॄणां प्रभो ॥ यज्ञाध्ययनपुत्रैस्तान्यनिस्तीर्य त्यजन्पतेत् ॥ ३९ ॥

तदौत्सुक्यनिवृत्तेः । देहे मृते आत्मनः स्वर्गादिलोकैषणां कालेन क्षयानुसंधानेन विसृजेत् । देव हे वसुदेव । यद्वा देवकालेन देवानामपि मृत्युना । मृत्युहेतुभूतेनेत्यर्थः । अत्राचारं प्रमाणयति । ग्राम इति ॥ ३८ ॥ किंच । ऋणैरिति । तथाच श्रुतिः । जायमानो वै ब्राह्मणस्त्रिभिर्ऋणवा जायते ब्रह्मचर्येण ऋषिभ्यो यज्ञेन देवेभ्यः प्रजया पितृभ्य इत्यादि तान्यनिस्तीर्य तेषामृणान्यनपाकृत्य । तथाच मनुः । ऋणानि त्रीण्यपाकृत्य मनो मोक्षे निवेशयेत् । अनपाकृत्य मोक्षं तु सेवमानो व्रजत्यध इति ॥ ३९ ॥

प्राप्त झालेल्या द्रव्यानें श्रद्धापूर्वक जें पुरुषोत्तम भगवंताचें यजन करणें हाच गृहस्थाश्रमी ब्राह्मणक्षत्रियवैश्यांचा कल्याणकारक मार्ग आहे ॥ ३७ ॥ हे वसुदेवा, कर्मांचा अत्यंत निरास होण्यास प्राण्याच्या सर्व इच्छा सुटल्या पाहिजेत, त्या सोडण्याचा प्रकार असा कीं,– विचारी पुरुषानें द्रव्याच्या फलभूत यज्ञांनीं व दानांनीं धनाची इच्छा सोडावी. गृहस्थाश्रमास योग्य अशा विषयभोगांनीं स्त्रीपुत्रादिकांची इच्छा सोडावी आणि देह मृत झाल्यावर आपणास स्वर्गादिलोक प्राप्त होण्याची जी इच्छा असते ती, देवांनाहि मारणारा जो काळ तो आपल्याहि सुखाचा नाश करील असें मनांत आणून सोडून द्यावी. ह्मणूनच पूर्वीचे धैर्यवान् पुरुष, गांवांत असतांनाच सर्व इच्छांचा त्याग करून नंतर तपोवनांमध्यें प्रविष्ट झाले आहेत ॥ ३८ ॥ आणि ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्यरूपी द्विज, देव, ऋषि व पितर यांच्या तीन ऋणांसहवर्तमानच उत्पन्न होत

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असतो. ह्मणून त्यानें यज्ञ, अध्ययन व पुत्रोत्पत्ति यांच्या योगानें तीं ऋणें फेडल्याशिवाय संसाराचा त्याग केला तर तो पतित होतो ॥ ३९ ॥ हे महामते वसुदेवा, तूं तर वेदाध्ययन व पुत्रोत्पादन केलें असल्यामुळें ऋषि व पितर या दोघांच्या ऋणांपासून मुक्त झाला आहेस. आतां यज्ञाच्या योगानें देवांचें ऋण फेडून ऋणरहित होत्साता संन्यस्त होऊन घरांतून निघून जा ॥ ४० ॥ हा क्रम तर चित्तशुद्धि न झालेल्या लोकांचा आहे. हे वसुदेवा, तूं तर कृतार्थच आहेस. कारण, तूं जगतांचा ईश्वर अशा भगवान् हरीचें प्रेमलक्षण भक्तीच्या योगानें पूजन केलें आहेस; ह्मणून तो भगवान् तुझ्यां उभयतांच्या पुत्रत्वाप्रत पावला आहे ॥ ४१ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, याप्रकारचें त्या ऋषींचें भाषण ऐकून उदारचित्त अशा त्या वसुदेवानें, त्याच ऋषींना मस्तकानें वंदन करून व प्रसन्न करून घेऊन, ऋत्विज वरिले ॥ ४२ ॥ हे राजा, नंतर धर्मानें वरिलेल्या त्या ऋत्विजांनीं त्या स्यमंतपंचक क्षेत्रामध्यें, मंत्र, तंत्र, व हविर्भागादिक सर्व उत्तम साहित्यांनीं संपन्न असे यज्ञ करवून त्या वसुदेवाकडून

निर्ऋणो निर्मुक्तऋणः । अशरणो भव गृहात्प्रव्रज ॥ ४० ॥ किंच अविशुद्धचित्तानामयं क्रमस्त्वं तु कृतार्थ एवेत्याहुः । वसुदेवेति । भवान्नूनं निश्चितं परमया प्रेमलक्षणया भ-

त्वं त्वद्य मुक्तो द्वाभ्यां वै ऋषिपित्रोर्महामते ॥ यज्ञैर्देवर्णमुन्मुच्य निर्ऋणोऽशरणो भव ॥ ४० ॥ वसुदेव भवान्नूनं भक्त्या परम्-
या हरिम् ॥ जगतामीश्वरं प्रार्चः स यद्वां पुत्रतां गतः ॥ ४१ ॥ श्रीशुक उवाच ॥ इति तद्वचनं श्रुत्वा वसुदेवो महामनाः ॥ ता-
नृषीनृत्विजो वव्रे मूर्ध्नाऽऽनम्य प्रसाद्य च ॥ ४२ ॥ त एनमृषयो राजन्वृता धर्मेण धार्मिकम् ॥ तस्मिन्नयाजयन्क्षेत्रे मखैरुत्तमक-
ल्पकैः ॥ ४३ ॥ तद्दीक्षायां प्रवृत्तायां वृष्णयः पुष्करस्रजः ॥ स्नाताः सुवाससो राजन्राजानः सुष्ठ्वलंकृताः ॥ ४४ ॥ तन्महिष्यश्च
मुदिता निष्ककंठ्यः सुवाससः ॥ दीक्षाशालामुपाजग्मुरालिप्ता वस्तुपाणयः ॥ ४५ ॥ नेदुर्मृदंगपटहशंखभेर्यानकादयः ॥ ननृतुर्नट-
नर्तक्यस्तुष्टुवुः सूतमागधाः ॥ जगुः सुकंठ्यो गंधर्व्यः संगीतं सहभर्तृकाः ॥ ४६ ॥ तमभ्यषिंचन्विधिवदक्तमभ्यक्तमृत्विजः ॥ पत्नी-
भिरष्टादशभिः सोमराजमिवोडुभिः ॥ ४७ ॥ ताभिर्दुकूलवलयैर्हारनूपुरकुंडलैः ॥ स्वलंकृताभिर्विबभौ दीक्षितोऽजिनसंवृतः ॥ ४८ ॥

क्त्या हरिम् । प्रार्चोऽर्चितवान् । यद्यस्मात् । वां युवयोः ॥ ४१ ॥ ४२ ॥ ४३ ॥ ४४ ॥ आलिप्ताः कुंकुमादिभिः । वस्तुपाणयो गृहीतार्हणहस्ताः ४५ ॥ ४६ ॥ अक्तं नेत्रयो रंजनेन । अभ्यक्तं सर्वांगेषु नवनीतेन ॥ ४७ ॥ ताभिः पत्नीभिः सहितो दीक्षितो विरेजे ॥ ४८ ॥

यजन करविलें ॥ ४३ ॥ हे राजा, जेव्हां त्या यज्ञाची दीक्षा वसुदेवानें ग्रहण केली तेव्हां स्नान केलेले, उत्तमवस्त्रें परिधान केलेले व उत्तम अलंकार धारण केलेले यादव व सर्व राजे तो यज्ञ पाहण्याकरितां यज्ञशाळेमध्यें प्राप्त झाले. तशाच उंची वस्त्रें नेसलेल्या व पदकादिक भूषणें धारण करून हर्षयुक्त झालेल्या वसुदेवाच्या अठरा स्त्रियाहि, हस्तामध्यें पूजनाचेवगैरे पदार्थ ग्रहण करून दीक्षाशाळेमध्यें प्रविष्ट झाल्या ॥ ४४ ॥ ४५ ॥ त्यावेळीं मृदंग, पटह, शंख, भेरी आनक इत्यादिक वाद्यें वाजूं लागलीं; नट आणि नर्तकी नृत्य करूं लागल्या; सूत व मागध हे स्तुतिपाठ करूं लागले; उत्तम कंठ असणाऱ्या गंधर्वांगना आपल्या पतींसह संगीत गायन करूं लागल्या ॥ ४६ ॥ त्या यज्ञांतील अभिषेकाच्या वेळीं तर देवक्यादिक अठरा स्त्रियांसहवर्तमान नेत्रांमध्यें अंजन घातलेल्या व अंगाला तेल, हळद, लोणीवगैरे लावलेल्या त्या वसुदेवाला ऋत्विजांनीं महाभिषेकविधीनें, जसा पूर्वीं नक्षत्रांसह चंद्राला अभिषेक केला होता त्याप्रमाणें अभिषेक केला ॥ ४७ ॥ त्यावेळीं यज्ञदीक्षा ग्रहण करून कृष्णाजिन पांघरलेला ॥२६१॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तो वसुदेव, पाठमें बेसून हातांत सुवर्णाचीं कांकणें कंठामध्यें हार, पायांत नूपुरें कानांत कुंडलें व दुसरेहि अलंकार धारण केलेल्या आपल्या पत्न्यांसहवर्तमान अत्यंत शोभूं लागला ॥ ४८ ॥ हे महाराजा, रत्नमये अलंकार व पीतांबरवस्त्रें परिधान करणारे ते त्या वसुदेवाचे ऋत्विज, जसे पूर्वी इंद्राच्या यज्ञामध्यें शोभत होते त्याप्रमाणें शोभूं लागले ॥ ४९ ॥ त्यावेळीं सर्व प्राण्यांचे स्वामी असे ते बळरामश्रीकृष्ण, आपआपल्या बंधूंनीं, आपापल्याच अंशभूत पुत्रांनीं युक्त व स्त्रियांनीं युक्त होत्साते शोभूं लागले ॥ ५० ॥ तेव्हां वसुदेवानें प्रत्येक यज्ञामध्यें विधियुक्त झालेल्या अग्निहोत्रादिरूप सर्व अंगांसहित ज्योतिष्टोमादिक यज्ञांनीं व सौर सत्रादिक वैकृत यज्ञांनीं, चरुपुरोडाशादिक द्रव्यें, मंत्र व कर्में एतत्स्वरूपी ईश्वराचें यजन केलें ॥ ५१ ॥ नंतर त्या वसुदेवानें, दक्षिणा देण्याच्या वेळीं अलंकार धारण केलेल्या ऋत्विजांना,

---

॥ ४२ ॥ जीवेशौ सर्वजीवानामीशौ ॥ ५० ॥ अनुयज्ञं प्रतियज्ञम् । आम्नातसर्वांगाः प्राकृता ज्योतिष्टोमदर्शपूर्णमासादयस्तेभ्यश्चोदनालिंगादिभिरतिदेशप्राप्तांगा वैकृताः सौरसत्रादयस्तैः सर्वैः । द्रव्यं पुरोडाशादि ज्ञानं मंत्रः क्रिया कर्म तेषामीश्वरम् ॥ ५१ ॥ ५२ ॥ सस्नुः स्नानं चक्रुः ॥ ५३ ॥ आश्वभ्यः शुनोऽभिव्याप्य । अन्नेन पूजयदपूजयत्

तस्यर्त्विजो महाराज रत्नकौशेयवाससः ॥ ससदस्या विरेजुस्ते यथा वृत्रहणोऽध्वरे ॥ ४९ ॥ तदा रामश्च कृष्णश्च स्वैः स्वैर्बंधुभिरन्वितौ ॥ रेजतुः स्वसुतैर्दारैर्जीवेशौ स्वविभूतिभिः ॥ ५० ॥ ईजेऽनुयज्ञं विधिना अग्निहोत्रादिलक्षणैः ॥ प्राकृतैर्वैकृतैर्यज्ञैर्द्रव्यज्ञानक्रियेश्वरम् ॥ ५१ ॥ अथर्त्विग्भ्योऽददात्काले यथाम्नातं स दक्षिणाः ॥ स्वलंकृतेभ्यो विप्रेभ्यो गोभूकन्या महाधनाः ॥ ५२ ॥ पत्नीसंयाजावभृथ्यैश्चरित्वा ते महर्षयः ॥ सस्नू रामह्रदे विप्रा यजमानपुरःसराः ॥ ५३ ॥ स्नातोऽलंकारवासांसि बंदिभ्योऽदात्तथा स्त्रियः ॥ ततः स्वलंकृतो वर्णानाश्वभ्योऽन्नेन पूजयत् ॥ ५४ ॥ बंधून्सदारान्ससुतान्पारिबर्हेण भूयसा ॥ विदर्भकोसलकुरून् काशिकेकयसृंजयान् ॥ ५५ ॥ सदस्यर्त्विक्सुरगणान्नृभूतपितृचारणान् ॥ श्रीनिकेतमनुज्ञाप्य शंसंतः प्रययुः क्रतुम् ॥ ५६ ॥ धृतराष्ट्रोऽनुजः पार्था भीष्मो द्रोणः पृथा यमौ ॥ नारदो भगवान् व्यासः सुहृत्संबंधिबांधवाः ॥ ५७ ॥

॥ ५४ ॥ बंध्वादिचारणांतान्पारिबर्हेण प्रीतिदानेन चापूजयत् । ते च सर्वे प्रययुः ॥ ५५ ॥ ५६ ॥ प्रयाणे केषांचिद्विशेषमाह । धृतराष्ट्र इति द्वाभ्याम् । अनुजो विदुरः । पार्था युधिष्ठिरभीमार्जुनाः । यमौ नकुलसहदेवौ ॥ ५७ ॥

आपणहि अलंकार धारण करून पुष्कळ द्रव्यानें युक्त अशा दक्षिणा तशाच गाई, भूमि व कन्याहि दिल्या ॥ ५२ ॥ नंतर ' पत्नीसंयाज ' व ' आवभृथ्य' यानांवांचे याग करून त्या महाऋत्विज, ब्राह्मणांनीं यजमानाला पुढें करून परशुरामानें केलेल्या ह्रदामध्यें स्नान केलें ॥ ५३ ॥ तें अवभृथ स्नान झाल्यावर उत्तम अलंकार धारण केलेल्या त्या वसुदेवानें व त्याच्या स्त्रियांनीं, स्तुतिपाठ करणाऱ्या लोकांस अलंकार व वस्त्रें अर्पण केलीं. तसेंच सर्व वर्णांना व श्वानापर्यंत सर्व जीवांना अन्नदानानें तृप्त केलें ॥ ५४ ॥ नंतर बंधु, त्यांच्या स्त्रिया, त्यांचे पुत्र, सभासद, ऋत्विज, देवांचे समुदाय, मनुष्यें, भूतें, पितृगण, चारण, तसेंच विदर्भ, कोसल, कुरु, काशि, केकय व सृंजय या देशांतील राजे या सर्वांना सन्मानार्थ मोठमोठे अहेर दिले. तेव्हां ते सदस्यादिक सर्वहि लोक, लक्ष्मीपति श्रीकृष्णाची आज्ञा ग्रहण करून यज्ञाची व त्या भगवंताची प्रशंसा करीत आपापल्या स्थानीं निघून गेले ॥ ५५ ॥ ५६ ॥ त्यावेळीं धृतराष्ट्र, विदुर, भीष्म, द्रोण, कुंती, युधिष्ठिर, भीमसेन, अर्जुन, नकुळ,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सहदेव, नारद, भगवान् व्यास, तसेच सुहृत्, संबंधि व बांधव ॥ ५७ ॥ हे आपल्या बांधव यादवांना आलिंगन करून स्नेहानें सद्गदितचित्त होऊन विरहाचें दुःख न सहन करीत होत्साते आपापल्या देशीं निघून गेले; तसेच इतरहि जन आपापल्या स्थानीं निघून गेले ॥ ५८ ॥ त्यावेळीं श्रीकृष्ण, बळराम व उग्रसेन इत्यादिक यादवांनीं वस्त्रादिक, मोठ्या सत्कारांनीं सत्कार केलेला नंदगोप, यादवबंधूवर प्रेमळ असल्यामुळें गोपाळांसहवर्तमान कांहीं दिवसपर्यंत तेथेंच राहिला ॥ ५९ ॥ वसुदेव तर यज्ञविषयक मनोरथरूपी महासमुद्राला अनायासानेंच तरून जाऊन, संतुष्टचित्त व संबंधीलोकांनीं परिवेष्टित होत्साता, नंदाचा हात धरून त्याला ह्मणाला कीं,– ॥ ६० ॥ वसुदेव ह्मणाला–हे दादा नंदराजा, स्नेहनामक, जो मनुष्यांना पाश आहे तो ईश्वरानेंच निर्माण केलेला असल्यामुळें शूरांनां त्यांच्या बळानें व योगिजनांना त्यांच्या ज्ञानानेंहि तोडण्यास मोठा कठिण आहे, असें मी मानितों ॥ ६१ ॥ कां ह्मणशील तर–ज्याअर्थी केलेले उपकार न जाणणाऱ्याहि आम्हांवर, अतिश्रेष्ठ अशा तुह्मी जी ही निरुपम मैत्री

सौहृदेनाक्लिन्नानि चेतांसि येषां ते ॥ ५८ ॥ ५९ ॥ मनोरथो यज्ञविषयस्तमेव महार्णवम् ॥ ६० ॥ शूराणां बलेन योगिनां ज्ञानेनापीत्यर्थः ॥ ६१ ॥ तत्कुतस्तत्राह । अस्मास्विति । कृताज्ञेषु कृतमुपकारमजानत्सु सत्तमैर्भवद्भिरप्रतिकल्पा अनुपमा मैत्रीयमर्पिता अफलाऽपि प्रत्युपकारशून्यापि कर्हिचिद्यद्यस्मान्न निवर्तेत तस्मादीश्वरकृतः पाशोऽयं भवता

बंधून्परिष्वज्य यदून्सौहृदाऽऽक्लिन्नचेतसः ॥ ययुर्विरहकृच्छ्रेण स्वदेशांश्चापरे जनाः ॥ ५८ ॥ नंदस्तु सह गोपालैर्बृहत्या पूजयाऽर्चितः ॥ कृष्णरामोग्रसेनाद्यैर्न्यवात्सीद्बंधुवत्सलः ॥ ५९ ॥ वसुदेवोंऽजसोत्तीर्य मनोरथमहार्णवम् ॥ सुहृद्वृतः प्रीतमना नंदमाह करे स्पृशन् ॥ ६० ॥ वसुदेव उवाच ॥ भ्रातरीशकृतः पाशो नृणां यः स्नेहसंज्ञितः ॥ तं दुस्त्यजमहं मन्ये शूराणामपि योगिनाम् ॥ ६१ ॥ अस्मास्वप्रतिकल्पेयं यत्कृताज्ञेषु सत्तमैः ॥ मैत्र्यर्पिताऽफला वाऽपि न निवर्तेत कर्हिचित् ॥ ६२ ॥ प्रागकल्पाच्च कुशलं भ्रातर्वो नाचराम हि ॥ अधुना श्रीमदांधाक्षा न पश्यामः पुरः सतः ॥ ६३ ॥ मा राज्यश्रीरभूत्पुंसः श्रेयस्कामस्य मानद ॥ स्वजनानुत बंधून्वा न पश्यति ययांऽधदृक् ॥ ६४ ॥ श्रीशुक उवाच ॥ एवं सौहृदशैथिल्यचित्त आनकदुंदुभिः ॥ रुरोद तत्कृतां मैत्रीं स्मरन्नश्रुविलोचनः ॥ ६५ ॥ नंदस्तु सख्युः प्रियकृत्प्रेम्णा गोविंदरामयोः ॥ अद्यश्व इति मासांस्त्रीन्यदुभिर्मानितोऽवसत् ॥ ६६ ॥

मिति गम्यत इत्यर्थः ॥ ६२ ॥ अफलत्वमेवाह । प्रागिति । हे भ्रातः अकल्पाद्सामर्थ्याद्वः कुशलं प्रियं न ह्याचराम न कृतवंतो वयम् । श्रीमदेनांधान्यक्षीणि येषां ते ॥ ६३ ॥ राज्यश्रीर्माभूत् । छांदसोऽडागमः ॥ ६४ ॥ ६५ ॥ अद्यश्व इति । प्रातर्निर्गमेऽद्यैवापराह्णे गम्यतामित्यपराह्णे निर्गमे श्वो गम्यतामिति पुनःपुनरेवं मानितः ॥ ६६ ॥

केली आहेत तिचे उतराई आह्मी जरी कधींहि होणार नाहीं तथापि ती मैत्री अजूनहि तशीच आहे कमी होत नाहीं, त्याअर्थी ईश्वरानेंच हा स्नेहपाश केला आहे असें वाटतें ॥ ६२ ॥ हे दादा नंदा, आह्मीं पूर्वीं बंदींत होतों तेव्हां असमर्थ असल्यामुळें कांहींच तुमचें प्रिय केलें नाहीं. आतां तर श्रीमदानें आंधळे डोळे झालेले आह्मी पुढें असणाऱ्याहि तुम्हांस पाहत नाहीं ॥ ६३ ॥ हे मानदा, कल्याणाची इच्छा करणाऱ्या पुरुषाला, राज्यलक्ष्मीच प्राप्त होऊं नये. कारण, तिच्या योगानें आंधळा (विवेकशून्य) झालेला तो पुरुष, आपल्या आश्रित लोकांना किंवा बांधवांनाहि पहात नाहीं (त्यांचा प्रत्युपकार करीत नाहीं) ॥ ६४ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, याप्रमाणें प्रेमातिशयानें सद्गदितचित्त झालेला तो वसुदेव, नंदानें केलेल्या पुत्रलालनादिक मैत्रीचें स्मरण करित होत्साता, नेत्रांत अश्रु आणून रोदन करूं लागला ॥ ६५ ॥ तो नंदराजा तर–सख्या वसुदेवाच्या व रामकृष्णांच्या प्रेमानें त्यांचें प्रिय करण्याकरितां, तीन महिनेपर्यंत तेथेंच राहिला. तो सकाळीं जावयास निघाला ह्मणजे आजच दोनप्रहरीं जावें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आणि दोनप्रहरीं जावयास निघाला म्हणजे उद्यां जावें असा यादवांनीं सन्मानपूर्वक राहून घेतला होता ॥ ६६ ॥ नंतर वसुदेव, उग्रसेन, कृष्ण, उद्धव व बळराम इत्यादिकांनीं, बहुत मोलाचीं भूषणें, रेशमी वस्त्रें आणि अनेकप्रकारचीं भांडींकुंडींवगैरे देऊन गोपांसहवर्तमान तृप्त केलेला व बरोबर पुष्कळ सैन्य देऊन पाठवणूक केलेला तो नंद, त्यांनीं दिलेलें तें सर्व पारितोषिक (बक्षीस) घेऊन आपल्या छकडेवगैरे सामानासह निघून गेला ॥ ६७ ॥ ६८ ॥ त्यावेळीं श्रीकृष्णाच्या चरणकमळीं जडलेलें चित्त पुनः माघारें फिरवून घेण्याविषयी असमर्थ व संसाराविषयीं विरक्त अशीं नंदगोप, गोप व गोपी हीं सर्वहि, आपल्या गोकुळांत न जातां निरंतर भगवत्सांनिध्य असणाऱ्या मथुरेंतच जाऊन राहिलीं ॥ ६९ ॥ याप्रमाणें सर्व बंधु आपापल्या स्थानीं निघून गेले असतां, कृष्ण हीच ज्यांची देवता आहे असे ते यादव, वर्षाऋतु जवळ आला असें जाणून,

---

॥ ६७ ॥ यापितो महासैन्येन प्रस्थापितः ॥ ६८ ॥ ६९ ॥ ७० ॥ यदुदेवस्य वसुदेवस्य महोत्सवं यज्ञादिलक्षणं सुहृत्संदर्शनादिकं चेति ॥ ७१ ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधे उत्तरार्धे टीकायां चतुरशीतितमोऽध्यायः ॥ ८४ ॥ ॥ पंचाशीतितमे रामकृष्णौ संप्रार्थितौ सुतौ ॥ पित्रे ज्ञानमथो मात्रे मृतान्पुत्रानयच्छताम् ॥ १ ॥ नंदयित्वा

ततः कामैः पूर्यमाणः सव्रजः सहबांधवः ॥ परार्ध्याभरणक्षौमनानाऽनर्घ्यपरिच्छदैः ॥ ६७ ॥ वसुदेवोग्रसेनाभ्यां कृष्णोद्धवबलादिभिः ॥ दत्तमादाय पारिबर्हं यापितो यदुभिर्ययौ ॥ ६८ ॥ नंदो गोपाश्च गोप्यश्च गोविंदचरणांबुजे ॥ मनः क्षिप्तं पुनर्हर्तुमनीशा मथुरां ययुः ॥ ६९ ॥ बंधुषु प्रतियातेषु वृष्णयः कृष्णदेवताः ॥ वीक्ष्य प्रावृषमासन्नां ययुर्द्वारवतीं पुनः ॥ ७० ॥ जनेभ्यः कथयांचक्रुर्यदुदेवमहोत्सवम् ॥ यदासीत्तीर्थयात्रायां सुहृत्संदर्शनादिकम् ॥ ७१ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे उत्तरार्धे तीर्थयात्रानुवर्णनं नाम चतुरशीतितमोऽध्यायः ॥ ८४ ॥ ॥ श्रीबादरायणिरुवाच ॥ अथैकदात्मजौ प्राप्तौ कृतपादाभिवंदनौ ॥ वसुदेवोऽभिनंद्याह प्रीत्या संकर्षणाच्युतौ ॥ १ ॥ मुनीनां स वचः श्रुत्वा पुत्रयोर्धामसूचकम् ॥ तद्वीर्यैर्जातविश्रंभः परिभाष्याभ्यभाषत ॥ २ ॥ कृष्ण कृष्ण महायोगिन्संकर्षण सनातन ॥ जाने वामस्य यत्साक्षात्प्रधानपुरुषौ परौ ॥ ३ ॥

कुरुक्षेत्रयात्रायां सुहृदो बहून् ॥ तत्त्वज्ञानं ततः पित्रोरादिशन्मृतसूनुभिः ॥ २ ॥ १ ॥ धाम प्रभावस्तत्सूचकम् । जातविश्रंभ उत्पन्नविश्वासः । परिभाष्य संबोध्य ॥ २ ॥ अस्य विश्वस्य यत्साक्षात्स्वरूपभूतं कारणं प्रधानपुरुषौ नाम परौ तयोरपि कारणत्वेनेश्वरौ च साक्षाद्वां युवामिति जाने ॥ ३ ॥

कृष्णाच्या आज्ञेनें पुन्हां द्वारकेंत निघून गेले ॥ ७० ॥ नंतर त्यांनीं तेथील लोकांना तीर्थयात्रेमध्यें झालेला वसुदेवाच्या यज्ञाचा महोत्साह व संबंधीलोकांचें दर्शनवगैरे जें कांहीं घडलें होतें तें सर्व वर्णन केलें ॥ ७१ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील उत्तरार्धामध्यें वसुदेवयज्ञमहोत्साहनिरूपणनामक हा चौऱ्याऐंशींवा अध्याय समाप्त झाला ॥ ८४ ॥ ॥ आतां ह्या पंचाऐंशींव्या अध्यायामध्यें, वसुदेवानें रामकृष्ण पुत्रांची प्रार्थना केली असतां, त्यांनीं त्या पित्याला ज्ञान व देवकीमातेला, पूर्वीं मरण पावलेले पुत्र आणून दिले, अशी कथा वर्णन केली आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, नंतर एकेवेळीं वसुदेव, आपल्याजवळ प्राप्त होऊन चरणावेठिकाणीं वंदन करणाऱ्या त्या रामकृष्ण पुत्रांना प्रीतीनें आशीर्वादांनीं अभिनंदन करून भाषण करण्यास उद्युक्त झाला ॥ १ ॥ तो, पुत्रांचें परमेश्वरत्वसूचक ऋषींचें भाषण ऐकून, त्यांच्या पाहिलेल्या व ऐकिलेल्या पराक्रमांनीं ‘ ते हे ईश्वर आहेत असा ’ विश्वासयुक्त होऊन रामकृष्णांना संबोधनें देऊन ह्मणाला कीं,— ॥ २ ॥ वसुदेव ह्मणाला—हे कृष्णा, हे कृष्णा, हे महायोगिन्,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हे संकर्षणा, हे सनातना, तुह्मी उभयतांस या जगाचें साक्षात् स्वरूपभूत कारण जे प्रकृतिपुरुष व त्यांवेहि कारणरूप असे परमेश्वर तुह्मी आहां, असें मी जाणतों ॥ ३ ॥ आतां, कर्ता कर्म इत्यादिक अनेकप्रकारच्या कारकांनीं झालेलें हें जग, प्रकृतिपुरुषात्मक कसें व त्यांच्याहि कारणत्वेंकरून आह्मांस ईश्वरत्व कसें ? असें ह्मणाल तर–ज्या स्वरूपीं, ज्या कर्त्यानें, ज्या साधनानें, ज्यापासून, ज्याच्या संबंधानें, ज्याकरितां, जें ज्यास जसें जेव्हां, हें जग उत्पन्न होतें तो भोग्यप्रकृतीचा व भोक्त्या पुरुषाचाहि

नन्विदं विश्वमनेकैः कारकैर्जायमानं कुतः प्रधानपुरुषात्मकं कु तस्तरामावयोस्तत्कारणत्वेनेश्वरत्वं तत्राह । यत्रेति । यत्राधिकरणे । येन कर्त्रा करणेन च । यतः अपादानात् । यस्य संबंधेन । षष्ठ्यर्थस्याकारकत्वेऽपि निमित्ततोक्ता । यस्मै संप्रदानाय । यद्यदिति प्रयोज्यकर्तृ कर्मकारके दर्शिते । ननु तयोर्नास्ति भेदः । यथोक्तम् । करोति क्रियमाणेन न कश्चित्कर्मणा विना ॥ भवत्यर्थस्य कर्ता च करोतेः कर्म जायते ॥ तथा । करोत्यर्थस्य यः कर्ता भवितुः स प्रयोजकः ॥ भविता तमपेक्ष्याथ प्रयोज्यत्वं प्रपद्यत इति च । सत्यम् । तथाऽप्यवस्थाभेदे भेदो विवक्षितः । दृश्यते चावस्थाभेदः । तंडुलानोदनं पचति मृदं घटं करोतीति तदेवं सप्तविभक्त्यर्था दर्शिताः । यथेति यदेति च क्रियाविशेषणभूतानामन्येषां चाव्ययानामर्थाः । स्यादिति क्रियापदार्थोपलक्षणम् । एवं सर्वं प्रपंचमनूद्य तत्कारणस्य भगवद्रूपतां विधत्ते । इदं साक्षादिति । प्रधानं भोग्यं पुरुषो भोक्ता तयोरीश्वरो भगवांस्त्वमेव साक्षादिति तयोरैक्यमभिप्रेत्यैकवचनम् ॥ ४ ॥ किंच धारणपोषणकर्ताऽपि त्वमेवेत्याह । एतदिति । हे आत्मन् प्राणः क्रियाशक्तिर्जीवो ज्ञानशक्तिश्च

यत्र येन यतो यस्य यस्मै यद्यद्यथा यदा ॥ स्यादिदं भगवान्साक्षात्प्रधानपुरुषेश्वरः ॥ ४ ॥ एतन्नानाविधं विश्वमात्मसृष्टमधोक्षज॥ आत्मनाऽनुप्रविश्यात्मन्प्राणो जीवो बिभर्ष्यजः ॥ ५ ॥ प्राणादीनां विश्वसृजां शक्तयो याः परस्य ताः ॥ पारतंत्र्याद्वैसादृश्याद्द्वयोश्चेष्टैव चेष्टताम् ॥ ६ ॥

संस्त्वमेव बिभर्षि ॥ ५ ॥ ननु प्राणादीनां विचित्रशक्तीनां कारणत्वावगमात्कथं परमेश्वरस्यैव कारणत्वेन सर्वात्मकत्वमुच्यत इत्याशंक्य प्राणादिशक्तयोऽपि तस्यैवेत्याह । प्राणादीनामिति । प्राणः सूत्रं तदादीनां विश्वसृजां विश्वकारणानां याः शक्तयस्ताः परस्य परमकारणस्येश्वरस्यैव । कुतः पारतंत्र्यात् । यथा वेधशक्तिर्न बाणस्यापितु पुरुषस्य तद्वदित्यर्थः । ननु भगवतः प्राणादिवर्गस्य च स्वातंत्र्यमेव किं न स्यादत आह । वैसादृश्याद्द्वयोरिति । चेतनाचेतनत्वेन विसदृशत्वाद्द्वयोः अचेतनप्राणादिवर्गस्य चेतनपारतंत्र्यमेव युक्तमित्यर्थः । यद्वा प्राणादिषु द्वयोर्द्वयोरेव तावद्विसदृशत्वं विरुद्धक्रियाकारित्वात्किं पुनर्बहूनाम् । तस्मादेकेन सर्वज्ञेन सर्वशक्तिनाऽधिष्ठितानामेव विशिष्टकार्यारंभकत्वं युक्तं न स्वतंत्राणामिति । तथा चोक्तम् । यदैते संहता भावा भूतेंद्रियमनोगुणाः ॥ यदायतननिर्माणे न शेकुर्ब्रह्मवित्तम ॥ तदा संहत्य चान्योन्यं भगवच्छक्तिचोदिताः ॥ सदसत्त्वमुपादाय चोभयं ससृजुर्ह्यद इति ॥ तथा । नानात्वात्स्वक्रियाऽनीशाः प्रोचुः प्रांजलयो विभुमित्यादि । ननु प्राणादीनां क्रियाकारित्वं शक्त्यभावे कुतः स्यादत आह । चेष्टैव चेष्टतामिति । चेष्टमानानामेषां चेष्टैव न तु शक्तिः । यथा वायोः शक्त्या तृणादीनां चलनम् । यथा वा पुरुषस्य शक्त्या शराणां वेग इति ॥ ६ ॥

ईश्वर भगवान् तूंच आहेस ॥ ४ ॥ आतां, धारण व पोषण करणाराहि तूंच आहेस असें सांगतो–हे अधोक्षजा, हे आत्मरूपा, आपणच उत्पन्न केलेल्या ह्या देवतिर्यगादिरूपी नानाप्रकारच्या जगामध्यें तूंच अंतर्यामिरूपानें प्रवेश करून स्वतां जन्मादिविकाररहित असूनहि, क्रियाशक्तिरूपी प्राण व ज्ञानशक्तिरूपी जीव होऊन याचें धारण व पोषण करितोस ॥ ५ ॥ आतां प्राणादिकांनांच विचित्रशक्तींनीं युक्त असें जगाचें कारणत्व दिसत असतां, परमेश्वरालाच कारणत्वेंकरून सर्वात्मकत्व कसें ? असें म्हणशील तर–जगाला उत्पन्न करणाऱ्या प्राणादिकांच्या ज्या शक्ति आहेत त्या ‘ त्या प्राणादिकांना परतंत्रत्व असल्यामुळें ’ त्यांचें परम कारण असलेल्या ईश्वराच्याच आहेत. ह्मणजे ॥२६३॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जशी वेध करण्याची शक्ति बाणांची आहेशी वाटते परंतु ते बाण, परतंत्र असल्यामुळें ती शक्ति त्यांची नव्हे, तर पुरुषाची आहे त्याप्रमाणें समजावें. आतां ईश्वराचें व प्राणादिकांचें निरनिराळें स्वातंत्र्य आहे असें ह्मणावें तर–ते प्राणादिक अचेतन व ईश्वर चेतन असल्यामुळें अचेतनाला चेतनाच्या स्वाधीन असणें योग्य आहे. आतां प्राणादिकांस शक्ति नाहीं तर कार्य कसें घडतें ? असें ह्मणावें तर–जसें वाऱ्याच्या शक्तीनें तृणादिकाचें चलनवलन घडतें परंतु त्यांची ती शक्ति नव्हे किंवा जसा पुरुषाच्या शक्तीनें बाणांना वेग उत्पन्न होतो, ती शक्ति बाणाची नव्हे त्याप्रमाणें चलनवलन पावणाऱ्या प्राणादिकांच्या ज्या शक्ति, त्या त्यांच्या नसून एक, सर्वज्ञ, सर्वशक्ति अशा परमेश्वराच्याच आहेत ॥ ६ ॥ आतां त्या प्राणादिकांचें परतंत्रत्व कसें ? तें सांगतो–चंद्राची कांति, अग्नीचें तेज, सूर्याची प्रभा, नक्षत्रें व विजा यांचें स्फुरण पावणें,

---

पारतंत्र्यमेव प्रपंचयति । कांतिरिति पंचभिः । चंद्रस्य कांतिः । अग्नेस्तेजः । अर्कस्य प्रभा । ऋक्षविद्युतां सत्ता स्फुरणमात्रेण सत्त्वम् । अर्थतो वस्तु तो भवान् । तथाच श्रुतिः । न तत्र सूर्यो भाति न चंद्रतारकं नेमा विद्युतो भांति कुतोऽयमग्निः ॥ तमेव भांतमनुभाति सर्वं तस्य भासा सर्वमिदं विभातीति । स्मृतिश्च । यदादित्यगतं तेजो जगद्भासयतेऽखिलम् ॥ यच्चंद्रमसि यच्चाग्नौ तत्तेजो विद्धि मामकमिति । भूमेर्वृत्तिः प्राणिनामाधारत्वेन वर्तनं गंधश्च भवान् । तवैव शक्तिरित्यर्थः ॥ ७ ॥ किंच । हे देव अपां तर्पणं तृप्तिजनकत्वं प्राणनं जीवनहेतुत्वं ता आपश्च तासां रसश्च त्वमेव । किंच वायोरोजःसहआदि तवैव शक्तिः ॥ ८ ॥ दिशामुपाधिकृताकाशप्रदेशानामवकाशो दिशश्च त्वम् ।

कांतिस्तेजः प्रभा सत्ता चंद्राग्न्यर्कर्क्षविद्युताम् ॥ यत्स्थैर्यं भूभृतां भूमेर्वृत्तिर्गंधोऽर्थतो भवान् ॥ ७ ॥ तर्पणं प्राणनमपां देवत्वं ताश्च तद्रसः ॥ ओजः सहो बलं चेष्टा गतिर्वायोस्तवेश्वर ॥ ८ ॥ दिशां त्वमवकाशोऽसि दिशः खं स्फोट आश्रयः ॥ नादो वर्णस्त्वमोंकार आकृतीनां पृथक्कृतिः ॥ ९ ॥ इंद्रियं त्विंद्रियाणां त्वं देवाश्च तदनुग्रहः ॥ अवबोधो भवान्बुद्धेर्जीवस्यानुस्मृतिः सती ॥ १० ॥ भूतानामसि भूतादिरिंद्रियाणां च तैजसः ॥ वैकारिको विकल्पानां प्रधानमनुशायिनाम् ॥ ११ ॥

खं सामान्याकाशस्तदाश्रयः स्फोटश्च शब्दतन्मात्रं परावस्था वागित्यर्थः । नादः पश्यंती ओंकारो मध्यमा वर्णश्चाकृतीनां पदार्थानां पृथक्कृतिः पृथक्करणमभिधानं यस्मात्तत्पदम् । वर्णपदाद्यात्मिका वैखरी च त्वमित्यर्थः ॥ ९ ॥ इंद्रियाणामिंद्रियं विषयप्रकाशनशक्तिर्देवाश्चेंद्रियाधिष्ठातारस्तदनुग्रहस्तेषामधिष्ठानशक्तिश्च त्वम् । अवबोधोऽध्यवसायशक्तिः । अनुस्मृतिः प्रतिसंधानशक्तिः ॥ १० ॥ भूतानां कारणं भूतादिस्तामसोऽहंकारस्त्वमसि । इंद्रियाणां कारणं तैजसो राजसोऽहंकारस्त्वम् । विविधमधिदैवाध्यात्माधिभूतभेदेन विकल्प्यंत इति विकल्पा देवास्तेषां कारणं वैकारिकः सात्विकोऽहंकारश्च त्वम् । अनुशायिनां जीवानां संसारकारणं प्रधानं त्वम् ॥ ११ ॥

पर्वतांची स्थिरता व भूमीचें प्राण्यांच्या आधारत्वेंकरून वर्तन व गंधगुण हीं सर्व वस्तुतः तुझ्याच शक्ति आहेत ॥ ७ ॥ हे ईश्वरा, उदकाची तृप्त करण्याची शक्ति, वांचविण्याची शक्ति, देवत्व, उदकत्व व त्यांचा रस हे सर्व तूंच आहेस; तसेंच वायूचें जें इंद्रियसामर्थ्य, अंतःकरणसामर्थ्य, शरीरसामर्थ्य, शरीरव्यापार व गति हीं सर्व तुझ्याच शक्ति आहेत ॥ ८ ॥ दिशांचा अवकाश व दिशा तूं आहेस आकाश व आकाशाचा आश्रय शब्दतन्मात्र, परा पश्यंती ओंकार (मध्यमा) व वर्णपदादिकांचें पृथक्करण करणारी वैखरी ह्या तूंच आहेस ॥ ९ ॥ इंद्रियांची जी विषयप्रकाशकशक्ति व त्यांचे जे अधिष्ठाते देव व त्यांची जी प्रेरणा करण्याची शक्ति ती तूंच आहेस, तशीच बुद्धीची जी निश्चयात्मक शक्ति व अंतःकरणाची अनुसंधान शक्ति ती तूं आहेस ॥ १० ॥ पंच महाभूतांचें कारण तामसाहंकार, इंद्रियांचें कारण राजसाहंकार,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

इंद्रियांच्या देवतांचें कारण सात्विक अहंकार व जीवांच्या संसाराचें कारण माया हीं सर्व तूं आहेत ॥ ११ ॥ जसे नश्वर असलेल्या घटकुंडलादिक पदार्थांमध्यें मृत्तिका-सुवर्णादिक पदार्थ मात्र अविनाशी आहेत त्याप्रमाणें येथें असलेल्या सर्व नश्वर पदार्थांमध्यें जें अविनाशी अवशेष राहणारें तत्त्व आहे तें तूं आहेस ॥ १२ ॥ सत्व, रज व तम हे तीन गुण व त्यांचें परिणामरूप जे महत्तत्वादिक पदार्थ, ते साक्षात्परब्रह्मरूप तुझेठिकाणीं योगमायेनें कल्पित आहेत ॥ १३ ॥ ह्मणून हे पदार्थ वास्तविकपणें तुझ्याहून निराळे नाहींत. ज्यावेळीं हे पदार्थ तुझ्यास्वरूपीं मायेनें कल्पितपणें प्रतीतीला येतात, त्याचवेळीं तूं यांच्यामध्यें कारणत्वानें अनुगत आहेस असें भासतें, नाहींतर निर्विकल्परूपानें तूंच अवशेष राहतोस ॥ १४ ॥ या गुणप्रवाहरूप संसारामध्यें सर्वात्मा अशा तुझी प्रपंचांतील सूक्ष्म गति न जाणणारे अज्ञानी लोक, देहाभिमानानें

अपिच । नश्वरेषु नाशशीलेष्विहैतेषु भावेषु यदनश्वरमवशिष्यमाणं रूपं तत्त्वमसि । द्रव्यविकारेषु मृत्सुवर्णादिकार्येषु घटकुंडलादिषु नश्वरेषु च द्रव्यमात्रं मृत्सुवर्णादिमात्रमनश्वरं यथा तद्वत् ॥ १२ ॥ ननु त्रिगुणात्मककार्यरूपोऽपि त्वमित्युक्तत्वात्कथमनश्वरत्वं तत्राह । सत्वमिति । तद्वृत्तयस्तत्परिणामाश्च महदादयः । अद्धा साक्षात्त्वयि परे ब्रह्मणि कल्पिताः ॥ १३ ॥ तस्मान्न संतीति । नन्वसतां कथं प्रतीतिरत आह । यर्हीति । यदा विकल्पितास्तदैव प्रतीतिमात्रेण त्वयि संति त्वं चामीषु तदैव कारणतयाऽनुगतः । अन्यदा त्वव्यावहारिकोऽविकल्पकस्त्वमेवावशिष्यस इत्यर्थः ॥ १४ ॥ एवं रूपत्वादज्ञाननिबंधनश्च संसार इत्याह । गुणप्रवाह इति । सूक्ष्मां निष्प्रपंचां गतिमबुधा अविद्वांसः ।

नश्वरेष्विह भावेषु तदसि त्वमनश्वरम् ॥ यथा द्रव्यविकारेषु द्रव्यमात्रं निरूपितम् ॥ १२ ॥ सत्वं रजस्तम इति गुणास्तद्वृत्तयश्च याः ॥ त्वय्यद्धा ब्रह्मणि परे कल्पिता योगमायया ॥ १३ ॥ तस्मान्न संत्यमी भावा यर्हि त्वयि विकल्पिताः ॥ त्वं चामीषु विकारेषु ह्यन्यदाऽव्यावहारिकः ॥ १४ ॥ गुणप्रवाह एतस्मिन्नबुधास्त्वखिलात्मनः ॥ गतिं सूक्ष्मामबोधेन संसरंतीह कर्मभिः ॥ १५॥ यदृच्छया नृतां प्राप्य सुकल्पामिह दुर्लभाम् ॥ स्वार्थे प्रमत्तस्य वयो गतं त्वन्माययेश्वर ॥ १६ ॥ असावहं ममैवैते देहे चास्यान्वयादिषु ॥ स्नेहपाशैर्निबध्नाति भवान्सर्वमिदं जगत् ॥ १७ ॥ युवां न नः सुतौ साक्षात्प्रधानपुरुषेश्वरौ ॥ भूभारक्षत्रक्षपण अवतीर्णौ तथात्थ ह ॥ १८ ॥

अबुद्धेति वा पाठः । अतोऽबोधेन देहाभिमानेन कृतैः कर्मभिः संसरंतीति ॥ १५ ॥ एवं तयोस्तत्त्वं निरूप्य तदप्राप्त्या शोचति । यदृच्छयेति । नृतां मनुष्यताम् । सुकल्पां पटुतरेंद्रियाम् ॥ १६ ॥ अहो किमिति प्रमत्तोऽसि त्वया बहुभिः पाशैर्निबद्धत्वादित्याह । असावहमिति । देहे अस्य देहस्यान्वयादिषु पुत्रादिषु च ममैवैत इति ॥ १७ ॥ अहो त्वत्पुत्रयोरावयोः किमिदमारोप्यते अत आह । युवामिति । भूभारक्षत्रक्षपणार्थमवतीर्णौ तथा ह निश्चितमात्थ कथयसि ॥ १८ ॥

केलेल्या कर्मांच्या योगानें या लोकामध्यें संसार पावत आहेत ॥ १५ ॥ याप्रमाणें त्यांचें तत्त्व निरूपण करून, आतां तें प्राप्त झालें नाहीं ह्मणून शोक करितो—हे ईश्वरा, दैवयोगानें या लोकीं दुर्लभ व इंद्रियेंवगैरे कुशळ असलेलें मनुष्यत्व प्राप्त झालें असतांहि तुझ्या मायेनें मोहित होऊन, आपल्या स्वार्थाविषयीं असावध राहणाऱ्या माझें, हें आयुष्य व्यर्थ निघून गेलें आहे ॥ १६ ॥ तूं काय ह्मणून असावध झालास असें ह्मणशील तर—देहाचेठिकाणीं हा मी आहें, अशा व या देहाच्या संबंधानें असलेल्या पुत्रादिकांचेठिकाणीं हे माझेच आहेत याप्रमाणें अभिमानरूप स्नेहपाशांच्या योगानें तूं हें सर्वहि जग मोहित करून टाकीत आहेस ॥ १७ ॥ वास्तव तुह्मी उभयतां आमचे पुत्र नाहीं तर साक्षात् प्रधानपुरुषांचे ईश्वर असून पृथिवीला भारभूत असलेल्या क्षत्रियांच्या संहाराकरितां अवतीर्ण झालां आहां. तसें तूं स्वतांच मला पूर्वीं सांगितलें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आहेस ॥ १८ ॥ ह्मणून हे दीनबंधो, शरणागतांचें संसाररूप भय नाहींसें करणाऱ्या तुझ्या चरणकमलाप्रत आज मी शरण झालों आहें. आतां तूं अतिसुखी असून व्यर्थ कां संसारसुखाला कंटाळतोस असें ह्मणशील तर–इतक्या झालेल्या विषयासक्ततेनें पुरे पुरे झालें. कारण, ज्या विषयासक्ततेनें मला, शरीरावर आत्मबुद्धि आणि तुज परमेश्वरावर पुत्रबुद्धि उत्पन्न झाली ॥ १९ ॥ आतां, मी परमेश्वर कसा ? असें ह्मणशील तर–हे भगवन् तूं मला सूतीगृहाचेठिकाणीं पूर्वीं असें सांगितलें आहेस कीं, ‘ जेव्हां तुह्मी दोघेंहि सुतपा आणि पृश्नि या नांवांचीं होतां तशींच जेव्हां कश्यप आणि अदिति होतां, व आतां वसुदेव आणि देवकी आहां, या तिन्ही वेळीं तुम्हांपासून जन्मरहित असाहि मी, आपण प्रवृत्त केलेल्या धर्ममर्यादांच्या रक्षणाकरितां अवतीर्ण झालों आहें ह्मणून आकाशासारखा असंगहि तूं, नानाप्रकारचे अवतार धारण करितोस व

तत्तस्मादरणं शरणमापन्नानां संसृतिभयमपहंतीति तथा तत् । ननु त्वमतिसुखी वृथा किं निर्विंचसेऽत आह । एतावतेति । इंद्रियलालसेनेंद्रियार्थतृष्णया । पचेनेंद्रियलालसेन मर्त्ये शरीरे आत्मदृगात्मबुद्धिरहं त्वयि च परे परमेश्वरेऽपत्यबुद्धिरस्मि तेनालमलं पर्याप्तमिति ॥ १९ ॥ ननु कुत एतदहं परमेश्वर इति तत्राह । सूतीगृहे इति । नौ आवयोः । अनुयुगं प्रतियुग्मम् । यदा सुतपाः पृश्निरिति युग्मम् । यदा कश्यपो दितिश्चेति युग्मम् । अधुना वसुदेवो देवकीति युग्मम् । एवं हि प्रतियुग्ममज एवाहं

तत्ते गतोऽस्म्यरणमद्य पदारविंदमापन्नसंसृतिभयापहमार्तबंधो ॥ एतावताऽलमलमिंद्रियलालसेन मर्त्यात्मदृक्त्वयि परे यदपत्य-
बुद्धिः ॥ १९ ॥ सूतीगृहे ननु जगाद भवानजो नौ संजज्ञ इत्यनुयुगं निजधर्मगुप्त्यै ॥ नानातनूर्गगनवद्विदधज्जहासि को वेद भूम्न
उरुगायविभूतिमायाम् ॥ २० ॥ श्रीशुक उवाच ॥ आकर्ण्येत्थं पितुर्वाक्यं भगवान्सात्वतर्षभः ॥ प्रत्याह प्रश्रयानम्रः प्रहसन्
श्लक्ष्णया गिरा ॥ २१ ॥ श्रीभगवानुवाच ॥ वचो वः समवेतार्थं तातैतदुपमन्महे ॥ यन्नः पुत्रान्समुद्दिश्य तत्वग्राम उदाहृतः
॥ २२ ॥ अहं यूयमसावार्य इमे च द्वारकौकसः ॥ सर्वेऽप्येवं यदुश्रेष्ठ विमृश्याः सचराचरम् ॥ २३ ॥ आत्मा ह्येकः स्वयंज्यो-
तिर्नित्योऽन्यो निर्गुणो गुणैः ॥ आत्मसृष्टैस्तत्कृतेषु भूतेषु बहुधेयते ॥ २४ ॥

संजज्ञेऽवतीर्ण इति भवान्नूनं जगाद । नन्वन्योऽसौ चतुर्भुजो देव इति तत्राह । नानातनूरिति । गगनवदसंग एव त्वम् । भूम्नः सर्वगतस्य विभूतिरूपां मायां को वेदेति ॥ २० ॥ २१ ॥ उपमन्महे उपमन्यामहे । समुद्दिश्य विषयीकृत्य । तत्वग्रामस्तत्वसमूहः । उदाहृतः सम्यङ्निरूपितः ॥ २२ ॥ इमामेव दृष्टिं सर्वत्र विधत्स्वेत्याह । अहमिति । एवं विमृश्या ब्रह्मत्वेनैवान्वेषणीयाः । किंच सचराचरं जगदपि ॥ २३ ॥ ननु नानाविकारवतां कुतो ब्रह्मत्वमिति चेन्न । ब्रह्मण एवोपाधिधर्मैर्बहुधा प्रतीतेरिति

सोडून देतोस. हे वेदगीता प्रभो, सर्वव्यापक अशा तुझ्या विभूतिरूप मायेला कोण पुरुष जाणत आहे ? कोणीच नाहीं ॥ २० ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, याप्रमाणें यादवांमध्यें श्रेष्ठ व विनयानें नम्र अशा भगवंतानें, पित्याचें भाषण श्रवण करून, हास्य करीत मधुर वाणीनें प्रतिभाषण केलें कीं– ॥ २१ ॥ श्रीभगवान् ह्मणाला–हे ताता, ज्याअर्थीं तुह्मीं आम्हां पुत्रांना उद्देशून तत्वसमुदाय उत्तमप्रकारें निरूपण केला आहे त्याअर्थीं हें तुमचें वचन यथार्थ आहे असें आम्ही मानितों ॥ २२ ॥ आतां हीच दृष्टि सर्वठिकाणीं धारण करावी असें सांगतो–हे यदुश्रेष्ठा ताता, मी, तुह्मी, हा बळराम, व हे द्वारकावासी सर्व लोक, किंबहुना चराचर सर्वहि प्राणी, तुह्मी माझ्यासारखेच (परब्रह्मरूपी) आहेत असें विचारपूर्वक जाणावें ॥ २३ ॥ जशीं–आकाश, वायु, तेज, उदक व भूमि हीं पंचमहाभूतें आपणापासून उत्पन्न झालेल्या घटादि कार्यांमध्यें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

उपाधिधर्मांनीं प्रगट होणें, नाश पावणें, थोडेपणा, बहुतपणावगैरे धर्म पावल्यासारखीं वाटतात त्याप्रमाणें हा आत्माहि आपण उत्पन्न केलेल्या गुणपरिणामात्मक महदादिक कारणांनीं रचलेल्या देवमनुष्यादिक देहामध्यें ' उपाधिधर्मांनीं मनुष्यादिकांमध्यें ज्ञानाच्या आविर्भावानें, वृक्षादिकांमध्यें ज्ञानाच्या तिरोभावानें, मशकादिकांत अल्पत्वानें व हस्त्यादिकांत महत्त्वानें नानाप्रकारें भासतो परंतु हा वस्तुतः तसा नाहीं तर हा—आत्मा एक असतां अनेकरूपांनीं, स्वयंप्रकाश असतां दृश्यरूपानें, नित्य असतां अनित्यरूपानें अनन्य असतां अन्यत्वानें, निर्गुण असतां सगुणत्वानें व व्यापक असतां परिच्छिन्न रूपानें भासतो ॥ २४ ॥ २५ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, याप्रमाणें भगवंतानें बोध केलेल्या त्या वसुदेवानें तें आत्म्याचें एकत्व श्रवण करून भेदबुद्धिरहित व संतुष्टचित्त होत्साता उगीच राहिला ॥ २६ ॥ हे राजा, नंतर तेथें

सदृष्टांतमाह द्वाभ्याम् । आत्माहीति । यथा खादिभूतानि तत्कृतेषु घटादिष्वाविस्तिरोभावादि यांत्येवमसावात्माऽप्यात्मसृष्टैर्गुणैः कृत्वा तत्कृतेषु देहेषु बहुधा ईयते पुनश्च यथाशयं यथोपाध्या विर्भावतिरोभावादिरूपेण प्रतीयते न वस्तुतः । कुतः । एको बहुधा स्वयंज्योतिर्दृश्यत्वेन नित्योऽनित्यत्वेनानन्योऽन्यत्वेन निर्गुणः सगुणत्वेनेत्यादि बहुधात्वं प्रपंचनीयम् ॥ २४ ॥ २५ ॥ २६ ॥ सुविस्मिता सती ॥ २७ ॥ समाश्राव्य संबोध्य ॥ २८ ॥ २९ ॥ भूमेर्भारायमाणानां राज्ञामर्थे तेषां निधनार्थं मे मयि

खं वायुर्ज्योतिरापो भूस्तत्कृतेषु यथाशयम् ॥ आविस्तिरोऽल्पभूर्येको नानात्वं यात्यसावपि ॥ २५ ॥ श्रीशुक उवाच ॥ एवं भगवता राजन्वसुदेव उदाहृतः ॥ श्रुत्वा विनष्टनानाधीस्तूष्णीं प्रीतमना अभूत् ॥ २६ ॥ अथ तत्र कुरुश्रेष्ठ देवकी सर्वदेवता ॥ श्रुत्वाऽऽनीतं गुरोः पुत्रमात्मजाभ्यां सुविस्मिता ॥ २७ ॥ कृष्णरामौ समाश्राव्य पुत्रान्कंसविहिंसितान् ॥ स्मरंती कृपणं प्राह वैक्लव्यादश्रुलोचना ॥ २८ ॥ देवक्युवाच ॥ राम रामाप्रमेयात्मन्कृष्ण योगेश्वरेश्वर ॥ वेदाहं वां विश्वसृजामीश्वरावादिपूरुषौ ॥ कालविध्वस्तसत्वानां राज्ञामुच्छास्त्रवर्तिनाम् ॥ भूमेर्भारायमाणानामवतीर्णौ किलाद्य मे ॥ ३० ॥ यस्यांशांशांशभागेन विश्वोत्पत्तिलयोदयाः ॥ भवंति किल विश्वात्मंस्तं त्वाऽद्याहं गतिं गता ॥ ३१ ॥ चिरान्मृतसुतादाने गुरुणा किल चोदितौ ॥ आनिन्यथुः पितृस्थानाद्गुरवे गुरुदक्षिणाम् ॥ ३२ ॥

किलावतीर्णौ ॥ ३० ॥ हे आद्य यस्यांशः पुरुषस्तस्यांशो माया तस्या अंशा गुणास्तेषां भागेन परमाणुमात्रलेशेन विश्वोत्पत्त्यादयो भवंति । तं त्वा त्वां गतिं शरणं गताऽस्मि ॥ ३१ ॥ आनिन्यथुरानीतवंतौ । पितृस्थानाद्यमसदनात् ॥ ३२ ॥

सर्वदेवतारूप देवकी, आपल्या रामकृष्ण पुत्रांनीं, सांदीपनिगुरूचा मरण पावलेला पुत्र जीवंत करून आणिला असें ऐकून, विस्मित झाली आणि कंसानें मारलेल्या आपल्या पुत्रांचें स्मरण करून, शोकानें नेत्रांत अश्रु आणीत होत्साती, श्रीकृष्ण व बळराम या उभयतांना संबोधनें देऊन दीनपणें असें ह्मणाली कीं,– ॥ २७ ॥ २८ ॥ देवकी ह्मणाली—हे अचिंत्यस्वरूपा रामा, रामा, हे योगेश्वरेश्वरा कृष्णा, तुह्मी उभयतां विश्वस्रष्ट्या प्रजापतींचे ईश्वर आदिपुरुष आहां असें मी जाणत्यें ॥ २९ ॥ तुह्मी उभयतां, काळाच्या प्रभावानें सत्वगुणाचें विवेकधैर्यादिक कार्य नाहींसें झालेल्या, शास्त्रीय मर्यादांचें उल्लंघन करणाऱ्या व भूमीला भारभूत अशा राजांच्या नाशाकरितां माझेठिकाणीं अवतीर्ण झालां आहां ॥ ३० ॥ हे विश्वात्म्या, हे आद्या, ज्या तुझ्या पुरुषरूप अंशाच्या मायारूप अंशापासून झालेल्या गुणांच्या अंशानें जगाचे उत्पत्तिस्थितिसंहार होतात असें प्रसिद्ध आहे, त्या तुला मी आज शरण आल्यें आहें ॥ ३१ ॥ हे योगेश्वरेश्वरहो, मरून फार वर्षें झालेल्या पुत्राला आणून देण्याविषयीं ॥२६५॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सांदीपनि गुरूनें आज्ञा केलेल्या तुह्मीं, यमसदनापासून त्याला आणिलें व गुरूला गुरुदक्षिणा दिलीत असें प्रसिद्ध आहे. तसाच माझाहि मनोरथ तुह्मी पूर्ण करावा. कोणता तो मनोरथ ? असें ह्मणाल तर–कंसानें मारलेल्या माझ्या पुत्रांना जर तुह्मी आणिलें तर त्यांना पाहण्याची मी इच्छा करीत आहें ॥ ३२ ॥ ३३ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, याप्रमाणें मातेनें प्रार्थना केलेल्या त्या रामकृष्णांनीं, आपल्या अचिंत्यशक्ति योगमायेचा आश्रय करून, सुतलामध्यें प्रवेश केला ॥ ३४ ॥ जगताचें आत्मभूत दैवत आणि आपलें तर अत्यंत इष्ट दैवत अशा पाताळांत प्रविष्ट झालेल्या त्या दोघां रामकृष्ण बंधूंना पाहून, त्यांच्या दर्शनानंदानें व्याप्तचित्त झालेल्या बळिराजानें, परिवारासहवर्तमान तत्काळ उठून त्यांना नमस्कार केला ॥ ३५ ॥ आणि त्या महात्म्या रामकृष्णांना प्रीतिपूर्वक श्रेष्ठ आसन समर्पण करून त्यावर

॥ ३३ ॥ ३४ ॥ दैत्यराट् बलिः । कथंभूतौ । विश्वस्यात्मभूतं दैवम् । सान्वयः सपरिवारः ॥ ३५ ॥ सवृंदः सपरिजनः । कथंभूतौ । पादाववनिज्य यदंबु ययोरवनेजनोदकमाब्रह्म ब्रह्माणमभिव्याप्य जगत्पुनत्पवित्रयद्वर्तते तौ ॥ ३६ ॥ ३७ ॥ इंद्रसेनो बलिः । प्रेमविभिन्नया प्रेमार्द्रया धिया । बिभ्रद्धारयन् ॥ ३८ ॥ अनंताय शेषाय ।

तथा मे कुरुतं कामं युवां योगेश्वरेश्वरौ ॥ भोजराजहतान्पुत्रान्कामये द्रष्टुमाहृतान् ॥ ३३ ॥ ऋषिरुवाच ॥ एवं संचोदितौ मात्रा रामः कृष्णश्च भारत ॥ सुतलं संविविशतुर्योगमायामुपाश्रितौ ॥ ३४ ॥ तस्मिन्प्रविष्टावुपलभ्य दैत्यराड्विश्वात्मदैवं सुतरां तथाऽऽत्मनः ॥ तद्दर्शनाह्लादपरिप्लुताशयः सद्यः समुत्थाय ननाम सान्वयः ॥ ३५ ॥ तयोः समानीय वरासनं मुदा निविष्टयोस्तत्र महात्मनोस्तयोः ॥ दधार पादाववनिज्य तज्जलं सवृंद आब्रह्मपुनद्यदंबु ह ॥ ३६ ॥ समर्हयामास सतौ विभूतिभिर्महार्हवस्त्राभरणानुलेपनैः ॥ तांबूलदीपामृतभक्षणादिभिः स्वगोत्रवित्तात्मसमर्पणेन च ॥ ३७ ॥ स इंद्रसेनो भगवत्पदांबुजं बिभ्रन्मुहुः प्रेमविभिन्नया धिया ॥ उवाच हानंदजलाकुलेक्षणः प्रहृष्टरोमा नृप गद्गदाक्षरम् ॥ ३८ ॥ बलिरुवाच ॥ नमोऽनंताय बृहते नमः कृष्णाय वेधसे ॥ सांख्ययोगवितानाय ब्रह्मणे परमात्मने ॥ ३९ ॥ दर्शनं वां हि भूतानां दुष्प्रापं चाप्यदुर्लभम् ॥ रजस्तमःस्वभावानां यन्नः प्राप्तौ यदृच्छया ॥ ४० ॥

बृहते फणैकदेशे विश्वधारणाद्बृहत्तस्मै कृष्णाय सदानंदरूपाय च । वेधसे जगद्विधात्रे । सांख्ययोगवितानायेत्यादिपदत्रयमैक्यविवक्षया ॥ ३९ ॥ योगेश्वराणामपि दुर्दर्शौ युवामस्माभिर्दृष्टावित्येतन्नातिचित्रमित्याह । दर्शनमिति । दुष्प्रापमपि युष्मत्कृपया केषांचिददुर्लभं सुलभमपि भवति तदाह । रजस्तमःस्वभावानामिति । नो दर्शनं प्राप्तौ ॥ ४० ॥

बसलेल्या त्यांच्या, ज्यांचें प्रक्षालनोदक ब्रह्मदेवापर्यंत सर्व जगाला पवित्र करीत आहे त्या चरणाचें प्रक्षालन करून तें उदक, आपल्या परिवारासहवर्तमान मस्तकीं धारण केलें ॥ ३६ ॥ आणि त्या रामकृष्णांचें उत्तम वस्त्रें, भूषणें, उट्या, तांबूल, दीप, आणि अमृतासारखें भोजन यांच्यायोगानें तसेंच आपलें पुत्रपौत्रादिक कुळ, धन व देह यांच्या समर्पणानें पूजन केलें ॥ ३७ ॥ हे राजा, नंतर तो बळिराजा, प्रेमानें द्रवयुक्त झालेल्या आपल्या बुद्धीनें भगवंताच्या चरणकमलाचें वारंवार धारण करित होत्साता, ज्याचे नेत्र आनंदाश्रूंनीं भरून गेले आहेत, ज्याच्या अंगावर रोमांच उभे राहिले आहेत व ज्याचा कंठ सद्गदित झाला आहे असा होऊन ह्मणाला कीं, ॥ ३८ ॥ बळि ह्मणाला–हे देवा, फडीच्या एकदेशीं जग धारण करणाऱ्या शेषरूपी तुज बळरामाला नमस्कार असो. व जग उत्पन्न करणाऱ्या तुज कृष्णाला नमस्कार असो. सांख्यशास्त्राचे व योगशास्त्राचे प्रवर्तक ब्रह्मरूपी व परमात्मे अशा एकरूपी तुम्हां उभयतांना नमस्कार असो ॥ ३९ ॥ ज्याअर्थीं योगेश्वरांच्याहि दृष्टि न पडणारे तुह्मी

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आपल्या इच्छेनें रजोगुणाच्या व तमोगुणाच्या स्वभावांनीं युक्त अशा आमच्या दृष्टीस पडलां आहां, त्याअर्थीं तुमचें दर्शन पुष्कळ जीवांना दुर्लभ असूनहि तुमच्या कृपेनें कांहीं जीवांनामात्र सुलभ होतें असें निश्चित झालें ॥ ४० ॥ आतां आह्मी शत्रु असूनहि सात्विक भक्तांपेक्षां सभाग्य आहों असें सांगतो–दैत्य, दानव इत्यादिक आह्मी व गंधर्वे, सिद्ध, विद्याधर, चारण, यक्ष, राक्षस, पिशाच, भूत, प्रमथाधिपति ॥ ४१ ॥ इत्यादिक आमच्यासारखे दुसरेहि जे कितीएक लोक आहेत ते साक्षात् शुद्धसत्वमय व वेदमूर्ति अशा तुझेठिकाणीं निरंतर वैरभाव धारण करणारे आहेत त्यांमध्यें जसे कितीएक (शिशुपालादिक) पराकाष्ठेच्या वैरभक्तीनें व कितीएक (गोपीवगैरे) कामभक्तीनें तुझें स्वरूप पावले आहेत, तसे सत्वनिष्ठ असलेले देवहि तुझें स्वरूप पावले नाहींत ॥ ४२ ॥ ४३ ॥ आतां सात्विकांपेक्षां राजसतामस श्रेष्ठ आहेत हें मोठें आश्चर्य

अहो विद्विषो वयं सात्विकभक्तेभ्योऽपि सभाग्या इत्याह । दैत्येत्यादित्रिभिः ॥ ४१ ॥ ४२ ॥ उद्धद्धवैरेण या भक्तिस्तया । केचनेति चैद्यादयः । कामतो भक्त्या गोप्यादयो यथा सन्निकृष्टास्त्वदात्मतां प्राप्ताः । तथा च सत्वसंरब्धाः सत्वाविष्टा अपि सुरादयो न सन्निकृष्टा इति ॥ ४३ ॥ ननु सात्विकेभ्योऽपि राजसादयः सन्निकृष्टा इति चित्रं तदाह । इदमित्थमिति । इदमिति स्वरूपतः इत्थमिति विशेषतश्च ॥ ४४ ॥ तदेवं यद्यपि वैरभावेन त्वत्प्राप्तिर्भवेत्तथाऽपि मां सात्विकं कुर्विति प्रार्थयते । तदिति । तत्तथा नः

दैत्यदानवगंधर्वाः सिद्धविद्याध्रचारणाः ॥ यक्षरक्षःपिशाचाश्च भूतप्रमथनायकाः ॥ ४१ ॥ विशुद्धसत्वधाम्न्यद्धा त्वयि शास्त्रशरीरिणि ॥ नित्यं निबद्धवैरास्ते वयं चान्ये च तादृशाः ॥ ४२ ॥ केचनोद्बद्धवैरेण भक्त्या केचन कामतः ॥ न तथा सत्वसंरब्धाः सन्निकृष्टाः सुरादयः ॥ ४३ ॥ इदमित्थमिति प्रायस्तव योगेश्वरेश्वर ॥ न विदंत्यपि योगेशा योगमायां कुतो वयम् ॥ ४४ ॥ तन्नः प्रसीद निरपेक्षविमृग्ययुष्मत्पादारविंदधिषणान्यगृहांधकूपात् ॥ निष्क्रम्य विश्वशरणांघ्र्युपलब्धवृत्तिः शांतो यथैक उत सर्वसखैश्चरामि ॥ ४५ ॥ शाध्यस्मानीशितव्येश निष्पापान्कुरु नः प्रभो ॥ पुमान्यच्छ्रद्धया तिष्ठंश्चोदनाया विमुच्यते ॥ ४६ ॥

प्रसीद । यथा निरपेक्षैराप्तकामैरपि विमृग्यं युष्मत्पादारविंदं तदेव धिषणमाश्रयस्तस्मादन्यद्गृहं तदेवांधकूपस्तस्मान्निष्क्रम्य निर्गत्य विश्वस्य शरणं रक्षितारो वृक्षास्तेषामंघ्रिमूलेषु स्वतएव गलितैः फलादिभिरुपलब्धा प्राप्ता वृत्तिर्जीविका येन सोऽहं शांतः सन्नेक एव चरामि । उत अथवा सर्वेषां सखायो महांतस्तैः सह यथा चरामीति ॥ ४५ ॥ कथमल्पपुण्यानामेवं भावः संभवतीति चेत्तर्हि यथैतद्भवेत्तथाऽस्माननुशिक्षयेत्याह । शाधीति । हे प्रभो ईशितव्याः सर्वे जीवास्तेषामीश यत्तवानुशासनमातिष्ठन्नाश्रयंश्चोदनाया विधिनिषेधलक्षणायाः सकाशाद्विमुच्यते । न खलु त्वद्भक्तो विधिकिंकरः स्यादिति भावः ॥ ४६ ॥

आहे असें ह्मणावें तर–हे योगेश्वरेश्वरा, बहुधा योगेश्वरहि तुझ्या योगमायेला 'ही अशा स्वरूपाची व अशा प्रकारांची आहे हें' जाणत नाहींत मग आह्मी तर काय जाणणार आहों ॥ ४४ ॥ आतां राजसतामसांना वैरभावानें जरी तुझी प्राप्ति होत्ये तथापि तूं मला सात्विकच कर अशी प्रार्थना करितो–हे देवा, निष्काम पुरुषांनींहि शोध करण्यास योग्य अशा तुझ्या चरणकमळाच्या आश्रयाहून इतर अशा गृहरूप अंधकारयुक्त कूपांतून निघून मी शांतपणें, जगाचें रक्षण करणाऱ्या वृक्षांखालीं आपोआप गळलेल्या फलादिकांनीं देहनिर्वाह करीत जसा एकटाच संचार करीन किंवा सर्वांचे मित्र अशा साधूंरोबर संचार करीन तसा तूं माझ्यावर अनुग्रह कर ॥ ४५ ॥ हे प्रभो, हे सर्व जीवांच्या ईश्वरा, जें तूं सांगितलेलें आचरण करणारा पुरुष, विधिनिषेधरूप बंधनापासून मुक्त (जीवन्मुक्त) होतो तें तूं आपलें दास्य आह्मांस सांग

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आणि निष्पाप कर ॥ ४६ ॥ याप्रमाणें प्रार्थना केलेला श्रीभगवान् ह्मणाला कीं,—स्वायंभुव मन्वंतरामध्यें मरीचिनामक प्रजापतीचे ऊर्णा—(कला) नामक स्त्रीचेठिकाणीं सहा पुत्र देव उत्पन्न झालेले होते, ते कन्या सरस्वतीबरोबर मैथुन करण्याविषयीं उद्युक्त झालेल्या ब्रह्मदेवाला पाहून हंसले ॥ ४७ ॥ त्या परिहासरूप दुष्टकर्माच्या योगानें (ब्रह्मदेवाच्या शापानें) ते तत्काळ दैत्ययोनि पावोन हिरण्यकशिपूचे पुत्र झाले होते. यद्यपि हिरण्यकशिपूचे पुत्र प्रल्हादादिक सांगितले आहेत तथापि या उक्तीच्या आधारानें तेहि त्याचे पुत्र झाले होते असें जाणावें. तेथून ते योगमायेनें देवकीच्या उदरीं नेल्यावर तेथून ते जन्मास येतांच कंसानें मारून टाकिले. हे बळिराजा, आतां ती देवकी त्या आपल्या मेलेल्या पुत्रांचा शोक करीत आहे. ते हे सहा जण तुझ्याजवळ आहेत ॥ ४८ ॥ ४९ ॥ आम्हीं यांना या स्थानापासून आईचा शोक

तदुक्तं सर्वमनुमोद्य स्वागमनकारणं सप्रपंचं कथयति । आसन्निति पंचभिः । ऊर्णायां भार्यायाम् । प्रथमेंऽतरे स्वायंभुवमन्वंतरे ते देवाः सुतां वाचं यभितुं यब्धुं मैथुनेन रमयितुमुद्यतमुद्युक्तं कं प्रजापतिं जहसुरुपहसितवंतः ॥ ४७ ॥ तेनावद्यकर्मणा पापेनासुरीं योनिमगन्नगमन् । अधुना तत्क्षणमेव । हिरण्यकशिपोर्जाता इत्यर्थः ॥ ४८ ॥

श्रीभगवानुवाच ॥ आसन्मरीचेः षट् पुत्रा ऊर्णायां प्रथमेंऽतरे ॥ देवाः कं जहसुर्वीक्ष्य सुतां यभितुमुद्यतम् ॥ ४७ ॥ तेनासुरीमगन्योनिमधुनाऽवद्यकर्मणा ॥ हिरण्यकशिपोर्जाता नीतास्ते योगमायया ॥ ४८ ॥ देवक्या उदरे जाता राजन्कंसविहिंसिताः ॥ सा तान् शोचत्यात्मजान्स्वांस्त इमेऽध्यासतेंऽतिके ॥ ४९ ॥ इत एतान्प्रणेष्यामो मातृशोकापनुत्तये ॥ ततः शापाद्विनिर्मुक्ता लोकं यास्यंति विज्वराः ॥ ५० ॥ स्मरोद्गीथः परिष्वंगः पतंगः क्षुद्रभृद्घृणी ॥ षडिमे मत्प्रसादेन पुनर्यास्यंति सद्गतिम् ॥ ५१ ॥ इत्युक्त्वा तान्समादाय इंद्रसेनेन पूजितौ ॥ पुनर्द्वारवतीमेत्य मातुः पुत्रानयच्छताम् ॥ ५२ ॥ तान्दृष्ट्वा बालकान्देवी पुत्रस्नेहस्नुतस्तनी ॥ परिष्वज्यांकमारोप्य मूर्ध्न्यजिघ्रदभीक्ष्णशः ॥ ५३ ॥ अपाययत्स्तनं प्रीता सुतस्पर्शपरिस्नुता ॥ मोहिता मायया विष्णोर्यया सृष्टिः प्रवर्तते ॥ ५४ ॥

ते च योगमायया ततो नीताः संतो देवक्या उदरे जाताः । हे राजन् बले ते च कंसेन विहिंसिताः । सा च तानात्मजान्मत्वा शोचति । ते चेमे तवांतिकेऽध्यासते ॥ ४९ ॥ लोकं देवलोकम् ॥ ५० ॥ स्मरोद्गीथः स्मरसहित उद्गीथः । सद्गतिं मोक्षम् । स्मरस्यैव पूर्वं कीर्तिमानिति नाम । अतः कीर्तिमंतं प्रथमजं कंसायानकदुंदुभिः । अर्पयामासेत्युक्तम् ॥ ५१ ॥ अयच्छतामर्पयामासतुः ॥ ५२ ॥ ५३ ॥ ५४ ॥

घालविण्याकरितां घेऊन जातों. आईचा शोक दूर झाल्यावर हे शापापासून (दैत्ययोनीपासून) मुक्त होऊन सुखयुक्त होत्साते देवलोकीं गमन करितील ॥ ५० ॥ स्मर, उद्गीथ, परिष्वंग पतंग, क्षुद्रभृत्, आणि घृणी या नांवांचे हे सहाजण पुत्र माझ्या प्रसादानें पुन्हा सद्गति पावतील ॥ ५१ ॥ असें बोलून त्या पुत्रांना घेऊन बळिराजानें पूजा केलेल्या त्या रामकृष्णांनीं, पुन्हा द्वारकेंत येऊन आईला ते पुत्र अर्पण केले ॥ ५२ ॥ त्या बालकांना अवलोकन करतांच पुत्रांच्या स्नेहानें स्तनांतून दूध स्रवूं लागलेली ती देवकी, त्यांना आलिंगन करून व मांडीवर बसवून घेऊन वारंवार मस्तकीं अवघ्राण करूं लागली ॥ ५३ ॥ नंतर, जिच्या योगानें सृष्टि प्रवृत्त होत्ये त्या विष्णूच्या मायेनें मोहित झाल्यामुळें संतुष्ट व पुत्रांच्या स्पर्शानें आनंदित झालेल्या त्या देवकीनें त्या पुत्रांकडून स्तनपान करविलें ॥ ५४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ते पुत्रहि श्रीकृष्णानें प्राशन करून अवशेष राहिलेलें त्या देवकीचें अमृतमय दूध प्राशन करून, श्रीकृष्णाच्या अंगस्पर्शानें, ज्यांना आह्मी देव आहों असें ज्ञान झालें आहे. असे होऊन ते श्रीकृष्ण, देवकी, वसुदेव आणि बळराम यांस नमस्कार करून सर्व लोक पाहात असतां, देवांचें स्थान अशा स्वर्गास निघून गेले ॥ ५५ ॥ ५६ ॥ हे राजा, तें मेलेल्या पुत्रांचें येणें व जाणें पाहून अत्यंत विस्मित झालेल्या देवकीदेवीनें, ती अहंताममतात्मक रचलेली श्रीकृष्णाची मायाच आहे असें मानिलें ॥ ५७ ॥ हे राजेंद्रा, अशाप्रकारचीं अनंतशक्ति परमात्म्या श्रीकृष्णाचीं अद्भुत चरित्रें अनंत आहेत ॥ ५८ ॥ सूत ह्मणाला—हे शौनकादिक ऋषिहो, श्रीशुकाचार्यांनें वर्णन केलेलें, जगाचें पाप नाहींसें करणारें, व भगवद्भक्तांच्या कर्णांना उत्तम आनंद देणारें हें अमृतकीर्ति भगवंताचें चरित्र, जो मनुष्य, भगवंताकडे आपलें चित्त ठेऊन श्रवण करील किंवा दुसऱ्याकडून श्रवण करवील

अमृतत्वे हेतुः । गदाभृतः पीतशेषमिति नारायणांगसंस्पर्शेन प्रतिलब्धं देवा वयमित्यात्मदर्शनं यैस्ते ॥ ५५ ॥ धाम देवलोकम् ॥ ५६ ॥ मृतानामागमनं निर्गमनं च श्रीकृष्णस्य मायां मेने । तेनैवापत्यादिरूपेण रचिताम् ॥ ५७ ॥ ५८ ॥ अमृतं कीर्तिर्यस्य तस्य । व्यासपुत्रैरिति बहुवचनं पूजार्थम् । जगतामघं भिनत्तीति तथा तत् । अलं निःशेषं यथा भवति तथा न कृच्छ्रादिवदिति । तदेवं मोक्षहेतुत्वं पापक्षयहेतुत्वं चोक्तम् । तद्भक्तानां तु सत्कर्णपूरं परमसुखावहं कर्णाभरणमिति स्वयं सुखरूपतामाह । किंच

पीत्वाऽमृतं पयस्तस्याः पीतशेषं गदाभृतः ॥ नारायणांगसंस्पर्शप्रतिलब्धात्मदर्शनाः ॥ ५५ ॥ ते नमस्कृत्य गोविंदं देवकीं पितरं बलम् ॥ मिषतां सर्वभूतानां ययुर्धाम दिवौकसाम् ॥ ५६ ॥ तं दृष्ट्वा देवकी देवी मृतागमननिर्गमम् ॥ मेने सुविस्मिता मायां कृष्णस्य रचितां नृप ॥ ५७ ॥ एवंविधान्यद्भुतानि कृष्णस्य परमात्मनः ॥ वीर्याण्यनंतवीर्यस्य संत्यनंतानि भारत ॥ ५८ ॥ सूत उवाच ॥ य इदमनुशृणोति श्रावयेद्वा मुरारेश्चरितममृतकीर्तेर्वर्णितं व्यासपुत्रैः ॥ जगदघभिदलं तद्भक्तसत्कर्णपूरं भगवति कृतचित्तो याति तत्क्षेम धाम ॥ ५९ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे उत्तरार्धे मृताग्रजानयनं नाम पंचाशीतितमोऽध्यायः ॥ ८५ ॥ ॥ राजोवाच ॥ ब्रह्मन्वेदितुमिच्छामः स्वसारं रामकृष्णयोः ॥ यथोपयेमे विजयो या ममासीत्पितामही ॥ १ ॥

भगवति कृतमावेशितं चित्तं येन स तथा भूत्वा तस्य क्षेमधाम कालादिभयरहितं लोकं यातीति ॥ ५९ ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधे उत्तरार्धे टीकायां पंचाशीतितमोऽध्यायः ॥ ८५ ॥ ॥ षडशीतितमे दंभात्सुभद्रामर्जुनोऽहरत् ॥ गत्वा च मिथिलां कृष्णो नृपविप्रावनंदयत् ॥ १ ॥ पित्रोः स्वज्ञानमादिश्य सुभद्रां फाल्गुनाय च ॥ जगाम मिथिलां कृष्णः स्वभक्तप्रियकृत्ततः ॥ २ ॥ देवक्या मृतपुत्रलाभवदर्जुनस्य सुभद्रालाभोऽपि रामप्रातिकूल्याद्दुर्घट इति मन्यमानः प्रसंगात्पृच्छति । ब्रह्मन्निति ॥ १ ॥

तो मनुष्य, त्या भगवंताच्या निर्भय अशा स्थानाप्रत पावेल ॥ ५९ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील उत्तरार्धांत मृताग्रजानयननिरूपणनामक हा पंचाऐशींवा अध्याय समाप्त झाला ॥ ८५ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ आतां ह्या शाऐशींव्या अध्यायामध्यें अर्जुनानें दांभिकपणानें सुभद्राहरण केलें आणि श्रीकृष्णानें मिथिला नगरीमध्यें जाऊन बहुलाश्वराजा व श्रुतदेव ब्राह्मण यांना आनंद उत्पन्न केला, अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ देवकीला जसा मेलेल्या पुत्रांचा लाभ दुर्घट होता तसाच अर्जुनालाहि सुभद्रालाभ, बळराम प्रतिकूळ असल्यामुळें दुर्घट होता असें मानणारा राजा प्रसंगानें प्रश्न करीत ह्मणाला कीं,—हे शुकाचार्य, रामकृष्णांची बहीण

---

१ सूतिकागृहामध्यें श्रीकृष्ण प्राकृतबालक झाला असें सांगितलें आहे ह्मणून त्यावेळीं भगवंतानें देवकीचें दूध प्राशन केलें असें तेथें जरी सांगितलेलें नाहीं तरी या उक्तीवरून तें समजावें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असून जी माझी आजी होती त्या सुभद्रेला अर्जुनानें, ज्याप्रकारें वरिली असेल तो विवाहप्रकार आह्मी आपल्यापासून जाणण्याची इच्छा करितों ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, जय मिळविण्यास समर्थ असा अर्जुन, तीर्थयात्रेच्या निमित्तानें पृथ्वीवर पर्यटण करित असतां, प्रभासतीर्थास निघून गेला. तेथें त्यानें, आपल्या मामाची (वसुदेवाची) कन्या जी सुभद्रा तिला बळराम, दुर्योधनास देणार आहे आणि इतर वसुदेवादिक तिला दुर्योधनास देऊं इच्छित नाहींत असें ऐकिलें. तेव्हां तिचें हरण करण्याची इच्छा करणारा तो अर्जुन, रामाला फसविण्याकरितां अतिपूज्य असा त्रिदंडी यतिवेष धारण करून द्वारकेंत प्रविष्ट झाला ॥ २ ॥ ३ ॥ आणि स्वार्थ साधणारा तो अर्जुन, तेथें पावसाळ्याचे चार महिनेपर्यंत राहिला, तेव्हां कपटवेष न जाणणाऱ्या पुरवासी लोकांनीं व रामानेंहि त्याचा वारंवार सत्कार केला ॥ ४ ॥ एकेवेळीं

॥ २ ॥ कथमशृणोत् । दुर्योधनायेति । अपरे वसुदेवादयो न दास्यंतीति । तल्लिप्सुस्तस्या मातुलेय्या लिप्सुः । रामं वंचयितुं पूज्यतमं त्रिदंडिवेषं विधाय गत इत्याह । स यतिरिति ॥ ३ ॥ स्वार्थसाधकः कन्यां प्रेप्सुः ॥ ४ ॥ तमातिथ्येन निमंत्र्य गृहमानीय बलेन यच्छ्रद्धयोपहृतं परिविष्टं तद्भैक्ष्यं किलार्जुनो बुभुज इत्यन्वयः ॥ ५ ॥ भावेन

श्रीशुक उवाच ॥ अर्जुनस्तीर्थयात्रायां पर्यटन्नवनीं प्रभुः ॥ गतः प्रभासमशृणोन्मातुलेयीं स आत्मनः ॥ २ ॥ दुर्योधनाय रामस्तां दास्यतीति न चापरे ॥ तल्लिप्सुः स यतिर्भूत्वा त्रिदंडी द्वारकामगात् ॥ ३ ॥ तत्र वै वार्षिकान्मासानवात्सीत्स्वार्थसाधकः ॥ पौरैः सभाजितोऽभीक्ष्णं रामेणाजानता च सः ॥ ४ ॥ एकदा गृहमानीय आतिथ्येन निमंत्र्य तम् ॥ श्रद्धयोपाहृतं भैक्ष्यं बलेन बुभुजे किल ॥ ५ ॥ सोऽपश्यत्तत्र महतीं कन्यां वीरमनोहराम् ॥ प्रीत्युत्फुल्लेक्षणस्तस्यां भावक्षुब्धं मनो दधे ॥ ६ ॥ साऽपि तं चकमे वीक्ष्य नारीणां हृदयंगमम् ॥ हसंती व्रीडितापांगी तन्न्यस्तहृदयेक्षणा ॥ ७ ॥ तां परं समनुध्यायन्नंतरं प्रेप्सुरर्जुनः ॥ न लेभे शं भ्रमच्चित्तः कामेनातिबलीयसा ॥ ८ ॥ महत्यां देवयात्रायां रथस्थां दुर्गनिर्गताम् ॥ जहारानुमतः पित्रोः कृष्णस्य च महारथः ॥ ९ ॥

रत्यभिप्रायेण क्षुभितं मनो दधे ॥ ६ ॥ व्रीडितापांगी सव्रीडकटाक्षा । तस्मिन्नेव न्यस्तं हृदयमीक्षणं च यया सा ॥ ७ ॥ अंतरं हर्तुमवसरं प्रेप्सुः प्राप्तुमिच्छुः । कामेन भ्रमच्चित्तं यस्य सः । शं रामादिसन्माननिमित्तं सुखम् ॥ ८ ॥ ९ ॥

बळरामानें त्या अर्जुनाला आतिथ्यानें निमंत्रण करून व घरीं आणून श्रद्धापूर्वक (आग्रहानें) अन्न वाढिलें असतां तें त्यानें भोजन केलें ॥ ५ ॥ तेथें त्यानें वीरपुरुषांचें मन हरण करणारी व तारुण्यवयांत आलेली एक मोठी कन्या पाहिली. तेणेंकरून प्रीतीनें प्रफुल्लितनेत्र झालेल्या त्यानें तिच्यावर रतिसुखाच्या इच्छेनें क्षोभ पावलेलें आपलें मन धारण केलें ॥ ६ ॥ आणि ती सुभद्राहि स्त्रियांना मनांतून आवडणाऱ्या त्या अर्जुनाला पाहून त्याचेवठिकाणीं मन व दृष्टि लावून लज्जायुक्त नेत्रकटाक्षांनीं त्याजकडे पाहून हंसत होत्साती, तोच आपणास पति असावा अशी इच्छा करूं लागली ॥ ७ ॥ तेव्हां केवळ त्या कन्येचें ध्यान करीत तिला हरण करण्याचा अवकाश मिळण्याची इच्छा करणारा तो अर्जुन, अतिबलवत्तर कामानें चित्तभ्रम पावल्यामुळें बळरामानें केलेल्या सत्कारानेंहि सुख पावेनासा झाला ॥ ८ ॥ नंतर एकेवेळीं त्या कन्येच्या आईबापांनीं (देवकीवसुदेवांनीं) व श्रीकृष्णानें अनुमोदन दिलेल्या त्या महारथी अर्जुनानें, मोठ्या देवयात्रेच्या निमित्तानें रथावर बसून द्वारकेंतून बाहेर निघाले-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ल्या त्या कन्येच्या रथावर बसून, आपलें गांडीव धनुष्य धारण करून व चोहोंकडून रोधन करणाऱ्या शूरांना पळवून, ते यादव आक्रोश करीत असतां, जसा सिंह आपला भाग हरण करितो त्याप्रमाणें त्यानें त्या सुभद्रेचें हरण केलें ॥ ९ ॥ १० ॥ तें ऐकून, जसा पूर्णिमेचे दिवशीं समुद्र खवळतो त्याप्रमाणें बळराम खवळला, परंतु श्रीकृष्णानें व दुसऱ्याहि बांधवांनीं पाय धरून त्याचें सांत्वन केलें असतां तो शांत झाला ॥ ११ ॥ आणि नंतर हर्षयुक्त झालेल्या त्या बळरामानें, त्या सुभद्रार्जुनरूपी वधूवरांना प्रीतीनें द्यावयाच्या पुष्कळ वस्तु तसेंच बहुतमोलाचे अलंकारवगैरे घातलेंले हत्ती, रथ, अश्व, सेवक, व दासी हीं पाठवून दिलीं. त्यावेळीं यादव आणि पांडव हे सर्वहि प्रीतीनें हर्षित झाले ॥ १२ ॥ आतां भक्तवात्सल्ययुक्त असें भगवंताचें दुसरें चरित्र सांगत श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, श्रुतदेव या नांवानें प्रसिद्ध असा एक ब्राह्मणश्रेष्ठ श्रीकृष्णाचा भक्त होता, तो कृष्णाच्या अनन्यभक्तीनें पूर्णमनोरथ, शांत, विषयासक्तिरहित व विचारवान् होता ॥ १३ ॥ तो विदेहदेशांतील मिथिलानगरी-

आसमंताद्रुंधत आवरणं कुर्वतः ॥ १० ॥ ११ ॥ पारिबर्हाणि वरवध्वोः प्रीतिदेयानि ॥ १२ ॥ १३ ॥ अनीहयाऽनुद्यमेनैवागतं यदाहार्यं भोज्यं तेन निर्वर्तिता निजाः क्रिया

रथस्थो धनुरादाय शूरांश्चारुंधतो भटान् ॥ विद्राव्य क्रोशतां स्वानां स्वभागं मृगराडिव ॥१० ॥ तच्छ्रुत्वा क्षुभितो रामः पर्वणीव महार्णवः ॥ गृहीतपादः कृष्णेन सुहृद्भिश्चान्वशाम्यत ॥ ११ ॥ प्राहिणोत्पारिबर्हाणि वरवध्वोर्मुदा बलः ॥ महाधनोपस्करेभरथाश्वनरयोषितः ॥ १२ ॥ श्रीशुक उवाच ॥ कृष्णस्यासीद्द्विजश्रेष्ठः श्रुतदेव इति श्रुतः ॥ कृष्णैकभक्त्या पूर्णार्थः शांतः कविरलंपटः ॥ १३ ॥ स उवास विदेहेषु मिथिलायां गृहाश्रमी ॥ अनीहयाऽऽगताहार्यनिर्वर्तितनिजक्रियः ॥ १४ ॥ यात्रामात्रं त्वहरहर्दैवादुपनमत्युत ॥ नाधिकं तावता तुष्टः क्रियाश्चक्रे यथोचिताः ॥ १५ ॥ तथा तद्राष्ट्रपालोऽङ्ग बहुलाश्व इति श्रुतः ॥ मैथिलो निरहंमान उभावप्यच्युतप्रियौ ॥ १६ ॥ तयोः प्रसन्नो भगवान् दारुकेणाहृतं रथम् ॥ आरुह्य साकं मुनिभिर्विदेहान्प्रययौ प्रभुः ॥ १७ ॥ नारदो वामदेवोऽत्रिः कृष्णो रामोऽसितोऽरुणिः ॥ अहं बृहस्पतिः कण्वो मैत्रेयश्च्यवनादयः ॥ १८ ॥ तत्र तत्र तमायांतं पौरा जानपदा नृप ॥ उपतस्थुः सार्घहस्ता ग्रहैः सूर्यमिवोदितम् ॥ १९ ॥

येन सः ॥ १४ ॥ यात्रामात्रं शरीरादि निर्वाहमात्रं भोज्यमुपनमति तं प्रत्यागच्छति ॥ १५ ॥ मिथिलस्य जनकस्य वंश्यो मैथिलः ॥ १६ ॥ प्रभुरेव स्वयं विदेहान्देशान् प्रययौ ॥ १७ ॥ कृष्णो व्यासः । रामो भार्गवः । अहं शुकः । एवमादिभिः सह ॥ १८ ॥ १९ ॥

मध्यें राहत असे. तो गृहस्थाश्रमी असूनहि उद्योगावांचून जें अन्नादिक प्राप्त होईल त्याच्याच योगानें आपलें भोजनादिक सर्व निर्वाह चालवीत असे ॥ १४ ॥ त्याच्या दैवानें त्याला दररोज शरीरादि निर्वाहापुरतेंच अन्नादिक प्राप्त होत असे, खटपट केली असतांहि अधिक प्राप्त होत नसे, ह्मणून जितकें प्राप्त होईल तितक्यानेंच संतुष्ट राहून तो आपलीं नित्यनैमित्तिक कर्में यथास्थितपणें करीत असे ॥ १५ ॥ हे राजा, त्या देशाचा अधिपति बहुलाश्व या नांवानें प्रसिद्ध असा राजा होता, तो जनकाच्या वंशांत झालेला असून देहादिकांचेठिकाणीं अभिमानरहित व श्रुतदेवासारखाच भगवद्भक्त होता. मिळून ते दोघेहि भगवंताला प्रिय होते ॥ १६ ॥ त्यांच्यावर प्रसन्न असलेला भगवान् प्रभु श्रीकृष्ण, एकेवेळीं दारुकानें आणिलेल्या रथावर बसून ऋषींसहवर्तमान विदेहदेशांत निघून गेला ॥ १७ ॥ ते ऋषि– नारद, वामदेव, अत्रि, व्यास, परशुराम, असित, अरुणि, मी (शुकाचार्य), बृहस्पति, कण्व, मैत्रेय व च्यवनादिक होते ॥ १८ ॥ तेव्हां विदेहदेशांत जाण्येवेळीं मार्गामध्यें त्या त्या स्थळीं प्राप्त होणाऱ्या त्या भग-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वंताचें हातांत पूजासाहित्य ग्रहण करणाऱ्या पुरवासी व देशवासी लोकांनीं जसें गुरुशुक्रादिक ग्रहांसह उदय पावणाऱ्या सूर्याचें पूजन करितात त्याप्रमाणें पूजन केलें ॥ १९ ॥ आणि हे राजा, त्यावेळीं आनर्त, धन्व, कुरु, जांगल, कंक, मत्स्य, पांचाल, कुंति, मधु, कैकय, कोसल व अर्ण या देशांत राहणाऱ्या लोकांनीं व दुसऱ्याहि देशांतील पुरुषांनीं व स्त्रियांनीं, आपल्या दृष्टींनीं, उदारहास्य व स्नेहयुक्त अवलोकन असलेलें त्या श्रीकृष्णाचें मुखकमळ आदरपूर्वक अवलोकन केलें ॥ २० ॥ तेव्हां आपल्या दर्शनानें अज्ञान नष्ट झालेल्या त्या लोकांना, अभय व तत्त्वज्ञान कृपादृष्टीनेंच देणारा तो त्रैलोक्यपूज्य भगवान् श्रीकृष्ण, दाहाही दिशांचेठिकाणीं व्यापून राहिलेलें, देवांनीं व मनुष्यांनीं गायन केलेलें, शुद्ध व पापनाशक असें आपलें यश ऐकत होत्साता, हळूहळू विदेहदेशांत जाऊन पोंचला ॥ २१ ॥ हे राजा, तेव्हां ते विदेहदेशांतील पुरवासी व देशवासी लोक, श्रीकृष्ण प्राप्त झाला असें ऐकून, हर्षयुक्त होऊन व हातांत पूजासाहित्यें घेऊन त्या भगवंताला सामोरे गेले ॥ २२ ॥ आणि त्या उत्तमकीर्ति भगवं

आनर्तादिषु अर्णांतास्तद्देशवर्तिनो नृनार्यः । उदारहासं स्निग्धमीक्षणं यस्मिंस्तत् । दृशिभिर्नेत्रैः ॥ २० ॥ स्ववीक्षणेनैव विनष्टतमिस्रा दृग्येषां तेभ्यः । क्षेममभयमर्थदृशं तत्त्वज्ञानं

आनर्तधन्वकुरुजांगलकंकमत्स्यपांचालकुंतिमधुकेकयकोसलार्णाः ॥ अन्ये च तन्मुखसरोजमुदारहासस्निग्धेक्षणं नृप पपुर्दृशिभिर्नृ-
नार्यः ॥ २० ॥ तेभ्यः स्ववीक्षणविनष्टतमिस्रदृग्भ्यः क्षेमं त्रिलोकगुरुरर्थदृशं च यच्छन् ॥ शृण्वन्दिगंतधवलं स्वयशोऽशुभघ्नं गीतं
सुरैर्नृभिरगाच्छनकैर्विदेहान् ॥ २१ ॥ तेऽच्युतं प्राप्तमाकर्ण्य पौरा जानपदा नृप ॥ अभीयुर्मुदितास्तस्मै गृहीतार्हणपाणयः ॥ २२॥
दृष्ट्वा तमुत्तमश्लोकं प्रीत्युत्फुल्लाननाशयाः ॥ कैर्धृतांजलिभिर्नेमुः श्रुतपूर्वांस्तथा मुनीन् ॥ २३ ॥ स्वानुग्रहाय संप्राप्तं मन्वानौ
तं जगद्गुरुम् ॥ मैथिलः श्रुतदेवश्च पादयोः पेततुः प्रभोः ॥ २४ ॥ न्यमंत्रयेतां दाशार्हमातिथ्येन सह द्विजैः ॥ मैथिलः श्रुतदेवश्च यु-
गपत्संहतांजली ॥ २५ ॥ भगवांस्तदभिप्रेत्य द्वयोः प्रियचिकीर्षया ॥ उभयोराविशद्गेहमुभाभ्यां तदलक्षितः ॥ २६ ॥ श्रोतुम-
प्यसतां दूरान् जनकः स्वगृहागतान् ॥ आनीतेष्वासनाग्र्येषु सुखासीनान्महामनाः ॥ २७ ॥

च ॥ २१ ॥ अभीयुः प्रत्युज्जग्मुः ॥ २२ ॥ प्रीत्योत्फुल्लान्याननान्याशया अंतःकरणानि च येषां ते । कैः शिरोभिः ॥ २३ ॥ २४ ॥ २५ ॥ तदभिप्रेत्यांगीकृत्य तत्तदोभाभ्यामपि ताभ्यां मद्गृहादन्यस्य गेहं यातीत्यलक्षितोऽविदितः । यद्वा उभाभ्यां रूपाभ्यां तदलक्षितस्ताभ्यामलक्षित इति ॥ २६ ॥ २७ ॥

ताला व पूर्वींच ज्यांचीं नांवें ऐकिलेलीं होतीं त्या नारदवामदेवादिक ऋषींना पाहून, ज्यांचीं नेत्रें व हृदयें प्रफुल्लित झालीं आहेत अशा त्या लोकांनीं, त्यांना आपल्या मस्तकीं हात जोडून प्रणाम केले ॥ २३ ॥ आपल्यावर अनुग्रह करण्याकरितां तो जगद्गुरु प्राप्त झाला आहे असें मानणारे ते बहुलाश्वराजा व श्रुतदेव ब्राह्मण हे उभयतां, भगवंताच्या पायांवर पडले ॥ २४ ॥ आणि त्या बहुलाश्व राजानें व श्रुतदेव ब्राह्मणानें, ब्राह्मणांसहवर्तमान त्या श्रीकृष्णाला एकदम हात जोडून आपल्या घरीं पूजा ग्रहण करण्यासाठीं येण्याचें आमंत्रण केलें ॥ २५ ॥ त्या दोघांच्याहि आमंत्रणाचा अंगीकार करून, दोघांचें प्रिय करण्याकरितां, त्या दोघांनींहि माझ्या घराहून दुसऱ्याच्या घरीं हा जात आहे असें न जाणलेला तो भगवान् श्रीकृष्ण, ब्राह्मणांसहवर्तमान दोन रूपें धारण करून, दोघांच्याहि घरीं प्रविष्ट झाला ॥ २६ ॥ तेव्हां वृद्धिंगत झालेल्या भक्तीनें हर्षितचित्त झालेल्या, आनंदाश्रूंनीं नेत्र भरून आलेल्या व उदारचित्त अशा त्या बहुलाश्व राजानें, दुराचारी लोकांना ज्याचें नांव ऐकणेंसुद्धां दूर आहे अशा परंतु कृपेनें आपल्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

घरीं आलेल्या व आपण दिलेल्या उत्तम आसनांवर सुखानें बसलेल्या त्या ऋषींना वंदन करून व त्यांचे पाय धुऊन, लोकांना पवित्र करणारीं तीं चरणक्षालनोदकें कुटुंबा-
सहवर्तमान मस्तकीं धारण केलीं आणि त्या समर्थांची–गंध, पुष्पें वस्त्रें, अलंकार, धूप, दीप, अर्घ्यें गाई व वृषभ यांच्या अर्पणानें पूजा केली ॥ २७ ॥ २८ ॥
॥ २९ ॥ नंतर, उत्तम अन्नानें तृप्त झालेल्या त्या ब्राह्मणांना तो राजा, मधुरवाणीनें प्रसन्न करीत होत्साता आपल्या मांडीवर घेतलेल्या श्रीकृष्णाच्या चरणाचें हळूहळू संम-
र्दन करीत हर्षानें असें ह्मणाला कीं–॥ ३० ॥ राजा ह्मणाला–हे विभो, तूं सर्व जीवांचा आत्मा, साक्षी व स्वप्रकाश आहेस, ह्मणून तूं आपल्या चरणकमळाचें स्मरण कर-
णाऱ्या आमच्या दृष्टी पडला आहेस ॥ ३१ ॥ एकांतभक्तापेक्षां मला बळराम बंधूहि, लक्ष्मी स्त्रीहि, आणि ब्रह्मदेव पुत्रहि प्रिय नाहींत, असें जें वचन तूं सांगितलें आहेस
तें सत्य करण्याकरितां तूं आमच्या दृष्टिगोचर झाला आहेस ॥ ३२ ॥ वास्तव ही गोष्ट जाणणारा कोणता बरें पुरुष, तुझ्या चरणकमळाचा त्याग करील? कोणीच कर-

उद्धर्षमुद्गतहर्षं हृदयं यस्य अस्त्रैराविले क्लिन्ने ईक्षणे यस्य सः स च स च ॥ २८ ॥ ईश्वरान् ईश्वरं तत्तुल्यांश्चेत्यर्थः ॥ २९ ॥ प्रीणन्प्रीणयन् । संस्पृशन्संमर्दयन् ॥ ३० ॥

प्रवृद्धभक्त्या उद्धर्ष हृदयस्राविलेक्षणः ॥ नत्वा तदंघ्रीन्प्रक्षाल्य तदपो लोकपावनीः ॥ २८ ॥ सकुटुंबो वहन्मूर्ध्ना पूजयांचक्र ई-
श्वरान् ॥ गंधमाल्यांबराकल्पधूपदीपार्घगोवृषैः ॥ २९ ॥ वाचा मधुरया प्रीणन्निदमाहान्नतर्पितान् ॥ पादावंकगतौ विष्णोः संस्पृ-
शन् शनकैर्मुदा ॥ ३० ॥ राजोवाच ॥ भवान्हि सर्वभूतानामात्मा साक्षी स्वदृग्विभो ॥ अथ नस्त्वत्पदांभोजं स्मरतां दर्शनं गतः
॥ ३१ ॥ स्ववचस्तदृतं कर्तुमस्मद्दृग्गोचरो भवान् ॥ यदात्थैकांतभक्तान्मे नानंतः श्रीरजः प्रियः ॥ ३२ ॥ को नु त्वच्चरणांभोज-
मेवंविद्विसृजेत्पुमान् ॥ निष्किंचनानां शांतानां मुनीनां यस्त्वमात्मदः ॥ ३३ ॥ योऽवतीर्य यदोर्वंशे नृणां संसरतामिह ॥ यशो
वितेने तच्छांत्यै त्रैलोक्यवृजिनापहम् ॥ ३४ ॥ नमस्तुभ्यं भगवते कृष्णायाकुंठमेधसे ॥ नरायणाय ऋषये सुशांतं तप ईयुषे
॥ ३५ ॥ दिनानि कतिचिद्भूमन्गृहान्नो निवस द्विजैः ॥ समेतः पादरजसा पुनीहीदं निमेः कुलम् ॥ ३६ ॥ इत्युपामंत्रितो राज्ञा
भगवाँल्लोकभावनः ॥ उवास कुर्वन्कल्याणं मिथिलानरयोषिताम् ॥ ३७ ॥

आत्मा चेतयिता । साक्षी प्रकाशकः । स्वदृक् स्वप्रकाशः । अथातःकारणात् ॥ ३१ ॥ अनंतो बंधुरपि श्रीर्भार्याऽपि अजः पुत्रोऽपि ॥ ३२ ॥ ३३ ॥ तच्छांत्यै संसारोपश-
माय ॥ ३४ ॥ ३५ ॥ गृहान् गृहेष्वित्यर्थः ॥ ३६ ॥ ३७ ॥

णार नाहीं जो तूं निष्किंचन व शांत अशा ऋषींना आपलें स्वरूपसुद्धां देत आहेस ॥ ३३ ॥ आणि ज्या तूं यदुराजाच्या वंशांत अवतार धारण करून, या संसारांत देव-
तिर्यगादिक योनींमध्यें उत्पन्न होऊन तापत्रयाचा अनुभव घेणाऱ्या जीवांना, त्या तापत्रयाची शांति होण्याकरितां त्रैलोक्यांतील सर्व लोकांचें पाप दूर करणारें आपलें
यश विस्तारिलें आहेस ॥ ३४ ॥ त्या तुज अकुंठितबुद्धि, अतिशांत तप करणाऱ्या ऋषिरूपी, नारायण भगवान् कृष्णाला नमस्कार असो ॥ ३५ ॥ असा नमस्कार करून
प्रार्थना करितो कीं,–हे व्यापका प्रभो, तूं कांहीं दिवसपर्यंत या सर्वऋषींसहवर्तमान आमच्या घरीं राहून, आपल्या चरणरजाच्या योगानें हें निमिराजाचें कुळ पवित्र कर
॥ ३६ ॥ याप्रमाणें बहुलाश्व राजानें प्रार्थना केलेला लोकपालक भगवान् श्रीकृष्ण, मिथिला नगरींतील पुरुषांचें व स्त्रियांचें कल्याण करीत होत्साता कांहींदिवसपर्यंत तेथेंच

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राहिला ॥ ३७ ॥ इकडे श्रुतदेव ब्राह्मणहि जनकराजाप्रमाणें, आपल्या घरीं प्राप्त झालेल्या श्रीकृष्णाला व ऋषींना नमस्कार करून, अत्यंत हर्षित झाला व वस्त्रानें त्यांस वारा घालीत नाचूं लागला ॥ ३८ ॥ नंतर आणलेल्या मोळ्वगैरे गवताच्या चटयांवर व दर्भादिकांच्या आसनांवर त्यांना बसवून व स्वागत प्रश्नानें त्यांचें अभिनंदन करून, भार्येसहित त्यानें मोठ्या हर्षानें त्यांच्या चरणांचें क्षालन केलें ॥ ३९ ॥ आणि त्या महाभाग्यवान् श्रुतदेवानें घर व कुटुंबासहित आपणास त्या उदकानें स्नान घालून घे-तलें. तेणेंकरून व भगवच्चरणांच्या स्पर्शादिकेंकरून तो अत्यंत हर्षित झाला व त्याचे सर्व मनोरथ पूर्ण झाले ॥ ४० ॥ नंतर त्यानें, फळें, गंधपुष्पादिक पूजापदार्थ, वाळ्यानें

धुन्वन्परिभ्रमयन् ॥ ३८ ॥ अवनिजे अवनिनिजे प्रक्षालितवान् ॥ ३९ ॥ ४० ॥ फलैरामलकादिभिरर्हणेनोशीरैस्तृणविशेषमूलैः सुवासितैः शिवैरमृतवत्स्वादुभिरंबुभिः । सुरभ्या मृदा कस्तूरीप्रमुखया । सपर्यया पूजया । यथोपपन्नयाऽनायासेन संपन्नया । भूतानुपद्रवलब्धत्वात् । सत्वविवर्धनं यदंधोऽन्नं तेन च ॥ ४१ ॥ अस्य श्रीकृष्णस्या त्मा मर्तिस्तस्य निकेतैः स्थानविशेषैर्भूसुरैश्च सर्वतीर्थास्पदपादरेणुभिः कृष्णादिभिर्यः संगमः स मम कुतोऽन्वभूदिति । अनु इति विस्मये । यद्वा आ इति वितर्के नु इति विस्मये

श्रुतदेवोऽच्युतं प्राप्तं स्वगृहान् जनको यथा ॥ नत्वा मुनीन्सुसंहृष्टो धुन्वन्वासो ननर्त ह ॥ ३८ ॥ तृणपीठबृसीष्वेतानानीतेषू-पवेश्य सः ॥ स्वागतेनाभिनंद्यांघ्रीन्सभार्योऽवनिजे मुदा ॥ ३९ ॥ तदंभसा महाभाग आत्मानं सगृहान्वयम् ॥ स्नापयांचक्र उ-द्धर्षो लब्धसर्वमनोरथः ॥ ४० ॥ फलार्हणोशीरशिवामृतांबुभिर्मृदा सुरभ्या तुलसीकुशांबुजैः ॥ आराधयामास यथोपपन्नया सपर्यया सत्त्वविवर्धनांधसा ॥ ४१ ॥ स तर्कयामास कुतो ममान्वभूद्गृहांधकूपे पतितस्य संगमः ॥ यः सर्वतीर्थास्पदपादरेणुभिः कृष्णेन चास्यात्मनिकेतभूसुरैः ॥ ४२ ॥ सूपविष्टान्कृतातिथ्याञ्छ्रुतदेव उपस्थितः ॥ सभार्य स्वजनापत्य उवाचांघ्र्यभिमर्शनः ॥ ४३ ॥ श्रुतदेव उवाच ॥ नाद्य नो दर्शनं प्राप्तः परं परमपूरुषः ॥ यर्हीदं शक्तिभिः सृष्ट्वा प्रविष्टो ह्यात्मसत्तया ॥ ४४ ॥

॥ ४२ ॥ उपस्थितः समीप उपविष्टः । भार्या भर्तव्याः स्वजना अपत्यानि च तैः सहितः । श्रीकृष्णस्यांघ्रिमभिमृशति संमर्दयतीत्यंघ्र्यभिमर्शनः ॥ ४३ ॥ यर्हीदं प्रविष्टस्त-दैव दर्शनं प्राप्त इति स एव सन्मात्रो नाद्यतनीभूतस्त्वमित्यर्थः । यद्वा नोऽस्मानद्यैव प्राप्त इति न किंतु तदैव प्राप्तो यर्हीदं विश्वं स्वशक्तिभिः सत्वादिभिः सृष्ट्वा स्वसत्तयाऽनु-प्रविष्टस्त्वम् । त्वद्दर्शनं तु परं केवलमद्यैव प्राप्तम् ॥ ४४ ॥

गार केलेलें अमृतासारखें गोड पाणी, सुगंधयुक्त मृत्तिका (कस्तूरी), तुळसी, दर्भ, कमळें व सत्वगुणवर्धक अन्न यांच्या योगानें अनायासानें सिद्ध झालेल्या पूजेनें त्या ऋषींचें आराधन केलें ॥ ४१ ॥ नंतर तो श्रुतदेव मनांत तर्क करूं लागला कीं, गृहरूप अंधकूपामध्यें पडलेल्या मला, श्रीकृष्णाचा व ज्यांचें चरणरज सर्व तीर्थांचेंहि दोष घालविणारें आहे व जे श्रीकृष्णाच्या मूर्तींचे निवासरूप आहेत अशा ब्राह्मणांचा समागम कोणत्या बरें पुण्याच्या योगानें झाला ? ॥ ४२ ॥ असो उत्तमप्रकारें आतिथ्य केले-ल्या व आसनांवर सुखानें बसलेल्या त्या ऋषींच्या समोर पोष्य असा पुत्र व स्वजनांसहित प्राप्त झालेला तो श्रुतदेव, श्रीकृष्णाच्या चरणाला स्पर्श करीत असें ह्मणाला कीं, ॥ ४३ ॥ श्रुतदेव ह्मणाला—हे प्रभो, उत्तम पुरुष असा तूं आह्मांजवळ आजच प्राप्त झालास असें नाहीं, तर जेव्हां आपल्या सत्वादिक शक्तींनीं हें जग उत्पन्न करून त्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मध्यें आपल्या सत्तेनें प्रविष्ट झाला आहेस त्याचवेळीं प्राप्त झाला आहेस परंतु तुझें दर्शनमात्र केवळ आजच झालें ॥ ४४ ॥ जसा निजलेला एकटाच पुरुष, आपल्या अविद्येच्या योगानें स्वप्नामध्यें, मनानेंच देवतिर्यगादिरूप दुसरा देहसमूह उत्पन्न करून व त्यांत प्रवेश करून, नानाप्रकारचा भासतो त्याप्रमाणें तूंहि या जगाला रचून त्यांत प्रवेश केल्यासारखा होऊन नानाप्रकारें भासत आहेस ॥ ४५ ॥ आणि जे मनुष्य निरंतर तुझें श्रवण, कीर्तन, पूजन, वंदन व परस्पर संवाद करितात त्या शुद्धचित्त पुरुषांच्याहि हृदयामध्यें तूं केवळ प्रकाशमात्र पावतोस आणि मलातर दृष्टिगोचरहि झाला आहेस. तेव्हां माझें मोठें भाग्य आहे ॥ ४६ ॥ आतां सर्वांच्या हृदयामध्यें असणारा मी

मायासृष्टिप्रवेशयोरविद्यासृष्टिप्रवेशौ दृष्टांततयाह । यथेति । आत्ममायया स्वाविद्यया । यद्वा आत्मनस्तव माययेति ॥ ४५ ॥ किंच । शृण्वतामिति । नित्यं श्रवणाकीर्तनादिपराणाममलात्मनामपि हृद्येव त्वं भासि । मम तु लोचनगोचरस्त्वमहो भाग्यमिति भावः ॥ ४६ ॥ ननु सर्वेषां हृदि स्थितः कथं केषांचिदेव हृदि भासि मेघैः सूर्यवज्जीवोपाधिभिरावृतत्वादिति यद्युच्यते तर्हि न कस्यापि भयादित्यत आह । हृदिस्थोऽपीति । कर्मभिर्विक्षिप्तं चेतो येषां तेषामात्मशक्तिभिरहंकारादिभिरग्राह्योऽव्यवहितोऽप्युपेतगुणः प्राप्तश्रवणकीर्तनादिसंस्कार आत्मा अंतःकरणं येषां तेषामंति समीपे अव्यवहितस्त्वमित्यर्थः ॥ ४७ ॥ एतदेव प्रपंचयन्नमस्यति । नमोऽस्त्विति । ते तुभ्यं नमोऽस्तु अध्यात्मविदां निवृत्तदेहाद्यहंकाराणां परात्मने परमात्मत्वेन प्रकाशमानाय मोक्षप्रदायेत्यर्थः । अनात्मने देहाद्यभिमानिने जीवाय परत्वेनाप्रकाशमानत्वात् । स्वात्मनः सकाशा-

यथा शयानः पुरुषो मनसैवात्ममायया ॥ सृष्ट्वा लोकं परं स्वाप्नमनुविश्यावभासते ॥ ४५ ॥ शृण्वतां गदतां शश्वदर्चतां त्वाऽभिवंदताम् ॥ नृणां संवदतामंतर्हृदि भास्यमलात्मनाम् ॥ ४६ ॥ हृदिस्थोऽप्यतिदूरस्थः कर्मविक्षिप्तचेतसाम् ॥ आत्मशक्तिभिरग्राह्योऽप्यंत्युपेतगुणात्मनाम् ॥ ४७ ॥ नमोऽस्तु तेऽध्यात्मविदां परात्मने अनात्मने स्वात्मविभक्तमृत्यवे ॥ सकारणाकारणलिंगमीयुषे स्वमायया संवृत रुद्धदृष्टये ॥ ४८ ॥ स त्वं शाधि स्वभृत्यान्नः किं देव करवामहे ॥ एतदंतो नृणां क्लेशो यद्भवानक्षगोचरः ॥ ४९ ॥

द्विभक्तः समर्पितो मृत्युः संसारो येन तस्मै । कुत एतत्तत्राह । सकारणं महदादि कार्यमकारणं प्रकृतिस्तदुभयलिंगमुपाधिं नियम्यतया ईयुषे प्राप्तवते । अत उभयनियंतुः स्वस्मात्सकाशात्तदुभयवश्याय जीवाय विभक्तमृत्यव इत्यर्थः । नियंतृनियम्यत्वे कारणं वदन्नाह । हे स्वमायया संवृतेति । अतोऽलुप्तैश्वर्यत्वान्नियंत्रे तुभ्यं नमः । किंच रुद्धदृष्टये मायावित्वादेवान्येषां रुद्धा आवृता दृष्टिर्येन तस्मै । यद्वा स्वमाययास्वस्या संवृता अन्येषां रुद्धा दृष्टिर्येन तस्मै इत्येकं पदम् ॥ ४८ ॥ स एवंभूतः परमेश्वरस्त्वं नोऽस्मान्स्वभृत्यान् शाध्यनुशिक्षय ॥ ४९ ॥

कितीएकांनाच प्रकाशित होतों व कितीएकांना प्रकाशित होत नाहीं हें कां ? असें म्हणशील तर—जरी तूं सर्वांच्या हृदयामध्यें आहेस तथापि लौकिकवैदिकादिक अनेक कर्मांनीं विक्षिप्तचित्त झालेल्या पुरुषांना तूं फारच दूर आहेस, आणि जरी अहंकारादिक आत्मशक्तींनीं तुझें ग्रहण होत नाहीं तथापि ज्यांच्या अंतःकरणामध्यें तुझ्या श्रवणकीर्तनादिकांचा संस्कार आहे त्यांना तूं अगदीं जवळ आहेस ॥ ४७ ॥ म्हणून देहाभिमान सुटलेल्या पुरुषांना मोक्ष देणारा, देहाभिमान असणाऱ्या जीवांना आत्म्याहून निराळा संसार देणाऱ्या, महत्तत्वादिक कार्य आणि त्याचें कारण प्रकृति या दोन्हीं उपाधींचा नियंता, आपल्या मायेनें अलुप्तैश्वर्य आणि आपल्या मायेनें दुसऱ्यांच्या ज्ञानाचें आवरण करणारा अशा तुजकारणें नमस्कार असो ॥ ४८ ॥ हे देवा, तो परमेश्वर तूं, तुझे दास अशा आम्हांस आज्ञा कर कीं, तुझें दास्य आम्ही काय करावें ! ॥२७०॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जोंपर्यंत तुझें दर्शन झालें नाहीं तोंपर्यंतच मनुष्यांना संसारक्लेश होतो, दर्शन झाल्यावर पुढें क्लेशांचा नाशच होतो ॥ ४९ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, असें त्या श्रु-
तदेवानें केलेलें भाषण ऐकून, भक्तांचें दुःख हरण करणारा तो भगवान् श्रीकृष्ण, आपलेठिकाणीं अधिक आदर व ब्राह्मणाचेठिकाणीं कमी आदर पाहून लोकसंग्रहाकरितां,
माझ्यापेक्षांहि ब्राह्मणाचेठिकाणीं तूं विशेष श्रद्धा ठेवावीस असें त्याला सांगण्याकरितां, आपल्या हातानें त्याचा हात धरून हास्य करीत करीत त्याला ह्मणाला कीं,
॥ ५० ॥ श्रीभगवान् ह्मणाला–हे ब्राह्मणा, तुझ्यावर अनुग्रह करण्याकरितां हे ऋषि, येथें आले आहेत असें तूं जाण. कारण, हे ऋषि, हृदयांत असलेल्या माझ्या योगानें आपल्या
चरणरजेंकरून लोकांस पवित्र करित होत्साते लोकांमध्यें संचार करीत असतात ॥ ५१ ॥ आणि देवादिकांपेक्षांहि ब्राह्मण श्रेष्ठ आहेत. कारण, देवांच्या मूर्ति, अयोध्यादिक क्षेत्रें
व गंगादिक तीर्थें, हीं दर्शन स्पर्शन व पूजन यांच्या योगेंकरून हळूहळू पुष्कळ कालानें पवित्र करितात. तेंहि पवित्र करणें सत्पुरुषांच्या दर्शनेंकरूनच तत्काळ होतें ॥ ९२ ॥

॥ ५० ॥ स्वस्मिन्नादरमत्यधिकं ब्राह्मणेषु मंदमिवालक्ष्य लोकसंग्रहपरो भगवान्मत्तोऽपि ब्राह्मणेषु श्रद्धातिरेकं कुर्विंत्येवं तमनुशास्ति । ब्रह्मन्निति सप्तभिः । मया हृदि स्थितेन
॥ ५१ ॥ देवादिभ्योऽपि ब्राह्मणाः श्रेष्ठा इत्याह । देवा इति । ते शनैः पुनंति एते तु सद्यः । किंच देवादीनि यत्पुनंति तदप्यर्हत्तमानामीक्षया ॥ ५२ ॥ मम कला परिकल-

श्रीशुक उवाच ॥ तदुक्तमित्युपाकर्ण्य भगवान्प्रणतार्तिहा ॥ गृहीत्वा पाणिना पाणिं प्रहसंस्तमुवाच ह ॥ ५० ॥ श्रीभगवानुवा-
च ॥ ब्रह्मंस्तेऽनुग्रहार्थाय संप्राप्तान्विद्ध्यमून्मुनीन् ॥ संचरंति मया लोकान्पुनंतः पादरेणुभिः ॥ ५१ ॥ देवाः क्षेत्राणि तीर्थानि
दर्शनस्पर्शनार्चनैः ॥ शनैः पुनंति कालेन तदप्यर्हत्तमेक्षया ॥ ५२ ॥ ब्राह्मणो जन्मना श्रेयान्सर्वेषां प्राणिनामिह ॥ तपसा वि-
द्यया तुष्ट्या किमु मत्कलया युतः ॥ ५३ ॥ न ब्राह्मणान्मे दयितं रूपमेतच्चतुर्भुजम् ॥ सर्ववेदमयो विप्रः सर्वदेवमयो ह्यहम्
॥ ५४ ॥ दुष्प्रज्ञा अविदित्वैवमवजानंत्यसूयवः ॥ गुरुं मां विप्रमात्मानमर्चादाविज्यदृष्टयः ॥ ५५ ॥ चराचरमिदं विश्वं भावा ये
चास्य हेतवः ॥ मद्रूपाणीति चेतस्याधत्ते विप्रो मदीक्षया ॥ ५६ ॥ तस्माद्ब्रह्मऋषीनेतान्ब्रह्मन्मच्छ्रद्धयाऽर्चय ॥ एवं चेदर्चितो-
ऽस्म्यद्धा नान्यथा भूरिभूतिभिः ॥ ५७ ॥

नमुपास्तिस्तया युतः ॥ ५३ ॥ किंच ब्राह्मणाराधनमेव मम प्रेष्ठमित्याह । नेति । हेतुमाह । सर्ववेदमयो विप्र इति । प्रमाणाधीनत्वात्प्रमेयस्य वेदमयो विप्रो देवमयादस्माद्रूपा-
त्प्रेष्ठ इत्यर्थः ॥ ५४ ॥ असूयवो दोषदृष्टयः । इज्यदृष्टयः पूज्यबुद्धयः ॥ ५५ ॥ अस्य विश्वस्य हेतवो भावा महदादयः । मदीक्षया ममैव सर्वत्रेक्षया ॥ ५६ ॥ ५७ ॥

या संसारामध्यें सर्वहि प्राण्यांत ब्राह्मण हा जन्ममात्रानेंच श्रेष्ठ आहे, मग तो जर तप, विद्या, संतोष व माझी उपासना ह्या गुणांनीं युक्त असेल तर तो श्रेष्ठ आहे हें काय
सांगावें ॥ ५३ ॥ हें माझें चतुर्भुज स्वरूपहि मला ब्राह्मणांपेक्षां अधिक प्रिय वाटत नाहीं. कारण, ब्राह्मण सर्ववेदमय आहे आणि मी सर्वदेवमय आहें. देवांची सिद्धता वेदा-
च्या स्वाधीन असल्यामुळें देवमय अशा मजपेक्षांहि वेदमय ब्राह्मण श्रेष्ठ आहे ॥ ५४ ॥ हें माझें मत न जाणूनच गुणांवर दोषारोप करणारे आणि प्रतिमादिकांवरच केवळ
पूज्यबुद्धि ठेवणारे दुर्बुद्धि लोक, गुरुरूपी, आत्मरूपी व मत्स्वरूपी अशा ब्राह्मणांचा अवमान करितात ॥ ५५ ॥ आणि ब्राह्मण हाच, सर्वठिकाणीं ईश्वर आहे अशी भावना
ठेऊन, हें स्थावरजंगमात्मक जग आणि याचीं कारणें जे महत्तत्वादिक पदार्थ आहेत ते सर्वहि माझीं रूपें आहेत असें आपल्या मनामध्यें धारण करितो ॥ ५६ ॥ ह्मणून हे
ब्राह्मणा, तूं ह्या सर्व ऋषींचें, हे माझें स्वरूपच आहेत अशा बुद्धीनें पूजन कर. असें जर त्यांचें पूजन करशील तर साक्षात् मीच पूजिल्यासारखा होईन. त्यावांचून पुष्कळ

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

उपचारांनीं पूजन केलेलाहि मी पूजन केल्यासारखा होत नाहीं ॥ ५७ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, याप्रमाणें श्रीकृष्ण प्रभूनें आज्ञा केलेला तो श्रुतदेव ब्राह्मण, व बहुलाश्व राजा, हे कृष्णासहित त्या सर्वद्विजोत्तमांना अभेददृष्टीनें आराधन करून भगवत्स्वरूपास पावले ॥ ५८ ॥ हे राजा, याप्रमाणें भक्तांची प्रीति बाळगणारा तो भगवान् श्रीकृष्ण, कांहीं दिवसपर्यंत त्या मिथिलानगरीमध्यें राहून आपले भक्त अशा श्रुतदेवबहुलाश्वांना वेदांचा प्रवृत्तिप्रकार व ब्रह्मपरत्व सांगून पुन्हा द्वारकेस निघून गेला ॥५९॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील उत्तरार्धांत सन्मार्गनिरूपणरूप हा शायशींवा अध्याय समाप्त झाला ॥ ८६ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥

॥ ५८ ॥ सतां वेदानां त्रिकांडविषयाणां प्रवृत्तिप्रकारमादिश्य ॥ ५९ ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधे उत्तरार्धे टीकायां षडशीतितमोऽध्यायः ॥ ८६ ॥ ॥ सप्ताशीतितमे नारायणनारदवादतः ॥ वेदैः स्तुतिर्गुणालंबा निर्गुणावधि वर्ण्यते ॥ १ ॥ वागीशा यस्य वदने लक्ष्मीर्यस्य च वक्षसि ॥ यस्यास्ते हृदये संवित्तं नृसिंहमहं भजे ॥ २ ॥ संप्रदायविशुद्ध्यर्थं स्वीयनिर्बंधयंत्रितः ॥ श्रुतिस्तुतिमितव्याख्यां करिष्यामि यथामति ॥ ३ ॥ श्रीमद्भागवतं पूर्वैः सारतः सन्निषेवितम् ॥ मया तु तदुपस्पृष्टमुच्छिष्टमुपचीयते ॥ ४ ॥ पूर्वाध्यायांते, एवं स्वभक्तयो राजन्भगवान्भक्तभक्तिमान् ॥ उषित्वाऽऽदिश्य सन्मार्गं पुनर्द्वारवतीमगादित्यत्र सन्मार्गं सतां स्वतः प्रमाणभूतानामप्रामाण्यकारणरहितानां वेदानां मार्गं ब्रह्मपरत्वमुपदिश्य भगवानगादित्युक्तं तत्र वेदानां ब्रह्मपरत्वमघटमानं मन्वानः पृच्छति । ब्रह्मन्निति । तत्र तावन्मुख्यालक्षणागुणभेदेन त्रिधा शब्दप्रवृत्तिः ।

श्रीशुक उवाच ॥ स इत्थं प्रभुणादिष्टः सहकृष्णान्द्विजोत्तमान् ॥ आराध्यैकात्मभावेन मैथिलश्चाप सद्गतिम् ॥ ५८ ॥ एवं स्वभक्तयो राजन्भगवान्भक्तभक्तिमान् ॥ उषित्वाऽऽदिश्य सन्मार्गं पुनर्द्वारवतीमगात् ॥ ५९ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे उत्तरार्धे श्रुतदेवानुग्रहो नाम षडशीतितमोऽध्यायः ॥ ८६ ॥ ॥ परीक्षिदुवाच ॥ ब्रह्मन्ब्रह्मण्यनिर्देश्ये निर्गुणे गुणवृत्तयः ॥ कथं चरंति श्रुतयः साक्षात्सदसतः परे ॥ १ ॥

मुख्याऽपि रूढियोगभेदेन द्विधा । रूढिश्च स्वरूपेण जात्या गुणेन वा निर्देशार्हे वस्तुनि संज्ञासंज्ञिसंकेतेन प्रवर्तते । यथा डित्थो गौः शुक्ल इति । लक्षणा च तेनैव संकेतेनाभिहितार्थसंबंधिनि । यथा गंगायां घोष इति । गौणी चाभिहितार्थलक्षितगुणयुक्ते तत्सदृशे । यथा सिंहो देवदत्त इति । यथाऽऽहुः । अभिधेयाविनाभूतप्रवृत्तिर्लक्षणेष्यते ॥ लक्ष्यमाणगुणैर्योगाद्वृत्तेरिष्टा तु गौणतेति । योगवृत्तिस्तु एतत्त्रिविधवृत्तिप्रतिपादितपदार्थयोः प्रकृतिप्रत्ययार्थयोर्वा योगेन । यथा पंकजमौपगवः पाचक इत्यादि । तत्र तावद्ब्रह्मणि रूढिवृत्तिर्न संभवतीत्याह । साक्षात्कथं चरंतीति । तत्र हेतुः । अनिर्देश्ये । अनिर्देश्यत्वेऽपि हेतुं वदन्गुणवृत्तिं निराकरोति । निर्गुणे गुणवृत्तय इति । गुणैर्वर्तमाना अपि निर्गुणे कथं चरंतीत्यर्थः । निर्गुणत्वे च हेतुं वदन् लक्षणां योगं च निराकरोति । सदसतः पर इति । कार्यकारणाभ्यां परस्मिन्नसंगे केनचिदपि संबंधाभावान्न लक्षणायोगवृत्ती संभवत इत्यर्थः । एवं पदार्थत्वायोगादपदार्थस्य च वाक्यर्थत्वायोगान्न श्रुतिगोचरत्वं ब्रह्मण इत्यभिप्रायः ॥ १ ॥

आतां ह्या सत्याऐशींव्या अध्यायामध्यें, नारायण व नारद यांच्या संवादानें वेदांनीं, ईश्वराची गुणांच्या आश्रयानें निर्गुणब्रह्मपर जी स्तुति केली तिचें वर्णन केलें आहे ॥ १ ॥ पूर्वाध्यायांतीं भगवान् श्रीकृष्ण, श्रुतदेव ब्राह्मण व बहुलाश्व राजा या आपल्या भक्तांना स्वतः प्रमाणभूत अशा वेदांचें ब्रह्मपरत्व सांगून पुन्हां द्वारकेस गेला असें शुकाचार्यानें सांगितलें तें ऐकून, शब्दरूप वेदांचें ब्रह्मपरत्व घडणें कठिण आहे असें मानणारा राजा प्रश्न करितो (राजा ह्मणाला—हे ब्रह्मनिष्ठ शुकाचार्य, सगुणपदार्थांचें वर्णन करणाऱ्या श्रुति, कोणत्याहिप्रकारें दाखविण्यास अशक्य, निर्गुण व कार्यकारणांहून पर (असंग) अशा ब्रह्माचेठिकाणीं, प्रत्यक्ष कशा प्रवृत्त होतात ? त्याचा अभिप्राय—

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रुति ह्मणजे शब्द होत. त्या शब्दांची प्रवृत्ति ह्मटली ह्मणजे—मुख्या, लक्षणा आणि गौणी अशी तीन प्रकारची आहे. त्यांत मुख्येचे रूढि आणि यौगी असे दोन भेद आहेत. त्यांत रूढिवृत्ति—ठेंगणा, उंच इत्यादि स्वरूपांनीं गाई, ब्राह्मण इत्यादिक जातींनीं किंवा पांढरा, काळा इत्यादिक गुणांनीं दर्शित करण्यास योग्य असलेल्या वस्तूवर हें त्या वस्तूचें नांव व ही ती वस्तु अशा संकेतानें प्रवृत्त होत्ये. ती रूढिवृत्ति—अनिर्देश्य व निर्गुण अशा ब्रह्माचेठिकाणीं 'तें आपला विषय नसल्यामुळें,' प्रवृत्त होत नाहीं. दुसरी लक्षणावृत्ति ती— पूर्वीं सांगितलेल्या संज्ञासंज्ञिसंकेतानेंच, 'जसें गंगेवर नावाड्याचें घर आहे इत्यादि स्थळीं गंगाशब्दानें गंगेच्या तीराचा संबंध घेऊन तेथें नावाड्याचें घर आहे असें समजावयाचें त्याप्रमाणें' सांगितलेल्या पदार्थाच्या संबंधानें प्रवृत्त होत्ये, ती—परब्रह्म सर्वसंबंधरहित असल्यामुळें तेथें प्रवृत्त होत नाहीं. तिसरी गुणवृत्ति ती—'जसा हा देवदत्त सिंह आहे. इत्यादिस्थळीं सिंहशब्दानें त्याच्या शूरत्वादिक गुणांसारखे गुण घेऊन त्या गुणांनीं विशिष्ट देवदत्त आहे असा अर्थ घ्यावयाचा त्याप्रमाणें' सांगितलेल्या पदार्थावर असलेल्या गुणांनीं युक्त अशा त्याच्यासारख्या दुसऱ्या पदार्थावरे प्रवृत्त होत्ये. ती—परब्रह्म निर्गुण असल्यामुळें तेथें प्रवृत्त होत नाहीं. चवथी योगवृत्ति, तीहि—वरील तीनप्रकारच्या शब्दवृत्तींनीं प्रतिपादन केलेल्या पद व अर्थ यांच्या किंवा प्रकृति व प्रत्यय यांच्या योगानें 'जसें पंकात् (चिखला-

---

उत्तरमाह । बुद्धींद्रियेति । बुद्ध्यादीनुपाधीन् जनानामनुशायिनां जीवानां मात्राद्यर्थं प्रभुरीश्वरोऽसृजत् । मीयंत इति मात्रा विषयास्तदर्थम् । भवार्थं भवो जन्मलक्षणं कर्म । तत्प्रभृति कर्मकरणार्थमित्यर्थः । आत्मने लोकांतरगामिने । आत्मनस्तत्तल्लोकभोगायेत्यर्थः । अकल्पनाय कल्पना निवृत्तये । मुक्तय इत्यर्थः । अर्थधर्मकाममोक्षार्थमिति क्रमेण पदचतुष्टयस्यार्थः । जनानामिति वदन् जीवार्थमीश्वरस्य सृष्ट्यादिषु प्रवृत्तिरिति दर्शयति । प्रभुरितीश्वरस्योपाधिवश्यताभावेन नित्यमुक्ततां दर्शयति । अयमभिप्रायः । सगुण-

श्रीशुक उवाच ॥ बुद्धींद्रियमनःप्राणान् जनानामसृजत्प्रभुः ॥ मात्रार्थं च भवार्थं च आत्मनेऽकल्पनाय च ॥ २ ॥

मेव गुणैरनभिभूतं सर्वज्ञं सर्वशक्तिं सर्वेश्वरं सर्वनियंतारं सर्वोपास्यं सर्वकर्मफलप्रदातारं समस्तकल्याणगुणनिलयं सच्चिदानंदं भगवंतं श्रुतयः प्रतिपादयंति । यः सर्वज्ञ स सर्ववित् । यस्य ज्ञानमयं तपः । सर्वस्य वशी सर्वस्येशानः । यः पृथिव्यां तिष्ठन्पृथिव्या आंतरः । सोऽकामयत बहुस्याम् । स ऐक्षत तत्तेजोऽसृजत । सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्मेत्याद्याः । तथाभूतेश्वरतां तावत्संसारिणो जीवस्य तन्निवृत्तये तत्त्वमसीत्यादिवाक्यानि बोधयंति । तत्र च तत्त्वंपदयोः सामानाधिकरण्यं प्रतीयते । तच्च प्रकारांतरेणाघट-

---

पासून) झालेलें ह्मणून पंकज (कमळ)' उपगुऋषीपासून झाला ह्मणून औपगव (त्याचा पुत्र) इत्यादिस्थळीं, त्या त्या पंकज औपगव इत्यादि शब्दांवर प्रवृत्त होत्ये. तीहि कार्यकरणापेक्षां पर व असंग अशा ब्रह्माचेठिकाणीं प्रवृत्त होत नाहीं. एतावता 'ब्रह्माला' पदार्थत्वाचा योग नसल्यामुळें व अपदार्थाला वाक्यार्थत्वाचा योग नसल्यामुळें ब्रह्माला श्रुतिगोचरत्व संभवत नाहीं। तेव्हां सगुणवस्तूचें प्रतिपादन करणाऱ्या श्रुति, निर्गुण ब्रह्माचेठिकाणीं कशा संचार करितात ? ॥ १ ॥ याप्रमाणें प्रश्न केलेला श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, सर्व करण्यास समर्थ व नित्यमुक्त अशा ईश्वरानें, प्रळयकालीं आपलेठिकाणीं लीन झालेल्या जीवांना पुन्हां यालोकीं विषयभोग व जन्मप्रभृति कर्मं प्राप्त होण्याण्याकरितां व परलोकीं स्वर्गादि लोकांचा उपभोग व मुक्ति मिळण्याकरितां (मिळून जीवांना अर्थधर्मकाममोक्ष प्राप्त होण्याकरितां,) बुद्धि, इंद्रियें, मन व प्राण हीं, उत्पन्न केलीं आहेत. जर बुद्धि, इंद्रियें, मन व प्राण (लिंगशरीर) हीं उत्पन्न केलीं नसतीं तर जीवांना साधन नसल्यामुळें अर्थधर्मादिक प्राप्त करून घेतां आले नसते, तसाच स्वरूपविचार न घडल्यामुळें मोक्षहि प्राप्त झाला नसता. ह्मणून तीं बुद्ध्यादिक ईश्वरानें उत्पन्न केलीं आहेत. आतां, निर्गुण ब्रह्माचेठिकानीं श्रुति कशा संचार करितात ? ह्या प्रश्नाचें उत्तर, ईश्वरानें बुद्ध्यादिकांची उत्पत्ति केली हें सांगण्याचा आशय, असा आहे कीं,— सर्व श्रुति, ईश्वराचें व त्यापासून झालेल्या जीवांच्या धर्मादि चतुर्विध पुरुषार्थांचें वर्णन करून, तात्पर्यादिवृत्तींनीं ब्रह्मपर आहेत; त्यांत कितीएक श्रुति, सगुण असूनहि गुणांनीं पराभूत न झालेल्या ईश्वराच्या 'सर्वज्ञ, सर्वशक्ति,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सर्वेश्वर, सर्वनियंता, सर्वोपास्य, सर्वकर्मफलदाता, सर्व कल्याणकारक गुणांचें निधान, सच्चिदानंदरूप इत्यादिक ' धर्मांचें प्रतिपादन करितात. दुसऱ्या कितीएक श्रुति जीवाचे किंचिज्ज्ञत्वादिक धर्म सांगून त्याच्या संसाराची निवृत्ति होण्याकरितां त्याला ' तें ईश्वराचें स्वरूप तूं आहेस असा ' उपदेश करितात; त्यांत तत्पदाचें व त्वंपदाचें सामानाधिकरण्य, दुसऱ्या प्रकारांनीं घडत नसल्यामुळें तें, जहदजहल्लक्षणेनें ब्रह्माचेठिकाणींच पर्यवसान पावतें. म्हणून त्या जीवेश्वरैक्यप्रतिपादक श्रुति, तात्पर्यवृत्तीनें ब्रह्मपरच आहेत. अस्थूल अनणु इत्यादिक निषेध करणाऱ्या श्रुतीहि तत्पदार्थशोधनाविषयीं उपयुक्त असल्यामुळें त्यांचें निर्गुणाचेचठिकाणीं पर्यवसान आहे. उपासनेचें निरूपण करणाऱ्या श्रुतिहि अंतःकरणशुद्धिद्वारा ज्ञानाच्या साधनांचा उपदेश करित असल्यामुळें त्यांचें पर्यवसान ज्ञानद्वारा परंपरासंबंधानें ब्रह्माचेचठिकाणीं आहे. सृष्टि

मानं ब्रह्मणि पर्यवसानं गमयति । तथाहि । न तावद्वैश्वदेव्यामिक्षेतिवदुभयोरेकार्थाभिधानेन सामानाधिकरण्यम् । यथोक्तम् । आमिक्षां देवतायुक्तां वदत्येवैष तद्धितः ॥ आमिक्षापदसान्निध्यात्तस्यैव विषयार्पणमिति । कुतः । भिन्नार्थत्वात् । न चाजहत्स्वार्थया निरूढलक्षणया विशेषणविशेष्यभावेन नीलमुत्पलमितिवत् । यथोक्तम् । स्वबुद्ध्या रज्यते येन विशेष्यं तद्विशेषणमित्यादि । कुतः । विरुद्धार्थत्वेन तदयोगात् । न च जहत्स्वार्थत्वेन संबंधिलक्षणया कुसुमितद्रुमा गंगेतिवत् । कुतः । एकार्थत्वस्य विवक्षितत्वात् । अतो जहदजहत्स्वार्थलक्षणया सोऽयं देवदत्त इतिवद्विरुद्धांशत्यागेनानुगतचिदंशेनैकार्थेन सामानाधिकरण्येन निर्गुणे पर्यवसानम् । अस्थूलादिवाक्यानां तु साक्षादुपाधिनिषेधेन तत्पदार्थशोधन उपयोगान्निर्गुण एव पर्यवसानम् । तथा चात्रैवोपक्रमे स्वसृष्टमिदमापीयेत्यादिना विशिष्टमालंबनं वक्ष्यति । अंते च श्रुतयस्त्वयि हि फलंत्यतन्निर-

सैषा ह्युपनिषद्ब्राह्मी पूर्वेषां पूर्वजैर्धृता ॥ श्रद्धया धारयेद्यस्तां क्षेमं गच्छेदकिंचनः ॥ ३ ॥ अत्र ते वर्णयिष्यामि गाथां नारायणान्विताम् ॥ नारदस्य च संवादमृषेर्नारायणस्य च ॥ ४ ॥ एकदा नारदो लोकान्पर्यटन्भगवत्प्रियः ॥ सनातनमृषिं द्रष्टुं ययौ नारायणाश्रमम् ॥ ५ ॥

सनेन भवन्निधना इत्युपसंहरिष्यंति । उपासनादिवाक्यानां तु क्रियार्थप्रवृत्तसृष्ट्याद्यवलंबनेन ज्ञानसाधनविधानेन तत्परत्वमित्येषा दिक् ॥ २ ॥ अत्र चानादिशिष्टपरंपरागतत्वान्न संदेहो युक्त इत्याह । सैषेति । सैषा यथोक्तालंबना ब्राह्मी ब्रह्मपरा । श्रद्धया आदरेण वैतंडिकतर्कानभिनिवेशेन यः श्रवणादिना धारयेत्सः अकिंचनो निरस्तदेहाद्युपाधिः सन् परं पदं प्राप्नुयादिति ॥ ३ ॥ एतदेव सर्वश्रुत्यर्थनिरूपणेन प्रपंचयितुमितिहासमवतारयति । अत्रेति । नारायणान्वितां नारायणः प्रवक्तृत्वेनान्वितो यस्यां ताम् । गाथामितिहासम् ॥ ४ ॥ ५ ॥

स्थितिप्रलयांचें प्रतिपादन करणाऱ्या श्रुतिहि, सृष्ट्यादिकथनद्वारा ज्ञानवैराग्यांना साधक असल्यामुळें परंपरासंबंधानें त्यांचें पर्यवसान ब्रह्माचेचठिकाणीं आहे. एतावता ईश्वरापासून सृष्ट्यादिद्वारा जीवांचे चतुर्विध पुरुषार्थ वर्णन करणाऱ्या सर्व श्रुतींचें परंपरादिसंबंधानें, निषेधादि मुखानें किंवा भागलक्षणेनें ब्रह्माचेठिकाणींच पर्यवसान आहे ॥ २ ॥ याविषयीं अनादिसिद्ध परंपरा चालत आल्यामुळें संदेह असणें योग्य नाहीं; असें सांगतो—तो हा श्रुतींचें ब्रह्मपरत्व प्रतिपादन करणारा रहस्य निर्णय, पूर्वजांचेहि पूर्वज अशा सनकादिकांनीं मनांत धारण केला आहे. जो पुरुष, शुष्कतर्कादिकांचा आग्रह न धरितां त्याचें श्रवणादिकेंकरून धारण करील तो देहादिक सर्व उपाधींचा निरास करून परमानंद स्वरूपास पावेल ॥ ३ ॥ हेंच सर्व श्रुतींच्या अर्थनिरूपणानें विस्तारानें सांगण्याकरितां इतिहास सांगतो—हे राजा, याविषयीं तुला जेथें नारायणच वक्ता आहे अशा बदरीनाथ नारायणाचा व नारदऋषीचा संवादरूप इतिहास वर्णन करितों ॥ ४ ॥ एकेवेळीं लोकांमध्यें पर्यटण करणारा भगवद्भक्त नारद, पुरातन

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ऋषि अशा नारायणाला पाहण्याकरितां त्याच्या बदरिकाश्रमास गेला होता ॥ ५ ॥ जो नारायण या भरतखंडामध्यें मनुष्यांच्या कल्याणाकरितां व मुक्तीकरितां कल्पाच्या आरंभापासून धर्म, ज्ञान व उपशम यांनीं युक्त असें तप करीत राहिला आहे ॥ ६ ॥ हे राजा, तो नारायण, त्या आश्रमामध्यें ‘ तेथील जवळच्याच ’ कलापनामक गांवांत राहणाऱ्या ऋषींनीं परिवेष्टित होऊन सुखानें बसला असतां, त्याला नारद ऋषीनें प्रणाम करून ‘ ब्रह्माचेठिकाणीं श्रुति कशा संचार करितात ’ हाच प्रश्न केला होता ॥ ७ ॥ तेव्हां भगवान् नारायणानें, त्या नारदाला सर्वऋषि श्रवण करित असतां, जो पूर्वींच्या अतिवृद्ध जनलोकनिवासी सनकादिकांचा प्रश्नोत्तरांनीं निर्णयरूप संवाद झाला होता तो कथन केला ॥ ८ ॥ श्रीभगवान् ह्मणाला—हे ब्रह्मपुत्रा, पूर्वीं जनलोकामध्यें तेथें असणाऱ्या ब्रह्मदेवाच्या मानसिकपुत्र अशा सनकादिक ऋषींचें ब्रह्मसत्र झालें ॥ ९ ॥ त्यावेळीं मी कोठें गेलों होतों ? असें ह्मणशील तर— श्वेतद्वीपाचा अधिपति जो अनिरुद्धनामक मी त्याचें दर्शन घेण्याकरितां जेव्हां तूं तेथें गेला होतास तेव्हां, तूं जो प्रश्न आतां मला केला आहेस

॥ ६ ॥ ७ ॥ ८ ॥ ब्रह्मसत्रमिति । यथा यजमाना एव समाना ऋत्विगादिरूपेण यत्र कर्म कुर्वंति तत्कर्म सत्रं प्रसिद्धम् । तथा यत्र समाना एव वक्तृश्रोतृभावेन ब्रह्म मीमांसते तद्ब्रह्मसत्रम् ॥ ९ ॥ अहो तर्हि मया कथं तन्न ज्ञातमित्यत आह । श्वेतद्वीपमिति । तदीश्वरं तत्रस्थं मामेवानिरुद्धमूर्तिम् ॥ १० ॥ ननु सर्वज्ञास्ते कस्तत्र वक्ता प्रष्टा

यो वै भारतवर्षेऽस्मिन्क्षेमाय स्वस्तये नृणाम् ॥ धर्मज्ञानशमोपेतमाकल्पादास्थितस्तपः ॥ ६ ॥ तत्रोपविष्टमृषिभिः कलापग्रामवासिभिः ॥ परीतं प्रणतोऽपृच्छदिदमेव कुरूद्वह ॥ ७ ॥ तस्मै ह्यवोचद्भगवानृषीणां शृण्वतामिदम् ॥ यो ब्रह्मवादः पूर्वेषां जनलोकनिवासिनाम् ॥ ८ ॥ श्रीभगवानुवाच ॥ स्वायंभुव ब्रह्मसंत्र जनलोकेऽभवत्पुरा ॥ तत्रस्थानां मानसानां मुनीनामूर्ध्वरेतसाम् ॥ ९ ॥ श्वेतद्वीपं गतवति त्वयि द्रष्टुं तदीश्वरम् ॥ ब्रह्मवादः सुसंवृत्तः श्रुतयो यत्र शेरते ॥ तत्र हायमभूत्प्रश्नस्त्वं मां यमनुपृच्छसि ॥ १० ॥ तुल्यश्रुततपःशीलास्तुल्यस्वीयारिमध्यमाः ॥ अपि चक्रुः प्रवचनमेकं शुश्रूषवोऽपरे ॥ ११ ॥ सनंदन उवाच ॥ स्वसृष्टमिदमापीय शयानं सह शक्तिभिः ॥ तदंते बोधयांचक्रुस्तल्लिंगैः श्रुतयः परम् ॥ १२ ॥

वा तत्राह । तुल्यश्रुतेति । श्रुतादिभिरविशेषा अरिमित्रोदासीनहीनत्वेन निरुपमकरुणा अतः सर्वे प्रवचनयोग्या अपि केनापि कौतुकेनैकं प्रवक्तारं कृत्वाऽन्ये पप्रच्छुरित्यर्थः ॥ ११ ॥ स्वसृष्टमिति । स्वयं निर्मितमिदं विश्वं प्रलयसमये आपीय संहृत्य शयानं योगेन निद्राणमिव वर्तमानं तदंते प्रलयांते तल्लिंगैस्तत्प्रतिपादकैर्वाक्यैः परमीश्वरं सृष्टिसमये प्रथमनिश्वासभूताः श्रुतयः प्रबोधयामासुः ॥ १२ ॥

हाच प्रश्न त्या जनलोकामध्यें झाला होता आणि नंतर तेथें असा उत्तम ब्रह्मविचार झाला कीं, ज्यांत सर्व श्रुति तात्पर्यवृत्तीनें येऊन गेल्या आहेत ॥ १० ॥ आतां, ते सर्वज्ञ असून त्यांत वक्ता कोण झाला व प्रश्न करणारा कोण झाला ? असें ह्मणशील तर—जरी ते चारहि सनकादिक ऋषि शास्त्राभ्यास, तपश्चर्या व स्वभाव यांनीं सारखे होते आणि मित्र, शत्रु व उदासीन यांमध्यें समता धारण करणारे असल्यामुळें सर्वहि व्याख्यान करण्यास समर्थ होते तथापि कांहींएक कौतुकानें त्यांनीं एका सनंदनाला वक्ता करून बाकीचे श्रोते झाले आणि प्रश्न केला ॥ ११ ॥ तेव्हां सनंदन ह्मणाला—हे सनकादिकहो, जेव्हां परमेश्वर, आपण रचलेल्या ह्या जगाला आपल्याच शक्तींनीं प्रळयकालीं स्वस्वरूपीं लीन करून योगनिद्रेनें निजल्यासारखा राहिला होता, तेव्हां त्या निद्रेच्या शेवटीं व सृष्टीच्या आरंभीं त्याच्या प्रथम श्वासोच्छ्वासांपासून प्रकट

१ जेथें सर्वेहि सारखे अधिकारी असून संशयरहित ब्रह्मज्ञानाकरितां एक वक्ता व बाकीचे श्रोते होऊन ब्रह्माचा विचार करितात त्यास ब्रह्मसत्र असें ह्मणतात.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

झालेल्या श्रुति, त्याच परमेश्वराचें प्रतिपादन करणाऱ्या वाक्यांनीं त्यास जागृत करूं लागल्या ॥ १२ ॥ जसे निजलेल्या सार्वभौम राजाजवळ प्रातःकाळीं त्याचा स्तुतिपाठ करणारे सेवक येऊन, प्रशस्त कीर्तियुक्त पराक्रमाच्या वर्णनांनीं त्याला जागृत करितात त्याप्रमाणें श्रुतिहि ईश्वराचें प्रतिपादन करणाऱ्या वाक्यांनीं त्याला बोध करूं लागल्या ॥ १३ ॥ श्रुति ह्मणाल्या– (हे अजित जय जय) ज्याला कोणींहि जिंकिलें नाहीं अशा हे परमेश्वरा, तूं आपला उत्कर्ष वारंवार प्रकट कर. कोणत्या प्रकारानें मी आपला उत्कर्ष प्रकट करावा ? असें ह्मणशील तर–(अगजगदोकसां दोषगृभीतगुणां अजां जहि) स्थावरजंगमात्मक जीवांच्या आनंदादिक गुणांचें आवरण करण्याकरितां सत्वादिक गुण ग्रहण करणाऱ्या अविद्येचा नाश कर. जशी व्यभिचारिणी स्त्री दुसऱ्या पुरुषांना फसविण्याकरितां हावभाववगैरे गुणांचें

सुश्लोकैः शोभनाः श्लोकाः कीर्तयो येषु तैः पराक्रमैः ॥ १३ ॥ जय जयेति । भो अजित जयजय उत्कर्षमाविष्कुरु । आदरे वीप्सा । केन व्यापारेण । अगजगदोकसां अगानि स्थावराणि जगंति जंगमानि च ओकांसि शरीराणि येषां जीवानां तेषामजामविद्यां जहि नाशय । किमिति गुणवती हंतव्येत्यत आह । दोषगृभीतगुणां दोषायानंदाद्यावरणाय गृहीता गुणा यया ताम् । हृग्रहोर्भश्छंदसीति भकारः । इयं हि स्वैरिणीव परप्रतारणाय गुणान् गृह्णात्यतो हंतव्येति । तर्हि मय्यपि दोषमावहेदिति ममापि तत्र का शक्तिः स्यादत आह । त्वमिति । यद्यस्मात्त्वमात्मना स्वरूपेणैव समवरुद्धसमस्तभगः संप्राप्तसमस्तैश्वर्योऽसि वशीकृतमायत्वादिति भावः । ननु स्वयमेते ज्ञानवैराग्यादिना किं न हन्युरित्यत आह । अखिलशक्त्यवबोधकेति । तेषां त्वमेवांतर्यामी सर्वशक्त्युद्बोधकः । अतो न ते ज्ञानादौ स्वतंत्रा इति भावः । नन्वहमकुंठज्ञानैश्वर्यादि-

यथा शयानं सम्राजं बंदिनस्तत्पराक्रमैः ॥ प्रत्यूषेऽभ्येत्य सुश्लोकैर्बोधयंत्यनुजीविनः ॥ १३ ॥ श्रुतय ऊचुः ॥
जय जय जह्यजामजित दोषगृभीतगुणां त्वमसि यदात्मना समवरुद्धसमस्तभगः ॥ अगजगदोकसामखिलशक्त्यवबोधक
ते क्वचिदजयात्मना च चरतोऽनुचरेन्निगमः ॥ १४ ॥

गुणो जीवानां कर्मज्ञानादिशक्त्यवबोधनेनाविद्याहंतेत्यत्र किं प्रमाणमिति चेदहमेव प्रमाणमित्याह । निगमो वेदः । नन्वेवंभूते मयि कथं श्रुतीनां प्रवृत्तिस्तत्राह । क्वचिदिति । कदाचित्सृष्ट्यादिसमयेऽजया मायया च रतः । क्रीडतो नित्यं चालुप्तभगतया सत्यज्ञानानंतानंदैकरसेनात्मना च चरतो वर्तमानस्य निगमोऽनुचरेत्प्रतिपादयेत् । कर्मणि षष्ठ्यौ । यतो वा इमानि भूतानि जायंते ॥ यो ब्रह्माणं विदधाति पूर्वं यो वै वेदांश्च प्रहिणोति तस्मै ॥ तं ह देवमात्मबुद्धिप्रकाशं मुमुक्षुर्वै शरणमहं प्रपद्ये ॥ य आत्मनि तिष्ठन् ॥ सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्म ॥ यः सर्वज्ञः स सर्वविदित्यादिनिगमकदंबस्त्वामेवंभूतं प्रतिपादयतीत्यर्थः ॥ जयजयाजित जह्यगजंगमावृतिमजामुपनीतमृषागुणाम् ॥ न हि भवंतमृते प्रभवंत्यमी निगमगीतगुणार्णवता तव ॥ १ ॥ १४ ॥

ग्रहण करित्ये त्याप्रमाणें ही अविद्या, जीवांना मोहित करण्याकरितां सत्वादिक गुणांचें ग्रहण करित्ये, ह्मणून इचा नाश कर. तर ही अविद्या माझेठिकाणींसुद्धां आपला दोष चिकटवील यास्तव मला तरी हिचा नाश करण्याची शक्ति कोठें आहे ? असें ह्मणशील तर– (यत् त्वं आत्मना समवरुद्धसमस्तभगः असि) ज्याअर्थी तूं (मायेला वश करून ठेविल्यामुळें) आपल्या स्वरूपसाक्षात्कारानेंच सर्व ऐश्वर्यें प्राप्त करून घेतलीं आहेस. आतां हे जीवच ज्ञानवैराग्यादिक साधनांनीं तिचा नाश कां करीनांत ? असें ह्मणशील तर (अखिलशक्त्यवबोधक) हे सर्वशक्तिप्रकाशका, तूंच त्या जीवांचा अंतर्यामी सर्वशक्तिप्रवर्तक आहेस. ह्मणून ते जीव ज्ञानवैराग्यादिक साधनांविषयीं स्वतंत्र नाहींत. आतां मी अखंडित ज्ञानैश्वर्यादिक गुणांनीं युक्त असून जीवांच्या कर्मज्ञानादिक शक्तींची प्रेरणा करून त्यांच्या अविद्येचा नाश ॥२७३॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करणारा आहें याविषयीं प्रमाण काय ? असें ह्मणशील तर- (**निगमः**) मी वेदच प्रमाण आहें. ~~आतां अशा माझ्या स्वरूपीं वेदांची प्रवृत्ति कशी होत्ये ? असें ह्मणशील तर~~ (**क्वचित् अजया आत्मना च चरतः ते निगमः अनुचरेत्**) केव्हांतरी (सृष्ट्यादिप्रसंगीं) मायेसहवर्तमान क्रीडा करणाऱ्या आणि निरंतर सत्य, ज्ञान, अनंत, आनंद, एकरसरूपानें राहणाऱ्या तुझें वेद प्रतिपादन करितो ॥ १४ ॥ ~~आतां,~~ वेदांमध्यें इंद्र, अग्नि, वायु, सूर्य इत्यादिक देवांचें प्रतिपादन केलेलें दिसतें, ~~तेथें माझें प्रति-पादन कोठें आहे ? असें ह्मणशील तर~~-(**एतत् उपलब्धं बृहत् अवयंति**) हें दिसलेलें इंद्र अग्नि इत्यादिक स्थावरजंगमात्मक सर्व जग, ब्रह्मरूपी तूंच आहेस असें विद्वान्‌लोक जाणतात. ~~कसें ह्मणशील तर~~-(**अवशेषतया**) प्रळयकाळीं सर्वांचा नाश झाला असतांहि तूंच अवशेष राहतोस ह्मणून. त्याचें कारण-(**यतः अविकृतात् मृदिवा विकृतेः उदयास्तमयौ ' स्तः '**) ज्या तुज अविकारी ब्रह्मापासून ' जसे मृत्तिकेपासून घटादिक पदार्थांचे उत्पत्तिनाश होतात त्याप्रमाणें विकार पावणाऱ्या जगाचे

ननु कथं मामेवं प्रतिपादयंति यतः इंद्रो यातोऽवसितस्य राजेत्यादिभिरिंद्रो यातो जंगमस्यावसितस्य स्थावरस्य च राजेति प्रतिपाद्यते तथाग्निर्मूर्धादिव इत्यादिभिश्चैवंभूतत्वेनाग्न्यादयः प्रतिपाद्यंते तत्राह । बृहदुपलब्धमेतदिति । अयमर्थः । एतदुपलब्धं दृष्टमिंद्रादिसर्वं बृहद्ब्रह्मत्वमित्येवावयंति जानंति । कथम् । बृहत एवावशेषतयाऽवशिष्यमाणत्वेन । कुतः । यतो बृहतः सर्वस्योदयास्तमयावुत्पत्तिलयौ सर्वोपादानत्वात् । तर्हि किं विकारित्वं बृहतः । न । अविकृतात् । विवर्ताधिष्ठानत्वेनाविकारादित्यर्थः । वाशब्द उपमार्थः । यथा घटादेर्विकृतेर्मृदि उदयास्तमयौ तद्वत् । वाचारंभणं विकारो नामधेयं मृत्तिकेत्येव सत्यम् ॥ सर्वं खल्विदं ब्रह्मेत्यादिभिस्तथा प्रतिपादनादित्यर्थः । अतः कार-

बृहदुपलब्धमेतदवयंत्यवशेषतया यत उदयास्तमयौ विकृतेर्मृदि वाऽविकृतात् ॥
अत ऋषयो दधुस्त्वयि मनोवचनाचरितं कथमयथा भवंति भुवि दत्तपदानि नृणाम् ॥ १५ ॥

णादृषयो मंत्रास्तद्द्रष्टारो वा त्वय्येव मनोवचनाचरितं दधुः मनसा आचरितं तात्पर्यं वचनाचरितमभिधानं च धृतवंतः । न पृथग्विकारेष्वित्यर्थः । अत्र निदर्शनम् । कथमयथेति । नृणां भूचराणां यत्र कुत्रापि दत्तानि निक्षिप्तानि पदानि भुवि कथमयथा भवंत्यदत्तानि भवंति । अतो यथा मृत्पाषाणेष्टकादिषु दत्तानि पदानि भुवं न व्यभिचरंति । तथा यत्किमपि विकारजातं वदंतो वेदास्त्वामेव सर्वकारणं परमार्थभूतं प्रतिपादयंतीत्यर्थः ॥ द्रुहिणवह्निरवींद्रमुखामरा जगदिदं न भवेत्पृथगुत्थितम् ॥ बहुमुखैरपि मंत्रगणैरजस्त्वमुरुमूर्तिरतो विनिगद्यसे ॥ २ ॥ १५ ॥

उत्पत्तिनाश होतात, तो तूं, जगद्रूप विवर्तांचें अधिष्ठान निर्विकारी असून उपादान कारणहि आहेस ह्मणून इंद्रादिकांचें प्रतिपादन करणाऱ्या ज्या श्रुति आहेत त्या वस्तुतः तुझेंच प्रतिपादन करितात. ~~कारण, इंद्रादिक देवता तुझ्याहून निराळ्या नाहींत.~~ (**अतः ऋषयः मनोवचनाचरितं त्वयि दधुः**) ह्मणूनच मंत्रांनीं किंवा मंत्रांच्या द्रष्ट्या ऋषींनीं मनांत आणलेलीं व वचनानें उच्चारलेलीं इंद्रादिक नांवें तुझ्याविषयींच धारण, केलीं आहेत निरनिराळ्या वज्रहस्तादिक विकारांवर धारण केलीं नाहींत. ~~याविषयीं उपपत्ति अशी कीं,~~- (**नृणां दत्तपदानि भुवि कथं अयथा भवंति**) भूमीवर राहणाऱ्या प्राण्यांनीं, कोठेंहि ठेवलेलीं पावलें भूमीवर न ठेवलेलीं कशीं होतील ? ह्मणजे मृत्तिका, पाषाण विटा इत्यादि कोणत्याहि पदार्थांवर ठेवलेलीं मनुष्याचीं पावलें जशीं भूमीचा आधार सुटून राहत नाहींत त्याप्रमाणें या सृष्टींतील कोणत्याहि वि-

---

१ चिंतामणि, मंत्र, कामधेनु इत्यादिक विकार न पावणाऱ्या पदार्थांपासून दुसऱ्या विकारी इच्छित पदार्थांचे उत्पत्तिनाश घडत असल्याचें प्रसिद्ध आहे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

काराचें वर्णन करणारे वेद, परमार्थभूत व सर्वकारण अशा तुझेंच प्रतिपादन करितात ॥ १५ ॥ आतां तूंच सर्वश्रुतिगोचर आहेस असें साधूंच्या प्रवृत्तीनें दृढ करीत श्रुति ह्मणतात– (हे त्र्यधिपते परम) हे त्रिगुणमायारूप हरिणीला खेळविणाऱ्या सर्वकारणा, (इति सूरयः तव अखिललोकमलक्षपणकथामृताब्धिं अवगाह्य तपांसि जहुः) तूंच सर्व कारणत्वेंकरून परमार्थरूप आहेस असें जाणून विवेकी पुरुष, सर्व लोकांच्या पापाला दूर करणाऱ्या तुझ्या कथारूप अमृतसमुद्राचें सेवन करून पापांची किंवा दुःखांची निवृत्ति करितात. जेव्हां तुझ्या कथाश्रवणादिकेंकरून सर्वसंतापांची निवृत्ति होत्ये तेव्हां (ये पुनः स्वधामविधुताशयकालगुणाः अजस्रसुखानुभवं पदं भजंति 'ते तपांसि जहुः इति', किमुत) जे पुन्हां तुझ्या स्वरूपस्फुरणानेंच आपल्या अंतःकरणांच्या रागादिक धर्मांची

त्वमेव सर्वनिगमगोचर इति सतां प्रवृत्त्या द्रढयति । इति तवेति । त्वमेव सर्वकारणत्वेन परमार्थ इति कृत्वा भो त्र्यधिपते त्रिगुणमायामृगीनर्तक सूरयो विवेकिनस्तवाखिललोकमलक्षपणकथामृताब्धिं सकलजनवृजिननिरसनहेतुं कीर्तिसुधासिंधुमवगाह्य निषेव्य तपांसि तपंतीति तपांसि पापानि दुःखानि वा जहुस्त्यक्तवंतः । त्वदीयकथामात्रेण यदा पापत्यागस्तदा किमु वक्तव्यं ये पुनः स्वधामविधुताशयकालगुणाः । स्वधाम्ना स्वरूपस्फुरणेनैव विधुतास्त्यक्ता आशयगुणा अंतःकरणधर्मा रागादयः कालगुणा जरादयश्च यैस्ते तथा हे परम तवाजस्रसुखानुभवमखंडानंदानुभवं पदं स्वरूपं भजंति सेवंते तथाभूता दुःखानि त्यजंतीति । तद्यथा पुष्करपलाश आपो न श्लिष्यंते एवमेवंविदि पापं कर्म न श्लिष्यते । न कर्मणा लिप्यते पापकेन ॥ तत्सुकृतदुष्कृते विधुनुते ॥ एत ँ ह वाव न तपति ॥ किमह ँ साधु नाकरवम् ॥ किमहं पापमकरवमित्यादिश्रुतेरित्यर्थः ॥ सक-

इति तव सूरयस्त्र्यधिपतेऽखिललोकमलक्षपणकथाऽमृताब्धिमवगाह्य तपांसि जहुः ॥ किमुत पुनः स्वधामविधुताशयकालगुणाः परम भजंति ये पदमजस्रसुखानुभवम् ॥ १६ ॥ दृतयइव श्वसंत्यसुभृतो यदि तेनुऽविधा महदहमादयोंऽडमसृजन्यदनुग्रहतः ॥ पुरुषविधोऽन्वयोऽत्र चरमोऽन्नमयादिषु यः सदसतः परं त्वमथ यदेष्ववशेषमृतम् ॥ १७ ॥

लवेदगणेरितसद्गुणस्त्वमिति सर्वमनीषिजना रताः ॥ त्वयि सुभद्र गुणश्रवणादिभिस्तव पदस्मरणेन गतक्लमाः ॥ ३ ॥ १६ ॥ असुर्या नाम ते लोका अंधेन तमसा वृताः ॥ तांस्ते प्रेत्याभिगच्छंति ये के चात्महनो जनाः ॥ तथा । न चेदवेदीन्महती विनष्टिः ॥ ये तद्विदुरमृतास्ते भवंत्यथेतरे दुःखमेवोपयंतीत्याद्याः श्रुतयः पूर्वश्लोकोक्तोभयविधभजनहीनान्निंदंति । दृतय इवेति । असुभृतो नरा यदि ते अनुविधा अनुविदधतीत्यनुविधा अनुवर्तिनो भक्ता इति यावत् । तर्हि श्वसंति जीवंति सफलजीवना भवंति । इतरथा दृतय इव भस्त्रा इव । वृथाश्वासा इत्यर्थः । नन्वभक्तानामपि कामादिफलमस्त्येव न कार्यकारणानुग्राहकत्वेन जीवनहेतोस्तवाभजने कृतघ्नानां तदपि न सिध्येदित्याशयेनाह । महदहमादय इति । महानहंकारश्चादिर्येषां ते यदनुग्रहतो यस्यानुप्रवेशेन लब्धसामर्थ्याः संतोंऽडं देहं समष्टिव्यष्टिरूपं सृष्टवंतः । तत्र च पंचापि कोशानन्नमयादीनाविश्य तत्तदाकारः सन्यश्चेतयते स त्वं तदाह । पुरुषविध इति । पुरुषस्यान्नमयादेर्विधेव विधा आकारो यस्य स तथा । ननु चिदेकरसस्य कथं तत्तदाकारताऽत आह । अन्वयोऽत्रेति । अत्र

आणि जरादिक काळधर्मांची निवृत्ति करून अखंडानंदानुभवरूप तुझ्या स्वरूपावें सेवन करितात त्यांच्या सर्व संतापांची निवृत्ति होत्ये हें काय सांगावें ! ॥ १६ ॥ आतां 'असुर्यानाम ते लोकाः' इत्यादिक कितीएक श्रुति, वरील दोन श्लोकांत सांगितलेलें सेवन न करणारांची निंदा करितात– (हे देव, असुभृतः यदि ते अनुविधाः 'तर्हि' श्वसंति 'इतरथा' दृतयः इव 'श्वसंति' हे देवा, प्राणी जर तुझी भक्ति करणारे होतील तरच त्यांचें वांचणें सफल होईल, नाहींतर त्यांचे श्वासोच्छ्वास लोहाराच्या भात्यांतील वायूसारखे व्यर्थ आहेत. आतां अभक्तांनाहि कामादिक फळ आहे असें ह्मणशील तर– (महदहमादयः यदनुग्रहतः अंडं असृजन्) महत्तत्व व अहंकार इत्यादिक तत्वांनींहि ज्या तुझ्या अनुप्रवेशानें सामर्थ्ययुक्त होऊन समष्टिव्यष्ट्यात्मक ब्रह्मांड उत्पन्न केलें आहे, त्या परम अनुग्रह करणाऱ्या तुझें भजन न ॥२७४॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करणारांस उलटा कृतघ्नपणाचा दोष प्राप्त होऊन तें विषयभोगादिक फळहि प्राप्त होत नाहीं. आतां कशाप्रकारचा मी, उपास्य आहें असें ह्मणशील तर– (यः अन्नमयादिषु पुरुषविधः) जो, अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि आनंदमय या पांच कोशांमध्यें त्या त्या अन्नमयादिक कोशांसारखा आकारवान् ह्मणजे देह, प्राण, मन, बुद्धि आणि ज्ञान या स्वरूपांनीं उच्चारिला जातो तो तूं आहेस. आतां चैतन्यस्वरूपी असलेल्या मला त्या त्या अन्नमयादिकांचा आकार कसा प्राप्त होतो? असें ह्मणशील तर– (अत्र अन्वयः) या कोशांमध्यें तुझा, अग्नीचा जसा काष्ठांमध्यें अन्वय असतो तसा अन्वय आहे ह्मणून तत्तदाकारता घडत्ये. तरमग मला सत्यत्व व असंगत्व कसें? असें ह्मणशील तर– (चरमः) अन्नमयादिकांचें वर्णन चाललें असतां 'ब्रह्म पुच्छं प्रतिष्ठा' असा पुच्छत्वानें अवधिर्त्वेंकरून सांगिलेला जो तो तूं आहेस. बरें, तथापि अन्नमयादिकांत अन्वय असल्यामुळें असंगत्वाची हानीच होईल असें ह्मणशील तर (सदसतः परं एषु अवशेषं अथ ऋतं यत् 'तत्' त्वं 'असि') स्थूलसूक्ष्मरूपी

एष्वन्नमयादिष्वन्वेतीत्यन्वयः । अतस्तत्तदाकारतेति । एवं तर्हि सत्यत्वमसंगत्वं च कथं तत्राह । चरमोऽन्नमयादिषु य इति । अन्नमयादिषूपदिश्यमानेषु यश्चरमो ब्रह्मपुच्छं प्रतिष्ठेति पुच्छत्वेनोक्तः स त्वमिति संबंधः । ननु तथाप्यन्नमयादिष्वन्वितत्वेऽसंगत्वव्याहतिरेव तत्राह । सदसतः परं त्वमथ यदेष्ववशेषमृतमिति । सदसतः स्थूलसूक्ष्मादन्नमयादेः परं व्यतिरिक्तं तत्साक्षिभूतम् । अवशेषमवशिष्यत इत्यवशेषमबाध्यम् । अथातएव ऋतं सत्यम् । तर्हि किमर्थं तेष्वन्वय उक्तः । शाखाचंद्रवच्छुद्धस्वरूपलक्षणार्थम् । तथाहि । स वा एष पुरुषोऽन्नरसमयस्तस्येदमेव शिर इत्यादिना स्थूलसूक्ष्मक्रमेण पंचकोशानुपदिश्य तस्य पुरुषविधतामन्वयं पुरुषविध इति । पुनः पुनस्तदन्वितत्वेनालक्ष्य ब्रह्मपुच्छं प्रतिष्ठेति सर्वसाक्षिशुद्धस्वरूपनिरूपणमित्यनवद्यम् ॥ नरवपुः प्रतिपद्य यदि त्वयि श्रवणवर्णनसंस्मरणादिभिः ॥ नरहरे न भजंति नृणामिदं दृतिवदुच्छ्वसितं विफलं ततः ॥ ४ ॥ १७ ॥

उदरमुपासते य ऋषिवर्त्मसु कूर्पदृशः परिसरपद्धतिं हृदयमारुणयो दहरम् ॥
तत उदगादनंत तव धाम शिरः परमं पुनरिह यत्समेत्य न पतंति कृतांतमुखे ॥ १८ ॥

एवं तावत्सर्वात्मके परमेश्वरे सर्वश्रुतिसमन्वयेन सद्भजनीयत्वमुक्त्वाऽभक्तनिंदया च तदेव दृढीकृत्येदानीमनवगाह्यमहिमनि प्रथमं तावदुपाध्यालंभनमुपासनमुदरं ब्रह्मेति शार्कराक्षा उपासते । हृदयं ब्रह्मेत्यारुणयो ब्रह्मा हैवैता इत ऊर्ध्वं त्वेवोदसर्पत्तच्छिरोऽश्रयत इत्याद्याः श्रुतयो विदधतीत्याह । उदरमुपासत इति । ऋषिवर्त्मसु ऋषीणां संप्रदायमार्गेषु ये कूर्पदृशस्ते उदरालंबनं मणिपूरकस्थं ब्रह्मोपासते ध्यायंति । शार्कराक्षा इति श्रुतिपदस्य प्रतिपदं कूर्पदृश इति । कूर्पं शर्करारजो विद्यते दृक्ष्वक्षिषु येषां ते तथा रजःपिहितदृष्टयः स्थूलदृष्टय इति यावत् । उदरस्य हृदयापेक्षया स्थूलत्वात् । यद्वा कूर्पं सूक्ष्मम् । सूक्ष्मदृश इत्यर्थः । तदा हृदयस्थं सूक्ष्ममेवालक्ष्य तत्प्रवेशाय प्रथममुदरमुपासत इति भावः । आरुणयस्तु साक्षाद्धृदयस्थं दहरं सूक्ष्ममेवोपासते । हृदयविशेषणं परिसरपद्धतिमिति । परितः सरंति प्रसर्पंतीति परिसरा नाड्यस्तासां

अन्नमयप्राणमयादि कोशांचें साक्षि, त्यांचा अपवाद झाला असतांहि अवशेष राहणारें आणि सत्यरूप जें ब्रह्म तें तूं आहेस. मग त्या कोशांमध्यें माझा अन्वय कां सांगितला? असें ह्मणशील तर तुझ्या शुद्धस्वरूपाच्या निरूपणाकरितां शाखाचंद्रन्यायानें अन्वय सांगितला आहे ॥ १७ ॥ आतां 'उदरं ब्रह्मेति शार्कराक्षा उपासते' इत्यादिक श्रुति, ईश्वराचेठिकाणीं मनाचा प्रवेश होण्याकरितां उपासनांचे भेद सांगतात– (हे अनंत ऋषिवर्त्मसु ये कूर्पदृशः 'ते' उदरं उपासते) हे अनंता, ऋषींच्या संप्रदायमार्गांमध्यें जे स्थूलदृष्टि पुरुष आहेत ते उदरांतील मणिपूरचक्रांत राहणाऱ्या ब्रह्माचें ध्यान करितात. (आरुणयः परिसरपद्धतिं हृदयं दहरं 'उपासते') अरुणाच्या वंशांत झालेले ऋषि तर– सर्वत्र नाड्या पसरण्याचें स्थान अशा हृदयांतील सूक्ष्मरूपाचेंच ध्यान करितात. कारण, (ततः परमं तव धाम शिरः उदगात्) त्या सूक्ष्मापासून सर्वोत्कृष्ट [ज्योतिर्मय] असें तुझ्या प्राप्तीचें स्थान [सुषुम्नानाडीरूप] मस्तकापर्यंत वर गेलें आहे. ह्मणजे मूलाधारचक्रापासून

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हृदयमध्यांतून ब्रह्मरंध्रापर्यंत वर गेलें आहे. त्याचा महिमा असा आहे कीं,–(यत् समेत्य पुनः इह कृतांतमुखे न पतंति) ज्या सुषुम्नानाडीरूप स्थानाची प्राप्ति झाली असतां पुन्हा ह्या मृत्यूच्या मुखरूप संसारांत पडत नाहींत ॥ १८ ॥ आतां ईश्वरालाहि जर जीवासारखा उदरादि संबंध आहे, तर कोणत्या विशेषानें त्याचें उपास्यत्व ? या शंकेचा परिहार करणाऱ्या ' एको देवः सर्वभूतेषु गूढः ' इत्यादिक श्रुति, स्तुति करितात कीं,–(हे प्रभो त्वं स्वकृतविचित्रयोनिषु हेतुतया विशन्निव) हे प्रभो, तूं आपणच केलेल्या उच्चनीचमध्यमरूप देवतिर्यङ्मनुष्ययोनींमध्यें उपादानत्वेंकरून प्रथमच असूनहि नंतर प्रवेश केल्यासारखा होऊन;

पद्धतिं मार्गं प्रसरणस्थानमि त्यर्थः । विशेषणस्य फलमाह । तत इति । ततो हृदयात् । भो अनंत तव धामोपलब्धिस्थानं सुषुम्नाख्यं परमं श्रेष्ठं ज्योतिर्मयं शिरो मूर्धानंप्रत्युद गादुदसर्पत् । मूलाधारादारभ्य हृदयमध्याद्ब्रह्मरंध्रं प्रत्युद्गतमित्यर्थः । कथंभूतं धाम । यत्समेत्य प्राप्य पुनरिह कृतांतमुखे मृत्युमुखे संसारे न पतंति । तथाच श्रुतिः । शतं चैका हृदयस्य नाड्यस्तासां मूर्धानमभिनिःसृतैका ॥ तयोर्ध्वमायन्नमृतत्वमेति विष्वगन्या उत्क्रमणे भवंतीति ॥ उदरादिषु यः पुंसां चिंतितो मुनिवर्त्मभिः ॥ हंति मृत्युभयं देवो हृद्गतं तमुपास्महे ॥ ५ ॥ १८ ॥ नन्वीश्वरस्यापि तर्हि जीववदुदरादिसंबंधे तदनुप्रविष्टस्य च तारतम्ये सति केन विशेषेणोपास्यत्वमितीमामाशंकां परिहरंत्यः । एको देवः सर्वभूतेषु गूढः सर्वव्यापी सर्वभूतांतरात्मा ॥ कर्माध्यक्षः सर्वभूताधिवासः साक्षी चेता केवलो निर्गुणश्चेत्याद्याः श्रुतयः स्तुवंतीत्याह । स्वकृतविचित्रयोनिष्विति । स्वयं कृतासूच्चनीचमध्यमासु योनिष्वभिव्यक्तिस्थानेषु कार्येषु देहादिषु हेतुतयोपादानतया प्रागेव विद्यमानत्वेन मुख्यप्रवेशासंभवाद्विशन्निव वर्तमानस्तरतमतो न्यूनाधिकभावेन

स्वकृतविचित्रयोनिषु विशन्निव हेतुतया तरतमतश्चकास्स्यनलवत्स्वकृतानुकृतिः ॥ अथ वितथास्वमूष्ववितथं तव धाम समं विरजधियोऽन्वयंत्यभिविपण्यव एकरसम् ॥ १९ ॥ स्वकृतपुरेष्वमीष्वबहिरंतरसंवरणं तव पुरुषं वदंत्यखिल-शक्तिधृतोंऽशकृतम् ॥ इति नृगतिं विविच्य कवयो निगमावपनं भवत उपासतेंऽघ्रिमभवं भुवि विश्वसिताः ॥ २० ॥

चकास्सि अवभाससे । स्वकृता योनीरनुकरोतीति स्वकृतानुकृतिः । अनलवत् अग्निर्यथा स्वतस्तारतम्यहीनोऽपि काष्ठानुसारेण तथा तथा प्रकाशते तद्वत् । अथातो वितथासु मिथ्याभूतास्वमूषु योनिष्ववितथं सत्यं यतः सममविशेषमतः सत्यं तव धाम स्वरूपं विरजधियो निर्मलमतयोऽन्वयंति जानंति । नु इति पृथक्पदं वा । अत्र हेतुः । अभिवि-पण्यव इति । अभितो विगतव्यवहाराः । पणव्यवहार इत्यस्य रूपं पण्युरिति । ऐहिकामुष्मिककर्मफलरहिता इत्यर्थः । अविशेषत्वादेवैकरसं सन्मात्रमतस्तवोपाधिकृततारत-म्याभावादप्रच्युतैश्वर्यस्योपास्यत्वमिति भावः ॥ स्वनिर्मितेषु कार्येषु तारतम्यविवर्जितम् ॥ सर्वानुस्यूतसन्मात्रं भगवंतं भजामहे ॥ ६ ॥ १९ ॥ अपि च कुतोन्वियमाशंका स्याद्भगवतो देहाद्युपाधिकृतदोषप्रसंग इति यतोऽविद्याकामकर्मभिः संसरतो जीवस्यापि भगवद्भावं लक्षणया बोधयंत्यस्तं दोषं निषेधयंति । स पश्चायं पुरुषे ॥

(स्वकृतानुकृतिः तरतमतः अनलवत् चकास्सि) आपणच केलेल्या त्या त्या देवादियोनींचें अनुकरण करित होत्साता उत्कृष्टनिकृष्टादि तारतम्यानें, जसा अग्नि, स्वतां तारतम्यरहित असूनहि काष्ठानुसारेंकरून दीर्घर्‍हस्वस्थूलादिरूपी भासतो त्याप्रमाणें भासत आहेस. (अथ अभिविपण्यवः विरजधियः) ह्मणून याललोकीं व परलोकीं भोगण्यास योग्य अशा कर्मफळानें रहित झालेले निर्मळबुद्धि पुरुष, (वितथासु अमूषु अवितथं समं एकरसं तव धाम अन्वयंति) मिथ्याभूत अशा या देवमनुष्यादिक योनींमध्यें सत्य, सम व एकरसरूपी तुझ्या स्वरूपासच जाणतात. ह्मणजे अखंडैश्वर्यरूपी तुज भगवंताला, उपाधीनें केलेला न्यूनाधिक भाव नसल्यामुळें तूंच उपास्य आहेस असें जाणतात ॥ १९ ॥ आतां 'स पश्चायं पुरुषे' इत्यादिक श्रुति, जीव हा वस्तुतः भगवत्स्वरूपीच आहे असा बोध करित होत्सात्या, ॥२७५॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अवतार धारण करणाऱ्या भगवंताच्या भजनाचा प्रकार सांगतात–(' हे देव ' स्वकृतपुरेषु अमीषु अबहिरंतरसंवरणं पुरुषं अखिलशक्तिधृतः तव अंशकृतं वदंति) हे देवा, आपल्या कर्मानें संपादन केलेल्या ह्या मनुष्यादिक देहांमध्यें भोक्तृत्वेंकरून असणाऱ्या परंतु कार्यकारणरूप आवरणांनीं रहित अशा ह्या जीवाला, हा सर्व शक्तीचा आश्रय व पूर्णरूपी अशा तुझ्या अंशासारखा व केल्यासारखा भासत असून वस्तुतः त्वद्रूपीच आहे असें तत्त्ववेत्ते ह्मणतात. (इति नृगतिं विविच्य कवयः निगमावपनं अभवं ते अंघ्रिं भुवि उपासते) याप्रमाणें (जीवाच्या तत्त्वाचा निर्णय केल्याखेरीज परब्रह्माची प्राप्ति होणार नाहीं ह्मणून) जीवाच्या तत्त्वाचा शोध करून तत्त्ववेत्ते पुरुष विश्वासयुक्त होत्साते सर्व कर्में अर्पण करण्याचा विषय ह्मणजे जेथें अर्पण केलेलीं सर्व कर्में मुक्तिरूप फळ देणारीं होतात

यश्चासावादित्ये ॥ स एकः ॥ तत्त्वमसीत्याद्याः श्रुतयः । ननु कृत्वर्थस्यात्मनः स्तुतिरियमीश्वरत्वेन क्रियते न तु तस्येश्वरत्वं बोध्यते । नैतद्युज्यते यतस्तत्र । यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ ॥ तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशंते महात्मन इत्याद्याः श्रुतयः कृतावतारस्य भगवतश्चरणभजनमुपायं वदंतीत्याह । स्वकृतपुरेष्विति । स्वकर्मोपार्जितेषु पुरेषु देहेष्वमीषु नरादिषु भोक्तृत्वेन वर्तमानं पुरुषमखिलशक्तिधृतः सर्वशक्त्याश्रयस्य पूर्णस्य तवांशकृतं वदंति । अंश इवांशः कृत इव कृतः । त्वद्रूपं वदंतीत्यर्थः । ननु कार्यकारणसंवृतस्य कुत एवंभूतत्वं तत्राह । अबहिरंतरसंवरणमिति । बहिः कार्यमंतरं कारणम् । वस्तुतस्तदावरणशून्यम् । तयोरसत्त्वादित्यर्थः । इत्येवं नृगतिं नुर्जीवस्य गतिं तत्त्वं विविच्य विशोध्य कवयोऽन्यथेदं न प्राप्यत इति जानंतो निगमावपनं निगमोक्तकर्मणामावपनमासमंताद्रुप्यतेऽस्मिन्नित्यावपनं क्षेत्रं सर्वकर्मार्पणविषयमित्यर्थः । यत्रार्पितानि कर्माणि मुक्तिफलं फलंति तं भवतोऽंघ्रिमभवं भवनिवर्तकं विश्वसिताः कृतविश्वासा उपासतेऽर्चनवंदनादिभिः सेवंते । भुवीति

दुरवगमात्मतत्त्वनिगमाय तवात्ततनोश्चरितमहामृताब्धिपरिवर्तपरिश्रमणाः ॥
न परिलषंति केचिदपवर्गमपीश्वर ते चरणसरोजहंसकुलसंगविसृष्टगृहाः ॥ २१ ॥

मर्त्यलोके इदमेवोचितमिति दर्शयंति ॥ त्वदंशस्य ममेशान त्वन्मायाकृतबंधनम् ॥ त्वदंघ्रिसेवामादिश्य परानंद निवर्तय ॥ ७ ॥ २० ॥ भक्तिरल्पसाधनमितिवचनमनुचितमिव मन्वानो भक्तिं गुरूकरोति । दुरवगमेति । भो ईश्वर दुरवगमं दुर्बोधं यदात्मतत्त्वं तस्य निगमाय ज्ञापनाय तवात्ततनोराविष्कृतमूर्तेश्चरितमहामृताब्धिपरिवर्तपरिश्रमणाः । चरितमेव महामृताब्धिस्तस्मिन्परिवर्तो विगाहस्तेन परिश्रमणाः परिवर्जनार्थः श्रमणं श्रमः गतश्रमा इत्यर्थः । अपवर्गमपि केचिन्न परिलषंति नेच्छंति कुतोऽन्यादिंद्रपदादि । केचिदित्येवंभूता भक्तिरसिका विरला इति दर्शयंति । न केवलमन्यन्नेच्छंति किंतु तेनैव सुखेन पूर्णाः संतः पूर्वसिद्धं गृहादिसुखमप्युपेक्षंत इत्याह । तव चरणसरोजहंसकुलसंगविसृष्टगृहा इति । तव चरणसरोजे हंसा इव रममाणा ये भक्तास्तेषां कुलं तेन संगस्तेन विसृष्टा गृहायैस्ते तथा । अनेन श्रवणकीर्तने दर्शिते । श्रुतिश्च मुक्तेरप्याधिक्यं भक्तेर्दर्शयति । यथाऽऽह । यं सर्वे देवा नमंति मुमुक्षवो ब्रह्मवादिनश्चेति । व्याख्यातं च सर्वज्ञैर्भाष्यकृद्भिः । मुक्ता अपि लीलया विग्रहं कृत्वा भजंत इति ॥ त्वत्कथामृतपाथोधौ विहरंतो महामुदः ॥ कुर्वंति कृतिनः केचिच्चतुर्वर्गं तृणोपमम् ॥ ८ ॥ २१ ॥

त्या संसारनिवर्तक तुझ्या चरणाचें, या भूमीवर अर्चनवंदनादिकेंकरून सेवन करितात हेंच यालोकीं योग्य आहे ॥ २० ॥ आतां भक्ति हें तर एक अल्पसाधन आहे असें बोलणें योग्य नाहीं असें मानणाऱ्या कितीएक श्रुति, भक्तीचें महत्त्व वर्णन करितात– (भो ईश्वर दुरवगमात्मतत्त्वनिगमाय आत्ततनोः तव) हे ईश्वरा, दुर्बोध अशा आत्मतत्त्वाचें ज्ञान होण्याकरितां अवतार धारण करणाऱ्या तुझ्या (चरितमहामृताब्धिपरिवर्तपरिश्रमणाः केचित्) चरित्ररूप महासमुद्रामध्यें स्नान करून श्रमरहित झालेले कितीएक विरळे भक्तिरसिक पुरुष, (ते चरणसरोजहंसकुलसंगविसृष्टगृहाः ' संतः ') तुझ्या चरण-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कमळाचेठिकाणीं हंसासारख्या रममाण होणाऱ्या भक्तजनांच्या कुळाशीं घडलेल्या संगतीनें घरादारादिकांचा त्याग करून श्रवणकीर्तनादिकांमध्यें निमग्न होतसाते, त्याच सुखानें तृप्त झाले ह्मणजे ते (अपवर्गमपि न परिलषंति) मोक्षाचीहि इच्छा करीत नाहींत; मग दुसऱ्या इंद्रपदादिकांची इच्छा काय ह्मणून करितील ! मुळींच करणार नाहींत. एतावता तुझी भक्ति मुक्तीपेक्षांहि अधिक आहे ॥ २१ ॥ आतां 'आराममस्य पश्यंति' इत्यादिक श्रुति वारंवार मोठ्यानें आक्रोश करून परमात्म्या ईश्वरावर प्रेम असावें असा उपदेश करितात (त्वदनुपथं इदं कुलायं आत्मसुहृत्प्रियवत् चरति) तुझ्या सेवेविषयीं उपयोगी पडणारें हें शरीर, आत्मा, सुहृत् व प्रिय यांच्या सारखें स्वाधीनपणानें वागत आहे (तथा आत्मनि प्रिये हिते उन्मुखे च त्वयि 'जीवाः' न रमंति बत) तथापि आत्मा, प्रिय हित व संसारापासून

आराममस्य पश्यंति न तं पश्यति कश्चन ॥ न तं विदाथ य इमा जजानान्यद्युष्माकमंतरं बभूव ॥ नीहारेण प्रावृता जल्प्या चासुतृप उक्थशासश्चरंतीत्याद्याः श्रुतयोऽनुक्रोशंत्यो जगदात्मनीश्वरे रतिमुपदिशंतीत्याह । त्वदनुपथमिति । त्वदनुवर्तित्वात्त्वत्सेवौपयिकमिदं कुलायं कौ पृथिव्यां लीयत इति कुलायं शरीरमात्मसुहृत्प्रियवत् आत्मा च सुहृच्च प्रियश्च तद्वच्चरति स्वाधीनतया वर्तत इत्यर्थः । तथाऽपि त्वयि उन्मुखे हिते प्रिये आत्मनि च अप्यर्थे चकारः । एवंभूते सुसेव्येऽपि त्वयि बताहो कष्टं न रमंति न सख्यादिना भजंति । असदुपासनया देहाद्युपलालनेनात्महनः प्रमादिनः । कुतः यदनुशयाः यस्यामसदुपासनायामनुशयो वासना येषां ते कुशरीरभृतः संत उरुभये संसारे भ्रमंति परिवर्तंते । अत आत्महन इति भावः ॥ त्वय्यात्मनि जगन्नाथे मन्मनो रमतामिह ॥ कदा ममेदृशं जन्म मानुषं संभविष्यति ॥ ९ ॥ २२ ॥ इदानीं आत्मा

त्वदनुपथं कुलायमिदमात्मसुहृत्प्रियवच्चरति तथोन्मुखे त्वयि हिते प्रिय आत्मनि च ॥ न बत रमंत्यहो असदुपासन-
यात्महनो यदनुशया भ्रमंत्युरुभये कुशरीरभृतः॥ २२ ॥ निभृतमरुन्मनोऽक्षदृढयोगयुजो हृदि यन्मुनय उपासते तदरयो-
ऽपि ययुः स्मरणात् ॥ स्त्रिय उरगेंद्रभोगभुजदंडविषक्तधियो वयमपि ते समाः समदृशोंऽघ्रिसरोजसुधाः ॥ २३ ॥

वारे द्रष्टव्यः श्रोतव्यो मंतव्यो निदिध्यासितव्य इत्याद्याः श्रुतयो ध्यानमंगत्वेनोपदिशंतीत्याह । निभृतमरुन्मनोऽक्षदृढयोगयुज इति । मरुत्प्राणो मनश्चाक्षाणींद्रियाणि च निभृतानि संयमितानि यैस्ते च ते दृढं योगं युंजंति ते दृढयोगयुजस्ते तथाभूता मुनयो हृदि यत्तत्त्वमुपासते तदेवारयोऽपि तव स्मरणाद्ययुः प्रापुः । स्त्रियोऽपि कामत उरगेंद्रभोगभुजदंडविषक्तधियः अहींद्रदेहसदृशयोर्भुजदंडयोर्विषक्ता धीर्यासां ताः परिच्छिन्नदृष्टयः समदृशः सममपरिच्छिन्नं त्वां पश्यंत्यो वयं श्रुत्यभिमानिन्यो देवता अपि ते समा एव कृपाविषतया । अंघ्रिसरोजसुधाः अंघ्रिसरोजं सुष्ठु धारयंत्यः । अयं भावः । इत्थंभूतस्तव स्मरणानुभावो ये योगिनस्त्वां हृद्यालंबन-

---

ताऱण्याविषयीं सन्मुख उभा व सर्वप्रकारें सुसेव्य अशाहि तुझेठिकाणीं प्राणी, श्रवण, कीर्तन, सख्य इत्यादिकेंकरून रमत नाहींत ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. रमत नाहींत इतकेंच नाहीं, तर (असदुपासनया आत्महनः) देहादिकांच्या लालनपालनादिकेंकरून ते आपला घात करून घेतात. तो आत्मघात असा कीं,– (यदनुशयाः कुशरीरभृतः उरुभये भ्रमंति) ज्या देहादिकांच्या लालनादिकांची वासना धारण करणारे ते जीव, श्वसूकरादिक निंद्य योनि धारण करून, अनेक भयांनीं युक्त अशा संसारामध्यें भ्रमण पावतात. ह्मणूनच ते आत्मघाती समजले पाहिजेत ॥ २२ ॥ आतां, 'आत्मा वारे द्रष्टव्यः श्रोतव्यो मंतव्यः' इत्यादिक श्रुति भक्तीच्या अंगत्वेंकरून ध्यानाचा उपदेश करितात.–(हे प्रभो निभृतमरुन्मनोक्षदृढयोगयुजः मुनयः हृदि यत् उपासते) हे समर्था, ज्यांनीं आपला प्राण, मन व इंद्रियें हीं स्वाधीन करून घेतलीं आहेत असे दृढ योग करणारे ऋषि, हृदयामध्यें ज्या तुझ्या तत्त्वाचें चिंतन करितात; तशाच–(ते अंघ्रिसरोजसुधाः वयं ॥२७६॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अपि समदृशः) तुझ्या चरणकमळाचें उत्तम प्रकारानें चिंतन करणाऱ्या आह्मी श्रुतींच्या अभिमानी देवताहि ज्या तत्त्वाला समत्वेंकरून (देशकालवस्तुपरिच्छेद रहितपणानें) पहात आहों. (तत् अरयः अपि तव स्मरणात् ययुः) तेंच तुझें तत्त्व, शत्रूंनींहि स्मरण मात्रेंकरून प्राप्त करून घेतलें आहे. आणि (उरगेंद्र भोगभुजदंडविषक्तधियः स्त्रियः समाः) शेषाच्या देहासारख्या मृदु बाहुदंडांवर आसक्तचित्त झालेल्या स्त्रिया गोपीहि तेंच तत्त्व कामेंकरून पावल्या आहेत. एतावता सर्वहि तुला सारखेच आहेत; ह्मणजे असा तुझ्या स्मरणाचा महिमा आहे कीं, जे योगी तुझी हृदयामध्यें उपासना करितात, ज्या आह्मी तुला अपरिच्छिन्न रूपत्वेंकरून पाहतों तशाच ज्या स्त्रिया, कामातुर होऊन तुझ्या परिच्छिन्नस्वरूपाचें ध्यान करितात आणि जे शत्रु, द्वेषानें तुझ्या परिच्छिन्न रूपाचें चिंतन करितात त्या सर्वांनाहि तें तुझें ध्यान तुझ्या स्वरूपाची सारखी प्राप्ति करून देतें ॥ २३ ॥ आतां 'यतो वाचो निवर्तंते' इत्यादिक श्रुति भगवंताचें तत्त्व दुर्ज्ञेय आहे असें सांगत

मुपासते याश्च वयं त्वां समं पश्यामो याश्च स्त्रियः कामतः परिच्छिन्नं ध्यायंति ये च द्वेषेण सर्वानपि तांस्त्वात्मेव प्रापयतीति ॥ चरणस्मरणं प्रेम्णा तव देव सुदुर्लभम् ॥ यथा कथंचिन्नृहरे मम भूयादहर्निशम् ॥ १० ॥ २३ ॥ यतो वाचो निवर्तंते अप्राप्य मनसा सह ॥ को अद्धा वेद क इह प्रवोचत् ॥ कुत आजाता कुत इयं विसृष्टिः ॥ अर्वाग्देवा अस्य विसर्जनेनाथा को वेद यत आबभूव ॥ अनेजदेकं मनसो जवीयो नैतद्देवा आप्नुवन् पूर्वमर्शत् ॥ तद्धावतोऽन्यानत्येति तिष्ठत्तस्मिन्नपो मातरिश्वा दधातीत्याद्याः श्रुतयो भगवत्तत्त्वं दुर्ज्ञेयं वदंत्यो भक्तिमेवोररीकृत्य स्तुवंतीत्याह । क इह नु वेदेति । बत अहो भगवन्निह जगत्यग्रसरं पूर्वसिद्धं त्वामवरजन्मलयोऽर्वाचीनोत्पत्तिनाशवान्को नु पुमान्वेद जानाति । ईश्वरस्य पूर्वसिद्धावन्यस्य चार्वाचीनत्वे प्रमाणं वदन् ज्ञानकारणाभावमाह । यत उदगादिति । यतस्त्वत्त ऋषिर्ब्रह्मा उत्पन्नो यं ब्रह्माणमनु उभये आ-

क इह नु वेद बतावरजन्मलयोऽग्रसरं यत उदगादृषिर्यमनु देवगणा उभये ॥
तर्हि न सन्न चासदुभयं न च कालजवः किमपि न तत्र शास्त्रमवकृष्य शयीत यदा ॥ २४ ॥

ध्यात्मिकाधिदैविका देवगणा उत्पन्नास्ततोऽप्यर्वाचीनाः सर्वे । यदा तु भवान्सर्वमवकृष्योपसंहृत्य शयीत तर्हि तदा अनुशायिनां जीवानां ज्ञानसाधनं नास्ति । यतस्तदा सत्स्थूलमाकाशादि । न चासत् सूक्ष्मं महदादि । न चोभयं सदसद्भ्यामारब्धं शरीरम् । न च कालजवस्तन्निमित्तभूतं कालवैषम्यम् । एवं सति तत्र तदा न किमपींद्रियप्रमाणाद्यपि न च ज्ञापकं शास्त्रमपि । अयमभिप्रायः । अर्वाक्सृष्टिगतानां देहाद्युपाधिकृतांतराणां कालवशेन च मलिनसत्वानां न तावद्भगवज्ज्ञानसामर्थ्यम् । तथाच श्रुतिः । न तं विदाथ य इमा जजानान्यद्युष्माकमंतरं बभूवेत्याद्याः । यदा तु प्रलयसमये न बह्वंतरमस्ति तदाऽपि साधनाभावान्न भगवज्ज्ञानसामर्थ्यं अतस्त्वदेकशरणतया श्रवणकीर्तनादिभक्तिरेव सुकरेति ॥ काहं बुद्ध्यादिसंरुद्धः क च भूमन्महस्तव ॥ दीनबंधो दयासिंधो भक्तिं मे नृहरे दिश ॥ ११ ॥ २४ ॥

होत्सात्या भक्तीचाच अंगीकार करून स्तुति करितात—(बत इह अग्रसरं अवरजन्मलयः कः नु वेद) हे भगवन्, या जगतामध्यें पूर्वींच असणाऱ्या तुला अलीकडच्या उत्पत्तिनाशांनीं युक्त असा पुरुष कोण बरें जाणत आहे ? कोणीच नाहीं. ह्मणजे पूर्वीं झालेला पुरुष, नंतर झालेल्या पुरुषाचा वृत्तांत जाणत असतो, नंतर झालेला पुरुष पूर्वींच्या पुरुषाचा वृत्तांत जाणत नसतो. जसा पिता, पुत्राच्या जन्मादिकांचा वृत्तांत जाणतो परंतु पुत्र पित्याच्या जन्मादिकांचा वृत्तांत जाणत नाहीं त्याप्रमाणें पूर्वसिद्ध असा तूं मात्र नंतर झालेल्या जीवांचा सर्व वृत्तांत जाणतोस; ते जीव तुझा वृत्तांत जाणत नाहींत. आतां ईश्वर पूर्वसिद्ध व जीव अर्वाचीन याविषयीं प्रमाण सांगणाऱ्या श्रुति, जीवांना ज्ञान न होण्याचें कारण सांगतात—(यतः ऋषिः उदगात् यं अनु उभये देवगणाः) ज्या तुझ्यापासून ब्रह्मदेव उत्पन्न झाला आहे व त्यानंतर आध्यात्मिक व आधिदैविक असे दोनप्रकारचे देवगण उत्पन्न झाले आहेत. पुढें सर्व जीव त्यांच्या अलिकडचे आहेत. आणि—(यदा अवकृष्य

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शयीत, जेव्हां तर तूं सर्व जगाचा उपसंहार करून शयन करितोस (यर्हि नसत् न च असत् ' न च ' उभयं न च कालजवः) त्यावेळीं तुझ्या मागाहून शयन करणाऱ्या जीवांना ज्ञानप्राप्तीचें साधनच नाहीं. कारण, त्यावेळीं आकाशादिक स्थूल पदार्थ, महत्तत्त्वादिक सूक्ष्मपदार्थ, स्थूलसूक्ष्मात्मक शरीर, आणि त्याला निमित्तभूत काळाचें वैषम्य हीं मुळींच नाहींत. तसेंच (तत्र किमपि न शास्त्रं) त्यावेळीं, इंद्रियें प्राण व त्यांना बोध करणारें वेदपुराणादिक शास्त्रहि नाहीं, ह्मणून त्यावेळींहि जीवांना तुझें ज्ञान होत नाहीं. याचा अभिप्राय असा कीं,–अलिकडच्या सृष्टीमध्यें उत्पन्न होऊन देहादिक उपाधींच्या योगानें तुजशीं बहुत अंतर पडलेल्या व कालवशेंकरून मलिनसत्व झालेल्या जीवांना ज्ञान संपादन करण्याचें सामर्थ्य नाहीं. आणि जेव्हां प्रळयकालीं तुझ्या व यांच्यामध्यें फारसें अंतर नसतें तेव्हांहि ज्ञानाचें साधन

इतोऽपि ज्ञानं न सुशकं उपदिशतामपि भ्रमबाहुल्यादित्याह । जनिमसत इति । असतो जगतो जनिमुत्पत्तिं ये वैशेषिकादयो वदंति असत एव ब्रह्मत्वस्योत्पत्तिं ये च पातंजलादयः । सत एवैकविंशतिप्रकारस्य दुःखस्य नाशं मोक्षं वदंति ये नैयायिकाः । उतापि ये च सांख्यादय आत्मनि भिदां भेदं च । ये मीमांसका विपणं कर्मफलव्यवहारमृतं सत्यं स्मरंति वदंति ते सर्वे आरुपितैरारोपितैर्भ्रमैरेवोपदिशंति न तत्त्वदृष्ट्या । सदेव सौम्येदमग्र आसीत् ॥ ब्रह्मैव सन् ब्रह्माप्येति ॥ अनीशया शोचति मुह्यमानः अविद्यायामंतरे वर्तमानाः ॥ स्वयं धीराः पंडितंमन्यमानाः ॥ जघन्यमानाः परियंति मूढा अंधेनैव नीयमाना यथांऽधाः ॥ एकमेवाद्वितीयं ब्रह्म ॥ एक एव हि भूतात्मा भूते

जनिमसतः सतो मृतिमुतात्मनि ये च भिदां विपणमृतं स्मरंत्युपदिशंति त आरुपितैः ॥
त्रिगुणमयः पुमानिति भिदा यदबोधकृता त्वयि न ततः परत्र स भवेदवबोधरसे ॥ २५ ॥

भूते व्यवस्थितः ॥ एकधा बहुधा चैव दृश्यते जलचंद्रवदित्यादिश्रुतिविरोधात् । किंच वस्तुतः पुरुषस्य त्रिगुणमयत्वे सर्वमिदं संगच्छेत न तु तदस्तीत्याह । त्रिगुणमयः पुमानितिभिदा यदबोधकृता त्वयीति । त्रिगुणमयः पुमानित्यनेन हेतुना या भिदा । उपलक्षणमेतद्द्विदादि । सा यस्मात्त्वयि विषये अबोधकृता त्वद्विषयाज्ञानविजृंभिता । तर्हि किमज्ञानमस्ति वस्तुतः पुंसि नैवेत्याह । ततः अबोधात्परत्र परेऽसंगेऽवबोधरसे ज्ञानघने स अबोधो न भवेन्न संभवतीत्यर्थः ॥ मिथ्यातर्कसुकर्कशेरितमहावादांधकारांतरभ्राम्यन्मंदमतेरमंदमहिमंस्त्वज्ज्ञानवर्त्मास्फुटम् ॥ श्रीमन्माधव वामन त्रिनयन श्रीशंकर श्रीपते गोविंदेति मुदा वदन्मधुपते मुक्तः कदा स्यामहम् ॥ १२ ॥ २५ ॥

नसल्यामुळें यांना तुझें ज्ञान घडत नाहीं, ह्मणून या जीवांनीं, तुला अनन्य शरण जाऊन तुझी भक्ती करावी ॥ २४ ॥ आतां ' सदेव सोम्येदमग्र आसीत् ' ' असद्वा इदमग्र आसीत् ' इत्यादिक श्रुति, उपदेश करणाऱ्या लोकांचेहि मतभेद असल्यामुळें पुष्कळ भ्रम आहेत ह्मणून तत्त्वज्ञान दुर्घट आहे असें सांगतात–(असतः जनिं ' ये ' स्मरंति) सृष्टीच्या पूर्वीं नसलेल्याच या जगाची उत्पत्ति झाली असें जे वैशेषिकादिक[1] बोलतात, अथवा जीवामध्यें पूर्वीं नसलेल्या ब्रह्मत्वाची योगसाधनानें उत्पत्ति होते असें जे पातंजलादिक[2] बोलतात. (सतः मृतिं ' ये स्मरंति ') पंच ज्ञानेंद्रियें व मन हीं ६ सहा इंद्रियें, ह्यांचे ६ सहा विषय व ६ सहा ज्ञानें, १ शरीर, १ सुख व १ दुःख अशा एकवीस प्रकारच्या दुःखांचा नाश होणें हाच मोक्ष होय असें जे नैयायिक बोलतात (उत च आत्मनि भिदां ये ' स्मरंति ') तसाच जीवात्मा

१ सप्तपदार्थवादी नवे तार्किक, ज्यांस ' काणाद ' असें ह्मणतात ते वैशेषिक होत. २ योगशास्त्र करणारे, त्यांचा आशय असा आहे कीं, जशा तांबेवगैरे धातु मूळच्या सुवर्णरूपी नसून सुवर्णकारक औषधींचीं पुटें दिल्यावर सुवर्णच होतात त्याप्रमाणें पूर्वीं ब्रह्मरूपी नसलेलाहि जीव, योगसामर्थ्यानें ब्रह्मरूप होतो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आणि परमात्मा यांच्यांत महाकाशांतील घटाकाशमठाकाशांसारखा भेद आहे असें जे सांख्यादिक बोलतात आणि–(विपणं ऋतं 'ये' स्मरंति) कर्मफळ सत्य आहे असें जे मीमांसक बोलतात (ते आरुपितैः उपदिशंति) ते निरनिराळा उपदेश करणारे सर्वहि मतवादी, आरोप केलेल्या भ्रमांनींच उपदेश करितात, तत्त्वदृष्टीनें उपदेश करीत नाहींत. कारण, हीं सर्वमतें आमच्या अद्वैतमताशीं विरुद्ध आहेत. आतां तो अंतर्यामी आत्मा जर वस्तुतः त्रिगुणमय असता तर यांचें सांगणें घडलें असतें परंतु (पुमान् त्रिगुणमयः इति भिदा यत् त्वयि अबोधकृता) पुराणपुरुष आत्मा, त्रिगुणमय आहे अशा कारणानें जो भेदवगैरे मानणें तो ज्याअर्थी तुझ्या विषयींच्या अज्ञानानें विलसित आहे त्याअर्थीं (सः ततः परत्र अवबोधरसे न भवेत्) तो भेद, अज्ञानाहून पलिकडच्या ज्ञानघनरूपी तुझेठिकाणीं मुळींच संभवत नाहीं ॥ २५ ॥ आतां जर असत् वस्तु उत्पन्न होत नाहीं, आणि पुरुष त्रिगुणमय नाहीं असें असेल तर हा सर्व प्रपंच आणि पुरुष हे भिन्न नाहींत असें होईल,

---

ननु यद्यसन्नोत्पद्यते यदि च त्रिगुणमयः पुरुषो न भवति तर्हीदं प्रपंचजातं पुरुषश्च पृथक् नास्तीत्युक्तं स्यात् कथं तर्हि तयोः सत्त्वेन प्रतीतिरत आह । सदिव मन इति । मनो मनोमात्रविलसितमिदं त्रिवृत्त्रिगुणात्मकं प्रपंचजातमसदेव सदिव विभाति । कथमिति चेत्तत्राह । त्वयीति । त्वय्यधिष्ठाने । अधिष्ठानसत्तया सद्वत्प्रतीयत इत्यर्थः । न केवलमिदंकारास्पदं किंत्वामनुजात् । मनुजः पुरुषः । अभिविधावाकारः । पुरुषमभिव्याप्येति । पुरुषस्यापि पृथक्सत्त्वप्रतीतिर्मनोमात्रविलसितेत्यर्थः । तथाच श्रुतिः । असतोऽधिमनोऽसृजत् ॥ मनः प्रजापतिमसृजत ॥ प्रजापतिः प्रजा असृजत ॥ तद्वा इदं मनस्येव परमं प्रतिष्ठितं यदिदं किंचेति । नन्वात्मविदामपि विश्वं सदेव स्फुरत्यतः कथम-

सदिव मनस्त्रिवृत्त्वयि विभात्यसदामनुजात्सदभिमृशंत्यशेषमिदमात्मतयाऽऽत्मविदः ॥
नहि विकृतिं त्यजंति कनकस्य तदाऽऽत्मतया स्वकृतमनुप्रविष्टमिदमात्मतयाऽवसितम् ॥ २६ ॥

सत्स्यादत आह । सदभिमृशंतीति । आत्मविदस्त्वशेषमिदं भोक्तृभोग्यात्मकं विश्वमात्मतयैव सदभिमृशंति सदिति जानंति । आत्मकार्यत्वान्न पृथगित्यर्थः । तथाहि । यदुपादानकं यत्कार्यं भवति तत्तेनैव रूपेण प्रतीयते उपादीयते चेति लोकाचारेण दर्शयति । नहि विकृतिमिति । कनकस्य विकृतिं कुंडलादिकं कनकार्थिनो न त्यजंति । अत्र हेतुः । तदात्मतया कनकरूपत्वेनेत्यर्थः । अतः स्वकृतमिदं विश्वमनुप्रविष्टं च पुरुषरूपमात्मतयैवाव सितं निश्चितम् ॥ यत्सत्त्वतः सदा भाति जगदेतदसत्स्वतः ॥ सदाभासमसत्यस्मिन्भगवंतं भजाम तम् ॥ १३ ॥ २६ ॥

परंतु त्यांच्या भेदाची प्रतीति तर अनुभवास येत्ये ती कशी ? असें कोणी ह्मणेल तर–'असतोऽधिमनोऽसृजत' इत्यादिक श्रुति ह्मणतात–(मनः इदं त्रि वृत् आमनुजात् असत् सदिव विभाति) मनाच्या योगानेंच विलास पावणारें हें त्रिगुणात्मक जग, अंतर्यामी पुरुषापर्यंत मिथ्याभूत असून अधिष्ठानरूप आत्म्याच्या खरेपणानें खरें असल्यासारखें भासतें. आतां आत्मवेत्त्या पुरुषांनाहि हें जग खरेंच आहे असें भासतें मग तें खोटें कसें ह्मणावें ? असें कोणी ह्मणेल तर–(आत्म विदः इदं अशेषं आत्मतया सत् अभिमृशंति) आत्मवेत्ते पुरुष तर, भोक्तृभोग्यात्मक ह्या सर्व जगाला आत्मत्वेंकरूनच (अधिष्ठानरूप आत्म्याच्या सत्तेनेंच) हें खरें आहे असें जाणतात; आत्म्याहून भिन्नसत्तारूप जाणत नाहींत. याविषयीं लोकाचार दाखवितात–('कनकार्थिनः कनकस्य विकृतिं नहि त्यजंति किंतु तदात्मतया 'गृण्हंति') जसे सुवर्ण घेण्याची इच्छा करणारे लोक, सुवर्णाचा विकार असलेल्या कुंडलादिक पदार्थांचाहि त्याग करीत नाहींत तर सुवर्णरूपत्वेंकरूनच त्यांचें ग्रहण करितात. त्याप्रमाणें (स्वकृतं अनुप्रविष्टं इदं आत्मतया अवसितम्) आत्म्यानें स्वतां उपादान कारण होऊन केलेलें व त्या पुरुषरूपी आत्म्यानें आंत

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रवेश केलेलें असें हें भोक्तृभोग्यात्मक जग, आत्मरूपच आहे असें आत्मवेत्त्या पुरुषांनीं जाणिलें आहे ॥ २६ ॥ आतां 'सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्म, इत्यादिक श्रुति भक्तीनेंच ज्ञान सुलभ होतें असें सांगतात— (हे प्रभो, अखिलसत्वनिकेततया ये तव परिचरंति) हे प्रभो, तूं सर्व प्राणिमात्रांचें आश्रयस्थान आहेस असें जाणून जे पुरुष तुझें सेवन करितात, (ते उत अविगणय्य निर्ऋतेः शिरः पदा आक्रमंति) तेच पुरुष, मृत्यूचा तिरस्कार करून त्या मृत्यूचें मस्तक पायानें आक्रमण करितात, म्हणजे मृत्यूला जिंकून मोक्ष पावतात. त्यांच्या कृतार्थत्वाविषयीं संदेह नाहीं. (त्वयि कृतसौहृदाः ते खलु पुनंति) तुझ्यावर ज्यांनीं प्रेम धारण केलें आहे

ननु, सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्म ॥ नेह नानाऽस्ति किंचन ॥ मृत्योः स मत्युमाप्नोति य इह नानेव पश्यति इत्यादिश्रुतिभिरेवंभूतस्य भगवतः प्रतिपादनात्तज्ज्ञानं सुकरमेवेति कृतं भक्त्या अत आह । तव परि ये चरंतीति । तवेति कर्मणि षष्ठी । त्वां ये परिचरंति । छंदसि व्यवहिताश्चेति यच्छब्देन व्यवधानमदोषः । केन रूपेण । अखिलसत्व निकेततया अखिलानि सत्वानि निकेतो यस्य स तथा तस्य भावस्त्त्वा तया । सर्वभूतावासतयेत्यर्थः । उत एव अविगणय्य तिरस्कृत्य त एव निर्ऋतेर्मृत्योः शिरो मूर्धानं पदा पादेनाक्रमंति मृत्योर्मूर्ध्नि पदं दधति । ते तरंति मुच्यंत इत्यर्थः । ये पुनर्विमुखा अभक्तास्तान् गिरा वाचा पशूनिव विबुधान्विदुषोऽपि परिवयसे बध्नासि । कुतः । त्वयि कृतसौहृदाः त्वयि कृतं सौहृदं प्रेम यैस्ते खलु निश्चितं पुनंति पवित्रयंति । आत्मानमन्यानपीति शेषः । नेतरे । तथाच श्रुतिः । तस्य वाक्तंतिर्नामानि दामानि ॥ तस्येदं वाचा तंत्या नामभिर्दामभिः सर्वं सितमिति । अयमभिप्रायः । सत्यमेवंभूतमात्मानं श्रुतयः प्रतिपादयंति तत्र च यद्यपि वस्तुनोऽपरोक्षत्वादपरोक्षमेव ज्ञानमुत्पद्यते तथाऽप्यसंभावना-

तव परि ये चरंत्यखिलसत्त्वनिकेततया त उत पदाऽऽक्रमंत्यविगणय्य शिरो निर्ऋतेः ॥ परिवयसे पशूनिव गिरा विबुधानपि तांस्त्वयि कृतसौहृदाः खलु पुनंति न ये विमुखाः ॥ २७ ॥ त्वमकरणः स्वराडखिलकारकशक्तिधरस्तव बलिमुद्वहंति समदंत्य-जयाऽनिमिषाः ॥ वर्षभुजोऽखिलक्षितिपतेरिव विश्वसृजो विदधति यत्र ये त्वधिकृता भवतश्चकिताः ॥ २८ ॥

विपरीतभावनातिरस्कृतत्वान्मलिनचित्तेषु परोक्षमिव भवतीति नापरोक्षसंसारभ्रमनिवृत्तिसमर्थम् । भगवत्परिचर्यया तु सम्यगमलचित्तानां तत्प्रसादेन लब्धापरोक्षज्ञानानाम-यत्नत एव करकलितो मोक्ष इति । तथाच श्रुतयः । देहांते देवः परं ब्रह्म तारकं व्याचष्टे ॥ यमेवैष वृणुते तेन लभ्यः ॥ यस्य देवे पराभक्तिरित्यादयः ॥ तपंतु तापैः प्रपतंतु पर्वतादटंतु तीर्थानि पठंतु चागमान् ॥ यजंतु यागैर्विवदंतु वादैर्हरिं विना नैव मृतिं तरंति ॥ १४ ॥ २७ ॥ ननु यद्यखिलसत्वनिकेतत्वेन भवतः सेव्यत्वमुच्यते तर्हि तत्करणसंबंधात्कर्तृत्वभोक्तृत्वे प्रसज्येयातां न वस्तुतस्तथा त्वमिति चेत्तर्हि जीवानामपि तत्तुल्यत्वमिति केन विशेषेण पुनः सेव्यसेवकत्वमितीमामाशंकां परिहरंत्यः । अपाणिपादो जवनो ग्रहीता पश्यत्यचक्षुः स शृणोत्यकर्णः ॥ स वेत्ति वेद्यं न च तस्य वेत्ता तमाहुरग्र्यं पुरुषं पुराणमित्याद्याः श्रुतयः स्तुवंतीत्याह । त्वमकरण इति ।

असे ते पुरुष, आपणास पवित्र करितात व दुसऱ्यांनाहि भक्तिमार्गाचा उपदेश करून पवित्र करून तारितात (ये विमुखाः 'ते न पुनंति') जे तुझ्याविषयीं विमुख (अभक्त) आहेत ते आपणांससुद्धां पवित्र करीत नाहींत मग दुसऱ्यांस कोठून करितील. कारण, (विबुधान् अपि तान् 'त्वं' गिरा पशून् इव परिवयसे) विद्वान् अशाहि त्या अभक्तांना तूं वेदरूप वाणीच्या योगानें, त्या त्या कर्मांच्या अधिकारस्वेंकरून, जसें दावणीनें वृषभादिक पशूंचें बंधन करितात त्याप्रमाणें बंधन करितोस म्हणून तुझ्या भक्तांनांच ज्ञान व मोक्ष हे सुलभ आहेत इतरांना नाहींत ॥ २७ ॥ आतां 'अपाणि पादो जवनो' इत्यादिक श्रुति भगवंताचें सुसेव्यत्व वर्णन करितात— ('हे प्रभो' त्वं अकरणः अखिलकारकशक्तिधरः स्वराट् 'असि') हे समर्था, तूं स्वतः इंद्रियसंबंधरहित असून सर्वप्राण्यांच्या इंद्रियशक्तींचा प्रवर्तक ॥२७८॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

व स्वतःसिद्धज्ञानवान् आहेस. ह्मणून-(अनिमिषाः विश्वसृजः अजया तव बलिं उद्वहंति समदंति च) जसे सेवक लोक, आपल्या स्त्रियांसहवर्तमान स्वामीची सेवा करितात त्याप्रमाणें इंद्रादि देव व त्यांनीं पूज्य असे ब्रह्मादिकहि, आपल्या अविद्येनें वेष्टित होत्सातेच तुला बलि समर्पण करितात ह्मणजे तुझी सेवा करितात आणि मनुष्यांनीं दिलेला हव्यकव्यादिरूप बळि आपण भक्षण करितात. यास दृष्टांत-(वर्षभुजः अखिलक्षितिपतेः इव) जसे मांडलिक राजे, आपल्या प्रजांनीं दिलेले करभार ग्रहण करून, सार्वभौम राजाला स्वतां करभार समर्पण करितात त्याप्रमाणें ब्रह्मादिक देव बळि समर्पण करितात. ते कसे ? असें कोणी ह्मणेल तर-(भवतः चकिताः संतः यत्र ये तु अधिकृताः 'ते तत्' विदधति) काळरूपी तुझ्यापासून भय पावत होत्साते ज्या सृष्ट्यादिक कर्माविषयीं जे ब्रह्मादिक

करणसंबंधरहित एवाखिलकारकशक्तिधरः अखिलानां प्राणिनां यानि कारकाणींद्रियाणि तेषां शक्तीर्धारयति प्रवर्तयतीति तथा । कुतः । स्वराट् यतः स्वेनैव राजसे दीप्यसे। नहि स्वतःसिद्धज्ञानशक्तेरिंद्रियापेक्षेत्यर्थः । अतस्तव बलिमुद्वहंति पूजां कुर्वंति । अजयाऽविद्यया सहितास्तयावृता इत्यर्थः । अनिमिषा देवा इंद्रादयस्तत्पूज्या विश्वसृजो ब्रह्मादयोऽपि । यथा सस्त्रीका एव किंकराः स्वामिनं सेवंते तथाऽविद्यायुक्ता देवादयस्त्वामिति लोकोक्तिः । समदंति च मनुष्यैर्दत्तं हव्यकव्यादिलक्षणं बलिं भक्षयंति । अत्र दृष्टांतः । वर्षभुजोऽखिलक्षितिपतेरिवेति । यथा वर्षभुजः खंडमंडलपतयोऽखिलक्षितिपतेर्महामंडलेश्वरस्य स्वप्रजादत्तबलिभुजो बलिमुद्वहंति तद्वदिति । कथं बलिं वहंति तदाह । विदधति यत्र ये त्वधिकृता भवतश्चकिता इति । त्वत्तो भीताः संतो यस्मिन्कर्मणि नियुक्तास्ते तत्कुर्वंतीति । त्वदाज्ञापालनमेव बल्युद्वहनमित्यर्थः । तथाच श्रुतिः ।

स्थिरचरजातयः स्युरजयोत्थनिमित्तयुजो विहर उदीक्षया यदि परस्य विमुक्त ततः ॥
नहि परमस्य कश्चिदपरो न परश्च भवेद्वियत इवापदस्य तव शून्यतुलां दधतः ॥ २९ ॥

भीषाऽस्माद्वातः पवते ॥ भीषोदेति सूर्यः ॥ भीषाऽस्मादग्निश्चेंद्रश्च ॥ मृत्युर्धावति पंचम इति ॥ अनिंद्रियोऽपि यो देवः सर्वकारकशक्तिधृक् ॥ सर्वज्ञः सर्वकर्ता च सर्वसेव्यं नमामि तम् ॥ १९ ॥ २८ ॥ तदेवं करणप्रवर्तकमीश्वरं करणपरतंत्रा नरा भजंतीत्युक्तम् । न केवलमियदेव कारणं तत उत्पन्नत्वेनापि तत्परतंत्रत्वादिति वदंति । यथाऽग्नेः क्षुद्रा विस्फुलिंगा व्युच्चरंत्येवमेवास्मादात्मनः सर्वे प्राणाः सर्वे लोकाः सर्वे देवाः सर्वाणि भूतानि सर्व एत आत्मानो व्युच्चरंतीत्याद्याः श्रुतय इत्याह । स्थिरचरजातय इति । हे विमुक्त नित्यमुक्त यदि तवाजया मायया विहरो विहारः क्रीडा भवति तदा स्थिरचरजातयः स्थिराश्च चराश्च जातयो जात्या लिंगिता देहा येषां ते जीवाः स्युर्भवेयुः । कथं भूतस्य । ततोऽजातः परस्य दूरे वर्तमानस्यासंगस्येत्यर्थः । कथं विहारः । उदीक्षया ईक्षणलेशेन । ननु मयि लीनानां जीवानां कथं जन्म स्यात्तत्राह । उत्थनिमित्तयुज

योजिलेले आहेत ते, तें कर्म करितात ह्मणजे तुझी आज्ञा पालन करणें हेंच त्याचें बळि समर्पण करणें होय ॥ २८ ॥ याप्रमाणें इंद्रियप्रवर्तक ईश्वराचें, इंद्रियपरतंत्र असलेले मनुष्य सेवन करितात असें सांगितलें. आतां दुसऱ्या 'यथाग्नेः क्षुद्रा विस्फुलिंगा' इत्यादिक श्रुति, इतकेच कारणानें, प्राणी ईश्वराचें सेवन करितात असें नाहीं, तर त्याच्यापासून आपण उत्पन्न झालेले असल्यामुळें त्याचें सेवन करितात असें सांगतात-(हे विमुक्त ततः परस्य तव यदि अजया उदीक्षया विहरः 'भवति') हे नित्यमुक्ता ईश्वरा, मायेपेक्षां पर असून मायेचा प्रेरक अशा तुझी जेव्हां मायेबरोबर केवळ अवलोकनमात्रेंकरून क्रीडा होत्ये-('तदा' उत्थनिमित्तयुजः स्थिरचरजातयः स्युः) तेव्हां तुझ्या अवलोकनेंकरूनच ज्यांचीं कर्में व कर्मयुक्त लिंगशरीरें प्रगट झालीं आहेत असे स्थावरजंगमजातींचे जीव उत्पन्न होतात. त्यांबद्दल तुझ्याठिकाणीं वैषम्य मुळींच नाहीं. कारण, (परमस्य वियतः इव शून्यतुलां दधतः अपदस्य 'तव' कश्चित् अपरः परश्च नहि

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भ वेत्) परम दयाळु, आकाशासारखा सम, शून्याचा सारखेपणा स्वीकारणारा आणि वाणीला व मनाला अगोचर अशा तुला, त्या जीवांपैकीं कोणी आपला किंवा परकीय मुळींच नाहीं. ह्मणून त्या जीवांनीं तुझें समभावानें सेवन करावें हेंच योग्य आहे ॥ २९ ॥ याप्रमाणें परमात्म्यापासून अविद्योपाधिक जीव होतात व ते त्याचें सेवन करितात असें सांगितलें, आतां जर ते जीव फार सूक्ष्म आहेत असें मानिलें तर देहव्यापक चैतन्य घडणार नाहीं; देहाएवढ्या परिमाणाचे आहेत असें मानिलें तर त्यांना सावयवत्वेंकरून अनित्यत्व प्राप्त होईल आणि तसें झालें असतां परलोकसाधनाचें व्यर्थत्व होईल ह्मणून ते वस्तुतःच सर्वगत व नित्य आहेत असें कित्येक मानितात

इति । ईक्षयैवोत्थान्युत्थितान्याविर्भूतानि निमित्तानि कर्माणि तद्युक्तानि लिंगशरीराणि वा तैर्युज्यंत इति तथा । ननु किंनिमित्तोत्थानेन मदिच्छयैव भवंतु, न, त्वयि वैषम्याभावाद्विषमसृष्टेरयोगादित्याह । परमस्येति । तव परमस्योत्तमस्य परमकारुणिकस्य वियत इवाकाशसदृशस्य । समस्येत्यर्थः । कश्चिदपरः स्वीयः परोऽस्वीयश्च न भवेत् । न संभवतीत्यर्थः । असद्वा इदमग्र आसीत् ॥ ततो वै सदजायतेत्यादिश्रुत्या शून्यपूर्वकत्वमिव प्रतीयते तदर्थं पुनर्विशिनष्टि । शून्यतुलां दधतः शून्यसाम्यं भजतः । तदेव दर्शयितुं पुनर्विशिनष्टि । अपदस्येति । न पद्यत इत्यपदस्तस्य वाङ्मनसयोरगोचरस्येत्यर्थः ॥ त्वदीक्षणवशक्षोभमायाबोधितकर्मभिः ॥ जातान्संसरतः खिन्नान्नृहरे पाहि नः पितः ॥ १६ ॥ २९ ॥ एवं तावत्परमात्मनः सकाशादविद्याकृतकार्योपाधयस्तदंशा एव जीवा जाताः संसरंतो भजंतीत्युक्तम् । तत्र यद्येकाऽविद्या तदा जीवस्याप्येकत्वादेकमुक्तौ सर्वमुक्तिप्रसंगः । अथ नानाविद्यास्तर्हि तस्यैवांशांतरेण संसारानपगमादनिर्मोक्ष इत्यादितर्कबलेन वस्तुत एव नानात्मानस्तत्र च तेषामणुत्वे देहव्यापि चैतन्यं

अपरिमिता ध्रुवास्तनुभृतो यदि सर्वगतास्तर्हि न शास्यतेति नियमो ध्रुव नेतरथा ॥
अजनि च यन्मयं तदविमुच्य नियंतृ भवेत्सममनुजानतां यदमतं मतदुष्टतया ॥ ३० ॥

न स्यात् देहपरिमाणत्वे च मध्यमपरिमाणानां सावयत्वेनानित्यत्वं स्यात् । अतः सर्वगता नित्याश्चेति केचन मन्यंते । तत्र न तावदुक्तदोषप्रसंगः अविद्याभेदेन तच्छक्तिभेदेन वा बद्धमुक्तव्यवस्थासंभवात् । ईश्वरस्य तु न केनाप्यंशेन संसारशंकेत्युक्तमेव । प्रसिद्धं चात्मैक्यं सर्वश्रुतिषु । किंच इमं पक्षमंतर्यामिब्राह्मणमपि न सहत इत्याह । अपरिमिता इति । वस्तुत एवानंता ध्रुवास्तेनैव रूपेण नित्याः सर्वगताश्च तनुभृतो जीवा यदि स्युस्तर्हि तेषां समत्वाच्छास्यता न घटत इति कृत्वा हे ध्रुव नियमो नियमनं त्वया न स्यादितरथा तु घटेत । कथम् । यन्मयमुपाधितो यद्विकारप्रायं यज्जीवाख्यमजनि जातं तत्तस्य स्वविकारस्य नियंतृनियामकं भवेत् । अविमुच्य कारणतयाऽपरित्यज्य । किं तत् । सममनुस्यूतम् । ननु किं यत्तच्छब्दैर्ज्ञायते चेदुच्यतामिदं तदित्यत आह । अनुजानतां यदमतमिति । जानीम इति वदतां यदमतमविज्ञातप्रायं अविषयत्वात् । तथा च श्रुतिः । यस्यामतं तस्य मतं मतं यस्य न वेद सः ॥ अविज्ञातं विजानतां विज्ञातमविजानताम् ॥ अवचनेनैव प्रोवाच स ह तूष्णीं बभूवेत्यादिः । किंच । मतस्य ज्ञातस्य

त्यांच्याहि मताचें दूषण करणाऱ्या कित्येक श्रुति ह्मणतात कीं,– (हे ध्रुव, जीवाः यदि अपरिमिताः ध्रुवाः सर्वगताः च स्युः) हे नित्यस्वरूपा प्रभो, जीव जर वस्तुतःच असंख्यात, नित्यरूप व सर्वव्यापक आहेत (तर्हि 'तेषां' शास्यता न इति 'भवता' नियमः न स्यात्) तर त्यांना तुझा सारखेपणा असल्यामुळें शिक्षणीयत्व नाहीं ह्मणून तुझ्याकडूनहि त्यांचें नियमन घडणार नाहीं. (इतरथा 'नियमो घटते') आणि तसें नसतां त्यांना अनित्यत्ववगैरे असेल तर तुझ्याकडून नियमन घडेल. तें कसें? असें ह्मणशील तर–(यन्मयं च जीवाख्यं, अजनि तत् अविमुच्य नियंतृ भवेत्) ज्या बिंबरूप ब्रह्मापासून अविद्यादिक उपाधिवशेंकरून

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विकाररूपी जीवनामक प्रतिबिंब उत्पन्न झालें, तें बिंबरूप ब्रह्म, आपल्या प्रतिबिंबरूपी जीवविकारांचें, कारणत्वानें त्याचा त्याग न करितां नियमन करणारें होईल. तें कोणतें? तर–(सत्यम्) सर्वठिकाणीं अनुस्यूत असलेलें. आतां जें तें अशा मोघम शब्दांनीं कां सांगतां? समजलें असेल तर हें तें असें स्पष्ट सांगा, असें जर कोणी ह्मणेल तर–(मतदुष्टतया अनुजानतां यत् अमतम्) जाणण्यांत आलेल्या वस्तूला दोष असल्यामुळें, आह्मी तें जाणतों असें ह्मणणारांना जें बहुतकरून समजलेंच नाहीं तें यत्तच्छब्दांनीं प्रकाशित न होणारें अतर्क्य, व सर्व पदार्थांत व्यापून असणारें वस्तुच जीवांचें नियामक होईल ॥ ३० ॥ आतां बिंबरूपी परमात्म्यापासून जीव होतात ह्मणून परमात्मा हा जीवांचा नियंता आणि जीव हे नियम्य आहेत असें जर ह्मणावें तर, जीवांना अनित्यपणाच्या प्रसंगानें प्रतिदिवशीं केलेल्या कर्मादिकांचा नाश आणि न केलेल्यांची प्राप्ति

दुष्टतया दोषश्रवणात् । तथाच श्रुतिः । यदि मन्यसे सुवेदेति दहरमेवापि नूनं त्वं वेत्थ ब्रह्मणो रूपं यदस्य त्वं यदस्य देवेषु इत्यादि । तस्माद्यत्तच्छब्दावद्योत्यमतर्क्यं किमपि सर्वानुस्यूतत्वेन समं नियन्तृ भवेदित्यर्थः। अंतर्यंता सर्वलोकस्य गीतः श्रुत्या युक्त्या चैवमेवावसेयः ॥ यः सर्वज्ञः सर्वशक्तिर्नृसिंहः श्रीमंतं तं चेत सैवावलंबे ॥ १७ ॥ ३० ॥ ननु यदि च परमात्मनो जीवा जायंते इति नियंतृनियम्यभाव उच्यते तथासति जीवानामनित्यत्वप्रसंगेन प्रतिदिनं कृतनाशाकृताभ्यागमप्रसंगः स्यात् । किंच तदा मोक्षो नाम जीवस्य स्वरूपहानिरेव स्यात् । न चैतद्युक्तम् । स्वप्रकाशानंदात्मनोऽविद्याकृतानर्थनिवृत्तिमात्रस्य मोक्षत्वाभ्युपगमादित्याशंक्योपाधिजन्मनैव जीवानां जन्मोच्यते न स्वतः अघटनादित्याह । न घटत इति । तत्र किं प्रकृतेर्जीवरूपेणोद्भवः स्यात्पुरुषस्य वा उभयोर्वा । आद्ये जीवानां जडत्वापत्तिः द्वितीये पुरुषस्य विकारित्वप्रसंगः अतएव

न घटत उद्भवः प्रकृतिपूरुषयोरजयोरुभययुजा भवंत्यसुभृतो जलबुद्बुदवत् ॥
त्वयि त इमे ततो विविधनामगुणैः परमे सरित इवार्णवे मधुनि लिल्युरशेषरसाः ॥ ३१ ॥

न तृतीय इत्याशयेनोक्तं प्रकृतिपूरुषयोरुद्भवो न घटत इति । श्रुत्याऽजत्वप्रतिपादनादपीत्याह । अजयोरि ति तथाच श्रुतिः । अजामेकां लोहितशुक्लकृष्णां बह्वीं प्रजां जनयंतीं सरूपाम् ॥ अजो ह्येको जुषमाणोऽनुशेते जहात्येनां भुक्तभोगामजोऽन्य इति । उभययुजां तु भवंति उभयं च तद्युज्य इति युक्संबद्धं परस्पराध्यस्तमिति यावत् । तेनासुभृतः प्राणाद्युपाधयो जीवा जायंत इत्यर्थः । जलबुद्बुदवदिति । यथा केवलेन जलेनानिलेन वा जलबुद्बुदा न भवंति किंतु मिलिताभ्यां तद्वत् । तत्र यथाऽनिलो निमित्तं जलमुपादानमेवमत्रापि प्रकृतिर्निमित्तं पुरुष उपादानम् । तस्माद्वा एतस्मादात्मान आकाशः संभूतः । सोऽकामयत बहुस्यां प्रजायेयेति । यथाऽग्नेः क्षुद्रा विस्फुलिंगा व्युच्चरंत्येवमेवास्मादात्मनः सर्वे प्राणाः सर्वे लोकाः सर्वे देवाः सर्वाणि भूतानि सर्व एवात्मानो व्युच्चरंतीत्यादिश्रुतिषु चेतनाचेतनप्रपंचस्य परमात्मोपादानत्वश्रवणात् । न च विका-

---

होण्याचा प्रसंग येईल आणि मोक्ष ह्मणजे जीवाच्या स्वरूपाचा नाशच असें होईल. सिद्धांतीं तर, स्वप्रकाश व आनंदमय अशा जीवात्म्याच्या अविद्येनें केलेल्या अनर्थांच्या निवृत्तीलाच मोक्ष असें ह्मटलें आहे, तेव्हां हा विरोध आहे अशी शंका कोणी घेईल तर, अंतःकरणादिक उपाधींच्या जन्मानेंच जीवांचें जन्म घडतें वस्तुत' घडत नाहीं असें सांगण्याकरितां शंका करितो कीं, जीवरूपानें उत्पत्ति प्रकृतीची घडत्ये किंवा पुरुषाची घडत्ये? अथवा दोघांचीहि घडत्ये? प्रकृतीची घडत्ये असें ह्मणावें तर जीवांना जडत्व प्राप्त होईल; पुरुषाची घडत्ये असें ह्मणावें तर पुरुषाला विकारित्वप्रसंग येईल ह्मणूनच दोघांचीहि घडत नाहीं असें सांगतो–(अजयोः प्रकृतिपुरुषयोः उद्भवः न घटते) 'अजामेकां' या श्रुतिनें अजत्व (जन्मरहितत्व) प्रतिपादन केलेल्या केवळ प्रकृतीची किंवा केवळ पुरुषाची जीवरूपानें उत्पत्ति घडत नाहीं (उभययुजा असुभृतः जलबुद्बुदवत् भवंति) प्रकृति व पुरुष या दोघांचा एकमेकांवर अध्यास झाला ह्मणजे त्यापासून प्राणादिक उपाधींनीं युक्त असे जीव, जसे

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

केवळ वाऱ्यानें व केवळ पाण्यानें बुडबुडे होत नाहींत, वर तीं दोन्ही एकत्र मिळालीं ह्मणजे होतात त्याप्रमाणें उत्पन्न होतात. बुडबुडे होण्याविषयीं जसा वारा हे निमित्तकारण असून पाणि हें उपादानकारण आहे त्याप्रमाणें जीवांच्या उत्पत्तीविषयीं प्रकृति हें निमित्तकारण असून पुरुष हें उपादानकारण आहे. एतावता प्रकृतिपुरुषांच्या ऐक्यानें जीवांची उत्पत्ति होत असून 'एकमेवाद्वितीयम्' इत्यादिक श्रुतींच्या बळानें व उत्पत्तीच्या श्रवणानें जीवाचें जन्म हें औपाधिक आहे, वास्तविक नाहीं, असें सिद्ध होतें. आतां जीवांच्या लयाचा प्रकार सांगतात—(**ततः ते इमे विविधनामगुणैः परमे त्वयि**) जन्म वास्तविक नाहीं ह्मणून ते हे जीव, आपल्या अनेकप्रकारच्या कार्योपाधींसहवर्तमान निरुपाधिक अशा तुझ्यामध्यें सुषुप्तीच्या व प्रळयाच्या वेळीं (**मधुनि अशेषरसा इव**) जसे मधामध्यें सर्वहि फुलांचे रस, विशेषेंकरून निरनिराळे ओळखतां येत नाहींत तथापि सामान्यपणें ओळखतां येतात त्याप्रमाणें सुषुप्तीच्या व प्रळयाच्या वेळीं

रित्वं परिणामानंगीकारात् । केचित्पुनः परिणाममंगीकृत्यात्मनो विकारभिया विपरीतं निमित्तोपादानभावमिच्छंति । सर्वथा तावत्प्रकृतिपुरुषैक्याद्भवतीति सिद्धम् । तदेकमेवाद्वितीयं ब्रह्म ॥ अजामेकामविनाशी वारेऽयमात्मेत्यादिश्रुतिबलादुत्पत्तिश्रवणाच्च जीवानामौपाधिकमेव जन्म न वस्तुत इत्युक्तम् । उपाधिलयेन परमात्मनि पुनर्लयश्रवणादपि न वास्तवं जन्मेत्याह । त्वयि त इति । त्वयि कारणात्मनि त इमे जीवाः । तत इति । यतो न वास्तवं जन्म तस्माद्विविधनामगुणैरनेकप्रकारकार्योपाधिभिः सह निलिल्युर्लीना बभूवुः । तत्र सुषुप्तिप्रलययोर्मधुन्यशेषरसा इव लीयंते । यथा मधुनि सकलकुसुमरसा विशेषतोऽनुपलक्ष्यमाणा अपि सामान्येनोपलक्ष्यंते एवं स्वापादौ विशेषमात्रलयात्कारणस्य विद्यमानत्वात्सामान्यतो वर्तंते । मुक्तौ तु कारणस्यापि लयात्त्वयि परमे निरुपाधौ सरित इवार्णवे लीयंत इति विवेकः । तथाच श्रुतयः । यथा सौम्य म-

नृषु तव मायया भ्रममम्मीष्ववगत्य भृशं त्वयि सुधियोऽभवे दधति भावमनुप्रभवम् ॥
कथमनुवर्ततां भवभयं तव यद्भ्रुकुटिः सृजति मुहुस्त्रिणेमिरभवच्छरणेषु भयम् ॥ ३२ ॥

धु मधुकृतो निस्तिष्ठंति नानात्ययानां वृक्षाणां रसान्समवहारमेकतां संगमयंति ॥ ते यथा तत्र न विवेकं लभंते अमुष्याहं वृक्षस्य रसोऽस्म्यमुष्याहं वृक्षस्य रसोऽस्मीत्येवमेव खलु सौम्येमाः सर्वाः प्रजाः सति संपद्य न विदुः सति संपद्यामह इति । यथा नद्यः स्यंदमानाः समुद्रेऽस्तं गच्छंति नामरूपे विहाय ॥ तथा विद्वान्नामरूपाद्विमुक्तः परात्परं पुरुषमुपैति दिव्यमित्याद्याः ॥ यस्मिन्नुच्चद्विलयमपि यद्भाति विश्वं लयादौ जीवोपेतं गुरुकरुणय। केवलात्मावबोधे ॥ अत्यंतांतं व्रजति सहसा सिंधुवत्सिंधुमध्ये मध्ये चित्तं त्रिभुवनगुरुं भावये तं नृसिंहम् ॥ १८ ॥ ३१ ॥ नन्वेवं तावत्परमेश्वराज्जीवा जायंते तद्वशेन च कर्माणि कुर्वंति पुनस्तत्र लीयंत इति संसारचक्रे परिभ्रमणमुक्तमिदानीं तन्निवृत्तये । परीत्य भतानि परीत्य लोकान्परीत्य सर्वाः प्रदिशो दिशश्च ॥ उपस्थाय प्रथमजामृतस्यात्मनात्मानमभिसंविवेशेत्याद्या भगवदनुवृत्तिं विदधतीत्याह । नृषु तव

तुझ्यामध्यें लय पावलेले जीव, विशेषरूपानें समजण्यांत आले नाहीं तरी त्यांचें कारण लिंगशरीर राहिल्यामुळें सामान्यरूपानें समजले जातात आणि मुक्तीच्या वेळीं तर— (**सरितः अर्णवे इव लिल्युः**) जशा नद्या, समुद्रामध्यें आपल्या नामरूपांचा त्याग करून ऐक्यभावानें लय पावतात त्याप्रमाणें सर्वजीव निरुपाधिक अशा तुझ्या ठिकाणीं आपला जीवभाव सोडून ऐक्यरूपानें लय पावतात ॥ ३१ ॥ याप्रमाणें परमेश्वरापासून जीव होतात आणि ते त्याच्या स्वाधीनपणानें कर्में करितात व पुन्हा त्याच्यामध्येंच लय पावतात असें संसारचक्रामध्यें परिभ्रमण सांगितलें. आतां त्या संसाराच्या निवृत्तीकरितां 'परीत्य भूतानि' इत्यादिक श्रुति भगवद्भाव सांगतात— (**अमीषु नृषु तव मायया अनुप्रभवं भ्रमं अवगत्य**) ह्या संसारी जीवांना तुझ्या मायेनें वारंवार जन्ममरणरूप भ्रम प्राप्त होतो असें जाणून, (**सुधियः अभवे त्वयि भृशं भावं दधति**) विवेकी पुरुष, संसारनिवर्तक अशा तुझेठिकाणीं श्रवणकीर्तनादिकेंकरून अत्यंत भक्ति करितात. बरें मग काय? तर—(**अनुवर्ततां**

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भवभयं कथं 'भवेत्') तुला शरण जाऊन तुझी भक्ति करणाऱ्या लोकांना संसारभय कसें प्राप्त होईल ? होण्यास नाहीं. (यत् तव भ्रुकुटिः त्रिणेमिः अभवच्छरणेषु भयं सृजति) कारण, तुझा भ्रुकुटिचालनरूप–उन्हाळा, पावसाळा व हिंवाळा असे तीन भाग असलेला संवत्सरात्मक काळ, ज्यांचें तूं रक्षण करित नाहींस त्यांनाच जन्ममरणादिरूप भय उत्पन्न करितो. ह्मणूनच विचारी पुरुष, तुझी भक्ति करितात ॥ ३२ ॥ ती भक्ति, मनाचा निग्रह केला असतां होत्ये, व तो मनोनिग्रह गुरूच्या आश्रयानें घडतो ह्मणून 'तद्विज्ञानार्थं स गुरुमेव' इत्यादिक श्रुति गुरूचा आश्रय करावा असें सांगतात– (हे अज, विजितहृषीकवायुभिः अतिलोलं

माययेति । नृषु जीवेष्वमीषु तव मायया भ्रममुक्तलक्षणमवगत्य ज्ञात्वा सुधियो भृशं त्वय्यभवे भवनिवर्तके भावं स्वभावमनुवृत्तिं दधति कुर्वंति । कीदृशं भ्रमम् । अनुप्रभवं अन्वनु प्रभवो यस्मिंस्तं भ्रमम् । ततः किमत आह । कथमिति । अनुवर्ततामनुवर्तमानानां त्वामेव शरणं भजतां भवभयं संसारभयं कथं भवेत् न कथंचिदपीत्यर्थः । कुतः । यद्यस्मात्तव भ्रुकुटिर्भ्रूभंगरूपस्त्रिणेमिस्तिस्रो नेमय इवावच्छेदाः शीतोष्णवर्षाकाला यस्य संवत्सरात्मकस्य कालस्य सः । अभवच्छरणेषु न भवान् शरणं रक्षिता येषां तेष्वेव भयं जन्ममरणादिलक्षणं सृजति करोति । अत एवंभूतं संसारमाकलय्य तन्निवृत्तये सुधियस्त्वयि भावं दधतीति ॥ संसारचक्रक्रकचैर्विदीर्णमुदीर्णनानाभवतापतप्तम् ॥ कथंचिदापन्नमिह प्रपन्नं त्वमुद्धर श्रीनृहरे नृलोकम् ॥ १९ ॥ ३२ ॥ स च भगवति भावो मनोनियमे सति भवति सोऽपि गुरूपसदनादिति गुरूपसदनं विदधति । तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत्समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम् ॥ आचार्यवान्पुरुषो वेद ॥ नैषा तर्केण मतिरापनेया प्रोक्ताऽन्येनैव सुज्ञानाय प्रेष्ठेत्याद्याः श्रुतय

विजितहृषीकवायुभिरदांतमनस्तुरगं य इह यतंति यंतुमतिलोलमुपायखिदः ॥ व्यसनशतान्विताः समवहाय गुरोश्चरणं वणिज इवाज संत्यकृतकर्णधरा जलधौ ॥ ३३ ॥ स्वजनसुतात्मदारधनधामधरासुरथैस्त्वयि सति किं नृणां श्रयत आत्मनि सर्वरसे ॥ इति सदजानतां मिथुनतो रतये चरतां सुखयति को न्विह स्वविहते स्वनिरस्तभगे ॥ ३४ ॥

इत्याह । विजितहृषीकवायुभिरिति । विजितानि हृषीकाणींद्रियाणि वायुश्च प्राणो यैस्तैरप्यदांतमनस्तुरगमदांतमदमितं मन एव तुरगो दुर्दमत्वसाम्यात्तं ये यंतुं नियंतुं यतंति प्रयतंते । अतिलोलमतिचंचलम् । गुरोश्चरणं समवहायानाश्रित्य ते उपायेषु खिद्यंते क्लिश्यंतीत्युपायखिदः संतो व्यसनशतान्विता बहुव्यसनाकुला इह संसारसमुद्रे संति तिष्ठंति दुःखमेव प्राप्नुवंतीत्यर्थः । हे अज अकृतकर्णधरा अस्वीकृतनाविका वणिजो यथा तद्वत् गुरुणोपदर्शितभगवद्भजनसुखानुभूतौ तु स्वत एव मनो निश्चलं भवति नान्यथेति भावः ॥ यदा परानंदगुरो भवत्पदे पदं मनो मे भगवँल्लभेत ॥ तदा निरस्ताखिलसाधनश्रमः श्रयेय सौख्यं भवतः कृपातः ॥ २० ॥ ३३ ॥ परीक्ष्य लोकान्कर्मचितान् ब्राह्मणो निर्वेदमायात् नास्त्यकृतः कृतेन ॥ तथा यदा सर्वे प्रमुच्यंते कामा येऽस्य हृदि श्रिताः ॥ अथ मर्त्योऽमृतो भवत्यत्र ब्रह्म समश्नुत इत्याद्या वैराग्यमंगं विदधतीत्याह । स्वजनसुतेति । आत्मा देहः । धाम गृहम् । असुः प्राणः । स्वजनादिभिः किम् । सर्वरसे सर्वे रसाः सुखानि विद्यंते यस्मिंस्तस्मिंस्त्वयि परमानंदे एतस्यैवानंदस्या-

अदांतमनस्तुरगं यंतुं ये यतंति) हे जन्मरहिता देवा, ज्यांनीं आपल्या इंद्रियांचा व प्राणांचा जय केला आहे त्या योग्यांनींहि वश करून घेण्यास अशक्य अशा आपल्या अतिचंचळ मनोरूपी घोड्यास वश करून घेण्याकरितां जे यत्न करितात (ते गुरोः चरणं समवहाय उपायखिदः व्यसनशतान्विताः 'संतः') ते गुरूच्या चरणांचा आश्रय न करितां दुसऱ्या उपायांमध्यें क्लेश भोगित होत्साते, शेंकडो विघ्नांनीं पराभूत होऊन, (अकृतकर्णधराः जलधौ इव इह संति) जसे नांवाड्याचा आश्रय न करणारे लोक, समुद्रामध्यें दुःख पावतात त्याप्रमाणें या जन्ममरणरूप संसारामध्यें दुःख पावत आहेत ॥ ३३ ॥ आतां– 'परीक्ष्य लोकान् कर्मचितान्' इत्यादिक दुसऱ्या कितीएक श्रुति, वैराग्य सांगतात कीं,– (श्रयतः सर्वरसे त्वयि आत्मनि सति) तुझी सेवा करणाऱ्या पुरुषाला सर्वसुखांचें स्थान अशा पर-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मानंदरूपी तुज आत्म्याचा लाभ झाला असतां,–(स्वजनसुतात्मदारधनधामधरासुरथैः किम्) स्वजन, पुत्र, देह, स्त्री, धन, गृह, भूमि, प्राण व रथ इत्यादिक अतितुच्छ सुखसाधनांनीं कोणता उपयोग होणार आहे ? कोणताच नाहीं. (इति सत् अजानतां मिथुनतः रतये चरतां नृणां) असें परमार्थसुख न जाणणाऱ्या व स्त्रीबरोबर संगत होऊन रतिसुखाकरितां घरामध्यें राहणाऱ्या पुरुषांना,–(स्वविहते स्वनिरस्तभगे इह को नु सुखयति) स्वतःच नश्वर व स्वतःच गतसार अशा या संसारामध्यें कोणता बरें स्वजनादिक अर्थ सुख देणार आहे ? कोणताच नाहीं ॥ ३४ ॥ याप्रमाणें गुरूपदेशानें आत्मतत्त्व जाणून सारासार विवेकानें विरक्त झालेल्या पुरुषाला सत्संगतीनें तत्त्वसाक्षात्कार होतो याविषयीं 'श्रोतव्यो मंतव्यः' इत्यादिक श्रुति सदाचार सांगतात–('ये' विमदाः भवत्पदां-

न्यानि भूतानि मात्रामुपजीवंतीति श्रुतेः । श्रयतस्त्वां सेवमानस्य पुंस आत्मनि सति नृणां तुच्छैरेतैः किं क उपयोग इति सत् सत्यं परमार्थसुखमजानतामतएव मिथुनतः स्त्रिया मिथुनीभूय रतये मायासुखाय चरतां प्रवर्तमानानाम् । कर्मणि षष्ठ्यौ । अजानतश्चरतः पुरुषान् को न्वर्थः सुखयत्यानंदयति । न कोऽपीत्यर्थः । इह संसारे । कथंभूते । स्वविहते स्वत एव नश्वरे । स्वनिरस्तभगे स्वत एव गतसारे । पाठांतरे तु कोन्वित्यस्यैतद्विशेषणद्वयम् । अतस्त्वद्भजनमेवोचितमित्यर्थः ॥ भजतो हि भवान्साक्षात्परमानंदचिद्घनः ॥ आत्मैव किमतः कृत्यं तुच्छदारसुतादिभिः ॥ २१ ॥ ३४ ॥ एवं गुरूपदेशेन तत्त्वमवगम्य सारासारविवेकेन च सर्वतो निर्विद्य तदेव महत्संगेनोपपत्तिभिः सम्यगवधारयितुं तीर्थसदनानि मुनयः पर्यटंतीति श्रोतव्यो मंतव्य इत्यादिश्रुत्यर्थमाह । भुवि पुरुपुण्यतीर्थसदनानीति । ते उक्तलक्षणा ऋषयो विमदा निरहंकारा यतो भवत्पदांबुजहृदः

भुवि पुरुपुण्यतीर्थसदनान्यृषयो विमदास्त उत भवत्पदांबुजहृदोऽघभिदंघ्रिजलाः ॥
दधति सकृन्मनस्त्वयि य आत्मनि नित्यसुखे न पुनरुपासते पुरुषसारहरावसथान् ॥ ३५ ॥

भवतः पदांबुजं हृदि येषां तेऽतः स्वयमेवाघभिदंघ्रिजलं येषां ते उत अपि तथाविधा अपि पुरूणि बहूनि पुण्यानि तीर्थानि सदनानि च क्षेत्राणि तान्येवोपासते सेवंते प्रायस्तत्रैव महत्संगो भवतीति । अथवा गुरु अधिकं भगवद्भजनलक्षणं पुण्यं येषां तानि च तानि तीर्थानि च गुरवो महांत इत्यर्थः । तेषां सदनान्याश्रमान् । यथाहामरसिंहः । निपानागमयोस्तीर्थमृषिजुष्टे जले गुराविति । न पुनः पुरुषसारहरावसथानुपासते पुरुषाणां सारं विवेकस्थैर्यधैर्यक्षमाशांतिप्रमुखं हरंतीति तथा ते च ते आवसथा गृहास्तान् । न च तेषां गृहादिभवकुत्सितसुखापेक्षेत्याह । दधति सकृन्मनस्त्वयि य आत्मनि नित्यसुख इति । सकृदपि त्वयि ये मनो दधतीति तेऽपि गृहाद्यासक्ता न भवंति किं पुनरेवंभूता इत्यर्थः ॥ मुंचन्नंगतदंगसंगमनिशं त्वामेव संचिंतयन्संतः संति यतो यतो गतमदास्तानाश्रमानावसन् ॥ नित्यं तन्मुखपंकजाद्विगलितत्वत्पुण्यगाथामृतस्रोतःसंप्लवसंप्लुतो नरहरे न स्यामहं देहभृत् ॥ २२ ॥ ३५ ॥

बुजहृदः अघभिदंघ्रिजलाः ते उत भुवि पुरुपुण्यतीर्थसदनानि 'उपासते') जे निरहंकारी, तुझ्या चरणकमळावें हृदयामध्यें ध्यान करणारे, व आपल्या चरणोदकानें लोकांच्या पापांचा नाश करणारे ऋषि आहेत तेसुद्धां सत्समागम होण्याकरितां भूमीवर असलेल्या बहुत पुण्यकारक तीर्थांचें, भगवंताच्या मंदिरांचें व भगवत्क्षेत्रांचें सेवन करितात. कारण, तेथेंच बहुतकरून सत्समागम घडतो. ('ते' पुनः पुरुषसारहरावसथान् न उपासते) ते ऋषि, पुन्हा पुरुषांच्या विवेक, स्थैर्य, धैर्य, क्षमा, दया, शांति इत्यादिकांचा नाश करणाऱ्या घरांचें सेवन करीत नाहींत. ('हे प्रभो' ये नित्यसुखे त्वयि आत्मनि सकृत् मनः दधति) हे प्रभो, जे ऋषि, नित्यसुखरूपी तुज आत्म्याचेठिकाणीं एकवार तरी आपलें मन धारण करितात तेसुद्धां विवेकादिकांचा नाश करणाऱ्या घरांचें सेवन करीत नाहींत. मग पूर्वीं ॥२८१॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सांगितलेले महासमर्थ ऋषि घरांवें सेवन करीत नाहींत हें काय सांमर्वे ? ॥ ३५ ॥ आतां कितीएक श्रुति, प्रश्नोत्तरांच्या योगानें मननपूर्वक तत्त्व निश्चयाचा प्रकार सांगतात– त्यांत प्रथम प्रश्न– (इदं सत्) , 'हा मी व हें माझें इत्यादिप्रकारें प्रतितीला येणारें ' हें सर्व द्वैत, सत्यरूपी आहे. कारण, (सतः उत्थितम्) ब्रह्मरूप सत्यवस्तूपासून उत्पन्न झालें आहे म्हणून. जें वस्तु ज्यापासून उत्पन्न होतें तें तद्रूपीच असतें, असें सर्वांच्या पाहण्यांत आहे. जसें सुवर्णापासून उत्पन्न झालेलें कुंड लादिक वस्तु सुवर्णच असतें त्याप्रमाणें. (इति चेत्) असा जर मीमांसकांचा प्रश्न असेल तर त्याचें उत्तर– (ननु तर्कहतं) हें तुमचें अनुमान विचार केला असतां बाधित होतें. कसें, म्हणाल तर– तुह्मी द्वैताचा सत्यवस्तूशीं अभेद करूं इच्छितां, परंतु तो सिद्ध करण्याकरितां जें तुह्मी कारण सांगितलें त्यावरूनच तो सिद्ध न होतां उलट द्वैताचा भेद सिद्ध होतो. तो असाकीं, सत्यवस्तूपासून उत्पन्न झालें इतकें सांगण्यानेंच त्याचा सत्यवस्तूहून निराळेपणा समजून येतो आणि सत्याहून निराळें तें असत्य असें सिद्ध होतें. तेव्हां तुमचें बोलणें बरोबर नाहीं. पुन्हा प्रश्न–आह्मी अभेद करूं इच्छित नाहीं तर भेदाचा निषेध करूं इच्छितों. तो असा कीं, द्वैत, सत्याहून निराळें नाहीं. कारण, तें सत्यापासून झालें आहे. जें ज्यापासून होतें तें त्याहून निराळें नसतें. जसें सुवर्णापासून झालेलें कुंडल सुवर्णाहून निराळें नसतें तसें. याप्रमाणें भेदाचा निषेध केल्यानें अभेदच

नन्वाम्नायस्य क्रियार्थत्वादानर्थक्यमतदर्थानाम् । तद्भूतानां क्रियार्थेन समन्वय इति तत्र तत्र जैमिनिना वेदस्य क्रियापरत्वाभिधानादुपनिषदामपि तदेव युक्तम् । यथोक्तं तंत्रवार्तिककृता । एतेन क्रत्वर्थकर्तृप्रतिपादनेनोपनिषदां नैराकांक्ष्यं व्याख्यातमिति न । एकमेवाद्वितीयं ब्रह्म ॥ विज्ञानमानंदं ब्रह्म ॥ अचक्षुरश्रोत्रमित्येवं तद्विपरीतात्मप्रतिपादनात् । नह्यद्वितीयपरमानंदरूपस्य कर्मांगत्वं युज्यते । अननुमतं चैतद्वार्तिककृतः । कथम् । सर्वत्रैव हि विज्ञानं संस्कारत्वेन गम्यते ॥ परांगं चात्मविज्ञानादन्यत्रेत्यवधा-

सत इदमुत्थितं सदिति चेन्ननु तर्कहतं व्यभिचरति क्वच क्वच मृषा न तथोभययुक् ॥

येतामिति तेनैवोक्तत्वात् । एतदर्थमेव मननाय मुनयः पर्यटंतीत्युक्तम् । तत्र तावद्द्वैतस्य सत्यत्वे भवेदप्येवं तदेव तु न संभवतीति प्रश्नोत्तराभ्यां मननेन तत्त्वावधारणप्रकारमाह । सत इदमुत्थितं सदिति चेदिति । इदं विश्वं धर्मि । सदिति साध्यो धर्मः । सत उत्पन्नत्वाद्धेतुः । यद्यत उत्पन्नं तत्तदात्मकमेव दृष्टम् । यथा कनकादुत्पन्नं कुंडलादि तदात्मकं तद्वदिति । तत्र यदि सदभेदः साध्यते तदाऽपादानत्वनिर्देशेनैव भेदप्रतीतेर्विरुद्धो हेतुरित्याह । ननु तर्कहतमिति । ननु नाभेदं साधयामः किंतु तदुत्पन्नत्वेन कुंड-

---

सिद्ध होतो ना ? याचें उत्तर– (व्यभिचरीत क्वच) जें ज्यापासून उत्पन्न होतें तें त्याहून भिन्न नाहीं हें तुमचें म्हणणें सदोदित जुळत नाहीं. पहा– पित्यापासून झालेला पुत्र व मुद्गरापासून झालेला घटप्रध्वंस (घटभंग) हे त्यांहून निराळे नसतात काय ? असतातच. पुन्हा प्रश्न–जी वस्तु ज्या उपादानापासून उत्पन्न होते ती वस्तु त्या उपादानाहून कधींच निराळी राहत नाहीं. पहा– कुंडल हें सुवर्णरूप उपादानापासून झालेलें आहे तें त्या सुवर्णाहून निराळें राहत नाहीं. पिता आणि मुद्गर हे पुत्र आणि घटप्रध्वंस यांचें उपादानकारण नाहींत, तर निमित्तकारण आहेत; म्हणून आमच्या सांगण्यांत कांहींच बाध येत नाहीं. याचें दूषणरूप उत्तर–(क्वच मृषा) एखादेठिकाणीं कार्य खोटेंच असतें, म्हणजे जी वस्तु ज्या उपादानापासून होते ती वस्तु त्या उपादानाहून भिन्न नसते हें तुमचें अनुमान कायम राहणारें नव्हे. कारण, रज्जुरूप उपादानापासून झालेला सर्प रज्जूहून भिन्न असून, रज्जु सत्य असतां तो मिथ्या असतो. तो खरा म्हणावा तर कुंडलाचा जसा बाध होत नाहीं त्याप्रमाणें सर्पाचाहि बाध होऊं नये तो होतो कीं नाहीं ? होतोच. यावर पुन्हा प्रश्न– रज्जूवर भासलेल्या सर्पाला केवळ रज्जूच उपादान कारण नाहीं, तर त्याच्याबरोबर दुसरें अज्ञानहि कारण आहे; म्हणून अज्ञानसहित रज्जूपासून झालेल्या सर्पाला मिथ्यात्व घडतें, परंतु केवळ सत्य ब्रह्म उपादानापासून झालेल्या जगाला मिथ्यात्व येणार नाहीं म्हणून जगद्रूपी द्वैत हें मिथ्या नव्हे; सत्य आहे. याचें दूषणरूप उत्तर– (उभययुक न तथा) द्वैतप्रपंचहि, सत्यरूप ब्रह्म आणि त्याच्याबरोबर असलेली अविद्या ह्या दोन

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

उपादानांपासून झालेला असल्यामुळें रज्जूवर भासलेल्या सर्पाप्रमाणेंच मिथ्या ठरतो; सत्य ठरत नाहीं. पुन्हा प्रश्न– या सांगितलेल्या कारणानें प्रपंचाचें सत्यत्व न घडो परंतु दुसऱ्या कारणानें आह्मी प्रपंचाचें सत्यत्व सिद्ध करितों. तें असें कीं,–हें द्वैत सत्य आहे. कारण, याच्यापासून ‘ घागरीनें पाणी आणणें इत्यादिक ’ कार्यभाग होतात. जें सत्य नाहीं त्यापासून कार्यभाग होत नाहींत. जसें शिंपीवर भासलेलें रुपें सत्य नाहीं. कारण, त्यापासून कार्यभाग होत नाहींत. याचें उत्तर– (व्यवहृतये विकल्पः इषतः) ‘ खोट्या रुप्यानेंहि केव्हां केव्हां दागिनेवगैरे व्यवहार चाललेला पाहण्यांत येतो, खरेंच पदार्थ सदोदित व्यवहारास पाहिजेत असें नाहीं, ह्मणून प्रापंचिक व्यवहार चालण्याकरितां द्वैतरूपी भ्रम घ्यावा हें आह्मांस इष्ट आहे. पुन्हा प्रश्न– जी वस्तु एकेजागीं खरी असत्ये तिचा दुसरेजागीं आरोप होणें याला भ्रम असें ह्मणतात. जसा सर्प एके जागीं खरा असून त्याचा रज्जूवर आरोप होतो तो भ्रम होय; तसा ब्रह्माचेठिकाणीं द्वैताचा भ्रम होण्यास दुसरेठिकाणीं द्वैत सत्य असलेंच पाहिजे. आकाशपुष्प अगदींच खोटें आहे ह्मणून त्याचा दुसरेठिकाणीं आरोप होत नाहीं, तसें द्वैत अगदींच खोटें असतें तर त्याचा ब्रह्माचेठिकाणीं आरोप झाला नसता आणि तो तर झाला

लादिवद्भेदं प्रतिषेधयामः । तत्राभेद एव स्यादित्याशंक्यानैकांतिकत्वेन दूषयति । व्यभिचरति क्वचेति । पितृपुत्रादिषु मुद्गरघटप्रध्वंसादिषु च तथादर्शनादिति भावः । ननु तदुत्पन्नत्वं नाम तदुपादानत्वं नतु तन्निमित्तत्वमतो नानैकांतिकत्वमित्याशंक्य दूषयति । क्व च मृषेति । गुणोपादानस्यापि फणिनो न गुणत्वं किंतु मिथ्यात्वम् । अन्यथा कुंडलादिवदबाधप्रसंगात् । अतः पुनरप्यनैकांतिकत्वमेवेति भावः । ननु न तत्र केवलं गुणमात्रं फणिन उपदानं किंत्वविद्यायुक्तम् । तथाभूतस्यावस्तुत्वाच्चोक्तं फणिनो मिथ्यात्वमित्याशंक्य तत्तुल्यमत्रापीति दूषयति । न तथोभययुपीति । अयमर्थः अत्राप्यविद्यायुक्तस्यैव सत उपदानत्वम् । एवंभूतस्य च न वस्तुसत्त्वम् । अतः सदुपादानत्व-

व्यवहृतये विकल्प इषितोंऽधपरंपरया भ्रमयति भारती त उरुवृत्तिभिरुक्थजडान् ॥ ३६ ॥

प्रसिद्धमिति न वस्तुसत्त्वं प्रपंचस्येति । ननु माभूदनेन हेतुना प्रपंचस्य सत्त्वं हेत्वंतरेण तु साधयामः । तथाहि सदिदमर्थक्रियाकारित्वात् । न यदेवं न तदेवं यथा शुक्तिरजतमिति तत्राह । व्यवहृतये विकल्प इषित इति । व्यवहारायार्थक्रियार्थं विकल्पो भ्रम इषित इष्ट एव । कूटकार्षापणादिनाऽपि क्वचिद्व्यवहारदर्शनात् । नन्वेकत्र सतोऽन्यत्रारोपो भ्रमः प्रसिद्धोऽत्यंतासत्त्वे कथं प्रपंचो भ्रमः स्यात् सत्त्वे वा नाद्वैतसिद्धिः । उक्तं च भट्टैः । अध्यस्यते खपुष्पत्वमसत्कथमवस्तुनि ॥ प्रज्ञातगुणसत्ताकमध्यारोप्येत वा न वेति नेत्याह । अंधपरंपरयेति अंधपरंपरया यो विकल्प इत्यन्वयः । अयं भावः । संस्कारजन्यो भ्रमः संस्कारसिद्धये पूर्वप्रतीतिमात्रमपेक्षते न वस्तुसत्त्वम् । प्रतीतौ

आहे तेव्हां द्वैत सत्य असें ठरून तुमचें अद्वैतच सत्य असें सिद्ध होत नाहीं. यांचें खंडनरूप उत्तर– (अंधपरंपरया) अंधपरंपरान्यायानें जो भ्रम (आरोप) तो व्यवहार चालण्याकरितां आह्मांस इष्ट आहे, ह्मणजे या वडाच्या झाडावर मी पिशाच पाहिलें आहे, असें एका आंधळ्यानें दुसऱ्या आंधळ्यास सांगितलें, त्यानें तिसऱ्यास, त्यानें चवथ्यास अशा परंपरेनें पिशाचाच्या ज्ञानासारखा जो निर्विवाद परिपाठ चालू असतो त्या परिपाठास अंधपरंपरान्याय असें ह्मणतात. कोणताहि भ्रम झाला ह्मणजे तो पूर्वसंस्कारानें उत्पन्न झालेला असतो. तो भ्रम, आपणांत संस्कार आहे असें सिद्ध करण्याकरितां भ्रम होणाची वस्तु (सर्पादिक) पूर्वीं होती इतक्या प्रसिद्धीची मात्र अपेक्षा बाळगितो, वस्तूच्या खरेपणाची अपेक्षा बाळगीत नाहीं. वस्तु खरी नसली तरी तिची एकदां प्रसिद्धि झाली ह्मणजे तो भ्रम उत्तरोत्तर चालतोच. इंद्रियांना अगोचर असेंहि ब्रह्म, स्वप्रकाशपणानें स्फुरण पावत असल्यामुळें, तेथें ‘ जसा इंद्रियांना अगोचर व साक्षिभास्य आकाशांमध्यें काळेपणाचा व पालथ्या कढईच्या आकाराचा भास होतो त्याप्रमाणें ’ द्वैतरूप आरोप भासणें हें योग्यच आहे; एतावता ब्रह्माचेठिकाणीं अनादिकाळापासून खोट्या द्वैताची जी प्रतीति चालत आली आहे तींत प्रथम प्रथम भासलेल्या द्वैतावर उत्तरोत्तर द्वैताचा भास होण्याचा संभव आहे. द्वैताची प्रतीति होत्ये ती वस्तुतः खरी नसून तिच्या खरेपणाला कारण, ब्रह्माची सत्ता मात्र खरी

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आहे त्यावरून अद्वैतच सत्य असें सिद्ध होतें. प्रपंचव्यवहार चालतो तो अंधपरंपरान्यायानें खोटाच चालत असल्यामुळें त्याच्या सत्यतेविषयीं जो अर्थक्रियाकारीपणाचा हेतु तुह्मी सांगितला तो निष्फळ आहे. यावर प्रश्न– 'अक्षय्यं ह वै चातुर्मास्ययाजिनः सुकृतं भवति' इत्यादिक श्रुतींनीं चातुर्मास्य यज्ञ करणारास अक्षय फळ प्राप्त होतें असें कर्मफळ नित्य सांगितलें आहे तें मिथ्या कसें होईल? त्यापेक्षां वेदानें प्रतिपादन केलेलें द्वैत सत्य आहे. याचें खंडनरूप उत्तर–(हे 'भगवन्' ते भारती उरुवृत्तिभिः उक्थजडान् भ्रमयन्ति) हे भगवंता, तुझी वेदलक्षणवाणी, गौणी व लक्षणा इत्यादिक वृत्तींच्या योगानें कर्मश्रद्धेच्या भाराचा दाब बसल्यामुळें मंदबुद्धि झालेल्या लोकांना, मोहित करीत आहे. याचा भाव असा कीं–वेद, कर्मफळाला नित्य असें मानीत नाहीं, तर लक्षणावृत्तीच्या योगानें कर्मफळाची प्रशस्ती मात्र करितो. असें न ह्मणावें तर–'तद्यथेह कर्मचितो लोकः क्षीयते' इत्यादिक दुसऱ्या श्रुतींशीं विरोध येतो. ह्मणून वेद सकाम पुरुषांकडून अंतःकरणशुद्ध्यर्थं कर्में करविण्याकरितां कर्मफळाची स्तुति करून, त्यांना कर्मांची आवड उत्पन्न करितो ॥ ३६ ॥ याप्रमाणें प्रपंचाच्या सत्यत्वाविषयीं साधक नाहीं असें सांगितलें. आतां त्याच्या अस-

सत्यां वस्तुसत्त्वाभावेन ब्रह्मव्यतिरेकादर्शनात् । अतोऽनादित्वात्पूर्वपूर्वभ्रमदृष्टस्योत्तरोत्तर आरोपो भविष्यति । अंधपरंपरान्यायेन व्यवहारः सेत्स्यतीत्यप्रयोजको हेतुरिति । ननु अक्षय्यं ह वै चातुर्मास्ययाजिनः सुकृतं भवति ॥ अपामसोमममृता अभूमेत्यादिभिः कर्मफलस्य नित्यत्वप्रतिपादनादसत्त्वं न घटते नहि नित्यं वस्त्वसद्भवति । तस्माद्वेदप्रतिपादितत्वाद्द्वैतं सदेवेत्याशंक्याह । भ्रमयतीति । हे भगवंस्ते भारती वेदलक्षणा उरुवृत्तिभिर्बह्वीभिर्गौणलक्षणादिवृत्तिभिरुक्थजडान्कर्मश्रद्धाभराक्रांतमंदमतीन् भ्रमयति मोहयति । अयं भावः । नहि वेदः कर्मफलं नित्यमभिप्रैति किंतु लक्षणया प्राशस्त्यमात्रं विध्येकवाक्यत्वात् । अन्यथा वाक्यभेदप्रसंगात् । तद्यथेह कर्मचितो लोकः क्षीयते ॥

नयदिदमग्र आस न भविष्यदतो निधनादनुमितमंतरा त्वयि विभाति मृषैकरसे ॥
अत उपमीयते द्रविणजातिविकल्पपथैर्वितथमनोविलासमृतमित्यवयंत्यबुधाः ॥ ३७ ॥

एवमेवामुत्र पुण्यचितो लोकः क्षीयत इतिन्यायोपबृंहितश्रुत्यंतरविरोधाच्च । अतः कर्मजडानामिदं भ्रममात्रमिति । एतेनैव तस्माद्वा एतस्मादात्मन आकाशः संभूत इत्यादीनामप्यन्यपरत्वं दर्शितं भवति ॥ उद्भूतं भवतः सतोऽपि भुवनं सन्नेव सर्पः स्रजः कुर्वत्कार्यमपीह कूटकनकं वेदोऽपि नैवं परः ॥ अद्वैतं तव सत्परं तु परमानंदं पदं तन्मुदा वंदे सुंदरमिंदिरानुत हरे मा मुंच मामानतम् ॥ २३ ॥ २६ ॥ तदेवं प्रपंचस्य सत्त्वे साधकं नास्तीत्युक्तं इदानीमसत्त्वे सृष्टिप्रलयश्रुतयः । यतो वा इमानि भूतानि जायंत इत्याद्यास्तन्मूलं चानुमानं प्रमाणमित्याह । न यदिदमिति । यद्यस्मादिदं विश्वमग्रे सृष्टेः पूर्वं न आस नासीत् सदेव सोम्येदमग्र आसीत् ॥ आत्मा वा इदमेक एवाग्र आसीदित्यादि

त्यत्वाविषयीं 'यतो वा इमानि भूतानि जायंते' इत्यादिक सृष्टिप्रलयश्रुति प्रमाण आहेत व अनुमानहि आहे असें सांगतात–(यत् इदं अग्रे न आस निधनात् अनु न भविष्यत्) ज्याअर्थीं हें जग सृष्टीच्या पूर्वीं नव्हतें आणि प्रळयानंतरहि राहणार नाहीं. (अतः अंतरा एकरसे त्वयि मृषा विभाति 'इति' मितम्) त्याअर्थीं मध्यावस्थेमध्येंहि केवळ एकरसरूप तुझ्या स्वरूपीं मिथ्यारूपत्वेंकरून भासतें असें निश्चित आहे. (अतः द्रविणजातिविकल्पपथैः उपमीयते) ह्मणून मृत्तिका, सुवर्ण, लोह इत्यादिक पदार्थांच्या घट, कुंडल व कुदळ इत्यादिक भेदांच्या प्रकारांनीं सारखेपणानें याचें निरूपण करितात. ह्मणजे जशीं घट, कुंडल व कुदळ इत्यादिक कार्यरूपी पदार्थांचीं तीं तीं नांवें मात्र उच्चारण्यांत येतात परंतु मृत्तिका सुवर्ण इत्यादिकच खरीं आहेत त्याप्रमाणें आकाशादिक कार्यें हीं नांवें मात्र असून ब्रह्मरूपच सत्य आहे. एतावता या प्रपंचाच्या खरेपणाविषयीं प्रमाण नसून खोटेपणाविषयीं पुष्कळ प्रमाणें असल्यामुळें (वितथमनोविलासं ऋतं इति अवयंति अबुधाः) व्यर्थ आणि मनोविलासमात्र अशा या प्रपंचाला जे कोणी पुरुष, खरा आहे असें मानतात ते अज्ञानी होत. याविषयीं असें अनुमान

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करावें कीं, हें द्वैत सत्य नाहीं. कारण, हें आदि व अंतीं रहित नाहीं, विकारी आहे आणि दृश्य आहे ह्मणून, जें आदी व अंतीं राहत नाहीं, विकारी व दृश्य असतें तें सत्य नव्हे. जसें शिंपीवर भासलेलें रुपें आदीं व अंतीं नसतें, विकारी व दृश्य असतें ह्मणून सत्य नव्हे त्याप्रमाणें. जी वस्तु आदीं व अंतीं असत्ये, विकारी व दृश्य नसत्ये ती सत्य आहे. जसा आत्मा द्वैताच्या आदीं व अंतीं असतो, विकारी व दृश्य नाहीं ह्मणून सत्य आहे ॥ ३७ ॥ आतां जर प्रपंच ह्मणून मुळींच नाहीं, असें ह्मटलें तर त्या मिथ्याभूत प्रपंचाशीं चैतन्याच्या संबंधाचा लेशहि नाहीं असें सिद्ध होईल आणि तसें झालें ह्मणजे मग जीवानें तरी काय अपराध केला आहे कीं, ज्याच्या योगानें तो संसार पावतो, किंवा ईश्वरानें तरी काय मोठें पुण्य आहे कीं, ज्याच्या योगानें तो नित्यमुक्त आहे आणि त्यावेळीं कर्मकांडाचा तरी विषय काय ? अशी शंका

श्रुतेः । न च निधनात्प्रलयादनु अनंतरं भविष्यद्भविष्यति । नासदासीन्नो सदासीत्तदानीमित्यादिश्रुतेः । अतः कारणादंतरा मध्येऽप्येकरसे केवले त्वयि मृषा मिथ्यारूपमेव विभातीति मितं निश्चितम् । यत एवमतः श्रुत्या द्रविणजातिविकल्पपथैर्द्रविणजातीनां द्रव्यमात्राणां मृल्लोहकार्ष्णायसरूपाणां विकल्पा भेदा घटकुंडलादयस्तेषां पंथानो मार्गाः प्रकारास्तैरुपमीयते सदृशतया निरूप्यते । यथा तत्र कार्याकाराणां नामधेयमात्रताकारणं मृदाद्येव तु सत्यं तथाऽत्राप्याकाशादीनां नाममात्रता ब्रह्मैव सत्यम् । तथाच श्रुतिः । यथा सौम्यैकेन मृत्पिंडेन सर्वं मृन्मयं विज्ञातं भवति ॥ वाचारंभणं विकारो नामधेयं मृत्तिकेत्येव सत्यम् ॥ यथा एकेन लोहमणिना सर्वं लोहमयं विज्ञातं स्यात् ॥ यथा एकेन नखनिकृंतनेन सर्वं कार्ष्णायसमित्यादि । तस्मादस्य सत्त्वे प्रमाणाभावादसत्त्वे प्रमाणस्य विद्यमानत्वाद्वितथमनोविलासमृतं सत्यमिति ये अवयंति जानंति तेऽबुधाः अज्ञा इत्यर्थः । अत्रैवं प्रयोगः । विवादाध्यासितं न सत् । आद्यंतयोरविद्यमानत्वाद्विकारित्वाद्दृश्यत्वाच्च शुक्तिरजतादिवत् इत्यन्वये दृष्टांतः । आत्मवच्चेति व्यतिरेके

स यदजया त्वजामनुशयीत गुणांश्च जुषन्भजति सरूपतां तदनु मृत्युमपेतभगः ॥
त्वमुत जहासि तामहिरिव त्वचमात्तभगो महसि महीयसेऽष्टगुणितेऽपरिमेयभगः ॥ ३८ ॥

दृष्टांतः ॥ मुकुटकुंडलकंकणकिंकिणीपरिणतं कनकं परमार्थतः ॥ महदहंकृतिखप्रमुखं तथा नरहरे न परं परमार्थतः ॥ २४ ॥ ३७ ॥ ननु यदि प्रपंचो नाम नास्त्येव तदाऽसता तेन न चैतन्यस्य संबंधगंधोऽपि तर्हि किमपराद्धं जीवेन यतोऽयं संसरति किंवा बहुपुण्यमीश्वरस्य यतो नित्यमुक्तः किं विषयं च तदा कर्मकांडमित्यपेक्षायां जीवेश्वरविशेषम् । द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषस्वजाते ॥ तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्त्यनश्नन्नन्यो अभिचाकशीति ॥ अजामेकां लोहितशुक्लकृष्णामित्याद्या वदंतीत्याह । स यदजयेति । स तु जीवो यद्यस्मादजया मायया अजामविद्यामनुशयीतालिंगेत्ततो गुणांश्च देहेंद्रियादीन् जुषन्सेवमान आत्मतयाऽध्यस्यंस्तदनु तदनंतरं सरूपतां तद्धर्मयोगं च जुषन्नपेतभगः पिहितानंदादिगुणः सन् मृत्युं संसारं भजति प्राप्नोति । तद्विषयमेव च कर्मकांडमिति भावः । त्वमुत त्वं तु जहासि तामजां मायाम् । ननु सा मय्येवास्ति कथं त्यागस्तत्राह । अहिरिव त्वचमिति । अयं भावः । यथा भुजंगः स्वगतमपि कंचुकं गुणबुद्ध्या नाभिमन्यते तथा त्वमजाम् । नहि निरंतराह्लादिसंवित्कामधेनुवृंदपतेरजया

आली असतां ‘ द्वा सुपर्णो ’ इत्यादिक श्रुति जीवेश्वरांचा विशेष सांगतात– (हे प्रभो सः यत् अजया अजां अनुशयीत) हे प्रभो, तो जीव, जेव्हां तुझ्या मायेनें मोहित होऊन आपल्या अविद्येला आलिंगन करितो तेव्हां (गुणान् जुषन् तदनुसरूपतां ‘ जुषन् ’ अपेतभगः मृत्युं भजति) देहेंद्रियादिक जीं गुणकार्यें त्यांना हें आपलें स्वरूपच आहे असें मानीत होत्साता व नंतर त्या देहेंद्रियादिकांच्या धर्मांनीं युक्त होत्साता आपल्या आनंदादिक गुणांचें आवरण पावून जन्ममरणादिरूप संसार पावतो. त्याच्या करितांच कर्मकांडाची अपेक्षा आहे. आणि (आत्तभगः त्वं उत अहिः त्वचं इव तां जहासि) नित्यप्राप्तैश्वर्य असा तूं तर, जसा सर्प आपणावर असलेल्या त्वचेचा (कांतीचा) ही चांगली आहे व माझी आहे असा अभिमान धारण करित नाहीं त्याप्रमाणें त्या मायेचा ‘ ही चांगली आहे अशा ॥२८३॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

बुद्धीनें ' स्वीकार करीत नाहींस तर तिची उपेक्षाच करितोस आणि (अपरिमेयभगः अष्टगुणिते महसि महीयसे) अपरिमित ऐश्वर्यानें युक्त होत्साता, अणिमादिक अष्टैश्वर्यांनीं युक्त अशा सर्वोत्कृष्ट ऐश्वर्याचेठिकाणीं पूज्य होतोस ह्मणूनच नित्ययुक्त आहेस ॥ ३८ ॥ याप्रमाणें सांगितलेल्या साधनसमुदायानें जे भगवंताचें सेवन करितात ते मृत्यूला तरून जातात व इतर लोक संसार पावतात असें सांगितलें. आतां जे बाह्यसंगतीचा त्याग करून भगवन्मार्गाचेठिकाणीं प्रवृत्त झाले असतांहि पुन्हा वमनाचें भक्षण करण्याप्रमाणें विषयांचें सेवनच करितात त्यांना भगवंताची प्राप्ति होत नाहीं व या लोकीं सुखहि मिळत नाहीं तर निंद्ययोनी प्राप्त होतात ह्मणून त्यांचा शोक करीत ' कामान् यः कामयते ' इत्यादिक श्रुति ह्मणतात कीं– (हे भगवन् ' ये ' यतयः हृदि कामजटाः यदि न समुद्धरंति) हे भगवंता जे सर्व-

कृत्यमिति तामुपेक्षस इति । कुत एतत्तदाह । आत्तभगो नित्यप्राप्तैश्वर्यः महसि परमैश्वर्येऽष्टगुणितेऽणिमाद्यष्टविभूतिमतिमहीयसे पूज्यसे विराजसे । कथंभूतः । अपरिमेयभगोऽपरिमितैश्वर्यः । नह्यन्येषामिव देशकालादिपरिच्छिन्नं तवाष्टगुणितमैश्वर्यमपितु परिपूर्णस्वरूपानुबंधित्वादपरिमितमित्यर्थः ॥ नृत्यंती तव वीक्षणांगणगता कालस्वभावादिभिर्भावात्सत्वरजस्तमोगुणमयानुन्मीलयंती बहून् ॥ मामाक्रम्य पदा शिरस्यतिभरं संमर्दयंत्यातुरं माया ते शरणं गतोऽस्मि नृहरे त्वामेव तां वारय ॥ २५ ॥ ३८ ॥ एवं तावदुक्तसाधनकदंबेन ये भगवंतं भजंति ते मृत्युं तरंति इतरे संसरंतीत्युक्तं इदानीं ये बहिःसंगं परित्यज्य भगवन्मार्गे प्रवृत्ता अपि कथंचिदंतर्वांताशिनः कामान्न मुंचंति ते न भगवंतं प्राप्नुवंति न चेह सुखं लभंते केवलं कुयोनीरेव प्राप्नुवंति तान् शोचन्कामान्यः कामयते मन्यमानः स कर्मभिर्जायते तत्र तत्रेत्यादिश्रुत्यर्थमाह । यदि न समुद्धरं-

यदि न समुद्धरंति यतयो हृदि कामजटा दुरधिगमोऽसतां हृदिगतोऽस्मृतकंठमणिः ॥
असुतृपयोगिनामुभयतोऽप्यसुखं भगवन्ननपगतांतकादनधिरूढपदाद्भवतः ॥ ३९ ॥

तीति । हे भगवन्ये यतयो हृदि स्थिताः कामजटाः कामस्य मूलानि वासना यदि न समुद्धरंति नोत्पाटयंति तेषामसतां भवान् हृदिगतोऽपि दुरधिगमो दुष्प्रापः । कथम् । अस्मृतकंठमणिर्विस्मृतो यः कंठमणिस्तत्तुल्यः । स यथा कंठे वर्तमानोऽप्यस्मृतश्चेदप्राप्त इव. भवति तद्वदिति । न केवलमेतावत्किंत्वसुतृपयोगिनामिंद्रियतर्पणपराणां योगच्छद्मनामुभयतोऽप्यसुखमिहामुत्र च दुःखमेव । तदाह । अनपगतांतकादनिवृत्तान्मृत्योः । लोकाराधनधनार्जनादिक्लेशाद्भोगवैभवप्राकट्यभयाच्चेह तावद्दुःखम् । भवतः ईश्वरादपि दुःखम् । कथंभूतात् । अनधिरूढपदात् अनधिरूढं पदं स्वरूपं यस्य तस्मात् । त्वत्स्वरूपप्राप्त्यभावादविद्यावद्विषयत्वेन प्राप्तनिजधर्मातिक्रमनिबंधनत्वद्दंडरूपनरकप्राप्तेरमुत्राप्यसुखमित्यर्थः ॥ दंभन्यासमिषेण वंचितजनं भोगैकचिंतातुरं संमुह्यंतमहर्निशं विरचितोद्योगक्लमैराकुलम् ॥ आज्ञालंघिनमज्ञमज्ञजनतासंमाननासन्मदं दीनानाथ दयानिधान परमानंद प्रभो पाहि माम् ॥ २६ ॥ ३९ ॥

संगपरित्यागपूर्वक संन्यासी होऊनहि आपल्या हृदयामध्यें असणाऱ्या कामवासनांना जर उपटून टाकीत नाहींत तर त्या–(असतां हृदि गतः 'त्वं' अस्मृतकंठमणिः इव दुरधिगमः) दुष्ट संन्याशांच्या हृदयामध्यें असलेलाहि तूं, जसा कंठामध्यें असलेलाहि मणि विस्मरण झालें असतां प्राप्त होत नाहीं. त्याप्रमाणें त्यांना प्राप्त होत नाहींस. इतकेंच नाहीं तर त्या– (असुतृपयोगिनां उभयतः अपि असुखं) इंद्रियांची तृप्ति करण्याविषयीं तत्पर असलेल्या दांभिक योग्यांना या लोकीं व परलोकीं दुःखच प्राप्त होतें. कसें ह्मणशील तर– (अनपगतांतकात् अनधिरूढपदात् भवतः) न चुकलेल्या मृत्युरूपी तुजपासून या लोकीं आणि स्वरूप प्राप्त न झालेल्या तुजपासून परलोकीं भय प्राप्त होतें ह्मणजे त्यांना लोकांना प्रसन्न राखणें, धन मिळविणेंवगैरेंचे क्लेश न चुकल्याचें व भोगांचें वैभव लोकांमध्यें प्रगट होण्याच्या भयाचें या लोकीं दुःख आणि तुझ्या स्वरूपाची प्राप्ति न झालेल्या अविद्यायुक्त पुरुषाला, सांगितलेल्या वर्णाश्रमधर्माचें उल्लंघन झाल्यामुळें तुझ्यापासून प्राप्त होणाऱ्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दंडरूप नरकप्राप्तीचें परलोकीं दुःख प्राप्त होतें ॥ ३९ ॥ आतां संन्याशाला कांहींच कर्तव्य नाहीं. तो सुखाच्या उपभोगानें केवळ आपल्या प्रारब्धकर्मांचा क्षय करितो, मग त्याला या लोकीं व परलोकीं सुख नाहीं अशी कां त्याची निंदा करितां, आणि ब्रह्मवेत्त्याचा महिमाहि मोठा सांगितला आहे. असें कोणी ह्मणले तर त्याविषयीं सांगतात कीं- (हे सगुण त्वदवगमी भवदुत्थशुभाशुभयोः गुणविगुणान्वयान् न वेत्ति) हे षड्गुणैश्वर्यसंपन्ना, ज्याला तुझें ज्ञान झालें आहे तो पुरुष, कर्मफलदात्या तुज ईश्वरापासून प्रकटित झालेल्या आपल्या प्राचीन पुण्यपापांच्या फलभूत सुखदुःखसंबंधांना मुळींच जाणत नाहीं. (तर्हि देहभृतां गिरश्च ' न वेत्ति ') आणि त्यावेळीं देहाभिमानी लोकांच्या प्रवृत्तिनिवृत्तिकारक असलेल्या विधिनिषेधरूप वाणीहि, जाणत नाहीं, ह्मणजे देहाभिमान सुटल्यामुळें त्याला कार्यांचा किंवा अकार्यांचा संबंध राहत नाहीं. आणि हें योग्यच आहे. (यतः मनुजैः अनुयुगं गीतपरंपरया अन्वहं श्रवणभृतः त्वं अपवर्गगतिः ' भवसि ')

ननु यतेर्न किमपि कृत्यमस्ति प्रारब्धमेव सुखोपभोगेनापक्षय्यते अतः किमिति वृथा शप्यते उभयतोऽप्यसुखमिति । श्रूयते च एष नित्यो महिमा ब्राह्मणस्य न कर्मणा वर्धते नो कनीयानित्यादि तत्राह । त्वदवगमीति । हे सगुण षड्गुणैश्वर्ययुक्त त्वदवगमी त्वज्ज्ञानवान्भवदुत्थशुभाशुभयोर्भवतः कर्मफलदातुरीश्वराद्धेतोरुत्थयोराविर्भूतयोः शुभाशुभयोः प्राचीनपुण्यापुण्यकर्मणोः फलभूतान् गुणविगुणान्वयान्सुखदुःखसंबंधान्न वेत्ति नानुसंधत्ते तर्हि तदानीं च देहभृतां देहाभिमानिनां प्रवृत्तिनिवृत्तिकरीर्गिरो विरोधिनिषेधलक्षणा न वेत्ति । विगतदेहाभिमानतया कार्याकार्यबोधाभावान्न नियुज्यत इत्यर्थः । युक्तं चैतत् । यतः कारणान्मनुजैरन्वहं श्रवणभृतः अनुदिनं श्रवणेन चेतसि धृतस्त्वं

त्वदवगमी न वेत्ति भवदुत्थशुभाशुभयोर्गुणविगुणान्वयांस्तर्हि देहभृतां च गिरः ॥ अनुयुगमन्वहं सगुण गीतपरंपरया श्रवणभृतो यतस्त्वमपवर्गगतिर्मनुजैः ॥ ४० ॥ द्युपतय एव ते न ययुरंतमनंततया त्वमपि यदंतरांडनिचया ननु सावरणाः ॥ ख इव रजांसि वांति वयसा सह यच्छ्रुतयस्त्वयि हि फलंत्यतन्निरसनेन भवन्निधनाः ॥ ४१ ॥

तेषामपवर्गगतिरपवर्गरूपा गतिर्भवसि । कथं श्रवणभृतः । अनुयुगं प्रतियुगं या गीतपरंपरा उपदेशसंततिस्तया सत्संप्रदायानुसारेणेत्यर्थः । एतदुक्तं भवति । ये तावत्तत्त्वज्ञानिनो न तेषां कर्माधिकारशंकाऽपि । ये चानवरतं त्वत्कथाश्रवणादिनिष्ठास्तेषामप्यासन्नभवत्पदानां विधिनिषेधबाधः इतरेषां तु योगच्छद्मनेंद्रियलालसानामुभयतोऽप्यसुखमिति ॥ अवगमं तव मे दिश माधव स्फुरति यन्न सुखासुखसंगमः ॥ श्रवणवर्णनभावमथापि वा नहि भवामि यथा विधिकिंकरः ॥ २७ ॥ ४० ॥ त्वदवगमी न वेत्ति सुखदुःखे न च विधिनिषेधावित्युक्तं तत्र ननु कथमवगंतुं शक्यते दुरधिगमत्वस्योक्तत्वादित्येवमाशंक्य सत्यमेवमनवगाह्यमहिम्नो वाङ्मनसागोचरत्वादविषयत्वेनैव ज्ञानमिति

कारण मनुष्यानें प्रत्येक युगामध्यें प्रकट होणाऱ्या सांप्रदायाप्रमाणें प्रतिदिवशीं श्रवणाच्या योगानें चित्तामध्यें धारण केलेला तूं, त्यांना मोक्षगतिरूप होतोस. ह्मणजे असें तात्पर्य कीं, ज्या पुरुषांना तत्त्वज्ञान झालें आहे त्यांना कर्माधिकाराची शंकाच नाहीं. आणि जे निरंतर तुझ्या श्रवणादिकांविषयीं तत्पर आहेत त्यांनाहि तुझ्या स्वरूपाची प्राप्ति होत असल्यामुळें विधिनिषेधांचा बाध नाहीं, इतर दांभिक योगसाधन दाखवून विषयलंपट असणाऱ्या पुरुषांना इहलोकीं व परलोकींहि सुख प्राप्त होत नाहीं ॥ ४० ॥ आतां तुझें स्वरूप जाणणारा पुरुष, सुखदुःखें व विधिनिषेध जाणत नाहीं असें सांगितलें, तेथें दुर्ज्ञेय ह्मणून सांगितलेलें जें तुझें स्वरूप तें कसें जाणतां येईल? ॥२८४॥
अशी शंका आली असतां, खरें आहे, परंतु तुझा महिमा वाणीला व मनाला अगोचर असल्यामुळें त्या महिम्याचें अविषयत्वेंकरूनच ज्ञान समजावयाचें असें दर्शवीत ' यदूर्ध्वं गार्गि दिवः ' इत्यादिक श्रुतींनीं प्रतिपादन केलेला अपरिमित महिमा सांगतात- (' हे भगवन् ' द्युपतयः एव ते अंतं न ययुः) हे भगवन् ; स्वर्गादिलोकांचे अधि-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पति ब्रह्मादिकहि तुझ्या अंताप्रत पावत नाहींत. ब्रह्मादिकांची तर गोष्ट राहूंद्या परंतु (त्वमपि 'आत्मनः अंतं न यासि' अनंततया) सर्वज्ञ असा तूंहि आपल्या अंताप्रत पावत नाहींस; कारण तुझा अंतच नाहीं ह्मणून. तर मग सर्वज्ञपणा व सर्वशक्तिता कशी ? तर जो अंत नाहींच तो जाणला नाहीं ह्मणून सर्वज्ञपणाची किंवा प्राप्त झाला नाहीं ह्मणून सर्वशक्तिमान्पणाची हानि होत नाहीं. कारण, सशाचें शिंग नाहींच तें जाणलें नाहीं ह्मणून सर्वज्ञतेची किंवा मिळालें नाहीं ह्मणून शक्तिवैभवाची हानि होत नाहीं. आतां माझें अनंतत्व कसें ? असें ह्मणशील तर– (खे रजांसि इव यदंतरा सावरणाः अंडनिचयाः वयसा सह वांति ननु) जसे आकाशामध्यें वायूच्या योगानें रजःकण परिभ्रमण पावतात त्याप्रमाणें ज्या तुझ्यामध्यें उत्तरोत्तर दशगुणित अधिक असलेल्या पृथिव्यादिक सात आवरणांसहित ब्रह्मांडांचे समूह,

---

दर्शयन् यदूर्ध्वं गार्गि दिवो यदर्वाक् पृथिव्या यदंतरा द्यावापृथिवी इमे यद्भूतं भवच्च भविष्यच्चेत्यादिश्रुतिप्रतिपादितमपरिमितं महिमानमाह । द्युपतय एवेति । हे भगवंस्ते अंतं द्युपतयः स्वर्गादिलोकपतयो ब्रह्मादयो न ययुर्न प्रापुः । तत्कुतः यदंतवद्वस्तु तत्किमपि त्वं न भवसि । आस्तां द्युपतयो न ययुरिति यद्यस्मात्त्वमप्यात्मनोऽतं न यासि । कुतस्तर्हि सर्वज्ञता सर्वशक्तिता वाऽत आह । अनंततया अंताभावेन । नहि शशविषाणाज्ञानं सार्वज्ञ्यं तदप्राप्तिर्वा शक्तिवैभवं विहंति । अनंतत्वमेवाह । यदंतरेति । यस्य तवांतरा मध्ये ननु अहो सावरणा उत्तरोत्तरं दशगुणसप्तावरणयुक्ता अंडनिचया ब्रह्मांडसमूहा वांति परिभ्रमंति । वयसा कालचक्रेण खे रजांसीव सह एकदैव न तु पर्यायेण । हि यस्मादेवमतः श्रुतयस्त्वयि फलंति तात्पर्यवृत्त्या पर्यवस्यंति न तु साक्षाद्वदंत्ययमेतावानिति । सगुणस्य गुणानंत्यान्निर्गुणस्य चागोचरत्वात् । कथं तर्ह्यपदार्थे तात्पर्यमिति ।

श्रीभगवानुवाच ॥ इत्येतद्ब्रह्मणः पुत्रा आश्रुत्यात्मानुशासनम् ॥ सनंदनमथानर्चुः सिद्धा ज्ञात्वाऽऽत्मनो गतिम् ॥ ४२ ॥ इत्यशेषसमाम्नायपुराणोपनिषद्रसः ॥ समुद्धृतः पूर्वजातैर्व्योमयानैर्महात्मभिः ॥ ४३ ॥ त्वं चैतद्ब्रह्मदायाद श्रद्धयाऽऽत्मानुशासनम् ॥ धारयंश्चर गां कामं कामानां भर्जनं नृणाम् ॥ ४४ ॥

तत्र विधिमुखवाक्ये भवेदयं नियमः पदार्थस्यैव वाक्यार्थत्वमिति । निषेधमुखे तु नायं नियम इत्याह । अतन्निरसनेनेति । अन्यदेव तद्विदितादथो अविदितादधि । अन्यत्र धर्माद-न्यत्राधर्मादन्यत्रास्मात्कृताकृतात् । अस्थूलमनण्वित्यादिप्रकारेण लक्षणया च तत्त्वमसीत्यादयः पर्यवस्यंति । न च वाच्यं निषेधैः शून्यमेव ज्ञाप्यत इति । यतो भवन्निधनाः भवति त्वयि निधनं समाप्तिर्यासां तास्तथा । नहि निरवधिर्निषेधः संभवत्यतोऽवधिभूते त्वयि फलंतीत्यर्थः ॥ द्युपतयो विदुरंतमनंत ते न च भावान्न गिरः श्रुतिमौलयः ॥ त्वयि फलंति यतो नम इत्यतो जयजयेति भजे तव तत्पदम् ॥ २८ ॥ ४१ ॥ ४२ ॥ इत्यशेषसमाम्नायपुराणोपनिषद्रस इति सर्वश्रुतिपुराणरहस्यतात्पर्यमित्यर्थः ॥ ४३ ॥ ब्रह्मदायादे-ति । ब्रह्मैव दायमिवायत्नप्राप्यमत्ति सेवत इति तथा । ब्रह्मपुत्रेति वा ॥ ४४ ॥

कालचक्राच्या योगानें एकदम परिभ्रमण पावतात, पर्यायानें ह्मणजे परिभ्रमण पावतात असें नाहीं, केवढें हें आश्चर्य ! (हि 'यस्मात्' भवन्निधनाः श्रुतयः अतन्निरसनेन त्वयि फलंति) ह्मणूनच तुझेठिकाणीं पर्यवसान पावणाऱ्या श्रुति स्थूलत्वादिक जड पदार्थांचा निरास करून निषेधमुखानें तुझेठिकाणीं तात्पर्यवृत्तीनें सफळ होतात ह्मणजे अवधीवांचून निषेध संभवत नाहीं ह्मणून अवधिभूत तुझेठिकाणीं निषेधमुखानें पर्यवसान पावोन सफळ होतात ॥ ४१ ॥ श्रीभगवान् ह्मणाला– हे नारदा, याप्रमाणें ब्रह्मदेवाच्या सनकादिक पुत्रांनीं सनंदनानें वर्णन केलेल्या वेदस्तुतिरूप आत्मतत्त्वाचें निरूपण ऐकून, आत्म्याचें तत्त्व जाणल्यामुळें कृतकृत्य झालेल्या त्यांनीं नंतर गुरुबुद्धीनें त्या सनंदनाचें पूजन केलें ॥ ४२ ॥ सृष्टीच्या आरंभीं उत्पन्न झालेल्या व आकाशगामी अशा त्या महात्म्या सनकादिक ऋषींनीं, असा हा सर्व श्रुतींचा, पुराणांचा व उपनिषदांचा तात्पर्यरूप रस काढिला आहे ॥ ४३ ॥ हे ब्रह्मपुत्रा नारदा, तूंहि, मनुष्यांच्या वासनांचें भस्म करणारें हें ब्रह्मनिरूपण, श्रद्धेनें मनांत धारण करून भूमीवर

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जेथें तुझी जाण्याची इच्छा असेल तेथें संचार कर ॥ ४४ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, याप्रमाणें नारायणऋषीनें उपदेश केलेल्या आत्मतत्त्वाचें श्रद्धेनें ग्रहण करून, आत्मवेत्ता, कृतकृत्य, श्रवण केलेला अर्थ मनामध्यें धारण करणारा व नैष्ठिक ब्रह्मचारी अशा त्या नारदानें भाषण केलें कीं, ॥ ४५ ॥ नारद ह्मणाला– जो तूं, सर्व प्राणिमात्रांना मोक्ष देण्याकरितां मनोहर अवतार धारण करितोस, त्या निर्मलकीर्ति तुज भगवान् श्रीकृष्णाला नमस्कार असो ॥ ४६ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, याप्रकारेंकरून तो नारद, आदिऋषि अशा त्या नारायणाला आणि त्याच्या महात्म्या शिष्यांना नमस्कार करून नंतर तेथून माझा साक्षात् (योनिसंबंधावांचून असलेला)

पूर्णः कृतकृत्यः । श्रुतधरः श्रुतमर्थं मनसि धारयन् । वीरव्रतो नैष्ठिकः ॥ ४५ ॥ नम इति । श्रीकृष्णावतारतया नारायणं नमस्यति । उक्तं हि एते चांशकलाः पुंसः कृष्णस्तु भगवान्स्वयमिति ॥ ४६ ॥ साक्षात्पितुरिति । योनिव्यवधानं विना जनकस्य अग्निमथनावसरे कथंचिदरणौ रेतः पतितं ममंथ व्यासस्तदैव तत उत्पन्नः शुक इति हि वदंति ॥ ४७ ॥ ४८ ॥ ४९ ॥ समस्तवेदस्तुत्यर्थं संग्रह्यानुस्मारयति । योऽस्योत्प्रेक्षक इति । योऽस्य विश्वस्योत्प्रेक्षकः । एवमनुशायिनां समस्तपुरुषार्थसिद्धये सृष्टिस्थितिप्रल-

श्रीशुक उवाच ॥ एवं स ऋषिणाऽऽदिष्टं गृहीत्वा श्रद्धयाऽऽत्मवान् ॥ पूर्णः श्रुतधरो राजन्नाह वीरव्रतो मुनिः ॥ ४५ ॥ नारद उवाच ॥ नमस्तस्मै भगवते कृष्णायामलकीर्तये ॥ यो धत्ते सर्वभूतानामभवायोशतीः कलाः ॥ ४६ ॥ इत्याद्यमृषिमानम्य तच्छिष्यांश्च महात्मनः ॥ ततोऽगादाश्रमं साक्षात्पितुर्द्वैपायनस्य मे ॥ ४७ ॥ सभाजितो भगवता कृतासनपरिग्रहः ॥ तस्मै तद्वर्णयामास नारायणमुखाच्छ्रुतम् ॥ ४८ ॥ इत्येतद्वर्णितं राजन्यन्नः प्रश्नः कृतस्त्वया ॥ यथा ब्रह्मण्यनिर्देश्ये निर्गुणेऽपि श्रुतिश्चरेत् ॥ ४९ ॥ योऽस्योत्प्रेक्षक आदिमध्यनिधने योऽव्यक्तजीवेश्वरो यः सृष्ट्वेदमनुप्रविश्य ऋषिणा चक्रे पुरः शास्ति ताः ॥ यं संपद्य जहात्यजामनुशयी सुप्तः कुलायं यथा तं कैवल्यनिरस्तयोनिमभयं ध्यायेदजस्रं हरिम् ॥ ५० ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे उत्तरार्धे नारदनारायणसंवादे वेदस्तुतिर्नाम सप्ताशीतितमोऽध्यायः ॥ ८७ ॥ ॥

यादिप्रापणीयमित्यालोचक इत्यर्थः । अनेन निमित्तत्वमुक्तम् । एवमालोच्यास्यादिमध्यनिधने आदिर्जन्म मध्यः पालनं निधनमंतः एतेषु कर्मसु यो वर्तते । अनेनोपादानत्वमुक्तम् । ननु प्रकृतिपुरुषयोरुपादाननिमित्तत्वे प्रसिद्धे सत्यम् तयोरपि तत एवोद्भूतत्वान्मूलकारणं स एवेत्याह । योऽव्यक्तजीवेश्वर इति । प्रवेशनियमने दर्शयति । य इति पूर्वोक्तप्रकारेणेदं सृष्ट्वा । यदर्थमेतत्सृष्टं तेन ऋषिणा सृष्टे कार्येऽहमिति दर्शनात् ऋषिर्जीवस्तेन सहानुप्रविष्टः पुरः शरीराणि तस्य भोगायतनानि चक्रे ताः पुरः शास्ति तस्य

पिता असा वेदव्यासाच्या आश्रमास निघून गेला ॥ ४७ ॥ तेव्हां वेदव्यासानें सत्कार केलेल्या त्या नारदानें, आसनाचा स्वीकार करून व त्या आसनावर बसून, नारायणाच्या मुखांतून आपण जें श्रवण केलें होतें तें सर्व त्या व्यासाला वर्णन केलें ॥ ४८ ॥ हे राजा, आह्मांला जो तूं, प्रश्न केला होतास तें, ‘ज्याप्रकारें अनिर्देश्य व निर्गुण ब्रह्माचेठिकाणीं श्रुतींची प्रवृत्ति होत्ये असें’ हें सर्व मी तुला वर्णन केलें आहे ॥ ४९ ॥ आतां सर्व वेदस्तुतीचा अर्थ संक्षेपानें सांगतो– जो भगवान्, आपल्या स्वरूपामध्यें निजलेल्या जीवांना सर्व पुरुषार्थांची सिद्धि होण्याकरितां या जगाचे उत्पत्तिस्थितिसंहार करण्याचा विचार करितो; जो या जगाच्या आरंभीं मध्यें व शेवटीं

१ एके वेळीं व्यास अग्नीचें मंथन करित असतां कांहीं कारणानें व्यासाचें रेत स्खलन पावून तें अरणीमध्यें पडलें तेव्हां व्यासानें त्याचेंच मंथन केलें ह्मणून त्या अरणीपासून तत्काळ शुक पुत्र उत्पन्न झाला अशी प्रसिद्धि आहे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राहतो; जो प्रकृति व पुरुष यांचें उपादान कारण आहे; ज्यानें, हें ब्रह्मांड उत्पन्न करून व त्यामध्यें अंतर्यामिरूपानें प्रवेश करून जीवांना भोग प्राप्त होण्याकरितां निरनिराळीं शरीरें उत्पन्न केलीं आहेत; जो जीवांना भोग देऊन त्या शरीरांचें रक्षण करितो आणि ज्याची प्राप्ति झाली असतां, चरणमूळावर वारंवार दंडासारखे प्रणाम-वगैरे करून उपासना करणारा हा जीव, जसा गाढ निजलेला पुरुष आपल्या शरीराचें अनुसंधान राखीत नाहीं तर त्याचा त्याग करितो त्याप्रमाणें जो आपल्या कार्य-कारणरूप अविद्येचें अनुसंधान न राखितां त्याग करितो, त्या भयनिवर्तक व अखंडस्वरूपस्थितीनें मायारूप मूळकारणाचा निरास करणाऱ्या भगवान् हरीचें निरंतर ध्यान करावें ॥ ५० ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील दशमस्कंधाच्या उत्तरार्धांत वेदस्तुतिनिरूपणनामक हा सत्याऐशींवा अध्याय समाप्त झाला ॥ ८७ ॥ ॥

भोगं ददत्परिपालयति । उपासकस्य च कैवल्यरूपो भवतीत्याह । यं संपद्येति । यं संपद्य प्राप्यानुशयी अन्वनुदंडवत्प्रणामैश्चरणमूले शेते इति तथा स जीवोऽजां कार्यकारणरूपामविद्यां त्यजति । ननु ब्रह्मसंपन्नस्यापि जीवस्य तत्संबंधो दृश्यतेऽत आह । सुप्तः कुलायं यथेति । अयं भावः । यथा सुप्तं शरीरवंतमन्ये पश्यंति स तु नात्मानं तथा पश्यति एवं जीवन्मुक्तमप्यन्ये देहवंतं पश्यंति स तु न किंचित्पश्यतीति । तं हरिमजस्रमनवरतं ध्यायेत् । किमित्यत आह । अभयं न भयं यस्माद्भयनिवर्तकमित्यर्थः । कुत एतत् । कैवल्यनिरस्तयोनिं कैवल्येनाप्रच्युतस्वरूपावस्थानेन निरस्ता तिरस्कृता योनिर्मूलकारणं माया येन तम् । सर्वश्रुतिशिरोरत्ननीराजितपदांबुजम् ॥ भोगयोगप्रदं वंदे

राजोवाच ॥ देवासुरमनुष्येषु ये भजंत्यशिवं शिवम् ॥ प्रायस्ते धनिनो भोजा न तु लक्ष्म्याः पतिं हरिम् ॥ १ ॥ एतद्वेदितुमिच्छामः संदेहोऽत्र महान्हि नः ॥ विरुद्धशीलयोः प्रभ्वोर्विरुद्धा भजतां गतिः ॥ २ ॥ श्रीशुक उवाच ॥ शिवः शक्तियुतः शश्वत्त्रिलिंगो गुणसंवृतः ॥ वैकारिकस्तैजसश्च तामसश्चेत्यहं त्रिधा ॥ ३ ॥

माधवं कर्मिनम्रयोः ॥ ५० ॥ इति श्रीमद्भागवते दशमस्कंधे उत्तरार्धे टीकायां सप्ताशीतितमोऽध्यायः ॥ ८७ ॥ ॥ अष्टाशीतितमे विष्णुभक्तः कैवल्यमश्नुते ॥ ततोऽर्वाग्देवभक्तस्तु विभूतिमिति वर्ण्यते ॥ १ ॥ हरिर्भजतां मुक्तिद इत्युक्तमभयं ध्यायेदजस्रहरिमिति तत्र शंकते । देवासुरेति । अशिवमवधीरितभोगम् । भोजा भोगिनः । लक्ष्म्याः पतिं सर्वभोगयुक्तम् ॥ १ ॥ २ ॥ अन्योन्योपमर्देन तमसस्त्रैविध्यात्त्रिलिंगः । त्रिलिंगत्वमाह । वैकारिक इति । अहमहंकार इति ॥ ३ ॥

आतां ह्या अठ्ठ्याऐशींव्या अध्यायामध्यें, विष्णुभक्ताला मोक्ष प्राप्त होतो आणि दुसऱ्या देवतांच्या भक्तांना ऐश्वर्य प्राप्त होतात अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ श्रीहरि भक्तांना मुक्ति देतो असें सांगितलेलें ऐकून राजा ह्मणाला कीं,—हे शुकाचार्य, देव असुर व मनुष्य यामध्यें जे लोक, विषयभोगांचा तिरस्कार करणाऱ्या शंकराचें आराधन करितात तेच बहुतकरून धनी व विषयभोग करणारे होतात, आणि लक्ष्मीचा पति व सर्वभोगयुक्त अशा श्रीहरीचें जे आराधन करितात ते दरिद्री व भोगरहित होतात याचें कारण काय ? ॥ १ ॥ हें जाणण्याची आह्मी इच्छा करितों, कारण याबद्दल आह्माला मोठा संदेह आहे, विरुद्ध स्वभाव असलेल्या हरिहरांच्या भक्तांना विरुद्ध फळ प्राप्त होतें. ऐश्वर्य टाकणाऱ्या शंकराच्या भक्तांना दारिद्र्य व्हावें व ऐश्वर्य स्वीकारणाऱ्या श्रीविष्णूच्या भक्तांना ऐश्वर्य मिळावें तें तसें न होतां विपरीत फळ प्राप्त होतें याचें कारण काय ? ॥ २ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, निरंतर आनंदरूपी असाहि ईश्वर, जेव्हां आपल्या शक्तीनें (प्रकृतीनें) युक्त होतो

तूं आमच्यासारखा त्याच्या प्रेमानें बद्ध होऊन, त्या श्रीवत्सलांछनाचें ध्यान करीत आहेस कीं काय ? सख्या, तूं आमच्यासारखाच त्याच्या दर्शनादिकांविषयीं अतिशय उत्कंठित व प्रेमानें आर्द्रचित्त होत्साता, त्याचें वारंवार स्मरण करून अश्रूंच्या धारा सोडित आहेस. अरे, त्याच्या बरोबर तूं सख्य काय म्हणून केलेंस ? कारण, त्याची संगति विरक्तांना सुख देणारी असली तरी, संसारी लोकांना दुःख देणारी आहे ॥ २० ॥ हे मंजुळकंठा कोकिळा, तूं मेलेल्यांनाहि संजीवन करणाऱ्या ह्या कोमळवाणीनें मला प्रियंवद श्रीकृष्णाच्या शब्दांसारखेच शब्द बोलून दाखवीत आहेस, तर आतां असें सांग कीं,– मी तुझें प्रिय काय करूं ? ॥ २१ ॥ हे उदारबुद्धे पर्वता, तूं हालत नाहींस व बोलतहि नाहींस त्याअर्थीं कांहींतरी मोठ्या गहन अर्थाचें चिंतन करीत आहेस, तर आम्ही जशा श्रीकृष्णाचे चरण स्तनावर धारण करण्याची इच्छा करितों तसा तूंहि आपल्या स्तनासारख्या शिखरांनीं भगवंताचे चरण धारण करण्याची इच्छा करित आहेस काय ? जर असें असेल तर तुलाहि आमच्यासारखीच अवस्था प्राप्त

भवास्तं ध्यायति । ध्याने लिंगान्याहुः । अत्युकंठ इत्यादि । अहो किमिति त्वया तेन सख्यं कृतं यतो दुःखदस्तत्प्रसंग इति ॥ २० ॥ हे कोकिल मे प्रियरावस्य प्रियंवदस्य श्रीकृष्णस्य पदानीव पदानि शब्दांस्त्वं भाषसे । मृतान्संजीवयतीति तथा तयाऽनया कोमळया गिरा वल्गितकंठ रमणीयकंठ मे कथय किं तव प्रियं करवाणीति ॥ २१ ॥ हे क्षितिधर त्वं न वदसि न चलसि अतो नूनं महांतमर्थं चिंतयसे । बत तर्हिं अपि किं यथा स्तनैर्विंधर्तुं वयं कामयामहे तथा त्वं स्तनतुल्यैः शृंगैर्वोढुं कामयसे । ओमिति चेत्तर्हि

प्रियरावपदानि भाषसेऽमृतसंजीविकयाऽनया गिरा ॥ करवाणि किमद्य ते प्रियं वद मे वल्गितकंठ कोकिल ॥ २१ ॥ न चलसि न वदस्युदारबुद्धे क्षितिधर चिंतयसे महांतमर्थम् ॥ अपि बत वसुदेवनंदनांघ्रिं वयमिव कामयसे स्तनैर्विधर्तुम् ॥ २२ ॥ शुष्यद्ध्रदाः करशिता बत सिंधुपत्न्यः संप्रत्यपास्तकमलश्रिय इष्टभर्तुः ॥ यद्वद्वयं यदुपतेः प्रणयावलोकमप्राप्य मुष्टहृदयाः पुरु कर्शिताः स्म ॥ २३ ॥ हंस स्वागतमास्यतां पिब पयो ब्रूह्यंग शौरेः कथां दूतं त्वां नु विदाम कच्चिदजितः स्वस्त्यास्त उक्तं पुरा ॥ किंवा नश्चलसौहृदः स्मरति तं कस्माद्भजामो वयं क्षौद्रालापय कामदं श्रियमृते सैवैकनिष्ठा स्त्रियाम् ॥ २४ ॥

तवाप्यस्मदवस्था भविष्यतीति भावः ॥ २२ ॥ भोः सिंधुपत्न्यो नद्यः संप्रति ग्रीष्मे सिंधुर्मेघद्वारा अमृतवृष्ट्या युष्मान्नानंदयति । बत अहो कष्टम् । अतः शुष्यंतो ह्रदा यासां ता अपगतकमलशोभाः कृशाश्च वयं यथा प्रियतमस्य भर्तुर्यदुपतेः । स्म प्रसिद्धम् ॥ २३ ॥ तदैव दैवादागतं हंसं दूतं कल्पयित्वाऽऽहुः । हंसेति । नोऽस्मान्प्रति पुरा रहस्युक्तं किंवा चलसौहृदः स्मरति स्मृत्वैव मां प्रस्थापितवानिति चेदत आहुः । हे क्षौद्र क्षुद्रस्य दूत कस्मात्तं वयं भजामः । कामार्थमाह्वयति युष्मानिति चेदत आहुः । अहो

झाली असेल ॥ २२ ॥ हे समुद्रपत्नी नद्या हो, जशा आम्ही श्रीकृष्णाच्या कृपाकटाक्षांना न पावोन त्यानें हृदय चोरून नेल्यामुळें फारच कृश होऊन गेलों आहों, तशा तुम्हीहि सांप्रत ग्रीष्मऋतूमध्यें आपल्या इष्टपति समुद्राचें जळ मेघद्वारा न पावोन, ज्यांचे डोह शुष्क होऊन गेले आहेत व ज्यांची कमळशोभा निघून गेली आहे अशा फारच कृश झालां आहां. म्हणून तुमचा पति समुद्र मेघद्वारा अमृतवृष्टीनें तुम्हांस आनंद देत नाहीं हें पाहून आम्हांस फार वाईट वाटतें ॥ २३ ॥ त्यावेळीं तेथें दैवानें आलेल्या हंसाला, हा दूत आहे अशी कल्पना करून म्हणाल्या–हे हंसा, तूं आलास ही फार चांगली गोष्ट झाली, तूं येथें बैस आणि दूध पी. हंसा, तूं कृष्णाची कथा आम्हांस सांग. तूं कृष्णाचा दूत होऊन आलास हें आम्हीं जाणतों, अरे श्रीकृष्ण खुशाल आहेना ? कृष्णानें ‘ तुझ्यासारखी प्रेमवती स्त्री ह्या गृहस्थाश्रमांत मी कोठें पाहत नाहीं असें जें पूर्वी आम्हांस सांगितलें होतें त्याचें आतां क्षणिकसख्य करणारा तो कृष्ण स्मरण, तरी करितो काय ? स्मरण करूनच त्यानें मला पाठविलें आहे असें म्हण-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शील तर हे क्षुद्राच्या दूता, आह्मी त्याच्याजवळ कशाकरितां यावें ? कामसुखाकरितां तो तुह्मांस बोलावीत आहे असें ह्मणशील तर–त्यालाच तूं इकडे बोलाव. बरें आहे असें ह्मणून निघाल्यासारख्या त्याला पाहून पुन्हा ह्मणाल्या कीं,– जी आम्हांस फसवून एकटीच त्या कृष्णाचें सेवन करित्ये, त्या लक्ष्मीवांचून त्याला इकडे बोलाव. ती त्याचेठिकाणीं एकनिष्ठ आहे तिला कशी सोडून देतां येईल ? असें ह्मणशील तर–आह्मी स्त्रियामध्यें तीच एकनिष्ठ आहे काय ? आह्मीं नाहींका, एकनिष्ठ ? ॥ २४ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, याप्रमाणें योगेश्वरेश्वर अशा श्रीकृष्णाचेठिकाणीं अशा निरुपम केलेल्या प्रेमानें त्या कृष्णस्त्रिया परमगति पावल्या ॥ २५ ॥ त्यांचें कृष्णावर असें प्रेम असणें हें आश्चर्य नाहीं. कारण, अनेक पुरुषांनीं अनेकप्रकारच्या गीतांनीं अनेकप्रकारें गायन केलेल्या त्या कृष्णाचें केवळ श्रवण झालें तरी जो

तर्हि तमालापयाकारय । ओमिति गच्छंतमिव तं पुनराहुः । याऽस्मान्वंचयित्वा एकाकिनी सेवते तां श्रियमृते तमेवालापय । सा तदेकनिष्ठा कथं परिहर्तुं शक्यत इति चेदत आहुः । स्त्रियां जातावेकवचनम् । अस्मासु स्त्रीषु मध्ये किं सैवैकनिष्ठा । न तु वयमित्यर्थः । पाठांतरे तु क्षौद्रं मधु तद्वन्मधुरालापमात्रं यस्य तमकामदमरतिप्रदं श्रियमृते वयं कस्माद्व्रजामः । किंत्वनाहताऽपि सती पुनः पुनः सैव भजतु यतोऽस्मादृश्यो मानिन्यः स्त्रिय एकनिष्ठा एकत्रैव स्वसंमानसिद्धौ निष्ठा यासामिति ॥ २४ ॥ २५ ॥ तासां

इतीदृशेन भावेन कृष्णे योगेश्वरेश्वरे ॥ क्रियमाणेन माधव्यो लेभिरे परमां गतिम् ॥ २५ ॥ श्रुतमात्रोऽपि यः स्त्रीणां प्रसह्याकर्षते मनः ॥ उरुगायोरुगीतो वा पश्यंतीनां कुतः पुनः ॥ २६ ॥ या संपर्यचरन्प्रेम्णा पादसंवाहनादिभिः ॥ जगद्गुरुं भर्तृबुद्ध्या तासां किं वर्ण्यते तपः ॥ २७ ॥ एवं वेदोदितं धर्ममनुतिष्ठन्सतां गतिः ॥ गृहं धर्मार्थकामानां मुहुश्चादर्शयत्पदम् ॥ २८ ॥ आस्थितस्य परं धर्मं कृष्णस्य गृहमेधिनाम् ॥ आसन्षोडशसाहस्रं महिष्यश्च शताधिकम् ॥ २९ ॥ तासां स्त्रीरत्नभूतानामष्टौ याः प्रागुदाहृताः ॥ रुक्मिणीप्रमुखा राजंस्तत्पुत्राश्चानुपूर्वशः ॥ ३० ॥ एकैकस्यां दश दश कृष्णोऽजीजनदात्मजान् ॥ यावंत्य आत्मनो भार्या अमोघगतिरीश्वरः ॥ ३१ ॥ तेषामुद्दामवीर्याणामष्टादश महारथाः ॥ आसन्नुदारयशसस्तेषां नामानि मे शृणु ॥ ३२ ॥

कृष्णे एवंभूतो भावो नातिचित्रमित्याह । श्रुतमात्रोऽपीति । उरुभिर्गायैर्गीतैः उरुधा गीतो वा यैः कैश्चिदपि गीतैः कथाभिः कथंचिदपि गीतो वेत्यर्थः ॥ २६ ॥ २७ ॥ पदं स्थानम् ॥ २८ ॥ २९ ॥ या रुक्मिणीप्रमुखा अष्टावुदाहृताः प्राक् ॥३०॥ एवमष्टोत्तरशताधिकषोडशसहस्रमहिषीणां पुत्रा लक्षमेकमशीत्युत्तरैकषष्टिसहस्राणि च भवंति ॥ ३१॥३२॥

स्त्रियांचें मन बलात्कारानें हरण करितो, मग त्याला साक्षात् पाहणाऱ्या स्त्रियांचें मन तो आकर्षण करील हें पुन्हा काय सांगावें ? ॥ २६ ॥ ज्या स्त्रियांनीं जगद्गुरु भगवंताचें पतिबुद्धीनें चरणशुश्रूषादिकें करून प्रेमानें सेवन केलें, त्या स्त्रियांच्या तपाचें आमच्या हातून वर्णन कसें होऊं शकेल ? ॥ २७ ॥ याप्रमाणें सत्पुरुषांची गति अशा भगवान् श्रीकृष्णानें वेदोक्त धर्माचें वारंवार आचरण करून घर हें– धर्म, अर्थ आणि काम यांचें स्थान आहे असें दर्शविलें ॥ २८ ॥ गृहस्थाश्रम्यांच्या परमधर्माचें सेवन करणाऱ्या श्रीकृष्णाच्या स्त्रिया सोळा हजार एकशें आठ होत्या ॥ २९ ॥ हे राजा, स्त्रियांमध्यें रत्नभूत अशा त्या स्त्रियांपैकीं रुक्मिणीआदिक ज्या आठ पट्टराण्या, त्या मी तुला पूर्वीं सांगितल्या आहेत व त्यांचे पुत्रहि अनुक्रमानें सांगितले आहेत ॥ ३० ॥ ह्या आठांहून दुसऱ्याहि जितक्या १६१०० श्रीकृष्णाच्या स्त्रिया होत्या त्या प्रत्येकीचेठिकाणींहि त्या सत्यसंकल्प ईश्वर श्रीकृष्णानें दहा दहा पुत्र उत्पन्न केले. मिळून श्रीकृष्णाचे पुत्र १६१०८० होते ॥ ३१ ॥ त्या महापराक्रमी पुत्रांमध्यें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अठरा पुत्र महारथी व मोठे यशस्वी होते. त्यांचीं नांवें मी तुला सांगतों, श्रवण कर ॥ ३२ ॥ १ प्रद्युम्न, २ अनिरुद्ध, ३ दीप्तिमान्, ४ भानु, ५ सांब, ६ मधु, ७ बृह-
द्भानु, ८ चित्रभानु, ९ वृक, १० अरुण, ॥ ३३ ॥ ११ पुष्कर, १२ देवबाहु, १३ श्रुतदेव, १४ सुनंदन, १५ चित्रबाहु, १६ विरूप, १७ कवि आणि १८ न्यग्रोध हीं होत
॥ ३४ ॥ हे राजेंद्रा, भगवंताच्या ह्या सर्व पुत्रांमध्येंहि रुक्मिणीचा प्रथम पुत्र जो महारथी प्रद्युम्न, तो रूपानें व गुणांनींहि पित्या (श्रीकृष्णा) सारखाच होता ॥ ३५ ॥
त्या महारथ्यानें रुक्म्याची कन्या रुक्मवती वरिली. तिच्यापासून त्याला, दाहाहजार हत्तींचें बळ असणारा अनिरुद्धनामक पुत्र झाला ॥ ३६ ॥ रुक्म्याच्या मुलीचा
मुलगा अशा त्या अनिरुद्धानेंहि रुक्म्याच्या मुलाची मुलगी(रोचना) वरिली, नंतर त्याला तिचेठिकाणीं वज्रनामक पुत्र उत्पन्न झाला. त्याला मुसळाच्या निमित्तानें झालेल्या

अनिरुद्धश्चेति । अतः पुत्राणां मध्ये सप्तदशैव महारथा ज्ञेयाः । अथवा अनिरुद्धनामाऽपि कश्चित्पुत्र एवेति ॥ ३३ ॥ ३४ ॥ ३५ ॥ ३६ ॥ ३७ ॥ ३८ ॥ ३९ ॥ ४० ॥

प्रद्युम्नश्चानिरुद्धश्च दीप्तिमान्भानुरेव च ॥ सांबो मधुर्बृहद्भानुश्चित्रभानुर्वृकोऽरुणः ॥ ३३ ॥ पुष्करो वेदबाहुश्च श्रुतदेवः सुनंदनः ॥
चित्रबाहुर्विरूपश्च कविर्न्यग्रोध एव च ॥ ३४ ॥ एतेषामपि राजेंद्र तनुजानां मधुद्विषः ॥ प्रद्युम्न आसीत्प्रथमः पितृवद्रुक्मिणीसुतः
॥ ३५ ॥ स रुक्मिणो दुहितरमुपयेमे महारथः ॥ तस्मात्सुतोऽनिरुद्धोऽभून्नागायुतबलान्वितः ॥ ३६ ॥ स चापि रुक्मिणः पौत्रीं
दौहित्रो जगृहे ततः ॥ वज्रस्तस्याभवद्यस्तु मौसलादवशेषितः ॥ ३७ ॥ प्रतिबाहुरभूत्तस्मात्सुबाहुस्तस्य चात्मजः ॥ सुबाहोः
शांतसेनोऽभूच्छतसेनस्तु तत्सुतः ॥ ३८ ॥ न ह्येतस्मिन्कुले जाता अधना अबहुप्रजाः ॥ अल्पायुषोऽल्पवीर्याश्च अब्रह्मण्याश्च
जज्ञिरे ॥ ३९ ॥ यदुवंशप्रसूतानां पुंसां विख्यातकर्मणाम् ॥ संख्या न शक्यते कर्तुमपि वर्षायुतैर्नृप ॥ ४० ॥ तिस्रः कोट्यः
सहस्राणामष्टाशीति शतानि च ॥ आसन्यदुकुलाचार्याः कुमाराणामिति श्रुतम् ॥ ४१ ॥ संख्यानं यादवानां कः करिष्य-
ति महात्मनाम् ॥ यत्रायुतानामयुतलक्षेणास्ते स आहुकः ॥ ४२ ॥ देवासुराहवहता दैतेया ये सुदारुणाः ॥ ते चोत्पन्ना
मनुष्येषु प्रजा दृप्ता बबाधिरे ॥ ४३ ॥

सहस्राणामपरिमितानां कुमाराणामित्यन्वयः ॥ ४१ ॥ यदा प्रत्येकं बहूनध्यापयतामाचार्याणामियं संख्या तदपि श्रुतमात्रं न तु सम्यक् ज्ञायते तदा कुमाराणामेवं संख्यानं
कर्तुं न शक्यते कुतः पुनः सर्वयादवानामिति ॥ ४२ ॥ ते चोत्पन्ना इति । प्रत्येकं बहुभी रूपैरिति ज्ञेयम् ॥ ४३ ॥

यादवांच्या संहारापासून भगवंतानें अवशेष राखिलें होतें ॥ ३७ ॥ त्या वज्रापासून प्रतिबाहु झाला, त्याचा पुत्र सुबाहु झाला, त्या सुबाहूपासून शांतसेन झाला, त्याचा
पुत्र श्रुतसेन झाला ॥ ३८ ॥ ह्या कुळामध्यें कोणीहि निर्धन, अल्पसंतति, अल्पायु, अल्पपराक्रमी व ब्राह्मणांचे अभक्त असे झाले नाहींत ॥ ३९ ॥ हे राजा, यदुवंशांत
उत्पन्न झालेल्या व प्रख्यात कर्में करणाऱ्या पुरुषांची संख्या लाखोवर्षांनींहि करण्यास अशक्य आहे ॥ ४० ॥ कारण, यदुकुळांतील अपरिमित बालकांनां विद्या शिकवि-
णारे गुरु तीन कोटि आठ हजार आठशें (३०००८८००) होते असें ऐकण्यांत आहे ॥ ४१ ॥ मग महात्म्या यादवांची संख्या कोण करूं शकेल ? जेथें अयुतांच्या अयुत-
लक्षांसहवर्तमान तो उग्रसेन राजा राज्य करीत होता ॥ ४२ ॥ ~~पूर्वीं अमृतप्राप्तीसाठीं देवदैत्यांचा संग्राम झाला, तेथें जे अतिभयंकर दैत्य मारले गेले~~ होते ते प्रत्येक,

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

बहुत रूपांनीं मनुष्यांमध्यें उत्पन्न होऊन गर्विष्ठ होत्साते प्रजांना दुःख देऊं लागले असून ॥ ४३ ॥ हे राजा, त्यांच्या नाशाकरितां हरीनें आज्ञा केलेले देव, यादवकुळांत प्रकट झाले असून त्यांचीं एकशेंएक (१०१) कुळें होतीं ॥ ४४ ॥ त्या कुळांना प्रभुत्वेंकरून मान्य असा भगवान् श्रीकृष्णच होता. जे यादव त्या भगवंताच्या आज्ञे-प्रमाणें वागणारे होते ते सर्वहि धन, बळ इत्यादिकेंकरून वृद्धि पावले ॥ ४५ ॥ आतां त्यांचा दुःख विसरण्याचा प्रकार सांगतो– कृष्णाचेठिकाणीं चित्त जडलेल्या त्या यादवांनीं, निजणें, बसणें, फिरणें, बोलणें, खेळणें, व स्नान करणें इत्यादि कर्मांमध्यें तत्पर असलेल्या आपल्या देहाचेंसुद्धां भान राखिलें नाहीं, मग ते अन्य सर्व दुःखें विसरले हें काय सांगावें ! ॥ ४६ ॥ आतां कृष्णकीर्तीचें जें सर्वतीर्थोत्तमत्व व श्रीकृष्णाचें जें सर्वदेवोत्तमत्व तीं आश्चर्यकारक नाहींत, असें सांगतो–

एवमेव यदुकुलेऽपि देवा इति । तथा चोक्तम् । सहस्रशः समुद्भूता देवा यदुकुले पृथगिति ॥ ४४ ॥ ४५ ॥ ४६ ॥ तस्मात्कृष्णकीर्तेः सर्वतीर्थोत्तमत्वं कृष्णस्य च सर्वदेवोत्तमत्वं न चित्र मित्याह । तीर्थं चक्र इति । इतः पूर्वं स्वःसरिदेव सर्वतोऽधिकं तीर्थमित्यासीत् । इदानीं तु यदुषु यदजनि जातं तीर्थं श्रीकृष्णकीर्तिरूपमेतत्स्वःसरिद्रूपं पादशौचं तीर्थमूनमल्पं चक्रे । स्वयमेव सर्वतीर्थोपरि विराजत इत्यर्थः । श्रीकृष्णस्य विद्विषः स्निग्धाश्च तत्सारूप्यं ययुरित्यपि नातिचित्रम् । तस्य परमकारुणिकत्वात् ।

तन्निग्रहाय हरिणा प्रोक्ता देवा यदोः कुले ॥ अवतीर्णाः कुलशतं तेषामेकाधिकं नृप ॥ ४४ ॥ तेषां प्रमाणं भगवान्प्रभुत्वेनाभवद्धरिः ॥ ये चानुवर्तिनस्तस्य ववृधुः सर्वयादवाः ॥ ४५ ॥ शय्यासनाटनालापक्रीडास्नानादिकर्मसु ॥ न विदुः संतमात्मानं वृष्णयः कृष्णचेतसः ॥ ४६ ॥ तीर्थं चक्रे नृपोनं यदजनि यदुषु स्वःसरित्पादशौचं विद्विट्स्निग्धाः स्वरूपं ययुरजितपरा श्रीर्यदर्थेऽन्ययत्नः ॥ यन्नामामंगलघ्नं श्रुतमथ गदितं यत्कृतो गोत्रधर्मः कृष्णस्यैतन्न चित्रं क्षितिभरहरणं कालचक्रायुधस्य ॥ ४७ ॥

तथेदं च न चित्रम् । किं तत् । अजितपरा अजिता कैश्चिदप्यप्राप्ता परा सर्वतः परिपूर्णा श्रीः कृष्णस्यैव नान्यस्येति । तदेवाह । यदर्थेऽन्येषां ब्रह्मादीनां यत्न इति । ननु निरपेक्षं तमेव लक्ष्मीः श्रयत इति चित्रमेवेति चेन्नहि परममंगलनामधेयत्वात्तस्येत्याह । यन्नामेति । तदपि नार्थस्मरणापेक्षमित्याह । श्रुतमथ गदितमिति । सर्वधर्माश्रयत्वादपीत्याह । यत्कृतो गोत्रधर्म इति । गोत्रेषु तत्तदृषिवंशेषु धर्मो यत्कृतो येन प्रवर्तितः । तस्य क्षितिभरहरणं नैव चित्रमित्याह । कृष्णस्यैतदिति । कालचक्रायुधस्येति सर्वसंहारकका लमूर्तेर्विशेषतो दुरंतप्रभावचक्रायुधस्य कियदेतदित्यर्थः ॥ ४७ ॥

हे राजा, यापूर्वीं भगवंताचें चरणक्षालनोदक जी गंगा तीच सर्वांहून मोठें तीर्थ होतें, आतां तर यादवांमध्यें जें श्रीकृष्णाचें कीर्तिरूप तीर्थ उत्पन्न झालें, तें त्या गंगेपेक्षां सर्वत्र सुलभ व अधिक सामर्थ्ययुक्त असल्यामुळें त्यानें तें गंगारूप तीर्थ अल्प करून सोडिलें; ज्या श्रीकृष्णाच्या परम दयालुत्वामुळें शत्रु व मित्र हे सर्वहि सायुज्यमुक्ति पावले, जी आपणास प्राप्त होण्याकरितां ब्रह्मादिकांचा प्रयत्न चालला आहे ती कोणासहि प्राप्त न होणारी परिपूर्ण लक्ष्मी, ज्या श्रीकृष्णाच्या ॥२२१॥
आश्रयानें राहिली आहे, ज्याचें नांव श्रवण केलें असतां किंवा उच्चारिलें असतां तें सर्व प्रकारच्या अमंगळपणाचा नाश करितें, व ज्यानें अनेक ऋषींच्या वंशांमध्यें धर्माची प्रवृत्ति केली आहे, त्या कालमूर्ति व चक्रायुध धारण करणाऱ्या श्रीकृष्णाचें हें पृथिवीचा भार हरण करणें आश्चर्यकारक नाहीं, म्हणजे सर्वसंहारक

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कालमूर्ति व विशेषेंकरून अनंत प्रभावाचें चक्र धारण करणाऱ्या श्रीकृष्णास हें कृत्य कितीसें आहे ? कांहींच नाहीं ॥ ४७ ॥ देवकीचेठिकाणीं जन्मास आला असें वर्णनमात्र केलेला परंतु वस्तुतः जन्मरहित, इच्छामात्रानें अधर्म घालविण्यास समर्थ असूनहि क्रीडेकरितां आपल्या बाहूंनीं अधर्म दूर करणारा, अधिकाराची अपेक्षा न धरितां वृंदावनांतील स्थावरजंगम जीवांच्या संसारदुःखाचा नाश करणारा आणि सुंदर मंदहास्ययुक्त श्रीमुखानें गोकुळवासी व नगरवासी स्त्रियांना भोगद्वारा मोक्ष देणारा असा तो जगन्निवास भगवान् श्रीकृष्ण, श्रेष्ठ यादवांनीं सेवित होत्साता उत्कर्ष पावत आहे ॥ ४८ ॥ याप्रमाणें आपल्या वेदोक्तधर्माच्या रक्षणाकरितां, त्यात्या कार्यांच्या प्रसंगीं मत्स्यादिक अनेक अवतार धारण करणारा परंतु त्यांत विशेषेंकरून यादवश्रेष्ठ श्रीकृष्ण अशा या परमात्म्याचीं मनुष्यावताररूप चेष्टेचें अनुकरण

यत एवंभूतः श्रीकृष्णस्ततः स एव सर्वोत्तम इत्याह । जयतीति । जनानां जीवानां यो निवास आश्रयस्तेषु वा निवसत्यंतर्यामितया तथा स कृष्णो जयति । देवक्यां जन्मेति वादमात्रं यस्य सः । वस्तुतो अजन्मा । यदुवराः पर्षत्सभासेवकरूपा यस्य । इच्छामात्रेण निरसनसमर्थोऽपि क्रीडार्थं दोर्भिरधर्ममस्यन् क्षिपन् । स्थिरचरवृजिनघ्नोऽधिकारी विशेषानपेक्षमेव वृंदावनगततरुतृणलतादीनां संसारदुःखहंता । त[…] विलासवैदग्ध्यानपेक्षं व्रजवनितानां पुरवनितानां च सुस्मितेन शोभनहास्ययुतेन श्रीमत

जयति जननिवासो देवकीजन्मवादो यदुवरपर्षत्स्वैर्दोर्भिरस्यन्नधर्मम् ॥ स्थिरचरवृजिनघ्नः सुस्मितश्रीमुखेन व्रजपुरवनितानां वर्धयन्कामदेवम् ॥ ४८ ॥ इत्थं परस्य निजवर्त्मरिरक्षयात्तलीलातनोस्तदनुरूपविडंबनानि ॥ कर्माणि कर्मकषणानि यदूत्तमस्य श्रूयादमुष्य पदयोरनुवृत्तिमिच्छन् ॥ ४९ ॥ मर्त्यस्तया[…]नुसवमेधितया मुकुंदश्रीमत्कथाश्रवणकीर्तनचिंतयैति ॥ तद्धाम दुस्तरकृतांतजवापवर्गं ग्रामाद्वनं क्षितिभुजोऽपि ययुर्यदर्था[…] इति श्रीमद्भागवते महापुराणे दशमस्कंधे उत्तरार्धे श्रीकृष्णचरितानुवर्णनं नामनवतितमोऽध्यायः ॥ ९० ॥ […]मस्कंधः सपूर्वोत्तरार्धः ॥ ॥ ॥ छ ॥ ॥ ॥

मुखेनैव कामदेवं वर्धयन् । कामश्चासौ दीव्यति वि[…]म् । भोगद्वारा मोक्षप्रदमित्यर्थः ॥ ४८ ॥ तत्तत्कार्यविशेषैः स्वीकृतमत्स्यकूर्मादिनानामूर्तेर्विशेषतो यदूत्तमस्य सतः परस्य तदनुरूपानुकारी[…]ने श्रूयात् शृणुयादित्यर्थः ॥ ४९ ॥ अनुवृत्तेः फलमाह । मर्त्य इति । श्रीमत्याः कथायाः श्रवणकीर्तनयुक्तया चिंतया संवर्धितयाऽनुवृत्त्या त[…] लोकमेति । लोकत्वेऽपि कालानाकलितत्वमित्याह । दुस्तरेति । दुर्लभपुरुषार्थतामाह । ग्रामादिति ॥ ॥ ९० ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे [दशम]स्कंधे उत्तरार्धे श्रीधरस्वामिविरचितायां भवार्थदीपिकाख्यायां टीकायां नवतितमोऽध्यायः ॥ ९० ॥ ॥

करणारीं असून जीवांच्या कर्मबंधांना तोडून टाकणारीं जीं कर्में आहेत तीं [या] श्रीकृष्णाच्या चरणांचेठिकाणीं आसक्तीची इच्छा करणाऱ्या पुरुषानें, अवश्य श्रवण करावीं ॥ ४९ ॥ म्हणजे श्रीकृष्णाच्या सुंदर कथांच्या श्रवणकीर्तनसहित चिंतनानें प्रतिक्षणीं वृद्धिंगत झालेल्या त्या आसक्तीनेंच मनुष्य, काळाच्या दुस्तर वेगाची शांतता करणाऱ्या त्याच्या लोकास पावतो. तो लोक इतका दुर्लभ आहे कीं, मोठमोठे राजेहि ज्याच्या अभिलाषानें आपल्या राज्यादिकांचा त्याग करून श्रवणादि साधनांच्या अनुष्ठानांकरितां गावांतून निघून वनांत गेले आहेत ॥ ९० ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या दशमस्कंधांतील उत्तरार्धांत कृष्णक्रीडानिरूपणनामक हा नव्वदाव अध्याय समाप्त झाला ॥ ९० ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

इति श्री[illegible]ते दशमस्कंधे उत्तरार्धः

सटीकः सार्थश्च समाप्तः

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ अथ श्रीमद्भागवते एकादशस्कंधः प्रारभ्यते ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ श्रीगणेशाय नमः ॥ ॥ आतां ह्या अकराव्या स्कंधामध्यें नवयोगेश्वरादिकांच्या इतिहासद्वारा एकतीस अध्यायांनीं संक्षेपानें व विस्तारानें मोक्षमार्गाचें वर्णन केलें आहे. तें प्रथम नारदानें वसुदेवाला संक्षेपानें सांगितलें असून तेंच पुढें भगवंतानें उद्धवाला अनेकप्रकारच्या उपपत्तींनीं सविस्तर सांगितलें आहे. त्यांत पहिल्या अध्यायामध्यें वैराग्य उत्पन्न होण्याकरितां यादवांच्या कुळाला ब्राह्मणांचा शाप झाला असें सांगून त्या मिषानें अतिउत्कृष्ट असलेल्याहि विषयसुखांना नश्वरत्व दाखविलें आहे. नंतर चार अध्यायांनीं निमिराजा व नऊ योगेश्वर यांच्या संवादानें परमतत्त्वाचें निरूपण केलें आहे. नंतर सहाव्या अध्यायामध्यें भगवंताच्या व उद्धवाच्या संवादाचा प्रस्ताव

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीकृष्णाय नमः ॥ ॥ ओंनमः श्रीपरमहंसास्वादितचरणकमलचिन्मकरंदाय भक्तजनमानसनिवासाय श्रीरामचंद्राय ॥ विजयंते परानंदकृष्णपादरजःस्रजः ॥ या धृता मूर्ध्नि जायंते महेंद्रादिमहःस्रजः ॥ १ ॥ उक्तैकत्रिंशताऽध्यायैर्मुक्तिरेकादशे ततः ॥ जायंतेयेतिहासाद्यैः समासव्यासरूपतः ॥ २ ॥ नारदो वसुदेवाय समासेन न्यवर्णयत् ॥ भगवानुद्धवायाथ विस्तरेणोपपत्तिभिः ॥ ३ ॥ तत्र तु प्रथमेऽध्याये यदुवंशस्य संक्षयः ॥ उपक्षिप्तो विरागाय मौसलव्यपदेशतः ॥ ४ ॥ प्रवृत्तितः परानंदकृष्णक्रीडाऽनुवर्णिता ॥ तन्निवृत्त्या परानंदपदारोहोऽनुवर्ण्यते ॥ ५ ॥ एवं तावद्दशमस्कंधे भूभारावतारणाय निजविभूतिविभूषितयदुवंशस्य यदुवंशावतारितसकलसुरांशस्य भगवतः श्रीकृष्णस्य तदुचितप्रवृत्तिविडंबनेन तच्छ्रवणस्मरणादिपराणां परेषामानंदकारणं क्रीडा निरूपिता । अथेदानीमपरिमितयोगमायावैभवस्य भक्तानामात्मतत्त्वोपदेशपूर्वकं क्रीडार्थं भूतलेऽवतारितानां चाधिकारिणां सुरांशानां मौसलापदेशेन तत्तदधिकारपदप्रापणपूर्वकं च ब्रह्माद्यनुग्रहाय निजपदारोहो निरूप्यते । तत्र कुरुक्षेत्रयात्रायामविरक्तस्य वसुदेवस्य कर्मणाकर्मनिर्हारो यथा स्यान्नस्तदुच्यतामित्येवं कर्मयोगं पृष्टवतो नारदादिभिः कर्मयोगो निरूपितः । कर्मणा कर्मनिर्हार एष साधु निरूपितः ॥ यच्छ्रद्धयाप्तवित्तेन शुक्लेनेज्येत पूरुषः

॥ ॐनमो भगवते वासुदेवाय ॥ ॥ श्रीबादरायणिरुवाच ॥ कृत्वा दैत्यवधं कृष्णः सरामो यदुभिर्वृतः ॥ भुवोऽवतारयद्भारं जविष्ठं जनयन् कलिम् ॥ १ ॥ ये कोपिताः सुबहु पांडुसुताः सपत्नैर्दुर्द्यूतहेलनकचग्रहणादिभिस्तान् ॥ कृत्वा निमित्तमितरेतरतः समेतान्हत्वा नृपान्निरहरत्क्षितिभारमीशः ॥ २ ॥

इत्यादिना । तेन च विशुद्धसत्वस्य श्रीकृष्णरामौ परमेश्वरत्वेन ज्ञातवतः षड्गर्भानयनाध्याये श्रीकृष्णेनात्मतत्त्वमुपदिष्टम् । वचो वः समवेतार्थं तातैतदुपमन्महे ॥ यन्नः पुत्रान्समुद्दिश्य तत्त्वग्राम उदाहृत इत्यादिना । तच्च विषयभोगातिशयेन पुनस्तिरोहितमासीत्तदेवेदानीं नारदमुखेन प्रथमं पंचाध्याय्या निरूप्यते । तत्र प्रथमेऽध्याये वैराग्योत्पादनाय यदुकुलस्य ब्रह्मशापापदेशेनात्युन्नतविषयसुखानामप्यनित्यता प्रतिपाद्यते । ततश्चतुर्भिर्निमिजायंतेयसंवादेन सपरिकरं परमतत्त्वनिरूपणम् । ततः षष्ठे भगवदुद्धवसंवादप्रस्तावः । ततस्त्रयोविंशत्या उद्धवं प्रति भगवतस्तत्त्वनिरूपणम् । ततो द्वाभ्यां मौसलक्रीडेत्येवमेकत्रिंशताऽध्यायैरेकादशस्कंधस्य प्रवृत्तिः । तस्य च यथामति व्याख्यानमारभ्यते । तत्र मौसलप्रसंगार्थं पूर्वस्कंधार्थमनुवदति श्लोकद्वयेन । कृत्वेति । अवतारयदवातारयदित्यडागमो द्रष्टव्यः । जविष्ठं वेगवत्तरमतिशीघ्रम् । हिंसापर्यवसायिनमित्यर्थः । कलिं कलहम् ॥ १ ॥ एतद्विवृणोति । ये कोपिता इति । सपत्नैर्दुर्योधनादिभिः कोपिताः कोपं कारिताः । सुबहु यथा भवति तथा बहुवारानित्यर्थः । तदेवाह । दुर्द्यूतहेलनकचग्रहणादिभिरिति ।

आहे. पुढें तेवीस अध्यायांनीं भगवंतानें उद्धवाला तत्त्वनिरूपण केलें आहे. नंतर दोन अध्यायांनीं मौसलक्रीडा सांगितली आहे. याप्रमाणें एकतीस अध्यायांनीं अकराव्या स्कंधाची प्रवृत्ति आहे. त्यांत पहिल्या अध्यायामध्यें वैराग्य होण्यासाठीं मुसळसंबंधी आख्यान सांगून यदुवंशाचा क्षय होणार असें वर्णन केलें आहे ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला— हे राजा, बलरामासहित व यादवांनीं युक्त असा श्रीकृष्णानें पूतनादिक दैत्यांचा स्वतां वध करून आणि कौरव पांडवांमध्यें बलवत्तर कलह उत्पन्न करून, पृथ्वीचा भार उतरून टाकिला ॥ १ ॥ याचेंच स्पष्टीकरण करितो— दुर्योधनादिक शत्रूंनीं, कपटद्यूत, अपमान, सभेमध्यें द्रौपदीच्या केशांचें आकर्षण करणें, विष घालणें

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

व लाक्षागृहामध्यें जाळणें इत्यादिकेंकरून अनेक वेळां ज्या पांडवांना कोप आणिला होता त्याचें निमित्त करून, त्या पांडवांचा व कौरवांचा युद्ध करण्याचा बेत ठरल्यानंतर त्या उभयतांच्या सहायाकरितां दोन्हीपक्षांमध्यें एकठिकाणीं मिळालेल्या राजांना परस्पर मारवून श्रीकृष्णानें पृथिवीचा भार हरण केला. त्यांत जे पूतनादिक प्रकट दैत्य होते त्यांना स्वतांच मारिलें आणि जे दैत्य बांधवरूपी होते त्यांना आपसांत कलह उपस्थित करून मारविलें ॥ २ ॥ आपल्या बाहूंनीं रक्षण केलेल्या यादवांच्या हातून, पृथिवीला भारभूत असलेल्या दुसऱ्या राजांच्या सेना मारवून, ज्याच्या कर्तव्याचा तर्क कोणाच्यानेंहि करवत नाहीं अशा त्या कृष्णानें विचार केला कीं,— लोक-

दुर्द्यूतं कपटद्यूतम् । हेलनमवज्ञा । कचग्रहणं दुःशासनेन द्रौपद्याः केशाकर्षणम् । एतान्यादिर्येषां गरदानजतुगृहदाहादीनां तैः कृत्वा ये कोपितास्तान्पांडुसुतान्निमित्तं कृत्वा इतरेतरत उभयोः पक्षयोः समेतान्मिलितान्नृपान्हत्वा क्षितेर्भारं निरहरज्जहार । यद्वा ये कोपिता यैश्च कोपितास्तानितरेतरतः परस्परं निमित्तं कृत्वेत्यन्वयः । ये तावत्प्रकटदैत्याः पूतनादयस्तान्स्वयमेव हतवान् । ये तु दैत्या बांधवच्छद्मना स्थितास्तान्परस्परं निमित्तं विधाय हत्वा भूभारमपाकृतवानित्यर्थः ॥ २ ॥ अपिच । भूभारेत्यादि । अन्याश्च भुवो भारभूता राजपृतना राज्ञां पृतनाः सेनाः राज्ञस्तेषां पृतनाश्चेति वा । स्वबाहुभिर्गुप्तैः परिरक्षितैर्यदुभिर्विवाहादिच्छलेन निरस्य हत्वा । बाहुभिरिति बहुवचनं वस्तुतश्चतुर्भुजाभिप्रायेण । नन्वेवं कृष्णश्चिकीर्षतीति ज्ञात्वा कथं तस्मै यादवा न दुद्रुहुरिति स्म तत्राह । अप्रमेयः प्रमातुमशक्यः । चिंतामाह । मन्य इति । नन्विति वितर्के । अवनेर्भूमेर्भारो यद्यपि लोकप्रतीत्या गत-

भूभारराजपृतना यदुभिर्निरस्य गुप्तैः स्वबाहुभिरचिंतयदप्रमेयः ॥ मन्येऽवनेर्ननु गतोऽप्यगतं हि भारं यद्यादवं कुलमहो
अविषह्यमास्ते ॥ ३ ॥ नैवान्यतः परिभवोऽस्य भवेत्कथंचिन्मत्संश्रयस्य विभवोन्नहनस्य नित्यम् ॥ अंतः कलिं
यदुकुलस्य विधाय वेणुस्तंबस्य वह्निमिव शांतिमुपैमि धाम ॥ ४ ॥ एवं व्यवसितो राजन्सत्यसंकल्प ईश्वरः ॥
शापव्याजेन विप्राणां संजह्रे स्वकुलं विभुः ॥ ५ ॥

स्तथाऽप्यहमगतमेव मन्ये । हि निश्चितम् । यद्यस्मादविषह्यं सोढुमशक्यम् । यादवं कुलमित्यनेनैव स्ववंशत्वात्स्वयं हननमनुचितमिति सूचितम् ॥ ३ ॥ तर्हीदमप्यन्यैर्घात्यतां तत्राह । नैवेति । अन्यतो देवादिभ्योऽपि यादवकुलस्य परिभवस्तिरस्कारो न भवेत् । कुतः । मत्संश्रयस्य मां संश्रयत इति मत्संश्रयं कुलं तस्य । किंच नित्यं विभवोन्नहनस्य विभवैर्गजतुरगादिभिरुच्छृंखलस्य । यद्वा तर्हीदं किमिति संहर्तव्यं तत्राह । विभवोन्नहनस्येति । तस्मादेवं करिष्यामीत्याह । अंतः कलिमिति । शांतिमुपशममुपैमि । वर्तमानसामीप्ये वर्तमानवद्वा । उपैष्यामि तदनंतरं धाम च वैकुंठाख्यमुपैष्यामीत्यर्थः ॥ ४ ॥ व्यवसितः कृतनिश्चयः । संजह्रे उपसंहृतवान् ॥ ५ ॥

दृष्टीनें जरी भूमीचा भार गेला आहे तथापि तो भार न गेल्यासारखाच आहे असें मी खरोखर मानितों. कारण, अहो, ज्याचें सहन करणें अतिशय अशक्य आहे असें हें यादवांचें कुळ अजून जशाचेंतसेंच राहिलें आहे ॥ ३ ॥ तर हें दुसऱ्यांकडून मारवावें असें कोणी ह्मणेल तर ह्मणतो कीं,— या यादवकुळाचा पराभव दुसऱ्या देवादिकांकडून कोणत्याहि प्रकारें होणार नाहीं. कारण, यानें माझा आश्रय केला आहे आणि हें हत्ती घोडे इत्यादिक वैभवानें उच्छृंखलहि आहे, ह्मणून याचा संहार केल्याखेरीज चालणार नाहीं; यास्तव जसा वेळूच्या बेटामध्यें घर्षणानें आपोआप अग्नि उत्पन्न होतो त्याप्रमाणें या यादवांच्या कुळांत आतां थोड्याच काळामध्यें कलह उत्पन्न करीन आणि मी शांतता पावोन आपल्या वैकुंठनामक लोकीं गमन करीन ॥ ४ ॥ हे राजा, याप्रकारेंकरून सत्यसंकल्प व पाहिजे तें करण्यास समर्थ अशा श्रीकृष्णानें ॥ १ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

निश्चय करून, ब्राह्मणाच्या शापमिषानें आपल्या कुळाचा संहार केला ॥ ५ ॥ नंतर लोकामध्यें कोठेंहि जिच्यापेक्षां अधिक सौंदर्य नाहीं किंवा जिच्यापासून लोकांना सौंदर्य प्राप्त झालें आहे अशा आपल्या मूर्तीनें लोकांचे नेत्र आपले ठिकाणीं आसक्त करून घेऊन, तसेंच आपल्या उपदेशरूप वाणीनें, त्या वाणीचें स्मरण करणाऱ्या लोकांचें चित्त आकर्षण करून व धुरळ्यामध्यें उमटलेल्या आपल्या चरणचिन्हांनीं त्यांना पाहणाऱ्या लोकांच्या गमनादिक चेष्टा दुसरेकडे प्रवृत्त होण्याचा अटकाव करून आणि पुढें होणारे लोक, इच्यायोगानें अनायासानें संसारसमुद्राला तरून जातील अशा विचारानें कवींच्या उत्तमश्लोकांत वर्णन केली जाणाऱ्या आपल्या कीर्तीचा पृथिवीवर

तदेवमवतारप्रयोजनं सर्वं संपाद्य स्वं लोकं जगामेत्याह लोकद्वयेन । स्वमूर्त्येति । लोकानां लावण्यस्य निर्मुक्तिस्त्यागो यया । यामपेक्ष्य लोकेषु लावण्यं नास्तीत्यर्थः । यद्वा लोकेभ्यो लावण्यस्य निर्मुक्तिर्दानं यतः । यत्संपर्केण लोका लावण्यवंतो भवंतीत्यर्थः । तया स्वमूर्त्या नृणां लोचनमाच्छिद्याकृष्य ततोऽन्यस्यावलोकने लोचनस्याप्रवृत्तेः । तथा स्वगीर्भिस्ता गिरः स्मरतां चित्तं चाच्छिद्य । तथा पदैस्तत्र तत्रांकितैस्तानि पदानीक्षतामीक्षमाणानामन्यतो गमनादिकाः क्रियाश्चाच्छिद्य । तदानींतनानां सर्वेषां चक्षुरादिप्रवृत्तीः स्वैकनिष्ठाः कृत्वेत्यर्थः ॥ ६ ॥ किंच । इतउपरि जनिष्यमाणानां संसारतरणाय कौ पृथिव्यां शोभनाः श्लोकाः सुश्लोकाः कवीनां यस्यां तां स्वकीर्तिं वितत्य विस्तार्यानया कीर्त्या अंजसा सुखेनैव नु निश्चितं तमस्तरिष्यंतीत्यभिप्रेत्येश्वरः स्वं पदं स्थानमगादिति ॥ ७ ॥ अब्रह्मण्येभ्योऽदातृभ्यो वाऽसेवकेभ्यो वा विप्राः कुप्यंति वृष्णयस्तु न

स्वमूर्त्या लोकलावण्यनिर्मुक्त्या लोचनं नृणाम् ॥ गीर्भिस्ताः स्मरतां चित्तं पदैस्तानीक्षतां क्रियाः ॥ ६ ॥ आच्छिद्य कीर्तिं सुश्लोकां वितत्य ह्यंजसा नु कौ ॥ तमोऽनया तरिष्यंतीत्यगात्स्वं पदमीश्वरः ॥ ७ ॥ राजोवाच ॥ ब्रह्मण्यानां वदान्यानां नित्यं वृद्धोपसेविनाम् ॥ विप्रशापः कथमभूद्वृष्णीनां कृष्णचेतसाम् ॥ ८ ॥ यन्निमित्तः स वै शापो यादृशो द्विजसत्तम ॥ कथमेकात्मनां भेद एतत्सर्वं वदस्व मे ॥ ९ ॥ श्रीशुक उवाच ॥ बिभ्रद्वपुः सकलसुंदरसन्निवेशं कर्माचरन्भुवि सुमंगलमाप्तकामः ॥ आस्थाय धाम रममाण उदारकीर्तिः संहर्तुमैच्छत कुलं स्थितकृत्यशेषः ॥ १० ॥

तथेत्याह । ब्रह्मण्यानामित्यादिना । किंच कोपे जातेऽपि कृष्णचेतसां कथमभूत्कथं प्रादुरभूदित्यर्थः ॥ ८ ॥ अतः स्पष्टस्य निमित्तस्याभावान्निमित्तांतरं पृच्छति । यन्निमित्त इति । एकात्मनामेकचित्तानां कथं भेदः कलहः ॥ ९ ॥ ईश्वरेच्छैवात्र निमित्तमिति परिहरति । बिभ्रदिति । सकलानां सुंदरवस्तूनां सन्निवेशो विन्यासविशेषो यस्मिंस्तद्वपुर्बिभ्रत् तर्हि किमितिसौंदर्याद्विषयपरः न सुमंगलं कर्माचरन् । तत्किं कयाऽपि कामनया न आप्तकामः । तर्हि किमिति कर्माचरति । धाम द्वारवत्याख्यं गृहमास्थाय रममाणः । गृहे रममाणान्कर्म ग्राहयितुमित्यर्थः । ननु किमाप्तकामस्य गृहरत्या कर्मभिर्वा तत्राह । उदारकीर्तिः उदारा बहुलप्रदा कीर्तिर्यस्य सः । कीर्तिवितानार्थमित्यर्थः । एवं परमैश्वर्येण वर्तमान एव कुलं संहर्तुमैच्छत् । तत्कस्य हेतोः । स्थितः कृत्ये भूभारहरणे शेषो यस्य सः ॥ १० ॥

विस्तार करून, प्रभु श्रीकृष्णानें आपल्या स्थानास गमन केलें ॥ ६ ॥ ७ ॥ परीक्षित राजा म्हणाला—हे शुकाचार्य, जे ब्राह्मणांचे अभक्त, अदाते, व वृद्ध पुरुषांची सेवा न करणारे असतात त्या पुरुषांवरच ब्राह्मण रागावतात. यादव तर ब्राह्मणांचे भक्त, महादाते, निरंतर वृद्ध पुरुषांची सेवा करणारे व श्रीकृष्णाचें चिंतन करणारे होते, त्यांना ब्राह्मणांचा शाप कसा झाला ? ॥ ८ ॥ हे ब्राह्मणश्रेष्ठा, तो शाप, कोणत्या निमित्तानें झाला ? कोणत्या प्रकारचा होता ? व एकचित्त असणाऱ्या यादवांचा परस्पर कलह कसा झाला ? हें सर्व मला सांग ॥ ९ ॥ यांविषयीं ईश्वराची इच्छाच कारण झाली असें उत्तर सांगत श्रीशुकाचार्य म्हणाला-पूर्णमनोरथ व उदारकीर्ति असा

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भगवान्, सर्वसुंदर वस्तूंचा ठेवाच असें शरीर धारण करून, भूमीवर असलेल्या द्वारका नगरींत राहून क्रीडा करीत व शुभकारक कर्मे आचरण करीत असतां त्यानें, भूमिभार हरण करण्याचेंमात्र आपलें कृत्य अवशेष राहिलें आहे, असें मनांत आणून, आपल्या कुळाचा संहार करण्याची इच्छा धारण केली ॥ १० ॥ लोकांनीं केलेलीं कितीएक (अश्वमेधादिक) कर्मे, केवळ पुण्यच उत्पन्न करितात, कितीएक (पुत्र लालनादिक) कर्मे, तत्काळ सुख देतात, कांहींएक (प्रायश्चित्तादिक) कर्मे, केवळ पापाचा नाश करितात, श्रीकृष्ण भगवंतानें तर–केवळ कीर्तनादिकेंकरूनच पुण्य देणारीं, अत्यंत सुखरूपी आणि गायन करणाऱ्या लोकांच्या कलियुगसंबंधी पापांचा नाश करणारीं अशीं कर्मे करून, कालरूपानें वसुदेवाच्या घरीं राहणाऱ्या त्यानें, कर्मे करण्याकरितां ज्या ऋषींना बोलाविलें होतें त्यांजकडून सर्व कर्मे करवून, त्यांना जाण्याविषयीं आज्ञा दिली असतां, ते ऋषि, द्वारकेच्या जवळच असलेल्या पिंडारकनामक क्षेत्रास निघून गेले ॥ ११ ॥ ते ऋषि–विश्वामित्र, असित, कण्व, दुर्वासा, भृगु, अंगिरा, कश्यप,

---

ईश्वरेच्छयोत्थितं ब्रह्मशापनिमित्तं वक्तुमाह । कर्माणीति । कर्मार्थमाहूताः कर्माणि कृत्वा विसृष्टा मुनयः पिंडारकं समगमन्नित्यन्वयः । विसृष्टाः प्रस्थापिताः पूर्वोक्तामुदारकीर्तितां विवृण्वन्कर्माणि विशिनष्टि । पुण्यनिवहानीत्यादित्रिभिः पदैः । कानिचिदश्वमेधादिकर्माणि पुण्यमेव जनयंति । पुत्रोपलालनादीनि तु तत्काले सुखमेव कुर्वंति । प्रायश्चित्तादीनि तु पापमेव हरंति । एतानि तु सर्वतोमुखानीत्याह । पुण्यनिवहानि कीर्तनादिना पुण्यानि निवहंति प्रापयंतीति । तथा सुमंगलान्यतिसुखात्मकानि । गायतो जगतः कलिमलापह-

कर्माणि पुण्यनिवहानि सुमंगलानि गायज्जगत्कलिमलापहराणि कृत्वा ॥ कालात्मना निवसता यदुदेवगेहे पिंडारकं समगमन्मुनयो विसृष्टाः ॥ ११ ॥ विश्वामित्रोऽसितः कण्वो दुर्वासा भृगुरंगिराः ॥ कश्यपो वामदेवोऽत्रिर्वसिष्ठो नारदादयः ॥ १२ ॥ क्रीडंतस्तानुपव्रज्य कुमारा यदुनंदनाः ॥ उपसंगृह्य पप्रच्छुरविनीता विनीतवत् ॥ १३ ॥ ते वेषयित्वा स्त्रीवेषैः सांबं जांबवतीसुतम् ॥ एषा पृच्छति वो विप्रा अंतर्वत्न्यसितेक्षणा ॥ १४ ॥ प्रष्टुं विलज्जती साक्षात्प्रब्रूतामोघदर्शनाः ॥ प्रसोष्यंती पुत्रकामा किंस्वित्संजनयिष्यति ॥ १५ ॥ एवं प्रलब्धा मुनयस्तानूचुः कुपिता नृप ॥ जनयिष्यति वो मंदा मुसलं कुलनाशनम् ॥ १६ ॥

राणि कृत्वा । मुनिप्रस्थापने हेतुः । कालात्मना संहारकरूपेण यदुदेवगेहे वसुदेवगृहे निवसता । स्वकुलं संजिहीर्षतेत्यर्थः । पिंडारकं ततो नातिदूरं तीर्थविशेषम् ॥ ११ ॥ १२ ॥ उपसंगृह्य पादग्रहणं कृत्वा ॥ १३ ॥ प्रश्नप्रकारमाह । ते वेषयित्वेति द्वयेन । हे अमोघदर्शना विप्राः । एषा अंतर्वत्नी गर्भिणी ॥ १४ ॥ वो युष्मान् साक्षात्प्रष्टुं विलज्जती लज्जमानाऽस्मन्मुखेन पृच्छति । प्रसोष्यंती आसन्नप्रसवा । किंस्वित्संजनयिष्यति कन्यां वा पुत्रं वा तत्प्रब्रूत ॥ १५ ॥ प्रलब्धा वंचिताः ॥ १६ ॥

वामदेव, अत्रि, वसिष्ठ व नारद इत्यादिक होते ॥ १२ ॥ ते ऋषि, कांहीं दिवसपर्यंत पिंडारक क्षेत्रांत राहिले असतां, एकेवेळीं यादवांचे कुमार, खेळतां खेळतां त्या ऋषींजवळ गेले. त्यावेळीं त्यांनीं जांबवतीचा पुत्र जो सांब त्याला स्त्रीवेषानें नटवून आपल्या बरोबर नेलें होतें. त्या उद्धट परंतु नम्र असल्यासारखी आपली खोटीच स्थिति दाखविणाऱ्या कुमारांनीं, त्या ऋषींचे चरण ग्रहण करून प्रश्न केला कीं,– हे अमोघज्ञानसंपन्न ब्राह्मणहो, ही गर्भिणी स्त्री प्रसूत व्हावयास झाली आहे, इला पुत्र व्हावा अशी इच्छा आहे, ही प्रत्यक्ष आपल्या मुखानें तुम्हास विचारण्याविषयीं लज्जा पावत असून आमच्या मुखानें तुम्हांस विचारीत आहे तर हिला 'पुत्र किंवा कन्या' काय होईल तें सांगा ॥ १३ ॥ १४ ॥ १५ ॥ हे राजा, याप्रमाणें फसविलेले ते ऋषी, क्रुद्ध होऊन त्या कुमारांस म्हणाले कीं– हे मंदभाग्य हो, ही स्त्री तुमच्या कुळाचा नाश करणारें मुसळ प्रसवेल ॥ १६ ॥ ॥ २ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हें ऐकून अत्यंत भिऊन गेलेल्या त्या कुमारांनीं लागलेंच सांबाचें पोट सोडून पाहिलें तों त्यांत कुळाचा संहार करणारें लोखंडाचें मुसळ त्यांच्या दृष्टीस पडलें ॥ १७ ॥ तेव्हां ते आपल्यामध्यें ह्मणूं लागले कीं, अहो ! मंदभाग्य अशा आह्मीं हें काय केलें ? लोक आह्मांला आतां काय ह्मणतील ? असें बोलून विव्हळ झालेले ते कुमार, मुसळ घेऊन आपल्या घरीं गेले ॥ १८ ॥ नंतर तें मुसळ राजसभेमध्यें नेऊन, ज्यांच्या मुखाची शोभा अगदीं म्लान होऊन गेली आहे अशा त्या कुमारांनीं, सर्व यादवांच्या सन्निध उग्रसेन राजाला आपण केलेलें सर्व कृत्य कळविलें परंतु श्रीकृष्णाला मात्र कळविलें, नाहीं ॥ १९ ॥ हे राजा, द्वारकावासी लोक, तो अमोघ ब्राह्मणाचा शाप ऐकून, तसेंच तें मुसळ प्रत्यक्ष पाहून विस्मित व भयाभीत झाले ॥ २० ॥ तेव्हां यादवांचा राजा अशा त्या उग्रसेनानेंहि श्रीकृष्णाला न विचारितां त्या मुसळाचें चूर्ण करवून तें चूर्ण

तस्मिन्नुदरे । अयस्मयं लोहमयम् ॥ १७ ॥ मंदभाग्यैर्नोऽस्माभिः किमेतत्कृतम् । नोऽस्मान् किं वदिष्यंतीति विह्वलिताः संतो मुसलमादाय गेहान्ययुः ॥ १८ ॥ राज्ञे उग्रसेनाय न तु श्रीकृष्णाय ॥ १९ ॥ २० ॥ आहुक उग्रसेनः । सोऽपि श्रीकृष्णमपृष्ट्वैव प्रास्यत्प्रक्षिप्तवान् । अस्य मुसलस्य चूर्णीक्रियमाणस्यावशेषितं लोहं च प्रास्यत् ॥

तच्छ्रुत्वा तेऽतिसंत्रस्ता विमुच्य सहसोदरम् ॥ सांबस्य ददृशुस्तस्मिन्मुसलं खल्वयस्मयम् ॥ १७ ॥ किं कृतं मंदभाग्यैर्नः किं वदिष्यंति नो जनाः ॥ इति विह्वलिता गेहानादाय मुसलं ययुः ॥ १८ ॥ तच्चोपनीय सदसि परिम्लानमुखश्रियः ॥ राज्ञ आवेदयां चक्रुः सर्वयादवसन्निधौ ॥ १९ ॥ श्रुत्वाऽमोघं विप्रशापं दृष्ट्वा च मुसलं नृप ॥ विस्मिता भयसंत्रस्ता बभूवुर्द्वारकौकसः ॥ २० ॥ तच्चूर्णयित्वा मुसलं यदुराजः स आहुकः ॥ समुद्रसलिले प्रास्यल्लोहं चास्यावशेषितम् ॥ २१ ॥ कश्चिन्मत्स्योऽग्रसील्लोहं चूर्णानि तरलैस्ततः ॥ उह्यमानानि वेलायां लग्नान्यासन्किलैरकाः ॥ २२ ॥ मत्स्यो गृहीतो मत्स्यघ्नैर्जालेनान्यैः सहार्णवे ॥ तस्योदरगतं लोहं स शल्ये लुब्धकोऽकरोत् ॥ २३ ॥ भगवान्ज्ञातसर्वार्थ ईश्वरोऽपि तदन्यथा ॥ कर्तुं नैच्छद्विप्रशापं कालरूप्यन्वमोदत ॥ २४ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे विप्रशापो नाम प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥

॥ २१ ॥ तरलैस्तरंगैः ॥ २२ ॥ अन्यैर्मत्स्यैः सह । शल्ये शराग्रे ॥ २३ ॥ ज्ञाताः सर्वेऽर्था येन स ईश्वरोऽपि समर्थोऽपि सन्नन्यथा कर्तुं नैच्छत् किं त्वन्वमोदत । यतः कालरूपी ॥ २४ ॥ इति श्रीमद्भागवते एकादशस्कंधे भावार्थदीपिकायां टीकायां प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥

आणि त्या मुसळाचें अवशिष्ट राहिलेलें लोखंड हीं सर्व समुद्राच्या पाण्यांत फेंकून देवविलीं ॥ २१ ॥ तें लोखंड एका मत्स्यानें गिळिलें व ते चूर्णाचे कण, लाटांनीं वहात वहात जाऊन समुद्राच्या कांठीं लागून ते तेथें लव्हाळ्याच्या रूपानें उगवले ॥ २२ ॥ पुढें समुद्रामध्यें कोळ्यांनीं दुसऱ्या मत्स्यांसहवर्तमान जाळ्यानें तो मत्स्यहि धरिला, तो एका लुब्धकानें (पारध्यानें) विकत घेतला. त्याला फाडतयेवेळीं त्याच्या पोटांत एक लोखंडाचा तुकडा सांपडला तो त्या लुब्धकानें आपल्या बाणाच्या अग्रभागीं लावून ठेविला ॥ २३ ॥ भगवान श्रीकृष्ण तर ते सर्व प्रकार जाणणारा व तो शाप चुकविण्यास समर्थहि होता, परंतु त्यानें तो ब्राह्मणाचा शाप अन्यथा करण्याची इच्छाच केली नाहीं, तर आपण काळरूपी असल्यामुळें त्याला अनुमोदनच दिलें ॥ २४ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या एकादशस्कंधांत विप्रशापकथनरूप हा

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पहिला अध्याय समाप्त झाला ॥ १ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ आतां ह्या दुसऱ्या अध्यायामध्यें, भक्तीनें प्रश्न करणाऱ्या वसुदेवाला नारदऋषीनें, निमिराजा व नऊ योगेश्वर यांच्या संवादानें भगवत्संबंधी धर्मांचें वर्णन केलें आहे ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे कुरुकुलदीपका राजा, श्रीकृष्णाच्या दर्शन, नमस्कारवगैरे उपासनेविषयीं उत्कंठित असा नारदऋषि, त्या कृष्णाच्या बाहूंनीं रक्षण केलेल्या द्वारकेमध्यें 'श्रीकृष्णानें वारंवार दुसरेठिकाणीं जाण्यास पाठविला असतांहि' पुनः पुनः येऊन तेथेंच राहत असे ॥ १ ॥ हे राजा, सर्वहि लोकांमध्यें मृत्यूचें भय असणारा कोण बरें इंद्रियवान् पुरुष, ब्रह्मरुद्रादिक देवश्रेष्ठांनींहि उपासना करण्यास योग्य अशा श्रीकृष्णाच्या चरणकमलाचें सेवन करणार नाहीं ? तर सर्वहि करतीलच ॥ २ ॥ एकेवेळीं आपल्या घरीं आलेल्या व पूजा स्वीकारून सुखानें आसनावर बसलेल्या त्या नारदाला नमस्कार करून

द्वितीये निमिजायंतसंवादेनाह नारदः ॥ धर्मान् भागवतान् भक्त्या वसुदेवाय पृच्छते ॥ १ ॥ अभीक्ष्णं प्रस्थापितोऽपि पुनः पुनरवात्सीदित्यर्थः । ननु नारदस्य दक्षादिशापात्नैकत्र वासः संभवतीत्याशंक्याह । गोविंदभुजगुप्तायामिति न तस्यां शापादेः प्रभाव इत्यर्थः । कृष्णोपासने लालसा औत्कंठ्यं यस्य सः ॥ १ ॥ यद्भजने मुक्तानामपीदृशमौत्सुक्यं तं को नाम भजेदित्याह । को न्विति । इंद्रियवानिति इंद्रियवत्त्वमात्रमेव यत्राधिकारिविशेषणमित्यर्थः । सर्वतः सर्वेष्वपि लोकेषु मृत्युर्यस्य सः ॥ २ ॥ ३ ॥ यथा पित्रोर्यात्रा आगमनमपत्यानां स्वस्तये मंगलाय । यथा चोत्तमश्लोकस्य वर्त्मभूतानां महतां यात्रा कृपणानां स्वस्तये तथा भगवद्रूपस्य भवतो यात्रा सर्वदेहिनां स्वस्तय

श्रीशुक उवाच ॥ गोविंदभुजगुप्तायां द्वारवत्यां कुरूद्वह ॥ अवात्सीन्नारदोऽभीक्ष्णं कृष्णोपासनलालसः ॥ १ ॥ को नु राजन्निंद्रियवान्मुकुंदचरणांबुजम् ॥ न भजेत्सर्वतो मृत्युरुपास्यममरोत्तमैः ॥ २ ॥ तमेकदा तु देवर्षिं वसुदेवो गृहागतम् ॥ अर्चितं सुखमासीनमभिवाद्येदमब्रवीत् ॥ ३ ॥ वसुदेव उवाच ॥ भगवन्भवतो यात्रा स्वस्तये सर्वदेहिनाम् ॥ कृपणानां यथा पित्रोरुत्तमश्लोकवर्त्मनाम् ॥ ४ ॥ भूतांना देवचरितं दुःखाय च सुखाय च ॥ सुखायैव हि साधूनां त्वादृशामच्युतात्मनाम् ॥ ५ ॥ भजंति ये यथा देवान्देवा अपि तथैव तान् ॥ छायेव कर्मसचिवाः साधवो दीनवत्सलाः ॥ ६ ॥

इति ॥ ४ ॥ देवैरपि महतामुपमानमनुचितमित्याह । भूतानामिति । देवानां चरितमतिवृष्ट्यादिना भूतानां दुःखायापि भवति । त्वादृशां त्वया सदृशानाम् । अच्युते आत्मा येषां तेषाम् ॥ ५ ॥ किंच सुखं कुर्वंतोऽपि देवा भजनानुसारेण कुर्वंति न तथा साधव इत्याह । भजंतीति । छायेव यथा पुरुषो यावत्करोति तावदेव तस्य छायापि तथा । कर्मसचिवाः कर्मसहायाः ॥ ६ ॥

वसुदेव ह्मणाला कीं, ॥ ३ ॥ वसुदेव ह्मणाला– हे भगवन् नारदा, जसें आईबापांचें येणें बालकांच्या कल्याणार्थ असतें किंवा जसें भगवंताचे मार्गभूत अशा साधूंचें येणें, आध्यात्मिकादि तापत्रयानें तप्त झालेल्या दीन लोकांच्या कल्याणार्थ असतें त्याप्रमाणें तुझा संचार सर्व प्राणिमात्रांच्या मंगलाकरितां आहे ॥ ४ ॥ देवांपेक्षांहि साधु श्रेष्ठ आहेत. कारण, देवांचें चरित्र, प्राणिमात्रांनां वृष्ट्यादिद्वारा सुख देतें खरें परंतु तें एखादे वेळीं अतिवृष्ट्यादिद्वारा दुःखहि देतें आणि भगवत्स्वरूपीं चित्त लागलेल्या तुझ्यासारख्या साधूंचें चरित्र तर सर्व लोकांनां सुखच देत असतें ॥ ५ ॥ आणि देव सुख देतात परंतु जे लोक देवांचें जसें लहानमोठ्या यज्ञादिकर्मेंकरून आराधन करितात त्यांनां देवहि त्या त्या कर्मांच्या तारतम्यानुसारें तसेंच फळ देतात मिळून देव हे, जशी पुरुषाची छाया, पुरुष कर्म करील तसें अनुकरण करित्ये ॥ ३ ॥
त्याप्रमाणें कर्मानुरूप फल देणारे आहेत आणि तुझ्यासारखे साधु तर दीनवत्सल आहेत ह्मणजे आपल्यावर उपकार होण्याची अपेक्षा न धरितां दुसऱ्यांचा ताप घालविणारे

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आहेत ॥ ६ ॥ यास्तव हे ब्रह्मन्, तुझ्या आगमनानें, सत्कारानें व संभाषणादिकेंकरूनच जरी आह्मी कृतार्थ झालों आहों तरी आतां, ज्या धर्मांनीं तुला भगवान् प्रसन्न झाला आहे व ज्या धर्मांचें श्रद्धापूर्वक श्रवण करणारा पुरुष, सर्व भयांपासून मुक्त होतो. ते भागवत धर्म कोणते? तें विचारितों ॥ ७ ॥ आतां तूं कदाचित् मला, तुझ्याहून दुसरा भगवत्प्रसादाचें पात्र कोण आहे? असें ह्मणशील तर– देवाच्या मायेनें मोहित झालेल्या मी, पूर्वजन्मीं या भूमीवर देवानें आपला पुत्र व्हावें या हेतूनेंच त्या मुक्तिदात्या भगवंताचें आराधन केलें आहे, मोक्षाकरितां केलें नाहीं. ह्मणून आतां भागवतधर्म विचारणें प्राप्त झालें आहे ॥ ८ ॥ यास्तव हे सुव्रता नारदा, आतां तुझ्या कृपेनें, अनेक दुःखांनीं युक्त व सर्वबाजूंकडून भय असलेल्या या संसारापासून जसे आह्मी अनायासानें मुक्त होऊं तसें स्पष्टरीतीनें तूं आह्मांस शिक्षण कर ॥ ९ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–

तदेवं यद्यपि भवत आगमनमात्रेणैव वयं कृतार्थास्तथापि पृच्छामः । तवेति । तव यैर्धर्मैः प्रसन्नो भगवांस्तानित्यर्थः ॥ ७ ॥ ननु त्वत्तोऽपि किमन्यो भगवत्प्रसादपात्रमस्ति तत्राह । अहं किलेति । भुवि प्रजार्थोऽपूजयं पुत्रलाभप्रयोजनः सन् पूजितवान् । किलेति स्मृतीग्रहे भगवदुक्तमनुस्मरति ॥ ८ ॥ अतो यथा मुच्येमहि तथा नोऽस्मान् शाधि शिक्षय । विचित्राणि व्यसनानि यस्मिन्संसारे तस्मात्संसारात् । तथा विश्वतः सर्वतो भयं यस्मिंस्तस्मात् । भवद्भिर्हेतुभूतैः । अंजसाऽनायासेन । अद्धा साक्षात् ॥ ९ ॥

ब्रह्मंस्तथापि पृच्छामो धर्मान्भागवतांस्तव ॥ यान् श्रुत्वा श्रद्धया मर्त्यो मुच्यते सर्वतोभयात् ॥ ७ ॥ अहं किल पुराऽनंतं प्रजार्थो भुवि मुक्तिदम् ॥ अपूजयं न मोक्षाय मोहितो देवमायया ॥ ८ ॥ यथा विचित्रव्यसनाद्भवद्भिर्विश्वतो भयात् ॥ मुच्येमह्यंजसैवाद्धा तथा नः शाधि सुव्रत ॥ ९ ॥ श्रीशुक उवाच ॥ राजन्नेवं कृतप्रश्नो वसुदेवेन धीमता ॥ प्रीतस्तमाह देवर्षिर्हरेः संस्मारितो गुणैः ॥ १० ॥ ॥ नारद उवाच ॥ सम्यगेतद्व्यवसितं भवता सात्वतर्षभ ॥ यत्पृच्छसे भागवतान्धर्मांस्त्वं विश्वभावनान् ॥ ११ ॥ श्रुतोऽनुपठितो ध्यात आदृतो वाऽनुमोदितः ॥ सद्यः पुनाति सद्धर्मो देव विश्वद्रुहोऽपि हि ॥ १२ ॥ त्वया परमकल्याणः पुण्यश्रवणकीर्तनः ॥ स्मारितो भगवानद्य देवो नारायणो मम ॥ १३ ॥

हरेर्गुणैर्वर्णनीयत्वेन प्रस्तुतैर्हरिः संस्मारित इत्यर्थः ॥ १० ॥ प्रीतिमाविष्करोति सम्यगिति त्रिभिः । पृच्छसे पृच्छसि । विश्वभावनान्सर्वशोधकान् ॥ ११ ॥ आदृत आस्तिक्येन गृहीतः । अनुमोदितः परैः क्रियमाणः संस्तुतः । सद्धर्मो भागवतो धर्मः । देव हे वसुदेवेत्यर्थः । यद्वा देवेभ्यो विश्वस्मै च द्रुह्यंति ये तानपि ॥ १२ ॥ किंच त्वया महानुपकारः कृत इत्याह । त्वयेति । पुण्ये श्रवणकीर्तने यस्य सः ॥ १३ ॥

हे राजा, याप्रकारें बुद्धिमान् वसुदेवानें प्रश्न केलेला व हरीच्या गुणांचें वर्णन करण्याचा प्रसंग आला ह्मणून त्या गुणांनींच हरीचें स्मरण करविलेला तो नारद, संतुष्ट होऊन, त्या वसुदेवास ह्मणाला कीं, ॥ १० ॥ नारद ह्मणाला– हे यादवश्रेष्ठा वसुदेवा, ज्या अर्थी तूं सर्वांनां पवित्र करणारे भागवत धर्म विचारीत आहेस त्याअर्थी तूं हा फार चांगला निश्चय केला आहेस. ह्मणजे या तुझ्या निश्चयानें लोकांमध्यें भागवतधर्मांची प्रसिद्धि होऊन पुष्कळ लोक कृतार्थ होतील ॥ ११ ॥ हे वसुदेवा, श्रवण केलेला, वारंवार पठन केलेला, ध्यान केलेला, आस्तिक्यबुद्धीनें ग्रहण केलेला किंवा दुसऱ्यांनीं आचरण केला असतां स्तविलेला भागवतधर्म, जगाचा द्रोह करणाऱ्याहि लोकांनां तत्काल पवित्र करितो ॥ १२ ॥ हे वसुदेवा, ज्याचीं श्रवणकीर्तनें पवित्र आहेत अशा परम कल्याणरूप, भगवान् नारायणाचें, आज मला तूं स्मरण करविलें आहेस

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हा माझ्यावर मोठा उपकार केला आहेस ॥ १३ ॥ या भगवद्धर्मांच्या निर्णयाविषयीं ऋषभयोगींद्राच्या पुत्रांचा व महात्म्या जनक राजाचा संवादरूप हा पुरातन इतिहास तत्त्ववेत्ते पुरुष सांगत असतात, तो मी तुला सांगतों श्रवण कर ॥ १४ ॥ स्वायंभुव मनूचा प्रियव्रतनामक जो पुत्र होता त्याचा पुत्र आग्नीध्र झाला, त्याचा नाभि व त्याचा पुत्र ऋषभ झाला ॥ १५ ॥ तो ऋषभदेव, मोक्षधर्म प्रवृत्त करण्याच्या इच्छेनें वासुदेवाचा अवतार झाला होता असें मोठमोठ्यांनीं वर्णन केलें आहे. त्या ऋषभालाहि वेद पारंगत असे शंभर पुत्र झाले ॥ १६ ॥ त्यांमध्यें ज्येष्ठ पुत्र भरत होय. तो मोठा भगवत्परायण होता, हें पूर्वीचें अजनाभनामक अद्भुत खंड, ज्या भरताच्या नांवानें भरत-

अत्रापि भगवद्धर्मनिर्णयेऽपि । विदेहस्य जनकस्य ॥ १४ ॥ आर्षभाणामुत्पत्तिं सान्वयां विविच्य कथयति प्रियव्रत इति सप्तभिः ॥ १५ ॥ मोक्षधर्मविवक्षया मोक्षधर्माणां प्रवर्तनेच्छया अवतीर्णं वासुदेवांशमाहुः । तस्य च वेदपारगं सुतशतमासीत् ॥ १६ ॥ तेषामृषभसुतानां मध्ये नवयोगीश्वराणां चरितं वक्तुमितरेषां चरितं ततो विविच्याह । तेषामिति । एतदजनाभं नाम वर्षं यस्य नाम्ना भारतमित्यद्भुतं विख्यातमासीत् । एतेन तस्य धर्मातिरेको निरूपितः ॥ १७ ॥ इमां पृथ्वीम् । गृहान्निर्गतः । हरिमुपासीनः सेव-

अत्राप्युदाहरंतीममितिहासं पुरातनम् ॥ आर्षभाणां च संवादं विदेहस्य महात्मनः ॥ १४ ॥ प्रियव्रतो नाम सुतो मनोः स्वायंभु-
वस्य यः ॥ तस्याग्नीध्रस्ततो नाभिर्ऋषभस्तत्सुतः स्मृतः ॥ १५ ॥ तमाहुर्वासुदेवांशं मोक्षधर्मविवक्षया ॥ अवतीर्णं सुतशतं तस्या-
सीद्ब्रह्मपारगम् ॥ १६ ॥ तेषां वै भरतो ज्येष्ठो नारायणपरायणः ॥ विख्यातं वर्षमेतद्यन्नाम्ना भारतमद्भुतम् ॥ १७ ॥ स भुक्तभो-
गां त्यक्त्वेमां निर्गतस्तपसा हरिम् ॥ उपासीनस्तत्पदवीं लेभे वै जन्मभिस्त्रिभिः ॥ १८ ॥ तेषां नव नवद्वीपपतयोऽस्य समंततः ॥
कर्मतंत्रप्रणेतार एकाशीतिर्द्विजातयः ॥ १९ ॥ नवाभवन्महाभागा मुनयो ह्यर्थशंसिनः ॥ श्रमणा वातरशना आत्मविद्याविशारदाः
॥ २० ॥ कविर्हरिरंतरिक्षः प्रबुद्धः पिप्पलायनः ॥ आविर्होत्रोऽथ द्रुमिलश्चमसः करभाजनः ॥ २१ ॥ त एते भगवद्रूपं विश्वं सदसदा-
त्मकम् ॥ आत्मनोऽव्यतिरेकेण पश्यंतो व्यचरन्महीम् ॥ २२ ॥

मानः सन् ॥ १८ ॥ नव सुताः नवद्वीपपतयो नवानां ब्रह्मावर्तादिभूखंडानां पतयः । अस्य भारतस्य वर्षस्य । एकाशीतिः सुताः कर्ममार्गप्रवर्तका ब्राह्मणा अभूवन् ॥ १९ ॥ अर्थशंसिनः परमार्थनिरूपकाः । श्रमणाः श्रमवंतः आत्माभ्यासे कृतश्रमा इत्यर्थः । वातरशना दिगंबराः । आत्मविद्यायां विशारदा निष्णाताः ॥ २० ॥ २१ ॥ तेषां पारमहं-स्यचरितमाह । त एत इति द्वाभ्याम् । भगवद्रूपं विश्वं पश्यंतः । सदसदात्मकं स्थूलसूक्ष्मरूपम् । तच्च स्वाव्यतिरेकेण पश्यंतः ॥ २२ ॥

खंड ह्मणून प्रसिद्ध झालें आहे ॥ १७ ॥ त्या भरतानें उपभोग केलेल्या ह्या भूमीचा त्याग करून वनांत गमन केलें आणि तपाच्या योगानें हरीचें सेवन करून तीन जन्मांनीं त्या हरीचें सायुज्य संपादन केलें ॥ १८ ॥ बाकीच्या नव्व्याण्णव पुत्रांपैकीं नऊ पुत्र या भरतखंडाच्या अंतर्गत ब्रह्मावर्तादिक नऊ भूखंडांचे आसमंतात् राजे झाले. दुसरे एक्यायशीं पुत्र कर्ममार्ग प्रवृत्त करणारे ब्राह्मण झाले ॥ १९ ॥ बाकीचे जे नऊ पुत्र ते महाभाग्यशाली योगेश्वर झाले. ते परमार्थाचें निरूपण करणारे, आत्माभ्यासाविषयीं श्रम करणारे, दिगंबर व आत्मविद्येमध्यें निष्णात होते ॥ २० ॥ त्यांचीं नावें– कवि, हरि, अंतरिक्ष, प्रबुद्ध, पिप्पलायन, आविर्होत्र, द्रुमिल, चमस आणि करभाजन हीं होतीं ॥ २१ ॥ ते हे योगेश्वर, स्थूलसूक्ष्मात्मक जगाला भगवद्रूपच आहे असें पहात होत्साते आणि त्या भगवद्रूपाशीं आपला अभेदपणा पहातहोत्साते भूमीवर

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

संचार करीत असत ॥ २२ ॥ आणि अर्जून हि ज्यांची इच्छित गति कोठेंहि कुंठित होत नाहीं असे व कोठेंहि आसक्त न होणारे ते नऊ योगेश्वर, देव, सिद्ध, साध्य, गंधर्व, यक्ष, मनुष्य, किंनर व नाग यांच्या लोकीं तसेच मुनि, चारण, भूतनाथ, विद्याधर द्विज आणि गाई यांच्या स्थानांमध्यें यथेच्छपणें संचार करीत असतात ॥ २३ ॥ ते योगेश्वर, एकेदिवशीं भरतखंडामध्यें महात्म्या निमिराजाच्या, ऋषींनीं अनुष्ठान चालविलेल्या सत्रामध्यें सहज इच्छेनें अकस्मात् प्राप्त झाले ॥ २४ ॥ हे राजा, सूर्यासारखे तेजःपुंज अशा त्या महाभागवत योगेश्वरांना पाहून यजमान, ब्राह्मण व मूर्तिमंत झालेले आहवनीयादिक अग्नि हे सर्वेहि उठून उभे राहिले ॥ २५ ॥ नंतर निमिराजानें, ते नारायणाचे परमभक्त आहेत असें जाणून संतुष्ट होऊन त्यांना आसनांवर बसवून त्यांचें ज्येष्ठादिक्रमानें विधिपूर्वक पूजन केलें ॥ २६ ॥ आणि अतिसंतुष्ट व नम्रतायुक्त

अव्याहता अप्रतिहता इष्टा अभिप्रेता गतिर्येषां ते । मुक्ता अनासक्ताः ॥ २३ ॥ महात्मनो निमेः । वितायमानमनुष्ठीयमानम् । अजनाभे भारतवर्षे ॥ २४ ॥ यजमानो निमिः । अग्नय आहवनीयादयः । विप्रा ऋत्विगादयः ॥ २५ ॥ अभिप्रेत्य ज्ञात्वा ॥ २६ ॥ स्वरुचैव रोचमानान्नत्वाभरणादिप्रकाशैः । ब्रह्मपुत्रोपमान्सनत्कुमारादिसदृशान् ॥ २७ ॥ परमप्रीत्या तद्दर्शनमभिनंदति द्वाभ्याम् । मन्य इति । ननु भगवतः पार्षदानां कथमत्रोपलब्धिस्तत्राह । विष्णोरिति । विष्णुभक्ता लोकपावनार्थं सर्वत्र पर्यटंतीत्यर्थः ॥ २८ ॥

अव्याहतेष्टगतयः सुरसिद्धसाध्यगंधर्वयक्षनरकिन्नरनागलोकान् ॥ मुक्ताश्चरंति मुनिचारणभूतनाथविद्याधरद्विजगवां भुवनानि कामम् ॥ २३ ॥ त एकदा निमेः सत्रमुपजग्मुर्यदृच्छया ॥ वितायमानमृषिभिरजनाभे महात्मनः ॥ २४ ॥ तान्दृष्ट्वा सूर्यसंकाशान्महाभागवतान्नृप ॥ यजमानोऽग्नयो विप्राः सर्व एवोपतस्थिरे ॥ २५ ॥ विदेहस्तानभिप्रेत्य नारायणपरायणान् ॥ प्रीतः संपूजयांचक्र आसनस्थान्यथार्हतः ॥ २६ ॥ तान्रोचमानान्स्वरुचा ब्रह्मपुत्रोपमान्नव ॥ पप्रच्छ परमप्रीतः प्रश्रयाऽवनतो नृपः ॥ २७ ॥ ॥ विदेह उवाच ॥ मन्ये भगवतः साक्षात्पार्षदान्वो मधुद्विषः ॥ विष्णोर्भूतानि लोकानां पावनाय चरंति हि ॥ २८ ॥ दुर्लभो मानुषो देहो देहिनां क्षणभंगुरः ॥ तत्रापि दुर्लभं मन्ये वैकुंठप्रियदर्शनम् ॥ २९ ॥ अत आत्यंतिकं क्षेमं पृच्छामो भवतोऽनघाः ॥ संसारेऽस्मिन्क्षणार्धोऽपि सत्संगः शेवधिर्नृणाम् ॥ ३० ॥

मया दुर्लभं लब्धमहोभाग्यमित्याह । दुर्लभ इति । बहवो देहा भवंति येषां ते देहिनो जीवास्तेषां क्षणभंगुरोऽपि मानुषो देहो दुर्लभः परमपुरुषार्थसाधनत्वात् । वैकुंठः प्रियो येषां वैकुंठस्य वा प्रियास्तेषां दर्शनम् ॥ २९ ॥ हे अनघा निरवद्याः । भवतो युष्मानात्यंतिकं क्षेमं पृच्छामः । यतः क्षणार्धकालभवोऽपि सत्संगः शेवधिर्निधिः । निधिलाभे यथाऽऽनंदो भवति तथात्र परमानंद इत्यर्थः ॥ ३० ॥

अशा त्या निमिराजानें, आपल्या कांतीनें प्रकाश पावणाऱ्या व ब्रह्मदेवाच्या सनकादिक पुत्रांसारख्या त्या नऊ योगेश्वरांना प्रश्न केला कीं, ॥ २७ ॥ विदेह म्हणाला– मी तुम्हांला साक्षात् भगवान् विष्णूचे पार्षद आहां असें जाणतों. आतां भगवंताच्या पार्षदांची येथें प्राप्ति कशी होईल असें म्हणाल तर विष्णूचे पार्षद लोकांना पवित्र करण्याकरितां सर्वत्र संचार करीत असतात हें प्रसिद्ध आहे ॥ २८ ॥ जीवांनां क्षणभंगुर असलेलाहि हा मनुष्यदेह, ' मोक्षाचें साधन असल्यामुळें ' दुर्लभ आहे, आणि त्या मनुष्यजन्मामध्येंहि भगवद्भक्तांचें दर्शन दुर्लभ आहे असें मी मानितों ॥ २९ ॥ म्हणून हे सामलोभादि दोषरहित हो, मी तुम्हांला विचारितों कीं, जगामध्यें सर्वोत्कृष्ट कल्याणकारक साधन कोणतें आहे ? कारण या संसारामध्यें मनुष्यांनां अर्धा क्षणभर सुद्धां घडलेला सत्समागम, निधि मिळाला असतां जसा आनंद होतो तसा आनंद देणारा आहे ॥ ३० ॥

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आणि त्या सर्वोत्कृष्ट कल्याणासाठीं आह्मांस श्रवण करण्याचा जर अधिकार असेल तर भगवंताचा संतोष करणाऱ्या भागवतधर्मांचें कथन करा. ज्या धर्मांनीं प्रसन्न झालेला अज भगवान्, शरणागत भक्ताला आपलें स्वरूपहि देतो ॥ ३१ ॥ नारद ह्मणाला– याप्रमाणें निमिराजानें प्रश्न केलेले ते कवि, हरि इत्यादिक नऊ योगेश्वर, प्रीतीनें सभासद व ऋत्विज यांसह त्या निमिराजाचा प्रतिसत्कार करून ते नऊजणहि अनुक्रमानें एकेक भाषण करूं लागले व बाकीचे भगवद्धर्मांच्या श्रवणाविषयीं तत्पर होऊन तेथेंच राहिले. त्यांत निमिराजानें, १ भगवद्धर्म, २ भगवद्भक्त, ३ माया, ४ माया तरण्याचा उपाय, ५ ब्रह्म, ६ कर्म, ७ अवतारलीला, ८ अभक्तांची गति व ९ युगानुक्रम हे नऊ प्रकार जाणण्याकरितां नऊ प्रश्न केले. त्या एकेक प्रश्नाचें उत्तर कवि आदिक एकेकानें सांगितलें आहे ॥ ३२ ॥ त्यांत सर्वोत्कृष्ट कल्याण सांगत कवि ह्मणाला– हे राजा, या संसारामध्यें, ज्याचा नाश कधींहि नाहीं, अशा भगवंताच्या चरणकमलाची उपासना करणें हेंच कालकर्मादिक सर्व भयांनीं रहित असें कल्याण-

तदर्थं च भागवतान्धर्मान्ब्रूत यदि नोऽस्माकं श्रुतये श्रवणाय क्षमं योग्यं भवति । कथंभूतान् । यैर्धर्मैः प्रपन्नाय भक्तायाजो हरिरात्मानमपि दास्यति तान् ॥ ३१ ॥ सह सदस्यैर्ऋत्विग्भिश्च वर्तमानम् । तेऽपि भगवद्धर्मश्रवणपरा बभूवुरित्यर्थः । भगवद्धर्मतद्भक्तमायातत्तरणानि च ॥ ब्रह्मकर्मावतारेहा भक्तप्राप्ययुगक्रमान् ॥ ज्ञातुं क्रमेण कृतवान्नव प्रश्नान्निमिर्नव ॥ एकैकस्योत्तरं प्रोचुः कविमुख्या मुनीश्वराः ॥ ३२ ॥ प्रथममात्यंतिकं क्षेमं कथयति । मन्य इति । न कुतश्चिद्भयं यस्मात्तदकुतश्चिद्भयम् । अत्र संसारेऽसदा-

धर्मान्भागवतान्ब्रूत यदि वः श्रुतये क्षमम् ॥ यैः प्रसन्नः प्रपन्नाय दास्यत्यात्मानमप्यजः ॥ ३१ ॥ नारद उवाच ॥ एवं ते निमिना
पृष्टा वसुदेव महत्तमाः ॥ प्रतिपूज्याब्रुवन्प्रीत्या ससदस्यर्त्विजं नृपम् ॥ ३२ ॥ कविरुवाच ॥ मन्ये कुतश्चिद्भयमच्युतस्य पादांबुजो-
पासनमत्र नित्यम् ॥ उद्विग्नबुद्धेरसदात्मभावाद्विश्वात्मना यत्र निवर्तते भीः ॥ ३३ ॥ ये वै भगवता प्रोक्ता उपाया ह्यात्मलब्धये ॥
अंजः पुंसामविदुषां विद्धि भागवतान्हि तान् ॥ ३४ ॥ यानास्थाय नरो राजन्न प्रमाद्येत कर्हिचित् ॥ धावन्निमील्य वा नेत्रे न-
स्खलेन्न पतेदिह ॥ ३५ ॥

त्मभावादसति देहादावात्मभावनातो नित्यं सर्वदोद्विग्नबुद्धेः । विश्वात्मना सर्वथा निःशेषं यत्र पादांबुजोपासने भीर्निवर्तते तत् ॥ ३३ ॥ भागवतधर्मलक्षणमाह । ये वै इति । मन्वादिमुखेन वर्णाश्रमादिधर्मानुक्त्वाऽतिरहस्यत्वात्स्वमुखेनैव भगवता विदुषामपि पुंसामंजः सुखेनैवात्मलब्धये ये वै उपायाः प्रोक्तास्तान्भागवतान्धर्मान्विद्धि ॥ ३४ ॥ अंजःपदेनोक्तं सुकरत्वं विवृणोति । यानिति । यानास्थायाश्रित्य योगादिष्विव न प्रमाद्येत विघ्नैर्न विहन्येत । किंच निमील्य नेत्रे धावन्नपि इह एषु भागवतधर्मेषु न स्खलेत् । निमीलनं

कारक उत्कृष्ट साधन आहे असें मी मानितों. कारण, ज्या उपासनेमध्यें, देहादिकांचेठिकाणीं आत्मभावनेनें सदोदित उद्विग्न बुद्धि झालेल्या प्राण्याचें भय, सर्वप्रकारें निवृत्त होतें ॥ ३३ ॥ आतां भागवतधर्मांचें लक्षण सांगतो– हे राजा, भगवंतानें मनु, याज्ञवल्क्य इत्यादिकांच्या मुखद्वारा वर्णाश्रमादिकांचे धर्म सांगून अतिगुह्य असल्यामुळें न जाणणाऱ्याहि पुरुषांनां सुखानेंच आत्मलाभ होण्याकरितां जे श्रवणादिक उपाय आपण स्वतां सांगितले आहेत तेच भागवतधर्म असें तूं जाण ॥ ३४ ॥ आतां भागवत धर्मांचें सुकरत्व स्पष्ट सांगतो– हे राजा, ज्या भागवतधर्मांचें पालन करणारा पुरुष, जसा योगादिकांचा अभ्यास करणारा, विघ्नांनीं पराभूत होतो तसा विघ्नादिकांनीं पराभूत होत नाहीं. आणि या भागवतधर्मांमध्यें दोन्ही डोळे मिटून धांवणाराहि पुरुष, ठेंचकळत नाहीं व पडतहि नाहीं. येथें दोन डोळे हे श्रुति व स्मृति हे होत. असें सांगितलें आहे कीं,– श्रुति व स्मृति हे ब्राह्मणांचे दोन डोळे आहेत. त्यांत एकानें विकळ असेल तो काणा आणि दोन्हींनीं विकळ असेल तो आंधळा ह्मटला आहे. तसेंच एके

॥ ५ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

परोक्षवादो वेदोऽयं बालानामनुशासनम् ॥ कर्ममोक्षाय कर्माणि विधत्ते ह्यगदं यथा ॥ ४४ ॥ नाचरेद्यस्तु वेदोक्तं स्वयमज्ञोऽजितेंद्रियः ॥ विकर्मणा ह्यधर्मेण मृत्योर्मृत्युमुपैति सः ॥ ४५ ॥ वेदोक्तमेव कुर्वाणो निःसंगोऽर्पितमीश्वरे ॥ नैष्कर्म्यां लभते सिद्धिं रोचनार्था फलश्रुतिः ॥ ४६ ॥ य आशु हृदयग्रंथिं निर्जिहीर्षुः परात्मनः ॥ विधिनोपचरेद्देवं तंत्रोक्तेन च केशवम् ॥ ४७ ॥

क्तमेव कुर्वाणो न तु निषिद्धम् । ननु कर्मणि क्रियमाणे तस्मिन्नासक्तिस्तत्फलं च स्यान्नतु नैष्कर्म्यरूपा सिद्धिरत आह । निःसंगोऽनभिनिवेशवान् । ईश्वरेऽर्पितं न तु फलोद्देशेन । ननु फलस्य श्रुतत्वात्कर्मणि कृते फलं भवेदेव न रोचनार्थेति । कर्मणि रुच्युत्पादनार्थमगदपाने खंडलड्डुकादिवत् । ततश्च कर्माभिरुच्या वेदार्थं सम्यग्विचारयति । तदा च । यो वा एतदक्षरमविदित्वा गार्ग्यस्माल्लोकात् प्रैति स कृपण इत्यनात्मज्ञस्यैव कृपणताम् । तमेतं वेदानुवचनेन ब्राह्मणा विविदिषंति । ब्रह्मचर्येण तपसा श्रद्धया यज्ञेनानाशकेनेति यज्ञादीनां ज्ञानशेषतां चावधार्य निष्कामेषु कर्मसु प्रवर्तते । ततश्च स्वर्गकामो यजेतेत्यादिभिः कामितस्यैव स्वर्गादेः फलत्वेनावगमादकामितोऽसौ न भवतीति नैष्कर्म्यसिद्धिर्भवतीति भावः ॥ ४६ ॥ वैदिकं कर्मयोगमुक्त्वा तांत्रिकमाह । य आश्विति । परात्मनः परस्यैव सत आत्मनो जीवस्य हृदयग्रंथिमहंकारबंधं निर्हर्तुमिच्छुः संस्तंत्रोक्तेन च विधिना प्रकारेण भजेत् । तंत्रमागमः । चकाराद्वैदिकेन सह समुच्चयमाह ॥ ४७ ॥

नसूनहि वेदोक्त कर्म आचरण करीत नाहीं तो कर्मलोपरूप अधर्मानें वारंवार जन्ममरणरूप संसार पावतो ॥ ४५ ॥ ह्मणून निषिद्ध कर्मांचा त्याग करून ज्ञान होईतोंपर्यंत जो मनुष्य फलासक्तिरहित होऊन, ईश्वराचेठिकाणीं अर्पण होईल तशा रीतीनें वेदानें सांगितलेलेंच कर्म करितो तो अंतःकरणशुद्धि, भक्ति, व विरक्ति पावून सर्वकर्मनिवर्तक अशी मोक्षरूप सिद्धि पावतो. स्वर्गादिप्राप्तिरूप फळाचें जें वेदानें वर्णन केलें आहे तें केवळ कर्मांवर रुचि उत्पन्न करण्याकरितांच आहे ॥ ४६ ॥ याप्रमाणें वैदिक कर्मयोग सांगून आतां तांत्रिक कर्मयोग सांगतो—जो मनुष्य, परब्रह्मरूपीच असणाऱ्या आपल्या जीवात्म्याचा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अहंकाररूप बंध त्वरित तोडून टाकण्याची इच्छा करीत असेल त्यानें तंत्रोक्त व वेदोक्त अशा दोन्ही प्रकारच्याहि विधींनीं भगवंताची पूजा करावी ॥ ४७ ॥ आचार्यापासून ज्याला उपनयनपूर्वक मंत्रलाभ प्राप्त झाला आहे आणि त्या गुरूनेंच ज्याला आगमानें सांगितलेला पूजादिप्रकार दाखविला आहे अशा पूजकानें आपणास आवडत असलेल्या रामकृष्णादिक मूर्तींच्या स्वरूपानें युक्त असलेल्या महापुरुष भगवंताचें पूजन करावें ॥ ४८ ॥ स्नानादिकेंकरून शुद्ध होऊन, मूर्तीच्या समोर बसून व प्राणायाम, भूतशुद्धि इत्यादिकेंकरून देहाची शुद्धता संपादन करून उत्तम प्रकारच्या न्यासांनीं रक्षणविधि झाल्यावर देशकालादिकांच्या आनुकूल्यानें प्राप्त झालेल्या गंधपुष्पादिक उपचारांनीं प्रतिमादिकांचेठिकाणीं किंवा हृदयामध्यें श्रीहरीचें पूजन करावें. तें करण्याच्या पूर्वींच पुष्पादिक पदार्थांना–कीटकादिकांच्य

तमेव विधिमाह । लब्धानुग्रह इत्यादिना । तेनाचार्येण संदर्शित आगमोऽर्चनप्रकारो यस्य सः ॥ ४८ ॥ मूर्तेः संमुखमासीनः । आदिशब्देन भूतशुद्ध्यादिभिः पिंडं देहं विशोध्या संन्यासैः सद्भिर्न्यासैः कृता रक्षा येन सः ॥ ४९ ॥ आदावेव द्रव्याणि पुष्पादीनि जंत्वादिशोधनेन क्षितिं संमार्जनादिना आत्मानमव्यग्रतया लिंगं मूर्तिमनुलेपक्षालनादिना निष्पाद्य योग्यानि कृत्वा ॥ ५० ॥ पाद्यादिपात्राण्युपकल्प्य सन्निधाप्य हृदि संपूजितं श्रीमूर्तौ ध्यात्वा हृदादिभिः हृदयशिरःशिखाकवचनेत्रास्त्रमंत्रैर्मूलमंत्रेण च देवे कृतन्यासो

लब्धानुग्रह आचार्यात्तेन संदर्शितागमः ॥ महापुरुषमभ्यर्चेन्मूर्त्याभिमतयाऽऽत्मनः ॥ ४८ ॥ शुचिः संमुखमासीनः प्राणसंयम-
नादिभिः ॥ पिंडं विशोध्य सन्न्यासकृतरक्षोऽर्चयेद्धरिम् ॥ ४९ ॥ अर्चादौ हृदये चापि यथालब्धोपचारकैः ॥ द्रव्यक्षित्यात्मलिंगानि
निष्पाद्य प्रोक्ष्य चासनम् ॥ ५० ॥ पाद्यादीनुपकल्प्याथ सन्निधाप्य समाहितः ॥ हृदादिभिः कृतन्यासो मूलमंत्रेण चार्चयेत्
॥ ५१ ॥ सांगोपांगां सपार्षदां तां तां मूर्तिं स्वमंत्रतः ॥ पाद्यार्घ्याचमनीयाद्यैः स्नानवासोविभूषणैः ॥ ५२ ॥ गंधमाल्याक्षत-
स्रग्भिर्धूपदीपोपहारकैः ॥ सांगं संपूज्य विधिवत्स्तवैः स्तुत्वा नमेद्धरिम् ॥ ५३ ॥ आत्मानं तन्मयं ध्यायन्मूर्तिं संपूजयेद्धरेः ॥
शेषामाधाय शिरसा स्वधाम्न्युद्वास्य सत्कृतम् ॥ ५४ ॥

मूलमंत्रेणार्चयेत् ॥ ५१ ॥ अंगानि हृदयादीन्युपांगानि सुदर्शनादीनि तत्सहितां सपार्षदां सपरिवाराम् । कैरुपचारैरर्चयेत्तदाह । पाद्येति । आदिशब्देन मधुपर्कमाचमनं च ॥ ५२ ॥ अक्षतास्तिलकालंकारे न तु पूजायाम् । नाक्षतैरर्चयेद्विष्णुं न केतक्या महेश्वरमिति निषेधात् । उपहारो नैवेद्यम् ॥ ५३ ॥ शेषां निर्माल्यम् । स्वधाम्नि स्वस्थाने । देवं हृदि मूर्तिं करंडके उद्वास्य स्थापयित्वा पूजाविधिं समापयेदिति शेषः ॥ ५४ ॥

शोधनानें, भूमीला–संमार्जनादिकेंकरून, मनाला–एकाग्रतेनें व श्रीहरीच्या मूर्तीला–पूर्वदिवशीं लावलेल्या चंदनादिकांच्या क्षालनादिकेंकरून योग्य करून व नंतर आसनावें प्रोक्षण करून ॥ ४९ ॥ ५० ॥ पाद्य, अर्घ्य व आचमनीय यांचीं तीन पात्रें स्थापन करावीं. नंतर एकाग्रपणें हृदयामध्यें ध्यान व पूजन केलेल्या भगवंताचें प्रतिमेवर सांनिध्य करून नंतर त्या देवाचेठिकाणीं, हृदय शिर, शिखा, नेत्र अस्त्रमंत्रांनीं व मूलमंत्रानें न्यास करून मूलमंत्रानें त्याचें पूजन करावें ॥ ५१ ॥ त्यांत हृदयादिक अंगें, सुदर्शनादिक उपांगें यांसहित व नंदादि पार्षदांसहित त्या त्या रामकृष्णादिक मूर्तीचें मूलमंत्रानें, पाद्य, अर्घ्य, आचमनीय, मधुपर्क, स्नान, वस्त्रें, भूषणें, गंध, पुष्पें, अक्षता, माळा धूप, दीप, नैवेद्य, व तांबूलादिक उपचारांनीं श्रीहरीची सांगोपांग यथाविधि पूजा करावी. नंतर स्तोत्रांनीं स्तुति करून भगवंताला नमस्कार करावा ॥ ५२ ॥ ५३ ॥ आपला आत्मा भगवद्रूप आहे असें ध्यान करीतच भगवंताच्या मूर्तीचें पूजन करावें. नंतर भगवंताचा प्रसाद (निर्माल्य) मस्तकीं धारण करून

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पूजा केलेल्या देवाचें स्वस्थानीं (देवाला हृदयांत व मूर्तीला करंड्यांत) स्थापन करून पूजाविधि समाप्त करावा ॥ ५४ ॥ याप्रमाणें अग्नि, सूर्य, उदक, अतिथि व हृदय इत्यादिकांचेठिकाणीं जो पुरुष आत्मा ईश्वराचें पूजन करितो तो पुरुष, लवकरच संसारापासून मुक्त होतो ॥ ५५ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या एकादश स्कंधांत मायादिनिरूपणनामक हा तिसरा अध्याय समाप्त झाला ॥ ३ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ आतां ह्या चवथ्या अध्यायामध्यें जयंतीचे पुत्र अशा नऊ योगेश्वरांमध्यें सातव्या द्रुमिलनामक योगेश्वरानें भगवंताच्या अवतारलीलांच्या प्रश्नाचें उत्तर सांगितलें, अशी कथा वर्णन केलेली आहे ॥ १ ॥ आपणास आवडत असेल त्यात्या मूर्तीचेठिकाणीं भगवंताचें पूजन करावें असें ऐकिल्यानें भगवंताच्या अवतारज्ञानाची अपेक्षा झाली आणि स्तोत्रांनीं स्तुति करून हरीला नमस्कार करावा असें ऐकिल्यानें श्रीहरीच्या गुणकर्मांच्या ज्ञानाचीहि अपेक्षा झाली म्हणून राजा ह्मणाला –हे ऋषिहो, श्रीहरीनें ज्या ज्या स्वच्छंद अवतारांनीं

तांत्रिकं कर्मयोगमुपसंहरति । एवमिति ॥ ५५ ॥ इति श्रीमद्भागवते एकादशस्कंधे टीकायां तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥ ॥ चतुर्थेऽवतारेहाप्रश्न स्योत्तरमुक्तवान् ॥ जयंतीनंदनो नाम्ना द्रुमिलो नवसप्तमः ॥ १ ॥ मूर्त्याभिमतयाऽऽत्मन इत्यनेनात्मनः प्रियमवतारं पूजयेदित्युक्तेऽवतारज्ञानमपेक्षितं तथा स्तवैः स्तुत्वा नमेद्धरिमित्युक्ते गुणकर्मज्ञानं चापेक्षितमतः पृच्छति । यानि यानीति । कर्ता करिष्यति ॥ १ ॥ त्वया पृष्टानि कालत्रयसंबंधिसकलावतारगुणकर्माणि कथयितुमशक्यानि संक्षेपतस्तु कानिचित्कथयिष्यामी-

एवमभ्यर्कतोयादावतिथौ हृदये च यः ॥ यजतीश्वरमात्मानमचिरान्मुच्यते हि सः ॥ ५५ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥ राजोवाच ॥ यानि यानीह कर्माणि यैर्यैः स्वच्छंदजन्मभिः ॥ चक्रे करोति कर्ता वा हरिस्तानि ब्रुवंतु नः ॥ १ ॥ द्रुमिल उवाच ॥ यो वा अनंतस्य गुणाननंताननुक्रमिष्यन्स तु बालबुद्धिः ॥ रजांसि भूमेर्गणयेत्कथंचित्कालेन नैवाखिलशक्तिधाम्नः ॥ २ ॥ भूतैर्यदा पंचभिरात्मसृष्टैः पुरं विराजं विरचय्य तस्मिन् ॥ स्वांशेन विष्टः पुरुषाभिधानमवाप नारायण आदिदेवः ॥ ३ ॥

त्याह । यो वा इत्यादिना । अनुक्रमिष्यन्गणयितुमिच्छति यः स तु बालानामिव बुद्धिर्यस्य स मंदमतिः । कालेन महता कोऽपि महामतिः रजांसि गणयेदप्यखिलशक्तिधाम्नः सर्वशक्त्याश्रयस्य भगवतो गुणांस्तु नैव गणयेत् । तथा च श्रुतिः विष्णोर्नु कं वीर्याणि प्रवोचं यः पार्थिवानि विममे रजांसीत्यादि ॥ २ ॥ तत्रादौ पुरुषावतार माह । भूतैरिति । यदा स्वसृष्टैर्भूतैर्विराजं ब्रह्मांडं पुरं निर्माय तस्मिन् लीलया प्रविष्टो न तु भोक्तृत्वेन । प्रभूतपुण्यस्य जीवस्य तत्र भोक्तृत्वात् ॥ ३ ॥

या मनुष्यलोकीं जीं जीं कर्में केलीं आहेत, जीं जीं करित आहे आणि जीं जीं पुढें करील तीं अवतारचरित्रें आह्मांस सांगा ॥ १ ॥ तेव्हां द्रुमिल ह्मणाला–हे राजा, जो पुरुष, अनंताच्या अनंत गुणांची गणना करण्याची इच्छा करील तो मंदबुद्धि समजला पाहिजे. कारण, कोणी एखादा महाबुद्धिवान् पुरुष, पुष्कळ काळानें व मोठ्या प्रयत्नानें कदाचित् भूमीच्या रजःकणांची गणना करील परंतु सर्व शक्तींचा आश्रय अशा भगवंताच्या गुणांची गणना करण्यास तो समर्थ होणार नाहीं. यास्तव तुला मी संक्षेपानें कांहींएक अवतारांचीं चरित्रें सांगतों श्रवण कर ॥ २ ॥ त्यांत प्रथम सर्व अवतारांचें बीज असा पुरुषावतार सांगतों–जेव्हां सर्व कारणभूत अशा नारायणानें आपणच उत्पन्न केलेल्या आकाशादि पंच महाभूतांकडून ब्रह्मांडरूप देह उत्पन्न करून त्यामध्यें आपल्या अंशानें प्रवेश केला तेव्हां तो पुरुषनांव पावला ॥ ३ ॥ ज्याच्या देहावर

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हीं त्रैलोक्याची रचना झाली आहे, ज्याच्या इंद्रियांपासून जीवांचीं ज्ञानकर्मेंद्रियें उत्पन्न झालीं आहेत, ज्याच्या स्वरूपभूत सत्वगुणापासून जीवांना ज्ञान प्राप्त होतें. ज्याच्या प्राणापासून जीवांना देहशक्ति, इंद्रियशक्ति आणि सर्वक्रिया ह्या उत्पन्न होतात आणि जो ह्या जगाच्या उत्पत्तिस्थितिसंहारांचा आदिकर्ता आहे ॥ ४ ॥ ज्याच्या रजोगुणापासून या जगाच्या उत्पत्तीविषयीं प्रथम ब्रह्मदेव झाला, ज्याच्या सत्वानें जगाच्या पालनाविषयीं यज्ञफलदाता व ब्राह्मणांचें व ब्राह्मणांच्या धर्मांचें पालन करणारा विष्णु झाला, ज्याच्या तमानें जगाच्या संहाराविषयीं रुद्र झाला. याप्रमाणें ज्यापासून उत्पन्न झालेल्या ब्रह्माविष्णुमहेश्वरांकडून निरंतर प्रजांचे उत्पत्ति,

अस्य गुणकर्माण्याह द्वयेन । यत्काय इति । यस्याधिष्ठेयः काय एषः । काय इति सप्तमी वा । तनुभृतां समष्टिव्यष्टिजीवानां ज्ञानकर्मेंद्रियाणि यस्य स्वतः स्वरूपभूतात्सत्वात्तनुभृतां ज्ञानम् । यस्य स्वतःसिद्धं ज्ञानमिति वा । यस्य श्वसनतः प्राणाद्बलं देहशक्तिः ओज इंद्रियशक्तिः ईहा क्रिया । यश्च सत्वादिभिर्विश्वस्य स्थितिलयोद्भवे आदिकर्ता ॥ ४ ॥ आदिकर्तेत्यनेन तत्पूर्वकं कर्त्रंतरमपि सूचितं तद्दर्शयितुं गुणावतारद्वारा चराचरसृष्ट्यादिकर्तृत्वमाह । आद्दाविति । यस्येत्यनुषंगः । यस्य रजसाऽस्य जगतः सर्गे कार्ये शतधृतिर्ब्रह्माऽभूत् । स्थितौ च विष्णुर्यस्य सत्वेनेति शेषः । क्रतुपतिस्तत्फलदाता । द्विजातीनां तद्धर्माणां च सेतुः पालक इत्यर्थः । यस्य तमसाऽस्याप्ययाय रुद्रोऽभूत् । इत्येतैर्ब्रह्मादिभिर्निमित्तभूतैः प्रजासूद्भवादयो यतो भवंति स आद्यः पुरुष इत्यन्वयः ॥ ५ ॥ नरनारायणावतारमाह । धर्मस्येति । धर्मस्य भार्यायां दक्षदुहितरि मूर्तिसंज्ञा-

यत्काय एष भुवनत्रयसन्निवेशो यस्येंद्रियैस्तनुभृतामुभयेंद्रियाणि ॥ ज्ञानं स्वतः श्वसनतो बलमोज ईहा सत्वादिभिः स्थितिलयोद्भव आदिकर्ता ॥ ४ ॥ आदावभूच्छतधृती रजसाऽस्य सर्गे विष्णुः स्थितौ क्रतुपतिर्द्विजधर्मसेतुः ॥ रुद्रोऽप्ययाय तमसा पुरुषः स आद्य इत्युद्भवस्थितिलयाः सततं प्रजासु ॥ ५ ॥ धर्मस्य दक्षदुहितर्यजनिष्ट मूर्त्यां नारायणो नर ऋषिप्रवरः प्रशांतः ॥ नैष्कर्म्यलक्षणमुवाच चचार कर्म योऽद्यापि चास्त ऋषिवर्यनिषेवितांघ्रिः ॥ ६ ॥ इंद्रो विशंक्य मम धाम जिघृक्षतीति कामं न्ययुंक्त सगणं स बदर्युपाख्यम् ॥ गत्वाऽप्सरोगणवसंतसुमंदवातैः स्त्रीप्रेक्षणेषुभिरविध्यदतन्महिज्ञः ॥ ७ ॥

यां नारायणो नर इति मूर्तिद्वयेनाजनिष्ट जातः । तच्चरितमाह । नैष्कर्म्यमात्मस्वरूपं लक्ष्यते येन तत्कर्म कर्मनिर्हाररूपं वा उवाच नारदादिभ्यः स्वयं चचार च । योऽद्यापि कर्माचरन्नास्ते । ऋषिवर्यैर्निषेवितावंघ्री यस्य सः ॥ ६ ॥ भगवदवतारत्वद्योतकं परमोपशमं दर्शयितुमितिहासमाह । इंद्र इति दशभिः । धाम स्थानं तपसा गृहीतुमिच्छतीति विशंक्य तपोनाशाय कामं सपरिवारं प्रेषयामास । स कामो बदरीभिरुपाख्यायते यस्तं तस्याश्रममप्सरोगणादिभिः सह गत्वा स्त्रीणां प्रेक्षणान्येव इषवो बाणास्तैः । न तस्य महि महिमानं जानातीत्यतन्महिज्ञः ॥ ७ ॥

स्थिति व संहार होत असतात तो आदिपुरुष होय ॥ ५ ॥ आतां, नरनारायणावतार व त्याचें कर्म सांगतो–धर्माची भार्या व दक्षाची कन्या अशा मूर्तिनामक स्त्रीच्या उदरीं ऋषींमध्यें श्रेष्ठ व अत्यंत शांत असा नारायण व नर अशा दोन मूर्तींनीं अवतार झाला. त्यानें आत्मस्वरूपाचें प्रकाशन करणारें कर्म नारदादिकांस सांगितलें आहे, व स्वतांहि आचरण केलें आहे. जो नरनारायण अजूनहि, नारदादिक ऋषिवर्यांनीं सेवितचरण होत्साता तपश्चर्या करीत राहिला आहे ॥ ६ ॥ आतां त्याची भगवदवतारत्वप्रकाशक मोठी सहनशीलता दाखविण्याकरितां इतिहास सांगतो–इंद्रानें त्या नरनारायणाचें तप पाहून ' हा माझें स्थान हरण करण्याची इच्छा करीत आहे अशी ' मनांत शंका आणून त्याच्या तपाच्या नाशाकरितां, वसंतादिक परिवारासह मदनास पाठविलें. तेव्हां त्याचा महिमा न जाणणारा तो काम अप्सरांचे समुदाय, वसंतऋतु व सुमंद ॥ १४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वायु यां सहवर्तमान त्याच्या ' बदरिकाश्रमांत जाऊन स्त्रियांच्या कटाक्षरूप बाणांनीं त्याला वेधूं लागला, ~~म्हणजे त्याच्या मनाचा क्षोभ करण्यास प्रवृत्त झाला~~ ॥ ७ ॥ तेव्हां त्या नरनारायणानें इंद्रानें केलेला अपराध जाणून, त्याच्या मोहस्मरणानें हास्य करून गर्वरहितपणें, ' आपला उद्योग व्यर्थ झाला म्हणून त्याच्या शापभयानें थरथरां कांपणाऱ्या ' त्या मदनादिकांस म्हणाला कीं, हे मदना, हे वायो, हे देवस्त्रियाहो, तुम्ही मजपासून भिऊं नका तुम्ही, आम्ही केलेली पूजा ग्रहण करून या आश्रमाला अशून्य (कृतार्थ) करा. ज्या आश्रमांत अतिथीचा सत्कार होत नाहीं त्या आश्रमाला शून्य असें म्हणतात ॥ ८ ॥ हे राजा, अभय देणाऱ्या त्या नरनारायणानें असें सांगितलें असतां सलज्ज व नम्रमस्तक झालेले ते कामादिक देव, त्याला कृपा उत्पन्न करीत म्हणाले कीं, हे विभो, मायेहून पर, कामक्रोधादि विकाररहित,

---

अक्रममपराधम् । अहो अहं धीर इति विस्मयो गर्वस्तद्रहितः । एजमानान् शापभिया कंपमानान् । भो विभो समर्थ । हे देववध्वः मा भैष्ट । बलिमातिथ्यं तान्प्रार्थयते । इममस्माकमाश्रमम् । आतिथ्याभावे शून्यप्रायः स्यादित्यर्थः ॥ ८ ॥ हे नरदेव अभयदे श्रीनारायणे इत्थं ब्रुवति सति देवाः कामादयः सव्रीडानि नम्राणि शिरांसि येषां ते । लज्जाभरेणैवावनतशिरस्का इत्यर्थः । सघृणं यथा भवति तथा कृपां जनयंत इत्यर्थः । कृपायुक्तं तमिति वा मायातः परे अतोऽविकृते । स्वरामाश्च ते धीराश्च तेषां निकरैरानतं पादपद्मं यस्य तस्मिन् । त्वय्येतदक्षोभानुकंपादि न विचित्रम् ॥ ९ ॥ अस्माकं चापराधावरणं स्वभावत्वान्नचित्रमित्याहुः । त्वामिति । त्वां सेवतां सेवमानानां सुरैरिंद्रादिभिः

विज्ञाय शक्रकृतमक्रममादिदेवः प्राह प्रहस्य गतविस्मय एजमानान् ॥ माभैष्ट भो मदन मारुत देववध्वो गृह्णीत नो बलिमशून्यमिमं कुरुध्वम् ॥ ८ ॥ इत्थं ब्रुवत्यभयदे नरदेव देवाः सव्रीडनम्रशिरसः सघृणं तमूचुः ॥ नैतद्विभो त्वयि परेऽविकृते विचित्रं स्वारामधीरनिकरानतपादपद्मे ॥ ९ ॥ त्वां सेवतां सुरकृता बहवोंऽतरायाः स्वौको विलंघ्य परमं व्रजतां पदं ते ॥ नान्यस्य बर्हिषि बलीन्ददतः स्वभागान्धत्ते पदं त्वमविता यदि विघ्नमूर्ध्नि ॥ १० ॥ क्षुत्तृट्त्रिकालगुणमारुतजैह्व्यशैश्न्यानस्मानपारजलधीनतितीर्य केचित् ॥ क्रोधस्य यांति विफलस्य वशं पदे गोर्मज्जंति दुश्चरतपश्च वृथोत्सृजंति ॥ ११ ॥

कृता अंतराया विघ्ना भवंति । कस्मादित्यत आहुः । स्वौक इति । स्वस्थानं स्वर्गमतिक्रम्य परमं तव स्थानं व्रजताम् । नान्यस्य त्वामसेवमानस्य । कुतः । बर्हिषि यज्ञे स्वभागान्पुरोडाशादीन्बलीन्करान्कृषिक इव राज्ञे इंद्रादिभ्यो ददतः प्रयच्छतः । तर्हि किं मद्भक्तो विघ्नैर्भ्रश्यति नेत्याहुः । धत्त इति । यदीति निश्चये । यतस्त्वं सर्वसुराधीश्वरोऽविता रक्षकोऽतोऽसौ विघ्नानां मूर्ध्नि पदमंघ्रिं धत्ते । कुतः पुनस्त्वयि विघ्नशंकेति भावः ॥ १० ॥ त्वदभक्तानां तु केवलं तपश्चरतां द्वयी गतिः । अस्माकं वा वशं

व स्वस्वरूपाचेठिकाणीं रममाण होणाऱ्या धीरपुरुषांच्या समुदायांनीं ज्याचें चरणकमळ वंद्य आहे अशा तुझेठिकाणीं हें क्षोभ न पावणें व कृपा करणें आश्चर्यकारक नाहीं ॥ ९ ॥ हे प्रभो, तुझी सेवा करणारे लोक, आपल्या स्थानाचें उल्लंघन करून सर्वोत्कृष्ट अशा वैकुंठलोकास जातात ~~म्हणून, त्यांनांच इंद्रादिक देवांनीं केलेलीं पुष्कळ~~ विघ्नें प्राप्त होतात. तुझी सेवा न करणारास तीं विघ्नें प्राप्त होत नाहींत. कारण, तो यज्ञामध्यें त्या इंद्रादिकांचे पुरोडाशादिक भाग त्यांस ' जसे शेतकरी लोक, राजाचे करभार राजास देतात त्याप्रमाणें देत असतो. तर माझा भक्त काय विघ्नांनीं पराभव पावतो ? नाहीं नाहीं, सर्व देवांचा अधिपति तूं त्याचें रक्षण करित असल्यामुळें तो भक्त विघ्नांच्या मस्तकीं पाय देऊन तुझ्या वैकुंठास जातो. जर तुझ्या भक्तासहि विघ्नें होत नाहींत तर मग तुला विघ्नें कोठून होणार, मुळींच व्हावयाचीं नाहींत ॥ १० ॥ तुझे अभक्त असून केवळ तप करणारांची दोन प्रकारची गति होतये. ते एक आमच्या स्वाधीन होतात किंवा क्रोधाच्या स्वाधीन होतात त्यांत आमच्या स्वाधीन होणा-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रानां विषयभोगतरी प्राप्त होतो क्रोधाच्या स्वाधीन होणारे तर फारच मंद होत. कारण, क्षुधा, तृषा, थंडी उन्हाळा, पावसाळा, वारा, जिव्हेचे विषय, व शिश्नाचे उपभोग ह्या अपार समुद्रांचें उल्लंघन करून कितीएक मूर्ख तपस्वी, निष्फळ अशा क्रोधाच्या स्वाधीन होऊन, गाईच्या पायांच्या खळग्यांतील पाण्यांत बुडतात आणि आपलें दुश्चर तप व्यर्थ घालवितात ह्मणजे जसे पाण्यांत बुडूं लागलेले पुरुष, घाबरून गेले ह्मणजे मस्तकावर घेतलेलें धनादिकांचें ओझें व्यर्थ टाकून देतात त्याप्रमाणें हे मूर्ख तपस्वीहि, मोक्षाकरितां नव्हे, व विषयभोगाकरितांहि नव्हे तर व्यर्थच शापादिरूपानें आपल्या दुश्चर तपाचा नाश करितात ॥ ११ ॥ याप्रमाणें ते देवादिक स्तुति करीत असतां नरनारायणानें, त्यांचा गर्व घालविण्याकरितां योगबलानें तेथें आपली शुश्रूषा करणाऱ्या, अतिअद्भुत स्वरूपवंत व उत्तम अलंकार धारण केलेल्या हजारो स्त्रिया निर्माण करून त्यांस दाखविल्या ॥ १२ ॥ तेव्हां मूर्तिमंत लक्ष्मीचकीं काय अशा त्या स्त्रियांना पाहून त्यांच्या रूपसौंदर्यातिशयानें निस्तेज झालेले ते कामादिक देव-

---

यांति क्रोधस्य वा । तत्रास्मद्वशाः कामोपभोगमपि तावदनुभवंति । क्रोधस्य वशाः पुनरतिमंदा इत्याहुः । क्षुत्तृडिति । क्षुच्च तृट्च त्रिकालगुणाश्च शीतोष्णवर्षाणि च मारुतश्च प्राणो बाह्यो वा जैह्वया जिह्वाभोगाश्च शैश्न्या गुह्योपभोगाश्च एतानस्मानपारजलधिरूपानतितीर्य विलंघ्य गोष्पदे मज्जंति । कुतः । यतः क्रोधस्य विफलस्य वशं यांति गच्छंति । किंच । जले मज्जंतो यथा विवशाः संतो मस्तकारोपितं भारमुत्सृजंति तथा वृथैव न मोक्षाय न च भोगाय शापादिना दुश्चरं तप उत्सृजंति ॥ ११ ॥ स्त्रियो योग-

इति प्रगृणतां तेषां स्त्रियोऽत्यद्भुतदर्शनाः ॥ दर्शयामास शुश्रूषां स्वर्चिताः कुर्वतीर्विभुः ॥ १२ ॥ ते देवानुचरा दृष्ट्वा स्त्रियः श्रीरिव रूपिणी ॥ गंधेन मुमुहुस्तासां रूपौदार्यहतश्रियः ॥ १३ ॥ तानाह देवदेवेशः प्रणतान्प्रहसन्निव ॥ आसामेकतमां वृङ्ध्वं सवर्णां स्वर्गभूषणाम् ॥ १४ ॥ ओमित्यादेशमादाय नत्वा तं सुरबंदिनः ॥ उर्वशीमप्सरःश्रेष्ठां पुरस्कृत्य दिवं ययुः ॥ १५ ॥ इंद्रायानम्य सदसि शृण्वतां त्रिदिवौकसाम् ॥ ऊचुर्नारायणबलं शक्रस्तत्रास विस्मितः ॥ १६ ॥ हंसस्वरूप्यवददच्युत आत्मयोगं दत्तः कुमार ऋषभो भगवान्पिता नः ॥ विष्णुः शिवाय जगतां कलयाऽवतीर्णस्तेनाहृता मधुभिदा श्रुतयो हयास्ये ॥ १७ ॥

निर्मिताः स्त्रीः शुश्रूषां कुर्वतीः स्वर्चिताः सुष्ठ्वलंकृतास्तेषां स्वलावण्यादिदर्पोपशमाय दर्शयामास ॥ १२ ॥ रूपिणी मूर्तिमती श्रीरिव ताः स्त्रियः स्त्रीर्दृष्ट्वा । तासां तु रूपस्यौदार्येण महत्त्वेन हता श्रीः कांतिर्येषां ते ॥ १३ ॥ वृङ्ध्वं वृणीध्वम् । क्व वयं वराकाः क्व चेमा इति चेत्तत्राह । सवर्णां समानरूपाम् । नैकाप्यस्मदनुरूपेति चेन्मा भवतु तथापि स्वर्गस्य भूषणरूपाम् ॥१४॥ सुरबंदिनो देवभृत्याः ॥१५॥ इंद्राय इंद्रंप्रति नारायणबलमूचुः । शक्रस्तत्रास त्रासं प्राप्तो विस्मितश्च । तत्र विस्मित आसेति वा ॥ १६ ॥ अन्यानप्यवता-

---

सेवक, त्या स्त्रियांच्या शरीरसुगंधानेंच मोह पावले ॥ १३ ॥ तेव्हां ब्रह्मादिकांचाहि ईश्वर असा त्या नरनारायणानें, हास्य केल्यासारखें दाखवून नम्र असलेल्या त्या कामादिकांस सांगितलें कीं, या स्त्रियांपैकीं एखादी स्त्री तुह्मी मागून घ्या. अतितुच्छ असे आह्मी कोठें ? आणि ह्या अतिसुंदर स्त्रिया कोठें ? असें तुमच्या मनांत आलें असेल तर, यांतील, एखादी वाईटशी, तुमच्यासारखीच मागून घ्या. तशी एकहि नाहीं असें ह्मणाल तर नसो परंतु स्वर्गाला भूषणरूप अशी एखादी मागा ॥ १४ ॥ तेव्हां त्या कामादिक देवांनीं बरें आहे असें ह्मणून, त्या नरनारायणाची आज्ञा मान्य केली. आणि त्याला नमस्कार करून व अप्सरांमध्यें श्रेष्ठ अशा उर्वशीला पुढें करून ते स्वर्गास निघून गेले ॥ १५ ॥ नंतर त्यांनीं सभेमध्यें बसलेल्या इंद्राला नमस्कार करून त्याला, देव श्रवण करित असतां, नरनारायणाचा प्रभाव वर्णन केला, तो ऐकून इंद्राला मोठें आश्चर्य वाटलें ॥ १६ ॥ आतां दुसरे अवतार व त्यांचीं चरित्रें सांगतो–जगाच्या कल्याणाकरितां अंशानें अवतार धारण करणाऱ्या विष्णूनें, हंसावतार धारण करून ब्रह्मदे- ॥ १९ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वाला ब्रह्मविद्येचा उपदेश केला. तसेच त्याविष्णूचे दत्तात्रेय, सनत्कुमार, व आमचा पिता भगवान् ऋषभदेव, हे तीन अवतार झाले, त्यांनींहि तत्त्वज्ञानाचा उपदेश केला. त्याच विष्णूनें हयग्रीवावतारीं मधुनामक दैत्याला मारून त्यापासून श्रुति परत आणिल्या ॥ १७ ॥ त्यानेंच मत्स्यावतार धारण करून प्रळयाचे वेळीं, वैवस्वत मनु, पृथिवी व औषधि यांचें रक्षण केलें. तसाच वराहावतार घेऊन पाण्यातून पृथिवीचा उद्धार करितांनां हिरण्याक्ष दैत्याचा वध केला, कूर्मावतार घेऊन समुद्रमंथनाच्या वेळीं पृष्ठभागीं मंदर पर्वताचें धारण केलें, आणि हरि अवताराचे वेळीं पीडित होऊन शरण गेलेल्या गजेंद्राला ग्राहापासून सोडविलें ॥ १८ ॥ त्याच भगवंतानें, निरनिराळे अवतार धारण करून कश्यपाकरितां समिधा आणण्यास वनांत जाऊन तेथें गाईच्या खुराच्या खळग्यांतील पाण्यांत बुडूं लागल्यामुळें इंद्रानें हंसलेल्या व श्रमपावून स्तुति करणाऱ्या वालखिल्यऋषींनां त्या संकटांतून तारिलें व वृत्रासुराच्या वधानें ब्रह्महत्यारूप पापांत पडलेल्या इंद्राला त्या पापापासून मुक्त केलें, तसेंच दैत्यांच्या

रांस्तच्चरितानि चाह । हंसस्वरूपीति । दत्तो दत्तात्रेयः । कुमारः सनकादिः । नः पिता ऋषभश्च । विष्णुरेव कलयाऽवतीर्णः सन्नात्मयोगमवदत् । तेन विष्णुना हयास्ये हयग्रीवावतारे मधुभिदा सता ततः श्रुतय आहृताः ॥ १७ ॥ इला पृथ्वी । ओषधयश्च गुप्ताः । क्रौडे च वाराहावतारे । ग्राहाद्गजेंद्रममुंचन्मोचयामास । एवमादौ यत्रावतारनाम नास्ति तत्र विष्णुः शिवाय जगतां कलयाऽवतीर्ण इत्यनुवर्तनीयम् ॥ १८ ॥ संस्तुन्वतः स्तुतिं कुर्वाणान् ऋषीन्वालखिल्यान्कश्यपार्थं समिदाहरणे गोष्पदे निमग्नानिंद्रेणोपह-

गुप्तोऽप्यये मनुरिलौषधयश्च मात्स्ये क्रौडे हतो दितिज उद्धरतांभसः क्ष्माम् ॥ कौर्मे धृतोऽद्रिरमृतोन्मथने स्वपृष्ठे ग्राहात्प्रपन्नमिभ-
राजममुंचदार्तम् ॥ १८ ॥ संस्तुन्वतोऽब्धिपतितान् श्रमणानृषींश्च शक्रं च वृत्रवधतस्तमसि प्रविष्टम् ॥ देवस्त्रियो सुरगृहे पिहिता
अनाथा जघ्नेऽसुरेंद्रमभयाय सतां नृसिंहे ॥ १९ ॥ देवासुरे युधि च दैत्यपतीन्सुरार्थे हत्वांतरेषु भुवनान्यदधात्कलाभिः ॥ भूत्वा
थ वामन इमामहरद्बलेः क्ष्मां याच्ञाछलेन समदाददितेः सुतेभ्यः ॥ २० ॥ निःक्षत्रियामकृत गां च त्रिःसप्तकृत्वो रामस्तु हैहयकु-
लाप्ययभार्गवाग्निः ॥ सोऽब्धिं बबंध दशवक्त्रमहन्सलंकं सीतापतिर्जयति लोकमलघ्नकीर्तिः ॥ २१ ॥

सितानुद्धृत्यापदोऽमोचयत् । तमसि ब्रह्महत्यायां प्रविष्टं मोचयामास । असुरगृहे पिहिता निरुद्धा या देवस्त्रियस्ताश्चामुंचदनेकावतारैः ॥ १९ ॥ अंतरेषु सर्वमन्वंतरेषु कलाभिर्मूर्तिभिर्भुवनान्यदधादपालयत् । इमां क्ष्मां समदाद्ददौ ॥ २० ॥ हैहयानां कुलस्याप्ययाय भार्गवरूपोऽग्निः । स रामो दाशरथिः सन्सलंकं लंकायां स्थितम् । स च जयति । वर्तमा-

---

घरीं कोंडून ठेविलेल्या देवांच्या अनाथ स्त्रियांना सोडविलें आणि त्या भगवंतानें नृसिंहावतार धारण करून साधूंना अभय प्राप्त होण्याकरितां हिरण्यकशिपूचा वध केला ॥ १९ ॥ त्याच भगवंतानें सर्व मन्वंतरांमध्यें देवदैत्यांच्या युद्धांत देवांचें कार्य साधण्याकरितां आपल्या अवतारांनीं दैत्याधिपतींनां मारून भुवनांचें रक्षण केलें आणि वामनावतार धारण करून याचना करण्याच्या छलानें बळिराजापासून ही पृथिवी हिरावून घेऊन देवांस अर्पण केली ॥ २० ॥ सहस्रार्जुनादिक राजांच्या कुळाच्या नाशाविषयीं भृगुकुळामध्यें उत्पन्न झालेला ~~जणुं अभीचकींकाय असा~~ परशुरामावतार धारण करून पृथिवी एकवीसवेळ निःक्षत्रिय केली. त्यानेंच रामावतार धारण करून समुद्रावर सेतु बांधला आणि लंकेत असणाऱ्या रावणाचा वध केला. ~~जो लोकांच्या पापांचा नाश करणाऱ्या कीर्तीनें युक्त असा~~ सीतापति रामचंद्र, सांप्रतकालीं राज्य

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करीत आहे ॥ २१ ॥ तोच जन्मरहित भगवान् पृथिवीचा भार उतरण्याकरितां यादवामध्यें रामकृष्णावतार धारण करून देवांनींहि करण्यास अशक्य अशीं चरित्रें करील आणि बुद्धावतार धारण करून, यज्ञाचें अनुष्ठान करण्याविषयीं अयोग्य असूनहि यज्ञ करूं इच्छिणाऱ्या दैत्यांस वेदविरुद्ध तर्कांचा बोध करून मोहित करील, तसाच कलियुगाच्या शेवटीं, कल्किरूपानें अवतीर्ण होऊन, शूद्रप्राय झालेल्या अधार्मिक राजांचा संहार करील ॥ २२ ॥ हे महापराक्रम्या राजा, याप्रकारचीं जगत्पति महाकीर्तिमान् भगवंताचीं, जन्में व कर्में मीं तुला संक्षेपानें वर्णन केलीं आहेत. दुसरींहि असलीं पुष्कळ चरित्रें कवींनीं त्यात्याठिकाणीं वर्णन केलेलीं आहेत ॥ २३ ॥ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या एकादशस्कंधांत अवतारनिरूपणनामक हा चवथा अध्याय समाप्त झाला ॥ ४ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ आतां ह्या पांचव्या अध्यायामध्यें, भक्तिहीन लोकांची गति काय होत्ये ? व युगयुगामध्यें पूजेचा विधि कोणता आहे ? या दोन प्रश्नांचें उत्तर सांगितलें आहे ॥ १ ॥ निमिराजा ह्मणाला– हे महाब्रह्मवेत्तेहो

नकालीनोऽवतार इत्यर्थः ॥ २१ ॥ भाविनं रामकृष्णावतारमाह । भूमेरिति । बुद्धावतारमाह । वादैरिति । अतदर्हान्यज्ञानर्हान्दैत्यान्विमोहयिष्यति । कल्क्यवतारमाह । शूद्रानिति । न्यहनिष्यन्निहनिष्यति ॥ २२ ॥ २३ ॥ इति श्रीमद्भागवते एकादशस्कंधे टीकायां चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥ ॥ पंचमे भक्तिहीनानां का निष्ठा को युगे युगे ॥ पूजाविधिरिति प्रश्नद्वयस्योत्तरमुच्यते ॥ १ ॥ त्वां सेवतां सुरकृता बहवोऽतराया इत्यनेन श्रीहरिभक्ता विघ्नमूर्ध्नि पदं दत्वा परां गतिं यांति अभक्तानां तु विघ्ना भवंतीत्युक्ते तर्हि तेषां का

भूमेर्भरावतरणाय यदुस्वजन्मा जातः करिष्यति सुरैरपि दुष्कराणि ॥ वादैर्विमोहयति यज्ञकृतोऽतदर्हान् शूद्रान्कलौ क्षितिभुजो न्यहनिष्यदंते ॥ २२ ॥ एवंविधानि कर्माणि जन्मानि च जगत्पतेः ॥ भूरीणि भूरियशसो वर्णितानि महाभुज ॥ २३ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥ ॥ राजोवाच ॥ भगवंतं हरिं प्रायो न भजंत्यात्मवित्तमाः ॥ तेषामशांतकामानां का निष्ठाऽविजितात्मनाम् ॥ १ ॥ चमस उवाच ॥ मुखबाहूरुपादेभ्यः पुरुषस्याश्रमैः सह ॥ चत्वारो जज्ञिरे वर्णा गुणैर्विप्रादयः पृथक् ॥ २ ॥ य एषां पुरुषं साक्षादात्मप्रभवमीश्वरम् ॥ न भजंत्यवजानंति स्थानाद्भ्रष्टाः पतंत्यधः ॥ ३ ॥

गतिर्भवतीति पृच्छति । भगवंतमिति । हे आत्मवित्तमाः अविजितात्मनामतएवाशांतकामानां का निष्ठा किं प्राप्यमित्यर्थः ॥ १ ॥ स्वजनकस्य गुरोर्भगवतोऽनादराद्गुरुद्रोहेण दुर्गतिं यांतीति वक्तुं भगवतः सकाशाद्वर्णाश्रमाणामुत्पत्तिमाह । मुखेति । गुणैः सत्वेन विप्रः । सत्वरजोभ्यां क्षत्रियः । रजस्तमोभ्यां वैश्यः । तमसा शूद्र इति ॥ २ ॥ एषां मध्ये येऽज्ञात्वा न भजंति ये च ज्ञात्वाप्यवजानंति । आत्मनः प्रभवो जन्म यस्मात्तम् । तदभजने कृतघ्नतामप्याह । ईश्वरमिति । स्थानाद्वर्णाश्रमाद्भ्रष्टाः ॥ ३ ॥

जे बहुतेक लोक भगवान् हरीचें भजन करीत नाहींत, त्या मनाला स्वाधीन करून न घेणाऱ्या व विषयसेवनाविषयीं आसक्त असलेल्या पुरुषांची शेवटीं गति काय होत्ये ? ॥ १ ॥ तेव्हां आपल्या उत्पादक अशा भगवंताच्या अनादरानें त्यांना दुर्गति प्राप्त होत्ये हें सांगण्याकरितां प्रथम चमसनामक योगेश्वर, भगवंतापासून वर्णाश्रमांची उत्पत्ति सांगतो चमस ह्मणाला–हे निमिराजा, नारायणाच्या मुख, बाहु, मांड्या आणि पाय या अवयवांपासून अनुक्रमानें निरनिराळे ब्राह्मणादिक चार वर्ण गुणांनीं ह्मणजे सत्वगुणानें ब्राह्मण, सत्वरजोगुणांनीं क्षत्रिय, रजतमोगुणांनीं वैश्य व तमोगुणानें शूद्र असे उत्पन्न झाले. तसेच हृदयापासून ब्रह्मचर्य आश्रम, कमरेच्या पुढील भागापासून गृहस्थाश्रम, वक्षस्थळापासून वानप्रस्थाश्रम आणि मस्तकापासून संन्यासाश्रम हे चारहि आश्रम उत्पन्न झाले ॥ २ ॥ या वर्णाश्रमवान् लोकांमध्यें जे लोक, आपणास उत्पन्न करणाऱ्या साक्षात् पुरुषोत्तम ईश्वराला जाणत नाहीं व सेवन करीत नाहींत किंवा जाणूनहि अवज्ञा करितात ते लोक, कृतघ्न असल्यामुळें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आपल्या वर्णाश्रमधर्मापासून भ्रष्ट होऊन दुर्गतीला पावतात ॥ ३ ॥ आतां ज्यांपासून भगवत्कथांचें श्रवण व भगवंताचें कीर्तन हीं दूर आहेत ह्मणजे तीं ज्यांना मुळींच घडलीं नाहींत, अशा स्त्रिया व शूद्रादिक जे असतील ते तुझ्यासारख्या अधिकारी राजांना, सामदानादिक उपायांच्या योगानें अनुग्रह करण्यास योग्य आहेत ॥ ४ ॥ आतां जे अधिकारी असूनहि जाणूनबुझून भगवंताचें भजन करीत नाहींत त्यांची निंदा करितो–कित्येक ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य हे जरी उपनयन संस्कार, अध्ययन इत्यादिकेंकरून भगवद्भजनाच्या उत्तम अधिकाराला पावले आहेत तथापि ते वेदांतील अर्थवाद (फलश्रुति) खऱ्या आहेत असें मानून कर्मफळांचेठिकाणीं आसक्त होऊन मोहित

तत्र येऽज्ञास्ते भवद्विधानामनुग्राह्या इत्याह । दूर इति । दूरे हरिकथाश्रवणं येषां ते अतएव दूरे चाच्युतकीर्तनं येषां ते । दूरे अच्युतकीर्तनाश्चेति वा ॥ ४ ॥ ज्ञानलवदुर्विदग्धास्त्वचिकित्स्यत्वादुपेक्ष्या इत्याशयेनाह । विप्र इति । श्रौतेनोपनयनाख्येन । उपलक्षणमेतत् । अध्यनादिनाऽपि हरेः पदांतिकं तद्भजनोत्तमाधिकारं प्राप्ता अपि मुह्यंति कर्मफलेषु सज्जंते । कुतः । आम्नायेषु ये वादा अर्थवादास्ते मोहकतया विद्यंते येषां ते । तदुक्तं गीतासु । यामिमां पुष्पितां वाचं प्रवदंत्यविपश्चितः ॥ वेदवादरताः पार्थ नान्यदस्तीति वादिन इत्यादिना ॥ ५ ॥ भक्तिमार्गदाढर्याय तेषां मोहं प्रपंचयन्निंदति । कर्मणीत्यादिना । अकोविदा यथा बंधकं न भवति तथा कर्तुमज्ञाः । न चाभिज्ञान्पृच्छंति । यतः स्तब्धा अनम्राः । स्तब्धत्वे हेतुः । यतो मूर्खा अपि पंडिता वयमिति मानवंतः । अतः अपामसोममृता अभूम ॥ अक्षय्यं ह वै चातुर्मास्ययाजिनः सुकृतं भवति ।

दूरेहरिकथाः केचिद्दूरे चाच्युतकीर्तनाः ॥ स्त्रियः शूद्रादयश्चैव तेऽनुकंप्या भवादृशाम् ॥ ४ ॥ विप्रो राजन्यवैश्यौ च हरेः प्राप्ताः पदांतिकम् ॥ श्रौतेन जन्मनाथापि मुह्यंत्याम्नायवादिनः ॥ ५ ॥ कर्मण्यकोविदाः स्तब्धा मूर्खाः पंडितमानिनः ॥ वदंति चाटुकान्मूढा यया माध्व्या गिरोत्सुकाः ॥ ६ ॥ रजसा घोरसंकल्पाः कामुका अहिमन्यवः ॥ दांभिका मानिनः पापा विहसंत्यच्युतप्रियान् ॥ ७ ॥ वदंति तेऽन्योन्यमुपासितस्त्रियो गृहेषु मैथुन्यपरेषु चाशिषः ॥ यजंत्यसृष्टान्नविधानदक्षिणं वृत्त्यै परं घ्नंति पशूनतद्विदः ॥ ८ ॥

यत्र नोष्णं न शीतं स्यान्न ग्लानिर्नाप्यरातय इत्यादिकया यया माध्व्या गिरोत्सुकाः संतो मूढास्तया चाटुकानप्सरोभिः सह विहरिष्याम इत्यादिप्रियान् शब्दान्वदंति ॥ ६ ॥ किंच तेषां कर्माभिनिवेशात्कामक्रोधदंभादयो वर्धंत इत्याह त्रयेण । रजसेति । घोरोऽभिचारादिः संकल्पो येषां ते । अहिवन्मन्युर्येषां ते ॥ ७ ॥ कामुकत्वं प्रपंचयति । वदंतीति । उपासिताः स्त्रियो यैर्न तु वृद्धास्ते मैथुन्यं मिथुनसुखमेव परं न त्वातिथ्यादि येषु गृहेषु तेष्वाशिषो वदंति । इदमद्य मया लब्धमिमं प्राप्स्ये मनोरथम् । इदमस्तीदमपि मे भविष्यति पुनर्धनमित्याकाराः । दांभिकतां प्रपंचयति । यजंतीति । असृष्टान्नविधानदक्षिणं न सृष्टा न संपादितान्नविधानदक्षिणा यथा तथा यजंति । तदा च वृत्त्यै जीविकार्थं परं केवलं पशून् घ्नंति । अतद्विदो हिंसादोषानभिज्ञाः ॥ ८ ॥

होतात ॥ ५ ॥ आतां भक्तिमार्गाच्या दृढीकरणार्थ त्यांच्या मोहाचा विस्तार करून त्यांची निंदा करितो–कर्माविषयीं अकोविद (जसें कर्म बंधक होणार नाहीं तसें करण्यास न जाणणारे) उद्धट व मूर्ख, असूनहि आपणच पंडित आहों असें मानणारे ते लोक, आह्मी येथें यज्ञामध्यें सोमपान करूं व पुढें अमर होऊं, इत्यादिक ज्या मधुरवाणीनें उत्कंठित होऊन मोहित होतात त्याच वाणीनें ते ‘ आह्मी अप्सरांबरोबर क्रीडा करूं ’ इत्यादिक मनाला प्रिय वाटणारे शब्द भाषण करितात ॥ ६ ॥ आणि रजोगुणांच्या आधिक्यानें दुसऱ्याचा घातपात करण्याचा संकल्प करणारे, विषयभोगाविषयीं आसक्त, सर्पासारखे कोपयुक्त, दांभिक, अभिमानी व पापी असे ते लोक, भगवद्भक्तांचा उपहास करितात ॥ ७ ॥ ज्यांनीं स्त्रियांचीच उपासना चालविली आहे ‘ वृद्धांची नाहीं ’ असे ते लोक, ज्यांमध्यें मैथुन हेंच सुख आहे, अतिथीचा सत्कार

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नाहीं, अशा घरांमध्यें राहून, 'आज मी इतकें मिळविलें आहे, आतां हा माझा मनोरथ पूर्ण होईल, माझ्यापाजवळ इतकें द्रव्य तर आतां आहेच आणि पुढें माझें इतकें द्रव्य होईल, इत्यादिक आपापले मनोरथ परस्पर वर्णन करितात. आणि ज्यांमध्यें परिपूर्ण दक्षिणा किंवा अन्नदान हीं नाहींत असे विधानरहित दांभिक यज्ञ करितात, तसेच हिंसेचा दोष मनांत न आणितां केवळ आपली जीविका चालविण्याकरितां पशूंची हिंसा करितात ॥ ८ ॥ संपत्ति, ऐश्वर्य, उत्तम कुळांत जन्म, विद्या, दान, रूप, बळ व कर्म यांपासून झालेल्या अभिमानानें अंधबुद्धि झालेले ते खळ, भगवंताचा व भगवद्भक्तांचा अवमान करितात ॥ ९ ॥ याप्रमाणें वर्तणूक करणारे ते मूर्ख लोक, वेदांच्या स्पष्ट असलेल्याहि खऱ्या अर्थाला जाणत नाहींत. कारण, ते लोक, सर्वप्राणिमात्रांमध्यें आत्मत्वानें व ईश्वरत्वानें आकाशाप्रमाणें

मानितां प्रपंचयति । श्रियेति श्रिया धनादिसंपदा । विभूत्या ऐश्वर्येण । श्यादिना जातो यः स्मयो गर्वस्तेनांधा धीर्येषां ते ईश्वरसहितान्सतोऽवमन्यंते ॥ ९ ॥ किंच एवं वर्तमानास्ते वेदतत्त्वार्थं स्फुटमपि न जानंतीत्याह । सर्वेष्विति । केन रूपेणावस्थितं तदाह । आत्मानमीश्वरमात्मतया ईश्वरतया चावस्थितम् । एवमप्यसंगतामाह । यथा खम् । पुरुषार्थतामाह । अभीष्टम् । स्फुटत्वमाह । वेदोपगीतं चेति । तत्कुतः । यतो मनोरथानां व्यवायामिषमद्यसेवाविषयाणां वार्तया प्रवदंति । निवृत्तिपरं संतं वेदं प्रवृत्तिपरं वर्णयंति ॥ १० ॥ ननु व्यवायादीनामपि ऋतौ भार्यामुपेयाद्धुतशेषं भक्षयेदित्यादिना विहितत्वात्किमेवं निंद्यतेऽत आह । लोक इति । व्यवायः स्त्रीसंगः । नित्या रागत एव नित्यं प्राप्ताः जंतोः प्राणिमात्रस्य । अतस्तत्र तासु चोदनाविधिर्नास्ति । ननु ऋतावुपेयादित्यादिना विधिर्दर्शितः । सत्यम् । नत्वयमपूर्वविधिः । रागतः प्राप्तत्वात्किंतु नियम-

श्रिया विभूत्याऽभिजनेन विद्यया त्यागेन रूपेण बलेन कर्मणा ॥ जातस्मयेनांधधियः सहेश्वरान्सतोऽवमन्यंति हरिप्रियान्खलाः ॥ ९ ॥ सर्वेषु शश्वत्तनुभृत्स्ववस्थितं यथा खमात्मानमभीष्टमीश्वरम् ॥ वेदोपगीतं च न शृण्वतेऽबुधा मनोरथानां प्रवदंति वार्तया ॥ १० ॥ लोके व्यवायामिषमद्यसेवा नित्यास्तु जंतोर्नहि तत्र चोदना ॥ व्यवस्थितिस्तेषु विवाहयज्ञसुराग्रहैरासु निवृत्तिरिष्टा ॥ ११ ॥

विधिरूपेण रागिणामभ्यनुज्ञामात्रं क्रियते तदाह । व्यवस्थितिरिति । तेषु व्यवायादिषु । कैः । विवाहयज्ञसुराग्रहैः विवाहविषय एव व्यवायः कार्यः । यज्ञ एवामिषसेवा । सौत्रामण्यां सुराग्रहान् गृह्णातीति श्रुतेस्तत्रैव मद्यसेवेति नियमः क्रियते । ननु च नियमपक्षेऽप्यावश्यकत्वान्न निंदायुक्ताऽत आह । आसु निवृत्तिरिति । आसु व्यवायामिषमद्यसेवासु निवृत्तिरिष्टा । अयं भावः । नायं नियमविधिरपि नित्यप्राप्तत्वादतो निवृत्तिः परिसंख्यैव । कथं तर्हि व्यवस्थितिरित्युक्तम् । उच्यते न तावत्परिसंख्याविधिना श्रुत्या निवृत्तिरुच्यते । तथा सति स्वार्थत्यागः परार्थकल्पना प्राप्तबाधश्चेति दोषत्रयं स्यात् अतः क्वचित्प्राप्स्यतोऽप्यर्थस्य प्रापणमनर्थकमित्यपूर्वविधिद्वाराऽन्यनिवृत्तिः फलतो भवति । तद्यथा । इमामगृभ्णन् रशनामृतस्येत्यश्वाभिधानीमादत्त इत्यत्र रशनालिंगतो गर्दभाश्वाभिधानी रशनाद्वये प्राप्स्यतो मंत्रस्यापूर्वविधिद्वारा परिसंख्योच्यते । यथोक्तं तंत्रवा-

---

व्यापून राहणाऱ्या, वेदानें गाइलेल्या व अतिप्रिय अशा आत्म्याचें श्रवणसुद्धां करित नाहींत, तर वस्तुतः निवृत्तिपर असलेल्याहि वेदाला स्त्रीसंभोग, मांसभक्षण व मद्यप्राशन इत्यादिक विषयांच्या वार्तेनें प्रवृत्तिपरत्वें करून, वर्णन करितात ॥ १० ॥ आतां, 'ऋतुकालीं स्त्रीसंभोग करावा, 'हवन करून अवशेष राहिलें मांस भक्षण करावें. इत्यादिक विधीनेंच संभोगादिक सांगितले असतां, त्यांची तुम्ही निंदा कां करितां? असें म्हणशील तर सांगतों ऐक—या लोकांमध्यें प्राणिमात्राला विषयासक्ति साहजिकच असल्यामुळें स्त्रीसंभोग, मांसभक्षण व मद्यप्राशन हीं निरंतर प्राप्त झालेलींच आहेत, तीं करण्याविषयीं म्हणजे वेदानें विधि सांगितला आहे असें नाहीं, तर त्या विषयांमध्यें आसक्त असलेल्या प्राण्याला नियमविधिरूपानें, विवाह, यज्ञ व सुराग्रहण यांच्या योगानें संभोगादिकांचें सेवन करण्याची आज्ञा दिल्यासारखें करून संकोचमात्र केला आहे. ॥ १७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्मणजे स्त्रीसंभोग करणें असेल तर तो–विवाह करून त्या स्त्रीचेठिकाणीं ऋतुकालींच (सोळा दिवसांमध्येंच) वर्ज्य दिवस सोडून रात्रीचा एकवारच पुत्र प्राप्त्यर्थच करावा, दुसऱ्यावेळीं करूं नये. तसेंच मांसभक्षण करणें असेल तर–यज्ञामध्यें शेष राहिलेला हविर्भागच सेवन करावा दुसरें मांस सेवन करूं नये. सुरापान करणें असेल तर सौत्रामणी नांवाची इष्टि करून तिच्यामध्येंच वास घेण्याच्या रूपानें सुरापान करावें अन्यथा करूं नये. असा संकोच केला आहे. तर मग स्त्रीसंभोग, मांसभक्षण व सुरापान हीं भारी खटपटीचीं असल्यामुळें नकोतच असें ह्मणून प्राणी त्यांचा त्याग करील तर तें त्याग करणेंच वेदाला इष्ट आहे ॥ ११ ॥ याप्रमाणें मैथुन, मांसभक्षण इत्यादि मनोरथांनीं व्याकुळचित्त झालेले लोक, प्रिय आत्म्याचें श्रवण करीत नाहींत असें सांगितलें. आतां धर्मद्वारा परमात्म्याची प्राप्ति करून देणाऱ्या धनाविहि ते पुरुष, केवळ

तिंके । अप्राप्तविधिरेवायमतो मंत्रस्य निश्चितः ॥ परिसंख्या फलेनोक्ता न विशेषः पुनः श्रुतेरिति । क्वचित्तु रागतो नित्यप्राप्तस्याप्राप्तांशपूरणलक्षणस्य नियमफलस्याप्यभावान्नियमविधिद्वारा फलतः परिसंख्या भवति । यथा पंचपंचनखा भक्ष्या इति । तथा रागतो नित्यवत्प्राप्तस्य व्यवायादेर्विवाहादिनियमेनाभ्यनुज्ञाद्वारा परिसंख्यैवेति । ननु यद्यभ्यनुज्ञामात्रमेतद्भवेत्तर्हि । ऋतुस्नातां तु यो भार्यां सन्निधौ नोपगच्छति ॥ घोरायां भ्रूणहत्यायां पच्यते नात्र संशय इत्यादिदोषश्रवणं न स्यात् । नैष दोषः । मनसि कामे सत्यपि तस्यामरुच्या द्वेषादिना वा तामनुपगच्छतो दोषश्रवणोपपत्तेरिति सर्वमनवद्यम् ॥ ११ ॥ तदेवं व्यवायादिमनोरथाकुलितत्वादभीष्टमात्मानं न शृण्वंतीत्युक्तमिदानीं धनस्यापि धर्मद्वारा परमात्मप्रापकस्य दृष्टोपभोगार्थं विनियोगात्मज्ञानगंधोऽपीत्याह । धनं चेति । धर्म एवैकं फलं यस्य तत् । कुतः । यतो यस्माद्धर्मात्सविज्ञानमपरोक्ष

धनं च धर्मैकफलं यतो वै ज्ञानं सविज्ञानमनुप्रशांति॥ गृहेषु युंजंति कलेवरस्य मृत्युं न पश्यंति दुरंतवीर्यम् ॥ १२ ॥ यद्घ्राणभक्षो विहितः सुरायास्तथा पशोरालभनं न हिंसा ॥ एवं व्यवायः प्रजया न रत्या इमं विशुद्धं न विदुः स्वधर्मम् ॥ १३ ॥

ज्ञानसहितं दृढं परोक्षज्ञानं भवति । कथंभूतम् । अनुप्रशांति अन्वनंतरमेव प्रकृष्टा शांतिर्निर्वाणलक्षणा यस्य तत् । एवंभूतं धनं गृहेषु देहार्थं युंजंति ॥ १२ ॥ किंच व्यवस्थयाऽपि व्यवायाद्यभ्यनुज्ञानं न यथेष्टमपि त्वन्यथैवेत्याह । यदिति । यद्यस्मात्सुराया घ्राणभक्षोऽवघ्राणं स एव विहितो न पानम् । तथा पशोरप्यालभनमेव विहितं न तु हिंसा । अयमर्थः । देवतोद्देशेन यत्पशुहननं तदालभनं वायव्यं श्वेतमालभेतेत्यादिश्रुतेर्न तु हिंसा । या वेदविहिता हिंसा न सा हिंसेति कीर्त्यते इति वचनात् । भक्षणोद्देशेन तु क्रियमाणं हननं लौकिकवद्धिंसैव । अत्र ह्यालभनमेव विहितं न तु हिंसा । अतो न यथेष्टभक्षणाभ्यनुज्ञेत्यर्थः । व्यवायोऽपि प्रजया निमित्तभूतया न तु रत्यै । अतो मनोरथवादिन इमं विशुद्धं स्वधर्मं न विदुरिति ॥ १३ ॥

विषयोपभोगांकरितांच विनियोग करितात, ह्मणून त्यांना ज्ञान प्राप्त होत नाहीं असें सांगतो धर्माचरण करणें हेंच धनाचें मुख्य फळ आहे. ज्या धर्मापासून परोक्षज्ञान आणि तत्काळ शांतता देणारें अपरोक्षज्ञान हीं दोन्हीहि प्राप्त होतात. अशा कल्याणकारक धनाचा ते विषयलंपट लोक, केवळ देहसुखाकरितां घरांमध्यें विनियोग करितात; ते अपरिहार्यपराक्रमानें युक्त असा मृत्यु, आपल्या देहाला घेरून राहिला आहे हें पाहत नाहींत ॥ १२ ॥ आणि वेदामध्यें जी मद्यपानादिकांची व्यवस्थेनें आज्ञा दिलेली आहे तीहि दुसऱ्या प्रकारचीच आहे, यथेष्ट नाहीं. ती अशी कीं,– सुरेचें जें प्राशन सांगितलें आहे तें सुरेचा नाकानें वास घेणें इतकेंच सांगितलें आहे, प्रत्यक्ष प्राशन सांगितलें नाहीं, तसेंच यज्ञामध्यें पशूचें देवतेच्या उद्देशानें आलभन (मारणें) सांगितलें आहे हिंसा (भक्षणाच्या उद्देशानें मारणें अशी) सांगितली नाहीं. याप्रमाणें स्त्रीसंभोगहि पुत्रप्राप्तीकरितांच सांगितलेला आहे, रतिसुखाकरितां सांगितलेला नाहीं. हा अत्यंत शुद्ध स्वधर्म ते अज्ञानी लोक जाणत नाहींत ॥ १३ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

याप्रमाणें भगवंताला विमुख असणारांचे बहुत दोष सांगून आतां त्यांची शेवटची गति सांगतो—जे तर अशा प्रकारचा धर्म न जाणणारे असत्पुरुष, उद्धटपणें, आह्मीच सत्पुरुष आहों असा अभिमान धारण करून निःशंकपणें 'असें केलें असतां असें होईल, असा' मनोरथ करून पशूंचा द्रोह करितात ते मरण पावल्यावर, त्यांनीं येथें मारलेले जे पशु असतात तेच त्यांना परलोकीं मारून खातात ॥ १४ ॥ आणि जे पुरुष, पुत्रादिसहित अशा ह्या आपल्या शवतुल्य शरीरावर स्नेह ठेऊन, इतर देहांमध्यें असणारा परंतु आपलाहि आत्मा अशा परमेश्वर हरीचा द्वेष करितात, ते मरण पावल्यावर दुर्गतीला पावतात ॥ १५ ॥ अज्ञानी लोक, तत्त्वज्ञान्यांचा अनुग्रह झाला असतां तरतात आणि तत्त्वज्ञानी तर स्वतःच तरतात परंतु जे तत्त्वज्ञान पावले नाहींत व जे अत्यंत मूढहि नव्हेत ते धर्मार्थकामांविषयीं खटपट करणारे व उपशांतीविषयीं क्षणभरहि अवकाश न मि-

---

एवं भगवत्पराङ्मुखानां बहुदोषतां प्रपंच्य तन्निष्ठां प्रपंचयति । ये त्विति पंचभिः । अनेवंविदः न एवं धर्मं विदंति ये ते । विस्रब्धा निःशंकाः । अनेन मनोरथो भविष्यतीति विश्वस्ता वा । तदानींतनपोषणेन वा तैः पशुभिर्विश्वस्तास्ते च पशवः प्रेत्य अमुत्र तान् खादंति । मांसभक्षयितामुत्र यस्य मांसमिहाद्म्यहम् । एतन्मांसस्य मांसत्वं प्रवदंति मनीषिण इति वचनात् ॥ १४ ॥ व्यभिचारादिना द्विषंतः । मृतके देहे । सानुबंधे पुत्रादिसहिते ॥ १५ ॥ अज्ञास्तत्त्वज्ञैरनुकंपितास्तरंति तत्त्वज्ञास्तु स्वतः । ये तु नात्यंतमज्ञा

ये त्वनेवंविदोऽसंतः स्तब्धाः सदभिमानिनः ॥ पशून्द्रुह्यंति विस्रब्धाः प्रेत्य खादंति ते च तान् ॥ १४ ॥ द्विषंतः परकायेषु स्वात्मानं हरिमीश्वरम् ॥ मृतके सानुबंधेऽस्मिन्बद्धस्नेहाः पतंत्यधः ॥ १५ ॥ ये कैवल्यमसंप्राप्ता ये चातीताश्च मूढताम् ॥ त्रैवर्गिका ह्यक्षणिका आत्मानं घातयंति ते ॥ १६ ॥ एत आत्महनो शांता अज्ञाने ज्ञानमानिनः ॥ सीदंत्यकृतकृत्या वै कालध्वस्तमनोरथाः ॥ १७ ॥ हित्वाऽत्यायासरचिता गृहापत्यसुहृच्छ्रियः ॥ तमो विशंत्यनिच्छंतो वासुदेवपराङ्मुखाः ॥ १८ ॥ राजोवाच ॥ कस्मिन्काले स भगवान्किंवर्णः कीदृशो नृभिः ॥ नाम्ना वा केन विधिना पूज्यते तदिहोच्यताम् ॥ १९ ॥

न च तत्त्वज्ञास्तेंऽतरालवर्तिनः पतंतीत्याह । य इति कैवल्यं तत्त्वज्ञानमसंप्राप्ताः । मूढतामत्यंतजडताम् । अत्र हेतुः । त्रिवर्गप्रधानाः । अक्षणिका उपशांतिक्षणरहिता देहादिस्थैर्यबुद्धयो वा स्वयमेवात्मानं घातयंति ॥ १६ ॥ तदाह । एत इति आत्महनः आत्मापन्हवकर्तारः । अज्ञाने कर्मणि । तथाच श्रुतिः । असुर्या नाम ते लोका अंधेन तमसा वृताः ॥ तांस्ते प्रेत्याभिगच्छंति ये के चात्महनो जना इति ॥ १७ ॥ या गृहापत्यसुहृच्छ्रियस्ता हित्वा ॥ १८ ॥ तदेवं भगवद्भक्तिरेव कर्तव्येति स्थिते तत्र विशेषं पृच्छति । कस्मिन्काल इति । किं वर्णः कीदृग्वर्णवान् । कीदृशः कीदृगाकारः । केन वा नाम्ना केन वा विधिना ॥ १९ ॥

ळालेले लोक, आपल्या हातानेंच आपला घात करून घेतात, ह्मणजे आत्मस्वरूप न जाणल्यामुळें जन्ममरणरूप संसार पावतात ॥ १६ ॥ हे लोक, आपणासच फसवून घेणारे, शांतिरहित, अज्ञानरूप कर्मालाच ज्ञान असें मानणारे व अवश्य कर्तव्य जें श्रवणादिक साधन तें न करणारे असल्यामुळें या लोकीं व परलोकीं काळाच्या योगानें नष्टमनोरथ होऊन अनेक प्रकारचीं दुःखें भोगितात ॥ १७ ॥ एवंच जे लोक वासुदेवाविषयीं विमुख आहेत ते पराकाष्ठेच्या आयासानें संपादन केलेल्या घर, मुलें, मित्र, धन वगैरे संपत्तींना, टाकण्याची इच्छा नसतांहि या लोकींच टाकून देऊन शेवटीं नरकामध्यें प्रवेश करितात ॥ १८ ॥ याप्रमाणें अभक्तांची गति सांगितल्यावरून साधकानें भगवद्भक्तीच करावी असें सिद्ध झालें असतां, त्यामध्यें विशेष विचारण्याकरितां निमिराजा ह्मणाला—हे ऋषिहो, तो भगवान् कोणत्याकाळीं कोणत्या वर्णाचा व कोणत्या आकाराचा ॥ १८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असतो आणि त्याचें कोणत्या नांवानें, व कोणत्या विधीनें मनुष्यांनीं पूजन करावें, तें आतां मला सांगा ॥ १९ ॥ तेव्हां करभाजन ह्मणाला— हे राजा, कृत, त्रेता, द्वापर आणि कलि अशीं चार युगें आहेत, त्यांमध्यें निरनिराळे वर्ण, नांवें व स्वरूपें धारण करणाऱ्या भगवंताची अनेकप्रकारच्या विधींनीं लोक पूजा करितात ॥ २० ॥ कृतयुगामध्यें श्वेतवर्ण, चतुर्भुज, जटाधारी, व वल्कलें परिधान करणारा, तसाच कृष्णाजिन, यज्ञोपवीत, रुद्राक्षमाळा, दंड व कमंडलु धारण करणारा ब्रह्मचारिरूपी भगवान् असतो ॥ २१ ॥ त्या युगांत मनुष्य, शांत, निर्वैर, सर्वांचे मित्र व सुखदुःखांविषयीं सम असून ते, ध्यानयोग, मनाचा निग्रह व इंद्रियांचा निग्रह यांच्यायोगानें भगवंताचें आराधन करितात ॥ २२ ॥ आणि ते लोक, हंस, सुपर्ण, वैकुंठ, धर्म, योगेश्वर, मनु, ईश्वर, पुरुष, अव्यक्त आणि परमात्मा अशीं भगवंताचीं नांवें गातात ॥ २३ ॥

एषु कृतादिकालेषु नानाप्रकारा वर्णाभिधाकारा यस्य सः । नानैव विधिना विविधेनैव मार्गेण ॥ २० ॥ तदेव वर्णादिचतुष्टयमाह । कृत इत्यादिना । कृष्णाजिनादीन्बिभ्रदिति ब्रह्मचारिवेषो दर्शितः ॥ २१ ॥ तपसा ध्यानेन ॥ २२ ॥ २३ ॥ त्रिगुणा दीक्षागभूता मेखला यस्य स यज्ञमूर्तिः । हिरण्यकेशः ॥ २४ ॥ पिशंगकेशः त्रय्या विद्यया वेदत्रयोक्तकर्मभिः

करभाजन उवाच ॥ कृतं त्रेता द्वापरं च कलिरित्येषु केशवः ॥ नानावर्णाभिधाकारो नानैव विधिनेज्यते ॥ २० ॥ कृते शुक्लश्चतुर्बाहुर्जटिलो वल्कलांबरः ॥ कृष्णाजिनोपवीताक्षान्बिभ्रद्दंडकमंडलू ॥ २१ ॥ मनुष्यास्तु तदा शांता निर्वैराः सुहृदः समाः ॥ यजंति तपसा देवं शमेन च दमेन च ॥ २२ ॥ हंसः सुपर्णो वैकुंठो धर्मो योगेश्वरोऽमलः ॥ ईश्वरः पुरुषोऽव्यक्तः परमात्मेति गीयते ॥ २३ ॥ त्रेतायां रक्तवर्णोऽसौ चतुर्बाहुस्त्रिमेखलः ॥ हिरण्यकेशस्त्रय्यात्मा स्रुक्स्रुवाद्युपलक्षणः ॥ २४ ॥ तं तदा मनुजा देवं सर्वदेवमयं हरिम् ॥ यजंति विद्यया त्रय्या धर्मिष्ठा ब्रह्मवादिनः ॥ २५ ॥ विष्णुर्यज्ञः पृश्निगर्भः सर्वदेव उरुक्रमः ॥ वृषाकपिर्जयंतश्च उरुगाय इतीर्यते ॥ २६ ॥ द्वापरे भगवान् श्यामः पीतवासा निजायुधः ॥ श्रीवत्सादिभिरंकैश्च लक्षणैरुपलक्षितः ॥ २७ ॥ तं तदा पुरुषं मर्त्या महाराजोपलक्षणम् ॥ यजंति वेदतंत्राभ्यां परं जिज्ञासवो नृप ॥ २८ ॥

॥ २५ ॥ पृश्निगर्भः पृश्निः सुतपसः प्रजापतेः पत्नी तस्याः पुत्रः । वृषाकपिः स्मृतः सन्वर्षति कामानाकंपयति क्लेशानिति तथा । जयत्येव सर्वदा जयंतः ॥ २६ ॥ श्यामोऽतसीपुष्पसंकाशः । निजानि चक्रादीन्यायुधानि च यस्य सः । श्रीवत्सो नाम वक्षसो दक्षिणभागे रोम्णां प्रदक्षिणावर्तः स आदिर्येषां करचरणादिगतपद्मादीनां तैरंकैरांगिकैश्चिह्नैर्लक्षणैर्बाह्यैः कौस्तुभादिभिः ॥ २७ ॥ महाराजोपलक्षणं छत्रचामरादियुक्तम् । वेदतंत्राभ्यां वैदिकेनागमिकेन च मार्गेण । यजंति पूजयंति परमीश्वरं ज्ञातुमिच्छवः ॥ २८ ॥

त्रेतायुगामध्यें, रक्तवर्ण, चतुर्बाहु, कमरेचेठिकाणीं दीक्षांगभूत त्रिगुणित मेखला धारण करणारा, पिंगटवर्ण केंस असलेला व स्रुचि स्रुवा इत्यादिक लक्षणांनीं युक्त असा यज्ञमूर्तिरूपी भगवान् असतो ॥ २४ ॥ त्यावेळीं धर्मिष्ठ व ब्रह्मवादी असलेले मनुष्य, इंद्रादि सर्वदेवतारूपी श्रीहरी देवाचें ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद यांत सांगितलेल्या यज्ञमार्गानें आराधन करितात ॥ २५ ॥ आणि ते लोक, विष्णु, यज्ञ, पृश्निगर्भ, सर्वदेव, उरुक्रम, वृषाकपि, जयंत आणि उरुगाय अशीं भगवंताचीं नांवें गातात ॥ २६ ॥ द्वापर युगामध्यें श्यामवर्ण, पीतांबरधारी व शंखचक्रगदापद्में धारण करणारा तसाच श्रीवत्सादिक चिन्हांनीं व कौस्तुभादिक लक्षणांनीं सुशोभित असा भगवान् असतो ॥ २७ ॥ हे राजा, त्यावेळीं तत्त्वज्ञानाची इच्छा करणारे मनुष्य, सार्वभौम राजाच्या छत्रचामरादिक चिन्हांनीं सुशोभित अशा त्या पुरुषोत्तम भगवंताचें वेदोक्त

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

व तंत्रोक्त अशा पूजादिप्रकारांनीं आराधन करितात ॥ २८ ॥ आणि स्तुति करितात कीं,— हे प्रभो, तुज वासुदेवाला नमस्कार असो. तसाच संकर्षण प्रद्युम्न व अनिरुद्धरूपी तुज भगवंताला नमस्कार असो ॥ २९ ॥ नारायण, ऋषि, महात्मा पुरुष, जगद्रूपी असून जगाचा ईश्वर अशा तुज सर्वभूतात्म्याला नमस्कार असो ॥ ३० ॥ याप्रकारें द्वापरयुगामध्यें लोक जगदीश्वराची स्तुति करितात. आतां कलियुगामध्येंहि नानाप्रकारच्या तांत्रिक विधानानें लोक जसें ईश्वरावें आराधन करितात तसें मी तुला सांगतों ऐक ॥ ३१ ॥ वर्णानें श्याम असूनहि कांतीनें देदीप्यमान आणि हृदयादिक अंगें, कौस्तुभादिक उपांगें, सुदर्शनादिक अस्त्रें व नंदसुनंदादिक पार्षद यांनीं युक्त अशा श्रीकृष्णाचें विवेकी पुरुष, ज्यांत नामसंकीर्तन व स्तुति पुष्कळ आहेत अशा पूजनादिक यज्ञांनीं आराधन करितात ॥ ३२ ॥ त्यांतील स्तुति अशी कीं,—

नामान्याह । नमस्त इति ॥ २९ ॥ ३० ॥ नानातंत्रविधानेनेति कलौ तंत्रमार्गस्य प्राधान्यं दर्शयति ॥ ३१ ॥ कृष्णवर्णं कृष्णावतारम् । अनेन कलौ कृष्णावतारस्य प्राधान्यं दर्शयति । अंगानि हृदयादीनि उपांगानि कौस्तुभादीनि अस्त्राणि सुदर्शनादीनि पार्षदाः सुनंदादयः तत्सहितम् । यज्ञैरर्चनैः । संकीर्तनं नामोच्चारणं स्तुतिश्च तत्प्रधानैः । सुमेधसो विवेकिनः ॥ ३२ ॥ स्तुतिमाह । ध्येयमिति । हे प्रणतपाल हे महापुरुष ते चरणारविंदं वंदे । कथंभूतम् ।

नमस्ते वासुदेवाय नमः संकर्षणाय च ॥ प्रद्युम्नायानिरुद्धाय तुभ्यं भगवते नमः ॥ २९ ॥ नारायणाय ऋषये पुरुषाय महात्मने ॥
विश्वेश्वराय विश्वाय सर्वभूतात्मने नमः ॥ ३० ॥ इति द्वापर उर्वीश स्तुवंति जगदीश्वरम् ॥ नानातंत्रविधानेन कलावपि यथा
शृणु ॥ ३१ ॥ कृष्णवर्णं त्विषाऽकृष्णं सांगोपांगास्त्रपार्षदम् ॥ यज्ञैः संकीर्तनप्रायैर्यजंति हि सुमेधसः ॥ ३२ ॥ ध्येयं सदा
परिभवघ्नमभीष्टदोहं तीर्थास्पदं शिवविरिंचिनुतं शरण्यम् ॥ भृत्यार्तिहं प्रणतपाल भवाब्धिपोतं वंदे महापुरुष ते चरणारविंदम्
॥ ३३ ॥ त्यक्त्वा सुदुस्त्यजसुरेप्सितराज्यलक्ष्मीं धर्मिष्ठ आर्यवचसा यदगादरण्यम् ॥ मायामृगं दयितयेप्सितमन्वधावद्वंदे महापुरुष
ते चरणारविंदम् ॥ ३४ ॥

ध्येयं ध्यातुं योग्यम् । सदेति सर्वत्र संबध्यते । ध्येयत्वे हेतवः । इंद्रियकुटुंबादिभिर्यः परिभवस्तिरस्कारस्तं हंतीति तथा तत् । किंच अभीष्टदोहं मनोरथपूरकम् । किंच तीर्थास्पदं गंगाद्याश्रयत्वेन परमपावनम् । शिवविरिंचिभ्यां नुतं स्तुतं महत्तमम् । ननु तौ कृतार्थाविव किमर्थं ताभ्यां नुतं तत्राह । शरण्यमाश्रययोग्यं सुखात्मकमित्यर्थः । तर्हि ब्रह्मादिस्तुत्यं प्राकृतस्य कथं गोचरः स्यात् न । भृत्यार्तिहं यस्य कस्यापि भृत्यमात्रस्यार्तिहंतृ न केवलमागंतुकार्तिमात्रं हंति किंतु भवाब्धिपोतं संसारार्णवतारकं च ॥ ३३ ॥ इदानीं स्वयमाप्तकामत्वान्नैरपेक्ष्यं भक्तार्थं च सापेक्षतां दर्शयन् श्रीरामचंद्रं स्तौति । त्यक्त्वेति । अन्यैः सुदुस्त्यजा या सुरेप्सिता राज्यलक्ष्मीस्तां त्यक्त्वा । यदिति य इत्यर्थः ।

हे भक्तपालका महापुरुषा, निरंतर ध्यान करण्यास योग्य, इंद्रियांपासून व कुटुंबापासून प्राप्त होणाऱ्या तिरस्काराचा नाश करणारें, गंगादिक तीर्थांचें आश्रय असल्यामुळें परम पवित्र, शंकर व ब्रह्मदेव यांनीं स्तविलेलें, सुखात्मक असल्यामुळें आश्रय करण्यास योग्य, कोणत्याहि भक्तमात्राचें दुःख घालविणारें व संसारसमुद्रापासून तारणारें अशा तुझ्या चरणकमळाला मी नमस्कार करितों ॥ ३३ ॥ हे महापुरुषा, धर्ममार्गी राहणाऱ्या ज्या तूं, रामावतारीं, इतरांनीं टाकण्यास अशक्य व देवांनींहि इच्छित असलेल्या राज्यलक्ष्मीचा त्याग करून दशरथ पित्याच्या वचनानें (त्यानें कैकेयीला सांगितलेल्या वचनाच्या पाळनाकरितां,) अरण्यांत गमन केलें आहेस व जो तूं भक्तवात्सल्यामुळें सीतेनें इच्छिलेल्या व मायेनें सुवर्णहरिणाचें रूप धारण करणाऱ्या मारीच राक्षसाच्या मागून धांवला आहेस. त्या श्रीरामरूपी तुज भगवंताच्य

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

चरणकमळाला मी नमस्कार करितों ॥ ३४ ॥ हे राजा, याप्रमाणें त्या त्या युगामध्यें योग्य अशा नांवांरूपांनीं चतुर्विध पुरुषार्थ देणाऱ्या भगवान् श्रीहरीचें, प्रत्येक युगांतील मनुष्य आराधन करितात ॥ ३५ ॥ परंतु गुण जाणणारे व सारग्राही लोक, चारहि युगांमध्यें कलियुगाचीच प्रशंसा करितात. कारण, कृतयुगामध्यें ध्यान केल्यानें, त्रेतायुगामध्यें यज्ञ केल्यानें, व द्वापरयुगामध्यें पूजन केल्यानें, जें फळ प्राप्त होतें तें सर्व फळ, ज्या कलियुगामध्यें केवळ नामसंकीर्तनानेंच प्राप्त होतें ॥ ३६ ॥ वास्तव या संसारांत भटकणाऱ्या देहधाऱ्यांना, कलियुगामध्यें ह्या नामसंकीर्तनापेक्षां दुसरा उत्कृष्ट कोणताच लाभ (पुरुषार्थाचें साधन) नाहीं. कारण, ज्या नामसंकीर्तनानें प्राण्याला मुक्तिरूप शांति प्राप्त होत्ये आणि संसाराचा नाश होतो ॥ ३७ ॥ हे राजा, कृतयुगादिकांतील प्रजा, आपणास कलियुगामध्यें जन्म घडावें अशी इच्छा

योऽरण्यमगात् । किं राज्यवैकल्यदर्शनेन, न । धर्मिष्ठः । कुतः । आर्यस्य गुरोर्दशरथस्य वचसा । किंच एवं राज्यं त्यक्त्वाऽपि भक्तवात्सल्येन दयितया सीतयेप्सितं मायामृगं स्वर्णाकारं योऽन्वधावत् तस्य भगवतश्चरणारविंदं वंदे । यद्वा हे धर्मिष्ठेति संबोधनम् । तथाऽप्यविवक्षितत्वादार्यपदेन संधिर्न भवति । तथा यदगादिति चरणारविंदमेवोच्यते । यन्मायामृगमन्वधावत्तत्ते चरणारविंदं वंद इत्यन्वयः । अन्यत्समानम् ॥ ३४ ॥ युगानुरूपाभ्यां नामरूपाभ्याम् ॥ ३५ ॥ एतेषु चतुर्युगेषु कलिरेव श्रेष्ठ इत्याह । कलिमिति । गुणज्ञाः

एवं युगानुरूपाभ्यां भगवान्युगवर्तिभिः ॥ मनुजैरिज्यते राजन् श्रेयसामीश्वरो हरिः ॥ ३५ ॥ कलिं सभाजयंत्यार्या गुणज्ञाः सारभागिनः ॥ यत्र संकीर्तनेनैव सर्वः स्वार्थोऽभिलभ्यते ॥ ३६ ॥ न ह्यतः परमो लाभो देहिनां भ्राम्यतामिह ॥ यतो विंदेत परमां शांतिं नश्यति संसृतिः ॥ ३७ ॥ कृतादिषु प्रजा राजन्कलाविच्छंति संभवम् ॥ कलौ खलु भविष्यंति नारायणपरायणाः ॥ ३८ ॥ क्वचित्क्वचिन्महाराज द्रविडेषु च भूरिशः ॥ ताम्रपर्णी नदी यत्र कृतमाला पयस्विनी ॥ ३९ ॥ कावेरी च महापुण्या प्रतीची च महानदी ॥ ये पिबंति जलं तासां मनुजा मनुजेश्वर ॥ प्रायो भक्ता भगवति वासुदेवेऽमलाशयाः ॥ ४० ॥ देवर्षिभूताप्तनृणां पितृणां न किंकरो नायमृणी च राजन् ॥ सर्वात्मना यः शरणं शरण्यं गतो मुकुंदं परिहृत्य कर्तम् ॥ ४१ ॥

कलेर्गुणं जानंति ये ते । ननु दोषाणां बहुत्वात्कथं सभाजयंति तत्राह । सारभागिनो गुणांशग्राहिणः । कोऽसौ गुणस्तमाह । यत्रेति । तदुक्तम् । ध्यायन्कृते यजन्यज्ञैस्त्रेतायां द्वापरेऽर्चयन् ॥ यदाप्नोति तदाप्नोति कलौ संकीर्त्य केशवमिति ॥ ३६ ॥ तस्मात्कलावतोऽस्मात्संकीर्तनात्परमो लाभो नास्ति । यतः संकीर्तनात् ॥ ३७ ॥ किंच । कृतादिष्विति ॥ ३८ ॥ ३९ ॥ अमलाशयाः संतः प्रायः प्रायशो भगवति भक्ता भवंति ॥ ४० ॥ भक्तस्य विधिनिषेधनिवृत्तेः कृतकृत्यतामाह । देवर्षीति । आप्ताः पोष्याः कुटुंबिन इतरे

करितात. कारण, कलियुगामध्यें मनुष्य खरोखर नारायणपरायण होतील तेव्हां आम्हीहि तसाच होऊं असा त्यांचा आशय असतो ॥ ३८॥ हे महाराज, कलियुगामध्यें कांहीं कांहीं देशांमध्यें त्यांत विशेषेंकरून द्रविडदेशांमध्यें भगवद्भक्त उत्पन्न होतील. कोणते ते द्रविडदेश असें ह्मणशील तर-जेथें ताम्रपर्णी नदी आहे तशीच कृतमाला, पयस्विनी, महापवित्र कावेरी, आणि महानदी प्रतीची ह्या नद्या आहेत ते द्रविडदेश होत. हे राजा, जे मनुष्य त्या ताम्रपर्णी वगैरे नद्यांचें जळ प्राशन करितात ते बहुतकरून निर्मळचित्त होऊन वासुदेव भगवंताचे परम भक्त होतात ॥ ३९ ॥ ४० ॥ आतां भक्ताची कृतकृत्यता सांगतो-हे राजा, देव, ऋषि, प्राणी, कुटुंबी, मनुष्य, व पितर यांचा, जसा अभक्त मनुष्य; ऋणी व किंकर (त्यांकरितां पंचमहायज्ञादिक करणारा) असतो, तसा जो सर्वकृत्यांचा किंवा भेददृष्टीचा त्याग करून, शरण जाण्यास

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

योग्य अशा मुक्तिदात्या भगवंताला सर्वभावानें शरण गेला आहे तो, देवादिकांचा ऋणी किंवा किंकर होत नाहीं. म्हणजे त्याला पंचमहायज्ञादिक करण्याची अवश्यकता राहत नाहीं. कारण, त्याचीं तीं सर्व कृत्यें भक्तीनेंच झाल्यासारखीं होतात ॥ ४१ ॥ आणि यमादिक सर्व देवांचा नियंता श्रीहरिच आपल्याहून इतर देवांवर व देहावरहि प्रेम न ठेवितां, अनन्यभावानें आपल्या चरणमूलाचें ध्यानार्चनादिकेंकरून सेवन करणाऱ्या प्रियभक्ताच्या हृदयामध्यें अंतर्यामिरूपानें प्रविष्ट होऊन त्याच्या हातून जरी कदाचित् प्रमादादिकेंकरून पाप घडलें असलें तरी तें सर्वहि पाप तत्काळ नाहींसें करितो म्हणजे भगवद्भक्तांना प्रमादानें घडलेल्याहि पापाच्या निवृत्तीकरितां प्रायश्चित्ताची गरज लागत नाहीं॥४२॥ नारद म्हणाला— हे वसुदेवा, याप्रमाणें उपाध्यायासहित असलेला तो निमिराजा, भागवतधर्मांचें श्रवण करून संतुष्ट झाला आणि त्यानें,

---

मे मयाऽश्रिताः । तदाह । एतेषां वृत्तिभिरात्मनः शिक्षाः शिक्षणीयानर्थान्हेयोपादेयादीनन्वशिक्षमनुशिक्षितवानस्मि ॥ ३५ ॥ नाहुषो ययातिः ॥ ३६ ॥ क्षितेः क्षमां शि-क्षितवानित्याह । भूतैरिति । आक्रम्यमाणः पीड्यमानः । तद्विद्वान्भूतानां दैववशवर्तित्वं विद्वान् । व्रतं नियमम् ॥ ३७ ॥ पर्वतरूपा वृक्षरूपा च या पृथिवी तस्याः शि-क्षितमाह । शश्वदिति । सर्वदा परार्थाः परोपकारार्था सर्वा ईहा यस्य सः । परार्थ एव एकांततः संभवो यस्य सः भूभृत्तः पर्वतात् । तस्य हि वृक्षतृणनिर्झरप्रसवक्रिया

एते मे गुरवो राजंश्चतुर्विंशतिराश्रिताः ॥ शिक्षा वृत्तिभिरेतेषामन्वशिक्षमिहात्मनः ॥ ३५ ॥ यतो यदनुशिक्षामि यथा वा नाहु-षात्मज ॥ तत्तथा पुरुषव्याघ्र निबोध कथयामि ते ॥ ३६ ॥ भूतैराक्रम्यमाणोऽपि धीरो दैववशानुगैः ॥ तद्विद्वान्न चलेन्मार्गाद-न्वशिक्षं क्षितेर्व्रतम् ॥ ३७ ॥ शश्वत्परार्थसर्वेहः परार्थैकांतसंभवः ॥ साधुः शिक्षेत भूभृत्तो नगशिष्यः परात्मताम् ॥ ३८ ॥ प्राण-वृत्त्यैव संतुष्येन्मुनिर्नैवेंद्रियप्रियैः ॥ ज्ञानं यथा न नश्येत नावकीर्येत वाङ्मनः ॥ ३९ ॥ विषयेष्वाविशन्योगी नानाधर्मेषु सर्वतः ॥ गुणदोषव्यपेतात्मा न विषज्जेत वायुवत् ॥ ४० ॥

परार्था एव यथा तद्वत् । तथा नगशिष्यो वृक्षशिष्यः सन्परात्मतां पराधीनात्मताम् । वृक्षो यथा परैरवखंड्योत्पाट्य वा नयनमप्यनुमन्यते तद्वत् ॥ ३८ ॥ वायुरपि द्विविधः प्राणो बाह्यश्च । तत्र प्राणस्य गुरुत्वमाह । प्राणवृत्त्येति । प्राणो ह्याहारादिमात्रेण प्रवर्तते रूपरसादीनिंद्रियविषयांस्तु नापेक्षते तथा मुनिरपि भवेदित्यर्थः । प्राणवृत्तेरक-रणे मनोवैकल्येन ज्ञाननाशः स्यादतो देहनिर्वाहः कर्तव्यः। गुणलिप्सायां तु वाङ्मनश्च विक्षिप्येतातो नाधिकं लिप्सेदित्याह। ज्ञानमिति। नावकीर्येत न विक्षिप्येत ॥ ३९॥ विषयान्सेवमानोऽपि तेष्वसनासक्तिं बाह्याद्वायोः शिक्षेदित्याह । विषयेष्विति । नानाधर्मेषु शीतोष्णादिधर्मकेषु । नहि वायुर्वने दहने वा सज्जते तद्वत् ॥ ४० ॥

असें साधूनें पर्वतापासून शिकावें आणि वृक्षांचा शिष्य होऊन त्यांपासून परात्मता शिकावी ह्मणजे जसा वृक्ष, दुसऱ्यांनीं तोडिला किंवा उपटून नेला तरी त्याला अनुमोदनच देऊन केवळ पराधीनपणें राहतो तसें आपणास कोणी मारिलें किंवा उचलून नेलें तरी त्यास अनुमोदन देऊन पराधीनपणें राहावें ॥ ३८ ॥ वायुहि प्राणवायु व बाह्यवायु असा दोनप्रकारचा आहे; त्यांत प्राणवायूचें गुरुत्व सांगतो–जसा प्राणवायु आहार मिळण्यानेंच संतुष्ट असतो रूपरसादिक इंद्रियांच्या विषयांची अपेक्षा धरीत नाहीं. त्याप्रमाणें योग्यानेंहि आहारमात्रानेंच संतुष्ट असावें, इंद्रियांना प्रिय अशा विषयांची अपेक्षा धरूं नये, मुळींच आहार केला नाहीं तर मन विव्हळ होऊन ज्ञानाचा नाश होईल तो न होण्यासाठीं देहनिर्वाहापुरता आहार मात्र करावा; चांगल्या आहारांची व विषयांची अपेक्षा धरिली तर मन व वाणी यांना विक्षेप प्राप्त होतो तो न होण्याची तजवीज ठेवावी ॥ ३९ ॥ आतां बाह्यवायूचें गुरुत्व सांगतो–जसा बाहेरचा वायु, वनांत

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

किंवा अग्नीमध्यें सर्वत्र फिरत असतां कोठेंच आसक्त राहत नाहीं त्याप्रमाणें गुणदोषांनीं रहितबुद्धि असलेल्या योग्यानें सर्वठिकाणीं शीत उष्ण इत्यादिक अनेक धर्मांच्या विषयांमध्यें अनुकूळ किंवा प्रतिकूळ प्राप्त झाले तरी त्यांचें सेवन करित असतां कोठेंच आसक्त होऊं नये ॥ ४० ॥ आणि जसा वायु सुगंधिक किंवा दुर्गंधिक पदार्थां-
 च्या आश्रयत्वेंकरून सुगंधिक किंवा दुर्गंधिक भासला तरी, वस्तुतः ते सुगंधादिक गुण पृथिवीचे असल्यामुळें त्यांचा संयोग पावत नाहीं त्याप्रमाणें पृथिवीच्या विकार-
 रूप देहांमध्यें प्रविष्ठ होऊन त्या देहांच्या बाल्यादि धर्मांचा आश्रय करून बालक तरुण इत्यादिरूपांनीं भासणाराहि योगी वस्तुतः आत्मद्रष्टा असल्यामुळें त्या बाल्यादिक गुणांनीं युक्त होत नाहीं· हें मी बाह्यवायूपासून शिकलों आहें ॥ ४१ ॥ आतां आकाशाचें गुरुत्व सांगतो–देहस्थितीनें वागणाऱ्याहि योग्यानें आपला आत्मा

यथा वायुर्गंधादिधर्मयोगेन प्रतीयमानोऽपि वस्तुतो न तद्योगी एवं देहादिधर्मयोगेनाहंप्रत्ययेन प्रतीयमानोऽप्यात्मा न तद्धर्मवानिति संभावितमिति वायोरेव शिक्षितमित्याह । पार्थिवेष्विति । तद्गुणाश्रयो देहधर्मान्बाल्यादीनाश्रित्य वर्तमानो गुणैस्तैरेव ॥ ४१ ॥ आकाशाच्छिक्षितं संभावनाद्वयमाह । अंतर्हितश्चेति द्वयेन । अंतर्हितश्च देहांतर्गतोऽपि मुनिरात्मनो देहाद्यसंगमत एवाव्यवच्छेदं च भावयेत् । कुतः । स्थिरजंगमेषु समन्वयेन या व्याप्तिस्तया । किं मणिषु सूत्रस्येव व्याप्तिः । न विततस्य सर्वगतस्य । तत्कुतः । ब्रह्मात्मभावेन ब्रह्मस्वरूपभावनया तत्त्वमसीति श्रुतेः । नन्वेतत्सर्वं कथं संभवति तत्राह । नभस्त्वं तत्तुल्यत्वं भावयेत् । यथा नभसः सर्वगतस्य न घटादिभिः

पार्थिवेष्विह देहेषु प्रविष्टस्तद्गुणाश्रयः ॥ गुणैर्न युज्यते योगी गंधैर्वायुरिवात्मदृक् ॥ ४१ ॥ अंतर्हितश्च स्थिरजंगमेषु ब्रह्मात्मभावेन समन्वयेन ॥ व्याप्त्या व्यवच्छेदमसंगमात्मनो मुनिर्नभस्त्वं विततस्य भावयेत् ॥ ४२ ॥ तेजोऽबन्नमयैर्भावैर्मेघाद्यैर्वायुनेरितैः ॥ न स्पृश्यते नभस्तद्वत्कालसृष्टैर्गुणैः पुमान् ॥ ४३ ॥ स्वच्छः प्रकृतितः स्निग्धो माधुर्यस्तीर्थभूर्नृणाम् ॥ मुनिः पुनात्यपां मित्रमीक्षोपस्पर्शकीर्तनैः ॥ ४४ ॥

संगः परिच्छेदो वा एवमात्मनोऽपि संभवतीति ॥ ४२ ॥ किंच कूटस्थस्यात्मनो नागमापायिदेहादिसंबंध इत्याह । तेजोबन्नमयैः तेजश्च आपश्चान्नं पृथिवी च तन्मयैः कालसृष्टैर्गुणैर्देहादिभिः पुमान्न स्पृश्यत इति नभोवत्संभवतीति ॥ ४३ ॥ स्वच्छत्वादिभिर्गुणैरुदकं जगत्पुनातीति तद्गुणा मया शिक्षिता इत्याह । स्वच्छो निर्मलः । प्रकृतितः स्वभावतः । स्निग्धो जनेष्वनुरागवान् । माधुर्यो मधुरालापी । तीर्थभूस्तीर्थस्थानम् । अपां मित्रमुदकतुल्यः । अघादिति पाठे सखायं पापात्पुनाति । स्वच्छत्वादिगुणैरर्थादुदकसादृश्यं ज्ञातव्यम् ॥ ४४ ॥

आकाशासारखा आहे अशी भावना करावी आणि जसें आकाश सर्वठिकाणीं व्यापून असलेंतरी त्याला घटादिक पदार्थांनीं संग किंवा परिच्छेद प्राप्त होत नाहीं त्याप्रमाणें ब्रह्मस्वरूप भावनेनें आपल्या आत्म्याची स्थावरजंगमामध्यें अनुस्यूतपणें व्याप्ति आणि तीतरी मण्यांमध्यें सूत्राची असल्ये तशी नव्हे तर सर्वांशीं व्याप्ति आहे असें समजून, आपला कोणत्याहि देहादिकांशीं संग किंवा कोणत्याहि पदार्थानें परिच्छेद नाहीं अशी भावना करावी ॥ ४२ ॥ आणि जसा आकाशाला, वायूनें प्रेरणा केलेल्या मेघ, धुरळा इत्यादिकांचा स्पर्श होत नाहीं त्याप्रमाणें अंतर्यामी जीवात्म्याला, कालानें निर्माण केलेल्या–तेज, उदक व पृथिवीमय देहादिक पदार्थांचा स्पर्श होत नाहीं ॥ ४३ ॥ आतां उदकापासून शिकलेले गुण सांगतो–जसें उदक, स्वच्छ, स्वभावानें स्निग्ध, मधुर, मनुष्यांना पवित्र होण्याचें स्थान, व दर्शन, स्पर्शन व वर्णन यांच्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

योगानें जगाला पवित्र करितें त्याप्रमाणें योग्यानेंहि—स्वच्छ, स्वभावानें स्नेहयुक्त, मधुर भाषण करणारा, मनुष्यांना पवित्र होण्याचें स्थान, आणि दर्शन, स्पर्शन व कीर्तन यांच्या योगानें जगाला पवित्र करणारा, असें असावें ॥ ४४ ॥ आतां अग्नीपासून शिकलेलें सांगतो—जसा अग्नी, तेजस्वी, तापशक्तीनें प्रकाशमान, क्षोभ करण्यास अशक्य, आपल्या पोटांत सर्व ठेवणारा व सर्वभक्ष असूनहि दोषरहित असतो त्याप्रमाणें योग्यानेंहि ज्ञानाच्या अतिशयानें तेजस्वी, तपानें प्रकाशमान, मोहित करण्यास अशक्य, उदर हेंच पात्र बाळगणारा व सर्वभक्ष असूनहि दोषरहित असें असावें ॥ ४५ ॥ आणि जसा अग्नि कोठें गुप्त, कोठें स्पष्ट, व कल्याणाची इच्छा करणाऱ्या पुरुषांनीं

अग्नेः शिक्षितमाह । तेजस्वीति । ज्ञानातिशयात् । विशेषतस्तपसा दीप्तः । दुर्धर्षोऽक्षोभ्यः स चासावुदरभाजनश्चापरिग्रहः । युक्तात्मा मुनिः ॥ ४५ ॥ अग्नेरेव शिक्षांतरमाह । क्वचिदिति । यथाऽग्निः परेच्छयैव हविर्गृह्णाति तथा मुनिरित्याह । दातॄणामिति । प्रागुत्तराशुभं भूतं भविष्यच्च पापम् ॥ ४६ ॥ आत्मनो देहोपाधिकमेवोच्चनीचत्वादि स्वाभाविकमित्यप्यग्निदृष्टांतेन संभावितमित्याह । स्वमायया स्वाविद्यया सृष्टं सदसल्लक्षणं देवतिर्यगादिरूपं विप्रशूद्रादिरूपं वा ॥ ४७ ॥ आत्मनो जन्मादिषड्विकाराभावश्चंद्रदृष्टांतेन संभावित इत्याह । विसर्गाद्या इति । विसर्गो जन्म । श्मशानं नाशः । तत्रेयं ज्योतिःशास्त्रप्रक्रिया । आप्यमंडलं चंद्रस्तेजोमयं मंडलमादित्यस्तयोरेकनक्षत्रावस्थाने चंद्रो न दृ-

तेजस्वी तपसा दीप्तो दुर्धर्षोदरभाजनः ॥ सर्वभक्षोऽपि युक्तात्मा नादत्ते मलमग्निवत् ॥ ४५ ॥ क्वचिच्छन्नः क्वचित्स्पष्ट उपास्यः श्रेय इच्छताम् ॥ भुंक्ते सर्वत्र दातॄणां दहन्प्रागुत्तराशुभम् ॥ ४६ ॥ स्वमायया सृष्टमिदं सदसल्लक्षणं विभुः ॥ प्रविष्ट ईयते तत्तत्स्वरूपोऽग्निरिवैधसि ॥ ४७ ॥ विसर्गाद्याः श्मशानांता भावा देहस्य नात्मनः ॥ कलानामिव चंद्रस्य कालेनाव्यक्तवर्त्मना ॥ ४८ ॥

श्यते चक्षुष आदित्यमंडलेन समदेशस्थितेन व्यवधानात् सा अमावास्या । अथ षष्टिघटिकाभिश्चंद्रो नक्षत्रांतरं गच्छति । आदित्यस्तु त्रयोदशभिरहोरात्रैः । अतः प्रतिपदमारभ्य विषमस्थितस्यादित्यमंडलस्य पंचदशः पंचदशो भाग आप्यमंडले प्रतिबिंबितो दृश्यते सा कलेत्युच्यते । एवं पंचदशेऽह्नि त्रयोदशभिर्नक्षत्रैरंतरमिति राशिचक्रस्य सप्तविंशतिनक्षत्रात्मकस्य मध्ये संमुखौ चंद्रादित्यौ तिष्ठतस्तदा संपूर्णं प्रतिबिंबं भूच्छायालांछितं दृश्यते सा पौर्णिमा । तस्याममावास्याप्रतिबिंबेन सह षोडशकलश्चंद्र उपचर्यते । ततः पुनः प्रतिपदमारभ्य मंडलयोर्विषमीभावात्कलाह्रासः । तत्र यथा कलानामेवोत्पत्त्यादयो नाप्यमंडलस्य तथात्मनोऽपीत्याह । कलानामिवेति ॥ ४८ ॥

उपासना करण्यास योग्य, असून आपणास होमद्रव्यें देणाऱ्या लोकांचें, पूर्वीं झालेलें व पुढें होणारें पाप जाळून टाकितो व दुसऱ्यांच्या इच्छेनें सर्व स्थळीं भक्षण करतो त्याप्रमाणें साधूनें कोठें गुप्त, कोठें स्पष्ट, व कल्याणाची इच्छा करणाऱ्या लोकांनीं सेवन करण्यास योग्य व अन्न देणाऱ्या लोकांच्या भूतभविष्य पापांचें भस्म करणारा असून दुसऱ्यांच्या इच्छेनें सर्वठिकाणीं भोजन करणारा, असें असावें ॥ ४६ ॥ आणि जसा अग्नि काष्ठामध्यें असला म्हणजे त्यांच्यासारखा लांब आंखूडवगैरे भासतो परंतु वस्तुतः तसा नसतो त्याप्रमाणें आत्माहि, आपल्या अविद्येनें उत्पन्न केलेल्या ल्हानमोठ्या देवतिर्यगादिरूप जगामध्यें प्रविष्ट झाला म्हणजे त्या त्या स्वरूपानें भासतो परंतु वस्तुतः तसा नाहीं हें योग्यानें जाणावें ॥ ४७ ॥ आतां चंद्रापासून शिकलेलें सांगतो—जसें, चंद्राच्या प्रकाशरूप सोळाकलांचेच उत्पत्तिनाश होतात,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

उदकमंडलरूप चंद्राचे होत नाहींत त्याप्रमाणें जन्मापासून मरणापर्यंत सर्व विकार अव्यक्तस्वरूपी काळाच्या योगानें देहाचेच होत असतात, आत्माचे होत नाहींत ॥ ४८ ॥ पुन्हा सिंहावलोकन्यायानें अग्नीपासून शिकलेलें वैराग्य सांगतो– नदीच्या प्रवाहासारखा वेग असलेल्या काळानें, आत्मसंबंधी प्राणिमात्रांच्या देहांचे उत्पत्तिविनाश प्रतिक्षणीं होत असतांहि, जसे अग्नीच्या ज्वाळांचे उत्पत्तिनाश प्रतिक्षणीं होत असलेले दिसत नाहींत त्याप्रमाणें दिसत नाहींत. एतावता देह क्षणभंगुर असल्यामुळें योग्यानें तेथें आसक्त होऊं नये ॥ ४९ ॥ आतां सूर्यापासून शिकलेलें सांगतो– जसा सूर्य आठ महिनेपर्यंत आपल्या किरणांनीं जळाचें आकर्षण करितो आणि पुन्हा वर्षाऋतूमध्यें तें सोडितो परंतु आकर्षण करण्याचा व सोडण्याचा अभिमान धारण करीत नाहीं त्याप्रमाणें देहाहून निराळ्या

सिंहावलोकनेनाग्निदृष्टांतेनैव देहानां क्षणभंगुरतया वैराग्यं शिक्षितमित्याह । कालेनेति । ओघवद्वेगो यस्य तेन । आत्मनः संबंधिनां भूतानां देहानामित्यर्थः । अर्चिषां ज्वालानाम् ॥ ४९ ॥ आदित्याच्छिक्षितमाह द्वयेन । गुणैरिति । गुणैरिंद्रियैर्गुणान्विषयानुपादत्ते यथा कालमर्थिन्यागते सति विमुंचति च न तेषु युज्यते लब्धमिति दत्तमिति वा

कालेन ह्योघवेगेन भूतानां प्रभवाप्ययौ ॥ नित्यावपि न दृश्येते आत्मनोऽग्नेर्यथाऽर्चिषाम् ॥ ४९ ॥ गुणैर्गुणानुपादत्ते यथाकालं विमुंचति॥न तेषु युज्यते योगी गोभिर्गा इव गोपतिः ॥ ५० ॥ बुध्यते स्वेन भेदेन व्यक्तिस्थ इवतद्गतः ॥ लक्ष्यते स्थूलमतिभिरात्मा चावस्थितोऽर्कवत्॥५१॥नातिस्नेहः प्रसंगो वा कर्तव्यः क्वापि केनचित्॥कुर्वन्विंदेत संतापं कपोत इव दीनधीः ॥ ५२ ॥

ऽभिनिवेशं न करोति । गोभी रश्मिभिर्गाः जलानि गोपतिः सूर्यो यथा ॥ ५० ॥ स्वतो भेदशून्यस्याप्यात्मनो भेदप्रतीतिरुपाधिवशादित्यादित्यदृष्टांतेनैव संभावितमित्याह । बुध्यत इति । स्वे स्वस्वरूपेऽवस्थित आत्मा भेदेन न बुध्यते । अभिव्यनक्तीति व्यक्तिरुपाधिः । व्यक्तिस्थ उपाधौ प्रतिबिंबितस्तु तद्गत इव उपाधिप्रविष्ट इव भेदेन स्थूलमतिभिर्लक्ष्यते । अर्कवदित्यन्वयः ॥ ५१ ॥ कपोताच्छिक्षितमाह । नातिस्नेह इति । स्नेहः प्रीतिः । प्रसंग उपलालनायासक्तिः ॥ ५२ ॥

आत्म्याचें अनुसंधान राखणारा योगीहि, इंद्रियद्वारा विषयांचा स्वीकार करितो व याचक प्राप्त झाला असतां ते विषय त्यास देतो परंतु त्यांचेठिकाणीं हे मी मिळविले व हे मी दिले असा अभिमान धारण करीत नाहीं ॥ ५० ॥ आणि जसा तो एकच सूर्य, जलादिकांमध्यें प्रतिबिंबित झाला म्हणजे स्थूलबुद्धि पुरुषांनीं निरनिराळा पाहिला जातो त्याप्रमाणें वस्तुतः स्वस्वरूपानें एकच असलेला आत्मा, देहादिक उपाधींमध्यें प्रविष्ट झाला ह्मणजे स्थूलबुद्धि (देहाभिमानी) पुरुषांनीं निरनिराळा जाणला जातो; असें योग्यानें जाणावें ॥ ५१ ॥ आतां कपोतापासून शिकलेलें सांगतो– मनुष्यानें कोणाविषयींहि व कोणाहिबरोबर अतिशय प्रीति किंवा लालनपालनादिक प्रसंग

---

१ ज्योतिषशास्त्रांत असें सांगितलें आहे कीं–चंद्राचें मंडळ उदकमय आहे आणि सूर्याचें मंडळ तेजोमय आहे. या दोन्हींचें एका नक्षत्रावर राहणें झालें ह्मणजे डोळ्यांसमोर आलेल्या सूर्यमंडळाच्या आड असलेलें चंद्रमंडळ दिसत नाहीं. ती अमावास्या होय. नंतर साठ घटिकांनीं चंद्र दुसऱ्या नक्षत्रावर जातो आणि सूर्यंतर तेरा दिवसांनीं दुसऱ्या नक्षत्रावर जातो. ह्मणून प्रतिपदेपासून विषम राहिलेल्या सूर्यमंडळाचा दररोज पंधरावा पंधरावा भाग उदकमंडळांत प्रतिबिंबित झालेला दिसूं लागतो, तिला कळा ह्मणतात. असें होतां-होतां पंधरावे दिवशीं तेरा नक्षत्रें अंतर पडल्यामुळें सत्तावीस नक्षत्ररूप राशिचक्राच्या मध्यें चंद्र व सूर्य हे दोघे एकमेकांसमोर येतात. तेव्हां पृथिवीच्या छायेनें चिन्हित झालेलें सूर्याचें संपूर्ण प्रतिबिंब दिसतें ती पूर्णिमा होय. त्या पूर्णिमेचे दिवशीं अमावास्येंतील प्रतिबिंबासह सोळा कलांचा चंद्र असें ह्मणतात. पुन्हा वद्यप्रतिपदेपासून हीं दोन्हीं मंडळें विषम झाल्यामुळें दररोज एकेक कळा कमी होत जात्ये. असे चंद्राच्या कळांचें मात्र उत्पत्तिनाश होतात, उदकमंडळरूप चंद्राचे होत नाहींत.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करूं नयेत, ते जर करील तर तो विवेकहीन होऊन कपोतपक्ष्यासारखा संताप पावेल ॥ ९२ ॥ कोणीएक कपोतपक्षी, अरण्यामध्यें एका वृक्षावर घरटें बांधून आपल्या कपोती स्त्रीसहवर्तमान कितीएक वर्षेंपर्यंत राहिला होता ॥ ५३ ॥ स्नेहानें एकमेकांवर चित्त गुंतलेल्या गृहधर्मी (मैथुनसुखनिमग्न) अशा त्या कपोत व कपोती ह्या दोघांनींहि, आपली दृष्टि दृष्टीनें, अंग अंगानें व बुद्धि बुद्धीनें अगदीं मिळविलीं होतीं ॥ ५४ ॥ तीं दोघेंहि, निजणें, बसणें, फिरणें, उमें राहणें, परस्पर भाषण करणें, रतिक्रीडा करणें व खाणें इत्यादिकांविषयीं निःशंकपणें राहून एकमेकांबरोबर वनपक्तींमध्यें फिरत असत ॥ ५५ ॥ हे राजा, हास्ययुक्त अवलोकन, मधुर भाषण इत्यादिकें करून कपोताला प्रसन्न करणारी आणि त्याचें प्रीतिपात्र झालेली ती कपोती, जों जो पदार्थ इच्छील तो तो पदार्थ, अजितेंद्रिय असा तो कपोतपक्षी, मोठ्या कष्टानेंहि

दृष्टांतं प्रपंचयति । कपोतः कश्चनेति ॥ ५३ ॥ तयोर्मिथः स्नेहप्रसंगौ दर्शयति । कपोता विति त्रयेण । स्नेहेन गुणितं बद्धं हृदयं ययोस्तौ ॥ ५४ ॥ विस्रब्धौ निःशंकौ ॥५५॥ सा कपोती तर्पयंती सहासवीक्षितालापादिभिः प्रीणयंत्यत एव तेनानुकंपिता सती यं यं वांछति तं तं कामं समनयत्संपादयामास । राजन्निति त्वं यथेति सूचितम् ॥ ५६॥

कपोतः कश्चनारण्ये कृतनीडो वनस्पतौ ॥ कपोत्या भार्यया सार्धमुवास कतिचित्समाः ॥ ५३ ॥ कपोतौ स्नेहगुणितहृदयौ गृहधर्मिणो ॥ दृष्टिं दृष्ट्यांऽगमंगेन बुद्धिं बुद्ध्या बबंधतुः ॥ ५४ ॥ शय्यासनाटनस्थानवार्ताक्रीडाशनादिकम् ॥ मिथुनीभूय विस्रब्धौ चेरतुर्वनराजिषु ॥ ५५ ॥ यं यं वांछति सा राजंस्तर्पयंत्यनुकंपिता ॥ तं तं समनयत्कामं कृच्छ्रेणाप्यजितेंद्रियः ॥ ५६ ॥ कपोती प्रथमं गर्भं गृह्णती काल आगते ॥ अंडानि सुषुवे नीडे स्वपत्युः सन्निधौ सती ॥ ५७ ॥ तेषु काले व्यजायंत रचितावयवा हरेः ॥ शक्तिभिर्दुर्विभाव्याभिः कोमलांगतनूरुहाः ॥ ५८ ॥ प्रजाः पुपुषतुः प्रीतौ दंपती पुत्रवत्सलौ ॥ शृण्वंतौ कूजितं तासां निर्वृतौ कलभाषितैः ॥ ५९ ॥ तासां पतत्रैः सुस्पर्शैः कूजितैर्मुग्धचेष्टितैः ॥ प्रत्युद्गमैरदीनानां पितरौ मुदमापतुः ॥ ६० ॥ स्नेहानुबद्धहृदयावन्योन्यं विष्णुमायया ॥ विमोहितौ दीनधियौ शिशून्पुपुषतुः प्रजाः ॥ ६१ ॥ एकदा जग्मतुस्तासामन्नार्थं तौ कुटुंबिनौ ॥ परितः कानने तस्मिन्नर्थिनौ चेरतुश्चिरम् ॥ ६२ ॥

॥ ५७ ॥ तेषु जलभरितेष्वंडेषु । हरेः स्वभावकर्मादिशक्तिभी रचितावयवाः पक्षिणः । कोमलान्यंगानि तनूरुहाश्च येषां ते ॥ ५८ ॥ ५९ ॥ पतत्रैः पक्षैः अदीनानां हृष्टानाम् ॥ ६० ॥ शिशून्बालान्प्रजाः पुत्रान् ॥ ६१ ॥ ६२ ॥

मिळवून देत असे ॥ ५६ ॥ नंतर प्रथमच गर्भधारण करणारी ती सती कपोती, प्रसूतिकाळ प्राप्त झाला असतां, आपल्या पतीच्या समीपभागींच घरट्यामध्यें आंडीं प्रसवली ॥ ५७ ॥ पुढें पाण्यानें भरलेल्या त्या आंड्यांत हरीच्या काळकर्मादिक अतर्क्यशक्तींनीं अवयवांची रचना होऊन उत्पत्तिकाळीं कोंवळ्या अवयवांनीं व रोमांनीं युक्त अशीं पिलें उत्पन्न झालीं ॥ ५८ ॥ नंतर संतुष्टचित्त व पुत्रवत्सल अशीं तीं उभयतां, त्या पिलांचा कुलकुलाट शब्द ऐकून त्यांच्या मधुर शब्दांनीं सुख पावत होत्सातीं त्यांचें पोषण करूं लागलीं ॥ ५९ ॥ तेव्हां हर्षयुक्त झालेल्या त्या पिलांच्या उत्तम स्पर्शकारक पंखांनीं, कुलकुलाट शब्दांनीं, लहानपणच्या भोळसर चेष्टांनीं व समोर येण्यांनीं त्या आईबापांना मोठा आनंद होत असे ॥ ६० ॥ याप्रमाणें विष्णूच्या मायेनें अत्यंत मोहित होऊन परस्पर स्नेहानें चित्त गढून गेलेलीं व त्या पिलांच्या पोषणाविषयीं तत्पर असल्यामुळें व्याकुळचित्त झालेलीं तीं उभयतां, त्या लहान बाळकांचें पोषण करीत होतीं ॥ ६१ ॥ एके दिवशीं त्या पिलांना खाण्याकरितां अन्नाची इच्छा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करणारे ते दोघेहि कुटुंबी कपोतपक्षी आपल्या घरट्याच्या आसमंताद्भागीं त्या अरण्यांत जाऊन बराच वेळपर्यंत फिरत होते ॥ ६२ ॥ तों इतक्यांत वनांत संचार करणाऱ्या कोणीएका पारध्यानें सहजगतीनें आपल्या घरट्याच्या आसपास वनांत फिरणाऱ्या त्या कपोतबालकांस पाहून आपलें जाळें पसरिलें आणि त्यांस धरिलें ॥ ६३ ॥ इकडे मुलांच्या पोषणाविषयीं निरंतर उत्सुक असा कपोत व कपोती हीं दोघें गेलीं होतीं तीं मुलांचें भक्ष्य घेऊन आपल्या घरट्यांत आलीं ॥ ६४ ॥ तेथें कपोतीनें आपलीं पिलें जाळ्यांत सांपडून ओरडत आहेत असें पाहून, अत्यंत दुःखित झाली आणि आपणहि आक्रोश करीत करीत त्यांच्याजवळ धांऊन गेली ॥ ६५ ती कपोती, भगवंताच्या मायेनें त्या मुलांवर वारंवार स्नेहानें बद्ध असल्यामुळें दीनचित्त होत्सात्ती, मीहि असेंच जाळ्यांत सांपडून मरेन अशा स्मृतीला विसरून, बद्ध झालेल्या त्यांना पाहत असतां आपणहि जाळ्यांत सांपडून बद्ध झाली ॥ ६६ ॥ तेव्हां तो कपोत पक्षी तर, आपल्या शरीरापेक्षांहि अधिक आवडणाऱ्या परंतु बद्ध झालेल्या त्या बालकांना

स्वालयांतिके चरतः क्रीडतः तान् कपोतपुत्रान् । आतत्य प्रसार्य ॥ ६३ ॥ उत्सुकत्वादेव तत्पोषणार्थं गतौ संतौ । पोषणं भक्ष्यम् ॥ ६४ ॥ ६५ ॥ शिवा जालेन

दृष्ट्वा तांल्लुब्धकः कश्चिद्यदृच्छातो वनेचरः ॥ जगृहे जालमातत्य चरतः स्वालयांतिके ॥ ६३ ॥ कपोतश्च कपोती च प्रजापोषे सदोत्सुकौ ॥ गतौ पोषणमादाय स्वनीडमुपजग्मतुः ॥ ६४ ॥ कपोती स्वात्मजान्वीक्ष्य बालकान् जालसंवृतान् ॥ तानभ्यधावत्क्रोशंती क्रोशतो भृशदुःखिता ॥ ६५ ॥ सा सकृत्स्नेहगुणिता दीनचित्ताऽजमायया ॥ स्वयं चाबध्यत शिवा बद्धान्पश्यंत्यपस्मृतिः ॥ ६६ ॥ कपोतश्चात्मजान्बद्धानात्मनोऽप्यधिकान्प्रियान् ॥ भार्यां चात्मसमां दीनो विललापातिदुःखितः ॥ ६७ ॥ अहो मे पश्यतापायमल्पपुण्यस्य दुर्मतेः ॥ अतृप्तस्याकृतार्थस्य गृहस्त्रैवर्गिको हतः ॥ ६८ ॥ अनुरूपाऽनुकूला च यस्य मे पतिदेवता ॥ शून्ये गृहे मां संत्यज्य पुत्रैः स्वर्याति साधुभिः ॥ ६९ ॥ सोऽहं शून्ये गृहे दीनो मृतदारो मृतप्रजः ॥ जिजीविषे किमर्थं वा विधुरो दुःखजीवितः ॥ ७० ॥ तांस्तथैवावृतान् शिग्भिर्मृत्युग्रस्तान्विचेष्टतः ॥ स्वयं च कृपणः शिक्षु पश्यन्नप्यबुधोऽपतत् ॥ ७१ ॥ तं लब्ध्वा लुब्धकः क्रूरः कपोतं गृहमेधिनम् ॥ कपोतकान्कपोतीं च सिद्धार्थः प्रययौ गृहम् ॥ ७२ ॥

॥ ६६ ॥ आत्मानुरूपां भार्यां च विललाप शुचोच ॥ ६७ ॥ विलापमाह त्रयेण । अहो इति । अतृप्तस्य दृष्टसुखे अकृतार्थस्यादृष्टमसंपादयतः ॥ ६८ ॥ ६९ ॥ ७० ॥ तानावृतान्पश्यन्नपि । शिक्षु जालेषु ॥ ७१ ॥ ७२ ॥

तशाच आपल्या शरीरासारख्या आवडत्या परंतु जाळ्यानें बद्ध झालेल्या त्या स्त्रीला पाहून, अत्यंत दुःखित व दीन होत्साता शोक करूं लागला कीं— ॥ ६७ ॥ अहो जनहो, अल्पपुण्य व दुर्मति अशा माझा केवढा हा घात झाला पहा! या लोकींच्या सुखानें तृप्त न झालेल्या व परलोकावेंहि कांहींच साधन न करणाऱ्या माझा धर्मार्थकाम संपादन करणारा हा गृहस्थाश्रम नष्ट झाला आहे ॥ ६८ ॥ ज्या माझी योग्य व अनुकूळ अशी पतिव्रता स्त्री, शून्य झालेल्या घरांत मला टाकून आपल्या उत्तम बालकांसहवर्तमान स्वर्गास निघून चालली आहे ॥ ६९ ॥ तो बायको व पुत्र मेल्यामुळें विधुर झालेला दीन असा मी, आतां शून्य घरामध्यें दुःखरूप आयुष्य घालवीत काय म्हणून वांचण्याची इच्छा करूं? ॥ ७० ॥ याप्रमाणें विलाप करणारा तो अज्ञानी दीन कपोत पक्षी तशाप्रकारें जाळ्यांत सांपडून धडपडणाऱ्या व मृत्यूनें ग्रास केलेल्या त्या स्त्रीसहित बालकांना पहात असतांहि त्यांच्या मोहानें आपणहि जाळ्यांत जाऊन पडला ॥ ७१ ॥ तो क्रूर पारधी तर, त्या गृहस्थाश्रमी कपोताची, त्याच्या पिलांची व

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कपोतीची एकदम प्राप्ति झाली असतां कृतकार्य होऊन आपल्या घरीं निघून गेला ॥ ७२ ॥ याप्रमाणें कपोतासारखा दुसराहि कुटुंबवत्सल गृहस्थ अशांतचित्तपणें सुख-दुःखादिकांमध्यें रमून कुटुंबाचें पोषण करूं लागला असतां तोहि त्या पुत्रकलत्रादिकांसहवर्तमान दुःखानें नाश पावतो ॥ ७३ ॥ यास्तव उघडलेलें मुक्तीचें केवळ द्वारच असा मनुष्य देह प्राप्त झाला असतां, त्या कपोत पक्ष्यासारखा जो घरामध्यें आसक्त होतो त्याला कल्याणमार्गाचा जिना चढूनहि पुन्हा खालीं पडला असें विद्वान् लोक जाणतात ॥ ७४ ॥ ~~याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या एकादशस्कंधांत अष्टगुरुशिक्षानिरूपणनामक हा सातवा अध्याय समाप्त झाला ॥ ७ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥~~ ॥
~~आतां ह्या आठव्या अध्यायामध्यें भगवंतानें उद्धवाला, दत्तात्रयानें अजगरादिक आठ गुरूंपासून घेतलेली शिक्षा, त्याच्याच वाणीनें वर्णन केली आहे~~ ॥ १ ॥ ब्राह्मण

दार्ष्टांतिके योजयति । एवमिति ॥ ७३ ॥ एवं गृहासक्तिस्तिरश्चामप्यनर्थहेतुर्मनुष्यस्य त्वतिनिंदितेत्याह । यः प्राप्येति ॥ ७४ ॥ इति श्रीमद्भागवते एकादशस्कंधे टीकायां सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥ ॥अष्टमेऽजगरादिभ्यो नवभ्यः शिक्षितं हरिः ॥ अवधूतगिरा प्राह विवेकायोद्धवं प्रति ॥ १ ॥ प्रारब्धकर्मभोगस्यावश्यंभावित्वात्तदर्थोद्यमैर्नायुर्व्ययो वृथा कर्तव्य इत्यजगराच्छिक्षितमित्याह । सुखमित्यादिना । यदैंद्रियकं सुखं तत्स्वर्गे नरके च भवत्येव । यथा दुःखम् । तस्माद्बुधस्तन्नेच्छेत् ॥ १ ॥ शरीरनिर्वाहमात्रं तु यथालब्धेन

एवं कुटुंब्यशांतात्मा द्वंद्वारामः पतत्रिवत् ॥ पुष्णन्कुटुंबं कृपणः सानुबंधोऽवसीदति ॥ ७३ ॥ यः प्राप्य मानुषं लोकं मुक्तिद्वारमपावृतम् ॥ गृहेषु खगवत्सक्तस्तमारूढच्युतं विदुः ॥ ७४ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥ ॥ ब्राह्मण उवाच ॥ सुखमैंद्रियकं राजन्स्वर्गे नरक एव च ॥ देहिनां यद्यथा दुःखं तस्मान्नेच्छेत तद्बुधः ॥ १ ॥ ग्रासं सुमृष्टं विरसं महांतं स्तोकमेव वा ॥ यदृच्छयैवापतितं ग्रसेदाजगरोऽक्रियः ॥ २ ॥ शयीताहानि भूरीणि निराहारोऽनुपक्रमः ॥ यदि नोपनमेद्ग्रासो महाहिरिव दिष्टभुक् ॥ ३ ॥ ओजःसहोबलयुतं बिभ्रद्देहमकर्मकम् ॥ शयानो वीतनिद्रश्च नेहेतेंद्रियवानपि ॥ ४ ॥

कर्तव्यमित्याह । ग्रासमिति । आजगरोऽजगरवृत्तिः । अक्रिय उदासीनः ॥ २ ॥ यदा नापतति तदा किं कर्तव्यं तत्राह । शयीतेति । अनुपक्रमो निरुद्यमः । दिष्टभुक् दैवमेव प्रापकमिति धैर्यवान् ॥ ३ ॥ ननु समर्थोऽपि शयीतैव किम् । ओमित्याह । ओज इति । ओज इंद्रियबलं सहो मनोबलं बलं शारीरमेव तद्युक्तमपि देहमकर्मकमेव बिभ्रच्छयान एव भवेत् । वीतनिद्रः स्वार्थे दत्तदृष्टिश्च भवेन्न पुनरीहेत । इंद्रियवानपीति दर्शनादिव्यापारमपि निवारयति ॥ ४ ॥

ह्मणाला– हे यदुराजा, जसें दुःख यत्नावांचून प्राप्त होतें तसें इंद्रियांपासून उत्पन्न होणारें जें सुख तें, स्वर्गाचेठिकाणीं व नरकामध्येंहि प्रारब्धानुसार प्राप्त होतें, यास्तव चतुर पुरुषानें त्याची इच्छा मुळींच करूं नये ॥ १ ॥ तर जसा अजगर उदासीन असतो तशी उदासीन वृत्ति धारण करून देहनिर्वाहापुरता दैवानेंच प्रयत्नावांचून प्राप्त झालेला आहारमात्र ‘मग तो चांगला मिष्ट असो, किंवा विरस असो तसाच पोटभर असो, किंवा थोडा असो’ भक्षण करावा ॥ २ ॥ जर ग्रास प्राप्त झाला नाहीं तर त्यानें दैवावर विश्वास ठेऊन महाअजगराप्रमाणें उद्योग न करितां निराहारीच बहुत दिवसपर्यंत निजून राहावें ॥ ३ ॥ ~~आहार मिळविण्यास सशक्त असूनहि त्यानें निजूनच राहावें कीं काय असें ह्मणशील तर– होय, इंद्रियबळ, मनोबळ व शारीरबळ यांनीं युक्त असाहि देहधाऱ्यानें कांहींच न करितां निजलेलें रहावें; तसेंच आत्मचिंतनरूप स्वार्थाविषयीं जागरूक राहून दर्शनादि व्यापार करण्यास समर्थ असतांहि तेसुद्धां करूं नयेत,~~ हें मी अजगरापासून शिकलों आहे ॥ ४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां समुद्रापासून शिकलेलें सांगतो– ऋषीनें निश्चलोदक असलेल्या समुद्राप्रमाणें बाहेरून प्रसन्न आंतून गंभीर (अभिप्रायानें) हा इतका आहे अशी इयत्ता करण्यास अशक्य, (तेजस्वीपणानें) इतरांस दुस्तर ' स्वरूपसाक्षात्कार असल्यामुळें ' काळानें व देशानें अंतपाररहित आणि (रागलोभादिक नसल्यामुळें) क्षोभरहित असावें ॥ ५ ॥ आणि जसा समुद्र, वर्षाऋतूमध्यें नद्यांच्या पाण्यानें समृद्ध झाला असतांहि वाढत नाहीं व ग्रीष्मऋतूमध्यें नद्यांचें पाणी मिळालें नसतांहि शुष्क होत नाहीं त्याप्रमाणें ऋषीनें समृद्धभोगस्थितीमध्यें हर्ष पावूं नये व भोगहीनस्थितीमध्यें शोकहि करूं नये, तर नारायणपरायण असावें ॥ ६ ॥ रूप, गंध, स्पर्श, शब्द आणि रस ह्या पांच विषयांनीं मोह पावलेले– पतंग, मधुकर, गज, हरिण आणि मत्स्य हे पांच नाश पावतात ह्मणून त्या रूपादिकांविषयीं आसक्त न होण्याविषयीं हे पांच गुरु आहेत, त्यांत पतंगापासून शिकलेलें सांगतो– जसा पतंग अग्नीचें रूप पाहून तें खाण्याच्या इच्छेनें त्यावर पडून नाश पावतो त्याप्रमाणें अजितेंद्रिय पुरुष, भगवंताच्या मायारूप स्त्रीला पाहून

समुद्राच्छिक्षितमाह । मुनिरिति । बहिः प्रसन्नश्चासावंतर्गंभीरश्च । दुर्विगाह्य एवंभूत इति परिकलयितुमशक्यः अलक्ष्याभिप्रायत्वात् । दुरत्ययोऽनतिक्रमणीयः तेजस्वित्वात् । अनंतपारः कालतो देशतश्चापरिच्छेद्यः स्वरूपाविर्भावात् । अक्षोभ्योऽविकार्यः रागाद्यभावात् । स्तिमितोदो निश्चलोदकोऽर्णवो तथा तद्वदेतैर्गुणैर्भवेदित्यर्थः ॥ ५ ॥ किंच । वर्षासु सरिद्भिः समृद्धोऽपि सागरो यथा नोत्सर्पेत । ग्रीष्मे तद्विहीनोऽपि न शुष्येत । तथा समृद्धकामस्तद्विहीनो वा न हृष्येन्न शोचेदित्यर्थः । अत्र हेतुः । नारायणपरो न तु

मुनिः प्रसन्नगंभीरो दुर्विगाह्यो दुरत्ययः ॥ अनंतपारो ह्यक्षोभ्यः स्तिमितोद इवार्णवः ॥ ५ ॥ समृद्धकामो हीनो वा नारायणपरो मुनिः ॥ नोत्सर्पेत न शुष्येत सरिद्भिरिव सागरः ॥ ६ ॥ दृष्ट्वा स्त्रियं देवमायां तद्भावैरजितेंद्रियः ॥ प्रलोभितः पतत्यंधे तमस्यग्नौ पतंगवत् ॥ ७ ॥ योषिद्धिरण्याभरणांबरादिद्रव्येषु मायारचितेषु मूढः ॥ प्रलोभितात्मा ह्युपभोगबुद्ध्या पतंगवन्नश्यति नष्टदृष्टिः ॥ ८ ॥ स्तोकं स्तोकं ग्रसेद्ग्रासं देहो वर्तेत यावता ॥ गृहानहिंसन्नातिष्ठेद्वृत्तिं माधुकरीं मुनिः ॥ ९ ॥

विषयपर इति ॥ ६ ॥ रूपगंधस्पर्शशब्दरसैः पंचभिर्विषयैर्मोहिताः पतंगमधुकरगजहरिणमीना हता अतस्तेष्वनासक्तौ पंचैते गुरवः । तदुक्तम् । पतंगमातंगकुरंगभृंगमीना हताः पंचभिरेव पंच ॥ एकः प्रमादी स कथं न हन्यते यः सेवते पंचभिरेव पचेति । तत्र रूपविलासमोहितो नश्यतीति पतंगाच्छिक्षितमाह । दृष्ट्वेति । तस्या भावैः प्रलोभितः ॥ ७ ॥ स्त्रियमुपलक्षणीकृत्यैतत्प्रपंचयति । योषिदिति ॥ ८ ॥ मधुकराच्छिक्षितमाह । स्तोकमिति । गृहान्गृहस्थानाहिंसन्नपीडयन् । अयं भावः । यथा मधुकरो विशिष्टगंधलोभेनैकस्मिन्नेव पद्मे वसन्नस्तमयसमये मुकुलिते तस्मिन्बध्यते एवं मुनिरपि गुणलोभेनैकमेव गृहमाश्रितस्तन्मोहेन बध्यत इति ॥ ९ ॥

तिच्या हावभावांनीं लोभित होत्साता तिचेठिकाणीं आसक्त झाला ह्मणजे शेवटीं नाश पावून अंधतम नरकामध्यें जाऊन पडतो ॥ ७ ॥ स्त्री हें तरी एक उपलक्षण आहे त्यावरून, भगवंताच्या मायेनें रचिलेल्या– स्त्री, सुवर्ण, भूषणें व वस्त्रादिक पदार्थ यांचाहि उपभोग करण्याच्या बुद्धीनें आसक्तचित्त झालेला पुरुष, मोहित व विवेकशून्य होऊन पतंगासारखा खरोखर नाश पावतो ह्मणून योग्यानें त्या स्त्रीपुत्रादिकांवेठिकाणीं आसक्त होऊं नये ॥ ८ ॥ मधुकर दोनप्रकारचा आहे. एक पुष्पांचा रस ग्रहण करणारा भ्रमर व दुसरी मधमाशी, त्यांतील भ्रमरापासून शिकलेलें सांगतो– जसा भ्रमर पुष्पांचा नाश न करितां त्यांतील थोडथोडा मकरंद घेऊन कोठेंच आसक्त न होतां आपला निर्वाह करितो त्याप्रमाणें मुनीनें गृहस्थांना पीडा न करितां जेवढ्यानें आपला निर्वाह होईल तितका, पुष्कळ घरांतील थोडा थोडा आहार भक्षण करण्याची माधुकरी (भ्रमराची वृत्ति) धारण करावी. असें न करील तर तो मुनि, जसा भ्रमर पुष्कळ मकरंदाच्या लोभानें एकाच कमळपुष्पावर राहिला असतां, सूर्यास्तानंतर तें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कमळ मिटलें ह्मणजे त्यांत मोहानें बंध पावतो तसा मुनिहि गुणलोभानें एकाच घरीं राहिला असतां तेथें मोहानें बद्ध होतो ॥ ९ ॥ आणि जसा भ्रमर लहानथोर फुलांतून मकरंदाचें ग्रहण करितो त्याप्रमाणें विवेकी मनुष्यानें, लहानथोर सर्व शास्त्रांपासून सार असेल त्याचें ग्रहण करावें ॥ १० ॥ संध्याकाळीं भक्षण करण्यास उपयोगी पडणाऱ्या किंवा दुसरेदिवशीं भक्षण करण्यास उपयोगी पडणाऱ्या भिक्षान्नादिकांचा संग्रह करूं नये, तर हस्त हेंच ज्याचें पात्र आहे ह्मणजे हातावर राहील तितकेंच ग्रहण करणारा व उदर हेंच ज्याचें सांठवण आहे असें व्हावें. जर संग्रह करील तर त्याला मधमाशीसारखें मरावें लागेल ॥ ११ ॥ याचेंच स्पष्टीकरण करितो– हें संध्याकाळीं भोजन करीन व हें उद्यां भोजन करीन अशा हेतूनें भिक्षान्नादिकांचा संग्रह करूं नये. जर संग्रह करील तर तो त्या संग्रह केलेल्या अन्नादिकासहवर्तमान जशी मधमाशी संग्रह केलेल्या मधासहवर्तमान नाश पावत्ये तसा नाश पावेल ॥ १२ ॥ स्पर्शाची आसक्ति, नाशाला कारण आहे याविषयीं हत्तीपासून शिकलेलें सांगतो– योग्यानें खऱ्यातर

किंच अणुभ्यश्चेति ॥ १० ॥ द्विविधो मधुकृत् । मधु कृंतति पुष्पादाच्छिद्य गृह्णातीति मधुकृद्भ्रमरः । मधुकरोऽत्याहारत्वेन स्वरूपेण चेति मधुमक्षिका च । तत्र प्रथमाच्छिक्षितमुक्तं द्वितीयाच्छिक्षितमाह । सायमिदं भोक्ष्यामि श्व इदं भोक्ष्यामीति भिक्षितमन्नादि न संगृह्णीत किंतु पाणिपात्रस्तन्मात्रग्राही । यद्वा उदरमेवामत्रं पात्रं यस्य सः । एकभिक्षायामुदरमात्रग्राही भवेत् । संग्रही तु मक्षिकेव न भवति न जीवतीत्यर्थः ॥ ११ ॥ एतद्विवृणोति पुनः । सायंतनमिति ॥ १२ ॥ स्पर्शासक्तिर्नाशहेतुरिति गजाच्छिक्षितमित्याह ।

अणुभ्यश्च महद्भ्यश्च शास्त्रेभ्यः कुशलो नरः ॥ सर्वतः सारमादद्यात्पुष्पेभ्य इव षट्पदः ॥ १० ॥ सायंतनं श्वस्तनं वा न संगृह्णीत भिक्षितम् ॥ पाणिपात्रोदरामत्रो मक्षिकेव न संग्रही ॥ ११ ॥ सायंतनं श्वस्तनं वा न संगृह्णीत भिक्षुकः ॥ मक्षिका इव संगृह्णन्सह तेन विनश्यति ॥ १२ ॥ पदापि युवतीं भिक्षुर्न स्पृशेद्दारवीमपि ॥ स्पृशन्करीव बध्येत करिण्या अंगसंगतः ॥ १३ ॥ नाधिगच्छेत्स्त्रियं प्राज्ञः कर्हिचिन्मृत्युमात्मनः ॥ बलाधिकैः स हन्येत गजैरन्यैर्गजो यथा ॥ १४ ॥ न देयं नोपभोग्यं च लुब्धैर्यद्दुःखसंचितम् ॥ भुंक्ते तदपि तच्चान्यो मधुहेवार्थविन्मधु ॥ १५ ॥

पदापीति । पादेनापि दारवीं दारुमयीमपि गजो हि करिणीं प्रदर्श्य निखाततृणपिहितगर्ते निपात्य बध्यते ॥ १३ ॥ किंच नाधिगच्छेदिति नोपगच्छेत् ॥ १४ ॥ त्यागभोगविहीनो धनसंचयः परगामी भवतीत्यत्र मधुहा गुरुरित्याह । न देयमिति । तदन्यो बलवान्भुंक्ते तदप्यन्यस्तच्चान्यः । मधुहा मक्षिकाभिः संचितं मधु यथा भुंक्ते तद्वत् । ननु सुगुप्तं धनं कथमन्यो ज्ञास्यति हरिष्यति चेति तत्राह । अर्थवित् लिंगैरर्थं तदुपायं च वेत्तीत्यर्थवित् । यथा मधुहा तरुकोटरादिगतं मधु वेत्ति हरति च ॥ १५ ॥

काय परंतु काष्ठाच्याहि स्त्रीला हातानें तर काय परंतु पायानेंहि स्पर्श करण्याची इच्छा करूं नये, जर स्पर्श करूं इच्छील तर, ' हत्तीला धरणारे लोक हत्ती असलेल्या अरण्यांत एक मोठा खाडा खणून त्यावर आच्छादन घालून त्याच्याजवळ लांकडाची रंग दिलेली हत्तीण उभी करून ठेवितात. तेव्हां स्त्रीच्यावेळीं त्या हत्तीणीच्या अंगसंगाविषयीं मदांधपणें जाणारा हत्ती खाड्यांत पडला ह्मणजे तो जसा परवश होऊन दुःख भोगितो त्याप्रमाणें ' तो भिक्षुहि नरकादिकांतपडून दुःख भोगील ॥ १३ ॥ आणि चतुर पुरुषानें कधींहि स्त्रीचेठिकाणीं भोग्यबुद्धीनें आसक्त होऊं नये, तर त्या स्त्रीला ' हा आपला मृत्यु आहे असें पाहावें ' तेथें जर आसक्त होईल तर तो पुरुष, जसा हत्तिणीचेठिकाणीं आसक्त झालेला गज तेथें आसक्त असलेल्या दुसऱ्या बलाढ्य गजांनीं मारिला जातो त्याप्रमाणें, त्या स्त्रीचेठिकाणीं आसक्त असणाऱ्या इतर पुरुषांनीं मारिला जाईल ॥ १४ ॥ आतां मध हरण करणाऱ्यापासून शिकलेलें सांगतो– जसा मधहारी पुरुष, मधमाशांनीं संचय केलेला मध हरण करून, घेऊन

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जाऊं लागला ह्मणजे त्यापासून तो मध दुसराच कोणीतरी बलाढ्य पुरुष,हरण करून भक्षण करितो त्याप्रमाणें, द्रव्यलोभी पुरुषांनीं दान करावयाचें नाहीं व उपभोगहि करावयाचें नाहीं असें दुःखानें संपादन केलेलें जें धन असतें, तें त्यांपासून दुसराच कोणीतरी हरण करितो व त्यापासून तिसराच हरण करून त्याचा उपभोग घेतो. आतां उत्तमरीतीनें गुप्त असलेलें धन दुसरा जाणतो कसा व हरण करितो कसा ? असें ह्मणशील तर— जसा मध हरण करणारा पुरुष, झाडाच्या ढोलींत व खडकाच्या वांबींत असलेलें मधाचें पोळें मधमाशांच्या योरण्यानें जाणतो त्याप्रमाणें लोकहि धन जाणतात् ॥ १५ ॥ आतां उद्योग केल्यावांचून यतीला भोजन प्राप्त होतें, हेंहि त्याच्यापासूनच मी शिकलों आहें असें सांगतो— अतिदुःखानें संपादन केलेल्या धनांनीं, घरांतील खाणेंपिणेंवगैरे भोगांची इच्छा करणाऱ्या गृहस्थांचे भोग, त्यांच्यापूर्वींच यति, जसा मधमाशांनीं संपादन केलेला मध त्यांच्या पूर्वींच मध हरण करणारा भक्षण करितो त्याप्रमाणें सेवन करितो. कारण, यति व ब्रह्मचारी हे दोघे शिजलेल्या अन्नाचे धनी

स्वोद्यमं विनाऽपि भोगः संभवतीत्यत्रापि स एव गुरुरित्याह । सुदुःखेति । आशासानामिति वक्तव्ये वर्णलोप आर्षः । यतिश्च ब्रह्मचारी च पक्कान्नस्वामिनावुभौ ॥ तयोरन्नमदत्वा तु भुक्त्वा चांद्रायणं चरेदिति ॥ गृहिणामावश्यकत्वेन दानविधानात् ॥ १६ ॥ हरिणाच्छिक्षितमाह । ग्राम्येति । भगवद्गीतं तु शृणुयादेव मृगयोर्लुब्धकस्य ॥ १७ ॥ हरिणशब्दादेव हरिणीसुत ऋष्यशृंगोऽपि गुरुर्ज्ञातव्य इत्याह । नृत्येति । वश्यो बभूवेति शेषः ॥ १८ ॥ रसासक्तिर्नाशहेतुरिति मीनाच्छिक्षितमित्याह । जिह्वयेति अतिप्रमाथिन्या अतिक्षोभिकया दुर्जयया । ऋच्छति प्राप्नोति । बडिशैरामिषलिप्तैर्लोहकंटकैः ॥ १९ ॥ दुर्जयत्वमुपपादयति इंद्रियाणाति द्वाभ्याम् । अयं भावः । यद्याहारस्त्यजते तर्ह्यन्येंद्रियजयः केवलं भवति रसनेंद्रियं तु वर्धते यदि तु भुज्यते तर्हि पुनश्च रसासक्त्या सर्वेंद्रियक्षोभः स्यात् । अतो रसासक्तिं परित्यज्यौषधवद्भुंजीतेति । प्राणवृत्त्यैव संतुष्येदित्यत्रोक्तमपि रसनस्यातिदुर्जयत्वज्ञापनायोच्यत इति विशेषः ॥ २० ॥

सुदुःखोपार्जितैर्वित्तैराशासानां गृहाशिषः ॥ मधुहेवाग्रतो भुंक्ते यतिर्वै गृहमेधिनाम् ॥ १६ ॥ ग्राम्यगीतं न शृणुयाद्यतिर्वनचरः क्वचित् ॥ शिक्षेत हरिणाबद्धान्मृगयोर्गीतमोहितात् ॥ १७ ॥ नृत्यवादित्रगीतानि जुषन् ग्राम्याणि योषिताम् ॥ आसां क्रीडनको वश्य ऋष्यशृंगो मृगीसुतः ॥ १८ ॥ जिह्वयाऽतिप्रमाथिन्या जनो रसविमोहितः ॥ मृत्युमृच्छत्यसद्बुद्धिर्मीनस्तु बडिशैर्यथा॥१९॥ इंद्रियाणि जयंत्याशु निराहारा मनीषिणः ॥ वर्जयित्वा तु रसनं तन्निरन्नस्य वर्धते ॥ २० ॥

आहेत, यास्तव ते प्राप्त झाले असतां गृहस्थानें त्यांना अन्न न देतां आपण भक्षण केलें तर त्यानें चांद्रायण प्रायश्चित्त करावें अशा रीतीनें गृहस्थांना आवश्यक दान सांगितलें आहे ॥ १६ ॥ आतां हरिणापासून शिकलेलें सांगतो— सर्वत्र संचार करणाऱ्या यतीनें भगवंताचें गायन व श्रवण करावें परंतु कधींहि विषयासक्त पुरुषांनीं केलेलें गायन ऐकूं नये हें तत्त्व, पारध्याच्या गायनानें मोहित होऊन बद्ध झालेल्या हरिणापासून यतीनें शिकावें, नाहीं तर तो बंध पावेल ॥ १७ ॥ असें कोठें दृष्टोत्पत्तीस आलें आहे ? असें ह्मणशील तर— हरिणीचा पुत्र ऋष्यशृंग ऋषि, स्त्रियांचीं ग्राम्य अशीं नृत्यें, वाद्यें व गायनें सेवन करून त्या स्त्रियांच्या स्वाधीन अगदीं खेळण्याच्या पदार्थासारखा झाला आहे ॥ १८ ॥ आतां रसाच्या सेवनाची आसक्ति, नाशाला कारण आहे; हें मी मत्स्यापासून शिकलों आहें असें सांगतो— अतिदुर्जय अशा जिव्हेनें रसाच्या सेवनाविषयीं आसक्त झालेला दुर्बुद्धि मनुष्य, जसा मांसरसाविषयीं आसक्त झालेला मत्स्य, त्या मांसांत टोंचलेल्या लोहकंटकांनीं मरण पावतो त्याप्रमाणें मरण पावतो ॥ १९ ॥ रसनेंद्रिय दुर्जय असें आहे कीं, आहाराचा त्याग करणारे विचारी पुरुष, रसनेंद्रियाला खेरीज करून बाकीच्या सर्व इंद्रियांना जिंकतात परंतु अन्नसहित

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुरुषाचें तें रसनेंद्रिय वृद्धिंगत होतें. बरें आहार सेवन केला असतां पुन्हा रसासक्तीनें सर्व इंद्रियांचा क्षोभ होतो, यास्तव रसाची आसक्ति सोडून देऊन केवळ औषधाप्रमाणें भोजन करावें ॥ २० ॥ आतां इतर इंद्रियांच्या जयानेंच कृतार्थ होईल असें मानावें तर– इतर इंद्रियांचा जय करणाऱ्याहि पुरुषानें जोंपर्यंत रसनेंद्रिय जिंकिलें नाहीं तोंपर्यंत तो जितेंद्रियच नव्हे. रसनेंद्रिय जिंकिलें असतां त्यानें सर्व इंद्रियें जिंकल्यासारखीं आहेत ॥ २१ ॥ हे राजपुत्रा, पूर्वीं विदेहराजाच्या नगरामध्यें पिंगला नांवाची एक वेश्या रहात असे. तिच्यापासून जें मीं कांहीं शिकलों आहें तें तुला सांगतों; श्रवण कर ॥ २२ ॥ ती वेश्या एकेदिवशीं एखाद्या पुष्कळ धन देणाऱ्या सुंदर पुरुषाला आपल्या रतिमंदिरांत घेऊन जाण्याकरितां अलंकार घातलेलें आपलें सुंदर रूप धारण करून सायंकाळीं बाहेरच्या दरवाज्यांत बसली होती ॥ २३ ॥ हे पुरुषांमध्यें उत्तम

॥ २१ ॥ पिंगलाया नैराश्यं शिक्षितमिति वक्तुं तदाख्यानमाह पिंगलेत्यादिना । मे मया शिक्षितम् ॥ २२ ॥ स्वैरिणी कामचारिणी । संकेते रतिस्थाने ॥ २३ ॥ तान्वित्तवतः सधनानतएव शुल्कदान्मूल्यदान् । कांतान्सुरताहान् ॥ २४ ॥ अपिः संभावनायाम् । अन्योऽपि मामुपैष्यत्येवं दुराशयेत्युत्तरेणान्वयः ॥ २५ ॥ द्वार्यवलंबमाना पुनः प्रविशती

तावज्जितेंद्रियो न स्याद्विजितान्येंद्रियः पुमान् ॥ न जयेद्रसनं यावज्जितं सर्वं जिते रसे ॥ २१ ॥ पिंगला नाम वेश्याऽऽसीद्विदेहनगरे पुरा ॥ तस्या मे शिक्षितं किंचिन्निबोध नृपनंदन ॥ २२ ॥ सा स्वैरिण्येकदा कांतं संकेत उपनेष्यती ॥ अभूत्काले बहिर्द्वारि बिभ्रती रूपमुत्तमम् ॥ २३ ॥ मार्ग आगच्छतो वीक्ष्य पुरुषान्पुरुषर्षभ ॥ तान् शुल्कदान्वित्तवतः कांतान्मेनेऽर्थकामुका ॥ २४ ॥ आगतेष्वपयातेषु सा संकेतोपजीविनी ॥ अप्यन्यो वित्तवान्कोऽपि मामुपैष्यति भूरिदः ॥ २५ ॥ एवं दुराशया ध्वस्तनिद्रा द्वार्यवलंबती ॥ निर्गच्छंती प्रविशती निशीथं समपद्यत ॥ २६ ॥ तस्या वित्ताशया शुष्यद्वक्त्राया दीनचेतसः ॥ निर्वेदः परमो जज्ञे चिंताहेतुः सुखावहः ॥ २७ ॥ तस्या निर्विण्णचित्ताया गीतं शृणु यथा मम ॥ निर्वेद आशापाशानां पुरुषस्य यथा ह्यसिः ॥ २८ ॥

पुनर्निर्गच्छंती एवं कुर्वती निशीथमर्धरात्रं प्राप ॥ २६ ॥ निर्वेदोऽलंबुद्धिः । वित्तचिंतैव हेतुर्यस्य सः ॥ २७ ॥ यथा यथावत् । मम मत्तः शृणु । ननु किं निर्विण्णाया गीतश्रवणेन तत्राह । हि यस्मात्पुरुषस्याशापाशानां निर्वेदोऽसिर्यथा तथा छेत्ता ॥ २८ ॥

राजा, धनाच्या अभिलाषानें व्याकुळचित्त झालेली ती पिंगला, मार्गांतून येणाऱ्या पुरुषांना पाहून त्यांत सधन व पुष्कळ मोल देणारे पुरुष आपणास रतिसुखास प्राप्त व्हावेत असें मानीत असे ॥ २४ ॥ ती जारपुरुषांकडून मिळालेल्या धनानें जीविका चालविणारी होती ह्मणून, आलेले सामान्य धनी पुरुष निघून गेले असतां दुसराच कोणीतरी मोठा धनवान् पुरुष मजकडे येईल व त्यापासून मला पुष्कळ धन प्राप्त होईल ॥ २५ ॥ अशा दुराशेनें निद्रा लोपून गेलेली व दरवाजांत उभी राहिलेली ती पिंगला,आतां कोणी येत नाहीं असे वाटलें ह्मणजे घरांत जात असे आणि इतक्यांत कोणी आला असें वाटतांच बाहेर येत असे. असें होतांहोतां मध्यरात्रीचा वेळ झाला ॥ २६ ॥ द्रव्याच्या आशेनें जिचें मुख अगदीं वाळून गेलें आहे अशा दीनचित्त झालेल्या त्या पिंगला वेश्येला, द्रव्याच्या चिंतेपासून परिणामी सुखकारक उत्कृष्ट विरक्ति (आतां विषयसुख पुरे अशी बुद्धि) उत्पन्न झाली ॥ २७ ॥ त्या विरक्तचित्त झालेल्या पिंगलेचें गीत जसें झालें आहे तसें मी तुला सांगतो तूं मजपासून श्रवण कर.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वैराग्य ह्मटलें ह्मणजे पुरुषाच्या आशारूप पाशांना तोडून टाकणारें खड्गच होय ॥ २८ ॥ हे यदुराजा, जसा अपरोक्षज्ञान न झालेला पुरुष, ममतेचा त्याग करण्याची इच्छा करीत नाहीं त्याप्रमाणें वैराग्य न झालेला पुरुष आपल्या देहबंधाचा त्याग करण्याची इच्छा करीत नाहीं ॥ २९ ॥ पिंगला ह्मणाली– अहो, जिनें मनाचा जय केला नाहीं अशा माझ्या मोहाचा विस्तार तरी हा किती आहे पहा ! ज्या मोहाच्या योगानें विवेकशून्य झालेली मी, तुच्छ पुरुषापासून भोगप्राप्तीची व धनप्राप्तीची इच्छा करित्यें ॥ ३० ॥ जी मूर्ख मी, जवळ (अंतर्यामी) असणाऱ्या मनाला रमवून सुख देणाऱ्या व लक्ष्मीपति असल्यामुळें धनहि देणाऱ्या ह्या नित्य ईश्वराचा त्याग करून, त्याहून इतर, भोगसंपादनास असमर्थ व दुःख, भय, काळजी, शोक व मोह उत्पन्न करणाऱ्या तुच्छ पुरुषाचें सेवन करित्यें ! ! ॥ ३१ ॥ अहो ! जी मी, स्त्रीलंपट, द्रव्यलोभी व शोक करण्यास

तत्र हेतुः । नहीति । अंग हे राजन् ॥ २९ ॥ अविजितात्मत्वे हेतुः । याऽहं बालिशा विवेकशून्या तस्याः । कुतः । येन कारणेनासतस्तुच्छान्नरात्कामं कामये ॥ ३० ॥ बालिशत्वं प्रपंचयति । संतमिति चतुर्भिः । समीपे संतमंतर्यामित्वात् । इममपरोक्षमीश्वरम् ॥ ३१ ॥ अति विगर्ह्याऽतिनिंद्या या वार्ता जीविका तया । कुतः । सांकेत्येन या वृत्तिस्तया । बहुव्रीहिणा स्वविशेषणं वा । परितापं प्रपंचयति । स्त्रैणादिति । स्त्रीलंपटादथ चार्थतृषो लुब्धादतएवानुशोच्यान्नराधाऽहं वित्तं रतिं चेच्छती । मया वृथाऽऽत्मा

नह्यंगजातनिर्वेदो देहबंधं जिहासति ॥ यथा विज्ञानरहितो मनुजो ममतां नृप ॥ २९ ॥ पिंगलोवाच ॥ अहो मे मोहविततिं पश्यताविजितात्मनः ॥ या कांतादसतः कामं कामये येन बालिशा ॥ ३० ॥ संतं समीपे रमणं रतिप्रदं वित्तप्रदं नित्यमिमं विहाय ॥ अकामदं दुःखभयाधिशोकमोहप्रदं तुच्छमहं भजेऽज्ञा ॥ ३१ ॥ अहो मयात्मा परितापितो वृथा सांकेत्यवृत्त्याऽतिविगर्ह्यवार्तया ॥ स्त्रैणान्नराद्याऽर्थतृषोऽनुशोच्यात्क्रीतेन वित्तं रतिमात्मनेच्छती ॥ ३२ ॥ यदस्थिभिर्निर्मितवंशवंश्यस्थूणं त्वचारोमनखैः पिनद्धम् ॥ क्षरन्नवद्वारमगारमेतद्विण्मूत्रपूर्णं मदुपैति काऽन्या ॥ ३३ ॥ विदेहानां पुरे ह्यस्मिन्नहमेकैव मूढधीः ॥ याऽन्यमिच्छंत्यसत्यस्मादात्मदात्काममच्युतात् ॥ ३४ ॥

परितापितः । केन वित्तमिच्छती । तेन नरेण क्रीतेन स्वयं विक्रीतेनात्मना देहेन ॥ ३२ ॥ अहो धिङ्मां याऽहमतिबीभत्सितं भजामीत्याह । यदिति । वंशो नाम स्थूणासु निहितस्तिर्यग्वेणुः वंश्यास्तस्मिन्नुभयतो निहिता वेणवः अस्थिभिरेव निर्मिता वंशादयो यस्मिंस्तत् । तत्र पृष्ठे दीर्घमस्थि यत्स वंशः । पार्श्वास्थीनि वंश्यानि स्थूणा हस्तपादास्थीनि तथा रोमभिर्नखैश्च पिनद्धं छादितम् । तथाऽपि क्षरंति नव द्वाराणि यस्मिंस्तत् । एवंभूतागाररूपं नृशरीरमेतन्मत् मत्तोऽन्या का वा कांतबुद्ध्या उपैति सेवते ॥ ३३ ॥ सत्संगतौ सत्यामप्यहो मम मोह इत्याह । विदेहानामिति । याऽहमसती अच्युतादन्यं । कामं भोगमिच्छंती सा ॥ ३४ ॥

योग्य अशा पुरुषापासून, त्यानें विकत घेतलेल्या व आपण त्यास विकलेल्या देहानें धनाची व रतिसुखाची इच्छा करीत आहें, त्या मी आजपर्यंत परपुरुषसमागमरूप अतिनिंद्य वृत्तीनें आपल्या अंतर्यामी आत्म्याला व्यर्थ ताप दिला आहे ! ॥ ३२ ॥ अहो ! मला धिक्कार असो. जी मी फारच निंद्य पदार्थाचें सेवन करित्यें. शरीररूप घर– कीं जेथें खांब, वांसे व आडें हीं सर्व हाडांचींच रचिलेलीं आहेत. 'त्यांत पाठीचा कणा हें आडें, त्याच्या दोन्ही बाजूंचीं हाडें हे वांसे आणि हातपाय हे खांब होत. अशा, त्वचारोमनखांनीं आच्छादित, जिथून नऊ द्वारें (मोऱ्या) वाहत आहेत व जें विष्ठेनें व मूत्रानें भरलेलें आहे अशा शरीररूपी घराला, हें चांगलें आहे अशा बुद्धीनें माझ्याहून दुसरी स्त्री कोण बरें सेवन करील, कोणीच करणार नाहीं ॥ ३३ ॥ अहो ! सत्संग असतांहि केवढा माझा मोह हा ! विदेहराजांच्या (ज्ञान्यांच्या) या नगरामध्यें मी एकच मूढबुद्धि आहें. कारण, ॥ ३३ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जी जारिणी मी, या नाशरहित व परमानंद देणाऱ्या भगवंताखेरीज दुसऱ्या भोगसुखाची इच्छा करित आहें ॥ ३४ ॥ यास्तव त्याअर्थी हा ईश्वर, सर्वप्राण्यांचा अतिप्रिय, स्वामी, हितकर्ता व आत्मा आहे त्याअर्थी आतां मी, त्याला आपणच आपल्या देहाचें अर्पण करून त्याबरोबर जशी लक्ष्मी रममाण होत्ये तशी रममाण होईन ॥ ३५ ॥ आतां, ईश्वराहून दुसऱ्याचें असेव्यत्व दाखवित्ये— जे शब्दादिक विषय व रतिसुख देणारे पुरुष किंवा इंद्रादिक देव आहेत ते तरी मज भार्येचें काय प्रिय करणार आहेत ? कांहींच नाहींत. करण, ते आदि व अंत यांनीं युक्त असून काळाचे ग्रासरूप झालेले आहेत. यास्तव या लोकीं किंवा परलोकीं ईश्वराखेरीज दुसरा कोणीच पुरुष सेवन करण्यास योग्य नाहीं ॥ ३६ ॥ असा निश्चय करून आपल्या भाग्याची प्रशंसा करित्ये— कोणत्यातरी प्राचीन शुभ कर्मांच्या योगानें भगवान् विष्णु, माझ्यावर

एवं निर्विण्णा सती अतः परमेवं करिष्यामीत्याह । सुहृदिति । अयमीश्वरः । आत्मनैवाऽऽत्मानमेव निवेद्य तं विक्रीय विशेषेण क्रीत्वाऽनेनैव सह रमे । रमा लक्ष्मीर्यथा ॥ ३५ ॥ अन्यस्यासेव्यत्वं दर्शयति । कियदिति । आद्यंतवंतो ये कामा विषयाः कामदा नरा वा देवा वा कालकलिता भार्यायाः । कियत्प्रियं कृतवंतो न किंचित् । अतो नेहामुत्र च तद्व्यतिरिक्तः कोऽपि सेव्योऽस्तीत्यर्थः ॥ ३६ ॥ एवं निश्चित्य स्वभाग्यमभिनंदति । नूनमिति । दुष्टा आशा यस्यास्तस्या मे ॥ ३७ ॥ ननु धनाप्राप्त्या क्लिष्टा

सुहृत्प्रेष्ठतमो नाथ आत्मा चायं शरीरिणाम् ॥ तं विक्रीयात्मनैवाहं रमेऽनेन यथा रमा ॥ ३५ ॥ कियत्प्रियं ते व्यभजन्कामा ये कामदा नराः ॥ आद्यंतवंतो भार्याया देवा वा कालविद्रुताः ॥ ३६ ॥ नूनं मे भगवान्प्रीतो विष्णुः केनापि कर्मणा ॥ निर्वेदोऽयं दुराशाया यन्मे जातः सुखावहः ॥ ३७ ॥ मैवं स्युर्मंदभाग्यायाः क्लेशा निर्वेदहेतवः ॥ येनानुबंधं निर्हृत्य पुरुषः शममृच्छति ॥ ३८ ॥ तेनोपकृतमादाय शिरसा ग्राम्यसंगताः ॥ त्यक्त्वा दुराशाः शरणं व्रजामि तमधीश्वरम् ॥ ३९ ॥ संतुष्टा श्रद्दधत्येतद्यथालाभेन जीवती ॥ विहराम्यमुनैवाहमात्मना रमणेन वै ॥ ४० ॥ संसारकूपे पतितं विषयैर्मुषितेक्षणम् ॥ ग्रस्तं कालाहिनाऽऽत्मानं कोऽन्यस्त्रातुमधीश्वरः ॥ ४१ ॥

ऽसि कथं विष्णुः प्रीतस्तत्राह । मैवमिति । मंदभाग्या चेदहं स्यां तर्ह्येव निर्वेदहेतवः क्लेशा न स्युरित्यर्थः । येन निर्वेदेनानुबंधं गृहादिकं निर्हृत्य परित्यज्य ॥ ३८ ॥ अतस्तेन श्रीविष्णुनोपकृतं कृतमुपकारं निर्वेदलक्षणम् । ग्राम्येषु नरेषु विषयेषु वा संगताः ॥ ३९ ॥ कथं व्रजसि तदाह । संतुष्टेति ॥ ४० ॥ ननु ब्रह्मादीन्हित्वा अमुनैवेति कोऽयं नियमस्तत्राह । संसारेति । मुषितेक्षणमपहृतविवेकम् ॥ ४१ ॥

खरोखर प्रसन्न झाला आहे, म्हणूनच दुष्ट आशा धारण करणाऱ्या मला, हें सुखकारक वैराग्य झालें आहे ॥ ३७ ॥ ईश्वरी प्रसन्नतेवांचून मंदभाग्य अशा मला वैराग्य होण्यास कारण असे क्लेश झालेच नसते. ज्या वैराग्यानें युक्त झालेला पुरुष, आपल्या घरादारादिकांचा संबंध सोडून देऊन शांति पावतो ॥ ३८ ॥ यास्तव आतां मी, त्या विष्णूनें केलेल्या वैराग्यरूप उपकारास शिरसा ग्रहण करून व तुच्छ विषयांबद्दल असलेल्या दुष्ट आशा टाकून, त्याच सर्वनियंत्या परमेश्वराला शरण जात्यें ॥ ३९ ॥ संतुष्ट असून या प्राप्त झालेल्या वैराग्यावर श्रद्धा ठेवणारी व दैवयोगानें जें प्राप्त होईल त्याच्या योगानेंच निर्वाह करणारी मी, याच आत्मरूप प्रियपतीसहवर्तमान क्रीडा करित्यें ॥ ४० ॥ आतां, ब्रह्मादिकांचा त्याग करून या आत्म्याबरोबरच कां रमत्येस असें कोणी म्हणेल तर— संसाररूप कूपामध्यें पडलेल्या, विषयरूप धुरानें विवेकरूप

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

डोळे फुटलेल्या व काळरूप अजगरानें गिळून टाकलेल्या आत्म्याला, ईश्वराहून दुसरा कोण बरें रक्षण करण्यास समर्थ आहे ? कोणीच नाहीं ॥ ४१ ॥ आतां, आपल्या रक्षणाकरितां त्याचें सेवन करित्येंस काय ? असें कोणी ह्मणेल तर–तसें नाहीं. कारण, हा पुरुष, जेव्हां सावधान होऊन, हें सर्व जग कालसर्पानें गिळून टाकिलेलें आहे असें पाहतो आणि सर्व प्रपंचापासून विरक्त होतो तेव्हां तो आपलें रक्षण करण्यास आपणच समर्थ होतो ह्मणून मी केवळ प्रेमानेंच त्या ईश्वराचें सेवन करित्यें ॥ ४२ ॥ ब्राह्मण ह्मणाला– याप्रमाणें बुद्धीचा निश्चय केलेल्या त्या पिंगला वेश्येनें पुरुषाच्या अभिलाषानें उत्पन्न झालेल्या धनादिक दुराशेला तोडून टाकून, शांतीचा आश्रय केला आणि शय्येवर प्रवेश करून सुखानें शयन केलें ॥ ४३ ॥ मिळून आशा हेंच परम दुःखाचें साधन आहे आणि आशा नसणें हेंच परम सुखाचें साधन आहे. पहा ! पतीच्या आशेनें दुःखित झालेल्याहि पिंगलेनें, त्या आशेला अगदीं तोडून टाकून परम आनंदानें शयन केलें ॥ ४४ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या एकादशस्कंधांत

तर्हि किमात्मत्राणोपाधिना तं भजिष्यसि । न तत्र सर्वतो निर्विद्य भगवद्भजने प्रवृत्तस्यात्मन एव समर्थत्वादित्याह । आत्मैवेति । यदा एवं जगत्पश्येत्तत्श्चाप्रमत्तः सन्निखिलादिहामुत्र च भोगान्निर्विंद्येत तदा ह्यात्मनैवात्मनो गोप्तेत्यन्वयः । अतः केवलप्रेम्णैव भजामीति भावः ॥ ४२ ॥ कांतस्य तर्षोऽभिलाषस्ततो जाताम् ॥ ४३ ॥ फलित-

आत्मैव ह्यात्मनो गोप्ता निर्विंद्येत यदाखिलात् ॥ अप्रमत्त इदं पश्येद्ग्रस्तं कालाहिना जगत् ॥ ४२ ॥ ब्राह्मण उवाच ॥ एवं व्यवसितमतिर्दुराशां कांततर्षजाम् ॥ छित्वोपशममास्थाय शय्यामुपविवेश सा ॥ ४३ ॥ आशा हि परमं दुःखं नैराश्यं परमं सुखम् ॥ यथा संछिद्य कांताशां सुखं सुष्वाप पिंगला ॥ ४४ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे पिंगलोपाख्यानेऽष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥ ॥ ब्राह्मण उवाच ॥ परिग्रहो हि दुःखाय यद्यत्प्रियतमं नृणाम् ॥ अनंतं सुखमाप्नोति तद्विद्वान्यस्त्वकिंचनः ॥ १ ॥ सामिषं कुररं जघ्नुर्बलिनो ये निरामिषाः ॥ तदामिषं परित्यज्य स सुखं समविंदत ॥ २ ॥

माह । आशा हीति ॥ ४४ ॥ इति श्रीमद्भागवते एकादशस्कंधे टीकायामष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥ ॥ नवमे कुररादिभ्यो देहतश्चोप शिक्षितम् ॥ श्रुत्वा यदुः कृतार्थोऽभूदिति कृष्णेन वर्णितम् ॥ १ ॥ कुरराच्छिक्षितमाह । परिग्रहो हीति । यद्यत्प्रियतमं तस्य तस्य परिग्रहः । तद्विद्वान् परिग्रहो दुःखमिति विद्वान्सन् । यस्त्वकिंचनस्त्यक्तपरिग्रहो न तु दरिद्रः ॥ १ ॥ तदाह । सामिषमिति ॥ २ ॥

अजगरादिगुरुशिक्षितकथनरूप हा आठवा अध्याय समाप्त झाला ॥ ८ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या नवव्या अध्यायामध्यें, कुररादिक गुरूंपासून व स्वतःच्या देहापासून दत्तात्रेयानें जें शिकलें होतें तें यदुराजानें श्रवण करून तो कृतार्थ झाला असें श्रीकृष्णानें उद्धवास सांगितलें आहे ॥ १ ॥ आतां कुररापासून शिकलेलें सांगण्याकरितां ब्राह्मण ह्मणाला– हे यदुराजा, मनुष्यांना जी जी अतिशय प्रियवस्तु असत्ये तिचा संग्रह केला असतां तो अतिदुःखाला कारण होतो ह्मणून जो पुरुष, संग्रह दुःखदायक आहे असें जाणून मुळींच संग्रह करीत नाहीं तो अनंत सुख पावतो ॥ १ ॥ यास दृष्टांत– एक टिटवा पक्षी आपल्या चोंचेंत मांस घेऊन जात असतां त्याला दुसरे जे बलवान् पक्षी, कीं ज्यांच्याजवळ मांस नव्हतें ते मारूं लागले, तेव्हां त्या पक्ष्यानें तें मांस टाकून दिलें त्याबरोबर ते पक्षी त्या मांसाकडे गेले आणि तो कुरर पक्षी सुख- ॥ ३४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पावला ॥ २ ॥ आतां बालकापासून शिकलेलें सांगतो— जसे बालकाला मान किंवा अपमान नसतात व गृहस्थासारखी घराची व मुलांबाळांची काळजी नसत्ये त्याप्रमाणें मलाहि मान किंवा अपमान नाहींत; घरादारांची व मुलांबाळांची काळजी नाहीं ह्मणून मी आपल्या बरोबरच क्रीडा करीत व आपल्याठिकाणींच प्रीति करीत या जगामध्यें बालकासारखा संचार करितों ॥ ३ ॥ यावरून अज्ञान्याचा व सर्वज्ञाचा सर्वप्रकारेंच सारखेपणा मानूं नये तर निश्चिंततेविषयीं मात्र सारखेपणा घ्यावा. कारण, या जगामध्यें मानापमानांच्या चिंतेनें मुक्त व परमानंदामध्यें निमग्न असे दोघेजणच आहेत. ते कोण तर— जो उद्योगरहित अज्ञानी बालक आणि जो गुणातीत परमेश्वराशीं ऐक्य पावलेला साधु ते होत ॥ ४ ॥ आतां कुमारीपासून शिकलेलें सांगतो—एका गावांत एका गृहस्थाची एक उपवर झालेली कंन्या होती, तिनें घरांतील पितावगैरे सर्व मनुष्यें, कांहीं कामासाठीं घरांतून बाहेर गेलीं असतां आपणांस वरण्याकरितां घरीं आलेल्या पाहुण्यांचा ‘ बसावयास आसन व पाणीवगैरे देऊन ’

अर्भकशिक्षामाह । नेति गेहपुत्रिणां तद्वतां या भवति चिंता सा च मे नास्ति । आत्मनैव क्रीडा यस्य । आत्मनि रतिः प्रीतिर्यस्य सः ॥ ३ ॥ नन्वज्ञसर्वज्ञयोः किं साद्दश्यं नैश्चिंत्यं परमसुखमित्याह । द्वाविति । विमुग्धोऽज्ञः जडोऽनुद्यमः एवंभूतो यो बालो यश्च प्रकृतेः परमीश्वरं प्राप्तस्तौ द्वौ ॥ ४ ॥ कुमार्याः शिक्षितं वक्तुमाख्यायिकामाह ।

न मे मानावमानौ स्तो न चिंता गेहपुत्रिणाम् ॥ आत्मक्रीड आत्मरतिर्विचरामीह बालवत् ॥ ३ ॥ द्वावेव चिंतया मुक्तौ परमानंद आप्लुतौ ॥ यो विमुग्धो जडो बालो यो गुणेभ्यः परं गतः ॥ ४ ॥ क्वचित्कुमारी त्वात्मानं वृणानान्गृहमागतान् ॥ स्वयं तानर्हयामास क्वापि यातेषु बंधुषु ॥ ५ ॥ तेषामभ्यवहारार्थं शालीन्रहसि पार्थिव ॥ अवघ्नंत्याः प्रकोष्ठस्थाश्चक्रुः शंखाः स्वनं महत् ॥ ६ ॥ सा तज्जुगुप्सितं मत्वा महती व्रीडिता ततः ॥ बभंजैकैकशः शंखान्द्वौ द्वौ पाण्योरशेषयत् ॥ ७ ॥ उभयोरप्यभूद्घोषो ह्यवघ्नंत्याः स्म शंखयोः ॥ तत्राप्येकं निरभिददेकस्मान्नाभवद्ध्वनिः ॥ ८ ॥ अन्वशिक्षमिमं तस्या उपदेशमरिंदम ॥ लोकाननुचरन्नेतांल्लोकतत्त्वविवित्सया ॥ ९ ॥ वासे बहूनां कलहो भवेद्वार्ता द्वयोरपि ॥ एक एव चरेत्तस्मात्कुमार्या इव कंकणः ॥ १० ॥

क्वचिदित्यादिना । वृणानान्स्ववरणायागतान् । बंधुषु पित्रादिषु ॥ ५ ॥ शंखाः शंखवलयाः । महद्यथा भवति तथा स्वनं चक्रुः ॥ ६ ॥ सा महती बुद्धिमती । तत्स्वयं शाल्यवहननं जुगुप्सितं दरिद्रताद्योतकम् । एकैकशः क्रमेणैकमेकं बभंज स्वकरादपसारितवती ॥ ७ ॥ निरभिदत् पृथक्कृतवती ॥ ८ ॥ ननु कुमार्यास्तव च कथं संगतिस्तत्राह । लोकानिति ॥ ९ ॥ वास इति प्रथमांतपाठे कलहहेतुः । वार्ता गोष्ठीहेतुर्भवेदित्यर्थः ॥ १० ॥

आपणच सत्कार केला ॥ ५ ॥ हे राजा, नंतर त्या पाहुण्यांच्या भोजनाकरितां ती कंन्या, एकांतीं उखळामध्यें साळी घालून कुटूं लागली असतां तिच्या हातांत असलेलीं शंखाचीं कांकणें मोठा खणखणाट शब्द करूं लागलीं ॥ ६ ॥ तेव्हां ती बुद्धिमती कंन्या, तें स्वतां साळीकांडणें आपली दरिद्रतासूचक आहे असें जाणून लज्जित झाली आणि नंतर तिनें आपल्या हातांतून एकएक अशा क्रमानें कांकणें काढिलीं. दोनदोन कांकणें हातांत अवशेष राखिलीं ॥ ७ ॥ आणि पुन्हां कांडूं लागली तों त्या दोनदोन कांकणांचाहि शब्द होऊं लागला, तेव्हां तिनें त्यांतूनहि एकेक काढून ठेविलें, तेव्हां एकेकापासून शब्द होत नाहींसा झाला ॥ ८ ॥ हे शत्रुदमना यदुराजा, लोकांचें तत्त्व जाणण्याकरितां या सर्व लोकांत संचार करणारा मी, सहज तेथें गेलों होतों तेव्हां त्या कंन्येचा हा उपदेश मी ग्रहण केला आहे कीं,— ॥ ९ ॥ पुष्कळ लोकांचा एकत्र वास झाला असतां कलह होतो व दोघांचा एकत्र वास झाला असतां परस्पर गोष्टी चालतात ह्मणून चतुर पुरुषानें त्या कुमारीच्या कांकणाप्रमाणें एकट्यानेंच संचार करावा ॥ १० ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां चित्ताची एकाग्रता केली असतां ती, द्वैत असतांहि तें स्फुरत नाहीं अशाप्रकारच्या समाधीचें कारण होत्ये असें बाणकारापासून मी शिकलों आहें तें सांगतों— एक बाण निर्माण करणारा कारागीर, आपल्या दुकानांत बाण करीत बसला होता त्याचें चित्त बाण चांगला होण्यासाठीं बाणाकडे लागलें होतें, त्यानें त्यावेळीं जसें जवळच्या रस्त्यांतून लगी डंका इत्यादिक वाद्यांच्या गजरांसह व सैन्यासह गेलेल्या राजासहि जाणिलें नाहीं. तसें ज्याचें मन ब्रह्माकार होतें तो योगी, कोणत्याहि पदार्थापासून होणाऱ्या सुखदुःखांस जाणत नाहीं असें जाणून योग्यानें आळस न करितां आसनाचा व श्वासाचा जय करून वैराग्यानें व अभ्यासयोगानें स्थिर केलेलें आपलें मन, एकठिकाणीं लावावें. कोठें लावावें? असें म्हणशील तर— जें हें मन, विषय नसले तर सुषुप्तीमध्यें लय पावतें आणि विषय असले तर त्यांमध्यें आसक्त होतें तें मन,

चित्तैकाग्रता द्वैतास्फूर्तिलक्षणसमाधिहेतुरिति शरकाराच्छिक्षितमित्याह । मन इति । तत्रोपायमाह । जितेति । आसनजये श्वासजयस्तस्य च जये श्वासाधीनं मनो निश्चलं भवति । ननु क्षणं निश्चलं सदपि मनो विषयवासनया यदि विक्षिप्येत सुषुप्ताविव सर्वथा लीयेत वा तदा किं तत्राह । वैराग्येणेति । वैराग्येणाविक्षिप्यमाणमभ्यासयोगेन लक्ष्ये ध्रियमाणं स्थिरीक्रियमाणम् ॥ ११ ॥ एकत्रेति कुत्र तदाह । यस्मिन्निति । यल्लयविक्षेपात्मकं मन एतद्यस्मिन्परमानंदरूपे भगवति लब्धास्पदं सत्कर्मरेणून्कर्मवासना मुंचति तस्मिन् । ननु कर्मवासना त्यागेऽपि सुषुप्तिवल्लयो दुर्वारः । न । सत्वेनेति । वृद्धेनोपशमात्मकेन । रजस्तमसोरभावे विक्षेपलयाभावान्निर्वाणमवृत्तिकं ध्येयाकारेणावस्था-

मन एकत्र संयुज्याज्जितश्वासो जितासनः ॥ वैराग्याभ्यासयोगेन ध्रियमाणमतंद्रितः ॥ ११ ॥ यस्मिन्मनो लब्धपदं यदेतच्छनैः शनैर्मुंचति कर्मरेणून् ॥ सत्वेन वृद्धेन रजस्तमश्च विधूय निर्वाणमुपैत्यनिंधनम् ॥ १२ ॥ तदैवमात्मन्यवरुद्धचित्तो न वेद किंचिद्बहिरंतरं वा ॥ यथेषुकारो नृपतिं व्रजंतमिषौ गतात्मा न ददर्श पार्श्वे ॥ १३ ॥ एकचार्यनिकेतः स्यादप्रमत्तो गुहाशयः ॥ अलक्ष्यमाण आचारैर्मुनिरेकोऽल्पभाषणः ॥ १४ ॥

खादिकांचा संबंध सुटल्यामुळें देहांत राहिल्यासारखा होत नाहीं आणि जसा स्वप्न पाहणारा जीव, वास्तविकपणें त्या देहांत राहत नसतांहि तेथील सुखदुःखादिकांच्या संबंधानें त्यांत राहिल्यासारखा होतो त्याप्रमाणें अज्ञानी जीव वस्तुतः देहसंबंधरहित असतांहि देहनिमित्तक सुखदुःखांचा आपलेठिकाणीं अध्यास करून देहसंबंधयुक्त असल्यासारखा होतो ॥ ८ ॥ येथें हेतुत्वेंकरून दुसरा भेद सांगतो-गुणकार्यरूप इंद्रियांनीं गुणकार्यरूप विषयांचा स्वीकार केला असतांहि जो रागद्वेषादिरहित मुक्त जीव आहे तो, मी ह्या विषयांचें ग्रहण करीत आहें असें मानीत नाहीं. कारण, गुणकार्यरूप इंद्रियें, गुणरूप विषयांचें ग्रहण करितात त्यांत आपला कांहीं संबंध नाहीं असें तो मानितो ॥ ९ ॥ आणि अज्ञानी जीवतर, पूर्वकर्माधीन असलेल्या शरीरामध्यें राहून इंद्रियांनीं होत असलेल्या कर्मांचा मी कर्ता आहें असा अभिमान धारण करून, त्या शरीरादिकांचेठिकाणीं बद्ध होतो. ह्या तीन श्लोकांनीं ज्ञानी कशी वर्तणूक करितो या प्रश्नाचें सुखदुःखशून्य व निरभिमान होऊन देहाचेठिकाणीं वर्तणूक करितो असें उत्तर जाणावें

अत्र हेतुत्वेन वैलक्षण्यांतरमाह । द्वाभ्याम् । इंद्रियैरिंद्रियार्थेषु गृह्यमाणेष्वपि यस्तु विद्वान्स नाहं कुर्यादहं गृह्णामीति मतिं न कुर्यादित्यर्थः । कुतः । गुणैर्गुणेषु गृह्यमाणेषु । अतएवाविक्रियो रागादिशून्यः । तदुक्तं गीतासु । तत्त्ववित्तु महाबाहो गुणकर्मविभागयोः ॥ गुणा गुणेषु वर्तंत इति मत्वा न सज्जत इति ॥ ९ ॥ अबुधस्तु पूर्वकर्माधीनेऽस्मिन् शरीरे वर्तमानो गुणैरिंद्रियैर्भाव्येन कर्मणा तत्र देहादौ निबध्यते । कुतः । कर्ताऽस्मीत्यहंकारेण । तदुक्तं तत्रैव । प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः ॥ अहंकारविमूढात्मा कर्ताऽहमिति मन्यते इति । एतैस्त्रिभिः श्लोकैः कथं वर्तेतेत्यस्य प्रश्नस्य सुखदुःखशून्यो निरभिमानश्च देहे वर्तेत इत्युत्तरमुक्तं भवति ॥ १० ॥ वैलक्षण्यांतरं वदन्कि

इंद्रियैरिंद्रियार्थेषु गुणैरपि गुणेषु च ॥ गृह्यमाणेष्वहं कुर्यान्न विद्वान्यस्त्वविक्रियः ॥ ९ ॥ दैवाधीने शरीरेऽस्मिन् गुणभाव्येन कर्मणा ॥ वर्तमानोऽबुधस्तत्र कर्ताऽस्मीति निबध्यते ॥ १० ॥ एवं विरक्तः शयन आसनाटनमज्जने ॥ दर्शनस्पर्शनघ्राणभोजनश्रवणादिषु ॥ ११ ॥ न तथा बध्यते विद्वांस्तत्र तत्रादयन् गुणान् ॥ प्रकृतिस्थोऽप्यसंसक्तो यथा खं सविताऽनिलः ॥ १२ ॥ वैशारद्येक्षयाऽसंगशितया छिन्नसंशयः ॥ प्रतिबुद्ध इव स्वप्नान्नानात्वाद्विनिवर्तते ॥ १३ ॥

भुंजीतेत्यादिप्रश्नोत्तरमाह एवमिति त्रिभिः । अन्यगतमेव कर्म मां बध्नातीत्येवं विरक्तो विद्वान् । तथा अविद्वानिव शयनासनादिषु न बध्यते । कुतः । तत्र तत्र विषयेषु गुणानिंद्रियाण्यादयन् भोजयंस्तत्साक्षित्वेन वर्तमानो न तु स्वयमदन् । एतदेव कुतस्तत्राह । प्रकृतिस्थोऽपीति सार्धेन । यथा खं सर्वत्र स्थितमपि न सज्जते यथा सविता जले प्रतिबिंबितोऽपि यथाऽनिलः सर्वत्र संचरन्नपि तद्वत् ॥ ११ ॥ १२ ॥ असंगेन वैराग्येण शितया तीक्ष्णया छिन्नाः संशया असंभावनादयो यस्य सः नानात्वाद्देहादिप्रपंचात् ॥ १३ ॥

॥ १० ॥ आतां दुसरा भेद सांगून कसा भोजन करितो इत्यादि प्रश्नाचें उत्तर सांगतो-इंद्रियांचें कर्म, मला उगीच बंधन करीत आहे असें जाणून विरक्त झालेला विद्वान् जीव, जरी-निजणें, बसणें, फिरणें, स्नानकरणें, पाहणें, स्पर्शकरणें, वास घेणें, भोजन करणें, श्रवण करणें, इत्यादिक कर्मामध्यें त्या त्या विषयांचा त्या त्या इंद्रियांकडून उपभोग करवीत असतो तथापि त्या कर्मांचा अभिमान आपलेठिकाणीं धारण करीत नसल्यामुळें प्रकृतिकार्यरूप देहामध्यें साक्षित्वानें असणाराही तो जीव, तेथील कर्मानीं, जसा अज्ञानी बंध पावतो त्याप्रमाणें बंध पावत नाहीं. तर-जसें आकाश सर्वत्र असतांहि, किंवा जसा सूर्य, जळांत प्रतिबिंबित झाला असतांहि अथवा जसा वायु सर्वत्र संचार करीत असतां कोठेंच आसक्त राहत नाहीं त्याचप्रमाणें कोठेंच आसक्त राहत नाहीं ॥ ११ ॥ ॥ १२ ॥ तर वैराग्यानें तीक्ष्ण झालेल्या ब्रह्मविद्येनें ज्याचे असंभावनादि दोष निवृत्त झाले आहेत असा तो विद्वान् पुरुष, स्वप्नांतून जागृत झाल्यासारखा देहादिप्रपंचापासून निवृत्त होतो. येणेंकरून बद्ध पुरुष व मुक्त पुरुष कसे भोग भोगितात इत्यादि प्रश्नांचें उत्तर झालें ॥ १३ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां बद्ध व मुक्त पुरुष कसे विहार करितो याच्या उत्तरत्वें करून त्यांचा भेद सांगतो–ज्या पुरुषाचे प्राण, इंद्रियें, मन आणि बुद्धि यांच्या 'हें खावें, हें पहावें व हें संपादन करावें इत्यादिक' वृत्ति, संकल्पांनीं रहित असतात तो देहस्थित असला तरी त्या देहाच्या गुणांनीं मुक्त आहे. येणेंकरून मुक्त पुरुष संकल्पानें रहित अशा प्राणादिकांच्या वृत्ति राखून विहार करितो आणि बद्ध पुरुष संकल्पयुक्त अशा प्राणादिकांच्या वृत्ति राखून विहार करितो असें जाणावें ॥ १४ ॥ याप्रमाणें बद्धमुक्तांचें स्वतां जाणावयाचें लक्षण सांगून आतां कोणत्या लक्षणांनीं जाणला जातो याच्या उत्तरत्वेंकरून दुसऱ्यांनींहि सहज जाणण्याजोगा भेद सांगतो– ज्याचा देह दुर्जन लोकांनीं पीडिला जातो व एखादेवेळीं दैववशात् एखाद्या कोणी तरी पूजिला जातो परंतु जर तो पुरुष विद्वान् असला तर त्याचें मन हर्षखेदादिक विकार पावत नाहीं ॥ १५ ॥

कथं विहरेदित्यस्योत्तरत्वेन वैलक्षण्यांतरमाह । यस्य स्युरिति । तद्गुणैर्देहगुणैः । संकल्पशून्याभिः प्राणादिवृत्तिभिर्विहरन्मुक्त इत्यर्थः ॥ १४ ॥ एवं तावद्बद्धमुक्तयोः स्वसंवेद्यमेव वैलक्षण्यमुक्तमिदानीं कैर्वा ज्ञायेत लक्षणैरित्यस्योत्तरतया परैरपि सुज्ञेयं वैलक्षण्यमाह । यस्यात्मेति त्रिभिः हिंस्रैर्दुर्जनैरन्यैर्वा प्राणिभिर्यस्यात्मा देहः पीड्यते । यदृच्छया येन केनापि क्वचित्किंचिदर्च्यते वा स बुद्धश्चेत्तत्र न व्यतिक्रियते । नातिविक्रियत इत्यर्थः । तदुक्तं याज्ञवल्क्येन । यः कंटकैर्वितुदति चंदनैर्यश्च लिंपति ॥ अक्रुद्धोऽपरितुष्टश्च समस्तस्य च तस्य चेति ॥ १५ ॥ किंच । साध्वसाधु वा कुर्वतो वदतो वा जनान्न स्तुवीत नच निंदेत । यो लौकिकव्यवहारे विमुखः स मुक्त इत्यर्थः ॥ १६ ॥ अपिच । न

यस्य स्युर्वीतसंकल्पाः प्राणेंद्रियमनोधियाम् ॥ वृत्तयः स विनिर्मुक्तो देहस्थोऽपि हि तद्गुणैः ॥ १४ ॥ यस्यात्मा हिंस्यते हिंस्रैर्येन किंचिद्यदृच्छया ॥ अर्च्यते वा क्वचित्तत्र न व्यतिक्रियते बुधः ॥ १५ ॥ न स्तुवीत न निंदेत कुर्वतः साध्वसाधु वा ॥ वदतो गुणदोषाभ्यां वर्जितः समदृङ्मुनिः ॥ १६ ॥ न कुर्यान्न वदेत्किंचिन्न ध्यायेत्साध्वसाधु वा ॥ आत्मारामोऽनया वृत्त्या विचरेज्जडवन्मुनिः ॥ १७ ॥ शब्दब्रह्मणि निष्णातो न निष्णायात्परे यदि ॥ श्रमस्तस्य श्रमफलो ह्यधेनुमिव रक्षतः ॥ १८ ॥

कुर्यादिति । यो दैहिकेऽपि कर्मण्युदासीनः स मुक्तः । इतरो बद्ध इत्यर्थः । एतान्येव सर्वाणि मुमुक्षोः साधनानि ज्ञातव्यानि ॥ १७ ॥ यस्तु केवलं शब्दब्रह्मण्यभिज्ञः पांडित्यमात्रश्लाघी न तूक्तैः साधनैस्तदर्थनिष्ठो भवेत्तं निंदति । शब्दब्रह्मणि निष्णातोऽर्थतः पारंगतोऽपि परे ब्रह्मणि न निष्णायाध्यानाद्यभियोगं न कुर्यात्तस्य शास्त्रश्रमः । श्रमैकफलो न तु पुरुषार्थपर्यवसायी । अधेनुं चिरप्रसूताम् ॥ १८ ॥

आणि तो गुणदोषांनीं रहित व समदृष्टि धारण करणारा मुनि चांगलें वाईट करणाऱ्या किंवा बोलणाऱ्या लोकांची स्तुति किंवा निंदा मुळींच करीत नाहीं, त्यालाच मुक्त असें समजावें आणि याहून विपरीत असेल त्याला बद्ध असें समजावें ॥ १६ ॥ तसाच आंतून मननशील व स्वस्वरूपीं रममाण असतांहि बाहेरून जो कांहीं चांगलें किंवा वाईट कर्म करीत नाहीं व कांहींच बोलत नाहीं व कसलाच विचार करीत नाहीं तर ह्यापूर्वीं सांगितलेल्या वृत्तीनें जडासारखा संचार करितो तो पुरुष मुक्त समजावा व त्याहून इतर बद्ध समजावा. हींच सांगितलेलीं मुक्तपुरुषाचीं लक्षणें मुमुक्षु पुरुषांचीं साधनें जाणावींत ॥ १७ ॥ आतां जो केवळ वेदब्रह्माचा ज्ञाता असून आपल्या पांडित्याचीमात्र प्रशंसा करितो परंतु पूर्वोक्त साधनांनीं वेदाच्या अर्थावर निष्ठा राखीत नाहीं त्याची निंदा करितो – जो पुरुष, वेदब्रह्माचेठिकाणीं अर्थतः पारंगत असूनहि जर परब्रह्माचेठिकाणीं ध्यानादिकांच्या अभ्यासानें तदेकनिष्ठ न होईल तर त्याचा अध्ययनादिक श्रम, ' भाकड

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

गाईला दुधाकरितां बाळगणाऱ्या पुरुषाच्या श्रमासारखा' श्रमरूपच फळ देणारा होतो, पुरुषार्थ देणारा होत नाहीं ॥ १८ ॥ हेंच दुसऱ्या दृष्टांतांनीं स्पष्ट करितो–हे उद्धवा, दूध देत नाहींशा झालेल्या (भाकड) गाईचें, प्रीतिशून्य असलेल्या स्त्रीचें, प्रतिक्षणीं दुःखाला कारण झालेल्या देहाचें, या लोकाला व पर लोकाला साधन नसलेल्या पुत्राचें, सत्पात्रीं दान केलें जात नसलेल्या अकीर्तिकारक व पापकारक धनाचें व माझ्या वर्णनानें रहित अशा वाणीचें जो पुरुष रक्षण करितो तो उत्तरोत्तर दुःखेंच भोगितो ॥ १९ ॥ हे उद्धवा, ज्या वाणीमध्यें या जगाच्या उत्पत्तिस्थितिसंहारांना कारणभूत असून श्रवणादिक करणाऱ्या लोकांना पवित्र करणारें माझें कर्म नसेल अथवा लीलेनें धारण केलेल्या माझ्या अवतारांपैकीं जगाला आवडणारें रामकृष्णादिक जन्म नसेल त्या निष्फळ वाणीचा उच्चार सुज्ञपुरुषानें करूं नये

एतदेवान्यार्थनिदर्शनैः प्रपंचयति गामिति । दुह्यत इति दोहः पयः । दुग्धो दोहो नोत्तरत्र दोह्योऽस्ति यस्यास्तामर्थशून्याम् । असतीं भार्यां कामशून्याम् । देहं पराधीनं प्रतिक्षणं दुःखहेतुम् । असत्प्रजां दृष्टादृष्टसाधनशून्यं पुत्रम् । अतीर्थीकृतमागते पात्रेऽदत्तं वित्तं दुष्कीर्तिदुरितापादकम् । अंग हे उद्धव । दुःखानंतरं दुःखमेव यस्य स रक्षति ॥ १९ ॥ मया हीनां वाचमित्युक्तं विवृणोति । यस्यां वाचि मे जगतः शोधकं चरित्रं न स्यात् । किं तत् अस्य विश्वस्य स्थित्यादिरूपम् । तद्धेतुरित्यर्थः । लीलावतारेष्वी-

गां दुग्धदोहामसतीं च भार्यां देहं पराधीनमसत्प्रजां च ॥ वित्तं त्वतीर्थीकृतमंग वाचं हीनां मया रक्षति दुःखदुःखी ॥ १९ ॥
यस्यां न मे पावनमंग कर्म स्थित्युद्भवप्राणनिरोधमस्य ॥ लीलावतारेप्सितजन्म वा स्याद्वंध्यां गिरं तां बिभृयान्न धीरः ॥ २० ॥
एवं जिज्ञासयाऽपोह्य नानात्वभ्रममात्मनि ॥ उपारमेत विरजं मनो मय्यर्प्य सर्वगे ॥ २१ ॥ यद्यनीशो धारयितुं मनो ब्रह्मणि नि-
श्चलम् ॥ मयि सर्वाणि कर्माणि निरपेक्षः समाचर ॥ २२ ॥ श्रद्धालुर्मे कथाः शृण्वन्सुभद्रा लोकपावनीः ॥ गायन्ननुस्मरन्कर्म ज-
न्म चाभिनयन्मुहुः ॥ २३ ॥ मदर्थे धर्मकामार्थानाचरन्मदपाश्रयः ॥ लभते निश्चलां भक्तिं मय्युद्धव सनातने ॥ २४ ॥

प्सितं जगतः प्रेमास्पदं श्रीरामकृष्णादि जन्म वा न स्यात् । तां निष्फलां गिरं धीरो धीमान्न धारयेत् ॥ २० ॥ उक्तं ज्ञानमार्गमुपसंहरति । एवं निश्चित्य विचारेणात्मनि नानात्वभ्रमं देहाद्यध्यासं निरस्य निर्मलं मनो मयि सर्वगे परिपूर्णे समर्प्य संधार्य उपारमेत । न शास्त्रपांडित्यमात्रेणेत्यर्थः ॥ २१ ॥ यद्यनीशोऽशक्तस्तर्ह्यास्तामिदं मद्भक्त्यैव कृतार्थो भविष्यसीत्याह । मयीति ॥ २२ ॥ मदर्पणेन कर्मणा विशुद्धसत्वस्यांतरंगां भक्तिमाह । श्रद्धालुरिति द्वाभ्याम् । अभिनयन्स्वयमनुकुर्वन् ॥ २३ ॥ आचरन्सेवमानः ॥ २४ ॥

॥ २० ॥ अशा विचारानें आत्म्याचे ठिकाणीं प्राप्त झालेला देवमनुष्यादि देहांच्या अध्यासाचा निरास करून, निर्मळ झालेलें मन परिपूर्णस्वरूपीं मज भगवंताचे ठिकाणीं धारण करून समाधान पावावें केवळ शास्त्रपांडित्यानें समाधान पावूं नये ॥ २१ ॥ आतां जर तूं ब्रह्माचे ठिकाणीं मन निश्चल धारण करण्यास अशक्त असशील तर फलमात्रीचीं इच्छा सोडून देऊन माझ्या उद्देशानें वर्णाश्रमविहित सर्व कर्मांचें आचरण कर, म्हणजे माझ्या भक्तीनेंच कृतार्थ होशील ॥ २२ ॥ हे उद्धवा, जो पुरुष, श्रद्धायुक्त होऊन परममंगलरूप व लोकांना पवित्र करणाऱ्या माझ्या कथांचें श्रवण करितो, माझ्या जन्माचें व कर्मांचें वारंवार गायन स्मरण व अनुकरण करितो, माझ्या संतोषाकरितां धर्म, अर्थ व काम यांचें आचरण करितो आणि माझाच आश्रय करून राहतो, तो पुरुष, सर्व कारणांचेंहि कारण अशा माझे ठिकाणीं निश्चल भक्ति पावतो ॥ २३ ॥ २४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सत्संगानें प्राप्त झालेल्या त्या मद्विषयक भक्तीनें तो भक्त माझें निरंतर ध्यान करून ध्यानशील झाला ह्मणजे तो, साधूंनीं दाखविलेल्या माझ्या स्वरूपाप्रत खरोखर सुखानें पावतो ॥ २५ ॥ आतां साधूंचा व भक्तीचा विशेष विचारिण्याकरितां उद्धव ह्मणाला--हे उत्तमकीर्ते प्रभो, मनुष्यांनीं आपआपल्या बुद्धीनें कल्पिलेले साधु पुष्कळ असतात परंतु तुला कोणत्या लक्षणांचा साधु मान्य आहे? तशीच भक्तिहि लोकांमध्यें पुष्कळ प्रकारची आहे परंतु नारदादिक साधूंनीं मान्य केलेली कोणत्या प्रकारची भक्ती तुझ्याविषयीं उपयोगीं पडत्ये? ॥ २६ ॥ हे पुरुषाध्यक्ष, हे लोकाध्यक्ष, हे जगत्पते, हें विचारिलेलें, तूं कृपा करून अत्यंत नम्र, भक्त व शरणागत अशा मला सांगावेंस ॥ २७ ॥ हे भगवन्, तूं आकाशासारखा असंग, परब्रह्मरूपी, व प्रकृतीहून पर असा पुरुष आहेस तथापि आपल्या भक्तांच्या इच्छेनें निराळें स्वरूप धारण करून

ततश्चागेन प्रकारेण मयि सत्संगेन लब्धया स भक्तो मामुपासिता ध्याता भवति स च ध्यानशीलः सद्भिर्दर्शितं वै निश्चितं सुखेनैव मे पदं स्वरूपं प्राप्नोति ॥ २५ ॥ सत्संगलब्धया भक्त्येत्युक्तं तत्र सतां भक्तेश्च विशेषं पृच्छति । साधुरिति । साधवः स्वस्वमतिकल्पिताः संति बहवस्तव तु कीदृशः संमतः भक्तिरपि बहुविधा लोके कीदृशी पुनस्त्वय्युपयुज्येत । सद्भिश्च नारदादिभिरादृता॥ २६ ॥ एतच्च कथ्यताम् । इदं चातिगुह्यं त्वयैव वक्तव्यमित्यैश्वर्यमाविष्करोति । हे पुरुषाध्यक्षेत्यादिना ब्रह्मादिनियंतः ॥ २७ ॥ अत्र हेतुः ।

सत्संगलब्धया भक्त्या मयि मां स उपासिता ॥ स वै मे दर्शितं सद्भिरंजसा विंदते पदम् ॥ २५ ॥ उद्धव उवाच ॥ साधुस्तवोत्तमश्लोक मतः कीदृग्विधः प्रभो ॥ भक्तिस्त्वय्युपयुज्येत कीदृशी सद्भिरादृता ॥ २६ ॥ एतन्मे पुरुषाध्यक्ष लोकाध्यक्ष जगत्प्रभो ॥ प्रणतायानुरक्ताय प्रपन्नाय च कथ्यताम् ॥ २७ ॥ त्वं ब्रह्म परमं व्योम पुरुषः प्रकृतेः परः ॥ अवतीर्णोऽसि भगवन्स्वेच्छोपात्तपृथग्वपुः ॥ २८ ॥ श्रीभगवानुवाच ॥ कृपालुरकृतद्रोहस्तितिक्षुः सर्वदेहिनाम् ॥ सत्यसारोऽनवद्यात्मा समः सर्वोपकारकः ॥ २९ ॥ कामैरहतधीर्दांतो मृदुः शुचिरकिंचनः ॥ अनीहो मितभुक् शांतः स्थिरो मच्छरणो मुनिः ॥ ३० ॥ अप्रमत्तो गभीरात्मा धृतिमान् जितषड्गुणः ॥ अमानी मानदः कल्पो मैत्रः कारुणिकः कविः ॥ ३१ ॥

त्वमिति । व्योमवदसंगः । यतः प्रकृतेः परः । स्वेषां भक्तानामिच्छयोपात्तं पृथक्परिमितं वपुर्येन सः ॥ २८ ॥ तत्र त्रिंशल्लक्षणैः साधुं निरूपयति कृपालुरिति पंचभिः । कृपालुः परदुःखासहिष्णुः । सर्वदेहिनां केषांचिदप्यकृतद्रोहः । तितिक्षुः क्षमावान् । सत्यं सारः स्थिरं बलं वा यस्य सः । अनवद्यात्माऽसूयादिरहितः । सुखदुःखयोः समो हर्षविषादरहितः । यथाशक्ति सर्वेषामुपकारकः ॥ २९ ॥ कामैर्विषयैरक्षुभितचित्तः । दांतः संयतबाह्येंद्रियः । मृदुरकठिनचित्तः । शुचिः सदाचारः । अकिंचनोऽपरिग्रहः । अनीहो दृष्टक्रियाशून्यः । मितभुक् लघ्वाहारः । शांतो नियतांतःकरणः । स्थिरः स्वधर्मे । मच्छरणो मदेकाश्रयः । मुनिर्मननशीलः ॥ ३० ॥ अप्रमत्तः सावधानः । गभीरात्मा

अवतीर्ण झाला आहेस ॥ २८ ॥ श्रीभगवान् ह्मणाला– हे उद्धवा, आतां तुला तीस लक्षणांच्या उत्तम साधूचें निरूपण करितों– १ लोकांवर कृपा करणारा, २ कोणाचाच द्रोह न करणारा, ३ क्षमाशील, ४ सत्यप्रतिज्ञ, ५ निंदादि दोषरहित, ६ सुखदुःखांविषयीं सम, ७ यथाशक्ति सर्वांवर उपकार करणारा, ॥ २९ ॥ ८ विषयांनीं चित्ताला क्षोभ न झालेला, ९ जितेंद्रिय, १० कोमलचित्त, ११ सदाचार पालन करणारा, १२ परिग्रहाचा त्याग करणारा, १३ या लोकींच्या सुखाकरितां कोणतींच कर्मे न करणारा, १४ परिमित भोजन करणारा, १५ शांत, १६ स्वधर्मांत स्थिर असणारा, १७ माझ्या आश्रयानें राहणारा, १८ मननशील ॥ ३० ॥ १९ सावधान, २० निर्विकार, २१ कष्टांच्या वेळींहि धैर्य धरणारा, २२ क्षुधा, तृषा, शोक, मोह, जरा, व मृत्यु या सहाहीं विकारांना जिंकणारा, २३ मानरहित, २४ दुसऱ्यांचा सत्कार करणारा, २५ दुसऱ्यांना बोध कर- ॥ ४४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ण्यास चतुर, २६ न फसविणारा, २७ करुणेनेंच परोपकाराविषयीं प्रवृत्त होणारा, २८ ज्ञानसंपन्न ॥ ३१ ॥ आणि २९ वेदरूपी मी सांगितलेले स्वधर्म पालन केले असतां अंतःकरणशुद्ध्यादिक गुण आहेत आणि पालन केले नसतां नरकपातादिक दोष आहेत असें जाणूनहि, हे धर्म प्रभूच्या ध्यानाविषयीं विक्षेप करणारे आहेत आणि आचरण केले नसतांहि हे भक्तीनेंच सिद्ध होणारे आहेत अशा दृढ निश्चयानें, त्या आपल्या सर्व धर्मांचा परित्याग करून जो पुरुष माझें सेवन करितो तो उत्तम साधु होय ॥ ३२ ॥ तसेच ३० जे पुरुष, मी देशकालादिपरिच्छेदरहित, सर्वात्मा व सच्चिदानंदरूप आहें असें सामान्यपणें जाणून व पुन्हां मननादिकेंकरून विशेषपणें जाणून, अनन्यभावानें माझें सेवन करितात ते उत्तम भक्त होत असें मला मान्य आहे ॥ ३३ ॥ असें साधूंचें लक्षण सांगून आतां भक्तीचें लक्षण आठ श्लोकांनीं सांगतो– माझ्या मूर्तीचें व माझ्या

निर्विकारः । धृतिमान्विपद्यप्यकृपणः । जितषड्गुणः । क्षुत्पिपासे शोकमोहौ जरामृत्यू षडूर्मयः । एते जिता येन सः । अमानी न मानाकांक्षी । अन्येभ्यो मानदः । कल्पः परबोधने दक्षः । मैत्रोऽवंचकः कारुणिकः करुणयैव प्रवर्तमानो न दृष्टलोभेन । कविः सम्यग्ज्ञानी ॥ ३१ ॥ किंच । मया वेदरूपेणादिष्टानपि स्वधर्मान्संत्यज्य यो मां भजेत सोऽप्येवं पूर्वोक्तवत्सत्तमः । किमज्ञानान्नास्तिक्याद्वा, न । धर्माचरणे सत्वशुद्ध्यादीन् गुणान्विपक्षे नरकपातादीन्दोषांश्चाज्ञाय ज्ञात्वाऽपि मद्ध्यानविक्षेपकतया मद्भक्त्यैव सर्वं भविष्यतीति दृढनिश्चयेनैव धर्मान्संत्यज्य । यद्वा भक्तिदार्ढ्येन निवृत्ताधिकारतया संत्यज्य । अथवा विद्धैकादश्युपवासकृष्णैकादश्यनुपवासानिवेद्यश्राद्धादयो ये भक्तिविरुद्धा

आज्ञायैवं गुणान्दोषान्मयादिष्टानपि स्वकान् ॥ धर्मान्संत्यज्य यः सर्वान्मां भजेत स सत्तमः ॥ ३२ ॥ ज्ञात्वाऽज्ञात्वाऽथ ये वै मां
यावान्यश्चास्मि यादृशः ॥ भजंत्यनन्यभावेन ते मे भक्ततमा मताः ॥ ३३ ॥ मल्लिंगमद्भक्तजनदर्शनस्पर्शनार्चनम् ॥ परिचर्या स्तु-
तिः प्रह्वगुणकर्मानुकीर्तनम् ॥ ३४ ॥ मत्कथाश्रवणे श्रद्धा मदनुध्यानमुद्धव ॥ सर्वलाभोपहरणं दास्येनात्मनिवेदनम् ॥ ३५ ॥
मज्जन्मकर्मकथनं मम पर्वानुमोदनम् ॥ गीततांडववादित्रगोष्ठीभिर्मद्गृहोत्सवः ॥ ३६ ॥ यात्रा बलिविधानं च सर्ववार्षिकपर्वसु ॥ वैदि-
की तांत्रिकी दीक्षा मदीयव्रतधारणम् ॥३७॥ ममार्चास्थापने श्रद्धा स्वतः संहत्य चोद्यमः ॥ उद्यानोपवनाक्रीडपुरमंदिरकर्मणि ॥ ३८ ॥

धर्मास्तान्संत्यज्येत्यर्थः ॥ ३२ ॥ किंच यावान्देशकालापरिच्छिन्नः । यश्च सर्वात्मा । यादृशः सच्चिदानंदादिरूपः । तं मां ज्ञात्वा अज्ञात्वाऽपि । यद्वा विशेषतः पुनः पुनर्ज्ञात्व एकांतभावेन ये भजंतीति ॥ ३३ ॥ साधुलक्षणमुक्तं भक्तेर्लक्षणमाह । मल्लिंगेत्यष्टभिः । लिंगानि प्रतिमादीनि ॥ ३४ ॥ सर्वलाभोपहरणं सर्वस्य लब्धस्य समर्पणम् ॥ ३५ ॥ पर्वाणि जन्माष्टम्यादीनि तदनुमोदनम् ॥ ३६ ॥ बलिविधानं पुष्पोपहारादिसमर्पणम् । सर्ववार्षिकपर्वसु चातुर्मास्यैकादश्यादिषु विशेषतः ॥ ३७ ॥ उद्यानादिकरणे सामर्थ्ये सति स्वतः । असति चान्यैः संभूयोद्यमः । उद्यानं पुष्पप्रधानम् । उपवनं फलप्रधानं वनम् । आक्रीडं क्रीडास्थानम् ॥ ३८ ॥

भक्तजनांचें दर्शन, स्पर्शन आणि पूजन करावें, माझी सेवा, स्तुति आणि गुणकर्मांचें वर्णन करावें, नम्रता राखावी ॥ ३४ ॥ हे उद्धवा, माझ्या कथाश्रवणाविषयीं श्रद्धा राखावी, माझें ध्यान करावें, जें कांहीं मिळेल तें सर्व मला अर्पण करावें, दास्य भावानें आपल्या देहाचें मला समर्पण करावें ॥ ३५ ॥ माझीं जन्में आणि कर्में यांचें वर्णन करावें, माझ्या जन्माष्टम्यादिक उत्सवांचें अनुमोदन करावें, माझ्या मंदिरांमध्यें समाज जमवून गायनें, नृत्यें, वाद्यें इत्यादिकांच्या योगेंकरून माझा उत्साह करावा ॥ ३६ ॥ माझ्या दर्शनादिकांस जाण्याची यात्रा करावी, चातुर्मास्यांतील जन्माष्टमी एकादश्यादिक पर्वांचेठिकाणीं महापूजा महानैवेद्यादिक समर्पण करावींत, वेदसंबंधी किंवा तंत्रसंबंधी दीक्षा ग्रहण करावी, माझ्या एकादश्यादिक व्रतांचें धारण करावें, ॥ ३७ ॥ माझी मूर्ति स्थापन करण्याविषयीं श्रद्धा राखावी, माझ्या उद्देशानें फुलझाडांच्या बागा, फळझाडां-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

च्या बागा क्रीडास्थानें, नगरें आणि मंदिरें उत्पन्न करण्याच्या कामीं सामर्थ्य असेल तर स्वतांच किंवा सामर्थ्य नसेल तर दुसऱ्यांबरोबर मिळून उद्योग करावा ॥ ३८॥ माझ्या मंदिरामध्यें निष्कपटभावानें दासासारखें सडा, संमार्जन, सारवण व रांगोळ्यावगैरे घालून शुश्रूषण करावें ॥ ३९ ॥ अभिमान व दांभिकपणा धरूं नये, आपण केलेल्या धर्माचें वर्णन करूं नये, मला अर्पण केलेल्या पदार्थांचा आपण उपभोग करूं नये, इतर पदार्थांची तर गोष्ट राहूंदे परंतु मला अर्पण केलेल्या दिव्याच्या प्रकाशा-

संमार्जनं रजसोपाकरणम् । उपलेपो गोमयादिभिरालेपनम् । सेकस्तैरेव प्रोक्षणम् । मंडलवर्तनं सर्वतोभद्रादिकरणम् । मह्यं मम ॥ ३९ ॥ कृतस्य धर्मस्यापरिकीर्तनम् । स्वयमन्येन वा निवेदितं न स्वीकुर्यात् । एतच्च साधारणं स्थावरविषयं रागप्राप्तविषयं वा । भक्त्या तु ग्राह्यमेव । षड्भिर्मासोपवासैस्तु यत्फलं परिकीर्तितम् ॥ विष्णोर्नैवेद्य-सिक्थेन पुण्यं तद्भुंजतां कलौ ॥ हृदि रूपं मुखे नाम नैवेद्यमुदरे हरेः ॥ पादोदकं च निर्माल्यं मस्तके यस्य सोऽच्युत इत्यादिवचनेभ्यः । यद्वा अन्यस्मै निवेदितं मे नोपयुं-

संमार्जनोपलेपाभ्यां सेकमंडलवर्तनैः ॥ गृहशुश्रूषणं मह्यं दासवद्यदमायया ॥ ३९ ॥ अमानित्वमदंभित्वं कृतस्यापरिकीर्तनम् ॥ अपि दीपावलोकं मे नोपयुंज्यान्निवेदितम् ॥ ४० ॥ यद्यदिष्टतमं लोके यच्चातिप्रियमात्मनः ॥ तत्तन्निवेदयेन्मह्यं तदानंत्याय कल्पते ॥ ४१ ॥ सूर्योऽग्निर्ब्राह्मणो गावो वैष्णवः खं मरुज्जलम् ॥ भूरात्मा सर्वभूतानि भद्र पूजापदानि मे ॥ ४२ ॥ सूर्ये तु विद्यया त्रय्या हविषाऽग्नौ यजेत माम् ॥ आतिथ्येन तु विप्राग्र्ये गोष्वंग यवसादिना ॥ ४३ ॥

ज्यात् । मह्यं न निवेदयेदित्यर्थः । विष्णोर्निवेदितान्नेन यष्टव्यं देवतांतरम् । पितृभ्यश्चैव तद्देयं तदानंत्याय कल्पते ॥ पितृशेषं तु यो दद्याद्धरये परमात्मने ॥ रेतोधाः पितरस्तस्य भवंति क्लेशभागिन इत्यादिवचनेभ्यः ॥ ४० ॥ ४१ ॥ इदानीमेकादशपूजाधिष्ठानान्याह । सूर्य इति । हे भद्र ॥ ४२॥ अधिष्ठानभेदेन पूजासाधनान्याह । सूर्य इति त्रिभिः । त्रय्या विद्यया सूक्तैरुपस्थानादिना । अंग हे उद्धव यवसादिना तृणादिना ॥ ४३ ॥

चाहि आपण उपयोग करूं नये. दुसऱ्या देवतेला निवेदन केलेले पदार्थ मला अर्पण करूं नयेत ॥ ४० ॥ लोकांमध्यें जो जो पदार्थ सर्वांना आवडणारा आहे व आपणाला अति आवडणारा आहे तो तो पदार्थ मला निवेदन करावा म्हणजे तो अनंत फळ देणारा होतो ॥ ४१ ॥ हे उद्धवा, सूर्य, अग्नि, ब्राह्मण, गाई, विष्णुभक्त, हृदयाकाश, वायु, जळ, पृथिवी, आपला जीवात्मा व सर्व प्राणी हीं अकरा माझीं पूजा करण्याचीं स्थानें होत ॥ ४२॥ आतां अधिष्ठानभेदानें पूजासाधनें सांगतो—हे उद्धवा, सूर्याचे ठिकाणीं, वेदांत सांगितलेल्या सूर्यस्तुतिपर सूक्तांच्या उपस्थानादिकेंकरून माझी पूजा करावी. अग्नीमध्यें घृतादिक होमद्रव्यांनीं माझी पूजा करावी. श्रेष्ठ ब्राह्मणाचे

१ विष्णूला निवेदन केलेलें घेऊं नये, याचा अर्थ लोभानें घेऊं नये भक्तीनें घ्यावेंच असा जाणावा. कारण, सहा महिने उपवास केल्यानें जें फळ प्राप्त होतें तें फळ विष्णूच्या नैवेद्याच्या एका शिताचेंहि भक्षण करणाऱ्या लोकांना कलियुगामध्यें प्राप्त होतें. ज्याच्या हृदयामध्यें हरीचें रूप, मुखामध्यें नांव, उदरामध्यें नैवेद्य व मस्तकावर चरणोदक व निर्माल्य हीं राहतात तो साक्षात् विष्णूच होय अशा अर्थाचीं स्मृतिवचनें आहेत. २ म्हणूनच पूजावगैरे करत्येवेळीं दुसरा दिवा लाऊन ठेवावा किंवा दोन वाती तरी घालाव्यात. ३ विष्णूला अर्पण केलेला अन्नादिक पदार्थ इतर देवांना अर्पण करावा आणि तो पितरांनाहि द्यावा तो अनंत फळ देणारा होतो. पितरांना देऊन अवशेष राहिलेला पदार्थ जो परमात्म्या हरीला अर्पण करितो त्याचे पितर, नरकांत पडून दुःख भोगतात अशा अर्थाचीं स्मृतिवचनें आहेत.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ठिकाणीं आदरपूर्वक सत्कारानें व गाईचेठिकाणीं कोंवळें गवतवगैरे यथेच्छ घालण्यानें माझें पूजन करावें ॥ ४३ ॥ विष्णुभक्ताचेठिकाणीं बंधूसारखा सत्कार करून माझें पूजन करावें. हृदयाकाशामध्यें ध्यानाची निष्ठा राखून माझी पूजा करावी. वायूचेठिकाणीं प्राणवायुदृष्टीनें व जळामध्यें जळादिक पदार्थांच्या तर्पणादिकेंकरून माझें पूजन करावें ॥ ४४ ॥ भूमीचेठिकाणीं रहस्यमंत्रांच्या न्यासानें व जीवात्म्याचेठिकाणीं विषयभोग अर्पण करून माझी पूजा करावी. सर्व प्राणिमात्रांचेठिकाणीं समता राखून त्यांच्या अंतर्यामीं असणाऱ्या मज क्षेत्रज्ञाचें पूजन करावें ॥ ४५ ॥ याप्रमाणें या अकराहि स्थानांचेठिकाणीं शंख, चक्र, गदा आणि कमळ यांनीं युक्त, चार भुजा धारण करणाऱ्या व शांत अशा स्वरूपाचें ध्यान करून एकाग्रचित्तपणें माझें पूजन करावें ॥ ४६ ॥ याप्रमाणें जितेंद्रिय असलेला जो पुरुष, माझें पूजन करितो व यज्ञयागादिक वैदिक

बंधुसत्कृत्या बंधुवत्संमानेन । हृदि खे हृदयाकाशे । मुख्यधिया प्राणदृष्ट्या । तोये तोयादिभिर्द्रव्यैस्तर्पणादिना ॥ ४४ ॥ स्थंडिले भुवि । मंत्रहृदयैः रहस्यमंत्रन्यासैः ॥ ४५ ॥ सर्वाधिष्ठानेषु ध्येयमाह । धिष्ण्येष्विति । इत्यनेन मंत्रप्रकारेण एषु धिष्ण्येषु ॥ ४६ ॥ उक्ताया भक्तेः फलमाह । इष्टापूर्तेनेति । सद्भक्तिं दृढां भक्तिम् । अस्या भक्तेरंतरंगसाधनमाह । इत्थं मत्स्मृतिः साधुसेवया भवति । यद्वा स्मृतिर्ज्ञानम् । ततश्च दृढभक्तिमतः पुंसः साधुसेवया मज्ज्ञानं भवतीत्यर्थः ॥ ४७ ॥ ज्ञानभक्तिमार्गावुक्तौ तत्र ज्ञानमार्गादपि भ-

वैष्णवे बंधुसत्कृत्या हृदि खे ध्याननिष्ठया ॥ वायौ मुख्यधिया तोये द्रव्यैस्तोयपुरस्कृतैः ॥ ४४ ॥ स्थंडिले मंत्रहृदयैर्भोगैरात्मा-
नमात्मनि ॥ क्षेत्रज्ञं सर्वभूतेषु समत्वेन यजेत माम् ॥ ४५ ॥ धिष्ण्येष्वेष्विति मद्रूपं शंखचक्रगदांबुजैः ॥ युक्तं चतुर्भुजं शांतं
ध्यायन्नर्चेत्समाहितः ॥ ४६ ॥ इष्टापूर्तेन मामेवं यो यजेत समाहितः ॥ लभते मयि सद्भक्तिं मत्स्मृतिः साधुसेवया ॥ ४७ ॥ प्रा-
येण भक्तियोगेन सत्संगेन विनोद्धव ॥ नोपायो विद्यते सध्र्यङ्प्रायणं हि सतामहम् ॥ ४८ ॥ अथैतत्परमं गुह्यं शृण्वतो यदुनं-
दन ॥ सुगोप्यमपि वक्ष्यामि त्वं मे भृत्यः सुहृत्सखा ॥ ४९ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे भगवदुद्धवसंवादे
एकादशोऽध्यायः ॥ ११ ॥

क्तिमार्गः श्रेष्ठ इत्याह । प्रायेणेति । सत्संगेन यो भक्तियोगस्तेन विनोपायः संसारतरणे न विद्यते । सत्संगेनेत्यत्र हेतुमाह । हि यस्मात्सतामहं प्रायणं प्रकृष्टमयनमाश्रयः । अतः सत्संगो मय्यंतरंग इत्यर्थः ॥ ४८ ॥ इदानीं सांख्ययोगादीनि साधनांतरसव्यपेक्षाणि सव्यभिचाराणि च सत्संगस्तु स्वतंत्र एव समर्थः फलाव्यभिचारी चेति वर्णयितुमाह । अथेति । एतद्वक्ष्यमाणं परमं गुह्यमतः शृण्वित्यर्थः ॥ ४९ ॥ इति श्रीमद्भागवते एकादशस्कंधे टीकायामेकादशोऽध्यायः ॥ ११ ॥

कर्मांनीं व वापीकूपतडागादिक स्मार्त कर्मांनीं माझें आराधन करितो, त्याला माझी दृढ भक्ति प्राप्त होत्ये, आणि दृढ भक्ति प्राप्त झालेल्या त्याला साधुसेवेच्या योगानें तत्त्वज्ञान होतें ॥ ४७ ॥ हे उद्धवा, तुला ज्ञानमार्ग व भक्तिमार्ग हे सांगितले, त्यांत ज्ञानमार्गापेक्षांहि भक्तिमार्ग श्रेष्ठ आहे. कारण, बहुतकरून सत्संगानें होणाऱ्या भक्तियोगावांचून संसार तरून जाण्याविषयीं दुसरा कोणताच चांगला उपाय नाहीं. याचें तरी कारण, सत्पुरुषांचा उत्तम आश्रय मी आहें ह्मणून सत्संगानें माझी प्राप्ति त्वरित होत्ये ॥ ४८ ॥ आतां दुसऱ्या साधनांची अपेक्षा असणाऱ्या सांख्ययोगादिकांपेक्षांहि स्वतंत्र असा सत्समागमच श्रेष्ठ आहे असें सांगण्याकरितां ह्मणतो कीं, हे यदुनंदना उद्धवा, तूं माझा दास, बंधु आणि मित्र आहेस यास्तव श्रद्धेनें श्रवण करणाऱ्या तुला मी अतिरहस्य व सर्वांपेक्षां गोप्य असा एक विषय सांगतों तो श्रवण कर ॥ ४९ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या एकादशस्कंधांत साधननिरूपणनामक हा अकरावा अध्याय समाप्त झाला ॥ ११ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां ह्या बाराव्या अध्यायामध्यें, प्रथम साधुसंगतीचा महिमा आणि नंतर कर्म करण्याची व कर्मांचा त्याग करण्याची व्यवस्था सांगितली आहे ॥*॥ श्रीभगवान् ह्मणाला–हे उद्धवा, इतर सर्व संगतींची निवृत्ति करणारा सत्संग, जसा मला वश करितो तसा आसनप्राणायामादिक योग, तत्त्वविवेकरूप सांख्य, अहिंसादिक धर्म, वेदजपरूप स्वाध्याय, कृच्छ्रादिक तप, संन्यासरूप त्याग, अग्निहोत्रादिक इष्ट, कूपारामादिक पूर्त, अभयदानादिरूप दक्षिणा, एकादश्युपवासादिक व्रतें, देवपूजादिक यज्ञ, रहस्यमंत्ररूप छंद, गंगादिक तीर्थें, शौचादिक नियम, अहिंसादिक यम, हीं सर्व साधनें वश करीत नाहींत ॥ १ ॥ २ ॥ हे उद्धवा, सत्संगाच्याच योगेंकरून दैत्य, राक्षस, मृग, पक्षी, गंधर्व, अप्सरा, नाग, सिद्ध,

---

द्वादशे साधुसंगस्य महिमा वर्णितः पुरा ॥ कर्मानुष्ठानतत्त्यागव्यवस्था च ततःपरम् ॥ १ ॥ न रोधयति न वशीकरोति । योग आसनप्राणायामादिः । सांख्यं तत्वानां विवेकः । धर्मः सामान्यतोऽहिंसादिः । स्वाध्यायो वेदजपः । तपः कृच्छ्रादि । त्यागः संन्यासः । इष्टापूर्तमिष्टं च पूर्तं च । तत्रेष्टमग्निहोत्रादि पूर्तं कूपारामादिनिर्माणम् । दक्षिणाशब्देन सामान्यतो दानं लक्ष्यते ॥ १ ॥ व्रतानि एकादश्युपवासादीनि । यज्ञो देवपूजा । छंदांसि रहस्यमंत्राः । अवरुंधे वशीकरोति ॥ २ ॥ यातुधाना राक्षसाः

श्रीभगवानुवाच ॥ न रोधयति मां योगो न सांख्यं धर्म एव च ॥ न स्वाध्यायस्तपस्त्यागो नेष्टापूर्तं न दक्षिणा ॥ १ ॥ व्रतानि यज्ञश्छंदांसि तीर्थानि नियमा यमाः ॥ यथाऽवरुंधे सत्संगः सर्वसंगापहो हि माम् ॥ २ ॥ सत्संगेन हि दैतेया यातुधाना मृगाः खगाः ॥ गंधर्वाप्सरसो नागाः सिद्धाश्चारणगुह्यकाः ॥ ३ ॥ विद्याधरा मनुष्येषु वैश्याः शूद्राः स्त्रियोऽन्त्यजाः ॥ रजस्तमःप्रकृतयस्तस्मिंस्तस्मिन्युगेऽनघ ॥ ४ ॥ बहवो मत्पदं प्राप्तास्त्वाष्ट्रकायाधवादयः ॥ वृषपर्वा बलिर्बाणो मयश्चाथ बिभीषणः ॥ ५ ॥ सुग्रीवो हनुमानृक्षो गजो गृध्रो वणिक्पथः ॥ व्याधः कुब्जा व्रजे गोप्यो यज्ञपत्न्यस्तथापरे ॥ ६ ॥ तेनाधीतश्रुतिगणा नोपासितमहत्तमाः ॥ अव्रतातप्ततपसः सत्संगान्मामुपागताः ॥ ७ ॥ केवलेन हि भावेन गोप्यो गावो नगा मृगाः ॥ येऽन्ये मूढधियो नागाः सिद्धा मामीयुरंजसा ॥ ८ ॥

॥ ३ ॥ ४ ॥ त्वाष्ट्रो वृत्रः । कायाधवः प्रन्हादः ॥ ५ ॥ ऋक्षो जांबवान् । गृध्रो जटायुः । वणिक्पथस्तुलाधारः । व्याधो धर्मव्याधः । यज्ञपत्न्यो दीक्षितभार्याः ॥ ६ ॥ तेषां सत्संगव्यतिरिक्तसाधनांतराभावमाह । त इति । न अधीताः श्रुतिगणा यैः तदर्थं च नोपासिता महत्तमा यैस्ते तथा । किंच अव्रतातप्ततपसः न व्रतानि येषां न तप्तानि तपांसियैस्ते च ते च । तथा । सत्संगादिति सद्भिः संगो नाम मयैव संग इत्यभिप्रेत्योक्तम् । यद्वा स्वसंगस्यापि सत्संगत्वं विवक्ष्यते । स्वस्यापि सत्त्वात् । यद्वा मदीयसंगादित्यर्थः ॥ ७ ॥ तत्र वृत्रादीनां भवतु नाम कथंचित्साधनांतरम् । गोपीप्रभृतीनां तु नान्यदस्तीत्याह । केवलेनेति । सत्संगलब्धेन केवलेनैव भावेन प्रीत्या । नगा यम-

---

चारण, गुह्यक, ॥ ३ ॥ विद्याधर, तसेच मनुष्यांमध्यें जे रजोगुणतमोगुणस्वभावाचे होते ते वैश्य, शूद्र, स्त्रिया व अंत्यज तसेच वृत्रासुर प्रन्हाद इत्यादिक पुष्कळ लोक त्या त्या युगामध्यें माझ्या स्वरूपाप्रत पावले आहेत, वृषपर्वा, बळिराजा, बाणासुर, मयासुर, बिभीषण ॥ ४ ॥ ५ ॥ सुग्रीव, हनुमान्, जांबवान्, गजेंद्र, जटायुपक्षी, तुलाधार वाणी, धर्मव्याध, कुब्जा दासी, गोकुलसंबंधी स्त्रिया, यज्ञ करणाऱ्या ऋषींच्या पत्न्या तसेच दुसरेहि पुष्कळ लोक माझ्या स्वरूपाप्रत पावले आहेत ॥ ६ ॥ त्यांनीं वेदांचें अध्ययन केलें नव्हतें, तसेंच वेदांचा अर्थ जाणण्याकरितां मोठमोठ्या सत्पुरुषांचें सेवन केलें नव्हतें, व्रतें स्वीकारिलीं नव्हतीं व तपहि आचरण केलें नव्हतें तथापि ते केवळ सत्समागमानेंच माझ्या स्वरूपाला पावले आहेत ॥ ७ ॥ त्यांत सत्समागमानेंच प्राप्त झालेल्या केवळ प्रीतीनें, गोपी, गाई, यमलार्जुनादिक वृक्ष, मृग व जे दुसरे मूढबुद्धि ॥ ४६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कालियादिक सर्व ते कृतार्थ होऊन, ज्यामत योग, सांख्य, दान, व्रत, तप, यज्ञ, व्याख्यान, वेदाध्ययन व संन्यास यांच्या योगानें यत्न करणाराहि पुरुष, पावत नाहीं, त्या मजमत अनायासानेंच पावले आहेत. प्रार्थ तात्पर्य असें कीं, – प्रथम श्रीकृष्णाबरोबर ज्या गोपींना व गाईवगैरे पशूंना समागम घडला तेच साधु होत. त्यांच्या प्रभावमच इतरांना सत्संग होऊन त्याच्यायोगानेंच त्यांना भक्ति प्राप्त झाली ॥ ८ ॥ ९ ॥ आतां गोपींच्या भक्तीचें वर्णन करितो– अक्रूरानें बलरामासहवर्तमान मला जेव्हां गोकुळांतून मथुरेंत नेलें, तेव्हां माझेठिकाणीं अतिदृढ प्रेमभावानें आसक्तचित्त व माझ्या वियोगानें अतिदुःखित झालेल्या गोपींनीं, माझ्याहून दुसरा कोणताच पदार्थ

लार्जुनादयः । नागाः कालियादयः । यद्वा तदानींतनानां सर्वतरुगुल्मादीनामपि भगवति भावोऽस्तीति गम्यते । तदुक्तं भगवतैव । अहो अमी देववरामरार्चितं पादांबुजं ते सुमनःफलार्हणम् ॥ नमंत्युपादाय शिखाभिरात्मनस्तमोपहत्यै तरुजन्म यत्कृतमित्यादि । सिद्धाः कृतार्थाः संत ईयुः प्रापुः ॥ ८ ॥ स्वप्राप्तेर्दुर्लभतामाह । यमिति । योगादिभिः कृतप्रयत्नोऽपि यं न प्राप्नुयात्तं मामीयुरिति पूर्वेणान्वयः । अत्र च प्रथमं या गोप्यः पश्वादयो वा श्रीकृष्णेन सह संगतास्ते संतस्तत्संगोऽन्येषां सत्संगस्तेन च तेषां भक्तिरिति ज्ञातव्यम् ॥ ९ ॥ गोपीनां भावं प्रपंचयति । रामेणेति चतुर्भिः । श्वाफल्किना अक्रूरेण मयि प्रणीते सति मे मत्तोऽन्यं सुखाय न ददृशुः । कुतः । वियोगेन तीव्रो दुःसह आधिर्यासां ताः । अत्र हेतुः । मयि विगाढेनातिदृढेन भावेन प्रेम्णाऽनुरक्तानि संसक्तानि चित्तानि यासां ताः ॥ १० ॥ तीव्राधित्वं व्यनक्ति । तास्ता इति । मया सह या

यं न योगेन सांख्येन दानव्रततपोध्वरैः ॥ व्याख्यास्वाध्यायसंन्यासैः प्राप्नुयाद्यत्नवानपि ॥ ९ ॥ रामेण सार्धं मथुरां प्रणीते श्वाफल्किना मय्यनुरक्तचित्ताः ॥ विगाढभावेन न मे वियोगतीव्राधयोऽन्यं ददृशुः सुखाय ॥ १० ॥ तास्ताः क्षपाः प्रेष्ठतमेन नीता मयैव वृंदावनगोचरेण ॥ क्षणार्धवत्ताः पुनरंग तासां हीना मया कल्पसमा बभूवुः ॥ ११ ॥ ता नाविदन्मय्यनुषंगबद्धधियः स्वमात्मानमतस्तथेदम् ॥ यथा समाधौ मुनयोऽब्धितोये नद्यः प्रविष्टा इव नामरूपे ॥ १२ ॥ मत्कामा रमणं जारमस्वरूपविदोऽबलाः ॥ ब्रह्म मां परमं प्रापुः संगाच्छतसहस्रशः ॥ १३ ॥

एव क्षपा रात्रयः क्षणार्धवन्नीतास्ता एव पुनर्मया हीनास्तासां कल्पसमा बभूवुः । कथंभूताः । तास्ताः वाचामगोचरा इत्यर्थः ॥ ११ ॥ किंच एवं तीव्राधयस्ता मोहमिषेण समाधिं प्राप्ता इत्याह । ता इति । मय्यनुषंगेणासक्त्या बद्धा धियो याभिस्ताः स्वमात्मानं स्वदेहमदो दूरस्थमिदं सन्निहितं च नाविदन् । यद्वा स्वं पतिपुत्रादिममतास्पदम् । आत्मानमहंकारास्पदं देहम् । अदः परं लोकमिदमिमं लोकं च नाविदन्निति । यथा मुनयः समाधौ नामरूपे न विदुस्तद्वत् । किंत्वब्धितोये नद्य इव मयि प्रविष्टा इत्यन्वयः ॥ १२ ॥ एवं ता अबलाः केवलं मत्कामा अस्वरूपविदः स्वरूपं तु न जानंति तथाऽपि सत्संगाज्जारं ब्रह्म जारबुद्धिवेद्यमपि ब्रह्मस्वरूपमेव मां परमं प्रापुरित्यर्थः ॥ १३ ॥

सुखकारक पाहिला नाहीं ॥ १० ॥ त्यांना असें दुःख झालें होतें कीं, – हे उद्धवा, वृंदावनांत प्राप्त झालेल्या व अतिप्रिय अशा प्रत्यक्ष माझ्या बरोबर क्रीडा करीत असतां, ज्या गोपींनीं ज्या रात्री अतिशय सुखानें अर्धक्षणासारख्या घालविल्या होत्या, त्या गोपींना त्याच रात्री माझा वियोग झाला असतां, कल्पासारख्या बहुत मोठ्या झाल्या ॥ ११ ॥ आतां अतिदुःख पावलेल्या त्या गोपी, मोहाच्या मिषानें समाधिस्थिति पावल्या असें सांगतो– जसे समाधीमध्यें स्थित असलेले ऋषि, आपलें नांव किंवा रूप कांहींच जाणत नाहींत त्याप्रमाणें माझेठिकाणीं आसक्तीनें आपल्या बुद्धि चिकटविणाऱ्या त्या गोपींनीं, आपल्यो पतिपुत्रादिकांना, देहाला, परलोकाला व या लोकालाहि मुळींच जाणिलें नाहीं तर जशा नद्या आपलीं नांवें व रूपें टाकून समुद्राच्या पाण्यांत प्रविष्ट होतात त्याप्रमाणें केवळ माझी कामना धारण करणाऱ्या त्या शेंकडो व हजारो

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

स्त्रिया, जरी माझें स्वरूप जाणणाऱ्या नव्हत्या तथापि ' आपणास रमविणारा हा एक जार आहे ' अशा बुद्धीनें जाणलेल्या परब्रह्मरूपी मजप्रत सत्संगतीच्या प्रभावानें पावल्या ॥ १२ ॥ १३ ॥ हे उद्धवा, माझ्या भजनाचा प्रभाव असा आहे म्हणून तूं, श्रुति, स्मृति, विधि, निषेध, प्रवृत्त कर्म, निवृत्त कर्म, श्रवण करावयाचें व श्रवण केलेलें सर्व शास्त्र सोडून देऊन, सर्व प्राणिमात्रांचा अंतर्यामी एक आत्मा अशा मला ' सर्व जगत् भगवद्रूपच आहे ' अशा भावनेनें शरण जा आणि माझी प्राप्ति करून घेऊन संसार-

यस्मादेवंभूतो मद्भजनप्रभावस्तस्मात्त्वं चोदनां श्रुतिं प्रतिचोदनां स्मृतिं च । यद्वा विधिं च निषेधं चोत्सृज्य मां शरणं याहि ॥ १४ ॥ मयैवाकुतोभयः स्याः भव ॥ १५ ॥ पूर्वं तावन्मयोदितेष्ववहितः स्वधर्मेष्वित्यादिना कर्म कर्तव्यमित्युक्तमिदानीं तु सर्वं त्यक्त्वा मां शरणं याहीत्युच्यते । तत्र किमात्मनः कर्तृत्वाद्यस्ति नास्ति वेत्यात्मस्थ आत्मा विषयः संशयो न निवर्तते । यद्वा कर्म कार्यं त्याज्यं वेत्यात्मस्थो हृदिस्थः संशयो न निवर्तत इति पृच्छति । संशय इति । येन संशयेन ॥ १६ ॥ उत्तरं स एष इत्यष्टभिः । अयं भावः । ईश्वरस्तावत्स्वमायावशात्प्रपंचात्मना भाति तत्प्रपंचाध्यासाच्च जीवानामनाद्यविद्यया कर्तृत्वादि ततो विधिप्रतिषेधाधिकारस्तदानीं सत्वशुद्ध्यर्थं कर्माणि कुर्वीत्यु-

तस्मात्त्वमुद्धवोत्सृज्य चोदनां प्रतिचोदनाम् ॥ प्रवृत्तं च निवृत्तं च श्रोतव्यं श्रुतमेव च ॥ १४ ॥ मामेकमेव शरणमात्मानं सर्व-देहिनाम् ॥ याहि सर्वात्मभावेन मया स्या ह्यकुतोभयः ॥ १५ ॥ उद्धव उवाच ॥ संशयः शृण्वतो वाचं तव योगेश्वरेश्वर ॥ न निवर्तत आत्मस्थो येन भ्राम्यति मे मनः ॥ १६ ॥ श्रीभगवानुवाच ॥ स एष जीवो विवरप्रसूतिः प्राणेन घोषेण गुहां प्रविष्टः ॥ मनोमयं सूक्ष्ममुपेत्य रूपं मात्रा स्वरो वर्ण इति स्थविष्ठः ॥ १७ ॥

क्तम् । सत्वे च शुद्धे पुनः कर्मजाड्यपरिहाराय भक्तिविक्षेपककर्मादरं परित्यज्य दृढविश्वासेन भजेत्युक्तम् । जातायां तु विद्यायां न किंचित्कर्तव्यमस्तीति । तत्र तावदीश्वराद्वा-गादींद्रियद्वारा जीवसंसृतिकारणभूतं प्रपंचोद्गममाह सार्धैश्चतुर्भिः । स एषोऽपरोक्षः जीवयतीति जीवः परमेश्वरः । अपरोक्षत्वे हेतुः । विवरेष्वाधारादिचक्रेषु प्रसूतिरिव प्रसू-तिरभिव्यक्तिर्यस्य सः । तामेवाभिव्यक्तिमाह । घोषेणेति । घोषेण पराख्येन नादवता प्राणेन सह गुहामाधारचक्रं प्रविष्टः सन्मनोमयं सूक्ष्मं रूपं पश्यंत्याख्यं मध्यमाख्यं च मणिपूरचक्रे विशुद्धिचक्रे चोपेत्य प्राप्य वक्त्रे मात्रा ऱ्हस्वादिः स्वरः उदात्तादिर्वर्णः ककारादिरित्येवं वैखर्याख्यः स्थविष्ठोऽतिस्थूलो नानावेदशाखात्मको भवति । तथाच श्रुतिः ।

भयापासून मुक्त हो ॥ १४ ॥ १५ ॥ उद्धव ह्मणाला— हे योगेश्वरांच्या ईश्वरा, तूं पूर्वी ' मी सांगितलेल्या स्वधर्मामध्यें सावधान राहून इत्यादिकें करून ' कर्म करावें असें सांगितलेंस, आणि आतां सर्व धर्मांचा त्याग करून मला शरण जा असें सांगतोस यास्तव तुझें भाषण श्रवण करणाऱ्या माझा आत्मविषयक ' आत्म्याला कर्तृत्व आहे किंवा नाहीं असा ' संशय निवृत्त होत नाहीं. कीं, ज्या संशयानें माझें मन भ्रमण पावत आहे. यास्तव त्या संशयाचें निराकरण कर ॥ १६ ॥ याचें उत्तर सांगण्याकरितां श्रीभग-वान् ह्मणाला— हे उद्धवा, तो हा प्रत्यक्ष आधारादिक चक्रांमध्यें नादादि रूपानें प्रकट झाल्यासारखा भासणारा ईश्वर, परा वाणीनामक नादरूप प्राणासहवर्तमान आधार-

१ हें सर्व उत्तर सांगण्याचा भगवंताचा अभिप्राय असा आहे कीं,–ईश्वरच, आपल्या मायेच्या योगानें प्रपंचरूपानें भासत आहे. जीवांना प्रपंचाच्या अध्यासानें अनादि अविद्ये-च्या योगेंकरून कर्तृत्वभोक्तृत्वादिक प्राप्त होऊन विधिनिषेधांचा अधिकार प्राप्त झाला आहे. तो जोंपर्यंत आहे, तोंपर्यंतच त्यांनीं अंतःकरणशुद्ध्यर्थ कर्मे करावीं, अंतःकरण शुद्ध झाल्यावर कर्मजाड्याचा परिहार होण्याकरितां भक्तीला विक्षेप करणाऱ्या कर्मांचा आदर सोडून देऊन दृढ विश्वासानें माझें भजन करावें आणि ज्ञान झालें ह्मणजे तर मग जीवांना कांहींच कर्तव्य रहात नाहीं.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

चक्रामध्यें प्रविष्ट होऊन, नंतर मणिपूरचक्रामध्यें पश्यंतीनामक मनोमयसूक्ष्मरूप पावून पुढें विशुद्धिचक्रामध्यें अस्पष्टनादात्मक किंचित् स्थूलरूप पावतो. नंतर मुखामध्यें ह्रस्वादिक मात्रा, उदात्तादिक स्वर व ककारादिक वर्ण अशाप्रकारें वैखरीनामक अतिस्थूल असा अनेक वेदशास्त्रात्मक होतो ॥ १७ ॥ यास दृष्टांत– जसा अग्नि, आकाशामध्यें प्रथम अस्पष्ट ऊष्मारूप असून त्याचें काष्ठांमध्यें बळानें विशेष मंथन केलें असतां प्रथम सूक्ष्म ठिणगीच्या रूपानें उत्पन्न होऊन, नंतर वायूच्या सहायानें मोठा होतां होतां घृतादिक होमद्रव्यांच्या योगानें वृद्धिंगत होतो, तशीच भज ईश्वराची परा, पश्यंती, मध्यमा आणि वैखरीनामक अतिसूक्ष्म, सूक्ष्म, स्थूळ आणि अतिस्थूळ अशी ही,

---

चत्वारि वाक्परिमिता पदानि तानि विदुर्ब्राह्मणा ये मनीषिणः ॥ गुहा त्रीणि निहिता नेंगयंति तुरीयं वाचो मनुष्या वदंतीति । अभियुक्तश्लोकश्च । या सा मित्रावरुणसदनादुच्चरंती त्रिषष्टिं वर्णानंतः प्रकटकरणैः प्राणसंगात्प्रसूते ॥ तां पश्यंतीं प्रथममुदितां मध्यमां बुद्धिसंस्थां वाचं वक्रे करणविशदां वैखरीं च प्रपद्ये ॥ १७ ॥ अव्यक्तस्य सतः सूक्ष्ममध्यमक्रमेणाभिव्यक्तौ दृष्टांतः । यथेति । यथाऽग्निः खे ऊष्मा अव्यक्तोष्मरूपः । दारुण्यधिकं मथ्यमानोऽनिलसहायः सन्नणुः सूक्ष्मविस्फुलिंगादिरूपो भवति पुनः प्रकृष्टो जातो हवि षा संवर्धते । तथैवेयं वाणी ममाभिव्यक्तिः ॥ १८ ॥ उक्तां वाग्वृत्तिमुपसंहरन्नितरेंद्रियवृत्तिष्वतिदिशति । एवं गदिर्गदनं भाषणं मे व्यक्तिरित्युपसंहारः । कर्महस्तयोर्वृत्तिर्गतिः पादयोर्विसर्गः पायूपस्थयोरिति कर्मेंद्रियाणाम् । घ्राणोऽवघ्राणं रसो रसनं दृक् दर्शनं स्पर्शः स्पर्शनं श्रुतिः श्रवणमिति ज्ञानेंद्रियाणाम् । संकल्पो मनसो

यथाऽनलः खेऽनिलबंधुरूष्मा बलेन दारुण्यधिमथ्यमानः ॥ अणुः प्रजातो हविषा समिध्यते तथैव मे व्यक्तिरियं हि वाणी ॥ १८ ॥ एवं गदिः कर्मगतिर्विसर्गो घ्राणो रसो दृक् स्पर्शः श्रुतिश्च ॥ संकल्पविज्ञानमथाभिमानः सूत्रं रजःसत्वतमोविकारः ॥ १९ ॥ अयं हि जीवस्त्रिवृदब्जयोनिरव्यक्त एको वयसा स आद्यः ॥ विश्लिष्टशक्तिर्बहुधेव भाति बीजानि योनिं प्रतिपद्य यद्वत् ॥ २० ॥

विज्ञानं बुद्धिचित्तयोरभिमानोऽहंकारस्य सूत्रं प्रधानस्य सत्वरजस्तमसां विकारोऽधिदैवादिस्त्रिविधः प्रपंचो मे व्यक्तिरिति पूर्वेणान्वयः ॥ १९ ॥ तस्मादीश्वरादिव्यक्तिरूपः प्रपंचो नेश्वराद्भिन्नोऽस्तीत्याह । अयमिति । अयं जीव ईश्वर आदावव्यक्त एक एव । वयसा कालेन विश्लिष्टा विभक्ता वागादींद्रियरूपाः शक्तयो यस्य । यद्वा विशेषेण श्लिष्टा आलिंगिता मायाशक्तिर्येन सः । बहुप्रकार इवाभाति । यतः स एवाद्यः । त्रिवृत् त्रिगुणाश्रयः । अब्जयोनिर्लोकपद्मस्य कारणभूतः । एकस्य बहुधा भाने दृष्टांतः । योनिं क्षेत्रं प्रतिपद्य प्राप्य बीजानि यद्वदिति ॥ २० ॥

वाणीच्या स्वरूपानें उत्पत्ति झाली आहे ॥ १८ ॥ याप्रमाणेंच भाषण, कर्म (हातांची वृत्ति), गति (पायांची वृत्ति), विसर्ग (पायु व उपस्थ या दोन इंद्रियांची वृत्ति) वास घेणें, रस ग्रहण करणें, पाहणें, स्पर्श करणें, श्रवण करणें संकल्प (मनाची वृत्ति), विज्ञान (बुद्धि व चित्त यांची वृत्ति), अभिमान (अहंकाराची वृत्ति), सूत्र (प्रधानाची वृत्ति) आणि रज, सत्व व तम, या तीन गुणांचा आधिदैवादिक हा सर्व प्रपंच उत्पन्न झाला आहे ॥ १९ ॥ आतां हा प्रपंच ईश्वराहून निराळा नाहीं असें सांगतो– लोकरूपी कमळाचा आधार व तिन्हीं गुणांचा आश्रय असा हा आद्य ईश्वर, प्रथम निरनिराळा नसून अव्यक्तरूपी एकच होता. तोच काळाच्या योगानें वाणीवगैरे इंद्रियरूप शक्तींचा विभाग पावून, जशीं बीजें क्षेत्राचा आधार पावून, वृक्षादि रूपानें अनेक प्रकारचीं भासतात त्याप्रमाणें इंद्रियादिरूपानें अनेक प्रकारचा भासतो ॥ २० ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कोष्ठयाच्या मागावर असलेला पट जसा उभ्या दीर्घतंतूंमध्यें ओत आणि आडव्या तंतूंमध्यें प्रोत असून त्यांहून निराळा नसतो त्याप्रमाणें हें जगहि ज्या कारणरूपी ईश्वरा-चेठिकाणीं ओतप्रोत असून त्याहून निराळें नाहीं. याप्रमाणें जो हा अनादिकालीन, प्रवृत्तिस्वभाववान्, अविद्येनें आत्म्याचेठिकाणीं कल्पिलेला देहरूपी संसारवृक्ष तो भोग-रूपी पुष्पें व मोक्षरूपी फळें उत्पन्न करितो ॥ २१ ॥ या वृक्षाचीं पुण्यपापरूपी दोन बीजें आहेत, वासनारूपी शेंकडो मुळें आहेत, गुणरूपी तीन कांडें आहेत, महाभूत-रूपी पांच खांदे आहेत, शब्दस्पर्शादिविषयरूपी पांच रस आहेत, इंद्रियरूपी अकरा खांद्या आहेत, याच्यावर जीवेश्वररूपी दोन पक्ष्यांचें घरटें आहे, याच्या वातपित्तश्लेष्म-

तस्मात्तन्मायाविलसितत्वात्तदाश्रयमिदं जगन्न ततः पृथगिति सदृष्टांतमाह । यस्मिन्निति तंतुवितानें संस्था स्थितिर्यस्य स पटो यथा तथा यस्मिन्निदं विश्वमोतं दीर्घतंतुषु पट इव प्रोतं तिर्यक्तंतुष्विव । एवंभूतं समष्टिव्यष्ट्यात्मकं विश्वमविद्याऽऽत्मन्यध्यस्तं वृक्षरूपं जीवस्य कर्तृत्वादिसंसारहेतुरतस्तद्विवेकज्ञानेन कर्मादि सर्वं त्याज्यमित्युक्तमित्या-शयेनाह । य एष इति सार्धैस्त्रिभिः । पुराणोऽनादिः कर्मात्मकः प्रवृत्तिस्वभावः । पुष्पफले भोगापवर्गौ । कर्म तत्फले वा । प्रसूते जनयति ॥ २१ ॥ वृक्षरूपकं प्रपंचयति । द्वे इति । द्वे पुण्यपापे अस्य बीजे । स च शतमूलः शतमपरिमिता वासना मूलानि यस्य । त्रयो गुणा नालानि प्रकांडा यस्य । पंच भूतानि स्कंधा यस्य । पंच रसाः शब्दादिविषयास्तेषां प्रसूतिर्यस्मात् । दश च एका च शाखा इंद्रियाणि यस्य । द्वयोः सुपर्णयोर्जीवपरमात्मनोर्नीडं यस्मिन् । त्रीणि वल्कलानि त्वचो वातपित्तश्लेष्माणो यस्य ।

यस्मिन्निदं प्रोतमशेषमोतं पटो यथा तंतुवितानसंस्थः ॥ य एष संसारतरुः पुराणः कर्मात्मकः पुष्पफले प्रसूते ॥ २१ ॥ द्वे अस्य बीजे शतमूलस्त्रिनालः पंचस्कंधः पंचरसप्रसूतिः ॥ दशैकशाखो द्विसुपर्णनीडस्त्रिवल्कलो द्विफलोऽर्कं प्रविष्टः ॥ २२ ॥ अदंति चैकं फलमस्य गृध्रा ग्रामेचरा एकमरण्यवासाः ॥ हंसा य एकं बहुरूपमिज्यैर्मायामयं वेद स वेद वेदम् ॥ २३ ॥ एवं गुरूपासनयैकभक्त्या विद्याकुठारेण शितेन धीरः ॥ विवृश्च्य जीवाशयमप्रमत्तः संपद्य चात्मानमथ त्यजास्त्रम् ॥ २४ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥

द्वे सुखदुःखे फले यस्य सः । अर्कं प्रविष्टः सूर्यमंडलपर्यंतं व्याप्तः । तन्निर्भिद्य गतस्य संसाराभावात् ॥ २२ ॥ तत्फलभोक्तॄनाह । गृध्यंतीति गृध्राः कामिनो ग्रामेचरा गृहस्था अस्य वृक्षस्यैकं फलं दुःखमदंति परिणामतः स्वर्गादेरपि दुःखरूपत्वात् । हंसा विवेकिनोऽरण्यवासाः संन्यासिन एकं फलं सुखमदंति । एवं परमात्मानं मायामयमेव बहुरूप-मिज्यैर्गुरुभिः कृत्वा यो वेद स वेदं वेदतत्त्वार्थं वेद ॥ २३ ॥ त्वं चैवं ज्ञात्वा कृतकृत्यः सर्वं साधनं त्यजेत्याह । एवमिति । एकांतभक्त्या शितेन तीक्ष्णेन ज्ञानकुठारेण स्वतंत्रता वा द्वयोर्ज्ञानभक्त्योः । जीवोपाधित्रिगुणात्मकं लिंगशरीरं विवृश्च्य छित्वा परमात्मानं च संपद्य प्राप्याथास्त्रं साधनं त्यजेति ॥ २४ ॥ इति श्रीमद्भागवते एका-दशस्कंधे टीकायां द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥

रूप तीन साली आहेत, याचीं सुखदुःखरूपी दोन फळें आहेत व हा वृक्ष सूर्यमंडळापर्यंत वाढला आहे. ह्मणजे सूर्यमंडळाचा भेद करून जाणाराला संसार राहत नाहीं ॥ २२ ॥ या वृक्षाचें एक फळ (दुःख) गांवामध्यें राहणारे गृध्रपक्षी (कामी गृहस्थ) भक्षण करितात. आणि दुसरें एक फळ (सुख) वनामध्यें राहणारे हंसपक्षी (विवेकी संन्यासी) भक्षण करितात. याप्रमाणें एक परमात्माच मायामय होऊन बहुरूपी झाला आहे, असें पूज्य गुरूंच्या उपदेशानें जो जाणतो तोच वेदांचा वास्तविक अर्थ जाणतो असें समजावें ॥ २३ ॥ हे उद्धवा, तूं तर याप्रमाणें सावधान व जितेंद्रिय होऊन गुरूच्या उपासनेनें वृद्धिंगत झालेल्या एकाग्रभक्तीनें तीक्ष्ण

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

केलेल्या ज्ञानकुठारानें जीवोपाधिरूप त्रिगुणात्मक लिंग शरीराचा छेद करून व परमात्म्याची प्राप्ति करून घेऊन नंतर सर्व साधनांचा त्याग कर ॥ २४ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या एकादशस्कंधांत सत्संगमाहात्म्यादिनिरूपणनामक हा बारावा अध्याय समाप्त झाला ॥ १२ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

आतां ह्या तेराव्या अध्यायामध्यें सत्वगुणाच्या वृद्धीनें ज्ञान उत्पन्न होण्याचा क्रम आणि हंसाच्या इतिहासानें चित्ताचा व गुणांचा परस्पर भेद होण्याचा प्रकार वर्णन केला आहे ॥ १ ॥ पूर्वाध्यायांतीं ज्ञानकुठारानें लिंगशरीराचा छेद करून साधनांचा त्यागकर असें सांगितलें, त्यांत गुणांच्या वृत्तींचा प्रतिबंध असतां ज्ञानाची उत्पत्ति कशी होईल ? अशी शंका आली असतां, गुणवृत्तींच्या निवृत्तीनें ज्ञानप्राप्तीचा प्रकार सांगण्याकरितां श्रीभगवान् ह्मणाला—हे उद्धवा, सत्व, रज आणि तम हे तीन गुण

त्रयोदशेऽथ सत्वस्य वृद्ध्या विद्योदयक्रमः ॥ हंसेतिहासतश्चित्तगुणविश्लेषवर्णनम् ॥ १ ॥ विद्याकुठारेण जीवाशयं विवृश्च्य साधनं त्यजेत्युक्तम् । ननु तत्र तमआदिगुणत्रयवृत्तिप्रतिबंधे सति कथं विद्योत्पत्तिरित्याशंक्य तन्निवृत्त्या विद्योत्पत्तिप्रकारमाह । सत्वमिति सप्तभिः । तत्र यद्यानंदादिवदात्मधर्मा गुणाः स्युस्तर्हि तत्स्वरूपत्वात्तेषामनिवृत्त्या विद्योत्पत्तिर्न स्यान्न त्वेतदस्तीत्याह । बुद्धेः प्रकृतेरेते गुणा नत्वात्मन इति । अतः सत्वेन सत्ववृद्ध्याऽन्यतमौ हन्यात् । रजस्तमोवृत्तीर्जयेदित्यर्थः । सत्वं च सत्यदयादिवृत्तिरूपमुपशमात्मकेन सत्वेनैव हन्यात् ॥ १ ॥ ननु गुणत्रयवृत्तीनां परस्परोपमर्दनरूपत्वात्कथं सत्ववृत्त्यैवेतरवृत्त्यो नियमेन हंतव्यास्तत्राह । सत्वादिति । मद्भक्ति

॥ श्रीभगवानुवाच ॥ सत्वं रजस्तम इति गुणा बुद्धेर्न चात्मनः ॥ सत्वेनान्यतमौ हन्यात्सत्वं सत्वेन चैव हि ॥ १ ॥ सत्वाद्धर्मो भवेद्वृद्धात्पुंसो मद्भक्तिलक्षणः ॥ सात्विकोपासया सत्वं ततो धर्मः प्रवर्तते ॥ २ ॥ धर्मो रजस्तमो हन्यात्सत्ववृद्धिरनुत्तमः ॥ आशु नश्यति तन्मूलो ह्यधर्म उभये हते ॥ ३ ॥ आगमोऽपः प्रजा देशः कालः कर्म च जन्म च ॥ ध्यानं मंत्रोऽथ संस्कारो दशैते गुणहेतवः ॥ ४ ॥

लक्षयति । यो धर्मः स मद्भक्तिरूप एव वा । सत्वमेव कथं वर्धेत तत्राह । सात्विकानां पदार्थानामुपासया सेवया सत्वं वृद्धं भवतीत्यर्थः ॥ २ ॥ स च धर्मो रजस्तमश्च हन्यात् । कुतः । न विद्यते उत्तमो यस्मात्स सर्वोत्तमः । यतः सत्ववृद्धिः सत्वस्य वृद्धिर्यस्मिन्कारणे सः । अतएव तत्कार्यो धर्मप्रतिबंधोऽपि नास्तीत्याह । तस्मिन्नुभयस्मिन्हते तन्मूलः । ते रजस्तमसी रागद्वेषादिना प्रमादालस्यादिना च मूलं यस्य सः ॥ ३ ॥ सात्विकोपासया सत्वं वधत इत्युक्तं तानेव सत्ववृद्धिहेतून् दर्शयितुं सामान्यतो गुणत्रयवृद्धिहेतूनाह । आगमः शास्त्रम् । अपः आपः । क्वचिदागमोऽर्थ इति पाठः ॥ ४ ॥

बुद्धीचेच (प्रकृतीचेच) आहेत आत्म्याचे नाहींत, ह्मणून सत्वगुणाच्या वृद्धीनें रजोगुणतमोगुणांच्या वृत्ती जिंकाव्या आणि सत्यदयादिवृत्तिरूप सत्वगुणाचा उपशमात्मक सत्वगुणानेंच जय करावा हा क्रम शास्त्रसिद्ध आहे ॥ १ ॥ वृद्धिंगत झालेल्या सत्वगुणापासून माझी भक्ती दाखविणारा धर्म उत्पन्न होतो, सत्वगुणच कसा वाढतो असें ह्मणशील तर सात्विक पदार्थांच्या सेवनानें सत्वगुण वाढतो आणि नंतर त्यापासून धर्म प्रवृत्त होतो ॥ २ ॥ आणि मग सत्वगुणानें वाढलेला तो सर्वोत्कृष्ट धर्म, रजोगुणाचा व तमोगुणाचा नाश करितो· त्या दोघांचा नाश झाला ह्मणजे ते दोघे रागद्वेषादिकेंकरून व प्रमादालस्यादिकेंकरून ज्याला कारण आहेत तो अधर्मंहि तत्काल नष्ट होतो ॥ ३ ॥ आतां सत्वगुणाच्या वृद्धीचीं कारणें सांगण्याकरितां प्रथम सामान्यपणें तिन्ही गुणांच्या वृद्धीचीं कारणें सांगतो—

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शास्त्रें, जळ, लोक, देश, काळ, कर्मे, जन्में, ध्यानें, मंत्रें, आणि संस्कार हे दहा पदार्थ, तिन्ही गुणांना वाढविणारे आहेत ॥ ४ ॥ यांमध्यें सात्विकादिकांचा निर्णय सांगतात कीं,—या जगांतील पदार्थांमध्यें शास्त्रवेत्ते लोक ज्याची ज्याची प्रशंसा करितात तो तो सात्विक होय, ज्याची ज्याची निंदा करितात तो तो तामस होय आणि ज्याची ज्याची प्रशंसा किंवा निंदा करीत नाहींत, तर उपेक्षा करितात तो राजस होय ॥ ५ ॥ त्यामध्यें सत्वगुणाच्या वृद्धीकरितां पुरुषानें सात्विक असतील त्याच निवृत्तिशास्त्र, गंगोदक इत्यादिक पदार्थांचें सेवन करावें ह्मणजे त्यापासून भक्तिलक्षण धर्म व त्यापासून आत्मसाक्षात्कार करणारें व स्थूलसूक्ष्मदेहांना कारणभूत अशा गुणांचा निरास

एषु सात्विकादिनिर्णयमाह । एषामेव मध्ये यद्यद्वृद्धाः । शास्त्रज्ञाः प्रचक्षते प्रशंसंति तत्तत्सात्विकम् । यच्च निंदंति तत्तामसम् । यत्तु तैर्वृद्धैरुपेक्षितं न स्तुतं न च निंदितं तद्राजसम् ॥ ५ ॥ सात्विकान्येवेति निवृत्तिशास्त्राण्येव सेवेत न प्रवृत्तिपाखंडशास्त्राणि । तीर्थाप एव न गंधोदकसुराद्याः । प्रजा जनाः निवृत्तान् जनान्न प्रवृत्तदुराचारान् । विविक्तदेशं न रथ्याद्यूतदेशान् । कालं ब्राह्ममुहूर्तादिकं ध्यानादौ न प्रदोषनिशीथादीन् । कर्म च नित्यं न काम्याभिचारादीनि । जन्म च वैष्णवशैवदीक्षालक्षणं न शाक्तक्षुद्रदीक्षारूपम् । ध्यानं श्रीविष्णोर्न कामिनीविद्विषाम् । मंत्रं प्रणवादिकं न काम्यक्षुद्रान् । संस्कारमात्मनः शोधकं न तु केवलं देहगृहादीनाम् । ननु ज्ञानं महावाक्यश्रवणादेवोत्पद्यते

तत्तत्सात्विकमेवैषां यद्यद्वृद्धाः प्रचक्षते ॥ निंदंति तामसं यत्तद्राजसं तदुपेक्षितम् ॥ ५ ॥ सात्विकान्येव सेवेत पुमान्सत्वविवृद्धये ॥
ततो धर्मस्ततो ज्ञानं यावत्स्मृतिरपोहनम् ॥ ६ ॥ वेणुसंघर्षजो वह्निर्दग्ध्वा शाम्यति तद्वनम् ॥ एवं गुणव्यत्ययजो देहः शाम्यति
तत्क्रियः ॥ ७ ॥ उद्धव उवाच ॥ विदंति मर्त्याः प्रायेण विषयान्पदमापदाम् ॥ तथापि भुंजते कृष्ण तत्कथं श्वखराजवत् ॥ ८ ॥

किं तत्र सत्ववृद्ध्या धर्मेण वाऽत आह । यावत् स्मृतिरात्मापारोक्ष्यम् । यावच्च देहद्वयतत्कारणभूतगुणापोहस्तावत्पर्यंतं ज्ञानं भवतीत्यर्थः ॥ ६ ॥ ननु गुणव्यतिकराज्जातो देहः कथं स्वाश्रयभूतान् गुणान्स्वत एवोत्पन्नया विद्ययाऽपोह्य स्वयमप्युपरमेत्तत्राह । वेणूनां संघर्षाज्जातोऽग्निर्यथा स्वत एवोत्पन्नाभिर्ज्वालाभिस्तद्वनं सर्वं दग्ध्वा पश्चात्स्वयं शाम्यति । एवं देहोऽपि तत्क्रियस्तस्याग्नेरिव क्रियाव्यापारो यस्य सः ॥ ७ ॥ ननु नियतेंद्रियतया सात्विकसेवायामियानस्ति पुरुषार्थस्तथाऽपि राजसादीन्विषयान्दुःखमिति जानंतोऽपि कथं सेवंत इति पृच्छति । विदंतीति । पदं स्थानम् । श्वानो यथा भर्त्स्यमाना अपि । खरा यथा पद्भ्यां ताड्यमाना अपि खरीमनुधावंतः । अजा यथा निर्लज्जा

करणारें ज्ञान होतें ॥ ६ ॥ आतां गुणांच्या मिश्रणापासून झालेला जो देह तो, आपल्या आश्रयभूत गुणांचा, स्वतः उत्पन्न झालेल्या ज्ञानानें निरास करून आपणहि कसा उपराम पावेल? असें ह्मणशील तर—जसा वेळूंच्या संघर्षणापासून झालेला अग्नि, स्वतांच उत्पन्न झालेल्या ज्वाळांनीं त्या सर्व वनाला जाळून आपणहि शांत होतो त्याप्रमाणें त्या अग्नीसारखी कृति असलेला व गुणांच्या मिश्रणानें झालेला देहहि, स्वतां उत्पन्न झालेल्या ज्ञानानें आपल्या कारणभूत गुणांचा निरास करून आपणहि शांत होतो ॥ ७ ॥ उद्धव ह्मणाला—हे कृष्णा, जितेंद्रियपणें सात्विक पदार्थ सेवन करण्यांत जर एवढा मोठा पुरुषार्थ आहे आणि जर बहुतेक मनुष्य, राजस व तामस विषयांना दुःखांचें स्थान

१ निवृत्ति, प्रवृत्ति व पाखंड इत्यादिक शास्त्रें, २ गंगाजळ, सुगंधीजळ व मद्य इत्यादिक जळें ३ सत्पुरुष, गृहासक्त व दुराचारी इत्यादिक लोक, ४ एकांत स्थळ, राजमार्ग व द्यूतस्थळ इत्यादिक देश, ५ प्रातःकाळ, प्रदोष व मध्यरात्र इत्यादिक काळ, ६ नित्यनैमित्तिक, काम्य व जारणमारण इत्यादिक कर्में, ७ वैष्णवदीक्षा, शैवदीक्षा, शाक्तदीक्षा व क्षुद्रदीक्षा इत्यादिरूप जन्में, ८ विष्णूचें, स्त्रीपुत्रादिकांचें व शत्रूचें इत्यादिक ध्यानें, ९ प्रणव, काम्य व क्षुद्र इत्यादिक मंत्र, आणि १० आत्मशोधक, देहशोधक व गृहादिशोधक वगैरे संस्कार होत.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असें जाणत आहेत तर तेच मनुष्य, पुन्हां 'जसे श्वान कुत्रीनें भर्त्सना केली असतांहि तिच्या उपभोगाविषयीं लंपट असतात, किंवा जसे गर्दभ पायांनीं ताडण केलें असतांहि गर्दभीच्या मागाहून धांवतात, अथवा जसे बकरे मारण्यात आगले असतांहि निर्लज्जपणें बकरीच्या मागाहून धांवतात त्याप्रमाणें विषयांच्या उपभोगाविषयीं लंपट रहातात हें कसें ? ॥ ८ ॥ श्रीभगवान् ह्मणाला–हे उद्धवा, विचारशून्य असलेल्या पुरुषाला प्रथम देहादिकांचेठिकाणीं 'मी आहें' अशी बुद्धि पूर्णरीतीनें उत्पन्न होत्ये. नंतर त्याच्या सत्वगुणप्रधान असलेल्याहि मनाला दुःखरूपी रजोगुण व्यापून टाकितो ॥ ९ ॥ मग रजोगुणानें युक्त झालेल्या त्या मनाचा 'हेंच चांगलें भोग्य आहे' असा भोग्यताविषयक संकल्प उत्पन्न होतो. नंतर, काय हें स्वरूप ! काय हा भाव ! काय हें माधुर्य ! अशा गुणांच्या चिंतनानें त्या दुर्बुद्धि पुरुषाला दुःसह कामवासना उत्पन्न होत्ये ॥ १० ॥ नंतर रजोगुणाच्या वेगानें मोहित होऊन कामपरवश झालेला तो अजितेंद्रिय पुरुष, विषयभोगाविषयीं केलेलीं कर्में परिणामीं

हंतुमानीता अपि तद्वत् ॥ ८ ॥ मिथ्याऽभिनिवेशेन भुंजत इति सहेतुकमाह । अहमिति त्रिभिः । प्रमत्तस्य विवेकशून्यस्य देहादावहमिति मिथ्याबुद्धिर्हृदि यथावदुत्सर्पति । ततोऽहंबुद्धेश्च वैकारिकं सत्वप्रधानमपि मनःप्रति घोरं दुःखात्मकं रज उत्सर्पति । मनो व्याप्नोतीत्यर्थः ॥ ९ ॥ इदमेवमिदमेवं भोग्यमिति सविकल्पः संकल्पः स्यात्ततश्च अहो रूपमहो भाव इति गुणाभिध्यानाद्दुर्धरः कामः स्यात् ॥ १० ॥ ततो विषयान् भोक्तुं कर्माणि करोति ॥ ११ ॥ एवं चेन्न कस्यापि दुःखनिवृत्तिः स्यादित्याशंक्याह ।

श्रीभगवानुवाच ॥ अहमित्यन्यथाबुद्धिः प्रमत्तस्य यथा हृदि ॥ उत्सर्पति रजो घोरं ततो वैकारिकं मनः ॥ ९ ॥ रजोयुक्तस्य मनसः संकल्पः सविकल्पकः ॥ ततः कामो गुणध्यानाद्दुःसहः स्याद्धि दुर्मतेः ॥ १० ॥ करोति कामवशगः कर्माण्यविजितेंद्रियः ॥ दुःखोदर्काणि संपश्यन्रजोवेगविमोहितः ॥ ११ ॥ रजस्तमोभ्यां यदपि विद्वान्विक्षिप्तधीः पुनः ॥ अतंद्रितो मनो युंजन्दोषदृष्टिर्न सज्जते ॥ १२ ॥ अप्रमत्तोऽनुयुंजीत मनो मय्यर्पयन् शनैः ॥ अनिर्विण्णो यथाकालं जितश्वासो जितासनः ॥ १३ ॥ एतावान्योग आदिष्टो मच्छिष्यैः सनकादिभिः ॥ सर्वतो मन आकृष्य मय्यद्धावेश्यते यथा ॥ १४ ॥

यदपि यद्यपि रजस्तमोभ्यां विक्षिप्तधीर्मूढधीश्च तथापि विद्वान्विवेकी पुनर्मनो निरुंधन्न सज्जते ॥ १२ ॥ विषयदोषदृष्ट्याऽपि मनोनिरोधाशक्तौ सुखं तन्निरोधोपायमाह । अप्रमत्त इति । अनिर्विण्णोऽनलसः यथाकालं त्रिषवणम् । मयि परमानंदरूपेऽर्पयन्समादध्यात् ॥ १३ ॥ विषयैः संग्रथितस्य मनसस्तद्वियोगेनेश्वरनिष्ठत्वमसंभावितं मन्यमानंप्रति तन्निरूपणायेतिहासमुपक्षिपति । एतावानिति । यथा यथावन्मय्यावेश्य ते एतावानित्यर्थः ॥ १४ ॥

दुःखरूप आहेत असें जाणत असूनहि तींच पुन्हां करितो ॥ ११ ॥ असें जर आहे तर कोणाच्याहि दुःखांची निवृत्ति होणार नाहीं असें ह्मणशील तर– जो विद्वान् (देहादिकांहून आत्मा निराळा आहे असें जाणणारा) आहे, तो पुरुष, जरी कदाचित् रजोगुणानें व तमोगुणानें बुद्धीला विपर्यास होऊन विषयासक्त झाला तथापि तो पुन्हां जर आलस्यरहित होत्साता विषयांचेठिकाणीं दोषदृष्टि ठेवून प्रयत्नानें मनाचा निरोध करील तर विषयांचेठिकाणीं आसक्त होणार नाहीं ॥ १२ ॥ आतां मनाच्या निरोधाचा सुलभ उपाय सांगतो–मन दुर्धर आहे ह्मणून त्याच्या जयाविषयीं विलंब लागला तरी आळस न करितां सावधपणें दररोज दिवसांतून तीनवेळां आसनाचा जय व प्राणायामांनीं श्वासवायूचा जय करणाऱ्या योग्यानें, आपलें मन हळूहळू माझेठिकाणीं लावून स्थिर करावें ॥ १३ ॥ आतां विषयांत मिसळून गेलेलें मन, विषयांपासून निराळें होऊन तें ईश्वराकडे लागणें असंभावित आहे असें मानणाऱ्या उद्धवाला, त्याचें निरूपण करण्याकरितां इतिहास सांगतो–हे उद्धवा, सर्वविषयांपासून

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आकर्षण केलेलें मन, जसें साक्षात् माझ्या स्वरूपीं परिपूर्णरीतीनें स्थिर होईल असा योग माझ्या सनकादिक शिष्यांनीं सांगितला आहे ॥ १४ ॥ उद्धव ह्मणाला—हे केशवा, तुला अतिवृद्ध अशा सनकादिक ऋषींना, या अवतारीं शिष्य करून घेण्याचें संभवत नाहीं यास्तव तूं त्या सनकादिक ऋषींना ज्याकाळीं ज्यारूपानें योगाचा उपदेश केलास तो काळ व तेंरूप जाणण्याची मी इच्छा करितों तर तें मला सांग ॥ १५ ॥ श्रीभगवान् ह्मणाला—हे उद्धवा, ब्रह्मदेवाचे मानसिक पुत्र जे सनकादिक ऋषि त्यांनीं, एकेवेळीं, आपल्या पित्याला, योगाच्या पराकाष्ठेच्या सूक्ष्मगतीविषयीं प्रश्न केला ॥ १६ ॥ सनकादिक ह्मणाले—हे समर्था ब्रह्मदेवा, चित्त हें स्वभावानेंच प्रीतियुक्त असल्यामुळें विषयांमध्यें प्रविष्ट होऊन तेथेंच आसक्त होतें आणि ते (अनुभव घेतलेले) विषयही वासनारूपानें चित्तामध्यें प्रवेश करितात. तेव्हां संसार-

मच्छिष्यैरित्युक्ते तेषामतिज्यायसामनेन रूपेण निरूपणासंभवात्पृच्छति। यदेति । तं कालं तदेतद्रूपं च वेदितुमिच्छामि तत्कथयेति ॥ १५ ॥ मानसाः पुत्राः सूक्ष्मां दुर्जयाम् । ऐकांतिकीं गतिं परां काष्ठाम् ॥ १६ ॥ तदेवाह । गुणेष्विति । विषयेषु स्वभावतो रागादिवशाच्चेतः प्रविशति ते चानुभूता विषया वासनारूपेण चेतसि प्रविशंति । अतितितीर्षोर्विषयानतिक्रमितुमिच्छोः ॥ १७ ॥ एवमिति । महान्देवोऽपि स्वयंभूरपि भूतानां स्रष्टाऽपि ध्यायमानो विचारयन्नपि प्रश्नस्य बीजं यदज्ञानादयं प्रश्नस्तन्नाविंदत् । यतः कर्मवि-

उद्धव उवाच ॥ यदा त्वं सनकादिभ्यो येन रूपेण केशव ॥ योगमादिष्टवानेतद्रूपमिच्छामि वेदितुम् ॥ १५ ॥ श्रीभगवानुवाच ॥ पुत्रा हिरण्यगर्भस्य मानसाः सनकादयः ॥ पप्रच्छुः पितरं सूक्ष्मां योगस्यैकांतिकीं गतिम् ॥ १६ ॥ सनकादय ऊचुः ॥ गुणेष्वाविशते चेतो गुणाश्चेतसि च प्रभो ॥ कथमन्योन्यसंत्यागो मुमुक्षोरतितितीर्षोः ॥ १७ ॥ श्रीभगवानुवाच ॥ एवं पृष्टो महादेवः स्वयंभूर्भूतभावनः ॥ ध्यायमानः प्रश्नबीजं नाभ्यपद्यत कर्मधीः ॥ १८ ॥ स मामचिंतयद्देवः प्रश्नपारतितीर्षया ॥ तस्याहं हंसरूपेण सकाशमगमं तदा ॥ १९ ॥ दृष्ट्वा मां त उपव्रज्य कृत्वा पादाभिवंदनम् ॥ ब्रह्माणमग्रतः कृत्वा पप्रच्छुः को भवानिति ॥ २० ॥ इत्यहं मुनिभिः पृष्टस्तत्त्वजिज्ञासुभिस्तदा ॥ यदवोचमहं तेभ्यस्तदुद्धव निबोध मे ॥ २१ ॥

क्षिप्तधीः ॥ १८ ॥ प्रश्नस्य पारमुत्तरमभिप्रायो वा तस्य तितीर्षया जिज्ञासया । हंसरूपेणेति । यथा हंसो नीरं क्षीरं च पृथक्कर्तुं शक्त एवमहं गुणांश्चेतश्चेति द्योतयितुं हंसरूपेण गतोऽस्मीति ॥ १९ ॥ २० ॥ इत्यहं मुनिभिः पृष्ट इति पृथग्वाक्यम् । यदवोचमिति च पृथक् । अतोऽस्मच्छब्दावृत्तिरदोषः । तेभ्यो यदवोचं तन्मे वचनं निबोध ॥ २१ ॥

समुद्रापासून तरून जाण्याची इच्छा करणाऱ्या मुमुक्षूला त्या विषयांचा व चित्ताचा परस्पर वियोग कसा होतो? तें सांग ॥ १७ ॥ श्रीभगवान् ह्मणाला—हे उद्धवा, याप्रमाणें प्रश्न केलेला तो देवाधिपति जगत्स्रष्टा ब्रह्मदेव, विचार करूं लागला परंतु त्यानें प्रश्नाचें बीज 'अज्ञानानें हा प्रश्न आहे असें' जाणलें नाहीं. कारण, त्याची बुद्धि त्यावेळीं दुसऱ्या सृष्ट्यादिक कर्मांच्या योगानें व्यग्र झाली होती ॥ १८ ॥ तेव्हां त्या ब्रह्मदेवानें, त्या प्रश्नाचा अभिप्राय व उत्तर जाणण्याच्या इच्छेनें माझें ध्यान केलें. तेव्हां मी, जसा हंसपक्षी पाणी व दूध यांचें पृथक्करण करण्यास समर्थ असतो तसा गुण व चित्त यांचें पृथक्करण करण्यास समर्थ आहें असें दर्शविण्याकरितां ॥ ५० ॥
हंसरूपानें त्याच्या समीपभागीं गेलों ॥ १९ ॥ तेव्हां मला पाहून ते सनकादिक ऋषि ब्रह्मदेवाला पुढें करून माझ्या जवळ आले आणि माझ्या चरणांना वंदन करून, त्यांनीं मला, तूं कोण आहेस असा प्रश्न केला ॥ २० ॥ हे उद्धवा, याप्रमाणें तत्त्व जाणण्याची इच्छा करणाऱ्या त्या ऋषींनीं मला प्रश्न केला असतां, त्यावेळीं जें मी

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्यांस सांगितलें आहे तें तूं मजपासून श्रवण कर ॥ २१ ॥ देहादिकांहून निराळ्या आत्म्याचें ज्ञान झालें असतां त्या आत्म्याचेठिकाणीं मनाची एकाग्रता राखणाऱ्या पुरुषाला, विषयासक्ति होण्याचा असंभव असल्यामुळें आपोआपच विषयांचा व चित्ताचा निरनिराळेपणा होतो, असें सांगण्याकरितां प्रश्नखंडनाच्या मिषानेंच प्रथम आत्मानात्मविवेक सांगतो— हे ब्राह्मण हो, हा तुमचा प्रश्न काय आत्मविषयक आहे ? किंवा आत्मोपाधिरूप भूतसमुदायविषयक आहे ? जर आत्मविषयक आहे तर त्या परमार्थभूत आत्मवस्तूला नानात्व नसल्यामुळें तुह्मी केलेला ' तूं कोण आहेस असा ' अनेक पदार्थांतून एकाचा निश्चय करण्याचा प्रश्न कसा घडेल ? आणि उत्तर देणाऱ्या मला तरी

देहादिविविक्तात्मज्ञाने सति तन्निष्ठस्य रागाद्यसंभवात्स्वयमेव विषयचेतसोर्विश्लेषो भवतीति वक्तुं प्रश्नखंडनमिषेणैव तावदात्मानात्मविवेकमाह । वस्तुन इति त्रिभिः । किमात्मनोऽयं प्रश्नस्तदुपाधेर्भूतसंघस्य वा । यद्यात्मनस्तर्हि तस्य वस्तुनः परमार्थरूपस्यानानात्वे सति हे विप्रा वो युष्माभिः कृतः प्रश्न ईदृशो बहुषु निर्धारणरूपः कथं घटेत । वक्तुरुत्तरदातुर्वा मे मम क आश्रयः । अविशेषे आत्मनि कं जातिगुणादिविशेषमाश्रित्योत्तरं वक्ष्यामीत्यर्थः ॥ २२ ॥ भूतसंघविषयत्वेऽप्ययं वः प्रश्नो वाचारंभो वाङ्मात्रेणारब्धः । यतोऽनर्थकः । कुतः भूतेषु देवमनुष्यादिदेहेषु पंचभूतात्मकेष्वतः समानेष्वभिन्नेषु । पुनश्च वस्तुतः परमकारणात्मना अभिन्नेषु वाचारंभणं विकारो नामधेयं मृत्तिकेत्येवसत्यमिति श्रुतेः ॥ २३ ॥ तत्र पंचात्मकत्वं प्रत्यक्षादिसिद्धमेवेति परमकारणाभेदमेवोपपादयति । मनसेति । मनआदिभिर्यद्गृह्यते तत्तदहमेवेत्यर्थः अंजसा तत्त्वविचारेण । एतेनैव सर्वात्मकोऽह-

वस्तुनो यद्यनानात्वमात्मनः प्रश्न ईदृशः ॥ कथं घटेत वो विप्रा वक्तुर्वा मे क आश्रयः ॥ २२ ॥ पंचात्मकेषु भूतेषु समानेषु च वस्तुतः ॥ को भवानिति वः प्रश्नो वाचारंभो ह्यनर्थकः ॥ २३ ॥ मनसा वचसा दृष्ट्या गृह्यतेऽन्यैरपींद्रियैः ॥ अहमेव न मत्तोऽन्यदिति बुद्ध्यध्वमंजसा ॥ २४ ॥ गुणेष्वाविशते चेतो गुणाश्चेतसि च प्रजाः ॥ जीवस्य देह उभयं गुणाश्चेतो मदात्मनः ॥ २५ ॥

मित्यंजसाऽप्युत्तरमुक्तं भवति ॥ २४ ॥ एवं प्रश्नखंडनमिषेणैवात्मस्वरूपं सामान्यतो निरूप्य ब्रह्मणोऽपि दुष्परिहरं यत्पृष्टं तत्रोत्तरमाह । गुणेष्वित्यादिना यावदध्यायसमाप्ति । अयमभिप्रायः । यदि कर्तृत्वभोक्तृत्वादिरूपतया विषयैः संग्रथितं चित्तं बुद्ध्यादिशब्दवाच्यमेव जीवस्य स्वरूपं भवेत्ततस्तद्वियोगो न घटेत । तस्य तु स्वरूपमहं ब्रह्मैव । चित्ताध्यासेन तु तत्स्वभावतया विषयैः संग्रथितम् । अतः स्वस्य ब्रह्मत्वभावनया विषयाणां च मिथ्यात्वानुसंधानेन सर्वतो निर्विद्य भगवंतं भजतो भवत्येव परिपूर्णस्वरूपावस्थानमिति । हे प्रजाः पुत्रकाः सत्यं गुणेषु चते आविशति गुणाश्च चेतसि एवं गुणाश्चेतश्चोभयं ग्रथितं मदात्मनो ब्रह्मरूपस्य जीवस्य देहोऽध्यस्त उपाधिर्न तु स्वरूपम् ॥ २५ ॥

कोणाचा आश्रय आहे ? ह्मणजे आत्म्यामध्यें कांहीं विशेष नसतां कोणत्या जातिगुणादिक विशेषांचा आश्रय करून मी उत्तर द्यावें ? ॥ २२ ॥ आतां हा प्रश्न भूतसमुदायविषयक असेल तरी देवमनुष्यादिक सर्व देह पंचमहाभूतात्मक असल्यामुळें वस्तुतः ते (परमकारणरूपानें) सारखे असतां, तूं कोण आहेस असा जो तुमचा प्रश्न आहे तो केवळ वाणीनेंमात्र उच्चारलेला असून निरर्थक आहे ॥ २३ ॥ त्यांत सर्व देहांचें पंचमहाभूतात्मकत्व तर प्रत्यक्ष सिद्धच आहे ह्मणून आतां त्यांचा परमकारणरूपी आत्म्याशीं अभेद सांगतो— मन, वचन, दृष्टि व इतरहि सर्व इंद्रियें ज्यावें ह्मणून ग्रहण करतात तें सर्वहि मीच आहें माझ्याहून दुसरें कांहीं नाहीं, असें तुह्मी तत्त्वविचारानें जाणा. या वाक्यानें ' तूं कोण आहेस ' या प्रश्नाचें ' मी सर्वात्मक आहें ' असें उत्तरहि सांगितल्यासारखें झालें ॥ २४ ॥ याप्रमाणें प्रश्नखंडनमिषानेंच आपलें स्वरूप, सामान्यपणें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

निरूपण करून, आतां, ब्रह्मदेवालाहि उत्तर सांगण्यास अशक्य जें विचारिलें होतें त्याचें उत्तर अध्याय संपेपर्यंत सांगतो. हे पुत्रहो, विषयांमध्यें चित्त प्रवेश करितें आणि विषय चित्तामध्यें प्रविष्ट होतात हें खरें आहे, तथापि ते विषय व चित्त हीं दोन्हींहि एकमेकांत मिसळून त्यांचा एकरूपी आकार झाला असतां तो, मत्स्वरूपी (ब्रह्मरूपी) जीवाचा देह (अध्यासानें आपला असा मानलेला उपाधि होय) वास्तविक स्वरूप नव्हे ॥ २५ ॥ ह्मणून वारंवार विषयसेवनाच्या संस्कारानें त्या विषयांमध्यें प्रवेश करणाऱ्या चित्ताचा आणि वासनारूपानें चित्तामध्यें प्रवेश करणाऱ्या विषयांचा, जीवानें, आपण ब्रह्मरूप होऊन त्याग करावा ॥ २६ ॥ आतां जाग्रदादिक अवस्थायुक्त असलेल्या जीवाला ब्रह्मपणा कसा प्राप्त होईल ? अशी शंका प्राप्त झाली असतां ह्मणतो कीं, — जाग्रत्, स्वप्न आणि सुषुप्ति ह्या तिन्ही अवस्था बुद्धीच्याच आहेत जीवाच्या

तस्मादभीक्ष्णं पुनः पुनर्गुणसेवया तत्संस्कारेण गुणेष्वाविशच्चित्तं ते च पुनर्वासनारूपेण चित्ते प्रकर्षेण भवंतीति तथा ते गुणाश्चेतश्च एवं यदुभयं तन्मद्रूपः संस्त्यजेत् ॥ २६ ॥ ननु जाग्रदाद्यवस्थावतः कुतः कूटस्थत्वरूपता तत्राह । जाग्रज्जागरः स्वप्नः सुषुप्तं चेति बुद्धेरेता वृत्तयो न तु जीवस्य ताश्च न स्वाभाविक्यः किंतु । सत्वाज्जागरणं विद्याद्रजसा स्वप्नमादिशेत् ॥ प्रस्वापं तमसा जंतोस्तुरीयं त्रिषु संततमिति वक्ष्यमाणक्रमेण गुणत एव । जीवस्तु विलक्षणस्तदवस्थारहित एव विनिश्चितः । कुतः । तासां साक्षित्वेन ॥ २७ ॥

गुणेषु चाविशच्चित्तमभीक्ष्णं गुणसेवया ॥ गुणाश्च चित्तप्रभवा मद्रूप उभयं त्यजेत् ॥ २६ ॥ जाग्रत्स्वप्नः सुषुप्तं च गुणतो बुद्धि-वृत्तयः ॥ तासां विलक्षणो जीवः साक्षित्वेन विनिश्चितः ॥ २७॥ यर्हि संसृतिबंधोऽयमात्मनो गुणवृत्तिदः॥ मयि तुर्ये स्थितो जह्या-त्त्यागस्तद्गुणचेतसाम् ॥ २८ ॥ अहंकारकृतं बंधमात्मनोऽर्थविपर्ययम् ॥ विद्वान्निर्विद्य संसारचिंतां तुर्ये स्थितस्त्यजेत् ॥ २९ ॥

ननु तर्हि कथमहं जागर्मीत्यादिप्रतीतिस्तत्राह । यर्हि यस्मात्सम्यक् सृतिः सरणमनयेति संसृतिर्बुद्धिस्तया बंधोऽयमात्मनो गुणवृत्तीर्ददाति तस्मान्मयि तुर्ये स्थितः सन्निमं संसृतिबंधं जह्यात् । तत्तदा गुणचेतसां गुणानां चेतसश्चान्योन्यं त्यागो भवति ॥ २८ ॥ कथं संसृत्या बंधः कथं च तं जह्यात्तदाह । अहंकारेण कृतं बंधमात्मनोर्थेऽविपर्ययमानं-दाद्यावरणेनानर्थहेतुं विद्वान् जानन्सन्निर्विंद्य दुःखमेतदिति ज्ञात्वा तुर्ये स्थितो भूत्वा संसारचिंतां संसारो बुद्धिस्तस्मिंश्चिंतामभिमानं तत्कृतां भोगचिंतां च त्यजेदिति ॥ २९ ॥

नाहींत. त्यातरी स्वाभाविक नाहींत तर अनुक्रमानें सत्व, रज आणि तम या तीन गुणांपासून झालेल्या आहेत. जीवतर त्या वृत्तींच्या साक्षित्वानें त्यांच्या अवस्थांहून निराळाच निश्चित आहे ॥ २७ ॥ ज्याअर्थीं बुद्धीनें केलेला हा अध्यास आत्म्याला ' मी जागा आहें, मी निजलों आहें इत्यादिक ' अवस्थारूप बंध करणारा झाला आहे त्याअर्थीं अवस्थात्रयरहित साक्षिरूपी मज चतुर्थाचेठिकाणीं राहून, जीवानें या बंधाचा त्याग करावा. ह्मणजे आपोआप विषयांचा व चित्ताचा परस्पर त्याग होतो ॥ २८ ॥ आतां बुद्धीनें बंध कसा केला आहे ? व त्याचा त्याग कसा करावा ? तें सांगतो—अहंकारानें केलेला बंध आपल्या परमानंदादिक धर्मांचें आवरण करून अनर्थाला कारण झाला आहे असें जीवानें जाणून, विषयांपासून विरक्त होऊन, तिन्ही अवस्थांहून निराळ्या चवथ्या माझेठिकाणीं ऐक्य रूपानें राहून, संसाराला कारणभूत असलेल्या

---

१ याचा अभिप्राय असा आहे कीं, कर्तृत्वभोक्तृत्वादिस्वरूपानें विषयांत गुंतून गेलेलें चित्तच बुद्धि अहंकार इत्यादि नांवांनीं उच्चारिलें जातें. तेंच जर जीवाचें खरें स्वरूप असतें तर त्याचा व विषयांचा वियोग घडला नसता. परंतु जीवाचें खरें स्वरूप मी ब्रह्म आहें. त्याला चित्ताच्या अध्यासानें चित्ताचा स्वभाव आल्यामुळें विषयांबरोबर गुतागूत झाली आहे. ह्मणून आपल्या ब्रह्मभावनेनें व विषयांच्या मिथ्यात्वानुसंधानानें सर्व विषयांपासून विरक्त होऊन भगवंताचें सेवन करणाऱ्या जीवाची परिपूर्णस्वरूपानें स्थिति होत्ये.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

देहाभिमानाचा व त्यानें केलेल्या भोगचिंतेचा त्याग करावा ॥ २९ ॥ जोंपर्यंत पुरुषाची भेदबुद्धि गुरूपदिष्टशास्त्राच्या अभ्यासापासून झालेल्या युक्तींनीं निवृत्त होत नाहीं तोंपर्यंत, जसा एखादा मनुष्य स्वप्नामध्यें जाग्रदवस्थेला पाहतो परंतु तें स्वप्नच होय त्याप्रमाणें तो अज्ञानी पुरुष, जागत असतांहि (सांसारिक कर्मांमध्यें हुशारीनें वागत असतांहि) स्वप्न पाहणाऱ्यासारखा समजावा. कारण, त्याला यथार्थज्ञान झालेलें नसतें ॥ ३० ॥ आतां वेदानें निरूपण केलेली वर्णांची आश्रमाची व तत्संबंधी कर्मादिकांची भेददृष्टि कशी निवृत्त होईल ? असें ह्मणाल तर—आत्म्याहून निराळ्या देहादिक पदार्थांना मिथ्यात्व असल्यामुळें त्यांनीं केलेला वर्णाश्रमादिक भेद, स्वर्गादिक फळें व त्यांना देणारीं कर्में हीं सर्व खोटीं आहेत, ह्मणजे आत्म्याहून निराळीं मुळींच नाहींत. ज्याप्रमाणें स्वप्न पाहणाऱ्या जीवाला, स्वप्नांतील देहादिक मिथ्या असल्यामुळें त्यांचे भेद, कर्में व फळें मिथ्या असतात त्याप्रमाणें आत्म्याचेहि वर्णाश्रमादिक सर्व प्रकार मिथ्या आहेत. एतावता अज्ञानी पुरुषांकरितांच वेद आहे ज्ञान्याक-

---

यावदेव न त्यजेत्तावत्तस्य कर्मज्ञानादि सर्वं व्यर्थमित्याह । यावदिति । यद्यपि जागर्ति कर्मादिषु तथापि स्वपन्स्वप्नान्पश्यन्निव भवति । यतोऽज्ञः असम्यग्दर्शी । अज्ञजागरस्य स्वप्नत्वे दृष्टांतः । स्वप्न इति ॥ ३० ॥ ननु कथं वेदप्रमितवर्णाश्रमकर्मादिनानाधीर्निवर्तेत तत्राह । असत्त्वादिति । भावानां देहादीनां तत्कृता भिदा वर्णाश्रमादिरूपा गतयः स्वर्गादिफलानि हेतवः कर्माणि चास्यात्मनो मृषा । अविद्यावद्विषयो वेद इति भावः ॥ ३१ ॥ युक्तिभिरित्युक्तं ता एव युक्तीराह । य इति । अर्थान्स्थूलान्देहादीन्समस्तकरणै-

यावन्नानार्थधीः पुंसो न निवर्तेत युक्तिभिः ॥ जागर्त्यपि स्वपन्नज्ञः स्वप्ने जागरणं यथा ॥ ३० ॥ असत्त्वादात्मनोऽन्येषां भावानां तत्कृता भिदा ॥ गतयो हेतवश्चास्य मृषा स्वप्नदृशो यथा ॥ ३१ ॥ यो जागरे बहिरनुक्षणधर्मिणोऽर्थान्भुंक्ते समस्तकरणैर्हृदि तत्सदृक्षान् ॥ स्वप्ने सुषुप्त उपसंहरते स एकः स्मृत्यन्वयात्त्रिगुणवृत्तिदृगिंद्रियेशः ॥ ३२ ॥

श्चक्षुरादिभिर्भुंक्ते । कथंभूतान् । अनुक्षणधर्मिणः क्षणिकबाल्यतारुण्यादिधर्मवतो यश्च स्वप्ने हृदि जागरदृष्टसदृशान्वासनामयान्भुंक्ते । यश्च सुषुप्ते तान् सर्वानुपसंहरति स एकः कुतः त्रिगुणवृत्तिदृगवस्थात्रयद्रष्टा । ननु जाग्रदवस्थां सर्वेंद्रियाणि पश्यंति स्वप्नं मनः सुषुप्तिं तत्संस्कारशेषा बुद्धिः कथमात्मा तद्द्रष्टा तत्राह । इंद्रियेशः । ननु इंद्रियेशा अपि विश्वतैजसप्राज्ञा भिन्नाः न । कुतः स्मृत्या प्रतिसंधानेन सर्वावस्थास्वन्वयात् । यः स्वप्नानद्राक्षं यश्च तदनंतरं न किंचिदवेदिषं स एवैतर्हि जागर्मीत्युपाधिभेदेन विश्वादिव्यवहार इति भावः । एतेन बाल्युवाद्यवस्थास्वपि प्रतिसंधानेनात्मैक्यं द्रष्टव्यम् ॥ ३२ ॥

रितां नाहीं ॥ ३१ ॥ आतां भेददृष्टि निवृत्त करणाऱ्या युक्ति सांगतो—जो (आत्मा), जाग्रदवस्थेमध्यें ज्यांची बाल्यतारुण्यादिक स्थिति क्षणोक्षणीं बदलत असत्ये ते बाहेरचे स्थूलदेहादिक सर्व पदार्थ चक्षुरादिक सर्व इंद्रियांनीं सेवन करितो, जो स्वप्नावस्थेमध्यें जाग्रदवस्थेंत पाहिलेल्या पदार्थांसारखेच क्षणोक्षणीं नाश पावणारे, हृदयामध्यें उत्पन्न झालेले वासनामय पदार्थ सेवन करितो, आणि जो सुषुप्ति अवस्थेमध्यें त्या सर्व विषयांचा उपसंहार करितो तो तिन्हीं अवस्थांचा द्रष्टा एक आहे. आतां जरी जाग्रदवस्थेला इंद्रियें पाहतात, स्वप्नावस्थेला मन पाहतें आणि सुषुप्ति अवस्थेला जाग्रत्स्वप्नावस्थांतील संस्कार शेष राहिलेली बुद्धि पाहत्ये, असें समजण्यांत येतें, तथापि त्या इंद्रियांचा, मनाचा व बुद्धीचा द्रष्टा तो आत्माच आहे. आतां जाग्रदादिक अवस्थांचे द्रष्टे विश्व, तैजस व प्राज्ञ हे निरनिराळे सांगितलेले आहेत असें कोणी ह्मणेल तर तसें नाहीं. कारण, ज्यानें स्वप्नें पाहिलीं व ज्यानें नंतर (सुषुप्तीमध्यें) काहींच जाणिलें नाहीं तोच मी आतां जाग्रत आहें अशा स्मृतीचा तिन्हीं अवस्थांमध्यें अन्वय

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असल्यामुळें उपाधिभेदानें विश्वादिक नांवें धारण करणारा तो आत्मा एकच आहे. याप्रमाणें बाल्यतारुण्यादिक अवस्थांमध्येंहि आत्म्याचें ऐक्य जाणावें ॥ ३२ ॥ याप्रकारें विचार करून, गुणांपासून ज्या मनाच्या जाग्रदादिक तीन अवस्था झाल्या आहेत त्या माझ्या अंशभूत जीवाचेठिकाणीं माझ्या अविद्येनें केलेल्या आहेत, त्या वास्तविक नाहींत. अशा आत्मरूप अर्थाचा निश्चय करणाऱ्या तुह्मी, अनुमानानें, साधूंच्या उपदेशानें व श्रुतींनीं तीक्ष्ण झालेल्या ज्ञानखड्गानें, 'आत्मा, देहाहून भिन्न आहे किंवा अभिन्न आहे इत्यादिक' संशयांचें अधिष्ठान अशा अहंकाराचें छेदन करून, हृदयामध्येंच असणाऱ्या माझें सेवन करा ॥ ३३ ॥ आतां अनुमानादिक दर्शवितो–हें जग, भ्रांतिमात्र आहे असें अनुमान करावें. कारण, हें स्वप्नासारखें मनोविलासरूप, दृश्य व नाशिवंत आहे, तसेंच अलातचक्रासारखें अतिचंचळ आहे. आतां भ्रांतितरी निर्वि-

ततः किमत आह । एवमिति । गुणतो या एता मनसस्त्र्यवस्थास्ता मदविद्यया मयि कृता न तत्त्वतः संतीति निश्चित आत्मरूपोऽर्थो यैस्ते यूयमखिलसंशयानामाधिं आधीयंतेऽस्मिन्नित्याधिरहंकारस्तं संछिद्य हार्दं हृदि स्थितं मां भजत । केन छित्वा तदाह । अनुमानैः सदुक्तिभिः सतामुपदेशैः श्रुतिभिश्च । तीक्ष्णेन ज्ञानखड्गेन ॥ ३३ ॥ अनुमानादि दर्शयति । ईक्षेतेति । इदं जगद्विभ्रममीक्षेत । तत्र हेतवः । मनोविजृंभितत्वात् दृष्टत्वाद्विनाशित्वाच्च स्वप्नवत् । अतिचंचलत्वाच्चालातचक्रवत् । ननु भ्रमोऽपि निर्विषयः कथं स्यात्तत्राह । विज्ञानमिति निगमनम् । तस्मात्त्रिधा योऽयं गुणपरिणामकृतो विकल्पो भेदः स मायेति ॥ ३४ ॥ तस्मात्ततो दृश्याद्दृष्टिं प्रतिनिवर्त्य निजसुखानुभवो भवेत् ।

एवं विमृश्य गुणतो मनसस्त्र्यवस्था मन्मायया मयि कृता इति निश्चितार्थाः ॥ संछिद्य हार्दमनुमानसदुक्तितीक्ष्णज्ञानासिना भजत
माऽखिलसंशयाधिम् ॥ ३३ ॥ ईक्षेत विभ्रममिदं मनसो विलासं दृष्टं विनष्टमतिलोलमलातचक्रम् ॥ विज्ञानमेकमुरुधेव विभाति
माया स्वप्नस्त्रिधा गुणविसर्गकृतो विकल्पः ॥ ३४ ॥ दृष्टिं ततः प्रतिनिवर्त्य निवृत्ततृष्णस्तूष्णीं भवेन्निजसुखानुभवो निरीहः ॥
संदृश्यते क्व च यदीदमवस्तुबुद्ध्या त्यक्तं भ्रमाय न भवेत्स्मृतिरानिपातात् ॥ ३५ ॥ देहं च नश्वरमवस्थितमुत्थितं वा सिद्धो न
पश्यति यतोऽध्यगमत्स्वरूपम् ॥ दैवादपेतमुत दैववशादुपेतं वासो यथा परिकृतं मदिरामदांधः ॥ ३६ ॥

तन्नैश्चल्यार्थं च निवृत्ततृष्णस्तूष्णीं निरीहश्च भवेत् । मनोवाक्कायव्यापाररहित इत्यर्थः । ननु देहवतः सर्वथा द्वैतदृष्टिप्रतिनिवर्तनायोगात्पुनः संसारः स्यादेव तत्राह । संदृश्यत इति । क्वचिदावश्यकाहारादिषु यद्यपीदं संदृश्यते तथापि पूर्वमवस्तुबुद्ध्या यत् त्यक्तं तत्पुनर्मोहाय न भवेदेव । किंतु देहपातपर्यंतं स्मृतिरिव स्मृतिः संस्कारमात्रेणावभासो भवेदित्यर्थः ॥ ३५ ॥ एतदेवोपपादयति । देहमिति । आसनादुत्थितमुत्थाय तत्रैव स्थितं ततः क्वचिदपेतं निर्गतं पुनस्तत्रैवोपेतं वा देहमपि नानुसंधत्ते कुतोऽन्यत् । यतो येन देहेन

ल्पक कशी पडेल ? अशी शंका आलीअसतां सांगतो कीं, भ्रांतीचें अधिष्ठान जें एक ब्रह्म, तेंच भ्रांतीच्या वेळीं अनेकप्रकारें भासत असतें ह्मणून गुणांच्या परिणामानें केलेला जो हा देहेंद्रियांतःकरणरूप तीनप्रकारचा भेद आहे, ती केवळ माया होय ॥ ३४ ॥ ह्मणून त्या दृश्य (देहादिक) प्रपंचावर असलेल्या अभिमानाचा त्याग करून, प्राण्यानें आपल्या स्वरूपसुखाचा अनुभव घ्यावा व त्या स्वरूपसुखाच्या निश्चळतेकरितां सर्व इच्छा व दैहिक व्यापार सोडून द्यावेत. आतां देहधारी पुरुषाला सर्वथा द्वैतदृष्टि निवृत्त होण्याचा असंभव असल्यामुळें पुन्हां त्याला संसार प्राप्त होईल अशी शंका आली असतां ह्मणतो कीं, जीवन्मुक्ताला एखाद्या आवश्यक आहारादिक कर्मांच्या वेळीं जरी हें देहादिक द्वैत दिसून येतें तथापि त्यापूर्वींच अवस्तुबुद्धीनें टाकलेलें तें, पुन्हा त्याला मोह उत्पन्न करण्यास समर्थ होत नाहीं; तर देह पडेपर्यंत त्याला त्याचें संस्कारवशेंकरून स्मरणमात्र राहतें ॥ ३५ ॥ तथापि जसा मद्याच्या मदानें मत्त झालेला पुरुष, शरीरावर धारण केलेलें वस्त्र, दुसरेकडे अस्ताव्यस्त पडलें किंवा तेथेंच

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राहिलें आहे याचें अनुसंधान राखीत नाहीं, त्याप्रमाणें जीवन्मुक्त झालेला पुरुष, ज्या देहानें आपण आत्मतत्त्व जाणलें, तो नश्वरत्व वेंकरून उपेक्षा केलेला आपला देह, निजलेला उठून आसनावर बसला आहे किंवा उभा राहिला आहे, किंवा तेथून दुसरेकडे कोठें गेला आहे किंवा जाऊन पुन्हां परत आला आहे? याचेंसुद्धां अनुसंधान राखीत नाहीं-मग त्याच्यासंबंधी स्त्रीपुत्रादिकांचें अनुसंधान कोठून राखणार तर मुळींच राखीत नाहीं॥ ३६ ॥ आतां ज्या देहाचें परिपालन केलें असतांहि तो मरणोन्मुख होतो त्याकडे जर मुळींच पाहिलेंसुद्धां नाहीं तर तो पडेलच असें ह्मणाल तर-प्रारब्धकर्माधीन असलेला तो देह, जोंपर्यंत आपणास उत्पन्न करणारें कर्म आहे तोंपर्यंत प्राणेंद्रियांसहवर्तमान वांचतोच याबद्दल संशय नाहीं-तर मग केव्हांतरी त्याच्यावर आसक्ति होईल असें ह्मणाल तर नाहीं. ज्यानें समाधीपर्यंत योग संपादन केला आहे व ज्यानें परमार्थवस्तु जाणिली आहे तो पुरुष, स्वप्नांतील

स्वरूपमध्यगमज्ज्ञातवांस्तं देहम् । यतः कारणादिति वा । परिकृतं परिहितं वासो गतं स्थितं वा यथा न वेत्ति तद्वत् ॥ ३६ ॥ ननु च यः परिपाल्यमानोऽपि मुमूर्षति तं चेन्न पश्यति तर्हि पतेदेव नेत्याह । देहोऽपीति । देहो दैववशेन गच्छन्स्वारंभकं कर्म यावदस्ति तावत्पर्यंतं प्रतिसमीक्षत एव जीवत्येव । सासुः प्राणेंद्रियसहितः । ननु तर्हि तस्मिन्कदाचिदासज्जेतापि नेत्याह । तमिति । स्वाप्नं स्वप्नतुल्यम् । अधिरूढः प्राप्तः समाधिपर्यंतो योगो येनातएव प्रतिबुद्धं ज्ञातं परमार्थवस्तु येन सः । तथाच श्रुतिः । तस्य

देहोऽपि दैववशगः खलु कर्म यावत्स्वारंभकं प्रतिसमीक्षत एव सासुः ॥ तं सप्रपंचमधिरूढसमाधियोगः स्वाप्नं पुनर्न भजते प्रतिबुद्धवस्तुः ॥ ३७ ॥ मयैतदुक्तं वो विप्रा गुह्यं यत्सांख्ययोगयोः ॥ जानीतमागतं यज्ञं युष्मद्धर्मविवक्षया ॥ ३८ ॥ अहं योगस्य सांख्यस्य सत्यस्यर्तस्य तेजसः ॥ परायणं द्विजश्रेष्ठाः श्रियः कीर्तेर्दमस्य च ॥ ३९ ॥ मां भजंति गुणाः सर्वे निर्गुणं निरपेक्षकम् ॥ सुहृदं प्रियमात्मानं साम्यासंगादयोऽगुणाः ॥ ४० ॥ इति मे छिन्नसंदेहा मुनयः सनकादयः ॥ सभाजयित्वा परया भक्त्या गृणत संस्तवैः ॥ ४१ ॥ तेरहं पूजितः सम्यक्संस्तुतः परमर्षिभिः ॥ प्रत्येयाय स्वकं धाम पश्यतः परमेष्ठिनः ॥ ४२ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥

तावदेव चिरं यावन्न विमोक्ष्ये अथ संपत्स्य इति ॥ ३७ ॥ उक्तार्थे तेषां विश्वासार्थं स्वस्वरूपमाह । मयेति । सांख्यमात्मानात्मविवेको योगोऽष्टांगस्तयोर्गुह्यं रहस्यम् । यज्ञं विष्णुम् । यज्ञो वै विष्णुरिति श्रुतेः । युष्मद्धर्मविवक्षयेत्यनेन धर्मा अप्युपदिष्टा इति ज्ञेयम् । अतएव यत्तेन हंसरूपेण ब्रह्मणेऽभ्यात्थ माधवेत्यनुवादो भविष्यति ॥ ३८ ॥ ऋतं प्रमीयमानो धर्मः । सत्यमनुष्ठीयमानो धर्मः । तेजः प्रभावः एतेषां परमयनम् ॥ ३९ ॥ किंच मामिति । कथंभूताः । अगुणाः गुणपरिणामरूपा न भवंति । किंतु नित्या इत्यर्थः ॥ ४० ॥ मे मया । अगृणत मां तुष्टुवुः ॥ ४१ ॥ प्रत्येयाय प्रत्यागतोऽस्मि ॥ ४२ ॥ इति श्रीमद्भागवते एकादशस्कंधे टीकायां त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥

देहासारख्या जागलेल्या त्या पुत्रकलत्रादिसहित देहाचें अहंममतेनें सेवन करीत नाहीं ॥ ३७ ॥ हे ब्राह्मणहो, आत्मानात्मविवेकरूप सांख्यशास्त्र व अष्टांगयोग यांतील हें रहस्य, मी तुह्मांला सांगितलें आहे. तुह्मांस मोक्षधर्म सांगण्याच्या इच्छेनें हंसरूपानें आलेला मी विष्णु आहें असें तुह्मीं जाणा ॥ ३८ ॥ हे द्विजश्रेष्ठहो, मी योग, सांख्य, जाणावयाचा धर्म, पालन करावयाचा धर्म, प्रभाव, लक्ष्मी, कीर्ति आणि इंद्रियनिग्रह यांचा परम आश्रय आहें ॥ ३९ ॥ ह्मणून निर्गुण, निरपेक्ष, व सर्वांचा सुहृद्, प्रिय व आत्मा अशा माझेंच, गुणांचा परिणामरूप नव्हेत असे-साम्य, असंग इत्यादिक सर्वेहि गुण सेवन करितात ह्मणून माझ्या सांगण्यावर तुह्मी दृढ विश्वास ठेवा ॥ ४० ॥ याप्रमाणें मी संशय तोडून टाकिलेले ते सनकादिक ऋषि, परम भक्तीनें माझा सत्कार करून उत्तम स्तवांनीं स्तुति करूं लागले ॥ ४१ ॥ त्यावर त्या ऋषींनीं पूजा व स्तुति केलेला

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मी, ब्रह्मदेव पहात असतां आपल्या स्थानास प्राप्त झालों ॥ ४२ ॥ याप्रमाणें श्रीम० महा० एकाद० हंसेतिहासनिरूपणनामक हा तेरावा अध्याय समाप्त झाला ॥ १३ ॥ श्रीकृष्णा०

आतां ह्या चवदाव्या अध्यायामध्यें भक्ति हेंच उत्तम साधन आहे, दुसरें कोणतेंच उत्तम साधन नाहीं, या विषयाचें व साधनसहित ध्यानयोगाचें वर्णन केलें आहे ॥ १ ॥ उद्धव ह्मणाला– हे कृष्णा, वेदवेत्ते पुरुष, कल्याणाचीं पुष्कळ साधनें सांगतात. त्याचें काय फलसाधनत्वेंकरून सर्वांचेंच मुख्य प्राधान्य आहे? किंवा त्यांतील एकाचें मुख्यत्व असून बाकीचीं साधनें त्याचे पोटभेद आहेत? ॥ १ ॥ हे स्वामिन् तूं तर–ज्याच्या योगानें सर्वप्रकारें विषयांची आसक्ति सुटून तुझेठिकाणीं मन प्रवेश करील असा भक्तियोगच मोक्षसाधनत्वेंकरून सांगितला आहेस, तेव्हां या साधनांची व्यवस्था कशी आहे? ॥ २ ॥ असा प्रश्न ऐकून, भक्ति हीच सर्वोत्तम फळ देणारी असल्यामुळें मुख्य साधन आहे

चतुर्दशे परं श्रेयो भक्तिरेव न चेतरत् ॥ इत्येतद्वर्ण्यते ध्यानयोगश्च सह साधनैः ॥ १ ॥ एवं तावद्भगवतो भक्त्या मोक्ष इत्युक्तमन्ये त्वन्यानि साधनानि वदंति तत्र विशेषनिर्धारणाय पृच्छति । वदंतीति । श्रेयांसि श्रेयःसाधनानि । किं विकल्पेन प्राधान्यमुताहो किंवा एकस्यैव मुख्यता ॥ १ ॥ एकमुख्यतापक्षोत्थाने कारणम् । भवतेति । न अपेक्षितमपेक्षा यस्मिन्सोऽहेतुकः । अयमर्थः । भवता यो भक्तियोग उक्तोऽन्ये च यानि श्रेयःसाधनानि वदंति तेषां किं साक्षात्फलसाधनत्वेन प्राधान्यमेव सर्वेषामुतांगांगित्वम् । प्राधान्येऽपि किं विकल्पेन सर्वेषां तुल्यफलत्वम् । यद्वा कश्चिदस्ति विशेष इति ॥ २ ॥ तत्र भक्तिरेव महाफलत्वेन मुख्या अन्यानि तु स्वस्वप्रकृत्यनुसारेण पुष्पस्थानीयस्वर्गा-

उद्धव उवाच ॥ वदंति कृष्ण श्रेयांसि बहूनि ब्रह्मवादिनः ॥ तेषां विकल्पप्राधान्यमुताहो एकमुख्यता ॥ १ ॥ भवतोदाहृतः
स्वामिन्भक्तियोगोऽनपेक्षितः ॥ निरस्य सर्वतः संगं येन त्वय्याविशेन्मनः ॥ २ ॥ श्रीभगवानुवाच ॥ कालेन नष्टा प्रलये वाणीयं
वेदसंज्ञिता ॥ मयाऽऽदौ ब्रह्मणे प्रोक्ता धर्मो यस्यां मदात्मकः ॥ ३ ॥ तेन प्रोक्ता च पुत्राय मनवे पूर्वजाय सा ॥ ततो भृग्वा-
दयोऽगृह्णन्सप्तब्रह्ममहर्षयः ॥ ४ ॥ तेभ्यः पितृभ्यस्तत्पुत्रा देवदानवगुह्यकाः ॥ मनुष्याः सिद्धगंधर्वाः सविद्याधरचारणाः ॥ ५ ॥
किंदेवाः किंनरा नागा रक्षःकिंपुरुषादयः ॥ बह्वयस्तेषां प्रकृतयो रजःसत्वतमोभुवः ॥ ६ ॥

दिफलबुद्धिभिः प्राणिभिः प्राधान्येन परिकल्पितानि क्षुद्रकफलानीति विवेक्तुं प्रकृत्यनुसारेण बहुधा वेदार्थप्रतिपत्तिमाह । कालेनेति सप्तभिः । मदात्मकः मय्येवात्मा चित्तं येन सः ॥ ३ ॥ भृग्वादयः भृगुश्च मरीचिरत्र्यंगिरसौ पुलस्त्यः पुलहः क्रतुरित्येते च सप्तब्रह्माणः प्रजापतयस्ते च ते ब्रह्मर्षयश्च ॥ ४ ॥ ५ ॥ किंदेवाः क्रमस्वेददौर्गंध्यादिराहित्येन किंदेवा मनुष्या वेति संदेहास्पदभूता द्वीपांतरमनुष्याः । एवं किन्नराः किंचिन्नरा इव मुखतः शरीरतो वा । किंपुरुषाः किंचित्पुरुषा इव वानरादयः प्रकृतयो

आणि दुसरीं साधनें तर आपापल्या स्वभावाप्रमाणें पुष्पस्थानीय स्वर्गादिफळांविषयीं आसक्तचित्त असलेल्या लोकांनीं मुख्यत्वेंकरून मानिलीं आहेत परंतु तीं क्षुल्लक फळ देणारीं आहेत, असें सांगण्याकरितां स्वभावानुसारें बहुतप्रकारें वेदार्थ जाणण्याचा प्रकार सांगत श्रीभगवान् ह्मणाला– हे उद्धवा, जिच्यामध्यें माझेठिकाणीं मन लागेल असा धर्म सांगितला आहे ती ही वेदनामक वाणी, पूर्वी प्रळयाच्या वेळीं काळाच्या योगानें नष्ट झाली होती. तीच मी सृष्टीच्या आरंभीं ब्रह्मदेवास सांगितली आहे ॥ ३ ॥ नंतर त्या ब्रह्मदेवानें ती वाणी, आपल्या ज्येष्ठपुत्र मनूला सांगितली. त्यापासून ती, महाऋषि अशा भृगु, मरीचि, अत्रि, अंगिरा, पुलस्त्य, पुलह आणि क्रतु या सात प्रजापतींनीं ग्रहण केली ॥ ४ ॥ त्या प्रजापतींपासून त्यांचे पुत्र जे देव, दानव, गुह्यक, मनुष्य, सिद्ध, विद्याधर, चारण, किंदेव, किन्नर, नाग, राक्षस आणि किंपुरुष, इत्यादिक झाले त्यांनीं ग्रहण केली. त्या देवादिकांच्या रजसत्वतमोगुणांपासून उत्पन्न झालेल्या नानाप्रकारच्या वासना असल्यामुळें ॥ ५ ॥ ६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्या वासनांच्या योगानें प्राण्यांमध्यें देव, असुर, व मनुष्यादिक भेद होऊन, त्यांच्या बुद्धिहि निरनिराळ्या होतात. तशाच त्या सर्वांच्या स्वभावानुसारें चित्रविचित्र वेदार्थ-व्याख्यानरूप वाणीहि प्रवृत्त होतात ॥ ७ ॥ याप्रमाणें स्वभावाच्या विचित्रत्वामुळेंच अध्ययनादिशून्य असलेल्याहि कित्येक लोकांच्या बुद्धि, उपदेशपरंपरेनें भेद पावतात. दुसरे कितीएक तर पाखंडबुद्धि वेदविरुद्ध अर्थ करणारेच होतात ॥ ८ ॥ हे पुरुषश्रेष्ठा उद्धवा, माझ्या मायेनें मोहित बुद्धि झालेले पुरुष, आपापल्या कर्मानुसार व रुच्यनुसार निरनिराळ्या प्रकारचीं कल्याणाचीं साधनें सांगतात ॥ ९ ॥ कोणी मीमांसक स्वर्ग हेंच फळ व धर्म हेंच त्याचें साधन असें म्हणतात. दुसरे अलंकार शास्त्रज्ञ—यशाला,

वासना बह्वृचः । कुतः । रजःसत्वतमांसि भुवः जन्मस्थानानि यासां ताः ॥ ६ ॥ भूतानि देवासुरमनुष्यादीनि । चित्रा वाचो वेदार्थव्याख्यानविषयाः ॥ ७ ॥ एवमित्युक्तोपसंहारः । केषांचिदध्ययनादिशून्यानामप्युपदेशपारंपर्येण । अपरे पाखंडमतयो वेदविरुद्धार्थमतयः ॥ ८ ॥ तत्प्रकृतीनां मायागुणमूलत्वान्मन्मायामोहितधियः । अनेकांतं नानाविधम् ॥ ९ ॥ तदेवाह । धर्ममिति सार्धेन । धर्मं कर्ममीमांसकाः । यदुक्तम् । मोक्षार्थी न प्रवर्तेत तत्र काम्यनिषिद्धयोः नित्यनैमित्तिके कुर्यात्प्रत्यवाय जिहासयेत्यादि । यशः काव्यालंकारकृतः । यथाहुः । यावत्कीर्तिर्मनुष्यस्य पुण्या लोकेषु गीयते ॥ तावद्वर्षसहस्राणि स्वर्गलोके महीयत इति । कामं वात्स्यायनादयः । सत्यं

याभिर्भूतानि भिद्यंते भूतानां मतयस्तथा ॥ यथाप्रकृति सर्वेषां चित्रा वाचः स्रवंति हि ॥ ७ ॥ एवं प्रकृतिवैचित्र्याद्भिद्यंते मतयो नृणाम् ॥ पारंपर्येण केषांचित्पाखंडमतयोऽपरे ॥ ८ ॥ मन्मायामोहितधियः पुरुषाः पुरुषर्षभ ॥ श्रेयो वदंत्यनेकांतं यथाकर्म यथारुचि ॥ ९ ॥ धर्ममेके यशश्चान्ये कामं सत्यं दमं शमम् ॥ अन्ये वदंति स्वार्थं वा ऐश्वर्यं त्यागभोजनम् ॥ केचिद्यज्ञतपोदानं व्रतानि नियमान्यमान् ॥ १० ॥ आद्यंतवंत एवैषां लोकाः कर्मविनिर्मिताः ॥ दुःखोदर्कास्तमोनिष्ठाः क्षुद्रानंदाः शुचार्पिताः ॥ ११ ॥ मय्यर्पितात्मनः सभ्य निरपेक्षस्य सर्वतः ॥ मयात्मना सुखं यत्तत्कुतः स्याद्विषयात्मनाम् ॥ १२ ॥

दमं शमं च योगशास्त्रकृतः । अन्ये दृष्टार्थवादिनो दंडनीतिकृतो वै प्रसिद्धं ऐश्वर्यमेव स्वार्थं पुरुषार्थं वदंति । अतः सामाद्युपाया एव श्रेयःसाधनमिति तेषां मतम् । तथैव त्यागं भोजनं च लोकायतिकाः यज्ञतपोदानं यज्ञो देवतानां पूजनं तपश्च दानं च ॥ १० ॥ तेषां तुच्छफलत्वमाह । आद्यंतवंत इति । एषां लोका एतैः साध्यानि । फलानि । तमोनिष्ठा मोहावसानाः । भोगकालेऽप्यसूयादिभिः शुचार्पिता व्याप्ताः ॥ ११ ॥ भक्तेर्मुख्यत्वमाह । मयीति यावत्समाप्ति । हे सभ्य । मया परमानंदरूपेणात्मना स्वरूपत्वेन स्फुरता ॥ १२ ॥

वात्स्यायनादिक कामाला, योगशास्त्री सत्य, दम, व शम यांना, व राजनीति जाणणारे लोक ऐश्वर्यालाच, स्वार्थ साधणारें मुख्य साधन असें म्हणतात. चार्वाक (नास्तिक) लोक, दान व भोग हेंच मुख्य साधन वर्णन करितात. दुसरे कितीएक लोकायतिक—यज्ञ, तप, दान, व्रत, नियम व यम हीं पुरुषार्थाचीं साधनें आहेत असें म्हणतात ॥ १० ॥ या 'धर्मादिक साधनें सांगणाऱ्या' सर्व लोकांनीं कर्माच्या योगानें निर्माण केलेलीं सर्व फळें आदि व अंत यांनीं युक्त, परिणामीं दुःखांत व मोहांत पाडणारीं, तुच्छ आनंदानें युक्त, व भोगकालींहि स्पर्धा, निंदा इत्यादिक दोषांनीं व शोकानें युक्त असतात ॥ ११ ॥ आतां भक्तीचें मुख्यत्व सांगतो— हे उद्धवा, माझेठिकाणीं चित्त लावणाऱ्या व सर्वहि वैषयिक सुखांविषयीं निरपेक्ष असलेल्या भक्ताला, परमानंदरूपानें स्वस्वरूपत्वेंकरून स्फुरण पावणाऱ्या माझ्यायोगानें जें सुख आहे तें विषयासक्तचित्तांना कोठून प्राप्त

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होणार ? मुळींच व्हावयाचें नाहीं ॥ १२ ॥ द्रव्यादिकांचा संग्रह न करणारा, जितेंद्रिय, शांत, समचित्त व माझ्या प्राप्तीच्या योगानेंच संतुष्टचित्त अशा भक्ताला सर्वहि दिशा सुखमय आहेत ॥ १३ ॥ आतां भक्ताची पूर्णता सांगतो– आपलें चित्त माझेठिकाणीं अर्पण करणारा भक्त, माझ्या खेरीज दुसरें– ब्रह्मदेवाचें आधिपत्य, स्वर्गाचें राज्य, संपूर्ण भूमंडळाचें आधिपत्य, पाताळांचें स्वामित्व, अणिमादिक अष्टैश्वर्यें व मोक्षपद यांचीहि इच्छा करीत नाहीं ॥ १४ ॥ आतां मलाहि तो भक्तच प्रिय आहे असें सांगतो– हे उद्धवा, जसा मला [1]तूं भक्त अतिप्रिय आहेस तसे ब्रह्मदेव पुत्रहि, शंकर मत्स्वरूपीहि, बळराम भाऊहि, लक्ष्मी स्त्रीहि आणि आत्मा मूर्तिहि अतिप्रिय नाहींत ॥ १५ ॥

किंच अन्येषां तत्तल्लोकादिपरिच्छिन्नं सुखं भक्तस्य तु परिपूर्णमित्याह । अकिंचनस्येति ॥ १३ ॥ परिपूर्णतामेवाह । न पारमेष्ठ्यमिति । रसाधिपत्यं पातालादिस्वाम्यम् । अपुनर्भवं मोक्षमपि । मद्विना मां हित्वाऽन्यन्नेच्छति । अहमेव तस्य प्रेष्ठ इत्यर्थः ॥ १४ ॥ ममापि स एव प्रेष्ठ इत्याह । न तथेति द्वाभ्याम् । आत्मयोनिर्ब्रह्मा पुत्रोऽपि । शंकरो मत्स्वरूपभूतोऽपि । संकर्षणो भ्रातापि । श्रीर्भार्याऽपि । आत्मा मूर्तिरपि । यथा भक्त इति वक्तव्येऽतिहर्षेणाह । भवानिति ॥ १५ ॥ पूयेय मदंतर्वर्तिब्रह्मांडानि पवित्रीकुर्यामिति भावेनेत्यर्थः ॥ १६ ॥ किंच मद्भक्तानां सुखमेतावदेवंभूतमिति वा को वक्तुं सामर्थो यतस्तत्स्वसंवेद्यं निरुपममित्याह । निष्किंचना इति ।

अकिंचनस्य दांतस्य शांतस्य समचेतसः ॥ मया संतुष्टमनसः सर्वाः सुखमया दिशः ॥ १३ ॥ न पारमेष्ठ्यं न महेंद्रधिष्ण्यं न सार्वभौमं न रसाधिपत्यम् ॥ न योगसिद्धीरपुनर्भवं वा मय्यर्पितात्मेच्छति मद्विनाऽन्यत् ॥ १४॥ न तथा मे प्रियतम आत्मयोनिर्न शंकरः॥ न च संकर्षणो न श्रीर्नैवात्मा च यथा भवान् ॥ १५॥ निरपेक्षं मुनिं शांतं निर्वैरं समदर्शनम् ॥ अनुव्रजाम्यहं नित्यं पूयेयेत्यंघ्रिरेणुभिः ॥ १६ ॥ निष्किंचना मय्यनुरक्तचेतसः शांता महांतोऽखिलजीववत्सलाः ॥ कामैरनालब्धधियो जुषंति यत्तन्नैरपेक्ष्यं न विदुः सुखं मम ॥ १७ ॥ बाध्यमानोऽपि मद्भक्तो विषयैरजितेंद्रियः ॥ प्रायः प्रगल्भया भक्त्या विषयैर्नाभिभूयते ॥ १८ ॥

महांतो निरभिमानाः अनालब्धधियोऽस्पृष्टचित्ताः । निष्किंचनत्वादीन। यथेष्टं हेतुहेतुमद्भावः एवं भूता मम मदीया यत्सुखं जुषंति सेवंते तत्सुखं त एव विदुर्लभंते नान्ये । कुतः । नैरपेक्ष्यं नास्त्यपेक्षणीयं येषां ते निरपेक्ष्यास्तैरेव लभ्यं न तु मोक्षापेक्षैरपीत्यर्थः । यद्वा एवंभूताः संतो ये मम मामित्यर्थः । जुषंति प्रीणंति त एव यन्नैरपेक्ष्यं सुखं तद्विदुर्नान्य इत्यन्वयः ॥ १७ ॥ अपि च आस्तां तादुक्तमभक्तकथा यतः प्राकृतोऽपि भक्तः कृतार्थ एवेत्याह । बाध्यमान इति द्वाभ्याम् । विषयैराकृष्यमाणोऽपि प्रगल्भया समर्थया ॥ १८ ॥

निरपेक्ष, मननशील, शांत, निर्वैर व समदृष्टि अशा भक्ताच्या पाठीमागून मी नित्य ' या भक्ताच्या चरणरजानें माझ्या पोटांत असलेल्या ब्रह्मांडांना पवित्र करीन अशा भावनेनें ' जात असतों ॥ १६ ॥ ज्यांच्या जवळ कोणत्याहि वस्तूचा संग्रह नाहीं, ज्यांचें मन माझेठिकाणीं लागलें आहे, ज्यांच्या चित्ताला शब्दादिक विषय स्पर्शसुद्धां करीत नाहींत व जे शांत, निरभिमानी व सर्व प्राणिमात्रांवर दया करणारे आहेत ते माझे भक्त, जें सुख भोगितात, निरपेक्ष पुरुषांना प्राप्त व्हावयाचें तें सुख तेच जाणतात दुसऱ्या कोणासहि तें जाणतां येत नाहीं ॥ १७ ॥ उत्तम भक्तांची तर कथा राहूंदे परंतु जितेंद्रिय नसल्यामुळें विषयांनीं आपणाकडे आकर्षण केलेलाहि माझा भक्त, प्रतिक्षणीं

१ भक्त अतिप्रिय आहे असें सांगावयाचें परंतु अतिहर्षानें भगवंतानें येथें तूं अतिप्रिय आहेस असें ह्मटलें आहे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वृद्धिंगत होणाऱ्या त्या भक्तीनें सुरक्षित असल्यामुळें बहुतकरून विषयांनीं पराभूत होत नाहीं, तर तो कृतार्थच होतो ॥ १८ ॥ हे उद्धवा, जसा स्वयंपाकवगैरे करण्याकरितांहि अत्यंत प्रदीप्त केलेला अग्नि, काष्ठांचें जाळून भस्म करितो, तशी कामद्वेषादिक कोणत्याहि निमित्तानें घडलेली माझी भक्ति, सर्व पातकांचें भस्म करित्ये ॥ १९॥ ह्मणून वृद्धिंगत झालेली माझी भक्ति, जशी मला वश करित्ये तशीं योग, सांख्य, धर्म, वेदाध्ययन, तप किंवा दान हीं साधनें मला वश करीत नाहींत ॥ २० ॥ प्रिय आत्मरूप मी, श्रद्धेनें उत्पन्न झालेल्या भक्तीनेंच सत्पुरुषांना वश होतों. माझी भक्ति चांडाळलोकांपर्यंत सर्वांना जातिदोषापासूनहि पवित्र करित्ये ॥ २१ ॥ भक्ति नसेल तर इतर साधनें व्यर्थ आहेत. कारण, सत्य व दया यांनीं युक्त धर्म, व तपानें युक्त आत्मविद्या हींद्वंद्वां माझ्या भक्तीनें रहित असलेल्या जीवाला उत्तमप्रकारें पवित्र करीत नाहींत ॥ २२ ॥ अंगावर रोमांच उभे राहिल्यावांचून, चित्ताला द्रव सुटल्यावांचून व नेत्रांमध्यें आनंदाश्रु प्राप्त झाल्यावांचून भक्ति तरी कशी समजणार ? व भक्ती-

---

पाकाद्यर्थं प्रज्वालितोऽग्निर्यथा काष्ठानि भस्मीकरोति तथा रागादिनाऽपि कथंचिन्मद्विषया सती भक्तिः समस्तपापानीति । भगवानपि स्वभक्तिमहिमाश्चर्येण संबोधयति । अहो उद्धव विस्मयं शृण्विति ॥ १९ ॥ अत एवंभूतं श्रेयो नान्यदस्तीत्याह । न साधयतीति द्वाभ्याम् ॥ २० ॥ श्रद्धया या भक्तिस्तया । संभवाज्जातिदोषादपीत्यर्थः ॥ २१ ॥

यथाऽग्निः सुसमृद्धार्चिः करोत्येधांसि भस्मसात् ॥ तथा मद्विषया भक्तिरुद्धवैनांसि कृत्स्नशः ॥ १९ ॥ न साधयति मां योगो न सांख्यं धर्म उद्धव ॥ न स्वाध्यायस्तपस्त्यागो यथा भक्तिर्ममोर्जिता ॥ २० ॥ भक्त्याऽहमेकया ग्राह्यः श्रद्धयाऽऽत्मा प्रियः सताम् ॥ भक्तिः पुनाति मन्निष्ठा श्वपाकानपि संभवात् ॥ २१ ॥ धर्मः सत्यदयोपेतो विद्या वा तपसान्विता ॥ मद्भक्त्यापेतमात्मानं न सम्यक्प्रपुनाति हि ॥ २२ ॥ कथं विना रोमहर्षं द्रवता चेतसा विना ॥ विनाऽनंदाश्रुकलया शुद्ध्येद्भक्त्या विनाऽऽशयः ॥ २३ ॥ वाग्गद्गदा द्रवते यस्य चित्तं रुदत्यभीक्ष्णं हसति क्वचिच्च ॥ विलज्ज उद्गायति नृत्यते च मद्भक्तियुक्तो भुवनं पुनाति ॥ २४ ॥ यथाऽग्निना हेम मलं जहाति ध्मातं पुनः स्वं भजते स्वरूपम् ॥ आत्मा च कर्मानुशयं विधूय मद्भक्तियोगेन भजत्यथो माम् ॥ २५ ॥

भक्त्यभावेऽन्यत्साधनं व्यर्थमित्याह द्वाभ्याम् । धर्म इति ॥ २२ ॥ रोमहर्षादिकं विना कथं भक्तिर्गम्यते । भक्त्या विना च कथमाशयः शुद्ध्येदिति ॥ २३ ॥ किंच भक्तिः स्वाश्रयं शोधयतीति किं वक्तव्यं यतो गद्गदवागादिलक्षणो मद्भक्तियुक्तो लोकं सर्वं पुनातीत्याह । वागिति ॥ २४ ॥ अपिच भक्त्यैवात्मशुद्धिर्नान्यत इति सदृष्टांतमाह । यथेति । यथाऽग्निना ध्मातं तापितमेव हेम सुवर्णमंतर्मलं जहाति न क्षालनादिभिः । स्वं निजं रूपं च भजते । कर्मानुशयं कर्मवासनाम् । मां भजते मद्रूपतामापद्यते ॥ २५ ॥

वांचून अंतःकरण तरी कसें शुद्ध होणार ? व्हावयाचेंच नाहीं ॥ २३ ॥ आणि माझी भक्ति, करणाऱ्या पुरुषाला पवित्र करित्ये हें काय सांगावें ! परंतु ज्याची वाणी, माझ्या प्रेमानें सद्गदित (अक्षरें अडखळणारी) होत्ये, ज्याचें चित्त द्रवयुक्त (बाहेरच्या व्यवहारांत शिथिल) होतें, जो माझा वियोग झाल्यासारखा वाटला ह्मणजे वारंवार रुदन करितो, केव्हांतरी माझ्या क्रीडेचें रहस्य समजलें ह्मणजे हास्य करितो, केव्हांतरी लोकलज्जा सोडून उच्चस्वरानें माझ्या चरित्राचें गायन करितो व नृत्य करितो, असा माझी भक्ति करणारा पुरुष, आपणास तर काय परंतु आपल्या दर्शनादिकांच्या योगानें जगालाहि पवित्र करितो ॥ २४ ॥ आतां भक्तीनेंच चित्तशुद्धि होत्ये, दुसऱ्या साधनांनीं होत नाहीं हें दृष्टांतपूर्वक सांगतो–जसें सुवर्ण, अग्नीनें तापविलें असतांच तें आपल्यामध्यें असलेल्या इतर धातूंच्या मळाचा त्याग करितें, क्षालनादिकेंकरून त्याग करीत नाहीं, आणि आपल्या मूळच्या स्वरूपाला पावतें. त्याप्रमाणें जीवहि माझ्या भक्तियोगानेंच संसाराला कारणभूत अशा कर्मवासनांचा त्याग करून माझें भजन

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करितो व माझ्याशीं ऐक्य पावतो ॥ २५ ॥ माझ्या पवित्र कथांच्या श्रवणानें व वर्णनानें जसें जसें अंतःकरण शुद्ध होतें तसातसा हा जीव, जसें अंजन घातलेला नेत्र दोषरहित होऊन सूक्ष्महि वस्तूला पाहतो त्याप्रमाणें सूक्ष्महि आत्मवस्तूला जाणण्यास समर्थ होतो· मिळून भक्तीचाच अवांतर व्यापार ज्ञान आहे भक्तीहून निराळें नाहीं ॥ २६ ॥ आणि तें ज्ञानतरी चित्ताचा मद्रूपत्वेंकरून एक परिणाम आहे आणि तोतरी माझी भक्ति करणाराला स्वाभाविकच होतो त्याबद्दल यत्न करावा लागत नाहीं, हें सदृष्टांत सांगतो–जसें विषयांचें ध्यान करणाऱ्या पुरुषाचें चित्त विषयांमध्यें आसक्त होतें तसेंच वारंवार माझें चिंतन करणाराचें चित्त माझेठिकाणींच लय पावतें ॥ २७ ॥ यास्तव हे उद्धवा, ज्याअर्थीं विषयांचें ध्यान संसाराला कारण व माझें ध्यान माझ्या प्राप्तीचें साधन आहे त्याअर्थीं जसे स्वप्नांत व मनोरथाच्या वेळीं प्राप्त झालेले विषय, मिथ्या आहेत

ननु ब्रह्मविदाप्नोति परम् । तमेव विदित्वाऽतिमृत्युमेतीत्यादिश्रुतिभ्यो ज्ञानादेवाविद्यानिवृत्त्या त्वत्प्राप्तिरवगम्यते कुतो भक्तियोगेनेत्युच्यते तत्राह । यथायथेति । आत्मा चित्तं परिमृज्यते शोध्यते मत्पुण्यकथानां श्रवणैरभिधानैश्च । भक्तेरेवावांतरव्यापारो ज्ञानं न पृथगित्यर्थः ॥ २६ ॥ किंच ज्ञानं नाम चित्तस्य मदाकारपरिणामः स च मां भजतः स्वभावत एव भवति न च यत्नांतरमपेक्षत इति सदृष्टांतमाह । विषयानिति ॥ २७ ॥ यस्मादन्यसाधनं तत्फलं च स्वप्नमनोरथवदसदभिध्यानमात्रं तस्मात्तद्धिहाय मय्येव मनः समाहितं कुर्विति प्रकरणार्थमुपसंहरति । तस्मादिति । मद्भावभावितं मद्भावेन भजनेनैव शोधितम् ॥ २८ ॥ विशेषतो वात्स्यायनाद्युक्तकाममार्गाः परित्याज्या इत्याह । स्त्रीणा

यथा यथाऽऽत्मा परिमृज्यतेऽसौ मत्पुण्यगाथाश्रवणाभिधानैः ॥ तथा तथा पश्यति वस्तु सूक्ष्मं चक्षुर्यथैवांजनसंप्रयुक्तम् ॥ २६ ॥ विषयान्ध्यायतश्चित्तं विषयेषु विषज्जते ॥ मामनुस्मरतश्चित्तं मय्येव प्रविलीयते ॥ २७ ॥ तस्मादसदभिध्यानं यथा स्वप्नमनोरथम् ॥ हित्वा मयि समाधत्स्व मनो मद्भावभावितम् ॥ २८ ॥ स्त्रीणां स्त्रीसंगिनां संगं त्यक्त्वा दूरत आत्मवान् ॥ क्षेमे विविक्त आसीनश्चिंतयेन्मामतंद्रितः ॥ २९ ॥ न तथाऽस्य भवेत्क्लेशो बंधश्चान्यप्रसंगतः ॥ योषित्संगाद्यथा पुंसो यथा तत्संगिसंगतः ॥ ३० ॥ उद्धव उवाच ॥ यथा त्वामरविंदाक्ष यादृशं वा यदात्मकम् ॥ ध्यायेन्मुमुक्षुरेतन्मे ध्यानं मे वक्तुमर्हसि ॥ ३१ ॥

मिति । आत्मवान् धीरः सन् । क्षेमे निर्भये देशे । विविक्ते विजने ॥ २९ ॥ एतदुपपादयति । न तथेति । अस्य पुंसो यथा तत्संगिसंगतः क्लेशो भवेत् । यथा च बंधो योषित्संगतस्तथाऽन्यप्रसंगतो न भवेदिति ॥ ३० ॥ मां चिंतयेदित्युक्तं तत्प्रकारं पृच्छति । यथेति ध्यानांगप्रश्नः । यादृशमिति ध्येयविशेषणप्रश्नः । यदात्मकमिति यस्य तानि विशेषणानि तत्स्वरूपप्रश्नः । एतन्मे ध्यानं मे वक्तुमर्हसीति पाठः । तत्रायमर्थः । मुमुक्षुस्त्वां यथा ध्यायेत् तन्मे वक्तुमर्हसीति जिज्ञासोः कथनाय । मे पुनरेतत्त्वद्दास्यमेव पुरुषार्थो न तु ध्यानेन कृत्यमस्तीति । तदुक्तम् । त्वयोपभुक्तस्रग्गंधेत्यादि । त्वं वक्तुमर्हसीति पाठः सुगमः ॥ ३१ ॥

त्याप्रमाणें भक्तीवांचून इतर साधनें व त्यांचीं फळें हीं केवळ मिथ्या (कल्पनारूप) आहेत असें जाणून त्यांचा त्याग कर आणि माझ्या भक्तीनें शुद्ध झालेलें चित्त माझेठिकाणीं स्थिर कर ॥ २८ ॥ धैर्यवान् पुरुषानें, स्त्रियांची व स्त्रियांशीं आसक्त असलेल्या कामी पुरुषांची संगति दुरूनच सोडून देऊन, निर्भय अशा एकांतस्थळीं बसावें आणि माझें चिंतन करावें ॥ २९ ॥ स्त्रियांच्या संगतीनें आणि स्त्रियांची संगति करणाऱ्या जार पुरुषांच्या संगतीनें, पुरुषाला जसे क्लेश व बंधन प्राप्त होतें त्याप्रमाणें दुसऱ्या कोणाच्याहि संगतीनें प्राप्त होत नाहीं, म्हणून त्यांची संगति सर्वथा सोडून द्यावी ॥ ३० ॥ माझें चिंतन करावें असें सांगितलें; त्याचा प्रकार विचारण्याकरितां उद्धव म्हणाला–हे कमलनेत्रा श्रीकृष्णा, मुमुक्षु पुरुषानें, ज्याप्रकारानें, ज्या लक्षणांनीं युक्त अशा ज्यास्वरूपी तुझें ध्यान करावें हें मला सांगण्याची कृपा करावीस. हेंतरी लोकांसाठीं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ऐकावयाचें आहे, मला स्वतःला तर तुझें दास्य हाच पुरुषार्थ असल्यामुळें ध्यानानें कांहींच कर्तव्य नाहीं ॥ ३१ ॥ आतां ध्यान व त्याच्या अंगत्वेंकरून आसनादिप्रकार सांगण्याकरितां श्रीभगवान् ह्मणाला—फार उंच नव्हे व फार नीच नव्हे अशा कंबलादिक आसनावर सारखा देह धारणकरून सुख वाटेल तशा रीतीनें बसणाऱ्या साधकानें, आपले दोन्हीं हात मांड्यांवर ठेवून व चित्ताच्या स्थिरतेकरितां नासिकाग्रीं दृष्टि ठेवून पूरक, कुंभक व रेचक याक्रमानें किंवा रेचक, पूरक व कुंभक अशा क्रमानें अथवा उजव्या नाकपुडीनें वर घेऊन कोंडलेला वायु, डाव्या नाकपुडीनें सोडणें व डाव्या नाकपुडीनें वर घेऊन कोंडलेला वायु, उजव्या नाकपुडीनें सोडणें अशा क्रमानें प्राणाचा मार्ग

तत्र ध्यानांगत्वेनासनप्राणायामप्रकारमाह। सम इति चतुर्भिः। समे नात्युच्छ्रिते नातिनीचे आसने कंबलादौ समकायः सन्। यथासुखमासीन इति नास्ति स्वस्तिकादिनियम इत्युक्तम्। नासाग्रनिरीक्षणं च चित्तस्थैर्याय। अंतर्लक्ष्यो बहिर्दृष्टिः स्थिरचित्तः सुसंयत इति योगशास्त्रोक्तेः ॥ ३२ ॥ विपर्ययेण रेचकपूरककुंभकक्रमेणापि। यद्वा वामनाड्या पूरितं दक्षिणया त्यजेत्तया वा पूरितं वामयेत्येवं विपर्ययेण। यथोक्तं योगे। इडया पूरयेद्वायुं त्यजेत्पिंगलया ततः ॥ पिंगलापूरितं वायुमिडया च परित्यजेदिति। निर्जितेंद्रिय इति प्रत्याहार उक्तः ॥ ३३ ॥ प्राणायामो द्विविधः सगर्भोऽगर्भश्चेति तत्र श्रेष्ठत्वात्प्रणवगर्भमाह। हृदीति द्वाभ्याम्। मूलाधारादारभ्याविच्छिन्नं संततं घंटानादतुल्यमों-

श्रीभगवानुवाच ॥ सम आसन आसीनः समकायो यथासुखम् ॥ हस्तावुत्संग आधाय स्वनासाग्रकृतेक्षणः ॥ ३२ ॥ प्राणस्य शोधयेन्मार्गं पूरकुंभकरेचकैः ॥ विपर्ययेणापि शनैरभ्यसेन्निर्जितेंद्रियः ॥ ३३ ॥ हृद्यविच्छिन्नमोंकारं घंटानादं बिसोर्णवत् ॥ प्राणेनोदीर्य तत्राथ पुनः संवेशयेत्स्वरम् ॥ ३४ ॥ एवं प्रणवसंयुक्तं प्राणमेव समभ्यसेत् ॥ दशकृत्वस्त्रिषवणं मासादर्वाग्जितानिलः ॥ ३५ ॥ हृत्पुंडरीकमंतस्थमूर्ध्वनालमधोमुखम् ॥ ध्यात्वोर्ध्वमुखमुन्निद्रमष्टपत्रं सकर्णिकम् ॥ ३६ ॥

कारं हृदि संस्थितं प्राणेनोदीर्योर्ध्वं द्वादशांतपर्यंतं नीत्वा। कथम्। बिसोर्णवत्कमलनालतंतुवत्। तत्र मात्रातीते स्वरं पंचदशं बिंदुं संवेशयेत्। अथ पुनरित्यस्य तं च बिंदुशिरस्कं कुर्यादित्यर्थः। यद्वा मूलाधारादारभ्य मूर्धांतपर्यंतं बिसतंतुवत्सूक्ष्ममविच्छिन्नं संततं हृदि मनसि प्राणेनोदीर्याभिव्यज्याथ पुनस्तत्रोंकारे घंटानादतुल्यं स्वरमुदात्तं नादं स्थिरीकुर्यादिति ॥ ३४ ॥ मासादर्वाक् जितानिलो भवति ॥ ३५ ॥ एवं ध्यानांगमुक्त्वा यादृशमित्यस्योत्तरं वक्तुं ध्येयपीठमाह। हृत्पुंडरीकमिति सार्धेन। अंतस्थं देहांतर्वर्ति ऊर्ध्वनालमधोमुखं मुकुलितं च कदलीपुष्पसंकाशं यदस्ति तद्विपरीतं ध्यात्वेत्यर्थः ॥ ३६ ॥

शुद्ध करून विषयांपासून इंद्रियें अंतर्मुख करून प्राणायामाचा अभ्यास करावा ॥ ३२ ॥ ३३ ॥ प्राणायाम सगर्भ आणि अगर्भ असा दोन प्रकारचा आहे. त्यांत श्रेष्ठ असल्यामुळें सगर्भ (ॐकारगर्भित) प्राणायाम सांगतो—मूलाधारचक्रापासून ब्रह्मरंध्रापर्यंत कमळाच्या देठींतील तंतूसारख्या सूक्ष्म आणि अविच्छिन्न असलेल्या ॐकाराला मनामध्यें प्राणवायूच्या योगानें प्रकट करून नंतर त्या ॐकारामध्यें घंटेच्या नादासारखा सूक्ष्मनादयुक्त उदात्त स्वर (अनुस्वार) स्थिर करावा ॥ ३४ ॥ याप्रमाणें प्रणवगर्भित प्राणायाम प्रतिदिवशीं सकाळीं, दोनप्रहरीं व सायंकाळीं दहादहावेळ जो पुरुष करितो तो एक महिन्याच्या पूर्वींच प्राणवायूला जिंकणारा होतो ॥ ३५ ॥ याप्रमाणें ध्यानाच्या अंगत्वेंकरून प्राणायाम सांगून, आतां ध्यान करावयाची मूर्ति सांगण्याकरितां तिचें आसन सांगतो—देहामध्यें वर देंठ व खालीं मुख असलेलें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

केळीच्या फुलासारखें मिटलेलें जें हृदयकमळ आहे तें खालीं देंठ व वर मुख असून प्रफुल्लित, अष्टदळ व कर्णिकायुक्त आहे असें ध्यान करून ॥ ३६ ॥ त्या कर्णिकेमध्यें एकावर एक अशा क्रमानें मंडळरूपानें सूर्य, चंद्र व अग्नि आहेत असें ध्यान करावें. नंतर अग्नीमध्यें, पुढें सांगावयाच्या ध्यानास विषय असें माझ्या स्वरूपाचें चिंतन करावें ॥ ३७ ॥ तें असें कीं, यथायोग्य अवयव असलेलें, शांत, सुंदरमुखानें युक्त, गुडघ्यांपर्यंत लांब अशा चार भुजांनीं शोभायमान, अतिरमणीय, सुंदर कंठ व गाल यांनीं विराजित, स्वच्छ अशा मंदहास्यानें शोभायमान ॥ ३८ ॥ सारख्या कर्णांवर घातलेल्या स्फुरण पावणाऱ्या मकराकार कुंडलांनीं युक्त, सुवर्णासारखा पिंवळा पीतांबर परिधान करणारें, मेघासारखें श्यामवर्ण, वक्षस्थळावर दक्षिणेकडे असलेलें श्रीवत्सलांछन व डावेकडे असलेली लक्ष्मी यांचें आश्रयस्थान, ॥ ३९ ॥ शंख, चक्र,

न्यसेच्चिंतयेत्। सविशेषणं ध्यानमाह। वह्निमध्य इति षड्भिः। ध्यानमंगलं ध्यानस्य शुभं विषयम् ॥ ३७ ॥ सममनुरूपावयवम्। दीर्घाश्चारवश्चत्वारो भुजा यस्मिंस्तत्। सुचारु अतिरम्यम् ॥ ३८ ॥ समानयोः कर्णयोर्विन्यस्ते स्फुरती मकराकारे कुंडले यस्मिंस्तत्। श्रीवत्सश्रियोर्निकेतनं वक्षसि दक्षिणवामतः। ताभ्यां युक्तमित्यर्थः ॥ ३९ ॥ ४० ॥

कर्णिकायां न्यसेत्सूर्यसोमाग्नीनुत्तरोत्तरम् ॥ वह्निमध्ये स्मरेद्रूपं ममैतद्ध्यानमंगलम् ॥३७॥ समं प्रशांतं सुमुखं दीर्घचारुचतुर्भुजम् ॥ सुचारु सुंदरग्रीवं सुकपोलं शुचिस्मितम् ॥ ३८ ॥ समानकर्णविन्यस्तस्फुरन्मकरकुंडलम् ॥ हेमांबरं घनश्यामं श्रीवत्सश्रीनिकेतनम् ॥ ३९ ॥ शंखचक्रगदापद्मवनमालाविभूषितम् ॥ नूपुरैर्विलसत्पादं कौस्तुभप्रभया युतम् ॥ ४० ॥ द्युमत्किरीटकटककटिसूत्रांगदायुतम् ॥ सर्वांगसुंदरं हृद्यं प्रसादसुमुखेक्षणम् ॥ ४१ ॥ सुकुमारमभिध्यायेत्सर्वांगेषु मनो दधत् ॥ इंद्रियाणींद्रियार्थेभ्यो मनसाऽऽकृष्य तन्मनः ॥ बुद्ध्या सारथिना धीरः प्रणयेन्मयि सर्वतः ॥ ४२ ॥ तत्सर्वव्यापकं चित्तमाकृष्यैकत्र धारयेत् ॥ नान्यानि चिंतयेद्भूयः सुस्मितं भावयेन्मुखम् ॥ ४३ ॥

द्युमद्भिः किरीटादिभिरासमंताद्युतमलंकृतम्। प्रसादेन शोभनं मुखमीक्षणं च यस्मिंस्तत् ॥ ४१ ॥ सुकुमारमतिकोमलम्। सविशेषणं ध्यानमुपसंहरति। इंद्रियाणीति। प्रकर्षेण नयेत्। सर्वतः सर्वांगयुक्ते ॥ ४२ ॥ यादृशमित्यस्योत्तरत्वेन सविशेषणमुक्त्वा यदात्मकमित्यस्योत्तरतया शनैर्विशेषणत्यागेन ध्यानमेव समाधिपर्यंतमाह। तदिति त्रिभिः। एकत्रांगे। अन्यान्यंगानि न चिंतयेत्। एकत्रेति यदुक्तं तदेवांगं दर्शयति। सुस्मितमिति ॥ ४३ ॥

गदा, पद्म व वनमाळा यांच्यायोगानें विभूषित, नूपुरांनीं पाय सुशोभित असलेलें, कौस्तुभ मण्याच्या कांतीनें युक्त ॥ ४० ॥ देदीप्यमान अशा मस्तकावरील किरीट, हातांतील कडीं तोडे, कमरेंतील करगोटा दंडावेठिकाणीं धारण केलेलीं बाहुभूषणें यांनीं युक्त, सर्व अवयवांनीं सुंदर, मनोरम, प्रसाद करण्याविषयीं प्रफुल्लित झालेल्या मुखानें व नेत्रांनीं युक्त ॥ ४१ ॥ आणि सुकुमार असें माझें स्वरूप, माझ्या पादादिक मस्तकापर्यंत अवयवांवेठिकाणीं मन ठेवून ध्यान करावें. याप्रकारेंकरून सविशेष ध्यान करून नंतर शब्दादिक विषयांपासून इंद्रियांचें मनानें आकर्षण (प्रत्याहार) करून, धैर्यवान् पुरुषानें तें संकल्पविकल्पात्मक मनहि सहायभूत अशा निश्चयात्मक बुद्धीनें सर्वांगयुक्त अशा माझेठिकाणीं स्थापन करावें ॥ ४२ ॥ नंतर तें सर्वांगव्यापक चित्त, सर्व अंगांपासून आकर्षण करून एकाच अवयवाचेठिकाणीं स्थापन करावें, मग ॥ ९६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुन्हां त्या दुसऱ्या अवयवांचें चिंतन करूं नये तर मंदहास्ययुक्त अशा मुखाचेंच ध्यान करावें ॥ ४३ ॥ नंतर त्या मुखाचेठिकाणीं स्थिरता पावलेलें चित्त, सर्वकारण रूप अशा माझेठिकाणीं स्थापन करावें. नंतर तें कारणत्वहि टाकून शुद्ध ब्रह्मरूप माझेठिकाणीं भक्त आरूढ झाला ह्मणजे त्यानें ध्याता, ध्यान व ध्येय या कोणत्याच विभागावें चिंतन करूं नये ॥ ४४ ॥ याप्रमाणें समाधिपर्यंत ध्यान करणारा पुरुष, माझेठिकाणीं निश्चळबुद्धि झाला ह्मणजे तो मला आपलेठिकाणीं पाहतो. आणि आपला आत्मा, जसें दीपादिकांचें तेज महाभूतरूपतेजाचेठिकाणीं लीन होतें त्याप्रमाणें सर्वात्म्या माझेठिकाणीं ऐक्यरूपानें संयुक्त झाला आहे असें पाहतो ॥ ४५ ॥ याप्रमाणें अत्यंत तीव्र ध्यानानें मनाची एकाग्रता संपादन करणाऱ्या योग्याचा अधिभूत, अधिदैव व अध्यात्मरूप किंवा द्रष्टृदर्शनदृश्यरूप असलेला भ्रम तत्काळ नाश पावतो ॥ ४६ ॥

व्योम्नि सर्वकारणरूपे । तच्च कारणत्वमपि त्यक्त्वा मदारोहो मयि शुद्धे ब्रह्मण्यारूढः सन् किंचिद्ध्यातृध्येयविभागमपि न चिंतयेत् ॥ ४४ ॥ मामेवात्मनि विचष्टे आत्मानं च सर्वात्मनि मयि संयुतं विचष्टे । ज्योतिर्ज्योतिषि संयुक्तमिवेत्यन्वयः ॥ ४५ ॥ एवंभूतसमाधिपर्यंतध्यानस्य फलमाह । ध्यानेनेति । मनो युंजतः समादधतः । द्रव्यज्ञानक्रियाभ्रमोऽधिभूताधिदैवाध्यात्मरूपो दृश्यद्रष्टृदर्शनरूपो वा भ्रमो निर्वाणं शांतिं सम्यग्यास्यतीति ॥ ४६ ॥ इति श्रीमद्भागवते एकादशस्कंधे टीकायां चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥

तत्र लब्धपदं चित्तमाकृष्य व्योम्नि धारयेत् ॥ तच्च त्यक्त्वा मदारोहो न किंचिदपि चिंतयेत् ॥ ४४ ॥ एवं समाहितमतिर्मामेवात्मानमात्मनि ॥ विचष्टे मयि सर्वात्मन् ज्योतिर्ज्योतिषि संयुतम् ॥ ४५ ॥ ध्यानेनेत्थं सुतीव्रेण युंजतो योगिनो मनः ॥ संयास्यत्याशु निर्वाणं द्रव्यज्ञानक्रियाभ्रमः ॥ ४६ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे भगवदुद्धवसंवादे चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥
॥ श्रीभगवानुवाच ॥ जितेंद्रियस्य युक्तस्य जितश्वासस्य योगिनः ॥ मयि धारयतश्चेत उपतिष्ठंति सिद्धयः ॥ १ ॥ उद्धव उवाच ॥ कया धारणया कास्वित्कथंस्वित्सिद्धिरच्युत ॥ कति वा सिद्धयो ब्रूहि योगिनां सिद्धिदो भवान् ॥ २ ॥ श्रीभगवानुवाच ॥ सिद्धयोऽष्टादश प्रोक्ता धारणायोगपारगैः ॥ तासामष्टौ मत्प्रधाना दशैव गुणहेतवः ॥ ३ ॥

ततः पंचदशे प्रोक्ताः सिद्धयो धारणानुगाः ॥ श्रीविष्णुपदसंप्राप्तावंतरायतया मताः ॥ १ ॥ एवं मनो युंजतो योगिनोऽतराविर्भवंत्यः सिद्धयोऽप्यंतरायप्राया एवातस्ताः परिहृत्य परमेश्वरपर एव भवेदिति वक्तुं सिद्धीराह । जितेंद्रियस्येति । युक्तस्य स्थिरचित्तस्य ॥ १ ॥ स्विदिति वितर्के । कास्वित्किंनामा कथंस्वित्कीदृशी वा । धारणाश्च कतीति प्रश्नांतरे वा शब्दः । त्वमेवैतज्जानासि नान्य इत्याशयेनाह । योगिनामिति ॥ २ ॥ धारणाश्चाष्टादशेऽत्यनुषंगः । योगपारगैरिति । त्रिकालज्ञत्वादिक्षुद्रसिद्धीरन्येऽपि जानंतीति

याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या एकादशस्कंधांत भक्तियोगनिरूपणनामक हा चवदावा अध्याय समाप्त झाला ॥ १४ ॥ ॥ आतां ह्या पंधराव्या अध्यायामध्यें मनाच्या धारणेनें प्राप्त होणाऱ्या परंतु विष्णुपदाच्या प्राप्तीविषयीं विघ्नरूप मानलेल्या अशा सिद्धि सांगितल्या आहेत ॥ १ ॥ याप्रकारें मनाची एकाग्रता करणाऱ्या योग्याला, त्या योगसाधनामध्यें विघ्नें करणाऱ्या सिद्धि प्राप्त होतात, त्याहि विघ्नरूपच आहेत, असें त्यानें जाणून त्यांचा त्याग करून परमेश्वरपरच व्हावें असें सांगण्या-करितां श्रीभगवान् ह्मणाला—हे उद्धवा, श्वासवायूचा व इंद्रियांचा जय करणाऱ्या व माझेठिकाणीं चित्त स्थापन करणाऱ्या योग्याला पुष्कळ सिद्धि प्राप्त होतात ॥ १ ॥ असें सांगितलें असतां त्या सिद्धींतील विशेष विचारण्याकरितां उद्धव ह्मणाला—हे श्रीकृष्णा, कोणत्या धारणेनें कोणत्या नांवाची कोणत्या प्रकारची सिद्धि प्राप्त होत्ये, आणि त्या सर्व सिद्धि किती आहेत हें मला सांग. कारण, तूं योग्यांना सिद्धि देणारा आहेस ॥ २ ॥ तेव्हां श्रीभगवान् ह्मणाला—हे उद्धवा, योगपारंगत पुरुषांनीं अठरा सिद्धि

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

व त्यांच्या अठरा धारणा सांगितल्या आहेत. यावरून त्रिकालज्ञत्वादिक क्षुद्र सिद्धींनां दुसरेहि लोक जाणत असतात असें सिद्ध झालें. त्या अठरांपैकीं आठ सिद्धि मुख्यत्वें-करून माझाच आश्रय करून राहतात. त्या माझें सारूप्य पावलेल्या सत्पुरुषांचेठिकाणीं माझ्याहून कांहीं कमी अंशानें राहतात आणि दहा सिद्धि सत्वगुणाच्या उत्कर्षानें प्राप्त होतात ॥ ३ ॥ त्यांत १-ली अणिमा, (मोठ्या शरीरानेंच एकदम सूक्ष्म होणें) २-री महिमा (सूक्ष्म शरीरानेंच एकदम मोठें होणें) आणि ३-री लघिमा (जड शरीरानें हलकें होणें) ह्या तीन सिद्धि देहाच्या आहेत. ४-थी प्राप्ति (सर्व प्राण्यांच्या इंद्रियांशीं त्या इंद्रियांच्या देवतारूपानें संबंध) ५-वी प्राकाश्य (परलोकींच्या व या लोकींच्या सर्व स्थानांमध्यें भोग पाहण्याचें सामर्थ्य) ६-वी ईशिता (ईश्वराचेठिकाणीं मायेची व इतरांचेठिकाणीं मायेच्या अंशांची प्रेरणा करण्याचें सामर्थ्य)

भावः । अहमेव प्रधानं मुख्यः स्वभावत आश्रयो यासां ताः । मत्सारूप्यं प्राप्तेषु किंचिन्न्यूना भवंतीति भावः । गुणहेतवः सत्वोत्कर्षहेतुकाः ॥ ३ ॥ ताः स्वरूपेणोपदिशति अणिमेति सार्धैः पंचभिः । अणिमा महिमा लघिमा च मूर्तेर्देहस्य तिस्रः सिद्धयः । प्राप्तिर्नाम सिद्धिः सर्वप्राणिनामिंद्रियैः सह । तत्तदधिष्ठातृदेवतारूपेण संबंध इत्यर्थः । श्रुतेषु पारलौकिकेषु दृष्टेषु दर्शनयोग्येष्वपि सर्वेषु भूविवरादिपिहितेष्वपि प्राकाश्यं भोगदर्शनसामर्थ्यं सिद्धिः शक्तीनां माया तदंशभूतानां प्रेरणम् । तत्रेश्वरे मायाया अन्येषु तदंशानां प्रेरणमीशितानाम सिद्धिः ॥ ४ ॥ विषयभोगेष्वसंगो वशिता सिद्धिः । यत्कामो यद्यत्सुखं कामयते तत्तदवस्यति तस्य तस्य सीमानं प्राप्नोतीति सिद्धिः । औत्पत्तिकाः स्वाभावि-

अणिमा महिमा मूर्तेर्लघिमा प्राप्तिरिंद्रियैः ॥ प्राकाश्यं श्रुतदृष्टेषु शक्तिप्रेरणमीशिता ॥ ४ ॥ गुणेष्वसंगो वशिता यत्कामस्तदवस्य-ति ॥ एता मे सिद्धयः सौम्य अष्टावौत्पत्तिका मताः ॥ ५ ॥ अनूर्मिमत्त्वं देहेऽस्मिन्दूरश्रवणदर्शनम् ॥ मनोजवः कामरूपं परकायप्रवेशनम् ॥ ६ ॥ स्वच्छंदमृत्युर्देवानां सहक्रीडानुदर्शनम् ॥ यथा संकल्पसंसिद्धिराज्ञाऽप्रतिहता गतिः ॥ ७ ॥ त्रिकालज्ञत्व-मद्वंद्वं परचित्ताद्यभिज्ञता ॥ अग्न्यर्काम्बुविषादीनां प्रतिष्टंभोऽपराजयः ॥ ८ ॥

क्यो निरतिशयाश्चेत्यर्थः ॥ ५ ॥ गुणहेतुसिद्धीराह । अनूर्मिमत्त्वं क्षुत्पिपासादिराहित्यम् । दूरे श्रवणं दर्शनं चेति द्वे सिद्धी । मनोवेगेन देहस्य गतिः । कामितरूपप्राप्तिः । परकाये प्रवेशः ॥ ६ ॥ स्वेच्छामृत्युः । अप्सरोभिः सह देवानां याः क्रीडास्तासामनुदर्शनं प्राप्तिः । संकल्पानुरूपप्राप्तिः । अप्रतिहता आसमंताद्गतिर्यस्याः सा आज्ञा चेत्येता दश ॥ ७ ॥ क्षुद्रसिद्धीश्च पंचाह । त्रिकालज्ञत्वमिति । अद्वंद्वं शीतोष्णाद्यनभिभवः । अग्न्यादीनां संस्तंभनम् ॥ ८ ॥

॥ ४ ॥ ७-वी वशिता (विषय भोगीत असतांहि असंगपणा) आणि ८-वी प्राकाम्य (जें जें सुख प्राप्त होण्याची इच्छा होईल तेंतें पराकाष्ठेचें प्राप्त होणें) हे उद्धवा, ह्या आठ सिद्धि माझेठिकाणीं स्वाभाविक असून निरतिशय आहेत ॥ ५ ॥ आतां सत्वगुणोत्कर्षाच्या सिद्धींचीं नांवें सांगतो—या देहाचेठिकाणीं ९-अनूर्मिमत्व (क्षुधा तृषावगैरे न लागणें) १०-दूरश्रवण (दुरून ऐकणें) ११-दूरदर्शन (दुरून पाहणें) १२-मनोजव (मनासारख्या वेगानें देहाची गति) १३-कामरूप (इच्छित स्वरूपाची प्राप्ति) १४-परकायप्रवेश (दुसऱ्याच्या देहांत प्रवेश करणें) १५-स्वच्छंदमृत्यु (आपल्या इच्छेप्रमाणें मरण) १६-देवांच्या सहक्रीडेचें दर्शन (अप्सरांसहवर्तमान देवांच्या ज्या क्रीडा होतात त्यांचें दर्शन) १७-यथासंकल्पसंसिद्धि (संकल्पानुरूप प्राप्ति होणें) १८-आणि जिची गति कोठेंच कुंठित होत नाहीं अशी आज्ञा ह्या दहा सत्वोत्कर्षाच्या सिद्धि होत ॥ ६ ॥ ७ ॥ आतां क्षुद्रसिद्धि सांगतो—त्रिकालज्ञान होणें, शीत उष्ण इत्यादिकांनीं पराभव न होणें, दुसऱ्यांच्या चित्तादिकांनां जाणणें, अग्नि, ॥ ९७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सूर्य, जळ, विष इत्यादिकांचें स्तंभन करणें व कोणत्याहि स्थळीं पराभव न पावणें ॥ ८ ॥ ह्या योगधारणांनीं होणाऱ्या मुख्य मुख्य सिद्धि मी तुला सांगितल्या आहेत. आतां ज्याज्या धारणेनें जीजी सिद्धि ज्याज्या प्रकारची होत्ये तें मी तुला सांगतों श्रवण कर ॥ ९ ॥ शब्दस्पर्शरूपरसगंधरूप सूक्ष्म भूतांची उपासना करणारा जो पुरुष, शब्दस्पर्शादिरूपी माझेठिकाणीं तदाकार झालेलें मन धारण करितो तो माझ्या अणिमानामक सिद्धीला पावतो ॥ १० ॥ ज्ञानशक्तिमान् महत्तत्त्वरूपी मज परमेश्वराचे- ठिकाणीं महत्तत्वाकार झालेल्या मनाची धारणा करणारा पुरुष, महिमानामक सिद्धीला पावतो आणि आकाशादि महाभूतरूपी माझेठिकाणीं मनाची धारणा करणारा

तत्तद्धारणाभिः सह विशेषतो निरूपयति । ययेति यावत्समाप्ति ॥ ९ ॥ भूतसूक्ष्मोपाधौ मयि तन्मात्रं भूतसूक्ष्माकारम् । स तन्मात्रोपासकः । मम मदीयमणिमानम् ॥ १० ॥ ज्ञानशक्तिमहत्तत्त्वोपाधौ मयि । यथासंख्यं महत्तत्त्वाकारम् । भूतानां चेति । आकाशादिभूतोपाधौ च मयि मनो धारयंस्तत्तद्भूतमहिमानं प्राप्नोतीत्यर्थः ॥ ११ ॥ वाय्वादि- भूतानां ये परमाणवस्तन्मये तदुपाधौ मयि चित्तं रंजयन् योगी कालसूक्ष्मार्थतां कालपरमाणूपाधिरूपतामिति लघुत्वविवरणम् । तदुक्तम् । स कालः परमाणुर्वै यो भुंक्ते परमा-

एता श्चोद्देशतः प्रोक्ता योगधारणसिद्धयः ॥ यया धारणया यास्याद्यथा वा स्यान्निबोध मे ॥ ९ ॥ भूतसूक्ष्मात्मनि मयि तन्मात्रं धारयेन्मनः ॥ अणिमानमवाप्नोति तन्मात्रोपासको मम ॥ १० ॥ महत्यात्मन्मयि परे यथासंस्थं मनो दधत् ॥ महिमानमवाप्नोति भूतानां च पृथक्पृथक् ॥ ११ ॥ परमाणुमये चित्तं भूतानां मयि रंजयन् ॥ कालसूक्ष्मार्थतां योगी लघिमानमवाप्नुयात् ॥ १२ ॥ धारयन्मय्यहं तत्त्वे मनो वैकारिकेऽखिलम् ॥ सर्वेंद्रियाणामात्मत्वं प्राप्तिं प्राप्नोति मन्मनाः ॥ १३ ॥ महत्यात्मनि यः सूत्रे धारयेन्मयि मानसम् ॥ प्राकाश्यं पारमेष्ठ्यं मे विंदतेऽव्यक्तजन्मनः ॥ १४ ॥ विष्णौ त्र्यधीश्वरे चित्तं धारयेत्कालविग्रहे ॥ स ईशित्वमवाप्नोति क्षेत्रक्षेत्रज्ञचोदनाम् ॥ १५ ॥

णुतामिति ॥ १२ ॥ वैकारिकाहंकारोपाधौ मयि । अखिलमेकाग्रम् । आत्मत्वमधिष्ठातृत्वम् । अत्र हेतुः । मन्मनाः । मयि मनोधारणप्रभावादेवं भवति नात्रातीव हेतुरनुसंधेय इति भावः । एवं मद्धारणानुभावेन मद्योगबलमाश्रय इत्यादिषु द्रष्टव्यम् ॥ १३ ॥ क्रियाशक्तिप्रधानं महत्तत्त्वमेव सूत्रं तदुपाधौ मयि स मे पारमेष्ठ्यं सर्वोत्कृष्टं प्राकाश्यं विंदते । कथंभूतस्य । अव्यक्ताज्जन्म यस्य तस्य सूत्रस्य । तदुपाधेर्ममेत्यर्थः ॥ १४ ॥ त्र्यधीश्वरे त्रिगुणमायानियंतरि अतएव कालविग्रहे आकलयितृरूपेऽतर्यामिणि । ईशित्वं विशि- नष्टि । क्षेत्रज्ञानां जीवानां क्षेत्राणां तदुपाधीनां च चोदनां प्रेरणं न तु विश्वसृष्ट्यादिकर्तृत्वलक्षणमित्यर्थः ॥ १५ ॥

पुरुष, त्यात्या महाभूताच्या महिम्याप्रत पावतो ॥ ११ ॥ वायूवगैरे पंचमहाभूतांच्या परमाणुस्वरूपी माझेठिकाणीं मनाची धारणा करणारा योगी, काळाची परमाणु- रूप स्थिति अशा लघिमानामक सिद्धीप्रत पावतो ॥ १२ ॥ सात्विकाहंकाररूप माझेठिकाणीं एकाग्र झालेल्या मनाची धारणा करणारा माझा उपासक, सर्व प्राणिमात्रांच्या इंद्रियद्वारा विषयग्रहणसामर्थ्यरूप प्राप्तिनांवाच्या सिद्धीला पावतो ॥ १३ ॥ क्रियाशक्तिप्रधान जें महत्तत्व तेंच सूत्र होय तद्रूपी माझेठिकाणीं जो मनाची धारणा करितो तो त्या सूत्रोपाधिक माझ्या सर्वोत्कृष्ट ब्रह्मांडांतील ज्ञानरूप प्राकाश्यनामक सिद्धीला पावतो ॥ १४ ॥ त्रिगुणात्मक मायेचा नियंता, काळरूपी व अंतर्यामी विष्णूचे- ठिकाणीं जो चित्ताची धारणा करील तो देहेंद्रियांतःकरणसमुदायरूप देहांच्या व जीवांच्या प्रेरणा करण्याच्या सामर्थ्यरूप ईशितानामक सिद्धीला पावतो ॥ १५ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विराट्, हिरण्यगर्भ आणि कारण या तिन्ही उपाधींनीं रहित अथवा जाग्रत् स्वप्न आणि सुषुप्ति ह्या तिन्ही अवस्थांचा साक्षी अशा तुरीयनामक, पूर्ण ऐश्वर्य, पूर्ण धर्म, पूर्ण यश, पूर्ण संपत्ति, पूर्ण ज्ञान आणि पूर्ण वैराग्य यांनीं संपन्न अशा मज नारायणाचेठिकाणीं माझ्या उपासनेनें एकाग्र झालेलें मन धारण करणारा योगी, विषयांचे-ठिकाणीं अनासक्तिरूप वशितानामक सिद्धीला पावतो ॥ १६ ॥ निर्गुण ब्रह्मरूप माझेठिकाणीं स्वच्छ झालेल्या मनाचें धारण करणारा योगी, परमानंदरूप प्राकाम्यनामक सिद्धीला पावतो. ह्या सिद्धीमध्यें सर्वप्रकारचे मनोरथ परिपूर्ण होतात ॥ १७ ॥ आतां सत्वगुणोत्कर्षरूप सिद्धि सांगतो–शुद्धसत्वात्मक व धर्मप्रवर्तक अशा अनिरुद्धरूपी माझेठिकाणीं मनाची धारणा करणारा मनुष्य, शुद्ध होऊन क्षुधा, तृषा, शोक, मोह, जरा व मृत्यु या धर्मांनीं रहित होण्याच्या अनूर्मिमत्त्वनामक सिद्धीला पावतो ॥ १८ ॥

तुरीयाख्ये विराट् हिरण्यगर्भश्च कारणं चेत्युपाधयः । ईशस्य यत्रिभिर्हीनं तुरीयं तत्पदं विदुरित्येवंलक्षणे । ऐश्वर्यस्य समग्रस्य धर्मस्य यशसः श्रियः ॥ ज्ञानवैराग्ययोश्चैव षण्णां भग इतीरणा ॥ तद्वति भगवच्छब्दशब्दिते ॥ १६ ॥ यत्र परमानंदरूपे सर्वोऽपि कामस्तदंशभूतोऽवसीयते समाप्यते तम् ॥ १७ ॥ अतःपरं गुणहेतुकाः सिद्धीराह । शुद्धे सत्वात्मके । श्वेततां शुद्धरूपताम् ॥ १८ ॥ आकाशात्मा यः प्राणः समष्टिरूपस्तद्रूपे मयि मनसा घोषं नादं चिंतयन्नसौ हंसो जीवस्तत्राकाशे उपलब्धा ज्ञाता संस्तत्रस्था विचित्रा वाचः शृणोति । यद्वा तत्राकाशे उपलब्धा अभिव्यक्ता या वाचस्ता दूरतः शृणोतीति ॥ १९ ॥ त्वष्टा आदित्यस्तस्मिन्नपरिच्छिन्ने चक्षुः संयोज्य तं च चक्षुषि संयोज्य तत्रो-

नारायणे तुरीयाख्ये भगवच्छब्दशब्दिते ॥ मनो मय्यादधद्योगी मद्धर्मा वशितामियात् ॥ १६ ॥ निर्गुणे ब्रह्मणि मयि धारयन्विशदं मनः ॥ परमानंदमाप्नोति यत्र कामोऽवसीयते ॥ १७ ॥ श्वेतद्वीपपतौ चित्तं शुद्धे धर्ममये मयि ॥ धारयञ्छ्वेततां याति षडूर्मिरहितो नरः ॥ १८ ॥ मय्याकाशात्मनि प्राणे मनसा घोषमुद्वहन् ॥ तत्रोपलब्धा भूतानां हंसो वाचः शृणोत्यसौ ॥ १९ ॥ चक्षुस्त्वष्टरि संयोज्य त्वष्टारमपि चक्षुषि ॥ मां तत्र मनसा ध्यायन्विश्वं पश्यति सूक्ष्मदृक् ॥ २० ॥ मनो मयि सुसंयोज्य देहं तदनुवायुना ॥ मद्धारणानुभावेन तत्रात्मा यत्र वै मनः ॥ २१ ॥ यदा मन उपादाय यद्यद्रूपं बुभूषति ॥ ततद्भवेन्मनोरूपं मद्योगबलमाश्रयः ॥ २२ ॥

भयसंयोगे मां ध्यायन् विश्वं दूरतः पश्यति ॥ २० ॥ मनो देहं च तदनुवर्तिना वायुना सह मयि सुसंयोज्य या मद्धारणा क्रियते तस्याः प्रभावेण यत्र मनो याति तत्रात्मा देहो यातीत्यर्थः । यद्वा मनः कर्तृं आत्मानं वायुना सह देहं च मयि सुसंयोज्य यत्र याति तदनु तत्र देहो यातीति ॥ २१ ॥ मन उपादाय उपादानकारणं कृत्वा यद्य-देवादिरूपं भवितुमिच्छति तत्तन्मनोरूपं मनसोऽभीष्टरूपं योगी भवेत् । कुतः । यतो मद्योगबलम् । योऽहमचिंत्यशक्तिर्नानाकारस्तस्मिन्मयि मनसो योगो धारणा तस्य बलं प्रभावः स एवाश्रयः कारणम् ॥ २२ ॥

आकाशरूपी ह्मणजे आकाशासारखा निर्मळ व सर्वव्यापक अशा जगत्प्राणरूप माझेठिकाणीं मनानें नादाचें चिंतन करणारा हा जीव, त्या आकाशामध्यें प्रकट झालेल्या सर्व प्राण्यांच्या वाणी श्रवण करितो आणि दूरश्रवणरूप सिद्धीला पावतो ॥ १९ ॥ आदित्यामध्यें चक्षुरिंद्रियाचा आणि चक्षूचेठिकाणीं आदित्याचा संयोग करून त्या उभयतांच्या संयोगामध्यें माझें चिंतन करणारा पुरुष, सूक्ष्मदृष्टि होऊन सर्व जगाला पाहतो ह्मणजे दूरदर्शनरूप सिद्धीला पावतो ॥ २० ॥ मन व देह या दोन्हींचा देहांत असलेल्या प्राणवायूसहवर्तमान माझेठिकाणीं संयोग करून माझी धारणा केली असतां, तिच्या प्रभावानें जेथें त्याचें मन जातें तेथेंच देहहि जाऊन पोंचतो, ह्मणजे त्याला मनोजवरूप सिद्धि प्राप्त होत्ये ॥ २१ ॥ अचिंत्यशक्ति व अनेक प्रकारचे आकार धारण करणाऱ्या माझेठिकाणीं जी मनाची धारणा केली जात्ये तिच्या बळाच्या ॥ ५८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आश्रयानें हा योगी, जेव्हां मनाला उपादान कारण करून जें जें देवादिरूप प्राप्त होण्याची इच्छा करितो, तेंतें मनानें इच्छिलेलें स्वरूप धारण करून प्राकम्यनामक सिद्धीला पावतो ॥ २२ ॥ परकायामध्यें प्रवेश करणाऱ्या सिद्धानें, त्या देहामध्यें आपल्या आत्म्याचें चिंतन करावें; आणि आपला स्थूलदेह सोडून देऊन, लिंगशरीररूप उपाधीसहवर्तमान वायुरूप मार्गाच्या आश्रयानें, जसा भ्रमर एका फुलावरून दुसऱ्या फुलावर जातो त्याप्रमाणें परदेहामध्यें प्रवेश करावा ॥ २३ ॥ आतां आपला देह सोडून देऊन, असें सांगितलें त्याचा प्रकार सांगत स्वच्छंदमृत्युरूप सिद्धि सांगतो–योग्यानें पायांच्या खोंटेनें गुदद्वाराचा निरोध करून प्राणोपाधिक आत्म्याला क्रमानें हृदय, उर, कंठ व मूर्धा या स्थांनीं नेऊन ब्रह्मरंध्रद्वारा ब्रह्मामध्यें किंवा दुसऱ्या इच्छित स्थानामध्यें मनानें नेऊन देहाचा त्याग करावा ॥ २४ ॥

यत्र प्रविविक्षति तत्रात्मानं चिंतयेत् । ततः पिंडं स्वदेहं हित्वा प्राणः प्राणप्रधानलिंगशरीरोपाधिर्वायुभूतो बाह्यवायौ भूतः प्रविष्टस्तेन मार्गेणेत्यर्थः । षडंघ्रिवत् भृंगो यथा पुष्पात्पुष्पांतरमनायासेन प्रविशति यद्वत् ॥ २३ ॥ पिंडं हित्वेत्युक्तं तत्प्रकारं कथयन्स्वच्छंदमृत्युमाह । पाष्ण्या पार्ष्णिना गुदं निरुध्य प्राणं प्राणोपाधिमात्मानं ब्रह्मरंध्रेण मूर्धद्वारेण । ब्रह्मेत्युपलक्षणम् । ब्रह्म वा अन्यद्वा अपेक्षितं स्थानं मनसा नीत्वा ॥ २४ ॥ मत्स्थं मन्मूर्तिरूपं शुद्धं सत्वं चिंतयेत् । तदा सत्ववृत्तयः सत्वांशभूताः ॥ २५ ॥ यदा वा अकालेऽपि । यथा वेति पाठे यथा वा येन केनापि प्रकारेण । बुद्ध्या संकल्पयेत्तत्तथा यथावत्प्राप्नोतीत्यर्थः । यद्वा यथा संकल्पयेद्यथा वा मत्परो मयि विश्वासवान्

परकायं विशन्सिद्ध आत्मानं तत्र भावयेत् ॥ पिंडं हित्वा विशेत्प्राणो वायुभूतः षडंघ्रिवत् ॥ २३ ॥ पाष्ण्यापीड्य गुदं प्राणं हृदुरःकंठमूर्धसु ॥ आरोप्य ब्रह्मरंध्रेण ब्रह्म नीत्वोत्सृजेत्तनुम् ॥ २४ ॥ विहरिष्यन्सुराक्रीडे मत्स्थं सत्वं विभावयेत् ॥ विमानेनोपतिष्ठंति सत्ववृत्तीः सुरस्त्रियः ॥ २५ ॥ यथा संकल्पयेद्बुद्ध्या यदा वा मत्परः पुमान् ॥ मयि सत्ये मनो युंजंस्तथा तत्समुपाश्नुते ॥ २६ ॥ यो वै मद्भावमापन्न ईशितुर्वशितुः पुमान् ॥ कुतश्चिन्न विहन्येत तस्य चाज्ञा यथा मम ॥ २७ ॥ मद्भक्त्या शुद्धसत्वस्य योगिनो धारणाविदः ॥ तस्य त्रैकालिकी बुद्धिर्जन्ममृत्यूपबृंहिता ॥ २८ ॥

भवति तथा तदनुरूपं सर्वमाप्नोतीत्यर्थः । किं कुर्वन् । सत्ये सत्यसंकल्पे मयि मनो युंजन् ॥ २६ ॥ मदिति पृथक् पदम् । ममेत्यर्थः । ईशितुः सर्वनियंतुर्वशितुः स्वतंत्रस्य मम भावं स्वभावं प्राप्तः । एता गुणहेतवः ॥ २७ ॥ अतःपरं क्षुद्राः धारणाविद इति त्रिकालज्ञेश्वरधारणा सूचिता । त्रैकालिकी त्रिकालवस्तुविषया । स्वजन्ममृत्युभ्यामुपबृंहिता तत्सहिता । अनयैव परचित्ताद्यभिज्ञताऽपि व्याख्याता ॥ २८ ॥

आतां देवक्रीडानुदर्शनसिद्धि सांगतो–जेथें देव क्रीडा करितात अशा विमानादिकांमध्यें अप्सरांसहवर्तमान क्रीडा करण्याची इच्छा करणाऱ्या पुरुषानें, माझी मूर्तीच अशा शुद्धसत्वाचें चिंतन करावें म्हणजे त्या सत्वगुणाच्या अंशभूत अप्सरा, विमानासहवर्तमान त्याच्या समीपभागीं प्राप्त होतात ॥ २५ ॥ माझ्या आराधनाविषयीं तत्पर असलेला पुरुष, सत्यसंकल्प अशा माझेठिकाणीं मनाची धारणा करून, ज्यावेळीं ज्याप्रकारच्या वस्तूचा बुद्धीनें संकल्प करील त्यावेळीं त्याप्रकारची वस्तु त्याला उत्तमप्रकारें प्राप्त होईल ॥ २६ ॥ जो पुरुष, सर्वनियंता व स्वतंत्र अशा माझ्या स्वभावाशीं ध्यानयोगानें ऐक्य पावला आहे त्याची आज्ञा, जशी माझी आज्ञा कोणीहि मोडीत नाहीं तशी कोणीहि मोडीत नाहीं. ह्या दहा गुणनिमित्तक सिद्धि होत ॥ २७ ॥ आतां त्रिकालज्ञत्वादिक क्षुद्र सिद्धि सांगतो– माझ्या भक्तीनें शुद्धचित्त झालेला व माझी धारणा जाणणारा जो पुरुष असेल त्याला भूतभविष्यवर्तमान काळच्या ज्ञानाची सिद्धि व स्वतांच्या जन्ममरणज्ञानाची सिद्धि प्राप्त होत्ये आणि या धारणेनेंच दुसऱ्याच्या चित्ता-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दिकांच्या ज्ञानाचीहि सिद्धि प्राप्त होत्ये ॥ २८ ॥ अग्नि, सूर्य, इत्यादिक उपघातांनीं रहित अशा माझ्या धारणेनें शांतचित्त झालेल्या मुनीचें प्रणायामादि योगसाधनांनीं स्वाधीन करून घेतलेलें शरीर, जसें मत्स्यादिक जलजंतूंचें शरीर उदकापासुन कोणत्याहि प्रकारें नाश पावत नाहीं त्याप्रमाणें अग्नि, सूर्य, जळ, विष इत्यादिकांनीं कोणत्याहिप्रकारें नाश पावत नाहीं. याच धारणेनें अद्वंद्वता (शीतउष्णादिकांनीं पराभव न पावणें) ही सिद्धिहि प्राप्त होत्ये ॥ २९ ॥ श्रीवित्सलांछनादिक चिन्हें, चक्रादिक आयुधें आणि ध्वजछत्रचामरादिक राजलक्षणें यांनीं भूषित अशा माझ्या अवतारांचें जो पुरुष ध्यान करितो तो सर्वठिकाणीं जय पावतो ॥ ३० ॥ याप्रमाणें निरनिराळ्या योगधारणेनें माझी उपासना करणाऱ्या मुनीला, पूर्वीं सांगितलेल्या सर्व सिद्धि प्राप्त होतात ॥ ३१ ॥ किंवा अनेक धारणा करण्याचा प्रयास करण्याची आवश्यकताच नाहीं;

अग्न्यादिसर्वोपघातशून्यो भगवानित्येवंभूतयोगमयं तैर्नाभिभूयेत । अत्र हेतुः । मद्योगेति । यादसामुदकं यथाऽभिघातकं न भवति तथा तस्य वपुषोऽग्न्यादय इत्यर्थः । अनयैवाद्वंद्वताऽपि व्याख्याता ॥ २९ ॥ मद्विभूतीर्ममावतारान् । ध्वजादिभिः सह ॥ ३० ॥ उपसंहरति । उपासकस्येति । एवं पृथग्धारणाभिः ॥ ३१ ॥ यद्वा किं नानाधारणाप्रयासेन एकयैव सर्वाः सिद्धयो भवंतीत्याह । जितेंद्रियस्येति । मद्धारणां नारायणे तुरीयाख्य इत्यत्रोक्ताम् । या सुदुर्लभा स्यात्सा का । न काचिदित्यर्थः ॥ ३२ ॥ यद्यप्येवं तथापि न प्रार्थ्या इत्याह । अंतरायानिति ॥ ३३ ॥ तस्मादहैतुकीयमेव धारणा कार्या नान्याः काम्या इत्याह । जन्मेति । जन्मनैव काश्चित्सिद्धयो भवंति । यथा देवानां

अग्न्यादिभिर्न हन्येत मुनेर्योगमयं वपुः ॥ मद्योगश्रांतचित्तस्य यादसामुदकं यथा ॥ २९ ॥ मद्विभूतीरभिध्यायन् श्रीवत्सास्त्रविभूषिताः ॥ ध्वजातपत्रव्यजनैः स भवेदपराजितः ॥ ३० ॥ उपासकस्य मामेवं योगधारणया मुनेः ॥ सिद्धयः पूर्वकथिता उपतिष्ठंत्यशेषतः ॥ ३१ ॥ जितेंद्रियस्य दांतस्य जितश्वासात्मनो मुनेः ॥ मद्धारणा धारयतः का सा सिद्धिः सुदुर्लभा ॥ ३२ ॥ अंतरायान्वदंत्येता युंजतो योगमुत्तमम् ॥ मया संपद्यमानस्य कालक्षपणहेतवः ॥ ३३ ॥ जन्मौषधितपोमंत्रैर्यावतीरिह सिद्धयः ॥ योगेनाप्नोति ताः सर्वा नान्यैर्योगगतिं व्रजेत् ॥ ३४ ॥ सर्वासामपि सिद्धीनां हेतुः पतिरहं प्रभुः ॥ अहं योगस्य सांख्यस्य धर्मस्य ब्रह्मवादिनाम् ॥ ३५ ॥

यथा च यादसामुदकस्तंभः पक्ष्यादीनां खेचरत्वादि । तदुक्तं पातंजले । जन्मौषधितपोमंत्रयोगजाः सिद्धय इति । योगेन मद्धारणामित्युक्तेन । योगगतिं मत्सालोक्यादिरूपाम् ॥ ३४ ॥ कुत इत्यत आह । सर्वासामित्यर्धेन । प्रभुत्वोपपादनं हेतुः कारणं पतिः पालयिता चेति । किंच न केवलं सिद्धीनामेव प्रभुरपितु मोक्षादीनामपीत्याह । अहमिति । योगो मोक्षः सांख्यं तत्साधनं ज्ञानम् । धर्मस्य तदुपदेष्टॄणां ब्रह्मवादिनां च ॥ ३५ ॥

कारण, इंद्रियांचा, मनाचा व श्वासवायूचा जय करणाऱ्या व पूर्वीं वशितानामक सिद्धीच्या प्रकरणीं सांगितलेल्या तुरीयनामक भगवान् नारायणाचेठिकाणीं मनाची धारणा करणाऱ्या मुनीला, अत्यंत दुर्लभ अशी सिद्धि कोणती आहे ? कोणतीच नाहीं. ह्मणजे त्या एका धारणेनेंच सर्वहि सिद्धि त्याला प्राप्त होतात ॥ ३२ ॥ असें जरी आहे तथापि त्या सिद्धीची अपेक्षा करूं नये. कारण, उत्तम योग (माझी उपासना) करणाऱ्या व माझी लवकर प्राप्ति करून घेण्याविषयीं अधिकारी असलेल्या योग्याला, ह्या सिद्धि, माझ्या प्राप्तीविषयीं मध्यें जन्मभोगादिकेंकरून कालविलंब लागण्यास कारण होतात ह्मणून, ह्या विघ्नरूप आहेत असें वृद्धपुरुष ह्मणतात ॥ ३३ ॥ ह्या जन्मामध्यें जन्म, ओषधि, तप व मंत्र यांच्या योगेंकरून जितक्या ह्मणून सिद्धि प्राप्त होतात त्या सर्वहि सिद्धींना, पूर्वोक्त तुरीय नामक नारायणाच्या धारणायोगानें योगी पावतो परंतु जन्म ओषधि इत्यादिक साधनांनींमात्र त्या माझ्या सालोक्यादिरूप सिद्धीला पावत नाहीं ॥ ३४ ॥ कां ह्मटलें तर– मी सर्वहि सिद्धींना देणारा, व त्यांचें रक्षण करणार

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रभु आहें. केवळ प्रभु आहें इतकेंच नाहीं तर– मोक्षाचा व मोक्षाला साधनभूत असलेल्या ज्ञानाचा, तसाच धर्माचा व त्याचा उपदेश करणाऱ्या ब्रह्मवेत्त्या साधूंचाहि प्रभु आहें ॥ ३५ ॥ याचें तरी कारण, जशीं पंचमहाभूतें जरायुजादिक चतुर्विध प्राण्यांच्या शरीरांमध्यें आंत, व बाहेर व्यापून आहेत त्याप्रमाणें सर्व जीवांचा अंतर्यामी आत्मा मीहि, सर्वांच्या आंत व बाहेर व्यापक असूनहि अपरिच्छिन्न आहें ॥ ३६ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या एकादशस्कंधांत सिद्धिनिरूपणनामक हा पंधरावा अध्याय

कुतस्तत्राह । अहमिति । सर्वदेहिनां जीवानामात्मा । यत आंतरोंऽतर्यामी । एष त आत्मांतर्याम्यमृत इति श्रुतेः । तर्हि किमंतर्वर्तित्वात्परिच्छिन्नः । न बाह्यश्च व्यापक इत्यर्थः । तत्र हेतुः । अनावृतः एतत्सदृष्टांतमाह । भूतेषु चतुर्विधेषु महाभूतानि यथा बहिश्चांतश्च भवंति स्वयमहमपि तथेत्यर्थः ॥ ३६ ॥ इति श्रीमद्भागवते एकादशस्कंधे टीकायां पंचदशोऽध्यायः ॥ १५ ॥ ॥ षोडशे तु हरेराविर्भावयुक्ता विभूतयः ॥ ज्ञानवीर्यप्रभावादिविशेषेणोपवर्णिताः ॥ १ ॥ अंतश्चित्तेन यद्ध्यानमशक्यमकृतात्मनाम् ॥ अतस्तद्योग्यताप्त्यै विभूत्यादिनिरूपणम् ॥ २ ॥ एवं तावन्नवाध्याय्यामष्टप्रश्ना निरूपिताः ॥ ब्रह्मत्वसंभवे तावत्सप्तमादिचतुष्टये ॥ ३ ॥ बंधमुक्त्योस्तु निर्धारे सद्भक्त्योश्च ततः परे ॥ द्वादशेऽनंतरं कर्मकृतित्यागव्यवस्थितौ ॥ ४ ॥ हंसेतिहासतो योगनिष्ठायां च त्रयोदशे ॥ श्रेयःसाधननिर्धारे ध्याने चैव चतुर्दशे ॥ ५ ॥ धारणासिद्धिभेदे च प्रसंगेन निरंतरे ॥ उद्धवप्रश्नतो दत्तमुत्तरं हरिणोचितम् ॥ ६ ॥ षोडशे भूतिविस्तारे द्वयोर्वर्णाश्रमव्रते ॥ ज्ञानादिनिर्णये चातो यमादीनां च निर्णये ॥ ७ ॥ योगत्रयाधिकारे तु विंशे च तदनंतरे ॥

अहमात्मांतरो बाह्योऽनावृतः सर्वदेहिनाम् ॥ यथा भूतानि भूतेषु बहिरंतः स्वयं तथा ॥ ३६ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे पंचदशोऽध्यायः ॥ १५ ॥ ॥ उद्धव उवाच ॥ त्वं ब्रह्म परमं साक्षादनाद्यंतमपावृतम् ॥ सर्वेषामपि भावानां त्राणस्थित्यप्ययोद्भवः ॥ १ ॥ उच्चावचेषु भूतेषु दुर्ज्ञेयमकृतात्मभिः ॥ उपासते त्वां भगवन्याथातथ्येन ब्राह्मणाः ॥ २ ॥

तत्वसंख्याविवादे च पुंप्रकृत्योर्विवेचने ॥ ८ ॥ जन्ममृत्युप्रकारे च द्वाविंशे दत्तमुत्तरम् ॥ परापराधसहने चतुर्भिस्तदनंतरैः ॥ ९ ॥ सप्तविंशे क्रियायोगप्रश्ने तदुपवर्णनम् ॥ अष्टाविंशे ततः प्रोक्ता ज्ञानयोगोपसंहृतिः ॥ १० ॥ संसारासंभवप्रश्ने तन्मध्ये दत्तमुत्तम् ॥ तदशक्त्या पुनः प्रश्ने भक्तियोगोपसंहृतिः ॥ ११ ॥ एवं प्रश्नोत्तराण्यत्र क्रमेणैतानि विंशतिः ॥ १२ ॥ अहमात्मांतरो बाह्योऽनावृतः सर्वदेहिनाम् ॥ यथा भूतानि भूतेषु बहिरंतः स्वयं तथेत्युक्तं तत्र भूतानि यथा क्वचित्केनचिद्गुणविशेषेणोद्रिक्तानि वर्तंते क्वचित्सामान्यरूपेणैव तथा त्वमपि क्व कथं वर्तस इति विभूतीः प्रष्टुं प्रथमं तावदुक्तमेव सर्वात्मकत्वमनुवदति । त्वं ब्रह्मेति । अपावृतं निरावरणं स्वतंत्रं वा । अतएव सर्वेषामपि त्राणं रक्षणम् । स्थितिर्जीवनम् । त्राणस्थितिसहितावप्ययोद्भवौ यस्मात् । सत्वमुपादानकारणमित्यर्थः ॥ १ ॥ अत्र सदाचारं प्रमाणमाह । याथातथ्येन । यथार्थत्वेन । सर्वभूतकारणं त्वाम् । ब्राह्मणा वेदतात्पर्यविदः ॥ २ ॥

समाप्त झाला ॥ १५ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या सोळाव्या अध्यायामध्यें, ज्ञान, वीर्य, प्रभाव इत्यादिकांच्या विशेषानें प्रकट झालेल्या भगवंताच्या अवताररूप विभूति वर्णन केल्या आहेत ॥ १ ॥ जसे प्राणी, कोठें संपत्तिप्रभृति गुणांनीं विशिष्ट असतात व कोठें नसतात तसा तूं कोठें कसा राहतोस? अशा विभूति विचारण्याकरितां उद्धव म्हणाला– हे कृष्णा, ज्याला आदि नाहीं, अंत नाहीं व आवरण नाहीं असें साक्षात् परब्रह्म तूं असून सर्वेहि प्राण्यांची जीविका चालविणारा व उत्पत्तिस्थितिसंहार करणारा तूंच आहेस ॥ १ ॥ हे भगवन्, ज्यांनीं आपलें मन जिंकिलें नाहीं त्यांनीं जाणण्यास अशक्य अशाहि तुला, वेदाचा अभिप्राय जाणणारे ब्राह्मण, लहानमोठ्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पदार्थांमध्यें यथार्थत्वेंकरून जाणून तुझी उपासना करितात ॥ ३ ॥ ते विवेकी ब्राह्मण, ज्या ज्या पदार्थांचेठिकाणीं भक्तीनें तुझी उपासना करित होत्साते मोक्ष पावतात तें मला सांग ॥ ३ ॥ हे भूतपालका, जो प्राण्यांच्या अंतर्यामी तूं, सर्व प्राण्यामध्यें गुप्तरूपानें राहिला आहेस, त्या तूं मोहित केलेले सर्व प्राणी, पाहणाऱ्याहि तुला पाहत नाहींत ॥ ४ ॥ यास्तव हे महाविभूते, भूमीवर, स्वर्गावर, पाताळामध्यें व दिशांचेठिकाणीं, कांहींएक शक्तिविशेषानें तूंच संयोजित केलेल्या ज्या कांहीं तुझ्या विभूति आहेत त्या सर्व मला सांग. सर्वतीर्थांचें स्थानरूप अशा तुझ्या चरणकमळाला मी नमस्कार करितों ॥ ५ ॥ श्रीभगवान् ह्मणाला— हे प्रश्नवेत्त्यांमध्यें श्रेष्ठा उद्धवा, जसा तूं

एवं कारणत्वेन सर्वात्मत्वमनूद्य विभूतीः पृच्छति । येष्विति । उपासीनाः सेवमानाः संतः ॥ ३ ॥ दुर्ज्ञेयत्वमेवाह । गूढः अस्फुटः । भूतानां प्राणिनां मध्ये । अत्र हेतुः । भूतानामात्मा अंतर्यामी । अत्रापि हेतुः । हे भूतभावनेति । ते त्वया ॥ ४ ॥ ता एव साकल्येन पृच्छति । हे महाविभूते याः काश्चिद्भूम्यादिषु ते विभूतयः । रसायां रसातले । अनुभावितास्त्वयैव केनचिच्छक्तिविशेषेण संयोजिताः । तीर्थानां पदं च तदंघ्रिपद्मं च ॥ ५ ॥ नरावतारभूतार्जुनप्रश्नसंवादित्वात्तवायं प्रश्नः साधीयानिति तावदनुमोदते । एवमिति त्रिभिः । प्रश्नं प्रष्टव्यम् । सपत्नैर्योद्धुमिच्छता । विनशने कुरुक्षेत्रे ॥ ६ ॥ युयुत्सोर्विभूतिप्रश्ने कः प्रसंगस्तत्राह । ज्ञात्वेति । लौकिकः प्राकृतमतिः सन् ॥ ७ ॥ स च यदा

येषु येषु च भावेषु भक्त्या त्वां परमर्षयः ॥ उपासीनाः प्रपद्यंते संसिद्धिं तद्वदस्व मे ॥ ३ ॥ गूढश्चरसि भूतात्मा भूतानां भूत-
भावन ॥ न त्वां पश्यंति भूतानि पश्यंतं मोहितानि ते ॥ ४ ॥ याः काश्च भूमौ दिवि वै रसायां विभूतयो दिक्षु महाविभूते ॥ ता
मह्यमाख्याह्यनुभावितास्ते नमामि ते तीर्थपदांघ्रिपद्मम् ॥ ५ ॥ श्रीभगवानुवाच ॥ एवमेतदहं पृष्टः प्रश्नं प्रश्नविदांवर ॥ युयुत्सु-
ना विनशने सपत्नैरर्जुनेन वै ॥ ६ ॥ ज्ञात्वा ज्ञातिवधं गर्ह्यमधर्मं राज्यहेतुकम् ॥ ततो निवृत्तो हंताहं हतोऽयमिति लौकिकः ॥ ७ ॥
स तदा पुरुषव्याघ्रो युक्त्या मे प्रतिबोधितः ॥ अभ्यभाषत मामेवं यथा त्वं रणमूर्धनि ॥ ८ ॥ अहमात्मोद्धवाममीषां भूतानां
सुहृदीश्वरः ॥ अहं सर्वाणि भूतानि तेषां स्थित्युद्भवाप्ययः ॥ ९ ॥

ततो ज्ञातिवधान्निवृत्तस्तदा मया प्रतिबोधितः सन् यथा त्वमभिभाषसे एवं संग्राममुखे मामभ्यभाषत । तद्वदेव तवापि कथयिष्यामीति भावः ॥ ८ ॥ ता विभूतीः कथयति । अहमिति । अस्मच्छब्दसमानाधिकरणाः प्रथमांता द्वितीयांताश्च सर्वा विभूतयस्तास्ताश्चोपासनार्थं कथ्यंते । षष्ठी च क्वचिन्निर्धारणे संबंधे च क्वचिद्यथायोग्यं द्रष्टव्या । ततश्चामीषां भूतानामात्मेति ते सुहृदिति ईश्वर इति च सामान्येनाहमुपास्य इत्यर्थः । एवं सर्वत्र । तेषां स्थित्युद्भवाप्ययः । तत्तद्धेतुरित्यर्थः ॥ ९ ॥

मला प्रश्न केलास त्याप्रमाणें हाच प्रश्न पूर्वी कुरुक्षेत्रामध्यें शत्रूंबरोबर युद्ध करण्याची इच्छा करणाऱ्या अर्जुनानें मला केला होता ॥ ६ ॥ युद्ध करण्याची इच्छा करणाऱ्याला विभूतिप्रश्न करण्याचा प्रसंग कोणता ? असें ह्मणशील तर— तो अर्जुन, मी मारणारा व हा लोक मरणारा असें मानून अज्ञानी लोकांसारखा मोहितचित्त आणि राज्यनिमित्तक जो ज्ञातींचा वध तोच केवळ अधर्म असून निंद्यहि आहे असें जाणून त्यापासून निवृत्त झाला होता ॥ ७ ॥ तेव्हां त्या पुरुषश्रेष्ठ अर्जुनाला त्या रणभूमीवरच मी युक्तीनें बोध केला. त्या प्रसंगीं त्यानें, जसा आतां तूं मला प्रश्न केलास असाव विभूतिप्रश्न केला होता. ह्मणून त्याला जसें सांगितलें तसेंच तुलाहि सांगतों श्रवण कर ॥ ८ ॥ हे उद्धवा, या सर्व प्राणिमात्रांचा आत्मा, मित्र व ईश्वरत्वानें मीच उपास्य आहें. आणि सर्व भूतें व त्यांच्या उत्पत्तिस्थितिसंहारांचें कारणही मीच आहें ॥ ९ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

गतिमान् पदार्थांची जी गति आहे तो मी आहें. दुसऱ्यांना वश करणाऱ्यांमध्यें काळ हें माझें स्वरूप आहे. सत्व, रज व तम ह्या तीन गुणांची जी समतारूप अवस्था (प्रकृति) ती मी आहें. पदार्थांमध्यें जो माधुर्यादिक स्वाभाविक गुण आहे तो मी आहें ॥ १० ॥ सत्वादि त्रिगुणात्मक पदार्थांमध्यें क्रियाशक्तिप्रधान पहिला विकार जें सूत्र तें मी आहें. मोठ्या पदार्थांमध्यें महत्तत्व मी आहें. सूक्ष्मपदार्थांमध्यें जीव मी आहें. दुर्जयांमध्यें मन मी आहें ॥ ११ ॥ वेदांना शिकविणारांमध्यें ब्रह्मदेव ही माझी विभूति आहे. मंत्रांमध्यें अकारउकारमकारस्वरूपी ॐकार मी आहें, अक्षरांमध्यें अकार मी आहें, छंदांमध्यें गायत्रीछंद मी आहें ॥ १२ ॥ सर्वदेवांमध्यें इंद्र मी आहें. अष्टवसुनामक देवांमध्यें अग्नि मी आहें. बारा आदित्यांमध्यें वामन मी आहें. अकरा रुद्रांमध्यें नीललोहितनामक रुद्र मी आहें ॥ १३ ॥ ब्रह्मर्षींमध्यें भृगु मी, राजर्षींमध्यें

विशेषतो विभूतीराह । कलयतां वशीकुर्वताम् । गुणानां मध्ये साम्यं सर्वत्र समत्वम् । गुणानां सत्वादीनां साम्यमव्याकृतं वा । गुणिनि धर्मिणि औत्पत्तिकः स्वभाविको यो गुणः सोऽहम् ॥ १० ॥ सूत्रं प्रथमकार्यम् । महान्महत्तत्वम् । सूक्ष्मोपाधित्वाद्दुर्ज्ञेयत्वाच्च जीवस्य सूक्ष्मत्वम् । बुद्धेर्गुणेनात्मगुणेन चैव वालाग्रमात्रो ह्यवरोऽपि दृष्ट इति

अहं गतिर्गतिमता कालः कलयतामहम् ॥ गुणानां चाप्यहं साम्यं गुणिन्यौत्पत्तिको गुणः ॥ १० ॥ गुणिनामप्यहं सूत्रं महतां च महानहम् ॥ सूक्ष्माणामप्यहं जीवो दुर्जयानामहं मनः ॥ ११ ॥ हिरण्यगर्भो वेदानां मंत्राणां प्रणवस्त्रिवृत् ॥ अक्षराणामकारोऽस्मि पदानि छंदसामहम् ॥ १२ ॥ इंद्रोऽहं सर्वदेवानां वसूनामस्मि हव्यवाट् ॥ आदित्यानामहं विष्णू रुद्राणां नीललोहितः ॥ १३ ॥ ब्रह्मर्षीणां भृगुरहं राजर्षीणामहं मनुः ॥ देवर्षीणां नारदोऽहं हविर्धान्यस्मि धेनुषु ॥ १४ ॥ सिद्धेश्वराणां कपिलः सुपर्णोऽहं पतत्रिणाम् ॥ प्रजापतीनां दक्षोऽहं पितॄणामहमर्यमा ॥ १५ ॥ मां विद्ध्युद्धव दैत्यानां प्रह्लादमसुरेश्वरम् ॥ सोमं नक्षत्रौषधीनां धनेशं यक्षरक्षसाम् ॥ १६ ॥ ऐरावतं गजेंद्राणां यादसां वरुणं प्रभुम् ॥ तपतां द्युमतां सूर्यं मनुष्याणां च भूपतिम् ॥ १७ ॥ उच्चैःश्रवास्तुरंगाणां धातूनामस्मि कांचनम् ॥ यमः संयमतां चाहं सर्पाणामस्मि वासुकिः ॥ १८ ॥ नागेंद्राणामनंतोऽहं मृगेंद्रः शृंगिदंष्ट्रिणाम् ॥ आश्रमाणामहं तुर्यो वर्णानां प्रथमोऽनघ ॥ १९ ॥

श्रुतेः ॥ ११ ॥ वेदानां संबंधी तेषामध्यापकः । पदानि त्रिपदा गायत्रीत्यर्थः ॥ १२ ॥ १३ ॥ हविर्धानी कामधेनुः ॥ १४ ॥ १५ ॥ नक्षत्रौषधीनां प्रभुं सोमम् । यक्षरक्षसां प्रभुम् ॥ १६ ॥ यादसां प्रभुम् । तपतां तापयताम् । द्युमतां दीप्तिमतां च मध्ये ॥ १७ ॥ संयमतां दंडयतामित्यर्थः ॥ १८ ॥ शृंगिणां दंष्ट्रिणां च मध्ये तेषां प्रभुर्वा । तुर्यः संन्यासः । प्रथमो ब्राह्मणः ॥ १९ ॥

स्वायंभुव मनु मी, देवर्षींमध्यें नारद मी आणि धेनूंमध्यें कामधेनु मी आहें ॥ १४ ॥ सिद्धेश्वरांमध्यें कपिल, पक्ष्यांमध्यें गरुड, प्रजापतींमध्यें दक्ष व पितरांमध्यें अर्यमा मी आहें ॥ १५ ॥ हे उद्धवा, दैत्यांमध्यें त्यांचा अधिपति प्रल्हाद मी आहें असें जाण. नक्षत्रें व ओषधि यांचा राजा चंद्र मी आहें. यक्ष व राक्षस यांचा प्रभु कुबेर मी आहें ॥ १६ ॥ गजेंद्रांमध्यें ऐरावत, जलजंतूंमध्यें त्यांचा प्रभु वरुण, तापविणाऱ्यांमध्यें व कांतिवानांमध्यें सूर्य आणि मनुष्यांमध्यें त्यांचा राजा मी आहें ॥ १७ ॥ घोड्यांमध्यें उच्चैःश्रवा (इंद्राचा घोडा) व धातूंमध्यें सुवर्ण मी आहें. दंड करणारांमध्यें यम व सर्पांमध्यें वासुकि मी आहें ॥ १८ ॥ नागश्रेष्ठांमध्यें शेष मी आहें. शिंगें किंवा दाढा अस-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

णाऱ्या पशूंमध्यें सिंह मी आहें. हे पवित्रा उद्धवा, आश्रमांमध्यें संन्यास व वर्णांमध्यें ब्राह्मण मी आहें ॥ १९ ॥ तीर्थांमध्यें व प्रवाहांमध्यें गंगा व स्थिर जलाशयांमध्यें समुद्र मी आहें. आयुधांमध्यें धनुष्य व धनुर्धाऱ्यांमध्यें त्रिपुरासुराचा नाश करणारा महादेव मी आहें ॥ २० ॥ निवासस्थानामध्यें मेरु व गहनस्थळांमध्यें हिमालय मी आहें. वनस्पतींमध्यें अश्वत्थ व ओषधींमध्यें यव (सातु) मी आहें ॥ २१ ॥ पुरोहितांमध्यें वसिष्ठ व वेदार्थनिष्ठांमध्यें बृहस्पति मी आहें. सर्व सेनाधिपतींमध्यें कार्तिकस्वामी व सन्मार्गप्रवर्तकांमध्यें भगवान् ब्रह्मदेव मी आहें ॥ २२ ॥ यज्ञामध्यें ब्रह्मयज्ञ व व्रतांमध्यें अहिंसा व्रत मी आहें. तासणें घांसणें इत्यादिक शुद्ध करण्याच्या प्रकारांमध्यें वायु,

---

स्रोतसां प्रवाहाणां च सरसां स्थिरोदकाशयानाम् ॥२०॥ धिष्ण्यानां निवासस्थानानाम् । गहनानां दुर्गमानाम् ॥२१॥ ब्रह्मिष्ठानां वेदार्थनिष्ठानाम् । सेनान्यां चमूपतीनाम् । अग्रण्यां सन्मार्गप्रवर्तकानाम् । अजो ब्रह्मा ॥२२॥ शुचीनां शोधकानामपि मार्जनतक्षणघर्षणादीनां मध्ये वाय्वादिरूपः शोधकोऽहम् ॥२३॥ योगानां योगांगानामष्टानां मध्ये आत्मसंरोधः समाधिरहम् । मंत्रो नीतिः । कौशलानां विवेकादिनैपुणानां मध्ये आन्वीक्षिकी आत्मानात्मविवेकविद्या । अख्यात्यन्यथाख्यातिशून्यख्यात्यसत्ख्यात्यनिर्वचनीयख्यातिवादिनामेवमिदमेवं वेति यो दुरंतो विकल्पः सोऽहम् ॥ २४ ॥ कुमारः सनत्कुमारः ॥ २५ ॥ संन्यासो भूताभयदानम् । क्षेमाणामभयस्थानानां मध्ये अबहिर्मतिरंतर्निष्ठा । सूनृतं प्रियवचनं

तीर्थानां स्रोतसां गंगा समुद्रः सरसामहम् ॥ आयुधानां धनुरहं त्रिपुरघ्नो धनुष्मताम् ॥ २० ॥ धिष्ण्यानामस्म्यहं मेरुर्गहनानां हिमालयः ॥ वनस्पतीनामश्वत्थ ओषधीनामहं यवः ॥ २१॥ पुरोधसां वसिष्ठोऽहं ब्रह्मिष्ठानां बृहस्पतिः॥ स्कंदोऽहं सर्वसेनान्यामग्रण्यां भगवानजः ॥ २२ ॥ यज्ञानां ब्रह्मयज्ञोऽहं व्रतानामविहिंसनम् ॥ वाय्वग्न्यर्काम्बुवागात्मा शुचीनामप्यहं शुचिः ॥ २३ ॥ योगानामात्मसंरोधो मंत्रोऽस्मि विजिगीषताम् ॥ आन्वीक्षिकी कौशलानां विकल्पः ख्यातिवादिनाम् ॥ २४ ॥ स्त्रीणां तु शतरूपाऽहं पुंसां स्वायंभुवो मनुः ॥ नारायणो मुनीनां च कुमारो ब्रह्मचारिणाम् ॥ २५ ॥ धर्माणामस्मि संन्यासः क्षेमाणामबहिर्मतिः ॥ गुह्यानां सूनृतं मौनं मिथुनानामजस्त्वहम् ॥ २६ ॥ संवत्सरोऽस्म्यनिमिषामृतूनां मधुमाधवौ ॥ मासानां मार्गशीर्षोऽहं नक्षत्राणां तथाऽभिजित् ॥ २७ ॥

मौनं च । नहि प्रियभाषणे मौने च पुरुषस्याभिप्रायो ज्ञायते । अजः प्रजापतिः । यस्य देहार्धाभ्यां मिथुनमभूत्स एव मुख्यं मिथुनम् । अर्धो ह वा एष आत्मनो यत्पत्नीति श्रुतेः ॥ २६ ॥ अनिमिषामनिमिषाणामप्रमत्तानाम् । मधुमाधवौ वसंत इत्यर्थः । अभिजिदुत्तराषाढाचतुर्थपादः श्रवणप्रथमपादश्च । तथाच श्रुतिः । अभिजिन्नाम नक्षत्रमुपरिष्टादषाढानामधस्ताच्छ्रोणाया इत्यादिः ॥ २७ ॥

अग्नि, सूर्य, जळ व ब्राह्मणांचें वचन या रूपांनीं शुद्ध करणारा मी आहें ॥ २३ ॥ अष्टांगयोगांमध्यें समाधि व विजयाची इच्छा करणारांमध्यें नीति मी आहें. विवेकादिक निपुणतांमध्यें आत्मानात्मविवेकरूप ब्रह्मविद्या मी आहें. अख्याति, अन्यथाख्याति इत्यादिक संशयवाद करणारांमध्यें ‘ हें असें किंवा असें ’ अशाप्रकारचा जो दुरंत विकल्प तो मी आहें ॥ २४ ॥ स्त्रियांमध्यें स्वायंभुवमनूची पत्नी जी शतरूपा ती मी आहें. पुरुषांमध्यें स्वायंभुव मनु, मुनींमध्यें नरनारायण व ब्रह्मचाऱ्यांमध्यें सनत्कुमार मी आहें ॥ २५ ॥ धर्मांमध्यें भूतांना अभय देणारा संन्यास, अभयस्थानांमध्यें अंतर्निष्ठा व गुह्यांमध्यें प्रियवचन व मौन हीं मी आहें. मिथुनामध्यें ज्याच्या अर्ध्या देहापासून पुरुष व अर्ध्यादेहापासून स्त्री उत्पन्न झाली तो ब्रह्मदेव मी आहें ॥ २६ ॥ सावध राहणारांमध्यें वर्षरूप जो काळ तो मी आहें. ऋतूंमध्यें चैत्रवैशाखरूप वसंतऋतु, मासां-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मध्यें मार्गशीर्ष आणि नक्षत्रांमध्यें अभिजित् नक्षत्र मी आहें ॥ २७ ॥ युगांमध्यें कृतयुग, आणि धीरपुरुषांमध्यें असित व देवल मुनि हे मी आहें. वेदविभाग करणारांमध्यें व्यास आणि बुद्धिमंतांमध्यें सूक्ष्मबुद्धिमान् शुक्राचार्य मी आहें ॥ २८ ॥ प्राणिमात्रांची उत्पत्ति, प्रळय, येणें, जाणें, विद्या व अविद्या ह्या सहांना जाणणारांमध्यें वासुदेव मी आहें. भगवद्भक्तांमध्यें हे उद्धवा, तूं माझें स्वरूप आहेस. वानरांमध्यें हनुमान्, विद्याधरांमध्यें सुदर्शन आणि रत्नांमध्यें पद्मराग मी आहें. सुंदर पदार्थांमध्यें कमळाचा कळा, दर्भजातींमध्यें कुश आणि होमद्रव्यांमध्यें गाईचें तूप मी आहें ॥ २९ ॥ ३० ॥ उद्योगी पुरुषांमध्यें धनादिसंपत्ति व द्यूत खेळणारांमध्यें कपटद्यूत मी आहें. सहनशी-

---

कृतं कृतयुगम् । देवलोऽसितश्च । व्यासानां वेदविभागकर्तॄणाम् । कवीनां विदुषां काव्यः शुक्रः ॥ २८ ॥ भगवताम् । उत्पत्तिं प्रलयं चैव भूतानामागतिं गतिम् ॥ वेत्ति विद्यामविद्यां च स वाच्यो भगवानित्येवं लक्षणानाम् ॥ २९ ॥ सुपेशसां सुंदराणाम् । दर्भजातीनां काशदूर्वादीनाम् । हविःषु चरुपुरोडाशादिषु घृतेषु वा ॥ ३० ॥ लक्ष्मीर्धनादिसंपत् ॥ ३१ ॥ बलवतामोजश्च सहश्च । सात्वतां भागवतानां भक्त्या कृतं कर्माहमित्यर्थः । तेषामेव नवव्यूहार्चने वासुदेवसंकर्षणप्रद्युम्नानिरुद्धनारायणहयग्रीववराहनृसिंहब्रह्माण इति या

अहं युगानां च कृतं धीराणां देवलोऽसितः ॥ द्वैपायनोऽस्मि व्यासानां कवीनां काव्य आत्मवान् ॥ २८ ॥ वासुदेवो भगवतां त्वं तु भागवतेष्वहम् ॥ किंपुरुषाणां हनुमान्विद्याध्राणां सुदर्शनः ॥ २९ ॥ रत्नानां पद्मरागोऽस्मि पद्मकोशः सुपेशसाम् ॥ कुशोऽस्मि दर्भजातीनां गव्यमाज्यं हविःष्वहम् ॥ ३० ॥ व्यवसायिनामहं लक्ष्मीः कितवानां छलग्रहः ॥ तितिक्षाऽस्मि तितिक्षूणां सत्वं सत्ववतामहम् ॥ ३१ ॥ ओजः सहो बलवतां कर्माहं विद्धि सात्वताम् ॥ सात्वतां नवमूर्तीनामादिमूर्तिरहं परा ॥ ३२ ॥ विश्वावसुः पूर्वचित्तिर्गंधर्वाप्सरसामहम् ॥ भूधराणामहं स्थैर्यं गंधमात्रमहं भुवः ॥ ३३ ॥ अपां रसश्च परमस्तेजिष्ठानां विभावसुः ॥ प्रभा सूर्येंदुताराणां शब्दोऽहं नभसः परः ॥ ३४ ॥ ब्रह्मण्यानां बलिरहं वीराणामहमर्जुनः ॥ भूतानां स्थितिरुत्पत्तिरहं वै प्रतिसंक्रमः ॥ ३५ ॥ गत्युक्त्युत्सर्गोपादानमानंदस्पर्शलक्षणम् ॥ आस्वादश्रुत्यवघ्राणमहं सर्वेंद्रियेंद्रियम् ॥ ३६ ॥

नव मूर्तयस्तासां मध्ये वासुदेवाख्या ॥ ३२ ॥ गंधर्वाणां विश्वावसुः । अप्सरसां पूर्वचित्तिः । गंधमात्रमविकृतम् ॥ ३३ ॥ परमो मधुरः परः पराख्यः शब्दः ॥ ३४ ॥ अर्जुनः पार्थः । भूतानां प्राणिनां प्रतिसंक्रमः प्रलयः ॥ ३५ ॥ गत्यादयः पंचकर्मेंद्रियव्यापाराः स्पर्शादयो ज्ञानेंद्रियव्यापाराः । तत्र लक्षणं दर्शनम् । सर्वेंद्रियाणामिंद्रियं तत्तदर्थग्रहणशक्तिरप्यहम् ॥ ३६ ॥

लांमध्यें सहनशीलता व धैर्यवंतांमध्यें धैर्य, ही माझी विभूति आहे ॥ ३१ ॥ बलवंतांमध्यें देहशक्ति व इंद्रियशक्ति मी आहें. तसेंच भगवद्भक्तांनीं भक्तीनें केलेलें जें कर्म तें मी आहें, भक्तांना पूज्य अशा– वासुदेव, संकर्षण प्रद्युम्न, अनिरुद्ध, नारायण, हयग्रीव, वराह, नृसिंह आणि ब्रह्मा ह्या नऊ मूर्तींमध्यें पहिली मूर्ति जी वासुदेव ती माझी श्रेष्ठ विभूति आहे ॥ ३२ ॥ गंधर्वांमध्यें विश्वावसु व अप्सरांमध्यें पूर्वचित्ति ही माझी विभूति आहे. पर्वतांमध्यें स्थिरता व भूमीचा अविकारी गंध गुण आणि उदकांचा मधुररस मी आहें. तेजस्वी पदार्थांमध्यें अग्नि, सूर्य, चंद्र व तारे यांची प्रभा व आकाशाचा नादरूप सूक्ष्मशब्द मी आहें ॥ ३३ ॥ ३४ ॥ ब्राह्मणभक्तांमध्यें बळिराजा व वीरांमध्यें अर्जुन मी आहें. सर्वप्राणिमात्रांच्या उत्पत्तिस्थितिसंहारांचें कारण मी आहें ॥ ३५ ॥ गति, भाषण, मलोत्सर्ग, ग्रहण, आनंद, स्पर्श, रुचि घेणें, श्रवण करणें, वास घेणें,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

व पाहणेंवगैरे दहा इंद्रियांच्या धर्मांमध्यें पाहणें ही माझी विभूति आहे ॥ ३६ ॥ याप्रमाणें त्या त्या पदार्थांतील विशेष विभूतींचें वर्णन करून आतां सामान्यपणें सर्वविभूतींचें निरूपण करितो– गंध, स्पर्श, शब्द, रस, रूप, अहंकार आणि महत्तत्व ह्या सात प्रकृतीच्या विकृति, पंचमहाभूतें, अकरा इंद्रियें मिळून सोळा प्रकारचा विकार, जीव आणि प्रकृति हीं पंचवीस तत्वें, सत्व, रज व तम हे तीन प्रकृतीचे गुण व परब्रह्म हें सर्व मीच आहें. ह्या तत्वांची गणती, ह्यांचें लक्षणपूर्वक ज्ञान त्याचें फळ व तत्वनिश्चय हीं सर्व मीच आहें ॥ ३७ ॥ जो जीवेश्वररूप दोन प्रकारचा भेद तसाच जो गुणगुणिरूप व क्षेत्रक्षेत्रज्ञरूप भेद आहे तो सर्वहि माझ्यावांचून मुळींच नाहीं; ह्मणजे मीच सर्व-

---

तदेवं तत्र तत्र निर्धारणेन तत्तत्संबंधेन च विशेषतो विभूतीर्निरूप्येदानीं सामान्यतः सर्वा अपि निरूपयति । पृथ्वीति सार्धद्वयेन । पृथिव्यादिशब्दैस्तन्मात्राणि विवक्षितानि । अहमहंकारः । महान्महत्तत्वम् । एताः सप्त प्रकृतिविकृतयः । विकारः पंचमहाभूतानि एकादशेंद्रियाणि चेत्येवं षोडशसंख्याकः । पुरुषो जीवः । अव्यक्तं प्रकृतिः । एवं पंचविंशतितत्वानि । तदुक्तम् । मूलप्रकृतिरविकृतिर्महदाद्याः प्रकृतिविकृतयः सप्त ॥ षोडशकश्च विकारो न प्रकृतिर्न विकृतिः पुरुष इति । किंच रजः सत्वं तम इति प्रकृतेर्गुणाश्च परं ब्रह्म च तदेतत्सर्वमहमेव । किंचैतत्प्रसंख्यानमेतेषां परिगणनमेतेषां लक्षणतो ज्ञानं च तत्फलं तत्त्वनिश्चयश्चाहमेव ॥ ३७ ॥ एतदेव संक्षिप्याह । मयेति । जीवेश्वररूपो द्विविधो यो भावो यश्च गुणिगुणरूपो यश्च क्षेत्रज्ञक्षेत्ररूपः स सर्वोऽपि मया विना मद्यतिरेकेण नास्ति । अहमेव सर्वमित्यर्थः ॥ ३८ ॥ ननु सामान्यतः किमेवं

पृथिवी वायुराकाश आपो ज्योतिरहं महान् ॥ विकारः पुरुषोऽव्यक्तं रजः सत्वं तमः परम् ॥ अहमेतत्प्रसंख्यानं ज्ञानं तत्त्वविनिश्चयः ॥ ३७ ॥ मयेश्वरेण जीवेन गुणेन गुणिना विना ॥ सर्वात्मनाऽपि सर्वेण न भावो विद्यते क्वचित् ॥ ३८ ॥ संख्यानं परमाणूनां कालेन क्रियते मया ॥ न तथा मे विभूतीनां सृजतोऽडानि कोटिशः ॥ ३९ ॥ तेजः श्रीः कीर्तिरैश्वर्यं ह्रीस्त्यागः सौभगं भगः ॥ वीर्यं तितिक्षा विज्ञानं यत्र यत्र स मेंऽशकः ॥ ४० ॥ एतास्ते कीर्तिताः सर्वाः संक्षेपेण विभूतयः ॥ मनोविकारा एवैते यथा वाचाऽभिधीयते ॥ ४१ ॥

संक्षिप्य कथयसि पूर्ववन्निर्धारणसंबंधाभ्यां विशेषतः सर्वाः कथयेति चेत्तत्राह । संख्यानं पृथिव्यादिपरमाणूनां कालेन महता तदपि मयैव क्रियते कृत्वा च वक्तुं शक्यते तथा मे विभूतीनां संख्यानं कर्तुं न शक्यते । कुत इत्यत आह । सृजतोंऽडानीति । यदा मया सृज्यमानानां ब्रह्मांडानामेव तावत्संख्या नास्ति तदा कुतस्तद्गतानां विभूतीनां संख्येत्यर्थः ॥ ३९ ॥ तथापि विशेषत एव सर्वा अपि संक्षेपतः कथयामीत्याह । तेजः प्रभावः । श्रीः संपत् । सौभगं मनोनयनाह्लादकत्वम् । भगो भाग्यम् । वीर्यं बलम् । अंशको विभूतिः ॥ ४० ॥ उपसंहरति । एता इति । एते च विभूतिभेदा मयि चित्तावताराय कल्पिता अतो नात्रातीवाभिनिवेशः कर्तव्य इत्याह । मनोविकारा एव

रूपी आहें ॥ ३८ ॥ आतां सामान्यपणें संक्षिप्त कां सागतोस, विशेषपणें सविस्तर सांग असें ह्मणशील तर–पृथिव्यादिकांच्या परमाणूंची गणना मोठ्या काळानें मला करितां व सांगतां येईल परंतु कोट्यावधि ब्रह्मांडें निर्माण करणाऱ्या माझ्या विभूतींची संख्या करितां व सांगतां येणार नाहीं. जर मी उत्पन्न केलेल्या ब्रह्मांडांचीच संख्या करितां येणार नाहीं तर त्यांतील विभूतींची संख्या करितां येणार नाहीं हें काय सांगावें ! ॥ ३९ ॥ तथापि विशेषेंकरून ध्यानांत येण्यासारख्या प्रकारानें सर्वांचा संक्षेप करून सांगतों– जेथें जेथें प्रभाव, संपत्ति, कीर्ति, ऐश्वर्य, लज्जा, दान, सौंदर्य, भाग्य, बल, सहनशक्ति आणि विज्ञान हे गुण आहेत तो तो माझा अंश आहे असें जाणावें ॥ ४० ॥ हे उद्धवा, ह्या सर्व विभूति संक्षेपानें मी तुला सांगितल्या आहेत, ह्या माझेठिकाणीं चित्त लागण्याकरितांच कल्पना करून सांगितल्या आहेत ह्मणून यांच्यावरच फारसा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मनाचा अभिनिवेश करूं नये. कारण, हे सर्व मनाचे विकार असून जसे आकाशपुष्प, सशाचें शिंग इत्यादिक पदार्थ केवळ सांगण्यांत मात्र येतात, परंतु खरे नसतात, तशा ह्या विभूति समजाव्या; परम सत्य तर केवळ ईश्वरच आहे ॥ ४१ ॥ ह्मणून तूं, वाणी, मन, प्राण आणि इंद्रियें यांना स्वाधीन करून घे आणि आपल्या बुद्धीचा निग्रह, सत्वगुणसंपन्न झालेल्या त्या बुद्धीनेंच कर, ह्मणजे पुन्हां संसारमार्गांत पडणार नाहींस ॥ ४२ ॥ जो संन्यासी, आपल्या बुद्धीनें उत्तमप्रकारें वाणी व मन यांचा निग्रह करीत नाहीं, त्याचें व्रत, तप आणि ज्ञान हीं, मातीच्या कच्च्या घागरींतून पाणी जसें हळुहळू गळून जातें त्याप्रमाणें नाहींशीं होतात ॥ ४३ ॥ यास्तव माझ्याविषयीं तत्पर राहणाऱ्या योग्यानें माझ्या भक्तियुक्त बुद्धीनें आपलें मन, वाणी व प्राण यांचा निग्रह करावा ह्मणजे तो कृतकृत्य होतो ॥ ४४ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या

न तु परमार्थाः । यथा किंचित् खपुष्पादिवाङ्मात्रेणाभिधीयते तत्तुल्याः ॥ ४१ ॥ तस्माद्वागादीन्नियच्छ । आत्मानं बुद्धिमात्मना सत्त्वसंपन्नया तयैव नियच्छ । अध्वने संसारमार्गाय ॥ ४२ ॥ असंयमने दोषमाह । य इति । असंयच्छन्न संयच्छति ॥ ४३ ॥ परिसमाप्यते कृतकृत्यो भवतीत्यर्थः ॥ ४४ ॥ इति श्रीमद्भागवते एकादशस्कंधे टीकायां षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥ ॥ ततः सप्तदशे पृष्टे स्वधर्मे भक्तिलक्षणे ॥ हंसोक्तं धर्ममन्वाह ब्रह्मचारिगृहस्थयोः ॥ १ ॥ कर्माहं विद्धि सात्वतामित्यत्र भक्त्या कृतं कर्म मोक्षसाधनं

वाचं यच्छ मनो यच्छ प्राणान्यच्छेंद्रियाणि च ॥ आत्मानमात्मना यच्छ न भूयः कल्पसेऽध्वने ॥ ४२ ॥ यो वै वाङ्मनसी सम्यगसंयच्छन्धिया यतिः ॥ तस्य व्रतं तपो दानं स्रवत्यामघटांबुवत् ॥ ४३ ॥ तस्मान्मनोवचःप्राणान्नियच्छेन्मत्परायणः ॥ मद्भक्तियुक्तया बुद्ध्या ततः परिसमाप्यते ॥ ४४ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥ ॥ उद्धव उवाच ॥ यस्त्वयाऽभिहितः पूर्वं धर्मस्त्वद्भक्तिलक्षणः ॥ वर्णाश्रमाचारवतां सर्वेषां द्विपदामपि ॥ १ ॥ यथाऽनुष्ठीयमानेन त्वयि भक्तिर्नृणां भवेत् ॥ स्वधर्मेणारविंदाक्ष तत्समाख्यातुमर्हसि ॥ २ ॥ पुरा किल महाबाहो धर्मं परमकं प्रभो ॥ यत्तेन हंसरूपेण ब्रह्मणेऽभ्यात्थ माधव ॥ ३ ॥

मद्विभूतिरित्युक्तं भक्तिसाधनत्वं च कर्मणां मयोदितेष्ववहितः स्वधर्मेष्वित्यादिना तत्र तत्रोक्तं न च कर्मानुष्ठातॄणां नियमेन भक्तिर्दृश्यतेऽतः पृच्छति । यस्त्वयेति सप्तभिः । पूर्वं कल्पादौ त्वद्भक्तिलक्षणस्तत्प्रापकस्तत्साधनमित्यर्थः । वर्णाश्रमहीनानामपि द्विपदां नराणाम् ॥ १ ॥ यथा येन प्रकारेणानुष्ठीयमानेन स्वधर्मेण ॥ २ ॥ ननु संप्रदायादेव ज्ञास्यते-किं पुनर्वर्णनेन तत्राह । पुरेति । परमकं परमश्चासौ कं सुखरूपश्च तम् । यत् यम् । हंसरूपेण धर्मोऽप्युक्त एव न तु योगमात्रम् । जानीतमागतं यज्ञं युष्मद्धर्मविवक्षयेत्युक्तत्वात् ॥ ३ ॥

एकादशस्कंधांत विभूतिनिरूपणनामक हा सोळावा अध्याय समाप्त झाला ॥ १६ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ आतां ह्या सतराव्या अध्यायामध्यें भक्तीचें साधन असा स्वधर्म उद्धवानें विचारिला असतां, श्रीकृष्णानें, ‘ पूर्वीं हंसावतारानें सांगितलेला ’ ब्रह्मचाऱ्याचा व गृहस्थाचा धर्म सांगितला आहे ॥ १ ॥ उद्धव ह्मणाला– हे श्रीकृष्णा, वर्णांचे धर्म व आश्रमांचे धर्म आचरण करणारांना व वर्णाश्रमरहित असलेल्या सर्व द्विपाद मनुष्यांना, तुझी भक्ति प्राप्त होण्याचें साधन असा जो धर्म तूं पूर्वीं युगाच्या आरंभीं सांगितला आहेस तो, जसा आचरण केला असतां, मनुष्यांना तुझ्याविषयीं भक्ति प्राप्त होईल तसा तो धर्म व त्याच्या आचरणाचा प्रकार मला सांगण्यास तूं समर्थ आहेस ॥ १ ॥ २ ॥ हे महाबाहो, शत्रुदमना, प्रभो, माधवा, खरोखर परमसुखरूप असा जो धर्म, तूं पूर्वीं त्या हंसरूपानें ब्रह्मदेवाला सांगितला होतास, तो पूर्वीं सांगितलेलाहि धर्म,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्यावर फार मोठा काळ निघून गेल्यामुळें लुप्त होऊन तो आतांच बहुतकरून चालत नाहींसा झाला आहे, तेव्हां तो पुढें मुळींच चालणार नाहीं ॥ ३ ॥ ४ ॥ हे अच्युता, ज्याअर्थी तुझ्याहून दुसरा पुरुष, या भूमीवर किंवा जेथें वेदादिकसुद्धां मूर्तिमंत आहेत त्या ब्रह्मदेवाच्या सभेमध्येंहि, या भक्तिसाधनरूप धर्माला सांगणारा, करणारा व रक्षण करणारा कोणीच नाहीं ॥ ५ ॥ त्याअर्थी हे मधुसूदना देवा, धर्माचें आवरण करणाऱ्या, रक्षण करणाऱ्या व सांगणाऱ्या तूं, या भूमितलाचा त्याग केलास ह्मणजे नष्ट झालेल्या त्या धर्माला कोण सांगणार आहे ? कोणीच नाहीं ॥ ६ ॥ यास्तव हे सर्वधर्मज्ञा प्रभो श्रीकृष्णा, तुझी भक्ति उत्पन्न करणारा तो धर्म, आह्मां मनुष्यांमध्यें ज्या वर्णाश्रमनिष्ठ अधिकाऱ्याला जसा सांगितला आहे तसा तूं मला वर्णन कर ॥ ७ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, याप्रमाणें भगवत्सेवकांमध्यें मुख्य अशा उद्धवानें

प्रागनुशासितोऽपि न भविता न भविष्यति ॥ ४ ॥ अत्र हेतुमाह । वक्तेति द्वाभ्याम् । ते त्वत्तोऽन्यः । कला वेदाद्याः ॥ ५ ॥ ६ ॥ तत्तस्मात्नोऽस्माकं मनुष्याणां मध्ये यस्य यथा विधीयते ॥ ७ ॥ ८ ॥ धर्म्यो धर्मादनपेतः । कुतो नैः श्रेयसकरो भक्तिजनकः । अतो मे मत्तस्तं धर्मं निबोध ॥ ९ ॥ तत्रादौ मदुपासनालक्षण एव मुख्यो धर्म आसीत् आचारलक्षणस्तु पश्चात्प्रवृत्तः स चैवमनुष्ठितो भक्तिहेतुरिति वर्णयितुमाह । आदाविति । कल्पादौ यत्कृतयुगं तस्मिन् । ते च तदा मामुपासत एव केवलं नान्यत्कुर्वंतीति वक्तुं

स इदानीं सुमहता कालेनामित्रकर्शन ॥ न प्रायो भविता मर्त्यलोके प्रागनुशासितः ॥ ४ ॥ वक्ता कर्ताऽविता नान्यो धर्मस्याच्युत ते भुवि ॥ सभायामपि वैरिंच्यां यत्र मूर्तिधराः कलाः ॥ ५ ॥ कर्ताऽवित्रा प्रवक्त्रा च भवता मधुसूदन ॥ त्यक्ते महीतले देव विनष्टं कः प्रवक्ष्यति ॥ ६ ॥ तत्त्वं नः सर्वधर्मज्ञ धर्मस्त्वद्भक्तिलक्षणः ॥ यथा यस्य विधीयेत तथा वर्णय मे प्रभो ॥ ७ ॥ श्रीशुक उवाच ॥ इत्थं स्वभृत्यमुख्येन पृष्टः स भगवान्हरिः ॥ प्रीतः क्षेमाय मर्त्यानां धर्मानाह सनातनान् ॥ ८ ॥ श्रीभगवानुवाच ॥ धर्म्य एष तव प्रश्नो नैश्रेयसकरो नृणाम् ॥ वर्णाश्रमाचारवतां तमुद्धव निबोध मे ॥ ९ ॥ आदौ कृतयुगे वर्णो नृणां हंस इति स्मृतः ॥ कृतकृत्याः प्रजा जात्या तस्मात्कृतयुगं विदुः ॥ १० ॥ वेदः प्रणव एवाग्रे धर्मोऽहं वृषरूपधृक् ॥ उपासते तपोनिष्ठा हंसं मां मुक्तकिल्बिषाः ॥ ११ ॥ त्रेतामुखे महाभाग प्राणान्मे हृदयात्त्रयी ॥ विद्या प्रादुरभूत्तस्या अहमासं त्रिवृन्मखः ॥ १२ ॥

कृतयुगनामनिरुक्तिमाह । कृतकृत्या इति । जात्या जन्मनैव ॥ १० ॥ किंच विधायकाभावादपि तदानीं नान्यत्कर्मास्तीत्याह । वेद इति । धर्मश्च मनोविषयोऽहमेव वृषरूपधृक् चतुष्पात्न क्रियाविशेषो यज्ञादिः अतस्तपोनिष्ठा । मनसश्चेंद्रियाणां च स्वैकाग्र्यं परमं तप इति वचनादेकाग्रतया हंसं शुद्धं मां ध्यायंतीत्यर्थः ॥ ११ ॥ पश्चात्त्रेतायुगप्रवेशे मे वैराजरूपस्य प्राणान्निमित्तात् । हृदयात्सकाशात् । तस्यास्त्रय्याः सकाशात् हौत्राध्वर्यवौद्गात्रैस्त्रिवृत्त्रिरूपः । यज्ञो वै विष्णुरिति श्रुतेः ॥ १२ ॥

प्रश्न केला असतां तो भगवान् श्रीकृष्ण, संतुष्ट होऊन मनुष्यांच्या कल्याणासाठीं पुरातन धर्म सांगूं लागला ॥ ८ ॥ श्रीभगवान् ह्मणाला कीं,– हे उद्धवा, तुझा हा प्रश्न, धर्मयुक्त व वर्णाश्रमधर्मांचें आचरण करणाऱ्या मनुष्यांना भक्ति उत्पन्न करणारा आहे यास्तव तो धर्म मी तुला सांगतों, तूं मजपासून श्रवण कर ॥ ९ ॥ कल्पाच्या आरंभीं कृतयुगामध्यें मनुष्यांचा हंस या नांवाचा एकच वर्ण होता. कारण, त्यावेळीं सर्व प्रजा, जन्मतः स्वभावानेंच कृतकृत्य होत्या, ह्मणून त्याला कृतयुग असें ह्मणतात ॥ १० ॥ त्या कृतयुगामध्यें वेद ॐकाररूपीच होता, आणि धर्महि वृषभाचें रूप धारण करणारा चार पायांचा मीच होतों, दुसरा यज्ञादिक धर्म कांहींच नव्हता. ह्मणून त्या युगांतील सर्व लोक तपोनिष्ठ व निष्पाप होत्साते मनाच्या एकाग्रतेनें शुद्ध हंसरूपी माझी ध्यानरूप उपासना करीत असत ॥ ११ ॥ नंतर हे महाभाग्यवंता उद्धवा, त्रेतायुगाच्या आरंभीं विराड्रूपी

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

माझ्या हृदयापासून श्वासवायुरूपानें, ऋक्, यजु, आणि साम अशी वेदरूपी विद्या प्रकट झाली. तिच्यापासून होता, अध्वर्यु व उद्गाता या तीन ऋत्विजांच्या कर्मांनीं युक्त असा यज्ञ उत्पन्न झाला ॥ १२ ॥ आतां वर्णांचे व आश्रमाचे धर्म सांगण्याकरितां त्यांची उत्पत्ति सांगतो– विराट्पुरुषरूपी माझ्या– मुख, बाहु, मांड्या व पाय यांपासून अनुक्रमानें ब्राह्मण, क्षत्रिय वैश्य आणि शूद्र हे चार वर्ण उत्पन्न झाले. ते आपआपल्या स्वधर्मांनें परस्पर निरनिराळे समजले जातात ॥ १३ ॥ आतां आश्रमाची उत्पत्ति सांगतो– विराड्रूपी माझ्या कमरेच्या पुढील भागापासून गृहस्थाश्रम, हृदयापासून ब्रह्मचर्य, वक्षःस्थलाच्या खालच्या भागापासून वानप्रस्थ आणि मस्तकापासून संन्यास हे चार आश्रम उत्पन्न झाले ॥ १४ ॥ त्यांचे अधिकारिविशेषानें स्वभाव सांगतो– मनुष्यांच्या वर्णांचे व आश्रमांचे स्वभाव, जन्मभूमींना अनुसरून झाले आहेत

वर्णानामाश्रमाणां च धर्मान्वक्तुं तेषामुत्पत्तिमाह। विप्रेति द्वाभ्याम्। आत्माचारः स्वधर्म एव लक्षणं ज्ञापको येषां ते ॥ १३ ॥ मम वैराजरूपस्य हृदो वक्षसोऽधस्तात्। ब्रह्मवर्यमिति नैष्ठिकाभिप्रायम् ॥ १४ ॥ तेषामधिकारिविशेषेण स्वभावानाह। वर्णानामिति पंचभिः। जन्मस्थानानुसारिण्यः। नीचैरित्यव्ययम्। अतोऽयमर्थः मंदाभिर्जन्मभूमिभिर्मंदाः।

विप्रक्षत्रियविट्शूद्रा मुखबाहूरुपादजाः ॥ वैराजात्पुरुषाज्जाता य आत्माचारलक्षणाः ॥ १३ ॥ गृहाश्रमो जघनतो ब्रह्मचर्यं हृदो मम ॥ वक्षःस्थानाद्वने वासो न्यासः शीर्षणि संस्थितः ॥ १४ ॥ वर्णानामाश्रमाणां च जन्मभूम्यनुसारिणीः ॥ आसन्प्रकृतयो नृणां नीचैर्नीचोत्तमोत्तमाः ॥ १५ ॥ शमो दमस्तपः शौचं संतोषः क्षांतिरार्जवम् ॥ मद्भक्तिश्च दया सत्यं ब्रह्मप्रकृतयस्त्विमाः ॥ १६ ॥ तेजो बलं धृतिः शौर्यं तितिक्षौदार्यमुद्यमः ॥ स्थैर्यं ब्रह्मण्यतैश्वर्यं क्षत्रप्रकृतयस्त्विमाः ॥ १७॥ आस्तिक्यं दाननिष्ठा च अदंभो ब्रह्मसेवनम् ॥ अतुष्टिरर्थोपचयैर्वैश्यप्रकृतयस्त्विमाः ॥ १८ ॥ शुश्रूषणं द्विजगवां देवानां चाप्यमायया ॥ तत्र लब्धेन संतोषः शूद्रप्रकृतयस्त्विमाः ॥ १९ ॥ अशौचमनृतं स्तेयं नास्तिक्यं शुष्कविग्रहः ॥ कामः क्रोधश्च तर्षश्च स्वभावोऽंतेवसायिनाम् ॥ २० ॥ अहिंसा सत्यमस्तेयमकामक्रोधलोभता ॥ भूतप्रियहितेहा च धर्मोऽयं सार्ववर्णिकः ॥ २१ ॥

उत्तमाभिरुत्तमाश्चेति ॥ १५ ॥ तप आलोचनम् ॥ १६ ॥ तेजः प्रतापः ॥ १७ ॥ १८ ॥ एतैरेवाश्रमस्वभावा अपि ज्ञेयाः ॥ १९ ॥ तद्बाह्यानां स्वभावानाह। अशौचमिति। शुष्कविग्रहो निर्मूलकलहः। तर्षस्तृष्णा ॥ २० ॥ तत्र तावत्सर्वसाधारणं धर्ममाह। अहिंसेति। वर्णग्रहणमुपलक्षणार्थं वर्णधर्मान् गृहस्थप्रकरणे वक्ष्यति ॥ २१ ॥

म्हणजे माझ्या मुखादिक उत्तम अंगांपासून झालेल्या ब्राह्मणादिकांचे उत्तम स्वभाव आणि निकृष्ट अंगांपासून झालेल्यांचे निकृष्ट स्वभाव झाले आहेत ॥ १५ ॥ शम, दम, तप, शौच, संतोष, शांति, सरळता, माझी भक्ति, दया आणि सत्य हे ब्राह्मणाचे स्वभावसिद्ध धर्म होत ॥ १६ ॥ प्रताप, बळ, धैर्य, शौर्य, दीनांचे अपराध सहन करणें, उदारता, उद्योग, स्थिरता, ब्राह्मणभक्ति, आणि ऐश्वर्य हे क्षत्रियांचे स्वभावसिद्ध धर्म होत ॥ १७ ॥ गुरुशास्त्रादिकांवर श्रद्धा, दानाविषयीं निष्ठा, निष्कपटपणा, ब्राह्मणाची सेवा, आणि धनाची वृद्धि झाली असतांहि असंतोष हे वैश्यांचे स्वभावसिद्ध धर्म होत ॥ १८ ॥ ब्राह्मण, गाई व देव यांची निष्कपटपणें सेवा करणें, आणि त्या सेवेमध्यें जें मिळेल त्याच्या योगानें संतुष्ट राहणें हे शूद्राचे स्वभावसिद्ध धर्म होत ॥ १९ ॥ आतां वर्णबाह्य अशा चांडाळादिकांचे स्वभाव सांगतो– अपवित्रता, खोटें बोलणें, चोरी करणें, नास्तिकपणा, निर्मूळ कलह करणें, काम, क्रोध, व अतिलोभ हा चांडाळादिकांचा स्वभाव होय ॥ २० ॥ आतां सर्वसाधारण धर्म सांगतो– अहिंसा,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सत्य भाषण, चोरी न करणें, कामक्रोधलोभांचा त्याग, आणि प्राणिमात्रावें प्रिय व हित करण्याचा उद्योग हा सर्व लोकांचा साधारण धर्म आहे ॥ २१ ॥ आतां चार आश्रमांतील पहिल्या ब्रह्मचाऱ्याचे धर्म सांगतो– ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य या तीन वर्णांतील पुरुषानें, गर्भाधानादिक संस्कारांच्या क्रमानें उपनयननामक द्वितीय जन्म प्राप्त झालें असतां, जितेंद्रियपणें गुरूच्या घरीं राहावें आणि गुरूनें बोलावून सांगितलें ह्मणजे वेदाचें अध्ययन करावें व त्याच्या अर्थाचा विचारहि करावा ॥ २२ ॥ त्या ब्रह्मचाऱ्यानें मेखला, कृष्णाजिन, दंड, रुद्राक्षांची माळा, यज्ञोपवीत, कमंडलु व कुश यांचें धारण करून, अभ्यंगवगैरे सोडून देऊन जटाधारी व्हावें, दांत घांसणें व वस्त्रें धुऊन विशेष स्वच्छ राखणें तसेंच बसावयाचें आसनवगैरे कौतुकानें रंगविणें हीं करूं नयेत ॥ २३ ॥ स्नान, भोजन, होम, जप व मलमूत्रांचा त्याग हीं करत्येवेळीं मौन

प्रथमं तावदाश्रमेषु ब्रह्मचारिणो धर्मा वर्ण्यंते । स द्विविधः । उपकुर्वाणको नैष्ठिकश्च । तत्राद्यस्य धर्मानाह । द्वितीयमिति नवभिः । द्विजस्त्रैवर्णिकः । आनुपूर्व्याद्गर्भाधानादिसंस्कारक्रमेण द्वितीयमुपनयनाख्यं जन्म प्राप्याचार्येणाहूतो ब्रह्म वेदमधीयीत । चकारात्तदर्थं च विचारयेत् ॥ २२ ॥ किंच मेखलादीन्कुशांश्च दधत् । तत्राक्षशब्देनाक्षमाला । कथंभूतः । जटिलः अनभ्यंगादिना जातजटः । तथा अधौतदद्वासोऽरक्तपीठः दंताश्च वासश्च दद्वासांसि न धौतानि तानि यस्य सः अधौतदद्वासाः स चासावरक्तपीठश्च न तु कौ-

द्वितीयं प्राप्यानुपूर्व्याज्जन्मोपनयनं द्विजः ॥ वसन्गुरुकुले दांतो ब्रह्माधीयीत चाहुतः ॥ २२ ॥ मेखलाजिनदंडाक्षब्रह्मसूत्रकमंडलून् ॥ जटिलोऽधौतदद्वासोऽरक्तपीठः कुशान्दधत् ॥ २३ ॥ स्नानभोजनहोमेषु जपोच्चारे च वाग्यतः ॥ न छिंद्यान्नखरोमाणि कक्षोपस्थगतान्यपि ॥ २४ ॥ रेतो नावकिरेज्जातु ब्रह्मव्रतधरः स्वयम् ॥ अवकीर्णेऽवगाह्याप्सु यतासुस्त्रिपदीं जपेत् ॥ २५ ॥ अग्न्यर्काचार्यगोविप्रगुरुवृद्धसुरान् शुचिः ॥ समाहित उपासीत संध्ये च यतवाग्जपन् ॥ २६ ॥ आचार्यं मां विजानीयान्नावमन्येत कर्हिचित् ॥ न मर्त्यबुद्ध्याऽसूयेत सर्वदेवमयो गुरुः ॥ २७ ॥ सायंप्रातरुपानीय भैक्ष्यं तस्मै निवेदयेत् ॥ यच्चान्यदप्यनुज्ञातमुपयुंजीत संयतः ॥ २८ ॥

तुकादिना रक्तं पीठमासनं यस्य सः ॥ २३ ॥ जपश्चोच्चारो मूत्रपुरीषोत्सर्गो जपोच्चारं तस्मिन्वाग्यतो मौनी भवेत् ॥ २४ ॥ रेतो बुद्धिपूर्वं नावकिरेन्नोत्सृजेत् । ब्रह्मव्रतधरोऽगृहस्थः । स्वयमेव कथंचिदवकीर्णे अवगाह्य स्नात्वा यतासुः कृतप्राणायामस्त्रिपदीं गायत्रीं जपेत् ॥ २५ ॥ संध्ये च द्वे यतवाग् जपन्नुपासीत । मध्याह्ने संध्यानिमित्तं मौनं नास्तीति द्विवचनम् ॥ २६ ॥ २७ ॥ अन्यदपि यत्संप्राप्तं तच्च निवेदयेत् । तेनानुज्ञातं तु संयतः सन्नुपयुंजीतेत्यर्थः ॥ २८ ॥

व्रत धारण करावें. नखें काढूं नयेत, तसेंच खाका व उपस्थ यांवरील रोम काढूं नयेत ॥ २४ ॥ ब्रह्मचर्यव्रत धारण करणाऱ्यानें, बुद्धिपूर्वक रेतस्त्याग कधींहि करूं नये. कदाचित् आपोआप रेतस्खलन झालें तर उदकामध्यें स्नान करून प्राणायाम करून गायत्रीमंत्राचा जप करावा ॥ २५ ॥ आणि शुचिर्भूत राहून दोन्हीं संध्यांच्या वेळीं व जपाच्या वेळीं मौनव्रत धारण करून अग्नीची होमादिकानें, सूर्याची अर्घ्यदानादिकानें, गुरूची नमस्कारादिकानें, गाईची तृणदानादिकानें, ब्राह्मणाची आदरसत्कारानें शास्त्रोपदेष्ट्या गुरूची उपकारस्मरणादिकेंकरून आणि देवांची गंधपुष्पादिक उपचारांनीं उपासना करावी ॥ २६ ॥ आपल्या गुरूला हा ईश्वरच आहे असें मानावें, कधींहि त्याची अवज्ञा करूं नये, आणि हा मनुष्य आहे अशा बुद्धीनें त्याच्या गुणांचेठिकाणीं दोषारोप कधींच करूं नये. कारण, गुरु हा सर्व देवमय आहे ॥ २७ ॥ सायंकाळीं व प्रातःकाळीं भिक्षा मागून आणिलेलें अन्न त्या गुरूला अर्पण करावें. दुसरेंहि जें कांहीं (वस्त्रपात्रादिक) मिळालें असेल तेंहि त्याला अर्पण करावें. त्यानें भोजनाविषयीं आज्ञा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

केलेलें मात्र अन्नादिक संतोषवृत्तीनें सेवन करावें ॥ २८ ॥ गुरूची शुश्रूषा करणाऱ्या त्या ब्रह्मचाऱ्यानें निरंतर आपल्या गुरूचें कोठें जाणें, निजणें, बसणें व उभें राहणें झालें तर त्या वेळींहि अगदीं जवळ नम्रतेनें राहून त्याची शुश्रूषा करावी ॥ २९ ॥ असें वर्तन ठेऊन भोगरहित असलेल्या ब्रह्मचाऱ्यानें आपलें अध्ययन संपेतोंपर्यंत अविच्छिन्न ब्रह्मचर्य व्रत धारण करून गुरुगृहाचेठिकाणीं वास करावा ॥ ३० ॥ याप्रमाणें अध्ययन संपल्यावर गृहस्थाश्रम स्वीकारणाऱ्या ब्रह्मचाऱ्याचे धर्म सांगून, आतां नैष्ठिकाचे (आमरणांत ब्रह्मचर्य व्रत धारण करणाराचे) विशेष धर्म सांगतो– जर तो ब्रह्मचारी, जेथें मूर्तिमंत वेद आहेत अशा ब्रह्मलोकीं जाण्याची इच्छा करीत असेल तर त्यानें, आमरणांत ब्रह्मचर्य व्रत धारण करून आपला देह, अधिक अध्ययनाकरितां किंवा केलेल्या अध्ययनाच्या निष्क्रयाकरितां गुरूला अर्पण करावा॥ ३१ ॥ आणि

यानशय्यासनस्थानैः यांतं पृष्ठतो यानेन । निद्रितमप्रमत्ततया समीपशयनेन, विश्रांतं पादसंवाहनादिभिः समीपासनेन, आसीनं कृतांजलिः । नियोगप्रतीक्षया नातिदूरेऽवस्थानेनेत्यर्थः ॥ २९ ॥ एवंभूतं वृत्तं यस्य सः ॥ ३० ॥ एवमुपकुर्वाणकस्य धर्मानुक्त्वा नैष्ठिकस्य विशेषधर्मानाह । यदीति षड्भिः । असौ ब्रह्मचारी यदि छंदसां लोकं महर्लोकं ततो ब्रह्मलोकं चारोक्ष्यन्नारोढुमिच्छतीत्यर्थः । यद्वा छंदसां लोकमिति ब्रह्मलोकविशेषणं यत्र मूर्तिधराः कल । इत्युक्तत्वात् । तर्हि बृहद्व्रतः सन्बृहन्नैष्ठिकं व्रतं यस्य सः । विन्यसे-

शुश्रूषमाण आचार्यं सदोपासीत नीचवत् ॥ यानशय्यासनस्थानैर्नातिदूरे कृतांजलिः ॥ २९ ॥ एवंवृत्तो गुरुकुले वसेद्भोगविवर्जितः ॥ विद्या समाप्यते यावद्बिभ्रद्व्रतमखंडितम् ॥ ३० ॥ यद्यसौ छंदसां लोकमारोक्ष्यन्ब्रह्मविष्टपम् ॥ गुरवे विन्यसेद्देहं स्वाध्यायार्थं बृहद्व्रतः ॥ ३१ ॥ अग्नौ गुरावात्मनि च सर्वभूतेषु मा परम् ॥ अपृथग्धीरुपासीत ब्रह्मवर्चस्व्यकल्मषः ॥ ३२ ॥ स्त्रीणां निरीक्षणस्पर्शसंल्लापक्ष्वेलनादिकम् ॥ प्राणिनो मिथुनीभूतानगृहस्थोऽग्रतस्त्यजेत् ॥ ३३ ॥ शौचमाचमनं स्नानं संध्योपासनमार्जवम् ॥ तीर्थसेवा जपोऽस्पृश्याभक्ष्यासंभाष्यवर्जनम् ॥ ३४ ॥ सर्वाश्रमप्रयुक्तोऽयं नियमः कुलनंदन ॥ मद्भावः सर्वभूतेषु मनोवाक्कायसंयमः ॥ ३५ ॥

कर्मणां परिणामित्वादाविरिंचादमंगलम् ॥ विपश्चिन्नश्वरं पश्येददृष्टमपि दृष्टवत् ॥ १८ ॥ भक्तियोगः पुरैवोक्तः प्रीयमाणाय तेऽनघ ॥ पुनश्च कथयिष्यामि मद्भक्तेः कारणं परम् ॥ १९ ॥ श्रद्धामृतकथायां मे शश्वन्मदनुकीर्तनम् ॥ परिनिष्ठा च पूजायां स्तुतिभिः स्तवनं मम ॥ २० ॥ आदरः परिचर्यायां सर्वांगैरभिवंदनम् ॥ मद्भक्तपूजाभ्यधिका सर्वभूतेषु मन्मतिः ॥ २१ ॥ मदर्थेष्वंगचेष्टा च वचसा मद्गुणेरणम् ॥ मय्यर्पणं च मनसः सर्वकामविवर्जनम् ॥ २२ ॥ मदर्थेऽर्थपरित्यागो भोगस्य च सुखस्य च ॥ इष्टं दत्तं हुतं जप्तं मदर्थं यद्व्रतं तपः ॥ २३ ॥ एवं धर्मैर्मनुष्याणामुद्धवात्मनिवेदिनाम् ॥ मयि संजायते भक्तिः कोऽन्योऽर्थोऽस्यावशिष्यते ॥ २४ ॥

भोगस्य तत्साधनस्य चंदनादेः । सुखस्य पुत्रोपलालनादेः । इष्टादि वैदिकं यत्कर्म तदपि मदर्थं कृतं भक्तेः कारणमित्यर्थः ॥ २३ ॥ भक्तिः प्रेमलक्षणा संजायते । अस्य स्यान्यः कोऽर्थः साधनरूपः साध्यरूपो वाऽवशिष्यते । सर्वोऽपि स्वत एव भवतीत्यर्थः ॥ २४ ॥

तुला, पुनरपि माझ्या भक्तीचीं श्रेष्ठ कारणें सांगतों ॥ १९ ॥ माझ्या अमृतासारख्या कथेच्या श्रवणाविषयीं आदर, व श्रवणानंतर निरंतर माझ्या कथांचें व्याख्यान माझ्या पूजेविषयीं आसक्तता, स्तोत्रांनीं माझें स्तवन करणें ॥२०॥ माझ्या मंदिरमार्जनादिक कर्मांविषयीं आदर, मला साष्टांग नमस्कार करणें, माझ्या भक्तांची विशेषपूज भूतांचेठिकाणीं माझी भावना ठेवणें ॥ २१ ॥ माझ्या पूजेचीं फुलें तुळशीवगैरे साहित्यें मिळविण्याची स्वतां खटपट करणें, वाणीनें माझ्या गुणांचें वर्णन मला आपलें मन अर्पण करणें, सर्वविषयवासना सोडून देणें ॥ २२ ॥ माझ्याकरितां द्रव्य खर्च करणें, माझ्या भजनाला अडचण येईल तर स्रक्चंदनादिक भोगसाध पुत्रलालनादिकसुखांचाहि त्याग करणें, यज्ञादिक वैदिक कर्म करणें, दानें, होम, जप, तप व एकादश्यादिक व्रतें हीं माझ्याकरितां करणें ॥ २३ ॥ हे उद्धव प्रकारच्या श्रवणादिक साधनांसह आत्मनिवेदन करणाऱ्या मनुष्यांना, माझेठिकाणीं प्रेमलक्षण भक्ति उत्पन्न होत्ये. मग त्यांना कोणता दुसरा साधनरूप गुण ता

त्मतत्त्व

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अर्थ अवशेष राहतो? कोणताच राहत नाहीं, तर सर्वहि अर्थ स्वतःच सिद्ध होतो ॥ २४ ॥ अधिक तर काय परंतु, चित्त हेंच अंतर्मुख व बहिर्मुख झालें म्हणजे व अनर्थाला कारण होतें. जेव्हां सत्वगुणानें युक्त झालेलें चित्त, आत्मरूप माझेठिकाणीं अर्पण केल्यामुळें शांत व तेथेंच आसक्त होतें तेव्हां तो पुरुष, धर्म, ज्ञान, व ऐश्वर्य यांनीं युक्त होतो ॥ २५ ॥ आणि जेव्हां तें चित्त देहगृहादिकांचेठिकाणीं अर्पित होत्सातें इंद्रियद्वारा विषयांकडे धांवून अतिशय मळिण व विषयास तेव्हां तो पुरुष, अधर्मादिकांनीं युक्त होतो असें जाण ॥ २६ ॥ आतां आपणास मान्य असलेल्या धर्मादिकांचें व्याख्यान करितो— जेणेंकरून माझी भक्ति प्राप्त तोच धर्म उत्कृष्ट असा शास्त्रांत सांगितला आहे; ज्याच्या योगानें एक आत्म्याचें दर्शन होतें तें ज्ञान, ज्याच्या योगानें विषयांची आसक्ति सुटत्ये तें वैराग्य आणि ज

किंबहुना चित्तमेवांतर्बहिर्निष्ठमर्थानर्थयोः कारणमित्याह । यदात्मनीति द्वाभ्याम् । यदा आत्मनि मयि ईश्वरे चित्तमर्पितं तदा पुमान् धर्मादीन्प्राप्नोत्येव ॥ २५ ॥ एतदेव रेकेण द्रढयति । यद्यदा तच्चित्तं विकल्पे देहगृहादावर्पितं सद्विषयेषु परिधावति तदाधिकं रजस्वलमसन्निष्ठं च भवति । ततश्च विपर्ययमधर्मादिकं विद्धि ॥ २६ ॥ स्वाभि न्धर्मादीन् व्याचष्टे । धर्मो मद्भक्तिकृत् । यतः स एव प्रोक्तः प्रकृष्ट उक्तः शास्त्रेषु ॥ २७ ॥ धर्मादीनां महाजनप्रसिद्धानामन्यथाव्याख्यातत्वाद्यमादिष्वपि संख्यातः स्व

यदात्मन्यर्पितं चित्तं शांतं सत्वोपबृंहितम् ॥ धर्मं ज्ञानं सवैराग्यमैश्वर्यं चाभिपद्यते ॥ २५ ॥ यदर्पितं तद्विकल्पे इंद्रियैः परिध वति ॥ रजस्वलं चासन्निष्ठं चित्तं विद्धि विपर्ययम् ॥ २६ ॥ धर्मो मद्भक्तिकृत्प्रोक्तो ज्ञानं चैकात्म्यदर्शनम् ॥ गुणेष्वसंगो वैराग्यमै श्वर्यं चाणिमादयः ॥ २७ ॥ उद्धव उवाच ॥ यमः कतिविधः प्रोक्तो नियमो वाऽरिकर्शन ॥ कः शमः को दमः कृष्ण का तिति क्षा धृतिः प्रभो ॥ २८ ॥ किं दानं किं तपः शौर्यं किं सत्यमृतमुच्यते ॥ कस्त्यागः किं धनं चेष्टं को यज्ञः का च दक्षिण ॥ २९ ॥ पुंसः किंस्विद्बलं श्रीमन् भगो लाभश्च केशव ॥ का विद्या ह्रीः परा का श्रीः किं सुखं दुःखमेव च ॥ ३० ॥ कः पं डितः कश्च मूर्खः कः पंथा उत्पथश्च कः ॥ स्वर्गो नरकः कस्वित्को बंधुरुत किं गृहम् ॥ ३१ ॥ क आढ्यः को दरिद्रो वा कृप णः कः क ईश्वरः ॥ एतान्प्रश्नान्मम ब्रूहि विपरीतांश्च सत्पते ॥ ३२ ॥

वा किंचिद्वैलक्षण्यं स्यादित्येवं संभावनया तद्विशेषं जिज्ञासुः पृच्छति यम इति पंचभिः ॥ २८ ॥ इष्टमभ्यर्हितं धनं च किम् ॥ २९ ॥ परेति विद्यादीनां विशेषणम् । श्रीम नम् ॥ ३० ॥ ३१ ॥ प्रश्नान्पृष्टानर्थान् । विपरीतानशमादीन् ॥ ३२ ॥

योगानें आणिमादिक सिद्धि प्राप्त होतात तें ऐश्वर्य असें शास्त्रामध्यें सांगितलें आहे ॥ २७ ॥ याप्रमाणें धर्मादिकांचें लोकप्रसिद्ध अर्थाहून निराळेंच व्याख्यान झाल्यामु यमनियमादिकांमध्येंहि कांहीं निराळाच अर्थ असल्यास तो ऐकावा अशा इच्छेनें उद्धव म्हणाला कीं,– हे शत्रुदमना प्रभो श्रीकृष्णा, यम कितीप्रकारचा सांगितला आहे ? नियमहि कितीप्रकारचा आहे? शम कशाला म्हणतात? दम कोणता? तितिक्षा कोणती? व धैर्य कोणतें? ॥ २८ ॥ दान कोणतें? तप कोणतें? शौर्य, सत्य व ऋत कोणतीं सांगितलीं आहेत? त्याग कोणता? इष्ट धन कोणतें? यज्ञ कोणता ? व दक्षिणा कोणती ? ॥ २९ ॥ हे श्रीमंता केशवा, मनुष्याचें बल कोणतें ? भाग्य कोण व लाभ कोणता? विद्या, शोभा व लज्जा ह्या उत्तम कोणत्या? सुख कोणतें व दुःख कोणतें? ॥ ३० ॥ पंडित कोणाला म्हणावें? मूर्ख कोण? सन्मार्ग कोणता व कुमार्ग कोणता? स्वर्ग कोणता व नरक कोणता? बंधु कोणता व घर कोणतें? ॥ ३१ ॥ संपन्न कोणाला म्हणावें? दरिद्री कोण? कृपण कोण व ईश्वर कोण आहे? हे सत्पुरुषां-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

च्या अधिपते, ह्या मी विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर आणि ह्यांच्याहून उलट असलेल्या 'अशम, अदम' इत्यादिकाचेंहि लक्षण मला सांग ॥ ३२ ॥ श्रीभगवान् ह्मणाला— हे उद्धवा, १ अहिंसा, २ सत्य भाषण, ३ चोरी न करणें, ४ आसक्ति न राखणें, ५ निंद्यकर्मांविषयीं लज्जा, ६ संग्रह न करणें, ७ धर्मावर विश्वास ठेवणें, ८ ब्रह्मचर्य, ९ मौन, १० स्थिरता, ११ क्षमा आणि १२ अभय ॥ ३३ ॥ तसेंच १ मनांतून शुद्धपणा, २ बाहेरून शुद्धपणा, ३ जप, ४ तप, ५ होम, ६ श्रद्धा, ७ अतिथीचा सत्कार, ८ माझी पूजा, ९ तीर्थयात्रा, १० दुसऱ्या करितां खटपट करणें, ११ संतोष व १२ गुरुची सेवा ॥ ३४ ॥ हे दोन श्लोकांमध्यें सांगितलेले बारा बारा अनुक्रमानें यम नियम समजावे. बा उद्धवा, याचें आचरण सकाम व निष्काम मनुष्यानीं केलें असतां हे त्यांच्या मनांतील उभ्युदय व मोक्षरूप कामना पूर्ण करणारे होतात ॥ ३५ ॥ आत

यमनियमानाह । अहिंसेति त्रिभिः । अस्तेयं मनसाऽपि परस्वाग्रहणम् । आस्तिक्यं धर्मे विश्वासः ॥ ३३ ॥ शौचं बाह्यमाभ्यंतरं चेति द्वयम् । अतो द्वादश नियमाः । श्रद्धा धर्मादरः ॥ ३४ ॥ उभयोः श्लोकयोर्ये स्मृतास्ते यमा नियमाश्च । यद्वा उभयोः प्रवृत्तनिवृत्तयोः । मुमुक्षोर्यमा मुख्याः सकामस्य नियमा मुख्याः स्मृता इत्यर्थः । अत्र हेतुमाह हि यस्मादुपासिताः सेविताः संतः पुंसां प्रवृत्तानां निवृत्तानां च यथाकामं कामानुसारेण मोक्षमभ्युदयं च दुहंतीति ॥३५ ॥ मुमुक्षोरुपादेयान् शमादीन्हेयांश्च दुःखादीन्महाजनप्रसिद्धेभ्यो विलक्षणानाह । शम इत्यादिना यावत्समाप्ति । एतेनैव तद्विपरीता अशमादयोऽप्युन्नेयाः । शमो मन्निष्ठता बुद्धेर्न तु शांतिमात्रम् । दम इंद्रियसंयमो न चौरादिदमन-

श्रीभगवानुवाच ॥ अहिंसा सत्यमस्तेयमसंगो ह्रीरसंचयः ॥ आस्तिक्यं ब्रह्मचर्यं च मौनं स्थैर्यं क्षमाऽभयम् ॥ ३३ ॥ शौचं जपस्तपो होमः श्रद्धाऽतिथ्यं मदर्चनम् ॥ तीर्थाटनं परार्थेहा तुष्टिराचार्यसेवनम् ॥ ३४ ॥ एते यमाः सनियमा उभयोर्द्वादश स्मृताः ॥ पुंसामुपासितास्तात यथाकामं दुहंति हि ॥ ३५ ॥ शमो मन्निष्ठता बुद्धेर्दम इंद्रियसंयमः ॥ तितिक्षा दुःखसंमर्षो जिह्वोपस्थजयो धृतिः ॥ ३६ ॥ दंडन्यासः परं दानं कामत्यागस्तपः स्मृतम् ॥ स्वभावविजयः शौर्यं सत्यं च समदर्शनम् ॥ ३७ ॥ ऋतं च सूनृता वाणी कविभिः परिकीर्तिता ॥ कर्मस्वसंगमः शौचं त्यागः संन्यास उच्यते ॥ ३८ ॥

म् । तितिक्षा विहितदुःखस्य संमर्षः सहनं न भारादेः । जिह्वोपस्थयोर्जयो वेगधारणं धृतिर्न त्वनुद्वेगमात्रम् ॥ ३६ ॥ दंडो भूतद्रोहस्तस्य त्यागो दानं न धनार्पणम् । कामत्यागो भोगोपेक्षा तपो न कृच्छ्रादिः । स्वभावो वासना तस्य विजयः प्रतिबंधः शौर्यं न विक्रांतिः । समं ब्रह्म तस्य दर्शनमालोचनं सत्यविषयत्वात्सत्यं न यथार्थभाषणम् ॥ ३७ ॥ अन्यच्च । ऋतं सूनृता सत्या प्रिया च वाक् । एवं च ऋतसत्ययोः स्फुट एव विवेकः । क्रमप्राप्तं त्यागं व्याख्यातुमादौ ततोऽर्थभेदेन शौचं व्याचष्टे । तस्य मलत्यागरूपत्वे त्यागाभेदप्रतीतेः कर्मस्वसंगमोऽनासक्तिः शौचं त्यागस्तु संन्यास इति तयोर्भेद इत्यर्थः ॥ ३८ ॥

मुमुक्षूला ग्राह्य असा शमादिकांचा अर्थ, लोकप्रसिद्ध असलेल्या अर्थाहून कांहीं निराळ्या रीतीनें सांगतो—बुद्धीची माझेठिकाणीं जी निष्ठा होणें तिला शम ह्मणतात, शांत असणें हा शम नव्हे. इंद्रियांना दमविणें हा दम होय, ~~केवळ चोरादिकांना दमविणें हा नव्हे.~~ दुःख सहन करणें ही तितिक्षा होय, केवळ भारादिकांचें सहन करणें ही जिव्हा आणि उपस्थ या इंद्रियांचा वेग धारण करणें हें धैर्य होय, केवळ उद्विग्नपणा नसणे हें नव्हे ॥ ३६ ॥ भूतद्रोहाचा त्याग करणें हेंच उत्कृष्ट दान होय, धनाचें करणें हें नव्हे. भोगांची उपेक्षा करणें हेंच तप होय, कृच्छ्रादिक नव्हे. स्वभावाचा जय करणें हेंच शौर्य होय, पराक्रम करणें हें नव्हे. समरूप ब्रह्माचें पाहणें हें सत्य केवळ खरें बोलणें हें नव्हे ॥ ३७ ॥ सत्य व प्रिय बोलणें हें ऋत असें कवींनीं सांगितलें आहे. कर्मांचेठिकाणीं जी अनासक्ति तें शौच होय, स्नानादिकेंकरून

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मळ घालविणें हें नव्हे. सर्व कर्मांचा संन्यास करणें हा त्याग होय केवळ घरवगैरे सोडणें हा नव्हे ॥ ३८ ॥ परमार्थरूप जो धर्म तेंच मनुष्यांचें इष्टधन होय, पशूवगैरे र
धन हें नव्हे. पूर्ण ज्ञानादिरूप परमेश्वर मीच यज्ञ आहें ह्मणजे माझ्या बुद्धीनेंच यज्ञानुष्ठान करावें, कर्मबुद्धीनें करूं नये. यज्ञाकरितां (माझ्याकरितां) ज्ञानोपदेश
तीच दक्षिणा होय. केवळ सुवर्णादिकाचें दान ती नव्हे. मनाला दमविण्याचें साधन जो प्राणायाम तेंच मोठें बळ होय, शरीरबळ हें बळ नव्हे ॥ ३९ ॥ माझी जी षड्गु
संपत्ति तें भाग्य होय, केवळ पुण्य हें भाग्य नव्हे. माझी भक्ति हाच उत्तम लाभ होय, पुत्रादिक हा नव्हे. आत्म्याचे ठिकाणीं प्रतीतीला येणाऱ्या देवमनुष्यादिक भेदांच
बाध होणें ती विद्या होय, केवळ ज्ञान नव्हे. निंद्यकर्मांचेठिकाणीं जी सोडून देण्याची बुद्धि ती लज्जा होय, केवळ लौकिकलज्जा नव्हे ॥ ४० ॥ निरपेक्षत्वादिक जो

नृणामिष्टं धनं धर्मो न पश्वादिसाधारणम् । भगवत्तमः परमेश्वरोऽहमेव यज्ञः मद्बुद्ध्या यज्ञोऽनुष्ठेयो न क्रियाबुद्ध्येत्यर्थः । यज्ञार्थं दानं दक्षिणा सा च ज्ञानोपदेशो न
ण्यादिदानम् । तेन हि यज्ञरूपो विष्णुः प्राप्यते । दुर्दमनं बलं तच्च मनोदमनहेतुत्वात्प्राणायाम इति ॥ ३९ ॥ लाभं व्याचिख्यासुः प्रथमं भगं ततो भेदेन व्याचष्टे ।
तयोरभेदप्रसिद्धेः । भगो भाग्यं तच्च मे ऐश्वरो भावो मदीयमैश्वर्यादिषाड्गुण्यमित्यर्थः । उत्तमो लाभस्तु मद्भक्तिर्न पुत्रादिः । विद्या चात्मनि प्रतीतस्य भेदस्य बाधो न ज्ञ
मात्रम् । अकर्मसु जुगुप्सा हेयत्वदर्शनं ह्रीर्न लज्जामात्रम् ॥ ४० ॥ गुणा एव श्रीर्मंडनं न किरीटादि । दुःखसुखयोरत्ययोऽतिक्रमोऽननुसंधानं सुखं न भोगः । विषयभो

धर्म इष्टं धनं नृणां यज्ञोऽहं भगवत्तमः ॥ दक्षिणा ज्ञानसंदेशः प्राणायामः परं बलम् ॥ ३९ ॥ भगो म ऐश्वरो भावो लाभो मद्भ
क्तिरुत्तमः ॥ विद्यात्मनि भिदाबाधो जुगुप्सा ह्रीरकर्मसु ॥ ४० ॥ श्रीर्गुणा नैरपेक्ष्याद्याः सुखं दुःखसुखात्ययः ॥ दुःखं कामसुखा-
पेक्षा पंडितो बंधमोक्षवित् ॥ ४१ ॥ मूर्खो देहाद्यहंबुद्धिः पंथा मन्निगमः स्मृतः ॥ उत्पथश्चित्तविक्षेपः स्वर्गः सत्त्वगुणोदयः ॥ ४२ ॥
नरकस्तम उन्नाहो बंधुर्गुरुरहं सखे ॥ गृहं शरीरं मानुष्यं गुणाढ्यो ह्याढ्य उच्यते ॥ ४३ ॥

क्षैव दुःखं नाग्निदाहादि । बंधान्मोक्षं द्वयं वा यो वेत्ति स पंडितो न विद्वन्मात्रम् ॥ ४१ ॥ अहंबुद्धिरित्युपलक्षणम् । देहगेहादिष्वहंममेत्यभिमानवान्मूर्ख इत्यर्थः । मन्निग
मां नितरां गमयति प्रापयति यो निवृत्तिमार्गः स तु पंथाः सन्मार्गो न कंटकादिशून्यः । चित्तविक्षेपः प्रवृत्तिमार्गः । स उत्पथः कुमार्गो न तु चौराद्याकुलः । सत्वगुणस्योद
उद्रेकः स्वर्गो नेंद्रादिलोकः ॥ ४२ ॥ तमस उन्नाह उद्रेकः स नरको न तामिस्रादिः । गुरुरेव बंधुर्न भ्रात्रादिः । स चाहमेव यथाऽहं जग द्गुरुः । एक एव परो बंधुर्विषमे समु
पस्थिते ॥ गुरुः सकलधर्मात्मा यत्राकिंचनगो हरिरिति । ससाधनं भोगायतनं गृहं तच्च मानुष्यं मानुषरूपं शरीरमेव न हर्म्यादि । गुणैः संपन्न आढ्य उच्यते न धनी ॥ ४३ ॥

तीच शोभा (भूषण) होय, किरीटादिक नव्हे. दुःखसुखांचें अनुसंधान न राखणें तेंच सुख होय, भोग नव्हे. विषयभोगांची जी इच्छा तेंच दुःख होय, अग्निदाहादिक
नव्हे. बंधापासून मोक्षाला, किंवा बंध व मोक्ष यां दोहोंना जो जाणतो तो पंडित होय, केवळ विद्वान् नव्हे ॥ ४१ ॥ देहगृहादिकांचेठिकाणीं जो मी आणि माझें असा अभिमान
धारण करितो तो मूर्ख होय, केवळ अविद्वान् नव्हे. माझी प्राप्ति करून देणारा जो निवृत्तिमार्ग तोच सन्मार्ग होय, केवळ कंटकादिशून्य तो नव्हे. चित्ताचा विक्षेपरूप जो
प्रवृत्तिमार्ग तो कुमार्ग होय, केवळ चोरादिकांनीं व्याप्त तो नव्हे. सत्वगुणाचा जो उत्कर्ष तो स्वर्ग होय. केवळ इंद्रादिलोक नव्हे ॥ ४२ ॥ तमोगुणाचा जो उद्रेक तो नरक होय;
केवळ रौरवादिक नव्हे. हे सख्या उद्धवा, गुरुरूपी जो मी तोच बंधु होय, भ्रातावगैरे नव्हे. मनुष्यशरीर हेंच घर होय, केवळ काष्ठमृत्तिकादिकांचें नव्हे. गुणांनीं संपन्न

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तोच संपन्न होय केवळ धनी नव्हे ॥ ४३ ॥ जो असंतुष्ट तो दरिद्री होय, केवळ निर्धन नव्हे. ज्यानें इंद्रियें जिंकिलीं नाहींत तो कृपण होय, केवळ दीन नव्हे. विषयांचेठिकाणीं जो आसक्तचित्त नाहीं तो ईश्वर होय, केवळ राजावगैरे नव्हे. विषयांचेठिकाणीं जो आसक्त तो अनीश्वर होय ॥ ४४ ॥ हे उद्धवा, तुझे हे सर्व प्रश्न मोक्षोपयोगित्वेंकरून मी निरूपण केले आहेत. पुष्कळ वर्णन करण्यांत काय आहे ? गुणदोषांचें लक्षण इतकेंच आहे कीं—गुण व दोष यांचें जें पाहणें तो दोष होय आणि ते गुणदोष न पाहण्याचा जो स्वभाव तो गुण होय असें जाणावें ॥ ४५ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक पुराणाच्या एकादशस्कंधांत यम नियमादिनिरूपणनामक हा एकुणिसावा अध्याय समाप्त झाला ॥ १९ ॥ आतां ह्या विसाव्या अध्यायामध्यें गुणदोषांच्या व्यवस्थांकरितां अधिकाऱ्यांच्या विभागानें भक्तियोग, ज्ञानयोग आणि कर्मयोग यांचें वर्णन केलें आहे ॥ १ ॥ गुण

असंतुष्टो यः स दरिद्रो न निःस्वः । योऽजितेंद्रियः स कृपणः शोच्यो न दीनः । विषयेष्वनासक्तधीर्यः स ईशः स्वतंत्रो न राजादिः । गुणसंगो गुणेषु संगो यस्य स विपर्ययोऽनीशः । एतच्च शमादिविपर्ययोपलक्षणार्थम् ॥ ४४ ॥ उपसंहरति । एत इति । साधु मोक्षोपयोगितया । एतच्च सर्वं गुणदोषयोर्विवेकायोद्धवेन पृष्टमिति तयोः संक्षेपलक्षणमाह । किंबहुना वर्णितेन गुणदोषयोर्लक्षणमेतावदेव । तदाह । गुणदोषयोर्दृशिर्दर्शनं दोषः । गुणस्तु तदुभयदर्शनविवर्जितः स्वभाव इति ॥ ४५ ॥ इति श्रीमद्भागवतएकादशस्कंधे टीकायामेकोनविंशोऽध्यायः ॥ १९ ॥ विंशे योगत्रयं प्रोक्तं भक्तिज्ञानक्रियात्मकम् । गुणदोषव्यवस्थार्थमधिकारिविभागतः ॥ १ ॥ गुणदोषदृशिर्दोषो गुणस्तू

दरिद्रो यस्त्वसंतुष्टः कृपणो योऽजितेंद्रियः ॥ गुणेष्वसक्तधीरीशो गुणसंगो विपर्ययः ॥ ४४ ॥ एत उद्धव ते प्रश्नाः सर्वे साधु निरूपिताः ॥ किं वर्णितेन बहुना लक्षणं गुणदोषयोः ॥ गुणदोषदृशिर्दोषो गुणस्तूभयवर्जितः ॥ ४५ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे भगवदुद्धवसंवादे एकोनविंशोऽध्यायः ॥ १९ ॥ ॥ उद्धव उवाच ॥ विधिश्च प्रतिषेधश्च निगमो हीश्वरस्य ते ॥ अवेक्षतेऽरविंदाक्ष गुणदोषं च कर्मणाम् ॥ १ ॥ वर्णाश्रमविकल्पं च प्रतिलोमानुलोमजम् ॥ द्रव्यदेशवयःकालान्स्वर्गं नरकमेव च ॥ २

यवर्जित इत्युक्तं तदाक्षिपति विधिश्चेति पंचभिः । विधिश्च प्रतिषेधश्चेश्वरस्य तव निगम आज्ञारूपो वेदः । स च विधेयानां प्रतिषेध्यानां च कर्मणां गुणं दोषं च पुण्यपापरूपमवेक्षते ॥ १ ॥ उत्तमाधमभावेन तदधिकारिणां वर्णानामाश्रमाणां विकल्पं भेदं च गुणदोषरूपमवेक्षते । प्रतिलोमानुलोमजं च गुणं दोषं च तथैवावेक्षते । प्रतिलोमजा असदुत्तमवर्णासु स्त्रीषु हीनवर्णेभ्यः पुरुषेभ्यो जाताः सूतवैदेहकादयः । अनुलोमजास्तूत्तमवर्णेभ्यः पुरुषेभ्यो हीनवर्णासु स्त्रीषु जाता मूर्धावसिक्तांबष्ठादयस्तेषां च । असत्त्वविज्ञेयाः प्रतिलोमानुलोमजा इति गुणदोषौ । द्रव्यादीन्कर्मार्हतानर्हताभ्याम् । स्वर्गं नरकं च तत्फलतया गुणदोषरूपमेवावेक्षते । एतच्चोत्तराध्याये प्रपंचयिष्यते ॥ २ ॥

दोष यांचें जें पाहणें तो दोष आणि गुण तर त्या दोन्हींहून निराळा आहे असें जें सांगितलें त्याच्यावर शंका करीत उद्धव म्हणाला कीं— हे कमलनयना, तुज परमेश्वराच्याच आज्ञाच असा जो वेद तो विधिनिषेधमय आहे तो वेद, विहित आणि निषिद्ध कर्मांच्या पुण्यपापरूप फलांचें प्रतिपादन करितो ॥ १ ॥ आणि उत्तमाधमभावानें त्यांचे अधिकारी असलेल्या वर्णाश्रमांच्या गुणदोषरूप भेदांचें प्रतिपादन करितो. तसेंच प्रतिलोमज (उत्तमवर्णांच्या स्त्रियांचे उदरीं हीनवर्ण पुरुषांपासून झालेले सूतवैदेहक) आणि अनुलोमज (उत्तमवर्णांच्या पुरुषांपासून हीनवर्णांच्या स्त्रियांचे उदरीं झालेले मूर्धावसिक्त अंबष्ठ इत्यादिक) भेदांचें प्रतिपादन करितो आणि कर्माला योग्य व अयोग्य असल्यामुळें द्रव्य, देश, अवस्था आणि काळ यांच्या गुणदोषरूप झालेल्या भेदांचें व त्यांच्या फलत्वेंकरून स्वर्गनरकांचें प्रतिपादन करितो ॥ २ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

बरें आतां त्यानें अडचण कोणती आली ? असें ह्मणशील तर–आतां तूं गुणदोषदृष्टि हा दोष असें सांगून त्या गुणदोषांचें निराकरण केलेंस, तेव्हां गुणदोषांच्या भेददृष्टीवांचून कर्मकांडांतील निषेधविधिरूप तुझें वचन (सांगणें) कसें घडतें ? व त्या वचनावांचून मनुष्यांना मोक्ष तरी कसा प्राप्त होतो ? ज्ञानकांडामध्यें तर– 'श्रोतव्यो मंतव्यः' आत्म्याचें श्रवण करावें व मनन करावें इत्यादिर्केकरून विधान केलेल्या श्रवणादिक गुणांचा व ' नानुध्यायेद्बहून् ग्रंथान् ' पुष्कळ ग्रंथांचें पठणवगैरे करूं नये इत्यादिकें-करून सांगितलेल्या दोषांचा अवश्य अंगीकार करावा लागतो; तेव्हां हा सर्वप्रकार कसा आहे तें मला सांग ॥ ३ ॥ आतां, पितर व देव हे सर्वज्ञ आहेत ते प्रत्यक्ष पाहून मनुष्यांना सांगतील असें ह्मणशील तर–हे ईश्वरा, पितर, देव, व मनुष्य यांनाहि, प्रत्यक्षादिक प्रमाणांनीं समजत नसलेल्या स्वर्गमोक्षादिकांच्या ज्ञानाविषयीं व हें याचें

तथापि प्रस्तुते किमायातमत आह । गुणदोषेति । गुणदोषदृशिर्दोष इति निराकृतत्वाद्गुणदोषभिदादृष्टिमंतरेण तां विना निषेधविधिलक्षणं कर्मकांडगतं तव वचः कथम् । तच्च वचोंऽतरेण नृणां निःश्रेयसं कथं स्यात्तत्रापि श्रोतव्यो मंतव्य इति साधनविधेर्नानुध्यायेद्बहून् शब्दान्वाचो विग्लापनं हि तदित्यादिनिषेधस्य चावश्यकत्वादिति भावः । यद्वा गुणदोषभिदादृष्टिरूपं निषेधविधिलक्षणं तव वचो विनेति सामानाधिकरण्यमेवास्तु । यद्वा गुणदोषभिदादृष्टिमंतरेण निषेधविधिलक्षणमपि वचः कथं नु तत्त्वमस्यादिवाक्य-वन्निःश्रेयसपरं स्यात् । सर्वस्य वेदस्य तत्परत्वांगीकारादित्यर्थः ॥ ३ ॥ ननु पितरो देवाश्च सर्वज्ञाः प्रत्यक्षतो दृष्ट्वा मनुष्येभ्यः कथयिष्यंति नेत्याह । पित्रादीनां सर्वेषां तव

गुणदोषभिदादृष्टिमंतरेण वचस्तव ॥ निःश्रेयसं कथं नृणां निषेधविधिलक्षणम् ॥ ३ ॥ पितृदेवमनुष्याणां वेदश्चक्षुस्तवेश्वर ॥ श्रेयस्त्वनुपलब्धेऽर्थे साध्यसाधनयोरपि ॥ ४ ॥ गुणदोषभिदादृष्टिर्निगमात्ते न हि स्वतः ॥ निगमेनापवादश्च भिदा या इति ह भ्रमः ॥ ५ ॥ श्रीभगवानुवाच ॥ योगास्त्रयो मया प्रोक्ता नृणां श्रेयोविधित्सया ॥ ज्ञानं कर्म च भक्तिश्च नोपायो-ऽन्योऽस्ति कुत्रचित् ॥ ६ ॥

त्वद्वाक्यरूपो वेद एव तु श्रेयः श्रेष्ठं चक्षुः प्रमापकम् । क । अनुपलब्धेऽर्थे मोक्षे स्वर्गादौ च । तथा साध्यसाधनयोरिदमस्य साध्यमिदमस्य साधनमित्यत्रापि । तदेवं गुणदोषदृष्ट्य-भावे निःश्रेयसं न घटेत् ॥ ४ ॥ किंच शास्त्रेणैव विहितां भेददृष्टिं तस्मिन्नेव विषये शास्त्रं कथं निवर्तयेदित्याह । ते निगमात्त्वदाज्ञारूपाद्वेदादेव नहि स्वतः । यस्मादर्थप्रा-प्तत्वेन निवर्तेत । ह स्फुटम् । भ्रमो भवति तं निवर्तयेति शेषः ॥ ५ ॥ विषयाभेदेऽप्यधिकारिभेदेनाविरोधं वक्तुं प्रथमं योगत्रयमाह । योगा इति । योगा उपाया ब्रह्मकर्मदे-वताकांडैः प्रोक्ताः । कर्म च निष्कामम् । श्रेयोविधित्सया मोक्षसाधनेच्छया । अन्य उपायो नास्तीति काम्यकर्मादिकं व्यावर्तयति । तथा चोत्तराध्याये स्फुटीकरिष्यति ते य एतानित्यादिना ॥ ६ ॥

साध्य व हें याचें साधन यांविषयीं तुझें वचनरूप जो वेद तोच उत्तम ज्ञापक आहे. मिळून गुणदोषदृष्टींचा अभाव झाला तर मोक्षसुख प्राप्त होणार नाहीं ॥ ४ ॥ एतावता, गुणदोषांची भेददृष्टि, तुझ्या आज्ञारूप वेदापासूनच आहे, स्वतः नाहीं; आणि पुन्हा तुझ्या वचनानेंच त्या भेदाचा अपवाद मी श्रवण केला आहे, ह्मणून मला भ्रम प्राप्त होतो त्याची निवृत्ति कर ॥ ५ ॥ असें उद्धवाचें भाषण ऐकून, विषयांमध्यें भेद नसतांहि अधिकारिभेदानें विरोध आहे असें सांगण्याकरितां प्रथम तीन योग सांगत श्रीभगवान् ह्मणाला– हे उद्धवा, मनुष्यांना मोक्ष प्राप्त होण्याच्या इच्छेनें मी ब्रह्मकर्मदेवताकांडांनीं, ज्ञान, निष्काम कर्म आणि भक्ति असे तीन प्रकारचे उपाय सांगितले आहेत. यांहून इतर उपाय कोणत्याहि शास्त्रांत सांगितलेला नाहीं ॥ ६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्यांत दुःखबुद्धीनें कर्मांच्या फलांविषयीं विरक्त होऊन कर्मांचा त्याग करणाऱ्या पुरुषांना ज्ञानयोग सिद्धि देणारा आहे व त्या कर्मांच्या फळांविषयीं ज्यांच्या चित्तांमध्यें विरक्ति प्राप्त झाली नाहीं त्या सकामपुरुषांना कर्मयोग सिद्धि देणारा आहे ॥ ७ ॥ आणि ज्या पुरुषाला दैवयोगानें माझ्या कथांच्या श्रवणकीर्तनादिकांविषयीं श्रद्धा उत्पन्न झाली आहे परंतु कर्मफळांविषयीं वैराग्य झालें नाहीं व अतिआसक्तिहि नाहीं त्याला भक्तियोग सिद्धि देणारा आहे ॥ ८ ॥ आतां, कर्मयोगाचा अवधि सांगतो– मनुष्याला जोंपर्यंत वैराग्य झालें नाहीं किंवा माझ्या कथाश्रवणादिकांविषयीं श्रद्धा उत्पन्न झाली नाहीं तोंपर्यंत त्यानें नित्यनैमित्तिक कर्में करावीं ॥ ९ ॥ आतां, कर्म करणाऱ्या योग्याचा, ज्ञानभक्तींच्या भूमिकेवर आरूढ होण्याचा प्रकार सांगतो– हे उद्धवा, फलकामनारहित होऊन स्वधर्माचरण करणारा व पुष्कळ यज्ञ करून माझें

तेष्वधिकारिभेदमाह । निर्विण्णानामिति द्वाभ्याम् । इह एषां मध्ये कर्मसु निर्विण्णानां दुःखबुद्ध्या तत्फलेषु विरक्तानामतएव तत्साधनभूतकर्मन्यासिनां ज्ञानयोगः सिद्धिद इत्युत्तरेणान्वयः । अनिर्विण्णचित्तानां दुःखबुद्धिशून्यानाम् । अतः कामिनां तत्फलेष्वविरक्तानामित्यर्थः ॥ ७ ॥ यदृच्छया केनापि भाग्योदयेन । तत्र काम्यकर्मसु प्रवर्तमानस्य सर्वात्मना विधिप्रतिषेधाधिकार इत्युत्तराध्याये वक्ष्यति । निष्कामकर्मयोगाधिकारिणस्तु यथाशक्ति । स च ज्ञानभक्तियोगाधिकारात्प्रागेव । तदधिकृतयोस्तु स्वल्पः । ताभ्यां सिद्धानां तु न किंचिदिति ॥ ८ ॥ सावधिं कर्मयोगमाह । तावदिति नवभिः । कर्माणि नित्यनैमित्तिकानि । यावता यावत् ॥ ९ ॥ कर्मयोगिनो ज्ञानभक्तिभूमिकारो-

निर्विण्णानां ज्ञानयोगो न्यासिनामिह कर्मसु ॥ तेष्वनिर्विण्णचित्तानां कर्मयोगस्तु कामिनाम् ॥ ७ ॥ यदृच्छया मत्कथादौ जातश्रद्धस्तु यः पुमान् ॥ न निर्विण्णो नातिसक्तो भक्तियोगोऽस्य सिद्धिदः ॥ ८ ॥ तावत्कर्माणि कुर्वीत न निर्विद्येत यावता ॥ मत्कथाश्रवणादौ वा श्रद्धा यावन्न जायते ॥ ९ ॥ स्वधर्मस्थो यजन्यज्ञैरनाशीःकाम उद्धव ॥ न याति स्वर्गनरकौ यद्यन्यन्न समाचरेत् ॥ १० ॥ अस्मिँल्लोके वर्तमानः स्वधर्मस्थोऽनघः शुचिः ॥ ज्ञानं विशुद्धमाप्नोति मद्भक्तिं वा यदृच्छया ॥ ११ ॥ स्वर्गिणोऽप्येतमिच्छंति लोकं निरयिणस्तथा ॥ साधकं ज्ञानभक्तिभ्यामुभयं तदसाधकम् ॥ १२ ॥

हप्रकारमाह । स्वधर्मस्थ इति । अनाशीःकामोऽफलकामः । अन्यन्निषिद्धं काम्यं च । नरकयानं हि द्विधैव । विहितातिक्रमाद्वा निषिद्धाचरणाद्वा । अतः स्वधर्मस्थत्वान्निषिद्धवर्जनाच्च नरकं न याति । अफलकामत्वान्न स्वर्गमपीत्यर्थः ॥ १० ॥ किंतु अस्मिँल्लोकेऽस्मिन्नेव देहे । अनघो निषिद्धत्यागी । अतः शुचिर्निवृत्तरागादिमलः । यदृच्छयेति केवलज्ञानादपि भक्तेर्दुर्लभतां द्योतयति ॥ ११ ॥ अनेन प्रकारेण ज्ञानभक्तिसाधनत्वान्नरदेहं स्तौति । स्वर्गिणोऽपीति । निरयिण इति दृष्टांतत्वेनोक्तम् । ज्ञानभक्तिभ्यां ज्ञानभक्त्योः । तदुभयं स्वर्गिनारकिशरीरम् ॥ १२ ॥

आराधन करणारा पुरुष निषिद्धकर्मांचें आचरण जर करीत नसेल तर तो मेल्यावर स्वर्गलोकीं किंवा नरकामध्यें जाणार नाहीं. म्हणजे नरकामध्यें जाणें दोनप्रकारचें आहे. एक विहितकर्मांचें उल्लंघन केल्यानें किंवा निषिद्धकर्मांचें आचरण केल्यानें. त्यांत तो पुरुष, स्वधर्मांचें आचरण करीत व निषिद्धांचें वर्जन करीत असल्यामुळें नरकांत जात नाहीं आणि फलकामनारहित असल्यामुळें स्वर्गलोकींहि जात नाहीं ॥ १० ॥ तर याच लोकीं व याच मनुष्यदेहामध्यें राहून निषिद्धकर्मांचा त्याग करीत व स्वधर्मांचे ठिकाणीं शुचिर्भूतपणें राहत होत्साता पुरुष, अनायासानेंच विशुद्ध ज्ञान किंवा माझी भक्ति पावतो ॥ ११ ॥ आतां, मनुष्यशरीराची प्रशंसा करितो– जसे नरकांतील लोक या मनुष्य शरीराची इच्छा करितात त्याप्रमाणें स्वर्गवासी देवहि याची इच्छा करितात. कारण, हें मनुष्यशरीर जसें ज्ञानभक्तींचें किंवा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ज्ञानभक्तींच्या योगानें मुक्तीचें साधक आहे तसें तें नरकांतील शरीर किंवा दिव्यशरीर साधक नाहीं ॥ १२ ॥ ह्मणून विवेकी पुरुषानें, स्वर्गगतीची किंवा नरकगतीची इच्छा करूं नये, ह्मणजे स्वर्गनरकांना साधक अशीं काम्यनिषिद्ध कर्में करूं नयेत आणि हा देह अतिश्रेष्ठ असल्यामुळें पुनरपि आपण मनुष्यच होईन अशीहि इच्छा करूं नये. कारण, देहाचे ठिकाणीं आसक्त झाला ह्मणजे तो स्वार्थाविषयीं सावध राहत नाहींसा होतो ॥ १३ ॥ असें जाणणाऱ्या त्या विवेकी पुरुषानें, अर्थसिद्धि देणारेंहि हें आपलें शरीर मरणधर्मानें युक्त आहे असें जाणून मृत्युकाळ प्राप्त होण्याच्या पूर्वीं अशक्त अवस्थेंमध्येंच सावधपणें मोक्षप्राप्तीविषयीं यत्न करावा ॥ १४ ॥ सावधान व मुक्तसंग झालेला पुरुष, सुख पावतो याविषयीं दृष्टांत– जसा पक्षी, आपण घरटें करून राहिलेल्या आपल्या आश्रयभूत वृक्षाला यमासारखे निर्दय पुरुष तोडित आहेत असें पाहू-

---

अतो नरः स्वर्गतिं न कांक्षेत् । नारकीमिति दृष्टांतः । यद्वा स्वर्गनरकसाधनकर्माणि न कुर्यादित्यर्थः । अस्यातिश्रेष्ठत्वात्पुनरपि मनुष्यो भवेयमित्यपि न कांक्षेत् । यतो देहावेशाद्देहासक्त्या स्वार्थे प्रमाद्यत्यवधानशून्यो भवति ॥ १३ ॥ अपित्वेतद्देहसाधकमिति विद्वांस्तच्चार्थसिद्धिदमपि मर्त्यं ज्ञात्वाऽप्रमत्तोऽनलसः सन् मृत्योः पूर्वमेव मोक्षाय घटेत प्रयत्नं कुर्यात् ॥ १४ ॥ अप्रमत्तो मुक्तसंगः सुखं प्राप्नोतीत्यत्र दृष्टांतः । छिद्यमानमिति । यमैर्यमवन्निर्दयैः पुरुषैः कृतं नीडं यस्मिंस्तम् । स्वकेतं स्वस्याश्रयम् । अलंपटोऽनासक्तः ॥ १५ ॥ दार्ष्टांतिकमाह । अहोरात्रैश्छिद्यमानमायुर्बुद्ध्वा । भयेन वेपथुः कंपो यस्य सः ॥ १६ ॥ एवमयतमानं प्रमत्तं निंदति । नृदेहं प्लवं नावं प्राप्येत्यध्याहारः ।

न नरः स्वर्गतिं कांक्षेन्नारकीं वा विचक्षणः ॥ नेमं लोकं च कांक्षेत देहावेशात्प्रमाद्यति ॥ १३ ॥ एतद्विद्वान्पुरा मृत्योरभवाय घटेत सः ॥ अप्रमत्त इदं ज्ञात्वा मर्त्यमप्यर्थसिद्धिदम् ॥ १४ ॥ छिद्यमानं यमैरेतैः कृतनीडं वनस्पतिम् ॥ खगः स्वकेतमुत्सृज्य क्षेमं याति ह्यलंपटः ॥ १५ ॥ अहोरात्रैश्छिद्यमानं बुद्ध्वायुर्भयवेपथुः ॥ मुक्तसंगः परं बुद्ध्वा निरीह उपशाम्यति ॥ १६ ॥ नृदेहमाद्यं सुलभं सुदुर्लभं प्लवं सुकल्पं गुरुकर्णधारम् ॥ मयाऽनुकूलेन नभस्वतेरितं पुमान्भवाब्धिं न तरेत्स आत्महा ॥ १७ ॥ यदारंभेषु निर्विण्णो विरक्तः संयतेंद्रियः ॥ अभ्यासेनात्मनो योगी धारयेदचलं मनः ॥ १८ ॥

यो भवाब्धिं न तरेत्स आत्महा । तत्र हेतवः । आद्यं सर्वफलानां मूलम् । एतदुपार्जितकर्मभिः सर्वप्राप्तेः । किंच सुदुर्लभमुद्यमकोटिभिरपि प्राप्तुमशक्यम् । तथापि तु सुलभम् । यदृच्छया लब्धत्वात् । तं च सुकल्पं पटुतरम् । किंच गुरुः संश्रितमात्र एव कर्णधारो नेता यस्य तम् । मया च स्मृतमात्रेणानुकूलमारुतेन प्रेरितम् ॥ १७ ॥ एवं तावदविरक्तस्य वैराग्यद्वारा ज्ञानभक्तिसाधकं कर्मयोगमुक्त्वेदानीं सम्यग्विरक्तस्य ज्ञानयोगं तस्य च ज्ञानप्राप्तेः पूर्वं किंचित्कृत्यं वर्जनीयं चाह सार्धैर्नवभिः । यदा त्वारंभेषु कर्मसु निर्विण्णो दुःखदर्शनेनोद्विग्नस्तत्फलेषु विरक्तश्च तदा संयतेंद्रियः सन्नात्मनोऽभ्यासनात्मैविषयवृत्तिसंततया अचलं यथा भवति तथा मनो धारयेत् ॥ १८ ॥

न तेथें आसक्त न होतां त्याचा त्याग करून निघून गेला असतां सुख पावतो त्याप्रमाणें अहोरात्ररूपी काळाच्या अवयवांनीं तोडल्यामुळें कमी होत चालेलें आपलें आयुष्य जाणून भयानें कांपणाऱ्या व सर्व व्यापाररहित झालेल्या जीवानें, परमात्म्याला जाणून देहाची संगति सोडून दिली ह्मणजे सर्वसंतापरहित होऊन परमानंद पावतो ॥ १५ ॥ १६ ॥ आतां, मोक्षसाधनरूप मनुष्यदेह प्राप्त झाला असतांहि जो पुरुष पूर्वीं सांगितल्याप्रमाणें प्रयत्न करीत नाहीं त्याची निंदा करितो– सर्व फळांची मूळभूत, कोट्यावधि उद्योगांनीं प्राप्त न होणारी, परंतु सहज प्राप्त झालेली, गुरुरूप नावाडी असलेली व स्मरणमात्रानें अनुकूळ वायुरूपी झालेल्या मी प्रेरणा केलेली अशी मनुष्यदेहरूपी नौका पावून जो प्राणी संसारसमुद्राला तरून जात नाहीं तो केवळ आत्मघाती समजावा ॥ १७ ॥ याप्रमाणें विरक्त नसलेल्या पुरुषाला वैराग्यद्वारा ज्ञान व भक्ति उत्पन्न

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करणारा कर्मयोग सांगून आतां उत्तम वैराग्य असलेल्या पुरुषाला ज्ञान व ज्ञानप्राप्तीच्या पूर्वी वर्ज्य करावयाचें कांहीं कृत्य सांगतो— जेव्हां योगी, कर्माचेठिकाणीं दुःखदर्शनानें उद्विग्न होतो, व कर्मांच्या फळांविषयीं विरक्त होतो तेव्हां त्यानें इंद्रियांचा निग्रह करून आत्मानुसंधानाच्या अभ्यासानें, आत्म्याचेठिकाणीं आपलें मन निश्चळ धारण करावें ॥ १८ ॥ त्यांत प्रथमच मनाची अत्यंत धारणा घडत नसल्यामुळें त्याचें स्वभावानुसारें वशीकरण सांगतो— माझेठिकाणीं धारण केलेलेंहि मन, जेव्हां भ्रमण पावून (दुसऱ्या विषयांवर जाऊन) स्थिर राहत नाहींसें होतें, तेव्हां योग्यानें आळस न करितां त्याची कांहीं इच्छा पूर्ण करण्याच्या द्वारानें त्याला हळुहळू आपल्या स्वाधीन करून घ्यावें ॥ १९ ॥ तर तें पूर्वींप्रमाणेंच भ्रमण पावेल असें ह्मणशील तर— त्याची उपेक्षा केली असतां तें अत्यंत चंचळ होईल ह्मणून त्याला स्वाधीन करून घेण्याचें सोडूं नये तर सावधपणें प्राणांचा व इंद्रियांचा जय करून सत्वगुणसंपन्न झालेल्या बुद्धीनें त्या मनाला स्वाधीन करून घ्यावें ॥ २० ॥ आतां, त्याची इच्छा पूर्ण करण्याचा

तत्र प्रथममेवात्यंतधारणासंभवात्तत्स्वभावानुसारेण वशीकरणमाह । यर्हि आशु भ्राम्यत्परिभ्रमदनवस्थितं भवति तदानुरोधेन किंचिदपेक्षापूरणद्वारेण ॥ १९ ॥ ननु तर्हि यथापूर्वमेव स्यात्तत्राह । मनोगतिं तु न विसृजेन्नोपेक्षेत किंत्वप्रमत्तः सन् लक्षयेदित्यर्थः ॥ २० ॥ अनुरोधमार्गं सदृष्टांतं स्तौति । एषः अनुवृत्तिमार्गेण मनसः संग्रहः परमो योगः । तत्साधनत्वादुपचारेण स्तुतिः । यथा अदांतस्य दमनीयस्यार्वतोऽश्वस्य हृदयज्ञत्वं स्वाभिप्रायेण गतिमन्विच्छन्नपेक्षमाणोऽश्वधारकः प्रथमं किंचित्तद्गतिमनुवर्तते तदा

धार्यमाणं मनो यर्हि भ्राम्यदाश्वनवस्थितम् ॥ अतंद्रितोऽनुरोधेन मार्गेणात्मवशं नयेत् ॥ १९ ॥ मनोगतिं न विसृजेज्जितप्राणो जितेंद्रियः ॥ सत्वसंपन्नया बुद्ध्या मन आत्मवशं नयेत् ॥ २० ॥ एष वै परमो योगो मनसः संग्रहः स्मृतः ॥ हृदयज्ञत्वमन्विच्छन्दम्यस्येवार्वतो मुहुः ॥ २१ ॥ सांख्येन सर्वभावानां प्रतिलोमानुलोमतः ॥ भवाप्ययावनुध्यायेन्मनो यावत्प्रसीदति ॥ २२ ॥ निर्विण्णस्य विरक्तस्य पुरुषस्योक्तवेदिनः ॥ मनस्त्यजति दौरात्म्यं चिंतितस्यानुचिंतया ॥ २३ ॥

च रश्मिना तं धृत्वैव गच्छति न तूपेक्षते तद्वदित्यर्थः ॥ २१ ॥ एवमीषद्वशीकृतस्य मनसोऽत्यंतनैश्चल्योपायानाह । सांख्येनेति त्रिभिः । सांख्येन तत्त्वविवेकेन सर्वभावानां महदादिदेहांतानामनुलोमतः प्रकृत्यादिक्रमेण भवं प्रतिलोमतः पृथिव्यादिक्रमेणाप्ययं चान्वनुध्यायेत् । प्रसीदति निश्चलं भवति ॥ २२ ॥ ननूपायसहस्रेणापि मनो विषयाकारतां न त्यजति किं भूयो भूय उपदेशेनेति चेत्तत्राह । निर्विण्णस्येति । ततश्चागमापायिषु तेष्ववधिभूतात्मदर्शनात्तदविवेकापन्नसंसारे निर्विण्णस्यातो विरक्तस्य ततश्चोक्तवेदिनो गुरूपदिष्टार्थालोचकस्य ततो गुरूपदिष्टस्यैव चिंतितस्य पुनः पुनरनुचिंतया दौरात्म्यं देहाद्यभिमानं त्यजति ॥ २३ ॥

मार्ग सदृष्टांत सांगतो— जसा घोड्याचा वस्ताद, शिक्षण लावण्यास योग्य अशा उद्धट घोड्याची गति, आपल्या इच्छेनुसार असण्याचें इच्छित होत्साता, हळुहळू आपण त्याच्या गतीला अनुसरूनच शिक्षण करितो व एखादेवेळीं धांवणाऱ्याहि त्याला दोरीनें धरूनच त्याच्या मागून धांवतो परंतु सर्वथा त्याची उपेक्षा करीत नाहीं, तर कांहीं वेळानें तरी त्याला स्वाधीन करून घेतोच त्याप्रमाणें मनाचा थोडासा हेतु पूर्ण करून त्याची उपेक्षा न करितां त्याला हळुहळू आपल्या स्वाधीन करून घेणें हेंच मोठें योगसाधन आहे असें जाणावें ॥ २१ ॥ याप्रमाणें थोडेंसें वश झालेलें मन अत्यंत निश्चळ होण्याचा उपाय सांगतो— तत्त्वविवेकानें महत्तत्त्वादिक देहापर्यंत सर्वपदार्थांची अनुलोमेंकरून (प्रकृत्यादिक्रमानें) उत्पत्ति आणि प्रतिलोमेंकरून (पृथिव्यादिक्रमानें) नाश यांचें जोंपर्यंत मन निश्चळ होई तोंपर्यंत चिंतन करावें ॥ २२ ॥ आतां, हजारो उपायांनींहि मन जर विषयाकारता सोडित नाहीं तर वारंवार उपदेशानें काय फळ होणार? असें ह्मणशील तर— उत्पत्तिनाशवान् पदार्थांचेठिकाणीं असलेल्या त्याच्या-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अवधिभूत आत्म्याच्या दर्शनानें, अज्ञानकृत संसाराविषयीं कंटाळून विरक्त झालेल्या व गुरूनें सांगितलेल्या अर्थाचा विचार करणाऱ्या आणि त्या विचार केलेल्याच अर्थाचें वारंवार चिंतन करणाऱ्या पुरुषाचें मन, देहादिकांचेठिकाणीं असलेल्या अभिमानाचा त्याग करितें ॥ २३ ॥ आणि यमादिक योगमार्गांनीं, तसेंच आत्मानात्मविचाररूप विवेनें, आणि माझें पूजन ध्यान इत्यादिकेंकरून योग्य झालेलें मन, परमात्म्याचें स्मरण करितें; दुसऱ्या साधनांनीं स्मरण करित नाहीं. ह्मणून योग्यानें मनाच्या जयाकरितां दुसरीं साधनें करूं नयेत ॥ २४ ॥ आतां पाप घडलें असतां योग्यानेंहि प्रायश्चित्त केलेंच पाहिजे असें ह्मणशील तर– योग्याच्या हातून आदीं पापाचरण घडतच नाहीं, कदाचित् प्रमादानें जर योग्यानें निषिद्ध कर्म केलें तर तें पाप त्यानें, ज्ञानाभ्यासानेंच जाळून टाकावें, त्याविषयीं दुसरें कृच्छ्रादिक प्रायश्चित्त मुळींच नाहीं ॥ २५ ॥ आतां नित्यनैमित्तिक

किंच यमादिभिर्योगमार्गैरान्वीक्षिक्या पदार्थद्वयशोधनेन ममार्चनध्यानादिभिर्वा । वाशब्देनास्य पक्षस्य स्वातंत्र्यं दर्शयति एतैरुपायैर्योग्यं परमात्मानं मनः स्मरेन्नान्यैरतोऽन्यत्न कुर्यादित्यर्थः ॥ २४ ॥ ननु पापापत्तौ प्रायश्चित्तं कार्यमेव तत्राह । यदीति । योगेन ज्ञानाभ्यासेनैव । एतच्च भक्तस्यापि नामकीर्तनाद्युपलक्षणार्थम् । नान्यत्कृच्छ्रादि ॥ २५ ॥ ननु नित्यनैमित्तिकं कर्म सत्वशोधकत्वाद्गुणो हिंसादिकं त्वशुद्धिहेतुत्वाद्दोषः । तत्र च तन्निवर्तकत्वात्कृच्छ्रादि प्रायश्चित्तं गुण इति विधिप्रतिषेधाभ्यामुक्तत्वात्प्रायश्चित्तं विना योगेनैव कथं पापं दहेत्तत्राह । स्वे स्व इति सार्धेन । स एव गुणो नेतरः । तदुपपादयति । यस्माद्विधिप्रतिषेधाभ्यामनेन गुणदोषविधानेन । कर्मणां नियमः संकोचः कृतः ।

यमादिभिर्योगपथैरान्वीक्षिक्या च विद्यया ॥ ममार्चोपासनाभिर्वा नान्यैर्योग्यं स्मरेन्मनः ॥ २४ ॥ यदि कुर्यात्प्रमादेन योगी कर्म विगर्हितम् ॥ योगेनैव दहेदंहो नान्यत्तत्र कदाचन ॥ २५ ॥ स्वे स्वेऽधिकारे या निष्ठा स गुणः परिकीर्तितः ॥ कर्मणां जात्यशुद्धानामनेन नियमः कृतः ॥ गुणदोषविधानेन संगानां त्याजनेच्छया ॥ २६ ॥

कुत इत्यत आह । जात्या उत्पत्त्यैवाशुद्धानाम् । स च प्राप्तानां संगानां त्याजनेच्छया । अयं भावः । पुरुषस्याशुद्धिर्नाम न प्रवृत्तेरन्यास्ति स्वाभाविकप्रवृत्त्यैव तस्य मलिनत्वात् । न च सहसा सर्वतो निवृत्तिः कर्तुं शक्यते । अत इदं न कर्तव्यमिदमेव कर्तव्यमित्येवं स्वाभाविकप्रवृत्तिसंकोचद्वारेण निवृत्तिरेव क्रियते । यथा च न प्रवृत्तिपरो वेदस्तथोत्तराध्याये वक्ष्याम उत्पत्त्यैव हि कामेष्वित्यादिना । अतो योगिनः स्वाभाविकप्रवृत्त्यभावान्न प्रायश्चित्तादिविधिगोचरतेति ॥ २६ ॥

कर्म अंतःकरणशोधक असल्यामुळें गुणरूप आहे आणि हिंसादिक कर्म अशुद्धीला कारण असल्यामुळें दोषरूप आहे, मग त्याचें निवारण करणारें प्रायश्चित्तहि गुणरूप आहे तें केल्यावांचून योगानेंच पाप कसें जाळतां येईल ? असें ह्मणशील तर– आपआपल्या अधिकाराचेठिकाणीं जी निष्ठा तोच गुण सांगितला आहे, दुसरा नाहीं. कारण, या विधिनिषेधांनीं सांगितलेल्या गुणदोषांच्या विधानानें, उत्पत्तीनेंच अशुद्ध असलेल्या कर्मांचा संकोच ‘ विषयासक्ति टाकण्याच्या इच्छेनें ’ केला आहे. याचें तात्पर्य असें कीं, पुरुषाला प्रवृत्तीवांचून दुसरी कोणतीच अशुद्धता नाहीं. कारण, स्वाभाविक प्रवृत्तीनेंच तो मळिण झाला आहे. आणि त्या प्रवृत्तीची एकाएकीं सर्वथा निवृत्ति करणें हेंहि अशक्य आहे, ह्मणून वेदानें ‘ हें करूं नये व हेंच करावें ’ याप्रकारें स्वाभाविक प्रवृत्तिसंकोचाच्या द्वारानें निवृत्तीच केली आहे आणि तो वेदहि प्रवृत्तिपर नाहीं निवृत्तिपरच आहे, असें आह्मीं पुढील अध्यायांत ‘ उत्पत्त्यैव हि कामेषु ’ इत्यादिकेंकरून तुला सांगूं. एतावता योग्याची कर्मांमध्यें स्वाभाविक प्रवृत्ति नसल्यामुळें त्याला प्रायश्चित्ताची

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आवश्यकता नाहीं ॥ २६ ॥ आतां, भक्तीविषयीं अधिकारी असणाराला भक्तियोग सांगतो– जेव्हां माझ्या कथांचेठिकाणीं श्रद्धा उत्पन्न होऊन, सर्वकर्मांविषयीं कंटाळतो परंतु त्यांच्या फळांविषयीं विरक्त होत नाहीं, म्हणजे विषय दुःखरूप आहेत असें जाणतो परंतु त्यांचा परित्याग करण्याविषयीं असमर्थ असतो ॥ २७ ॥ तेव्हां परिणामी दुःखरूप अशा त्या विषयांची निंदा करीत व निर्वाहापुरतें त्यांचें सेवन करित होत्साता, भक्तीनेंच माझे सर्व मनोरथ पूर्ण होतील असा दृढ निश्चय करून त्या पुरुषानें प्रीतीनें माझी भक्ति करावी ॥ २८ ॥ 'माझ्या अमृतासारख्या कथेचेठिकाणीं श्रद्धा' इत्यादिकेंकरून सांगितलेल्या भक्तियोगानें माझें नित्य भजन करणाऱ्या पुरुषाच्या हृदयांत मी राहिलों असतां, तेथें असलेल्या कामवासना सर्वहि नाश पावतात ॥ २९ ॥ जेव्हां सर्वांचा अंतर्यामी आत्मा अशा माझा साक्षात्कार होतो तेव्हां या भक्ताचा

भक्त्यधिकारिणो भक्तियोगमाह । जातश्रद्ध इति नवभिः । मत्कथासु जातश्रद्धोऽतएवान्येषु कर्मसूद्विग्नो न तु तत्फलेषु विरक्तः । तदाह । वेदेति । यद्यपि वेद तथापि तत्परित्यागेऽनीश्वरोऽशक्तः ॥ २७ ॥ एवंभूतो यः श्रद्धालुर्भक्त्यैव सर्वं भविष्यतीति दृढनिश्चयः संस्ततस्तदनंतरं मां प्रीत्या भजेत विषयांस्तु सेवमानोऽपि तेषु प्रीतिं न कुर्यादित्याह । गर्हयन्निति ॥ २८ ॥ कथं भजेत किंवा ततो भवति तदाहा प्रोक्तेनेति द्वाभ्याम् । श्रद्धामृतकथायां मे शश्वन्मदनुकीर्तनमित्यादिना तत्रतत्रोक्तेन मा मामसकृन्नित्यं

जातश्रद्धो मत्कथासु निर्विण्णः सर्वकर्मसु ॥ वेद दुःखात्मकान्कामान्परित्यागेऽप्यनीश्वरः ॥ २७ ॥ ततो भजेत मां प्रीतः श्रद्धालुर्दृढनिश्चयः ॥ जुषमाणश्च तान्कामान्दुःखोदर्कांश्च गर्हयन् ॥ २८ ॥ प्रोक्तेन भक्तियोगेन भजतो माऽसकृन्मुनेः ॥ कामा हृदय्या नश्यंति सर्वे मयि हृदि स्थिते ॥ २९ ॥ भिद्यते हृदयग्रंथिश्छिद्यंते सर्वसंशयाः ॥ क्षीयंते चास्य कर्माणि मयि दृष्टेऽखिलात्मनि ॥ ३० ॥ तस्मान्मद्भक्तियुक्तस्य योगिनो वै मदात्मनः ॥ न ज्ञानं न च वैराग्यं प्रायः श्रेयो भवेदिह ॥ ३१ ॥ यत्कर्मभिर्यत्तपसा ज्ञानवैराग्यतश्च यत् ॥ योगेन दानधर्मेण श्रेयोभिरितरैरपि ॥ ३२ ॥ सर्वं मद्भक्तियोगेन मद्भक्तो लभतेंऽजसा ॥ स्वर्गापवर्गं मद्धाम कथंचिद्यदि वांछति ॥ ३३ ॥

भजतो हृदय्या हृद्गताः कामा नश्यंति ॥ २९ ॥ हृदयमेव ग्रंथिरहंकारस्तत्पूर्वकाश्च सर्वे संशया असंभावनादयः । कर्माण्यनारब्धफलानि संसारहेतुभूतानि च ॥ ३० ॥ तदेवं व्यवस्थयाऽधिकारत्रयमुक्तम् । तत्र च भक्तेरन्यनिरपेक्षत्वादन्यस्य च तत्सापेक्षत्वाद्भक्तियोग एव श्रेष्ठ इत्युपसंहरति । तस्मादिति त्रिभिः । मदात्मनो मय्यात्मा चित्तं यस्य तस्य । श्रेयः श्रेयःसाधनम् ॥ ३१ ॥ तत्र हेतुः यत्कर्मभिरित्यादि । इतरैरपि तीर्थयात्राव्रतादिभिः श्रेयःसाधनैर्यद्राव्यं सत्त्वशुद्ध्यादि तत्सर्वमंजसा अनायासेनैव । स्वर्गमपवर्गं मद्धाम वैकुंठं लभत एव । वांछा तु नास्तीत्युक्तं यदि वांछतीति ॥ ३२ ॥ ३३ ॥

अहंताममतारूप हृदयग्रंथि भेद पावतो, असंभावनादिक सर्व संशय तुटून जातात व संसाराला कारणभूत असलेलीं सर्वहि कर्में क्षीण होतात ॥ ३० ॥ याप्रमाणें व्यवस्थेनें तीन अधिकार सांगितले. त्यांत भक्तीला ज्ञानकर्मांची अपेक्षा नाहीं आणि ज्ञानकर्मांना मात्र भक्तीची अपेक्षा आहे म्हणून भक्तीच सर्वांत श्रेष्ठ आहे असा उपसंहार करितो– माझ्या भक्तीनें युक्त व माझेठिकाणीं मन लावणाऱ्या योग्याला, त्या कामीं ज्ञान किंवा वैराग्य हीं साधनें कल्याणकारक होत नाहींत; तर भक्ति हेंच साधन कल्याणकारक आहे ॥ ३१ ॥ त्याचें कारण, कर्म, तप, ज्ञान, वैराग्य, योग, दानधर्म व तीर्थयात्रादिक इतर साधनें यांनीं जें अंतःकरणशुद्ध्यादिक फळ संपादन करावयाचें तें सर्व फळ माझ्या भक्ताला माझ्या भक्तियोगानें अनायासानेंच प्राप्त होतें. हें तर काय परंतु जर तो स्वर्ग, मोक्ष किंवा माझा वैकुंठलोक यांची इच्छा करील तर तेहि त्याला प्राप्त

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होतील परंतु तो इच्छाच करीत नाहीं ॥ ३२ ॥ ३३ ॥ कारण, जे धीर, साधु माझे एकांत भक्त आहेत ते, मी आग्रहानें दिलेलें सर्वोत्कृष्ट मोक्षपदहि ग्रहण करीत नाहींत, मग ते तें इच्छित नाहींत हें काय सांगावें ? ॥ ३४ ॥ निरपेक्षता हेंच उत्कृष्ट व मोठें कल्याणाचें फळ व साधन आहे असें ह्मणतात. ह्मणून कशाचीच प्रार्थना न करणाऱ्या निरपेक्ष पुरुषालाच माझी भक्ति प्राप्त होत्ये ॥ ३५ ॥ माझेठिकाणीं एकांतभक्ति, करणाऱ्या सम चित्त व बुद्धीहून पलीकडच्या ईश्वरस्वरूपास पावलेल्या साधूंना, विहित-प्रतिषिद्ध कर्मांपासून होणारे पुण्यपापादिक गुणदोष प्राप्त होत नाहींत ॥ ३६ ॥ आतां, सकाम कर्मनिष्ठेची निंदा करीत या मुक्तिमार्गांचा उपसंहार करितो– जे पुरुष,

---

तत्र हेतुमाह । न किंचिदिति । धीरा धीमंतो यतो मम एकांतिनो मय्येव प्रीतियुक्ता अतो मया दत्तमपि न गृह्णंति । किं वक्तव्यं न वांछंतीत्यर्थः । अपुनर्भवमात्यंतिकमपि कैवल्यम् ॥ ३४ ॥ तदुपपादयति । नैरपेक्ष्यमेव परमुत्कृष्टमनल्पकं महन्निःश्रेयसं फलं तत्साधनं च प्राहुः । मे भक्तिर्निराशिषः प्रार्थनाशून्यस्य निरपेक्षस्य प्रार्थनाकारणभूतापेक्षारहितस्य पुंसो भवेत् । यद्वा मे निरपेक्षस्य या भक्तिः सा निराशिषो भवेदित्यर्थः ॥ ३५ ॥ अनेन प्रकारेण सिद्धानां न गुणदोषा इति विरोधपरिहारमुपसंहरति । न मयीति । गुणदोषैर्विहितप्रतिषिद्धैरुद्भवो येषां ते गुणाः पुण्यपापादयः । साधूनां निरस्तरागादीनामतः समचित्तानामतएव बुद्धेः परमीश्वरं प्राप्तानाम् ॥ ३६ ॥ काम्यकर्मनिष्ठां निंदिष्यन्नेतान्मुक्तिमार्गानुपसंहरति । एवमिति । मे पथो मत्प्राप्त्युपायान् येऽनुतिष्ठंति ते क्षेमं कालमायादिरहितं मम लोकं विंदंति यत्परमं ब्रह्म तच्च विदुः ॥ ३७ ॥ इति

न किंचित्साधवो धीरा भक्ता ह्येकांतिनो मम ॥ वांछंत्यपि मया दत्तं कैवल्यमपुनर्भवम् ॥ ३४ ॥ नैरपेक्ष्यं परं प्राहुर्निःश्रेयसमनल्पकम् ॥ तस्मान्निराशिषो भक्तिर्निरपेक्षस्य मे भवेत् ॥ ३५ ॥ न मय्येकांतभक्तानां गुणदोषोद्भवा गुणाः ॥ साधूनां समचित्तानां बुद्धेः परमुपेयुषाम् ॥ ३६ ॥ एवमेतान्मयादिष्टाननुतिष्ठंति मे पथः ॥ क्षेमं विंदंति मत्स्थानं यद्ब्रह्म परमं विदुः ॥ ३७ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे विंशतितमोऽध्यायः ॥ २० ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ य एतान्मत्पथो हित्वा भक्तिज्ञानक्रियात्मकान् ॥ क्षुद्रान्कामांश्चलैः प्राणैर्जुषंतः संसरंति ते ॥ १ ॥

श्रीमद्भागवते एकादशस्कंधे टीकायां विंशतितमोऽध्यायः ॥ २० ॥ ॥ जयति स्वपरानंदः परानंदनृकेसरी ॥ यत्कृपालवलेशेन श्रीधरः सत्कृतिः कृती ॥ १ ॥ ईक्षंतामिच्छया संतः क्षमंतां मम साहसम् ॥ मया हि स्वीयबोधाय कृतमेतन्न सर्वतः ॥ २ ॥ एकविंशे क्रियाज्ञानभक्तिष्वनधिकारिणाम् ॥ कामिनां द्रव्यदेशादिगुणदोषाः प्रपंचिताः ॥ ३ ॥ तदेवं गुणदोषव्यवस्थार्थं योगत्रयमुक्तं तत्र ज्ञानभक्तिसिद्धानां न किंचिद्गुणदोषौ । साधकानां तु प्रथमतो निवृत्तिकर्मनिष्ठानां यथाशक्ति नित्यनैमित्तिकं कर्म सत्वशोधकत्वाद्गुणः । तदकरणं निषिद्धकरणं च तन्मलीमसकरणत्वाद्दोषः । तन्निवर्तकत्वाच्च प्रायश्चित्तं गुणः । विशुद्धसत्वानां तु ज्ञाननिष्ठानां ज्ञानाभ्यास एव सिद्धिहेतुत्वाद्गुणः । भक्ति-

---

याप्रकारें मी सांगितलेल्या ह्या माझ्या प्राप्तीच्या मार्गांचें सेवन करितात ते काळ, माया इत्यादिकांनीं रहित अशा माझ्या लोकाप्रत पावतात आणि ज्याला परब्रह्म असें ह्मणतात त्याला जाणतात ॥ ३७ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील एकादशस्कंधांत भक्त्यादियोगत्रयनिरूपणनामक हा विसावा अध्याय समाप्त झाला ॥ २० ॥ ॥ आतां ह्या एकविसाव्या अध्यायामध्यें कर्मयोग, ज्ञानयोग, व भक्तियोग यांविषयीं अधिकार नसलेल्या सकाम पुरुषांना, पदार्थ, देश, काळ इत्यादिकांचे गुणदोष सविस्तर सांगितले आहेत ॥ १ ॥ पूर्वी गुणदोषांच्या व्यवस्थेकरितां ज्ञान, कर्म व भक्ति असे जे तीन योग सांगितले, त्यांत ज्ञान व भक्ति यांनीं सिद्ध असलेल्या पुरुषांना कोणतेच गुणदोष नाहींत परंतु साधकांपैकीं जे निवृत्तिकर्मनिष्ठ आहेत त्या पुरुषांना, यथाशक्ति नित्यनैमित्तिक कर्में करणें हा अंतःकरणशोधक असल्यामुळें गुण आहे व तें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कर्म न करणें किंवा निषिद्ध कर्म करणें हें अंतःकरणाला मलिन करणारें असल्यामुळें दोष आहे, तसेंच प्रायश्चित्त करणें तें दोष घालविणारें असल्यामुळें गुण आहे, शुद्धचित्त झालेल्या ज्ञाननिष्ठांना तर ज्ञानाभ्यास हाच सिद्धीला कारण असल्यामुळें गुण आहे, त्यावांचून बाकीचे सर्व दोष आहेत; भक्तिनिष्ठांना श्रवणकीर्तनादिक भक्ति हाच गुण आहे, त्याविरुद्ध असलेले सर्व दोष आहेत असें सांगितलें. आतां जे सिद्ध नव्हेत व साधकहि नव्हेत, केवळ सकाम कर्म करणारे आहेत त्यांना सर्व गुण व दोष सांगण्याकरितां प्रथम त्या अतिबहिर्मुखांची निंदा करीत श्रीभगवान् ह्मणाला– हे उद्धवा, जे पुरुष, ह्या भक्तिज्ञानकर्मरूप माझ्या मार्गांचा त्याग करून विषयांचेठिकाणीं धांवणाऱ्या इंद्रियांनीं, त्या नश्वर विषयांचें सेवन करितात ते सर्व गुणदोष सेवन करणारे असल्यामुळें नानाप्रकारच्या योनी पावतात ॥ १ ॥ आतां त्याच कर्मांनीं कितीएक गुणदोषयुक्त होतात व कितीएक होत नाहींत हें वैषम्य कां ? अग्नीच्या योगानें कितीएकांना ताप होतो व कितीएकांना ताप होत नाहीं असें संभवत नाहीं असें ह्मणशील तर– आप-

निष्ठानां पुनः श्रवणकीर्तनादिभक्तिरेव गुणः । तद्विरुद्धं सर्वमुभयेषां दोष इत्युक्तम् । इदानीं ये तु न सिद्धा नापि साधकाः किंतु केवलं काम्यकर्मप्रधानास्तेषां सकलगुणदोषान्प्रपंचयिष्यन्नादौ तानतिबहिर्मुखान्निंदति । य एतानिति । मत्पथो मदुक्तमार्गान् क्षुद्रांस्तुच्छांश्चलैरस्थिरैः प्राणैर्देहवायुभिरिंद्रियैर्वा जुषंतः सेवमाना भवंति ते संसरंति । निखिलगुणदोषभाक्त्वेन नानायोनीः प्राप्नुवंतीत्यर्थः ॥ १ ॥ ननु तैरेव कर्मभिः केचिद्गुणदोषभाजः केचिन्नेति कुतो वैषम्यम् । नह्यग्निना केचित्तप्यंते केचिन्नेति संभवति तत्राह । स्वे स्व इति । अधिकारभेदेन कल्पितौ गुणदोषौ न वस्तुनिष्ठाविति भावः ॥ २ ॥ तदाह । शुद्ध्यशुद्धी इति । विचिकित्सार्थं योग्यमयोग्यं वेति संदेहद्वारा स्वाभाविकप्रवृत्तिप्रतिबंधार्थमित्यर्थः । तत्र शुद्ध्यशुद्धी योग्यत्वायोग्यत्वे । गुणदोषौ तन्निमित्तोपादेयत्वानुपादेयत्वे । शुभाशुभौ तन्निमित्तावर्थानर्थौ ॥ ३ ॥ तत्र शुद्ध्यशुद्धी धर्मार्थम् । शुद्धेन धर्मः अशुद्धेनाधर्म इति । गुणदोषौ व्यवहारार्थम् । अशुद्धावपि राजादीनां व्यवहारदर्शनाद्युपादेयं नान्यदिति । शुभाशुभौ यात्रार्थं दोषत्वेऽप्यापत्सु शरीरनिर्वाहमात्रोपादाने न पापमधिकोपादाने तु पापमिति । मया मन्वादिरूपेण । धर्मरूपां धुरं भारम् । कर्मजडानामित्यर्थः ॥ ४ ॥

स्वे स्वेऽधिकारे या निष्ठा स गुणः परिकीर्तितः ॥ विपर्ययस्तु दोषः स्यादुभयोरेष निश्चयः ॥ २ ॥ शुद्ध्यशुद्धी विधीयेते समानेष्वपि वस्तुषु ॥ द्रव्यस्य विचिकित्सार्थं गुणदोषौ शुभाशुभौ ॥ ३ ॥ धमार्थं व्यवहारार्थं यात्रार्थमिति चानघ ॥ दर्शितोऽयं मयाऽऽचारो धर्ममुद्वहतां धुरम् ॥ ४ ॥

ल्या अधिकाराचेठिकाणीं जी निष्ठा ठेवणें त्याला गुण ह्मटलें आहे आणि दुसऱ्या अधिकारावर आसक्ति ठेवणें हा दोष होय. असा हा गुणदोषांच्या स्वरूपांचा निर्णय आहे, ह्मणजे अधिकारभेदानेंच गुणदोषांची कल्पना होत्ये ते वस्तूवर अवलंबून राहिलेले नाहींत ॥ २ ॥ तेंच सांगतो– पदार्थ वस्तुतः सारखे असतां, 'हा पदार्थ योग्य आहे किंवा अयोग्य आहे अशा संदेहद्वारा' तेथें प्राण्याची स्वाभाविक प्रवृत्ति होण्याचा प्रतिबंध होण्याकरितां पदार्थांचेठिकाणीं वेदानें शुद्धि व अशुद्धि (योग्यपणा व अयोग्यपणा) सांगितल्या आहेत, व तन्निमित्तक गुणदोष आणि तन्निमित्तक पुण्यपापरूप अर्थ व अनर्थ सांगितले आहेत ॥ ३ ॥ हे उद्धवा, त्यांत शुद्धि व अशुद्धि ह्या धर्म, व्यवहार व देहनिर्वाह यांसाठीं गुणदोषरूप सांगिल्या आहेत. त्यांत धर्मार्थ अशा कीं,– शुद्धीनें धर्म घडतो व अशुद्धीनें अधर्म घडतो. व्यवहारार्थ अशा कीं,– आशौचादिक अशुद्धस्थितीमध्येंहि राजादिकांना प्रजादिकांचा न्यायवगैरे करण्याविषयीं शुद्धि आहे, इतर कृत्यांविषयीं शुद्धि नाहीं तर अशुद्धीच आहे. देहनिर्वाहाकरितां अशा कीं,– प्रतिग्रह निषिद्ध खरा परंतु तो आपत्कालीं देहनिर्वाहापुरता केला असतां पाप लागत नाहीं, अधिक केला असतां पाप लागतें इत्यादिक. हा आचार, धर्मरूप भार वाह-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

गाऱ्या पुरुषांना मी मन्वादिरूपानें दाखविला आहे ॥ ४ ॥ वास्तविक रीतीनें विचार करून पाहिलें असतां सर्वेंहि पदार्थ सारखे आहेत. कारण, ब्रह्मदेवापासून तों स्थावर-पर्यंत सर्व प्राण्यांच्या शरीरांच्या उत्पत्तीचीं कारणें, जीं भूमि, उदक, अग्नि, वायु आणि आकाश हीं पंचमहाभूतें आहेत तीं सारखीं असून सर्वांचा जीवात्माहि ईश्वराचा अंशरूप असल्यामुळें एकरूपच आहे ॥ ५ ॥ ह्मणून हे उद्धवा, या प्राण्यांना प्रवृत्तीच्या नियमद्वारानें धर्मादिचतुर्विध पुरुषार्थांची सिद्धि होण्याकरितां यांच्या सारख्या असलेल्याहि पंचमहाभूतात्मक देहांचेठिकाणीं वेदानें विषम अशीं वर्णाश्रमादिक नांवें कल्पिलीं आहेत ॥ ६ ॥ हे उद्धवा, केवळ देहादिकांचेठिकाणींच ही कल्पना आहे असें नाहीं तर देश, काळ, फळ, निमित्त, अधिकारी व ग्रहण करावयाचे तांदूळवगैरे पदार्थ या सर्वांनाहि गुणदोष, 'कर्माच्या स्वाभाविक प्रवृत्तीचा संकोच होण्याकरितां,' वेदरूपी

शुद्ध्यशुद्धी प्रपंचयिष्यन्वेदोक्तत्वेन तदभिनिवेशो माभूदिति समानेष्वपि वस्तुष्विति यदुक्तं तत्प्रपंचयति। भूमीति त्रिभिः। भूतानां प्राणिनाम्। धारयंतीति धातवः कारणानि। शारीराः शरीरारंभकाः। देहतः साम्यमुक्तं जीवतोऽप्याह। आत्मसंयुता इति ॥ ५॥ धातुषु देहेषु। नामरूपाणि वर्णाश्रमादीनि। कल्पनायाः प्रयोजनमाह। एतेषां प्राणिनां स्वार्थसिद्धये प्रवृत्तिनियमद्वारा धर्मादिपुरुषार्थसिद्धये ॥ ६ ॥ न केवलं देहेष्वेवापितु देशकालादिभावानामपि। आदिशब्देनानुपादेयानां फलनिमित्ताधिकारिणां ग्रहणम्। वस्तूनामुपादेयानां व्रीह्यादीनामपि। मम मया। नियमार्थं संकोचार्थमित्यर्थः ॥ ७ ॥ एवं गुणदोषविषयं परिशोध्य तयोः शुद्ध्यशुद्धिमूलत्वाच्छुद्ध्यशुद्धी प्रपंचयति। अकृष्णसार

भूम्यंब्वग्न्यनिलाकाशा भूतानां पंच धातवः ॥ आब्रह्मस्थावरादीनां शारीरा आत्मसंयुताः ॥ ५ ॥ वेदेन नामरूपाणि विषमाणि समेष्वपि ॥ धातुषूद्धव कल्प्यंत एतेषां स्वार्थसिद्धये ॥ ६ ॥ देशकालादिभावानां वस्तूनां मम सत्तम॥ गुणदोषौ विधीयेते नियमार्थं हि कर्मणाम् ॥ ७ ॥ अकृष्णसारो देशानामब्रह्मण्योऽशुचिर्भवेत् ॥ कृष्णसारोऽप्यसौवीरकीकटासंस्कृतेरिणम् ॥ ८ ॥ कर्मण्यो गुणवान्कालो द्रव्यतः स्वत एव वा ॥ यतो निवर्तते कर्म स दोषोऽकर्मकः स्मृतः ॥ ९ ॥

इत्यष्टभिः। देशानां मध्ये कृष्णहरिणरहितोऽशुचिः। तत्राप्यब्रह्मण्यो ब्राह्मणभक्तिशून्योऽत्यंतमशुचिः। कृष्णसारोऽपि कृष्णेन मृगेण सारः श्रेष्ठो यः सोऽप्यसौवीरकीकटः सुवीराः सत्पुरुषास्तद्वान्सौवीरः कीकटोऽपि शुचिः। तदुक्तम्। स वै पुण्यतमो देशः सत्पात्रं यत्र लभ्यत इति। तद्वर्जितो यः कीकटोंऽगवंगकलिंगादिः। असंस्कृतः संमार्जनादिशून्यो म्लेच्छबहुलो वा। ईरिणमूषरम्। एकवद्भावः। तदशुचि। तदन्यः शुचिरित्यर्थादुक्तं भवति ॥ ८ ॥ कालस्य शुद्ध्यशुद्धी दर्शयति। कर्मण्य इति। द्रव्यतो द्रव्यसंपत्त्या स्वतो वा पूर्वाह्णादिर्यः कर्मण्यः कर्मार्हः स कालस्तस्मिन्कर्मणि गुणवान्। यतो यस्मिन्द्रव्यालाभेन वा राष्ट्रविप्लवादिना वा कर्म निवर्तते। यश्च सूतकादौ दशाहादिलक्षणोऽकर्मकः कर्मानर्हः स्मृतः स कालो दोषः अशुद्ध इत्यर्थः ॥ ९ ॥

मी सांगितले आहेत ॥ ७ ॥ याप्रमाणें गुणदोषांच्या विषयाचें परिशोधन करून आतां ते गुणदोष, शुद्धि व अशुद्धि यांपासून होणार आहेत ह्मणून शुद्धीचें व अशुद्धीचें स्पष्टीकरण करितो— ज्या देशामध्यें काळवीट हरिण फिरत नाहीं तो देश अपवित्र होय, त्यांमध्येंहि जेथें ब्राह्मणभक्ति नाहीं तो देश अत्यंत अपवित्र होय. आणि जेथें काळवीट हरिणहि आहे परंतु सत्पुरुष नाहींत तो कीकट (अंग, वंग, कलिंग, सौराष्ट्र व मगध इत्यादिक) देशहि अपवित्र गणला आहे, परंतु त्या कीकटदेशांत सत्पुरुष असला तर तो पवित्र मानिला आहे. तसाच सडासंमार्जनादिक नसलेला, पुष्कळ म्लेंछ असलेला व उकीर निघणारा भूमीचा भाग हे देश अपवित्र असून बाकीचे पवित्र आहेत ॥ ८ ॥ आतां काळाच्या शुद्धि अशुद्धी दाखवितो— जो काळ, पदार्थांच्या संपत्तीनें युक्त किंवा जो पूर्वाण्हादिक काळ स्वतःच कर्मयोग्य आहे तो त्या कर्मावि-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

षयीं शुद्ध होय आणि जेथें पदार्थ मिळत नाहींत किंवा राष्ट्रविप्लवादिकें करून कर्म घडत नाहीं आणि जो सूतकादिकांमध्यें कर्माला अयोग्य असतो तो दशाहादिक काळ अशुद्ध मानिला आहे ॥ ९ ॥ आतां पदार्थांच्या शुद्धिअशुद्धि दाखवितो– पदार्थांची शुद्धि किंवा अशुद्धि, दुसऱ्या पदार्थांनें, वचनानें, संस्कारानें, काळानें अथवा जास्तीकमीपणानें मानली आहे. त्यांत पदार्थानें– तंदुलादिक पदार्थांची जळादिकांनीं शुद्धि व मूत्रादिकांनीं अशुद्धि होय. वचनानें– हें वस्तु शुद्ध आहे किंवा अशुद्ध आहे असा संशय प्राप्त झाला असतां, हें शुद्ध आहे अशा ब्राह्मणाच्या वचनानें शुद्धि, अन्यथा अशुद्धि होय. संस्कारानें– प्रोक्षणवगैरे केल्यानें पुष्पादिकांची शुद्धि, आणि वास घेतल्यानें अशुद्धि जाणावी. काळानें– दाहादिवस होऊन गेल्यावर नव्या पाण्याची शुद्धि आणि विपरीत काळानें शिळ्या अन्नाचीवगैरे अशुद्धि होय. आणि जास्तीकमीपणानें– चांडाळादिकांचा स्पर्श झाला असतांहि तलावादिकांच्या पाण्याची शुद्धि व घटादिकांतील पाण्याची अशुद्धि समजावी ॥ १० ॥

वस्तुशब्दोपात्तानां द्रव्याणां शुद्ध्यशुद्धी दर्शयति। द्रव्यस्येति चतुर्भिः। द्रव्येण तोयादिना शुद्धिर्मूत्रादिना त्वशुद्धिः। वचनेन शुद्धमशुद्धं वेति संदेहे शुद्धमित्येवं रूपेण ब्राह्मणवचनेन शुद्धिर्विपरीतेनाशुद्धिः। संस्कारेण प्रोक्षणादिना पुष्पादेः शुद्धिरवघ्राणादिना त्वशुद्धिः। कालेन दशाहादिना नवोदकादेः शुद्धिः। काले मेघोदकं ग्राह्यं वर्ज्यं तु त्र्यहमेव हि ॥ अकाले दशरात्रं स्यात्ततः शुद्धिर्विधीयते ॥ विपरीतेनाशुद्धिः पर्युषितान्नादेरशुद्धिः। अंत्यजाद्युपहतानां तडागाद्युदकानां महत्त्वाल्पत्वाभ्यां शुद्ध्यशुद्धी ॥ १० ॥ शक्त्याऽशक्त्या सूर्योपरागादिसूतकान्नादेः शक्तान्प्रत्यशुद्धिरशक्तान्प्रति शुद्धिः। बुद्ध्या पुत्रजननादौ दशाहाद्बहिर्ज्ञानेन शुद्धिरंतर्ज्ञानेनाशुद्धिः। समृद्ध्या जीर्णमलवद्वस्त्रादेः

द्रव्यस्य शुद्ध्यशुद्धी च द्रव्येण वचनेन च ॥ संस्कारेणाथ कालेन महत्त्वाल्पतयाऽथवा ॥ १० ॥ शक्त्याऽशक्त्याऽथवा बुद्ध्या समृद्ध्या च यदात्मने ॥ अघं कुर्वंति हि यथा देशावस्थानुसारतः ॥ ११ ॥ धान्यदार्वस्थितंतूनां रसतैजसचर्मणाम् ॥ कालवाय्वग्निमृत्तोयैः पार्थिवानां युतायुतैः ॥ १२ ॥

समृद्धं प्रत्यशुद्धिर्दरिद्रंप्रति शुद्धिः। तत्रापि विशेषमाह। यदिति। एते च द्रव्यवचनादयो द्रव्याशुद्धिद्वारा आत्मने यदघं कुर्वंति तद्देशावस्थानुसारत एव यथा यथावत्कुर्वंति न सर्वतः। तथाहि। निर्भय एव देशे कुर्वंति न तु चौराद्याकुले तथा रोगादिव्यतिरिक्तयुवाद्यवस्थायामेव कुर्वंति न बाल्यरोगाद्यवस्थायामिति। तथाच स्मृतिः। देशं कालं तथात्मानं द्रव्यं द्रव्यप्रयोजनम् ॥ उपपत्तिमवस्थां च ज्ञात्वा शौचं प्रकल्पयेदिति ॥ ११ ॥ द्रव्यादिभिर्द्रव्यस्य शुद्धिरित्युक्तं तत्र वचनादिशुद्धिरेकरूपैव द्रव्यतस्तु शुद्धिर्बहुरूपेति तां प्रपंचयति। धान्येति। दारु लौकिकं ग्रहचमसादि च अस्थि गजदंतादि रसास्तैलघृतादयः तैजसाः सुवर्णादयः तेषां पार्थिवानां च रथ्याकर्दमघटेष्टकादी-

---

तशीच शक्तीनें व अशक्तीनें– सूर्यग्रहणादिक सूतकान्नादिकांची सशक्त पुरुषांना अशुद्धि व अशक्तांना शुद्धि होय. ज्ञानानें– पुत्रजन्मादिक आशौच दहादिवसांनंतर कळलें तर शुद्धि व दहादिवसांचे आंत कळलें तर दहा दिवसांपर्यंत अशुद्धि. समृद्धीनें– जुन्या व मळिण वस्त्रादिकांची श्रीमंताला अशुद्धि व दरिद्र्याला शुद्धि जाणावी; त्यांतहि हे पदार्थ, आपल्या अशुद्धपणानें प्राण्याला जें पाप उत्पन्न करितात तें देश, अवस्था इत्यादिकांच्या अनुसारेंच करितात, सर्वत्र करित नाहींत. ह्मणजे निर्भय देशींच करितात चोरादिकांचा उपद्रव असलेल्या देशांत करीत नाहींत, रोगादिरहित तारुण्यादिक अवस्थेमध्येंच करितात रोगादियुक्त अवस्थेमध्यें किंवा बाल्यादिक अवस्थेमध्यें करीत नाहींत ॥ ११ ॥ आतां द्रव्यांची अनेकप्रकारची शुद्धि सांगतो– धान्याची शुद्धि वायूनें होत्ये, लौकिक काष्ठांची पाण्यानें व ग्रहचमसादिक यज्ञपात्रांची उष्णोदकानें होत्ये. गजदंतादिक अस्थींची शुद्धि काळानें होत्ये. घृत, तैल इत्यादिक रसांची व सुवर्णादिक धातूंची शुद्धि अग्नीनें होत्ये. वस्त्रादिकांची शुद्धि जळानें, चर्मादि-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कांची शुद्धि काळानें व रंगानें होत्ये. मार्ग व घट इत्यादिकांची शुद्धि काळादिकांनीं व इतर पदार्थांची शुद्धि निरनिराळ्या शुद्धिकारक पदार्थांनीं व दोनतीनवगैरे पदार्थांच्या मिश्रणानें होत्ये. काक अंत्यज इत्यादिकांनीं स्पर्श केलेल्या पदार्थांची शुद्धि स्पर्शादितारतम्यानें काळादिकांनीं होत्ये ॥ १२ ॥ आतां लेपविषयक शुद्धि सांगतो– अमंगल पदार्थानें लिप्त झालेलें– पाट, पात्र, वस्त्रवगैरे जें वस्तु, ज्या तासण्यानें, खाऱ्या आंबटवगैरे पाण्यानें धुतल्यानें व क्षालनवगैरे करण्यानें अमंगलपदार्थाची घाण, लेप, व आंगचा मळ टाकून, मूळच्या स्थितीला पावतें त्या पाटवगैरे वस्तूचें तें तासणेंवगैरे शोधक होय. त्याच्याहि गंधलेप जाईपर्यंत वारंवार आवृत्ति करणें इष्ट आहे ॥ १३ ॥ अशी द्रव्यादिकांची शुद्धि सांगून आतां कर्त्यांची शुद्धि सांगतो– स्नान, दान, तप, अवस्था, शक्ति, उपनयनादिक संस्कार, संध्योपासनादिक कर्म आणि

नां यथायथं कालादिभिः शुद्धिः । तत्रापि काकांत्यजाद्युपघाततारतम्येन देशकालावस्थाद्यनुसारेणैव । एतैरन्यैश्च युतायुतैर्मिलितैः केवलैश्च । कालस्य पुनर्ग्रहणं युतत्वप्रदर्शनार्थम् ॥ १२ ॥ अस्पृश्यस्पर्शे शुद्धिमुक्त्वा लेपविषयेऽप्याह । यत्पीठपात्रवस्त्रादि येन तक्षणक्षाराम्लोदकादिना गंधं लेपं च व्यपोहति त्यजति स्वगतं च मलं त्यक्त्वा प्रकृतिं स्वमेव रूपं भजते तस्य तच्छौचं शोधकम् । यावता च तक्षणादिना व्यपोहति तावत्प्रमाणं स्वरूपत आवृत्तितो वा तत्कर्तव्यमिष्यते ॥ १३ ॥ एवं तावद्द्रव्यशुद्धिरुक्ता इदानीं कर्तृशुद्धिमाह । स्नानेति । अवस्था कौमारादिः वीर्यं शक्तिः संस्कार उपनयनादिः कर्म संध्योपासनदीक्षादिलक्षणं आत्मनः साहंकारस्य कर्तुरेतैः स्नानादिभिर्यथायथं तत्कार्यानुसारिणी शुद्धिः । इयं च शुद्धिर्न व्यवहारार्था किंतु विहितकर्मार्थेत्याह । शुद्ध इति । द्विज इत्युपलक्षणं शूद्रादेरपि ॥ १४ ॥ मंत्रशुद्धिमाह । सद्गुरुमुखाद्यथावत्परिज्ञानं

अमेध्यलिप्तं यद्येन गंधं लेपं व्यपोहति ॥ भजते प्रकृतिं तस्य तच्छौचं तावदिष्यते ॥ १३ ॥ स्नानदानतपोवस्थावीर्यसंस्कारकर्मभिः ॥ मत्स्मृत्या चात्मनः शौचं शुद्धः कर्माचरेद्द्विजः ॥ १४ ॥ मंत्रस्य च परिज्ञानं कर्म शुद्धिर्मदर्पणम् ॥ धर्मः संपद्यते षड्भिरधर्मस्तु विपर्ययः ॥ १५ ॥ क्वचिद्गुणोऽपि दोषः स्याद्दोषोऽपि विधिना गुणः ॥ गुणदोषार्थनियमस्तद्भिदामेव बाधते ॥ १६ ॥

मंत्रस्य शुद्धिः । कर्मशुद्धिमाह । ईश्वरार्पणं कर्मणः शुद्धिः । धर्माद्यर्थं शुद्ध्यशुद्धी प्रपंचतः प्रदर्श्योपसंहरति । धर्म इति । देशकालद्रव्यकर्तृमंत्रकर्मभिः षड्भिः शुद्धैर्धर्मः संपद्यते । एतेषां यो विपर्ययः सोऽधर्मस्तद्धेतुरित्यर्थः ॥ १५ ॥ अयं च गुणदोषविभागो न वास्तव इत्याह । क्वचिदिति । आपदि प्रतिग्रहो गुणोऽप्यनापदि निषिद्धत्वाद्दोषः । परधर्मश्च परस्य गुणोऽपि स्वस्य दोषः । दोषोऽपि कुटुंबत्यागादिर्विरक्तादेर्न दोषोऽपितु विधिबलेन गुणः । एवं योऽयं गुणदोषयोरेकस्मिन्नर्थे नियमो गुणदोषार्थं वा यो नियमो नियामकं शास्त्रं स तयोर्भेदमेव बाधते ॥ १६ ॥

माझें स्मरण यांच्या योगानें कर्त्यांची शुद्धि सांगितली आहे. यास्तव या संस्कारांनीं ब्राह्मण, क्षत्रिय वैश्य व शूद्र यांनीं शुद्ध होऊन, आपल्या अधिकारानें प्राप्त झालेलें कर्म आचरण करावें ॥ १४ ॥ आतां मंत्राची व कर्मांची शुद्धि सांगतो–सद्गुरूच्या मुखापासून अंगोपांगांसहित मंत्राचें ज्ञान होणें ही मंत्रशुद्धि होय; मज ईश्वराला समर्पण करणें ही कर्मांची शुद्धि होय. याप्रमाणें देश, काल, पदार्थ, कर्ता, मंत्र व कर्म हीं सहाहि शुद्ध झालीं असतां त्यांपासून धर्म प्रवृत्त होतो आणि यांत विपरीतपणा प्राप्त झाला असतां अधर्म होतो ॥ १५ ॥ हा तरी सांगितलेला गुणदोषविभाग सर्वत्र कायमचा नाहीं. कारण, आपत्कालीं प्रतिग्रह हा गुण असला तरी तो समृद्धिकाळीं निषिद्ध असल्यामुळें दोष होय. तसाच दुसऱ्याचा धर्म हा त्याचा गुण असला तरी तो आपणास दोष होय. कुटुंबत्याग करणें हा गृहस्थास दोष असला तरी तो विरक्ताला दोष नाहीं तर विधिबळानें गुणच आहे. मिळून गुणदोषांचें एकाच अर्थाविषयीं नियमन करणारें जें शास्त्र तें शेवटीं त्या गुणदोषांच्या भेदाचाच बाध

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करितें ह्मणजे गुणदोष हे वास्तविक नाहींत असा सिद्धांत करितें ॥ १६ ॥ एखादेवेळीं दोष असूनहि तो दोष होत नाहीं तर तो गुणच होतो. जसें सुरापानादिक कर्म पतित नसलेल्या पुरुषांना पतित होण्यास कारण असलें तरी तें जातीनें किंवा कर्मानें पतित झालेल्या पुरुषांना पुनः अधिक पतनास कारण होत नाहीं. तसाच स्त्रीसंग हा संन्याशाला दोषरूप असला तरी तो गृहस्थाला 'ऋतुकालीं स्त्रीचा संभोग करावा, असा विधि असल्यामुळें' गुणच आहे. यास दृष्टांत–जो पुरुष प्रथमच खालीं निजला आहे तो अधिक खालीं पडत नाहीं॥ १७ ॥ ह्मणूनच गुणदोषनियमविधींचें तात्पर्य–प्रवृत्तीच्या संकोचद्वारानें निवृत्तीविषयींच आहे. कारण, ज्याज्या विषयापासून हा पुरुष निवृत्त होतो, त्या त्यापासून मुक्त होतो आणि मुक्त होणें हा धर्मच मनुष्यांना कल्याणकारक असून शोक, मोह आणि भय यांचा नाश करणारा आहे ॥ १८ ॥ आतां वेदाच्या ऐकिलेल्या प्रवृत्तिपर-

दोषस्य क्वचिद्दोषत्वाभावे गुणत्वे चोदाहरणं दर्शयति । समानस्य तस्यैव कर्मणः सुरापानादेराचरणमपतितानां पतनहेतुरपि जात्या कर्मणा वा पतितानां पुनः पातकमधिकारभ्रंशकं न भवति पूर्वमेव पतितत्वात् । अतोऽत्र दोषस्यापि दोषता नास्तीत्यर्थः । तथा संगोऽपि यो यतेर्दोषः स गृहस्थस्यौत्पत्तिकः पूर्वस्वीकृतो न दोषोऽपितु गुणः ऋतौ भार्यामुपेयादित्यादिविधानात् । उभयत्र दृष्टांतः । पूर्वमेवाधःशयानो यथा न पततीति ॥ १७ ॥ अतो गुणदोषनियमविधीनां प्रवृत्तिसंकोचद्वारा निवृत्तावेव तात्पर्यमित्यभिप्रेत्याह । यतो यत इति ॥ १८ ॥ यथाश्रुतप्रवृत्तिपरतां वेदस्य निराकर्तुं प्रवृत्तिमार्गस्यानर्थहेतुतां दर्शयति । विषयेष्विति चतुर्भिः । संग आसक्तिः तत्र तेषु विषयेषु । येन प्रति

समानकर्माचरणं पतितानां न पातकम् ॥ औत्पत्तिको गुणः संगो न शयानः पतत्यधः ॥ १७ ॥ यतो यतो निवर्तेत विमुच्येत ततस्ततः ॥ एष धर्मो नृणां क्षेमः शोकमोहभयापहः ॥ १८ ॥ विषयेषु गुणाध्यासात्पुंसः संगस्ततो भवेत् ॥ संगात्तत्र भवेत्कामः कामादेव कलिर्नृणाम् ॥ १९ ॥ कलेर्दुर्विषहः क्रोधस्तमस्तमनुवर्तते ॥ तमसा ग्रस्यते पुंसश्चेतना व्यापिनी द्रुतम् ॥ २० ॥ तया विरहितः साधो जंतुः शून्याय कल्पते ॥ ततोऽस्य स्वार्थविभ्रंशो मूर्छितस्य मृतस्य च ॥ २१ ॥ विषयाभिनिवेशेन नात्मानं वेद नापरम् ॥ वृक्षजीविकया जीवन्व्यर्थं भस्त्रेव यः श्वसन् ॥ २२ ॥

हन्यते कामस्तेन सह कामादेव कलिः कलहो विवादः ॥ १९ ॥ दुर्विषहस्तीव्रः । तमः संमोहः । तं क्रोधम् । चेतना कार्याकार्यस्मृतिः । द्रुतं शीघ्रम् ॥ २० ॥ शून्याय कल्पते असत्तुल्यो भवतीत्यर्थः । स्वार्थविभ्रंशः पुरुषार्थहानिः । मूर्छितस्य मृततुल्यस्य ॥ २१ ॥ तत्तुल्यत्वं प्रपंचयति । विषयेति । व्यर्थं वृक्षजीविकयैव यो जीवन्वर्तते स मूर्छिततुल्यः । अतएव यो भस्त्रेव श्वसन्वर्तते स मृततुल्यः अतः स्वार्थनाश इत्यर्थः ॥ २२ ॥

तेचें निराकरण करण्याकरितां प्रवृत्तिमार्गाला अनर्थहेतुत्व दाखवितो–प्रथम विषयांचेठिकाणीं, हे फार चांगले आहेत अशी बुद्धि उत्पन्न झाली ह्मणजे पुरुषाला त्यांविषयीं आसक्ति होत्ये, आणि आसक्ति झाल्यावर त्यांचेठिकाणीं उपभोग करण्याची इच्छा होत्ये, ती पूर्ण होण्याविषयीं विघ्न करणाराबरोबर त्या पुरुषांचा त्या इच्छेच्या हेतूनेंच कलह होतो ॥ १९ ॥ आणि कलहापासून तीव्र क्रोध होतो. त्या क्रोधाच्या मागाहून संमोह होतो. आणि त्या संमोहानें पुरुषाची सर्व पदार्थांचे ठिकाणीं पसरून राहिलेली 'करावें काय व न करावें काय' याबद्दलची स्मृति तत्काळ लोपून जाते ॥ २० ॥ मग त्या विवेकस्मृतीनें रहित झालेला प्राणी, असून नसल्यासारखा होतो. नंतर मूर्छितासारख्या किंवा मेल्यासारख्या झालेल्या त्या प्राण्याच्या पुरुषार्थाची हानि होत्ये ॥ २१ ॥ तो मूर्छितासारखा किंवा मेल्यासारखा कसा तें दर्शवितो– विषयांचेठिकाणीं अभिनिवेशानें (हें अवश्य केलें पाहिजे अशा आग्रहानें) जो आपणाला जाणत नाहीं व दुसऱ्यालाहि जाणत नाहीं तर वृक्षासारखा केवळ आहारमात्र ग्रहण करून वांचतो तो

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मूर्छितासारखा होय आणि जो लोहाराच्या भात्यासारखें व्यर्थ श्वासोच्छ्वास टाकून राहतो तो मृततुल्य होय ॥ २९ ॥ आतां, जर विषयांचा आग्रह असा अनर्थ करणारा आहे तर परमप्रमाणभूत वेदानें स्वर्गादिविषयांचें फलत्वानें निरूपण कसें केलें? असें ह्मणशील तर– 'स्वर्गाची कामना करणारानें अग्निष्टोम यज्ञ करावा' अशी जी ही फलश्रुति आहे ती मनुष्यांना परमपुरुषार्थ देणारी नाहीं, तर बहिर्मुख पुरुषांना मोक्ष सांगण्याच्या इच्छेनें अवांतर फलांनीं कर्मावर रुचि उत्पन्न करणारी आहे. ह्या फलश्रुतीनें जसा पिता, बालकांच्या ज्वरादिक रोगांची निवृत्ति होण्याकरितां त्यांना औषध पाजण्याचें मनांत आणून त्यांस औषधाचें फळ खडीसाखर व लाडू देईन ह्मणून सांगतो त्याप्रमाणें स्वर्गादिक फळ सांगितलें आहे ॥ २३ ॥ आतां कर्मकांडामध्यें मोक्षाचें नांवहि ऐकूं येत नसून मोक्ष सांगण्याच्या इच्छेनें श्रुतीनें स्वर्गादिक फळें सांगितलीं असें कसें ह्मणतोस? असें ह्मणशील तर– श्रुतींत ऐकूं येतें तसें घडत नसल्यामुळें त्या श्रुतीच्या सांगण्याचें तात्पर्य मोक्षाविषयींच आहे; असें सांगतो– आपल्या अन-

---

ननु प्रवृत्तस्य स्वर्गादिफलश्रवणात्कुतः स्वार्थविभ्रंशस्तत्राह । फलश्रुतिरिति । इयं फलश्रुतिर्न श्रेयः परमपुरुषार्थपरा न भवतीत्यर्थः । किंतु बहिर्मुखानां नृणां मोक्षविवक्षयाऽवांतरफलैः कर्मसु रुच्युत्पादनमात्रम् । यथा भैषज्ये औषधे रोचनं रुच्युत्पादनम् । तथाहि । पिब निंबं प्रदास्यामि खलु ते खंडलड्डुकान् ॥ पित्रैवमुक्तः पिबति न फलं तावदेव तु ॥ २३ ॥ ननु कर्मकांडे मोक्षस्य नामापि न श्रूयते कुत एवं व्याख्यायते यथा श्रुतस्याघटनादित्याह । उत्पत्त्येति द्वाभ्याम् । उत्पत्त्या स्वभावत एव कामेषु पश्वादिषु प्राणेष्वायुरिंद्रियबलवीर्यादिषु । स्वजनेषु पुत्रादिषु । अनर्थहेतुषु परिपाकतो दुःखहेतुषु ॥ २४ ॥ अतस्तान्स्वार्थं परमसुखमविदुषः । अतो नतान् प्रह्वीभूतान् । वेदो यद्बोधयि-

फलश्रुतिरियं नृणां न श्रेयो रोचनं परम् ॥ श्रेयोविवक्षया प्रोक्तं यथा भैषज्यरोचनम् ॥ २३ ॥ उत्पत्त्यैव हि कामेषु प्राणेषु स्वजनेषु च ॥ आसक्तमनसो मर्त्या आत्मनोऽनर्थहेतुषु ॥ २४ ॥ न तानविदुषः स्वार्थं भ्राम्यतो वृजिनाध्वनि ॥ कथं युंज्यात्पुनस्तेषु तांस्तमो विशतो बुधः ॥ २५ ॥ एवं व्यवसितं केचिदविज्ञाय कुबुद्धयः ॥ फलश्रुतिं कुसुमितां न वेदज्ञा वदंति हि ॥ २६ ॥ कामिनः कृपणा लुब्धाः पुष्पेषु फलबुद्धयः ॥ अग्निमुग्धा धूमतांताः स्वं लोकं न विंदंति ते ॥ २७ ॥

ष्यति तदेव श्रेय इति विश्वसितानित्यर्थः । तानेवंभूतान्वृजिनाध्वनि कामवर्त्मनि देवादियोनिषु भ्राम्यतः । ततः पुनस्तमो वृक्षादियोनिं विशतः । पशुकाम इति आयुरिंद्रियादिकाम इति च पुत्रादिकाम इति च कथं पुनस्तेष्वेव कामेषु स्वयं बुधो वेदो युंज्यात्प्रवर्तयेत् । तथा सत्यनाप्तः स्यादिति भावः ॥ २५ ॥ कथं तर्हि कर्ममीमांसकाः फलपरतां वदंति तत्राह । एवमिति । व्यवसितं वेदस्याभिप्रायम् । कुसुमितामवांतरफलप्ररोचनया रमणीयां परमफलश्रुतिं वदंति । कुतस्ते कुबुद्धयस्तदाह । हि यस्माद्वेदज्ञा व्यासादयस्तथा न वदंतीति ॥ २६ ॥ कुबुद्धितां प्रपंचयति कामिन इत्यष्टभिः । कामित्वात्कृपणास्ततो लुब्धास्तृष्णाकुला अतः पुष्पेष्ववांतरफलेषु परमफलबुद्धयोऽतएवाग्निमुग्ध

र्थाला कारण असे जे पश्वादिक विषय, आयुष्य, इंद्रियें, बळ, पराक्रम व पुत्रादिक स्वजन त्यांचेठिकाणीं, स्वभावानेंच आसक्तचित्त असलेल्या व वेद जें सांगेल त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या, स्वतःस्वार्थ न जाणणाऱ्या व देवादियोनिरूप दुःखमार्गामध्यें भ्रमण पावून शेवटीं वृक्षादियोनींत जन्म घेणाऱ्या त्या लोकांना पुन्हा त्याच पश्वादिक विषयांचेठिकाणीं, त्यांचा परम आप्त जो वेद तो कसा बरें प्रवृत्त करील? मुळींच करावयाचा नाहीं ॥ २४ ॥ २५ ॥ तर मग कर्ममीमांसक वेदाला स्वर्गादिफलपरत्व कसें सांगतात? असें ह्मणशील तर, कितिएक कुबुद्धि (कर्ममीमांसक) वेदाचा अभिप्राय न जाणतां स्वर्गादिक फळें सांगितलेलीं असल्यामुळें मनोरम वाटणाऱ्या फळश्रुतीलाच खरी मानितात. आतां ते कुबुद्धि कसे असें णणशील तर– वेदवेत्ते व्यासादिक ऋषि तसें मानीत नाहींत आणि ते मानितात ह्मणून ते कुबुद्धि होत ॥ २६ ॥ आतां त्यांची कुबुद्धिता सांगतो– जे पुरुष, कामी, कृपण, लोभी, स्वर्गादि अवांतर फलांचेठिकाणीं परमफलबुद्धि, अग्निसाध्य कर्मांच्या आग्रहानें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विवेकहीन व शेवटीं दक्षिणायनमार्गानें गमन करणारे आहेत ते कोणत्याहि प्रकारें आत्मतत्त्वाला जाणत नाहींत ॥ २७ ॥ हे उद्धवा, जो परमात्मा जगद्रूप आहे ह्मणजे ज्याहून जग निराळें नाहीं व ज्यापासून जग उत्पन्न झालें आहे, त्या हृदयस्थित मज परमात्म्यालाहि, ते जाणत नाहींत. याचें कारण, त्यांना पशुहिंसारूप कर्मफळच वर्णनीय असून ते आपल्या प्राणांची तृप्ति करण्याविषयीं तत्पर असतात ह्मणून, जसे अंधकारानें व्याप्तदृष्टि झालेले लोक जवळ असलेल्याहि पदार्थाला पाहत नाहींत तसे ते जवळ असणाऱ्याहि मला जाणत नाहींत ॥ २८ ॥ ते अस्पष्ट असलेलें माझें मत न जाणतां विषयात्मक होऊन देवादिकांचें यजन करितात. माझें मत असें आहे कीं-

अग्निसाध्यकर्माभिनिवेशेन लुप्तविवेकास्ततश्च धूमतांता धूमता धूममार्गोऽते येषां ते । स्वं लोकमात्मतत्त्वम् । तथाच श्रुतिः । कश्चिद्ध वा अस्माल्लोकात्प्रेत्य आत्मानं वेद अयमहमस्मीति ॥ कश्चित्स्वं लोकं न प्रतिजानाति ॥ अग्निमुग्धो हैव धूमतांत इति ॥ २७ ॥ कोऽसौ स्वलोकस्तमाह । हृदिस्थमात्मानं मां स्वलोकम् । ननु हृदिस्थमहंकारास्पदं जानंत्येव । सत्यम् । परमात्मानं तु जानंतीत्याह । य इदं यद्व्यतिरिक्तं जगन्नास्ति । कुतः । यत इदं जगज्जातम् । तं कुतो न जानंति । हि यस्मात् । उक्थं कर्मैव शस्त्रं शंस्यं कथनीयं पशुहिंसासाधनं वा येषां ते । अतः केवलमसुतृपः प्राणतर्पणपराः । नीहारं तमस्तेन व्याप्तानि चक्षूंषि येषां ते यथा सन्निहितमपि न जानंति तद्वत् । तथाच श्रुतिः । न तं विदाथ य इमा जजानान्यद्युष्माकमंतरं बभूव ॥ नीहारेण प्रावृता जल्प्या चासुतृप उक्थशासश्चरंतीति ॥ २८ ॥ वेदतात्पर्याज्ञानाचान्यान्यजंतीत्याह । ते

न ते मामंग जानंति हृदिस्थं य इदं यतः ॥ उक्थशस्त्रा ह्यसुतृपो यथा नीहारचक्षुषः ॥ २८ ॥ ते मे मतमविज्ञाय परोक्षं विषयात्मकाः ॥ हिंसायां यदि रागः स्याद्यज्ञ एव न चोदना ॥ २९ ॥ हिंसाविहारा ह्यालब्धैः पशुभिः स्वसुखेच्छया ॥ यजंते देवता यज्ञैः पितृभूतपतीन्खलाः ॥ ३० ॥ स्वप्नोपममसुं लोकमसंतं श्रवणप्रियम् ॥ आशिषो हृदि संकल्प्य त्यजंत्यर्थान् यथा वणिक् ॥ ३१ ॥

परोक्षमस्फुटं मे मतमविज्ञाय देवतादीन्यजंत इत्युत्तरेणान्वयः । स्वमतमेवाह । हिंसायां मांसभक्षणार्थं तत्फलार्थं च यदि रागः स्यात्तर्हि यज्ञ एवेत्यभ्यनुज्ञाद्वारा परिसंख्येयं न त्वावश्यकत्वेन चोदनेत्येवंरूपम् । यद्यपि नित्यनैमित्तिकयोः कामविशेषानुबंधो नास्ति तथापि कर्मणा पितृलोक इति श्रुतेः । सामान्यतः पितृलोककामनाऽस्त्येव । अंतःकरणशुद्धिकामना चेति भावः । तदुक्तम् । नाकामस्य क्रिया काचिद्दृश्यते वेह कर्हिचित् ॥ यद्यद्धि कुरुते जंतुस्तत्तत्कामस्य चेष्टितमिति ॥ २९ ॥ अज्ञत्वादेव हिंसया विहारः क्रीडा येषां ते ॥ ३० ॥ किंच तेऽतिमंदबुद्धय इत्याह । स्वप्नोपममिति । असुं परलोकम् । आशिषश्चास्मिन्लोके संकल्प्य न तु निश्चित्य विघ्नबाहुल्यात् । त्यजंति कर्मसु विनियोजयंति । यथा कश्चिद्वणिग् दुस्तरसमुद्रादिलंघनेन बहुधनार्जनेच्छया सिद्धं धनं त्यजन्नुभयभ्रष्टो भवति तद्वदित्यर्थः ॥ ३१ ॥

मांसभक्षणाविषयीं जर प्रीति असेल तर यज्ञामध्यें होम करून अवशेष राहिलेलें मांस देवताप्रसादत्वेंकरून ग्राह्य आहे; आवश्यकत्वेंकरून न घेण्याची आज्ञा नाहीं ॥ २९ ॥ हिंसा करणारे व क्रूरस्वभावाचे ते लोक, आपल्या सुखाच्या इच्छेनें, पशु मारून केलेल्या यज्ञांनीं देवता, पितर व भूतपति यांचें यजन करितात ॥ ३० ॥ स्वप्नासारख्या नश्वर व कानाला-मात्र प्रिय लागणाऱ्या परलोकाच्या व या लोकाच्या कामनांचा मनामध्यें संकल्प धरून मिळविलेलें द्रव्य खर्च करितात. ते लोक, जसा एखादा व्यापारी दुस्तर समुद्राच्या उल्लंघनानें पुष्कळ द्रव्य मिळविण्याची इच्छा धरून जवळच्या द्रव्याचा खर्च करितो व इतोभ्रष्ट ततोभ्रष्ट होतो तसे ते इहलोकींच्या व परलोकींच्या सुखाला मुकतात ॥ ३१ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ते लोक रजःसत्वतमोगुणस्वभावाचे असल्यामुळें आपल्यासारख्या रजःसत्वतमोगुणी इंद्रादिकांचेंच आराधन करितात, गुणांतीत अशा माझें आराधन करीत नाहींत. आतां ते इंद्रादिक देव जरी माझेच अंशभूत आहेत तथापि भेददर्शीपणानें त्यांची केलेली उपासना, विधिपूर्वक होत नसल्यामुळें ती माझी केल्यासारखी होत नाहीं ॥ ३२ ॥ त्यांचा अभिप्राय असा आहे कीं– येथें आह्मी यज्ञांनीं देवांचें यजन करून स्वर्गावर जाऊं आणि तेथें अप्सरांसहवर्तमान क्रीडा करूं; पुढें स्वर्गभोग भोगल्यानंतर या लोकीं जन्म घेऊन मोठे संभावित कुलीन गृहस्थ होऊं ॥ ३३ ॥ याप्रमाणें पुष्पस्थानीय स्वर्गादिसुखाचें वर्णन करणाऱ्या वाणीनें ज्याचें मन विक्षिप्त झालें आहे अशा अभिमानी

अतो रजःसत्वतमोजुषः स्वानुरूपानिंद्रादीनेवोपासते न तु मां गुणातीतम् । यद्यपींद्रादीनामपि मदंशत्वान्मदुपासनमेव तत्तथापि यथावन्नोपासते भेददर्शित्वादित्यर्थः ॥ ३२ ॥ हृदि संकल्प्येत्युक्तं तमेव संकल्पं दर्शयति । इष्ट्वेति । तस्य भोगस्यांते । महाशाला महागृहस्थाः ॥ ३३ ॥ ततः किमत आह । एवमिति । अतो मत्प्रवणत्वाभावान्नित्यं संसारिणो भवंतीति भावः ॥ ३४ ॥ तदेवं वेदानां प्रवृत्तिपरत्वं निराकृत्य प्रकृतं निवृत्तिपरत्वमेवोपसंहरति । वेदा इति । कर्मब्रह्मदेवताकांडविषया इमे वेदा ब्रह्मात्मविषयाः ब्रह्मैवात्मा न संसारीत्येतत्पराः । तत्परत्वाप्रतीतौ च । फलश्रुतिरियं नृणां न श्रेयो रोचनं परम् ॥ श्रेयोविवक्षया प्रोक्तं यथा भैषज्यरोचनमित्युक्तमेव कारणमनुस्मारयति । परोक्षेति । ऋषयो मंत्रास्तद्द्रष्टारो वा । तत्किमिति यतः परोक्षमेव मम च प्रियम् । अयं भावः । शुद्धांतःकरणैरेवैतद्बोद्धव्यं नान्यैरनधिकारिभिर्वृथाकर्मत्यागेन भ्रंशप्रसंगा दिति

रजःसत्वतमोनिष्ठा रजःसत्वतमोजुषः ॥ उपासते इंद्रमुख्यान्देवादीन्न तथैव माम् ॥ ३२॥ इष्ट्वेह देवता यज्ञैर्गत्वा रंस्यामहे दिवि ॥ तस्यांत इह भूयास्म महाशाला महाकुलाः ॥ ३३ ॥ एवं पुष्पितया वाचा व्याक्षिप्तमनसां नृणाम् ॥ मानिनां चातिस्तब्धानां मद्वार्ताऽपि न रोचते ॥ ३४ ॥ वेदा ब्रह्मात्मविषयास्त्रिकांडविषया इमे ॥ परोक्षवादा ऋषयः परोक्षं मम च प्रियम् ॥ ३५ ॥ शब्दब्रह्म सुदुर्बोधं प्राणेंद्रियमनोमयम् ॥ अनंतपारं गंभीरं दुर्विगाह्यं समुद्रवत् ॥ ३६ ॥

॥ ३५ ॥ ननु वेदज्ञा अपि जैमिन्यादयः किमिति तथा न वर्णयंति मां विना तत्त्वतो वेदं तदर्थं वा न कोऽपि वेदेत्याशयेनाह । शब्दब्रह्मेति यावत्समाप्ति । स्वरूपतोऽर्थतश्च दुर्विज्ञेयम् । तच्च सूक्ष्मं स्थूलं चेति द्विविधम् । तत्र सूक्ष्मं तावत्स्वरूपतोऽपि दुर्ज्ञेयमित्याह । प्राणेंद्रियमनोमयम् । प्रथमं प्राणमयं पराख्यं ततो मनोमयं पश्यंत्याख्यं तत इंद्रियमयं मध्यमाख्यम् । तस्य वाग्व्यंजकत्वेन वागिंद्रियप्रधानत्वात् । किंच अनंतपारं समष्टिप्राणादिमयस्य निर्विशेषस्य च तस्य कालतो देशतश्चापरिच्छेदात् । अर्थतोऽपि दुर्ज्ञेयत्वमाह । गंभीरं निगूढार्थम् । अतो दुर्विगाह्यं मतिप्रवेशानर्हम् । तथाच श्रुतिः । चत्वारि वाक्परिमिता पदानि तानि विदुर्ब्राह्मणा ये मनीषिणः ॥ गुहा त्रीणि निहिता

व गर्विष्ठ झालेल्या त्या पुरुषांना माझीवार्तासुद्धां आवडत नाहीं, ह्मणून ते निरंतर संसारांतच राहतात ॥ ३४ ॥ याप्रमाणें वेदांचें प्रवृत्तिपरत्व निराकरण करून आतां सांगत असलेल्या निवृत्तिपरत्वाचाहि उपसंहार करितो– त्रिकांडविषयक (कर्मब्रह्मदेवताकांडविषयक) हे सर्व वेद, जीवात्मा ब्रह्मरूपच आहे संसारी नाहीं असेंच सांगणारे आहेत. ते वेद किंवा त्यांचे द्रष्टे ऋषि, आपणांतील अर्थ गुप्त ठेवितात व तें अर्थ गुप्त ठेवणें मला प्रिय आहे ॥ ३५ ॥ आतां जैमिन्यादिक ऋषि वेदवेत्ते असूनहि असें कां वर्णन करीत नाहींत असें ह्मणशील तर– माझ्यावांचून दुसरा कोणीच वेदाला किंवा त्याच्या अर्थाला खऱ्यारीतीनें जाणत नाहीं असें सांगतो– परा पश्यंती मध्यमानामक सूक्ष्म व वैखरीनामक स्थूळ असें दोनप्रकारचें वेदब्रह्म आहे तें दोन्हीप्रकारचेंहि जाणावयाचें फार कठिण आहे. कारण, तें देशतः कालतः अंतपाररहित व अर्थतः गंभीर

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असल्यामुळें समुद्रासारखें बुद्धीचा प्रवेश होण्यास अशक्य आहे ॥ ३६ ॥ त्यांत बुद्धिमंतांनींच जाणावयाचें सूक्ष्मतत्त्व सांगतो– अनंतशक्ति, व्यापक व परब्रह्मरूपी मी, तें वेदब्रह्म, आंतून प्रेरणा करून वृद्धिंगत केलेलें आहे. तें जसे कमळाच्या नाळांत असलेले सूक्ष्म तंतु, चतुर पुरुषांच्या लक्षांत येतात त्याप्रमाणें सर्व प्राण्यांच्या शरीरांत नाद-रूपानें चतुर पुरुषांच्या अनुभवास येतें ॥ ३७ ॥ आतां त्यापासून वैखरीनामक स्पष्ट वाणीच्या उत्पत्तीचा प्रकार सदृष्टांत सांगतो– जसा कोळी (एका जातीचा प्राणी) आपल्या हृदयापासून मुखद्वारा तंतु बाहेर प्रकट करितो व त्या तंतूंवर कांहीं वेळपर्यंत क्रीडा करून शेवटीं त्यांचा आपलेठिकाणींच उपसंहार करितो त्याप्रमाणें प्राणोपाधी-

नेंगयंति तुरीयं वाचो मनुष्या वदंति । अयमर्थः । वाचः शब्दब्रह्मणः परिमितानि गणितानि पद्यते ज्ञायते परं तत्त्वमेभिरिति पदानि रूपाणि चत्वारि तानि चत्वार्यपि ये मनीषिणोऽतदृष्टयस्त एव विदुर्नान्ये यतो गुहायां देहमध्ये त्रीणि निहितानि नेंगयंति स्वरूपं न प्रकाशयंत्यतः केवलं वाचस्तुरीयं चतुर्थं भागं वैखरीरूपं मनुष्याः प्राणि-नो वदंति तदपि वदंत्येव न तत्त्वतो जानंति ॥ ३६ ॥ तत्र मनीषिभिरेव ज्ञेयं सूक्ष्मं तत्त्वरूपं दर्शयति । मयेति । मयांतर्यामिणोपबृंहितमधिष्ठितम् । अंतस्थत्वेऽप्यपरिच्छे-दमाह । भूम्नेति । अधिष्ठातृत्वेऽप्यविकारित्वमाह । ब्रह्मणेति । अविकृतस्यापि नियंतृत्वं घटयति । अनंतशक्तिनेति । भूतेषु सर्वप्राणिषु घोषरूपेण नादरूपेण लक्ष्यते मनीषि-भिः । अंतःसूक्ष्मत्वेन दर्शने दृष्टांतो बिसेषूर्णातंतुरिवेति ॥ ३७ ॥ ततो वैखर्याख्याया बृहत्या वाच उत्पत्तिप्रकारं सदृष्टांतमाह । यथेति त्रिभिः । हृदयात्सकाशात् । मुखात् द्वारात् । उद्गमते बहिः प्रकटयति । दार्ष्टांतिके योजयति । आकाशादिति । प्राणस्तदुपाधिर्हिरण्यगर्भरूपः प्रभुर्भगवान् तेन रूपेण छंदोमयो वेदमूर्तिः । अतस्त्वमृतमयः ।

मयोपबृंहितं भूम्ना ब्रह्मणानंतशक्तिना ॥ भूतेषु घोषरूपेण बिसेषूर्णेव लक्ष्यते ॥ ३७ ॥ यथोर्णनाभिर्हृदयादूर्णामुद्वमते मुखात् ॥ आकाशाद्घोषवान्प्राणो मनसा स्पर्शरूपिणा ॥ ३८ ॥ छंदोमयोऽमृतमयः सहस्रपदवीं प्रभुः ॥ ओंकाराद्व्यंजितस्पर्शस्वरोष्मांतस्थभू-षिताम् ॥ ३९ ॥ विचित्रभाषाविततां छंदोभिश्चतुरुत्तरैः ॥ अनंतपारां बृहतीं सृजत्याक्षिपते स्वयम् ॥ ४० ॥

घोषवान्नादोपादानवान् । मनसा निमित्तभूतेन । निमित्ततामेव दर्शयति । स्पर्शादीन्वर्णान् रूपयति । संकल्पयतीति स्पर्शरूपितेन । स्पर्शग्रहणमुपलक्षणम् । हृदयाकाशाद्बृहतीं सृजतीति तृतीयश्लोकेनान्वयः । बृहतीशब्दार्थव्याख्यानाय विशेषणानि । सहस्रपदवीं बहुमार्गाम् । तदेवाह । ओंकारादुरःकंठादिसंगेन व्यंजितैः स्पर्शादिभिर्भूषिताम् । ओं-कारश्चात्र हृद्गतः सूक्ष्मोऽभिप्रेतो न त्वकारादिवर्णरूपः तस्य व्यंग्यकोटित्वात् । तत्र स्पर्शाः कादिपंचवर्गाः । स्वरा अकारादयः षोडश । ऊष्माणः शषसहाः अंतस्था यरल वाः एवं विचित्राभिर्वैदिकलौकिकभाषाभिर्विततताम् । यथोत्तरं चत्वारि चत्वार्यक्षराण्युत्तराण्यधिकानि येषां तैश्छंदोभिरुपलक्षिताम् । एवमनंतपारां सृजति स्वयमेवाक्षिपते उपसंहरति ॥ ३८ ॥ ३९ ॥ ४० ॥

नें हिरण्यगर्भरूपी झालेला, वेदमूर्ति व अमृतमय असा हा नादरूपी भगवान्, स्पर्शादिक वर्णांची कल्पना करणाऱ्या मनोरूप निमित्तानें आपल्या हृदयाकाशापासून अनंत मार्गांनीं युक्त व अनंतपार अशी वेदब्रह्मात्मक वाणी उत्पन्न करितो आणि शेवटीं तिचा आपणच उपसंहार करितो. ती वाणी हृदयस्थित सूक्ष्म ओंकारापासून उर कंठ इत्यादिक स्थानांच्या संयोगानें स्पर्श (क ख पासून भ म पर्यंत पंचवीस अक्षरें) सोळा स्वर, ऊर्ष्मे (श ष स ह) व अंतस्थ (य र ल व) या वर्णांनीं भूषित असून वैदिक व लौकिक अशा विचित्र भाषांनीं विस्तृत आहे तिचे चोवीस अक्षरांपासून अठ्ठावीस बत्तीसवगैरे चार चार अक्षरांनीं वाढत गेलेले छंद आहेत ॥ ३८ ॥ ३९ ॥ ४० ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पंक्ति, त्रिष्टुप्, जगती, अतिजगती, अष्टी, अत्यष्टी विराट् व अतिविराट् असे छंद आहेत. त्यांत
अनुष्टुप् इत्यादिक चार चार अक्षरांनीं अधिक अधिक असलेले बृहतीवगैरे छंद आहेत ॥ ४१ ॥
णी कर्मकांडांमध्यें विधिवाक्यांनीं कशाचें विधान करिते, देवताकांडामध्यें मंत्रवाक्यांनीं कशाचा
रित्ये या बद्दलचें यावाणीचें तात्पर्य माझ्याहून दुसरा कोणीच जाणत नाहीं ॥ ४२ ॥ आतां तूंच
वेदवाणी कर्मकांडांमध्यें यज्ञरूपी माझेंच विधान करित्ये, देवताकांडांमध्यें त्या त्या देवतारूपी माझाच

त्री । ततश्चतुरक्षरवृद्ध्योष्णिगादिछंदांसि । अत्यष्टिः अतिजगती अतिविराट्चेत्यर्थः । एतैश्छंदोभिरु-
इत्युक्तम् ॥ ४१ ॥ अर्थतोऽपि दुर्ज्ञेयत्वमाह । किमिति । कर्मकांडे विधिवाक्यैः किं विधत्ते ।
कल्पयेन्निषेधार्थमित्येवमस्या हृदयं तात्पर्यं मत् मत्तोऽन्यः कश्चिदपि न वेद ॥ ४२ ॥ ननु तर्हि
मेव तत्तद्देवतारूपमभिधत्ते न मत्तः पृथक् । यच्चाकाशादिप्रपंचजातं तस्माद्वा एतस्मादात्मन आकाशः

गत्यतिच्छंदो ह्यत्यष्ट्यतिजगद्विराट् ॥ ४१ ॥ किं विधत्ते किमाचष्टे किमनूद्य
कश्चन ॥ ४२ ॥ मां विधत्तेऽभिधत्ते मां विकल्प्यापोह्यते त्वहम् ॥ एतावा-
नत्रमनूद्यांते प्रतिषिध्य प्रसीदति ॥ ४३ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एका-

। कुत इत्यपेक्षायां सर्ववेदार्थं संक्षेपतः कथयति । एतावानेव सर्वेषां वेदानामर्थः । तमेवाह ।
नेति प्रतिषिध्य प्रसीदति निवृत्तव्यापारो भवति । अयं भावः । यथा ह्यंकुरे यो रसः स एव
द्विस्तारभूतानां सर्ववेदकांडशाखानामपि संगच्छते नान्य इति ॥ ४३ ॥ नित्यमुक्तः स्वतः
वते एकादशस्कंधे टीकायां एकविंशोऽध्यायः ॥ २१ ॥ ॥

जो 'तस्माद्वा एतस्मात्' इत्यादि श्रुतींनीं आकाशादि सर्व प्रपंचाची कल्पना करून शेवटीं
हें माझ्याहून दुसरें कांहीं नाहीं. कां नाहीं ? असें ह्मणशील तर- सर्व वेदांचा अर्थ इतकाच
शादि भेदाचा, हा सर्व मायामय आहे असें सांगून त्याचा शेवटीं निषेध करून शांत होतो. याचा
, फळें, फुलें इत्यादिकांमध्यें प्राप्त होतो तसाच ॐकाराचा जो अर्थ परमेश्वर आहे तोच त्याच्या
प्रामाणें श्रीमद्भा० एका० स्कं० गुणदोषनिरूपण नामक हा एकविसावा अ० स० झाला ॥ २१ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

…रुषांचा विवेक आणि जन्ममृत्यूंचा प्रकार इत्यादिक विषयांचें वर्णन केलें आहे ॥ १ ॥
…आंतून आंतून विवाद आहेतच. ते असे– कितीएक तत्त्वसंख्यांविषयीं विवाद करितात त्यां-
…विवाद करितात. त्यांत खरें काय आहे तें जाणण्याच्या इच्छेनें उद्धव ह्मणाला– हे प्रभो, विश्वे-
…त्रामध्यें जीं कांहीं तत्त्वें सांगितलीं आहेत त्यांमध्यें किती योग्य आहेत? तूं तर नऊ, अकरा,
…॥ कितीएक ऋषि, सव्वीस तत्त्वें आहेत असें ह्मणतात, दुसरे पंचवीस, तिसरे कितीएक सात,

…च ॥ १ ॥ तदेवं वेदानां प्रवृत्तिपरत्वं निराकृत्य मोक्षपरत्वं निर्णीतम् । संति च
…बाह्यार्थसदसत्त्वे आत्मत्वेऽप्येकत्वनानात्वादिषु तत्र किं सत्यमिति जिज्ञासया पृच्छति ।
…न्मतानुवादपूर्वकं बहुधा संख्यानं प्रपंचयति नवेति त्रिभिः । त्वं तावदष्टाविंशतितत्त्वान्यात्थ तानि
…नात्वमित्यर्थः । यद्विवक्षया यत्प्रयोजनमभिप्रेत्य च गायंति । आयुष्मन्नित्यमूर्ते ॥ ३ ॥

…मः प्रभो ॥ नवैकादश पंच त्रीण्यात्थ त्वमिह शुश्रुम ॥ १ ॥ केचित्षड्विं-
…केचिच्चत्वार्येकादशापरे ॥ २ ॥ केचित्सप्तदश प्राहुः षोडशैके त्रयोदश ॥
…पृथगायुष्मन्निदं नो वक्तुमर्हसि ॥ ३ ॥ श्रीभगवानुवाच ॥ युक्तयः संति
…वदतां किं नु दुर्घटम् ॥ ४ ॥ नैतदेवं यथाऽऽत्थ त्वं यदहं वच्मि तत्तथा ॥

…युक्तमिति । यथा ब्राह्मणा भाषंते तद्युक्तं न च वस्तुतः । यस्मात्संति सर्वत्रांतर्भूतानि सर्वाणि तत्त्वानि ।
…वीकृत्य । नहि मरीचिजलपरिमाणादिविवादे किंचिदघटितमिव भवति ॥ ४ ॥ ननु यदि सर्वमपि
…दस्तत्राह । नैतदेवमिति । हेतुं प्रति च विवदमानानां मदीया दुरतिक्रमा शक्तयः सत्वाद्या अंतःकरणवृ-

…तत्त्वाचें वर्णन करितात ॥ २ ॥ कितीएक सतरा, कितीएक सोळा, व कितीएक तेरा तत्त्वें सांग-
…जें प्रयोजन सांगण्याच्या इच्छेनें वर्णन केले आहेत तें सर्व मला सांगण्याची तूं कृपा कर ॥ ३ ॥
…प्रकार सांगितले आहेत त्या सर्वांविषयींहि युक्ति आहेत; कारण, माझ्या मायेचा स्वीकार करून
…ळाच्या परिमाणाविषयीं विवाद चालविला असतां अघटित असें कांहींच नाहीं ॥ ४ ॥ आतां जर
…तर त्या भेदांचीं कारणें सिद्ध करण्याविषयीं त्यांचा विवाद कां? असें ह्मणशील तर– ‘ जसें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तूं सांगतोस असें हें नाहीं, तर जसें मी सांगतों तसेंच खरें आहे असा' विवाद करणाऱ्या पुरुषांना अंतःकरणवृत्तींच्या रूपानें परिणाम पावलेल्या माझ्या दुरतिक्रमणीय सत्वादिक शक्तीच कीं, ज्यांच्या क्षोभानें विवाद करणाऱ्या लोकांमध्यें वाद करण्यावा विषय पक्षभेद झाला आहे, त्या कारण आहेत. जेव्हां शम आणि दम हें प्राप्त होतात तेव्हां तो विकल्प (भेद) नाहींसा होतो आणि भेद नाहींसा झाला ह्मणजे वादहि शांत होतो ॥ ६ ॥ अशां सर्वत्र युक्ति आहेत असें जें सांगितलें तेंच स्पष्ट करून दाखवितो— हे पुरुषश्रेष्ठा उद्धवा, तत्त्वांचा एकमेकांमध्यें अनुप्रवेश होत असल्यामुळें वाद करणाऱ्या पुरुषांची जशी लहानमोठी संख्या विवक्षित असेल तशी 'पहिलें कारण व नंतरचें कार्य अशा धर्मानें' ती संख्या होऊं शकत्ये ॥ ७ ॥ जसे— घट परळ इत्यादिक कार्यपदार्थ, कारणरूप मृत्तिकेमध्यें अंतर्भाव पावलेले दिसतात किंवा जशी

तासां विवादहेतुत्वमुपपादयति । यासामिति । यासां व्यतिकरात्क्षोभाद्वदतां पदं विषयो विकल्पो भेद आसीदंतःकरणवृत्तिविकल्पो वा तन्मूलभूतः । एतदेव व्यतिरेकेण द्रढयति । शमदमयोर्द्वंद्वैक्यम् । तस्मिन्प्राप्ते विकल्पोऽप्येति नीयते । तं च विकल्पनाशमनुवादः शाम्यतीति ॥ ६ ॥ संति सर्वत्रेति यदुक्तं तत्प्रपंचयति । परस्परेति द्वाभ्याम् । अन्योऽन्यस्मिन्ननुप्रवेशाद्वक्तुर्यथा विवक्षितं तथा पूर्वं कारणमपरं कार्यम् । कार्यकारणभावेन प्रसंख्यानं भवति । यद्वा पूर्वा अल्पसंख्यापराधिकसंख्या तयोर्भावः पौर्वापर्यंतेन प्रसंख्यानं गणनमिति ॥ ७ ॥ अनुप्रवेशं दर्शयति । एकस्मिन्नपीति । पूर्वस्मिन्कारणभूते तत्त्वे कार्यतत्त्वानि सूक्ष्मरूपेण प्रविष्टानि मृदि घटवत् । अपरस्मि-

यासां व्यतिकरादासीद्विकल्पो वदतां पदम् ॥ प्राप्ते शमदमेऽप्येति वादस्तमनुशाम्यति ॥ ६ ॥ परस्परानुप्रवेशात्तत्त्वानां पुरुषर्षभ ॥ पौर्वापर्यप्रसंख्यानं यथा वक्तुर्विवक्षितम् ॥ ७ ॥ एकस्मिन्नपि दृश्यंते प्रविष्टानीतराणि च ॥ पूर्वस्मिन्वा परस्मिन्वा तत्त्वे तत्त्वानि सर्वशः ॥ ८ ॥ पौर्वापर्यमतोऽमीषां प्रसंख्यानमभीप्सताम् ॥ यथा विविक्तं यद्वक्त्रं गृह्णीमो युक्तिसंभवात् ॥ ९ ॥ अनाद्यविद्यायुक्तस्य पुरुषस्यात्मवेदनम् ॥ स्वतो न संभवादन्यस्तत्त्वज्ञो ज्ञानदो भवेत् ॥ १० ॥

न्कार्यतत्त्वे कारणतत्त्वान्यनुगतत्वेन प्रविष्टानि घटे मृद्वत् ॥ ८ ॥ अविरोधमुपसंहरति । अतोऽमीषां तत्त्वानां पौर्वापर्यं तत्तत्कारणकार्यत्वं प्रसंख्यानं च न्यूनाधिकमभीप्सतां वादिनां मध्ये यथा विवक्षया यद्वक्त्रं यस्य मुखं प्रवर्तते तत्सर्वं विविक्तं निश्चितं वयं गृह्णीमः उक्तन्यायेन सर्वत्र युक्तेः संभवात् ॥ ९ ॥ ननु कार्यकारणतत्त्वानां पृथक्त्वापृथक्त्वविवक्षया भवतु नाम संख्याभेदः । जीवेश्वरयोस्तु कथं भेदाभेदविवक्षया यथा षड्विंशतिपंचविंशतिपक्षौ प्रवृत्तावत आह । अनादीति । स्वतो न संभवत्यन्यतस्तु संभवात्स्वतः सर्वज्ञः । परमेश्वरोऽन्यो भवितव्यो इति षाड्विंशतिपक्षाभिप्राय इत्यर्थः ॥ १० ॥

ती कारणरूपें मृत्तिका कार्यरूप घटादिकांमध्यें समावेश पावलेली दिसत्ये त्याप्रमाणें पूर्वींच्या कारणभूत एकादि तत्त्वामध्यें इतर सर्व कार्यतत्त्वें किंवा पुढच्या एकादि कार्यरूप तत्त्वांमध्यें पूर्वींचीं कारणतत्त्वें अंतर्भावानें प्रविष्ट झालेलीं दिसतात ॥ ८ ॥ ह्मणून या तत्त्वांचें कार्यकारणत्व व कमजास्ती संख्या इच्छिणाऱ्या वाद्यांमध्यें जें सांगण्याच्या इच्छेनें ज्याचें मुख प्रवृत्त होतें तें सर्व सांगणें युक्तियुक्त असल्यामुळें आह्मी खरेपणानें ग्रहण करितों ॥ ९ ॥ आतां कार्यरूप व कारणरूप जडतत्त्वांचा निराळेपणा व एकपणा सांगण्याच्या इच्छेनें तत्त्वांच्या संख्येचा भेद होवो परंतु जीव आणि ईश्वर हे चैतन्यरूपी असल्यामुळें त्यांच्या भेदाची व अभेदाची विवक्षा कशी झाली ? कीं जिच्या योगानें तत्त्वांचे पंचवीस व सव्वीस संख्याभेदाचे दोन पक्ष झाले आहेत असें ह्मणशील तर—अनादि अविद्येनें युक्त अशा जीवाला स्वतःच आत्मज्ञान होण्याचें संभवत नाहीं; दुसऱ्यापासून संभवतें ह्मणून त्याला ज्ञानोपदेश करणारा दुसरा तत्त्ववेत्ता सर्वज्ञ परमेश्वर असला पाहिजे असें मानून सव्वीस तत्त्वांच्या संख्येचा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पक्ष प्रवृत्त झाला आहे ॥ १० ॥ तरप्रश्न पंचविसांचा पक्ष कसा झाला ? असें ह्मणशील तर–या शरीरामध्यें जीव आणि ईश्वर यांचें, ते चैतन्यरूपी असल्यामुळें अणुमात्रहि निराळेपणा नाहीं ह्मणून त्यांची निरनिराळेपणाची कल्पना करणें हें व्यर्थ आहे आणि ज्ञान हें सत्वगुणाची वृत्ति असल्यामुळें तो प्रकृतीचाच गुण आहे ह्मणून जीवेश्वरांचें ऐक्य मानून पंचवीस तत्त्वांचा पक्ष प्रवृत्त झाला ॥ ११ ॥ आतां ज्ञान हें जीवाचा धर्म आहे तो प्रकृतीचा गुण कसा होईल ? असें ह्मणशील तर– तीन्हीं गुणांची समताह्रूप जी अवस्था तीच प्रकृति होय, ह्मणून स्थिति, उत्पत्ति आणि प्रळय यांचे कारणभूत जे सत्व, रज आणि तम असे तीन गुण आहेत ते त्या प्रकृतीचेच

कथं तर्हिं पंचविंशतिपक्षस्तत्राह । पुरुषेति । वैलक्षण्यं विसदृशत्वं नास्ति द्वयोरपि चिद्रूपत्वादतस्तयोरन्यं(?)ऽन्यत्वकल्पना अपार्था व्यर्था । एवं पंचविंशतिपक्षः प्रवृत्त इत्यर्थः । नन्वेवमपीश्वरप्रसादलभ्यज्ञानस्य पृथक्त्वात्पक्षद्वयमपि न घटतेऽत आह । ज्ञानं चेति । सत्वगुणवृत्तित्वात्तदंतर्भूतमित्यर्थः ॥ ११ ॥ ननु ज्ञानं जीवधर्मः कथं प्रकृतेर्गुणः स्यादत आह । प्रकृतिरिति । गुणसाम्यं हि प्रकृतिरतस्तद्विशेषरूपा गुणास्तस्या एव नत्वात्मनो जीवस्य अकर्तृत्वात्तस्य स्थित्यादिहेतुभूत गुणाश्रयत्वानुपपत्तेः ॥ १२ ॥ अतः सत्वं सत्वमयं ज्ञानं प्रकृतेर्गुण इति पूर्वेणैवान्वयः । ननु तन्निवर्त्यं कर्माज्ञानं च तत्त्वांतरं स्यात् । न । रजःकर्म रजसो वृत्तिः । अज्ञानं च तमसः । अतः कर्माज्ञानयो रजस्तमोद्वारा प्रकृतावेवांतर्भाव इति भावः । तथापि कालस्वभावयोस्तत्त्वांतरता स्यात् । न । गुणव्यतिकर इति । गुणानां व्यतिकरो यस्मात्स ईश्वर एव कालो नाम ।

पुरुषेश्वरयोरत्र न वैलक्षण्यमण्वपि ॥ तदन्यकल्पनाऽपार्था ज्ञानं च प्रकृतेर्गुणः ॥ ११ ॥ प्रकृतिर्गुणसाम्यं वै प्रकृतेर्नात्मनो गुणाः ॥ सत्त्वं रजस्तम इति स्थित्युत्पत्त्यंतहेतवः ॥ १२ ॥ सत्वं ज्ञानं रजःकर्म तमोऽज्ञानमिहोच्यते ॥ गुणव्यतिकरः कालः स्वभावः सूत्रमेव च ॥ १३ ॥ पुरुषः प्रकृतिर्व्यक्तमहंकारो नभोऽनिलः ॥ ज्योतिरापः क्षितिरिति तत्त्वान्युक्तानि मे नव ॥ १४ ॥ श्रोत्रं त्वग्दर्शनं घ्राणो जिह्वेति ज्ञानशक्तयः ॥ वाक्पाण्युपस्थपाय्वंघ्रिः कर्माण्यंगोभयं मनः ॥ १५ ॥

स्वभावो नाम सूत्रं महत्तत्त्वमेव । तस्य सर्वशक्तिमत्वात् । तदेवं ज्ञानादीनां यथायथमंतर्भावात्र पक्षद्वयेऽपि तत्त्ववृद्धिरेतच्च पक्षांतरेष्वपि ज्ञेयम् ॥ १३ ॥ स्वमते तु गुणानामागमापायित्वात्प्रकृतेर्भेदो विवक्षितोऽतो गुणास्त्रीणि तत्त्वान्यपराणि पंचविंशतितत्त्वानि पूर्वोक्तपक्षद्वयसाधारणानि दर्शयति पुरुष इति सार्द्धद्वाभ्याम् । व्यक्तं महत्तत्त्वम् । नभआदीनि पंचतन्मात्राणि मे मया ॥ १४ ॥ एकादश दर्शयति । श्रोत्रमिति । दर्शनं चक्षुः । ज्ञानशक्तयो ज्ञानेंद्रियाणि पंच । वागादिपाय्वंतानि द्वंद्वैक्येनोक्तानि चत्वार्यंघ्रिश्चेति कर्माणि कर्मेंद्रियाणि पंच । उभयात्मकं मनः । उभयेंद्रियसाधारणमित्यर्थः । अंग हे उद्धव । एवमेतान्येकादश ॥ १५ ॥

आहेत, आत्म्याचे नाहींत. कारण, आत्मा अकर्ता असल्यामुळें त्याचेठिकाणीं सृष्ट्यादिकांना कारणभूत असलेल्या गुणाचें आश्रयत्व संभवत नाहीं ॥ १२ ॥ यास्तव सत्वगुणमय जें ज्ञान तो प्रकृतीचाच गुण होय; तसेंच रजोगुणात्मक जें कर्म व तमोगुणात्मक जें अज्ञान तीं या तत्त्वसंख्यांमध्यें तत्त्वें नसून त्यांच्या प्रकृतीच्याच गुणांमध्यें अंतर्भाव आहे गुणाची मिसळ करणारा काळ, स्वभाव आणि सूत्र (महत्तत्त्व) यांचाहि प्रकृतीमध्येंच अंतर्भाव आहे ॥ १३ ॥ आतां आपल्या मतें अठ्ठावीस तत्त्वांची व्यवस्था सांगतो–हे उद्धवा, पुरुष, प्रकृति, महत्तत्त्व, अहंकार, आकाश, वायु, तेज, जळ आणि पृथिवी हीं मी नऊ तत्त्वें सांगितलीं आहेत ॥ १४ ॥ श्रोत्र, त्वचा, चक्षु, घ्राण आणि जिव्हा हीं पांच ज्ञानेंद्रियें, वाणी, हात, पाय, गुद आणि उपस्थ हीं पांच कर्मेंद्रियें आणि ज्ञानकर्ममय मन, हीं अकरा ॥ १५ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तशींच शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध ह्या पांच विषयरूपांनीं परिणाम पावलेलीं पंचमहाभूतें आणि सत्व, रज व तम हे तीन गुण मिळून माझ्या मतें अठ्ठावीस तत्त्वें आहेत. गति, भाषण, वीर्योत्सर्ग, मलोत्सर्ग आणि कलाकौशल्य हीं कर्मेंद्रियांचीं फळें असल्यामुळें त्यांचा कर्मेंद्रियांमध्येंच अंतर्भाव जाणावा ॥ १६ ॥ याप्रमाणें पंचवीस, सव्वीस व अठ्ठावीस तत्त्वसंख्याभेदांचीं मतें सांगून आतां त्या संख्याभेद सांगणारांचें तात्पर्य दर्शवितो— श्रोत्रेंद्रियापासून गंधापर्यंत पूर्वीं सांगितलेल्या सोळा विकाररूप कार्यांना व महत्तत्त्वादिक पृथिवीपर्यंत सांगितलेल्या सात कारणांना धारण करणारी जी प्रकृति तीच या जगाच्या सृष्ट्यादिकांविषयीं गुणांच्या योगेंकरून सृज्यत्वादिक अवस्था धारण करित्ये आणि परिणामरहित व निमित्तकारणभूत असा जो पुरुष तो साक्षीपणानें तें केवळ पाहतो ह्मणून तो परिणाम पावणाऱ्या त्या प्रकृतीहून निराळा आहे

पंच दर्शयति । शब्द इति । शब्दादीनि विषयतया परिणतानि पंचमहाभूतानि । ननु गत्यादिभिस्तत्त्वाधिक्यं पक्षत्रयेऽपि स्यान्नेत्याह । गतीति । गतिश्च उक्तिश्च उत्सर्गौ च शिल्पं च तानि कर्मायतनानां कर्मेंद्रियाणां सिद्धयः फलानि न तत्त्वांतराणीत्यर्थः ॥ १६ ॥ तदेवं मतत्रयेऽपि तत्त्वसंख्याभेदं निरूप्य यद्विवक्षया गायंतीति यत्पृष्टं तत्तन्मततात्पर्यं दर्शयति । सर्गादाविति । कार्याणि षोडशविकाराः कारणानि महदादीनि सप्त तद्रूपिणी सती प्रकृतिरस्य विश्वस्य सर्गादौ गुणैः सृज्यत्वाद्यवस्थां धत्ते । उपादानकारणरूपत्वात् । पुरुषस्त्वव्यक्तो परिणामी निमित्तभूतः केवलमीक्षते । अतः परिणामिन्याः प्रकृतेः पुरुषो भिन्न इति ॥ १७ ॥ तत्त्वैरारब्धकार्यस्य तदंतर्भावमभिप्रे-

शब्दः स्पर्शो रसो गंधो रूपं चेत्यर्थजातयः ॥ गत्युक्त्युत्सर्गशिल्पानि कर्मायतनसिद्धयः ॥ १६ ॥ सर्गादौ प्रकृतिर्ह्यस्य कार्यकारणरूपिणी ॥ सत्त्वादिभिर्गुणैर्धत्ते पुरुषोऽव्यक्त ईक्षते ॥ १७ ॥ व्यक्तादयो विकुर्वाणा धातवः पुरुषेक्षया ॥ लब्धवीर्याः सृजंत्यंडं संहताः प्रकृतेर्बलात् ॥ १८ ॥ सप्तैव धातव इति तत्रार्थाः पंच खादयः ॥ ज्ञानमात्मोभयाधारस्ततो देहेंद्रियासवः ॥ १९ ॥ षडित्यत्रापि भूतानि पंचषष्ठः परः पुमान् ॥ तैर्युक्त आत्मसंभूतैः सृष्ट्वेदं समुपाविशत् ॥ २० ॥

त्याह । व्यक्तादय इति । व्यक्तादयो महदादयः प्रकृतेरुत्पन्ना ये धातवस्ते विकुर्वाणाः पुरुषेक्षणेन लब्धवीर्याः संहता अंडं सृजंति । प्रकृतेर्बलात्तामाश्रित्येत्यर्थः ॥ १८ ॥ एवं स्वमतमुपसंहृत्य मतांतरेष्वपि सामान्यतो निरूपितां घटनां विशेषतः सतात्पर्यां दर्शयति । सप्तैवेति । ज्ञानं जानातीति द्रष्टा जीवः । उभयोर्द्रष्टृदृश्ययोराधार आत्मा चेति सप्त । तत्र प्रकृत्यादीनां कारणत्वेन खादिष्वंतर्भावः । उत्तरेषामंतर्भावार्थमाह । ततस्तेभ्यः सप्तभ्यो देहेंद्रियासवः सर्वकार्याणि जायंते ॥ १९ ॥ षडिति मतेऽपि भौतिकस्य भूतांतर्भावं जीवस्य च परमात्मांतर्भावमाह । तैर्युक्त इति ॥ २० ॥

॥ १७ ॥ प्रकृतीपासून उत्पन्न होऊन, विकार पावणारीं जीं महत्तत्त्वादिक कारणें तीं प्रकृतीचा आश्रय करून, पुरुषाच्या अवलोकनानें सामर्थ्ययुक्त व परस्पर संयोगयुक्त होऊन ब्रह्मांड उत्पन्न करितात ॥ १८ ॥ याप्रमाणें आपलें मत सांगितल्यानंतर मतांतरांमध्येंहि सामान्यपणें निरूपण केलेली घटना, विशेषेंकरून तात्पर्यसहित दर्शवितो— सातच तत्त्वें असें ह्मणणारांचा अभिप्राय असा कीं, पंचमहाभूतें, ज्ञान (द्रष्टा जीव) आणि आत्मा (द्रष्ट्याचा व दृश्य जगाचा आधार ईश्वर) इतकींच तत्त्वें होत. त्यांत प्रकृति, महत्तत्त्व व अहंकार या कारणतत्त्वांचा व इंद्रिय प्राण इत्यादिक कार्यतत्त्वांचा आकाशादिकांमध्यें अंतर्भाव जाणावा ॥ १९ ॥ कितीएक सहा तत्त्वें मानितात तीं— पंचमहाभूतें व सहावा परमात्मा (पुरुष) हीं होत. त्यांत तोच परमात्मा आपल्यापासून झालेल्या त्या आकाशादिकांनीं युक्त होऊन हें ब्रह्मांड उत्पन्न

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करितो आणि त्यांत अंतर्यामित्वेंकरून प्रवेश करितो. येथें भौतिक पदार्थांचा पंचभूतांमध्यें व जीवाचा परमात्म्यामध्यें अंतर्भाव जाणावा ॥ २० ॥ आतां चारच तत्त्वें असें ह्मणतात तेथें आत्म्यापासून, झालेलीं तेज, उदक व पृथिवी हीं तीन व आत्मा चवथा हींच होत. त्या चार तत्त्वांनींच ह्या अवयवी जगाचें जन्म झालें आहे. एतावता त्या चार तत्त्वांमध्येंच सर्व कार्य कारणांचा अंतर्भाव जाणावा ॥ २१ ॥ कित्येकांच्या मतामध्यें सत्रा तत्त्वें गणिलीं आहेत, त्यांत पांच महाभूतें, शब्दादिक पांच विषय श्रोत्रादिक पांच ज्ञानेंद्रियें व एक मन यांसहवर्तमान आत्मा सत्रावा होय ॥ २२ ॥ सोळासंख्येच्या गणनेमध्येंहि पूर्वींचींच पंधरा तत्त्वें होत आणि आत्माच संकल्प करूं लागला ह्मणजे त्याला मन ह्मणतात. ह्मणून आत्मा व मन हें एकच तत्त्व होय. आतां तेराच तत्त्वें ह्मणतात तेथें पंचमहाभूतें, पंचज्ञानेंद्रियें, मन, जीव आणि आत्मा हीं समजावीं ॥ २३ ॥

अन्नं पृथ्वी आत्मनो जातानि आत्मना सह चत्वारि तत्त्वानि । अंतर्भावार्थमाह । तैरिति । अवयविनः कार्यस्य ॥ २१ ॥ भूतानि च मात्राणि च इंद्रियाणि च पंचपंच एकेन मनसा सह आत्मा सप्तदशः ॥ २२ ॥ आत्मैव संकल्पयन्मन उच्यते । त्रयोदशपक्षे भूतानि तन्मात्रैरेकीकृतानि पंचैव । इंद्रियाणि तत्प्रकाशकानि पंचैव । मनश्चैकामिंद्रियाधिष्ठातृ । आत्मा च द्विविधः । एवं त्रयोदश ॥ २३ ॥ एकादशत्वपक्षे पंचमहाभूतानि पंचेंद्रियाणि जीवमनसोश्चात्मांतर्भावेनैतान्येवैकादश । नवपक्षे अष्टौ प्रकृतयः पुरुषश्च विकाराण

चत्वार्येवेति तत्रापि तेज आपोन्नमात्मनः ॥ जातानि तैरिदं जातं जन्मावयविनः खलु ॥ २१ ॥ संख्याने सप्तदशके भूतमात्रेंद्रियाणि च ॥ पंचपंचैकमनसा आत्मा सप्तदशः स्मृतः ॥ २२ ॥ तद्वत्षोडशसंख्याने आत्मैव मन उच्यते ॥ भूतेंद्रियाणि पंचैव मन आत्मा त्रयोदश ॥ २३ ॥ एकादशत्व आत्माऽसौ महाभूतेंद्रियाणि च ॥ अष्टौ प्रकृतयश्चैव पुरुषश्च नवेत्यथ ॥ २४ ॥ इति नानाप्रसंख्यानं तत्त्वानामृषिभिः कृतम् ॥ सर्वं न्याय्यं युक्तिमत्त्वाद्विदुषां किमशोभनम् ॥ २५ ॥ उद्धव उवाच ॥ प्रकृतिः पुरुषश्चोभौ यद्यप्यात्मविलक्षणौ ॥ अन्योन्यापाश्रयात्कृष्ण दृश्यते न भिदा तयोः ॥ प्रकृतौ लक्ष्यते ह्यात्मा प्रकृतिश्च तथाऽऽत्मनि ॥ २६ ॥

तदंतर्भावः ॥ २४ ॥ उपसंहरति । इतीति । इति एभिः प्रकारैः । प्रकृतिपुरुषभेदज्ञापनायेत्यर्थः ॥ २५ ॥ ननु गुणसाम्यं प्रकृतिस्तस्याः सत्वादयो गुणा न त्वात्मन इति तयोर्भेदाप्रतीतेः कथं ज्ञातुं शक्यत इत्युद्धवः पृच्छति । प्रकृतिरिति । आत्मना जडाजडस्वभावेन विलक्षणौ । अन्योन्यापाश्रयात्प रस्परपरिहारेणाप्रतीतेरित्यर्थः । अन्योन्यापाश्रयत्वमेवाह । प्रकृताविति प्रकृतौ तत्कार्ये देवे । प्रकृतिश्चात्मनि । तेन विना तस्या अप्रतीतेः । अहमित्यभेदप्रतीतेर्न देहात्मनो भेदो लक्ष्यत इत्यर्थः ॥ २६ ॥

अकराच तत्त्वें आहेत असा पक्ष आहे तेथें आत्मा पंचमहाभूतें आणि पंचज्ञानेंद्रियें, हीं जाणावीं. नऊ तत्त्वांच्या पक्षांमध्यें पंचमहाभूतें, मन, बुद्धि, अहंकार व पुरुष अशीं समजावीं ॥ २४ ॥ याप्रमाणें ऋषींनीं तत्त्वांची निरनिराळी जी संख्या सांगितली आहे ती प्रकृतीहून पुरुष निराळा आहे असें समजण्याकरितांच आहे ती सर्व युक्तिसहित असल्यामुळें न्यायाला अनुसरूनच आहे. कारण, विद्वान् लोकांचें सांगणें वाईट कोणतें आहे ? कोणतेंच नाहीं ॥ २५ ॥ आतां प्रकृतीचेच सत्वादिक गुण आहेत आत्म्याचे नाहींत हें त्या प्रकृतिपुरुषांचा भेद समजत नसल्यामुळें कसें समजतां येईल ? असें विचारण्याकरितां उद्धव ह्मणाला कीं,– हे श्रीकृष्णा, प्रकृति व पुरुष हे दोघे जरी स्वभावानें जड व चैतन्य असल्यामुळें परस्पर भिन्न आहेत तथापि त्यांची परस्पर निराळेपणानें प्रसिद्धी नसल्यामुळें त्यांचा भेद दिसत नाहीं; ह्मणजे प्रकृतीच्या कार्यरूप देहाचेठिकाणीं हाच आत्मा आहे असें लक्षांत येतें व आत्म्याचेठिकाणीं हाच देह असें लक्षांत येतें त्यांचा परस्पर भेद लक्षांत येत नाहीं ॥ २६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तेव्हां हे कमलनयना, माझ्या हृदयामध्यें असलेला हा मोठा संशय, तूं सर्वज्ञ असल्यामुळें युक्तींविषयीं निपुण असलेल्या आपल्या वचनांनीं घालविण्याविषयीं समर्थ आहेस ॥ २७ ॥ कारण, या संसारामध्यें जीवांना यथार्थ ज्ञान तुझ्या प्रसादानेंच होतें व ज्ञानाचा भ्रंशहि तुझ्या मायेनेंच होतो आणि आपल्या मायेचा विस्तार खरोखर तूंच जाणत आहेस दुसरा कोणी जाणत नाहीं ह्मणून तूंच या संशयाचें निराकरण करावेंस ॥ २८ ॥ असा प्रश्न ऐकून, विकार अविकारांनीं, नानात्व एकत्वांनीं, सापेक्षत्व निरपेक्षत्वांनीं आणि प्रकाश अप्रकाशांनीं प्रकृतीचा व पुरुषाचा अत्यंत भेद सांगण्याकरितां श्रीभगवान् ह्मणाला—हे पुरुषश्रेष्ठा उद्धवा, महदादिरूपानें परिणाम पावणारी ती प्रकृति आणि परिणाम न पावणारा तो पुरुष असा प्रकृतिपुरुषांचा भेद स्पष्टच आहे. कसा ह्मणशील तर—प्रकृतिशब्दानें सांगितलेला हा देहेंद्रियादि समुदायरूप सर्ग, जन्मादि विकारांनीं युक्त व गुणांच्या

हृदि वर्तमानं संशयम् । नये युक्तौ नैपुणं प्रावीण्यं येषां तैः ॥ २७ ॥ अर्हसीत्युक्तं तत्र हेतुमाह । त्वत्त इति । हि यस्मात् त्वत्तस्त्वत्प्रसादादेव । अत्र ज्ञाने प्रमोषो भ्रंशश्च ते शक्तितो मायातः । ननु स्वप्रकाशस्यात्मनः कथं ज्ञानप्रमोषः ज्ञानदाने तत्प्रमोषे वा मम किं प्रयोजनं तत्राह । त्वमेवेति ॥ २८ ॥ विकाराविकाराभ्यां नानात्वैकत्वाभ्यां सापेक्षनिरपेक्षत्वाभ्यां प्रकाशाप्रकाशाभ्यां चात्यंतं भेदं वक्तुमाह । प्रकृतिः पुरुषश्चेति विकल्पोऽत्यंतभेद एव । कुत इत्यपेक्षायां प्रकृतिशब्दोक्तदेहादिसंघातस्य विका-

एवं मे पुंडरीकाक्ष महांतं संशयं हृदि ॥ छेत्तुमर्हसि सर्वज्ञ वचोभिर्नयनैपुणैः ॥ २७ ॥ त्वत्तो ज्ञानं हि जीवानां प्रमोषस्तेऽत्र शक्तितः ॥ त्वमेव ह्यात्ममायाया गतिं वेत्थ न चापरः ॥ २८ ॥ श्रीभगवानुवाच ॥ प्रकृतिः पुरुषश्चेति विकल्पः पुरुषर्षभ ॥ एष वैकारिकः सर्गो गुणव्यतिकरात्मकः ॥ २९ ॥ ममांगमायागुणमय्यनेकधा विकल्पबुद्धीश्च गुणैर्विधत्ते ॥ वैकारिकस्त्रिविधोऽध्यात्ममेकमथाधिदैवमधिभूतमन्यत् ॥ ३० ॥ दृग्रूपमार्कं वपुरत्र रंध्रे परस्परं सिद्ध्यति यः स्वतः खे ॥ आत्मा यदेषामपरो य आद्यः स्वयाऽनुभूत्याऽखिलसिद्धसिद्धिः ॥ एवं त्वगादि श्रवणादि चक्षुर्जिह्वादि नासादि च चित्तयुक्तम् ॥ ३१ ॥

रित्वं तावद्दर्शयति एष इति द्वाभ्याम् । एष सर्गः सृज्यत इति सर्गो देहादिसंघातो वैकारिको विकारवान् । अत्र हेतुः । गुणव्यतिकरात्मको गुणक्षोभकृतः ॥ २९ ॥ नानात्वमाह । ममेति । विकल्पं भेदं तद्बुद्धीश्च । अनेकधात्वं प्रपंचयति । वैकारिकोऽनेकविकारवानपि स्थूलेन मार्गेण तावत्त्रिविधः । त्रैविध्यमाह । अध्यात्ममिति । एकं रूपम् ॥ ३० ॥ तानि रूपाणि दर्शयति । दृगध्यात्मम् । रूपमधिभूतम् । अत्र रंध्रे चक्षुर्गोलके प्रविष्टमार्कं वपुरंशोधिदैवमिति । सापेक्षप्रकाशतामाह । परस्परमिति । चक्षुषा रूपं ज्ञायते । तदन्यथाऽनुपपत्त्या चक्षुः तत्प्रवृत्त्यन्यथानुपपत्त्या तदधिष्ठात्री देवता । ततश्च चक्षुषः प्रवृत्तिस्ततो रूपज्ञानमित्येवमेतत्त्रयं परस्परं सिध्यति । अत्र रंध्र इति

परस्पर मिश्रणानें केलेला आहे ॥ २९ ॥ आतां प्रकृतिकार्याला नानात्व सांगतो—हे उद्धवा, माझी गुणमयी माया, आपल्या गुणांनीं अनेकप्रकारचे भेद व भेदबुद्धि उत्पन्न करिते त्यांत प्रथम विकार पावणारा सर्गच, तीन प्रकारचा आहे. एक अध्यात्म, दुसरा अधिदैव आणि तिसरा अधिभूत ॥ ३० ॥ तीं तीनहि रूपें दर्शवितो—चक्षु अध्यात्मरूप अधिभूत आणि ह्या चक्षूच्या गोलकामध्यें प्रवेश केलेलें जें सूर्याचें स्वरूप आहे तें अधिदैव होय. या चक्षूप्रमाणेंच त्वचा, स्पर्श आणि वायु; श्रवण, शब्द आणि दिशा; जिव्हा, रस आणि वरुण; नासिक, गंध आणि अश्विनीकुमार; चित्त, चेतयितव्य आणि वासुदेव; मन, मंतव्य आणि चंद्र; बुद्धि बोद्धव्य आणि ब्रह्मा; अहंकार अहंकर्तव्य आणि रुद्र हीं समजावींत. ह्या अध्यात्मादिकांची परस्पर सापेक्षतेनें सिद्धि होत्ये; ह्मणजे चक्षु नसेल तर रूप सिद्ध होत नाहीं, रूप नसेल तर चक्षु सिद्ध

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होत नाहीं, चक्षूची प्रवृत्ति झाली नाहींतर त्याची अधिष्ठात्री देवता सिद्ध होत नाहीं, अधिष्ठात्या देवतेवांचून चक्षूची प्रवृत्ति सिद्ध होत नाहीं आणि चक्षूच्या प्रवृत्तीवांचून रूपज्ञान सिद्ध होत नाहीं. मिळून सर्वांच्या सिद्धतेविषयीं परस्परांची अपेक्षा आहे. याप्रमाणेंच त्वचावगैरे तीन तीन पदार्थांची सिद्धता जाणावी. आणि जो आकाशामध्यें मंडळरूपी सूर्य आहे तो कोणाचीहि अपेक्षा न धरितां स्वतांच सिद्ध असून आपल्या प्रकाशानें सर्वत्रांच्या चक्षूच्या अधिष्ठात्या देवतांचा जसा प्रकाशक आहे त्याप्रमाणें जो आत्मा आहे तो या अध्यात्मादिकांचें आद्यकारण असून यांच्याहून निराळा व स्वतःसिद्ध प्रकाशानें परस्पर प्रकाशक असलेल्या पूर्वोक्त अध्यात्मादिकांचा

विशेषणव्यावर्त्यमाह दृष्टांतोपयोगितया । यस्तु खे आकाशे अर्को वर्तते मंडलात्मा स तु स्वतः सिध्यति । चक्षुर्विषयत्वेऽपि प्रतियोग्यपेक्षाभावमात्रेण स्वत इत्युक्तम् । इदानीमात्मनो विकारित्वाद्यभावेन भेदमाह । यद्यस्मादात्मा एषामध्यात्मादीनामाद्यः कारणमत एकरूपोऽभिन्नश्च । तस्मादेतेभ्यो परो भिन्नः । स्वप्रकाशत्वादप्रतियाह । स्वयाऽनुभूत्या स्वतःसिद्धप्रकाशेनाखिलानां सिद्धानां परस्परप्रकाशकानामपि प्रकाशकः । सर्वेषामपि सामान्यतश्चित्प्रकाशविषयत्वात् । अतएव स्वप्रकाशत्वं सिद्धम् । चक्षुषि दर्शितं त्रैविध्यमिंद्रियांतरेष्वप्यतिदिशति । एवमिति । यथा चक्षुरेवं त्वगाद्यपीत्यर्थः । त्वक् स्पर्शो वायुरिति । श्रवणं शब्दो दिश इति । जिव्हा रसो वरुण इति । नासा गंधोऽश्विनाविति । चित्तेन युक्तमंतःकरणांतरमपि । तत्र चित्तं चेतयितव्यं वासुदेव इति । मनो मंतव्यं चंद्र इति । बुद्धिर्बोद्धव्यं ब्रह्मेति । अहंकारोऽहं कर्तव्यं रुद्र इत्येवं त्रिविधमित्यर्थः ॥ ३१ ॥ ननु पुनरपि वैलक्षण्यमात्रमेवोक्तं त्रिविधप्रपंचव्यतिरिक्तात्मप्राप्तिस्तु कुतः स्यात् । अहंकारनिवृत्त्या । तत्कुतः । त्रिविधविकल्पनिवृत्त्यैवेत्याशयेनाह ।

योऽसौ गुणक्षोभकृतो विकारः प्रधानमूलान्महतः प्रसूतः॥ अहं त्रिवृन्मोहविकल्पहेतुर्वैकारिकस्तामस ऐंद्रियश्च ॥ ३२ ॥ आत्मापरिज्ञानमयो विवादो ह्यस्तीति नास्तीति भिदार्थनिष्ठः ॥ व्यर्थोऽपि नैवोपरमेत पुंसां मत्तः परावृत्तधियां स्वलोकात् ॥ ३३ ॥

योऽसावहमहंकारः । तमेवाह । गुणक्षोभं करोतीति तथा ततः परमेश्वरात्कालाद्वा निमित्तात्प्रधानं मूलमुपादानं यस्य तस्मान्महतः प्रसूतो विकारः स त्रिवृत् त्रिविधो मोहमयस्य विकल्पस्य हेतुः । त्रिवृत्त्वमेवाह । वैकारिका इति ॥ ३२ ॥ स कुतो निवर्तते आत्माज्ञानविलसितत्वात्तज्ज्ञानेनेत्याशयेनाह । आत्मा परिज्ञानमय इति । ननु कथं मोहमयत्वं विकल्पस्याहंकारस्य वा कैश्चित्सत्यत्वांगीकारात्तत्राह । विवाद इति । अयं भिदार्थनिष्ठो विवादोऽप्यात्मा परिज्ञानमय इत्यन्वयः । यद्वा विवादः सर्वोऽपि भिदार्थनिष्ठ एव न तु वस्तुमात्रनिष्ठः । अतः परस्परं युक्तिभिरेव भेदस्य निराकृतत्वान्मोहमयत्वं सिद्धमिति । ननु यद्यहंकारो विकल्पश्च नास्ति अलं तर्हि तन्निवृत्तिप्रयासेन तत्राह । व्यर्थोऽप्यर्थरहितोऽपि स्वरूपभूतान्मत्तो बहिर्मुखानां नैवोपरमेत् । प्रत्युत तत्कृतैः कर्मभिरुच्चनीचदेहेषु ते संसरंतीति ॥ ३३ ॥

प्रकाशक आहे ॥ ३१ ॥ याप्रमाणें प्रकृतिपुरुषांचा भेद सांगून आतां त्यांच्या अभेदरूपानें असलेल्या प्रसिद्धीविषयीं कारण सांगतो-जो हा गुणाचा क्षोभ करणाऱ्या कालरूपी निमित्तानें, प्रकृति मूळकारण असलेल्या महत्तत्त्वापासून झालेला सात्विक राजस व तामस असा विकाररूपी अहंकार आहे तोच मोहमय विकल्पाचें (देव मी मनुष्य मी इत्यादिक भेदाचें) कारण आहे ॥ ३२ ॥ तो भेद कसा निवृत्त होतो ? असें ह्मणशील तर, आत्म्याच्या अज्ञानानें भासलेला तो भेद आत्मज्ञानानेंच निवृत्त होतो अन्यथा होत नाहीं. अशा आशयानें सांगतो-देहाहून निराळा, आत्मा आहे किंवा नाहीं अशा भेदाचा आश्रय धरून राहिलेला जो विवाद आहे तो आत्म्याच्या अज्ञानानेंच झालेला आहे तो वस्तुतः जरी निरर्थक आहे तथापि स्वस्वरूपभूत मज परमात्म्याहून ज्यांच्या बुद्धि बहिर्मुख झाल्या आहेत त्या पुरुषांचा कधींहि निवृत्त

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होत नाहीं. ह्मणजे ते भेद्रानें केलेल्या कर्मांच्या योगानें उच्चनीच योनींमध्यें संसारच पावतात ॥ ३३ ॥ उद्धव ह्मणाला–हे प्रभो, तुजपासून ज्यांच्या बुद्धि बहिर्मुख झाल्या आहेत ते जन, आपण केलेल्या कर्मांनीं उत्कृष्टनिकृष्ट देहांचें जसें ग्रहण करितात व जसा त्याग करितात तें मला सांग. ह्मणजे वस्तुतः व्यापक असलेल्या आत्म्याला या देहांतून त्या देहांत जाणें कसें घडतें, अकर्त्याला कर्में कशीं घडतात व नित्याला जन्ममरणें कशीं प्राप्त होतात हें अल्पबुद्धि पुरुषांनीं तर्क करण्यासहि अशक्य आहे तें हे गोविंदा, तूं मला सांग. हें जाणणारे बहुतकरून दुसरे कोणीच नाहींत. कारण– सर्वहि लोक, तुझ्या मायेनें मोहित झालेले आहेत ॥ ३४ ॥ ३५ ॥ यद्यपि नित्य आत्म्याला जन्ममरणादिक घडत नाहीं तथापि लिंगशरीराच्या अध्यासानें हें सर्व घडतें असें उत्तर सांगण्याच्या अभिप्रायानें श्रीभगवान् ह्मणाला कीं,–हे उद्धवा, पांच इंद्रियांनीं

तत्र पृच्छति । त्वत्त इति । व्यापकस्यात्मनो देहाद्देहांतरगमनमकर्तुः कर्मांणि नित्यस्य च जन्ममरणादीनि कथमिति भावः ॥ ३४ ॥ एतद्विद्वांसो न संति । हि यस्मान्मायया वंचिता मोहिताः ॥ ३५ ॥ लिंगशरीराध्यासेन सर्वं घटत इत्युत्तरमाह । मन इति प्रधानत्वेन पंचभिरिति निर्देशोऽन्येषामप्युपलक्षणार्थम् । देहाद्देहांतरं प्रतियाति । ततोऽन्य एवात्मा तन्मनोऽनुवर्तते अहंकारेणानुगच्छंति ॥ ३६ ॥ ननु मनसोऽपि पूर्वदेहवियोगो देहांतरयोगश्च कथं भवतीति चेत्स्मृतिवियोगयोगाभ्यामिति वक्तुं तयोः कारणमाह । ध्यायदिति । कर्मतंत्रत्वात्कर्मोपस्थापितान् दृष्टान्वा अनुश्रुतान्वेदोक्तान्विषयाननुध्यायत् । अथानंतरं ध्यायमानेषूद्यदाविर्भवत्पूर्वविषयेषु च लीदल्ली-

उद्धव उवाच ॥ त्वत्तः परावृत्तधियः स्वकृतैः कर्मभिः प्रभो ॥ उच्चावचान्यथा देहान् गृह्णंति विसृजंति च ॥ ३४ ॥ तन्ममाख्याहि गोविंद दुर्विभाव्यमनात्मभिः ॥ नह्येतत्प्रायशो लोके विद्वांसः संति वंचिताः ॥ ३५ ॥ श्रीभगवानुवाच ॥ मनःकर्ममयं नृणामिंद्रियैः पंचभिर्युतम् ॥ लोकाल्लोकं प्रयात्यन्य आत्मा तदनुवर्तते ॥ ३६ ॥ ध्यायन्मनोऽनु विषयान्दृष्टान्वाऽनुश्रुतानथ ॥ उद्यत्सीदत्कर्मतंत्रं स्मृतिस्तदनुशाम्यति ॥ ३७ ॥ विषयाभिनिवेशेन नात्मानं यत्स्मरेत्पुनः ॥ जंतोर्वै कस्यचिद्धेतोर्मृत्युरत्यंतविस्मृतिः ॥ ३८ ॥ जन्मत्वात्मतया पुंसः सर्वभावेन भूरिद ॥ विषयस्वीकृतिं प्राहुर्यथा स्वप्नमनोरथः ॥ ३९ ॥

यमानं भवति तदनंतरं तस्य स्मृतिः पूर्वापरानुसंधानं नश्यति ॥ ३७ ॥ ततः किमत आह । विषयेति । कर्मोपस्थापितदेवादिदेहात्यंताभिनिवेशेनात्मानं पूर्वदेहं पुनर्न स्मरेदिति यत्सैव यातनादेहाभिनिवेशेन भयशोकादेर्देवादिदेहाभिनिवेशेन वा हर्षतर्षादेर्हेतोः पूर्वदेहेऽत्यंतविस्मृतिरहंकारनिवृत्तिस्तदभिमानिनो जंतोर्जीवस्य मृत्युरुच्यते न तु देहवन्नाशः ॥ ३८ ॥ जन्म तु विषयस्य देहस्यात्मतया स्वीकृतिमभिमानं प्राहुर्न तु देहवदुत्पत्तिः । न च पुत्रादिदेहवत्प्रीत्यतिशयमात्रेण किंतु सर्वभावेनाभेदेन । अभिमानमात्रेणो

संयुक्त असलेलें हें जीवांचें कर्ममय मनच एका देहांतून दुसऱ्या देहांत किंवा एका लोकांतून दुसऱ्या लोकांत जातें तेव्हां त्या मनाहून निराळा असलेलाहि आत्मा त्या मनाशीं ऐक्य पावून त्याला अनुसरतो ह्मणजे त्याच्या जाण्यानें आपणच गेलों असें मानितो ॥ ३६ ॥ कर्माधीन असलेलें मन, देवमनुष्यादिक अनेक शरीरांच्या प्राप्तीला कारण असलेल्या कर्मांपैकीं, फलोन्मुख झालेल्या कर्मांनीं पुढें आणिलेल्या दृष्टश्रुतविषयांचें, देहांचे अंतकाळीं ध्यान करूं लागलें ह्मणजे तें ध्यानांत आलेल्या नव्या विषयांत (देहांत) प्रविष्ट होतें आणि पूर्वीच्या जुन्या विषयांतून (देहांतून) सुटतें; नंतर त्याची पूर्वपरानुसंधानरूप स्मृति नाहींशी होत्ये ॥ ३७ ॥ त्यावेळीं कर्मानें प्राप्त झालेल्या देवादिक देहावर 'हाच मी आहें असा' अत्यंत अभिनिवेश होऊन, प्राणी जो पुन्हा आपल्या देहाचें स्मरण करीत नाहींसा होतो ती ज्वररोगादिक कांहींतरी निमित्तानें झालेली पूर्वदेहाची अत्यंत विस्मृतीच (अहंकारनिवृत्तीच) जीवाचा मृत्यु असें ह्मणतात. पहा– त्यावेळीं देहाच्या नाशासारखा जीवाचा नाश होत नाहीं, तर जीव निघून जातो ॥ ३८ ॥ आणि हे उद्धवा, दुसऱ्या देहाशीं मनाचें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ऐक्य होऊन पूर्णपणें 'हा देहच मी आहें' अशा बुद्धीचें स्वप्नासारखा किंवा मनोरथासारखा जीवातें त्या नव्या देहाचा स्वीकार केला ह्मणजे त्यालाच जन्म असें ह्मणतात, त्यावेळींहि देहासारखी जीवाची उत्पत्ति होत नाहीं ॥ ३९ ॥ आतां सांगितलेल्या दृष्टांतांचें विवरण करितो– जसा स्वप्न पाहणारा किंवा मनोरथ करणारा हा जीव, त्या स्वप्नाच्या किंवा मनोरथाच्या वेळीं पूर्वींच्या आपल्या देहाचें स्मरण करीत नाहीं आणि भासलेल्या त्या पूर्वींच्याच देहाला हा अपूर्वदेह आहे असें पाहतो ॥ ४० ॥ मिळून मनाचा दुसऱ्या देहाशीं ऐक्यभाव उत्पन्न झाला ह्मणजे तेणेंकरून आत्म्यालाहि त्या देहाच्या अभिमानानें उत्तममध्यमकनिष्ठपणा प्राप्त होतो आणि नंतर जसा जीव स्वप्नामध्यें मिथ्याभूत अनेक देहांना पाहूं लागला ह्मणजे अनेकस्वरूपी भासतो किंवा जसा कुपुत्राचा पिता वस्तुतः सर्वत्र सम असतांहि पुत्राच्या अभिमानानें त्याच्या

त्पत्तिमरणयोर्दृष्टांतद्वयम् । यथा स्वप्नश्च मनोरथश्चेत्यर्थः ॥ ३९ ॥ दृष्टांतौ विवृणोति । स्वप्नमिति । तत्र वर्तमाने स्वप्नादौ । पूर्वं चेति अपूर्वमिवेति चान्वयः । पूर्वसिद्धमप्यात्मानमपूर्वमिवाद्य जातमिव पश्यतीत्यर्थः ॥ ४० ॥ उपसंहरति । इंद्रियाणामयनं मनस्तस्य देहांतराभिनिवेशेन या सृष्टिरुत्पत्तिस्तया वस्तुन्यात्मनि तदभिमानेनेदं त्रैविध्यमुत्तममध्यमनीचत्वमसदेव भातीत्यन्वयः । एवंभूत आत्मा बाह्याभ्यंतरभेदहेतुश्च भवति । बाह्यविषयानांतरान्सुखादींश्च पश्यतीत्यर्थः । यथा जनो जीवः स्वप्ने बहूनसतो जनान् देहान्कुर्वन्पश्यन् बहुरूपो भाति तद्वत् । यद्वा इदं त्रैविध्यमध्यात्मादिरूपं भाति । असज्जनकृदुष्टपुत्रोत्पादको जनः पिता स्वयं समोऽपि पुत्राभिमानतस्तदरिमित्रादिषु यथा

करितां मोठ्या भक्तीनें पूर्ण केला ॥ ११ ॥ पुढें त्याठिकाणीं ज्यांच्या बुद्धीला प्रारब्धानें भ्रंश पडला होता, ते यादव, ज्या मद्यरसानें बुद्धिभ्रष्ट होते असें मैरेयक नांवाचें सुरस मद्य यथेच्छ प्याले ॥ १२ ॥ महाभिमानी असे ते वीर अतिमद्यपानानें मत्त आणि श्रीकृष्णाच्या मायेनें मूढ झाले, त्या योगानें त्या परस्परांमध्यें मोठा कलह वाढला ॥ १३ ॥ त्यावेळीं ते यादव क्रोधानें व्याप्त होऊन मारण्यास प्रवृत्त होत्साते धनुष्य, खड्ग, भाला, गदा, तोमर, ऋष्टि हीं आयुधें घेऊन समुद्रतीरीं युद्ध करूं लागले ॥ १४ ॥ सक्रोन्मत्त झालेले ते यादव ज्यांच्यावर पताका इकडून तिकडे हालत आहेत असे रथ, हत्ती, गर्दभ, उंट, बैल, महिष मनुष्य आणि खेचरें यांना परस्परांशीं भिडवून बाणांनीं प्रहार करूं लागले. यास दृष्टांत जसे वनांत हत्ती एकमेकांवर दंतांनीं प्रहार करितात तद्वत् ॥ १५ ॥

पीयत इति पानम् । मैरेयकं मदिराविशेषम् । मधु सुरसम् । दिष्टेन दैवेन विभ्रंशितधियः । नह्यन्यथा तस्मिन्स्थाने तदुचितमिति भावः । यद्द्रवैर्यस्य द्रवै रसैः ॥ १२ ॥ कृष्णमायाविमूढानामिति मुख्यो हेतुः । संघर्षः कलहः ॥ १३ ॥ ततो युयुधुश्च ॥ १४ ॥ पतंत्य इतस्ततश्चलंत्यः पताका येषु तैरथादिभिर्मिथः समेत्य न्यहन्नघ्नन्नित्यर्थः ।

ततस्तस्मिन्महापानं पपुर्मैरेयकं मधु ॥ दिष्टविभ्रंशितधियो यद्द्रवैर्भ्रश्यते मतिः ॥ १२ ॥ महापानाभिमत्तानां वीराणां दृप्तचेतसाम् ॥ कृष्णमायाविमूढानां संघर्षः सुमहानभूत् ॥ १३ ॥ युयुधुः क्रोधसंरब्धा वेलायामाततायिनः ॥ धनुर्भिरसिभिर्भल्लैर्गदाभिस्तोमरर्ष्टिभिः ॥ १४ ॥ पतत्पताकै रथकुंजरादिभिः खरोष्ट्रगोभिर्महिषैर्नरैरपि ॥ मिथः समेत्याश्वतरैः सुदुर्मदान्न्यहन् शरैर्दद्भिरिव द्विपा वने ॥ १५ ॥ प्रद्युम्नसांबौ युधि रूढमत्सरावक्रूरभोजावनिरुद्धसात्यकी ॥ सुभद्रसंग्रामजितौ सुदारुणौ गदौ सुमित्रासुरथौ समीयतुः ॥ १६ ॥ अन्ये च ये वै निशठोल्मुकादयः सहस्रजिच्छतजिद्भानुमुख्याः ॥ अन्योऽन्यमासाद्य मदांधकारितां जघ्नुर्मुकुंदेन विमोहिता भृशम् ॥ १७ ॥ दाशार्हवृष्ण्यंधकभोजसात्वता मध्वर्बुदा माथुरशूरसेनाः ॥ विसर्जनाः कुकुराः कुंतयश्च मिथस्ततस्तेऽथ विसृज्य सौहृदम् ॥ १८ ॥ पुत्रा अयुध्यन्पितृभिर्भ्रातृभिश्च स्वस्रीयदौहित्रपितृव्यमातुलैः ॥ मित्राणि मित्रैः सुहृदः सुहृद्भिर्ज्ञातींस्त्वहन् ज्ञातय एव मूढाः ॥ १९ ॥

दद्भिर्दंतैरिव ॥ १५ ॥ मिथः समेत्येत्यस्य प्रपंचः प्रद्युम्नेत्यादिचतुर्भिः । गदौ श्रीकृष्णस्य भ्राता एकः पुत्रश्चापरस्तौ । सुमित्रारथाविति दैर्घ्यमार्षम् । असुरथनामा वा कश्चित् ॥ १६ ॥ मदांधेन मदतमसा बलात्कारिताः ॥ १७ ॥ दाशार्हादयो नव तत्तद्वंश्याः । अर्बुदा माथुराः शूरसेनाश्च तत्तद्देशीयाः ॥ १८ ॥ भ्रातृभिश्चेति भ्रात्रादिशब्दानां सप्रतियोगिवाचित्वाद्भ्रातरो मातुला इत्यादि ज्ञेयम् । मित्रैश्च मित्राणि च । अहन्हतवंतः ॥ १९ ॥

परस्परांचा युद्धप्रसंग झाला, तो असा– प्रद्युम्न आणि सांब, अक्रूर आणि भोज, अनिरुद्ध आणि सात्यकी, सुभद्र आणि संग्रामजित्, गद म्हणून श्रीकृष्णाचा बंधु होता तो आणि श्रीकृष्णाचा पुत्र गद, सुमित्र आणि सुरथ, यांना परस्परांविषयीं क्रोध उत्पन्न होऊन हे परस्परांवर तुटून पडले ॥ १६ ॥ आणि इतर जे निशठ, उल्मुक सहस्रजित्, शतजित्, भानु आदिकरून वीर होते तेहि मद्यपानमदानें परस्परांवर धांवत येऊन तमोगुणाच्या अतिशय क्रोधानें आधीन होऊन एकमेकांस मारूं लागले. कारण, कृष्णानेंच त्यांना मोह घातला होता ॥ १७ ॥ दाशार्ह, वृष्णि, अंधक, भोज, सात्वत, मधु, विसर्जन, कुकुर आणि कुंति या वंशांतील तसेच अर्बुद माथुर व शूरसेन या देशांतील ते सर्व वीर मित्रभाव सोडून एकमेकांवर प्रहार करूं लागले ॥ १८ ॥ ते असे– पित्यावर पुत्र, बंधूवर बंधु, भाच्यावर मामा, दौहित्रावर मातामह, चुलत्यावर पुतण्या, मामावर भाचा,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मित्रांवर मित्र, सुहृदांवर सुहृद, आणि ज्ञातींवर ज्ञाति, मूढ होऊन प्रहार करूं लागले ॥ १९ ॥ ह्याप्रमाणें ते यादव प्रहार करीत असतां कांहीं वेळानें त्यांचे बाण
संपून गेले, ~~धनुष्यें भग्न झालीं~~, आणि शस्त्रें क्षीण झालीं; नंतर त्यांनीं मुठींत लव्हाळयाच्या काड्या ग्रहण केल्या ॥ २० ॥ त्यासमयीं त्यांनीं मुठींत धरलेल्या त्या
काड्या वज्रतुल्य लोहदंडाप्रमाणें झाल्या व ते त्यांनींच प्रहार करूं लागले; त्यावेळीं कृष्ण त्यांस निवारण करीत होता; पण ते श्रीकृष्णासही मारूं लागले ॥ २१ ॥
हे राजा, मूढ झालेले ते यादव बलरामास शत्रु असें मानून, त्याला मारण्याचा निश्चय करून, व मारण्याविषयीं उद्युक्त होऊन त्याच्याजवळ प्राप्त झाले ॥ २२ ॥ हे
कुरुनंदना, नंतर बलराम व कृष्ण हे दोघेहि अतिक्रोधायमान होऊन लोहदंडासारख्या लव्हाळ्यांच्या मुष्टि उगारून त्या युद्धांत संचार करून मारीत सुटले ॥ २३ ॥
ते यादव ब्राह्मणांच्या शापानें ग्रस्त झाले आणि श्रीकृष्णाच्या मायेनें मोहित झाले, ह्मणून त्यांना स्पर्धानिमित्त क्रोध उत्पन्न होऊन त्यानें त्यांच्या कुलांचा निध्वंस

धन्वसु धनुःषु जन्हुर्जगृहुः ॥ २० ॥ परिघा लोहदंडाः । भृताः धृताः । तं च श्रीकृष्णमपि ॥ २१ ॥ प्रत्यनीकं प्रतिपक्षम् ॥ २२ ॥ एरका मुष्टिरूपौ परिघावुद्यम्य ॥ २३ ॥

शेरषु क्षीयमाणेषु भज्यमानेषु धन्वसु ॥ शस्त्रेषु क्षीयमाणेषु मुष्टिभिर्जन्हुरेरकाः ॥ २० ॥ ता वज्रकल्पा ह्यभवन्परिघा मुष्टिना भृताः ॥
जघ्नुर्द्विषस्तैः कृष्णेन वार्यमाणास्तु तं च ते ॥ २१ ॥ प्रत्यनीकं मन्यमाना बलभद्रं च मोहिताः ॥ हंतुं कृतधियो राजन्नापन्ना
आततायिनः ॥ २२ ॥ अथ तावपि संक्रुद्धावुद्यम्य कुरुनंदन ॥ एरका मुष्टिपरिघौ चरंतौ जघ्नतुर्युधि ॥ २३ ॥ ब्रह्मशापोपसृष्टानां
कृष्णमायावृतात्मनाम् ॥ स्पर्धाक्रोधः क्षयं निन्ये वैणवोऽग्निर्यथा वनम् ॥ २४ ॥ एवं नष्टेषु सर्वेषु कुलेषु स्वेषु केशवः ॥ अव-
तारितो भुवो भार इति मेनेऽवशेषितः ॥ २५ ॥ रामः समुद्रवेलायां योगमास्थाय पौरुषम् ॥ तत्याज लोकं मानुष्यं संयोज्या-
त्मानमात्मनि ॥ २६ ॥ रामनिर्याणमालोक्य भगवान्देवकीसुतः ॥ निषसाद धरोपस्थे तूष्णीमासाद्य पिप्पलम् ॥ २७ ॥ बिभ्र-
च्चतुर्भुजं रूपं भ्राजिष्णु प्रभया स्वया ॥ दिशो वितिमिराः कुर्वन्विधूम इव पावकः ॥ २८ ॥

स्पर्धानिमित्तः क्रोधः कुलं क्षयं निन्ये ॥ २४ ॥ २५ ॥ पौरुषं योगं परमपुरुषध्यानलक्षणम् । तमेवाह । संयोज्येति । मानुष्यं लोकं भूर्लोकं मनुष्यरूपतां वा ॥ २६ ॥ धरो-
पस्थे भूतले ॥ २७ ॥ भ्राजिष्णु रूपं बिभ्रदिति ॥ २८ ॥

केला. ~~याप्र दृष्टांत—जसा वेळूंच्या संघर्षणानें उत्पन्न झालेला अग्नि त्या वेळूंच्याच वनाला जाळून टाकितो तद्वत्~~ ॥ २४ ॥ याप्रमाणें स्वकीय सारीं कुलें नष्ट झालीं
असतां भगवान् श्रीकृष्ण ' अवशेष राहिलेला भूमीचा भार उतरला ' असें मानिता झाला ॥ २५ ॥ बलराम समुद्राच्या तीरीं पौरुषयोग (परमपुरुषाचें ध्यान)
धारण करून व परमात्म्याचेठायीं मनाचा संयोग करून भूर्लोक किंवा मनुष्यदेह सोडून गेला ॥ २६ ॥ याप्रकारें बलरामाचें निर्याण अवलोकन करून भगवान्
देवकीपुत्र पिंपळाच्या वृक्षाखालीं जाऊन भूमीवर स्वस्थ बसला ॥ २७ ॥ त्यावेळीं भगवंतानें चतुर्भुज—रूप धारण केलें होतें. भगवंताचें रूप फार देदीप्यमान
असल्यामुळें त्याच्या कांतीनें दशदिशांचा अंधकार दूर झाला. ~~ह्यास दृष्टांत—जसा धूमरहित अग्नि प्रज्वलित झाला असतां त्याच्या कांतीनें अंधकार दूर होतो तद्वत्~~ ॥ २८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भगवंताच्या वक्षःस्थलावर श्रीवत्सं[1] चिन्ह होतें, भगवंताचें स्वरूप सजल मेघाप्रमाणें कृष्णवर्ण असून त्याची कांति अग्नींत तापविलेल्या सुवर्णासारखी होती, दोन पीतांबरांनीं सुशोभित असें भगवंताचें रूप फारच सुंदर दिसत होतें ॥ २९ ॥ सुंदर व किंचित् हास्ययुक्त ज्याचें मुखकमल, नीलवर्ण केशांनीं मंडित श्वेतकमलाप्रमाणें सुंदर ज्याचे नेत्र व ज्याच्या कर्णांत मकराकार कुंडलें शोभत आहेत ॥ ३० ॥ कमरेंत कटिसूत्र, कंठांत यज्ञोपवीत, मस्तकावर किरीट, हातांत कडीं, बाहूंवर बाहुभूषणें, कंठांत हार, पायांत नूपुरें, अंगुलींत मुद्रिका, कंठांत कौस्तुभ-मणि यांनीं भगवत्स्वरूप अतिशोभायमान दिसत होतें ॥ ३१ ॥ त्याचीं अंगें वनमालेनें आच्छादित झालीं होतीं, त्याच्याजवळ आयुधें मूर्तिमान् होतीं- असा तो भगवान् कमलासारखा अरुणवर्ण डावा पाय उजव्या मांडीवर ठेऊन बसला

तदेवानुवर्णयति श्रीवत्सांकमिति चतुर्भिः ॥ २९ ॥ सुंदरस्मितं वक्त्राब्जं यस्मिंस्तत् । पुंडरीकवदभिरामे सुंदरे अक्षिणी यस्मिंस्तत् ॥ ३० ॥ ३१ ॥ वनमालापरीतान्यंगानि

श्रीवत्सांकं घनश्यामं तप्तहाटकवर्चसम् ॥ कौशेयांबरयुग्मेन परिवीतं सुमंगलम् ॥ २९ ॥ सुंदरस्मितवक्त्राब्जं नीलकुंतलमंडितम् ॥ पुंडरीकाभिरामाक्षं स्फुरन्मकरकुंडलम् ॥ ३० ॥ कटिसूत्रब्रह्मसूत्रकिरीटकटकांगदैः ॥ हारनूपुरमुद्राभिः कौस्तुभेन विराजितम् ॥ ३१ ॥ वनमालापरीतांगं मूर्तिमद्भिर्निजायुधैः ॥ कृत्वोरौ दक्षिणे पादमासीनं पंकजारुणम् ॥ ३२ ॥ मुसलावशेषायःखंडकृतेषुर्लुब्धको जरा ॥ मृगास्याकारं तच्चरणं विव्याध मृगशंकया ॥ ३३ ॥ चतुर्भुजं तं पुरुषं दृष्ट्वा स कृतकिल्बिषः ॥ भीतः पपात शिरसा पादयोरसुरद्विषः ॥ ३४ ॥ अजानता कृतमिदं पापेन मधुसूदन ॥ क्षंतुमर्हसि पापस्य उत्तमश्लोक मेऽनघ ॥ ३५ ॥ यस्यानुस्मरणं नृणामज्ञानध्वांतनाशनम् ॥ वदंति तस्य ते विष्णो मयाऽसाधु कृतं प्रभो ॥ ३६ ॥ तन्माऽऽशु जहि वैकुंठ पाप्मानं मृगलुब्धकम् ॥ यथा पुनरहं त्वेनं न कुर्यां सदतिक्रमम् ॥ ३७ ॥

यस्मिंस्तत् । निजायुधैश्च परीतांगम् । पंकजारुणं वामं पादं दक्षिण ऊरौ कृत्वा आसीनं रूपं बिभ्रदिति पूर्वेणान्वयः ॥ ३२ ॥ जरा नाम कश्चिल्लुब्धको मृगयुः । मृगास्यमिवाकारो यस्य तं चरणम् ॥ ३३ ॥ ३४ ॥ ३५ ॥ ३६ ॥ ३७ ॥

होता ॥ ३२ ॥ पूर्वीं यादवांनीं मुसळ झिजवून अवशेष राहिलेला थोडा भाग टाकून दिला; तो भाग जरानामक व्याधाला धरलेल्या माशाच्या पोटांत सांपडला; व त्यानें त्याचें बाणाग्र तयार केलें होतें. त्या व्याधानें भगवंताचें चरणकमल दुरून पाहिलें तेव्हां त्याला त्याचा आकार हरिणाच्या तोंडासारखा दिसला; आणि 'हा मृग' असें वाटून त्यानें त्याजवर त्या बाणानें वेध केला ॥ ३३ ॥ नंतर तो व्याध पुढें आला तों चतुर्भुज पुरुष श्रीकृष्ण आहे असें पाहून अपराध घडल्यामुळें फारच भ्याला व त्यानें भगवंताच्या चरणकमलीं मस्तक ठेविलें ॥ ३४ ॥ आणि प्रभूचे पाय धरून तो व्याध ह्मणाला-हे भगवंता, मधुसूदना, ह्या पाप्याच्या हातून न जाणून ही गोष्ट झाली आहे. हे उत्तमश्लोका निष्पापा, मी फार अपराधी आहें माझा अपराध क्षमा करण्याविषयीं तूं समर्थ आहेस ॥ ३५ ॥ हे प्रभो, नारायणा, ज्याचें स्मरण केलें असतां मनुष्याचा अज्ञानरूपी अंधकार दूर होतो ह्मणून पंडित सांगतात; त्या तुझें मीं फार वाईट केलें ॥ ३६ ॥ हे वैकुंठा, भगवंता ! मीं मृगलोभी व महापापी आहें ॥११८॥

---

१ उजव्या स्तनावर दक्षिणावर्त भोंवरा होता तेंच श्रीवत्स होय.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मला तूं लौकर शिक्षा कर, कीं ज्या योगानें मी अशा प्रकारचा मोठ्याचा अपराध पुन्हां कधीं हि करणार नाहीं ॥ ३७ ॥ आतां ब्राह्मणाच्या शापानें अशी गोष्ट झाली यांत तुझा अपराध नाहीं असें ह्मणशील तर— तुझ्या मायेनें रचित अशा ह्या जगाला ब्रह्मदेव, व ह्यांचे पुत्र, रुद्रादिक, व वेदांचे द्रष्टे ऋषि हे जाणत नाहींत; कारण त्यांच्या दृष्टि तुझ्याच मायेनें आच्छादित आहेत, तेव्हां ज्यांचें जन्म खरोखर पापमय आहे अशा आह्मीं तुझ्या ब्रह्मशापादिकांचें काय वर्णन करावें ! (ह्मणून लवकर माझा वध कर) ॥ ३८ ॥ भगवान् ह्मणाला—जरे (व्याधा) भिऊं नको, उठ, तूं माझी इच्छा पूर्ण केलीस. आतां मजकडून अनुज्ञा मिळालेला तूं पुण्यवानांचें स्थान अशा स्वर्गास जा ॥ ३९ ॥ स्वतःच्या इच्छानुरूप शरीर धारण करणाऱ्या (ज्यानें आपली शुद्ध सत्वमयमूर्ति गुप्त करून ज्या प्रतिमेनें हें नर-

ब्रह्मशापकृतमेतत्तव नापराध इति चेदत आह । यस्य तवात्मयोगरचितं स्वाधीनमायया रचितं विरिंचः अस्य तनया रुद्रादयश्च ये चान्ये गिरां पतयो वेदद्रष्टारस्तेऽपि न विदुस्तस्य तेऽचिंत्यमायस्य एतद्ब्रह्मशापादि अंजसा असद्गतयः पापयोनयो वयं किं गृणीमः कथं वर्णयामः । अतस्तदास्तामाशु मा जहीति भावः ॥ ३८ ॥ ३९ ॥ इच्छाशरीरि-

यस्यात्मयोगरचितं न विदुर्विरिंचो रुद्रादयोऽस्य तनयाः पतयो गिरां ये ॥ त्वन्मायया पिहितदृष्टय एतदंजः किं तस्य ते वयमसद्गतयो गृणीमः ॥ ३८ ॥ श्रीभगवानुवाच ॥ माभैर्जरे त्वमुत्तिष्ठ काम एष कृतो हि मे ॥ याहि त्वं मदनुज्ञातः स्वर्गं सुकृतिनां पदम् ॥ ३९ ॥ इत्यादिष्टो भगवता कृष्णेनेच्छाशरीरिणा ॥ त्रिः परिक्रम्य तं नत्वा विमानेन दिवं ययौ ॥ ४० ॥ दारुकः कृष्णपदवीमन्विच्छन्नधिगम्य ताम् ॥ वायुं तुलसिकामोदमाघ्रायाभिमुखं ययौ ॥ ४१ ॥ तं तत्र तिग्मद्युभिरायुधैर्वृतं ह्यश्वत्थमूले कृतकेतनं पतिम् ॥ स्नेहप्लुतात्मा निपपात पादयो रथादवप्लुत्य सबाष्पलोचनः ॥ ४२ ॥ अपश्यतस्त्वच्चरणांबुजं प्रभो दृष्टिः प्रनष्टा तमसि प्रविष्टा ॥ दिशो न जाने न लभे च शांतिं यथा निशायामुडुपे प्रनष्टे ॥ ४३ ॥ इति ब्रुवति सूते वै रथो गरुडलांछनः ॥ खमुत्पपात राजेंद्र साश्वध्वज उदीक्षतः ॥ ४४ ॥

णेत्यस्यायं भावः । शुद्धसत्त्वमयीं निजां मूर्तिमंतर्धाय तत्प्रतिकृत्यैवं विडंबनमात्रमिति । एतदेव स्फुटीकरिष्यति । देवादयो ब्रह्ममुख्या इत्यादिना ॥ ४० ॥ ४१ ॥ तं पतिं तत्र दृष्ट्वा तस्य पादयोर्निपपात ॥ ४२ ॥ ४३ ॥ उदीक्षतः उदीक्षमाणस्य सूतस्य सतः ॥ ४४ ॥

लोकाचें अनुकरण चालविलें होतें त्या—) भगवान् श्रीकृष्णानें अशी आज्ञा दिली असतां तो व्याध श्रीकृष्णाला तीन प्रदक्षिणा घालून विमानांत बसून स्वर्गलोकीं गेला ॥ ४० ॥ दारुक (कृष्णाचा सारथि) श्रीकृष्णाचा मार्ग शोधीत असतां त्याला तो मार्ग सांपडला, नंतर तो ज्या दिशेकडून तुळशीच्या सुवासानें युक्त वायु येत होता तिकडे मुख करून त्या सुगंधाचें अवघ्राण करीत पुढें चालला ॥ ४१ ॥ तों अश्वत्थमूलाचा आश्रय धरून बसलेला व ज्याच्या भोंवतीं प्रखर तेजस्वी आयुधें आहेत, असा आपला धनी कृष्ण त्याच्या दृष्टीस पडला. प्रेमामुळें त्याचें अंतःकरण गहिंवरून आलें, व नेत्रांस अश्रु-बिंदु आले, तो रथांतून उडी टाकून भगवंताचे पायां पडला व ह्मणाला ॥ ४२ ॥ हे भगवंता, तुझें चरणकमळ दिसेनासें झालें ह्मणून माझी दृष्टि नष्ट होऊन अज्ञानांत प्रविष्ट झाली. रात्रीं चंद्राचा लोप झाला असतां जशी स्थिति होते त्याप्रमाणें मला दिशांचें ज्ञान होत नाहीं. व कोठें शांति मिळत नाहीं ॥ ४३ ॥ हे राजेंद्रा, सारथी असें बोलत असतां गरुड-चिन्हानें युक्त असा तो रथ अश्व व ध्वज

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

यांसह दारुकासमक्ष आकाशांत उडाला ॥ ४४ ॥ त्याच्या मागून विष्णूचीं दिव्य आयुधें आकाशांत गेलीं; तो प्रकार पाहून दारुकाला अतिविस्मय वाटला तेव्हां श्रीकृष्ण दारुकाला ह्मणाला– ॥ ४५ ॥ हे सारथे, द्वारकेंत जा आणि ज्ञातींचें परस्परांच्या हस्तें मरण, बळरामाचें योगमार्गानें निर्याण व माझी ही अवच्छा हा सर्व प्रकार बंधूंना निवेदन कर ॥ ४६ ॥ आणि सांग की–तुह्मी आपल्या बंधूंसह द्वारकेंत राहूं नये; कारण मीं त्यागिलेल्या ह्या यदुपुरीला समुद्र बुडविणार आहे ॥ ४७ ॥ सर्व जन आपआपला परिवार व आमचे मातापितर यांना बरोबर घेऊन अर्जुनाकडून आपलें रक्षण करवीत इंद्रप्रस्थास जा (असा माझा निरोप बंधूंना कळीव) ॥ ४८ ॥ तूं तर पुत्र, द्रव्य इत्यादिकांविषयीं उदासीन राहून ज्ञानप्राप्तीकडे लक्ष ठेव, मला प्रिय असे भागवतधर्म आचरण करीत रहा, व ही सर्व विश्वरचना मायाकृत आहे असें जाणून

॥ ४५ ॥ निर्याणं योगमार्गेण । मद्दशामितीच्छाशरीराभिप्रायेण ॥ ४६ ॥ ४७ ॥ अविता रक्ष्यमाणा इंद्रप्रस्थं गमिष्यथेति ब्रूहीति पूर्वेणान्वयः ॥ ४८ ॥ मन्मायारचनामेतां विज्ञायेति निजमूर्तेरंतर्हितत्वाद्वृथा शोकं मा कुर्वित्यर्थः ॥ ४९ ॥ कुलस्य विनष्टत्वाद्दुर्मनाः ॥ ५० ॥ इति श्रीमद्भागवते एकादशस्कंधे टीकायां त्रिंशोऽध्यायः ॥ ३० ॥ ॥

तमन्वगच्छन्दिव्यानि विष्णुप्रहरणानि च ॥ तेनातिविस्मितात्मानं सूतमाह जनार्दनः ॥ ४५ ॥ गच्छ द्वारवतीं सूत ज्ञातीनां नि-
धनं मिथः ॥ संकर्षणस्य निर्याणं बंधुभ्यो ब्रूहि मद्दशाम् ॥ ४६ ॥ द्वारकायां च न स्थेयं भवद्भिश्च स्वबंधुभिः ॥ मया त्यक्तां यदु-
पुरीं समुद्रः प्लावयिष्यति ॥ ४७ ॥ स्वं स्वं परिग्रहं सर्वे आदाय पितरौ च नः ॥ अर्जुनेनाविताः सर्वे इंद्रप्रस्थं गमिष्यथ ॥ ४८ ॥
त्वं तु मद्धर्ममास्थाय ज्ञाननिष्ठ उपेक्षकः ॥ मन्मायारचनामेतां विज्ञायोपशमं व्रज ॥ ४९ ॥ इत्युक्तस्तं परिक्रम्य नमस्कृत्य पुनः
पुनः ॥ तत्पादौ शीर्ष्ण्युपाधाय दुर्मनाः प्रययौ पुरीम् ॥ ५० ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे यदुकुलसंक्षयो नाम
त्रिंशोऽध्यायः ॥ ३० ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ अथ तत्रागमद्ब्रह्मा भवान्या च समं भवः ॥ महेंद्रप्रमुखा देवा मुनयः सप्रजेश्वराः
॥ १ ॥ पितरः सिद्धगंधर्वा विद्याधरमहोरगाः ॥ चारणा यक्षरक्षांसि किन्नराप्सरसो द्विजाः ॥ २ ॥

एकत्रिंशे स्वकं धाम जगाम भगवानितः ॥ तमेवानुययुः प्रीत्या वसुदेवादयस्ततः ॥ १ ॥ देवान्यदून्विधायादौ भूयो देवान्विधाय च ॥ श्रीकृष्णः स्वेच्छया धाम स्वतन्वैव समाविशत् ॥ २ ॥ मुनयः सनकादयः । प्रजेश्वरा मरीच्यादयः ॥ १ ॥ द्विजा गरुडलोकनिवासिनः पक्षिणः मैत्रेयादयो वा ॥ २ ॥

उपसम पाव ॥ ४९ ॥ कृष्णानें असें सांगितलें असतां दारुकानें त्याला प्रदक्षिणा घालून पुनःपुनः नमस्कार केला, व चरण मस्तकीं धरून खिन्न होऊन तो द्वारकेस गेला ॥ ५० ॥ अशाप्रकारें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या एकादश स्कंधांतील यदुकुलसंक्षय नांवाचा हा तिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३० ॥ ॥ आतां ह्या एकतीसाव्या अध्यायांत श्रीकृष्ण ह्या लोकांतून निजधामाला गेला वसुदेवादिक प्रेमभावेंकरून त्याच्या मागून तिकडेच गेले, असा कथाभाग निरूपिला आहे ॥ १ ॥ प्रथम देवांना यादव करून, व नंतर पुन्हां यादवांना देव करून, श्रीकृष्ण स्वेच्छेनें आपल्या पूर्वजांसह निजधामीं प्रविष्ट झाला ॥ २ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला,–नंतर तेथें ब्रह्मदेव, भवानीसह शंकर महेंद्र आदिकरून देव, प्रजापतींसह मुनि हे प्राप्त झाले ॥ १ ॥ पितर, सिद्ध, गंधर्व, विद्याधर, मोठमोठे सर्प, चारण, यक्ष, राक्षस, किन्नर,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हो.

अप्सरा गरुडलोक निवासी पक्षी, ॥ २ ॥ भगवंताचें निर्याण अवलोकन करण्यासाठीं अत्यंत उत्सुक होऊन त्याठिकाणीं प्राप्त झाले; व गायन करीत कृष्णाचीं चरित्रें व अवतार वर्णूं लागले ॥ ३ ॥ हे राजा, अत्यंत भक्तीनें युक्त अशा त्या लोकांनीं फुलांची वृष्टि केली—आणि विमानांच्या ओळींनीं आकाश व्याप्त करून सोडिलें ॥ ४ ॥ भगवान् ब्रह्मदेवाकडे आणि इंद्रादि आपल्या विभूतींकडे अवलोकन करून परमात्मरूपीं चित्त एकाग्र लावून आपले कमलासारखे नेत्र मिटते झाले. त्याचा भाव असा कीं— पूर्वी ब्रह्मदेवांनीं लोकपालांसह आमचें रक्षण कर अशी प्रार्थना केली होती व आतां ते सर्व देव आपल्याला स्वलोकीं घेऊन जाण्यासाठीं आले आहेत; त्या सर्वांनाच निःपक्षपातपणा दाखविला पाहिजे ह्यासाठीं त्यांची वंचना करण्याकरितां समाधि लावण्याचें निमित्त करून भगवान् डोळे मिटून बसले ॥ ५ ॥ लोकांना सर्वतोपरी रमविण्यास

भगवतो निर्याणं द्रष्टुकामाः संतः परमोत्सुकास्तत्रागमन् । तेषामौत्सुक्यकृतं महोत्सवमाह सार्धेन । गायंतश्चेति ॥ ३ ॥ ४ ॥ विभूतीरिंद्रादींश्च । पद्मनेत्रे न्यमीलयदित्यत्रायं भावः । पूर्वं ब्रह्मादिभिः, सलोकान् लोकपालान्नः पाहि वैकुंठ किंकरानिति प्रार्थितत्वादिदानीं च स्वं स्वं लोकं प्रति नेतुमागतत्वाद्बहुषु च तेषु दाक्षिण्यात्तान्वंचयितुं समाधिमिव कुर्वन्नेत्रे न्यमीलयदिति ॥ ५ ॥ योगिनामिव स्वच्छंदमृत्युभ्रमं वारयति । लोकाभिरामामिति । अयमर्थः । योगिनो हि स्वच्छंदमृत्यवः स्वां तनुमाग्नेय्या योगधारणया दग्ध्वा लोकांतरं प्रविशंति भगवांस्तु न तथा किंत्वदग्ध्वैव स्वतनुसहित एव स्वकं धाम वैकुंठाख्यमविशत् । तत्र हेतुः । लोकाभिरामां लोकानामभिरामोऽभितो रमणं स्थितिर्यस्यां ताम् ।

द्रष्टुकामा भगवतो निर्याणं परमोत्सुकाः ॥ गायंतश्च गृणंतश्च शौरेः कर्माणि जन्म च ॥ ३ ॥ ववृषुः पुष्पवर्षाणि विमानावलिभिर्नभः ॥ कुर्वंतः संकुलं राजन् भक्त्या परमया युताः ॥ ४ ॥ भगवान्पितामहं वीक्ष्य विभूतीरात्मनो विभुः ॥ संयोज्यात्मनि चात्मानं पद्मनेत्रे न्यमीलयत् ॥ ५ ॥ लोकाभिरामां स्वतनुं धारणाध्यानमंगलम् ॥ योगधारणयाऽऽग्नेय्याऽदग्ध्वा धामाविशत्स्वकम् ॥ ६ ॥ दिवि दुंदुभयो नेदुः पेतुः सुमनसश्च खात् ॥ सत्यं धर्मो धृतिर्भूमेः कीर्तिः श्रीश्चानु तं ययुः ॥ ७ ॥ देवादयो ब्रह्ममुख्या न विशंतं स्वधामनि ॥ अविज्ञातगतिं कृष्णं ददृशुश्चातिविस्मिताः ॥ ८ ॥

जगदाश्रयत्वेन जगतोऽपि दाहप्रसंगादित्यर्थः । किंच धारणाया ध्यानस्य च मंगलं शोभनम् । विषयमितरथा तयोर्निर्विषयत्वं स्यात् दृश्यते चाद्यापि तदुपासकानां तथैव तद्रूपसाक्षात्कारः फलप्राप्तिश्चेति भावः । इच्छाशरीराभिप्रायेण वा यथाश्रुतमेवास्तु तत्रापि तु लोकाभिरामामित्यादीनां विशेषणानामानर्थक्यप्रसंगात्तदप्यदग्ध्वा तिरोधाय निर्गत इत्येव सांप्रतम् ॥ ६ ॥ तदा स्वं स्वमेव लोकमागमिष्यतीति संभ्रमेण देवादिकृतः सर्वतो दुंदुभिनादपुष्पवृष्ट्यादिमहोत्सवोऽभवदित्याह । दिवीति । भूमेः सकाशात् । श्रीकृष्णमनु ययुः ॥ ७ ॥ तदा श्रीकृष्णेंऽतर्हिते सति कुतो गत इति वितर्कयंतोऽपि ब्रह्ममुख्या देवादयः स्वधामनि विशंतं श्रीकृष्णं न ददृशुः ।

व धारणेच्या योगें ध्यानाचा चांगला विषय अशा आपल्या शरीराला अग्नीच्या योगधारणेनें दग्ध न करितां भगवान् आपल्या लोकीं गेला. योग्यांना स्वच्छंदानें मृत्यु स्वीकारितां येतो, ते अग्निधारणा करून देह जाळून लोकांतरीं जातात, भगवंतानें भक्तजनांना ध्यानाला विषय मिळावा व साक्षात्कार घडावा ह्यासाठीं आपल्या शरीराचें दहन केलें नाहीं भक्त अद्यापि त्या मूर्तीचें ध्यान करितात व त्यांना साक्षात्कारहि घडतो ॥ ६ ॥ त्याप्रसंगीं स्वर्गामध्यें नौबदी वाजल्या, आकाशांतून पुष्पवृष्टि झाली. कृष्णाच्या मागून सत्य, धर्म, धृति, कीर्ति व लक्ष्मी हीं भूमीवरून निघून गेलीं ॥ ७ ॥ ज्याची गति कोणाला समजत नाहीं. तो श्रीकृष्ण स्वधामीं प्रविष्ट होत असलेला ब्रह्मदेवादि देवांना दिसला नाहीं. म्हणून ते आश्चर्यानें थक्क होऊन राहिले ॥ ८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ज्याप्रमाणें आकाशांत वीज अभ्रमंडल सोडून जात असतां तिची गति मनुष्यांना कळत नाहीं. तशी कृष्णाची गति देवतांना कळली नाहीं ॥ ९ ॥ ब्रह्मदेव, शंकर इत्यादि ते हरीची योगगति पाहून विस्मय पावले व तिची वाखाणणी करीत आनंदानें आपापल्या लोकांमध्यें गेले ॥ १० ॥ हे राजा, परमेश्वर यादवांमध्यें शरीर धारण करून तें गुप्त करिता झाला व त्याच्या योगें त्यानें अनेक लीला केल्या हें जसें नट सोंगें घेतो तसें त्यानें मायेच्या योगें केलेलें अनुकरण जाण. तो स्वतः हें विश्व उत्पन्न करून त्यामध्यें प्रविष्ट होत्साता विहार करितो व अंतीं संहार करून स्वतांच्या महिम्यानें उपराम पावलेला असतो ॥ ११ ॥ ज्यानें मनुष्यरूपानें यमलोकास नेलेला

तत्र हेतुः । अविज्ञानगतिमिति । क्वचित्क्वचिद्ददृशुश्च ततोऽतिविस्मिता बभूवुरित्यर्थः ॥ ८ ॥ अविज्ञातगतित्वं दृष्टांतेन स्पष्टयति । सौदामन्या गतिर्यथा मर्त्यैर्न लक्ष्यते देवैस्तु लक्ष्यते तथा भूमंडलं हित्वा गच्छतः श्रीकृष्णस्य गतिर्देवैरपि न लक्ष्यते किंतु तत्पार्षदैरेवेत्यर्थः ॥ ९ ॥ १० ॥ अभिप्रायापरिज्ञानात्प्रथमं परिक्लिष्टं ततश्च दृष्टांतेन स्पष्टमुक्ते हृष्टं दृष्ट्वा पुनस्तमेवार्थं प्रपंचयति राजन्निति त्रिभिः । परस्य सर्वकारणस्य तनुभृत्सु यादवादिषु जननाप्ययेहाः आविर्भावतिरोभावरूपाश्चेष्टा मायया अनुकरणमात्रमवेहि । नटो यथा विकृत एव नानारूपैर्जन्मादीन्विडंबयति तद्वत् । आस्तां तावद्यादवादिषु जन्मादिशंका यावद्विश्वसर्गनिरोधादिष्वप्यसावविकृत एवास्त इत्याह । सृष्ट्वेति । आत्मना स्वयमेवेदं जगत्सृष्ट्वांऽतर्यामित्वेनानुविश्य आत्ममहिना स्वमहिम्ना उपरत आस्ते ॥ ११ ॥ न पुनरन्यथा मंतव्यं यतोऽस्मिन्नेवावतारे तत्प्रभावो निरतिशयो दृष्ट इत्याह ।

सौदामन्या यथाकाशे यांत्या हित्वाऽभ्रमंडलम् ॥ गतिर्न लक्ष्यते मर्त्यैस्तथा कृष्णस्य दैवतैः ॥ ९ ॥ ब्रह्मरुद्रादयस्ते तु दृष्ट्वा योगगतिं हरेः ॥ विस्मितास्तां प्रशंसंतः स्वं स्वं लोकं ययुस्तदा ॥ १० ॥ राजन्परस्य तनुभृज्जननाप्ययेहा मायाविडंबनमवेहि यथा नटस्य ॥ सृष्ट्वाऽऽत्मनेदमनुविश्य विहृत्य चांते संहृत्य चात्ममहिनोपरतः स आस्ते ॥ ११ ॥ मर्त्येन यो गुरुसुतं यमलोकनीतं त्वां चानयच्छरणदः परमास्त्रदग्धम् ॥ जिग्येऽतकांतकमपीशमसावनीशः किं स्वावने स्वरनयन्मृगयुं सदेहम् ॥ १२ ॥ तथाऽप्यशेषस्थितिसंभवाप्ययेष्वनन्यहेतुर्यदशेषशक्तिधृक् ॥ नैच्छत्प्रणेतुं वपुरत्र शेषितं मर्त्येन किं स्वस्थगतिं प्रदर्शयन् ॥ १३ ॥

मर्त्येनेति । यमेन स्वलोकं प्रति नीतं गुरुसुतं मर्त्येन तेनैव शरीरेण य आनयदानीतवान् । शरणदः शरणागतरक्षकस्त्वां च ब्रह्मास्त्रदग्धं यो रक्षितवान् । यश्चांतकानामंतकमपि ईशं श्रीरुद्रं बाणसंग्रामे जितवान् । मृगयुं लुब्धकं सदेहं स्वः स्वर्गमनयन्निन्ये । असौ स्वावने स्वरक्षणे अनीशोऽसमर्थः किम् ॥ १२ ॥ ननु यदि समर्थस्तर्हि किंचित्कालमत्रैव तेनैव वपुषा किं नातिष्ठत्तत्राह । तथापीति । यद्यप्युक्तप्रकारेणाशेषस्य जगतश्चराचरस्य स्थित्यादिष्वनन्यहेतुर्निरपेक्ष एव कारणं स्वयं यद्यस्मादशेषशक्तिधृक् तथापि यादवान् संहृत्य निजं वपुरत्र शेषितमवशेषितं प्रणेतुं कर्तुं नैच्छत् किंतु स्वमेव लोकमनयत् । तत्र हेतुः । मर्त्येन देहेन किं न किंचित्कार्यमिति स्वस्थानामात्मनिष्ठानां दिव्यां गतिमेव प्रकृष्टां दर्शयन् । अन्यथा तेऽपि दिव्यां गतिमनादृत्य योगबलेन देहसिद्धिं विधायात्रैव रंतुं यतेरंस्तन्माऽभूदित्येतदर्थमिति भावः ॥ १३ ॥

गुरूचा पुत्र परत आणिला, ज्या शरणागतरक्षकानें ब्रह्मास्त्रानें दग्ध झालेल्या तुला रक्षिलें, ज्यानें मृत्यूचाहि मृत्यु अशा शंकरालाहि जिंकिलें आणि जो पारध्याला देहासह स्वर्गास नेता झाला. तो स्वतांचें रक्षण करण्यास असमर्थ असेल का ? ॥ १२ ॥ तर मग तो कांहीं कालपर्यंत येथेंच कां राहिला नाहीं ? तर त्याचेंहि कारण सांगतों— जरीहि पूर्वोक्त प्रकारानें तो प्रभु जगाचें उत्पत्तिस्थिति लय करण्यास निरपेक्ष कारण आहे; कारण, तो सकल शक्तिधारी आहे; तथापि यादवांचा संहार केल्यावर आपलें शरीर येथें अवशिष्ट राखावें अशी त्यानें इच्छा केली नाहीं. कारण, पुढें मनुष्यशरीरानें कांहीं कर्तव्यभाग नव्हता. व त्याला आत्मनिष्ठलोकांना दिव्य गति दाखवावयाची ॥१२॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हो[illegible] ॥ जो पुरुष प्रातःकाळीं उठून शुद्ध होऊन भक्तीनें कृष्णाच्या ह्या दिव्य गतीचें कीर्तन करितो, तो पुरुष त्याच
विरह झाला असतां दारुक द्वारकेंत येऊन वसुदेवाच्या आणि उग्रसेनाच्या पायां पडला व त्यांच्या चरणांस अश्रुजलांनीं
सर्व यादवांच्या मरणाचा वृत्तांत सांगितला तो ऐकून लोकांचीं हृदयें विदारण झालीं व ते शोकमूर्छित होऊन पडले ॥ १६
मुखावर प्रहार करीत ज्याठिकाणीं यादव मरून पडले होते, तेथें त्वरित प्राप्त झाले ॥ १६ ॥ देवकी, रोहिणी तसाच वसुदे
म्हणून तीं अगदीं व्याकुल होऊन मूर्छित पडलीं. त्यांची आत्मस्मृति नष्ट झाली ॥ १८ ॥ भगवंताच्या विरहानें व्याकुल अशा त

य एतामुक्तप्रकाराम् । पदवीं गतिम् ॥ १४ ॥ तदैव भगवता स्वलोकं गच्छता वसुदेवादीनामपि तत्प्राप्तये उपायश्चिंतित अ

य एतां प्रातरुत्थाय कृष्णस्य पदवीं पराम् ॥ प्रयतः कीर्तयेद्भक्त्या तामेवाप्नोत्यनुत्तमाम् ॥ १४
ग्रसेनयोः ॥ पतित्वा चरणावस्रैर्न्यषिंचत्कृष्णविच्युतः ॥ १५ ॥ कथयामास निधनं वृष्णीनां कृत्स्
नाः शोकविमूर्च्छिताः ॥ १६ ॥ तत्र स्म त्वरिता जग्मुः कृष्णविश्लेषविह्वलाः ॥ व्यसवः शेरते
देवकी रोहिणी चैव वसुदेवस्तथा सुतौ ॥ कृष्णरामावपश्यंतः शोकार्ता विजहुः स्मृतिम् ॥ १८
रहातुराः ॥ उपगुह्य पतींस्तात चितामारुरुहुः स्त्रियः ॥ १९ ॥ रामपत्न्यश्च तद्देहमुपगुह्याग्निमा
म्नादीन् हरेः स्नुषाः ॥ कृष्णपत्न्योऽविशन्नग्निं रुक्मिण्याद्यास्तदात्मिकाः ॥ २० ॥ अर्जुनः प्रेय
आत्मानं सांत्वयामास कृष्णगीतैः सदुक्तिभिः ॥ २१ ॥ बंधूना नष्टगोत्राणामर्जुनः सांपरायिकम्
नुपूर्वशः ॥ २२ ॥ द्वारकां हरिणा त्यक्तां समुद्रोऽप्लावयत्क्षणात् ॥ वर्जयित्वा महाराज श्रीमद्भगव
तस्तत्र भगवान्मधुसूदनः ॥ स्मृत्याऽशेषाशुभहरं सर्वमंगलमंगलम् ॥ २४ ॥

॥ १७ ॥ कृष्णरामौ सुतावपश्यंतः ॥ १८ ॥ १९ ॥ २० ॥ सदुक्तिभिः सत्योऽवितथा उक्तयो येषु तैः । नाहं प्रकाशः सर्वस्य योगम
नाति लोको मामजमव्ययमित्यादिभिः ॥ २१ ॥ नष्टगोत्राणां नष्टसंततीनाम् । सांपरायिकं पिंडोदकादि ॥ २२ ॥ २३ ॥ २४ ॥

आलिंगन देऊन चितेवर आरोहण करित्या झाल्या ॥ १९ ॥ रामपत्न्यांनीं त्याचा देह आलिंगून अग्निप्रवेश केला. वसुदेवपत्न्यांनीं त्याच
च्या सुनांनीं प्रद्युम्नादिकांच्या शरीरांना आलिंगून अग्नींत प्रवेश केला. रुक्मिण्यादि कृष्णपत्न्याहि त्याच्याकडे चित्त लावून अग्नींत प्रविष्ट
प्रियमित्राच्या विरहामुळें व्याकुल झाला; पण तो कृष्णानें गायिलेल्या अबाधित गीतावचनांच्या योगें आत्म्याचें सांत्वन करून घेता झाल
त्या मृतबंधूंचें पिंडोदकादि कार्य यथाशास्त्र क्रमानें अर्जुन करविता झाल[illegible] ॥ महाराज, श्रीहरीनें द्वारकेचा त्याग केल्याबरोबर एक
न्भगवंताचें मंदिर सोडून बाकी सारी बुडवून टाकिली ॥ २३ ॥ स्मृति[illegible]ाऱ्या अशुभांचा नाश करणाऱ्या व सर्व मंगलांहून मंग

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मधुसूदनाचें नित्य सान्निध्य आहे ॥ २४ ॥ अर्जुन, मृतांतून अवशिष्ट जे गति त्याणणी त्या स्त्रिया, बाल, वृद्ध ह्यांना घेऊन इंद्रप्रस्थांत गेला
करविला ॥ २५ ॥ हे राजा, अर्जुनाकडून ज्ञातिवधवृत्तांत ऐकून तुझे लीला पांडव तुला वंशाला आधार करून ठेवून सगळे महापथ

॥ २५ ॥ २६ ॥ आदित आरभ्य श्रीकृष्णचरितकीर्तनस्य फलमाह य एतदिति द्वाभ्याम् ॥ २७ ॥ शंतमानि परममंगलानि । परमहंस

स्त्रीबालवृद्धानादाय हतशेषान्धनंजयः ॥ इंद्रप्रस्थं समावेश्य वज्रं तत्राभ्यषेचयत् ॥ २५ ॥ श्रु
महाः ॥ त्वां तु वंशधरं कृत्वा जग्मुः सर्वे महापथम् ॥ २६ ॥ य एतद्देवदेवस्य विष्णोः क
मर्त्यः सर्वपापैः प्रमुच्यते ॥ २७ ॥ इत्थं हरेर्भगवतो रुचिरावतारवीर्याणि बालचरितानि च शं
गृणन्मनुष्यो भक्तिं परां परमहंसगतौ लभेत ॥ २८ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादश
कादशस्कंधे एकत्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३१ ॥ ॥ समाप्तोऽयमेकादशः स्कंधः ॥ ॥ श्रीकृष्णा

दशस्कंधभावार्थस्य प्रदीपिका ॥ स्वाज्ञानध्वांतभीतेन श्रीधरेण प्रकाशिता ॥ १ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्य
स्वामिविरचितायां श्रीभावार्थदीपिकायां टीकायामेकत्रिंशोऽध्यायः ॥ ३१ ॥ ॥ समाप्तोऽयमेकादशः स्कंधः ॥ ११ ।

धिदेव विष्णूचें हें जन्म व हीं चरित्रें श्रद्धेनें कीर्तन करितो, तो सर्व पापांपासून मुक्त होतो ॥ २७ ॥ अशाप्रकारें ह्या व दु
अत्यंत कल्याणकारक अशीं हीं सुंदर अवतारचरित्रें व बाललीला जो मनुष्य श्रवण करील, त्याला परमहंसांनीं प्राप्य अशा भ
अ ... श्रीमद्भागवताख्य महापुराणाच्या एकादशस्कंधांतील भेरावदंतधर्मनिरूपणनामक हा एकतिसावा अध्याय समाप्त झा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्मटला ह्मणजे

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ श्रीगणेशाय नमः ॥ ॥ आतां ह्या बाराव्या स्कंधामध्यें तेरा अध्यायांनीं जगाच्या आश्रयाचें वर्णन केलें आहे. आश्रय म्हटला म्हणजे जगाच्या उत्पत्तीचें कारण व लयाचा अवधि जो ईश्वर तो होय. त्या ईश्वराचें या स्कंधांत प्राकृत व आत्यंतिक प्रळयांच्या वेळीं अवधित्वानें व महापुरुषवर्णनाच्या वेळीं उत्पत्तीच्या कारणत्वानें वर्णन केलें आहे. त्यांत या स्कंधाच्या पहिल्या सहा अध्यायांनीं आश्रयभूत ईश्वराचीं बहुतेक लक्षणें श्रीशुकांनीं परिक्षितीस सांगितलीं आहेत. बाकी राहिलेलीं लक्षणें शौनकादिकांनीं प्रश्न केलेल्या सूतानें, बाकीच्या (सात) अध्यायांनीं सांगितलीं आहेत. त्यांत पहिल्या चार अध्यायांनीं, आपल्या आश्रयाचें (परमेश्वराचें) श्रवण करण्याविषयीं विचारी श्रोत्यानें विलंब लावूं नये असें हें काळाचें वैषम्य सांगितलें आहे. त्यांतहि पहिल्या अध्यायांत कळीच्या प्रभावेंकरून संकरादिकांच्या योगानें मलिन

॥ श्रीगुरुगणेशांबिकाभ्यो नमः ॥ ॥ जयंति श्रीपरानंदकृपापांगलसदृशः ॥ या नित्यमनुवर्तंते संपदो विगतापदः ॥ १ ॥ उक्तस्त्रयोदशाध्यायैर्द्वादशे त्वाश्रयः सतः ॥ अधिष्ठानावधित्वाभ्यामाश्रयश्चेश्वरः सतः ॥ २ ॥ उक्तो लयावधित्वेन प्राकृतात्यंतिके लये ॥ अधिष्ठानतया चोक्तो महापुरुषवर्णने ॥ ३ ॥ तत्रादौ षड्भिरध्यायैः शुकः प्राह परीक्षिते ॥ शेषैस्तत्राखिलान्याह सूतः पृष्टोऽथ सप्तभिः ॥ ४ ॥ स्वाश्रयश्रवणे कार्यो न विलंबो मनीषिणा ॥ इत्येतत्कालवैषम्यं चतुर्भिस्तावदुच्यते ॥ ५ ॥ तत्र तु प्रथमे भाविमागधान्वयभूमिपान् ॥ कलिप्रभावतः प्राह संकरादिमलीमसान् ॥ ६ ॥ एवंभूते सोमवंशे मुकुंदस्वैरक्रीडा वर्णिताऽथो स एव ॥ वंशो भावी वर्ण्यते कृष्णभक्तिं

॥ ॐनमो भगवते वासुदेवाय ॥ ॥ राजोवाच ॥ स्वधामानुगते कृष्णे यदुवंशविभूषणे ॥ कस्य वंशोऽभवत्पृथ्व्यामेतदाचक्ष्व मे मुने ॥ १ ॥ श्रीशुक उवाच ॥ योंऽत्यः पुरंजयो नाम भाव्यो बार्हद्रथो नृपः ॥ तस्यामात्यस्तु शुनको हत्वा स्वामिनमात्मजम् ॥ २ ॥ प्रद्योतसंज्ञं राजानं कर्ता यत्पालकः सुतः ॥ विशाखयूपस्तत्पुत्रो भविता राजकस्ततः ॥ ३ ॥

मुक्त्वा मुक्त्यै वर्त्म नास्तीति वक्तुम् ॥ ७ ॥ तदेवं वैवस्वतमनुवंशे सोमवंशप्रस्तावेन श्रीकृष्णावतारचरितानि सप्रपंचमनुवर्णितानि । अथेदानीं भावी सोमवंशः कलौ विजातीयसंकरादिमलीमसो वैराग्यद्वारा श्रीकृष्णैकभक्तिनिगमनायानुवर्ण्यते । तत्र तु सोमवंशशाखासु चिरकालानुवर्तितया मागधवंशोऽनुक्रम्यते । तत्र पूरोर्वंशे उपरिचरो वसुस्तस्य बृहद्रथस्तस्य जरासंधस्तस्य सहदेवः पुत्रोऽभूदित्युक्तं नवमस्कंधे । तत्रैव सहदेवान्मार्जारिस्ततः श्रुतश्रवा इत्यादयो रिपुंजयांता विंशतिर्भाविनो राजानो निरूपिताः तत्र राजा पृच्छति । स्वधामेति ॥ १ ॥ इदानीं तदुपरितनं वंशं संकरादिदोषैः प्रपंचयति । योंऽत्य इति । रिपुंजय एव पुरंजयः । स्वामिनं पुरंजयं हत्वा स्वपुत्रं प्रद्योतसंज्ञं राजानं करिष्यति । यस्य पालको नाम सुतो भविष्यति ॥ २ ॥ ३ ॥

(भ्रष्ट) झालेल्या मागधवंशांतील भावी राजांचें वर्णन केलें आहे ॥ १ ॥ याप्रमाणें वैवस्वतमनूच्या वंशामध्यें सोमवंशाच्या प्रस्तावानें श्रीकृष्णाचीं अवतारचरित्रें सविस्तर सांगितलीं. आतां वैराग्यद्वारा श्रीकृष्णाच्या केवळ भक्तीचेंच निगमन करण्याकरितां कलियुगांत विजातीय लोकांच्या संकरादिकानें मळकट झालेल्या पुढील सोमवंशाचें वर्णन करितो. त्यांत पूरूच्या वंशामध्यें उपरिचरवसूपासून सहदेवापर्यंत व त्या सहदेवापासून रिपुंजयापर्यंत वीस राजे पूर्वीं (नवमस्कंधांत) जे सांगितले त्याविषयीं परीक्षित् राजा प्रश्न करीत ह्मणाला कीं,–हे मननशीला शुकाचार्या, यदुकुलाला अलंकाररूप असा भगवान् श्रीकृष्ण, निजधामास गेला असतां ह्या पृथ्वीवर कोणाचा वंश झाला ? हें मला सांग ॥ १ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, बृहद्रथाच्या वंशांत जो शेवटचा पुरंजयनामक राजा होईल ह्मणून सांगितलें तो झाला ह्मणजे त्याचा शुनक नांवचा प्रधान, आपल्या स्वामीला (पुरंजयराजाला) मारून त्याच्या गादीवर आपल्या प्रद्योतनामक पुत्राला बसवील. त्याचा पालकनामक पुत्र

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होईल. त्याचा पुत्र विशाखयूप, त्याचा पुत्र राजक होईल ॥ २ ॥ ३ ॥ आणि त्या राजकाचा नंदिवर्धननामक पुत्र राजा होईल. हे राजा, प्रद्योतन नांवाचे हें पांच राजे, एकशें अडतीस वर्षेंपर्यंत पृथ्वीचें पालन करितील ॥ ४ ॥ नंतर, त्या नंदिवर्धनापासून शिशुनाग, त्याचा पुत्र काकवर्ण, त्याचा पुत्र क्षेमधर्मा व त्या क्षेमधर्म्याचा पुत्र क्षेत्रज्ञ होईल ॥ ५ ॥ त्या क्षेत्रज्ञाचा पुत्र विधिसार, त्याचा अजातशत्रु होईल. त्याचा पुत्र दर्भक, दर्भकाचा अजय होईल ॥ ६ ॥ अजयाचा नंदिवर्धन व त्याचा पुत्र महानंदिनामक होईल. हे राजा, हे शिशुनागादिक दहा राजे कलियुगांत तीनशें साठ वर्षेंपर्यंत पृथ्वीचें राज्य करितील. हे कुरुकुलश्रेष्ठा, पुनः त्या महानंदीला शूद्रीच्या दर्भापासून झालेला कोणीएक नंदनामक पुत्र होईल; तो महाबलिष्ठ व महापद्मसंख्याक सेनेचा किंवा धनाचा अधिपति होऊन तो क्षत्रियांचा नाश करणारा

प्रद्योतनाः प्रद्योतसंज्ञाः ॥ ४ ॥ ५ ॥ ६ ॥ ७ ॥ ८ ॥ नंदो नाम कश्चिन्महापद्मसंख्यायाः सेनाया धनस्य वा पतिर्भविष्यति । अतएव महापद्म इत्यपि तस्य नाम ॥ ९ ॥ एकमेव छत्रं यस्यां तां पृथिवीं शासिष्यति पालयिष्यति । क्षत्रोत्सादने दृष्टांतः । भार्गवः परशुराम इव ॥ १० ॥ समाः संवत्सरान् ॥ ११ ॥ नवनंदान्नंदं च तत्पुत्रांश्चेत्येवं

नंदिवर्धनस्तत्पुत्रः पंच प्रद्योतना इमे ॥ अष्टत्रिंशोत्तरशतं भोक्ष्यंति पृथिवीं नृपाः ॥ ४ ॥ शिशुनागस्ततो भाव्यः काकवर्णस्तु तत्सुतः ॥ क्षेमधर्मा तस्य सुतः क्षेत्रज्ञः क्षेमधर्मजः ॥ ५ ॥ विधिसारः सुतस्तस्याजातशत्रुर्भविष्यति ॥ दर्भकस्तत्सुतो भावी दर्भकस्याजयः स्मृतः ॥ ६ ॥ नंदिवर्धन आजेयो महानंदिः सुतस्ततः ॥ शिशुनागा दशैवैते षष्ट्युत्तरशतत्रयम् ॥ ७ ॥ समा भोक्ष्यंति पृथिवीं कुरुश्रेष्ठ कलौ नृपाः ॥ महानंदिसुतो राजन् शूद्रीगर्भोद्भवो बली ॥ ८ ॥ महापद्मपतिः कश्चिन्नंदः क्षत्रविनाशकृत् ॥ ततो नृपा भविष्यंति शूद्रप्रायास्त्वधार्मिकाः ॥ ९ ॥ स एकछत्रां पृथिवीमनुल्लंघितशासनः ॥ शासिष्यति महापद्मो द्वितीय इव भार्गवः ॥ १० ॥ तस्य चाष्टौ भविष्यंति सुमाल्यप्रमुखाः सुताः ॥ य इमां भोक्ष्यंति महीं राजानः स्म शतं समाः ॥ ११ ॥ नवनंदान्द्विजः कश्चित्प्रपन्नानुद्धरिष्यति ॥ तेषामभावे जगतीं मौर्या भोक्ष्यंति वै कलौ ॥ १२ ॥ स एव चंद्रगुप्तं वै द्विजो राज्येऽभिषेक्ष्यति ॥ तत्पुत्रो वारिसारस्तु ततश्चाशोकवर्धनः ॥ १३ ॥

नव । प्रपन्नान्विश्वस्तान्विख्यातान्वा । द्विजः कौटिल्यवात्स्यायनादिपर्यायश्चाणक्य उद्धरिष्यत्युन्मूलयिष्यति । मौर्याः मौर्यसंज्ञाः ॥ १२ ॥ कथं भोक्ष्यति तदाह । स एवेति । चंद्रगुप्तं मौर्यप्रथमम् ॥ १३ ॥

होईल व त्यापुढील सर्वहि राजे शूद्रप्राय व मोठे अधार्मिक होतील ॥ ७ ॥ ८ ॥ ९ ॥ तो महापद्मपति नंदराजा, ज्याच्या आज्ञेवें कोणीच उल्लंघन करणार नाहींत असा होऊन तो जणुं दुसरा परशुरामच कीं काय असा क्षत्रियांचा संहार करीत करीत एकछत्र पृथ्वीचें पालन करील ॥ १० ॥ त्या नंदाला शूद्रीपासून सुमाल्य इत्यादिक आठ पुत्र होतील तेच पुढें राजे होऊन शंभर वर्षेंपर्यंत या पृथ्वीचा उपभोग करितील ॥ ११ ॥ नंतर कोणीएक चाणक्यनांवचा विश्वासघातकी ब्राह्मण, नंद व त्याचे आठ पुत्र अशा नऊ नंदांना विश्वास पाववून त्यांचा समूळ नाश करील. ते नाहींसे झाल्यावर पुढें कलियुगांत मौर्यनांवांचे राजे पृथ्वीचें पालन करितील ॥ १२ ॥ आतां ते कसे कसे राज्य करितील तें सांगतो–हे राजा, तो चाणक्य ब्राह्मणच, मौर्यांतील पहिल्या चंद्रगुप्ताला राज्यावर अभिषेक करील. त्या चंद्रगुप्ताचा पुत्र वारिसार

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होईल त्यापासून अशोकवर्धन होईल ॥ १३ ॥ त्या अशोकवर्धनाचा पुत्र सुयशा होईल; सुयशाचा पुत्र संगत, त्याचा शालिशूक, शालिशूकाचा पुत्र सोमशर्मा होईल ॥ १४ ॥ नंतर त्याचा शतधन्वा व त्याचा बृहद्रथ होईल. हे कुरुकुलश्रेष्ठ राजा, हे दहा मौर्य राजे, कलीमध्यें एकशें सदतीस वर्षेंपर्यंत पृथ्वीचा उपभोग करतील. नंतर त्या बृहद्रथाचा सेनापति पुष्पमित्र हा, आपला स्वामी जो बृहद्रथ त्याला मारून स्वतःच राज्य करील; तोच शुंग राजांमध्यें पहिला होय. त्यापासून पुढें अग्निमित्र होईल. अग्निमित्रापासून सुज्येष्ठ होईल ॥ १५ ॥ १६ ॥ त्याला वसुमित्र, त्याला भद्रक, त्याला पुलिंद पुत्र होईल. त्या पुलिंदापासून घोष पुत्र

॥ १४ ॥ तेषां पंचमो दशरथः पराशरादिभिरुक्तोऽत्राप्यनुसंधेयः तेन सह मौर्या दश । सप्तत्रिंशच्छतोत्तरं सप्तत्रिंशदुत्तरं शतं समाः ॥ १५ ॥ १६ ॥ १७ ॥ बृहद्रथस्य सेनापतिः पुष्पमित्रो नाम स्वामिनं बृहद्रथं हत्वा राज्यं करिष्यति स च शुंगानां प्रथमः । ततोऽग्निमित्रादयो नवेत्येवं शुंगा दशवर्षशताधिकं द्वादशाधिकं

सुयशा भविता तस्य संगतः सुयशः सुतः ॥ शालिशूकस्ततस्तस्य सोमशर्मा भविष्यति ॥ १४ ॥ शतधन्वा ततस्तस्य भविता तद्बृहद्रथः ॥ मौर्या ह्येते दश नृपाः सप्तत्रिंशच्छतोत्तरम् ॥ १५ ॥ समा भोक्ष्यंति पृथिवीं कलौ कुरुकुलोद्वह ॥ अग्निमित्रस्ततस्तस्मात्सुज्येष्ठोऽथ भविष्यति ॥ १६ ॥ वसुमित्रो भद्रकश्च पुलिंदो भविता सुतः ॥ ततो घोषः सुतस्तस्माद्वज्रमित्रो भविष्यति ॥ १७ ॥ ततो भागवतस्तस्माद्देवभूतिरिति श्रुतः ॥ शुंगा दशैते भोक्ष्यंति भूमिं वर्षशताधिकम् ॥ १८ ॥ ततः कण्वानियं भूमिर्यास्यत्यल्पगुणान्नृप ॥ शुंगं हत्वा देवभूतिं कण्वोऽमात्यस्तु कामिनम् ॥ १९ ॥ स्वयं करिष्यते राज्यं वसुदेवो महामतिः ॥ तस्य पुत्रस्तु भूमित्रस्तस्य नारायणः सुतः ॥ २० ॥ काण्वायना इमे भूमिं चत्वारिंशच्च पंच च ॥ शतानि त्रीणि भोक्ष्यंति वर्षाणां च कलौ युगे ॥ २१ ॥ हत्वा काण्वं सुशर्माणं तद्भृत्यो वृषलो बली ॥ गां भोक्ष्यत्यंध्रजातीयः कंचित्कालमसत्तमः ॥ २२ ॥

वर्षशतम् ॥ १८ ॥ कथं काण्वान्यास्यति तदाह । शुंगमिति । परस्त्रीकामिनं देवभूतिनामानं शुंगं हत्वा तदमात्यो वसुदेवनामा कण्वो राज्यं करिष्यति ॥ १९ ॥ काण्वानां चतुर्थः सुशर्मा ज्ञेयः ॥ २० ॥ इमे वसुदेवादयः काण्वायना वर्षाणां त्रीणि शतानि पंचचत्वारिंशद्वर्षाणि च भूमिं भोक्ष्यंति ॥ २१ ॥ काण्वानामंतिमं सुशर्माणं हत्वा बलीनामा तद्भृत्यो गां भोक्ष्यति ॥ २२ ॥

व घोषापासून वज्रमित्र होईल ॥ १७ ॥ त्यापासून भागवत व भागवतापासून देवभूति नांवानें प्रख्यात असा राजा होईल. हे शुंगनांवाचे दहा राजे, सुमारें एकशें बारा वर्षेंपर्यंत पृथ्वीचें राज्य करितील ॥ १८ ॥ त्यानंतर ही भूमि, अल्पपराक्रमी अशा कण्ववंशीय राजांच्या ताब्यांत जाईल. ~~ती अशी कीं,~~ – हे राजा, स्त्रीलंपट झालेल्या त्या देवभूतिनामक शुंगाला मारून, त्याचा महाचतुर प्रधान वसुदेवनामक कण्व स्वतःच राज्य करील. त्याचा पुत्र भूमित्र, त्याचा पुत्र नारायण आणि नारायणाचा पुत्र सुशर्मानामक होईल ॥ १९ ॥ २० ॥ हे राजा, हे वसुदेवादिक कण्ववंशीय चार राजे, कलियुगांत तीनशें पंचेचाळीस वर्षेंपर्यंत पृथ्वीचें राज्य करितील ॥ २१ ॥ पुढें कण्वांच्या शेवटच्या त्या सुशर्म्याला मारून त्याचाच सेवक कोणीएक आंध्रजातीचा बळी नांवाचा दुष्ट शूद्र कांहीं वर्षेंपर्यंत पृथ्वीचें राज्य करील ॥ २२ ॥

---

१ यद्यपि येथें चंद्रगुप्तादिक नऊ राजे अनुक्रमानें सांगितले आहेत तथापि पराशरादिकांच्या मतानें त्यांमध्यें पांचवा दशरथनामक राजा आहे; त्यासह हे दहा होतात, असें जाणावें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तदनंतर त्या बलिराजाचा कृष्णनामक बंधु राजा होईल. त्याचा पुत्र श्रीशांतकर्ण, त्याचा पुत्र पौर्णमास,– ॥ २३ ॥ त्याचा पुत्र लंबोदर, त्यापासून चिबिलक राजा होईल. त्यापासून मेघस्वाति, त्याचा अटमान,– ॥ २४ ॥ अटमानाचा अनिष्टकर्मा, अनिष्टकर्म्यांचा हालेय, हालेयाचा तलक, तलकाचा पुत्र पुरीषभीरु, त्याचा पुत्र सुनंदन राजा होईल ॥ २५ ॥ त्या सुनंदनाचा पुत्र चकोर होईल. हे शत्रुदमना राजा, त्या चकोराच्या निरनिराळ्या नांवाच्या आठ पुत्रांमध्यें शेवटचा पुत्र शिवस्वातिनामक होईल. त्याचा पुत्र गोमती, त्यापासून पुरीमान् होईल ॥ २६ ॥ त्याचा पुत्र मेदशिरा, त्याचा शिवस्कंद, त्याचा यज्ञश्री, त्याचा विजय, विजयाचा पुत्र चंद्रविज्ञ आणि चंद्रविज्ञाचा पुत्र सलोमधिनामक होईल ॥ २७ ॥ हे कुरुनंदना राजा, हे तीस राजे चारशें छप्पन्न ४५६ वर्षेंपर्यंत पृथ्वीचें पालन करितील ॥ २८ ॥ त्यानंतर, अवभृतिनामक

॥ २३ ॥ २४ ॥ २५ ॥ यत्र येषु बहुसंज्ञेष्वष्टसु चरमः शिवस्वातिनामा भविता ॥ २६ ॥ २७ ॥ २८ ॥ आवभृत्याः अवभृतिर्नगरी तद्राजानः ॥ २९ ॥ ३० ॥ एते आभीरादयो मौनव्यतिरिक्ताः पंचषष्टिनृपा एकोनशताधिकं वर्षसहस्रं पृथिवीं भोक्ष्यंति । ततः पूर्वोक्ता एवैकादश मौनास्त्रीण्यब्दशतानि क्षितिं भोक्ष्यंति ॥ ३१ ॥ तैः संस्थिते

कृष्णनामाऽथ तद्भ्राता भविता पृथिवीपतिः ॥ श्रीशांतकर्णस्तत्पुत्रः पौर्णमासस्तु तत्सुतः ॥ २३ ॥ लंबोदरस्तु तत्पुत्रस्तस्माच्चिबिलको नृपः ॥ मेघस्वातिश्चिबिलकादटमानस्तु तस्य च ॥ २४ ॥ अनिष्टकर्मा हालेयस्तलकस्तस्य चात्मजः ॥ पुरीषभीरुस्तत्पुत्रस्ततो राजा सुनंदनः ॥ २५ ॥ चकोरो बहवो यत्र शिवस्वातिररिंदम ॥ तस्यापि गोमती पुत्रः पुरीमान्भविता ततः ॥ २६ ॥ मेदशिराः शिवस्कंदो यज्ञश्रीस्तत्सुतस्ततः ॥ विजयस्तत्सुतो भाव्यश्चंद्रविज्ञः सलोमधिः ॥ २७ ॥ एते त्रिंशन्नृपतयश्चत्वार्यब्दशतानि च ॥ षट्पंचाशच्च पृथिवीं भोक्ष्यंति कुरुनंदन ॥ २८ ॥ सप्ताभीरा आवभृत्या दश गर्दभिनो नृपाः ॥ कंकाः षोडश भूपाला भविष्यंति च लोलुपाः ॥ २९ ॥ ततोऽष्टौ यवना भाव्याश्चतुर्दश तुरुष्ककाः ॥ भूयो दश गुरुंडाश्च मौना एकादशैव तु ॥ ३० ॥ एते भोक्ष्यंति पृथिवीं दशवर्षशतानि च ॥ नवाधिकां च नवतिं मौना एकादश क्षितिम् ॥ ३१ ॥ भोक्ष्यंत्यब्दशतान्यंग त्रीणि तैः संस्थिते ततः ॥ किलकिलायां नृपतयो भूतनंदोऽथ वंगिरिः ॥ ३२ ॥ शिशुनंदिश्च तद्भ्राता यशोनंदिः प्रवीरकः ॥ इत्येते वै वर्षशतं भविष्यंत्यधिकानि षट् ॥ ३३ ॥ तेषां त्रयोदश सुता भवितारश्च बाह्लिकाः ॥ पुष्पमित्रोऽथ राजन्यो दुर्मित्रोऽस्य तथैव च ॥ ३४ ॥

तेषु मृतेषु किलकिलायां पुर्यां नृपतयो भविष्यंतीत्युत्तरेणान्वयः ॥ ३२ ॥ अधिकानि च षड्वर्षाणि ॥ ३३ ॥ तेषां भूतनंदादीनां यथायथं बाह्लिकनामानस्त्रयोदश सुता भविष्यंति । अथ पुष्पमित्रो नामाऽन्यो राजन्यः अस्य च दुर्मित्रो नाम पुत्रः ॥ ३४ ॥

नगरीमध्यें सात आभीरजातीचे राजे होतील. नंतर दहा गर्दभिसंज्ञक राजे होतील. पुढें अतिलोभी असे सोळा कंकजातीचे राजे होतील ॥ २९ ॥ नंतर, आठ यवन, चवदा तुरुष्क (तुरकस्थानचे तुरक), पुनः दहा गुरुंड आणि अकरा मौनसंज्ञक राजे होतील ॥ ३० ॥ हे राजा, मौनराजांशिवाय हे आभीरादिक पांसष्ट राजे, एक हजार नव्याणव १०९९ वर्षें पृथ्वीचें राज्य करितील आणि अकरा मौनराजे तर तीनशें वर्षें राज्य करितील. पुढें ते मौन मरण पावल्यावर किलकिलानामक नगरींमध्यें भूतनंदादि वक्ष्यमाण राजे होतील. त्यांमध्यें प्रथमतः भूतनंद, नंतर वंगिरि– ॥ ३१ ॥ ३२ ॥ वंगिरीच्या नंतर त्याचा बंधु शिशुनंदि, यशोनंदी व प्रवीरक हे एकशें सहा १०६ वर्षें पर्यंत राजे होतील ॥ ३३ ॥ नंतर त्या भूतनंदादिकांचे अनुक्रमानें बाह्लिक नांवाचे तेरा पुत्र राजे होतील. पुढें एक दुसरा पुष्पमित्रनामक क्षत्रिय राजा होईल व

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याचा पुत्र दुर्मित्रनामक होईल ॥ ३४ ॥ पुनः त्या पूर्वोक्त बाल्हिकांच्या वंशांतील सात आंध्रदेशाचे राजे, सात कोशलदेशाचे राजे, कांहीं विदूरदेशाचे राजे व कांहीं निषधदेशाचे राजे हे, त्या त्या देशांच्या नांवांनीं प्रसिद्ध होत्साते एकाचकाळीं वेगवेगळे खंडपति होऊन राज्य करितील ॥ ३५ ॥ मागधवंशामध्यें तर विश्वफूर्जिनामक राजा होईल. तो पूर्वीच्या पुरंजयाहून अतिप्रख्यात असा दुसरा पुरंजय ह्मणून प्रसिद्ध होऊन, ब्राह्मणादिक वर्णांना 'भ्रष्ट करून' पुलिंद, यदु व मद्रक या नांवाचे म्लेच्छांसारखे वर्ण करील ॥ ३६ ॥ आणि तो दुष्ट पराक्रमी पुरंजय राजा, ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तीन वर्णांवांचून दुसऱ्या शूद्रवर्णांच्या प्रजा स्थापन करून व

तथा अंध्राः कोशला विदूरपतयो निषधाश्च एते च तत्तद्देशनामभिः प्रख्यातास्तुल्यकालाः खंडमंडलेषु भूपास्तत एव तेभ्यो बाल्हिकेभ्य एव भाव्या भविष्यंति ॥ ३५ ॥ ततश्च मागधानां तु राजा विश्वस्फूर्जिर्नाम भविता । स च पूर्वोक्तात्पुरंजयादपरः पुरंजय इति प्रसिद्धः सन्वर्णान्ब्राह्मणादीन्पुलिंदयदुमद्रकसंज्ञान्म्लेच्छप्रायान्करिष्यति । अपरानिति पाठे अन्यान्पुलिंदादिसंज्ञान्वर्णान्करिष्यतीत्यर्थः ॥ ३६ ॥ किंचैवं कृत्वाऽब्रह्मभूयिष्ठा अत्रैवर्ण्यप्रचुराः सतीः प्रजाः स्थापयिष्यति पालयिष्यति । स च पद्मवत्यां पुरि वसन्

एककाला इमे भूपाः सप्तांध्राः सप्त कौशलाः ॥ वैदूरपतयो भाव्या निषधास्तत एव हि ॥ ३५ ॥ मागधानां तु भविता विश्वस्फूर्जिः पुरंजयः ॥ करिष्यत्यपरो वर्णान्पुलिंदयदुमद्रकान् ॥ ३६ ॥ प्रजाश्चाब्रह्मभूयिष्ठाः स्थापयिष्यति दुर्मतिः ॥ वीर्यवान्क्षत्रमुत्साद्य पद्मवत्यां स वै पुरि ॥ अनुगंगामाप्रयागं गुप्तां भोक्ष्यति मेदिनीम् ॥ ३७ ॥ सौराष्ट्रावंत्यभीराश्च शूरा अर्बुदमालवाः ॥ व्रात्या द्विजा भविष्यंति शूद्रप्राया जनाधिपाः ॥ ३८ ॥ सिंधोस्तटं चंद्रभागां कौंतीं काश्मीरमंडलम् ॥ भोक्ष्यंति शूद्रा व्रात्याद्या म्लेच्छाश्चाब्रह्मवर्चसः ॥ ३९ ॥ तुल्यकाला इमे राजन्म्लेच्छप्रायाश्च भूभृतः ॥ एतेऽधर्मानृतपराः फल्गुदास्तीव्रमन्यवः ॥ ४० ॥ स्त्रीबालगोद्विजघ्नाश्च परदारधनादृताः ॥ उदितास्तमितप्राया अल्पसत्त्वाल्पकायुषः ॥ ४१ ॥ असंस्कृताः क्रियाहीना रजसा तमसावृताः ॥ प्रजास्ते भक्षयिष्यंति म्लेच्छा राजन्यरूपिणः ॥ ४२ ॥

अनुगंगां गंगाद्वारमारभ्य प्रयागपर्यंतं गुप्तां पालितां मेदिनीं भोक्ष्यति ॥ ३७ ॥ तदनंतरं च सौराष्ट्रादिदेशवर्तिनो द्विजा व्रात्या उपनयनरहिता भविष्यंति ॥ ३८ ॥ अब्रह्मवर्चसः वेदाचारशून्याः ॥ ३९ ॥ इमे च म्लेच्छप्राया भूभृतस्तुल्यकाला भविष्यंति । किंच एते सर्वेऽधर्मानृतपरा अधर्मेऽनृते च परिनिष्ठिताः । फल्गुदा अल्पदातारः ॥ ४० ॥ उदितास्तमितप्राया हर्षशोकादिबहुलाः ॥ ४१ ॥ असंस्कृता गर्भाधानादिसंस्काररहिताः । प्रजा भक्षयिष्यंति धनाद्यपहारादिना पीडयिष्यंति ॥ ४२ ॥

क्षत्रियांचा नाश करून पद्मवतीनामक नगरीमध्यें राहून गंगाद्वारापासून प्रयागापर्यंत पालन केलेल्या पृथ्वीचा उपभोग करील ॥ ३७ ॥ तदनंतर, सौराष्ट्र, आवंत्य' शूर, अर्बुद व माळवा या देशांतील ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य हे उपनयनसंस्काररहित होतील व राजेहि शूद्रप्राय होतील ॥ ३८ ॥ सिंधुनदीचा तीरप्रदेश, चंद्रभागा नदीचा प्रदेश, कौंतीनगरी व काश्मीरप्रदेश यांचा उपभोग, शूद्र, म्लेच्छ, वेदाचाररहित ब्राह्मण व संस्कारहीन लोक करतील ॥ ३९ ॥ हे राजा, हे म्लेच्छप्राय राजे एकाच काळीं होतील. आणि हे अधर्म व असत्य याविषयीं तत्पर, अल्पदानी, मोठे कोपिष्ठ, स्त्रिया, बालक, गाई व ब्राह्मण यांच्या हत्या करणारे, परस्त्री व परधन यांविषयीं लंपट, अनेकप्रकारच्या हर्षशोकादिकांनीं युक्त, अल्पपराक्रमी, अल्पायुषी,— ॥ ४० ॥ ४१ ॥ संस्कारहीन, क्रियाहीन आणि रजोगुणतमोगुणांनीं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

व्याप्त असे होतील. ते राजांचें रूप धारण करणारे म्लेच्छ, द्रव्यवगैरे हरण करून प्रजांना पीडा देतील ॥ ४२ ॥ आणि ते तशाप्रकारचे ज्यांचे राजे आहेत असे व त्यांच्यासारखा स्वभाव, आचार व वादविवाद असणारे ते देशवासी सर्वजन, परस्पर प्राप्त झालेल्या क्लेशांनीं व राजांनीं केलेल्या उपद्रवांनीं पीडित होऊन नाश पावतील ॥ ४३ ॥ परमहंसें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील द्वादशस्कंधामध्यें भाविसोमवंशनिरूपणनामक हा पहिला अध्याय समाप्त झाला ॥ १ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या दुसऱ्या अध्यायांत, कलियुगाच्या दोषांची वृद्धि झाली असतां भगवंताचा कल्की अवतार होऊन त्याच्या योगानें अधार्मिक लोकांचा नाश झाल्यावर पुनः कृतयुग सुरू होईल; असें सांगितलें आहे ॥ १ ॥ कलिधर्माचें विस्तारानें वर्णन करीत श्रीशुकाचार्य ह्मणाला कीं–हे राजा, पुढें बलवत्तर कलिकालाच्या योगानें दिवसेंदिवस धर्म, सत्य, शुचिर्भूतपणा, क्षमा, दया, आयुष्य बल व स्मृति (कर्तव्याकर्तव्य विचार) यांचा हळुहळू नाश होत जाईल ॥ १ ॥ हे राजा,

---

किंच तन्नाथाः ते नाथा येषां ते जनपदा देशवर्तिनो मनुष्यास्तच्छीलाचारवादिनस्तेषामिव शीलमाचारो वादश्च तद्वंतः ॥ ४३ ॥ इति श्रीमद्भागवते द्वादशस्कंधे भावार्थदीपिकायां टीकायां प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥ ॥ द्वितीये तु कलेर्दोषवृद्धौ कल्क्यवतारतः ॥ अधर्मिष्ठे जने नष्टे पुनः कृतयुगागमः ॥ १ ॥ कलिधर्मान्प्रपंचयति ततश्चेत्यादिना ॥ १ ॥ धर्मन्याययोर्व्यवस्थायां बलमेव ॥ २ ॥ दांपत्ये भार्यापतिभावेऽभिरुचिरेव हेतुर्न कुलगोत्रादिः । व्यावहारिके क्रयविक्रयादौ । स्त्रीत्वे पुंस्त्वे च तयोः श्रैष्ठ्ये रतिकौ-

तन्नाथास्ते जनपदास्तच्छीलाचारवादिनः ॥ अन्योऽन्यतो राजभिश्च क्षयं यास्यंति पीडिताः ॥ ४३ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे द्वादशस्कंधे प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ ततश्चानुदिनं धर्मः सत्यं शौचं क्षमा दया ॥ कालेन बलिना राजन्नंक्ष्यत्यायुर्बलं स्मृतिः ॥ १ ॥ वित्तमेव कलौ नृणां जन्माचारगुणोदयः ॥ धर्मन्यायव्यवस्थायां कारणं बलमेव हि ॥ २ ॥ दांपत्येऽभिरुचिर्हेतुर्मायैव व्यावहारिके ॥ स्त्रीत्वे पुंस्त्वे च हि रतिर्विप्रत्वे सूत्रमेव हि ॥ ३ ॥ लिंगमेवाश्रमख्यातावन्योऽन्यापत्तिकारणम् ॥ अवृत्त्या न्यायदौर्बल्यं पांडित्ये चापलं वचः ॥ ४ ॥ जनाढ्यतैवासाधुत्वे साधुत्वे दंभ एव तु ॥ स्वीकार एवोद्वाहे स्नानमेव प्रसाधनम् ॥ ५ ॥

शलमेव हेतुर्न कुलमाचारो वा ॥ ३ ॥ आश्रमाणां ख्यातौ ज्ञाने लिंगमेव दंडाजिनादिकं हेतुर्नत्वाचारविशेषः । अन्योन्यापत्तिकारणं चाश्रमादाश्रमांतरप्राप्तौ च कारणम् । यद्वा बहूदकहंसादीनामन्योन्यापत्तौ नमस्कारादिव्यवहारे कारणम् । अवृत्त्या मुद्रार्पणादिदानासामर्थ्येन न्याये दौर्बल्यं पराजयः । चापलं वचो बहुभाषणम् ॥ ४ ॥ असाधुत्वे चौर्याद्यभियोगे । प्रसाधनमलंकारः ॥ ५ ॥

कलियुगांत द्रव्य हेंच, मनुष्यांच्या जन्म, आचार व गुण यांच्या उत्कर्षाला कारण होईल. बळ हेंच, धर्म आणि न्याय यांच्या व्यवस्थेविषयीं कारण होईल ॥ २ ॥ परस्पर प्रीति हीच, स्त्रीपुरुषांच्या परस्पर संबंधाविषयीं मुख्य कारण होईल; कुलगोत्रादिकांना कोणी विचारणार नाहीं. क्रयविक्रयादिक व्यापारांत कपट फार होईल. मैथुनसंबंधी कुशलताच, स्त्रियांच्या व पुरुषांच्या श्रेष्ठपणाविषयीं कारण होईल; कुल किंवा आचार हे होणार नाहींत. जानवें हेंच ब्राह्मणाला ओळखण्याचें साधन होईल ॥ ३ ॥ दंड, मृगचर्म इत्यादिक चिन्हें धारण करणें हेंच, यतीच्या व ब्रह्मचाऱ्याच्यावगैरे ओळखण्यास कारण होईल; तसेंच तें चिन्ह धारण करणेंच, एक आश्रम सुटून दुसरा आश्रम प्राप्त होण्याचें साधन होईल; आचाराकडे कोणीहि लक्ष देणार नाहीं. न्यायाधीशाला द्रव्य देण्यास सामर्थ्य नसलें ह्मणजे न्यायामध्यें पराजय होईल. चपळपणें पुष्कळ बोलणें हेंच पंडितपणाला कारण होईल ॥ ४ ॥ दरिद्रता हीच नीचपणाला (चोरवगैरे मानण्याला) कारण होईल. ढोंग करणें हेंच ॥ ३ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

साधुपणाला (चांगुलपणाला) कारण होईल. परस्परांनीं परस्परांचा स्वीकार करणें हाच विवाहामध्यें विध्युक्तप्रकार होईल. स्नान करणें हेंच देहाचा अलंकार मानला जाईल ॥ ५ ॥ दूर असलेल्या पाण्याच्या सांठ्यालाच तीर्थ असें मानितील; जवळ असलेली गंगा, गुरु व पितावगैरेंना कोणी तीर्थरूप मानणार नाहींत; अनेक तऱ्हेनीं केंस राखणें हेंच सुंदरपणाचें कारण होईल. पोट भरणें हाच कायतो मोठा पुरुषार्थ मानिला जाईल. उद्धटपणें मोठ्यानें बोलणें हेंच खरेपणाचें कारण होईल ॥ ६ ॥ कुटुंबाचें पोषण करणें हीच दक्षता होईल आणि कीर्तिकरितांच धर्माचें आचरण केलें जाईल. हे राजा, याप्रमाणें दुष्ट प्रजांनीं भूमंडळ व्यापून गेलें असतां—॥ ७ ॥ ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांमध्यें जो कोणी बळी असेल तोच राजा होईल. तेव्हां चोरांसारख्या लुटारू, निर्दय व लुब्ध अशा राजांनीं, ज्यांच्या स्त्रिया व धन हरण केलीं आहेत असे लोक, गांव सोडून पर्वतांवर व अरण्यांत निघून जातील; आणि तेथें वृक्षांचीं पानें, मुळें, डिंक, मध, फळें, पुष्पें व आख्यावगैरे खाऊन निर्वाह करितील॥८॥९॥ कितीएक

दूरे वर्तमानं वार्ययनं जलाशयस्तीर्थं न तु गुर्वादि । स्वार्थः पुरुषार्थः ॥ ६ ॥ ७ ॥ ८ ॥ आच्छिन्ना अपहृता दारा द्रविणानि च यासां ताः । अष्टिर्बीजम् ॥ ९ ॥ १० ॥

दूरे वार्ययनं तीर्थं लावण्ये केशधारणम् ॥ उदरंभरता स्वार्थः सत्यत्वे धार्ष्ट्यमेव हि ॥ ६ ॥ दाक्ष्यं कुटुंबभरणं यशोऽर्थे धर्मसेवनम् ॥ एवं प्रजाभिर्दुष्टाभिराकीर्णे क्षितिमंडले ॥ ७ ॥ ब्रह्मविट्क्षत्रशूद्राणां यो बली भविता नृपः ॥ प्रजा हि लुब्धै राजन्यैर्निर्घृणैर्दस्युधर्मभिः ॥ ८ ॥ आच्छिन्नदारद्रविणा यास्यंति गिरिकाननम् ॥ शाकमूलामिषक्षौद्रफलपुष्पाष्टिभोजनाः ॥ ९ ॥ अनावृष्ट्या विनंक्ष्यंति दुर्भिक्षकरपीडिताः॥ शीतवातातपप्रावृड्हिमैरन्योऽन्यतः प्रजाः ॥ १० ॥ क्षुत्तृड्भ्यां व्याधिभिश्चैव संतापेन च चिंतया ॥ त्रिंशद्विंशतिवर्षाणि परमायुः कलौ नृणाम् ॥ ११॥ क्षीयमाणेषु देहेषु देहिनां कलिदोषतः ॥ वर्णाश्रमवतां धर्मे नष्टे वेदपथे नृणाम् ॥ १२ ॥ पाखंडप्रचुरे धर्मे दस्युप्रायेषु राजसु ॥ चौर्यानृतवृथाहिंसानानावृत्तिषु वै नृषु ॥ १३ ॥ शूद्रप्रायेषु वर्णेषु छागप्रायासु धेनुषु ॥ गृहप्रायेष्वाश्रमेषु यौनप्रायेषु बंधुषु ॥ १४ ॥

॥ ११ ॥ क्षीयमाणेष्वित्यादीनामित्थं कलौ गतप्राय इति पंचमेनान्वयः । क्षीयमाणेष्वल्पप्रायेषु ॥ १२ ॥ दस्युप्रायेषु चौरतुल्येषु । चौर्यानृतवृथाहिंसाद्या नानावृत्तयो येषां तेषु ॥ १३ ॥ छागप्रायासु प्रमाणतः क्षीरतश्चाजातुल्यासु ॥ १४ ॥

प्रजा, अनावृष्टीनें पडलेला दुष्काळ व राजांचे बसलेले कर यांनीं पीडित होऊन गारवारा, उन्हाळा, पावसाळा व थंडी यांच्या योगानें आजारी पडून व परस्परांमध्यें कलह करून नाश पावतील ॥ १० ॥ कितीएक प्रजा, क्षुधेनें, तृषेनें, अनेकप्रकारच्या व्याधींनीं, संतापानें व चिंतेनें अतिशय दुःख पावतील. कलियुगामध्यें मनुष्यांचें आयुष्य फार झालें ह्मणजे वीसपासून तीस वर्षांपर्यंत होईल ॥ ११ ॥ हे राजा, कलियुगाच्या दोषानें जेव्हां प्राणिमात्रांचे देह लहान लहान होतील; वर्णाश्रमवान् मनुष्यांचा वेदविहित धर्म नष्ट होईल;— ॥ १२ ॥ धर्मामध्यें नास्तिकपणा अधिक वाढेल; राजेलोक चोरप्राय (लुटारू) होतील; सर्वजन, चोरी, असत्यभाषण, विनाकारण हिंसावगैरे अनेकप्रकारच्या कर्मांनीं आपला निर्वाह करूं लागतील;— ॥ १३ ॥ ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य हे वर्ण, बहुतकरून शूद्रांसारखे होतील; गाई, शेळ्यांएवढ्या लहान होतील;

CC-0. In Public Domain. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

संन्यासादिक आश्रमी लोक, गृहस्थांप्रमाणें वागूं लागतील; स्त्रीच्या संबंधावे असतील त्यांनाच आप्त मानूं लागतील- ॥ १४ ॥ वनस्पति अतिसूक्ष्म होतील; वृक्ष शमीसारखे लहान होतील; मेघ पाणी थोडें व विजांचें चमकणें फार असे होतील; आणि घरें अतिथिभोजनवगैरे धर्मांनीं रहित होतील; ॥ १५ ॥ याप्रमाणें लोकांची स्थिति होऊन असह्यचेष्टित असें तें कलियुग संपत संपत आलें असतां, भगवान् श्रीविष्णु, सत्वगुणानें धर्माचें रक्षण करण्यासाठीं कल्किरूपानें अवतार धारण करील ॥ १६ ॥ चराचराचा गुरु व सर्वजगाचें कारण अशा त्या जगन्नियंत्या विष्णूचा अवतार, साधूंच्या धर्मसंरक्षणाकरितां व मोक्षाकरितां असतो ॥ १७ ॥ असो; तो कल्कि

अणुप्रायासु श्यामाकतुल्यासु । स्थास्नुषु वृक्षेषु । विद्युत्प्रायेषु तडिद्बहुलेषु । शून्यप्रायेषु धर्मादिरहितेषु सद्मसु गृहेषु ॥ १५ ॥ जने तु खरधर्मिणि दुःसहचेष्टिते कलौ गतप्राये समाप्तप्राये ॥ १६ ॥ एतत्प्रपंचयति चतुर्भिः चराचरगुरोरीश्वरस्येति च धर्मत्राणे हेतुः । गुरुत्वेश्वरत्वयोरुपपादनमखिलस्य विश्वस्यात्मनः कारणस्येति । एवंभूतस्य विष्णोर्जन्म साधूनां धर्मत्राणाय । धर्मत्राणप्रयोजनमाह । कर्मापनुत्तये मोक्षाय ॥ १७ ॥ शंभलग्रामे मुख्यस्य प्रधानस्य नाम्ना विष्णुयशसो ब्राह्मणस्य भवने गृहे ॥ १८ ॥ धर्मत्राण-

अणुप्रायास्वोषधीषु शमीप्रायेषु स्थास्नुषु ॥ विद्युत्प्रायेषु मेघेषु शून्यप्रायेषु सद्मसु ॥ १५ ॥ इत्थं कलौ गतप्राये जने तु खरधर्मिणि ॥ धर्मत्राणाय सत्त्वेन भगवानवतरिष्यति ॥ १६ ॥ चराचरगुरोर्विष्णोरीश्वरस्याखिलात्मनः ॥ धर्मत्राणाय साधूनां जन्म कर्मापनुत्तये ॥ १७ ॥ शंभलग्राममुख्यस्य ब्राह्मणस्य महात्मनः ॥ भवने विष्णुयशसः कल्किः प्रादुर्भविष्यति ॥ १८ ॥ अश्वमाशुगमारुह्य देवदत्तं जगत्पतिः ॥ असिनाऽसाधुदमनमष्टैश्वर्यगुणान्वितः ॥ १९ ॥ विचरन्नाशुना क्षोण्यां हयेनाप्रतिमद्युतिः ॥ नृपलिंगच्छदो दस्यून्कोटिशो निहनिष्यति ॥ २० ॥ अथ तेषां भविष्यंति मनांसि विशदानि वै ॥ वासुदेवांगरागातिपुण्यगंधानिलस्पृशाम् ॥ पौरजानपदानां वै हतेष्वखिलदस्युषु ॥ २१ ॥

प्रकारमाह । अश्वमिति । असाधवो दम्यंते येन तमश्वमारुह्यासिना दस्यून्कोटिशो निहनिष्यतीत्युत्तरेणान्वयः । असाधुदमन इति पाठे कल्किविशेषणम् । अणिमाद्यष्टैश्वर्याणि गुणाश्च सत्यसंकल्पत्वादयस्तैरन्वितः ॥ १९ ॥ तत्प्रपंचः आशुना शीघ्रगामिना तेन हयेनाश्वेन क्षोण्यां पृथिव्यां विचरन् । नृपलिंगच्छदो राजवेषछन्नान् ॥ २० ॥ ततश्च पुनः कृतयुगप्रवृत्तिं वक्तुमाह । अथेति सार्द्धाभ्याम् । तेषां पौरजानपदानां मनांसि विशदानि भविष्यंति । तत्र हेतुः । वासुदेवस्यांगरागेण चंदनादिनाऽतिपुण्यगंधो योऽनिलस्तं स्पृशंतीति तथा तेषाम् ॥ २१ ॥

अवतार, शंभलनामक गांवामध्यें श्रेष्ठ अशा विष्णुयशानामक महात्म्या ब्राह्मणाच्या घरीं प्रगट होईल ॥ १८ ॥ आणि अणिमादिक अष्टैश्वर्यांनीं व सत्यसंकल्पादिक गुणांनीं युक्त असा तो अप्रतिमकांति भगवान् कल्कि, दुष्टांना दमविणाऱ्या व शीघ्रगामी अशा देवदत्त नांवाच्या घोड्यावर बसून, त्या शीघ्रगति घोड्याच्या योगानें पृथिवीवर फिरत होत्साता, हातांत घेतलेल्या तलवारीनें राजवेषानें गुप्त असलेल्या कोट्यावधि चोरांना मारून टाकील ॥ १९ ॥ २० ॥ हे राजा, याप्रमाणें सर्व चोर मारले गेले असतां त्या कल्किरूपी वासुदेवाच्या अंगाला लावलेल्या सुगंधिक उट्यांच्या संबंधी अतिपवित्र सुवासिक वायूचा स्पर्श झालेल्या त्या पुरवासी व देशवासी

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लोकांचीं मनें, निर्मळ होतील ॥ २१ ॥ आणि त्या जनांच्या हृदयांत सत्वमूर्ति भगवान् वासुदेव स्थित झाला असतां, पुढें त्यांची प्रजासृष्टि उत्तरोत्तर मोठमोठी होत जाईल ॥२२॥ हे राजा, ज्या वेळीं ~~धर्मांचा पति भगवान् श्रीहरि~~, कल्किरूपानें अवतीर्ण होईल त्या वेळीं कृतयुगाची प्रवृति होईल व प्रजांची उत्पत्तिहि सत्वगुणयुक्त होईल॥२३ ॥ आतां अवतार केव्हां होईल तो काळ सांगतो–जेव्हां चंद्र, सूर्य व बृहस्पति या तिन्ही ग्रहांचा संयोग होऊन ते एका कर्क राशीवर त्यांत पुष्य नक्षत्रावर एकदम प्रवेश करितात

स्थविष्ठः स्थूलः ॥ २२ ॥ कृतयुगप्रवृत्तिमाह । यदावतीर्ण इति । प्रजानां सूतिः प्रसूतिः ॥ २३ ॥ तदवतारकालोपलक्षणमाह । यदा चंद्रश्चेति । तिष्यः पुष्यः । अयमर्थः । चंद्रसूर्यबृहस्पतीनां यदा पुष्यनक्षत्रे योगस्तदा तत्कृतयुगं भविष्यति । यद्यपि च प्रतिद्वादशाब्दं कर्कराशौ बृहस्पतौ वर्तमाने द्वित्रास्वमावास्यासु तेषां त्रयाणामपि पुष्ययोगः संभवति तथाऽपि तेषां सहप्रवेशोऽत्र विवक्षितः । समेष्यंतीति वचनात् । अतो नातिप्रसंगः ॥ २४ ॥ एवं नवमस्कंधमारभ्यानुक्रांतवैवस्वतमनोर्वंशद्वयं निगमयति । येऽतीता इति । उद्देशतः संक्षेपतः ॥ २५ ॥ कलियुगावांतरविशेषं वक्तुमाह । आरभ्येत्यादिना । वर्षसहस्रं पंचदशोत्तरं शतं चेति कयाऽपि विव-

तेषां प्रजाविसर्गश्च स्थविष्ठः संभविष्यति ॥ वासुदेवे भगवति सत्वमूर्तौ हृदि स्थिते ॥ २२ ॥ यदाऽवतीर्णो भगवान्कल्किर्धर्मपतिर्हरिः ॥ कृतं भविष्यति तदा प्रजासूतिश्च सात्विकी ॥ २३ ॥ यदा चंद्रश्च सूर्यश्च तथा तिष्यबृहस्पती ॥ एकराशौ समेष्यंति तदा भवति तत्कृतम् ॥ २४ ॥ येऽतीता वर्तमाना ये भविष्यंति च पार्थिवाः ॥ ते त उद्देशतः प्रोक्ता वंशीयाः सोमसूर्ययोः ॥ २५ ॥ आरभ्य भवतो जन्म यावन्नंदाभिषेचनम् ॥ एतद्वर्षसहस्रं तु शतं पंचदशोत्तरम् ॥ २६ ॥ सप्तर्षीणां तु यौ पूर्वौ दृश्येते उदितौ दिवि ॥ तयोस्तु मध्ये नक्षत्रं दृश्यते यत्समं निशि ॥ २७ ॥

क्षयाऽवांतरसंख्येयम् । वस्तुतस्तु परीक्षिन्नंदयोरंतरं द्वाभ्यां न्यूनं वर्षाणां सार्धसहस्रं भवति । यतः परीक्षित्समकालं मागधं मार्जारिमारभ्य रिपुंजयांता विंशति राजानः सहस्रसंवत्सरं भोक्ष्यंतीत्युक्तं नवमस्कंधे । ये बार्हद्रथभूपाला भाव्याः साहस्रवत्सरमिति । ततः परं पंच प्रद्योतना अष्टात्रिंशोत्तरं शतम् । शिशुनागाश्च षष्ट्युत्तरशतत्रयं भोक्ष्यंति पृथिवीमित्यत्रैवोक्तत्वात् ॥ २६ ॥ कलेः प्रवृत्तिं वृद्धिं च निरूपयितुं कालज्ञानोपलक्षणमाह । सप्तर्षीणां त्विति । अयमर्थः । प्रागग्रशकटाकारं तारासप्तकं सप्तर्षिमंडलम् । तत्र किंचिदुन्नतेषाऽग्रस्थानीयो मरीचिः । ततः पश्चादानम्रयुगकंधराकारो वसिष्ठः सभार्यः । ततः पश्चादीषदुन्नतेषामूलस्थानीयोंऽगिराः । ततः पश्चाच्चतुरस्रताराचतुष्के

तेव्हां कल्कि अवतार होऊन तें कृतयुग प्रवृत्त होतें ॥ २४ ॥ हे राजा, सोमसूर्यांच्या वंशांतील राजे, जे पूर्वीं होऊन गेले, जे सध्यां आहेत व जे पुढें होतील ते सर्व राजे मी तुला संक्षेपानें सांगितले आहेत ॥ २५ ॥ ~~आतां कलियुगांतील अवांतर विशेष सांगण्याकरितां ह्मणतो कीं~~ हे राजा, तुझें जन्म झाल्यापासून नंदराजाला राज्याभिषेक होईपर्यंत इतकीं हीं कलियुगाचीं अकराशें पंधरा (१११५) वर्षें होतील ॥ २६ ॥ ~~आतां कलीची प्रवृत्ति व वृद्धि सांगण्याकरितां कालज्ञानाचें धोरण सांगतो–हे राजा, आकाशांत रात्रीं सप्तऋषींचा उदय होतो तेव्हां जे दोन तारे प्रथम उगवलेले दृष्टी पडतात ते पुलहक्रतुनामक दोन ऋषि होत. त्यांच्यामध्यें दक्षिणोत्तर~~

१ जरी प्रत्येक बारा बारावर्षांनीं कर्कराशीवर बृहस्पति आला असतां दोन किंवा तीन अमावास्यांचे दिवसीं चंद्र, सूर्य व बृहस्पति यांचा पुष्यनक्षत्राशीं योग होतो तथापि तो एकदम होत असतो ह्मणून असा योग कृतयुगाच्याच आरंभीं येतो असें जाणावें. २ अकराशें पंधरा वर्षें (१११५) ही संख्या मुळांत कोणत्यातरी विवक्षेनें पोटसंख्या सांगितलेली आहे. वस्तुतः पूर्वापर विचार करितां ती संख्या चवदाशें अठ्याण्णव (१४९८) वर्षें होत्ये.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

खेवर समभागीं असलेलें अश्विन्यादि नक्षत्रांपैकीं जें एक नक्षत्र दिसतें ॥ २७ ॥ त्याच नक्षत्रानें युक्त ते सप्तर्षि, मनुष्यांचीं शंभर वर्षेंपर्यंत राहत असतात. आणि ते सप्तऋषि, तुझ्या आतांच्या काळीं मघा नक्षत्रावर आहेत ॥ २८ ॥ ज्या वेळीं भगवान् श्रीविष्णूचा हा शुद्धसत्वात्मक कृष्णनामक देह वैकुंठलोकीं गेला त्या वेळीं लोकांत कलीचा प्रवेश झाला. ज्या कलियुगांत लोक, पापाचेठिकाणीं रममाण होतात ॥ २९ ॥ जोंपर्यंत तो लक्ष्मीपति भगवान् श्रीकृष्ण, आपल्या चरणकमलांनीं पृथ्वीला स्पर्श करीत राहिला होता तोंपर्यंत 'पूर्वीं सूक्ष्मरूपानें प्रविष्ट झालेलाहि' कलि, पृथ्वीचा पराभव करण्यास (पृथिवीवर आपला पराक्रम चालविण्यास) समर्थ

ईशान्यामत्रिः । ततो दक्षिणतः पुलस्त्यः पुलस्त्यात्पश्चिमतः पुलहस्तत उत्तरतः क्रतुः । एवंस्थिते तेषां मध्ये यौ पूर्वौ उदयसमये प्रथममुदितौ दृश्येते पुलहक्रतुसंज्ञौ तयोस्तु मध्ये तयोस्तु पूर्वयोस्तु मध्ये यत्समं दक्षिणोत्तररेखायां समदेशावस्थितमश्विन्यादिषु यदन्यतमं नक्षत्रं दृश्यते तेन तथैव युक्ता नृणामब्दशतं तिष्ठंति ते च द्विजास्त्वदीये कालेऽधुना मघा आश्रिता वर्तते ॥ २७ ॥ २८ ॥ तेषु मघासु वर्तमानेषु सत्सु यदा विष्णोर्भानुर्भातीति भानुः शुद्धसत्वात्मको देहो दिवं वैकुंठं गतस्तदा कलियुगमविशत् । यद्यस्मिन्युगे जनः पापे रमत इति कलियुगस्य लक्षणम् ॥ २९ ॥ ननु श्रीकृष्णे पृथिव्यां वर्तमानेऽपि संध्यारूपेण कलिः प्रविष्ट एवासीत् । सत्यम् ।

तेनैत ऋषयो युक्तास्तिष्ठंत्यब्दशतं नृणाम् ॥ ते त्वदीये द्विजाः काले अधुना चाश्रिता मघाः ॥ २८ ॥ विष्णोर्भगवतो भानुः कृष्णाख्योऽसौ दिवं गतः ॥ तदाऽविशत्कलिर्लोकं पापे यद्रमते जनः ॥ २९ ॥ यावत्स पादपद्माभ्यां स्पृशन्नास्ते रमापतिः ॥ तावत्कलिर्वै पृथिवीं पराक्रांतुं न चाशकत् ॥ ३० ॥ यदा देवर्षयः सप्त मघासु विचरंति हि ॥ तदा प्रवृत्तस्तु कलिर्द्वादशाब्दशतात्मकः ॥ ३१ ॥ यदा मघाभ्यो यास्यंति पूर्वाषाढां महर्षयः ॥ तदा नंदात्प्रभृत्येष कलिर्वृद्धिं गमिष्यति ॥ ३२ ॥ यस्मिन्कृष्णो दिवं यातस्तस्मिन्नेव तदाऽहनि ॥ प्रतिपन्नं कलियुगमिति प्राहुः पुराविदः ॥ ३३ ॥ दिव्याब्दानां सहस्रांते चतुर्थे तु पुनः कृतम् ॥ भविष्यति यदा नृणां मन आत्मप्रकाशकम् ॥ ३४ ॥

तथापि तावत्तस्य पराक्रमो नाभवदित्याह । यावदिति । पराक्रांतुमभिभवितुम् ॥ ३० ॥ अतो यथोक्त एव कलिप्रवेशकाल इत्याह । यदा देवर्षय इति । द्वादशाब्दशतात्मक इति । दिव्येन मानेन संध्यासंध्यांशाभ्यां सह यो द्वादशाब्दशतात्मकः स कलिस्तदा संध्यामतिक्रम्य प्रविष्ट इत्यर्थः ॥ ३१ ॥ कलेः प्रवेशकालमुक्त्वा तस्य वृद्धिकालमाह । यदेति । तदा प्रद्योतनात्प्रभृति वृद्धिं गच्छन्नंदात्प्रभृत्यतिवृद्धिं गमिष्यतीत्यर्थः ॥ ३२ ॥ ननु यदा कलेर्लिंगमुपलब्धं तदैव प्रविष्ट इति युक्तं ततः पूर्वमेव प्रवेशस्ततः परं वृद्धिरित्यत्र किं प्रमाणं तत्राह । यस्मिन्निति । प्रतिपन्नं प्रविष्टमिति ज्ञातम् । पुराविदः पूर्वज्ञातारः ॥ ३३ ॥ कलेरनंतरं कृतयुगप्रवेशमाह । दिव्याब्दानामिति । चतुर्थे कलौ प्रवेश-

झाला नाहीं ॥ ३० ॥ आतां जेव्हांपासून सप्तऋषि मघानक्षत्रावर संचार करूं लागले तेव्हांपासून 'पूर्वीं प्रविष्ट झालेला' संध्या व संध्यांशयांसहित दिव्यमानानें बाराशेंवर्षें प्रमाणाचा जो कलि तो संध्याकाळाचें उल्लंघन करून प्रवृत्त झाला आहे ॥ ३१ ॥ ज्या वेळीं ते सप्तऋषि, मघांपासून क्रमाक्रमानें पूर्वाषाढा नक्षत्रावर जातील त्या वेळीं हा कलि, 'प्रद्योतन राजापासून वाढत वाढत जाऊन' नंदराजापासून अतिशयच वृद्धिंगत होईल ॥ ३२ ॥ आतां ज्या वेळीं कलीचें चिन्ह दिसूं लागलें त्याचवेळीं तो प्रवृत्त झाला हें सांगणें योग्य होतें; चिन्ह दिसण्याच्या पूर्वींच त्याचा प्रवेश व त्यानंतर त्याची वृद्धि सांगण्याविषयीं प्रमाण काय? असें ह्मणशील तर ज्या दिवशीं व ज्या वेळीं भगवान् श्रीकृष्ण, वैकुंठाप्रत गेला त्याच दिवशीं व त्याच वेळीं कलियुग प्रवृत्त झालें असें पूर्वींचे ज्ञाते ह्मणतात ॥ ३३ ॥ आतां कलियुगानंतर ॥ ९ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कृतयुगाची प्रवृत्ति सांगतो—हे राजा, ज्या वेळीं मनुष्यांचें मन, आत्मस्वरूपाचें प्रकाशक होईल त्या वेळीं, कलियुगाचीं संध्या व संध्यांशयांसहित मधलीं देवांच्या मानानें हजार वर्षें होऊन गेलीं ह्मणजे पुनः कृतयुग प्रवृत्त होईल ॥ ३४ ॥ आतां राजवंशाचेठिकाणीं सांगितलेली व्यवस्था ब्राह्मणादिकांच्या वंशाचेठिकाणींहि दर्शवितो—याप्रमाणें हा वैवस्वत मनूचा वंश भूमीवर जशा उच्चनीच अवस्थांनीं सांगितला आहे त्याप्रमाणें वैश्य, शूद्र व ब्राह्मण यांच्योहि त्या त्या अवस्था प्रत्येक युगामध्यें जाणाव्या ॥ ३५ ॥ हे राजा, कथामात्र अवशेष राहिलेल्या व नांवांनींच ओळखावयाच्या अशा ह्या महात्म्या पुरुषांची कीर्तीच भूमीवर अवशेष राहिली आहे ॥ ३६ ॥ आतां कलियुगांत नाश

नाब्दपरिमितेनांशेनाऽपि सहातीते सतीत्यर्थः । कृतयुगप्रवेशचिह्नमाह । यदा नृणां मन आत्मप्रकाशकं भविष्यति तदेति ॥ ३४ ॥ राजवंशोक्तां स्थितिं ब्राह्मणादिवंशेष्वप्यतिदिशति । इत्येष इति । यथा याभिरुच्चनीचावस्थाभिः । तास्ता अवस्थाः । वंशा इति वा पाठः ॥ ३५ ॥ एतत्कीर्तनस्य वैराग्योपयोगितामाह । एतेषामिति । नामैव लिंगं ज्ञापकं येषां तेषां कथामात्रेणैवावशिष्टानां कीर्तिरेव स्थिता न तु राज्यं पुत्रादयो वा ॥ ३६ ॥ कलावुत्सन्नानां राजवंशानां पुनः प्रवृत्तिप्रकारमाह । देवापि·

इत्येष मानवो वंशो यथा संख्यायते भुवि ॥ तथा विट्शूद्रविप्राणां तास्ता ज्ञेया युगे युगे ॥ ३५ ॥ एतेषां नामलिंगानां पुरुषाणां महात्मनाम् ॥ कथामात्रावशिष्टानां कीर्तिरेव स्थिता भुवि ॥ ३६ ॥ देवापिः शंतनोर्भ्राता मरुश्चेक्ष्वाकुवंशजः ॥ कलापग्राम आसाते महायोगबलान्वितौ ॥ ३७ ॥ताविहैत्य कलेरंते वासुदेवानुशिक्षितौ ॥ वर्णाश्रमयुतं धर्मं पूर्ववत्प्रथयिष्यतः ॥ ३८ ॥ कृतं त्रेता द्वापरं च कलिश्चेति चतुर्युगम् ॥ अनेन क्रमयोगेन भुवि प्राणिषु वर्तते ॥ ३९ ॥ राजन्नेते मया प्रोक्ता नरदेवास्तथाऽपरे ॥ भूमौ ममत्वं कृत्वांऽते हित्वेमां निधनं गताः ॥ ४० ॥ कृमिविड्भस्मसंज्ञांते राजनाम्नोऽपि यस्य च ॥ भूतध्रुक् तत्कृते स्वार्थं किं वेद निरयो यतः ॥ ४१ ॥

सोमवंशजः । मरुस्तु सूर्यवंशजः । कलापग्रामो नाम योगिनामावासः प्रसिद्धः ॥ ३७ ॥ ३८ ॥ इममेव प्रकारं प्रतिचतुर्युगं दर्शयति । कृतमिति ॥ ३९ ॥ एतेषां नामलिंगानामित्यादि यदुक्तं तत्प्रपंचयति । राजन्निति पंचभिः ॥ ४० ॥ ममत्वं कृत्वेत्यनेन सूचितां भूतद्रोहप्रवृत्तिं निंदति । कृमीति । राजनाम्नो राजेति नाम यस्य तस्यापि देहस्यांते कृमयो विष्ठा भस्मेति वा संज्ञा भविष्यति । तत्कृते तदर्थं यो भूतध्रुक् भूतेभ्यो द्रुह्यति स किं स्वार्थं वेद किंतु न वेदैव । कुत इत्यपेक्षायां हेतुत्वेन भूतद्रोहं विशिनष्टि । यतो भूतद्रोहान्निरयो भवति ॥ ४१ ॥

पावलेल्या राजांच्या वंशाची पुनः प्रवृत्ति होण्याचा प्रकार सांगतो—शंतनुराजाचा बंधु देवापि व इक्ष्वाकूच्या वंशांत झालेला मरु राजा हे दोघे सोमसूर्यवंशांतील होत. हे राजे, महायोगबळाच्या प्रभावानें समाधिस्थ होऊन ‘ योगिजनांचें राहण्याचें स्थान अशा ’ कलापनामक गावांमध्यें राहिले आहेत ॥ ३७ ॥ ते दोघे राजे, कलियुगाच्या शेवटीं भगवान् वासुदेवाच्या आज्ञेनें पुन्हा माघारे येऊन या भूमीवर पूर्वीप्रमाणें वर्णाश्रमधर्मांची प्रसिद्धि करितील ॥ ३८ ॥ कृत, त्रेता, द्वापर आणि कलि हीं चारहि युगें याच क्रमानें पृथ्वीवर प्राणिमात्रांचेठिकाणीं वर्तन करितील ॥ ३९ ॥ हे राजा, मी सांगितलेले हे राजे, तसेच दुसरेहि पुष्कळ राजे ह्या पृथ्वीवर ममता करून व शेवटीं हिचा त्याग करून आपणच मरण पावले आहेत ॥ ४० ॥ हे राजा, ‘नांवानें मात्र ओळखावयाच्या’ असें जें सांगितलें तें असें कीं, राजा हें नांव असलेल्याहि ज्या देहाला

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शेवटीं 'पुरिला असतां' किडे, 'कोल्ह्याकुत्र्यांनीं भक्षण केला असतां' विष्ठा व 'दग्ध झाला असतां' भस्म असें नांव प्राप्त होतें त्या देहानिमित्त जो कोणी, प्राणिमात्रांचा द्रोह करितो तो आपला स्वार्थ जाणतो काय? नाहींच जाणत. कारण,– ज्या प्राणिमात्रांच्या द्रोहानें नरक प्राप्त होतो ॥ ४१ ॥ आतां ममतेचा प्रकार सांगतो– जी अखंड पृथ्वी, माझ्या पूर्वजांनीं धारण केली होती ह्मणजे जिचें माझ्या वाडवडिलांनीं पालन केलें होतें व जी हल्लीं माझ्याकडे आहे ती अखंड पृथ्वी, माझ्या पुत्राकडे, माझ्या नातवाकडे तशीच वंशजांकडे कशीबरें राहील? ॥ ४२ ॥ याप्रमाणें ते मूर्ख राजे, तेज, उदक व अन्नमय देहाला 'हा आपला आहे' असें मानून व पृथ्वीला 'ही माझी आहे' असें मानून राहिले असतां शेवटीं देह व पृथ्वी या दोहोंचा त्याग करून मरण पावले आहेत ॥ ४३ ॥ हे राजा, ज्या ज्या राजांनीं आपल्या पराक्रमाच्या योगानें पृथ्वीचा उपभोग केला आहे त्या सर्वंहि राजांना काळानें, कथेंमध्यें कथामात्र करून ठेविलें आहे ॥ ४४ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील

ममत्वप्रकारं प्रपंचयति । कथमिति । सेयमखंडा भूर्मे पूर्वजैर्धृता सती इदानीं मत्पूर्वा च सती मत्पुत्रादेः कथं स्यादित्येवम् ॥ ४२ ॥ उभौ महीं कायं च । अदर्शनं मृत्युम् ॥ ४३ ॥ उपसंहरति । ये ये इति । ते सर्वे च कथासु क्रियमाणासु । कथामात्राः कालेन कृताः ॥ ४४ ॥ इति श्रीमद्भागवते द्वादशस्कंधे टीकायां द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥ ॥

कथं सेयमखंडा भूः पूर्वैर्मे पुरुषैर्धृता ॥ मत्पुत्रस्य च पौत्रस्य मत्पूर्वा वंशजस्य च ॥ ४२ ॥ तेजोऽबन्नमयं कायं गृहीत्वाऽऽत्मतयाऽबुधाः ॥ महीं ममतया चोभौ हित्वांऽतेऽदर्शनं गताः ॥ ४३ ॥ ये ये भूपतयो राजन्भुंजंति भुवमोजसा ॥ कालेन ते कृताः सर्वे कथामात्राः कथासु च ॥ ४४ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे द्वादशस्कंधे द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ दृष्ट्वाऽऽत्मनि जये व्यग्रान्नृपान्हसति भूरियम् ॥ अहो मां विजिगीषंति मृत्योः क्रीडनका नृपाः ॥ १ ॥ काम एष नरेंद्राणां मोघः स्याद्विदुषामपि ॥ येन फेनोपमे पिंडे येऽतिविश्रंभिता नृपाः ॥ २ ॥

तृतीये भूमिगीतैश्च राज्यदोषादि वर्ण्यते ॥ कलौ च दोषभूयिष्ठे दोषहंत्री हरेर्नतिः ॥ १ ॥ देहेऽहंतां भूमौ च ममतां कुर्वंत्यतोऽबुधा इत्युक्तं तदेव भूमिगीतैः प्रपंचयति । दृष्ट्वेत्यादिना । आत्मनि पृथिव्या जये व्यग्रानुद्युक्तान् । हासप्रकारमेवाह । अहो इति । मा माम् ॥ १ ॥ येन कामेन फेनोपमे पिंडे देहेऽतिविश्रंभिता विश्वासं नीता ये तेषां नरेंद्राणामेष कामो मोघ एव स्यात् ॥ २ ॥

द्वादशस्कंधामध्यें कलिदोषनिरूपणनामक हा दुसरा अध्याय समाप्त झाला ॥ २ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या तिसऱ्या अध्यायांत, पृथ्वीनें गायन केलेल्या वाक्यांनीं राज्याच्या दोषादिकांचें वर्णन करून, अनेकप्रकारच्या दोषांनीं युक्त असलेल्या कलियुगांत, श्रीहरीला नमस्कार करणें हेंच त्या दोषांचा नाश करणारें आहे; असें वर्णन केलें आहे ॥ १ ॥ पूर्वाध्यायांत देहावर अहंता व भूमीवर ममता धारण करणारे ते राजे मूर्ख असें सांगितलें. आतां तो त्यांचा मूर्खपणा कसा तें भूमिगीतानें वर्णन करितो– हे परीक्षित् राजा, ही पृथ्वी, आपणांस जिंकण्यासाठीं उत्सुक झालेल्या राजांना पाहून त्यांच्या मूर्खतेविषयीं हास्य करित्ये; आणि ह्मणत्ये कीं– अहो मृत्यूच्या (यमाच्या) खेळण्याचें साधनरूप झालेले हे राजे, मला जिंकण्याची इच्छा करितात! ॥ १ ॥ अहो, ज्या मनोरथानें पाण्यावरील बुडबुड्यांप्रमाणें नश्वर असलेल्या आपल्या शरीरावर 'हें अजरामर आहे असें मानून' जे राजे अत्यंत विश्वास पावतात त्या 'आपले– बाप आजावगैरे पूर्वज मृत्यु पावले व आपणहि मरणार असें' जाण- ॥ ६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

णाऱ्याहि राजांचा हा पृथ्वी जिंकण्याचा मनोरथ व्यर्थच होतो ॥ २ ॥ ते असें ह्मणतात कीं– विषयलंपट असलेल्या पुरुषास राज्यप्राप्ति होत नाहीं ह्मणून आह्मी; प्रथमतः पांच ज्ञानेंद्रियें व मन हीं सहा इंद्रियें जिंकून देवतांचा प्रसाद संपादन करूं आणि राजांचे मंत्री वश करून घेऊं. नंतर शत्रूंचा पराभव करून त्यांचे प्रधान, पुरवासी लोक, राजगुरुवगैरे आप्त व मोठमोठे हत्ती यांस आपल्या तांब्यांत घेऊं ॥ ३ ॥ अशा क्रमाक्रमानें हळूहळू समुद्रवलयांकित पृथ्वीला जिंकून राज्य करूं. अशी आशा मनांत घोळत असलेले ते राजे, जवळ आलेल्या आपल्या मृत्यूला पाहत नाहींत. ह्मणजे आशा करितांकरितांच मरून जातात ॥ ४ ॥ कितीएक तर, समुद्रवेष्टित अशा मला (सर्व पृथ्वीला) जिंकूनहि पुनः ते, अतितृष्णेनें आपल्या पराक्रमाच्या योगानें द्वीपांतरावें राज्य करण्यास जाण्याकरितां समुद्रांत प्रवेश करितात. याप्रमाणें

काममेव दर्शयति द्वाभ्याम् । पूर्वमिति । इंद्रियार्थलंपटस्य न राज्यप्राप्तिः स्यादिति प्रथममिंद्रियषड्वर्गं निर्जित्य राजमंत्रिणो जेष्यामो वशीकरिष्यामः । सचिवा अमात्याः करींद्रा हस्तिपास्तांश्च जेष्यामः । कंटकान्प्रतिपक्षान् । अस्य अपास्य । अथ कंटकानिति वा पाठः ॥ ३ ॥ ४ ॥ एवं केचिदाशाबद्धा एव केचिन्मां पुनर्जित्वाऽप्यतितृष्ण-

पूर्वं निर्जित्य षड्वर्गं जेष्यामो राजमंत्रिणः ॥ ततः सचिवपौराप्तकरींद्रानस्य कंटकान् ॥ ३ ॥ एवं क्रमेण जेष्यामः पृथ्वीं सागरमेखलाम् ॥ इत्याशाबद्धहृदया न पश्यंत्यंतिकेंऽतकम् ॥ ४ ॥ समुद्रावरणां जित्वा मां विशंत्यब्धिमोजसा ॥ कियदात्मजयस्यैतन्मुक्तिरात्मजये फलम् ॥ ५ ॥ यां विसृज्यैव मनवस्तत्सुताश्च कुरूद्वह ॥ गता यथागतं युद्धे तां मां जेष्यंत्यबुद्धयः ॥ ६ ॥ मत्कृते पितृपुत्राणां भ्रातृणां चापि विग्रहः ॥ जायते ह्यसतां राज्ये ममताबद्धचेतसाम् ॥ ७ ॥ ममैवेयं मही कृत्स्ना न ते मूढेति वादिनः ॥ स्पर्धमाना मिथो घ्नंति म्रियंते मत्कृते नृपाः ॥ ८ ॥ पृथुः पुरूरवा गाधिर्नहुषो भरतोऽर्जुनः ॥ मांधाता सगरो रामः खट्वांगो धुंधुहा रघुः ॥ ९ ॥ तृणबिंदुर्ययातिश्च शर्यातिः शंतनुर्गयः ॥ भगीरथः कुवलयाश्वः ककुत्स्थो नैषधो नृगः ॥ १० ॥

याऽब्धिं विशंति । तदेवमिंद्रियजयेन ये राज्यं साधयितुमिच्छंति तेऽतिमंदा इत्याह । कियदिति ॥ ५ ॥ अंतकं न पश्यंतीत्युक्तं तदेवाह । यामिति । कुरूद्वहेति भूमिगीतं कथयन् शुकः संबोधयति । कुलोद्वहा इति तु पाठः सुगमः ॥ ६ ॥ अबुद्धय इत्युक्तं तत्प्रपंचयति । मत्कृत इति ॥ ७ ॥ ८ ॥ रामो नाम कश्चिद्राजा । यद्वा लोकदृष्ट्या दाशरथिरेव निर्दिष्टः ॥ ९ ॥ १० ॥

जे इंद्रियें जिंकून राज्य संपादन करण्याची इच्छा करितात ते अतिमंदबुद्धि होत. कारण, इंद्रियजयाचें फळ पृथ्वीला जिंकणें हें नव्हे; तर, इंद्रियजय झाला असतां त्याचें फळ मुक्तीच झाली पाहिजे ॥५॥ हे कुरुश्रेष्ठ राजा, ती पृथ्वी आणखी असें ह्मणत्ये कीं– ज्या मला सोडून, मनु व मनूचे पुत्रवगैरे राजे, जसे (जन्मास) आले होते तसेच पुनः मरून गेले त्या मला हे निर्बुद्ध राजे, युद्धामध्यें जिंकण्याची इच्छा करितात; केवढें बरें हें आश्चर्य ! ॥ ६ ॥ पहा ! माझी माझी ह्मणून मजविषयीं आसक्तचित्त झालेल्या त्या दुष्टांचा, माझ्याकरितां पित्यापुत्रांचा व बंधुबंधूंचा परस्पर कलह होतो ॥ ७ ॥ तो असा कीं– ही संपूर्ण पृथ्वी माझीच आहे; रे मूर्खा तुझी नव्हे. असा वादविवाद करणारे ते राजे, परस्परांशीं स्पर्धा करून, माझ्यासाठीं दुसऱ्यांना मारतात व आपणहि मरण पावतात ॥ ८ ॥ ते कोणकोणते राजे ? असें ह्मणशील तर– पृथु, पुरूरवा, गाधि, नहुष, भरत, सहस्रार्जुन, मांधाता, सगर, राम[1] खट्वांग, धुंधुहा, रघु,– ॥ ९ ॥ तृणबिंदु, ययाति, शर्याति, शंतनु, गय, भगीरथ, कुवलयाश्व, ककुत्स्थ,

---

१ येथें ' राम, ' या नांवचा कोणीएक राजा किंवा लोकदृष्टीनें दशरथाचा पुत्र रामच पृथ्वीनें दर्शित केला असें जाणावें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नैषध, नृग हे राजे ॥ १० ॥ आणि हिरण्यकशिपु, वृत्र, लोकांना दुःख देणारा रावण, नमुचि, शंबर, भौम (नरकासुर), हिरण्याक्ष व तारकासुर हे दैत्य होत ॥ ११ ॥ आणि दुसरेहि पुष्कळ जे महासमर्थ असून सर्वहि सर्वज्ञ व सर्वहि स्वतां अजिंक्य असून सर्वांना जिंकणारे शूर राजे व दैत्य माझ्यावर (पृथ्वीवर) मोठी ममता करून राहिले ते मरणधर्मी असल्यामुळें त्यांचे मनोरथ पूर्ण होण्याच्या पूर्वींच त्यांना काळानें, कथामात्र अवशेष राखिलें आहे. ह्मणजे ते मरण पावोन त्यांच्या कथामात्र अवशेष राहिल्या आहेत. हे महासमर्था राजा, असें पृथ्वीनें वर्णन केलें आहे ॥ १२ ॥ १३ ॥ आतां, राजांचा वंश वर्णन केल्याचें तात्पर्य सांगतो– हे राजा, विषयांच्या असारतेचें ज्ञान व त्यापासून वैराग्य हीं निरूपण करण्याच्या इच्छेनें, लोकांमध्यें कीर्तीचा विस्तार करून मरण पावलेल्या राजांच्या ह्या कथा कथन केल्या आहेत; परंतु हे राजा, त्या केवळ वाणीच्या

लोकं रावयति रोदयतीति लोकरावणः ॥ ११ ॥ १२ ॥ मयि उच्चैर्ममतां कृत्वा येऽवर्तंत ते कालेन कथावशेषाः कृताः । विभो इति संबोधनं कुरुद्वहेतिवत् ॥ १३ ॥ राजवंशानुकथनस्य तात्पर्यमाह । कथा इमा इति । विज्ञानं विषयासारताज्ञानं ततो वैराग्यं तयोर्विवक्षया परेयुषां मृतानां वचोविभूतीर्वाग्विलासमात्ररूपा न तु परमार्थ्यं परमार्थे युक्तं कथनं न भवतीत्यर्थः ॥ १४ ॥ कस्तर्हि पुरुषाणामुपादेयः परमार्थस्तमाह । यस्त्विति । नित्यं प्रत्यहम् । तत्राप्यभीक्ष्णम् ॥ १५ ॥ कलिदोषोपचये सति भक्ते-

हिरण्यकशिपुर्वृत्रो रावणो लोकरावणः ॥ नमुचिः शंबरो भौमो हिरण्याक्षोऽथ तारकः ॥ ११ ॥ अन्ये च बहवो दैत्या राजानो
ये महेश्वराः ॥ सर्वे सर्वविदः शूराः सर्वे सर्वजितोऽजिताः ॥ १२ ॥ ममतां मय्यवर्तंत कृत्वोच्चैर्मर्त्यधर्मिणः ॥ कथाऽवशेषाः का-
लेन ह्यकृतार्थाः कृता विभो ॥१३ ॥ कथा इमास्ते कथिता महीयसां विताय लोकेषु यशः परेयुषाम् ॥ विज्ञानवैराग्यविवक्षया
विभो वचोविभूतीर्न तु पारमार्थ्यं ॥ १४ ॥ यस्तूत्तमश्लोकगुणानुवादः संगीयतेऽभीक्ष्णममंगलघ्नः ॥ तमेव नित्यं शृणुयादभी-
क्ष्णं कृष्णेऽमलां भक्तिमभीप्समानः ॥ १५ ॥ राजोवाच ॥ केनोपायेन भगवन्कलेर्दोषान्कलौ जनाः ॥ विधमिष्यंत्युपचितांस्त-
न्मे ब्रूहि यथा मुने ॥ १६ ॥ युगानि युगधर्मांश्च मानं प्रलयकल्पयोः ॥ कालस्येश्वररूपस्य गतिं विष्णोर्महात्मनः ॥ १७ ॥ श्री-
शुक उवाच ॥ कृते प्रवर्तते धर्मश्चतुष्पात्तज्जनैर्धृतः ॥ सत्यं दया तपो दानमिति पादा विभोर्नृप ॥ १८ ॥

रसंभवं मन्यमानः पृच्छति । केनोपायेनेति । विधमिष्यंति नाशयिष्यंति । यथा यथावत् ॥ १६ ॥ कलियुगे कः परो धर्म इति बुभुत्सया पृच्छति । युगानीति । ब्रूहीत्यनुषंगः । आत्यंतिकप्रलयजिज्ञासया पुनः पृच्छति । प्रलयकल्पयोः संहारस्थितिकालयोः । न चायं बहिर्मुखः प्रश्न इत्याह । कालस्येति ॥ १७ ॥ तत्र युगधर्मांस्तावदाह । कृत इति । तज्जनैस्तत्कालीनैर्जनैः । दानमरागद्वेषतयाऽभयदानम् । तदेव प्रथमस्कंधे शौचशब्देनोक्तम् । विभोः संपूर्णस्य धर्मस्य ॥ १८ ॥

विलासरूप आहेत. हाच केवळ परमार्थ असें नाहीं ॥ १४ ॥ तर मग पुरुषांना ग्राह्य असा परमार्थ कोणता ? असें ह्मणसील तर [या कथांमध्यें जो सर्व दोषांचा नाश करणारा पुण्यकीर्ति भगवंताचा गुणानुवाद, वारंवार वर्णन करण्यांत आला आहे त्याचेंच, श्रीकृष्णाचेठिकाणीं निर्मळ भक्तीची इच्छा करणाऱ्या पुरुषानें, सदोदित आणि वारंवार श्रवण करावें ॥ १५ ॥ आतां, कलिदोषांची वृद्धि झाली असतां भक्ति होणार नाहीं असें मनांत आणून [राजा ह्मणाला– हे भगवन् शुकाचार्य, कलियुगामध्यें लोक, कलीच्या वृद्धिंगत झालेल्या दोषांचा, कोणत्या उपायानें नाश करितील ? हे मुने, तें मला सविस्तर सांगावें ॥ १६ ॥ आणि युगें, युगांचे धर्म, प्रलयकालाचें व स्थितिकाळाचें प्रमाण व ईश्वररूपी विष्णुमूर्ति महात्म्या कालाची गति हींहि कथन कर ॥ १७ ॥ श्रीशुकाचार्य ह्मणाला– हे राजा, कृतयुगांत त्यावेळच्या लोकांनीं धारण केलेला चार

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

चरणांनीं पूर्ण असा धर्म प्रवृत्त होत असतो. सत्य, दया, तप व दान (रागद्वेष न करितां अभय देणें) हे संपूर्ण धर्माचे चरण होत ॥ १८ ॥ आतां त्यावेळचे लोक कसे असतात तें सांगतो– हे राजा, त्या सत्ययुगांतील जन, दैवानें जें अन्नादिक प्राप्त होईल तेवढ्यानेंच संतोष मानणारे, परदुःखाचें निराकरण करणारे, प्राणिमात्रांशीं मैत्री करणारे, शांत, दांत, सुखदुःखादि द्वंद्वांचें सहन करणारे, आत्म्याचेठिकाणीं रममाण होणारे, सर्वांवर समदृष्टि ठेवणारे व प्रायः आत्माभ्यास करणारे असे असतात. ॥ १९ ॥ आतां, त्रेतायुगांत–अनृत, हिंसा, असंतोष व कलह या अधर्माच्या चार पायांनीं, धर्माच्या चारहि पायांचा चतुर्थांश हळुहळू नष्ट होतो. ह्मणजे असत्य भाषणानें सत्यरूप पायाचा, हिंसेनें दयेचा, असंतोषानें तपाचा व कलहानें दानाचा मिळून संपूर्ण धर्माच्या चारहि पायांचा एकेक चतुर्थांश नाहींसा होतो ॥ २० ॥ हे राजा, त्या वेळीं लोक, फारशी हिंसा न करणारे व विषयांवर फारसे आसक्त न होणारे असून, यज्ञादि क्रिया व तप यांचेठिकाणीं तत्पर, धर्मार्थकामा विषयीं झटणारे, वेदोक्त

तदानींतनजनानाह । संतुष्टा इति । मैत्रा भूतमैत्रीयुक्ताः । श्रमणा आत्माभ्यासवंतः ॥ १९ ॥ अनृतेन सत्यं हिंसया दया असंतोषेण तपः विग्रहेण दानमिति यथासंख्यं योज्यम् ॥ २० ॥ ब्रह्मोत्तरा ब्राह्मणाधिकाः ॥ २१ ॥ हिंसाऽतुष्टयनृतद्वेषैरित्ययं क्रमो न विवक्षितः । धर्मस्यार्धं ह्रसति क्षीयते । अधर्मस्य लक्षणैश्चिह्नैः । पादैरित्यर्थः ॥ २२ ॥

संतुष्टाः करुणा मैत्राः शांता दांतास्तितिक्षवः ॥ आत्मारामाः समदृशः प्रायशः श्रमणा जनाः ॥ १९ ॥ त्रेतायां धर्मपादानां तुर्यांशो हीयते शनैः ॥ अधर्मपादैरनृतहिंसाऽसंतोषविग्रहैः ॥ २० ॥ तदा क्रियातपोनिष्ठा नातिहिंस्रा न लंपटाः ॥ त्रैवर्गिकास्त्रयीवृद्धा वर्णा ब्रह्मोत्तरा नृप ॥ २१ ॥ तपःसत्यदयादानेष्वर्धं ह्रसति द्वापरे ॥ हिंसातुष्ट्यनृतद्वेषैर्धर्मस्याधर्मलक्षणैः ॥ २२ ॥ यशस्विनो महाशीलाः स्वाध्यायाध्ययने रताः ॥ आढ्याः कुटुंबिनो हृष्टा वर्णाः क्षत्रद्विजोत्तराः ॥ २३ ॥ कलौ तु धर्महेतूनां तुर्यांशोऽधर्महेतुभिः ॥ एधमानैः क्षीयमाणो ह्यंते सोऽपि विनंक्ष्यति ॥ २४ ॥ तस्मिँलुब्धा दुराचारा निर्दयाः शुष्कवैरिणः ॥ दुर्भगा भूरितर्षाश्च शूद्रदासोत्तराः प्रजाः ॥ २५ ॥ सत्वं रजस्तम इति दृश्यंते पुरुषे गुणाः ॥ कालसंचोदितास्ते वै परिवर्तंत आत्मनि ॥ २६ ॥

यशस्विनः कीर्तिप्रियाः । क्षत्रद्विजोत्तराः क्षत्रियब्राह्मणप्रधानाः ॥ २३ ॥ कलौ धर्मपादानां तुर्यांशश्चतुर्थांशोऽवशिष्यते ॥ २४ ॥ शूद्रदासोत्तराः शूद्रकैवर्तादिप्रधानाः ॥ २५ ॥ युगानामेवंभूतवैषम्ये कारणमाह । सत्वमिति पंचभिः ॥ २६ ॥

कर्मांत निपुण, व ज्यामध्यें ब्राह्मणवर्णच अधिक आहे असे असतात ॥ २१ ॥ पुढें द्वापरयुगांत, हिंसा, असंतोष, मिथ्याभाषण व द्वेष या अधर्माच्या चार चरणांनीं तप, सत्य, दया व दान या धर्माच्या प्रत्येक पायांचा, ह्मणजे असत्यानें सत्याचा, हिंसेनें दयेचा, असंतोषानें तपाचा व द्वेषानें दानाचा असा अर्धा अर्धा भाग नाहींसा होतो ॥ २२ ॥ यास्तव त्या द्वापरयुगांतील लोक–कीर्तीच ज्यांना प्रिय आहे असे, उदारस्वभावाचे, वेदाध्यन करण्याविषयीं तत्पर, धनाढ्य, कुटुंबवत्सल , आनंदयुक्त व क्षत्रिय व ब्राह्मण हेच वर्ण ज्यांमध्यें मुख्य आहेत असे असतात ॥ २३ ॥ हे राजा, कलियुगांत तर, वृद्धिंगत झालेल्या व अधर्माला कारणीभूत अशा अधर्माच्या पायांनीं धर्माच्या पायांचा चतुर्थांश अवशेष राहतो व तोहि हळुहळू क्षीण होऊन शेवटीं नाश पावेल ॥ २४ ॥ त्या कलियुगांत सर्व लोक, अतिलोभी, दुराचारी, निर्दय, विनाकारण वैर करणारे, हतभाग्य, ‘ अर्थकामांसाठीं ’ अतिशय तृष्णा करणारे व शूद्र, व दास ह्मणजे कोळी वगैरे लोक हेच ज्यांत प्रमुख आहेत असे होतील ॥ २५ ॥ आतां ह्या युगांमध्यें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अशाप्रकारचें वैषम्य होण्याचें कारण सांगतो– हे राजा, सत्व, रज व तम हे गुण पुरुषाचेठिकाणीं दिसून येतात ते काळानें प्रेरणा केलेले ते गुणच, अंतःकरणांत हास्य व उल्हासवगैरे उत्पन्न करीत असतात ॥ २६ ॥ हे राजा, ज्या वेळीं मन, बुद्धि व इंद्रियें हीं सत्वगुणाचेठिकाणीं अतिशयेंकरून प्रवृत्त होतात त्या वेळीं कृतयुग प्रवृत्त झालें असें समजावें; ज्या कृतयुगांत प्राण्यांना, ज्ञानाविषयीं व तपाविषयीं अभिरुचि उत्पन्न होत्ये ॥ २७ ॥ जेव्हां मनुष्यांनो धर्म, अर्थ व काम या विषयांचेठिकाणीं प्रीति उत्पन्न होत्ये तेव्हां हे बुद्धिमंता राजा, रजोगुणप्रधान असें त्रेतायुग प्रवृत्त झालें असें धोरणानें समज ॥ २८ ॥ तसेंच जेव्हां लोभ, असंतोष, अभिमान व मत्सर हे प्रवृत्त होऊन लोकांना काम्यकर्मांवर प्रीति उत्पन्न होत्ये तेव्हां तें रजोगुणतमोगुणप्रधान द्वापरयुग प्रवृत्त झालें असें समजावें ॥ २९ ॥ आणि ज्या काळीं, कपट, असत्य, आलस्य,

---

मनश्च बुद्धिश्चेंद्रियाणि च सत्वे यदा प्रभवंत्यतिशयेन वर्तंते ॥ २७ ॥ यदा कर्मादिषु भक्तिः प्रीतिस्तदा रजोवृत्तिप्रधानं त्रेतायुगमिति जानीहि ॥ २८ ॥ काम्यानां कर्मणां विषये यदा प्रीतिस्तत्तदा रजस्तमःप्रधानं द्वापरं जानीहीति पूर्वेणानुषंगः ॥ २९ ॥ विषादनं दुःखम् ॥ ३० ॥ कलिदोषान्प्रपंचयति । यस्मादित्यादिना । यस्मात्कलेर्हेतोः । क्षुद्रदृशो मंदम-

प्रभवंति यदा सत्वे मनोबुद्धींद्रियाणि च ॥ तदा कृतयुगं विद्याज्ज्ञाने तपसि यद्रुचिः ॥ २७ ॥ यदा कर्मसु काम्येषु भक्तिर्भवति देहिनाम् ॥ तदा त्रेता रजोवृत्तिरिति जानीहि बुद्धिमन् ॥ २८ ॥ यदा लोभस्त्वसंतोषो मानो दंभोऽथ मत्सरः ॥ कर्मणां चापि काम्यानां द्वापरं तद्रजस्तमः ॥ २९ ॥ यदा मायाऽनृतं तंद्रा निद्रा हिंसा विषादनम् ॥ शोको मोहो भयं दैन्यं स कलिस्तामसः स्मृतः ॥ ३० ॥ यस्मात्क्षुद्रदृशो मर्त्याः क्षुद्रभाग्या महाशनाः ॥ कामिनो वित्तहीनाश्च स्वैरिण्यश्च स्त्रियोऽसतीः ॥ ३१ ॥ दस्यूत्कृष्टा जनपदा वेदाः पाखंडदूषिताः ॥ राजानश्च प्रजाभक्षाः शिश्नोदरपरा द्विजाः ॥ ३२ ॥ अव्रता बटवोऽशौचा भिक्षवश्च कुटुंबिनः ॥ तपस्विनो ग्रामवासा न्यासिनो ह्यर्थलोलुपाः ॥ ३३ ॥

तयः । क्षुद्रभाग्या अल्पभाग्याः । महाशना बह्वाहाराः । वित्तहीना अपि कामिनश्च । स्वैरिण्यः पुंश्चल्यः । असतीरसत्यः ॥ ३१ ॥ दस्यव उत्कृष्टाः प्रचुरा येषु ते ॥ ३२ ॥ अव्रता विहिताचारशून्याः अशौचाः शौचशून्याश्च बटवो ब्रह्मचारिणो भविष्यंति । कुटुंबिनश्च गृहस्थाः स्वयं भिक्षाटनपरा भविष्यंति न तु भिक्षां दास्यंति । तपस्विनो वनस्था वनं हित्वा ग्रामवासा भविष्यंति । न्यासिनो यतयोऽतीवार्थलोलुपा भविष्यंति ॥ ३३ ॥

निद्रा, हिंसा, दुःख, शोक, मोह, भय आणि दीनता हीं उत्पन्न होतात तेव्हां तें पूर्णतमोगुणी कलियुग असें जाणावें ॥ ३० ॥ ज्या कलीमध्यें लोक,– मंदमति, अल्पभाग्य, अतिआहार करणारे व निर्धन असूनहि विषयासक्त होतील. तशाच स्त्रियाहि व्यभिचारिणी व दुष्ट होतील ॥ ३१ ॥ तसेंच ज्या कलीमध्यें सर्व देश, बहुत चोरांनीं युक्त होतील; वेद, पाखंडमार्गानें दूषित होतील; राजे लोक, प्रजाभक्षक म्हणजे त्यांचें सर्वस्व लुटून खाणारे होतील. ब्राह्मण, शिश्न व उदर यांविषयीं तत्पर होऊन ते आपलीं यज्ञयागादिक कर्तव्यकर्में करणार नाहींत ॥ ३२ ॥ ब्रह्मचारी, आपल्या आश्रमाला उचित असा आचार व शुचिर्भूतपणा ठेवणार नाहींत; गृहस्थ लोक, स्वतः भिक्षा मागतील, मग दुसऱ्यांना भिक्षा घालण्याची गोष्ट तर कशाला पाहिजे ? तपस्वी अरण्य सोडून गांवांत येऊन राहूं लागतील व संन्याशी द्रव्याकरितां अतिलंपट होतील ॥ ३३ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

~~आतां पुन्हा स्त्रि~~यांचा स्वभाव सांगतो- स्त्रिया, ठेंगण्या, अतिआहार करणाऱ्या, पुष्कळ मुलें होणाऱ्या, निर्लज्ज, निरंतर कठोर किंवा अप्रिय भाषण करणाऱ्या आणि चोरी, कपट व अतिसाहस करणाऱ्या होतील ॥ ३४ ॥ वाणी लोक हलकट व ठकविणारे होऊन कपटानें देण्याघेण्याचा व्यापार करितील; आणखी सर्वलोक, संकट नसतांहि निंद्यवृत्तीलाच चांगली असें मानतील ॥ ३५ ॥ चाकर लोक, सर्वांमध्यें उत्तम (श्रेष्ठ) असूनहि द्रव्यहीन झालेल्या आपल्या स्वामीचा त्याग करितील आणि स्वामीहि, रोगादिक कारणांनीं काम करण्यास असमर्थ झालेल्या कुलपरंपरागतहि आपल्या सेवकाचा व वृद्धपणामुळें दूध देत नाहींशा झालेल्या गाईंचा त्याग करितील ॥ ३६ ॥ हे राजा, कलियुगांत ~~मैथुननिमित्त मैत्री करणारे व स्त्री~~वश असल्यामुळें दीन झालेले पुरुष, पिता, बंधु, मित्र व ज्ञाति यांचा त्याग करून आपल्या भार्येच्या बहिणी व भाऊ यांच्या बरावर मसलदी करणारे होतील ॥ ३७ ॥ तपस्व्यांचा वेष घेऊन निर्वाह करणारे शूद्र, प्रतिग्रह (दानें) घेतील. धर्म न

पुनरपि स्त्रीणां स्वभावमाह । ह्रस्वकाया इति । कटुकभाषिण्योऽप्रियवादिन्यः । चौर्यं च माया कपटमुरु च साहसं यासां ताः ॥ ३४ ॥ किंच । किराटा वणिजः । पणयिष्यंति क्रयविक्रयादिव्यवहारं प्रवर्तयिष्यंति । किंच । सर्वे जना अनापद्यपि जुगुप्सितां निंदितां वार्तां वृत्तिं साधु मंस्यंते ॥ ३५ ॥ सर्वोत्तममपि पतिं द्रव्यहीनं भृत्यास्त्य-

ह्रस्वकाया महाहारा भूर्यपत्या गतह्रियः ॥ शश्वत्कटुकभाषिण्यश्चौर्यमायोरुसाहसाः ॥ ३४ ॥ पणयिष्यंति वै क्षुद्राः किराटाः कूटकारिणः ॥ अनापद्यपि मंस्यंते वार्तां साधु जुगुप्सिताम् ॥ ३५ ॥ पतिं त्यक्ष्यंति निर्द्रव्यं भृत्या अप्यखिलोत्तमम् ॥ भृत्यं विपन्नं पतयः कौलं गाश्च पयस्विनीः ॥ ३६ ॥ पितृभ्रातृसुहृज्ज्ञातीन्हित्वा सौरतसौहृदाः ॥ ननांदृश्यालसंवादा दीनाः स्त्रैणाः कलौ नराः ॥ ३७ ॥ शूद्राः प्रतिग्रहीष्यंति तपोवेषोपजीविनः ॥ धर्मं वक्ष्यंत्यधर्मज्ञा अधिरुह्योत्तमासनम् ॥ ३८ ॥ नित्यमुद्विग्नमनसो दुर्भिक्षकरकर्शिताः ॥ निरन्ने भूतले राजन्ननावृष्टिभयातुराः ॥ ३९ ॥ वासोन्नपानशयनव्यवायस्नानभूषणैः ॥ हीनाः पिशाचसंदर्शा भविष्यंति कलौ प्रजाः ॥ ४० ॥ कलौ काकिणिकेऽप्यर्थे विगृह्य त्यक्तसौहृदाः ॥ त्यक्ष्यंति च प्रियान्प्राणान्हनिष्यंति स्वकानपि ॥ ४१ ॥ न रक्षिष्यंति मनुजाः स्थविरौ पितरावपि ॥ पुत्रान्सर्वार्थकुशलान्क्षुद्राः शिश्नोदरंभराः ॥ ४२ ॥

क्ष्यंति । पतयश्च विपन्नं रोगादिभिर्व्यापाराक्षमं कौलं कुलपरंपरायातं त्यक्ष्यंति । अपयस्विनीर्दुग्धदोहाः ॥ ३६ ॥ सौरतं सुरतनिमित्तं सौहृदं येषां ते । त एव ननांदरोऽत्र भार्याभगिन्यः श्याला भार्याभ्रातरस्तैः संवादो मंत्रालोचनं येषां ते । ननंद इति वा पाठः ॥ ३७ ॥ ३८ ॥ ३९ ॥ पिशाचसंदर्शाः पिशाचसदृशाः ॥ ४० ॥ काकिणिके- विंशतिवराटकामात्रेऽप्यर्थे विषयभूते । विगृह्य वैरं कृत्वा ॥ ४१ ॥ ४२ ॥

जाणणारे लोक, उत्तम (उंच) आसनावर बसून धर्मोपदेश करितील ॥ ३८ ॥ हे राजा, कलियुगांत अनावृष्टीच्या भयानें व्याकुळ झालेल्या प्रजा,- पृथ्वीमंडळावर कोठेंच अन्न नाहींसें झालें म्हणजे दुष्काळ व राजकर यांच्या योगानें पीडित होऊन निरंतर उद्विग्नचित्त होत्सात्या वस्त्र, अन्न, पान, शय्या, मैथुन, स्नान व भूषणें यांनीं रहित झाल्यामुळें पिशाचासारख्या दिसूं लागतील ॥ ३९ ॥ ४० ॥ कलियुगांत लोक, वीस कवड्यां इतक्याहि द्रव्यासाठीं स्नेह टाकून वैर करितील व आपल्या आप्तांसुद्धां ठार मारतील व त्यांना मारण्यास असमर्थ असल्यास आपल्या प्रिय प्राणांचाहि त्याग करितील म्हणजे आपणहि मरतील ॥ ४१ ॥ शिश्न व उदर यांची तृप्ति करणारे नीच मनुष्य, वृद्ध अशा आपल्या मातापितरांचें व सर्व विषयांत कुशळ अशा आपल्या पुत्रांचेंहि रक्षण करणार नाहींत ॥ ४२ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां मोठाच अनर्थ सांगतो–हे राजा, कलियुगांत बहुतकरून वेदविरुद्ध मार्गांनीं विक्षिप्तचित्त झालेले मनुष्य, त्रैलोक्याचे अधिपति ब्रह्मादिक देवहि ज्याच्यी चरणकमळाला नमस्कार करितात असा जो जगतांचा परम गुरु भगवान् अच्युत त्याची पूजा करणार नाहींत ॥ ४३ ॥ अहो मरणोन्मुख झालेल्या, रोगानें आतुर होऊन परवश झालेल्या किंवा पडत अडखळत असलेल्या मनुष्यानें, ज्याचें नांव उच्चारिलें असतां तो कर्मबंधापासून मुक्त होऊन उत्तम गतीला प्रवतो, त्या भगवंताचें कलियुगांत लोक पूजन करणार नाहींत ॥ ४४ ॥ याप्रमाणें कलियुगाचे दोष सांगून आतां त्यांचा तरणोपाय सांगतो–हे राजा, अंतःकरणांत स्फुरण पावणारा भगवान् पुरुषोत्तम , पुरुषांच्या निषिद्ध पदार्थ, निषिद्ध देश व विषयासक्त मन यांपासून उत्पन्न होणाऱ्या कलिकृत सर्व दोषांचें हरण करितो ॥ ४५ ॥ श्रवण,

---

महांतमनर्थमाह द्वाभ्याम् । कलाविति । त्रिलोकनाथैरानतं नमस्कृतं पादपंकजं यस्य तम् । न यक्ष्यंति न पूजयिष्यंति । पाखंडैर्विभिन्नमन्यथाकृतं चेतो येषां ते ॥ ४३ ॥ विवशो गृणन्सन् । विमुक्ताः कर्मरूपा अर्गलाः प्रतिबंधा यस्य सः ॥ ४४ ॥ तदेवं कलिदोषान्प्रपंच्य प्रस्तुतं तन्निस्तारोपायमाह। पुंसामिति षड्भिः । द्रव्यदेशात्मभिः संभवो

कलौ न राजन् जगतां परं गुरुं त्रिलोकनाथानतपादपंकजम् ॥ प्रायेण मर्त्या भगवंतमच्युतं यक्ष्यंति पाखंडविभिन्नचेतसः ॥ ४३ ॥ यन्नामधेयं म्रियमाण आतुरः पतन्स्खलन्वा विवशो गृणन्पुमान् ॥ विमुक्तकर्मार्गल उत्तमां गतिं प्राप्नोति यक्ष्यंति न तं कलौ जनाः ॥ ४४ ॥ पुंसां कलिकृतान्दोषान्द्रव्यदेशात्मसंभवान् ॥ सर्वान्हरति चित्तस्थो भगवान्पुरुषोत्तमः ॥ ४५ ॥ श्रुतः संकीर्तितो ध्यातः पूजितश्चादृतोऽपि वा ॥ नृणां धुनोति भगवान् हृत्स्थो जन्मायुताशुभम् ॥ ४६ ॥ यथा हेम्नि स्थितो वह्निर्दुर्वर्णं हंति धातुजम् ॥ एवमात्मगतो विष्णुर्योगिनामशुभाशयम् ॥४७॥ विद्यातपःप्राणनिरोधमैत्रीतीर्थाभिषेकव्रतदानजप्यैः ॥ नात्यंतशुद्धिं लभतेंऽतरात्मा यथा हृदिस्थे भगवत्यनंते ॥ ४८ ॥ तस्मात्सर्वात्मना राजन् हृदिस्थं कुरु केशवम् ॥ म्रियमाणो ह्यवहितस्ततो यासि परां गतिम् ॥ ४९ ॥

येषां तान् । चित्तस्थश्चित्ते स्फुरितः ॥ ४५ ॥ ४६ ॥ अयमेवोपायो नान्य इति सदृष्टांतमाह । यथेति । धातुजं ताम्रादिसंश्लेषजातं हेम्नो दुर्वर्णं मालिन्यं तत्र स्थितो वह्निरेव हंति हरति न तु तोयादि । एवं योगिनामपि विष्णुरेव न तु योगादिकमित्यर्थः ॥ ४७ ॥ एतदेव विवृणोति । विद्येति । विद्या देवतोपासना ॥ ४८ ॥ ४९ ॥

कीर्तन, ध्यान, पूजन किंवा आदर सत्कार केलेला भगवान्, मनुष्यांच्या हृदयांत राहून त्यांच्या हजारो जन्मांमध्यें केलेल्या पापांचा नाश करितो ॥ ४६ ॥ जसा सुवर्णाचे ठिकाणीं असलेला अग्निच, त्याला तांबेंवगैरे धातूंच्या संबंधानें प्राप्त झालेल्या मळाचा नाश करितो, पाणीवगैरे पदार्थ नाश करीत नाहींत; त्याप्रमाणें योग्यांच्या हृदयांत असलेला भगवान् विष्णूच, त्यांच्या पापवासनांचा नाश करितो; योगवगैरे साधनें नाश करित नाहींत ॥ ४७ ॥ भगवान् अनंत हृदयांत स्थित झाला असतां जशी प्राण्याच्या अंतःकरणाची अत्यंत शुद्धि होत्ये तशी विद्या, तप, प्राणांचा निरोध (प्राणायाम) मैत्री, तीर्थस्नान, व्रत, दान व मंत्रजप यांच्या योगानें होत नाहीं ॥ ४८ ॥ यास्तव हे राजा, तूंहि मरणोन्मुख झाला आहेस ह्मणून सावधान होत्साता, एकाग्रचित्त करून, भगवंताला आपल्या हृदयांत स्थापन कर ह्मणजे तेणेंकरून तूं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

उत्तम गतीला पावशील ॥ ४९ ॥ कारण—हे राजा, मरणोन्मुख झालेल्या पुरुषांनीहि ध्यान करण्यास योग्य, सर्वांचा आश्रयभूत व सर्वांचा अंतर्यामी असा भगवान् परमेश्वर, त्या ध्यान करणाऱ्या पुरुषांना आपल्या स्वरूपाच्या ऐक्यतेला पोंचवितो ॥ ५० ॥ आतां कलीची प्रशंसा करितो—दोषांचा निधीच अशा या कलीचा घेण्यासारखा एक मोठा गुण आहे. तो हा कीं—श्रीकृष्णाच्या नामसंकीर्तनानेंच मनुष्य, संसारबंधनापासून सुटून परमपदाला पावतो ॥ ५१ ॥ हे राजा, कृतयुगांत विष्णूचें ध्यान करणारास, त्रेतायुगांत विष्णूचें यज्ञांनीं यजन करणारास आणि द्वापरयुगांत विष्णूचें पूजन करणारास जें फळ प्राप्त होतें तें फळ, कलियुगांत विष्णूचें नामसंकीर्तन केल्यानेंच प्राप्त होतें ॥ ५२ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील द्वादशस्कंधामध्यें कलियुगदोषनिरूपणनामक हा तिसरा अध्याय समाप्त झाला ॥ ३ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥

आत्मभावं स्वस्वरूपम् ॥ ५० ॥ इदानीं कलिं स्तौति द्वाभ्याम् । कलेर्दोषनिधे राजन्निति ॥ ५१ ॥ तत्सर्वं हरिकीर्तनादेव कलौ भवति नान्यस्मिन्युगे । उक्तं च । ध्यायन्कृते यजन्यज्ञैस्त्रेतायां द्वापरेऽर्चयन् । यदाप्नोति तदाप्नोति कलौ संकीर्त्य केशवमिति ॥ ५२ ॥ इति श्रीमद्भागवते द्वादशस्कंधे टीकायां तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥ ॥ चतुर्थे तु चतुर्धोक्ता लया नैमित्तिकादयः ॥ तत्र संसारनिस्तारो हरिकीर्त्यैव वर्ण्यते ॥ १ ॥ कलिदोषनिवर्तकं हरिनामसंकीर्तनादिकं स एव च कलौ परमो धर्म इति प्रश्नद्वयस्योत्तरमु-

म्रियमाणैरभिध्येयो भगवान्परमेश्वरः ॥ आत्मभावं नयत्यंग सर्वात्मा सर्वसंश्रयः ॥ ५० ॥ कलेर्दोषनिधे राजन्नस्ति ह्येको महान्गुणः ॥ कीर्तनादेव कृष्णस्य मुक्तबंधः परं व्रजेत् ॥ ५१ ॥ कृते यद्ध्यायतो विष्णुं त्रेतायां यजतो मखैः ॥ द्वापरे परिचर्यायां कलौ तद्धरिकीर्तनात् ॥ ५२ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे द्वादशस्कंधे तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ कालस्ते परमाण्वादिर्द्विपरार्धावधिर्नृप ॥ कथितो युगमानं च शृणु कल्पलयावपि ॥ १ ॥ चतुर्युगसहस्रं च ब्रह्मणो दिनमुच्यते ॥ स कल्पो यत्र मनवश्चतुर्दश विशांपते ॥ २ ॥

क्तम् । यच्चान्यत्पृष्टं प्रलयकल्पयोर्मानं ब्रूहीति तदिदानीं तृतीयस्कंधोक्तकालमानानुवादपूर्वकं निरूपयति । काल इति । स कालः परमाणुर्वै यो भुंक्ते परमाणुतामित्यादिना कालः कथितः । चत्वारि त्रीणि द्वे चैकं कृतादिषु यथाक्रमम् ॥ संख्यातानि सहस्राणि द्विगुणानि शतानि चेति युगमानं कथितम् ॥ १ ॥ तत्र कल्पमानमाह । चतुर्युगेति । यत्र चतुर्दश मनवः क्रमेण भवंति ॥ २ ॥

आतां ह्या चवथ्या अध्यायांत, नैमित्तिक, प्राकृतिक, आत्यंतिक आणि नित्य असे चारप्रकारचे लय सांगितले असून त्यांमध्यें हरिकीर्तनाच्या योगानेंच संसार तरण्याचा उत्तम उपाय वर्णन केला आहे ॥ १ ॥ पूर्वाध्यायांत, हरीचें नामसंकीर्तन व स्मरणादिक केलें असतां तें कलिदोषांनां निवृत्त करितें व कलियुगांत हरिकीर्तन करणें हाच उत्तम धर्म होय; असें परीक्षित् राजाच्या दोन प्रश्नांचें उत्तर सांगितलें. दुसरें 'प्रलयाचें व कल्पाचें मान सांग' असें जें विचारलें होतें तें आतां तृतीयस्कंधांत सांगितलेल्या कालमानाचा अनुवाद करून सांगण्याकरितां श्रीशुकाचार्य ह्मणाला—हे राजा, परमाणूपासून दोन परार्धांपर्यंत असलेल्या काळाचें व कृतादियुगाचें मान मी तुला (तृतीयस्कंधांत) सांगितलें आहे. आतां कल्प (स्थिति) व प्रलय (संहार) यांचें मान सांगतों श्रवण कर ॥ १ ॥ त्यामध्यें कल्पमान असें कीं—कृत, त्रेता, द्वापर आणि कलि हीं चारहि युगें हजार वेळां होऊन गेलीं ह्मणजे तो ब्रह्मदेवाचा एक दिवस असें ह्मणतात; त्यामध्येंच अनुक्रमानें स्वायंभुवादिक चौदाहि मन्वंतरें होऊन जातात ॥ २ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां, नैमित्तिक, प्राकृतिक, आत्यंतिक, व नित्य असा जो चारप्रकारचा प्रलय आहे त्यांतून पहिला नैमित्तिक प्रलय व त्याचें मान सांगतो–त्या कल्पाच्या (ब्रह्मदेवाच्या दिवसाच्या) शेवटीं तेवढाच (चार हजार युगप्रमाणाचाच) प्रलय होतो त्याला ब्रह्मदेवाची रात्र असें ह्मणतात. हे राजा, त्या प्रलयामध्यें स्वर्ग, मृत्यु व पाताळ हे तिन्ही लोक नाश पावतात ॥ ३ ॥ त्याचें निमित्तत्व दर्शवितो–जेव्हां विश्व उत्पन्न करणारा, शेषशायी भगवान् नारायण, विश्वाचा आपल्याठिकाणीं उपसंहार करून शयन करितो तेव्हां ब्रह्मदेवहि त्या नारायणाचेठिकाणींच लीन होतो. मिळून ब्रह्मदेवाच्या निद्रारूप निमित्तानें होतो ह्मणून या प्रळयाला नैमित्तिक प्रलय असें ह्मणतात ॥ ४ ॥ आतां प्राकृतिक प्रलय सांगतो–परमेष्ठी ब्रह्मदेवाच्या आयुष्याचा दोन परार्ध वर्षें काळ निघून गेला ह्मणजे त्या वेळीं महत्तत्त्व, अहंकार व पंचतन्मात्रा (शब्द, स्पर्श, रूप,

---

प्रलयस्तु चतुर्विधः । नैमित्तिकः प्राकृतिक आत्यंतिको नित्यश्चेति । तत्र नैमित्तिकं प्रलयं मानसहितमाह । तदंत इति द्वाभ्याम् । तावान् चतुर्युगसहस्रप्रमाणः । सैव ब्राह्मी- रात्रिः ॥ ३ ॥ नैमित्तिकत्वं दर्शयति । यत्र यदा विश्वसृक् श्रीनारायणो विश्वमात्मसात्कृत्य स्वस्मिन्नुपसंहृत्य शेते । आत्मभूर्ब्रह्मा च तस्मिन् शेते । तयोरभेदविवक्षया वा ब्रह्मण एवानंतासनत्वमुक्तम् । ब्रह्मणो निद्रां निमित्तीकृत्य प्रवर्तमानो लोकत्रयप्रलयो नैमित्तिक इत्यर्थः ॥ ४ ॥ प्राकृतिकं प्रलयमाह द्वाभ्याम् । द्विपरार्धे तु ब्रह्मण आयुषि ।

तदंते प्रलयस्तावान्ब्राह्मी रात्रिरुदाहृता ॥ त्रयो लोका इमे तत्र कल्पंते प्रलयाय हि ॥ ३ ॥ एष नैमित्तिकः प्रोक्तः प्रलयो यत्र विश्वसृट् ॥ शेतेऽनंतासनो विश्वमात्मसात्कृत्य चात्मभूः ॥ ४ ॥ द्विपरार्धे त्वतिक्रांते ब्रह्मणः परमेष्ठिनः ॥ तदा प्रकृतयः सप्त कल्पंते प्रलयाय वै ॥ ५ ॥ एष प्राकृतिको राजन्प्रलयो यत्र लीयते ॥ आंडकोशस्तु संघातो विघात उपसादिते ॥ ६ ॥ पर्जन्यः शतवर्षाणि भूमौ राजन्न वर्षति ॥ तदा निरन्ने ह्यन्योऽन्यं भक्षमाणाः क्षुधार्दिताः ॥ क्षयं यास्यंति शनकैः कालेनोपद्रुताः प्रजाः ॥ ७ ॥ सामुद्रं दैहिकं भौमं रसं सांवर्तको रविः ॥ रश्मिभिः पिबते घोरैः सर्वं नैव विमुंचति ॥ ८ ॥ ततः संवर्तको वह्निः संकर्षणमुखोत्थितः ॥ दहत्यनिलवेगोत्थः शून्यान्भूविवरानथ ॥ ९ ॥

सप्त प्रकृतयो महदहंकारपंचतन्मात्राणि ॥ ५ ॥ संघातो महदादिकार्यभूतः । प्रकृतीनां तत्कार्यब्रह्मांडस्य च प्रलयात्प्राकृतिक इत्यर्थः । विघाते विघातकारणे उपसादिते सति ॥ ६ ॥ तदेवाह । पर्जन्य इत्यादिना बुद्धींद्रियार्थरूपेणेत्यतः प्राक्तनेन ग्रंथेन ॥ ७ ॥ सामुद्रादिकं सर्वं रसं रविः पिबते आकर्षति ॥ ८ ॥ अनिलवेगोत्थो वायुवेगोद्भूतः । अनिलवेगो वा इति पाठे अनिलेन वेगो यस्य सः । वाः रविणा रश्मिभिः पीतमुदकं च दहतीत्यर्थः । अनिलवेगो वै इति तु पाठः सुगमः ।

रस व गंध) ह्या सातहि प्रकृति लय पावतात व त्या प्रळयामध्यें नाश होण्याचें कारण प्राप्त झालें असतां हे राजा, महद्‌ वादिकांचा कार्यभूत हा ब्रह्मांडकोशहि लीन होतो असून हा प्राकृतिक प्रळय होय ॥ ५ ॥ ६ ॥ हे राजा, हा प्राकृतिक प्रळय होऊं लागला ह्मणजे प्रथमतः शंभर वर्षेंपर्यंत पृथ्वीवर पाऊस पडत नाहीं त्यामुळें कोठेंहि अन्न मिळत नाहींसें झालें ह्मणजे क्षुधाक्रांत व काळाच्या योगानें पीडित झालेल्या सर्व प्रजा, एकमेकांस भक्षण करूं लागून हळूहळू सर्व नाश पावतात ॥ ७ ॥ तेव्हां प्रळयकालचा तो सूर्य, आपल्या प्रखर किरणांच्या योगानें समुद्र, देह व पृथ्वी यांसंबंधी सर्व रस, शोषून घेतो व पुन्हा सोडीत नाहीं ॥ ८ ॥ नंतर, संकर्षण भगवंताच्या मुखापासून उत्पन्न झालेला व वाऱ्याच्या योगानें विशेष पेटलेला प्रळयकालीन अग्नि, ' सूर्यानें दैहिक रसाचें आकर्षण केल्यामुळें ' प्राणिरहित झालेल्या पृथ्वी, पाताळवगैरे ॥ १० ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रदेशांना जाळून टाकितो ॥ ९ ॥ तेव्हां वरून खालून व चहूंकडून, अग्नि व सूर्य यांच्या ज्वालांनीं दग्ध झालेलें हें ब्रह्मांड जळलेल्या गोमयाच्या (भस्माच्या गोळ्यासारखें) पिंडासारखें भासूं लागतें ॥१०॥ तदनंतर, शंभरांहून कांहीं अधिक वर्षेंपर्यंत प्रळयकाळचा प्रचंड वारा सुटतो व जिकडेतिकडे धुराळ्यानें भरलेलें आकाश धूम्रवर्ण होतें ॥११॥ त्यानंतर शंभर वर्षेंपर्यंत चित्रविचित्र वर्णांचे अनेक मेघ, 'हत्तीच्या सोंडेसारख्या धारांची' वृष्टि करितात व भयंकर शब्दांनीं गर्जना करितात ॥ १२ ॥ त्या वृष्टीच्या योगानें, ब्रह्मांडविवरांतील सर्वजग, जळमय होऊन जातें ॥ १३ ॥ याप्रमाणें उदकांमध्यें सर्वजग बुडून गेलें ह्मणजे भूमीच्या गंधरूप गुणाला पाणी गिळून टाकितें ह्मणजे पाण्यांत पृथ्वीचा गंधगुण लीन होतो, गंध गुणाचा नाश झाला ह्मणजे पृथ्वीहि नाश पावत्ये ॥ १४ ॥ नंतर त्या उदकाच्या रसगुणाला तेज गिळून टाकितें तेव्हां

भूविवरान्पातालादीन् शून्यात्रविणा दैहिकरसाकर्षणात्प्राणिरहितान् ॥ ९ ॥ शिखाभिर्ज्वालाभिः ॥ १० ॥ किंचिदधिकं वर्षाणां शतम् । सांवर्तकः प्रलयहेतुः परो वायुर्वाति तदा रजसाऽऽवृतं खं धूम्रं भवति ॥ ११ ॥ रभसस्वनैस्तीव्रगर्जितैः ॥ १२ ॥ ब्रह्मांडविवरमध्यगतं विश्वमेकोदकमेकार्णवोदकव्याप्तं भवति ॥ १३ ॥ उदप्लवे उदकेनाप्लवे सति ।

उपर्यधः समंताच्च शिखाभिर्वह्निसूर्ययोः ॥ दह्यमानं विभात्यंडं दग्धगोमयपिंडवत् ॥१०॥ ततः प्रचंडपवनो वर्षाणामधिकं शतम् ॥ परः सांवर्तको वाति धूम्रं खं रजसावृतम् ॥ ११ ॥ ततो मेघकुलान्यंग चित्रवर्णान्यनेकशः ॥ शतं वर्षाणि वर्षंति नदंति रभसस्वनैः ॥ १२ ॥ तत एकोदकं विश्वं ब्रह्मांडविवरांतरम् ॥ १३ ॥ तदा भूमेर्गंधगुणं ग्रसंत्याप उदप्लवे ॥ ग्रस्तगंधा तु पृथिवी प्रलयत्वाय कल्पते ॥ १४ ॥ अपां रसमथो तेजस्ता लीयंतेऽथ नीरसाः ॥ ग्रसते तेजसो रूपं वायुस्तद्रहितं तदा ॥ १५ ॥ लीयते चानिले तेजो वायोः खं ग्रसते गुणम् ॥ स वै विशति खं राजंस्ततश्च नभसो गुणम् ॥ १६ ॥ शब्दं ग्रसति भूतादिर्नभस्तमनु लीयते तैजसश्चेंद्रियाण्यंग देवान्वैकारिको गुणैः ॥ १७ ॥ महान् ग्रसत्यहंकारं गुणाः सत्वादयश्च तम् ॥ ग्रसतेऽव्याकृतं राजन् गुणान्कालेन चोदितम् ॥ १८ ॥ न तस्य कालावयवैः परिणामादयो गुणाः ॥ अनाद्यनंतमव्यक्तं नित्यं कारणमव्ययम् ॥ १९ ॥

प्रलयत्वायाभावाय ॥ १४ ॥ १५ ॥ १६ ॥ भूतादिस्तामसोऽहंकारः । गुणैर्वृत्तिभिः सह ॥ १७ ॥ अव्याकृतं प्रधानम् ॥ १८ ॥ तस्य तु लयो नास्तीत्याह । न तस्येति कालावयवैरहोरात्रादिभिः । गुणा भावविकाराः । परिणामो विपरिणामः । अव्यक्तमस्तित्वविकारशून्यम् । नित्यं सर्वदैकरूपं ऱ्हासवृद्धिरहितमित्यर्थः । अव्ययमपक्षयशून्यम् । सर्व-

---

निरस झालेलें तें पाणी तेजाचेठिकाणीं लीन होतें. मग तेजाच्या रूपगुणाला वायु ग्रासून टाकितो, तेव्हां रूपानें रहित झालेलें तें तेज वायूमध्यें लीन होतें. नंतर वायूच्या स्पर्शगुणाला आकाश गिळून टाकितें, मग तो वायु आकाशांत प्रविष्ट होतो. आकाशाच्या शब्दगुणाला, तामसाहंकार गिळून टाकितो, मग तें आकाशहि त्या तामसाहंकारांत लीन होतें. हे राजा, नंतर, इंद्रियांना त्यांच्या वृत्तीसहवर्तमान राजसाहंकार गिळून टाकीतो आणि इंद्रियांच्या देवतांना सात्विक अहंकार गिळून टाकितो ॥१५॥१६॥१७॥ त्या तामस, राजस व सात्विक अशा तीनप्रकारच्याहि अहंकाराला, महत्तत्त्व गिळून टाकितें; त्या महत्तत्त्वाला, सत्वादि गुण ग्रासून टाकितात. हे राजा नंतर, काळानें प्रेरित झालेलें प्रधान (प्रकृति) त्या सत्वादि तिन्हीं गुणांना ग्रासून टाकितें, ह्मणजे ते गुण त्यांत मिळून जातात ॥ १८ ॥ त्या प्रधानालामात्र काळाच्या अहोरात्रादि अवयवांनीं परिणामादिक विकार होत नाहींत; कारण, तें आदि व अंत यांनीं रहित आहे, तसेंच अव्यक्त (अस्तित्वविकारानें रहित) आहे, ह्मणूनच दिसण्यांत येत नाहीं; तें सदोदित

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सारखें (क्षयवृद्धिरहित) असतें व तें कधींच नाश पावत नाहीं; तें सर्वांचें कारण आहे ॥ १९ ॥ ज्याठिकाणीं वाणी, मन, सत्वगुण, रजोगुण, तमोगुण, महत्तत्त्वादिक विकार, प्राण, बुद्धि, इंद्रियें व देवता तसाच हा लोकरूप रचनाविशेष मुळींच नाहीं ॥ २० ॥ जेथें स्वप्न, जाग्रत् व सुषुप्ति ह्या तीन अवस्था, आकाश, जल, भूमि, वायु, अग्नि व सूर्य हीं मुळींच राहत नाहींत. आणि जें इंद्रियरहित असल्यामुळें निजल्यासारखें व तर्क करण्यास अशक्य असल्यामुळें शून्यासारखें प्रतीतीला येतें परंतु शून्य नव्हे. हे राजा, तेंच जगाचें मूळभूत तत्त्व असें तत्त्ववेत्ते पुरुष वर्णन करितात ॥ २१ ॥ ज्या वेळीं पुरुष व प्रकृति यांच्या सत्वादिक शक्ति, काळाच्या योगानें पराभव पावल्यामुळें परवश होऊन लय पावतात त्या वेळीं हा प्राकृतिक लय होतो ॥ २२ ॥ आतां तिसरा आत्यंतिक लय (मोक्ष) सांगतो– तो मोक्ष ब्रह्मज्ञानानें सर्व प्रपंचाचा

त्र हेतुः कारणमिति ॥ १९ ॥ किंच । वागादिगोचरस्य सविशेषस्य विकारा भवंतीदं तु न तथेत्याह । न यत्रेति द्वाभ्याम् । लोककल्पो लोकरूपः सन्निवेशो रचनाविशेषो नास्ति ॥ २० ॥ स्वप्नजाग्रत्स्वप्नजागरावस्थायुक्तम् । संसुप्तवदिंद्रियाभावात् । शून्यसादृश्ये हेतुः । अप्रतर्क्यं न पुनः शून्यमेवेत्याह । तदिति ॥ २१ ॥ उपसंहरति । लय इति । शक्तयः सत्वादयः ॥ २२ ॥ आत्यंतिकं लयमाह । बुद्धींद्रियेति द्वादशभिः । आत्यंतिकलयो मोक्षः । स च ब्रह्मज्ञानेन सर्वप्रपंचलयात्मकः । न च प्रपंचस्यात्मवत्सत्यत्वे लयः संभवतीति ज्ञानरूपाद्ब्रह्मणः पृथग्भूतस्य तस्यासत्त्वमुपपादयति । बुद्धिश्चेंद्रियाणि चार्थाश्चेत्येवं ग्राहककरणग्राह्यरूपेण तेषामाश्रयभूतं ज्ञानमेव भाति न पृथक् । तत्रहेतुमाह ।

न यत्र वाचो न मनो न सत्वं तमो रजो वा महदादयोऽमी ॥ न प्राणबुद्धींद्रियदेवता वा न सन्निवेशः खलु लोककल्पः ॥ २० ॥ न स्वप्नजाग्रन्न च तत्सुषुप्तं न खं जलं भूरनिलोऽग्निरर्कः ॥ संसुप्तवच्छून्यवदप्रतर्क्यं तन्मूलभूतं पदमामनंति ॥ २१ ॥ लयः प्राकृतिको ह्येष पुरुषाव्यक्तयोर्यदा ॥ शक्तयः संप्रलीयंते विवशाः कालविद्रुताः ॥ २२ ॥ बुद्धींद्रियार्थरूपेण ज्ञानं भाति तदाश्रयम् ॥ दृश्यत्वाव्यतिरेकाभ्यामाद्यंतवदवस्तु यत् ॥ २३ ॥ दीपश्चक्षुश्च रूपं च ज्योतिषो न पृथग्भवेत् ॥ एवं धीः खानि मात्राश्च न स्युरन्यतमादृतात् ॥ २४ ॥

दृश्यत्वाव्यतिरेकाभ्यामिति । अतो यदाद्यंतवत्तदवस्तु । अत्रैवं प्रयोगः । विमतं सन्न भवति । दृश्यत्वात्कारणाव्यतिरेकादाद्यंतवत्त्वाच्च रज्जुसर्पादिवदिति ॥ २३ ॥ तत्राव्यतिरेकं दृष्टांतेन प्रपंचयति । दीप इति । दीपचक्षुरूपाणां तेजोविशेषाणां तेजसो यथा न व्यतिरेकस्तथा धीः कर्त्री खानि करणानि मात्रा विषयाः ऋताद्ब्रह्मणः पृथङ्न स्युर्ब्रह्मकार्यत्वात् । नन्वेवं कार्यकारणयोरभेदे कार्यासत्त्वे कारणस्याप्यसत्त्वं प्रसज्जेत तत्राह । अन्यतमादिति । कार्यादत्यंतव्यतिरिक्ताद्ब्रह्मणः । प्रपंचाद्ब्रह्मणोऽस्ति व्यतिरेकः

लयरूप समजावा. आतां आत्म्याप्रमाणेंच जर प्रपंचाला सत्यत्व असेल तर त्याचा लय होणार नाहीं; ह्मणून ज्ञानरूप ब्रह्मापासून निराळा प्रपंचच नाहीं असें सांगतो–हे राजा, बुद्धि, इंद्रियें व विषय हे जे ग्राहक, साधन व ग्राह्यरूपानें प्रसिद्ध आहेत. त्यांच्या रूपानें त्याचें आश्रयभूत असलेलें एक ब्रह्मच भासतें, ब्रह्माहून त्यांचा निराळा भास होत नाहीं. मृत्तिकेचेठिकाणीं भासलेल्या घटशरावादिक वस्तु जशा दृश्य व आद्यंतरूप असल्यामुळें मृत्तिकेहून निराळ्या नाहींत त्याप्रमाणें ब्रह्माचेठिकाणीं भासलेला जो हा बुद्धींद्रियादिक प्रपंच तो दृश्य व आद्यंतरूप असल्यामुळें आपल्या कारणभूत ब्रह्माहून निराळा नाहीं ॥ २३ ॥ आतां ब्रह्माहून प्रपंचाचें अभिन्नत्व दृष्टांतानें स्पष्ट सांगतो– हे राजा, ज्याप्रमाणें दीपक, चक्षु व रूप हीं आपल्या कारणभूत तेजाहून पृथक् नाहींत तसें बुद्धि, इंद्रियें, व विषय हे कार्यरूप आपणाहून अत्यंत निराळें व आपलें अधिष्ठान अशा ब्रह्माहून भिन्न नाहींत. ह्मणजे सर्प भासण्याचें कारण जो रज्जु तोमात्र जसा त्या सर्पाहून अत्यंत निराळा असतो; परंतु त्यावर भासलेला सर्प ॥ ११ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रज्जूला सुटून नसतो त्याप्रमाणें प्रपंचाहून ब्रह्म निराळें आहे परंतु प्रपंचमात्र ब्रह्माहून निराळा नाहीं ॥ २४ ॥ ज्याअर्थी बुद्धीचेंच मिथ्यात्व आहे त्याअर्थी तिच्या अवस्थांचेंहि अत्यंत मिथ्यात्व आहे अशा अभिप्रायानें ह्मणतो कीं,– हे राजा, बुद्धीच्या जागृति, स्वप्न व सुषुप्ति अशा तीन अवस्था आहेत असें विवेकी जन ह्मणतात. त्या अवस्थांचा अभिमान धारण करणारें जें हें विश्वतैजसप्राज्ञरूप नानात्व तें परब्रह्माचेठिकाणीं केवळ मायेनें कल्पित आहे, खरें नव्हे ॥ २५ ॥ जसे मेघ, एकादेवेळीं आकाशांत उत्पन्न होतात व एकादेवेळीं नाश पावतात त्याप्रमाणें अवयवयुक्त व उत्पत्तिनाशयुक्त असें हें जग, परब्रह्माचेठिकाणीं (सृष्टीच्या वेळीं) उत्पन्न होतें प्रळयाच्या वेळीं नाहींसें होतें. ह्मणजे जसा घट, अवयवी व आद्यंतवान् असल्यामुळें नाश पावतो तशी मृत्तिका नाश पावत नाहीं. त्याप्रमाणें हें विश्वहि अवयवि व आद्यंतयुक्त असल्यामुळें नाश पावतें,

---

प्रपंचस्य तु सतो नास्ति व्यतिरेक इत्यर्थः ॥ २४ ॥ यदा तु बुद्धेरसत्त्वं तदा तदवस्थानां सुतरामसत्त्वमित्याशयेनाह । बुद्धेरिति । ननु विश्वतैजसप्राज्ञानामेता अवस्था न बुद्धेरित्याशंक्याह । मायामात्रमिति । इदं विश्वतैजसप्राज्ञरूपम् ॥ २५ ॥ आद्यंतवत्त्वादित्यस्य हेतोरसिद्धिमाशंक्य सावयवत्वेन साधयति । यथेति । अवयवीति । यत्सावयवं तदाद्यंतवद्घटादिवदित्यर्थः । अत उदयाप्ययादाद्यंतवत्त्वाद्विश्वं सन्न भवतीत्यर्थः । यद्वा पृथगेवागमापायित्वाद्विश्वं मिथ्या । ब्रह्म तु तदवधित्वात्सत्यमित्यनेन साध्यते । दृष्टांतस्तु पूर्वोक्त एव । यथा जलधरा व्योम्नीति दृष्टांतस्त्वागमापायि तदवधित्वमात्रे न तु मिथ्यात्वे ॥ २६ ॥ अन्यतमाहतादिति प्रतिज्ञातं कारणस्य सत्यत्वमुपपादयति । सत्यमिति । अवयवः कारणं प्रोक्तो वाचारंभणं विकारो नामधेयं मृत्तिकेत्येव सत्यमित्यादिश्रुतिभिः । अत्र युक्तिमपि दर्शयति । विनेति । अंग हे राजन् हि यस्मादर्थेनाव-

बुद्धेर्जागरणं स्वप्नः सुषुप्तिरिति चोच्यते ॥ मायामात्रमिदं राजन्नानात्वं प्रत्यगात्मनि ॥ २५ ॥ यथा जलधरा व्योम्नि भवंति न भवंति च ॥ ब्रह्मणीदं तथा विश्वमवयव्युदयाप्ययात् ॥ २६ ॥ सत्यं ह्यवयवः प्रोक्तः सर्वावयविनामिह ॥ विनाऽर्थेन प्रतीयेरन्पट-स्येवांग तंतवः ॥ २७ ॥ यत्सामान्यविशेषाभ्यामुपलभ्येत स भ्रमः ॥ अन्योन्यापाश्रयात्सर्वमाद्यंतवदवस्तु यत् ॥ २८ ॥

यविना पृथगेवावयवाः प्रतीयेरन् । यथा पटस्यावयवास्तंतवः पटात्पृथक्प्रतीयंते तद्वदिति ॥ २७ ॥ ननु कार्याभावे कारणत्वं ब्रह्मणः कुतो घटेत । सत्यम् । तदपि नातीव सत्यमित्याह । यदिति । सामान्यं कारणं विशेषः कार्यं तद्रूपेणान्योन्यापाश्रयात्परस्परापेक्षत्वेन निरूपणासहत्वादित्यर्थः । अतः कारणत्वमवधित्वं व्यापकत्वमित्यादिकमपि यत्परापेक्षत्वादाद्यंतवत्तत्सर्वमवस्त्वित्यर्थः । यद्वा तत्रैव हेत्वंतरमेतत् । यदुपलभ्येत स भ्रमः सामान्यविशेषरूपत्वात्स्वप्नवत् । अन्योऽन्यापाश्रयादितीदमपि हेत्वंतरं गुणगु-णिविशेषणविशेष्यव्याप्यव्यापकत्वादिरूपेण परस्पराधीनसिद्धित्वात् । तथाभूतस्वप्नवदिति निगमनम् । अतो यदाद्यंतवत्तत्सर्वमवस्त्विति ॥ २८ ॥

ब्रह्म नाश पावत नाहीं. ह्मणून तें ब्रह्मच सत्य होय ॥ २६ ॥ आतां 'अन्यतमात्' ह्या विशेषणानें प्रतिज्ञापूर्वक जें कारणाला (ब्रह्माला) सत्यत्व सांगितलें त्याचें उपपादन करितो–हे राजा, व्यवहारांत, सर्वहि अवयवी (घटादिक) पदार्थांना कारणाभूत जो (मृत्तिकादिक) अवयव असतो तोच सत्य असतो. याविषयीं युक्ति अशी कीं,– जसे पटाचे अवयव तंतु होत; ते पट नसतो त्यावेळींहि प्रतीतीला येतात त्याप्रमाणें घटादिक अवयव्यांवांचूनहि मृत्तिकादिक अवयव प्रतीतीला येतात. यावरून ब्रह्मावांचून जगाची मात्र प्रतीति होत नाहीं, जगावांचून ब्रह्माची होत्ये; असें सिद्ध होतें ॥ २७ ॥ आतां कार्यच नसेल तर ब्रह्माला कारणत्वतरी कसें घडेल ? घडणार नाहीं. खरें, परंतु तें कारणत्व तरी अगदीं सत्य नाहीं; असें सांगतो–कारण व कार्य यांच्या स्वरूपानें निरनिराळे जे कांहीं पदार्थ दिसून येतात त्या एकमेकांना एकमेकांची अपेक्षा असल्यामुळें तो सर्व हि भ्रमच आहे ह्मणून ज्यांना आदि व अंत आहेत ते सर्वहि पदार्थ खरे नव्हेत असें सिद्ध होतें. ह्मणून ब्रह्माचेठिकाणीं मानलेले कारणत्वादिक धर्महि आरोपित आहेत वास्त-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विक नाहींत ॥ २८ ॥ याप्रमाणें अनेक हेतूंनीं प्रपंचाचें असत्त्व साधिलें. तेथें शंका अशी कीं–प्रपंचहि प्रकाशमान असल्यामुळें त्याचें आत्म्यासारखें सत्यत्व कां होणार नाहीं? याचें उत्तर सांगतो–प्रकाशमान होणाराहि प्रपंच, प्रत्यगात्म्याच्या प्रकाशावांचून अणुमात्रसुद्धां 'प्रकाशमान आहे असें' निरूपण करतां येत नाहीं. आतां जर तो प्रपंच त्या प्रत्यगात्म्यावांचून प्रकाशमान आहे असें निरूपण करतां आलें तर, तो चिद्रूप आत्म्यासारखा स्वप्रकाशच होईल ह्मणजे आत्म्याप्रमाणें एकरूपच होईल ॥ २९ ॥ कसा असें ह्मणशील तर–हे राजा, अज्ञानी पुरुषानें सत्यपदार्थाला अनेकपणा जरी मानिला तरी तो खरा नव्हे. कारण, सत्य पदार्थाला अनेकपणा नसतोच. आतां जरी सत्यरूप आत्म्याला जीवब्रह्मरूपांनीं अनेकत्व आहे असें मानिलें तरी तें अनेकत्व, उपाधिकृत परिच्छेदअपरिच्छेदांविषयीं घटाकाशमहाकाशासारखें किंवा

तदेवमनेकैर्हेतुभिः प्रपंचस्यासत्त्वं साधितम् । तत्र शंका । ननु प्रपंचस्यापि प्रकाशमानत्वादात्मवत्सत्त्वं किं न स्यादिति तत्राह । विकार इति । ख्यायमानः प्रकाशमानोऽपि विकारः प्रपंचः प्रत्यगात्मप्रकाशं विनाऽणुमात्रोऽपि न निरूप्योऽस्ति । तं विना निरूप्यः स्याच्चेत्तर्हि सोऽपि चित्समः स्याच्चिद्रूपेणात्मना समः स्वप्रकाशो भवेत् । तथा च सति सोऽप्यात्मवत्स्यात् । एकरूपः स्यादित्यर्थः ॥ १९ ॥ कुतः इत्यत आह । नहीति । ननु सत्यस्याप्यात्मनो जीवब्रह्मरूपं नानात्वमस्त्येव तत्राह । यद्येवं नानात्वं मन्यते तर्ह्यविद्वान् । कथं तर्हि तयोर्भेदव्यवहारः उपाधिकृत इत्याह । नानात्वमिति । तत्र छिद्रयोर्घटाकाशमहाकाशयोरिवेति परिच्छेदापरिच्छेदे दृष्टांतः । ज्योतिषोराकाशजलस्थयोः सूर्ययोरिवेत्युपाधिकृतविकारसदसद्भावे । वातयोर्बाह्यशरीरस्थवाय्वोरिवेति क्रियाभेदे ॥ ३० ॥ ब्रह्मण एव प्रपंचव्यवहारालंबनत्वं दृष्टांतेन स्पष्टयति ।

विकारः ख्यायमानोऽपि प्रत्यगात्मानमंतरा ॥ न निरूप्योऽस्त्यणुरपि स्याच्चेच्चित्सम आत्मवत् ॥ २९ ॥ नहि सत्यस्य नानात्वमविद्वान्यदि मन्यते ॥ नानात्वं छिद्रयोर्यद्वज्ज्योतिषोर्वातयोरिव ॥ ३० ॥ यथा हिरण्यं बहुधा समीयते नृभिः क्रियाभिर्व्यवहारवर्त्मसु ॥ एवं वचोभिर्भगवानधोक्षजो व्याख्यायते लौकिकवैदिकैर्जनैः ॥ ३१ ॥ यथा घनोऽर्कप्रभवोऽर्कदर्शितो ह्यर्कांशभूतस्य च चक्षुषस्तमः ॥ एवं त्वहं ब्रह्मगुणस्तदीक्षितो ब्रह्मांशकस्यात्मन आत्मबंधनः ॥ ३२ ॥

यथेति । क्रियाभिस्तत्तद्रचनाभेदैर्बहुधा कटककुंडलादिरूपेण । लौकिकवैदिकैर्वचोभिः । जनैरहंकारोपहितैः ॥ ३१ ॥ नन्वहंकारस्य कथं ब्रह्मस्वरूपावरणेन भेदव्यवहारहेतुत्वं तस्य स्वकारणभूतब्रह्मावरकत्वासंभवादावरणे वा स्वस्यापि प्रकाशासंभवादित्याशंक्य सदृष्टांतमाह । यथेति । अर्करश्मय एव मेघरूपेण परिणता वर्षंति । अग्नौ प्रास्ताहुतिः सम्यगादित्यमुपतिष्ठते ॥ आदित्याज्जायते वृष्टिर्वृष्टेरन्नं ततः प्रजा इत्यादिवचनात्तस्मादर्कप्रभवः । अर्केणैव दर्शितः प्रकाशितश्च । तमःस्वरूपभूतार्कदर्शनप्रतिबंधको भवति । अहमहंकारो ब्रह्मगुणो ब्रह्मकार्यभूतस्तदीक्षितस्तेनैव प्रकाशितश्चात्मनो जीवस्यात्मबंधनो ब्रह्मस्वरूपदर्शनप्रतिबंधको भवति ॥ ३२ ॥

उपाधिकृत विकारित्वअविकारित्वांविषयीं जलप्रतिबिंबित व आकाशस्थ सूर्यांसारखें अथवा उपाधिकृत कर्मभेदांविषयीं बाह्य व शरीरस्थ वायूंसारखेंच भासतें, वास्तविक मुळींच नाहीं ॥ ३० ॥ आतां, ब्रह्मालाच प्रपंचव्यवहाराचें आश्रयत्व आहे असें दृष्टांतानें स्पष्ट करितो–हे राजा, जसें सुवर्ण, व्यवहारमार्गामध्यें कडीं कुंडलेंवगैरे अनेक अलंकारभेदानीं बहुतप्रकारचें, लोकांच्या दृष्टोत्पत्तीस येतें त्याप्रमाणेंच अधोक्षज भगवान्, अहंकारोपाधियुक्त लोकांनीं, व्यवहारांत लौकिक व वैदिक वचनांनीं नानाप्रकारें वर्णन केला आहे. सुवर्ण इंद्रियगोचर आहे आणि अधोक्षज भगवान् इंद्रियगोचर नाहीं; एवढाच कायतो भेद आहे ॥ ३१ ॥ आतां अहंकाराला ब्रह्मस्वरूपाच्या आवरणानें भेदव्यवहाराचें हेतुत्व कसें घडतें? कारण, त्याला आपल्या कारणभूत ब्रह्माचें आवरकत्व संभवत नाहीं. आवरकत्व संभवतें असें ह्मटलें तर, तो आपणासहि

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रकाशित करणार नाहींत अशी शंका आली असतां तें दृष्टांतासहित सांगतो—जसा सूर्यापासून झालेला व सूर्याच्या योगानें प्रकाश पावणारा मेघ, सूर्याच्या अंशभूत अशा चक्षु इंद्रियाला, आपल्या स्वरूपभूत सूर्यदर्शनाविषयीं प्रतिबंधक होतो त्याप्रमाणें ब्रह्माचा कार्यभूत व ब्रह्माच्या योगानें प्रकाशित झालेला अहंकार, ब्रह्मांशभूत जीवास ब्रह्मस्वरूपाच्या दर्शनाविषयीं प्रतिबंधक होतो ॥ ३२ ॥ यास्तव अहंकाराचा नाश झाला असतां ब्रह्मस्वरूपाचें दर्शन होतें असें त्याच दृष्टांतानें सांगतो—हे राजा, ज्या वेळीं तो सूर्यापासून झालेला मेघ, नाहींसा होतो त्या वेळीं चक्षुइंद्रिय आपल्या स्वरूपभूत सूर्याला अवलोकन करितें. त्याप्रमाणें ब्रह्मापासून झालेला आपला आवरक अहंकार, विचाराच्या योगानें जेव्हां नष्ट होतो तेव्हां जीवहि आपल्या स्वरूपभूत ब्रह्माला अवलोकन करितो, ह्मणजे मीच ब्रह्मरूप आहें असें पहातो ॥ ३३ ॥ हे राजा, जेव्हां

अतएवाहंकारनाशे स्वरूपदर्शनं भवतीति तेनैव दृष्टांतेनाह । घन इति । आत्मन उपाधिः । जिज्ञासया विचारेण । तर्हि तदाऽनुस्मरेत् । ब्रह्माहमिति पश्यतीत्यर्थः ॥ ३३ ॥ सोऽयमात्यंतिकः प्रलय इत्युपसंहरति । यदैवमिति । विवेकहेतिना ज्ञानशस्त्रेण । अहंकरणमेवात्मबंधनम् । अच्युतं परिपूर्णमात्मानमनुभवतीति तथा ॥ ३४ ॥ नित्यप्रलयमाह । नित्यदेति ॥ ३५ ॥ कुत इत्यत आह । कालेति । परिणामिनां नदीप्रवाहप्रदीपज्वालादीनां या उच्चनीचावस्थास्ताः कालरूपस्रोतसो वेगेनाशु ह्रियमाणस्य देहादेर्दृश्यमानास्ता एव नित्यदा जन्मप्रलयहेतवो भवंति । देहः प्रतिक्षणं प्रध्वंसी प्रतिक्षणमवस्थाभेदास्पदत्वात्प्रदीपादिवदित्यनुमानम् ॥ ३६ ॥ ननु यदि प्रतिक्षण-

घनो यदाऽर्कप्रभवो विदीर्यते चक्षुः स्वरूपं रविमीक्षते तदा ॥ यदा ह्यहंकार उपाधिरात्मनो जिज्ञासया नश्यति तर्ह्यनुस्मरेत् ॥ ३३ ॥ यदैवमेतेन विवेकहेतिना मायामयाहंकरणात्मबंधनम् ॥ छित्त्वाऽच्युतात्मानुभवोऽवतिष्ठते तमाहुरात्यंतिकमंग संप्लवम् ॥ ३४ ॥ नित्यदा सर्वभूतानां ब्रह्मादीनां परंतप ॥ उत्पत्तिप्रलयावेके सूक्ष्मज्ञाः संप्रचक्षते ॥ ३५ ॥ कालस्रोतोजवेनाशु ह्रियमाणस्य नित्यदा ॥ परिणामिनामवस्थास्ता जन्मप्रलयहेतवः ॥ ३६ ॥ अनाद्यंतवताऽनेन कालेनेश्वरमूर्तिना ॥ अवस्था नैव दृश्यंते वियति ज्योतिषामिव ॥ ३७ ॥

मवस्था भवंति तर्हि किं न दृश्यंतेऽतो हेतुरसिद्ध इत्याशंक्याह । अनाद्यंतवता कालेन जायमाना अवस्था नैव लक्ष्यंते । आकाशे गच्छतां ज्योतिषां चंद्रादीनां गमनावस्थाविशेषा यथा नैव लक्ष्यंते तद्वत् । अतो यथा तेषां प्रदेशांतरप्राप्त्या प्रतिक्षणं गत्यवस्थाः कल्प्यंते तद्वदत्रापि बाल्यतारुण्यादिदर्शनेन मध्यवर्तिन्योऽवस्थाः कल्प्यंत इति न हेतुरसिद्ध इत्यर्थः ॥ ३७ ॥

जीव, या विवेकरूप शस्त्रेंकरून मायामय अहंकाररूप आपलें बंधन छेदून टाकून, परिपूर्ण आत्मस्वरूपाचा अनुभव घेत राहतो, त्या वेळीं त्याला आत्यंतिक लय असें ह्मणतात ॥ ३४ ॥ आतां चौथा नित्य प्रळय असा कीं—हे राजा, कित्येक सूक्ष्मविचार जाणणारे विद्वान् लोक, ब्रह्मदेवादिक सर्व भूतांचे प्रतिक्षणींच उत्पत्ति प्रळय होतात असें सांगतात ॥ ३५ ॥ ते कसे होतात असें ह्मणशील तर—जशा परिणाम पावणाऱ्या नदीप्रवाह व दीपज्वाळा इत्यादिकांच्या त्या त्या उच्चनीच अवस्था क्षणोक्षणीं फेरफार होत असल्यामुळें त्यांचे उत्पत्तिनाश दर्शवितात त्याप्रमाणेंच काळरूप प्रवाहाच्या वेगानें फेरफार पावणाऱ्या देहाच्या ज्या अवस्था त्या, देहाचे क्षणोक्षणीं उत्पत्तिनाशे आहेत असें दाखविण्यास कारण होतात ॥ ३६ ॥ आतां जर प्रतिक्षणीं अवस्था होतात तर त्या दिसत कां नाहींत. असें ह्मणशील तर—हे राजा, ज्याला आदि नाहीं व अंत नाहीं अशा या परमेश्वरमूर्ति काळाच्या योगानें, आकाशांत गमन करणाऱ्या चंद्रादिकांच्या चालण्याचे अवस्थाविशेष जसे दिसत नाहींत त्याप्रमाणें काळाच्या योगानें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

देहाच्या क्षणोक्षणीं होणाऱ्या अवस्थाहि दिसत नाहींत. यास्तव, जशी त्या चंद्रादिकांच्या उदयस्तांनीं प्रतिक्षणीं होणाऱ्या मधल्या अवस्थांची कल्पना करितां येत्ये तशीच,
देहाच्याहि बाल्यवृद्धत्वादिक अवस्थांवरून मध्यवर्ती अवस्थांची कल्पना करितां येत्ये ॥ ३७ ॥ याप्रमाणें नित्य, नैमित्तिक प्राकृतिक व आत्यंतिक असा चारप्रकारचा
प्रळय सांगितला. हे राजा, अशाप्रकारची काळाची गति आहे ॥ ३८ ॥ हे कुरुकुळश्रेष्ठ राजा, सर्वांतर्यामी जगत्कर्त्या भगवान् नारायणाच्या ह्या लीलारूप कथा, मी तुला संक्षे-
पानें सांगितल्या आहेत. विस्तारानें न सांगतां संक्षेपानेंच कां सांगितल्या? असें ह्मणशील तर—विस्तारपूर्वक सांगण्यास ब्रह्मदेवहि समर्थ होणार नाहीं ॥ ३९ ॥ आतां
जर भगवत्कथा संपूर्ण सांगतां येणार नाहींत तर संक्षेपानें त्यांच्या सांगण्यानें काय उपयोग होणार आहे? असें ह्मणशील तर—हे राजा, अनेकप्रकारच्या दुःखरूप

उपसंहरति । नित्य इति ॥ ३८ ॥ पुराणार्थमुपसंहरति । एता इति । लीलाविषयाः कथा अजो ब्रह्माऽपि कात्स्न्र्येनाभिधातुं नेशः ॥ ३९ ॥ ननु यदि साकल्येनाभिधातुं न
शक्यंते तर्हि किं तदभिधानेन तत्राह । संसारेति । विविधं दुःखमेव दवो दावानलस्तेनार्दितस्य पीडितस्यात उत्तितीर्षोः पुंसो भगवतो या लीलास्तासां कथास्तासां रसस्त-

नित्यो नैमित्तिकश्चैव तथा प्राकृतिको लयः ॥ आत्यंतिकश्च कथितः कालस्य गतिरीदृशी ॥ ३८ ॥ एताः कुरुश्रेष्ठ जगद्विधातुर्ना-
रायणस्याखिलसत्त्वधाम्नः ॥ लीलाकथास्ते कथिताः समासतः कात्स्न्र्येन नाजोऽप्यभिधातुमीशः ॥ ३९ ॥ संसारसिंधुमतिदुस्तरमु-
त्तितीर्षोर्नान्यः प्लवो भगवतः पुरुषोत्तमस्य ॥ लीलाकथारसनिषेवणमंतरेण पुंसो भवेद्विविधदुःखदवार्दितस्य ॥ ४० ॥ पुराणसंहि-
तामेतामृषिर्नारायणोऽव्ययः ॥ नारदाय पुरा प्राह कृष्णद्वैपायनाय सः ॥ ४१ ॥ स वै मह्यं महाराज भगवान्बादरायणः ॥ इमां
भागवतीं प्रीतः संहितां वेदसंमिताम् ॥ ४२ ॥ एतां वक्ष्यत्यसौ सूत ऋषिभ्यो नैमिषालये ॥ दीर्घसत्रे कुरुश्रेष्ठ संपृष्टः शौनकादि-
भिः ॥ ४३ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे द्वादशस्कंधे चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥ ॥

न्निषेवणमंतरेणान्यः प्लवस्तरणसाधनं न भवेत् । उपायांतरासंभवात्तत्कथाश्रवणमेव यथाशक्ति निषेव्यमित्यर्थः ॥ ४० ॥ श्रोतुरादरदार्ढ्याय संप्रदायप्रवृत्तिमाह । पुराणसंहि-
तामिति त्रिभिः ॥ ४१ ॥ स वै बादरायणः प्रीतः सन्मह्यमिमां संहितां प्राहेति पूर्वेणान्वयः ॥ ४२ ॥ असौ सूत इति पुरतः स्थितमंगुल्या निर्दिश्याह । नैमिषालये नैमिषार-
ण्यस्थाने ॥ ४३ ॥ इति श्रीमद्भागवते द्वादशस्कंधे टीकायां चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥ ॥

दावाग्नीनें पीडित झालेल्या व तरून जाण्यास अतिकठिण अशा संसाररूप समुद्राला तरून जाण्याची इच्छा करणाऱ्या पुरुषाला, भगवान् पुरुषोत्तमाच्या लीलारूप कथा-
मृतरसाच्या सेवनाखेरीज दुसरें तरण्याचें साधनच नाहीं ह्मणून त्यानें यथाशक्ति भगवत्कथेचेंच श्रवण करावें ॥ ४० ॥ आतां श्रोत्याला विशेष आदर वाटण्याक-
रितां संप्रदायाची प्रवृत्ति सांगतो–हे राजा, पूर्वी अविनाशी अशा नरनारायण ऋषींनें, ही (भगवतसंबंधी) पुराणसंहिता नारदाला सांगितली होती. त्या नारदानें
व्यासाला सांगितली ॥ ४१ ॥ हे समर्था राजा, त्या भगवान् व्यासानें संतुष्ट होऊन, ही श्रीमद्भागवतसंबंधी वेदतुल्य संहिता मला सांगितली आहे ॥ ४२ ॥ नंतर
पुढें बसलेल्या सूताला बोटानें दाखवून ह्मणतो–हे कुरुश्रेष्ठा राजा, ही संहिता, नैमिषारण्यामध्यें, दीर्घकालानें समाप्त होणाऱ्या सत्राच्या सभेंत शौनकादिक ऋषींनीं प्रश्न
केलेला हा सूत, त्या ऋषींना सांगेल ॥ ४३ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणाच्या द्वादशस्कंधामध्यें प्रळयनिरूपणनामक हा चवथा अध्याय समाप्त झाला ॥ ४ ॥ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां या पांचव्या अध्यायांत, संक्षेपानें, परब्रह्माचा उपदेश करून परीक्षित्‌राजाला तक्षकाच्या दंशापासून होणाऱ्या मृत्यूच्या भीतीचें निवारण केलें, असें वर्णन केलें आहे ॥ १ ॥ हें भागवत पुराण श्रवण केलें असतां, अभय प्राप्त होतें असें-सांगण्याच्या अभिप्रायानें या पुराणाच्या अर्थाचें पुनः (सजाकडून) स्मरण करवीत श्रीशुकाचार्य ह्मणाला–हे राजा, या श्रीमद्भागवतामध्यें, ज्याच्या रजोगुण वृत्तिरूप हर्षापासून जगताला उत्पन्न करणारा ब्रह्मदेव झाला आहे व ज्याच्या क्रोधापासून सर्वसंहार करणारा शंकर झाला आहे, त्या भक्तांचें दुःख हरण करणाऱ्या जगदात्म्या भगवंताचें वारंवार वर्णन केलें आहे ॥ १ ॥ हे राजा, तूं तर, ह्या श्रीमद्भागवताच्या श्रवणानें कृतार्थच आहेस यास्तव ‘ मी मरेन अशा ’ ह्या अविवेकाचा त्याग कर. कारण, जसा देह, पूर्वी झालेला नसून आतां झाला आहे ह्मणून

पंचमे तु समासेन परब्रह्मोपदेशतः ॥ राज्ञस्तक्षकसंदंशान्मृत्युभीतिनिवारणम् ॥ १ ॥ एतत्पुराणं शृण्वन्नभयं प्राप्नोतीत्यभिप्रेत्य पुराणार्थमनुस्मारयति । अत्रेति । अयं भावः । जगतः कर्ता ब्रह्माऽपि यस्य प्रसादजः । प्रसादोऽत्र रजोवृत्तिर्हर्षः । ततो जातत्वात्परतंत्रः । सर्वसंहर्ता रुद्रश्च यस्य क्रोधसंभवो न तु स्वतंत्रः । स विश्वस्यात्मा नियंता भगवानत्रानुवर्ण्यते । अत एवंभूतं भगवंतं शृण्वतः कुतोऽन्यस्माद्भयशंकेति ॥ १ ॥ त्वं पुनः कृतार्थ एवेत्यनुस्मारयति । त्वं त्विति । पशुबुद्धिमविवेकम् । यस्मान्न नंक्ष्यसि । कुत इत्यत आह । न जात इति । यथा देहः प्रागभूत एवाद्य जातो नंक्ष्यति । न चैवं त्वं पूर्वं नाभूर्न चाद्य जातोऽस्यतो न नंक्ष्यसि ॥ २ ॥ ननु बीजादंकुरवत्स्वस्मात्पुत्ररूपेणापि स्वयमेव भवति । यथाऽऽह श्रुतिः । अंगादंगात्संभवसि हृदयादभिजायसे ॥ आत्मा वै पुत्रनामाऽसि स जीव शरदः शतमिति । ततः पुनरंकुराद्बीजमिव पौत्रादि-

॥ श्रीशुक उवाच ॥ अत्रानुवर्ण्यतेऽभीक्ष्णं विश्वात्मा भगवान्हरिः ॥ यस्य प्रसादजो ब्रह्मा रुद्रः क्रोधसमुद्भवः ॥ १ ॥ त्वं तु राजन्मरिष्येति पशुबुद्धिमिमां जहि ॥ न जातः प्रागभूतोऽद्य देहवत्त्वं न नंक्ष्यसि ॥ २ ॥ न भविष्यसि भूत्वा त्वं पुत्रपौत्रादिरूपवान् ॥ बीजांकुरवद्देहादेर्व्यतिरिक्तो यथाऽनलः ॥ ३ ॥ स्वप्ने यथा शिरश्छेदं पंचत्वाद्यात्मनः स्वयम् ॥ यस्मात्पश्यति देहस्य तत आत्मा ह्यजोऽमरः ॥ ४ ॥

रूपेणापि स्वयमेव भवति । पिता पुत्रेण पितृमान्योनियोनाविति श्रुतेः । अतस्तेषु नश्यत्सु कथं न नंक्ष्यामीति चेत्तत्राह । न भविष्यसीति । भूत्वा पुत्रपौत्रादिरूपवान्बीजांकुरवन्न भविष्यसि यस्माद्देहादेर्व्यतिरिक्तस्त्वं । यथाऽनलः काष्ठात् । देहाद्देहो जायते नात्मेति भावः ॥ ३ ॥ जन्मादीनां देहधर्मत्वं दृष्टांतेन प्रपंचयति । स्वप्ने यथाऽऽत्मनः शिरश्छेदं स्वयं पश्यति एवं जागरणेऽपि यस्माद्देहस्य पंचत्वादिकं पश्यति ततस्तद्द्रष्टा देवात्मन इदं भ्रममात्रम् । वस्तुतश्चात्माऽजोऽमरश्चेत्यर्थः । तदुक्तम् । आत्मनः पितृपुत्राभ्यामनुमेयौ भवाप्ययौ ॥ न भवाप्ययवस्तूनामभिज्ञोऽद्वयलक्षण इत्यादि ॥ ४ ॥

नाश पावेल तसा तूं (आत्मा) पूर्वी कधीं झालेला नसून आतांहि झाला नाहींस ह्मणून पुढेंहि नाश पावणार नाहींस ॥ २ ॥ हे राजा, जशीं बीजेंच अंकुररूपानें उत्पन्न होतात व ते अंकूर पुन्हा बीजरूपानें उत्पन्न होतात, तसा तूं पुत्रपौत्रादिरूपवान्‌ होऊन नाश पावणार नाहींस. कारण, जसा अग्नि काष्ठांत व्यापून असला तरी वस्तुतः त्याहून निराळाच असतो, तसा तूंहि देहांत व्यापून असलास तरी वस्तुतः त्याहून निराळाच आहेस. मिळून देहापासून देहच उत्पन्न होतो आत्मा उत्पन्न होत नाहीं ॥ ३ ॥ आतां जन्मादिकांना देहधर्मत्व आहे असें दृष्टांतानें स्पष्ट करितो– जसा स्वप्नामध्यें आपल्या देहाचा शिरच्छेद आपणच पाहतो, हा केवळ भ्रम आहे तसा जागृदवस्थेंमध्येंहि आपल्या देहाचे जन्मादिक विकार आपणच पाहतो, त्यांत पुत्रादिकांचें जन्म व पिता इत्यादिकांचें मरण पाहिल्यानें आपणास अशींच जन्ममरणें आहेत असें अनु-

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मान करितो व बाकीचे वृध्यादिक विकार स्वतः अनुभवानें पाहतो आणि ते विकार देहाच्या अध्यासानें आपणासच आहेत असें मानितो, हा केवळ भ्रम आहे. कारण, जन्ममरणादिकांचा द्रष्टा जो आत्मा तो त्यांहून निराळा असल्यामुळें तो जन्ममरणादिकांनीं रहित आहे ॥ ४ ॥ आतां ज्याअर्थी जीवात्म्याला हा देहोपाधीनें जन्मादिक संसारभ्रम प्राप्त झाला आहे त्याअर्थी त्या उपाधीची निवृत्ति झाली म्हणजे तो जीवात्मा मुक्त होतो असें दृष्टांतपूर्वक सांगतो–घट फुटून गेल्यावर त्यांतील आकाश जसें पूर्वीप्रमाणें महाकाशरूप होतें त्याप्रमाणें तत्त्वज्ञानानें देहाचा लय झाला असतां हा जीव पुन्हा ब्रह्मरूप होतो ॥ ५ ॥ आतां ज्ञानानें लयाची भावना करण्याकरितां आत्म्याला मायेनें केलेल्या देहादिक उपाधीच्या संबंधाचा प्रकार सांगतो–मन हेंच आत्म्याला देह, गुण व कर्में यांना उत्पन्न करितें व त्या मनाला माया

यस्माद्देहोपाधिकोऽयमात्मनो जन्मादिसंसारभ्रमस्तस्मादुपाधिनिवृत्तौ मुच्यत इति सदृष्टांतमाह । घट इति । यथा पुरा घटोपाधेः पूर्वमिव पुनर्घटे भिन्ने तदंतर्वर्त्यवकाश आकाश एव स्याद्यथा । एवं देहे मृते तत्त्वज्ञानेन लीने सति ॥ ५ ॥ ज्ञानेन लयं भावयितुं मायाकृतमात्मनो देहाद्युपाधिसंबंधप्रकारमाह । मन इति । मन आत्मनो देहादीन्सृजति । तच्च मनो माया सृजति । ततो मायाद्युपाधिसमुदायाज्जीवस्य संसृतिर्न स्वतः ॥ ६ ॥ यस्मादुपाधिनिबंधनो जीवस्य संसारोऽतस्तन्नाशे जीवत्वं गच्छतीत्येतदेव सदृष्टांतमाह सार्धेन । स्नेहेति । दीपस्य ज्योतिषो दीपत्वं ज्वालारूपः परिणामः । तत्र तैलस्थानीयं कर्म । तदधिष्ठानस्थानीयं मनः । वर्तिस्थानीयो देहः । अग्निसंयोगस्थानी-

घटे भिन्ने यथाऽकाश आकाशः स्याद्यथा पुरा ॥ एवं देहे मृते जीवो ब्रह्म संपद्यते पुनः ॥ ५ ॥ मनः सृजति वै देहान्गुणान्कर्माणि चात्मनः ॥ तन्मनः सृजते माया ततो जीवस्य संसृतिः ॥ ६ ॥ स्नेहाधिष्ठानवर्त्यग्निसंयोगो यावदीयते ॥ ततो दीपस्य दीपत्वमेवं देहकृतो भवः ॥ रजःसत्वतमोवृत्त्या जायतेऽथ विनश्यति ॥ ७ ॥ न तत्रात्मा स्वयंज्योतिर्यो व्यक्ताव्यक्तयोः परः ॥ आकाश इव चाधारो ध्रुवोऽनंतोपमस्ततः ॥ ८ ॥

यश्चैतन्याध्यासः । दीपस्थानीयः संसार इति योज्यम् । देहकृतो देहनिबंधनः । यद्वा देहकृतो मनसो न त्वात्मनः ॥ ७ ॥ अतो दीपवत्संसार एव नश्यति न त्वात्मा ज्योतिर्वेदित्याह । नेति । न तु तत्र प्रतीयमान आत्मा । कुत इत्यत आह । य इति । व्यक्ताव्यक्तयोः स्थूलसूक्ष्मदेहयोः परोऽन्यः । यतः स्वयंज्योतिः । परत्वं प्रपंचयति । आकाश इवेति । आधारो देहादेः प्रपंचस्य । ध्रुवो निर्विकारः । नास्त्यंत उपमा च यस्य सोऽनंतोपमः । ततो विभुः ॥ ८ ॥

उत्पन्न करित्ये; नंतर त्या मायावगैरे उपाधिसमुदायापासून जीवाला जन्ममरणादिरूप संसार प्राप्त होतो, स्वतः प्राप्त होत नाहीं ॥ ६ ॥ ज्याअर्थी उपाधीनें केलेलाच जीवाला संसार आहे त्याअर्थी उपाधीचा नाश झाला असतां जीवाचा जीवपणा जातो हें दृष्टांतसहित सांगतो–हे राजा, जोंपर्यंत तेल, त्याचें समईवगैरे पात्र, कापसाची वात, व अग्नीचा संयोग हे आहेत तोंपर्यंत दीपाचें दीपत्व (ज्योतीचा ज्वालारूपानें परिणाम) दृष्टी पडतो त्याप्रमाणें जोंपर्यंत तेलाच्या स्थानीं कर्म, पात्राच्या स्थानीं मन, वातीच्या स्थानीं देह, अग्निसंयोगाच्या स्थानीं चैतन्याचा अध्यास हे आहेत तोंपर्यंत; दिव्याच्या स्थानीं असलेला संसार प्रतीतीला येतो. तो तरी रजःसत्वतमोगुणांच्या वृत्तींनीं अनुक्रमें उत्पन्न होतो, रहतो व नाश पावतो ॥ ७ ॥ एतावता दिव्याचा नाश झाला असतांहि जसें पंचमहाभूतरूप तेज नाहींसें होत नाहीं त्याप्रमाणें संसाराचा नाश झाला असतांहि स्वयंप्रकाश, स्थूल सूक्ष्म देहांहून निराळा व आकाशासारखा आधार जो आत्मा तो नाश पावत नाहीं, म्हणूनच तो अनंत ॥ १४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

व निरूपम आहे ॥ ८ ॥ यास्तव हे समर्था राजा, वासुदेवाच्या वारंवार चिंतनानें युक्त असा तूं, द्रष्टा, दृश्य, अन्वय व व्यतिरेक यांच्या विचारशक्तीनें युक्त अशा आपल्या बुद्धीनें आपणच आपल्या देहादिकामध्यें असलेल्या स्वाश्रयभूत आत्म्याचें विवेचन करून घे ॥ ९ ॥ हे राजा, असें विवेचन केलें असतां, ब्राह्मणाच्या वचनानें प्रेरणा केलेला तक्षक, तुझें जाळून भस्म करणार नाहीं. कारण, मृत्यूला कारणभूत जे कालादिक आहेत तेहि मृत्यूचाहि मृत्युरूप अशा ईश्वराला जाळून टाकण्यास समर्थ होत नाहींत ॥ १० ॥ आतां, विचाराचा प्रकार दर्शवीत तक्षकाचें अदर्शन दाखवितो– हे राजा, जो मी आहे तें परमपदरूप ब्रह्म आहें व जें परमपदरूप ब्रह्म आहे तोच मी आहें अशाप्रकारें निरुपाधिक ब्रह्माचेठिकाणीं जीवात्म्याचें स्थापन करून ऐक्यरूपानें पाहणारा तूं,

अतस्त्वमेवं चिंतयेत्याह । एवमिति । आत्मस्थं देहाद्युपाधिस्थितम् । आमृश विचारय । अनुमानगर्भिण्या द्रष्टृदृश्यान्वयव्यतिरेकयुक्तया ॥ ९ ॥ एवं च सति त्वां तक्षको न दहेदित्याह । चोदित इति । तत्र हेतवः । मृत्यव इति । मृत्युहेतवः ॥ १० ॥ विमर्शप्रकारं दर्शयंस्तक्षकादर्शनं दर्शयति द्वाभ्याम् । योऽहं स ब्रह्मैव यद्ब्रह्म तदहमेवेति समीक्षन् । तत्राहंब्रह्मेति भावनया जीवस्य शोकादिनिवृत्तिः ब्रह्माहमिति भावनया च ब्रह्मणः पारोक्ष्यनिवृत्तिर्भवतीति व्यतिहारो दर्शितः।[1] निष्कले निरुपाधौ । आत्मनि ब्रह्मणि ॥ ११ ॥

एवमात्मानमात्मस्थमात्मनैवामृश प्रभो ॥ बुद्ध्याऽनुमानगर्भिण्या वासुदेवानुचिंतया ॥ ९ ॥ चोदितो विप्रवाक्येन न त्वां धक्ष्यति तक्षकः ॥ मृत्यवो नोपधक्ष्यंति मृत्यूनां मृत्युमीश्वरम् ॥ १० ॥ अहं ब्रह्म परं धाम ब्रह्माहं परमं पदम् ॥ एवं समीक्षन्नात्मानमात्मन्याधाय निष्कले ॥ ११ ॥ दशंतं तक्षकं पादे लेलिहानं विषाननैः ॥ न द्रक्ष्यसि शरीरं च विश्वं च पृथगात्मनः ॥ १२ ॥ एतत्ते कथितं तात यथाऽऽत्मा पृष्टवान्नृप ॥ हरेर्विश्वात्मनश्चेष्टां किं भूयः श्रोतुमिच्छसि ॥ १३ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे द्वादशस्कंधे ब्रह्मोपदेशो नाम पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥ ॥ सूत उवाच ॥ एतन्निशम्य मुनिनाऽभिहितं परीक्षिद्व्यासात्मजेन निखिलात्मदृशा समेन ॥ तत्पादपद्ममुपसृत्य नतेन मूर्ध्ना बद्धांजलिस्तमिदमाह स विष्णुरातः ॥ १ ॥

विषयुक्तैराननैर्दशंतं ग्रसंतं तक्षकम् । लेलिहानं सर्पम् । यद्वा लेलिहानं जिह्वाभिरोष्ठप्रांतान्सनिष्पेषमास्वादयंतम् । आत्मनः पृथक् ॥ १२ ॥ हरेश्चेष्टामात्मा त्वं यत्पृष्टवांस्तदेतत्ते कथितम् । शिष्यस्य कृतार्थतापरीक्षणाय पृच्छति । किमिति ॥ १३ ॥ इति श्रीमद्भागवते द्वादशस्कंधे टीकायां पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥ ॥ षष्ठे परीक्षितो मोक्षः सर्पहोमादि तत्सुतात् ॥ वेदशाखविभागोक्तौ त्रिवेदिव्यासवर्णनम् ॥ १ ॥ एतत्पुराणं निशम्य निखिलात्मा हरिस्तं पश्यति निखिलं वाऽऽत्मनि पश्यतीति तथा तेन अतः समेन । नते-

जिभेनें ओंठांचें प्रांत चाटणाऱ्या व विषयुक्त मुखांनीं, आपल्या पायांस दंश करणाऱ्या तक्षकाला, आपल्या देहाला व जगाला आत्म्याहून भिन्नपणें पाहणार नाहींस ॥ ११ ॥ ॥ १२ ॥ बा परीक्षित्राजा, तूं, विश्वात्म्या भगवान् श्रीहरीच्या लीलेविषयीं जसें मला विचारिलें होतेंस तसें हें सर्व मी तुला सांगितलें आहे. आतां, शिष्याची कृतार्थता झाली किंवा नाहीं याची परीक्षा पाहण्याकरितां विचारितो कीं– राजा, तूं पुन्हा काय बरें श्रवण करण्याची इच्छा करीत आहेस ? ॥ १३ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील द्वादशस्कंधामध्यें मृत्युभयनिवारणनिरूपणनामक हा पांचवा अध्याय समाप्त झाला ॥ ५ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां ह्या सहाव्या अध्यायांत, परीक्षित्राजाचा मोक्ष, त्याच्या पुत्रानें (जनमेजयानें) केलेलें सर्पसत्रादिक आणि वेदशाखांच्या विभागवर्णनांत ऋग्वेद, यजुर्वेद, व सामवेद या तीन वेदांचा व्यासानें केलेला शाखाभेदरूप विस्तार यांचें वर्णन केलें आहे ॥ १ ॥ शौनकादिक ऋषींना सूत म्हणाला– हे ऋषिहो, सर्वात्म्या श्रीहरीला निरंतर पाहणारा सर्वत्र समबुद्धि असा व्यासपुत्र श्री-

१ येथें मी ब्रह्म आहें अशा भावनेनें जीवाची शोकादिनिवृत्ति व ब्रह्म मी आहें अशा भावनेनें ब्रह्माचें अपरोक्ष ज्ञान होतें असें दर्शविलें आहे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शुकमुनीनें सांगितलेलें हें पुराण ऐकून, तो विष्णुरात परीक्षित् राजा, नम्र मस्तकानें त्या शुकाचार्यांच्या चरणकमळावर मस्तक ठेऊन व हात जोडून त्याला ह्मणाला, कीं—॥ १ ॥ हे शुकाचार्य, मी कृतार्थ झालों आहें. कारण, करुणामूर्ति अशा तूं, जें माझ्याकडून, आदिअंतरहित साक्षात् श्रीहरीचें (परब्रह्माचें) श्रवण करविलें आहेस, तो तूं माझ्यावर मोठाच अनुग्रह केला आहेस ॥ २ ॥ आतां त्याचें करुणामूर्तित्व सांगतो— हे ऋषे, भगवद्रूपी महात्म्या पुरुषांचें संसारतापानें तप्त झालेल्या अज्ञ लोकांवर जें अनुग्रह करणें तें मी, मोठेंसें आश्चर्य मानीत नाहीं; कारण, तें कृत्य त्यांचें साहजिक असतें ॥ ३ ॥ आह्मी तुह्मांपासून, जिच्यामध्यें, पुण्यकीर्ति भगवंताचेंच वारंवार वर्णन केलेलें आहे अशी ही श्रीमद्भागवतनामक पुराणसंहिता आह्मीं (सर्वांनीं) श्रवण केली आहे ॥ ४ ॥ आतां, मी कृतार्थ आहें असें पूर्वीं सांगितलें होतें त्याचें स्पष्टीक-

नावनतेन मूर्ध्ना तत्पादतलमुपसृत्य तत्पादौ शिरसि निधायेत्यर्थः ॥ १ ॥ सिद्धः कृतार्थोऽस्मि । यतोऽनुग्रहीतोऽस्मि । अनुग्रहमेवाह । यद्यस्माच्छ्रावितः वशब्दात्प्राप्तिसाधनं च श्रावितम् ॥ २ ॥ करुणात्मतामभिनंदति द्वाभ्याम् । नात्यद्भुतमिति ॥ ३ ॥ अश्रौष्म श्रुतवंतः । भवतः सकाशात् ॥ ४ ॥ सिद्धोऽस्मीत्युक्तं तदेवाविष्करोति । भगवन्निति । यतस्त्वया दर्शितं ब्रह्म प्रविष्टः । कथंभूतम् । अभयम् । यतो निर्वाणं कैवल्यरूपम् ॥ ५ ॥ किं भूयः श्रोतुमिच्छसीति यदुक्तं तत्र सिद्धोऽहं न किंचिच्छ्रोतुमिच्छामि

राजोवाच ॥ सिद्धोऽस्म्यनुगृहीतोऽस्मि भवता करुणात्मना ॥ श्रावितो यच्च मे साक्षादनादिनिधनो हरिः ॥ २ ॥ नात्यद्भुतमहं मन्ये महतामच्युतात्मनाम् ॥ अज्ञेषु तापतप्तेषु भूतेषु यदनुग्रहः ॥ ३ ॥ पुराणसंहितामेतामश्रौष्म भवतो वयम् ॥ यस्यां खलूत्तमश्लोको भगवाननुवर्ण्यते ॥ ४ ॥ भगवंस्तक्षकादिभ्यो मृत्युभ्यो न बिभेम्यहम् ॥ प्रविष्टो ब्रह्म निर्वाणमभयं दर्शितं त्वया ॥ ५ ॥ अनुजानीहि मां ब्रह्मन् वाचं यच्छाम्यधोक्षजे ॥ मुक्तकामाशयं चेतः प्रवेश्य विसृजाम्यसून् ॥ ६ ॥ अज्ञानं च निरस्तं मे ज्ञानविज्ञाननिष्ठया ॥ भवता दर्शितं क्षेमं परं भगवतः पदम् ॥ ७ ॥ सूत उवाच ॥ इत्युक्तस्तमनुज्ञाप्य भगवान्बादरायणिः ॥ जगाम भिक्षुभिः साकं नरदेवेन पूजितः ॥ ८ ॥

केवलमनुज्ञां देहीत्याह । अनुजानीहीति । वाचमित्युपलक्षणं सर्वेंद्रियाणाम् । वाचं नियम्य किं करिष्यसि तदाह । मुक्ताः कामाशयास्तद्वासना येन तच्चेतोऽधोक्षजे प्रवेश्यासून्विसृजामि ॥ ६ ॥ ननु किं प्राणत्यागेन किंचित्कालं ज्ञाननिष्ठो भवेति चेत्तत्राह । अज्ञानं चेति । चकारात्तत्संस्कारश्च । तच्च त्वत्कृपयैवेत्याह । भवतेति ॥ ७ ॥ ८ ॥

रण करितो— हे भगवन्, मी, मृत्यूला कारण असलेल्या तक्षकादिकांपासून भीत नाहीं. कारण, तूं दाखविलेल्या निर्भय मोक्षरूप ब्रह्मामध्यें प्रविष्ट झालों आहें ॥ ५ ॥ आतां काय श्रवण करण्याची इच्छा करितोस असें जें विचारिलें होतें त्याविषयीं, मी कृतार्थ झालों आहें ह्मणून कांहींच श्रवण करण्याची इच्छा करीत नाहीं, तर आतां केवळ मला ईश्वराचेठिकाणीं चित्त लावण्यास आज्ञा दे; असें सांगतो— हे श्रीशुकाचार्य, मी, आतां वाणीचें व सर्व इंद्रियांचें नियमन करून, कामवासनारहित झालेलें आपलें चित्त, अधोक्षज भगवंताचेठिकाणीं लावून प्राणाचा त्याग करितों यास्तव हें करण्याविषयीं तूं मला आज्ञा दे ॥ ६ ॥ आतां प्राणत्याग करून काय करावयाचें आहे ? कांहीं काळपर्यंत ज्ञाननिष्ठ हो असें ह्मणशील तर— तूं, भगवंताचें परम कल्याणकारक स्वरूप दाखविलें आहेस. त्यामुळें ज्ञान व विज्ञान यांच्या निष्ठेनें माझें अज्ञान व अज्ञानापासून झालेला संस्कार नष्ट झाला आहे ॥ ७ ॥ सूत ह्मणाला— हे शौनकादिक ऋषि हो, याप्रमाणें राजानें प्रार्थना करून पूजा केलेला तो भगवान् व्यासपुत्र श्रीशुक, राजाला

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आज्ञा देऊन, आपण जाण्याविषयीं राजाची आज्ञा घेऊन संन्यासीलोकांसह निघून गेला ॥ ८ ॥ श्रीशुकाचार्य गेल्यावर संशय निवृत्त झालेला, निःसंग व गंगातीरीं पूर्वदिशेकडे अग्रें केलेल्या दर्भांच्या आसनावर उत्तराभिमुख बसलेल्या अशा त्या राजर्षि परीक्षितीनेंहि बुद्धीच्या योगानें आपल्या मनाला प्रत्यगात्म्याचेठिकाणीं लाऊन परमात्म्याचें ध्यान केलें; तेव्हां तो महायोगी राजा ब्रह्मरूप होऊन, वृक्षाप्रमाणें लीनप्राण झाला ॥ ९ ॥ १० ॥ ~~याप्रमाणें ब्रह्मभूत झालेल्या त्याचेठिकाणीं तक्षकाचें येणेंवगैरे पिठाच्या पुन्हा दळण्यासारखें व्यर्थ झालें असें दर्शवितो~~ हे विप्रहो, ब्राह्मणपुत्रानें क्रुद्ध होऊन प्रेरणा केलेला तक्षक नाग, राजाला मारण्याकरितां जात असतां त्यानें मार्गामध्यें कश्यपऋषीला पाहिलें ॥ ११ ॥ ‘ तो कश्यप, तक्षकाचें विष उतरून परीक्षित्‌राजाच्या रक्षणानें द्रव्य मिळविण्याकरितां राजाकडे जात होता. त्याला पाहतांच त्याची परीक्षा करण्याकरितां तेथें एक वटवृक्ष होता. त्याला तक्षकानें दंश करून जाळून भस्म केलें. तेव्हां कश्यपानें त्या वटवृक्षाला मंत्रजपादिकेंकरून अंकुरवगैरे आणवून

आत्मना बुद्ध्या आत्मानं मन आत्मनि प्रत्यक्प्रकाशे समाधाय परमात्मानं दध्यौ । अस्पंदासुर्लीनप्राणः । यथा तरुः स्थाणुः ॥ ९ ॥ तमेव विशिनष्टि । प्राक्कूले प्रागग्रे । बर्हिषि दर्भे ॥ १० ॥ तदेवं ब्रह्मभूते तस्मिंस्तक्षकागमनादिकं पिष्टपेषणमिवाभवदिति दर्शयति । तक्षक इति त्रिभिः । हे विप्राः ॥ ११ ॥ तं विषचिकित्सया परीक्षिद्रक्षणेन

परीक्षिदपि राजर्षिरात्मन्यात्मानमात्मना ॥ समाधाय परं दध्यावस्पंदासुर्यथा तरुः ॥ ९ ॥ प्राक्कूले बर्हिष्यासीनो गंगाकूल उदङ्मुखः ॥ ब्रह्मभूतो महायोगी निःसंगश्छिन्नसंशयः ॥ १० ॥ तक्षकः प्रहितो विप्राः क्रुद्धेन द्विजसूनुना ॥ हंतुकामो नृपं गच्छन्ददर्श पथि कश्यपम् ॥ ११ ॥ तं तर्पयित्वा द्रविणैर्निवर्त्य विषहारिणम् ॥ द्विजरूपप्रतिच्छन्नः कामरूपोऽदशन्नृपम् ॥ १२ ॥ ब्रह्मभूतस्य राजर्षेर्देहोऽहिगरलाग्निना ॥ बभूव भस्मसात्सद्यः पश्यतां सर्वदेहिनाम् ॥ १३ ॥ हाहाकारो महानासीद्भुवि खे दिक्षु सर्वतः ॥ विस्मिता ह्यभवन्सर्वे देवासुरनरादयः ॥ १४ ॥ देवदुंदुभयो नेदुर्गंधर्वाप्सरसो जगुः ॥ ववृषुः पुष्पवर्षाणि विबुधाः साधुवादिनः ॥ १५ ॥ जनमेजयः स्वपितरं श्रुत्वा तक्षकभक्षितम् ॥ यथा जुहाव संक्रुद्धो नागान्सत्रे सह द्विजैः ॥ १६ ॥

द्रव्यार्जनायागच्छंतम् । तत्र स्वालीढवटवृक्षस्य भस्मीभूतस्य पुनरंकुरादिक्रमेणोत्थापनाद्विषहारिणं तदपेक्षितद्रविणैः संतर्प्य ततो निवर्त्य द्विजरूपेण तिरोहितः सन्नदशत् ॥ १२ ॥ तच्च पुत्रकृत्यमिव जातमित्याह । ब्रह्मभूतस्येति ॥ १३ ॥ तत्र क्षणं सर्वेषां दुःखं च ततः परमुत्सवं चाह द्वाभ्याम् । हाहाकार इति ॥ १४ ॥ १५ ॥ प्रासंगिकमाह । जनमेजय इत्यादि । सर्पाभिचारसत्रे द्विजैः सह वर्तमानो यथावदाजुहाव जुहावेति वा । सर्वसर्पाह्वाने कारणमाह । संक्रुद्ध इति ॥ १६ ॥

पूर्वीप्रमाणें जिवंत केलें, असें पाहून ’ तक्षकानें, त्या विष हरण करणाऱ्या कश्यपाला, अपेक्षित द्रव्यवगैरे देऊन माघारें फिरविलें आणि इच्छितरूप धारण करणाऱ्या त्या तक्षकानें ब्राह्मणवेषानें राजाजवळ जाऊन पुन्हा तक्षकरूपानें राजाला दंश केला ॥ १२ ॥ ~~तें पुत्रकृत्यासारखें झालें असें सांगतो~~ ब्रह्मरूप झालेल्या राजाचा देह, तेव्हां सर्व लोक पहात असतां तक्षकाच्या विषरूप अग्नीनें, तत्काळ भस्मरूप झाला ॥ १३ ॥ त्या प्रसंगीं क्षणभर सर्वांना दुःख झालें ~~व नंतर सर्वांनीं उत्साह केला असें सांगतो~~ त्या वेळीं पृथ्वीवर, आकाशांत व दशदिशांमध्यें जिकडेतिकडे मोठा हाहाकार शब्द झाला, आणि देव, दैत्य मनुष्यवगैरे सर्वहि लोक आश्चर्ययुक्त झाले ॥ १४ ॥ नंतर देवांनीं वाजविलेले दुंदुभि वाजूं लागले; गंधर्व अप्सरावगैरे गायन करूं लागल्या; व देव, राजाचा मोक्ष झाला हें फार चांगलें झालें असें म्हणत पुष्पांचे वर्षाव करूं लागले ॥ १५ ॥ तदनंतर, जनमेजय राजानें, आपला पिता, तक्षकानें दंश केल्यामुळें मरण पावला असें ऐकून तो क्रुद्ध होत्साता ब्राह्मणांना ऋत्विज-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वरून यज्ञामध्यें सर्व सर्पांचा होम करूं लागला ॥ १६ ॥ तेव्हां त्या सर्पसत्रांमध्यें प्रदीप्त झालेल्या अग्नींत मोठमोठे सर्प जळूं लागले असें पाहून भयानें अगदीं व्याकुळ झालेला तो तक्षक, ' रक्षणाकरितां ' इंद्राला शरण गेला ॥ १७ ॥ इकडे परीक्षितीचा पुत्र जो जनमेजय त्यानें, सर्पसत्रामध्यें तक्षक दृष्टी पडेना म्हणून ब्राह्मणांस विचारिलें कीं,– द्विज हो, सर्पांमध्यें अधम अशा त्या तक्षकाचा अजून कां तुम्ही होम करीत नाहीं ? ॥ १८ ॥ तेव्हां विप्र म्हणाले–हे राजेंद्रा जनमेजया, तो तक्षक इंद्राला शरण गेल्यामुळें इंद्र त्याचें रक्षण करीत आहे. त्या इंद्रानें तक्षकाचें स्तंभन केलें आहे म्हणून तो सर्प अग्नीमध्यें पडत नाहीं ॥ १९ ॥ याप्रमाणें ब्राह्मणांनीं सांगितलेलें ऐकून तो उदारबुद्धि परीक्षित्पुत्र जनमेजय राजा म्हणाला कीं,–हे विप्रहो, तरमग इंद्रासहवर्तमानच त्या तक्षकाला तुम्ही अग्नीमध्यें कां बरें पाडीत नाहीं ? ॥ २० ॥ हें राजाचें भाषण ऐकून, ते ब्राह्मण, इंद्रासहवर्तमान तक्षकाचें हवन करण्याकरितां मंत्र उच्चारूं लागले. ~~वो असा कीं~~– हे तक्षका, मरुत्नामक देवगणांसहित

॥ १७ ॥ १८ ॥ कस्मात्तक्षको न दह्येतेत्युक्ताः संतो द्विजा ऊचुः तमिति । तेनेंद्रेण । असौ सर्पः ॥ १९ ॥ ऋत्विजः प्रत्याह । सहेंद्र इंद्रसहितः किमिति न पात्यते ॥ २० ॥ तद्राज्ञो वचः श्रुत्वा आजुहुवुः । साक्षेपमाह्वानं दर्शयति । तक्षकेति । इहाग्नावाशु पतस्व । मरुत्वता मरुद्गणवर्तेंद्रेण सह ॥ २१ ॥ ब्राह्मणैरुक्तैराक्षेपैः परुषवाक्यैः ॥ २२ ॥

सर्पसत्रे समिद्धाग्नौ दह्यमानान्महोरगान् ॥ दृष्ट्वेंद्रं भयसंविग्नस्तक्षकः शरणं ययौ ॥ १७ ॥ अपश्यंस्तक्षकं तत्र राजा पारिक्षितो
द्विजान् ॥ उवाच तक्षकः कस्मान्न दह्येतोरगाधमः ॥ १८ ॥ तं गोपायति राजेंद्र शक्रः शरणमागतम् ॥ तेन संस्तंभितः सर्प-
स्तस्मान्नाग्नौ पतत्यसौ ॥ १९ ॥ पारीक्षित इति श्रुत्वा प्राहर्त्विज उदारधीः ॥ सहेंद्रस्तक्षको विप्रा नाग्नौ किमिति पात्यते ॥ २० ॥
तच्छ्रुत्वाऽऽजुहुवुर्विप्राः सहेंद्रं तक्षकं मखे ॥ तक्षकाशु पतस्वेह सहेंद्रेण मरुत्वता ॥ २१ ॥ इति ब्रह्मोदिताक्षेपैः स्थानादिंद्रः प्र-
चालितः ॥ बभूव संभ्रांतमतिः सविमानः सतक्षकः ॥ २२ ॥ तं पतंतं विमानेन सह तक्षकमंबरात् ॥ विलोक्यांगिरसः प्राह
राजानं तं बृहस्पतिः ॥ २३ ॥ नैष त्वया मनुष्येंद्र वधमर्हति सर्पराट् ॥ अनेन पीतममृतमथवा अजरामरः ॥ २४ ॥ जीवितं
मरणं जतोर्गतिः स्वेनैव कर्मणा ॥ राजंस्ततोऽन्यो नान्यस्य प्रदाता सुखदुःखयोः ॥ २५ ॥

तं तक्षकम् । अंगिरसः पुत्रो बृहस्पतिः प्राह ॥ २३ ॥ २४ ॥ भवतु नामाजरामरस्तथाऽपि पितृमारकं धक्ष्यामीति चेत्तत्राह । जीवितमिति । गतिः परलोकः । अतो दुर्मरणनिमित्ता पितुर्दुर्गतिरनेन कृतेत्यपि न शंकनीयमित्यर्थः ॥ २५ ॥

असणाऱ्या इंद्रासहवर्तमान तूं ' अग्नीमध्यें ' शीघ्र पड ॥ २१ ॥ याप्रमाणें ब्राह्मणांनीं उच्चालेल्या प्रेषोच्चारात्रींच्या योगानें तक्षक व विमान यांसह इंद्र, आपल्या स्थानापासून चलित झाला व गडबडून गेला ॥ २२ ॥ तेव्हां आकाशांतील विमानांतून तक्षकासहवर्तमान पडणाऱ्या त्या इंद्रास पाहून, अंगिरा ऋषीचा पुत्र बृहस्पति त्या राजाजवळ येऊन त्याला म्हणाला कीं– ॥ २३ ॥ हे मनुष्यश्रेष्ठा राजा, हा सर्पांचा राजा तक्षक, तुझ्यापासून वध पावण्यास योग्य नाहीं. कारण, यानें अमृत प्राशन केलें आहे, त्याच्या योगानें हा अजरामर झाला आहे ॥ २४ ॥ ~~आतां, हा जरी अजरामर आहे तथापि यानें माझ्या पित्याला मारिलें म्हणून मी याला जाळून टाकितों असें म्हणशील तर– प्राण्याला वांचणें, मरणें, व स्वर्गादि लोकांची प्राप्ति होणें हीं, सर्व आपल्या कर्मांच्याच योगानें होत असतात. म्हणून~~, हे राजा, दुसऱ्याला सुखदुःखें देणारा दुसरा कोणी नाहीं, म्हणून दुर्मरणनिमित्तक पित्याची वाईट गति, या तक्षकानें केली असें तूं–मनांत आणूं नकोस ॥ २५ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां सर्पादिक दिसत असल्यामुळें सुखदुःखें देणारा दुसरा कोणी नाहीं असें कसें होईल असें ह्मणशील तर–हे राजा, सर्प, चोर, अग्नि, वीज क्षुधा, तृषा किंवा व्याधी वगैरेंच्या योगानें जें मरण पावतो तें तो आपलें प्रारब्ध कर्मच भोगितो ह्मणजे त्याच्या कर्मानें प्रेरणा केलेलेच सर्पादिक त्याला दंश करितात; ते स्वतंत्र नाहींत ॥ २६ ॥ तस्मात् हे राजा, हिंसायुक्त हें सत्र आतां तूं समाप्त करावेंस. कारण पांत दुसरे निरपराधी सर्प विनाकारण दग्ध झाले आहेत. हा तरी तुझा अपराध आहे असें ह्मणतां येत नाहीं; कारण, त्यांच्या दैवानेंच तुला असी प्रेरणा केली आहे. एतस्तव सर्वहि लोक आपलें प्राचीन कर्मच भोगितात त्यांत अपराध कोणाचा ह्मणावयाचा ? ॥ २७ ॥ सूत ह्मणाला–हे ऋषिहो, याप्रमाणें बृहस्पतीनें सांगितलें असतां तो जनमेजय राजा, त्याच्या वचनास मान देत होत्साता ‘ बरें आहे ’ असें ह्मणाला व

कथमन्यः सुखदुःखप्रदाता नास्ति सर्पादीनामुपलभ्यमानत्वादिति चेत्तत्राह । सर्पादिना जंतुः पंचत्वं मृत्युमृच्छति प्राप्नोतीति यत्तदारब्धं कर्मैव भुंक्ते । स्वकर्मप्रयुक्ता एव सर्पादयो न स्वतंत्रा इति भावः ॥ २६ ॥ संस्थीयेत समाप्यताम् । आभिचारिकं हिंसाफलम् । दिष्टं प्राचीनं कर्म । अतः सर्पादिष्टप्रयुक्तस्य तवाप्ययं नापराध इति भावः ॥२७ ॥ वाक्पतिं बृहस्पतिम् ॥ २८ ॥ ननु कथं विदुषामप्येवं संमोहो यतो ब्रह्मकोपात्परीक्षितो मृत्युर्जनमेजयकोपात्सर्पाणामित्यादि तत्राह । सैषेति । तस्या महत्त्वं दर्शयति । अलक्षणा न लक्ष्यत इत्यलक्षणा अप्रतर्क्येत्यर्थः । काऽसावित्यत आह । ययाऽस्य विष्णोरेवात्मभूता आत्मांशभूताः प्राणिनो गुणवृत्तिभिः क्रोधादिभिः सह भूतेषु देहेषु मुह्यंति ।

सर्पचौराग्निविद्युद्भ्यः क्षुत्तृड्व्याध्यादिभिर्नृप ॥ पंचत्वमृच्छते जंतुर्भुंक्त आरब्धकर्म तत् ॥ २६ ॥ तस्मात्सत्रमिदं राजन्संस्थीयेताभिचारिकम् ॥ सर्पा अनागसो दग्धा जनैर्दिष्टं हि भुज्यते ॥ २७ ॥ सूत उवाच ॥ इत्युक्तः स तथेत्याह महर्षेर्मानयन्वचः ॥ सर्पसत्रादुपरतः पूजयामास वाक्पतिम् ॥ २८ ॥ सैषा विष्णोर्महामायाऽबाध्ययाऽलक्षणा यया ॥ मुह्यंत्यस्यैवात्मभूता भूतेषु गुणवृत्तिभिः ॥ २९ ॥ न यत्र दंभीत्यभया विराजिता मायात्मवादेऽसकृदात्मवादिभिः ॥ न यद्विवादो विविधस्तदाश्रयो मनश्च संकल्पविकल्पवृत्ति यत् ॥ ३० ॥

बाध्यबाधकतां व्रजंतीत्यर्थः । ननु श्रवणादिना बाधितया तया कुतो मोहः स्यात्तत्राह । अबाध्यया बाधितुमशक्यया ॥ २९ ॥ कथं तर्हि माया तत्कार्यनिवृत्तिरित्याशंक्य श्रीविष्णुस्वरूपनिरूपणपूर्वकं तद्भजनात्सर्वानर्थनिवृत्तिरिति शास्त्रार्थमुपसंहरति न यत्रेति पंचभिः । दंभीति माया । कपटवानयं पुमानित्येवंभूतायां बुद्धावसक्रुदुल्लिख्यमाना या मायेत्यर्थः । साऽऽत्मवादे क्रियमाणे आत्मवादिभिर्यत्राभया न विराजिता न प्रकाशिता किंतु भीतेव स्वकार्यं मोहादिकमकुर्वंती कथंचिद्वर्तत इति प्रतिपादितेत्यर्थः ।

सर्पसत्रापासून उपरत होऊन त्यानें त्या बृहस्पतीचें पूजन केलें ॥ २८ ॥ आतां विद्वानांलासुद्धां असा कसा मोह पडतो; कीं, ज्याच्या योगानें ब्राह्मणाच्या कोपेंकरून परीक्षित् राजाला मरण प्राप्त झालें व जनमेजयाच्या कोपेंकरून सर्पांना मृत्यु प्राप्त झाला ? असें ह्मणाल तर–ऋषिहो, ती ही विष्णूची तर्क करण्यास अशक्य अशी महामाया होय. ज्या अनिवार्य मायेच्या योगानें, या विष्णूचेच अंशभूत प्राणी, क्रोधलोभादिकांच्या योगानें प्राण्याचेठिकाणीं मोहानें वैरभाव करून बाध्यबाधकता पावतात ॥ २९ ॥ तर मग त्या मायेची व तिच्या मोहवगैरे कार्यांची निवृत्ति कशी होईल ? असें ह्मणाल तर, श्रीविष्णूचें स्वरूप निरूपणपूर्वक त्याच्या भजनानेंच सर्व अनर्थांची निवृत्ति होते असें सांगतो–हा पुरुष कपटी आहे अशा बुद्धीमध्यें जिचा वारंवार उल्लेख होतो ती माया जेथें आत्मविचार करणाऱ्या पुरुषांनीं वारंवार आत्मविचार सुरू केला असतां, निर्भयपणें प्रकाशित होत नाहीं तर भयभीत असल्याप्रमाणें आपलें मोहादिक कार्य न करितां कशी तरी (मोठ्या कष्टानें) राहत्ये आणि जेथें मायेचा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आश्रयभूत असा अनेकप्रकारचा वादविवाद नाहीं व जेथें संकल्पविकल्परूप वृत्ति असलेलें मन नाहीं ॥ ३० ॥ तसेंच जेथें इंद्रिय समुदायासहित कर्म नाहीं व त्या दोहोंनीं साध्य होणारें कल्याणरूप फल नाहीं, तसाच कर्म, इंद्रियसमुदाय फल व या तिघांनीं युक्त असा अहंकारात्मक जीवहि नाहीं; ह्मणूनच जेथें बाध्यबाधकांचा निषेध केला आहे अशा त्या ह्या आत्मस्वरूपाचेठिकाणीं, मननशील पुरुषानें, अहंकारादिकांचा त्याग करून रममाण व्हावें ॥ ३१ ॥ तें आत्मस्वरूप असें आहे कीं—आत्म्यावांचून दुसरेठिकाणीं प्रेम न ठेवणारे व ‘ नेति नेति ’ अशा निषेधवाक्यानें आत्म्याहून निराळ्या वस्तूचा त्याग करूं इच्छिणारे भक्त पुरुष, त्या आत्मस्वरूपालाच सर्वोत्कृष्ट

तदुक्तम् । तस्मै नमो भगवते वासुदेवाय धीमहि ॥ यन्मायया दुर्जयया मां ब्रुवति जगद्गुरुम् ॥ विलज्जमानया यस्य स्थातुमीक्षापथेऽमुया ॥ विमोहिता विकत्थंते ममाहमिति दुर्धिय इति । किंच यद्यस्मिंस्तदाश्रयो मायाश्रयो विविधो विवादोऽपि नास्ति । विशेषविषयत्वाद्विवादानां तस्य च विशेषातीतत्वादिति भावः ॥ संकल्पविकल्पा वृत्तयो यस्य तन्मनोऽपि यत्र नास्ति । संकल्पविकल्पानामपि विशेषविषयत्वात् ॥ ३० ॥ किंच । सृज्यं कर्म सृजता कारकवर्गेण सहोभयोः सृज्यस्रष्ट्रोः परं साध्यं श्रेयःफलमपि । अतस्त्रिभिः सृज्यस्रष्टृफलैरन्वितो जीवश्चांहंकारात्मको यत्र नास्ति । अतएवोत्सादितौ निरस्तौ बाध्यबाधकौ यस्मिंस्तदेतत्स्वयमात्मस्वरूपमित्यर्थः । तत्तस्मिन्नूर्मीनहंकारादीन्निषिध्य विरमेत् । विशेषेण क्रीडेदित्यर्थः ॥ ३१ ॥ यतस्तद्वैष्णवं पदमामनंतीत्याह । परमिति । यदेतत्तदेव परं वैष्णवं पदं स्वरूपमामनंति । के । अतत् आत्मव्यतिरिक्त-

न यत्र सृज्यं सृजतोभयोः परं श्रेयश्च जीवस्त्रिभिरन्वितस्त्वहम् ॥ तदेतदुत्सादितबाध्यबाधकं निषिध्य चोर्मीन्विरमेत्स्वयं मुनिः ॥ ३१ ॥ परं पदं वैष्णवमामनंति तद्यन्नेतिनेतीत्यतदुत्सिसृक्षवः ॥ विसृज्य दौरात्म्यमनन्यसौहृदा हृदोपगुह्यावसितं समाहितैः ॥ ३२ ॥ त एतदधिगच्छंति विष्णोर्यत्परमं पदम् ॥ अहंममेति दौर्जन्यं न येषां देहगेहजम् ॥ ३३ ॥ अतिवादांस्तितिक्षेत नावमन्येत कंचन ॥ न चेमं देहमाश्रित्य वैरं कुर्वीत केनचित् ॥ ३४ ॥ नमो भगवते तस्मै कृष्णायाकुंठमेधसे ॥ यत्पादांबुरुहध्यानात्संहितामध्यगामिमाम् ॥ ३५ ॥

मुत्सिसृक्षवस्त्यक्तुमिच्छवः । यतोऽनन्यसौहृदाः नास्त्यन्यस्मिन्सौहृदं येषां ते । कुतः दौरात्म्यं देहाद्यहंभावं विसृज्य । देहेऽहंकाराभावादन्यत्र सौहृदं नास्त्यतस्त्यक्तुमिच्छव इत्यर्थः । कथम् । नेति नेतीत्येवम् अत्र । विद्वदनुभवमपि प्रमाणयति । हृदोपगुह्य ध्यानादिना ततः समाहितैरवसितं निश्चितम् । यद्वा अवसितमवबद्धमात्मतया गृहीतमित्यर्थः ॥ ३२ ॥ एतत्प्राप्तावधिकारिणो दर्शयति । त एतदिति । देहजमहमिति गेहजं ममेति ॥ ३३ ॥ तत्र प्राप्त्युपायमाह । अतिवादानिति ॥ ३४ ॥ शास्त्रसमाप्तौ गुरुं प्रणमति । नम इति । कृष्णाय व्यासाय । अध्यगामधिगतवानस्मि ॥ ३५ ॥

विष्णूचें स्वरूप असें जाणतात आणि देहादिकाचेठिकाणीं असलेल्या अहंकाराचा त्याग करून एकाग्रचित्त असलेल्या मुमुक्षु पुरुषांनीं, तेंच स्वरूप हृदयानें ध्यानवगैरे करून निश्चित केलें आहे ॥ ३२ ॥ आतां त्या स्वरूपाच्या प्राप्तीविषयीं अधिकारी कोण तें दर्शवितो—ज्या पुरुषांना, देह व घर यांचेठिकाणीं मी व माझें असा दुष्ट अभिमान नाहीं तेच पुरुष विष्णूच्या ह्या सर्वोत्कृष्ट स्वरूपाला पावतात ॥ ३३ ॥ आतां तें प्राप्त होण्याचे उपाय सांगतो—दुसऱ्याच्या दुष्ट भाषणाचें सहन करावें; ‘ आपला अपमान केला ह्मणून ’ आपण दुसऱ्याचा अपमान करूंनये; व त्या (नश्वर) देहाचा आश्रय करून ‘ त्याच्याकरितां ’ दुसऱ्या कोणाहि बरोबर वैर करूं नये ॥ ३४ ॥ शास्त्रसमाप्तीचेवेळीं सूत गुरूला नमस्कार करितो—ज्याच्या चरणकमलाच्या ध्यानेंकरून, ही श्रीमद्भागवतसंहिता समाप्त झाली आहे त्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अकुंठबुद्धि भगवान् व्यासाला माझा नमस्कार असो ॥ ३५ ॥ आतां ही संहिता मला प्राप्त झाली असें सांगितलें तें ऐकून पुराणसंहितेचा विभाग विशेषेंकरून जाणण्याची इच्छा करणारा शौनक, प्रसंगानें वेदांचाहि विभाग निरनिराळा विचारीत ह्मणाला कीं– हे सूता, व्यासांचे शिष्य, वेदांचे प्रवर्तक जे पैलादिक महात्मे ऋषि होते त्यांनीं वेदांचे कितीप्रकारचे विभाग केले आहेत ? हें आह्मांला सांग ॥ ३६ ॥ सूत ह्मणाला– हे शौनका, समाधि लावून भगवंताचें ध्यान करीत बसलेल्या परमेष्ठी ब्रह्मदेवाच्या हृदयाकाशापासून प्रथमतः नारद उत्पन्न झाला. की जो कानांत बोटें घालून त्यांची बाहेरचा शब्द ऐकण्याची वृत्ति बंद केली असतां अस्मदादिकांनाहि ऐकूं येतो ॥ ३७ ॥ आणि हे शौनका, ज्या नादब्रह्मोपासनेनें योगिजन, आपल्या अधिभूत, अध्यात्म, व अधिदैवतनामक मळाचें क्षालन करून मोक्षाप्रत पावतात; तो होय ॥ ३८ ॥ त्या

इमां संहितामध्यगामित्युक्तं तत्र पुराणसहिताविभागं विशेषतो बुभुत्सुर्वेदविभागमपि प्रसंगात्पृथक् पृच्छति । पैलादिभिरिति । हे सौम्य ॥ ३६ ॥ तत्र प्रथमं वेदाविर्भावप्रकारमाह समाहितात्मन इत्यष्टभिः । ब्रह्मणो हृदि य आकाशस्तस्मान्नादोऽभूत् । यः कर्णपुटपिधानेन श्रोत्रवृत्तिनिरोधादस्मदादिष्वपि विभाव्यते वितर्क्यते ॥ ३७ ॥ प्रसंगान्नादोपासकानां मोक्षफलमाह । यस्य नादस्योपासनयाऽऽत्मनो मलं धूत्वाऽपोह्य । कथंभूतं मलं तमाह । द्रव्यमधिभूतं क्रियाऽध्यात्मं कारकमधिदैवं एवं त्रिधाभूता आख्या यस्येति तथा तम् ॥ ३८ ॥ त्रिवृत् त्रिमात्रः कंठोष्ठादिभिरुच्चार्यमाणस्योंकारस्याक्षरसमाम्नायांतर्भावात्सूक्ष्मतया तं विशिनष्टि । अव्यक्तः प्रभवो यस्य सः । तदेवाह । स्वराट् स्वत

शौनक उवाच ॥ पैलादिभिर्व्यासशिष्यैर्वेदाचार्यैर्महात्मभिः ॥ वेदाश्च कतिधा व्यस्ता एतत्सौम्याभिधेहि नः ॥ ३६ ॥ सूत उवाच ॥ समाहितात्मनो ब्रह्मन्ब्रह्मणः परमेष्ठिनः ॥ हृद्याकाशादभून्नादो वृत्तिरोधाद्विभाव्यते ॥ ३७ ॥ यदुपासनया ब्रम्हन्योगिनो मलमात्मनः ॥ द्रव्यक्रियाकारकाख्यं धूत्वा यांत्यपुनर्भवम् ॥ ३८ ॥ ततोऽभूत्त्रिवृदोंकारो योऽव्यक्तप्रभवः स्वराट् ॥ यत्तल्लिंगं भगवतो ब्रह्मणः परमात्मनः ॥ ३९ ॥ शृणोति य इमं स्फोटं सुप्तश्रोत्रे च शून्यदृक् ॥ येन वाग्व्यज्यते यस्य व्यक्तिराकाश आत्मनः ॥ ४० ॥

एव हृदि प्रकाशमानः । तमेव कार्येण लक्षयति । यत्तदिति । नपुंसकत्वं लिंगशब्दविशेषणत्वात् । लिंगं गमकम् ॥ ३९ ॥ कोऽसौ परमात्मा तमाह । शृणोतीति । इमं स्फोटमव्यक्तमोंकारम् । ननु जीव एव तं शृणोतु नेत्याह । सुप्तश्रोत्रे कर्णपिधानादिनाऽवृत्तिकेऽपि श्रोत्रे सति । जीवस्तु करणाधीनज्ञानत्वान्न तदा श्रोता । तदुपलब्धिस्तु तस्य परमात्मद्वारिकैवेति भावः । ईश्वरस्तु नैवम् । यतः शून्यदृक् शून्येपींद्रियवर्गे दृक् ज्ञानं यस्य । तथाहि सुप्तो यदा शब्दं श्रुत्वा प्रबुद्ध्यते न तदा जीवः श्रोता लीनेंद्रियत्वात् । अतो यस्तदा शब्दं श्रुत्वा जीवं प्रबोधयति स यथा परमात्मैव तद्वत् । कोऽसावोंकारस्तं विशिनष्टि सार्धेन । येन वाग्बृहती व्यज्यते । यस्य च हृदयाकाशे आत्मनः सकाशाद्व्यक्तिरभिव्यक्तिः ॥ ४० ॥

नादापासून अकार-उकार-मकारात्मक तीन मात्रांनीं युक्त असा ओंकार उत्पन्न झाला. ज्या ओंकाराची उत्पत्ति स्पष्ट समजण्यांत येत नाहीं, जो स्वतःच हृदयामध्यें प्रकाश पावतो, जो ब्रह्मरूप परमात्म्या भगवंताचें स्वरूप आहे ॥ ३९ ॥ कोणता परमात्मा असें ह्मणशील तर– जो या अस्पष्ट ओंकाराचें श्रवण करितो. आतां जीवच त्याला ऐकतो असें ह्मणावें तर तसें नाहीं. कान झाकिल्यामुळें श्रोत्रेंद्रिय, श्रवण करण्याच्या वृत्तीनेंरहित झालें असतां जो ओंकाराचें श्रवण करितो. जीवे तर ‘ इंद्रियाधीन ज्ञान असल्यामुळें ’ त्यावेळीं श्रवण करीत नाहीं. त्याला त्याची प्राप्ति परमात्म्याच्या द्वारानेंच होत्ये. ईश्वर तर असा नाहीं. कारण, तो इंद्रिय समुदायाचा लय झाला असतांहि ज्ञानवान् आहे; ह्मणजे जेव्हां निजलेला मनुष्य, शब्द ऐकून जागा होतो तेव्हां तो शब्द इंद्रियें लीन झाल्यामुळें जीव ऐकत नाहीं, तर जो त्यावेळीं शब्द ऐकून

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जीवाला जाग्रत करितो ' तोच परमात्मा होय. त्याचा वाचक ओंकार आहे आणि ज्या ओंकाराच्या योगानें वैखरीवाणी व्यक्त होत्ये, व ज्याची हृदयाकाशामध्यें आत्म्यापासून उत्पत्ति आहे ॥ ४० ॥ आणि जो आपल्या आश्रयभूत साक्षात् ब्रह्मस्वरूपी परमात्म्याचा वाचक आहे तोच ओंकार, सर्वमंत्रांचें रहस्य व वेदांचें सदोदित एकरूपी (निर्विकारी) कारण आहे ॥ ४१ ॥ हे शौनका, त्या ओंकाराचे अकार, उकार व मकार असे तीन वर्ण (अक्षरें) आहेत; ज्या ' अ उ म् ' या तीन वर्णांनीं, अनुक्रमें रज, सत्व, तम हे गुण, ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद हीं नांवें भूर्लोक, भुवर्लोक व स्वर्लोक हे अर्थ, आणि जाग्रत्, स्वप्न व सुषुप्ति ह्या वृत्ति धारण केल्या आहेत ॥ ४२ ॥ हे शौनका, नंतर भगवान् ब्रह्मदेवानें, त्या ' अ उ म् ' या वर्णांपासून, य र ल व हे अंतस्थ, श ष स ह हे ऊष्मे, अ-पासून औ-पर्यंत स्वर, क- पासून

किंच स्वधाम्नः स्वस्याश्रयः कारणं यद्ब्रह्म तस्य । किंच परमात्मांशभूतसमस्तदेवतावाचकोऽपीत्याशयेनाह । स इति । सर्वमंत्राणामुपनिषद्रहस्यं सूक्ष्मरूपमित्यर्थः । तत्र हेतुः । वेदानां बीजं कारणम् । बीजत्वेऽप्यविकारितामाह । सनातनं सदैकरूपम् । तस्य ब्रह्मरूपत्वात् ॥ ४१ ॥ इदानीं ततः सर्वप्रपंचोत्पत्तिप्रकारमाह । तस्य हीति । त्रयस्त्रिसंख्यायुक्ताभावा यैरकारोकारमकारैर्धार्यंते तत्कारणत्वात् । तानेवाह । गुणाः सत्वादयः । नामानि ऋग्यजुःसामानि । अर्था भूर्भुवः स्वर्लोकाः । वृत्तयो जाग्रदाद्याः ॥ ४२ ॥ ततस्तेभ्यो वर्णेभ्यः अक्षराणां समाम्नायं समाहारम् । तमेवाह । अंतस्था यरलवाः । ऊष्माणः शषसहाः । स्वरा अकाराद्याः । स्पर्शाः कादयः । ह्रस्वदीर्घाश्च आदिशब्दाज्जिव्हामूलीयादयः त एव लक्षणं स्वरूपं यस्य तम् ॥ ४३ ॥ विभुश्चतुर्मुखस्वरूपो भगवान् असृजदिति पूर्वस्य वाऽनुषंगः । चातुर्होत्रविवक्षया चत्वारो होत्रोपलक्षिता ऋत्विजश्चतुर्होतारस्तैरनुष्ठेयं हौत्राध्वर्यवादिकं कर्म चातुर्होत्रं तद्विवक्षया ॥ ४४ ॥ पुत्रान्मरीच्यादीन् तान्वेदान् ब्रह्मकोविदान्वेदोच्चारणादिनिपुणान् ॥ ४५ ॥ एवं चतुर्युगेषु प्राप्ताः । द्वापराद्वौ द्वापरमादिर्यस्य तदंत्यांशलक्षणस्य कालस्य तस्मिन् । द्वापरांते वेदविभागप्रसिद्धेः । शंतनुसमकालं व्यासावतारप्रसिद्धेश्च । व्यस्ता विभक्ताः ॥ ४६ ॥ तत्र हेतुः । क्षीणायुषो जनान् । तर्हि पुरुषबुद्धिप्रभवत्वादनादरणीयत्वं स्यादित्याशंक्याह । हृदिस्थेति ॥ ४७ ॥

स्वधाम्नो ब्रह्मणः साक्षाद्वाचकः परमात्मनः ॥ स सर्वमंत्रोपनिषद्वेदबीजं सनातनम् ॥ ४१ ॥ तस्य ह्यासंस्त्रयो वर्णा अकाराद्या भृगूद्वह ॥ धार्यंते यैस्त्रयो भावा गुणनामार्थवृत्तयः ॥ ४२ ॥ ततोऽक्षरसमाम्नायमसृजद्भगवानजः ॥ अंतस्थोष्मस्वरस्पर्शह्रस्वदीर्घादिलक्षणम् ॥ ४३ ॥ तेनासौ चतुरो वेदांश्चतुर्भिर्वदनैर्विभुः ॥ सव्याहृतिकान्सोंकारांश्चातुर्होत्रविवक्षया ॥ ४४ ॥ पुत्रानध्यापयत्तांस्तु ब्रह्मर्षीन् ब्रह्मकोविदान् ॥ ते तु धर्मोपदेष्टारः स्वपुत्रेभ्यः समादिशन् ॥ ४५ ॥ ते परंपरया प्राप्तास्तत्तच्छिष्यैर्धृतव्रतैः ॥ चतुर्युगेष्वथ व्यस्ता द्वापरादौ महर्षिभिः ॥ ४६ ॥ क्षीणायुषः क्षीणसत्त्वान्दुर्मेधान्वीक्ष्य कालतः ॥ वेदान्ब्रह्मर्षयो व्यस्यन् हृदिस्थाच्युतनोदिताः ॥ ४७ ॥

म-पर्यंत स्पर्श आणि ऱ्हस्व दीर्घवगैरे लक्षणांचा अक्षरसमुदाय उत्पन्न केला ॥ ४३ ॥ नंतर त्या अक्षर समुदायाच्या योगानें, त्या ब्रह्मदेवानें, आपल्या चार मुखांनीं होता अध्वर्यु इत्यादिक चार ऋत्विजांनीं करावयाचें कर्म (यज्ञ) सांगण्याच्या इच्छेनें ' भूर्भुवःस्वः ' या तीन व्याहृतींसह व ओंकारासह चार वेद उत्पन्न केले ॥ ४४ ॥ आणि ते चारहि वेद वेदाध्ययन करण्यांत निपुण अशा आपल्या मरीच्यादि पुत्रांना पढविले नंतर त्या धर्मोपदेष्ट्या ऋषींनीं ते वेद आपल्या पुत्रांना शिकविले ॥ ४५ ॥ नंतर ते वेद, नियम धारण करणाऱ्या त्यांच्या शिष्यांकडून परंपरेनें चारहि युगांमध्यें प्राप्त होऊन द्वापराच्या शेवटीं महर्षींनीं त्या वेदांचे विभाग केले ॥ ४६ ॥ त्याचें कारण, हृदयामध्यें असणाऱ्या भगवंतानें प्रेरणा केलेल्या त्या ब्रह्मर्षींनीं, कालाच्या योगानें दिवसेंदिवस सर्व जन, बलहीन, त्यांत दुर्बुद्धि व तशांत ॥ १८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अल्पायुषी होऊं लागले असें पाहून, वेदांचे ' निरनिराळ्या शाखांनीं' विभाग केले ॥ ४७ ॥ याप्रमाणें सामान्येंकरून वेदविभागांचा क्रम सांगून आतां वैवस्वत मन्वं-
तरामध्यें विशेषेंकरून सांगण्याकरितां ह्मणतो कीं–हे शौनका, ह्या मन्वंतरामध्येंहि ब्रह्मदेव, शंकरप्रमुख देवांनीं व इंद्रादिक लोकपालांनीं, धर्माच्या संरक्षणासाठीं प्रार्थना
केलेला लोकपालक समर्थ भगवान्–॥ ४८ ॥ पराशर ऋषीपासून सत्यवतीनामक स्त्रीचेठिकाणीं मायेच्या सत्वांशानें व्यासरूपानें, अवतीर्ण होऊन, त्यानें वेदाचे चार विभाग
केले॥ ४९ ॥ जसा एकठिकाणीं असलेल्या अनेकप्रकारच्या रत्नांच्या मोठ्या राशींतून पद्मरागादिक रत्नांच्या राशी निरनिराळ्या काढितात त्याप्रमाणें, संपूर्ण वेदाच्या मो-
ठ्या राशींतील ऋक्, अथर्व, यजु व साम या मंत्रांच्या राशी त्यात्या प्रकरणभेदांनीं निरनिराळ्या काढून, ऋग्वेद यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद अशा चार संहिता केल्या

एवं सामान्यतो वेदविभागक्रममुक्त्वा वैवस्वतमन्वंतरे विशेषतो निरूपयितुमाह । अस्मिन्नपीति ॥ ४८ ॥ अंशो माया तस्या अंशः सत्त्वं तस्य कलयांऽशेनावतीर्णः सन्
॥ ४९ ॥ चातुर्विध्यमेवाह । ऋगिति । ऋगादिमंत्राणां राशीन्वर्गशस्तत्तत्प्रकरणभेदैरुद्धृत्य यथाऽनेकविधमणिराशेर्मणिगणाः पद्मरागादयो विविच्योद्ध्रियंते तद्वदुद्धृत्य तैर्म-
न्त्रैश्चतस्रः ऋगादिसंहिताश्चक्रे ॥ ५० ॥ तासां संहितानां मध्ये एकैकाम् ॥ ५१ ॥ ऋक्समुदायरूपत्वाद्बह्वृचाख्याम् । नितरां प्रश्लेषेण गद्यमानत्वान्निगदाख्यम् ॥ ५२ ॥

अस्मिन्नप्यंतरे ब्रह्मन् भगवांल्लोकभावनः ॥ ब्रह्मेशाद्यैर्लोकपालैर्याचितो धर्मगुप्तये ॥ ४८ ॥ पराशरात्सत्यवत्यामंशांशकलया विभुः ॥
अवतीर्णो महाभाग वेदं चक्रे चतुर्विधम् ॥ ४९ ॥ ऋगथर्वयजुःसाम्नां राशीनुद्धृत्य वर्गशः ॥ चतस्रः संहिताश्चक्रे मंत्रैर्मणिगणा इ-
व ॥ ५० ॥ तासां स चतुरः शिष्यानुपाहूय महामतिः ॥ एकैकां संहिता ब्रह्मन्नेकैकस्मै ददौ विभुः ॥ ५१ ॥ पैलाय संहितामा-
द्यां बह्वृचाख्यामुवाच ह ॥ वैशंपायनसंज्ञाय निगमाख्यं यजुर्गणम् ॥ ५२ ॥ साम्नां जैमिनये प्राह तथा छंदोगसंहिताम् ॥ अथ-
र्वांगिरसीं नाम स्वशिष्याय सुमंतवे ॥ ५३ ॥ पैलः स्वां संहितामूच इंद्रप्रमितये मुनिः ॥ बाष्कलाय च सोऽप्याह शिष्येभ्यः
संहितां स्वकाम् ॥ ५४ ॥ चतुर्धा व्यस्य बोध्याय याज्ञवल्क्याय भार्गव ॥ पराशरायाग्निमित्रे इंद्रप्रमितिरात्मवान् ॥ ५५ ॥ अ-
ध्यापयत्संहितां स्वां मांडूकेयमृषिं कविम् ॥ तस्य शिष्यो देवमित्रः सौभर्यादिभ्य ऊचिवान् ॥ ५६ ॥

छंदःसु गीयमानत्वाच्छंदोगाख्यां संहिताम् ॥ ५३ ॥ तत्र ऋग्वेदशाखाविभागमाह । पैल इति । स्वसंहितां द्विधा विभज्य इंद्रप्रमितये बाष्कलाय च ऊचे । स बाष्कलोऽपि
स्वकां संहितां चतुर्धा व्यस्य बोध्यादिभ्यः शिष्येभ्य आह । हे भार्गव इंद्रप्रमितिरपि स्वां संहितां स्वसुतं मांडूकेयमध्यापयामास । तस्य मांडूकेयस्य शिष्यो देवमित्रः॥५४॥५५॥५६॥

॥ ५० ॥ हे शौनका नंतर, त्या महाबुद्धिमान् व्यासानें, आपल्या चार शिष्यांस बोलावून त्या संहितांमध्यें एक एक संहिता एकेकाला दिली ॥ ५१ ॥ पहिली बह्वृच-
नामक ऋग्वेदसंहिता पैलऋषीला सांगितली. दुसरी निगद नांवाची गद्यरूप यजुर्वेदसंहिता वैशंपायन ऋषीला सांगितली. तशीच तिसरी छंदोगनांवाची सामवेदसंहिता
जैमिनिऋषीला व चवथी अथर्वांगिरसीनामक अथर्ववेदसंहिता सुमंतुऋषीला सांगितली ॥ ५२ ॥ ५३ ॥ आतां ऋग्वेदाच्या शाखा सांगतो– हे शौनका, पैलऋषीनें आपल्या
ऋक्संहितेच्या दोन शाखा करून त्यांतून एक इंद्रप्रमितिनामक शिष्याला व दुसरी बाष्कलनामक शिष्याला सांगितली. त्या बाष्कलानेंहि आपल्या संहितेच्या चार शाखा
करून, एक बोध्याला, दुसरी याज्ञवल्क्याला, तिसरी पराशराला व चवथी अग्निमित्राला पढविली. हे शौनका, पूर्वी सांगितलेल्या आत्मज्ञानी इंद्रप्रमितीनें, आपल्या मांडूकेय-
नांवाच्या विद्वान् पुत्राला आपली सर्व संहिता पढविली. मांडूकेयाचा शिष्य देवमित्र होवा त्यानें ती संहिता आपल्या सौभरींवगैरे शिष्यांना सांगितली ॥ ५४ ॥ ५५ ॥ ५६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तसाच त्या मांडूकेयाचा पुत्र शाकल्य होता, त्यानें त्या आपल्या संहितेचे पांच भाग करून वात्स्य, मुद्गल, शालीय गोखल्य आणि शिशिर या पांच शिष्यांस पढविली ॥ ५७ ॥ त्याच शाकल्याचा शिष्य जातूकर्ण्य ह्मणून होता; त्यानें आपल्या संहितेचे तीन विभाग करून, व वैदिकपदार्थांचें व्याख्यानरूप चवथें निरुक्त करून त्यासह ते विभाग बलाक, पैज, वैताल व विरज यांस शिकविले ॥ ५८ ॥ बाष्कलाचा पुत्र बाष्कलि त्यानें पूर्वोक्त सर्व शाखांपासून वालखिल्यनावाची एक संहिता तयार केली· ती बालायनि, भज्य व कासार यानीं अध्ययन केली ॥ ५९ ॥ हे शौनका, ह्या ऋग्वेदाच्या संहिता, या ब्रह्मर्षीनीं धारण केल्या आहेत· जो कोणी पुरुष या संहितांच्या विस्ताराचें श्रवण करितो तो सर्व पापांपासून मुक्त होतो ॥ ६० ॥ आतां यजुर्वेदामध्यें तैतिरीय शाखेच्या उत्पत्तीचा प्रस्ताव सांगतो– हे शौनका, वैशंपा-

तत्सुतो मांडूकेयसुतः । शाकल्यो वात्स्यादिषु पंचस्वधात् । तानध्यापयामासेत्यर्थः ॥ ५७ ॥ तच्छिष्यः शाकल्यशिष्यः स्वसंहितां त्रेधा विभज्य चतुर्थं वैदिकपदार्थव्याख्यानरूपं निरुक्तं च कृत्वा बलाकादिभ्यश्चतुर्भ्यो ददौ ॥ ५८ ॥ बाष्कलिः पूर्वोक्तस्य बाष्कलस्य पुत्रः । प्रतिशाखाभ्य उक्तसर्वशाखाभ्यः । बालायन्यादयस्तामादधुरधीतवंतः ॥ ५९ ॥ ऋक्शाखोपसंहारपूर्वकं तच्छ्रवणफलमाह । बह्वृचा इति । एतच्छंदसामेतेषां छंदसाम् ॥ ६० ॥ यजुर्वेदे तैत्तिरीयशाखोत्पत्तिप्रस्तावमाह वैशंपायनशिष्या

शाकल्यस्तत्सुतः स्वां तु पंचधा व्यस्य संहिताम् ॥ वात्स्यमुद्गलशालीयगोखल्यशिशिरेष्वधात् ॥ ५७ ॥ जातूकर्ण्यश्च तच्छिष्यः सनिरुक्तां स्वसंहिताम् ॥ बलाकपैजवैतालविरजेभ्यो ददौ मुनिः ॥ ५८ ॥ बाष्कलिः प्रतिशाखाभ्यो वालखिल्याख्यसंहिताम् ॥ चक्रे बालायनिर्भज्यः कासारश्चैव तां दधुः ॥ ५९ ॥ बह्वृचाः संहिता ह्येता एभिर्ब्रह्मर्षिभिर्धृताः ॥ श्रुत्वैतच्छंदसां व्यासं सर्वपापैः प्रमुच्यते ॥ ६० ॥ वैशंपायनशिष्या वै चरकाध्वर्यवोऽभवन् ॥ यच्चेरुर्ब्रह्महत्यांऽहःक्षपणं स्वगुरोर्व्रतम् ॥ ६१ ॥ याज्ञवल्क्यश्च तच्छिष्य आहाहो भगवन्कियत् ॥ चरितेनाल्पसाराणां चरिष्येऽहं सुदुश्चरम् ॥ ६२ ॥ इत्युक्तो गुरुरप्याह कुपितो याह्यलं त्वया ॥ विप्रावमंत्रा शिष्येण मदधीतं त्यजाश्विति ॥ ६३ ॥ देवरातसुतः सोऽपि छर्दित्वा यजुषांगणम् ॥ ततो गतोऽथ मुनयो ददृशुस्तान्यजुर्गणान् ॥ ६४ ॥

इत्यादिना । चरकनामनिरुक्तिमाह । यच्चेरुरिति । यद्यस्माद्ब्रह्महत्यारूपमंहः क्षपयतीति तथा तत्स्वगुरोरनुष्ठेयं व्रतं तच्चरणाच्चरका इत्यर्थः ॥ ६१ ॥ तच्छिष्य वैशंपायनशिष्यः । अल्पसाराणामेतेषां चरितेन कियत् । सुदुश्चरमहं चरिष्यामीति ॥ ६२ ॥ विप्राणामवमंत्राऽवज्ञाकर्त्रा । मत्तोऽधीतमाशु त्यजेति ॥ ६३ ॥ देवरातसुतो याज्ञवल्क्यः ॥ ६४ ॥

यनऋषीचे चरकाध्वर्यु नांवाचे शिष्य होते· त्यांना चरकाध्वर्यु नांव पडण्याचें कारण असें होतें कीं,– त्यांनीं आपल्या वैशंपायनगुरूला ब्रह्महत्या घडली असतां तिचा नाश करणारें त्या गुरूनें आचरण करावयाचें व्रत (प्रायश्चित्त) आपण आचरण केलें ह्मणून ते 'चरकाध्वर्यु' असें नांव पावले ॥ ६१ ॥ याज्ञवल्क्यहि त्या वैशंपायनाचा शिष्य होता, तो गुरूला ह्मणाला कीं,– हे भगवन्, अल्पधैर्य अशा या शिष्यांनीं आचरण केलेल्या व्रतानें काय फळ प्राप्त होणार आहे ? काहींच नाहीं· याकरितां, यांनीं आचरण करण्यास अति कठिण असेंहि व्रत मी आचरण करीन ॥ ६२ ॥ असें सांगितलेला वैशंपायनगुरुहि रागावून ह्मणाला, कीं,– अरे ब्राह्मणांचा अपमान करणाऱ्या त्वां शिष्यानें पुरें झालें· तूं माझ्यापासून अध्ययन केलें आहेस त्याचा त्याग करून येथून लवकर निघून जा· असें सांगतांच– ॥ ६३ ॥ देवराताचा पुत्र तो याज्ञवल्क्यहि

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

यजुर्वेदांच्या समुदायाचें तेथेंच वमन करून टाकून तेथून निघून गेला. नंतर ते वमन केलेले यजुर्वेद कित्येक ऋषींच्या दृष्टीस पडले ॥ ६४ ॥ तेव्हां त्यांस त्यांचें ग्रहण करण्याची इच्छा झाली परंतु वमनाचें ग्रहण करणें हें ब्राह्मणांस योग्य नाहीं ह्मणून त्या ऋषींनीं, त्या वेदांच्या लोभानें आपण तित्तिनामक पक्ष्यांचीं रूपें घेऊन त्याचे ग्रहण केलें. त्या अतिसुंदर व तैत्तिरीय नावानें प्रसिद्ध अशा यजुर्वेदाच्या शाखा झाल्या ॥ ६५ ॥ आतां कण्वमाध्यंदिनादि शाखांचा प्रसंग सांगतो– हे शौनका, तो याज्ञवल्क्य, आपल्या गुरूजवळ ‘ व्यासानें विभाग करून न सांगितल्यामुळें ’ नसलेल्या दुसऱ्याच अधिक यजुर्वेदमंत्राचा शोध करीत होत्साता ऋग्वेदादि सर्व वेदांच्या नियंत्या सूर्यनारायणाची स्तुति करूं लागला ॥ ६६ ॥ याज्ञवल्क्य ह्मणाला– हे सवित्या सूर्यनारायणा, जो तूं एकच भगवान् असून, जरायुज, अंडज, स्वेदज व उद्भिज्ज अशा

छर्दितस्यादानं विप्ररूपेणानुचितमिति तित्तिराः पक्षिविशेषा भूत्वाऽऽददुः ततश्च तैत्तिरीया इति प्रसिद्धाः । सुपेशला अतिरम्याः । बहुवचनमवांतरभेद विवक्षया ॥ ६५ ॥ काण्वमाध्यंदिनादिशाखाप्रसंगमाह याज्ञवल्क्य इत्यादिना । गुरोर्वैशंपायनस्य व्यासेन विभज्यानुक्तत्वादविद्यमानान्यधिकानि गवेषयन्मृगयन्सूपतस्थे सम्यक् तुष्टाव । ईश्वरमृ गादिवेदानाम् । तथाच श्रुतिः । ऋग्भिः पूर्वाह्णे दिवि देव ईयते ॥ यजुर्वेदे तिष्ठति मध्ये अह्नः ॥ सामवेदेनास्तमये महीयते ॥ वेदैरशून्यस्त्रिभिरेति सूर्य इति ॥ ६६ ॥ नमो

यजूंषि तित्तिरा भूत्वा तल्लोलुपतयाऽऽददुः ॥ तैत्तिरीया इति यजुःशाखा आसन्सुपेशलाः ॥ ६५ ॥ याज्ञवल्क्यस्ततो ब्रह्मंश्छंदांस्यधिगवेषयन् ॥ गुरोरविद्यमानानि सूपतस्थेऽर्कमीश्वरम् ॥ ६६ ॥ याज्ञवल्क्य उवाच ॥ ओं नमो भगवते आदित्यायाखिलजगतामात्मस्वरूपेण कालस्वरूपेण चतुर्विधभूतनिकायानां ब्रह्मादिस्तंबपर्यंतानामंतर्हृदयेषु बहिरपि चाकाश इवोपाधिनाऽव्यवधीयमानो भगवानेक एव क्षणलवनिमेषावयवोपचितसंवत्सरगणेनापामादानविसर्गाभ्यामिमां लोकयात्रामनुवहति ॥ ६७ ॥ यदुहवाव विबुधर्षभ सवितरदस्तपत्यनुसवनमहरहराम्नायविधिनोपतिष्ठमानानामखिलदुरितवृजिनबीजावभर्जन भगवतः समभिधीमहि तपन मंडलम् ॥ ६८ ॥

भगवते तुभ्यमादित्याय । यो भगवानेक एवेमां लोकयात्रामनुवहतीत्यन्वयः । तदेव दर्शयति । अखिलजगतामात्मस्वरूपेणांतर्हृदयेषु कालस्वरूपेण च बहिरपिवर्तमान इति । अखिलजगतामित्यस्य प्रपंचः । चतुर्विधेति । हृदयांतर्वर्तित्वेऽपि जीववत्तेनोपाधिनाऽव्यवधीयमानोऽनाच्छाद्यमानः । कालस्वरूपेण चेत्यस्य प्रपंचः । क्षणेति । क्षणलवादयो येऽवयवास्तैरुपचिताः संवत्सरास्तेषां गणेन प्रत्यब्दमपामादानं शोषणं विसर्गो वृष्टिस्ताभ्याम् । अनेन गायत्रीप्रथमपादोक्तवरेण्यताऽनुवर्णिता ॥ ६७ ॥ द्वितीयपादार्थानुवर्णनेन स्तौति । यदुहेहि । हे विबुधर्षभ हे सवितः यदमुष्यदो भगवतस्तव मंडलं तपति तत्समभिधीमहीति सम्यगाभिमुख्येन ध्यायेम । पुनस्तस्यैव संबोधनम् ।

चारप्रकारच्या भूतसमुदायरूप ब्रह्मदेवापासून तृणापर्यंत असलेल्या संपूर्ण जगतांच्या हृदयामध्यें आत्मस्वरूपानें व बाहेर क्षण, लव निमेषवगैरे अवयवांनीं वाढलेल्या संवत्सरसमुदायरूप कालस्वरूपानें, ‘ जसें– आकाश घटमठ इत्यादिक उपाधींच्या आंत व बाहेर व्यापून असलें तरी कोठेंहि लिप्त होत नाहीं त्याप्रमाणें ’ देहादिक उपाधींच्या आंत व बाहेर असला तरी त्या उपाधींनीं आच्छादित न होत्साता प्रतिवर्षीं उदकाचें शोषण व पुन्हा वृष्टि करणें यांच्या योगानें लोकांची जीविका चालवितोस त्या तुज आदित्यरूपी भगवंताला नमस्कार असो (याप्रकारें गायत्रीच्या प्रथमपादानें सांगितलेली सूर्याची वरण्यता वर्णन केली आहे) ॥ ६७ ॥ आतां गायत्रीच्या द्वितीय चरणांत असलेल्या अर्थाचें वर्णन करून स्तवितो – हे देवोत्तमा हे सवित्या, दररोज सकाळीं दुपारीं व संध्याकाळीं वैदिककर्ममार्गानें तुझी स्तुति करणाऱ्या भक्तां-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

च्या सर्व पातकांपासून झालेल्या दुःखबीजांचा नाश करणाऱ्या हे सूर्यनारायणा, ह्या तुझ्या प्रतिदिवशीं प्रकाश पावणाऱ्या मंडळाचें आम्ही ध्यान करितों ॥ ६८ ॥ हे सूर्यनारायणा, जो तूं, सर्वांचा अंतर्यामी आत्मा होत्साता, आपणच आश्रय असलेल्या स्थावरजंगमात्मक जीवांच्या जडरूप अशा मन, इंद्रियें व पंचप्राण यांची प्रेरणा

 करितोस त्या तुज भगवंताला नमस्कार असो ॥ ६९ ॥ आतां गायत्रीच्या तृतीयचरणानें स्तुति करितो– हे सूर्यनारायणा, जो परमदयाळु भगवान्, अतिभयंकर मुख असलेल्या अंधकारनामक अजगररूप ग्रहानें गिळून टाकिलेल्या आणि त्याच्या योगानेंच मरण पावल्यासारखा अचेतन पडलेल्या या लोकाला पाहून व त्याला आपल्या दयायुक्त दृष्टीच्या योगानें उठवून प्रतिदिवशीं त्रिकाल कल्याणकारक स्वधर्मरूप परमात्म्याच्या उपासनेविषयीं प्रवृत्त करितो; व ' जम्रा– राजा, दुष्ट लोकांना भय उत्पन्न

प्रत्यहं त्रिषवणं वैदिककर्ममार्गेण स्तुवतां भक्तानां यान्यखिलानि दुरितानि तत्फलानि च वृजिनानि दुःखानि तेषां बीजमज्ञानं च तेषामवर्भंजन विनाशक हे तपनेति ॥ ६८ ॥ तृतीयपादेन स्तौति । य इहेति । भवान्स्थावरजंगमसमूहानां स्वाश्रयाणां जीवानां मन इंद्रियप्राणगणाननात्मनो जडान्स्वयमात्मैवांतर्यामी सन्प्रचोदयति प्रवर्तयति ॥ ६९ ॥ तृतीयपादमेव मंडलस्थपरतया व्याचक्षणः स्तौति । य एवेति । य एक एव भगवानतिकरालवदनो योंऽधकारसंज्ञोऽजगरग्रहस्तेन गिलितमतएव मृतकमिव विचेतनं स्व-

य इह वाव स्थिरचरनिकराणां निजनिकेतनानां मनइंद्रियासुगणाननात्मनः स्वयमात्मांतर्यामी प्रचोदयति ॥ ६९ ॥ य एवेमं लोकमतिकरालवदनांधकारसंज्ञाजगरग्रहगिलितं मृतकमिव विचेतनमवलोक्यानुकंपया परमकारुणिक ईक्षयैवोत्थाप्याहरहरनुसवनं श्रेयसि स्वधर्माख्यात्मावस्थाने प्रवर्तयत्यवनिपतिरिवासाधूनां भयमुदीरयन्नटति ॥ ७० ॥ परित आशापालैस्तत्र तत्र कमलकोशांजलिभिरुपहृतार्हणः ॥ ७१ ॥ अथ ह भगवंस्तव चरणनलिनयुगलं त्रिभुवनगुरुभिर्वंदितमहमयातयामयजुःकाम उपसरामीति ॥ ७२ ॥ सूत उवाच ॥ एवं स्तुतः स भगवान्वाजिरूपधरो हरिः ॥ यजूंष्ययातयामानि मुनयेऽदात्प्रसादितः ॥ ७३ ॥ यजुर्भिरकरोच्छाखा दश पंच शतैर्विभुः ॥ जगृहुर्वाजसंन्यस्ताः काण्वमाध्यंदिनादयः ॥ ७४ ॥

धर्माख्यं यदात्मावस्थानं प्रत्यक्प्रवणत्वं तदेव श्रेयस्तस्मिन्प्रवर्तयति । किंच यो भवानवनिपतिरिवाटति गच्छति ॥ ७० ॥ आशापालैरिंद्रादिभिः । कमलकोशयुक्तैस्तत्तुल्यैर्वांऽजलिभिरुपहृतार्हणो दत्तार्घः ॥ ७१ ॥ यत एवंभूतस्त्वमथातः ह स्फुटमयातयामान्यन्यैर्यथावदविज्ञातानि यजूंषि तत्कामोऽहमुपसरामि भजामि ॥ ७२ ॥ एवं स्तुतप्रसादितश्च ॥ ७३ ॥ पंचदश शाखाः याः शतैरपरिमितैर्यजुर्भिरकरोत् । स तैरिति पाठे स एष याज्ञवल्क्यस्तैर्यजुर्भिरकरोदिति । जगृहुरधीतवंतः । रविणाऽश्वरूपेण वाजेभ्यः केसरेभ्यो वाजेन वेगेन वा संन्यस्तास्त्यक्ताः शाखा वाजसनीसंज्ञाताः शाखा इति वा ॥ ७४ ॥

करीत संचार करितो तसा ' दुराचारी लोकांना भय उत्पन्न करीत गमन करितो– ॥ ७० ॥ आणि ज्याला आसमंतात् बाजूंनीं इंद्रादिक लोकपाल, त्यांच्या आपापल्या स्थानीं राहून कमलकोशासारख्या हातांच्या अंजलींनीं अर्घ्य देतात त्या भगवान् सूर्याला नमस्कार असो ॥ ७१ ॥ हे भगवन्, ज्याअर्थीं तूं अशाप्रकारचा आहेस त्याअर्थीं दुसऱ्यांनीं यथार्थ न जाणलेल्या यजुर्वेदमंत्रांच्या इच्छेनें मी, त्रिलोकीच्या अधिपतींनीं (इंद्रादिकांनीं) वंदन केलेल्या तुझ्या चरणकमलद्वयाचें भजन करितों ॥ ७२ ॥ सूत म्हणाला– याप्रमाणें स्तुति करून प्रसन्न करून घेतलेल्या त्या भगवान् सूर्यनारायणानें, वाजिरूप (घोड्याचें स्वरूप) धारण करून, याज्ञवल्क्य मुनीला अयातयाम (विस्मरणादि दोषांनीं रहित असून दुसऱ्यांकडे नसलेले) असे यजुर्वेदाचे मंत्र दिले ॥ ७३ ॥ नंतर याज्ञवल्क्यानें त्या असंख्यात यजुर्वेदमंत्रांच्या पंधरा १५ शाखा केल्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्या वाजसनेयीनामक शाखांचें काण्व, माध्यंदिन इत्यादिक ऋषींनीं अध्ययन केलें ॥ ७४ ॥ आतां सामवेदाच्या शाखांचा विभाग सांगतो– सामवेद गायन करणाऱ्या जैमिनीचा एक समंतुनामक पुत्र होता व त्या सुमंतूचा एक सुन्वान्नामक पुत्र होता. त्या दोघांस (पुत्राला व नातवाला) त्यानें आपल्या संहितेच्या दोन शाखा करून एकेकास एक एक सांगितली ॥ ७५ ॥ त्या जैमिनीचा सुकर्मानामकहि एक महाबुद्धिमान् असा शिष्य होता; त्यानें, सामवेदरूप वृक्षाच्या एक हजार संहिता निरनिराळ्या केल्या. तदनंतर, हे शौनकादिक विप्रहो, त्या सुकर्म्यांचा एक शिष्य कौशल्य हिरण्यनाभ, दुसरा शिष्य पौष्यंजि व तिसरा शिष्य ब्रह्मवेत्ता (सामवेद जाणणारा)

सामशाखाविभागमाह । जैमिनेरिति । तत्सुतः सुमंतुसुतः । ताभ्यां पुत्रपौत्राभ्यां क्रमेणैकैकां प्राह ॥ ७५ ॥ तच्छिष्यो जैमिनेः शिष्यः । महानतिमेधावी । सहस्रसंहितारूपं भेदं चक्रे । साम्नां तं संहिताभेदम् । ततस्तदनंतरम् । सुकर्मणः शिष्य एकः कौशल्यो हिरण्यनाभः पौष्यंजिर्नामैकस्तौ जगृहतुः । आवंत्यश्चान्यस्तस्यैव शिष्यः सोऽपि जग्राह ॥ ७६ ॥ ७७ ॥ पौष्यंज्यावंत्ययोरपि चकाराद्धिरण्यनाभस्यापि पंचशतानि शिष्या आसन् । ते तावतीः शाखा यथायथं जगृहुः । तानुदीच्यान्सतः कालतः कांश्चित्प्राच्यांश्च प्रचक्षत इत्यर्थः । यथैवोक्तं वैष्णवे । उदीच्यसामगाः शिष्यास्तस्य पंचशतं स्मृताः ॥ हिरण्यनाभात्तावत्याः संहिता यैर्द्विजोत्तमैः ॥ गृहीतास्तेऽपि चोच्यंते

जैमिनेः सामगस्यासीत्सुमंतुस्तनयो मुनिः ॥ सुन्वांस्तु तत्सुतस्ताभ्यामेकैकां प्राह संहिताम् ॥ ७५ ॥ सुकर्मा चापि तच्छिष्यः सामवेदतरोर्महान् ॥ सहस्रसंहिताभेदं चक्रे साम्नां ततो द्विजाः ॥ ७६ ॥ हिरण्यनाभः कौशल्यः पौष्यंजिश्च सुकर्मणः ॥ शिष्यो जगृहतुश्चान्य आवंत्यो ब्रह्मवित्तमः ॥ ७७ ॥ उदीच्याः सामगाः शिष्या आसन्पंचशतानि वै ॥ पौष्यंज्यावंत्ययोश्चापि तांश्च प्राच्यान्प्रचक्षते ॥ ७८ ॥ लौगाक्षिर्मांगलिः कुल्यः कुशीदः कुक्षिरेव च ॥ पौष्यंजिशिष्या जगृहुः संहितास्ते शतं शतम् ॥ ७९ ॥ कृतो हिरण्यनाभस्य चतुर्विंशतिसंहिताः ॥ शिष्य ऊचे स्वशिष्येभ्यः शेषा आवंत्य आत्मवान् ॥ ८० ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे द्वादशस्कंधे वेदशाखाप्रणयनं नाम षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥ ॥

पंडितैः प्राच्यसामगा इति ॥ ७८ ॥ पुनरप्येतेषां त्रयाणां सुकर्मणः शिष्याणां शिष्यांतरैः शाखाबाहुल्यं दर्शयति । लौगाक्षिरिति द्वाभ्याम् ॥ ७९ ॥ कृतो नाम हिरण्यनाभस्य शिष्यः स्वशिष्येभ्य ऊचे । शेषा अन्या अपि याः प्रसिद्धाः शाखास्ता आवंत्यः स्वशिष्येभ्य ऊच इति ॥ ८० ॥ इति श्रीमद्भागवते द्वादशस्कंधे टीकायां षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥ ॥

आवंत्य यांनीं त्या सर्व संहितांचें ग्रहण केलें ॥ ७६ ॥ ७७ ॥ त्या पौष्यंजि व आवंत्य यांचे आणि हिरण्यनाभाचेहि उत्तरदिशेस राहून सामवेद गायन करणारे असे पांचशें शिष्य होते त्यांनीं त्या संहिता सारख्या विभागून घेतल्या. यद्यपि ते सर्वहि उदीच्य होते तथापि कालाच्या योगानें त्यांतून कित्येकांस प्राच्य (पूर्वदिशेचे राहणारे) असें ह्मणतात ॥ ७८ ॥ आतां शिष्यप्रशिष्यरूपानें आणखींहि पुष्कळ शाखा झाल्या असें सांगतो– लौगाक्षि, मांगलि, कुल्य, कुशीद व कुक्षि हे पौष्यजीचे शिष्य होते त्यांनीं शंभर शंभर संहिता घेतल्या ॥ ७९ ॥ त्या हिरण्यनाभाचा कृतनामक शिष्य होता त्यानें चोवीस संहिता आपल्या शिष्यांस सांगितल्या. आणि बाकीच्या राहिलेल्या संहिता, आवंत्यऋषीनेंहि आपल्या शिष्यांस पढविल्या ॥ ८० ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील द्वा० वेदशाखाविभागनिरूपणनामक हा सहावा अध्याय समाप्त झाला ॥ ६ ॥ ॥

---

१ घोड्याच्या मानेवरच्या केंसांना आणि वेगाला. वाज असें ह्मणतात सूर्यानें केसांतून किंवा वेगाने दिल्या ह्मणून त्या वाजसनेयी ’ या नावानें प्रसिद्ध झाल्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां ह्या सातव्या अध्यायांत, अथर्ववेदाचा विस्तार सांगितला असून नंतर पुराणांचा विभाग पुराणांचीं लक्षणें व श्रीमद्भागवतश्रवणाचें फल हीं सांगितलीं आहेत ॥ १ ॥ त्यामध्यें प्रथमतः अथर्ववेदाचा विभाग सांगत सूत ह्मणाला–हे शौनका, अथर्व वेद जाणणाऱ्या सुमंतुऋषीनें आपली संहिता कबंधनामक शिष्यास पढविली. त्या कबंधानेंहि त्या संहितांच्या दोन शाखा करून, एक पथ्यनामक शिष्यास व दुसरी वेददर्शनामक शिष्यास सांगितली ॥ १ ॥ वेददर्शीनें, आपल्या संहितेच्या चार शाखा करून शौक्लायनि, ब्रह्मबलि, मोदोष व पिप्पलायनि या चार शिष्यांस पढविल्या. आतां पथ्याचे शिष्य सांगतो, ऐक–हे शौनका, कुमुद, शुनक, व जाजलि हे

सप्तमेऽथर्वविस्तारः पुराणव्यसनं ततः ॥ पुराणलक्षणादीनि फलं भागवतश्रुतेः ॥ १ ॥ क्रमप्राप्तमथर्ववेदविभागमाह । अथर्वविदिति । शिष्यं कबंधनामानम् । स्वकां स्वकीयां संहिताम् । सोऽपि शिष्योऽपि तां द्विधा विभज्य । तदुक्तं वैष्णवे । अथर्ववेदं स मुनिः सुमंतुरमितद्युतिः ॥ शिष्यमध्यापयामास कबंधं सोऽपि च द्विधा ॥ कृत्वा तु वेददर्शाय तथा पथ्याय दत्तवानिति ॥ १ ॥ तत्र वेददर्शः स्वसंहितां चतुर्धा विभज्य चतुरः शिष्यानध्यापयामास पथ्यश्च त्रिधा विभज्य त्रीनित्याह सार्धेन । शौक्लायनिरिति ॥ २ ॥ अंगिरसः शुनकस्य शिष्यो बभ्रुः सैंधवायनश्च । तदुक्तम् । शुनकस्तु द्विधा कृत्वा ददावेकां तु बभ्रवे । द्वितीयां संहितां प्रादात्सैंधवायनसंज्ञिने इति । सावर्ण्याद्याः

सूत उवाच ॥ अथर्ववित्सुमंतुश्च शिष्यमध्यापयत्स्वकाम् ॥ संहितां सोऽपि पथ्याय वेददर्शाय चोक्तवान् ॥ १ ॥ शौक्लायनिर्ब्रह्मबलिर्मोदोषः पिप्पलायनिः ॥ वेददर्शस्य शिष्यास्ते पथ्यशिष्यानथो शृणु ॥ कुमुदः शुनको ब्रह्मन् जाजलिश्चाप्यथर्ववित् ॥ २ ॥ बभ्रुः शिष्योऽथांगिरसः सैंधवायन एव च ॥ अधीयेतां संहिते द्वे सावर्ण्याद्यास्तथाऽपरे ॥ ३ ॥ नक्षत्रकल्पः शांतिश्च कश्यपांगिरसादयः ॥ एते आथर्वणाचार्याः शृणु पौराणिकान्मुने ॥ ४ ॥ त्रय्यारुणिः कश्यपश्च सावर्णिरकृतव्रणः ॥ वैशंपायनहारीतौ षड्वै पौराणिका इमे ॥ ५ ॥ अधीयंत व्यासशिष्यात्संहितां मत्पितुर्मुखात् ॥ एकैकामहमेतेषां शिष्यः सर्वाः समध्यगाम् ॥ ६ ॥

सैंधवायनादीनां शिष्याः ॥ ३ ॥ नक्षत्रकल्पः शांतिकल्पश्चेति द्वौ । तदुक्तम् । नक्षत्रकल्पो वेदानां संहितानां तथैव च ॥ चतुर्थः स्यादांगिरसः शांतिकल्पश्च पंचम इति । नक्षत्रकल्पादीनां कर्तारस्तत्तन्नामभिरुच्यंते ॥ ४ ॥ ५ ॥ मत्पितुर्मुखादिति । प्रथमं व्यासः षट्संहिताः कृत्वा मत्पित्रे रोमहर्षणाय प्रादात् । तस्य च मुखादेते त्रय्यारुण्यादय एकैकां संहितामधीयंत । एतेषां षण्णां शिष्योऽहं ताः सर्वाः समधीतवान् ॥ ६ ॥

तिघे, ' पथ्यानें आपल्या संहितेच्या तीन शाखा करून पढविल्यामुळें ' अथर्ववित् झाले ॥ २ ॥ शुनकाचे बभ्रुव व सैंधवायन दोन शिष्य होते त्यांनीं दोन संहितांचें अध्ययन केलें. तसेच सैंधवादिकांचे सावर्ण्यादिक ह्मणजे नक्षत्रकल्प, शांतिकल्प कश्यप व आंगिरसवगैरे शिष्य हे अथर्ववेदाचे आचार्य (शाखाविभाग करून प्रवृत्त करणारे) होत. हे मुने, आतां पुराणांचे आचार्य सांगतों; ऐक– ॥ ४ ॥ हे शौनका, त्रय्यारुणि, कश्यप, सावर्णि, अकृतव्रण, वैशंपायन व हारीत हे सहा पौराणिक होत ॥ ५ ॥ प्रथमतः वेदव्यासानें पुराणाच्या सहा संहिता करून माझ्या रोमहर्षण पित्याला शिकविल्या. नंतर त्या व्यासशिष्य अशा माझ्या पित्याच्या मुखापासून त्रय्यारुणि आदिकरून सहाजणांनीं एक एक संहितेचें अध्ययन केलें व त्या सर्वांचा शिष्य मी (प्रत्येकाकडून एकेक अशा) सर्वहि (सहाहि) संहिता शिकलों ॥ ६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कश्यप, मी (सूत), सावर्णि व परशुरामाचा शिष्य अकृतव्रण या आह्मी चौघांनीं, व्यासाच्या शिष्याकडून पुराणांच्या चार मूळसंहितांचें अध्ययन केलें ॥७॥ आतां श्रीशुकपरीक्षित्संवादामध्यें सांगितलेल्या पुराणांचें लक्षण व त्यांचे भेद सांगतो—हे शौनका, ब्रह्मर्षींनीं वेदशास्त्राला अनुसरून जें पुराणांचें लक्षण सांगितलें आहे तें लक्ष लावून श्रवणकर ॥ ८ ॥ हे शौनका, या विश्वाच्या सर्ग, विसर्ग, वृत्ति (स्थान), रक्षा (पोषण), मन्वतरें, वंश, वंशजांचें चरित्र (ईशानुकथा), संस्था (निरोध किंवा मुक्ति) हेतु (ऊति) व अपाश्रय या दहा लक्षणांनीं जें युक्त असतें त्याला 'पुराण' असें ह्मणातात. कितीएक आचार्य तर असें ह्मणतात कीं—सर्ग विसर्ग, वंश, मन्वतरें व

रामशिष्यो योऽकृतव्रणः एवं चत्वारो वयम् । मूलसंहिता इत्यनेन ततः संहिताबाहुल्यं सूचितम् ॥ ७ ॥ शुकपरीक्षित्संवादे निरूपितमपि पुराणलक्षणं तद्भेदकथनाय दर्शयति । पुराणेति ॥ ८ ॥ अस्य विश्वस्य । अत्र सर्गो विसर्गश्च स्थानं पोषणमूतयः ॥ मन्वंतरेशानुकथा निरोधो मुक्तिराश्रय इत्यत्रोक्ते स्थानपोषणे वृत्तिरक्षाशब्दाभ्यामुच्येते । अंतराणि मन्वंतराणि वंशो वंश्यानुचरितमितीशानुकथाः । संस्था निरोधः । अनेनैवात्यंतिकलयरूपा मुक्तिरप्युक्ता । हेतुशब्देन जीवाश्रयवासनाशब्दवाच्या ऊतयो गृहीताः ॥ ९ ॥ दशभिरेतैर्लक्षणैरर्थैर्युक्तं महापुराणं विदुः । केचित्पंचविधम् । सर्गश्च प्रतिसर्गश्च वंशो मन्वंतराणि च । वंश्यानुचरितं चेति पुराणं पंचलक्षणमिति । महत्पुराणमल्पं

कश्यपोऽहं च सावर्णी रामशिष्योऽकृतव्रणः ॥ अधीमहि व्यासशिष्याच्चतस्रो मूलसंहिताः ॥ ७ ॥ पुराणलक्षणं ब्रह्मन्ब्रह्मर्षिभिर्निरूपितम् ॥ शृणुष्व बुद्धिमाश्रित्य वेदशास्त्रानुसारतः ॥ ८ ॥ सर्गोऽस्याथ विसर्गश्च वृत्तिरक्षांतराणि च ॥ वंशो वंश्यानुचरितं संस्था हेतुरपाश्रयः ॥ ९ ॥ दशभिर्लक्षणैर्युक्तं पुराणं तद्विदो विदुः ॥ केचित्पंचविधं ब्रह्मन्महदल्पव्यवस्थया ॥ १० ॥ अव्याकृतगुणक्षोभान्महतस्त्रिवृतोऽहमः ॥ भूतसूक्ष्मेंद्रियार्थानां संभवः सर्ग उच्यते ॥ ११ ॥ पुरुषानुगृहीतानामेतेषां वासनामयः ॥ विसर्गोऽयं समाहारो बीजाद्बीजं चराचरम् ॥ १२ ॥

चेति व्यवस्थया । यत्र दशापि लक्षणानि पृथक् पृथङ्निरूप्यंते तन्महापुराणम् । यत्र त्वन्येषां पंचस्वेवांतर्भावस्य विवक्षा तदल्पमिति व्यवस्थयेत्यर्थः ॥ १० ॥ सर्गादिलक्षणानि व्याचष्टे अव्याकृतेत्यादिना । अव्याकृतस्य प्रधानस्य गुणानां क्षोभाद्यो महांस्तस्माच्च त्रिवृदहंकारस्तस्माद्भूतमात्राणां सूक्ष्माणामिंद्रियाणां च तदर्थानां च स्थूलानां देवतानां च संभवः सर्गः कारणसृष्टिसर्ग इत्यर्थः । उच्यत इति यथाऽपेक्षमुत्तरत्राप्यनुषंगः ॥ ११ ॥ विसर्गं व्याचष्टे । पुरुषेणेश्वरेणानुगृहीतानामेतेषां महदादीनाम् । पूर्वकर्मवासनाप्रधानोऽयं समाहारः । कार्यभूतश्चराचरप्राणिरूपो बीजाद्बीजमिव प्रवाहापन्नो विसर्ग उच्यत इत्यर्थः ॥ १२ ॥

वंश्यानुचरित या पांचप्रकारच्या लक्षणांनीं युक्त असलेलें पुराण होय. तर मग पुराणांचीं दोन लक्षणें आहेत असें ह्मणशील तर—नाहीं. या मत भेदामध्यें मोठें व लहान अशी व्यवस्था आहे. ती अशी कीं—ज्यामध्यें दहाहि लक्षणें निरनिराळीं निरूपण केलीं आहेत तें महापुराण आणि ज्यामध्यें दुसऱ्या पांच लक्षणांचा अंतर्भाव करून पांच लक्षणें निरूपण केलीं आहेत तें अल्प पुराण (उपपुराण) होय असें समजावें ॥ ९ ॥ १० ॥ आतां सर्ग विसर्गादिकांचीं लक्षणें सांगतो—हे शौनका, प्रधानाच्या (प्रकृतीच्या) गुणांचा क्षोभ होऊन त्यापासून महत्तत्वाची महत्तत्त्वापासून तीन प्रकारच्या अहंकाराची व त्यापासून शब्दादि तन्मात्रा, इंद्रियें, पंचतत्त्वें व त्यांच्या देवता यांची जी सृष्टि होते तिला 'सर्ग' असें ह्मणतात ॥ ११ ॥ ॥ ईश्वरानें अनुग्रह केलेल्या (सृष्टिसामर्थ्य दिलेल्या) या महत्तत्त्वादिकांचा जो, पूर्वकर्म

१ 'मूलसंहिता' असें श्लोकांत पद आहे त्यावरून आणखींहि पुष्कळ संहिता होत्या असें सुचविलें आहे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वासना प्रधान असलेला व 'जसें, बीजापासून दुसरें बीज उत्पन्न होतें तसा' प्रवाहासारखा असलेला 'कार्यभूत' चराचरप्राणिरूप समुदाय त्याला 'विसर्ग' असें ह्मणतात ॥ १२ ॥ चर प्राण्यांचें सामान्येंकरून अचरप्राणी व चरप्राणी हें जीविकासाधन होय. त्यामध्यें मनुष्यांचें त्यांच्या त्यांच्या स्वभावानुसार प्रीतीस्तव किंवा शास्त्रोक्त विधीला अनुसरून तें जें जीविकासाधन केलें आहे त्यालाच 'वृत्ति' असें ह्मणतात ॥ १३ ॥ ज्यांच्या योगानें दैत्यांचा नाश केला जातो त्या, प्रत्येक युगांत पशुपक्षी, मनुष्य, ऋषि व देव यांच्यामध्यें भगवान् अच्युताच्या अवतारसंबंधीं लीला होऊन विश्वाचें रक्षण होतें तीं 'रक्षा' होय ॥ १४ ॥ मनु, देव, मनुपुत्र, इंद्र, सप्तर्षि व श्रीहरीचा अंशेंकरून अवतार हे सहा वर्ग जेव्हां आपापल्या अधिकाराचेठिकाणीं प्रवृत्त होतात त्यावेळच्या त्या काळास 'मन्वंतर' असें ह्मणतात ॥ १५ ॥

चराणां भूतानां सामान्यतोऽचराणि । चकाराच्चराणि च वृत्तिः । तत्र नृणां स्वेन स्वभावेन कामाच्चोदनयाऽपि वा या नियता वृत्तिर्जीविका कृता सा वृत्तिरुच्यत इत्यर्थः ॥ १३ ॥ तिर्यङ्मर्त्यर्षिदेवेषु येऽच्युतावतारास्तेषामीहा लीला सा विश्वस्य रक्षोच्यत इत्यर्थः । यैरवतारैरिति समासान्निष्कृष्य कथंचित्संबंधः । त्रयीद्विषो दैत्याः ॥ १४ ॥ षड्विधं मन्वंतरमुच्यते । षड्विधत्वमेवाह । मनुरिति । मन्वादयः षडेते वर्गाः स्वस्वाधिकारेण यदा प्रवर्तंते तन्मन्वंतरमित्यर्थः ॥ १५ ॥ वंशमाह । राज्ञामिति ॥

वृत्तिर्भूतानि भूतानां चराणामचराणि च ॥ कृता स्वेन नृणां तत्र कामाच्चोदनयाऽपि वा ॥ १३ ॥ रक्षाऽच्युतावतारेहा विश्वस्यानुयुगे युगे ॥ तिर्यङ्मर्त्यर्षिदेवेषु हन्यंते यैस्त्रयीद्विषः ॥ १४ ॥ मन्वंतरं मनुर्देवा मनुपुत्राः सुरेश्वरः ॥ ऋषयोंऽशावताराश्च हरेः षड्विधमुच्यते ॥ १५ ॥ राज्ञां ब्रह्मप्रसूतानां वंशस्त्रैकालिकोऽन्वयः ॥ वंश्यानुचरितं तेषां वृत्तं वंशधराश्च ये ॥ १६ ॥ नैमित्तिकः प्राकृतिको नित्य आत्यंतिको लयः ॥ संस्थेति कविभिः प्रोक्ता चतुर्धाऽस्य स्वभावतः ॥ १७ ॥ हेतुर्जीवोऽस्य सर्गादेरविद्याकर्मकारकः ॥ यं चानुशयिनं प्राहुरव्याकृतमुतापरे ॥ १८ ॥ व्यतिरेकान्वयो यस्य जाग्रत्स्वप्नसुषुप्तिषु ॥ मायामयेषु तद्ब्रह्म जीववृत्तिष्वपाश्रयः ॥ १९ ॥

ब्रह्मणः सकाशात्प्रसूतिर्येषां शुद्धानामित्यर्थः । तेषामन्वयो वंशः । तेषां वृत्तम् । ये च तद्वंशधरास्तेषां च वृत्तं वंशानुचरितमुच्यते ॥ १६ ॥ अस्य विश्वस्य । स्वभावतो मायातो निष्पन्नस्य । यद्वा मायातो यश्चतुर्विधो लय इति ॥ १७ ॥ अस्य जगतः सर्गादेर्हेतुर्निमित्तं जीवः । सोऽत्र हेतुरुच्यत इत्यर्थः । तस्य निमित्ततामाह । अविद्यया कर्मकारकः कर्मकर्ता । जीवादृष्टप्रयुक्तत्वाद्विश्वसर्गादेः स तु तत्र हेतुरित्यर्थः । नन्वनुशयी निमित्तमिति केचित् । अव्याकृतमित्यपरे । तत्राह । यमिति । चैतन्यप्राधान्येनानुशयिनमुपाधिप्राधान्यविवक्षयाऽव्याकृतम् ॥ १८ ॥ अपाश्रयमाह । व्यतिरेकेति । जाग्रदादिष्ववस्थासु जीवतया वर्तंत इति जीववृत्तयो विश्वतैजसप्राज्ञास्तेषु माया-

---

ब्रह्मापासून झालेल्या (शुद्ध अशा) राजांच्या भूत, भविष्य व वर्तमानकाळीं होणाऱ्या संततीला 'वंश' आणि त्या शुद्ध राजांच्या चरित्रास व त्यांचे वंशज होतात, त्यांच्या चरित्रास 'वंश्यानुचरित' असें ह्मणतात ॥ १६ ॥ या विश्वाचा नैमित्तिक, प्राकृतिक, नित्य व आत्यंतिक असा जो चारप्रकारचा मायेच्या योगानें प्रलय होत असतो त्याला 'संस्था' असें विद्वज्जन ह्मणतात ॥ १७ ॥ हे शौनका, चैतन्यास मुख्य मानणारे कित्येक लोक, ज्या जीवाला अनुशायी असें ह्मणतात व दुसरे उपाधीला मुख्य मानणारे कित्येक लोक, अव्याकृत असें ह्मणतात तो अविचेनें 'मोहित होऊन' कर्में करणारा जीव, या विश्वाची उत्पत्तिवगैरे होण्यास कारणीभूत आहे; ह्मणून त्याला 'हेतु' असें ह्मणतात ॥ १८ ॥ ज्याचा–जाग्रत्, स्वप्न व सुषुप्ति या अवस्थांमध्यें जीवपणानें असणाऱ्या व मायामय अशा विश्व, तैजस व ॥ २२ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्राज्ञरूप वृत्तीमध्यें अन्वय (व्यापकता) आहे आणि ज्याच्या समाधीवगैरेच्याठिकाणीं त्यामध्यें व्यतिरेक (नसणें) आहे असें जें ब्रह्म त्याला ' आश्रय ' असें ह्मणतात ॥ १९ ॥ आतां तेंच दृष्टांत देऊन सांगतो–' जसें कारणभूत असलेलें मृतिकोवगैरे वस्तु, नामरूपेंनीं युक्त अशा आपल्या कार्यरूप घटादिक पदार्थांमध्यें अनुस्यूत असूनहि त्याहून भिन्न असतें त्याप्रमाणें ' गर्भाधानापासून मरणापर्यंत असलेल्या देहाच्या अवस्थांमध्यें ' अधिष्ठानपणानें ' अनुस्यूत व ' साक्षित्वानें ' त्याहून भिन्न असें जें नामरूपांचेठिकाणीं सत्तामात्र असणारें परब्रह्म तेंच अपाश्रय होय ॥ २० ॥ याप्रमाणें पुराणांच्या दहाहि लक्षणांचें व्याख्यान करून आतां त्यांचें प्रयोजन सांगतो– ज्यावेळीं पुरुषाचें मन, रजःसत्त्वतमोरूप तीन वृत्तींचा त्याग करून विराम पावेल अथवा येथेंच केलेल्या योगबलानें किंवा सर्गादि लक्षणांच्या श्रवण कीर्तनेंकरून

मयेषु साक्षितयाऽन्वयः समाध्यादौ च व्यतिरेको यस्य तद्ब्रह्म संसारप्रतीतिबाधयोरधिष्ठानावधिभूतमपाश्रय उच्यत इत्यर्थः ॥ १९ ॥ एतदेव सदृष्टांतं प्रपंचयति । पदार्थेषु घटादिषु द्रव्यं मृदादि यथा युतमन्वितमयुतं च बहिरप्यवस्थानात् । रूपनामसु च सन्मात्रं सत्तामात्रं यथा । एवं बीजं गर्भाधानमादिर्यासां पंचतांऽतो यासां तासु देहावस्थासु नवस्वप्यधिष्ठानत्वेन साक्षित्वेन च युतमयुतं च यत्तदपाश्रय इति ॥ २० ॥ एवं दशापि लक्षणानि व्याख्याय दशमस्य विशुद्ध्यर्थं नवानामिह लक्षणम् । वर्णयंति महात्मान इति यदुक्तं तदाह । विरमेतेति । यदा सर्गादीनां मायामयत्वानुसंधानेन वामदेवादेरिव स्वयमेव चित्तं विरमेत । इहैवानुष्ठितेन योगेन वा देवहूत्यादिवत् । सदा विक्षेपा-

पदार्थेषु यथा द्रव्यं सन्मात्रं रूपनामसु ॥ बीजादिपंचतां तासु ह्यवस्थासु युतायुतम् ॥ २० ॥ विरमेत यदा चित्तं हित्वा वृत्तित्रयं स्वयम् ॥ योगेन वा तदाऽऽत्मानं वेदेहाया निवर्तते ॥ २१ ॥ एवंलक्षणलक्ष्याणि पुराणानि पुराविदः ॥ मुनयोऽष्टादश प्राहुः क्षुल्लकानि महांति च ॥ २२॥ ब्राह्मं पाद्मं वैष्णवं च शैवं लैंगं सगारुडम् ॥ नारदीयं भागवतमाग्नेयं स्कांदसंज्ञितम् ॥ २३ ॥ भविष्यं ब्रह्मवैवर्तं मार्कंडेयं सवामनम् ॥ वाराहं मात्स्यं कौर्मं च ब्रह्मांडाख्यमिति त्रिषट् ॥ २४ ॥ ब्रह्मन्निदं समाख्यातं शास्त्रप्रणयनं मुनेः ॥ शिष्यशिष्यप्रशिष्याणां ब्रह्मतेजोविवर्धनम् ॥२५॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे द्वादशस्कंधे सप्तमोऽध्यायः ॥ ७॥ ॥

भावादात्मानं वेद । तदा चाविद्यानिवृत्तेरीहायाः संसाररूपाया निवर्तत इत्यर्थः ॥ २१ ॥ पुराणविभागप्रस्तावेन तल्लक्षणादिप्रासंगिकमुक्त्वा प्रस्तुतमाह । एवंविधैर्लक्षणैर्लक्ष्याणि ॥ २२ ॥ २३ ॥ त्रिषडष्टादश ॥ २४ ॥ उपसंहरति । ब्रह्मन्निति । मुनेर्व्यासस्य शिष्यादीनां च । ब्रह्मतेजो ब्रह्मवर्चसं तद्विवर्धनम् । श्रोतॄणामिति शेषः ॥ २५ ॥ इति श्रीमद्भागवते द्वादशस्कंधे टीकायां सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥ ॥

झालेल्या भक्तियोगानें वैराग्य पावेल तेव्हां विक्षेप नाहींसा झाल्यामुळें हा पुरुष आत्म्याला जाणेल व संसाररूप अविद्येपासून स्वतःच निवृत्त होईल ॥ २१ ॥ शौनका, अशा प्रकारच्या लक्षणांनीं जाणलीं जाणारीं महापुराणें व उपपुराणें मिळून अठरा आहेत असें पूर्वींचे ज्ञाते ह्मणतात ॥ २२ ॥ त्यांचीं नांवें–ब्राह्म (ब्रह्मपुराण), पाद्म (पद्मपुराण) ' वैष्णव, शैव, लैंग, गारुड, नारदीय, भागवत, आग्नेय, स्कांद, भविष्य, ब्रह्मवैवर्त, मार्कंडेय, वामन, वाराह, मात्स्य, कौर्म व ब्रह्माण्ड हीं अठरा १८ पुराणें होत ॥ २३ ॥ २४ ॥ हे शौनका, व्यास, व्यासाचे शिष्य, त्यांचे शिष्य व त्यांचेहि प्रतिशिष्य इत्यादिकांनीं केलेला व श्रोत्याचें ब्रह्मवर्चस्व वाढविणारा असा हा शास्त्रांचा विस्तार मी तुला वर्णन केला ॥ २५ ॥ याप्रमाणें श्रीम० महा० द्वादशस्कंधामध्यें पुराणलक्षणनिरूपणनामक हा सातवा अध्याय समाप्त झाला ॥ ७ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ आतां या आठव्या अध्यायांत, मार्कंडेयऋषीची तपश्चर्या, त्याला मोह उत्पन्न करणाऱ्या कामादिक देवतांपासून झालेला असंमोह व त्यानें केलेली नरनारायणांची स्तुति यांचें वर्णन केलेलें आहे ॥ १ ॥ आतां पुराणविभागाच्या प्रसंगानें पुराणकर्त्या मार्कंडेयाच्या चरित्राविषयीं प्रश्न करीत शौनक ह्मणाला– हे वक्तृश्रेष्ठा सूता, तूं चिरकाल जीवंत रहा. तूं संसाररूप अपार अंधकारांमध्यें भ्रमण करणाऱ्या पुरुषांना त्यांतून पार दाखविणारा आहेस. यास्तव विचारितों तें आह्मांस सांग ॥ १ ॥ ज्या प्रलयाच्या योगानें हें जगत् नाश पावतें त्या कल्पाच्या शेवटीं होणाऱ्या प्रलयामध्येंहि जो (एकटाच) अवशेष राहिला त्या मृकंडपुत्र मार्कंडेयऋषीला सर्वलोक 'चिरायु' असें ह्मणतात. तर हें कसें संभवतें ? ह्मणजे प्रलयामध्येंहि जीवंतपणीं राहणें कसें घडून आलें ? ॥ २ ॥ दुसरें असें कीं– तो मार्कंडेय, भृगुवंशामध्यें श्रेष्ठ असल्यामुळें याच

अष्टमे तु तपश्चर्या मार्कंडेयस्य मोहकैः ॥ कामादिभिरसंमोहो नरनारायणस्तुतिः ॥ १ ॥ पुराणविभागप्रसंगेन पुराणकर्तुर्मार्कंडेयस्य चरितप्रश्नमाह । सूतेति । त्वमेव वक्तुं योग्य इत्याह । तमसि संसारे भ्रमतां पारदर्शनस्तन्निवर्तकः ॥ १ ॥ वक्तव्यमाह । आहुरिति । उर्वरितोऽवशिष्टः । येन कल्पांतेन । एतत्कथं घटत इत्येकः प्रश्नः ॥ २ ॥ प्रलयाभावादप्येतन्न घटत इत्याह । स वा इति । यतो भार्गवर्षभः । कोऽपि प्राकृतिको नैमित्तिको वा ॥ ३ ॥ अन्यदप्यघटितमेवेत्याह । एक एवेति । तोकं बालकम् ॥ ४ ॥

शौनक उवाच ॥ सूत जीव चिरं साधो वद नो वदतांवर ॥ तमस्यपारे भ्रमतां नृणां त्वं पारदर्शनः ॥ १ ॥ आहुश्चिरायुषमृषिं मृकंडतनयं जनाः ॥ यः कल्पांते उर्वरितो येन ग्रस्तमिदं जगत् ॥ २ ॥ स वा अस्मत्कुलोत्पन्नः कल्पेऽस्मिन्भार्गवर्षभः ॥ नैवाधुनाऽपि भूतानां संप्लवः कोऽपि जायते ॥ ३ ॥ एक एवार्णवे भ्राम्यन्ददर्श पुरुषं किल ॥ वटपत्रपुटे तोकं शयानं त्वकेमद्भुतम् ॥ ४ ॥ एष नः संशयो भूयान्सूत कौतूहलं यतः ॥ तं नश्छिंधि महायोगिन्पुराणेष्वपि संमतः ॥ ५ ॥ सूत उवाच ॥ प्रश्नस्त्वया महर्षेऽयं कृतो लोकभ्रमापहः ॥ नारायणकथा यत्र गीता कलिमलापहा ॥ ६ ॥ प्राप्तद्विजातिसंस्कारो मार्कंडेयः पितुः क्रमात् ॥ छंदांस्यधीत्य धर्मेण तपःस्वाध्यायसंयुतः ॥ ७ ॥

कौतूहलमौत्सुक्यम् । तं संशयम् । न केवलं त्वं महायोगी किंतु पुराणेष्वपि ज्ञातृत्वेन संमतः ॥ ५ ॥ प्रश्नमभिनंदति । हे महर्षे अयं प्रश्नः । तत्र हेतुः । नारायणेति । यत्र प्रश्नविषये ॥ ६ ॥ तत्र मार्कंडेयस्तपसा भगवंतमाराध्य मायाप्रदर्शनं वव्रे ततश्च तेनैव भगवन्मायया सप्तकल्पा दृष्टा नान्यैरित्युत्तरं वक्तुमादित आरभ्य तस्य चरितमाह । प्राप्त इत्यादिना । मार्कंडेयो मृत्युं जिग्ये इति पंचमश्लोकेनान्वयः । मध्यमग्रंथेन तस्य धर्मः कथ्यते । प्राप्तो द्विजातिसंस्कार उपनयनाख्यो येन सः । पितुः सकाशाद्गर्भाधानादिक्रमात् । छंदांसि वेदान् ॥ ७ ॥

कल्पामध्यें आणि आमच्या कुलांत उत्पन्न झाला आहे. आणि अजूनपर्यंत (भृगुकुलोत्पत्ति झाल्यापासून) तर प्राण्यांचा प्राकृत किंवा नैमित्तिक यांपैकीं कोणताहि प्रलय झालेला नाहीं. ह्मणजे यावेळपर्यंत प्रलयच जर झाला नाहीं तर 'प्रलयांतून अवशिष्ट राहिला' हें ह्मणणें कसें संभवतें ? ॥ ३ ॥ त्याहून दुसरेंहि एक अघटित आहे; तें असें कीं;– तो मार्कंडेय, प्रलयसमुद्रांत एकटाच भ्रमण करीत असतां," वटपत्राच्या पुटावर (द्रोणांत) शयन केलेला असा एक आश्चर्यकारक बालकरूप पुरुष त्याच्या दृष्टीस पडला ॥४॥ हा आह्मांस मोठा संशय उत्पन्न झाल्यामुळें श्रवण करण्याविषयीं मोठें औत्सुक्य झालें आहे. हे बहुज्ञा सूता, तूं केवळ महायोगीच आहेस असें नाहीं; तर ज्ञातृत्वें करून सर्वपुराणांमध्येंहि मान्य आहेस. यास्तव तो आमचा संशय नाहींसा कर ॥ ५ ॥ सूत ह्मणाला– हे शौनका, ज्या तुझ्या प्रश्नाचें समाधान करितेवेळीं कलीदोषांचा ॥२३॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नाश करणारी भगवान् नारायणाची कथा गायन केली जाईल असा हा लोकांचा श्रम दूर करणारा फार चांगला प्रश्न केलास ! ॥ ६ ॥ आतां त्या प्रश्नाविषयीं, तपश्चर्येनें भगवंताचें आराधन करून त्याजकडून 'तुझी माया दाखीव' असा वर मागून घेतल्यावर मार्कंडेयानेंच भगवन्माया पाहिली दुसऱ्या कोणीहि पाहिली नाहीं असें सांगण्याकरितां पहिल्यापासून आरंभ करून मार्कंडेयाचें चरित्र सांगतो— हे शौनका, तो मार्कंडेय, पित्याकडून गर्भाधानादिकांच्या क्रमाक्रमानें उपनयन संस्कार प्राप्त झाल्यावर, शास्त्रोक्तविधीनें वेद पढून तप (आपल्याला उचित असे धर्म) व स्वाध्याय यांनीं युक्त झाला ॥ ७ ॥ आणि वल्कलवस्त्र धारण करणारा व जटा धारण-करणारा असा तो शांत नैष्ठिकब्रह्मचारी मार्कंडेय, धर्मवृद्धीसाठीं दंड, कमंडलु, यज्ञोपवीत, मेखला, रुद्राक्षांच्या जपमालेसहित कृष्णाजिन, व दर्भ हीं धारण करून अग्नि, सूर्य, गुरु, ब्राह्मण आणि आत्मा यांचेठिकाणीं श्रीहरीचें अर्चन करूं लागला. तो, सकाळीं व संध्याकाळीं भिक्षान्न मागून आणून आपल्या गुरूला अर्पण करीत असे आणि जर आपल्या गुरूनें आज्ञा दिली तर मौनव्रत धारण करून आपण एकवेळ भोजन करीत असे; कदाचित् गुरूनें भोजन करण्यास आज्ञा न दिल्यास

बृहद्व्रतधरो नैष्ठिको ब्रह्मचारी सन् ॥ ८ ॥ नियमर्द्धये धर्मवृद्धये । अग्न्यादिषु पंचसु हरिमर्चयन् ॥ ९ ॥ भैक्ष्यं गुरवेऽर्थमाहृत्य तेनानुज्ञातश्चेत्तर्हि बुभुजे नो चेत्सकृत्कदा चिदुपो-

बृहद्व्रतधरः शांतो जटिलो वल्कलांबरः ॥ बिभ्रत्कमंडलुं दंडमुपवीतं समेखलम् ॥ ८ ॥ कृष्णाजिनं साक्षसूत्रं कुशांश्च नियमर्द्धये ॥ अग्न्यर्कगुरुविप्रात्मस्वर्चयन्संध्ययोर्हरिम् ॥ ९ ॥ सायं प्रातः स गुरवे भैक्ष्यमाहृत्य वाग्यतः ॥ बुभुजे गुर्वनुज्ञातः सकृन्नोचेदुपोषितः ॥ १० ॥ एवं तपःस्वाध्यायपरो वर्षाणामयुतायुतम् ॥ आराधयन्हृषीकेशं जिग्ये मृत्युं सुदुर्जयम् ॥ ११ ॥ ब्रह्मा भृगुर्भवो दक्षो ब्रह्मपुत्राश्च येऽपरे ॥ नृदेवपितृभूतानि तेनासन्नतिविस्मिताः ॥ १२ ॥ इत्थं बृहद्व्रतधरस्तपःस्वाध्यायसंयमैः ॥ दध्यावधोक्षजं योगी ध्वस्तक्लेशांतरात्मना ॥ १३ ॥ तस्यैवं युंजतश्चित्तं महायोगेन योगिनः ॥ व्यतीयाय महान्कालो मन्वंतरषडात्मकः ॥ १४ ॥ एतत्पुरंदरो ज्ञात्वा सप्तमेऽस्मिन्किलांतरे ॥ तपोविशंकितो ब्रह्मन्नारेभे तद्विघातनम् ॥ १५ ॥

षितो भवति ॥ १० ॥ ११ ॥ तेन मृत्युंजयेन ॥ १२ ॥ ध्वस्ता क्लेशा रागादयो यस्य तेनांतरात्मना प्रत्याहृतमनसा ॥ १३ ॥ १४ ॥ तस्य तपोनिष्ठामितिहासेन वर्णयति एतदित्यादिना । अस्मिन्सप्तमे मन्वंतरे । तपसा मत्पदं ग्रहीष्यतीति विशंकितः ॥ १५ ॥

देदिल उपोषित राहत असे ॥८॥ ९ ॥१०॥ हे शौनका, याप्रमाणें तप व स्वाध्याय यांच्याविषयीं तत्पर असणाऱ्या त्या मार्कंडेयानें, दहाकोटि वर्षेपर्यंत श्रीहरीचें आराधन करून जिंकण्यास अतिकठिण अशाहि मृत्यूला जिंकिलें ॥ ११ ॥ मार्कंडेयानें मृत्यूस जिंकल्यामुळें ब्रह्मदेव, भृगु, महादेव, दक्ष, व ब्रह्मदेवाचे नारदादिक पुत्र यांना आणि दुसरे जे मनुष्य, देव, पितर, भूतेंवगैरे होते त्यांना मोठें आश्चर्य वाटलें ॥ १२ ॥ याप्रमाणें नैष्ठिक ब्रह्मचर्य व्रत धारण करणारा तो योगी, तप, स्वाध्याय व इंद्रियजय यांच्या योगानें रागादिरहित अशा अंतःकरणेंकरून भगवान् अधोक्षजाचें ध्यान करूं लागला ॥ १३ ॥ असा मोठ्या योगबलानें मनाचें नियमन करीत असणाऱ्या त्या मार्कंडेयाचा सहा मन्वंतरांइतका (१७०४ कृतादि युगें मोठा) काळ निघून गेला ॥ १४ ॥ आतां त्याची तपाविषयींची निष्ठा इतिहासरूपानें सांगतो— हे शौनका, या सातव्या मन्वंतरामध्यें हें वर्तमान जाणून त्या मन्वंतरांतील पुरंदरनामक इंद्र, तपाच्या योगानें 'हा माझें इंद्रपद घेईल असा' शंकित होऊन

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याच्या तपश्चर्येला विघ्न करण्यास उद्युक्त झाला ॥ १५ ॥ त्या इंद्रानें, मार्कंडेय मुनीला तपापासून भ्रष्ट करण्याकरितां गंधर्व, अप्सरा, मदन, वसंतऋतु व मलयपर्वतावरील (सुगंधित) वायु, तसेच रजोगुणाला अतिप्रिय असा लोभ व मद यांस पाठवून दिले ॥ १६ ॥ हे शौनका, ते सर्वहि हिमालयाच्या उत्तरेच्या बाजूस ज्याठिकाणीं पुष्पभद्रा-नामक नदी व चित्रानामक शिला आहे त्याठिकाणीं मार्कंडेयाच्या आश्रमाजवळ प्राप्त झाले ॥ १७ ॥ त्या पवित्र आश्रमाचें स्थान, सुंदर वृक्षवल्लींनी सुशोभित, पवित्र पक्ष्यांच्या समुदायांनें व्याप्त, आणि पवित्र व निर्मल अशा जलाशयांनीं युक्त असें होतें ॥ १८ ॥ तसेंच जेथें, मत्त झालेले भ्रमर गुंजारव करीत असून, व मत्त अशाप्रकारचे कोकिळ आपले 'कुहूकुहू' शब्द करीत आहेत व ज्याठिकाणीं मदोन्मत्त झालेले मयूररूप नट नृत्य करीत आहेत असें तें मदोन्मत्त अशा पक्षिकुलांनीं व्याप्त आहे होतें

मुनये मुनिं भ्रंशयितुम् । रजसस्तोकमतिप्रियमपत्यं लोभो मदश्च तौ ॥ १६ ॥ १७ ॥ तदाश्रमपदं प्रविष्टो वायुर्ववाविति तृतीयेनान्वयः । पुण्यैर्द्रुमैर्लताभिश्चांचितं पूजितम् । पुण्यद्विजानामृषीणां कुलैराकीर्णम् । पुण्या अमला जलाशया यस्मिन् ॥ १८ ॥ मत्तभ्रमराणां संगीतं यस्मिन् । मत्तकोकिलानां कुजितं यस्मिन् । मत्ता बर्हिण एव नटास्ते-षामाटोपो नृत्यसंभ्रमो यस्मिन् । मत्तानां द्विजानां पक्षिणां कुलैराकुलं व्याप्तम् ॥ १९ ॥ एवंभूतं तदाश्रमपदं प्रविष्टः सन्वायुर्मलयानिलो ववौ प्रससार । उत्तंभयन्नुद्दी-

गंधर्वाप्सरसः कामं वसंतमलयानिलौ ॥ मुनये प्रेषयामास रजस्तोकमदौ तथा ॥ १६ ॥ ते वै तदाश्रमं जग्मुर्हिमाद्रेः पार्श्व उत्त-रे ॥ पुष्पभद्रा नदी यत्र चित्राख्या च शिला विभो ॥ १७ ॥ तदाश्रमपदं पुण्यं पुण्यद्रुमलतांचितम् ॥ पुण्यद्विजकुलाकीर्णं पुण्यामलजलाशयम् ॥ १८ ॥ मत्तभ्रमरसंगीतं मत्तकोकिलकूजितम् ॥ मत्तबर्हिनटाटोपं मत्तद्विजकुलाकुलम् ॥ १९ ॥ वायुः प्रविष्ट आदाय हिमनिर्झरशीकरान् ॥ सुमनोभिः परिष्वक्तो ववावुत्तंभयन्स्मरम् ॥ २० ॥ उद्यच्चंद्रनिशावक्त्रः प्रवालस्तबकालि-भिः ॥ गोपद्रुमलताजालैस्तत्रासीत्कुसुमाकरः ॥ २१ ॥ अन्वीयमानो गंधर्वैर्गीतवादित्रयूथकैः ॥ अदृश्यतात्तचापेषुः स्वःस्त्रीयूथप-तिःस्मरः ॥ २२ ॥ हुत्वाऽग्निं समुपासीनं ददृशुः शक्रकिंकराः ॥ मीलिताक्षं दुराधर्षं मूर्तिमंतमिवानलम् ॥ २३ ॥ ननृतुस्तस्य पुरतः स्त्रियोऽथो गायका जगुः ॥ मृदंगवीणापणवैर्वाद्यं चक्रुर्मनोरमम् ॥ २४ ॥

पयन् । तत्र वृक्षेषु प्रवेशान्मांद्यं हिमनिर्झरकणानामादानाच्छैत्यं पुष्पपरिष्वंगात्सौगंध्यं चोक्तम् ॥ २० ॥ किंच । उद्यश्चंद्रो यस्मिंस्तन्निशावक्त्रं रजनीमुखं यस्मिन्सः । प्रवा-लस्तबकानामालयः श्रेणयो येषु तैः । गुप्यंति विटपैः संश्लिष्यंतीति गोपा द्रुमा लताश्च तेषां जालैः समूहैरुपलक्षित आविर्बभूव ॥ २१ ॥ किंच । तदा गीतवादित्रयूथकैर्गाय-कादिसमुदायिभिर्गंधर्वैरन्वीयमानः । तथा स्वःस्त्रियोऽप्सरसस्तासां यूथस्य पतिः । आत्तं चापमिषुश्च येन स स्मरश्च तत्रादृश्यत ॥ २२ ॥ दुराधर्षमभिभवितुमशक्यम् ॥ २३ ॥ २४ ॥

॥ १९ ॥ अशाप्रकारच्या त्या आश्रमामध्यें पुष्पांनीं सुगंधित झालेला तो मलयवायु, थंडगार झऱ्यांचे तुषार घेऊन कामदेवाला उद्दीपित करीत वाहूं लागला ॥ २० ॥ ज्यांमध्यें चंद्रोदय झाला आहे असा प्रदोषकाल प्राप्त झाला असतां वसंतऋतुहि कोमल पल्लवांच्या पंक्तींनीं आलिंगित अशा वृक्षांच्या व लतांच्या समूहांवर प्रगट झाला ॥ २१ ॥ आणि गाणाऱ्या वाजविणाऱ्या मंडळींसहवर्तमान गंधर्वांस बरोबर घेऊन, सज्ज केलेलें धनुष्य व बाण धारण केलेला अप्सरांचा पति मदन, त्या आश्रमांत दृष्टि पडूं ॥ २४ ॥
लागला ॥ २२ ॥ नंतर त्या इंद्राच्या सर्व सेवकांना, अग्नीमध्यें हवन करून डोळे झांकून बसलेला तो मार्कंडेय, पराभव करण्यास अशक्य असल्यामुळें मूर्तिमान जणुं अग्नीच आहे कीं काय असा भासला ॥ २३ ॥ अप्सरा त्या मार्कंडेयाच्या पुढ्यांत नृत्य करूं लागल्या; गंधर्व गायन करूं लागले व कित्येक मृदंग, वीणा, ढोल वगैरे

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वाद्यांचा मनोहर ध्वनि करूं लागले ॥२४॥ त्यावेळीं मदनानें शोषण, दीपन संमोहन, तापन व उन्मादन अशीं पांच मुखें असलेल्या अस्त्राचें आपल्या धनुष्याचेठिकाणीं संधान केलें. त्याचवेळीं वसंतऋतु लोभ व दुसरे इंद्राचे सेवक हे ऋषीच्या मनाला चलविचल करूं लागले ॥ २५ ॥ नंतर तेथें पुंजिकस्थली या नांवाची अप्सरा, चेंडूनीं खेळूं लागली असतां स्तनांच्या भारानें तिचा मध्यभाग अमर्दीं दमून गेला होता आणि तिच्या वेणींतून फुलांच्या माळा खालीं पडत होत्या ॥ २६ ॥ ती अप्सरा चेंडूच्या मागून फिरत असतां इकडून तिकडे दृष्टि फिरवीत असे. इतक्यांत कमरपट्टा तुटून पडल्यामुळें मलयाचलवायूनें त्या अप्सरेच्या सूक्ष्मवस्त्राचें हरण केलें ॥ २७ ॥ तेव्हां मदनानें, मार्कंडेयाला आपण जिंकिलें असें मानून आपला बाण सोडिला; परंतु जसा निर्भागी पुरुषाचा केलेला उद्योग निष्फळ होतो त्याप्रमाणें मदनाचा 'तपापासून भ्रष्ट करण्याकरितां केलेला' सर्व प्रयत्न त्या मार्कंडेयाच्याठिकाणीं निष्फळ झाला ॥ २८ ॥ हे मुने, याप्रमाणें मार्कंडेयऋषीला प्रतिकूल असें आचरण करणारे ते

शोषणदीपनसंमोहनतापनोन्मादनाख्यानि पंचमुखानि यस्य तदस्त्रं संदधे । तदैव मधुर्वसंतः । रजस्तोकश्च । पुंस्त्वमार्षम् । अन्ये चेंद्रभृत्यास्तस्य मनो व्यकंपयन् ॥ २५ ॥ ॥ २६ ॥ किंच । वायुर्मलयानिलः पुंजिकस्थल्यास्तत्सूक्ष्मं वासो जहार ॥ २७ ॥ सर्वं तेषां कर्म । तत्र तस्मिन् । मोघं व्यर्थम् । अनीशस्य निर्दैवस्य ॥ २८ ॥ मुनेरपकुर्वंतः

संदधेऽस्त्रं स्वधनुषि कामः पंचमुखं तदा ॥ मधुर्मनो रजस्तोक इंद्रभृत्या व्यकंपयन् ॥ २५ ॥ क्रीडंत्याः पुंजिकस्थल्याः कंदुकैस्तनगौरवात् ॥ भृशमुद्विग्नमध्यायाः केशविस्रंसितस्रजः ॥ २६ ॥ इतस्ततो भ्रमद्दृष्टेश्चलंत्या अनुकंदुकम् ॥ वायुर्जहार तद्वासः सूक्ष्मं त्रुटितमेखलम् ॥ २७ ॥ विससर्ज तदा बाणं मत्वा तं स्वजितं स्मरः ॥ सर्वं तत्राभवन्मोघमनीशस्य यथोद्यमः ॥ २८ ॥ त इत्थमपकुर्वंतो मुनेस्तत्तेजसा मुने ॥ दह्यमाना निववृतुः प्रबोध्याहिमिवार्भकाः ॥ २९ ॥ इतींद्रानुचरैर्ब्रह्मन्धर्षितोऽपि महामुनिः ॥ यन्नागादहमो भावं न तच्चित्रं महत्सु हि ॥३०॥ दृष्ट्वा निस्तेजसं कामं सगणं भगवान्स्वराट् ॥ श्रुत्वाऽनुभावं ब्रह्मर्षेर्विस्मयं समगात्परम् ॥ ३१ ॥ तस्यैवं युंजतश्चित्तं तपःस्वाध्यायसंयमैः ॥ अनुग्रहायाविरासीन्नरनारायणो हरिः ॥ ३२ ॥ तौ शुक्लकृष्णौ नवकंजलोचनौ चतुर्भुजौ रौरववल्कलांबरौ ॥ पवित्रपाणी उपवीतकं त्रिवृत्कमंडलुं दंडमृजुं च वैष्णवम् ॥ ३३ ॥

प्रतिकूलमाचरंतः । हे मुने ॥ २९ ॥ अहमोऽहंकारस्य । भावं विकारम् ॥ ३० ॥ निस्तेजसं म्लानवदनम् । स्वराडिंद्रः ॥ ३१ ॥ नरनारायणरूपो हरिः ॥ ३२ ॥ तावनुवर्णयति द्वाभ्याम् । ताविति । रौरवं कृष्णाजिनं वल्कलं चांबरं ययोस्तौ । पवित्रे पाण्योर्ययोस्तौ । त्रिवृत्त्रिगुणं नवतंतुकमिति वा । त्रिवृद्बहिःपवमानमित्यादौ नवके प्रयोगात् ।

इंद्रदूत, त्याच्या तेजानें दग्ध होऊं लागले तेव्हां 'जसे बालक, सर्पास जागें करून भयानें मागच्यामागें पळून जात असतात त्याप्रमाणें' तेथून परत निघून गेले ॥ २९ ॥ हे शौनका, याप्रमाणें इंद्राच्या अनुचरांनीं पराभूत केलेल्याहि त्या महामुनि मार्कंडेयाला अहंकारापासून होणारा क्रोधमोहादिक विकार ज्याअर्थीं उत्पन्न झाला नाहीं त्याअर्थीं अशाप्रकारच्या महंताचेठिकाणीं खरोखरच कांहीं आश्चर्य मानण्यासारखें नाहीं ॥ ३० ॥ इकडे भगवान् इंद्र, इतर मंडळीसहवर्तमान म्लान मुख झालेल्या त्या मदनास पाहून व 'त्यांजकडून' त्या ब्रह्मर्षीचा प्रभाव ऐकून परम विस्मय पावला ॥ ३१ ॥ नंतर अशा रीतीनें तप, स्वाध्याय व यमनियम यांच्या योगानें चित्ताचा जय करणाऱ्या त्या मार्कंडेयावर अनुग्रह करण्याकरितां नर व नारायण यांच्या रूपानें श्रीहरि त्याच्याजवळ प्रगट झाला ॥ ३२ ॥ ते बांध्यानें उंच आणि चतुर्भुज असून शुक्ल व कृष्णवर्णाचे होते; त्यांचे नेत्र कमळासारखे सुंदर होते; त्यांनीं कृष्णाजिन व वल्कलें हीं वस्त्रें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

परिधान केलीं असून हातांत पवित्रें व गळ्यांत तीन पदरांचें (नवसूत्री) यज्ञोपवीत धारण केलें होतें; त्यांच्या शरीराची कांति चमकणाऱ्या विद्युल्लतेसारखी पिंगटवर्णाची असल्यामुळें ते साक्षात् तपोमूर्तीच दिसत असत; त्यांनीं कमंडलु, वेळूचा सरळ दंड, कमळमण्यांची (कमळकाकड्यांची) माळ, ' चालतांना किडेवगैरे प्राणी मरूं नयेत

॥ २५ ॥ म्हणून ' त्यांना एकाबाजूस करण्याचें साधन (वस्त्राचा कुंचावगैरे) व दर्भमुष्टि हीं एकएक धारण केलीं होतीं. असे ते देवश्रेष्ठांनाहि पूज्य होते ॥ ३३॥३४॥ हे शौनका, भगवंताचे ते नरनारायणनामक अवतार होते अशा त्या ऋषींना पाहतांच मार्कंडेयानें, उठून व आदरसत्कार करून शरीरानें दंडवत् नमस्कार केला ॥३५॥ त्यांच्या दर्शनाच्या योगानें झालेल्या आनंदानें ज्याचीं देह, इंद्रियें व मन हीं फार शांत झालीं आहेत, ज्याच्या अंगावर रोमांच उठले आहेत व ज्याचे नेत्र अश्रूंनीं परिपूर्ण झाले आहेत असा तो मार्कं-

उपवीतकादीन्दधानौ ॥ ३३ ॥ वेदं दर्भमुष्टिम् । किंच साक्षात्तप एव तौ । तत्र हेतुः । तपत्तडिद्वर्णं देदीप्यमानविद्युत्संकाशं यत्पिशंगं रोचिस्तेन रूपिणौ मूर्तिमंतौ । तादृक्तेजोयुक्तमूर्तिभ्यां तपोमयत्वेन प्रकाशमानावित्यर्थः प्रांशू उन्नतौ ॥ ३४ ॥ उच्चैर्महताऽऽदरेण ॥ ३५ ॥ तयोः संदर्शनेन य आनंदस्तेन निर्वृता उपशांता आत्मेंद्रियाशया देहेंद्रियमनांसि यस्य सः । न सेहे नाशक्नोत् ॥ ३६ ॥ आश्लिषन्नालिंगन्निव ॥ ३७ ॥ पादयोरवनिज्य पादौ प्रक्षाल्य । अर्हणेनाऽर्घ्येण ॥ ३८ ॥ पादाभ्यां पादावानम्य गरिष्ठौ पूज्यतमौ तौ प्रति ॥ ३९ ॥ अंतर्यामिणस्तस्यैव प्राणादिप्रवर्तकत्वादात्मनस्तत्स्तुतावस्वातंत्र्यं पश्यन्नाह । किमिति । तव त्वां किमहं वर्णये कथं स्तौमि । यद्येन

पद्माक्षमालामुत जंतुमार्जनं वेदं च साक्षात्तप एव रूपिणौ ॥ तपत्तडिद्वर्णपिशंगरोचिषा प्रांशू दधानौ विबुधर्षभार्चितौ ॥ ३४ ॥
ते वै भगवतो रूपे नरनारायणावृषी ॥ दृष्ट्वोत्थायादरेणोच्चैर्ननामांगेन दंडवत् ॥ ३५ ॥ स तत्संदर्शनानंदनिर्वृतात्मेंद्रियाशयः ॥
हृष्टरोमाऽश्रुपूर्णाक्षो न सेहे तावुदीक्षितुम् ॥ ३६ ॥ उत्थाय प्रांजलिः प्रह्व औत्सुक्यादाश्लिषन्निव ॥ नमो नम इतीशानौ बभाषे
गद्गदाक्षरः ॥ ३७ ॥ तयोरासनमादाय पादयोरवनिज्य च ॥ अर्हणेनानुलेपेन धूपमाल्यैरपूजयत् ॥ ३८ ॥ सुखमासनमासीनौ
प्रसादाभिमुखौ मुनी ॥ पुनरानम्य पादाभ्यां गरिष्ठाविदमब्रवीत् ॥ ३९ ॥ मार्कंडेय उवाच ॥ किं वर्णये तव विभो यदुदीरितो-
ऽसुः संस्पंदते तमनु वाङ्मनइंद्रियाणि ॥ स्पंदंति वै तनुभृतामजशर्वयोश्च स्वस्याप्यथापि भजतामसि भावबंधुः ॥ ४० ॥

त्वयैवोदीरितः प्रेरितोऽसुः प्राणः संस्पंदते प्रवर्तते तमनु च वागादयः स्पंदंति । अत्र हेतुः । वै अन्वयव्यतिरेकाभ्यां श्रोत्रस्य श्रोत्रमित्यादि श्रुतिभिश्चैतत्प्रसिद्धमित्यर्थः । न केवलं प्राकृतानां तनुभृतां किंत्वजशर्वयोश्चातः स्वस्य ममापि तथैव । एवं यद्यपि न कस्यापि स्वातंत्र्यमथापि दारुयंत्रवत्त्वत्प्रवर्तितैरपि वागादिभिर्भजतां पुंसां भावबंधुरात्मबंधुरसि न तु पित्रादिवद्देहमात्रबंधुः । अहो कृपालुता तवेत्यर्थः ॥ ४० ॥

डेयऋषि, त्या नर-नारायणांकडे पाहण्याविषयीं समर्थ झाला नाहीं ॥ ३६ ॥ तदनंतर, तो उत्सुकपणानें आलिंगन करितोच कीं काय असा उठून, हात जोडून, नम्र होत्साता त्या नरनारायणऋषींप्रत " तुम्हां उभयतांस नमस्कार असो नमस्कार असो " असें अडखळत अडखळत म्हणाला ॥ ३७ ॥ आणि त्यानें, त्यांना आसन देऊन व त्यांचे पाय धुवून अर्घ्य, चंदन, पुष्पें, धूपवगैरे उपचारांनीं त्यांची पूजा केली ॥ ३८ ॥ नंतर मार्कंडेयऋषि, सुखपूर्वक आसनावर बसलेल्या व प्रसाद करण्यास समर्थ अशा त्या अतिपूज्य नर-नारायणमुनींच्या पुनः पायां पडून असें म्हणाला कीं- ॥ ३९ ॥ आतां, नर-नारायणांची स्तुति करण्यास आपण समर्थ नाहीं असा विचार करून तेच अंतर्यामीं आत्मरूपानें राहून प्राणादिकांची प्रवृत्ति करितात म्हणून आत्मरूपाचीच स्तुति करीत मार्कंडेय म्हणाला- हे विभो, मी तुझी स्तुति कशी बरें करावी ? कारण ॥ २५ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

देह धारण करणाऱ्या प्राण्यांचा तूं प्रेरणा केलेला प्राण प्रवृत्त होतो व त्याच्या मागून वाणी, मन इंद्रियें हीं 'आपापलीं कर्मे करण्यास' प्रवृत्त होतात; केवल प्राकृत प्राण्यांचीच अशी स्थिति असें नाहीं, तर,– ब्रह्मदेव व शंकर यांच्या प्राणादिकांस तूंच प्रेरणा केल्यावर ते प्रवृत्त होतात. आणि माझे स्वताःचेहि प्राणादिक तुझ्याच प्रेरणेनें प्रवृत्त होतात हें श्रुतिप्रसिद्ध आहे. एतावता तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणालाहि स्वतंत्रपणा नाहीं. असें जरी आहे तथापि तूं, लांकडाच्या बाहुलीप्रमाणें प्रवृत्त केलेल्या त्या वाणी, मन व इंद्रियें यांच्या योगानें तुझें भजन करणाऱ्या पुरुषांच्या आत्म्याचा तूं बंधु आहेस; पिता पुत्र इत्यादिक हे केवळ देहाचेच बंधु होत तसा तूं नाहींस ॥ ४० ॥ आतां आह्मीं दोघेहि धर्माचे पुत्र असल्यामुळें प्राणादिकांचे प्रवर्तक कसे बरें होऊं? असें ह्मणशील तर– हे भगवन्, जसे तूं ह्या विश्वाचें रक्षण करण्याकरितां मत्स्यकूर्मादिक अनेक अवतार धारण करितोस, तशाच ह्या दोन भगवंताच्या (तुझ्या, मूर्तीहि त्रैलोक्याचें पालन करण्यासाठीं, दुःखनिवृत्ति करण्यासाठीं व मृत्यूला

ननु कथमावां प्राणादिप्रवर्तकौ धर्मपुत्रत्वादावयोरिति चेत्तत्राह । मूर्ती इति । हे भगवन् भगवतस्तव इमे मूर्ती त्रिलोक्याः क्षेमाय पालनाय तापविरमाय च दुःखनिवृत्त्यै मृत्युजित्यै मोक्षाय । नतु त्वं कस्यापि पुत्र इत्यर्थः । अत्र दृष्टांतः । यथेदं विश्वमवितुमन्यास्तनूर्मत्स्यकूर्मादिलक्षणा नाना अनेकप्रकारा बिभर्षि तद्वत् । न केवलं पालनमात्रं तव कर्म किंतु सृष्टिलयावपीत्याह । सृष्ट्वेति । तत्राप्यन्यनिरपेक्षत्वे दृष्टांतः । ऊर्णनाभिरिवेति ॥ ४१ ॥ यस्मादेवंभूतस्त्वं तस्मात्त्वांघ्रिमूलं भजामीत्याह । तस्येति । तस्यावितुः पालकस्य स्थावरजंगमानामीश्वरस्यांघ्रिमूलं भजामीति तृतीयश्लोकस्थस्यानुषंगः । कथंभूतमंघ्रिमूलम् । यत्स्थं यत्र स्थितम् । कर्मगुणकालानां रजो मलम् । अन्ये च पूर्वोक्ता

मूर्ती इमे भगवतो भगवंस्त्रिलोक्याः क्षेमाय तापविरमाय च मृत्युजित्यै ॥ नाना बिभर्ष्यवितुमन्यतनूर्यथेदं सृष्ट्वा पुनर्ग्रससि सर्वमिवोर्णनाभिः ॥ ४१ ॥ तस्यावितुः स्थिरचरेशितुरंघ्रिमूलं यत्स्थं न कर्मगुणकालरजः स्पृशंति ॥ यद्वै स्तुवंति निनमंति यजंत्यभीक्ष्णं ध्यायंति वेदहृदया मुनयस्तदाप्त्यै ॥ ४२ ॥ नान्यं तवांघ्र्युपनयादपवर्गमूर्तेः क्षेमं जनस्य परितोभिय ईश विद्मः ॥ ब्रह्मा बिभेत्यलमतो द्विपरार्द्धधिष्ण्यः कालस्य ते किमुत तत्कृतभौतिकानाम् ॥ ४३ ॥

स्तापादयो न स्पृशंति । रुज इति वा पाठः । यतो वेदो हृदये येषां ते वेदतात्पर्यविदो मुनयो यदेव स्तुवंति नितरां नमंति । तदाप्त्यै तत्प्राप्तये एव स्तवनादि कुर्वंति ॥ ४२ ॥ यतोऽन्यः पुरुषार्थो नास्तीत्याह । नान्यमिति अंघ्र्युपनयाच्छ्रीमच्चरणप्राप्तेरन्यं क्षेमं न विद्मः । परितः सर्वेष्वपि लोकेषु भीर्यस्य तस्य जनस्य । तदेवाह । द्विपरार्धं धिष्ण्यं स्थानं यस्य स ब्रह्माऽपि ते कालस्य त्वद्भ्रूविजृंभरूपात्कालादलं बिभेति । अतः किमुत वक्तव्यं तेन ब्रह्मणा कृतानां भौतिकानां प्राणिनां भयमिति ॥ ४३ ॥

जिंकून मोक्षप्राप्ति होण्यासाठीं तूं धारण केल्या आहेस. आतां केवल पालन करणें हेंच तुझें काम नव्हे तर सृष्टि उत्पन्न करणें व लय करणें हेंहि तुझेंच काम आहे असें सांगतो– 'जसा, कोळी प्रथम आपल्या पोटांतून सूत काढून घर (जाळें) करितो व तें स्वतांच पुनः भक्षण करितो तसा तूंहि हें जगत् उत्पन्न करून पुनः त्याचा संहार करितोस ॥ ४१ ॥ आतां, 'ज्याअर्थीं तूं अशाप्रकारचा आहेस त्याअर्थीं मी तुझ्या चरणकमलाचें सेवन करितों' असें सांगतो– हे भगवन्, स्थावरजंगमात्मक जगताला प्रेरणा करणाऱ्या व पालन करणाऱ्या तुझ्या चरणकमलाचें मी भजन करितों. कीं, ज्याची उपासना करणाऱ्या पुरुषाला, कर्म, गुण व काल यांचे दोष स्पर्शसुद्धां करीत (लागत) नाहींत व वेदाचें तात्पर्य जाणणारे मुनि, त्याच्या प्राप्तिसाठीं ज्याची (चरणांची) स्तुति करितात, पूजन करितात, नमस्कार करितात व निरंतर ध्यान करितात ॥४२॥ आतां, याहून दुसरा पुरुषार्थ नाहीं असें सांगतो– हे नियंत्या परमेश्वरा, तूं भ्रुकुटि उघडून (किंवा ताठ करून) पाहतोस त्यावेळीं

CC-0. In Public Domain Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याच्या योगानें, ज्याचें स्थान दोन परार्धवर्षेपर्यंत कायम रहातें तो ब्रह्मदेवहि, अगदीं भिऊन जातो; मग त्या ब्रह्मदेवानें निर्माण केलेले प्राणी भय पावतील हें काय सांगावें ! याकरितां सर्वत्रठिकाणीं भय पावणाऱ्या जनाला, मोक्षरूपी तुझ्या श्रीमच्चरणाच्या प्राप्तीशिवाय दुसरें कल्याणकारक स्थान आह्मी जाणत नाहीं ॥ ४३ ॥ यास्तव, आत्मस्वरूपाचें आवरण करणाऱ्या, निष्फळ, तुच्छ, नश्वर, व 'अगदींच खोटे नसल्यामुळें' आत्मस्वरूपाहून भिन्न न दिसणाऱ्या या देहादिक पदार्थांचा त्याग करून मी, त्या जीवनिर्षत्या, सत्यस्वरूप व कारणाहून पर अशा तुझ्या त्या पादमूलाचें भजन करितों. तर मग मोक्षाकरितांच माझें भजन करावें आणि दुसऱ्या फळाची अपेक्षा असल्यास अन्य देवतेला भजावें काय ? असें ह्मणशील तर– नाहीं. जर पुरुष, तुझें भजन करील तर तुजपासूनच त्याला इच्छित फळ प्राप्त होईल ॥ ४४ ॥

यस्मादेवं तत्तस्मात्तव पादमूलं भजामि । कथंभूतस्य । ऋतधियः सत्यज्ञानस्वरूपस्य । यद्वा सत्या धीर्यस्य यस्मिन्वा तस्यात्मगुरोर्जीवनियंतुरतः कारणात्परस्य । किं कृत्वा । आत्मच्छदि स्वात्मावरकमपार्थं च निष्फलमसच्च तुच्छमंत्यं च नश्वरमिदं देहादि हित्वा देहादिभजनं त्यक्त्वा । असच्चेत्कथं प्रतीयेत तत्राह । अभिन्नमात्रम् । नह्यत्यंतमसत्किंत्वात्ममात्रम् । न ततः पृथगस्तीत्यर्थः । नन्वपवर्गाय भवतु मद्भजनं फलांतरार्थं त्वन्यभजनं कार्यमेव तत्राह । तर्हीति । यदि त्वां भजति पुरुषस्तर्हि ते त्वत्त एव सर्वं मनीषितमर्थं विंदेतेति ॥ ४४ ॥ ननु ब्रह्मरुद्रावपि ममैव मूर्ती अतो मामेव किमत्यंतमाद्रियसे तत्राह । सत्त्वमिति । यदपि यद्यपि तवैव मायया कृता एता लीलास्त्वयैव

तद्वै भजाम्यृतधियस्तव पादमूलं हित्वेदमात्मच्छदि चात्मगुरोः परस्य ॥ देहाद्यपार्थमसदंत्यमभिज्ञमात्रं विंदेत ते तर्हि सर्वमनीषितार्थम् ॥ ४४ ॥ सत्त्वं रजस्तम इतीश तवात्मबंधो मायामयाः स्थितिलयोदयहेतवोऽस्य ॥ लीलाधृता यदपि सत्त्वमयी प्रशांत्यै नान्ये नृणां व्यसनमोहभियश्च याभ्याम् ॥ ४५ ॥ तस्मात्तवेह भगवन्नथ तावकानां शुक्लां तनुं स्वदयितां कुशला भजंति ॥ यत्सात्वताः पुरुषरूपमुशंति सत्त्वं लोको यतोऽभयमुतात्मसुखं न चान्यत् ॥ ४६ ॥

धृतास्तथापि या सत्वमयी सैव प्रशांत्यै मोक्षाय न केवलमस्य प्रशांत्यभावमात्रमन्यभजने किं त्वनिष्टं च भवेदित्याह । व्यसनेति ॥ ४५ ॥ तदेव सदाचारेण द्रढयति । तस्मादिति । हे भगवन् तव शुक्लां तनुं श्रीनारायणाख्याम् । अथ तावकानां च शुक्लां तनुं नराख्याम् । यद्यस्मात्सात्वताः सत्वमेव पुरुषस्येश्वरस्य रूपमुशंति मन्यंते न त्वन्यद्रजस्तमश्चेति । अत्र हेतुः । यतः सत्त्वाल्लोको वैकुंठाख्यः लोकत्वे सत्यप्यभयं च भोगे सत्यप्यात्मसुखं च ॥ ४६ ॥

आतां, ब्रह्मदेव व शंकर हेहि माझ्याच मूर्ति आहेत यास्तव माझाच पुष्कळ आदरसत्कार कां करितोस ? असें ह्मणशील तर– हे जीवहितचिंतका, यद्यपि सत्व, रज व तम हे तीन्ही गुण तुझ्याच मूर्ति असून यांच्या योगानें तूं या जगताचे उत्पत्ति, स्थिति व लय होण्यास हेतुभूत अशा मायेनें केलेल्या लीला धारण करितोस तथापि हे परमेश्वरा, त्यांतून जी सत्वगुणमय मूर्ति आहे तीच मनुष्यांना मोक्ष मिळण्यास कारण होते. दुसऱ्या (रजोतमोरूप) मूर्तीचें भजन केलें असतां त्यांपासून दुःख, मोह व भीति हींच प्राप्त होतात ॥ ४५ ॥ आतां ज्याअर्थीं सत्त्वमूर्तीच कल्याण करणारी आहे त्याअर्थीं हे भगवंता, या लोकीं निपुणबुद्धि लोक, तुझ्या (नारायणाच्या) शुद्धसत्त्वात्मक मूर्तीचें व तुझ्या भक्तांच्या मनाला आवडणाऱ्या शुद्धसत्त्वात्मक (नररूप) मूर्तीचेंच भजन करितात. कारण, ज्या सत्त्वमूर्तिपासून वैकुंठलोक प्राप्त होऊन अभय मि ळाल्यामुळें आत्म्याला सुख होतें; तें सत्त्वच पुरुषाचें रूप होय असें भक्तजन मानितात. रजोगुणाला व तमोगुणाला ईश्वराचें रूप मानीत नाहींत ॥ ४६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हे ईश्वरा तूं सर्वांतर्यामी व्यापक, विश्वरूप विशुश्वरु, परम दैवत, शुद्धमूर्ति व वाणीचा नियंता, वेदांचाहि प्रवर्तक असून आतां नारायण व नरोत्तम या रूपांनीं ऋषि झाला आहे त्या तुज भगवंताला नमस्कार करितों ॥ ४७॥ आतां, वेदमार्ग प्रवृत्त कसा केला त्याविषयीं हेतु सांगतों—जो निष्फल अशा इंद्रियमार्गांनीं विक्षिप्तबुद्धि झालेला पुरुष, आपल्या इंद्रियांमध्यें प्राणांमध्यें हृदयांत दृष्टिगोचर असणाऱ्या पदार्थांमध्यें असणाऱ्याहि तुला जाणत नाहीं तो तुझ्या मायेनें आच्छादितमति झालेला पुरुष, पूर्वीसारखा अविद्वान् असूनहि सर्वांचा गुरु अशा तुझ्यापासून प्रवृत्त झालेला वेद प्राप्त झाल्यावर तुला प्रत्यक्ष जाणतो॥ ४८ ॥ आतां वेदानेंच तुझें ज्ञान होतें असें उपपादन करीत ह्मणतो—हे भगवंता तुझ्या रहस्याला प्रकाशित करणारें ज्या तुझें ज्ञान वेदामध्यें होत असतें, ज्या तुझेठिकाणीं , ब्रह्मदेव, महादेव वगैरे मोठमोठे विद्वान्हि, ‘ स्वरूपज्ञान व्हावें ह्मणून ’ सांख्ययोगादि

अतस्तं प्रणमति । तस्मै नम इति । हंसाय शुद्धाय । संयत गिरे नियतवाचे । अथ च निगमेश्वराय वेदमार्गप्रवर्तकाय ॥ ४७ ॥ वेदार्थसंप्रदायप्रवर्तने हेतुत्व वदन्स्तौति । यमिति । वितथाक्षपथैः कपटेंद्रियमार्गैर्भ्रमद्धीर्विक्षिप्तबुद्धिः पुमान्स्वेंद्रियादिषु नियंतृत्वेन संतमपि यं त्वां न वेद । दृक्पथेषु विषयेषु । बुद्धिविक्षेपे हेतुः । तन्मायया तस्य तवैव मायया आवृता आत्मनिष्ठा मतिर्यस्य स उ सोऽपि आद्य एव पूर्वमविद्वानेवाखिलगुरोस्तव त्वत्प्रवर्तितं वेदमुपसाद्य प्राप्य तं त्वां साक्षाद्वेद ॥ ४८ ॥ वेदेनैव त्वज्ज्ञानमित्युपपादयन्प्रणमति । यस्य तव दर्शनं निगमे भवति । कथंभूतम् । आत्मनस्तव रहो रहस्यं तस्य प्रकाशकम् । अन्यथा दुर्ज्ञेयतामाह । अजपरा ब्रह्ममुख्याः कवयोऽपि सांख्ययोगादिभिर्यतमाना यत्र त्वयि मुह्यंति । कुत इत्यत आह । सर्वेषां सांख्यादिवादिनां ये वादास्तेषां विषया भेदादयस्तेषां

तस्मै नमो भगवते पुरुषाय भूम्ने विश्वाय विश्वगुरवे परदेवतायै॥ नारायणाय ऋषये च नरोत्तमाय हंसाय संयतगिरे निगमेश्वराय ॥ ४७ ॥ यं वै न वेद वितथाक्षपथैर्भ्रमद्धीः संतं स्वखेष्वसुषु हृद्यपि दृक्पथेषु ॥ तन्माययावृतमतिः स उ एव साक्षादाद्यस्व तेऽखिलगुरोरुपसाद्य वेदम् ॥ ४८ ॥ यद्दर्शनं निगम आत्मरहःप्रकाशं मुह्यंति यत्र कवयोऽजपरा यतंतः ॥ तं सर्ववादविषयप्रतिरूपशीलं वंदे महापुरुषमात्मनिगूढबोधम् ॥ ४९ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे द्वादशस्कंधेऽष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥ ॥ सूत उवाच ॥ संस्तुतो भगवानित्थं मार्कंडेयेन धीमता ॥ नारायणो नरसखः प्रीत आह भृगूद्वहम् ॥ १ ॥

प्रतिरूपं तत्तदनुसारि शीलं स्वभावो यस्य तम् । कुतः । आत्मना देहादिसंघातेन निगूढो बोधो यस्य तम् । एवंभूतं महापुरुषं त्वां वंदे ॥ ४९ ॥ इति श्रीमद्भागवते द्वादशस्कंधे टीकायामष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥ ॥ नवमे भगवन्मायादिदृक्षोर्दर्शने मुहुः ॥ मायाशिशोर्लयाब्धौ च मुनेर्निर्वेशनिर्गमैः ॥ १ ॥ भगवतः परितोषपूर्वकं तदपेक्षितवरदानं कथयितुमाह संस्तुत इत्यादिना ॥ १ ॥

कैंकरून यत्न करीत असूनहि मोह पावतात ज्याचा स्वभाव सर्व सांख्यवादी लोकांच्या वादसंबंधीं भेदादिकांस अनुसरून आहे व ज्याचें ज्ञान, देहादिकाच्या संघातानें गुप्त आहे अशा त्या महापुरुषरूपी तुला मी नमस्कार करितों ॥ ४९ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणामध्यें द्वादशस्कंधांतील मार्कंडेयतपश्चर्यानिरूपणनामक हा आठवा अध्याय समाप्त झाला ॥ ८ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ आतां या नवव्या अध्यायांत, भगवंताच्या मायेचें दर्शन होण्याची इच्छा करणाऱ्या मार्कंडेय मुनीला, प्रलयसमुद्रांत वारंवार प्रवेश करणें व त्यांतून निघणें यांच्या योगेंकरून भगवन्मायेचें दर्शन व नंतर मायिक बालकरूप भगवंताचें दर्शन झालें; असें सांगितलें आहे ॥ १ ॥ आतां भगवंतानें, संतोषपूर्वक त्या मार्कंडेय ऋषीला वरदान दिलें असें सांगण्याकरितां, सूत ह्मणाला—हे शौनका, त्या बुद्धिमान् मार्कंडेय मुनीनें याप्रमाणें स्तुति करून प्रसन्न

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

झालेला नराचा मित्र जो भगवान् नारायण तो, त्या भृगुकुलश्रेष्ठ मार्कंडेयाप्रत भाषण करूं लागला– ॥ १ ॥ श्रीभगवान् ह्मणाला–हे ब्रह्मर्षिश्रेष्ठा, तूं चित्त एकाग्र करून माझ्याठिकाणीं निर्दोष अशी भक्ति केलीस व तपश्चर्या, वेदाध्ययन आणि संयम (इंद्रियनिग्रह) हींहीं केलीस त्यामुळें तूं सिद्ध झाला आहेस ॥ २ ॥ हे ऋषे, तुझ्या नैष्ठिक ब्रह्मचर्येंकरून आह्मीं तुला प्रसन्न झालों आहों. यास्तव वर देणाऱ्यामध्यें श्रेष्ठ अशा आह्मापासून तूं इच्छित वर मागून घे. तुझें कल्याण असो ॥३॥ मार्कंडेयऋषि ह्मणाला–हे देवदेवा, हे शरणागतांचीं दुःखें हरण करणाऱ्या अच्युता, वराच्या योगानें मला लोभ उत्पन्न करून, तूं आपला उत्कर्ष दाखविलास. हे ईश्वरा, आतां जें तूं दर्शन दिलेंस, एवढाच तो वर पुरे आहे; याहून दुसऱ्या वराची इच्छा नाहीं ॥ ४ ॥ ब्रह्मदेवादिक देव, योगाभ्यास करून पक्क (शुद्ध) झालेल्या फक्त मनानें ज्या तुझ्या श्रीमत्पादारविंदाचें

आत्मसमाधिना चित्तैकाग्र्येण ॥ २ ॥ वयं ते परितुष्टाः स्मेति बहुवचनं सर्वदेवाभिप्रायेण । वरदेशादित्येकवचनं द्वयोरैक्याभिप्रायेण । प्रतीच्छ गृहाण ॥ ३ ॥ वरेण छंदयता त्वया जितमुत्कर्षो दर्शितः । मम तु वराकांक्षा नास्तीत्याह । वरेणेति ॥ ४ ॥ यस्य तव श्रीमत्पादाब्जदर्शनं मनसाऽपि गृहीत्वा प्राप्य कृतार्था अजादयो भवंति स भवान्मेऽक्षगोचरो जातोऽस्ति किमतःपरं वरेणेत्यर्थः ॥ ५ ॥ द्रक्ष्ये द्रष्टुमिच्छामि । लोकपालैर्ब्रह्मादिभिः सहितोऽयं लोको जनो यया सद्भिदां सति वस्तुनि भेदम्

श्रीभगवानुवाच ॥ भो भो ब्रह्मर्षिवर्यासि सिद्ध आत्मसमाधिना ॥ मयि भक्त्याऽनपायिन्या तपःस्वाध्यायसंयमैः ॥ २ ॥ वयं ते
परितुष्टाः स्म त्वद्बृहद्व्रतचर्यया ॥ वरं प्रतीच्छ भद्रं ते वरदेशादभीप्सितम् ॥ ३ ॥ ऋषिरुवाच ॥ जितं ते देवदेवेश प्रपन्ना-
र्तिहराच्युत ॥ वरेणैतावताऽलं नो यद्भवान्समदृश्यत ॥ ४ ॥ गृहीत्वाऽजादयो यस्य श्रीमत्पादाब्जदर्शनम् ॥ मनसा योगपक्केन
स भवान्मेऽक्षगोचरः ॥ ५ ॥ अथाप्यंबुजपत्राक्ष पुण्यश्लोकशिखामणे ॥ द्रक्ष्ये मायां यया लोकः सपालो वेद सद्भिदाम्
॥ ६ ॥ सूत उवाच ॥ इतीडितोऽर्चितः काममृषिणा भगवान्मुने ॥ तथेति स स्मयन्प्रागाद्बदर्याश्रममीश्वरः ॥ ७ ॥ तमेव चिंतयन्न-
र्थमृषिः स्वाश्रम एव सः ॥ वसन्नग्न्यर्कसोमांबुभूवायुवियदात्मसु ॥ ८ ॥ ध्यायन्सर्वत्र च हरिं भावद्रव्यैरपूजयत् ॥ क्वचित्पूजां
विसस्मार प्रेमप्रसरसंप्लुतः ॥ ९ ॥

॥ ६ ॥ तथेति द्रक्ष्यसीति । स ईश्वरः स्मयन्प्रागात् । पाठांतरे क्रियाविशेषणम् ॥ ७ ॥ तमेवार्थं मायादर्शनरूपम् । अग्न्यादिमूर्तिषु ॥ ८ ॥ भावद्रव्यैर्मनोमयैर्द्रव्यैः । क्वचित्कदाचित्प्रेमप्रसरसंप्लुतः प्रेमोद्रेकं प्राप्तः ॥ ९ ॥

दर्शन घेऊन कृतार्थ होतात तो तूं प्रत्यक्ष माझ्या दृष्टि पडलास ! तरी ह्यापेक्षां दुसरा वर कोणता मागून घ्यावयाचा आहे ? ॥ ५ ॥ तथापि हे पवित्रकीर्ति असणाऱ्यांमध्यें श्रेष्ठा कमलपत्राक्षा, ज्या मायेच्या योगानें ब्रह्मादिकांसहवर्तमान हा जन, सत्यवस्तूचेठिकाणीं देव तिर्यक्, मनुष्य इत्यादिक भेद पहातो ती माया मात्र दृष्टीस पडावी अशी इच्छा मी करीत आहे. ॥ ६ ॥ सूत ह्मणाला–हे शौनका, याप्रमाणें मार्कंडेयऋषीनें पुष्कळ स्तुति करून पुजा केली तेव्हां तो महासमर्थ (नरनारायण) भगवान् तथास्तु (माझी माया तुझ्या दृष्टीस पडेल) असें ह्मणून व विस्मय पावून बदरिकाश्रमीं निघून गेला ॥ ७ ॥ नंतर त्या मायेचें दर्शन मला केव्हां घडेल असें चिंतन करीत तो मार्कंडेयऋषि आपल्या आश्रमामध्येंच राहून,– अग्नि, सूर्य, चंद्र, उदक, भूमि, वायू, आकाश व आत्मा यांचेठिकाणीं व दुसऱ्या सर्वठिकाणीं श्रीहरीचें ध्यान करीत मानसोपचारांनीं त्याचें पूजन करूं लागला. एकेवेळीं तर तो आनंदरूप प्रवाहांत निमग्न होत्साता त्या श्रीहरीची पूजा करण्यास विसरून गेला ॥ ८ ॥ ९ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हे ब्रह्मन् शौनका, एकेदिवशीं संध्याकाळीं तो मुनि, पुष्पभद्रानदीच्या तटाकीं संध्यावगैरे करीत बसला असतां हे भृगुश्रेष्ठा, मोठा सोंसाट्याचा वारा सुटला ॥ १० ॥ प्रचंड शब्द करणाऱ्या वायूच्या मागून भयंकर मेघ प्राप्त झाले. त्या मेघांतून विजांच्या चमकण्याबरोबर मोठा कडकडाट शब्द होऊन रथचक्राच्या छिद्रांतील दंडासारख्या मोठमोठ्या जिकडून तिकडून पावसाच्या धारा पडूं लागल्या ॥ ११ ॥ नंतर ज्यांमध्यें अतिक्रूर नक्र, व महाभयंकर भोंवरे असून गंभीर शब्द होत आहेत असे चारहि समुद्र, चारबाजूंनीं वायूच्या वेगानें उत्पन्न झालेल्या लाटांनीं पृथ्वीमंडळास ग्रासूं लागले ॥ १२ ॥ स्वर्ग व पाताळ यांस व्यापून टाकिलेल्या त्या उदकांनीं सूर्याच्या प्रखर किरणांनीं (किंवा प्रचंडवायूंनीं) व विजांनीं, आपल्यासहवर्तमान (मार्कंडेयासह) जरायुजादि चतुर्विध जगत् आंतून व बाहेरून अत्यंत त्रास पावलें आणि पृथ्वी उदकांत

माया दर्शनमाह तस्येत्यादिना ॥ १० ॥ तं वायुमनु बलाहका मेघा अभवन्नाविर्बभूवुः । ते च तडिद्भिः सहिता उच्चैः स्वनंतो गर्जंतः । अक्षो रथांगं तद्वत्स्थविष्ठा अभितो वर्षधारा मुमुचुः ॥ ११ ॥ चतुर्दिक्षु वर्तमानाः समुद्राः समीरवेगेनोर्मय स्तैर्भूतलं ग्रसंतः । उग्रा नक्रा येषु महाभया आवर्ता येषु गभीरो घोषो येषु ते च ते च ते च ॥ १२ ॥ आत्मना सह जरायुजादिचतुर्विधं जगदंतर्बहिश्चोपतापितं वीक्ष्य क्ष्मां जलाप्लुतां वीक्ष्य मुनिः समत्रसद्भयं प्राप । केनोपतापितम् । अद्भिः । कथंभूताभिः । अतिद्युभिरति-

तस्यैकदा भृगुश्रेष्ठ पुष्पभद्रातटे मुनेः ॥ उपासीनस्य संध्यायां ब्रह्मन्वायुरभून्महान् ॥ १० ॥ तं चंडशब्दं समुदीरयंतं बलाहका अन्वभवन्करालाः ॥ अक्षस्थविष्ठा मुमुचुस्तडिद्भिः स्वनंत उच्चैरभिवर्षधाराः ॥ ११ ॥ ततो व्यदृश्यंत चतुःसमुद्राः समंततः क्ष्मातलमाग्रसंतः ॥ समीरवेगोर्मिभिरुग्रनक्रमहाभयावर्तगभीरघोषाः ॥ १२ ॥ अंतर्बहिश्चाद्भिरतिद्युभिः स्वरैः शतह्रदाभीरुपतापितं जगत् ॥ चतुर्विधं वीक्ष्य सहात्मना मुनिर्जलाप्लुतां क्ष्मां विमनाः समत्रसत् ॥ १३ ॥ तस्यैवमुद्वीक्षित ऊर्मिभीषणः प्रभंजनाघूर्णितवार्महार्णवः ॥ आपूर्यमाणो वरषद्भिरंबुदैः क्ष्मामप्यधाद्द्वीपवर्षाद्रिभिः समम् ॥ १४ ॥ सक्ष्मांतरिक्षं सदिवं सभागणं त्रैलोक्यमासीत्सह दिग्भिराप्लुतम् ॥ स एक एवोर्वरितो महामुनिर्बभ्राम विक्षिप्य जटा जडांधवत् ॥ १५ ॥ क्षुत्तृट्परीतो मकरैस्तिमिंगिलैरुपद्रुतो वीचिनभस्वताहतः ॥ तमस्यपारे पतितो भ्रमन्दिशो न वेद खं गां च परिश्रमेषितः ॥ १६ ॥

क्रांता द्यौर्याभिः स्वरैश्च सूर्यरश्मिभिर्वायुभिर्वेति शेषः । शतह्रदाभिश्च विद्युद्भिः दीर्घत्वमार्षं छंदोऽनुसारेण ॥ १३ ॥ प्रभंजनेनाघूर्णितं प्रकंपितं वाः उदकं यस्मिन् सः । अप्यधाच्छादयामास । समं सह ॥ १४ ॥ सक्ष्मांतरिक्षं भूम्यंतरिक्षस्थप्राणिसहितम् । सदिवं स्वर्गस्थदेवसहितम् । भागणा ज्योतिर्गणास्तैः सहितम् । जटा विक्षिप्य विकीर्य ॥ १५ ॥ परिश्रमेण इषितो गतः प्राप्त इत्यर्थः । इषु सर्पण इत्यस्मात् ॥ १६ ॥

बुडाली असें पाहून तो मार्कंडेय मुनि अतिखिन्न होऊन भय पावला ॥ १३ ॥ याप्रमाणें तो मार्कंडेयमुनि पहात असतां, वृष्टि करणाऱ्या मेघांच्या उदकांनीं भरून गेलेल्या व अतिप्रचंड अशा वायूच्या योगानें उदक उचंबळूं लागलें त्यामुळें तरंगांनीं अतिभयंकर दिसणाऱ्या समुद्रानें, द्वीपें, खंडें, व पर्वत यांसहवर्तमान पृथ्वीचें आच्छादन केलें ॥ १४ ॥ हे शौनका पृथ्वी, आकाश, स्वर्ग, नक्षत्रगण व दिशा यांसह सगळें त्रैलोक्य अग दीं बुडून गेलें. त्यामध्यें महामुनि मार्कंडेय मात्र एकटाच शिल्लक राहिला; तो, जटा अस्ताव्यस्त सोडून देऊन वेडगळ व आंधळा यांसारिखा भटकूं लागला ॥ १५ ॥ आणि मगर व लहान मत्स्यांस भक्षण करणारे मोठे मत्स्य यांच्या योगानें उपद्रव पावलेला व लाटा व वारा यांनीं आदळल्यामुळें फार श्रम पावोन क्षुधातृषांनीं व्याप्त झालेला तो मुनि, फिरतां फिरतां अपार अंधकारांत पडला, त्यामुळें त्याला दिशा,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आकाश, पृथ्वीवगैरे कांहींच समजेना ॥ १६ ॥ तो एखाद्या वेळीं मोठ्या भोंवऱ्यांत सांपडत असे; एखाद्यावेळीं समुद्राच्या लाटांनीं ताडित होत असे; कधीं कधीं त्यास भक्षण करण्याकरितां परस्परांत युद्ध करणाऱ्या उदकांतील प्राण्यांनीं तो भक्षण केला जात असे ॥ १७ ॥ त्याला कधीं शोक होत असे; कधीं मोह होत असे; कधीं दुःख प्राप्त होत असें कधीं सुख, कधीं भय व कधीं कधीं तर रोगादिकांनीं पीडित होऊन मृत्यु प्राप्त होत असे ॥ १८ ॥ अशाप्रकारें विष्णुमायेनें मोहितचित्त झालेला तो मार्कंडेय मुनि, त्या प्रलय समुद्रांत फिरतां फिरतां एक शंकु (१००००००००००००००) संख्ये इतकीं वर्षें निघून गेलीं ॥ १९ ॥ असा तो ब्राह्मण त्या समुद्रांत फिरत असतां एकेवेळीं पृथ्वीच्या उंच प्रदेशावर फळांनीं व पल्लवांनीं सुशोभित असें वडाचें पोर (लहानसा वड) त्याच्या दृष्टीस पडलें ॥ २०॥आणि त्या वडाच्या ईशान्य दिशे-

---

अन्योन्यघातिभिस्तद्भक्षणाय परस्परं युध्यद्भिः ॥ १७ ॥ १८ ॥ विष्णुमायावृतात्मन इति । स तथा दृष्टवानित्यर्थः ॥ १९ ॥ ककुद्युन्नतप्रदेशे न्यग्रोधपोतं कोमलवटम् ॥ २० ॥ तस्येशानदिक्शाखायां शिशुमपि ॥ २१ ॥ श्रीमद्रम्यं वदनपंकजं यस्य तम् । कंबुवत्रिरेखावृता ग्रीवा यस्य तम् । महोरस्कं विशालवक्षसम् । सुनासं शोभना नासा यस्य तम् । सुंदरे भ्रुवौ यस्य तम् ॥ २२ ॥ श्वासैरेजंतः कंपमाना अलकास्तैराभातं शोभितम् । कंबुवदंतर्वलयेन श्रीर्ययोस्तौ कंबुश्रियौ तयोः कर्णयोर्दाडिमपुष्पे

क्वचिद्गतो महावर्ते तरलैस्ताडितः क्वचित् ॥ यादोभिर्भक्ष्यते क्वापि स्वयमन्योऽन्यघातिभिः ॥ १७ ॥ क्वचिच्छोकं क्वचिन्मोहं क्वचिद्दुःखं सुखं भयम् ॥ क्वचिन्मृत्युमवाप्नोति व्याध्यादिभिरुतार्दितः ॥ १८ ॥ अयुतायुतवर्षाणां सहस्राणि शतानि च ॥ व्यतीयुर्भ्रमतस्तस्मिन्विष्णुमायावृतात्मनः ॥ १९ ॥ स कदाचिद्भ्रमंस्तस्मिन्पृथिव्याः ककुदि द्विजः ॥ न्यग्रोधपोतं ददृशे फलपल्लवशोभितम् ॥ २० ॥ प्रागुत्तरस्यां शाखायां तस्यापि ददृशे शिशुम् ॥ शयानं पर्णपुटके ग्रसंतं प्रभया तमः ॥ २१ ॥ महामरकतश्यामं श्रीमद्वदनपंकजम् ॥ कंबुग्रीवं महोरस्कं सुनासं सुंदरभ्रुवम् ॥ २२ ॥ श्वासैजदलकाभातं कंबुश्रीकर्णदाडिमम् ॥ विद्रुमाधरभासेषच्छोणायितसुधास्मितम् ॥ २३ ॥ पद्मगर्भारुणापांगं हृद्यहासावलोकनम् ॥ श्वासैजद्वलिसंविग्ननिम्ननाभिदलोदरम् ॥ २४ ॥

यस्य तम् । विद्रुमतुल्याधरभासा ईषच्छोणायितं सुधातुल्यं स्मितं यस्य तम् ॥ २३ ॥ पद्मगर्भवत् आ ईषदरुणावपांगौ नेत्रप्रांतौ यस्य तम् । हृद्यो हासो यस्मिंस्तदवलोकनं यस्य तम् । श्वासैरेजंत्यश्चलंत्यो वलयस्तिर्यङ्निम्नरेखास्ताभिः संविग्ना चंचला निम्ना गंभीरा नाभिर्यस्मिंस्तद्दलवदश्वत्थपत्रसंकाशमुदरं यस्य तम् ॥ २४ ॥

कडे असलेल्या शाखेच्या एका पर्णपुटावर (द्रोणांत) निजलेला व आपल्या तेजाच्या योगानें अंधकाराचा नाश करणारा असा एक बालक त्यानें पाहिला ॥ २१ ॥ तो बालक,— उत्तम ~~पाचेच्या मण्यासारखा~~ श्यामवर्ण होता. त्याचें मुखकमल सुशोभित असून कंठ शंखासारखा वळ्यांनीं युक्त होता. विशाल वक्षःस्थल व सुंदर सरळ नाक असून भ्रुकुटि सुंदर होत्या ॥ २२ ॥ आणि तो श्वासोच्छ्वासांच्या योगानें हालणाऱ्या केसांनीं शोभायमान झाला होता. शंखासारख्या आंतून वळ्या असल्यामुळें सुंदर दिसणाऱ्या त्याच्या दोन्ही कानांवर डाळिंबीचीं फुलें होतीं. तो पोंवळ्यासारख्या ओष्ठांच्या कांतीनें किंचित् लाल झालेल्या अमृततुल्य (शुभ्र) हास्यानें युक्त होता. त्याचे नेत्रप्रांत (कटाक्ष) कमळाच्या गाभ्याप्रमाणें किंचित् आरक्तवर्ण हो • ता मनोहर हास्य करून अवलोकन करीत होता. आणि त्याच्या पिंपळाच्या पानासारख्या उदरावरील वळ्या, श्वासांनीं हालत होत्या त्यामुळें त्याची गंभीर (खोल) असलेली नाभि चंचळ झाली होती ॥ २३ ॥ २४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तो सुरेख अंगुली असलेल्या हातांनीं आपलें चरणकमल वर करून व तें मुखामध्यें घालून चोखीत होता. अशा त्या मनोहरमूर्ति बालकास पाहून तो ब्राह्मणश्रेष्ठ मार्कंडेय, अत्यंत विस्मय पावला ॥ २५ ॥ हे शौनका, त्याचें दर्शन होतांच ज्याचा परिश्रम नाहींसा झाला आहे, आनंदाच्या योगानें ज्याचें हृदयकमल व नेत्रकमल हीं प्रफुल्लित झालीं आहेत व त्याच्या अतिशय आश्चर्यकारक रूपानें शंकित झाल्यामुळें ज्याच्या अंगावर रोमांच उठले आहेत असा तो मार्कंडेय, त्या बाळकास प्रश्न करण्याकरितां पुढें सरसावून त्याच्या जवळ गेला ॥ २६ ॥ इतक्यांत, त्या बालकाच्या वर ओढलेल्या श्वासाच्या योगानें तो मार्कंडेय, त्याच्या उदरांत माशीप्रमाणें पटकन गेला तेथें जातांच त्यानें हें जग जसें प्रलयाच्या पूर्वी बाहेर होतें तसेंच आंतहि सगळें आहे असें पाहिलें तेव्हां तो अतिशय विस्मित होऊन मोह पावला ॥ २७॥ आकाश, स्वर्ग,

चार्वोऽगुलयो ययोस्ताभ्यामुन्नीयाकृष्य धयंतं पिबंतम् ॥ २५ ॥ हृत्पद्मं च विलोचनांबुजे च प्रोत्फुल्लानि तानि यस्य सः । अद्भुतभावोऽत्याश्चर्यरूपं तेन शंकितः सन्नपि तं प्रष्टुं पुरः प्रससार समीपं गतः ॥ २६ ॥ अदः इदं जगद्यथा पुरा प्रलयात्पूर्वं न्यस्तं विन्यस्तं दृष्ट्वा चातीव विस्मितः सन्नमुह्यत ॥ २७ ॥ कृत्स्नशो दर्शनं प्रपंचयति

चार्वंगुलिभ्यां पाणिभ्यामुन्नीय चरणांबुजम् ॥ मुखे निधाय विप्रेंद्रो धयंतं वीक्ष्य विस्मितः ॥ २५ ॥ तद्दर्शनाद्वीतपरिश्रमो मुदा प्रोत्फुल्लहृत्पद्मविलोचनांबुजः ॥ प्रहृष्टरोमाद्भुतभावशंकितः प्रष्टुं पुरस्तं प्रससार बालकम् ॥ २६ ॥ तावच्छिशोर्वै श्वसितेन भार्गवः सोंऽतःशरीरं मशको यथाऽऽविशत् ॥ तत्राप्यदो न्यस्तमचष्ट कृत्स्नशो यथा पुराऽमुह्यदतीव विस्मितः ॥ २७ ॥ खं रोदसी भगणानद्रिसागरान्द्वीपान्सवर्षान्ककुभः सुरासुरान् ॥ वनानि देशान्सरितः पुराकरान्खेटान्व्रजानाश्रमवर्णवृत्तयः ॥ २८ ॥ महांति भूतान्यथ भौतिकान्यसौ कालं च नानायुगकल्पकल्पनम् ॥ यत्किंचिदन्यद्व्यवहारकारणं ददर्श विश्वं सदिवावभासितम् ॥ २९ ॥ हिमालयं पुष्पवहां च तां नदीं निजाश्रमं तत्र ऋषीनपश्यत् ॥ विश्वं विपश्यन् श्वसिताच्छिशोर्वै बहिर्निरस्तो न्यपतल्लयाब्धौ ॥ ३० ॥ तस्मिन्पृथिव्याः ककुदि प्ररूढं वटं च तत्पर्णपुटे शयानम् ॥ तोकं च तत्प्रेमसुधास्मितेन निरीक्षितो ऽपांगनिरीक्षणेन ॥ ३१ ॥

स्वमित्यादिना । ककुभो दिशः । पुराण्याकरांश्च । खेटान्कर्षकग्रामान् । व्रजान्गोकुलानि । आश्रमांश्च वर्णांश्च तेषां वृत्तीश्चेत्यर्थः ॥ २८ ॥ नानायुगानि कल्पांश्च कल्पयति तैर्वा कल्प्यत इति तथा तं कालं च । सदिव परमार्थं इवावभासितं तेनैव ॥ २९ ॥ ३०॥ वटं च तोकं च वीक्ष्य तस्य प्रेम्णा सुधातुल्यस्मितयुक्तेनापांगनिरीक्षणेन निरीक्षितः सन् । अथ तं बालकमधोक्षजं परिष्वक्तुमभ्ययादिति द्वयोरन्वयः । कथंभूतम् । नेत्राभ्यां हृदि धिष्ठितम् ॥ ३१ ॥

पृथ्वी, नक्षत्रें, पर्वत, समुद्र, खंडांसहित द्वीपें, दिशा, देव, दैत्य, वनें, देश, नद्या, शहरें, खाणी, शेतकीचे गांव, गौळवाडे, आश्रम, वर्ण, त्यांच्या (वर्णाश्रमांच्या) वृत्ति (निर्वाहाचीं साधनें)॥ २८ ॥ पंचमहाभूतें, त्यांपासून झालेले पदार्थ, अनेक युगांची व कल्पांची कल्पना करणारा काळ व दुसरेंहि जें कांहीं व्यवहाराला कारण असतें तें सर्वहि त्या बालकरूप परमेश्वरानेंच परमार्थासारखें (खऱ्यासारखें) भासविलेलें त्या मार्कंडेयाच्या दृष्टीस पडलें ॥ २९ ॥ तसेंच त्यानें तो हिमालय, ती पुष्पभद्रा नदी, तिच्या तीरावर तो आपला आश्रम व त्यामध्यें असलेले ते ऋषीहि पाहिले. हे शौनका, मार्कंडेय असें तें विश्व पहात असतां, त्या बालकाच्या श्वासांतून बाहेर निघाला तो त्या प्रलयसमुद्रांत जाऊन पडला ॥ ३० ॥ आणि पुनः त्यानें पृथ्वीच्या त्या उंचवट्यावर उगवलेला तो वट व त्याच्या पानाच्या द्रोणांत निजलेला तो बालक

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पाहिल्यावर त्या बालकानें प्रेमेंकरून अमृततुल्य मंदहास्यानें युक्त असलेल्या नेत्रकटाक्षावलोकनानें त्याच्याकडे पाहिलें. नंतर अतिक्लेश पावलेला तो मार्कंडेय, नेत्रद्वारें हृदयांत स्थापन केलेल्या त्या बालकरूप अधोक्षजाला आलिंगन देण्यासाठीं त्याच्याजवळ गेला ॥ ३१ ॥ ३२ ॥ आणि आलिंगन देणार इतक्यांत ' जसा भाग्यहीन पुरुषानें केलेला उद्योगधंदा एकदम नाश पावतो त्याप्रमाणें सर्वांच्या हृदयांत राहणारा तो योगाधिपति भगवान्, मार्कंडेय ऋषीपासून एकाएकीं अंतर्धान पावला ॥ ३३ ॥ भगवान् अंतर्धान पावल्यानंतर हे शौनका तो वट, तें जल व तो लोकांचा प्रलय वगैरे सर्वच एकाक्षणांत नाहींसें झालें व मार्कंडेय मुनीहि पूर्वीप्रमाणें आपल्या आश्रमांत स्वस्थ राहिला ॥ ३४ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील द्वादशस्कंधापैकीं आश्रयनिरूपणामध्यें मायादर्शननामक हा नववा अध्याय समाप्त झाला ॥ ९ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

॥ ३२ ॥ तावत्परिष्वंगलाभात्पूर्वमेव ऋषेस्तस्यांतर्हितो बभूव । तदुद्यमवैफल्ये दृष्टांतः । अनीशो निर्दैवस्तेन निर्मिता ईहा क्रीडा यथेति ॥ ३३ ॥ अंतर्हितं भगवंतमनु वटः सलिलं लोकसंप्लवश्च तिरोधाय्यंतर्हितः । स च स्वाश्रम एव यथा पूर्वं स्थित इति ॥ ३४ ॥ इति श्रीमद्भागवते द्वादशस्कंधे टीकायां नवमोऽध्यायः ॥ ९ ॥ ॥

अथ तं बालकं वीक्ष्य नेत्राभ्यां धिष्ठितं हृदि ॥ अभ्ययादतिसंक्लिष्टः परिष्वक्तुमधोक्षजम् ॥ ३२ ॥ तावत्स भगवान्साक्षाद्योगाधीशो गुहाशयः ॥ अंतर्दध ऋषेः सद्यो यथेहानीशनिर्मिता ॥ ३३ ॥ तमन्वथ वटो ब्रह्मन्सलिलं लोकसंप्लवः ॥ तिरोधायि क्षणादस्य स्वाश्रमे पूर्ववत्स्थितः ॥ ३४ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे द्वादशस्कंधे मायादर्शनं नाम नवमोऽध्यायः ॥ ९ ॥ ॥ सूत उवाच ॥ स एवमनुभूयेदं नारायणविनिर्मितम् ॥ वैभवं योगमायायास्तमेव शरणं ययौ ॥ १ ॥ मार्कंडेय उवाच ॥ प्रपन्नोऽस्म्यंघ्रिमूलं ते प्रपन्नाभयदं हरे ॥ यन्माययाऽपि विबुधा मुह्यंति ज्ञानकाशया ॥ २ ॥ सूत उवाच ॥ तमेवं निभृतात्मानं वृषेण दिवि पर्यटन् ॥ रुद्राण्या भगवान्रुद्रो ददर्श स्वगणैर्वृतः ॥ ३ ॥

दशमे शिव आगत्य मुनेस्तुष्टो वरानदात् ॥ तेन साकमतिप्रीत्या समाभाष्य सभाजयन् ॥ १ ॥ १ ॥ ज्ञानकाशया ज्ञानवत्प्रकाशमानया त्वद्भजनं विना विद्वांसोऽपि यस्य तव मायया ज्ञानिनो वयमित्यहंकारेण विमुह्यंतीत्यर्थः ॥ २ ॥ श्रीनारायण एव स्वमायादर्शनश्रांतं शिवरूपेण सांत्वयामास । तदाह तमेवमित्यादिना । निभृतात्मानं समाहितचित्तम् । रुद्राण्या भवान्या ॥ ३ ॥

आतां ह्या दहाव्या अध्यायांत, मार्कंडेय मुनीला प्रसन्न झालेल्या महादेवानें, येऊन प्रशंसा करीत त्याच्यासहवर्तमान अत्यंत प्रेमपूर्वक संभाषण करून त्याला वर दिले असें वर्णन केलें आहे ॥ १ ॥ सूत ह्मणाला– याप्रमाणें तो मार्कंडेयमुनि, भगवान् नारायणानें निर्माण केलेल्या योगमायेच्या ह्या वैभवाचा अनुभव घेऊन त्याच नारायणाला शरण गेला ॥ १ ॥ मार्कंडेय ह्मणाला–हे भगवन् श्रीहरे, मोठमोठे विद्वान्‌देखील ज्ञानासारखी प्रकाश पावणाऱ्या ज्या तुझ्या मायेच्या योगानें, ' आह्मी ज्ञानी आहों अशा अहंकारानें ' मोह पावतात त्या तुझ्या शरणागताला अभय देणाऱ्या चरणमूलाप्रत मी शरण आलों आहें ॥ २ ॥ आतां, श्रीनारायणानेंच, शिवरूपानें येऊन आपल्या मायेच्या दर्शनानें श्रम पावलेल्या त्या मार्कंडेयाचें सांत्वन केलें असें सांगण्याकरितां सूत ह्मणाला– नंतर एकेवेळीं पार्वतीसहवर्तमान नंदीवर बसून व आपल्या शृंगी भृंगीवगैरे गणाला ॥ २९ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

बरोबर घेऊन आकाशांत पर्यटण करीत असणाऱ्या भगवान् महादेवानें, समाधि लावून बसलेल्या त्या मार्कंडेयमुनीस अवलोकन केलें ॥ ३ ॥ तेव्हां पार्वती, त्या ऋषीला पाहून महादेवाला ह्मणाली– हे भगवन्, वादळ नसलेल्या वेळीं उदक व मत्स्य मगर वगैरे प्राणी निश्चल झाले असतां समुद्र जसा शांत होतो त्याप्रमाणें ज्याचीं देह, इंद्रियें व मन हीं निश्चल होऊन गेलीं आहेत अशा ह्या (शांत) ब्राह्मणाकडे पाहून याच्या तपश्चर्येचें फल प्रगट करावें. कारण,–तूंच तपस्व्यांना सिद्धिदाता आहेस ॥ ४ ॥ ५ ॥ श्रीभगवान् शंकर ह्मणाला– हे पार्वति, याला, अविनाशी भगवान् पुरुषोत्तमाचेठिकाणीं मोठी भक्ति उत्पन्न झाली आहे ह्मणून हा ब्रह्मर्षि मार्कंडेय, तपाची फलसिद्धि होण्याची इच्छा करीत नाहीं. फार तर काय सांगूं ! मोक्षसुद्धां खरोखर इच्छित नाहीं. मग संसारसंबंधीं सुख इच्छित नाहीं हें काय सांगितलें पाहिजे ? ॥ ६ ॥ तथापि हे पा-

---

निभृता निश्चला आत्मेंद्रियाशया देहेंद्रियमनांसि यस्य तम् ॥ ४ ॥ निभृतं निश्चलमुदकं झषव्रातश्च यस्मिंस्तम् । संसिद्धिं फलं साक्षात्कुरु प्रकटीकुरु । यतो भवान्सिद्धिदः ॥ ५ ॥ आशिषोऽभ्युदयलक्षणाः । उत निश्चितम् । अत्र हेतुः । भक्तिमिति ॥ ६ ॥ संवदिष्यामः संवादं करिष्यामः ॥ ७ ॥ सात्वतां सताम् । गतित्वे हेतुः । ईशान इति

अथोमा तमृषिं वीक्ष्य गिरिशं समभाषत ॥ पश्येमं भगवन्विप्रं निभृतात्मेंद्रियाशयम् ॥ ४ ॥ निभृतोदझषव्रातं वातापाये यथाऽर्णवम् ॥ कुर्वस्य तपसः साक्षात्संसिद्धिं सिद्धिदो भवान् ॥ ५ ॥ श्रीभगवानुवाच ॥ नैवेच्छत्याशिषः क्वापि ब्रह्मर्षिर्मोक्षमप्युत ॥ भक्तिं परां भगवति लब्धवान्पुरुषेऽव्यये ॥ ६ ॥ अथापि संवदिष्यामो भवान्येतेन साधुना ॥ अयं हि परमो लाभो नृणां साधुसमागमः ॥ ७ ॥ सूत उवाच ॥ इत्युक्त्वा तमुपेयाय भगवान्सात्वतां गतिः ॥ ईशानः सर्वविद्यानामीश्वरः सर्वदेहिनाम् ॥ ८ ॥ तयोरागमनं साक्षादीशयोर्जगदात्मनोः ॥ न वेद रुद्धधीवृत्तिरात्मानं विश्वमेव च ॥ ९ ॥ भगवांस्तदभिज्ञाय गिरीशो योगमायया ॥ आविशत्तद्गुहाकाशं वायुश्छिद्रमिवेश्वरः ॥ १० ॥ आत्मन्यपि शिवं प्राप्तं तडित्पिंगजटाधरम् ॥ त्र्यक्षं दशभुजं प्रांशुमुद्यंतमिव भास्करम् ॥ ११ ॥ व्याघ्रचर्मांबरं शूलधनुरिष्वसिचर्मभिः ॥ अक्षमालाडमरुककपालपरशुं सह ॥ १२ ॥

॥ ८ ॥ रुद्धा धियोंऽतकरणस्य वृत्तयो येन सः ॥ ९ ॥ १० ॥ न केवलं बहिरेवात्मन्यपि प्राप्तं शिवं विचक्ष्य विस्मितः । कथं प्राप्तम् । सहसाऽकस्मादेव हृदि भातम् । कथंभूतम् । तडिद्वत्पिशंगा जटा धारयतीति तथा तम् । त्रीण्यक्षीणि यस्य तम् । शूलादिभिः सहाक्षमालादीन्बिभ्राणमित्यन्वयः । अक्षमालादीनां द्वंद्वैक्यम् ॥ ११ ॥ १२ ॥

र्वति, ह्या साधूबरोबर आपण संभाषण करूं. कारण, साधूंचा समागम घडणें हाच मनुष्यांना खरोखर परम लाभ होय ॥ ७ ॥ सूत ह्मणाला– हे शौनका, सर्व प्राण्यांचा ' अंतर्यामिरूपानें ' नियंता असल्यामुळें सर्व विद्यांचा प्रवर्तक अशा त्या भक्तांना गति (मोक्ष) देणाऱ्या भगवान् महादेवानें, असें सांगून त्या मार्कंडेयाजवळ गमन केलें ॥ ८ ॥ त्यावेळीं त्यानें अंतःकरणाच्या वृत्ति अवरोधून अंतर्यामी ईश्वराकडे लाविल्यामुळें जो आपल्या देहाला अगर विश्वाला जाणत नव्हता त्या मार्कंडेयाला जगदात्म्या ईश्वर-पार्वतींचें येणें समजलें नाहीं ॥ ९ ॥ तो त्याच्या वृत्तींचा अवरोध जाणून भगवान् ईश्वर, योगमायेच्या योगानें त्याच्या हृदयरूप गुहेंतील आकाशांत–जसा, वायू जिकडे जिकडे पोकळी सांपडली तिकडे तिकडे शिरतो तसा– प्रविष्ट झाला ॥ १० ॥ तेव्हां विद्युल्लतेसारख्या पिंगटवर्णांच्या जटा धारण करणारा आणि शूल, धनुष्य, बाण, खड्ग व ढाल यांसहित व्याघ्रचर्मरूप वस्त्र, रुद्राक्षांच्या माळा, डमरु, नरकपाल व परशु हीं धारण केलीं असून ज्याला तीन नेत्र आहेत, जो दशभुज असून उंच

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आहे व जो 'अंतर्हृदयामध्यें' सूर्यासारखा उदय पावत आहे अशा केवळ बाहेरच नव्हे तर हृदयांतसुद्धां प्राप्त झालेल्या भगवान् सदाशिवाला पाहून तो मार्कंडेय मुनि, काय हें हृदयांत एकाएकीं भासमान झालें ? व कोठून प्राप्त झालें ! अशा विस्मयानें थक्क होऊन समाधीपासून विराम पावला ॥ ११ ॥ १२ ॥ १३ ॥ नंतर, नेत्र उघडतांच आपल्या गणासह व पार्वतीसहवर्तमान त्रैलोक्याचा एकच गुरु असा भगवान् रुद्र प्राप्त झाला आहे असें त्याच्या दृष्टि पडलें. तेव्हां त्या मुनीनें, मस्तकानें (नम्र होऊन) नमस्कार केला ॥ १४ ॥ व आलेल्या गणासह व पार्वतीसह त्याची स्वागत, आसन, पाद्य, अर्घ्य, गंध, पुष्पें, धूप व दीपवगैरे उपचारांनीं पूजा केली ॥ १५ ॥ आणि ह्मणाला—हे समर्था ईश्वरा, ज्या तुझ्या योगानें ह्या जगताला सुख प्राप्त होतें त्या आत्मसामर्थ्यानें पूर्णकाम असलेल्या तुझें आह्मी कोणतें बरें कार्य करावें ? आह्मीतर कांहींच करण्यास समर्थ नाहीं ॥ १६ ॥ यास्तव हे विभो, वास्तविक पाहिलें असतां तूं निर्गुण व शांत असूनहि सत्वगुणाचा अंगिकार करून (विष्णुरूपानें पालन करून)

विस्मयपूर्वकं बहिर्दर्शनमाह । किमिदमिति ॥ १३ ॥ सोमया उमया सहागतं रुद्रं ददृशे । ततो ननाम ॥ १४ ॥ १५ ॥ पूर्णकामत्वं व्यनक्ति । येन त्वया जगन्निर्वृतं भवतीति ॥ १६ ॥ निर्गुणत्वेन च नमस्करोति । नमः शिवाय निर्गुणाय । सत्त्वाय सत्त्वाधिष्ठात्रे । अतएव प्रमृडयति सुखयतीति तथा तस्मै ॥ १७ ॥ १८ ॥

बिभ्राणं सहसा भातं विचक्ष्य हृदि विस्मितः ॥ किमिदं कुत एवेति समाधेर्विरतो मुनिः ॥ १३ ॥ नेत्रे उन्मील्य ददृशे सगणं सोमयाऽऽगतम् ॥ रुद्रं त्रिलोकैकगुरुं ननाम शिरसा मुनिः ॥ १४ ॥ तस्मै सपर्यां व्यदधात्सगणाय सहोमया ॥ स्वागतासनपाद्यर्घ्यगंधस्रग्धूपदीपकैः ॥ १५ ॥ आह चात्मानुभावेन पूर्णकामस्य ते विभो ॥ करवाम किमीशान येनेदं निर्वृतं जगत् ॥ १६ ॥ नमः शिवाय शांताय सत्त्वाय प्रमृडाय च ॥ रजोजुषेऽप्यघोराय नमस्तुभ्यं तमोजुषे ॥ १७ ॥ सूत उवाच ॥ एवं स्तुतः स भगवानादिदेवः सतां गतिः ॥ परितुष्टः प्रसन्नात्मा प्रहसंस्तमभाषत ॥ १८ ॥ श्रीभगवानुवाच ॥ वरं वृणीष्व नः कामं वरदेशा वयं त्रयः ॥ अमोघं दर्शनं येषां मर्त्यो यद्विंदतेऽमृतम् ॥ १९ ॥ ब्राह्मणाः साधवः शांता निःसंगा भूतवत्सलाः ॥ एकांतभक्ता अस्मासु निर्वैराः समदर्शिनः ॥ २० ॥

नोऽस्मत्तः । त्रयो ब्रह्मविष्णुमहेश्वराः । यद्येभ्यः । ते वयम् ॥ १९ ॥ वरदानादिना भवत्सेवैवास्माभिः क्रियते न त्वनुग्रहो जगद्वंद्यत्वाद्भवतामिति ब्राह्मणान्स्तौति ब्राह्मणा इत्यादि । ये साधवः सदाचाराः । शांता मत्सरादिरहिताः । निःसंगा निष्कामाः ॥ २० ॥

सर्वांस सुख उत्पन्न करितोस. तसाच रजोगुण अंगिकारितोस व तमोगुण स्वीकारून अतिभयंकररूपी होतोस त्या तुला माझा नमस्कार असो; नमस्कार असो ॥ १७ ॥ सूत ह्मणाला—याप्रमाणें स्तुति केली असतां संतुष्ट झालेला व साधूंचा गतिरूप असलेला तो भगवान् आदिदेव शंकर, प्रसन्नांतःकरण होऊन हंसत हंसत त्या मार्कंडेयाप्रत असें बोलूं लागला कीं— ॥ १८ ॥ भगवान् महादेव ह्मणाला— हे मार्कंडेया, ज्यांचें दर्शन झालें असतां तें कधींहि निष्फल होत नसतें व ज्यांपासून मनुष्याला मोक्ष प्राप्ति होतये ते ब्रह्मदेव, विष्णु व महादेव हे तिघे आह्मीं वर देणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ आहों; तरी आह्मांपासून तूं आपला इच्छित वर मागून घे ॥ १९ ॥ आतां, तुह्मी ब्राह्मण सर्व जगाला वंद्य असल्यामुळें आह्मी वरदानवगैरे देऊन तुमची सेवाच करितों, तुमच्यावर हा अनुग्रह करितों असें नाहीं. अशी ब्राह्मणांची स्तुति करीत ह्मणतो— हे मुने, जे ब्राह्मण, साधु (सदाचारयुक्त), शांत (मत्सरादिरहित), निःसंग (निष्काम), प्राणिमात्रांचेठिकाणीं दयायुक्त, निर्वैर व सर्वत्र समदृष्टि ठेवणारे असल्यामुळें आह्मां तिघांविषयीं सास्त्वी

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

एकांत (निष्कपट) भक्ति करणारे अशाप्रकारचे असतात— ॥ २० ॥ त्यांना, मर्त्यलोकांसहित इंद्रादि लोकपाल वंदन करितात, त्यांचें पूजन करितात व सेवा करितात. केवळ तेच तुह्माला भजतात असें नाहीं; तर—मी, (महादेव) ब्रह्मदेव व स्वतः ईश्वर (माझ्यासुद्धां सर्वांचा अधिपति) असलेला श्रीहरी हे आह्मी तिघेहि त्यांना वंदनादिक करून सेवेविषयीं तत्पर असतों ॥ २१ ॥ कारण, ते ब्राह्मण, मी (महादेव) विष्णु व ब्रह्मदेव या आह्मां तिघांमध्यें आपल्यामध्यें अगर इतर प्राकृत जनामध्यें सुद्धां अणुमात्रहि भेद मानीत नाहींत. यास्तव, आह्मी तुह्मां ब्राह्मणांना भजतों ॥ २२ ॥ हे मुने, उदकमय तीर्थें व चेतनारहित (जड पाषाणमय) देव हे दर्शनानें पवित्र करीत नाहींत असें नाहीं तर पवित्र करितात परंतु ते ‘ सेवा करितां करितां ’ बहुत काळानें पवित्र करितात. आणि तुह्मी साधुलोक तर दर्शन होतांच उद्धार करून सोडितां ॥ २३ ॥ जे चित्ताचें एकाग्र्य, शास्त्रावलोकन, वेदाध्ययन व वाणी वगैरेचें संयमन यांच्या योगेंकरून वेदत्रयीरूप आमचें (ब्रह्मविष्णुशंकरांचें) रूप धारण करितात

न केवलं त एव किंत्वहं चेत्यादि ॥ २१ ॥ पूज्यतमत्वे हेत्वंतरमाह । नेति । अण्वप्यणुमात्रमपि न चक्षते न पश्यंति । तत्तस्मादेवंभूतान्युष्मान् ईमहि भजेम ॥ २२ ॥ ॥ २३ ॥ ब्राह्मणेभ्यो ब्राह्मणान् । आत्मसमाधानं चित्तैकाग्र्यम् । तप आलोचनम् । स्वाध्यायोऽध्ययनम् । संयमो वागादिनियमस्तैः ॥ २४ ॥ किंच श्रवणा-

सलोका लोकपालास्तान्वंदंत्यर्चंत्युपासते ॥ अहं च भगवान्ब्रह्मा स्वयं च हरिरीश्वरः ॥ २१ ॥ न ते मय्यच्युतेऽजे च भिदामण्वपि चक्षते ॥ नात्मनश्च जनस्यापि तद्युष्मान्वयमीमहि ॥ २२ ॥ न ह्यम्मयानि तीर्थानि न देवाश्चेतनोज्झिताः ॥ ते पुनंत्युरुकालेन यूयं दर्शनमात्रतः ॥ २३ ॥ ब्राह्मणेभ्यो नमस्यामो येऽस्मद्रूपं त्रयीमयम् ॥ बिभ्रत्यात्मसमाधानतपःस्वाध्यायसंयमैः ॥ २४ ॥ श्रवणाद्दर्शनाद्वाऽपि महापातकिनोऽपि वः ॥ शुद्ध्येरन्नंत्यजाश्चापि किमु संभाषणादिभिः ॥ २५ ॥ सूत उवाच ॥ इति चंद्रललामस्य धर्मगुह्योपबृंहितम् ॥ वचोऽमृतायनमृषिर्नातृप्यत्कर्णयोः पिबन् ॥ २६ ॥ स चिरं मायया विष्णोर्भ्रामितः कर्शितो भृशम् ॥ शिववागमृतध्वस्तक्लेशपुंजस्तमब्रवीत् ॥ २७ ॥ ऋषिरुवाच ॥ अहो ईश्वरचर्येयं दुर्विभाव्या शरीरिणाम् ॥ यन्नमंतीशितव्यानि स्तुवंति जगदीश्वराः ॥ २८ ॥

दित्यादि ॥ २५ ॥ चंद्रो ललामो भूषणं यस्य तस्य धर्मरहस्ययुक्तममृताम्पदं वचः कर्णाभ्यां पिबन्नातृप्यदलमिति नामन्यत । कर्णयोरमृतायनमिति वाऽन्वयः ॥ २६ ॥ शिवस्य वागेवामृतं तेन ध्वस्तः क्लेशपुंजो यस्य सः ॥ २७ ॥ इयं लीला दुर्विभाव्याऽवितर्क्या । यद्यया ईशितव्यानि स्वनियम्यानि यानि भूतानि तानि जगदीश्वराः स्वयं नमंति स्तुवंति चेति ॥ २८ ॥

त्या ब्राह्मणांना आह्मी नमस्कार करितों ॥ २४ ॥ तुह्मां ब्राह्मणांच्या दर्शनानें किंवा फक्त नामश्रवणानें महान्पातकी व चांडालदेखील शुद्ध होतात; मग तुमच्याशीं संभाषणवगैरे करून पवित्र होतील हें काय सांगावें ? (ह्मणजे आह्मीं तुझ्याबरोबर संभाषण केल्यामुळें कृतार्थ आहों) ॥ २५ ॥ सूत ह्मणाला— हे शौनका, ज्याच्या भालीं चंद्र हें भूषण आहे त्या भगवान् महादेवाचें धर्मरहस्यानें युक्त व अमृतासारखें मधुर असें वचन कर्णद्वारें प्राशन करून तो मार्कंडेयऋषि तृप्ति पावला नाहीं. ह्मणजे तें एकून त्याला पुरेसें वाटलें नाहीं ॥ २६ ॥ जो विष्णूच्या मायेनें फार दिवसपर्यंत भ्रमिष्ठासारखा होऊन अत्यंत कृश झाला होता परंतु सध्या शंकराच्या वचनामृताच्या योगानें ज्याचे क्लेशसमुदाय नष्ट झाले आहेत असा तो मार्कंडेय, त्या शंकराला ह्मणाला ॥ २७ ॥ मार्कंडेय ऋषि ह्मणाला— अहो ! ही ईश्वराची लीला, देह धारण करणाऱ्या मनु-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ष्यांना तर्क करण्यास मोठी अशक्य काहे; कीं– जिच्या योगानें नियमन केलीं जाणारीं जीं (माझ्यासारखीं) भूतें त्यांस स्वतः जगदीर असूनहि जे नमस्कार करितात व त्यांची स्तुति करितात काय हें आश्चर्य ! ! ॥ २८ ॥ मला तर असें वाटतें कीं– बहुतकरून धर्म सांगणारे (धर्माचा उपदेश करणारे) पुरुष, जें स्वतः आचरण करितात, करूं इच्छिणाऱ्यास अनुमोदन देतात व ' केलें असतां ' त्याची प्रशंसा करितात तें देहधारी प्राण्यांनीं आपापला धर्म स्वीकारावा एतदर्थच होय ॥ २९ ॥ तर मग अशा कृतीनें माझ्या महत्त्वाला कमीपणा येतो कीं काय? असें ह्मणशील तर–नाहीं- हे भगवंता, असा हा लोकसंग्रह करण्यानें, आपल्या मायामयवृत्ति ज्यामध्यें आहेत अशा त्या नमनादिकेंकरून, 'जसा, जादुगाऱ्यानें जादूंत केलेल्या आचरणानें त्याचा मुळाचा प्रभाव दूषित होत नाहीं त्याप्रमाणें' मायिक जो तूं त्या तुजभगवंताचा प्रभाव दूषित होत नाहीं ॥३०॥

अथवा लोकसंग्रहमात्रमेतदित्याह । धर्ममिति । प्रवक्तारोऽपि यत्स्वयं देहिनां धर्मं ग्राहयितुमाचरंति ॥ २९ ॥ नन्वेतत्स्वप्रभावतिरस्कारकं कथं मया क्रियते तत्राह । नैतावतेति । एतावता लोकसंग्रहमात्रेण । तैर्नमनादिभिः । कथंभूतैः । स्वमायामयी वृत्तिर्येषु तैर्भगवतो मायिनस्तवानुभावो न दुष्येत । यतः प्रसिद्धस्य मायिनः कुहकं कपटं यथा तथा एतानि नमनादीनि । अतस्तस्य तथा कुहकैरात्मानुभावो न दुष्यति तद्वत् । मद्दुष्येतानुभाव इति पाठे नकारस्य दृष्टांतेप्यनुषंगः ॥ ३० ॥ मायाचेष्टितं प्रपंचयति ।

धर्मं ग्राहयितुं प्रायः प्रवक्तारश्च देहिनाम् ॥ आचरंत्यनुमोदंते क्रियमाणं स्तुवंति च ॥ २९ ॥ नैतावता भगवतः स्वमायामयवृत्तिभिः ॥ न दुष्येतानुभावस्तैर्मायिनः कुहकं यथा ॥ ३० ॥ सृष्ट्वेदं मनसा विश्वमात्मनाऽनु प्रविश्य यः ॥ गुणैः कुर्वद्भिराभाति कर्तेवस्वप्नदृग्यथा ॥ ३१ ॥ तस्मै नमो भगवते त्रिगुणाय गुणात्मने ॥ केवलायाद्वितीयाय गुरवे ब्रह्ममूर्तये ॥ ३२ ॥ कं वृणे नु परं भूमन्वरं त्वद्वरदर्शनात् ॥ यद्दर्शनात्पूर्णकामः सत्यकामः पुमान्भवेत् ॥ ३३ ॥ वरमेकं वृणेऽथापि पूर्णात्कामाभिवर्षणात् ॥ भगवत्यच्युतां भक्तिं तत्परेषु तथा त्वयि ॥ ३४ ॥

सृष्ट्वेति । स्वप्नदृग्यथेत्यविद्याचेष्टिते दृष्टांतः ॥ ३१ ॥ त्रिगुणत्वेऽपि न जीववत्तदभिभूताय किंतु गुणानामात्मने नियंत्रे ॥ ३२ ॥ वरं वृणीष्वेति यदुक्तं तत्राह । कमिति । वरं दर्शनं यस्य तस्मात् । त्वत्तः परं कं नु वरं वृणे । यस्य तव दर्शनादवलोकनात्पूर्णकामः सर्वानंदसंदोहरूपः सत्यकामो यथेच्छं प्राप्तसर्वानंदः ॥ ३३ ॥ ३४ ॥

आतां मायेची चेष्टा सांगतो– जसा स्वप्न पाहणारा पुरुष, स्वप्नामध्येंच अविद्येच्या योगानें मनानें अनेक पदार्थ कल्पून त्यांत प्रवेश करितो तेव्हां इंद्रियांनीं केल्या जाणाऱ्या क्रिया आपणच केल्या असें त्याच्या प्रतीतीस येतें त्याप्रमाणें–तूं संकल्पमात्रानें हे विश्व उत्पन्न करून नंतर त्यांत जीवात्मरूपानें प्रविष्ट होतोस तेव्हां गुणांनीं केल्याजाणाऱ्या क्रिया तूंच करितोस असा भास होतो. परंतु जो तूं त्रिगुणात्मक असून जीवांसारखा गुणांच्या योगें पराभव न पावल्यामुळें गुणनियामकच आहेस त्या शुद्धरूप, अद्वितीय, गुरु व ब्रह्मरूप अशा तुज भगवंताला नमस्कार असो ॥ ३१ ॥ ३२ ॥ हे व्यापका प्रभो, ज्या तुझ्या दर्शनेंकरून, पुरुषाला यथेच्छ सर्वानंद प्राप्त झाल्यामुळें त्याचे सकल मनोरथ पूर्ण होतात त्या उत्तमदर्शन असलेल्या तुझ्याकडून दुसरा वर कोणता बरें मागून घेऊं? ॥ ३३ ॥ तथापि भक्तांचे मनोरथ पुरविणाऱ्या व पूर्णकाम अशा तुझ्याकडून एक एवढाच वर मागून घेतों कीं–माझी भगवान् अच्युताचेठिकाणीं, त्याच्या भक्तांचेठिकाणीं व तशीच तुझ्याठिकाणीं भक्ति असावी ॥ ३४ ॥ ॥ ३१ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सूत ह्मणाला– याप्रमाणें ~~मधुर वाणीच्या योगानें~~ स्तुति व पूजन केलें असतां तो शंकर, पार्वतीचेंहि अनुमोदन घेऊन त्या मार्कंडेयाला असें ह्म णाला कीं– ॥ ३५ ॥ हे महर्षे, तूं ब्रह्मवर्चस्वानें युक्त असून अधोक्षज भगवंताचेठिकाणीं भक्तिमान् आहेस त्याअर्थी तुझा हा मनोरथ पूर्ण होवो. ह्या कल्पाच्या शेवटपर्यंत तुझी पवित्र कीर्ति कायम राहील आणि तुला अजरामरपणाहि प्राप्त होईल हे ब्राह्मणा, तुला भूत-भविष्य-वर्तमानकाळींचें वस्तुविषक ज्ञान, वैराग्ययुक्त विज्ञान (आत्मानात्मविचार) व पुराणांचा आचार्यपणा हीं प्राप्त होतील ॥ ३६ ॥ ३७ ॥ सूत ह्मणाला– हे शौनका, मार्कंडेयाला अशाप्रकारचे वर देऊन तो त्र्यंबक ईश्वर, त्यानें पूर्वी अनुभविलेलें जें भगवंताच्या मायेचें वैभव तें पार्वतीला सांगत सांगत तेथून निघून गेला ॥ ३८ ॥ तदनंतर, तो मार्कंडेय मुनि, महायोगाचा महिमा (सामर्थ्य) प्राप्त झाल्यावर साक्षात् श्रीहरींच्याठिकाणीं

वरदानाय स्वयमेव प्रवृत्तः शर्वयोमया चाभिनंदितोऽनुमोदितः सन्नाह ॥ ३५ ॥ कामोऽयं सर्वोऽप्यन्यच्च यत्पुण्यं यश इत्यादि ब्रह्मवर्चस्विनस्ते भूयादित्युत्तरेणान्वयः । यतस्त्वमधोक्षजे भक्तिमान् ॥ ३६ ॥ ३७ ॥ तस्य कर्म तपआदि । मुनेः पुराऽनुभूतं यद्भगवन्मायावैभवं तच्च कथयन् ॥ ३८ ॥ अवाप्तो महायोगमहिमा येन सः ॥ ३९ ॥ एतन्मार्कंडेयस्य चरितं नेनानुभूतं च भगवन्मायावैभवं तेऽनुवर्णितम् ॥ ४० ॥ नन्वेवमप्यस्मत्कुलोत्पन्नस्यास्य सप्तकल्पायुष्ट्वं वृद्धैरुच्यमानं विरुद्धमेव तत्राह । एतन्मार्कंडेयेनानुभूतं भगवन्मायावैभवं नानाकल्परूपं कादाचित्कमीश्वरेच्छया तस्यैवाकस्मिकं न तु सर्वसाधारणम् । एतत्केचिदनादि बहुकालमावर्तितं दैवयुगसहस्रद्वयमानेन पुनः पुनः परिवर्तितं प्रचक्षते । के ते । नृणां संसृतिं सर्गप्रलयादिलक्षणामात्मनो भगवतो मायेत्येवमविद्वांसः । विद्वांसस्तु मायाशिशोः श्वासोच्छ्वासाभ्यां सप्तकृत्वस्तदुदरप्रवेशनिर्गमतः सप्तकल्पत्वं तत्क्षणमात्रेणेति वदंत्यतो न विरोध इत्यर्थः ॥ ४१ ॥

सूत उवाच ॥ इत्यर्चितोऽभिष्टुतश्च मुनिना सूक्तया गिरा ॥ तमाह भगवाञ्छर्वः शर्वया चाभिनंदितः ॥ ३५ ॥ कामस्तेऽयं महर्षेऽस्तु भक्तिमांस्त्वमधोक्षजे ॥ आकल्पांताद्यशः पुण्यमजरामरता तथा ॥ ३६ ॥ ज्ञानं त्रैकालिकं ब्रह्मन्विज्ञानं च विरक्तिमत् ॥ ब्रह्मवर्चस्विनो भूयात्पुराणाचार्यताऽस्तु ते ॥ ३७ ॥ सूत उवाच ॥ एवं वरान्स मुनये दत्त्वाऽगात्त्र्यक्ष ईश्वरः ॥ देव्यै तत्कर्म कथयन्ननुभूतं पुरा मुनेः ॥ ३८ ॥ सोऽप्यवाप्तमहायोगमहिमा भार्गवोत्तमः ॥ विचरत्यधुनाऽप्यद्धा हरावेकांततां गतः ॥ ३९ ॥ अनुवर्णितमेतत्ते मार्कंडेयस्य धीमतः ॥ अनुभूतं भगवतो मायावैभवमद्भुतम् ॥ ४० ॥ एतत्केचिदविद्वांसो मायासंसृतिमात्मनः ॥ अनाद्यावर्तितं नृणां कादाचित्कं प्रचक्षते ॥ ४१ ॥

एकांतभक्त बनून या भूलोकीं संचार करूं लागला. आणि अजूनहि तो आनंदानें संचार करीत आहे ॥ ३९ ॥ हे शौनका, त्या बुद्धिमान् मार्कंडेयाचें हें चरित्र व त्यानें अनुभविलेलें अद्भुत असें भगवंताच्या मायेचें वैभव मी तुला सविस्तर सांगितलें ॥ ४० ॥ आतां आमच्या कुलामध्यें उत्पन्न झालेल्या मार्कंडेयाला सात कल्प आयुष्य आहे असें जें वृद्धलोक सांगतात त्याला तुझ्या सांगण्यावरून विरोध येतो असें ह्मणशील तर– हें मार्कंडेयानें अनुभविलेलें भगवन्मायेचें अनेक कल्परूप वैभव भगवंताच्या इच्छेनें त्यालाच फक्त अकस्मात् दिसून आलें; तसें सर्वांच्या दृष्टोत्पत्तीस आलें नाहीं; ह्मणून तो प्राकृत किंवा नैमित्तिक प्रळय नव्हे. आतां मनुष्यांचे उत्पत्ति-प्रलय वगैरे होतात ती भगवंताचीच माया होय असें न समजणारे कित्येक लोक, बहुतकालपर्यंत ‘ देवांच्या मानानें दोन हजार युगांनीं ’ पुनः पुनः (अनेक वेळां) उत्पत्ति-प्रलय झाले असें ह्मणतात. आणि विद्वान् लोक तर तो मार्कंडेय, त्या मायिक बालकाच्या श्वासोच्छ्वासांबरोबर सातवेळां पुन्हा पुन्हा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

उदरांत जाऊन त्याचक्षणीं बाहेर आला असें ह्मणतात. ह्मणून यांच्या ह्मणण्यास विरोध येत नाहीं ॥ ४१ ॥ हे भृगुकुलश्रेष्ठ शौनका, जो पुरुष, विष्णूच्या मायावैभवानें युक्त असें हें वर्णिलेलें मार्कंडेयाचें चरित्र स्वतः श्रवण करील अथवा जो कोणी दुसऱ्याकडून श्रवण करवील त्या दोघांसहि, कर्मवासनासंबंधीं—जन्ममरणरूप—संसार प्राप्त होणार नाहीं ॥ ४२ ॥ याप्रमाणें श्रीमद्भागवतनामक महापुराणांतील द्वादशस्कंधामध्यें मार्कंडेयभक्तिलाभादिनिरूपणनामक हा दहावा अध्याय समाप्त झाला ॥ १० ॥ ॥ आतां या अकराव्या अध्यायांत, पूजा करण्याकरितां महापुरुषाचें वर्णन करून सूर्याच्या व्यूहाचें प्रत्येक महिन्याचें निरनिराळें व्याख्यान केलें आहे ॥ १ ॥ आतां, ज्याच्या योगानें मार्कंडेय हा मनुष्य असून त्याला अमरत्व प्राप्त झालें त्या अंगोपांगांनीं कल्पिलेल्या क्रियायोगाविषयीं प्रश्न करीत शौनक ह्मणाला—हे भगवद्भक्ता सूता, तूं संपूर्ण तंत्रशास्त्रांच्या

संशृणुयात् । उ इति हर्षे । संश्रावयेद्वा । यौ तावुभौ तयोः कर्म वासनाकृता संसृतिर्न भवेदिति ॥ ४२ ॥ इति श्रीमद्भागवते द्वादशस्कंधे टीकायां दशमोऽध्यायः ॥ १० ॥ ॥ एकादशे तु पूजार्थं महापुरुषवर्णनम् ॥ रवेर्व्यूहस्य चाख्यानं प्रतिमासं पृथक् पृथक् ॥ १ ॥ येनामर्त्यत्वमापन्नो मर्त्योऽसौ भार्गवोत्तमः ॥ तं पृच्छति क्रियायोगं सांगोपांगादिकल्पितम् ॥ २ ॥ अथेति । हे भागवत यतो भवान्समस्ततंत्रराद्धांते तत्त्वविद्रहस्यज्ञः ॥ १ ॥ प्रष्टव्यमाह तांत्रिका इति । परिचर्यायामुपासनायां विषये । केवलस्य

य एवमेतद्भृगुवर्य वर्णितं रथांगपाणेरनुभावभावितम् ॥ संश्रावयेत्संशृणुयादुतावुभौ तयोर्न कर्माशयसंसृतिर्भवेत् ॥ ४२ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे द्वादशस्कंधे दशमोऽध्यायः ॥ १० ॥ ॥ शौनक उवाच ॥ अथेममर्थं पृच्छामो भवंतं बहुवित्तमम् ॥ समस्ततंत्रराद्धांते भवान्भागवत तत्त्ववित् ॥ १ ॥ तांत्रिकाः परिचर्यायां केवलस्य श्रियः पतेः ॥ अंगोपांगायुधाकल्पं कल्पयंति यथैव यैः ॥ २ ॥ तन्नो वर्णय भद्रं ते क्रियायोगं बुभुत्सताम् ॥ येन क्रियानैपुणेन मर्त्यो यायादमर्त्यताम् ॥ ३ ॥ सूत उवाच ॥ नमस्कृत्वा गुरून्वक्ष्ये विभूतीर्वैष्णवीरपि ॥ याः प्रोक्ता वेदतंत्राभ्यामाचार्यैः पद्मजादिभिः ॥ ४ ॥ मायाद्यैर्नवभिस्तत्त्वैः सविकारमयो विराट् ॥ निर्मितो दृश्यते यत्र सचित्के भुवनत्रयम् ॥ ५ ॥

चैतन्यघनस्य । अंगानि पादादीन्युपांगानि गरुडादीन्यायुधानि सुदर्शनादीन्याकल्पाः कौस्तुभादयस्तेषां द्वंद्वैक्यम् । तद्यथा कल्पयंति यैश्च तत्त्वैः कल्पयंति तन्नो वर्णयेति ॥ २ ॥ ३ ॥ गुरूपदेशगम्यत्वादस्यार्थस्य तन्नमस्कारपूर्वकमाह । नमस्कृत्येति । विभूतीर्विराड्विग्रहाद्याः ॥ ४ ॥ अंगादिकल्पनां भूरादिभिर्दर्शयितुं प्रथमं तावद्यथा कल्पयंतीति प्रश्नस्य वैराजरूपेणेत्युत्तरं वक्तुं विराड्विग्रमाह । मायाद्यैः प्रकृतिसूत्रमहदहंकारपंचतन्मात्रैर्नवभिस्तत्त्वैः । विकारा एकादशेंद्रियाणि पंचमहाभूतानीति षोडश ।

सिद्धांताचें रहस्य जाणणारा आहेस. यास्तव बहुश्रुत लोकांमध्यें श्रेष्ठ असा तुला आह्मी या विषयाचा प्रश्न करीतों ॥१॥ तो विषय असा कीं—तंत्रमार्गानें भगवंताचें आराधन करणारे जन, चैतन्यघन असलेल्या लक्ष्मीपति भगवंताची उपासना करावयाची असल्यास पादादिक अंगें, गरुडादि उपांगें, सुदर्शनादि आयुधें व कौस्तुभादिक अलंकार यांचीं ज्याप्रकारें ज्या तत्त्वांनीं कल्पना करून ध्यान करितात ॥ २ ॥ तो क्रियायोग (उपासनामार्ग) श्रवण करण्याची इच्छा करणाऱ्या आह्मांस कथन कर; कीं ज्या क्रियायोगांत निपुणता प्राप्त झाली असतां मनुष्य अमरत्वाला पोंचतो हे सूता, तुझें कल्याण असो ॥ ३ ॥ सूत ह्मणाला— हे शौनका, मी श्रीगुरूंना नमस्कार करून, ब्रह्मदेवादिक आचार्यांनीं वेदामध्यें व तंत्रामध्यें ज्या वर्णन केल्या आहेत त्या विष्णूच्या विराट्देहादिक विभूति सांगतों ॥ ४ ॥ आतां, अंगादिकांची कल्पना, भूमि वगैरेंनीं दर्शविण्याकरितां प्रथमतः 'अंगादिकांची कल्पना कशी करितात ?' या प्रश्नाचें विराट्स्वरूपाच्या वर्णनानें उत्तर सांगण्यासाठीं विराट्देह कसा निर्माण ॥ ३२ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

झाला तें सांमतो-जो चेतनाधिष्ठित (चैतन्ययुक्त) झाला असतां त्याचेठिकाणीं हें त्रैलोक्य दिसून येतें तो विराट्देह—प्रकृति, सूत्र, महत्तत्त्व, अहंकार व पांच तन्मात्रा ह्या नऊ तत्त्वांच्या योगानें अकरा इंद्रियें व पांच महाभूतें ह्या सोळा विकारांचा समुदायरूप विराट्देह बनला आहे ॥ ५ ॥ हे शौनका, हें (ब्रह्मांड) त्या विराट् पुरुषाचें रूप होय. त्याची कल्पना अशी आहे कीं—पृथ्वी त्याचे दोन पाय होत; स्वर्ग हें मस्तक आहे. आकाश नाभि, सूर्य त्याचे दोन नेत्र, वायु नासिका, दिशा त्याचे दोन कान होत ॥ ६ ॥ प्रजापति त्या ईश्वराचें शिश्न, मृत्यु गुद, लोकपाल त्याचे बाहु, चंद्र मन, यम दोन भ्रुकुटि ॥ ७ ॥ लज्जा त्याचा वरचा ओंठ, लोभ त्याचा खालचा ओंठ, चंद्रिका (चांदणें) दांत, भ्रम हास्य, वृक्ष हे रोमांच व मेघ हे त्या व्यापक पुरुषाचे केश होत ॥ ८ ॥ हे शौनका, जेवढा हा व्यष्टि (साधारण) पुरुष लौकिक

तन्मयो विराट् स प्रसिद्धो निर्मितः । यत्र विराजि सचित्के चेतनाधिष्ठिते भुवनत्रयं दृश्यते । अनेनांगादिकल्पनासौलभ्यं दर्शितम् ॥ ५ ॥ एतद्वै पौरुषम् । पुरुषस्य वैराजस्य रूपमेवेश्वरेणाधिष्ठितत्वात्तदभेदविवक्षया तस्य रूपमुच्यते । अंगकल्पनामाह भूः पादावित्यादित्रिभिः । भूराद्यनुवादेन भगवत्पादादिभावना विधीयते ॥ ६ ॥ प्रजजनं मेढ्रम् ।

एतद्वै पौरुषं रूपं भूः पादौ द्यौः शिरो नभः ॥ नाभिः सूर्योऽक्षिणी नासे वायुः कर्णौ दिशः प्रभोः ॥ ६ ॥ प्रजापतिः प्रजननमपानो मृत्युरीशितुः ॥ तद्बाहवो लोकपाला मनश्चंद्रो भ्रुवौ यमः ॥ ७ ॥ लज्जोत्तरोऽधरो लोभो दंता ज्योत्स्ना स्मयो भ्रमः ॥ रोमाणि भूरुहा भूम्नो मेघाः पुरुषमूर्धजाः ॥ ८ ॥ यावानयं वै पुरुषो यावत्या संस्थया मितः ॥ तावानसावपि महापुरुषो लोकसंस्थया ॥ ९ ॥ कौस्तुभव्यपदेशेन स्वात्मज्योतिर्बिभर्त्यजः ॥ तत्प्रभा व्यापिनी साक्षाच्छ्रीवत्समुरसा विभुः ॥ १० ॥ स्वमायां वनमालाख्यां नानागुणमयीं दधत् ॥ वासश्छंदोमयं पीतं ब्रह्मसूत्रं त्रिवृत्स्वरम् ॥ ११ ॥ बिभर्ति सांख्यं योगं च देवो मकरकुंडले ॥ मौलिं पदं पारमेष्ठ्यं सर्वलोकाभयंकरम् ॥ १२ ॥ अव्याकृतमनंताख्यमासनं यदधिष्ठितः ॥ धर्मज्ञानादिभिर्युक्तं सत्त्वं पद्ममिहोच्यते ॥ १३ ॥

अपानः पायुः ॥ ७ ॥ ८ ॥ अनुक्रमन्यदप्येवमूह्यमित्याह । यावानयं व्यष्टिः पुरुषः स्वमानतः सप्तवितस्तिः संस्थयाऽवयवसन्निवेशेन मितः परिमितः ॥ ९ ॥ भूषणादीन्याह कौस्तुभेत्यादिना । स्वात्मज्योतिः शुद्धं जीवचैतन्यम् । या तस्य कौस्तुभस्य प्रभा तामेव श्रीवत्सं बिभर्ति ॥ १० ॥ त्रिवृत्स्वरं त्रिमात्रं प्रणवम् ॥ ११ ॥ पारमेष्ठ्यं पदं ब्रह्मलोकम् ॥ १२ ॥ अव्याकृतं प्रधानम् । यदधिष्ठितोऽधिष्ठाय स्थितः । तदासनभूतं पद्मं सत्त्वं सत्वगुणः ॥ १३ ॥

अवयवांनीं आपल्या सात वितीप्रमाणाचा आहे तेवढाच तो समष्टि (विराट्) पुरुषहि भूर्लोकादिक अवयवांनीं सातविती प्रमाणाचा आहे ॥ ९ ॥ त्या जन्मरहित व्यापक भगवंतानें कौस्तुभमण्याच्या मिषानें शुद्ध जीवचैतन्य धारण केलें असून आपल्या वक्षःस्थलावर श्रीवत्सचिन्हाबद्दल त्या शुद्धचैतन्यरूप कौस्तुभाची व्यापक प्रभा धारण केली आहे ॥ १० ॥ त्यानें, अनेकगुणयुक्त आपली माया, ही वनमाला या नामेंकरून धारण केली असून वेदमय पिंवळें वस्त्र व तीनमात्रांनीं युक्त असा स्वर (ॐकार) हें यज्ञोपवीत धारण केलें आहे ॥ ११ ॥ त्या देवानें, सांख्य व योग हीं दोन मकराकार कुंडलें व ब्रह्मलोक हा सर्वलोकांस अभय देणारा मुकुट स्वीकारिला आहे ॥ १२ ॥ तो ज्याच्यावर आधार धरून राहिला आहे व ज्याला प्रधानरूप अनंत- (शेष) नामक आसन असें ह्मणतात त्या धर्मज्ञानवैराग्यादिक शक्तींनीं युक्त अशा कमळाला सत्व-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

गुण असें यालोकीं ह्मणतात ॥ १३ ॥ त्यानें ओज (मनाचें सामर्थ्य), सह (इंद्रियांचें सामर्थ्य) व बल (देहसामर्थ्य) यांनीं युक्त जें मुख्य प्राणतत्त्व ती गदा, उदकाचें तत्त्व तो शंख, तेजाचें तत्त्व तें सुदर्शनचक्र, आकाशाचें तत्त्व हें श्यामवर्ण खड्ग, अंधकाररूप ढाल, कालरूप शार्ङ्गधनुष्य व बाण ठेवण्याचा कर्ममय भाता हीं धारण केलीं आहेत ॥ १४ ॥ १५ ॥ या भगवंताचे–इंद्रियें हे बाण आहेत असें ह्मणतात. क्रियाशक्तीनें युक्त जें मन तो त्याचा रथ व पंच तन्मात्रा त्या रथाचें बाहेरून दिसणारें रूप होय आणि तो भगवान् मुद्रेच्या योगानें वरद अभय इत्यादि रूपें धारण करितो ह्मणून त्या त्या मुद्रेनें तसतशी भावना करून पूजन करावें ॥ १६ ॥

मुख्यतत्त्वं प्राणतत्त्वम् । प्राणो वै मुख्य इति श्रुतेः । दरवरं शंखम् ॥ १४ ॥ १५ ॥ आकूतीः क्रियाशक्तियुक्तं मनः । अस्य रथस्याभिव्यक्तिं बहिरभिव्यक्तं रूपम् । मुद्रया धृतयाऽर्थक्रियात्मतां वरदाभयदादिरूपत्वं बिभर्ति । तत्तन्मुद्रया तथा तथा भावयेदित्यर्थः ॥ १६ ॥ मंडलं देवयजनं देवपूजाभूमिं सूर्यमंडलत्वेन भावयेदित्यर्थः । अंतर्वह्निमंडलं वा । दीक्षासंस्कार आत्मनो गुरुकृतां मंत्रदीक्षामेवात्मनस्तत्पूजायोग्यतां भावयेदित्यर्थः । परिचर्येति । भगवतस्तां परिचर्यां स्वस्य सकलपापक्षयायेत्येवं भावयेदित्यर्थः ॥ १७ ॥ पूर्वमासनपद्ममुक्तमिदानीं करस्थं पद्ममाह । भगवानिति । भगशब्दार्थमैश्वर्यादिषाड्गुण्यम् ॥ १८ ॥ हे द्विजाः । एकवचनांतो वा पाठः । अकुतोभयं कैवल्यं धाम गृहमभजत् । यद्वा वैकुंठस्य विशेषणमकुतोभयं यद्धामेति । त्रिवृत् ऋग्यजुःसामरूपो वेदः । सुपर्णोऽसि गरुत्मांस्त्रिवृत्ते शिर इत्यादिमंत्रलिंगात् । यज्ञं यज्ञरूपं पुरुषम् । यज्ञो वै विष्णुरिति श्रुतेः ॥ १९ ॥ अनपायिनी हरेः शक्तिः । तत्र हेतुः । साक्षादात्मनः स्वरूपस्य चिद्रूपत्वात्तस्यास्तदभेदादित्यर्थः । तंत्रमूर्तिः पंचरात्राद्यागमरूपः । येऽणिमादयोऽष्टौ गुणास्ते हरेर्द्वारपाला नंदादयः ॥ २० ॥

ओजःसहोबलयुतं मुख्यतत्त्वं गदां दधत् ॥ अपां तत्त्वं दरवरं तेजस्तत्त्वं सुदर्शनम् ॥ १४ ॥ नभोनिभं नभस्तत्त्वमसिं चर्म त-
मोमयम् ॥ कालरूपं धनुः शार्ङ्गं तथा कर्ममयेषुधिम् ॥ १५ ॥ इंद्रियाणि शरानाहुराकूतीरस्य स्यंदनम् ॥ तन्मात्राण्यस्याभिव्य-
क्तिं मुद्रयाऽर्थक्रियात्मताम् ॥ १६ ॥ मंडलं देवयजनं दीक्षा संस्कार आत्मनः ॥ परिचर्या भगवत आत्मनो दुरितक्षयः ॥ १७ ॥
भगवान्भगशब्दार्थं लीलाकमलमुद्वहन् ॥ धर्मं यशश्च भगवांश्चामरव्यजनेऽभजत् ॥ १८ ॥ आतपत्रं तु वैकुंठं द्विजा धामाकुतो
ऽभयम् ॥ त्रिवृद्वेदः सुपर्णाख्यो यज्ञं वहति पूरुषम् ॥ १९ ॥ अनपायिनी भगवती श्रीः साक्षादात्मनो हरेः ॥ विष्वक्सेनस्तंत्रमू-
र्तिर्विदितः पार्षदाधिपः ॥ नंदादयोऽष्टौ द्वास्थाश्च तेऽणिमाद्या हरेर्गुणाः ॥ २० ॥

देवपूजेचें जें स्थान तें सूर्यमंडल (किंवा अग्निकुंड), गुरूनें दिलेली जी मंत्रदीक्षा ती आत्म्याची पूजा करण्याची योग्यता व भगवंताची पूजा करणें तो आपला पापक्षय होय; ह्मणजे त्याची पूजा आपल्या पापक्षयाकरितांच होय. अशी भावना करावी ॥ १७ ॥ मागें आसनाचें कमल सांगितलें; आतां हातांतील कमल सांगतो– त्या भगवंतानें 'भग' या शब्दाचे अर्थ जे ऐश्वर्यादि सहा गुण तें लीलेकरितां कमळ धारण केलें आहे. तसेंच त्या भगवंतानें धर्मरूप चँवरी व कीर्तिरूप पंखा स्वीकारिला आहे. ॥ १८ ॥ निर्भय असें जें वैकुंठ– (कैवल्य) नामक तापहारक स्थान तें त्या भगवंताचें घर (किंवा छत्र) होय. ऋग्यजुःसामरूप तीन वेद हें त्याचें सुपर्ण–(गरुड) नामक वाहन होय, तो गरुड त्या यज्ञरूप पुरुषाला वाहून नेत असतो ॥ १९ ॥ 'आत्मस्वरूपाशीं चिद्रूपाचा अभेद असल्यामुळें' भगवती (चिद्रूप) लक्ष्मी ही त्या आत्म-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

स्वरूपी श्रीहरीची अविचळ शक्ति होय. पंचरात्रादि आगमरूप प्रसिद्ध जो विष्वक्सेन तो त्यांच्या पार्षदांचा अधिपति (मुख्य पार्षद) होय. आणि आणिमादिसिद्धिरूप जे आठ गुण ते त्या श्रीहरीचे द्वारपाल होत ॥ २० ॥ हे शौनका, वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न व अनिरुद्ध अशा मूर्तिभेदांनीं भगवान् नारायणच स्वतः झाला आहे असें ह्मणून चतुर्व्यूहमूर्तीनेंच त्याची उपासना करितात ॥ २१ ॥ आतां त्या चतुर्व्यूहमूर्तिची उपासना सांगतो– तो भगवान् विश्व, तैजस, प्राज्ञ, व तुरीय ह्या चार वृत्तींनीं (अवस्थांनीं) जाणला जातो. बाह्यविषय, मन, त्या दोहोंच्या संस्कारानें युक्त असलेलें अज्ञान व त्या तिघांचें साक्षिभूत ज्ञान हे त्या वृत्तींचे उपाधि होत. ह्मणजे ज्यावेळीं नेत्र नासिका इत्यादि इंद्रियांनीं बाह्यविषय समजण्यांत येतात ती जाग्रदवस्था होय, तीच्यामध्यें विश्व; ज्यावेळीं मनालाच फक्त कल्पित विषय भासतात ती स्वप्नावस्था, तीच्यामध्यें तैजस; जेव्हां बाह्य विषय व मन या दोहोंच्या संस्कारानें युक्त असें अज्ञान असतें ती सुषुप्त्यवस्था तिच्यामध्यें प्राज्ञ; व त्या तीन्ही अवस्थांचा

तस्यैव चतुर्व्यूहोपासनामाह । वासुदेवादिशब्दैः पुरुषः श्रीनारायण एव स्वयं मूर्तिभेदैरुपास्य इत्यभिधीयते ॥ २१ ॥ तस्यैवाध्यात्मनि चतुर्धोपासनामाह । स एव भगवान्विश्वादिशब्दैर्वृत्तिभिर्जाग्रदाद्यवस्थाभिः परिभाव्यते । तद्वृत्त्युपाधीनाह । अर्था बाह्याः इंद्रियं मनः आशयस्तदुभयसंस्कारयुक्तमज्ञानं ज्ञानं त्रितयसाक्षि तैः ॥ २२ ॥ उक्तचतुर्व्यूहद्वयोपासनेऽपि पूर्वोक्तमंगाद्युपासनमाह । अंगेति । अंगादिभिरुपलक्षितो भगवान्हरिर्वासुदेवादिचतुर्मूर्तिः सन्विश्वादिचतुष्टयं बिभर्ति स्म । विश्वादिभावेऽपि तन्नियंतु-

वासुदेवः संकर्षणः प्रद्युम्नः पुरुषः स्वयम् ॥ अनिरुद्ध इति ब्रह्मन्मूर्तिव्यूहोऽभिधीयते ॥ २१ ॥ स विश्वस्तैजसः प्राज्ञस्तुरीय इति वृत्तिभिः ॥ अर्थेंद्रियाशयज्ञानैर्भगवान्परिभाव्यते ॥ २२ ॥ अंगोपांगायुधाकल्पैर्भगवांस्तच्चतुष्टयम् ॥ बिभर्ति स्म चतुर्मूर्तिर्भगवान्हरिरीश्वरः ॥ २३ ॥ द्विजऋषभ स एष ब्रह्मयोनिः स्वयंदृक्स्वमहिमपरिपूर्णो मायया च स्वयैतत् ॥ सृजति हरति पातीत्याख्ययाऽनावृताक्षो विवृत इव निरुक्तस्तत्परैरात्मलभ्यः ॥ २४ ॥ श्रीकृष्णकृष्णसख वृष्ण्यृषभावनिध्रुग्राजन्यवंशदहनानपवर्गवीर्य ॥ गोविंदगोपवनिताव्रजभृत्यगीततीर्थश्रवः श्रवणमंगल पाहि भृत्यान् ॥ २५ ॥

स्तस्य न जीवत्वमित्याह । विश्वादिचतुष्टयं बिभ्रदपि भगवानीश्वर एवेति ॥ २३ ॥ तस्यैव ब्रह्मादित्रिमूर्तितामाह । द्विजऋषभेति । स एष एव भगवान् ब्रह्मयोनिर्वेदस्य कारणमित्यादिहेतुत्रयम् । वस्तुतो भेदाभावेऽप्येतज्जगत्स्वगतमायया सृजति हरति पातीति कृत्वाऽऽख्यया ब्रह्मादिरूपयाऽनावृताक्षो नाच्छन्नज्ञानोऽपि विवृत इव भिन्न इव निरुक्तः शास्त्रेषु न तु भिन्नः । अत्र विद्वदनुभवं प्रामाणयति । यतस्तत्परैरात्मत्वेनैव लभ्यत इति ॥ २४ ॥ यस्येदमुपासनमुक्तं तं श्रीकृष्णं प्रार्थयते । कृष्णसख अर्जु-

---

साक्षी असून त्याहून जो भिन्न तोच तुरीय समजावा ॥ २२ ॥ आतां चतुर्व्यूहमूर्तींची उपासना करितेवेळीं देखील पूर्वोक्त (५–२० श्लोकांपर्यंत) अंगादिकांची योजना करावी असें सांगतो–तो भगवान् अंगें, उपांगें, आयुधें व भूषणें यांनीं युक्त व वासुदेवादि चतुर्मूर्ति असूनहि विश्वतैजसादि चार स्वरूपें धारण करितो आणि तसा असूनहि त्याला जीवपणा नाहीं तर– तो भगवान् श्रीहरि त्या सर्वांचा नियंताच आहे ॥ २३ ॥ हे ब्राह्मणश्रेष्ठा शौनका, तो हा वेदांचा प्रवर्तक, स्वयंप्रकाश व आपल्या प्रभावानें परिपूर्ण असलेला भगवान्, आपल्या मायेच्या योगानें हें जग उत्पन्न करितो, पालन करितो व संहार करितो, त्याचें संकोचित ज्ञान नसूनहि शास्त्रामध्यें ब्रह्मा-विष्णु-महेश्वर अशा नांवांनीं, निरनिराळा असल्यासारखें वर्णन केलें आहे; परंतु वस्तुतः तो भिन्न नाहीं. यास्तव त्याच्या भक्तिमान् पुरुषांना तो (अंतःकरणामध्यें) आत्मस्वरूपानें प्राप्त होतो ॥ २४ ॥ आतां ज्याची ही उपासना सांगितली त्या श्रीकृष्णरूप भगवताची प्रार्थना करितो– हे ~~अर्जुनाच्या~~ मित्रा, हे यादवश्रेष्ठा, हे– पृथ्विद्रोही राजांच्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वंशाला भस्म करणाऱ्या, हे अक्षीणपराक्रमा, हे श्रवण केलें असतां मंगलकारका, ज्याची पवित्र कीर्ति गोपस्त्रियांचे समुदाय व नारदादि भक्त यांनीं गायन केलेली आहे अशा हे गोविंदा श्रीकृष्णा, तूं आह्मां दासांचें रक्षण कर ॥ २५ ॥ हे शौनका, जो पुरुष प्रातःकाळीं उठून, स्नानादिकेंकरून शुद्ध होऊन व भगवंताकडे लक्ष लावून ह्या (वर्णिलेल्या) महापुरुषाच्या लक्षणाचा जप करील त्याला हृदयांत असणारें ब्रह्म दृष्टि पडेल ॥ २६ ॥ मर्मे (२७ व्या श्लोकांत) 'देवपूजेचें स्थान तें सूर्यमंडल' असें सांगितलें आहे त्याची स्मृति होऊन मूर्तिव्यूहाच्या प्रसंगानें सूर्यव्यूहाविषयीं प्रश्न करीत शौनक ह्मणाला—हे सूता, श्रीशुकाचार्यांनें (पंचमस्कंधांत) परीक्षित् राजा श्रवण करीत असतां त्याला सूर्यसंबंधीं 'ऋषि, गंधर्व, अप्सरा, नाग, यक्ष, राक्षस व देव यांचा हा' सात सातांचा गण, प्रत्येक महिन्यामध्यें बदलतो असें जें सांगितलें ॥ २७ ॥

नस्य सखे वृष्णिश्रेष्ठ। अवनिद्रुहो ये राजन्यस्तेषां वंशस्य दहनः। अनपवर्गमक्षीणं वीर्यं यस्य। गोपवनितानां व्रजाः समूहा भृत्या नारदादयस्तैर्गीतं तीर्थभूतं श्रवः कीर्तिर्यस्य। श्रवणमेव मंगलं यस्य ॥ २५ ॥ एतज्जपमात्रस्यापि ब्रह्मज्ञानं फलमित्याह। य इति। कल्ये उषःकाले यस्तच्चित्तं प्रयतः शुचिश्च स जप्त्वा गुहाशयं हृदिस्थं ब्रह्म पश्यति ॥ २६॥ मंडलं देवयजनमित्युक्त्या बुद्धिमागतो मूर्तिव्यूहप्रसंगेन रविव्यूहोऽत्र पृच्छयते। शुक इति। पंचमे यदाह तथाऽन्ये च ऋषयो गंधर्वाप्सरसो नागा ग्रामण्यो यातुधाना देवा इत्येकैकशो गणाः सप्तेत्यादिना। सौरः सूर्यसंबंधी। सप्तकः सप्तानां गणः ॥ २७ ॥ तेषां सप्तानामधीश्वरैस्तत्तत्पतिभिस्तत्तन्मासाधिकृतसू-

य इदं कल्य उत्थाय महापुरुषलक्षणम् ॥ तच्चित्तः प्रयतो जप्त्वा ब्रह्म वेद गुहाशयम् ॥ २६ ॥ शौनक उवाच ॥ शुको यदाह भगवान्विष्णुराताय शृण्वते ॥ सौरो गणो मासि मासि नाना वसति सप्तकः ॥ २७ ॥ तेषां नामानि कर्माणि संयुक्तानामधीश्वरैः ॥ ब्रूहि नः श्रद्दधानानां व्यूहं सूर्यात्मनो हरेः ॥ २८ ॥ सूत उवाच ॥ अनाद्यविद्यया विष्णोरात्मनः सर्वदेहिनाम् ॥ निर्मितो लोकतंत्रोऽयं लोकेषु परिवर्तते ॥ २९ ॥ एक एव हि लोकानां सूर्य आत्माऽऽदिकृद्धरिः ॥ सर्ववेदक्रियामूलमृषिभिर्बहुधोदितः ॥ ३० ॥ कालो देशः क्रिया कर्ता करणं कार्यमागमः ॥ द्रव्यं फलमिति ब्रह्मन्नवधोक्तोऽजया हरिः ॥ ३१ ॥

र्यैर्वा। व्यूहं विभागम् ॥ २८ ॥ तत्र तावत् व्यूहं निरूपयितुं प्रथमं सूर्यस्वरूपमाह। अनाद्यविद्यया मायया। अयं सूर्यः। लोकतंत्रो लोकयात्राप्रवर्तकः ॥ २९ ॥ अतस्तस्य क्रियाभेदोपाधिकमेव नानात्वं न स्वत इत्याह। एक एवेति। सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्चेति श्रुतेः। जगदात्मा आदिकृत्सृष्टिकर्ता हरिरेव सूर्यः स च सर्वासां वेदोक्तक्रियाणां मूलं संस्तेनोपाधिना बहुधोक्तः ॥ ३० ॥ कालरूपधारिणो हरेर्द्वादशादित्यरूपं भेदं क्रियोपाधिकं दर्शयितुं प्रथमं सर्वकर्मप्रवृत्तये मायाकृतं नवधा भेदमाह। काल इति। कालः मासादिः। देशः समादिः। क्रिया अनुष्ठानम्। कर्ता ब्राह्मणादिः। करणं स्रुगादि। कार्यं यागादि। आगमो मंत्रादिः द्रव्यं व्रीह्यादि। फलं स्वर्गादि ॥ ३१ ॥

त्यांच्या त्या त्या अधिपतींनीं (सूर्यांच्या नांवांनीं) संयुक्त असलेल्या त्यांचीं नांवें व कर्में हीं आह्मांस सांग. कारण, आह्मी त्या सूर्यात्म्या श्रीहरीचा व्यूह श्रवण करण्याची इच्छा करीत आहों ॥ २८ ॥ आतां सूर्यव्यूह निरूपण करण्याकरितां प्रथमतः त्याचें स्वरूप वर्णन करीत सूत ह्मणाला—हे शौनका, सर्व देह धारण करणाऱ्या प्राणिमात्रांचा आत्मा जो विष्णु त्याच्या अनादिमायेनें निर्माण केलेला व लोकांच्या व्यवहारास प्रवृत्त करणारा हा सूर्य, सर्व लोकांत फिरत असतो ॥ २९ ॥ ॥ ३४ ॥
जो सर्वलोकांचा आत्मा असून सृष्टि उत्पन्न करणारा श्रीहरी तोच एक सूर्य होय. तो सूर्य, सर्व वेदोक्त कर्मांचें मूळ असून, कित्येके ऋषि, त्या वेदोक्तकर्मांच्या उपाधींच्या योगानेंच अनेकप्रकारचा आहे असें ह्मणतात ॥ ३० ॥ आतां, कालरूप धारण करणाऱ्या श्रीहरीचा द्वादशादिरूप भेद, क्रियेच्या उपाधीनें झाला आहे असें दर्शे-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

